# मनोगत

'पवित्र बायबल' हे भाषांतर प्रामुख्याने सामान्य माणसे नवसाक्षर लोक तसेच शाळकरीमुले यांच्यासाठी करण्यात आलेले आहे. म्हणून मोठमोठी वाक्ये किंवा कठीण शब्दांचा वापर टाळलेला आहे यासाठी की अगदी नव्यानेच वाचू लागलेल्या वाचकांसही ते स्पष्ट समजू शकेल.

प्रस्तुत भाषांतराच्या मार्गदर्शनासाठी "चांगले भाषांतर म्हणजे विचारांची योग्य देवाण घेवाण" या विचार तत्वाचा चांगला उपयोग झालेला आहे. वास्तविक शब्दकोषातील मिळत्या जुळत्या शब्दांचा वापर केला म्हणजे प्रामाणिक भाषांतर होते असे नाही. मूळ संदेश भाषांतरित करतांना केवल समानार्थी शब्दांचा वापर न करता, संदेशाच्या मूळ आशयाशी सुसंगतपणा ठेवणारी तसेच वाचकांच्या अभिरूचीस आकृष्ट करून घेणारी आणि हजारो वर्षांपूर्वी होत असे तसाच परिणाम आजही साध्य करणाऱ्या शैलीचा वापर असणारी ही प्रक्रिया आहे.

त्यामुळे "प्रभावी सादरीकरण ही या भागाच्या भाषांतरकर्त्यांच्या दृष्टिने अत्यंत महत्वाची होती. मात्र सुसंवादाच्या ह्या अपेक्षेमुळे अचूकतेचे महत्व मात्र कमी मानलेले नाही. 'अचूकता' याचा अभिप्रेत अर्थ असा आहे की संदेशातील मूळ कल्पनांचे प्रामाणिक सादरीकरण होय अचूकता म्हणजे नुसते भाषाशास्त्राच्या विशिष्ठ स्वरूपाशी त्याचा तंतोतंत मेळ बसविणे असा त्याचा अर्थ समजण्यात आलेला नाही.

पवित्र शास्त्राचे लेखक विशेषत: ज्यांनी नव्या कराराचे हे लिखाण केले त्यांच्या भाषेच्या शैलीवरून असे दिसते की, विचारांची योग्य देवाण घेवाण व्हावी यावर त्यांचा भर होता. त्यामुळे त्यांच्याच उदाहरणास अनुसरुन या भाषांतराची वाटचाल करावी असे प्रस्तुत भाषांतराच्या भाषांतरकर्त्यांस वाटत होते. त्यामुळे त्यांच्यासमोर असलेल्या विशिष्ट वाचकांना पवित्र शास्त्रातील आशयाचा अर्थ सहज समजेल अशा सोप्या (मराठी) भाषेत सादर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. समजण्यास अडचण निर्माण करील अशी भाषा कटाक्षाने टाळून, पवित्र शास्त्रातील सत्ये सहजपणे आकलन होण्यास मदत होईल अशा सुलभ शैलीचा वापर करून, पवित्रशास्त्रातील सत्यांचे भंडार खोलण्याची जणू गुरूकिल्लीच वाचकांच्या हाती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सदरच्या भाषांतरात अनेक खास रुपचिन्हांचा वापर केलेला आहे. त्यामुळे भाषांतर समजण्यास अधिक मदत होईल. कठीण किंवा मोधम अर्थाच्या शब्दांनंतर लगेचेच ( ) त्रोटक स्पष्टीकरण किंवा समानार्थी शब्द दिलेले आहेत. ज्या शब्दांचा किंवा वाक्प्रचारांचा विस्तृत खुलासा करणे आवश्यक आहे तेथे (*) तारांकित खूप असून (पृष्ठाच्या खालच्या बाजूस) तळटीपेत त्याचे स्पष्टीकरणे दिलेली आहेत. पवित्र शास्त्रातील अवतरणांचे संदर्भ किंवा बदलणारे वाचनपाठ. हे सुध्दा तळटीपेत दिलेले आहेत.

# प्रस्तावना

‘बायबल’ हा शब्द ग्रीक भाषेतून घेतला असून त्याचा अर्थ ‘पुस्तके’ असा आहे. वास्तविक ‘बायबल’ या ग्रंथात दोन पुस्तकसंग्रह असून; पहिल्या पुस्तकसंग्राहास ‘जुना करार’ व दुसऱ्या पुस्तकसंग्रहास ‘नवा करार’ असे संबोधले जाते. भाषांतरीत शब्द ‘टेस्टामेंट’ हा करार किंवा समझोता अशा अर्थाने वापरला जातो. देवाने मोशेच्या काळात आपल्या इस्राएल (यहूदी) लोकांना आशीर्वादित करण्याविषयीचे वचन दिले होते. त्या घटनेशी ‘करार’ या शब्दाचा संबंध आहे. ‘जुन्या करारा’ तील पुस्तकसंग्रहाचे लिखाण प्रामुख्याने मोशेच्या काळात देवाने यहूदी (इस्राएल) लोकांशी जो करार केला होता त्याच्याशी संबंधित आहे. तसेच ‘नवा करार’ या पुस्तकसंग्रहातील लिखाण हे, देवाने येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांशी केलेल्या कराराशी संबंधित आहे.

‘जुन्या करारा’ मधील लिखाणामध्ये, देवाने यहूदी लोकांसाठी केलेली महत्कृत्ये वर्णिली असून संपूर्ण जगाचे अभिष्ट करण्याकरिता असलेली देवाची योजना याच लोकांच्या द्वारे प्रकट करणे याविषयीचा तपशील दिलेला आहे. आणि ह्या सर्व लिखाणाचा रोख वरील योजनेच्या परिपूर्तीकरिता देवाकडून येणारा जगाचा तारणारा येशू ख्रिस्त (मशीहा) याजकडेच आहे. म्हणजे नव्या करारातील लिखाण हे जुन्या करारातील गोष्टीचा उत्तरार्ध आहे असे दिसून येईल. नव्या करारात येशू ख्रिस्ताचे येणे व त्याचा मानवजातीसाठी असलेला परस्पर संबंध यांचे तपशीलवार वर्णन करण्यात आलेले आहे. म्हणून ‘नवा करार’ सपष्टपणे समजण्याकरिता ‘जुना करार’ महत्वाचा आहे. कारण त्यामध्ये पवित्र योजनेची पार्श्वभूमि विशद केलेली आहे. म्हणजे ‘जुन्या करारा’त सुरू झालेली तारणाची कथा ‘नवा करार’ पूर्ण करतो म्हणून तोही तितकाच महत्वाचा आहे.

**जुना करार:**
जुना करार हा एकोणचाळीस पुस्तकांचा संग्रह असून तो वेगवेगळ्या लेखकांनी लिहिला आहे. प्राचीन इस्राएलची भाषा इब्री (हिब्रू) असल्यामुळे साहजिकच ही पुस्तके इब्री (हीब्रू) भाषेत लिहिलेली होती. तथापि त्यातील कांही भाग आरामी (अरमेईक) भाषेत लिहिलेला आढळतो कारण आरामी (अरमेईक) ही तत्कालीन बाबेल साम्राज्याची अधिकृत राजभाषा होती. जुन्या करारातील लिखाण हे सुमारे 3500 वर्षांपूर्वी लिहिले गेले असून त्यातील पहिल्या व शेवटच्या पुस्तकातील लिखाणामध्ये सुमारे एक हजार वर्षांहून अधिक अंतर होते. जुन्या करारातील पुस्तक संग्रहामध्ये प्रामुख्याने नियमशास्त्र, इतिहास, गद्य, गीते, काव्ये तसेच अनेक सुज्ञांची बोधपर शिकवण, यांचा अंतर्भाव केलेला आहे.

जुन्या करारातील लिखाणाचे प्रामुख्याने तीन प्रकारात वर्गीकरण करतात. (अ) नियमशास्त्र (ब) भविष्यवादी (क) पवित्र लेख. ‘नियमशास्त्र’ या लेख प्रकारात पाच पुस्तके अंतर्भूत असून त्यांना “मोशेची पाच पुस्तके” असे संबोधले जाते. उत्पत्ति हे त्यातील पहिले पुस्तक असून आपण शिकलो तसा पृथ्वीच्या निर्मितीचा वृत्तांत यात निवेदन केलेला आहे. तसेच आद्य पुरूष व स्त्री आणि त्यांचे देवाविरूध्द घडलेले पहिले पातक, महापूर व त्यातून देवाने वाचविलेले कुटुंब, देवाने विशेष हेतुने निवडलेले इस्राएल लोक आणि इस्राएल राष्ट्राची सुरूवात अशा अनेकविध बाबींचे सविस्तर कथन त्यात केलेले आढळते.

**अब्राहामाची गोष्ट**
‘विश्वासणाऱ्यांचा पिता’ म्हणून ओळखला जाणारा अब्राहाम नामक मनुष्य होता. देवाने त्याच्याशी एक करार केला होता. त्या करारानुसार अब्राहामाला एका महान राष्ट्राचा पिता बनविण्याचे वचन देवाने दिले होते. शिवाय तो व त्याचे

वंशज यांना कनान प्रांत वतनादाखल देण्याचा अंतर्भाव या वचनात होता. तो करार स्वीकारल्याची खुण म्हणून अब्राहामाने सुंता करून घेतली आणि तेव्हांपासून 'सुंता' ही खुण देव व त्याचे लोक यांच्यामधील कराराचा पुरावा समजली गेली. वचन दिल्याप्रमाणे सर्व घटना देव कशा घडवून आणील याची अब्राहामास मुळीच कल्पना नव्हती. तथापि अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला. आणि त्यामुळे देव अब्राहामावर संतुष्ट होता.

मेसोपोटेमिया येथील इब्र्यांमधील आपले घरदार सोडून देण्याविषयी देवाने अब्राहामास आज्ञा दिली, आणि कनान (तथा पालेस्ताईन ) या वचनदत्त देशास देव त्याला घेऊन गेला. अब्राहामाला आपल्या उतारवयात एक पुत्र झाला होता. त्याचे नाव इसहाक असे होते. इसहाकाला याकोब (तथा इस्राएल) नावाचा एक पुत्र होता. याकोबाला (इस्राएलास) बारा पुत्र व एक कन्या होती. हेच कुटुंब पुढे इस्राएल राष्ट्र बनले. तरी ते आपल्या मूळ जमातकुळास विसरले नाहीत. ते आपणास इस्राएलाची "बारा कुळे" (किंवा इस्राएल कुटुंब संघ) असेच अभिमानाने म्हणवून घेत. याकोबाचे बारा वंशज येणे प्रमाणे, रऊबेन, शिमोन, लेवी, यहूदा, दान, नफताली, गाद, अशेर, इस्साखार, जबुलून, योसेफ व बन्यामिन, आणि यांचे तिघे पूर्वज अब्राहाम, इसहाक व याकोब (इस्राएल) हे "वडील" किंवा मूळ पुरूष म्हणून ओळखले जातात.

अब्राहाम दुसऱ्या अर्थाने सुध्दा "पिता" मानला होता. प्राचीन इस्राएलात पुष्कळदा देव काही विशिष्ट व्यक्तींना आपला 'प्रवक्ता' म्हणून पाचारण करीत असे, यासाठी की, हे प्रवक्ते किंवा याजक लोकांकरिता देवाचे प्रतिनिधी व्हावेत. या संदेष्ट्यांमार्फत देव इस्राएल लोकांकरिता अभिवचने, इशारे (ताकीद) नियम किंवा शिकवण देत असे. तसेच मागील अनुभवांवर आधारलेले व भावी घटनांवर आधारलेले धडेसुध्दा देव देत असे. अशा रीतीने पवित्र शास्त्रामध्ये 'इब्री' अब्राहाम याचा प्रथम संदेष्टा म्हणून उल्लेख आढळतो.

### इस्राएलाची गुलामगिरीतून सुटका

याकोबाचे कुटुंब आपल्या परिवारात त्याच्या सत्तर वंशजांना सामावून घेईल इतके मोठे झाले. पुढे याकोबाच्या पुत्रांपैकी एकजण (योसेफ) हा इजिप्तमध्ये एक उच्च अधिकारी बनला होता. दिवस कठिण असल्यामुळे याकोब व त्यांचे कुटुंब इजिप्तला गेले. कारण तेथे अन्नाचा भरपूर साठा असून तेथे जीवन सुखकर होते. इब्री लोकांच्या हया कुळाची वाढ एका लहान राष्ट्रा एवढी झाली. त्यामुळे इजिप्तचा राजा फारो याने त्यांना द्वेषाने गुलाम बनविले. परंतु अखेर चारशे वर्षांनंतर देवाने मोशेच्या द्वारे इस्राएल लोकांची गुलामगिरीतून सुटका केली व त्यांस कनान देशात परत नेले. 'निर्गम' ह्या पुस्तकामध्ये हा सर्व तपशील वर्णन केला आहे. मात्र इस्राएलाच्या ह्या मुक्ततेची जबर किंमत पडली. आणि ती किंमत इजिप्तमधील लोकांना चुकवावी लागली. फारो आणि इजिप्त येथील प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ पुत्र मारला गेला आणि त्यानंतरच फारो इस्राएल लोकांची सुटका करण्यास मान्य झाला होता. इजिप्तच्या ज्येष्ठ पुत्राची हत्या व त्याच्या मोबदल्यात झालेली इस्राएलांची सुटका हया घटनेचे इस्राएल लोक आपल्या उपासनेत व अर्पणांच्या वेळी ठेवीत असतात.

इस्राएल लोक आपल्या 'सुटके'च्या प्रवासास उत्सुक होते. इजिप्तमधून एकदाची सुटका झाली म्हणून इस्राएल लोकांनी ह्या आनंदास साजेशी वस्त्रे परिधान केली होती, कुटुंबामागे एकेक कोकरा मारून तो भाजला आणि त्या कोकऱ्याचे रक्त, देवाकडून मिळलेली खास खूण म्हणून दाराच्या कपाळपट्टीवर लावले. त्यांनी घाईघाईने बिन खमिराची भाकरी भाजली आणि आपले भोजन उरकले. त्या रात्री परमेश्वराचा देवदूत तेथून गेला. ज्या दारबाह्यांवर कोकऱ्याच्या रक्ताची खूण नव्हती त्या घरातील ज्येष्ठ पुत्र मृत्यू पावला. इस्राएल लोक मुक्त झाले आणि आता इजिप्त सोडून निघाले तोच फारोने आपले मन बदलले. इस्राएलास पुन्हा पकडून आणावे व गुलाम बनवावे याकरिता त्याने आपले सैन्य पाठविले; पण देवाने आपल्या लोकांना वाचवले. देवाने तांबडा समुद्र दुभागला आणि आपले लोक 'इस्राएल' यांना त्यातून सुखरूपपणे पलीकडे पार नेले. पण पाठलाग करणाऱ्या इजिप्तच्या सैन्याचा नाश केला. तद्नंतर अरबस्तानात सीनाय वाळवंटातील डोंगरावर देवाने इस्राएल लोकांबरोबर एक विशेष करार केला.

### मोशेचे नियमशास्त्र

देवाकडून इस्राएल लोकांची झालेली सुटका व सीनाय येथे त्यांच्याबरोबर देवाने केलेला करार, ह्यामुळे हे राष्ट्र इतर सर्व राष्ट्रांपासून वेगळे करण्यात आले. ह्या 'करारा' मध्ये इस्राएलांसाठी अभिवचने व नियम समाविष्ट होते. ह्या कराराचा एक उल्लेखनीय भाग म्हणजे इस्राएल लोकांसाठी दोन दगडी पाटयांवर देवाने लिहिलेल्या "दहा आज्ञा" होय.

ह्या 'आज्ञां' मध्ये देवाच्या अपेक्षेप्रमाणे इस्राएल लोकांनी आपले जीवन जगावे यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत नीतिमूल्यांचा समावेश आहे. त्यांची देवाच्या संबंधात, कुटुंबाच्या संबंधात व समाजाच्या संबंधात असणारी त्यांची कर्तव्ये यांचेही मार्गदर्शन त्यात आढळते.

सीनाय पर्वतावर देण्यात आलेल्या "दहा आज्ञा" आणि इतर नियम व शिकवणी "मोशेचे नियमशास्त्र" किंवा केवळ "नियमशास्त्र" म्हणून ओळखले जाते. पुष्कळदा हे दोन्हीही शब्दप्रयोग पवित्र शास्त्राच्या पहिल्या पाच पुस्तकांच्या संदर्भात किंवा संपूर्ण जुन्या कराराच्या संदर्भात वापरले जातात.

दहा आज्ञा आणि इतर वागणूकविषयक नियमांव्यतिरिक्त मोशेच्या नियमशास्त्रात याजक, अर्पणे, उपासना आणि पवित्र दिवस यांच्यासंबंधीचे नियम आढळतात ह्या सर्व नियमांचा तपशील लेवीच्या पुस्तकात वर्णिलेला आढळतो. मोशेच्या नियमशास्त्रानुसार सर्व याजक व त्यांचे मदतनीस हे लेवीच्या कुळातील असत. ह्या मदतनीसांस 'लेवी' म्हणत तर अति महत्वाच्या याजकास 'प्रमुख याजक' या नावाने ओळखत असत.

याशिवाय दर्शनमंडप सभास्थान किंवा उपासना मंदिरांच्या बांधकामा विषयीच्या सविस्तर सूचनाही नियमशास्त्रात समाविष्ट आहेत. तसेच त्यांच्या 'उपासनेमध्ये' लागणाऱ्या सर्व वस्तूंची यादी व त्या बनविण्यासंबंधीचे मार्गदर्शन नियमशास्त्रात नमूद केलेले आहे. ह्यामुळेच येरूशलेमेमधील सीयोन पर्वतावर उपासनेकरिता मंदिर बांधण्यास इस्राएल लोक प्रवृत्त झाले. अर्पणे व उपासना यांच्या संबंधातील नियमांमुळे, इस्राएल लोक, आपली एकमेकांविरूध्द किंवा देवाविरूध्द कांही पापे होतात का हे पाहाण्या विषयी दक्ष राहू लागले. एवढेच नव्हे तर त्यांनी एकमेकांना क्षमा करण्यास एकमेकांशी व देवाशी समेट करून आपले परस्पर संबंध पूर्ववत सुधारण्यास त्या नियमांद्वारे त्यांनी मार्गदर्शन प्राप्त केले. सर्व मानवजातीला देण्यासाठी देव जे अर्पण तयार करीत होता ते स्पष्टपणे समजण्यासाठी ह्या नियमशास्त्रातील अर्पणांनी चांगलीच पार्श्वभूमि तयार केली होती.

कित्येक पवित्र दिवस व उत्सव साजरे करण्यासंबंधीचे नियम व मार्गदर्शनही नियमशास्त्रात अंतर्भूत केलेले आहेत. प्रत्येक सणाला (उत्सवाला) त्यांच्या परीने विशेष अर्थ होता. कांही उत्सव वर्षातील आंनदाचे प्रसंग साजरे करणारे होते. (उदा. प्रथम फळाचा हंगामाचा सण, पेंटेकॉस्ट–किंवा आठवडयांचा सण, मंडपाचा सण)

देवाने आपल्या लोकांकरिता, अद्‌भुत गोष्टींच्या स्मरणार्थ काहीं सण असत. वल्हांडणाचा सण हा अशांपैकीच एक होय. इजिप्तमधून ज्या दिवशी सुटका झाली त्या दिवसाचे प्रत्येक कुटुंब सुटकेच्या आंनदाप्रीत्यर्थ विशेष स्मरण करीत असे. लोक यावेळी देवाला स्तुतिगीते गात असत. त्याप्रसंगी कोकरा मारून भोजन केले जाई. त्यांना दुःखी व यातनामय जीवनातून सोडवण्यासाठी देवाने जे जे केले त्या सर्व गोष्टींचे स्मरण, या भोजनातील प्रत्येक द्राक्षारसाचा पेला व अन्नाचा प्रत्येक घास त्यांना देत असे.

इतर सण कांहींसे गंभीर स्वरूपाचे असत. दरवर्षी प्रायाश्चित्ताचा एक दिवस ते पाळीत असत. या दिवशी इस्राएल लोकांना इतरांच्या संबंधात आणि देवाच्या संबंधात केलेल्या सर्व दुष्कृत्यांचे स्मरण करावे लागे. हा दुःखाचा दिवस असल्यामुळे लोक भोजन करीत नसत. कारण त्या दिवशी त्यांच्या पापंच्या प्रायश्चित्ताकरिता प्रमुख याजक विशेष यज्ञ करीत असत.

जुन्या कराराच्या लेखकांच्या दृष्टीने, देव आणि इस्राएल लोक यांच्यामधील 'करार' फार महत्वाचा होता. कारण जवळ जवळ सर्व संदेष्ट्यांची पुस्तके आणि पवित्र शास्त्रलेख यांची पायाभूत धारणा आशी होती की, इस्राएल राष्ट्राने आणि इस्राएलाच्या प्रत्येक नागरिकाने आपल्या देवाशी एक अगदी विशेष करार केलेला आहे. त्याला ते 'प्रभूचा करार' किंवा केवळ 'करार' असे म्हणत. त्यांची इतिहासाची पुस्तके वेगवेगळ्या घडामोडींचा (घटना) भावार्थ कराराला अनुलक्षूनच काढतात: जर एखादी व्यक्ति किंवा राष्ट्र कराराशी विश्वासू राहिले तर देव त्यांना पारितोषिक (आशीर्वाद) देत असे. उलट जे कराराशी बेइमानी करीत त्यांना देव शासन (शिक्षा) करीत असे. त्यामुळे देवाशी केलेल्या कराराचे लोकांस स्मरण देण्याकरिता देव त्यांच्याकडे संदेष्टे पाठवीत असे. देवाने आपल्या आज्ञाधारक लोकांकरिता केलेल्या अद्‌भुत कृत्यांसंबंधीची गीते ते गात. मात्र आज्ञाभंजक लोकांवरील पीडेमुळे त्यांस विलापगीते गावी लागत. ह्या लेखकांच्या बऱ्या वाइटाविषयीच्या कल्पना करारातील शिकवणुकीवर आधारित असत. आणि निरपराध लोकांना त्रास सोसावा लागल्यास त्याच्या कारणांचा छडा लावण्यासाठी ते अतिशय कष्ट घेत असत.

## इस्राएल चे राज्य
प्राचीन इस्राएल लोकांचा तपशीलवार इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, हे लोक नेहमी त्यांच्या इच्छेप्रमाणे वागत. कधी देवाचा त्याग करीत तर संकट समयी पुन्हा त्याचा धावा करीत, संकटातून देवाने त्यांची सुटका केली की कांही काळाने पुन्हा देवाचा त्याग करत. असे हे चक्र अखंड चालू असे. सीनाय पर्वतावर इस्राएल लोकांनी देवाला अनुसरण्याचे मान्य केले पण लगेच त्यांनी देवाविरूध्द बंड केले. त्यामुळे देवाने त्यांना चाळीस वर्षे अरण्यात भटकावयास लावले. अखेरीस मोशेचा मदतनीस यहोशवा हा इस्राएल लोकांना वचनदत्त देशात घेऊन गेला. त्या प्राथमिक विजयानंतर इस्राएल लोक ह्या प्रदेशात अंशत: स्थिरावले. असे स्थिरस्थावर झाल्यानंतर कांही शतके त्यांचे अनुशासन स्थानिक पुढाऱ्यांकडूनच होत असे. त्यांना 'शास्ते' असे म्हणत.

पुढे कालांतराने मात्र लोकांना राजाची गरज वाटू लागली. त्याप्रमाणे शौल त्यांचा पहिला राजा बनला पण शौलाने देवाच्या आज्ञा पाळण्याचे सोडले म्हणून देवाने दावीद नावाच्या मेंढपाल मुलास राजा होण्याकरिता निवडिले. मग शमुवेल संदेष्ट्याने दाविदाच्या डोक्यावर तेल ओतून त्याला इस्राएलाचा नवीन राजा म्हणून अभिषेक केला. इस्राएलाचे राजे हे यहूदा कुळातील त्याचेच वंशज असतील असे देवाने दाविदास अभिवचन दिले होते. पुढे दाविदाने यरूशलेम जिंकले व तेथे आपली राजधानी बनविली. तसेच मंदिराकरिता जागा निश्चित केली आणि मंदिरातील उपासनेकरिता दाविदाने याजक, संदेष्टे, गीतकार, संगीतकार आणि गायक यांना संघटित केले. त्याने स्वत:ही अनेक गीते (स्तोत्रे) रचिली. पण देवाने दाविदाला मंदिर बांधू दिले नाही. तो म्हातारा होऊन मरावयास टेकला असतांना दाविदाने आपला पुत्र शलमोन यास इस्राएलावर राजा केले. देवास अनुसरावे व कराराचे पालन करावे असे दाविदाने आपल्या पुत्रास बजावून ठेवले. शलमोनाने मंदिर बांधले व आपल्या राज्याच्या सीमा वाढविल्या. अशा रीतीने इस्राएल हे बलवान राष्ट्र बनून आपल्या गौरव शिखरावर गेले. आणि त्यामुळे शलमोन सर्वदा प्रसिध्दी पावला.

## यहूदा आणि इस्राएल– फूट पडलेले राज्य
शलमोनाच्या मृत्यूनंतर त्याच्या राज्यात आपापसात तंटे सुरू झाले आणि परिणामी राज्य विभागले गेले. उत्तरेकडील दहा कुळे आपणास 'इस्राएल' म्हणु लागली तर दक्षिणेकडील कुळांनी स्वत:स 'यहूदा' हे नाव घेतले. यहूदा कराराशी व दाविदाच्या राजघराण्याशी निष्ठा ठेऊन राहिला. त्याची सत्ता यरूशलेमेमध्ये चालू असतांनाच बाबेलच्या राजाने त्याचावर स्वारी करून त्यास जिंकले व त्याच्या लोकांना पाडाव करून नेऊन हद्दपार केले. अशा रीतीने कराराचे पालन न केल्यामुळे, उत्तरेत अनेक राजसत्ता आल्या आणि गेल्या. त्यांनी वेळावेळी आपली राजधानी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवली. त्यांच्या राजधानीचे अखेरचे शहर 'शोमरोन' हे होते. लोकांवरील आपली हुकमत (पकड) मजबूत करण्याकरिता इस्राएलच्या राजांनी देवाच्या आराधनेची पध्दत बदलून टाकली. त्यांनी नवीन याजक निवडले; व दोन नवी मंदिरे बांधली. एक दान येथे (इस्राएलच्या उत्तर सीमेवर) आणि दुसरे बेथेल येथे (यहूदाच्या सीमेलगत). आपसातील तंट्यांच्या व कटकटींच्या दरम्यान देवाने यहूदा व इस्राएल यांच्याकडे अनेक संदेष्टे पाठवले कांही संदेष्टे याजक होते आणि कांही शेतकरी होते. काहीजण राजाचे सल्लागार तर कांही सामान्य माणसे होती. त्यापैकी काहींनी आपली शिकवण व संदेश लिहून ठेवले. मात्र इतरांनी तसा प्रयत्न केला नाही. पण निश्चितपणे सर्व संदेष्टे, न्याय, सालसपणा आणि देवावर अढळ निष्ठा ठेवण्याची गरज याविषयी कळकळीचे उपदेश करीत असत.

पुष्कळ संदेष्ट्यांनी लोकांना बजावून ठेवले की जर ते देवाकडे परत फिरले नाहीत तर त्यांचा नाश केला जाईल. कारण कांही संदेष्ट्यांना दृष्टांत होत आणि त्यात त्यांना भावी गौरव आणि भावी शासन पाहावयास मिळत असे. नवीन राजा राज्य करण्यास येणार आहे; याची कल्पना असल्यामुळे तो नेमका कोणत्या वेळेस येईल याकडे कित्येक संदेष्टे डोळे लावून होते. देवाच्या लाकरांना सुवर्णयुगात घेऊन जाणारा राजा दावीद वंशजापैकीच असेल असा काहींचा ठाम विश्वास होता. त्यामुळे ह्या राजाविषयी काही संदेष्ट्यांची खात्री होती की, त्याचे राज्य सार्वकालिक असून त्याची सत्ता अखंड असेल, याच्या उलट हा राजा सेवक म्हणून येईल व आपल्या लोकांना पुन्हा देवाकडे वळविण्याकरिता त्याला अनेक कष्ट सोसावे लागतील असा कांही संदेष्ट्यांचा विश्वास होता. तथापि तो देवाने निवडलेला अभिषिक्त (तारणारा) मशीहा असून तो नवीन युग निर्माण करील यावर मात्र सर्व संदेष्ट्यांचे एकमत होते.

## यहूदा व इस्राएल यांचा सर्वनाश
लोकांनी देवाने दिलेले नियम मानले नाहीत त्यामुळे असे झाले की (ख्रि.पू.) सुमारे 722/721 साली असिरियन राजाने शोमरोन नगरावर हल्ला केला आणि शोमरोन त्यात पराभूत झाले. इस्राएलचे लोक बेघर होऊन संपूर्ण असिरियन

साम्राज्यात विखुरले गेले. त्यांची, आपले भाऊबंद यहूदा, यांच्यापासून कायमची ताटातूट झाली. पुढे असिरियन राजाने इस्राएलच्या प्रदेशात पुन्हा वस्ती करण्यासाठी परदेशीय लोक आणले. ह्या लोकांना यहूदा व इस्राएल यांच्या धर्माचे शिक्षण देण्यात आले. त्यानुसार कांही परदेशीय लोकांनी देवाशी झालेल्या करारचे पालन करण्याचा प्रयत्न केला. हेच लोक पुढे शोमरोनी म्हणून ओळखले जाऊ लागले. असिरियन लोकांनी यहूदावरही चाल करण्याचा प्रयत्न केला. त्यात पुष्कळ शहरांचा पाडाव झाला. पण देवाने यरूशलेम शहराचा बचाव केला. मात्र असिरियन पराभूत राजा आपल्या घराकडे परताच, त्याच्या दोन मुलांनी त्याचा वध केला. अशा रीतीने यहूदाचा बचाव झाला.

अल्प काळासाठी यहूदाच्या लोकांच्या वर्तनामध्ये बदल दिसला. अल्प काळ ते देवाच्या आज्ञा पाळू लागले. पण अखेरीस त्यांनाही पाडाव होऊन परागंदा व्हावे लागले. पुढे बाबेलचे राज्य आले आणि त्याने यहूदावर चाल केली, प्रारंभी त्यांनी कांही निवडक प्रमुख व्यक्ति बंदीवान बनवल्या पुढे कांही वर्षानंतर ख्रि. पू. 587/586 मध्ये ते पुन्हा यरूशलेम व तेथील मंदिर यांचा नाश करण्या करिता चालून आले. या लढाईतून जीव वाचविण्यासाठी काही लोक इजिप्त येथे पळाले. पण इतर बहुतेकांना गुलाम बनवून बाबेल येथे नेण्यात आले. अशा परिस्थितीत देवाने पुन्हा आपले संदेष्टे लोकांकडे पाठविले त्यामुळे लोक (देवास अनुसरू लागले) देवाचे आज्ञा पालन करू लागले. यरूशलेमचा आणि तेथील मंदिराचा नाश आणि बाबेलमधील हद्दपारी या धडामोडीमुळेच यामुळेंच जणू लोकांच्या वर्तना मध्ये खरा बदल झाला होता. तशातच नवीन राजा व त्याचे राज्य यांविषयी संदेष्टे वरचेवर अधिकाअधिक बोलत राहिले. इतकेच नव्हे तर त्यांपैकी यिर्मया नावाचा संदेष्टा 'नवीन करारा' विषयीही बोलत असे. हा "नवा करार" दगडी पाटयांवर नव्हे तर देवाच्या लोकांच्या अंत:करणामध्ये लिहिलेला असेल, असे तो बारंबार सांगत असे.

**पालेस्ताईन येथे यहूद्यांचे पुनरागमन**

दरम्यान सायरस हा मेदीच्या पर्शीयन साम्राज्यामध्ये सत्तेवर आला. आणि त्याने बाबेलचा पाडाव केला. परिणामी असे घडले की, सायरसने हद्दपारीतील लोकांना आपल्या घराकडे जाण्याची मुभा दिली. त्यामुळे तब्बल सत्तर वर्षांच्या हद्दपारीनंतर बरेचसे यहूदी आपापल्या घरी शकेल. लोकांनी आपल्या राष्टाची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न केला तथापि यहूदा हे राष्ट्र किरकोळ आणि दुर्बळच राहिले. मात्र, शलमोनाने बांधलेल्या मंदिरासारखे सुंदर जरी नसले, तरी लोकांनी मंदिर पुन्हा बांधून काढले. याचा परिणाम असा झाला की काही लोक खरोखर देवाकडे वेळले व देवाच्या भजनी लागले. त्यांनी मोशेचे नियमशास्त्र, संदेष्टयांची पुस्तके व पवित्र शास्त्र लेख यांचा अभ्यास सुरू केला. इतकेच नव्हे तर शेवटी लोकांनी पवित्र शास्त्र ग्रंथाच्या अभ्यासाकरिता खास शाळांचे संघटन केले. लोक शब्बाथ दिवशी (शनिवारी) शास्त्रभ्यास प्रार्थना व देवाची उपासना करण्यासाठी एकत्र जमू लागले. सभास्थानातील त्यांच्या सभांमधूनही ते पवित्र धर्मग्रांथाचे अध्ययन करु लागले आणि पुष्कळ लोक येणाऱ्या मशीहाची वाट पाहू लागले.

पाश्चिमात्य जगात जगज्जेता अलेक्झांडर या सम्राटाने ग्रीसवर ताबा मिळवला आणि पुढे अल्पावधितच संपूर्ण जग काबीज केले. ग्रीक भाषा आणि ग्रीक संस्कृति यांचा जगातील अनेक भागात त्याने प्रसार केला. पुढे त्याच्या मृत्यूनंतर त्याचे राज्य विभागले गेले. आणि लवकरच दुसऱ्या साम्राज्याचा (रोमन) उदय होऊन त्याने तत्कालिन ज्ञात जगातील बहुतांश भाग आपल्या काबूत आणला. यहूदी लोक राहात असलेला पॅलेस्ताईन प्रांत सुध्दा यात समाविष्ट होता. नवीन रोमन सत्ताधिकारी स्वभावत:च क्रूर आणि कठोर होते. तर यहूदी लोक गर्विष्ठ आणि मगरूर होते. आशा क्लेशकारक संबंध असलेल्या परिस्थितीमध्ये पुष्कळ यहूदी लोक तारणारा (मशीहा) आपल्याच आयुष्यकालात यावा म्हणून आतुरतेने वाट पाहात होते. कारण ते केवळ देव आणि देवाच्या वचनाप्रमाणे येणारा तारणारा (मशीहा) यांच्याच अनुशासनात राहू इच्छित होते. मशीहाद्वारे सर्व जगाचे तारण करण्याचे देवाने योजले होते मात्र हे यहूद्यांना समजत नसे. देव त्याच्या योजनेप्रमाणे केवळ यहूद्यानांच, मशीहाद्वारे जगापासून सोडविणार होता आसा त्यांचा दावा होता. देव आपला (मशीहा) तारणारा पाठवून देणार असल्याने कांही यहूदी खूष असत. पण उरलेल्या यहूद्यांनी नवीन राज्याची स्थापना करण्यासाठी देवाला "साहाय्य" करण्याचे ठरविले. अशा विचाराच्या यहूद्यांना "जिलोत" असे म्हणत. हे "जिलोत" रोमी लोकांशी वारंवार झगडण्याचा प्रयत्न करीत. एवढेच नव्हे तर अशा प्रसंगी जे यहूदी रोमी, लोकांशी हातमिळवणी करीत त्यांनाही ते ठार करीत.

**यहूद्यांचे धार्मिक पंथ**

ख्रि. पू. पहिल्या शतकामध्ये मोशेचे नियमशास्त्र यहूदी लोकांसाठी अतिशय महत्वाचे बनले होते. त्याचा ते अभ्यास करीत तसेच त्यावर ते वादविवादही करीत असत. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून लोक नियमशास्त्राचा अर्थ समजावू घेत

असत, एवढच नव्हे तर पुष्कळ यहूदी लोक ह्या नियमशास्त्राकरिता आपला प्राण देण्यासाठी ही तयार असत. यहूदी लोकांमध्ये धार्मिक विचारसरणीनुसार तीन प्रमुख गट असत आणि त्या प्रत्येक धर्म गटात त्यांचे स्वत:चे शास्त्री (कायदेतज्ञ किंवा कायदेपंडित) असत.

**सदूकी**

यहूदी धर्ममतातील एक पंथ सदूकी या नावाने ओळखला जातो. दाविदाच्या काळातील प्रमुख याजक सादोक याच्या नावावरून कदाचित हे नाव आले असावे असे दिसते. कारण पुष्कळसे. याजक आणि अधिकारी हे सदूकी पंथाचे होते. सदूकी पंथीय लोक कोणत्याहि धार्मिक बाबीचे आधारभूत प्रमाण म्हणून केवळ (मोशेच्या पाच पुस्तकांस) नियमशास्त्रासच मानीत असत. कारण त्यांमध्ये याजक आणि अर्पणे यांविषयी पुष्कळ गोष्टींचे शिक्षण व सूचना आहेत. परंतु 'मरणानंतरचे जीवन' यासंदर्भात मोशेच्या नियमशास्त्रात कोणतेही शिक्षण उपलब्ध नाही. त्यामुळे सदूकी पंथाचे लोक 'पुनरूत्थानावर' विश्वास ठेवीत नाहीत.

**परुशी**

यहूदी धर्मातील दुसऱ्या पंथास परूशी असे नाव आहे, (हिब्रू) इब्री या शब्दाचा अर्थ, (फोड करणे) "स्पष्ट करणे" किंवा "वेगळे करणे" असा आहे. त्या अर्थावरून परूशी हा शब्द प्रचारात आलेला आहे. परूशी लोक मोशेच्या नियम शास्त्राचा उलगडा करून सामान्य लोकांस शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत असत. मोशेच्या काळाशी अनुरूप अशी एक तोंडी, अलिखिति प्रथा (रूढी) असल्याचे मान्य करणारा व त्यावर विश्वास ठेवणारा हा पंथ आहे. प्रत्येक पिढीतील लोकांस मोशेच्या नियमशास्त्रचे त्यांच्या गरजेप्रमाणे अर्थ लावण्याचे स्वातंत्र्य आहे. असा या पंथाच्या लोकांचा विश्वास आहे. याचाच अर्थ हा पंथ केवळ मोशेच्या नियमशास्त्रास प्रमाण न मानता, संदेष्ट्योंची पुस्तके, पवित्र ग्रंथलेख आणि त्यांच्या रूढी परंपरा यांनाही मानतो. रुढी परंपरा आणि मोशेचे नियमशास्त्र कोटेकोर पणे पाळण्याचाते प्रयत्न करीत असत. आपण काय खातो किंवा आपण कशाला स्पर्श करतो अशा लहान बाबतीही ते अतिशय दक्ष असत. तसेच हात धुणे आणि स्नान करणे याही बाबतीत ते फार काळजी घेत. शिवाय मृत्यूनंतर माणसे जिवंत केली जातात याच्यावर त्यांचा विश्वास असे. कारण बऱ्याचशा संदेष्ट्यांच्या लिखाणवरून ह्या गोष्टीला दुजोरा मिळत असे

**एसेनेस**

यहूदी धर्मपंथातील तिसऱ्या प्रमुख पंथाचे नाव एसेनेस होते. यरूशलेमातील बरेच याजक देवाच्या अपेक्षेप्रमाणे जीवन जगत नसत; शिवाय रोमी लोकांनी असे बरेच याजक नेमले होते की ज्यांची पात्रता मोशेच्या नियमशास्त्रास अनुसरून नव्हती. त्यामुळे यरूशलेम येथे अशा याजकांकडून होत असलेली उपासना व अर्पणे ही योग्य रीतीने होत नसल्याचे त्यांना जाणवत असे. म्हणून एसेनेस या पंथाचे लोक यहूदीयाच्या वाळवंटी रानाकडे वस्तीस गेले. ते उपास व प्रार्थना करीत. आणि देव, मशीहा (तारणारा) पाठवून मंदिराचे व याजकत्वाचे शुध्दीकरण करील असा त्यांचा विश्वास होता आणि यांच घटनेची ते आतुरतेने वाट पाहात असत.

**नवा करार**

देवाने आपल्या योजनेस आरंभ केला होता. एका विशेष राष्ट्राची त्याने त्यासाठी निवड केली होती. देवाचा न्याय व चांगुलपणा (दया) समजण्याची तयारी व्हावी म्हणून देवाने त्या राष्ट्रातील लोकांशी करार केला होता. अधिक चांगल्या नवीन करारावर आधारित पूर्ण आध्यात्मिक 'राज्य' स्थापन करून जगाला आशीर्वादित करण्याची देवाची योजना होती. ती योजना संदेष्टे आणि गवई यांच्यामार्फत लोकांना प्रकट केली होती आणि ह्या योजनेची सुरूवात 'वचनदत्त' मशीहाच्या आगमनापासून होणार होती. कारण संदेष्ट्योनी मशीहाच्या आगमनाची भाकिते, सविस्तरपणे कथन केलेली होती. म्हणजे मशीहाचा जन्म कोठे होईल, तो कोणत्या प्रकारचा माणूस असेल आणि त्यास कोणत्या प्रकारची जबाबदारी पार पाडावी लागेल याचा पूर्ण तपशील त्यात निवेदन करण्यात आलेला होता. आणि त्यानुसार मशीहाने येऊन नव्या करारास आरंभ करण्याचा समय आला होता.

देवाचा नवीन करार कसा प्रकट करण्यात आला याचा तपशील नव्या करारातील लिखाणात दिलेला आहे. तसेच त्या कराराची अंमलबजावणी येशू ख्रिस्त (देवाचा 'अभिषिक्त' किंवा 'मशीहा') याने कशी केली याचेही विवेचन ह्यात केलेले आढळते. त्यामुळे देवाचा हा 'नवीन करार' सर्व लोकांसाठी आहे अशी शिकवण नव्या करारतील लिखाणाकडून आपणास मिळते. देवाच्या ह्या कृपादानाचा पहिल्या शतकातील लोकांनी कसा स्वीकार केला आणि ते ह्या नव्या

कराराचा एक अविभाज्य भाग म्हणून कसे गणले गेले, या सर्वांचे विवेचन यामध्ये केलेले आहे. याच्याशिवाय देवाच्या लोकांनी ह्या जगात राहात असतांना कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी घ्यावी, याविषयीच्या विस्तृत सूचना व मार्गदर्शन ह्या लिखाणात दिलेले आहे. ह्या भूतलावरील सर्व अर्थपूर्ण जीवनसाठी व मृत्यूनंतरच्या अनंतकालिक जीवनसाठी देव जे जे आशीर्वाद देण्याचे वचन देतो त्याचे ही वर्णन या लिखाणामधून आढळते.

नव्या कराराच्या लिखणात सत्तावीस वेगवेगळ्या पुस्तकांचा समावेश असून सुमारे आठ वेगवेगळ्या लेखकांनी ती लिहिली आहेत. पहिल्या शतकातील जग हे सामान्यपणे ग्रीक भाषा बोलत असल्यामुळे ह्या सर्व लेखकांनी आपले लिखाण ग्रीक भाषेत लिहिले होते. त्यातील एकूण लिखाणापैकी निम्म्याहून अधिक लिखाण चार 'प्रेषितांनी' (आपले खास प्रतिनिधी; मदतनीस म्हणून येशूने निवडलेली माणसे) केलेले होते. ह्या जगातील जीवनकाळामध्ये बारा शिष्यांपैकी तिघे (मत्तय, योहान, व पेत्र) हे येशूचे अगदी जवळचे अनुयायी होते आणि पौल हा चौथा लेखक, याला येशूने नंतरच्या काळात अद्‌भुत रीतीने दर्शन देऊन शिष्य होण्याकरिता निवडले होते.

"शुभवर्तमाने" म्हटलेल्या पहिल्या चार पुस्तकांमध्ये येशूचे जीवन आणि मृत्यु यांचा वृतांत दिलेला आहे. सामान्यपणे ह्या पुस्तकात येशूची शिकवण, येशूचा ह्या भूतलावरील आगमनाचा उद्देश व येशूच्या जीवनातील केवळ ऐतिहासिक घटना तसेच त्याच्या क्रुसावरील मृत्यूचा बोधार्थ यावर विशेष भर दिलेला आहे. विशेष करून योहानाने लिहिलेले शुभवर्तमान या चौथ्या पुस्तकाच्या बाबतीत हे अधिक सत्य आहे. मात्र पहिली तीनही 'शुभवर्तमाने' आशयाच्या बाबतीत एकमेकांशी बरीच मिळती जुळती आहेत असे दिसेल खरे तर एका पुस्तकातील बराचसा तपशील पुढील एका किंवा दोन्हीही शुभवर्तमानात आढळतो. तथापि, प्रत्येक लेखकवेगवेगळ्या वाचकांसाठी लिहीत असून प्रत्येकाच्या उपदेशामध्ये किंचितसा फरक असल्याचे जाणवते.

चार शुभवर्तमानांनंतर 'प्रेषितांची कृत्ये' हे पुस्तक असून येशूच्या मृत्यूनंतरच्या घटनांचा इतिहास त्यात समाविष्ट केलेला आहे. या पुस्तकामध्ये देवाने सर्व लोकांसाठी देऊ केलेले प्रीतीचे दान, आणि त्या दानाची येशूच्या शिष्यांनी जगभर केलेली घोषणा हे सविस्तर लिहिलेले आहे. तसेच सुवार्तेची घोषणा, तिचा प्रसार आणि पालेस्ताईनसह रोमन जगतात ख्रिस्ती विश्वासाचा स्वीकार; या सबंधीचा वृत्तांत वर्णन केलेला आहे. 'प्रेषितांची कृत्ये' हे पुस्तक संत लूकाने लिहिलेले असून त्याने या पुस्तकात नमूद केलेल्या सर्व घटनांचा तो साक्षीदार होता. लूक हा तिसऱ्या शुभमर्तमानाचाही लेखक होता. त्याने या दोन पुस्तकांचा तार्किकदृष्ट्या एकच सलग भाग बनवला असून येशूच्या जीवन वृत्तांतानंतर प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकात त्याचा नैसर्गिक उत्तरार्ध दाखविला आहे.

'प्रेषितांची कृत्ये' या पुस्तकाच्या पाठोपाठ अनेक पत्रांचा संग्रह असून यातील कांही पत्रे व्यक्तींना तर कांही पत्रे ख्रिस्ती मंडळ्यांना उद्देशून लिहिलेली आहेत. पौल व पेत्र यां सारख्या येशूच्या शिष्यांतील नेत्यांकडून ही पत्रे पाठविली गेलेली होती. तत्कालिन लोकांना समस्यांना तोंड देतांना व त्या सोडवतांना मदत व्हावी या उद्देशाने ही पत्रे लिहिली आहेत. ह्या पत्रांचे प्रमुख उद्देश, लोकांना बंधुजनांबद्दल माहिती सादर करणे, त्यांच्या चुका दुरूस्त करणे, वेगवेगळ्या व्यवहारांच्या बाबतीत शिकवण देणे, त्यांना उतेजन देणे, असे आहत. ज्यांच्या नावाने ही पत्रे लिहिली आहेत त्यांनाच केवळ नव्हे तर सर्व ख्रिस्ती लोकांना त्यांच्या जीवनासाठी, विश्वासासाठी आणि जगातील त्यांच्या एकूण जीवनात मार्गदर्शन करण्यासाठी ही लिहिली आहेत.

मात्र नव्या करारातील शेवटचे पुस्तक "योहानाला झालेले प्रकटीकरण" हे मात्र इतर पुस्तकां पेक्षा वेगळे आहे. या पुस्तकाचा लेखक, योहान याला झालेला दृष्टांत वर्णन करतांना त्याने वापरलेली भाषा बरीच अलंकारिक आहे. यात आलेल्या बहुतांश आकृति आणि प्रतिमा ह्या जुन्या करारातून घेतलेल्या आहेत. जुन्या कराराशी याची तुलनात्मक पडताळणी केल्यास त्यांचा अर्थ अधिक चांगला व सपष्ट कळू शकेल. येशू ख्रिस्ताच्या नेतृत्वाखाली, देवाच्या सामर्थ्याने सैतानाच्या सर्व दुष्ट शक्तींवर आपलाच अंतिम विजय आहे, हे महान अभिवचन सर्व ख्रिस्ती लोकांना या पुस्तकाद्वारे मिळते.

**बायबल आणि आजचा वाचक**

पवित्र शास्त्रातील पुस्तके ही हजारो वर्षांपूर्वी आपल्यापेक्षा भिन्न संस्कृति असलेल्या लोकांसाठी लिहिली होती हे आजच्या वाचकाने लक्षात ठेवावे. सामान्यपणे हे लिखाण केवळ "सार्वत्रिक सत्ये" असलेल्या जीवन मूल्यांवर लक्ष

केंद्रित करतात. तथापि स्पष्टीकरणाकरिता वापरलेले कांही ऐतिहासिक तपशील, उदाहरणे किंवा संदर्भ समजून घेण्यासाठी त्यांचा काळ आणि त्यांची संस्कृति यांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. उदा. येशूने, शेतात बी पेरणाराची गोष्ट सांगितली, त्या शेतातील जमीन ठिकाठिकाणी वेगवेगळ्या प्रकाराची होती. परंतु त्या सर्व जमिनीतील भिन्न भिन्न प्रकाराच्या तंतोतंत अवस्था आजच्या वाचकाला अपरिचित असू शकतील तरी सुध्दा उदाहरणाच्या साहाय्याने येशूने शिकविलेला धडा आजही सर्व ठिकाणच्या सर्व लोकांसाठी अगदी समर्पकपणे लागू असल्याचे दिसून येईल.

पवित्र शास्त्रकालिन जग हे आजच्या वाचकांसाठी विचित्र, अपरिचित किंवा परके वाटू शकेल. कारण तत्कालिन लोक त्यांचे रीतीरिवाज, त्यांच्या प्रवृत्ति किंवा त्यांच्या बोलीभाषेची पध्दत अपरिचित किंवा परकीया वाटणे साहजिक आहे. तरीही त्यांचे मूल्यमापन ‘आज’च्या परिमाणाने करणे तितकेसे तर्कसंगत होणार नाही; तर ‘तो’ समय आणि ‘ते’ ठिकाणे यांच्याच परिमाणाने त्यांचे मूल्य मापन करणे आवश्यक आहे. लक्षात ठेवण्यासारखी आणखी एक महत्वाची गोष्ट की पवित्र शास्त्र हे विज्ञानशास्त्रप्रमाणे लिहिलेले पुस्तक नाही उलट ते ऐतिहासिक घटनांचे तपशीलवार वर्णन करून त्या घटनांतून मानव प्राण्यासाठी असलेला बोधार्थ सर्व लोकांस सादर करण्यासाठी लिहिलेले आहे. ‘पवित्र शास्त्र’ जे जे शिकविते त्यांमध्ये विज्ञानशास्त्राच्या कक्षेबाहेर (आवाक्याबाहेर) असलेल्या अनेक सार्वत्रिक सत्यांचा समावेश आहे. आणि पवित्र शास्त्राची ती शिकवण आजच्या युगातही तितक्याच समर्पकपणाने लागू पडत असल्याचे दिसते कारण ती मनुष्यप्राण्याची मूलभूत आध्यात्मिक गरज हाताळीत असते. आणि मनुष्यप्राण्याची “मूलभूत आध्यात्मिक” गरज ही कधीही बदलत नसते.

जो कोणी सहेतुकपणे (जाणीवपूर्वक) पवित्र शास्त्राचे वाचन करील तर, अनेक बाबतीत त्याचा फायदा झाल्याचे त्याला जाणवेल. एकतर त्याला प्राचीन जगाचा इतिहास आणि संस्कृति यांचे ज्ञान संपादन करता येईल, येशू ख्रिस्त आणि त्याची शिकवण, शिवाय त्याचा शिष्य होणे म्हणजे काय अशा अनेर बाबी हे त्याला समजू शकतील. इतकेच नव्हे तर त्याला मूलभूत आध्यात्मिक दृष्टि प्राप्त होऊन आनंदी गतिमान जीवन जगण्यासाठी उपयुक्त असे अनेक व्यवहारी धडे त्याला शिकावयास मिळतील. याव्यतिरिक्त जीवनातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या समस्यांना सहज उत्तरे मिळू शकतील. या आणि अशा अनेक चांगल्या कारणांमुळे पवित्र शास्त्र वाचन तुमच्या फायद्याचे ठरेल इतकेच नव्हे तर, अधिक मोकळ्या मनाने आणि चौकसबुध्दिने जर तुम्ही पवित्र शास्त्राचे वाचन केले तर निश्चितपणे तुमच्या जीवनासाठी देवाची काय इच्छा आहे हेही तुम्हास समजू शकेल.

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**

- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from: http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from: http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html

# उत्पत्ति

### जगाची सुरवात
### पहिला दिवस–प्रकाश

1 देवाने आकाश व पृथ्वी निर्माण केली. सुरुवातीला
2पृथ्वी पूर्णपणे रिकामी होती; पृथ्वीवर काहीही नव्हते.
अंधाराने जलाशय झाकलेले होते; आणि देवाचा आत्मा
पाण्यावर पाखर घालीत होता 3नंतर देव बोलला, “प्रकाश
होवो” आणि प्रकाश चमकू लागला. 4देवाने प्रकाश पाहिला
आणि त्याला कळले की तो चांगला आहे. नंतर देवाने
अंधारापासून प्रकाश वेगळा केला. 5देवाने प्रकाशाला
“दिवस” व अंधारला “रात्र” अशी नांवे दिली.

संध्याकाळ झाली व नंतर सकाळ झाली. हा झाला पहिला दिवस.

### दुसरा दिवस–आकाश

6नंतर देव बोलला, “जलांस दुभागण्याकरिता जलांच्या
मध्यभागी अंतराळ होवो.” 7तेव्हा देवाने अंतराळ केले
आणि अंतराळावरच्या व खालच्या जलांस वेगळे केले.
8देवाने अंतराळास “आकाश” असे नांव दिले.

संध्याकाळ झाली व नंतर सकाळ झाली. हा झाला दुसरा दिवस.

### तिसरा दिवस–कोरडी भूमि व हिरवळ

9नंतर देव बोलला, “अंतराळाखालील पाणी एकत्र गोळा
होवो व कोरडी जमीन दिसून येवो.” आणि तसे घडले,
10देवाने कोरड्या जमिनीस “भूमि” आणि एकत्र झालेल्या
जलसंचयास “समुद्र” अशी नांवे दिली. आणि देवाने पाहिले
की हे चांगले आहे.

11मग देव बोलला, “गवत, बीज देणाऱ्या वनस्पती आणि
फळे देणाऱ्या वनस्पती पृथ्वीवर वाढोत. फळझाडे बिया
असलेली फळे तयार करतील आणि प्रत्येक वनस्पती
आपल्या जातीच्याच बिया तयार करील अशा वनस्पती
पृथ्वीवर वाढोत.” आणि तसे झाले. 12गवत, आपापल्या
जातीचे बीज देणाऱ्या वनस्पती आणि आपापल्या जातीची
फळे देणारी व त्या फळातच आपापल्या जातीचे बीज
असणारी फळ झाडे भूमीने उपजविली. देवाने पाहिले की
हे चांगले आहे.

13संध्याकाळ झाली व नंतर सकाळ झाली. हा झाला
तिसरा दिवस.

### चौथा दिवस–सूर्य, चंद्र व तारे

14मग देव बोलला “दिवस व रात्र ही वेगळी करण्यासाठी
आकाशात ज्योति होवोत व त्या विशेष चिन्हे, आणि विशेष
मेळावे, ऋतू, दिवस, आणि वर्षे दाखविणाऱ्या होवोत.
15पृथ्वीला प्रकाश देण्यासाठी आकाशात त्या ज्योति
होवोत.” आणि तसे झाले.

16देवाने दोन मोठ्या ज्योति निर्माण केल्या. दिवसावर
सत्ता चालविण्यासाठी मोठी ज्योति सूर्य आणि रात्रीवर
सत्ता चालविण्यासाठी लहान ज्योति, चंद्र, आणि त्याने
तारेही निर्माण केले. 17–18देवाने त्या ज्योति पृथ्वीवर
प्रकाश पाडण्यासाठी आणि दिवसावर व रात्रीवर सत्ता
हचालविण्यासाठी आकाशात ठेवल्या. त्या ज्योतींनी प्रकाश
व अंधार वेगळे केले. आणि देवाने पाहिले की हे चांगले
आहे. 19संध्याकाळ झाली व नंतर सकाळ झाली. हा
झाला चौथा दिवस. हे

### पाचवा दिवस–मासे व पक्षी

20मग देव बोलला, “जलामध्ये जीवजंतूचे थवेच्या थवे
उत्पन्न होवोत. आणि पृथ्वीवर आकाशात पक्षी
उडोबागडोत” – 21समुद्रातील प्रचंड जलचर म्हणजे पाण्यात
फिरणारे व अनेक जातीचे व प्रकारचे जलप्राणी देवाने
उत्पन्न केले. तसेच आकाशात उडणारे निरनिराळ्या
जातीचे पक्षीही देवाने उत्पन्न केले आणि देवाने पाहिले
की हे चांगले आहे.

22देवाने त्यांना आशीर्वाद दिला, “फलद्रूप व्हा, वाढा,
समुद्रातील पाणी व्यापून व भरुन टाका आणि पक्षी बहुगुणित
होवोत व पृथ्वी व्यापून टाकोत.”

23संध्याकाळ झाली व नंतर सकाळ झाली हा होता
पाचवा दिवस.

### सहावा दिवस–जमिनीवरील प्राणी व मनुष्य प्राणी

24मग देव बोलला, “निरनिराळ्या जातीचे पशू, मोठे
प्राणी वेगवेगळ्या जातीचे सरपटणारे व रांगणारे लहान
प्राणी असे जीवधारी प्राणी पृथ्वीवर उत्पन्न होवोत. ते
आपापल्या जातीचे अनेक प्राणी निर्माण करोत.” आणि
तसे सर्व झाले.

25असे देवाने वनपशू, पाळीव जनावरे, सरपटत जाणारे
लहान प्राणी व वेगवेगळ्या जातीचे जीवधारी प्राणी निर्माण

केले. आणि देवाने पाहिले की हे चांगले आहे. 26मग देव
बोलला, "आपण आपल्या प्रतिरुपाचा आपल्या सारखा
मनुष्य निर्माण करु; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी,
सर्व वनपशू, मोठी जनावरे व जमिनीवर सरपटणारे सर्व
लहान प्राणी यांच्यावर ते सत्ता चालवितील."

27तेव्हा देवाने आपल्या प्रतिरुपाचा मनुष्य निर्माण केला;
देवाचे प्रतिरुप असा तो निर्माण केला; नर व नारी अशी
ती निर्माण केली. 28देवाने त्यांना आशीर्वाद दिला; देव
त्यांना म्हणाला, "फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा आणि पृथ्वी
व्यापून टाका; ती आपल्या सत्तेखाली आणा; समुद्रातील
मासे, आकाशातील पक्षी आणि पृथ्वीवर फिरणारा प्रत्येक
सजीव प्राणी यांवर सत्ता चालवा."

29देव म्हणाला, "धान्य देणाऱ्या सर्व वनस्पती आणि
आपापल्या फळामध्येच वृक्षाचे बीज असलेली सर्व फळझाडे
मी तुम्हांस दिली आहेत. ही तुम्हांकरिता अन्न होतील.
30तसेच पृथ्वीवरील सर्व पशू, आकाशातील सर्व पक्षी
आणि जमिनीवर सरपटत जाणारे सर्व प्राणी यांच्याकरिता
अन्न म्हणून मी हिरव्या वनस्पती दिल्या आहेत." आणि
सर्व तसे झाले. 31आपण केलेले सर्वकाही फार चांगले
आहे असे देवाने पाहिले.

संध्याकाळ झाली व नंतर सकाळ झाली. हा झाला
सहावा दिवस.

## सातवा दिवस-विसावा

2 याप्रमाणे पृथ्वी, आकाश आणि त्यांतील सर्वकाही
पूर्ण करून झाले. 2देवाने आपण करीत असलेले
काम संपवले म्हणून सातव्या दिवशी त्याने काम
करण्यापासून विसावा घेतला. 3देवाने सातवा दिवस
आशीर्वाद देऊन पवित्र केला व विशेष ठरविला कारण
त्या दिवशी जग निर्माण करताना त्याने केलेल्या सर्व
कामापासून विसावा घेतला.

## मानवाची सुरवात

4हा आकाश व पृथ्वी निर्माण केल्याचा इतिहास आहे.
देवाने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली त्या वेळी जे जे
घडले त्यांच्या उत्पत्ति क्रमाविषयीचा हा वृत्तान्त आहे.
5त्यापूर्वी पृथ्वीवर वनस्पती नव्हती, शेतात काही उगवले
नव्हते. कारण परमेश्वराने अद्याप पृथ्वीवर पाऊस पाडला
नव्हता आणि जमिनीची मशागत करण्यास कोणी मनुष्य
नव्हता. 6पृथ्वीवरुन धुके वर जात असे व त्याने सर्व
जमिनीवर पाणी शिंपडले व पसरले जात असे.

7नंतर परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य
घडवला व त्याच्या नाकपुड्यात जीवनाचा श्वास फुंकला
आणि मनुष्य जीवधारी म्हणजे जीवंत प्राणी झाला. 8मग
परमेश्वर देवाने पूर्वेकडे एदेन नावांच्या जागेत एक बाग
लावली आणि त्या बागेत आपण घडविलेल्या मनुष्याला
ठेवले. 9परमेश्वर देवाने सुंदर दिसणारी अन्नासाठी उत्तम
अशी सर्व जातीची झाडे बागेमध्ये उगवविली आणि बागेच्या
मध्यभागी जीवनाचे झाड आणि बऱ्यावाईटाचे ज्ञान देणारे
झाड अशी झाडे लावली.

10एदेन बागेत एक नदी उगम पावली व तिने सर्व
बागेला पाणी पुरवले. नंतर ती नदी विभागून तिच्या चार
वेगळ्या नद्या झाल्या. 11पहिल्या नदीचे नांव पीशोन होते.
ही सर्व हवीला देशाला वेढा घालून वाहाते 12त्या देशात
चांगल्या प्रतीचे सोने सांपडते. तेथे मोती व गोमेद ही रत्ने
सापडतात 13दुसऱ्या नदीचे नांव गीहोन आहे, ही सगळ्या
कूश म्हणजे इथिओपिया देशाभोवती वाहते. 14तिसऱ्या
नदीचे नांव हिद्दकेल. ही अश्शूर म्हणजे असीरिया देशाच्या
पूर्वेस वहात जाते. चौथ्या नदीचे नांव फरात म्हणजे युफ्रेटीस
असे आहे.

15परमेश्वर देवाने मनुष्याला एदेन बागेत तिची मशागत
करण्यासाठी व बागेची काळजी घेण्यासाठी ठेवले.
16परमेश्वराने मनुष्याला ही आज्ञा दिली; परमेश्वर
म्हणाला, "बागेतील कोणत्याही झाडाचे फळ तू खुशाल
खाऊ शकतो. 17परंतु बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या
झाडाचे फळ तू खाऊ नको; जर त्या झाडाचे फळ तू
खाशील तर तू नक्की मरशील."

## पहिली स्त्री

18नंतर परमेश्वर बोलला, "मनुष्याने एकटे असावे हे
बरे नाही; मी त्याच्यासाठी योग्य मदतनीस निर्माण करीन."

19परमेश्वराने मातीतून शेतातील सर्व जातीचे प्राणी आणि
आकाशातील सर्वजातीचे पक्षी उत्पन्न केले आणि त्यांना
मनुष्याकडे नेले आणि मनुष्याने म्हणजे आदामाने त्या
सर्वांना नांवे दिली. 20आदामाने सर्व पाळीव प्राणी,
आकाशातील सर्वपक्षी आणि सर्व वनपशू म्हणजे
जंगलातील, रानावनातील जनावरे यांना नांवे दिली.
आदामाने हे सर्व पशू-पक्षी पाहिले परंतु त्याला त्यांच्यात
आपणासाठी योग्य असा मदतनीस सापडला नाही. 21तेव्हा
परमेश्वर देवाने आदामाला गाढ झोप लागू दिली. आणि
तो झोपला असता परमेश्वराने आदामाच्या शरीरातून एक
फासळी काढली व ती जागा चमड्याने बंद केली. तेव्हा ती
मांसाने भरुन आली. 22परमेश्वराने आदामाची फासळी
काढून तिची स्त्री बनवली आणि तिला आदामाकडे नेले.
23तेव्हा आदाम म्हणाला,

"आता ही मात्र माझ्यासारखी आहे. तिची हाडे माझ्या
हाडा पासून व तिचे शरीर माझ्या शरीरापासून बनवले
आहे. मी तिला स्त्री म्हणजे नारी असे नांव देतो. कारण
ती नरापासून बनवलेली आहे."

24म्हणून मनुष्य आपल्या आईबापांस सोडून आपल्या
बायकोला जडून राहील आणि ती दोघे एक देह होतील.

25एदेन बागेत आदाम व त्याची बायको ही दोघे नग्न
होती. परंतु त्यांना कसलीच लाज वाटत नव्हती.

## पापाची सुरवात

3 परमेश्वर देवाने निर्माण केलेल्या सर्व वन्य प्राण्यांमध्ये
सर्प हा अतिशय धूर्त आणि हुषार होता. त्याला स्त्रीची
फसवणूक करायची होती. त्यावेळी सर्प त्या स्त्रीशी बोलला
व तो तिला म्हणाला, "स्त्रिये, बागेतल्या कोणत्याही झाडाचे
फळ खाऊ नको असे देवाने तुला खरोखरच सांगितले
आहे काय?"

2स्त्रीने सर्पाला उत्तर दिले, "नाही. देवाने तसे म्हटले
नाही बागेतल्या झाडांची फळे आम्ही खाऊ शकतो. 3परंतु
असे एक झाड आहे की ज्याचे फळ आम्ही खाता कामा
नये देवाने आम्हाला सांगितले, 'बागेच्या मधोमध असलेल्या
झाडाचे फळ तुम्ही मुळीच खाऊ नका. त्या झाडाला
स्पर्शही करु नका. नाहीतर तुम्ही मराल.'"

4परंतु सर्प त्या स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार
नाही. 5कारण देवाला हे माहीत आहे की जर तुम्ही त्या
झाडाचे फळ खाल तर बरे व वाईट काय आहे हे तुम्हांला
समजेल आणि तुम्ही देवासारखे व्हाल."

6स्त्रीने पाहिले की ते झाड दिसण्यात सुंदर, त्याचे फळ
खाण्यास चांगले व शहाणपण देणारे आहे म्हणून तिने त्या
झाडाचे फळ तोडून घेतले व खाल्ले. तिचा नवरा
तिच्याबरोबर तेथे होता; तेव्हा तिने त्या फळातून त्याला
थोडे दिले व त्याने ते खाल्ले.

7तेव्हा त्या दोघांचे डोळे उघडले व आपण नग्न
आहो असे त्यांस समजले; तेव्हा त्यांनी अंजिराची पाने
शिवून आपणासाठी काही वस्त्रे तयार केली व ती
घातली.

8संध्याकाळी परमेश्वर बागेत फिरत होता. त्यावेळी
आदामाने आणि त्याच्या बायकोने परमेश्वराचा आवाज
ऐकला. आणि त्याच्या नजरेस पडू नये म्हणून ती दोघे
परमेश्वरापासून बागेच्या झाडात लपली. 9तेव्हा
परमेश्वराने आदामाला हाक मारुन म्हटले, "तू कोठे
आहेस?"

10तो म्हणाला, "बागेत मी तुझ्या चालण्याचा आवाज
ऐकला व मला भीती वाटली कारण मी नग्न होतो आणि
म्हणून मी लपलो."

11परमेश्वर त्याला म्हणाला, "तू नग्न आहेस हे तुला
कोणी सांगितले? ज्या विशेष झाडाचे फळ तू खाऊ नकोस
अशी मी तुला आज्ञा दिली होती त्या झाडाचे फळ तू
खाल्लेस काय?"

12आदाम म्हणाला, "तू ही स्त्री माझ्यासाठी मदतनीस
म्हणून दिलीस. तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि
म्हणून मी ते खाल्ले."

13मग परमेश्वर त्या स्त्रीला म्हणाला, "तू हे काय
केलेस?"

ती स्त्री म्हणाली, "सर्पाने मला भुरळ घालून फसविले
व म्हणून मी ते फळ खाल्ले."

14म्हणून परमेश्वर सर्पाला म्हणाला,

"तू हे फार वाईट केलेस म्हणून तुझे पण वाईट होईल.
तू हे केलेस म्हणून इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा तू अधिक
शापित आहेस. तू पोटाने सरपटत चालशील आणि
आयुष्यभर तू माती खाशील

15तू व स्त्री, यांस मी एकमेकांचे शत्रु करीन. तुझी
संतती आणि तिची संतती एकमेकाचे शत्रू होतील तिच्या
संततीच्या पायाची तू टाच फोडशील पण तो तुझे डोके
ठेचील

16नंतर परमेश्वर स्त्रीला म्हणाला,

"तू गरोदर असताना तुला त्रास होईल आणि मुलांना
जन्म देते वेळी तुला खूप वेदना होतील. तरी तुझी ओढ
तुझ्या नवऱ्याकडे राहील; आणि तो तुझ्यावर अधिकार
चालवील."

17नंतर परमेश्वर देव आदामाला म्हणाला,

"त्या विशेष झाडाचे फळ खाऊ नको अशी मी तुला
आज्ञा दिली होती परंतु तू तुझ्या बायकोने सांगितलेल्या
गोष्टी ऐकल्यास आणि त्या झाड़ाचे फळ खाल्लेस.
तेव्हा मी तुझ्यामुळे भूमीला शाप देत आहे. तू
तिजपासून अन्न मिळविण्यासाठी जन्मभर अतिशय
कष्ट करशील;

18जमीन तुझ्यासाठी काटेकुटे वाढवेल आणि शेतातल्या
रानटी वनस्पती तुला खाव्या लागतील.

19तू अतिशय श्रम करून निढळाच्या घामाने भाकर
मिळविशील तू मरायच्या दिवसापर्यंत अतिशय काम
करशील. आणि नंतर तू पुन्हा माती होशील मी तुला
मातीतून उत्पन्न केले आहे; आणि तू मरशील तेव्हा
परत मातीला जाऊन मिळशील."

20आदामाने आपल्या बायकोचे नांव हव्वा ठेवले. या
जगात जन्म घेणाऱ्या सर्व माणसांची ती आई आहे म्हणून
आदामाने तिला हे नांव दिले.

21परमेश्वराने आदाम व त्याची बायको हव्वा यांच्यासाठी
जनावरांच्या चामड्यांची वस्त्रे केली; आणि ती त्यांना
घातली.

22परमेश्वर म्हणाला, "पाहा, मनुष्य आपल्या सारखा
झाला आहे. त्याला बरे व वाईट समजते. तर आता कदाचित
जीवनांच्या झाडावरुन तो फळ घेईल आणि जर का तो ते
फळ खाईल तर मग सदासर्वकाळ तो जीवंत राहील."

23तेव्हा परमेश्वराने मनुष्याला ज्या जमिनीतून उत्पन्न
केले होते तिची मशागत करण्यासाठी एदेन बागेतून बाहेर
घालवून दिले.

24परमेश्वर देवाने मनुष्याला एदेन बाग सोडण्यासाठी
भाग पाडले. नंतर परमेश्वराने एदेन बागेची राखण
करण्यासाठी बागेच्या पूर्वेकडे करुब देवदूतांना पहारा
करण्यास ठेवले. तसेच तेथे जीवनाच्या झाडाकडे जाणाऱ्या
मार्गाचे रक्षण करण्यासाठी गरगर फिरणारी अग्नीची एक
तलवार ठेवली.

## पहिले कुटुंब

4 आदाम आणि त्याची बायको हव्वा यांचा लैंगिक
संबंध आला; हव्वा गर्भवती होऊन तिने एका बाळाला
जन्म दिला. त्या मुलाचे नांव काइन असे ठेवले.
तेव्हा हव्वा म्हणाली, “परमेश्वराच्या सहाय्याने मला
पुरूषसंतान लाभले आहे.”
2त्यानंतर हव्वेने आणखी एका बाळाला जन्म दिला. हा
मुलगा म्हणजे काइनाचा भाऊ हाबेल होता. हाबेल मेंढपाळ
झाला; काइन शेतकरी झाला.

## पहिला खून

3काही काळानंतर हंगामाचे वेळी काइनाने परमेश्वराला
आदराने दान देण्यासाठी आपल्या शेतातील उत्पन्नातून
काही अर्पण आणले. 4हाबेलानेही आपल्या कळपातील
काही मेंढरे देवाला अर्पण म्हणून आणली. त्याने मेंढरांचे
सर्वात उत्तम भाग आणले.
परमेश्वराने हाबेलाचे अर्पण स्वीकारले. 5परन्तु काइन
आणि त्याचे अर्पण स्वीकारले नाही. यामुळे काइन फार
दु:खी झाला व त्याला फार राग आला 6परमेश्वराने
काइनाला विचारले, “तू का रागावलास? तुझा चेहरा
दु:खी का दिसत आहे? 7तू जर चांगल्या गोष्टी करशील
तर तुझे माझे संबंध चांगले राहतील मग मी तुझा स्वीकार
करीन; परंतु तू जर वाईट रीतीने चालशील तर ते पाप
तुझ्यात राहील व ते पाप तुझ्यावर सत्ता चालवू पाहील;
पण तू त्या पापावर सत्ता चालवली पाहिजेस.”
8काइन आपला भाऊ हाबेल यास म्हणाला, “चल,
आपण जरा शेतात जाऊ या.” तेव्हा काइनाने हाबेलाला
बाहेर शेतात नेले. तेव्हा काइनाने आपला भाऊ हाबेल
यावर हल्ला केला व त्याला ठार मारले.
9काही वेळाने परमेश्वर काइनास म्हणाला, “तुझा भाऊ
हाबेल कोठे आहे?”
काइनाने उत्तर दिले, “मला माहीत नाही; माझ्या भावावर
नजर ठेवणे व त्याची काळजी घेणे हे माझे काम आहे
काय?”
10नंतर परमेश्वर म्हणाला, “तू हे काय केलेस? 11तू
तुझ्या भावाला ठार केलेस. त्याचे रक्त मला जमिनीतून
हाका मारीत आहे; त्याचे रक्त तुझ्या हातातून घेण्यास
भूमीने आपले तोंड उघडले आहे. ह्याच कारणाने तू
शापित आहेस. भूमी तुला नकारेल.12पूर्वी तू जमिनीची
मशागत केलीस आणि तिने तुला चांगले पीक दिले. पण
आता तू मशागत करशील तरी ती भूमी तुला पीक देणार
नाही. तू पृथ्वीवर एका ठिकाणी घर करून राहणार
नाहीस तर तू भटकत राहशील व परागंदा होशील.”
13मग काइन म्हणाला, “ही शिक्षा मी सहन करु शकणार
नाही इतकी भारी आहे. 14पहा तू मला ह्या माझ्या भूमिवरुन
दूर पाठवीत आहेस, मी तुला पाहू शकणार नाही किंवा
तुझ्या जवळ मला येता येणार नाही; मला घरदार असणार
नाही. या पृथ्वीवर तू मला ठिकठिकाणी भटकणे व
परागंदा होणे लादले आहेस. मी जर कोणाच्या हाती सापडेन
तर तो मला ठार मारुन टाकेल.”
15मग परमेश्वर काइनास म्हणाला, “मी असे घडू देणार
नाही. कारण तुला जर कोणी ठार मारील तर त्याला मी
कितीतरी अधिक पटीने शिक्षा देईन.” मग काइनाला
कोणी मारु नये म्हणून परमेश्वराने त्याच्यावर एक विशिष्ठ
खूण केली.

## काइनाचे घराणे

16काइन परमेश्वरा समोरुन निघून गेला आणि एदेनाच्या
पूर्वेस नोद देशात जाऊन राहिला.
17काईन आपल्या पत्नीजवळ जाऊन निजला तेव्हा ती
गर्भवती होऊन तीने हनोख नांवाच्या मुलाला जन्म दिला;
काइनाने एक नगर बांधले तेव्हा त्याने त्या नगराला
आपल्या मुलाचेच हनोख हे नांव दिले.
18हनोखाला इराद नांवाचा मुलगा झाला; इरादाला
महूयाएल झाला महूयाएलास मथुशाएल झाला; आणि
मथुशाएलास लामेख झाला.
19लामेखाने दोन बायका केल्या. पहिलीचे नांव आदा
व दुसरीचे नांव सिल्ला.
20आदाने याबालास जन्म दिला; तो तंबूत राहाणाऱ्या व
गुरेढोरे पाळणाऱ्या लोकांचा मूळ पुरुष झाला. 21आदाला
आणखी एक मुलगा झाला. (त्याचे नांव युबाल; हा
याबालाचा भाऊ); युबाल तंतुवाद्ये, व वायुवाद्ये म्हणजे
वीणा व बासरी वाजविणाऱ्या कलावंताचा मूळ पुरुष झाला.
22सिल्ला हिला तुबल–काइन झाला; तो तांब्याची व
लोखंडाची कामे करणाऱ्या लोकांचा मूळ पुरुष झाला.
तुबल काइनास नामा नांवाची बहीण होती.
23लामेख आपल्या बायकांना म्हणाला,

“आदा आणि सिल्ला माझी वाणी ऐका; लामेखाच्या
बायकांनो, मी ज्या गोष्टी बोलतो तिकडे कान द्या; एका
माणसाने मला जखमी केले, तेव्हा मी त्याला ठार मारले,
एका तरुणाने मला मारले म्हणून मी त्याला ठार केले.
24काइनाला मारणाऱ्याला खूप खूप शिक्षा होईल तर
मग मला मारणाऱ्याला त्याहीपेक्षा आधिकात अधिक
शिक्षा होईल. ”

25आदाम पुन्हा पत्नीजवळ गेला. आणि तिला मुलगा
झाला. त्यांनी त्याचे नांव शेथ असे ठेवले हव्वा म्हणाली,
“काइनाने हाबेलास ठार केले म्हणून देवाने मला दुसरा
मुलगा दिला.” 26शेथलाही मुलगा झाला, त्याचे नांव त्याने
अनोश ठेवले; त्या काळापासून लोक परमेश्वराच्या नांवाने
प्रार्थना करु लागले.

## आदामाच्या वंशावळीचा इतिहास

5 आदामाच्या वंशावळीची नोंद अशी आहे. देवाने मनुष्य आपल्या प्रतिरुपाचा म्हणजे आपल्या सारखा निर्माण केला. 2देवाने त्यांस नर व नारी असे उत्पन्न केले. देवाने त्यांस ज्या दिवशी उत्पन्न केले त्याच दिवशी देवाने त्यांस आशीर्वाद दिला व त्यांस “आदाम” म्हणजे मनुष्य हे नांव दिले.

3आदाम एकशेतीस वर्षांचा झाल्यावर त्याला त्याच्या प्रतिरुपाचा म्हणजे हुबेहूब त्याच्या सारखा दिसणारा मुलगा झाला. त्याने त्याचे नांव शेथ ठेवले; 4शेथ जन्मल्यानंतर आदाम आठशें वर्षे जगला आणि या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या. 5अशारीतीने आदाम एकंदर नऊशेतीस वर्षे जगला; नंतर तो मरण पावला.

6शेथ एकशेंपाच वर्षांचा झाल्यावर त्याला अनोश नांवाचा मुलगा झाला. 7अनोशच्या जन्मानंतर शेथ आठशेंसात वर्षे जगला, त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 8शेथ एकंदर नऊशेंबारा वर्षे जगला, मग तो मरण पावला.

9अनोश नव्वद वर्षांचा झाल्यावर त्याला केनान नांवाचा मुलगा झाला; 10केनान जन्मल्यानंतर अनोश आठशेंपंधरा वर्षे जगला; त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 11अनोश एकंदर नऊशेंपाच वर्षे जगला; त्यानंतर तो मरण पावला.

12केनान सत्तर वर्षांचा झाल्यावर त्याला महललेल नांवाचा मुलगा झाला; 13महललेल झाल्यावर केनान आठशेंचाळीस वर्षे जगला; त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 14केनान एकंदर नऊशेंदहा वर्षे जगला; नंतर तो मरण पावला.

15महललेल पासष्ट वर्षांचा झाल्यावर त्याला यारेद नांवाचा मुलगा झाला; 16यारेद जन्मल्यानंतर महललेल आठशेंतीस वर्षे जगला; त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 17महललेल एकंदर आठशें पंच्याण्णव वर्षे जगला; त्यानंतर तो मरण पावला.

18यारेद एकशें बासष्ट वर्षांचा झाल्यावर त्यास हनोख नावाचा मुलगा झाला; 19हनोख झाल्यावर यारेद आठशें वर्षे जगला; त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 20यारेद एकंदर नऊशे बासष्ट वर्षे जगला; त्या नंतर तो मरण पावला.

21हनोख पासष्ट वर्षांचा झाल्यावर त्याला मथुशलह झाला; 22मथुशलह जन्मल्यावर हनोख तीनशें वर्षे देवाबरोबर चालला व त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 23हनोख एकंदर तीनशें पासष्ट वर्षे जगला; 24एके दिवशी हनोख देवाबरोबर चालत होता; नंतर तो नाहिसा झाला कारण देवाने त्याला नेले.

25मथुशलह एकशे सत्याऐंशी वर्षांचा झाल्यावर त्याला लामेख नावांचा मुलगा झाला; 26लामेखाच्या जन्मानंतर मथुशलह सातशेंब्याऐंशी वर्षे जगला; त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 27मथुशलह एकंदर नऊशें एकुणसत्तर वर्षे जगला; त्यानंतर तो मरण पावला.

28लामेख एकशें ब्याऐंशी वर्षांचा झाल्यावर त्याला एक मुलगा झाला; 29त्याने त्याचे नांव नोहा (म्हणजे विसावा) असे ठेवले. लामेख म्हणाला, “देवाने भूमिला शाप दिल्यामुळे आपल्याला शेतकरी म्हणून खूप कष्ट करावे लागतात; परंतु नोहा आपल्याला विसावा देईल.”

30नोहा झाल्यावर लामेख पाचशें पंच्याण्णव वर्षे जगला; त्या काळात त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या; 31लामेख एकंदर सातशें सत्याहत्तर वर्षे जगला; नंतर तो मरण पावला.

32नोहा पाचशें वर्षांचा झाल्यावर त्याला शेम, हाम व याफेथ नांवांचे मुलगे झाले.

## माणसे दुष्ट होतात

6 पृथ्वीवरील मनुष्यांची संख्या वाढतच राहिली आणि त्यांना मुली झाल्या; 2त्या मुली सुंदर आहेत असे देवपुत्रांनी पाहिले, म्हणून आपल्या आवडी निवडी प्रमाणे त्यांनी त्यांच्याशी लग्न केले.

3या स्त्रियांनी मुलांना जन्म दिला. त्या काळी व त्यानंतर पृथ्वीवर नेफिलिम लोक राहात होते. ते फार नामांकित होते. ते प्राचीन काळापासूनचे महावीर होते.

4नंतर परमेश्वर म्हणाला, “मनुष्य हा देहधारी आहे, तो भ्रांत झाल्यामुळे माझ्या आत्म्याची सत्ता त्यांच्या ठायी सर्वकाळ राहणार नाही; म्हणून मी माझ्या आत्म्याला त्याच्यापासून सतत–त्रास होऊ देणार नाहीं; तर मी त्यांस एकशेंवीस वर्षांचेच आयुष्य देईन.”

5परमेश्वराने पाहिले की पृथ्वीवरील लोक दुष्ट आहेत; त्यांचे विचार नेंहमी वाईट असतात. 6म्हणून पृथ्वीवर मनुष्य निर्माण केल्याबद्दल परमेश्वराला वाईट वाटले; 7आणि तो मनात फार दु:खी झाला; तेव्हा तो म्हणाला, “मी उत्पन्न केलेल्या मानवास पृथ्वीतलावरुन नष्ट करीन; तसेच माणसे, पशू, सरपटणारे प्राणी, व आकाशातील पक्षी या सर्वांचा मी नाश करीन कारण या सर्वांना उत्पन्न केल्याचे मला दु:ख होत आहे.”

8परन्तु परमेश्वराला आनंद देणारा एक माणूस पृथ्वीवर होता तो म्हणजे नोहा.

## नोहा आणि जलप्रलय

9ही नोहाच्या घराण्याची कहाणी आहे. नोहा आयुष्यभर त्या पिढीतला नीतिमान माणूस होता. तो नेहमी देवाच्या आज्ञांप्रमाणे चालला 10नोहाला शेम, हाम व याफेथ नांवाचे तीन मुलगे होते.

11देवाने पृथ्वीकडे पाहिले तेव्हा माणसांनी ती भ्रष्ट केली आहे असे त्याला आढळले. 12जिकडे तिकडे हिंसांचार चालू होते; लोक वाईट व क्रूर झाले होते; त्यांनी पृथ्वीवर आपल्या जीवनाचा नाश करून घेतला होता. 13म्हणून

देव नोहाला म्हणाला, “मनुष्यांनी सर्व पृथ्वी संतापांने व
हिंसेने भरुन टाकली आहे; म्हणून मी उत्पन्न केलेल्या
सर्व प्राण्यांचा नाश करीन; त्यांचा पृथ्वी तलावरुन नायनाट
करीन 14तेव्हा आपणासाठी सायप्रस म्हणजे गोफेर झाडाच्या
लाकडाचे एक तारु कर; त्यात खोल्या कर आणि त्याला
सर्वत्र म्हणजे आतून व बाहेरुन डांबर लाव.”

15देव म्हणाला, “तारवाचे मोजमाप मी सांगतो त्याप्रमाणे
असावे. ते 300 क्यूबिट लांब, 50 क्यूबिट रुंद, आणि 30
क्यूबिट उंच असावे; 16तारवाला छतापासून सुमारे 18
इंचावर एक खिडकी कर; तारवाच्या एका बाजूस दार
ठेव; तसेच तारवाला वरचा, मधला व खालचा असे तीन
मजले कर.

17“मी सांगतो ते समजून घे. मी पृथ्वीवरजलप्रलय
आणीन. मी पृथ्वीवरील सर्वलोक आणि सर्व सजीव प्राण्यांना
नष्ट करीन. 18मी तुझ्याशी एक विशेष करार करतो; तू
आपले मुलगे, आपली बायको व आपल्या सुना यांस
घेऊन तारवात जा. 19तसेच पृथ्वीवरील प्रत्येक जातीतील
सजीव प्राण्यापैकी एक नरमादीची जोडी तू तारवात ने,
त्यांना तुझ्याबरोबर तारवात जिवंत ठेव.

20पक्षी, पशू आणि भूमीवर रांगणारे प्राणी या पैकी
प्रत्येकाच्या जातीतून नरमादी असे दोनदोन तुझ्याबरोबर
तरवात ने; त्यांना तुझ्याबरोबर तारवात जिवंत ठेव. 21तसेच
तुला व त्यांना लागणारे पृथ्वीवरील सर्व प्रकारचे अन्न
तारवात साठवून ठेव.”

22देवाने आज्ञा दिल्याप्रमाणे नोहाने सर्व काही केले.

## जलप्रलयाची सुरवात

7 नंतर परमेश्वर नोहाला म्हणाला, “या काळातील
दुष्ट लोकात माझ्यासमोर तूच एक नीतिमान माणूस
आहेस असे मला आढळले आहे; तेव्हा तुझ्या कुटुंबातील
सर्वांना घेऊन तारवात जा. 2अर्पणासाठी वरील प्रत्येक
जातीच्या शुद्ध प्राण्यापैकी नरमाद्यांच्या सात जोड्या, इतर
अशुद्ध प्राण्यापैकी नरमादी अशी एकच जोड़ी, 3आणि
पक्षांच्या नरमादी अशा सात जोड्या तुझ्याबरोबर तारवात
ने. पृथ्वीवर त्यांचे बीज राहील 4आतापासून सात दिवसांनी
मी पृथ्वीवर चाळीस दिवस व चाळीस रात्र प्रचंड पाऊस
पाडीन; त्यामुळे पृथ्वीवर मी निर्माण केलेल्या प्रत्येक
गोष्टीचा नाश होईल.” 5परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणे
नोहाने सर्वकाही केले.

6पाऊस आला तेव्हा नोहा सहाशे वर्षांचा होता.
7जलप्रलयातून तरुन जावे म्हणून नोहा व त्याचे सह त्याचे
कुटुंब म्हणजे त्याची बायको, त्याचे मुलगे व सुना हे
तारवात गेले. 8तसेच पृथ्वीतलावरील सर्व शुद्ध व अशुद्ध
पशूपक्षी, सरपटणारे व रांगणारे प्राणी 9हे सर्व देवाने
सांगितल्याप्रमाणे नर व मादी अशा जोडी जोडीने नोहाबरोबर
तारवात गेले. 10मग सात दिवसानंतर पृथ्वीवर पाऊस
पडण्यास व जलप्रलय येण्यास सुरवात झाली.

11–13दुसऱ्या महिन्याच्या सतराव्या दिवशी पृथ्वीतील
पाण्याचे सर्वझरे फुटले व पाणी उफाळून वर आले व
जमिनीवरुन वाहू लागले; त्याच दिवशी मुसळधार पाऊस
पडण्यास सुरुवात झाली; जणू काय आकाशाच्या खिडक्या
उघडल्या; चाळीस दिवस व चाळीस रात्र मुसळधार पाऊस
पडला. त्याच दिवशी नोहा, त्याची बायको, त्याचे मुलगे
शेम, हाम व याफेथ व त्यांच्या बायका ही सर्वमंडळी
तारवात गेली. त्यावेळी नोहा सहाशे वर्षांचा होता. 14नोहाचे
कुटुंब आणि पृथ्वीवरील सर्व सजीव प्राणी म्हणजे सर्व
जातीची गुरेढोरे इतर पशू जमिनीवर सरपटणारे आणि
आकाशात उडणारे पक्षी हे तारवात होते. 15आणि ज्यांच्या
जीवात प्राण आहे असे सर्व प्रकारचे प्राणी दोन दोनच्या
गटाने तारवात गेले. 16देवाने दिलेल्या आज्ञेप्रमाणे हे जीवंत
प्राणी जोडीने नर व मादी असे तारवात गेले आणि मग
परमेश्वराने दार बंद केले पाणी वाढू लागले आणि त्याने
जमिनीवरुन तारु उचलले.

17चाळीस दिवस पृथ्वीवर महापुर पाणी आले; 18पाणी
एक सारखे चढतच गेले आणि त्यामुळे तारु जमिनीपासून
उंचावर तरंगू लागले; 19पाणी इतके वर चढत गेले की
उंच उंच पर्वत देखील पाण्यात बुडून गेले; 20पाणी सर्वात
उंच पर्वत शिखरावर वीस फुटा पेक्षा अधिक उंच इतके
वर चढले.

21–22पृथ्वीवरील सर्व जिवंत प्राणी, म्हणजे सर्व स्त्री,
पुरुष, तसेच सर्व पक्षी, गुरेढोरे, ग्रामपशू, वनपशू सरपटणारे
प्राणी हे सर्व जीव जंतू मरुन गेले. 23अशा रीतीने देवाने
पृथ्वीच्या पाठीवरील सर्वकाही म्हणजे मानव, पशू,
सरपटणारे प्राणी आणि आकाशातील पक्षी अशा सर्व
जीवधारी प्राण्यांचा नाश केला; जे वाचले ते म्हणजे नोहा,
त्याचे कुटुंब आणि तारवात त्याच्या सोबत असलेले प्राणी,
फक्त एवढेच. 24पाण्याने एकशे पन्नास दिवस पृथ्वीला
झाकून ठेवले होते.

## जलप्रलयाचा शेवट

8 पण देव नोहाला विसरला नाही; त्याने नोहाची व
त्याच्या सोबत तारवात असलेल्या सर्व प्राण्यांची
आठवण केली; देवाने पृथ्वीवर वारा वाहवला. आणि
पाणी दिसेनासे होऊ लागले.

2आकाशातून मुसळधार पडणारा पाऊस थांबला; आणि
पृथ्वीच्या पोटातून उफाळून वर येणारे सर्व झऱ्यांचे पाणी
वाहाण्याचे थांबले, 3–4पृथ्वी भरुन टाकलेले पाणी ओसरुन
खाली खाली जाऊ लागले. दीडशे दिवसानंतर पाणी इतके
खाली आले की त्यामुळे 5सातव्या महिन्याच्या सतराव्या
दिवशी तारु आरारात पर्वताजवळ थांबून पुन्हा जमिनीवर
टेकले; पाणी सतत ओसरत राहिले आणि दहाव्या
महिन्याच्या पहिल्या दिवशी पर्वताची शिखरे दिसू लागली.

6चाळीस दिवसांनंतर नोहाने तयार केलेली तारवाची
खिडकी उघडली 7आणि एक कावळा बाहेर सोडला; तो

पाणी संपून जमीन कोरडी होईपर्यंत इकडे-तिकडे उडत
राहिला. [8]जमिनीच्या पृष्टभागावरून पाणी उतरले आहे
का नाही हे जाणून घेण्याकरिता नोहाने एका कबुतरालाही
बाहेर सोडले.

[9]जमीन अजून पाण्याने झाकलेली असल्यामुळे
कबुतराला टेकायला जागा मिळाली नाही. म्हणून ते
तारवाकडे परत आले तेव्हा नोहाने हात बाहेर काढून
त्याला धरले व तारवाच्या आत घेतले.

[10]सात दिवसानंतर नोहाने पुन्हा कबुतराला बाहेर सोडले;
[11]तेव्हा ते दुपारी नोहाकडे परत आले तेव्हा त्याच्या चोचींत
ऑलीव्ह वृक्षाचे (म्हणजे जैतून झाडाचे) कोवळे पान
होते. यावरुन जमीन सुकली असल्याचे नोहाला समजले,
[12]आणखी सात दिवसांनी नोहाने कबुतराला पुन्हा बाहेर
सोडले परंतु यावेळी मात्र ते परत आले नाही.

[13]त्यानंतर नोहाने तारवाचे दार उघडले. जमीन सुकून
गेली आहे असे होता नोहाला दिसले. हा वर्षाच्या पहिल्या
महिन्याचा पहिला दिवस होता. नोहा तेव्हा 601 वर्षांचा
होता. [14]दुसऱ्या महिन्याच्या सत्ताविसाव्या दिवसापर्यंत जमीन
खडखडीत कोरडी झाली होती.

[15]नंतर देव नोहाला म्हणाला, [16]"तू, तुझी बायको, मुले
व सुना यांना घेऊन आता तारवाच्या बाहेर नीघ; [17]तुझ्या
बरोबर सर्वपक्षी, पशू जमिनीवर रांगणारे प्राणी यां सर्वांना
तारवातून बाहेर आण; ते प्राणी आपापल्या जातीची भरपूर
संतती उत्पन्न करतील व पुन्हा पृथ्वी भरुन टाकतील."

[18]तेव्हा नोहा आपले पुत्र, बायको व सुना यांना घेऊन
तारवातून बाहेर निघाला; [19]त्याच्या बरोबरचे सर्व पशू,
रांगणारे प्राणी व पक्षी जातवारीने जोडीजोडीने तारवातून
बाहेर निघाले.

[20]त्यानंतर नोहाने परमेश्वराकरिता एक वेदी बांधली
आणि देवाने अगोदर सांगितल्याप्रमाणे सर्व शुद्ध पक्षी व
सर्व शुद्ध पशू यांतून काही अर्पणासाठी घेतले आणि त्याने
देवासाठी देणगी म्हणून त्यांचे वेदीवर होमार्पण केले.

[21]परमेश्वराने त्या अर्पणाचा सुवास घेतला आणि त्याने
त्याला आनंद झाला; परमेश्वर स्वत:स म्हणाला, "मानवास
शिक्षा करण्याकरिता मी पुन्हा कधीही भूमिला असा शाप
देणार नाही; आपल्या लहानपणापासूनच मानव दुष्ट आहे;
तेव्हा येथून पुढे कधीही मी पृथ्वीवरुन सर्वसजीव सृष्टीचा
नाश करणार नाही पुन्हा; [22]जोपर्यंत पृथ्वी राहील तो
पर्यंत पेरणी व कापणी, थंडी व ऊन, हिवाळा व उन्हाळा,
दिवस व रात्र व्हावयाची थांबणार नाहींत."

## नवीन सुरवात

9 देवाने नोहाला व त्याच्या मुलांना आशीर्वाद दिला.
तो त्यांना म्हणाला, "पुष्कळ मुलांबाळांना जन्म द्या;
आणि तुमच्या संततीने पृथ्वी भरुन टाका. [2]पृथ्वीवरील
सर्व पशू, आकाशातील प्रत्येक पक्षी, जमिनीवर सरपटणारा
प्रत्येक प्राणी आणि समुद्रातील सर्व मासे, तुमचे भय धरतील;
ते सर्व तुमच्या सत्तेखाली असतील. [3]ह्या आधी मी तुम्हाला,
खाण्याकरिता हिरव्या वनस्पती दिल्या; आता सर्व प्राणीही
तुमचे अन्न होतील. मी पृथ्वीवरील सर्व काही तुमच्या
हाती देतो. ते सर्व तुमचे आहे. [4]पण मी तुम्हांस एक आज्ञा
देतो की रक्तासकट मांस तुम्ही खाऊ नका कारण रक्त
हे त्याचे जीवन आहे; [5]तसेच मी तुमच्या जीवाबद्दल रक्ताची
मागणी करीन म्हणजे माणसाला ठार मारणाऱ्या कोणत्याहीं
पशूच्या जीवाची मी मागणी करीन आणि माणसाचा जीव
घेणाऱ्या प्रत्येक माणसाच्या जीवाची मी मागणी करीन.

[6]"देवाने माणूस आपल्या प्रतिरुपाचा उत्पन्न केला आहे.
म्हणून जर एखादी व्यक्ति एखाद्या व्यक्तिद्वारे ठार मारली
गेली तर ती व्यक्तिपण त्याच व्यक्तिद्वारेच ठार केली
जाईल.

[7]"नोहा, तू व तुझी मुले तुम्हाला भरपूर संतती होवो व
तुमच्या लोकांद्वारे पृथ्वी भरली जावो."

[8]मग देव नोहाला व त्याच्या मुलांना म्हणाला, [9]"मी
आता तुम्हाशी व तुमच्या मागे तुमच्या संततीशी एक
करार करतो; [10]तसेच तुमच्या सोबत जे पक्षी, गुरेढोरे,
पशू आणि इतर जे प्राणी तारवातून बाहेर आले त्यांच्याशीही
एक करार करतो म्हणजे सर्व सजीव सृष्टीशी मी करार
करतो; [11]तो करार असा: पृथ्वीवरील सर्वप्राणीमात्र
जलप्रलयामुळे नष्ट झाले पण येथून पुढे तसे कधीच
होणार नाही, व सर्व सजीव सृष्टीचा नाश करणारा जलप्रलय
पुन्हा कधी येणार नाहीं." [12]आणि देव म्हणाला, "मी
तुम्हाशी हा करार केल्याची काही तरी खूण तुम्हाला देतो
त्या खुणेवरुन (पुराव्यावरुन) मी तुम्हाशी व सर्व सजीव
सृष्टीशी करार केल्याचे दिसेल. हा करार पिढ्यानपिढ्या
व युगानुयुग कायम राहील. [13]मी ढगात सप्तरंगी धनुष्य
ठेवले आहे; ते सर्व पृथ्वी व माझ्यामध्ये केलेल्या कराराचा
पुरावा म्हणून राहील. [14]मी जेव्हा पृथ्वीवर ढग आणेल
तेव्हा तुम्हाला ढगात सप्तरंगी धनुष्य दिसेल [15]जेव्हा मी ते
पाहीन तेव्हा मी तुमच्याशी व पृथ्वीवरील सर्व प्राण्यांशी
केलेल्या माझ्या कराराची मला आठवण होईल, ह्या
कराराप्रमाणे जलप्रलय पृथ्वीवरील जीवनाचा पुन्हा कधीही
नाश करणार नाही. [16]आणि ते धनुष्य पाहून कराराची
मला आठवण होईल मी पृथ्वीवरील प्रत्येक जिवंत प्राण्याशी
चिरंतन काळासाठी केलेल्या कराराची मला आठवण
होईल."

[17]तेव्हा देव नोहाला म्हणाला, "ते रंगीत धनुष्य
माझ्यामध्ये व पृथ्वीवरील सर्वसजीव प्राण्यामध्ये झालेल्या
कराराचा पुरावा आहे."

## प्रश्नांची पुन्हा सुरुवात

[18]नोहाबरोबर त्याचे मुलगे तारवाबाहेर आले; त्यांची
नांवे शेम, हाम व याफेथ अशी होती; (हाम हा कनानाचा

बाप होता 19हे नोहाचे तीन मुलगे होते; यांच्या पासूनच
पृथ्वीवर लोकवस्ती झाली.

20नोहा शेतकरी झाला व त्याने एक द्राक्षमळा लावला;
21त्याने द्राक्षारस तयार केला व तो भरपूर प्यायला; तो
द्राक्षारसाने धुंद झाला व आपल्या तंबूत उघडानागडा पडला.
22तेव्हा कनानाचा बाप हाम याने आपला बाप उघडानागडा
पडलेला असल्याचे पाहिले व त्याने तंबूच्या बाहेर येऊन
ते आपल्या भावांना सांगितले; 23मग शेम व याफेथ यांनी
एक झगा घेतला व तो आपल्या पाठीवर ठेवून ते पाठमोरे
तंबूत गेले. अशा प्रकारे त्यांनी आपल्या वडिलांची नग्नता
झाकली; पाठमोरे असल्यामुळे ती त्यांना दिसली नाहीं.

24नंतर नोहा जागा झाला, (तो द्राक्षारसाच्या नशेमुळे
झोपला होता) तेव्हा आपला धाकटा मुलगा हाम याने
काय केले हे त्याला समजले. 25तेव्हा नोहा म्हणाला,

“कनान शापित होवो, तो आपल्या भावाच्या गुलामातील
सर्वात खालचा गुलाम होवो.”

26नोहा आणखी म्हणाला,“शेमचा परमेश्वर देव
धन्यवादित असो! कनान शेमचा गुलाम होवो.

27देव याफेथाला अधिक जमीन देवो! देव शेमच्या
तंबूत राहो,आणि कनान त्यांचा गुलाम होवो.”

28जलप्रलया नंतर नोहा साडेतीनशे वर्षे जगला; 29नोहा
एकूण साडे नऊशे वर्षे जगला; मग त्यानंतर तो मरण
पावला.

## राष्ट्रांची वाढ आणी प्रसार

10 शेम, हाम व याफेथ ह्या नोहाच्या तीन मुलांना
जलप्रलयानंतर पुष्कळ मुलगे झाले; त्यांची
वंशावळ येणे प्रमाणे:

## याफेथाचे वंशज

2याफेथाचे मुलगे; गोमर, मागोग, मादय, यावान, तुबाल,
मेशेख व तीरास हे होते.

3गोमरचे मुलगे; आष्कनाझ, रीपाथ व तोगार्मा, हे होते.

4यावानाचे मुलगे; अलीशा, तार्शीश, कित्तीम व दोदानीम.

5भूमध्यसमुद्रच्या किनाऱ्याच्या आसपास जी राष्ट्रे झाली
ती सर्व याफेथाच्या संततीपासून होती; प्रत्येक मुलाला
स्वत:ची जमीन होती ही सर्व कुळे वाढत गेली व त्यांची
वेगवेगळी राष्ट्रे झाली. प्रत्येक राष्ट्राची भाषा वेगळी होती.

## हामाचे वंशज

6हामचे मुलगे याप्रमाणे होते: कूश, मिस्राईम, पूट व
कनान

7कुशाचे मुलगे: सबा, हवीला, साब्ता, रामा, व साब्तका;
आणि रामाचे मुलगे शबा व ददान हे होते.

8कुशाला निम्रोद नांवाचा मुलगा होता, तो पृथ्वीवर
महाबलवान व पराक्रमी असा वीरपुरुष होता. 9तो
परमेश्वरापुढे बलवान शिकारी झाला म्हणून इतर
माणसांची निम्रोदाशी तुलना करून “तो माणूस,
परमेश्वरासमोर बलवान निम्रोद शिकाऱ्यासारखा आहे”
असे म्हणण्याची प्रथा आहे.

10शिनार प्रांतातील बाबेल, एरक, अक्काद व कालहने
ही निम्रोदाच्या राज्यातील सुरवातीची शहरे होती. 11तेथून
तो अश्शुरालाही गेला व तेथे त्याने निनवे, रहोबोथ,
ईरकालह व रेसन ही शहरे वसवली 12(रेसन हे शहर,
निनवे व मोठे शहर कालह यांच्या दरम्यान आहे.)

13मिस्राईम याला लूद, अनामीन, लहाबीम, नाप्तुहीम
14पात्रुस कास्लूह व कफ्तोरी हे मुलगे झाले. कास्लूहपासून
पलिष्टी लोक आले.

15कनानाचा पहिला मुलगा सीदोन हा होता; कनान हा
हेथचाही बाप होता. कनानापासून उदयास आलेली राष्ट्रे,
16यबूसी, अमोरी, गिर्गाशी, 17हिव्वी, आर्की, शीनी
18अर्वादी, समारी व हमाथी ही होती. पुढे कनानाची कुळे
जगाच्या वेगवेगळ्या भागात पसरली.

19कनान्यांची सीमा उत्तरेकडील सीदोनापासून
दक्षिणेकडील गरारापर्यंत व पश्चिमेकडील गाजापासून तर
पूर्वेस सदोम व गमोरा पर्यंत तसेच आदमा पासून व सबोईम
पासून व लेशापर्यंत पसरली होती.

20ही सर्व हाम याची वंशजे होती; हया सर्व वंशजांना
स्वत:ची भाषा व देश होते; ती सर्व वेगवेगळी राष्ट्रे झाली.

## शेम याचे वंशज

21शेम हा याफेथाचा वडील भाऊ होता. एबर हा शेम
यांचा वंशज होता. तो इब्री लोकांचा मूळ पुरुष होता.

22शेम याचे मुलगे: एलाम, अश्शूर, अर्पक्षद, लूद व
अराम;

23अरामाचे मुलगे: ऊस, हूल, गेतेर व मश हे होते;

24अर्पक्षदास शेलह झाला, शेलहास एबर झाला: 25एबर
यास दोन मुलगे झाले; एकाचे नांव पेलेग होते. पेलेग
म्हणजे वाटणी; कारण याच्याच हयातीत पृथ्वीची वाटणी
झाली; त्याच्या भावाचे नांव यक्तान होते.

26यक्तानास अलमोदाद, शेलेफ, हसर्मावेथ, येरह,
27हदोराम, ऊजाल, दिक्ला 28ओबाल, अबीमाएल, शबा,
29ओफीर, हवीला व योबाब असे मुलगे झाले; हे सगळे
यक्तानाचे मुलगे; 30ते मेशापासून पूर्वेकडील डोंगराळ
भागात राहात होते. मेशा सफारच्या देशाकडे होते.

31हे शेमाचे वंशज होते. कुळे, भाषा, देश व राष्ट्रे
याप्रमाणे त्यांची विभागणी अशी आहे.

32ही नोहाच्या मुलांची व त्यांच्या वंशजांची, पिढ्या व
कुळाप्रमाणे यादी आहे; त्यांच्या राष्ट्रांप्रमाणे ती आखलेली
आहे; जलप्रलयानंतर त्यांची पृथ्वीवर वेगवेगळी राष्ट्रे
झाली.

## जगाचे विभाजन

11 जलप्रलयानंतर पृथ्वीवरील सर्व लोकांची एकच
भाषा व एकच बोली होती, 2लोक पूर्वेकडून पुढे
निघाले तेव्हा जाता जाता शिनार देशात त्यांना एक मोठे
मैदान लागले आणि मग त्यांनी तेथेच वस्ती केली.
3लोक म्हणाले, “चला, आपण विटा करु व त्या विस्तवात
भाजू म्हणजे त्या खूप कठीण होतील;” तेव्हा लोकांनी
घरे बांधण्यासाठी दगडाऐवजी विटांचा आणि चुन्याऐवजी
डांबराचा उपयोग केला.
4मग लोक म्हणाले, “चला, आपण आपणासाठी नगर
बांधू; आणि आकाशाला भिडणारा उंचच उंच बुरुज बांधू;
असे केले तर मग आपण नांवाजलेले लोक होऊ व
आपण पांगले जाणार नाहीं तर एके जागी एकत्र राहू.”
5परमेश्वर ते नगर व तो उंच बुरुज पाहण्यासाठी खाली
आला. लोक ते बांधीत आहेत असे परमेश्वराने पाहिले.
6तेव्हा परमेश्वर म्हणाला, “हे सर्व लोक एकच भाषा
बोलतात आणि हे बांधणीचे काम करण्यासाठी ते सगळे
एकत्र जमले आहेत, ते काय करु शकतात त्याची ही तर
नुसती सुरवात आहे; लवकरच ते त्यांना जे पाहिजे ते
करु शकतील, 7तेव्हा आपण खाली जाऊन त्यांच्या भाषेचा
घोटाळा करून टाकू; मग मात्र त्यांना एकमेकांचे बोलणे
समजणार नाहीं.”
8तेव्हा परमेश्वराने पृथ्वीभर त्यांची पांगापांग केली
म्हणून नगर व बुरुज बांधण्याचे काम तसेच राहिले.
9ह्याच ठिकाणी परमेश्वराने सर्व पृथ्वीच्या भाषेचा घोटाळा
केला म्हणून त्या नगराला बाबेल म्हटले आहे. अशा
रीतीने परमेश्वराने त्या ठिकाणापासून इतरत्र पसरण्यास
लोकांना भाग पाडले.

## शेमच्या कुळांची वंशावळ

10शेमच्या कुळाची वंशावळ येणे प्रमाणे: जलप्रलयानंतर
दोन वर्षांनी शेम शंभर वर्षांचा झाल्यावर त्याचा मुलगा
अर्पक्षद जन्मला; 11त्यानंतर शेम पाचशे वर्षे जगला, आणि
त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या.
12अर्पक्षद पस्तीस वर्षांचा असताना त्याचा मुलगा शेलह
जन्मला 13शेलहच्या जन्मानंतर अर्पक्षद चारशेतीन वर्षे
जगला व त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या.
14शेलह तीस वर्षांचा असताना त्याला एबर झाला;
15एबर झाल्यावर शेलह चारशेतीन वर्षे जगला व त्याच्या
हयातीत त्याला आणखी मुलगे व मुली झाल्या.
16एबर चौतीस वर्षांचा झाल्यावर त्याला पेलेग झाला.
17पेलेग झाल्यावर एबर चारशेतीस वर्षे जगला व त्याला
आणखी मुलगे व मुली झाल्या.
18पेलेग तीस वर्षांचा झाल्यावर त्याला रऊ झाला; 19रऊ
झाल्यावर पेलेग दोनशे नऊ वर्षे जगला व त्याला आणखी
मुलगे व मुली झाल्या.
20रऊ बत्तीस वर्षांचा झाल्यावर त्याला सरुग झाला;
21सरुग झाल्यावर रऊ दोनशे सात वर्षे जगला व त्याला
आणखी मुलगे व मुली झाल्या.
22सरुग तीस वर्षांचा झाल्यावर त्याला नाहोर झाला.
23नाहोर झाल्यावर सरुग दोनशें वर्षे जगला आणि त्याला
आणखी मुलगे व मुली झाल्या. 24नाहोर एकूणतीस
वर्षांचा झाल्यावर त्याला तेरह झाला; 25तेरह झाल्यावर
नाहोर आणखी एकशें एकोणीस वर्षे जगला आणि त्याला
इतर मुलगे व मुली झाल्या.
26तेरह सत्तर वर्षांचा झाल्यावर त्याचे मुलगे अब्राम,
हारान व नाहोर हे जन्मले.

## तेरहच्या कुळाची वंशावळ

27तेरहच्या कुळाची वंशावळ येणेप्रमाणे: तेरहाला अब्राम,
नाहोर व हारान हे मुलगे होते. हारानाचा मुलगा लोट.
28हारान, आपला बाप तेरह जिवंत असताना आपली
जन्मभूमी खास्द्यांचे ऊर अथवा बाबेल गांव येथे मरण
पावला. 29अब्राम व नाहोर या दोघांनीही लग्न केले;
अब्रामाच्या बायकोचे नांव साराय आणि नाहोरच्या बायकोचे
नांव मिल्का होते; मिल्का ही हारानाची मुलगी होती; हा
हारान मिल्का व इस्का यांचा बाप होता. 30साराय वांझ
होती, तिला मूलबाळ नव्हते.
31मग तेरह आपले कुटुंब घेऊन म्हणजे आपला मुलगा
अब्राम, आपला नातू म्हणजे (हारानाचा मुलगा) लोट,
आणि आपली सून म्हणजे (अब्रामाची बायको) साराय
यांना बरोबर घेऊन बाबीलोनिया मधील म्हणजे खास्द्यांच्या
ऊर येथून कनान देशास जाण्यासाठी निघाला: आणि
प्रवास करीत ते हारान शहरात आले व तेथेच स्थायिक
होण्याचे त्यांनी ठरविले. 32तेरह दोनशेंपाच वर्षे जगला;
त्यानंतर तो हारान येथे मरण पावला.

## देव अब्रामाला बोलावतो

12 परमेश्वर अब्रामाला म्हणाला,
“तू आपला देश, आपले गणगोत व आपल्या बापाचे
घर सोड; आणि मी दाखवीन त्या देशात जा.
2मी तुला आशीर्वाद देईन; तूझ्या पासून मोठे राष्ट्र
निर्माण करीन; मी तुझे नांव मोठे करीन, लोक तुझ्या
नांवाने इतरांना आशीर्वाद देतील,
3जे लोक तुला आशीर्वाद देतील त्यांना मी आशीर्वाद
देईन, आणि जे लोक तुला शाप देतील त्यानां मी शाप
देईन. तुझ्यामुळे पृथ्वीवरील सर्वलोक आशीर्वादित
होतील.”

## अब्राम कनान देशात जातो

4तेव्हा अब्रामाने परमेश्वराची आज्ञा मानली. त्याने
हारान सोडले लोट त्याच्या बरोबर गेला. या वेळी अब्राम
पंच्याहत्तर वर्षांचा होता. 5हारान सोडताना तो एकटा नव्हता
तर त्याने आपली बायको साराय, पुतण्या लोट आणि

हारानमध्ये त्यांनी मिळवलेली मालमत्ता तसेच गुलाम या
सर्वांना बरोबर घेऊन त्याने हारान सोडले व तो कनान
देशाच्या प्रवासास निघाला आणि कनान देशात आला.
6अब्राम कनान देशातून प्रवास करीत शखेम गावाला
आला आणि मोरेच्या मोठ्या वृक्षांपर्यंत गेला. याकाळी त्या
देशात कनानी लोक राहात होते.
7परमेश्वर अब्रामास दर्शन देऊन म्हणाला, “हा देश मी
तुझ्या वंशाजांना देईन.”
ज्या जागेवर परमेश्वराने अब्रामाला दर्शन दिले त्या
जागी त्याने परमेश्वराची उपासना करण्यासाठी एक वेदी
बांधली. 8मग अब्राम तेथून निघाला आणि प्रवास करीत
तो बेथेलच्या पूर्वेस डोंगराळ भागात पोहोंचला व त्याने
तेथे तळ दिला; तेथून बेथेल पश्चिमेस होते आणि आय
शहर पूर्वेस होते; तेथे त्याने परमेश्वरासाठी दुसरी वेदी
बांधली आणि देवाची उपासना केली. 9त्यानंतर अब्राम
पुन्हा पुढच्या प्रवासास निघाला व नेगेबकडे गेला.

## मिसरमध्ये अब्राम

10त्या काळी त्या प्रदेशात मोठा दुष्काळ पडला; तेथे
पाऊस पडला नाही आणि अन्नधान्य उगवले नाहीं म्हणून
अब्राम मिसरमध्ये राहाण्यास गेला. 11आपली बायको साराय
फार सुंदर आहे असे अब्रामाने पाहिले; तेव्हा मिसर देशाच्या
हद्दीत शिरण्यापूर्वी अब्राम साराय हिला म्हणाला, “मला
माहीत आहे की तू अतिशय सुंदर व रुपवान स्त्री आहेस,
12म्हणून मिसरचे लोक जेव्हा तुला पाहतील तेव्हा ते
म्हणतील ‘ही त्याची बायको आहे.’ आणि मग तुझ्या साठी
ते मला मारुन टाकतील; 13तर तू माझी बहीण आहेस
असे तू लोकांस सांग म्हणजे मग ते मला मारणार नाहींत;
ते माझ्यावर दया करतील; अशा रीतीने तू माझा जीव
वाचवशील.”
14मग अब्राम मिसर देशात गेला; तेथील लोकांनी पाहिले
की साराय ही फार सुंदर स्त्री आहे. 15मिसरच्या
राजवाड्यातील सरदारांनी सारायला पाहिले व त्यांनी
आपला राजा फारो याच्या जवळ तिच्या सौंदर्याची वाखाणणी
केली; आणि त्यांनी तिला राजाच्या घरी नेऊन ठेवले.
16अब्राम सारायचा भाऊ आहे असे समजल्यावर फारो
राजाने त्याजवर दया केली व त्याला मेंढरे, गुरेढोरे, व
गाढवे दिली तसेच अब्रामाला दास, दासी व उंटही मिळाले.
17अब्रामाची बायको साराय हिला फारोने नेले म्हणून
परमेश्वराने फारो व त्याच्या घरातील लोकाना भयंकर
रोगाची पीडा भोगावयास लावली. 18तेव्हा फारोने अब्रामास
बोलावले. तो म्हणाला, “तू माझ्याबाबत फार वाईट गोष्ट
केलीस, साराय तुझी बायको आहे, हे तू मला सांगितले
नाहीस का? 19‘ती माझी बहीण आहे’ असे तू का म्हणालास?
मला बायको करण्यासाठी मी तिला नेले होते परंतु मी
आता तुझी बायको तुला परत करतो; तिला घे व येथून
निघून जा.”20मग अब्रामाची मिसरमधून बाहेर रवानगी
करावी अशी फारोने आपल्या सरदारांना आज्ञा दिली;
तेव्हा अब्राम व त्याची बायको साराय यांनी आपले सर्व
काही बरोबर घेऊन मिसर सोडले.

## अब्राम कनान देशाकडे माघारे येतो

13 अशा रीतीने अब्रामाने मिसर देश सोडला व तो
आपली बायको साराय, पुतण्या लोट आणि त्यांची
सर्व मालमत्ता घेऊन नेगेब मधून प्रवास करीत गेला. 2त्या
काळी अब्राम फार श्रीमंत झाला होता; त्याच्याजवळ पुष्कळ
गुरेढोरे, शेरेडेमेंढरे, गाढवे व उंट तसेच सोने चांदी इत्यादी
भरपूर होते.
3अब्राम इकडेतिकडे सतत प्रवास करीत राहिला; त्याने
नेगेब सोडले व तो पुन्हा मागे बेथेलला गेला; बेथेल व
आय यांच्या दरम्यान याच ठिकाणी त्याने त्याच्या कुटुंबासह
तळ दिला होता व 4परमेश्वराची उपासना करण्याकरिता
त्याने एक वेदी बांधली होती, म्हणून त्याच ठिकाणी
अब्रामाने परमेश्वराची उपासना केली.

## अब्राम व लोट वेगळे होतात

5या काळात लोट अब्रामाबरोबर प्रवास करीत होता.
लोट याजकडे खूप, गुरेढोरे व तंबू होते 6अब्राम व लोट
यांची गुरेढोरे इतकी वाढली की त्या दोघांना एकत्र राहाण्यास
ती जागा व तो प्रदेश पुरेना, 7शिवाय अब्राम व लोट यांच्या
गुराख्यांची एकसारखी भांडणे होऊ लागली; त्याकाळी
त्या देशात कनानी व परिज्जी लोकांची वस्ती होती.
8तेव्हा अब्राम लोटास म्हणाला, “तुझ्या माझ्यामध्ये तसेच
तुझे व माझे गुराखी यांच्यामध्ये भांडणतंटा नसावा, कारण
आपण सगळे भाऊबंद आहोत. 9तेव्हा आपण वेगळे व्हावे
हे आपल्यासाठी बरे आहे तुला पाहिजे तो प्रदेश तू निवड;
तू जर डावीकडे गेलास तर मी उजवीकडे जाईन, आणि
तू जर उजवीकडे गेलास तर मी डावीकडे जाईन.”
10लोटाने यार्देन दरीकडे नजर टाकली तेव्हा तेथे सर्वत्र
भरपूर पाणी असल्याचे त्याला दिसले (परमेश्वराने सदोम
व गमोरा या नगरांचा नाश केला त्याच्या आधीची ही
घटना आहे. त्यावेळी थेट सोअरापर्यंत पसरलेले यार्देन
नदीचे खोरे परमेश्वराच्या बागे सारखे सुंदर होते मिसर
मधील प्रदेशाप्रमाणे ही भूमी चांगली होती.) 11तेव्हा लोटाने
यार्देन नदीच्या खोऱ्यात राहाणे निवडले; मग ते दोघे
वेगळे झाले आणि लोटाने पूर्वेकडे प्रवास करण्यास सुरवात
केली; 12अब्राम कनान देशातच राहिला आणि लोट
यार्देनेच्या तळवटीतील शहरातून राहिला; लोट दक्षिणेकडे
दूर सदोमाला गेला आणि तेथेच त्याने आपला तबू ठोकला.
13सदोम नगराचे लोक अतिशय दुष्ट व वाईट असल्याचे
परमेश्वराला माहित होते.
14लोट निघून गेल्यावर परमेश्वर अब्रामाला म्हणाला,
“तुझ्या अवतीभोवती, उत्तरेकडे व दक्षिणेकडे, पूर्वेकडे व
पश्चिमेकडे दूरवर नजर टाकून पाहा; 15तू पाहातोस हा

सगळा प्रदेश मी तुला आणि तुझ्यानंतर तुझ्या संततीला
कायमचा देईन. 16मी तुझी संतती या पृथ्वीवरील धुळीच्या
कणाइतकी करीन, ती इतकी करीन की जर कोणाला ते
कण मोजता येतील तर तुझ्या संततीचीही गणना होईल.
17तर उठून जा व या तुझ्या प्रदेशातून फिरुन ये; हा सर्व
प्रदेश मी आता तुला देत आहे."

18तेव्हा अब्रामाने आपले तंबू हलविले व हेब्रोन
शहराजवळील मम्रेच्या मोठया वृक्षांत तो राहावयास गेला;
परमेश्वराची उपासना करण्यासाठी त्याने तेथे वेदी बांधिली.

## लोट याला कैद केले जाते

14 शिनाराचा राजा अम्रफेल, एल्लासाराचा राजा
अर्योक, एलामाचा राजा कदार्लागोमर आणि
गोयीमाचा राजा तिदाल, 2यांनी सदोमाचा राजा बेरा,
गमोराचा राजा बिर्शा, अदमाचा राजा शिनाब, सबोयिमाचा
राजा शमेबर आणि बेलाचा म्हणजे सोअराचा राजा यांच्यांशी
युद्ध केले.

3या सर्व राजांनी आपले सैन्य सिद्दीम खोऱ्यात एकत्र
जमविले. (हे खोरे म्हणजे आताचा क्षार समुद्र) 4या सर्व
राजांनी बारा वर्षे कदार्ला गोमर राजाची सेवा केली, परंतु
तेरव्या वर्षी ते त्याच्या विरुद्ध उठले. 5–6तेव्हा चौदाव्या
वर्षी कदार्लागोमर व त्याच्या बरोबरचे राजे लढाई करण्यास
चालून आले आणि त्यांनी अष्टरोथ कर्णईम येथे रेफाई
लोकांचा, हाम येथे लूजी लोकांचा, शावेह किर्याथाईम
येथे एमी लोकांचा आणि, सेईर म्हणजे ईदोम डोंगराळ
प्रदेशात होरी लोकांचा पराभव केला आणि त्यांना एलपारान
(हे वाळवंटा जवळ आहे) जवळ असलेल्या रानापर्यंत
पिटाळून लावले. 7त्यानंतर कदार्लागोमर राजा उत्तरेकडे
वळाला व एन मिशपात म्हणजे कादेश येथे जाऊन त्याने
अमालेकी लोकांचा पराभव केला; तसेच हससोन–तामार
येथे राहणाऱ्या अमोरी लोकांचाही पराभव केला.

8त्यावेळी सदोमाचा राजा, गमोराचा, राजा, अदमाचा
सबोयिमाचा राजा आणि बेला म्हणजे सोअराचा राजा यांनी
आपले सैन्य एकत्र केले व आपल्या शत्रूशी लढण्याकरिता
ते सिद्दीम खोऱ्याकडे गेले. 9एलामाचा राजा कदार्लागोमर,
गोयीमाया राजा तिदाल, शिनाराचा राजा अम्राफेल आणि
एलामाचा राजा अर्योक यांच्या विरुद्ध ते लढले; असे चार
राजे पांच राजांविरुद्ध लढले.

10सिद्दीम खोऱ्यात डांबराने भरलेल्या अनेक खाणी
होत्या. सदोम व गमोराचे राजे सैन्यासह पळून जाताना
बरेच सैनिक खाणीत पडले परंतु बाकीचे डोंगराकडे पळून
गेले.

11तेव्हा त्यांच्या शत्रुनी सदोम व गमोरा येथील लोकांची
सर्व मालमत्ता, अन्न व वस्त्र सामग्री लुटून नेली त्यांनी
त्यांच्या सर्व वस्तू ही नेल्या. 12अब्रामाचा पुतण्या लोट
सदोमात राहात होता. त्याला शत्रूनीं पकडले व त्याच्या
मालकीच्या सर्व मालमत्तेसह त्याला कैद करून ते घेऊन
गेले. 13या लढाईत पकडला न गेलेला एक मनुष्य अब्राम
इब्रीकडे पळून गेला व त्याने त्याला हे वर्तमान सांगितले.
त्यावेळी अब्राम मम्रे अमोरी वृक्षांजवळ तळ देऊन राहिला
होता; मम्रे, अष्कोल व आनेर ह्यांनी एकमेकांना व
अब्रामाला मदत करण्याचा करार केला.

## अब्राम लोटाची सुटका करतो

14लोटाला कैद करून नेल्याचे वर्तमान अब्रामाला
समजले, तेव्हा त्याने आपल्या कुटुंबात जन्मलेल्या सर्वांना
एकत्र बोलावले व त्यांच्यातून लढाईच्या कामात कसलेले
असे तीनशे अठरा तरबेज लढवैय्ये घेऊन त्याने थेट दान
नगरापर्यंत शत्रूंचा पाठलाग केला. 15त्या रात्री त्याने
आपल्या सैनिक दासासह शत्रूसैन्यावर अचानक हल्ला
चढवला; त्यांनी शत्रू सैन्याचा पराभव केला व दिमिष्काच्या
म्हणजे दमास्कसच्या उत्तरेस असलेल्या होबा पर्यंत त्यांचा
पाठलाग केला.

16तेव्हा शत्रुने लुटलेली सगळी मालमत्ता तसेच आपला
पुतण्या लोट याची मालमत्ता, स्त्रिया आणि दास अब्रामाने
परत आणले.

17मग कदार्लागोमर व त्याच्याबरोबरचे राजे यांचा
पराभव केल्यावर अब्राम आपल्या घरी गेला; तेव्हा
सदोमाचा राजा शावेच्या खोऱ्यात त्याला भेटावयास गेला.
(त्या खोऱ्याला आता राजाचे खोरे असे म्हणतात.)

## मलकीसदेक

18आणि परात्पर देवाचा याजक असलेला शालेमाचा
राजा मलकीसदेकही भाकर व द्राक्षारस घेऊन अब्रामाला
भेटण्यास आला. 19मलकीसदेकाने अब्रामाला आशीर्वाद
देऊन म्हटले,

"अब्रामा, आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्नकर्ता परात्पर
देव तुला आशीर्वाद देवो.
20त्या परात्पर देवाने तुझ्या शत्रूंचा पराभव करण्यास
तुला मदत केली त्या परात्पर देवाचा आम्ही धन्यवाद
करतो."

तेव्हा अब्रामाने लढाईच्या काळात त्याच्याजवळून जे जे
घेतले होते त्याचा दहावा भाग मलकीसदेकाला दिला.

21मग सदोमाचा राजा अब्रामास म्हणाला, "मला फक्त
कैद करून नेलेले माझे लोक द्या आणि त्यांची मालमत्ता
तुम्ही तुमच्यासाठी ठेवा."

22परंतु अब्राम सदोमाच्या राजाला म्हणाला, "आकाश
व पृथ्वीचा निर्माणकर्ता परमेश्वर, परात्पर देव याला मी
वचन देतो की, 23मी तुझे असलेले काहीही ठेवणार
नाहीं, एखादे सूत वा जोड्याचा बंधही ठेवणार नाही 'मी
अब्रामाला श्रीमंत केले' असे तू म्हणावे असे मला वाटत

नाही. 24माझ्या या तरुण माणसांनी जे अन्न खाल्ले आहे
तेवढ्याचाच मी स्वीकार करतो; परंतु इतर लोकांना
लढाईतून मिळालेल्यापैकी त्यांचा वाटा घेऊ दे, आणि
त्यातून काही आनेर, अष्कोल व मम्रे यांस दे, कारण
त्यांनी लढाईत मला खूप मदत केली."

## देवाचा अब्रामाशी करार

15 या सर्व गोष्टी घडल्यावर अब्रामाला दृष्टान्तात
परमेश्वराचे वचन आले. देव म्हणाला, "अब्रामा,
भिऊ नको; मी तुझे रक्षण करीन आणि तुला आनंद
होईल असे मी तुला मोठे प्रतिफळ देईन."

2परंतु अब्राम म्हणाला, "परमेश्वर देवा, असे काहीही
प्रतिफळ नाही की जेणे कडून मला आनंद होईल, कारण
मला मुलगा नाही; म्हणून माझ्या मरणानंतर माझे सर्वकाही
दिमिष्कातील माझा गुलाम, अलिएजर यालाच मिळेल."
3अब्राम पुढे म्हणाला, "तू मला मुलगा दिला नाहीस म्हणून
माझ्या घरात जन्मलेला माझा गुलामच माझ्या सगळ्या
मालमत्तेचा वारस होईल."

4परमेश्वर अब्रामाशी बोलला, तो म्हणाला, "तुझे
सर्वकाही त्या तुझ्या गुलामाला मिळणार नाही; तर तुला
मुलगा होईल* आणि तोच तुझ्या सगळ्या मालमत्तेचा
वारस होईल."

5मग देवाने अब्रामाला रात्रीचे आकाश दाखविण्यासाठी
बाहेर नेले. देव म्हणाला, "ह्या आकाशातील ताऱ्यांकडे
पाहा, तुला मोजता येणार नाहीत इतके ते आहेत; येथून
पुढच्या काळात तुझी संततीही त्या ताऱ्यांइतकी अगणित
होईल."

6अब्रामाने देवावर विश्वास ठेवला देवाने त्याची
प्रामाणिकांत गणना केली प्रमाणिक जीवन जगण्यास योग्य
असा त्याचा विश्वास होता. 7देव अब्रामाला म्हणाला, "हा
देश तुला वतन करून देण्याकरिता खास्द्यांच्या ऊर
नगरातून तुला आणणारा मीच परमेश्वर आहे."

8परंतु अब्राम म्हणाला, "परमेश्वरा, माझ्या स्वामी, हा
देश कायमचा वतन करून मला मिळेल, याची खात्री
मला कशी यावी?"

9देव अब्रामाला म्हणाला, "माझ्यासाठी तीन वर्षांची एक
कालवड, तीन वर्षांची एक शेळी, तीन वर्षांचा एक एडका
तसेच एक होला व एक पारव्याचे पिल्लू आण."

10अब्रामाने तीं सर्व देवाकडे आणली अब्रामाने त्यांना
चिरुन त्या प्रत्येकाचे दोन दोन अर्धे तुकडे केले; व ते
समोरा समोर ठेवले; पक्षी मात्र त्याने दोन अर्धे चिरले
नाहीत; 11मग कापलेल्या प्राण्यांचे मांस खाण्याकरिता हिंस्र
पक्ष्यांनी उडून त्यावर झडप घातली; परंतु अब्रामाने त्यांना
हाकलून लावले.

12नंतर त्या दिवशी सूर्य मावळू लागला, तेव्हा अब्रामाला
गाढ झोप लागली म्हणून तो झोपला; तो झोपेत असताना
अती भयंकर अंधार त्याच्यावर पडला; 13मग परमेश्वर
अब्रामाला म्हणाला, "तुला या गोष्टी समजल्या पाहिजेत;
तुझे वंशज परक्या देशात राहतील ते तेथे परके असतील,
ते तेथे गुलाम होतील आणि 400 वर्षे त्यांचा छळ होईल,
त्यांच्यावर जुलूम केला जाईल; 14परंतु चारशे वर्षानंतर
ज्याने त्यांना गुलाम बनवले त्या राष्ट्राला मी शिक्षा करीन,
आणि मग आपल्या बरोबर पुष्कळ धन घेऊन ते त्या
देशातून निघतील.

15"तू स्वत: फार म्हातारा होऊन शांतीने मरण पावशील
आणि तुझे पूर्वज जेथे पुरलेले आहेत तेथे तुला मूठमाती
देतील. 16मग चार पिढ्यानंतर तुझे लोक या देशात माघारे
येतील. त्यावेळी ते येथे राहाणाऱ्या अमोरी लोकांचा पराभव
करतील, अमोरी लोकांना शिक्षा करण्यासाठी मी तुझ्या
लोकांचा उपयोग करीन. (हे काही काळानंतर घडेल
कारण अमोरी लोकांचा दुष्टपणा अद्याप शिगेला पोहोंचला
नाहीं.)"

17सूर्य मावळल्यानंतर गडद अंधार पडला; मारलेल्या
जनावरांच्या तेथेच पडलेल्या धडांच्या दोन दोन अर्ध्या
तुकड्यांमधून धुराचा लोट आणि अग्नी निघून गेला.
18म्हणून त्या दिवशी परमेश्वराने अब्रामाला वचन दिले
व त्याच्याशी करार केला. परमेश्वर म्हणाला, "मिसर
देशाच्या नदी पासून फरात म्हणजे युफ्रेटीस या
महानदीपर्यंतचा प्रदेश मी तुझ्या वंशजांना देतो; 19केनी,
कनिजी, कदमोनी, 20हित्ती, परिजी, रफाईम, 21अमोरी,
कनानी, गिर्गाशी व यबूसी या लोकांचा प्रदेश मी तुम्हाला
देतो."

## हागार दासी

16 अब्राम व त्याची बायको साराय यांना मुलबाळ
नव्हते. साराय हिची हागार नावाची एक मिसरी
म्हणजे मिसर देशाची एक दासी होती. 2साराय अब्रामाला
म्हणाली, "परमेश्वराने मला मुले होण्यापासून रोखले
आहे तेव्हा तुम्ही माझ्या दासीपाशी जा, तिच्यापोटी जन्मलेले
मूल माझेच मूल आहे असे समजून मी ते स्वीकारीन."

अब्रामाने आपली बायको साराय हिचे म्हणणे मान्य
केले. 3कनान देशात अब्राम दहा वर्षे राहिल्यावर हे झाले
आणि सारायने आपली मिसरी मोलकरीण हागार आपला
नवरा अब्राम याला बायको म्हणून दिली.

4हागार अब्रामापासून गरोदर राहिली; आपण गरोदर
आहो हे पाहून आपण आपली मालकीण साराय हिच्यापेक्षा
अधिक चांगल्या आहो असे हागारेला वाटू लागले व
तिला गर्व झाला; 5परंतु साराय अब्रामाला म्हणाली, "माझी
दासी हागार आता मला तुच्छ लेखते; त्या बद्दल मी
तुम्हाला दोष देते, कारण मीच स्वत: तिला तुमची उपपत्नी
होण्याचा मान दिला म्हणून ती गरोदर राहिली आणि

---

**मुलगा होईल** त्याचा शब्दश: अर्थ तो जो तुझ्या स्वत:च्या देहातून
जन्मेल.

आता ती माझ्यापेक्षा चांगली व विशेष आहे असे तिला
वाटू लागले; परमेश्वर आपल्या दोघांचा न्याय करो."
6परंतु अब्राम सारायला म्हणाला, "तू हागारेची मालकीण
आहेस, तुला काय पाहिजे तसे तू तिचे कर." तेव्हा सारायने
तिचा छळ केला म्हणून हागार पळून गेली."

## हागारेचा मुलगा

7शूर गांवाच्या वाटेवर वाळवंटातील एका पाण्याच्या
झऱ्याजवळ हागार एका परमेश्वराच्या देवदूताला
आढळली. 8देवदूत तिला म्हणाला, "सारायचे दासी हागारे,
तू येथे का आलीस? तू कोठे जात आहेस?"
हागार म्हणाली, "माझी मालकीण साराय हिच्यापासून
मी पळून जात आहे."
9परमेश्वराचा दूत तिला म्हणाला, "साराय तुझी
मालकीण आहे, तू तिच्याकडे घरी परत जा आणि तिच्या
आज्ञेत राहा." 10परमेश्वराचा दूत आणखी म्हणाला,
"तुझ्यापासून इतकी संतती होईल की ती मोजणे शक्य
होणार नाहीं."
11परमेश्वराचा दूत पुढे आणखी म्हणाला,

"तू आता गरोदर आहेस आणि तुला मुलगा होईल
त्याचे नांव तू इश्माएल म्हणजे 'परमेश्वर एकतो' असे
ठेव कारण प्रभूने तुझ्या दु:खाविषयी ऐकले आहे; (तो
तुझे सहाय्य करील.)
12"इश्माएल जंगली गाढवासारखा रानटी आणि स्वतंत्र
असेल. तो सर्वांविरुद्ध व सर्व त्या विरुद्ध होतील; तो एका
ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आपल्या भावांच्या जवळ
तळ देत फिरेल, परंतु तो त्यांच्या विरुद्ध असेल."

13परमेश्वर हागारेशी बोलला; हागारेने देवासाठी नवे
नांव वापरायला सुरवात केली. ती म्हणाली, "तू 'मला
पाहणारा देव' आहेस," कारण "मला समजते की या
ठिकाणीही देव मला भेटतो व माझी काळजी करतो."
14तेव्हा तेथील विहिरीला बैर-लहाय-रोई* असे नांव
पडले; ती विहीर कादेश व बेरेद यांच्या दरम्यान आहे.
15हागारेला अब्रामापासून मुलगा झाला; अब्रामाने त्याचे
नांव इश्माएल ठेवले. 16त्या वेळी अब्राम शह्यांशी वर्षांचा
होता.

## सुंता-कराराची खूण

17 अब्राम नव्याण्णव वर्षांचा झाला तेव्हा परमेश्वर
त्याच्याशी बोलला परमेश्वर म्हणाला, "मी
सर्वशक्तिमान देव आहे; माझ्यासाठी पुढील प्रमाणे गोष्टी
कर: माझ्या आज्ञा पाळ, आणि योग्य मार्गाने चाल व
सात्विकतेने राहा. 2तू असे करशील तर मी आपणामध्ये
एक करार करीन; मी तुला अगणित पटीत वाढवीन असे
अभिवचन देतो."
3मग अब्रामाने देवाला लवून नमन केले; देव त्याला
म्हणाला, 4"आपल्या करारातील माझा भाग हा असा; मी
तुला अनेक राष्ट्रांचा महान पिता करीन; 5मी तुझे नांव
बदलतो; तुझे नांव अब्राम असणार नाहीं तर तुझे नांव
अब्राहाम होईल; मी तुला हे नांव देत आहे कारण तू
अनेक राष्ट्रांचा पिता होशील. 6मी तुला भरपूर संतती
देईन; तुझ्यापासून नवीन राष्ट्रे उदयास येतील, आणि राजे
उत्पन्न होतील. 7आणि मी तुझ्यामध्ये व माझ्यामध्ये एक
करार करतो हा करार तुझ्या वंशजानांही पिढ्यानपिढ्या
कायम लागू राहील; मी तुझा व तुझ्या वंशजांचा देव
होईन. 8ज्या प्रदेशामधून तू जात आहेस तो म्हणजे कनान
देश मी तुला व तुझ्या वंशजाता कायमचा देईन आणि मी
तुमचा देव होईन."
9आणि देव अब्राहामाला पुढे म्हणाला, "आता ह्या
करारतील तुझा भाग हा असा: तू व तुझ्या वंशजांनी
पाळवयाचा माझा करार हा 10की तुझ्या वंशजात जन्मलेल्या
प्रत्येक पुरुषांची सुंता करून घ्यावी. 11तू हा करार पाळीत
असल्याची खूण म्हणून आपली सुंता करून घ्यावीस.
12जन्मलेला लहान मुलगा आठ वर्षांचा होईल तेव्हा तू
त्याची सुंता करावी; तुझ्या कुटुंबात जन्मलेल्या तसेच
तुझ्या दासाच्या किंवा गुलामांच्या कुटुंबात जन्मलेल्या
हरएक पुरुषाची सुंता करावी; 13अशा रीतीने तुझ्या राष्ट्रात
जन्मलेल्या प्रत्येक पुरुषांची सुंता करावी, मग तो तुझ्या
कुटुंबातील असो किंवा विकत घेतलेल्या गुलामाच्या
कुटुंबात जन्मलेला असो; तुझ्या व माझ्यामध्ये केलेला
करार या खुणेवरुन कायम राहील; 14ज्या कोणाची सुंता
झाली नाही त्याला समाजातून बाहेर टाकावे; कारण त्याने
माझा करार मोडला आहे."

## इसहाक-वचनाचा पुत्र

15देव अब्राहामाला म्हणाला, "तुझी बायको साराय हिला
मी नवीन नांव देतो, तिचे नांव सारा असे होईल. 16मी
तिला आशीर्वादीत करीन; मी तिला मुलगा देईन आणि तू
बाप होशील. सारा अनेक राष्ट्रांची माता होईल राष्ट्रांचे
राजे तिच्या पासून निपजतील."
17अब्राहामाने देवाला लवून नमन केले, परंतु स्वत:शीच
हसून तो म्हणाला, "मी शंभर वर्षांचा आहे; मला मुलगा
होणे शक्य नाहीं; आणि सारा नव्वद वर्षांची आहे; तिला
मूल होऊ शकणार नाहीं."
18मग अब्राहाम देवाला म्हणाला, "इश्माएल जगेल व
तुझी सेवा करील अशी मला आशा वाटते."
19देव म्हणाला, "नाही, मी सांगितले की तुझी बायको
सारा हिला मुलगा होईल; त्याचे नांव तू इसहाक ठेव; मी
त्याच्याशी करार करीन; तो करार त्याच्या वंशजांसाठी
चिरंतन असेल.

**बैर-लहाय-रोई** म्हणजे "मला पाहणाऱ्या जिवंत देवाची विहीर."

20"तू मला इश्माएल विषयी विचारलेस ते मी ऐकले;
मी त्याला आशीर्वाद देईन; त्याला भरपूर संतती होईल;
बारा महान सरदारांचा तो पिता होईल; त्याचे कुटुंब म्हणजे
एक मोठे राष्ट्र होईल; 21पण मी इसहाका बरोबर माझा
करार करीन, साराला मुलगा होईल तो इसहाक असेल;
तो मुलगा पुढल्या वर्षी याचवेळी जन्मेल."
22देवाचे अब्राहामाशी बोलणे संपल्यावर देव अब्राहामाला
सोडून वर (स्वर्गात)गेला, व अब्राहाम तेथे एकटाच राहीला;
23तेव्हा अब्राहामाने आपला मुलगा इश्माएल व आपल्या
घरी जन्मलेल्या गुलामांना व मोल देऊन विकत घेतलेल्या
मुलानां एकत्र केले, आणि देवाने सांगितल्याप्रमाणेच त्याच्या
घरातले सर्वपुरुष व मुलगे यांची त्याच दिवशी सुंता करण्यात
आली.
24अब्राहाम नव्याण्णव वर्षांचा होता तेव्हा त्याची सुंता
झाली; 25आणि त्याचा मुलगा इश्माएल तेरा वर्षांचा होता
तेव्हा त्याची सुंता झाली. 26सगळ्या गुलामांची एकाच दिवशी
सुंता झाली; 27आणि त्याच्या घरी जन्मलेले व त्याने विकत
घेतलेले असे त्याच्या घरचे सगळे पुरुष यांचीही त्याच्या
बरोबर सुंता झाली.

## भेटीस आलेल्या तीन व्यक्ति

18 काही काळानंतर परमेश्वराने अब्राहामाला पुन्हा
दर्शन दिले. अब्राहाम तेव्हा मम्रेच्या एलोन झाडांच्या
राईत राहात होता. एके दिवशी भर दुपारी कडक उन्हाच्या
वेळी अब्राहाम आपल्या तंबूच्या दाराशी बसला होता.
2अब्राहामाने वर पाहिले तों आपल्या समोर तीन पुरुष
उभे असलेले त्याला दिसले; त्यांना पाहून अब्राहाम धावत
त्यांना सामोरा गेला आणि त्याने त्यांना लवून नमन केले;
3अब्राहाम त्यांचे स्वागत करून म्हणाला, "माझ्या स्वामीनों,
मी जो आपला सेवक त्या माझ्या सोबत कृपा करून
काही वेळ राहा; 4तुमचे पाय धुण्यासाठी मी पाणी घेऊन
येतो; तुम्ही झाडा खाली सावलीत अमळ विसावा घ्या;
5मी तुम्हासाठी थोडी भाकर आणतो; तुम्हाला पाहिजे
तेवढे जेवा; मग पुढील प्रवास चालू करा."
ते तीन पुरुष म्हणाले, "बरं, हे तर ठीक आहे आम्ही
तुझ्या म्हणण्याप्रमाणे करतो."
6अब्राहाम लगेच घाईने पळत तंबूत गेला व साराला
म्हणाला, "तिघांना तीन भाकरी पुरतील एवढे पीठ
ताबडतोब मळ, त्याच्या भाकरी कर." 7नंतर अब्राहाम
आपल्या गुरांच्या कळपाकडे पळत गेला, आणि त्यातून
त्याने उत्तम कोवळे वासरु घेतले; ते दासाजवळ देऊन
त्याने त्याला लवकर कापून जेवणासाठी रांधण्यास
सांगितले; 8अब्राहामाने त्या तीन पुरूषांना वासराचे
शिजवलेले मांस, तसेच दूध व लोणी खाण्यासाठी त्यांच्यापुढे
वाढले आणि त्यांचे जेवण संपेपर्यंत अब्राहाम राईत
झाडाखाली त्यांच्या जवळ त्यांची सेवा करण्याकरीता उभा
राहिला.

9ते पुरुष अब्राहामाला म्हणाले, "तुझी बायको सारा
कोठे आहे?"
अब्राहाम म्हणाला, "ती तंबूत आहे."
10मग परमेश्वर म्हणाला, "मी पुढल्या वसंत ऋतू तूत
येईन त्या वेळी तुझी बायको सारा हिला मुलगा होईल."
सारा तंबूच्या तोंडाशी उभी राहून कान देत होती म्हणून
या गोष्टी तिने ऐकल्या. 11अब्राहाम व सारा वयाने फार
म्हातारे झाले होते. साराचे मुले होण्याजोगे वय निघून गेले
होते. 12म्हणून साराने जे ऐकले त्यावर विश्वास ठेवला
नाहीं. ती स्वत:शीच हसून म्हणाली, "मी म्हातारी झाली
आहे, आणि माझा नवराही म्हातारा झाला आहे मी इतकी
म्हातारी झाली आहे की आता मला मूल होणे शक्य
नाही."
13तेव्हा परमेश्वर अब्राहामाला म्हणाला, "सारा का
हसली? मी आता म्हातारी झाली आहे म्हणून मला मुलगा
होईल काय असे ती का म्हणाली. 14परमेश्वराला काही
अशक्य आहे का? येत्या वसंतऋतू तूत सांगितल्याप्रमाणे मी
पुन्हा येईन तेव्हा तुझी बायको सारा हिला मुलगा होईल."
15परंतु सारा म्हणाली, "मी हसलेच नाही!" (ती असे
म्हणाली कारण ती फार घाबरली होती.)
परंतु परमेश्वर म्हणाला, "नाही, मला माहीत आहे की
हे खरे नाहीं; तू नक्की हसलीसच."
16नंतर ते पुरुष उठले व सदोम नगराकडे वळून ते
तिकडे जाण्यास निघाले; अब्राहाम त्यांना वाटेस
लावण्यासाठी त्यांच्या बरोबर थोडा रस्ता चालून गेला.

## अब्राहामाने परमेश्वराबरोबर केलेला चांगला सौदा

17परमेश्वर आपणा स्वत:शीच बोलला, "मी आता जे
काही करणार आहे त्या विषयी अब्राहामाला सांगावे काय?
18कारण अब्राहामापासून एक मोठे व शक्तीमान राष्ट्र
नक्की निर्माण होईल, आणि पृथ्वीवरील सगळी राष्ट्रे
त्याच्यामुळे आशीर्वादित होतील. 19मी अब्राहामाबरोबर
एक विशेष करार केलेला आहे, तो यासाठी की त्याने
आपल्या मुलांना व वंशजाना देवाच्या इच्छेप्रमाणे चालण्याची
आज्ञा करावी आणि त्यांनी न्यायनीतीने चालावे; मग मी
परमेश्वर त्याला मी दिलेल्या वचनाप्रमाणे जे द्यायचे ते
देईन."
20मग परमेश्वर म्हणाला, "सदोम व गमोरा येथील
लोक फार दुष्ट आहेत असे मी पुष्कळ वेळा ऐकले
आहे. 21म्हणून मी स्वत: प्रत्यक्ष जाऊन परिस्थीती पाहीन
व मग त्यांची दुष्ट करणी ऐकल्याप्रमाणे खरोखर आहे
की काय हे मला नक्की समजेल."
22मग ते पुरुष सदोमाकडे वळून चालू लागले, परंतु
अब्राहाम परमेश्वरा पुढे तसाच उभा राहिला. 23मग
अब्राहामाने परमेश्वराजवळ जाऊन विचारले, "परमेश्वर
तू दुष्ट लोकांचा नाश करताना चांगल्या लोकांचाही नाश
करणार काय? 24आणि जर कदाचित त्या नगरात पन्नास

लोक चांगले व नीतिमान असतील तर? तरी ही त्या
नगराचा तू नाश करणार काय? तू खात्री ने नगरात
राहाणाऱ्या पन्नास नीतिमान लोकांसाठी नगराचा बचाव
करशील. 25तू नक्की नगराचा नाश करणार नाहीस;
दुष्ट लोकांना मारण्यासाठी तू पन्नास नीतिमान लोकांना
मारणार नाहीस; आणि जर तसे झाले तर मग चांगले व
वाईट अशा लोकांची गत सारखीच होणार; त्या दोन्ही
प्रकारच्या लोकांना शिक्षा होणार; तू सर्व पृथ्वीचा
न्यायाधीश आहेस, तू योग्य तेच करशील हे मला माहीत
आहे."

26नंतर परमेश्वर बोलला, "या सदोम शहरात मला
पन्नास चांगले लोक आढळले तर त्यांच्यासाठी मी संपूर्ण
शहराची गय करीन, व सर्व शहर वाचवीन."

27मग अब्राहाम म्हणाला, "हे प्रभु, तुझ्या तुलनेने मी
केवळ धूळ व राख आहे, तरी तुला एक प्रश्न विचारु दे;
28समजा कदाचित् जर पाच लोक कमी असतील म्हणजे
फक्त पंचेचाळीसच चांगले लोक असतील तर? त्या पाच
कमी असलेल्या लोकांकरिता तू सर्व नगराचा नाश
करशील काय?"

परमेश्वर म्हणाला, "मला पंचेचाळीस लोक चांगले
आढळले तर मी नगराचा नाश करणार नाही."

29पुन्हा अब्राहाम परमेश्वराला म्हणाला, "आणि जर
तेथे तुला चाळीसच चांगले लोक आढळले तर? संपूर्ण
शहराचा तू नाश करशील काय?"

परमेश्वर म्हणाला, "जर मला चाळीसच लोक चांगले
आढळले तर मी शहराचा नाश करणार नाही."

30मग अब्राहाम म्हणाला, "प्रभु, कृपा करून माझ्या
बोलण्याचा तुला राग न यावा; मला आणखी विचारण्याची
परवानगी असावी; तेथे फक्त तीसच लोक चांगले असतील
तर? तू त्या नगराचा नाश करशील काय?"

परमेश्वर म्हणाला, "जर तीस चांगले लोक असतील
तर मी तसे करणार नाही."

31मग अब्राहाम म्हणाला, "प्रभु, थोडा त्रास देऊन पुन्हा
विचारु का? समजा तेथे कदाचित् वीसच लोक चांगले
असतील तर?

परमेश्वराने उत्तर दिले, "जर तेथे वीसच लोक चांगले
असतील तर त्या वीसा करिता मी नगराचा नाश करणार
नाही."

32अब्राहाम म्हणाला, "प्रभु, कृपा करून माझ्यावर रागावू
नकोस, परंतु शेवटी एकदाच थोडा त्रासदायक प्रश्न
विचारण्यास परवानगी असावी, कदाचित् तुला तेथे दहाच
लोक चांगले आढळले तर तू काय करशील?"

परमेश्वर म्हणाला, "जर मला नगरात दहाच लोक
चांगले आढळले तर त्या दहाकरिता मी नगराचा नाश
करणार नाहीं."

33मग अब्राहामाशी बोलणे संपविल्यावर परमेश्वर
निघून गेला आणि अब्राहाम आपल्या तंबूकडे परत गेला.

## लोटाचे पाहुणे

19 त्या दिवशी संध्याकाळी ते दोन देवदूत सदोम नगरात
आले. नगराच्या वेशी जवळ बसलेल्या लोटाने
त्यांस पाहिले; लोट उठून त्यांस सामोरा गेला आणि त्याने
त्यांस आदराने लवून नमन केले. 2लोट त्यांस म्हणाला,
"माझे स्वामी महाराज, कृपया माझ्या घरी या; मला आपली
सेवा करु द्या; तेथे तुम्ही आपले पाय धुवा, आजची रात्र
रहा; मग उद्या तुमच्या पुढील प्रवासास निघा."

त्या देवदूतांनी उत्तर दिले, "नाही नाही , आम्ही रात्री
वेशीजवळील चौकात मुक्काम करु."

3परंतु लोट त्यांना पुन्हा पुन्हा विनंती करीतच राहिला;
तेव्हा देवदूतांनी त्याची विनंती मान्य केली व ते त्याच्या
घरी मुक्कामास गेले. लोट याने त्यास पिण्यास पाणी दिले,
त्याने त्यांच्यासाठी भाकरी केल्या व ते जेवले.

4त्या रात्री झोपण्याच्या वेळेपूर्वी त्या नगराच्या सर्व
भागातून पुरुष तरुण आणि वृध्द असे सर्वच पुरुष लोटाच्या
घरी आले; त्या सदोमकर पुरुषांनी लोटाच्या घराला गराडा
घातला व त्यांनी लोटाला हाक मारत म्हटले, 5"आज
रात्री तुझ्या घरी आलेले ते दोन पुरुष(देवदूत) कोठे
आहेत? त्यांना आमच्याकडे बाहेर आण; म्हणजे आम्ही
त्यांच्याशी समागम करु." 6लोट घरातून बाहेर आला व
त्याने आपल्यामागे घराचे दार बंद केले. 7लोट त्या
सदोमकर लोकांना म्हणाला, "नाही, नाही, माझ्या बंधूंनो!
मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो की तुम्ही असे
भयंकर वाईट काम करु नका. 8पाहा, माझ्या दोन मुली
आहेत; त्यांचा अद्याप कोणाही पुरुषाशी संबंध आला नाही;
त्या शुद्ध कुमारी आहेत; मी त्यांना तुमच्या स्वाधीन करतो.
तुमच्या मर्जीस येईल तसे तुम्ही त्यांच्याशी वागा; परंतु ह्या
पुरुषांना (देवदूतांना) काहीही करु नका; ते माझ्या घरी
पाहुणे म्हणून आले आहेत आणि त्यांचे रक्षण करणे माझे
प्रथम कर्तव्य आहे."

9तेव्हा सभोंवतालचे घेरा टाकलेले लोक म्हणाले, "चल
हो बाजूला." नंतर ते आपापसात म्हणू लागले, "हा लोट
आमच्या नगरात पाहुणा म्हणून आला आणि आता आम्ही
काय करावे हे हा उपरा आम्हाला शिकवू पाहतो काय?"
मग ते लोक लोटाला म्हणाले, "अरे, आम्ही त्या पाहुण्यांशी
जेवढे दुष्टपणे वागू त्यापेक्षा अधिक दुष्टतेने व वाईट
रीतीने तुझ्याशी वागू, समजलास!" तेव्हा ते लोक लोटाच्या
अधिक जवळ जवळ येऊ लागले व घराचा दरवाजा
तोडण्यास ते पुढे सरसावले.

10परंतु लोटाच्या घरातील त्या दोन पाहुण्यांनी दार
उघडले व लोटाला मागे ओढून घरात घेतले, आणि दार
बंद केले.

11त्या दोन पुरुषांनी दारा बाहेरील लोकांस आंधळे
केले; म्हणून घरात घुसण्याचा पयत्न करणारे ते सर्व
तरुण व म्हातारे आंधळे झाले, त्यामुळे अखेर पर्यंत त्यांना
घराचे दार सापडलेच नाहीं.

## सदोमापासून पलायन

12ते दोन पुरुष लोटाला म्हणाले, “तुझ्या कुटुंबातील व नात्यातील इतर कोणी लोक म्हणजे तुझे जांवई, मुलगे, मुली किवां इतर नातेवाईक या नगरात आहेत काय? तसे कोणी असतील तर त्यांना आता ताबडतोब हे शहर सोडून बाहेर पडण्यास सांग; 13कारण आम्ही या नगराचा नाश करणार आहोत. हे नगर किती वाईट आहे ते परमेश्वराने ऐकले आहे आणि म्हणून त्याने आम्हाला या नगराचा नाश करण्यासाठी पाठवले आहे.”

14म्हणून मग लोट बाहेर गेला व आपल्या जावयांस भेटला. तो त्यांना म्हणाला, “चला उठा, त्वरा करा, व हे शहर सोडून लवकर बाहेर पडा; कारण परमेश्वर या नगराचा नाश करणार आहे.” परंतु लोट गंमत करीत आहे असे त्याच्या जावयांस वाटले.

15दुसऱ्या दिवशी पहाटे ते दूत लोटाला घाईकरून म्हणालें, “उठ, ह्या नगराला ताडण होणार आहे; तेव्हा तू तुझी बायको व तुझ्या जवळ असलेल्या तुझ्या दोन मुली यांस घेऊन ताबडतोब येथून नीघ; म्हणजे मग या नगराबरोबर तुमचा नाश होणार नाही, तर तुम्ही आपले जीव वाचवाल.”

16परंतु लोट एकदम गोंधळून गेला व दिरंगाई करु लागला; तेव्हा त्या दोन पुरुषांनी (देवदूतांनी) लोट, त्याची बायको आणि त्याच्या दोन मुली यांचे हात धरुन त्यांस सुरक्षितपणे नगराबाहेर नेले. परमेश्वराने अशा रीतीने लोट व त्याच्या कुटुंबियावर दया केली. 17नगराबाहेर आल्यावर त्या देवदूतापैकी एक जण म्हणाला, “आता पळा व तुमचे जीव वांचवा, नगराकडे मागे वळून पाहू नका आणि या खोऱ्यात कोणत्याही ठिकाणी थांबू नका; पर्वतावर जाईपर्यंत पळत राहा जर का मधे कोठे थांबला, तर नगराबरोबर तुमचाही नाश होईल.”

18परंतु लोट त्या दोन देवदूतांना म्हणाला, “प्रभू! इतके दूर पळत जाण्याची माझ्यावर सक्ती करु नका,

19मी तर तुमच्या दासासारखा आहे; पण मला वांचविण्यासाठी तुम्ही माझ्यावर खूप दया केली आहे. मी डोंगरापर्यंत पळत जाऊ शकणार नाहीं; जर मी अगदी सावकाश पळू लागलो तर काहीतरी विपरीत व वाईट घडेल व मी मरुन जाईन. 20परंतु पाहा, येथे जवळच फार लहान गांव आहे; तेथे जाण्याची मला परवानगी असावी, त्या गावापर्यंत पळत जाऊन मी सुरक्षित राहू शकतो.”

21तेव्हा देवदूत लोटाला म्हणाला, “ठीक आहे, मी तसेही करण्यास तुला परवानगी देतो; मी त्या नगराचा नाश करणार नाही;

22पण तेथे लवकर पळत जा. तू तेथे सुरक्षितपणे जाऊन पोहोंचेपर्यंत मला सदोम नगराचा नाश करता येणार नाही.” (लहान असल्यामुळे त्या गांवाला तेव्हापासून सोअर असे नांव पडले.)

## सदोम व गमोरा नगरांचा नाश

23लोट सोअर गांवात पाऊल टाकीत असताना सकाळ झाली व सूर्य तेजाने प्रकाशू लागला, 24आणि परमेश्वराने सदोम व गमोरा या नगरांचा नाश करायला सुरूवात केली; त्याने आकाशातून त्या नगरावर गंधक व अग्नी यांचा वर्षाव केला; 25अशा रीतीने परमेश्वराने सदोम व गमोरा या नगरांचा तसेच त्या सगळ्या खोऱ्याचा म्हणजे त्या तळवटीत राहाणाऱ्या सगळ्या माणसांचा, पशूंचा व वनस्पतींचा नाश केला.

26लोट व त्याचे कुटुंबीय नगरातून पळून जात असताना लोटाच्या बायकोने मागे वळून जळणाऱ्या नगराकडे पाहिले तेव्हा तत्काळ ती मिठाचा खांब झाली.

27त्याच दिवशी पहाटे अब्राहाम उठला आणि आदल्या दिवशी तो परमेश्वरासमोर ज्या ठिकाणी उभा राहिला होता तेथे गेला. 28त्याने तेथून सदोम व गमोरा नगराकडे व संबंध खोऱ्यातील तळवटीच्या प्रदेशाकडे नजर टाकली तेव्हा तो अवघा प्रदेश म्हणजे भल्यामोठ्या अग्नीच्या ज्वालांनी व धुराच्या लोटांनी भरलेला त्याला दिसला.

29देवाने त्या खोऱ्यातील नगरांचा अशा रीतीने नाश केला परंतु तो करीत असताना, अब्राहामाने त्याला विचारलेल्या गोष्टींची त्याने आठवण ठेवली; लोट (अब्राहामचा पुतण्या) दरीतील नगरांत राहात होता. पण नगरांचा नाश करण्यापूर्वी देवाने लोटाला तेथून दूर पाठवून दिले होते.

## लोट व त्याच्या मुली

30या नंतर अधिक काळ सोअरात राहण्यास लोटाला भीती वाटली; तेव्हा तो त्याच्या मुलींना घेऊन डोंगरात एका गुहेत जाऊन राहिला. 31एके दिवशी वडील मुलगी धाकटीला म्हणाली, “पृथ्वीवर जिकडे तिकडे स्त्री पुरुष लग्न करून राहतात, आपले वडील म्हातारे होत राहिले आहेत; आणि या भागात आपल्याबरोबर लग्न करण्यास एकही पुरुष नाही; 32तर आता आपणाला मुले होण्याकरिता आपण आपल्या वडिलांचा उपयोग करु, तेव्हा आपण आपल्या वडिलाकडे जाऊन त्यांना भरपूर द्राक्षमद्य पाजू आणि मग त्यांच्यापाशी निजू म्हणजे मग त्यामुळे आपला वंश चालू राहील.”

33त्याच रात्री त्या दोघी मुली वडिलांकडे गेल्या आणि त्यांना त्यानी द्राक्षमद्य पाजले; नंतर वडील मुलगी आपल्या वडिलांच्या बिछान्यात गेली व त्यांच्याजवळ निजली; पण द्राक्षमद्याच्या नशेमुळे ती आपल्याजवळ निजली हे लोटाला कळले नाही.

34दुसऱ्या दिवशी वडील बहीण धाकट्या बहिणीला म्हणाली, “मी काल रात्री आपल्या वडिलाजवळ निजले, तर आज रात्री पुन्हा आपण वडिलांना द्राक्षमद्य पाजू या, मग रात्री तू वडिलांच्या बिछान्यात जाऊन त्याच्याजवळ नीज. अशा प्रकारे आपण त्याना मुले होऊ देऊ व आपल्या

वडिलांचा वंश चालविण्यास त्यांचा उपयोग करु." [35]तेव्हा
त्या रात्री त्या दोन मुलींनी आपल्या वडिलानां द्राक्षमद्य
पाजला; नंतर धाकटी मुलगी आपल्या वडिलांच्या बिछान्यात
गेली व त्यांच्याजवळ निजली; यावेळी ही नशेमुळे आपली
मुलगी आपल्याजवळ निजली हे लोटाला समजले नाहीं.
[36]अशा रीतीने लोटाच्या दोन्हीही मुली गरोदर राहिल्या.
त्यांचे वडीलच त्यांच्या बांळांचे वडील होते. [37]थोरल्या
मुलीला मुलगा झाला, तेव्हा तिने त्याचे नांव मवाब ठेवले;
आजतागायत राहात असलेल्या मवाबी लोकांचा हा मूळ
पुरुष, [38]धाकट्या मुलीलाही मुलगा झाला; तिने त्याचे
नांव बेनअम्मी असे ठेवले; आजमितीला जे अम्मोनी
लोक आहेत त्यांचा हा मूळ पुरुष.

## अब्राहाम गरारास जातो

20 अब्राहामाने ते ठिकाण सोडले व तो नेगेबकडे
म्हणजे यहूदा प्रांताच्या दक्षिणेकडील
वाळवंटाच्या भागाकडे प्रवास करीत गेला, आणि कादेश
व शूर यांच्या दरम्यान असलेल्या गरार नगरात त्याने
वस्ती केली; गरारात असताना [2]अब्राहामाने सारा आपली
बहीण असल्याचे लोकांना सांगितले. गराराचा राजा
अबीमलेख याने हे ऐकले. त्याला सारा हवी होती म्हणून
त्याने काही माणसे पाठवून तिला राजवाड्यात आणले.
[3]परंतु रात्री देव अबीमलेखाच्या स्वप्नात येऊन म्हणाला,
"तू आता नक्की मरशील कारण तू आणलेली स्त्री विवाहित
आहे."
[4]अबीमलेखाने अद्याप साराला स्पर्श केला नव्हता. तेव्हा
अबीमलेख म्हणाला, "प्रभु, मी दोषी नाही, मग एका
निरपराध माणसाला तू मारुन टाकणार काय? [5]कारण
अब्राहामाने स्वत: मला सांगितले की, 'ही स्त्री माझी बहीण
आहे,' आणि त्या स्त्रीने ही सांगितले की, 'हा माझा भाऊ
आहे,' तेव्हा मी निरपराधी आहे; मी काय करीत होतो हे
मला कळले नाही."
[6]मग देव अबीमलेखाला स्वप्नात म्हणाला, "होय! मला
माहीत की तू निरपराधी आहेस आणि तसेच तू काय
करत होता हे तुला कळले नाहीं; म्हणूनच मी तुला
वाचविले आणि माझ्या विरुद्ध तू पाप करु नयेस म्हणून
मी तुला आवरले; आणि मीच तुला साराला स्पर्श करु
दिला नाही. [7]तेव्हा आता तू अब्राहामाची बायको त्याची
त्याला परत दे; अब्राहाम माझ्या वतीने बोलणारा संदेष्टा
आहे; तो तुझ्यासाठी प्रार्थना करील व तू वाचशील; परंतु
तू सारेला अब्राहामाकडे परत पाठवले नाहीस तर मग मी
सांगतो की तू आणि तुझ्या बरोबर तुझे सर्व कुटुंबीय
खात्रीने मराल."
[8]दुसऱ्या दिवशी पहाटे अबीमलेखाने आपल्या सर्व
सेवकांना बोलावून त्याने स्वप्नात पाहिलेल्या सर्वगोष्टी
त्यांना सांगितल्या; ते सर्वजण फार घाबरले. [9]मग
अबीमलेखाने अब्राहामास बोलावून आणले व म्हटले, "तू
हे असे आम्हाला का केलेस? मी तुझे काय वाईट केले?
मी तुझ्याविरुद्ध काय गैर वागलो? तू असे खोटे का
बोललास की ती तुझी बहीण आहे? तू माझ्या राज्यावर
मोठे संकट आणलेस; तू माझ्याशी अशा गोष्टी करायच्या
नव्हत्या. [10]तुला कशाची भीती वाटली? अशा रीतीने तू
माझ्याशी का वागलास?"
[11]मग अब्राहाम म्हणाला, "मला भीती वाटली येथील
कोणीही लोक देवाचे भय धरीत नाहीत असे मला वाटले
आणि म्हणून माझी बायको सारा मिळविण्यासाठी कोणीही
मला ठार मारील असे मला वाटले. [12]ती माझी बायको
आहे हे खरे आहे, तरी पण ती माझी नात्याने बहीण
लागते हे ही तितकेच खरे आहे; कारण ती माझ्या बापाची
मुलगी आहे पण माझ्या आईची ती मुलगी नाही. [13]देवाने
मला माझ्या बापाच्या घरापासून दूर नेले आणि बऱ्याच
वेगवेगळ्या ठिकाणी भटकायला लावले; आणि असे झाले
तेव्हा मी साराला सांगितले, 'माझ्यासाठी एवढे कर की
आपण जिकडे जाऊ तिकडे तू माझी बहीण आहेस असे
लोकांना सांग.'"
[14]हे समजल्यावर अबीमलेखाने अब्राहामाला सारा परत
दिली; तसेच त्याने त्याला मेंढरे, बैल व दास दासीही
दिल्या. [15]अबीमलेख म्हणाला, "तुझ्या अवती भोवती चौफेर
नजर टाक; हा सर्व माझा देश आहे; तुला पाहिजे तेथे तू
राहा."
[16]अबीमलेख सारेला म्हणाला, "तुझा भाऊ अब्राहाम
याला मी एक हजार चांदीची नाणी दिली आहेत; यासाठी
की तेणेकडून, ह्या ज्या गोष्टी घडल्या त्या सर्वाबद्दल मला
दु:ख होत आहे, हे इतरास समजावे आणि माझा न्यायीपणा
व निरपराधीपणा व तुझी शुद्धता सर्व लोकांना कळावीत."
[17–18]परमेश्वराने अबीमलेखाच्या कुटुंबातील सर्व
स्त्रियांची गर्भाशये त्यांना मुले होऊ नयेत म्हणून बंद
केली होती; देवाने हे केले कारण अबीमलेखाने
अब्राहामाची बायको सारा हिला त्याच्या घरी नेले होते;
परंतु अब्राहामाने देवाची प्रार्थना केली आणि देवाने
अबीमलेख, त्याची बायको आणि त्याच्या दासी यांना मुले
न होण्याच्या दोषापासून बरे केले.

## शेवटी साराला मूल

21 परमेश्वराने साराला दिलेले वचन पाळले व पूर्ण
केले. [2]सारा गरोदर राहिली आणि अब्राहामाच्या
म्हातारपणी तिने त्याला मुलगा दिला. ह्या सगळ्या गोष्टी
परमेश्वराने वचन दिल्याप्रमाणे अगदी जशाच्या तशाच
घडून आल्या. [3]अब्राहामापासून साराला मुलगा झाला आणि
त्याने त्याचे नांव इसहाक ठेवले. [4]परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे
अब्राहामाने इसहाक आठ दिवसांचा झाल्यावर त्याची सुंता
केली. [5]इसहाक जन्मला तेव्हा अब्राहाम शंभर वर्षांचा
होता. [6]आणि सारा म्हणाली, "परमेश्वर देवाने मला हास्य
म्हणजे आनंदीआनंद दिला आहे. ज्या कोणाला हे समजेल

त्या प्रत्येकाला माझ्याबरोबर आनंद होईल. 7मला आता ह्या वयात अब्राहामापासून मूल होईल असे कोणाला वाटले असते काय? परंतु अब्राहाम म्हातारा झाला असताना देखील मी त्यास मुलगा दिला आहे."

## घरात संकट

8इसहाक वाढत राहिला, तो दुधाऐवजी जेवण घेण्याइतक्या वयाचा झाला तेव्हा त्याचे दूध तोडण्याच्या प्रसंगी अब्राहामाने मोठी मेजवानी दिली. 9ह्याच्या आधी साराची मिसर देशाची दासी हागार हिने अब्राहामापासून एका मुलाला जन्म दिला होता; अब्राहाम त्याचाही बाप होता. परंतु आता साराने पाहिले की तो आधीचा मुलगा इसहाकाला चिडवत होता. 10तेव्हा सारा अब्राहामाला म्हणाली, "त्या दासीला व तिच्या मुलाला येथून बाहेर घालवून द्या; आपल्या मरणानंतर आपल्या मालमत्तेचा वारस इसहाक होईल; या दासीचा मुलगा इसहाकाबरोबर आपल्या मालमत्तेचा वाटेकरी व तुमचा वारस होणार नाही."

11ह्या गोष्टीमुळे अब्राहामाला वाईट वाटले व त्याला इश्माएलाची चिंता वाटू लागली; 12परंतु देव अब्राहामाला म्हणाला, "त्या मुलाबद्दल बिलकूल चिंता करु नकोस, तसेच त्या दासीचीही चिंता करु नकोस. साराच्या इच्छेप्रमाणे कर. इसहाकच तुझा एकटाच वारस होईल. 13परंतु मी त्या दासीच्या मुलालाही आशीर्वाद देईन; तो तुझा मुलगा आहे म्हणून त्याच्या कुटुंबांपासूनही मी एक मोठे राष्ट्र निर्माण करीन."

14दुसऱ्या दिवशी सकाळी अब्राहामाने भाकरी व पाण्याची पिशवी आणून हागारेला दिली; ती शिदोरी व आपला मुलगा घेऊन हागार तेथून निघाली आणि अब्राहामाने तिची रवानगी केली; हागार तेथून निघून बैर-शेबाच्या वाळवंटात भटकत राहिली.

15काही वेळाने पिशवीतील सर्व पाणी संपले, एक थेंबही पिण्यासाठी राहिला नाही; तेव्हा हागारेने आपल्या मुलाला एका झुडपाखाली ठेवले; 16आणि तेथून काही अंतर ती चालून गेली व थांबून तेथे बसली. आपला मुलगा पाण्यावाचून मरेल असे तिला वाटले; त्याचा मृत्यू आपल्याला पाहवणार नाही असे समजून ती तेथे दूर अंतरावर बसली, व हंबरडा फोडून रडू लागली.

17देवाने मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकला; आणि देवाचा दूत स्वर्गातून हागारेला हाक मारुन म्हणाला, "हागारे, तुला काय झाले? भिऊ नकोस; तुझ्या मुलाचे रडणे परमेश्वराने ऐकले आहे 18ऊठ मुलाला उचलून घे; त्याचा हात धर व त्याला घेऊन पुढे चल; मी त्याच्यापासून एक मोठे राष्ट्र निर्माण करीन."

19मग देवाने हागारेला पाण्याची विहीर दिसू दिली. तेव्हा हागार त्या विहिरीपाशी गेली आणि तिने मसक पाण्याने भरली, नंतर आपल्या तहानलेल्या मुलाला तिने पाणी पाजिले.

20तो मुलगा वाढत असताना देव सतत त्याच्याबरोबर राहिला; इश्माएल वाळवंटात लहानाचा मोठा होऊन शिकारी झाला; तो धनुष्यबाण मारावयास शिकला व तरबेज तिरंदाज झाला; 21नंतर त्याच्या आईने त्याला मिसर देशातील मुलगी बायको करून दिली. ते पारानच्या वाळवंटात राहिले.

## अब्राहामाचा अबीमलेखाशी करार

22त्यानंतर अबीमलेख व त्याचा सेनापति पीकोल यांनी अब्राहामाशी बोलणी केली; ते अब्राहामास म्हणाले, "तू जे काही करतोस त्यात देव तुझ्याबरोबर असतो; 23तेव्हा आता देवासमोर येथे मला वचन दे की तू माझ्याशी व माझ्यामागे माझ्या संतानाशी न्यायनीतीने वागशील असा माझ्याशी करार कर; तू माझ्याशी व ज्या ह्या माझ्या देशात तू राहिलास त्या देशाशी दयाळूपणे राहशील, असे वचन दे, तसेच मी जसा तुझ्याशी दयाळूपणाने वागलो तसाच तूही माझ्याशी दयाळूपणाने राहशील असे वचन तू मला दे, व असा करार तू माझ्याशी कर."

24आणि अब्राहाम म्हणाला, "मी असे वचन देतो की जसा तू माझ्याशी दयाळूपणे वागलास तसाच मी ही तुझ्याशी वागेन." 25मग अबीमलेखाच्या सेवकांनी पाण्याची विहीर बळकावली म्हणून अब्राहामाने अबीमलेखाकडे तक्रार केली.

26परंतु अबीमलेख म्हणाला, "असे कोणी केले आहे ते मला माहीत नाही. ह्या पूर्वी तू हे मला कधीही सांगितले नाहीस."

27अशा रीतीने अब्राहाम व अबीमलेख यांनी आपसात करार केला. अब्राहामाने अबीमलेखाला काही मेंढरे व बैल, कराराचा पुरावा म्हणून दिले;

28अब्राहामाने अबीमलेखा पुढे मेंढ्याच्या सात माद्या ठेवल्या.

29अबीमलेखाने अब्राहामाला विचारले, "या सात मेंढ्या तू अशा बाजूला का काढल्यास?"

30अब्राहामाने उत्तर दिले, "जेव्हा तू ह्या मेंढया माझ्याकडून स्वीकारशील तेव्हा ही विहीर मी खणली असा तो पुरावा होईल."

31तेव्हा त्यानंतर त्या विहिरीला बैर-शेबा असे नाव पडले, कारण त्या ठिकाणी अब्राहाम व अबीमलेख यांनी एकमेकांना वचन देऊन करार केला.

32त्यांनी बैर शेबा येथे करार केल्यानंतर अबीमलेख व त्याचा सेनापती पलिष्ट्यांच्या देशात परत गेले.

33अब्राहामाने बैर-शेबा येथे एक विशेष प्रकारचे झाड लावले, आणि त्याच जागी, जो निरंतर राहतो अशा परमेश्वराची प्रार्थना केली; 34आणि तो बराच काळ पलिष्ट्यांच्या देशात राहिला.

## अब्राहामा, तुझ्या पुत्राचे माझ्यासाठी होमार्पण कर

22 या गोष्टी घडल्यानंतर देवाने अब्राहामाच्या
विश्वासाची कसोटी घेण्याचे ठरवले. देवाने
अब्राहामाला हाक मारली, “अब्राहाम”,
आणि अब्राहाम म्हणाला, “मी येथे आहे”
2देव म्हणाला, “तुझा एकुलता एक प्रिय पुत्र इसहाक
याला घेऊन तू मोरिया देशात जा आणि तेथे, मी सांगेन
त्या डोंगरावर माझ्यासाठी त्याचे होमार्पण कर.”
3तेव्हा अब्राहाम पहाटेस उठला, त्याने खोगीर घालून
आपले गाढव तयार केले; इसहाकाला व दोन सेवकांना
आपल्या बरोबर घेतले तसेच होमार्पणाकरिता लाकडे
घेतली आणि मग ते सर्व देवाने सांगितलेल्या ठिकाणी
गेले. 4तीन दिवस प्रवास केल्यानंतर अब्राहामाने वर पाहिले
तेव्हा काही अंतरावर त्याला जेथे जायचे होते ते ठिकाण
दिसले. 5मग अब्राहाम आपल्या सेवकांना म्हणाला, “तुम्ही
येथे गाढवा जवळ थांबा; मी माझ्या मुलाला घेऊन त्या
समोरच्या जागी जातो, व देवाची उपासना करून आम्ही
माघारी येतो.”
6अब्राहामाने लाकडे घेऊन मुलाच्या खांद्यावर ठेवली;
एक खास सुरा (बळी देण्याकरिता) आणि विस्तव घेतला.
मग तो व त्याचा मुलगा असे दोघे जण देवाची उपासना
करण्यासाठी होमार्पणाच्या जागेकडे संगती निघाले.
7इसहाकाने आपल्या बापास हाक मारली, “बाबा!”
अब्राहामाने उत्तर दिले, “काय माझ्या प्रिय मुला?”
इसहाक म्हणाला, “मला लाकडे व विस्तव दिसतात,
परंतु होमार्पणासाठी कोंकरू? ते कोठे आहे?”
8अब्राहामाने उत्तर दिले, “माझ्या लाडक्या बाळा,
होमार्पणासाठी लागणारे कोंकरू देव आपल्याला योग्यवेळी
देईल.”

## इसहाक वाचतो

तेव्हा अब्राहाम व त्याचा मुलगा संगती निघाले 9व
देवाने सांगितलेल्या ठिकाणी ते जाऊन पोहोंचले, तेथे
अब्राहामाने एक वेदी बांधली, त्याने वेदीवर लाकडे रचली;
नंतर त्याने आपला पुत्र इसहाक याला बांधून वेदीवरील
लाकडावर ठेवले; 10मग अब्राहामाने आपल्या मुलाचा
बळी देण्यासाठी हातातील सुरा उंचावला.
11परंतु तेवढ्यात, त्याच क्षणाला परमेश्वराच्या दूताने
त्याला थांबवले; तो स्वर्गातून ओरडून त्याला म्हणाला,
“अब्राहामा! अब्राहामा!”
अब्राहामाने उत्तर दिले, “मी येथे आहे.”
12देवदूत म्हणाला, “तू आपल्या मुलाला मारु नकोस,
किंवा त्याला कोणत्याही प्रकारची इजा करु नकोस; कारण
आता मला खात्रीने समजले की तू देवाला घाबरतोस
आणि त्याचा आदर करतोस; कारण तू माझ्यासाठी आपल्या
एकुलत्या एका लाडक्या पुत्रालाही, अर्पण करावयास
मागेपुढे न पाहता तयार झालास.”
13आणि मग अब्राहामाने वर दृष्टि करून सभोंवार
पाहिले तेव्हा त्याला एका झुडपात शिंगे अडकलेला एक
एडका दिसला; मग त्याने जाऊन तो घेतला व परमेश्वराला
होमार्पणासाठी त्याचा बळी दिला. अशा रीतीने अब्राहामाचा
मुलगा इसहाक वांचला. 14तेव्हा अब्राहामाने त्या जागेला,
“याव्हे यिरे” असे नांव दिले; आणि आजवर देखील, “या
डोंगरावर परमेश्वर दिसू शकतो असे लोक बोलतात.”

15नंतर स्वर्गातून परमेश्वराच्या दूताने अब्राहामास
दुसऱ्यांदा हाक मारली. 16तो म्हणाला, “परमेश्वर म्हणतो
की तू माझ्यासाठी तुझ्या एकुलत्या एका लाडक्या मुलाचा
बळी द्यावयांस मागे पुढे न पाहता तयार झालास म्हणून मी
परमेश्वर स्वत:ची शपथ घेऊन तुला वचन देतो की
17मी खरोखर तुला आशीर्वाद देईन व तुझी वाढ करीन;
मी तुला असंख्य वंशज देईन; तुझी संतती आकाशातील
ताऱ्याइतकी, समुद्रकिनाऱ्यावरील वाळू इतकी होईल असे
मी करीन; आणि तुझी संतती आपल्या सर्व शत्रुंचा पराभव
करून त्यांना जिंकेल.
18पृथ्वीवरील प्रत्येक राष्ट्र तुझ्या वंशजाद्वारे आशीर्वाद
पावेल; तू माझ्या सर्व आज्ञा पाळल्यास म्हणून मी हे
करीन.”
19मग अब्राहाम आपल्या सेवकाकडे मागे आला आणि
अब्राहाम, इसहाक व त्याचे सेवक असे सर्व मिळून प्रवास
करीत मागे बैरशेबाला गेले; आणि अब्राहामाने बैर-शेबा
येथे वस्ती केली.
20या सर्व गोष्टी घडल्यानंतर अब्राहामाला असा निरोप
आला, “पाहा तुझा भाऊ नाहोर व त्याची बायको मिल्का
यांनाही आता मुले झाली आहेत; 21त्यांच्या पहिल्या मुलाचे
नांव ऊस, दुसऱ्याचे बूज, तिसऱ्याचे कमुवेल-हा
आरामाचा बाप; 22त्यानंतर केसेद, हजो, पिलदाश, यिदलाप
आणि बथुवेल अशी त्यांची नांवे आहेत” 23बथुवेल
रिबकाचा बाप होता. अब्राहामाचा भाऊ नाहोर याजपासून
मिल्केला हे आठ मुलगे झाले;
24आणि त्याची स्त्रीगुलाम रेऊमा हिलाही त्याच्या पासून
तेबाह, गहाम, लहश व माका हे चार मुलगे झाले.

## सारेचा मृत्यु

23 सारा एकशें सत्तावीस वर्षे जगली; 2ती कनान
देशातील किर्याथ-आरबा (म्हणजे होब्रोन) येथे
मरण पावली; तेव्हा अब्राहाम फार दु:खी झाला व त्याने
तिच्यासाठी रडून खूप शोक केला. 3मग अब्राहाम आपल्या
मृत बायको जवळून उठला व तो हेथी लोकांस भेटण्यास
गेला. तो म्हणाला, 4“मी या देशाचा रहिवासी नाही, तर
परदेशी आहे; म्हणून माझ्या बायकोला पुरण्यासाठी मला
जागा नाही; तेव्हा मला जागेची गरज आहे,ती मला द्या.”
5ते हेथी लोक अब्राहामाला म्हणाले, 6“स्वामी,
परमेश्वराच्या महान नेत्यांपैकी आपण एक आम्हामध्ये

आहा; आम्हाकडे असलेल्या जागांपैकी चांगल्यातली चांगली जागा आपल्या मयतासाठी आपण घेऊ शकता; आमच्या कफनाच्या जागांपैकी तुम्हाला हवी ती जागा तुम्ही घेऊ शकता. अशा ठिकाणी आपल्या पत्नीला पुरण्यास आम्ही कोणीही मना करणार नाही.”

7अब्राहाम उठला व अदबीने त्या लोकांना नमन करून म्हणाला, 8“तुम्हाला जर माझ्या मयत बायकोला पुरण्यासाठी खरोखर मला मदत करावी असे वाटत असेल तर मग माझ्यातर्फे सोहराचा मुलगा एफ्रोन याच्याकडे शब्द टाका;

9त्याच्या मालकीच्या शेताच्या एका टोकाला असलेली मकपेला येथील गुहा विकत घेणे मला आवडेल; मी तिची पुरेपूर किंमत त्याला देतो, व ती माझ्या मालकीची स्मशानभुमि म्हणून विकत घेतो; त्या बद्दल तुम्ही सर्वजण साक्षी असावे.”

10त्या वेळी तेथे एफ्रोन हित्ती हा हेथी लोकात बसलेला होता; तो त्या सर्वांच्या देखत अब्राहामाला म्हणाला, 11“नाही, नाही! माझे स्वामी, मी पैसे घेणार नाही; येथे माझ्या लोकांसमक्ष ते शेत व ती गुहा मी तुम्हाला देतो; तुम्ही तुमच्या बायकोला तेथे पुरा.”

12मग अब्राहामाने हेथी लोकांस नमन केले; 13अब्राहाम सर्व लोकांसमक्ष एफ्रोनास म्हणाला, “परंतु मला त्या शेताची पूर्ण किंमत तुला देऊन ते विकत घ्यायचे आहे; त्याचे पैसे माझ्याकडून घे आणि मग मी आपल्या मयतास तेथे मूठमाती देईन.”

14एफ्रोनाने अब्राहामास उत्तर दिले, 15“माझे स्वामी, माझे जरा ऐका; जमिनीची किंमत 10 पौंड* चांदी आहे ही किंमत तुम्हाला व मला म्हणजे काय मोठे? तेव्हा त्यापेक्षा सरळ माझे शेत ताब्यात घ्या व तेथे तुमच्या बायकोला मूठमाती द्या.”

16अब्राहामाने ही किंमतच असल्याचे समजून घेतले व त्याने एफ्रोनाला त्यांच्या पद्धतीप्रमाणे चांदीची दहा नाणी (म्हणजे चारशे शेकेल भार रुप्याची नाणी) तोलून दिली.

17या प्रमाणे मम्रेच्या पूर्वेला असलेले मकपेला येथील शेत, गुहा व त्यातील सर्व झाडी यांवरील एफ्रोनाचा मालकी हक्क बदलून तो अब्राहामाला मिळाला; 18एफ्रोन व अब्राहाम यांच्यामध्ये ही मालकी हक्काची अदलाबदल नगरातील सर्व लोकांसमक्ष झाली;

19त्यानंतर मम्रे (म्हणजे कनान देशातील हेब्रोन) जवळील त्या शेतातील गुहेत अब्राहामाने आपली बायको सारा हिला पुरले. याप्रमाणे ते शेत, गुहा इत्यादि हित्तीकडून विकत घेतल्यामुळे ती 20अब्राहामाची मालमत्ता झाली आणि त्याने त्या जागेचा आपल्या मयतासाठी स्मशानभूमि म्हणून उपयोग केला.

## इसहाकासाठी पत्नी

24 अब्राहाम आता फार म्हातारा झाला होता; परमेश्वराने अब्राहामाला व त्याने जे जे केले त्या सर्व गोष्टीना आशीर्वादित केले होते. 2अब्राहामाचा सर्वात म्हातारा सेवक होता; तो त्याच्या सर्व मालमत्तेचा व घरदाराचा कारभार पाहणारा मुख्य कारभारी होता. एकदा अब्राहामाने त्याला बोलावून म्हटले, “तू आपला हात माझ्या मांडीखाली ठेव 3आणि आकाश व पृथ्वी यांचा निर्माणकर्ता परमेश्वर याजसमोर मला वचन दे की माझा मुलगा इसहाक याला तू कनान देशातील कोणत्याच मुलीबरोबर लग्न करु देणार नाहीस; आपण या कनान देशात राहतो हे खरे परंतु या देशातील कोणत्याच मुलीबरोबर त्याला लग्न करु देणार नाहीस. 4माझ्या देशाला, माझ्या लोकांकडे जा आणि तेथून माझा मुलगा इसहाक याच्यासाठी नवरी शोधून तिला येथे आण.”

5त्याचा सेवक त्याला म्हणाला, “यदा कदाचित ती स्त्री माझ्याबरोबर या देशात येण्यास तयार होणार नाही, तर मग माझ्याबरोबर तुमच्या मुलास ज्या देशातून तुम्ही आला त्या देशात घेऊन जाऊ काय?”

6अब्राहाम त्याला बजावून म्हणाला, “नाही, नाही, माझ्या मुलास त्या देशाला घेऊन जाऊ नकोस. 7स्वर्गाच्या ज्या परमेश्वराने मला माझ्या बापाच्या घरातून व आमच्या वंशजांच्या जन्मभूमीतून काढून वचन देऊन येथे आणले व ही येथील नवीन भूमि मला व माझ्या वंशजास वतन म्हणून दिली तो परमेश्वर तू तेथे जाऊन पोहोंचण्यापूर्वी त्याचा दूत पाठवील आणि तू तेथून माझ्या मुलाकरीता नवरी आणशील. 8परंतु ती मुलगी तुझ्याबरोबर येथे येण्यास कबूल झाली नाही तर मग तू माझ्या शपथेतून मोकळा होशील; परंतु काहीही झाले तरी माझ्या मुलाला तिकडे बिलकूल घेऊन जाऊ नकोस. 9तेव्हा त्याच्या सेवकाने आपल्या धन्याच्या मांडीखाली हात ठेवून तशी शपथ घेतली.

## शोध सुरु होतो

10अब्राहामाचे दहा उंट घेऊन त्याचा सेवक निघाला; त्याने आपल्याबरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर व मोलवान वस्तू देणग्या देण्यासाठी घेतल्या; तो अराम-नहाराईम मेसोपोटेमीयातील (म्हणजे मसोपटेम्या) नाहोर राहात असलेल्या नगरात गेला. 11तो सेवक नगराबाहेरच्या विहिरीजवळ गेला संध्याकाळी पाणी नेण्यासाठी बायका तेथे येत असत. त्याने उटांना विसावा घेण्यासाठी तेथे बसवले.

12सेवक म्हणाला, “हे परमेश्वर देवा, तू माझा स्वामी अब्राहाम याचा परमेश्वर आहेस,; आजच त्याच्या मुलासाठी मला मुलगी सापडावी असे कर; कृपया, माझा मालक अब्राहाम ह्याच्यावर एवढी दया कर. 13मी येथे या विहिरीजवळ उभा राहात आहे. 14मी तर इसहाकासाठी योग्य मुलगी निवडण्याकरिता काही विशेष खुणेचा शोध

**10 पौंड** म्हणजे “400 शेकेल.”

करीत आहे; तर असे घडू दे, की मी ज्या मुलीस म्हणेन, ‘मुली तुझी पाण्याची घागर उतरुन मला प्यायला पाणी दे,’ आणि ती जर असे म्हणेल, ‘प्या बाबा, आणि मी तुमच्या उंटांसही पाणी पाजते;’ जर असे घडून येईल तर मग तीच इसहाकासाठी योग्य नवरी असल्याचे तू सिद्ध केले आहेस असे होईल आणि तू माझ्या स्वामीवर दया केली आहेस असे मला कळेल.”

### नवरी सांपडते

15मग त्या सेवकाची प्रार्थना संपली नाहीं तोंच अब्राहामाचा भाऊ नाहोर याजपासून मिल्केला झालेल्या बथुवेलाची कन्या, रिबका नांवाची एक तरुणी खांद्यावर घागर घेऊन विहिरीपाशी आली; 16ती फार देखणी व सुंदर मुलगी होती; ती कुमारी होती; ती पुरुषाबरोबर कधीच निजली नव्हती. विहिरीत उतरुन तिने घागर भरली. 17तेव्हा सेवक धावत जाऊन तिला म्हणाला, “मुली, तुझ्या घागरीतून मला थोडे पाणी पाज.”

18तेव्हा ताबडतोब रिबकेने आपल्या खांद्यावरील घागर उतरुन त्याला पाणी पाजले; ती म्हणाली, “प्या बाबा;” 19त्याचे पुरेसे पाणी पिऊन झाल्यावर ती म्हणाली, “तुमच्या उंटांनाही भरपूर पाणी पाजते.” 20मग तिने लगेच उंटासाठी घागर डोणीत ओतली आणि आणखी पाणी आणण्याकरिता ती धावत विहिरीकडे गेली, या प्रमाणे तिने सगळ्या उंटांना भरपूर पाणी पाजले.

21तेव्हा तो सेवक अचंबा करून तिच्याकडे पाहात राहिला; परमेश्वराने आपल्या प्रार्थनेचे उत्तर देऊन आपला प्रवास यशस्वी केला की काय अशी खात्री करण्याकरिता तो शांतपणे विचार करीत उभा राहिला. 22उंटाचे पाणी पिणे झाल्यावर त्या सेवकाने रिबकेला पांच औंस भाराची (म्हणजे अर्धा शेकेल भाराची) सोन्याची आंगठी दिली; तसेच त्याने प्रत्येकी पाच शेकेल भाराच्या दोन (म्हणजे दहा शेकेल भाराच्या दोन) सोन्याच्या बांगड्या तिला दिल्या. 23त्याने तिला विचारले, “मुली, तू कोणाची मुलगी आहेस? तुझ्या बापाचे नांव काय? तुझ्या बापाच्या घरी आम्हा सर्वांना उतरुन रात्री मुक्काम करावयास जागा आहे काय?”

24रिबकेने उत्तर दिले, “नाहोर व मिल्का यांचा मुलगा बथुवेल याची मी कन्या;” आणखी ती पुढे म्हणाली, 25“हो, तुमच्या उंटासाठी आमच्यापाशी भरपूर गवत व पेंढा आहे आणि तुमच्या सर्वांसाठी मुक्काम करण्यास माझ्या बापाच्या घरी भरपूर जागा आहे.”

26तेव्हा सेवकाने नमन करून परमेश्वराची उपासना केली. 27तो म्हणाला, “माझ्या स्वामीचा, अब्राहामाचा परमेश्वर धन्यवादित आहे; त्याची माझ्या स्वामीवर प्रेमदया आणि निष्ठा आहे, माझ्या स्वामीच्या, पुत्रासाठी योग्य अशा मुलीकडेच परमेश्वराने मला नेले आहे.”

28नंतर रिबका धावत घरी गेली व तिने या सर्व गोष्टी आपल्या आईस व घरच्या सर्वांस सांगितल्या; 29–30रिबकेला लाबान नांवाचा भाऊ होता; सेवक तिच्याशी ज्या गोष्टी बोलला त्या तिने त्याला सांगितल्या; या सगळ्या तो शांतपणे ऐकत होत; आणि जेव्हा त्याने आपल्या बहिणीच्या बोटातील सोन्याची आंगठी, व हातातील सोन्याच्या बांगड्या पाहिल्या तेव्हा तो घरातून निघून पळत विहिरीकडे गेला; तेव्हा उंटा जवळ उभा असलेला तो सेवक त्याला विहिरीपाशी दिसला. 31लाबान त्याला म्हणाला, “स्वामी येथे बाहेर याप्रमाणे उभे राहाण्याची गरज नाही; परमेश्वरचे आशीर्वादित स्वामी, आम्ही तुमचे स्वागत करतो, तुम्ही सर्व आमच्या घरी या. मी तुमच्या मुक्कामासाठी खोली तयार करून ठेवली आहे; तसेच तुमच्या उंटांसाठी ही जागा केली आहे.”

32तेव्हा अब्राहामाचा सेवक त्याच्या घरी गेला; लाबानाने उटांना सोडवीण्यास त्याला मदत केली आणि गवत व पेंढा दिले; 33आणि त्याच्या पुढे जेवण वाढले; परंतु अब्राहामाच्या सेवकाने जेवण घेण्याचे नाकारले; तो म्हणाला, “मी येथे येण्याचे कारण तुम्हाला सांगितल्याशिवाय जेवणार नाही.”

तेव्हा लाबान म्हणाला, “ठीक आहे, तुम्ही येथे कशासाठी आला ते आम्हाला सांगा.”

### रिबकेसाठी सौदा

34तो सेवक म्हणाला, “मी अब्राहामाचा सेवक आहे; 35परमेश्वराने माझ्या स्वामीला सर्व बाबतीत आशीर्वाद देऊन त्याचे कल्याण केले आहे. माझा स्वामी आता एक थोर माणूस झाला आहे; परमेश्वराने त्याला मेंढरांचे कळप, गुराढोरांची खिल्लारे तसेच खूप सोने. चांदी, दासदासी, उंट व गाढवे दिली आहेत. 36सारा, ही माझ्या स्वामीची पत्नी, स्वामीने त्याची सगळी मालमत्ता आपल्या मुलास दिली आहे. 37माझ्या स्वामीने सक्तीने माझ्याकडून वचन घेतले; तो म्हणाला, ‘आपण या कनान देशात राहतो खरे, परंतु माझ्या मुलासाठी येथील कनानी मुलीतून कोणतीच मुलगी बायको करून देऊ नकोस; 38माझ्या स्वामीने मला शपथ घ्यावयास लावले व सांगितले, तू माझ्या बापाच्या देशात माझ्या आप्ता कडे, गणगोताकडे जा व तेथून माझ्या मुलाकरिता तू नवरी शोधून आण.’ 39मी माझ्या स्वामीला म्हणालो, ‘यदा कदाचित तर नवरी मुलगी माझ्याबरोबर या देशात येण्यास कबूल झाली नाही तर?’ 40परंतु स्वामी, म्हणाले, ‘ज्या परमेश्वराची मी सेवा करतो तो त्याच्या दूताला तुझ्याबरोबर पाठवील व तो तुला मदत करील आणि तेथील माझ्या आप्तांतून तू माझ्या मुलाकरिता नवरी आणशील; 41परंतु माझ्या बापाच्या देशात त्याच्या घरी तू जाशील आणि ते माझ्या मुलाकरिता नवरी मुलगी द्यावयाचे नाकारतील तर मग तू माझ्या शपथेतून मोकळा होशील.’

42“आज मी या विहिरीपाशी आलो आणि परमेश्वराला प्रार्थना केली, ‘हे माझ्या स्वामीच्या अब्राहमच्या परमेश्वरा, ही माझ्या प्रवासाची फेरी सफळ कर; 43पाहा, मी येथे या

विहिरीजवळ उभा राहतो; येथे पाणी भरण्यास येणाऱ्या
तरुण मुलीची वाट पाहतो; ती आल्यावर मी तिला विचारीन,
“मुली, कृपा करून तुझ्या घागरीतून मला थोडे पाणी
पाज!” 44तेव्हा ती योग्य मुलगी विशेष प्रकारे असे उत्तर
देईल, ती म्हणेल, “प्या बाबा! आणि मी तुमच्या उंटासाठी
ही पाणी आणते,” असे घडेल तेव्हा ती मुलगी माझ्या
धन्याच्या मुलाकरिता परमेश्वराने निवडलेली नवरी आहे
असे मी समजेन.’

45“माझी प्रार्थना संपण्याच्या आत रिबका खांद्यावर घागर
घेऊन पाणी भरण्यास विहिरीवर आली; तिने विहिरीत
उतरुन पाणी आणले; मी तिला म्हणालो, ‘मुली, कृपा
करून मला थोडे पाणी प्यावयाला दे.’ 46तेव्हा तिने लगेच
खांद्यावरुन घागर उतरवली आणि माझ्यासाठी पाणी ओतीत
ती म्हणाली, ‘बाबा, हे पाणी प्या आणि तिने माझ्या उंटांनाही
पाणी पाजले;’ 47मग मी तिला विचारिले, ‘तू कोणाची
मुलगी आहेस? तुझ्या बापाचे नांव काय?’ तिने उत्तर
दिले, ‘नाहोरापासून मिल्केला झालेल्या बथुवेलाची मी
कन्या;’ तेव्हा मग मी तिला सोन्याची आंगठी आणि हातात
घालण्यासाठी सोन्याच्या दोन बांगडयादिल्या; 48त्यावेळी मी
मस्तक लववून माझ्या धन्याच्या परमेश्वराची
उपकारस्तुति केली, कारण त्याने मला माझ्या स्वामीच्या
भावाच्या मुलीला त्याच्या मुलाकडे नेण्याचा योग्य मार्ग
दाखवला; 49तेव्हा आता तुम्ही मला सांगा; तुम्ही माझ्या
धन्याशी खरेपणाने आणि दयाळूपणाने वागाल का? आणि
तुमची मुलगी त्याला देता का? की मुलगी देण्यास नकार
देता? बोला, काय करता हे मला नक्की सांगा म्हणजे मग
मी काय करावे हे मला समजेल.”

50मग लाबान व बथुवेल यांनी उत्तर दिले, “आपण
परमेश्वराच्या प्रेरणेने आला आहा हे आम्ही समजतो; जे
त्याच्या इच्छेप्रमाणे घडलेच पाहिजे ते आम्ही बदलू शकत
नाही; 51पाहा, रिबका तुमची आहे; तिला तुम्ही घेऊन जा
आणि तिला तुमच्या स्वामीच्या मुलाशी लग्न करु द्या.”

52अब्राहामाच्या सेवकाने हे शब्द ऐकले आणि भूमिपर्यंत
लवून परमेश्वराला नमन केले; 53त्याने नवरीसाठी
आणलेल्या मोलवान भेटवस्तू म्हणजे हिरेमाणके यांनी
मढवलेले सोन्याचांदीचे दागदागिने व बरीच सुंदर वस्त्रे
रिबकेला दिली; त्याचप्रमाणे त्याने तिचा भाऊ व तिची
आई यांना ही मोलवान देणग्या दिल्या. 54मग त्याने व
त्याच्या बरोबरच्या माणसांनी त्यांचे खाणेपिणे झाल्यावर
रात्री तेथेच मुक्काम केला; दुसऱ्या दिवशी उठल्यावर ते
म्हणाले, “आता आम्ही आमच्या स्वामीकडे माघारी जाण्यास
निघतो.” 55तेव्हा रिबकेची आई व भाऊही म्हणाला,
“रिबकेला आमच्याजवळ थोडे दिवस म्हणजे निदान दहा
दिवस तरी राहू द्या; मग ती येईल.”

56परंतु तो सेवक त्यांना म्हणाला, “कृपा करून मला
थांबवून घेऊ नका; परमेश्वराने ही माझी फेरी सफळ
केली आहे, तेव्हा आता मला धन्याकडे परत जाऊ द्या.”

57तेव्हा रिबकेचा भाऊ व आई म्हणाली, “आम्ही
रिबकेला बोलावून तिची काय इच्छा आहे ते विचारतो;”
58मग त्यांनी तिला बोलावून विचारिले, “अब्राहामाच्या या
सेवकाबरोबर तू आता जाण्यास तयार आहेस काय?”

ती म्हणाली, “होय, मी तयार आहे.”

59तेव्हा त्यांनी रिबकेला अब्राहामाचा सेवक व त्याची
माणसे यांच्या सोबत जाण्यास परवानगी दिली; रिबकेचा
लहानपणापासून सांभाळ करणारी तिची दाईही
त्यांच्याबरोबर गेली; 60ते सर्व जाण्यास निघाले तेव्हा त्यांनी
तिला निरोप देताना आशीर्वाद देऊन म्हटले,

“आमचे भगिनी, तू लाखो लोकांची माता हो; तुझी
संतती त्यांच्या शत्रुंचा बिमोड करून त्यांची नगरे जिंकून
त्यांचा ताबा घेवोत.”

61मग रिबका व तिच्या दाई-दासी उंटावर बसल्या
आणि अब्राहामाचा सेवक व त्याची माणसे यांच्या मागे
निघाल्या; अशा रीतीने तो सेवक रिबकेला घेऊन माघारे
आपल्या घराकडे प्रवासास निघाला.

62ह्या वेळी इसहाक बैर-लहाय-रोई सोडून नेगेबात
राहात होता. 63तो एका संध्याकाळी ध्यानमनन करण्यास
शेतात गेला असता त्याने नजर वर करून पाहिले तेव्हा
त्याला दूर अंतरावरुन उंट येताना दिसले;

64रिबकेने नजर वर करून इसहाकाला पाहिले तेव्हा
ती उंटावरुन खाली उतरली. 65तिने सेवकाला विचारले,
“शेतातून आपल्याला भेटावयास सामोरा येत असलेला
तरुण पुरुष कोण आहे?”

सेवकाने उत्तर दिले, “तो माझ्या स्वामीचा पुत्र आहे.”
तेव्हा रिबकेने बुरख्याने आपले तोंड झाकून घेतले.

66सेवकाने इसहाकाला काय काय घडले त्याविषयी
सविस्तर सांगितले; 67मग इसहाकाने मुलीला आपल्या
आईच्या तंबूत आणले; त्या दिवशी रिबका त्याची बायको
झाली; इसहाकाचे रिबकेवर फार प्रेम जडले; त्यामुळे
आपल्या आईच्या मरणानंतर रिबकेमुळे त्याला समाधान
मिळाले.

## अब्राहामाचे कुटुंब

25 अब्राहामाने पुन्हा लग्न केले, त्याच्या दुसऱ्या
बायकोचे नांव कटूरा होते. 2कटूरेला जिम्रान,
यक्षान, मदान, मिद्यान, इश्बाक व शुह ही मुले झाली;
3यक्षानास शबा व ददान ही दोन मुले होती; अश्शूरी व
लऊमी लदूशी लोक हे ददानाचे वंशज होते; 4एफा, एफर,
हनोख, अबीदा व एल्दा हे मिद्यानाचे मुलगे होते; ही सर्व
मुले अब्राहामापासून कटूरेला झाली. 5-6मरण्यापूर्वी
अब्राहामाने आपल्या गुलाम स्त्रियांच्या मुलांसाठी काही
देणग्या दिल्या; त्याने या मुलांना इसहाकापासून वेगळे

करून दूर पूर्वेकडील देशात पाठवून दिले; नंतर त्याने
आपली सगळी मालमत्ता इसहाकाला दिली.
7अब्राहाम एकशे पंच्याहत्तर वर्षे जगला; 8त्याला
दीर्घकाळ सुखी व समाधानी जीवन लाभले; मग तो अशक्त
होऊन मरण पावला व आपल्या पूर्वजास जाऊन मिळाला;
9इसहाक व इश्माएल या त्याच्या मुलांनी त्याला सोहराचा
मुलगा एफ्रोन हित्ती याच्या मम्रेच्या पूर्वेकडे असलेल्या
शेतातील मकपेला गुहेत सारेच्या जवळ पुरले; 10अब्राहामाने
हित्ती लोकांकडून विकत घेतलेली हीच ती गुहा.
11अब्राहामाच्या मृत्यूनंतर परमेश्वराने त्याचा मुलगा
इसहाक याला आशीर्वादित केले आणि त्यानंतर ही इसहाक
बैर-लहाय-रोई येथेच राहू लागला.
12अब्राहामापासून सारेची दासी हागार हिला झालेल्या
इश्माएलाची ही वंशावळ; 13इश्माएलाच्या मुलांची नांवे
अशी. नबायाथ हा त्याचा पहिला मुलगा; नंतर केदार
जन्मला, मग अदबील, मिबसाम, 14मिश्मा, दुमा, मस्सा,
15हदद, तेमा, यतूर, नापीश व केदमा; 16अशी इश्माएलाच्या
पुत्रांची नांवे होती; प्रत्येक मुलाच्या परिवार गटाचा एक
तळ होता; पुढे त्याचेच एक गांव बनले; हे बारा पुत्र
आपापल्या लोकासहीत बारा वंशाचे संस्थापक सरदार
झाले. 17इश्माएल एकशें सदतीस वर्षे जगला नंतर तो
मेला आणि आपल्या पूर्वजांमध्ये गोळा झाला; 18त्याचे
वंशज सर्व वाळवंट भागात तळ देत राहिले; हा भाग
मिसर जवळील हवीलापासून शूरपर्यंत आहे आणि तो
शूरपासून पार अश्शूरपर्यंत जातो. अश्शूर इश्माएलाचे
वंशज अधूनमधून आपल्याच भाऊबंदावर हल्ला करीत
असत.

## इसहाकाचा वंश

19इसहाकाची घराणी अशी:-अब्राहामाला इसहाक
नांवाचा मुलगा होता. 20तो चाळीस वर्षांचा झाला तेव्हा
त्याने पदन अराम येथील अरामी बथुवेलाची कन्या व
लाबान याची बहीण रिबका इजशी लग्न केले.
21इसहाकाच्या बायकोला मूलबाळ होईना म्हणून
इसहाकाने रिबकेसाठी परमेश्वराची प्रार्थना केली;
परमेश्वराने इसहाकाची प्रार्थना ऐकली आणि रिबका
गर्भवती झाली.
22ती गरोदर असताना तिच्या उदरातील दोन मुले
एकमेकांशी झगडू लागली; तेव्हा परमेश्वराची प्रार्थना
करून ती म्हणाली, "परमेश्वरा, मला हे असे का होत
आहे?" 23परमेश्वर तिला म्हणाला, "दोन राष्टांचे राज्यकर्ते
तुझ्या उदरातून जन्म घेतील; एक मुलगा दुसऱ्यापेक्षा
बलवान होईल; वडील मुलगा धाकट्याची सेवा करील."
24मग रिबकेची प्रसूतीची वेळ आली तेव्हा तिला जुळी
मुले झाली; 25पहिला मुलगा तांबूस रंगाचा होता, त्याचे
अंग जणूकाय केसाळ झग्यासारखे होते; म्हणून त्याचे
नांव एसाव (म्हणजे केसाळ) असे ठेवले. 26पाठोपाठ दुसरा
मुलगा जन्मला तेव्हा त्याने एसावाची टाच हाताने घट्ट
धरली होती; म्हणून त्याचे नांव याकोब असे ठेवले.
रिबकेला ही जुळी मुले झाली तेव्हा इसाहक साठ वर्षांचा
होता.
27ही जुळी मुले वाढत जाऊन मोठी झाली तेव्हा एसाव
तरबेज शिकारी झाला; शेताशेतातून व रानावनातून
फिरण्याची त्याला आवड होती. पण याकोब शांत होता तो
त्याच्या तंबूत राहिला. 28एसाव इसहाकाचा आवडता होता;
त्याने शिकार करून आणलेल्या प्राण्यांचे मांस खाणे
इसहाकाला आवडत असे; परंतु याकोब रिबकेचा आवडता
होता.
29एके दिवशी एसाव शिकारीहून परत आला; तो फार
थकलेला होता व भुकेने अगदी गळून गेला होता. याकोब
मसुरीच्या लाल डाळीचे वरण शिजवीत होता. 30तेव्हा
एसाव याकोबाला म्हणाला, "मी भुकेने व्याकूळ झालो
आहे तर मला थोडे तांबड्या डाळीचे वरण खावयास घेऊ
दे;" यावरुन लोक त्याला अदोम (म्हणजे तांबडा) म्हणत.

31परंतु याकोब म्हणाला, "त्याबद्दल तू मला आजच
तुझा ज्येष्ठपणाचा हक्क दिला पाहिजेस."
32एसाव म्हणाला, "भुकेने माझा प्राण चालला आहे,
मी जर मेलो तर माझ्या बापाची मालमत्ता मला काय
उपयोगाची? तेव्हा मी माझा ज्येष्टपणाचा हक्क तुला देतो."
33परंतु याकोब म्हणाला, "तर प्रथम, तू तुझा ज्येष्ठपणाचा
वारसा हक्क मला देशील अशी शपथ माझ्याशी वाहा."
तेव्हा एसावाने तशी शपथ वाहिली; अशा रीतीने एसावाने
आपल्या बापाकडून मिळणाऱ्या सगव्व्या मालमत्तेचा व
ज्येष्टपणाचा आपला वारसा हक्क आपला धाकटा भाऊ
याकोब याला मोबदला म्हणून दिला. 34मग याकोबाने
त्याला भाकर व मसुरीच्या डाळीचे वरण दिले. एसावाने
ते खाल्ले व पाणी पिऊन झाल्यावर तो तेथून निघून
गेला. अशा रीतीने आपल्या बापाकडून मिळणाऱ्या
ज्येष्ठपणाच्या हक्काची एसावाने बेपर्वाईने कदर केली
नाहीं.

## इसहाक अबीमलेखाशी खोटे बोलतो

26 पूर्वी अब्राहामाच्या काळात मोठा दुष्काळ पडला
होता त्यासारखा दुसरा दुष्काळ आताही पडला;
तेव्हा इसहाक पलिष्ट्यांचा राजा अबीमलेख याजकडे गरार
नगरात गेला. 2परमेश्वराने त्याला दर्शन देऊन म्हटले,
"तू मिसर देशात जाऊ नकोस; तर मी सांगितलेल्या देशातच
राहा; 3तू तेथे राहा आणि मी तेथे तुझ्याबरोबर असेन; मी
तुला आशीर्वादित करीन; ही सर्व भूमी मी तुला आणि
तुझ्या वंशजांना देईन; तुझा बाप अब्राहाम याला मी जे जे
देण्याचे वचन दिले आहे ते सर्व मी पूर्ण करीन. 4मी
तुमची संतती आकाशातील ताऱ्यांइतकी करीन आणि हे
सर्व देश मी तुमच्या वंशजांस देईन; तुमच्या वंशजांमुळे

पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे मी आशीर्वादित करीन; 5कारण
तुझा बाप अब्राहाम याने माझ्या आज्ञा, नियम व कायदे
पाळले आणि मी सांगितलेल्या गोष्टी केल्या."

6म्हणून मग इसहाक गरार नगरातच वस्ती करून
राहिला. 7इसहाकाची बायको रिबका अतिशय देखणी
होती. तेथील लोकांनी रिबके विषयी इसहाकाला विचारले
तेव्हा, "ती माझी बहीण आहे," असे त्याने उत्तर दिले; "ती
माझी बायको आहे," असे सांगण्याची इसहाकाला भीती
वाटली कारण रिबका मिळविण्यासाठी कोणीही त्याचा
घात केला असता.

8बराच काळ तेथे राहिल्यावर एकदा खिडकीतून बाहेर
पाहताना इसहाक रिबकेशी प्रेमाचे खेळ खेळण्यात रंगल्याचे
अबीमलेखाला दिसले. 9तेव्हा त्याने इसहाकाला बोलावून
विचारले, "ही स्त्री तुझी बायको आहे ना? मग ती तुझी
बहीण आहे असे तू आम्हाला का सांगितलेस?"

इसहाक म्हणाला, "मला अशी भीती वाटली की तिला
मिळविण्याकरिता तुम्ही कोणीही मला मारुन टाकाल."

10अबीमलेख म्हणाला, "तू आम्हाशी असे वागून ही
वाईट गोष्ट केलीस; कारण आमच्या लोकातून कोणीही
तुझ्या बायको बरोबर निजला असता आणि त्यामुळे त्याच्या
माथी मोठे पाप लागून तो अपराधी ठरला असता."

11म्हणून अबीमलेखाने सर्व लोकांना हुकूम देऊन
बजावून ठेवले; तो म्हणाला, "या माणसाला किंवा याच्या
बायकोला कोणीही हात लावू नये आणी जर कोणी तसे
करील तर त्याला जिवे मारण्यात येईल."

## इसहाक श्रीमंत होतो

12इसहाकाने त्या देशात धान्य पेरले; आणि त्या वर्षी
त्याला भरमसाट पीक आले. परमेश्वराने त्याला भरपूर
आशीर्वाद दिला. 13इसहाकाने भरपूर संपत्ती मिळवली
आणि तो खूप श्रीमंत झाला; 14त्याच्याकडे शेरड्यामेंढ्यांचे
कळप व गुराढोरांची खिल्लारे पुष्कळ होती; तसेच त्याच्या
पदरी अनेक दासदासी होत्या; त्यावरुन पलिष्टी लोक
त्याचा हेवा करु लागले; 15म्हणून त्याचा बाप अब्राहाम
याच्या हयातीत पूर्वी त्याच्या नोकरांचाकरानी खणलेल्या
सर्व विहिरी पलिष्टी लोकांनी मातीने बुजवून सपाट केल्या;
16तेव्हा अबीमलेख इसहाकास म्हणाला, "आता तू आमचा
देश सोडून निघून जा कारण आमच्यापेक्षा तू अधिक
शक्तीमान झाला आहेस."

17म्हणून इसहाकाने तो देश सोडला व गराराच्या एका
लहान नदीजवळ त्याने तळ दिला आणि तेथेच त्याने
वस्ती केली. 18याच्या बरेच वर्षे आधी अब्राहामाने आपल्या
हयातीत बऱ्याच विहिरी खणल्या होत्या; परंतु अब्राहामाच्या
मरणानंतर त्या पलिष्टी लोकांनी मातीने बुजविल्या होत्या;
त्यामुळे इसहाकाने मागे जाऊन त्या परत खणून घेतल्या
त्या विहिरींना त्याच्या वडीलांनी दिलेली नांवेच पुन्हा त्याने
दिली. 19त्याच्या नोकरांनी एक विहीर नदीजवळ खणली;
तेव्हा त्या विहिरीत त्यांना एक जीवंत पाण्याचा झरा लागला;
20परंतु गरार खोऱ्यातील गुराख्यांनी इसहाकाच्या
गुराख्यांशी हुज्जत घातली; ते म्हणाले, "हे पाणी आमचे
आहे." त्या लोकांनी आपल्याशी त्या जागी भांडण केले
म्हणून इसहाकाने त्या विहिरीचे नांव 'एसेक' ठेवले.

21मग इसहाकाच्या नोकरांनी दुसरी विहीर खणली;
तेथील लोकही तिच्यावरुन भांडले म्हणून इसहाकाने त्या
विहिरीचे नांव 'सितना' ठेवले.

22इसहाक तेथुन पुढे गेला आणि त्याने आणखी एक
विहीर खणली; तेव्हा मात्र कोणीही भांडण करावयास
आले नाही म्हणून इसहाकाने तिचे नांव 'रहोबोथ' ठेवले.
इसहाक म्हणाला, "आता मात्र परमेश्वराने आम्हासाठी
जागा शोधून दिली आहे; आता या देशात आमची भरभराट
होईल; आणि आम्हाला यश मिळेल."

23तेथून इसहाक बैर-शेबा येथे गेला; 24त्याच रात्री
परमेश्वराने इसहाकाला दर्शन देऊन म्हटले, "इसहाका,
तुझा बाप अब्राहाम याचा देव मी आहे; तर भिऊ नकोस,
कारण मी तुझ्याबरोबर आहे; मी आपला सेवक अब्राहाम
याच्याकरिता तुला आशीर्वादित करीन." आणि तुझा वंश
खूप वाढवीन.

25तेव्हा इसहाकाने परमेश्वरा करिता तेथे एक वेदी
बांधली व परमेश्वराची उपासना व उपकार स्तुती केली;
व त्याने तेथे आपला तळ दिला; तेथेच त्याच्या नोकरांनी
एक विहीर खणली.

26त्यानंतर एके दिवशी अबीमलेख राजा आपला
सल्लागार अहुज्जाथ व आपला सेनापती पीकोल यांना
बरोबर घेऊन गरार येथून इसहाकाला भेटावयास आला.

27इसहाकाने विचारले, "तुम्ही या अगोदर माझ्याशी
मित्रासारखे वागला नाही, एवढेच नव्हे तर माझ्यावर जोर
करून तुम्ही मला तुमचा देश सोडणे भाग पाडले; मग
आता माझ्याकडे का आलात?"

28त्यांनी उत्तर दिले, "परमेश्वर तुझ्याबरोबर आहे हे
आम्हाला आता पूर्णपणे समजले आहे; आम्हाला असे
वाटते की आपण आता आपल्यामध्ये एक करार करावा;
तू आम्हाला वचन द्यावे अशी आमची इच्छा आहे; 29आम्ही
तुला त्रास दिला नाही त्याच प्रमाणे आता तुही आम्हाला
त्रास देणार नाही असा तू आमच्याशी करार करावा;
आम्ही तुला घालवून दिले हे खरे आहे, परंतु तुला आम्ही
शांतीने जाऊ दिले; परमेश्वराने तुला आशीर्वादित केले
आहे ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे."

30तेव्हा इसहाकाने त्यांना मेजवानी दिली; त्यांनी आनंदाने
भरपूर खाणे पिणे केले, 31दुसऱ्या दिवशी सकाळी त्या
प्रत्येकाने वचन दिले आणि शपथ वाहिली; नंतर ते लोक
शांतीने आपल्या घरी गेले.

32त्याच दिवशी इसहाकाच्या नोकरांनी येऊन त्यांनी
खणलेल्या विहिरी विषयी त्याला सांगितले. ते म्हणाले,
"त्या विहिरीत आम्हांस मुबलक पाणी लागले आहे;"

33तेव्हा इसहाकाने त्या विहिरीचे नांव 'शेबा' ठेवले; आणि
त्या नगराला अजूनही 'बैर शेबा' म्हटले जाते.

## एसावाच्या बायका

34एसाव चाळीस वर्षांचा झाल्यावर त्याने दोन हेथी
स्त्रियांशी लग्ने केली, एकीचे नांव होते यहूदीथ, ही बैरी
हित्तीची मुलगी, आणि दुसरीचे नांव होते बासमथ, ही
एलोन हित्तीची मुलगी; 35हेथी बायकांमुळे इसहाक व
रिबका दु:खाने अस्वस्थ झाले.

## वारसा हक्का संबंधी प्रश्न

27 इसहाक म्हातारा झाल्यावर त्याची दृष्टि मंद
झाली व त्याला स्पष्ट दिसेनासे झाले; एके दिवशी
त्याने आपला वडील मुलगा एसाव याला बोलावून म्हटले,
"एसावा, माझ्या मुला;"
आणि एसाव म्हणाला, "मी येथे आहे"
2इसहाक म्हणाला, "पाहा, मी आता म्हातारा झालो
आहे, कदाचित लवकरच मी मरेन; 3तेव्हा तू तुझे धनुष्य
व बाणांचा भाता घेऊन शिकारीस जा आणि माझ्यासाठी
शिकार घेऊन ये. 4आणि त्या शिकारीचे मला आवडणारे
रुचकर जेवण तयार करून माझ्याकडे आण म्हणजे मग
मी ते खाईन व मरण्यापूर्वी तुला आशीर्वाद देईन."
5त्याप्रमाणे एसाव शिकारीस गेला.

## याकोब इसहाकाला युक्तीने फसवतो

इसहाक एसावाला या गोष्टी सांगत असताना रिबका
ऐकत होती. 6ती आपला मुलगा याकोब याला म्हणाली,
"नीट लक्ष देऊन ऐक; तुझा बाप एसावाशी बोलताना मी
एकले; 7तुझा बाप म्हणाला, 'माझ्यासाठी शिकार घेऊन
ये आणि त्याचे रुचकर जेवण करून माझ्याकडे घेऊन ये
म्हणजे मी ते खाईन आणि मरण्यापूर्वी तुला आशीर्वाद
देईन.' 8तेव्हा ऐक, आणि मी सांगते ते कर; 9चटकन
आपल्या कळपाकडे जा आणि त्यातून दोन चांगले करडे
घेऊन मला आणून दे; मी त्यांचे तुझ्या बापाच्या आवडीचे
जेवण तयार करते, 10मग ते जेवण तुझ्या बापाकडे घेऊन
जा, म्हणजे मग ते खाऊन तुझा बाप मरण्यापूर्वी तुला
आशीर्वाद देईल."
11परंतु याकोब आपली आई रिबका हिला म्हणाला,
"माझा भाऊ केसाळ अंगाचा आहे; मी त्याच्या सारखा
केसाळ अंगाचा नाही; 12माझ्या बापाने जर मला चाचपून
पाहिले तर मग मी एसाव नाही हे त्यांना समजेल आणि
मग फसवणूक केल्याबद्दल माझा बाप मला आशीर्वादाच्या
ऐवजी शाप देईल."
13तेव्हा रिबका त्याला म्हणाली, "जर काही गडबड
झाली तर त्याबद्दलचा दोष मी माझ्या स्वत:वर घेईन, मी
सांगते ते कर; लवकर जाऊन दोन करडे माझ्याकडे
घेऊन ये."
14तेव्हा त्याने जाऊन ते करडे आईकडे आणले; मग
तिने त्यांचे त्याच्या बापाच्या विशेष आवडीचे रुचकर
जेवण तयार केले; 15नंतर तिने एसावाच्या आवडीचे कपडे
काढले आणि ते धाकट्या मुलाच्या म्हणजे याकोबाच्या
अंगावर चढवले; 16तसेच तिने करडांचे कातडे याकोबाच्या
हातावर व मानेवर लावले; 17मग तिने स्वत: इसहाकासाठी
तयार केलेले विशेष रुचकर जेवण आणून याकोबाला
दिले; 18ते घेऊन याकोब आपल्या बापाकडे गेला आणि
त्याने बापाला हाक मारली, "बाबा!"
त्याचा बाप म्हणाला, "काय मुला; तू कोण आहेस?"
19याकोब म्हणाला, "मी तुमचा वडील मुलगा एसाव
आहे; तुम्ही सांगतिल्याप्रमाणे सर्वकाही करून मी
तुमच्यासाठी जेवण घेऊन आलो आहे; तेव्हा आता उठून
जेवावयास बसा व तुमच्यासाठी शिकार करून आणलेले
मांस खा आणि मग मला आशीर्वाद द्या."
20परंतु इसहाक आपल्या मुलाला म्हणाला, "एवढया
लवकर तुला शिकार कशी काय मिळाली?"
याकोब म्हणाला, "कारण तुमच्या परमेश्वराने मला
लवकर शिकार मिळू दिली."
21मग इसहाक आपल्या मुलाला म्हणाला, "माझ्या मुला,
जरा माझ्याजवळ ये,म्हणजे मी तुला चाचपून पाहतो, मग
चाचपण्यावरुन तू खरेच एसाव आहेस का? ते मला समजेल"
22तेव्हा याकोब आपल्या बापाजवळ गेला; त्याला चाचपून
इसहाक म्हणाला, "तुझा आवाज तर याकोबाच्या
आवाजासारखा आहे परंतु तुझे हात मात्र एसावाच्या
हातासारखे केसाळ आहेत." 23तो याकोब आहे असे
इसहाकाला समजले नाही कारण त्याचे हात एसावाच्या
हाता सारखे केसाळ होते; म्हणून त्याने याकोबाला आशीर्वाद
दिला.
24तो म्हणाला, "तू खरेच माझा मुलगा एसावच आहेस
काय?"
याकोबाने उत्तर दिले, "होय बाबा, मी एसावच आहे."

## याकोबाला दिलेला आशीर्वाद

25मग इसहाक म्हणाला, "तू जेवण माझ्याकडे आण,
मी ते खाईन, मग तुला आशीर्वाद देईन." तेव्हा याकोबाने
आपल्या बापाला जेवण दिले; ते त्यानी खाल्ले, त्याने
त्यांना द्राक्षमद्यही दिले, आणि ते ते प्यायले.
26मग इसहाक त्याला म्हणाला, "माझ्या मुला जरा
माझ्याजवळ ये व मला मुका दे." 27मग याकोब आपल्या
बापाजवळ गेला आणि त्याने बापाचे चुंबन घेतले;
इसहाकाला एसावाच्या कपडयांचा वास आला; तेव्हा त्याने
त्याला आशीर्वाद दिला; तो म्हणाला,

परमेश्वराने आशीर्वाद दिलेल्या, पिकाने भरलेल्या
शेताच्या सुगंधासारखा माझ्या मुलाचा सुगंध दरवळत
आहे.

28परमेश्वर तुला भरपूर पाऊस देवो म्हणजे हंगामाच्या
वेळी तुझी सुपीक शेते तुला भरपूर धान्य व द्राक्षारस
देतील.
29सर्व लोक तुझी सेवा करोत; राष्ट्रे तुझ्यापुढे नमोत;
तू तुझ्या भावांवर राज्य करशील; ते तुला वंदन करतील
व तुझ्या आज्ञा पाळतील; तुला शाप देणारे शापित होतील
आणि तुला आशीर्वाद देणारे आशीर्वादित होतील."

## एसावाला दिलीला आशीर्वाद

30इसहाकाने याकोबाला आशीर्वाद देण्याचे संपविले.
त्यानंतर याकोब आपल्या बापापासून निघून गेला तोंच
एसाव शिकारीहून आला. 31त्याने आपल्या बापाच्या विशेष
आवडीचे रुचकर भोजन तयार केले, व तो ते घेऊन
आपल्या बापाकडे आला, तो बापाला म्हणाला, "बाबा,
उठा आणि तुमच्या मुलाने शिकार करून आणलेल्या
मृग मांसाचे हे रुचकर जेवण खा; आणि मग मला आशीर्वाद
द्या."
32परंतु इसहाक त्याला म्हणाला, "तू कोण आहेस?"
त्याने उत्तर दिले,"बाबा, मी तुमचा मुलगा, वडील मुलगा
एसाव आहे."
33मग इसहाक अतिशय अस्वस्थ झाला; तो म्हणाला,
"तर मग तू येण्याअगोदर ज्याने जेवण तयार करून मला
आणून दिले तो कोण होता? मी ते सर्व जेवण खाल्ले
आणि त्याला आशीर्वादही दिला. तो आशीर्वाद मागे घेण्यास
आता फार उशीर झाला आहे; तो त्याला मिळणार."
34एसावाने आपल्या बापाचे शब्द ऐकले तेव्हा त्याला
फार राग आला व तो खिन्न झाला; हंबरडा फोडून तो
बापाला म्हणाला, "तर मग मला ही आशीर्वाद द्या हो
बाबा!"
35इसहाक म्हणाला, "तुझ्या भावाने मला फसवले; तो
आला व तुझा आशीर्वाद घेऊन गेला."
36एसाव म्हणाला, "त्याचे नांव याकोब (म्हणजे
युक्तीबाज, किंवा युक्तीने हिरावून घेणारा) असे आहे ते
त्याला योग्यच आहे; त्याने मला दोनदा फसवले; आहे
त्याने माझा ज्येष्ठपणाचा हक्क हिरावून घेतला आणि
आता त्याने माझा आशीर्वादही काढून घेतला आहे." मग
एसाव पुढे म्हणाला, "बाबा माझ्याकरिता तुम्ही काही
आशीर्वाद राखून ठेवला आहे काय?"
37इसहाकाने उत्तर दिले, "नाही बाळा, आता फार उशीर
झाला आहे; मी याकोबाला तुझ्यावर धनीपणा करण्याचा
अधिकार दिला आहे, आणि तुझे बंधू तुझे सेवक होतील
असाही आशीर्वाद दिला आहे; त्याच प्रमाणे त्याला भरपूर
धान्य व द्राक्षारस मिळावा असाही आशीर्वाद दिला आहे;
तेव्हा माझ्या बाळा, आता तुला द्यावयाला काही राहिले
नाही."
38परंतु एसाव आपल्या बापाला विनवणी करीतच
राहिला; तो म्हणाला, "बाबा तुमच्याकडे एकच आशीर्वाद
होता काय? बाबा, माझे बाबा, मलाही आशीर्वाद द्या हो!"
असे म्हणत तो टाहो फोडून रडू लागला!
39तेव्हा इसहाक म्हणाला,

"तुला चांगल्या सुपीक जमिनीवर राहावयास मिळणार
नाही व तुला भरपूर पाऊसही मिळणार नाही;
40जगण्यासाठी तुला झगडावे लागेल; आणि तू तुझ्या
भावाचा गुलाम होशील, परंतु तू स्वतंत्र होण्यासाठी लढशील
आणि तुझ्या भावाचे नियंत्रण झुगारुन देशील व त्याच्या
पासून वेगळा होशील."

41त्यानंतर आपला आशीर्वाद हिरावून घेतल्याबद्दल
एसाव याकोबाचा द्वेष करु लागला; एसाव विचार करून
स्वत:शीच म्हणाला, "लवकरच माझा बाप मरुन जाईल
आणि बापाच्या वियोगामुळे मला दु:ख होईल; परंतु त्यानंतर
मात्र मी याकोबाला ठार मारीन."
42याकोबाला ठार मारण्याच्या बेताचा रिबकेला सुगावा
लागला; तेव्हा तिने त्याला बोलावून घेतले; मग ती त्याला
म्हणाली, "माझ्या बाळा, ऐक, तुझा भाऊ तुला ठार
मारण्याचा बेत करीत आहे; 43तेव्हा बाळा, मी सांगते ते
कर; हारान प्रांतात माझा भाऊ लाबान राहत आहे,
त्याच्याकडे जाऊन तू लपून राहा. 44तुझ्या भावाचा राग
शांत होईपर्यंत थोडा काळ त्याजकडे राहा. 45तू त्याला
काय केलेस हे थोडया काळाने तो विसरुन जाईल; मग
सेवक पाठवून मी तुला मागे बोलावून घेईन एकाच दिवशी
मी माझ्या दोन्हीही मुलांना अंतरावे असे न होवो."
46मग रिबका इसहाकाला म्हणाली, "तुमचा मुलगा
एसाव याने हेथी स्त्रीयांशी लग्न केले, मला त्यांच्यामुळे
जीव नकोसा झाला आहे, कारण त्या काही आपल्यापैकी
नाहीत; जर याकोबाने ही यांच्या सारख्या स्थानिक स्त्रीयांशीं
लग्न केले तर मात्र मी मेलेलीच बरी."

## याकोब स्वत:साठी बायको शोधतो

28 नंतर इसहाकाने याकोबाला बोलावून त्याला
आशीर्वाद दिला; नंतर त्याने त्याला बजावून
आज्ञा दिली; तो म्हणाला, "तू कनानी मुलीपैकी कोणत्याच
मुलीशी लग्न करता कामा नये; 2तेव्हा तू आता येथून
नीघ, व पदन अरामात बथुवेल तुझ्या आईचे वडील
बथुवेल याच्या कडे जा. तुझ्या आईचा भाऊ लाबान तेथे
राहातो आणि त्याच्या मुलीपैकीच एकीशी लग्न कर. 3मी
सर्वसमर्थ देव* याची प्रार्थना करतो की त्याने तुला
आशीर्वादित करावे; आणि तुला खूप मुले द्यावीत तू महान
राष्ट्राचा पिता व्हावे अशी प्रार्थना करतो. 4तसेच
परमेश्वराने अब्राहामाला व त्याच्या संततीला जसा
आशीर्वाद दिला तसाच आशीर्वाद त्याने तुला व तुझ्या

---

**सर्वसमर्थ देव** म्हणजे अक्षरश: "एल शद्दाय."

संततीलाही द्यावा अशी मी प्रार्थना करतो; आणि मी आणखी
अशी ही प्रार्थना करतो की जो हा देश परमेश्वराने
अब्राहामाला दिला व ज्यात तू राहातोस त्या देशाचा त्याने
तुला मालक करावे."

5अशी रीतीने इसहाकाने याकोबाला पदन अराम येथे
पाठवले; तेव्हा याकोब पदन अराम येथील अरामी
बथुवेलाचा मुलगा व आपली आई रिबका हिचा भाऊ,
लाबान याच्याकडे गेला.

6एसावाला कळले की आपला बाप इसहाक याने
याकोबाला आपला आशीर्वाद दिला, व याकोबाने
कोणत्याच कनानी स्त्रिशी लग्न करु नये अशी आज्ञा
दिली, तसेच बायको शोधण्यासाठी त्याने याकोबाला पदन
अराम येथे पाठवून दिले; 7आणि याकोबही आपल्या
आईबापाची आज्ञा मानून पदन अरामास गेला ह्या ही
गोष्टी एसावास कळाल्या; 8या सर्व गोष्टींवरून आपल्या
बापाला आपल्या मुलांनी कोणत्याच कनानी मुलीशी लग्न
करु नये असे वाटते हे एसावाला उमगले 9एसावाला
अगोदरच दोन कनानी बायका होत्या, म्हणून तो
इश्माएलाकडे गेला आणि त्याने आणखी एका स्त्रीशी
म्हणजे इश्माएलाची मुलगी महलथ हिच्याशी लग्न केले,
इश्माएल अब्राहामाचा मुलगा होता आणि महलथ
नबायोथाची बहीण.

## परमेश्वराचे निवासस्थान-बेथेल

10याकोबाने बैर-शेबा सोडले व तो हारानाला गेला;
11प्रवास करताना सूर्य मावळला म्हणून त्याने एके जागी
रात्रीं मुक्काम केला; तेथे रात्रीं झोंपताना त्याला एक
धोंडा दिसला तो उशास घेऊन तो रात्रीं तेथेच झोंपला;
12तेव्हा त्याला एक स्वप्न पडले; स्वप्नात एक उंच शिडी
आहे, तिचे एक टोक जमिनीवर व दुसरे टोक वर स्वर्गापर्यंत
पाहोचलेले आहे असे त्याने पाहिले; 13याकोबाने पाहिले
की देवदूत शिडीवर चढत व उतरत आहेत. शिडीवरती
परमेश्वर उभा असल्याचे त्याला दिसले; परमेश्वर त्याला
म्हणाला, "तुझे आजोबा अब्राहाम व तुझे वडील इसहाक
यांचा मी परमेश्वर व देव आहे; तू ज्या भूमिवर झोंपला
आहेस ती भूमि म्हणजे तो देश मी तुला व तुझ्या वंशजांना
देईन

14तसेच मी तुला भरपूर वंशज देईन; तुझे वंशज
पृथ्वीवरील मातीच्या कणाइतके अगणित होतील; ते उत्तर
व दक्षिण, पूर्व व पश्चिम या दिशांकडील देशात पसरतील;
तुझ्यामुळे व तुझ्या वंशजांमुळे पृथ्वीवरील सर्व लोक
आशीर्वादित होतील.

15"मी सतत तुझ्याबरोबर आहे आणि तू ज्या ज्या ठिकाणी
जाशील त्या प्रत्येक ठिकाणी मी तुझे रक्षण करीन आणी
तुला या देशात परत आणीन; मी हे माझे वचन पूर्ण
करीपर्यंत तुला अंतर देणार नाही."

16मग याकोब झोपेतून जागा झाला व म्हणाला, "खरोखर
या ठिकाणी परमेश्वर आहे हे मला समजले आहे; परंतु
झोंपून उठेपर्यंत ते मला कळले नाही."

17याकोबाला भीती वाटली, तो म्हणाला, "हे फार महान
ठिकाण आहे, हे देवाचे निवासस्थान, त्याचे घर व स्वर्गाचे
दार आहे."

18याकोब पहाटे लवकर उठला; त्याने उशास घेतलेला
धोंडा एका टोकावर उभा करून जमिनीत रोवला; मग
त्याने त्यावर तेल ओतले. अशा प्रकारे त्याने त्या धोंड्याचे
देवाचे स्मारक केले. 19त्या ठिकाणाचे नांव लूज होते
परंतु याकोबाने त्याचे नांव बेथेल ठेवले.

20मग याकोबाने शपथ वाहून नवस केला; तो म्हणाला,
"जर देव माझ्याबरोबर राहील; आणि जेथे जेथे मी जाईन
तेथे तो माझे रक्षण करील; आणि जर तो मला खावावयास
अन्न व ल्यावयास वस्त्र पुरवील; 21आणि जर मी शांतीने
माझ्या बापाच्या घरी परत येईन जर देव या सर्वगोष्टी
करील तर मग तो माझा परमेश्वर होईल;

22मी हा धोंडा या ठिकाणी स्मारकस्तंभ म्हणून उभा
करून ठेवतो, त्यावरुन परमेश्वराकरिता हे पवित्र ठिकाण
आहे असे दिसेल आणि देवाने मला दिलेल्या सर्वाचा
दशांश म्हणजे दहावा भाग मी देवाला अर्पण करीन."

## याकोब राहेलला भेटतो

29 नंतर याकोबाने आपला प्रवास पुढे चालून ठेवला.
तो पूर्वेकडील प्रदेशात गेला. 2त्याने समोर पाहिले
तेव्हा त्याला एका शेतात एक विहीर दिसली; त्या विहिरी
जवळ शेरडामेंढराचे तीन कळप बसलेले होते; ही विहीर
त्यांची पाणी पिण्याची जागा होती.या विहिरीचे तोंड एका
मोठया दगडाने झाकलेले होते; 3जेव्हा सर्व कळप तेथे
जमत तेव्हा मेंढपाळ विहिरीच्या तोंडावरील मोठा दगड
ढकलून बाजूला सारीत मग सर्व कळपांचे पाणी पिऊन
झाल्यावर ते तो दगड परत त्याच जागेवर ठेवीत.

4याकोब त्या मेंढपाळांना म्हणाला, "माझ्या बंधूंनो, तुम्ही
कोठून आलात?"

ते म्हणाले, "आम्ही हारानाहून आलो आहोत."

5मग याकोब म्हणाला, "नाहोराचा मुलगा लाबान याला
तुम्ही ओळखता का?"

ते म्हणाले, "होय, आम्ही त्याला ओळखतो."

6याकोबाने त्यांना विचारले, "तो बरा आहे काय?"

त्यांनी उत्तर दिले, "तो बरा व खुशाल आहे आणि
त्याचे सर्वकाही चांगले आहे. ती पाहा त्याची मुलगी राहेल,
त्याची मेंढरे घेऊन इकडे येत आहे."

7याकोब म्हणाला, "हे पाहा, अद्याप दिवस बराच आहे
आणि सूर्य मावळण्यास अजून बराच वेळ आहे; तसेच
रात्रीसाठी कळपांना गोळा करण्यास अजून बराच अवकाश
आहे; तेव्हा त्यांना पाणी पाजा, आणि चरण्यासाठी त्यांना
परत शेतात जाऊद्या."

8परंतु ते म्हणाले, “आम्हाला तसे करता येत नाही,
कारण सर्व कळप एकत्र आल्यावरच आम्ही विहिरीवरील
दगड बाजूला सारतो व मग सर्व कळपांना पाणी पाजतो.”

9याकोब मेंढपाळांशी बोलत असतानाच राहेल आपल्या
बापाची मेंढरे घेऊन आली; (कारण शेरडा मेंढराना
चारण्याचे व त्यांची निगा राखण्याचे काम ती करीत
असे.) 10राहेल ही याकोबाच्या मामाची म्हणजेच याकोबाची
आई रिबका हिचा भाऊ लाबान याची मुलगी होती.
याकोबाने जेव्हा राहेलीस पाहिले तेव्हा त्याने जाऊन
विहिरीच्या तोंडावरील दगड लोटला आणि आपल्या
मामाच्या मेंढरास पाणी पाजले. 11नंतर त्याने राहेलीचे
चुंबन घेतले आणि तो खूप रडला; 12आपण तिच्या बापाच्या
आप्तातील असल्याचे म्हणजे तिच्या बापाची धाकटी बहीण
रिबका हिचा मुलगा असल्याचे त्याने राहेलीस सांगितले;
तेव्हा राहेल धावत घरी गेली आणि या गोष्टी तिने आपल्या
बापाला सांगितल्या.

13आपला भाचा याकोब आल्याचे वर्तमान लाबानाने
ऐकले तेव्हा लाबान धावत त्याला भेटावयास गेला; त्याने
याकोबाला मिठी मारली व त्याची चुंबने घेतली आणि
त्याला आपल्या घरी आणले;मग याकाबाने घडलेल्या सर्व
गोष्टी आपला मामा लाबान याला सांगितल्या.

14मग लाबान म्हणाला, “हे आश्चर्य आहे की आपले
रक्ताचे नाते आहे;” तेव्हा त्यानंतर याकोब एक महिनाभर
लाबानापाशी राहिला.

## याकोब फसवला जातो

15एके दिवशी लाबान याकोबाला म्हणाला, “तू माझ्या
घरी, काही मोबदला न घेता गुलामासारखे काम करीत
राहावेस हे योग्य नाही; तू माझा नातलग आहेस; तर तुला
मी काय वेतन द्यावे ते सांग.”

16लाबानाला दोन मुली होत्या; थोरल्या मुलीचे नांव
होते लेआ आणि धाकटीचे राहेल.

17लेआचे डोळे अधू आणि निस्तेज होते. परंतु राहेल
सुडौल बांध्याची व दिसावयास सुंदर होती; 18याकोबाचे
राहेलीवर प्रेम जडले होते; म्हणून याकोब लाबानमामास
म्हणाला, “तुम्ही मला तुमच्या धाकट्या मुलीशी राहेलीशी
लग्न करण्याची परवानगी देणार असाल तर मी तुमच्या
घरी सात वर्षे तुमची सेवाचाकरी करीन.”

19लाबान म्हणाला, “परक्या कोणापेक्षा तिने तुझ्याशी
लग्न करावे हे तिच्यासाठी चांगले आहे; म्हणून तू आता
माझ्यापाशी राहा.” 20म्हणून मग याकोब आपल्या
मामापाशी राहिला आणि त्याने सात वर्षे त्याची सेवाचाकरी
केली; परंतु राहेलीवरील गाढ प्रेमामुळे ती वर्षे त्याला
फार थोड्या दिवसासारखी वाटली.

21सात वर्षानंतर याकोब लाबानाला म्हणाला, “आता
मला राहेल द्या म्हणजे मी तिच्याशी लग्न करीन कारण
तुमच्या सेवा चाकरीचा माझा वेळ संपलेला आहे.”

22तेव्हा लाबानाने तेथील सर्वलोकांस मेजवानी दिली;
23त्या रात्री लाबानाने आपली थोरली मुलगी लेआ
याकोबाच्या स्वाधीन केली; त्या रात्री याकोब व त्याची
बायको लेआ यांनी एकत्र निजून विवाहाच्या जीवनाचा
आनंद उपभोगला; 24(लाबानाने आपली दासी जिल्पा
आपल्या मुलीची दासी म्हणून तिला दिली.) 25दुसऱ्या
दिवशी सकाळी याकोबाने लेआला पाहिले तेव्हा आपण
रात्री लेआबरोबर एकत्र निजलो असे त्याला समजले;
मग याकोब लाबानाला म्हणाला, “तुम्ही मला फसवले;
मला राहेलीशी लग्न करता यावे म्हणून मी अतिशय
काबाडकष्ट केले; तुम्ही मला असे का फसवले?”

26लाबान म्हणाला, “आमच्या देशातील रीतीरिवाजा
प्रमाणे आधी थोरल्या मुलीचे लग्न झाल्या शिवाय आम्ही
धाकटया मुलीचे लग्न करून देत नाहीं; 27तरी परंतु हा
लग्न विधी सप्ताह सोहळा साजरा करण्यात सहभागी हो
म्हणजे मग मी तुला लग्न करण्यासाठी राहेलही देतो;
परंतु त्यासाठी तू आणखी सात वर्षे माझी सेवाचाकरी
केली पाहिजेस.”

28त्याप्रमाणे याकोबाने आठवडाभर तो सर्व लग्न सोहळा
पूर्ण केला; मग लाबानाने त्याची धाकटी कन्या राहेल
त्याला बायको करून दिली; 29(लाबानाने आपली दासी
बिल्हा, आपली कन्या राहेल हिला दासी म्हणून दिली.)
30तेव्हा मग याकोब राहेलीशीही एकत्र निजला; आणि
याकोबाचे लेआपेक्षा राहेलीवर अधिक प्रेम होते, म्हणून
लाबानाकडे याकोबाने राहेलीसाठी आणखी सात वर्षे सेवा
चाकरी केली.

## याकोबाची वंशावळ वाढली

31परमेश्वराने पाहिले की याकोबाचे लेआपेक्षा
राहेलीवर अधिक प्रेम आहे, म्हणून परमेश्वराने लेआला
मुले होऊ दिली परंतु राहेलीस मूलबाळ दिले नाही;

32लेआला मुलगा झाला; तिने त्याचे नांव रऊबेन ठेवले;
कारण ती म्हणाली, “परमेश्वराने माझे दुःख पाहिले आहे;
कारण माझा नवरा माझ्यावर प्रेम करीत नाही; परंतु
आता कदाचित तो माझ्यावर प्रेम करील.”

33लेआ पुन्हा गरोदर राहिली आणि तिला आणखी एक
मुलगा झाला; ह्या मुलाचे नांव तिने शिमोन ठेवले, कारण
ती म्हणाली, “माझ्या नवऱ्याचे माझ्यावर प्रेम नाही हे
परमेश्वराने ऐकले आहे म्हणून त्याने मला हा मुलगा
दिला आहे.”

34लेआ आणखी गर्भवती झाली व तिला मुलगा झाला;
तेव्हा तिने त्याचे नांव लेवी असे ठेवले; कारण ती म्हणाली,
“आता मात्र माझा नवरा माझ्यावर नक्की प्रेम करील
कारण मी त्यांना तीन मुलगे दिले आहेत.”

35त्यानंतर लेआला आणखी एक मुलगा झाला; तिने
त्याचे नांव यहूदा ठेवले; कारण ती म्हणाली, “आता मी
परमेश्वराची स्तुति करीन.” नंतर तिचे जनन थांबले.

30 याकोबापासून आपल्याला मुले होत नाहीत हे
पाहिल्यावर राहेल आपली बहीण लेआ हिचा
मत्सर करु लागली; तेव्हा राहेल याकोबाला म्हणाली,
“मला मुले देणारी करा नाही तर मी मरेन.”
2याकोब राहेलीवर रागावला; तो म्हणाला, “तुला पुत्रवती
करायला मी काय देव आहे? देवानेच तुला मुले होऊ
नयेत असे करून ठेवले आहे.”
3मग राहेल म्हणाली, “तुम्ही माझी दासी बिल्हा उपपत्नी
म्हणून घ्या; तुम्ही तिच्याजवळ निजा; मग ती माझ्या
मांडीवर बाळंत होईल व तिजपासून मला मूल मिळेल;
तिच्यामुळे मग मलाही मुलगा होईल आणि मी आई होईन.”
4तेव्हा राहेलीने बिल्हा आपला नवरा याकोब ह्याला
उपपत्नी म्हणून दिली; आणि याकोब तिजपाशी गेला;
5तेव्हा बिल्हा याकोबापासून गरोदर राहिली व तिला मुलगा
झाला. 6राहेल म्हणाली, “देवाने माझी प्रार्थना ऐकली
आहे. त्याने मला मुलगा देण्याचे ठरवले;” म्हणून तिने
त्याचे नांव दान ठेवले.
7बिल्हा पुन्हा गर्भवती झाली व तिला याकोबापासून
दुसरा मुलगा झाला; 8राहेल म्हणाली, “मी माझ्या बहिणीशी
जिद्दीने स्पर्धा करून कठीन लढा दिला आहे व जय
मिळवला आहे.” तेव्हा तिने त्याचे नांव नफताली ठेवले.
9लेआने असे पाहिले की, आता आपल्याला आणखी मुले
होणार नाहीत; तेव्हा तिने आपली दासी जिल्पा हीला
आपला नवरा याकोब याला उपपत्नी म्हणून दिली. 10नंतर
जिल्पाला मुलगा झाला; 11तेव्हा लेआ म्हणाली, “मी
कितीतरी भाग्यवान आहे;” तेव्हा तिने त्याचे नांव गाद
ठेवले. 12जिल्पाला आणखी एक मुलगा झाला; 13तेव्हा
लेआ म्हणाली, “आता मला खूप आनंद झाला आहे!
इतर स्त्रिया मला धन्य म्हणतील” मग तिने त्याचे नांव
आशेर ठेवले.
14गव्हाच्या हंगामाच्या दिवसात रुबेन शेतात गेला असता
त्याला काही विशेष प्रकारची फुले सांपडली* त्याने ती
फुले आपली आई लेआ हिच्याकडे आणून दिली; परंतु
राहेल लेआला म्हणाली, “तुझा मुलगा रुबेन याने
आणलेल्या पुत्रदात्रीच्या फुलातून काही फुले कृपा करून
मला दे.”
15लेआने उत्तर दिले, “अगोदरच तू माझा नवरा घेतलास
तर घेतलास, आणि आता माझ्या मुलाने आणलेली
पुत्रदात्रीची फुलेही तू माझ्याकडून घेण्याचा प्रयत्न करतेस
काय?”
परंतु राहेल म्हणाली, “जर तुझ्या मुलाने आणलेली
पुत्रदात्रीची फुले मला देशील तर त्यांच्या मोबदल्यात आज
रात्री तुला याकोबापाशी निजावयाला मिळेल.”

16याकोब शेतावरुन त्या रात्री घरी आला; लेआने त्याला
पाहिले व ती त्याला भेटावयास बाहेर गेली; व ती म्हणाली,
“आज रात्री तुम्ही माझ्याजवळ निजणार आहात कारण
माझ्या मुलाने आणलेली पुत्रदात्रीची फुले राहेलीस देऊन
मी त्यांचा मोबदला भरुन दिला आहे.” तेव्हा याकोब त्या
रात्रीं लेआपाशी निजला.
17तेव्हा देवाने लेआची कूस फलदायी केली व ती
पुन्हा गर्भवती होऊन तिला पाचवा मुलगा झाला; 18लेआ
म्हणाली, “देवाने माझ्या कृत्याचे मला बक्षीस दिले आहे
कारण मी माझी दासी माझ्या नवऱ्याला दिली.” तेव्हा
लेआने आपल्या मुलाचे नांव इस्साखार ठेवले.
19लेआ पुन्हा गरोदर राहिली व तिला सहावा मुलगा
झाला. 20ती म्हणाली, “देवाने मला उत्तम देणगी दिली
आहे; आता मात्र माझा नवरा प्रेमाने माझा स्वीकार करील
कारण मी त्याला सहा मुलगे दिले आहेत;” म्हणून लेआने
त्याचे नांव जबुलून ठेवले. 21त्यानंतर लेआला एक मुलगी
झाली; तिने तिचे नांव दीना ठेवले
22मग देवाने राहेलीची प्रार्थना ऐकली; देवाने तिला
मुल होणे शक्य केले; 23म्हणून राहेल गर्भवती झाली व
तिला मुलगा झाला; 24राहेल म्हणाली, “देवाने माझी
लाजीरवाणी स्थिती दूर करून मला मुलगा दिला आहे;”
म्हणून राहेलीने त्याचे नांव योसेफ ठेवले.

## याकोब लाबानास फसवितो

25मग योसेफाच्या जन्मानंतर याकोब लाबानाला
म्हणाला, “आता मला माझ्या स्वत:च्या घरी जाऊ द्या.
26मला माझ्या बायका व माझी मुले द्या; मी कष्टाने
तुमची सेवाचाकरी करून ती मिळवली आहेस, मी चौदा
वर्षे तुमची चांगली सेवा केली आहे हे तुम्ही जाणता.”
27लाबान म्हणाला, “थांब, तुझी इच्छा असेल तर मला
थोडे बोलू दे. परमेश्वराने केवळ तुझ्यामुळे मला
आशीर्वादित केले आहे हे मी जाणतो. 28तर मी तुला
काय वेतन देऊ हे मला सांग म्हणजे ते मी तुला देईन.”
29याकोबाने उत्तर दिले, “मी अतिशय कष्टाने तुमची
सेवाचाकरी केली आहे हे तुम्ही जाणता; आजपर्यंत मी
काळजी घेतल्यामुळे तुमचे कळप वाढले आहेत व ते
चांगले पोसलेले आहेत; 30मी जेव्हा तुमच्याकडे आलो
तेव्हा तुम्हापाशी फार थोडी शेरडेमेंढरे होती; परंतु आता
तुम्हापाशी किती तरी कळप आहेत; ज्या ज्या वेळी मी
तुमच्यासाठी काही केले त्या प्रत्येक वेळी परमेश्वराने
तुम्हाला आशीर्वादित केले आहे. आता मात्र मी स्वत:साठी
काही करण्याची व माझ्यासाठी घर बांधण्याची वेळ आली
आहे. 31लाबानेने विचारले, “तर मग मी तुला काय देऊ?”
याकोबाने उत्तर दिले, “तुम्ही मला काही द्यावे असे
मला नको आहे. मला फक्त मी केलेल्या सेवाचाकरीचा
मोबदला पाहिजे; एवढी एकच गोष्ट करा, म्हणजे मग मी
पूर्वीप्रमाणे आपले कळप चारीन व सांभाळीन; 32परंतु

**सांपडली** ही फुले खाल्ल्यावर वांझ स्त्रियांना मुले होतात अशी लोकांची समजूत होती; त्यांनाच दुसरे नांव “प्रेमाचे रोपटे” किंवा “पुत्रदात्री.”

आजच मला तुमच्या सगळ्या कळपात जाऊ द्या म्हणजे
त्यांच्यात फिरून त्यातील मेंढरापैकी ठिबकेदार व पट्टे
असलेली मेंढरे व बकरे आणि काळ्या रंगाची मेंढरे
तसेच शेरडांपैकी ठिबकेदार व पट्टे असलेली शेरडे मी
बाजूला करीन; हेच माझे वेतन असेल. 33त्यानंतर कधीही
तुम्ही पाहाल तर मी प्रामाणिक आहे किंवा नाही हे सहज
तुम्हाला दिसेल, तुम्ही कधीही येवून माझे कळप पाहू
शकता; जर त्यात तुम्हाला ठिबकेदार व पट्टे नसलेली
शेरडे व काळी नसलेली मेंढरे आढळली तर ती मी
चोरली असे तुम्हाला समजेल."

34लाबानाने उत्तर दिले, "ठीक आहे, हे मी मान्य करतो;
तू म्हणतोस तसे आपण करु;" 35परंतु त्याच दिवशी
लाबानाने ठिबकेदार व बांडे एडके तसेच ठिबकेदार व
बांड्या शेव्ळ्या आणि मेंढरापैकी काळी मेंढरे कळपातून
काढून लपवली; गुपचूप ती आपल्या मुलांच्या हवाली
केली व त्यांवर लक्ष ठेवून त्यांना सांभाळण्यास सांगितले;
36तेव्हा त्याच्या मुलांनी ती ठिबकेदार व पट्टे असलेली
सर्व जनावरे घेऊन मजला करीत तीन दिवसांच्या
अंतरावरील दुसऱ्या जागी नेली; याकोब मात्र मागे राहून
उरलेली म्हणजे ठिबके पट्टे व काळी नसलेली जनावरे
सांभाळीत राहिला.

37मग याकोबाने हिवर व बदाम या झाडांच्या हिरव्या
कोवळ्या फांद्या कापून घेतल्या; त्याने त्यांच्या साली,
त्यांचे आतील पांढरे पट्टे दिसेपर्यंत त्या सोलून काढल्या;
38त्याने त्या पांढऱ्या काव्ळ्या किंवा पांढरे फोक कळपांच्या
समोर पाणी पिण्याच्या पन्हाळात व कुंड्यात ठेवले जेव्हा
शेव्ळ्या मेंढ्या पाणी पिण्यास तेथे येत तेव्हा त्यांच्यावर
त्याचे नर उडत व त्या फळत 39तेव्हा त्यांना ठिबकेदार,
पांढऱ्या पट्ट्यांची किंवा काळी करडे कोकरे होत असत.
40याकोब कळपातील इतर जनावरातून ठिबकेदार,
पांढऱ्या पट्ट्यांची व काळी करडे कोंकरे लाबानाच्या
कळपापासून वेगळी करून ठेवत असे. 41जेव्हा जेव्हा
कळपातील चांगली पोसलेली जनावरे फळत असत तेव्हा
तेव्हा याकोब त्या पांढऱ्या फांद्या त्यांच्या नजरे समोर ठेवी
आणि मग ती जनावरे त्या फांद्या समोर फळत; 42परंतु
जेव्हा दुर्बल, अशक्त जनावरे फळत तेव्हा याकोब त्यांच्या
नजरे समोर त्या झाडांच्या फांद्या ठेवत नसे; म्हणून मग
अशक्त नरमाद्यापासून झालेली करडी कोंकरे लाबानाची
होत; आणि सशक्त नरमाद्यापासून झालेली करडी कोंकरे
लाबानाची होत; 43अशा प्रकारे याकोब अतिशय श्रीमंत
झाला; त्याच्यापाशी शेरडेमेंढरे, उंट, गाढवे व दासदासी हे
सर्व भरपूर होते.

### निघण्याची वेळ–याकोब पळून जातो

31 एके दिवशी लाबानाचे मुलगे आपसात बोलत
असताना याकोबाने ऐकले; ते म्हणाले, "आपल्या
बापाच्या मालकीचे सर्वकाही याकोबाने घेतले आहे आणि
ती धनदौलत घेतल्यामुळे तो श्रीमंत झाला आहे." 2तेव्हा
लाबान पूर्वी आपल्याशी जसा मित्राप्रमाणे प्रेमाने वागत
आला होत तसा तो आता वागत नसल्याचे याकोबाच्या
लक्षात आले; 3परमेश्वर याकोबाला म्हणाला, "तुझे पूर्वज
ज्या देशात राहिले त्या तुझ्या देशास तू परत जा, आणि मी
तुझ्याबरोबर असेन."

4तेव्हा याकोबाने राहेल व लेआ यांना, तो आपले
शेरडामेंढरांचे कळप राखीत होता तो तेथे येऊन त्याला
भेटण्यास सांगितले; 5याकोब, राहेल व लेआ यांना म्हणाला,
"तुमचा बाप माझ्यावर रागावला असल्याचे मला समजले
आहे; पूर्वी तुमचा बाप माझ्याशी नेहमी मित्राप्रमाणे फार
प्रेमाने वागत होता, परंतु आता ते तसे वागत नाहीत; परंतु
माझ्या वडिलांचा देव माझ्याबरोबर आहे. 6तुम्हां दोघींनाही
माहीत आहे की जेवढे कष्ट घेणे मला शक्य होते तेवढे
कष्ट घेऊन मी तुमच्या बापासाठी काम केलेले आहे;
7परंतु तुमच्या बापाने मला फसवले; त्यानी माझ्या वेतनात
दहा वेळा बदल केलेला आहे; परंतु या सर्व काळात
लाबानाच्या फसवणूकीच्या कारवाया पासून देवाने माझे
रक्षण केले.

8"एकदा लाबान म्हणाला, 'सर्व ठिबकेदार शेव्ळ्या तू
ठेवून घे, त्या तुला वेतनादाखल होतील,' त्याने असे
म्हटल्यानंतर सर्व शेव्ळ्यांना ठिबकेदार करडे होऊ लागली;
तेव्हा अर्थात् ती सर्व माझी झाली; परंतु मग लाबान
म्हणाला, 'तू बांड्या बकऱ्या घे; त्या तुला वेतना दाखल
होतील;' त्याने असे म्हटल्यानंतर सर्व बकऱ्यांना बांडी
करडे होऊ लागली, 9तेव्हा अशा रीतीने देवाने तुमच्या
बापाच्या कळपातून जनावरे काढून घेऊन ती मला दिलेली
आहेत.

10"जेव्हा माद्यावर नर उडत होते त्या ऋतूत मला
स्वप्न पडले त्यात मी असे पाहिले की फक्त ठिबकेदार
व बांडे असलेलेच नर उडत होते; 11देवदूत माझ्याशी
बोलला; त्याने मला, 'याकोब' म्हणून हाक मारली.

मी उत्तर दिले, 'काय आज्ञा आहे?'

12"देवदूत म्हणाला, 'पाहा, फक्त ठिबकेदार व बांडे
असलेलेच नर माद्यांवर उडत आहेत! हे मी घडवून आणीत
आहे. लाबान तुझ्याशी अन्यायाच्या गोष्टी कशा करीत
आहे ते मी पाहिलेले आहे; म्हणूनच मी हे करीत आहे
की त्यामुळे तुला नवीन जन्मलेली सर्व करडे मिळावीत.
13बेथेलमध्ये जो मी तुझ्याकडे आला तो मी देव; आहे;
त्या ठिकाणी तू वेदी बांधलीस, तिच्यावर तेल ओतलेस
आणि तू मला वचन दिलेस आता तू ज्या देशात जन्मलास
त्या आपल्या मायदेशी परत जाण्यास तयार असावेस अशी
माझी इच्छा आहे.'"

14राहेल व लेआ यांनी याकोबाला उत्तर दिले, "आमच्या
बापाच्या मरणानंतर आम्हास वारसा म्हणून मिळण्याकरिता
त्यांच्याजवळ काही नाही; 15आम्ही परक्या असल्यासारखे
त्यानी आम्हाला वागवले त्याने आम्हांस तुम्हाला विकून

टाकले आहे आणि आमचे सर्व पैसे खर्च करून टाकले.
16देवाने ही सर्व संपत्ती आमच्या बापाकडून घेतली आणि
आता ती आपली व आपल्या मुळाबाळांची संपत्ती झाली
आहे; तेव्हा देवाने तुम्हास जे करावयास सांगितले आहे ते
करा!"

17तेव्हा याकोबाने आपल्या प्रवासाची तयारी केली;
त्याने आपल्या बायकामुलांना उंटावर बसवले; 18नंतर
आपला बाप राहात होता त्या कनान देशास परत जाण्यासाठी
त्यांनी प्रवास सुरु केला; याकोबाच्या मालकीच्या जनावरांचे
कळप त्यांच्यापुढे चालले, पदन अराम येथे राहात असताना
त्याने मिळवलेली सर्व मालमत्ता त्याने आपल्या बरोबर
नेली.

19त्याच वेळी लाबान आपल्या मेंढरांची लोकर
कातरण्यास गेला होता; तो गेला असताना राहेल त्याच्या
घरात गेली आणि तिने आपल्या बापाच्या कुलदेवतांच्या
मूर्ती चोरल्या.

20याकोबाने अरामी लाबानास फसवले; कारण आपण
येथून निघून आपल्या देशाला जात आहो हे त्याने लाबानास
सांगितले नाही; 21याकोब आपली बायकांमुले व सर्व
चीजवस्तू घेऊन ताबडतोब निघाला; त्यांनी फरात नदी
ओलांडली आणि ते गिलाद डोंगराळ प्रदेशाकडे निघाले.

22तीन दिवसानंतर याकोब पळून गेल्याचे लाबानास
कळाले. 23तेव्हा त्याने आपली माणसे एकत्र जमवली
आणि याकोबाचा पाठलाग सुरु केला. सात दिवसानंतर
गिलादाच्या डोंगराळ प्रदेशाजवळ त्याला याकोब सापडला.
24त्या रात्री देव लाबानाच्या स्वप्नात येऊन म्हणाला,
"लाबाना, सावधान! तू याकोबाशी बोलताना प्रत्येक शब्द
संभाळून वापर."

## चोरलेल्या कुलदेवतांचा शोध

25दुसऱ्या सकाळी लाबानाने याकोबाला गाठले;
याकोबाने डोंगरावर आपला तळ दिला होता म्हणून
लाबानानेही आपल्या बरोबरच्या माणसासह गिलादाच्या
डोंगराळ भागात आपला तळ दिला.

26लाबान याकोबाला म्हणाला, "तू मला का फसवलेस?
युद्धात धरुन नेलेल्या स्त्रियां प्रमाणे तू माझ्या मुलींना का
घेऊन आलास? 27तू मला न सांगता का पळून गेलास?
तुला जायचे आहे असे तू मला सांगितले असतेस तर
नाचगाणी बजावणी व संगिताची धामधूम या सहित मी
तुला मेजवानी दिली असती; 28अरे, तू मला माझ्या लाडक्या
नातवांचा व माझ्या प्रिय मुलींचा निरोप घेण्याची संधी ही
दिली नाहीस की त्यांची चुंबने घेण्यास सवड दिली नाहींस!
तू हा अगदी मूर्खपणा केलास! 29खरे तर अपाय करण्याची
माझ्यात ताकद आहे परंतु गेल्या रात्री तुझ्या बापाचा देव
माझ्या स्वप्नात आला आणि मी तुला कोणत्याच प्रकारे
अपाय करु नये म्हणून त्याने मला ताकीद दिली आहे;
30तुला तुझ्या बापाच्या घरी जायचे आहे हे मला माहीत
आहे आणि म्हणूनच तू जाण्यास निघालास परंतु तू माझ्या
घरातील कुलदेवता का चोरल्यास?"

31याकोबाने उत्तर दिले, "मी तुम्हाला न सांगता निघालो
कारण मला भीती वाटली; मला विचार आला की तुम्ही
तुमच्या मुली माझ्यापासून घेऊन जाल; 32परंतु मी तुमच्या
कुलदेवता मुळीच चोरल्या नाहीत. जर येथे माझ्याबरोबर
असणाऱ्या कोणी तुमच्या कुलदेवता घेतल्या आहेत असे
तुम्हाला आढळले तर ती व्यक्ती ठार केली जाईल; तुमची
माणसे या बाबतीत माझे साक्षी असतील; तुमच्या कोणत्याही
चीजवस्तूसाठी तुम्ही झडती घेऊ शकता; जे काही तुमचे
असेल ते घेऊन जा." (राहेलीने लाबानाच्या कुलदेवता
चोरल्या होत्या ते याकोबास माहीत नव्हते.) 33म्हणून मग
लाबानाने याकोबाच्या छावणीची झडती घेतली; त्याने
याकोबाच्या तंबूची व नंतर लेआच्या तंबूची झडती घेतली;
त्यानंतर त्याच्या घरातील कुलदेवता सापडल्या नाहीत.
त्यानंतर लाबान राहेलीच्या तंबूत गेला. 34राहेलीने त्या
कुलदेवता आपल्या उंटाच्या कंठाळीत लपवून ठेवल्या
होत्या आणि ती त्यांच्यावर बसली होती. लाबानाने सगळा
तंबू शोधून पाहिला परंतु त्या कुलदेवता कोठेही सापडल्या
नाहीत. 35आणि राहेल आपल्या बापाला म्हणाली, "बाबा,
मी आपल्यासमोर उभी राहू शकत नाही म्हणून माझ्यावर
रागावू नका, कारण माझा मासिक धर्म आला आहे."
अशी रीतीने लाबानाने तळाची कसून तपासणी केली
परंतु त्याला कुलदेवता सापडल्या नाहीत.

36मग याकोबाला फार राग आला. तो म्हणाला, "मी
काय वाईट केले आहे? मी कोणता करार मोडला आहे?
माझा पाठलाग करण्याचा आणि मला थांबविण्याचा तुम्हाला
काय अधिकार आहे? 37माझ्या मालकीच्या सर्व चीजवस्तू
तुम्ही तपासून पाहिल्या आहेत आणि तुम्हाला तुमच्या
मालकीची एकही चीजवस्तू आढळली नाही; जर तुम्हाला
तुमचे काही मिळाले असेल तर ते मला दाखवा; ते या
ठिकाणी समोर ठेवा म्हणजे तुमची आमची माणसे ते
बघतील. तुमच्या व माझ्यामध्ये कोण खरा आहे हे या
माणसांना ठरवू द्या.38मी तुमची वीस वर्षे सेवाचाकरी
केलेली आहे. त्या सर्व काळात एकही करडू किंवा कोकरु
मेलेले जन्मले नाहीं; आणि तुमच्या कळपातील एकही
एडका मी खाल्ला नाही.39एखाद्या वेळी जर एखादी मेंढी
जनावरांनी ठार मारली तर ती मी नेहमीच माझ्या कळपातून
भरुन दिली. मी कधीही मेलेले जनावर तुमच्याकडे घेऊन
आलो नाही आणि यात माझा काही दोष नाही असे म्हणालो
नाही. दिवसा व रात्री मी तुमच्या कळपाची काळजी घेतली.
40दिवसा सूर्याच्या उन्हातापाने माझी शक्ती क्षीण होई व
रात्री थंडीगारठ्यामुळे माझ्या डोळ्यातील झोंप काढून घेतली
जाई. 41वीस वर्षे एखाद्या गुलामासारखी मी तुमची
सेवाचाकरी केली; पहिली चौदा वर्षे तुमच्या दोन मुली
जिंकण्यासाठी आणि शेवटची सहा वर्षे तुमचे कळप वाढावेत
म्हणून मी कष्ट केले; आणि त्या काळात दहा वेळा तुम्ही

माझ्या वेतनात फेरबदल केला; 42परंतु माझ्या पूर्वजांचा देव, अब्राहामाचा देव आणि इसाहाकाचा देव (म्हणजे 'भय') माझ्या संगती होता. जर देव माझ्याबरोबर नसता तर तुम्ही मला रिकामेच माझ्या घरी पाठवले असते; परंतु देवाने मला झालेला त्रास पाहिला; देवाने मी कष्टाने केलेले काम पाहिले आणि काल रात्री देवाने सिद्ध करून दाखवले की मी रास्त माणूस आहे."

### याकोब व लाबान यांच्यामधील करार

43लाबान याकोबाला म्हणाला, "ह्या मुली माझ्या कन्या आहेत आणि त्यांची मुले माझ्या ताब्यात आहेत आणि ही जनावरेही माझीच आहेत; येथे तू जे पाहतोस ते सर्व माझे आहे; परंतु माझ्या मुली व त्यांची मुले यांना ठेवून घेण्यासंबंधी मी काही करु शकत नाही. 44म्हणून मी तुझ्याशी करार करण्यास तयार आहे. आपण करार केला आहे हे दाखविण्यासाठी खूण म्हणून येथे दगडांची रास रचू."

45तेव्हा याकोबास एक मोठा धोंडा सापडला. तो त्याने करार केला होता हे दाखविण्यासाठी तेथे ठेवला. 46त्याने त्याच्या माणसांना आणखी काही दगड शोधून त्यांची रास करण्यास सांगितले. नंतर त्या दगडांच्या राशीशेजारी बसून ते जेवले. 47लाबानाने त्या जागेचे नांव यगर सहादूथा ठेवले; परंतु याकोबाने त्या जागेचे नांव गलेद ठेवले. (गलेद हे गिलादाचे दुसरे नांव, हिब्रू भाषेत 'कराराची-दगडांची रास')

48लाबान याकोबास म्हणाला, "ही दगडांची रास आपण केलेल्या कराराची आठवण ठेवण्यास आपणा दोघास मदत करील." म्हणूनच याकोबाने त्या जागेचे नांव गलेद ठेवले.

49मग लाबान म्हणाला, "आपण एकमेकापासून अलग होत असताना परमेश्वर आपणावर लक्ष ठेवो." म्हणून त्या जागेचे नांव मिस्पा ठेवण्यात आले.

50नंतर लाबान म्हणाला, "जर का तू माझ्या कन्यांना दुःख देशील तर देव तुला शिक्षा करील हे लक्षात ठेव. जर का तू इतर स्त्रियांशी लग्न करशील तर देव पाहात आहे हे लक्षात ठेव. 51आपणामध्ये येथे साक्षी म्हणून मी ही दगडांची रास ठेवली आहे आणि हा येथे विशेष स्तंभ आहे त्यावरुन आपण येथे करार केला हे दिसेल. 52ही रास व हा स्तंभ ही दोन्ही आपल्यातील कराराची आपणास आठवण देण्यास मदत करोत ही ओलांडून मी तुझ्या विरुद्ध भांडणतंटा करण्यास तुझ्याकडे कधीही जाणार नाही आणि तू ही माझ्याविरुद्ध भांडणतंटा करण्यास माझ्या बाजूकडे, ही ओलांडून कधीही येऊ नये. 53जर आपण हा करार मोडल्याचा दोष करु तर अब्राहामाचा देव, नाहोराचा देव आणि त्यांच्या पितरांचा देव आमचा न्याय करो व आम्हास दोषी ठरवो."

याकोबाचा बाप, इसहाक देवाला "भय" म्हणत असे म्हणून याकोबाने "भय" हे नांव वापरुन शपथ घेतली. 54मग याकोबाने त्या डोंगरावर एक पशू मारला व तो देवाला देणगी म्हणून अर्पण केला आणि त्याने आपल्या सर्व माणसांना भोजनासाठी येऊन सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. भोजन संपल्यावर त्यांनी ती रात्र डोंगरावरच घालवली. 55दुसऱ्या दिवशी लाबान पहाटेस उठला. त्याने आपल्या कन्या व आपली नातवंडे यांची चुंबने घेऊन त्यांचा निरोप घेतला. त्याने त्यांना आशीर्वाद दिला आणि मग तो आपल्या घरी परत गेला.

### एसावाशी पुनर्भेट

32 याकोबानेही ते ठिकाण सोडले. तो प्रवास करीत असताना त्याला देवदूत भेटले. 2जेव्हा याकोबाने त्यांना पाहिले तेव्हा तो म्हणाला, "हा देवाचा तळ आहे." म्हणून त्याने त्या जागेचे नांव 'महनाइम' ठेवले.

3याकोबाचा भाऊ एसाव सेइर नांवाच्या देशात राहात होता. हा देश म्हणजे अदोमाचा डोंगराळ प्रांत होता. याकोबाने एसावाकडे निरोपे पाठवले. 4त्याने त्यांना सांगितले "तुम्ही या सर्व गोष्टी माझे स्वामी एसाव यांना सांगा, 'आपला सेवक याकोब असे म्हणतो की आजपर्यंत अनेक वर्षे मी लाबानाकडे राहिलो; 5माझ्यापाशी पुष्कळ गाईगुरे, गाढवे, शेरडामेंढराचे कळप आणि दास व दासी आहेत. महाराज, आपण आमचा स्वीकार करावा अशी विंनती करण्यासाठी मी आपणाकडे हा निरोप पाठवीत आहे.'"

6निरोपे याकोबाकडे मागे आले आणि म्हणाले, "आम्ही आपला भाऊ एसाव याजकडे गेलो व त्यांस भेटलो तो आपणाला भेटावयास येत आहे; त्याच्या बरोबर चारशे माणसे आहेत."

7त्या निरोपामुळे याकोब घाबरला. आपल्या जवळच्या लोकांच्या त्याने दोन टोळ्या केल्या. तसेच शेरडेमेंढरे, गुरेढोरे आणि उंट गाढवे यांच्याही त्याने दोन टोळ्या केल्या. 8त्याने विचार केला, "जर एसाव आला व त्याने एका टोळीचा नाश केला तर दुसरी टोळी पळून जाईल व वाचवली जाईल."

9याकोब म्हणाला, "माझे वडील अब्राहाम, इसहाक यांच्या देवा! परमेश्वरा! तू मला माझ्या देशात व माझ्या कुटुंबात परत येण्यास सांगितलेस; तसेच तू माझे कल्याण करशील असेही तू म्हणालास. 10तू माझ्यावर दया केली आहेस आणि माझ्या करिता अनेक चांगल्या गोष्टी केल्या आहेस हे मी जाणतो. मी पहिल्याच वेळी यार्देन नदी उतरून प्रवास केला तेव्हा माझ्याजवळ एका काठी शिवाय माझ्या मालकीचे काहीही नव्हते; परंतु आता माझ्या मालकीच्या, भरपूर वस्तूंच्या व माणसांच्या पूर्ण दोन टोळ्या आहेत. 11मी तुझी प्रार्थना करतो की कृपाकरून तू माझा भाऊ एसाव याच्यापासून मला वाचव; मला त्याची भीती वाटते, की तो येऊन आम्हा सर्वांस ठार मारील; मुलांच्या मातांनाही लेंकरासकट तो मारुन टाकील. 12परमेश्वरा! तू मला वचन दिलेस, 'मी तुझे भले करीन; मी तुझी संतती वाढवीन

आणि ती समुद्राच्या वाळू इतकी करीन; त्याची गणती
करता येणार नाही एवढी ती करीन.'"
13त्या रात्री याकोब त्या ठिकाणी राहिला. त्याने एसावाला
देणगी म्हणून देण्यासाठी काही गोष्टींची भेट तयार केली.
14त्याने दोनशे शेळ्या व वीस बोकड, दोनशें मेंढ्या व
वीस एडके, 15तसेच तीस साडणी व त्यांची बछडी, चाळीस
गाई व दहा खोंड, वीस गाढवी व दहा गाढवे घेतली व
एवढ्यांचे वेगवेगळे कळप केले. 16त्याने प्रत्येक कळप
एकेका नोकराच्या ताब्यात दिला; मग तो नोकरांना
म्हणाला, "प्रत्येक कळप वेगळा करा आणि कळपाकळपात
थोडे अंतर ठेवून माझ्यापुढे चाला." 17याकोबाने चाकरांना
आज्ञा दिल्या; जनावरांच्या पहिल्याच टोळीच्या चाकराला
तो म्हणाला, "जेव्हा माझा भाऊ एसाव तुझ्याकडे येईल व
विचारील, 'ही कोणाची जनावरे आहेत? तू कोठे चाललास?
तू कोणाचा नोकर आहेस?' 18तेव्हा तू त्याला असे उत्तर
दे, 'ही जनावरे आपला सेवक याकोब याच्या मालकीची
आहेत. याकोबाने ही स्वामी आपल्याला भेट म्हणून
पाठवली आहेत आणि याकोब आमच्या पाठोपाठ येत
आहे.'"
19याकोबाने दुसऱ्या तिसऱ्या आणि इतर सर्व चाकरांना
अशीच आज्ञा करून अशाच प्रकारे उत्तर देण्यास सांगितले.
तो म्हणाला, "तुम्हाला जेव्हा एसाव भेटेल तेव्हा तुम्ही
असेच करावे. 20तुम्ही म्हणावे, 'ही आपणाकरिता भेट
आहे आणि आपला दास याकोब आमच्या मागून येत
आहे.'"
याकोबाने विचार केला, "जर मी ही माणसे भेटीसह
पुढे पाठवली तर कदाचित एसाव मला क्षमा करील व
माझा स्वीकार करील." 21म्हणून त्याप्रमाणे याकोबाने
भेट पुढे पाठवली परंतु तो त्या रात्री तळावरच मागे राहिला.
22मग याकोब रात्रीचाच उठला. त्याने आपल्या दोन्ही
बायका, दोन्ही दासी आणि अकरा मुले यांस बरोबर घेतले
आणि तो यब्बोक नदीच्या उतारापाशी नदी पार करून
गेला. 23त्याने आपल्या कुटुंबातील सर्वांस नदी पार करून
पाठवले; नंतर त्याचे जे काही होते तेही सर्व त्याने नदी
पार करून पलीकडे पाठवले.

## देवाशी झोंबी

24नदी उतरुन पलीकडे जाण्यात याकोब सर्वात शेवटी
होता; परंतु नदी उतरुन जाण्यापूर्वी तो अद्याप एकटाच
असताना एक पुरुष आला व त्याने याकोबाशी झोंबी
केली. सूर्य उगवेपर्यंत त्याने त्याच्याशी झोंबी केली 25त्या
माणसाने पाहिले की आपण याकोबावर मात करून त्याचा
पराभव करु शकत नाही म्हणून त्याने याकोबाच्या जांघेस
स्पर्श केला तेव्हा याकोबाचा पाय जांघेच्या सांध्यातून
निखळला.
26मग तो पुरुष याकोबास म्हणाला, "आता मला जाऊ
दे कारण सूर्य वर येत आहे."
परंतु याकोब म्हणाला, "तू मला आशीर्वाद दिलाच
पाहिजेस नाहीतर मी तुला जाऊ देणार नाही."
27तो पुरुष त्याला म्हणाला, "तुझे नांव काय आहे?"
आणि याकोब म्हणाला, "माझे नांव याकोब आहे."
28तेव्हा तो पुरुष म्हणाला, "तुझे नांव याकोब असणार
नाही. येथून पुढे तुझे नांव इस्राएल असेल. मी हे नांव
तुला देत आहे कारण तू देवाशी व माणसांशी झोंबी केली
आहेस आणि तू हरला नाहीस तर जिंकलास."
29मग याकोबाने त्याला विचारले, "कृपया तुझे नांव
मला सांग."
परंतु तो पुरुष म्हणाला, "तू माझे नांव का विचारतोस?"
त्यावेळी तेथेच त्या पुरुषाने याकोबाला आशीर्वाद दिला.
30म्हणून याकोबाने त्या जागेचे नांव पनीएल ठेवले.
याकोब म्हणाला, "ह्या ठिकाणी मी देवाला तोंडोतोंड पाहिले
आहे परंतु माझा जीव वाचवला गेला." 31मग पनीएलाहून
तो पुढे निघाला तेव्हा सूर्य उगवला. याकोब आपल्या
पायामुळे लंगडत चालत होता. 32म्हणून आजपर्यंत इस्राएल
लोक जनावरांच्या जांघेच्या सांध्याजवळचा स्नायू खात
नाहीत कारण याच स्नायूपाशी याकोबाला दुखापत झाली
होती.

## याकोब आपले शौर्य दाखवितो

33 याकोबाने वर पाहिले आणि त्याला एसाव येताना
दिसला; त्याच्या बरोबर चारशे माणसे होती. तेव्हा
याकोबाने आपल्या कुटुंबाचे चार गट पाडले. लेआ व
तिची मुले यांचा एक गट, राहेल व योसेफ यांचा आणखी
एक गट, आणि त्याच्या दोन दासी व त्यांची आपली मुले
यांचे वेगळे दोन गट होते. 2याकोबाने त्याच्या दासी व
त्यांची मुले यांना आघाडीला त्यानंतर त्याच्यामागे लेआ व
तिची मुले आणि राहेल व योसेफ यांना सर्वात शेवटी
ठेवले.
3याकोब स्वत: एसावा पुढे सामोरा गेला म्हणून एसावा
समोर पुढे आलेला तोच पहिला होता; आपला भाऊ
एसाव याला सामोरा जात असताना त्याने सात वेळा भूमिपर्यंत
लवून त्याला नमन केले.
4एसावाने जेव्हा याकोबाला पाहिले तेव्हा त्याला भेटण्यास
तो धावत गेला आणि आपल्या बाहुंचा विळखा त्याच्या
भोवती टाकून त्याने गळ्यात गळा घालून याकोबाला मिठी
मारली. त्याचे चुंबन घेतले, आणि ते दोघे रडले. 5एसावाने
आपल्या समोरील स्त्रिया व मुले पाहून विचारले, "तुझ्या
बरोबर ही कोण मंडळी आहे?"
याकोबाने उत्तर दिले, "देवाने मला दिलेली ही मुले
आहेत, देवाने माझे कल्याण केले आहे."
6मग याकोबाच्या दोन दासी आपल्या मुलांबरोबर पुढे
गेल्या आणि त्यांनी एसावाला लवून नमन केले. 7त्यानंतर
लेआ व तिची मुले, मग राहेल व योसेफ, एसावापुढे गेली
आणि त्यांनी त्याला लवून नमन केले.

8एसावाने विचारले, “इकडे येताना मला दिसले ते लोक
कोण? व त्यांच्या बरोबरची जनावरे कशासाठी?”
याकोबाने उत्तर दिले, “आपण माझा स्वीकार करावा
म्हणून देणगी दाखल मी आपणाला दिलेली ही भेट आहे.”
9परंतु एसाव म्हणाला, “माझ्या बंधो, तू मला काही भेट
द्यावयाची नाही, मला माझ्याकरिता भरपूर आहे.”
10याकोब म्हणाला, “नाही नाही; मी आपणाला आग्रहाची
विनंती करतो, आपण जर खरोखर माझा स्वीकार
करिता तर मग कृपाकरून मी आपणाला देतो त्या भेटीचा
स्वीकार करा; आपले तोंड मला पुन्हा पाहावयास मिळाले
म्हणून मला फार आनंद होत आहे; जणू काय मला
देवाचे मुख पाहावयास मिळाले आहे. आपण माझा
स्वीकार करिता म्हणूनही मला अतिशय आनंद
वाटतो;
11म्हणून मी आग्रहाची विनंती करतो की मी आपणाला
भेट देतो तिचा स्वीकार करा. देवाने माझे कल्याण केले
आहे. माझ्यापाशी माझ्या गरजा पुरुन उरेल एवढे आहे.”
या प्रमाणे भेटी दाखल दिलेल्या देणग्या घेण्यासाठी
याकोबाने एसावास आग्रहाची विनवणी केली म्हणून
मग एसावाने त्या देणग्यांचा स्वीकार केला.
12मग एसाव म्हणाला, “आता तू वाटेस लाग व तुझा
प्रवास पुढे चालू ठेव; मीही तुझ्याबरोबर चालतो.”
13परंतु याकोब त्याला म्हणाला, “माझी मुले नाजुक
आहेत हे आपणाला माहीत आहे; आणि माझ्या कळपातली
दुभती जनावरे व त्यांची कच्ची बच्ची, करडे कोंकरे,
वासरे यांची मला काळजी घेतली पाहिजे. मी जर त्यांच्यावर
एकाच दिवशी अधिक दौड लादली तर सगळी जनावरे
मरुन जातील; 14तर माझे स्वामी आपण पुढे निघा; मी
माझी गायीगुरे, शेरडेमेंढरे इत्यादी जनावरांना जितके
चालवेल आणि माझी लहानमुलेही थकणार नाहीत अशा
चालीने चालेन व आपणास सेईर येथे येऊन भेटेन.”
15तेव्हा एसाव म्हणाला, “मग मी माझ्या माणसातून
काही माणसे तुला मदत करण्यासाठी मागे ठेवितो;”
परंतु याकोब म्हणाला, “ही तर माझ्या स्वामीची माझ्यावर
कृपा आहे; परंतु माणसे ठेवण्याची तशी गरज नाही.”
16तेव्हा त्याच दिवशी एसाव सेईरास परत जाण्यास निघाला.
17याकोब गांवास गेला; तेथे त्याने स्वत:साठी घर बांधले
आणि गुरांढोरांसाठी खोपट्या बांधल्या म्हणून त्या ठिकाणाचे
नांव सुक्कोथ पडले. 18याकोबाने पदन आरामपासून
सुरु केलेला प्रवास कनान देशातील शखेमला सुखरुपपणे
संपवला व त्या नगराजवळील एका शेतात आपला तळ
दिला. 19ते शेत त्याने शखेमाचा बाप हमोर याच्या
वंशजाकडून शंभर कसिटा (चांदीची नाणी) देऊन विकत
घेतले;
20देवाची उपासना करण्यासाठी त्याने तेथे एक वेदी
बांधली. त्याने त्या ठिकाणाचे नांव “एल, इस्राएलाचा देव
ठेवले.”

## दीनावर बलात्कार

34 दीना ही लेआ व याकोब यांची मुलगी होती. एके
दिवशी ती त्या देशाच्या स्त्रियांना पाहाण्यास बाहेर
गेली. 2तेव्हा त्या देशाचा राजा हमोर याचा मुलगा शखेम
याने दीनाला पाहिले आणि तो तिला बळजबरीने घेऊन
गेला व तिच्या बरोबर निजून त्याने तिला भ्रष्ट केले.
3शखेमाचे दीनावर प्रेम जडले आणि तिने त्याच्याशी लग्न
करावे म्हणून त्याने तिची मनधरणी केली. 4शखेमाने
आपल्या बापास सांगितले, “कृपा करून ही मुलगी मला
मिळवून द्या; मला तिच्याशी लग्न करावयाचे आहे.”
5आपल्या मुलीशी त्या मुलाने भयंकर वाईट कर्म करून
तिला भ्रष्ट केले हे याकोबास समजले परंतु त्याची सर्व
मुले गुरांढोरांबरोबर रानात होते म्हणून ते घरी येईपर्यंत
त्याने या बाबतीत काहीही केले नाही. 6त्याच वेळी इकडे
शखेमाचा बाप हमोर संबंधीत बोलणी करण्यासाठी
याकोबाकडे गेला.
7नगरात जे काही घडले त्या विषयीची बातमी याकोबाच्या
मुलांनी शेतात ऐकली तेव्हा त्यांचा राग भयंकर भडकला,
इतका की ते रागाने वेडे झाले, कारण याकोबाच्या मुलीशी
केलेल्या वाईट कर्मामुळे शखेमाने इस्राएलाची अब्रू घेतली
होती; म्हणून मग ते सगळे भाऊ शेतातून घरी आले.
8परंतु हमोर त्या भावांशी बोलला. तो म्हणाला, “माझा
मुलगा शखेम दीनाशी लग्न करावयास फार आतुर झाला
आहे. 9ह्या लग्नामुळे तुमच्या आमच्यामध्ये विशेष करार
झाल्याचे दिसून येईन. मग त्यामुळे आमचे पुरुष तुमच्या
स्त्रियांशी व तुमचे पुरुष आमच्या स्त्रियांशी लग्ने करु
शकतील. 10तसेच त्यामुळे तुम्ही ह्याच देशात आमच्या
बरोबर राहूं शकाल; येथील जमीनजुमला विकत घेऊन
येथे वतन मिळविण्यास व येथेच व्यापार उदीम करण्यास
तुम्हाला मोकळीक मिळेल.”
11शखेम देखील याकोबाशी व दीनाच्या भावांशी बोलला;
तो म्हणाला, “कृपा करून माझा स्वीकार करा; तुम्ही जे
काही करण्यास मला सांगाल ते मी जरुर करीन; 12तुम्ही
मला फक्त दीनाशी लग्न करण्यास परवानगी द्या मग
तुम्हाला पाहिजे ते म्हणजे रीतीप्रमाणे बायको साठी द्यावयाचे
ते किंवा तुम्ही जे काही मागाल ते मी जरुर देईन.”
13याकोबाच्या मुलांनी शखेम व त्याचा बाप यांच्याशी
खोटेपणाने वागावयाचे ठरवले. आपल्या बहिणीला भ्रष्ट
केल्यामुळे ते भाऊ अद्याप संतापाने वेडे झाले होते. 14तेव्हा
ते भाऊ त्याला म्हणाले, “आम्ही तुला आमच्या बहिणीशी
लग्न करु देणे शक्य नाही कारण अद्याप तुझी सुंता
झालेली नाहीं. आमच्या बहिणीने तुझ्याशी लग्न करणे
चुकीचे, अनीतीचे व कलंक लावणारे होईल; 15पण तू
जर एवढी एक गोष्ट करशील तर मग आम्ही तुला
तिच्याशी लग्न करु देऊ : ह्या नगरातील सगळ्या पुरुषांची
आमच्या प्रमाणे सुंता झाली पाहिजे; 16मग तुमचे पुरुष
आमच्या स्त्रियांशी व आमचे पुरुष तुमच्या स्त्रियांशी लग्न

करु शकतील आणि मग आपण सर्व एक राष्ट्र होऊ.
[17]पण जर तुम्ही सुंता करावयास नकार द्याल तर मग
मात्र आम्ही दीनाला घेऊन जाऊ." [18]ह्या करारामुळे
हमोर व शखेम यांना फार आनंद झाला. [19]दीनाच्या
भावांनी जे सांगितले ते लवकर करण्यास शखेमाला तर
फारच उत्साह व आनंद वाटला.

### सूड

शखेम त्यांच्या घराण्यात सर्वांत आदरणीय होता. [20]हमोर
व शखेम त्या नगरातील वेशीपाशी गेले व नगरातील
लोकांशी बोलले. ते म्हणाले, [21]"ह्या इस्राएल लोकांची
आपल्याशी मैत्रीचे संबंध ठेवावयाची खरोखरच इच्छा आहे.
त्यांना आपणामध्ये आपल्या देशात राहू द्यावे. व व्यापार
करु द्यावा. त्यांनी आमच्याशी शांततेने राहावे असे
आपल्यालाही वाटते; आपल्या सर्वांना पुरेल एवढा आपला
देश मोठा आहे. त्यांच्या स्त्रियांशी लग्ने करण्यास आपणास
मोकळीक आहे आणि आपल्या स्त्रिया त्यांना लग्नात
देण्यात आपल्यालाही आनंद आहे. [22]परंतु त्यांची एक
अट पूर्ण करण्याचे आपण सर्वांनी कबूल केले पाहिजे; ती
म्हणजे आपण सगव्व्या पुरुषांनी या इस्राएल लोकांप्रमाणे
सुंता करून घेण्याचे मान्य केले पाहिजे. [23]जर हे आपण
करु तर मग त्यांची शेरडेमेंढरे गुरेढोरे व संपत्ती आपल्याला
मिळाल्याने आपण श्रीमंत होऊ; म्हणून आपण त्यांच्याशी
असा करार केला पहिजे मग ते आपल्या बरोबर येथेच
वस्ती करून राहतील." [24]तेव्हा वेशीतून येणाऱ्या सर्वांनी
हे ऐकले व हमोर आणि शखेम यांचे म्हणणे मान्य केले;
आणि त्यावेळी तेथील सर्व पुरुषांनी सुंता करून घेतली.
[25]तीन दिवसानंतर सुंता केलेले लोक जखमांच्या
वेदनांनी बेजार झालेले असताना, याकोबाची दोन मुले
शिमोन व लेवी यांना माहीत होते की ते लोक आता
दुर्बल व कमकुवत असणार म्हणून मग ते नगरात गेले व
त्यांनी तेथील सर्व पुरुषांना ठार मारले. [26]दीनाच्या त्या
दोन भावांनी शिमोन आणि लेवी यांनी हमोर व त्याचा
मुलगा शखेम यांनाही ठार मारले. नंतर दीनाला शखेमाच्या
घरातून बाहेर काढून ते तिला घेऊन तेथून निघाले.
[27]नंतर याकोबाची सर्व मुले नगरात गेली आणि त्यांनी
तेथील सर्व चीज वस्तू लुटल्या, कारण त्यांच्या बहिणीला
शखेमाने भ्रष्ट केल्याने त्यांच्या रागाचा पारा अद्याप खूपच
चढलेला होता. [28]तेव्हा त्यांनी त्या लोकांची शेरडेमेंढरे,
गुरेढोरे, गाढवे इत्यादी सर्व जनावरे आणि घरातील व
शेतातील सर्व वस्तू लुटल्या; [29]तसेच त्यांनी तेथील
लोकांच्या मालकीची धनदौलत, मालमत्ता व सर्व चीजवस्तू
आणि त्यांच्या बायका व मुलेबाळे देखील घेतली. [30]परंतु
याकोब, शिमोन व लेवी यांना म्हणाला, "तुम्ही मला खूप
त्रास देऊन संकटात टाकले आहे; आता या देशाचे रहिवासी
कनानी व परिज्जी माझा द्वेष करतील व माझ्या विरुद्ध
उठतील; आपण थोडकेच लोक आहोत. या देशातील
सर्वलोक एकत्र होऊन आपल्या विरुद्ध जर लढावयास
आले तर मग माझ्याजवळच्या आपल्या सर्वांचा
माझ्याबरोबर नाश केला जाईल."
[31]परंतु ते भाऊ म्हणाले, "आम्ही त्या लोकांना आमच्या
बहिणीशी एखाद्या वेश्येप्रमाणे वागू द्यावे काय? नाही, कदापि
नाही! त्या लोकांनी आमच्या बहिणीशी असे वागणे चुकीचे
व अनीतीचे होते!"

### बेथेलमध्ये याकोब

35 देव याकोबाला म्हणाला, "तू बेथेल या नगरात
जाऊन राहा; आणि तुझा भाऊ एसाव याजपासून
तू पळून जात असताना त्या ठिकाणी ज्याने तुला दर्शन
दिले त्या 'एल' (म्हणजे इस्राएलाचा देव) याची आठवण
कर व त्याच देवाची उपासना करण्यासाठी तेथे एक वेदी
बांध."
[2]तेव्हा याकोब आपल्या घरच्या मंडळीस व
आपल्याबरोबरच्या सगव्व्या दासांना म्हणाला, "तुमच्या
जवळ असलेले लाकडांचे व धातूंचे परके देव फोडून
तोडून टाका; तुम्ही स्वत:ला शुद्ध करा; स्वच्छ कपडे
घाला; [3]आपण येथून निघून बेथेलास जाऊ; मी त्रासात व
संकटात असताना ज्याने मला मदत केली त्या देवासाठी
मी तेथे एक वेदी बांधीन; आणि तोच देव मी जेथे जेथे
गेलो तेथे तेथे माझ्याबरोबर असत आला आहे."
[4]तेव्हा त्या लोकांनी त्यांच्या जवळ असलेले सर्व परके
देव आणून याकोबाला दिले आणि त्यांनी आपल्या
कानातील कुंडलेही काढून दिली; तेव्हा याकोबाने त्या
सर्व वस्तू शखेम नांवाच्या नगराजवळील एका एला
झाडाच्या खाली पुरुन टाकल्या.
[5]याकोब व त्याची मुले यांनी ठिकाण सोडले. त्या भागात
राहणाऱ्या लोकांना त्याचा पाठलाग करून त्यांना ठार
मारावयास पाहिजे होते परंतु त्यांना फार भीती वाटली*
म्हणून त्यांनी याकोबाचा पाठलाग केला नाही. [6]अशा
रीतीने याकोब व त्याचे लोक कनान देशात लूज येथे
पोहोंचले; त्यालाच आता बेथेल म्हणतात.
[7]याकोबाने तेथे एक वेदी बांधली, व त्या ठिकाणाचे
नांव "एल बेथेल" असे ठेवले; याकोबाने या जागेसाठी हे
नांव निवडले कारण आपला भाऊ एसाव याजपासून पळून
जाताना ह्याच जागी प्रथम देवाने त्याला दर्शन दिले होते.
[8]रिबकेची दाई दबोरा ह्या ठिकाणी मरण पावली तेव्हा
त्यांनी तिला बेथेल येथे एका एला झाडाच्या खाली पुरले;
त्या जागेचे नांव त्यांनी अल्लोन बाकूथ' असे ठेवले.

### याकोबाचे नवे नांव

[9]पदन अराम येथून याकोब परत आल्यावर देवाने
त्याला पुन्हा दर्शन देऊन आशीर्वाद दिला. [10]देव याकोबाला

**भीती वाटली** देवाकडच्या भीतीचा त्यांच्यावर वर्षाव झाला.

म्हणाला, “तुझे नांव याकोब आहे मी ते बदलतो; तुला
आता याकोब म्हणणार नाहीत तर तुझे नवे नांव इस्राएल’
असे असेल;” आणि म्हणून देवाने त्याला इस्राएल हे नांव
दिले.

11देव त्याला म्हणाला, “मी सर्व शक्तिमान देव आहे;
तुला भरपूर संतती होवो आणि त्यांची वाढ होऊन त्यांचे
एक महान राष्ट्र बनो. तसेच तुझ्यातून इतर राष्ट्रे व राजे
निर्माण होवोत; 12मी अब्राहाम व इसहाक यांना जो काही
विशिष्ट देश दिला, तो आता मी तुला व तुझ्यामागे राहणाऱ्या
तुझ्या संततीला देतो.” 13मग देव तेथून निघून गेला.
14–15मग याकोबाने तेथे स्मारक म्हणून दगडाचा एक
स्तंभ उभा केला त्याने त्यावर पेयार्पण म्हणून द्राक्षारस व
तेल ओतून तो पवित्र केला. तेव्हा हे एक विशेष ठिकाण
झाले कारण येथेच देव याकोबाशी बोलला आणि म्हणून
याकोबाने त्या ठिकाणाचे नांव बेथेल ठेवले.

## प्रसूत होऊन राहेल मरते

16याकोब व त्याच्या बरोबरचा लवाजमा म्हणजे त्याची,
घरची मंडळी व इतर माणसे हे सर्व बेथेल येथून निघाले,
ते इफ्राथ (म्हणजे बेथलहेम) गांवाच्या अगदी जवळ आले
असताना तेथे पोहोंचण्यापूर्वी राहेलीस प्रसूती वेदना सुरु
झाल्या. 17परंतु राहेलीस यावेळी प्रसूती वेदनांचा अतिशय
त्रास होत होता; त्याचवेळी राहेलीची सुईण तिची कठीण
अवस्था पाहून तिला म्हणाली, “भिऊ नकोस राहेल, तू
आणखी एका मुलास जन्म देत आहेस.”

18त्या मुलास जन्म देताना राहेल मरण पावली परंतु
मरण्यापूर्वी तिने त्याचे नांव बेनओनी’ असे ठेवले; परंतु
याकोबाने त्याचे नांव बन्यामीन’ असे ठेवले. 19एफ्राथ
(म्हणजे बेथलहेम) गांवाला जाणाऱ्या वाटेजवळ राहेलीस
पुरले 20आणि याकोबाने तिच्या सन्मानाकरिता तिचे
स्मारक म्हणून तिच्या कबरेवर एक दगडी स्तंभ उभा
केला; तो स्तंभ आजपर्यंत तेथे कायम आहे. 21त्यानंतर
इस्राएलाने (याकोबाने) आपला पुढचा प्रवास चालू केला;
आणि एदेर बुरुजाच्या अगदी दक्षिणे कडे आपला तळ
दिला.

22इस्राएल तेथे थोडा काळ राहिला, त्यावेळी रऊबेन,
इस्राएलाची म्हणजे आपल्या बापाची उपपत्नी बिल्हा
हिच्यापाशी निजला या विषयी इस्राएलाने ऐकले तेव्हा तो
अतिशय संतापला.

## इस्राएलाचे कुटुंब

याकोब (इस्राएल) यास बारा मुलगे होते.

23लेआ हिचे मुलगे–याकोबाचा पाहिला मुलगा रऊबेन
आणि

शिमोन, लेवी, यहुदा, इस्साखार व जबुलून;

24राहेल हिचे मुलगे–योसेफ व बन्यामीन;

25राहेलीची दासी बिल्हा हिचे मुलगे–दान व नफताली;

26आणि लेआची दासी जिल्पा हिचे मुलगे गाद आशेर
पदन अरामात झाले.

27याकोब मग ‘किर्याथ अरबा’ (म्हणजे ‘हेब्रोन) येथीन
मम्रे या ठिकाणी आपला बाप इसहाक याजकडे गेला.
येथेच अब्राहाम व इसहाक हे राहिले होते. 28इसहाक
एकशे ऐंशी वर्षे जगला. 29आणि दीर्घ आयुष्यानंतर तो
अशक्त होऊन मरण पावला. त्याचे मुलगे एसाव व याकोब
यांनी त्याला त्याच्या बापाला पुरले होते त्याच जागी पुरले.

## एसावाचे वंशज

36 एसाव (म्हणजे ‘अदोम’) याची वंशावळ
2एसावाने कनानी मुलींशी लग्ने केली; त्याच्या
बायका येणे प्रमाणे– एलोन हित्ती याची मुलगी आदा;
सिबोन हिव्वी याचा मुलगा अना, त्याची मुलगी ओहोलीबामा

3आणि इश्माएलाची मुलगी नबायोथाची बहीण बासमथ.
4एसावापासून आदेला झालेल्या मुलाचे नांव अलीपाज व
बासमथला झालेल्या मुलाचे नांव रेऊल होते.

5आणि ओहोलीबामेस, यऊश, यालाम व कोरह हे
तीन मुलगे होते. हे एसावाचे मुलगे; हे त्याला कनान
देशात झाले.

6–8याकोब व एसाव यांच्या कुटुंबांची एवढी वाढ झाली
की कनान देश सर्वांना पुरेनासा झाला म्हणून एसाव
आपला भाऊ याकोब याजपासून बाजूला निघाला; तो
आपल्या बायका, मुले, मुली तसेच सर्व नोकर चाकर,
गाईगुरे व इतर जनावरे आणि कनान देशात त्याने
मिळवलेली धनसंपत्ती व मालमत्ता हे सर्व घेऊन सेईर या
डोंगराळ प्रदेशाकडे गेला.

9एसाव हा अदोमी लोकांचा मुळ पुरुष होय. सेईरच्या
डोंगराळ प्रदेशात राहाणाऱ्या एसावाची वंशावळ:

10एसावाच्या मुलांची नांवे–एसाव व आदा यांचा मुलगा
अलीपाज आणि एसाव व बासमाथ यांचा मुलगा रेऊल.

11अलीपाजाला पांच मुलगे होते; तेमान, ओमार, सपो,
गाताम व कनाज; 12अलीपाज याची तिम्ना नांवाची एक
गुलामस्त्री होती; तिम्ना व अलीपाज यांना एक मुलगा
झाला; त्याचे नांव अमालेक.

13रेऊलास चार मुलगे होते. त्यांची नांवे–नहाथ, जेरह,
शाम्मा व मिज्जा ही एसावाची नातवंडे होती.

बासमथाच्या पोटी झालेल्या रगुवेलाची ही मुले.

14सिबोनाचा मुलगा अना याची मुलगी अहलीबामा ही
एसावाची तिसरी बायको होती. यऊश, यालाम व कोरह
हे एसाव व अहलीबामा यांचे मुलगे होते.

15एसावाचे मुलगे आपापल्या कुळांचे प्रमुख झाले ते
हे–

एसावाचा पहिला मुलगा अलीपाज, त्याचे मुलगे; तेमान,
ओमार, सपो, कनाज 16कोरह, गाताम व अमालेख;

हे आपापल्या कुळांचे प्रमुख एसावास त्याची बायको
आदा हिच्या पोटी झाले.

17एसावाचा मुलगा रेऊल याचे मुलगे हे–नहाथ, जेरह, शाम्मा व मिज्जा;

हे सर्व कूळप्रमुख एसावास त्याची बायको बासमथ हिच्या पोटीं झाले.

18एसावाची बायको अनाची मुलगी अहलीबामा हिचे मुलगे–यऊश, यालाम व कोरह; हे तिघे जण आपापल्या कुळांचे प्रमुख झाले; 19हे सर्व पुरुष एसावापासून (अदोमपासून) झालेल्या कुळांचे नेते होत.

20एसावापूर्वी अदोममध्ये सेईर नांवाचा एक होरी माणूस होता. त्याचे मुलगे हे– लोटन, शोबाल, सिबोन, 21अना, दीशोन, एसर व दिशान; हे सेईराचे मुलगे होरी वंशातील आपापल्या कुळांचे प्रमुख झाले.

22लोटानाचे मुलगे होते होरी व हेमाम. (तिम्ना ही लोटानाची बहीण होती.) 23शोबालाचे मुलगे अलवान, मानहाथ, एबाल, शपो व ओनाम.

24सिबोनाचे दोन मुलगे होते; अय्या व अना (आपला बाप सिबोन याची गाढवे राखीत असता ज्याला डोंगरात गरम पाण्याचे झरे सांपडले तोच हा अना.) 25अनाचा मुलगा दिशोन व अनाची मुलगी अहलीबामा. 26दीशोनाला चार मुलगे होते;हेमदान, एश्बान, यित्रान व करान.

27एसराला बिल्हान, जावान व अकान हे तीन मुलगे होते.

28दीशानाला ऊस व अरान हे दोन मुलगे होते.

29होरी कुळांचे जे प्रमुख झाले त्यांची नांवे अशी–लोटान, शोबाल, सिबोन, अना, 30दीशोन, एसर व दीशान, यहूदा प्रांताच्या पूर्वे कडील सेईर (अदोम) प्रदेशात राहाणाऱ्या आपापल्या कुळांचे हे प्रमुख झाले. 31इस्राएलने राज्य करण्यापूर्वी अदोमला राजे होते.

32बौराचा मुलगा बेला याने अद्रोमावर राज्य केले; दिन्हाबा नगर ही त्याची राजधानी होती. 33बेला मेल्यावर बस्रा येथील जेरहाचा मुलगा योबाब हा त्याच्या जागी राजा झाला. 34योबाब मेल्यावर तेमानी लोकांच्या देशाचा हुशाम याने त्याच्या जागी राज्य केले. 35हुशाम मेल्यावर बदाद याचा मुलगा हदाद याने त्याच्या जागी राज्य केले. (यानेच मवाब देशात मिद्यानांचा पराभव केला) अवीत नगर ही त्याची राजधानी होती. 36हदाद मेल्यावर मास्रेका येथील साम्ला याने त्या देशावर राज्य केले. 37साम्ला मेल्यावर फरात (युफ्रेटीस) नदीवर असलेल्या रहोबोथ येथील शौल याने त्या देशावर राज्य केले. 38शौल मेल्यावर अकबोराचा मुलगा बाल–हानान याने त्या देशावर राज्य केले.

39बाल–हानान मेल्यावर हदार याने त्या देशावर राज्य केले. पाऊ हा त्याची राजधानी होती. त्याच्या बायकोचे नांव महेटाबेल होते; ही मे–जाहाबाची मुलगी मात्रेद हिची मुलगी होती.

40–43एसावाच्या वंशातील कुळांप्रमाणे त्या त्या कुळांच्या प्रमुखांची नांवे–तिम्ना, आल्वा, यतेथ, अहलीबामा, एला, पीनोन, कनाज तेमान, मिब्सार, माग्दीएल व ईराम हयातील प्रत्येक कूळ त्या कुळाचे नांव दिलेल्या प्रदेशात राहिले.

## स्वप्ने पडणारा योसेफ

37 याकोब कनान देशात वस्ती करून राहिला; येथेच त्याचा बापही राहिला होता. 2याकोबाच्या वंशाचा हा वृत्तान्त आहे.

योसेफ सतरा वर्षांचा उमदा तरुण होता. शेळ्यामेंढ्यांचा सांभाळ करणे हे त्याचे काम होते. आपल्या भावांबरोबर (म्हणजे आपल्या बापाच्या बायका बिल्हा व जिल्पा यांच्या मुलांबरोबर) तो हे काम करीत असे; त्या भावांनी केलेल्या वाईट गोष्टीविषयी त्याने आपल्या बापाला सांगितले. 3इस्राएल (याकोब) सर्व मुलांपेक्षा योसेफावर अधिक प्रीती करीत असे कारण तो त्याचा म्हातारपणाचा मुलगा होता. त्याने योसेफाला एक विशेष सुंदर पायघोळ झगा दिला होता.

4आपला बाप आपल्या इतर भावांपेक्षा योसेफावर अधिक प्रीती करतो हे त्याच्या भावांना दिसले म्हणून ते योसेफाचा द्वेष करु लागले. यासेफाशी चांगल्या रीतीने बोलणे देखील त्यांनी सोडून दिले.

5एकदा योसेफास एक विशेष स्वप्न पडले; नंतर त्याने ते स्वप्न आपल्या भावांना सांगितले; त्यानंतर तर त्याचे भाऊ त्याचा अधिक द्वेष करु लागले.

6योसेफ, म्हणाला, “मला असे स्वप्न पडले. 7आपण सर्वजण शेतात गव्हाच्या पेंढ्या बांधण्याचे काम करीत होतो; तेव्हा माझी पेंढी उठून उभी राहिली आणि तुम्हा सर्वांच्या पेंढ्या तिच्या भोवती गोलाकार उभ्या राहिल्या व त्यांनी माझ्या पेंढीला खाली वाकून नमन केले.” 8हे ऐकून त्याचे भाऊ त्याला म्हणाले, “याचा अर्थ तू आमचा राजा होऊन आमच्यावर राज्य करणार असे तुला वाटते काय?” त्याच्या त्यांच्याविषयीच्या या स्वप्नामुळे तर त्याचे भाऊ आता त्याचा अधिकच द्वेष करु लागले.

9नंतर योसेफाला आणखी एक स्वप्न पडले. तेही त्याने आपल्या भावांना सांगितले. तो म्हणाला, “मला आणखी एक स्वप्न पडले; सूर्य चंद्र व अकरा तारे यांनी मला खाली वाकून नमन केलेले पाहिले.” 10योसेफाने आपल्या बापालाही या स्वप्नाविषयी सांगितले; परंतु त्याच्या बापाने त्याबद्दल टीका करून म्हटले, “असले कसले रे स्वप्न आहे हे? तुझी आई, तुझे भाऊ व मी आम्ही भूमीपर्यंत लवून तुला नमन करु असे तुला वाटते काय?”

11योसेफाचे भाऊ त्याचा हेवा करीतच राहिले; परंतु योसेफाच्या बापाने या गोष्टी संबंधी खूप विचार केला आणि या गोष्टींचा काय अर्थ असावा या विषयी आश्चर्य करीत त्याने ते विचार आपल्या मनात ठेवले.

12एके दिवशी योसेफाचे भाऊ आपल्या बापाची मेंढरे चारावयास शखेम येथे गेले. 13याकोब योसेफाला म्हणाला,

"तुझे भाऊ शखेम येथे आपल्या मेंढाराबरोबर आहेत; तू
तेथे जा."
योसेफ म्हणाला, "बर, मी जातो."
14योसेफाचा बाप म्हणाला, "शखेमाला जा; आणि तुझे
भाऊ सुखरुप आहेत का?; व माझी मेंढरे ठीक आहेत
का ते पाहा व मागे येऊन मला त्यांच्या संबंधी सांग."
अशा रीतीने योसेफाच्या बापाने त्याला हेब्रोन दरीतून
शखेमास पाठवले.
15शखेमाजवळ योसेफ वाट चुकला; तो शेतात इकडे
तिकडे भटकताना एका माणसाला आढळला त्या माणसाने
त्याला विचारले, "तू कोणाला शोधत आहेस?"
16योसेफाने उत्तर दिले, "मी माझ्या भावांना शोधत
आहे; आपल्या मेंढरांबरोबर ते कोठे आहेत ते आपण
मला सांगू शकाल का?"
17तो माणूस म्हणाला, "ते अगोदरच येथून गेले आहेत;
आपण दोथानास जाऊ असे त्यांस बोलताना मी ऐकले."
म्हणून मग योसेफ आपल्या भावांमागे गेला व ते त्याला
दोथानात सांपडले.

## योसेफ गुलाम म्हणून विकला जातो

18योसेफाच्या भावांनी योसेफाला दुरुन येताना पाहिले
आणि कट करून त्याला ठार मारण्याचे ठरवले. 19ते
एकमेकांस म्हणाले, "हा पाहा, एकामागे एक स्वप्ने पडणारा
योसेफ इकडे येत आहे. 20आता आपल्याला शक्य आहे
तोंवर याला आपण ठार मारुन टाकावे त्याचे शरीर एका
कोरड्या खाड्यात फेकून देऊ आणि त्याला कोणाएका
हिंस्र पशूने मारून टाकले असे आपल्या बापाला सांगू;
मग त्याची स्वप्ने काही कामाची नाहीत हे आपण त्याला
दाखवून देऊ."
21परंतु रऊबेनास योसेफाला वाचवावयाला पाहिजे होते;
म्हणून रऊबेन म्हणाला, "आपण त्याला ठार मारु नये;
22त्याला काहीही इजा न करता, त्याला आपण एखाद्या
खाड्यात टाकून देऊ;" आपल्या भावांच्या हातातून सोडवून
योसेफाला वाचवावयाचे व त्याच्या बापाकडे परत पाठवून
द्यावयाचे असा रऊबेनाचा बेत होता. 23योसेफ त्याच्या
भावाजवळ येऊन पोहोंचला तेव्हा त्यांनी त्याच्यावर हल्ला
केला; त्यांनी त्याचा विशेष सुंदर पायघोळ झगा फाडून
टाकला. 24नंतर त्यांनी त्याला एका खोल कोरड्या खाड्यात
टाकून दिले. 25योसेफ खाड्यात असताना त्याचे भाऊ
भाकरी खावयास बसले. त्यांनी वर नजर करून पाहिले
तेव्हा त्यांना दुरुन एक उंटांचा तांडा दिसला; ते आपल्या,
उंटांवर मसाल्याचे अनेक पदार्थ व वनस्पती इत्यादी भारी
किंमतीचे पदार्थ लादून गिलादाहून मिसरकडे चालले होते.
26तेव्हा यहूदा म्हणाला, "आपल्या भावाला ठार मारून
आणि त्याचा खून लपवून ठेवून आपल्याला काय फायदा?
27आपण त्याला जर ह्या इश्माएली व्यापाऱ्यांना विकून
टाकले तर आपल्याला अधिक लाभ होईल; आणि आपल्या
स्वत:च्या भावाला ठार मारल्याचा दोषही आपणावर येणार
नाहीं;" इतर भावांना हे म्हणणे पटले. 28ते मिद्यानी व्यापारी
जवळ आल्यावर त्या भावांनी योसेफाला खाड्यातून बाहेर
काढले व त्या इश्माएली व्यापाऱ्यांस वीस चांदीची नाणी
घेऊन विकून टाकले. ते व्यापारी योसेफास मिसर देशास
घेऊन गेले.
29इतका वेळपर्यंत रऊबेन आपल्या भावाबरोबर तेथे
नव्हता, म्हणून त्यांनी योसेफाला विकून टाकल्याचे त्याला
माहीत नव्हते; रऊबेन त्या खाड्याकडे परत गेला तेव्हा
त्यात त्याला योसेफ दिसला नाही; तेव्हा त्याला अतिशय
दु:ख झाले; अतिशोकामुळे त्याने आपली वस्त्रे फाडली;
30तो शोक करीत आपल्या भावांकडे जाऊन म्हणाला,
"बंधूनो, आपला धाकटा भाऊ योसेफ खाड्यात नाही, हो!
तर आता मी काय करु!" 31त्या भावांनी एक तरुण
बकरा मारून त्याचे रक्त योसेफाच्या सुंदर पायघोळ
झग्याला लावले. 32नंतर तो रक्ताने भरलेला झगा आपल्या
बापाला दाखवून ते म्हणाले, "आम्हाला हा झगा सांपडला;
हा झगा योसेफाचा आहे की काय?"
33त्यांच्या बापाने तो झगा पाहिला आणि तो योसेफाचाच
आहे हे ओळखले! तेव्हा त्याचा बाप म्हणाला, "होय!
मुलांनो, हा त्याचाच झगा आहे! हिंस्र पशूने त्याला खाऊन
टाकले असावे. माझा मुलगा योसेफ याला हिंस्त्र पशूने
खाऊन टाकले आहे यात संशय नाही." 34याकोबाला
आपल्या मुलाबद्दल अतिशय दु:ख झाले, एवढे की त्याने
आपली वस्त्रे फाडली आणि कंबरेस गोणताट गुंडाळले
आणि कितीतरी दिवस आपल्या मुलासाठी शोक केला.
35याकोबाच्या सर्व मुलांनी व मुलीनीं त्याचे सांत्त्वन
करण्याचा खूप प्रयत्न केला खरा परंतु तो कधीही समाधान
पावला नाही; तो म्हणाला, "मी मरेपर्यंत माझ्या मुलासाठी
शोक करीत राहीन व अधोलोकात माझ्या मुलाकडे
जाईन*." असा त्याच्या बापाने योसेफाकरिता अतिशय
शोक केला.
36त्या मिद्यानी व्यापाऱ्यांनी योसेफास मिसर देशात नेऊन
पोटीफर नांवाचा फारो राजाचा अधिकारी, गारद्यांचा सरदार
होता त्यास विकून टाकले.

## यहूदा व तामार

38 त्याच सुमारास यहूदा आपल्या भावांना सोडून
अदुल्लाम नगरातील हीरा नांवाच्या माणसाबरोबर
त्याच्या घरी राहावयास गेला. 2तेथे यहूदाला शूवा नांवाच्या
एक कनानी माणसाची मुलगी भेटली. तेव्हा यहूदाने
तिच्याशी लग्न केले. 3त्या कनानी मुलीला एक मुलगा
झाला. त्यांने त्याचे नांव एर ठेवले. 4त्यानंतर तिला आणखी
एक मुलगा झाला त्यांनी त्याचे नांव ओनान ठेवले.

---

**मी मरेपर्यंत ... जाईन** माझ्या दु:खात मी खाली माझ्या मुलाकडे शेओलमध्ये (मृतांच्या जागी) जाईन.

[5]त्यानंतर तिला शेला नांवाचा आणखी एक मुलगा झाला.
तिसरा मुलगा झाला तेव्हा यहूदा कजीब येथे राहात होता.
[6]यहूदाने आपला पहिला मुलगा एर याच्यासाठी बायको
म्हणून तामार नांवाच्या स्त्रीची निवड केली. [7]परंतु एर
याने बऱ्याच वाईट गोष्टी केल्या मुळे परमेश्वर त्याच्यावर
खुश नव्हता म्हणून परमेश्वराने त्याला ठार मारले.
[8]मग यहूदा, एर याचा भाऊ ओनान याला, म्हणाला, "तू
जाऊन तुझ्या मरण पावलेल्या भावाच्या बायकोपाशी नीज;
आणि तू तिचा नवरा असल्याप्रमाणे तिच्याशी वाग जर
तुझ्यापासून तिला मुले झाली तर ती तुझ्या भावाची मुले
समजली जातील व त्याचा वंश पुढे चालवितील;"*
[9]आपल्या भावाजयीपाशी निजल्यावर ह्या मीलनातून
होणारी मुले आपले नांव धारण करून चालणार नाहीत
हे ओनानला माहीत होते म्हणून जेव्हा तो त्याच्या
भावजयीपाशी निजे तेव्हा तो आपले वीर्य बाहेर जमिनीवर
पाडत असे. [10]परंतु त्याच्या ह्या वागण्याचा परमेश्वराला
राग आला, म्हणून त्याने ओनानलाही मारून टाकले.
[11]मग यहूदा आपली सून तामार हिला म्हणाला, "तू तुझ्या
बापाच्या घरी जाऊन तेथे राहा, पण माझा मुलगा शेला
लग्नाच्या वयाचा होईपर्यंत लग्न करु नको;" कारण
शेलाही आपल्या दोन भावाप्रमाणे मारला जाईल अशी
यहूदाला भीती वाटली; म्हणून मग तामार आपल्या बापाच्या
घरी जाऊन राहिली.
[12]काही काळानंतर यहूदाची बायको म्हणजे शूवाची
मुलगी मरण पावली. तिच्यासाठी शोक करण्याचे दिवस
संपल्यानंतर तो अदुल्लाम येथील आपला मित्र हिरा
याच्याबरोबर [13]आपल्या मेंढरांची लोकर कातरवून
घेण्याकरिता तिम्ना येथे जात होता हे तामारला समजले.
[14]तामार नेहमीच आपल्या विधवादशेतील वस्त्रे घालीत
असे; तेव्हा तिने आता वेगळी वस्त्रे घातली आणि बुरखा
घेऊन आपले तोंड झाकले. नंतर तिम्ना जवळच्या एनाईम
गांवाला जाणाऱ्या रस्त्याच्याजवळ ती बसून राहिली.
यहूदाचा मुलगा शेला आता लग्न करण्याच्या वयाचा
झाला आहे हे तामारला माहीत होते; परंतु त्याच्याशी तिचे
लग्न लावून देण्याविषयी यहूदा काहीच योजना करीत
नव्हता. [15]यहूदा रस्त्याने चालला होता. त्याने तिला पाहिले
परंतु ती एक वेश्या असावी असे त्याला वाटले; (कारण
वेश्या जसे आपले तोंड झाकतात तसे तिने आपले तोंड
बुरख्याने झाकले होते.) [16]तेव्हा यहूदा तिच्या जवळ जाऊन
म्हणाला, "मला तुझ्यापाशी निजू दे." (ती तामार आहे,
म्हणजे आपली सून आहे हे यहूदाला माहीत नव्हते.)

ती म्हणाली, "तुम्ही मला त्याबद्दल काय मोबदला द्याल?"
[17]यहूदा म्हणाला, "मी तुला माझ्या कळपातून एक चांगला
तरणाबांड बकरा पाठवून देईन."

ती म्हणाली, "ठीक आहे, मी मान्य करिते, परंतु तो
पाठवून देई पर्यंत प्रथम माझ्याजवळ काय हडप
ठेवाल?"

[18]यहूदा म्हणाला, "मी तुला बकरा पाठवून देईन त्यासाठी
पुरावा म्हणून तुझ्यापाशी मी काय हडप ठेवावे अशी तुझी
इच्छा आहे?"

तामार म्हणाली, "तुम्ही कागदपत्रे, करार वगैरेवर
उमटवण्यासाठी व सीलबंद करण्यासाठी जो शिक्का व
जी दोरी वापरता ती मला द्या." तेव्हा यहूदाने त्या वस्तू
तिला दिल्या. मग तो तिजपाशी जाऊन निजला. आणि
त्यामुळे ती गरोदर राहिली. [19]मग घरी गेल्यावर तामारने
आपले तोंड झाकण्याचा बुरखा काढून टाकला आणि
पुन्हा पहिल्या सारखी विधवेची वस्त्रे घातली.

[20]आपण कबूल केल्याप्रमाणे त्या वेश्येला बकरा
देण्यासाठी यहुदाने आपला मित्र हीरा याला एनाईम गांवाला
त्या वेश्येकडे पाठवले. त्याचप्रमाणे आपण तिला दिलेल्या,
शिक्का, दोरी व काही वस्तू तिजकडून घेऊन येण्यास
सांगितले, परंतु हीराला ती वेश्या सांपडली नाही. [21]त्याने
एनाईम गांवातील काही लोकांना विचारले, "येथे ह्या
रस्त्याच्या बाजूला होती ती वेश्या कोठे आहे?"

तेव्हा लोकांनी उत्तर दिले, "येथे कधीच कोणीही वेश्या
नव्हती."

[22]तेव्हा यहूदाचा मित्र त्याच्याकडे परत गेला व म्हणाला,
"ती वेश्या मला काही सांपडली नाही, तेथे राहाणारे लोक
म्हणाले की तेथे कोणीही वेश्या कधीच नव्हती."

[23]तेव्हा यहूदा म्हणाला, "जाऊ दे, त्या वस्तू तिला
ठेवून घेऊ दे. अधिक चौकशी केल्यास लोकांकडून
आपलीच नालस्ती होईल आणि लोकांकडून आपले हंसे
व्हावे अशी माझी इच्छा नाही. मी कबूल केल्याप्रमाणे
तिला बकरा देण्याचा प्रयत्न केला, परंतु ती आपणांस
सापडली नाही. झाले एवढे पुरे आहे."

## तामार गरोदर राहते

[24]या नंतर जवळ जवळ तीन महिन्यांनी कोणीतरी
यहूदाला सांगितले, "तुझ्या सुनेने वेश्येप्रमाणे पापकर्म केले
आणि त्या जारकर्मामुळे ती आता गरोदर राहिली आहे."

तेव्हा मग यहूदा रागाने म्हणाला, "तिला खेचून बाहेर
काढा व जाळून टाका."

[25]त्याप्रमाणे काही लोक तामारला ठार मारण्याकरिता
तिजकडे गेले, परंतु तिने आपल्या सासऱ्यासाठी एक निरोप
पाठवला. तामार म्हणाली, "मला गर्भवती करणारा पुरुष
ह्या वस्तूंचा मालक आहे. या वस्तूंकडे नीट पाहा; कोणाच्या
आहेत या वस्तू? कोणाची आहे ही मोहोर व ही दोरी?
कोणाची आहे ही काठी? सांगा;" [26]यहूदाने त्या वस्तू

---

**तू जाऊन ... चालवितील** कारण त्या काळी इस्राएल लोकात अशी रुढी होती की जर एखादा विवाहित माणूस मूल न होता मरण पावला तर भावापैकी एकाने त्याच्या बायकोशी लग्न करावे आणि जर तिला मुले झाली तर ती मुले त्याच्या मरण पावलेल्या भावाची समजावीत.

ओळखल्या आणि तो म्हणाला, “तिचे बोलणे अगदी बरोबर आहे; माझेच चुकले आहे; मी तिला वचन दिल्याप्रमाणे तिचे माझ्या मुलाशी लग्न लावून दिले नाही.” आणि त्यानंतर मात्र त्याने तिच्याशी पुन्हा कधीच शरीर संबंध केला नाही. 27तामार हिची बाळंत होण्याची वेळ जवळ आली. तिला जुळे होणार असे लोकांना वाटले. 28बाळंत होते वेळी एका बाळाचा हात बाहेर आला. तेव्हा सुईणीने त्याच्या हाताला लाल धागा बांधला व ती म्हणाली, “हा आधी जन्मला;” 29परंतु त्या बाळाने आपला हात आखडून घेतला. त्यानंतर मग दुसरे बाळ प्रथम जन्मले; म्हणून मग ती सुईण म्हणाली, “हं! मग तू प्रथम वाट काढून जन्मलास तर!” म्हणून त्यांनी त्याचे नांव पेरेस (म्हणजे हिब्रू भाषेप्रमाणे ‘वाट काढणारा’) असे ठेवले. 30त्यानंतर हाताला लाल धागा बांधलेले ते दुसरे बाळ जन्मले. त्यांनी त्याचे नांव जेरह (म्हणजे हिब्रू भाषेप्रमाणे तेजस्वी किंवा तेजाने प्रकाशणारा) असे ठेवले.

### योसेफ मिसरमध्ये पोटीफरला विकला जातो

39 योसेफाला विकत घेतलेल्या व्यापाऱ्यांनी त्याला मिसरला नेले व फारो राजाचा एक अधिकारी गारद्यांचा म्हणजे संरक्षक दलाचा सरदार पोटीफर यास विकले. 2परंतु परमेश्वराने योसेफाला सहाय्य केले म्हणून तो यशस्वी पुरुष झाला. योसेफ आपला स्वामी मिसरचा रहिवासी पोटीफर याच्याच घरी राहात असे.

3परमेश्वर योसेफा बरोबर आहे आणि म्हणून त्याच्या हर एक कामात तो त्याला यश देतो हे पोटीफरला दिसून आले. 4म्हणून पोटीफर योसेफावर फार खुष होता. त्याने योसेफाला आपल्या घरचा कारभार पाहाण्यात मदत करण्यास सांगितले. 5तेव्हा पोटीफराच्या सर्व कारभाराचा अधिकारी नेमल्यावर परमेश्वराने योसेफामुळे पोटीफराचे घरदार, शेतीबाडी इत्यादी त्याच्या मालकीच्या सर्व मालमत्तेस आशीर्वाद दिला. 6याप्रमाणे पोटीफराने आपल्या घरादाराचा सर्व कारभार योसेफाच्या हवाली केला; म्हणून पोटीफर फक्त पुढ्यात वाढलेले भोजन घेई, त्या पलीकडे कशाचीही जबाबदारी त्याच्यावर नव्हती.

### योसेफ पोटीफराच्या बायकोला नकार देतो

योसेफ फार देखणा व बांधेसूद तरुण होता. 7काही काळानंतर पोटीफराच्या बायकोला तो आवडू लागला. एके दिवशी ती त्याला म्हणली, “माझ्याबरोबर नीज”

8परंतु तसे करण्यास योसेफाने तिला नकार दिला. तो म्हणाला, “पाहा, या घराच्या सर्व कारभाराबद्दल माझ्या स्वामीचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे आणि तुम्हा खेरीज येथील सर्व गोष्टी त्याने माझ्या ताब्यात देऊन त्यांची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. 9माझ्या स्वामीने मला या घरात जवळ जवळ त्याच्या समान मोठेपणा दिला आहे; असे असताना अशा उदार स्वामीच्या बायकोपाशी निजणे मला योग्य नाही. ते चुकीचे आहे; ते परमेश्वराच्या विरुद्ध घोर पाप आहे!”

10पोटीफराची बायको दररोज योसफाबरोबर बोलत असे परंतु त्याने तिच्याबरोबर निजण्यास स्पष्ट पणे नकार दिला. 11एके दिवशी योसेफ आपले काही काम करण्याकरिता आतल्या घरात गेला. तो तेथे अगदी एकटाच होता व घरात दुसरे कोणीही नव्हते. 12अशावेळी त्याच्या स्वामीच्या बायकोने त्याचे वस्त्र धरून त्याला म्हटले “तू माझ्यापाशी नीज.” परंतु योसेफ ते वस्त्र तिच्या हातात सोडून आतल्या घरातून बाहेर पळून गेला. 13तेव्हा योसेफ आपले वस्त्र आपल्या हाती सोडून पळून गेला हे तिने पाहिले. खोटे बोलून या घटनेचा अर्थ उलट करायचा असे तिने ठरवले. 14आणि तिने आरडा ओरडा करून बाहेरील माणसांना बोलावले. ती म्हणाली, “पाहा, हा इब्री तरुण गुलाम आमच्या घरच्या माणसांची अब्रू घेण्यासाठी येथे आणून ठेवला आहे. त्याने आत येऊन माझ्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. परंतु मी मोठयाने आरडा ओरडा केला; 15त्यामुळे घाबरून हे त्याचे वस्त्र माझ्यापाशी टाकून तो पळून गेला.” 16तेव्हा तिने आपला नवरा, योसेफाचा स्वामी घरी येईपर्यंत ते वस्त्र आपल्याजवळ सांभाळून ठेवले. 17आणि आपला नवरा घरी आल्यावर तिने त्याला तीच गोष्ट सांगितली. ती म्हणाली, “तुम्ही हा जो इब्री तरूण गुलाम घरी आणून ठेवला आहे त्याने माझ्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. 18परंतु तो माझ्याजवळ आल्यावर मी आरडा ओरडा केला म्हणून तो घाबरून आपले वस्त्र टाकून पळून गेला;”

### योसेफ तुरुंगात टाकला जातो

19आपल्या बायकोचे बोलणे ऐकल्यावर योसेफाच्या स्वामीचा राग खूप भडकला. 20राजाच्या शत्रूंना डांबण्यासाठी एक तुरुंग होता. तेव्हा पोटीफराने योसेफाला त्या तुरुंगात टाकले. योसेफ त्या तुरुंगात राहिला.

21परंतु परमेश्वर योसेफाबरोबर होता; आणि योसेफावर परमेश्वराची दया सतत राहिली; काही काळानंतर तुरुंगाच्या अधिकाऱ्यास योसेफ आवडू लागला. 22त्या अधिकाऱ्याने तुरुंगातील सर्व कैद्यांना योसेफाच्या स्वाधीन केले योसेफ; त्यांचा प्रमुख होता तरी पण तोही त्यांच्या सारखेच काम करी. 23तुरुंगाच्या अधिकाऱ्याने तुरुंगातील सर्व गोष्टींसाठी योसेफावर विश्वास ठेवला; परमेश्वर योसेफाबरोबर होता म्हणून हे सर्व काही झाले. योसेफ जे काही करी त्यात परमेश्वर त्याला यश देई.

### योसेफ दोन स्वप्नांचा अर्थ सांगतो

40 काही दिवसानंतर फारोच्या नोकराकडून काही अपराध घडला. हे नोकर म्हणजे एक आचारी व दुसरा प्यालेबरदार हे होते. 2म्हणून फारो राजा त्यांच्यावर रागावला. 3तेव्हा फारोने त्यांना योसेफ ज्या तुरुंगात होता

त्यातच डांबून टाकले. फारोच्या गारदयांचा सरदार पोटीफर
हा त्या तुरुंगाचा मुख्य अधिकारी होता. 4त्या सरदाराने
त्या दोघाही अपराध्यांना योसेफाच्या ताब्यात देऊन
त्यांच्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले. ते दोघे काही काळपर्यंत
तुरुंगात अटकेत राहिले. 5एके रात्री त्या दोघांही अपराध्यांना
एकेक स्वप्न पडले, आणि प्रत्येकाच्या स्वप्नाचा विशेष
अर्थ होता. 6दुसऱ्या दिवशी सकाळी योसेफ त्यांच्याकडे
गेला तेव्हा ते त्याला दु:खी व चिंतेत असलेले दिसले.
7तेव्हा योसेफाने त्यांना विचारले, "तुम्ही आज एवढे
काळजीत का दिसता?"
8त्या दोघांनी उत्तर दिले, "आम्हा दोघांना रात्री एक
एक स्वप्न पडले; परंतु त्यांचा अर्थ आम्हाला समजत
नाही; त्यांचा अर्थ सांगणारा किंवा उलगडा करणारा कोणी
नाही." योसेफ त्यांना म्हणाला, "एकच म्हणजे केवळ
देवच स्वप्नांचा अर्थ सांगू शकतो किंवा उलगडा करु
शकतो; म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की तुम्ही मला
तुमची स्वप्ने सांगा."

## प्यालेबरदाराचे स्वप्न

9तेव्हा प्यालेबरदाराने योसेफाला आपले स्वप्न सांगितले.
तो म्हणाला, "मी माझ्या स्वप्नात एक द्राक्षवेल पाहिला.
10त्याला तीन फाटे होते. त्या फाटयांना फुले आली व
नंतर त्यातून द्राक्षे तयार झाली असे मी पाहिले. 11मी
फारो राजाचा मद्याचा प्याला धरून उभा होतो; तेव्हा मी
ती द्राक्षे घेऊन त्या प्यालात पिळली; आणि मग द्राक्षारसाचा
तो प्याला मी फारोच्या हातात दिला."
12नंतर योसेफ म्हणाला, "ह्या तुझ्या स्वप्नाचा अर्थ मी
तुला उलगडून सांगतो; ते तीन फाटे म्हणजे तीन दिवस.
13हे तीन दिवस संपण्यापूर्वी फारो राजा तुझ्या अपराधाची
तुला क्षमा करील व तुला पुन्हा तुझ्या पूर्वीच्या कामावर
परत घेईल. तू आतापर्यंत फारोचे जे काम करीत होतास
तेच काम तू करशील. 14परंतु तुला तुरुंगातून सोडल्यावर
माझी आठवण कर, व माझ्यावर कृपा करून मला मदत
कर. माझ्या संबंधी फारोला सांग म्हणजे मग मी ह्या
तुरुंगातून सुटेन. 15मला माझ्या घरातून व माझ्या
मायदेशातून म्हणजे माझ्या इब्री लोकांच्या देशातून येथे
बळजबरीने आणले गेले; वास्तविक मला येथे तुरुंगात
अटकेत राहाण्याची शिक्षा मिळावी असा मी कोणाचा
काहीच अपराध केला नाही."

## आचाऱ्याला पडलेले स्वप्न

16आचाऱ्याने पाहिले की दुसऱ्या बंदीवान सेवकाचे
स्वप्न चांगले आहे; म्हणून तो योसेफाला म्हणाला, "मला
ही एक स्वप्न पडले, ते असे; माझ्या डोक्यावर रोट्यांच्या
तीन टोपल्या होत्या. 17सगळ्यात वरच्या टोपलीत फारो
राजासाठी सर्व प्रकारची पक्वाने होती; परंतु त्या
पक्वान्नातील पदार्थ पक्षी खात होते."

18योसेफाने उत्तर दिले, "तुझ्या स्वप्नाचा अर्थ मी उलडून
सांगतो त्या तीन टोपल्या म्हणजे तीन दिवस. 19तीन दिवस
संपण्याच्या आत फारो राजा तुला या बंदीवासातून सोडवील
आणि तुझे शीर उडवून टाकील व तुझे धड झाडाला
टांगील; आणि पक्षी तुझ्या धडाचे मांस तोडून खातील."

## योसेफाचा विसर पडतो

20तीन दिवसानंतर फारो राजाचा वाढदिवस होता. तेव्हा
त्याने आपल्या सर्व सेवक वर्गाला एक मेजवानी दिली;
त्यावेळी त्याने त्या आचाऱ्याला व प्यालेबरदाराला तुरुंगातून
सोडले. 21फारोने प्यालेबरदाराची सुटका केली व त्याला
पुन्हा पूर्वीप्रमाणे त्याच्या कामावर ठेवले; आणि
प्यालेबरदाराने मद्याचा प्याला फारो राजाच्या हातात दिला.
22परंतु फारोने आचाऱ्याला फाशी दिले.; तेव्हा जे होईल
असे योसेफाने सांगितले होते ते थेट तसेच घडून आले.
23परंतु त्या प्यालेबरदाराने योसेफाला मदत करण्याची
आठवण ठेवली नाही; फारोजवळ योसेफासंबंधी तो काहीच
बोलला नाही. अशा रीतीने त्या प्यालेबरदाराला
योसेफाविषयी विसर पडला.

## फारो राजाला पडलेली स्वप्ने

41 दोन वर्षानंतर फारो राजाला स्वप्न पडले;ते असे
की तो नाईल नदीच्या काठी उभा राहिला होता.
2तेव्हा त्याने सात गाई नाईल नदीतून बाहेर येताना पाहिल्या.
त्या धुष्टपुष्ट व सुंदर होत्या. त्या तेथे उभ्या राहून गवत
खात होत्या. 3त्यानंतर आणखी सात रोड व कुरुप गाई
नदीतून बाहेर आल्या व त्या सात धष्टपुष्ट व सुंदर गाईंच्या
बाजूला उभ्या राहिल्या. 4आणि त्या सात दुबळ्या व कुरुप
गाईनी त्या सात सुंदर व धष्टपुष्ठ गाईना खाऊन टाकले.
त्या नंतर फारो राजा जागा झाला.
5मग फारो राजा पुन्हा झोपल्यावर त्याला दुसऱ्यांदा
स्वप्न पडले; त्यात त्याने पाहिले की एकाच ताटाला सात
भरदार कणसे आली. 6त्या नंतर त्या ताटाला सात
खुरटलेली व करपलेली अशी सात कणसे आली. 7नंतर
त्या सात खुरटलेल्या व करपलेल्या कणसांनी ती सात
चांगली व टपोऱ्या दाण्यांची भरदार कणसे गिळून टाकली;
तेव्हा फारो पुन्हा जागा झाला आणि ते तर स्वप्न असल्याचे
त्याला समजले.
8दुसऱ्या दिवशी सकाळ झाल्यावर फारो राजा त्या
स्वप्नामुळे चिंतेत पडून बेचैन झाला व त्याने पंडितांना
बोलावले; फारोने आपली स्वप्ने त्यांना सांगितली; परंतु
त्यांतील कोणालाच त्या स्वप्नांच अर्थ सांगता आला नाही
किंवा त्याचा उलगडा करता आला नाही.

## प्यालेबरदार योसेफाविषयी फारोला सांगतो

9तेव्हा प्यालेबरदाराला योसेफाची आठवण आली. तो
फारोस म्हणाला, "माझ्या बाबतीत जे घडले त्याची मला

आठवण येत आहे; 10आपण माझ्यावर व आचाऱ्यावर
संतापला होता आणि आपण आम्हांस तुरुंगात टाकले
होते. 11तेव्हा तुरुंगात असताना एकाच रात्री आम्हा दोघांना
स्वप्ने पडली. प्रत्येक स्वप्नाचा अर्थ वेगळा होता.
12तेथे कोणी इब्री तरुण आमच्या बरोबर कैदेत होता.
तो गारद्यांच्या सरदाराचा दास होता. त्याला आम्ही आमची
स्वप्ने सांगितली त्याने त्यांचे स्पष्टीकरण केले आणि
त्याने आमच्या स्वप्नांचा अर्थ सांगितला व उलगडा केला.
13आणि त्याने सांगितलेला अर्थ खरा ठरला. तो म्हणाला
की माझी सुटका होईल व मला पूर्वीप्रमाणे माझ्या कामावर
पुन्हा घेतले जाईल आणि अगदी त्याप्रमाणे खरेच घडून
आले; आणि तो म्हणाला की आचारी मरेल आणि त्याप्रमाणे
तेही खरे झाले."

### योसेफाला स्वप्नांचा अर्थ सांगण्यास बोलावले जाते

14मग फारोने योसेफाला तुरुंगातून आणण्यास बोलावणे
पाठवले. तेव्हा गारद्यांनी योसेफाला ताबडतोब तुरुंगातून
बाहेर आणले. योसेफ दाढी करून व स्वच्छ कपडे बदलून
फारोपुढे येऊन उभा राहिला. 15मग फारो योसेफास
म्हणाला, "मला स्वप्न पडले आहे, परंतु त्याचा अर्थ
सांगणारा कोणी नाही. मी तुझ्याविषयी ऐकले की जो
कोणी तुला स्वप्न सांगतो तेव्हा तू लगेच स्वप्नांचा अर्थ
सांगतोस."
16योसेफ म्हणाला, "मी माझ्या कौशल्याने किंवा
हुशारीने स्वप्नांचा अर्थ सांगतो असे नाही, तर केवळ
देवालाच हे सामर्थ्य आहे आणि तो देवच फारोच्या स्वप्नांचा
अर्थ सांगेल."
17मग फारो योसेफाला म्हणाला, "स्वप्नामध्ये मी नाईल
नदीच्या काठी उभा होतो. 18तेव्हा नदीतून सात धष्टपुष्ट
व सुंदर गाई बाहेर आल्या व गवत खाऊ लागल्या असे
मी पाहिले. 19त्यानंतर सात रोड व कुरुप गाई नदीतून
बाहेर येताना मी पाहिल्या. त्यांच्या सारख्या दुबळ्या व
कुरुप गाई मी सबंध मिसर देशात कधीच पाहिल्या नव्हत्या.
20त्या रोड व कुरुप गाईनी आधीच्या धष्टपुष्ट व सुंदर
गाई गिळून टाकल्या. 21तरीही त्या रोड व कुरुपच राहिल्या,
त्यांच्याकडे पाहिल्यावर त्यांनी त्या सात गाई गिळून टाकल्या
असे वाटत नव्हते; त्या पूर्वी इतक्याच अशक्त व रोड
दिसत होत्या मग मी जागा झालो.
22"त्यानंतर दुसऱ्या स्वप्नात एकाच ताटाला सात चांगली
भरदार व टपोऱ्या दाण्यांची भरगच्च कणसे आली, 23मग
त्यांच्या मागून त्या ताटाला आणखी दुसरी करपटलेली,
कुरुप व गरम वाऱ्याच्या झळयामुळे करपलेली सात
कणसे आली. 24व त्यांनी ती चांगली सात कणसे गिळून
टाकली.
"ही माझी स्वप्ने मी माझ्या जादुगारांना, ज्योतिष्यांना व
पंडितांना सांगितली; परंतु त्यांचा अर्थ कोणालाही सांगता
आला नाही; तेव्हा त्यांचा अर्थ काय आहे?"

### योसेफ स्वप्नांचा अर्थ सांगतो

25मग योसेफ फारोला म्हणाला, "महाराज, ह्या दोन्हीही
स्वप्नांचा अर्थ एकसारखाच आहे; लवकरच काय होणार
आहे हे देव आपणास सांगत आहे; 26त्या सात चांगल्या
गाई आणि ती सात चांगली कणसे म्हणजे सात चांगली
वर्षे. दोन्हीही स्वप्ने सारखीच आहेत; 27त्या दुसऱ्या सात
रोड गाई व ती सात रोड कणसे म्हणजे अवघ्या देशावर
येणाऱ्या दुष्काळाची सात वर्षे. ती सात वर्षे चांगल्या सात
वर्षानंतर येतील. 28लवकरच काय घडणार आहे हे देवाने
आपणास दाखवले आहे. मी संगितल्याप्रमाणेच हे घडून
येईल. 29सात वर्षांच्या सुबत्तेच्या काळात चांगले व भरपूर
पीक येईल व मिसर देशभर भरपूर खावयास असेल.
30परंतु सुकाळाच्या सात वर्षांनंतर सर्व देशभर
दुष्काळाची अशी सात वर्षे येतील की त्यामुळे मिसर
देशभर पिकलेले धान्य विसरले जाईल; आणि हा दुष्काळ
देशाचा नाश करील. 31आणि भरपूर धान्य असतानाचे
दिवस कसे होते याचा लोकांना विसर पडेल.
32"तेव्हा फारो महाराज, एकाच गोष्टीविषयी आपणाला
दोन स्वप्ने पडली ते यासाठी की देव हे सर्व लवकरच व
नक्की घडवून आणील, हे आपणास दाखवावे. 33तेव्हा,
फारो महाराज, आपण एखाद्या चतुर व शहाण्या पुरुषाची
निवड करून त्याला सर्व मिसर देशावर प्रशासक म्हणून
नेमावे; 34त्या नंतर शेतकऱ्याकडून धान्य गोळा
करण्यासाठी इतर अधिकारी निवडावेत; येत्या सात वर्षांच्या
सुकाळात प्रत्येकाने आपल्या धान्याच्या उत्पन्नाचा पांचवा
हिस्सा सरकारला द्यावा. 35अशा रीतीने ही माणसे
सुकाळाच्या सात वर्षात पुष्कळ अन्न गोळा करतील आणि
गरज पडेपर्यंत नगरात साठवून ठेवतील अशा प्रकारे,
फारो, हे अन्न तुझ्या नियंत्रणात राहील. 36येणाऱ्या
दुष्काळातील सात वर्षांच्या काळात त्या धान्याचा उपयोग
होईल. तेव्हा मग दुष्काळाच्या सात वर्षात मिसरचा नाश
होणार नाही."
37फारो राजाला ही कल्पना फार चांगली वाटली व
पटली; तसेच त्याच्या सर्व सेवकांनी एकमताने तिला संमती
दिली. 38फारोने म्हटले, "योसेफापेक्षा अधिक चांगला व
योग्य, दुसरा कोणी पुरुष सापडेल काय? देवाचा आत्मा
त्याच्यात असल्यामुळे त्याला शहाणपण येते!"
39तेव्हा फारो योसेफास म्हणाला, "देवाने तुला या सर्व
गोष्टी दाखवल्या आहेत, म्हणून तुझ्यासारखा चतुर व
शहाणा दुसरा कोणी नाही. 40म्हणून मी तुला या देशाचा
(मिसरचा) अधिपती म्हणजे सर्वात उच्च अधिकारी म्हणून
नेमतो. सर्व लोक तुझ्या सर्व आज्ञा पाळितील; या देशात
केवळ राजासना पुरता म्हणजे नामधारी राजा म्हणून
काय तो मी एक तुझ्यापेक्षा मोठा असेन."
41मग फारो योसेफास म्हणाला, "मी तुला आता अवघ्या
मिसर देशाचा प्रशासक म्हणून नेमितो." 42मग फारोने
राजमुद्रा असलेली आपल्या बोटातील अंगठी योसेफाच्या

बोटात घातली; तलम तागाच्या वस्त्राचा पोशाख त्याला घातला आणि त्याच्या गळ्यात एक सोन्याची साखळी घातली. 43नंतर फारोने योसेफाला संचलनातील दुसऱ्या रथात बसण्यास सांगितले; खास नेमलेले गारदी पुढे चालले होते; ते ललकारुन जाहीरपणे सांगत होते, “लोक हो! आपल्या देशाचा प्रशासक योसेफ, याला लवून मुजरा करा.”

अशी रीतीने योसेफाला मिसर देशाचा प्रशासक (प्रमुख अधिकारी) नेमले. 44फारो योसेफाला म्हणाला, “मी मिसरचा राजा आहे खरा, परंतु तुझ्या हुकुमाशिवाय कोणी आपला हात किंवा पाय हलवू शकणार नाहीं.”

45फारोने योसेफाला सापनाथ-पानेह असे दुसरे नांव दिले. फारोने ओन शहराचा याजक पोटीफरा याची मुलगी आसनथ ही योसेफाला बायको करून दिली. अशा रीतीने योसेफ सर्व मिसर देशावर प्रशासक झाला. 46योसेफ मिसर देशाचा राजा फारो याची सेवा करु लागला तेव्हा तो अवघा तीस वर्षांचा होता; योसेफाने मिसर देशभर दौरा करून देशाची पाहणी केली. 47सुकाळाच्या सात वर्षात सर्व देशभर भरपूर पीक आले. 48योसेफाने सुकाळाच्या सात वर्षात अन्न गोळा करून त्या त्या शेतातले धान्य जवळच्याच नगरोनगरी साठवून ठेवले. 49योसेफाने जणू काय समुद्राच्या वाळू इतके धान्य गोळा करून साठवून ठेवले; ते इतके होते की त्याचे मोजमाप करता येत नव्हते.

50योसेफाची बायको ही ओन नगराचा याजक पोटीफरा याची मुलगी होती. दुष्काळाच्या सात वर्षांपैकी पहिले वर्ष येण्याअगोदर योसेफ व आसनथ यांना दोन मुलगे झाले. 51पहिल्या मुलाचे नांव मनश्शे होते; योसेफाने त्याला हे नांव दिले कारण तो म्हणाला, “देवाने मला झालेला त्रास व माझ्यावर झालेला अन्याय, तसेच माझ्या घराकडील सर्व काही यांचा मला विसर पडू दिला.” 52योसेफाने दुसऱ्या मुलाचे नांव एफ्राईम असे ठेवले कारण तो म्हणाला, “माझ्यावर संकटे आली परंतु देवाने मला सर्वबाबतीत सफल केले.”

## दुष्काळ पडण्यास सुरवात होते

53सात वर्षांपर्यंत मिसरमध्ये भरपूर अन्न होते पण ती वर्षे संपली. 54परंतु सात वर्षानंतर अगदी योसेफाने सांगितल्याप्रमाणे दुष्काळ पडण्यास सुरुवात झाली; तेव्हा कोणत्याच देशात कोठेही कसलेच पीक आले नाही; आणि लोकांना खावयास धान्य मिळेना; परंतु मिसरमध्ये मात्र योसेफाने धान्य साठवल्यामुळे लोकांपाशी खावयास भरपूर अन्न होते. 55दुष्काळ पडण्यास सुरुवात झाली, तेव्हा लोकांनी धान्यासाठी फारोकडे ओरड केली; तेव्हा फारो मिसरच्या लोकांना म्हणाला, “योसेफाला विचारा व तो सांगले ते करा.”

56तेव्हा चोहीकडे दुष्काळ पडल्यावर योसेफाने मिसरच्या लोकांना धान्य भांडारातून धान्य विकत दिले. मिसरमध्ये फार वाईट प्रकारचा दुष्काळ पडला होत. 57मिसरच्या सभोवतालच्या देशातून लोक धान्य विकत घेण्यासाठी योसेफाकडे येऊ लागले कारण त्यावेळी जगाच्या त्या भागात दुष्काळ पडला होता.

## स्वप्ने खरी होतात

42 या सुमारास कनानमध्ये ही दुष्काळ पडला होता परंतु मिसरमध्ये धान्य असल्याचे याकोबाला समजले. तेव्हा याकोब आपल्या मुलांना म्हणाला, “आपण येथे काही न करता स्वस्थ का बसलो आहो. 2मिसर देशात धान्य मिळते असे मी ऐकले आहे. तुम्ही जाऊन आपणासाठी धान्य विकत आणा म्हणजे आपण जगू, मरणार नाही.”

3तेव्हा योसेफाचे दहा भाऊ धान्य विकत घेण्यासाठी मिसरला गेले. 4याकोबाने, योसेफाचा सख्खा भाऊ बन्यामीन याला त्याच्या भावाबरोबर पाठवले नाही; कारण योसेफाप्रमाणे बन्यामीनावरही काही वाईट प्रसंग ओढवेल अशी त्याला भीती वाटली. 5कनान देशात फारच तीव्र दुष्काळ पडला होता, म्हणून कनानातून पुष्कळ लोक धान्य विकत घ्यावयास मिसरला गेले त्या लोकांत इस्राएलाचे मुलगेही होते.

6त्या वेळी योसेफ मिसरचा प्रशासक म्हणजे प्रमुख अधिकारी होता. बाहरेच्या देशातून धान्य विकत घ्यावयास मिसरमध्ये येणाऱ्या लोकांना धान्य विकण्याचा अधिकार केवळ योसेफालाच होता; म्हणून योसेफाचे भाऊ त्याजकडे आले आणि त्यांनी त्याला लवून नमन केले. 7योसेफाने आपल्या भावांना पाहिल्याबरोबर ओळखले परंतु ते कोण आहेत हे माहीत नसल्यासारखे दाखवून तो त्यांच्याशी कठोरपणाने बोलला त्याने त्यांना विचारले, “तुम्ही कोठून आला?”

त्याच्या भावांनी उत्तर दिले, “महाराज, आम्ही कनान देशातून धान्य विकत घेण्यासाठी आलो आहो.”

8योसेफाने आपल्या भावांना ओळखले परंतु त्यांनी त्याला ओळखले नाही. 9आणि मग योसेफाला आपल्या भावांविषयी पडलेली स्वप्ने आठवली.

## योसेफ आपल्या भावांना हेर ठरवतो

योसेफ आपल्या भावांना म्हणाला, “तुम्ही हेर आहात! तुम्ही धान्य खरेदी करण्यास नव्हे तर आमच्या देशाचा कमजोरपणा हेरण्यास आला आहात.”

10परंतु त्याचे भाऊ म्हणाले, “नाही नाही, महाराज! आम्ही आपले दास खरोखर केवळ धान्य विकत घ्यावयास आलो आहोत. 11आम्ही सर्व भाऊ एका पुरुषाचे मुलगे आहोत. आम्ही प्रमाणिक म्हणजे खरेपणाने बोलणारे व चालणारे सरळ माणसे आहोत. आम्ही खरेच धान्य खरेदी करण्यास आलो आहोत.”

12नंतर योसेफ त्यांना म्हणाला, “नाही, तुम्ही आमचा
कमकुवतपणा पाहण्यास आलेले हेर आहात.”
13परंतु ते भाऊ म्हणाले, “नाही नाही महाराज! आम्ही
सर्व भाऊच आहोत. आमच्या कुटुंबातील आम्ही एका
बापाचे बारा मुलगे आहोत. आमचा सर्वात धाकटा भाऊ
घरी बापाजवळ आहे. आणि आमचा दुसरा एक भाऊ
फार पूर्वी मरण पावला. कनान देशातले आम्ही सर्व
आपल्या दासासमान आहोत.”
14परंतु योसेफ त्यांना म्हणाला, “नाही, माझे म्हणणे
अगदी बरोबर आहे. तुम्ही हेरच आहात; 15परंतु तुम्ही
खरे बोलत आहा हे पटवून देण्याची मी तुम्हाला एक संधी
देतो; फारोची शपथ! मी वचन देतो की तुमचा धाकटा
भाऊ येथे येईपर्यंत तुम्हाला येथून जाता येणार नाही.
16तेव्हा तुम्हातील एकाने मागे घरी जाऊन तुमच्या धाकट्या
भावाला येथे घेऊन यावे, आणि तो पर्यंत तुम्ही इतरांनी
येथे तुरुंगात राहावे; मग तुम्ही कितपत खरे बोलता हे
आम्हास कळेल. परंतु माझी खात्री आहे की तुम्ही हेरच
आहात.” 17मग योसेफाने त्या सर्वांना तीन दिवस तुरुंगात
अटकेत ठेवले.

## शिमोनास ओलीस ठेवले जाते

18तीन दिवसानंतर योसेफ त्यांना म्हणाला, “मी देवभिरू
माणूस आहे. म्हणून मी सांगतो तसेच करा, म्हणजे तुमच्या
धाकट्या भावाला येथे आणून तुमचा खरेपणा पटवून द्या;
मग मी तुम्हाला वाचवू शकेन. 19तुम्ही जर खरेच प्रामाणिक
असाल तर मग तुम्हातील एका भावास येथे तुरुंगात ओलीस
ठेवा व बाकीचे तुम्ही तुमच्या घरच्या माणसांकरिता धान्य
घेऊन जा. 20मग तुमच्या धाकट्या भावास येथे माझ्याकडे
घेऊन या. यावरुन तुम्ही माझ्याशी खरे बोलता किंवा
नाही याची मला खात्री पटेल.” आणि तुम्हाला मरावे
लागणार नाही.”
तेव्हा तसे करण्यास ते भाऊ कबूल झाले. 21ते एकमेकांस
म्हणाले, “आपला धाकटा भाऊ योसेफ याच्याशी आपण
वाईट रीतीने वागलो त्याचा बदला म्हणून आपणास ही
शिक्षा होत आहे. त्याने त्याला सोडून द्यावे व त्याचा जीव
वाचवावा म्हणून काकुळतीने रडून आपणास विनंती केली
परंतु आपण त्याचे ऐकले नाही म्हणून आता आपणास हे
भोगावे लागत आहे.”
22मग रऊबेन त्यांना म्हणाला, “मी तुम्हाला सांगितले
की त्या लहान भावाच्या जीवाला, वाईट रीतीने वागून
काही अपाय करु नका; परंतु तुम्ही ते ऐकले नाही
म्हणून आता त्याच्या मृत्यूबद्दल आपण ही शिक्षा भोगीत
आहोत.” 23योसेफ दुभाष्यातर्फे आपल्या भावांशी बोलत
असल्यामुळे, योसेफाला आपल्या भाषेतील बोलणे कळत
असेल असे त्यांना वाटले नाही. परंतु त्यांचे सर्व बोलणे
योसेफाला समजले; त्यामुळे त्याला फार दु:ख झाले व
24म्हणून तो त्यांच्यापासून बाजूला जाऊन रडला थोडया
वेळाने तो परत त्यांच्याकडे आला. आणि त्यांच्याशी बोलला
इतर भाऊ पाहात असताना त्याने एका भावाला शिमोनला
त्यांच्यातून काढून घेतले आणि बांधले. 25मग आपल्या
भावांच्या पोत्यात धान्य भरण्यास तसेच त्या धान्याबद्दल
त्याच्या भावांनी दिलेला परंतु योसेफाने न घेतलेला पैसा
गुपचूप ज्याच्या त्याच्या पोत्यात भरण्यास व त्यांच्या परतीच्या
प्रवासात वाटेत खाण्यासाठी अन्नसामग्री देण्यास योसेफाने
आपल्या काही सेवकांना सांगितले.
26तेव्हा त्या भावांनी ते धान्य आपापल्या गाढवावर
लादले व तेथून ते माघारी जाण्यास निघाले. 27ते भाऊ
रात्रीच्या मुक्कामासाठी एका ठिकाणी थांबले. तेव्हा
त्यांच्यापैकी एकाने त्याच्या गाढवाला थोडेसे धान्य
देण्यासाठी आपली गोणी उघडली तेव्हा त्याने धान्यासाठी
दिलेले पैसे त्याला त्या गोणीत आढळले. 28तेव्हा तो आपल्या
इतर भावांना म्हणाला, “पाहा! धान्यासाठी मी दिलेले हे
पैसे कोणीतरी पुन्हा माझ्या गोणीत ठेवले आहेत!” तेव्हा
ते भाऊ अतिशय घाबरले, ते एकमेकांस म्हणाले, “देव
आपल्याला काय करत आहे.”

## ते भाऊ याकोबाला हकीकत सांगतात

29ते भाऊ कनान देशास आपला बाप याकोब याजकडे
गेले आणि त्यांनी घडलेल्या सर्व गोष्टी त्याला सांगितल्या.
30ते म्हणाले, “त्या देशाचा (मिसरचा) अधिपति म्हणजे
प्रमुख अधिकारी आमच्याशी कठोरपणाने बोलला आम्ही
हेर आहोत असे त्याला वाटले; 31परंतु आम्ही हेर नसून
प्रामाणिक म्हणजे खरेपणाने वागणारे सरळ माणसे आहोत
असे त्याला सांगितले. 32आम्ही त्याला सांगितले की आम्ही
बारा भाऊ एका माणसाचे मुलगे आहोत आमचा एक
भाऊ वारला तसेच आमचा सर्वात धाकटा भाऊ कनान
देशात आजपर्यंत आमच्या बापाजवळच असतो असेही
सांगितले.
33“तेव्हा त्या देशाचा प्रशासक म्हणजे प्रमुख अधिकारी
आम्हाला म्हणाला, ‘तुम्ही प्रामाणिक व साळसूद लोक
आहात हे पटवून देण्याचा एक मार्ग आहे; तो असा की
तुम्ही तुम्हातील एका भावास येथे ओलीस माझ्यापाशी
ठेवा; तुम्ही इतरजण तुमच्या कुटुंबातील माणसाकरिता
धान्य घेऊन जा. 34आणि नंतर तुम्ही तुमच्या धाकट्या
भावाला येथे माझ्याकडे घेऊन या; मग तुम्ही खरेच
प्रामाणिक व साळसूद माणसे आहात हे मला पटेल; नाही
तर मग तुम्ही तुमच्या सेनापतीच्या हुकुमाने आमचा नाश
करावयास आला आहात असे मी समजेन; तुम्ही जर खरे
बोलत असाल तर मग मी तुमचा भाऊ परत तुमच्या
हवाली करीन आणि मग तुम्हाला आपणाकरिता आमच्या
देशातून धान्य विकत घेण्यासाठी ये जा करण्याची परवानगी
असेल.’”
35मग ते भाऊ आपापल्या पोत्यातून धान्य काढावयास
गेले; तेव्हा प्रत्येकाच्या पोत्यात पैशाची पिशवी मिळाली.

त्या पैशाच्या पिशव्या पाहून ते भाऊ व त्यांचा बाप हे
अतिशय घाबरले.
36 याकोब त्यांना म्हणाला, "मी माझ्या सर्व मुलांना मुकावे
अशी तुमची इच्छा आहे काय? योसेफ गेला; शिमोनही
गेला; आणि आता बन्यामीनालाही माझ्यापासून घेऊन
जाण्याची तुमची इच्छा आहे!"
37 मग रऊबेन आपल्या बापास म्हणाला, "बाबा, मी जर
बन्यामीनाला मागे आणले नाही तर माझे दोन मुलगे
तुम्ही मारुन टाका; बाबा, माझ्यावर विश्वास ठेवा! मी
खरोखर बन्यामीनाला मागे तुमच्याकडे घेऊन येईन!"
38 परंतु याकोब म्हणाला, "मी बन्यामीनाला
तुमच्याबरोबर पाठविणार नाही; त्याचा भाऊ मरण पावला
आणि आता माझी बायको राहेल हिचा एवढा एकच
मुलगा राहिला आहे. मिसरच्या फेरीत त्याला काही अपाय
झाला तर त्यामुळे मला मरण येईल; आणि अतिशय
दु:खी म्हातारा माणूस म्हणून तुम्ही मला कबरेत पाठवाल."

## याकोब बन्यामीनाला मिसरला देण्यास कबूल होतो

43 त्याकाळी कनान देशात फारच तीव्र दुष्काळ
पडला होता. 2 याकोबाच्या मुलांनी मिसरहून
आणलेले सगळे धान्य घरातील माणसांनी खाऊन
संपल्यावर याकोब आपल्या मुलांना म्हणाला, "तुम्ही पुन्हा
मिसरला जा व आपल्याला खाण्यासाठी आणखी धान्य
विकत आणा."
3 परंतु यहूदा याकोबास म्हणाला, "त्या देशाच्या प्रमुख
अधिकाऱ्याने आम्हाला ताकीद दिली; तो म्हणाला, 'तुम्ही
जर तुमच्या धाकटया भावाला तुमच्या बरोबर माझ्याकडे
आणले नाही तर मी तुमच्याशी बोलणार देखील नाही.'
4 तेव्हा तुम्ही बन्यामीनाला आमच्याबरोबर पाठवत असाल
तरच आम्ही जाऊन धान्य आणू. 5 पण तुम्ही बन्यामीनाला
पाठवणार नाही तर मग आम्ही धान्य आणावयास जाणार
नाही. तुमच्या धाकटया भावाशिवाय तुम्ही परत मागे येऊ
नका असे त्या आधिकाऱ्याने आम्हास बजावून सांगितले
आहे."
6 इस्राएल (याकोब) म्हणाला, "पण तुम्हाला आणखी
एक भाऊ आहे असे त्या प्रमुख अधिकाऱ्याला तुम्ही का
सांगितले? आणि त्यामुळे तुम्ही मला पेचात का पाडले?"
7 त्या भावांनी उत्तर दिले, "त्या प्रमुख अधिकाऱ्याने
आम्हा सर्वांविषयी काळजी व चिंता दाखवून मोठया प्रेमाने
व कळकळीने आपल्या घरच्या सर्वांविषयी विचारपूस
केली, कारण त्याला आपल्या घरच्या सर्वांविषयी माहिती
करून घ्यावयास पाहिजे होती. त्याने आम्हाला विचारले,
'तुमचा बाप अजून जिवंत आहे का? तुमचा एखादा भाऊ
सध्या घरी आहे का?' आम्ही तर नुसती त्याच्या प्रश्नांची
उत्तरे दिली. आम्हाला काय माहीत की तो आमच्या भावाला
त्याच्याकडे घेऊन यावयास सांगेल म्हणून."
8 मग यहुदा आपल्या बापाला म्हणाला, "बाबा
बन्यामीनाला माझ्याबरोबर पाठवा. मी त्याची सगळी
काळजी घेईन, कारण आम्हाला धान्य आणावयास मिसरला
गेलेच पाहिजे; नाही तर आपण सर्व आपल्या मुलाबाळांसकट
मरुन जाऊ. 9 त्याच्या सुरक्षिततेची हमी मी घेतो; तसेच
त्याची सगळी जबाबदारीही मी घेतो. मी जर त्याला परत
माघारी आणू शकलो नाही तर मग तुम्ही मला जन्माचा
दोषी ठरवा. 10 तुम्ही आम्हाला अगोदरच जाऊ दिले असते
तर आतापर्यंत धान्य आणण्याच्या आमच्या दोन फेऱ्या
झाल्या असत्या."
11 मग त्यांचा बाप इस्राएल म्हणाला, "हे जर अगदी खरे
असेल तर मग तुम्ही बन्यामीनाला तुमच्याबरोबर घेऊन
जा; परंतु त्या प्रमुख अधिकाऱ्याकरिता आपल्या देशातून
आपण मिळवलेल्या काही किंमती वस्तू, काही पदार्थ
म्हणजे थोडा मध, पिस्ते, बादाम, डिंक, गंधरस वगैरे
देणग्या भेट म्हणून घेऊन जा. 12 यावेळी दुप्पटीपेक्षा पैसा
बरोबर न्या. मागच्यावेळी तुम्ही दिलेला जो पैसा तुमच्या
गोण्यामधून परत आला तोही परत घेऊन जा; कारण
कदाचित त्या अधिकाऱ्याकडून काही चूक झाली असेल.
13 बन्यामीनाला घेऊन त्या अधिकाऱ्याकडे परत जा. 14 त्या
अधिकाऱ्यापुढे तुम्ही जाऊन उभे राहाल तेव्हा सर्व समर्थ
देव तुम्हाला सहाय्य करो अशी मी प्रार्थना करतो; तसेच
तो बन्यामीनाला व शिमोनाला सुखरुपपणे परत मागे पाठवो
यासाठी ही देवाची प्रार्थना करतो. असे घडले नाही तर
मग माझ्या मुलांना गमावल्याबद्दल मी शोक करीन."
15 अशा रीतीने त्या भावांनी प्रमुख अधिकाऱ्याकरिता
भेट वस्तू घेतल्या व पहिल्यावेळी घेतले होते त्याच्या
दुप्पट पैसे यावेळी संगती घेतले बन्यामीनाला घेऊन ते
मिसर देशाला रवाना झाले.

## त्या भावांना योसेफाच्या घरी जाण्याचे निमंत्रण दिले जाते

16 मिसरमध्ये त्या भावांच्याबरोबर योसेफाने बन्यामीनास
पाहिले; तेव्हा योसेफ आपल्या कारभाऱ्यास म्हणाला,
"या लोकांना माझ्या घरी आण. एक चांगला पोसलेला
पशू मारून भोजन तयार कर, कारण हे सर्वजण दुपारी
माझ्याबरोबर भोजन करतील."
17 तेव्हा त्या कारभाऱ्याने त्याला सांगितल्याप्रमाणे
भोजनाची सर्व तयारी केली. नंतर त्याने त्या सर्व भावांना
योसेफाच्या घरी नेले.
18 योसेफाच्या घरी नेल्यावर ते भाऊ फार घाबरले. ते
म्हणाले, "मागच्या वेळी आपल्या पोत्यात आपण दिलेले
पैसे परत ठेवण्यात आले म्हणून आपणास येथे आणले
आहे, त्यावरुन आपणास दोषी ठरवून ते आपली गाढवे
घेतील व आपल्याला गुलाम करतील असे वाटते."
19 म्हणून मग ते भाऊ योसेफाच्या कारभाऱ्याकडे गेले.
20 ते म्हणाले, "महाराज, आम्ही शपथ घेऊन खरे तेच

सांगतो; मागच्या वेळी आम्ही धान्य खरेदी करण्यासाठीच
आलो होतो. 21–22आम्ही घरी परत जाताना एका
मुक्कामाच्या ठिकाणी आमची पोती उघडली तेव्हा आमच्या
पोत्यात पैसे कसे आले हे आम्हाला माहीत नाही. परंतु ते
सगळे पैसे तुम्हाला परत देण्यासाठी आम्ही आमच्या सोबत
आणले आहेत; आणि आता यावेळी आणखी धान्य विकत
घेण्यासाठी अधिक पैसे आणले आहेत."
23परंतु योसेफाच्या घरच्या कारभाऱ्याने उत्तर दिले,
"भिऊ नका; माझ्यावर विश्वास ठेवा; तुमच्या व तुमच्या
पित्याच्या देवाने तुमच्या पोत्यात देणगी म्हणून ते पैसे
ठेवले असतील. मागच्या खेपेच्या धान्याचे पैसे तुम्ही मला
दिले याची मला पक्की आठवण आहे."
नंतर त्या कारभाऱ्याने शिमोनाला तुरुंगातून सोडवून
घरी आणले. 24मग त्या कारभाऱ्याने त्या भावांना
योसेफाच्या घरी आणले; त्याने त्यांना पाय धुण्यासाठी
पाणी दिले व त्यांनी पाय धुतले. मग त्याने त्यांच्या गाढवांस
वैरण दिले. 25आपण योसेफासोबत भोजन करणार आहो
हे त्या भावांना समजले. तेव्हा त्यांनी दुपारपर्यंत काम
करून योसेफाला देण्याच्या भेटीची तयारी केली.
26योसेफ घरी आला तेव्हा त्या भावांनी त्याच्यासाठी
आपल्या सोबत आणलेली भेट अर्पण केली व त्यांनी
त्याला भूमिपर्यंत लवून मुजरा केला.
27मग योसेफाने ते सर्व बरे खुशाल आहेत ना, याची
विचारपूस केली. तो म्हणाला, "तुमचे म्हातारे वडील,
ज्यांच्याबद्दल तुम्ही मागे मला सांगितले, ते बरे आहेत
का? ते अजून जिवंत आहेत ना!"?
28त्या भावांनी उत्तर दिले, "होय महाराज! आमचे वडील
सुखरुप आहेत; ते अजून जिवंत आहेत." आणि त्यांनी
पुन्हा लवून नमन केले.

## योसेफ आपला भाऊ बन्यामीन यास पाहतो

29मग योसेफाने आपला सख्खा भाऊ बन्यामीन यास
पाहिले. (योसेफ व बन्यामीन यांची आई एकच होती) तो
म्हणाला, "तुम्ही मला ज्याच्याविषयी सांगितले तो हाच
का तुमचा भाऊ?" नंतर योसेफ बन्यामीनास म्हणाला,
"मुला! देव तुझ्यावर कृपा करो!"
30मग योसेफ घाईघाईने खोली बाहेर निघून गेला. आपला
प्रिय भाऊ बन्यामीन याला प्रेमाने घट्ट मिठी मारावी असे
त्याला फार वाटले आणि त्याला खूप रडू आले; म्हणून
गुपचूप तो आपल्या खोलीत गेला व खूप रडला. 31मग
तोंड धुऊन तो परत आला; मग स्वत:स सावरुन तो
म्हणाला, "आता आपण भोजनास बसू या."
32योसेफ एकटाच एका मेजावर बसला होता. त्याचे
भाऊ दुसऱ्या मेजावर एकत्र बसले; मिसरचे लोक आणखी
दुसऱ्या मेजावर बसले कारण इब्री लोकांबरोबर जेवणे
चुकीचे आहे असे ते मानीत. 33योसेफाचे भाऊ त्याच्या
समोरील मेजावर बसले. त्यांच्या बसण्याची व्यवस्था त्यांच्या
ज्येष्ठतेप्रमाणे केली असल्यामुळे ते चकित होऊन
एकमेकांकडे पाहू लागले. 34वाढपी, योसेफाच्या पुढच्या
मेजावरील पक्वान्ने घेऊन त्यांना वाढीत होते; परंतु त्यांनी
बन्यामीनास इतरापेक्षा पांचपट अधिक वाढले. ते सर्व
भाऊ योसेफाबरोबर भरपूर जेवले व मनमुराद प्यायले.

## योसेफ सापळा टाकतो

44 मग योसेफाने आपल्या कारभाऱ्याला आज्ञा
देऊन म्हटले, "या लोकांच्या पोत्यात जेवढे
अधिक धान्य मावेल व त्यांना देता येईल तेवढे भर;
आणि त्या सोबत प्रत्येकाचे पैसेही त्या पोत्यात ठेव. 2सर्वात
धाकट्या भावाच्या पोत्यात पैशाबरोबर माझा विशेष चांदीचा
प्यालाही ठेव." त्याच्या कारभाऱ्याने त्याच्या आज्ञाप्रमाणे
सर्वकाही केले.
3दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी त्या भावांना त्यांच्या
गाढवांसहित त्यांच्या देशाला रवाना करण्यात आले. 4त्यांनी
नगर सोडल्यानंतर थोडया वेळाने योसेफ आपल्या
कारभऱ्यास म्हणाला, "जा आणि त्या लोकांचा पाठलाग
कर आणि त्यांना थांबवून असे म्हण, 'आम्ही तुमच्याशी
भलेपणाने वागलो! असे असता तुम्ही आमच्याशी अशा
वाईट रीतीने का वागला.' तुम्ही माझ्या स्वामीचा चांदीचा
प्याला का चोरला? 5हा प्याला खास माझा धनी
पिण्याकरिता वापरतात; गुप्त गोष्टी समजून घेण्यासाठी तो
वापरतात. तसेच देवाला प्रश्न विचारण्याकरिता माझा
धनी हयाच प्यालाचा उपयोग करतात. हा प्याला चोरून
तुम्ही फार वाईट केले आहे.'"
6तेव्हा तो कारभारी स्वार होऊन व त्यांना गाठून
योसेफाने आज्ञा केल्याप्रमाणे बोलला.
7परंतु ते भाऊ कारभाऱ्याला म्हणाले, "स्वामी असे
का बरे बोलतात? आम्ही कधीच अशा गोष्टी करीत
नाही! 8मागे आमच्या पोत्यात मिळालेले पैसे आम्ही आता
येताना आठवणीने आणले; तेव्हा खात्रीने आपल्या
स्वामीच्या घरातून आम्ही सोने किंवा चांदी चोरणार नाही.
9या उपर आम्हापैकी कोणाच्या पोत्यात तुम्हाला जर तो
चांदीचा प्याला मिळाला तर तो भाऊ मरेल; तुम्ही त्याला
मारून टाकावे आणि मग आम्ही सर्वजण आमच्या स्वामीचे
गुलाम होऊ."
10कारभारी म्हणाला, "ठीक आहे, तुम्ही म्हणता
त्याप्रमाणे आपण करु. जर मला चांदीचा प्याला मिळाला
तर मग तो माणूस माझ्या धन्याचा गुलाम होईल; इतर
जण जाण्यास मोकळे राहतील."

## सापळा उघडतो; बन्यामीन त्यात अडकतो

11नंतर हर एक भावाने लगेच आपली गोणी जमिनीवर
उतरुन उघडली. 12कारभाऱ्याने थोरल्या भावापासून
सुरवात करून धाकटया भावाच्या गोणीपर्यंत तपासून
पाहिले; तेव्हा त्याला बन्यामीनाच्या गोणीत तो चांदीचा

प्याला मिळाला. 13तेव्हा त्याभावांना भयंकर दु:ख झाले;
अति दु:खामुळे त्यांनी आपली वस्त्रे फाडली आणि आपल्या
गोण्या गाढवांवर लादून ते परत नगरात आले. 14यहूदा
व त्याचे भाऊ परत योसेफाच्या घरी गेले. योसेफ अजून
घरातच होता. त्या भावांनी योसेफापुढे लोटांगण घातले.
15योसफ त्यांना म्हणाला, “तुम्ही असे का केले? मला
शकून पाहून गुप्त समजण्याचे विशेष ज्ञान आहे हे तुम्हाला
माहीत नाही का? आणि या बाबतीत माझ्यापेक्षा अधिक
चांगले ज्ञान इतर कोणालाही नाही!”

16यहूदा म्हणाला, “महाराज! आम्ही आता काहीच बोलू
शकत नाही, व याचा उलगडा करण्याचा दुसरा मार्ग
नाही. आम्ही अपराधी नाही हे पटविण्यास दुसरा कोणताच
मार्ग नाही. आमच्या दुसऱ्या कोणत्यातरी अपराधाबद्दल
देवाने आम्हाला दोषी ठरवले आहे. म्हणून आता
बन्यामीनासकट आम्ही सर्वजण महाराजांचे गुलाम झालो
आहोत.”

17परंतु योसेफ म्हणाला, “मी तुम्हा सर्वजणांना गुलाम
करणार नाही! फक्त ज्याने चांदीचा प्याला चोरला तोच
माझा गुलाम होईल. बाकीचे तुम्ही शांतीने आपल्या बापाकडे
जाऊ शकता.”

## यहूदा बन्यामीनाकरिता विनवणी करतो

18मग यहूदा योसेफाकडे जाऊन म्हणाला, “कृपा करून
माझ्यावर रागावू नका परंतु अगदी खरेपणाने व
मोकळेपणाने मला आपल्याबरोबर बोलू द्या. आपण फारो
राजासमान असून इतके अधिकार आपणाला आहेत हे
मी जाणतो. 19मागच्या वेळी आम्ही येथे असताना आपण
आम्हाला विचारले, ‘तुम्हाला बाप किंवा भाऊ आहे का?’
20आणि आम्ही आपणास उत्तर दिले, ‘होय! आमचा बाप
आहे, परंतु तो आता फार म्हातारा झाला आहे; तसेच
आम्हाला एक धाकटा भाऊही आहे. आमच्या बापाच्या
म्हातारपणी हा आमचा भाऊ जन्मला म्हणून आमच्या
बापाचा त्याच्यावर फार जीव आहे; आणि त्याचा तरुण
भाऊ मरण पावला; तेव्हा त्या दोघांच्या आईचा ही एकच
मुलगा राहिला आहे; आणि म्हणूनच तो आमच्या बापाचा
फार प्रिय व लाडका मुलगा आहे.’ 21आपण म्हणाला,
‘मग त्या तुमच्या धाकटया भावाला माझ्याकडे घेऊन या;
मला त्याला पाहावयाचे आहे.’ 22आणि आम्ही आपणास
म्हणालो, ‘तो धाकटा भाऊ येऊ शकणार नाही, कारण
तो बापाला सोडून कोठे जात नाही, जर का बापापासून
त्याची ताटातूट झाली तर मग आमचा बाप भयंकर दु:खी
होईल व त्या दु:खाने तो मरुन जाईल.’ 23परंतु आपण
आम्हाला बजावून म्हणाला, ‘तुम्ही तुमच्या धाकटया
भावाला घेऊन आलाच पाहिजे नाही तर मी तुम्हाला
पुन्हा धान्य विकणार नाही.’

24म्हणून मग आम्ही आमच्या बापाकडे परत गेलो व
आपण जे बोलला ते त्याला सांगितले.

25“काही दिवसानंतर आमचा बाप म्हणाला, ‘मुलांनो,
पुन्हा जाऊन आपणासाठी धान्य विकत आणा.’ 26आणि
आम्ही म्हणालो, ‘आम्ही आमच्या धाकट्या भावाला बरोबर
घेतल्याशिवाय जाणार नाही कारण तुमच्या धाकट्या
भावाला माझ्याकडे आणल्या खेरीज मी पुन्हा तुम्हाला
धान्य विकणार नाही असे त्या प्रमुख अधिकाऱ्याने आम्हास
बजावले आहे.’ 27मग आमचा बाप आम्हाला म्हणाला,
‘मुलांनो, तुम्हाला माहीत आहे की माझी बायको राहेल
हिच्या पोटी मला दोन मुलगे झाले; 28आणि त्यातल्या
एकाला मी पाहिले तो वन्यपशूद्वारे मारला गेला. पुन्हा तो
कोणाच्या दृष्टीस पडला नाही. 29आणि आता माझ्या ह्या
दुसऱ्या मुलाला तुम्ही माझ्यापासून घेऊन गेला आणि
त्याला जर काही अपाय झाला तर मी भयंकर दु:खी
होऊन मरून जाईन.’ 30तो मुलगा आमच्या बापाच्या
आयुष्यात फार महत्वाचा आहे तेव्हा आता जर का आम्ही
आमच्या धाकटया भावाशिवाय घरी गेलो आणि आमच्या
बापाने हे पाहिले तर 31आमचा धाकटा भाऊ आमच्या
बरोबर नाही असे पाहून आमचा बाप नक्की मरून जाईल;
आणि आपल्या बापाला भयंकर दु:ख देऊन त्याच्या मरणास
आम्ही कारण झालो हा दोष सतत आमच्या माथ्यावर
राहील.

32“हया धाकट्या भावाबद्दल मी माझ्या बापास जामीन
राहिलो आहे. मी माझ्या बापास सांगितले, ‘जर मी माझ्या
धाकट्या भावाला तुम्हाकडे परत घेऊन आलो नाही तर
मग जन्मभर मी तुमचा दोषी राहीन.’ 33तेव्हा महाराज, मी
हात जोडून तुमची काकूळतीने विनवणी करतो; तुम्हापाशी
भिक्षा मागतो, त्या धाकट्या मुलाला त्याच्या भावांबरोबर
परत जाऊ द्या. मी येथे राहातो आणि तुमचा गुलाम होतो
माझे स्वामी! 34आणि त्या धाकटया भावाशिवाय माझ्या
बापाकडे माघारी जाण्याची माझ्यात हिंमत नाही! माझ्या
बापाचे काय होईल याची मला भयंकर भीती वाटते, हो
स्वामी!”

## योसेफ ओळख देतो

45 आता मात्र अधिक वेळपर्यंत योसेफाला आपले
दु:ख रोखून धरता येईना. तेव्हा तेथे हजर
असलेल्या सर्व लोकां देखत तो मोठ मोठयाने रडू लागला.
तो म्हणाला, “येथील इतर सर्व लोकांना येथून निघून
जाण्यास सांगा.” तेव्हा तेथील सर्वजण निघून गेले; केवळ
त्याचे भाऊच त्याच्यापाशी राहिले; मग योसेफाने आपली
ओळख दिली. 2तो एकसारखा रडत होता. फारोच्या
वाडयातील मिसरच्या लोकांनी व फारोच्या घराण्यातील
लोकांनीही त्याचे रडणे ऐकले.

3मग योसेफ हूंदके देत आपल्या भावांना म्हणाला, “प्रिय
भावांनो! तुमचा भाऊ योसेफ--मीच आहे!” मग गहिंवर
आवरून योसेफ पुढे म्हणाला, “माझा बाप खुशाल आहे

ना!" परंतु त्याचे भाऊ आश्चर्याने चकित झाले; ते एवढे घाबरले व गोंधळले की त्यांच्या तोंडून शब्द फुटेना!

[4]तेव्हा योसेफ आपल्या भावांना पुन्हा म्हणाला, "जरा इकडे माझ्याकडे या; कृपा करून माझ्याजवळ या अशी मी विनंती करतो." तेव्हा त्याचे भाऊ त्याच्या जवळ गेले; आणि योसेफ त्यांना म्हणाला, "तुमचा भाऊ योसेफ मीच आहे; होय! ज्या भावाला तुम्ही मिसरच्या लोकांना गुलाम म्हणून विकले तो योसेफ मीच आहे. [5]आता त्याविषयी काही चिंता व काळजी करु नका; किंवा तुम्ही जे केले त्याबद्दल आपल्याला संताप करून घेऊ नका; मी येथे यावे व त्यामुळे आपणा सर्वांचे प्राण वाचावेत ही देवाचीच योजना होती. [6]हा भयंकर दुष्काळ आता दोन वर्षे पडला आहे आणि आणखी पाच वर्षे पेरणी किंवा कापणी होणार नाही. [7]अशारीतीने या देशात मी अगोदर येऊन तुमच्यासर्वांचे प्राण वाचावेत म्हणून देवाने मला तुमच्या आधी येथे पाठवले आहे. [8]मला येथे पाठवण्यात तुमचा दोष नव्हता तर ही देवाची योजना होती. देवाने मला फारोच्या बापासमान केले आहे; त्यामुळे मी फारोच्या घरदाराचा स्वामी आणि सर्व मिसर देशाचा प्रशासक झालो आहे."

## इस्राएलास मिसरला जाण्याचे निमंत्रण येते

[9]योसेफ म्हणाला, "तर आता तोबडतोब माझ्या बापाकडे जाण्यास निघा; माझ्या बापाला सांगा की तुमचा मुलगा योसेफ याने तुम्हाला येणे प्रमाणे संदेश पाठवला आहे."

देवाने मला अवघ्या मिसर देशाचा प्रशासक म्हणजे अधिपति केले आहे. तर आता वेळ न दवडता माझ्याकडे निघून या. [10]तुम्ही माझ्या जवळ गोशेन प्रांतात राहा; तुम्ही, तुमची मुले, नातवंडे तसेच तुमची शेरडेमेंढरे, गुरेढोरे अशा तुम्हां सर्वांचे मी स्वागत करतो. [11]येणाऱ्या दुष्काळाच्या पाच वर्षात मी तुमची सर्व प्रकारची काळजी घेईन त्यामुळे तुम्हावर व तुमच्या कुटुंबावर सर्व काही गमावण्याची वेळ येणार नाही.

[12]योसेफ आपल्या भावांशी बोलतच राहिला. तो म्हणाला, "मी योसेफच आहे याची आता तुम्हाला खात्री पटली असेल; तुमचा भाऊ बन्यामीन याला खात्री पटली आहे; त्याने मला ओळखले आहे; आणि तुमच्याशी बोलणारा मी खरोखर योसेफच आहे. [13]तेव्हा मिसर देशातील माझी धनदौलत व माझे वैभव आणि तुम्ही येथे जे जे पाहिले आहे त्या संबंधी माझ्या बापाला सांगा; आता लवकर जाऊन माझ्या बापाला माझ्याकडे घेऊन या." [14]मग योसेफ आपला धाकटा भाऊ बन्यामीन याला मिठी मारुन रडला; आणि बन्यामीनही त्याच्या खांद्यावर डोके ठेऊन रडला. [15]मग योसेफाने आपल्या प्रत्येक भावाला मिठी मारली व त्यांचे मुके घेतले आणि तो रडला; यानंतर त्याचे भाऊ त्याज बरोबर बोलू लागले.

[16]योसेफाचे भाऊ त्याजकडे आहे आहेत अशी बातमी फारो, त्याच्या घरची मंडळी व त्याचे सेवक यांना समजली त्यामुळे त्या सर्वांना त्याविषयी आनंद झाला. [17]तेव्हा फारो योसेफाला म्हणाला, "तुझ्या भावांना सांग की तुम्हाला गरज असेल तेवढी अन्नसामग्री घेऊन कनान देशास जा; [18]तसेच तुमचा बाप आणि तुमच्या घरची सर्व मंडळी यांना घेऊन माझ्याकडे या; तुम्हाला राहावयास मिसरमधील सर्वात उत्तम प्रदेश मी देईन आणि तुमच्या घरातील मंडळी, यांना आमच्या येथे असलेले उत्तम पदार्थ खावयास मिळतील." [19]मग फारो म्हणाला, "आपल्या गाड्यांपैकी सर्वात चांगल्या गाड्या तुझ्या भावांना दे व त्यांना सांग की कनान देशास जाऊन तुमचे वडील आणि तुमच्या स्त्रिया व मुले या सर्वांना गाड्यात बसवून मागे घेऊन या; [20]त्यांचे सामान सुमान व जे काही असेल ते सर्व घेऊन येण्यास संकोच धरु नका असे सांग. मिसरमधील उत्तम आम्ही त्यांना देऊ शकतो!"

[21]तेव्हा इस्राएलाच्या मुलांनी तसे केले; योसेफाने त्यांना फारोने वचन दिल्याप्रमाणे सर्वात चांगल्या गाड्या दिल्या; आणि त्यांच्या प्रवासाकरिता भरपूर अन्नसामग्री दिली; [22]तसेच त्याने प्रत्येक भावाला एक सुंदर पोशाख दिला; व बन्यामीनाला पाच सुंदर पोशाख आणि चांदीची तीनशे नाणी दिली. [23]त्याने आपल्या बापासाठीही देणग्या पाठवल्या. मिसरमधील चांगले पदार्थ गोण्यात लादलेली दहा गाढवी आपल्या बापाकरिता परतीच्या प्रवासासाठी पाठवल्या. [24]मग योसेफाने आपल्या भावांना निरोप दिला; ते निघाले तेव्हा त्याने त्यांना सांगितले, "सरळ घरी जा आणि रस्त्यात एकमेकांशी भांडू नका."

[25]अशा रीतीने त्याचे भाऊ मिसर सोडून कनान देशास आपल्या बापाकडे गेले. [26]त्यांनी आपल्या बापास सांगितले, "बाबा! बाबा! तुमचा मुलगा योसेफ अजून जिवंत आहे आणि तो अवघ्या मिसर देशाचा प्रशासक म्हणजे प्रमुख अधिकारी आहे." हे ऐकून त्यांच्या बापाला भोवळ आली.

त्यांच्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसेना! [27]परंतु त्यांनी त्याला योसेफाने सांगितलेल्या सर्व गोष्टी कळवल्या; मग योसेफाने त्या सर्वांना मिसरला घेऊन जाण्यासाठी पाठवलेल्या चांगल्या गाड्या पाहिल्या तेव्हा त्याच्या जीवात जीव आला व त्याला फारच फार आनंद झाला; [28]इस्राएल म्हणाला, "आता मात्र तुमच्यावर माझा विश्वास बसला आहे की माझा मुलगा योसेफ अजून जिवंत आहे; आता मी मरण्यापूर्वी त्याला जाऊन भेटेन!"

## देव इस्राएलास अभयवचन देतो

46 अशा रीतीने इस्राएलाने मिसरच्या प्रवासास सुरवात केली. प्रथम तो बैरशेबास गेला. तेथे त्याने आपला बाप इसहाक याच्या देवाची उपासना केली व देवाला अर्पणे वाहिली. [2]रात्री देव स्वप्नात दर्शन देऊन इस्राएलाशी बोलला. तो म्हणाला, "याकोबा, याकोबा!"

आणि इस्राएलाने उत्तर दिले, “हा मी आहे, काय आज्ञा?”
3देव म्हणाला “मी देव आहे, तुझ्या बापाचा देव आहे;
पाहा, मिसर देशास जाण्यास तू भिऊ नको 4जाताना मी
तुझ्याबरोबर येईन, आणि तुझ्या संततीस मी मिसरमधून
पुन्हा बाहेर आणीन; तू मिसरमध्ये मरण पावशील परंतु
मरण्याच्या वेळी योसेफ तुझ्याजवळ असेल; तू मरण
पावशील तेव्हा तो आपल्या हातांनी तुझे डोळे झाकील.”

## इस्राएल मिसर ला जातो

5मग इस्राएल (याकोब) बैरशेबा सोडून मिसरच्या
प्रवासास निघाला. त्याच्या मुलांनी आपला बाप, आपल्या
बायका व मुले या सर्वांना फारोने पाठवलेल्या गाडयातून
मिसरला आणले. 6–7त्याच प्रमाणे त्यांनी आपली शेरडेमेंढरे
गुरेढोरे आणि कनान देशात त्यांनी मिळवलेले सर्वकाही
मिसरला नेले. अशा रीतीने इस्राएल आपल्या कुटुंबातील
सर्वांना म्हणजे आपले मुलगे व नातू, आपल्या मुली व
नाती या सर्वांना घेऊन मिसरला गेला.

## याकोबाची संतती

8इस्राएलाचे जे मुलगे आणि नातवंडे त्याच्याबरोबर
मिसरला गेले त्यांची नांवे अशी–
याकोबाचा पहिला मुलगा रऊबेन होता. 9रऊबेनाचे
मुलगे: हनोक, पल्लू, हेस्रोन, व कार्मी
10शिमोनाचे मुलगे: यमुवेल, यामीन, ओहाद, याकोन,
सोहार आणि कनानी स्त्रीपासून झालेला मुलगा शौल.
11लेवीचे मुलगे: गेर्षोन, कहाथ व मरारी.
12यहूदाचे मुलगे: एर, ओनान, शेला, पेरेस व जेरह;
यापैकी एर व ओनान हे कनान देशात मरण पावले;
पेरेसाचे मुलगे हेस्रोन व हामूल.
13इस्साखाराचे मुलगे: तोला, पुवा, योब व शिम्रोन.
14जबुलूनाचे मुलगे: सेरेद, एलोन व याहलेल.
15हे सहा मुलगे व मुलगी दीना ही लेकरे याकोबापासून
लेआला पदन–अरामात झाली; त्या कुटुंबात तेहतीस जण
होते.
16गाद याचे मुलगे: सिफयोन, हगी, शूनी, एसबोन, एरी,
अरोदी व अरेली.
17आशेराचे मुलगे: इम्ना, इश्बा, इश्वी व बरीया; आणि
त्याची बहीण सेराह; बरीयाचे मुलगे हेबेर व मालकीएल.
18जिल्पा ह्या बायकोपासून झालेले हे सगळे याकोबाचे
मुलगे होते. (लाबानने आपली मुलगी लीआ हिला जिल्पा
दिली होती.) एकंदर त्या कुटुंबात सोळा माणसे होती.
19योसेफ व बन्यामीन हे याकोबाची बायको राहेल हिचे
मुलगे होते.
20योसेफास मिसर देशातील ओन नगराचा याजक
पोटीफरा याची मुलगी आसनथ हिच्या पोटी मनश्शे व
एफ्राईम हे मुलगे झाले.
21बन्यामीनाचे मुलगे: बेला, बेकेर, आशबेल, गेरा,
नामान, एही, रोष, मुप्पीम, हुप्पीम आणि आर्द.
22योसेफ व बन्यामीन, याकोबापासून राहेलीस झाले व
त्यांना झालेली संतती मिळून ते सर्व चौदा जण ह्या कुटुंबात
होते.
23दान याचा मुलगा हुशीम होता
24नफतालीचे मुलगे: यासहेल, गुनी, येसेर आणि शिल्लेम
हे होते.
25लाबानाने आपली मुलगी राहेल हिला दिलेल्या बिल्हेचे
याकोबापासून झालेले मुलगे दान व नफताली आणि त्यांना
झालेली संतती असे हे सात जण त्या कुटुम्बात होते.
26याकोबाच्या वंशातील जी माणसे मिसरमध्ये गेली
ती याकोबाच्या मुलांच्या बायका सोडून सहासष्ट जण
होती. 27योसेफास मिसर देशात झालेले दोन मुलगे मिळून
एकंदर याकोबाच्या घराण्यातले सत्तर जण मिसर देशात
होते.

## इस्राएल मिसरमध्ये पोहोंचतो

28याकोबाने प्रथम यहूदाला योसेफाकडे पाठवले; यहूदा
गोशेन प्रांतात योसेफाकडे गेला त्यानंतर याकोब व त्याच्या
परिवारातील सर्व मंडळी यहूदाच्या मागे गोशेन प्रांतात
गेली. 29आपला बाप जवळ येत आहे असे योसेफास समजले;
तेव्हा तो आपला रथ तयार करून आपला बाप इस्राएल
याच्या भेटीस गोशेन प्रांतात त्याला सामोरा गेला. योसेफाने
आपल्या बापास पाहिले तेव्हा त्याने त्याच्या गळ्यास मिठी
मारली व त्याच्या गळ्यातगळा घालून तो बराच वेळ
रडला.
30मग इस्राएल योसेफाला म्हणाला, “आता मात्र मी
शांतीने मरण पावेन; मी प्रत्यक्ष तुझे तोंड पाहिले आहे
आणि तू जिवंत आहेस हे मला समजले आहे.”
31मग योसेफ आपल्या भावांना व आपल्या बापाच्या
घरच्या सर्वांस म्हणाला, “मी जाऊन फारोला सांगतो की
‘माझे भाऊ व माझ्या बापाच्या घरातील सर्व मंडळी हे
कनान देश सोडून येथे माझ्याकडे आले आहेत; 32माझ्या
बापाच्या घरचे सर्वजण मेंढपाळ आहेत. ते सतत शेरडेमेंढरे
व गुरुढोरे पाळीत आले आहेत. ते त्यांची शेरडेमेंढरे,
गुरेढोरे व त्यांचे तेथे जे काही होते ते सर्व घेऊन आले
आहेत.’
33जेव्हा फारो तुम्हाला बोलावून विचारील, ‘तुम्ही काय
काम धंदा करता?’ 34तेव्हा तुम्ही असे सांगा, ‘आम्ही सर्व
मेंढपाळ आहोत. दुभती जनावरे पाळून आम्ही उपजिविका
करतो. हा आमचा पिढीजात धंदा आहे. आमच्या आधी
आमचे वाडवडील हाच धंदा करीत होते.’ मग फारो तुम्हाला
गोशेन प्रातांत राहू देईल. मिसरच्या लोकांना मेंढपाळ
आवडत नाहीत; म्हणून गोशेन प्रांतात राहणे तुमच्या
फायद्याचे आहे.”

## इस्राएल गोशेन प्रांतात वस्ती करतो

47 योसेफ फारोकडे जाऊन म्हणाला, “माझा बाप
माझे भाऊ व त्यांच्या कुटुंबातील सर्व मंडळी
कनानातून त्यांची शेरडेमेंढरे, गुरेढोरे व त्यांचे सर्वकाही
घेऊन येथे आले आहेत. ते हल्ली गोशेन प्रांतात आहेत.”
2योसेफाने आपल्याबरोबर फारोसमोर जाण्यासाठी आपल्या
भावांपैकी पाच जणांची निवड केली.

3फारो त्या भावांना म्हणाला, “तुम्ही काय धंदा करता?”
ते भाऊ म्हणाले, “महाराज, आम्ही आपले दास मेंढपाळ
आहोत; आमच्या आधी आमचे पूर्वजही मेंढपाळच होते.”
4ते फारोला पुढे म्हणाले, “कनान देशात फारच भयंकर
व कडक दुष्काळ पडला आहे. तेथे एकाही शेतात आमच्या
कळपासाही हिरवे गवत किंवा हिरवा चारा नाही म्हणून
आम्ही ह्या देशात राहण्यास आलो आहोत; महाराज आम्ही
आपणास नम्र विनंती करतो की आम्हास कृपा करून
गोशेन प्रांतात राहू द्यावे.”

5मग फारो योसेफाला म्हणाला, “तुझा बाप व तुझे
भाऊ तुझ्याकडे आले आहेत. 6त्यांना राहण्याकरिता तू
मिसरमधील कोणतेही ठिकाण निवड; त्यांना उत्तम जमीन
असलेला प्रदेश दे. त्याना गोशेन प्रांतात वस्ती करून राहू
दे; आणि ते जर तरबेज व कुशल मेंढपाळ असतील तर
मग त्यांनी माझ्या गुराढोरांचीही काळजी घ्यावी.”

7मग योसेफाने आपल्या बापाला फारोच्या समोर येण्यास
सांगितले. तेव्हा याकोबाने फारोस आशीर्वाद दिला. 8मग
फारोने याकोबाला विचारले, “तुमचे वय किती आहे?”

9याकोबाने उत्तर दिले, “मला फक्त थोडे परंतु कठिण
आणि दुःखी असे जीवन लाभले आहे व ते मला त्रासदायक
व दुःखदायक असे झाले; मला फक्त 130 वर्षांचे आयुष्य
मिळाले परंतु माझे पूर्वज माझ्यापेक्षा अधिक वर्षांचे जीवन
जगले.” 10याकोबाने फारोला आशीर्वाद दिला व मग तो
फारोपुढून निघून गेला. 11योसेफाने फारोचे म्हणणे मानले
व त्याने आपल्या बापाला व भावांना मिसरमधील सर्वात
उत्तम भूमीचा रामसेस नगराजवळील प्रांत त्यांना राहावयास
दिला. 12आणि त्याने आपला बाप, आपले भाऊ व त्यांच्या
घरचे सर्व यांना भरपूर अन्नसामग्री पुरवली.

## योसेफ फारोसाठी जमीन खरेदी करतो

13त्यावेळी दुष्काळ तर फारच कडक झाला. देशात
अन्नधान्य कोठेच मिळेना; त्यामुळे मिसर व कनान देश
या वाईट परिस्थितीमुळे हवालदील झाले. 14लोकांनी
अधिकात अधिक धान्य विकत घेतले; योसेफाने धान्य
विक्रीचे पैसे साठवून फारोच्या वाड्यात आणले. 15काही
काळाने मिसर व कनान देशातील लोकांचे पैसे संपून
गेले. त्यांच्या जवळचे सर्व पैसे अन्नधान्य विकत घेण्यात
खर्च झाल्यामुळे त्यांच्याकडे शिल्लक काहीच राहिले
नाही. त्यामुळे मिसरचे लोक योसेफाकडे जाऊन म्हणाले,
“महाराज! कृपा करून आम्हाला धान्य द्या! आमचे सर्व
पैसे संपले आहेत; आम्हाला जर काही खावयास मिळाले
नाही तर तुमच्या डोळ्यादेखत आम्ही मरून जाऊ.”

16परंतु योसेफ म्हणाला, “तुम्ही मला तुमची गुरेढोरे द्या
म्हणजे मग मी तुम्हाला धान्य देईन.” 17तेव्हा लोकांनी
त्याच्याकडील गुरेढोरे शेरडेमेंढरे, घोडे, गाढवे आणि इतर
जनावरे देऊन अन्नधान्य विकत घेतले; आणि त्या वर्षात
लोकांकडून गुरेढोरे घेऊन त्यांच्या बदल्यात योसेफाने
त्यांना अन्नधान्य दिले.

18परंतु त्याच्या नंतरच्या वर्षात लोकांच्यापाशी असलेली
गुरेढोरेही संपली व अन्नधान्य विकत घेण्यास त्यांच्या
जवळ काहीही राहिले नाही; म्हणून मग लोक योसेफाकडे
जाऊन म्हणाले, “महाराज! आपणास माहीत आहे की
आमच्याकडे पैसे उरलेले नाहीत आणि आमची गुरेढोरेही
तुमची झाली आहेत; तेव्हा आमच्याकडे आता आपणास
दिसतात ती फक्त आमची शरीरे व आमची जमीन या
शिवाय दुसरे काहीही राहिलेले नाही. 19आता मात्र आपण
बघत असताना आम्ही नक्की मरून जाऊ; परंतु जर
आपण आम्हास अन्नधान्य द्याल तर मग आम्ही आमची
जमीन फारोला देऊ आणि आम्ही त्याचे गुलाम होऊ ;
कृपा करून आम्हाला बियाणे द्या म्हणजे आम्ही ते पेरु;
मग मात्र आम्ही जगू, मरणार नाही; आणि आमची जमीन
आम्हांस धान्य देईल.”

20तेव्हा मिसरमधील सर्व शेतजमीनी योसेफाने
फारोकरिता विकत घेतल्या; मिसरच्या लोकांनी आपल्या
शेतजमिनी योसेफाला विकल्या कारण दुष्काळ भयंकर
तीव्र झाला होता. 21मिसरमधील सर्व लोक फारोचे गुलाम
झाले. 22योसेफाने याजकांच्या मालकीच्या जमिनी मात्र
विकत घेतल्या नाहीत. फारो याजकांना त्यांच्या कामाबद्दल
पगार देत होता; त्या पैशातून ते आपणासाठी अन्नधान्य
विकत घेत असत म्हणून त्यांच्यावर आपल्या जमिनी
विकण्याची वेळ आली नाही. 23तेव्हा योसेफ लोकांना
म्हणाला, “पाहा, मी फारोकरिता तुम्हाला तुमच्या
जमिनीसकट विकत घेतले आहे; तर मी आता तुम्हाला
बियाणे देतो; ते तुम्ही शेतात पेरा; 24मग हंगामाच्या वेळी
तुमच्या उत्पन्नातील पांचवा हिस्सा फारोला दिलाच पाहिजे;
बाकीचे चार हिस्से तुम्ही तुमच्याकरिता घ्यावेत. त्यातून
पुढच्या वर्षाकरिता तुम्ही बियाणे ठेवावे व बाकीच्या
धान्याचा तुमच्या घरातील लहानथोरांस खाण्यासाठी
उपयोग करावा.”

25लोक म्हणाले, “महाराज, आपण आम्हाला वाचवले
आहे म्हणून फारोचे गुलाम होण्यात आम्हाला आनंद
आहे.”

26त्यावेळी मग योसेफाने देशासाठी एक कायदा केला,
तो आजपर्यंत चालू आहे; त्या कायद्याप्रमाणे जमिनीच्या
उत्पन्नचा पाचवा भाग फारोचा आहे. फारो मिसरमधील
सर्व जमिनीचा मालक आहे; फक्त याजकांची जमीन
फारोच्या मालकीची नाही.

### "मला मिसरमध्ये मूठमाती देऊ नको"

27इस्राएल (याकोब) मिसरमध्ये गोशेन प्रांतात राहिला.
त्याची संतती खूप वाढली व त्यांची भरभराट झाली;
त्यांना मिसरमधील जमीन मिळाली व त्यांनी वतने केली
आणि तेथे त्यांचे सर्वकाही चांगले झाले.

28याकोब मिसरमध्ये सतरा वर्षे राहिला तेव्हा तो एकशे
सत्तेचाळीस वर्षांचा झाला. 29दिवस वाढत गेले तसे इस्राएलाने
(याकोबाने) जाणले की आता आपण लवकर मरणार,
म्हणून मग त्याने आपला मुलगा योसेफ याला आपणाजवळ
बोलावले; तो म्हणाला, "तू जर माझ्यावर प्रेम करतोस
तर माझ्या मांडीखाली तुझा हात ठेवून मला वचन दे की
मी जे सांगतो ते तू करशील आणि तू माझ्याशी खरेपणाने
वागशील. जेव्हा मी मरेन तेव्हा मला मिसरमध्ये पुरु
नको; 30तर मला मिसरमधून बाहेर घेऊन जा व माझ्या
पूर्वजांना जेथे पुरले आहे तेथे म्हणजे आपल्या वंशजांसाठी
घेतलेल्या कबरस्तानात मला मूठमाती दे." योसेफाने उत्तर
दिले, "बाबा! तुम्ही मला जे करावयास सांगितले ते मी
नक्की करीन असे वचन देतो."

31मग याकोब म्हणाला, "तू माझ्याशी तशी शपथ वाहा;"
तेव्हा तसे करण्याबद्दल योसेफाने शपथ वाहिली; मग
इस्राएलाने (याकोबाने) आपले डोके मागे पलंगाच्या
उशाकडे नम्रतेने लववून नमन केले.

### मनश्शे व एफ्राईम यांना आशीर्वाद

48 मग काही काळानंतर आपला बाप फारो आजारी
असल्याचे समजले म्हणून योसेफ आपले दोन
मुलगे मनश्शे व एफ्राईम यांना घेऊन आपल्या बापाला
भेटावयास गेला; 2"योसेफ आपणास भेटावयास आला आहे"
असे समजल्याबरोबर इस्राएल फार अशक्त झाला होता;
तरीही अगदी कष्टाने प्रयत्न करून तो बिछान्यावर उठून
बसला.

3मग इस्राएल योसेफास म्हणाला, "सर्वसमर्थ देवाने मला
कनानातील लूज येथे दर्शन देऊन आशीर्वाद दिला. 4देव
म्हणाला, 'मी तुला खूप संतती देईन व ती वाढवीन आणि
तुम्ही एक मोठे राष्ट्र व्हाल; तुझी संतती या देशाची कायमची
वतनदार होईल.' 5आणि आता तुला दोन मुलगे आहेत.
मी येथे मिसरला येण्यापूर्वी हे दोघे येथे जन्मले. तुझे हे
दोन मुलगे मनश्शे व एफ्राईम मला माझ्या स्वत:च्या
मुलासारखे आहेत; म्हणजे जसे मला रऊबेन व शिमोन
तसेच हे दोघे आहेत. 6ते माझे मुलगे आहेत म्हणून माझ्या
सर्व मालमत्तेत वाटेकरी होतील; परंतु तुला जर आणखी
मुलगे झाले तर मग ते तुझे होतील; पण ते एफ्राईम व
मनश्शे यांना, त्यांच्या मुलग्यांसारखे होतील म्हणजे पुढील
काळात एफ्राईम व मनश्शे यांच्या मालमत्तेचे ते वारस
होतील म्हणजेच त्यांचे वतन एफ्राईम व मनश्शे ह्या त्यांच्या
भावांच्या नावाने चालेल. 7कारण पदन-अराम येथून
येताना तुझी आई राहेल एफ्राथजवळ आम्ही, वाटचाल
करीत असताना कनान देशात मरण पावली; त्यामुळे मी
फार दु:खी झालो; तेव्हा एफ्राथच्या म्हणजे बेथलेहेमाच्या
वाटेवर मी तिला मूठमाती दिली."

8मग इस्राएलाने योसेफाच्या मुलांना पाहिले; तेव्हा इस्राएल
म्हणाला, "हे मुलगे कोणाचे आहेत?"

9योसेफ आपल्या बापास म्हणाला, "बाबा! हे माझे मुलगे
आहेत; हे मला देवाने दिले आहेत."

इस्राएल म्हणाला, "तुझ्या मुलांना माझ्याकडे आण म्हणजे
मी त्यांना आशीर्वाद देईन."

10इस्राएल अतिशय म्हातारा झाला होता आणि त्याची
नजर मंद झाल्यामुळे त्याला चांगले स्पष्ट दिसत नव्हते;
तेव्हा इस्राएलाने त्या मुलांना कवटाळून त्यांचे मुके घेतले.
11मग इस्राएल योसेफास म्हणाला, "मुला तुझे तोंड पुन्हा
पाहावयास मिळेल असे वाटले नव्हते, पण पाहा! देवाने
तुझी व माझी भेट होऊ दिली. मला तुझी मुलेही पाहू
दिली."

12मग योसेफाने आपल्या मुलांना इस्राएलाच्या मांडीवरून
काढून घेतले; ते मुलगे इस्राएला समोर उभे राहिले व
त्यांनी त्याला लवून नमन केले. 13योसेफाने मनश्शेला
आपल्या डाव्या हाती म्हणजे तो इस्राएलाच्या उजव्या हाती
येईल असे व एफ्राईमाला आपल्या उजव्या हाती म्हणजे
तो इस्राएलाच्या डाव्या हाती येईल असे उभे केले. 14परंतु
इस्राएलाने आपल्या उजव्या डाव्या हातांची घडी टाकून
अदलाबदल केली आणि आपला उजवा हात त्याने धाकट्या
मुलाच्या म्हणजे एफ्राईमाच्या डोक्यावर ठेवला व डावा
हात थोरल्याच्या म्हणजे मनश्शेच्या डोक्यावर ठेवला;
15आणि इस्राएलाने योसेफाला आशीर्वाद दिला; तो म्हणाला,

"माझे पूर्वज अब्राहाम व इसहाक यांनी आपल्या देवाची
उपासना केली व त्याच देवाने मला माझ्या सर्व आयुष्यभर
चालवले आहे;

16तोच मला सर्व संकटातून सोडवणारा माझा देवदूत
होता. त्यानेच ह्या मुलांना आशीर्वाद द्यावा अशी मी प्रार्थना
करतो. आता ही मुले माझे व आपले पूर्वज अब्राहाम व
इसहाक यांचे नांव चालवोत; ते वाढून त्यांची पृथ्वीवर
अनेक कुटुंबे, कुळे व राष्ट्रे होवोत अशी मी प्रार्थना
करतो."

17आपल्या बापाने एफ्राईमाच्या डोक्यावर आपला उजवा
हात ठेवला असे पाहिले तेव्हा योसेफाला ते आवडले
नाही; त्याला तो हात एफ्राईमाच्या डोक्यावरून काढून
मनश्शेच्या डोक्यावर ठेवावयास पाहिजे होता म्हणून
योसेफाने आपल्या बापाचा हात धरला. 18योसेफ आपल्या
बापास म्हणाला, "बाबा! तुम्ही आपला उजवा हात चुकीच्या
मुलावर ठेवला आहे. मनश्शे हा प्रथम जन्मलेला म्हणजे
माझा थोरला मुलगा आहे. 19परंतु त्याचा बाप आपले
म्हणणे कायम ठेवत पुढे म्हणाला, "माझ्या मुला! मला

माहीत आहे; होय मला माहीत आहे की मनश्शे हा प्रथम जन्मलेला आहे; आणि तो महान होईल; तो अनेक राष्ट्रांचा पिता होईल म्हणजे त्याच्यापासून अनेक राष्ट्रे उदयास येतील, परंतु धाकटा भाऊ थोरल्या पेक्षाही अधिक महान होईल आणि त्याची कुळे वाढून त्यांचा मोठा राष्ट्रसमूह निर्माण होईल."
20तेव्हा त्या दिवशी इस्राएलाने त्या मुलांना आशीर्वाद दिला; तो म्हणाला,

"इस्राएल लोक आशीर्वाद देताना तुमची नांवे उच्चारितील; ते म्हणतील, "देव तुम्हाला एफ्राईमासारखा, मनश्शेसारखा आशीर्वाद देवो."

अशारीतीने इस्राएलाने एफ्राईमास मनश्शेपेक्षा अधिक मोठे केले.
21मग इस्राएल योसेफास म्हणाला, "माझे शेवटचे दिवस आता अगदी जवळ आले आहेत, आता मी मरणार; परंतु देव सतत तुमच्या बरोबर राहील, तो तुम्हाला तुमच्या पूर्वजांच्या देशात घेऊन जाईल.
22तुझ्या भावांना मी जे दिले नाही ते मी तुला देतो; मी स्वत: तलवारीने व धनुष्याने लढून अमोरी लोकाकडून जिंकलेला पर्वत तुला देतो."

## याकोब आपल्या मुलांना आशीर्वाद देतो

49 मग याकोबाने आपल्या सर्व मुलांना आपल्याजवळ बोलावले. तो म्हणाला, "माझ्या मुलांनो, माझ्या जवळ या म्हणजे पुढील काळी तुमचे काय होईल हे मी तुम्हास सांगतो."

2 "याकोबाच्या मुलांनो! तुम्ही सर्व एकत्र या आणि तुमचा बाप इस्राएल याचे ऐका."

### रऊबेन

3"रऊबेना! तू माझा पहिलाच म्हणजे थोरला मुलगा आहेस; पुरुष म्हणून माझ्यात असलेल्या शक्तीचा तू पहिला पुरावा आहेस. तू सर्वापेक्षा अधिक शक्तीवान व सर्वापेक्षा अधिक अभिमान वाटावा असा आहेस;
4परंतु तुझ्या भावना पुराच्या अनावर व बेबंद लाटांप्रमाणे आहे; तू माझ्या मुलांमध्ये श्रेष्ठ किंवा सर्वात अधिक महत्वाचा मुलगा होणार नाहीस कारण तू आपल्या बापाच्या एका बायकोपाशी जाऊन निजलास; तू आपल्या बापाच्या अंथरुणाचा आदर करून मान राखला नाहीस."

### शिमोन व लेवी

5"हे भाऊ आहेत; या दोन भावांना तरवारींने लढण्याची आवड आहे.
6त्यांनी गुपचूप वाईट गोष्टी करण्याचे ठरवले; त्यांचे हे बेत माझ्या जीवाला मान्य नाहीत; तसेच त्यांच्या गुप्त बैठका मला मान्य नाहीत; त्यांनी रागाच्या भरात माणसांची कत्तल केली; गंमत म्हणून त्यांनी पशूंना जखमी केले;
7त्यांचा राग शाप आहे; ते अति रागाने वेडे होतात तेव्हा अतिशय क्रूर बनतात; याकोबाच्या जमिनीत त्यांना वाटा मिळणार नाही. ते सर्व इस्राएल देशभर पसरतील."

### यहूदा

8"यहूदा, तुझे भाऊ तुझी स्तुती करतील; तू तुझ्या शत्रूंचा पराभव करशील; तुझे भाऊ तुला लवून नमन करतील.
9यहूदा, तू आपली शिकार मारलेल्या सिंहासारखा आहेस; माझ्या मुला, आपल्या शिकारीचा पशू मारून त्याच्यावर उभा असलेल्या सिंहासारखा तू आहेस;
यहूदा विसावा घेणाऱ्या सिंहासारखा आहे
आणि त्याला त्रास देण्याइतका शूर दूसरा कोणीही नाही.
10यहूदाचे कुटुंबीय राजे होतील
आणि योग्य राजा येईपर्यंत त्याच्या कुळातील राजवेत्र जाणार नाही मग बहुतेक जण त्याच्या आज्ञेत राहतील व त्याची सेवा करतील.
11तो आपले गाढव अगदी चांगल्या
द्राक्षवेलीस बांधून ठेवील; तो उंची द्राक्षारसाने आपले कपडे धुईल;
12द्राक्षमद्य घेतल्याने त्याचे डोळे त्या द्राक्षमद्यापेक्षा अधिक लालबुंद होतील; त्याचे दात दूधपिण्यामुळे दूधापेक्षा अधिक सफेद होतील."

### जबुलून

13"जबुलून समुद्र किनाऱ्याजवळ राहील; त्याचा समुद्र किनारा जहाजासाठी सुरक्षित बंदर असेल. त्याच्या जमिनीची हद्द सिदोन नगरापर्यंत असेल."

### इस्साखार

14"इस्साखार अतिशय कष्टाने काम करणाऱ्या गाढवासारखा होईल; जड वजनाचे सामान वाहून नेल्यावर तो विश्रांती घेईल.
15आपले विसावा घेण्याचे ठिकाण चांगले आहे, आपला देश आनंददायक आहे असे तो पाहील आणि मग जड बोजा वाहून नेण्यास व अगदी गुलामाप्रमाणे काम करण्यास तो तयार होईल."

### दान

16"दान इस्राएलाच्या इतर वंशाप्रमाणे आपल्या लोकांचा न्याय करील.
17तो रस्त्याच्या कडेला असणाऱ्या सापाप्रमाणे, वाटेच्या कडेला पडून असलेल्या भयंकर नागाप्रमाणे होईल; तो घोड्याच्या टाचेला दंश करील; त्यामुळे घोडेस्वार घोड्यावरून खाली कोसळेल;

18"हे परमेश्वरा, तुझ्या कडून उध्दार होण्याची
मी वाट पाहात आहे."

### गाद

19"लुटारुंची टोळी" गाद वर हल्ला करेल*, परंतु तो
त्यांना पळवून लावील."

### आशेर

20"आशेराची जमीन उत्तम अन्न भरपूर उपजवील;
राजाला योग्य असे चांगले अन्नपदार्थ त्याजकडे असतील."

### नफताली

21"नफताली मोकळ्या सुटलेल्या बागडणाऱ्या
हरिणीप्रमाणे होईल; त्याचे शब्द म्हणजे त्याचे बोलणे
हरिणींच्या पाडसाप्रमाणे गोड व सुंदर असेल."

### योसेफ

22"योसेफ अतिशय यशस्वी झाला आहे; तो ओढ्याकाठी
वाढणाऱ्या द्राक्षवेलीसारखा आहे; ती कुंपणावरही पसरते.
23पुष्कळ लोक त्याच्या विरुद्ध झाले व त्याच्याशी लढले;
धनुर्धारी लोकांनी त्याचा द्वेष केला;
24परंतु आपल्या बळकट धनुष्याच्या आणि कुशल
बाहुंच्या जोरावर त्याने युद्ध जिंकिले. त्याला याकोबाचा
सामर्थ्यवान देव, मेंढपाळ, इस्राएलाचा खडक व तुमच्या
बापाचा देव याजकडून तुम्हाला शक्ती मिळते.
25सर्वशक्तिमान देव तुला वर आकाशातून व खाली
खोल दरीतून आशीर्वाद देवो तसेच स्तनांचा व गर्भाचा
आशीर्वाद तो तुला देवो.
26माझ्या आईबापाच्या जीवनात अनेक चांगल्या घटना
घडल्या व अनेक चांगल्या गोष्टी त्यांना मिळाल्या; आणि
मी तुझा बाप, मला त्यांच्यापेक्षा अधिक आशीर्वाद मिळाला;
तुझ्या भावांनी तुला काही ठेवले नाही. परंतु माझे सर्व
आशीर्वाद तुझ्यावर पर्वता एवढे होतील.'

### बन्यामीन

27"बन्यामीन एखाद्या भुकेलेल्या लांडग्यासारखा आहे.
तो सकाळी आपले भक्ष्य मारून खाईल व राहिलेले
संध्याकाळी वाटून टाकील."
28हे सर्व इस्राएलाचे बारा वंश होत; आणि हया गोष्टी
त्यांचा बाप त्यांच्याशी बोलला; त्याने प्रत्येक मुलाला ज्याच्या
त्याच्या योग्यतेप्रमाणे आशीर्वाद दिला. 29मग इस्राएलाने
त्यांना आज्ञा दिली. तो म्हणाला, "मी मरेन तेव्हा तुम्ही
मला माझ्या लोकात नेऊन ठेवावे. एफ्राम हित्ती ह्याच्या
शेतातील गुहेत माझ्या पूर्वजांबरोबर मला पुरावे. 30ती
गुहा कनान देशात मम्रेच्या राईजवळील मकपेला येथील
शेतात आहे. आपल्या घराण्याला कबरस्तान असावे म्हणून
अब्राहामाने ते शेत एफ्रामकडून विकत घेतले. 31अब्राहाम
व त्याची बायको सारा, यांना त्या गुहेत पुरले आहे. इसहाक
आणि त्याची बायको रिबेका यांनाही तेथेच पुरले आहे.
आणि माझी बायको लेआ हिलाही मी तेथेच पुरले आहे.
32ती गुहा हेथी लोकाकडून विकत घेतलेल्या शेतात आहे."
33आपल्या मुलांशी हे बोलणे संपवल्यानंतर इस्राएल आपले
पाय पलंगावर घेऊन झोपला व मरण पावला.

### याकोबाची प्रेतक्रिया

50 इस्राएल मरण पावला तेव्हा योसेफ फार दु:खी
झाला. तो आपल्या बापाला कवटाळून खूप
रडला; त्याने बापाची चुंबने घेतली. 2योसेफाने आपल्या
सेवाकांतील वैद्यांना आपल्या बापाचे प्रेत मसाला लावून,
व भरून तयार ठेवण्याची आज्ञा केली. तेव्हा त्यांनी खास
मिसरच्या पद्धतीने इस्राएलाचे प्रेत मसाला लावून, भरून,
पुरण्यासाठी तयार केले. 3अशा खास पद्धतीने प्रेत तयार
केल्यानंतर ते पुरण्या पूर्वी मिसरचे लोक चाळीस दिवस
थांबत असत. त्यानंतर मिसरच्या लोकांनी त्यांच्या
रीतीप्रमाणे याकोबासाठी सत्तर दिवस शोक केला.
4सत्तर दिवसानंतर शोक करण्याचा काळ संपला. तेव्हा
योसेफ फारोच्या अधिकाऱ्यांना म्हणाला, "फारोला हे
सांगा, 5'माझा बाप मरावयास टेकला असताना मी त्याला
वचन दिले होते की मी त्याला कनान देशातील त्याने
स्वत:साठी तयार केलेल्या गुहेत पुरेन. तेव्हा कृपया माझ्या
बापास पुरावयास जाऊ द्या; मग मी परत आल्यावर तुम्हाला
भेटेन.'"
6फारोने उत्तर दिले, "तू आपल्या बापाला दिलेले वचन
पूर्ण कर; तू जाऊन आपल्या बापाने सांगितल्या प्रमाणे
त्याला पुरून ये."
7तेव्हा योसेफ आपल्या बापाला पुरण्यासाठी गेला; तेव्हा
फारोचे सर्व अधिकारी व मिसरचे नेते आणि सर्व वडीलजन
योसेफाबरोबर गेले; 8आपले कुटुंबीय, आपले भाऊ व
त्यांचे कुटुंबीय तसेच आपल्या बापाचे कुटुंबीय
योसेफाबरोबर होते. (फक्त लहान मुले व पशू एवढेच
गोशेन प्रांतात मागे राहिले होते.) 9तो लोकांचा खूप मोठा
समूह होता. सैनिकांची एक पलटणही घोडयावर बसून
मोठया संख्येने योसेफाबरोबर गेले.
10ते यार्देन (जॉर्डन) नदीच्या पूर्वेस गोरेन आताद येथील
खळ्यावर गेले. या ठिकाणी इस्राएलाचा प्रेतक्रिया विधी
झाला. हा प्रेतकियेचा विधी सात दिवस चालला.
11कनान देशात राहाणाऱ्या लोकांनी गोरेन आताद
येथील हे प्रेतक्रियेचे विधी व संस्कार पाहिले तेव्हा ते
म्हणाले, "मिसरच्या लोकांचे प्रेतक्रिया विधी व संस्कार

---

**लुटारुंची ... करेल** "लुटारुंची टोळी" व "हल्ला" ह्या शब्दांसाठी असलेल्या इब्री भाषेतील शब्दाचा उच्चार "गाद" या शब्दाच्या उच्चारासारखा आहे.

फारच दु:खाने भरलेले आहेत." त्यामुळे आता त्या जागेला
अबेल मिस्राईम असे नांव पडले आहे. 12अशाप्रकारे
याकोबाच्या मुलांनी आपल्या बापाने दिलेल्या आज्ञेप्रमाणे
केले; 13त्यांनी त्याचे प्रेत कनान देशात नेऊन एफ्रोन
हित्ती याजकडून कबरस्तान म्हणून उपयोगी पडावे यासाठी
अब्राहामाने विकत घेतलेल्या मम्रे येथील शेतातील मकपेला
गुहेत पुरले. 14आपल्या बापाच्या प्रेतक्रियेनंतर योसेफ आणि
त्याच्या बरोबर गेलेला सर्वसमुदाय मिसरला माघारी गेला.

### योसेफाच्या भावांना योसेफाची भीती वाटते

15याकोब मरण पावल्यावर योसेफाचे भाऊ चिंतेत पडले.
फार पूर्वी आपण योसेफाबरोबर दुष्टपणाने वागलो त्यावरून
आता सुद्धा आपल्यावर त्याचा राग भडकेल अशी त्यांना
भीती वाटली. ते स्वत:शीच म्हणाले कदाचित "योसेफ
अजूनही आपला तिरस्कार करत असेल आणि आपण
त्याच्याशी वाईट वागलो त्याचा तो बदला घेईल." 16तेव्हा
त्या भावांनी योसेफाला येणे प्रमाणे निरोप पाठवला.

तुझ्या बापाने मरण्यापूर्वी आम्हाला अशी आज्ञा
दिली 17तो म्हणाला, 'योसेफाला सांगा की तुझ्या
भावांनी तुझ्याशी जे वाईट वर्तन केले त्याबद्दल तू
त्यांची क्षमा करावीस अशी मी विनंती करतो.' तेव्हा
हे योसेफा, आम्ही तुला अशी विनंती करतो की,
आम्ही तुझ्याशी वाईट रीतीने वागलो त्याबद्दल कृपया
तू आमची क्षमा कर. आम्ही देवाचे, तुझ्या बापाच्या
देवाचे दास आहोत.

योसेफाचे भाऊ वरीलप्रमाणे बोलले त्यामुळे योसेफाला
फार दु:ख झाले व तो रडला. 18योसेफाचे भाऊ त्यांजकडे
गेले व ते त्याच्या पाया पडले, मग ते म्हणाले, "आम्ही
आपले दास आहोत."

19मग योसेफ त्यांना म्हणाला, "भिऊ नका; मी देव
नाही, म्हणजे शिक्षा करण्याचा मला अधिकार नाही!
20तुम्ही माझे वाईट करण्याचा कट केला, पण देव
माझ्यासाठी चांगली योजना करीत होता. असंख्य लोकांचे
प्राण वाचविण्यासाठी माझा उपयोग करावा अशी देवाची
योजना होती. आजही देवाची तीच योजना आहे. 21तेव्हा
भिऊ नका; मी तुमची व तुमच्या मुलाबाळांची काळजी
घेईन, तुमचे पोषण करीन." योसेफ त्याच्या भावाशी ममतेने
बोलला त्यामुळे त्याच्या भावांना बरे वाटले.

22योसेफ आपल्या बापाच्या कुटुंबीयासह मिसरमध्ये
राहिला. तो एकशे दहा वर्षांचा असताना मरण पावला.
23योसेफाच्या हयातीत एफ्राईमाला मुले व नातवंडे झाली;
आणि त्याचा मुलगा मनश्शे याला माखीर नांवाचा मुलगा
झाला. योसेफाने माखीराची मुले ही पाहिली.

### योसेफाचे मरण

24योसेफाचे मरण जवळ आले तेव्हा तो आपल्या भावांना
म्हणाला, "माझी मरण्याची वेळ जवळ आली आहे; परंतु
देव तुमची काळजी घेईल हे मला माहीत आहे. तो देव
तुम्हाला ह्या देशातून काढून अब्राहाम, इसहाक, व याकोब
यांना जो देश देण्याचे वचन त्याने दिले होते त्या देशात
घेऊन जाईल."

25मग योसेफाने आपल्या वंशजास वचन देण्यास
सांगितले. तो म्हणाला, "देव जेव्हा तुम्हाला येथून काढून
पुढे घालून त्या नवीन देशात घेऊन जाईल तेव्हा माझे
शरीर तुम्ही तुमच्या बरोबर घेऊन जाल असे मला वचन
द्या."

26योसेफ एकशेदहा वर्षांचा झाल्यावर मिसरमध्ये मरण
पावला. वैद्यांनी त्याच्या शरीराला मसाला लावून ते
पुरण्यासाठी तयार केले व ते शवपेटीत मिसरमध्ये ठेवले.

# निर्गम

### मिसरमधील याकोबाचे कुटुंब

1 याकोब (इस्राएल) आपली मुले व त्यांची कुटुंबे यांच्या
बरोबर मिसरला गेला. इस्राएलाची मिसरला गेलेली
मुले ही; 2रऊबेन, शिमोन, लेवी, यहूदा 3इस्साखार,
जबुलून, बन्यामीन; 4दान, नफताली, गाद व आशेर.
5त्याच्या वंशाचे हे एकूण सत्तरजण होते. (त्याच्या बारा
मुलांपैकी योसेफ हा अगोदरच मिसरमध्ये होता.)
6काही काळानंतर योसेफ, त्याचे भाऊ व त्या पिढीतील
सर्व लोक मरण पावले. 7परंतु इस्राएल लोकांना पुष्कळ
मुले झाली आणि त्यांची संख्या वाढत वाढत गेली; ते
लोक महाप्रबल झाले आणि सर्व मिसर देश त्यांनी भरून
गेला.

### इस्राएल लोकांना त्रास

8नंतर मिसर देशावर नवीन राजा राज्य करु लागला.
योसेफ व त्याची कर्तबगारी याची त्याला माहीती नव्हती.
9तो आपल्या लोकांना म्हणाला, “ह्या इस्राएल लोकांकडे
पाहा; देशात ते फार झाले आहेत! आणि ते आपल्यापेक्षा
संख्येने अधिक आहेत व शक्तीमानही झाले आहेत;
10त्यांची वाढ थांबवावी म्हणून आपण काहीतरी उपाय
योजना केलीच पाहिजे. जर एखादा युद्धाचा प्रसंग आला
तर हे इस्राएल लोक आपल्या शत्रुला जाऊन मिळतील;
आणि मग ते आपला पराभव करुन आपणापासून निसटून
जातील.”
11तेव्हा इस्राएल लोकांस त्रास देऊन त्यांचे जीवन
कष्टमय व कठीण करावयाचे असे मिसरच्या लोकांनी
ठरविले. म्हणून त्यांनी, गुलामाकडून बिगार कामे करून
घेण्यासाठी जसे मुकादम नेमतात तसे इस्राएल लोकांवर
मुकादम नेमले. त्या मुकादमांनी राजाकरिता पिथोम व
रामसेस ही दोन शहरे जबरदस्तीने इस्राएल लोकांकडून
बांधून घेतली; राजाने या दोन शहरांचा धान्य व इतर
वस्तू साठवून ठेवण्यासाठी उपयोग केला.
12मिसरवासीयांनी इस्राएल लोकांवर अधिक कठीण
व कष्टाची कामे लादली; परंतु जसजसे ते त्यांच्यावर
अधिक कष्टाची कामे लादू लागले तसतसे इस्राएल लोक
अधिकच संख्येने वाढत गेले व अधिकच पसरले; 13आणि
मग मिसरवासीयांना त्यांची अधिकच भीती वाटू लागली;
म्हणून त्यांनी त्यांच्यावर अधिक कष्टाची कामे लादली.
14अशा प्रकारे मिसरवासीयांनी इस्राएल लोकांचे जीवन
फारच कठीण काबाडकष्टांचे व हालअपेष्टांचे केले; त्यांनी
त्यांना विटा बनविण्याची, घाण्याची तसेच शेतीची व इतर
अतिशय कठीण व कष्टाची कामे बळजबरीने करायला
लावली.

### देवाच्या आज्ञा पाळणाऱ्या सुइणी

15इस्राएली स्त्रिया बाळंत होताना त्यांना मदत करणाऱ्या
शिप्रा व पुवा नावांच्या दोन इब्री म्हणजे इस्राएली सुइणी
होत्या. मिसरच्या राजाने त्यांना आज्ञा केली. 16तो म्हणाला,
“तुम्ही इब्री स्त्रियांना बाळंतपणात सहाय्य करण्याचे काम
चालू ठेवा. त्या स्त्रियांना मुलगी झाली तर तिला जिवंत
ठेवा; परंतु त्यांना मुलगा झाला तर त्याला अवश्य मारून
टाका.”
17परंतु त्या सुइणा देवाचे भय व आदर धरून त्याच्यावर
विश्वास ठेवणाऱ्या होत्या म्हणून त्यांनी राजाची आज्ञा
मानली नाही; त्यांनी जन्मणाऱ्या मुलांनाही जिवंत ठेवले.
18तेव्हा मिसरच्या राजाने त्या सुइणींना बोलावून
विचारले, “तुम्ही असे का केले? तुम्ही जन्मलेल्या मुलांना
का जिवंत ठेवले?”
19सुइणी म्हणाल्या, “ह्या इब्री म्हणजे इस्राएली स्त्रिया
मिसरच्या स्त्रियांपेक्षा फार ताकदवान आहेत; आम्ही सुइणी
त्यांच्याकडे जाऊन पोहोंचण्यापूर्वीच त्या बाळंत होतात.”
20त्या सुइणींच्या कामाबद्दल देवाला आनंद झाला; त्याबद्दल
देवाने त्यांचे कल्याण केले व त्यांची घराणी स्थापित
केली; 21इस्राएल लोकांना अधिक मुले होत राहिली; ते
संख्येने फार वाढले व फार बलवान झाले.
22तेव्हा फारोने आपल्या सर्व लोकांना आज्ञा दिली,
“त्या लोकापैकी ज्यांना मुलगा होईल तो प्रत्येक मुलगा
नाईल नदीत फेकून द्या पण मुलगी मात्र जिवंत ठेवा.”

### मोशे बाळ

2 लेवी वंशातील एक माणूस होता. त्याने लेवी
वंशातीलच मुलगी बायको केली. 2ती गरोदर राहिली
व तिला मुलगा झाला; तो मुलगा फार सुंदर व देखणा
आहे असे पाहून त्याच्या आईने त्याला तीन महिने लपवून
ठेवले. 3तो बाळ मुलगा असल्यामुळे सापडला जाईल व

मारला जाईल अशी त्याच्या आईला भीती वाटली. तीन
महिन्यानंतर तिने एक लव्हाळ्याची पेटी तयार केली; ती
पाण्यावर तरंगावी म्हणून तिने तिला आतून व बाहेरून
डांबर लावले. तिने त्या तान्ह्या बाळाला पेटीत ठेवले;
नंतर तिने ती पेटी नदीत उंच लव्हाळ्यात ठेवली. 4त्या
बाळाची बहीण, त्याचे पुढे काय होते ते पाहण्यासाठी तेथून
दूर बाजूला उभी राहिली.
5त्याच वेळी फारोची मुलगी (राजकन्या) आंघोळ
करण्यासाठी नदीवर गेली. तिच्या दासी नदीच्या
किनाऱ्यावर फिरत होत्या. राजकन्येने उंच लव्हाळ्यात
ती पेटी पाहिली; आणि एका दासीला तिकडे जाऊन ती
पेटी आणण्यास सांगितले.
6राजकन्येने ती पेटी उघडली तेव्हा तिला तिच्यात एक
लहान बाळ दिसले, ते बाळ रडत होते, म्हणून तिला
त्याच्याबद्दल फार वाईट वाटले! ती म्हणाली, “हा बाळ
कोणातरी इब्री म्हणजे इस्राएलाच्या कुटुंबात जन्मलेला
मुलगा आहे.”
7मग आतापर्यंत लपून बसलेली ती बाळाची बहीण
राजकन्येकडे गेली व म्हणाली, “या बाळाची काळजी
घेण्यासाठी मी जाऊन एखादी इब्रीदाई शोधून आणू का?”
8राजकन्येने उत्तर दिले, “होय कृपाकरून लवकर
घेऊन ये.”
तेव्हा ती मुलगी गेली व त्या बाळाच्या आईलाच घेऊन
आली.
9राजकन्या त्या बाईला म्हणाली, “बाई, ह्या बाळाला
घरी घेऊन जा, व माझ्याकरिता त्याला दूध पाज आणि
त्याची चांगली काळजी घे; त्याबद्दल मी तुला मोबदला
देईन.”
तेव्हा त्या बाईने ते बाळ घेतले आणि त्याची योग्य
काळजी घेतली. 10ते मूल वाढले. मग काही काळानंतर
एके दिवशी ती बाई त्या बाळाला घेऊन राजकन्येकडे
आली; तेव्हा राजकन्येने ते बाळ घेतले आणि त्याला
आपला स्वत:चा मुलगा म्हणून स्वीकारले; तिने त्याचे
नांव मोशे ठेवले कारण तिने त्याला पाण्यातून उचलून
घेतले होते.

## मोशे आपल्या लोकांस मदत करतो

11मोशे वाढत जाऊन एक तरूण माणूस झाला. तेव्हा
आपल्या इब्री लोकांस फार कष्टाची कामे करावयास
भाग पाडले जात आहे हे त्याने पाहिले. एके दिवशी एक
मिसरचा माणूस इब्री माणसास मारत असताना त्याने पाहिले.
12तेव्हा आपल्याकडे पाहणारा आजूबाजूला कोणीही नाही
हे जाणून मोशेने त्या मिसरच्या माणसाला जिवे मारले व
वाळूत पुरुन टाकले.
13दुसऱ्या दिवशी दोन इब्री माणसे मारामारी करत होती.
मोशेने पाहिले की त्यांच्यामधील एक दोषी आहे. मोशे
त्याला म्हणाला, “तू आपल्या शेजाऱ्याला का मारत
आहेस?”
14त्या माणसाने उत्तर दिले, “तुला आम्हावर अधिकारी
व न्यायाधीश कोणी नेमले? मला सांग! तू काल* जसे
त्या मिसरच्या माणसाला जिवे मारलेस, तसे मला मारावयास
पाहातोस काय?”
तेव्हा मोशे घाबरला. तो विचार करीत स्वत:शीच
म्हणाला, “मी काय केले ते आता सर्वांना माहीत झाले
आहे.”
15मोशेने काय केले हे फारोला समजले तेव्हा त्याने
त्याला जिवे मारावयाचे ठरवले. परंतु मोशे फारोपासून
दूर पळून गेला. तो मिद्यान देशात गेला आणि तेथे एका
विहिरीजवळ थांबला.

## मिद्यान देशात मोशे

16मिद्यानात एक याजक होता. त्याला सात मुली होत्या;
आपल्या बापाच्या शेरडामेंढरास पाणी पाजण्यासाठी त्या
विहिरीवर आल्या. त्या डोणीत पाणी भरण्याचा प्रयत्न
करीत होत्या; 17परंतु काही मेंढपाळांनी त्यांना पाणी भरू
न देता हुसकून लावले. तेव्हा मोशेने त्या मुलींना त्यांच्या
शेरडामेंढरांस पाणी पाजण्यास मदत केली.
18मग त्या मुली आपला बाप रगुवेल याच्याकडे गेल्या;
तेव्हा त्यांचा बाप त्यांना म्हणाला, “तुम्ही आज एवढ्या
लवकर घरी कशा आला?”
19मुलींनी उत्तर दिले, “तेथील मेंढपाळानी आम्हाला
हाकलून देण्याचा प्रयत्न केला. परंतु एका मिसरच्या
माणसाने आम्हाला मदत केली. त्याने आम्हासाठी पाणी
काढून आपल्या शेरडेमेंढरास पाजले.”
20तेव्हा रगुवेल आपल्या मुलींना म्हणाला, “तो माणूस
कोठे आहे? तुम्ही त्याला सोडून का आला? त्याला आपल्या
घरी जेवावयास बोलावून आणा.”
21त्या माणसापाशी राहण्यास मोशेला आनंद वाटला.
त्या माणसाने आपली मुलगी सिप्पोरा हिच्याबरोबर त्याचे
लग्न करून दिले. 22सिप्पोराला एक मुलगा झाला. मोशेने
त्याचे नांव गेर्षोम ठेवले.

## देव इस्राएल लोकांना मदत करण्याचे ठरवतो

23बऱ्याच वर्षानंतर मिसरचा राजा मरण पावला.
अजूनही इस्राएल लोकांना अतिशय कष्टाची कामे करावी
लागत होती. त्यांनी मदतीकरिता हाका मारल्या व देवाने
त्या ऐकल्या; 24देवाने त्यांच्या प्रार्थना ऐकल्या आणि
अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्याशी केलेल्या कराराची
त्याला आठवण झाली. 25देवाने इस्राएल लोकांचे हाल
पाहिले आणि त्यांना लगेच मदत करावयाचे ठरवले.

---

**काल** या अर्थाचा शब्द प्राचीन ग्रीक भाषांतरात आढळतो; तो मूळ इब्री भाषेतील आवृतीत नाही.

## जळते झुडूप

3 मोशेच्या सासऱ्याचे नांव इथ्रो असे होते. मोशे त्याची
शेरडेमेंढरे चारणारा मेंढपाळ होता. एके दिवशी मोशे
वाळवंटाच्या पश्चिमेला होरेब डोंगर म्हणजे सिनाय डोंगर
ह्या देवाच्या डोंगराकडे आपली मेंढरे घेऊन गेला. 2त्या
डोंगरावर त्याने एका जळत्या झुडुपात परमेश्वराच्या दूताला
पाहिले. मोशेने असे पाहिले की झुडूप जळत होते परंतु ते
जळून खाक होत नव्हते तर जसेच्या तसेच होते. 3तेव्हा
मोशे स्वत:शी म्हणाला, “हे झुडूप जळत असून जळून
नष्ट का होत नाही हे मी जरा जवळ जाऊन पाहातो.”

4मोशे झुडूपाजवळ येत होता हे परमेश्वराने पाहिले.
तेव्हा झुडूपातून देवाने मोशेला हाक मारून म्हटले, “मोशे
मोशे!”

आणि मोशे म्हणाला, “मी इथे आहे”

5तेव्हा परमेश्वर म्हणाला, “तू आहेस तेथून झुडुपाजवळ
येऊनकोस, तर तुझ्या पायातले पायतण काढ; कारण तू
पवित्र भूमिवर उभा आहेस. 6मी तुझ्या पूर्वजांचा म्हणजे
अब्राहाम, इसहाक व याकोब यांचा देव आहे.”

देवाकडे पाहाण्यास मोशेला भीती वाटली म्हणून त्याने
आपले तोंड झाकून घेतले.

7परमेश्वर म्हणाला, “मिसरमध्ये माझ्या लोकांना कसा
त्रास भोगावा लागत आहे; आणि मिसरच्या लोकांनी त्याचा
कसा छळ चालविलेला आहे, हे मी पाहिले आहे; त्या
लोकांच्या हाका मी ऐकल्या आहेत; लोकांचे हाल व
दु:ख मला समजले आहे. 8आता मी खाली जाऊन माझ्या
लोकांचा मिसरच्या लोकांपासून बचाव करीन; मी त्यांना
ह्या देशातून काढून जेथे त्यांना कसलाही त्रास होणार
नाही अशा चांगल्या देशात* जेथे कनानी, हित्ती, अमोरी,
परिज्जी, हिव्वी व यबूसी असे विविध प्रकारचे लोक राहतात,
तेथे घेऊन जाईन. 9मी इस्राएल लोकांचे आक्रोश ऐकले
आहेत आणि मिसरच्या लोकांनी त्यांचे जीवन कसे कष्टमय
व कठीण केले आहे तेही पाहिले आहे. 10तेव्हा मी आता
तुला फारोकडे पाठवीत आहे! तर तू आता त्याच्याकडे
जा! आणि माझ्या लोकांना म्हणजे माझ्या इस्राएल लोकांना
मिसरमधून तुझ्या पुढाकाराने घेऊन ये!”

11परंतु मोशे देवाला म्हणाला, “मी कोणी मोठा माणूस
नाही! मी साधा माणूस आहे! तेव्हा फारोकडे जाऊन
इस्राएल लोकांना मिसरमधून घेऊन यावयाच्या पात्रतेचा
माणूस मी नाही, तर मग मी हे कसे करु शकेन?”

12देव म्हणाला, “हे तू करु शकशील, कारण मी
तुजबरोबर असेन मी तुला पाठवीत आहे याचा पुरावा
असा असेल; तू इस्राएल लोकांना मिसरमधून बाहेर
आणल्यावर या डोंगरावर येऊन माझी उपासना करशील.”

13मग मोशे देवाला म्हणाला, “परंतु मी जर इस्राएल
लोकाकडे जाऊन म्हणालो, ‘तुमच्या पूर्वजांचा देव याने
मला तुमच्याकडे पाठवले आहे;’ तर मग ते लोक
विचारतील ‘त्याचे नांव काय आहे?’ मग मी त्यांना काय
सांगू?” 14मग देव मोशेला म्हणाला, “त्याचे नांव ‘जो मी
आहे तो मी आहे’* असे आहे, हे त्यांना सांग. तू इस्राएल
लोकांकडे जाशील तेव्हा ‘मी आहे’ ने मला पाठवले आहे
असे त्यांना सांग. 15देव मोशेला आणखी म्हणाला, याव्हे
हा तुमच्या पूर्वजांचा म्हणजे अब्राहामाचा देव, इसहाकाचा
देव व याकोबाचा देव आहे असे तू त्यांना सांग. माझे नांव
नेहमीच ‘याव्हे’ असेल. इस्राएल लोक पिढ्यान्‌पिढ्या मला
त्याच नांवाने ओळखतील; ‘त्याच याव्हेने मला तुमच्याकडे
पाठवले आहे’ असे त्यांना सांग!”

16आणखी परमेश्वर म्हणाला, “तू जाऊन इस्राएल
लोकांच्या वडीलधाऱ्यांना (पुढाऱ्यांना) एकत्र बोलव आणि
त्यांना सांग की तुमच्या पूर्वजांचा देव म्हणजे अब्राहाम,
इसाहाक व याकोब यांचा देव ‘याव्हे’ मला दर्शन देऊन
माझ्याशी बोलला आहे. परमेश्वर म्हणतो मी तुमच्याविषयी
व मिसरमध्ये तुम्हाला जे जे सोसावे लागले त्याविषयी
विचार केला आहे. 17आणि मी असे ठरवले आहे की
मी तुम्हाला मिसरमध्ये भोगाव्या लागत असलेल्या
त्रासापासून सोडवीन व आता कनानी, हित्ती, अमोरी, परिज्जी,
हिव्वी व यबुसी अशा वेगवेगळ्या लोकांच्या ताब्यात
असलेल्या देशात घेऊन जाईन. मी तुम्हाला दूधामधाचे
प्रवाह वाहणाऱ्या देशात नेईन. 18ते वडीलधारे (पुढारी)
तुझे ऐकतील मग तू व ते वडीलधारे (पुढारी) मिळून
तुम्ही मिसरच्या राजाकडे जा व त्याला सांगा, ‘इब्री लोकांचा
देव ‘याव्हे’ आम्हाकडे आला. व त्याने आम्हास वाळवंटात
तीन दिवसांचा प्रवास करून जाण्यास व तेथे आमचा देव
‘याव्हे’ यासाठी बळी अर्पण करण्यास सांगितले आहे.’

19“परंतु मला माहीत आहे की मिसरचा राजा तुम्हाला
जाऊ देणार नाही. केवळ महान सामर्थ्यच तुम्हाला जाऊ
देण्यास त्याला भाग पाडील; 20तेव्हा मग मीच माझे महान
सामर्थ्य मिसरविरुद्ध वापरीन; मी त्या देशात महान
चमत्कार करीन. मग ते केल्यावर तो तुम्हाला जाऊ
देईल; 21आणि मिसरचे लोक तुम्हा इस्राएल लोकांवर
दया करतील असे मी करीन. तेव्हा तुम्ही निघताना मिसरचे
लोक तुम्हाला पुष्कळ बक्षिसे व भेट वस्तू देतील.

22प्रत्येक इब्री स्त्री म्हणजे इस्राएली स्त्री आपल्या
मिसरमधील शेजारणीकडून व आपल्या घरात राहाणाऱ्या
मिसरच्या स्त्रीकडून भेट वस्तू मागून घेईल व ते लोक
तिला भेट वस्तू देतील; तुम्हा लोकांना सोन्याचांदीचे दागिने
व उंची कपडे भेट म्हणून मिळतील. मिसरमधून निघताना
त्या वस्तू तुम्ही आपल्या मुलांमुलीच्या अंगावर घालाल.
अशा प्रकारे तुम्ही मिसरच्या लोकांची संपत्ती घ्याल.”

---

**चांगल्या देशात** म्हणजे जेथे दूध व मध वाहतात त्या देशात.

**मी आहे** “जो मी आहे तो मी आहे” यासाठी असलेल्या हिब्रू भाषेतील शब्द “याव्हे” असा आहे; त्याचा अर्थ “परमेश्वर,” “तो आहे,” किंवा तो “सर्वास अस्तित्व देणारा.”

## मोशेकरिता पुरावा

4 मग मोशे देवाला म्हणाला, “तू मला पाठवले आहेस
असे मी इस्राएल लोकांना सांगेन तेव्हा ते माझ्यावर
विश्वास ठेवणार नाहीत; ते म्हणतील, ‘परमेश्वराने तुला
दर्शन दिले नाही.’”
2परंतु देव मोशेला म्हणाला, “तुझ्या हातात ते काय
आहे?”
मोशेने उत्तर दिले, “ती माझी काठी आहे.”
3मग देव म्हणाला, “तुझ्या हातातली तुझी काठी
जमिनीवर टाक.”
तेव्हा मोशेने तसे केले; आणि त्या काठीचा साप झाला.
तेव्हा मोशे घाबरला व त्यापासून बाजूला पळाला. 4परंतु
परमेश्वर मोशेला म्हणाला, “तुझा हात पुढे कर व त्या
सापाची शेपटी धर.”
तेव्हा मोशेने तसे केल्यावर त्या सापाची पुन्हा काठी
झाली. 5मग देव म्हणाला, “ह्याप्रमाणे तुझ्या काठीचा उपयोग
कर म्हणजे मग तू इस्राएली पूर्वजांच्या परमेश्वराला
म्हणजेच अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव व याकोबाचा
देव, याला भेटलास असा ते लोक विश्वास धरतील.”
6मग परमेश्वर मोशेला म्हणाला, “मी तुला आणखी
एक चिन्ह किंवा पुरावा देतो. तू तुझा हात झग्याच्या आत
तुझ्या छातीवर ठेव” तेव्हा मोशेने आपला हात झग्याच्या
आत आपल्या छातीवर ठेवला; मग त्याने आपला हात
बाहेर काढला तेव्हा त्यावर बर्फासारखे पांढरे डाग दिसले*;
असा त्याचा हात बदलून गेला.
7मग देव म्हणाला, “आता पुन्हा तुझा हात झग्याच्या
आत तुझ्या छातीवर ठेव.” तेव्हा मोशेने तसे केले. मग
त्याने आपला हात तेथून काढला तेव्हा त्याच्यात बदल
होऊन तो पुन्हा पूर्वी सारखा चांगला झाला.
8मग देव बोलला, “तू तुझ्या काठीचा चमत्कार
दाखवल्यावरही जर त्या लोकांनी तुझ्यावर विश्वास ठेवला
नाही, तर मग हा हाताचा चमत्कार दाखवल्यावर ते
तुझ्यावर विश्वास ठेवतील. 9हे दोन्ही चमत्कार
दाखवल्यावरही त्यांनी जर तुझ्यावर विश्वास ठेवला नाही
तर मग नाईल नदीचे थोडे पाणी घे आणि ते जमिनीवर
ओत; ओतल्याबरोबर त्याचे रक्त होईल.”
10परंतु मोशे परमेश्वराला म्हणाला, “परंतु परमेश्वरा
मी तुला खरे ते सांगतो; मी काही चांगला वक्ता नाही;
मला लोकांसमोर कधीही नीट बोलता आलेले नाही.
आणि आता तुझ्याबरोबर बोलल्यानंतरही नाही. तुला माहीत
आहे की मी सावकाश व अडखळत बोलतो आणि बोलताना
मला योग्य, परिणामकारक शब्द सापडत नाहीत;”
11मग परमेश्वर त्याला म्हणाला, “माणसाचे तोंड कोणी
केले? माणसाला बहिरा, मुका, आंधळा किंवा डोळस
कोण करतो? मीच की नाही? मी ‘याव्हे’ आहे! होय ना?
12तेव्हा मी सांगतो, तू आता जा. तू बोलत असताना मी
तुझ्याबरोबर असेन. मी योग्य शब्द तुझ्या मुखात घालीन.”
13परंतु मोशे म्हणाला, “माझ्या परमेश्वरा! मी तुला
कळकळीची विनंती करतो की तू दुसऱ्या कोणाला पाठव.
मला नको.”
14परमेश्वर मोशेवर रागावला! परमेश्वर म्हणाला, “मी
तुला आणखी मदत देतो. लेवी कुटुंबातील तुझा भाऊ
अहरोन याचा मी उपयोग करतो. तो पटाईत वक्ता आहे.
तो अगोदरच तुझ्याकडे येण्यास निघाला आहे. तुला
भेटल्यावर त्याला आनंद होईल. 15तो तुझ्याबरोबर
फारोकडे येईल. तू काय बोलावेस ते मी तुला सांगेन; मग
ते तू अहरोनाला सांग, आणि मग अहरोन योग्य शब्दात
फारोशी बोलेल. 16आणि अहरोन तुझ्या तर्फे लोकांशी
बोलेल; तो तुझे मुख होईल आणि त्याने काय बोलावे हे
सांगणारा तू त्याला देवासारखा होशील. 17तर आता जा!
तुझी काठी तुझ्या सोबत घे. मी तुझ्याबरोबर आहे हे
लोकांना दाखवण्यासाठी त्या काठीचा व इतर चमत्कारांचा
उपयोग कर!”

## मोशे मिसरला परत जातो

18मग मोशे आपला सासरा इथ्रो याच्याकडे परत गेला.
तो इथ्रोला म्हणाला, “मला मिसरला माझ्या भाऊबंदाकडे
जाऊ द्या. ते अद्याप जिवंत आहेत की नाहीत ते मला पाहू
द्या.”
इथ्रो म्हणाला, “तू शांततेने जा.”
19तेव्हा मोशे अद्याप मिद्यानात असताना देव त्याला
म्हणाला, “आता मिसरला परत जाणे तुझ्यासाठी सुरक्षिततेचे
आहे. जे लोक तुला ठार मारु पाहात होते ते आता मरण
पावले आहेत.”
20तेव्हा मोशेने आपली बायको व आपल्या मुलांना
गाढवांवर बसवले व त्यांना घेऊन तो मिसरला माघारी
गेला. त्याने देवाच्या सामर्थ्याने भरलेली आपली काठी
बरोबर नेली.
21मोशे मिसरचा प्रवास करत असताना देव त्याच्याबरोबर
बोलला. देव म्हणाला, “तू फारोशी बोलताना मी तुला जे
चमत्कार करण्याची शक्ती दिली आहे त्यायोगे ते चमत्कार
त्याला दाखवण्याची आठवण ठेव. परंतु मी फारोचे मन
अतिशय कठीण करीन; तो तुम्हाला जाऊ देणार नाही.
22मग तू फारोला सांग की 23परमेश्वर म्हणतो, ‘इस्राएल
माझा मोठा मुलगा* आहे. आणि मी तुला सांगत आहे
की तू माझ्या थोरल्या मुलाला माझी उपासना
करण्याकरिता जाऊ दे! जर तू माझ्या प्रथम जन्मलेल्या
मुलास म्हणजे माझ्या इस्राएल लोकांस जाऊ देण्याचे

---

**मग ... डाग दिसले** हाताला कोडसारखा काहीतरी कातडीचा रोग झाला होता.

**मोठा मुलगा** म्हणजे कुटुबात जन्मलेले पहिले अपत्य पूर्वीच्या काळी मोठ्या मुलाला फार महत्व असे.

नाकारशील तर मी तुझ्या प्रथम जन्मलेल्या म्हणजे थोरल्या
मुलास ठार मारीन.'"

### मोशेच्या मुलाची सुंता होते

24मोशे मिसरच्या प्रवासात असताना एके ठिकाणी
मुक्कामासाठी थांबला. तेव्हा परमेश्वराने मोशेला त्या
ठिकाणी गाठून त्याला ठार मारण्याचा* प्रयत्न केला.
25परंतु सिप्पोराने एक गारगोटीची धारदार सुरी घेतली व
तिने आपल्या मुलाची सुंता केली. मग तिने मुलाची
अग्रत्वचा घेतली आणि ती मोशेच्या पायावर ठेवून ती
त्याला म्हणाली, "तू माझा रक्ताने मिळवलेला नवरा
आहेस."
26सिप्पोरा असे म्हणाली कारण तिला आपल्या मुलाची
सुंता करावी लागली. तेव्हा देवाने मोशेला क्षमा केली व
त्याला ठार मारले नाही.

### देवासमोर मोशे व अहरोन

27परमेश्वराने अहरोनाला सांगितले होते, "तू वाळवंटात
जाऊन मोशेला भेट," म्हणून अहरोन देवाच्या डोंगरावर
म्हणजे होरेब किंवा सिनाय डोंगरावर जाऊन मोशेला
भेटला. मोशे भेटल्यावर अहरोनाने त्याचे चुंबन घेतले.
28परमेश्वराने मोशेला सांगितलेल्या सर्व गोष्टी मोशेने
अहरोनाला सांगितल्या व देवाने त्याला का पाठवले तेही
सांगितले; तसेच परमेश्वराने मोशेला जे चमत्कार करून
दाखवावयाची आज्ञा दिली होती त्याविषयीही त्याने
अहरोनाला सांगितले.
29मग मोशे व अहरोन यांनी जाऊन इस्राएली वंशजाचे
सर्व वडीलधारी एकत्र जमवले.
30नंतर परमेश्वराने मोशेला सांगितलेल्या सर्व गोष्टी
अहरोनाने लोकांस कळवल्या; त्यानंतर मोशेने
लोकांसमक्ष चमत्कार करून दाखवले. 31तेव्हा देवानेच
मोशेला पाठवले असल्याबद्दल त्यांची खात्री झाली. देवाने
त्यांच्या हालअपेष्टा पाहिल्या आहेत व तो त्याना भेटण्यास
आला आहे हे त्यांना माहीत झाले. तेव्हा त्यांनी नमन
करून देवाची उपासना केली.

### फारोसमोर मोशे व अहरोन

5 मोशे व अहरोन इस्राएल लोकांशी बोलल्यानंतर
फारोकडे गेले व त्याला म्हणाले, "इस्राएल लोकांचा
देव* म्हणतो, 'माझ्या लोकांना माझ्या सन्मानाकरिता
उत्सव करावयास रानात जाऊ द्यावे.'"
2परंतु फारो म्हणाला, "हा परमेश्वर कोण आहे? आणि
मी त्याचे का ऐकावे? मी इस्राएल लोकांना का जाऊ
द्यावे? तुम्ही परमेश्वर म्हणता तो कोण आहे हे मला
माहीत नाही. म्हणून इस्राएल लोकांस मी जाऊ देत नाही."
3मग अहरोन व मोशे म्हणाले, "इब्री लोकांचा म्हणजे
इस्राएल लोकांचा देव आम्हाशी बोलला आहे. म्हणून
आम्हाला रानात तीन दिवसांच्या वाटेवर जाऊ द्यावे आणि
तेथे आमचा देव परमेश्वर या करिता यज्ञार्पण करु द्यावे
अशी आम्ही आपणाला विनंती करतो. आणि आम्ही जर
असे केले नाही तर कदाचित् त्याला फार राग येईल व
तो रोगराईने किंवा तलवारीने आमचा नाश करेल."
4परंतु फारो त्यांना म्हणाला, "हे मोशे, हे अहरोना,
तुम्ही त्रास निर्माण करून घेत आहात! तुम्ही लोकांना
काम करु देत नाही; तुम्ही त्यांच्या कामात अडथळा
आणीत आहात! त्या गुलामांना आपल्या कामावर माघारी
जाण्यास सांगा! 5येथे खूप कामगार आहेत आणि त्यांना
काम करण्यापासून तुम्ही रोखत आहात!"

### फारो लोकांना शिक्षा देतो

6त्याच दिवशी इस्राएल लोकांचे काम अधिक खडतर
करण्यासाठी फारोने मुकादमांना व नायकांना आज्ञा दिली.
7तो त्यांना म्हणाला, "तुम्ही ह्या लोकांना विटा
बनविण्याकरिता आजपर्यंत सतत गवत दिलेले आहे. परंतु
आता त्यांना लागणारे गवत त्यांना स्वत: शोधून आणण्यास
सांगा. 8तरी परंतु पूर्वी इतक्याच विटा त्यांनी बनविल्या
पाहिजेत. ते आळशी झाले आहेत आणि म्हणूनच त्यांच्या
देवाला यज्ञ करण्यासाठी त्यांना जाऊ देण्याविषयी ते मला
विचारत आहेत. 9तेव्हा त्यांच्यावर अधिक काम लादून
त्यांना सतत कामात ठेवा, म्हणजे मग मोशेच्या खोट्या
गोष्टी ऐकण्यास त्यांना वेळ मिळणार नाही."
10म्हणून मिसरचे मुकादम व इस्राएली किंवा इब्री नायक
इस्राएल लोकांकडे जाऊन म्हणाले, "फारोने तुम्हाला विटा
बनविण्यासाठी लागणारे गवत न देण्याचे ठरवले आहे.
11तेव्हा तुम्हाला लागणारे गवत तुम्ही स्वत:च आणले
पाहिजे म्हणून आता जाऊन तुमच्यासाठी गवत आणा
परंतु पूर्वीइतक्याच विटा तुम्ही बनविल्या पाहिजेत."
12म्हणून मग इस्राएल लोक गवत शोधण्याकरिता सर्व
मिसर देशभर पांगले. 13त्यांच्यावर नेमलेले मुकादम
त्यांच्याकडून अधिक काम करवून घेऊन पूर्वी इतक्याच
विटा तयार करण्याकरिता त्याच्या मागे सतत तगादा लावीत.
14मिसरच्या मुकादमांनी लोकांवर इब्री म्हणजे इस्राएली
नायक नेमले होते. लोकांनी केलेल्या कामासाठी त्यांना
जबाबदार धरले जाई. मिसरचे मुकादम इस्राएली नायकांना
मारीत व म्हणत, "तुम्ही पूर्वी जेवढ्या विटा बनवीत होता
तेवढ्या आता का बनवीत नाही? तुम्ही जर त्यावेळी तेवढ्या
विटा करीत होता तर मग आताही तेवढ्याच विटा करु
शकला पाहिजे!"
15मग इस्राएली नायक तक्रार घेऊन फारोकडे गेले व
म्हणाले, "आम्ही जे तुमचे सेवक त्या आमच्याशी तुम्ही

---

**ठार मारण्याचा** किंवा याचा अर्थ बहुत करून "मोशेच्या सुंते विषयी असावा."

**देव** म्हणजे 'याव्हे.'

अशाप्रकारे का वागत आहा? [16]तुम्ही आम्हाला गवत देत नाही परंतु पूर्वी इतक्याच विटा बनविण्याचा हुकूम करता. आणि आता आमचे मुकादम आम्हाला मारतात. अशा रीतीने तुमचे लोक जे करीत आहेत ते चुकीचे आहे."

[17]फारोने उत्तर दिले, "तुम्ही लोक आळशी आहा. तुम्हाला काम करायला नको आणि म्हणूनच तुम्हाला जाऊ देण्याविषयी तुम्ही मला विचारता आणि त्या करिताच तुम्हाला येथून निघून जायला आणि तुमच्या परमेश्वराला यज्ञ करावयास पाहिजे. [18]आता आपल्या कामावर माघारी जा. आम्ही तुम्हाला गवत देणार नाही परंतु पूर्वी इतक्याच विटा तुम्ही केल्या पाहिजेत."

[19]आपण संकटात आहोत हे इस्राएली नायकांना समजले, कारण पूर्वी इतक्याच विटा करून दे त्यांना शक्य नव्हते.

[20]फारोच्या भेटीनंतर परत जाताना त्यांना मोशे व अहरोन भेटले; ते नायकांसाठीच थांबले होते. [21]तेव्हा ते मोशे व अहरोनास म्हणाले, "आम्हाला जाऊ द्यावे असे फारोला विचारून तुम्ही मोठे वाईट केले. फारो व त्याचे अधिकारी यांच्या मनात आमच्या विरुद्ध द्वेष निर्माण केल्याबद्दल परमेश्वर तुम्हाला शिक्षा करो. आम्हास मारून टाकण्यास तुम्ही त्यांना चांगले निमित्त दिले आहे."

## मोशे देवाकडे तक्रार करतो

[22]मग मोशे परमेश्वराची प्रार्थना करीत म्हणाला, "प्रभु तुझ्या लोकांसाठी ही वाईट गोष्ट तू का केलीस? तू मला इकडे का पाठवलेस? [23]मी फारोकडे जाऊन तू मला सांगितलेल्या गोष्टी त्याला सांगितल्या. परंतु त्या वेळेपासून तो लोकांशी अधिक कठोरपणे वागत आहे. आणि त्यांच्या मदतीकरिता तू काहीच केले नाहीस!"

6 तेव्हा परमेश्वर मोशेला म्हणाला, "मी आता फारोचे काय करतो ते तू बघशील; मी माझ्या महान सामर्थ्याचा त्याच्या विरुद्ध उपयोग करीन; मग तो माझ्या लोकांना जाऊ देईल. तो त्यांना जाऊ देण्यास एवढा तयार होईल की तो त्यांना बळजबरीने घालवून देईल."

[2]मग देव मोशेला म्हणाला, [3]"मी परमेश्वर आहे मी अब्राहाम, इसहाक व याकोब यांना दर्शन दिले; त्यांनी मला 'एल-शदाय' असे नांव दिले; त्यांना 'याव्हे' (म्हणजे 'परमेश्वर') हे माझे नांव माहीत नव्हते. [4]त्यांच्याशी पवित्र करार करून मी त्यांना कनान देश देण्याचे वचन दिले. ते त्या देशात राहिले परंतु तो देश त्यांचा स्वत:चा नव्हता; ते तेथे उपरे होते. [5]आता मला इस्राएल लोकांच्या त्रासाविषयी, मिसरमधील त्यांच्या गुलामगिरी विषयी समजले आहे आणि त्यांच्याशी केलेल्या पवित्र कराराची मला आठवण आहे. [6]तेव्हा त्यांना सांग, मी म्हणतो, 'मी तुमचा परमेश्वर आहे; मी तुम्हास वाचवीन व तुम्हांस स्वतंत्र करीन; तुम्ही मिसरच्या लोकांचे गुलाम राहणार नाही. मी माझ्या महान सामर्थ्याचा उपयोग करून मिसरच्या लोकांना भयंकर शिक्षा करीन व मग तुम्हाला सोडवीन. [7]तुम्ही माझे लोक व्हाल व मी तुमचा देव होईन. मी तुमचा देव परमेश्वर आहे आणि मी तुम्हाला मिसरमधून सोडविले आहे हे तुम्हाला समजेल.

[8]मी अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्याशी मोठा करार करून त्यांना वचन दिले की मी त्यांना एक विशेष देश देईन; तेव्हा त्या देशात मी तुम्हाला नेईन व तो देश तुम्हाला कायमचे वतन करून देईन. मी परमेश्वर आहे.'"

[9]तेव्हा मोशेने हे सर्व इस्राएल लोकांना सांगितले. परंतु लोकांना एवढे काम करावे लागत होते की त्यामुळे त्यांना मोशेचे म्हणणे ऐकावयास उत्सुकता नसे म्हणून ते त्याचे ऐकेनात.

[10]मग परमेश्वर मोशेला म्हणाला, [11]"जा व फारोला सांग की त्याने इस्राएल लोकांना जाऊ दिलेच पाहिजे."

[12]परंतु मोशेने उत्तर दिले, "इस्राएल लोकांनी माझे ऐकण्यास नाकारले! तेव्हा फारोही नक्कीच माझे ऐकणार नाही! मी अजिबात चांगला वक्ता नाही."

[13]परंतु परमेश्वर मोशे व अहरोन यांच्याशी बोलला आणि त्याने त्यांना इस्राएल लोकाकडे जाऊन त्यांच्याशी बोलण्याची, तसेच फारोकडे जाऊन त्याच्याशी बोलणी करण्याची आणि इस्राएल लोकांना मिसर मधून बाहेर घेऊन जाण्याची आज्ञा दिली.

## इस्राएल लोकांची काही कुळे

[14]इस्राएल लोकांच्या पूर्वजांच्या घराण्यातील प्रमुख पुरुषांची नांवे अशी: इस्राएलाचा पहिला मुलगा रऊबेन. त्याची मुले हनोख, पल्लू, हस्रोन व कर्मी. ही रऊबेनाची कुळे: [15]शिमोनाची मुले यमुवेल यामीन, ओहद, याखीन, जोहर व (कनानी स्त्री पोटी झालेला शौल.) ही शिमोनाची कुळे. [16]लेवीचे आयुष्य एकशे सदतीस वर्षांचे होते. लेवीच्या वंशावळी प्रमाणे त्याच्या मुलांची नांवे ही: गेर्षोन, कहाथ, व मरारी. [17]गेर्षोनाचे मुलगे त्यांच्या त्यांच्या कुळाप्रमाणे हे: गेर्षोनाचे दोन मुलगे लिबनी व शिमी. [18]कहाथाचे मुलगे अम्राम, इसहार, हेब्रोन व उज्जियेल. कहाथाचे आयुष्य एकशे तेहतीस वर्षांचे होते. [19]मरारीची मुले महली व मूशी, लेवीची कुळे त्याच्या वंशावळी प्रमाणे ही होती.

[20]अम्रामाने आपली आत्या योखबेद हिच्याशी लग्न केले तिच्या पोटी त्याला अहरोन व मोशे ही दोन मुले झाली. अम्राम एकशेसदतीस वर्षे जगला. [21]इसहाराची मुले–कोरह, नेफेग व जिख्री. [22]उज्जियेलाची मुले: मिशाएल, एलसाफान व सिथ्री.

[23]अहरोनने अलीशेबाशी लग्न केले. (अलीशेबा अम्मीनादाबची मुलगी व नहशोनाची बहीण होती) त्यांना नादाब, अबीहू, एलाजार व इथामार ही मुले झाले. [24]कोरहाची मुले: अस्सीर, एलकाना व अबीयासाफ; ही कोरहाची कुळे. [25]अहरोनाचा मुलगा एलाजार याने पुटीयेलाच्या मुलीशी लग्न केले; तिच्या पोटी त्याला

फिनहास हा मुलगा झाला. हे सर्व लोक म्हणजे इस्राएलाचा
मुलगा लेवी याची वंशावळ होय.
26इस्राएल लोकांना मिसर देशातून बाहेर घेऊन जा
असे देवाने ज्यांना सांगितले होते ते अहरोन व मोशे ह्याच
कुळातले.
27इस्राएल लोकांना मिसर देशातून बाहेर जाऊ द्यावे
असे मिसरचा राजा फारो याच्याशी जे बोलले तेच हे
अहरोन व मोशे.

## देव मोशेबरोबर पुन्हा बोलतो

28मग मिसर देशात देव मोशे बरोबर बोलला. 29तो
त्याला म्हणाला, "मी परमेश्वर आहे. मी तुला सांगतो ते
सर्व तू मिसरचा राजा फारो याला सांग."
30परंतु मोशेने उत्तर दिले, "मी तर चांगला वक्ता नाही.
फारो राजा माझे ऐकणार नाही."
7 परमेश्वर मोशेला म्हणाला, "मी तुझ्याबरोबर असेन
मी तुला फारोसाठी देव असे केले आहे; आणि
अहरोन हा तुझा संदेष्टा होईल; 2मी तुला सांगतो ते सर्व तू
अहरोनाला सांग; मग माझे सर्व बोलणे तो फारोला सांगेल
आणि मग फारो इस्राएल लोकांना हा देश सोडून जाऊ
देईल. 3परंतु मी फारोचे मन कठोर करीन. मग मी
मिसरमध्ये अनेक चमत्कार दाखवीन. तरीही फारो
ऐकणार नाही. 4तेव्हा मग मी मिसरच्या लोकांना जबर
शिक्षा करीन आणि त्या देशातून माझ्या सर्व लोकांना मी
बाहेर काढीन 5तेव्हा मिसरच्या लोकांना समजेल की मी
परमेश्वर आहे मी मिसरच्या लोकांविरुद्ध होईन आणि
मग त्यांना कळेल की मी परमेश्वर आहे मग मी माझ्या
लोकांना त्यांच्या देशातून बाहेर घेऊन जाईन."
6मग मोशे व अहरोन यांनी परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे
केले. 7ते फारोबरोबर बोलले तेव्हा मोशे ऐंशी वर्षांचा व
अहरोन त्र्याऐंशी वर्षांचा होता.

## मोशेच्या काठीचा साप होतो

8परमेश्वर मोशे व अहरोन यांना म्हणाला, 9"फारो
तुम्हाला मी पाठविल्याचा पुरावा म्हणून एखादा चमत्कार
करून तुमचे सामर्थ्य दाखविण्या विषयी विचारील तेव्हा
अहरोनाला आपली काठी जमिनीवर टाकण्यास सांग
म्हणजे फारोच्या देखत त्या काठीचा साप होईल.
10तेव्हा मोशे व अहरोन परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे
फारोकडे गेले. अहरोनाने आपली काठी जमिनीवर
टाकली. तेव्हा फारो व त्याचे सेवक यांच्या देखत त्या
काठीचा साप झाला.
11तेव्हा फारो राजाने आपले जाणते व मांत्रिक बोलावले;
तेव्हा मिसरच्या त्या जादूगारांनी आपल्या मंत्रतंत्रांच्या
जोरावर अहरोनाप्रमाणे केले. 12त्यांनीही आपल्या काठ्या
जमिनीवर टाकल्या तेव्हा त्यांचेही साप झाले परंतु
अहरोनाच्या काठीच्या सापाने त्यांचे साप गिळून टाकले.
13तरीही परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे फारोचे मन कठोर
झाले आणि त्याने मोशे व अहरोन यांचे ऐकले नाही व
इस्राएल लोकांना जाऊ दिले नाही.

## पाण्याचे रक्त होते

14मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "फारोचे मन कठीण
झाले आहे; तो इस्राएल लोकांना जाऊ देत नाही. 15उद्या
सकाळी फारो नदीवर जाईल; तू साप झालेली काठी
बरोबर घे आणि नाईल नदीच्या काठी त्याला भेटावयास
जा. 16त्याला असे सांग, 'इब्री म्हणजे इस्राएल लोकांचा देव
परमेश्वर याने मला तुझ्याकडे पाठवले आहे व त्याच्या
लोकांना त्याची उपासना करावयास रानात जाऊ दे, असे
तुला सांगण्यास मला बजावले आहे. आतापर्यंत तू
परमेश्वराचे ऐकले नाहीस. 17तेव्हा परमेश्वर म्हणतो
की मी परमेश्वर आहे हे त्याला अशावरून कळेल: मी
नाईल नदीच्या पाण्यावर ह्या माझ्या हातातील काठीने
तडाखा मारीन तेव्हा नदीच्या पाण्याचे रक्त होईल.18मग
पाण्यातील सर्व मासे मरतील, नदीला घाण सुटेल आणि
मिसरचे लोक नदीचे पाणी पिऊ शकणार नाहीत."
19परमेश्वर मोशेला म्हणाला, "आपली काठी
मिसरमधील नद्या, नाले, तलाव व जेथे पाणी भरून ठेवतात
त्या जागेवर उगारण्यास अहरोनास सांग म्हणजे त्याने तसे
केल्यावर सर्व पाण्याचे रक्त होईल; घरातील लाकडांच्या
व दगडांच्या भांड्यात भरलेल्या पाण्याचे देखील रक्त
होईल.'"
20तेव्हा मोशे व अहरोन यांनी परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणे केले. अहरोनाने आपली काठी उगारली
नाईल नदीवर मारली. त्याने हे फारो व त्याचे अधिकारी
यांच्यासमोर केले. तेव्हा नदीतल्या सर्व पाण्याचे रक्त
झाले. 21नदीतले मासे मेले व तिला घाण सुटली. त्यामुळे
मिसराचे लोक नदीचे पाणी पिऊ शकेनात. अवघ्या
मिसरभर रक्तच रक्त झाले.
22मिसरच्या जादुगारांनी आपल्या मंत्रतंत्रांच्या जोरावर
तसेच केले. तेव्हा परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे फारोचे
मन कठीण झाले. 23मोशे व अहरोन यांनी केलेल्या
चमत्काराकडे फारोने लक्ष दिले नाही; तो मागे फिरला
व आपल्या घरी निघून गेला.
24मिसरच्या लोकांना नदीचे पाणी पिववेना म्हणून त्यांनी
पिण्याच्या पाण्यासाठी झरे खणले.

## बेडकांची पीडा

25परमेश्वराने नाईल नदीला दिलेल्या तडाख्याला सात
दिवस होऊन गेले.
8 मग परमेश्वराने मोशेला सांगितले, "जा आणि फारोला
सांग, परमेश्वर म्हणतो, 'माझ्या लोकांना माझी
उपासना करण्याकरिता जाऊ दे! 2जर तू माझ्या लोकांना
जाऊ दिले नाहीस तर मी सारा देश बेडकांनी भरून

टाकीन व सगळ्या देशाला पीडीन. 3नाईल नदीत बेडकांचा
सुळसुळाट होईल. बेडूक नदीतून तुझ्या वाड्यात झोपण्याच्या
खोलीत, बिछान्यात तसेच तुझ्या सेवकांच्या व
अधिकाऱ्यांच्या घरात, भट्ट्यात पाण्यांच्या भांड्यात येतील.
4ते तुझ्या, तुझ्या सेवकांच्या व लोकांच्या अंगावर चढतील.'"
5मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "अहरोनाला त्याच्या
हातातील काठी नद्या, नाले, तलाव यांच्यावर उगारण्यास
सांग म्हणजे मग बेडूक मिसर देशावर चढून येतील."
6मग अहरोनाने मिसरमधील जलाशयांवर आपला हात
उगारला तेव्हा बेडूक बाहेर आले आणि त्यांनी अवघा
मिसर देश व्यापून टाकला.
7तेव्हा जादुगारांनी मंत्रतंत्राच्या योगे तसेच केले आणि
मिसर देशावर आणखी बेडूक आणले.
8मग फारोने मोशे व अहरोन यांना बोलावून आणले.
फारो त्यांना म्हणाला, "हे बेडूक माझ्यापासून, व माझ्या
लोकांपासून दूर करण्याकरिता तुमच्या परमेश्वराला
विनंति करा. मग तुमच्या परमेश्वराची उपासना
करण्याकरिता मी तुम्हा लोकांना जाऊ देईन."
9मोशे फारोला म्हणाला, "हे बेडूक केव्हा दूर करावेत
अशी तुमची इच्छा आहे ते मला सांगा. मी तुमच्यासाठी,
तुमच्या लोकांसाठी व तुमच्या सेवकांसाठी प्रार्थना करीन.
मग बेडूक तुम्हापासून व तुमच्या घरातून दूर होतील
आणि फक्त नदीत राहतील."
10फारोने उत्तर दिले "उद्या,"
तेव्हा मोशे म्हणाला, "तुमच्या म्हणण्याप्रमाणे होईल
अशा प्रकारे तुम्हाला समजेल की आमच्या
परमेश्वरासारखा दुसरा देव नाही. 11बेडूक तुम्हापासून
तुमच्या घरातून, तुमचे सेवक व तुमचे लोक याच्यापासून
निघून जातील; ते फक्त नदीत राहतील."
12मग मोशे व अहरोन फारोपासून निघून गेले आणि
फारोवर बेडूक आणले होते त्याविषयी मोशेने परमेश्वराला
प्रार्थना केली. 13मग परमेश्वराने मोशेच्या विनंतीप्रमाणे
केले. तेव्हा घरादारात, अंगणात व शेतात होते ते सर्व
बेडूक मेले. 14ते सडू लागले आणि त्यामुळे सर्व देशात
घाण वास येऊ लागला.
15बेडकांची पीडा दूर झाली हे फारोने पाहिले आणि
त्याचे मन पुन्हा कठीण झाले. त्याने मोशे व अहरोन
यांनी विचारल्याप्रमाणे केले नाही. परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणेच हे झाले.

## उवांची पीडा

16मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "अहरोनाला त्याची
काठी जमिनीवरील धुळीवर मारण्यास सांग म्हणजे मग
अवघ्या मिसर देशभर धुळीच्या उवा बनतील."
17त्याने तसे केले. अहरोनाने आपल्या हातातली काठी
जमिनीवरील धुळीवर मारली, आणि त्यामुळे सगळ्या
मिसर देशात धुळीच्या उवा बनल्या; त्या पशूवर व माणसांवर
चढल्या.
18जादुगारांनी त्यांच्या मंत्रतंत्रांच्या जोरावर तसेच
करण्याचा प्रयत्न केला परंतु धुळीतून त्यांना उवा बनविता
आल्या नाहीत; त्या उवा पशूवर व लोकांच्या अंगावर
राहिल्या. 19तेव्हा जादुगारांनी फारोला सांगितले की हा
चमत्कार देवाच्या सामर्थ्यानेच झाला आहे. परंतु फारोने
मन कठीण केले व त्यांचे म्हणणे ऐकायचे नाकारले
आणि परमेश्वराने सांगितल्याप्रमाणेच हे झाले.

## गोमाशांची पीडा

20मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "सकाळी लवकर
ऊठ; आणि फारो नदीवर जाईल तेव्हा त्याच्याकडे जा.
त्याला असे सांग की परमेश्वर म्हणतो, 'माझी उपासना
करण्यासाठी माझ्या लोकांना जाऊ दे! 21जर तू त्यांना
जाऊ देणार नाहीस तर मग तुझ्या घरात, तुझ्यावर, तुझ्या
सेवकांवर गोमाशा येतील. अवघ्या मिसर देशातील घरे
गोमाशांच्या थव्यांनी भरून जातील. गोमाशांचे थवे अंगणात
व जमिनीवरही येतील. 22परंतु मी इस्राएल लोकांशी
मिसरच्या लोकांप्रमाणे वागणार नाही. तर ज्या गोशेन
प्रांतांत माझे लोक राहतात तेथे एकही गोमाशी असणार
नाही. अशा प्रकारे तुम्हाला समजेल की मी परमेश्वर या
पृथ्वीवर आहे. 23तेव्हा उद्या माझ्या लोकांशी वागताना
आणि तुमच्या लोकांशी वागताना मी भेद करीन आणि
तोच माझा पुरावा असेन.'"
24अशा रीतीने परमेश्वराने जे सांगितले होते त्याप्रमाणे
त्याने केले. मिसर देशात गोमाशांचे थवेच्या थवे आले. ते
फारोच्या वाड्यात व त्याच्या सेवकांच्या घरात शिरले; ते
सगळ्या देशात पसरले, गोमाशांच्या त्या थव्यांनी देशाची
नासाडी केली, 25म्हणून मग फारोने मोशे व अहरोन
यांना बोलावून आणले व त्यांना सांगितले, "तुम्ही तुमच्या
देवाला आमच्या येथेच म्हणजे आमच्या देशातच यज्ञ करा."
26परंतु मोशे म्हणाला, "तसे करणे योग्य होणार नाही
कारण आमचा देव परमेश्वर ह्याला आम्ही जो यज्ञ करणार
आहो तो यज्ञ तुम्हा मिसरच्या लोकांच्या दृष्टिने किळसवाणा
असेल त्यामुळे आम्ही तो मिसरच्या लोकांसमोर केला
तर ते आम्हावर दगडफेक करतील व आम्हाला मारून
टाकतील. 27तर आम्हास रानात तीन दिवसांच्या वाटेवर
जाऊ द्या. व आमचा देव परमेश्वर ह्याला यज्ञ करू द्या.
आमचा देव परमेश्वर ह्याने आम्हाला हे करावयास
सांगितले आहे."
28तेव्हा फारो म्हणाला, "मी तुम्हाला तुमचा देव परमेश्वर
ह्याला यज्ञ करण्याकरिता रानात जाऊ देतो परंतु तीन
दिवसांच्या प्रवासापेक्षा जास्त पुढे जायचे नाही; तेव्हा आता
जा व माझ्यासाठीही प्रार्थना करा."
29मोशे म्हणाला, "पाहा, मी जातो आणि तुझ्यापासून,
तुझे लोक व सेवक या सर्वांपासून उद्या गोमाशा दूर

करण्याकरिता परमेश्वराला विनंती करतो परंतु यज्ञ करण्यास जाणाऱ्या आमच्या लोकांना तुम्ही अडवू नये."

30तेव्हा मोशे फारोपासून निघून गेला आणि त्याने परमेश्वराची प्रार्थना केली. 31आणि परमेश्वराने मोशेची विनंती मान्य केली व त्याने फारो, त्याचे सेवक व त्याचे लोक यांच्यापासून सर्व गोमाशा दूर केल्या. तेथे एकही गोमाशी राहिली नाही. 32परंतु फारो पुन्हा हट्टी व कठोर बनला आणि त्याने इस्राएली लोकांना जाऊ दिले नाही.

## शेती-पशूमध्ये मरीची पीडा

9 नंतर परमेश्वराने मोशेला फारोकडे जाऊन असे बोलण्यास सांगितले, "इस्राएलांचा देव परमेश्वर म्हणतो, 'माझी उपासना करण्याकरिता माझ्या लोकांना जाऊ दे!'

2तू जर त्यांना जाण्यापासून सतत असाच अडवीत राहशील व त्यांना जाऊ देणार नाहीस; 3तर शेतावरील पशूंविरुद्ध परमेश्वर आपल्या सामर्थ्याचा वापर करील. परमेश्वर तुझे घोडे, गाढवे, उंट, गुरेढोरे व शेरडेमेंढरे यांना भयंकर आजाराने त्रस्त करील 4परंतु तो इस्राएल लोकांच्या व मिसरच्या लोकांच्या पशूत भेद करील; इस्राएल लोकांच्या पशूपैकी एकही पशू मरणार नाही. 5याकरिता परमेश्वराने वेळही नेमलेली आहे. ह्या देशात उद्या हे सर्व घडून येईल."

6दुसऱ्या दिवशी सकाळी मिसरमधील शेतीवरील सर्व पशू मेले. परंतु इस्राएल लोकांच्या मालकीच्या पशूंपैकी एकही मेला नाही. 7इस्राएल लोकांच्या पशूपैकी एखादा मेला काय हे पाहण्यासाठी फारोने माणसे पाठवली. परंतु त्यांच्या पशूपैकी एकही मेला नाही. तरीपण फारो हट्टी व कठीण मनाचाच राहिला. त्याने इस्राएल लोकांना जाऊ दिले नाही.

## गळवांची पीडा

8नंतर परमेश्वर मोशे व अहरोन यांना म्हणाला, "मोशेने ओंजळभर भट्टीची राख घेऊन फारो देखत आकाशाकडे उधळावी. 9त्या राखेचा धुरळा बनेल व तो सगव्या मिसरभर पसरेल आणि त्याच्या स्पर्शाने माणसांना व गुरांना फोड येऊन गळवे होतील."

10तेव्हा मोशे व अहरोन यांनी भट्टीतून राख घेतली व ते फारो राजासमोर उभे राहिले. मोशेने ती राख हवेत उधळली आणि त्यामुळे माणसांना व जनावरांना फोड व गळवे येऊ लागली. 11जादुगार मोशेला तसे करण्यापासून अडवू शकले नाहीत कारण त्यांनाही गळवे आली होती. सर्व मिसरभर ही गळवे आली.

12परंतु परमेश्वराने फारोचे मन कठीण केले आणि त्याने मोशे व अहरोन यांचे ऐकले नाही, व लोकांना जाऊ दिले नाही. परमेश्वराने पूर्वीच सांगितले होते त्याप्रमाणे हे झाले.

## गारांची पीडा

13मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "तू सकाळी उठव फारोकडे जा; आणि त्याला सांग की इस्राएल लोकांचा देव परमेश्वर म्हणतो, 'माझी उपासना करण्याकरिता माझ्या लोकांना जाऊ दे! 14तू हे केले नाहीस तर मग मी माझे सारे सामर्थ्य तुझ्याविरुद्ध तुझे सेवक व तुझ्या लोकांच्याविरुद्ध वापरीन. तेव्हा मग तुला माहीत होईल की या जगात माझ्यासारखा दुसरा देव नाही. 15मी माझे सगळे सामर्थ्य वापरून असा आजार तुम्हावर पाठवू शकतो की त्यामुळे तू व तुझी प्रजा या पृथ्वीवरून नष्ट व्हाल. 16परंतु मी तुला एका हेतूने ठेवले आहे की मी तुला माझे सामर्थ्य दाखवावे. मग सर्व जगाला मी कोण आहे हे कळेल. 17तू अजूनही माझ्या लोकांविरुद्ध आहेस. तू त्यांना अजूनही मोकळे करून जाऊ देत नाहीस. 18म्हणून उद्या ह्याच वेळेस मी गारांचा असा काही वाईट वादळी वर्षाव मिसरवर आणीन की असा गारांचा वादळी वर्षाव मिसर राष्ट्राची स्थापना झाल्यापासून कधी आला नाही. 19तेव्हा आता तू तुझी गुरेढोरे सुरक्षित जागी ठेवलीच पाहिजेस; शेतात तुझ्या मालकीचे काही असल्यास ते सुरक्षित जागी ठेवलेच पाहिजेस. कारण जर एखादा माणूस किंवा पशू शेतात राहील तर तो मारला जाईल. जे जे तुम्ही तुमच्या घरात गोळा करून ठेवणार नाही त्यांवर गारांचा भडीमार पडेल.'"

20फारोच्या सेवकापैकी काहींनी परमेश्वराच्या संदेशाचा मान ठेवून लगेच आपली गुरेढोरे व गुलाम यांना आसऱ्याला घरी आणले व सुरक्षित जागी ठेवले. 21परंतु इतर सेवकांनी परमेश्वराच्या संदेशाकडे दुर्लक्ष केले त्यामुळे रानांतील त्यांचे सर्व दास व गुरेढोरे, शेरडेमेंढरे मरून गेली.

22परमेश्वराने मोशेला सांगितले, "तू आपले हात आकाशाकडे उगार आणि मग सर्व मिसरभर गारांच्या वर्षावाला सुरवात होईल. गारांचा मारा सर्व लोकांवर, गुराढोरावर आणि मिसर देशातील सर्व शेतांवर होईल."

23तेव्हा मोशेने आपली काठी आकाशाकडे उगारली आणि मग परमेश्वराने मेघगर्जना, लखलखणाऱ्या विजा व गारा यांचा पृथ्वीवर वर्षाव केला. अशा प्रकारे परमेश्वराने मिसर देशावर भडीमार केला. 24गारांचा मारा व त्यासोबत विजांच्या अग्नीचा लोळ जमिनीवर आला. मिसर राष्ट्राची स्थापना झाल्यापासून गारांचे असे भयंकर व वाईट वादळ मिसरवर कधी आले नव्हते. 25त्या गारांच्या वादळाच्या माऱ्याने मिसरमधील शेतात जे होते ते सर्व नष्ट केले. तसेच माणसे, जनावरे व झाडे झुडपे नष्ट केली; आणि मोठमोठी झाडे मोडून पडली. 26गारांच्या वर्षावाच्या तडाख्यापासून वाचलेला भाग एकच आणि तो म्हणजे इस्राएली लोक राहात असलेला गोशेन प्रांत; तेथे

गारांचा वर्षाव झाला नाही. 27फारोने मोशे व अहरोन
यांना बोलावून आणले व त्यांना सांगितले, “ह्यावेळी मी
पाप केले आहे. परमेश्वराचे खरे आहे; मी व माझे
लोक, आम्ही चुकलो आहोत. 28हा देवाकडून झालेला
गारांचा मारा व मेघांचा गडगडाट फार भयंकर झाला! हे
वादळ थांबविण्यास देवाकडे विनंती करा आणि मग मी
तुम्हाला जाऊ देतो.”
29मोशेने फारोला सांगितले, “जेव्हा मी हे शहर सोडून
जाईन तेव्हा माझे हात पसरून मी परमेश्वरापुढे विनंती
करीन आणि मग ही मेघगर्जना व हा गारांचा मारा थांबेल;
तेव्हा तुला कळेल की पृथ्वी परमेश्वराची आहे. 30परंतु
तू व तुझे सेवक अजूनही परमेश्वराचे भय बाळगीत नाहीत
हे मला माहीत आहे.”
31यावेळी सातूचे दाणे तयार होऊन तो कापणीला आला
होता व जवसाला बोंडे आली होती. ह्या पिकांचा आता
नाश झाला. 32परंतु साधा गहू व जर्मन गहू इतर धान्यापेक्षा
उशीरा पिकतात; त्यांची उशीरा पेरणी झाल्यामुळे ते अजून
उगवले नव्हते, म्हणून त्यांचा नाश झाला नाही.
33मोशे फारोपुढून निघून नगराबाहेर गेला. त्याने
परमेश्वराकडे हात पसरून प्रार्थना केली. आणि मेघगर्जना
व गारांचा वर्षाव थांबला आणि पृथ्वीवर पाऊस पडणे बंद
झाले.
34पाऊस, गारा व मेघांचा गडगडाट बंद झाल्याचे फारोने
पाहिले तेव्हा फारो व त्याचे सेवक यांनी मन पुन्हा कठोर
केले. 35फारोने आपण दिलेल्या वचनाप्रमाणे करण्याचे
नाकारले व इस्राएल लोकांना मोकळे करून त्याने
जाऊ दिले नाही. परमेश्वराने मोशेद्वारे सांगितल्याप्रमाणे
हे झाले.

## टोळांची पीडा

10 परमेश्वर मोशेला म्हणाला, “तू फारोकडे जा.
त्याचे व त्याच्या सेवकांची मने मी कठीण केली
आहेत. मी हे यासाठी केले आहे की मला त्यांना माझ्या
चमत्कारांचे सामर्थ्य दाखववायचे होते. 2तसेच तुम्ही
तुमच्या मुलांना व नातवंडांना मी मिसरमध्ये केलेल्या
चमत्कारांचे व अद्भुत गोष्टींचे वर्णन सांगावे. मग तुम्हा
सर्वांना कळेल की मी परमेश्वर आहे.”
3मग मोशे व अहरोन फारोकडे गेले. त्यांनी त्याला
सांगितले, “इस्राएल लोकांचा देव परमेश्वर म्हणतो, ‘अजून
किती दिवस तू माझे ऐकणार नाहीस? माझी उपासना
करण्याकरिता माझ्या लोकांना जाऊ दे. 4जर तू माझ्या
लोकांना जाऊ देण्याचे नाकारशील तर उद्या मी तुझ्या
देशावर टोळ धाड आणिन. 5ते टोळ सर्व जमीन झाकून
टाकतील. ते इतके असतील की तुला जमीन दिसणार
नाही. गारा व पावसाच्या तडाख्यातून जे काही वाचले
असेल त्याला टोळ खाऊन टाकतील. शेतातील सर्व झाडांचा
पाला ते खाऊन फस्त करतील. 6ते टोळ तुझा वाडा,
तुझ्या सेवकांची घरे, व मिसरमधील घरे, वाडे या सर्वात
भरून जातील. तुझ्या वाडवडीलांनी आजपर्यंत पाहिले
असतील त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक ते असतील.
मिसरमध्ये लोकवस्ती होऊ लागली त्या काळापासून
आतापर्यंत कधीही नव्हते, तेवढे अधिक ते टोळ असतील.’”
नंतर फारो समोरून मोशे निघून गेला.
7फारोच्या सेवकांनी फारोला विचारले, “कोठवर
आम्ही ह्या इस्राएल लोकांच्या सापळ्यात अडकून राहावे?
त्यांना आपल्या देव परमेश्वराची उपासना करण्याकरिता
जाऊ द्यावे जर आपण त्यांना जाऊ देणार नाही तर मग
आपणास समजण्यापूर्वी मिसर देशाचा नाश होईल.”
8तेव्हा फारोने मोशे व अहरोन यांना पुन्हा बोलावून
आणण्यास आपल्या काही सेवाकांना सांगितले. फारो त्यांना
म्हणाला, “जा व तुमचा देव परमेश्वर याची उपासना
करा. परंतु नक्की कोण कोण जाणार आहे ते मला
सांगा.”
9मोशेने उत्तर दिले, “आमची तरूण व म्हातारी मंडळी
यांना तसेच आम्ही आमची मुलं, आमच्या मुली, आमची
शेरडेमेंढरे व गाईगुरे यांनाही आमच्या बरोबर घेऊन जाऊ;
आम्ही झाडून सर्वजण जाऊ कारण परमेश्वराचा उत्सव
सर्वांकरिता आहे.”
10फारो त्यांना म्हणाला, “तुम्ही व तुमची मुलेबाळे यांना
मिसरमधून जाऊ देण्यापूर्वी खरेच परमेश्वर मजपासून
तुमचे रक्षण करो! हे पाहा, तुम्ही काही तरी वाईट असा
कट करीत आहात. 11तुमच्यातील पुरुषांनी तुमच्या
परमेश्वराची उपासना करावयास जावे. आणि हीच तर
तुम्ही मला विनंती केली होती. तेव्हा तुम्हा सर्वांना मी
जाऊ देणार नाही.” त्यानंतर फारोने मोशे व अहरोन
यांना घालवून दिले.
12मग परमेश्वराने मोशेला सांगितले, “आपली काठी
मिसर देशावर उगार म्हणजे मग मिसरवर टोळ धाड
येईल! ते टोळ मिसर देशभर पसरतील आणि पाऊस व
गारा यांच्या सपाट्यातून वाचलेल्या वनस्पती खाऊन
टाकतील.”
13मग मोशेने आपल्या हातातील काठी मिसर देशावर
उगारली तेव्हा परमेश्वराने एक दिवसभर व रात्रभर
पूर्वेकडून वारा वाहविला, तेव्हा सकाळी वाऱ्याबरोबर
टोळच टोळ आले. 14ते उडत आले व अवघ्या मिसर
देशभर जमिनीवर पसरले. इतके टोळ ह्यापूर्वी मिसर
देशावर कधी आले नव्हते व इतके येथून पुढेही कधी
येणार नाहीत.
15त्या टोळांनी सर्व जमीन झाकून टाकली, आणि त्यांच्या
आकाशात उडण्यामुळे सर्व देशभर अंधार पडला. गारांच्या
तडाख्यातून वाचलेल्या वनस्पती आणि झाडावरील
वाचलेली फळे त्यांनी खाऊन फस्त केली; आणि
मिसरमधील कुठल्याच झाडांझुडपांवर एकही पान राहिले
नाही. 16फारोने तातडीने मोशे व अहरोन यांना बोलावून

आणले. तो म्हणाला, “मी तुमचा देव परमेश्वर ह्याच्या
विरुद्ध व तुमच्या विरुद्ध पाप केले आहे. 17तेव्हा ह्या वेळी
माझ्या पापांबद्दल मला क्षमा करा आणि हे मरण (टोळ)
माझ्यापासून दूर करण्याकरिता परमेश्वराकडे प्रार्थना
करा.”
18मोशे फारोसमोरून निघून गेला व त्याने परमेश्वराची
प्रार्थना केली. 19तेव्हा परमेश्वराने वाऱ्यात बदल केला.
त्याने पश्चिमेकडून जोराचा वारा वाहविला तेव्हा त्या
वाऱ्याने सर्व टोळ वाहवून तांबड्या समुद्रात टाकले.
मिसरमध्ये एकही टोळ राहिला नाही. 20तरी परंतु
परमेश्वराने फारोचे मन पुन्हा कठीण केले आणि त्याने
इस्राएल लोकांना जाऊ दिले नाही.

## अंधाराची पीडा

21मग परमेश्वराने मोशेला सांगितले, “तू आपला हात
आकाशात उंच कर म्हणजे अवघा मिसर देश अंधारात
गडप होईल तो अंधार इतका दाट असेल की तुम्हाला
चाचपडत जावे लागेल.”
22तेव्हा मोशेने तसे केले आणि अंधाऱ्याढगाने अवघ्या
मिसरदेशाला तीन दिवस गडप केले. 23कोणालाही दुसरे
काहीही दिसेना आणि म्हणून कोणीही उठून तीन दिवस
कोठेही गेले नाही; परंतु इस्राएल लोक जेथे राहात होते
त्या सर्व भागावर म्हणजे गोशेन प्रांतात सर्वत्र भरपूर प्रकाश
होता.
24तेव्हा पुन्हा फारोने मोशेला बोलावले. तो म्हणाला,
“तुम्ही जा व तुमच्या परमेश्वराची उपासना करा. तुम्ही
तुमची मुलेबाळेही बरोबर न्या. परंतु तुमची शेरडेमेंढरे व
गुरेढोरे येथेच राहिली पाहिजेत.”
25मोशे म्हणाला, “आमचेच पशू नव्हे तर तू देखील
आम्हांस यज्ञपशू व होमबळी देशील; आणि त्यांचा आम्ही
आमचा देव परमेश्वर ह्याला अर्पणासाठी उपयोग करु!
26यज्ञ व होमार्पणासाठी आम्ही आमचे पशूही आमच्या
बरोबर नेऊ. जनावराचा एक खूरही आम्ही मागे ठेवणार
नाही. आमच्या परमेश्वराला यज्ञ व होमार्पणासाठी काय
लागेल हे आता येथून आम्हाला सांगता येणार नाही; परंतु
तेथे गेल्यावरच आम्हाला काय हवे व काय नको हे
समजेल. म्हणून ह्या सर्वगोष्टी आम्हाला आमच्या सोबत
नेल्याच पाहिजेत.”
27परमेश्वराने फारोचे मन पुन्हा कठीण केले.
तेव्हा फारो इस्राएली लोकांना जाऊ देईना! 28मग
फारो मोशेवर ओरडला व म्हणाला, “तू येथून चालता
हो! आपले तोंड मला पुन्हा दाखवू नकोस! यानंतर तू
आपले तोंड मला दाखवशील त्या दिवशी तू
मरशील!”
29मोशे म्हणाला, “तू एक गोष्ट बरोबर बोललास, मी
तुझे तोंड पुन्हा कधीही पाहणार नाही!”

## प्रथम जन्मलेल्यांचे मरण

11 मग परमेश्वराने मोशेला सांगितले, “मी फारोवर
व मिसर देशावर आणखी एक पीडा आणणार
आहे. ह्या पीडेनंतर मात्र फारो तुम्हाला मिसरमधून जाऊ
देईल; खरे म्हणजे तो तुम्हाला मिसर देशातून बाहेर घालवून
देईल. 2तू माझा हा निरोप इस्राएल लोकांना सांग, ‘तुम्ही
पुरुष व स्त्रिया यांनी आपल्या मिसरच्या रहिवासी शेजाऱ्या
पाजाऱ्यांकडून सोन्याचांदीच्या वस्तू मागून घ्याव्यात.
3मिसरच्या लोकांनी तुम्हाशी दयाळूपणे वागावे व तुम्हाला
त्या वस्तू द्याव्यात अशी परमेश्वर त्यांची मने वळवील.
मिसरचे सर्व लोक आणि फारोचे सेवक देखील मोशे
महान माणूस असल्याचे अगोदर पासून मानीत होते.’”
4मोशे लोकांना म्हणाला, “परमेश्वर म्हणतो ‘आज रात्री
मी मिसर देशातून फिरेन 5आणि मिसरमधील प्रत्येक
प्रथम जन्मलेला मुलगा मरण पावेल. (मिसर देशाचा राजा)
फारो याचा प्रथम जन्मलेला मुलगा याच्यापासून तर दळण
दळणाऱ्या दासीच्या प्रथम जन्मलेल्या मुलापर्यंत सर्व मुलगे
मरण पावतील. प्रथम जन्मलेले पशू देखील मरतील.
6मिसर देशभर पूर्वी कधीही झाला नव्हता एवढा आणि
भविष्यात कधीही होणार नाही एवढा धायमोकलून
रडण्याचा आक्रोश होईल. 7परंतु इस्राएल लोकांना किवा
त्यांच्या जनावरांना काहीच अपाय होणार नाही. कुत्रा
देखील त्यांच्यावर भुंकणार नाही यावरून मी इस्राएली
लोकात व मिसरच्या लोकात कसा भेद ठेवलेला आहे हे
तुम्हास कळून येईल. 8मग हे सर्व तुमचे दास (म्हणजे
मिसरचे लोक) माझ्या पाया पडून माझी उपासना करतील.
ते म्हणतील, “तुम्ही तुमच्या सर्व लोकांसह व परिवारासह
येथून निघून जा.” मग मी त्यानंतर रागाने संतप्त होऊन
मोशे फारोला सोडून निघून गेला.’”
9मग परमेश्वर मोशेला म्हणाला, “फारोने तुझे ऐकले
नाही. का? ते तुला माहीत आहे का? कारण की मी
त्याला मिसरमध्ये माझे महान सामर्थ्य दाखवावे.” 10आणि
म्हणूनच मोशे व अहरोन यांनी फारोपुढे अद्भुत चिन्हे
केली; आणि म्हणूनच परमेश्वराने फारोचे मन कठीण
केले आणि त्याने मिसरमधून इस्राएल लोकांना जाऊ
दिले नाही.

## वल्हांडण

12 मोशे व अहरोन अद्याप मिसरमध्ये असताना
परमेश्वर त्यांच्याशी बोलला. तो म्हणाला, 2“हा
तुमच्या वर्षाचा पहिला महिना असे. * 3ही आज्ञा इस्राएलाच्या
सर्व जनसमूहासाठी आहे; ह्या महिन्याच्या दहाव्या दिवशी
प्रत्येक माणसाने आपल्या कुटुंबातील माणसाकरिता एक
कोकरा घ्यावा. 4जर तो संपूर्ण कोकरा, घरातील माणसांना

---

**पहिला महिना असे** अबाब हा महिना होय तो साधारणपणे असेल मार्चच्या मध्यापासून एप्रिलच्या मध्यापर्यंत येत असे.

सरणार नसेल तर त्याने आपल्या भोजनात वाटेकरी
होण्यासाठी आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना निमंत्रण द्यावे.
5तो कोकरा, एक वर्षाचा नर असावा व तो पूर्णपणे
निरोगी असावा तो कोकरा मेंढ्यातला किंवा बकऱ्यातला
असावा. 6ह्या पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवसापर्यंत
त्या मेंढ्याची किंवा बकऱ्याची निगा राखावी व त्यावर
लक्ष ठेवावे. चौदाव्या दिवशी सर्व इस्राएल लोकांनी
कातरवेळी म्हणजे सूर्य मावळल्यानंतर व अंधार पडण्यापूर्वी
आपापल्या मेंढ्याचा किंवा बकऱ्याचा वध करावा. 7त्यांचे
रक्त गोळा करून ते ज्या घरात त्याचे मांस खाणार आहेत
त्याच्या दाराच्या कपाळ पट्ट्यांवर व दोन्ही बाजूंच्या चौकटींना
लावावे.

8"त्याच रात्री तो मेंढा किंवा बकरा विस्तावावर भाजावा
आणि कडू भाजी व बेखमीर भाकरी बरोबर त्याचे सर्व
मांस खाऊन टाकावे; 9तुम्ही त्याचे मांस कच्चे किंवा
पाण्यात शिजवून खाऊ नये तर विस्तवावर भाजून खावे;
त्याची मुंडी, पाय व आंतडी ही सुद्धा भाजून खावीत. 10त्या
रात्रीच ते सर्व मांस खावे; त्यातले काहीही सकाळपर्यंत
ठेवू नये आणि जर काही उरलेच तर ते आगीत जाळून
टाकावे."

11ते खाण्या अगोदर तुम्ही प्रवासास जाण्याच्या तयारीने
अंगावर कपडे घालावेत, पायात जोडे घालावेत आणि
हातात काठी घ्यावी आणि मग घाईघाईने ते मांस खावे;
कारण हा परमेश्वराचा वल्हांडण सण आहे.

12"आज रात्री मी मिसर देशभर फिरेन आणि त्यातील
प्रथम जन्मलेल्या मुलांना व जनावरांतील नरांना मी मारून
टाकीन, आणि मिसरमधील सर्व दैवतांना धडा शिकवून
दाखवीन की मी परमेश्वर आहे. 13परंतु तुमच्या घरांच्या
दारावरील रक्त ही एक विशेष खूण असेल. मी जेव्हा ती
पाहीन तेव्हा ते घर ओलांडून मी पुढे जाईन. मी
मिसरच्या लोकांना मारीन तेव्हा कोणतीही विनाशकारी
पीडा तुम्हांवर येणार नाही व तुम्हाला अपाय करणार
नाही.

14"अशा रीतीने आजची रात्र कायमची तुमच्या
आठवणीत राहील. हा दिवस तुम्हासाठी विशेष उत्सवाचा
म्हणजे सणाचा दिवस असेल. तुमच्या वंशजांनी येथून पुढे
हा सण पिढ्यान्‌पिढ्या कायमचा नियम म्हणून पाळावा.
15तसेच सणाच्या दिवासांत तुम्ही सात दिवस खमीर न
घातलेली भाकर खावी; ह्या सणाच्या पहिल्या दिवशी
तुम्ही प्रत्येकाने आपल्या घरातील सर्व खमीर काढून
टाकावे व पूर्ण सात दिवस तुम्ही खमीर न घातलेली
भाकर खावी. तुम्हातील जर कोणी खमीर घातलेली भाकर
खाईल तर त्याला तुम्ही इस्राएल लोकांमधून बाहेर टाकावे.
16या सणाच्या पहिल्या व शेवटल्या म्हणजे सातव्या दिवशी
पवित्र मेळा भरवावा; ह्या दोन्ही दिवशी स्वयंपाकाच्या
कामाशिवाय इतर कोणतेही काम करु नये. 17बेखमीर
भाकरीच्या सणाची तुम्ही आठवण ठेवावी कारण याच
दिवशी मी तुम्हा सर्वांना गटगटांनी मिसरदेशातून बाहेर
काढून नेले म्हणून तुमच्या सर्व वंशजांनी हा दिवस
पिढ्यान्‌पिढ्या कायमचा नियम म्हणून पाळावा. 18तेव्हा
पहिल्या महिन्यातील (निसान महिन्यातील) चौदाव्या
दिवसाच्या संध्याकाळपासून ते त्या महिन्याच्या एकविसाव्या
दिवसाच्या संध्याकाळपर्यंत तुम्ही बेखमीर भाकरी खाव्या.
19ह्या सात दिवसात तुमच्या घरात खमीर नसावे; कारण
जो कोणी एखादी खमीराची वस्तू खाईल मग तो परदेशी
असो किंवा स्वदेशी असो त्याला इस्राएल लोकांमधून
बाहेर टाकावे. 20या दिवशी कोणीही खमीर खाऊ नये;
तर तुम्ही कोठेही राहात असला तरी बेखमीर भाकरच
खावी."

21म्हणून मग मोशेने इस्राएली लोकांच्या सर्व वडीलधाऱ्यां
लोकांना एकत्र बोलावले. तो त्यांना म्हणाला, "तुम्ही
आपापल्या घराण्याप्रमाणे एकएक कोकरू घ्यावे; आणि
वल्हांडण सणाच्या यज्ञाकरिता त्याचा वध करावा. 22मग
एजोब झाडाच्या पानांच्या जुड्या घेऊन त्या पात्रातील
कोकराच्या रक्तात बुचकाळाव्या आणि त्याचे रक्त
दाराच्या दोन्ही बाजूंच्या चौकटींना व कपाळ पट्ट्यांवर
लावावे. आणि सकाळपर्यंत कोणीही घराबाहेर जाऊ नये.
23कारण त्यावेळी परमेश्वर मिसरमधील प्रथम
जन्मलेल्यांना ठार मारण्यासाठी फिरणार आहे; तो जेव्हा
घराच्या दारावरील कपाळ पट्टीवर व दाराच्या चौकटीच्या
दोन्ही बाजूला लावलेले रक्त पाहील तेव्हा तो त्या घराचे
संरक्षण करील; नाश करणाऱ्याला तुमच्या घरात प्रवेश
करु देणार नाही, व तुम्हाला काही अपाय होऊ देणार
नाही. 24तुम्ही या आज्ञेची आठवण ठेवली पाहिजे की
तुम्ही व तुमचे वंशज यानी पाळावयासाठी हा नियम कायमचा
नियम आहे. 25परमेश्वर त्याच्या वचनानुसार जो देश
तुम्हाला देणार आहे त्यात तुम्ही गेला तर तेथेही तुम्ही हा
नियम पाळण्याची आठवण ठेवावी. 26जेव्हा तुमची मुलेबाळे
तुम्हाला विचारतील की हा विधी आपण का करीत आहोत?
27तेव्हा तुम्ही त्यांना सांगा, 'हा परमेश्वराच्या वल्हांडणाचा
यज्ञ आहे; कारण आम्ही जेव्हा मिसरमध्ये होतो तेव्हा या
दिवशी परमेश्वराने मिसरच्या लोकांना मारले परंतु इस्राएल
लोक राहात असलेली घरे ओलांडून तो पुढे गेला व त्या
घरातील आम्हा सर्वांना त्याने वाचवले' त्यानंतर इस्राएल
लोकांनी परमेश्वरापुढे नतमस्तक होऊन त्याची उपासना
केली.

28परमेश्वराने मोशे व अहरोन यांना आज्ञा दिली होती
म्हणून इस्राएल लोकांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे केले.

29मध्यरात्री परमेश्वराने मिसरमधील सर्व प्रथम
जन्मलेले मुलगे, म्हणजे मिसरदेशाचा राजा फारो याच्या
थोरल्या मुलापासून तर तुरुंगात पडलेल्या कैद्याच्या थोरल्या
मुलापर्यंत सर्व मुलांना तसेच पशूंच्या प्रथम जन्मलेल्या
सर्व नरांना मारून टाकले. 30त्या रात्री अवघ्या मिसर
देशातील अगदी प्रत्येक घरातून एक ना एकजण तरी

मरण पावला. फारो राजा, त्याचे सेवक आणि मिसरचे
लोक मोठमोठ्याने रडून शोक करु लागले.

### इस्राएल लोक मिसर देश सोडून जातात

31तेव्हा रात्रीच्या रात्रीच फारोने मोशे व अहरोन यांना
बोलावून आणले, फारो त्यांना म्हणाला, “आता उठा आणि
आमचे लोक सोडून निघा, तुम्ही म्हटल्याप्रमाणे तुम्ही व
तुमचे लोक निघून जा आणि तुमच्या परमेश्वराची उपासना
करा. 32आणि तुम्ही म्हणाल्याप्रमाणे तुमची शेरडेमेंढरे, व
गुरेढोरे ही तुमच्या बरोबर घेऊन जा. येथून निघा! आणि
जाताना मलाही आशीर्वाद द्या!” 33मिसरच्या लोकांनी सुद्धा
इस्राएल लोकांना घाईकरून लवकर निघून जाण्यास
सांगितले; कारण ते म्हणाले, “तुम्ही जर येथून निघून
जाणार नाही तर आम्ही सर्वजण मरून जाऊ!”

34इस्राएल लोकांना आपल्या भाकरीच्या पिठात खमीर
घालण्यास बिलकुल वेळ मिळाला नाही म्हणून त्यांनी
मळलेल्या पिठाच्या काथवटी कापडात गुंडाळल्या आणि
त्या आपल्या खांद्यावर टाकून ते घेऊन गेले. 35इस्राएल
लोकांनी मोशेने त्यांना सांगितल्याप्रमाणे आपल्या मिसरच्या
शेजाऱ्या पाजाऱ्यांकडे जाऊन भारी भारी कपडे,
सोन्याचांदीचे दागदागिने मागून घेतले होते. 36मिसरच्या
लोकांनी इस्राएल लोकांना त्या त्या वस्तू दयाव्यात म्हणून
त्यांच्या मनात परमेश्वराने इस्राएल लोकांविषयी दया
निर्माण केली आणि म्हणून मिसरच्या लोकांनी इस्राएल
लोकांना मौल्यवान वस्तू दिल्या.

37तेव्हा इस्राएल लोक मिसरमधून निघून रामसेस येथून
प्रवास करीत सुक्कोथ येथे गेले. मुलेबाळे सोडून ते सर्वजण
मिळून सुमारे सहा लाख होते; 38त्यांच्या सोबत पुष्कळ
शेरडेमेंढरे व गुरेढोरे होती. अनेक प्रकारचे लोक
त्यांच्याबरोबर प्रवास करीत होते, ते इस्राएली नव्हते परंतु
त्यांनी त्याच्या बरोबर मिसर देश सोडला. 39इस्राएल लोकांस
आपल्या भाकरीच्या पिठात खमीर घालण्यास अजिबात
वेळ मिळाला नाही. तसेच आपल्याबरोबर प्रवासाकरिता
खावयास काही विशेष जेवण करता आले नाही; म्हणून
त्यांना बेखमीर भाकरीच भाजाव्या लागल्या.

40इस्राएली लोक मिसरमध्ये चारशेतीस वर्षे राहिले
होते. 41मग चारशे तीसाव्या वर्षातील अगदी शेवटच्या
दिवसापर्यंत राहिल्यानंतर परमेश्वराच्या सर्व सेना म्हणजे
सर्व इस्राएल लोक मिसर देशातून निघाले. 42म्हणून ज्या
रात्री त्यांनी मिसरदेश सोडला त्या रात्री परमेश्वराने त्यांच्या
करिता काय केले त्याविषयी त्या विशेष रात्रीची त्यांना
आठवण राहील. सर्व इस्राएल लोकांनी त्या रात्रीची आठवण
अगदी पिढ्यान् पिढ्या ठेवावी.

43परमेश्वराने मोशे व अहरोन यांना सांगितले,
“वल्हांडण सण पाळण्याविषयीचे नियम असे आहेत. कोणाही
परदेशी माणसाने वल्हांडणाचे भोजन खाऊ नये. 44परंतु
जर कोणी एखादा गुलाम विकत घेतला असेल आणि
त्याची सुंता त्याने करवून घेतली असेल तर मग त्या
गुलामाने वल्हांडणाचे भोजन खावे; 45परंतु केवळ तुमच्या
देशात राहणारा उपरा माणूस किंवा मोलकरी ह्यांपैकी
कोणीही ते खाऊ नये. (कारण वल्हांडण सण फक्त इस्राएल
लोकांसाठीच आहे.)

46“प्रत्येक इस्राएली कुटुंबाने आपले वल्हांडण सणाचे
भोजन एकाच घरात खाल्ले पाहिजे; ते भोजन घराबाहेर
नेऊ नये. यज्ञपशूचे कोणतेही हाड मोडू नये. 47सर्व इस्राएल
लोकांनी हा सण पाळलाच पाहिजे. 48इस्राएली नसलेला
कोणी एक जण तुम्हांबरोबर राहात असेल व जर त्याला
परमेश्वराच्या वल्हांडण सणाच्या भोजनात सहभागी
होण्याची इच्छा असेल तर त्याने सुंता करून घेतलीच
पाहिजे, म्हणजे मग तो इस्राएल लोकांसारखा रहिवासी
होईल, मग त्याने वल्हांडण सणाच्या भोजनात सहभागी
व्हावे; परंतु त्याने सुंताकरून घेतली नाही तर त्याला
वल्हांडण सणाच्या भोजनात सहभागी होता येणार नाही.
49हे नियम सर्वांसाठी सारखेच आहेत, मग तो इस्राएली
असो किंवा तुमच्या देशात राहणारा इस्राएली नसलेला
कोणी परदेशी असो. प्रत्येकासाठी सारखेच नियम आहेत.”

50तेव्हा परमेश्वराने मोशे व अहरोन यांना ज्या आज्ञा
दिल्या त्या सर्व इस्राएली लोकांनी पाळल्या. 51अशा रीतीने
त्याच दिवशी परमेश्वराने सर्व इस्राएल लोकांना मिसर
देशातून बाहेर नेले व ते गटगटांनी गेले.

13 मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“इस्राएलाचा
प्रत्येक प्रथम जन्मलेला म्हणजे मातेच्या उदरातून
बाहेर आलेला मुलगा, त्याच प्रमाणे पशूतला प्रथम
जन्मलेला नर ह्यांना माझ्यासाठी पवित्र म्हणून वेगळे
ठेव. ते माझे आहेत”

3मोशे लोकांना म्हणाला, “आजच्या दिवसाची आठवण
ठेवा. तुम्ही मिसर देशात गुलाम म्हणून होता; परंतु ह्या
दिवशी परमेश्वराने आपल्या महान सामर्थ्याने तुम्हांस
गुलामगिरीतून सोडवून बाहेर आणले म्हणून तुम्ही खमीर
घातलेली भाकर खाऊ नये. 4आज अबीब महिन्यात तुम्ही
मिसर सोडून निघत आहात. 5परमेश्वराने तुमच्या पूर्वजांशी
विशेष करार केला होता की कनानी, हित्ती, अमोरी,
हिव्वी व यबूसी या लोकांचा देश मी तुम्हाला देईन;*
त्यामुळे त्या देशात नेल्यानंतर तुम्ही या दिवसाची आठवण
ठेवलीच पाहिजे; तुम्ही प्रत्येक वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या
ह्या दिवशी परमेश्वराची उपासना करण्यासाठी हा सण
पाळला पाहिजे.

6“या सात दिवसात तुम्ही बेखमीर भाकर खावी. सातव्या
दिवशी मोठी मेजवानी करून तुम्ही हा सण पाळावा; 7ह्या
सात दिवसात तुम्ही खमीर घातलेली भाकर खाऊ नये.
तुमच्या देशाच्या हद्दीत कोठे ही खमीर घातलेली भाकर
नसावी. 8“ह्या दिवशी परमेश्वराने आम्हाला मिसर देशातून

---

**तुम्हाला देईन** म्हणजे ज्यात दूध व मध वाहात आहेत असा.

बाहेर आणले म्हणून आम्ही हा सण पाळीत आहोत' असे
तुम्ही आपल्या मुलाबाळांना सांगावे.
9“हा सणाचा दिवस म्हणजे जणू काय तुम्हाला आठवण
देण्याकरिता तुमच्या हाताला बांधलेल्या दोऱ्यासारखा
होईल, तो तुम्हाला डोळ्यांच्या दरम्यान चिन्ह असा होईल.*
त्याच्यामुळे तुम्हाला परमेश्वराच्या शिकवणुकीची
आठवण होईल. तसेच परमेश्वराने आपल्या सामर्थ्याने
तुम्हाला मिसरमधून बाहेर आणले याची आठवण करण्यास
तो तुम्हाला मदत करील. 10म्हणून प्रत्येक वर्षी योग्य
वेळी म्हणजे ह्या सणाच्यावेळी ह्या दिवसाची तुम्ही आठवण
ठेवा.
11“परमेश्वराने तुमच्या पूर्वजांना वचन दिल्याप्रमाणे तो
तुम्हाला आता कनानी लोक राहात असलेल्या देशात
घेऊन जाईल व तो देश तुम्हाला देईल. तो दिल्यानंतर
12तुम्ही परमेश्वराला तुमचा प्रथम जन्मलेला मुलगा व
पशूंमधील प्रथम जन्मलेला नर देण्याची आठवण ठेवलीच
पाहिजे. 13गाढवाच्या प्रथम जन्मलेल्या शिंगराला एक
कोकरु देऊन परमेश्वराकडून सोडवून घेता येईल; परंतु
तुम्हाला ते शिंगरु तसे सोडवायचे नसेल तर त्याचा वध
करावा. तो परमेश्वराला यज्ञ होईल तुम्ही त्याची मान
मोडावी प्रत्येक प्रथम जन्मलेला मुलगा सुध्दा मोबदला
देऊन सोडवून घ्यावा.
14“पुढील काळीं तुमची मुले बाळे विचारतील की तुम्ही
असे का करिता म्हणजे हा सण का पाळिता? ते म्हणतील,
'या सर्वांचा अर्थ काय?' तेव्हा तुम्ही उत्तर द्यावे, 'आम्ही
मिसरमध्ये गुलामगिरीत होतो परंतु परमेश्वराने आपल्या
महान सामर्थ्याने आम्हाला मिसरमधून सोडवून येथे
आणले. 15मिसरचा राजा फारो ह्याने आम्हांस मिसर
सोडून जाऊ देण्याचे नाकारले; परंतु परमेश्वराने
मिसरमधील प्रथम जन्मलेली मुले व पशुमधील प्रथम
जन्मलेले नर मारून टाकले; आणि म्हणूनच आम्ही
पशूंमधील प्रथम जन्मलेले नर परमेश्वराला देऊन टाकतो
आणि प्रथम जन्मलेली मुले आम्ही परमेश्वराकडून सोडवून
घेतो.'
16हा सण म्हणजे जणू काय आठवणीसाठी हाताला
बांधलेल्या दोरीच्या खुणे सारखा व डोळ्यांच्या दरम्यानच्या
कपाळपट्टी सारखा आहे. परमेश्वराने आपल्या महान
सामर्थ्याने आम्हाला मिसर देशातून बाहेर आणले त्याची
आठवण देण्यास हा दिवस मदत करतो.”

## मिसरपासून बाहेर प्रवास

17फारोने इस्राएल लोकांना मिसर सोडून जाऊ दिले,
परंतु परमेश्वराने लोकांना पलिष्टी लोकांच्या देशातून
जवळची वाट असताना देखील त्यातून जाऊ दिले नाही;
कारण परमेश्वर म्हणाला, “त्यांना त्यातून जाताना लढावे
लागेल आणि मग त्यामुळे आपल्या मनातले विचार बदलून
ते लोक माघारे वळून मिसर देशाला परत जातील.”
18म्हणून परमेश्वराने त्यांना दुसऱ्या मार्गाने तांबड्या
समुद्राजवळील रानातून नेले. इस्राएल लोक मिसरमधून
सशस्त्र होऊन निघाले होते.

## योसेफाच्या अस्थी वचन दिलेल्या देशात नेल्या जातात

19मोशेने योसेफाच्या अस्थी आपल्याबरोबर घेतल्या,
(कारण मरण्यापूर्वी योसेफाने आपणाकरिता इस्राएली
पुत्रांकडून वचन घेतले होते. तो म्हणाला होता, “परमेश्वर
जेव्हा तुम्हाला मिसरमधून सोडवील तेव्हा माझ्या अस्थी
मिसरमधून घेऊन जाण्याची आठवण ठेवा.”)

## परमेश्वर आपल्या लोकांना घेऊन जातो

20इस्राएल लोकांनी सुक्कोथ हे ठिकाण सोडले व
रानाजवळील एथाम या ठिकाणी त्यांनी तळ दिला. 21दिवसा
त्यांना मार्ग दाखविण्यासाठी उंच ढगाची व रात्री उंच
अग्निस्तंभाची योजना करून परमेश्वर त्यांच्या पुढे चालत
असे. लोकांना रात्रीही प्रवास करता यावा यासाठी तो ढग
त्यांना रात्री प्रकाश देत असे.
22दिवसा तो उंच ढग व रात्री तो अग्निस्तंभ सतत त्या
लोकांबरोबर असत.

14 नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“इस्राएल
लोकांना असे सांग की, तुम्ही मागे फिरून मिग्दोल
व(तांबडा) समुद्र यांच्यामध्ये व बालसफोना जवळ असलेल्या
पी-हहीरोथ येथे तळ देऊन रात्री मुक्काम करावा. 3त्यामुळे
इस्राएल लोक रानात वाट चुकले आहेत व गोंधळल्यामुळे
राहण्यासाठी त्यांना जागा सापडत नाही असे फारोला वाटेल.
4मी फारोचे मन कठीण करीन व तो तुमचा पाठलाग
करील परंतु मी फारो व त्याची सेना यांचा पराभव करून
गौरवशाली होईन मग मिसरच्या लोकांना समजेल की मी
परमेश्वर आहे.” तेव्हा इस्राएल लोकांनी देवाच्या
आज्ञेप्रमाणे केले.

## फारो इस्राएल लोकांचा पाठलाग करितो

5इस्राएल लोक निसटून गेल्याचे फारोला समजले तेव्हा
तो व त्याचे अधिकारी यांचे विचार बदलले व आपण हे
काय केले असे त्यांना वाटले. फारो म्हणाला, “आपण
इस्राएली लोकांना आपल्या हातून पळून का जाऊ दिले?
आता आपण आपल्या गुलामांना मुकलो आहोत!”
6तेव्हा फारोने आपला रथ तयार करण्यास सांगितले
आणि आपल्या लोकांना घेऊन तो निघाला. 7त्याने सहाशे
उत्तम योद्धे व सर्व रथ आपल्या बरोबर घेतले. प्रत्येक
रथात एक अधिकारी होता. 8इस्राएल लोक तर मिसरहून
मोठ्या अवसानाने चालले होते, परंतु परमेश्वराने फारोचे

---

**तो ... होईल** तुमच्या हातावरची खूण व डोळ्यांमधील आठवण.

मन कठीण केले आणि त्याने इस्राएल लोकांचा पाठलाग
केला.
9मिसरच्या लष्करात पुष्कळ घोडेस्वार व रथ होते.
त्यांनी इस्राएल लोकांचा पाठलाग करुन इस्राएलींनी लाल
समुद्र व बालसफोनाच्या दरम्यान पीहहीरोथ येथे तळ
दिला होता तेथे त्यांना गाठले.
10फारो व त्याचे सैन्य आपणाकडे येताना इस्राएल
लोकांनी पाहिले, तेव्हा ते अतिशय घाबरले; आणि
मदतीसाठी ते परमेश्वराचा धावा करु लागले. 11ते मोशेला
म्हणाले, “तू आम्हाला मिसरमधून येथे रानात मरावयास
का आणले? आम्ही शांतीने मिसरमध्ये मरण पावलो
असतो आणि आमच्या कबरांसाठी तेथे भरपूर जागा होती;
12असे होईल हे आम्ही तुला सांगितले होते! मिसरमध्ये
आम्ही म्हणालो, ‘आमची चिंता करु नकोस; आम्ही येथेच
राहून मिसरच्या लोकांची सेवाचाकरी करु;’ मिसरमधून
येथे रानात येऊन मरण्यापेक्षा, आम्ही मिसरमध्ये गुलाम
म्हणून राहिलो असतो तर बरे झाले असते.”
13परंतु मोशेने उत्तर दिले, “भिऊ नका! स्थिर उभे
राहा आणि परमेश्वर आज तुम्हाला वाचवील ते पाहा.
आजच्या दिवसानंतर हे मिसरचे लोक तुम्हाला पुन्हा
कधीही दिसणार नाहीत. 14शांत राहण्यावाचून तुम्हाला
काहीच करावे लागणार नाही. परमेश्वर तुमच्याकरिता
त्यांच्याशी लढेल.”
15मग परमेश्वर मोशेला म्हणाला, “तुला माझा धावा
करण्याची काही गरज नाही! इस्राएल लोकांना पुढे
चालण्याची आज्ञा कर. 16तांबड्या समुद्रावर तुझ्या हातातली
काठी उगार म्हणजे समुद्राचे दोन भाग होतील आणि
इस्राएल लोक भर समुद्रातील कोरड्या भूमीवरून चालत
जाऊन समुद्र ओलांडतील. 17मी मिसरच्या लोकांची मने
कठीण केली आहेत म्हणून ते तुमचा पाठलाग करतील,
परंतु फारो व त्याचे सर्व सैन्य, घोडेस्वार व रथ यांच्यापेक्षा
मी अधिक सामर्थ्यवान आहे, असे माझे महात्म्य मी
तुम्हाला दाखवून देईन. 18मग मिसरच्या लोकांना समजेल
की मी गौरवशाली परमेश्वर आहे, फारो व त्याच्या
घोडेस्वारांचा व रथांचा पराभव केल्यावर मिसरचे लोक
मला मान देतील.”
19इस्राएल लोकांना घेऊन जाण्यासाठी नेहमीप्रमाणे
त्यांच्या पुढे चालणारा परमेश्वराचा दूत इस्राएल लोकांच्या
मागे जाऊन उभा राहिला, तेव्हा तो उंच मेघस्तंभ इस्राएल
लोकांच्या आघाडीवरून त्यांच्या पिछाडीस गेला. 20अशा
रीतीने तो उंच ढग मिसरचे लोक व इस्राएल लोक
यांच्यामध्ये उभा राहिला; तेव्हा इस्राएल लोकांना प्रकाश
मिळाला परंतु मिसरच्या लोकांभोंवती अंधार राहिला;
त्यामुळे त्या रात्री मिसरचे लोक इस्राएल लोकांना
गाठण्यासाठी जराही त्यांच्या जवळ जाऊ शकले नाहीत.
21मग मोशेने तांबड्या समुद्रावर आपला हात उगारला
व परमेश्वराने पूर्वेकडून जोराचा वारा वाहावयास लाविला.
तो रात्रभर वाहिला. तेव्हा समुद्र दुभंगला आणि त्यातील
मार्ग वाऱ्यामुळे सुकून कोरडा झाला. 22आणि इस्राएल
लोक कोरड्या वाटेवरून भरसमुद्रातून पार गेले. समुद्राचे
पाणी त्यांच्या उजव्या व डाव्या बाजूला भिंती सारखे उभे
राहिले. 23त्यानंतर फारोचे सर्व घोडे, रथ व स्वार यांनी
समुद्रातून इस्राएल लोकांचा पाठलाग केला. 24तेव्हा त्या
दिवशी भल्या पहाटे परमेश्वराने मेघस्तंभातून व
अग्नीस्तंभातून खाली मिसरच्या सैन्याकडे पाहिले आणि
त्यांचा गोंधळ उडवून त्यांचा पराभव केला.
25रथांची चाके रुतल्यामुळे रथावर ताबा ठेवणे मिसरच्या
लोकांना कठीण झाले; तेव्हा ते मोठ्याने ओरडून म्हणाले,
“आपण येथून लवकर निघून जाऊ या! कारण परमेश्वर
इस्राएलच्या बाजूने आम्हाविरुद्ध लढत आहे.”
26नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, “तुझा हात समुद्रावर
उगार म्हणजे भिंतीसारखे उभे राहिलेले पाणी खाली पडून
एकत्र होईल व ते फारोचे घोडे, रथ व स्वार यांना बुडवून
टाकील.”
27म्हणून दिवस उजाडण्याच्या आत मोशेने आपला हात
समुद्रावर उगारला तेव्हा पाणी पहिल्यासारखे समान
पातळीवर आले; तेव्हा मिसरच्या लोकांनी पळून जाण्याचा
प्रयत्न केला परंतु परमेश्वराने त्यांना पाण्यात बुडवून
टाकले. 28पाणी पूर्ववत झाले व त्याने घोडे, रथ व स्वारांना
गडप केले आणि इस्राएल लोकांचा पाठलाग करणाऱ्या
सर्व सैन्याचा नाश झाला, त्यातले कोणीही वाचले नाही.
29परंतु इस्राएली लोक कोरड्या भूमिवरुन भरसमुद्र
ओलांडून पार गेले. ते पाणी त्यांच्या उजव्या व डाव्या
हाताला भिंतीप्रमाणे उभे राहिले. 30तेव्हा अशा रीतीने त्या
दिवशी परमेश्वराने मिसरच्या लोकांपासून इस्राएल
लोकांना वाचविले व त्यांनी तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर
मिसरच्या लोकांची प्रेते पडलेली पाहिली. 31तसेच
परमेश्वराने आपल्या महान सामर्थ्याने मिसरच्या लोकांचा
पराभव केला तेही त्यांनी पाहिले; तेव्हा त्यांनी परमेश्वराचे
भय धरले आणि त्यांनी त्याच्यावर व त्याचा सेवक मोशे
याच्यावरही विश्वास ठेवला.

## मोशेचे गीत

15 नंतर मोशे व इस्राएल लोक परमेश्वराला हे गीत
गाऊ लागले.

“मी परमेश्वराला गीत गाईन कारण त्याने महान कृत्ये
केली आहेत; घोडा व स्वार यांना त्याने समुद्रात फेकून
दिले आहे. 2परमेश्वर माझे सामर्थ्य आहे.तो माझे रक्षण
करितो. मी त्याची स्तुतिस्तोत्रे गाईन*; परमेश्वर माझा

---

**परमेश्वर ... गाईन** शब्दश “याहवे माझे सामर्थ्य व स्तुती आहे आणि तोच माझे तारण आहे.”

देव आहे; तो माझ्या पूर्वजाचा देव आहे; मी त्याचे गौरव करीन.

3 परमेश्वर महान योद्धा आहे; त्याचे नांव याव्हे आहे.

4 त्याने फारोचे रथ व स्वार यांना समुद्रात फेकून दिले; त्याने फारोचे उत्तम लष्करी अधिकारी तांबड्या समुद्रात बुडविले.

5 खोल पाण्याने त्यांना बुडविले; ते खोल पाण्यात दगडाप्रमाणे तळापर्यंत बुडाले.

6"हे परमेश्वर तुझा उजवा हात आश्चर्यकारकरीत्या बलशाली आहे; त्या हाताने तू शत्रूंचा चुराडा करून टाकलास.

7तुझ्या वैभवशाली सामर्थ्याने तू तुझ्याविरुद्ध बंड करून उठणाऱ्यांचा नाश करतोस; अग्नीने वाळलेल्या गवताच्या काड्या जाळाव्या तसे तू त्यांना तुझ्या रागाने जाळून भस्म करतोस.

8तू वाहविलेल्या जोराच्या वाऱ्याने पाणी राशी सारखे उंच उभे राहिले व जोराने वाहणाऱ्या पाण्याची टणक भिंत झाली; समुद्राचे पाणी अगदी खोलवर घट्ट टणक बनले

9'शत्रू म्हणाला, 'मी त्यांचा पाठलाग करीन, त्यांना गाठीन, मी त्यांची सर्व संपत्ती लुटून घेईन; त्यामुळे माझा जीव तृप्त होईल. माझ्या तलवारीने त्यांचे सर्व काही हिरावून घेईन; माझ्या हातांनी त्यांचे सर्वकाही मी स्वत: करिता घेईन.'

10 परंतु तू त्यांच्यावर फुंकर वायू सोडलास आणि समुद्राच्या पाण्याने त्यांना गडप केलेस; ते शिशाप्रमाणे समुद्रात खोल पाण्यात तळापर्यंत बुडाले.

11"परमेश्वरासारखा, देवतांमध्ये कोण देव आहे का? नाही! परमेश्वरा तुझ्या समान कोणी देव नाही; तू आश्चर्यकारक, अति पवित्र देव आहेस! तुझे सामर्थ्य आश्चर्यकारक आहे! तू महान चमत्कार करतोस!

12 तू तुझा उजवा हात उगारला पृथ्वीने त्यांना गिळून टाकले

13 तू उद्धारिलेल्या लोकांना तू तुझ्या दयाळूपणाने चालविले आहेस; तुझ्या सामर्थ्याने तू त्यांना तुझ्या पवित्र आणि आनंददायी प्रदेशात नेले आहेस.

14इतर राष्ट्रे ही गोष्ट ऐकून भयभीत होतील; पलिष्टी लोक भीतीने थरथरा कांपतील.

15 मग अदोमाची कुटुंबे व मवाबाचे बलवान लोक भीतीने थरथरा कांपतील आणि कनानी लोकांचे धैर्य लोप पावेल

16 तुझे सामर्थ्य पाहून ते लोक घाबरतील, आणि परमेश्वराचे लोक म्हणजे तू तारलेले लोक निघून पार जाईपर्यंत ते तुझ्या लोकांना काहीही न करता, दगडासारखे एकाच जागी उभे राहतील;

17 तू तुझ्या लोकांना तुझ्या वतनाच्या पर्वतावर घेऊन जाशील;हे परमेश्वरा, तू त्यांना तुझ्या सिहांसनासाठी तयार केलेल्या ठिकाणाजवळ राहू देशील, व तू हे परमेश्वरा तू तुझे मंदिर बांधशील.

18 परमेश्वर सदासर्वदा राज्य करो!"

19फारोचे घोडे, घोडेस्वार व रथ समुद्रात गेले आणि परमेश्वराने त्यांना समुद्राच्या पाण्यात गडप केले; परंतु इस्राएल लोक भरसमुद्रातून कोरड्या जमिनीवरून चालत पार गेले.

20त्यानंतर अहरोनाची बहीण मिर्याम संदेष्ट्री हिने डफ घेतला आणि ती व इतर स्त्रिया गाऊ व नाचू लागल्या. मिर्याम हे गीत पुन्हा पुन्हा गात होती;

21"परमेश्वराला गीत गा; कारण त्याने महान कृत्ये केली आहेत. त्याने घोडा व घोडेस्वार यांना समुद्रात फेकून दिले आहे."

22मोशे इस्राएल लोकांना तांबड्या समुद्रापासून पुढे घेऊन
गेला. ते लोक शूरच्या रानात गेले; त्यांनी तीन दिवस
रानातून प्रवास केला; पण त्यांना पाणी मिळाले नाही.
23तीन दिवस प्रवास केल्यानंतर ते लोक मारा नांवाच्या
ठिकाणी पोहोंचले; तेथे पाणी होते परंतु ते फार कडू
असल्यामुळे लोकांना ते पिववेना, (म्हणूनच त्या ठिकाणाचे
नांव मारा. पडले)
24लोक मोशेकडे कुरकुर करीत म्हणाले, "आता आम्ही
काय प्यावे?"
25मोशेने परमेश्वराचा धावा केला तेव्हा परमेश्वराने
त्याला एक झाड दाखवले. मोशेने ते झाड पाण्यात टाकले
तेव्हा ते पाणी गोड म्हणजे पिण्यालायक झाले.
त्यावेळी परमेश्वराने इस्राएल लोकांना विधी व नियम
लावून दिला; तसेच त्याने त्यांच्या विश्वासाची कसोटी
घेतली. 26परमेश्वर म्हणाला, "तुम्ही तुमचा देव परमेश्वर
ह्याच्या आज्ञा पाळा; ज्या गोष्टी चांगल्या आहेत असे तो
म्हणतो त्या तुम्ही करा; जर तुम्ही तुमच्या परमेश्वराच्या
आज्ञा व विधी पाळाल तर तुम्हाला मिसरच्या लोकांप्रमाणे
पीडा भोगाव्या लागणार नाहीत आणि मी जो परमेश्वर
त्या मी मिसरच्या लोकांवर जे रोग पाठवले ते तुम्हांवर
पाठविणार नाही; मी परमेश्वर आहे; तुम्हाला बरे करणारा
मीच आहे."
27मग इस्राएल लोक प्रवास करीत एलीम या ठिकाणी
गेले; तेथे पाण्याचे बारा झरे होते व सत्तर खजुरीची झाडे
होती; तेव्हा लोकांनी तेथे पाण्याजवळ तळ दिला.

16 मग इस्राएल लोक प्रवास करीत एलीम या
ठिकाणाहून निघाले व मिसरमधून निघाल्यानंतर
दुसऱ्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी एलीम व सीनाय
यांच्या दरम्यान असलेल्या सीनायच्या रानात आले. 2लोक
पुन्हा, रानात मोशे व अहरोन यांच्याकडे कुरकुर करु

लागले; 3ते म्हणाले, “परमेश्वराने आम्हाला मिसरमध्येच
मारून टाकले असते तर बरे झाले असते कारण तेथे
आम्हास खावयास लागणारे सर्व प्रकारचे अन्न भरपूर
होते; परंतु तुम्ही आम्हांस येथे रानात आणले आहे; येथे
आम्ही सर्वजण भुकेने तडफडून मरून जाऊ.”
4मग परमेश्वर मोशेला म्हणाला, “तुम्हाला
खाण्याकरिता मी आकाशातून अन्न पडावे असे करीन;
दर दिवशी लोकांनी आपल्याला त्या दिवसाला पुरेल एवढे
अन्न बाहेर जाऊन गोळा करावे. मी सांगतो त्याप्रमाणे
लोक करतात की नाही हे पाहण्यासाठी मी हे करीन.
5दरदिवशी लोकांनी एक दिवस पुरेल एवढेच अन्न गोळा
करावे, परंतु शुक्रवारी जेव्हा ते जेवण तयार करतील
तेव्हा मात्र ते जेवण दोन दिवस पुरेल इतके करावे,”
6म्हणून मोशे व अहरोन लोकांना म्हणाले, “आज
रात्री तुम्ही परमेश्वराचे सामर्थ्य पाहाल; तेव्हा मिसरमधून
तुम्हाला वाचविणारा परमेश्वर हाच आहे हे तुम्हाला
कळेल. 7उद्या सकाळी तुम्ही परमेश्वराचे तेज पाहाल;
तुम्ही परमेश्वराकडे तक्रार केली आणि त्याने ती
ऐकली; आणि तुम्ही उगीच आम्हाकडे पुन्हा पुन्हा तक्रार
करीत आला आहात. आता आपण जरा आराम करु
या.”
8आणि मोशे म्हणाला, “तुम्ही एक सारखी तक्रार करीत
आहात; परमेश्वराने तर तुमची तक्रार ऐकली आहे;
तेव्हा आज रात्री परमेश्वर तुम्हाला मांस देणार आहे;
आणि दर दिवशी सकाळी तुम्हाला पाहिजे तेवढ्या भाकरी
मिळतील; तुम्ही अहरोनाकडे व मजकडे तक्रार करीत
आहात तुम्ही माझ्या किंवा अहरोनाच्याविरुद्ध कुरकुर
करीत नाही तर परमेश्वराविरुद्ध तक्रार करीत आहात
हे लक्षात घ्या.”
9मग मोशे अहरोनाला म्हणाला, “तू इस्राएल लोकांशी
बोल; त्यांना सांग, ‘तुम्ही परमेश्वराकडे एकत्र या कारण
त्याने तुमच्या तक्रारी ऐकल्या आहेत.”
10मग अहरोन सर्व इस्राएल लोकांशी बोलला. ते सर्वजण
एके ठिकाणी जमले होते; अहरोन बोलत असताना सर्व
लोकांनी वळून रानाकडे पाहिले; आणि त्यांना एका ढगात
परमेश्वराचे तेज दिसले.
11परमेश्वर मोशेला म्हणाला, 12“मी इस्राएल लोकांच्या
तक्रारी ऐकल्या आहेत तेव्हा त्यांना सांग, ‘रात्री तुम्ही
मांस खाल आणि दररोज सकाळी तुम्हाला पाहिजे तितक्या
भाकरी खाल; मग परमेश्वर मी तुमचा देव आहे हे
तुम्हाला समजेल.’”
13त्या संध्याकाळच्या वेळी, रात्र पडण्याच्या सुमारास
तेथे लावे पक्षी आले व छावणीभर ते पसरले (आणि
त्यांना खाण्याकरिता इस्राएल लोकांनी ते पकडले) आणि
सकाळी छावणीच्या सभोंवती जमिनीवर दंव पडले. 14सूर्य
उगवल्यावर दंव विरून गेले परंतु त्या नंतर जमिनीवर
खवल्यासारखे हिमकणा एवढे कण दिसले. 15ते पाहून
इस्राएल लोकांनी एकमेकांना विचारले, “ते काय आहे?”*
त्यांनी असे विचारले कारण ते काय आहे हे त्यांना
माहीत नव्हते. तेव्हा मोशेने त्यांना सांगितले, “परमेश्वर
हे अन्न तुम्हाला खाण्याकरिता देत आहे. 16परमेश्वर
म्हणतो, ‘आपल्याला जेवढ्या अन्नाची गरज आहे तेवढे
प्रत्येक जणाने घ्यावे; तुम्हापैकी प्रत्येकाने तुमच्या
कुटुंबातील लोकांकरिता दर माणशी आठवाट्या म्हणजे
एक ओमर गोळा करावे.’”
17तेव्हा इस्राएल लोकांनी तसे केले, म्हणजे प्रत्येकाने
हे अन्न गोळा करून घेतले; काही जणांनी इतरांपेक्षा
अधिक घेतले. 18लोकांनी ते आपल्या कुटुंबातील प्रत्येकास
दिले; ते मोजल्यानंतर प्रत्येकासाठी पुरेसे भरले; परंतु
कमी अधिक गोळा केले असले तरी ते कधीही कमी
किंवा जास्त नव्हते कारण प्रत्येक जण आपल्या स्वत:साठी
व आपल्या घरातील सर्व माणसास पुरेल एवढे गोळा
करी.
19मोशेने लोकांना सांगितले, “दुसऱ्या दिवसासाठी ते
अन्न ठेवू नका.” 20परंतु लोकांनी मोशेचे ऐकले नाही,
काही लोकांनी त्या अन्नातून काही बाकी ठेवले आणि
त्या ठेवलेल्या अन्नात किडे पडले व त्याची घाण येऊ
लागली. तेव्हा असे करणाऱ्यावर मोशे फार रागावला.
21दर दिवशी ते लोक आपल्याला पुरेसे अन्न गोळा
करीत परंतु दुपारी सूर्याच्या उष्णतेमुळे ते अन्न वितळून
जाई व नाहीसे होई. 22शुक्रवारी लोकांनी दुप्पट अन्न
म्हणजे दर माणशी सोळा वाट्या किंवा दोन ओमर अन्न
गोळा केले. तेव्हा सर्व पुढारी लोक मोशेकडे आले व
त्यांनी हे त्याला कळविले.
23मोशेने त्यांना सांगितले, “हे असे होईल असे
परमेश्वराने सांगितले होते; हे असे झाले कारण उद्या
शब्बाथ दिवस आज तुम्हाला लागणारे सर्व अन्न शिजवून
तयार ठेवावे परंतु उरलेले दुसऱ्या दिवशी सकाळसाठी
ठेवावे.”
24म्हणून लोकांनी उरलेले अन्न दुसऱ्या दिवसाकरिता
ठेवले आणि त्यातील थोडे ही वाईट झाले नाही किंवा
त्यात कोठेही किडे पडले नाहीत.
25शनिवारी मोशेने लोकांना सांगितले, “आज शब्बाथ
दिवस म्हणजे विसावा घेण्याचा आणि परमेश्वराची उपकार
स्तुती करण्याचा विशेष दिवस आहे; तेव्हा तुम्हापैकी
कोणीही बाहेर जाऊ नये तर तुम्ही काल गोळा केलेल्या
अन्नातून जेवण खावे. 26तुम्ही सहा दिवस अन्न गोळा
करावे परंतु आठवड्याचा सातवा दिवस हा विसाव्याचा
दिवस आहे; या दिवशी अन्न मिळणार नाही.”
27शनिवारी काही लोक अन्न गोळा करावयास बाहेर
गेले परंतु त्यांना काहीच मिळाले नाही. 28नंतर परमेश्वर

---

**ते काय आहे?** हिब्रू भाषेत या प्रश्नाचा उच्चार “मान्ना” या शब्दाच्या उच्चारासारखा वाटतो.

मोशेला म्हणाला, “माझ्या आज्ञा व माझे नियम पाळावयास तुम्ही कोठवर नाकारणार? 29पाहा तुम्ही विसावा घ्यावा यासाठी परमेश्वराने शब्बाथ दिवस बनविला आहे; म्हणून शुक्रवारी परमेश्वर तुम्हाला दोन दिवस पुरेल एवढे अन्न देतो, तेव्हा शब्बाथ दिवशी तुम्ही आहात तेथे बसून विसावा घ्यावा.” 30म्हणून मग लोक शब्बाथ दिवशी विसावा घेऊ लागले.

31लोक त्या विशेष अन्नाला “मान्ना” म्हणू लागले; ते धण्यासारखे पांढऱ्या रंगाचे होते त्याची चव मध घालून केलेल्या सपाट पोळी सारखी होती. 32मोशे म्हणाला, “परमेश्वराने सांगितले, ‘या अन्नातील आठवाट्या म्हणजे एक ओमर इतके किंवा एका एफाचा दहावा भाग इतके अन्न तुमच्या पुढील पिढ्यांसाठी राखून ठेवा म्हणजे मग तुम्हाला मिसर देशातून काढून नेल्यावर मी तुम्हाला रानात कसे अन्न दिले हे त्यांना समजेल.’”

33तेव्हा मोशेने अहरोनाला सांगितले, “एक मोठ्या तोंडाचे खोल भांडे घे आणि त्यात आठवाट्या म्हणजे एक ओमर मान्ना घाल. तो परमेश्वरापुढे सादर करण्यासाठी ठेव तो आपल्या पुढील पिढ्यांसाठी राखून ठेव.”

34मग अहरोनाने, परमेश्वराने मोशेला दिलेल्या आज्ञे प्रमाणे केले. अहरोनाने परमेश्वराच्या आज्ञापटा पुढे मान्ना भरलेले ते भांडे ठेवले. 35इस्राएल लोक तो मान्ना चाळीस वर्षे म्हणजे वस्ती असलेल्या देशाला पोहोंचेपर्यंत म्हणजे कनान देशाच्या सरहद्दीला पोहोंचेपर्यंत, खात होते. 36एक ओमर मान्ना म्हणजे त्यांच्या मोजमापाप्रमाणे सुमारे आठवाट्या किंवा “एका एफाचा दहावाभाग” होता

17 सर्व इस्राएल लोक सीनच्या रानातून एकत्र प्रवास करत गेले. परमेश्वराने त्यांना आज्ञा केल्याप्रमाणे ते ठिकठिकाणाहून प्रवास करत रफीदीम येथे गेले आणि त्यांनी तेथे तळ दिला; तेथे त्यांना प्यावयास पाणी नव्हते. 2तेव्हा इस्राएल लोक मोशेविरुद्ध उठले व त्याच्याशी भांडू लागले. ते म्हणाले, “आम्हाला प्यावयास पाणी दे.”

मोशे त्यांना म्हणाला, “तुम्ही माझ्याविरुद्ध का उठला आहात? तुम्ही परमेश्वराची परीक्षा का पाहात आहात?”

3परंतु लोक तहानेने कासावीस झाले होते म्हणून ते मोशेकडे कुरकुर करीतच राहिले; ते म्हणाले, “तू आम्हाला मिसर देशातून बाहेर का आणलेस? आमची मुलेबाळे, गुरेढोरे यांना पाण्यावाचून मारण्यासाठी तेथून आम्हाला तू येथे आणलेस काय?”

4तेव्हा मोशे परमेश्वराकडे धावा करून म्हणाला, “मी ह्या लोकांना काय करु? ते मला ठार मारावयास उठले आहेत.”

5परमेश्वर मोशेला म्हणाला, “तू इस्राएल लोकांपुढे जा. त्यांच्यापैकी काही वडीलधारी म्हणजे पुढारी माणसे तुजबरोबर घे. नाईल नदीच्या पाण्यावर तू जी काठी आपटली होतीस ती तू तुझ्याबरोबर घे. 6होरेब डोंगरावरील एका खडकावर म्हणजे सिनाय डोंगरावरील एका खडकावर मी तुझ्या पुढे उभा राहीन, त्या खडकावर ती आपट म्हणजे त्या खडकातून पाणी बाहेर येईल. मग लोकांनी ते प्यावे.”

मोशेने हे सर्व केले आणि इस्राएल लोकांच्या वडिलधाऱ्या माणसांनी म्हणजे पुढाऱ्यांनी ते पाहिले. 7मोशेने त्या ठिकाणाचे नांव मरीबा व मस्सा ठेवले; कारण या ठिकाणी इस्राएल लोकांनी परमेश्वराविरुद्ध बंड केले आणि त्यांनी त्याची परीक्षा पाहिली. परमेश्वर त्यांच्याबरोबर आहे किंवा नाही हे त्यांना पाहावयाचे होते.

8रफिदीम येथे अमालेकी लोक इस्राएल लोकांवर चालून आले आणि त्यांनी त्यांच्याशी लढाई केली. 9तेव्हा मोशे यहोशवाला म्हणाला, “काही लोकांना निवड व त्यांना घेऊन उद्या अमालेकांशी लढाई कर; देवाने मला दिलेली काठी हातात धरून मी टेकडीच्या माथ्यावर उभा राहीन.”

10यहोशवाने मोशेची आज्ञा मानली व त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी तो अमालेकी लोकांविरुद्ध लढावयास गेला त्यावेळी मोशे, अहरोन व हूर हे टेकडीच्या माथ्यावर गेले. 11जेव्हा मोशे हात वर करी तेव्हा लढाईत इस्राएलाची सरशी होई; परंतु जेव्हा तो हात खाली करी तेव्हा पिछेहाट होई.

12काही वेळाने मोशेचे हात थकून गेले. [मोशे बरोबर असलेल्या लोकांना मोशेचे हात वर धरून ठेवण्यासाठी काही मार्ग शोधावयाचा होता] म्हणून त्यांनी मोशेला बसण्याकरिता मोठा दगड त्याच्या खाली ठेवला; नंतर एका बाजूने अहरोन व दुसऱ्या बाजूने हूर यांनी आधार देऊन मोशेचे हात सूर्य मावळेपर्यंत तसेच वर धरून ठेवले. 13तेव्हा यहोशवाने या लढाईत तलवारीच्या धारेने अमालेकांचा पराभव केला.

14नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, “लढाई विषयींच्या ह्या सर्व गोष्टी पुस्तकात लिहून ठेव म्हणजे येथे काय झाले त्याविषयी लोकांना आठवण राहील; आणि यहोशवाला सांग कारण मी अमालेकी लोकांना पृथ्वीतलावरून नक्की पूर्णपणे नष्ट करीन.”

15मग मोशेने एक वेदी बांधली व तिला “परमेश्वर माझे निशाण,” असे नांव दिले. 16आणि तो म्हणाला, “परमेश्वराच्या सिंहासनावर हात उचलल्यामुळे परमेश्वराचे अमालेकांशी पिढ्यान्‌पिढ्या युध्द होईल.”

## मोशेचा सासरा सल्ला देतो

18 मोशेचा सासरा इथ्रो, मिद्यानाचा याजक होता. मोशे व इस्राएल लोक यांना देवाने अनेक मार्गांनी मदत केली तसेच त्यांना त्याने मिसर देशातून सोडवून बाहेर आणले यासंबंधी इथ्रोने ऐकले; 2तेव्हा तो देवाच्या पर्वताजवळ म्हणजे होरेब किंवा सीनाय पर्वताजवळ, जेथे मोशेने तळ दिला होता तेथे मोशेला भेटावयास गेला इथ्रोने मोशेची बायको सिप्पोरा हिलाही बरोबर आणले; (सिप्पोरा मोशे बरोबर नव्हती कारण त्याने तिला माहेरी पाठवले होते.) 3इथ्रोने मोशेच्या दोन मुलांनाही बरोबर आणले.

पहिल्या मुलाचे नांव गेर्षोम होते' कारण त्याचा जन्म
झाला त्यावेळी मोशे म्हणाला होता, "मी या देशात परका
आहे." 4दुसऱ्या मुलाचे नांव एलीएजर असे होते, कारण
तो जन्मला तेव्हा मोशे म्हणाला होता, "माझ्या वडिलांचा
देव याने मला मदत केली व मला मिसरच्या राजाच्या
हातातून वाचविले." 5तेव्हा इथ्रो रानात देवाच्या पर्वताजवळ
म्हणजे सीनाय पर्वताजवळ जेथे मोशेने तळ दिला होता
तेथे मोशेची बायको सिप्पोरा व त्याची दोन मुले यांना
बरोबर घेऊन गेला.

6इथ्रो ने मोशेला निरोप पाठवला, "मी तुझा सासरा,
इथ्रो, तुझी बायको व तिची दोन मुले यांना घेऊन तुझ्याकडे
आलो आहे."

7तेव्हा मोशे आपल्या सासऱ्याला भेटावयास सामोरा
गेला; त्याने त्याच्यापुढे लवून त्याला नमन केले, आणि
त्याचे चुंबन घेतले. त्या दोघांनी एकमेकांची खुशाली
विचारली. नंतर ते अधिक बोलणे करावयास मोशेच्या
तंबूत गेले. 8परमेश्वराने इस्राएली लोकांसाठी जे जे केले
ते सर्व मोशेने इथ्रोस सांगितले. मिसर देशाचा राजा फारो
व त्याचे लोक ह्यांचे परमेश्वराने काय केले तसेच मिसरहून
प्रवास करताना काय काय संकटे आली व कसा त्रास
झाला आणि परमेश्वराने त्या सर्वांतून दरवेळी इस्राएल
लोकांना कसे वाचवले ती सर्व हकीकत मोशेने इथ्रोस
सांगितली.

9परमेश्वराने इस्राएल लोकांसाठी ज्या चांगल्या गोष्टी
केल्या त्या ऐकल्यावर आणि मिसरच्या लोकांपासून
परमेश्वराने इस्राएल लोकांना स्वतंत्र केले म्हणून इथ्रोला
फार आनंद झाला. 10तो म्हणाला,

"परमेश्वराची स्तुती असो कारण त्याने फारोच्या
तावडीतून व मिसरच्या लोकांपासून तुम्हाला स्वतंत्र केले
आहे.
11 परमेश्वर सर्व देवांहून महान आहे हे आता मला
कळाले, कारण इस्राएल लोकांपेक्षा स्वत:ला चांगले मानीत
असलेल्या इतर लोकांचे त्याने काय केले हे मला समजले."

12मग इथ्रोने देवाला यज्ञ व अर्पणे केली. नंतर अहरोन
व इस्राएल लोकांमधील वडीलधारी माणसे म्हणजे पुढारी
देवाची विशेष उपासना करावी म्हणून मोशेचा सासरा
इथ्रो याच्याबरोबर जेवावयास आले.

13दुसऱ्या दिवशी मोशेला लोकांचा न्यायनिवाडा
करण्याचे विशेष काम होते. लोक खूप असल्यामुळे त्यांना
दिवसभर मोशेसमोर उभे रहावे लागले.

14मोशेला इस्राएल लोकांचा न्यायनिवाडा करताना इथ्रोने
पाहिले तेव्हा त्याने त्याला विचारले, "तू असे का करीत
आहेस? तू एकटाच न्यायनिवाडा का करीत आहेस? आणि
लोक न्यायनिवाड्यासाठी दिवसभर तुझ्याकडे का येतात?"
15मोशे आपल्या सासऱ्यास म्हणाला, "आपल्या अडचणी
व आपले प्रश्न या संबंधी देवाचा काय निर्णय आहे ते
विचारण्यासाठी लोक माझ्याकडे येतात. 16लोकांचा काही
भांडणतंटा असेल तर ते माझ्याकडे येतात तेव्हा कोणत्या
माणसाचे म्हणणे खरे आहे हे मी ठरवितो. ह्याप्रमाणे मी
लोकांना देवाचे नियम व विधी यांचे शिक्षण देतो."

17परंतु मोशेचा सासरा त्याला म्हणाला, "हे तू करतोस
ते चांगले नाही. 18तुझ्या एकट्यासाठी हे काम फार आहे
त्यामुळे तू थकून जातोस व लोकही थकून जातात हे
काम तुला एकट्याला करवणार नाही. 19तू लोकांची
गाऱ्हाणी ऐकत असावेस व त्याचबरोबर त्यांसंबंधी देवाकडे
बोलतही रहावेस असा मी तुला सल्ला देतो, त्यात देव
तुझ्याबरोबर असो अशी मी प्रार्थना करतो. 20तू लोकांना
देवाचे नियम व विधी या संबंधी शिक्षण दे; आणि ते त्यांनी
मोडू नयेत अशी ताकीद त्यांना दे; लोकांनी आपल्या
जीवनात योग्य मार्गाने चालावे व त्यासाठी त्यांनी काय
करावे याविषयी त्यांना तू समजावून सांग. 21तू लोकांमधून
कर्तबगार देवाला भिणारे, व विश्वासू, पैसे खाऊन आपला
निकाल बदलून अन्याय न करणारे असे लोक निवडून
घे; त्यांना हजार लोकांवर, शंभर लोकावर, पन्नास
लोकावर आणि दहा लोकावर नायक म्हणून नेम. 22ह्या
नायक लोकांनी लोकांचा न्यायनिवाडा करावा; जर अगदी
महत्वाची बाब असेल तर तिचा न्यायनिवाडा करण्याकरिता
तो वाद नायकांनी तुझ्याकडे आणावा, परंतु साध्या
प्रकरणांसंबंधी त्यांनी स्वत: निर्णय द्यावेत. अशा प्रकारे
तुझे काम सोपे होईल तसेच तुझ्या कामात ते वाटेकरी
होतील. 23तू असे करशील व परमेश्वराची तशी इच्छा
असेल तर तुझे काम करीत राहणे तुला शक्य होईल,
आणि त्याचवेळी लोकांचे प्रश्न सुटून ते घरी जाऊ
शकतील."

24तेव्हा मोशेने इथ्रोच्या म्हणण्याप्रमाणे केले. 25त्याने
इस्राएल लोकांतून चांगले लोक निवडले आणि त्यांना
हजार हजार, शंभर शंभर पन्नास पन्नास व दहादहावर
नायक म्हणून नेमले. 26ते लोकांवर न्यायाधीश झाले.
लोक सतत नायकाकडे आपली गाऱ्हाणी आणू लागले व
मोशेला फार महत्वाच्या प्रकणांबद्दलच निकाल देण्याचे
काम करावे लागे.

27मग थोड्याच दिवसांनी मोशेने आपला सासरा इथ्रो
याला निरोप दिला आणि इथ्रो माघारी आपल्या घरी गेला.

## इस्राएलशी देवाचा पवित्र करार

19 मिसरमधून प्रवासास निघाल्यानंतर तिसऱ्या
महिन्यात इस्राएल लोक सीनायाच्या रानात
पोहोंचले. 2ते लोक रफीदीम सोडून सीनायच्या रानात
आले होते; त्यांनी होरेब म्हणजे सीनाय पर्वताजवळ आपला
तळ दिला. 3मग मोशे पर्वतावर देवाला भेटावयास गेला तो
पर्वतावर असताना देव त्याला म्हणाला, "तू या इस्राएल
लोकांना म्हणजे याकोबाच्या वंशजांना सांग, 4"मी माझ्या

शत्रूंचे काय करतो ते तुम्ही पाहिले आहे. मिसरच्या लोकांचे
मी काय केले आहे आणि गरुड पक्षी आपल्या पिल्लांना
सुरक्षित जागी जसा नेतो तसेच मिसरच्या लोकांच्या
तावडीतून सुरक्षितपणे तुम्हाला येथे आणले तेही तुम्ही
पाहिले आहे. 5म्हणून मी आता तुम्हाला सांगतो की तुम्ही
माझ्या आज्ञांचे व माझ्या कराराचे पालन करावे; असे
तुम्ही कराल तर तुम्ही खास माझे लोक व्हाल हे सर्व
जग माझे आहे परंतु त्यातील सर्व लोकांतून मी तुम्हाला
निवडून घेईन आणि तुम्ही खास माझे लोक व्हाल. 6तुम्ही
एक पवित्र राष्ट्र–याजक लोकांचे राज्य व्हाल' या सर्व
गोष्टी, मोशे, तू इस्राएल लोकांस सांग."
7तेव्हा मोशे पर्वतावरून खाली आला, व त्याने इस्राएल
मधील वडिलधाऱ्या माणसांना म्हणजे पुढाऱ्यांना एकत्र
बोलावले; परमेश्वराने त्याला आज्ञा केल्याप्रमाणे सर्व
गोष्टी त्याने त्यांना सांगितल्या; 8आणि सर्व लोकांनी
एकमुखाने उत्तर दिले; ते म्हणाले, "परमेश्वराने
सांगितलेल्या सर्व आज्ञा आम्ही पाळू."
मग मोशे पुन्हा पर्वतावर देवाला भेटावयास गेला आणि
लोकत्याच्या आज्ञा पाळतील असे त्याने देवाला सांगितले.
9आणि परमेश्वर मोशेला म्हणाला, "मी दाट ढगात येऊन
तुझ्याशी बोलेन आणि माझे तुझ्याबरोबरचे बोलणे सर्व
इस्राएल लोकांना ऐकू जाईल; मी हे ह्यासाठी करीन की
त्यामुळे तू सांगितलेल्या सर्व गोष्टींवर ते नेहमी विश्वास
ठेवतील."
मग मोशेने लोकांचे म्हणणे परमेश्वराला सांगितले
10परमेश्वर मोशेला म्हणाला, "आज आणि उद्या माझ्या
विशेष भेटीसाठी लोकांना पवित्र कर; त्यांनी कपडे स्वच्छ
धुवावेत, 11व तिसऱ्या दिवशी माझ्या भेटीसाठी तयार
राहावे कारण तिसऱ्या दिवशी परमेश्वर सीनाय पर्वतावर
उतरेल आणि सर्व लोक मला पाहतील. 12–13परंतु लोकांना
पर्वतापासून दूर राहाण्यास तू सांग; तेथे तू एक सीमारेषा
काढ आणि लोकांनी ती ओलांडू नये असे तू त्यांना बजावून
सांग; जर कोणा माणसाचा किंवा जनावराचा पर्वताला
स्पर्श झाला तर त्याला दगडाने किंवा बाणाने मारून टाकावे.
परंतु त्याला कोणीही स्पर्श करु नये. शिंगाचा आवाज
ऐकू येईपर्यंत लोकांनी थांबावे. तो आवाज ऐकल्यावर ते
पर्वत चढून जाऊ शकतील."
14मग मोशे पर्वतावरून खाली उतरला; तो लोकांकडे
गेला व देवाच्या भेटीसाठी त्याने त्यांना पवित्र केले. लोकांनी
आपले कपडे धुवून स्वच्छ केले.
15मग मोशे लोकांना म्हणाला, "तीन दिवस तुम्ही देवाची
भेट घेण्यासाठी तयार राहा. तो पर्यंत पुरुषांनी स्त्रियांना
स्पर्श करु नये."
16तीन दिवसानंतर पर्वतावर विजांचा लखलखाट व
गडगडाट झाला; पर्वतावर एक दाट ढग उतरला आणि
रणशिंगाचा फार मोठा आवाज झाला. तेव्हा छावणीत
राहाणारे सर्व लोक घाबरले. 17नंतर मोशेने लोकांना
छावणीतून बाहेर काढून देवाला भेटावयास पर्वताजवळच्या
जागी नेले. 18सीनाय पर्वत धुराने झाकून गेला. भट्टीतून
येणाऱ्या धुरासारखा धूर पर्वतातून वर आला. परमेश्वर
पर्वतावर अग्नीतून उत्तरला म्हणून असे झाले; आणि सर्व
सीनाय पर्वत थरथरु लागला. 19शिंगाचा आवाज मोठमोठा
होऊ लागला. मोशे देवाबरोबर जेव्हा जेव्हा बोलला तेव्हा
तेव्हा देवाने त्याला मेघगर्जनेसारख्या आवाजाने उत्तर दिले.
20याप्रमाणे परमेश्वर स्वर्गातून सीनाय पर्वताच्या
शिखरावर उतरला आणि त्याने मोशेला बोलावून आपल्या
बरोबर पर्वताच्या शिखरावर येण्यास सांगितले. तेव्हा मोशे
पर्वतावर गेला.
21परमेश्वर मोशेला म्हणाला, "तू खाली जा आणि
लोकांना बजावून सांग की त्यांनी माझ्याजवळ येऊ नये व
माझ्याकडे बघू नये. जर ते तसे करतील तर बरेच जण
मरतील. 22तसेच याजक लोकांनाही सांग की माझ्या
भेटीस माझ्याजवळ येताना आपणांस पवित्र करून यावे;
तसे केले नाही तर मी त्यांना शिक्षा करीन."
23मोशेने परमेश्वराला सांगितले, "परंतु लोक पर्वतावर
येऊ शकणार नाहीत, कारण तू स्वत: आम्हाला एक
सीमारेषा आखावयास व लोकांनी ती रेषा ओलांडून पवित्र
भूमिवर येऊ नये असे सांगितलेस."
24परमेश्वर त्याला म्हणाला, "तू खाली लोकांकडे जा
व मागे येताना अहरोनाला तुझ्याबरोबर परत आण, परंतु
याजक किंवा इतर लोकांना इकडे येऊ देऊ नको; ते
जर माझ्याजवळ येतील तर मी त्यांना शिक्षा करीन."
25तेव्हा मोशे लोकांकडे खाली गेला व त्याने त्यांना या
गोष्टी सांगितल्या.

## दहा आज्ञा

20 मग देव म्हणाला,
2"मी याव्हे तुझा प्रभू, तुझा देव आहे. तुम्ही
मिसरमध्ये गुलाम होता तेव्हा मीच तुम्हाला तेथून
गुलामगिरीतून सोडवून आणले.

3"माझ्या शिवाय इतर कोणत्याही दैवतांची तू
उपासना करु नयेस.
4"तू आपल्यासाठी कोरीव मूर्ती करु नकोस; वर
आकाशातील, खाली पृथ्वीवरील व पृथ्वीखालच्या
जलातील कशाचीही प्रतिमा करु नकोस; 5त्यांची
उपासना करू नको; किंवा त्यांची सेवा करु नकोस;
कारण मी परमेश्वर तुझा देव आहे;* मी ईर्ष्यावान
देव आहे, जे माझ्याविरुद्ध पाप करतात, माझा द्वेष
करतात ते माझे शत्रू बनतात; मी त्यांना शिक्षा करीन;
मी त्यांच्या मुलांना तिसऱ्या चौथ्या पिढीपर्यंत
वडिलांच्या अपराधाबद्दल शिक्षा करतो; 6परंतु जे

**तुझा देव आहे** म्हणजे "एलकाना."

माझ्यावर प्रेम करतात व माझ्या आज्ञा पाळतात
अशांच्या हजारो पिढ्यांवर मी दया करतो.

7"परमेश्वर देवाचे नांव तू व्यर्थ घेऊ नकोस;
परमेश्वराच्या नांवाचा उपयोग तू अयोग्य गोष्टींसाठी
करु नकोस; जर कोणी तसे करील तर तो दोषी
ठरेल आणि परमेश्वर त्याला निर्दोष ठरविणार नाही.

8"शब्बाथ दिवस हा पवित्र दिवस म्हणून पाळण्याची
आठवण ठेव; 9आठवड्यातील सहा दिवस तू तुझे
कामकाज करावेस; 10परंतु सातवा दिवस तुझा देव
परमेश्वर याच्या सन्मानासाठी विसाव्याचा दिवस आहे
म्हणून त्या दिवशी तू, तुझे मुलगे तुझ्या मुली, तुझे
गुलाम व तुझ्या गुलाम स्त्री यांनी तसेच तुझी गुरेढोरे
व तुझ्या गावात राहाणाऱ्या परकीयांनीही कोणतेही
कामकाज करु नये;

11कारण परमेश्वराने सहा दिवस काम करून
आकाश, पृथ्वी, समुद्र व त्यांतील सर्व काही उत्पन्न
केले आणि त्यानंतर सातव्या दिवशी विसावा घेतला;
याप्रमाणे परमेश्वराने शब्बाथ दिवस हा विसाव्याचा
विशेष दिवस म्हणून आशीर्वाद देऊन तो पवित्र केला
आहे.

12"तू आपल्या बापाचा व आपल्या आईचा मान
राख म्हणजे त्यामुळे परमेश्वर तुझा देव जो देश
तुला देत आहे त्या देशात तुला दीर्घायुष्य लाभेल.

13"कोणाचाही खून करु नकोस.

14"व्यभिचार करु नकोस.

15"चोरी करु नकोस.

16"तू आपल्या शेजाऱ्याविरुध्द खोटी साक्ष देऊ
नकोस.

17"तू आपल्या शेजाऱ्याच्या घराचा लोभ धरु
नकोस; त्याच्या बायकोचा लोभ धरु नकोस; त्याचा
गुलाम, त्याची स्त्री गुलाम, बैल, गाढव, किंवा त्याच्या
मालकीचे जे काही असेल त्या कशाचाही लोभ धरु
नकोस."

## लोकांना देवाची भीती वाटते

18ह्या वेळेपर्यंत तेथील लोकांनी पर्वतावरील ढगांचा
गडगडाट ऐकला, विजांचा चकचकाट पाहिला व पर्वतातून
धूर वर चढताना पाहिला; तेव्हा लोक घाबरले व भीतीने
त्यांचा थरकांप झाला. ते पर्वतापासून दूर उभे राहिले.
19नंतर लोक मोशेला म्हणाले, "तुला जर आमच्याशी
बोलावयाचे असेल तर तू खुशाल बोल; आम्ही ऐकू;
परंतु कृपा करून देवाला आमच्याशी बोलू देऊ नकोस;
तो बोलेल तर आम्ही मरुन जाऊ."

20मग मोशे लोकांना म्हणाला, "भिऊ नका! कारण
परमेश्वर तुम्हावर प्रीती करतो हे दाखविण्यासाठी आणि
तुम्ही त्याचा मान राखून त्याचे भय धरावे व पाप करु
नये हे दाखविण्यासाठी तो आला आहे." 21नंतर मोशे,
ढगांच्या दाट अंधारात, जेथे देव होता तेथे त्याला भेटावयास
गेला, तोपर्यंत लोक पर्वतापासून लांब उभे राहिले. 22मग
परमेश्वर मोशेला म्हणाला, "तू इस्राएल लोकांना असे
सांग, 'मी तुमच्याशी आकाशातून बोललो हे तुम्ही प्रत्यक्ष
पाहिले आहे. 23माझ्या स्पर्धेत तुम्ही सोन्या चांदीच्या मूर्ती
करु नये असे खोटे देव तुम्ही करता कामा नये."

24"माझ्यासाठी मातीची एक विशेष वेदी बांधा आणि
तिच्यावर आपली शेरडेमेंढरे व गुरेढोरे ह्यांची होमार्पणे व
शांत्यर्पणे वाहा; माझी आठवण व्हावी म्हणून मी सांगतो
त्या प्रत्येक जागी हे करा मग मी येईन व तुम्हाला आशीर्वाद
देईन. 25तुम्ही जर दगडाची वेदी बांधणार असाल तर ती
चिऱ्याच्या दगडाची नसावी; जर वापरावयाचा दगड
चिऱ्याचा बनविण्यासाठी तू त्याला कसले हत्यार लावशील
तर ती वेदी मी मान्य करणार नाही. 26आणि वेदीकडे
जाण्यासाठी तुम्ही पायऱ्या करु नका कारण पायऱ्यांवरून
वेदीकडे चढून जाताना लोकांना तुमची नग्नता दिसेल.'"

## दूसरे नियम व आज्ञा

21 मग देव मोशेला म्हणाला, "जे इतर नियम तू
इस्राएल लोकांना लावून द्यावेत ते हे:

2"तुम्ही जर एखादा इस्राएली गुलाम विकत घेतला तर
त्याने फक्त सहा वर्षे काम करावे; सहा वर्षानंतर सातव्या
वर्षी तो मुक्त होऊन स्वतंत्र होईल; भरपाई म्हणून तो
तुझे काही देणे लागणार नाही. 3जर तो सडा आला असेल
तर त्याने मुक्त होताना एकटेच निघून जावे; परंतु जर तो
त्याची बायको घेऊन आला असेल तर त्याने त्याच्या
बायकोला घेऊन जावे. 4जर तो सडा आला असेल तर
त्याच्या मालकाने त्याला बायको करून द्यावी; तिला मुले
किंवा मुली झाल्या असतील तर त्याची बायको व तिची
मुलेबाळे मालकाच्या मालकीची राहतील; आपली सेवा
पूर्ण करताच त्याला एकट्याला मुक्त केले जाईल.

5"पण जर कदाचित आपल्या मालकाबरोबर राहाण्याचे
तो ठरविल तर मग 'मी माझ्या मालकावर व माझ्या
बायकोमुलांवर प्रेम करतो, मी मुक्त होऊ इच्छित नाही,
मी मालकाकडेच राहातो,' असे त्याने म्हटले पाहिजे.
6असे झाले तर त्याच्या मालकाने त्याला देवासमोर अथवा
न्यायधीशासमोर आणावे; त्याने त्याला दाराजवळ किंवा
दरवाजाच्या लाकडी चौकटीजवळ न्यावे आणि अरीच्या
अणकुचीदार टोकाने त्याचा कान टोचावा; मग तो गुलाम
त्या मालकाची आयुष्यभर चाकरी करील.

7"एखाद्या माणसाने आपली मुलगी गुलाम म्हणून
विकण्याचे ठरविले तर तिच्या मुक्ततेचे नियम
पुरुषगुलामाच्या मुक्तते सारखे नाहीत. 8जर मालक
तिच्यावर खूष नसेल तर त्याने तिला परत तिच्या बापाला
विकावे; जर त्याने तिच्याबरोबर लग्न करावयाचे कबूल
केले असेल तर तिला परक्याला विकण्याचा त्याला
अधिकार नाही. 9तिला आपल्या मुलाशी लग्न करून

देण्यासाठी ठेवून घ्यावयाचे असेल तर त्याने तिला गुलामस्त्रीप्रमाणे नव्हे तर मुलीप्रमाणे वागवावे.

10“मालकाने दुसऱ्या स्त्रीशी लग्न केले तर त्याने पहिल्या बायकोस अन्नवस्त्र कमी पडू देऊ नये तसेच तिला लागणाऱ्या इतर वस्तू देणे व तिच्याशी बायको या नात्याने व्यवहार करणे चालू ठेवावे कारण तसा तिला त्याच्याविरुद्ध हक्क आहे. 11ह्या तीन गोष्टी त्याने तिच्यासाठी कराव्यात आणि त्या केल्या नाहीत तर मग ती त्याला काही खंडणी न देता मुक्त होईल; ती त्याचे काही देणे लागणार नाही.

12“कोणी एखाद्याला मारले व त्यामुळे तो मेला तर त्याला अवश्य जिवे मारावे. 13परंतु जाणूनबुजून न ठरविता, अपघाताने एखाद्याचे हातून कोणी मेले तर देवाने हे घडू दिले असे समजावे. लोक सुरक्षिततेसाठी जाऊ शकतील अशा काही खास जागा मी निवडीन तो माणूस आपल्या सुरक्षिततेसाठी मी निवडलेल्या विशेष ठिकाणापैकी एके जागी पळून जाऊ शकेल.

14परंतु जर कोणी एकाने जाणूनबुजून व ठरवून रागाने किंवा द्वेषाने दुसऱ्या माणसाला ठार मारले तर मात्र त्याला शिक्षा करावी; त्याला वेदीपासून खेचून आणून ठार मारावे.

15“जो माणूस आपल्या आईबापास मारहाण करील त्याला अवश्य ठार मारावे. 16जो कोणी एखाद्याला चोरून नेऊन गुलाम म्हणून विकेल किंवा गुलाम म्हणून स्वत:कडे ठेवेल तर त्याला अवश्य जिवे मारावे.

17“जो कोणी आपल्या बापाला किंवा आईला शिव्याशाप देईल त्या माणसाला अवश्य जिवे मारावे.

18“दोघे जण भांडत असताना एकाने दुसऱ्याला दगड किंवा ठोसा मारला आणि त्यामुळे जर दुसरा मेला नाही तर मारणाऱ्याला जिवे मारु नये. 19जर मारलेल्या माणसाला काही दिवस बिछान्यात पडून राहावे लागले तर मारणाऱ्याने त्याला त्याच्या वाया गेलेल्या वेळेबद्दल नुकसान भरपाई द्यावी व तो माणूस बरा होईपर्यंत त्याच्यासाठी लागणारा खर्च द्यावा.

20“काही वेळा लोक आपल्या गुलामाला किंवा गुलाम स्त्रीला छडीने मारहाण करतात त्यामुळे जर तो गुलाम किंवा ती गुलाम स्त्री मेली तर त्यांना मारणाऱ्याला अवश्य शिक्षा करावी; 21आणि जर तो गुलाम किंवा गुलाम स्त्री मेली नाही आणि काही दिवसांनी तो किंवा ती बरी झाली तर त्यांना मारणाऱ्याला खुना बद्दलची शिक्षा होणार नाही कारण मालकाने त्यांना किंमत देऊन विकत घेतले आहे; आणि ते त्याचे गुलाम आहेत.

22“दोघे जर मारामारी करीत असतील व त्यांचा धक्का एखाद्या गरोदर बाईला लागला आणि त्या बाईचा गर्भपात झाला पण तिला इतर कोणतीही इजा झाली नाही तर ज्याचा धक्का तिला लागला तिचा नवरा न्यायाधीशांच्या सल्ल्याने जो दंड ठरवील तो दंड त्याने द्यावा. 23परंतु त्या बाईला जास्त इजा झाली असेल तर त्या माणसाला शिक्षा करावी; जर एखाद्या माणसाला ठार मारण्यात आले असेल तर त्या कृत्याला जबाबदार असणाऱ्या माणसाला ठार मारावे. म्हणजे जिवाबद्दल जीव, 24डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात, हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय, 25चटक्याबद्दल चटका, ओरखड्याबद्दल ओरखडा, व जखमेबद्दल जखम असा बदला घ्यावा.

26“जर एखाद्याने आपल्या गुलामाच्या किंवा गुलाम स्त्रीच्या डोळ्यावर मारल्यामुळे त्याचा किंवा तिचा डोळा गेला तर त्या मालकाने त्याला मुक्त करून जाऊ द्यावे कारण त्याने आपला डोळा देऊन खंडणी भरली आहे. गुलाम किंवा गुलामस्त्रीला हा नियम सारखाच लागू आहे. 27एखाद्या मालकाने आपल्या गुलामाच्या किंवा गुलाम स्त्रीच्या तोंडावर मारल्यामुळे त्याचा किंवा तिचा दात पडला तर मारणाऱ्याने गुलामाला मुक्त करून जाऊ द्यावे कारण त्याने आपला दात देऊन खंडणी भरली आहे. गुलाम किंवा गुलामस्त्रीला हा नियम सारखाच लागू आहे.

28“एखाद्याच्या बैलाने एखाद्या पुरुषाला किंवा बाईला हुंदडून जिवे मारले तर त्या बैलास दगडमार करून जिवे मारावे, त्या बैलाचे मांस कोणी खाऊ नये, परंतु त्या बैलाचा मालक दोषी ठरणार नाही. 29परंतु त्या बैलाने पूर्वी काहीजणांना मारले असेल आणि त्याविषयी त्याच्या मालकाला जर सूचना दिली असेल तर मग तो मालक दोषी आहे कारण त्याने त्या बैलाला बांधून ठेवले नाही किंवा गोठ्यात त्याच्या जागी बंद करून ठेवले नाही आणि म्हणून मोकळा ठेवल्यामुळे त्या बैलाने जर कोणाला जिवे मारले तर त्याबद्दल त्याचा मालक दोषी आहे, त्या बैलाला धोंडमार करुन जिवे मारावे व त्याच्या मालकासही जिवे मारावे. 30परंतु मेलेल्या माणसाच्या कुटुंबातील लोकांना त्या मालकाच्या जिवाबद्दल खंडणी पाहिजे असल्यास त्या बैलाच्या मालकास जिवे मारू नये पण त्याने आपला जीव वाचविण्यासाठी न्यायाधीश ठरवील ती खंडणी द्यावी.

31“बैलाने एखाद्या मुलाला किंवा मुलीला हुंदडून जिवे मारले तर त्याबाबतीत हाच नियम लागू करावा. 32एखाद्या बैलाने जर गुलामाला हुंदडून ठार मारले तर त्या बैलाच्या मालकाने त्या गुलामाच्या मालकाला चांदीची तीस नाणी* द्यावी आणि त्या बैलालाही दगडाने जिवे मारावे; गुलाम किंवा गुलाम स्त्री म्हणजे गुलाम पुरुष किंवा स्त्री यांना हा नियम सारखाच लागू राहील.

33“एखाद्या माणसाने विहिरीवरचे झाकण काढून घेतले असेल किंवा त्याने खड्डा खणून त्यावर झाकण ठेवले नसेल आणि जर एखाद्याचे जनावर म्हणजे बैल, गाढव वगैरे त्या खड्ड्यात पडून मेले तर खड्ड्याचा मालक दोषी आहे; 34त्याने त्या जनावराच्या मालकाला भरपाई म्हणून त्याची किंमत द्यावी आणि ते मेलेले जनावर घेऊन जावे.

35“जर एखाद्याच्या बैलाने दुसऱ्या बैलाला हुंदडून मारून टाकले तर जिवंत राहिलेला बैल विकून आलेले पैसे

---

**चांदीची तीस नाणी** म्हणजे नवीन गुलामाची किंमत.

दोघा मालकांनी निम्मे निम्मे वाटून घ्यावेत आणि मेलेला
बैलही अर्धा अर्धा वाटून घ्यावा. 36परंतु त्या बैलाने पूर्वी
इतर बैलांना हुंदडून जिवे मारले असेल तर आपल्या
मारक्या बैलाला मोकळे सोडल्याबद्दल मालक दोषी ठरेल;
त्याने बैलाबद्दल बैल द्यावा व मेलेला बैल घ्यावा.

22 “एखाद्याने बैल किंवा मेंढरू चोरले तर त्याला
कशी शिक्षा करावी? एखाद्याने बैल किंवा मेंढरू
चोरून ते कापले किंवा विकून टाकले तर त्याला ते
परत देणे शक्य होणार नाही म्हणून त्याने चोरलेल्या एका
बैलाबद्दल पाच बैल व एका मेंढराबद्दल चार मेंढरे द्यावीत;
चोरीबद्दल त्याने अशी भरपाई करावी. 2जर चोराजवळ
स्वत:चे काही नसेल तर चोरीच्या भरपाईसाठी त्याला
गुलाम म्हणून विकावे. 3परंतु चोराजवळ बैल, गाढव,
मेंढरू वगैरे जिवंत सापडले तर त्याने चोरलेल्या एकेका
प्राण्याबद्दल दोन दोन द्यावी.

4“जर एखादा चोर रात्री घरफोडी करताना सापडला व
ठार मारला गेला तर त्याच्या मरणाबद्दल कोणीही दोषी
ठरणार नाही; पण असे दिवसाढवळ्या घडले तर त्याला
मारणारा खुनाबद्दल दोषी ठरेल.

5“कोणी आपले जनावर आपल्या शेतात किंवा
द्राक्षमळ्यात चरण्यासाठी मोकळे सोडले व ते भटकत
जर दुसऱ्याच्या शेतात किंवा द्राक्षमळ्यात जाऊन चरले
तर आपल्या शेतातील किंवा द्राक्षमळ्यातील चांगल्यात
चांगल्या पिकातून त्याने त्याचे नुकसान भरून द्यावे.

6“जर कोणी आपल्या शेतातील कांटेरी झुडुपे
जाळण्यासाठी आग पेटवली व ती भडकल्यामुळे
शेजाऱ्याच्या शेतातील धान्याच्या सुड्या किंवा शेतातील
उभे पीक जळाले तर आग पेटवणाऱ्याने शेजाऱ्याकडे
नुकसान भरून दिले पाहिजे.

7“एखाद्याने आपल्या शेजाऱ्याकडे आपला पैसा किंवा
काही चीजवस्तू ठेवण्यासाठी दिल्या आणि जर ते सर्व
शेजाऱ्याच्या घरातून चोरीस गेले तर तुम्ही चोर शोधून
काढण्याचा प्रयत्न करावा आणि चोर सापडला तर त्याने
चोरीस गेलेल्या वस्तूच्या किंमतीच्या दुप्पट किंमत भरून
द्यावी. 8परंतु जर चोर सापडला नाही तर घरमालकाला
देवासमोर किंवा न्यायाधीशासमोर न्यावे म्हणजे मग त्याने
स्वत:च त्या वस्तू चोरल्याचा दोष त्याच्यावर येतो की
काय याचा न्याय, देव किंवा न्यायाधीश करील.

9“जर हरवलेला एखादा बैल, किंवा एखादे गाढव किंवा
मेंढरू किंवा वस्त्र यांच्या संबंधी दोन माणसात वाद उत्पन्न
झाला व एकजण म्हणाला, ‘हे माझे आहे;’ आणि दुसरा
म्हणाला, ‘नाही, ते माझे आहे;’ तर त्या दोघांनी देवासमोर
जावे; त्यातून कोण दोषी आहे, हे देव ठरवील; मग दोषी
माणसाने दुसऱ्याला त्या वस्तूंच्या किंमतीच्या दुप्पट दाम
भरून द्यावे.

10“एखाद्याने आपले गाढव, बैल, किंवा मेंढरु थोडे दिवस
सांभाळण्याकरता आपल्या शेजाऱ्याकडे दिले परंतु ते जर
मेले, किंवा जखमी झाले किंवा कोणाचे लक्ष नसताना
कोणी ते चोरून नेले तर तुम्ही काय कराल? 11त्या
शेजाऱ्याने ते चोरले नसेल तर त्याने परमेश्वरापुढे तसे
शपथेवर सांगावे; तसे सांगितले तर त्या जनावराच्या
मालकाने त्याच्या शपथेवर विश्वास ठेवावा; मग त्या
शेजाऱ्याला जनावराची किंमत भरून द्यावी लागणार नाही.
12परंतु जर शेजाऱ्यानेच ते जनावर चोरले असेल तर
त्याने त्याची किंमत मालकाला भरून द्यावी. 13जर ते
जनावर जंगली जनावरांनी मारून टाकले असेल तर
शेजाऱ्याने ते पुराव्यादाखल आणून दाखवावे म्हणजे त्याला
मारल्या गेलेल्या जनावरासाठी मालकास भरपाई भरून
द्यावी लागणार नाही. 14जर कोणी आपल्या शेजाऱ्याकडून
त्याचे जनावर घेतले तर त्याबद्दल तो जबाबदार राहील;
त्या जनावराला जर काही इजा झाली किंवा ते मेले तर
मग शेजाऱ्याने त्याच्या मालकाला त्याची किंमत भरून
द्यावी; मालक तेथे हजर नसताना हे घडले म्हणून त्याला
शेजारी जबाबदार आहे. 15जर त्यावेळी तेथे जनावराजवळ
मालक असेल तर मग भरपाई करावी लागणार नाही;
किंवा ते जनावर भाड्याने घेतले असले तर मग ते जरी
जखमी झाले किंवा मेले तर त्याच्या भाड्याचे पैसे त्याच्या
भरपाईसाठी पुरेसे होतील.

16“जर एखाद्या माणसाने एखाद्या मागणी न झालेल्या
शुद्ध कुमारिकेला भ्रष्ट केले तर त्याने तिच्या बापाला
नियमाप्रमाणे पूर्ण देज देऊन तिच्याशी लग्न केलेच पाहिजे;
17त्या कुमारिकेचा बाप त्याला ती लग्न करावयासाठी
देण्यास तयार नसला तर भ्रष्ट करणाऱ्याने तिच्या बापाला
तिच्याबद्दल पूर्ण देज द्यावे.

18“कोणत्याही स्त्रीला चेटूक करु देऊ नये कोणत्याही
चेटकिणीला जिवंत ठेवू नये.

19“कोणालाही पशूबरोबर शारीरिक संबंध ठेवू देऊ
नयेत पशुगमन करणाऱ्यास अवश्य जिवे मारावे.

20“कोणा माणसाने खोट्या दैवताला अर्पण वाहिले तर
त्याला अवश्य जिवे मारावे; परमेश्वर हाच एक देव आहे
आणि म्हणून तू त्यालाच अर्पणे वाहावीत.

21“तुमच्या देशात परका किंवा उपरा कोणी असला
तर त्याला तुम्ही फसवू नये किंवा त्याचा छळ करु नये;
कारण पूर्वी तुम्ही देखील मिसर देशात परके किंवा उपरे
होता याची आठवण ठेवा. 22विधवा किंवा अनाथ यांना
तुम्ही कधीही त्रास देऊ नये; 23तुम्ही जर त्यांना त्रास
दिला तर ते मला समजेल; त्यांच्या दु:खाच्या व त्रासाच्या
प्रार्थना मी ऐकेन; 24व माझा राग तुम्हावर भडकेल व मी
तुम्हाला तलवारीने मारून टाकीन म्हणजे मग तुमच्या
बायका विधवा व तुमची मुले पोरकी होतील.

25“माझ्या एखाद्या गरीब इस्राएल माणसाला तुम्ही उसने
पैसे दिले तर त्याबद्दल तुम्ही व्याज आकारु नये व पैसे
लवकर परत करण्यासाठी त्याच्याकडे तगादा लावू नये.
26कोणी तुझ्याकडे पैसे मागितले व ते परत करण्याची

हमी म्हणून आपले पांघरून तुझ्याजवळ गहाण ठेवण्यास
दिले तर दिवस मावळण्याआधी तू त्याचे पांघरुन त्याला
परत करावे; 27जर त्याला पांघरावयास दुसरे काही
नसेल तर रात्री झोपताना त्याला थंडी वाजेल आणि
अशा वेळी तो माझा धावा करेल तेव्हा मी त्याची प्रार्थना
ऐकेन कारण मी दयाळू आहे.

28"तुम्ही आपल्या देवाला किंवा लोकनायकांना शाप
देऊ नये.

29"हंगामाच्या वेळी तुमच्या पहिल्या धान्यातून काही व
फळफळांचा काही रस मला दान करावा, हंगामाच्या
वर्षाच्या शेवटापर्यंत थांबू नये.

"तू तुझा प्रथम जन्मलेला मुलगा मला द्यावा; 30तसेच
प्रथम जन्मलेले वासरु (नर) मेढे, यांना जन्मल्यापासून
सात दिवस त्यांच्या आईजवळ ठेवावे व आठव्या दिवशी
ते मला द्यावेत.

31"तुम्ही माझे विशेष निवडलेले व पवित्र लोक आहात
म्हणून क्रूर पशूंनी मारून फाडून टाकलेल्या कोणत्याही
जनावरांचे मांस तुम्ही खाऊ नये; ते कुत्र्यांना घालावे

## सर्वांकरिता न्याय

23 "इतर लोकांविरुद्ध खोट्या अफवा पसरवू नका;
जर तुम्हाला कोर्टात साक्ष द्यावयाची असेल तर
खोटे बोलणाऱ्या दुष्ट माणसाच्या मदतीसाठी खोटी साक्ष
देण्यात सहभागी होऊ नका.

2"सर्वजण एखादी गोष्ट करतात म्हणून तुम्हीही ती
खरी मानून करु नका. जर एखादा जनसमूह चुकीची
गोष्ट करीत असेल तर तुम्ही त्याच्यांत सामील होऊ
नका; तुम्हीही चुकीची गोष्ट करावी म्हणून त्यांनी तुमचे
मन वळविण्याचा प्रयत्न केला तरी त्यांचे मुळीच ऐकू
नका; तुम्ही तर जे योग्य व न्याय्य आहे तेच करावे.

3"एखाद्या गरीब माणसाचा न्याय होताना, दया येऊन
वाईट वाटल्यामुळे काही जण त्याची बाजू उचलून धरतील,
परंतु त्याची बाजू खरी असल्याशिवाय तुम्ही तसे करु
नये.

4"जर तुम्हाला एखादा हरवलेला बैल किंवा एखादे
गाढव दिसले तर त्याचा मालक तुमचा शत्रू असला तरी
तुम्ही ते त्याच्या मालकाकडे नेऊन सोडावे.

5"जास्त ओझ्याच्या भारामुळे एखाद्या जनावराला चालता
येत नसल्याचे तुम्ही पाहिले तर ते जनावर तुमच्या शत्रूचे
असले तरी तुम्ही थांबून त्या जनावराला मदत करावी.

6"तुम्ही एखाद्या गरीब माणसावर अन्याय होऊ देऊ
नका; त्या गरीबाचा न्याय इतर कोणत्याही सामान्य
माणसासारखाच होऊ द्यावा.

7"कोणाला दोष देण्याअगोदर फार काळजीपूर्वक विचार
करा; कोणावरही खोटे दोषारोप करु नका; एखाद्या निष्पाप
वा निरपराधी माणसाला मरणाची शिक्षा होऊ देऊ नये;
जो कोणी निरपराधी माणसाला ठार मारतो तो दुष्ट आहे;
अशा दुष्टास मी कधीच क्षमा करणार नाही.

8"एखादा अपराधी माणूस, खोटी साक्ष देण्याकरता
तुम्हाला लाच देण्याचा प्रयत्न करील, तर ती तुम्ही मुळीच
घेऊ नये; लाच घेतल्यामुळे न्यायाधीश आंधळे बनतात;
त्यांना सत्य दिसत नाही आणि अशा लाचलुचपतीमुळे
चांगले सज्जन लोकही खोटे बोलू लागतात.

9"तुम्ही परक्याला कधीही छळू नये; परक्याला कसे
वाटते हे तुम्हाला चांगले माहीत आहे कारण तुम्ही देखील
एकेकाळी मिसरदेशात परके होता.

## विशेष सुट्ट्यां

10"सहा वर्षे जमिनीची मशागत करा; पेरणी करा;
धान्य पिकवा; चांगला हंगाम येऊ द्या. 11परंतु सातव्या
वर्षी जमीन पडीक ठेवा; सातवे वर्ष हे जमिनीसाठी खास
विसाव्या वर्ष ठेवा. त्यावर्षी शेतात काहीही पेरू नये. जर
शेतात काही उगवले तर ते गरीबांना घेऊद्या; व राहिलेले
वनपशूंना खाऊ द्या; तुमचे द्राक्षमळे व जैतुनाची बने
यांच्या बाबतीतही असेच करावे.

12"तुम्ही सहा दिवस काम करावे, व सातव्या दिवशी
विसावा घ्यावा; त्यामुळे तुमच्या गुलामांना व इतर
कामकऱ्यांनाही विसावा मिळेल व त्यांना मोकळे मोकळे
वाटेल; तुमच्या बैलांना व गाढवानांही विसावा मिळेल.

13"हे सर्व नियम तुम्ही अवश्य व कटाक्षाने पाळावेत;
इतर दैवतांची उपासना करु नका; त्यांची नांवेही तुमच्या
तोंडाने उच्चारू नका.

14"दरवर्षी तुम्हाला तीन विशेष सुट्ट्या असतील; ह्या
सुट्ट्यांच्या दिवसात तुम्ही माझी उपासना करण्याकरता
विशेष ठिकाणी तुम्ही माझ्याकडे यावे. 15पहिली सुट्टी
बेखमीर भाकरीच्या सणाची होय. मी आधी आज्ञा
दिल्याप्रमाणे तुम्ही हा सण पाळावा; त्यात सात दिवस खमीर
न घातलेली भाकर तुम्ही खावी; हा सण तुम्ही अबीब
महिन्यात पाळावा, कारण याच महिन्यात तुम्ही मिसरमधून
बाहेर निघून आला; या सणाच्या वेळी प्रत्येक माणसाने
माझ्यासाठी अर्पण आणावे.

16"दुसरी सुट्टी साधारणपणे उन्हाळ्याच्या सुरवातीस
असेल; यावेळी तुम्ही शेतात पेरलेल्या पहिल्या पिकाच्या
कापणीचा किंवा हंगामाचा सण पाळावा.

तिसरी सुट्टी 'मंडपाचा सणाच्या' वेळी असेल–हा सण
वर्षाच्या अखेरीस म्हणजे सुगीच्या दिवसात जेव्हा तुम्ही
शेतातील धान्य गोळा करता तेव्हा पाळावा.

17"अशा रीतीने वर्षातून तीन वेळा माझ्या उपासनेच्या
विशेष ठिकाणी तुम्ही सर्वांनी माझ्याकडे म्हणजे याव्हे
कडे म्हणजेच आपल्या प्रभूकडे यावे.

18"तुम्ही यज्ञपशूचे रक्त मला अर्पण करावयाचे वेळी
खमीर घातलेल्या भाकरीसोबत अर्पण करु नये; आणि

मला अर्पण केलेल्या यज्ञपशूची चरबी दुसऱ्या दिवसापर्यंत
राहू देऊ नये.
19“हंगामाच्या वेळी जेव्हा तुम्ही धान्य गोळा करता तेव्हा
त्या प्रत्येक प्रथम उपजातील उत्तम तुम्ही आधी
परमेश्वराच्या मंदिरात आणावे
“करडू त्याच्या आईच्या दुधात शिजवून खाऊ नये.”

## देव इस्राएलला त्यांचा देश घेण्यासाठी मदत करतो

20देव म्हणाला, “मी एका दूताला तुमच्याकडे पाठवीत
आहे तो तुमच्यापुढे चालून, मी तुमच्यासाठी जे ठिकाण
तयार केले आहे तेथे तुम्हांस घेऊन जाईल; तो तुमचे
संरक्षण करील. 21तुम्ही त्याच्या आज्ञा पाळा आणि त्याच्या
मागे चाला; त्याच्याविरुद्ध बंड करु नका. तुम्ही त्याच्या
विरुद्ध काही चुकीच्या गोष्टी कराल तर तो तुम्हांला क्षमा
करणार नाही; माझे सामर्थ्य त्याच्यापाशी आहे. 22तो जे
जे सांगेल ते ते सर्व तुम्ही ऐकले पाहिजे; मी सांगतो ते सर्व
तुम्ही केले पाहिजे असे तुम्ही कराल तर मी तुम्हांबरोबर
राहीन; मी तुमच्या सर्व शंत्रूचा शत्रू व विरोधकांचा विरोधक
होईन.”
23देव म्हणाला, “माझा दूत तुमच्यापुढे चालून, अमोरी,
हित्ती, परिज्जी, कनानी, हिव्वी व यबूसी अशा
निरनिराळ्या लोकांच्या देखत त्या देशात तुम्हाला घेऊन
जाईल.
24“परंतु या सर्व लोकांच्या दैवतांची पूजा करु नका;
त्यांना नमन करु नका; त्यांच्या चालीरीतीप्रमाणे तुम्ही
कधीही वागू नये; त्यांच्या मूर्तीचा तुम्ही नाश करावा,
आणि त्यांच्या मूर्तीच्या स्मारकांचे दगड व स्तंभ तोडून
फोडून टाकावे. 25तुम्ही आपला देव परमेश्वर याचीच
उपासना करावी; तुम्ही असे कराल तर माझ्या कृपेने
तुम्हाला भरपूर अन्नपाणी मिळेल मी तुमच्या मधून रोगराई
काढून टाकीन. 26तुमच्या सर्व स्त्रिया मुलेबाळे प्रसवतील
कोणीही वांझ असणार नाही; जन्म देताना त्यांचे एकही
बाळ मरणार नाही. आणि मी तुम्हाला दीर्घायुषी करीन.
27“तुम्ही जेव्हा तुमच्या शत्रूविरुद्ध लढाल तेव्हा मी
माझे महान सामर्थ्य तुमच्यापुढे पाठवीन–माझ्या महान
सामर्थ्याची नुसती बातमी तुमच्या पुढे जाईल आणि तुमचे
शत्रू घाबरून जातील; त्यांचा पराभव करण्यास मी तुम्हास
मदत करीन; तुमच्याविरुद्ध लढणाऱ्या सैन्यात रणांगणावर
गोंधळ उडेल व ते लोक पळून जातील. 28मी तुमच्या पुढे
गांधील माशा पाठवीन; त्यामुळे त्या गांधील माशा* हिव्वी,
कनानी, व हित्ती लोकांना तुमच्या देशातून निघून जावयास
भाग पाडतील. 29परंतु त्या सगळ्या लोकांना मी लगेच
तुमच्या देशातून घालवून देणार नाही आणि एका वर्षभरात
मी हे करणार नाही; कारण मी तसे फार लवकर केले
तर देश एकदम ओस पडेल आणि मग जंगली जनावरांची
वाढ होऊन देशात ते वरचढ होतील आणि त्यामुळे तुम्हाला
त्रास होईल.
30तेव्हा मी त्या लोकांना तुमच्या देशातून हळूहळू घालवून
देईन; तेव्हा तुम्ही देश व्यापण्यास पुढे चालावे, आणि
तुम्ही जसे पुढे जाल तसे मी तेथील इतर लोकांना
तुमच्यापुढून घालवून देईन.
31“मी तुम्हाला तांबडा समुद्र ते थेट युफ्रेटीस नदी एवढा
सारा प्रदेश देईन; तुमची पश्चिमेकडील सीमा पलिष्ट्यांच्या
समुद्रापर्यंत म्हणजे भूमध्यसमुद्रापर्यंत व पूर्वेकडील सीमा
अरबी वाळवंटापर्यंत, अशा तुमच्या प्रदेशाच्या सीमा
असतील. मी तुम्हाला तेथे राहाणाऱ्या लोकांचा पराभव
करावयास लावीन व तुम्ही त्या सर्वांना तेथून घालवून
द्याल. 32तुम्ही त्या लोकांच्या बरोबर किंवा त्यांच्या
दैवतांबरोबर कोणताही करार करु नये. 33तुम्ही त्यांना
तुमच्या देशात राहू देऊ नका; तुम्ही जर त्यांना तुमच्यात
राहू द्याल तर ते पुढे तुम्हाला सापळ्यासारखे अडकविणारे
होतील ते तुम्हाला माझ्याविरुद्ध पाप करावयास लावतील
व तुम्ही त्यांच्या दैवतांची उपासना करण्यास सुरवात
कराल.”

## देव आणि इस्राएल लोक यांचा करार

24 देवाने मोशेला सांगितले, “तू, अहरोन, नादाब,
अबीहू आणि इस्राएल लोकांमधील सत्तर
वडीलधारी माणसे पर्वतावर येऊन दुरुनच माझी उपासना
करा; 2मग मोशे एकटाच परमेश्वरा जवळ येईल; इतरांनी
परमेश्वराजवळ येऊ नये, आणि इतर लोकांनी तर पर्वत
चढून वरही येऊ नये.”
3मोशेने लोकांना परमेश्वराचे सर्व नियम व आज्ञा
सांगितल्या; मग सर्व लोक एकमुखाने म्हणाले,
“परमेश्वराने सांगितलेल्या सर्व आज्ञा आम्ही पाळू.”
4तेव्हा मोशेने सर्व आज्ञा लिहून काढल्या दुसऱ्या दिवशी
सकाळी मोशेने उठून पर्वताच्या पायथ्याशी एक वेदी बांधली
व त्याने इस्राएलच्या बारा वंशासाठी, प्रत्येक वंशास एंक
याप्रमाणे बारा दगड तेथे रोवून स्तंभ उभे केले. 5मग
मोशेने काही तरुणांना यज्ञार्पणे वाहाण्यासाठी पाठवले व
त्यांनी परमेश्वराला बैलांची होमार्पणे व शांत्यार्पणे वाहिली.
6मोशेने त्या अर्पणातून अर्धे रक्त राखून काही भांड्यात
ठेवले आणि दुसरे अर्धे रक्त त्याने वेदीवर ओतले.
7मग मोशेने गुंडाळी पत्रात लिहिलेला विशेष करार
सर्वांनी ऐकावा म्हणून वाचून दाखविला आणि मग लोक
म्हणाले, “परमेश्वराने दिलेल्या आज्ञा आम्ही ऐकल्या
आहेत; त्या आम्ही पाळू असे आम्ही कबूल करतो.”
8मग मोशेने भांड्यांतील अर्पणाचे रक्त लोकावर
शिंपडले, तो म्हणाला, “परमेश्वराने तुमच्याशी विशेष
करार केला आहे असे हे रक्त दर्शविते; त्याचे स्पष्टीकरण
देवाने दिलेल्या नियमांमध्ये आहे.” 9नंतर मोशे, अहरोन,

---

**गांधीलमाशा** किंवा ह्याचा अर्थ कदाचित देवदूत वा देवाचे प्रचंड सामर्थ्य असा असावा.

नादाब, अबीहू, व इस्राएल लोकांमधील सत्तर वडीलधारी
माणसे पर्वतावर चढून गेले. 10तेथे त्यांनी इस्राएलाच्या
देवाला पाहिले; नीलमण्यांच्या चौथऱ्यासारखे तेथे काही
होते, ते आकाशाप्रमाणे स्वच्छ व निळेभोर होते त्यावर
देव उभा होता! 11इस्राएल मधील सगव्व्या वडिलधाऱ्या
माणसांनी देवाला पाहिले परंतु त्याने त्यांचा नाश केला
नाही.* मग त्यांनी तेथे एकत्र खाणेपिणे केले."

### देवाचे नियम आणण्याकरता मोशे जातो

12परमेश्वर मोशेला म्हणाला, "पर्वतावर मला भेटावयास
ये; मी दोन दगडी पाट्यांवर इस्राएल लोकांसाठी नियम व
आज्ञा लिहिलेल्या आहेत; त्या मी तुला देतो." 13तेव्हा
मोशे व त्याचा मदतनीस यहोशवा देवाच्या पर्वतावर चढून
गेले. 14मोशे इस्राएलाच्या वडीलधाऱ्या माणसांना म्हणाला,
"तुम्ही येथे आम्हासाठी थांबा, मी परत येईपर्यंत अहरोन
व हूर हे तुम्हावर अधिकारी म्हणून राहतील; कोणाचे
काही प्रकरण असेल तर त्याने त्यांच्याकडे जावे."

### मोशे देवाला भेटतो

15मग मोशे पर्वतावर चढून गेला आणि ढगाने पर्वत
झाकून टाकला; 16परमेश्वराचे तेज सीनाय पर्वतावर
उतरले; ढगाने सहा दिवस पर्वताला झाकून टाकले; सातव्या
दिवशी परमेश्वर मोशेबरोबर ढगातून बोलला. 17इस्राएल
लोकांनी पर्वतावर परमेश्वराचे तेज पाहिले; ते पर्वताच्या
शिखरावर भस्म करणाऱ्या धगधगत्या अग्नीसारखे होते.
18मोशे पर्वतावर चढून आणखी वर ढगात गेला; मोशे
चाळीस दिवस व चाळीस रात्र तेथे होता.

### पवित्र वस्तूची अर्पणे

25 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"इस्राएल लोकांना
माझ्यासाठी अर्पणे आणावयास सांग. प्रत्येक
माणसाने माझ्यासाठी काय अर्पण आणावयाचे ते मनापासून
ठरवून आणावे; ही अर्पणे तू माझ्यासाठी स्वीकारावी.
3लोकांकडून तू माझ्याकरता घ्यावयाच्या वस्तूंच्या
अर्पणाची यादी अशी: सोने, चांदी, पितळ; 4निळ्या,
जांभळ्या व किरमिजी रंगाचे सूत आणि तलम सणाचे
कापड; बकऱ्याचे केस; 5लाल रंगविलेली मेंढ्यांची कातडी;
तहशाची कातडी बाभळीचे लाकूड; 6दिव्यासाठी जैतूनाचे
तेल; अभिषेकाच्या तेलासाठी आणि सुगंधी धुपासाठी
मसाले;
7एफोद ह्यांच्यामध्ये खोचण्यासाठी गोमेद नांवाचे रत्न
व इतर रत्ने."

### पवित्र निवास मंडप

8परमेश्वर म्हणाला, "इस्राएल लोकांनी माझ्यासाठी
एक पवित्र निवास मंडप बांधावा म्हणजे मग मी इस्राएल
लोकांबरोबर राहीन. 9तो पवित्र निवास मंडप कसा असावा
त्याचा नमुना व त्यातील वस्तू कशा असाव्यात त्यांचा
नमुना मी तुम्हास दाखवीन. मग तुम्ही, अगदी मी
दाखविलेल्या नमुन्याप्रमाणेच तो बांधावा.

### आज्ञापटाचा कोश

10"बाभळीच्या लाकडाची एक पेटी किंवा पवित्रकोश
तयार करावा; त्याची लांबी पंचेचाळीस इंच, रुंदी सत्तावीस
इंच व उंची सत्तावीस इंच असावी. 11तो आतून बाहेरून
सोन्याने मढवावा आणि त्याच्यावर सभोवती शुद्ध सोन्याचा
काठकरावा. 12पवित्रकोश उचलून नेण्यासाठी त्याला
सोन्याच्या चार गोल कड्या कराव्यात त्या पवित्रकोशाच्या
प्रत्येक बाजूला दोन अशा चारही कोपऱ्यांच्या पायावर
घट्ट बसवाव्यात 13मग पवित्रकोश वाहून नेण्याकरता
बाभळीच्या लाकडाचे दांडे करावेत व तेही सोन्याने
मढवावेत 14पवित्रकोशाच्या कोपऱ्यांवरील गोल
कड्यांमध्ये दांडे घालून मग तो वाहून न्यावा.
15पवित्रकोशाचे हे दांडे कड्यात कायम तसेच राहू द्यावेत,
ते काढून घेऊनयेत."
16देव म्हणाला, "मी तुला पवित्रकराराचा साक्षपट देईन
तो तू पवित्रकोशात ठेवावास. 17मग शुद्ध सोन्याचे एक
झाकण बनवावे; ते पंचेचाळीस इंच लांब, सत्तावीस इंच
रुंद असावे; 18मग सोन्याचे घडीव काम करुन दोन करूब
देवदूत करुन ते झाकणाच्या म्हणजे दयासनाच्या दोन्ही
टोकांना ठेवावेत. 19एक देवदूत एका बाजूला व दुसरा,
दुसऱ्या बाजूला असे दयासनाशी एकत्र जोडून अखण्ड
सोन्याचे घडवावेत.
20त्या दूतांचे पंख आकाशाकडे वर पसरलेले असावेत
व त्यांच्या पंखांनी दयासन झाकलेले असावे; त्याची तोंडे
समोरासमोर असावीत व त्यांची दृष्टी दयासनाकडे
लागलेली असावी.
21"मी तुला पवित्र कराराचा आज्ञापट देईन तो तू
पवित्रकोशामध्ये ठेवावा; आणि दयासन त्याच्यावर ठेवावे.
22मी जेव्हा तुला भेटेन तेव्हा कराराच्या कोशावर ठेवलेल्या
देवदूतांच्यामधून मी तुझ्याशी बोलेन; आणि तेथूनच मी
इस्राएल लोकांसाठी माझ्या सर्व आज्ञा देईन.

### पवित्र मेज

23"बाभळीच्या लाकडाचे एक मेज बनवावे; ते छत्तीस
इंच लांब आठरा इंच रुंद व सत्तावीस इंच उंचीचे असावे.
24ते शुद्ध सोन्याने मढवावे, व त्याच्या भोवती सोन्याचा
काठकरावा. 25मग तीन इंच रुंदीची एक चौकट बनवावी
व सोन्याचा काठतिच्यावर ठेवावा. 26मग सोन्याच्या चार
गोल कड्या बनवून त्या मेजाच्या चार पायांच्या कोपऱ्यांवर

---

**नाश केला नाही** देवाला कोणी मानवप्राणी पाहू शकत नाही, असे बायबल म्हणजे देवाचे वचन सांगते; परंतु आपले स्वरुप कसे आहे हे लोकांना समजावे यासाठी देवाने लोकांना त्याच्या या विशेष स्वरुपात पाहू दिले.

घट्ट बसवाव्यात. [27]ह्या कड्या मेजाच्या वरच्या भागाभोवती
चौकटीच्या जवळ ठेवाव्यात. मेज वाहून नेण्यासाठी ह्या
कड्यांमध्ये दांडे घट्ट बसतील. [28]मेज वाहून नेण्यासाठी
बाभळींच्या लाकडाचे दांडे बनवावेत व ते सोन्याने मढवावेत.
[29]मेजावरची तबके, चमचे, धूपपात्र, सुरया व कटोरे शुद्ध
सोन्याचे बनवावेत; सुरयांचा व कटोऱ्यांचा पेयार्पणे
ओतण्यासाठी उपयोग होईल. [30]माझ्यापुढे मेजावर
समक्षतेची भाकर ठेवावी व ती नेहमी माझ्यापुढे असावी.

## सोन्याचा दीपवृक्ष

[31]"मग तू एक दीपवृक्ष तयार कर. शुध्द सोने वापर व
ते ठोकून बैठक व दांडा घडव शुध्द सोन्यापासून फुले,
कळ्या व पाकळ्या तयार कर. व हे सर्व एकत्र जोडून
एकसंध कर. [32]त्या दीपवृक्षाला एका बाजूला तीन व
दुसऱ्या बाजूला तीन अशा सहा शाखा असाव्यात. [33]प्रत्येक
शाखेला तीन फुले असावीत; ही फुले, ह्या कळ्या व
पाकळ्या बदामाच्या झाडावर असतात तशा असाव्यात.
[34]ह्या दीपवृक्षावर आणखी चार फुले बनवावीत; ती
बदामाच्या झाडावरील, कळ्या पाकळ्यासहित असलेल्या
फुलाप्रमाणे असावीत. [35]ह्या दीपवृक्षावर दांड्याच्या एका
बाजूला तीन व दुसऱ्या बाजूला तीन अशा सहा शाखा
असाव्यात; जेथे शाखा मुख्य दांड्याला जोडलेली आहे त्या
प्रत्येक जोडाखाली कळ्या व पाकळ्या सहित एक फूल
बनवावे. [36]हे दीपवृक्ष, फुले व फांद्या यांच्या सहीत शुध्द
सोन्याचे घडविले पाहिजे हे सर्व ठोकून व एकत्र जोडून
एकसंध केले पाहिजे. [37]मग ह्या दीपवृक्षावर सात दिवे
बसवावेत म्हणजे त्या दिव्यातून दीपवृक्षाच्या समोरील
भागावर प्रकाश पडेल.

[38]दिवे मालवण्याचे चिमटे व त्यांच्या ताटल्या ही सर्व
शुध्द सोन्याची असावीत. [39]हा दीपवृक्ष व त्याच्या बरोबरची
सर्व उपकरणे एक किक्कार म्हणजे सुमारे पन्नास शेर
शुद्ध सोन्याची करावी; [40]आणि मी तुला पर्वतावर
दाखविलेल्या नमुन्याप्रमाणेच ह्या सर्व वस्तू बनविण्याकडे
तू लक्ष दे."

## पवित्र निवास मंडप

26 परमेश्वर मोशेला म्हणाला, "पवित्र निवास मंडप
कातलेल्या तलम सणाच्या कापडाच्या दहा
पडद्यांपासून व निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या
सुतापासून तयार करावा. एखाद्या शिवणकाम करणाऱ्या
कुशल कारागिराकडून त्या पडद्यांवर, पसरलेल्या पंखांच्या
करुब देवदूतांची चित्रे शिवावीत. [2]प्रत्येक पडद्याचे मोजमाप
एक सारखेच असावे म्हणजे तो चौदा वार किंवा चौदा
गज लांब व दोन वार किंवा दोन गज रुंद असावा; [3]त्यापैकी
पाच पडदे एकत्र जोडून एक भाग करावा व दुसऱ्या
पाचांचा जोडून दुसरा भाग करावा; [4]त्या दोन्हीही भागांच्या
शेवटाच्या किनारीवर निळ्या सुताची बिरडी करावीत.
[5]पहिल्या भागाच्या शेवटच्या कडेला पन्नास बिरडी असावीत
व दुसऱ्या भागातही ती तशीच असावीत; [6]पडद्यांचे ते दोन
भाग जोडण्यासाठी सोन्याच्या पन्नास गोल कड्या बनवून
त्यांच्या सहाय्याने ते दोन भाग एकत्र जोडावेत म्हणजे त्या
दोन्ही भागांचे मिळून एकच सलग कापड होईल आणि
मग त्यापासून पवित्र निवास मंडप तयार करता येईल.

[7]"त्यानंतर ह्या पवित्र निवास मंडपाला झाकून टाकणारा
असा दुसरा मंडप बकऱ्याच्या केसापासून तयार केलेल्या
अकरा पडद्यांच्या सहाय्याने तयार करावा. [8]हे सर्व पडदे
एकसारख्या मोज मापाचे म्हणजे पंधरा वार लांब व दोन
वार रुंद अशा मापाचे बनवावेत. [9]त्यातून पाच पडदे एकत्र
जोडून एक सलग भाग करावा; मग दुसरे सहा पडदे
जोडून दुसरा भाग करावा; मंडपाच्या पुढच्या बाजूला सहाव्या
पडद्याचा अर्धा भाग मागे दुमडावा. [10]पहिल्या भागाच्या
कडेखाली पन्नास बिरडी करावीत व दुसऱ्या भागाच्या
कडेलाही तसेच करावे; [11]नंतर पडदे जोडण्यासाठी
पितळेच्या पन्नास गोल कड्या कराव्यात; त्यामुळे दोन
भागांना जोडून तंबूसाठी सलग एकच भाग होईल. [12]ह्या
तंबूच्या शेवटच्या पडद्याचा अर्धाभाग पवित्र निवास मंडपाच्या
मागच्या टोकाखाली लोंबत राहील. [13]त्या तंबूच्या बाजूचे
पडदे पवित्र निवास मंडपाच्या खालच्या कडेच्या खाली
अठरा इंच लोंबत राहतील; त्यामुळे पवित्र निवास मंडपाला
पूर्ण आच्छादान मिळेल. [14]बाहेरचा तंबू झाकण्याकरिता
दोन आच्छादने करावीत; एक मेंढ्याच्या लाल रंगविलेल्या
कातड्याचे व दुसरे तहशाच्या–एका प्रकारच्या जनावराच्या
कातड्याचे करावे.

[15]"पवित्र निवास मंडपाला बाभळीच्या लाकडापासून
केलेल्या फळ्यांचा आधार द्यावा. [16]ह्या फळ्या पंधरा
फूट उंच व सत्तावीस इंच रुंद असाव्यात. [17]प्रत्येक फळीच्या
दोन बाजूला दोन कुसे करावीत; दोन फळ्या उभ्या आडव्या
तुकड्यांनी जोडाव्यात. पवित्र निवासमंडपाच्या सर्व फळ्या
एक सारख्याच असाव्यात. [18]पवित्र निवास मंडपाच्या दक्षिण
बाजूसाठी वीस फळ्या कराव्यात; [19]फळ्यासाठी चांदीच्या
चाळीस बैठका– खुर्च्या–कराव्यात. प्रत्येक फळीला आत
खोल जाण्यासाठी प्रत्येक बाजूस एक बैठक या प्रमाणे
दोन, चांदीच्या बैठका असाव्यात. [20]पवित्र निवास मंडपाच्या
दुसऱ्या म्हणजे उत्तर बाजूसाठी वीस फळ्या कराव्यात;
[21]आणि त्यांच्यासाठी प्रत्येक फळीखाली दोन बैठका या
प्रमाणे चांदीच्या चाळीस बैठका–खुर्च्या कराव्यात. [22]पवित्र
निवास मंडपाच्या मागच्या बाजूसाठी म्हणजे पश्चिम
बाजूसाठी आणखी सहा फळ्या कराव्यात; [23]आणि मागील
बाजूला कोपऱ्यासाठी दोन फळ्या कराव्यात.
[24]कोपऱ्याच्या फळ्या खालच्या बाजूस जोडाव्यात; त्यांच्या
वरील भागांची कडी त्यांना जोडून ठेवील दोन्ही
कोपऱ्यांसाठी असेच करावे. [25]पवित्र निवास मंडपाच्या
पश्चिम टोकास एकूण आठ फळ्या असतील आणि त्या

प्रत्येक फळीच्या खाली दोन याप्रमाणे सोळा, चांदीच्या बैठका असतील. 26त्यांच्या फव्व्यांसाठी बाभळीच्या लाकडाचे अडसर करावेत; त्यांच्या पहिल्या बाजूस पाच अडसर व 27दुसऱ्या बाजूस पाच अडसर असावेत; आणि त्यांच्या पाठीमागच्या म्हणजे पश्चिम बाजूस पाच अडसर असावेत. 28मध्यभागावरील अडसर लाकडांच्या फव्व्यातून एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जावा.

29"फव्व्या आणि अडसर सोन्याने मढवावेत आणि त्यांना जोडणाऱ्या कड्याही सोन्याच्या कराव्यात. 30मी तुला पर्वतावर दाखविल्याप्रमाणे पवित्र निवास मंडप बांधावा.

## पवित्र निवास मंडपाची आतील बाजू

31"तलम सणाच्या कापडाचा व निळ्या जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा मिळून पवित्र निवास मंडपाच्या आतील विशेष पडदा–अंतरपट बनवावा आणि त्यावर करूब दूतांची चित्रे कारागिराकडून काढून घ्यावीत. 32बाभळीच्या लाकडाचे चार खांब बनवून ते सोन्याने मढवावेत, त्यावर सोन्याच्या आकड्या लावाव्यात आणि चांदीच्या चार खुर्च्या त्या खांबाखाली ठेवाव्यात; मग तो पडदा खांबांच्या आकड्यावर लटकत ठेवावा. 33सोन्याच्या आकड्याखाली हा पडदा ठेवावा मग त्याच्यामागे आज्ञापटाचा कोश–ठेवावा; हा अंतरपट पवित्र स्थान व परमपवित्र स्थान यांना अलग करील; 34परमपवित्र स्थानातील आज्ञापटाच्या कोशावर दयासन ठेवावे.

35"अंतरपटाच्या दुसऱ्या बाजूला तू बनविलेला विशेष मेज ठेवावा; तो पवित्र निवास मंडपाच्या उत्तर बाजूस असावा व दक्षिण बाजूला मेजासमोर दीपवृक्ष ठेवावा.

## पवित्र निवास मंडपाचे दार

36"पवित्र निवास मंडपाच्या दारासाठी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा पडदा करावा व त्यावर भरतकाम करावे. 37हा पडदा लावण्यासाठी बाभळीच्या लाकडाचे पाच खांब करावेत व ते सोन्याने मढवावेत; त्यांच्या साठी पितळेच्या पाच बैठका बनवाव्यात; हा पडदा अडकविण्यासाठी सोन्याच्या आकड्या कराव्यात."

## होमार्पणाकरता वेदी

27 परमेश्वर मोशेला म्हणाला, "होमार्पणाकरता बाभळीच्या लाकडाची साडेसात फूट लांब, साडेसात फूट रुंद व साडे चार फूट उंच* अशी चौरस वेदी तयार कर. 2वेदीच्या चार कोपऱ्यांना प्रत्येकी एक अशी चार शिंगे बनवावी; प्रत्येक शिंग त्याच्या कोपऱ्यास जोडावे म्हणजे ते सर्व सलग व अखंड दिसेल; मग वेदी पितळेने मढवावी.

3"वेदीवरील राख काढण्यासाठी लागणारी भांडी, फावडी, कटोरे, काटे व अग्नीपात्रे ही सर्व उपकरणे पितळेची बनवावी 4तिच्यासाठी पितळेच्या जाळीची एक चाळण बनवावी. 5ही चाळण वेदीच्या कंगोऱ्याखालीं, वेदीच्या तळापासून अर्ध्या उंची इतकी येईल अशा अंतरावर लावावी.

6"वेदीसाठी बाभळीच्या लाकडाचे दांडे करावेत व ते पितळेने मढवावेत. 7ते वेदीच्या दोन्ही बाजूच्या कड्यांत घालावेत म्हणजे वेदी उचलून नेण्यासाठी त्यांचा उपयोग होईल. 8वेदीच्या बाजूंना फव्व्या बसवाव्यात; पर्वतावर मी तुला दाखविल्याप्रमाणे ती तयार करावी.

## पवित्र निवास मंडपाच्याभोवतीचे अंगण

9"पवित्र निवास मंडपाला अंगण तयार कर; त्याच्या दक्षिणेला कातलेल्या तलम सणाच्या पडद्यांची पन्नास यार्ड* (वार) लांबीची कनात बनवावी. 10तिच्याकरिता वीस खांब करावेत व त्यांच्यासाठी पितळेच्या वीस बैठका बनवाव्यात; खांबाच्या आकड्या व पडद्याचे गज चांदीचे करावेत. 11वेदीच्या उत्तर बाजूसही दक्षिण बाजूप्रमाणे पन्नास यार्ड(वार) लांबीची कनात, तिच्यासाठी वीस खांब, पितळेच्या वीस बैठका आणि चांदीच्या आकड्या व गज हे सर्व असावे.

12"अंगणाच्या पश्चिम बाजूस पडद्यांची पंचवीस यार्ड* (वार) लांबीची एक कनात असावी; तिला दहा खांब व खांबांना दहा खुर्च्या असाव्यात. 13अंगणाची पूर्वेकडील म्हणजे प्रवेश द्वाराकडील बाजूही पंचवीस यार्ड(वार) असावी. 14अंगणाच्या फाटकाच्या एका बाजूला साडे सात यार्ड* (वार) लांबीची पडद्याची कनात असावी; ह्या बाजूस तीन खांब व तीन खुर्च्या असाव्यात; 15फाटकाच्या दुसऱ्या बाजूलाही तेवढ्याच लांबीची पडद्याची कनात, व तिलाही तीन खांब व तीन खुर्च्या हे सर्व असावे.

16"अंगणाच्या फाटकासाठी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा दहा यार्ड (वार) लांबीचा पडदा असावा व त्यावर नक्षीचे विणकाम असावे; पडद्यासाठी चार खांब व चार खुर्च्या असाव्यात. 17अंगणाभोवतीचे सर्व खांब चांदीच्या बांधपट्ट्यांनी जोडलेले असावेत; त्यांच्या आकड्या चांदीच्या व खुर्च्या पितळेच्या असाव्यात. 18अंगण पन्नास गज लांब व पंचवीस गज रुंद असावे; अंगणाभोवतीची पडद्याची कनात अडीच गज उंच असावी व ती कातलेल्या तलम सणाच्या सुताची बनविलेली असावी; आणि तिच्या

**साडे चार फूट उंच** म्हणजे दोन पूर्णांक दोन दशांश मीटर लांब, तेवढीच रुंद व एक पूर्णांक तीन दशांश मीटर उंच.

**पन्नास यार्ड** शंभर हात लांबीची.

**पंचवीस यार्ड** पन्नास हात.

**साडे सात यार्ड** पंधरा हात.

खांबाच्या खुर्च्या पितळेच्या असाव्यात. 19पवित्र निवास मंडपातील सर्व उपकरणे, तंबूच्या मेखा आणि इतर वस्तू आणि अंगणाभोवतीच्या कनातीच्या मेखा पितळेच्या असाव्यात.

### दिव्यासाठी तेल

20"इस्राएल लोकांनी दीपवृक्ष सतत जळत ठेवण्यासाठी जैतुनाचे उत्तम तेल रोज संध्याकाळी आणावे अशी तू त्यांना आज्ञा कर; 21अहरोन व त्याची मुले यांनी दिवा जळत ठेवण्याची काळजी घ्यावी; अंतरपटातील पडद्यामागील आज्ञापटाच्या बाहेर असलेल्या दर्शन मंडपात त्यांनी जावे; आणि तो दीपवृक्ष संध्याकाळपासून सकाळपर्यंत परमेश्वरासमोर जळत ठेवण्याची खातरीने सोय करावी; हा इस्राएल लोकांसाठी व त्यांच्या वंशासाठी पिढ्यान्‌पिढ्या कायमचा विधी आहे; तो त्यांनी पाळलाच पाहिजे."

### याजकांसाठी वस्त्रे

28 परमेश्वर मोशेला म्हणाला, "याजक म्हणून माझी सेवा करण्यासाठी तुझा भाऊ अहरोन व त्याचे मुलगे नादाब, अबीहू, एलाजार व इथामार यांना इस्राएल लोकांतून वेगळे होऊन तुजकडे यावयास सांग.

2"तुझा भाऊ अहरोन याच्यासाठी विशेष वस्त्रे तयार कर त्यामुळे त्याला मान व आदर मिळेल 3ही वस्त्रे बनविणारे कारागीर इस्राएल लोकात आहेत; ही विशेष कला मीच त्यांना दिलेली आहे; ह्या वस्त्रामुळे अहरोन माझी याजकीय सेवा करण्यासाठी पवित्र होईल मग त्याने याजक या नात्याने माझी सेवा करावी.

4तुझा भाऊ अहरोन व त्याची मुले ह्यांनी याजक या नात्याने माझी सेवा करावी म्हणून कारागिरांनी त्यांच्यासाठी ही वस्त्रे बनवावीत: न्यायाचा ऊरपट, एफोद, झगा, चौकड्याचा अंगरखा, मंदिल किंवा फेटा व कमरबंद; 5त्या कारागिरांनी सोन्याची जर आणि निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे सूत व तलम सणाचे कापड वापरून ही वस्त्रे तयार करावीत.

### एफोद व कमरबंद

6"सोन्याची जर व निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे सूत तसेच कातलेल्या तलम सणाचे कापड घेऊन कुशल कारागिराकडून त्यांचे एफोद तयार करुन घ्यावेत;

7एफोदाच्या दोन्ही खांद्यावर दोन खांदपट्ट्या असाव्यात, या खांदपट्ट्या एफोदाच्या दोन्ही कोपऱ्यांना जोडाव्यात.

8"एफोद बांधण्यासाठी कारागिरांनी फार काळजीपूर्वक एक पट्टी विणावी; ही एफोदाप्रमाणेच म्हणजे सोन्याची जर, व निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे सूत व कातलेल्या तलम सणाच्या कापडाने विणावी.

9"मग दोन गोमेद रत्ने घेऊन त्यांच्यावर इस्राएलाच्या मुलांची बारा नांवे कोरावीत. 10एकावर सहा नांवे व दुसऱ्यावर सहा अशी त्यांच्या जन्माच्या क्रमाप्रमाणे कोरावीत. 11कोरीव काम करणारा कारागीर ज्याप्रमाणे कुशलतेने एखादी मुद्रा कोरतो त्याप्रमाणे दोन्ही रत्नावर इस्राएलाच्या मुलांची नांवे कोरावी आणि ती सोन्याच्या कोंदणात बसवावीत. 12ती दोन्ही रत्ने एफोदाच्या दोन्ही खांदपट्ट्यांवर लावावीत; परमेश्वरासमोर उभे राहताना अहरोन हा खास रत्ने जडलेला एफोद घालून जाईल आणि त्या रत्नावर कोरलेल्या नांवामुळे देवाला इस्राएल लोकांची आठवण होईल. 13एफोदावर ती रत्ने पक्की रहावीत म्हणून त्यांच्यासाठी शुद्ध सोन्याची कोंदणे बसवावीत; 14पीळ घातलेल्या दोरी सारख्या शुद्ध सोन्याच्या दोन साखळ्या कराव्यात व त्या कोंदणात बसवाव्यात.

### न्यायाचा ऊरपट

15"न्यायाचा ऊरपटही तयार करून घ्यावा; कुशल कारागिरांनी जसा एफोद तयार केला, तसाच तो करावा. तो सोन्याच्या जरीचा, आणि निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा करावा; 16तो चौरस दुमडलेला दुहेरी असावा; व त्याची लांबी व रुंदी एक एक वीत म्हणजे नऊ नऊ इंच असावी. 17त्यात सुंदर रत्ने खोचलेल्या चार रांगा असाव्यात; पहिल्या रांगेत लाल, पुष्कराज व माणिक; 18दुसऱ्या रांगेत पाचू, नीलमणी व हिरा;

19तिसऱ्या रांगेत तृणमणी, सूर्यकांत व पद्मराग; 20आणि चौथ्या रांगेत लसणा, गोमेद व यास्फे; ही सर्व रत्ने सोन्याच्या कोंदणात खोचावीत. 21न्यायाच्या ऊरपटावर इस्राएलाच्या प्रत्येक मुलामागे एक या प्रमाणे बारा रत्ने, प्रत्येक मुलाचे नांव कोरलेली अशी असावीत.

22"न्यायाच्या ऊरपटावर लावण्यासाठी दोरीसारखा पीळ घातलेल्या शुद्ध सोन्याच्या साखळ्या कराव्यात. 23न्यायाच्या ऊरपटावर सोन्याच्या दोन कड्या कराव्यात; त्या न्यायाच्या ऊरपटाच्या दोन्ही टोकास लावाव्यात; 24ह्या दोन कड्यात पीळ घातलेल्या सोन्याच्या साखळ्या घालाव्यात. 25पीळ घातलेल्या दोन्ही साखळ्यांची दुसरी टोके दोन्ही कोंदणात खोचून त्या एफोदाच्या दोन्ही खांदपट्ट्यांवर पुढल्या बाजूस लावाव्यात. 26सोन्याच्या आणखी दोन गोल कड्या करुन न्यायाच्या ऊरपटाच्या आतल्या दोन्ही कोपऱ्यांना एफोदाच्या बाजूला लावाव्यात. 27सोन्याच्या आणखी दोन गोल कड्या करून त्या खांदपट्ट्यांखालील एफोदाच्या समोर त्याच्या जोडाजवळील पट्टीवर लावाव्यात. 28न्यायाच्या ऊरपटाच्या कड्या एफोदाच्या कड्यांना निळ्या फितींनी

बांधाव्यात; त्यामुळे ऊरपट एफोदाच्या पट्टीवर घट्ट धरून राहील, घसरणार नाही.

29“अहरोन पवित्र स्थानात प्रवेश करील तेव्हा त्याच्या न्यायाच्या ऊरपटावर म्हणजे आपल्या हृदयावर त्याने इस्राएलाच्या मुलांची नांवे कोरलेली असतील त्यामुळे परमेश्वराला इस्राएलाच्या बारा पुत्रांची सतत आठवण राहील. 30न्यायाच्या ऊरपटात तू उरीम व थुम्मीम ठेव अहरोन परमेश्वरासमोर जाईल तेव्हा ते त्याच्या हृदयावर असतील, त्यामुळे इस्राएल लोकांचा न्याय करण्याचा मार्ग तो नेहमी आपल्या हृदयावर घेऊन जाईल.

## याजकासाठी इतर वस्त्रे

31“एफोदाबरोबर घालावयाचा झगा संपूर्ण निव्व्या रंगाचा करावा; 32त्याच्या मध्यभागी डोके घालण्यासाठी एक भोक असावे आणि त्याच्या भोंवती कापडाचा गोट शिवावा म्हणजे झग्याचा तो भाग फाटणार नाही. 33निव्व्या, जांभव्व्या व किरमिजी रंगाच्या सुताच्या कापडाची डाळिंबे काढून ती त्या झग्याच्या खालच्या घेराभोंवती लावावीत आणि दोन डाळिंबाच्या मधील जागेत सोन्याची घुंगरे लावावीत; 34त्यामुळे झग्याच्या घेराच्या खालच्या बाजूला एक डाळिंब व एक घुंगरु अशी क्रमावर ती असावीत. 35याजक या नात्याने माझी सेवा करताना अहरोनाने हा झगा घालावा; जेव्हा जेव्हा तो पवित्रस्थानात परमेश्वरासमोर जाईल किंवा तेथून बाहेर पडेल तेव्हा तेव्हा त्या घुंगरांचा आवाज ऐकू येईल; त्यामुळे तो मरावयाचा नाही.

36“शुद्ध सोन्याची एक पट्टी बनवावी आणि मुद्रा कोरतात त्याप्रमाणे तिच्यावर ‘परमेश्वरासाठी पवित्र’ ही अक्षरे कोरावीत. 37ही सोन्याची पट्टी अहरोनाच्या मंदिलाला (फेट्याला) समोरील बाजूस निव्व्या फितीने बांधावी; 38ती अहरोनाच्या कपाळावर सतत असावी ह्यासाठी की ज्या भेटी इस्राएल लोक परमेश्वराला अर्पण करतील त्यात जर काही दोष असेल तर तो त्याने काढावा; त्यामुळे ती दाने परमेश्वराला मान्य ठरतील व अर्पिण्यास ती पात्र होतील.

39“कातलेल्या तलम सणाच्या पांढऱ्या कापडाचा एक अंगरखा विणावा एक मंदिल–फेटा–व एक वेलबुट्टीदार कमरबंद करावा. 40अहरोनाच्या मुलांसाठीही अंगरखे, कमरबंद व फेटे करावेत; त्यामुळे त्या मुलांचा मान व आदर राखला जाईल. 41तुझा भाऊ अहरोन ह्याला व त्याच्या मुलांना ही वस्त्रे घाल, त्यांच्या डोक्यावर विशेष प्रकारचे तेल ओतून त्यांना आभिषेक करून त्यांना पवित्र कर म्हणजे मग याजक या नात्याने ते माझी सेवा करतील.

42“त्यांच्यासाठी सणाच्या कापडाचे चोळणे कर म्हणजे कमरेपासून मांडीपर्यंत त्यांचे अंग झाकलेले राहील

43आणि अहरोन व त्याचे मुलगे ज्या ज्या वेळी दर्शनमंडपात पवित्रस्थानापुढे याजक म्हणून सेवा करण्यास जातील त्या त्या वेळी त्यांनी हे चोळणे घातलेच पाहिजेत; तसे न केल्यास, दोषी ठरुन ते मरतील; अहरोनाला व त्याच्यानंतर त्याच्या वंशाला हा कायमचा नियम आहे.”

## याजक नेमण्याचा विधी

29 परमेश्वर मोशेला म्हणाला, “अहरोन व त्याची मुले याजक या नात्याने विशेष प्रकारे माझी सेवा करावी यासाठी त्यांना पवित्र करण्यासाठी तू काय करावेस ते मी तुला सांगतो: अहरोन व त्याची मुले यांनी माझ्या सेवेसाठी याजक या नात्याने त्यांचे समर्पण करण्यासाठी याप्रमाणे विधी करावा: एक गोऱ्हा व दोन निर्दोष मेंढे घ्यावेत; 2मग मैद्याच्या बेखमीर भाकरी, तेलात मळलेल्या बेखमीर पोळ्या व जैतुनाचे तेल लावलेल्या बेखमीर चपात्या कराव्यात; 3त्या सर्व एका टोपलीत घालून ती टोपली त्याच प्रमाणे तो गोऱ्हा व ते दोन मेंढे त्याचवेळी अहरोन व त्याची मुले यांच्याकडे द्यावीत;

4“अहरोन व त्याचे पुत्र यांना दर्शन मंडपाच्या दारासमोर घेऊन यावे; त्यांना आंघोळ घालावी; 5याजकाच्या विशेष प्रकारच्या वस्त्रातून अहरोनाला त्याचा अंगरखा व एफोदाबरोबरचा झगा घालावा, त्याला एफोद व न्यायाचा ऊरपट बांधावा आणि बेलबुट्टीदार पट्टा त्याच्या कमरेला बांधावा; 6त्याच्या डोक्याला मंदिल किंवा फेटा बांधावा आणि फेट्यावर पवित्र मुकुट ठेवावा. 7नंतर अभिषेकाचे तेल घेऊन ते अहरोनाच्या डोक्यावर ओतावे व त्याला अभिषेक करावा; यावरून अहरोनाला याजकाच्या सेवेसाठी निवडले आहे असे दिसून येईल.

8“मग त्याच्या मुलांना तेथे आणून त्यांना अंगरखे घालावेत; 9मग त्यांना कमरबंद बांधावेत व त्यांच्या डोक्यांना फेटे बांधावेत; अशा प्रकारे या विधीने त्यांना याजकपद मिळेल व ते कायम राहील. ह्याप्रमाणे अहरोन व त्याची मुले यांच्यावर संस्कार करुन तू त्यांना याजक बनवावेस.

10“नंतर तो गोऱ्हा दर्शन मंडपासमोर आणावा आणि अहरोन व त्याची मुले यांनी आपले हात त्याच्या डोक्यावर ठेवावेत–11मग तेथेच परमेश्वरासमोर दर्शन मंडपाच्या दारापाशी त्या गोऱ्ह्याचा वध करावा; परमेश्वर हे सर्व पाहील. 12मग गोऱ्ह्याचे थोडे रक्त घेऊन ते आपल्या बोटांनी तू वेदीच्या शिंगांना लावावेस व बाकीचे सगळे रक्त वेदीच्या पायथ्याशी ओतावे. 13मग त्याच्या आतड्यांवरील सर्व चरबी, काळजाभोंवतीची चरबी आणि दोन्ही गुरदे व त्यांच्या भोवतीची चरबी अशी त्या गोऱ्ह्याच्या शरीरातील सर्व चरबी काढून घ्यावी व गुरदे व तिचा वेदीवर होम करावा. 14नंतर गोऱ्हाचे मांस, कातडे व बाकी राहिलेले शरीर छावणी बाहेर नेऊन आगीत जाळून टाकावे; हा याजकांच्या पाप निवारण्याचा यज्ञ होय.

15“मग अहरोन व त्याच्या मुलांनी आपले हात एका मेंढ्याच्या डोक्यावर ठेवावेत; 16आणि त्या मेंढ्याचा वध

करावा; त्याच्या रक्तातून थोडेसे रक्त घेऊन वेदीच्या चारही बाजूस शिंपडावे. 17मेंढा कापल्यानंतर त्याचे तुकडे करावेत; मग त्याची आतडी व पाय धुऊन ते, त्याचे तुकडे व डोके ह्यांच्या बरोबर ठेवावेत; 18मग मेंढ्याच्या सर्व भागांचा वेदीवर होम करावा; हे परमेश्वराकरिता विशेष होमार्पण होय; हे परमेश्वराप्रीत्यर्थ सुवासिक हव्य होय; त्यामुळे परमेश्वराला संतोष होईल.

19"नंतर अहरोन व त्याच्या मुलांनी दुसऱ्या मेंढ्याच्या डोक्यावर आपले हात ठेवावेत; 20मग तो मेंढा वधावा व त्याच्या रक्तातून थोडे रक्त घेऊन ते अहरोनाच्या व त्याच्या मुलांच्या उजव्या कानांच्या पाळ्या व त्यांच्या उजव्या हातांच्या व उजव्या पायांच्या आंगठ्यांना लावावे आणि बाकीचे रक्त वेदीवर चार बाजूस शिंपडावे. 21नंतर वेदीवरील थोडे रक्त घेऊन ते अभिषेकाच्या तेलात मिसळावे, व त्यातले काही घेऊन अहरोनावर व त्याच्या वस्त्रावर तसेच त्याच्या मुलांवर व त्यांच्या वस्त्रावरही शिंपडावे; त्यामुळे तो व त्याची वस्त्रे आणि त्याच्या बरोबर त्याची मुले व त्यांची वस्त्रे शुध्द होतील, यावरुन अहरोन व त्याची मुले माझे याजक आहेत व ते विशेष वस्त्रे घालून माझी सेवा करतात हे दिसेल.

22"तो मेंढा अहरोनाच्या समर्पण विधीसाठी असल्यामुळे त्याची चरबी, आणि त्याच्या शेपटावरील व आतड्यावरील चरबी ही घ्यावीत; 23त्याचप्रमाणे परमेश्वरासमोर ठेवलेल्या बेखमीर भाकरीच्या टोपलीतून एक भाकर, तेलात मळलेल्या सपिठाची एक पोळी व एक चपाती घ्यावी 24आणि ते सर्व अहरोन व त्याच्या मुलांच्या हातावर ठेवावे व ते अर्पण म्हणून परमेश्वरासमोर वर धरण्यास त्यांना सांगावे.

25मग त्या सर्व वस्तू अहरोन व त्याच्या मुलांच्या हातातून घेऊन मेंढ्यासह परमेश्वरासमोर व वेदीवर त्यांचा होम करावा; ते परमेश्वराला अर्पिलेले सुवासिक हव्य होय.

26"मग त्या मेंढ्याचे ऊर घेऊन परमेश्वरासमोर विशेष अर्पण म्हणून वर धरावे; मग ते तुझ्याकरिता तुझ्याजवळ ठेव. 27नंतर अहरोन व त्याची मुले ह्यांच्या समर्पण विधीसाठी मारलेल्या मेंढ्याचे अर्पिलेले ऊर व मांडी ही अहरोन व त्याच्या मुलांना द्यावी; हे अर्पण त्यांच्यासाठी पवित्र होईल. 28इस्राएल लोकांनी अहरोन व त्याचे मुलगे यांना अर्पणाचा हा हिस्सा नेहमी द्यावा; ते जेव्हा परमेश्वराला अर्पणे आणतील तेव्हा अर्पणाचा हा भाग याजकाच्या हक्काचा म्हणून राहील; आणि इस्राएल लोक जेव्हा अर्पणाचा हा भाग याजकाला देतील तेव्हा ते परमेश्वराला दिलेल्या समर्पणासारखे होईल.

29"अहरोनाची पवित्र वस्त्रे त्याच्यानंतर सांभाळून ठेवावीत; ती त्याच्या पुत्रपौत्रांसाठी असावीत, जेव्हा त्यांची याजक म्हणून निवड होईल तेव्हा त्यांनी ती घालावीत. 30अहरोनाच्या जागी त्याचा जो मुलगा याजक होईल त्याने पवित्रस्थानात सेवा करण्यासाठी दर्शनमंडपात जाताना ती वस्त्रे सात दिवस घालावीत. 31महान याजक म्हणून अहरोनाच्या समर्पण विधीसाठी वध केलेल्या मेंढ्याचे मांस घेऊन ते पवित्र जागी शिजवावे; 32अहरोन व त्याच्या मुलांनी त्या मेंढ्याचे मांस आणि टोपलीतील भाकर दर्शनमंडपाच्या दारापाशी खावी; 33ही अर्पणे त्यांची पवित्र याजकासाठी निवड होण्याच्या वेळी, त्यांचे पाप नाहीसे व्हावे म्हणून वाहिलेली होती, म्हणून ती अर्पणे त्यांनीच खावीत.

34समर्पित केलेल्या मांसातले किंवा भाकरीतले जर काही सकाळपर्यंत उरले तर ते जाळून टाकावे, ते खाऊ नये कारण ते पवित्र आहे; ते फक्त पवित्र ठिकाणी व विशेष वेळी खाण्यासारखे आहे.

35"अहरोन व त्याच्या मुलांनी समर्पण विधीच्या सात दिवसात मी तुला आज्ञा केलेल्या ह्या सर्व गोष्टी कराव्यात. 36त्या सात दिवसात दर दिवशी एक गोऱ्हा मारून अर्पण करावा. अहरोन व त्याच्या मुलांनी केलेल्या पापांच्या प्रायश्चितासाठी–भरपाईसाठी हा होम होय, वेदी शुद्ध करण्यासाठी ह्या अर्पणाचा उपयोग करावा आणि ती पवित्र करण्यासाठी तिच्यावर जैतुनाचे तेल ओतावे 37सातही दिवस वेदी शुद्ध व पवित्र करावी; ती ह्या दिवसात जास्तीत जास्त पवित्र होईल, इतकी पवित्र की तिला कशाचाही स्पर्श झाला तर तेही पवित्र होईल.

38"दररोज वेदीवर एक एक वर्षांची दोन कोकरे ठार मारावीत व त्यांचा होम करावा.

39एका कोकराचा सकाळी व दुसऱ्या कोकराचा संध्याकाळी होम करावा. 40पहिल्या कोकराच्या अर्पणासोबत आठमापे सपीठपाव हीन–(द्रव पदार्थ मोजण्याचे माप)–द्राक्षारसात मळून अर्पण करावे. 41आणि संध्याकाळी दुसऱ्या कोकराबरोबरही सकाळच्या अर्पणाप्रमाणे आठमापे सपीठअर्पण करावे व पाव हीन द्राक्षारसाचे पेयार्पण करावे; ह्या हव्याच्या मधुर सुवासाने परमेश्वराला संतोष होईल.

42"ह्या सर्व गोष्टीचे अर्पण दर्शनमंडपाच्या दारापाशी दररोज परमेश्वरासमोर करीत राहावे; ह्या अर्पणानंतर मी परमेश्वर त्या ठिकाणी भेट देईन व तुमच्याशी बोलेन. 43त्याठिकाणी मी इस्राएल लोकांना भेटेन आणि माझ्या महानतेने मंडप पवित्र होईल.

44"ह्याप्रमाणे मी दर्शनमंडप व वेदी पवित्र करीन आणि अहरोन व त्याच्या मुलांना याजक या नात्याने माझी सेवा करावी म्हणून मी त्यांनाही पवित्र करीन. 45मी इस्राएल लोकांमध्ये राहीन आणि त्यांचा देव होईन. 46आणि लोकांना समजेल की मी त्यांचा देव परमेश्वर आहे; मला त्यांच्याबरोबर राहाता यावे म्हणून मीच त्यांना मिसर देशातून सोडवून आणले आहे हे त्यांना कळेल; मीच परमेश्वर त्यांचा देव आहे."

## धूप जाळण्यासाठी वेदी

30 देव मोशेला म्हणाला, "धूप जाळण्यासाठी
बाभळीच्या लाकडाची एक वेदी करावी. 2ती चौरस
असावी; ती आठरा इंच* लांब व आठरा इंच रुंद
असावी, आणि ती छत्तीस इंच* उंच असावी; तिच्या चारही
कोपऱ्यांना शिंगे असावीत; ती वेदीच्या एकाच अखंड
लाकडाची करावी. 3वेदीचा वरचा भाग व तिच्या चारही
बाजू शुद्ध सोन्याने मढवाव्यात आणि वेदीभोवती सोन्याचा
कंगोरा करावा. 4त्या कंगोऱ्याखाली वेदीच्या एकमेकींच्या
विरुद्ध बाजूंना सोन्याच्या दोन दोन गोल कड्या असाव्यात;
त्यांच्यात दांडे घालून वेदी उचलून नेण्याकरता त्यांच्या
उपयोग होईल. 5हे दांडे बाभळीच्या लाकडाचे करुन ते
सोन्याने मढवावेत. 6वेदी अंतरपटासमोर ठेवावी;
आज्ञापटाचा कोश अंतरपटाच्या मागे असेल; आज्ञापटाच्या
कोशावर असणाऱ्या दयासनासमोर वेदी असेल; ह्याच
ठिकाणी मी तुला भेटत जाईन.

7"अहरोन दिव्याची तेलवात करण्यासाठी येईल त्या
प्रत्येक सकाळी दररोज त्याने वेदीवर सुगंधी धूप जाळावा;
8पुन्हा संध्याकाळी अहरोन दिवे लावण्यासाठी येईल तेव्हा
त्याने वेदीवर सुगंधी धूप जाळावा; याप्रमाणे दररोज
परमेश्वरापुढे सुगंधी धूप सतत पिढयानपिढया जाळावा.
9तिच्यावर दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा धूप जाळू नये
किंवा हव्य अर्पण करू नये; तसेच अन्नार्पण किंवा पेयार्पण
अर्पण करू नये.

10"अहरोनाने वर्षातून एकदा वेदीच्या शिंगावर प्रायश्चित्त
करावे; लोकांच्या पापांची भरपाई करण्यासाठी अहरोनाने
पापार्पणातील रक्त घेऊन ते वेदीवर अर्पण करावे. ह्या
दिवसाला 'प्रायश्चित दिवस' म्हणावे. हे परमेश्वरासाठी
परम पवित्र आहे."

## मंदिरावरील खंडणी

11परमेश्वर मोशेला म्हणाला, 12"एकूण इस्राएल लोक
किती आहेत याची तुला माहिती असावी म्हणून तू त्यांची
शिरगणती करावीस; अशा प्रत्येक शिरगणतीच्या वेळी
प्रत्येक इस्राएलाने स्वतःच्या जिवाबद्दल परमेश्वराला खंड
द्यावा; जो कोणी असा खंड देईल त्याच्यावर भयंकर संकट
येणार नाही. 13शिरगणती झालेल्या प्रत्येक इस्राएल व्यक्तिने
पवित्र निवास मंडपातील अधिकृत मापाने अर्धा शेकेल
खंडणी द्यावी. (एका शेकेलाचे वजन वीस 'गेरा' असते)
हा अर्धा शेकेल म्हणजे परमेश्वराला दिलेले अर्पण होय.
14वीस वर्षे व त्याहून जास्त वयाच्या शिरगणती झालेल्या
प्रत्येक इस्राएली माणसाने परमेश्वराला हे अर्पण करावे.
15श्रीमंत माणसाने अर्धा शेकेलापेक्षा जास्त देऊ नये व
गरीबाने अर्धा शेकेलापेक्षा कमी देऊ नये; सर्व जणांनी
परमेश्वराला सारखेच अर्पण करावे; हे तुम्हाला आपल्या
जिवाबद्दल प्रायश्चित्ताची खंडणी असे होईल. 16हा पैसा
इस्राएल लोकांकडून गोळा करावा आणि त्याचा
दर्शनमंडपातील सेवेसाठी उपयोग करावा; हा पैसा म्हणजे
परमेश्वराला आपल्या लोकांची आठवण राहण्याचा एक
मार्ग होईल; लोक आपल्या जिवाबद्दल खंडणी देत राहतील."

## गंगाळ

17परमेश्वर मोशेला म्हणाला, 18"पितळेचे एक गंगाळ
बनवून ते पितळेच्या बैठकीवर ठेवावे, त्यातील पाण्याचा
हात पाय धुण्यासाठी उपयोग करावा; ते दर्शनमंडप व वेदी
यांच्यामध्ये ठेवावे व ते पाण्याने भरावे. 19या गंगाळातील
पाण्याने अहरोन व त्याच्या मुलांनी आपले हात पाय धुवावेत;
20दर्शनमंडपात व वेदीजवळ जाताना प्रत्येक वेळी त्यांनी
आपले हात पाय धुवावेत; असे केल्यास ते मरणार नाहीत.
21त्यांनी आपले हात पाय धुतलेच पाहिजेत नाहीतर ते
मरतील; हा अहरोन व त्याच्या लोकांसाठी कायमचा
नियम होय; अहरोनाच्या मागे त्याच्या पुत्रपौत्रांसाठी
पिढ्यान्‌पिढ्या हा नियम लागू राहील."

## अभिषेकाचे तेल

22मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 23"उत्तमात उत्तम
मसाले घे; अधिकृत मापाप्रमाणे बारा पौंड म्हणजे पाचशे
शेकेल प्रवाही गंधरस; त्याच्या निम्मे म्हणजे सहा पौंड
म्हणजेच अडीचशे शेकेल सुगंधी दालचिनी, बारा पौंड
म्हणजे पाचशे शेकेल सुगंधी बच, 24आणि बारा पौंड
म्हणजे पाचशे शेकेल तज आणि एक हीनभर जैतुनाचे
तेल घे

25"व या सर्वांच्या मिश्रणाने अभिषेकासाठी पवित्र, सुगंधी
तेल तयार कर; 26हे पवित्र तेल दर्शन मंडपावर व
आज्ञापटाच्या कोशावर ओतून त्यांना पवित्र कर; या
गोष्टींना विशेष महत्व आहे हे यावरून दिसून येईल.
27तसेच मेज व त्यांवरील सर्व समान, दीपवृक्ष व त्याची
उपकरणे, धूपवेदी, 28तसेच होमवेदी व तिचे सर्वसामान
आणि गंगाळ व त्याची बैठक ह्यासर्वांवर तेल ओतावे.
29त्यांना पवित्र करावे म्हणजे ती परमेश्वराला परमपवित्र
होतील; ज्याचा त्यांना स्पर्श होईल ते पवित्र होईल.

30"अहरोन व त्याच्या मुलांना तेलाचा अभिषेक कर
म्हणजे ते पवित्र होतील, मग याजक या नात्याने ते माझी
सेवा करतील; 31इस्राएल लोकांना तू सांग की अभिषेकाचे
तेल पवित्र आहे, पिढ्यान्‌पिढ्या ते केवळ माझ्यासाठीच
वापरावे. 32ह्या तेलाचा, ते साधे सुवासिक तेल
असल्यासारखा कोणीही वापर करु नये; हे पवित्र तेल
ज्याप्रकारे तयार केले तसे तेल कोणीही तयार करु नये;
हे तेल पवित्र आहे आणि तुम्हालाही ते अगदी पवित्रच
वाटले पाहिजे. 33ह्या पवित्र तेलासारखे सुवासिक तेल जर

---

**आठरा इंच** म्हणजे एक क्युबिट.

**छतीस इंच** म्हणजे दोन क्युबिट.

कोणी तयार करील किंवा ते कोणा परकीयाला देईल तर त्याला आपल्या लोकांतून बाहेर काढून टाकावे."

## धूप

[34]नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, "तू हे सुवासिक मसाले म्हणजे उत्तम गंधरस, जटामांसी, गांधा बिरूजा व शुद्ध धूप आणावेस. ह्या सर्व वस्तू समभाग घ्याव्यात; [35]आणि गांध्याच्या कसबाप्रमाणे मिसळून त्यांचे सुवासिक धूप द्रव्य तयार करावे; तसेच त्यात मीठमिसळावे म्हणजे ते मिश्रण केलेल धूप द्रव्य शुद्ध व पवित्र होईल. [36]त्यातले काही कुटून त्याचे चुर्ण करावे, व ते दर्शन मंडपात पवित्र करारापुढे ठेवावे; ह्याच कोशापुढे मी तुला दर्शन देत जाईन; हे चूर्ण तुम्ही परमपवित्र लेखावे. [37]या धूपद्रव्याचा फक्त परमेश्वरासाठीच उपयोग करावा; त्याच्या सारखे दुसरे धूप द्रव्य तुम्ही करु नये. [38]सुवासाचा आनंद घ्यावा म्हणून कोणी आपल्या स्वत:साठी असे धूप द्रव्य तयार करील तर त्याला आपल्या लोकांतून बाहेर काढून टाकावे."

## बसालेल आणि अहलियाब

31 नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, [2]"यहुदा वंशातील उरी याचा मुलगा बसालेल याला मी निवडून घेतले आहे. (उरी हूर याचा मुलगा होता.) [3]देवाच्या आत्म्याने त्याला भरले आहे; आणि सर्व प्रकारची कामे करण्यासाठी मी त्याला कसब, बुद्धी व ज्ञान ही दिली आहेत. [4]बसालेल फार चांगला कसबी कारागीर आहे, तो सोने, चांदी व पितळ यांच्या कलाकुसरीच्या वस्तू तयार करील. [5]तो हिऱ्यांना सुंदर पैलू पाडील व हिरे जडवून देईल; तो लाकडावरील कोरीव कामही करील; आणि अशा सर्व प्रकारची कलाकुसरीची कामे करील. [6]त्याच्या बरोबर काम करण्याकरता दान याच्या वंशातील अहिसामाख याचा मुलगा अहलियाब यालाही मी निवडले आहे; बाकीच्या कारागिरांना मी कौशल्य दिले आहे त्यामुळे ते सर्व मिळून मी तुला सांगितलेली सर्व कामे बरोबर करतील.

[7]दर्शनमंडप आज्ञापटाचा कोश, त्यावरील दयासन आणि तंबूचे सर्व सामान;

[8] मेज व त्यावरील सर्व समान, शुद्ध सोन्याचा दीपवृक्ष व त्याची उपकरणे;

[9] होमवेदी व तिची उपकरणे, गंगाळ व त्याची बैठक;

[10]अहरोन व त्याच्या मुलांनी याजक या नात्याने माझी सेवा करताना घालावयाची, विणिलेली तलम व पवित्र वस्त्रे;

[11]अभिषेकाचे सुवासिक तेल आणि पवित्र स्थानी जाळावयाचा सुगंधी द्रव्याचा धूप.

ह्या सर्व वस्तू मी तुला सांगितल्याप्रमाणे हे कारागिर तयार करतील."

## शब्बाथ दिवस

[12]नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, [13]"इस्राएल लोकांना हे सांग की विश्रांतीच्या पवित्र दिवसासंबंधी मी सांगितलेले नियम तुम्ही अवश्य पाळावेत, ते या करता की त्यावरून ते पिढ्यान्‌पिढ्या तुमच्या माझ्यामध्ये खूण म्हणून राहतील आणि त्यामुळे मी जो परमेश्वर त्या मी तुम्हाला माझे पवित्र लोक केले आहे हे तुम्हाला कळेल;

[14]"म्हणून शब्बाथ दिवस तुम्ही पवित्रपणे पाळावा; शब्बाथ दिवसाला जर कोणी इतर दिवसासारखा लेखून तो भ्रष्ट करील तर त्याला अवश्य जिवे मारावे; जो कोणी शब्बाथ दिवशी काम करील, त्याला आपल्या लोकांतून बाहेर काढून टाकावे. [15]काम करण्याकरता आठवड्याचे इतर सहा दिवस आहेत; परंतु सातवा दिवस विसावा घेण्यासाठी पवित्र दिवस आहे हा परमेश्वराला मान देण्याचा पवित्र दिवस आहे; जर कोणी शब्बाथ दिवशी काम करील तर त्याला अवश्य ठार मारावे.

[16]इस्राएल लोकांनी शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळावा; त्यांनी तो निरंतर पाळावा कारण हा त्यांच्या माझ्यामध्ये पिढ्यान्‌पिढ्या चालणारा करार आहे. [17]शब्बाथ दिवस इस्राएल लोकामध्ये व माझ्यामध्ये कायमची खूण आहे. परमेश्वराने सहा दिवस काम करून आकाश व पृथ्वी निर्माण केल्यावर सातव्या दिवशी विसावा घेतला व त्याचा थकवा गेला."

[18]या प्रमाणे परमेश्वराने सीनाय पर्वतावर मोशे बरोबर आपले बोलणे संपविले व मग त्याने आपल्या बोटांनी लिहिलेल्या दोन सपाट दगडी पाट्या (आज्ञापट) मोशेला दिल्या.

## सोन्याचे वासरु

32 इस्राएल लोकांनी असे पाहिले की बराच वेळ होऊन गेला तरी मोशे पर्वतावरून खाली आला नाही; तेव्हा सर्व लोक अहरोनाभोवती जमले व त्याला म्हणाले, "पाहा, मोशेने आम्हाला मिसर देशातून बाहेर आणले परंतु मोशेचे काय झाले ते आम्हांस कळत नाही, म्हणून आमच्यापुढे चालतील असे देव आमच्यासाठी तयार कर; आम्ही त्यांच्या मागे जाऊ."

[2]अहरोन लोकांना म्हणाला, "तुम्ही तुमच्या बायका मुले व मुली यांच्या कानातील सोन्याची कुंडले मजकडे आणा"

[3]मग सर्व लोकांनी त्यांच्या कडील सोन्याची कुंडले गोळा करून अहरोनाकडे आणली. [4]अहरोनाने लोकांकडून ते सोने घेतले; आणि ते ओतून व कोरणीने कोरुन त्यापासून वासराची मूर्ती केली.

मग लोक म्हणाले, “हे इस्राएला, पाहा; हा तुमचा देव!
यानेच तुला मिसर देशातून बाहेर आणले.”

5अहरोनाने हे सर्व पाहिले तेव्हा त्याने त्या वासरापुढे
एक वेदी बांधली आणि जाहीर करून तो म्हणाला, “तुमच्या
परमेश्वराच्या सन्मानाकरता उद्या मोठा उत्सव होणार
आहे.”

6लोक दुसऱ्या दिवशी पहाटेच उठले; त्यांनी जनावरांचा
वध केला व होमार्पणे व शांत्यर्पणे वाहिली. मग ते
खाण्यापिण्यास बसले; नंतर उठून ते खेळायला लागले.

7त्याच वेळी परमेश्वर मोशेला म्हणाला, “तू पर्वत उतरुन
लवकर खाली जा, कारण ज्या तुझ्या लोकांना तू मिसर
देशातून बाहेर आणले त्यांनी महाभयंकर पाप केले आहे.
8मी त्यांना करावयास संगितलेल्या गोष्टीपासून किती
लवकर ते दूर गेले आहेत! त्यांनी आपल्यासाठी सोने
वितळवून वासराची मूर्ती केली आहे; ते त्याची पूजा करीत
आहेत व त्याला अर्पणे वाहात आहेत; ते म्हणत आहेत,
‘हे इस्राएला, ह्याच देवांनी तुला मिसर देशातून बाहेर
आणले आहे.’”

9परमेश्वर मोशेला म्हणाला, “ह्या लोकांना मी पाहिले
आहे; ते फार ताठमानेचे लोक आहेत; ते नेहमी मजविरुद्ध
उठतात. 10तर आता मला त्यांना माझ्या रागाच्या तडाख्याने
नष्ट करु दे! नंतर मी तुझ्यापासून एक महान राष्ट्र
निर्माण करीन.”

11परंतु काकुळतीने विनंती करुन मोशे आपला देव
परमेश्वर ह्याला म्हणाला, “परमेश्वरा, तुझ्या रागाने तुझ्या
लोकांचा नाश न होवो; तू तुझ्या महान शक्तीने व सामर्थ्याने
त्यांना मिसर देशातून बाहेर आणलेस 12आणि आता तू
त्यांचा नाश केलास तर मिसर देशाचे लोक म्हणतील,
‘परमेश्वराने त्यांचे वाईट करण्यासाठी, डोंगरावर त्यांना
ठार मारण्यासाठी व पृथ्वीवरुन त्यांचा नायनाट करण्यासाठी
त्यांना मिसर देशातून बाहेर नेले’ म्हणून तू त्यांच्यावर
रागावू नकोस; तुझा राग तू सोडून टाक; तुझ्याच लोकांचा
तू नाश करु नयेस; 13तुझे सेवक अब्राहाम, इसहाक व
याकोब, यांची आठवण कर; तू तुझ्या नांवाने शपथ वाहिली
होतीस; तू म्हणाला होतास, ‘मी तुमची संतती आकाशातील
ताऱ्या इतकी करीन, मी वचन दिलेला देश त्यांना देईन
व तो कायमचेच त्यांचे वतन होईल.’”

14तेव्हा परमेश्वराला लोकांबद्दल वाईट वाटले आणि
आधी म्हटल्याप्रमाणे त्याने त्यांचा नाश केला नाही.

15मग मोशे पर्वतावरुन खाली उतरला; कराराच्या दोन
सपाट पाट्या त्याच्या जवळ होत्या; त्या पाट्यावर पुढे व
मागे अशा दोन्ही बाजूंना आज्ञा लिहिलेल्या होत्या. 16देवाने
स्वत:च त्या पाट्या तयार केल्या होत्या व त्याने स्वत:च
त्यांच्यावर कोरुन आज्ञा लिहिलेल्या होत्या. 17यहोशवाने
लोकांचा गोंगाट ऐकला व तो मोशेला म्हणाला, “छावणीत
लोकांच्या लढाईसारखा आवाज ऐकू येत आहे.” 18मोशेने
उत्तर दिले, “एखाद्या सैन्याच्या विजयाचा हा आवाज नाही
किंवा एखाद्या सैन्याच्या पराभवाचा हा आक्रोश नाही;
मला जो आवाज ऐकू येत आहे तो नाचगाण्यांचा आहे.”

19मोशे छावणीजवळ येऊन पोहोंचल्यावर त्याने ते
सोन्याचे वासरु व लोकांच्या नाच गाण्यांचा धिंगाणा पाहिला
आणि तो भयंकर संतापला; त्याने आपल्या हातातल्या
दगडी पाट्या खाली फेकून दिल्या; तेव्हा त्या डोंगराच्या
पायथ्यावर पडून फुटल्या व त्यांचे तुकडे तुकडे झाले.
20नंतर लोकांनी बनविलेले ते सोन्याचे वासरु मोशेने
तोडून फोडून टाकले व ते अग्नीत वितळवले; त्याचा
कुटून त्याने भुगाभुगा केला; मग तो त्याने पाण्यात टाकला
व ते पाणी त्याने इस्राएल लोकांस प्यावयास लावले.

21मोशे अहरोनास म्हणाला, “ह्या लोकांनी तुझे असे
काय केले होते की तू त्यांना असे भयंकर पाप करावयास
लावलेस?”

22अहरोन मोशेला म्हणाला, “स्वामी, असे माझ्यावर
रागावू नका; हे लोक जे वाईट ते करावयास तत्पर
असतात, हे आपणास माहीत आहे. 23लोक मला म्हणाले,
‘मोशेने आम्हाला मिसर देशातून काढून बाहेर आणले;
परंतु आता त्याचे काय झाले हे आम्हाला माहीत नाही;
तेव्हा आमच्यापुढे चालतील असे देव तू आमच्यासाठी
करुन दे.’

24तेव्हा मी त्यांना सांगितले, ‘जर तुम्हाकडे सोन्याची
कुंडले असतील तर ती मला द्या.’ तेव्हा लोकांनी मला
त्यांच्याकडील सोने दिले; मी सोने भट्टीत टाकले आणि
तिच्यातून हे वासरु बाहेर आले!”

25मोशेने पाहिले की अहरोनाने लोकांवरचे नियंत्रण
ढिले केले त्यामुळे ते बेभान होत गेले आणि त्यांच्या
मूर्खपणाच्या आचरणाचा तमाशा त्यांच्या शत्रूंनी पाहिला.
26तेव्हा मोशे छावणीच्या दाराजवळ उभा राहिला आणि
म्हणाला, “ज्या कोणाला परमेश्वराच्या मागे यावयाचे
असेल, त्याने मजकडे यावे,” आणि लगेच लेवी वंशाचे
सर्व लोक मोशेकडे पळत गेले.

27मग मोशे त्यांना म्हणाला, “इस्राएलाचा देव परमेश्वर
काय म्हणतो ते मी तुम्हांस सांगतो, ‘प्रत्येक माणसाने
आपली तलवार घ्यावी आणि छावणीच्या एका टोकापासून
दुसऱ्या टोकापर्यंत अवश्य जावे आणि प्रत्येक माणसाने
आपला भाऊ, मित्र व शेजारी यांना अवश्य जिवे मारावे.”

28लेवी वंशाच्या लोकांनी मोशेची आज्ञा पाळली आणि
त्या दिवशी सुमारे तीन हजार इस्राएल लोक मेले. 29मग
मोशे म्हणाला, “आपली मुले व आपले भाऊ यांच्याविरुध्द
तुम्ही उठला आणि स्वत:ला कृपापात्र केलेत”

30दुसऱ्या दिवशी सकाळी मोशेने लोकांना सांगितले,
“तुम्ही भयंकर पाप केले आहे! परंतु आता मी
परमेश्वराकडे पर्वतावर जातो; काही तरी करून कदाचित्
परमेश्वराकडून मला तुमच्या पापांची क्षमा मिळविता
येईल.” 31तेव्हा मोशे माघारी परमेश्वराकडे जाऊन
म्हणाला, “परमेश्वरा, कृपा करून माझे ऐक; ह्या लोकांनी

आपणासाठी सोन्याचे देव केले हे फार वाईट पाप केले;
32तरी आता तू त्यांच्या ह्या पापांची क्षमा कर! परंतु जर
तू त्यांच्या पापांची क्षमा करणार नसशील तर मग तू
लिहिलेल्या जीवनी पुस्तकातून माझे नांव काढून टाक.
33परंतु परमेश्वर मोशेला म्हणाला, “जे मजविरुद्ध पाप
करतात केवळ त्या लोकांचीच नांवे मी माझ्या पुस्तकातून
काढून टाकतो. 34तेव्हा तू आता खाली जा आणि मी
सांगतो तेथे लोकांना घेऊन जा; माझा दूत तुजपुढे चालेल
व तुला मार्ग दाखवील जेव्हा पाप केलेल्या लोकांना शिक्षा
करण्याची वेळ येईल तेव्हा त्यांना शिक्षा केली जाईल.”
35लोकांनीच आपल्यासाठी अहरोनाला सोन्याचे वासरु
बनवावयास सांगितले म्हणून परमेश्वराने लोकांवर
भयंकर रोगराई आणली.

## “मी तुमच्या बरोबर येणार नाही”

33 मग परमेश्वराने मोशेला सांगितले, “तू आणि
तुझ्या बरोबर मिसर देशातून तू आणलेले लोक,
तुम्ही येथून पुढच्या प्रवासास निघा; आणि जो देश मी
तुझ्या संततीला देईन अशी मी अब्राहाम, इसहाक व याकोब
यांना शपथ वाहिली होती त्या देशाला तुम्ही जा. 2तुमच्यापुढे
चालण्यास मी माझ्या दूताला पाठवीन आणि कनानी,
अमोरी, हित्ती, परिज्जी, हिव्वी व यबूसी लोकांचा मी पराभव
करीन व त्यांना तुमचा देश सोडावयास भाग पाडीन. 3तेव्हा
तुम्ही दुधामधाच्या देशास जा; मी तुमच्याबरोबर येणार
नाही कारण तुम्ही फार ताठमानेचे लोक आहात जर मी
तुमच्या बरोबर आलो तर तुम्ही मला रागाला आणाल.
कदाचित मी जर मी आलो तर रस्त्यातच तुम्हाला नष्ट
करीन.”

4ही वाईट बातमी ऐकल्यावर लोक फार दु:खी झाले
आणि त्यानंतर कोणीही आपल्या अंगावर दागदागिने घातले
नाहीत; 5कारण परमेश्वर मोशेला म्हणाला, “तू इस्राएल
लोकांस असे सांग, ‘तुम्ही फार ताठमानेचे लोक आहात;
मी तुमच्या बरोबर थोडा वेळ जरी प्रवास केला तरी मी
तुम्हाला नष्ट करीन; म्हणून तुम्ही तुमचे दागदागिने काढून
ठेवा; मग तुमचे काय करावयाचे ते मी ठरवीन.’” 6म्हणून
होरेब पर्वतापासून (सीनाय पर्वतापासून) पुढे इस्राएल
लोकांनी दागदागिने घालणे बंद केले.

## दर्शन मंडप

7मोशे छावणी बाहेर बऱ्याच अंतरावर तंबू लावत असे.
मोशेने त्याला ‘दर्शन मंडप’ असे नांव दिले होते; ज्या
कोणाला परमेश्वराला काही विचारावयाचे असेल तो
छावणीबाहेरील दर्शन मंडपाकडे जाई. 8ज्या ज्या वेळी
मोशे छावणीतून दर्शन मंडपाकडे जाई त्या त्यावेळी सर्व
लोक आपापल्या तंबूच्या दारात उभे राहात आणि मोशे
दर्शन मंडपात जाईपर्यंत त्याला बघत. 9जेव्हा मोशे तंबूत
जाई तेव्हा उंच ढग खाली उतरुन येई आणि दर्शन मंडपाच्या
दारापाशी तो उभा राही; ह्याप्रमाणे परमेश्वर मोशेशी बोलत
असे. 10जेव्हा लोक दर्शन मंडपाच्या दारात ढग बघत
तेव्हा ते आपापल्या तंबूच्या दारात उभे राहून देवाला
नमन करीत.

11ज्याप्रमाणे एखादा माणूस आपल्या मित्राशी बोलतो
त्याप्रमाणे परमेश्वर मोशेबरोबर समोरासमोर बोलत असे.
परमेश्वराशी बोलल्यानंतर मोशे नेहमीआपल्या छावणीत
माघारी जाई तरी मोशेचा मदतनीस, नूनाचा मुलगा
यहोशवा हा तरुण पुरुष मंडप सोडून बाहेर येत नसे.

## मोशे परमेश्वराचे तेज पाहातो

12मोशे परमेश्वराला म्हणाला, “ह्या लोकांना घेऊन
जाण्यास तू मला सांगितलेस, परंतु तू माझ्याबरोबर कोणाला
पाठविणार ते तू सांगितले नाहीस; तू मला म्हणालास, ‘मी
तुला तुझ्या नांवाने ओळखतो आणि तुझ्याविषयी मी संतुष्ट
आहे.’ 13जर मी तुला खरोखर संतोष दिला असेल तर तू
मला तुझे मार्ग शिकव. तुला जाणून घेण्याची माझी इच्छा
आहे मग तुला सतत संतोष देणे मला जमेल. हे सर्व लोक
तुझे आहेत याची तू आठवण ठेव.”

14परमेश्वराने उत्तर दिले, “मी स्वत: तुझ्या बरोबर
येईन व तुला विसावा देईन.”

15मग मोशे परमेश्वराला म्हणाला, “जर तू
आमच्याबरोबर येणार नाहीस तर मग आम्हाला या
ठिकाणापासून पुढे पाठवू नकोस. 16तसेच तू माझ्या विषयी
व लोकांविषयी संतुष्ट आहेस ते आम्हाला कसे कळेल?
जर तू आमच्याबरोबर येशील तर मग मात्र आम्हाला
खातरीने कळेल! जर तू आमच्याबरोबर येणार नाहीस
तर मग मी व हे लोक त्यांच्यात आणि पृथ्वीवरील
कोणत्याही लोकात काही फरक राहणार नाही.”

17मग परमेश्वर मोशेला म्हणाला, “तू मागतोस त्याप्रमाणे
मी करीन, कारण मी तुजवर संतुष्ट आहे आणि मी तुला
तुझ्या नांवाने ओळखतो.”

## मोशे परमेश्वराचे तेज पाहातो

18नंतर मोशे म्हणाला, “आता कृपा करून मला तुझे
तेज दाखव.

19मग परमेश्वराने मोशेला उत्तर दिले, “मी माझे सर्व
चांगुलपण तुझ्यापुढे चालवीन; मी परमेश्वर आहे आणि
हे माझे नांव मी जाहीर करीन म्हणजे तू ते ऐकशील
कारण मी निवडलेल्या कोणावरही दया करीन व त्यांच्यावर
प्रेम करीन. 20परंतु तू माझा चेहरा पाहू शकणार नाहीस,
कारण माझा चेहरा पाहिलेला कोणीही माणूस जगणार
नाही.

21“माझ्याजवळ ह्या ठिकाणी एक खडक आहे; तू त्यावर
उभा राहा. 22माझे तेज त्या जागेजवळून पुढे जाईल तेव्हा
मी तुला त्या खडकातील मोठ्या भेगेत ठेवीन; आणि मी
निघून जाईपर्यंत माझ्या हाताने तुला झाकीन; 23नंतर मी

माझा हात काढून घेईन आणि तू माझी पाठपाहाशील;
परंतु तू माझा चेहरा पाहाणार नाहीस."

## नवीन दगडी पाट्या

34 मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "पहिल्या
तुटलेल्या दोन पाट्याप्रमाणे आणखी दोन दगडी
पाट्या तयार कर म्हणजे पहिल्या दोन पाट्यांवर लिहिलेलीच
अक्षरे मी त्या पाट्यांवर लिहीन.
2उद्या सकाळीच तयार हो व सीनाय पर्वतावर चढून ये
आणि तेथे पर्वताच्या शिखरावर माझ्या समोर हजर राहा.
3तुझ्याबरोबर कोणालाही चढून वर येण्याची परवानगी
नाही; पर्वतावरील कोणत्याच ठिकाणी कोणी माणूस देखील
दिसू नये; तसेच तुझ्या जनावरांच्या खिल्लारांना व
मेंढ्यांच्या कळपांना पर्वताच्या पायथ्याशी देखील चरु
देऊ नयेस."
4तेव्हा मोशेने पहिल्या पाट्यांसारख्याच आणखी दोन
दगडी पाट्या तयार केल्या; दुसऱ्या दिवशी सकाळीच तो
सीनाय पर्वतावर गेला; परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे सर्वकाही
करून त्याने त्या दोन दगडी पाट्या आपल्याबरोबर नेल्या;
5मोशे पर्वतावर आल्यावर परमेश्वर एका ढगातून
त्याच्याकडे खाली उतरला व तो मोशेपाशी उभा राहिला;
तेव्हा मोशेने परमेश्वराचे नाव घेतले*
6परमेश्वर मोशेपुढून गेला व म्हणाला , "मी याव्हे
म्हणजे प्रभु आहे; मी दयाळू, कनवाळू, मंदक्रोध (लवकर
राग न येणारा,) महान प्रेमाने पुरेपूर भरलेला व विश्वास
ठेवण्यास पात्र असा देव आहे. 7परमेश्वर हजारो लोकांवर
दया करतो; तो लोकांच्या वाईट कर्मांची त्यांना क्षमा
करतो; परंतु तो दोषी लोकांना शिक्षा करावयास विसरत
नाही; परमेश्वर फक्त लोकांनाच शिक्षा करतो असे
नाही परंतु त्यांची मुले, त्यांची नातवंडे व पतवंडे ह्यांना
म्हणजे त्यांच्या तिसऱ्या चौथ्या पिढीपर्यंत, त्यांच्या पूर्वजांच्या
अपराधाबद्दल शिक्षा भोगावयास लावतो."
8मग मोशेने ताबडतोब भूमिपर्यंत वाकून परमेश्वराला
नमन केले. मोशे म्हणाला, 9"परमेश्वरा तू जर मजवर
खूष असशील तर कृपा करून आमच्याबरोबर चाल! हे
लोक ताठमानेचे आहेत हे मला माहीत आहे; परंतु आम्ही
केलेल्या पापाबद्दल तू आम्हाला क्षमा कर! आणि तुझे
लोक म्हणून आमचा स्वीकार कर."
10मग परमेश्वर म्हणाला, "मी तुझ्या सर्व लोकांबरोबर
हा करार करीत आहे; आतापर्यंत पृथ्वीवरील कोणत्याही
राष्ट्रासाठी या पूर्वी कधीही केलेले नाहीत ते चमत्कार मी
करीन; तुझ्याबरोबर असलेले सर्व लोक पाहातील की
मी जो परमेश्वर आहे तो महान सामर्थ्यवान आहे;
मी तुझ्यासाठी जे चमत्कार करीन ते पाहून सर्व
लोकांना माझे सामर्थ्य कळेल. 11मी आज तुला ज्या
आज्ञा देतो त्या तू पाळ म्हणजे मग मी तुझ्या शत्रूंना तुझ्या
पुढून घालवून देईन म्हणजे अमोरी, कनानी, हित्ती,
परिज्जी, हिव्वी व यबूसी ह्यांना तुझ्या देशातून घालवून
देईन. 12सावध राहा! तू ज्या देशात जात आहेस त्यात
राहणाऱ्या लोकांबरोबर कोणत्याही प्रकारे करारमदार
करु नकोस; जर तसे करशील तर तुमच्यावर संकट
येईल. 13परंतु त्यांच्या वेद्या नष्ट करा; ते उपासना करीत
असलेले दगडधोंडे तोडून टाका; त्यांच्या मूर्ती फोडून टाका.
14दुसऱ्या कोणत्याही दैवतांची पूजा करु नका; मी 'याव्हे'
(कानाह) आहे; हे माझे नांव आहे; मी ईर्ष्यावान देव'
आहे.
15"सावध राहा! या देशातील रहिवाशांबरोबर कोणत्याही
प्रकारचे करारमदार करु नका; जर तुम्ही ते कराल तर
ते लोक त्यांच्या दैवतांना नमन करताना कदाचित तुम्ही
त्यांना साथ देऊन त्यांच्या दैवतांना नमन कराल; ते
लोक त्यांच्या पूजेच्या वेळी तुम्हाला भाग घेण्यासाठी
बोलावतील आणि तुम्ही त्यांच्या बलिदानातले काही खाल.
16त्या लोकातील मुलींची तुम्ही आपल्या मुलांसाठी बायका
म्हणून कदाचित् निवड कराल; त्या मुली तर खोट्या
दैवतांची उपासना करत असतील तर, त्या कदाचित् तुमच्या
मुलांना देखील त्यांची उपासना करावयास लावतील.
17"तुम्ही आपल्यासाठी ओतीव मूर्ती करु नका.
18"बेखमीर भाकरीचा सण पाळ, मी पूर्वी दिलेल्या
आज्ञेप्रमाणे नेमलेल्या वेळी अबीब महिन्यातील सात दिवस
पर्यंत तुम्ही बेखमीर भाकर खावी कारण ह्याच महिन्यात
मिसर देशातून तुम्ही बाहेर आलात.
19"स्त्रीपासून जन्मलेला प्रथम पुत्र माझा आहे; तसेच
तुमच्या गुराढोरापैकी गायीचे व मेंढराचे प्रथम जन्मलेले
नर माझे आहेत. 20गाढवीचे पहिले शिंगरु खंडणी दाखल
एक कोकरु देऊन सोडवून घ्यावे पण त्याला तसे सोडवले
नाही तर त्याची मान मोडावी. तुझ्या मुलांपैकी प्रत्येक
पहिला जन्मलेला मुलगा मोबदला देऊन सोडवून घ्यावा.
कोणी रिकाम्या हाताने माझ्यासमोर येऊ नये.
21"सहा दिवस तू आपले कामकाज कर परंतु सातव्या
दिवशी अवश्य विसावा घे; नांगरणीच्या व कापणीच्या
हंगामातही सातव्या दिवशी तू अवश्य विसावा घे.
22"तू सप्ताहाचा, म्हणजे गव्हाच्या कापणीच्या प्रथम
पिकाचा सण पाळ. गव्हाच्या पिकाचे पहिले धान्य या
सणासाठी वापर. आणि वर्ष परिवर्तनाच्या काळात सुगीचा
सण पाळ.;
23"तुमच्या सर्व पुरुषांनी वर्षातून तीनदा प्रभु परमेश्वर
म्हणजे इस्राएलाचा देव याच्यासमोर हजर राहावे.
24"तुझ्या देशात जाशील तेव्हा तुझ्या शत्रूंना मी तुझ्या
देशातून घालवून देईन; मी तुझ्या देशाच्या सीमा वाढवीन;
आणि वर्षातून तीनदा तू आपला देव परमेश्वरासमोर

---

**मोशेने ... घेतले** शब्दश: "तो परमेश्वराच्या नावाने भेटला"
ह्याचा अर्थ कदाचित त्याने परमेश्वराची उपासना केली असा
असावा.

हजर राहावयास जाशील त्यावेळी तुझ्यापासून तुझा देश
घेण्याचा कोणीही प्रयत्न करणार नाही.
25“माझ्या यज्ञबलीचे रक्त खमीराच्या भाकरीबरोबर
अर्पू नये;” आणि वल्हांडण सणाच्या यज्ञपशूच्या मांसापैकी
काहीही दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत राहू देऊ नये.
26“हंगामाच्या वेळी तुझ्या जमिनीच्या उत्पन्नातील प्रथम
पीक, तुझा जो देव परमेश्वर, याच्या मंदिरात आण; “करडू
त्याच्या आईच्या दुधात कधीच शिजवू नये.”
27“मग परमेश्वर मोशेला म्हणाला, “मी तुला
सांगितलेल्या सर्व गोष्टी लिहून ठेव कारण त्या, मी तुझ्याशी
व इस्राएल लोकांशी केलेल्या कराराच्या त्या गोष्टी आहेत.”
28मोशे तेथे परमेश्वराजवळ चाळीस दिवस व चाळीस
रात्री राहिला; त्या दिवसात त्याने अन्न किंवा पाणी घेतले
नाही; आणि मोशेने त्या पवित्रकराराची वचने-दहा
आज्ञा-त्या दोन दगडी पाट्यांवर लिहिली.

## मोशेचा सतेज चेहरा

29मग मोशे, पवित्रकरार लिहिलेल्या त्या दोन दगडी
पाट्या घेऊन सीनाय पर्वतावरून खाली उतरला;
परमेश्वराशी बोलल्यामुळे त्याचा चेहरा तेजाने तळपत
होता, परंतु ते त्याला ठाऊक नव्हते. 30अहरोन व सर्व
इस्राएल लोक यांनी मोशेच्या चेहऱ्यावरील तेजस्वी किरणे
पाहिली तेव्हा ते त्याच्या जवळ जाण्यास घाबरले; 31परंतु
मोशेने त्यांना बोलावले तेव्हा अहरोन व इस्राएल लोकांचे
वडीलजन त्याच्याकडे गेले तेव्हा तो त्यांच्याशी बोलला.
32त्यानंतर सर्व इस्राएल लोक मोशेकडे आले आणि त्याने
त्यांना परमेश्वराने त्याला सीनाय पर्वतावर दिलेल्या आज्ञा
दिल्या.
33लोकांशी आपले बोलणे संपविल्यावर मोशेने आपला
चेहरा आच्छादनाने झाकला. 34जेव्हा कधीही मोशे
परमेश्वराबरोबर बोलावयास त्याच्या समोर जाई, तेव्हा
तो आपल्या चेहऱ्यावरील आच्छादन काढीत असे; मग
तो इस्राएल लोकांकडे येऊन परमेश्वराने दिलेल्या आज्ञा
त्यांना सांगत असे. 35मोशेचा तेजाने तळपणारा चेहरा
इस्राएल लोक पाहात तेव्हा तो पुन्हा आपला चेहरा झाकून
घेई; आणि तो बोलावयास पुन्हा परमेश्वराकडे जाईपर्यंत
आपला चेहरा झाकून ठेवी.

## शब्बाथ दिवसाविषयी नियम

35 मग मोशेने सगळ्या इस्राएल लोकांना एकत्र केले;
तो त्यांना म्हणाला, “ज्या आज्ञा तुम्ही पाळाव्या
म्हणून परमेश्वराने तुम्हाला दिल्या आहेत त्या मी तुम्हाला
सांगतो;
2“कामकाजासाठी सहा दिवस आहेत परंतु सातवा दिवस
विसाव्यासाठी पवित्र दिवस आहे, तो पाळून विसावा
घेतल्यामुळे तुम्ही परमेश्वराचा सन्मान कराल. सातव्या
दिवशी-शब्बाथ दिवशी काम करणाऱ्या कोणत्याही
माणसास अवश्य जिवे मारावे. 3शब्बाथ दिवशी तुम्ही
राहात असलेल्या जागेत कोठेही तुम्ही विस्तव देखील
पेटवू नये.”

## पवित्र मंडपात आणावयाची अर्पणे

4मोशे सर्व इस्राएल लोकांस म्हणाला, “परमेश्वराने
दिलेल्या आज्ञा अशा. 5परमेश्वरासाठी पवित्र अर्पणे गोळा
करा; काय द्यावे ह्याविषयी तुम्ही प्रत्येकाने आपल्या मनात
ठरवावे आणि मग मनापासून ठरविलेले ते अर्पण
परमेश्वराकडे आणावे; सोने, चांदी, पितळ; 6निळे, जांभळे
व किरमिजी रंगाचे सूत, व तलम सणाचे कापड, बकऱ्याचे
केस; 7लाल रंगविलेली मेंढ्याची कातडी व तहशाची
कातडी, बाभळीचे लाकूड; 8दिव्यासाठी तेल, अभिषेकाच्या
तेलासाठी आणि सुगंधी धुपासाठी मसाले; 9तसेच एफोद व
न्यायाचा ऊरपट ह्यात खोचण्यासाठी गोमेद मणी आणि
इतर रत्ने आणावी.
10“जे तुम्ही कारागीर आहात त्या तुम्ही परमेश्वराने
आज्ञा केलेल्या सर्व वस्तू तयार कराव्यात म्हणजे, 11पवित्र
निवास मंडप, त्याचा बाहेरील तंबू व त्यावरील आच्छादान,
त्याचे आकडे, फळ्या, अडसर, खांब, व खुर्च्या; 12पवित्र
कोश, त्याचे दांडे, दयासन व अंतरपाट, 13मेज व त्याचे
दांडे, त्यावरील सर्व पात्रे व समक्षतेची पवित्र भाकर;
14प्रकाशाकरीता दीपवृक्ष, त्याची उपकरणे व दिवे,आणि
दिव्यासाठी तेल; 15धूपवेदी व तिचे दांडे, अभिषेकासाठी
तेल, सुगंधी धूप, पवित्र निवास मंडपाच्या दारासाठी पडदा;
16होमवेदी व तिची पितळेची जाळी, दांडे व तिचे इतर
साहित्य, पितळेचे गंगाळ व त्याची बैठक;
17अंगणाभोवतीच्या कनातीचे पडदे, त्यांचे खांब व त्यांच्या
खुर्च्या, आणि अंगणाचे दार झाकण्यासाठी पडदा;
18निवासमंडप व अंगण ह्यांच्यासाठी आधार देणाऱ्या मेखा
व तणावासाठी लागणाऱ्या दोऱ्या; 19पवित्र स्थानात
सेवाकरण्यासाठी कुशलतेने विणलेली वस्त्रे आणि याजक
ह्या नात्याने सेवाकरण्यासाठी अहरोन याजकाची व त्याच्या
मुलांची पवित्र वस्त्रे.”

## लोकांनी आणलेली महान अर्पणे

20मग सर्व इस्राएल लोक मोशेपुढून निघून गेले. 21नंतर
ज्या लोकांना मनापासून इच्छा झाली त्या सर्वांनी
दर्शनमंडपाच्या कामासाठी, त्यातील सगळ्या सेवेसाठी
आणि पवित्र वस्त्रासाठी परमेश्वराला अर्पणे आणली.
22ज्यांना मनापासून देण्याची इच्छा झाली त्या सगळ्या
स्त्री पुरुषांनी नथा, कुंडले, अंगठ्या, बांगड्या असे सर्व
प्रकारचे सोन्याचे दागिने आणले; ही सोन्याची पवित्र अर्पणे
परमेश्वरासाठी आणली.
23ज्यांच्याकडे निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे
सूत व तलम सणाचे कापड, बकऱ्याचे केस, लाल

रंगविलेली मेंढ्याची कातडी व तहशाची कातडी होती
त्यांनी ते ते आणले. 24चांदी व पितळ अर्पण करणाऱ्या
प्रत्येकाने ती अर्पणे परमेश्वरासाठी आणली आणि
ज्यांच्याकडे बाभळीचे लाकूड होते त्यांनी ते परमेश्वराला
अर्पण केले. 25ज्या स्त्रिया शिवणकाम व विणकाम ह्यात
तरबेज होत्या त्यांनी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाचे
कातलेले सूत व तलम सणाचे कापड आपल्या हातांनी
विणून आणले. 26ज्या इतर स्त्रियांना मदत करण्याची इच्छा
झाली त्या सर्वांनी आपले कौशल्य दाखवून बकऱ्याच्या
केसाचे कापड आणले.

27अधिकाऱ्यांनी याजकाचे एफोद व न्यायाचा ऊरपट
ह्यांत जडवण्यासाठी गोमेदमणी व इतर रत्ने आणली.
28लोकांनी सुगंधी मसाले व जैतुनाचे तेल देखील आणले
त्यांचा उपयोग सुगंधी धूप अभिषेकाचे तेल आणि दिव्याचे
तेल यासाठी करण्यात आला.

29ज्या इस्राएल लोकांना मदत करण्याची मनापासून
इच्छा झाली त्या सर्वांनी आपल्या खुषीने परमेश्वरासाठी
अर्पणे आणली; परमेश्वराने मोशेला व लोकांना आज्ञा
केल्याप्रमाणे वस्तू बनविण्यास त्यांचा उपयोग झाला.

### बसालेल आणि अहलियाब

30तेव्हा मोशे इस्राएल लोकांना म्हणाला “पहा
परमेश्वराने यहुदा वंशातील उरी (उरी हा हूरचा पुत्र
होता) ह्याचा मुलगा बसालेल ह्याची निवड केली आहे.
31परमेश्वराच्या आत्म्याने बसालेल याला भरले आहे
त्याला सर्व प्रकारच्या वस्तू बनवण्यासाठी कसब आणि
ज्ञान दिले आहे. 32तो सोने, चांदी आणि पितळ ह्यांच्यापासून
कलाकुसरीच्या वस्तू तयार करील. 33तो हिऱ्यांना पैलू
पाडून हिरे आणि रत्ने जडवून देईल. बसालेल लाकूड
कामही करून त्यापासून सर्व प्रकारच्या वस्तू बनवील.
34परमेश्वराने त्याला आणि दान वंशातील अहिसामाख
याचा मुलगा अहलियाब, याला ह्या विशेष कला इतरांना
शिकविण्याचे सामर्थ्य दिले आहे. 35कोरीव काम करणारे
कुशल सुतार, धातू काम करणारे कारागीर, निळ्या,
जांभळ्या ज्ञान व किरमिजी रंगाच्या सुताच्या कापडावर
व तलम सणाच्या कापडावर कशिदा काढणारे, विणकाम
करणारे, सर्व प्रकारचे कसबी काम करणारे व कुशल
कामाची योजना करणारे अशा सारख्या. सर्व कारागिरीची
कामे ते करु शकतात कारण परमेश्वराने त्यासाठी ह्या
दोघांना ज्ञान व कसब दिले आहे.”

36 “तेव्हा बसालेल व अहलियाब यांनी आणि
परमेश्वराने ज्या इतर कारागिरांना ह्या कामाच्या
कसबाचे ज्ञान व समज दिली आहे त्यांनी परमेश्वराच्या
आज्ञेप्रमाणे पवित्र मंडपाचे हे बांधकाम करावे.”

2नंतर बसालेल व अहलियाब यांना आणि ज्या
कारागिरांना परमेश्वराने विशेष कसब व ज्ञान दिले होते
त्यांना मोशेने बोलावले, ह्या कामात मदत व सेवा करण्याची
त्या लोकांची इच्छा होती म्हणून तेही खुषीने आले. 3इस्राएल
लोकांनी जी जी अर्पणे आणली होती त्यांचा देवाचे
पवित्रस्थान बांधण्यासाठी त्यांनी उपयोग केला. रोज सकाळी
इस्राएल लोकांनी अर्पणे आणणे चालूच ठेवले. 4शेवटी
मग सर्व कसबी कारागीर पवित्रस्थानाचे करीत असलेले
आपले काम सोडून मोशेकडे आले व म्हणाले, 5“लोकांनी
खूप अर्पणे आणली आहेत! आम्हाला ह्या पवित्रस्थानाचे
बांधकाम पूर्ण करावयास लागणाऱ्या साहित्यापेक्षा
कितीतरी अधिक आमच्यापाशी आले आहे!”

6तेव्हा मोशेने सर्व छावणीभर असा हुकूम सोडला की,
“कोणाही स्त्रीने किंवा पुरुषाने आता पवित्रस्थानाच्या
सेवेसाठी अधिक अर्पणे आणू नयेत.” तेव्हा अशा रीतीने
आणखी अर्पणे आणावयास बंदी घालण्यात आली.

7लोकांनी हे काम पूर्ण करण्याकरता लागणाऱ्या
साहित्यापेक्षा कितीतरी अधिक साहित्य अर्पण केले
होते!

### पवित्र निवास मंडप

8मग त्या कसबी कारागिरांनी पवित्र निवास मंडप
बांधण्याचे काम सुरु केले; त्यांनी कातलेल्या तलम सणाच्या
कापडाचे आणि निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या
सुताचे दहा पडदे तयार केले व त्यांच्यावर त्यांनी, पसरलेल्या
पंखाच्या, करुब दूतांची चित्रे शिवली. 9प्रत्येक पडद्याचे
मोजमाप सारखेच होते म्हणजे तो चौदावार-गज-लांब व
दोन वार-गज-रुंद असे होते. 10त्या कारागिरांनी त्यापैकी
पांच पडदे जोडून एक भाग व दुसरे पांच पडदे जोडून
दुसरा भाग असे दोन भाग तयार केले. 11नंतर त्यांनी त्या
दोन्हीही भागांच्या शेवटच्या किनारीवर निळ्या सुताची
बिरडी केली; तसेच दुसऱ्या पडद्याच्या किनारीवर ही तशीच
बिरडी केली. 12त्यानी एका पडद्याखाली किनारीवर पन्नास
बिरडी व दुसऱ्या पडद्याच्या किनारीवरही पन्नास बिरडी
केली; ती बिरडी समोरासमोर होती. 13नंतर ते दोन पडदे
एकत्र जोडण्यासाठी त्यांनी सोन्याच्या पन्नास गोल कड्या
केल्या; त्या कड्यांनी ते पडदे एकत्र जोडल्यावर त्या सर्वांचा
मिळून अखंड पवित्र निवास मंडप तयार झाला.

14नंतर पवित्र निवास मंडप झाकण्यासाठी त्या
कारागिरांनी बकऱ्याच्या केसांच्या अकरा पडद्यांचा एक
तंबू बनविला. 15ह्या सर्व पडद्यांचे मोजमाप सारखेच होते
म्हणजे पंधरा वार लांब व दोन वार रुंद होते. 16त्या
कारागिरांनी त्यापैकी पाच पडदे जोडून एक भाग व दुसरे
सहा पडदे जोडून दुसरा भाग तयार केला. 17नंतर त्यांनी
एका कनातीच्या बाहेरील शेवटच्या पडद्याच्या किनारीवर
पन्नास बिरडी व तशीच दुसऱ्या कनातीच्या बाहेरील
शेवटच्या पडद्याच्या किनारीवर पन्नास बिरडी केली. 18हे
दोन पडदे जोडून एक तंबू करण्यासाठी त्यांनी पितळेच्या
पन्नास गोल कड्या केल्या. 19मग त्यांनी पवित्र निवास

मंडप झाकण्यासाठी लाल रंग दिलेल्या, मेंढ्याच्या कातड्याचे व दुसरे तहाशाच्या कमावलेल्या कातड्याचे अशी दोन आच्छादने केली.

[20]मग पवित्र निवास मंडपाला आधार देण्यासाठी त्यांनी बाभळीच्या लाकडाच्या फळ्या तयार केल्या. [21]प्रत्येक फळी पंधरा फूट लांब व सत्तावीस इंच रुंद होती. [22]त्यांनी प्रत्येक फळीच्या दोन बाजूला दोन कुसे केली व उभ्या आडव्या तुकड्यांनी त्या दोन फळ्या जोडल्या; त्यांनी पवित्र निवास मंडपाच्या सर्व फळ्या एकासारख्याच केल्या. [23]त्यांनी पवित्र निवास मंडपाच्या दक्षिण बाजूस लावण्यासाठी वीस फळ्या केल्या; [24]मग त्या वीस फळ्यांच्या खाली लावण्यासाठी त्यांनी चांदीच्या चाळीस खुर्च्या केल्या, एका फळी खाली दोन म्हणजे प्रत्येक कुसाखाली एक याप्रमाणे त्या केल्या. [25]त्याचप्रमाणे पवित्र निवास मंडपाच्या दुसऱ्या म्हणजे उत्तर बाजूस लावण्यासाठी त्यांनी वीस फळ्या केल्या.

[26]त्यांनी त्या वीस फळ्यासाठी एकेका फळीखाली दोन या प्रमाणे चांदीच्या चाळीस खुर्च्या केल्या. [27]पवित्र निवास मंडपाच्या मागील बाजूस म्हणजे पश्चिम बाजूस लावण्यासाठी सहा फळ्या, [28]आणि त्याचप्रमाणे निवास मंडपाच्या कोपऱ्यासाठी दोन फळ्या त्यांनी केल्या.

[29]ह्या फळ्या खालच्या बाजूला जोडलेल्या होत्या आणि वरच्या भागी एकत्र गोल कडीला त्या अडकवल्या होत्या; दोन्ही कोपऱ्यासाठी त्यांनी अशाच फळ्या केल्या. [30]तेव्हा पवित्र निवास मंडपाच्या पश्चिमबाजूस एकूण आठफळ्या व प्रत्येक फळी खाली चांदीच्या दोन खुर्च्या अशा सोळा खुर्च्या झाल्या.

[31]त्यांनी बाभळीच्या लाकडाचे अडसर तयार केले–पवित्र निवास मंडपाच्या एका बाजूच्या फळ्यासाठी पाच, [32]दुसऱ्या बाजूच्या फळ्यासाठी पाच आणि पश्चिमेच्या म्हणजे मागल्या बाजूसाठी पांच; [33]आणि त्यांनी फळ्याच्या मध्यभागी लावावयाचा अडसर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोंचेल असा केला.

[34]त्या फळ्या त्यांनी सोन्याने मढविल्या, अडसर लावण्याच्या कड्या सोन्याच्या बनविल्या आणि अडसरही सोन्याने मढविले.

[35]मग त्यांनी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा आणि तलम सणाच्या कापडाचा एक अंतरपट बनविला व त्यावर करूब दूतांची चित्रे शिवून घेतली. [36]आणि त्यासाठी त्यांनी बाभळीच्या लाकडाचे चार खांब केले व ते सोन्याने मढविले; त्याच्या आकड्या सोन्याच्या केल्या आणि त्यांच्यासाठी चांदीच्या चार खुर्च्या बनविल्या, [37]मग त्यांनी पवित्र निवास मंडपाच्या प्रवेशद्वारासाठी निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा नक्षीदार पडदा बनविला. [38]व त्या पडद्यासाठी त्यांनी पाच खांब व त्यांच्या आकड्या बनविल्या; त्यांचा वरचा भाग व त्यांच्या बांधपट्ट्या सोन्याने मढविल्या; आणि खांबासाठी पितळेच्या पाच खुर्च्या बनविल्या.

## आज्ञापटाचा कोश

37 मग बसालेलाने बाभळीच्या लाकडाचा एक पवित्र कोश (पेटी) बनविला; तो पंचेचाळीस इंच लांब, सत्तावीस इंच रुंद व सत्तावीस इंच उंच होता. [2]त्याने तो आतून बाहेरून शुद्ध सोन्याने मढविला आणि त्याच्या सभोवती सोन्याचा काठकेला. [3]त्याने सोन्याच्या चार कड्या केल्या व त्या चारी कोपऱ्यांना लावल्या पेटी उचलून नेण्यासाठी त्यांचा उपयोग झाला प्रत्येक बाजूला दोन कड्या होत्या. [4]मग कोश वाहून नेण्याकरता त्याने बाभळीच्या लाकडाचे दांडे करुन ते शुद्ध सोन्याने मढविले. [5]ते दांडे कोशाच्या दोन्ही बाजूंच्या कड्यात घातले. [6]नंतर त्याने शुद्ध सोन्याचे दयासन बनविले; ते पंचेचाळीस इंच लांब व सत्तावीस इंच रुंद होते. [7]मग त्याने सोने घडवून दयासनाच्या दोन्ही टोकासाठी दोन करुब दूत बनविले [8]त्याने एक करूब दूत एका टोकासाठी व दुसरा करूब दूत दुसऱ्या टोकासाठी बनवून असे जडविले की करूब दूत व दयासन हे सोन्याच्या एकाच अखंड तुकड्यापासून बनविलेले दिसू लागले [9]करूबांचे पंख वर आकाशाकडे पसरवलेले होते व त्या पंखांनी दयासन झाकले होते; करुब दूतांची तोंडे समोरासमोर असून त्यांची दृष्टी दयासनाकडे लागलेली होती.

## पवित्र (विशेष) मेज

[10]त्याने बाभळीच्या लाकडाचे मेज बनविले, ते छत्तीस इंच लांब, अठरा इंच रुंद व सत्तावीस इंच उंच होते. [11]त्याने ते शुद्ध सोन्याने मढविले व त्याच्या सभोवती सोन्याचा काठकेला; [12]आणि त्याने त्याच्यासाठी तीन इंच रुंदीची एक पाळ केली व त्या पाळीस सभोवती सोन्याचा काठकेला. [13]त्याच्यासाठी सोन्याच्या चार गोल कड्या करुन त्याच्या चारही पायावरच्या चार कोपऱ्यांना त्या लावल्या. [14]ह्या गोल कड्या त्या पाळीजवळ ठेवल्या, त्या मेज उचलावयाच्या दांड्यासाठी होत्या. [15]मग मेज उचलण्यासाठी त्याने बाभळीच्या लाकडाचे दांडे केले व ते सोन्याने मढविले; [16]नंतर त्याने मेजावरची पात्रे म्हणजे तबके, चमचे, धूपपात्रे व पेयार्पणे ओतण्यासाठी कटोरे व सुरया ही सर्व शुद्ध सोन्याची बनविली.

## दीपवृक्ष

[17]मग त्याने शुद्ध सोन्याचा एक दीपवृक्ष बनविला; हा दीपवृक्ष, त्याची बैठक, त्याचा दांडा, त्याच्या फुलासारख्या वाट्या, त्याच्या कळ्या व पाकळ्या ही सर्व एकाच अखंड तुकड्याची घडविली. [18]त्या दीपवृक्षाला एका बाजूला तीन व दुसऱ्या बाजूला तीन अशा सहा शाखा होत्या. [19]प्रत्येक

शाखेला बदामाच्या फुलासारख्या तीन तीन वाट्या, कव्व्या
व पाकव्व्यासहित होत्या. 20दीपवृक्षाच्या दांड्याला आणखी
चार, बदामाच्या फुलांसारखी फुले, कव्व्या पाकव्व्या होत्या.
21ह्या दीपवृक्षावर दांड्याच्या एका बाजूला तीन व दुसऱ्या
बाजूला तीन अशा सहा शाखा होत्या; जेथे शाखा मुख्य
दांड्याला जोडलेली होती त्या प्रत्येक जोडाखाली कव्व्या व
पाकव्व्यासहित एक फूल होते. 22शाखा व फूले असलेला
हा संपूर्ण दीपवृक्ष शुद्ध सोन्याच्या एकाच अखंड तुकड्यातून
घडविलेला होता 23ह्या दीपावृक्षावर त्याने सात दिवे बनविले;
मग त्याने दिवे मालवण्याचे चिमटे व त्यांच्या ताटल्या ही
सर्व शुद्ध सोन्याची बनविली. 24हा दीपवृक्ष व त्याच्या
बरोबरची सर्व उपकरणे एक किक्कार म्हणजे सुमारे
चौतीस किलोग्रॅम शुद्ध सोन्याची त्याने बनविली.

## धूप जाळावयाची वेदी

25मग त्याने बाभळीच्या लाकडाची एक चौरस वेदी
केली; ती अठरा इंच लांब, अठरा इंच रुंद व छत्तीस इंच
उंच होती; वेदीवर प्रत्येक कोपऱ्याला एक याप्रमाणे चार
शिंगे होती. ती वेदीला अशी जोडली होती की वेदी व शिंगे
एका अखंड तुकड्याची बनविलेली दिसत होती. 26त्याने
त्या वेदीचा वरचा भाग, तिच्या चारही बाजू व तिची शिंगे
सोन्याने मढविली व तिला सभोवती सोन्याचा काठकेला;
27त्या काठाच्याखाली तिच्या दोन्ही बाजूस, त्याने वेदी
वाहून नेण्यासाठी दांडे घालण्याकरता सोन्याच्या दोन दोन
गोल कड्या केल्या. 28त्याने बाभळीच्या लाकडाचे दांडे
केले व ते सोन्याने मढविले.
29नंतर त्याने अभिषेकाचे पवित्र तेल तसेच सुगंधी
शुद्ध धूप सुगंधीलोक बनवितात त्या प्रमाणे बनविला.

## होमार्पणाकरता वेदी

38 मग बसालेलाने बाभळीच्या लाकडाची एक चौरस
होमवेदी बनविली; ती साडेसात फूट लांब, साडेसात
फूट रुंद व साडेचार फूट उंच अशी केली. 2त्याने तिच्या
प्रत्येक कोपऱ्यास एक, याप्रमाणे चार शिंगे बनविली व
ती कोपऱ्यांना अशी जोडली की वेदी व शिंगे एकाच
अखंड तुकड्यांची बनविलेली दिसू लागली; त्याने ती
पितळेने मढविली. 3मग त्याने वेदीची सर्व उपकरणे म्हणजे
हंड्या फावडी, कटोरे, कांटे व अग्निपात्रे ही सर्व पितळेची
बनविली. 4मग त्याने वेदीसाठी पितळेची पड्द्यासारखी जाळी
बनविली व ती वेदी भोवतीच्या काठाखाली अशी बसवली
की ती खालपासून वेदीच्या तळाच्या अर्ध्या अंतरापर्यंत
वर आली. 5मग त्याने पितळेच्या जाळीच्या चारही
कोपऱ्यांना दांडे घालण्यासाठी चार गोल कड्या केल्या;
त्यांच्यात दांडे घालून वेदी वाहून नेण्याकरता त्या उपयोगी
होत्या. 6मग त्याने बाभळीच्या लाकडाचे दांडे केले व ते
पितळेने मढविले. 7वेदी उचलून वाहून नेण्याकरता तिच्या
बाजूंच्या गोल कड्यात त्याने दांडे घातले; वेदीच्या चारही
बाजूस फळ्या लावून ती मध्यभागी पोकळ ठेवली. 8दर्शन
मंडपाच्या दारापाशी सेवा करणाऱ्या स्त्रियांनी अर्पण म्हणून
आणलेल्या पितळी आरशांचे पितळ घेऊन त्याने गंगाळ व
त्याची बैठक बनवली.

## पवित्र निवास मंडपाभोवतीचे अंगण

9मग त्याने अंगण तयार केले; त्याच्या दक्षिण बाजूला
कातलेल्या तलम सणाच्या कापडाच्या पड्द्यांची पन्नास
वार लांबीची एक कनात त्याने केली. 10तिला वीस पितळी
बैठका असलेल्या वीस खांबाचा आधार दिलेला होता;
खांबांच्या आकड्या व त्यांच्या बांधपट्ट्या चांदीच्या होत्या.
11अंगणाच्या उत्तर बाजूलाही पन्नास वार लांबीची पड्द्यांची
कनात होती व तीही वीस पितळी बैठका असलेल्या वीस
खांबावर आधारलेली होती; खाबांच्या आकड्या व त्यांच्या
बांधपट्ट्या चांदीच्या होत्या.
12अंगणाच्या पश्चिम बाजूला पड्द्यांची पंचवीस वार
लांबीची कनात होती; तिच्यासाठी दहा खांब व दहा खुर्च्या
होत्या; ह्या खांबांच्या आकड्या व त्यांच्या बांधपट्ट्या चांदीच्या
होत्या; 13पूर्वेकडील रुंदीची बाजू पंचवीस वार लांब होती;
14अंगणाच्या फाटकाच्या एका बाजूला साडे सात वार
लांबीची कनात होती; तिच्या करता तीन खांब व तीन
खुर्च्या होत्या; 15अंगणाच्या फाटकाची दुसरी बाजूही अगदी
तशीच होती. 16अंगणाच्या सभोवतालचे सर्व पडदे
कातलेल्या तलम सणाच्या कापडाचे होते. 17खांबाच्या
खुर्च्या पितळेच्या आणि आकड्या व बांधपट्ट्या चांदीच्या
होत्या; खांबांची वरची टोके चांदीने मढविली होती; अंगणाचे
सर्व खांब चांदीच्या बांधपट्ट्यांनी जोडले होते.
18अंगणाच्या फाटकाचा पडदा निळ्या, जांभळ्या व
किरमिजी रंगाच्या सुताचा आणि कातलेल्या तलम सणाच्या
कापडाचा होता; त्यावर नक्षी विणलेली होती; तो दहा वार
लांब व अडीच वार उंच होता; ही उंची अंगणाच्या
सभोवतीच्या कनातीच्या उंचीइतकी होती. 19तो पडदा
पितळेच्या चार खुर्च्या असलेल्या चार खांबावर अधारलेला
होता; खांबांवरील आकड्या व बांधपट्ट्या चांदीच्या
बनविलेल्या होत्या; खांबाची वरची टोके चांदीने मढविली
होती. 20पवित्र निवास मंडपाच्या आणि अंगणाच्या सभोवती
असलेल्या सर्व मेखा पितळेच्या होत्या.
21मोशेने लेवी लोकांना, पवित्र निवास मंडप म्हणजे
कराराचा मंडप तयार करण्याकरता लागलेल्या सर्व
सामानाची यादी करण्यास सांगितले होते; अहरोनाचा मुलगा
इथामार त्याच्यावर ती जबाबदारी प्रमुख म्हणून सोपविलेली
होती.
22ज्या ज्या वस्तू करण्याविषयी परमेश्वराने मोशेला
आज्ञा दिली होती त्या सर्व वस्तू यहुदा वंशातील हूराचा
नातू म्हणजे उरीचा मुलगा बसालेल याने बनविल्या; 23तसेच
त्याला मदतनीस म्हणून दान वंशातील अहिसामाख याचा
मुलगा अहलियाब हा होता; तो सर्व प्रकारचे कोरीव

काम करणारा कुशल कारागीर होता; तो विणकाम
व निळ्या, व जांभळ्या व किरमिजी रंगाच्या तलम
कापडावर कशिदा काढण्याच्या कामात तरबेज होता.
24लोकांनी पवित्रस्थानाकरता परमेश्वराला अर्पण
केलेले सोने सुमारे दोन टनाहून जास्त होते*
25लोकांपैकी ज्यांची नोंद करण्यात आली त्या एकूण
लोकांनी अर्पण केलेली चांदी पावणेचार टनाहून* अधिक
होती. 26वीस वर्षे व त्याहून अधिक वयाच्या पुरुषांची
गणती केली तेव्हा ते सहा लाख, तीन हजार, पाचशे
पन्नास भरले आणि प्रत्येकाला एक बेका चांदी (म्हणजे
पवित्र स्थानाच्या अधिकृत मापाप्रमाणे “अर्धा शेकेल”
चांदी)कर म्हणून द्यावी लागली. 27त्यांनी ती चांदी
पवित्रस्थानाकरिता शंभर खुर्च्या व अंतरपटाच्या खुर्च्या
करण्यासाठी वापरली; त्यांनी प्रत्येक खुर्चीसाठी पंचाहत्तर
पौंड चांदी* वापरली. 28बाकीची पन्नास पौंड चांदी*
आकड्या बांधपट्ट्या आणि खांबांना मढविण्यासाठी लागली.
29साडे सव्वीस टनाहून अधिक* पितळ परमेश्वरासाठी
देण्यात आले. 30त्या पितळेचा दर्शनमंडपाच्या प्रवेश
दाराजवळील खुर्च्या, वेदी, तिची उपकरणे व तिची जाळी
ह्या करता;
31त्याचप्रमाणे अंगणाच्या कनातीच्या खांबांच्या खुर्च्या,
प्रवेशद्वारावरील पडद्यांच्या खांबांच्या खुर्च्या, तसेच पवित्र
निवास मंडप अंगणाच्या चारही बाजूस लागणाऱ्या मेखा
बनविण्यासाठी उपयोग झाला.

## याजकांची खास पवित्र वस्त्रे

39 पवित्र स्थानात सेवा करताना याजकांनी
घालावयाची, निळ्या, जांभळ्या व किरमिजी
रंगाच्या सुताची पवित्र वस्त्रे कारागिरांनी तयार केली;
अहरोनासाठीही परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे
त्यांनी पवित्र वस्त्रे बनविली.

## एफोद

2त्यांनी सोन्याच्या जरीचा आणि निळ्या, जांभळ्या,
किरमिजी रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या
कापडाचा एफोद तयार केला. 3त्यांनी सोने ठोकून त्याचे
पातळ पत्रे केले व ते पत्रे कापून त्याची तार केली आणि
ती कुशल कारागिराकडून निळ्या, जांभळ्या व किरमिजी
रंगाच्या सुतात व कातलेल्या तलम सणाच्या कापडात
भरली. 4त्यांनी एफोदसाठी खांदपट्ट्या केल्या व त्या
एफोदाच्या दोन्ही टोकांना जोडल्या 5त्यांनी कमरपट्टा विणला
व तो एफोदाला अडकवला. हा पट्टाही एफोदाप्रमाणेच
म्हणजे सोन्याच्या जरीचा, निळ्या, जांभळ्या, किरमिजी
रंगाच्या सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा
त्यांनी तयार केला.
6कारागिरांनी इस्राएलाच्या मुलांची नांवे गोमेद रत्नावर
कोरली व ती रत्ने सोन्याच्या कोंदणात बसविली. 7मग
देवाला इस्राएल लोकांची आठवण राहावी म्हणून त्यांनी
ती रत्ने एफोदाच्या खांदपट्ट्यांवर लावली; परमेश्वराने
मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे हे केले.

## न्यायाचा ऊरपट

8नंतर त्यांनी कुशल कारागिराकडून एफोदाप्रमाणेच
सोन्याच्या जरीचा, निळ्या, जांभळ्या व किरमिजी रंगाच्या
सुताचा व कातलेल्या तलम सणाच्या कापडाचा न्यायाचा
ऊरपट बनवून घेतला. 9न्यायाचा ऊरपट चौरस व्हावा
म्हणून तो दुमडला; तो नऊइंच लांब व नऊइंच रुंद असा
चौरस होता. 10मग कारागिरांनी त्या न्यायाच्या ऊरपटावर
सुंदर रत्नांच्या चार रांगा बसविल्या; पहिल्या रांगेत लाल,
पुष्कराज व माणिक; 11दुसऱ्या रांगेत पाचू नीलमणी व
हिरा; 12तिसऱ्या रांगेत तृणमणी, सूर्यकांत व पद्मराग;
13आणि चौथ्या रांगेत लसणा, गोमेद व यास्फे, ही सर्व
रत्ने सोन्याच्या कोंदणात बसविली. 14इस्राएलाच्या
(याकोबाच्या) प्रत्येक मुलासाठी एक या प्रमाणे ती बारा
रत्ने न्यायाच्या ऊरपटावर होती; एकेका रत्नावर एकेका
मुलाचे नांव मुद्रा कोरतात त्याप्रमाणे त्यांनी कोरले होते.
15दोरीसारखा पीळ घातलेल्या शुद्ध सोन्याच्या साखळ्या
त्यांनी न्यायाच्या ऊरपटावर लावल्या. 16कारागिरांनी
सोन्याची दोन कोंदणे व सोन्याच्या दोन गोल कड्या बनवून
त्या न्यायाच्या ऊरपटाच्या दोन्ही टोकास लावल्या. 17मग
त्यांनी न्यायाच्या ऊरपटांच्या टोकांस लावलेल्या दोन्ही गोल
कड्यात पीळ घातलेल्या सोन्याच्या साखळ्या घातल्या.
18पीळ घातलेल्या दोन्ही साखळ्यानी दुसरी दोन टोके
सोन्याच्या कोंदणात खोचून त्या त्यांनी एफोदाच्या दोन्ही
खांदपट्ट्यांवर समोरच्या बाजूला लावल्या. 19मग त्यांनी
सोन्याच्या आणखी दोन गोल कड्या करून त्या न्यायाच्या
ऊरपटाच्या दोन्ही टोकांवर एफोदाच्या आतील बाजूच्या
कडेला एफोदाजवळ लावल्या. 20त्यांनी सोन्याच्या आणखी
दोन कड्या खांदपट्ट्यांच्या तळाला एफोदाच्या समोर
लावल्या. 21त्यांनी नंतर न्यायाच्या ऊरपटाच्या गोल कड्या
एफोदाच्या गोल कड्यांनी निळ्या, फितीने अशा बांधल्या
की ऊरपट एफोदाच्या पट्ट्यांवर राहावा व तो एफोदावर

---

**जास्त होते** म्हणजे शब्दश: ते पवित्र स्थानाच्या वजनाच्या चलनाप्रमाणे, “एकोणतीस किक्कार व सातशे तीस शेकेल” एवढे होते.

**पावणेचार टनाहून** म्हणजे ती “पवित्र स्थानाच्या अधिकृत मापाप्रमाणे” शंभर किक्कार व एक हजार सातशे पंचाहत्तर शेकेल भरली.”

**पंचाहत्तर पौंड चांदी** म्हणजे “एक किक्कार” चांदी.

**पन्नास पौंड चांदी** म्हणजे पवित्र स्थानाच्या अधिकृत मापाप्रमाणे “एक हजार सातशे पंचाहत्तर शेकेल” चांदी.

**साडे सव्वीस टनाहून अधिक** म्हणजे “सत्तर किक्कार व दोन हजार चारशे शेकेल” एवढे.

घट्ट बसावा; परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे त्यांनी
हे सर्व केले.

### याजकांसाठी इतर वस्त्रे

22नंतर त्यांनी एफोदाबरोबर घालावयाचा निळ्या
रंगाच्या सुताचा झगा कारागिराकडून विणून घेतला.
23त्यांनी झग्याच्या मध्यभागी एक भोक ठेवले व त्या
दरम्यान झगा फाटू नये म्हणून त्या भोकाच्या किनारीला
सभोवती कापडाचा गोट शिवला.

24मग त्यांनी त्या झग्याच्या खालच्या घेराभोवती
कातलेल्या तलम सणाच्या कापडाची व निळ्या, जांभळ्या
व किरमिजी रंगाच्या कापडाची डाळींबे काढली. 25नंतर
त्यांनी शुद्ध सोन्याची घुंगरे केली व ती झग्याच्या खालच्या
घेराभोवती डाळींबाच्यामध्ये लावली. 26झग्याच्या खालच्या
घेराभोवती घुंगरुं मग डाळींब, पुन्हा घुंगरु मग डाळींब
याप्रमाणे दोन डाळींबामध्ये एक घुंगरुं अशी ती झाली; हा
झगा याजकाने परमेश्वराची सेवा करताना घालावयासाठी
होता; परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे हे केले.

27कारागिरांनी अहरोन व त्याच्या मुलांसाठी तलम
सणाच्या विणलेल्या कापडाचे कुडते केले. 28आणि त्यांनी
तलम सणाचे मंदिल, फेटे व चोळणे केले. 29मग त्यांनी
तलम सणाच्या कापडाचा व निळ्या जांभळ्या व किरमिजी
रंगाच्या सुताचा कमरपट्टा बनविला व त्यावर नक्षी काढली;
परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे हे केले.

30मग त्यांनी पवित्र मुकुटासाठी शुद्ध सोन्याची पट्टी केली
व तिच्यावर "परमेश्वरासाठी पवित्र" अशी अक्षरे कोरली.
31त्यांनी ती सोन्याची पट्टी निळ्या फितीवर लावली व ती
निळी फीत मंदिला भोवती समोर बांधली; परमेश्वराने
मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे हे केले.

### मोशे पवित्र निवास मंडपाची पाहिणी करतो

32अशा प्रकारे पवित्र निवास मंडपाचे म्हणजे
दर्शनमंडपाचे सर्व काम पूर्ण झाले. परमेश्वराने मोशेला
आज्ञा दिली होती अगदी त्याप्रमाणे इस्राएल लोकांनी सर्व
काही केले. 33मग त्यांनी मोशेला सर्व सामान दाखवले;
म्हणजे पवित्र निवास मंडप आणि तंबू व त्याचे सर्व सामान
म्हणजे गोल कड्या, आकड्या फळ्या, अडसर, खांब
खांबांच्या खुर्च्या (बैठका); 34आणि लाल रंगविलेली मंडप
झाकण्याची मेंढ्यांची कातडी व तहशाची कातडी, व
अंतरपट; 35आज्ञापटाचा कोश, तो वाहून नेण्याचे दांडे
आणि दयासन; 36मेज, त्यावरील सर्व सामान व पवित्र
समक्षतेची भाकर; 37शुद्ध सोन्याचा दीपवृक्ष त्यावरील
दिवे व त्याची सर्व उपकरणे व दिव्यासाठी तेल; 38सोन्याची
वेदी, अभिषेकाचे तेल, सुगंधी धूप आणि तंबूच्या दारासाठी
पडदा; 39पितळेची वेदी व तिची पितळेची जाळी, वेदी
वाहून नेण्याचे दांडे व तिची सर्व पात्रे, गंगाळ व त्याची
बैठक;
40अंगणाचे पडदे व कनाती, खांब व त्याच्या खुर्च्या
(बैठका), अंगणाच्या प्रवेश दाराचा पडदा तणावे, मेखा व
पवित्र निवास मंडपाच्या व दर्शनमंडपाच्या सेवेसाठी लागणारे
सर्व साहित्य;

41पवित्र निवास मंडप, म्हणजे दर्शन मंडप सेवा
करण्यासाठी विणलेली वस्त्रे, अहरोन याजकाची पवित्र
वस्त्रे आणि याजक या नात्याने सेवा करण्यासाठी त्याच्या
मुलांची वस्त्रे;

42परमेश्वराने मोशेला आज्ञा दिली होती अगदी त्याप्रमाणे
इस्राएल लोकांनी सगळे काम केले. 43लोकांनी काम
केले ते सर्व मोशेने बारकाईने पाहिले; ते त्यांनी अगदी
परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले होते म्हणून मोशेने त्यांना
आशीर्वाद दिला.

### मोशे पवित्र निवास मंडप उभा करतो

40 मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"पहिल्या
महिन्याच्या पहिल्या दिवशी दर्शनमंडपाचा पवित्र
मंडप उभा कर. 3आज्ञापटाचा कोश त्या पवित्र मंडपात
ठेव व तो अंतरपटाने झांक. 4मग मेज आणून आत ठेव
व त्याच्यावरील सामान व्यवस्थित ठेव; नंतर दीपवृक्ष
मंडपात आण व त्यावरील दिवे योग्य ठिकाणी ठेव. 5सोन्याची
धूपवेदी मंडपात आण व ती आज्ञापटाच्या कोशापुढे ठेव
आणि पवित्र निवास मंडपाच्या दाराचा पडदा लाव.

6"दर्शन मंडपाच्या म्हणजे पवित्रनिवास मंडपाच्या दारापुढे
होमार्पणासाठी वेदी ठेव. 7दर्शनमंडप व वेदी ह्यांच्यामध्ये
गंगाळ ठेव व त्यात पाणी भर. 8सभोवती अंगण कर व
मग त्याच्या प्रवेशदारापाशी पडदा लाव.

9अभिषेकाचे तेल घेऊन पवित्र निवास मंडपाला व
त्यातल्या सर्व वस्तूंना अभिषेक कर व त्याचे सर्व सामान
पवित्र कर म्हणजे तो पवित्र होईल. 10होमवेदी व तिची
सर्व उपकरणे यांना अभिषेक करुन पवित्र कर म्हणजे
ती परम पवित्र होईल. 11गंगाळ व त्याच्या खालची बैठक
ह्यांस अभिषेक कर व त्यांना पवित्र कर.

12"अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना दर्शनमंडपाच्या
दारापाशी नेऊन त्यांना आंघोळ घाल. 13मग अहरोनाला
पवित्र वस्त्रे घाल व त्याला तेलाने अभिषेक करून
पवित्र कर मग तो याजक या नात्याने माझी सेवा करील.
14मग त्याच्या मुलांना अंगरखे घाल. 15त्याच्या बापाला
जसा अभिषेक करशील त्याप्रमाणेच त्यांना कर म्हणजे
याजक या नात्याने ते माझी सेवा करतील; तू त्यांना
अभिषेक केल्यावर ते याजक होतील; ते घराणे
पिढ्यान्‌पिढ्या निरंतरचे याजकपण करीत राहील."
16मोशेने परमेश्वराची आज्ञा पाळली व परमेश्वराने त्याला
सांगितल्याप्रमाणे सर्वकाही त्याने केले.

17योग्य वेळी म्हणजे दुसऱ्या वर्षातील पहिल्या महिन्याच्या
पहिल्या दिवशी पवित्र निवास मंडपाची उभारणी झाली.
18परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे मोशेने पवित्र निवास मंडप

उभा केला; प्रथम त्याने खुर्च्या (बैठका) बसवून घेतल्या,
मग त्याने त्यांच्यावर फळ्या लावल्या, अडसर लावले व
त्यांचे खांब उभे केले; 19त्यानंतर पवित्र निवास मंडपावरचा
तंबू केला, मग वरच्या तंबूवर त्याने आच्छादन घातले;
परमेश्वराने आज्ञा केल्याप्रमाणे मोशेने हे सर्व केले.

20मोशेने करार घेऊन आज्ञापटाच्या कोशात ठेवला व
कोशाला दांडे लावून त्याच्यावर दयासन ठेवले. 21मग
मोशेने तो कोश पवित्र निवास मंडपात नेला आणि योग्य
ठिकाणी अंतरपट लावून आज्ञापटाचा कोश झाकला;
अशा रीतीने त्याने पवित्र कोश सुरक्षित केला; परमेश्वराने
मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे त्याने हे केले. 22मग मोशेने
पवित्र निवास मंडपाच्या उत्तर बाजूस दर्शन मंडपात
अंतरपटाच्या समोर मेज ठेवले; 23मग त्याने त्याच्यावर
परमेश्वरासमोर समर्पित भाकर ठेवली; परमेश्वराने आज्ञा
दिल्याप्रमाणे त्याने हे केले. 24मग त्याने पवित्र निवास
मंडपाच्या दक्षिण बाजूस दर्शनमंडपात मेजासमोर दीपवृक्ष
ठेवला. 25नंतर त्याने परमेश्वरासमोर दीपवृक्षावर दिवे
ठेवले; परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे त्याने हे
केले.

26मग त्याने दर्शनमंडपात अंतरपटासमोर सोन्याची वेदी
ठेवली. 27नंतर त्याने तिच्यावर सुगंधी धूप जाळला;
परमेश्वराने मोशेला आज्ञा केल्याप्रमाणे हे झाले. 28मग
त्याने पवित्र निवास मंडपाच्या दाराला पडदा लावला.

29त्याने पवित्र निवास मंडपाच्या दर्शन मंडपाच्या
दारापाशी होमवेदी ठेवली व तिच्यावर होमार्पणे व अन्नार्पणे
वाहिली; परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे त्याने हे
केले.

30मग त्याने दर्शनमंडप आणि वेदी ह्यांच्यामध्ये गंगाळ
ठेवले व धुण्यासाठी त्यात पाणी भरले. 31मोशे, अहरोन
व अहरोनाची मुले त्यात आपापले हातपाय धूत असत;
32ते दर्शनमंडप व वेदीपाशी जाताना प्रत्येक वेळेस आपले
हातपाय तेथे धूत असत; परमेश्वराने मोशेला आज्ञा
केल्याप्रमाणे त्यांनी हे केले. 33मग त्याने पवित्र निवास
मंडपाभोवती अंगणाची कनात उभी केली व अंगणात वेदी
बसवली आणि अंगणाच्या फाटकास पडदा लावला; ह्या
प्रकारे परमेश्वराने सांगितल्या प्रमाणे मोशेने सर्व काम
संपविले.

## परमेश्वराचे तेज

34मग दर्शन मंडपावर मेघाने छाया केली व पवित्र
निवास मंडप परमेश्वराच्या तेजाने भरून गेला.
35दर्शनमंडपावर मेघ राहिला व परमेश्वराच्या तेजाने पवित्र
निवास मंडप भरून गेला म्हणून मोशेला आत जाता येईना.

36पवित्र निवास मंडपावरील मेघ वर जाई तेव्हा इस्राएल
लोक आपला पुढील प्रवास सुरु करीत; 37परंतु तो मेघ
पवित्र निवास मंडपावर असे पर्यंत लोक तेथून हलत
नसत; तो वर जाई पर्यंत ते तेथेच थांबत. 38परमेश्वराचा
मेघ दिवसा पवित्र निवास मंडपावर राही आणि रात्री त्यात
अग्नी असे त्यामुळे सर्व इस्राएल लोकांना आपल्या प्रवासात
तो दिसत असे.

# लेवीय

### यज्ञ व अर्पणे

1 परमेश्वर देव दर्शनमंडपातून मोशेला हाक मारुन
म्हणाला, 2“इस्राएल लोकांना असे सांग: की जेव्हा
तुम्ही परमेश्वराला पशूबली अर्पिता तेव्हा तो प्राणी तुमच्या
पाळीव गुराढोरांच्या खिल्लारांतील किंवा शेरडांमेंढरांच्या
कळपातील असावा.
3“जेव्हा एखाद्या माणसाला गुरांढोरांतले होमार्पण
अर्पावयाचे असेल तेव्हा त्याने दोष नसलेला नर अर्पावा;
तो त्याने दर्शनमंडपाच्या दारापाशी आणून अर्पावा म्हणजे
परमेश्वर ते अर्पण मान्य करील. 4त्या माणसाने यज्ञपशूच्या
डोक्यावर आपला हात ठेवावा म्हणजे तो पशू त्याच्याबद्दल
प्रायश्चित म्हणून मान्य होईल.
5“त्याने परमेश्वरासमोर तो गोऱ्हा वधावा आणि
अहरोनाचे मुलगे जे याजक आहेत त्यांनी त्याचे रक्त
दर्शनमंडपाच्या दारापाशी असलेल्या वेदीवर व वेदीच्या
सभोंवती शिंपडावे. 6याजकाने त्या यज्ञपशूचे कातडे काढावे
व मग त्याच्या शरीराचे तुकडे करावे. 7नंतर अहरोन
याजकाच्या मुलांनी वेदीवर विस्तव ठेवावा व नंतर
त्याच्यावर लाकडे रचावी; 8त्यांनी वेदीवरच्या
विस्तवावरील लाकडावर त्या पशूचे तुकडे, डोके व चरबी
रचावी; 9त्याचे पाय व आंतडी पाण्याने धुवावी, मग याजकाने
सर्व भागांचा वेदीवर होम करावा; हे होमार्पण
परमेश्वरासाठी आहे; त्याच्या सुवासामुळे परमेश्वराला
आनंद होतो.
10“कोणाला कळपामधून शेरडू वा मेंढरु होमार्पण
करावयाचे असल्यास त्याने दोष नसलेला नर अर्पावा.
11त्याने वेदीच्या उत्तरेस परमेश्वरासमोर तो वधावा; मग
अहरोनाचे मुलगे जे याजक आहेत त्यांनी त्याचे रक्त
वेदीवर व वेदीच्या सभोंवती शिंपडावे. 12मग याजकाने
त्या पशूचे कापून तुकडे करावेत व त्याने ते तुकडे,
डोके व चरबी वेदीवरील विस्तवाच्या लाकडावर
रचावी. 13त्याचे पाय व आंतडी पाण्याने धुवावी; मग
याजकाने त्या सर्व भागांचा वेदीवर होम करावा; हे होमार्पण
परमेश्वरासाठी सुवासिक हव्य होय; त्याच्यामुळे
परमेश्वराला संतोष होतो.
14“जेव्हा कोणाला परमेश्वरासाठी पक्ष्याचे होमार्पण
करावयाचे असेल तेव्हा त्याने होले किंवा पारव्याची पिले
आणावी. 15याजकाने तो पक्षी वेदीजवळ आणावा, त्याचे
मुंडके मुरगाळून उपटून काढावे व वेदीवर त्याचा होम
करावा आणि त्याचे रक्त वेदीच्या बाजूवर निचरून टाकावे.
16त्याने त्याचा चुनाळ व पिसे काढून वेदीच्या पूर्वेस
वेदीवरील राख टाकण्याच्या जागी फेकून द्यावी. 17त्याने
तो पक्षी पंखाच्या तेथून फाडावा, परंतु त्याने त्याचे दोन
भाग वेगळे करु नयेत; मग याजकाने त्या पक्षाचा वेदीवरील
जळत्या लाकडावर होम करावा; हे पण होमार्पण आहे.
त्याच्या सुवासामुळे परमेश्वराला आनंद होतो.

### अन्नार्पणे

2 “जेव्हा एखाद्याला परमेश्वरदेवासाठी अन्नार्पण
करावयाची इच्छा असेल, तेव्हा त्याने मैदा आणावा;
त्याने त्यात तेल ओतावे व त्यावर धूप ठेवावा; 2मग त्याने
ते अर्पण अहरोनाचे मुलगे जे याजक त्यांच्याकडे आणावे;
त्यातून मूठभर मैदा, तेल व सगळा धूप घेऊन स्मरणासाठीचे
अर्पण म्हणून वेदीवर त्याचा होम करावा. हे परमेश्वरासाठी
सुवासिक हव्य होय. त्याच्या गंधाने परमेश्वराला आनंद
होतो.
3“अन्नार्पणातून जे काही उरेल ते अहरोनाचे व त्याच्या
मुलांचे होईल. परमेश्वरासाठी केलेले हे अर्पण अति
पवित्र आहे.

### भाजलेले अन्नार्पण

4“जेव्हा भट्टीत भाजलेले अन्नार्पण करावयाचे असेल,
तर ते तेलात मळलेल्या मैद्याचे बेखमीर भाकरीचे वा
वरुन तेल ओतलेल्या बेखमीर चपात्याचे असले पाहिजे.
5जर तुला तव्यावर भाजलेल्या भाकरीचे अन्नार्पण
करावयाचे असेल तर ते तेलात मळलेल्या बेखमीर मैद्याचे
असावे. 6त्याचे लहान लहान तुकडे करून त्यांच्यावर
तेल ओतावे; हे अन्नार्पण होय. 7कढईत तळलेल्यातले
अन्नार्पण असेल तर ते तेलात मळलेल्या उत्तम मैद्याचे
असावे.
8“अशाप्रकारचे अन्नार्पण तू परमेश्वरासमोर आणावे;
ते याजकाकडे द्यावे व त्याने ते वेदीवर अर्पावे. 9मग
याजकाने अन्नार्पणातून स्मारकाचा भाग घेऊन वेदीवर
त्याचा होम करावा. हे अग्नीद्वारे द्वारे केलेले अर्पण आहे;
त्याच्या सुवासाने परमेश्वराला आनंद होतो.
10अन्नार्पणातून जे काही उरेल ते अहरोन व त्याच्या

मुलांचे असेल; अग्नीद्वारे परमेश्वराला केलेले हे अर्पण
अतिपवित्र आहे.
11“खमीर असलेले कोणतेही अर्पण परमेश्वराला अर्पू
नये कारण होमाग्नीमध्ये खमीर किंवा मध हे परमेश्वराला
अर्पण म्हणून अर्पावयाचे नाही. 12प्रथम उत्पन्न म्हणून
त्यांचे अर्पण परमेश्वराला करावे; पण ते सुवासिक अर्पण
म्हणून वेदीवर अर्पू नये. 13तू करशील ते प्रत्येक अन्नार्पण
मिठाने रुचकर कर; तू आपल्या देवाशी केलेल्या कराराचे
मीठ आपल्या अन्नार्पणात घालावयास चुकू नको; तुझ्या
सर्व अर्पणाबरोबर मीठ पण अर्पावे.

### पहिल्या हंगामाचे धान्यार्पण

14“परमेश्वराकरिता तुला धान्यार्पण म्हणून पहिल्या
हंगामाचा उपज अर्पावयाचा असेल तर विस्तवावर
भाजलेल्या हिरव्या कणसातले चोळून काढलेले ताजे दाणे
आण; हे हंगामातील तुझ्या प्रथम पिकाचे धान्यार्पण होय.
15त्यावर तेल ओत आणि धूप ठेव; हे धान्यार्पण होय.
16चोळून काढलेले दाणे व तेल ह्यापैकी काही व सर्व धूप
ह्यांचा याजकाने स्मारकभाग म्हणून होम करावा; हे
परमेश्वरासाठी अग्नीद्वारे केलेले अर्पण आहे.

### शांत्यर्पणे

3 “कोणाला शांत्यर्पणाचा यज्ञ करावयाचा असेल तर
त्याने गुरांढोरापैकी दोष नसलेला नर किंवा मादी
यांचा करावा. 2त्याने त्या पशूच्या डोक्यावर आपला हात
ठेवावा व दर्शनमंडपाच्या दारापाशी त्याचा वध करावा;
मग अहरोनाचे मुलगे जे याजक आहेत त्यांनी त्याचे रक्त
वेदीवर व सभोवती शिंपडावे. 3शांत्यर्पण हे अग्नीद्वारे केलेले
अर्पण होय. याजकाने पशूच्या आंतड्यावरील चरबी व
त्यांस लागून असलेली सर्व चरबी अर्पण करावी. 4दोन्ही
गुरदे, त्यांच्यावरची कमरेजवळची चरबी आणि काळजाच्या
पडद्यावरील चरबी हे सर्व अर्पावे. 5ह्याा सर्वांचा अहरोनाच्या
मुलांनी वेदीवरील विस्तवावर रचलेल्या लाकडावरील
होमार्पणावर त्याचा होम करावा; हे अग्नीद्वारे केलेले
अर्पण आहे. त्याच्या सुवासाने परमेश्वराला आनंद होतो.
6“परमेश्वराकरिता कोणाला शांत्यर्पणासाठी
शेरडांमेंढरांचे अर्पण आणावयाचे असेल तर ते दोष
नसलेल्या नराचे किंवा मादीचे असावे. 7जर त्याला कोकरु
अर्पण करावयाचे असेल तर त्याने ते परमेश्वरासमोर
आणावे. 8त्याने त्या पशूच्या डोक्यावर आपला हात ठेवावा
व दर्शनमंडपासमोर तो वधावा आणि अहरोनाच्या मुलांनी
त्याचे रक्त वेदीसभोंवती शिंपडावे. 9अर्पण करणाऱ्यांने
शांत्यर्पणाचा काही भाग परमेश्वराला हव्य म्हणून अर्पण
करण्यासाठी द्यावा. त्याने त्या पशूची चरबी व पाठीच्या
कण्यातून कापून काढलेले चरबीदार शेपूट, आंतड्यावरील
भोवतालची चरबी, 10दोन्ही गुरदे, त्यांच्यावरची
कमरेजवळील चरबी व गुरद्यापर्यंतचा चरबीचा पडदा हे
सर्व अर्पावे. 11मग याजकाने त्या सर्वांचा वेदीवर होम
करावा; हे शांत्यर्पण अग्नीद्वारे परमेश्वराला केलेले अर्पण
आहे. परंतु हे लोकांसाठी अन्नसुध्दा होईल.

### बकऱ्याचे शांत्यार्पण

12“कोणाला जर बकऱ्याचे अर्पण करावयाचे असेल
तर त्याने तो बकरा परमेश्वरासमोर आणावा. 13त्याने
त्या बकऱ्याच्या डोक्यावर आपला हात ठेवावा व
दर्शनमंडपासमोर त्याचा वध करावा; मग अहरोनाच्या
मुलांनी त्याचे रक्त वेदीवर व सभोंवती शिंपडावे. 14त्याने
त्या शांत्यर्पणाचा काही भाग परमेश्वरासाठी होम
करण्याकरिता द्यावा; तसेच त्याने त्याच्या बलीच्या
आंतड्यावरील व त्यास लागून असलेली चरबी, 15दोन्ही
गुरदे, त्यांवरील कमरेजवळची चरबी आणि गुरद्यापर्यंतचा
काळजावरील चरबीचा पडदा हे सर्व अर्पावे. 16मग याजकाने
वेदीवर त्या सर्वांचा होम करावा ह्या सुवासिक शांत्यर्पणाने
परमेश्वराला आनंद होतो; हे अग्नीद्वारे केलेले अर्पण
आहे. हे लोकांसाठी अन्न होईल. परंतु त्यातील उत्तम
भाग म्हणजे चरबी परमेश्वराची आहे. 17तुम्ही चरबी व
रक्त मुळीच खाऊ नये; तुम्ही जेथे कोठे राहाल तेथे
तुमच्यासाठी हा नियम पिढ्यान्‌पिढ्या कायमचा चालू
राहील.”

### चुकून केलेल्या पापांसाठी अर्पणे

4 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“इस्राएल लोकांना असे
सांग: जर कोणी परमेश्वराने मना केलेल्या
कृत्यापैकी एखादे कृत्य केले वा चुकून त्याच्या हातून
पाप घडले तर त्याने पुढील गोष्टी कराव्यात:
3“जर अभिषेक झालेल्या याजकाने लोकांवर दोष येईल
असे पाप केले तर आपल्या पापाबद्दल त्याने पापार्पण
म्हणून कोणताही दोष नसलेला एक गोऱ्हा परमेश्वरासाठी
अर्पावा. 4त्याने तो गोऱ्हा परमेश्वरासमोर दर्शनमंडपाच्या
दारापाशी आणावा, त्याच्या डोक्यावर त्याने आपला हात
ठेवावा आणि परमेश्वरासमोर त्याचा वध करावा. 5मग
अभिषेक झालेल्या याजकाने गोऱ्ह्याचे थोडे रक्त घ्यावे
व ते दर्शनमंडपात न्यावे; 6त्याने आपले बोट त्या रक्तात
बुडवावे व परमेश्वरासमोर, परमपवित्र स्थानातील
अंतरपटासमोर ते सात वेळा शिंपडावे. 7मग त्याने त्यातले
काही रक्त घेऊन दर्शनमंडपापुढे परमेश्वरासमोर
असलेल्या धूपवेदीच्या शिंगांना ते लावावे; मग त्या गोऱ्ह्याचे
राहिलेले सगळे रक्त दर्शनमंडपाच्या दारापाशी असलेल्या
होमवेदीच्या पायथ्यावर ओतावे; 8आणि त्याने पापार्पणाच्या
गोऱ्ह्याच्या आंतड्यावरील चरबी, त्यास लागून असलेली
सर्व चरबी; 9दोन्ही गुरदे, त्यांच्यावरची कमरेजवळची चरबी
आणि गुरद्यापर्यंतच्या काळजावरील पडद्याची चरबी वेगळी
करावी; 10शांत्यर्पणात जसे हे भाग अर्पण करतात तसेच

ते अर्पण करुन याजकाने त्यांचा होमवेदीवर होम करावा.
11गोऱ्ह्याचे कातडे, आंतडी, सर्व मांस, डोके, पाय व शेण,
12असा सर्व गोऱ्हा छावणी बाहेरील विधीपूर्वक नेमलेल्या
व स्वच्छ केलेल्या ठिकाणी राख टाकण्याच्या जागेवर
नेऊन लाकडाच्या विस्तवावर जाळून टाकावा.

13“इस्राएलाच्या सर्व राष्ट्राकडून चुकून काही पाप घडले
आणि ते मंडळीच्या लक्षात आले नाही, म्हणजे परमेश्वराने
मना केलेले एखादे कर्म केले तर ते सर्वजण दोषी ठरतील.
14आणि मग जर ते त्यांच्या लक्षात आले तर त्यांनी सर्व
इस्राएल लोकांकरिता पापार्पण म्हणून एक गोऱ्हा
दर्शनमंडपाजवळ आणून अर्पावा. 15मंडळीच्या वडिलांनी
परमेश्वरासमोर त्या गोऱ्ह्याच्या डोक्यावर आपले हात
ठेवावे व परमेश्वरासमोर एकाने त्याचा वध करावा.
16नंतर अभिषेक झालेल्या याजकाने त्या गोऱ्ह्याचे थोडे
रक्त घ्यावे व ते दर्शनमंडपात न्यावे; 17मग याजकाने त्या
रक्तात आपले बोट बुडवून परमेश्वरासमोर,
अंतरपटासमोर ते सात वेळा शिंपडावे. 18मग त्याने
दर्शनमंडपातील परमेश्वरासमोर असलेल्या वेदीच्या
शिंगांना थोडे रक्त लावावे, व बाकीचे सर्व रक्त
दर्शनमंडपापाशी असलेल्या होमवेदीच्या पायथ्यावर
ओतावे. 19त्या गोऱ्ह्याची सर्व चरबी याजकाने काढून
तिचा वेदीवर होम करावा; 20पापार्पणाच्या गोऱ्ह्याच्या
भागांचे जसे अर्पण करावयाचे तसेच ह्याच्याही भागांचे
अर्पण करावे; अशा प्रकारे याजकाने इस्राएल लोकांसाठी
प्रायश्चित करावे म्हणजे परमेश्वर देव त्यांच्या पापांची
क्षमा करील.* 21आधीचा गोऱ्हा जसा जाळून टाकावयाचा
तसा हाही गोऱ्हा याजकाने छावणीच्या बाहेर नेऊन जाळून
टाकावा. हे सर्व इस्राएल लोकांकरिता पापार्पण होय.

22“एखाद्या अधिपतीने परमेश्वराने मना केलेले कर्म
केले व चुकून पाप घडले तर तो दोषी ठरेल. 23त्याने
केलेले पाप जेव्हा त्याला कळून येईल तेव्हा त्याने एक
दोष नसलेला बकरा अर्पिण्यासाठी आणावा; 24त्याने त्या
बकऱ्याच्या डोक्यावर आपला हात ठेवावा आणि
परमेश्वरासमोर जेथे यज्ञपशूचा वध करतात तेथे त्याचा
वध करावा. हे पापार्पण होय. 25मग याजकाने त्या
पापार्पणातील काही रक्त घेऊन ते आपल्या बोटाने
होमवेदीच्या शिंगांना लावावे व बाकीचे रक्त होमवेदीच्या
पायथ्यावर ओतावे. 26उपकारस्तुतीच्या अर्पणातील
यज्ञपशूच्या चरबी प्रमाणे याजकाने ह्या बकऱ्याच्याही सर्व
चरबीचा वेदीवर होम करावा; अशा प्रकारे त्या अधिपतीच्या
पापाबद्दल याजकाने प्रायश्चित करावे, म्हणजे देव त्या
अधिपतीला क्षमा करील.

27“एखादा सामान्य माणूस परमेश्वराने मना केलेले
एखादे कर्म केल्यामुळे चुकून पाप घडल्यामुळे दोषी ठरला;
28आणि त्याने केलेले पाप त्याला कळून आले तर त्याने
त्या पापाबद्दल अर्पण म्हणून एक दोष नसलेली बकरी
आणावी; 29त्याने त्या बकरीच्या डोक्यावर आपला हात
ठेवावा आणि होमबलीचा वध करतात तेथे तिचा वध
करावा; 30मग याजकाने त्या अर्पणातील काही रक्त
घेऊन आपल्या बोटाने ते होमवेदीच्या शिंगांना लावावे
आणि बाकीचे सर्व रक्त वेदीच्या पायथ्यावर ओतावे;
31आणि याजकाने त्या बकरीच्या चरबीचा शांत्यर्पणाच्या
यज्ञपशूच्या चरबी प्रमाणे परमेश्वरासाठी सुवासिक हव्य
म्हणून वेदीवर होम करावा; अशा प्रकारे याजकाने त्या
सामान्य माणसाकरिता प्रायश्चित करावे म्हणजे परमेश्वर
त्याला क्षमा करील.

32“त्याने आपल्या अर्पणासाठी पापबली म्हणून कोंकरु
आणले तर ती दोष नसलेली मादी असावी. 33त्याने त्या
कोंकराच्या डोक्यावर आपला हात ठेवावा व जेथे
होमबलीचा वध करतात तेथे पापार्पणाकरिता त्याला वधावे.
34याजकाने त्या पापार्पणातील काही रक्त घेऊन ते आपल्या
बोटाने होमवेदीच्या शिंगांना लावावे व बाकीचे वेदीच्या
पायथ्याशी ओतावे. 35त्याने शांत्यर्पणाच्या कोंकराच्या
चरबी प्रमाणे त्याची सर्व चरबी काढून घ्यावी आणि
होमवेदीवर तिचा परमेश्वरासाठी होम करावा. ह्याप्रमाणे
त्याने केलेल्या पापाबद्दल याजकाने प्रायश्चित करावे
म्हणजे देव त्याला क्षमा करील.

## चुकून घडलेली वेगळी पापे

5 “एखाद्याने इतरांस सांगण्यासारखी सूचना ऐकली
किंवा त्याने काही पाहिले किंवा ऐकले तर त्या
बाबीसंबंधी त्याने साक्ष द्यावी; तो जर साक्ष द्यावयाचे
नाकारील तर पाहिलेले किंवा माहीत असलेले न सांगण्याचे
पाप केल्यामुळे तो दोषी ठरेल; 2किंवा कोणी अशुद्ध
वस्तूला किंवा मेलेल्या वनपशुला किंवा अशुद्ध मानलेल्या
पाळीव प्राण्याला वा अशुद्ध सरपटणाऱ्या गोष्टींना जरी न
कळत शिवल्यामुळे अशुद्ध झाला तरीही तो दोषी ठरेल.
3माणसाच्या आंतून बाहेर पडणाऱ्या स्राव इत्यादि अनेक
गोष्टी अशुद्ध असतात; एखादा माणूस दुसऱ्या माणसाच्या
अशा अशुद्ध गोष्टीला न कळत शिवला व आपण अशुद्ध
झालो आहो असे त्याला नंतर कळाले तर तो दोषी ठरेल.
4किंवा एखादी बरी किंवा वाईट गोष्ट करण्यासंबंधी कोणी
घाईघाईने शपथ घेतली आणि नंतर ती पूर्ण करण्यास तो
विसरला; परंतु नंतर त्याला ती आठवली तर आपली
शपथ पूर्ण न केल्यामुळे तो दोषी होईल. 5तो अशा कोणत्याही
गोष्टीविषयी दोषी ठरला तर त्याने पाप केलेली बाब
कबूल करावी; 6आणि केलेल्या पापाबद्दल
परमेश्वरासमोर त्याने दोषार्पण म्हणून मेंढी आणावी; आणि
मग याजकाने त्या माणसाच्या पापाबद्दल प्रायश्चित करावे.

7“त्याला कोंकरु देण्याची ऐपत नसेल तर आपण केलेल्या
पापाबद्दल त्याने दोषार्पण म्हणून दोन होले किंवा पारव्याची

---

**त्यांच्या पापांची क्षमा करील** किंवा “प्रायश्चित्त करणे” हिब्रू शब्दाचा अर्थ “झाकणे” “लपवणे” किंवा “पापे खोडणे.”

दोन पिले परमेश्वरासमोर आणावी; त्यापैकी एकाचे
पापार्पण व दुसऱ्याचे होमार्पण करावे. 8त्याने ती
याजकापाशी आणावी; मग याजकाने पहिल्याने त्यातील
पापार्पण अर्पावे; त्याने पक्ष्याची मुंडी मुरगाळून मोडावी
परंतु त्याचे दोन भाग करु नयेत. 9पापार्पणाचे काही रक्त
वेदीच्या भोंवती शिंपडावे व बाकीचे रक्त वेदीच्या पायथ्याशी
ओतावे; हे पापार्पण होय. 10मग याजकाने दुसऱ्या पक्ष्याचा
विधीप्रमाणे होम करावा; ह्याप्रमाणे त्याने केलेल्या पापाबद्दल
याजकाने त्या माणसाकरिता प्रायश्चित करावे; आणि मग
देव त्याला क्षमा करील.

11“जर दोन होले किंवा पारव्याची दोन पिले देखील
देण्याची त्याला ऐपत नसेल तर आपल्या पापाबद्दल त्याने
एका एफाचा दहावा भाग मैदा त्याचे पापार्पण म्हणून
आणावा; ते पापार्पण असल्यामुळे त्याने त्यावर तेल घालू
नये किंवा त्याच्यावर धूप ठेवू नये. 12त्याने तो मैदा
याजकाकडे आणावा आणि याजकाने त्याच्यातून मूठभर
मैदा घेऊन त्याचा स्मारक भाग म्हणून परमेश्वराकरिता
होम करावा; हे पापार्पण होय. 13अशा प्रकारे याजकाने
त्याच्यासाठी प्रायश्चित करावे; आणि मग देव त्याला क्षमा
करील; अन्नार्पणाप्रमाणे पापार्पणाचा उरलेला मैदा
याजकाचा होईल.” 14परमेश्वर मोशेला म्हणाला,
15“परमेश्वराची कोणतीही पवित्र वस्तू* चुकून दूषित
करुन कोणी पापी ठरला तर त्याने दोषार्पण म्हणून तू
ठरवशील तितक्या किमतीचा दोष नसलेला मेंढा आणावा;
16ज्या पवित्र वस्तूची विटंबना करुन त्याने पाप केले
असेल तिची त्याने भरपाई करावी आणि तिच्या किंमतीचा
पांचवा हिस्सा रक्कम त्याने याजकाला द्यावी; ह्याप्रकारे
याजकाने हा दोषार्पणाचा मेंढा अर्पून त्या माणसाकरिता
प्रायश्चित करावे; आणि मग देव त्याला क्षमा करील.

17“परमेश्वराने मना केलेली एखादी गोष्ट करुन
कोणाकडून चुकून किंवा न कळत पाप घडले तर तो
दोषी ठरेल; त्या पापाबद्दल त्याने शिक्षा भोगावी. 18त्याने
दोष नसलेला एक मेंढा दोषार्पणासाठी याजकापाशी आणावा;
हे दोषार्पण होय. अंशा रीतीने याजकाने त्या माणसाकडून
नकळत घडलेल्या पापाबद्दल प्रायश्चित करावे; आणि
मग देव त्याला क्षमा करील. 19तो माणूस जरी त्याच्या
हातून नकळत पाप घडले तरी तो दोषी आहे म्हणून
परमेश्वरासाठी त्याने दोषार्पण अर्पावे.”

## इतर पापांकरिता अर्पावयाची दोषार्पणे

6 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“कोणी
परमेश्वराविरुद्ध खालीलपैकी एखादी गोष्ट करुन
पाप केले म्हणजे एखाद्याने गहाण ठेवलेली वस्तू किंवा
ठेव म्हणून ठेवलेली वस्तू परत करण्यास खोटे बोलून
नकार दिला. किंवा एखाद्याची चोरी केली किंवा कोणाला
फसवीले” 3किंवा एखाद्याची हरवलेली वस्तू सापडली
असता सापडली नाही अशी लबाडी केली किंवा एखादे
काम करण्याचे वचन दिले, पण मग ते काम करणार
नाही किंवा एखादे वाईट काम केले; 4जर कोणी वरील
प्रमाणे काही केले तर त्याच्यावर पाप केल्याचा दोष
येईल; त्याने चोरलेली वस्तू माघारी आणावी; किंवा फसवून
काही घेतलेले किंवा गहाण ठेवलेली वस्तू किंवा ठेव
किंवा जिच्याबद्दल त्याने लबाडी केली अशी सापडलेली
वस्तू किंवा 5खोटे वचन देऊन न केलेले काम त्या
प्रत्येकाबद्दल त्याने पूर्ण भरपाई करावी आणि त्या त्या
वस्तूंच्या किंमतीचा पांचवा हिस्सा अधिक भरावा. त्याने
खऱ्या मालकाला पैसे द्यावेत; दोषार्पण आणण्याच्या
दिवशीच त्याने हे करावे.

6“त्याने परमेश्वरासाठी याजकाने सांगितलेल्या
किंमतीचा एक निर्दोष मेंढा दोषार्पण म्हणून याजकापाशी
आणावा; 7मग याजकाने तो मेंढा घेऊन परमेश्वरासमोर
जावे व त्या माणसासाठी प्रायश्चित करावे; आणि मग ज्या
अपराधामुळे तो दोषी ठरला असेल त्याची त्याला देव
क्षमा करील.”

## होमार्पणे

8परमेश्वर मोशेला म्हणाला, 9“अहरोन व त्याचे मुलगे
ह्यांना आज्ञा कर की होमापर्णाचे असे नियम आहेत.
होमबली अग्नीकुंडावर रात्रभर ठेवून तो सकाळपर्यंत
राहू द्यावा; आणि वेदीवरील अग्नी तिच्यावर जळतच
ठेवावा. 10मग याजकाने आपला सणाचा झगा व चोळणा
अंगात घालून होमार्पणामुळे वेदीवर राहिलेली राख
उचलावी व ती वेदी जवळ ठेवावी. 11मग याजकाने आपली
वस्त्रे बदलावी व दुसरी वस्त्रे घालून ती राख छावणी बाहेर
एखाद्या स्वच्छ ठिकाणी न्यावी;

12“परंतु वेदीवरील अग्नी तिच्यावर जळतच ठेवावा, तो
विझू देऊ नये; याजकाने रोज सकाळी त्या अग्नीवर
जळावू लाकडे ठेवून तो पेटत ठेवावा व त्याच्यावर
शांत्यर्पणाच्या अर्पणातील चरबीचा होम करावा.
13वेदीवरील अग्नी सतत जळत ठेवावा, तो विझू देऊ नये.

## अन्नार्पणे

14“अन्नार्पणाचा नियम असा आहे: अहरोनाच्या मुलांनी
परमेश्वरासमोर वेदीपुढे ते आणावे; 15याजकाने त्या
अन्नार्पणातून मूठभर मैदा, थोडे तेल व सगळा धूप घ्यावा
व त्याचा वेदीवर होम करावा; ते परमेश्वरासाठी स्मारक
अर्पण होईल; त्याच्या सुवासाने परमेश्वराला संतोष होतो.

16“त्यातून उरलेले, खमीर नसलेले हे अन्नार्पण अहरोन
व त्याच्या मुलांनी दर्शनमंडपाच्या अंगणात पवित्र ठिकाणी
बसून खावे. 17ते खमीर घालून भाजू नये; माझ्या अर्पणातून

---

**परमेश्वराच्या कोणतीही पवित्र वस्तू** परमेश्वराला देण्यासाठी आश्वास केलेली परंतु प्रत्यक्षात देण्यास विसरून गेलेली ही कदाचित विशेष दाने असावीत.

याजकाचा वाटा म्हणून मी ते त्याना दिलेले आहे; पापार्पण
व दोषार्पण ह्या सारखेच हेही परमपवित्र आहे. 18ह्या
अर्पणातून अहरोनाच्या संतानातील प्रत्येक पुरुष हे खाऊ
शकतो परमेश्वराच्या अर्पणातून हा त्यांचा वाटा
पिढ्यान्‌पिढ्या सतत चालू राहावा; ह्या अर्पणास स्पर्श
झाल्याने ते पवित्र होतील."

### याजकांचे अन्नार्पण

19परमेश्वर मोशेला म्हणाला, 20"अहरोन व त्याच्या
मुलांनी अहरोनाच्या अभिषेकाच्या दिवशी परमेश्वराला
अर्पण आणावयाचे ते हे: आठ वाट्या म्हणजे एक दशांश
एफा मैदा रोजच्या अर्पणाच्यावेळी आणावा, व त्यापैकी
अर्धा सकाळी व अर्धा संध्याकाळी अर्पावा.
21"तो तेलात चांगला मळावा आणि तव्यावर चांगला
भाजल्यावर व तेलात परतल्यावर आत आणावा व
परतलेल्या त्या अन्नार्पणाचे तुकडे करावेत; त्यांचा सुवास
परमेश्वराला आनंद देईल.
22"अहरोनाच्या मुलांपैकी त्याच्या जागी अभिषिक्त
याजक म्हणून ज्याची निवड होईल त्यानेही असेच अर्पण
आणावे. कायमचा विधी म्हणून ह्या अन्नार्पणाचा
परमेश्वरासाठी पूर्णपणे होम करावा. 23याजकाच्या प्रत्येक
अन्नार्पणाचा संपूर्ण होम करावा; ते अन्नार्पण खाऊ नये."

### पापार्पणाचा विधि

24परमेश्वर मोशेला म्हणाला, 25"अहरोन व त्याचे मुलगे
ह्यांना सांग की पापार्पणाचा विधि असा. ज्या ठिकाणी
होमबलीचा वध करतात त्याच ठिकाणी परमेश्वरासमोर
पापबलीचाही वध करावा; तो परमपवित्र आहे.
26"जो याजक पापबली अर्पील त्याने तो दर्शनमंडपाच्या
अंगणात पवित्र ठिकाणी खावा. 27ज्या माणसाला किंवा
वस्तूला त्या मांसाचा स्पर्श होईल तो माणूस किंवा ती
वस्तू पवित्र होईल;
"त्याचे रक्त जर कोणाच्या वस्त्रावर उडाले तर ते वस्त्र
तू पवित्र स्थानीं धुवावे. 28पापार्पणाचे मांस जर मडक्यात
शिजवले असेल तर ते मडके फोडून टाकावे; पण ते जर
पितळेच्या भांड्यात शिजवले असेल तर ते भांडे घासून
पाण्याने धुवावे.
29"याजकाच्या घराण्यातील प्रत्येक पुरुषाला पापार्पणाचे
मांस खाण्याचा हक्क आहे; ते परमपवित्र आहे; 30पण
ज्या पापबलीचे थोडे रक्त दर्शनमंडपात पवित्र ठिकाणी
प्रायश्चितासाठी* आणले जाईल त्याचे मांस खाऊ नये; ते
अग्नीत जाळावे."

---

**प्रायश्चितासाठी** किंवा पवित्र करणे हिब्रू शब्दचा अर्थ झाकणे
किंवा लपवणे किंवा पाप नाहीसे करणे असा आहे.

### दोषार्पणे

7 "दोषार्पणाविषयी जे नियम आहेत, ते हे: हे अर्पण
परमपवित्र आहे. 2ज्या जागीं होमबलीचा वध
करावयाचा त्याच जागी दोषार्पणाच्या बळीचा वध करावा,
आणि याजकाने त्या बळीचे रक्त वेदीवर सभोवती शिंपडावे.
3"त्याची सर्व चरबी याजकाने अर्पावी; त्याचे चरबीदार
शेपूट, आंतड्यावरील चरबी, 4दोन्ही गुरदे, त्यांच्यावरील
कमरेजवळील चरबी व गुरद्यापर्यंतचा काळजावरील
चरबीचा पडदा, 5ह्या सर्वांचा याजकाने होम करावा; हे
परमेश्वरासाठी होमार्पण आहे. हेच दोषार्पण होय.
6"याजकवर्गातील प्रत्येक पुरुषाला हे दोषार्पण बळी
खाण्याचा अधिकार आहे; ते परमपवित्र आहे म्हणून ते
पवित्र स्थानींच बसून खावे. 7दोषार्पण पापार्पणासारखेच
आहे; त्या दोघांचे विधि एकच आहेत; जो याजकह्या
होमबलीच्याद्वारे प्रायश्चित करील त्याचा त्या अर्पणावर
हक्क राहील. 8प्रायश्चित करणाऱ्या याजकाचा त्या
बळीच्या कातड्यावरही अधिकार असेल. 9भट्टीत भाजलेले
कढईत किंवा तव्यावर तळलेले सर्व अन्नार्पण, ते
अर्पण करणाऱ्या याजकाचे होईल. 10प्रत्येक तेल
मिश्रित किंवा कोरडे अन्नार्पण ते अर्पण करणाऱ्या
याजकाचे-अहरोनाच्या मुलांचे-आहे; त्या सर्वांचा
त्यांच्यावर सारखाच अधिकार आहे.

### शांत्यर्पणे

11"परमेश्वरासाठी कोणाला शांत्यर्पणाचा यज्ञ
करावयाचा असेल तर त्याचा विधि असा: 12त्याला तो
शांत्यर्पणाचा यज्ञ उपकारस्तुतीसाठी करावयाचा असेल
तर त्याने तेलात मळलेल्या, बेखमीर पोव्व्या तेल लावलेल्या
बेखमीर चपात्या आणि तेलात मळलेल्या मैद्याच्या तळलेल्या
पोव्व्या शांत्यर्पणाच्या यज्ञासोबत अर्पाव्या. 13शांत्यर्पण हे
देवाकरिता शांत्यर्पणाच्या यज्ञासारखेच आहे म्हणून
त्यासोबत त्याने खमीर घातलेल्या भाकरीही अर्पाव्या 14ह्या
प्रत्येक अर्पणातून परमेश्वरासाठी एक एक पोळी अर्पावी;
शांत्यर्पणाचे रक्त शिंपडणाऱ्या याजकाचा त्या पोळीवर
हक्क आहे. 15शांत्यर्पणासाठी केलेल्या शांत्यर्पणाच्या
यज्ञबलीचे मांस त्याने अर्पण करण्याच्या दिवशीच खावे;
त्यातील काहीही सकाळपर्यंत ठेवू नये.
16"यज्ञबलीचे अर्पण स्वखुशीचे किंवा नवसाचे असेल
तर ज्या दिवशी तो ते अर्पील त्या दिवशी त्याने ते खावे
आणि जर त्यातून काही उरले तर ते त्याने दुसऱ्या दिवशी
खावे. 17परंतु त्या यज्ञबलीचे काही मांस तिसऱ्या दिवसापर्यंत
उरले तर ते अग्नीत जाळून टाकावे. 18शांत्यर्पणाच्या
यज्ञबलीच्या मांसातून तिसऱ्या दिवशी मांस जर तो खाईल
तर परमेश्वराला ते आवडणार नाही, व तो ते अर्पण
मान्य करणार नाही; ते अर्पण अमंगळ होईल; त्या पापाबद्दल
भोगाव्या लागणाऱ्या शिक्षेस तो स्वत: जबाबदार राहील.

19“त्याचप्रमाणे ज्या मांसाला कोणत्याही अशुद्ध वस्तूचा
स्पर्श झाला असेल ते कोणी खाऊ नये; ते अग्नीत जाळून
टाकावे. शुद्ध असणाऱ्यानेच शांत्यर्पण खावे; 20परंतु जर
कोणी अशुद्ध असून परमेश्वराला अर्पिलेल्या शांत्यर्पणाच्या
यज्ञबलीचे मांस खाईल तर त्याला आपल्या लोकांतून
बाहेर टाकावे.

21“एखादा माणूस जर एखाद्या अशुद्ध वस्तूला स्पर्श
करील मग ती अशुद्धता माणसाची, पशूची किंवा दुसऱ्या
कोणत्या अमंगळ पदार्थाची असो, तर तो अशुध्द होईल
आणि परमेश्वराला अर्पण केलेल्या शांत्यर्पणाच्या
यज्ञबलीचे जर तो मांस खाईल तर त्याला स्वजनातून
बाहेर टाकावे.”

22परमेश्वर मोशेला म्हणाला, 23“इस्राएल लोकांना असे
सांग: तुम्ही बैलाची, मेंढराची किंवा बकऱ्याची चरबी
खाऊ नये. 24मेलेल्या जनावराची चरबी किंवा इतर पशूंनी
फाडून टाकलेल्या जनावराची चरबी तुम्ही इतर कामासाठी
वापरू शकता पण ती मुळीच खाऊं नये. 25परमेश्वरला
अर्पिलेल्या पशूची चरबी जर कोणी खाईल तर त्याला
स्वजनातून बाहेर टाकावे.

26“तुम्ही कोठेही राहात असला तरी आपल्या घरात
पक्ष्याचे किंवा जनावराचे रक्त तुम्ही कधीही खाऊ नये.
27जर कोणी कोणतेहि रक्त खाईल तर त्याला स्वजनातून
बाहेर टाकावे.”

## ओवाळणीच्या अर्पणाचे नियम

28परमेश्वर मोशेला म्हणाला, 29“इस्राएल लोकांना असे
सांग: जर कोणी परमेश्वरासमोर आपल्या शांत्यर्पणाचा
यज्ञबली अर्पील तर त्याने त्या अर्पणातून काही भाग
परमेश्वराकडे आणावा. 30त्याने आपल्या हाताने
परमेश्वरासाठी अर्पणे आणावी; त्याने चरबी व ऊर
याजकाकडे आणावा; ते ऊर परमेश्वरासमोर ओवाळले
जाईल; हे ओवाळणीचे अर्पण होय. 31मग याजकाने त्या
चरबीचा होम करावा परंतु ऊर अहरोन व त्याचे मुलगे
ह्यांचा होईल. 32तसेच तुम्ही आपल्या शांत्यर्पणाच्या
यज्ञबलीची उजवी मांडीही समर्पित केलेला अंश म्हणून
याजकाला द्यावी. 33अहरोनाच्या मुलांपैकी जो कोणी
शांत्यर्पणाचे रक्त व चरबी अर्पील त्याचा त्या मांडीवर
हक्क असावा. 34मी परमेश्वर इस्राएल लोकांच्या
शांत्यर्पणाच्या यज्ञबलीतून ओवाळणीचा ऊर व उजवी मांडी
काढून घेऊन अहरोन याजक व त्याचे मुलगे ह्यांना दिली
आहे; हा इस्राएल लोकांकडून त्यांना मिळणारा नेहमीचा
हिस्सा आहे. इस्राएल लोकांनी हा निरंतरचा विधी म्हणून
पिढ्यान्‌पिढ्या पाळावा.”

35परमेश्वरा करिता अर्पिलेल्या अर्पणातून हे भाग
अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना देण्यात आलेले आहेत;
जेव्हा जेव्हा ते याजक म्हणून परमेश्वराची सेवा करतात
तेव्हा तेव्हा त्या समर्पणातून ते भाग त्यांना मिळावेत. देवाची
सेवा करणारे याजक म्हणून ज्या दिवशी त्यांची नेमणूक
करण्यात आली त्याच दिवसापासून असे ठरले आहे.
36परमेश्वराने ज्या दिवशी त्यांना अभिषेक केला त्या
दिवशी त्याने इस्राएल लोकांकडून हा भाग त्यांना मिळावा
अशी आज्ञा दिली म्हणून पिढ्यान्‌पिढ्या हा त्यांचा कायमचा
हक्क ठरला आहे.

37होमार्पण, अन्नार्पण, पापार्पण, दोषार्पण, याजकाच्या
समर्पणाच्या वेळेचे अर्पण आणि शांत्यर्पण ह्या विषयींचे
विधि असे: 38इस्राएल लोकांनी परमेश्वराकरिता काय
काय अर्पणे आणावीत ह्या विषयी त्याने त्यांना सीनाय
रानात आज्ञा दिली त्यावेळी त्याने मोशेला ह्याप्रमाणे सीनाय
पर्वतावर हे विधीनियम लावून दिले.

## मोशे याजकांना तयार करतो

8 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“तू अहरोन व
त्याच्याबरोबर त्याचे मुलगे ह्यांना आणि त्यांची वस्त्रे,
अभिषेकाचे तेल, पापार्पणाचा गोऱ्हा, दोन मेंढे आणि
बेखमीर भाकरीची टोपली घेऊन, 3दर्शनमंडपाच्या
दाराजवळ सर्व मंडळीला एकत्र जमवून आण.”

4परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे मोशेने केले. लोक
दर्शनमंडपाच्या प्रवेशद्वाराशी जमले. 5मग मोशे लोकांना
म्हणाला, “परमेश्वराने जे करावयाची आज्ञा दिली आहे,
ते हे.” 6मग मोशेने अहरोन व त्याच्या मुलांना आणवून
पाण्याने आंघोळ घातली. 7मग त्याने अहरोनाला विणलेला
सदरा घातला, त्याच्या कमरेला कमरबंद बांधला; मग
त्याला झगा घातला, नंतर त्याच्यावर एफोद चढवला
आणि अहरोनावर नक्षीदार सुंदर पट्टी आवळून बांधली.
8मग मोशेने त्याच्यावर न्यायाचा ऊरपट बांधला आणि
त्याच्यात उरीम व थुम्मीम ठेवले; 9नंतर त्याच्या डोक्यावर
फेटा ठेवला; आणि फेट्याच्या पुढल्या भागावर सोन्याची
पट्टी म्हणजे पवित्र मुकुट ठेवला; परमेश्वराने जसे करण्यास
सांगितले होते, तसेच मोशेने केले.

10मग मोशेने अभिषेकाचे तेल घेतले आणि पवित्र निवास
मंडपावर व त्यातील सर्व वस्तूंवर ते शिंपडून त्यांना पवित्र
केले. 11अभिषेकाच्या तेलातून थोडे घेऊन त्याने ते वेदीवर
सात वेळा शिंपडले आणि वेदी, तिची सर्व उपकरणे, गंगाळ
व त्याची बैठक यांच्यावरही त्याने अभिषेकाचे तेल
शिंपडले. अशा रीतीने त्याने ते सर्व अभिषेकाने पवित्र
केले. 12मग मोशेने थोडे अभिषेकाचे तेल अहरोनाच्या
डोक्यावर ओतले व अशा प्रकारे त्याने अभिषेक करुन
त्याला पवित्र केले. 13मग मोशेने अहरोनाच्या मुलांना
आणले, त्यांना विणलेले सदरे घातले, कमरेस कमरबंद
घातले व त्यांच्या डोक्यांना फेटे बांधले; परमेश्वराने मोशेला
आज्ञा दिल्याप्रमाणे त्याने हे केले.

14मग मोशेने पापार्पणाचा गोऱ्हा आणला आणि अहरोन
व त्याचे मुलगे ह्यांनी त्या गोऱ्ह्याच्या डोक्यावर आपले
हात ठेवले. 15मग मोशेने तो वधला व त्याचे रक्त घेऊन

आपल्या बोटाने वेदीच्या सर्व शिंगांना ते लावले, अशाप्रकारे
त्याने वेदी शुद्ध केली आणि ते रक्त वेदीच्या पायथ्यावर
ओतले, अशा रीतीने लोकांनी यज्ञ अर्पण करावीत म्हणून
ती पवित्र करण्यासाठी त्याने प्रायश्चित केले. 16गो-ह्याच्या
आंतड्यावरील सर्व चरबी, काळजावरील चरबीचा पडदा
आणि चरबीसहित दोन्ही गुरदे घेऊन मोशेने वेदीवर त्यांचा
होम केला. 17परंतु गोऱ्हा, त्याचे कातडे, त्याचे मांस व
त्याचे शेण ही सर्व छावणीबाहेर नेऊन अग्नीत जाळून
टाकली, परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणे मोशेने हे केले.

18मग त्याने होमापर्णाचा मेंढा आणला. अहरोन व त्याचे
मुलगे ह्यांनी त्याच्या डोक्यावर आपले हात ठेवले. 19मग
मोशेने तो वधला व त्याचे रक्त त्याने वेदीवर व सभोंवती
शिंपडले. 20–21मग त्याने त्या मेंढ्याचे कापून तुकडे केले,
मग त्याची आंतडी व पाय पाण्याने धुतले व ते घेऊन,
तसेच त्याचे डोके, तुकडे व चरबी हे सर्व घेऊन संपूर्ण
मेंढ्याचा त्याने वेदीवर होम केला. ते परमेश्वराकरिता
अग्नीद्वारे केलेले अर्पण झाले. त्याच्या सुवासाने
परमेश्वराला आनंद झाला. परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणे
त्याने हे केले.

22मग मोशेने दुसरा मेंढा आणला; तो अहरोन व त्याची
मुले यांची याजक म्हणून नेमणूक झाली हे दाखवण्याकरिता
होता. अहरोन व त्याच्या मुलांनी आपले हात त्या मेंढ्याच्या
डोक्यावर ठेवले. 23मोशेने त्याचा वध केला व त्याचे
थोडे रक्त घेऊन अहरोनाच्या उजव्या कानाच्या पाळीला;
उजव्या हाताच्या अंगठ्याला व उजव्या पायाच्या अंगठ्याला
लावले. 24मग मोशेने अहरोनाच्या मुलांना आणून त्याच्या
उजव्या कानाच्या पाळीला, उजव्या हाताच्या अंगठ्याला
व उजव्या पायाच्या अंगठ्याला. काही रक्त लावले व मग
ते रक्त त्याने वेदीवर व सभोंवती शिंपडले. 25मोशेने
चरबी, चरबीदार शेपूट, आंतड्यावरील सर्व चरबी
काळजावरील चरबीचा पडदा, दोन्ही गुरदे, त्यांच्यावरील
चरबी व उजवी मांडी घेतली; 26दररोज एक बेखमीर
भाकरीची टोपली देवासमोर ठेवली जात असे मोशेने
त्यातून एक बेखमीर पोळी, तेल लावलेली एक भाकर व
एक पापडी घेऊन त्या, चरबीवर व मागच्या बाजूच्या
उजव्या मांडीवर ठेवल्या. 27हे सर्व त्याने अहरोन व त्याच्या
मुलांच्या हातावर ठेवले आणि परमेश्वरासमोर
ओवाळणीचे अर्पण म्हणून ते ओवाळले. 28मग मोशेने ते
त्यांच्या हातातून घेऊन वेदीवरील होमार्पणासहित त्यांचा
होम केला; अहरोन व त्याचे मुलगे ह्यांचे याजक म्हणून
समर्पण करण्यासाठी हे अर्पण केले. हे होमार्पण होते
परमेश्वराला त्यामुळे संतोष झाला. 29मोशेने मेंढ्याच्या
उराचा भाग घेऊन ओवाळणीचे अर्पण म्हणून तो
परमेश्वरासमोर ओवाळला; याजकाच्या समर्पणासाठी
असलेल्या मेंढ्याचा हा भाग मोशेच्या वाट्याचा होता;
परमेश्वराने दिलेल्या आज्ञेप्रमाणे मोशेने हे केले. 30मग
मोशेने अभिषेकाचे काही तेल व वेदीवरील काही रक्त
घेऊन अहरोन व त्याची वस्त्रे, व त्याच्यासहित त्याचे
मुलगे व त्यांची वस्त्रे ह्यांच्यावर शिंपडले आणि अहरोन व
त्याची वस्त्रे व त्याच्याबरोबर त्याचे मुलगे व त्यांची वस्त्रे
पवित्र केली.

31मोशे अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना म्हणाला, “मी
सांगितल्याप्रमाणे, ‘अहरोन व त्याच्या मुलांनी हे मांस खावे;’
तेव्हा ही भाकरीची टोपली व याजकाच्या समर्पणासाठीचे
हे मांस घ्या; दर्शनमंडपाच्या दारापाशी ते शिजवा आणि
मी सांगितल्याप्रमाणे मांस व भाकर तेथेच खा. 32मांस व
भाकर ह्यातून काही उरले तर ते अग्नीत जाळून टाका;
33तुमच्या समर्पणाचा विधी सात दिवस चालेल; ते सात
दिवस पूर्ण होईपर्यंत तुम्ही दर्शनमंडपाच्या बाहेर जाऊ नये.
34परमेश्वराने आज्ञा केली आहे की आज केल्याप्रमाणे
तुमच्यासाठी प्रायश्चित करावे. 35तेव्हा दर्शनमंडपाच्या
दारापाशी तुम्ही सात दिवस व रात्री राहा, ही परमेश्वराची
आज्ञा तुम्ही पाळली नाही तर तुम्ही मराल; कारण
परमेश्वराने मला तशी आज्ञा दिली आहे.”

36तेव्हा मोशेच्याद्वारे परमेश्वराने ज्या गोष्टीविषयी आज्ञा
दिली होती त्या सर्व अहरोन व त्याच्या मुलांनी केल्या.

### याजक आपले काम सुरू करतात

9 आठव्या दिवशी मोशेने अहरोन, त्याचे मुलगे तसेच
इस्राएलांचे वडील ह्यांना (पुढाऱ्यांना) बोलावले.
2मोशे अहरोनाला म्हणाला, “पापार्पणासाठी एक निर्दोष
गोऱ्हा व होमार्पणासाठी निर्दोष मेंढा आण आणि त्यांना
परमेश्वराला अर्पण कर; 3आणि इस्राएल लोकांना असे
सांग, ‘तुम्ही पापार्पणासाठी एक बकरा आणा व
होमार्पणासाठी एक गोऱ्हा व एक कोकरु आणा; ही
दोन्ही एक एक वर्षाची व निर्दोष असावीत; 4आणि
परमेश्वरासमोर शांत्यर्पणे करण्यासाठी बली म्हणून एक
बैल, एक मेंढा व तेलात मळलेले अन्नार्पण आणा कारण
आज परमेश्वर तुम्हाला दर्शन देणार आहे.’”

5मग मोशेने आज्ञा दिल्याप्रमाणे सर्व लोक आले व
त्यांनी ते सर्व दर्शनमंडपाच्या दारापाशी आणले मग सर्वजण
येऊन परमेश्वरासमोर उभे राहिले. 6तेव्हा मोशे म्हणाला,
“परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणे तुम्ही सर्वकाही करावे;
मग परमेश्वराचे तेज तुम्हाला दिसेल.”

7मग मोशेने अहरोनाला सांगितले, “जा व परमेश्वराने
आज्ञा दिल्याप्रमाणे सर्व काही कर; वेदीजवळ जाऊन
आपला पापबली व होमबली ह्यांचे अर्पण कर आणि
स्वत:साठी व लोकांसाठी प्रायश्चित कर आणि
लोकाकडील बळीही अर्पण करुन त्यांच्यासाठी प्रायश्चित
कर.”

8तेव्हा अहरोन वेदीजवळ गेला व त्याने स्वत:साठी
पापार्पणाचा गोऱ्हा वधला. 9मग अहरोनाचे मुलगे रक्त
घेऊन त्याच्यापाशी गेले. तेव्हा त्याने आपले बोट त्यात
बुडवून ते वेदीच्या शिंगांना लावले मग ते वेदीच्या पायथ्याशी

ओतले. 10त्याने पापार्पणाची चरबी, गुरदे व काळजावरील
चरबीचा पडदा घेऊन त्यांचा वेदीवर परमेश्वराने मोशेला
दिलेल्या आज्ञेप्रमाणेच होम केला. 11मग अहरोनाने मांस
व कातडे छावणीबाहेर नेऊन अग्नीत जाळून टाकले.

12नंतर त्याने होमबली वधला व त्याचे तुकडे केले;
अहरोनाच्या मुलांनी त्या होमबलीचे रक्त अहरोनाकडे
आणले तेव्हा त्याने ते वेदीवर व सभोंवती शिंपडले. 13मग
अहरोनाच्या मुलांनी होमबलीचे तुकडे व त्याचे डोके
अहरोनाकडे दिले आणि त्याने त्यांचा वेदीवर होम केला.
14त्याने त्याची आंतडी व पाय धुवून त्यांचाही वेदीवर होम
केला.

15मग त्याने लोकांकडचे अर्पण जवळ नेले व त्यांच्यासाठी
आणलेला पापार्पणाचा बकरा वधला आणि पहिल्याप्रमाणेच
तोही पापार्पण म्हणून अर्पिला. 16त्याने होमबलीही जवळ
नेऊन परमेश्वराने आज्ञा दिल्याप्रमाणे तो अर्पिला. 17मग
त्याने अन्नार्पण वेदीजवळ नेले व त्यातले मूठभर घेऊन
दररोज सकाळच्या होमार्पणासह तेही अर्पण केले.

18लोकांसाठी शांत्यर्पणे म्हणून आणलेला बैल व मेंढा
हे त्याने वधले आणि त्याच्या मुलांनी त्या बलींचे व मेंढ्याचे
रक्त अहरोनाकडे आणले तेव्हा त्याने ते वेदीवर व सभोंवती
शिंपडले. 19अहरोनाच्या मुलांनी बैलाची व मेंढ्याची चरबी,
चरबीदार शेपूट, आंतड्यावरील चरबी, गुरदे आणि
काळजावरील चरबीचा पडदा ही सर्व अहरोनाकडे आणली.
20 त्यांनी ती सर्व चरबी त्या बलींच्या ऊराच्या भागावर
ठेवली; मग अहरोनाने त्या सर्वांचा वेदीवर होम केला.
21अहरोनाने बलींचे ऊर व उजवी मांडी ही मोशेच्या
सांगण्याप्रमाणे परमेश्वरासमोर ओवाळणीचे अर्पण म्हणून
ओवाळली.

22मग अहरोनाने लोकांकडे वळून, हात वर करुन
त्यांना आशीर्वाद दिला आणि ज्या वेदीवर त्याने पापार्पण
होमार्पण व शांत्यर्पणे केली होती तेथून तो खाली आला.

23मोशे व अहरोन दर्शन मंडपात गेले आणि बाहेर
आल्यावर त्यांनी लोकांना आशीर्वाद दिला; तेव्हा
परमेश्वराचे तेज सर्व लोकांना दिसले; 24तेव्हा
परमेश्वरासमोरुन अग्नी निघाला व त्याने वेदीवरील
होमार्पण व चरबी भस्म केली; हे पाहून सर्व लोकांनी
जयजयकार केला व दंडवत घातले.

### देव अहरोनाच्या दोन मुलांचा नाश करतो

10 मग अहरोनाचे मुलगे नादाब व अबीहू ह्यांनी
आपआपली धुपाटणी घेतली व त्यात वेगळ्या
अग्नीने धूप पेटवला; परंतु मोशेने आज्ञा दिल्याप्रमाणे
त्यांनी अग्नीचा उपयोग न करता वेगळ्याच अग्नीचा
उपयोग केला;

2म्हणून परमेश्वरासमोरुन अग्नी निघाला व त्याने त्यांना
भस्म केले; ते परमेश्वरासमोर मरण पावले. 3मग मोशे
अहरोनाला म्हणाला, “परमेश्वर म्हणतो, ‘जे याजक
माझ्याजवळ येतील त्यांनी माझा मान राखलाच पाहिजे;
मी पवित्र आहे हे त्यांना व सर्व लोकांना समजलेच पाहिजे.’”
तेव्हा अहरोन, नादाब व अबीहू ह्यांच्या विषयी काहीही न
बोलता गप्प राहिला.

4अहरोनाचा चुलता उज्जिएल ह्याला मिशाएल व
एलसाफान असे दोन मुलगे होते. मोशे त्या मुलांना म्हणाला,
“ह्या पवित्र स्थानाच्या पुढच्या भागाकडे जा व तुमच्या
बांधवांची प्रेते पवित्र स्थानासमोरुन उचलून छावणीबाहेर
घेऊन जा.”

5तेव्हा मोशेने सांगितल्याप्रमाणे मिशाएल व एलसाफान
यांनी त्यांना उचलून छावणीबाहेर नेले; त्यावेळी
परमेश्वराची सेवा करताना घालावयाचे विणलेले विशेष
अंगरखे नादाब व अबीहू ह्यांच्या अंगात अद्याप तसेच
होते.

6मोशेने अहरोन व त्याचे मुलगे एलाजार व इथामार
यांना सांगितले, “तुम्ही तुमचे केस मोकळे सोडू नका तर
ते विंचरा, आणि तुमची वस्त्रे फाडू नका! तुमचे दुःख
दाखवू नका! म्हणजे मग तुम्ही मारले जाणार नाही आणि
परमेश्वराचा राग सर्व मंडळीवर भडकणार नाही; सर्व
इस्राएल घराणे तुमचे बांधव आहेत; नादाब व अबीहू
ह्यांना परमेश्वराने अग्नीने भस्म केल्याबद्दल त्यांनी शोक
करावा; 7पण तुम्ही दर्शनमंडपाच्याबाहेर जाऊ नये; जर
बाहेर जाल तर मराल! कारण परमेश्वराच्या अभिषेकाच्या
तेलाने तुमचा अभिषेक झाला आहे.” तेव्हा अहरोन,
एलाजार व इथामार ह्यांनी मोशेची आज्ञा मानली.

8मग परमेश्वर अहरोनाला म्हणाला, 9“जेव्हा तू व तुझे
मुलगे तुम्ही दर्शनमंडपात जाल तेव्हा तुमच्यापैकी कोणीही
द्राक्षारस किंवा मद्य पिऊ नये; प्याल तर मराल! हा
तुमच्यासाठी पिढ्यान्‌पिढ्या कायमचा विधि आहे. 10तुम्ही
परमेश्वराच्या दृष्टीने पवित्र व सामान्य तसेच शुद्ध व
अशुद्ध ह्यामधील भेद जाणावा; 11आणि परमेश्वराने
मोशेद्वारे नेमून दिलेले सर्व विधीनियम अहरोनाने सर्व
इस्राएल लोकांना शिकवावे.”

12मग मोशे अहरोनाला आणि एलाजार व इथामार ह्या
हयात असलेल्या त्याच्या मुलांना म्हणाला, “परमेश्वराच्या
अर्पणापैकी उरलेले अन्नार्पण घ्या व ते वेदीपाशी
खमीराशिवाय खा, कारण ते परमपवित्र आहे;
13परमेश्वरासाठी अर्पिलेल्या अर्पणाचा तो भाग आहे आणि
मी दिलेल्या विधीनियमांच्या शिकवणुकीप्रमाणे तो भाग
तुझा व तुझ्या मुलांच्या हक्काचा आहे; परंतु तो तुम्ही
पवित्र जागी खावा.

14“त्याप्रमाणे तू, तुझे मुलगे, व तुझ्या मुली ह्यांनी,
ओवाळलेला ऊर व मागचा पाय स्वच्छ ठिकाणी खावा;
कारण इस्राएल लोकांनी केलेल्या शांत्यर्पणाच्या यज्ञापैकी
तुला तो हक्क म्हणून दिला आहे. 15ओवाळणीचा ऊर व
समर्पणाची मांडी ही चरबीच्या हव्याबरोबर ओवाळणीचे
अर्पण म्हणून लोकांनी परमेश्वरासमोर ओवाळण्यासाठी

आणावी; ओवाळून झाल्यावर परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे हा भाग तुझा व तुझ्या मुलाबाळांचा कायमच्या हक्काचा आहे."

16मोशेने पापार्पणाच्या बकऱ्याची बारकाईने विचारपूस केली असता तो जाळून टाकल्याचे त्याला कळाले; तेव्हा अहरोनाचे मुलगे एलाजार व इथामार ह्यांच्यावर मोशे भयंकर रागावला; तो म्हणाला, 17"तुम्ही पापार्पणाच्या बलीचे मांस पवित्रस्थानी खावयास पाहिजे होते; कारण ते परमपवित्र आहे! तुम्ही ते परमेश्वरासमोर का खाल्ले नाही? मडळीचा अन्याय वाहून त्यांच्यासाठी परमेश्वरासमोर प्रायश्चित करावे म्हणून परमेश्वराने ते तुम्हांला दिले होते; 18त्याचे रक्त पवित्रस्थानात आणण्यात आले नव्हते; माझ्या आज्ञेप्रमाणे तुम्ही त्याचे मांस पवित्र जागीं बसून अवश्य खावयाचे होते."

19परंतु अहरोन मोशेला म्हणाला, "पाहा, आज त्यांनी आपले पापार्पण व होमार्पण परमेश्वरासमोर अर्पण केले, आणि तरी आज माझ्यावर कशी संकटे आली आहेत हे तू जाणतोस; तेव्हा आज मी पापबली खाल्ला असता तर परमेश्वराला ते आवडले असते, असे तुला वाटते काय? नाही ना!"

20मोशेने हे ऐकले, तेव्हा त्याचे समाधान झाले.

### मांस खाण्यासंबंधीचे नियम

11 परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना म्हणाला : 2"इस्राएल लोकांना असे सांगा की पृथ्वीवरील ज्या प्राण्यांचे मांस तुम्ही खावे ते हे : 3ज्या प्राण्यांचे खूर दुभंगलेले आहेत व जे रवंथ करतात त्यांचे मांस तुम्ही खावे.

4–6"काही प्राणी रवंथ करतात परंतु त्यांचे खूर दुभंगलेले नाहीत, ते तुम्ही खाऊ नयेत, उंट, शाफान–सशासारखा खडकात राहणारा एक प्राणी, ससा हे असे प्राणी आहेत, ते तुम्हांकरिता अशुद्ध प्राणी आहेत. 7डुकराचे खूर दुभंगलेले आहे पण तो रवंथ करत नाही म्हणून तो तुम्हांकरिता अशुद्ध आहे. 8ह्या प्राण्यांचे मांस तुम्ही खाऊ नये व त्यांच्या शवाला शिवू नये; ते तुमच्यासाठी अशुद्ध आहेत.

### जलचर प्राणी खाण्यासंबंधी नियम

9"जलाशयात, समुद्रात व नद्यात संचार करणाऱ्या ज्या प्राण्यांना पंख व खवले आहेत ते तुम्ही खावे. 10 11जलचरापैकी समुद्रात व नद्यात संचार करणाऱ्या ज्या प्राण्यांना पंख आणि खवले नाहीत असे प्राणी तुम्ही खाऊ नये; परमेश्वराच्या दृष्टिने ते अयोग्य आहेत. ते तुम्ही अयोग्य समजावे; त्यांचे मांस खाऊ नये; त्यांच्या शवांना देखील शिवू नये. 12जलाशयातल्या ज्या प्राण्यांना पंख व खवले नाहीत ते देवाच्या दृष्टिने खाण्यास योग्य नाहीत ते ओंगळ समजावे."

### खाण्यास मना केलेले पक्षी

13"देवाच्या दृष्टिने अशुद्ध प्राण्याप्रमाणेच अशुद्ध असलेले व म्हणून खाऊ नयेत ते पक्षी असे: गरूड, गिधाडे, कुरर, 14घार, निरनिराळ्या जातीचे ससाणे, 15निरनराळ्या जातीचे कावळे, 16शहामृग, गवळण, कोकीळ, निरनिराळ्या जातीचे बहिरी ससाणे, 17पिंगळा, करढोक, मोठे घुबड, 18पांढरे घुबड, पाणकोळी, गिधाड, 19करकोचा, निरनिराळ्या जातीचे बगळे, टिटवी आणि वटवाघूळ.

### खाण्याच्या कीटकासंबंधी नियम

20"जितके पंख असलेले कीटक प्राणी चार पायावर चालतात तितके परमेश्वराच्या दृष्टिने खाण्यास योग्य नाहीत; ते खाऊ नये! 21परंतु पायावर चालणाऱ्या व पंख असलेल्या प्राण्यांपैकी ज्यांना जमिनीवर उड्या मारण्यासाठी पायाबरोबर तंगड्या असतात ते तुम्ही खावे. 22त्याच प्रमाणे निरनिरळ्या जातीचे टोळ, निरनिरळ्या जातीचे नाकतोडे, निरनिराळ्या जातीचे खरपुडे व निरनिराळ्या जातीचे गवत्ये टोळ तुम्ही खावे.

23"परंतु चार पायाचे पंख असलेले इतर प्राणी परमेश्वराच्या दृष्टीने ओंगळ आहेत ते खाऊ नये. 24त्यांच्यामुळे तुम्ही अशुद्ध व्हाल; जो कोणी त्यांच्या शवाला शिवेल तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध होईल; 25जो कोणी मेलेल्या कीटकांना उचलील, त्याने आपली वस्त्रे धुवावी व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.

### प्राण्यांविषयी आणखी नियम

26–27"ज्या प्राण्याचे खूर दुभागलेले आहेत पण ते दोन अगदी सारखे भाग करीत नाहीत व जे रवंथ करीत नाहीत ते तुम्ही अशुद्ध समजावेत; चार पायावर चालणाऱ्या सर्व पशूपैकी जे आपल्या पंजावर चालतात ते सर्व तुम्ही अशुद्ध समजावे; त्याच्या शवांना जो कोणी शिवेल त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 28जो कोणी त्यांची शवे उचलील त्याने आपली वस्त्रे धुवून संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे; ते प्राणी तुम्ही अशुद्ध समजावे.

### रांगणाऱ्या प्राण्यांविषयी नियम

29"जमिनीवर रांगणाऱ्या प्राण्यांपैकी तुम्ही अशुद्ध समजावे ते हे: मुंगूस, उंदीर, निरनिराळ्या जातीचे सरडे, 30चौपई, घोरपड, पाल, सांडा व गुहिऱ्या सरडा. 31हे प्राणी तुम्हाकरिता अशुद्ध समजावे. त्यांच्या शवांना जो कोणी शिवेल त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.

### अशुद्ध प्राण्यांविषयी नियम

32"त्यांच्यापैकी कोणी मरुन एखाद्या वस्तूवर पडला तर ती वस्तूही अशुद्ध समजावी; लाकडी पात्र, वस्त्र, कातडे, तरट किंवा कोणत्याही कामाचे हत्यार असो, ते पाण्यात टाकावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध समजावे; मग ते

धुतल्यावर शुद्ध समजावे. 33त्यांच्यापैकी एखादा मरुन मातीच्या पात्रात पडला तर त्या पात्रात जे काही असेल ते अशुद्ध समजावे व ते पात्र फोडून टाकावे. 34अशुद्ध खापराचे पाणी अन्नावर पडल्यास ते अन्नही अशुद्ध होते. अशुद्ध भांड्यातील कोणतेही पेय अशुद्ध होईल. 35त्यांच्या शवांचा एखादा भाग एखाद्या भट्टीवर किंवा चुलीवर पडला तर ती अशुद्ध समजून, तिचे तुकडे तुकडे करुन ती मोडून तोडून टाकावी, ती पुन्हा शुद्ध होणार नाही; म्हणून तुम्ही ती अशुद्ध समजावी.

36"झरा किंवा विहीर, ज्यांच्यात सतत पाणी असते ते शुद्धच राहतात; परंतु त्याच्यातील शवांना जो शिवेल तो अशुद्ध होईल. 37त्याच्या शवाचा काही भाग पेरण्याच्या बियाणावर पडला तरी ते बियाणे शुद्ध समजावे; 38परंतु जर बियाणे पाण्याने भिजल्यावर त्या प्राण्याच्या शवाचा काही भाग त्यांवर पडला तर ते तुम्ही अशुद्ध समजावे.

39"खाण्यास योग्य अशा प्राण्यांपैकी एखादा मेला आणि त्याच्या शवास कोणी शिवला तर त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 40कोणी त्याच्या शवाचा काही भाग खाल्ला तर त्याने आपली वस्त्रे धुवावी व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे; जो त्याचे शव उचलील त्यानेही आपली वस्त्रे धुवावी व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.

41"जमिनीवर रांगणारे सर्व प्राणी ओंगळ आहेत; परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे ते खाऊ नयेत. 42जमिनीवर जे आपल्या पोटावर सरपटतात, किंवा चार पायावर चालतात, किंवा ज्यांना फार पाय आहेत असे सरपटणारे प्राणी तुम्ही खाऊ नयेत, कारण ते ओंगळ आहेत. 43कोणत्याही जातीच्या रांगणाऱ्या प्राण्यामुळे तुम्ही स्वत:ला अशुद्ध करुन घेऊ नका, किंवा त्यांच्यामुळे स्वत:ला अशुद्ध करुन विटाळवू नका!

44कारण मी परमेश्वर, तुमचा देव आहे! मी पवित्र आहे! म्हणून तुम्ही ही आपणांस पवित्र असे ठेवावे! म्हणून जमिनीवर रांगणाऱ्या कोणत्याही जातीच्या प्राण्यामुळे तुम्ही आपणास विटाळवू नका! 45मी तुम्हाला मिसर देशातून यासाठी बाहेर आणले की तुम्ही माझे पवित्र लोक व्हावे व मी तुमचा देव असावे; मी पवित्र आहे म्हणून तुम्हीही पवित्र असावे!"

46प्राणी, पक्षी, सर्व जलचर व जमिनीवर रांगणारे सर्व प्राणी ह्यांच्याविषयी हे नियम आहेत. 47ह्या नियमावरुन शुद्ध प्राणी व अशुद्ध प्राणी तसेच खाण्यास योग्य असे प्राणी व जे खाऊ नयेत असे प्राणी ह्यांच्यातील भेद तुम्हांस समजावा.

## बाळंत झालेल्या मातांच्या शुद्धीकरणाविषयी नियम

12 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"इस्राएल लोकांना सांग, जर स्त्री गर्भवती होऊन तिला मुलगा झाला तर तिने सात दिवस अशुद्ध राहावे; मासिक पाळीच्या वेळी जशी ती असते तशीच ती अशुद्ध समजावी. 3आठव्या दिवशी त्या मुलाची सुंता करावी. 4नंतर त्या स्त्रीला आपल्या रक्त स्त्रावापासून शुद्ध होण्यासाठी तेहतीस दिवस काढावे लागतील; त्या मुदतीत तिने कोणत्याही पवित्र वस्तूला शिवू नये व पवित्र स्थानात जाऊ नये. 5परंतु जर तिला मुलगी झाली तर मासिक पाळीच्या काळात जशी ती असते तसेच तिने चौदा दिवस अशुद्ध राहावे; तिला आपल्या रक्त स्त्रावापासून शुद्ध होण्यासाठी सहासष्ट दिवस लागतील.

6"तिला मुलगा किंवा मुलगी झाल्यावर तिची शुद्धीहोण्याची मुदत पुरी झाली म्हणजे तिने होमार्पणासाठी एक वर्षाचे कोंकरु आणि पापार्पणासाठी पारव्याचे पिलू किंवा होला आणून दर्शनमंडपापाशी याजकाकडे द्यावीत. 7तिला कोकरु अर्पिण्याची ऐपत नसेल तर तिने दोन होले किंवा पारव्याची दोन पिले, एक होमार्पणासाठी व दुसरा एक पापार्पणासाठी आणावी. 8मग याजकाने ते होले किंवा ती पिले परमेश्वरासमोर अर्पून तिच्यासाठी प्रायश्चित करावे म्हणजे ती आपल्या रक्तस्त्रावापासून शुद्ध होईल; मुलगा किंवा मुलगी झालेल्या स्त्री विषयी हे नियम आहेत."

## त्वचारोगाविषयी नियम

13 परमेश्वर मोशे व अहरोन यांना म्हणाला, 2"एखाद्या माणसाच्या अंगावरील कातडीला सूज, खवंद किंवा तकतकीत डाग असेल व तो महारोगाच्या चट्ट्यासारखा दिसत असेल तर त्याला अहरोन याजकाकडे किंवा त्याच्या याजक मुलांपैकी एकाकडे न्यावे. 3मग याजकाने त्याच्या अंगाच्या कातडीवरील तो चट्टा तपासावा व त्या चट्ट्यावरील केस पांढरे झाले असल्यास व तो चट्टा कातडीपेक्षा खोल गेलेला दिसल्यास तो महारोगाचा चट्टा समजावा; मग त्या माणसाची तपासणी झाल्यावर याजकाने त्याला अशुद्ध ठरवावे.

4"त्या माणसाच्या अंगाच्या कातडीवरील डाग पांढरा असेल पण त्याच्या कातडीपेक्षा तो खरोखर खोल गेलेला नसेल व त्यावरील केस पांढरे झालेले नसतील तर याजकाने त्या चट्टा पडलेल्या माणसाला सात दिवस इतर माणसापासून वेगळे ठेवावे. 5सातव्या दिवशी याजकाने परत त्याची तपासणी करावी आणि तो चट्टा जसाच्या तसाच असून कातडीत पसरला नाही असे त्याला दिसून आले तर याजकाने त्याला आणखी सात दिवस इतरापासून वेगळे ठेवावे. 6सातव्या दिवसानंतर याजकाने पुन्हा त्याची तपासणी करावी आणि चट्टा जर बुजत चालला असेल व तो कातडीत पसरला नसेल तर याजकाने त्याला शुद्ध ठरवावे; ते साधे खवंद होय; त्या माणसाने आपली वस्त्रे धुवावी आणि पुन्हा शुद्ध व्हावे.

7"परंतु त्या माणसाने स्वत:ला शुद्ध ठरविण्यासाठी याजकाला दाखविल्यानंतर त्याच्या कातडीवरील ते खवंद पसरत गेले असेल तर मग त्याने पुन्हा याजकापुढे हजर व्हावे. 8याजकाने त्याची तपासणी करावी आणि ते खवंद

कातडीत पसरल्याचे दिसून आल्यास त्याने त्याला अशुद्ध
ठरवावे; तो महारोग होय.
9"एखाद्या माणसाला महारोगाचा चट्टा असेल तर त्याला
याजकाकडे न्यावे. 10याजकाने त्याला तपासावे; आणि
जर त्याच्या कातडीला पांढऱ्या चट्ट्यावर सूज आली असेल
व तेथील केस पांढरे झाले असतील व सुजेच्या जागेवरील
मांस हुळहुळे झाले असेल तर 11त्याच्या कातडीतला तो
जुनाट महारोग होय; याजकाने त्याला अशुद्ध ठरवावे;
अधिक तपासणीसाठी त्याला काही काळासाठी इतरापासून
वेगळे ठेवू नये, कारण तो अशुद्धच आहे.
12"एखाद्या माणसाच्या कातडीला कोड फुटून तो
डोक्यापासून पायापर्यंत अंगभर सर्व कातडीवर पसरला
असेल तर याजकाने त्याला अंगभर तपासावे, 13त्याचा
कोड अंगभर पसरल्याचे त्याला दिसून आले तर त्याने
त्याला शुध्द ठरवावे; त्याचे सर्व अंग पांढरे झाले आहे
म्हणजे तो शुद्ध आहे. 14पण त्याच्या अंगावर काही मांस
कोवळे असेल तर तो अशुद्ध समजावा.
15याजकाने कोवळे मांस पाहून त्याला अशुद्ध ठरवावे;
असले कोवळे मांस अशुद्धच असते; तो महारोग होय.
16"परंतु ते कोवळे मांस जर परत पांढरे झाले तर
त्याने परत याजकाकडे यावे; 17याजकाने पुन्हा त्याला
तपासावे आणि जर त्याचा चट्टा परत पांढरा झाला असेल
तर त्याने त्या माणसाला शुद्ध ठरवावे; तो शुद्ध आहे.
18कोणाच्या कातडीला फोड येऊन तो बरा झाला 19व
फोडाच्या जागी पांढरी सूज आली किंवा पांढरा तकतकीत
लाल रेषा असलेला डाग पडला तर त्याने तो याजकाला
दाखवावा. 20याजकाने त्याला तपासावे आणि जर ती जागा
कातडीपेक्षा खोल गेलेली दिसली व त्यावरील केस पांढरे
झाले असले तर त्याने त्याला अशुद्ध ठरवावे; फोडातून
बाहेर पडलेला हा महारोगाचा चट्टा आहे. 21पण तपासणी
केल्यावर त्यावरचे केस पांढरे झालेले नाहीत व ती
जागाकातडीपेक्षा खोल गेलेली नाही तसेच ती बुजून पुसट
होत चाललेली आहे असे याजकाला दिसून आले तर
त्याने त्याला सात दिवस वेगळे ठेवावे. 22तो कातडीवर
पसरत गेला आहे असे दिसले तर याजकाने त्या माणसाला
अशुद्ध ठरवावे; तो चट्टा आहे. 23पण तो तकतकीत डाग
तेथल्या तेथेच राहून पसरला नाही तर तो फोडाचा वण
आहे, म्हणून याजकाने त्या माणसाला शुद्ध ठरवावे.
24"एखाद्याच्या कातडीत जळाल्याचा वण असेल व त्या
वणाच्या कोवळ्या मांसात पांढरा तकतकीत पण त्यावर
लाल रेषा असलेला किंवा नुसता पांढरा डाग दिसून येईल.
25तर याजकाने त्याला तपासावे; त्या तकतकीत डागावरील
केस पांढरे झाले असतील व कातडीपेक्षा ती जागा खोल
गेलेली दिसत असेल तर त्या जळलेल्या जागी महारोग
फुटला आहे; मग याजकाने त्याला अशुद्ध ठरवावे; तो
महारोगाचा चट्टा होय. 26पण तपासल्यावर त्या तकतकीत
डागावरचे केस पांढरे झालेले नाहीत व ती जागा कातडीपेक्षा
खोल गेलेली नाही आणि ती पुसट होत चालली आहे असे
याजकाला दिसून आले तर त्याने त्याला सात दिवस वेगळे
ठेवावे. 27सातव्या दिवशी त्याने त्याला तपासावे व त्याचा
डाग कातडीवर पसरत गेला आहे असे दिसले तर याजकाने
त्या माणसाला अशुद्ध ठरवावे; तो महारोगाचा चट्टा होय;
28परंतु तो तकतकीत डाग तेथल्या तेथेच असून कातडीवर
पसरला नाही व तो पुसट होत चालला आहे असे दिसून
आल्यास ती जळलेल्या जागेची सूज आहे म्हणून याजकाने
त्याला शुद्ध ठरवावे; तो त्या जळलेल्या जागेवरचा वण
होय.
29"एखाद्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या डोक्यावर किंवा
हनुवटीवर चट्टा असला, 30तर याजकाने त्याची तपासणी
करावी आणि ती जागा कातडीपेक्षा खोल दिसली व
तिच्यावर काही पिंगट बारीक केस असले तर त्याने त्या
व्यक्तीला अशुद्ध ठरवावे; ती चाई डोक्याचा किंवा
हनुवटीचा महारोग होय. 31तो चाईचा चट्टा कातडीपेक्षा
खोल नसला व त्याच्यावर काळे केस नसले तर चाईचा
चट्टा असलेल्या व्यक्तीला त्याने सात दिवस वेगळे ठेवावे;
32सातव्या दिवशी त्याने त्या चट्ट्याची तपासणी करावी; ती
चाई पसरली नाही, त्या जागी पिंगट केस नाहीत व
ती जागा कातडीपेक्षा खोल गेलेली दिसली नाही, 33तर
त्या माणसाने आपल्या डोक्याचे केस काढावेत; पण
चाईवरचे केस काढू नयेत; याजकाने चाई असलेल्या
त्या माणसाला आणखी सात दिवस वेगळे ठेवावे.
34सातव्या दिवशी याजकाने ती चाई पुन्हा तपासून पाहावी
आणि चाई कातडीवर पसरलेली नसली व कातडीपेक्षा
ती खोल गेलेली नसली तर त्याने त्याला शुद्ध
ठरवावे; त्या माणसाने आपले कपडे धुवावे व शुद्ध व्हावे.
35परंतु तो शुद्ध ठरल्यानंतर ती चाई पसरत गेली
36तर याजकाने त्याला तपासावे व ती चाई कातडीवर
पसरलेली दिसली तर पिंगट केस शोधीत न बसता
त्या माणसाला अशुद्ध ठरवावे. 37परंतु ती चाई होती
तेवढीच असेल व तिच्यावर काळे केस येत आहेत असे
त्याला दिसून आले तर ती चाई बरी झाली आहे व
तो माणूस शुद्ध झाला आहे; याजकाने त्याला शुद्ध
ठरवावे.
38"कोणा पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या अंगावर तकतकीत
पांढरे डाग असतील 39तर याजकाने ते तपासावे व त्या
व्यक्तीच्या अंगावरील ते तकतकीत डाग करडे असतील
तर ती कातडीवर फुटलेली दाद-अपाय न करणारा त्वचेचा
रोग-होय. ती व्यक्ती शुद्ध होय.
40"कोणा माणसाचे केस गळून पडू लागले तर ते केवळ
टक्कल आहे; तो माणूस शुद्ध होय. 41त्याच्या डोक्याच्या
बाजूचे केस गळू लागले तरी ते एक प्रकारचे टक्कल
होय; तो माणूस शुद्ध आहे. 42परंतु त्या टक्कल पडलेल्या
डोक्यावरील चामडीवर तांबूस पांढरा चट्टा पडलेला असेल
तर त्याच्या डोक्यावर महारोग फुटत आहे. 43मग याजकाने

त्याला तपासावे आणि त्याच्या टक्कल पडलेल्या डोक्याच्या
भागावर, अंगावरील कातडीच्या महारोगासारखा तांबूस
पांढरा चट्टा पडलेला असल्याचे दिसले, 44तर त्या माणसाच्या
डोक्यावर पडलेला चट्टा महारोगाचा होय; तो माणूस अशुद्ध
होय; याजकाने त्याला अशुद्ध ठरवावे."

45"ज्याला महारोग झालेला आहे त्याचे कपडे फाटके
असावे; त्याने आपले केस मोकळे सोडावे, आपले तोंड
झाकावे व इतर लोकांना इशारा देण्यासाठी 'अशुद्ध अशुद्ध'
असे ओरडत जावे. 46जोपर्यंत त्याच्या अंगावर चट्टा असेल
तितक्या दिवसापर्यंत त्याने अशुद्ध राहावे; तो अशुद्ध
होय; त्याने एकटे राहावे; त्याची वस्ती छावणीबाहेर
असावी.

47–48"एकाद्या लोकरीच्या किंवा सणाच्या वस्त्राला
महारोगाचा चट्टा पडला, किंवा तो सणाच्या किंवा
लोकरीच्या ताण्याला किंवा बाण्याला, चामड्याला किंवा
चामड्याच्या वस्तूला पडला, 49आणि तो चट्टा हिरवट
किंवा तांबूस असला तर तो महारोगाचा चट्टा होय; तो
याजकाला दाखवावा; 50याजकाने तो चट्टा तपासावा; चट्टा
पडलेली ती वस्तू त्याने सात दिवस वेगळी करुन ठेवावी.
51–52त्याने सातव्या दिवशी तो चट्टा तपासावा आणि
चामड्यावर किंवा वस्त्राच्या ताण्यावर किंवा बाण्यावर
अथवा चामड्याच्या कोणत्याही वस्तूवर तो चट्टा पसरलेला
दिसला तर ते वस्त्र किंवा चामडे अशुद्ध आहे, चरत
जाणारे कुष्ठ आहे. याजकाने ते वस्त्र किंवा चामडे जाळून
टाकावे;

53"परंतु तो चट्टा पसरला नाही असे याजकाला दिसून
आले तर ते वस्त्र किंवा चामडे अवश्य धुतले पाहिजे.
54याजकाने लोकांना ते वस्त्र किंवा चामडे धुण्यास सांगावे.
मग धुवून झाल्यावर ते त्याने आणखी सात दिवस वेगळे
ठेवावे. 55त्यानंतर याजकाने पुन्हा त्याची तपासणी करावी,
आणि जर तो आहे तसाच असला व जरी पसरलेला
नसला तरी तो अशुद्ध समजावा आणि ते वस्त्र किंवा
चामडे अग्नीत जाळून टाकावे.

56"परंतु धुतल्यावर तो चट्टा पुसट झाला आहे असे
याजकाला दिसून आले तर त्याने त्या वस्त्राचा किंवा
चामड्याचा अथवा ताण्याचा किंवा बाण्याचा भाग फाडून
टाकावा. 57इतके केल्यावरही जर त्या वस्त्रावर, त्याच्या
ताण्यावर किंवा बाण्यावर अथवा चामड्याच्या कोणत्याही
वस्तूवर तो चट्टा पुन्हा आला तर तो चट्टा चरत व पसरत
आहे असे समजून ते चामडे किंवा वस्त्र अवश्य जाळून
टाकावे. 58परंतु तो चट्टा धुतल्यानंतर पुन्हा आला नाही
तर मग ते चामडे किंवा वस्त्र शुद्ध समजावे, ते शुद्ध
आहे."

59लोकरीच्या किंवा सणाच्या वस्त्रावर, त्याच्या ताण्यावर
किंवा बाण्यावर अथवा चामड्याच्या कोणत्याही वस्तूवर
महारोगाचा चट्टा दिसून आला तर ती शुद्ध किंवा अशुद्ध
ठरविण्याचे हे नियम आहेत.

### शुद्ध झालेल्या महारोग्याकरिता नियम

14 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"महारोग बरा
झालेल्या लोकांना शुद्ध करून घेण्याविषयीचे
नियम असे: याजकाने महारोग्याला तपासावे. 3त्याने
छावणीच्या बाहेर जाऊन त्या महारोग्याला तपासावे व
त्याचा महारोग बरा झाला आहे किंवा नाही ते पाहावे.
4तो बरा झाला असल्यास त्याने त्याला शुद्ध होण्यासाठी
दोन जिवंत शुद्ध पक्षी, गंधसरुचे लाकूड, किरमिजी रंगाचे
कापड व एजोब घेऊन येण्यास सांगावे. 5मग वाहत्या
पाण्यावर मातीच्या पात्रात त्यातला एक पक्षी मारण्याची
याजकाने त्याला आज्ञा द्यावी. 6याजकाने जिवंत पक्षी,
गंधसरुचे लाकूड, किरमिजी रंगाचे कापड व एजोब ही
सामग्री घेऊन जिवंत पक्षासह वाहत्या पाण्यावर मारलेल्या
पक्ष्याच्या रक्तात बुडवावी; 7आणि ते रक्त महारोगापासून
शुद्ध ठरवावयाच्या माणसावर सात वेळा शिंपडावे; मग तो
शुद्ध झाला आहे असे सांगावे व त्यानंतर याजकाने
माळरानात जाऊन त्या जिवंत पक्ष्याला सोडून द्यावे;

8"मग शुद्ध ठरवावयाच्या माणसाने आपले कपडे धुवावे,
आपले मुंडन करुन घ्यावे आणि पाण्याने स्नान करावे
म्हणजे तो शुद्ध ठरेल; त्यानंतर त्याने छावणीत यावे; तरी
त्याने सात दिवस आपल्या तंबूबाहेर राहावे; 9सातव्या
दिवशी त्याने आपले डोके, दाढी, भुवया व अंगावरील
एकंदर सर्व केस मुंडवावे; आपले कपडे धुवावे व पाण्याने
स्नान करावे, म्हणजे तो शुद्ध होईल.

10"आठव्या दिवशी त्या माणसाने दोन निर्दोष कोकरे,
एक वर्षाची निर्दोष मेंढी, अन्नार्पणासाठी तेलात मळलेला
चोवीस* वाट्या—तीन दशांश एफा—मैदा, व दोन तृतीय
अंश पिंट—एक लोगभर तेल ही सामग्री याजकाकडे
आणावी; 11आणि शुद्ध ठरविणाऱ्या याजकाने शुद्ध
ठरवावयाच्या माणसाला, त्या अर्पण करावयाच्या सामग्रीसह
परमेश्वरासमोर दर्शनमंडपाच्या दारापाशी उभे करावे.
12मग याजकाने दोषार्पणासाठी एक कोकरु व एक लोगभर
तेल अर्पावे; ते ओवाळणीचे अर्पण म्हणून ओवाळावे; 13मग
याजकाने पवित्र स्थानात जेथे पापबली व होमबली ह्यांचा
वध करतात तेथे ते कोकरु वधावे कारण पापबली प्रमाणेच
दोषबलीवरही याजकाचा हक्क आहे; हे अर्पण परमपवित्र
आहे.

14"मग याजकाने दोषबलीचे काही रक्त घेऊन शुद्ध
ठरवावयाच्या माणसाच्या उजव्या कानाच्या पाळीला,
उजव्या हाताच्या अंगठ्याला व उजव्या पायाच्या अंगठ्याला
लावावे. 15याजकाने लोगभर तेलातले थोडेसे तेल आपल्या
डाव्या तळ हातावर ओतावे; 16मग त्याने आपल्या उजव्या
हाताचे बोट आपल्या डाव्या तळहातावरील तेलात बुडवून
त्यातले काही परमेश्वरासमोर सात वेळा बोटाने शिंपडावे.
17त्याच्या तळहातावर जे तेल उरेल त्यातले काही घेऊन

---

**चोवीस कप** एकाचे 3/10.

याजकाने शुद्ध ठरवावयाच्या माणसाच्या उजव्या कानाच्या
पाळीवरील, उजव्या हाताच्या अंगठ्यावरिल दोषार्पणाच्या
रक्तावर लावावे, 18तळहातावर उरलेले तेल याजकाने
शुध्द ठरवावयाच्या माणसाच्या डोक्याला लावावे आणि
अशा प्रकारे त्या माणसासाठी याजकाने परमेश्वरासमोर
प्रायश्चित करावे.

19"मग याजकाने पापबली अर्पावा आणि शुद्ध
ठरवावयाच्या माणसासाठी प्रायश्चित करावे; त्यानंतर
त्याने होमबलीचा वध करावा; 20मग याजकाने होमबली
व अन्नबली वेदीवर अर्पून त्या माणसासाठी प्रायश्चित
करावे म्हणजे तो शुद्ध ठरेल.

21"परंतु तो माणूस गरीब असून एवढे आणण्याची त्याला
ऐपत नसेल तर त्याने आपल्या प्रायश्चितासाठी ओवाळणीचे
एक कोंकरु दोषार्पण म्हणून आणावे आणि अन्नार्पणासाठी
तेलात मळलेला, आठ वाट्या-एक दशांश एफा-मैदा आणि
दोन तृतीय अंश पिंटभर-एक लोगभर-तेल आणावे;
22आणि ऐपतीप्रमाणे दोन होले किंवा पारव्याची दोन पिले
त्याने आणावी; त्यातील एक पापबली व एक होमबली
व्हावा.

23"आठव्या दिवशी आपल्या शुद्धीकरणासाठी त्याने ही
सामग्री घेऊन दर्शनमंडपाच्या दारापाशी याजकाकडे
परमेश्वरासमोर जावे. 24मग याजकाने ते दोषार्पणाचे
कोंकरु व लोगभर तेल घेऊन ओवाळणीचे अर्पण म्हणून
परमेश्वरासमोर ओवाळावे. 25त्यानंतर याजकाने
दोषार्पणाच्या कोंकराचा वध करावा आणि त्याने त्याचे
काही रक्त घेऊन शुद्ध ठरवावयाच्या माणसाच्या उजव्या
कानाच्या पाळीला, उजव्या हाताच्या व उजव्या पायाच्या
अंगठ्यांना लावावे. 26याजकाने त्या तेलातले काही आपल्या
डाव्या तळहातावर ओतावे; 27मग त्याने उजव्या हाताच्या
बोटाने त्यातील काही तेल परमेश्वरासमोर सात वेळा
शिंपडावे. 28मग याजकाने आपल्या तळहातावरील काही
तेल घेऊन शुद्ध ठरवावयाच्या माणसाच्या उजव्या कानाच्या
पाळीवर, उजव्या हाताच्या व उजव्या पायाच्या अंगठ्यांवर,
दोषबलीचे रक्त लावलेल्या जागेवर लावावे; 29याजकाने
तळहातावर उरलेले तेल शुध्द ठरवावयाच्या माणसाच्या
डोक्याला परमेश्वरासमोर त्या माणसासाठी प्रायश्चित
म्हणून लावावे.

30"मग त्याच्या ऐपतीप्रमाणे त्याला मिळालेले होले किंवा
पारव्याची पिले ह्यांच्यापैकी एकाचे त्याने अर्पण करावे;
31त्यांच्यापैकी एकाचे पापार्पण करावे व दुसऱ्याचे होमार्पण
करावे; पक्ष्यांची ही अर्पणे त्याने अन्नार्पणासहित करावी;
ह्या प्रकारे याजकाने शुद्ध ठरवावयाच्या माणसाकरिता
परमेश्वरासमोर प्रायश्चित करावे; मग तो माणूस शुद्ध
होईल."

32अंगावरील महारोगाचा चट्टा बरा झालेल्या माणसाला
आपल्या शुद्धीकरणासाठी साहित्य मिळण्याची ऐपत
नसलेल्या माणसाच्या शुद्धीकरणासंबंधी हे नियम आहेत.

### घराला पडलेल्या महारोगाच्या चट्ट्यासंबंधी नियम

33परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना असेही म्हणाला,
34"कनान देश मी तुम्हाला वतन म्हणून देत आहे. तुमचे
लोक त्यात जाऊन पोहोंचतील त्यावेळी तुमच्या वतनाच्या
देशातील एखाद्या घराला मी महारोगाचा चट्टा पाडला,
35तर त्या घराच्या मालकाने याजकाला जाऊन सांगावे
की, 'माझ्या घरात चट्ट्यासारखे काही तरी दिसते.'

36"मग याजकाने लोकांना घर रिकामे करण्याची आज्ञा
द्यावी; लोकांनीही घरातील सर्व वस्तू याजक, चट्टा
तपासण्यासाठी घरात जाण्याच्या अगोदर बाहेर काढाव्या
नाही तर घरातील सर्व वस्तू अशुद्ध ठरावयाच्या. मग
याजकाने रिकाम्या घरात जाऊन ते तपासावे. 37तो चट्टा
त्याने तपासावा, आणि घराच्या भिंतीवर हिरवट किंवा
तांबूस रंगाची छिद्रे किंवा खळगे असतील व ती भिंतीच्या
पृष्ठभागाच्या आत गेली असतील, 38तर मग याजकाने
घराबाहेर दारापाशी यावे व ते घर सात दिवस बंद करुन
ठेवावे.

39"मग सातव्या दिवशी याजकाने पुन्हा जाऊन ते घर
तपासावे आणि तो चट्टा घराच्या भिंतीवर पसरला असल्यास,
40चट्टा असलेले दगड काढून नगराबाहेर एखाद्या अशुद्ध
जागी टाकून देण्याची त्याने लोकांना आज्ञा द्यावी. 41मग
त्याने घर लोकांकडून आतून खरडवून घ्यावे आणि
खरडवून काढलेला चुना नगराबाहेर अशुद्ध ठिकाणी
लोकांनी टाकून द्यावा. 42त्या माणसाने त्या दगडांच्या ऐवजी
भिंतीत दुसरे दगड बसवावे आणि त्या घराला नव्या चुन्याचा
गिलावा करावा.

43"जुने दगड काढून नवीन दगड बसविल्यावर व घर
खरडवून नवीन गिलावा केल्यावर जर तो चट्टा घरात
पुन्हा उद्भवला, 44तर याजकाने आत जाऊन तो तपासावा;
घरात तो चट्टा पसरला असल्यास तो घरात चरत जाणारा
महारोगाचा चट्टा होय; ते घर अशुद्ध आहे. 45मग त्या
माणसाने ते घर खणून पाडावे; त्याचे दगड, लाकूड व
सगळा चुना त्याने तेथून काढून नगराबाहेर एखाद्या अशुद्ध
ठिकाणी फेकून द्यावा.

46आणि घर बंद असताना त्यात कोणी शिरला तर
त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे; 47त्या घरात कोणी
काही खाल्ले किंवा कोणी त्या घरात निजला तर त्याने
आपले कपडे धुवावे.

48"घराला नवीन दगड बसविल्यावर व नवीन गिलावा
केल्यावर याजकाने आत जाऊन ते घर तपासावे आणि
घरात चट्टा परत उद्भवला नसेल तर त्या घरातला चट्टा
गेल्यामुळे त्याने ते शुद्ध ठरवावे.

49"त्या घराच्या शुद्धीकरणासाठी दोन पक्षी, गंधसरुचे
लाकूड, किरमिजी रंगाचे कापड व एजोब ही त्याने आणावी;
50त्याने एक पक्षी वाहात्या पाण्यावर मातीच्या पात्रात
मारावा; 51मग त्याने गंधसरुचे लाकूड, एजोब, किरमिजी
रंगाचे कापड व जिवंत पक्षी घेऊन त्या मारलेल्या पक्ष्याच्या

रक्तात व वाहात्या पाण्यात बुडवून त्या घरावर सात वेळा
शिंपडावे;
52ह्या सर्व सामग्रीचा उपयोग करुन ह्या प्रकारे याजकाने
ते घर शुद्ध करावे. 53मग त्याने तो जिवंत पक्षी नगराबाहेर
जाऊन माळरानात सोडून द्यावा; ह्या प्रकारे त्याने घरासाठी
केले म्हणजे ते शुद्ध होईल."
54सर्व प्रकारचे महारोगाचे चट्टे, चाई, 55कपड्यावरील
किंवा घराचा महारोग, 56सूज, खवंद, तकतकीत डाग ह्या
सर्वांसंबधीचे हे नियम आहेत; 57हे केव्हा शुद्ध व केव्हा
अशुद्ध हे ठरविण्याचे शिकवतात; हे महारोगासंबंधीचे
नियम आहेत.

### शरीरातून वाहणाऱ्या अशुद्ध स्त्रावासंबधी नियम

15 परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना आणखी म्हणाला,
2"इस्राएल लोकांना सांगा की एखाद्या पुरुषाच्या
शरीरातून स्त्राव होत असल्यास तो पुरुष अशुद्ध होय.
3त्याचा स्त्राव वाहात असो किंवा बंद पडो, ती त्याची
अशुद्धताच होय.
4"स्त्राव होणारा माणूस ज्या बिछान्यावर झोपेल तो अशुद्ध
होय आणि ज्या वस्तूवर तो बसेल तीही अशुद्ध होय. 5जो
कोणी त्याच्या बिछान्याला शिवेल त्याने आपले कपडे
धुवावे, पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहावे. 6स्त्राव होणारा माणूस बसलेल्या वस्तूवर कोणी
बसेल तर त्याने आपले कपडे धुवावे, पाण्याने स्नान
करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 7स्त्राव होणाऱ्या
माणसाच्या अंगाला कोणी शिवला तर त्याने आपले कपडे
धुवावे, पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहावे.
8"स्त्राव होणारा माणूस जर एखाद्या शुद्ध माणसावर
थुंकला तर त्या शुद्ध माणसाने आपले कपडे धुवावे,
पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.
9स्त्राव होणारा माणूस ज्या खोगीराचा उपयोग करील ते
खोगीर अशुद्ध होय. 10त्याच्या अंगाखालच्या कोणत्याही
वस्तूला कोणी शिवला तर त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहावे, व त्या वस्तू जो उचलील त्याने आपले कपडे
धुवावे, पाण्याने स्नान करावे आणि संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहावे.
11"स्त्राव होणारा माणूस पाण्याने हात न धुता कोणाला
शिवला तर त्या त्या दुसऱ्या माणसाने आपले कपडे धुवावे,
पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.
12"परंतु स्त्राव होणारा माणूस एखाद्या मातीच्या पात्राला
शिवला तर ते पात्र फोडून टाकावे, मात्र प्रत्येक लाकडी
पात्र पाण्याने धुवावे.
13"स्त्राव होणारा माणूस आपल्या स्त्रावापासून बरा
झाल्यावर त्याने आपल्या शुद्धीकरणासाठी सात दिवस
थांबावे आणि मग आपले कपडे धुऊन वाहत्या पाण्यात
आपले अंग धुवावे म्हणजे तो शुद्ध ठरेल. 14आठव्या
दिवशी त्याने दोन होले किंवा पारव्याची दोन पिले घेऊन
दर्शनमंडपाच्या दारापाशी परमेश्वरासमोर जावे व
याजकाकडे ती द्यावी. 15मग याजकाने त्यातील एकाचे
पापार्पण व दुसऱ्याचे होमार्पण करावे आणि त्या माणसाच्या
स्त्रावाबद्दल परमेश्वरासमोर त्याच्यासाठी प्रायश्चित करावे.

### पुरुषासाठी नियम

16"एखाद्या पुरुषाचा वीर्यपात झाला तर त्याने आपले
सर्वांग पाण्याने धुवून संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 17ज्या
कपड्याला किंवा चामड्याला वीर्य लागले असेल तेही
पाण्याने धुऊन संध्याकाळपर्यंत अशुद्ध समजावे. 18स्त्री
बरोबर निजला असताना पुरुषाचा वीर्यपात झाला तर त्या
दोघांनी पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध
राहावे.

### स्त्रीयांसाठी नियम

19"एखादी स्त्री ऋतुमती झाली तर तीने सात दिवस दूर
बसावे; जो कोणी तिला शिवेल त्याने संध्याकाळपर्यंत
अशुद्ध राहावे; 20ती दूर असेपर्यंत ज्यावर ती झोपेल वा
बसेल तेही अशुद्ध होय. 21जो कोणी तिच्या अंथरुणाला
शिवेल, त्याने आपले कपडे धुवावे, पाण्याने स्नान करावे
व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 22ती ज्यावर बसली
असेल त्याला जो कोणी शिवेल त्याने आपले कपडे धुवावे,
पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.
23तिच्या अंथरुणाला किंवा ज्यावर ती बसली असेल त्याला
शिवणाऱ्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे.
24"अशा स्त्रीबरोबर लैंगिक संबंध केलेला पुरुषाने सात
दिवस अशुद्ध राहावे व ज्या अंथरुणावर तो झोपेल तेही
अशुद्ध समजावे.
25"एखाद्या स्त्रीचा ऋतुकाल नसताना जर अनेक दिवस
तिला रक्तस्त्राव होत असेल किंवा मुदतीच्या बाहेर ती
ऋतुमती राहिली तर तिचे स्त्रावाचे सर्व दिवस तिच्या
ऋतुकालाच्या दिवसाप्रमाणे समजावे. ती अशुद्ध होय.
26तिला स्त्राव होत असतानाच्या सर्व काळात ती ज्या
अंथरुणावर झोपेल, ते अंथरुण तिच्या मासिक पाळीच्या
वेळच्या अंथरुणाप्रमाणे समजावे. ती ज्यावर बसेल ती
प्रत्येक गोष्ट तिच्या मासिक पाळीच्या काळात समजते,
तशी अशुद्ध समजावी. 27जर कोणी त्या वस्तूंना शिवेल
तर तो अशुद्ध होईल. त्याने आपले कपडे धुवावे, पाण्याने
स्नान करावे आणि संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे. 28त्या
स्त्रीचा स्त्राव बंद झाल्यावर तिने सात दिवस थांबावे; त्यानंतर
ती शुद्ध होईल. 29मग आठव्या दिवशी तिने दोन होले
किंवा पारव्याची दोन पिले घेऊन दर्शनमंडपाच्या दारापाशी
याजकाकडे जावे. 30मग याजकाने एकाचे पापार्पण व
दुसऱ्याचे होमार्पण करावे. अशाप्रकारे याजकाने तिच्या
अशुद्धतेकरिता परमेश्वरासमोर प्रायश्चित करावे. 31"ह्या
प्रकारे तुम्ही इस्त्राएल लोकांना अशुद्धतेबद्दल बजावून

ठेवावे; नाहीतर ते माझा पवित्र निवासमंडप भ्रष्ट करतील आणि मग त्याच्याबद्दल त्यांना मरावेच लागेल!”

32स्त्राव होऊन किंवा वीर्यपात होऊन जो पुरुष अशुद्ध होतो; 33आणि जी स्त्री ऋतुमती होते आणि जो कोणी पुरुष, ऋतुमती असल्यामुळे अशुद्ध झालेल्या स्त्रीशी लैंगिक संबंध करुन अशुद्ध होतो, त्यांच्या संबंधीचे हे नियम आहेत.

## प्रायश्चित्ताचा दिवस

16 अहरोनाचे दोन मुलगे परमेश्वरासमोर धूप दाखविण्यासाठी गेले असताना मरण पावले. त्यानंतर परमेश्वर मोशेशी बोलला. 2तो म्हणाला, “तुझा भाऊ अहरोन ह्याला सांग की त्याने वाटेल त्यावेळी परमपवित्रस्थानात अंतरपटाच्या आत पवित्र कोशावर असलेल्या दयासनापुढे जाऊ नये; तेथे दयासनावरील ढगात मी दर्शन देत असतो; अहरोन जर तेथे जाईल तर तो मरेल!

3“परमपवित्रस्थानात जाण्यापूर्वी त्याने पापार्पणासाठी एक गोऱ्हा व होमार्पणासाठी एक मेंढा आणावा. 4त्याने पाण्याने स्नान करावे मग तागाचा पवित्र सदरा व तागाचे चोळणे आपल्या अंगात घालावे; तागाच्या कमरपट्ट्याने आपली कमर कसावी आणि तागाचा फेटा बांधावा; ही पवित्र वस्त्रे आहेत.

5“अहरोनाने इस्राएलाच्या मंडळीकडून पापार्पणाकरिता दोन बकरे व होमार्पणाकरिता एक मेंढा घ्यावा. 6त्याने पापार्पणाचा गोऱ्हा अर्पण करुन स्वत:साठी व आपल्या घराण्यासाठी प्रायश्चित करावे.

7“मग त्याने ते दोन बकरे घेऊन दर्शनमंडपाच्या दारापाशी परमेश्वरासमोर उभे करावेत. 8अहरोनाने त्या दोन बकऱ्यावर चिठ्ठ्या टाकाव्या; एक चिठ्ठी परमेश्वरासाठी व अजाजेलसाठी.

9“परमेश्वरासाठी म्हणून, चिठ्ठी निघालेला बकरा अहरोनाने पापार्पण म्हणून अर्पण करावा; 10पाप वाहून नेण्यासाठी अशी चिठ्ठी निघालेला बकरा परमेश्वरासमोर जिवंत उभा करावा व तो लोकांकरिता प्रायश्चित म्हणून पाप वाहून नेण्यासाठी रानात सोडून द्यावा.

11“मग अहरोनाने पापार्पणाच्या गोऱ्ह्याचा वध करुन स्वत:साठी व स्वत:च्या घराण्यासाठी प्रायश्चित करावे. 12नंतर त्याने परमेश्वरासमोर असलेल्या वेदीवरील निखाऱ्यांनी भरलेले धुपाटणे घ्यावे आणि कुटून बारीक केलेला ओंजळभर सुगंधी धूप अंतरपटामागील आतल्या खोलीत आणावा. 13त्याने तो परमेश्वरासमोर अग्नीवर, इतका घालावा की त्याच्या धुराने आज्ञापटावरील दयासन व्यापून टाकावे म्हणजे मग तो मरणार नाही; 14त्याचप्रमाणे त्याने गोऱ्ह्याचे काही रक्त घेऊन ते दयासनाच्या पूर्वबाजूला बोटाने शिंपडावे आणि काही रक्त दयासनासमोर बोटाने सात वेळा शिंपडावे.

15“मग अहरोनाने लोकांसाठी आणलेला पापार्पणाचा बकरा वधावा; त्याचे रक्त अंतरपटाच्या आतल्या दालनात आणावे आणि त्याने गोऱ्ह्याच्या रक्ताचे जसे केले तसेच बकऱ्याच्या रक्ताचे करावे म्हणजे ते दयासनावर व दयासनासमोर शिंपडावे. 16ह्या प्रकारे त्याने इस्राएल लोकांची अशुद्धता, त्यांचे अपराध व त्यांची पापे ह्या सर्वांबद्दल परमपवित्रस्थान पवित्र करावे; आणखी अशुद्ध लोकांच्या परिसरात मध्यभागी वसत असलेल्या दर्शनमंडपासाठीही त्याने असेच करावे. 17अहरोन प्रायश्चित करण्यासाठी जेव्हा परमपवित्रस्थानात जाईल तेव्हापासून, तो स्वत:साठी, स्वत:च्या घराण्यासाठी आणि इस्राएल लोकांसाठी प्रायश्चित करुन बाहेर येईपर्यंत दर्शनमंडपात कोणी नसावे व कोणी तेथे जाऊ नये. 18मग त्याने तेथून निघून परमेश्वरासमोरील वेदीपाशी जावे व तिच्यासाठी प्रायश्चित करावे, त्याने गोऱ्ह्याचे काही रक्त व बकऱ्याचे काही रक्त घेऊन त्या वेदीच्या चारही बाजूच्या शिंगांना लावावे. 19मग त्याने काही रक्त घेऊन आपल्या बोटाने ते सात वेळा तिच्यावर शिंपडावे; अशा प्रकारे त्याने इस्राएल लोकांच्या अशुद्धतेपासून ती शुद्ध व पवित्र करावी.

20“तेव्हा परमपवित्रस्थान, दर्शनमंडप आणि वेदी ह्यांच्याकरिता प्रायश्चित करण्याचे संपविल्यावर त्याने जिवंत बकरा सादर करावा. 21अहरोनाने आपले दोन्ही हात त्या जिवंत बकऱ्याच्या डोक्यावर ठेवून इस्राएल लोकांची सर्व पापे व अपराध ह्यांचा अंगिकार करावा; व ती त्या बकऱ्याच्या डोक्यावर ठेवून त्याला घेऊन जाण्यासाठी तयार असलेल्या माणसाच्या हाती रानात पाठवून द्यावे. 22तेव्हा तो बकरा त्या लोकांच्या सर्व पापकर्मांचा भार घेऊन निर्जन रानात वाहून नेईल; त्या माणसाने त्या बकऱ्याला रानात सोडून द्यावे.

23“मग अहरोनाने दर्शनमंडपात येऊन परमपवित्र स्थानात जाण्यापूर्वी घातलेली तागाची वस्त्रे उतरुन तेथे ठेवावी. 24मग त्याने एखाद्या पवित्र ठिकाणी पाण्याने आंघोळ करावी, आपली वस्त्रे घालावी व तेथून बाहेर येऊन स्वत:साठी होमार्पण करावे, लोकांसाठी होमार्पण करावे आणि स्वत:साठी व लोकांसाठी प्रायश्चित करावे. 25मग त्याने पापार्पणाच्या चरबीच्या वेदीवर होम करावा.

26“ज्या माणसाने पाप वाहून नेण्यासाठी निवडलेला बकरा रानात सोडून दिला त्याने आपले कपडे धुवावे, पाण्याने आंघोळ करावी व त्यानंतर छावणीत यावे.

27“पापार्पणाच्या ज्या गोऱ्ह्याचे व बकऱ्याचे रक्त अहरोनाने प्रायश्चितासाठी पवित्रस्थानात नेले होते त्या दोन्ही पशूंना छावणीच्या बाहेर न्यावे आणि त्यांचे कातडे, मांस व शेण ही अग्नीत जाळून टाकावीत. 28ती जाळून टाकणाऱ्याने आपले कपडे धुवावे, पाण्याने आंघोळ करावी व मग छावणीत यावे.

29“तुमच्यासाठी हा एक कायमचा विधीनियम असावा: सातव्या महिन्याच्या दशमीस तुम्ही अन्न न घेता,* जिवास दंडन करावे-तुम्ही नम्र व्हावे; त्या दिवशी तुम्ही तसेच तुमच्या देशात राहणारे परके किंवा परदेशी ह्यापैकी कोणीही कसलेच काम करु नये; 30कारण त्या दिवशी तुम्ही पापापासून शुद्ध व्हावे म्हणून याजक तुमच्यासाठी प्रायश्चित करील, मग परमेश्वरासमोर तुम्ही पापापासून शुध्द ठराल. 31तुमच्यासाठी हा फार महत्वाचा व पूर्ण विसाव्याचा शब्बाथ दिवस आहे; तुम्ही अन्न न घेता आपल्या जिवास दंडन करावे. तुम्ही नम्र व्हावे; हा कायमचा विधी नियम होय.

32तेव्हा आपल्या पित्याच्या जागी मुख्या याजक म्हणून ज्याची निवड होऊन ज्याचा अभिषेक होईल त्याने तागाची पवित्र वस्त्रे घालून प्रायश्चित करावे. 33त्याने परमपवित्रस्थान, दर्शनमंडप व वेदी तसेच याजकवर्ग आणि सर्व इस्राएल लोक ह्यांच्यासाठी प्रायश्चित करावे. 34इस्राएल लोकांसाठी त्यांच्या पापाबद्दल वर्षातून एकदा प्रायश्चित करण्याकरिता हा कायमचा विधीनियम होय.”

परमेश्वराने मोशेला दिलेल्या आज्ञेप्रमाणे त्यांनी ते सर्व केले.

### प्राण्यांना मारून त्यांचे मांस खाण्याविषयीचे नियम

17 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“अहरोन त्याचे मुलगे आणि सर्व इस्राएल लोक ह्यांना सांग की परमेश्वराने आज्ञा दिली आहे ती ही: 3इस्राएल घराण्यातील एखाद्या माणसाने, छावणीत किंवा छावणीबाहेर एखादा बैल; कोकरू किंवा बकरा मारला, 4तर त्या माणसाने तो प्राणी परमेश्वराला अर्पण करण्यासाठी दर्शनमंडपापाशी आणावा; त्याने त्या प्राण्याचा वध करुन रक्त सांडले आहे म्हणून त्याने तो परमेश्वराच्या निवासमंडपापाशी आणावा; त्याने जर तसे केले नाही तर त्या माणसाला आपल्या लोकांतून बाहेर टाकावे. 5ह्या नियमाचा हेतू असा की इस्राएल लोक आपले पशू खुल्या शेतात मारतात ते त्यांनी दर्शनमंडपाच्या दारापाशी याजकाकडे परमेश्वरासमोर आणावे, व परमेश्वराकरिता शांत्यर्पणे म्हणून अर्पावे. 6याजकाने त्यांचे रक्त दर्शन मंडपाच्या दारापाशी परमेश्वराच्या वेदीवर टाकावे आणि परमेश्वराला सुवास म्हणून त्यांच्या चरबीचा होम करावा म्हणजे त्या सुवासाने त्याला आनंद होईल. 7आणि यापुढे त्यांनी ‘अजमूर्तीना’ अजिबात बळी अर्पण करु नयेत. ते त्या दुसऱ्या देवांच्या मागे लागले व अशारीतीने त्यांनी वेश्येप्रमाणे आचरण केले. हे तुम्हाला पिढयान् पिढ्या कायमचे विधी नियम आहेत!

8“तू त्यांना सांग की इस्राएल घराण्यापैकी किंवा त्यांच्यामध्ये राहाणाऱ्या परकीय किंवा परदेशीय लोकांपैकी कोणी होमार्पण अथवा यज्ञ केला, 9तर त्याने तो परमेश्वराला अर्पण करण्यासाठी दर्शनमंडपाच्या दारापाशी आणावा; त्याने तसे न केल्यास आपल्या लोकांतून त्याला बाहेर टाकावे.

10“इस्राएल घराण्यापैकी किंवा त्यांच्यामध्ये राहणाऱ्या परदेशीय लोकांपैकी कोणी रक्त खाईल! तर मी देव त्या माणसापासून आपले तोंड फिरवीन व त्याला आपल्या लोकांतून बाहेर टाकीन. 11कारण शरीराचे जीवन रक्तात असते आणि ते वेदीवर ओतण्याविषयी मी विधीनियम लावून दिले आहेत; तुम्ही घेतलेल्या जिवाच्या भरपाईबद्दल ते रक्त वेदीवर मला दिले पाहिजे; तुमच्या जिवाबद्दल प्रायश्चितासाठी ते वेदीवर ओतले पाहिजे. 12म्हणून मी इस्राएल लोकांना सांगतो की तुमच्यातील कोणीही, तसेच तुमच्यामध्ये राहाणाऱ्या परदेशीयांनीही रक्त सेवन करु नये.

13“इस्राएलापैकी असो किंवा त्यांच्यामध्ये राहणाऱ्या परदेशीयापैकी असो! कोणी खाण्यालायक पशूची किंवा पक्ष्याची शिकार केली तर त्याने त्याचे रक्त जमिनीवर ओतून मातीने झाकावे. 14कारण मासांमध्ये जर अद्याप रक्त आहे तर त्या प्राण्याचा जीव अद्याप त्याच्या मांसात आहे, म्हणून मी इस्राएल लोकांना ही आज्ञा देतो की ज्या मांसात अद्याप रक्त आहे ते मांस खाऊ नका! जर कोणी माणूस रक्त खाईल, तर त्याला आपल्या लोकांतून बाहेर टाकावे.

15“त्याचप्रमाणे कोणी इस्राएल माणूस असो किंवा त्यांच्यामध्ये राहणारा परदेशीय असो! तो जर आपोआप मेलेल्या किंवा जंगली जनावराने मारलेल्या प्राण्याचे मांस खाईल तर त्याने संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे; त्याने आपले कपडे धुवावे, पाण्याने स्नान करावे व संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहावे म्हणजे मग तो शुद्ध होईल. 16त्याने आपले कपडे धुतले नाहीत किंवा स्नान केले नाही तर तो आपल्या अपराधाबद्दल दोषी राहील, त्याने त्याबद्दल शिक्षा भोगावी.”

### शरीरसंबंधाविषयी नियम

18 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“इस्राएल लोकांना सांग: मी परमेश्वर तुमचा देव आहे. 3तुम्ही ज्या मिसर देशात राहात होता त्या देशातील रीतीरीवाजाप्रमाणे चालू नका! तसेच ज्या कनान देशात मी तुम्हाला घेऊन जात आहे त्या देशातील चालीरीती प्रमाणेही तुम्ही चालू नका! त्यांचे विधी पाळू नका.” 4तुम्ही माझ्याच नियमाप्रमाणे चाला व माझेच विधी कसोशीने पाळा! कारण मी तुमचा देव परमेश्वर आहे. 5म्हणून तुम्ही माझे विधी व माझे नियम पाळावे; ते जो पाळील तो त्यांच्यामुळे जिवंत राहील! मी परमेश्वर आहे!

6“तुम्ही कधीही आपल्या जवळच्या नातलगाशी शरीरसंबंध करु नये! मी परमेश्वर आहे: 7“तुम्ही तुमच्या

---

**अन्न न घेता** शब्दश: “स्वत:ला नम्र करा.”

आईवडिलांबरोबर शारीरिक संबंध ठेवू नयेत. ती तुमची
आई आहे. म्हणून तिच्याबरोबर शारीरिक संबंध असता
कामा नये.
8तू तुझ्या सावत्र आईशी शारीरिक संबंध ठेवू नको,
त्यामुळे तुझ्या बापाची* लाज जाईल.
9“तू तुझ्या बहिणीशी शारीरिक संबंध ठेवू नको, ती
बहीण सख्खी असो किंवा सावत्र असो; ती तुझ्या घरात
जन्मलेली असो किंवा तुझ्या घराबाहेर दुसऱ्याच्या घरी
जन्मलेली असो,* तू तिच्यापाशी जाऊ नको.
10“तू तुझ्या नातीशी शारीरिक संबंध ठेवू नको, मग ती
तुझ्या मुलाची मुलगी असो किंवा मुलीची मुलगी असो;
त्यामुळे तुझीच लाज जाईल!
11“जर तुझ्या बापाच्या बायकोला तुझ्या बापापासून मुलगी
झाली असेल तर ती तुझी बहीणच आहे; म्हणून तू तिच्याशी
शारीरिक संबंध ठेवू नको.
12“तुझ्या आत्याशी शारीरिक संबंध ठेवू नको. ती तुझ्या
बापाची जवळची नातलग आहे. 13तुझ्या मावशीशी
शारीरिक संबंध ठेवू नको, ती तुझ्या आईची जवळची
नातलग आहे. 14तू तुझ्या चुलत्याची लाज उघडी करु
नको, म्हणजे त्याच्या बायकोशी शारीरिक संबंध ठेवू
नको; ती तुझी चुलती आहे.
15“तुझ्या सुनेशी शारीरिक संबंध ठेवू नको, ती तुझ्या
मुलाची बायको आहे.
16“तुझ्या भावजयीशी शारीरिक संबंध ठेवू नको, त्यामुळे
तुझ्या भावाची लाज जाईल.
17“एखाद्या स्त्रीशी व तिच्या मुलीशी म्हणजेच दोघींशी
अथवा तिच्या नातीशी मग ती तिच्या मुलाची मुलगी असो
किंवा मुलीची मुलगी असो शारीरिक संबंध ठेवू नको.
कारण त्या तिच्या जवळच्या नातलग आहेत; असे करणे
अति दुष्टपणाचे आहे.
18“तुझी बायको जिवंत असताना तिच्या बहिणीला बायको
करुन तिला सवत करुन घेऊ नको; त्यामुळे त्या
एकमेकींच्या शत्रू होतील; तू तिच्या बहिणीशी शारीरिक
संबंध ठेवू नको.
19“स्त्री ऋतुमती झाली असताना तिच्यापाशी जाऊ नको;
कारण ऋतुकालात ती अशुद्ध असते.
20“तू आपल्या शेजाऱ्याच्या बायकोशी शारीरिक संबंध
ठेवू नको. त्यामुळे तू अमंगळ होशील!
21“तू तुझ्या लहान मुलांमुलीपैकी कोणाचाही मौलख
दैवतासाठी होम करु नको; असे करशील तर तू आपल्या
देवाच्या नांवाचा अवमान करुन त्याच्या नांवाला कलंक
लावशील! मी परमेश्वर आहे.
22“स्त्रीगमनाप्रमाणे पुरुषगमन करु नको! ते भयंकर
पाप आहे!
23“कोणत्याही पशूशी गमन करु नको; त्यामुळे तू मात्र
अमंगळ होशील! त्याचप्रमाणे स्त्रीने पशूशी गमन
करावयासाठी त्याच्यापाशी जाऊ नये; ते कृत्य निसर्गाविरुद्ध
आहे!
24“असल्याप्रकारच्या पाप कर्मामुळे स्वत:ला अशुद्ध
करुन घेऊ नका! कारण मी राष्ट्रांना त्यांच्या देशातून
बाहेर घालवून देत आहे, आणि तो देश मी तुम्हाला देत
आहे! कारण तेथील लोकांनी असली भयंकर पापकर्मे
केली!
25म्हणून त्यांचा देश भयंकर भ्रष्ट झाला आहे! आणि
आता तो तेथील रहिवाशांना, ओकून बाहेर टाकीत
आहे!
26“ह्याकरिता तुम्ही माझे विधी व नियम पाळावे; हे
नियम इस्राएल लोकांकरिता आणि त्यांच्यामध्ये राहाणाऱ्या
परदेशीय लोकांकरिताही आहेत; तुम्हांपैकी कोणीही
असली भयंकर अमंगळ पापकर्मे करु नये. 27कारण
तुमच्या पूर्वी ह्या देशात राहाणाऱ्या लोकांनी असली भयंकर
अमंगळ पापकृत्ये केल्यामुळे हा देश अमंगळ झाला आहे.
28जर तुम्ही या गोष्टी केल्या तर तुम्ही हा देश भ्रष्ट
कराल आणि तुमच्या पुर्वीच्या राष्ट्रांचा जसा त्याने त्याग
केला तसा तो तुमचाही त्याग करील. 29जे कोणी ह्यातील
कोणतेही अमंगळ पापी कृत्य करतील त्या सर्वांना आपल्या
लोकांतून बाहेर टाकावे. 30इतर लोकांनी असली भयंकर
अमंगळ पापकृत्ये केली, परंतु तुम्ही माझे विधी व नियम
पाळावेत; तसली भयंकर अमंगळ पापकृत्ये करुन तुम्ही
आपणाला अमंगळ करुन घेऊ नये! मी तुमचा देव परमेश्वर
आहे.”

### इस्राएल देवाचा आहे

19 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“सर्व इस्राएल
लोकांना सांग की मी तुमचा देव परमेश्वर आहे!
मी पवित्र आहे, म्हणून तुम्हीही पवित्र असलेच पाहिजे.
3तुमच्यातील प्रत्येकाने आपली आई व आपला बाप
ह्यांचा मान राखलाच पाहिजे आणि माझे शब्बाथ पाळलेच
पाहिजेत; मी तुमचा देव परमेश्वर आहे!”
4“तुम्ही मूर्तीपूजा करु नका; आपल्यासाठी ओतीव देव
करु नका. मी तुमचा देव परमेश्वर आहे!
5“तुम्ही परमेश्वरासाठी शांत्यर्पणाचा यज्ञ कराल तेव्हा
तो असा करा की त्यामुळे तुम्ही मला मान्य व्हाल. 6त्या
अर्पणाचे मांस यज्ञाच्या दिवशी व त्याच्या दुसऱ्या दिवशी

---

**लैंगिक संबंध ... बापाची** शब्दश: “ती तुझ्या वडीलांची नग्नता आहे. पती व पत्नी एक व्यक्ति आहेत. पाहा उत्पत्ती 2:24

**तुमच्या बहीण ... घरी जन्मलेली असो** किंवा “घराणे” जर एखाद्याला पुष्कळ बायका असतील तर प्रत्येक बायकोसाठी व तिच्या मुलांसाठी स्वतंत्र तंबू किंवा घराचा काही भाग असे. ते कुंटुंबातील एक लहान कुंटुंबीय गट असल्याप्रमाणे होते. ह्याचा कदाचित असा अर्थ असावा की स्वत:च्या वडीलांच्या मुलींबरोबर म्हणजेच बहिणीबरोबर एखाद्या व्यक्तिला लैंगिक संबंध ठेवता येत नसे.

खावे, पण तिसऱ्या दिवशी जर त्यातून काही उरले तर ते अग्नीत जाळून टाकावे. [7]तिसऱ्या दिवशी त्यातील खाणे भयंकर पाप आहे; ते अर्पण मान्य होणार नाही. [8]कोणी तसे करील तर ते पाप केल्यामुळे तो अपराधी ठरेल, कारण त्याने परमेश्वराच्या पवित्र वस्तूचा मान न राखता ती दूषित केली असे होईल; त्या माणसाला आपल्या लोकातून बाहेर टाकावे.

[9]"तुम्ही हंगामाच्या वेळी आपल्या शेतातील पिकाची कापणी कराल तेव्हा, आपल्या शेताच्या कोनाकोपऱ्यातील झाडून सारेच पीक कापू नका व पीक काढून घेतल्यावर सरवा वेचू नका.

[10]आपला द्राक्षमळाही झाडून सारा खुडू नका, तसेच द्राक्षमळ्यात खाली पडलेली फळे गोळा करु नका; गोरगरीबांसाठी व तुमच्या देशातून प्रवास करणाऱ्या उपरी लोकांसाठी ती राहू द्यावी; मी तुमचा देव परमेश्वर आहे!

[11]"तुम्ही चोरी करु नये, कोणाला फसवू नये व एकमेकाशीं खोटे बोलू नये. [12]तुम्ही माझ्या नांवाने खोटी शपथ वाहू नये; तसे कराल तर तुम्ही माझे भय न धरता माझ्या नांवाला कलंक लावाल. मी परमेश्वर आहे!

[13]"आपल्या शेजाऱ्यावर जुलूम करु नका व त्याला लुबाडू नका; मजुराची मजुरी रात्रभर दिवस उजाडेपर्यंत आपल्याजवळ ठेवू नका.

[14]"बहिऱ्याला शिव्याशाप देऊ नका; आंधळ्याने ठोकर लागून पडावे म्हणून एखाद्या वस्तूचे अडखळण त्याच्या वाटेत ठेवू नका; पण आपल्या देवाचा मान राखा-त्याचे भय बाळगा. मी परमेश्वर आहे!

[15]"न्यायनिवाडा करताना कोणावर अन्याय करु नका तर योग्य न्याय द्या. न्यायदान करताना गरीब लोक व वजनदार लोक ह्यांना विशेष मर्जी दाखवू नका. आपल्या शेजाऱ्याचा न्याय करताना योग्य तोच न्याय द्या. [16]इतर लोकाविषयी खोट्यानाट्या गोष्टी सांगत इकडे तिकडे फिरु नका; आपल्या शेजाऱ्याचा जीव धोक्यात येईल असे काही करु नका. मी परमेश्वर आहे.

[17]"आपल्या मनात आपल्या भावाचा द्वेष बाळगूं नका; आपल्या शेजाऱ्याने चुकीचे काही कृत्य केल्यास त्याची कान उघाडणी करावी, परंतु त्याच्या अपराधामध्ये सहभागी होऊ नये. [18]लोकांनी तुमचे वाईट केलेले विसरुन जावे, त्याबद्दल सूड घेण्याचा प्रयत्न करु नका तर आपल्या शेजाऱ्यावर स्वत: सारखी प्रीती करा. मी परमेश्वर आहे!

[19]"तुम्ही माझे नियम पाळा. आपल्या पशूंचा भिन्न जातीच्या पशूंशी संकर करु नका; दोन जातीचे बी मिसळून ते आपल्या शेतात पेरु नका; भिन्न सूत एकत्र करुन विणलेला कपडा अंगात घालू नका.

[20]"एकाद्या पुरुषाची स्त्री गुलाम, ती विकत घेतलेली नसेल किंवा खंडणी भरुन मुक्त झाली नसेल, अशा स्त्रीशी कोणी शरीर संबंध केल्यास त्या दोघांना शिक्षा व्हावी; परंतु तिची मुक्तता झाली नसल्यामुळे त्यांना जिवे मारु नये; [21]हे पाप केलेल्या माणसाने आपले दोषार्पण म्हणून एक मेंढा दोषार्पणासाठी, दर्शनमंडपाच्या दारापाशी परमेश्वरासमोर आणावा; [22]आणि त्याने केलेल्या पापाबद्दल दोषार्पणाच्या मेंढ्याद्वारे त्याच्यासाठी याजकाने परमेश्वर समोर प्रायश्चित करावे; म्हणजे त्याने केलेल्या पापाची त्याला क्षमा होईल.

[23]"तुम्ही आपल्या देशात जाऊन पाहोंचल्यावर खाण्यासाठी निरनिराळ्या प्रकारची फळ झाडे लावाल, तेव्हा फळ झाडे लावल्यावर तुम्ही तीन वर्षे थांबावे, त्यांची फळे खाऊं नयेत. [24]पण चौथ्या वर्षी त्यांची सर्व फळे परमेश्वराची होतील; ती परमेश्वराच्या उपकारस्मरणाच्या यज्ञासाठी पवित्र समजावी. [25]मग पाचव्या वर्षी तुम्ही त्यांची फळे खावी. असे केल्याने त्यांना तुमच्यासाठी अधिकात अधिक फळे येतील. मी तुमचा देव परमेश्वर आहे!

[26]"तुम्ही कोणतेही मांस रक्तासह खाऊ नका;

"तुम्ही काही जादू-टोणा, मंत्रतंत्र व शकूनमुहूर्त ह्यांच्याद्वारे भविष्य पाहण्याचा प्रयत्न करु नका.

[27]"आपल्या डोक्याला घेर ठेवू नका; आपल्या दाढीचे कोपरे छाटू नका. [28]मृताची आठवण म्हणून अंगावर जखम करुन घेऊ नका. आपले अंग गोंदवून घेऊन नका. मी परमेश्वर आहे!

[29]"तू आपल्या मुलीला वेश्या बनून भ्रष्ट होऊ देऊ नको, त्यामुळे तू तिच्या पावित्र्याचा मान राखीत नाहीस असे दिसेल. तुमच्या देशात वेश्या होऊ देऊ नका त्या प्रकारच्या पापाने तुमचा देश भ्रष्ट होऊ देऊ नका.

[30]"तुम्ही माझे शब्बाथ, काम न करिता विसाव्याचे दिवस म्हणून पाळावे. तुम्ही माझ्या पवित्रस्थानाविषयी आदर बाळगावा. मी परमेश्वर आहे!

[31]सल्लामसलत विचारण्यासाठी पंचाक्षऱ्याकडे किंवा चेटक्याकडे जाऊ नका; त्यांच्या मागे लागू नका; ते तुम्हाला अशुद्ध करतील. मी तुमचा देव परमेश्वर आहे!

[32]वडीलधाऱ्यामाणसांना मान द्या; वृद्ध माणूस घरात आल्यास उठून उभे राहा; आपल्या देवाचे भय बाळगा. मी परमेश्वर आहे!

[33]"कोणी परदेशीय तुमच्या देशात तुमच्याबरोबर राहात असेल तर त्याच्याशी वाईट वागू नका. [34]तुमच्याबरोबर राहणाऱ्या परदेशीय माणसाला स्वदेशीय माणसासारखेच माना; आणि त्याच्यावर स्वत: सारखीच प्रीती करा; कारण तुम्हीही एके काळी मिसरदेशात परदेशीय होता. मी तुमचा देव परमेश्वर आहे!

[35]लोकांचा न्याय करताना तुम्ही योग्य न्याय करावा; मोजण्यामापण्यात व तोलण्यात तुम्ही अन्याय करु नका. [36]तुमच्यापाशी खरी मापे, खरी वजने, खरे तराजू, खरा एफा व खरा हिन असावा. मी परमेश्वर

तुमचा देव आहे! मीच तुम्हाला मिसर देशातून बाहेर
आणले!
37“म्हणून तुम्ही माझे विधी व नियम ह्यांची आठवण
ठेवून ते पाळावे. मी परमेश्वर आहे.”

### मूर्तींची पूजा करण्याविरुद्ध ताकीद

20 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“तू इस्राएल
लोकांना आणखी असे सांग की इस्राएल
लोकांपैकी किंवा इस्राएल लोकांमध्ये राहाणाऱ्या
परदेशीयापैकी कोणी आपल्या मुलाबाळांतून एखादे मूल
मोलख दैवतास अर्पील तर त्या माणसाला जिवे मारावे!
आपल्या देशाच्या लोकांनी त्याला धोंडमार करावा! 3मीही
त्या माणसाच्या विरुद्ध होईन! आणि त्याला आपल्या
लोकांतून बाहेर टाकीन! कारण त्याने आपले मूल मोलख
दैवतास अर्पून माझे पवित्रस्थान भ्रष्ट केले व माझ्या
पवित्र नांवाला कलंक लावला!
4मोलख दैवताला आपले मूल अर्पिण्याकडे देशाचे इतर
सामान्य लोक डोळेझांक करुन त्याला जिवे मारणार
नाहीत,
5तर मी त्या माणसाच्या व त्याच्या कुटुंबाच्या विरुद्ध
होईन! आणि त्याला व मजवर अविश्वास दाखवून जे
कोणी मोलख दैवताच्या नादी लागून त्याच्या मागे जातील
त्यांना आपल्या लोकांतून बाहेर टाकीन!
6“जो माणूस सल्लामसलत विचारण्यास पंचाक्षऱ्याकडे
व चेटक्याकडे जातो तो माझ्याशी विश्वासघात करीत
आहे.* मी त्याच्या विरुध्द होईन व त्याला आपल्या
लोकांतून बाहेर टाकीन.
7“म्हणून पावन व्हा! आपणास पवित्र करा! कारण मी
तुमचा देव परमेश्वर आहे! 8तुम्ही माझ्या नियमांची आठवण
ठेवून ते पाळा; तुम्हाला पवित्र करणारा मीच परमेश्वर
आहे!
9“जो माणूस आपल्या बापाला किंवा आपल्या आईला
शिव्याशाप देईल त्याला अवश्य जिवे मारावे;* त्याने
आपल्या बापाला व आपल्या आईला शिव्याशाप दिला
आहे म्हणून त्याच्या रक्तपाताची जबाबदारी त्याच्याच माथी
राहील.

### व्यभिचाराच्या पापाबद्दल शिक्षा

10“जो माणूस आपल्या शेजाऱ्याच्या बायकोपाशी जातो
तो माणूस व ती स्त्री, ती दोघेही व्यभिचाराच्या पापाचे
अपराधी आहेत; त्या जाराला व जारिणीला अवश्य जिवे
मारावे. 11जो आपल्या बापाच्या बायकोपाशी जातो तो
आपल्या बापाची लाज उघडी करतो! तो माणूस व त्याच्या
बापाची बायको त्या दोघांनाही अवश्य जिवे मारावे; त्यांच्या
रक्तपाताची जबाबदारी त्यांच्याच माथी राहील.
12“एखादा पुरुष आपल्या सुनेशी शारीरिक संबंध ठेवेल
तर त्या दोघांनाही अवश्य जिवे मारावे; त्यांनी शरीरसंबंधाचे
भयंकर पाप केले आहे! त्यांच्या रक्तपाताची जबाबदारी
त्यांच्याच माथी राहील.
13“एखाद्या पुरुषाने स्त्रीगमनाप्रमाणे पुरुषगमन केले तर
ते भयंकर पाप त्या दोघांनी केले आहे म्हणून त्या दोघांनाही
अवश्य जिवे मारावे; त्यांच्या रक्तपाताची जबाबदारी
त्याच्याच माथीं राहील.
14“कोणा पुरुषाने एखादी स्त्री व तिची मुलगी ह्या
दोघींबरोबर विवाह केला तर तो अतिदुष्टपणा होय. त्या
पुरुषाला व त्या दोन्ही स्त्रीयांना अग्नीत जाळून टाकावे!
तुमच्यामध्ये असे अतिदुष्टपणाचे पाप होऊ देऊ नये!
15कोणा पुरुषाने पशूगमन केले तर त्याला अवश्य जिवे
मारावे आणि त्या पशूलाही मारुन टाकावे. 16कोणी स्त्री
पशूगमन करील तर त्या स्त्रीला व त्या पशूला जिवे
मारावे; त्यांना अवश्य मारुन टाकावे; त्यांच्या रक्तपाताची
जबाबदारी त्यांच्याच माथी राहील.
17“कोणी आपल्या बहिणीला, मग ती त्याच्या बापाची
मुलगी असो किंवा त्याच्या आईची मुलगी असो, आपली
बायको करुन घेईल व ती दोघे शरीरसंबंध करतील तर
ते लाजीरवाणे कर्म आहे! त्या दोघांना आपल्या
भाऊबंदादेखत शिक्षा व्हावी! त्यांना आपल्या लोकांतून
बाहेर टाकावे. त्याने आपल्या बहिणीबरोबर केलेल्या वाईट
कर्माबद्दल शिक्षा भोगावी.*
18“ऋतुमती स्त्रीशी कोणी पुरुषाने शरीर संबंध केला
तर तो पुरुष व ती स्त्री ह्या दोघांनाही त्यांच्या लोकांतून
बाहेर टाकावे; कारण त्यांने तिच्या रक्ताचा झरा उघडा
करुन पाप केले आहे. 19आपली मावशी किंवा आपली
आत्या ह्याच्याशी शारीरिक संबंध ठेवू नयेत व तसे
करणाऱ्याच्या हातून मात्रागमनाचे पाप घडेल, त्यांनी
आपल्या दुष्कर्माबद्दल शिक्षा भोगावी.*
20“कोणी आपल्या चुलतीशी शारीरिक संबंध ठेवेल
तर त्याने आपल्या चुलत्याची लाज उघडी केली असे
होईल; ते आपल्या पापाची शिक्षा भोगतील व संतती न
होता मरतील. 21आपल्या भावजयीशी शारीरिक संबंध
ठेवणे हे पापी कृत्य आहे; जो कोणी असे करील त्याने
आपल्या भावाची लाज उघडी केली असे होईल! त्यांना
संतती* होणार नाही.

---

**विश्वासघात करीत आहे** शब्दश: त्यांचे अनुकरण करून स्वत: व्यभिचार करीत आहे.

**जो माणूस ... मारावे** शब्दाश “त्याचे रक्त त्याच्यावर आहे.”

**त्याने आपल्या ... शिक्षा भोगावी** शब्दश: “तो त्याचे अपराध वाहून नेईल.”

**त्यांनी आपल्या ... शिक्षा भोगावी** शब्दश: “तुम्ही तुमचे अपराध वाहाल.”

**त्याने आपल्या ... संतती** (मुले) शब्दश: “त्यांनी त्यांचे नि:संतानत्व सहन करावे ते मरतील.”

22“म्हणून तुम्ही माझे सर्व विधी व माझे सर्व नियम ह्यांची आठवण ठेवून ते पाळावे म्हणजे ज्या देशात मी तुम्हाला घेऊन जात आहे त्यात तुमची वस्ती होईल; तो देश तुमचा त्याग करणार नाही. 23ज्या राष्ट्रांना मी तुमच्या पुढून घालवून देत आहे त्यांनी असली सर्व पापी कृत्ये केली म्हणून मला त्यांचा वीट आला! तुम्ही त्यांच्या रीतीरीवाजाप्रमाणे चालू नका.

24“मी तुम्हास सांगितले आहे की त्यांचा देश* तुमचे वतन होईल! तो मी तुमच्या ताब्यात देत आहे,

“त्यात दुधामधाचे प्रवाह वाहात आहेत; इतर राष्ट्रापासून वेगळे करुन मी तुम्हाला माझे विशेष लोक म्हणून चालविले आहे. मी तुमचा देव परमेश्वर आहे! 25म्हणून तुम्ही शुद्ध व अशुद्ध पशू व शुद्ध व अशुद्ध पक्षी ह्यांच्यातील भेद पाळावा, आणि जे पशू, पक्षी व जमिनीवर रांगणारे प्राणी मी अशुद्ध ठरविले आहेत ते तुम्ही खाऊ नये. 26तुम्ही माझेच असावे म्हणून मी तुम्हाला इतर राष्ट्रांपासून वेगळे केले आहे; तुम्ही माझ्याकरिता पवित्र व्हावे! कारण मी तुमचा परमेश्वर आहे आणि मी पवित्र आहे! 27कोणी पंचाक्षरी किंवा चेटूक करणारा असला, मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, त्यांना अवश्य जिवे मारावे; लोकांनी त्यांना धोंडमार करावा; त्यांच्या रक्तपाताची जबाबदारी त्यांच्याच माथी राहील.”

### याजकांकरिता विधीनियम

21 परमेश्वर मोशेला म्हणाला, “अहरोनाचे मुलगे, जे याजक त्यांना असे सांग की मेलेल्या माणसाला स्पर्श करुन याजकाने स्वत:ला अशुद्ध करून घेऊ नये. 2परंतु आपले जवळचे नातलग म्हणजे आपली आई, बाप, मुलगा, मुलगी, भाऊ, 3आणि आपल्या जवळ असलेली आपली अविवाहित बहीण ह्यांच्या प्रेताला स्पर्श केल्यास हरकत नाही. 4याजक आपल्या लोकांचा प्रमुख असल्यामुळे त्याने सामान्य माणसाप्रमाणे स्वत:ला अपवित्र करुन घेऊ नये.

5“याजकांनी आपल्या डोक्याचे मुंडण करु नये; आपल्या दाढीचे कोपरे छाटू नयेत किंवा आपल्या शरीरावर घाव करु नयेत; 6त्यांनी आपल्या देवासाठी पवित्र राहावे आणि आपल्या देवाच्या नांवाचा मान राखावा. त्याचे भय धरावे. आणि त्याच्या नांवाला काळिमा लावू नये; ते अग्नीद्वारे परमेश्वराला अर्पण म्हणजे अन्नार्पण अर्पित असतात म्हणून त्यांनी अवश्य पवित्र राहावे. 7याजक पवित्रपणे देवाची सेवा करतात म्हणून त्यांनी भ्रष्ट झालेल्या स्त्रीला, वेश्येला, किंवा नवऱ्याने टाकलेल्या स्त्रीला आपली बायको करुन घेऊ नये. 8याजक पवित्रपणे देवाला अन्नार्पण करतो म्हणून तुम्ही त्याला पवित्र मानावे; कारण तो पवित्र वस्तू देवाकडे घेऊन जातो! तो देवाला पवित्र अन्नार्पण करतो आणि मी पवित्र आहे.

9“एखाद्या याजकाची मुलगी वेश्याकर्म करील तर ती भ्रष्ट होईल, व आपल्या पावित्र्याचा नाश करुन घेईल; आणि त्यामुळे ती आपल्या बापाच्या पावित्र्याला काळिमा लावील; तिला अग्नीत जाळून टाकावे.

10“आपल्या भावांतून मुख्य याजक निवडला गेला, त्याच्या मस्तकावर अभिषेकाचे तेल ओतले गेले आणि पवित्र वस्त्रे परिधान करावयास त्याच्यावर संस्कार झाला; अशा रीतीने याजक ह्या नात्याने पवित्र सेवा करण्यासाठी त्याची निवड झाली आहे, म्हणून त्याने आपल्या डोक्याचे केस मोकळे सोडू नयेत व लोकांच्यात शोकप्रदर्शनार्थ आपली वस्त्रे फाडू नयेत; 11त्याने आपणाला अशुद्ध करुन घेऊ नये; त्याने प्रेताजवळ जाऊ नये; आपल्या बापाच्या किंवा आईच्या प्रेताजवळही जाऊ नये. 12त्याने पवित्रस्थानाबाहेर जाऊ नये, त्याने अशुद्ध होऊ नये व आपल्या देवाचे पवित्रस्थान भ्रष्ट करु नये; त्याच्या डोक्यावर अभिषेकाचे तेल ओतल्यामुळे त्याच्यावर संस्कार झाला आहे व त्यामुळे इतर लोकांपासून तो वेगळा झाला आहे. मी परमेश्वर आहे!

13“त्याने कुमारिकेशीच लग्न करावे, 14भ्रष्ट झालेली स्त्री, वेश्या किंवा टाकलेली स्त्री अथवा विधवा स्त्री ह्यापैकी कोणाही स्त्रीला त्याने बायको करुन घेऊ नये; तर त्याने आपल्या लोकांतील एखाद्या कुमारिकेशीच लग्न करावे. 15अशा प्रकारे त्याने आपल्या लोकांत आपली संतती भ्रष्ट होऊ देऊ नये;* कारण मी जो परमेश्वर त्या मी त्याला पवित्र सेवेसाठी पवित्र केले आहे.”

16परमेश्वर मोशेला म्हणाला, 17“अहरोनाला असे सांग की पुढील पिढ्यामध्ये, तुझ्या वंशात जर कोणाला काही व्यंग-शारीरिक दोष-निघाले तर त्याने आपल्या देवाकरिता अन्न अर्पिण्यासाठी वेदीजवळ जाऊ नये. 18शारीरिक व्यंग असलेल्या कोणत्याही माणसाने मला अर्पण आणू नये; याजक ह्या नात्याने माझी सेवा करण्यास पात्र नसलेली माणसे अशी:

आंधळा, लंगडा, चेहऱ्यावर विद्रूप वण असलेला, हातपाय प्रमाणाबाहेर लांब असलेला,

19मोडक्या पायाचा, थोटा,

20कुबडा, ठेंगू, डोळ्यात दोष असलेला, पुरळ किंवा त्वचेचे इतर वाईट रोग झालेला अथवा भग्नांड असलेला;

21अहरोन याजकाच्या वंशापैकी कोणास असे व्यंग असेल तर त्याने परमेश्वराला अर्पण किंवा अन्न अर्पावयास वेदीजवळ जाऊं नये; 22तो याजकाच्या कुटुंबापैकी

---

**त्यांचा देश** शब्दश: “दूध व मध वाहाणारा.”

**संतती भ्रष्ट होऊ देऊ नये** किंवा “त्याची मुले लोकांकडून अशुध्द होणार नाहीत.”

असल्यामुळे त्याने पवित्र अन्न तसेच परमपवित्र अन्न
खावे;
23परंतु त्याला व्यंग असल्यामुळे त्याने अंतरपटाच्या
आत आणि वेदीजवळ जाऊ नये व माझी परम पवित्र
स्थाने भ्रष्ट करु नये; कारण त्यांना पवित्र करणारा मी
परमेश्वर आहे!"
24तेव्हा मोशेने अहरोन, त्याचे मुलगे व सगळे इस्राएल
लोक ह्यांना हे सर्व सांगितले.

22 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"अहरोन व त्याचे
मुलगे ह्यांना सांग की इस्राएल लोक ज्या वस्तू
मला समर्पण करतात त्या पवित्र होतात; त्या माझ्या आहेत;
म्हणून त्या याजकांनी घेऊ नयेत; त्या पवित्र वस्तू घेऊन
जर तुम्ही वापरल्या तर तुम्ही माझा मान न राखता–माझे
भय न धरता–माझ्या नांवाला कलंक लावाल. मी
परमेश्वर आहे! 3तुझ्या वंशजापैकी कोणी जर त्या
पवित्र वस्तूंना हात लावील, तर तो अपवित्र ठरेल; त्याला
मजसमोरुन दूर करावे! इस्राएल लोकांनी त्या वस्तू मला
अर्पण केल्या आहेत. मी परमेश्वर आहे.
4"अहरोनाच्या वंशापैकी कोणी महारोगी किंवा स्त्राव
होणारा असला तर त्याने शुद्ध होईपर्यंत पवित्र केलेले
पदार्थ खाऊ नयेत. हा नियम अशुद्ध झालेल्या प्रत्येक
याजकाला लागू आहे. प्रेताला स्पर्श केल्यामुळे किंवा
वीर्यपातामुळे अशुद्ध झालेला माणूस, 5किंवा जमिनीवर
सरपटणाऱ्या कोणत्याही अशुद्ध प्राण्याला स्पर्श केल्यामुळे
किंवा कोणत्याही इतर कारणामुळे अशुद्ध झालेल्या
माणसास स्पर्श केल्यामुळे याजक अशुद्ध होईल. 6याजकाने
अशा कोणालाही स्पर्श केला तर त्याने संध्याकाळपर्यंत
अशुद्ध राहावे. त्याने पवित्र पदार्थ खाऊ नयेत; त्याने
पाण्याने स्नान केले तरी पवित्र पदार्थ खाऊं नयेत. 7सूर्य
मावळल्यावरच तो माणूस शुद्ध ठरेल; त्यानंतर त्याने
पवित्र पदार्थ खावे; कारण ते त्याचे अन्न आहे.
8"आपोआप मेलेल्या किंवा जंगली जनावरांनी मारुन
टाकलेल्या जनावराचे मांस याजकाने खाऊं नये, जर
तो ते खाईल तर तो अशुद्ध होईल; मी परमेश्वर आहे!
9"त्यांनी माझी आज्ञा पाळावी व पवित्र पदार्थ अपवित्र
होणार नाहीत याची काळजी घ्यावी; ती ते घेतील तर
आज्ञाभंगाच्या पापामुळे ते मरणार नाहीत. मी परमेश्वराने
त्यांना ह्या पवित्र कामासाठी वेगळे केले आहे. 10फक्त
याजकाच्या कुटुंबातील लोकांनी पवित्र अन्न खावे;
त्याच्याकडील पाहुण्याने किंवा त्या याजकाने कामाला
लावलेल्या मजुराने पवित्र अन्न खाऊ नये; 11परंतु
याजकाने स्वत:चे पैसे देऊन एखादा गुलाम विकत घेतला
असेल तर त्या गुलामाने व याजकाच्या घरात जन्मलेल्या
त्याच्या मुलाबाळांनी त्या पवित्र अन्नातून खावे.
12याजकाच्या मुलीने याजक वंशाच्या बाहेरच्या
माणसाबरोबर लग्न केले असेल तर तिने पवित्र पदार्थ
खाऊ नयेत.
13याजकाची मुलगी विधवा झाली असेल किंवा तिच्या
नवऱ्याने तिला सोडून दिले असेल, तिला एकही मूल
झालेले नसेल व परत ती तरुणपणी होती तशीच आपल्या
बापाच्या घरी राहात असेल तर मग आपल्या बापाच्या
म्हणजे याजकाच्या घरातील पवित्र अन्नातून तिने खावे,
परंतु याजकाच्या घरचे पवित्र अन्न फक्त त्याच्या
कुटुंबातील लोकांनीच खावे.
14"एखाद्याने चुकून पवित्र पदार्थ खाल्ला तर त्याने त्या
खाल्लेल्या पदार्थाइतकी व त्या पदार्थाच्या पाचव्या
हिश्श्याइतकी किंमत भरपाई म्हणून त्यात घालून याजकास
द्यावी.
15"इस्राएल लोक परमेश्वराला अर्पणे देतात तेव्हा ती
अर्पणे पवित्र होतात, म्हणून ती पवित्र अर्पणे याजकाने
अपवित्र करु नयेत; 16जर याजकांनी त्यांना पवित्र अर्पणे
खाण्याची परवानगी दिली तर ते स्वत:वर अपराध ओढवून
घेतील. आणि त्या अपराधाबद्दल त्यांना पैसे भरावे लागतील.
मी परमेश्वर त्यांना पवित्र करणारा आहे!"
17मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 18"अहरोन, त्याचे
मुलगे व सर्व इस्राएल लोक ह्यांना सांग की तुम्हांइस्राएल
लोकांपैकी किंवा तुम्हांमध्ये राहाणाऱ्या उपरी लोकांपैकी
कोणाला आपल्या नवसाचा किंवा काही विशेष
कारणासाठी स्वखुषीचा परमेश्वरासाठी यज्ञबली
अर्पावयाचा असेल, 19–20व तो गुरे, मेंढरे किंवा बकरे
ह्यापैकी असेल तर तो त्यांच्यातील नर असावा, व त्याच्यात
काहीही दोष नसावा! परंतु दोष असलेली कोणतीही अर्पणे
तू स्वीकारु नये; त्या अर्पणामुळे मला संतोष होणार नाही!
21"एखाद्या माणसाला आपला नवस फेडण्यासाठी किंवा
खुषीच्या अर्पणासाठी परमेश्वराला गुरांढोरातून किंवा
शेरडांमेंढरातून शांत्यर्पण करावयाचे असेल तर ते दोषहीन
असावे म्हणजे ते मान्य होईल. 22आंधळा, हाड मोडलेला,
लुळा, वाहती जखम असलेला किंवा अंगवार मस, चाई,
खरुज असा त्वचेचा रोग असलेला असा कोणताही प्राणी
परमेश्वराला अर्पू नये, किंवा परमेश्वराकरिता वेदीवर
त्याचा अर्पण म्हणून होम करु नये.
23"गोऱ्हा किंवा मेंढा ह्याचा एखादा पाय आखुड–पूर्णपणे
न वाढलेला–किंवा प्रमाणाबाहेर लांब असेल तर तो
खुषीच्या अर्पणाकरिता चालेल, पण नवस फेडण्याकरिता
त्याचा स्वीकार होणार नाही.
24"ज्याचे अंड ठेचलेले, चिरडलेले किंवा फाटलेले
असेल असा प्राणी परमेश्वराला अर्पण करु नये अशा
गोष्टी तुम्ही तुमच्या देशात करु नयेत.
25"परमेश्वराला अर्पण करण्यासाठी म्हणून कोणतेही
प्राणी तुम्ही विदेशी लोकांकडून घेऊ नये कारण त्या
प्राण्यांना काही इजा झालेली असेल किंवा त्यांच्यात काही
दोष असेल तर; ते प्राणी स्वीकारले जाणार नाहीत!"
26परमेश्वर मोशेला म्हणाला, 27"वासरु, कोकरु किंवा
करडू जन्मल्यावर सात दिवस त्याच्या आईजवळ असले

पाहिजे; आठव्या दिवशी व त्यानंतर ते परमेश्वराला अर्पण म्हणून अर्पण करण्यासाठी स्वीकारावयास योग्य ठरेल. 28परंतु गाय व तिचे वासरु, मेंढी व तिचे कोकरु ह्या प्रमाणे एखादा प्राणी व त्याची आई ह्यांचा एकाच दिवशी वध करु नये.

29“परमेश्वराकरिता तुम्हाला उपकारस्तुतीचा यज्ञबली अर्पावयाचा असल्यास तो देवाला संतोष देईल अशाप्रकारे तुम्ही अर्पावा.

30अर्पण केलेल्या पशूचे मांस त्याच दिवशी तुम्ही खाऊन टाकावे; त्यातील काहीही दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत शिल्लक ठेवू नये. मी परमेश्वर आहे!

31“तुम्ही माझ्या आज्ञांची आठवण ठेवून त्या पाळाव्या; मी परमेश्वर आहे! 32माझ्या पवित्र नांवाचा मान राखावा–माझे भय धरावे–! इस्राएल लोकांमध्ये मला पवित्र मानण्यात येईल; मी तुम्हाला माझे पवित्र लोक केले आहे. मी परमेश्वर आहे! 33मी तुम्हाला मिसर देशातून बाहेर आणले, आणि मी तुमचा देव झालो. मी परमेश्वर आहे!”

### पवित्र सण

23 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“इस्राएल लोकांना असे सांग. परमेश्वराने नेमलेले सण, पवित्र मेळे भरवण्यासाठी म्हणून तुम्ही जाहीर करावे; ते माझे नेमलेले पवित्र सण असे.

### शब्बाथ दिवस

3“सहा दिवस कामकाज करावे, परंतु सातवा दिवस, विसाव्याचा शब्बाथ दिवस व पवित्र मेळ्याचा दिवस होय; ह्या दिवशी तुम्ही कसलेही काम करु नये; तुमच्या सर्व घराघरात हा परमेश्वरचा शब्बाथ असावा.

### वल्हांडण सण

4“परमेश्वराने ठरविलेले सणाचे दिवस तुम्ही पवित्र मेळ्याचे दिवस म्हणून जाहीर करावे; ते हे, 5पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी संध्याकाळपासून परमेश्वराचा वल्हांडण सण आहे.

### बेखमीर भाकरीचा सण

6“त्याच निसान महिन्याच्या पंधराव्या दिवशी बेखमीर भाकरीच्या सणाचा दिवस येतो. तेव्हा तुम्ही सात दिवस बेखमीर–खमीर न घातलेली–भाकर खावी. 7सणाच्या पहिल्या दिवशी तुम्ही पवित्र मेळा भरवावा; त्या दिवशी तुम्ही कसलेही काम करु नये. 8सात दिवस तुम्ही परमेश्वराकरिता अग्नीत हव्य अर्पावे आणि सातव्या दिवशी आणखी दुसरा पवित्र मेळा भरवावा; त्या दिवशी काही काम करु नये:”

### पहिल्या हंगामाचा सण

9परमेश्वर मोशेला म्हणाला, 10“इस्राएल लोकांना सांग: मी तुम्हाला देत असलेल्या देशात तुम्ही जाऊन पोहोंचाल व हंगामाच्या वेळी कापणी कराल त्यावेळी पिकाच्या पहिल्या उपजातील पेंढी तुम्ही याजकाकडे आणावी; 11याजकाने ती पेंढी शब्बाथाच्या दुसऱ्या दिवशी परमेश्वरासमोर ओवाळावी म्हणजे ती तुमच्यासाठी स्वीकारण्यात येईल.

12“पेंढी ओवाळाल त्या दिवशी निर्दोष अशा एक वर्षाच्या मेंढ्याचे होमार्पण करावे; 13तुम्ही त्याच बरोबर तेलात मळलेल्या दोन दशमांश मैद्याच्या पिठाचे अन्नार्पण अर्पावे. त्याच्या सुवासाने परमेश्वराला संतोष होतो; आणि त्या बरोबरचे पेयार्पण म्हणून एकचतुर्थांश हिन द्राक्षारस अर्पावा. 14तुम्ही आपल्या देवाला हे सर्व अर्पण आणाल, त्या दिवसापर्यंत नव्या पिकाची भाकर, किंवा हुरडा किंवा हिरव्या धान्याची भाकर खाऊ नये; तुम्ही जेथे कोठे राहाल तेथे तुमच्याकरिता हा नियम पिढ्यान्‌पिढ्या कायमचा चालू राहील.

### पन्नासाव्या दिवसाचा–हंगामाचा–सण

15“तुम्ही शब्बाथ दिवसाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी–रविवारी सकाळी-जेव्हा ओवाळणीची पेंढी आणाल, त्या दिवसापासून सात शब्बाथ दिवस मोजावे; 16सातव्या शब्बाथ दिवसानंतर दुसऱ्या दिवशी येणाऱ्या रविवारी म्हणजे पन्नासाव्या दिवशी तुम्ही परमेश्वराकरिता नवे अन्नार्पण आणावे. 17त्या दिवशी तुम्ही आपल्या घरातून दोन दशांश एफाभर मैद्याच्या, खमीर घालून भाजलेल्या दोन भाकरी ओवाळण्यासाठी आणाव्या; परमेश्वराकरिता हे पहिल्या उपजाचे अर्पण होय.

18“एक गोऱ्हा, दोन मेंढे व एक एक वर्षाची सात नर कोंकरे ही सर्व निर्दोष अशी घेऊन त्यांचा परमेश्वरासमोर अन्नार्पणासोबत परमेश्वरासाठी हव्य म्हणून होम करावा. त्या सुवासिक अर्पणामुळे परमेश्वराला संतोष होईल. 19आणि पापार्पणासाठी एक बकरा व शांत्यर्पणासाठी एक एक वर्षाची दोन नर कोंकरे अर्पावेत.

20“याजकाने ती अर्पणे प्रथम उपजाच्या भाकरीबरोबर त्या मेंढ्यांसह परमेश्वरासमोर ओवाळावी; ती परमेश्वराकरिता पवित्र आहेत; ती याजकाच्या वाट्याची व्हावी. 21त्याच दिवशी तुम्ही पवित्र मेळा भरवावा; तुम्ही कोणतेही काम करु नये; तुमच्या प्रत्येक घरासाठी हा तुम्हाला पिढ्यान्‌पिढ्या निरंतरचा नियम होय.

22“तसेच तुम्ही आपल्या जमिनीतील पिकाची कापणी कराल तेव्हा तुमच्या शेताच्या कोनाकोपऱ्यातील साऱ्या पिकाची कापणी करु नका आणि सरवा वेचूं नका; गरीब व तुमच्या देशातून प्रवास करणाऱ्या उपरी लोकांसाठी तो राहू द्या. मी तुमचा देव परमेश्वर आहे!”

### कर्णे वाजविण्याचा सण

23आणखी परमेश्वर मोशेला म्हणाला, 24“इस्राएल
लोकांना सांग: सातव्या महिन्याचा पहिला दिवस हा
विसाव्याचा पवित्र दिवस असावा; त्या दिवशी पवित्र मेळा
भरवावा व पवित्र स्मरणासाठी तुम्ही कर्णे फुंकावी; 25तुम्ही
कोणतही काम करु नये; तर तुम्ही परमेश्वराला अर्पण
अर्पावे.”

### प्रायश्चिता:चा दिवस

26परमेश्वर मोशेला म्हणाला, 27“सातव्या महिन्याचा
दहावा दिवस हा प्रायश्चित्ताचा दिवस म्हणून पाळावा; त्या
दिवशी पवित्र मेळा भरवावा; काही न खाता आपल्या
जिवांस दंडन करुन नम्र व्हावे व परमेश्वराला अर्पण
अर्पावे. 28त्या दिवशी तुम्ही कसलेही कामकाज करु नये
कारण तो प्रायश्चिताचा दिवस आहे; त्या दिवशी तुमच्या
परमेश्वरासमोर तुमच्यासाठी प्रायश्चित करण्यात येईल.
29“त्या दिवशी जो माणूस काही न खाता आपल्या
जिवास दंडन करुन आपणाला नम्र करणार नाही त्याला
आपल्या लोकांतून बाहेर टाकावे. 30त्या दिवशी कोणाही
माणसाने जर कसलेही काम केले तर मी देव त्याला
त्याच्या लोकातून नाहीसा करीन. 31तुम्ही अजिबात
कसलेही काम करु नये; तुम्ही जेथे कोठे राहात असाल
तेथे तुमच्या सर्व घराघरात तुम्हाला हा पिढ्यान्‌पिढ्या
कायमचा नियम होय. 32तो दिवस तुम्हाला पवित्र विसाव्याचा
शब्बाथ दिवस व्हावा; त्या दिवशी तुम्ही काही न खाता
आपल्या जिवास दंडन करावे व नम्र व्हावे; त्या महिन्याच्या
नवव्या दिवसाच्या संध्याकाळपासून सुरवात करुन दुसऱ्या
दिवशी संध्याकाळपर्यंत तुम्ही हा विसाव्याचा दिवस पाळावा.”

### मंडपाचा सण

33परमेश्वर मोशेला पुन्हा म्हणाला, 34“इस्राएल लोकांना
सांग: सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवसापासून पुढे सात
दिवसपर्यंत परमेश्वराकरिता मंडपाचा सण पाळावा;
35पहिल्या दिवशी पवित्र मेळा भरवावा; त्या दिवशी कसलेही
काम करु नये. 36सात दिवस परमेश्वराला अर्पण अर्पावे;
आठव्या दिवशी दुसरा पवित्र मेळा भरवावा व त्या दिवशीही
परमेश्वराला अर्पण अर्पावे; त्या दिवशी तुम्ही कसलेही
काम करु नये.
37“परमेश्वराने हे सण नेमलेले आहेत: त्या दिवशी
पवित्र मेळे भरवावेत; त्यांत योग्य वेळी हव्य म्हणजे होमार्पण,
अन्नार्पण, शांत्यर्पण व पेयार्पण परमेश्वराला अर्पावे.
38परमेश्वराच्या नेहमीच्या शब्बाथ पालना शिवाय अधिक
म्हणून हे सणाचे दिवस तुम्ही साजरे करावेत; तुमची
सणाची अर्पणे ही तुमची नवस फेडीची अर्पणे, तुम्ही
परमेश्वराला अर्पावयाच्या भेटी व इतर अर्पणे, ह्यांच्यात
भर घालणारी अर्पणे असावीत.
39“जमिनीचा उपज गोळा केल्यावर त्याच सातव्या
महिन्याच्या पंधराव्या दिवसापासून पुढे सात दिवस पर्यंत
परमेश्वराकरिता सण पाळावा; त्यातील पहिला दिवस व
आठवा दिवस हे विसाव्याचे दिवस म्हणून पाळावे. 40पहिल्या
दिवशी तुम्ही झाडांची चांगली फळे, खजुरीच्या झावळ्या
दाट पालवीच्या झाडांच्या डहाळ्या आणि ओहळालगतचे
वाळूंज ही घेऊन परमेश्वरासमोर सात दिवस उत्सव
करावा. 41प्रत्येक वर्षी सात दिवस परमेश्वराकरिता हा
सण पाळावा; तुमचा हा पिढ्यान्‌पिढ्या कायमचा नियम
होय; सातव्या महिन्यात हा सण पाळावा. 42तुम्ही सात
दिवस तात्पुरत्या उभारलेल्या मांडवात राहावे; जन्मापासून
जे इस्राएल आहेत त्या सर्वांनी मांडवात राहावे, 43म्हणजे
तुमच्या पुढील पिढ्यांना कळेल की मी इस्राएल लोकांना
मिसर देशातून बाहेर आणले तेव्हा त्यांना तात्पुरत्या
उभारलेल्या मांडवात राहावयास लावले. मी परमेश्वर
तुमचा देव आहे!”
44तेव्हा ह्याप्रमाणे परमेश्वराने नेमिलेले सण मोशेने
इस्राएल लोकांना कळवले.

### दीपवृक्ष आणि पवित्र भाकर

24 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2“इस्राएल लोकांना
आज्ञा कर की, दीप सतत तेवत राहून प्रकाश
मिळावा म्हणून जैतुनाच्या हातकुटीचे शुद्ध तेल त्यांनी
तुझ्याकडे घेऊन यावे;
3अहरोनाने दर्शनमंडपात साक्षपटासमोरील
अंतरपटाबाहेर परमेश्वरासमोर संध्याकाळपासून
सकाळपर्यंत दीप सतत तेवत ठेवावा; हा तुमचा पिढ्यान्‌पिढ्या
कायमचा नियम होय. 4त्याने परमेश्वरासमोर शुद्ध
सोन्याच्या दीपवृक्षावरील दिवे सतत तेवत ठेवावे. 5तू मैदा
घेऊन त्याच्या बारा पोव्व्या भाज; एक पोळी दोन दशमांश
एफाभर मैद्याचा करावा. 6त्यांच्या दोन रांगा करुन एका
रांगेत सहा सहा पोव्व्या शुद्ध सोन्याच्या मेजावर
परमेश्वरासमोर ठेवाव्यात. 7प्रत्येक रांगेवर धूप ठेव ह्यामुळे
देवाला अग्नींतून केलेल्या अर्पणाचे ते प्रतीक असेल.
8दर शब्बाथ दिवशी अहरोनने त्या, परमेश्वरासमोर
मांडाव्या; इस्राएल लोकांच्या वतीने हा सर्वकाळचा करार
होय. 9ती भाकर अहरोन व त्याचे मुलगे ह्यांचा कायमचा
वाटा होय; त्यांनी ती पवित्र ठिकाणी खावी; कारण
कायमच्या नियमाप्रमाणे परमेश्वराला अर्पिलेल्या
अर्पणांपैकी ती त्याला परमपवित्र होय.”

### देवाला शिव्याशाप देणारा माणूस

10त्याकाळीं कोणा एका इस्राएल स्त्रीला
मिसरी–पुरुषापासून झालेला एक मुलगा होता; तो इस्राएली
होता व इस्राएल लोकांप्रमाणे वागत होता. तो छावणीत
एका इस्राएल माणसाशी भांडू लागला. 11तो इस्राएल स्त्रीचा

मुलगा परमेश्वराच्या नांवाची निंदा करुन शिव्याशाप देऊ
लागला म्हणून लोकांनी त्याला मोशेकडे आणले; त्याच्या
आईचे नांव शलोमीथ होते; ती दान वंशातील दिब्री ह्याची
मुलगी होती; 12त्याच्या संबंधी परमेश्वराची आज्ञा स्पष्टपणे
कळावी म्हणून त्यांनी त्याला अटकेत ठेवले.

13मग परमेश्वरदेव मोशेला म्हणाला, 14“तुम्ही त्या
शिव्याशाप देणाऱ्या माणसाला छावणीबाहेर न्या; मग
जितक्यांनी ती निंदा ऐकली तितक्यांना एकत्र बोलावा;
त्यांनी आपले हात त्या माणसाच्या डोक्यावर ठेवावे; आणि
मग सर्व लोकांनी त्याला दगडमार करुन मारुन टाकावे.
15तू इस्राएल लोकांना अवश्य सांग की जो कोणी आपल्या
देवाला शिव्याशाप देईल त्याने आपल्या पापाची शिक्षा
भोगावी. 16जो कोणी परमेश्वराच्या नावाची निंदा करील
त्याला अवश्य जिवे मारावे; सर्व मंडळीने त्याला दगडमार
करावा; तो परदेशीय असो किंवा स्वदेशीय असो, त्याने
परमेश्वराच्या नावाची निंदा केली तर त्याला अवश्य
जिवे मारावे.

17“जर एखादा माणूस दुसऱ्या माणसाला ठार मारील
तर त्याला अवश्य जिवे मारावे. 18जर कोणी दुसऱ्याच्या
पशूस ठार मारील तर त्याने त्याच्या बदली दुसरा पशू
देऊन भरपाई करावी.

19“जो कोणी एखाद्याला दुखापत करील त्याला उलट
त्याच प्रकारची दुखापत करावी. 20हाड मोडल्याबद्दल हाड
मोडणे, डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल दात; ह्याप्रमाणे
एखाद्याने कोणा माणसाला जी इजा केली असेल त्याच
प्रकारची इजा त्याला केली जावी. 21पशूला ठार
मारणाऱ्याने त्याची भरपाई करावी, पण मनुष्य हत्या
करणाऱ्याला अवश्य जिवे मारावे.

22“परदेशीयांना व स्वदेशीयांना एकच नियम लागू
असावा; कारण मी परमेश्वर तुमचा देव आहे.”

23मोशेने इस्राएल लोकांना ह्याप्रमाणे सांगितल्यावर
त्यांनी त्या शिव्याशाप देणाऱ्या माणसाला छावणीबाहेर
नेऊन दगडमार केला; अशाप्रकारे परमेश्वराने मोशेला
आज्ञा दिल्याप्रमाणे इस्राएल लोकांनी केले.

### इस्राएल लोकांच्या देशासाठी विसाव्याचा समय

25 सीनाय पर्वतावर परमेश्वर मोशेला म्हणाला,
2“इस्राएल लोकांना असे सांग: मी तुम्हाला देत
असलेल्या देशात तुम्ही जाऊन पोहोंचाल त्यावेळी त्या
देशाने परमेश्वरासाठी पवित्र शब्बाथ म्हणजे पवित्र
विसाव्याचा समय पाळावा.

3सहा वर्षे आपली शेती करावी आणि सहा वर्षे आपल्या
द्राक्षमळ्याची छाटणी करावी आणि त्याचे पीक जमा
करावे; 4पण सातव्या वर्षी देशाला विसावा द्यावा
म्हणजे परमेश्वराकरिता हा पवित्र शब्बाथाचा विसावा
असावा, त्यावर्षी शेते पेरू नयेत आणि द्राक्षमळ्याची
छाटणी करु नये. 5तुमचा हंगाम संपल्यानंतर आपोआप
उगवलेले धान्य कापू नये; आणि न छाटलेल्या द्राक्षवेलीची
फळे गोळा करु नयेत; देशाला ते वर्ष विसाव्याचे वर्ष
असावे.

6“तरी तुम्हाला भरपूर अन्न मिळेल व तुमच्या
दासदासींना, तुमच्या मजुरांना व तुमच्याबरोबर राहाणाऱ्या
परदेशीयांनाही भरपूर अन्न मिळेल; 7आणि तुमची गायीगुरे
व इतर पशू ह्यांनाही भरपूर खाद्य मिळेल.

### योबेल वर्ष

8“तसेच तुम्ही सात वर्षांचे सात गट मोजा—सात शब्बाथ
वर्षे—म्हणजे सात गुणिले सात इतकी वर्षे मोजा; तो
एकोणपन्नास वर्षांचा काळ होईल. 9मग सातव्या महिन्याच्या
दहाव्या दिवशी म्हणजे प्रायश्चिताचा दिवशी मोठ्या
आवाजाचे मेंढ्याचे शिंग देशभर सर्वत्र फुंकावे; 10त्या
पन्नासाव्या वर्षाला पवित्र मानावे, आणि देशातील सर्व
रहिवासी मुक्त झाल्याची घोषणा करावी; ह्या वर्षाला
तुम्ही “योबेल” म्हणावे; ह्या वर्षी तुम्ही आपापल्या वतनात
व आपापल्या कुटुंबात परत जावे. 11हे पन्नासावे वर्षे
तुमच्यासाठी “योबेल” वर्ष होय; त्या वर्षी तुम्ही काही पेरु
नये, आपोआप उगवलेले कापू नये आणि छाटणी न
केलेल्या द्राक्षवेलीची फळेही गोळा करु नयेत; 12कारण
ते “योबेल” वर्ष होय; ते तुम्हांकरिता पवित्र वर्ष असावे;
शेतात सांपडेल तो उपज तुम्ही खावा. 13ह्या “योबेल” वर्षी
तुम्ही सर्वांनी आपापल्या वतनात परत जावे.

14“तुम्ही आपल्या शेजाऱ्याला जमीन विकाल किंवा
त्याच्याकडून जमीन विकत घ्याल तेव्हा एकमेकावर
अन्याय करु नका. 15तुम्हाला तुमच्या शेजाऱ्याकडून
जमीन विकत घ्यावयाची असेल तर गेल्या “योबेल”
वर्षापासून किती वर्षे झाली ती मोजा; तुम्हाला जमीन
विकावयाची असेल तर “योबेल” वर्ष येईपर्यंत ती किती
वर्षे पीक देईल ती मोजा; त्या वर्षांवरुन खरेदी विक्रीची
किंमत ठरविता येईल कां? कारण तो फक्त पुढच्या
योबेल वर्षापर्यंत पीक घेण्याचे अधिकार तुम्हाला विकत
आहे. 16जर वर्षे खूप असतील, तर किंमत जास्त असेल.
जर वर्षे कमी असतील तर किंमतही कमी असेल. का?
कारण तुमचा शेजारी तुम्हाला खरोखरी फक्त काही
पिकेच विकत आहे. पुढच्या योबेलच्या वर्षी जमीन
पुन्हा त्याच्या कुटुंबाच्या मालकीची होईल. 17तुम्ही
एकमेकांवर अन्याय करु नये; तुम्ही परमेश्वराचे भय
धरावे! मी परमेश्वर तुमचा देव आहे! 18माझ्या विधी
नियमांची आठवण ठेवून ते पाळा! म्हणजे मग तुम्ही आपल्या
देशात सुरक्षित राहाल; 19आणि भूमि तुम्हाकरिता चांगले
पीक देईल; मग तुम्हाकरिता भरपूर अन्न असेल व
तुम्ही देशात सुरक्षित राहाल. 20तुम्ही कदाचित् म्हणाल,
‘आम्ही पेरावयाचे नाही व पीक गोळा करावयाचे नाही
तर मग सातव्या वर्षी खाण्याकरिता आम्हास काहीच
राहाणार नाही.’ 21चिंता करु नका! सहाव्या वर्षी मी

तुमच्यावर कृपा करीन व मी तुम्हाला अशी बरकत
देईन की जमीन तुम्हाला तीन वर्षांचे पीक देईल. 22मग
आठव्या वर्षी तुम्ही पेराल तो पर्यंत तुम्ही जुना साठा खात
राहाल, नवव्या वर्षाचे पीक हाती येईपर्यंत तुम्ही जुना
साठा खात राहाल.

### मालमत्तेविषयी नियम

23“जमीन खरोखर माझी आहे; म्हणून ती तुम्हाला
कायमची विकता येणार नाही; तुम्ही परके व उपरी
म्हणून माझ्या आश्रयाला आला आहा; 24म्हणून लोक
आपली जमीन विकतील खरी परंतु ती नेहमी त्यांच्या
घराण्यातील कुळाला परत मिळणार. 25तुझा कोणी भाऊबंद
कंगाल झाला आणि त्याने आपल्या वतनातील मालमत्तेचा
काही भाग विकला तर त्याच्या सगळ्यात जवळच्या
नातलगाने पुढे येऊन आपल्या नातलगाकरिता खंडणी
भरुन ती मालमत्ता परत विकत घेऊन सोडवावी. 26आपल्या
वतनाचा भाग सोडवून घ्यावयास एखाद्या माणसाला आपला
जवळचा नातलग नसेल परंतु तो भाग सोडवून घ्यावयास
त्याची स्वत:ची ऐपत वाढली असेल, 27तर त्याने जमीन
विकल्यापासूनची वर्षे मोजावीत आणि त्यांची संख्या पाहून
त्या जमिनीसाठी किती किंमत द्यायची ते ठरवावे आणि
त्याला त्याने जमीन विकली असेल त्याला शिल्लक
राहिलेली रक्कम द्यावी. 28पण ते वतन परत मिळविण्याची
त्याला ऐपत नसेल तर आपली जमीन त्याने योबेल वर्षापर्यंत
विकत घेणाऱ्याच्या ताब्यात राहू द्यावी; योबेल वर्षी ती
सुटेल आणि मग ते वतन परत योग्य मालकाकडे जाईल.

29“एखाद्या माणसाने तटबंदीच्या नगरात असलेले आपले
घर विकले, तर ते विकल्यावर एक वर्षाच्या आत सोडवून
परत घेण्याचा त्याला हक्क आहे, व तो हक्क एक
वर्षभर राहील;

30परंतु वर्ष संपण्याच्या आत त्याने ते सोडविले नाही
तर तटबंदीच्या नगरातले ते घर विकत घेणाऱ्याचे होईल
व पिढ्यान्‌पिढ्या त्याच्या वंशात कायम राहील; योबेल
वर्षी ते आपल्या पहिल्या मालकाकडे परत जाणार नाही.
31तटबंदी नसलेली नगरे उघड्या शेतासमान समजली जावी;
म्हणून त्यांतील घरे योबेल वर्षी त्यांच्या पहिल्या मालकाकडे
जातील.

32“परंतु लेव्यांच्या नगराविषयी म्हणावयाचे झाले तर
त्यांतील घरे लेव्यांना पाहिजे तेव्हा सोडविता येतील.
33एखाद्या लेव्याच्या वतनाच्या नगरातले घर जर कोणी
विकत घेतले तर ते घर योबेल वर्षी परत त्या लेव्याचेच
होईल; कारण लेव्यांच्या वतनाच्या नगरातली घरेच काय
ती लेवी वंशाची वतने होत; ती इस्राएल लोकांनी त्यांना
दिलेली आहेत.

34लेवी लोकांच्या नगराभोंवतीच्या शिवारातल्या जमिनी
व कुरणे विकता येणार नाहीत; ती कायमची त्यांच्या
मालकीची होत.

### गुलामांच्या मालकांकरिता नियम

35“तुझा एखादा भाऊबंद, त्याचे स्वत:चे* पोट देखील
भरता येऊ नये, इतका कंगाल झाला तर तू त्याला
परक्या किंवा उपऱ्याप्रमाणे तुझ्याजवळ राहू द्यावे; 36त्याला
तू पैसे देशील तर त्यावर व्याज घेऊ नको. परमेश्वर देवाचे
भय धर व आपल्या भाऊबंदाला* आपल्यापाशी राहू दे.
37तू त्याला उसने दिलेल्या पैशावर व्याज घेऊ नको
आणि त्याला विकलेल्या अन्न धान्यावर नफा काढण्याचा
प्रयत्न करु नको. 38मी परमेश्वर तुमचा देव आहे; तुम्हाला
कनान देश द्यावा व तुमचा देव व्हावे म्हणून मी तुम्हाला
मिसर देशातून बाहेर आणले.

39“तुझा एखादा भाऊबंद तुझ्यासमोर इतका कंगाल
झाला की त्याने स्वत:ला तुला दास म्हणून विकले तर
त्याला गुलामाप्रमाणे राबवून घेऊ नको; 40योबेल वर्षापर्यंत
त्याने मजुराप्रमाणे किंवा उपऱ्याप्रमाणे तुझ्यापाशी राहावे
व तुझी सेवाचाकरी करावी. 41त्या वर्षी त्याने आपल्या
मुलांबाळासह तुझ्यापासून निघून आपल्या वाडवडिलांच्या
वतनात परत जावे; 42कारण ते माझे दास आहेत! मी
त्यांना मिसर देशातून सोडवून बाहेर आणले; त्यांनी पुन्हा
दास होऊ नये. 43तू धनी म्हणून त्याच्यावर कठोरपणाने
अधिकार चालवू नको; आपल्या देवाचे भय धर.

44“तुमच्या दास दासी विषयी: तुमच्या देशासभोंवतीच्या
राष्ट्रातून तुम्ही आपणासाठी गुलाम आणावे; 45तसेच तुमच्या
देशात राहाणाऱ्या परदेशीय किंवा उपऱ्या लोकांच्या
कुटुंबात जन्मलेली मुले तुम्ही गुलाम म्हणून विकत घ्यावी;
ती तुमची मालमत्ता होतील; 46तुम्ही त्यांचा ताबा
आपल्यामागे आपल्या मुलांना द्यावा म्हणजे ते तुमच्या
मुलांचे दासदासी होतील; त्या लोकांना तुम्ही कायमचे
गुलाम करुन घ्यावे; पण तुमच्या इस्राएल भाऊबंदानी
आपला अधिकार एकमेंकावर कठोरपणाने चालवू नये.

47“तुझा एखादा परदेशीय किवा उपरी शेजारी धनवान
झाला व त्याच्यापाशी असलेला तुझा एखादा बंधू कंगाल
होऊन त्याने स्वत:स तुम्हामध्ये राहात असणाऱ्या त्या
परदेशीयाला किंवा परदेशीयाच्या कुटुंबातील एखाद्याला
गुलाम म्हणून विकले असेल; 48तर त्यांची विक्री
झाल्यावरही त्याला स्वत:ला सोडवून घेण्याचा हक्क
राहील; त्याच्या भाऊबंदापैकी कोणासही त्याला सोडवता
येईल; 49किंवा त्याचा चुलता, चुलत भाऊ अथवा त्याच्या
कुळापैकी कोणी जवळचा नातलग ह्यांना त्याला सोडवता
येईल किंवा तो स्वत:च धनवान झाला तर त्याला स्वत:
पैसे भरुन स्वत:ची सुटका करुन घेता येईल.

50“त्याला विकत घेणाऱ्या परदेशीयाच्या बरोबर त्याने
आपल्या विक्रीच्या वर्षापासून योबेल वर्षापर्यंत हिशोब
करावा आणि वर्षांच्या संख्येप्रमाणे विक्रीची किंमत

---

**तुझ्या ... स्वत:चे** शब्दश: “तुमच्या भावांपैकी एक.”

**आपल्या भाऊ** किंवा “तुमच्या स्वत:च्या प्रदेशातील एक व्यक्ति.”

ठरवावी; कारण खरे पाहता त्या मालकाने त्याला फक्त
थोडी वर्षे मजुराच्या रोजाप्रमाणे लावल्यासारखेच आहे!
51योबेलास बरीच वर्षे असतील तर विक्रीच्या रकमेतून
आपल्या मुक्ततेचे मोल त्या वर्षांच्या संख्येच्या प्रमाणात
त्याला परत द्यावे; ते वर्षांच्या संख्येवर अवलंबून राहील.
52योबेलास थोडीच वर्षे असतील तर त्याने मूळ किंमतीपैकी
थोडाच भाग परत करावा. 53त्याने आपल्या मालकापाशी
प्रत्येक वर्षी साळकरु प्रमाणे राहावे; तुमच्यासमोर त्याच्या
मालकाचा अधिकार कठोरपणाने तुम्ही त्याच्यावर चालू
देऊ नये.

54"जरी त्या माणसाला पुन्हा कोणी विकत घेतले नाही,
तरी तो स्वतंत्र होईल. योबेल वर्षी तो व त्याची मुलबाळे
मुक्त होतील. 55कारण इस्राएल लोक माझे दास आहेत;
त्या माझ्या दासांना मी मिसर देशातून बाहेर आणले आहे.
मी देव आहे!

### देवाच्या आज्ञापालनाबद्दल मिळणारी आशीर्वादाची फळे

26 "तुम्ही आपणासाठी मूर्ती करु नका; तसेच कोरीव
मूर्ती किंवा स्मारक स्तंभ–आठवणींचा
बुरुज–उभारु नका अथवा पूजा करण्यासाठी आपल्या
देशात, कोरीव पाषाण स्थापन करु नका; कारण मी
परमेश्वर तुमचा देव आहे!

2"तुम्ही माझ्या पवित्र विसाव्याच्या दिवसांची–पवित्र
शब्बाथांची–आठवण ठेवून ते पाळावे आणि माझ्या पवित्र
स्थानांविषयी आदर बाळगावा. मी परमेश्वर आहे!

3"तुम्ही आठवण ठेवून माझ्या नियमाप्रमाणे चालावे व
माझ्या आज्ञा पाळाव्या! 4तुम्ही असे कराल तर मी
तुमच्यासाठी योग्य वेळी पाऊस पाडीन; जमीन आपले
पीक देईल व मळ्यातील झाडे आपापली फळे देतील.
5तुम्ही द्राक्षांच्या हंगामापर्यंत धान्याची मळणी करीत राहाल
आणि पेरणीच्या दिवसापर्यंत द्राक्षांची तोडणी करीत राहाल.
मग खाण्याकरिता तुम्हाजवळ भरपूर अन्न असेल, आणि
तुम्ही आपल्या देशात सुरक्षित राहाल. 6मी तुमच्या देशाला
शांतता देईन; तुम्ही शांतीने झोपी जाल; तुम्हाला कोणाची
भीती वाटणार नाही. मी हिंस्त्र पशूंना तुमच्या देशाबाहेर
ठेवीन आणि तुमच्या देशावर कोणी सैन्य चाल करुन
येणार नाही.

7"तुम्ही तुमच्या शत्रूंचा पाठलाग कराल व त्यांचा पराभव
कराल. तुम्ही तुमच्या तलवारींनी त्यांचा वध कराल.
8तुमच्यातील पांच जण शंभरांना व शंभरजण दहा हजारांना
पळवून लावतील. तुम्ही तुमच्या शत्रूंचा पराभव कराल,
व तुमच्या तलवारीने त्यांना ठार माराल.

9"मग मी तुमच्याकडे वळेन व तुम्हाला भरपूर संतती
देईन आणि तुमच्याशी केलेला माझा करार पक्का करीन:
10तुम्हाला मुबलक धान्य मिळेल व ते वर्षभर पुरुन
उरेल. तुम्हाला नवीन धान्य आल्यावर जुने बाहेर काढावे
लागेल! म्हणजे नवीन धान्य ठेवावयास जागा मिळेल.
11आणखी मी तुम्हामध्ये माझा पवित्र मंडप टाकून वस्ती
करीन; तुम्हापासून मी जाणार नाही! 12मी तुमच्याबरोबर
चालेन आणि तुमचा देव होईन, आणि तुम्ही माझे लोक
व्हाल. 13मी परमेश्वर तुमचा देव आहे. मिसर देशात
तुम्ही गुलाम होता. मी तुम्हाला मिसर देशातून बाहेर
काढले; गुलाम म्हणून काम करताना जड वजनांचा भार
वाहून तुम्ही वाकून गेला होता, परंतु तुमच्या खांद्यावरील
जोखड मोडून मी तुम्हाला पुन्हा ताठ चालवले आहे!

### देवाच्या आज्ञाभंगाबद्दल मिळणारी शिक्षा

14"परंतु जर तुम्ही माझे ऐकले नाही व माझ्या आज्ञा
पाळल्या नाहीत तर मग ह्या वाईट गोष्टी तुम्हावर येतील.
15तुम्ही जर माझे नियम मानण्यास व माझ्या आज्ञा पाळण्यास
नकार द्याल तर मग तुम्ही माझा करार मोडाल. 16तुम्ही
तसे कराल तर मग तुम्हावर भयंकर संकटे येतील असे
मी करीन; क्षयरोग व ताप ह्यांनी मी तुम्हाला पीडीन; ती
तुमची दृष्टी नष्ट करतील, व तुमचा जीव घेतील; तुम्ही
बियाणे पेराल पण तुम्हाला यश मिळणार नाही–तुम्हाला
पीक मिळणार नाही–आणि तुमचे शत्रू तुमचे धान्य खाऊन
टाकतील. 17मी तुमच्याविरुद्ध होईन, म्हणून तुमचे शत्रू
तुमचा पराभव करतील; तुमचा द्वेष करणारे तुमचे शत्रू
तुम्हावर राज्य करतील; आणि कोणी तुमचा पाठलाग
करत नसतानाही तुम्ही पळाल.

18"ह्या नंतरही जर तुम्ही माझ्या आज्ञा पाळणार नाही;
तर तुमच्या पापाबद्दल मी तुम्हाला सातपट शिक्षा करीन.
19मी तुमच्या बळाचा गर्व मोडून टाकीन; तुमचे आकाश
लोखंडासारखे व तुमची जमीन पितळेसारखी करीन.
20तुम्ही खूप कष्ट कराल पण त्याचा काही उपयोग होणार
नाही; कारण तुमची जमीन पीक * देणार नाही व तुमची
झाडे फळे देणार नाहीत.

21"तरी सुध्दा अद्याप तुम्ही माझ्याविरुद्ध वागाल व माझ्या
आज्ञा पाळण्यास नकार द्याल तर मी तुम्हाला तुमच्या
पापांच्या मानाने सातपट अधिक ताडण करीन! तुम्ही
जेवढी अधिक पापे कराल तेवढी अधिक शिक्षा पावाल!
22मी तुमच्यावर हिंस्त्र पशू पाठवीन आणि ते तुमच्या
मुलांबाळांना तुमच्यापासून घेऊन जातील; ते तुमच्या
गुराढोरांचा नाश करतील; ते तुमच्या अनेक लोकांना
मारुन टाकतील, व त्यामुळे तुमचे रस्ते ओस पडतील!

23"एवढे करुनही तुम्हाला अद्दल घडली नाही आणि
तुम्ही माझ्याविरुद्धच वागलात, 24तर मीही तुमच्याविरुद्ध
होईन आणि मी, होय मी परमेश्वर तुमच्या पापाबद्दल
तुम्हाला सातपट ताडण करीन. 25तुम्ही माझा करार मोडला
म्हणून मी तुम्हाला शिक्षा करीन; तुमच्यावर सैन्ये चालून

---

**आकाश ... पिक** शब्दश: "तुमची आकाशे लोखंडासारखी, तुमची जमीन पितळेसारखी."

येतील असे मी करीन; सुरक्षिततेसाठी तुम्ही तुमच्या नगरात
जाल पण तेव्हा मी तुमच्यावर मरीचा रोग पसरवीन;
तुमचे शत्रू तुमचा पराभव करतील. 26मी तुम्हाला धान्याचा
फार थोडा वाटा देईन; तेव्हा दहा स्त्रीया एकाच चुलीवर
तुमची भाकर भाजतील व ती तुम्हाला तोलून देतील; ती
तुम्ही खाल तरी तुमचे पोट भरणार नाही-तुम्ही भुकेलेच
राहाल!

27"एवढे सर्व करुनही तुम्ही माझे ऐकले नाही व तुम्ही
माझ्याविरुद्ध वागला, 28तर मात्र खरोखर मी माझा राग
तुम्हाला दाखवीन! मी, होय मी परमेश्वर तुमच्या पापाबद्दल
तुम्हाला सातपट शिक्षा करीन! 29तुमच्या मुलांचे व मुलींचे
मांस खाण्याची तुम्हावर पाळी येईल. 30तुमच्या पूजेची
उच्चस्थाने मी नष्ट करीन; तुमच्या धूपवेद्या फोडून टाकीन
आणि तुमच्या मूर्तीच्या मढ्यांवर तुमची मढी टाकीन; मला
तुमचा वीट येईल.

31मी तुमची नगरे नष्ट करीन, तुमची पवित्र स्थळे
ओसाड करीन. तुमच्या सुवासिक अर्पणांचा वास घेणे
मी बंद करीन. 32मी तुमचा देश ओसाड करीन; हे
पाहून तुमच्या देशात राहाण्यास येणारे तुमचे शत्रू
चकित होतील. 33परराष्ट्रांमध्ये मी तुमची पांगापांग करीन;
मी माझी तलवार उपसून तुमचा नायनाट करीन;
तुमचा देश ओसाड होईल आणि तुमच्या शहरांचा नाश
होईल.

34"तुम्हाला तुमच्या शत्रूच्या देशात नेतील; तुमचा देश
ओसाड होईल. तेव्हा अखेरीस तुमच्या देशाला विसावा
मिळेल. तो शब्बाथाचा विसावा उपभोगील. 35देश ओसाड
असेपर्यंत तुम्ही राहात असताना तुमच्या शब्बाथांनी त्याला
दिला नाही इतका विसावा त्याला मिळेल. 36तुमच्यातील
जे जगूनवाचूंन उरतील त्यांचे धैर्य आपल्या शत्रूंच्या देशात
खचेल; त्यांना प्रत्येक गोष्टीची भीती वाटेल; वाऱ्याने
उडविल्या जाणाऱ्या पानाप्रमाणे ते इकडे तिकडे सभोंवार
पळतील; कोणी तलवार घेऊन पाठीस लागल्याप्रमाणे ते
पळतील. कोणी पाठीस लागले नसतानाही ते पळतील.
37कोणी तलवार घेऊन पाठीस लागल्याप्रमाणे ते पळतील
व कोणी त्यांच्यामागे लागले नसतानाही पळाल्यामुळे ते
अडखळून एकमेंकावर पडतील.

"तुमच्या शत्रूविरुद्ध उभे ठाकण्याइतके बळ तुमच्यात
नसणार. 38राष्ट्राराष्ट्रात पांगून तुमच्या शत्रूंच्या देशात तुम्ही
नाहीसे व्हाल. 39तेव्हा जगूनवाचून उरलेले त्यांच्या शत्रूंच्या
देशात आपल्या पापामुळे खंगत जातील आणि त्यांचे
वाडवडील ज्याप्रमाणे त्यांच्या पापात खंगले त्याप्रमाणे ते
आपल्या पापात खंगत जातील.

### माणसाला नेहमी आशा असते

40"परंतु कदाचित् ते आपली पापे व आपल्या
वाडवडीलांची पापे कबूल करतील. ते माझ्याविरुद्ध गेले
हेही ते कदाचित् कबूल करतील, त्यांनी माझ्याविरुद्ध
पाप केले हेही ते कदाचित् मान्य करतील. 41मी,
त्यांच्याविरुद्ध होऊन, त्यांना त्यांच्या शत्रूंच्या देशात आणले
असे ते कबूल करतील आणि त्यांचे
अशुद्ध-बेसुनत-हृदय लीन होऊन ते आपल्या
पापाबद्दलची शिक्षा मान्य करतील. 42तेव्हा मग मी याकोब,
इसहाक व अब्राहाम ह्यांच्याशी केलेल्या कराराची आठवण
करीन व त्या देशाचीही आठवण करीन.

43"त्यांचा देश त्यांच्यावाचून ओस पडेल आणि ओस
असेपर्यंत तो आपल्या शब्बाथांचा विसावा उपभोगीत राहील;
मग जगूनवाचून राहिलेले आपल्या पापाबद्दलची शिक्षा
मान्य करतील; त्यांनी माझ्या नियमांना व विधींना तुच्छ
लेखून ते पाळले नाहीत म्हणून त्यांच्या दुष्टतेबद्दल त्यांना
शिक्षा झाली हे त्यांना समजेल. 44त्यांनी खरोखर पाप
केले; पण त्यांच्यापासून मी आपले तोंड फिरवणार नाही;
ते आपल्या शत्रूंच्या देशात असले तरी मी त्यांचे ऐकेन.
मी त्यांना समूळ नष्ट करणार नाही. त्यांच्याशी केलेला
करार मी मोडणार नाही, कारण मी परमेश्वर त्यांचा देव
आहे! 45त्यांच्याकरिता मी त्यांच्या वाडवडिलांशी केलेल्या
कराराची आठवण करीन, कारण मी त्यांचा देव व्हावे
म्हणून त्यांच्या वाडवडिलांना मिसर देशातून बाहेर आणले
आणि हे सर्व इतर राष्ट्रांनी पाहिले आहे. मी परमेश्वर
आहे!"

46हे विधी, नियम व निर्बंध परमेश्वराने इस्राएल
लोकांसाठी दिले. हे नियम परमेश्वर व इस्राएल लोक
ह्यांच्यामधील करार आहे. हे नियम परमेश्वराने सीनाय
पर्वतापाशी मोशेला दिले ते हेच होत मोशेने हे नियम
इस्राएल लोकांना सांगितले.

### नवस महत्वाचे आहेत

27 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"इस्राएल लोकांना
सांग: एखाद्या माणसाने परमेश्वराला मानवाचा
विशेष नवस केला तर त्या माणसाचे मोल याजकाने
येणेप्रमाणे ठरवावे: 3वीस ते साठ वर्षे वयाच्या आतील
पुरुषाचे मोल पवित्रस्थानातील शेकेलाच्या चलनाप्रमाणे
पन्नास शेकेल रुपे असावे, 4आणि त्याच वयाच्या स्त्रीचे
मोल तीस शेकेल रुपे असावे; 5मुलगा पांच वर्षे ते वीस
वर्षांच्या आतील वयाचा असेल तर त्याचे मोल वीस शेकेल
रुपे व मुलीचे दहा शेकेल रुपे असावे. 6मुलगा एक
महिन्याहून मोठा व पांचवर्षाहून लहान असला तर त्याचे
मोल पांच शेकेल रुपे व मुलीचे तीन शेकेल रुपे असावे.
7साठ वर्षे वा साठ वर्षाहून अधिक वर्षे वयाच्या पुरुषाचे
मोल पंधरा शेकेल रुपे व स्त्रीचे दहा शेकेल रुपे असावे.

8"परंतु तू ठरविलेले मोल न देण्याइतका कोणी गरीब
असेल तर त्याला याजकापुढे आणावे; आणि याजकाने
नवस करणाऱ्याच्या ऐपतीप्रमाणे नवसाच्या मानवाचे मोल
ठरवावे.

### परमेश्वराला द्यावयाच्या देणग्या

[9]“काही पशू परमेश्वराला अर्पण करता येतात त्यापैकी कोणी एखाद्या पशूचा नवस केला तर परमेश्वराला अर्पावयाचा असा प्रत्येक प्राणी पवित्र समजावा. [10]त्याने तो बदलू नये किंवा त्याच्या ऐवजी दुसरे काही देण्याचा प्रयत्न करु नये. त्याने वाईट पशू ऐवजी चांगला किंवा चांगल्याबद्दल वाईट असा बदल करू नये त्याने जर तसा बदल करण्याचा प्रयत्न केला तर मग ते दोन्ही पवित्र होतील व दोन्ही परमेश्वराच्या मालकीचे होतील.

[11]“काही पशू परमेश्वराला अर्पण करावयास योग्य नसतात—ते अशुद्ध असतात—कोणी अशुद्ध पशूंपैकी एखादा परमेश्वराला अर्पण करावयास आणला तर त्याने तो याजकाकडे आणावा. [12]तो पशू चांगला असो किंवा वाईट असो याजकाने त्याचे मोल ठरवावे; याजक ठरवील ते त्याचे मोल समजावे. [13]पण नवस करणाऱ्याला तो पशू सोडवावयाचा असला तर त्या किंमतीत आणखी एकपंचमांश भर घालून त्याने तो सोडवावा.

### घराचे मोल

[14]“एखाद्याने आपले घर परमेश्वराला वाहिले तर ते चांगले असो किंवा वाईट असो याजकाने त्या घराचे मोल ठरवावे; याजक ठरवील ते त्याचे मोल समजावे. [15]परंतु घर वाहणाऱ्याला ते सोडवून परत घ्यावयाचे असेल तर त्याने, याजकाने ठरविलेल्या किंमतीत एकपंचमांश भर घालून ते सोडवावे; मग ते घर त्याचे होईल.

### मालमत्तेचे मोल

[16]“एखाद्याने आपल्या शेतीचा काही भाग परमेश्वराला वाहिला तर त्यात किती बियाणे पेरले जाते त्यावरुन त्याचे मोल ठरेल; एक होमर* सुमारे सहा बुशेल जवासाठी पन्नास शेकेल* रुपे अशी किमत असावी. [17]योबेल वर्षापासून त्याने आपले शेत देवाला वाहिले तर याजक ठरविल त्याप्रमाणे त्याचे मोल होईल. [18]परंतु योबेल वर्षानंतर जर एखाद्याने आपले शेत परमेश्वराला वाहिले तर पुढच्या योबेल वर्षापर्यंत जितकी वर्षे उरली असतील तितक्या वर्षांचा हिशोब करुन याजकाने त्याचे नक्की मोल ठरवावे. [19]शेत वाहणाऱ्याला, मोल देऊन आपले शेत सोडवून परत घ्यावयाचे असले तर त्याच्या ठरविलेल्या किंमतीत एकपंचमांश भर घालून त्याने ते सोडवावे. मग ते शेत परत त्याच्या मालकीचे होईल. [20]त्याने ते शेत सोडविले नसेल किंवा दुसऱ्या कोणाला ते विकले असेल तर त्या पहिल्या मालकाला ते सोडवून घेता येणार नाही; [21]पण योबेल वर्षी ते शेत परत विकत घेतले नाही तेव्हा पूर्णपणे समर्पित केलेल्या शेताप्रमाणे परमेश्वराकरिता ते पवित्र ठरेल, अर्थात ते याजकाचे कायमचे वतन होईल! [22]“स्वत:च्या कुळाचे नसलेले म्हणजे एखाद्याने स्वत: खरेदी केलेले शेत त्याला परमेश्वराकरिता अर्पण करावयाचे असेल, [23]तर याजकाने योबेल वर्षापर्यंत त्याचा हिशोब करावा व जितके मोल ठरेल तितके परमेश्वराकरिता पवित्र समजून त्याने त्याच दिवशी ते देऊन टाकावे. [24]ज्याच्याकडून त्याने ते शेत पहिल्यांदा खरेदी केलेले असेल म्हणजे ज्याच्या वतनाचे ते असेल त्याच्या ताब्यात ते योबेल वर्षी परत जावे.

[25]“मोल देताना ते पवित्रस्थानातील चलनाप्रमाणे ठरविलेले असावे. शेकेल म्हणजे वीस गेरा*

### पशूंचे मोल

[26]“लोकांना गुरेढोरे, शेरडेमेंढरे विशेष देणग्या म्हणून अर्पण करता येतील परंतु त्यापैकी प्रथम जन्मलेला नर परमेश्वराचा ठरलेला आहेच; त्याला, ते विशेष भेट म्हणून वाहू शकणार नाहीत. [27]तो प्रथम जन्मलेला नर अशुद्ध पशूंपैकी असला तर याजकाने ठरविलेल्या मोलात एकपंचमांश भर घालून अर्पण करणाऱ्याने तो सोडवावा; पण तो सोडवीत नसला तर याजकाने ठरविलेल्या किंमतीला तो विकून टाकावा.

### विशेष देणगी

[28]“लोक परमेश्वराला काही विशेष देणगी देतात, ती देणगी माणसे, पशू किंवा वतनांची शेते ह्या प्रकारची असेल; ती देणगी परमेश्वराचीच आहे; ती सोडवून परत घेता येणार नाही किंवा विकता येणार नाही.

[29]“ती वाहिलेली विशेष देणगी मानव प्राण्यांपैकी असेल तर त्या मानवाला सोडवून घेता येणार नाही; त्याचा अवश्य वध करावा.

[30]“भूमीच्या सर्व उत्पन्नाचा एकदशांश भाग म्हणजे शेतातील सर्व उपज आणि झाडे वेली ह्यांची फळे ह्यांचा एकदशांश भाग परमेश्वराकरिता आहे. [31]म्हणून एखाद्याला आपला एकदशांश भाग सोडवून घ्यावयाचा असला तर त्याच्या किंमतीत एकपंचमांशाची भर घालून त्याने तो सोडवावा.

[32]“गुरेढोरे किंवा शेरडेमेंढरे अशा प्रत्येक दहांपैकी एक पशू याजक घेईल. प्रत्येक दहावे जनावर परमेश्वराचे असेल. [33]निवडलेला पशू चांगला आहे किंवा वाईट आहे ह्या विषयी त्याच्या धन्याने चिंता करु नये किंवा त्याला बदलू नये; त्याने बदल करावयाचे ठरविले तर मग तो पशू व त्याच्या बदलीचा पशू असे दोन्ही पशू परमेश्वराकरिता पवित्र होतील; किंमत देऊन ते सोडविता येणार नाहीत.” [34]परमेश्वराने इस्राएल लोकांकरिता सीनायपर्वतावर मोशेला दिलेल्या आज्ञा ह्याच होत.

---

**होमर** 6 बुशेल एवढे एक कोरडे माप.

**शेकेल** किंवा औसाच्या 2/5.

**एक गेरा** म्हणजे एकपन्नासांश औंस.

# गणना

### मोशे इस्राएल लोकांची शिरगणती करतो

1 इस्राएल लोक मिसर देशातून निघाल्यावर दुसऱ्या वर्षाच्या दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी सीनाय रानातील दर्शनमंडपात परमेश्वर मोशेशी बोलला; तो म्हणाला, 2“सर्व इस्राएल लोकांची शिरगणती कर; प्रत्येक पुरुषाचे नांव, त्याचे कूळ आणि त्याच्या वाडवडिलांचे घराणे ह्यांच्यासह त्यांच्या नावांची यादी कर. 3वीस वर्षांचे किंवा त्याहून अधिक वयाचे जितके पुरुष युद्धास लायक असतील त्या सर्वांची त्यांच्या दलाप्रमाणे तू आणि अहरोन मिळून गणती करा. 4प्रत्येक वंशातला एकजण तुम्हाला मदत करील तो त्या वंशाचा प्रमुख असेल. 5तुमच्याबरोबर राहून तुम्हाला मदत करणाऱ्यांची नावे ही:

रऊबेन वंशातला शदेयुराचा मुलगा अलीसूर;
6 शिमोन वंशातला सुरीशाद्दैचा मुलगा शलूमियेल;
7 यहुदा वंशातला अम्मीनादाबाचा मुलगा नहशोन;
8 इस्साखार वंशातला सुवाराचा मुलगा नथनेल;
9 जबुलून वंशातला हेलोनाचा मुलगा अलीयाब;
10 योसेफ पुत्राच्या वंशात म्हणजे एफ्राइम वंशातला अम्मीहूदाचा मुलगा अलीशामा, आणि मनश्शे वंशातला पदाहसुराचा मुलगा गमलीयेल.
11 बन्यामीन वंशातला गदोनीचा मुलगा अबीदान;
12 दान वंशातला आम्मीशद्दैचा मुलगा अहीएजर;
13 आशेर वंशातला आक्रानाचा मुलगा पागीयेल;
14 गाद वंशातला दगुवेलाचा मुलगा एल्यासाप;
15 नफताली वंशातला एनानाचा मुलगा अहीरा;”

16हे सर्वजण आपापल्या घराण्याचे प्रमुख होते; लोकांनीही त्यांना आपापल्या कुळाचे सरदार म्हणून निवडले. 17प्रमुख म्हणून निवडलेल्या ह्या सर्वांना मोशे व अहरोन ह्यांनी आपल्याबरोबर घेतले; 18आणि त्यांनी सर्व इस्राएल लोकांना एकत्र जमविले; मग त्यांच्या कुळांप्रमाणे व त्यांच्या घराण्यांप्रमाणे त्यांची नोंद करण्यात आली. वीस किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्यांची यादी करण्यात आली. 19परमेश्वराने मोशेला आज्ञा दिली होती अगदी त्याप्रमाणे त्याने सीनाय रानात त्यांची गणती केली.

20इस्राएलाचा ज्येष्ठ पुत्र–थोरला मुलगा–रऊबेन ह्याच्या वंशाचे लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी त्यांची गणना करण्यात आली. ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्यापेक्षा अधिक वयाचे असून सैन्यात दाखल होण्यास लायक होते त्यांची यादी करण्यात आली; त्यांची यादी घराणी आणि कुळे ह्यांच्याप्रमाणे करण्यात आली. 21ती मोजदाद एकूण शेहेचाळीस हजार पाचशे भरली.

22शिमोन वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्यापेक्षा अधिक वयाचे असून सैन्यात दाखल होण्यास लायक होते त्यांची यादी करण्यात आली; 23ती मोजदाद एकूण एकुणसाठ हजार तीनशे भरली.

24गाद वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्यापेक्षा अधिक वयाचे असून सैन्यात दाखल होण्यास लायक होते त्यांची यादी करण्यात आली; 25ती मोजदाद एकूण पंचेचाळीसहजार सहाशे पन्नास भरली.

26यहुदा वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्यापेक्षा अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक होते, त्या सर्वांची नोंद करण्यात आली; 27ती मोजदाद एकूण चौऱ्याहत्तर हजार सहाशे भरली.

28इस्साखार वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्याहून अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक होते त्या सर्वांची नोंद करण्यात आली; 29ती मोजदाद एकूण चोपन्न हजार चारशे भरली.

30जबुलून वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्याहून अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक होते त्या सर्वांची नोद करण्यात आली; 31ती मोजदाद एकूण सत्तावन्न हजार चारशे भरली.

32योसेफ पुत्रांपैकी एफ्राइम वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्याहून अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक होते त्या सर्वांची नोंद करण्यात आली; 33ती मोजदाद एकूण चाळीस हजार पाचशे भरली.

34मनश्शे वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे

व त्याहून अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास
लायक होते त्या सर्वांची नोंद करण्यात आली; 35ती मोजदाद
एकूण बत्तीस हजार दोनशे भरली. 36बन्यामीन वंशातील
लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी
ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्याहून अधिक
वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक होते त्या
सर्वांची नोंद करण्यात आली; 37ती मोजदाद एकूण पस्तीस
हजार चारशे भरली.

38दान वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या
वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे
व त्याहून अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास
लायक होते त्या सर्वांची नोंद करण्यात आली; 39ती मोजदाद
एकूण बासष्ट हजार सातशे भरली.

40आशेर वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या
वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे
व त्याहून अधिक वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास
लायक होते त्या सर्वांची नोंद करण्यात आली; 41ती मोजदाद
एकूण एकेचाळीस हजार पाचशे भरली. 42नफताली
वंशातील लोक म्हणजे त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची
घराणी ह्याप्रमाणे जितके पुरुष वीस वर्षांचे व त्याहून अधिक
वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक होते त्या
सर्वांची नोंद करण्यात आली. 43ती मोजदाद एकूण त्रेपन्न
हजार चारशे भरली. 44मोशे, अहरोन आणि इस्राएलांच्या
प्रत्येक घराण्यातील एक प्रमुख असे बारा नेते, ह्यांनी ही
मोजदाद केली. 45त्यांनी वीस वर्षांचे व त्याहून अधिक
वयाचे असून सैन्यात सेवा करण्यास लायक असलेल्या
प्रत्येक पुरुषाची त्याच्या वाडवडिलांच्या घराण्याप्रमाणे नोंद
केली. 46ती मोजदाद एकूण सहा लाख तीन हजार पाचशे
पन्नास भरली.

47इस्राएल लोकांबरोबर लेवी कुळांच्या दलातील
लोकांची गणती करण्यात आली नाही. 48परमेश्वराने
मोशेला सांगितले होते की, 49“लेवी कुळांच्या दलातील
लोकांची गणती करु नको किंवा इतर इस्राएल लोकांच्या
गणतीत त्यांचा समावेश करुं नको; 50लेवी लोकांना सांग
की आज्ञापटाच्या पवित्र निवास मंडपाबद्दल ते जबाबदार
आहेत; पवित्र निवासमंडप व त्याबरोबर त्यातील सर्व
सामानाची त्यांनी काळजी घ्यावी. पवित्रनिवास मंडप व
त्यातील सर्व सामान त्यांनी वाहून न्यावे. त्यांनी आपले
तंबू पवित्र निवास मंडपाभोवती ठोकावेत आणि त्याची
निगा राखावी. 51जेव्हा जेव्हा पवित्र निवास मंडप
हलवावयाचा असेल तेव्हा तेव्हा तो लेवी लोकांनीच उतरावा
व तो उभारताना लेवी लोकांनीच तो उभा करावा; त्याची
निगा राखणे हे त्यांचेच काम आहे; लेवी कुळापैकी नसलेला
कोणी जर पवित्रनिवास मंडपाच्या सेवेचा प्रयत्न करु लागला
तर त्याला जिवे मारावे. 52इस्राएल लोकांपैकी प्रत्येकाने
आपापले तंबू आपापल्या दलाप्रमाणे आपापल्या छावणीत
आपापल्या कुळाच्या निशाणाजवळ ठोकावेत.
53परंतु लेवी लोकांनी आपले तंबू पवित्रनिवास मंडपाच्या
सभोंवती ठोकावेत; त्यांनी आज्ञापट असलेल्या पवित्र
निवासमंडपाचे रक्षण करावे म्हणजे इस्राएल लोकांवर
संकट येणार नाही.” 54परमेश्वराने मोशेला आज्ञा
दिल्याप्रमाणे इस्राएल लोकांनी सर्व काही केले.

## छावणीची व्यवस्था

2 परमेश्वर, मोशे व अहरोन यांना म्हणाला, 2“इस्राएल
लोकांनी दर्शनमंडपाभोवती आपापले तंबू ठोकावेत;
प्रत्येक दलाला आपले स्वत:चे निशाण असावे आणि
प्रत्येकाने आपापल्या दलाच्या निशाणाजवळ आपला तंबू
ठोकावा.

3“यहुदावंशाच्या छावणीचे निशाण उगवत्या सूर्याच्या
दिशेला म्हणजे पूर्व दिशेला असावे. यहुदावंशातील सर्व
लोकांनी आपली छावणी त्या निशाणाजवळ ठोकावी.
अम्मीनादाबाचा मुलगा नहशोन हा यहुदावंशाचा प्रमुख
सरदार असावा. 4त्याच्या दलात चौऱ्याहत्तर हजार सहाशे
लोक होते.

5“इस्साखार वंशाच्या लोकांनी यहुदावंशाच्या छावणी
शेजारी आपली छावणी ठोकावी. सुवाराचा मुलगा नथनेल
हा इस्साखारवंशाचा प्रमुख सरदार असावा. 6त्याच्या दलात
चोपन्न हजार चारशे लोक होते.

7“जबुलून वंशाच्या लोकांनीही यहुदावंशाच्या
छावणीनंतर जवळच आपली छावणी उभारावी. हेलोनाचा
मुलगा अलीयाब हा जबुलून वंशाचा प्रमुख सरदार असावा.
8त्याच्या दलात सत्तावन्न हजार चारशे लोक होते.

9“यहुदावंशाच्या छावणीत एकूण एक लाख शहाऐंशी
हजार चारशे लोक होते. ते त्यांच्या कुळाप्रमाणे विभागलेले
होते. इस्राएल लोकांनी एका ठिकाणाहून दुसऱ्या
ठिकाणाकडे प्रवास करिताना यहुदावंशाच्या दलाने सर्वात
पुढे चालावे.

10“पवित्रनिवास मंडपाच्या दक्षिण बाजूस रऊबेन वंशाच्या
छावणीचे निशाण असावे. प्रत्येक गटाने आपापल्या
निशाणाजवळ आपली छावणी उभारावी. शदेउराचा मुलगा
अलीसूरहा रऊबेन वंशाचा प्रमुख सरदार असावा. 11त्याच्या
दलात शेहेचाळीस हजार पाचशे लोक होते.

12“शिमोन वंशातल्या कुळांनी रऊबेन वंशाच्या छावणी
शेजारी आपली छावणी उभारावी. सुरीशादैचा मुलगा
शलूमीयेल हा शिमोन वंशाचा प्रमुख सरदार असावा.
13त्याच्या दलात एकोणसाठ हजार तीनशें लोक होते.

14“गादवंशाच्या कुळांनीही रऊबेन वंशाच्या छावणी
जवळ आपली छावणी उभारावी. रगुवेलाचा मुलगा
एल्यासाप हा गाद वंशाचा प्रमुख सरदार असावा.
15त्याच्या दलात पंचेचाळीस हजार सहाशें पन्नास लोक
होते.

16“रऊबेनच्या छावणीत कुळांप्रमाणे एकंदर एक लाख
एकावन्न हजार चारशें पन्नास लोक होते. इस्राएल लोकांचा

मुक्काम हलविताना रऊबेनच्या दलातील लोकांनी दुसऱ्या
क्रमांकावर चालावे.
17"त्यानंतर इस्राएलचे लोक हालल्यावर लेवीच्या
लोकांनी मुक्काम हलवावा (यहूदा आणि रऊबेन नंतर)
दर्शनमंडप त्यांच्याबरोबर असावा व तो इतर छावण्याच्या
लोकांच्या मध्ये असावा. प्रवास करताना छावण्या ज्या
क्रमाने निघतात त्याच क्रमाने मुक्काम करताना त्यांनी
आपापल्या छावण्या ठोकाव्यात. प्रत्येक माणसाने आपल्या
कुळाच्या निशाणाजवळ राहावे.
18"एफ्राइम वंशाच्या छावणीचे निशाण पश्चिम बाजूस
असावे व त्याच्या कुळातल्या लोकांनी आपली छावणी
तेथे उभारावी. अम्मीहुदाचा मुलगा अलीशामा एफ्राइम
वंशाचा प्रमुख सरदार असावा. 19त्याच्या दलात चाळीस
हजार पाचशे लोक होते.
20"मनश्शेवंशाच्या दलाने एफ्राइम वंशाच्या छावणी
शेजारी आपली छावणी ठोकावी. पदासुराचा मुलगा
गमलीयेल हा मनश्शेवंशाचा प्रमुख सरदार असावा.
21त्याच्या दलात बत्तीस हजार दोनशें लोक होते.
22"बन्यामीन वंशाच्या दलानेही एफ्राइमाच्या दलाशेजारी
आपली छावणी ठोकावी. बन्यामीन वंशाचा प्रमुख सरदार
गिदोनीचा मुलगा अबीदान हा असावा. 23त्याच्या दलात
पस्तीस हजार चारशें लोक होते.
24"एफ्राइम वंशाच्या छावणीत एकूण एक लाख आठ
हजार शंभर लोक होते. इस्राएल लोकांचा मुक्काम
हलविताना एफ्राइम वंशाचा तिसरा क्रमांक असावा.
25"दान वंशाच्या छावणीचे निशाण उत्तरेकडील बाजूस
असावे. त्यांच्या कुळातल्या लोकांनी आपल्या दलाची
छावणी तेथे उभारावी. अम्मीशादैचा मुलगा अहीयेजर हा
दानवंशाचा सरदार असावा. 26त्याच्या दलात बासष्ट हजार
सातशें लोक होते.
27"आशेर वंशाच्या दलाने दान वंशाच्या छावणी शेजारी
आपली छावणी उभारावी. आक्रानाचा मुलगा पगीयेल हा
आशेर वंशाचा सरदार असावा. 28त्याच्या दलात एकेचाळीस
हजार पाचशे लोक होते.
29"नफताली वंशाच्या कुळांनीही दान वंशाच्या
छावणीजवळ आपली छावणी उभारावी. एनानाचा मुलगा
अहीरा हा नफताली वंशाचा पुढारी असावा. 30त्याच्या
दलात त्रेपन्न हजार चारशें लोक होते.
31"दान वंशाच्या छावणीत एक लाख सत्तावन्न हजार
सहाशें लोक होते. इस्राएल लोकांचा तळ ठिकठिकाणाहून
हलविताना दानवंशाच्या कुळांनी सर्वात शेवटी चालावे.
प्रत्येक माणसाने आपल्या कुळाच्या निशाणाजवळ
राहावे."
32अशी ही इस्राएल लोकांची मंडळी होती. त्यांच्या वंशात
त्यांच्या कुळाप्रमाणे व त्यांच्या वाडवडिलांच्या घराण्याप्रमाणे
त्यांची गणती केली तेव्हा त्यांची एकूण संख्या सहा लाख
तीन हजार पाचशें पन्नास होती. 33मोशेने परमेश्वराच्या
आज्ञेप्रमाणे इस्राएल लोकांबरोबर लेवी लोकांची गणती
केली नाही.
34तेव्हा परमेश्वराने मोशेला दिलेल्या आज्ञाप्रमाणे
सर्वकाही इस्राएल लोकांनी केले. प्रत्येक दलाने आपल्या
निशाणापाशी तळ दिला आणि प्रत्येक जण आपापल्या
कुळात व आपापल्या वाडवडिलांच्या घराण्यांच्या छावणीत
राहिला.

## अहरोनाचे कुटुंब याजक घराणे

3 परमेश्वर सीनाय पर्वतावर मोशेशी बोलला त्याकाळची
अहरोन व मोशे ह्यांची वंशावळ अशी:
2अहरोनाला चार मुलगे होते. नादाब हा थोरला मुलगा,
त्यानंतरचे अबीहू, एलाजार व इथामार. 3अहरोनाचे हे
मुलगे याजक ह्यां नात्याने परमेश्वराची पवित्र सेवा
करण्यासाठी निवडले होते व त्यांचा अभिषेक करण्यात
आला होता;
4परंतु नादाब व अबीहू परमेश्वराची सेवा करिताना
सीनाय रानात मरण पावले. त्यांनी परमेश्वराकरिता यज्ञ
अर्पण केला परंतु त्यासाठी त्यांनी परमेश्वराला मान्य
नसलेल्या प्रकारे अग्नीचा उपयोग केला. त्यांना मुलगे
नव्हते म्हणून एलाजार व इथामार हे आपला बाप अहरोन
हयात असताना याजक होऊन परमेश्वराची सेवा करीत
असत.

## लेवी याजकांचे मदतनीस

5परमेश्वर मोशेला म्हणाला, 6"लेवी वंशातील सर्व
लोकांना अहरोन याजकाकडे आण म्हणजे ते त्याचे
मदतनीस होतील. 7अहरोन दर्शनमंडपात सेवा करताना
लेवी लोक त्याला मदत करतील आणि इस्राएल लोक
परमेश्वराची सेवा करण्यास दर्शनमंडपात येतील तेव्हा
त्या लोकांना मदत करतील. 8इस्राएल लोकांनी
दर्शनमंडपातील सर्व वस्तूचे रक्षण करावे. ते त्यांचे काम
आहे. परंतु त्या वस्तूची निगा राखण्यामुळे लेवी लोक
इस्राएल लोकांची मदत करतील. पवित्रनिवास मंडपात
त्यांनी ह्याप्रकारे सेवा करावी.
9"लेवी लोकांना अहरोन व त्याचे मुलगे ह्यांच्या ताब्यात
दे. त्यांना सर्व इस्राएल लोकांनी अहरोन व त्याचे मुलगे
ह्यांची मदत करण्यासाठी निवडले आहे.
10"अहरोन व त्याचे मुलगे ह्यांची याजक म्हणून नेमणूक
कर. त्यांनी याजक म्हणून आपले सेवेचे काम करावे.
कोणी दुसरा पवित्र वस्तूंच्याजवळ येऊन सेवा करण्याचा
प्रयत्न करु लागला तर त्याला जिवे मारावे."
11परमेश्वर मोशेला आणखी म्हणाला, 12"इस्राएल
लोकांतील प्रथम जन्मलेल्यांच्या ऐवजी मी आता माझी
सेवा करण्यासाठी लेवी वंशातील लोकांना निवडून घेत
आहे. लेवी माझेच असतील तेव्हा आता इतर इस्राएल

लोकांना त्यांचे प्रथम जन्मलेले मुलगे मला द्यावे लागणार
नाहीत.
13“जेव्हा तुम्ही मिसर देशात होता तेव्हा त्या मिसरच्या
लोकांचे प्रथम जन्मलेले मुलगे मी मारुन टाकले. त्याच
दिवशी इस्राएल लोकांतील पुरुषांपैकी व पशूपैकी प्रथम
जन्मलेले सर्व मी आपणासाठी घेतले. ते माझेच आहेत.
परंतु तुमची प्रथम जन्मलेली मुले तुमचीच राहातील व
फक्त लेवी माझे होतील. मी परमेश्वर आहे.”
14परमेश्वर सीनाय रानात पुन्हा मोशेशी बोलला. तो
म्हणाला, 15“लेवी वंशातील जितके पुरुष व एक महिन्याचे
किंवा त्याहून अधिक वयाची मुले असतील त्यांची, त्यांच्या
कुळाप्रमाणे व त्यांच्या वाडवडिलांच्या घराण्याप्रमाणे गणती
कर.” 16म्हणून मोशेने देवाची आज्ञा मानून त्यांची गणती
केली.
17लेवीला गेर्षोन, कहाथ व मरारी नांवाचे तीन मुलगे
होते. 18प्रत्येक मुलगा अनेक कुळांचा पुढारी होता. गेर्षोनाचे
मुलगे त्यांच्या कुळाप्रमाणे; लिब्नी व शिमी.
19कहाथाचे मुलगे त्यांच्या कुळाप्रमाणे हे: अम्राम,
इसहार, हेब्रोन व उजीयेल. 20मरारीचे मुलगे त्यांच्या
कुळाप्रमाणे हे:माहली व मूशी. ही लेवी कुळातील घराणी
होत.
21गेर्षोनापासून लिब्नी व शिमी ही कुळे चालू झाली ही
गेर्षोनी कुळे. 22ह्या दोन कुळात एक महिन्याचे व त्याहून
अधिक वयाचे मुलगे व पुरुष मिळून सात हजार पाचशें
होते. 23गेर्षोनी कुळांनी त्यांना सांगितल्याप्रमाणे पश्चिमेच्या
बाजूस पवित्र निवासस्थानाच्या मागे आपले डेरे ठोकले.
24लायेलाचा मुलगा एल्यासाप हा गेर्षोनी घराण्याचा सरदार
होता.
25दर्शन मंडपातील पवित्र निवास मंडप, बाह्य मंडप,
आणि आच्छादन यांची निगा राखण्याचे काम गर्षोनी
लोकांवर सोपविण्यात आले. दर्शन मंडपाच्या प्रवेश
द्वारावरील पडद्याचीही निगा त्यांच्यावर सोपवली होती.
26पवित्र निवास मंडप व वेदी ह्यांच्या सभोंवतीच्या अंगणाचे
पडदे, अंगणाच्या दाराचा पडदा, त्यांच्यासाठी लागणारे तणावे
व इतर सामान ह्यांची निगा राखण्याची जबाबदारी त्यांनी
घेतली.
27कहाथापासून अम्राम, इसहार, हेब्रोन व उजीयेल ही
कुळे चालू झाली; ही कहाथी कुळे. 28ह्या कुळात एक
महिन्याचे व त्याहून अधिक वयाचे मुलगे व पुरुष आठ
हजार सहाशे होते. पवित्रस्थळातील वस्तूची निगा राखण्याचे
काम कहाथी कुळांना देण्यात आले. 29त्यांना पवित्र निवास
मंडपाचा दक्षिणेकडचा भाग देण्यात आला, तेव्हा तेथे
त्यांनी आपली छावणी उभारली.
30उजीयेलाचा मुलगा अलीसापान हा कहाथी घराण्याचा
पुढारी होता. 31पवित्र कराराचा कोश, मेज, दीपवृक्ष, वेद्या,
पवित्र मंडपात सेवेसाठी असलेली पात्रे, पडदा व इतर सर्व
सामान ह्यांची देखभाल करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली.
32अहरोनाचा मुलगा एलाजार याजक हा लेवी लोकांच्या
पुढऱ्यांचा पुढारी होता. पवित्र वस्तूचे रक्षण करण्याचे
काम ज्यांच्यावर सोपविले होते त्या सर्वांवर देखरेख
करणारा तो प्रमुख होता.
33मरारीपासून माहली व मुशी ही घराणी चालू झाली
ही मरारी कुळे. 34ह्या कुळात एक महिन्याचे व त्याहून
अधिक वयाचे मुलगे व पुरुष सहा हजार दोनशें होते.
35अबीहाईलाचा मुलगा सूरीएल हा मरारी घराण्याचा पुढारी
होता. ह्या कुळांना पवित्र निवास मंडपाच्या उत्तरेकडचा
भाग दिला होता तेव्हा त्यांनी तेथे आपली छावणी ठोकली.
36मरारीवंशातील लोकांना पवित्र निवास मंडपाच्या फळ्या
व त्यांचे सर्व अडसर, खांब व उथळ्या आणि पवित्र
निवास मंडपाच्या फळ्यांशी निगडीत अशा सर्व सामानाची
निगा राखण्याचे काम देण्यात आले; 37तसेच पवित्र निवास
मंडपाच्या अंगणासभोंवतीचे सर्व खांब, त्यांच्या
बैठका-उथळ्या-मेखा आणि तणाव्याचे दोर ह्यांची ही
देखभाल करण्याचे काम त्यांनी घेतले.
38मोशे, अहरोन व त्याचे मुलगे ह्यांची छावणी
दर्शनमंडपाच्या समोर असलेल्या पवित्र निवास मंडपाच्या
पूर्वेस होती. इस्राएल लोकांच्यावतीने पवित्र
निवासस्थानाच्या रक्षणाचे काम त्यांना देण्यात आले. सर्व
इस्राएलाकरिता त्यांनी हे काम केले. कोणी दुसरा पवित्र
निवासस्थानाजवळ आल्यास त्याला जिवे मारावे असा त्यांना
आदेश होता.
39लेवी वंशातील एक महिन्याचे व त्याहून अधिक
वयाचे मुलगे व पुरुष ह्यांची गणती करण्यास परमेश्वराने
मोशे व अहरोन ह्यांना सांगितले, तेव्हा पुरुष लेवीयांची
एकूण संख्या बावीस हजार भरली.

## लेवी लोक इस्राएलांच्या प्रथम जन्मलेल्या मुलांची जागा घेतात

40परमेश्वर मोशेला म्हणाला, “इस्राएल लोकांपैकी
जितके प्रथम जन्मलेले, एक महिन्याचे व त्याहून अधिक
वयाचे मुलगे व पुरुष असतील त्यांच्या नांवांची एक यादी
तयार कर; 41आता मी इस्राएलाचे प्रथम जन्मलेले मुलगे
व पुरुष घेणार नाही, त्या ऐवजी मी परमेश्वर, लेवी
वंशाचे लोक घेईन, तसेच इस्राएल लोकांच्या प्रथम
जन्मलेल्या पशूंच्या ऐवजी लेवी लोकांच्या पशूंचे प्रथम
जन्मलेले घेईन.”
42तेव्हा मोशेने परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले. त्याने
इस्राएल लोकांच्या प्रथम जन्मलेल्या सर्वांची गणती केली.
43मोशेने प्रथम जन्मलेले एक महिन्याचे व त्याहून अधिक
वयाचे जे इस्राएल मुलगे व पुरुष होते त्यांच्या नांवांची
यादी केली. त्या यादीत बावीस हजार दोनशें त्र्याहत्तर
नांवे होती.
44परमेश्वर मोशेला आणखी म्हणाला, 45“मी परमेश्वर
तुला अशी आज्ञा देतो की इस्राएलांच्या प्रथम जन्मलेल्या

ऐवजी तू लेवी लोक घे; आणि इस्राएलांच्या पशू ऐवजी मी लेवी लोकांचे पशू घेतो, कारण लेवी माझे लोक आहेत. 46लेवी लोक बावीस हजार आहेत आणि इस्राएल लोकांच्या कुळात प्रथम जन्मलेले बावीस हजार दोनशे त्र्याहत्तर आहेत. म्हणजे इस्राएलातील प्रथम जन्मलेल्यांपैकी दोनशे त्र्याहत्तर मुलगे अधिक शिल्लक राहातात. 47त्यांना सोडवून घेण्यासाठी प्रत्येकाकडून पवित्र स्थानातील अधिकृत चलनाप्रमाणे पाच शेकेल चांदी प्रत्येकी 273 जणांसाठी घे. (एक शेकेल म्हणजे वीस गेरा) इस्राएल लोकांकडून ही चांदी घे, 48व ती अहरोन व त्याच्या मुलांना दे. इस्राएल लोकांनी सोडविलेल्या दोनशें त्र्याहत्तर प्रथम जन्मलेल्या लोकांनी दिलेले ते सोडवणुकीचे पैसे होत."

49तेव्हा मोशेने त्या दोनशे त्र्याहत्तर लोकांकडून पैसे गोळा केले. ह्या दोनशेत्र्याहत्तर लोकांची जागा घेण्यास लेवी लोकाकडे कोणी उरले नव्हते. 50इस्राएलांच्या प्रथम जन्मलेल्या ह्या लोकांकडून अधिकृत पवित्र स्थानातील चलनाप्रमाणे मोशेने एकूण एक हजार तीनशें पासष्ट शेकेल चांदी गोळा केली. 51परमेश्वराने सांगितलेले मोशेने ऐकले व त्याच्या आज्ञेप्रमाणे त्याने ती चांदी-ते पैसे-अहरोन व त्याच्या मुलांना दिले.

## कहाथी कुळाची कामे

4 परमेश्वर मोशे व अहरोन यांना म्हणाला, 2"लेवी लोकांपैकी कहाथी कुळांच्या लोकांची त्यांच्या वाडवडिलांच्या घराण्याप्रमाणे गणती कर. (हे लोक लेवीच्या कुळापैकीच होते) 3सैन्यात सेवा केलेल्या तीस ते पन्नास वर्षांच्या पुरुषांची दर्शनमंडपात सेवा करण्यासाठी गणती कर. 4दर्शनमंडपातील परमपवित्र वस्तूची त्यांनी काळजी घ्यावी.

5"इस्राएल लोक आपला तळ नवीन जागी हलवितील तेव्हा अहरोन व त्याच्या मुलांनी दर्शनमंडपात जाऊन अंतरपट खाली काढावा व त्याने पवित्र कराराचा कोश झाकावा. 6मग त्यांनी ह्या सर्वांवर तहशाच्या कातड्याचे आच्छादन घालावे व त्यावर संपूर्ण निळ्या रंगाचे कापड पसरावे व मग कराराच्या कोशाला दांडे लावावे.

7"मग त्यांनी पवित्र मेजावर निळ्या रंगाचे कापड पसरावे व त्यावर तबके, धूपपात्रे, वाट्या व पेयार्पणे ओतण्याचे पेले ठेवावे; त्याचप्रमाणे पवित्र भाकरही त्यावर ठेवावी. 8मग त्या सर्वांवर किरमिजी रंगाचे कापड पसरावे व नंतर ते सर्व तहशाच्या उत्तम कातड्याने झाकून टाकावे; त्यानंतर मेजाला दांडे बसवावे. 9मग त्यांनी दीपवृक्ष आणि त्यावरील दिवे, तसेच दिवे सतत तेवत ठेवण्याकरिता लागणारी सर्व उपकरणे चिमटे, ताटल्या-आणि दिव्यासाठी लागणाऱ्या तेलाची सर्व पात्रे ही सर्व निळ्या कापडाने झाकावी. 10मग ह्या सर्व वस्तू त्यांनी तहशाच्या उत्तम कातड्याने लपेटून घ्याव्यात आणि हे सर्व वाहून न्यावयाच्या खांबांवर त्यांनी ठेवावे.

11"त्यांनी सोन्याच्या वेदीवर निळे कापड पसरावे. ते तहशाच्या उत्तम कातड्याने झाकावे व मग वेदीला वाहून नेण्याचे दांडे बसवावे.

12"मग पवित्र स्थानातील उपासनेसाठी लागणारी सर्व उपकरणे त्यांनी गोळा करावीत व ती निळ्या कापडात गुंडाळावीत; त्यावर तहशाच्या उत्तम कातड्याचे आच्छादन टाकावे आणि मग हे सर्व त्यांनी वाहून नेणाऱ्या चौकटीवर ठेवावे.

13"मग त्यांनी वेदीवरील सर्व राख काढून ती स्वच्छ करावी व तिच्यावर जांभळ्या रंगाचे कापड पसरावे. 14नंतर त्यांनी वेदीच्या सेवेची सर्व उपकरणे म्हणजे अग्निपात्रे, काटे, फावडी व कटोरे हे वेदीचे सर्व सामान गोळा करुन ते वेदीवर ठेवावे; मग तिच्यावर तहशाच्या उत्तम कातड्याचे आच्छादान घालावे व मग तिला वाहून नेण्याचे दांडे बसवावेत.

15"अहरोन व त्याचे मुलगे ह्यांनी पवित्रस्थानातील सर्व पवित्र वस्तूवर आच्छादन टाकण्याचे पूर्ण करावे; मग कहाथी लोकांनी आत जावे आणि त्या वस्तू वाहून नेण्याचे काम सुरु करावे; अशा प्रकारे ते पवित्र वस्तूंना स्पर्श करणार नाहीत आणि मरणार नाहीत.

16"पवित्र निवासमंडप व त्यातील सर्व सामान व उपकरणे म्हणजे पवित्रस्थान व त्यातील दिव्यांना लागणारे तेल, सुगंधी धूप, रोजची अन्नार्पणे व अभिषेकाचे तेल ह्या सर्वांची जबाबदारी अहरोन याजकाचा मुलगा एलाजार ह्याने घ्यावी."

17परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना म्हणाला, 18"सावध राहा! कहाथी लोकांचा नाश होऊदेऊ नका; 19तुम्ही ही कामे करावीत म्हणजे मग कहाथी लोक परम पवित्र स्थानाजवळ जातील तेव्हा ते मरणार नाहीत; अहरोन व त्याचे मुलगे ह्यांनी परमपवित्रस्थानात जाऊन कहाथी लोकांतील एकेका माणसाला त्याने कोणकोणत्यावस्तू वाहून न्याव्यात ते सांगावे व ते दाखववे. 20जर तुम्ही असे करणार नाही तर मग कहाथी लोक कदाचित आत जातील व पवित्र वस्तू त्यांच्या नजरेस पडतील आणि त्यांनी तसे क्षणभर जरी पाहिले तरी ते मरतील."

## गेर्षोनी कुळाची कामे

21परमेश्वर मोशेला म्हणाला, 22"गेर्षोन वंशातील पुरुषांची गणना कर आणि त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्यांच्याप्रमाणे त्यांची यादी कर; 23म्हणजे तीस ते पन्नास वर्षे वयाच्या ज्या लोकांनी सैन्यात सेवा केली आहे अशा लोकांची गणती कर; दर्शनमंडपाची देखभाल करण्याचे काम त्यांच्याकडे राहील.

24"गेर्षोनी कुळांनी करावयाची सेवा व वाहावयाची ओझी ही अशी: 25त्यांनी पवित्र निवासमंडपाचे पडदे, दर्शनमंडप

व त्याचे आच्छादन आणि तलमशा उत्तम कातड्याचे
आच्छादन तसेच दर्शनमंडपाच्या प्रवेशद्वाराचा पडदा,
26पवित्रनिवासमंडप व वेदी ह्यांच्या भोंवतीच्या अंगणाच्या
कनातीचे पडदे, तसेच अंगणाच्या प्रवेश दाराचा पडदा,
सर्व तणावे व त्यांच्याबरोबर लागणारी उपकरणे, हे सर्व
सामान गेर्षोनी कुळांनी वहावे; आणि ह्या सामानासंबंधी जे
काही काम पडेल ते त्यांनी करावे; 27अहरोन आणि
त्याचे मुलगे यांनी झालेल्या सर्व कामाची पाहणी करावी.
त्यांनी गेर्षोनी लोक जे जे वाहून नेतील आणि इतर जे
काही काम करतील त्यावरही नजर ठेवावी. तुम्ही त्यानी
वाहावयाच्या वस्तूची कल्पना त्यांना द्यावी. ते वाहून नेत
असलेल्या वस्तूची जबाबदारी त्यांच्यावर आहे असे त्यांना
सांगावे 28गेर्षोनी कुळातील लोकांची दर्शनमंडपातली ही
सेवा आहे. अहरोन याजकाचा मुलगा इथामार ह्याच्यावर
त्यांच्या कामाची जबाबदारी राहील."

## मरारी कुळाची कामे

29"मरारी वंशजांचीही, त्यांची कुळे व त्यांच्या
वाडवडिलांची घराणी ह्या प्रमाणे गणती कर. 30म्हणजे
तीस ते पन्नास वर्षेच्या वयाच्या दलात सेवा केलेल्या
पुरुषांची गणती कर. हे लोक दर्शनमंडपातील विशेष सेवा
करतील. 31तुम्ही जेव्हा पुढील प्रवासासाठी निघाल तेव्हा
दर्शनमंडपाचा सांगाडा वाहून नेण्याचे काम त्यांनी करावे.
32तसेच सभोंवतीच्या अंगणाचे खांब, उथळ्या, तंबूच्या
मेखा, तणावे आणि अंगणाच्या खांबासाठी लागणारी इतर
उपकरणे, इत्यादी सर्वसामान वाहून नेण्याचे काम मरारी
लोकांचे आहे. त्या माणसांच्या नावांची यादी करा व
प्रत्येकाने नेमके काय वाहून न्यायचे ते त्याला सांगा.
33दर्शनमंडपाची कामे करिताना मरारी कुळातील पुरुषांनी
ही सेवा करावी त्यांच्या कामासाठी अहरोन याजकाचा
मुलगा इथामार हा जबाबदार राहील."

## लेवी वंशाची कुळे

34मोशे, अहरोन व इस्राएल लोकांचे पुढारी ह्यांनी कहाथी
लोकांची, त्यांची कुळे व वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे
गणती केली. 35त्यांनी, सैन्यात सेवा केलेल्या तीस ते
पन्नास वर्षे वयाच्या पुरुषांची गणती केली. दर्शनमंडपासाठी
त्यांना खास काम दिले गेले होते.

36हे काम करण्यास दोन हजार सातशे पन्नास कहाथी
लोक पात्र ठरले. 37तेव्हा त्यांना दर्शनमंडपात पवित्र सेवा
करण्याचे काम देण्यात आले. मोशे व अहरोन ह्यांनी,
परमेश्वराने मोशेला सांगितल्या प्रमाणे हे केले.

38तसेच गेर्षोनी वंशजांचीही, त्यांची कुळे व वाडवडिलांची
घराणी ह्याप्रमाणे गणती करण्यात आली; 39म्हणजे सैन्यात
सेवा केलेल्या तीस ते पन्नास वर्षे वयाच्या सर्व पुरुषांची
गणती करण्यात आली. त्यांना दर्शनमंडपासाठी
करण्यासाठी विशेष काम दिले गेले होते. 40तेव्हा
दर्शनमंडपात काम करण्यास दोन हजार सहाशें तीस गेर्षोनी
लोक पात्र ठरले. 41तेव्हा त्यांना दर्शनमंडपात पवित्र काम
देण्यात आले. मोशे व अहरोन ह्यांनी, परमेश्वराने मोशेला
सांगितल्याप्रमाणे हे केले. 42त्याचप्रमाणे मरारी वंशजांचीही,
त्यांची कुळे व त्यांच्या वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे
गणती करण्यात आली, 43म्हणजे सैन्यात सेवा केलेल्या
तीस ते पन्नास वर्षे वयाच्या सर्व पुरुषांची गणती करण्यात
आली. 44तेव्हा तीन हजार दोनशें मरारी लोक दर्शनमंडपात
काम करण्यास पात्र ठरले. 45तेव्हा त्यांना त्यांचे विशेष
काम देण्यात आले. मोशे व अहरोन ह्यांनी, परमेश्वराने
मोशेला सांगितल्याप्रमाणे हे केले. 46तेव्हा मोशे, अहरोन
व इस्राएलाचे पुढारी ह्यांनी सर्व लेवी लोकांची गणती,
त्यांची कुळे व वाडवडिलांची घराणी ह्याप्रमाणे केली.

47तीस ते पन्नास वर्षे वय असलेल्या व सैन्यात सेवा
केलेल्या पुरुषांची गणती करण्यात आली; त्यांना
दर्शनमंडपासाठी खास काम देण्यात आले. इस्राएल लोकांचे
प्रवासात दर्शनमंडप वाहून नेण्याचे विशेष सेवेचे काम
त्यांना देण्यात आले. 48त्यांची एकूण संख्या आठ हजार
पांचशे ऐंशी होती.

49तेव्हा परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे प्रत्येक
माणसाची गणती करण्यात आली; प्रत्येक माणसाला त्याने
स्वत: करावयाचे काम नेमून देण्यात आले व त्याने काय
वाहून न्यावयाचे ते सांगण्यात आले. हे सर्व परमेश्वराने
आज्ञा दिल्याप्रमाणे करण्यात आले.

## स्वच्छतेसंबंधीचे नियम

5 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"इस्राएल लोकांनी
आपली छावणी आजारापासून रोगराईपासून स्वच्छ
ठेवावी अशी मी आज्ञा देतो: त्यांना सांग की कोणी महारोगी,
कोणाला कसल्याही प्रकारचा स्त्राव होत असेल व कोणी
प्रेताला शिवल्यामुळे अशुद्ध झालेला असल्यास अशा
लोकांना त्यांनी छावणीच्या बाहेर घालवून दयावे; 3मग तो
पुरुष असो किंवा ती स्त्री असो त्यांना छावणीच्या बाहेर
काढावे म्हणजे मग छावणी आजार व विटाळापासून शुद्ध
स्वच्छ राहील; कारण मी छावणीत तुमच्याबरोबर राहात
आहे."

4तेव्हा परमेश्वराने मोशेला आज्ञा दिल्याप्रमाणे इस्राएल
लोकांनी परमेश्वराची आज्ञा मानून त्या लोकांना छावणी
बाहेर काढून टाकिले.

## अपराधाची भरपाई

5परमेश्वर मोशेला म्हणाला, 6"इस्राएल लोकांना हे
सांग की एखादा पुरुष वा स्त्री दुसऱ्याचा अपराध करील
तर खरे पाहता तो परमेश्वराविरुध्दच पाप करील व
म्हणून तो दोषी ठरेल. 7तेव्हा त्या माणसाने आपला अपराध
कबूल करावा. मग ज्याचा त्याने अपराध केला आहे
त्याची त्याने पूर्णपणे भरपाई करावी व त्या भरपाईत

आणखी एक पंचमांशाची भर घालून ज्याचा त्याने अपराध
केला आहे त्याला ती सर्व दयावी. 8पण ज्याच्यावर अपराध
घडला आहे तो मेला आणि अपराधाबद्दलची भरपाई घेण्यास
त्याचे जवळचे कोणी नातलग नसतील तर त्या अपराधी
माणसाने ती भरपाई परमेश्वराला अर्पण करावी. त्याने
ती पूर्ण भरपाई याजकाकडे द्यावी. याजकाने त्या
अपराध्याच्या प्रायश्चितासाठी प्रायश्चिताचा मेंढा अर्पण करावा
परंतु राहिलेली भरपाई याजकाने ठेवावी.

9"जर कोणी इस्राएल परमेश्वराला समर्पित
करण्याकरिता काही विशेष देणगी याजकाकडे देईल तर
ती याजकाने ठेवून घ्यावी; ती त्याचीच होईल. 10कोणी
अशा देणग्या द्याव्यात असे नाही परंतु जर त्याने त्या
आणिल्या तर त्या याजकाच्या होतील."

## संशयी नवरे

11मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 12"इस्राएल लोकांना
असे सांग की एखाद्या माणसाच्या बायकोने त्याचा
विश्वासघात केला. 13म्हणजे तिने दुसऱ्या माणसाशी कुकर्म
केले व ही गोष्ट तिने आपल्या नवऱ्यापासून लपवून
ठेविली तर कोणी साक्षीदार नसल्यामुळे हे कुकर्म तिच्या
नवऱ्याला कधीच कळणार नाही; ती स्वत: तर आपल्या
नवऱ्याला ही गोष्ट सांगणारच नाही; 14परंतु आपल्या
बायकोने आपल्या विरुद्ध पाप केले आहे अशी शंका
कदाचित तिच्या नवऱ्याला येऊ लागेल व तो तिचा द्वेष
करील; ती शुद्ध नाही व आपल्याशी विश्वासू नाही असे
त्याला वाटू लागेल; 15जर असे झाले, तर त्या माणसाने
आपल्या बायकोला याजकाकडे घेऊन जावे. तसेच त्याने
अर्पण म्हणून आठ वाट्या-एक दशांश एफा-जवाचे पीठ
घेऊन जावे; त्या पिठावर त्याने तेल ओतू नये किंवा धूप
ठेवू नये; हे जवाचे पीठ म्हणजे परमेश्वराकरिता अन्नार्पण
होय. हे द्वेषामुळे त्या माणसाने परमेश्वराला दिले आहे.
आपली बायको आपल्याशी विश्वासू राहिली नाही असा
त्याचा विश्वास आहे असे ह्या अन्नार्पणामुळे दिसेल.

16"याजकाने त्या स्त्रीला परमेश्वरासमोर उभे करावे.
17मग याजकाने मातीच्या पात्रात पवित्र पाणी घ्यावे व
पवित्र निवास मंडपाच्या जमिनीवरील थोडीशी धूळ त्यात
टाकावी. 18याजकाने त्या स्त्रीला परमेश्वरासमोर उभे
रहावयास सांगावे. मग त्याने तिच्या डोक्याचे केस सोडावे,
आणि द्वेषामुळे अर्पण करण्यासाठी आणिलेले सातूचे पीठ
तिच्या हातावर ठेवावे. त्याचवेळी त्याने पवित्र पाण्याचे
पात्र आपल्या हातात घ्यावे; स्त्रिला पीडा देऊ शकणारे
असे ते विशेष प्रकारचे पाणी आहे.

19"मग त्या याजकाने त्या स्त्रीला खोटे न बोलण्याबद्दल
सुचना द्यावी. तसेच तिने खरे सांगण्याचे वचन द्यावे.
याजकाने तिला म्हणावे; 'तू लग्न झालेल्या तुझ्या
नवऱ्याविरुद्ध पाप करुन दुसऱ्या पुरुषाबरोबर कुकर्म
केले नसेल तर मग ह्या अतिशय पीडा देणाऱ्या पवित्र
पाण्यापासून तुला काही अपाय होणार नाही. 20परंतु तू
जर तुझ्या नवऱ्या विरुद्ध पाप केले असेल-तू दुसऱ्या
पुरुषाबरोबर संबंध केला असशील तर मग तू शुद्ध नाहीस.
21म्हणून तू हे पाणी पिशील तेव्हा तुला अनेक प्रकारचा
त्रास होईल तुला मूल होऊ शकणार नाही; तू गरोदर
असशील तर तुझे मूल मरुन जाईल; तुझे लोक तुला
बाहेर टाकतील व तुझी निंदा करतील.'

"मग याजकाने त्या स्त्रीला परमेश्वरापुढे विशेष शपथ
घ्यावयास सांगावे; तिने जर लबाडी केली तर ह्या सर्व
वाईट गोष्टी तिच्यावर येतील असे तिने कबूल करावे;
22याजकाने म्हणावे, 'तुला त्रास देणारे हे पाणी तू प्यालीच
पाहिजेस; जर तू पाप केले असशील तर तुला मुले होऊ
शकणार नाहीत आणि जर तुझ्या उदरात मूल असेल तर
ते जन्मण्यापूर्वीच मरुन जाईल.' मग त्या स्त्रीने म्हणावे
'आमेन' म्हणजे आपण म्हणता तसे मला होवो.

23"मग याजकाने दिलेल्या सुचनेचे शब्द आणि त्या
स्त्रीने उच्चारलेल्या शपथेचा शब्द गुंडाळी कागदावर
लिहावेत व गुंडाळीवरील ते शब्द त्या पाण्यात धुवावेत.
24मग पीडा देणारे ते शापित पाणी त्या स्त्रीने प्यावे. हे पाणी
तिच्या पोटात जाईल आणि ती अपराधी असेल तर त्या
पाण्यामुळे तिला खूप त्रास व दु:ख सोसावे लागेल.

25"नंतर याजकाने ते (द्वेषाबद्दलचे अन्नार्पण) त्या स्त्रीच्या
हातातून घ्यावे व परमेश्वरासमोर उंच धरावे आणि मग
ते वेदी जवळ घेऊन जावे. 26मग त्यातील मूठभर अन्नार्पण
घेऊन ते वेदीवर ठेवावे व त्याचा होम करावा. त्या नंतर
याजकाने त्या स्त्रीला हे पाणी पिण्यास सांगावे-27जर त्या
स्त्रीने आपल्या नवऱ्याविरुद्ध पाप केले असेल तर त्या
पाण्यामुळे तिला खूप त्रास व दु:ख सोसावे लागेल. ते
तिच्या पोटात जाईल आणि तिला खूप त्रास होईल. तिच्या
पोटात मूल असेल तर तें जन्मण्याआधीच मरेल आणि
तिला कधीही मुले होणार नाहीत. सर्व लोक तिला शाप
देतील. 28परंतु त्या स्त्रीने आपल्या नवऱ्याविरुद्ध पाप
केले नसेल व ती शुद्ध असेल तर ती स्त्री अपराधी नाही
असे याजकाने तिला सांगावे. मग ती पूर्वीसारखीच होईल
व गर्भधारणेस पात्र ठरेल. 29तेव्हा द्वेषासंबंधी हा नियम
आहे. एखाद्या स्त्रीने आपल्या नवऱ्याविरुद्ध जर पाप केले
तर तू ही अशी कारवाई करावी. 30किंवा एखाद्या पुरुषाने
आपल्या बायकोने आपल्या विरुद्ध पाप केले आहे असा
संशय व द्वेष धरला तर त्या माणसाने अशी कारवाई
करावी; याजकाने त्या स्त्रीला परमेश्वरासमोर उभे करावे
व सांगितलेल्या नियमाप्रमाणे तिच्याविरुद्ध कारवाई करावी.

31मग नवरा अधर्म करण्यापासून मुक्त होईल परंतु
जर स्त्रीने* पाप केले असेल तर तिला त्रास भोगावा
लागेल."

---

**जर स्त्रीने** नवऱ्याविरुध्द काही पाप केले नसेल, तर त्याचा द्वेष
पाप मानला जाणार नाही.

## नाजीरासंबंधी नियम

6 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"इस्राएल लोकांस असे सांग की कोणा पुरुषाने किंवा स्त्रीने आपणास इतरापासून वेगळे होऊन काही काळपर्यंत पूर्णपणे परमेश्वरास वाहून घ्यावयाचा नवस केला तर त्याने किंवा तिने सर्वकाळ परमेश्वराच्या सेवेसाठी वाहून घ्यावे. त्यांना नाजीर म्हणावे. 3त्या काळात नाजीराने द्राक्षारस किंवा मद्य पिऊ नये; द्राक्षारसाचा किंवा कडक मद्याचा शिरकाही पिऊ नये; द्राक्षाचा कसलाही रस पिऊ नये; तसेच ताजी किंवा सुकी द्राक्षेही खाऊ नयेत. 4त्या वेगळेपणाच्या विशेष काळात त्याने द्राक्षापासून बनविलेला कोणताच पदार्थ खाऊ नये. एवढेच नव्हे तर त्याने द्राक्षाच्या बिया किंवा द्राक्षाचे सालपट देखील खाऊ नये.

5"स्वत:ला वेगळे केलेल्या त्या काळात नाजीराने आपले केस कापू नयेत. त्याच्या नवसाचा काळ संपेपर्यंत त्याने पवित्र राहावे. त्याने आपले केस लांब वाढू द्यावेत; ते केस त्याने देवाला केलेल्या विशेष नवसाची खूण आहे. स्वत:ला वाहवून घेतलेल्या नवसाचा काळ संपेपर्यंत त्याने आपले केस लांब वाढू द्यावेत.

6"वेगळेपणाच्या त्या काळात नाजीराने परमेश्वराला वाहून घेतल्यामुळे प्रेताजवळ जाऊ नये. 7त्याचा स्वत:चा बाप, आई, भाऊ किंवा बहीण ह्यातून कोणी मरण पावल्यास त्याने त्यांनाही शिवू नये; तो शिवेल तर तो अपवित्र होईल. आपण पूर्णपणे परमेश्वराच्या सेवेसाठी स्वत:ला वेगळे केले आहे, हे त्याने दाखवावे 8व वेगळे राहाण्याचा पूर्णकाल त्याने परमेश्वराला संपूर्णपणे वाहून घ्यावे. तोपर्यंत त्याने परमेश्वराचीच सेवा करावी.

9"एखाद्या वेळी असे होईल की नाजीराबरोबर असलेला एखादा माणूस एकाएकी मरण पावला; आणि जर नाजीराने त्याला स्पर्श केला तर तो अशुध्द होईल जर असे झाले तर नाजीराने आपल्या नवसाची खूण असलेल्या आपल्या डोक्याचा केसांचे मुंडण करावे. ते मुंडण त्याने सातव्या दिवशी करावे कारण त्या दिवशी तो पवित्र होईल. 10आठव्या दिवशी त्याने दोन होले किंवा पारव्याची दोन पिले आणून दर्शनमंडपाच्या दारापाशी ती याजकाला द्यावीत. 11मग याजकाने एकाचा पापार्पण म्हणून व दुसऱ्याचा होमार्पण करावा. हे पापार्पण म्हणजे त्याच्या पापाबद्दलचे प्रायश्चित होय; कारण तो प्रेताजवळ गेला होता. त्याचवेळी त्या नाजीराने पुन्हा नव्याने देवाची सेवा करण्यासाठी विशेष नवस म्हणून आपल्या डोक्याचे केस देवाला अर्पण करावेत. 12याचा अर्थ त्या माणसाने परमेश्वराच्या सेवेसाठी वेगळे होण्यासाठी स्वत:ला परमेश्वराला द्यावे. त्याने एक वर्षाचा मेंढा दोषार्पणासाठी आणून द्यावा. तरी पण त्याचे नाजीरपणाचे आधीचे दिवस वाया जातील. त्याने आता नव्याने नवस करुन नाजीरपणाचा वेगळा वेळ द्यावा कारण नाजीरपणाच्या पहिल्या काळात त्याचा प्रेताला स्पर्श झाला. होता.

13"मग त्याच्या नाजीरपणाच्या नवसाचे दिवस पूर्ण झाल्यावर त्याने दर्शनमंडपाच्या दारापाशी जावे. 14तेथे त्याने पुढीलप्रमाणे अर्पणे करावीत.

त्याने एक वर्षाचा निर्दोष मेंढा होमबली म्हणून आणावा; एक वर्षाची निर्दोष मेंढी पापबली म्हणून आणावी; आणि शांत्यार्पणासाठी एक दोषहीन मेंढा आणावा.

15एक टोपलीभर बेखमीर भाकरी म्हणजे तेलात मळलेल्या मैद्याच्या पोव्व्या व वरुन तेल लाविलेल्या चपात्या त्याच प्रमाणे त्या बरोबर अर्पणाचा भाग म्हणून अन्नार्पणे व पेयार्पणे आणावीत.

16"मग ही सर्व अर्पणे याजकाने परमेश्वराला अर्पण करावीत; त्याने पापबली व होमबली परमेश्वराला अर्पावेत; 17तशीच बेखमीर भाकरीची टोपलीही परमेश्वराला अर्पण करावी; मग शांत्यार्पणासाठी परमेश्वराकरिता मेंढा अर्पावा व त्या बरोबरचे अन्नार्पण व पेयार्पण अर्पण करावे.

18"मग नाजीराने निवास मंडपाच्या दारापाशी जावे; तेथे त्याने परमेश्वरासाठी नवस म्हणून वाढविलेल्या आपल्या केसाचे मुंडण करावे. ते केस त्याने शांत्यापर्णाच्या खाली असलेल्या जाळावर टाकावेत.

19"नाजीराने आपल्या केसाचे मुंडण केल्यावर याजकाने त्याला मेंढ्याचा शिजविलेला फरा व टोपलीतून एक बेखमीर पोळी व एक बेखमीर चपाती द्यावी. 20मग याजकाने ते ओवाळणीचे अर्पण म्हणून परमेश्वरासमोर ओवाळावे. हे सर्व पदार्थ पवित्र आहेत व ते याजकासाठी आहेत. त्याच प्रमाणे मेंढ्याचे ऊर व मांडीही परमेश्वरासमोर ओवाळावी; हे सर्व पदार्थ पवित्र आहेत व ते याजकासाठी आहेत. त्या नंतर नाजीर झालेला होता तो माणूस द्राक्षारस पिण्यास मोकळा आहे.

21"जर एखादा माणूस नाजीर होऊन परमेश्वराची सेवा करण्यास वेगळा होण्याचा नवस करावयाचे ठरवील तर त्याने ही सर्व अर्पणे परमेश्वरासाठी अवश्य द्यावीत; पण एखादा माणूस ह्याही पेक्षा अधिक अर्पणे देऊ शकत असेल व जर त्याने काही अधिक द्यावयाची शपथ घेतली असेल तर मग त्याने आपली शपथ पूर्ण करावी. नाजीर होण्याच्या नवसाची शपथ घेण्याविषयी हा नियम आहे."

## याजकांनी द्यावयाचे आशीर्वाद

22परमेश्वर मोशेला म्हणाला, 23"अहरोन व त्याच्या मुलांना इस्राएल लोकांना ह्याप्रमाणे आशीर्वाद देण्यास सांग; त्यांनी म्हणावे:

24परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो;
25परमेश्वर आपला मुख प्रकाश तुजवर पाडो व तुजवर दया करो;
26परमेश्वर आपले मुख तुजकडे करो व तुला शांति देवो."

27मग परमेश्वर म्हणाला, “इस्राएल लोकांना आशीर्वाद
देताना अहरोन व त्याच्या मुलांनी अशा प्रकारे माझ्या
नांवाचा उपयोग करावा; म्हणजे मी त्यांना आशीर्वाद देईन.”

## पवित्र निवास मंडपाचे समर्पण

7 मोशेने पवित्र निवास मंडप उभा करण्याचे काम
संपविले व त्याच दिवशी परमेश्वराला तो समर्पित
केला. त्याने पवित्र निवास मंडप, त्यातील सर्व सामान
तसेच वेदी व तिच्या सोबत वापरावयाची उपकरणे ही सर्व
तेलाच्या अभिषेकाने पवित्र केली. त्यावरुन त्या वस्तू
फक्त परमेश्वराच्या उपासनेकरिताच वापरावयाच्या
आहेत हे दिसले.
2त्यानंतर जे इस्राएल लोकांचे आपापल्या वंशाचे प्रमुख
व कुळांचे पुढारी होते त्यांनी अर्पणे आणिली; हेच लोक
शिरगणतीच्या कामात प्रमुख होते. 3त्यांनी परमेश्वरासाठी
झाकलेल्या सहा गाड्या भरुन व बारा बैलांनी त्या ओढीत
आणिलेली आपापली अर्पणे आणिली. प्रत्येक पुढाऱ्याने
एक बैल दिला व दोघांनी मिळून एक गाडी दिली. ही
अर्पणे परमेश्वराला देण्यासाठी त्यांनी पवित्र निवास
मंडपासमोर आणिली.
4परमेश्वर मोशेला म्हणाला, 5“तू त्यांच्या देणग्या घे;
दर्शनमंडपाच्या कामासाठी त्यांचा उपयोग होईल; त्या लेवी
लोकांना दे. त्यांच्या कामात त्यांची मदत होईल.”
6मोशेने त्या गाड्या व बैल घेऊन लेवी लोकांना दिले.
7त्याने दोन गाड्या व चार बैल गेर्षोनी वंशाच्या लोकांना
दिले; त्यांच्या कामासाठी त्यांना त्यांची गरज होती. 8त्याने
चार गाड्या व आठ बैल मरारी वंशाच्या लोकांना दिले;
त्यांच्या कामासाठी त्यांना त्यांची गरज होती. अहरोन
याजकाचा मुलगा इथामार हा ह्या सर्व लोकांच्या कामाबद्दल
जबाबदार होता. 9मोशेने कहाथी वंशाच्या लोकांना बैल
किंवा गाड्या दिल्या नाहीत; कारण पवित्र वस्तू आपल्या
खांद्यावर वाहून नेण्याचे काम त्यांना देण्यात आले होते.
10मोशेने वेदीचा तेलाने अभिषेक केला. त्याच दिवशी
इस्राएल लोकांच्या प्रमुखांनी वेदीला समर्पण करण्यासाठी
आपली अर्पणे आणिली; त्यांनी आपली अर्पणे परमेश्वराला
वेदीपाशी दिली.
11परमेश्वराने मोशेला सांगितले, “प्रत्येक दिवशी एका
प्रमुखाने आपले अर्पण वेदीला समर्पण करण्यासाठी
आणावे.”
12–83बारा प्रमुखापैकी प्रत्येकाने ह्याप्रमाणे अर्पणे
आणिली: प्रत्येक प्रमुखाने पवित्रस्थानाच्या चलनाप्रमाणे
एकशे तीस शेकेल वजनाचे चांदीचे एक ताट व सत्तर
शेकेल वजनाचा चांदीचा एक कटोरा आणिला. ती दोन्ही
धान्यार्पणाकरिता उपयोगी असलेल्या, तेलात मळलेल्या
मैद्याच्या पिठाने भरलेली होती. तसेच प्रत्येकाने धुपाने
भरलेले दहा शेकेल वजनाचे एक मोठे सोन्याचे धूपपात्र
आणिले. प्रत्येक प्रमुखाने एक गोऱ्हा, एक मेंढा, एक
वर्षाचे नर असलेले एक कोकरुं ही होमार्पणासाठी, तसेच
पापार्पणासाठी एक बकरा; शांत्यापर्णासाठी दोन बैल, पाच
मेंढे, पाच बकरे आणि एक एक वर्षाची नर असलेली
पाच कोंकरे आणिली. पहिल्या दिवशी यहुदा वंशाचा
प्रमुख अम्मीनादाबाचा मुलगा नहशोन ह्याने आपली अर्पणे
आणिली.
दुसऱ्या दिवशी इस्साखार वंशाचा सूवाराचा मुलगा
नथनेल ह्याने आपली अर्पणे आणिली.
तिसऱ्या दिवशी जबुलून वंशाचा प्रमुश हेलोनाचा मुलगा
अलीयाब ह्याने आपली अर्पणे आणिली.
चौथ्या दिवशी रऊबेन वंशाचा प्रमुख शदेयुराचा मुलगा
अलीसूर ह्याने आपली अर्पणे आणिली.
पांचव्या दिवशी शिमोन वंशाचा प्रमुख सुरीशद्दैचा मुलगा
शलुमियेल ह्याने आपली अर्पणे आणिली.
सहाव्या दिवशी गाद वंशाचा प्रमुख दगुवेलाचा मुलगा
एल्यासाप ह्याने आपली अर्पणे आणिली.
सातव्या दिवशी एफ्राईम वंशाचा प्रमुख अम्मीहुदाचा
मुलगा अलीशामा ह्याने आपली अर्पणे आणिली.
आठव्या दिवशी मनश्शे वंशाचा प्रमुख पदाहसुराचा
मुलगा गमलीयेल ह्याने आपली अर्पणे आणिली.
नवव्या दिवशी बन्यामीन वंशाचा प्रमुख गिदोनीचा मुलगा
अबीदान ह्याने आपली अर्पणे आणिली.
दहाव्या दिवशी दान वंशाचा प्रमुख अम्मीशद्दैचा मुलगा
अहीएजर ह्याने आपली अर्पणे आणिली.
अकराव्या दिवशी आशेर वंशाचा प्रमुख आक्रानाचा
मुलगा पगीयेल ह्याने आपली अर्पणे आणिली.
बाराव्या दिवशी नफताली वंशाचा प्रमुख एनानाचा मुलगा
अहीरा ह्याने आपली अर्पणे आणिली.
84मोशेने वेदीला तेलाने अभिषेक करुन तिचे समर्पण
करण्याच्या वेळी इस्राएल लोकांच्या प्रमुखांनी ही अर्पणे
आणिली: चांदीची बारा ताटे, चांदीचे बारा कटोरे, सोन्याची
बारा धूपपात्रे. 85प्रत्येक चांदीच्या ताटाचे वजन एकशेतीस
शेकेल व प्रत्येक चांदीच्या कटोऱ्याचे वजन सत्तर शेकेल
होते. पवित्र स्थानाच्या चलनाप्रमाणे चांदीची ताटे व चांदीचे
कटोरे मिळून त्यांचे एकूण वजन जवळ जवळ ‘दोन हजार
चारशे’ शेकेल होते. 86अधिकृत वजनाप्रमाणे, प्रत्येकी
चार औंस वजन असलेले, धुपाने भरलेले 12 सोन्याचे
चमचे त्या 12 चमच्यांचे एकूण वजन सुमारे 3 पौंड होते.
87होमार्पणासाठी बारा गोऱ्हे, बारा मेंढे व एक एक
वर्षाची बारा नर असलेली कोंकरे एवढे पशू होते; आणि
त्यांच्या बरोबर अर्पिण्यासाठी अन्नार्पणेही होती; आणि
परमेश्वराला पापार्पण वाहण्यासाठी बारा बकरे होते;
88इस्राएलांच्या प्रमुखांनी शांत्यापर्णासाठीही पशू अर्पण
केले. त्यांची एकूण संख्या, चोवीस गोऱ्हे, साठ मेंढे, साठ
बकरे व एक एक वर्षाची साठ नर असलेली कोंकरे
एवढी होती. मोशेने वेदीला तेलाचा अभिषेक केल्यावर
त्यांनी अशा प्रकारे समर्पण केली.

[89]मोशे परमेश्वराशी बोलण्यासाठी दर्शनमंडपात गेला त्यावेळी त्याने परमेश्वराची वाणी त्याच्याशी बोलताना ऐकली. ती, पाणी आज्ञापटाच्या कोशावरील पवित्र दयासनावरुन दोन करुब दूतांच्या दरम्यान असलेल्या भागातून येत होती. अशा प्रकारे देव मोशेबरोबर बोलला.

### दीपवृक्ष

8 परमेश्वर मोशेला म्हणाला, [2]"मी तुला दाखविलेल्या जागेवर सात दिवे ठेवण्यास अहरोनास सांग, म्हणजे त्यांचा प्रकाश दीपवृक्षा समोरच्या जागेवर पडेल."

[3]परमेश्वराने मोशेद्वारे दिलेली आज्ञा अहरोनाने मानून त्याने तसे केले; त्याने त्या दिव्यांची तोंडे योग्य दिशेकडे करुन ते योग्य ठिकाणी ठेविले, त्यामुळे दीपवृक्षासमोरील भागावर त्यांचा उजेड पडला. [4]परमेश्वराने मोशेला दाखविल्याप्रमाणे दीपवृक्ष त्यांच्या बैठकीपासून तर त्याच्या सोनेरी पानापर्यंत घडीव सोन्याचा केला होता.

### लेवी लोकांचे समर्पण

[5]परमेश्वर मोशेला म्हणाला, [6]"लेवी लोकांना इतर इस्राएल लोकांपासून वेगळे कर; व त्यांना शुद्ध कर. [7]त्यांना शुद्ध करण्यासाठी पापार्पणातील पवित्र पाणी त्यांच्यावर शिंपड म्हणजे त्या पाण्यामुळे ते शुद्ध होतील. मग त्यांनी आपल्या अंगावरील केस काढावेत आणि आपले कपडे धुवावेत; त्यामुळे ते शुद्ध होतील.

[8]"लेवी लोकांनी एक गोऱ्हा घ्यावा; त्या सोबत अर्पिण्यासाठी तेलात मळलेल्या पिठाचे अन्नार्पण घ्यावे; मग त्यांनी पापार्पणासाठी आणखी एक गोऱ्हा घ्यावा. [9]तू लेवी लोकांना दर्शनमंडपासमोरील अंगणात आण व मग सर्व इस्राएल लोकांना तेथे एकत्र जमव [10]मग लेवी लोकांना परमेश्वरासमोर आण; तेव्हा इस्राएल लोकांनी त्यांच्या डोक्यावर आपले हात ठेवावे. [11]नंतर अहरोनाने त्यांना परमेश्वराला समर्पित करावे. अशा रितीने लेवी लोक पवित्र परमेश्वराची सेवा कराण्यास पात्र होतील.

[12]"मग लेवी लोकांना आपले हात गोऱ्ह्यांच्या डोक्यावर ठेवण्यास सांग एक गोऱ्हा परमेश्वरासाठी पापार्पण म्हणून व दुसरा होमार्पण म्हणून होईल. ह्या अर्पणामुळे ते लेवी लोक शुद्ध होतील. [13]मग लेवी लोकांना अहरोन व त्याचे मुलगे ह्यांच्या समोर उभे राहण्यास सांग. मग त्यांचे ओवाळणीचे अर्पणा प्रमाणे ते परमेश्वराला अर्पण कर. [14]त्यामुळे ते लेवी पवित्र होतील. ते इतर इस्राएल लोकापेक्षा वेगळे असतील, व ते माझे लोक होतील.

[15]"तेव्हा तू लेवी लोकांना शुद्ध कर आणि ओवाळणीचे अर्पणा प्रमाणे परमेश्वराला त्यांना समर्पित कर. तू हे केल्यानंतर त्यांनी दर्शनमंडपात येऊन आपले काम करावे. [16]इस्राएल लोकांनी लेवी

लोक मला द्यावेत. ते माझे होतील. पूर्वी मी प्रत्येक इस्राएलास सांगितले होते की प्रत्येक घरातून प्रथम जन्मलेला मुलगा मला द्यावा. परंतु आता इतर इस्राएलातील प्रथम जन्मलेल्या मुलांच्या ऐवजी मी लेवी लोक घेत आहे. [17]इस्राएलात प्रथम जन्मलेला प्रत्येक नर माझा आहे; मग तो माणसापैकी असो किंवा पशूपैकी असो, तो माझाच आहे; कारण मी मिसर देशातील सर्व प्रथम जन्मलेली मुले व पशू मारुन टाकिले आणि म्हणून प्रथम जन्मलेले मुलगे मी माझ्याकरता निवडून घेतले. [18]परंतु आता इस्राएल लोकातील सर्व प्रथम जन्मलेल्या ऐवजी मी लेवी लोक घेतले आहेत. [19]इस्राएल लोकातून मी लेवी लोक निवडले आहेत आणि अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना मी ते दान म्हणून देत आहे. दर्शनमंडपात लेवी लोकांनी सर्व इस्राएल लोकाकरिता काम करावे अशी माझी इच्छा आहे. ते इस्राएल लोकांसाठी असलेली प्रायाश्चिताची अर्पणे करतील त्यामुळे इस्राएल लोक शुद्ध होतील. मग इस्राएल लोक पवित्रस्थानाजवळ आले तरी त्यांना भारी आजार किंवा त्रास होणार नाही."

[20]तेव्हा मोशे, अहरोन आणि सर्व इस्राएल लोकांनी परमेश्वराची आज्ञा मानून परमेश्वराने मोशेला सांगितल्याप्रमाणे त्यांनी लेवी लोकाकरिता सर्वकाही केले. [21]लेवी लोकांनी स्नान केले व, आपले कपडे धुतले. तेव्हा अहरोनाने त्यांना ओवाळणी च्या अर्पणाप्रमाणे परमेश्वराला अर्पिले, आणि त्यांच्या पापाबद्दल प्रायश्चित्त करुन त्याने त्यांना शुद्ध केले.

[22]त्यानंतर लेवी लोक सेवा करण्यास दर्शनमंडपात आले. अहरोन व त्याच्या मुलांनी त्यांच्यावर देखरेख केली; कारण ते लेवी लोक करीत असलेल्या सेवेबद्दल जबाबदार होते. परमेश्वराने मोशेकडून अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना सांगितल्याप्रमाणे त्यांनी लेवी लोकांचे सर्व काही केले.

[23]मग परमेश्वर मोशेला म्हणाला, [24]"लेवी लोकासाठी विशेष आज्ञा अशी आहे की पंचवीस वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या प्रत्येक लेवी माणसाने दर्शनमंडपातील सेवा करण्यात भाग घ्यावा. [25]परंतु लेवी माणूस पन्नास वर्षांचा होईल तेव्हा त्याने आपल्या सेवेतून मोकळे व्हावे; त्याने सेवा करण्याची गरज नाही. [26]त्या वर्षाच्या अथवा त्याहून मोठे असलेल्या लेवी माणसांनी पाहिजे तर दर्शनमंडपात सेवा करणाऱ्या आपल्या बंधूंना त्यांच्या कामात मदत करावी; परंतु त्यांनी स्वत: सेवा करु नये. लेवी लोकांना सेवा करण्यास निवडून घेताना तू हा नियम पाळावा."

### वल्हांडण सण

9 मिसरमधून इस्राएल लोक बाहेर आल्यानंतर दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या महिन्यात परमेश्वर सीनायच्या रानात मोशेबरोबर बोलला. परमेश्वर म्हणाला, [2]"इस्राएल लोकांना ठरलेल्या वेळी वल्हांडण सण पाळण्यास सांग. [3]ह्या महिन्यात चौदाव्या दिवशी सूर्य मावळल्यानंतर अंधार

पडण्या अगोदर–संधी प्रकाशात–त्यांनी वल्हांडण सणाचे भोजन करावे. त्यांनी ते ठरलेल्यावेळी आणि वल्हांडण सण पाळण्याच्या नियमाप्रमाणे करावे."

4तेव्हा मोशेने इस्राएल लोकांना वल्हांडण सण पाळावयास सांगितले. 5तेव्हा परमेश्वराने मोशेद्वारे दिलेल्या आज्ञेप्रमाणे इस्राएल लोकांनी सीनायच्या वाळवंटात संधीप्रकाशात पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी हा सण पाळला; परमेश्वराने मोशेकडून दिलेल्या आज्ञेप्रमाणे इस्राएल लोकांनी सर्वकाही केले.

6परंतु काही लोकांना त्या दिवशी वल्हांडण सण पाळता येईना कारण प्रेताला शिवल्यामुळे ते अशुद्ध झाले होते, म्हणून ते त्या दिवशी मोशे व अहरोन ह्यांच्याकडे गेले.
7ते लोक मोशेला म्हणाले, "एका माणसाच्या प्रेताला आमचा स्पर्श झाला व आम्ही अशुद्ध झालो. त्यामुळे ठरलेल्या वेळी परमेश्वराला अर्पणे करण्यास याजकांनी आम्हाला बंदी केली. तेव्हा इतर इस्राएल लोकाबरोबर आम्हाला अर्पणे करिता येत नाहीत!"

8मोशे त्यांना म्हणाला, "ह्या संबंधी परमेश्वराचे काय म्हणणे आहे, हे मी त्याला विचारितो."

9मग परमेश्वर मोशेला म्हणाला, 10"तू इस्राएल लोकांना हे सर्व सांग की हा नियम तुम्हा करिता व तुमच्या वंशजाकरिता आहे; प्रेताला स्पर्श झाल्यामुळे एखादा माणूस अशुद्ध झाला असेल किंवा एखादा माणूस त्यावेळी दूरच्या प्रवासात असेल व म्हणून त्याला ठरलेल्यावेळी वल्हांडण सण पाळता येत नसेल तरी; 11त्याला वल्हांडण सण पाळता येईल; त्याने तो दुसऱ्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी संध्याकाळी संधी प्रकाशात साजरा करावा. त्यावेळी त्याने अर्पण केलेले कोंकरु, बेखमीर भाकर व कडू भाजीपाला हे खावे; 12त्याने भोजनातील काहीही दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत शिल्लक ठेवू नये; तसेच त्याने कोंकऱ्याचे कोणतेही हाड मोडू नये. त्याने वल्हांडण सणाचे सर्व नियम पाळावेत. 13परंतु जर कोणी शुद्ध आहे आणि दूरच्या प्रवासात नाही व तो सण पाळू शकतो तर अशा माणसाने वल्हांडण सण ठरलेल्या वेळी पाळला नाही तर त्याला आपल्या लोकातून काढून टाकावे. तो अपराधी आहे म्हणून त्याला अवश्य शिक्षा व्हावी! कारण त्याने योग्य वेळी परमेश्वराला दान दिले नाही. 14तुमच्यामध्ये राहाणाऱ्या एखाद्या विदेशी माणसाला तुमच्याबरोबर वल्हांडण सण पाळण्याची व परमेश्वराला अर्पण देण्याची इच्छा असेल तर त्याला तसे करण्यास परवानगी आहे. परंतु तो त्याने वल्हांडण सणाचे सर्व नियम पाळून साजरा करावा. प्रत्येकासाठी स्वदेशी किंवा परदेशी सणाचे नियम सारखेच आहेत."

### ढग व अग्नि

15ज्या दिवशी पवित्र निवास मंडप म्हणजे कराराचा कोश असलेला तंबू उभा करण्यात आला त्या दिवशी परमेश्वराच्या ढगाने त्याच्यावर छाया केली; रात्री तो पवित्र निवास मंडपावरील ढग अग्नि सारखा दिसला.
16तो ढग सतत पवित्र निवास मंडपावर असे आणि रात्री तो अग्निसारखा दिसे. 17जेव्हा तो ढग पवित्र निवास मंडपावरील जागेवरुन हलत असे तेव्हा इस्राएल लोकही तळ हलवून त्याच्यामागे जात असत आणि जेव्हा तो थांबत असे तेव्हा त्याच ठिकाणी ते आपला तळ ठोकीत असत. अशा प्रकारे ते तळ ठोकीत असत. 18अशा प्रकारे तळ कधी हलवावा व कधी थांबून तळ कोठे ठोकावा हे परमेश्वर इस्राएल लोकांना दाखवीत असे. जोपर्यंत ढग पवित्र निवास मंडपावर राही तोपर्यंत इस्राएल लोक आपला मुक्काम तेथेच ठेवीत. 19कधी कधी ढग पवित्र निवास मंडपावर बरेच दिवस राही तेव्हा इस्राएल लोक परमेश्वराची आज्ञा पाळून मुक्काम हलवीत नसत.

20कधी कधी ढग थोडेच दिवस पवित्र निवास मंडपावर राही, तेव्हा इस्राएल लोक परमेश्वराची आज्ञा पाळीत. ढग हालला की ते ढगामागे जात असत. 21कधी कधी ढग फक्त रात्रीचाच पवित्र निवास मंडपावर राही व सकाळी तो हाले. तेव्हा इस्राएल लोक आपले सामान घेऊन त्याच्यामागे जात असत. 22ढग जर पवित्र निवास मंडपावर दोन दिवस, किंवा महिनाभर किंवा वर्षभर राहिला तर लोक परमेश्वराची आज्ञा मानून तेथेच राहात असत आणि ढग हाले पर्यंत तेथून हालत नसत, मग ढग जेव्हा आपल्या जागेवरुन हाले तेव्हा लोकही तळ हलवीत.

23तेव्हा इस्राएल लोक परमेश्वराची आज्ञा मानीत, परमेश्वर दाखवी तेथेच ते तळ देत आणि परमेश्वर जेव्हा हालण्यास आज्ञा देई तेव्हा लोक तळ हलवून ढगाच्या मागे जात. लोक लक्ष देऊन परमेश्वराने मोशेला दिलेल्या आज्ञा पाळीत.

### चांदीचे कर्णे

10 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"चांदीचे दोन घडीव कर्णे बनव. लोकांना एकत्र जमविण्यासाठी आणि तळ कधी हलवावा हे सांगण्यासाठी त्यांचा उपयोग होईल.
3तू जर दोन्ही कर्णे बराच वेळपर्यंत वाजविले तर मग सर्व लोकांनी दर्शन मंडपासमोरील अंगणात जमावे. 4परंतु बराच वेळ एकच कर्णा वाजविला तर मग फक्त इस्राएलांच्या बारा वंशाच्या प्रमुखांनीच तुला भेटावयास यावे.

5"कर्ण्याचा थोडा गजर झाला म्हणजे लोकांनी आपला तळ हलवावा हे सांगण्याचा तो एक मार्ग होईल. पहिल्याच वेळी जेव्हा तू कर्ण्याचा थोडा गजर करशील तेव्हा दर्शनमंडपाच्या पूर्वेकडील छावण्यातील वंशानी पुढे चालण्यास सुरवात करावी. 6दुसऱ्या वेळी थोडाच वेळ तू कर्णा वाजवशील तेव्हा दक्षिणेकडील छावण्यातील वंशानी पुढे निघण्यास सुरवात करावी. 7परंतु विशेष कारणासाठी मंडळी एकत्र जमावावयाची असेल तर कर्णे वेगळ्या प्रकारे

म्हणजे एकाच सरळ सारख्याच सुरात वाजवावेत. 8फक्त अहरोनाच्या याजक असलेल्या मुलांनीच कर्णे वाजवावीत. तुम्हाला पिढ्यान्‌पिढ्याचा कायमचा विधीनियम आहे.

9"जर तुम्ही तुमच्या देशातच शत्रूशी लढत असाल, तर त्यांच्याशी लढावयास जाण्यापूर्वी तुम्ही मोठमोठ्याने कर्णे वाजवावेत. परमेश्वर तुमचा कर्ण्यांचा आवाज ऐकेल आणि तो तुमच्या शत्रूपासून तुमचे रक्षण करील.

10तसेच तुम्ही सणाच्या व इतर आनंदाच्या प्रसंगी व नवीन चंद्राच्या दिवशी पौर्णिमेच्या दिवशी किंवा महिन्याच्या पहिल्या दिवशी–तुमची होमार्पणे, शांत्यार्पणे वाहताना तुम्ही कर्णे वाजवावेत; तुमच्या परमेश्वराला तुमची आठवण करुन देण्याचा हा एक विशेष मार्गच आहे; हे तुम्ही करावे अशी मी तुम्हास आज्ञा देतो. मी तुमचा देव परमेश्वर आहे."

### इस्राएल लोक आपला तळ हलवितात

11इस्राएल लोकांनी मिसरदेश सोडल्यानंतर दुसऱ्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या विसाव्या दिवशी कराराचा कोश असलेल्या पवित्र निवास मंडपावरील ढग वर गेला. 12तेव्हा इस्राएल लोकांनी आपला प्रवास सुरू केला. त्यांनी सीनायचे रान सोडले आणि ढग पारानाच्या रानात थांबेपर्यंत ते प्रवासकरीत गेले. 13छावणी हलवण्याची इस्राएल लोकांची ही पहिलीच वेळ होती. परमेश्वराने त्यांना मोशेकडून दिलेल्या आज्ञेप्रमाणे त्यांनी हे केले.

14यहुदाच्या छावणीतील तीन गट पहिल्याने निघाले. त्यांच्या निशाणा मागे ते चालले. पहिला गट यहुदाच्या कुळाचा होता. अम्मीनादाबाचा मुलगा नहशोन त्यांचा सेनानायक होता. 15त्यानंतर इस्साखारचे कूळ निघाले. सुवाराचा मुलगा नथनेल त्यांचा नेता होता. 16आणि मग जबुलूनाचे कूळ निघाले. हेलोनाचा मुलगा अलीयाब त्यांचा नेता होता.

17मग पवित्र निवास मंडप उतरविण्यात आला आणि गेर्षोन व मरारी वंशाचे लोक पवित्र निवास मंडप घेऊन निघाले. तेव्हा ह्या वंशाचे लोक नंतरच्या रांगेत होते.

18त्यानंतर रऊबेन वंशाच्या छावणीतील तीन गट निघाले. लोक त्यांच्या निशानामागे चालले होते. त्यातील पहिला गट रऊबेन कुळाचा होता. शदेयुराचा मुलगा अलीसूर त्यांचा सेनानायक होता. 19त्यानंतर शिमोन कुळाचे लोक निघाले. सुरीशदैचा मुलगा शलूमीयेल हा त्यांचा सेनानायक होता. 20नंतर गाद वंशाच्या दलाचे लोक निघाले. रगुवेलाचा मुलगा एल्यासाप त्यांचा सेनानायक होता. 21मग कहाथी लोक पवित्र स्थानातील पवित्र वस्तू घेऊन निघाले. ते अशावेळी जाऊन पोहोंचले की त्यांच्या येण्याअगोदर इतर लोकांनी पवित्र निवास मंडप उभा करुन तयार ठेवला होता.

22त्यानंतर एफ्राइम वंशाच्या छावणीतील तीन गट निघाले. लोक त्यांच्या निशाणामागे चालले होते. त्यात पहिला गट एफ्राइम कुळाचा होता. अम्मीहूदाचा मुलगा अलीशामा त्यांचा सेनानायक होता. 23त्यानंतर मनश्शे कुळाचे लोक निघाले. पदाहसुराचा मुलगा गमलीयेल त्यांचा सेनानायक होता. 24मग बन्यामीन कुळाचे लोक निघाले. गिदोनीचा मुलगा अबीदान त्यांचा सेनानायक होता.

25छावण्यांच्या रांगेतील सर्वात शेवटची तीन दले दान वंशाची होती. ती पुढे गेलेल्या दलांचे संरक्षण करणारी पिछाडीची तुकडी होती. तिच्यात पहिले दान कुळाचे लोक होते. ते त्यांच्या निशाणामागे चालले होते. अम्मीशद्दैचा मुलगा अहीएजर त्यांचा सेनानायक होता. 26त्यानंतर आशेर कुळाचे लोक निघाले. आक्रानाचा मुलगा पगीयेल त्यांचा सेनानायक होता. 27मग नफताली कुळाचे लोक निघाले. एनानाचा मुलगा अहीरा त्यांचा सेनानायक होता. 28इस्राएल लोक ठिक ठिकाणाहून प्रवास करिताना ह्या क्रमाने निघत.

29मोशेचा सासरा रगुवेल ह्याचा मुलगा होबाब ह्याला मोशे म्हणाला, "देवाने आम्हाला वचन दिलेल्या देशात आम्ही जात आहोत. तू आमच्याबरोबर चल. आम्ही तुझ्याशी चांगले वागू; इस्राएल लोकांना उत्तम गोष्टी देण्याचे परमेश्वराने वचन दिले आहे."

30परंतु होबाबाने उत्तर दिले, "नाही, मी तुमच्याबरोबर येणार नाही. मला माझ्या देशात व माझ्या लोकात परत गेले पाहिजे."

31मग मोशे त्याला म्हणाला, "मी विनंती करितो की तू आम्हाला सोडून जाऊ नको; कारण ह्या रानाची आमच्यापेक्षा तुला अधिक माहिती आहे. तू आमचा वाटाड्या होऊ शकतोस. 32तू आमच्याबरोबर येशील तर परमेश्वर आम्हाला ज्या ज्या चांगल्या गोष्टी देईल त्यात आम्ही तुला वाटा देऊ"

33मग होबाब मान्य झाला. आणि परमेश्वराच्या पर्वतापासून ते प्रवास करीत निघाले. याजकांनी परमेश्वराचा पवित्र कराराचा कोश घेतला व ते लोकांच्यापुढे चालले. मुक्कामासाठी जागा शोधताना तीन दिवस तो पवित्र कोश त्यांनी वाहिला. 34प्रत्येक दिवशी परमेश्वराचा ढग त्यांच्यावर राहून त्यांना मार्ग दाखवीत असे.

35लोक जेव्हा पवित्र कराराचा कोश उचलून मुक्काम हलवीत तेव्हा मोशे म्हणत असे,

"हे परमेश्वरा, ऊठ तुझ्या शत्रूंची सर्व दिशांना पांगापांग
होवो, तुझे सर्व शत्रू तुजपासून पळून जावोत,"

36आणि जेव्हा पवित्र कराराचा कोश त्याच्या जागी ठेवला जाई तेव्हा मोशे म्हणत असे,

"हे परमेश्वरा, इस्राएलाच्या लाखो लोकांकडे परत ये."

## इस्राएल लोक पुन्हा तक्रार करतात

11 मग इस्राएल लोक आपल्या त्रासाबद्दल परत तक्रार करु लागले. ती परमेश्वराने ऐकली व ती ऐकल्यावर त्याचा राग भडकला. परमेश्वरापासूनचा अग्नि त्यांच्यात पेटला आणि त्याने छावणीच्या कडेचा काही भाग जाळून टाकिला. 2तेव्हा लोकांनी मोशेकडे मदतीसाठी आरडाओरड केली. मोशेने परमेश्वराला विनंती केली तेव्हा अग्नि शमला. 3त्यामुळे त्या ठिकाणाचे नांव तबेरा असे पडले. लोकांनी त्या ठिकाणाला तसे नांव दिले कारण परमेश्वराच्या अग्निमुळे छावणीचा भाग जळून गेला.

## अधिक वयाचे सत्तर नेते

4जे विदेशी इस्राएल लोकाबरोबर राहात होते, त्यांना इतर काही पदार्थ खावेसे वाटू लागले. लवकरच इस्राएल लोकांनी पुन्हा कुरकुर करण्यास सुरवात केली. लोक म्हणाले, "आम्हांला मांस खावयास पाहिजे. 5मिसरमध्ये असताना खाल्लेल्या माश्यांची आम्हाला आठवण येते; तेथे ते आम्हाला फुकट खावयास मिळत. त्याचप्रमाणे तेथे आम्हाला काकड्या, खरबूजे, भाजी, कांदे, लसूण असा चांगला भाजीपाला मिळत असे. 6परंतु आता आम्ही कमजोर झालो आहोत. मान्याशिवाय आम्हाला येथे काही ही खावयास मिळत नाही!" 7(हा मान्ना लहान धण्यासारखा होता, आणि तो झाडाच्या डिंकासारखा दिसे. 8लोक तो गोळा करीत, तो उखळात कुटीत, किंवा भांड्यात शिजवीत किंवा दळीत व त्याच्या भाकरी करी. उत्तम तेलात भाजलेल्या गोड पुऱ्या सारखी त्याची चव लागे. 9रात्री दव पडल्यामुळे जमीन ओली झाल्यावर मान्ना जमिनीवर पडत असे.)

10मोशेने लोकांची कुरकुर ऐकली. प्रत्येक कुटुंबातील लोक आपापल्या तंबूसमोर बसून कुरकुर करीत होते. त्यामुळे परमेश्वराचा राग भयंकर भडकला आणि त्यामुळे मोशे खिन्न झाला. 11मोशेने परमेश्वराला विचारले, "परमेश्वरा, तू माझ्यावर हे संकट का आणिले? मी तुझा दास आहे. माझे काय चुकले? तुला एवढे रागावण्यासारखे मी काय केले? ह्या सर्व लोकांची जबाबदारी तू माझ्यावर का टाकलीस? 12तुला माहीत आहे की मी काही ह्या सर्व लोकांचा बाप नाही, की मी ह्यांना जन्म दिला नाही. परंतु परिचारिका-जशी लहान बाळाला छातीशी धरते तशी मी त्यांची काळजी घेतली पाहिजे अशी सक्ति तू माझ्यावर का करतोस? तू आमच्या वाडवडिलांना वचन दिलेल्या देशात त्यांना घेऊन जाण्याची सक्ति माझ्यावर का करतोस? 13एवढ्या लोकांना पुरेल एवढे मांस माझ्याजवळ नाही! आणि त्यांची तर माझ्यामागे कुरकुर चालूच आहे. ते म्हणतात, 'आम्हाला खावयास मांस दे!' 14मी एकटा ह्या सर्वांची काळजी घेऊ शकत नाही. हे ओझे माझ्यासाठी फारच जड आहे. 15त्यांचा त्रास मी सहन करण्याचे काम चालू ठेवावे असा जर तुझा विचार असेल तर मग तू आजच मला मारुन टाक. तू मला दास समजत असशील तर मग आता मला मरु दे. मग माझ्या मागचा सर्व त्रास संपून जाईल!"

16तेव्हा परमेश्वर मोशेला म्हणाला, "इस्राएल मंडळीतील सत्तर वडील मजकडे आण. मंडळीचे नेते असलेल्या ह्या लोकांना दर्शनमंडपाच्या दारापाशी आण; व तुझ्याबरोबर त्यांना उभे कर. 17मग मी खाली येऊन तेथे तुझ्याशी बोलेन. मग तुझ्यावर असलेल्या आत्म्यातून काही भाग मी त्यांनाही देईन. मग लोकांची काळजी घेण्यास ते तुला मदत करतील. ह्या प्रकारे इस्राएल लोकांची जबाबदारी केवळ तुझ्या एकट्यावर राहणार नाही.

18तू ह्या गोष्टी लोकांना सांग: उद्या तुम्ही स्वत: शुद्ध राहा म्हणजे तुम्हाला मांस खावयास मिळेल. परमेश्वराने तुमचे रडगाणे ऐकले आहे. 'आम्हाला मांस खाण्यास पाहिजे! आम्ही मिसरमध्ये होतो ते बरे होते,' असे तुम्ही म्हणाला ते शब्दही परमेश्वराने ऐकले आहेत. तेव्हा आता परमेश्वर तुम्हाला मांस देईल आणि तुम्ही ते खाल. 19तुम्ही ते एक, किंवा दोन, किंवा पाच, किंवा दहा दिवसच नव्हे तर वीस दिवस देखील खाल. 20येवढेच नव्हे तर तुम्ही ते पूर्ण महिनाभर खाल. तुम्हाला त्याचा तिटकारा येईपर्यंत ते खाल. हे असे होईल कारण तुम्ही आपल्या परमेश्वराविरुद्ध कुरकुर केली. परमेश्वर तुम्हामध्ये राहतो आणि तुम्हाला काय पाहिजे ते त्याला माहीत आहे; परंतु तुम्ही त्याच्या विरुद्ध ओरड केली आणि म्हणाला, 'आम्ही का बरे मिसर सोडले?'"

21मोशे म्हणाला, "परमेश्वरा येथे सहा लाख लोक आहेत आणि तू म्हणतोस की 'ह्यांना पूर्ण महिनाभर पुरेल एवढे मांस मी खावयास देईन!' 22आम्ही जरी सर्व शेरडेमेंढरे व गुरेढोरे कापली तरी ह्या सर्व लोकांना महिनाभर खाण्यास तेवढेही पुरे पडणार नाहीत."

23परंतु परमेश्वर मोशेला म्हणाला, "परमेश्वराचा हात असमर्थ तोकडा पडला आहे काय? मी माझे म्हणणे खरे करुन दाखवीन हे तुला दिसेल."

24तेव्हा मोशे लोकांशी बोलण्याकरिता बाहेर गेला. परमेश्वर जे बोलला ते त्याने त्यांना सांगितले. मग मोशेने मंडळीच्या सत्तर वडिलांना (नेत्यांना) एकत्र जमविले; त्याने त्यांना तंबू भोंवती उभे राहण्यास सांगितले. 25मग परमेश्वर ढगातून खाली आला आणि मोशेशी बोलला. मोशेवर परमेश्वराचा आत्मा होता. त्यातून काही घेऊन परमेश्वराने तो त्या सत्तर वडिलावर (नेत्यावर) ठेवला. तो आत्मा आल्यावर ते संदेश सांगू लागले. परंतू त्यानंतर मात्र त्यांनी पुन्हा संदेश सांगीतला नाही.

26त्यातील दोन वडील (नेते) एलदाद व मेदाद छावणीच्या बाहेर गेले नाहीत. त्यांची नांवे वडीलांच्या (नेत्यांच्या) यादीत होती. परंतु ते छावणीतच राहिले; त्यामुळे आत्मा त्यांच्यावरही आला आणि ते छावणीतच संदेश सांगू लागले. 27तेव्हा एका तरुणाने पळत जाऊन मोशेला हे सांगितले.

तो म्हणाला, "एलदाद व मेदाद हे छावणीत संदेश सांगत आहेत."

28तेव्हा नूनाचा मुलगा यहोशवा मोशेला म्हणाला, "मोशे, माझे स्वामी तुम्ही त्यांना बंदी घाला." (यहोशवा तरुण असल्यापासून मोशेचा मदतनीस होता)

29मोशेने त्याला उत्तर दिले, "ह्याच्या योगाने माझ्या नेतेपणाला कमीपणा येईल असे तुला वाटते काय? परमेश्वराचे सर्वच लोक संदेष्टे असते आणि परमेश्वराने त्या सर्वांवर आपला आत्मा ठेविला असता तर किती बरें होते." 30मग मोशे व इस्राएलांचे नेते छावणीमध्ये परत गेले.

### परमेश्वर लावे पक्षी पाठवितो

31मग परमेश्वराने समुद्रावरुन जोरदार वारा वाहावयास लाविला. त्या वाऱ्याने लावे पक्षी त्या भागात वाहून आणिले. ते लावे पक्षी सर्व छावणीच्या भोंवती उडत राहिले. ते इतके होते की छावणीचे अंगण व सारा परिसर त्यांनी भरुन गेला. त्यांचा जमिनीपासून तीन फूट वरपर्यंत थर साचला. माणूस एक दिवसभरात जितका दूर चालत जाईल तेथ पर्यंत तो थर होता. 32लोक बाहेर पडले व त्यांनी दिवसभर व रात्रभर लावे पक्षी गोळा केले आणि त्यांनी पूर्ण दुसरा दिवसभरही ते गोळा केले. कोणत्याही माणसाने गोळा केलेले पक्षी कमीत कमी साठ बुशेल भरले. मग लोकांनी लावे पक्षांचे मांस सर्व छावणी सभोंवती पसरवले.

33लोकांनी मांस खाण्यास सुरवात केली परंतु परमेश्वराचा राग भयंकर भडकला. ते मांस त्यांच्या तोंडात होते तोच म्हणजे ते पूर्ण खाऊन होण्यापूर्वी परमेश्वराने त्यांना भयंकर आजारी पाडले व मारुन टाकिले. 34म्हणून लोकांनी त्या ठिकाणाला किब्रोथ-हत्तव्वा असे नांव दिले, कारण ह्याच ठिकाणी, ज्या लोकांना मांस खाण्याची अतिशय कडक इच्छा झाली होती त्यांना पुरण्यात आले.

35किब्रोथ हत्तव्वापासून लोकांनी हसेरोथपर्यंत प्रवास केला व तेथे त्यांनी मुक्काम केला.

### मिर्याम व अहरोन मोशेविषयी तक्रार करतात

12 मिर्याम व अहरोन मोशेविरुद्ध बोलू लागले. त्यांनी त्याच्यावर टीका केली कारण त्याने एका इथिओपीयन-कुशी-स्त्रीशी लग्न केले. मोशेने त्या इथिओपीयन-कुशी-स्त्रीशी लग्न केले ते योग्य केले नाही असे त्यांना वाटले. 2ते स्वत:शीच म्हणाले, "परमेश्वराने लोकांशी बोलण्यासाठी मोशेचा उपयोग केला. पण मोशे काय असा एकच नव्हे. परमेश्वर आमच्याद्वारेही बोलला आहे!"

परमेश्वराने हे ऐकले. 3(मोशे फार नम्र माणूस होता. त्याने कधी अभिमान धरला नाही किंवा बढाई मारली नाही पृथ्वीवरील कोणत्याही माणसापेक्षा मोशे अधिक नम्र होता.) 4तेव्हा परमेश्वर आला आणि मोशे, अहरोन व मिर्याम ह्यांच्याशी बोलला. परमेश्वर म्हणाला, "तुम्ही तिघे आत्ताच्या आता दर्शनमंडपापाशी या!"

तेव्हा मोशे, अहरोन व मिर्याम दर्शनमंडपापाशी गेले. 5परमेश्वर एका उंच ढगातून खाली आला दर्शनमंडपाचा दारापाशी उभा राहिला. परमेश्वराने हाक मारली, "अहरोन व मिर्याम!" तेव्हा अहरोन व मिर्याम त्याच्याकडे गेले. 6परमेश्वर म्हणाला, "माझे ऐका!" तुमच्यातील संदेष्ट्यांना मी परमेश्वर दृष्टांतातून दर्शन देतो, मी त्यांच्याशी स्वप्नात बोलतो 7परंतु मोशेचे तसे नाही. मोशे माझ्या सर्व घरण्यात विश्वासू आहे. 8मी त्याच्याशी बोलताना समोरासमोर बोलतो. मी त्याच्याशी दाखल्याने किंवा गुप्त अर्थ असलेल्या गोष्टींनी बोलत नाही-त्याला समजाव्यात अशा गोष्टी मी त्याला स्पष्टपणे दाखवितो. आणि मोशे परमेश्वराचे रुप स्पष्टपणे बघतो. तर असे असताना माझा सेवक मोशे ह्याच्या विरुद्ध बोलण्याची हिंमत तुम्हाला कशी झाली.?"

9परमेश्वराचा राग त्यांच्यावर खूप भडकला आणि तो त्यांना सोडून निघून गेला. 10ढग पवित्र निवास मंडपापासून वर गेला. तेव्हा अहरोनाने वळून मिर्यामकडे पाहिले. तिचे अंग बर्फासारखे पांढरे झाले होते. तिला भयंकर त्वचेचा रोग झाला होता!

11म्हणून अहरोन मोशेला विनंती करुन म्हणाला, "माझे स्वामी, आम्ही केलेल्या मूर्खपणाच्या पापाबद्दल आमची क्षमा करा. 12मेलेल्या जन्मलेल्या बाळाच्या चामड्यासारखे तिचे चामडे होऊ देऊ नका." (कधी कधी आपले अर्धे चामडे खाऊन टाकल्याप्रमाणे एकादे बाळ जन्मते.)

13म्हणून मोशेने परमेश्वराला विनंती केली, "देवा, तिला ह्या रोगापासून बरे कर."

14परमेश्वराने मोशेला उत्तर दिले, "जर तिचा बाप तिच्या तोंडावर थुंकला असता तर तिला सात दिवस लाज वाटली असती ना! तेव्हा सात दिवस तिला छावणीच्या बाहेर काढ मग ती बरी होईल; मग तिने परत छावणीत यावे.

15म्हणून त्यांनी तिला सात दिवस छावणीच्याबाहेर काढले आणि ती छावणीत परत येईपर्यंत लोकांनी आपला मुक्काम हलविला नाही. 16त्यानंतर लोकांनी हसेरोथ सोडले आणि पारानाच्या रानापर्यंत त्यांनी प्रवास केला आणि तेथे रानातच त्यांनी आपला तळ ठोकला."

### हेर कनान देशात जातात

13 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"कनान देश हेरण्यासाठी काही लोकांना पाठव. हाच देश मी इस्राएल लोकांना देणार आहे. त्यांच्या बारा वंशानुसार प्रत्येकी एका नेत्याला पाठव"

3तेव्हा मोशेने परमेश्वराची आज्ञा मानून, लोक पारानच्या वाळवंटात असताना हे नेते पाठविले. 4त्यांची नांवे अशी आहेत:

रऊबेन वंशातला जक्कुराचा मुलगा शम्मुवा.
5 शिमोन वंशातला होरीचा मुलगा शाफाट.
6 यहुदा वंशातला यफुन्नेचा मुलगा कालेब.
7 इस्साखार वंशातला योसेफाचा मुलगा इगाल.
8 एफ्राईम वंशातला नूनाचा मुलगा होशा.
9 बन्यामीन वंशातला राफूचा मुलगा पलटी,
10 जबुलून वंशातला सोदीचा मुलगा गद्दीयेल,
11 योसेफ वंशातला(मनश्शे)– सूसीचा मुलगा गद्दी,
12 दान वंशातला गमल्लीचा मुलगा अम्मीयेल,
13 आशेर वंशातला मीकाएलाचा मुलगा सतूर,
14 नफताली वंशातला बाप्सीचा मुलगा नहब्बी.
15 आणि गाद वंशातला माकीचा मुलगा गऊवेल.

16मोशेने देश हेरावयास पाठविलेल्या लोकांची ही नांवे होती. “(मोशेने नूनाचा मुलगा होशा ह्याचे नांव यहोशवा असे ठेविले.)

17मोशेने कनान देश हेरण्यास पाठविताना लोकांना सांगितले की तुम्ही येथून नेगेबमधून निघा आणि मग डोंगराळ प्रदेशात जा. 18देश कसा आहे? तेथील लोक कसे आहेत! ते बलवान आहेत किंवा दुबळे आहेत? ते थोडे आहेत किंवा फार आहेत? ते पाहा व समजून घ्या. 19ते राहतात तो देश कसा आहे? तो चांगला आहे किंवा वाईट आहे? ते लोक कशा प्रकारच्या नगरात राहतात? संरक्षणासाठी त्या नगरांभोवती कोट आहेत का? त्या नगरांची संरक्षण व्यवस्था बलवान आहे का? ह्या सर्व गोष्टी पाहा व समजून घ्या. तेथील जमीन पीक घेण्यास 20योग्य आहे का? त्या प्रदेशात झाडे आहेत का? तेथील काही फळे बरोबर घेऊन या.” (हे पहिली द्राक्षे पिकण्याच्या वेळी घडले.)

21म्हणून ते तो प्रदेश शोधायला निघाले. त्यांनी सीन वाळवंटापासून रहोब आणि लेबोहामाथपर्यंतच्या प्रदेशाचा शोध घेतला. 22त्यांनी नेगेवमधून त्या प्रदेशात प्रवेश केला आणि ते हेब्रोनला गेले. (हेब्रोन शहर मिसर देशातल्या सोअन शहराच्या सात वर्षे आधी बांधले होते.) अहीमन शेशय आणि तलमय हे अनाकाचे वंशज तेथे राहात होते. 23नंतर ते लोक अष्कोलच्या खोऱ्यात गेले. तेथे त्यांनी द्राक्षाच्या वेलीची एक फांदी तोडली. त्या फांदीला द्राक्षाचा घड लागलेला होता. त्यांनी ती फांदी एका खांबावर ठेवली आणि दोघे जण ती आपल्या मधोमध ठेवून घेऊन गेले. त्यांनी बरोबर काही डाळींबे व अंजीर ही घेतली. 24त्या जागेला अष्कोल खोरे असे म्हणतात कारण तिथे इस्राएल लोकांनी द्राक्षाचा घड तोडला होता.

25त्या लोकांनी त्या प्रदेशाचा 40 दिवस शोध घेतला. नंतर ते आपल्या छावणीत परत गेले. 26इस्राएल लोकांची छावणी पारानच्या वाळवंटात कादेशजवळ होती ते लोक मोशे, अहरोन आणि इस्राएलच्या सर्व लोकांजवळ गेले. त्यांनी मोशे, अहरोन आणि इतर लोकांना त्यांनी पाहिलेल्या गोष्टीविषयी सांगितले आणि त्या प्रदेशातली फळे त्यांना दाखवली.

27ते लोक मोशेला म्हणाले, “तू आम्हाला पाठवलेस त्या प्रदेशात आम्ही गेलो. तो प्रदेश अनेक चांगल्या गोष्टींनी भरलेला* आहे. त्या प्रदेशात होणारी ही काही फळे पाहा. 28पण तेथे राहणारे लोक खूप शक्तिशाली आहेत. शहरे खूप मोठी आहेत. शहरांचे रक्षण चांगल्या प्रकारे होते. काही अनाकांच्या वंशजानाही आम्ही पाहिले. 29अमालेकी लोक नेगेबमध्ये राहतात. हिती, यबूसी आणि अमोरी डोंगराळ भागात राहतात. आणि कनानी लोक समुद्राजवळ आणि यार्देन नदीच्या काठावर राहतात.”

30मोशेजवळच्या लोकांना गप्प बसायला सांगून कालेब म्हणाला, “परत जाऊन तो प्रदेश आपण घ्यायला पाहिजे. आपण तो प्रदेश सहज घेऊ शकू.”

31पण जे लोक त्याच्याबरोबर तेथे गेले होते ते म्हणाले, “आपण त्यांच्याशी लढू शकणार नाही. ते आपल्यापेक्षा खूप शक्तिशाली आहेत. 32आणि त्या माणसांनी इस्राएलच्या सर्व लोकांना सांगितले की त्या प्रदेशातल्या लोकांचा पराभव करण्याइतके शक्तिशाली आपण नाहीत. ते म्हणाले, “आम्ही जो प्रदेश पाहिला तो शक्तिशाली लोकांनी भरलेला आहे. ते लोक तिथे जाणाऱ्या कुठल्याही माणसाचा सहज पराभव करण्याइतके शक्तिमान आहेत. 33आम्ही तिथे खूप नेफीलीम लोक पाहिले. (अनाकाचे वंशज नेफीलीम लोकांपासून आलेले आहेत) त्यांनी आमच्याकडे आम्ही जणू नाकतोडे आहोत अशा नजरेने पाहिले. होय! त्यांच्या दृष्टीने आम्ही नाकतोडेच होतो.”

## लोक पुन्हा तक्रार करतात

14 त्या रात्री छावणीतले सगळे लोक जोरजोरात आक्रोश करायला लागले. 2इस्राएल लोकांनी मोशे आणि अहरोन विरुद्ध तक्रारी केल्या. सगळे लोक एकत्र आले आणि मोशेला व अहरोनाला म्हणाले, “आम्ही मिसरमध्ये किंवा वाळवंटात मरुन जायला हवे होते. या नवीन प्रदेशात मारले जाण्यापेक्षा ते अधिक चांगले झाले असते. 3या नवीन प्रदेशात युद्धात जाण्यासाठीच परमेश्वराने आम्हाला इथे आणले का? शत्रू आम्हाला मारून टाकील आणि आमच्या बायका मुलांना घेऊन जाईल. मिसर देशात परत जाणेच आमच्या दृष्टीने जास्त बरे आहे.”

4नंतर लोक एकमेकांना म्हणाले, “आपण आता दुसरा नेता निवडू आणि मिसर देशात परत जाऊ.”

5तिथे जमलेल्या सर्व लोकांसमोर मोशे आणि अहरोन पालथे पडले. 6यहोशवा आणि कालेब यांनी आपले कपडे फाडले (तक्रारी ऐकून झालेल्या दु:खप्रदर्शनासाठी) नूनाचा मुलगा यहोशवा आणि यफुन्नेचा मुलगा कालेब हे ही या प्रदेशाच्या शोधात गेलेल्या लोकांपैकी होते. 7या दोघांनी

---

**चांगल्या गोष्टींनी भरलेला** शब्दश: दूध आणि मध यांनी वहाणार.

तिथे जमलेल्या इस्राएल लोकांना सांगितले, “आम्ही जो
प्रदेश बघितला तो खूप चांगला आहे. 8तो प्रदेश चांगल्या
चांगल्या गोष्टींनी संपन्न आहे. आणि जर परमेश्वर
आपल्यावर प्रसन्न झाला तर तो आपल्याला त्या प्रदेशात
नेईल आणि तो प्रदेश आपल्याला देईल. 9म्हणून
परमेश्वराविरुद्ध जाऊ नका. त्या प्रदेशातल्या लोकांची
भीती बाळगू नका. आपण त्यांचा पराभव करु शकू.
त्यांच्याकडे कसलेही संरक्षण नाही. सुरक्षित राहण्यासाठी
काहीही नाही. परंतु आपल्याजवळ परमेश्वर आहे. म्हणून
घाबरु नका.”

10सर्व लोक यहोशवाला आणि कालेबला दगडांनी ठार
मारण्याची भाषा बोलू लागले. परंतु परमेश्वराची प्रभा
दर्शन मंडपावर दिसू लागली. तेथून ती सर्व लोकांना
दिसली. 11परमेश्वर मोशेला म्हणाला, “हे लोक किती
वेळ माझ्याविरुद्ध जाणार आहेत? त्यांचा माझ्यावर विश्वास
नाही असे ते दाखवितात ते माझ्या सामर्थ्यावर विश्वास
ठेवायला नकार देतात. मी त्यांना खूप शक्तिशाली चिन्हे
दाखवली तरीही ते माझ्यावर विश्वास ठेवत नाहीत. मी
त्यांच्या मध्ये खूप मोठमोठ्या गोष्टी केल्या आहेत. 12मी
त्यांना एखाद्या भयानक आजाराने मारून टाकीन. मी
त्यांचा नाश करीन. मी तुझा उपयोग करुन दुसरे राष्ट्र
निर्माण करीन. तुझा देश या लोकांपेक्षा मोठा आणि
शक्तिमान असेल.”

13नंतर मोशे परमेश्वराला म्हणाला, “जर तू असे केलेस
तर ते मिसर मधील लोक ऐकतील तुझ्या लोकांना
मिसरमधून बाहेर आणण्यासाठी तू तुझ्या महान शक्तीचा
उपयोग केलास हे त्यांना माहीत आहे. 14मिसरमधल्या
लोकांनी कनानच्या लोकांना हे सांगितले आहे. तू परमेश्वर
आहेस हे त्यांना अगोदरच माहीत झालेले आहे. तू आपल्या
लोकांबरोबर असतोस हे त्यांना माहीत झाले आहे. लोकांनी
तुला पाहिले हे त्यांना माहीत आहे. लोकांना खास
ढगाविषयी माहिती आहे. तुझ्या लोकांना मार्ग
दाखविण्यासाठी तू त्या ढगाचा उपयोग करतोस हे त्या
लोकांना माहीत आहे. रात्री त्या ढगाचा अग्नी होतो आणि
तुझ्या लोकांना मार्ग दाखवतो हे ही त्यांना माहीत आहे.
15म्हणून आता तू या लोकांना मारू नकोस. जर तू त्यांना
मारलेस तर सर्व देशांना ही बातमी कळेल व ते म्हणतील.
16‘परमेश्वर त्या लोकांना त्याने वचन दिलेल्या प्रदेशात
आणू शकत नव्हता म्हणून परमेश्वराने त्यांना वाळवंटात
मारून टाकले.’

17“प्रभू, म्हणून आता तू तुझी शक्ती दाखव. तू, ‘मी ती
दाखवीन’ असे म्हणाला होतास त्याप्रमाणे दाखव. 18तू
म्हणालास, ‘परमेश्वराला रागवायला वेळ लागतो. तो महान
प्रीतिने भरलेला आहे. परमेश्वर अपराधांची व अधर्माची
क्षमा करतो * पण जे लोक अपराधी आहेत त्यांना परमेश्वर
नेहमी शिक्षा करतो. त्यांच्या मुलांना व नातवंडांना शिक्षा
करतो आणि पंतवंडाना देखील त्या वाईट गोष्टी* बद्दल
शिक्षा करतो.’ 19आता तुझे दिव्य प्रेम या लोकांना दाखव.
त्यांच्या पापाची क्षमा कर. त्यांनी मिसर सोडल्यापासून
आतापर्यंत तू जसा त्यांना क्षमा करीत आला आहेत तशीच
आताही क्षमा कर.”

20परमेश्वराने उत्तर दिले, “तू सांगितलेस त्याप्रमाणे मी
लोकांना क्षमा करीन.” 21पण मी तुला सत्य सांगतो. मी
नक्कीच जिवंत आहे आणि माझी प्रभा नक्कीच साऱ्या
पृथ्वीवर भरून आहे. हे जसे खरे आहे तसेच खरेपणाने
मी तुला वचन देतो. 22मी मिसर देशातून ज्या लोकांना
बाहेर काढले त्यांच्यापैकी कोणीही कनान देश कधीही
बघणार नाही. त्या लोकांनी मिसर देशात माझा पराक्रम
आणि मी केलेल्या महान गोष्टी पाहिल्या. आणि वाळवंटात
ज्या महान गोष्टी मी केल्या त्याही त्यांनी बघितल्या. परंतु
त्यांनी माझी आज्ञा पाळली नाही आणि माझी दहादा परीक्षा
पाहिली. 23मी त्यांच्या पूर्वजांना वचन दिले. मी त्यांना तो
प्रदेश देण्याचे वचन दिले. पण त्यांच्यापैकी जे लोक
माझ्याविरुद्ध गेले ते कधीही त्या प्रदेशात पाऊल टाकणार
नाहीत. 24पण माझा सेवक कालेब वेगळा होता. तो माझे
अनुकरण पूर्णपणे करतो. म्हणून मी त्याला त्याने आधी
पाहिलेल्या प्रदेशात घेऊन जाईन. आणि त्याच्या वंशजांना
तो प्रदेश मिळेल. 25अमालेकी आणि कनानी लोक
खोऱ्यात रहात आहेत. म्हणून उद्या तुम्ही ही जागा सोडली
पाहिजे. तांबड्या समुद्राकडे रस्त्यावरच्या वाळवंटात परत
जा.”

## परमेश्वर लोकांना शिक्षा करतो

26परमेश्वर मोशेला आणि अहरोनला म्हणाला, 27“हे
वाईट लोक किती काळ माझ्याविरुद्ध तक्रार करीत राहणार
आहेत? मी त्यांच्या तक्रारी आणि कुरकुरी ऐकलेल्या
आहेत. 28म्हणून तू त्यांना सांग, ‘ज्याविषयी तुम्ही तक्रार
करत. त्या सर्व गोष्टी परमेश्वर तुम्हाला करील. तुम्हाला
पुढील गोष्टी होतील. 29तुम्ही या वाळवंटात मराल. वीस
वर्षांचा किंवा त्याहून मोठा असलेला आणि माझ्या
लोकांपैकी असलेला प्रत्येक जण मरेल. तुम्ही माझ्याविरुद्ध,
परमेश्वराविरुद्ध तक्रार केली आहे. 30म्हणून जो प्रदेश
देण्याचे वचन मी तुम्हाला दिले त्या प्रदेशात तुमच्यापैकी
कोणीही प्रवेश करणार नाही आणि कोणीही राहाणार
नाही. फक्त यफुन्नेचा मुलगा कालेब आणि नूनाचा मुलगा
यहोशवा त्या प्रदेशात जातील. 31त्या प्रदेशातील लोक
तुमची मुले नेतील अशी भीती तुम्हाला वाटली आणि
त्याविरुद्ध तुम्ही तक्रार केली. पण मी तुम्हाला सांगतो की

**क्षमा करतो** किंवा सोडून देतो.

**आणि पंतवंडना ... वाईट गोष्टी** किंवा परमेश्वर वडिलांच्या अपराधची शिक्षा त्याच्या मुलांना आणि नातवंडांना तिसऱ्या किंवा चौथ्या पिढीला सुध्दा देतो.

मी ती मुले त्या प्रदेशात आणीन. तुम्ही ज्या गोष्टींचा
स्वीकार करायला नकार दिला त्या गोष्टींचा ते उपभोग
घेतील. 32आणि तुमच्याबद्दल बोलायचे तर तुम्ही या
वाळवंटात मराल

33"तुमची मुले इथे या वाळवंटात 40 वर्षे भटकणारे
मेंढपाळ असतील. त्यांना दुःख भोगावे लागेल कारण
तुम्ही माझ्याशी इमानदार नव्हता. या वाळवंटात जोपर्यंत
तुम्ही मरणार नाही तोपर्यंत त्यांना दुःख भोगावे लागेल.
34तुम्हाला तुमच्या पापाबद्दल 40 वर्षे दुःख भोगावे लागेल.
(त्या माणसांना तो प्रदेश शोधायला 40 दिवस लागले. त्या
प्रत्येक दिवसासाठी एक वर्ष) मी तुमच्या विरोधात असणे
ही किती भयानक गोष्ट आहे हे तुम्हाला समजेल.

35"मी परमेश्वर आहे आणि मी बोललो आहे. मी
वचन देतो की या दुष्ट माणसांना मी या सर्व गोष्टी करीन.
माझ्याविरुद्ध जाण्यासाठी ते लोक एकत्र आले म्हणून ते
सर्व या वाळवंटात मरतील."

36मोशेने ज्या लोकांना नवीन प्रदेश शोधण्यासाठी
पाठवले होते त्याच लोकांनी परत येऊन इस्राएल लोकांमध्ये
तक्रारी पसरावयाला सुरुवात केली. ते लोक म्हणाले की
त्या प्रदेशात जाण्याइतके आपले लोक शक्तिवान नाहीत.
37इस्राएल लोकांमध्ये संकटे पसरविण्यास तेच लोक
जबाबदार होते म्हणून परमेश्वराने त्या लोकांना
मारण्यासाठी आजार निर्माण केला. 38यफुन्नेचा मुलगा
कालेब आणि नूनाचा मुलगा यहोशवा हे ही तो प्रदेश
शोधायला पाठवलेल्या लोकांत होते परंतु परमेश्वराने
त्या दोघांना वाचवले. ज्या आजाराने इतर सर्वजण मेले,
तो आजार त्या दोघांना झाला नाही.

## लोक कनानमध्ये जाण्याचा प्रयत्न करतात

39मोशेने या सर्व गोष्टी इस्राएल लोकांना सांगितल्या.
लोक खूप दुःखी झाले. 40दुसऱ्या दिवशी पहाटे लोकांनी
डोंगरावर असलेल्या त्या प्रदेशात जायला सुरुवात केली.
लोक म्हणाले, "आम्ही पाप केले आहे. आम्ही
परमेश्वरावर विश्वास ठेवला नाही याचे आम्हाला वाईट
वाटते. परमेश्वराने वचन दिलेल्या प्रदेशात आम्ही जाऊ."

41पण मोशे म्हणाला, "तुम्ही परमेश्वराची आज्ञा का
पाळत नाही? तुम्हाला यश मिळणार नाही. 42त्या प्रदेशात
जाऊ नका. परमेश्वर तुमच्याबरोबर नाही म्हणून तुमचा
सहज पराभव होऊ शकेल. 43अमालेकी आणि कनानी
लोक तेथे तुमच्याविरुद्ध लढतील. तुम्ही परमेश्वरापासून
दूर गेला आहात म्हणून युध्दाच्या वेळी तो तुमच्याबरोबर
नसेल आणि तुम्ही सर्व युद्धात मारले जाल."

44परंतु लोकांनी मोशेवर विश्वास ठेवला नाही. ते उंच
डोंगरावरच्या प्रदेशात गेले. परंतु मोशे आणि परमेश्वराचा
आज्ञापटाचा कोश त्यांच्याबरोबर गेला नाही.
45डोंगरावरच्या प्रदेशात राहणारे अमालेकी आणि कनानी
लोक खाली आले आणि त्यांनी इस्राएल लोकांवर हल्ला
केला. त्यांनी इस्राएल लोकांचा सहज पराभव केला आणि
हर्मापर्यंत त्यांचा पाठलाग केला.

## यज्ञासंबंधीचे नियम

15 परमेश्वर मोशेला म्हणाला, 2"इस्राएल
लोकांबरोबर बोल आणि त्यांना सांग." मी तुम्हाला
एक प्रदेश वस्ती करण्यासाठी देत आहे. तुम्ही जेव्हा तिथे
प्रवेश कराल तेव्हा 3तुम्ही परमेश्वराला खास होमार्पणे
द्या. त्याच्या सुवासाने परमेश्वरास आनंद होईल. तुम्ही
तुमच्या गायी, मेंढ्या आणि बकऱ्या यांचा उपयोग होमार्पण
यज्ञ नवस स्वखुशीने द्यावयाच्या देणग्या किंवा नेहमीच्या
यज्ञातला भाग म्हणून उपयोग कराल.

4"एखादा माणूस जेव्हा त्याची अर्पणे आणतो तेव्हा त्याने
परमेश्वराला धान्यसुध्दा अर्पण केले पाहिजे. हे धान्यार्पण
आठ कप* सपीठ 1/4 हिंनभर* तेलात मिसळून केलेले
असले पाहिजे. 5प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही छोटी
बकरी/कोकरु अर्पण कराल तेव्हा त्याच्याबरोबर 1/4
कप द्राक्षारस पेयार्पण केला पाहिजे.

6"जर तुम्ही मेंढा अर्पण करणार असाल तर त्याच्या
बरोबर धान्यार्पणही केले पाहिजे. हे धान्यार्पण सोळा कप*
सपीठ 1/3 हिन* तेलात मिसळून दिले पाहिजे. 7आणि
तुम्ही 1/4 कप द्राक्षारस पेयार्पण केला पाहिजे. त्याचा
सुवास परमेश्वराला आनंदित करेल.

8"जेव्हा तुम्ही लहान बैल होमार्पण म्हणून अर्पण कराल
किंवा शांत्यार्पण म्हणून द्याल किंवा परमेश्वराला दिलेले
खास वचन म्हणून अर्पण कराल. 9तेव्हा त्या गोऱ्ह्या
बरोबर तुम्ही धान्यार्पणसुध्दा आणले पाहिजे. हे धान्यार्पण
24 कप* सपीठ 2 कप तेलात मिसळलेले असले पाहिजे.
10त्याच्याबरोबर 2 कप* द्राक्षारस पेयार्पण केला पाहिजे.
हे अर्पण होमार्पण असेल त्याचा सुवास परमेश्वराला
आनंदित करील. 11तुम्ही परमेश्वराला जो बैल, मेंढा,
मेंढी किंवा बकरी यांचे अर्पण कराल ते याप्रमाणे तयार
करायला पाहिजे. 12तुम्ही जो प्राणी अर्पण कराल त्या
प्रत्येका बरोबर हे ही अर्पण करा.

13"अशाप्रकारे इस्राएलच्या प्रत्येक नागरिकाने
परमेश्वराला आनंदित करण्यासाठी होमार्पण केले पाहिजे.
14परदेशी लोक तुमच्यातच राहतील. परमेश्वराला प्रसन्न
करण्यासाठी त्यांनीही या प्रमाणेच होमार्पण केले पाहिजे.
15हेच नियम सर्वांना लागू आहेत. इस्राएलचे लोक आणि

---

**आठ कप** शब्दश: एफाचे 1/10.

**1/4 हिन** शब्दश: 1 क्वार्ट.

**सोळा कप** शब्दश: एफाचे 2/10.

**1/3 हिन** 1 1/4 क्वार्ट.

**24 कप** एफाचे 3/10.

**2 कप** 1/2 हिन.

परदेशी लोक तुमच्या देशात राहतात. त्यांना हे नियम
सर्वकाळ लागू राहतील. तुम्ही आणि तुमच्याबरोबर राहणारे
इतर लोक परमेश्वरापुढे समान आहात. [16]याचा अर्थ
असा की तुम्ही सारख्याच नियमाचे व विधींचे पालन
केले पाहिजे. हे नियम व विधी इस्राएल लोकांसाठी आणि
तुमच्यात राहणाऱ्या इतर लोकांसाठी आहेत."

[17]परमेश्वर मोशेला म्हणाला, [18]"इस्राएल लोकांना या
गोष्टी सांग: मी तुम्हाला दुसऱ्या प्रदेशात नेत आहे. [19]जेव्हा
तुम्ही तेथे पिकणारे अन्न खाल तेव्हा त्यातला थोडा भाग
परमेश्वराला अर्पण करा. [20]तुम्ही धान्य गोळा करुन ते
दळाल आणि त्याचे भाकरीसाठी पीठ कराल. त्या पिठाचा
पहिला भाग तुम्ही नेहमी परमेश्वराला अर्पण केला पाहिजे.
हे मळणीच्या वेळी धान्यार्पण करतात त्याप्रमाणे हे अर्पण
केले पाहिजे. [21]हा नियम सर्वकाळ राहील. त्या पीठाचा
पहिला भाग तुम्ही नेहमी परमेश्वराला अर्पण केला पाहिजे.

[22]"जर तुम्ही काही चूक केली आणि परमेश्वराने
मोशेला दिलेल्या एखाद्या आज्ञेचे पालन करायला विसरलात
तर तुम्ही काय कराल? [23]परमेश्वराने त्या आज्ञा तुम्हाला
मोशे मार्फत दिल्या आहेत ज्या दिवसापासून त्या दिल्या
तेव्हापासून त्या लागू आहेत. आणि त्या सदैव राहतील.
[24]तेव्हा जर तुम्ही चूक केलीत आणि या आज्ञांचे पालन
करायला विसरलात तर तुम्ही काय कराल? जर
इस्राएलच्या सर्व लोकांनी मिळून चूक केली तर त्यानी
सर्वांनी मिळून एक गोऱ्हा परमेश्वराला होमार्पण केला
पाहिजे. त्याचा सुवास परमेश्वराला आनंदित करील.
गोऱ्ह्याबरोबर धान्यार्पण आणि पेयार्पण करायला पाहिजे.
तुम्ही पापार्पणासाठी बकराही अर्पण केला पाहिजे.

[25]"म्हणून याजकाने लोकांना शुद्ध करण्यासाठी काही
गोष्टी केल्या पाहिजेत. त्याने या गोष्टी इस्राएलच्या सर्व
लोकांसाठी केल्या पाहिजेत. ते पाप करीत आहेत हे
लोकांना माहित नव्हते. पण जेव्हा ते त्यांना समजले तेव्हा
त्यांनी परमेश्वरासाठी भेट आणली. त्यांनी होमार्पण आणि
पापार्पण आणले म्हणून लोकांना क्षमा केली जाईल.
[26]इस्राएलाच्या सर्व लोकांना आणि त्यांच्यात राहणाऱ्या
इतर लोकांना क्षमा केली जाईल. त्यांना क्षमा करण्यात
येईल. कारण आपण चूक करीत आहोत हे त्यांना माहीत
नव्हते.

[27]"पण जर फक्त एकाच माणसाने चूक केली तर
त्याने एक वर्ष वयाची बकरी आणली पाहिजे. ती बकरी
पापासाठी अर्पण केली जाईल. [28]याजक त्या माणसाला
शुद्ध करण्यासाठी काही गोष्टी करील. त्या माणसाने चूक
केली आणि परमेश्वरापुढे पाप केले. पण याजकाने त्याला
शुद्ध केले तर त्याला क्षमा केली जाईल. [29]जो माणूस
चूक करतो आणि पाप करतो त्याच्यासाठी हा नियम
आहे. इस्राएलच्या कुटुंबात जन्मलेल्या लोकांसाठी व तुमच्या
घरात राहणाऱ्या परदेशी लोकांसाठी सारखेच नियम
आहेत.

[30]"पण जर एखाद्याने पाप केले आणि आपण चूक
करीत आहो हे त्याला कळत असले, तर तो माणूस
परमेश्वराविरुद्ध आहे. त्या माणसाला त्याच्या लोकांपासून
वेगळे काढून टाकले पाहिजे. इस्राएलाच्या वंशात जन्मलेल्या
माणसासाठी किंवा तुमच्यात राहणाऱ्या परदेशी माणसासाठी
सारखाच नियम आहे.

[31]परमेश्वराचा शब्द महत्वाचा आहे असा विचार त्या
माणसाने केला नाही आणि त्याने परमेश्वराची आज्ञा
मोडली. तर त्या माणसाला तुमच्या समूहापासून वेगळे
केलेच पाहिजे. तो माणूस अपराधी आहे आणि त्याला
शिक्षा झालीच* पाहिजे."

## माणूस विश्रांतीच्या दिवशी काम करतो

[32]या वेळी इस्राएल लोक अजून वाळवंटात रहात होते.
एका माणसाला जळणासाठी लाकूड सापडले म्हणून तो ते
गोळा करीत होता. परंतु तो शब्बाथचा दिवस होता. इतरांनी
त्याला ते करताना पाहिले. [33]ज्या लोकांनी त्याला लाकडे
गोळा करताना पाहिले त्यांनी त्याला मोशे व अहरोनाकडे
आणले आणि सर्व लोक भोवती गोळा झाले. [34]त्यांनी त्या
माणसाला तिथेच ठेवले कारण त्याला काय शिक्षा द्यायची
ते त्यांना माहीत नव्हते. [35]नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला,
"तो माणूस मेला पाहिजे. तेव्हा सर्व लोकांनी त्याच्यावर
छावणीबाहेर दगडमार करावा." [36]म्हणून लोक त्याला
छावणीबाहेर घेऊन गेले आणि त्याला दगडमार करून
मारले. परमेश्वराने मोशेला आज्ञा केली त्याप्रमाणे त्यांनी
हे केले.

## नियम लक्षात ठेवण्यासाठी परमेश्वर त्याच्या लोकांना मदत करतो

[37]परमेश्वर मोशेला म्हणाला, [38]"इस्राएल लोकांशी
बोल. त्यांना या गोष्टी सांग: माझ्या आज्ञा तुमच्या लक्षात
राहाण्यासाठी मी तुम्हाला काहीतरी देईन. दोऱ्याचे खूपसे
तुकडे एकत्र बांधा आणि ते तुमच्या कपड्याच्या एका
टोकाला बांधून ठेवा. त्या प्रत्येक गोंड्याला एक निळा
दोरा बांधा. या गोष्टी तुम्ही नेहमी अंगावर बाळगा. [39]तुम्ही
या गोंड्याकडे बघून परमेश्वराने दिलेल्या सगळ्या आज्ञा
लक्षात ठेवू शकाल. म्हणजे तुम्ही आज्ञा पाळाल. तुम्ही
आज्ञा विसरुन काहीही चूक करणार नाही आणि तुमच्या
शरीराला व डोळ्यांना हव्या असलेल्या गोष्टी करणार
नाही. [40]माझ्या सगळ्या आज्ञा पाळायच्या आहेत हे तुम्ही
लक्षात ठेवाल. म्हणजे तुम्ही परमेश्वराचे खास लोक
व्हाल. [41]मी तुमचा देव परमेश्वर आहे. तुम्हाला मिसर
देशातून आणणारा मीच आहे. तुमचा देव होण्यासाठी मी
हे केले. मीच तुमचा देव परमेश्वर आहे."

---

**त्याला शिक्षा झालीच** शब्दश: त्याचा अपराध त्याच्यावर आहे.

## कोणी नेते मोशेविरुध्द उठले

16 कोरह, दाथान, अबीराम आणि ओन मोशेच्या
विरुद्ध गेले. (कोरह इसहारचा मुलगा होता. इसहार
कहाथचा मुलगा होता आणि कहाथ लेवीचा मुलगा होता.
दाथान आणि अबीराम भाऊ होते आणि ती अलीयाबाची
मुले होती. ओन पेलेथचा मुलगा होता. दाथान, अबीराम
आणि ओन रऊबेन वंशातील होते.) 2या चार माणसांनी
इस्राएल मधून 250 माणसे एकत्र जमविली आणि ते
मोशेविरुद्ध उठले. ते लोकांनी निवडलेले नेते होते, हे
सर्व लोकांना माहीत होते. 3ते मोशे विरुद्ध बोलण्यासाठी
समुहाने आले. ते लोक मोशेला आणि अहरोनला म्हणाले,
"तुम्ही फारच अधिकार दाखवता आता पुरे झाले! इस्राएलचे
इतर लोक ही पवित्र आहेत. त्यांच्यात अजूनही परमेश्वर
राहतो. तुम्ही परमेश्वराच्या इतर लोकांपेक्षा स्वत:ला
अधिक महत्वाचे समजत आहात."

4जेव्हा मोशेने या गोष्टी ऐकल्या तेव्हा त्याने त्याचे तोंड
जमिनीपर्यंत लवविले. तो गार्विष्ठ नाही हे त्याला दाखवायचे
होते. 5मग मोशे कोरह व त्याच्या सर्व अनुयायांना म्हणाला,
"उद्या सकाळी परमेश्वर कोण खरोखर त्याचा माणूस
आहे ते दाखवील. कोण खरा पवित्र आहे ते परमेश्वर
दाखवील आणि परमेश्वर त्या माणसाला त्याच्या जवळ
आणिल. परमेश्वर त्या माणसाची निवड करील आणि
त्याला स्वत: जवळ आणिल. 6म्हणून कोरह तू आणि
तुझ्या अनुयायांनी हे करायला हवे:

7उद्या अग्नी आणि ऊद–धूप काही खास भांड्यात ठेवा.
नंतर ती भांडी परमेश्वरासमोर आणा. खरोखरच जो
पवित्र असेल त्याची परमेश्वर निवड करील. लेवीच्या
वंशजांनो तुम्ही फार पुढे गेलात. तुम्ही चूक केलीत."

8मोशे कोरहला आणखी म्हणाला, "लेवीच्या वंशजांनो
तुम्ही माझे ऐका 9तुमची निवड इस्राएलाच्या देवाने केली
आहे आणि तुम्हाला खास दर्जा दिला आहे म्हणून तुम्ही
आनंदी असायला हवे. तुम्ही इस्राएलच्या इतर लोकांपेक्षा
वेगळे आहात. परमेश्वराने तुम्हाला खास कामासाठी,
इस्राएल लोकांना परमेश्वराची भक्ती करायला मदत व्हावी
म्हणून त्याच्या पवित्र निवास मंडपात त्याच्या जवळ आणले.
हे पुरेसे नाही का? 10परमेश्वराने लेवीच्या वंशजांना
याजकांच्या मदतीसाठी जवळ आणले. परंतु आता तुम्हीच
याजक व्हायचा प्रयत्न करीत आहात. 11तुम्ही आणि तुमचे
अनुयायी एकत्र आलात आणि परमेश्वराच्या विरुद्ध गेलात.
अहरोनाने काही चूक केली का? नाही. मग तुम्ही
अहरोनाविरुद्ध का तक्रार करीत आहात."

12नंतर मोशेने दाथान, अबीराम, ह्या अलियावाच्या
मुलांना बोलावले पण ते दोघे म्हणाले, "आम्ही येणार
नाही. 13तू आम्हाला वाळवंटात दूध आणि मध असलेल्या
प्रदेशातून आणले आहेस. तू आम्हाला वाळवंटात ठार
मारायला आणले आहेस. आणि आता आमच्यावर तुझी
अधिक सत्ता आहे हे तुला दाखवायचे आहे. 14आम्ही
तुझ्या मागे का यावे? तू आम्हाला चांगल्या गोष्टींनी समृद्ध
असलेल्या नवीन प्रदेशात आणले नाहीस. देवाने कबूल
केलेला प्रदेश तू आम्हाला दिला नाहीस. तू आम्हाला शेते
व द्राक्षमळे दिले नाहीस तू ह्या लोकांना गुलाम करणार
आहेस का? नाही. आम्ही येणार नाही."

15म्हणून मोशेला खूप राग आला. तो परमेश्वराला
म्हणाला, "मी या लोकांच्या बाबतीत काहीही वाईट केले
नाही. मी त्यांच्या कडून काहीही घेतले नाही–साधा गाढव
देखील नाही! परमेश्वरा, त्यांची अर्पणे स्विकारु नकोस."

16नंतर मोशे कोरहला म्हणाला, "उद्या तू आणि तुझे
अनुयायी परमेश्वरापुढे उभे राहतील. तिथे तू अहरोन
आणि तुझे अनुयायी असतील. 17तुम्ही प्रत्येकाने एक
भांडे आणावे त्यात ऊद–धूप टाकावा आणि ते परमेश्वराला
द्यावे. नेत्यांसाठी 250 भांडी असतील आणि एकेक भांडे
तुझ्यासाठी व अहरोनासाठी असेल."

18म्हणून प्रत्येकाने भांडे आणले आणि त्यात उद धूप
जाळला. नंतर ते दर्शन मंडपाच्या दारात उभे राहिले.
मोशे आणि अहरोनसुद्धा तिथे उभे राहिले. 19कोरहनेसुद्धा
तंबूच्या दारात लोक जमा केले. नंतर प्रत्येकाला
परमेश्वराची प्रभा दिसली.

20परमेश्वर मोशेला आणि अहरोनाला म्हणाला, 21"या
लोकांपासून दूर जा. मला आता त्यांचा नाश करायचा
आहे."

22पण मोशे आणि अहरोन जमिनीवर पालथे पडले
आणि ओरडले, "कृपा करुन या सगळ्यांवर रागावू नकोस,
सर्वांच्या आत्म्यांच्या देवा! फक्त एका माणसाने पाप केले
आहे!"

23नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, 24"सर्व लोकांना
कोरह, दाथान, व अबीराम यांच्या तंबूपासून दूर जायला
सांग."

25मोशे उभा राहिला आणि दाथान व अबीराम यांच्याकडे
गेला. इस्राएलचे सर्व वडिलधारी त्याच्या मागे गेले. 26मोशेने
सर्व लोकांना बजावले, "या दुष्टांच्या तंबू पासून दूर जा.
त्यांच्या कोणत्याही वस्तूला हात लावू नका.जर तुम्ही हात
लावला तर त्यांच्या पापामुळे तुमचाही नाश होईल."

27म्हणून लोक कोरह, दाथान, व अबीराम यांच्या तंबू
पासून दूर गेले. दाथान आणि अबीराम त्यांच्या तंबूकडे
गेले. ते त्यांच्या तंबू बाहेर आपल्या बायका, मुले आणि
तहान्या मुलांबरोबर उभे राहिले.

28नंतर मोशे म्हणाला, "परमेश्वराने मला मी तुम्हाला
सांगितलेल्या गोष्टी करायला पाठवले आहे या बद्दलचा
पुरावा मी तुम्हांला दाखवीन. या गोष्टी करण्याची कल्पना
माझी नव्हती हेही मी तुम्हांला दाखवीन. 29हे इथले लोक
मरतील. पण ते जर सामान्य रीतीने मेले–जशी माणसे
नेहमी मरतात–तर त्यावरून असे दिसेल की परमेश्वराने
मला खरंच पाठवलं नाही. 30पण जर परमेश्वराने या
लोकांना वेगळ्या नव्या रीतीने मारले–तर तुम्हांला कळेल

की त्यांनी परमेश्वराविरुद्ध पाप केले होते. हा पुरावा आहे: धरती दुभागेल आणि त्या लोकांना आपल्या पोटात घेईल. ते जिवंतपणीच त्यांच्या कबरेत जातील. आणि त्यांची सर्व चीजवस्तू त्यांच्याबरोबर जाईल.”

31जेव्हा मोशेचे बोलणे संपले तेव्हा त्या लोकांच्या पायाखालची जमीन दुभागली. 32धरतीने जणू आपले तोंड उघडून त्यांना गिळून टाकले. कोरहची सगळी माणसे, त्याचे संपूर्ण घराणे आणि त्यांची सर्व चीजवस्तू त्यांच्याबरोबर जमिनीत गेली. 33ते लोक जिवंतपणी कबरेत गेले आणि त्यांची सगळी चीजवस्तूही त्यांच्या बरोबर गेली. नंतर जमीन पूर्ववत झाली. ते नष्ट झाले-लोकांतून नाहीसे झाले.

34इस्राएल लोकांनी नाश होत असलेल्या लोकांचे आक्रोश ऐकले म्हणून ते सर्व सैरावैरा धावू लागले आणि म्हणाले, “पृथ्वी आपल्यालासुद्धा गिळून टाकील”

35नंतर परमेश्वराकडून अग्नी आला. त्याने उद-धूप जाळणाऱ्या 250 लोकांचा नाश केला.

36परमेश्वर मोशेला म्हणाला: 37-38“याजक अहरोन याचा मुलगा एलाजार याला उदा-धूपाची सगळी भांडी अग्नी जवळून घ्यायला सांग. त्याला कोळसा आणि राख पसरावयाला सांग. त्या लोकांनी माझ्याविरुद्ध पाप केले आणि त्यांच्या पापामुळे त्यांना प्राण गमवावे लागले. पण उदा-धुपाची भांडी अजूनही पवित्र आहेत. ही भांडी पवित्र आहेत कारण ती परमेश्वराला अर्पण केली होती. भांडी ठोकून त्याचा पत्रा कर. या पत्र्याचा उपयोग वेदी झाकायला कर. इस्राएलाच्या सर्व लोकांना हा ताकीदीचा इशारा असेल.”

39म्हणून याजक एलाजारने लोकांनी आणलेली काशाची* सर्व भांडी गोळा केली. ते सगळे लोक जळून गेले पण त्यांची भांडी मात्र होती. नंतर एलाजारने काही माणसांना भांडी ठोकून त्यांचा पत्रा करायला सांगितले. नंतर त्याने धातूचा पत्रा वेदीवर ठेवला. 40परमेश्वराने मोशेला जशी आज्ञा केली होती तसेच त्याने केले. अहरोनच्या वंशातीलच कोणी तरी परमेश्वरासमोर उद-धूप जाळू शकतो, दुसऱ्या कोणी परमेश्वरासमोर उद-धूप जाळला तर तो कोरह आणि त्याच्या अनुयायांप्रमाणे मरेल, हे इस्राएल लोकांनी लक्षात ठेवायची ही एक खूण होती.

## अहरोन लोकांचे रक्षण करतो

41दुसऱ्या दिवशी इस्राएलच्या सर्व लोकांनी मोशे आणि अहरोनविरुद्ध तक्रार केली. ते म्हणाले, “तुम्ही परमेश्वराची माणसे मारली.”

42मोशे आणि अहरोन दर्शन मंडपाच्या दारात उभे होते. लोक मोशे आणि अहरोन विरुद्ध तक्रार करायला एकत्र जमले. पण जेव्हा त्यांनी दर्शन मंडपाकडे पाहिले तेव्हा ढगांनी त्याला झाकून टाकले आणि तिथे परमेश्वराचे तेज दिसू लागले. 43नंतर मोशे आणि अहरोन तंबूच्या पुढच्या भागात आले.

44परमेश्वर मोशेला म्हणाला, 45“त्या लोकांपासूर दूर जा म्हणजे मी त्यांचा नाश करीन ताबोडतोब. मोशे आणि अहरोन यांनी त्यांचे चेहरे जमिनीपर्यंत लववून दंडवत घातले.”

46नंतर मोशे अहरोनला म्हणाला, “तुझे तांब्याचे भांडे आणि थोडासा अग्नी वेदीवरुन घे. नंतर त्यावर उद-धूप टाक. लवकर लोकांकडे जा आणि त्यांना शुध्द करण्यासाठी काहीतरी कर. परमेश्वर त्यांच्यावर रागावला आहे. आजार पसरायला सुरुवात झाली होती.”

47-48म्हणून अहरोनाने मोशेने जे सांगितले ते केले. अहरोनाने अग्नि व धूप घेतला आणि मग तो लोकांमध्ये धावत गेला. परंतु लोकात आजाराची लागण झाली होती म्हणून अहरोन मेलेल्या आणि अजून जिवंत असलेल्या लोकांच्या मध्ये जाऊन उभा राहिला अहरोनाने लोकांना पवित्र करण्यासाठी प्रायश्चित्त केले. आणि आजार तिथेच थांबला. 49पण त्या आजारामुळे 14,700 लोक मेले. यात कोरहमुळे मृत्युमुखी पडलेल्यांचा समावेश नाही. 50भयानक आजार थांबला आणि अहरोन दर्शन मंडपाच्या दाराशी असलेल्या मोशेकडे गेला.

## अहरोन मुख्य याजक असल्याचे परमेश्वर सिध्द करतो

17 परमेश्वर मोशेला म्हणाला, “इस्राएल लोकांशी बोल. त्यांच्या कडून चालण्यासाठी वापरतात 2तशा बारा काठ्या घे. बारा वंश प्रमुखांकडून प्रत्येकी एक काठी घे. प्रत्येक माणसाचे नाव त्याच्या त्याच्या काठीवर लिही. 3लेवीच्या काठीवर अहरोनचे नाव लिही. प्रत्येक वंश प्रमुखासाठी एकेक काठी असलीच पाहिजे. 4या काठ्या दर्शन मंडपात आज्ञापटाचा कोशाच्या वेदीजवळ ठेव. हीच मी तुला भेटण्याची जागा आहे. 5खरा याजक म्हणून मी एका माणसाची निवड करीन. मी कोणाची निवड केली ते तुला कळेल कारण त्याच्या काठीला पालवी फुटायला लागेल. याप्रमाणे मी लोक तुझ्या आणि माझ्याविरुद्ध तक्रारी करतात ते बंद पाडीन.”

6म्हणून मोशे इस्राएलच्या लोकांशी बोलला. प्रत्येक वंश प्रमुखाने त्याला काठी दिली. त्या 12 काठ्या होत्या. प्रत्येक वंश प्रमुखाकडून एकेक काठी आली. एक काठी अहरोनची होती. 7मोशेने त्या काठ्या कराराच्या मंडपात परमेश्वरा पुढे ठेवल्या.

8दुसऱ्या दिवशी मोशेने मंडपात प्रवेश केला. लेवी वंशाकडून आलेल्या अहरोनच्या काठीला पाने फुटली असल्याचे त्याला दिसले. त्या काठीला फांद्याही फुटल्या होत्या आणि बदामही लागले होते. 9म्हणून मोशेने परमेश्वराच्या जागेतून सगळ्या काठ्या आणल्या. मोशेने

---

**काशाची** धातू हिब्रू शब्दाचा अर्थ कास तांब किंवा पितळ.

त्या काठ्या इस्राएल लोकांना दाखवल्या. त्या सर्वांनी काठ्यांकडे पाहिले आणि प्रत्येकाने आपली काठी परत घेतली.

10नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, “अहरोनची काठी परत मंडपात आज्ञापटाचा कोशाजवळ ठेव. जे लोक नेहमी माझ्याविरुद्ध जातात त्यांच्यासाठी ही ताकिदीची खूण असेल. मी त्यांचा नाश करु नये म्हणून माझ्या विरुद्ध तक्रारी करणे यामुळे बंद होईल.” 11मोशेने परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले.

12इस्राएलचे लोक मोशेला म्हणाले, “आम्ही मरणार आहोत हे आम्हाला माहित आहे आम्ही हरवलो आहोत. आमचा सगव्व्यांचा नाश होणार आहे. 13जो कोणी माणूस नुसता परमेश्वराच्या पवित्र स्थानाजवळ येईल त्याचा नाश होईल. आम्ही मरणार हे खरे आहे का?”

## याजकांचे आणि लेवीच्या वंशजांचे काम

18 परमेश्वर अहरोनला म्हणाला, “या पवित्र जागेविरुद्ध काही वाईट गोष्टी केल्या तर तू, तुझी मुले, तुझ्या वडिलांच्या कुटुंबातले सगळे लोक त्याला जबाबदार रहाल. तू आणि तुझी मुले याजकांविरुध्द केलेल्या वाईट गोष्टींबद्दल जबाबदार राहाल. 2तुझ्या कुळातील इतर लेवी लोकांना आण. तुझ्याबरोबर आणि कराराच्या मंडपात काम करण्यासाठी ते तुला आणि तुझ्या मुलांना मदत करतील. 3लेवी वंशातील लोक तुझ्या सत्तेखाली आहेत. मंडपात जे जे काम करायचे आहे ते ते लोक करतील. परंतु त्यांनी पवित्र स्थानाजवळ आणि वेदीजवळ जाता कामा नये. जर ते गेले तर ते मरतील आणि तू सुध्दा मरशील. 4ते तुझ्या बरोबर असतील आणि तुला मदत करतील. ते दर्शन मंडपाची काळजी घ्यायला जबाबदार असतील. मंडपात जे काही काम करायचे असेल ते सर्व ते करतील. तू जेथे असशिल तेथे दुसरा कोणीही येऊ नये.

5“पवित्र जागेची आणि वेदीची काळजी घेण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे. इस्राएल लोकांवर मला पुन्हा रागवायचे नाही. 6इस्राएल मधल्या सर्व लोकांतून मीच लेवी लोकांना निवडले. ते तुझ्यासाठी एक भेट आहे. त्या लोकांना मी तुला दिले. ते परमेश्वराची सेवा करतील आणि दर्शन मंडपात काम करतील. 7पण अहरोन फक्त तू आणि तुझ्या मुलांनीच याजकाचे काम केले पाहिजे. वेदीजवळ फक्त तुम्हीच जाऊ शकता. अति पवित्र स्थानाच्या पडद्याआड फक्त तुम्हीच जाऊ शकता. मी तुला एक भेट देत आहे-याजक म्हणून तू करावयाची सेवा. माझ्या पवित्र स्थानाजवळ दुसरा कोणी आला तर त्याला मारुन टाकले जाईल.”

8नंतर परमेश्वर अहरोनला म्हणाला, “लोक मला ज्या खास भेटी देतात त्यांची जबाबदारी मी स्वत: तुझ्यावर टाकली आहे. इस्राएलाचे लोक ज्या पवित्र भेटी मला देतात त्या सर्व मी तुला दिल्या आहेत. तू आणि तुझी मुले त्या वाटून घेऊ शकता. त्या नेहमीच तुमच्या राहतील.

9लोक होमार्पण, धान्यार्पण, पापार्पणे आणि अपराधासाठी करावयाची अर्पणे इत्यादी बऱ्याच गोष्टी आणतील. ती अर्पणे पवित्र आहेत. सर्वांत पवित्र अर्पणातला न जळलेला भाग तुझा असेल. त्या सगव्व्या गोष्टी फक्त तुझ्यासाठी आणि तुझ्या मुलांसाठी असतील. 10त्या गोष्टी फक्त पवित्र जागेतच खा. तुझ्या कुटुंबातला प्रत्येक पुरुष ते खाऊ शकतो. पण ती अर्पणे पवित्र आहेत हे तू लक्षात ठेव.

11“आणि इस्राएलचे लोक ओवाळणीची अर्पणे म्हणून जी अर्पणे देतील ती सुध्दा तुझीच असतील. मी ती तुला, तुझ्या मुलांना आणि मुलींना देत आहे. हा तुझा वाटा आहे. तुझ्या कुटुंबातला प्रत्येक शुद्ध माणूस ती खाऊ शकेल.

12“आणि मी तुला सर्वात चांगले जैतूनाचे तेल, नवीन द्राक्षारस आणि धान्य देत आहे. या गोष्टी इस्राएलचे लोक मला परमेश्वराला देतात. कापणीच्या वेळी या गोष्टी ते प्रथम गोळा करतात. 13लोक जेव्हा कापणीच्या वेळी धान्य गोळा करतात तेव्हा प्रथम गोळा केलेले धान्य ते परमेश्वराकडे आणतात. म्हणून मी या गोष्टी तुला देतो आणि तुझ्या कुटुंबातील शुद्ध माणसे ते खाऊ शकतात.

14“इस्राएलमधून ज्या ज्या गोष्टी परमेश्वराला देण्यात* येतात त्या तुझ्या आहेत.

15“स्त्रिचे पहिले मूल आणि जनावराचे पहिले पाडस परमेश्वराला अर्पण केलेच पाहिजे. ते मूल तुझे असेल. जन्माला आलेले पहिले पाडस जर अशुद्ध असेल तर ते परत मागे विकत घेतले पाहिजे. जर ते मूल असेल तर ते परत मागे विकत घेतले पाहिजे. ते मूल परत त्या कुटूंबाचे होईल. 16मूल एक महिन्याचे झाल्यानंतर त्यांनी पैसे दिले पाहिजेत. त्याची किंमत दोन औंस* चांदी इतकी असेल. तू चांदी मोजायला अधिकृत मोजमापच वापरले पाहिजेस. अधिकृत मोजमापानुसार एक शेकेल म्हणजे 20 गेरा*

17“परंतु तू प्रथम जन्मलेल्या गाय, मेंढी आणि बकरीसाठी पैसे देऊ नकोस. ते प्राणी पवित्र आहेत. त्यांचे रक्त वेदीवर शिंपड आणि त्यांची चरबी जाळून टाक. ही अग्नीत दिलेली अर्पणे आहेत. त्यांचा सुवास परमेश्वराला संतोष देतो. 18पण या प्राण्यांचे मांस तुझे असेल. ओवाळणीचा ऊर तुझा असेल आणि इतर अर्पणातली उजवी मांडी तुझीच असेल. 19लोक ज्या पवित्र गोष्टी मला अर्पण करतात त्या मी परमेश्वर तुला देतो. तो तुझा वाटा आहे. मी तो तुला, तुझ्या मुलांना व मुलींना देत आहे. हा नियम सदैव अस्तित्वात राहील. तो परमेश्वराबरोबर केलेला पवित्र

---

**परमेश्वराला देण्यात** देवाला दिलेल्या वस्तू त्या परत आणता येत नाहीत.

**दोन औंस** शब्दश: पाच शेकेल.

**20 गेरा** किंवा औंसाच्या 2/5.

करार आहे. तो मोडता* येणार नाही. मी तुला आणि
तुझ्या वंशजांना असे वचन देतो.”
20परमेश्वर अहरोनाला आणखी म्हणाला, “तुला
कुठलीही जमीन मिळणार नाही आणि जे दुसऱ्या लोकांचे
आहे ते तुला मिळणार नाही. मी परमेश्वर तुझा हिस्सा
आहे. इस्राएल लोकांना मी वचन दिल्याप्रमाणे जमीन
मिळेल. पण मी मात्र तुझी भेट आहे.
21“इस्राएलाचे लोक त्यांच्या जवळच्या सर्व गोष्टीतला
दहावा हिस्सा देतील. म्हणून तो दहाव्वा भाग मी लेवीच्या
सर्व वंशजांना देतो. ते दर्शन मंडपात जे काम करतील
त्याचा हा मोबदला आहे. 22परंतु इस्राएलच्या इतर लोकांनी
कधीही दर्शन मंडपाजवळ जाता कामा नये. ते जर गेले
तर त्यांना मारून टाकण्यात यावे. 23लेवीचे जे वंशज
दर्शन मंडपात काम करतात ते त्याच्याविरुद्ध केलेल्या
पापाला जबाबदार असतील. हा नियम नेहमी अस्तीत्वात
राहील. मी इस्राएल लोकांना जी जमीन देण्याचे वचन
दिले आहे ती जमीन लेवींना मिळणार नाही. 24परंतु
इस्राएल लोकांजवळ जे आहे त्याचा दहावा भाग ते मला
देतील. आणि तो दहावा भाग मी लेवी लोकांना देईन.
म्हणून मी लेवी लोकांबद्दल असे बोललो: त्या लोकांना
मी इस्राएल लोकांना जी जमीन देणार आहे ती मिळणार
नाही.”
25परमेश्वर मोशेला म्हणाला, 26“तू लेवी लोकांशी
बोल आणि त्यांना सांग: इस्राएलाचे लोक त्यांच्या जवळ जे
जे आहे त्या सगळ्याचा दहावा भाग परमेश्वराला देतील.
तो दहावा भाग लेवी लोकांचा असेल. पण त्याचा दहावा
भाग तू परमेश्वराला अर्पण केला पाहिजेस.
27पिक काढल्यानंतर तुला धान्य देण्यात येईल आणि
द्राक्षारसही देण्यात येईल. म्हणून ती तुझी परमेश्वराला
देण्यात येणारी अर्पणे असतील. 28याप्रमाणे तू सुद्धा
इस्राएलाचे लोक देतात तशी परमेश्वराला अर्पणे देशील.
इस्राएलचे लोक परमेश्वराला जे देतात त्याच्या दहावा
भाग ते तुला देतील आणि त्यातला दहावा भाग तू याजक
अहरोनाला देशील. 29इस्राएलचे लोक जेव्हा त्यांच्याकडे
असलेल्या गोष्टीतील दहावा भाग तुला देतील तेव्हा तू
त्यातला सर्वात चांगला आणि पवित्र भाग निवडायला
पाहिजेस आणि तो दहावा भाग तू परमेश्वराला अर्पण
केला पाहिजेस.
30“मोशे लेवी लोकांना सांग: इस्राएलचे लोक त्यांच्या
कापणीचा आणि द्राक्षरसाचा दहावा भाग त्यांना देतील.
तेव्हा तुम्ही त्यातला सर्वांत चागंला भाग परमेश्वराला
द्यावा. 31उरलेले तुम्ही आणि तुमचे कुटुंबीय ह्यांनी खावा.
तुम्ही दर्शन मंडपात जे काम करता त्याबद्दलची ही मजुरी
आहे. 32आणि जर तुम्ही सर्वांत चांगला दहावा भाग
परमेश्वराला द्याल तर तुम्ही कधीही अपराधी होणार
नाही. तुम्हाला हे नेहमी आठवेल की त्या भेटी म्हणजे
इस्राएल लोकांकडून पवित्र अर्पणे होत आणि तुम्ही मरणार
नाही.”

## लाल गायीची राख

19 परमेश्वर मोशेशी आणि अहरोनाशी बोलला.
तो म्हणाला, 2“परमेश्वराने इस्राएल लोकांना
जी शिकवण दिली तिचे हे नियम आहेत. काहीही दोष
नसलेली एक लाल गाय घ्या. त्या गायीला कसलीही इजा
झालेली नसावी आणि त्या गायीने मानेवर कधीही जू
घेतलेले नसावे. 3ती गाय याजक एलाजारला द्या. एलाजार
ती गाय छावणी बाहेर नेईल आणि तिथे तिला मारील.
4नंतर एलाजार, हा याजक थोडे रक्त आपल्या बोटावर
घेईल आणि काही रक्त दर्शनमंडपाकडे शिंपडेल. त्याने
असे सात वेळा केले पाहिजे. 5नंतर संपूर्ण गाय त्याच्या
समोर जाळली पाहिजे. कातडी, मास रक्त आणि आतडे
सर्वकाही जळले पाहिजे. 6नंतर याजकाने गंधसरूची एक
काठी, एजोबाची फांदी व लाल दोरी घ्यावी. याजकाने या
गोष्टी गाय जळत असलेल्या जाळात फेकाव्या. 7याजकाने
स्वत:ला आणि त्याच्या कपड्यांना स्वच्छ पाण्याने धुवावे.
आणि मगच छावणीत परत यावे. याजक संध्याकाळपर्यंत
अशुद्ध असेल. 8ज्या माणसाने गायीला जाळले असेल
त्याने स्वत:ला धुवावे. स्वत:चे कपडेही पाण्याने स्वच्छ
धुवावे. तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध असेल.
9“नंतर जो माणूस शुद्ध असेल तो गायीची राख गोळा
करेल. तो ती राख छावणीच्या बाहेर स्वच्छ जागी ठेवील.
शुद्ध होण्याचा जेव्हा लोक खास विधी करतात त्यावेळी
त्यांना या राखेचा उपयोग करता येईल. एखाद्याचे पाप
नाहीसे करण्यासाठी सुध्दा या राखेचा उपयोग करण्यात
येईल.
10“ज्या माणसाने गायीची राख गोळा केली असेल त्याने
त्याचे कपडे धुवावे. तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. हे
नियम नेहमी अस्तित्वात असतील.”
हा नियम इस्राएलच्या सर्व नागरिकांसाठी आहे आणि
तुमच्या बरोबर जे परदेशी लोक रहात आहेत त्यांच्यासाठीही
हा नियम आहे. 11जर एखाद्याने प्रेताला हात लावला तर
तो सात दिवस अशुद्ध राहील. 12त्याने स्वत:ला तिसऱ्या
दिवशी व नंतर सातव्या दिवशी खास पाण्याने धुवावे. जर
त्याने असे केले नाही तर तो अशुद्धच राहील. 13जर
एखाद्याने प्रेताला हात लावला तर तो अशुद्ध होईल. जर
माणूस अशुद्ध असताना पवित्र निवास मंडपात गेला तर
मंडपही अशुद्ध होईल. म्हणून त्या माणसाला इस्राएल
लोकांपासून दूर ठेवावे. जर अशुद्ध माणसावर खास पाणी
शिंपडले नाही तर तो अशुद्ध राहील.
14“जे लोक त्यांच्या मंडपात मरतात त्यांच्यासाठी हा
कायदा आहे. जर एखादा माणूस त्याच्या मंडपात मेला तर

**हा नियम ... मोडता** शब्दश: हा देवासमोर केलेला शाश्वत मिठाचा करार आहे.

त्या मंडपातले सगळे लोक आणि सगळ्या वस्तू अशुद्ध होतील. ते सात दिवस अशुद्ध राहतील. 15आणि झाकण नसलेले प्रत्येक भांडे अशुद्ध होईल. 16जर एखाद्याने प्रेताला हात लावला तर तो सात दिवस अशुद्ध राहील. जर ते प्रेत बाहेर उघड्यावर असेल किंवा तो माणूस युद्धात मारला गेला असेल तरच हे लागू आहे. आणि जर एखाद्याने मेलेल्या माणसाच्या अस्थींना हात लावला तरी तो माणूस सात दिवस अशुद्ध होईल.

17"त्या माणसाला पुन्हा स्वच्छ करण्यासाठी जाळलेल्या गायीची राख तुम्ही वापरली पाहिजे. एखाद्या भांड्यात राखेवर ताजे पाणी* टाका. 18शुद्ध माणसाने एजोबाची काठी घेऊन ती पाण्यात बुडवावी. नंतर ते पाणी तंबूवर, भांड्यावर आणि मंडपातल्या माणसांवर शिंपडावे. जो प्रेताला हात लावील त्याच्या बाबतीत हे करावे. तुम्ही हे प्रत्येकाला करा. जो युद्धात कबरेला हात लावील किंवा मेलेल्या माणसाच्या हाडांना हात लावील त्याच्या बाबतीत हे करा.

19"नंतर शुद्ध माणसाने हे पाणी तिसऱ्या व सातव्या दिवशी अशुद्ध माणसाच्या अंगावर शिंपडावे. तो माणूस सातव्या दिवशी शुद्ध होईल. त्याने त्याचे कपडे पाण्यात धुवावे. तो संध्याकाळी शुद्ध होईल.

20"एखादा माणूस अशुद्ध झाल्यांनंतर पुन्हा शुद्ध झाला नाही तर त्याला इस्राएल लोकांपासून वेगळे ठेवावे. त्या माणसावर ते खास पाणी शिंपडले नाही आणि तो शुद्ध झाला नाही तर तो पवित्र निवास मंडपही अशुद्ध करील. 21तुमच्यासाठी हा नियम सदैव असेल. ज्या माणसावर पाणी शिंपडणे त्या माणसाने स्वत:चे कपडे सुद्धा धुतले पाहिजेत. कुठल्याही माणसाने त्या खास पाण्याला स्पर्श केला तर तो संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील. 22जर त्या अशुद्ध माणसाने दुसऱ्या कोणाला स्पर्श केला तर तो माणूस सुद्धा अशुद्ध होईल. तो माणूस संध्याकाळपर्यंत अशुद्ध राहील.

## मिर्याम मरण पावते

20 इस्राएलचे लोक सीनच्या वाळवंटात पहिल्या महिन्यात आले. त्यांनी कादेशला मुक्काम केला. मिर्याम तेथे मरण पावली आणि तिला तेथेच पुरण्यात आले.

## मोशे चूक करतो

2त्या ठिकाणी लोकांना पुरेसे पाणी नव्हते. म्हणून ते मोशे आणि अहरोनजवळ तक्रार करण्यासाठी एकत्र आले. 3लोकांनी मोशेशी वाद घातला. ते म्हणाले, "आमचे भाऊ जसे परमेश्वरा समोर मेले तसेच आम्हीही मरायला हवे होते. 4तू परमेश्वराच्या लोकांना या वाळवंटात का आणलेस? आम्ही आणि आमची जनावरे इथे मरावी असं तुला वाटतं का? 5तू आम्हाला मिसर देशातून का आणलेस? तू आम्हाला या वाईट ठिकाणी का आणलेस? इथे धान्य नाही. इथे अंजीर, द्राक्षे किंवा डाळिंबही नाहीत आणि इथे पिण्यास पाणीही नाही."

6म्हणून मोशे आणि अहरोन लोकांची गर्दी सोडून दर्शन मंडपाच्या प्रवेशद्वाराशी गेले. त्यांनी जमिनीपर्यंत लवून नमस्कार केला आणि त्यांना परमेश्वराचे तेज दिसले.

7परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला: 8"चालण्याची खास काठी घे. तुझा भाऊ अहरोन याला आणि त्या लोकांना बरोबर घे आणि खडकाजवळ जा. लोकांसमोर खडकाशी बोल. नंतर त्या खडकातून पाणी वाहू लागेल आणि तू ते पाणी त्या लोकांना आणि त्यांच्या जनावरांना देऊ शकशील.

9चालण्याची काठी पवित्र निवास मंडपात परमेश्वरासमोर होती. परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे मोशेने काठी घेतली." 10मोशे आणि अहरोन यांनी लोकांना त्या खडकासमोर भेटायला सांगितले. नंतर मोशे म्हणाला, "तुम्ही लोक नेहमी तक्रारी करीत असता. आता माझे ऐका. मी आता या खडकातून पाणी काढीन." 11मोशेने आपला हात वर उचलला आणि काठीने खडकावर दोन वार केले. खडकातून पाणी बाहेर वाहू लागले आणि माणसे व जनावरे ते पाणी पिऊ लागली.

12पण परमेश्वर मोशेला आणि अहरोनला म्हणाला, "इस्राएलचे सगळे लोक एकत्र जमले होते. पण तू मला मान दिला नाहीस. पाणी निर्माण करण्याची शक्ती माझ्यामुळे आली हे तू लोकांना दाखवले नाहीस. तुझा माझ्यावर विश्वास आहे हे तू लोकांना दाखवले नाहीस. मी वचन दिल्याप्रमाणे त्या लोकांना तो प्रदेश देईन. पण तू त्यांना तिथे घेऊन जाणार नाहीस."

13त्या जागेला मरीबा असे नांव पडले. इस्राएल लोकांनी परमेश्वराबरोबर जिथे वाद घातला तीच ती जागा होती. याच जागेवर परमेश्वराने त्यांना तो किती पवित्र आहे ते दाखवले होते.

## अदोम इस्राएल लोकांना आपल्या हद्दीतून जाऊ देत नाही.

14मोशे कादेशला होता तेव्हा त्याने अदोमच्या राजाकडे काही लोकांना एक निरोप देऊन पाठवले. तो निरोप होता: "तुझे भाऊ, इस्राएलचे लोक तुला म्हणतात: आमच्यावर जी जी संकटे आली त्याबद्दल तुला माहिती आहेच. 15खूप खूप वर्षापूर्वी आमचे पूर्वज मिसर देशात गेले. आणि तिथे आम्ही अनेक वर्षे राहिलो. मिसर देशाचे लोक आमच्याशी फार दुष्टपणे वागले. 16पण आम्ही परमेश्वराकडे मदतीची याचना केली. परमेश्वराने आमची प्रार्थना ऐकली आणि आमच्या मदतीसाठी देवदूताला पाठविले. परमेश्वराने आम्हाला मिसर देशातून बाहेर आणले.

---

**ताजे पाणी** शब्दश: जिवंत पाणी म्हणजे ताजे वाहाणारे पाणी.

"आता आम्ही कादेशमध्ये आहोत. इथे तुझा प्रदेश सुरु
होतो. 17कृपा करुन आम्हाला तुझ्या प्रदेशातून जाऊ दे.
आम्ही कोठल्याही शेतातून वा द्राक्षाच्या मळ्यातून जाणार
नाही. आम्ही तुझ्या विहिरीचे पाणी पिणार नाही. आम्ही
राजरस्त्यांच्या बाजूने फक्त जाऊ. आम्ही रस्ता सोडून
डावीकडे अथवा उजवीकडे वळणार नाही. तुझ्या देशातून
बाहेर येईपर्यंत आम्ही रस्त्यावरच राहू."

18परंतु अदोमच्या राजाने उत्तर दिले, "तुम्ही आमच्या
देशातून जाणार नाही. जर तुम्ही आमच्या देशातून जायचा
प्रयत्न केला तर आम्ही येऊन तुमच्याशी तलवारीने युद्ध
करु.

19इस्राएल लोकांनी उत्तर दिले, "आम्ही मुख्य रस्त्यावरुन
जाऊ. जर आमची जनावरे तुमचे पाणी प्यायले तर आम्ही
तुम्हाला त्याचा मोबदला देऊ. आम्हाला फक्त तुमच्या
देशातून जायचे आहे. आम्हाला तो प्रदेश आमच्यासाठी
घ्यायची इच्छा नाही."

20पण अदोमने पुन्हा उत्तर दिले, "आम्ही तुम्हाला
आमच्या देशातून जाण्याची परवानगी देणार नाही."

नंतर अदोमच्या राजाने मोठी आणि शक्तिशाली
सेना गोळा केली आणि तो इस्राएल लोकांशी
लढण्यासाठी गेला. 21अदोमाने इस्राएल लोकांना त्याच्या
देशातून जाण्याची परवानगी दिली नाही. आणि
इस्राएलचे लोक तोंड फिरवून दुसऱ्या रस्त्याने निघून
गेले.

## अहरोन मरतो

22इस्राएलचे सर्व लोक कादेशहून होर पर्वताकडे गेले.
23होर पर्वत अदोमच्या सरहद्दीजवळ होता. परमेश्वर
मोशेला आणि अहरोनला म्हणाला, 24"अहरोनची
मरण्याची आणि त्याच्या पूर्वजांजवळ जाण्याची वेळ आली
आहे. मी इस्राएल लोकांना ज्या प्रदेशात नेण्याचे वचन
दिले होते तिथे अहरोन जाणार नाही. मोशे मी हे सांगत
आहे कारण तुम्ही मी मरिबाच्या पाण्याजवळ दिलेल्या
आज्ञा पूर्णपणे पाळल्या नाहीत.

25आता अहरोनला आणि त्याचा मुलगा एलाजार यांना
घेऊन होर पर्वतावर जा. 26अहरोनाचे खास कपडे त्याच्या
जवळून घे आणि ते कपडे त्याचा मुलगा एलाजार याला
घाल. अहरोन तिथे त्या पर्वतावर मरुन पडेल आणि तो
त्याच्या पूर्वजांकडे जाईल."

27मोशेने परमेश्वराची आज्ञा पाळली. मोशे, अहरोन
आणि एलाजार होर पर्वतावर गेले. इस्राएलाच्या सर्व
लोकांनी त्यांना जाताना पाहिले. 28मोशेने अहरोनाचे खास
कपडे काढले व ते एलाजारला घातले. नंतर अहरोन
पर्वतावर मेला. मोशे आणि एलाजार पर्वतावरुन खाली
आले.

29इस्राएलाच्या सर्व लोकांना अहरोन मेला हे कळले.
म्हणून त्यांनी 30 दिवस दुखवटा पाळला.

## कनानच्या लोकांबरोबर युद्ध

21 अरादचा कनानी राजा नेगेबमध्ये राहात होता.
इस्राएल लोक अथारीम वरून जात आहेत हे
त्याने ऐकले. म्हणून राजा त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी
बाहेर पडला आणि त्याने त्यांच्यातील काही लोकांना कैद
केले. 2नंतर इस्राएल लोकांनी परमेश्वरला खास वचन
दिले: "परमेश्वरा या लोकांचा पराभव करायला आम्हाला
मदत कर. जर तू हे केले तर आम्ही तुला त्यांची शहरे
देऊ. आम्ही त्यांचा संपूर्ण नाश करु."

3परमेश्वराने इस्राएल लोकांचे म्हणणे ऐकले आणि
त्याने इस्राएल लोकांना कनानी लोकांचा पराभव करायला
मदत केली. इस्राएल लोकांनी कनानी लोकांचा व त्यांच्या
शहरांचा संपूर्ण नाश केला. म्हणून त्या प्रदेशाला हर्मा
असे नाव पडले.

## पितळेचा साप

4इस्राएल लोकांनी होर पर्वत सोडला व ते तांबड्या
समुद्राकडे जाणाऱ्या रस्त्याला लागले. अदोम देशाला वळसा
घालून जाण्यासाठी त्यांनी असे केले. परंतु लोक अधीर
झाले. 5त्यांनी मोशेविरुद्ध व देवविरुद्ध तक्रार करायला
सुरुवात केली. लोक म्हणाले, "तू आम्हाला ह्या वाळवंटात
मरण्यासाठी मिसर देशातून बाहेर का आणलेस? इथे
भाकरी नाही, पाणी नाही आणि ह्या हलक्या अन्नाला
आम्ही कंटाळलो आहोत."

6तेव्हा परमेश्वराने लोकांमध्ये विषारी साप सोडले.
साप लोकांना चावले आणि बरेच इस्राएल लोक मेले.
7लोक मोशेकडे आले आणि म्हणाले, "आम्ही तुझ्या
विरुद्ध आणि परमेश्वराविरुद्ध बोललो तेव्हा आम्ही पाप
केले हे आम्हाला माहीत आहे. तू परमेश्वराची प्रार्थना
कर. हे साप आमच्या मधून काढून टाक." तेव्हा मोशेने
लोकांसाठी परमेश्वराची प्रार्थना केली.

8परमेश्वर मोशेला म्हणाला, "एक पितळेचा साप कर
आणि तो खांबावर ठेव. साप चावल्यानंतर जर एखाद्याने
खांबावरच्या पितळेच्या सापाकडे पाहिले तर तो माणूस
मरणार नाही." 9मोशेने परमेश्वराची आज्ञा पाळली त्याने
पितळेचा साप बनवला व तो खांबावर ठेवला. नंतर जेव्हा
जेव्हा एखाद्या साप चावलेल्या माणसाने त्या खांबावरच्या
पितळेच्या सापाकडे पाहिले तेव्हा तो जिवंत राहिला.

## मवाबाचा प्रवास

10इस्राएल लोक तो प्रदेश सोडून ओबोथ येथे आले.
11नंतर ओबोथ सोडून त्यांनी इये-आबारीमला मवाबाच्या
पूर्वेकडे वाळवंटात तळ दिला. 12तो सोडून ते जरेद खोऱ्यात
आले व तिथे तळ दिला. 13ते तेथूनही निघाले आणि
आर्णोन नदीच्या पैलतीरावरच्या वाळवंटात त्यांनी तळ
दिला. या नदीचा उगम आमोऱ्याच्या सरहद्दीवर आहे. या
नदीचे खोरे हीच मवाब आणि अमोरी यांची सरहद्द होती.

[14]म्हणून ‘परमेश्वराचे युद्ध’ या पुस्तकात त पुढील शब्द लिहिले आहेत:

“... आणि सुफातला वाहेब व आर्णोनची खोरी.
[15]आणि आर व रस्त्यांपर्यंतचे दऱ्यांजवळचे डोंगर हे
प्रदेश मवाबच्या सरहद्दीवर आहेत.”

[16]इस्राएल लोकांनी तो प्रदेश सोडला व ते बएर* येथे गेले. ही जागा विहिरीने युक्त होती. या ठिकाणी परमेश्वराने मोशेला सांगितले, “इथे लोकांना एकत्र आण. व मी त्यांना इथे पाणी देईन.” [17]नंतर इस्राएलचे लोक हे गाणे गाऊ लागले:

“विहिरींनो पाण्याने भरून जा. त्या संबंधी गाणे गा.
[18]महान लोकांनी ही विहीर खणली. त्यांनी ही विहीर त्यांच्या राजदंडानी व काठ्यांनी खणली. ही वाळवंटातील भेट* आहे.”

म्हणून लोकांनी त्या विहिर असलेल्या प्रदेशाला “मत्ताम” म्हटले. [19]लोक मत्तानहून नाहालीयेलला गेले. नंतर ते नाहीलयेलासहून बामोथला गेले. [20]लोक बामोथहून मवाबाच्या खोऱ्यात गेले. या जागी पिसगा पर्वताच्या उंच माथा वाळवंटाकडे जातो. (पिसगा पर्वताच्या उंच माथ्यावरुन वाळवंट दिसते)

## सिहोन आणि ओग

[21]इस्राएल लोकांनी काही माणसे आमोऱ्याचा राजा सीहोन याच्याकडे पाठवली. ते राजास म्हणाले, [22]“आम्हाला तुमच्या देशातून जाण्याची परवानगी द्या. आम्ही कुठल्याही शेतातून वा द्राक्षाच्या मळ्यातून जाणार नाही. आम्ही तुमच्या कुठल्याही विहिरीचे पाणी पिणार नाही. आम्ही केवळ राजामार्गावरुनच जाऊ.”

[23]पण सिहोन राजाने इस्राएल लोकांना त्याच्या देशातून जाण्याची परवानगी दिली नाही. राजाने आपले सैन्य गोळा केले आणि तो वाळवंटाकडे कूच करीत निघाला. तो इस्राएल लोकांबरोबर युद्ध करण्यासाठी निघाला होता. याहसला राजाच्या सैन्याने इस्राएल लोकांशी युद्ध केले.

[24]पण इस्राएल लोकांनी राजाला मारले. नंतर त्यांनी अर्णोन आणि यब्बोक नद्यांच्या मधला प्रदेश घेतला. त्यांनी अम्मोनी लोकांच्या सरहद्दीपर्यंतचा प्रदेश घेतला. ते त्या सरहद्दीवर थांबले कारण आम्मोनी लोक तिचे रक्षण करीत होते. [25]इस्राएल लोकांनी सगळी अम्मोनी शहरे घेतली आणि तिथे रहायला सुरुवात केली. त्यांनी हेशबोन शहराचा व आजुबाजूच्या लहान शहरांचाही पराभव केला.

[26]हेशबोनमध्ये अमोऱ्यांचा राजा सीहोन रहात होता. पूर्वी सीहोनने मवाबच्या राजाशी युद्ध केले होते. सीहोनने आर्णोन नदीपर्यंतचा प्रदेश घेतला होता. [27]त्यावरुन गायक हे गाणे गातात:

“जा व हेशबोन पुन्हा बांधा सीहोनचे शहर भक्कम करा.
[28]हेशबोनमधून आग निघाली आहे. आग सीहोनच्या शहरातून निघाली आहे. त्या आगीत मवाबमधले आर शहर बेचिराख झाले. अर्णोन नदीच्या वरचे डोंगर आगीत जळाले.
[29]मवाब, तुझ्या दृष्टीने हे वाईट आहे. कमोशचे लोक नष्ट झाले. त्याची मुले पळून गेली. त्याच्या मुलींना अमोऱ्याचा राजा सीहोन याने कैद करुन पकडून नेले.
[30]पण आम्ही अमोरी लोकांचा पराभव केला. आम्ही त्यांची शहरे उध्वस्त केली. हेशबोन पासून दीबोनपर्यंत. नाशीम पासून मेदबाजवळच्या नोफापर्यंत.”

[31]तेव्हा इस्राएल लोकांनी अमोरी लोकांच्या प्रदेशात तळ ठोकला.

[32]मग मोशेने याजेर शहर बघण्यासाठी काही लोकांना पाठवले. मोशेने हे केल्यानंतर इस्राएल लोकांनी ते शहर जिंकले. त्यांनी त्या शहरालगतची छोटी शहरेही घेतली. जे अमोरी लोक तिथे रहात होते त्यांना इस्राएल लोकांनी तिथून जायला भाग पाडले.

[33]नंतर इस्राएल लोक बाशानच्या रस्त्याला लागले. बाशानचा राजा ओग याने त्याचे सैन्य घेतले व तो इस्राएल लोकांशी लढण्यासाठी निघाला. तो त्यांच्याबरोबर एद्रेई येथे लढला.

[34]पण परमेश्वर मोशेला म्हणाला, “त्या राजाची भीती बाळगू नकोस. मी तुला त्याचा पराभव करायची परवानगी देईन. तू त्याचे सगळे सैन्य व त्याचा सगळा प्रदेश घेशील. तू हेशबोनमध्ये राहाणाऱ्या अमोऱ्यांचा राजा सीहोन ह्याचे जे केलेस तेच याचेही कर.”

[35]म्हणून इस्राएल लोकांनी ओगचा व त्याच्या सैन्याचा पराभव केला. त्यांनी त्याला व त्याच्या मुलांना आणि त्याच्या सैन्याला मारून टाकले. इस्राएल लोकांनी त्याचा सर्व प्रदेश घेतला.

## बालाम आणि मवाबचा राजा

22 नंतर इस्राएल लोक मवाबमधल्या यार्देन नदीच्या खोऱ्याकडे निघाले. यरिहोच्या पलिकडे असलेल्या यार्देन नदीजवळ त्यांनी तळ दिला.

[2–3]सिप्पोराच्या मुलाने, बालाक याने इस्राएल लोकांनी अमोरी लोकांचे काय केले ते पाहिले होते. मवाबचा राजा खूप घाबरला कारण इस्राएलचे लोक खूप होते. मवाब त्यांना खरोखरच भीत होता.

---

**बएर–** या हिब्रू शब्दाचा अर्थ विहिर असा आहे.

**वाळवंटातील भेट** हिब्रू भाषेत हा “माताना” शब्दाचा अर्थ आहे.

4मवाबचा राजा मिद्यानींच्या नेत्यांना म्हणाला, “गाय
जशी शेतातले सगळे गवत खाऊन टाकते तसेच हे लोक
आपला नाश करतील.”
त्यावेळी सिप्पोराचा मुलगा बालाक मवाबचा राजा होता.
5त्याने बौराचा मुलगा बलाम ह्याला बोलवायला काही
माणसे पाठवली. बलाम फरात नदीकाठी पथोर शहरात
रहात होता. इथेच बलामचे लोक रहात असत. बालाकाचा
निरोप हा होता: “एका नवीन राष्ट्राचे लोक मिसर मधून
आले आहेत. ते इतके आहेत की ते सगळा प्रदेश व्यापून
टाकतात. त्यांनी माझ्याजवळच तळ ठोकला आहे. 6ये
आणि मला मदत कर. मला एकट्याला हे लोक खूप
भारी आहेत. तुझ्याजवळ खूप शक्ति आहे हे मला माहीत
आहे. जर तू एखाद्याला आशीर्वाद दिलास तर त्याच्या
बाबतीत चांगल्या गोष्टी घडतात. आणि जर एखाद्याला
शाप दिलास तर त्याच्या बाबतीत वाईट गोष्टी घडतात.
म्हणून ये आणि या लोकांविरुद्ध बोल. कदाचित त्यानंतर
मी त्यांचा पराभव करु शकेन. मी त्यांना माझा देश
सोडायला भाग पाडू शकेन.”
7मवाब आणि मिद्यानचे पुढारी बलामशी बोलायला गेले.
त्याच्या कामाचा* मोबदला म्हणून त्यांनी बरोबर पैसै
नेले. नंतर त्यांनी बालाक काय म्हणाला ते बलामाला
सांगितले. 8बलाम त्यांना म्हणाला, “रात्री इथे रहा. मी
परमेश्वराशी बोलेन आणि तो काय उत्तर देतो ते तुम्हाला
सांगेन.” मवाबचे पुढारी त्या रात्री बलामबरोबर राहिले.
9देव बलामकडे आला आणि त्याने विचारले, “तुझ्याकडे
हे कोण लोक आले आहेत?”
10बलाम देवाला म्हणाला, “सिप्पोरचा मुलगा बालाकने,
मवाबच्या राजाने यांना माझ्याकडे एक निरोप देऊन
पाठवले आहे. 11तो निरोप हा: एका नवीन राष्ट्राचे लोक
मिसरमधून आले आहेत. ते इतके आहेत की ते सगळा
प्रदेश व्यापून टाकतात. म्हणून ये आणि त्या लोकांविरुद्ध
बोल. नंतर कदाचित मी त्या लोकांचा पराभव करु शकेन.
आणि त्यांना माझ्या देशातून जायला भाग पाडू शकेन.”
12पण देव बलामला म्हणाला, “त्यांच्याबरोबर जाऊ
नकोस. तू त्या लोकांविरुद्ध बोलू नकोस. ती माझा आशीर्वाद
मिळालेली माणसे आहेत.”
13दुसऱ्या दिवशी बलाम उठला आणि बालाकच्या
पुढाऱ्यांना म्हणाला, “तुम्ही तुमच्या देशात परत जा.
परमेश्वर मला तुमच्या बरोबर जाऊ देणार नाही.”
14त्यामुळे मवाबचे पुढारी बालाकाकडे परत गेले आणि
त्यांनी त्याला हे सांगितले. ते म्हणाले, “बलामने आमच्या
बरोबर यायला नकार दिला.” 15म्हणून बालाकने
बलामकडे दुसरे पुढारी पाठवले. यावेळी त्याने पहिल्या
वेळेपेक्षा खूप जास्त पुढारी पाठवले. हे पुढारी
पहिल्या पुढाऱ्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे होते. 16ते बलामकडे
गेले आणि म्हणाले, “बालाक, सिप्पोराचा मुलगा तुला हे
सांगतो: तुझ्या इथे येण्याच्या आड कुठलीही गोष्ट येऊ
देवू नको. 17मी जे सांगतो ते तू केलेस तर मी तुला
नक्कीच मान देईन आणि तू मला जे काही विनवशिल ते
मी करीन* पण तू ये व या लोकांविरुद्ध माझ्यासाठी
बोल.”
18बलामने बालाकाच्या पुढाऱ्यांना उत्तर दिले. तो
म्हणाला, “मी माझ्या देवाची, परमेश्वराची आज्ञा पाळली
पाहिजे. मी त्याच्या आज्ञे विरुद्ध काहीही करु शकत
नाही. परमेश्वराने सांगितल्या खेरीज मी कुठलीही
लहान-मोठी गोष्ट करणार नाही. बालाकाने मला त्याचे
सुंदर घर सोन्या-चांदीने भरुन दिले तरीही मी काही
करणार नाही. 19परंतु आजच्या रात्रीपुरते तुम्ही इथे मागच्या
सारखे राहू शकता. आणि परमेश्वर मला काय सांगतो ते
मला रात्रीतून कळू शकेल.”
20त्या रात्री देव बलामकडे आला. देव म्हणाला, “तुला
घेऊन जाण्यासाठी हे लोक पुन्हा आले आहेत. म्हणून तू
त्यांच्या बरोबर जाऊ शकतोस. पण मी जे सांगेन तेवढेच
तू कर.”

## बलाम आणि त्याचे गाढव

21दुसऱ्या दिवशी सकाळी बलाम उठला आणि त्याने
आपल्या गाढवीवर खोगीर घातले. नंतर तो मवाबच्या
पुढाऱ्यांबरोबर चालला. 22बलाम त्याच्या गाढवीवर बसला
होता. त्याचे दोन नोकर त्याच्याबरोबर होते. बलाम प्रवास
करीत होता तेव्हा देव त्याच्यावर रागावला. परमेश्वराचा
दूत रस्त्यावर बलामपुढे येऊन उभा राहिला. देवदूत
बलामला थांबवणार* होता.
23बलामच्या गाढवीने परमेश्वराच्या दूताला रस्त्यात उभे
असलेले पाहिले. देवदूताने हातात तलवार घेतली होती.
म्हणून गाढवी रस्ता सोडून शेतात गेली. बलामला देवदूत
दिसू शकला नाही. म्हणून तो गाढवीवर खूप रागावला.
त्याने गाढवीला मारले आणि जबरदस्तीने रस्त्यावर आणले.
24नंतर परमेश्वराचा दूत रस्ता जिथे अरुंद होता तिथे
थांबला. हा दोन द्राक्षांच्या मळ्यांच्या मधला भाग होता.
रस्त्याच्या दोन्ही बाजूला भिंती होत्या. 25गाढवीने पुन्हा
परमेश्वराच्या दूताला पाहिले म्हणून ती एका भिंतीला
चिकटून चालू लागली त्यामुळे बलामचा पाय भिंतीला
लागून चिरडला गेला. म्हणून बलामने गाढवीला पुन्हा
मारले.

---

**त्याच्या कामाचा** किंवा शाप देण्यासाठी त्याला लागणाऱ्या गोष्टीसाठी प्राचीन काळी लोक इतरांचे वाईट चिंतीत असत आणि या गोष्टी ते बऱ्याच पूर्वीच्या खास भांड्यावर लिहित आणि ते समारंभात वापरीत. वाईट गोष्टी खरोखरच घडल्या म्हणून ते असे करीत.

**मी जे सांगतो ... मी करीन** किंवा मी तुला खूप मान देईन.

**थांब** विरोध कर किंवा आळ घालणे.

26नंतर परमेश्वराचा दूत दुसऱ्या ठिकाणी उभा राहिला.
अरुंद रस्ता असलेले हे दुसरे ठिकाण होते. येथे वळायला
सुध्दा मुळीच जागा नव्हती. गाढवीला त्याला वळसा घालून
जाणे शक्य नव्हते. 27गाढवीने परमेश्वराच्या दूताला पाहिले
म्हणून बलाम तिच्यावर बसला असतानाच ती खाली बसली
त्यामुळे बलाम खूप रागावला आणि त्याने गाढवीला त्याच्या
चालण्याच्या काठीने मारायला सुरुवात केली.
28नंतर परमेश्वराने गाढवीला बोलते केले. गाढवी
बलामला म्हणाली, “तू माझ्यावर का रागावला आहेस?
मी तुला काय केले आहे? तू मला तीन वेळा मारलेस.”
29बलामने गाढवीला उत्तर दिले, “तू मला मूर्ख बनवलेस.
जर माझ्या हातात तलवार असती तर मी तुला मारुन
टाकले असते.”
30पण गाढवी बलामला म्हणाली, “बघ मी तुझीच गाढवी
आहे. खूप वर्षे तू माझ्यावर बसत आला आहेस. आणि या
पूर्वी मी असे काही केले नाही हे तुला माहीत आहे.”
‘हे खरे आहे’ बलाम म्हणाला.
31नंतर परमेश्वराने बलामाचे डोळे उघडले, तेव्हा त्याला
परमेश्वराचा दूत दिसला. तो रस्त्यात तलवार घेऊन उभा
होता. त्याने परमेश्वराच्या दूताला रस्त्यात जमिनीपर्यंत
वाकून नमस्कार केला.
32परमेश्वराच्या दूताने बलामला विचारले, “तू तुझ्या
गाढवीला तीनदा का मारलेस? तुला थांबवण्यासाठी मी
आलो आहे. पण अगदी ऐनवेळी* 33तुझ्या गाढवीने मला
पाहिले आणि ती दूर गेली. असे तीन वेळा घडले. जर
गाढवी वळली नसती तर आतापर्यंत मी तुला मारले असते
आणि तुझ्या गाढवीला जिवंत राहू दिले असते.”
34तेव्हा बलाम परमेश्वराच्या दूताला म्हणाला, “मी
पाप केले आहे. तू रस्त्यात उभा आहेस हे मला माहीत
नव्हते. मी जर चूक करीत असेन तर मी घरी परत
जाईन.”
35तेव्हा परमेश्वराचा दूत बलामला म्हणाला, “नाही! तू
या लोकांबरोबर जाऊ शकतोस. पण सावध रहा. मी जे
सांगेन तेच शब्द बोल.” म्हणून बलाम बालाकाने
पाठवलेल्या पुढाऱ्यांबरोबर गेला.
36बलाम येत असल्याचे बालाकाला समजले. म्हणून
तो बलामला भेटायला अर्णोन नदी जवळच्या मवाबच्या
शहरात गेला. ते त्याच्या देशाच्या उत्तर सरहद्दीवर होते.
37जेव्हा बालाकाने बलामला पाहिले तेव्हा तो त्याला
म्हणाला, “मी तुला आधीच यायला सांगितले होते. हे खूप
खूप महत्त्वाचे आहे असे मी तुला सांगत होतो. तू माझ्याकडे
का आला नाहीस? आता मी तुला कदाचित पैसे देऊ
शकणार नाही.”
38बलामने उत्तर दिले, “पण आताच मी येथे आलो
आहे. मी आलो आहे पण तू सांगितलेल्या गोष्टी मला
कदाचित करता येणार नाहीत. परमेश्वर देव जेवढे सांगेत
तेवढेच मी बोलू शकतो.”
39नंतर बलाम बालाकाबरोबर किर्याथ–हसोथ येथे
गेला. 40बालाकाने काही गुरे व मेंढ्या बळी म्हणून मारल्या.
त्याने थोडे मास बलामला दिले आणि थोडे त्याच्याबरोबर
असलेल्या पुढाऱ्यांना दिले.
41दुसऱ्या दिवशी सकाळी बालाक बलामला घेऊन
बामोथबाल शहरी गेला. तेथून त्यांना इस्राएल लोकांच्या
तळाचा शेवटचा भाग दिसू शकत होता.

## बलामचा पहिला संदेश

23 बलाम म्हणाला, “इथे सात वेद्या बांधा आणि
माझ्यासाठी सात बैल आणि सात मेंढे तयार ठेवा.”
2बलामने एक मेंढा व एक बैल प्रत्येक वेदीवर मारला.
3नंतर बलाम बालाकाला म्हणाला, “या वेदीजवळ थांब.
मी दुसरीकडे जातो. नंतर परमेश्वर माझ्याकडे येईल
आणि मी काय बोलायचे ते मला सांगेल” नंतर बलाम
उंच जागी गेला.
4देव त्या जागी बलामकडे आला आणि बलाम म्हणाला,
“मी सात वेद्या तयार केल्या आहेत. आणि प्रत्येक वेदीवर
मी एकेक मेंढा व बैल बळी दिला आहे.”
5नंतर परमेश्वराने काय बोलायचे ते बलामला सांगितले.
परमेश्वर म्हणाला, “बालाकाकडे परत जा आणि मी
सांगतो तेच त्याला जाऊन सांग.”
6तेव्हा बलाम बालाकाकडे परत गेला. बालाक अजूनही
वेदीजवळ उभा होता. आणि मवाबचे सर्व पुढारी तेथे
त्याच्याजवळ उभे होते. 7नंतर बलामने हे सांगितले:

पूर्वेकडच्या अराम पर्वतावरुन मवाबचा राजा बालाक
याने मला येथे आणले. बालाक मला म्हणाला, “ये,
माझ्यासाठी याकोब विरुद्ध बोल. ये इस्राएल लोकांविरुद्ध
बोल.”
8पण देव त्या लोकांच्या विरुद्ध नाही. म्हणून मी देखील
त्यांच्या विरुद्ध बोलू शकत नाही. परमेश्वराने त्यांचे काही
वाईट व्हावे असे म्हटले नाही म्हणून मी सुध्दा तसे करु
शकत नाही.
9मी त्या लोकांना पर्वतावरुन बघू शकतो. मी त्यांना
उंच डोंगरावरुन बघतो. ते लोक एकटे राहतात. ते दुसऱ्या
देशाचा भाग नाहीत.
10याकोबची माणसे कोण मोजू शकेल? ते धुळीच्या
कणांइतके असंख्य आहेत. त्यांचा चौथा हिस्सा देखील
कोणी मोजू शकणार नाही. मला चांगल्या माणसाप्रमाणे
मरु दे. त्यांच्या प्रमाणेच माझ्या आयुष्याचा शेवट सुखी
होऊ दे.

---

**पण अगदी ऐनवेळी** शब्दशः माझ्या समोरचा रस्ता जणू नाहीसा झाला किंवा कारण तू योग्य रीतीने करत नाही हे हिब्रू समजायला अवघड आहे.

11बालाक बलामला म्हणाला, “तू हे काय केलेस? माझ्या शत्रूंविरुद्ध बोलण्यासाठी मी तुला येथे आणले. पण तू तर त्यांना आशीर्वाद दिलास.”

12पण बलाम म्हणाला, “परमेश्वर जे सांगेल तेच मी बोलायला पाहिजे.”

13नंतर बालाक त्याला म्हणाला, “म्हणून माझ्याबरोबर दुसऱ्या जागी ये. तिथून तुला ह्यातील आणखी बरेच लोक दिसू शकतील. तू त्या सगळ्यांना बघू शकणार नाहीस. पण त्यांचा काही भाग तुला दिसू शकेल. कदाचित त्या जागेवरुन तू त्यांच्याविरुद्ध माझ्यासाठी काही बोलू शकशील.” 14तेव्हा बालाक बलामला पिसगाच्या माथ्यावरील सोकिमाच्या माळ्यावर* घेऊन गेला. तेथे बालाकने सात वेद्या बांधल्या. नंतर बालाकाने प्रत्येक वेदीवर एक बैल आणि एक मेंढा बळी दिला.

15तेव्हा बलाम बालाकाला म्हणाला, “या वेदीजवळ थांब. मी तिकडे जाऊन देवाला भेटून येतो.”

16परमेश्वर बलामकडे आला आणि काय बोलायचे ते त्याने त्याला सांगितले. नंतर परमेश्वराने बलामला बालाकाकडे जायला सांगितले. आणि त्याने सांगितलेलेच बोलायला सांगितले. 17म्हणून बलाम बलाकाकडे परत गेला. बालाक वेदीजवळच उभा होता. मवाबचे पुढारी त्याच्या जवळ होते. बालाकाने बलामला येताना पाहिले. आणि तो म्हणाला, “परमेश्वराने काय सांगितले?”

## बलामचा दुसरा संदेश

18 नंतर बलाम या गोष्टी म्हणाला,

“बालाका उभा रहा आणि मी काय सांगतो ते ऐक. सिप्पोरेच्या मुला, बालाका, मी सागतो ते ऐक:

19 देव माणूस नाही. तो खोटे बोलणार नाही. देव म्हणजे काही माणूस नाही. त्याचे निर्णय बदलणार नाहीत. जर परमेश्वराने सांगितले की तो एखादी गोष्ट करील. तर तो ती करीलच. जर परमेश्वराने वचन दिले तर तो ते वचन दिलेली गोष्ट करीलच.

20 परमेश्वराने मला त्या लोकांना आशीर्वाद द्यायला सांगितले, परमेश्वराने त्यांना आशीर्वाद दिला. म्हणून मी ते बदलू शकत नाही.

21देवाला याकोबाच्या माणसात काही चूक दिसली नाही. इस्राएल लोकांमध्ये देवाला पाप दिसले नाही. परमेश्वर त्यांचा देव आहे आणि तो त्यांच्या बरोबर आहे. थोर राजा त्यांच्या बरोबर आहे.

22देवाने त्या लोकांना मिसर देशातून आणले. ते रानबैला इतके शक्तिमान आहेत.

23याकोबाच्या माणसांचा पराभव करु शकेल अशी कोणतीही शक्ति नाही. इस्राएल लोकांना थोपवू शकेल अशी कोणतीही जादू नाही. लोक याकोबाबद्दल आणि इस्राएल लोकांबद्दल असे म्हणतील: ‘देवाने केलेल्या महान गोष्टी बघा.’

24ते लोक सिंहासारखे शक्तिमान आहेत. ते सिंहासारखे उठत आहेत. तो सिंह शत्रूला खाऊन टाकल्या खेरीज विश्रांती घेणार नाही. तो सिंह त्याच्याविरुद्ध असलेल्या लोकांचे रक्त प्यायल्या खेरीज विश्रांती घेणार नाही.”

25नंतर बालाक बलामला म्हणाला, “त्या लोकांच्या बाबतीत चांगल्या गोष्टी व्हाव्यात असे तू म्हटले नाहीस. पण त्यांच्या बाबतीत वाईट घडावे असेही तू म्हटले नाहीस.”

26बलाम उत्तरला, “मी तुला आधीच सांगितले होते की परमेश्वर जे सांगेल तेच मला बोलता येईल.”

27नंतर बालाक बलामला म्हणाला, “तेव्हा माझ्याबरोबर दुसऱ्या ठिकाणी ये. कदाचित देव आनंदी होईल आणि तुला त्या लोकांना शाप द्यायची परवानगी देईल.” 28म्हणून बालाक बलामला घेऊन पौर पर्वताच्या माथ्यावर गेला. या पर्वतावरुन वाळवंट दिसते.

29बलाम म्हणाला, “इथे सात वेद्या बांध. नंतर सात बैल आणि सात मेंढे बळी देण्यासाठी तयार कर.” 30बलामने सांगितल्याप्रमाणे बालाकाने साऱ्या गोष्टी केल्या. बालाकाने वेदीवर बैल आणि मेंढे बळी दिले.

## बलामचा तिसरा संदेश

24 इस्राएलला आशीर्वाद द्यायची परमेश्वराची इच्छा आहे हे बलामने पाहिले. म्हणून त्याने ते कुठल्याही प्रकारची जादू वापरुन थांबवायचा प्रयत्न केला नाही. पण तो वळला आणि त्याने वाळवंटाकडे पाहिले. 2बलामने वाळवंटाच्या कडे पाहिले आणि त्याला इस्राएलचे सगळे लोक दिसले. त्यांनी आपापल्या भागात आपापल्या गटांसह तळ दिला होता. नंतर देवाचा आत्मा बलामावर आला. 3आणि बलामने हे शब्द उच्चारले:

“हा निरोप बौराचा मुलगा बलाम याच्याकडून आहे. मला ज्या गोष्टी स्पष्ट दिसतात त्याविषयी मी बोलतो.

4मी हा निरोप देवाकडून ऐकला. सर्वशक्तिमान देवाने मला जे दाखविले ते मी पाहिले. मला जे दिसले त्याबद्दल मी नतमस्तक होऊन सांगत आहे.

5“याकोबाच्या माणसांनो तुमचे तंबू सुंदर आहेत. इस्राएल लोकांनो तुमचीघरे सुंदर आहेत.

6तुम्ही झऱ्याच्या काठी लावलेल्या बागेसारखे आहात. नदीकाठी वाढणाऱ्या बागे प्रमाणे तुम्ही आहात. तुम्ही परमेश्वराने लावलेल्या, गोड सुगंध असणाऱ्या झुडपाप्रमाणे आहात. पाण्याजवळ वाढणाऱ्या सुंदर झाडाप्रमाणे तुम्ही आहात.

7तुमच्याकडे नेहमी भरपूर पाणी असेल. तुमचे बी वाढण्यासाठी लागणारे पाणी तुमच्याकडे भरपूर असेल.

---

**सोकिमाच्या माळ्यावर** किंवा सोकीमचे शेत.

तुमचा राजा अगागच्या राजापेक्षा थोर असेल. तुमचे राज्य खूप महान असेल.

8“देवाने त्या लोकांना मिसरमधून आणले. ते रानटी बैलासारखे शक्तिशाली आहेत. ते त्यांच्या सर्व शत्रूंचा पराभव करतील. ते त्यांची हाडे मोडतील आणि त्यांचे बाण तोडतील.
9“इस्राएल सिंहासारखा आहे. तो वेटोळे करून झोपला आहे. होय. तो लहान सिहांप्रमाणे आहे आणि त्याला उठवायची कोणीही इच्छा धरत नाही. जो माणूस तुला आशीर्वाद देईल त्याला आशीर्वाद मिळेल. जो माणूस तुझ्या विरुद्ध बोलेल त्याच्यावर संकटे येतील.”

10बालाक बलामवर खूप रागावला. तो बलामला म्हणाला, “मी तुला माझ्या शत्रूंविरुद्ध बोलण्यासाठी बोलावले, पण तू त्यांना आशीर्वाद दिलास. तू त्यांना तीन
वेळा आशीर्वाद दिलास. 11आता इथून जा. घरी जा. मी तुला चांगला मोबदला देईन असे म्हटले होते. परंतु परमेश्वराने तुझे इनाम हिरावून घेतले.”
12बलाम बालाकाला म्हणाला, “तूच माझ्याकडे माणसे पाठविलीस. त्या माणसांनी मला येण्याबद्दल विचारले. पण
मी त्यांना म्हणालो, 13‘बालाक मला त्याचे सोन्या-चांदीने भरलेले घर देऊ शकेल. पण मी परमेश्वराने आज्ञा केलेल्या गोष्टीच बोलेन. मी स्वत: काहीही चांगले अथवा वाईट करु शकत नाही. परमेश्वर जेवढी आज्ञा देईल तेव्हढीच मी बोलतो.’ तुला या गोष्टी नक्कीच आठवत
असतील की मी हे तुझ्या माणसांना सांगितले होते. 14आता
मी माझ्या माणसांकडे परत जात आहे. पण मी तुला एक इशारा देतो. इस्राएलचे हे लोक भविष्यात तुला आणि तुझ्या लोकांना काय करतील ते सांगतो.”

## बलामचा शेवटचा संदेश

15 नंतर बलामने या गोष्टी सांगितल्या:

“हा निरोप बौरचा मुलगा बलाम याचा आहे. मला ज्या गोष्टी स्पष्ट दिसतात त्याबद्दल मी बोलतो.
16 मी हा निरोप देवाकडून ऐकला. परात्पर देवाने मला जे शिकविले ते मी शिकलो. सर्वशक्तिमान देवाने मला जे दाखविले ते मी पाहिले. मला जे स्पष्ट दिसते ते मी नतमस्तक होऊन सांगतो.
17“मला परमेश्वर येताना दिसतो, पण एवढ्यात नाही. तो मला एवढ्या लवकर येताना दिसत नाही. याकोबच्या घराण्यातून एक तारा उदय पावेल इस्राएल मधून एक राजा निघेल. तो राजा मवाबच्या लोकांना चिरडून टाकील. सेथच्या सर्व मुलांचा तो चुराडा करील.
18इस्राएल सर्वशक्तिमान बनेल. त्याला अदोमचा प्रदेश मिळेल. त्याला सेईरचा, त्याच्या शत्रूचा प्रदेश मिळेल.
19“याकोबाच्या घराण्यातून नवा राजा येईल. त्या शहरात जे लोक जिवंत राहिले असतील त्यांचा तो नाश करील.”
20नंतर बलामने अमालेकी लोकांना पाहिले आणि तो हे म्हणाला:

“सर्व अमालेकी बलिष्ठ आहेत. पण अमालेकचा सुद्धा नाश होईल.”

21नंतर बलामने केनी लोकांना पाहिले आणि तो म्हणाला:

“उंच पर्वतावर असलेल्या पक्ष्याच्या घरट्याप्रमाणे* तुमचा प्रदेश सुरक्षित आहे असे तुम्हाला वाटते.”
22पण केनी लोकांचासुद्धा नाश होईल. परमेश्वराने काईनाचा जसा नाश केला त्याप्रमाणे. अश्शूर तुला बंदिवान करील.”

23नंतर बलाम हे शब्द बोलला:

“देव जेव्हा असे करतो तेव्हा कोणीही जिवंत रहात नाही.
24कित्तीच्या किनाऱ्यावरुन बोटी येतील. त्या अश्शूर आणि एबेर याचा नाश करतील. पण त्या बोटींचासुद्धा नाश होईल.”

25नंतर बलाम उठला आणि त्याच्या घरी परत गेला आणि बालाकही मार्गस्थ झाला.

## इस्राएल लोक पौरला जातात

25 इस्राएल लोक शिट्टीमात रहात असताना त्यांनी मवाबच्या बायकांबरोबर लैंगिक पाप करायला सुरुवात केली.
2-3मवाबच्या स्त्रियांनी पुरुषांना आमंत्रण दिले आणि त्यांच्या खोट्या देवतेच्या अर्पणात त्यांना भाग घ्यायला सांगितले. म्हणून इस्राएलचे लोक त्या खोट्या देवतेच्या उपासनेत भाग घेऊ लागले. त्या जागेत, इस्राएल लोकांनी बआल पौरच्या खोट्या देवताची उपासना करायला सुरुवात केली आणि परमेश्वर त्यांच्यावर खूप रागावला.
4परमेश्वर मोशेला म्हणाला, “त्या सर्व लोकांच्या पुढाऱ्यांना आण, नंतर त्यांना मारून टाक म्हणजे सर्व लोकांना दिसेल.* त्यांची प्रेते परमेश्वरासमोर ठेव. नंतर परमेश्वर सर्व इस्राएल लोकांना त्याचा राग दाखवणार नाही.”

---

**घरटे** केनिट, केन शब्दांचा खेळ केन किंवा केनिट या शब्दाचा हिब्रू अर्थ घरटे असा आहे

**लोकांना दिसेल** शब्दश: सूर्या समोर.

5मोशे इस्राएलच्या न्यायधिशांना म्हणाला, “तुमच्यापैकी प्रत्येकाने अशा कुटुंब प्रमुखाला शोधले पाहिजे की ज्याने लोकांना बआलपौरच्या खोट्या देवताची उपासना करायला भाग पाडले. नंतर तुम्ही त्या माणसांना मारून टाका.”

6त्यावेळी मोशे आणि इस्राएलची वडीलधारी मंडळी (पुढारी) दर्शन मंडपाच्या प्रवेशद्वाराशी जमले होते. एका इस्राएली माणसाने एक मिद्यानी स्त्री त्यांच्यासमोर आपल्या भाऊंच्या घरी आणली. मोशे आणि इतर वडील धारी (पुढारी) यांनी ते पाहिले आणि ते खूप दुःखी झाले. 7फिनहास हा एलाजारचा मुलगा आणि याजक अहरोन याचा नातू होता. फिनहासने या माणसाला त्या स्त्रीला आणताना पाहिले. म्हणून फिनहासने तंबू सोडला व त्याने त्याची बरची घेतली 8त्याने त्या इस्राएली माणसाचा त्याच्या तंबूपर्यंत पाठलाग केला. नंतर त्याने त्या इस्राएली माणसाला व मिद्यानी स्त्रीला तिच्या मंडपात* मारण्यासाठी बरचीचा उपयोग केला. त्याने बरची त्या दोघांच्या शरीरात खुपसली. त्यावेळी इस्राएल लोकांमध्ये खूप मोठा आजार पसरला होता. पण फिनहासने त्या दोघांना मारल्यानंतर त्या आजाराचा प्रसार थांबला. 9या आजारामुळे एकून 24000 लोक मेले.

10परमेश्वर मोशेला म्हणाला, 11“माझ्या लोकांविषयी माझ्या भावना तीव्र आहेत. ते फक्त माझेच असावेत असे मला वाटते. एलाजारच्या मुलांने, याजक अहरोनच्या नातवाने इस्राएल लोकांना माझ्या रागापासून वाचवले, माझ्या लोकांबद्दलच्या त्या भावना दाखवून त्याने हे केले म्हणून मला आधी वाटत होते त्याप्रमाणे मी आता त्या लोकांना मारणार नाही. 12फिनिहासला सांग की मी त्याच्याबरोबर शांतिचा करार करीत आहे. 13तो करार हा आहे: तो आणि त्याच्या नंतरचे त्याचे वंशज याजक होतील. कारण आपल्या देवाबद्दलच्या त्याच्या भावना खूप तीव्र होत्या. आणि त्याने ज्या गोष्टी केल्या त्यामुळे इस्राएलचे लोक शुध्द झाले.

14मिद्यानी स्त्री बरोबर जो इस्राएली माणूस मारला गेला होता त्याचे नाव जिम्री होते. तो सालूचा मुलगा होता. तो शिमोनी वंशातील एका घराण्याचा प्रमुख होता.” 15आणि मारल्या गेलेल्या मिद्यानी स्त्रीचे नाव कजबी* होते. ती सूरची मुलगी होती. सूर मिद्यानी कुटुंबाचा प्रमुख होता व पुढारी होता.

16परमेश्वर मोशेला म्हणाला: 17“तू त्यांना ठार मारले पाहिजेस. मिद्यानचे लोक तुझे शत्रू आहेत. 18तू त्यांना ठार मारले पाहिजेस. त्यांनी अगोदरच तुम्हाला त्यांचे शत्रू केले आहे त्यांनी तुला पिओर येथे फसवले आहे. आणि त्यांनी तुला कजबीच्या बाबतीतही नीचपणाने फसवले. ती मिद्यानच्या पुढाऱ्याची मुलगी होती. पण इस्राएल लोकांमध्ये आजार पसरला तेव्हा ती मारली गेली. बआल पौर या खोट्या देवतेची लोकांना फसवून उपासना करायला लावली म्हणून तो आजार इस्राएल लोकांमध्ये पसरला होता.”

## लोकांची मोजणी (गणना) केली

26 मोठ्या आजारानंतर परमेश्वर मोशे आणि अहरोनचा मुलगा याजक एलाजार यांच्याशी बोलला: 2तो म्हणाला, “इस्राएल लोकांची मोजणी करा, 20 वर्षांचे आणि 20 वर्षांवरील सगळ्या पुरुषांची मोजणी करा आणि त्यांची वंशाप्रमाणे यादी करा. तेच पुरुष इस्राएलच्या सैन्यात काम करू शकतील.”

3त्या वेळी लोकांनी मवाबमधील यार्देन नदीच्या खोऱ्यात तळ दिला होता. तो यरीहोंच्या पलिकडे यार्देन नदीजवळ होता. तेव्हा मोशे आणि याजक एलाजार लोकांशी बोलले, ते म्हणाले, 4“20 वर्षांवरील प्रत्येक माणूस तुम्ही मोजा. परमेश्वराने मोशेला ही आज्ञा केली आहे.” मिसरमधून आलेल्या इस्राएल लोकांची ही यादी आहे.

5जे लोक रऊबेनच्या कुळातून आले (रऊनबेन हा इस्राएलचा (याकोब) पहिला मुलगा होता.)

ती कुळे म्हणजे: हनोखचे हनोखी कूळ, पल्लूचे पल्लूवी कूळ.

6हेस्रोनचे हेस्रोनी कूळ, कर्मीचे कर्मी कूळ.

7रऊबेनच्या वंशातील ही कुळे. त्यात एकूण 43,730 पुरुष होते.

8पल्लूचा मुलगा अलियाब. 9अलीयाबाची मुले नमुवेल, दाथान व अबीराम. दाथान व अबीराम हे दोन पुढारी मोशेच्या आणि अहरोनाच्या विरुद्ध गेले होते. कोरह जेव्हा परमेश्वराच्या विरुद्ध गेला तेव्हा त्यांनी कोरहला पाठींबा दिला. 10त्यावेळी धरती दुंभगली आणि तिने कोरह आणि त्याचे पाठिराखे यांना गिळकृंत केले. आणि 250 माणसे मेली. तो इस्राएलाच्या इतर लोकांना इशारा होता. 11परंतु कोरहाच्या कुळातले इतर लोक मात्र मेले नाहीत.

12 शिमोनाच्या कुळातलीही काही कुळे

नमुवेलाचे नमुवेली कूळ. यामीनाचे यामीनी कुळ. याकीनाचे याकीनी कुळ.

13जेरहाचे जेरही कूळ. शौलाचे शौली कूळ.

14ही शिमोनी कुळातील कुळे. ते एकूण 22,200 पुरुष होते.

15गाद कुळातून जी कुळे निर्माण झाली ती अशी:

सफोनाचे सफोनी कुळ. हग्गीचे हग्गी कूळ. शूनीचे शूनी कूळ.

16आजनीचे आजनी कूळ. एरीचे एरी कूळ.

17अरोदचे अरोदी कूळ. अरलीचे अरेली कूळ.

---

**तिच्या मंडप** वेश्या असलेल्या एका स्त्रीचा खास तंबू तेथे तो बाल पेआरे या खोट्या देवाची सेवा करीत असे.

**कजबी** माझे असत्य असा या हिब्रू शब्दाचा अर्थ आहे.

18गादच्या कुळातील ही कुळे. त्यात एकूण 40,500 पुरुष होते.
19-20यहुदाच्या कुळातून जी कुळे निर्माण झाली ती अशी:

शेलाचे शेलानी कूळ, पेरेसाचे पेरेसी कूळ, जेरहाचे जेरही कूळ. (यहुदाची दोन मुले एर आणि ओनान हे कनान मध्ये मरण पावले.)
21पेरेसच्या कुळातील ही कुळे: हेस्रोनचे हेस्रोनी कूळ, हामूलचे हामूली कूळ.

22ही यहुदाच्या कुळातील कुळे. त्यात एकूण 76,500 पुरुष होते.
23इस्साखारच्या कुळातील काही कुळे अशी:

तोलाचे तोलाई कूळ पूवाचे पुवाई कूळ.
24याशूबचे याशुबी कूळ, शिम्रोनचे शिम्रोनी कूळ.

25इस्साखारच्या कुळातील ही कुळे. त्यांत एकूण 64,300 पुरुष होते.
26जुबुलूनच्या कुळातील कुळे:

सेरेदचे सेरेदी कूळ, एलोनचे एलोनी कूळ, याहलेलचे याहलेली कूळ.

27जुबुलूनच्या कुळातील ही कुळे. त्यांत एकूण 60,500 पुरुष होते.
28योसेफची मुले मनश्शे व एफ्राईम. या प्रत्येकापासून कुळे निर्माण झाली. 29मनश्शेच्या कुळातील कुळे:

माखीरचे माखीरी कूळ (माखीर गिलादचा बाप होता.) गिलादचे गिलादी कूळ.
30गिलादची कुळे होती: इयेजेराचे इयेजेरी कूळ, हेलेकचे हेलेकी कूळ.
31अस्रियेलाचे अस्रियेली कूळ. शेखेमाचे शेखेमी कूळ.
32शमीदचे शमीदाई कूळ व हेफेरचे हेफेरी कूळ.
33हेफेरचा मुलगा सलाफहाद याला मुले नव्हती-फक्त मुली होत्या. त्याच्या मुलींची नावे महला, नोआ, होग्ला, मिल्का व तिरसा.

34ही मनश्शेच्या कुळातील कुळे होती ते एकूण 52,700 पुरुष होते.
35एफ्राइमच्या कुळातील घराणी पुढीलप्रमाणे होती:
शूथेलाहाचे शूथेलाही कूळ. बेकेराचे बेकेरी कूळ व तहनाचे तहनी कूळ.
36एरान शूथेलाहाच्या कुटुंबातील होता. एरानचे कूळ एरानी.

37ही एफ्राइमच्या कुळातील कुळे: त्यात 32,500 पुरुष होते. ते सगळे योसेफच्या कुळातील होते.
38बेन्यामीनच्या कुळातील कुळे होती:

बेलाचे बेलाई कूळ. आशबेलाचे आशबेली कूळ. अहीरामचे अहीरामी कूळ.
39शफूफामचे शफूफामी कूळ. हुफामचे हुफामी कूळ.
40बेलाची कुळे होती: अर्दचे अर्दी कूळ नामानचे नामानी कूळ.

41ही सगळी कुळे बन्यामीनच्या कुळातील. त्यांतील पुरुषांची संख्या 45,600 होती.
42दानच्या कुळातील कुळे होती:

शूहामचे शूहामी कूळ.

हे कूळे दानच्या कुळातील होते. 43शूहामीच्या कुळात
अनेक कुळे होती. त्यातील पुरुषांची संख्या 64,400 होती.
44आशेरच्या कुळातील कुळे होती:

इम्नाचे इम्नाई कूळ. इश्वीचे इश्वी कूळ. बरीयाचे बरीयाई कूळ.

45बरीयाच्या कुळातील कुळे होती:

हेबेरचे हेबेराई कूळ. मलकीएलचे मलकीएली कूळ.

46(आशेरला सेरा नावाची मुलगी होती) 47ही सगळे
लोक आशेरच्या कुळातील होते. त्यातील पुरुषांची संख्या 53,400 होती.
48 नफतालीच्या कुळातील कुळे होती:

यहसेलचे यहसेली कूळ. गूनीचे गूनी कूळ.
49येसेरचे येसेरी कूळ व शिल्लेमचे शिल्लेमी कूळ.

50ही नफतालीच्या कुळातील कुळे. त्यातील पुरुषांची संख्या 45,400 होती.
51म्हणजे इस्राएलमधील एकूण पुरुषांची संख्या सहा लाख एक हजार सातशे तीस होती.
52परमेश्वर मोशेला म्हणाला, 53"जमिनीचे भाग करुन
ते लोकांना दिले जातील. प्रत्येक कुळातील गणती केलेल्या
सर्व लोकांना पुरेशी इतकी जमीन मिळेल. 54मोठ्या
कुळाला जास्त जमीन मिळेल आणि लहान कुळाला कमी
जमीन मिळेल. त्यांना जी जमीन मिळेल ती त्या कुळात
मोजलेल्या माणसांच्या समप्रमाणात असेल. 55पण तू कुठल्या
कुळाला कुठली जमीन द्यायची ते ठरवण्यासाठी चिठ्ठ्याफासे
टाक. प्रत्येक कुळाला त्याच्या जमिनीचा भाग मिळेल

आणि त्या जमिनीला त्या कुळाचे नाव दिले जाईल. 56प्रत्येक
लहान अणि मोठ्या कुळाला जमीन मिळेल आणि निर्णय
करण्यासाठी तू चिठ्या टाकशील.
57त्यांनी लेव्याच्या कुळातील कुळांचीही गणती केली.
लेव्याच्या कुळातील कुळे ही होती:

गेर्षोनाचे गेर्षोनी कूळ. कहाथचे कहाथी कूळ मरारीचे
मरारी कूळ.

58लेव्याच्या कुळात ही कुळे सुद्धा होती:
लीब्नी कूळ. हेब्रोनी कूळ. महली कूळ. मूशी कूळ.
कोरही कूळ.

अम्राम कोहाथच्या कुळातील होता. 59अम्रामच्या
बायकोचे नाव योखबेद होते. ती सुद्धा लेव्याच्या कुळातील
होती. ती मिसर देशात जन्मली. अम्राम आणि योखाबेदला
दोन मुले: अहरोन आणि मोशे. त्यांना एक मुलगीही
होती. तिचे नाव मिर्याम.
60नादाब, अबीहू, एलाजार व इथामार यांचे अहरोन
वडील होते. 61पण नादाब व अबीहू मेले. ते मेले कारण
त्यांनी परमेश्वराने परवानगी न दिलेल्या अग्नीने अर्पणे
केली.
62लेव्याच्या कुळातील एकूण पुरुषांची संख्या 23000
होती. परंतु यांची गणती इस्राएलच्या इतर लोकांबरोबर
केली नाही. परमेश्वराने इतर लोकांना जमीन दिली त्यात
यांना हिस्सा मिळाला नाही.
63मोशे आणि याजक एलाजार यांनी ते यार्देन नदीच्या
खोऱ्यात मवाब येथे होते तेव्हा लोक मोजले. हे यरीहोच्या
पलिकडे यार्देन नदीजवळ होते. 64खूप वर्षापूर्वी सीनायाच्या
वाळवंटात मोशे आणि याजक अहरोन यांनी इस्राएल
लोकांची गणती केली होती. पण ते सगळे लोक आता
मेले होते. त्यापैकी कोणीही आता जिवंत नव्हते. 65कारण
इस्राएल लोकांना तुम्ही वाळवंटात मराल असे परमेश्वराने
सांगितले होते. फक्त दोन पुरुषांना परमेश्वराने जिवंत
ठेवले होते. ते होते यफुन्नेचा मुलगा कालेब व नूनचा
मुलगा यहोशवा.

## सलाफहादची मुलगी

27 सलाफहाद हेफरचा मुलगा होता. हेफर गिलादचा
मुलगा होता. गिलाद माखिरचा मुलगा होता.
माखिर मनश्शेचा मुलगा होता. मनश्शे योसेफचा मुलगा
होता. सलाफहादला पाच मुली होत्या. त्यांची नावे महला,
नोआ, होग्ला, मिल्का व तिरसा. 2या पाच स्त्रिया दर्शन
मंडप प्रवेशद्वारापाशी गेल्या आणि मोशे, याजक एलाजार,
पुढारी आणि इस्राएलचे लोक यांच्यासमोर जाऊन उभ्या
राहिल्या.
त्या पाच मुली म्हणाल्या, 3“आम्ही वाळवंटातून प्रवास
करीत असताना आमचे वडील गेले. त्यांना नैसर्गिक मरण
आले. ते कोरहाच्या समूहाला मिळण्यांपैकी नव्हते (कोरह
हा परमेश्वराच्या विरुद्ध जाणाऱ्यापैकी होता.) पण आमच्या
वडिलांना एकही मुलगा नव्हता. 4याचा अर्थ असा की
आमच्या वडिलांचे नाव पुढे चालू राहणार नाही. आमच्या
वडिलांचे नाव पुढे चालू राहणार नाही हे योग्य नाही.
त्यांचे नाव संपून जाईन कारण त्यांना मुले नाहीत. म्हणून
आम्ही तुम्हाला विनंती करायला आलो की आमच्या
वडिलांच्या भावांना जी जमीन मिळेल त्यातली थोडी
आम्हाला द्या.”
5तेव्हा मोशेने परमेश्वराला त्याने काय करायला हवे
ते विचारले. 6परमेश्वर त्याला म्हणाला, 7“सलाफहादच्या
मुलींचे म्हणणे बरोबर आहे. त्यांच्या वडिलांच्या भावांना
मिळणाऱ्या जमिनीत त्यांचाही वाटा असायला पाहिजे. म्हणून
त्यांच्या वडिलांना जी जमीन मिळाली असती ती त्यांना
दे.”
8“इस्राएल लोकांसाठी हा नियम कर: ‘जर एखाद्याला
मुलगा नसला आणि तो मेला तर त्याच्या मुलींना त्याचे
सर्व काही मिळावे. 9जर त्याला मुलीही नसल्या तर त्याची
मिळकत त्याच्या भावांना मिळावी. 10जर त्याला भाऊही
नसला तर त्याच्या वस्तू त्याच्या वडिलांच्या भावाला
मिळाव्या.
11जर त्याच्या वडिलांना भाऊ नसेल तर त्याची सगळी
मिळकत घरातल्या सगळ्यात जवळच्या नातेवाईकाला
मिळावी.’” इस्राएल लोकांमध्ये हा कायदा असावा अशी
आज्ञा परमेश्वराने मोशेला केली. हा इस्राएली लोकांचा
कायदा व्हावा.

## यहोशवा नवीन पुढारी झाला

12नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, “यार्देन नदीच्या
पूर्वेकडच्या वाळवंटातील डोंगरावर जा. मी इस्राएल लोकांना
जी जमीन देणार आहे ती तुला तेथे दिसेल. 13तू ही जागा
बघितल्यानंतर तू तुझ्या भावाप्रमाणे, अहरोनाप्रमाणे
मरशील. 14जेव्हा लोक त्सीनच्या वाळवंटात पाण्यासाठी
रागावले होते तेव्हा तुम्ही दोघांनी, तू आणि अहरोनाने
माझ्या आज्ञा पाळायला नकार दिला. तुम्ही मला मान
दिला नाही आणि लोकांना मी पवित्र आहे असे दाखवले
नाही.” (हे त्सीनच्या वाळवंटात कादेश जवळ मरिबाच्या
पाण्याजवळ घडले.)
15मोशे परमेश्वराला म्हणाला: 16“लोक काय विचार
करतात ते परमेश्वर देवाला कळते. 17परमेश्वरा, मी
प्रार्थना करतो की तू या लोकांसाठी* नेता निवडशील.”
18तेव्हा परमेश्वर मोशेला म्हणाला, “नूनाचा मुलगा

---

**ते … लोकांसाठी** शब्दश: परमेश्वर सर्व लोकांच्या आत्म्याचा देव या समाजासाठी एका माणसाची नेमणूक करो.

यहोशवा. तो खूप शहाणा* आहे. त्याला नवीन नेता
कर. [19]त्याला याजक एलाजार आणि इतर लोकांसमोर
उभे रहायला सांग आणि नंतर त्याला नेता कर.

[20]"लोकांना असे दाखव की तू त्याला नेता करीत
आहेस. नंतर सर्व लोक त्याच्या आज्ञा पाळतील. [21]जर
यहोशवाला काही निर्णय घ्यायचे असतील तर तो याजक
एलाजारकडे जाईल. एलाजार उरीमचा उपयोग करुन
परमेश्वराचे उत्तर माहीत करुन घेईल. नंतर यहोशवा
आणि इस्राएलचे सर्व लोक देवाच्या सांगण्याप्रमाणे करतील.
जर तो म्हणेल की, 'युद्ध करा', तर ते युद्ध करतील.
आणि त्याने सांगितले की 'घरी जा', तर ते घरी जातील."

[22]मोशेने परमेश्वराची आज्ञा पाळली. त्याने यहोशवाला
एलाजारच्या आणि लोकांच्या पुढे उभे राहाण्यास सांगितले.
[23]नंतर मोशेने तो नवीन नेता आहे हे दाखवण्यासाठी
त्याच्या डोक्यावर आपले हात ठेवले. परमेश्वराने त्याला
जसे सांगितले होते तसेच त्याने केले.

## रोजची अर्पणे

28 नंतर परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला,
[2]"इस्राएल लोकांना ही आज्ञा दे. योग्यवेळी
धान्यार्पणे आणि बळी न विसरता मला अर्पण करायला
त्यांना सांग. अग्नी बरोबर देण्याची ती अर्पणे आहेत.
त्यांचा सुवास परमेश्वराला आनंदित करतो.
[3]अग्नीबरोबरची अर्पणे त्यांनी परमेश्वराला दिलीच
पाहिजेत. त्यांनी रोज एक वर्षाची दोन कोकरे दिली
पाहिजेत. ती दोषरहित असली पाहिजेत. [4] एक कोकरू
सकाळच्या वेळी आणि दुसरे संधिप्रकाशाच्या वेळी अर्पण
करावे.

[5]शिवाय आठ कप पीठ पाव कप हीन तेलात मिसळून
केलेले धान्यार्पणही द्यावे."

[6](ही रोजची अर्पणे देणे त्यांनी सीनाय पर्वतावर सुरु
केले. ही अग्नी बरोबर दिलेली अर्पणे होती. त्यांचा सुवास
परमेश्वराला प्रसन्न करीत असे.) [7]"लोकांनी
धान्यार्पणाबरोबरच दिली जाणारी पेयाअर्पणेसुद्धा द्यावीत.
त्यांनी एक पाव द्राक्षाचा रस प्रत्येक मेंढी बरोबर द्यावा. हे
पेय वेदीवर एका पवित्र जागेवर ओतावे. ती परमेश्वराला
द्यावयाची भेट आहे.

[8]दुसरी मेंढी संधिप्रकाशाच्या वेळी अर्पणे करावी. ही
शिजवलेली असावी हे अर्पण सकाळच्या अर्पणाप्रमाणेच
द्यावे. तसेच त्याबरोबरची पेयार्पणेही करावीत. हे
होमार्पण असेल. त्याचा सुवास परमेश्वराला आनंद
देतो."

## शब्बाथची अर्पणे

[9]"शब्बाथच्या वेळी तुम्ही एक वर्षाच्या दोन मेंढ्या दिल्या
पाहिजेत. त्या दोषरहित असाव्यात. तुम्ही 16 कप पीठ
हीन तेलात मिसळून केलेले धान्याचे अर्पण आणि पेयाचे
अर्पणही दिले पाहिजे. [10]विश्रांतीच्या दिवसाचे हे खास
अर्पण आहे. रोज देण्यात येणारे अर्पण आणि पेयार्पणा
व्यतीरिक्त हे अर्पण आहे."

## महिन्याच्या सभा

[11]"प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी तुम्ही
परमेश्वराला खास होमार्पणे द्याल. या अर्पणात दोन बैल,
1 मेंढा आणि 1 वर्षाच्या सात मेंढ्या असतील. त्या मेंढ्या
दोषरहित असाव्यात. [12]प्रत्येक बैलाबरोबर तुम्ही 24 कप
पीठ हीन तेलात मिसळून अर्पण करा. आणि मेंढ्याबरोबर
16 कप पीठ हीन तेलात मिसळून द्या. [13]प्रत्येक मेंढीबरोबर
आठ कप पीठ हीन तेलात मिसळून अर्पण करा. ही
अग्नीबरोबर द्यायची अर्पणे असतील. त्याचा सुवास
परमेश्वराला आनंदित करतो. [14]तसेच प्रत्येक बैलाबरोबर
2 हिन द्राक्षारस, 1 1/2 हिन द्राक्षारस प्रत्येक मेंढ्याबरोबर
आणि 1 हिन प्रत्येक कोकराबरोबर अर्पण करा. ही
होमार्पणे प्रत्येक वर्षाच्या प्रत्येक महिन्याला अर्पण केली
पाहिजेत. [15]प्रत्येक दिवशी करण्यात येणाऱ्या अर्पणा
व्यतिरिक्त तुम्ही 1 बकरा परमेश्वराला अर्पण केला
पाहिजे. तो पापार्पण म्हणून द्यावा.

## वल्हांडण

[16]"परमेश्वराचा वल्हांडण महिन्याच्या 14 व्या दिवशी
असेल. [17]बेखमीर भाकरीचा सण महिन्याच्या 15 व्या
दिवशी सुरु होतो. हा सण सात दिवस असेल. खमीराशिवाय
(यीस्ट) केलेली भाकरीच फक्त तुम्ही खाऊ शकता.
[18]या सणाच्या पहिल्या दिवशी तुम्ही खास सभा बोलावली
पाहिजे. त्या दिवशी तुम्ही कुठलेही काम करायचे नाही.
[19]तुम्ही परमेश्वराला होमार्पणे द्याल. या अर्पणात दोन
बैल, 1 मेंढा आणि 1 वर्षाची सात कोकरे असतील. ती
दोषरहित असावीत.

[20–21]या बरोबरच 24 कप पीठ तेलात मिसळून केलेले
धान्यार्पण प्रत्येक बैलाबरोबर, 16 कप पीठ मेंढ्याबरोबर
व आठ कप पीठ प्रत्येक कोकरा बरोबर द्या. [22]तुम्ही
एक बकराही अर्पण केला पाहिजे. तुम्हाला शुद्ध
करण्यासाठी देण्यात येणारे ते पापार्पण असेल. [23]ही अर्पणे
नेहमीच्या सकाळच्या अर्पणाव्यतिरिक्त करायची आहेत.

[24]"त्याचबरोबर सात दिवस दररोज ही होमार्पणे आणि
पेयार्पणे तुम्ही परमेश्वराला दिली पाहिजेत. त्यांच्या सुवासाने
परमेश्वराला आनंद होईल. ही अर्पणे म्हणजे लोकांचे
अन्न असेल. ही अर्पणे नेहमीच्या होमार्पणाव्यतिरिक्त
असतील.

---

**तेव्हा ... शहाणा** शब्दश: तुमचा मुलगा यशया याला घे तो आत्मा असलेला माणूस आहे याचा अर्थ यशया खूप राहाणा होता असा असेल किंवा देवाचा आत्मा त्याच्यात होता असाही असू शकेल.

25नंतर या सणाच्या सातव्या दिवशी तुम्ही एक खास
सभा घ्याल. तुम्ही त्या दिवशी काहीही काम करणार
नाही.

### सप्ताहांचा सण

26“पहिल्या फळाच्या हंगामाच्या सणाला (सप्ताहांचा
सण) परमेश्वराला धान्यार्पणे देण्यासाठी नवीन धान्य वापरा.
त्यावेळी तुम्ही एक खास सभाही बोलवा त्या दिवशी तुम्ही
काहीही काम करायचे नाही. 27तुम्ही होमार्पणे द्यावे.
अग्नीबरोबर दिलेली ही अर्पणे असतील. तुम्ही दोन बैल,
एक मेंढा व 1 वर्षाची सात कोकरे अर्पण करा. हि सर्व
दोषरहित असावीत. 28तुम्ही प्रत्येक बैलाबरोबर 24 कप
पीठ तेलात मिसळून द्यावे. 16 कप पीठ मेंढ्याबरोबर 29व
आठ कप पीठ प्रत्येक कोकऱ्या बरोबर द्यावे. 30स्वत:ला
शुद्ध करण्यासाठी तुम्ही एक बकरा बळी द्या. 31रोजच्या
होमार्पणाशिवाय व धान्यार्पणाशिवाय तुम्ही ही अर्पणे द्या.
प्राणी आणि पेय दोषरहित आहेत याची खात्री करा.

### कर्ण्याचा सण

29 “सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी खास सभा
असेल. त्या दिवशी तुम्ही काहीही काम करणार
नाही. हा कर्णा* वाजवण्याचा दिवस आहे. 2तुम्ही होमार्पणे
द्याल. त्याचा सुवास परमेश्वराला आनंदित करील. तुम्ही
एक बैल, 1 मेंढा आणि 1 वर्षाची सात कोकरे अर्पण
करा. ती सर्व दोषरहित असावीत. 3तुम्ही 24 कप पीठ
तेलात मिसळून बैलाबरोबर, 16 कप पीठ 4मेंढ्याबरोबर
व आठ कप पीठ प्रत्येक कोकराबरोबर अर्पण कराल.
5एक बकरासुद्धा पापार्पण म्हणून द्या. त्यामुळे तुम्ही शुद्ध
व्हाल. 6अमावास्याचे होमार्पण आणि धान्यार्पण ही नेहमीच्या
अर्पणांव्यतिरिक्त असतील. आणि ही रोजच्या धान्यार्पणे
व पेयार्पणे यांच्या व्यतिरीक्त असतील. हे सर्व नियमाप्रमाणे
केले पाहिजे. ही सर्व अग्नीबरोबर करावयाची अर्पणे
आहेत. त्यांचा सुवास परमेश्वराला आनंदित करील.

### प्रायश्चित्ताचा दिवस

7“सातव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी एक खास सभा
बोलावण्यात येईल. त्या दिवशी तुम्ही अन्न घ्यायचे नाही
आणि काही कामही करायचे नाही. 8तुम्ही होमार्पणे द्यायची.
त्यांचा सुवास परमेश्वराला आनंदित करील. तुम्ही एक
बैल, एक मेंढा आणि एक वर्ष वयाचे सात कोकरे अर्पण
करावेत. ते दोषरहित असले पाहिजेत. 9त्याबरोबर तुम्ही
24 कप पीठ तेलात मिसळून बैलाबरोबर, 16 कप पीठ
10मेंढ्या बरोबर आणि आठ कप पीठ प्रत्येक कोकरा
बरोबर अर्पण केले पाहिजे. 11पापार्पण म्हणून तुम्ही एक
बकराही अर्पण कराल. प्रायश्चित्ताच्यादिवशी करावयाच्या
पापार्पणाबरोबरच ही अर्पणे द्यायची. तसेच रोजच्या बळीच्या,
धान्याच्या व पेयाच्या अर्पणाबरोबर ही अर्पणे करावीत.

### मंडपाचा सण

12“सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी एक खास सभा
असेल. तो मंडपाचा सण असेल. त्या दिवशी तुम्ही काहीही
काम करायचे नाही आणि परमेश्वरासाठी सात दिवसांची
खास सुट्टी साजरी करायची. 13तुम्ही होमार्पणे करावीत.
ही अग्नीबरोबर करावयाची अर्पणे आहेत. त्यांचा सुवास
परमेश्वराला आनंदित करील. तुम्ही 13 बैल, 2 मेंढे,
14 कोकरे अर्पण कराल. ते सर्व दोषरहित असले पाहिजेत.
14तुम्ही 24 कप पीठ तेलात मिसळून प्रत्येक बैलाबरोबर,
16 कप पीठ प्रत्येक मेंढ्याबरोबर व 15आठ कप पीठ
प्रत्येक कोकरा बरोबर अर्पण करावे. 16तुम्ही एक बकराही
अर्पण केला पाहिजे. रोजच्या अर्पणाव्यातिरिक्त आणि
त्याबरोबरच्या धान्य व पेय यांच्या अर्पणाव्यातिरिक्त ही
अर्पणे असतील.

17“या सुट्टीच्या दुसऱ्या दिवशी तुम्ही 12 बैल, 2 मेंढे
आणि 1 वर्षाचे 14 कोकरे अर्पण करावेत. ती दोषरहित
असावी. 18बैल, मेंढे आणि कोकरे यांच्याबरोबर तुम्ही
योग्य प्रमाणात धान्यार्पण आणि पेयार्पण केले पाहिजे. 19एक
बकरा पापार्पण म्हणून द्यावा. ही सर्व रोजच्या बळीच्या व
धान्य व पेय यांच्या अर्पणाव्यतिरिक्त असली पाहिजे.

20“या सुट्टीच्या तिसऱ्या दिवशी तुम्ही 11 बैल, 2 मेंढे
आणि एक वर्षाचे 14 कोकरे अर्पण करावेत. ते दोषरहित
असले पाहिजेत. 21बैल, मेंढे आणि कोकरे यांच्याबरोबर
तुम्ही योग्यप्रमाणात धान्यार्पण व पेयार्पण केले पाहिजे.
22पापार्पण म्हणून एक बकराही द्यावा. हे सर्व रोजच्या
बळीच्या व धान्य व पेय यांच्या अर्पणाव्यतिरिक्त असले
पाहिजे. 23“सुट्टीच्या चौथ्या दिवशी तुम्ही 10 बैल, 2 मेंढे
व 1 वर्षाचे 14 कोकरे अर्पण करवेत. ते निर्दोष असले
पाहिजेत.

24बैल, मेंढे व कोकरे यांच्याबरोबर तुम्ही योग्यप्रमाणात
धान्यार्पण व पेयार्पणही केले पाहिजे. 25एक बकरा पापार्पण
म्हणून दिला पाहिजे. हे सर्व रोजच्या बळी, धान्य व पेय
यांच्या अर्पणाव्यतिरिक्त असले पाहिजे.

26“सुट्टीच्या पाचव्या दिवशी तुम्ही 9 बैल, 2 मेंढे व
एक वर्षाचे 14 कोकरे अर्पण केले पाहिजे. ते दोषरहित
असावेत. 27बैल, मेंढे व कोकरे यांच्याबरोबर तुम्ही
योग्यप्रमाणात धान्यार्पण व पेयार्पण ही केले पाहिजे. 28एक
बकरा पापार्पण म्हणून दिला पाहिजे. हे सर्व रोजच्या बळी,
धान्य व पेय यांच्या अर्पणा व्यतिरिक्त असले पाहिजे.

29“सुट्टीच्या सहाव्या दिवशी तुम्ही 8 बैल, 2 मेंढे व
एक वर्षाचे 14 कोकरे अर्पण केले पाहिजेत. ते दोषरहित
असावेत. 30बैल, मेंढे व कोकरे यांच्याबरोबर तुम्ही
योग्यप्रमाणात धान्यार्पण, व पेयार्पणही केले पाहिजे. 31एक

---

**हा कर्णा** किंवा ओरडणे हा ओरडण्याचा व आनंदी असण्याचा
दिवस आहे असा याचा अर्थ असू शकेले.

बकरा पापार्पण म्हणून द्यावा. हे सर्व रोजच्या बळी, धान्य व पेय यांच्या अर्पणाव्यतिरिक्त असले पाहिजे.

32“सुट्टीच्या सातव्या दिवशी तुम्ही 7 बैल, 2 मेंढे व एक वर्षाचे 14 कोकरे अर्पण करावेत. ते. दोषरहित असावेत. 33बैल, मेंढे व कोकरे यांच्याबरोबर तुम्ही योग्यप्रमाणात धान्यार्पण व पेयार्पणही केले पाहिजे. 34एक बकरा पापार्पण म्हणून द्यावा. हे सर्व रोजच्या बळी, धान्य व पेय यांच्या अर्पणाव्यतिरिक्त असले पाहिजे.

35“या सुट्टीच्या आठव्या दिवशी तुमच्यासाठी एक खास सभा भरवावी. त्या दिवशी तुम्ही कोणतेही काम करू नये. 36तुम्ही होमार्पण करावे. ते अग्नीबरोबर करायचे अर्पण असेल. त्याचा सुवास परमेश्वराला आनंदित करील. तुम्ही एक बैल, 1 मेंढा व एक वर्षाचे सात कोकरे अर्पण करावेत. ते दोषरहित असावेत. 37प्रत्येक बैल, मेंढा व कोकरा यांच्याबरोबर तुम्ही योग्यप्रमाणात धान्यार्पण व पेयार्पण दिले पाहिजे. 38एक बकरा पापार्पण म्हणून दिला पाहिजे. हे सर्व रोजच्या बळी, धान्य व पेय यांच्या अर्पणाव्यतिरिक्त असले पाहिजे.

39“या खास सुट्टीत तुम्ही होमार्पण व पेयार्पण ही नवस व शांत्यर्पणाची अर्पणे म्हणून आणली पाहिजेत. ही सर्व अर्पणे तुम्ही परमेश्वराला करावीत. ही सर्व अर्पणे तुम्हाला परमेश्वराला खास भेट द्यायची असेल किंवा परमेश्वराला काही खास वचन दिले आहे म्हणून द्यावयाच्या अर्पणाव्यतिरिक्त असतील.”

40मोशेने परमेश्वराच्या या सर्व आज्ञा इस्राएल लोकांना सांगितल्या.

## खास वचने

30 मोशे इस्राएलच्या सर्व वंशप्रमुखांशी बोलला. त्याने त्यांना परमेश्वराकडून आलेल्या आज्ञांबद्दल सागितले:

2“जर एखाद्याला देवाला काही खास वचन द्यायचे असेल किंवा त्याने देवाला खास वस्तू द्यायचे वचन दिले असेल तर त्याला ती गोष्ट करु द्या. पण त्या माणसाने जे वचन दिले असेल तेच नेमके केले पाहिजे. 3“एखादी तरुण स्त्री असून तिच्या वडिलांच्या घरात रहात असेल आणि तिने परमेश्वराला खास वस्तू देण्याचे वचन दिले असेल. 4जर तिच्या वडिलांनी या वचनाबद्दल ऐकले आणि ते सहमत झाले तर त्या स्त्रीने वचनाप्रमाणे केले पाहिजे.

5पण जर तिच्या वडिलांनी वचनाबद्दल ऐकले आणि ते सहमत झाले नाहीत तर ती तिच्या वचनातून मुक्त होईल. तिने जे वचन दिले ते तिला पूर्ण करावे लागणार नाही.

6“तिला तिच्या वडिलांनी तिला मना केले म्हणून परमेश्वर तिला माफ करील.

7तिच्या नवऱ्याने त्या वचनाबद्दल ऐकले आणि तो त्याच्याशी सहमत झाला तर त्या स्त्रीने वचनाची पूर्तता केली पाहिजे. 8पण जर नवऱ्याने वचनाबद्दल ऐकले आणि तो सहमत झाला नाही तर तिला वचन पूर्ण करण्याची गरज नाही. तिच्या नवऱ्याने वचन मोडले–तिने जे सांगितले ते पूर्ण करण्याची त्याने परवानगी दिली नाही–म्हणून परमेश्वर तिला क्षमा करील.

9“विधवा किंवा घटस्फोटिता स्त्रीने परमेश्वराला वचन दिले असेल तर तिने वचनाप्रमाणे केले पाहिजे. 10लग्न झालेल्या स्त्रीने परमेश्वराला काही वचन दिले असेल.

11तिच्या नवऱ्याने त्यावचनाबद्दल ऐकले आणि त्याची पूर्तता करण्याची त्याने तिला परवानगी दिली तर तिने त्याप्रमाणे केले पाहिजे. 12पण जर तिच्या नवऱ्याने वचनाबद्दल ऐकले आणि त्याने तिला त्याप्रमाणे करण्याची परवानगी दिली नाही तर तिने वचनाप्रमाणे वागण्याची गरज नाही. तिने काय वचन दिले होते त्याला महत्त्व नाही. तिचा नवरा वचन मोडू शकतो. तिच्या नवऱ्याने वचन मोडले तर परमेश्वर तिला क्षमा करील. 13लग्न झालेल्या स्त्रीने परमेश्वराला काही वचन दिले असेल किंवा काही गोष्टी सोडण्याचे* वचन तिने दिले असेल किंवा तिने देवाला काही खास वचन दिले असेल. 14नवरा यापैकी कुठल्याही वचनाला मनाई करु शकतो. किंवा त्यापैकी कुठल्याही वचनाची पूर्तता करण्याची परवानगी तो देऊ शकतो. 15पण जर नवऱ्याने वचनांबद्दल ऐकले आणि त्यांच्यावर त्याने बंदी आणली तर तिने दिलेले वचन मोडण्याला तो जबाबदार असेल.*”

16परमेश्वराने मोशेला या आज्ञा दिल्या. या एक पुरुष आणि त्याची बायको यांच्याबद्दलच्या आज्ञा आणि वडील व वडीलांच्या घरी राहणारी मुलगी यांच्याबद्दलच्या या आज्ञा आहेत.

## इस्राएल मिद्यान्यांच्या विरुद्ध लढतात

31 परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला: 2“मी इस्राएल लोकांना मिद्यान्यांचा सूड घ्यायला मदत करीन. मोशे, तू त्यानंतर मरशील.*”

3तेव्हा मोशे लोकांशी बोलला. तो म्हणाला, “तुमच्यातल्या काहींची सैनिक म्हणून निवड करा. परमेश्वर त्यांचा उपयोग मिद्यान्याचा सूड घेण्यासाठी करील. 4इस्राएलच्या प्रत्येक वंशातून 1000 लोक निवडा. 5म्हणजे इस्राएलमधून 12,000 सैनिक होतील.”

6मोशेने त्या 12,000 लोकांना लढाईवर पाठवले. त्याने त्यांच्याबरोबर याजक एलाजारचा मुलगा फिनहास याला पाठवले. फिनहासने बरोबर पवित्र गोष्टी, रणशिंगे आणि तुताऱ्या घेतल्या. 7लोक परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे

---

**काही गोष्टी सोडण्याचे** शब्दश: तिचा आत्मा विनम्र होईल सामान्यत: याचा अर्थ शरीराला काहीही करून उदा. उपास करून कष्टविणे असा आहे.

**तो … असेल** शब्दश: तो तिचा अपराध वागवतो.

**तू त्यानंतर मरशील** शब्दश: लोक तुझ्यासाठी गोळा होतील.

मिद्यान्यांबरोबर लढले. त्यांनी सर्व मिद्यानी पुरुषांना मारले. [8]त्यांनी जे लोक मारले त्यांत अवी, रेकेम, सूर, हूर व रेबा हे मिद्यानाचे राजे होते. त्यांनी बौराचा मुलगा बलामलांही तलवारीने मारले.

[9]इस्राएल लोकांनी मिद्यानाच्या स्त्रियांना व मुलांना कैद करुन नेले. त्यांनी त्यांच्या गायी, मेंढ्या व इतर गोष्टीही नेल्या. [10]त्यांनी त्यांची सर्व शहरे व खेडीही जाळली.

[11]त्यांनी त्यांची सर्व माणसे, पशू घेतले आणि त्यांना [12]मोशे, याजक एलाजार आणि इस्राएलच्या इतर लोकांकडे आणले. त्यांनी युद्धात ज्या गोष्टी घेतल्या त्या सर्व इस्राएलींच्या तळावर आणल्या. इस्राएलाचा एक तळ यार्देन नदीच्या खोऱ्यात मवाबमध्ये होता. हा तळ यार्देन नदीच्या पूर्वेला यरीहोपलीकडे होता. [13]नंतर मोशे, याजक एलाजार आणि लोकांचे पुढारी सैनिकांना भेटण्यासाठी छावणीबाहेर गेले. [14]मोशे सैनिकांच्या प्रमुखावर खूप रागावला. तो युद्धावरुन परतलेल्या 1000 सैनिकांच्याप्रमुखावर आणि 100 सैनिकांच्या प्रमुखावर खूप रागावला. [15]मोशे त्यांना म्हणाला, "तुम्ही स्त्रियांना जिवंत का ठेवले? [16]या स्त्रिया इस्राएलच्या पुरुषांसाठी वाईट आहेत. लोक परमेश्वरा पासून दूर जातील. बलामच्या वेळी झाले तसे होईल. परमेश्वराच्या लोकांना पुन्हा रोगराई येईल. [17]आताच मिद्यानाच्या सर्व मुलांना ठार मारा आणि पुरुषाबरोबर राहिलेल्या सर्व स्त्रियांना मारून टाका. कुठल्याही पुरुषाबरोबर लैंगिक संबंध असलेल्या सर्व स्त्रियांना मारून टाका.

[18]आणि नंतर तुमच्या पैकी ज्यांनी दुसऱ्यांना मारले असेल त्यांनी सात दिवस तळाच्या बाहेर राहावे. [19]तुम्ही प्रेताला केवळ हात जरी लावला असला तरीही तुम्ही बाहेर राहावे. तिसऱ्या दिवशी तुम्ही स्वत:ला आणि तुमच्या कैद्यांना शुद्ध करा. हीच गोष्ट पुन्हा सातव्या दिवशीही करा.

[20]तुम्ही तुमचे सर्व कपडे धुवा. लाकूड, लोकर आणि चामडे यांपासून बनवलेल्या वस्तू धुवा. तुम्ही शुद्ध झालेच पाहिजे."

[21]नंतर याजक एलाजार सैनिकांशी बोलला. तो म्हणाला, "परमेश्वराने मोशेला सांगितले ते हे नियम आहेत. युद्धावरुन परत आलेल्या सैनिकांसाठी हे नियम आहेत. तुम्ही सोने, चांदी, तांबे, [22–23]लोखंड, पत्रा किंवा शिसे अग्नीत टाकले पाहिजे. नंतर त्या वस्तू खास पाण्याने धुवाव्यात म्हणजे त्या शुद्ध होतील. जर काही वस्तू अग्नीत टाकता येत नसतील तर त्या तुम्ही विशिष्ट पाण्याने धुवाव्यात. [24]सातव्या दिवशी तुम्ही तुमचे सर्व कपडे धुवा. नंतर तुम्ही शुद्ध व्हाल त्यानंतर तुम्ही तळावर येऊ शकता."

[25]नंतर परमेश्वर मोशेला म्हणाला, [26]"सैनिकांनी जे कैदी, प्राणी आणि इतर गोष्टी युद्धावरुन आणल्या आहेत त्यांची मोजदाद एलाजार याजक, तू आणि नेत्यांनी करावी. [27]नंतर युद्धावर गेलेल्या सैनिकांत आणि इस्राएलच्या इतर लोकांत त्यांची वाटणी करा. [28]युद्धावर गेलेल्या सैनिकांच्या हिश्श्यातून काही भाग वेगळा करा. तो भाग परमेश्वराचा आहे. परमेश्वराचा 500 वस्तूत 1 वस्तू असा भाग आहे. त्यांत माणसे, गायी, गाढवे व मेंढ्या यांचा समावेश आहे. [29]युद्धावरून सैनिकांनी आणलेल्या लुटीचा त्यांच्यातला अर्धा भाग घ्या. नंतर त्या वस्तू याजक एलाजारला द्या. तो भाग परमेश्वराचा आहे. [30]नंतर लोकांच्या अर्ध्या भागातील प्रत्येक 50 वस्तू मधील एक वस्तू घ्या. त्यात माणसे, गायी, गाढवं, बकऱ्या व इतर प्राणी यांचा समावेश आहे. तो भाग लेवी लोकांना द्या. कारण लेवी लोक परमेश्वराच्या पवित्र निवास मंडपाची काळजी घेतात."

[31]म्हणून मोशे आणि एलाजारने परमेश्वराने मोशेला दिलेल्या आज्ञेप्रमाणे केले. [32]सैनिकांनी 675000 बकऱ्या, [33]72000 गायी, [34]81,000 गाढवे [35]आणि 32000 स्त्रियां आणल्या. (यांत कोणत्याही पुरुषाबरोबर लैंगिक संबंध न आलेल्या स्त्रियांचाच फक्त समावेश आहे) [36]युध्दावर गेलेल्या सैनिकांना 337500 मेंढ्या मिळाल्या.

[37]त्यांनी 675 मेंढ्या परमेश्वराला दिल्या. [38]सैनिकांना 36,000 गायी मिळाल्या. त्यांतील 72 गायी त्यांनी परमेश्वराला दिल्या. [39]सैनिकांना 30,500 गाढवे मिळाली. त्यांतील 61 गाढवें त्यांनी परमेश्वराला दिले. [40]सैनिकांना 16,000 स्त्रीया मिळाल्या. त्यांपैकी 32 त्यांनी स्त्रीया परमेश्वराला दिल्या. [41]मोशेने परमेश्वराच्या या सर्व भेटी त्याच्या आज्ञेनुसार याजक एलाजारला दिल्या.

[42]नंतर मोशेने लोकांतल्या हिश्श्याच्या अर्ध्या भागाची मोजणी केली. हा युद्धावर गेलेल्या सैनिकांकडून मोशेने घेतलेला अर्धा भाग होता. [43]लोकांना 337,500 मेंढ्या, [44]36,000 गायी, [45]गाढवे 30,500 [46]आणि 16,000 स्त्रिया मिळाल्या. [47]प्रत्येक 50 वस्तूमागे मोशेने एक वस्तू परमेश्वरासाठी घेतली. त्यांत पशू आणि माणसे याचा समावेश होता. नंतर त्याने या वस्तू लेवींना दिल्या. कारण त्यांनी परमेश्वराच्या पवित्र निवास मंडपाची काळजी घेतली.

[48]नंतर सैनिकांचे पुढारी ( 1000 सैनिकांचे व 100 सैनिकांचे पुढारी) मोशेकडे आले. [49]त्यांनी मोशेला सांगितले, "आम्ही तुझ्या सेवकांनी आमचे सैनिक मोजले. आम्ही एकही सैनिक सोडला नाही.

[50]म्हणून आम्ही प्रत्येक सैनिकाकडून परमेश्वराची भेट आणत आहोत. आम्ही सोन्याच्या वस्तू आणत आहोत–बाजूबंद, बांगड्या, आंगठ्या, कुड्या आणि हार. आम्हाला शुद्ध करण्यासाठी या परमेश्वराच्या भेटी आहेत." [51]मोशेने सोन्याच्या सर्व वस्तू घेतल्या आणि त्या याजक एलाजारला दिल्या. [52]हजार आणि शंभर सैनिकावरच्या प्रमुखांनी जे सोने परमेश्वरला दिले त्याचे वजन 420 पौंड* होते. [53]सैनिकांनी त्यांना युद्धात मिळालेल्या इतर वस्तू स्वत:जवळ ठेवल्या.

---

**420 पौंड** शब्दश: 16,850 शेकेल.

54मोशे आणि एलाजार यांनी हजार आणि शंभर सैनिकांवरच्या प्रमुखांकडून सोने घेतले. नंतर त्यांनी ते सोने दर्शन मंडपात ठेवले. ही भेट म्हणजे इस्राएल लोकांनी परमेश्वराला आठवणी खातर दिलेली भेट होती.

## यार्देन नदीच्या पूर्वेकडची घराणी

32 रऊबेन आणि गाद या घराण्यांकडे खूप गायी होत्या. त्यांनी याजेर व गिलाद येथील जमिनी पाहिल्या. ही जमीन आपल्या गायींसाठी चांगली आहे असे त्यांना वाटले. 2म्हणून रऊबेन व गाद यांच्या घराण्यातील लोक मोशेकडे आले. ते मोशे, याजक एलाजार आणि लोकांचे पुढारी यांच्याशी बोलले. 3-4ते म्हणाले, “आम्ही तुमचे गुलाम आहोत. आमच्याकडे खूप गायी आहेत आणि इस्राएलच्या लोकांसाठी देवाने जी जमीन जिंकली ती खूप चांगली आहे. या जमिनीत अटारोथ, दीबोन, याजेर, निम्रा, हेशबोन, एलाले, सबाम, नबो व बौन यांच्या आसपास असलेल्या प्रदेशाचा समावेश होतो. 5जर तुम्हाला योग्य वाटत असेल तर तो प्रदेश आम्हाला देण्यात यावा असे आम्हाला वाटते. आम्हाला यार्देन नदीच्या पलिकडे नेऊ नका.”

6रऊबेन आणि गादच्या घराण्यातील लोकांना मोशे म्हणाला, “स्वत: इथे राहून तुम्ही तुमच्या भावाना लढायला पाठवाल का? 7तुम्ही इस्राएल लोकांना का निरूत्साहित करीत आहात? तुम्ही त्यांना नदी पार करण्याच्या इच्छेपासून परावृत कराल आणि परमेश्वराने त्यांना दिलेली जमीन तुम्ही घ्याल. 8तुमच्या वाडवडिलांनी हीच गोष्ट माझ्याबाबतीत केली होती. कादेश-बर्ण्याला मी काही हेरांना जमीन बघण्यासाठी पाठवले. 9ते लोक अष्कोल खोऱ्यापर्यंत गेले. त्यांनी जमीन बघितली आणि त्या लोकांनी इस्राएल लोकांना परमेश्वराने दिलेल्या प्रदेशात जाण्याच्या इच्छेपासून परावृत केले. 10परमेश्वर त्या लोकांवर खूप रागावला. परमेश्वराने ही शपथ घेतली: 11‘मिसर देशातून आलेल्या 20 वर्षांवरील कुठल्याही माणसाला हा प्रदेश बघू दिला जाणार नाही. मी अब्राहाम, इसहाक व याकोब यांना वचन दिले होते. त्याना मी ही जमीन द्यायचे कबूल केले होते. परंतु त्यांनी मला मनापासून अनुसरले नाही. म्हणून त्यांना हा प्रदेश मिळणार नाही. 12फक्त यफुन्नेचा मुलगा कालेब आणि नूनाचा मुलगा यहोशवा हे मनापासून परमेश्वराला अनुसरले.’

13“परमेश्वर इस्राएल लोकांवर खूप रागावला होता. म्हणून परमेश्वराने त्यांना 40 वर्षे वाळवंटात ठेवले. ज्या लोकांनी परमेश्वराविरुद्ध पाप केले त्या लोकांना परमेश्वराने मरण येईपर्यंत तिथे ठेवले. 14आणि आता तुमच्या वाडवडिलांनी जी गोष्ट केली तीच तुम्ही करीत आहात. पाप्यांनो, परमेश्वराने त्याच्या लोकांवर आणखी रागवावे अशी तुमची इच्छा आहे का? 15जर तुम्ही परमेश्वराची भक्ति करायचे सोडले तर परमेश्वर इस्राएल लोकांना अधिक काळ वाळवंटात ठेवील आणि नंतर तुम्ही त्या सर्व लोकांचा नाश कराल.”

16पण रऊबेनच्या आणि गादच्या घराण्यातील लोक मोशेकडे गेले. ते म्हणाले, “आम्ही या जागेवर आमच्या मुलांसाठी शहरे आणि आमच्या जनावरांसाठी गोठे उभारू. 17त्यामुळे आमची मुले या ठिकाणी राहाणाऱ्या इतर लोकांपासून सुरक्षित राहतील. पण आम्ही इस्राएलच्या इतर लोकांना मदत करण्यासाठी आनंदाने येऊ. आम्ही त्यांना त्यांच्या प्रदेशात आणू. 18इस्राएलमधल्या प्रत्येकाने त्याच्या वाट्याची जमीन घेतल्याशिवाय आम्ही परत येणार नाही.

19यार्देन नदीच्या पश्चिमेकडची कुठलीही जमीन आम्ही घेणार नाही. आमच्या वाट्याची जमीन यार्देन नदीच्या पूर्वेला आहे.”

20तेव्हा मोशे त्यांना म्हणाला, “जर तुम्ही या सर्व गोष्टी केल्या तर हा प्रदेश तुमचा होईल. परंतु तुमच्या सैनिकांनी परमेश्वरासमोर लढाईत उतरले पाहिजे. 21तुमच्या सैन्याने यार्देन नदी पार करून शत्रु सैन्याला या प्रदेशातून हाकलले पाहीजे. 22सगळा प्रदेश घेण्यासाठी परमेश्वराने आपल्याला मदत केली की तुम्ही घरी जाऊ शकता. नंतर परमेश्वराला आणि इस्राएलला तुम्ही पापी आहात असे वाटणार नाही. नंतर परमेश्वर तुम्हाला ही जमीन देईल. 23पण जर तुम्ही या गोष्टी केल्या नाहीत तर तुम्ही परमेश्वराविरुद्ध पाप कराल आणि तुमच्या पापाबद्दल तुम्हाला शासन होईल याची खात्री बाळगा. 24तुमच्या मुलांसाठी शहरे बसवा आणि जनावरांसाठी गोठे बांधा. पण तुम्ही वचन दिल्याप्रमाणे सारे काही करा.”

25नंतर रऊबेन आणि गादच्या कुटुंबातील लोक मोशेला म्हणाले, “आम्ही तुझे नोकर आहोत. तू आमचा मालक आहेस म्हणून तू जे सांगतोस ते आम्ही करु. 26आमच्या बायका, मुले आणि आमची सर्व जनावरे गिलाद शहरात राहतील. 27पण आम्ही, तुझे नोकर यार्देन नदी पार करु. आम्ही परमेश्वरापुढे लढाईस जाऊ, जसे आमचा धनी सांगत आहे.”

28याप्रमाणे त्यांनी वचन दिले. ते मोशे, याजक एलाजार, नूनाचा मुलगा यहोशवा आणि इस्राएलचे सर्व कुटुंबप्रमुख या सर्वांनी ते ऐकले. 29मोशे त्यांना म्हणाला, “गाद आणि रऊबेनचे लोक यार्देन नदी पार करतील. ते लढाईत परमेश्वराच्या पुढे चालतील. ते तुम्हाला प्रदेश जिंकायला मदत करतील आणि तुम्ही गिलादचा प्रदेश त्यांच्या वाटेचा भाग म्हणून द्याल. 30पण ते तुमच्या सैन्याबरोबर जाण्यात अपयशी ठरले तर कनानमध्ये तुमच्यामध्ये त्यांना जमीन मिळेल.”

31गाद आणि रऊबेनच्या लोकांनी उत्तर दिले, “आम्ही परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे सर्वकाही करण्याचे वचन देतो. 32आम्ही यार्देन नदी पार करु आणि लढाईत परमेश्वरापुढे

कनानच्या प्रदेशात जाऊ. आमच्या देशाचा प्रदेश यार्देन
नदीच्या पूर्वेला आहे."
33तेव्हा मोशेने ती जमीन गादच्या, रऊबेनच्या लोकांना
आणि मनश्शेच्या कुटुंबातील अर्ध्या लोकांना दिली.
(मनश्शे योसेफचा मुलगा होता.) त्या प्रदेशात अमोऱ्याचा
राजा सीहोन आणि बाशानाचा राजा ओग यांच्या राज्याचा
त्या भूमीत समावेश होता. त्यांत आजुबाजूच्या प्रदेशातील
शहरे होती.
34गादच्या लोकांनी दीबोन, अटारोथ, अरोएर.
35अटारोथ-शोफान, याजेर, यागबहा, 36बेथनिम्रा आणि
बेथ-हारान ही शहरे वसवली. त्यांनी शहराभोवती तटबंदी
उभारली आणि त्यांच्या जनावरांसाठी गोठे बांधले.
37रऊबेनच्या लोकांनी हेशबोन, एलाले, किर्याथाईम.
38नबो व बाल-मौन आणि सिबमाह ही शहरे वसवली.
त्यांनी पुन्हा वसवलेल्या शहरांना जुनीच नावे दिली. पण
नेबो आणि बाल-मोनचे नांव त्यांनी बदलले.
39माखीरच्या कुटुंबातील लोक गिलादला गेले (माखीर
मनश्शेचा मुलगा होता.) त्यांनी त्या शहराचा पराभव
केला. तेथे राहणाऱ्या आमोरी लोकांचा त्यांनी पराभव
केला. 40मोशेने गिलाद मनश्शेच्या कुटुंबातील माखीरला
दिले. म्हणून त्याचे कुटुंब तेथे राहिले. 41मनश्शेच्या
कुटुंबातील याईर याने छोट्या शहरांचा पराभव केला.
नंतर त्याने त्यांना याईरची शहरे असे म्हटले.
42नोबहने कनाथ व त्याच्या आसपासच्या छोट्या शहरांचा
पराभव केला. नंतर त्याने त्या जागेला आपले नाव दिले.

## इस्राएलचा मिसरपासूनचा प्रवास

33 मोशे आणि अहरोन यांनी इस्राएल लोकांना
मिसरामधून लहान लहान टोळ्यांनी बाहेर
काढले. त्यांनी ज्या ज्या देशांतून प्रवास केला ते या प्रमाणे:
2त्यांनी जेथे जेथे प्रवास केला त्याबद्दल मोशेने लिहिले
आहे. परमेश्वराला जे हवे होते तेच मोशेने लिहिले. ते
ज्या ठिकाणी गेले ती ठिकाणे आणि तेथून ते कधी गेले
त्या वेळा या प्रमाणे:
3पहिल्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी त्यांनी रामसेस
सोडले. वल्हांडणाच्या दुसऱ्या दिवशी इस्राएलचे लोक
विजयोत्सवात हात वर करुन बाहेर पडले. मिसर देशाच्या
सगळ्या लोकांनी त्यांना पाहिले. 4मिसर देशाचे लोक
परमेश्वराने मारलेल्या लोकांचे दफन करीत होते. ते
त्यांच्या पहिल्या मुलांचे दफन करीत होते. परमेश्वराने
मिसर देशाच्या देवतांना कडक शासन केले.
5इस्राएल लोकांनी रामसेस सोडले आणि ते सुक्कोथला
गेले. 6ते सुक्कोथहून एथामला गेले. लोकांनी तेथे
वाळवंटाच्या काठावर तंबू ठोकले. 7त्यांनी एथाम सोडले
आणि ते पीहहीरोथला गेले. ते बाल-सफोन जवळ होते.
लोकांनी मिगदोलसमोर तंबू ठोकले.
8लोकांनी पीहहीरोथ सोडले आणि ते समुद्रामधून चालत
गेले. ते वाळवंटाकडे गेले. नंतर ते तीन दिवस वाळवंटातून
चालत होते. लोकांनी मारा येथे तळ दिला.
9लोकांनी मारा सोडले व ते एलिमला जाऊन राहिले.
तिथे 12 पाण्याचे झरे होते आणि 70 खजुराची झाडे होती.
10लोकांनी एलिम सोडले व त्यांनी तांबड्या समुद्राजवळ
तंबू ठोकले.
11त्यांनी तांबडा समुद्र सोडला आणि त्सीन वाळवंटात
तळ दिला.
12त्सीन वाळवंट सोडून ते दफकाला आले.
13लोकांनी दफका सोडले व ते आलूश येथे राहिले.
14लोकांनी आलूश सोडले व रफिदिमला तळ दिला.
त्या जागी पिण्यासाठी पाणी नव्हते.
15लोकांनी रफिदिम सोडले व त्यांनी सीनाय वाळवंटात
तळ दिला.
16त्यांनी सीनाय वाळवंट सोडले व किब्रोथ-हत्तव्वा येथे
तळ दिला.
17किब्रोथ-हत्तव्वा येथून ते हसेरोथला राहिले.
18हसेरोथ येथून त्यांनी रिथमाला तंबू ठोकले.
19रिथमा सोडून ते रिम्मोन-पेरेसला आले.
20रिम्मोन-पेरेस सोडल्यावर त्यांनी लिब्नाला तळ दिला.
21लोकांनी लिब्ना सोडले व रिस्सा येथे तळ दिला.
22रिस्सा सोडून ते कहेलाथा येथे तळ दिला.
23लोकांनी कहेलाथा सोडले व त्यांनी शेफेर पर्वतावर
तंबू ठोकले.
24शेफेर पर्वत सोडून लोक हरादांत आले.
25लोकांनी हरादा सोडले व मकहेलोथ येथे तळ दिला.
26मकहेलोथ सोडून ते तहथाला आले.
27लोकांनी तहथा सोडले व ते तारहला आले.
28तारह सोडून त्यांनी मिथकाला तळ दिला.
29लोकांनी मिथका सोडले व हशमोना येथे तंबू ठोकले.
30हशमोना सोडून ते मोसेरोथला आले.
31त्यांनी मोसेरोथ सोडले व बनेयाकानला तळ दिला.
32बनेयाकान सोडून ते होर-हागिदगादला आले.
33होर-हागिदगाद सोडून त्यांनी याटबाथाला तंबू ठोकले.
34याटबाथा येथून ते अब्रोनाला आले.
35अब्रोनाहून त्यांनी एसयोन-गेबेर येथे तळ दिला.
36लोकांनी एसयोन-गेबेर सोडले व त्यांनी त्सीन
वाळवंटात कादेश येथे तंबू ठोकले.
37लोकांनी कादेश सोडले व त्यांनी होरला तंबू ठोकले.
अदोम देशाच्या सीमेवरील हा एक पर्वत होता. 38याजक
अहरोनने परमेश्वराची आज्ञा पाळली व तो होर पर्वतावर
गेला. अहरोन त्याजागी मरण पावला. हा इस्राएल लोकांनी
मिसर देश सोडल्याचा चाळीसाव्या वर्षाच्या पाचव्या
महिन्याचा पहिला दिवस होता.
39अहरोन होर पर्वतावर मेला तेव्हा तो 123 वर्षांचा
होता.

40कनान देशातील नेगब जवळ अराद शहर होते. अर्द
येथे असलेल्या कनानी राजाने इस्राएलचे लोक येत
असल्याबद्दल ऐकले. 41लोकांनी होर पर्वत सोडला व
सलमोनाला तंबू ठोकले.
42त्यांनी सलमोना सोडले व ते पुनोनला आले.
43पूनोन सोडून त्यांनी ओबोथला तळ दिला.
44लोकांनी ओबोथ सोडले व ते इये-अबारिमला आले.
हे मवाब देशाच्या सीमेवर होते.
45मग ईयीमाहून (इये-अबारिम) ते दीबोन-गादला
आले.
46लोकांनी दीबोन-गाद सोडले व
अलमोन-दिबलाथाईमला आले.
47अलमोन-दिलाथाईमहून त्यांनी नबोजवळच्या
अबारीम पर्वतावर तंबू ठोकले.
48लोकांनी अबारीम पर्वत सोडला व ते यार्देन
खोऱ्यातल्या मवाब येथे आले. हे यरीहोच्या समोर यार्देन
नदीजवळ होते. 49त्यांनी यार्देन नदीच्या यार्देन खोऱ्यात
तंबू ठोकले. त्यांचे तंबू बेथ-यारीमोथापासून अकाशीयाच्या
शेतार्पयत होते.
50त्या ठिकाणी परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला,
51“इस्राएल लोकांशी बोल. त्यांना या गोष्टी सांग: तुम्ही
यार्देन नदी पार कराल. तुम्ही कनान देशात जाल. 52तिथे
जे लोक तुम्हाला आढळतील त्यांच्यापासून तुम्ही तो प्रदेश
घ्याल. तेव्हा तुम्ही त्यांच्या कोरीव पुतळ्यांचा आणि मूर्तीचा
नाश करा. त्यांच्या उंचावरच्या पुजेच्या ठिकाणांचा नाश
करा. 53तुम्ही तो प्रदेश घ्या आणि तिथेच रहा. कारण मी
हा प्रदेश तुम्हाला देत आहे. तो तुमच्या कुटुंबाचा होईल.
54तुमच्यातील प्रत्येक कुळाला जमिनीचा काही भाग
मिळेल. तुम्ही चिठ्ठया टाकून कोणाला कुठली जमीन
मिळते ते ठरवाल. मोठ्या कुळाला जमिनीचा मोठा भाग
मिळेल. लहान कुळाला लहान भाग मिळेल. चिठ्यां
कुठल्या कुळाला कुठली जमीन मिळाली ते कळेल.
प्रत्येक कुळाला त्याचा स्वत:चा जमिनीचा तुकडा मिळेल.
55“तुम्ही त्या लोकांना जबरदस्तीने बाहेर काढा. जर
तुम्ही त्यांना तिथेच राहू दिले तर ते तुमच्यावर अनेक
संकटे आणतील. ते तुमच्या डोव्व्यातील कुसळासारखे
आणि शरीरातल्या काट्यासारखे बोचतील. तुम्ही ज्या देशात
रहाल त्या देशात ते अनेक संकटे आणतील. 56मी
तुमच्याबाबत काय करणार आहे ते मी तुम्हाला दाखवले
आहे. आणि जर तुम्ही त्यांना त्या देशात राहू दिले तर मी
ते सर्व तुमच्याबाबतीत करीन.”

## कनानच्या सीमा

34 परमेश्वर मोशेशी बोलला, तो म्हणाला, 2“इस्राएल
लोकांना ही आज्ञा दे: तुम्ही कनान देशात येत
आहात. तुम्ही त्या देशाचा पराभव करा. तुम्ही सर्व कनान
देश घ्या. 3दक्षिणे कडे अदोमजवळच्या त्सीन वाळवंटाचा
काही भाग तुम्हाला मिळेल. तुमची दक्षिणेकडची सीमा
मृत समुद्राच्या दक्षिण टोकापासून सुरु होईल. 4तेथून
अक्रब्बीम चढावाचे दक्षिण टोक पार करुन ती त्सीन
वाळवंटातून कादेश-बर्ण्याला जाईल. आणि नंतर
हसर-अद्दारपर्यंत जाऊन असमोनाला पोहोचेल.
5असमोनहून ती मिसर देशाच्या नदीपर्यंत जाईल आणि
भूमध्यसमुद्रात तिची समाप्ती होईल. 6तुमची पश्चिमेकडची
सीमा म्हणजे भूमध्य समुद्र(महासुमद्र.) 7तुमची उत्तरेकडची
सीमा भूमध्यसमुद्रात सुरु होईल व होर पर्वताकडे
जाईल(लेबानान मध्ये). 8होर पर्वतावरुन ती
लेबो-हमासला जाईल व तेथून सदादला. 9नंतर ती सीमा
जिफ्रोनला जाईल व हसर-एनानला ती संपेल. तेव्हा ती
तुमची उत्तर सीमा. 10तुमची पूर्व सीमा एनानजवळ सुरु
होईल व ती शफामपर्यंत जाईल. 11शफामपासून ती
अईनच्या पूर्वेकडे रिब्लाला जाईल. ती सीमा गालीली
तलावाजवळच्या पर्वतांच्या रांगांपर्यंत जाईल. 12आणि नंतर
ती यार्देन नदीच्या काठाने जाऊन मृतसमुद्रात तिची समाप्ती
होईल. तुझ्या देशाच्या या सीमा आहेत.”
13तेव्हा मोशेने इस्राएल लोकांना या आज्ञा दिल्या,
“तुम्हाला हा प्रदेश मिळेल. तुम्ही नऊ कुळात आणि
मनश्शेच्या अर्ध्या कुळात जमिनीची विभागणी करण्यासाठी
चिठ्ठ्या टाकाल. 14रऊबेन आणि गादची कुळे आणि
मनश्शेच्या अर्ध्या कुळांनी आधीच त्यांची जमीन घेतली
आहे. 15त्या अडीच कुळानी यरीहोजवळ यार्देन नदीच्या
पूर्वेकडची जागा घेतली आहे.”
16नंतर परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला,
17“जमिनीची विभागणी करण्यासाठी तुला या माणसांची
मदत होईल: याजक एलाजार आणि नूनाचा मुलगा यहोशवा.
18आणि सर्व कुळांचे प्रमुख. प्रत्येक कुळाचा एक प्रमुख
असेल. ते लोक जमिनीची विभागणी करतील. 19प्रमुखांची
ही नावे आहेत:

यहुदाच्या वंशातला यफुन्नेचा मुलगा कालेब.
20 शिमोनेच्या कुटुंबातील अम्मीहुदाचा मुलगा
शमुवेल.
21 बन्यामिनच्या कुटुंबातील किसलोनच्या मुलगा
अलीदाद.
22 दानी कुटुंबातील यागलीचा मुलगा बुक्की.
23 योसेफच्या वंशातील मनश्शेच्या कुटुंबातील
एफोदचा मुलगा हन्नीएल.
24 एफ्राईम कुटुंबातील शिफटानचा मुलगा कमुवेल.
25 जबुलून वंशातील पर्नाकचा मुलगा अलीसाफान.
26 इस्साखार वंशातील अज्जानचा मुलगा पलटीयेल.
27 आशेरी वंशातील शलोमीचा मुलगा अहीहूद.
28 आणि नफ्ताली वंशातील अम्मीहुदाचा मुलगा
पदाहेल.”

29परमेश्वराने कनानच्या भूमीची इस्राएल लोकांमध्ये
वाटणी करण्यासाठी या माणसांची निवड केली.

## लेवींची शहरे

35 परमेश्वर मोशेशी बोलला. हे मवाबमधील
यार्देनच्या खोऱ्यात यरीहोसमोर यार्देन नदीजवळ
घडले. परमेश्वर म्हणाला, 2“इस्राएल लोकांना सांग की
त्यांनी त्यांच्या भागातील काही शहरे लेवी लोकांना दिली
पाहिजेत. इस्राएल लोकांनी काही शहरे आणि त्याच्या
आजूबाजूची कुरणे लेवी लोकांना दिली पाहिजेत. 3लेवी
लोक त्या शहरात राहू शकतील आणि लेवी लोकांच्या
गायी आणि इतर जनावरे शहराभोवतालच्या कुरणात चरु
शकतील.

4तुम्ही तुमच्या प्रदेशातील किती भाग लेवी लोकांना
देणार? 5शहरांच्या तटबंदीपासून 1500 फूट भाग लेवी
लोकांच्या मालकीचा असेल. 3000 फूट पूर्वेला आणि
3000 हात दक्षिणेला, 3000 हात पश्चिमेला आणि 3000
हात उत्तरेपर्यंतची जागा लेवींना मिळेल. (शहर या सर्व
प्रदेशाच्या मध्यभागी असेल) 6त्यापैकी सहा शहरे शरणपुरे
असतील. जर एखाद्या माणसाने चुकून कुणाला मारले
तर तो माणूस संरक्षणासाठी त्या शहरात जाऊ शकतो.
त्या सहा शहरांखेरीज आणखी 42 शहरे तुम्ही लेवींना
द्या. 7म्हणजे तुम्ही एकूण 48 शहरे लेवींना द्या. त्या
शहरांभोवतालची जमीनही तुम्ही लेवींना द्या. 8इस्राएलच्या
मोठ्या कुटुंबांना जमिनीचे मोठे तुकडे मिळतील आणि
लहान कुळांना लहान तुकडे मिळतील. म्हणून मोठी
कुळे जास्त शहरे आणि लहान कुळे थोडी शहरे लेवींना
देतील.”

9नंतर परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला,
10“लोकांना या गोष्टी सांग: तुम्ही लोक यार्देन नदी पार
करुन कनानच्या प्रदेशात जाल. 11तेव्हा तुम्ही शरणपुरे
निवडा. जर एखाद्याने चुकून कुणाला ठार मारले तर तो
संरक्षणासाठी त्यापैकी एखाद्या शहरात जाऊ शकतो. 12तेथे
तो माणूस बदला घेणाऱ्या मृत माणसाच्या कुटुंबियांपासून
सुरक्षित राहू शकतो. त्या माणसाचा कोर्टात न्याय होईपर्यंत
तो तेथे सुरक्षित राहू शकतो.

13अशी 6 संरक्षक शहरे असतील. 14यापैकी तीन
शहरे यार्देन नदीच्या पूर्वेला असतील आणि तीन शहरे
कनानच्या प्रदेशात यार्देन नदीच्या पश्चिमेला असतील.
15ही शहरे इस्राएलच्या नागरिकांसाठी, परदेशी
नागारिकासाठी आणि प्रवाशांसाठी शरणपुरे असतील.
यांच्यापैकी कुणीही चुकून कुणाला ठार मारले तर ते
संरक्षणासाठी या शहरात जाऊ शकतात.

16“जर एखादा माणूस कुणाला मारण्यासाठी लोखंडी
शस्त्राचा उपयोग करत असेल तर त्याने मेले पाहिजे.
17आणि जर एखाद्याने दगड घेऊन कुणाला मारले तर
त्यानेसुध्दा मेले पाहिजे. (पण त्या दगडाचा आकार एखाद्याला
मारण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दगडाएवढा असला
पाहिजे.) 18आणि जर एखादा माणूस कुणाला मारण्यासाठी
लाकडाच्या तुकड्याचा उपयोग करीत असेल तर तो माणूस
सुद्धा मेला पाहीजे. (हा लाकडाचा तुकडा म्हणजे सामान्यत:
कोणाला तरी मारण्यासाठी उपयोगात आणतात तसे
लाकडाचे शस्त्र असले पाहिजे.) 19मेलेल्या माणसाच्या
कुटुंबातील कुणीही त्या खुन्याचा पाठलाग करुन त्याला
ठार मारू शकतो.

20-21“माणूस एखाद्याला हाताने मारून सुद्धा ठार मारू
शकतो. किंवा एखाद्याला ढकलून देऊन सुद्धा ठार मारू
शकतो, किंवा कुणाला काही फेकून मारून सुद्धा त्याला
ठार करु शकतो. जर कुणी ते हेतूपूर्वक द्वेषबुद्धीने केले
असेल तर तो खुनी ठरतो. त्या माणसाला ठार मारलेच
पाहिजे. मेलेल्या माणसाच्या कुटुंबातील कुणीही त्या
खुन्याचा पाठलाग करुन त्याला मारु शकतो.

22“एखादा माणूस अपघाताने दुसऱ्याला मारू शकेल.
मेलेल्या माणसाचा त्याने द्वेष केला नाही-त्याला त्याने
चुकून मारले असेल. किंवा त्याने एखादी वस्तू चुकून
फेकली असेल आणि ती चुकून एखाद्याला लागून तो
मेला-तर त्याने ते विचारपूर्वक केले असे नाही. 23किंवा
एखाद्या माणसाने दगड फेकला आणि तो त्याला न दिसलेल्या
माणसाला लागला व तो मेला तर त्या माणसाने योजनापूर्वक
मारले असे नाही. तो माणूस मेलेल्या माणसाचा द्वेष करत
नव्हता. तो केवळ योगायोगाने मेला. 24जर असे घडले
तर काय करायचे ते समाजाने ठरवायचे. मेलेल्या
माणसाच्या कुटुंबातील एखादा माणूस त्याला मारु शकतो
की नाही ते लोक न्यायालयाने ठरवायचे. 25जर लोकांनी
खुन्याचे त्या कुटुंबापासून रक्षण करायचे असे ठरवले तर
समाजाने खुन्याला संरक्षक शहरात परत न्यावे आणि
जोपर्यंत मुख्य याजक मरत नाही तोपर्यंत खुन्याने तिथेच
रहावे.

26-27“त्या माणसाने संरक्षक शहराच्या बाहेर जायचे
नाही. जर त्याने त्या सीमा ओलांडल्या आणि मृत माणसाच्या
कुटुंबाने त्याला पकडले आणि मारले तर त्या कुटुंबातील
तो माणूस खुनाचा अपराधी ठरणार नाही. 28एखाद्या
माणसाने चुकून कोणाला मारले असेल तर त्याने मुख्य
याजक मरेपर्यंत शरणपुरातच राहिले पाहिजे. मुख्य याजक
मेल्यानंतर तो माणूस त्याच्या स्वत:च्या प्रदेशात जाऊ
शकतो.

29तुम्हा लोकांच्या सर्व शहरांमध्ये हाच नियम सदैव
लागू राहील.

30“मारणाऱ्याला मरणाची शिक्षा जर साक्षीदार असेल
तरच दिली जाईल. जर एकच साक्षीदार असेल तर
कोणालाही मरणाची शिक्षा दिली जाणार नाही.

31जर एखादा माणूस खुनी असेल तर त्याला मारलेच
पाहिजे. पैसे घेऊन त्याची शिक्षा बदलू नका. त्या खुन्याला
मारलेच पाहिजे.

32“जर एखाद्याने कुणाला मारले आणि तो संरक्षक शहरात पळून गेला तर घरी जाण्यासाठी त्याच्याकडून पैसे घेऊ नका. मुख्य याजक मरेपर्यंत त्याने शरणपुरातच राहिले पाहिजे.

33“तुमच्या प्रदेशाला निष्पाप रक्ताने भ्रष्ट करु नका जर एखाद्याने कुणाचा खून केला तर त्या अपराधासाठी असलेली एकमेव शिक्षा म्हणजे त्या खुन्याला ठार मारणे. त्याशिवाय त्याप्रदेशाची त्या अपराधापासून सुटका होऊच शकत नाही. 34मी परमेश्वर आहे. मी तुमच्या देशांत इस्राएल लोकांबरोबर राहीन. मी तिथे राहणार आहे. म्हणून ती जागा निष्पाप लोकांच्या रक्ताने अशुद्ध करु नका.”

## सलाफहादच्या मुलींची जमीन

36 मनश्शे योसेफचा मुलगा होता. माखिर मनश्शेचा मुलगा होता. गिलाद माखिरचा मुलगा होता. गिलादच्या कुटुंबातील प्रमुख लोक मोशेशी व इस्राएलच्या कुटुंबातील प्रमुखांशी बोलायला गेले. 2ते म्हणाले, “परमेश्वराने आम्हाला चिठ्या टाकून आमची जमीन घेण्याची आज्ञा केली आहे. आणि परमेश्वराने सलाफहादची जमीन त्याच्या मुलींना द्यायची आज्ञा केली आहे. सलाफहाद आमचा भाऊ होता. 3कदाचित दुसऱ्या कुटुंबातील एखादा माणूस सलाफहादच्या एका मुलीशी लग्न करील तर ती जमीन आमच्या कुटुंबातून जाईल. ती जमीन त्या दुसऱ्या कुटुंबाकडे जाईल का? चिठ्या टाकून मिळालेली आमची जमीन आम्हाला दुरावणार का? 4लोक त्यांची जमीन विकतील सुद्धा. पण पन्नासव्या वर्षात सर्व जमीन ज्या कुंटुबाची होती त्या कुटुंबाला परत केली जाते त्यावेळी सलाफहादची जमीन कोणाला मिळेल? ती जमीन आमच्या कुटुंबाकडून कायमचीच जाईल का?”
5मोशेने इस्राएल लोकांना ही आज्ञा केली: ही परमेश्वराची आज्ञा होती, “योसेफच्या कुटुंबातील ह्या लोकांचे म्हणणे बरोबर आहे. 6सलाफहादच्या मुलींसाठी परमेश्वराची ही आज्ञा आहे: “जर तुम्हाला कोणाशी लग्न करायचे असेल तर तुम्ही तुमच्या कुळातील कोणाशी तरी लग्न करा. 7यामुळे इस्राएल लोकांमध्ये जमीन एका कुळाकडून दुसऱ्या कुळाकडे जाणार नाही. आणि प्रत्येक इस्राएली माणसाला त्याच्या पूर्वजांकडून मिळालेली जमीन ठेवता येईल. 8आणि जर एखाद्या. स्त्रीला तिच्या वडिलांकडून जमीन मिळाली तर तिने तिच्या कुळातील एखाद्याशीच लग्न केले पाहिजे. यामुळे प्रत्येकाला पूर्वजांकडून मिळालेली जमीन ठेवता येईल. 9तेव्हा इस्राएल लोकांमध्ये जमीन एक कुळाकडून दुसऱ्या कुळाकडे जाऊ शकणार नाही. प्रत्येक इस्राएली माणूस त्याच्या पूर्वजांकडून मिळालेली जमीन जवळ बाळगू शकेल.” 10सलाफहादच्या मुलींनी परमेश्वराने मोशेला दिलेल्या आज्ञांचे पालन केले.

11म्हणून सलाफहादच्या महाला, तिरसा, होग्ला, मिल्का व नोआ यांनी त्यांच्या चुलत भावांशी लग्न केले. 12त्यांचे नवरे मनश्शेच्या कुळातील होते. म्हणून त्याची जमीन त्यांच्या वडिलांच्या कुळाकडेच राहिली. 13परमेश्वराने यार्देन नदीजवळ मवाबमधील यार्देन खोऱ्यात यरीहोच्या पलीकडे मोशेला दिलेल्या या आज्ञा आहेत.

# अनुवाद

### इस्राएल लोकांसमोर मोशेचे प्रवचन

1 मोशेने इस्राएल लोकांना हा संदेश दिला. तेव्हा ते सर्व यार्देन नदीच्या पूर्वेकडील रानात सूफाच्या समोर एकीकडे पारान आणि दुसरीकडे तोफेल, लाबान, हसेरोथ व दी-जाहाब या नगरांच्या मध्ये होते.

2होरेबा (सिनाई) पासून कादेश-बर्ण्यापर्यंतची वाट सेईर डोंगरांच्या मागे फक्त अकरा दिवसांची आहे. 3पण इस्राएलांनी मिसर सोडले आणि ते या जागी आले याला चाळीस वर्षे लागली. तेव्हा चाळीसाव्या वर्षाच्या अकराव्या महिन्यातील पहिल्या दिवशी मोशे इस्राएल लोकांशी हे बोलला. परमेश्वराने जे जे काही सांगायची आज्ञा केली होती; ते सर्व त्याने सांगितले. 4अमोऱ्यांचा राजा सीहोन आणि बाशानचा राजा ओग यांना परमेश्वराने ठार मारल्यानंतरची ही गोष्ट आहे. (सीहोन अमोरी लोकांचा राजा होता. तो हेशबोनमध्ये राहात असे. ओग बाशानचा राजा होता. तो अष्टेरोथ व एद्रई येथे राहाणारा होता.) 5परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे मोशे आता यार्देनच्या पूर्वेला मवाबच्या देशात नियमशास्त्राचे विवरण करू लागला.

6"मोशे म्हणाला, आपला देव परमेश्वर होरेबात (सिनाई) आपल्याशी बोलला. त्याने सांगितले, 'या डोंगरातील तुमचे वास्तव्य आता पुरे झाले. 7आता तुम्ही इथून अमोऱ्यांच्या डोंगराळ प्रदेशात जा. आसपासच्या सर्व प्रदेशात प्रवास करा. यार्देनेच्या खोऱ्यात, अराबांच्या पहाडी प्रदेशात, पश्चिमेकडील उतारावर, नेगेवमध्ये समुद्रकिनारी जा. कनान आणि लबानोन मार्गे फरात या महानदीपर्यंत जा. 8पाहा हा प्रदेश मी तुम्हाला देऊ करत आहे. जा आणि त्यावर ताबा मिळवा. अब्राहाम, इसहाक आणि याकोब या तुमच्या पूर्वजांना व त्यांच्यानंतर त्यांच्या वंशजांना हा प्रदेश देण्याचे मी वचन दिले होते.'"

### अधिकाऱ्यांची नेमणूक

9मोशे पुढे म्हणाला, "तेव्हा मी तुम्हाला सांगितले होते की मी एकटा तुमचा सांभाळ करू शकणार नाही. 10आणि आता तर तुमची संख्या कितीतरी वाढली आहे. परमेश्वर देवाच्या कृपेने ती वाढून आकाशातील ताऱ्यांइतकी झाली आहे. 11तुमच्या पूर्वजांचा देव परमेश्वर ह्याच्या कृपेने ती आणखी वाढून आत्ताच्या हजारपट होवो आणि त्याने कबूल केल्याप्रमाणे त्याचा आशीर्वाद तुम्हाला मिळो. 12पण मी एकटा तुमचा सांभाळ करायला तसेच तुमची आपापसांतली भांडणे सोडवायला असमर्थ आहे. 13म्हणून मी तुम्हाला सांगितले, 'आपापल्या वंशातून अनुभवी, ज्ञानी व समंजस व्यक्तींची निवड करा. मी त्यांना प्रमुख म्हणून नेमतो.'

14"त्यावर 'हे चांगलेच झाले' असे तुम्ही म्हणालात.

15"म्हणून मी त्या ज्ञानी व अनुभवी व्यक्तींना तुमचे प्रमुख म्हणून नेमले. हजारांच्या समूहावर एक अधिकारी, शंभरांवर एक, पन्नासंवर, दहावर तसेच घराण्यावर अशा या अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या.

16"या न्यायाधीशांना मी त्यावेळी सांगितले की तुमच्या भाऊबंदांतील वाद नीट ऐकून घ्या. निवाडा करताना पक्षपात करू नका. मग तो वाद दोन इस्राएलींमधला असो की एक इस्राएली व एक उपरा यांच्यातील असो. नीतीने न्याय करा. 17कोणालाही कमी अधिक लेखू नका. सर्वांना समान लेखा. कोणाचीही भीती बाळगू नका. कारण तुम्ही दिलेला न्याय हा देवाचा आहे. एखादे प्रकरण तुम्हाला विशेष अवघड वाटले तर ते माझ्याकडे आणा. मी त्याचा निवाडा करीन.

18तुमच्या इतर कर्तव्यांबद्दलही मी तेव्हाच तुम्हांला सांगितले होते.

### कनानात पाठवलेले हेर

19"मग आपला देव परमेश्वर ह्याच्या आज्ञेनुसार आपण होरेबहून पुढे अमोऱ्यांच्या डोंगराळ प्रदेशाकडे निघालो. तेव्हा वाटेत आपल्याला ते विस्तीर्ण आणि भयंकर वाळवंट लागले. ते ओलांडून आपण कादेश-बर्ण्याला पोचलो. 20तिथे मी तुम्हाला म्हणालो की पाहा, अमोऱ्यांच्या पहाडी प्रदेशात तुम्ही पोचलात. आपला देव परमेश्वर तुम्हाला हा प्रदेश देणार आहे. 21हा प्रदेश तुमचाच आहे. तुमच्या पूर्वजांचा परमेश्वर ह्याया आज्ञेनुसार तो हस्तगत करा. कचरु नका व कशाचीही भीती बाळगू नका.

22पण तेव्हा तुम्ही सगळे मला म्हणालात की, आधी आपण काही जणांना त्या प्रदेशाच्या पाहाणीसाठी पुढे पाठवू. म्हणजे ते त्या देशाची माहिती मिळवून आपल्याला कोणत्या मार्गाने जावे लागेल, कोणकोणती नगरे तेथे लागतील याची खबर आणतील.

23"मलाही ते पटले. म्हणून प्रत्येक घराण्यातून एक अशी बारा माणसे मी निवडली. 24ते लोक मग निघाले व

पहाडी प्रदेशात जाऊन अष्कोल ओढ्यापर्यंत पोचले. त्यांनी
तो देश हेरला. 25येताना त्यांनी तिकडे होणारी काही फळे
बरोबर आणली. त्या प्रदेशाची माहिती सांगितली व ते
म्हणाले की, आपला देव परमेश्वर देत असलेला हा
भूभाग उत्तम आहे.
26"पण तुम्ही तेथे जायचे नाकारलेत. आपला देव
परमेश्वर याच्या आज्ञेविरुद्ध बंड केलेत. 27तुम्ही आपापल्या
तंबूत जाऊन कुरकुर करत म्हणालात की परमेश्वर
आमचा द्वेष करतो. अमोऱ्यांच्या हातून आमचा नाश
व्हावा म्हणूनच आम्हाला त्याने मिसर देशातून बाहेर काढले.
28आता आम्ही कुठे जाणार? आमच्या या भावांच्या (12
हेरांच्या) बातम्यांमुळे घाबरून आमच्या तोंडचे पाणी पळाले
आहे. त्यांच्या खबरीनुसार हे लोक धिप्पाड व आमच्यापेक्षा
उंच आहेत. तेथील नगरे मोठी असून त्यांची तटबंदी
आकाशाला भिडली आहे. आणि तेथे अनाक वंशी महाकाय
आहेत.
29"तेव्हा मी तुम्हाला म्हणालो की हताश होऊ नका.
त्या लोकांना घाबरू नका. 30स्वत: परमेश्वर देव तुमचा
पाठिराखा आहे. मिसर देशात तुमच्यादेखत त्याने जे केले
तेच तो येथेही करील. तुमच्यासाठी लढेल. 31तिकडे तसेच
या रानातल्या वाटचालीतही, माणूस आपल्या मुलाला जपून
नेतो तसे त्याने तुम्हांला येथपर्यंत सांभाळून आणले.
32"तरीही तुम्ही आपल्या परमेश्वर देवावर विश्वास
ठेवला नाही. 33प्रवासात तो तुमच्यासाठी मुक्कामाचे
ठिकाण शोधायला तसेच रात्री अग्नीत व दिवसा मेघात
प्रकट होऊन तुम्हाला मार्गदर्शन करायला तुमच्यापुढे चालत
असे.

## लोकांना कनानात प्रवेश बंदी

34"परमेश्वराने तुमचे बोलणे ऐकले व तो संतापला.
कठोरपणे शपथपूर्वक तो म्हणाला, 35'तुमच्या पूर्वजांना
कबूल केलेला हा उत्तम प्रदेश या कृतघ्न पिढीतील
एकाच्याही दृष्टीस पडणार नाही. 36यफुन्नेचा मुलगा कालेब
मात्र तो पाहील. त्याचे पाय या भूमीला लागले आहेत.
त्याला व त्याच्या वंशजांना मी ही भूमी देईन. कारण तो
परमेश्वराचा खरा अनुयायी आहे.'
37"तुमच्यामुळे परमेश्वराचा माझ्यावरही कोप झाला.
तो म्हणाला, 'मोशे, तूही या प्रदेशात प्रवेश करणार नाहीस.
38पण तुझ्या सेवेस हजर राहणारा, नूनाचा मुलगा यहोशवा
तेथे जाईल. त्याला तू प्रोत्साहन दे कारण इस्राएलांना तोच
देश वतन म्हणून मिळवून देईल.'
39"परमेश्वर पुढे आपल्याला म्हणाला, 'शिवाय आपले
शत्रू आपल्या मुलाबाळांना पळवतील असे तुम्ही म्हणालात.
ती मात्र या देशात जातील. मी मुलांवर तुमच्या चुकांचे
खापर फोडत नाही. कारण बरे वाईट ठरविण्याइतकी ती
मोठी नाहीत. 40पण तुम्ही-तुम्ही मात्र परत फिरुन तांबड्या
समुद्राच्या वाटेने रानाकडे कूच करा.'
41"मग तुम्ही मला म्हणालात की आमच्या हातून पाप
घडले आहे. आपल्या परमेश्वर देवाच्या आज्ञेनुसार आम्ही
वर जाऊन लढू. मग तुम्ही शस्त्रास्त्रे घेऊन सज्ज झालात.
तो डोंगराळ भाग सर करणे सहज जमेल असे तुम्हांला
वाटले.
42"पण परमेश्वर मला म्हणाला, 'त्यांना तेथे जाऊन
युद्ध करण्यापासून परावृत कर. कारण मी त्यांच्या बाजूचा
नाही. शत्रू त्यांना पराभूत करेल.'
43"त्याप्रमाणे मी त्यांना सांगितले. पण तुम्ही ऐकले नाही.
तुम्ही परमेश्वराची आज्ञा पाळली नाहीत. आणि धिटाई
करून त्या डोंगराळ प्रदेशात चढून गेलात. 44तेव्हा तेथील
अमोरी तुमच्याशी सामना करायला सामोरे आले. आणि
चवताळलेल्या मधमाश्यांप्रमाणे त्यांनी सेईर देशातील
हर्मापर्यंत तुम्हाला पिटाळून लावले. 45मग तुम्ही परत येऊन
परमेश्वराकडे मदतीसाठी याचना केलीत. पण त्याने तुमचे
काहीही ऐकले नाही. 46तेव्हा तुम्ही कादेश येथे बरेच
दिवस राहिलात.

## रानात इस्राएलांनी कंठलेली वर्षे

2 "मग परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे आपण मागे
फिरून तांबड्या समुद्राच्या वाटेने रानात निघालो
आणि बरेच दिवस सेईर डोंगराभोवती फिरत राहिलो.
2परमेश्वर तेव्हा मला म्हणाला, 3'या डोंगराभोवती तुम्ही
फार दिवस फिरत राहिला आहात. आता उत्तरेकडे वळा.
4आणि लोकांना आणखी एक सांग. म्हणावे, की तुम्हाला
वाटेत सेईर लागेल. ती भूमी एसावच्या वंशाजांची, तुमच्या
भाऊबंदांची आहे. त्यांना तुमची भीती वाटेल. तेव्हा सांभाळा.
5त्यांच्याशी भांडू नका. त्यांच्यातली तसूभरही जमीन मी
तुम्हाला देणार नाही. कारण सेईर डोंगर मी एसावला
वतन म्हणून दिला आहे. 6तुमच्या अन्नपाण्याचा खर्च
तुम्ही त्यांना द्या. 7तुमच्या सर्व कार्यात तुमचा देव परमेश्वर
याचे तुम्हाला आशीर्वाद आहेत. तुमच्या या रानातील
वाटचालीकडे त्याचे लक्ष आहे. गेली चाळीस वर्षे तुमचा
देव परमेश्वरा ह्याने तुम्हाला साथ दिली आहे. तुम्हाला
कशाचीही वाण पडली नाही.
8"तेव्हा एसावचे वंशज राहात असलेल्या सेईर वरुन
आपण गेलो. एलाथ आणि एसयोन-गेबर वरुन येणारा
अराबाचा मार्ग आपण सोडला आणि मवाबच्या रानातल्या
रस्त्याला आपण वळलो.

## इस्राएल लोक आर येथे येतात

9"परमेश्वराने मला सांगितले, 'मवाबाला उपद्रव पोचू
देऊ नका. त्यांना युद्धाला प्रवृत करू नका. त्यांच्यातली
जमीन मी तुम्हाला देणार नाही. कारण आर नगर मी
लोटच्या वंशजांना इनाम दिले आहे.'"
(10 पूर्वी तेथे एमी लोक राहात असत. ते बहुसंख्य,
धिप्पाड व अनाकी लोकांप्रमाणे महाकाय होते. 11या एमींना

लोक अनाकी यांच्यासारखे रेफाई समजत असत. पण
मवाबी लोक त्यांना एमी म्हणतात. 12पूर्वी सेईरात होरी
लोकही राहात असत. पण एसावांनी त्यांची जमीन
बळकावली, होरींचा संहार केला व तेथे स्वत: वस्ती
केली. परमेश्वराने त्यांना दिलेल्या देशाचे इस्राएलांनी जसे
केले तसेच त्यांनी इथे केले.)
13“मग परमेश्वराने मला जेरेद ओढ्यापलीकडे जायला
सांगितले. त्याप्रमाणे आपण जेरेद ओढ्यापलीकडे गेलो.
14कादेश-बर्ण्या सोडून जेरेद ओढ्यापलीकडे पोहोंचेपर्यंत
अडतीस वर्षे उलटली होती. तोपर्यंत आपल्या गोटातील
सर्व लढवय्ये मरण पावले होते. परमेश्वराने हे भाकित
केलेच होते. 15त्यांचे समूळ उच्चाटन होईपर्यंत परमेश्वराचा
त्यांच्यावर कोप होता.
16“ती पिढी नामशेष झाल्यावर 17परमेश्वर मला
म्हणाला, 18‘तुला आज मवाबची सीमा ओलांडून आर
नगरापलीकडे जायचे आहे. 19तेथे अम्मोनी लोक भेटतील.
त्यांना उपद्रव देऊ नको. त्यांच्याशी युध्द करू नको.
त्यांच्या जमिनीतील वाटा मी तुला देणार नाही. कारण ते
लोटाचे वंशज असून त्यांना मी ती वतन दिली आहे.’”
20त्या भागाला रेफाई देश असेही म्हणतात. पूर्वी तेथे
रेफाई लोकांची वस्ती होती. अम्मोनी त्यांना जमजुम्मी
म्हणत. 21जमजुम्मी संख्येने पुष्कळ व सशक्त होते. अनाकी
लोकांप्रमाणे ते धिप्पाड होते. पण त्यांचा संहार करायला
अम्मोनी लोकांना परमेश्वराचे साहाय्य होते. आता त्या
जमिनीचा ताबा घेऊन अम्मोनी तेथे राहतात. 22एसावाच्या
वंशजांनाही देवाचे असेच पाठबळ होते. पूर्वी सेईर येथे
होरी लोक राहात असत. पण एसावाच्या वंशजांनी होरींचा
संहार केला व आजतागायत ते तेथे राहतात. 23कफतोरी
लोकांबद्दलही हेच म्हणता येईल. गाजाच्या आसपासच्या
गावांमध्ये अव्वी लोक राहात होते. त्यांचा कफतोराहून
आलेल्या लोकांनी उच्छेद करून त्यांची भूमी बळकावली
आणि आता ते तेथे राहात आहेत.

## अमोरींशी सामना

24“पुढे परमेश्वर मला म्हणाला, ‘आता उठा व आर्णोनचे
खोरे ओलांडून जा. हेशबोनचा अमोरी राजा सीहोन
याच्याबरोबरच्या युद्धात मी तुम्हाला यश देईन. त्याचा देश
ताब्यात घ्या. 25तुमच्याविषयी मी सर्व लोकांच्या मनात
दहशत निर्माण करीन. तुमचे नाव ऐकताच ते भयभीत
होतील.’
26“मग मी कदेमोथच्या रानातून हेशबोनचा राजा सीहोन
याच्याकडे दूताकरवी सलोख्याचा निरोप पाठवला की,
27तुमच्या देशातून आम्हाला जाऊ दे. आमची वाट सोडून
आम्ही डावी उजवीकडे वळणार नाही. आम्हाला खायला
प्यायला लागेल ते आम्ही चांदीच्या मुद्रा देऊन विकत
घेवू. 28आम्हाला फक्त इथून पलीकडे जाऊ दे.
29यार्देनपलीकडे आमचा देव परमेश्वर आम्हाला देणार
असलेल्या जमिनीपर्यंत आम्हाला जायचे आहे. सेईरच्या
एसाव लोकांनी आणि आर येथील मवाबी लोकांनी
आम्हाला जाऊ दिले तसेच तूही कर.
30“पण हेशबोनचा राजा सीहोन आपल्या देशातून जाऊ
देईना. आपण त्याला पराभूत करावे म्हणूनच तुमचा देव
परमेश्वर ह्याने त्याला अडेलतट्टू केले. आज तुम्ही पाहातच
आहात की तो देश आपल्या हाती आहे.
31“परमेश्वर मला म्हणाला, ‘सीहोन राजा आणि त्याचा
देश हे मी तुमच्या हवाली करत आहे. त्यांचा ताबा घ्या.
32आणि अशा वेळी सीहोन व त्याची प्रजा याहस येथे
लढाईसाठी सज्ज झाले. 33पण आमच्यावर परमेश्वर देवाची
कृपा होती म्हणून आम्ही त्याचा, त्याच्या मुलांचा व प्रजेचा
पराभव करू शकलो. 34त्याच्या कक्षेतील सर्व नगरांचा
आम्ही ताबा घेतला. आणि तेथील पुरुष, बायका, मुले
सर्वांचे बळी घेतले. कोणालाही जिवंत ठेवले नाही. 35तेथील
पशुधन आणि मौल्यवान चिजा मात्र आम्ही आमच्यासाठी
घेतल्या. 36आर्णोन खोऱ्याच्या कडेला वसलेले अरोएर
नगर, खोऱ्याच्या मध्यावरील एकनगर तसेच आर्णोन
खोरे ते गिलाद या टापूतील सर्व नगरे, परमेश्वर आमच्या
पाठीशी असल्यामुळे आम्ही जिंकून घेतली. आम्हाला दुर्गम
असे एकही नगर नव्हते. 37अम्मोन्यांचा प्रदेश वगळता
फक्त यब्बोक नदीच्या किनाऱ्यावर तसेच डोंगराळ
प्रदेशातील नगरांकडे आम्ही मोर्चा वळवला नाही. कारण
आमच्या परमेश्वराने तेथे जाण्यास बंदी केली होती.

## बाशानातील लोकांशी संघर्ष

3 “मग आपण वळसा घेऊन बाशानच्या वाटेने निघालो.
तेव्हा एद्राई येथे बाशानचा राजा ओग आणि त्याची
सेना युद्धासाठी सामोरी आली. 2परमेश्वर मला म्हणाला,
‘ओगला भिऊ नका. तो, त्याची प्रजा आणि त्याची भूमी
मी तुमच्याच हाती सोपवणार आहे. हेशबोनवर राज्य
करणारा अमोऱ्यांचा राजा सीहोन याचा पराजय केलात
तसाच याचाही कराल.’
3“आमचा देव परमेश्वर ह्याने बाशानचा राजा ओग
आणि त्याची प्रजा आमच्या हाती दिली. आम्ही त्यांचा
असा समाचार घेतला की त्यांच्यापैकी कोणीही जिवंत
राहिले नाही. 4मग ओगच्या अखत्यारीतील सर्वच्या सर्व
साठ नगरे म्हणजे अर्गोबचा सारा प्रदेश घेतला. बाशानातले
ओगचे राज्य ते हेच. 5या सर्व नगरांना भक्कम तटबंदी
होती. त्यांना उंच भिंती, वेशी, मजबूत अडसर होते. याशिवाय
तट नसलेली गावे पुष्कळच होती. 6हेशबोनच्या सीहोन
राजाच्या नगरांप्रमाणेच येथेही आम्ही संहार केला. पुरुष,
बायका, मुलंबाळं-कोणालाही म्हणून शिल्लक ठेवलं
नाही. 7गुरंढोरं आणि किंमती लूट मात्र घेतली.
8“अशाच पद्धतीने अमोऱ्यांच्या दोन राजांच्या ताब्यातला
प्रदेशही आपण घेतला. तो म्हणजे यार्देनच्या पूर्वेकडचा,
आर्णोन खोऱ्यापासून हर्मोन पर्वतापर्यंतचा. 9(सीदोनी लोक

या हर्मोन पर्वताला सिर्योन म्हणतात. पण अमोरी लोक
सनीर म्हणतात.) 10माळावरील सर्व नगरे, सगळा गिलाद
प्रांत तसेच बाशानच्या ओगच्या राज्यातील सलका व एद्रेई
सकट सर्व प्रांत आपण काबीज केला."

11रेफाई लोकांपैकी बाशानचा राजा ओग तेवढा अजून
जिवंत होता. त्याचा पलंग लोखंडाचा होता. तो पलगं तेरा
फूट लांब आणि सहा फूट रुंद होता. अम्मोन्यांच्या रब्बा
नगरात तो अजूनही आहे.)

## यार्देन नदीच्या पूर्वेकडील वस्ती

12"तेव्हा ती जमीन आम्ही काबीज केली. रऊबेनी
आणि गादी यांना त्यातील काही भाग मी दिला. तो
असा–आर्णोन खोऱ्यातल अरोएर नगरापासून गिलादाच्या
डोंगराळ प्रदेशाचा अर्धा भाग व त्यातील नगरे. 13गिलादाचा
उरलेला अर्धा भाग आणि संपूर्ण बाशान मनश्शेच्या अर्ध्या
वंशाला दिले."

(बाशान म्हणजे ओगचे राज्य. त्याच्या एका भागाला
अर्गोब म्हणतात. ह्यालाच रेफाईंचा देशही म्हणतात.
14मनश्शेचा मुलगा याईर याने गशूरी आणि माकाथी
ह्यांच्या सीमेपर्यंत अर्गोबचा सर्व प्रदेश हस्तगत केला. त्याच्या
नावानेच तो भाग ओळखला जात असे. म्हणून आजही
लोक त्याला याईरची नगरेच म्हणतात.)

15"आणि गिलाद मी माखीराला दिला. 16त्याचा पुढचा
प्रदेश रऊबेनी आणि गादी यांना दिला. आर्णोन खोऱ्याच्या
मध्यभागापासून अम्मोन्यांच्या सीमेवरील यब्बोक नदीपर्यंत
त्याची सरहद्द ठरवली. 17पश्चिमेला यार्देन नदी. उत्तरेला
गालिल सरोवर, पूर्वेला पिसागाची उतरण व त्याच्या तळाशी
दक्षिणेला मृत समुद्र म्हणजेच क्षार समुद्र. 18"त्यावेळी मी
त्या सर्वांना आज्ञा दिली की यार्देन नदीच्या अलीकडचा हा
प्रदेश तुमचा देव परमेश्वर ह्याने तुमच्या हवाली केला
आहे. पण तुमच्यापैकी सर्व लढाऊ पुरुषांनी पुढाकार घेऊन,
हत्यारबंद होऊन आपल्या इस्राएली भाऊबंदाना पलीकडे
घेऊन जावे. 19तुमच्या बायका, मुलेबाळे आणि गायीगुरे
(ती बरीच आहेत हे मला माहीत आहे) इथेच मी दिलेल्या
प्रदेशात राहतील. 20यार्देन नदी पलीकडचा प्रदेश इस्राएली
बांधवांनी ताब्यात घेईपर्यंत त्यांना मदत करा. परमेश्वराच्या
कृपेने ते तुमच्या प्रमाणे स्थिरस्थावर झाले की मग तुम्ही
आपापल्या प्रदेशात परत या.

21"मग मी यहोशवाला सांगितले, 'या दोन राजांचे तुमचा
देव परमेश्वर ह्याने काय केले हे तू पाहिलेच. पुढेही ज्या
ज्या राज्यात तू जाशील त्या सर्वांचे परमेश्वर असेच करील.
22तेथील राजांना घाबरू नका. कारण युद्धात तुमचा देव
परमेश्वर तुमच्या बाजूने लढणार आहे.'

## कनानमध्ये मोशेला प्रवेशबंदी

23"मग मी माझ्यासाठी काहीतरी विशेष करण्यासाठी
परमेश्वराची आळवणी केली. मी म्हणालो, 24'परमेश्वरा,
मी तुझा दास आहे. तुझ्या थक्क करून टाकणाऱ्या
पराक्रमाची तू मला फक्त चुणूक दाखवली आहेस.
तुझ्यासारखे थोर प्रताप करणारा स्वर्गात किंवा पृथ्वीवर
दुसरा कोण आहे? 25तेव्हा कृपा करून मला यार्देन नदी
पलीकडची सुपीक भूमी, चांगला डोंगराळ प्रदेश आणि
लबानोन पाहू दे.' 26"पण तुमच्यापायी परमेश्वर माझ्यावर
रुष्ट झाला होता. त्याने माझे म्हणणे ऐकले नाही. तो
म्हणाला, 'पुरे, आता एक शब्दही बोलू नको. 27पिसगाच्या
शिखरावर जा. आणि तेथून पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण
अशा चारी दिशांना बघ. तेथून तुला सर्व काही दिसेल पण
यार्देनच्या पलीकडे तू पाऊल ठेवू शकणार नाहीस.

28यहोशवा मात्र तू सूचना दे. त्याला उत्तेजन देऊन
समर्थ कर. कारण तोच लोकांना पलीकडे नेईल. तू तो
देश पाहशील पण यहोशवाच त्यांना ती जमीन राहाण्यासाठी
मिळवून देईल.'

29"आणि म्हणून आम्ही बेथ–पौराच्या समोरच्या
खोऱ्यात राहिलो."

## परमेश्वर देवाच्या आज्ञा पाळण्याविषयी मोशेचा लोकांना उपदेश

4 "इस्राएल लोकहो, आता मी जे नियम आणि आज्ञा
सांगतो ते नीट ऐकून घ्या. त्यांचे पालन केलेत तर
जिवंत राहाल आणि तुमच्या पूर्वजांचा देव परमेश्वर जो
देश तुम्हाला देणार आहे त्याचा ताबा घ्याल. 2माझ्या
आज्ञांमध्ये तुम्ही अधिक–ऊणे करू नका. या तुमचा देव
ह्याच्या आज्ञा मी तुम्हाला देत आहे. त्या तुम्ही पाळा.

3"बाआल पौराच्या जे नादी लागले त्यांना परमेश्वराने
नष्ट केले. 4पण परमेश्वराशी एकनिष्ठ राहिलेले तुम्ही
आज जिवंत आहा.

5"परमेश्वराने आज्ञा दिली त्याप्रमाणे विधी आणि नियम
मी तुम्हाला शिकवले. तुम्ही जो देश ताब्यात घ्यायला
जात आहात तेथे तुम्ही ते पाळावेत म्हणून मी ते सांगितले.
6त्यांचे काटेकोरपणे पालन करा. म्हणजे तुम्ही सूज्ञ व
समजूतदार आहात हे इतर देशवासियांना कळेल. ते हे
नियम ऐकून म्हणतील, 'खरंच, हे महान राष्ट्र (इस्राएल)
बुद्धिमान व समंजस लोकांचे आहे.'

7"आपण आपला देव परमेश्वर ह्याचा धावा करतो
तेव्हा तो आपल्या जवळच असतो. असे कोणत्या राष्ट्राचे
आहे बरे? 8ज्या विधी आणि नियमांची शिकवण मी तुम्हाला
दिली तसे नियमशास्त्र असणारे दुसरे राष्ट्र तरी कोठे
आहे? 9पण तुम्ही हे डोळ्यांत तेल घालून जपले पाहिजे.
नाही तर तुम्ही ज्या गोष्टी पाहिल्या आहेत त्या विसरून
जाल. आपल्या मुला नातवंडांना त्याची माहिती द्या. 10तुम्ही
सर्व होरेब पर्वतापाशी परमेश्वरासमोर उभे होतात तो दिवस
आठवा. परमेश्वर मला म्हणाला होता, 'मला काही सांगायचे
आहे तेव्हा सर्वांना एकत्र बोलाव. म्हणजे आयुष्यभर ते
माझ्याबद्दल आदर बाळगतील. आपल्या मुलबाळांनाही

तशीच शिकवण देतील.’ 11मग तुम्ही जवळ आलात व
पर्वताच्या पायथ्याशी उभे राहिलात. तेव्हा डोंगर उभा
पेटला होता व त्याच्या ज्वाळा आकाशाला भिडल्या होत्या.
सर्वत्र काळेकुट्ट ढग आणि अंधार पसरला होता. 12परमेश्वर
त्या अग्नीतून तुमच्याशी बोलला. तुम्हाला आवाज ऐकू
आला पण दिसले काहीच नाही. फक्त वाणी ऐकू आली.
13परमेश्वराने आपला पवित्र करार तुम्हाला सांगितला.
त्याने तुम्हाला दहा आज्ञा सांगितल्या व त्यांचे पालन
करण्याविषयी तुम्हाला आज्ञा दिली. त्याने त्या आज्ञा दोन
दगडी पाट्यांवर लिहून दिल्या. 14त्याचवेळी तुम्ही ज्या
देशात वस्ती करणार होतात तेथे पाळण्यासाठी आणखीही
काही विधी नियम परमेश्वराने मला तुम्हाला शिकवण्यास
सांगितले.

15“होरेब पर्वतावरून अग्नीतून परमेश्वर तुमच्याशी
बोलला. त्या दिवशी तो तुम्हाला दिसला नाही. कारण
त्याला कोणताही आकार नव्हता. 16तेव्हा जपून असा.
कोणत्याही सजीवाची प्रतिमा किंवा खोटी दैवते उभारण्याचे
पाप करून स्वत:ला बिघडवू नका. स्त्री किंवा पुरुषासारखी
दिसणारी मूर्ती करू नका. 17जमिनीवरील प्राणी किंवा
आकाशात उडणारा पक्षी, 18जमिनीवर सरपटणारा जीव
किंवा समुद्रातील मासा अशासारखीही मूर्ती करू नका.
19तसेच आकाशातील सूर्य, चंद्र, तारे आणि इतर गोष्टी
पाहाताना सावध राहा. त्यांच्यापुढे लोटांगण घालून त्यांची
उपासना करू नका. या गोष्टी तो जगातील इतरांना करू
देतो. 20पण तुम्हाला त्याने मिसर देशाबाहेर आणले आणि
तुम्हाला स्वत:चे खास लोक केले. जणू तापलेल्या लोखंडी
भट्टीतून त्याने तुम्हाला बाहेर काढले आणि तुम्ही आता
त्याचे खास लोक आहा!

21“तुमच्यामुळे परमेश्वराचा माझ्यावर कोप झाला व
त्याने निश्चयाने सांगितले की मी यार्देन नदीपलीकडे
पाऊल ठेवू शकणार नाही. परमेश्वराने तुम्हाला दिलेल्या
ज्या सुपीक भूमीत तुम्ही प्रवेश करणार आहात, तेथे मला
मज्जाव आहे. 22त्यामुळे मी येथेच देह ठेवणार आहे. मी
यार्देन नदीपलीकडे येऊ शकत नसलो तरी तुम्ही तो
चांगला प्रदेश ताब्यात घ्या व राहा. 23तेथे तुमचा देव
परमेश्वर ह्याने तुमच्याशी केलेला पवित्रकरार विसरू
नका व त्याच्या आज्ञा पाळा. कुठल्याही प्रकारे कोणत्याही
आकाराची मूर्ती करू नका. 24कारण मूर्तिपूजेचा त्याला
तिटकारा आहे. परमेश्वर देव ईर्ष्यावान् असून तो क्षणात
भस्म करणारा अग्नी आहे.

25“त्या देशात तुम्ही दीर्घकाळ राहाल. तुमचा वंश वाढेल.
तुम्ही म्हातारे व्हाल. आणि मग तुम्ही स्वत:चा नाश ओढवून
घ्याल तुम्ही सर्व तऱ्हेच्या मूर्ती कराल. या तुमच्या कृत्यामुळे
देव क्रुद्ध होईल. 26म्हणून मी आत्ताच तुम्हाला सावध
करत आहे. स्वर्ग आणि पृथ्वी याला साक्ष आहेत. ही नीच
गोष्ट कराल तर तुमचा नाश त्वरीत होईल. तुम्ही त्या
प्रदेशात वस्ती करायला यार्देन नदी पार करत आहात.
पण मूर्ती केल्यात तर मात्र तुम्ही तेथे फार काळ राहणार
नाही. नव्हे, तुमचा सर्वस्वी नायनाट होईल. 27परमेश्वर
देव तुम्हांला वेगवेगळ्या राष्ट्रात विखरुन टाकील. आणि
जेथे जेथे तो पाठवील तेथे तुमची संख्या अगदीच अल्प
राहील. 28तेथे तुम्ही माणसांनी घडवलेल्या दगडी, लाकडी
दैवातांची–जे पाहू शकत नाहीत, ऐकत नाहीत, खात नाहीत
की वास घेत नाहीत अशांची सेवा कराल. 29परंतु तेथूनही
तुम्ही परमेश्वराला, आपल्या देवाला कायावाचामने शरण
गेलात तर तो तुम्हाला पावेल. 30या सर्व गोष्टी घडतील,
तुम्ही संकटात असाल तेव्हा तुम्ही पुन्हा त्याच्या कडेच
परतून याल व त्याला शरण जाल. 31आपला परमेश्वर
देव दयाळू आहे. तो तुम्हाला अंतर देणार नाही. तो तुमचा
सर्वनाश होऊ देणार नाही. तो तुमच्या पूर्वजांशी त्याने
केलेला पवित्रकरार तो विसरणार नाही.

## परमेश्वराच्या महान लीलांचे स्मरण करा

32“असा चमत्कार कधी घडला आहे का? कधीच
नाही. पूर्वीचे आठवून बघा. तुमच्या जन्माआधीपासूनच्याही
सर्व गोष्टी आठवा. देवाने पृथ्वीवर माणूस निर्माण केला.
तेव्हापासून आजपर्यंत जगाच्या कानाकोपऱ्यात घडलेल्या
सर्व गोष्टी पाहा. असा महान चमत्कार कोणाच्या ऐकिवात
तरी आहे का? 33साक्षात अग्नीमधून देव तुमच्याशी बोलला,
ते तुम्ही ऐकले आणि तरीही तुम्ही जिवंत आहात. असे
कधी दुसऱ्या राष्ट्राच्या बाबतील घडले आहे? 34दुसऱ्या
राष्ट्रात जाऊन त्यातून एक राष्ट आपलेसे करायचे असा
दुसऱ्या कुठल्या परमेश्वराने प्रयत्न तरी केला आहे का?
नाही ना? पण आपल्या परमेश्वर देवाने या महान गोष्टी
केल्याचे तुम्ही स्वत: पाहिले आहे. त्याने आपले सामर्थ्य
व प्रताप तुम्हाला दाखवले आहेत. कसोटी पाहणाऱ्या
प्रसंगांतून तुम्ही गेलात. तुम्ही अनेक चमत्कार व नवलपूर्ण
गोष्टी पाहिल्यात. तसेच युद्ध आणि भयानक घटनाही
पाहिल्यात. 35परमेश्वर हाच खरा देव आहे हे तुम्हाला
कळावे म्हणून त्याने तुम्हाला हे दाखवले. त्याच्यासारखा
दुसरा देव नाही. 36तुम्हाला शिकवण द्यावी म्हणून त्याने
आकाशातून आपली वाणी ऐकवली. पृथ्वीवर आपला
महान अग्नी त्याने दाखवला व त्यातून त्याचे शब्द तुम्ही
ऐकले.

37“त्याचे तुमच्या पूर्वजांवर प्रेम होते. म्हणून त्याने तुमची
निवड केली. त्यामुळेच त्याने तुम्हाला आपल्या महान
सामर्थ्याने मिसर देशातून बाहेर आणले. तो तुमच्या पाठीशी
राहिला. 38तुम्ही जसे पुढे जाल तसे त्याने तुमच्यापेक्षा
मोठ्या व समर्थ राष्ट्रांना हुसकून लावले आणि तेथे तुमचा
शिरकाव करून दिला. त्यांचा प्रदेश त्याने तुम्हाला
राहाण्यासाठी दिला. आजही तो हे करत आहे. 39तेव्हा,
वर आकाशात आणि खाली पृथ्वीवर परमेश्वर हाच देव
आहे, दुसरा कोणीही नाही. हे आज तुम्ही नीट समजून घ्या
व लक्षात ठेवा. 40आज मी तुम्हाला त्याचे नियम व आज्ञा

सांगणार आहे, त्या पाळा. त्याने तुमचे व तुमच्या मुलाबाळांचे
भले होईल. तुमच्या परमेश्वर देवाने दिलेल्या प्रदेशात
तुमचे वास्तव्य दीर्घकाळ राहील. तो प्रदेश कायमचा तुमचाच
होईल.

## सुरक्षितेसाठी तीन नगरांची निवड

41मग मोशेने यार्देन नदीच्या पूर्वेला तीन नगरांची निवड
केली. 42अशासाठी की, पूर्वी काही वैर नसताना, नजाणता
एखाद्याने कोणाची चुकून हत्या केली तर त्याला ह्यातल्या
एखाद्या नगराचा आसरा घेता यावा. मृत्युदंडाला सामोरे
जावे लागू नये. 43ती नगरे अशी: रऊबेनींसाठी रानातील
माळावरचे बेसेर. गादींसाठी गिलादमधील रामोथ आणि
मनश्शे लोकांसाठी बाशान मधील गोलान.

## परमेश्वराने घालून दिलेल्या नियमांची मोशेने करून दिलेली तोंड ओळख

44–45 इस्राएल लोक मिसर देशातून बाहेर पडल्यावर
मोशेने त्यांना हे नियमशास्त्र, शिकवण दिली. 46मोशेने हे
निर्बंध त्यांना सांगितले तेव्हा ते बेथपौरच्या समोरच्या
खोऱ्यात यार्देन नदीच्या पूर्वेला होते. म्हणजेच हेशबोनचा
अमोऱ्यांचा राजा सीहोन याला पराजित केले त्याच्या देशात.
(मोशे आणि इस्राएलच्या लोकांनी मिसरातून बाहेर
पडल्यावर सीहोनचा पराभव केला होता. 47त्यांनी हा देश
आणि बाशानचा राजा ओग याचाही देश ताब्यात घेतला.
अमोऱ्यांचे हे दोन्ही राजे यार्देन नदीच्या पूर्वेकडे राहात
असत. 48आर्णोन खोऱ्याच्या सीमेवरील अरोएर
नगरापासून थेट सिर्योन (म्हणजेच हर्मोन) पर्वतापर्यंत हा
प्रदेश पसरलेला आहे. 49यार्देन नदीच्या पूर्वेकडील संपूर्ण
खोरे, दक्षिणेला अराबा (मृत) समुद्रापर्यंतचा विस्तार, आणि
पूर्वेला पिसगा पर्वताच्या पायथ्यापर्यंत एवढा हा प्रदेश त्यांनी
काबीज केला होता.)

## दहा आज्ञा

5 मोशेने सर्व इस्राएल लोकांना एकत्र बोलवून सांगितले,
"इस्राएल लोकहो, आज मी जे विधी आणि नियम
सांगतो ते ऐका. ते नीट समजून घ्या आणि त्यांचे काटेकोरपणे
पालन करा. 2होरेब पर्वताजवळ असताना तुमचा देव
परमेश्वर ह्याने आपल्याबरोबर करार केला होता. 3हा
पवित्र करार आपल्या पूर्वजांशी नव्हता तर
आपल्याशीच-आज ह्यात असणाऱ्या आपल्या सर्वांशी
केला होता. 4त्या पर्वतावर प्रत्यक्ष आपल्यासमोर उभे
राहून, अग्नीतून त्याने आपल्याशी संवाद केला. 5पण त्या
अग्नीच्या भीतीने तुम्ही तो पर्वत चढला नाहीत. तेव्हा
त्याचे म्हणणे तुमच्यापर्यंत पोचवायला मी तुम्हा दोघांच्यामध्ये
उभा राहिलो. परमेश्वर तेव्हा म्हणाला, 6मी परमेश्वर,
तुमचा देव आहे. मिसरमध्ये तुम्ही गुलामीत होतात तेथून
मी तुम्हाला बाहेर काढले. तुम्ही आता या आज्ञा पाळा.

7"माझ्याखेरीज दुसऱ्या कोणाचीही तुम्ही उपासना
करता कामा नये.

8"तुम्ही कोणतीही मूर्ती करू नका. आकाश, पृथ्वी
किंवा पाणी यातील कोणाचीही प्रतिमा किंवा मूर्ती
करू नका. 9कोणत्याही प्रकारच्या मूर्तीची पूजा किंवा
सेवा करू नका. कारण मी तुमचा देव परमेश्वर
आहे. माझ्या लोकांनी इतर देवांची पूजा करावी
ह्याचा मला द्वेष आहे.* जे माझ्याविरुध्द पाप करतात
ते माझे शत्रू बनतात. त्यांना मी शासन करीन. एवढेच
नव्हे तर त्यांची मुले, नातवंडे अशा व पतंवडे चार
पिढ्यांना शासन करीन. 10पण जे माझ्यावर प्रेम
करतील आणि माझ्या आज्ञा पाळतील त्यांच्यावर
मी दया करीन. त्यांच्या हजारो पिढ्यांवर माझी कृपा
राहील.*

11"तुमचा देव परमेश्वरा ह्याच्या नावाचा तुम्ही
गैरवापर करू नका. जो गैरवापर करील तो दोषी
ठरेल. मग परमेश्वर त्याची गय करणार नाही.

12"शब्बाथ दिवस तुमचा देव परमेश्वरा ह्याच्या
आज्ञेप्रमाणे विशेष दिवस म्हणून पाळा.
13आठवड्यातील सहा दिवस काम करा. 14पण सातवा
दिवस हा तुमचा देव परमेश्वरा ह्याच्या सन्मानार्थ
विश्रांतीचा दिवस आहे. म्हणून त्या दिवशी कोणीही
काम करता कामा नये. तुम्ही तुमची मुलं, मुली,
अतिथी किंवा दास-दासी, एवढेच नव्हे तर तुमचे
बैल, गाढव इत्यादी पशू यांनी सुद्धा काम करू नये.
तुमच्या गुलामांनाही तुमच्या सारखाच विसावा घेता
आला पाहिजे. 15मिसर देशात तुम्ही गुलाम होता
याचा विसर पडू देऊ नका. तुमचा देव परमेश्वर
ह्याने आपल्या सामर्थ्याने तुम्हाला तेथून बाहेर आणले,
त्याने तुम्हाला मुक्त केले. म्हणून शब्बाथ नेहमी
विशेष दिवस म्हणून पाळा, ही तुमचा देव परमेश्वर
ह्याचा आज्ञा आहे. 16"आपल्या आईवडलांचा आदर
ठेवा. ही तुमचा देव परमेश्वर ह्याची आज्ञा आहे.
हिचे पालन केले तर तुम्हाला दीर्घायुष्य मिळेल.
तुम्हाला दिलेल्या प्रदेशात तुमचे कल्याण होईल.

17"कोणाचीही हत्या करू नका.

18"व्यभिचार करू नका.

19"चोरी करू नका.

20"आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष* देऊ
नका.

---

**माझ्या लोकांनी ... द्वेष आहे**: किंवा "मी एलकाना इर्ष्यावान देव."

**हजारो पिढ्यांवर माझी कृपा राहील** "जे माझ्यावर प्रिती करतात आणि माझ्या आज्ञा पाळतात अशा हजारो जणावर मी दया दाखवितो."

**खोटी साक्ष** "तु तुझ्या शेजाऱ्या विरुध्द खोटी साक्ष देऊ नये."

21“दुसऱ्याच्या पत्नीची अभिलाषा बाळगू नका.
दुसऱ्याचे घर, शेत, दास दासी, गुरे-गाढवे, कशाचीही
हाव बाळगू नका.”

## लोकांना देवाची दहशत

22पुढे मोशे, म्हणाला, “ही वचने परमेश्वराने अग्नी,
मेघ आणि घनदाट अंधार यातून तुम्हाला मोठ्या आवाजात
सांगितली. तेव्हा तुम्ही त्या पर्वताशी एकत्र जमला होता.
एवढे सांगितल्यावर अधिक न बोलता त्याने ती दोन दगडी
पाट्यांवर लिहून माझ्याकडे दिली.

23“पर्वत धगधगून पेटलेला असताना तुम्ही त्याची वाणी
काळोखातून ऐकलीत. तेव्हा तुमच्या वंशातील वडिलधारे
आणि प्रमुख माझ्याकडे आले. 24आणि म्हणाले, ‘आमचा
देव परमेश्वर ह्याने आम्हाला त्याचे तेज आणि महानता
दाखवली आहे. त्याला प्रत्यक्ष अग्नीतून बोलताना आम्ही
ऐकले. देव माणसाशी बोलला तरी माणूस जगू शकतो हे
आम्ही पाहिले आहे. 25पण पुन्हा परमेश्वर देव आमच्याशी
बोलला तर आम्ही नक्की मरु. तो भयंकर अग्नी आम्हाला
बेचिराख करील. आणि आम्हाला मरायचे नाही. 26साक्षात
देवाला अग्नीतून बोलताना ऐकूनही नंतर जिवंत राहिला
आहे. असा आमच्याखेरीज कोणी ही नाही. 27तेव्हा मोशे,
तूच आपला देव परमेश्वर ह्याच्या जवळ जाऊन त्याचे
म्हणणे ऐकून घे. आणि मग ते आम्हाला सांग. आम्ही ते
ऐकून त्याप्रमाणे वागू.’

## परमेश्वराचा मोशेशी संवाद

28“हे तुमचे बोलणे परमेश्वराने ऐकले. तो मला म्हणाला,
‘मी सर्व ऐकलेले आहे आणि ते ठीकच आहे. 29ते माझ्याशी
आदराने वागले, माझ्या आज्ञा मनापासून पाळल्या तर
त्यांचे व त्यांच्या वंशाजांचे निरंतर कल्याण होईल. एवढेच
मला त्यांच्याकडून हवे आहे.’

30“त्यांना म्हणावे तुम्ही परत आपापल्या जागी जा. 31पण
मोशे तू इथेच थांब. त्यांना द्यायच्या सर्व आज्ञा, विधी
नियम मी तुला सांगतो. त्यांना मी जो देश वतन म्हणून देत
आहे तेथे त्यांनी ते पाळावे.’

32“तेव्हा परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे आपले आचरण
राहील याची खबरदारी घ्या. त्यालाच अनुसरा. 33तुमचा
देव परमेश्वर ह्याने दाखवलेल्या मार्गानेच चाला. म्हणजे
तुम्हाला वतन दिलेल्या प्रदेशात तुम्ही सुखाने व दीर्घकाळ
रहाल.

## परमेश्वराची आज्ञा पाळा व परमेश्वरावर प्रेम करा

6 “तुमचा देव परमेश्वर ह्याने तुम्हाला सांगण्यासाठी
सांगितलेले विधी, नियम व आज्ञा त्या ह्याच. ज्या
प्रदेशात तुम्ही राहण्यासाठी जात आहात तेथे हे नियम
पाळा. 2तुम्ही व तुमची मुले नातवंडे-सर्वांनी आमरण
आपल्या परमेश्वराचा आदर बाळगा. त्याने घालून दिलेल्या
नियमांप्रमाणे वागा. म्हणजे दीर्घायुषी व्हाल. 3इस्राएल
लोकहो, काळजीपूर्वक ऐका व हे नियम पाळा. मग तुमचे
भले होईल. तुम्हाला भरपूर संतती होईल आणि तुमच्या
देशात दुधामधाचे पाट वाहतील. परमेश्वर देवाने कबूल
केल्याप्रमाणे सर्वकाही मिळेल.

4“हे इस्राएल लोकहो, ऐका! परमेश्वर हाच आपला
देव आहे. परमेश्वर एकच आहे. 5आणि आपला देव
परमेश्वर ह्यावर संपूर्ण अंत:करणाने, संपूर्ण मनाने व
संपूर्ण शक्तीने प्रेम करा. 6मी आज दिलेल्या आज्ञा तुमच्या
कायम लक्षात असू द्या. 7त्या आपल्या मुलाबाळांनाही
शिकवा. घरी, दारी, झोपता-उठताना, त्याविषयी बोलत
राहा. 8त्या लिहून आठवणीसाठी हाताला बांधा व कपाळावर
चिकटवा. 9दरवाजाच्या खांबांवर व फाटकांवर त्या लिहून
ठेवा.

10“अब्राहाम, इसहाक आणि याकोब या तुमच्या पूर्वजांना
तुम्हांला हा देश देण्याचे तुमचा देव परमेश्वर ह्याने वचन
दिले होते. तो तुम्हांला मिळेल. तुम्ही स्वत: वसवलेली
नाहीत अशी मोठी, समृध्द नगरे तो तुम्हाला देईल. 11उत्तम
वस्तूंनी भरलेली घरे परमेश्वर तुम्हाला देईल. तुम्हाला
खोदाव्या न लागलेल्या विहिरी परमेश्वर तुम्हांला देईल.
तुम्ही लागवड न केलेले द्राक्षांचे आणि जैतून वृक्षांचे मळे
तुम्हाला देईल. आणि मुबलक अन्नधान्याने तुम्ही तृप्त
व्हाल.

12“पण सावध राहा! परमेश्वराला विसरु नका.
मिसरमध्ये तुम्ही गुलाम होता पण तेथून त्याने तुम्हांला
बाहेर आणले. 13त्याचा आदर ठेवा व त्याचीच सेवा करा.
शपथ घेताना त्याच्या नावाने शपथ वाहा, खोट्या देवांच्या
नावाने घेऊ नका. 14तुमच्या आसपासच्या राष्ट्रातील
लोकांच्या दैवतांच्या नादी लागू नका. 15तुमचा देव
परमेश्वर सतत तुमच्या बरोबर आहे. त्याच्या लोकांनी
इतर दैवतांची पूजा केलेली परमेश्वराला आवडत नाही.
भलत्याच दैवतांची तुम्ही पूजा केल्यास त्याचा कोप होईल.
त्या क्रोधाने तो तुम्हाला पृथ्वीच्या पाठीवरुन नष्ट करील.

16“मस्सा येथे तुम्ही आपला देव परमेश्वर याची परीक्षा
पाहिलीत, तसे इथे करू नका. 17त्याच्या आज्ञा कटाक्षाने
पाळा. त्याच्या शिकवणीचे व नियमांचे पालन करा.
18उचित आणि चांगले आहे तेच करा. त्यानेच परमेश्वर
प्रसन्न होतो. त्याने तुमचे कल्याण होईल. परमेश्वराने जो
चांगला प्रदेश तुम्हांला द्यायचे तुमच्या पूर्वजांना कबूल
केले आहे, त्यात तुमचा प्रवेश होईल. 19परमेश्वराने कबूल
केल्याप्रमाणे, तुम्ही आपल्या शत्रूंना हुसकावून लावाल.

## देवाने जे केले ते मुलांना शिकवा

20“आपल्या परमेश्वर देवाने जी शिकवण दिली, विधी
नियम सांगितले त्याचा अर्थ काय असे पुढे तुमची मुले
विचारतील. 21तेव्हा त्यांना सांगा की आम्ही मिसरमध्ये

फारोचे गुलाम होतो. परंतु परमेश्वराने आपल्या प्रचंड
सामर्थ्याने आम्हाला तेथून बाहेर आणले. 22त्याने मिसरी
लोक, फारो व त्याचे कुटुंब यांच्याविरुद्ध मोठे प्रभावी
चमत्कार करून दाखवले ते आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहेत.
23आपल्या पूर्वजांना कबूल केलेला प्रदेश आपल्याला
द्यायला त्याने आम्हांला मिसरमधून बाहेर आणले. 24ही
सर्व शिकवण पाळायची आज्ञा परमेश्वराने आम्हांला दिली
आहे. आपण आपला देव परमेश्वर ह्याचा आदर बाळगला
पाहिजे. मग तो आपल्याला कायम जीवंत ठेवील व भले
करील. 25जर आपण काळजीपूर्वक परमेश्वराचे सर्व
नियम पाळले तर आपण फार चांगली गोष्ट* केली आहे
असे तो म्हणेल.

## इस्राएल म्हणजे देवाची पवित्र प्रजा

7 “जो देश वतन करून घ्यायला तुम्ही निघाला आहात
तेथे तुमचा देव परमेश्वर तुम्हाला नेईल. आणि
हित्ती, गिर्गाशी, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी, यबूसी
अशा तुमच्यापेक्षा मोठ्या आणि बलाढ्य अशा सात राष्ट्रांना
तेथून घालवून देईल.
2तुमचा देव परमेश्वर त्यांना तुमच्या अधिपत्याखाली
आणेल आणि तुम्ही त्यांचा पराभव कराल तेव्हा तुम्ही
त्यांचा समूळ विध्वंस करा. त्यांच्याशी कुठलाही करार
करू नका. त्यांना दया दाखवू नका.
3त्यांच्याशी सोयरीक जुळवू नका. आपल्या मुली त्यांना
देऊ नका. त्याच्या मुली आपल्या मुलांना करून घेऊ
नका. 4कारण हे लोक तुमच्या मुलांना माझ्यापासून
विचलीत करतील. त्यामुळे तुमची मुले अन्य दैवतांचे
भजनपूजन करतील. अशाने परमेश्वराचा तुमच्यावर कोप
होईल व तो तात्काळ तुमचा नाश करील.

## खोट्या देवांचा नाश करा

5“त्या देशात तुम्ही असे करा. त्यांच्या वेद्या पाडून टाका.
त्यांचे स्मारकस्तंभ फोडून टाका. अशेरा दैवताचे
स्तंभउपटून टाका, मूर्ती जाळून टाका. 6कारण तुम्ही
परमेश्वराची पवित्र प्रजा आहात. जगाच्या पाठीवरील सर्व
लोकांमधून त्याने आपली खास प्रजा म्हणून तुमचीच निवड
केली आहे. 7परमेश्वराने प्रेमाने तुम्हालाच का निवडले?
तुम्ही एखाद्या मोठ्या राष्ट्रातील होता म्हणून नव्हे. उलट
तुम्ही संख्येने सगळ्यात कमी होता. 8पण सर्व सामर्थ्यानिशी
तुम्हाला दास्यातून मुक्त करून परमेश्वराने तुम्हाला मिसर
बाहेर आणले. फारोच्या अंमलातून सुटका केली. याचे
कारण हेच की तुमच्यावर त्याचे प्रेम आहे आणि तुमच्या
पूर्वजांना दिलेले वचन त्याला पाळायचे होते.

9“तेव्हा लक्षात ठेवा तुमचा देव परमेश्वर हाच एक देव
आहे. त्यावर विश्वास ठेवा. तो आपला करार पाळतो.
त्याच्यावर प्रेम करणाऱ्या आणि त्याच्या आज्ञा पाळणाऱ्या
लोकांवर व त्यांच्या पुढच्या हजार पिढ्यांवर तो दया करतो.
10पण त्याचा द्वेष करणाऱ्यांना तो शासन करतो. तो त्यांचा
नाश करील. त्याचा द्वेष करणाऱ्यांना शासन करण्यास
तो विलंब करणार नाही. 11जेव्हा ज्या आज्ञा व विधी,
नियम आज मी सांगितले त्यांचे काळजीपूर्वक पालन करा.
12“हे नियम तुम्ही नीट ऐकून त्यांचे काटेकोर पालन
केलेत तर तुमच्या पूर्वजांशी केलेला प्रेमाचा पवित्र करार
तो पाळेल. 13तो तुमच्यावर प्रेम करील, तुम्हाला आशीर्वाद
देईल. तुमच्या राष्ट्राची तो वाढ करील. तो तुमच्या
मुलाबाळांना आर्शीवाद देईल. तुमची शेते पिके तो
आशीर्वादीत करील. तो तुम्हाला धान्य, नवीन द्राक्षारस व
तेल देईल. तुमची गाया बैले, वासरे, मेंढ्या व कोंकरे
ह्यांना तो आशीर्वाद देईल. तुमच्या पूर्वजांना वचन दिलेल्या
प्रदेशात हे सर्व आशीर्वाद तो तुम्हाला देईल.
14इतरांपेक्षा तुम्ही जास्त आशीर्वादीत व्हाल. प्रत्येक
दांपत्याला मुलंबाळं होतील. गाई वासरांना जन्म देतील.
15परमेश्वर सर्व आजार काढून टाकील. मिसर देशात
तुम्हाला माहीत असलेली कोणतीही भयंकर रोगराई इथे
होणार नाही. हे रोग परमेश्वर तुमच्या शत्रूंवर आणील.
16तुमचा देव परमेश्वर ह्याने तुमच्या हाती सोपवलेल्या
सर्वांचा तुम्ही पराभव करून विध्वंस करा. त्यांच्याबाबतीत
वाईट वाटून घेऊ नका. त्यांच्या दैवतांची पूजा करू नका.
कारण ती दैवते म्हणजे तुम्हाला अडकवणारा सापळा
आहे. त्याने तुमच्या आयुष्याचा नाश होईल.

## परमेश्वराचे मदतीचे वचन

17“हे देश आपल्यापेक्षा बलवान आहेत, त्यांना आम्ही
कसे घालवून देऊ असा विचारही मनात आणू नका.
18त्यांची मुळीच भीती बाळगू नका. आपल्या परमेश्वर
देवाने फारोचे आणि मिसर देशाचे काय केले ते आठवा.
19त्यांच्यावर कशी भयंकर संकटे आणली, काय चमत्कार
केले हे तुम्ही पाहिलेले आहे. तुम्हाला मिसरबाहेर
काढतानाचे त्याचे प्रताप व सामर्थ्य तुम्हाला माहीत आहेत.
ज्या लोकांची तुम्हाला भीती वाटते आहे त्यांच्याविरुध्द
तुमचा देव परमेश्वर असेच सामर्थ्य वापरील.
20“याशिवाय, जे तुमच्या तावडीतून निसटतील, लपून
बसतील त्यांच्या मागावर परमेश्वर आपला देव गांधील
माश्या पाठवील. त्यामुळे त्यांचाही नाश होईल. 21तेव्हा
त्यांना घाबरु नका. कारण परमेश्वर आपला देव तुमच्या
बरोबर आहे. तो महान आणि भययोग्य देव आहे. 22त्या
राष्ट्रांना आपला देव परमेश्वर हळूहळू घालवून देईल.
त्यांचा तुम्ही एकाच वेळी विध्वंस करणार नाही. कारण
तसे झाले तर वन्यपशूंची संख्या प्रमाणाबाहेर वाढेल. 23पण
त्या राष्ट्रांचा बिमोड करण्यात तुमचा देव परमेश्वर तुम्हाला

---

**चांगली गोष्ट** किंवा “जर आपण त्याने आज्ञा दिल्याप्रमाणे सर्व नियम काळजीपूर्वक पाळले तर परमेश्वर आपला देव आपल्याला नीतिमान ठरवेल.”

साहाय्य करील. युद्धात त्यांच्यात गोंधळ माजवील आणि शेवटी त्यांचा नाश होईल. 24परमेश्वराच्या मदतीने तुम्ही त्यांच्या राजांचा पराभव कराल, त्यांना ठार कराल आणि जगाच्या आठवणीतूनही ते पुसले जातील. कोणीही तुम्हांला अडवू शकणार नाही. तुम्ही सर्वांचा विध्वंस कराल!

25"त्यांच्या दैवतांच्या मूर्ती तुम्ही आगीत टाकून जाळून टाका. त्या मूर्तीवरच्या चांदीसोन्याचा मोह धरु नका, ते घेऊ नका. कारण तो सापळाच आहे. त्याने तुमचे आयुष्य बरबाद होईल. परमेश्वर आपला देव मूर्तिद्वेष्टा आहे. 26त्या अमंगळ, हानिकारक मूर्ती तुम्ही घरीही आणू नका. त्यांची घृणा बाळगा आणि त्या नष्ट करून टाका.'

## परमेश्वराची आठवण करा

8 "आज मी दिलेल्या सर्व आज्ञांचे पालन करा. कारण त्याने तुम्ही जगाल, आणि वाढून एक महान राष्ट्र बनाल. तुमच्या राष्ट्राची भरभराट होईल. तुमच्या पूर्वजांना परमेश्वराने कबूल केलेला प्रदेश तुम्ही ताब्यात घ्याल. 2तसेच गेली चाळीस वर्षे आपल्या परमेश्वर देवाने तुम्हाला रानावनातून कसे चालवले, त्या प्रवासाची आठवण ठेवा. परमेश्वर तुमची परीक्षा पाहात होता. तुम्हाला नम्र करावे, तुमच्या अंत:करणातील गोष्टी जाणून घ्याव्या, तुम्ही त्याच्या आज्ञा पाळता की नाही ते बघावे म्हणून त्याने हे केले. 3परमेश्वराने तुम्हाला लीन केले, तुमची उपासमार होऊ दिली आणि मग, तुम्ही अन् तुमचे पूर्वज यांना माहीत नसलेला मान्ना तुम्हाला खाऊ घातला. माणूस फक्त भाकरीवर जगत नाही तर परमेश्वराच्या मुखातील वचनाने जगतो हे तुम्हाला कळावे म्हणून त्याने हे सर्व केले. 4गेल्या चाळीस वर्षात तुमचे कपडे झिजले-फाटले नाहीत की तुमचे पाय सुजले नाहीत. का बरे? कारण परमेश्वराने तुमचे रक्षण केले. 5तुमचा देव परमेश्वर ह्याने तुमच्यासाठी ह्या सर्व गोष्टी केल्या आहेत ह्याची आठवण तुम्ही ठेवलीच पाहिजे. बाप आपल्या मुलाला शिकवतो, त्याच्यावर संस्कार करतो तसा तुमचा देव परमेश्वर तुम्हाला आहे.

6"तुमचा देव परमेश्वर ह्याच्या आज्ञा पाळा, त्याला अनुसरा आणि त्याच्याबद्दल आदर बाळगा. 7तुमचा देव परमेश्वर तुम्हाला उत्तम देशात घेऊन जात आहे. ती भूमी सुजला, सुफला आहे. तेथे डोंगरात उगम पावून जमिनीवर वाहणारे नद्यानाले आहेत. 8ही जमीन गहू, जव, द्राक्षमळे, अंजीर, डाळिंब यांनी समृद्ध आहे. येथे जैतून तेल, मध यांची रेलचेल आहे. 9येथे मुबलक धान्य आहे. कोणत्याही गोष्टीची तुम्हाला उणीव नाही. येथील दगड लोहयुक्त आहेत. तुम्हाला डोंगरातील तांबे खणून काढता येईल.

10तेव्हा तुम्ही खाऊन तृप्त व्हावे आणि असा चांगला प्रदेश दिल्याबद्दल तुमचा देव परमेश्वर ह्याचे गुणगान गावे.

## परमेश्वराची कृत्ये विसरू नका

11"सावध असा! तुमचा देव परमेश्वर याचा विसर पडू देऊ नका! मी दिलेल्या आज्ञा नियम, विधी, यांचे कटाक्षाने पालन करा. 12त्यामुळे तुम्हाला अन्न धान्याची कमतरता पडणार नाही. चांगली घरे बांधून त्यात राहाल. 13तुमची गायीगुरे आणि शेळ्या मेंढ्या यांची संख्या वाढेल. सोनेरुपे आणि मालमत्ता वाढेल. 14या भरभराटीने उन्मत्त होऊ नका. आपला देव परमेश्वराला विसरू नका. मिसरमध्ये तुम्ही गुलाम होता. परंतु मिसरमधून परमेश्वराने तुमची सुटका केली व बाहेर आणले. 15विषारी नाग आणि विंचू असलेल्या निर्जल, रखरखीत अशा भयंकर रानातून त्याने तुम्हाला आणले. त्याने तुमच्यासाठी खडकातून पाणी काढले. 16तुमच्या पूर्वजांनी कधीही न पाहिलेला मान्ना तुम्हाला खायला घालून पोषण केले. परमेश्वराने तुमची परीक्षा पाहिली. शेवटी तुमचे भले व्हावे म्हणून परमेश्वराने तुम्हांला नम्र केले. 17हे धन मी माझ्याच बळावर आणि कुवतीवर मिळवले असे चुकूनसुद्धा मनात आणू नका.' 18तुमचा देव परमेश्वर याचे स्मरण ठेवा. त्यानेच तुम्हाला हे सामर्थ्य दिले हे लक्षात ठेवा. त्याने तरी हे का केले? कारण आजच्याप्रमाणेच त्याने तुमच्या पूर्वजांशी पवित्रकरार केला होता, तोच तो पाळत आहे.

19"तेव्हा आपला देव परमेश्वर ह्याला विसरू नका. इतर दैवतांना अनुसरू नका. त्यांची पूजा किंवा सेवा करू नका. तसे केलेत तर तुमचा नाश ठरलेलाच ही ताकीद मी आत्ताच तुम्हाला देऊन ठेवतो. 20त्याचे म्हणणे तुम्ही ऐकले नाही तर तुमच्या देखत इतर राष्ट्रांचा नाश परमेश्वराने केला तसाच तो तुमचाही करील!

## परमेश्वर इस्राएलांचा पाठिराखा

9 "हे इस्राएलांनो ऐका, तुम्ही आज यार्देन नदी पलीकडे जाणार आहात. तुमच्यापेक्षा मोठी आणि शक्तिशाली अशी राष्ट्रे ताब्यात घेणार आहात. तेथील नगरे मोठी आहेत. त्यांची तटबंदी आकाशाला भिडलेली आहे. 2तेथील अनाकी वंशाचे लोक उंच आणि धिप्पाड आहेत. हे तुम्हाला माहीत आहेच. त्यांचा पाडाव कोणी करू शकणार नाही असे त्यांच्याबद्दल आपल्या हेरांनी म्हटलेले तुम्ही ऐकलेले आहे. 3पण तुमचा देव परमेश्वर नदी उतरुन आधी तुमच्यापुढे जाणार आहे ह्याची खात्री बाळगा. आणि विध्वंस करणाऱ्या अग्नीसारखा तो आहे. तो राष्ट्रांचा विध्वंस करील. त्या राष्ट्रांना तुमच्यापुढे नमवेल. मग तुम्ही त्यांना घालवून द्याल, त्यांचा तात्काळ पराभव कराल. हे घडणार आहे, असे परमेश्वराने वचनच दिले आहे.

4"तुमचा देव परमेश्वर त्या राष्ट्रांना तुमच्यापुढून हुसकावून लावेल. पण 'आमच्या पुण्याईमुळेच परमेश्वराने हा प्रदेश आमच्या ताब्यात दिला' असे मनात आणू नका. कारण ते खोटे आहे. परमेश्वराने त्यांना घालवले ते त्यांच्या दुष्टपणामुळे, तुमच्या सात्विकपणामुळे नव्हे. 5तुम्ही

फार चांगले आहा आणि योग्य मार्गाने जगता म्हणून तुम्ही येथे राहायला जाणार आहात असे नाही. त्यांच्या दुष्टपणामुळे तुमचा देव परमेश्वर त्यांना घालवून देत आहे आणि अब्राहाम, इसहाक व याकोब या पूर्वजांना दिलेला शब्द तो पाळत आहे. 6तेव्हा तुमचा चांगूलपणा याला कारणीभूत नाही. उलट, खरे सांगायचे तर तुम्ही फार हट्टी लोक आहात.

## परमेश्वराची राग आठवा

7“रानात असताना तुम्ही तुमच्या परमेश्वर देवाचा कोप ओढवून घेतला होता. मिसर सोडल्या दिवसापासून ते इथे येईपर्यंत तुम्ही परमेश्वराच्या आज्ञेविरुद्ध बंड करीत आलेले आहात. 8होरेबात तुम्ही त्याला क्रुद्ध केलेत. तेव्हाच तो तुमचा नाश करणार होता. 9त्याचे असे झाले. परमेश्वराने तुमच्याशी केलेला पवित्र करार दगडी पाट्यांवर खोदून शब्दबद्ध केला होता. त्या पाट्या आणायला मी डोंगरावर चढून गेलो. तेथे मी चाळीस दिवस अन् चाळीस रात्री अन्नपाणी न घेता राहिलो. 10परमेश्वराने त्या पाट्या माझ्या हवाली केल्या. परमेश्वराने आपल्या हाताने त्या पाट्यांवर त्याच्या आज्ञा लिहिल्या. तुम्ही पर्वतापाशी जमलेले असताना देव अग्नीतून तुमच्याशी जे बोलला ते सर्व त्याने लिहिले.

11“चाळीस दिवस, चाळीस रात्रीअखेर त्याने त्या आज्ञापटाच्या पाठ्या मला दिल्या. 12तो म्हणाला, ‘ऊठ आणि ताबडतोब खाली जा. मिसरहून तू आणलेले लोक बिघडले आहेत. इतक्यातच ते माझ्या आज्ञांपासून ढळले आहेत. त्यांनी सोने वितळवून मूर्ती केली आहे.’

13“तो असेही म्हणाला, ‘त्यांचे मी एक पाहून ठेवले आहे. ते फार हट्टी आहेत. 14त्यांची नावनिशाणीही राहणार नाही असा मला त्यांचा नाश करू दे. मग मी तुझे, त्यांच्याहून श्रेष्ठ आणि समर्थ असे दुसरे राष्ट्र उभारीन.’

## सोन्याचे वासरू

15“मग मी मागे फिरून डोंगर उतरुन आलो. डोंगरावर आग धगधगत होती. माझ्या हातात आज्ञापटाच्या दोन पाट्या होत्या. 16“मी पाहिले की तुमचा देव परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध वागून तुम्ही पाप केले होते. तुम्ही वासराची सोन्याची ओतीव मूर्ती केली होती. तुम्ही परमेश्वर देवाच्या आज्ञा पाळण्याचे थांबविलेत! 17तेव्हा मी धरलेल्या त्या आज्ञापटाच्या पाट्या हातातून फेकून दिल्या आणि तुमच्या समोर त्यांच्या ठिकाऱ्या ठिकाऱ्या केल्या. 18मग मी परमेश्वरापुढे जमिनीवर डोके टेकून पूर्वीप्रमाणेच चाळीस दिवस अन् चाळीस रात्र पालथा पडून राहिलो. तुमच्या घोर पापामुळे मी हे केले. परमेश्वराच्या दृष्टिने तुम्ही हे फार वाईट केले आणि परमेश्वराचा कोप ओढवून घेतलात. 19परमेश्वराच्या कोपाची मला भिती वाटत होती कारण संतापाच्या भरात त्याने तुमचा संहार केला असता. पण या ही वेळी परमेश्वराने माझे ऐकले. 20अहरोनला तर तो संतापाने ठारच करणार होता. पण मी त्याच्यांसाठी प्रार्थना केली. 21मग तुमचे ते पापीकृत्य—तुम्ही केलेली वासराची मूर्ती—मी आगीत जाळून टाकली. नंतर तिचे तुकडे तुकडे करून भस्म करून टाकले व डोंगरावरुन वाहाणाऱ्या ओढ्यात फेकून दिले.

## इस्राएल लोकांना क्षमा करणे बाबत मोशे देवाला विनंती करतो

22“नंतर तबेरा, मस्सा व किब्रोथ—हत्तव्वा येथेही तुम्ही परमेश्वराला संतप्त केलेत. 23परमेश्वराने तुम्हाला कादेश—बर्ण्या सोडण्यास सांगितले तेव्हाही तुम्ही त्याचे ऐकले नाहीत. त्याने तुम्हाला तो देत असलेला प्रदेश काबीज करायला सांगितले पण त्याचे सांगणे ऐकले नाहीत. त्याच्यावर भरवसा ठेवला नाहीत. त्याची आज्ञा पाळली नाहीत. 24जेव्हापासून मी तुम्हाला ओळखतो तेव्हापासून तुम्ही परमेश्वराचे ऐकण्यासाठी नेहमीच नकार दिलेला आहे.

25“तेव्हा मी त्याच्या पायाशी चाळीस दिवस अन् चाळीस रात्री पडून राहिलो. कारण तुमचा नाश करीन असे तो म्हणाला होता. 26मी त्याची विनवणी केली की हे प्रभो तुझ्या प्रजेचा नाश करू नकोस. ती तुझीच आहे. तुझ्या सामर्थ्याने तू त्यांना मिसरमधून मुक्त करून बाहेर आणले आहेस. 27अब्राहाम, इसहाक आणि याकोब या तुझ्या सेवाकांना तू शब्द दिला आहेस तो आठव. त्यांचा ताठरपणा विसरून जा. त्यांची पापे किंवा दुराचार यांच्याकडे दुर्लक्ष कर.

28तू त्यांना शासन केलेस तर मिसरमधील लोक म्हणतील, ‘परमेश्वर त्यांना स्वत:च कबूल केलेल्या प्रदेशात नेऊ शकला नाही. त्यांचा तो द्वेष करत होता. म्हणून मारून टाकण्यासाठीच त्याने त्यांना रानात आणले.’ 29पण हे लोक तुझेच आहेत. तू त्यांना महासामर्थ्याने आपण होऊन मिसर मधून बाहेर आणले आहेस.

## नवीन दगडी पाट्या

10 “तेव्हा हुबेहूब पहिल्यासारख्या दोन सपाट दगडी पाट्या परमेश्वराने मला घडवायला सांगितल्या. ‘त्या घेऊन माझ्याकडे डोंगरावर ये आणि एक लाकडी पेटीही कर’ असे ही सांगितले. 2तो पुढे म्हणाला, ‘तू फोडून टाकलेल्या पाट्यांवर होता तोच मजकूर मी या पाट्यांवर लिहीन. मग तू या नवीन पाट्या पेटीत ठेव.’

3“मग मी बाभळीच्या लाकडाची पेटी केली. पहिल्यासारख्याच दोन दगडी पाट्या केल्या आणि डोंगरावर गेलो. पाट्या माझ्या हातातच होत्या. 4मग, डोंगरावर सर्व जमले होते तेव्हा ज्या दहा आज्ञा परमेश्वराने अग्नीतून तुम्हाला दिल्या त्याच त्याने पहिल्या लेखाप्रमाणे या पाट्यांवर लिहिल्या आणि त्या माझ्या स्वाधीन केल्या. 5मी डोंगर उतरुन खाली आलो. त्या पाट्या मी केलेल्या पेटीत ठेवल्या.

त्या तशा ठेवायला मला परमेश्वराने सांगितले होते. आणि
अजूनही त्या तिथे आहेत.”
(6इस्राएल लोक प्रवास करत बनेयाकान विहिरींवरुन
मोसेरा येथे आले. तेथे अहरोन मरण पावला. त्याला
तेथेच दफन केले. त्याच्या जागी त्याचा मुलगा एलाजार
याजकाचे काम करू लागला. 7इस्राएल लोक मग मोसेराहून
गुदगोधा येथे आणि तेथून पुढे थाटबाधा या नद्यांच्या प्रदेशात
आले. 8त्यावेळी परमेश्वराने एका खास कामगिरीसाठी
लेवीचा वंश इतरांपेक्षा वेगळा केला. परमेश्वराच्या
आज्ञापटाची ती पेटी वाहून नेण्याची जबाबदारी त्यांच्यावर
सोपवली. याजक म्हणून परमेश्वराची सेवा करणे,
परमेश्वराच्या वतीने लोकांना आशीर्वाद देणे ही त्यांची
कामे होती. ती ते अजूनही करतात. 9त्यामुळेच लेवींना
इतरांसारखा जमिनीत वाटा मिळाला नाही. परमेश्वराने
कबूल केल्याप्रमाणे त्यांची मालमत्ता म्हणजे खुद्द परमेश्वरच
आहे.)
10“मी पहिल्यावेळेप्रमाणेच चाळीस दिवस आणि रात्र
डोंगरावर राहिलो. याहीवेळी परमेश्वराने माझे ऐकले. व
तुमचा नाश न करायचे ठरविले. 11त्याने मला सांगितले,
‘ऊठ आणि लोकांना पुढच्या प्रवासाला घेऊन जा. म्हणजे
मी त्यांच्या पूर्वजांना जो प्रदेश द्यायचे वचन दिले तेथे ते
जाऊन राहतील.’

## परमेश्वराला खरंच काय पाहिजे

12“आता, हे इस्राएल लोकांहो तुमच्या परमेश्वराची
तुमच्याकडून काय अपेक्षा आहे ते आता ऐका. परमेश्वराची
अशी इच्छा आहे की तुम्ही त्याचा मान राखावा आणि तो
म्हणतो त्याप्रमाणे करावे तुम्ही त्याच्यावर प्रेम करावे आणि
संपूर्ण अत:करणाने व जीवाने त्याची सेवा करावी. 13तेव्हा
तुमच्या भल्यासाठीच मी आज परमेश्वराचे नियम आणि
आज्ञा सांगतो, ते ऐका व पाळा.
14“सर्वकाही तुमचा देव परमेश्वर ह्याचे आहे. आकाश,
आकाशापलीकडचे आकाश, पृथ्वी व पृथ्वीवरचे सर्व
काही परमेश्वर देवाचे आहे. 15त्याचे तुमच्या पूर्वजांवर
फार प्रेम होते. त्या प्रेमखातर त्याने इतरांना वगळून तुम्हांला
आपले मानले. आजही वस्तूस्थिती तीच आहे.
16“तेव्हा हट्टीपणा सोडा. आपली अंत:करणे परमेश्वराला
द्या. 17कारण परमेश्वर तुमचा देव आहे तो देवांचा देव व
प्रभुंचा प्रभु आहे. तो महान परमेश्वर आहे. तो विस्मयकारी
आहे. त्याला सर्व जण सारखेच आहेत. तो पक्षपात करत
नाही की लाच घेत नाही. 18अनाथांना, विधवांना इतकेच
काय शहरात आलेल्या नवख्यांनाही साहाय्य करतो. त्यांना
अन्न वस्त्र पुरवतो. 19म्हणून तुम्ही परक्यांशी प्रेमाने वागले
पाहिजे. कारण मिसर देशात तुम्हीही उपरेच होतात. 20तुम्ही
फक्त तुमचा देव परमेश्वर याचीच सेवा करा. त्याच्याबद्दल
आदर बाळगा. त्याला धरुन राहा. शपथ वाहताना त्याच्याच
नावाने शपथ घ्या. 21फक्त परमेश्वराची स्तुती करा. तो
तुमचा देव आहे. त्याने केलेले चमत्कार आणि थोर
कृत्ये तुम्ही प्रत्यक्ष पाहिली आहेत. 22तुमचे पूर्वज खाली
मिसरमध्ये गेले तेव्हा ते फक्त सत्तरजण होते. आता तुमच्या
परमेश्वराच्या कृपेने तुम्ही त्याच्या कितीतरी पट,
आकाशातील ताऱ्यांइतके आहात.

## परमेश्वराची आठवण ठेवा

11 “म्हणून तुमचा देव परमेश्वर ह्यावर प्रेम करा.
त्याच्या आज्ञेप्रमाणे वागा. त्याने घालून दिलेल्या
नियमांचे, आज्ञांचे पालन करा. 2त्याने तुमच्यासाठी केलेले
सर्व प्रताप आज आठवा. हे मी तुम्हांलाच सांगत आहे.
तुमच्या मुलाबाळांना नव्हे. कारण त्यांनी यापैकी काहीच
पाहिले, अनुभवले नाही. त्याची थोरवी, त्याचे सामर्थ्य व
पराक्रम तुम्ही पाहिलेले आहे. 3मिसरचा राजा फारो व
त्याचा सर्व देश यांच्या विरुध्द त्याने कोणती कृत्ये केली
हे तुम्ही पाहिलेच आहे. 4मिसरचे सैन्य, त्यांचे घोडे, रथ
यांची कशी दैना झाली, तुमचा ते पाठलाग करत असताना
त्यांच्यावर तांबड्या समुद्राच्या पाण्याचा लोंढा कसा आणला
हेही तुम्ही पाहिले. परमेश्वराने त्यांना पूर्ण नेस्तनाबूत केले.
5तुम्ही येथे येईपर्यंत रानावनातून तुम्हाला त्याने कसे आणले
हे तुम्हाला माहीत आहेच. 6त्याचप्रमाणे रऊबेनाचा मुलगा
अलीयाब याच्या दाथान व अबीराम या मुलांचे देवाने
काय केले ते तुम्हांला माहीत आहे. त्यांना आणि त्यांचे
कुटुंबिय, त्यांचे तंबू, नोकरचाकर व गायीगुरे यांना सर्व
इस्राएलीदेखत पृथ्वीने आपल्या पोटात घेतले. 7परमेश्वराची
ही महान कृत्ये तुमच्या मुलांनी नाही, तर तुम्ही पाहिलीत.
8“तेव्हा आज मी देतो ती प्रत्येक आज्ञा कटाक्षाने पाळा.
त्यामुळे तुम्ही बलशाली व्हाल, यार्देन ओलांडून जो देश
ताब्यात घ्यायला तुम्ही सिद्ध झाला आहात तो हस्तगत
कराल. 9त्या देशात तुम्ही चिरकाल राहाल. तुमच्या
पूर्वजांना व त्यांच्या वंशजांना हा प्रदेश द्यायचे परमेश्वराने
वचन दिले आहे. या प्रदेशात सुबत्ता आहे. 10तुम्ही जिथे
जाणार आहात तो प्रदेश तुम्ही सोडून आलेल्या मिसरसारखा
नाही. तेथे तुम्ही पेरणी झाल्यावर भाजीचा मळा शिंपावा
तसे पायाने कालव्याचे पाणी ओढून देत होता. 11पण आता
मिळणारी जमीन तशी नाही. इस्राएलमध्ये डोंगर आणि
खोरी आहेत. आकाशातून पडणाऱ्या पावसाचे पाणी या
भूमीला मिळते. 12तुमचा देव परमेश्वर या जमिनीची
काळजी राखतो. वर्षाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्याची
या जमिनीवर कृपादृष्टी असते.
13“परमेश्वर म्हणतो, ‘ज्या आज्ञा मी आज तुम्हांला देत
आहे त्यांचे तुम्ही काटेकोरपणे पालन करा. मन:पूर्वक
तुमचा देव परमेश्वर याची सेवा करा. त्याच्यावर प्रेम
करा. 14तसे वागलात तर तुमच्या भूमिवर मी योग्य वेळी
पाऊस पाडीन. म्हणजे तुम्हाला धान्य, नवीन द्राक्षारस,
तेल यांचा साठा करता येईल. 15माझ्यामुळे तुमच्या

गुराढोरांना कुरणात गवत मिळेल. तुम्हाला खाण्याकरीता
पुष्कळ असेल.'
16"पण सांभाळा, गाफील राहू नका. या देवापासून परावृत
होऊन इतर दैवतांचे भजन पूजन करू नका. 17तसे केलेत
तर परमेश्वराचा कोप होईल. तो आकाश बंद करील
आणि मग पाऊस पडणार नाही. जमिनीत पीक येणार
नाही. जो चांगला देश परमेश्वर तुम्हांला देत आहे त्यात
तुम्हांला लौकरच मरण येईल.
18"म्हणून सांगतो या आज्ञा लक्षात ठेवा. त्या हृदयात
साठवून ठेवा. त्या लिहून ठेवा. आणि लक्षात राहण्यासाठी
हातावर बांधा व कपाळावर लावा. 19आपल्या मुलाबाळांना
हे नियम शिकवा. घरीदारी, झोपताना, झोपून उठताना
त्याविषयी बोलत राहा. 20घराच्या फाटकांवर, आणि
दारांच्या खांबांवर ही वचने लिहा. 21म्हणजे जो देश
परमेश्वराने तुमच्या पूर्वजांना शपथपूर्वक देऊ केला त्या
देशात तुम्ही आणि तुमची मुलेबाळे पृथ्वीवर आकाशाचे
छप्पर असेपर्यंत राहाल.
22"मी सांगतो त्या सर्व आज्ञा नीट पाळा. परमेश्वर
तुमचा देव ह्याजवर प्रेम करा. त्याने सांगितलेल्या मार्गाने
जा. त्याच्यावरच निष्ठा ठेवा. 23म्हणजे तुम्ही जाल तेव्हा
तेथील इतर राष्ट्रांना तो तेथून हुसकावून लावेल.
तुमच्यापेक्षा मोठ्या आणि सामर्थ्यवान राष्ट्रांवर तुम्ही ताबा
मिळवाल. 24जेथे जेथे तुम्ही पाय ठेवाल ती जमीन तुमची
होईल. दक्षिणेतील वाळवंटापासून उत्तरेला लबानोन पर्यंत
आणि पूर्वेला फरात नदीपासून पश्चिमेला समुद्रापर्यंत एवढा
प्रदेश तुमचा होईल. 25कोणीही तुमचा सामना करू शकणार
नाही. परमेश्वर देवाने तुम्हाला सांगितल्याप्रमाणे, तुम्ही
जेथे जेथे जाल तेथे लोकांना तुमची दहशत वाटेल.

### इस्राएल पुढचे पर्याय: आशीर्वाद किंवा शाप

26"आज मी तुमच्यापुढे आशीर्वाद आणि शाप हे पर्याय
ठेवत आहे. त्यातून निवड करा. 27आज मी तुमचा देव
परमेश्वर ह्याच्या ज्या आज्ञा तुम्हाला सांगितल्या त्या नीट
लक्षपूर्वक पाळल्यात तर तुम्हाला आशीर्वाद मिळेल. 28पण
या आज्ञा न ऐकता भलतीकडे वळलात तर शाप मिळेल.
तेव्हा आज मी सांगितलेल्या मार्गानेच जा. इतर दैवतांच्या
मागे लागू नका. परमेश्वराला तुम्ही ओळखता पण इतर
दैवतांची तुम्हाला ओळख नाही.
29"तुमचा देव परमेश्वर तुम्हाला त्या प्रदेशात घेऊन
जाईल. तुम्ही लौकरच तो प्रदेश ताब्यात घ्याल. तेथे
गेल्याबरोबर तुम्ही गरिज्जीम डोंगरावर जा, व आशीर्वाद
उच्चारा. मग तेथून एबाल डोंगरावर जाऊन शापवाणीचा
उच्चार करा. 30हे डोंगर यार्देन नदीच्या पलीकडे, अराबात
राहाणाऱ्या कनानी लोकांच्या प्रदेशात, पश्चिमेकडे
गिलगाल शहराजवळच्या मोरे येथील ओक वृक्षांजवळ
आहेत. 31तुम्ही यार्देन नदी पार करून जाल. तुमचा देव
परमेश्वर देत असलेली जमीन तुम्ही ताब्यात घ्याल. ती
तुमची असेल. त्यात वस्ती कराल तेव्हा 32मी आज
सांगितलेले नियम, विधी यांचे पालन करा.

### देवाच्या उपासनेसाठी स्थळ

12 "परमेश्वर हा तुमच्या पूर्वजांचा देव आहे. त्याने
दिलेल्या प्रदेशात तुम्ही हे विधी व नियम यांचे
पालन काटेकोरपणे करा. 2आता तेथे असलेल्या राष्ट्रांना
घालवून तुम्ही ती जमीन ताब्यात घेणार आहात. तेथील
लोकांची सर्व पूजास्थळे तुम्ही नेस्तनाबूत करून टाका.
उंच पर्वत, टेकड्या, हिरवीगार झाडी अशा बऱ्याच ठिकाणी
ही पूजास्थळे विखुरलेली आहेत. 3तुम्ही तेथील वेद्या मोडून
टाका, दगडी स्मारकस्तंभांचा विध्वंस करा. अशेरा
मूर्ती जाळा, त्यांच्या दैवतांच्या मूर्तींची मोडतोड करा. म्हणजे
त्या ठिकाणी त्यांची नावनिशाणीही उरणार नाही.
4"ते लोक करतात तशी तुम्ही आपला देव परमेश्वर
ह्याची उपासना करू नका. 5तुमचा देव परमेश्वर तुमच्या
सर्व वसाहतीतून एक विशिष्ट स्थान निवडून घेईल. आपल्या
नावाची स्थापना तेथे करील. ते त्याचे खास निवासस्थान
असेल. तेथे तुम्ही उपासनेसाठी जात जा. 6तेथे तुम्ही आपापले
होमबली, यज्ञबली, आपल्या पिकांचा व जनावरांचा एक
दशांश हिस्सा, काही खास भेटी, नवस फेडण्याच्या वस्तू,
खुशीने अर्पण करायच्या वस्तू तसेच आपल्या पाळीव
प्राण्यांना झालेला पहिला गोऱ्हा तुम्ही आणा. 7आपल्या
कुटुंबियासमवेत तुमचा देव परमेश्वर याच्या सान्निध्यात
तुम्ही तेथे भोजन करा. तुम्ही कष्ट करून जे मिळवलेत
त्याच्या आनंदात तेथे तुम्ही सर्वजण सामील व्हा. तुमचा
देव परमेश्वर याच्या आशीर्वादाने तुम्हाला सर्व गोष्टी
मनासारख्या मिळत आहेत याची आठवण ठेवा.
8"आतापर्यंत आपण सगळे जशी उपासना करत आलो
तशी आता करू नका. इतके दिवस आपण प्रत्येकाच्या
मनाला येईल त्याप्रमाणे देवाची उपासना करत आलो.
9कारण तुमचा देव परमेश्वर देत असलेले हे विसाव्याचे
ठिकाण अजून मिळाले नव्हते. 10पण आता तुम्ही यार्देन
नदी पलीकडे परमेश्वर देणार असलेल्या देशात जाऊन
राहणार आहात. तेथे तुम्हाला सर्व शत्रूंपासून अभय मिळेल.
तुम्हाला स्वस्थता लाभेल. 11मग परमेश्वर एक ठिकाणी
आपले खास निवासस्थान निवडेल. त्याला तो आपले
नाव देईल. तिथे तुम्ही मी सांगतो त्या सर्व वस्तू घेऊन
जा–होमबली, यज्ञबली, धान्याचा व प्राण्यांचा दहावा
हिस्सा,* परमेश्वराला अर्पण करायच्या वस्तू, नवस
फेडायच्या वस्तू, आणि पाळीव पशुपक्षी यांचा पहिला गोऱ्हा.
12येताना आपली मुलेबाळे, नोकरचाकर, या सर्वांना या
ठिकाणी घेऊन या. तुमच्या वेशींच्या आत राहणाऱ्या
लेवींनाही बरोबर आणा (कारण त्यांना जमिनीत
तुमच्याबरोबर वाटा नाही.) सर्वांनी मिळून तुमचा देव

---

**प्राण्यांचा दहावा हिस्सा** किंवा "दशांश" पाहा अनुवाद 14:22–29.

परमेश्वर याच्या सान्निध्यात आनंदात वेळ घालवा. 13आपले होमबली निष्काळजीपणाने वाटेल त्या ठिकाणी अर्पण करू नका. 14परमेश्वर तुमच्या वसाहतीत कुठेतरी एक पवित्र जागा निवडील. तेथेच तुम्ही हे होमबली अर्पण करा व ज्या इतर गोष्टी करायला सांगितल्या त्या करा.

15"तथापी, तुम्ही राहता तेथे हरीण, सांबर असे कोणतेही चांगले प्राणी मारून खाऊ शकता. देवदयेने मिळतील तितके आणि हवे तितके खा. हे मांस शुद्ध, अशुद्ध अशा कोणत्याही लोकांनी खावे. 16फक्त त्यातले रक्त तेवढे खाऊ नका. ते पाण्यासारखे जीमनीवर ओतून टाका.

17आपण राहतो तेथे काही गोष्टी खाणे निषिद्ध आहे. त्या म्हणजे, देवाच्या वाट्याचे धान्य, नवीन द्राक्षारस, तेल, कळपातील पहिला गोऱ्हा, देवाला अर्पण करायच्या वस्तू नवस फेडण्याच्या गोष्टी, आणखी काही देवाला अर्पण करायच्या खास गोष्टी वगैरे. 18या गोष्टी तुमचा देव परमेश्वर जे स्थान निवडील तेथेच आणि त्याच्या समवेत खाव्या. आपली मुलेबाळे, दासदासी, वेशीच्या आतील लेवी यांना बरोबर घेऊन तिथे जाऊन त्या खा. जी कामं पार पाडली त्याबद्दल तुमचा देव परमेश्वर याच्या सान्निध्यात आनंद व्यक्त करा. 19या देशात राहाल तितके दिवस या सगळ्यात लेवींना न चुकता सामील करून घ्या.

20–21"तुमच्या देशाच्या सीमा वाढवायचे तुमचा देव परमेश्वर ह्याने तुम्हाला वचन दिले आहे. तसे झाले की त्याने निवडलेली जागा तुमच्या राहत्या घरापासून लांब पडेल. तेव्हा मांसाची गरज पडली की जे मिळेल ते मांस तुम्ही खा. परमेश्वराने दिलेल्या पशुपक्ष्यांच्या कळपातील कोणताही प्राणी मारलात तरी चालेल. मी आज्ञा दिल्याप्रमाणे तुम्ही राहत्या जागी हे मांस हवे तेव्हा खा. 22हरीण किंवा सांबर यांच्याप्रमाणेच हे खा. शुद्ध, अशुद्ध कोणीही व्यक्तिने ते खावे. 23पण रक्त मात्र खाण्यात येऊ देऊ नका. कारण रक्त म्हणजे जीवन आहे. ज्या मांसात जीवनाचा अंश आहे ते खाणे कटाक्षाने टाळा. 24रक्त सेवन करू नका. ते पाण्यासारखे जमिनीवर ओतून टाका. 25परमेश्वराच्या दृष्टिने जे योग्य तेच तुम्ही करावे म्हणजे तुमचे व तुमच्या वंशजांचे कल्याण होईल.

26"देवाला काही विशेष अर्पण करायचे ठरवले तर तुमचा देव परमेश्वर याने निवडलेल्या त्याच्या जागी तुम्ही जावे. नवस बोललात तर तो फेडायलाही तेथे जा. 27आपले होमबली म्हणजे मांस व रक्त तेथे वेदीवर अर्पण करा. इतर बळींचे रक्त वेदीवर वाहा. मग त्याचे मांस खा. 28मी दिलेल्या या सर्व आज्ञांचे पालन काळजीपूर्वक करा. जे तुमचा देव परमेश्वर ह्याच्या दृष्टिने चांगले व उचित आहे ते केल्याने तुमचे व तुमच्या मुलाबाळांचे निरंतर कल्याण होईल.

29"तुम्ही दुसऱ्यांच्या जमिनीवर ताबा मिळवणार आहात. तुमचा देव परमेश्वर तुमच्यासाठी त्यांचा पाडाव करील. तेव्हा तेथील लोकांना हुसकावून तुम्ही तेथे राहाल. 30एवढे झाल्यावर एक खबरदारी घ्या. त्यांचा पाडाव झाल्यावर तुम्हालाच त्यांचे अनुकरण करण्याचा मोह होईल. आणि त्यांच्या देवांच्या भजनी लागाल. तेव्हा सावध. त्यांच्या दैवतांच्या नादी लागू नका. 'या लोकांनी ज्याप्रकारे पूजा केली तशीच मी आता करतो' असे मनात आणू नका. 31तुमचा देव परमेश्वर याच्या बाबतीत तसे करू नका. कारण परमेश्वराला ज्या गोष्टींचा तिटकारा आहे त्या सर्व गोष्टी हे लोक करतात. ते देवाप्रीत्यर्थ आपल्या मुलाबाळांचा होमसुद्धा करतात.

32"तेव्हा मी सांगतो तेच कटाक्षाने करा. त्यात अधिक उणे करू नका.

## भोंदू संदेष्टे

13 "स्वप्नांचे अर्थ सांगणारा एखादा भोंदू संदेष्टा तुमच्याकडे एखाद्या वेळी येईल. आपण काही चिन्ह, किंवा चमत्कार दाखवतो असे तो म्हणेल. 2कदाचित् त्या चिन्हाचा तुम्हाला पडताळा येईल किंवा चमत्कार खराही ठरेल. मग तो, तुम्हाला अपरिचित अशा इतर दैवतांची सेवा करायला सुचवेल. 3पण त्याचे ऐकू नका. कारण तुमचा देव परमेश्वर तुमची परीक्षा पाहात असेल. हे लोक आपल्यावर मनापासून प्रेम करतात की नाही हे परमेश्वराला पाहायचे असेल. 4तेव्हा तुम्ही आपल्या परमेश्वर देवालाच अनुसरा. त्याच्याविषयी आदर बाळगा. त्याच्या आज्ञा पाळा. आणि त्याने सांगितलेले ऐका. त्याची सेवा करा. त्याचा त्याग करू नका. 5तसेच त्या संदेष्ट्याला किंवा स्वप्न सांगणाऱ्याला ठार मारा. कारण तो तुम्हाला तुमच्या परमेश्वर देवापासून विचलीत करतो आहे. तुम्ही मिसर देशात गुलाम होतात तेव्हा आपल्या परमेश्वरानेच तुम्हाला तेथून सोडवले आहे. परमेश्वर देवाने आज्ञा देऊन नेमून दिलेल्या जीवनमार्गापासून हा माणूस तुम्हाला दूर नेतो म्हणून आपल्यामधून तुम्ही त्याचे निर्मूलन करा.

6"तुमच्या निकटची एखादी व्यक्ती हळूच तुम्हांला दुसऱ्या दैवताच्या भजनी लावायचा प्रयत्न करील. ही व्यक्ति म्हणजे तुमचा सख्खा भाऊ, मुलगा, मुलगी, प्रिय पत्नी, किंवा जिवलग मित्रही असू शकतो. तो म्हणेल, 'चल आपण या दुसऱ्या दैवताची पूजा करू.' (तुझ्या किंवा तुझ्या पूर्वजांच्या ऐकिवातही नसलेले हे दैवत असेल 7तुमच्या भोवताली जवळपास किंवा लांब राहणारे जे लोक आहेत त्यांचे हे दैवत होत.) 8त्या व्यक्तीच्या म्हणण्याला मान्यता देऊ नका. त्याचे ऐकू नका. त्याची कणव येऊ देऊ नका. त्याला मोकळा सोडू नका. तसेच त्याला संरक्षण देऊ नका. 9–10त्याला ठार करा. त्याला दगडांनी मारा. पहिला दगड तुम्ही उचला आणि मारायला सुरुवात करा. मग इतर जण त्याला दगडांनी मारतील. कारण मिसरमधून ज्याने तुम्हाला दास्यातून सोडवले त्या परमेश्वर देवापासूनच हा तुम्हाला बहकवायचा प्रयत्न करत आहे. 11ही गोष्ट

सर्व इस्राएलांच्या कानावर गेली की ते ही धास्ती घेतील, आणि अशी दुष्कृत्ये करायला धजावणार नाहीत.

## नगरे उध्वस्त करण्याविषयी

12"तुम्हाला राहाण्याकरता तुमचा देव परमेश्वर नगरे देईल. त्यापैकी एखाद्या नगरातून तुमच्या कानावर वाईट बातमी येईल. ती अशी की 13तुमच्यापैकीच काही नीच माणसे आपल्यापैकी काही जणांना कुमार्गाला लावत आहेत. 'आपण अन्य दैवतांची सेवा करू या' असं म्हणून ते इतरांना बहकवत आहेत. (ही दैवते तुम्हाला अपरिचित असतील.) 14असे काही कानावार आल्यास ते खरे आहे की नाही याचा आधी पूर्ण शहानिशा करून घ्या. ते खरे निघाले, असे काही भयंकर घडल्याचे सिद्ध झाले 15तर त्या नगरातील लोकांना त्याचे शासन द्या. त्या सर्वांचा वध करा. त्यांच्या जनावरांनाही शिल्लक ठेवू नका. ते शहर पूर्णपणे उध्वस्त करा. 16मग तेथील सर्व मौल्यवान वस्तू गोळा करून शहराच्या मध्यभागी आणा. आणि त्याचबरोबर सर्व शहर बेचिराख करून टाका. तो आपल्या परमेश्वराचा होमार्पण असेल. ते शहर पुन्हा कधी ही वसवता कामा नये. 17ते नगर नाश करायला परमेश्वराच्या हवाली केले जावे. म्हणून त्यातील कोणतीही वस्तू स्वत:साठी ठेवून घेऊ नका. ही आज्ञा ऐकलीत तर परमेश्वराचा तुमच्यावरचा क्रोध ओसरेल. त्याला तुमची दया येईल तुमच्याबद्दल प्रेम वाटेल तुमच्या पूर्वजांना त्याने कबूल केल्याप्रमाणे त्याच्याकृपेने तुमच्या देशाची भरभराट होईल. 18तुमचा देव परमेश्वर याचे ऐकलेत, त्याच्या आज्ञा पाळल्यात तरच हे घडेल. तेव्हा तुमचा देव परमेश्वर याच्या दृष्टिने जे योग्य तेच तुम्ही करा.

## देवाची पवित्र प्रजा: इस्राएल लोक

14 "तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याची मुले आहात. तेव्हा कोणी मरण पावले तर शोक प्रदर्शित करायला अंगावर वार करून घेणे, क्षौर करणे असे करू नका. 2कारण इतरांपेक्षा तुम्ही वेगळे आहात. तुम्ही परमेश्वराची पवित्र प्रजा आहात. आपली खास प्रजा म्हणून त्याने जगभरातून तुमची निवड केली आहे.

## काय खावे, काय खाऊ नये याचे संकेत

3"परमेश्वराला ज्यांची घृणा वाटते असे काही खाऊ नका. 4–5गाय-बैल, शेळ्या, मेंढ्या, सांबर, हरीण, भेकर, चितळ, रोही, गवा, रानमेंढा हे खाऊ शकता. 6दुभंगलेल्या खुरांचा* आणि रवंथ करणारा कोणताही प्राणी खाण्यास योग्य आहे. 7पण उंट, ससा व शाफान खाऊ नका. कारण ते रवंथ करणारे असले तरी त्यांचे खूर दुभंगलेले नाहीत. तेव्हा ते खाण्यास अशुद्ध समजावेत. 8डुक्करही खाऊ नये. त्याचे खूर दुभंगलेले आहेत पण तो रवंथ करत नाही. तेव्हा तोही अशुद्ध होय. त्याचे मांस खाऊ नका, तसेच मेलेल्या डुकराला स्पर्शही करू नका.

9"जलचरांपैकी पंख आणि खवले असलेला कोणताही मासा खा. 10पण ज्यांना पंख आणि खवले नाहीत असा मासा खाऊ नका. ते अशुद्ध अन्न होय.

11"कोणताही शुद्ध पक्षी खा. 12पण गरुड, लोळणारा गीध, मत्स्यमाऱ्या, 13गीध, ससाणा, वेगवेगळ्या जातीच्या घारी, 14कोणत्याही जातीचा कावळा, 15शहामृग, गवळणा, कोकीळ, बहिरी ससाणा, 16पिंगळा, मोठे घुबड व पांढरे घुबड, 17पाणकोळी, गिधाड, करढोख, 18बगळा, सर्व प्रकारचे करकोचे, टिटवी, वाघूळ यापैकी कोणताही पक्षी खाऊ नये.

19"पंख असलेले कीटक खाण्यास अशुद्ध होत. तेव्हा ते खाऊ नयेत. 20पण कोणताही शुद्ध पक्षी खायला हरकत नाही.

21"नैसर्गिक मृत्यू आलेला कोणताही प्राणी खाऊ नका. तो तुम्ही नगरात आलेल्या परक्या पाहुण्याला देऊ शकता. त्याला तो खायला हरकत नाही. किंवा त्याला तुम्ही तो विकू शकता. पण तुम्ही मात्र तो खाऊ नका. कारण तुम्ही परमेश्वर तुमचा देव ह्याची पवित्र प्रजा आहात.

"करडू त्याच्या आईच्या दुधात शिजवू नका.

## दहावा हिस्सा देण्याविषयी नियम

22"दरवर्षी तुमच्या शेतात पिकवलेल्या धान्याचा एक दशांश हिस्सा काढून ठेवा. 23मग परमेश्वराने निवडलेल्या त्याच्या वस्तीच्या ठिकाणी, त्याचा सहवास मिळावा म्हणून जा. धान्य, नवी, द्राक्षारस, तेल यांचा दहावा भाग, गुराढोरांचा पहिला गोऱ्हा यांचे तेथे सेवन करा. असे केल्याने तुमच्या परमेश्वर देवाबद्दल तुमच्या मनात सतत आदर राहील. 24पण एखादेवेळी हे ठिकाण फार दूर असेल तर हे सर्व तेथपर्यंत वाहून नेणे तुम्हाला शक्य होणार नाही. असे झाले तर, 25तेवढा भाग तुम्ही विकून टाका. तो पैसा गाठिला बांधून परमेश्वराने निवडलेल्या जागी जा. 26त्या पैशाने तुम्ही गायीगुरे, शेळ्या मेंढ्या, द्राक्षारस, मद्य किंवा कोणताही खाद्यपदार्थ विकत घ्या. आणि सहकुटुंब सहपरिवार त्याचा आनंदाने उपभोग घ्या. 27हे करताना तुमच्या नगरातील लेवींना वगळू नका. त्यांनाही यात सामील करून घ्या. कारण तुमच्याप्रमाणे त्यांना जमिनीत वाटा मिळालेला नाही.

28दर तीन वर्षांनी त्या वर्षाच्या उत्पन्नातील दहावा भाग काढून ठेवा. गावातील इतरांसाठी म्हणून हे धान्य गावात वेगळे साठवून ठेवा. 29लेवींना तुमच्यासारखे वतन नाही म्हणून त्यांनी तसेच इतर गरजूंनीही यातून धान्य घ्यावे. नगरात आलेले परकीय, विधवा, अनाथ मुले यांच्यासाठीही ते आहे. असे वागलात तर तुमचा देव परमेश्वर तुम्हाला सर्व कार्यात आशीर्वाद देईल.

---

**खूर** काही प्राण्यांच्या पायाचा कठीण भाग.

## कर्जमाफीचे ठराविक वर्ष

15 “दर सात वर्षांच्या शेवटी तुम्ही कर्ज माफ करून टाकावे. [2]त्याची पद्धत अशी: प्रत्येकाने आपल्या इस्राएल बांधवाला दिलेले कर्ज रद्द करून टाकावे. त्याला परतफेड करायला सांगू नये. कारण परमेश्वरानेच त्यावर्षी कर्जमुक्ती जाहीर केली आहे. [3]परक्याकडून वसुली करावी, पण इस्राएलाला कर्जमाफी द्यावी. [4]तुमच्या देशात कोणी गरीब असता कामा नये. कारण ही भूमी तुम्हाला परमेश्वराने दिली आहे आणि तो तुम्हाला भरभरून आशीर्वाद देणार आहे. [5]पण त्यासाठी तुम्ही तुमचा देव परमेश्वर याच्या आज्ञेत राहिले पाहिजे. मी आज सांगितलेल्या सर्व आज्ञा काळजीपूर्वक पाळा. [6]मग तुमचा देव परमेश्वर आपल्या वचनानुसार तुमचे कल्याण करील. तुम्ही इतर राष्ट्रांना उसने द्याल पण उसने घ्यायची तुमच्यावर वेळ येणार नाही. तुम्ही इतर राष्ट्रांवर सत्ता चालवाल पण तुमच्यावर इतरांची सत्ता चालणार नाही.

[7]“तुमचा देव परमेश्वर तुम्हांला देणार असलेल्या या देशात एखादा माणूस गरीब असेल, त्याला मदत करायला हात आखडता घेऊ नका, स्वार्थीपणाने वागू नका. [8]त्याच्यासाठी हात सैल सोडा आणि त्याच्या गरजेपुरते उसने द्या.

[9]“कर्जमाफीचे वर्ष (सातवे वर्ष) आता जवळच आले आहे अशा मतलबी विचाराने कुणाला मदत नाकारु नका. गरजूंच्या बाबतीत असे क्षुद्र विचार मनात आणू नका. त्याच्या बाबतीत अनुदार राहू नका. तसे केले तर ते तुमच्याविरुद्ध परमेश्वराकडे गाऱ्हाणे गातील. आणि तुम्हांला पाप लागेल.

[10]“तेव्हा तुम्हांला शक्य आहे ते त्यांना द्या. उदार अंत:करणाने द्या. या सत्कृत्याबद्दल तुम्हांला परमेश्वर देवाचा आशीर्वाद मिळेल. तुम्ही जे काम हाती घ्याल त्यात तुम्हांला यश मिळेल. [11]गरीब लोक तर देशात नेहमीच असणार म्हणून मी म्हणतो की त्यांना मदत करायला तयार राहा. आपल्या देशातील गरजवंतांना सढळ हाताने मदत करा.

## दासांची सुटका

[12]“एखादी इब्री बाई किंवा पुरुष तुम्ही दास म्हणून विकत घेतलेला असेल तर सहा वर्षे चाकरी झाल्यावर, सातव्या वर्षी त्याला मुक्त करा. [13]पण त्याला रिक्त हस्ताने जाऊ देऊ नका. [14]त्याला आपल्यातील काही गुरं, धान्यधुन्य, द्राक्षारस द्या. तुमचा देव परमेश्वर याच्या आशीर्वादाने तुम्हाला भरभरून मिळाले आहे. तेव्हा तुमच्या दासालाही सढळ हाताने द्या. [15]आपणही मिसरमध्ये दास होतो व तुमचा देव परमेश्वर याने तुम्हाला मुक्त केले हे लक्षात ठेवा. त्यासाठीच मी तुम्हाला आज ही आज्ञा देत आहे.

[16]“तुमच्या कुटुंबाचा लळा लागल्यामुळे आणि आनंदात असल्यामुळे तुमचा एखादा दास तुम्हाला सोडून जायला तयार होणार नाही. [17]तेव्हा दरवाजा जवळ धरून आरीने त्याचा कान टोचा. तो तुमचा कायमचा दास आहे हे त्यावरून कळेल. दासीच्या बाबतीतही असेच करा.

[18]“दासांना मुक्त करून जाऊ देताना तुम्हाला जड वाटू नये. पगारी नोकराला तुम्हाला द्यावे लागले असते त्याच्या निम्म्या पैशातच याने तुमची सेवा केली आहे हे लक्षात ठेवा. असे केलेत तर तुम्ही जे जे कराल त्यात देव तुम्हाला आशीर्वाद देईल.

## पहिल्या गोऱ्ह्याबद्दलचे नियम

[19]“तुमच्या कळपातील सर्व जनावरांचा पहिला गोऱ्हा पवित्र मानून तो परमेश्वराला अर्पण करा. पहिल्या गोऱ्ह्याला कामाला जुपूं नका. पहिल्या मेंढराची लोकर कातरु नका. [20]दरवर्षी या सगळ्या गोऱ्ह्यांना तुमचा देव परमेश्वर याने निवडलेल्या जागी घेऊन जा. तेथे सर्व कुटुंबियां समवेत परमेश्वरासमोर त्याचे मांस खा.

[21]“पण यापैकी एखाद्या जनावरात लंगडेपणा, आंधळेपणा असे काही व्यंग असेल तर तुमचा देव परमेश्वर ह्याला त्याचा बळी देऊ नका. [22]वाटल्यास घरीच त्याचे मांस खा. हरणाचे किंवा सांबराचे मांस खातात त्याप्रमाणे अशुद्ध व शुद्ध कोणीही ते खावे. [23]फक्त त्याचे रक्तसेवन करू नये. ते तेवढे पाण्याप्रमाणे जमिनीवर ओतून टाकावे.

## वल्हांडण सण

16 “अबीब महिन्यात लक्षात ठेवून तुमचा देव परमेश्वराप्रित्यर्थ वल्हांडण हा सण साजरा करा. कारण याच महिन्यात तुमचा देव परमेश्वर याने तुम्हाला रात्रीच्या वेळी मिसरमधून बाहेर काढले. [2]परमेश्वराने आपल्या निवासासाठी निवडलेल्या जागी जा. तेथे वल्हांडणाचा यज्ञपशू परमेश्वराला अर्पण करा. शेळ्या मेंढ्या किंवा गाय बैल यापैकी हा पशू असावा. [3]त्यावेळी खमीर घातलेली भाकर खाऊ नका. बेखमीर भाकरी तुम्ही सात दिवस खावी. ही भाकरी म्हणजे ‘संकटाची भाकर’ होय. त्याने तुम्हाला मिसरमधील संकटांची जन्मभर आठवण राहील. किती गडबडीने तुम्हाला तो देश सोडावा लागला होता! त्याचा तुम्ही आमरण विसर पडू देऊ नका. [4]तेव्हा या सात दिवसात देशभर कुणाच्याही घरी खमीर असता कामा नये. तसेच पहिल्या दिवशी संध्याकाळी जो बळी द्याल तो उजाडायाच्या आत खाऊन संपवून टाका.

[5]“वल्हांडणाच्या पशूचे यज्ञार्पण तुमचा देव परमेश्वर याने तुम्हाला वस्तीसाठी दिलेल्या कोणत्याही नगराच्या आत करू नका. [6]देव आपले निवासस्थान निवडील तेथेच व सुर्य अस्त होण्याच्या वेळीच ते केले पाहिजे. मिसरमधून परमेश्वराने तुम्हाला बाहेर काढल्याप्रित्यर्थ हा सण आहे. [7]परमेश्वर जे स्थान निवडील तेथेच हा यज्ञपशू शिजवून खा. मग सकाळी आपापल्या घरी परत जा. [8]सहा दिवस खमीर विरहीत भाकर खा. सातव्या

दिवशी कोणतेही कामकाज करू नये. या दिवशी सर्वांनी
एकत्र येऊन तुमचा देव परमेश्वर ह्याच्याप्रित्यर्थ पवित्र
मेळा भरवावा.

### सप्ताहांचा (किंवा पन्नासाव्या दिवसाचा) सण

9“पीक काढल्यापासून सात आठवडे मोजा. 10मग,
आपल्या इच्छेनुसार एखादी विशेष भेटवस्तू आणून आपला
देव परमेश्वर याच्यासाठी सप्ताहांचा सण साजरा करा.
आपल्याला परमेश्वर देवाच्या कृपेने किती मिळाले याचा
अंदाज घेऊन किती द्यायचे ते ठरवा. 11परमेश्वराने
निवडलेल्या त्याच्या विशेष निवासस्थानी जा. तेथे तुमचा
देव परमेश्वर याच्या सान्निध्यात सहकुटुंब सहपरिवार
आनंदात वेळ घालवा. आपली मुलेबाळे, दास, लेवी
गावातील पांथस्थ, अनाथ, विधवा या सर्वांना बरोबर घ्या.
12तुम्ही मिसरमध्ये दास होता हे विसरु नका. तेव्हा हे
नियम न चुकता पाळा.

### मंडपाचा सण

13“खळ्यातील आणि द्राक्षकुंडांमधील उत्पन्न जमा
केल्यावर सात दिवसांनी मंडपाचा सण साजरा करा. 14हा
सणही मुलंबाळं, नोकरचाकर, लेवी, शहरातील
वाटसरु, अनाथ, विधवा, यांच्यासह साजरा करा.
15तुमचा देव परमेश्वर याने निवडलेल्या निवासस्थानी,
त्याच्या सन्मानार्थ सात दिवस हा सण साजरा करा.
तुमच्या पिकांवर आणि तुम्ही घेतलेल्या कष्टांवर
तुमचा देव परमेश्वर याची कृपादृष्टि आहे. तेव्हा आनंदात
राहा.

16“तुमचा देव परमेश्वर याच्या पवित्र निवासस्थानी
तुम्हातील सर्व पुरुषांनी वर्षातून तीनदा एकत्र जमले पाहिजे.
बेखमीर भाकरीचा सण, सप्ताहांचा सण आणि मंडपाचा
सण हे ते तीन प्रसंग होत. येताना प्रत्येकाने भेटवस्तू
आणली पाहिजे. 17प्रत्येकाने यथाशक्ति दिले पाहिजे
परमेश्वराने आपल्याला काय दिले याचा विचार करून
आपण काय द्यायचे ते ठरवावे.

### लोकांसाठी न्यायाधीश व अधिकारी

18“तुमचा देव परमेश्वर याने तुम्हाला दिलेल्या नगरांमध्ये
आपापल्या वंशाप्रमाणे न्यायाधीश व अधिकारी यांच्या
नेमणुका कराव्यात. या व्यक्तींनी नीतीने न्यायदान करावे.
19त्यांनी नेहमी नि:पक्षपाती असले पाहिजे. त्यांनी लाच
घेऊन न्यायनिवाडा करता कामा नये. पैसे पाहून भल्या
भल्यांचेही डोळे फिरतात व ते निरपराध लोकांच्या
म्हणण्याचा विपर्यास करतात. 20चांगुलपणा आणि
नि:पक्षपातीपणा यांचीच नेहमी कास धरावी. म्हणजे तुमचा
देव परमेश्वर याने तुम्हाला दिलेला हा प्रदेश संपादन
करून तेथे तुम्ही सुखाने राहाल.

### परमेश्वर मूर्तीचा तिरस्कार करतो

21“जेव्हा तुमचा देव परमेश्वर यासाठी तुम्ही वेदी
उभाराल तेव्हा तिच्याशेजारी अशेरा देवीच्या सन्मानार्थ
लाकडी स्तंभ उभारु नका. 22कोणत्याही खोट्या दैवतांसाठी
स्तंभ उभारू नका. तुमचा देव परमेश्वर ह्याला अशा
गोष्टींचा तिरस्कार वाटतो.

### यज्ञपशू निर्दोष असावा

17 “यज्ञात अर्पण करायचा गोऱ्हा किंवा मेंढरु यांच्यात
कोणतेही व्यंग असता कामा नये. कारण तुमचा
देव परमेश्वर ह्याला त्याचा तिटकारा आहे.

### मूर्तिपूजकांना शासन

2“तुमचा देव परमेश्वर ह्याने दिलेल्या प्रदेशात राहायला
लागल्यावर एखाद्या नगरात दृष्कृत्ये घडल्याचे तुमच्या
कानावर येईल. परमेश्वराच्या कराराचा भंग केल्याचे
पाप एखाद्या बाईच्या किंवा पुरुषाच्या हातून झाल्याचे कळेल.
परमेश्वराच्या आज्ञेविरुद्ध 3त्याने इतर दैवतांची पूजा केली,
किंवा सूर्य, चंद्र, तारे यांना देवपण दिले अशा स्वरुपाचे ते
असेल. मी जी परमेश्वराची आज्ञा तुम्हाला दिली त्याच्या
हे विरुद्ध आहे. 4अशी बातमी कानावर आली की तुम्ही
त्याबाबतीत कसून चौकशी करा. हे भयंकर कृत्ये
इस्राएलमध्ये खरोखर घडले आहे याबद्दल तुमची बालंबाल
खात्री झाली पाहिजे. हे खरे असल्याचे सिद्ध झाले 5तर ही
दुष्कृत्ये करणाऱ्याला स्त्री असो वा पुरुष तुम्ही शिक्षा
करा. नगराच्या वेशीजवळ भर चौकात त्या व्यक्तीला
आणून तिला दगड धोंड्यांनी मरेपर्यंत मारा. 6त्या व्यक्तिच्या
दुष्कृत्याला दोन किंवा तीन साक्षीदार असले पाहिजेत.
एकच साक्षीदार असेल तर मात्र अशी शिक्षा करू नका.
7प्रथम साक्षीदारांनी मारायला हात उचलावा, मग इतरांनी
मारावे. अशाप्रकारे आपल्यामधून अमंगळपणा निपटून
काढावा.

### अवघड न्यायनिवाडे

8“एखादे खुनाचे प्रकरण, दोन व्यक्तीमधील वाद, किंवा
मारामारीत एखादा जखमी होणे अशा सारख्या काही
खटल्यांमध्ये न्यायानिवाडा करणे तुम्हाला आवाक्या बाहेरचे
वाटेल. या वादांची सुनावणी चाललेली असताना उचित
काय ते ठरवणे न्यायाधीशांना जड जाईल. अशा वेळी
परमेश्वराने निवडलेल्या पवित्र निवासस्थानी जावे. 9तेथे
लेवी वंशातील याजक व त्यावेळी कामावर असलेला
न्यायाधीश यांचा सल्ला घ्या. या समस्येची सोडवणूक ते
करतील. 10परमेश्वराच्या पवित्र निवासस्थानी ते आपला
निर्णय तुम्हाला सांगतील. त्यांचे म्हणणे ऐकून तसे करा.
ते जे जे करायला सांगतील ते ते सर्व कुचराई न करता
अंमलात आणा. 11त्यांचा निवाडा शिरोधार्य मानून त्यांच्या
सूचनांमध्ये काडीमात्र बदल न करता त्यांच्या सूचना पाळा.

12“जो याजकाचे व न्यायाधीशाचे ऐकणार नाही त्याला
चांगले शासन करा. त्याला मृत्युदंड द्या. इस्राएलमधून या
नीच माणसाचे उच्चाटन करा. 13हे ऐकून इतरांना दहशत
बसेल व घाबरुन ते पुढे उन्मत्तपणा करणार नाहीत.

### राजाची निवड

14“तुमचा देव परमेश्वर देत असलेल्या प्रदेशात तुम्ही
जात आहात. त्याचा ताबा घेऊन तुम्ही तेथे राहाल. मग
इतर राष्ट्रांप्रमाणे आपणही आपल्यावर राजा नेमावा असे
तुम्हाला वाटेल. 15तेव्हा परमेश्वराने निवड केलेल्या
व्यक्तिची तुम्ही राजा म्हणून नेमणूक करा. राजा हा
तुमच्यापैकीच असला पाहिजे, परदेशी असता कामा नये.
16त्याने स्वत:साठी अधिकाधिक घोडे बाळगता कामा
नयेत. घोडदळ वाढवण्यासाठी त्याने मिसरमध्ये माणसे
पाठवता कामा नयेत. कारण, ‘तुम्ही पुन्हा माघारी फिरता
कामा नये,’ असे परमेश्वराने बजावले आहे. 17तसेच
त्याला बऱ्याच बायका असू नयेत. कारण त्याने तो
परमेश्वरापासून परावृत होईल. सोन्या-रुप्याचाही फार
साठा त्याने करू नये.

18“राज्य करायला लागल्यावर त्याने स्वत:साठी
नियमशास्त्राची एक नक्कल वहीत लिहून ठेवावी. याजक,
लेवी यांनी आपल्या जवळ ठेवलेल्या पुस्तकातून ती करावी
व जन्मभर त्याचे अध्ययन करावे. 19नियमशास्त्रातील
सर्व आज्ञांचे त्याने पालन करावे व अशा रीतीने परमेश्वर
देवाचा आदर ठेवावा. 20म्हणजे आपल्या प्रजेपेक्षा,
भाऊबंदापेक्षा आपण कोणी उच्च आहोत अशी जाणीव
त्याला स्पर्श करणार नाही. तो नियमांपासून विचलीत
होणार नाही. अशाप्रकारे वागल्यास तो व त्याचे वंशज
इस्राएलांवर दीर्घकाळ राज्य करतील.

### याजक लेवींचा निर्वाह

18 “लेवी वंशातील लोकांना इस्राएलमध्ये जमिनीत
वाटा मिळणार नाही. ते याजक म्हणून काम
करतील. परमेश्वरासाठी अग्नीत अर्पण केलेल्या बलींवर
त्यांनी निर्वाह करावा. तोच त्यांचा वाटा. 2इतर वंशांप्रमाणे
लेवींना जमिनीत वाटा नाही. परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे
खुद्द परमेश्वरच त्यांचा वाटा आहे.

3“यज्ञासाठी गोऱ्हा किंवा मेंढरु मारताना त्या जनावराचा
खांद्याचा भाग, गालफडे व कोथळा याजकाला द्यावा. 4धान्य,
नवीन द्राक्षारस व तेल या आपल्या उत्पन्नातील पहिला
वाटाही त्यांना द्यावा. तसेच मेंढरांची पहिल्यांदा कातरलेली
लोकरही लेवींना द्यावी.

5कारण तुम्हा सर्वांमधून लेवी व त्याच्या वंशजांना तुमचा
देव परमेश्वर ह्याने आपल्या निरंतर सेवेसाठी निवडून
घेतले आहे.

6“प्रत्येक लेवीच्या मंदिरातील सेवेच्या ठराविक वेळा
असतील. पण दुसऱ्या कुठल्या वेळेला त्याला काम करायचे
असल्यास तो करू शकतो. इस्राएलमध्ये कुठल्याही नगरात
राहणारा कुणीही लेवी घर सोडून परमेश्वराच्या पवित्र
निवासस्थानी येऊ शकतो. हे केव्हाही करायची त्याला
मुभा आहे. 7आपल्या इतर बांधवांप्रमाणे त्यानेही तेथे सेवा
करावी. 8त्याला इतरांप्रमाणेच वाटा मिळेल. शिवाय
आपल्या कुटुंबाच्या उत्पन्नात त्याचा वाटा असेलच.

### इतर राष्ट्रांचे अनुकरण नको

9“तुमचा देव परमेश्वर ह्याने दिलेल्या या प्रदेशात
राहायला जाल तेव्हा तिकडच्या राष्ट्रातील लोकांप्रमाणे
भयंकर कृत्ये करू नका. 10आपल्या पोटच्या मुलाबाळांचा
यज्ञाची वेदीवर बळी देऊ नका. ज्योतिषी, चेटूक करणारा,
मांत्रिक यांच्या नादी लागू नका. 11वशीकरण करणाऱ्याला
थारा देऊ नका. मध्यस्थ, मांत्रिक तुमच्यापैकी कोणी बनू
नये. मृतात्म्याशी संवाद करणारा असू नये. 12अशा गोष्टी
करणाऱ्यांचा तुमचा देव परमेश्वर ह्याला तिरस्कार आहे.
म्हणून तर तो इतर राष्ट्रांना तुमच्या वाटेतून बाजूला
करत आहे. 13तुमचा देव परमेश्वर ह्याच्याशी विश्वासू
असा.

### परमेश्वराचा विशेष संदेष्टा

14“इतर राष्ट्रांना आपल्या भूमीतून हुसकावून लावा. ते
लोक मांत्रिक, चेटूककरणारे अशांच्या नादी लागणारे
आहेत. पण तुमचा देव परमेश्वर तुम्हाला तसे करू देणार
नाही. 15तो तुमच्यासाठी संदेष्ट्याला पाठवील.
तुमच्यामधूनच तो उदयाला येईल. तो माझ्यासारखा असेल.
त्याचे तुम्ही ऐका. 16तुमच्या सांगण्यावरुनच देव असे करत
आहे. होरेब पर्वताशी तुम्ही सर्व जमलेले असताना तुम्हाला
या पर्वतावरील अग्नीची आणि देववाणीची भीती वाटली
होती. तेव्हा तुम्ही म्हणालात, ‘पुन्हा हा आमचा देव परमेश्वर
ह्याचा आवाज आमच्या कानी न पडो. तसा अग्नीही पुन्हा
दृष्टीस न पडो, नाहीतर खचितच आम्ही मरु!’

17“तेव्हा परमेश्वर मला म्हणाला, ‘यांचे म्हणणे ठीकच
आहे. 18मी यांच्यामधूनच तुझ्यासारखा एक संदेष्टा उभा
करीन. माझी वचने त्याच्या मुखाने ऐकवीन. माझ्या
आज्ञेप्रमाणे तो लोकांशी बोलेल. 19हा संदेष्टा माझ्या वतीने
बोलेल. तेव्हा जो कोणी ते ऐकणार नाही त्याला मी शासन
करीन.’

### भोंदू संदेष्ट्याची पारख

20“पण हा संदेष्टा मी न सांगितलेले ही काही माझ्या
वतीने बोलला. तर त्याला मृत्युदंड दिला पाहिजे. इतर
दैवतांच्या वतीने बोलणारा संदेष्टाही कदाचित् निपजेल.
त्यालाही ठार मारले पाहिजे. 21तुम्ही म्हणाल की अमुक
वचन परमेश्वराचे नव्हे हे आम्हाला कसे कळणार?
22तर, परमेश्वराच्या वतीने म्हणून तो संदेष्टा काही बोलला
व ते प्रत्येक्षात उतरले नाही तर समजा की ते परमेश्वराचे

बोलणे नव्हे तो संदेष्टा स्वत:चेच विचार बोलून दाखवत
होता. त्याला तुम्ही घाबरायचे कारण नाही.

## आश्रय घेण्याची शहरे

19 “इतर राष्ट्रांच्या मालकीचा प्रदेश तुमचा देव
परमेश्वर तुम्हाला देत आहे. परमेश्वर त्या राष्ट्रांना
नष्ट करेल. मग त्यांच्या जागी तुम्ही वस्ती कराल. त्यांची
नगरे आणि घरे तुम्ही ताब्यात घ्याल. तेव्हा 2-3त्या प्रदेशाचे
तुम्ही तीन भाग करा. मग प्रत्येक भागात सर्वांना जवळ
पडेल असे एक नगर निवडा. त्या नगरांना रस्त्यांची सोय
करा. म्हणजे कोणाच्या हातून मनुष्यवध झाल्यास त्याला
आश्रयासाठी या नगराकडे धाव घेता येईल.

4“मनुष्यवध करून या तीनपैकी एका नगरात आश्रयाला
येणाऱ्याबद्दल नियम असा: पूर्वीचे वैर नसताना ज्याच्या
हातून चुकून आपल्या शेजाऱ्याचा वध झाला आहे त्याने
येथे जावे. 5उदाहरणार्थ, दोन माणसे लाकडे तोडायला
जंगलात गेली. तेथे झाडावर कुऱ्हाड चालवत असताना
चूकून कुऱ्हाडीचे पाते दांड्यापासून निसटले आणि ते नेमके
दुसऱ्यावर पडून तो मेला. अशावेळी कुऱ्हाड चालवणाऱ्याने
या तीनपैकी एखाद्या नगराच्या आश्रयाला जाऊन आपले
प्राण वाचवावे.

6हे नगर फार दूर असेल तर त्याला तेथपर्यंत पोचता
येणार नाही. मृताचा जवळचा नातेवाईक* त्याचा पाठलाग
करील व त्याला त्या नगरात पोचण्यापूर्वीच गाठेल. आणि
रागाच्या भरात त्याचा वध करील. यास्तव मुळात त्या
माणसाच्या हातून वैर नसताना मनुष्य हत्या झाली होती
तेव्हा तो प्राणदंडाला पात्र नव्हता. 7म्हणून ही नगरे सर्वांना
जवळ पडायला हवीत. तेव्हा अशी तीन नगरे राखून ठेवा.
8“तुमच्या प्रदेशाचा विस्तार करण्याचे तुमचा देव परमेश्वर
ह्याने तुमच्या वाडवडिलांना वचन दिले होते. त्यांच्याजवळ
कबूल केलेला सर्वप्रदेश तो तुम्हांला देईल.

9तुमचाच देव परमेश्वर ह्याजवर प्रेम करा व त्याने
दाखवलेल्या जीवनमार्गाने जा. या मी दिलेल्या आज्ञा तुम्ही
पूर्णपणे पाळल्यात तर तुम्हाला हे सर्व मिळेल. मग
परमेश्वराने तुमच्या प्रदेशाचा विस्तार केला की तुम्ही
पहिल्या तीन नगरांच्या भरीला आश्रयासाठी आणखी तीन
नगरे निवडा.

10म्हणजे तुमचा देव परमेश्वर तुम्हाला देणार असलेल्या
भूमीवर निर्दोष माणसांची हत्या होणार नाही. आणि अशा
हत्येचे पाप तुम्हांला लागणार नाही.

11“पण द्वेषापोटीही एखादा माणूस संधीची वाट पाहात
लपून छपून दुसऱ्याच्या जिवावर उठेल, त्याच्यावर
प्राणघातक हल्ला करून या नगरात आश्रयाला येईल.
12अशावेळी त्याच्या नगरातील वडिलधाऱ्यांनी माणसे
पाठवून त्याला तेथून बाहेर काढावे व मृताच्या आप्तांच्यां
हवाली करावे. त्याला मृत्यूची सजा झाली पाहिजे.
13त्याच्याबद्दल कळवळा वाटू देऊ नका. कारण त्याने
निरपराध माणसाचा खून केला आहे. इस्राएलमधून हा
कलंक दूर करा. मग सर्व काही ठीक होईल.

## जमिनीची हद्द

14“शेजाऱ्याच्या जमिनीची हद्द दाखवणारे दगड दूर करू
नका. पूर्वीच्या लोकांनी त्या सीमा आखलेल्या आहेत. हे
दगड म्हणजे तुमचा देव परमेश्वर ह्याने तुमच्या वाट्याला
जेवढी जमीन दिली त्याच्या खुणा होत.

## साक्षीदार

15“नियमाविरुद्ध वागल्याचा, अपराधाचा आरोप
कुणावर असेल तर त्याला दोषी ठरवायला एक साक्षीदार
पुरेसा नाही. त्याने खरेच गुन्हा केला आहे हे ठरवायला
दोन किंवा तीन साक्षीदार तरी हवेतच.

16“अमक्याच्या हातून अपराध घडला आहे असे एखादा
साक्षीदार द्वेषबुद्धीने, मुद्दाम खोटे सांगू शकतो. 17अशावेळी
त्या दोघांनी परमेश्वराच्या पवित्र निवासस्थानी जावे आणि
तेथे जे याजक व न्यायाधीश त्यावेळी असतील त्यांनी
निवाडा करावा. 18न्यायाधीशांनी कौशल्याने चौकशी केली
पाहीजे. त्यातून साक्षीदाराचा खोटारडेपणा उघडकीला आला
तर 19मग तुम्ही त्याला शिक्षा करा. तथाकथित अपराध्याला
जे शासन व्हावे असे त्याला वाटत होते तेच याला करा.
अशा रीतीने आपल्यामधून नीच वृत्तीचा नायनाट करा.
20इतरांच्या कानावर हे गेले की त्यांनाही दहशत बसेल
आणि असे प्रकार करायला ते धजावणार नाहीत.

21“गुन्हा जितका गंभीर स्वरूपाचा तितकीच शिक्षाही
कडक असावी. अपराध्याला शासन करताना दया
दाखवण्याचे कारण नाही. कोणी कोणाचा जीव घेतल्यास
त्यालाही देहांताचे शासन द्यावे. डोळ्याबद्दल डोळा, दाताबद्दल
दात, हाताच्या बदल्यात हात आणि पायाच्या बदल्यात पाय
असा दंड करावा.

## युद्धनीती

20 “तुम्ही शत्रूवर चाल करून जाल तेव्हा त्यांचे
घोडे, रथ आणि तुमच्यापेक्षा मोठे सैन्य पाहून
घाबरुन जाऊ नका. कारण ज्याने तुम्हाला मिसरमधून
बाहेर काढले तो परमेश्वर देव तुमचा पाठीराखा आहे.

2“तुम्ही युद्धावर जाल तेव्हा तुमच्या याजकाने आपल्या
सैन्याशी बातचीत करावी. 3ती अशी, ‘इस्राएल लोकहो,
ऐका. तुम्ही आज शत्रूवर चाल करून जात आहात. तेव्हा
आपले धैर्य गमावू नका. भयभीत होऊ नका. उभारी
कायम ठेवा. शत्रूला घाबरू नका. 4कारण तुम्हाला देव

---

**जवळचा नातेवाईक** शब्दश: “रक्ताचा सूड घेणारा” जेव्हा एखादी
व्यक्ति मारली जाते तेव्हा तिच्या जवळच्या नातेवाईकांनी खूनी
व्यक्तिला शासन झाले किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक
आहे.

परमेश्वर ह्याची साथ आहे. शत्रू विरुद्ध लढाई करायला तसेच विजय मिळवायला तो तुम्हाला मदत करणारा आहे.'

5"मग लेवी अधिकाऱ्यांनी सैन्याला उद्धेशून असे सांगावे, 'नवीनघर बांधून अजून गृह प्रवेश केला नाही असा कोणी तुमच्यात आहे का? त्याने परत जावे. कारण तो युद्धात प्राणाला मुकल्यास दुसरा कोणी गृहप्रवेश करील. 6द्राक्षमळा लावून अजून त्याची तोडणी केली नाही, फळ चाखले नाही असा कोणी आहे काय? त्याने माघारी जावे कारण तो युद्धात मरण पावल्यास दुसराच कोणी त्याच्या मळ्यातील फळे खाईल. 7तसेच, वाड निश्चय होऊन अजून लग्न झालेले नाही असा कोणी असल्यास त्याने परत जावे. कारण तो युद्धात कामी आल्यास त्याच्या वाग्दत्त वधूशी दुसरा कोणी लग्न करील. '

8"त्या लेवी अधिकाऱ्यांनी पुढे हेही सांगावे की युद्धाच्या भीतीने कोणी गलितगात्र झालेला असल्यास त्याने घरी परत जावे. नाहीतर त्याच्यामुळे इतरांचेही अवसान गळेल. 9अशाप्रकारे सैन्याशी संभाषण केल्यानंतर अधिकाऱ्यांनी सेनापतींची नेमणूक करावी.

10"तुम्ही एखाद्या नगरावर चाल करून जाल तेव्हा प्रथम शांततेच्या तहाची बोलणी करून पाहा. 11त्यांनी तुमच्या बोलण्याला मान्यता देऊन नगराचे दरवाजे उघडले तर तेथील सर्व प्रजा तुमची गुलाम होईल व तुमची सेवाचाकरी करील. 12पण त्यांनी तुमची तहाची बोलणी फेटाळून लावली आणि ते युद्धाला सज्ज झाले तर मग नगराला वेढा घाला. 13आणि तुमचा देव परमेश्वर ते तुमच्या हाती देईल तेव्हा तेथील सर्व पुरुषांना ठार करा. 14पण तेथील बायका, मुले, गुरेढोरे इत्यादी लूट स्वत:साठी घ्या. तुमचा देव परमेश्वर ह्याने दिलेल्या या लुटीचा उपभोग घ्या. 15तुमच्यापासून फार लांब असणाऱ्या व तुमच्या प्रदेशाबाहेर असणाऱ्या नगरांबाबत असे करण्यात यावे.

16"पण तुमचा देव परमेश्वर तुम्हाला देणार असलेल्या प्रदेशातील नगरे तुम्ही ताब्यात घ्याल तेव्हा तिथे मात्र कोणालाही जिवंत ठेवू नका. 17हत्ती, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी, यबूसी अशा एकूण एक सर्वांचा तुमचा देव परमेश्वर ह्याच्या आज्ञेप्रमाणे समूळ नाश करा. 18नाहीतर आपापल्या दैवतांची पूजा करताना ते ज्या अमंगळ गोष्टी करतात त्या ते तुम्हाला शिकवतील आणि तसे करणे आपला देव परमेश्वर ह्याच्या दृष्टीने पाप आहे.

19"युद्धात एखाद्या नगराला तुम्ही फार काळ वेढा घालून राहिलात तर तेथील फळझाडांवर कुऱ्हाड चालवू नका. त्यांची फळे अवश्य खा पण झाडे तोडू नका. त्यांच्याशी युद्ध पुकारायला ती झाडे काही तुमची शत्रू नाहीत. 20पण ज्यांना फळ येत नाहीत ती झाडे तोडलीत तरी चालतील. युद्ध चालू असेपर्यंत युद्धासाठी लागणारी शस्त्र बनवायला त्या लाकडाचा उपयोग हवा तर करा.

## अज्ञात व्यक्तीची हत्या

21 "तुमचा देव परमेश्वर तुम्हाला देणार असलेल्या प्रदेशात एखाद्याचा उघड्यावर खून झालेला आढळला आणि मारेकऱ्याचा पत्ता लागला नाही 2तर तुमच्यापैकी वडीलधारे आणि न्यायाधीश यांनी पुढे येऊन मृतदेहापासून सभोवार पसरलेल्या गावांचे अंतर मोजावे. 3मग जो गाव प्रेताच्या सर्वात जवळचा असेल तेथील वडिलधाऱ्यांनी आपल्या कळपातील एक गाय निवडावी. कधीही कामाला न जुंपलेली व अजून न व्यायलेली अशी ती गाय असावी. 4मग तिला वाहता झरा असलेल्या खोऱ्यांत आणावी. हे खोरे कधी पेरणी, नांगरणी न झालेले असावे. अशा ठिकाणी त्या गायीची मान कापावी. 5लेवी वंशातील याजकांनी या वेळी तिथे असावे. (आपली सेवा करून घ्यायला आणि आपल्या वतीने लोकांना आशीर्वाद द्यायला तुमचा देव परमेश्वर ह्याने त्यांची याजक म्हणून निवड केली आहे. प्रत्येक वादात किंवा मारामारीत ते निवाडा करतील.) 6त्या खोऱ्यात, मृताच्या जवळच्या नगरातील वडील माणसांनी, गाय मारल्यावर तिच्या मानेतून वाहणाऱ्या रक्ताने आपले हात धुवावे. 7व म्हणावे 'या व्यक्तीला आमच्या हातून मरण आले नाही. ही घटना घडताना आम्ही पाहिली नाही. परमेश्वरा तू इस्राएलाल वाचवलं आहेस.

8आम्हाला तू आपलस केल आहेस. आमचा उद्धार केला आहेस. आम्हाला शुद्ध कर. एका निरपराध व्यक्तीच्या हत्येबद्दल आम्हाला दोषी धरु नकोस. असे केले असता त्या निरपराध व्यक्तीच्या हत्येचे पाप या लोकांना लागणार नाही.' 9याप्रमाणे परमेश्वराच्या दृष्टिने जे योग्य ते करून तुम्ही आपल्यामधून या पापाचा निचरा करा.

## युद्धकैदी स्त्रिया

10"शत्रूशी युद्ध करायला गेल्यावर तुमचा देव परमेश्वर ह्याच्या साहाय्याने तुम्ही शत्रूला पराभूत कराल व त्याच्या सैनिकांना बंदीवान कराल. 11तेव्हा बंदिवानात एखादी सुंदर स्त्री पाहून तिच्याशी लग्न करावे असे एखाद्याला वाटेल.

12तेव्हा त्याने तिला आपल्या घरी आणावे. तिने आपले केशवपन करावे व नखे कापावी. 13तिचे पहिले, युद्धकैदीचे द्योतक असलेले वस्त्रही काढून टाकावे. आपल्या आईवडलांपासून दुरावल्याबद्दल तिने पूर्ण महिनाभर त्याच्या घरी शोक करावा. मग त्याने तिच्याजवळ जावे. म्हणजे तो तिचा पती व ती त्याची पत्नी होईल. 14पुढे त्याला ती आवडली नाही तर त्याने घटस्फोट देऊन तिला मुक्त करावे. पण तिची विक्री करू नये. तिला गुलाम म्हणूनही त्याने वागवता कामा नये. कारण त्याने तिच्याशी शरीरसंबंध ठेवला होता.

### ज्येष्ठ मुलगा

[15]“एखाद्याला दोन बायका असतील आणि त्याचे एकीवर दुसरीपेक्षा जास्त प्रेम असेल. दोघींना मुले असतील. पण नावडतीचा मुलगा सगळ्यात मोठा असेल. [16]अशा परिस्थितीत, आपल्या मालमत्तेची वाटणी करताना ज्येष्ठ मुलाच्या वाटणीचे, आवडतीच्या मुलाला देऊ नये. [17]त्याने आपल्या ज्येष्ठ पुत्राचा नावडतीचा मुलगा असला तरी स्वीकार केला पाहिजे. तसेच आपल्या एकंदर मालमत्तेतील दुप्पट वाटा त्याला दिला पाहिजे. कारण तो ज्येष्ठ पुत्र आहे. व त्यालाच जेष्ठपणाचा हक्क आहे.

### बंडखोर मुलगा

[18]“एखाद्याचा मुलगा हट्टी अजिबात न ऐकणारा, आईबापांना न जुमानणारा निघतो. शिक्षा केली तरी काही फरक पडत नाही. [19]अशावेळी आईवडलांनी त्याला गावच्या चावडीवर वडीलधाऱ्यांपुढे न्यावा. [20]त्यांनी सांगावे की, हा उद्दाम आहे. आमचे ऐकत नाही. तसेच तो खादाड व मद्यपी आहे. [21]यावर त्या गावातील माणसांनी या मुलाला दगडांनी मरेपर्यंत मारावे. असे केल्याने तुम्ही हे पाप आपल्यामधून काढून टाकाल. इस्राएलमधील इतर लोकांच्या कानावर ही गोष्ट गेली की ते घाबरून राहतील.

### गुन्हेगारांची झाडावर टांगलेली प्रेते

[22]“एखाद्याचा अपराध मृत्युदंड मिळण्याइतका मोठा असेल. अशावेळी त्याच्या देहान्ता नंतर लोक त्याचे प्रेत झाडाला टांगतील. [23]तेव्हा ते रात्रभर झाडावर टांगलेले राहू देऊ नका. त्याचदिवशी कटाक्षाने त्याचे दफन करा. कारण झाडाला टांगलेल्या त्या मृतदेहाला देवाचा शाप असतो. तुमचा देव परमेश्वर तुम्हाला देणार असलेली भूमी अशी विटाळू नका.

### इतर नियम

22 “आपल्यापैकी कोणाचा बैल किंवा मेंढरु मोकाट सुटलेले आढळले तर तिकडे दुर्लक्ष न करता ते त्याच्या मालकाकडे पोंचते करा. [2]तो मालक जवळपास राहात नसला किंवा कोण ते माहीत नसला तर त्या जनावराला आपल्या घरी आणा. त्याचा मालक शोध करत आला की त्याचे त्याला परत करा. [3]कोणाचे गाढव, कपडे किंवा इतर कोणतीही वस्तू अशी इकडे तिकडे दिसली तरी असेच करा, व त्या शेजाऱ्याला मदत करा.

[4]“कोणाचे गाढव किंवा बैल रस्त्यात पडलेले आढळले तर तिकडे दुर्लक्ष करू नका. त्याला उठवून उभे राहायला मदत करा.

[5]“बायकांनी पुरुषांचा किंवा पुरुषांनी बायकोचा पेहेराव करू नये. तुमचा देव परमेश्वर ह्याच्या दृष्टीने ते निंद्य आहे.

[6]“वाटेत तुम्हाला झाडावर किंवा जमिनीवर पक्ष्याचे घरटे आढळले आणि मादी अंडी उबवत किंवा पिल्लांवर बसलेली दिसली तर पिल्लांसकट तिला नेऊ नका. [7]हवी तर फक्त पिल्ले घ्या पण आईला सोडा. हे नियम पाळलेत तर तुमचे कल्याण होईल व तुम्ही चिरायु व्हाल.

[8]“नवीन घर बांधलेत तर त्याच्या छताला कठडा* अवश्य करा. म्हणजे वरून तोल जाऊन कोणी पडल्यास त्याच्या हत्येचे पातक तुम्हाला लागणार नाही.

### यांची सांगड घालू नये

[9]“द्राक्षमळ्यात इतर धान्याचे बियाणे पेरु नये. पेरलेत तर सारेच वाया जाईल. धान्य आणि द्राक्षं यापैकी काहीच तुम्हाला वापरता येणार नाही.

[10]“बैल आणि गाढव एका नांगराला जुंपू नका.

[11]“लोकर आणि ताग यांच्या मिश्र विणीचे वस्त्र वापरू नका.

[12]“वेगवेगळे धागे एकत्र करून त्यांचे गोंडे* आपल्या पांघरायच्या वस्त्राला चारीही टोकांना लावा.

### विवाहविषयक नियम

[13]“एखाद्या माणसाला लग्न केल्यावर बायकोशी शरीरसंबंध ठेवल्यावर काही काळानंतर बायको आवडेनाशी झाली आणि [14]‘मी या बाईशी लग्न केले पण ती कुमारी नसल्याचे आमच्या शरीरसंबंधाच्या वेळी मला आढळून आले’ असा खोटा आरोप त्याने तिच्यावर ठेवला तर लोकांमध्ये तिची बदनामी होईल. [15]अशा वेळी त्या मुलीच्या आईवडिलांनी तिच्या कौमार्याचा पुरावा घेऊन गावच्या चावडीवर वडीलधाऱ्या पंचाकडे जावे. [16]‘मी या पुरुषाशी माझ्या मुलीचे लग्न लावून दिले आहे. पण आतां ती त्याला नकोशी झाली आहे. [17]त्याने तिच्यावर भलते सलते आरोप केले आहेत. आणि हा म्हणतो की कौमार्याची लक्षणे तिच्या ठायी आढळली नाहीत. पण हा घ्या माझ्या मुलीच्या कौमार्याचा पुरावा,’ असे मुलीच्या वडलांनी तेथे सांगून, त्या मंडळींना ती चादर दाखवावी. [18]यावर गावच्या पंचानी त्या नवऱ्याला धरून शिक्षा करावी. [19]त्याला चाळीस औंस चांदी* दंड करावा. एका इस्राएल कन्येवर ठपका ठेवून तिची बदनामी केल्याबद्दल

---

**छताला कठडा** प्राचिन इस्राएलमध्ये धाब्याची घरे होती त्यामुळे धाब्याचा उपयोग अतिरिक्त खोलीसारखा करण्यात येत असे. ह्या नियमामुळे छप्पर ही एक सुरक्षित जागा झाली होती.

**गोंडे** हे गोंडे निरनिराळ्या कापडांचे बनविलेले असून ते पवित्र मानलेले असत. त्यांचा उपयोग देव व त्याच्या आज्ञा ह्यांची आठवण राहाण्यासाठी केला जात असे.

**चाळीस औंस चांदी** लग्नाचा करार पक्का करण्यासाठी मुलगा नवरीच्या पित्याला नेहमी देतो त्यापेक्षा ही जवळ जवळ दुप्पट रक्कम आहे.

ही रक्कम त्याने मुलीच्या वडीलांना द्यावी. त्याने बायको म्हणून तिचा स्वीकार केला पाहिजे. तसेच जन्मभर त्याने तिचा त्याग करता कामा नये.

[20]पण बायकोबद्दल नवऱ्याने केलेला आरोप खराही असू शकतो. तिच्या कौमार्याचा पुरावा तिचे आईवडील दाखवू शकले नाहीत तर [21]गावातील ज्येष्ठ मंडळींनी तिला आपल्या वडिलांच्या घराच्या दारापाशी आणावी आणि गावकऱ्यांनी तिला मरेपर्यंत दगडांनी मारावे. कारण तिने इस्राएलमध्ये ही लाजिरवाणी गोष्ट केली आहे. आपल्या वडलांच्या घरी असतानाचे तिचे वर्तन वेश्येसमान आहे. हा कलंक आपल्यामधून तुम्ही धुवून काढलाच पाहिजे.

## स्वैर वर्तन

[22]"एखाद्या पुरुषाचे दुसऱ्या विवाहित स्त्री बरोबर लैंगिक संबंध असतील तर दोघांनाही मृत्युदंड द्यावा. आणि इस्राएलमधून या दुराचाराचे निर्मूलन करावे.

[23]"एखाद्या कुमारिकेचा वाङनिश्चय झालेला असताना गावातील दुसऱ्या एखाद्या पुरुषाने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवलेले आढळले तर [24]त्या दोघांना गावाच्या वेशीपाशी भर चौकात आणून दगडांनी मरेपर्यंत मारावे-ती दुसऱ्याची बायको होणार होती. तिच्याशी शरीरसंबंध ठेवल्याबद्दल पुरुषाला आणि गावांत असून मदतीसाठी आरडाओरडा केला नाही म्हणून त्या मुलीला मरेपर्यंत दगडांनी मारावे. अशाप्रकारे आपल्या लोकांमधून हा दुराचार निपटून टाकावा.

[25]"पण अशा वाग्दत्त मुलीला एखाद्याने रानात गाठले आणि तिच्यावर बलात्कार केला तर मात्र फक्त त्या पुरुषाला मारावे. [26]त्या मुलीला काही करू नये. देहान्तशासन व्हावे असे तिने काही एक केले नाही. कोणी आपल्या शेजाऱ्यावर चालून जाऊन त्याचा जीव घ्यावा तसेच हे झाले. [27]त्याला ही मुलगी रानात आढळली. त्याने तिच्यावर हात टाकला. कदाचित् तिने मदतीसाठी हाका मारल्याही असतील पण तिच्या बचावासाठी तिथे कोणी नव्हते. तेव्हा तिला शिक्षा करू नये.

[28]"जिचा वाङनिश्चय झालेला नाही अशी कुमारिका कोणाला आढळली आणि त्याने तिच्यावर बलात्कार केला हे लोकांनी पाहिल्यास [29]त्याने मुलीच्या वडीलांना वीस औंस चांदी* द्यावी. आता ती त्याची बायको झाली. कारण त्याने तिच्याशी शरीरसंबंध ठेवल्याचे पाप केले आहे. तो आता तिचा जन्मभर त्याग करू शकत नाही.

[30]"आपल्या वडलांच्या बायकोशी गमन करून कोणी त्यांच्या तोंडाला काळे फासू नये."

## उपासनेत सहभागी होण्याविषयी

23 "जो भग्नांड किंवा छिन्नेंद्रिय आहे त्याला परमेश्वराच्या उपासनेत सहभागी होण्यास मनाई आहे. [2]ज्यांच्या आईवडीलांचा रीतसर विवाह झालेला नाही त्यानेही उपासनेत सहभागी होऊ नये. त्याच्या दहाव्या पिढीपर्यंत ही मनाई आहे.

[3]"अम्मोनी आणि मवाबी यांनी व त्यांच्या पुढच्या दहा पिढ्यांनीही इस्राएलांबरोबर उपासनेत सामील होवू नये. [4]कारण तुमच्या मिसरपासूनच्या प्रवासात तुम्हाला अन्नपाणी देण्यास त्यांनी नकार दिला होता. तसेच बलामला पैसे चारून त्यांनी त्याला तुम्हांला शाप द्यायला लावले. (मेसोपोटेमियातील पथोर नगरामधला बौर याचा बलाम हा मुलगा.) [5]तुमचा देव परमेश्वर ह्याने मात्र बलामचे ऐकले नाही. उलट त्या शापाचे रूपांतर आशीर्वादात केले. कारण तुमचा देव परमेश्वर याचा तुमच्यावर लोभ आहे. [6]या अम्मोनी किंवा मवाबी लोकांबरोबर कधीही सलोखा करू नका. तुम्ही जिवंत असेपर्यंत त्यांच्याशी मैत्री करू नका.

## इस्राएलींनी कोणाला आपले म्हणावे?

[7]"अदोमी लोकांचा कधीही तिरस्कार करू नका. कारण ते तुमचे आप्त आहेत. तसेच मिसरींचा द्वेष करू नका. कारण त्यांच्या देशात तुम्ही उपरे होतात. [8]अदोमी आणि मिसरी यांच्या तिसऱ्या पिढीपासूनच्या लोकांना इस्राएलांबरोबर परमेश्वराच्या प्रार्थनेत सहभागी व्हायला हरकत नाही.

## सैन्यातील शुचिता

[9]"युद्धावर छावणीत असताना जे जे म्हणून अशुद्धकारक त्यापासून दूर राहा. [10]एखाद्याला रात्री स्वप्नावस्था झाल्यास त्याने छावणीच्या बाहेर जावे. छावणीत राहू नये. [11]मग संध्याकाळी स्नान करावे. आणि सूर्यास्त झाल्यावरच परत छावणीत यावे.

[12]"प्रातर्विधींसाठी छावणीच्या बाहेर एक जागा असावी. [13]आपल्या शस्त्रास्त्रांबरोबरच खणण्यासाठी म्हणून एक कुदळ असावी. प्रातर्विधीस बसण्यापूर्वी एक खड्डा खणावा व विधी आटोपल्यावर त्यावर माती पसरून तो झाकून टाकावा. [14]कारण तुमच्या संरक्षणासाठी आणि तुमच्याहातून शत्रूचा पराभव करण्यासाठी तुमचा देव परमेश्वर तुमच्या बरोबरच राहणार आहे. तेव्हा छावणी पवित्र असावी. नाहीतर काही किळसवाण्या गोष्टी पाहून तो तुम्हांला सोडून जायचा.

## इतर नियम

[15]"एखादा गुलाम कधी त्याच्या मालकाकडून पळून जाऊन तुमच्याकडे आला तर त्याला त्याच्या मालकाच्या स्वाधीन करू नका. [16]त्याला तुमच्या वेशीमध्ये हव्या त्या गावात राहू द्या. त्याला जाच करू नका.

---

**वीस औंस चांदी** सदर रक्कम हुंड्याच्या स्वरूपात मुलगा नवरीच्या पित्याला लग्नाचा करार पक्का करण्यासाठी देत असे. नवरीचा पिता सदर रक्कम मुलीच्या पतीला जर काही झालेच तर तिची काळजी घेण्यासाठी जपून ठेवत असे.

17“इस्राएलच्या स्त्रीपुरुषांपैकी कोणीही देवळातील वेश्या
होऊ नये. 18पुरुष किंवा स्त्रीवेश्येच्या कमाईचा पैसा तुमचा
देव परमेश्वर ह्याच्या पवित्र निवासस्थानी, नवस फेडण्याच्या
कामासाठी वापरला जाणार नाही याची दक्षता घ्या. कारण
तुमचा देव परमेश्वर ह्याच्या दृष्टीने अशा व्यक्ती
तिरस्करणीय आहेत.

19“आपल्या इस्राएल बांधवांपैकी कोणाला काही उसने
दिल्यास त्यावर व्याज लावू नका. पैसा, अन्नधान्य किंवा
कोणत्याही व्याजी लावता येण्यासारख्या गोष्टीवर व्याज
आकारु नका. 20परक्याकडून व्याज घेतले तरी चालेल.
पण आपल्याच बांधवाला व्याज लावू नका. हे नियम
पाळलेत तर, ज्या प्रदेशात तुम्ही राहणार आहात तेथे हाती
घेतलेल्या प्रत्येक कार्यात तुम्हांला तुमचा देव परमेश्वर
ह्याचा आशीर्वाद मिळेल.

21“तुमचा देव परमेश्वर ह्याला नवस बोललात तर तो
फेडायला उशीर करू नका. कारण तुमचा देव परमेश्वर
तुम्हाला त्याचा जाब विचारील. नवस फेडला नाहीत तर
पाप लागेल. 22पण नवस बोललाच नाहीत तर पाप लागणार
नाही. 23जे वचन तुम्ही देता ते पाळत जा. देव काही
तुम्हाला ‘नवस बोला’ असे म्हणत नाही. तुम्ही स्वखुशीने
तो बोलता तेव्हा त्याप्रमाणे वागा.

24“दुसऱ्याच्या द्राक्षमळ्यातून जात असताना वाटल्यास
हवी तितकी द्राक्षे खा पण टोपलीत घालून बरोबर
घेऊन जाऊ नका. 25कोणाच्या शेतातून जाताना धान्याची
कणसे खुडून खाऊ शकता पण विळ्याने कापून नेऊ
नका.

24 “एखाद्याला लग्नानंतर आपल्या बायकोच्या
संबंधाने एखादी न आवडणारी गुप्त गोष्ट कळली
व ती त्याला आवडेनाशी झाली तर त्याने तिला घटस्फोट
लिहून द्यावा. मग तिला घराबाहेर काढावे. 2त्याच्या घरातून
बाहेर पडल्यावर हवे तर तिने दुसरे लग्न करावे. 3-4त्यातून
समजा असे झाले की या नवऱ्याचीही तिच्यावर इतराजी
झाली आणि त्याने तिला घटस्फोट दिला तर मात्र त्याने
तिला सोडल्यावर पुन्हा पहिल्या नवऱ्याने तिच्याशी लग्न
करू नये. किंवा हा दुसरा नवरा वारला तरी पहिल्या
नवऱ्याने पुन्हा तिच्याशी लग्न करू नये. कारण ती आता
भ्रष्ट झालेली आहे. तिच्याशी पहिल्या नवऱ्याने पुन्हा
लग्न करणे हे तुमचा देव परमेश्वर ह्याच्या दृष्टीने निंद्य
आहे. तुमचा देव परमेश्वर तुम्हाला देणार असलेल्या या
प्रदेशात असे पाप करू नका.

5“एखाद्याचे नुकतेच लग्न झाले असेल तर त्याला सैन्यात
मोहिमेवर पाठवू नये. तसेच त्याच्यावर विशेष कामगिरी
सोपवू नये. नववधूला सुखी ठेवण्यासाठी वर्षभर घरीच
राहण्याची मोकळीक त्याला द्यावी.

6“कोणाला काही उसने दिल्यास त्याबद्दल जाते किंवा
जात्याची तळी तारण म्हणून ठेवून घेऊ नये. नाहीतर
त्याच्या तोंडचा घासच काढून घेतल्यासारखे होईल.

7“कोणी आपल्या इस्राएली बांधवाला पळवले आणि
गुलाम म्हणून त्याची विक्री केली तर त्या पळवणाऱ्या
माणसाला ठार करावे व आपल्यामधून अशा दुष्कृत्याचे
निर्मूलन करावे.

8“कोणाला महारोग झाल्याचे आढळले तर लेवी
याजकाने सांगितलेल्या सर्व गोष्टींचे काटेकोर पालन
करा. माझ्या आज्ञेप्रमाणे याजक सांगतील, ते ऐका.
9मिसरमधून बाहेर पडल्यावर पुढच्या प्रवासात मिर्यामेचे
तुमचा देव परमेश्वर ह्याने काय केले ते चांगले लक्षात
असू द्या.

10“तुम्ही कोणाला कर्ज द्याल तेव्हा तारण मिळवायला
त्याच्या घरात शिरू नका. 11बाहेरच थांबा. मग तो आत
जाऊन गहाण ठेवण्याची वस्तू घेऊन येईल. 12तो फार
गरीब असला तर दुसरे काहीच त्याच्याजवळ गहाण
ठेवण्यासारखे नसल्यामुळे आपले गरम कपडे आणील.
तर ते रात्रभर तुम्ही स्वत:जवळ ठेवू नका. 13त्याला
रोजच्या रोज संध्याकाळ झाली की देत जा म्हणजे त्याला
पुरेसे अंथरुन पांघरुण मिळेल. त्याबद्दल तो तुम्हाला दुवा
देईल. तुमचा देव परमेश्वर ह्याच्या दृष्टीने हे तुमचे वागणे
न्यायीपणाचे व उचित होय.

14“तुमच्याकडे काम करणाऱ्या गरीब आणि गरजू
नोकरांचे शोषण करू नका. मग तो इस्राएली बांधव असो
की तुमच्या गावात राहणारा कोणी परकीय असो. 15त्याला
रोज सूर्यास्तापूर्वी त्याचा रोजगार देत जा. कारण हातावर
पोट असल्यामुळे त्याचा उदरनिर्वाह या पैशावरच होतो.
तुम्ही मजुरी दिली नाहीत तर तो परमेश्वराकडे आपले
गाऱ्हाणे सांगेल आणि तुम्ही पापाचे धनी व्हाल.

16“मुलांच्या वागणुकीची शिक्षा म्हणून आईवडलांना
देहान्तशासन होऊन नये. तसेच आईवडलांच्या दुष्कृत्याची
सजा म्हणून मुलांना ठार करू नये. ज्याच्या त्याच्या
दुष्कृत्याची सजा ज्याला त्याला मिळावी.

17“गावातील परकीय आणि अनाथ यांना उचित वागणूक
मिळावी. विधवेचा कपडालत्ता गहाण ठेवून घेऊ नये.
18मिसरमध्ये तुम्ही गरीब गुलाम होतात आणि तुमचा देव
परमेश्वर ह्याने तुम्हाला तेथून सोडवून मुक्त केले हे
लक्षात ठेवा. दीन दुबळ्यांशी असे वागा हे मी एवढ्याचसाठी
तुम्हाला सांगत आहे.

19“शेतातील पीक कापताना एखादी पेंढी तिथेच राहिली
तर ती आणायला परत जाऊ नका. अनाथ, उपरे विधवा
ह्यांच्यासाठी ती राहू द्या. त्यांना थोडे धान्य मिळाले तर
तुम्हांला तुमच्या प्रत्येक कार्यात तुमचा देव परमेश्वर
ह्याचा आशीर्वाद मिळेल. 20जैतून वृक्षांची फळांसाठी झाडणी
कराल तेव्हा डहाळ्यांमध्ये कुठे फळे राहिली आहेत का
हे पुन्हा पुन्हा तपासू नका. उरलेली फळे अनाथ, परकीय,
विधवा यांच्यासाठी राहू द्या. 21द्राक्षमळ्यातून द्राक्षे खुडताना
उरली सुरली द्राक्षेही त्यांच्यासाठीच राहू द्या. 22तुम्हीही
मिसरमध्ये गरीब गुलाम. होता म्हणून मी तुम्हाला हे

करायला सांगत आहे. त्याची आठवण ठेवा आणि
गरिबांसाठी एवढे करा.

25 “दोन व्यक्तिमंध्ये वाद झाल्यास त्यांनी न्याय
मागण्यासाठी न्यायाधीशांकडे जावे. वादाचा
निवाडा न्यायाधीश करील. 2दोषी व्यक्ति फटक्यांच्या
शिक्षेला पात्र ठरल्यास न्यायाधीशाने त्याला पालथे पाडावे
व आपल्या समक्ष त्याला फटके मारून घ्यावेत. फटक्यांची
संख्या गुन्ह्याच्या प्रमाणात असावी. 3चाळीस फटक्यांच्यावर
कोणालाही शिक्षा होऊ नये. त्याच्यापेक्षा अधिक मारल्यास
त्याचा जीव तुमच्या लेखी, महत्त्वाचा नाही असा त्याचा
अर्थ होईल. 4“धान्याची मळणी करताना बैल धान्यात तोंड
घालील या भीतीने त्याच्या मुसक्या बांधू नका.

5“दोन भाऊ एकत्र राहात असले आणि त्यातला एक
मूलबाळ व्हायच्या आधीच वारला तर त्याच्या बायकोने
कुटुंबाबाहेरच्या कोणा परपुरूषाशी लग्न करू नये. दिरानेच
तिच्याशी लग्न करावे व दिराचे कर्तव्य बजावावे. 6यानंतर
तिला जो पहिला मुलगा होईल त्याने तिच्या मृत पतीचे
नाव पुढे चालवावे. म्हणजे त्याचे नाव इस्राएलमधून नामशेष
होणार नाही. 7त्या मृत व्यक्तीच्या भावाने आपल्या विधवा
भावजयीशी लग्न करण्याचे नाकारले तर तिने गावाच्या
वेशीपाशी वडीलधाऱ्या पंचांकडे जावे व सांगावे की आपला
दिर त्याच्या भावाचे नाव इस्राएलमध्ये राखायला राजी
दिसत नाही. दिराच्या कर्तव्याला अनुसरून तो माझ्याशी
वागत नाही. 8अशावेळी पंचानी त्याला बोलावून त्याच्याशी
बोलावे. यावरही तो ऐकायला तयार नसेल, तिच्याशी
लग्न करायला तयार नसेल 9तर सर्वांसमोर त्याच्यापुढे
येऊन तिने त्याच्या पायातला जोडा काढावा. त्याच्या तोंडावर
थुकावे. आणि म्हणावे, ‘जो कोणी आपल्या भावाचा वंश
वाढवत नाही त्याचे असेच करावे.’ 10‘जोडा काढून
घेतलेल्याचे घराणे,’ अशी मग त्याची इस्राएलभर ख्याती
होईल.

11“दोन पुरुषांच्या मारामारीमध्ये त्यातील एकाची बायको
आपल्या नवऱ्याच्या मदतीसाठी मध्ये पडली असता तिने
दुसऱ्याचे नाजूक इंद्रिय पकडू नये. 12तसे केल्यास दयामाया
न दाखवता तिचा हात तोडावा.

13“बनावट तराजू वापरून लोकांची फसवणूक करू
नये. वजने अती जड किंवा अती हलकी नसावीत.
14आपल्या जवळची मापे फार मोठी किंवा फार लहान
असू नयेत. 15आपली वजने मापे अचूक आणि योग्य
असावीत. म्हणजे तुमचा देव परमेश्वर तुम्हाला देणार
असलेल्या प्रदेशात तुम्ही दीर्घकाळ राहाल. 16खोट्या
वजनमापांनी लोकांची फसवणूक करणाऱ्यांचा, अनुचित
वागणाऱ्यांचा तुमचा परमेश्वर देव तिरस्कार करतो.

## अमालेकांचा नाश करावा

17“तुम्ही मिसरमधून येत असताना अमालेक येथील
लोक तुमच्याशी कसे वागले ते आठवा. 18त्यांना देवाविषयी
आदर नव्हता. तुम्ही दमले भागलेले असताना त्यांनी
तुमच्यावर हल्ला केला. दमून मागे पडलेल्या तुमच्यातील
दुर्बळांना त्यांनी ठार केले. 19म्हणून अमालेकांची आठवण
सुद्धा तुम्ही पृथ्वीच्या पाठीवरून पुसून टाकली पाहिजे. देव
तुम्हाला देणार असलेल्या प्रदेशात प्रवेश केल्यावर तुम्ही
हे अंमलात आणा. इतर शत्रूंपासून तुमचा देव परमेश्वर
ह्याने तुम्हांला विसावा दिल्यावर अमालेकांचा न विसरता
समाचार घ्या.

## पहिले उत्पन्न

26 “लौकरच तुम्ही तुमचा देव परमेश्वर तुम्हाला
देणार असलेल्या प्रदेशात पाऊल टाकून तेथील
जमिनीचा ताबा घेऊन, तेथे राहाल. 2तेथील परमेश्वराने
दिलेल्या शेतजमिनीचे सर्व उत्पन्न गोळा कराल. तेव्हा
पहिले पीक टोपल्यात भरून त्या घेऊन तुमचा देव परमेश्वर
ह्याने निवडलेल्या त्याच्या पवित्र निवासस्थानी जा. 3त्यावेळी
जो याजक असेल त्याच्याकडे जाऊन सांगा की परमेश्वराने
आमच्या पूर्वजांना आम्हांला जमीन देण्याचे वचन दिले
होते. त्याप्रमाणे मी येथे पोहोंचलो आहे, हे सांगायला मी
तुमचा देव परमेश्वर ह्याच्या दारी आलो आहे!

4“मग तो याजक तुमच्या हातून ती टोपली घेईल. तुमचा
देव परमेश्वर ह्याच्या वेदीसमोर तो ती खाली ठेवील.
5तेव्हा तुम्ही तुमचा देव परमेश्वर ह्याच्यासमोर असे म्हणावे,
‘आमचा पूर्वज हा भटकणारा अरामी होता, तो खाली
मिसरमध्ये जाऊन राहिला. तिथे पोहोंचला तेव्हा त्याचा
परिवार लहान होता. पण मिसरमध्ये त्याचे महान व
सामर्थ्यशाली राष्ट्र बनले. 6तेथे मिसरी लोकांनी आम्हाला
वाईट वागणूक दिली. आम्हाला गुलाम बनवले. जबरदस्तीने
कष्टाच्या कामाला जुंपले व छळ केला. 7मग आम्ही
परमेश्वर जो आमच्या पूर्वजांचा देव ह्याचा धावा केला.
त्यांच्या बद्दलची गाऱ्हाणी सांगितली. परमेश्वराने आमचे
ऐकले. त्याने आमचा त्रास, आमचे कष्ट आणि छळ
त्याने पाहिले.

8मग त्याने आपल्या प्रचंड सामर्थ्याने आम्हाला
मिसरमधून बाहेर आणले. तेव्हा त्याने मोठे चमत्कार
प्रताप दाखवले आणि उत्पात घडवले. 9आणि येथे आम्हाला
आणून ही दुधामधाचे पाट वाहणारी भूमी आम्हाला दिली.
10आता हे परमेश्वरा, त्या भूमीतील पहिले उत्पन्न आम्ही
आणले आहे.’

“मग तो उत्पन्नाचा वाटा परमेश्वरासमोर ठेवून
परमेश्वराला वंदन करा. 11त्यानंतर सर्वजण एकत्र भोजन
करा. तुम्हाला व तुमच्या कुटुंबियांना तुमचा देव परमेश्वर
ह्याच्या कृपेने जे जे चांगले मिळाले त्याबद्दल आनंद व्यक्त
करा. यात लेवी आणि गावातील परकीय यांनाही सामील
करून घ्या.

12“दर तिसरे वर्ष हे दशांश देण्याचे वर्ष होय. यावर्षी
आपल्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा लेवी, गावातील परकीय

विधवा अनाथ यांना द्या. म्हणजे तेही तृप्त होतील. 13या वेळी तुमचा देव परमेश्वर ह्याला सांगा की माझ्या घरातून मी हा उत्पन्नाचा पवित्र हिस्सा आणला आहे. लेवी, परकीय, विधवा, अनाथ या सर्वांना द्यायचे ते मी दिले आहे. तुझ्या सर्व आज्ञांचे न चुकता पालन केले आहे. कोणत्याही आज्ञेचे उल्लंघन केलेले नाही. 14मी दु:खी* मन:स्थितीत यातील काही खाल्लेले नाही. तसेच अशुद्ध असताना यातील काही खाल्लेले नाही. मृतांना यातील काही अर्पण केले नाही. मी तुझे ऐकले आहे. तुझ्या आज्ञांप्रमाणे वागलो आहे. 15आता तू तुझ्या पवित्र निवासस्थानातून, स्वर्गातून आम्हा इस्राएल लोकांना आशीर्वाद दे. आम्हाला दिलेल्या भूमिला आशीर्वाद दे. ही दुधामधाची रेलचेल असलेली भूमी आम्हाला द्यायचे तू आमच्या पूर्वजांना कबूल केले होतेस.

## परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करा

16"तुम्ही हे सर्व नियम व विधी पाळावे अशी तुमचा देव परमेश्वर ह्याची तुम्हाला आज आज्ञा आहे. ते सर्व तुम्ही मन:पूर्वक पाळा. 17परमेश्वर हाच तुमचा देव असे आज तुम्ही म्हणाला आहात. त्याच्या मार्गाने चालायचे तुम्ही मान्य केले आहे. त्याच्या शिकवणीनुसार वागायचे त्याचे नियम व आज्ञा पाळायचे तुम्ही वचन दिले आहे. तो जे जे सांगेल त्याप्रमाणे आचरण ठेवायचे तुम्ही कबूल केले आहे. 18परमेश्वराने आज तुम्हाला पूर्वी सांगितल्याप्रमाणे आपली खास प्रजा म्हणून आपलेसे केले आहे. माझ्या सर्व आज्ञा पाळाव्या असेही तुम्हाला त्याने सांगितले आहे. 19इतर सर्व राष्ट्रांपेक्षा तो तुम्हाला महान करणार आहे. तो तुम्हाला प्रशंसा, नावलौकिक, सन्मान बहाल करील. आणि त्याच्याच सांगण्याप्रमाणे तुम्ही त्याची खास प्रजा व्हाल."

## लोकांसाठी स्मारक शिला

27 मोशे आणि इस्राएलमधील वडीलधारे लोकांशी बोलले. मोशे म्हणाला, "आज मी देणार असलेल्या सर्व आज्ञा पाळा. 2तुमचा देव परमेश्वर देणार असलेल्या प्रदेशात तुम्ही लौकरच यार्देन नदी ओलांडून जाणार आहात. त्यादिवशी मोठ्या शिला उभारा. त्यांना गिलावा करा. 3त्यावर या आज्ञा आणि शिकवण लिहून काढा. यार्देन नदी उतरून जाल त्या दिवशी हे करा. नंतरच परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे, तो देणार असलेल्या त्या धनधान्यसंपन्न भूमीत पाऊल टाका. परमेश्वर, तुमच्या पूर्वजांचा देव ह्याने हा प्रदेश तुम्हाला देण्यासाठी वचन दिले आहे.

4"यार्देन नदी ओलांडून गेल्यावर माझ्या आजच्या आज्ञा पाळा. एबाल पर्वतावर या गिलावा केलेल्या शिला उभारा. 5तसेच तुमचा देव परमेश्वर ह्यासाठी दगडी वेदी तयार करा. दगड फोडण्यासाठी लोखंडी हत्यार वापरू नका. 6वेदी अखंड, न घडलेल्या दगडाची असावी. आणि त्यावर होमबली अर्पण करा. 7तेथे शांत्यार्पणांचे यज्ञ करून भोजन करा. सर्वजण आनंदाने एकत्र जमून हे करा. 8मग शिलांवर ही वचने सुवाच्य अक्षरात लिहा."

## शापवाणीला लोकांची मान्यता

9मोशे आणि याजक इस्राएल लोकांशी बोलले. मोशे म्हणाला, "हे इस्राएला, शांत रहा! आणि ऐक! आज तू तुझा देव परमेश्वर ह्याच्या प्रजेतील झालास. 10तेव्हा तो सांगतो त्याप्रमाणे वागा. मी आज देतो त्या त्याच्या आज्ञा आणि नियम पाळा. 11त्याच दिवशी मोशेने लोकांना हे ही सांगितले, 12ते यार्देन नदी पार करून जातील तेव्हा शिमोन, लेवी, यहूदा, इस्साखार, योसेफ व बन्यामीन यांनी आशीर्वाद देण्यासाठी गरिज्जीम डोंगरावर उभे राहावे. 13तसेच रऊबेन, गाद, आशेर, जबुलून, दान व नफताली यांनी शाप वाचून दाखवण्यासाठी एबाल डोंगरावर उभे राहावे.

14"लेवींनी सर्वांना मोठ्याने असे सांगावे, 15'मूर्ती घडवून तिची गुप्तपणे स्थापना करणारा शापित असो. या मूर्ती म्हणजे कोणा कारागिराने लाकूड, दगड किंवा धातू यांच्यापासून घडवलेल्या असतात. परमेश्वराला अशा गोष्टींचा तिटकारा आहे! "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

16"नंतर लेवींनी लोकांना सांगावे 'आपल्या आईवडीलांचा अनादर दाखवणारी कृत्ये करतो तो शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

17"परत लेवींनी म्हणावे, 'शेजाऱ्याच्या शेताची हद्द दाखवणारी खूण जो सरकवतो तो शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

18"लेवींनी म्हणावे, 'आंधळ्याला फसवून त्याचा रस्ता चुकवणारा शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

19"लेवींनी म्हणावे 'परकीय, अनाथ, आणि विधवा यांच्याबाबतीत न्यायीपणाने न वागणारे शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

20"लेवींनी म्हणावे 'वडीलांच्या बायकोशी (सख्ख्या किंवा सावत्र आईशी) शरीरसंबंध ठेवून वडीलांच्या तोंडाला काळे फासणारा शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

21"लेवींनी म्हणावे 'पशूशी लैंगिक संबंध ठेवणारा शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

22"लेवींनी म्हणावे, 'सख्ख्या अथवा सावत्र बहिणीशी लैंगिक संबंध ठेवणारा शापित असो.' "तेव्हा सर्व लोकांनी 'आमेन' म्हणावे.

---

**मी दु:खी** : देवाने दिलेल्या पुष्कळ गोष्टांबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी लोक हे अन्न खात असत. त्यामुळे दु:खाच्या वेळी खाण्यात येणारे हे अन्न नसावे.

23“लेवींनी म्हणावे, ‘सासूशी लैंगिक संबंध ठेवणारा
शापित असो.’ “तेव्हा सर्व लोकांनी म्हणावे ‘आमेन.’
24“लेवींनी म्हणावे, ‘दुसऱ्याचा खून करणारा तो जरी
पकडला गेला नाही तरी शापित असो.’ “तेव्हा सर्व लोकांनी
म्हणावे ‘आमेन.’
25“लेवींनी म्हणावे, ‘निरपराध व्यक्तीला ठार
मारण्यासाठी जो पैसे घेतो तो शापित असो.’ “तेव्हा सर्व
लोकांनी म्हणावे ‘आमेन’.
26“लेवींनी म्हणावे, ‘जो ही नियमशास्त्राची वचने मान्य
करीत नाही, आचरणात आणत नाही तो शापित असो.’
“तेव्हा सर्व लोकांनी म्हणावे ‘आमेन.’

## आज्ञापालनाबद्दल आशीर्वाद

28 “आज, मी दिलेल्या सर्व आज्ञा तुम्ही काळजीपूर्वक
पाळल्यात तर तुमचा देव परमेश्वर तुम्हाला
पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांपेक्षा उच्चस्थानी नेईल. 2तुमचा देव
परमेश्वर ह्याचे ऐकलेत तर तुम्हांला हे आशीर्वाद मिळतील:

3 “तुम्हाला तुमच्या नगरात आणि शेतात परमेश्वराचे
आशीर्वाद मिळतील.
4 परमेश्वराच्या आशीर्वादाने तुम्हाला भरपूर मुलेबाळे
होतील. त्याच्या आशीर्वादाने तुमची भूमी सफल होईल.
तुमच्या पाळीव प्राण्यांना परमेश्वराच्या आशीर्वादाने भरपूर
पिल्ले होतील व ह्या वासरा-करडांवर परमेश्वराचे
आशीर्वाद राहतील.
5 तुमच्या धान्याच्या टोपल्या आणि पिठाच्या पराती
परमेश्वराच्या आशीर्वादाने सदोदित भरलेल्या राहतील.
6 तुम्ही आत याल आणि बाहेर जाल तेव्हा तुम्हाला
सदासर्वकाळ परमेश्वराचा आशीर्वाद मिळेल.

7“तुमच्यावर चाल करून येणाऱ्या शत्रूला पराभूत
करण्यास तुम्हाला परमेश्वराचे साहाय्य होईल. एका वाटेने
आलेला शत्रू सात वाटांनी सैरावैरा पळत सुटेल.
8“परमेश्वराच्या कृपेने तुमची कोठारे भरलेली
राहतील. तुम्ही हाती घेतलेल्या कार्यात त्याचे आशीर्वाद
मिळतील. तुमचा देव परमेश्वर तुम्हाला जो देश देत आहे
त्यात तुमची भरभराट होईल. 9परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणे आचरण ठेवलेत आणि त्याच्या आज्ञा
पाळल्यात तर आपल्या वचनाला जागून तो तुम्हाला आपली
पवित्र प्रजा करून घेईल. 10परमेश्वराच्या नावाने तुम्ही
ओळखले जाता हे पाहिल्यावर इतर राष्ट्रातील लोकांना
तुमचा धाक वाटेल.
11“परमेश्वराने द्यायचे कबूल केलेल्या या देशात तुम्हाला
भरपूर संतती होईल. गाईचे खिल्लार वाढेल. पीक चांगले
येईल. 12आपले आशीर्वादाचे भांडार तो तुमच्यासाठी खुले
करील. योग्यवेळी तुमच्या भूमीवर पाऊस पडेल. तुमच्या
सर्व कामात त्याचे आशीर्वाद मिळतील. तुम्ही इतर राष्ट्रांना
कर्ज द्याल पण तुम्हाला कर्ज काढावे लागणार नाही.
13आज मी सांगितलेल्या तुमचा देव परमेश्वर ह्याच्या
आज्ञांप्रमाणे वागलात तर तुम्ही नेते व्हाल, अनुयायी होणार
नाही, उच्चस्थानी जाल, तळाला जाणार नाही. तेव्हा
काळजीपूर्वक या नियमांचे पालन करा.
14या शिकवणीपासून परावृत होऊ नका. डावी उजवी
कडे वळू नका. इतर दैवतांची उपासना करू नका.

## आज्ञाभंगाबद्दल शाप

15“पण तुमचा देव परमेश्वर ह्याचे ऐकले नाहीत, त्याच्या
ज्या आज्ञा आणि विधी मी आज सांगत आहे त्यांचे पालन
केले नाहीत तर पुढील सर्व वाईट गोष्टी तुमच्याबाबतीत
घडतील.

16“नगरात आणि शेतात तुम्ही शापित व्हाल.
17तुमच्या धान्याच्या टोपल्या आणि पिठाच्या पराती
शापित होतील आणि त्या रिकाम्या राहतील.
18परमेश्वराच्या शापाने तुम्हाला फार संतती होणार
नाही, जमिनीत पीक चांगले येणार नाही, गुराढोरांचे
खिल्लार फार वाढणार नाही. वासरे-करडे शापित होतील.
19बाहेर जाताना आणि आत येताना परमेश्वर तुम्हाला
शाप देईल.

20“तुम्ही दुष्कृत्ये करून परमेश्वरापासून परावृत झालात
तर तुमच्यावर संकटे कोसळतील. हाती घेतलेल्या प्रत्येक
कामात अडचणी येतील व तुम्ही हताश व्हाल. तुमचा
विनाविलंब समूळ नाश होईपर्यंत हे चालेल. परमेश्वराच्या
मार्गापासून विचलित होऊन तुम्ही भलतीकडे गेल्यामुळे
असे होईल. 21जो प्रदेश काबीज करायला तुम्ही जात
आहात तेथून तुम्ही पूर्णपणे नष्ट होईपर्यंत परमेश्वर तुम्हाला
भयंकर रोगराईने ग्रस्त करील. 22परमेश्वर तुम्हाला रोग,
ताप, सूज यांनी शिक्षा करील. उष्णता भयंकर वाढेल
आणि अवर्षण पडेल. पिके होरपळून आणि कीड पडून
करपून जातील. तुमचा नाश होईपर्यंत ही संकटे तुमच्या
पाठीस लागतील. 23आकाशात ढग दिसणार नाही. आकाश
लखलखीत पितळेसारखे तप्त आणि पायाखालची जमीन
लोखंडासारखी घट्ट होईल. 24परमेश्वर पाऊस पाडणार
नाही. आकाशातून फक्त धूळ आणि वाळू यांचा वर्षाव
होईल. तुमचा नाश होईपर्यंत हे चालेल.
25“शत्रू तुम्हांला पराभूत करतील. शत्रूवर तुम्ही एका
दिशेने चढाई कराल आणि सात दिशांनी पळ काढाल.
तुमच्यावरील संकटे पाहून पृथ्वीवरील इतर लोक भयभीत
होतील. 26तुमच्या प्रेतांवर जंगली श्वापदे आणि पक्षी ताव
मारतील आणि त्यांना हुसकावून लावायला कोणी असणार
नाही.
27“परमेश्वराने पूर्वी मिसरच्या लोकांना गळवांनी पीडित
केले तसेच तो यावेळी तुम्हाला करील. गळवे, वाहणारी

खरुज, सतत कंड सुटणारा नायटा अशा गोष्टींनी तो तुम्हांला
शासन करील. 28वेड, अंधत्व, भांबावलेपण यांनी तुम्ही
ग्रस्त व्हाल. भर 29दिवसा आंधळ्यासारखे चाचपडत
चालाल. प्रत्येक कामात अपयशाचे धनी व्हाल. लोक
तुम्हाला एकसारखे नागवतील, दुखावतील. आणि तुम्हाला
कोणी त्राता राहणार नाही.
30“तुमचे जिच्याशी लग्न ठरले आहे, तिचा उपभोग
दुसरा कोणी घेईल. तुम्ही घर बांधाल पण त्यात राहणार
नाही. द्राक्षमळा लावाल पण त्याचे फळ तुम्हाला मिळणार
नाही. 31लोक तुमच्यादेखत तुमच्या गायी कापतील पण
त्याचे मांस तुम्हाला खायला मिळणार नाही. तुमची गाढवे
लोक पळवून नेतील आणि परत करणार नाही. तुमच्या
शेळ्या मेंढ्या शत्रूच्या हाती जातील आणि तुम्हाला कोणी
सोडवणारा नाही.
32“तुमच्या मुला-मुलींचे इतर लोक अपहरण करतील.
दिवसामागून दिवस तुम्ही त्यांचा शोध घ्याल. वाट पाहता
पाहता तुमचे डोळे शिणतील. पण ती सापडणार नाहीत.
आणि देव तुमच्या मदतीला येणार नाही.
33“तुमच्या जमिनीचे उत्पन्न आणि तुमच्या साऱ्या श्रमाचे
फळ एखादे अपरिचित राष्ट्र बळकावेल. लोक तुमची
उपेक्षा करतील. 34जे दृष्टीस पडेल त्याने तुम्ही चक्रावून
जाल. 35तुमच्या गुडघ्यांवर, पायांवर, पावलांपासून
डोक्यापर्यंत सर्व शरीरावर ठसठसणारी बरी न होणारी
गळवे उठतील. अशा रीतीने परमेश्वर तुम्हाला शासन
करील.
36“तुम्ही तुमच्या पूर्वजांनी कधी न पाहिलेल्या अशा
देशात तुमची व तुमच्या राजाची रवानगी परमेश्वर करील.
तुम्ही तेथे काष्ठ पाषाणाच्या अन्य देवतांची पूजाअर्चा
कराल. 37तुमच्यावर येणारी संकटे पाहून तेथील लोक
विस्मयचकित होतील. त्यांच्या चेष्टेचा आणि निंदेचा तुम्ही
विषय व्हाल.

## अपयशाचा शाप

38“तुमच्या शेतात भरपूर पीक येईल पण त्यातले तुमच्या
पदरात थोडेच पडेल. कारण बरेचसे टोळधाड फस्त करील.
39तुम्ही द्राक्षमळा लावून त्यात खूप मेहनत कराल. पण
द्राक्षं किंवा द्राक्षारस तुम्हाला मिळणार नाही. कारण कीड
ते खाऊन टाकील. 40तुमच्या जमिनीत जैतून वृक्ष जिकडे
तिकडे येतील पण त्यांचे तेल मात्र तुम्हाला मिळणार
नाही. कारण फळ जमिनीवर गळून, तेथेच सडून जातील.
41तुम्हाला मुलं-बाळं होतील पण ती तुम्हाला लाभणार
नाहीत. त्यांचे अपहरण होईल. 42टोळधाडीने तुमच्या झाडांचे,
शेतातील उभ्या पिकाचे नुकसान होईल. 43तुमच्या गावात
राहाणाऱ्या परकीयांची उन्नती होईल आणि तुमची अधोगती
होईल. 44ते तुम्हाला कर्ज देतील, तुमच्याजवळ त्यांना
उसने द्यायला काही असणार नाही. सर्व शरीरावर मस्तकाचे
नियंत्रण असते त्याप्रमाणे ते तुमच्यावर नियंत्रण ठेवतील.
तुम्ही जणू तूच्छ बनून राहाल.
45“तुमचा देव परमेश्वर ह्याने जे सांगितले ते तुम्ही
ऐकले नाही, त्याच्या आज्ञा आणि नियम यांचे पालन
केले नाही तर हे सर्वशाप तुमचा नायनाट होईपर्यंत तुमचा
पिच्छा पुरवतील. 46तुम्हाला व तुमच्या वंशजांना हे
परमेश्वराचे शाप कायमचे भोवतील. ते पाहून इतर लोक
आश्चर्यचकित होतील.
47“सर्व तऱ्हेची समृद्धी असताना तुम्ही आनंदाने व
उत्साहित मनाने तुमचा देव परमेश्वर ह्याची सेवा केली
नाही म्हणून 48परमेश्वराने पाठविलेल्या शत्रूसमोर तुम्हाला
नतमस्तक व्हावे लागेल. तुम्ही तहान भूकेने गांजलेले
दीन, सर्व तऱ्हेने वंचित असे व्हाल. परमेश्वर तुमच्या
मानेवर जोखंड ठेवील. ते तुम्हाला बाजूला करता येणार
नाही. तुमच्या अंतापर्यंत ते तुम्हांला वागवावे लागेल.

## शत्रू राष्ट्राचा शाप

49“दूरच्या राष्ट्रातील शत्रूला परमेश्वर तुमच्यावर
पाठवील. त्यांची भाषा तुम्हाला समजणार नाही. गरुडांसारखे
ते झेपावत येतील. 50ते क्रूर असतील. वृद्धांचा ते मान
राखणार नाहीत. लहानांना दया दाखवणार नाहीत. 51तुमची
जनावरे आणि तुम्ही काढलेले पीक ते नेतील. तुम्ही नष्ट
होईपर्यंत ते तुमची लूट करतील. धान्य, द्राक्षारस, तेल,
गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या काही म्हणता काही तुम्हाला उरणार
नाही.
52“ते राष्ट्र तुमच्या नगरांना वेढा घालून हल्ला करील.
आपल्या नगराभोवती असणारी उंच आणि भक्कम तटबंदी
आपले रक्षण करील असे तुम्हाला वाटेल. पण ती तटबंदी
कोसळून पडेल. तुमचा देव परमेश्वर तुम्हांला देणार
असलेल्या प्रदेशातील तुमच्या सर्व नगरांना शत्रू वेढा घालेल.
53“तुम्हाला फार यातना भोगाव्या लागतील. शत्रू वेढा
घालून तुमची रसद तोडेल. त्यामुळे तुमची उपासमार होईल.
तुम्ही भुकेने व्याकुळ होऊन, तुमचा देव परमेश्वर ह्याने
तुमच्या पोटी घातलेल्या मुलाबाळांनाच तुम्ही खाल.
54“तुमच्यामधील अत्यंत संवेदनशील आणि हळव्या
मनाचा माणूससुध्दा क्रूर बनेल, मग इतरांची काय कथा!
क्रौर्याने त्याची नजर इतरांकडे वळेल. आपली प्रिय पत्नी,
अजून जिवंत असलेली मुले ही त्यातून सुटणार नाहीत.
55खायला काहीच शिल्लक उरणार नाही तेव्हा तो आपल्या
मुलांचाच घास करेल. आणि त्या मांसात तो
कोणालाही-अगदी आपल्या घरातल्यांनाही-वाटेकरी होऊ
देणार नाही. शत्रूच्या वेढ्यामुळे आणि छळामुळे असे विपरीत
घडेल.
56“तुमच्यामधील अतिशय कोमल हृदयाची आणि
नाजूक बाईसुद्धा क्रूर बनेल. नाजुकपणाची कमाल म्हणजे
आजतागायत तिने चालायला जमिनीवर पावलेही टेकवली
नसतील. पण आता आपला प्राणप्रिय पती, आपली लाडकी

मुले यांच्याबद्दलही ती निष्ठुर होईल. [57]पण लपूनछपून मुलाला जन्म देऊन ते नवजात बालक व प्रसूतिसमयी बाहेर पडणारे सर्व काही ती भुकेने व्याकुळ झाल्यामुळे खाऊन टाकील. जेव्हा तुमचा शत्रू तुमच्या शहरांना वेढा घालील आणि यातना सहन करायला लावील, त्यावेळी वरील सर्व वाईट गोष्टी घडून येतील.

[58]"या ग्रंथातील सर्व शिकवण व आज्ञा तुम्ही पाळा. प्रतापी आणि विस्मयकारी तुमचा देव परमेश्वर ह्याचा आदर करा. याप्रमाणे आचरण ठेवले नाहीत तर [59]तुमच्यावर व तुमच्या वंशाजांवर संकटे कोसळतील, भयंकर रोगराई पसरेल. [60]अशा रोगराईला आणि उपद्रावांना तुम्ही मिसरमध्ये तोंड दिलेले आहे. त्यांची तुम्हाला धास्ती वाटत असे. त्या सगळ्यातून तुम्हाला पुन्हा जावे लागेल. [61]या ग्रंथात नसलेले उपद्रव आणि रोगसुद्धा परमेश्वर तुमच्या मागे लावील. तुमचा समूळ नाश होईपर्यंत तो हे करील. [62]आकाशातील ताऱ्यांइतके तुम्ही संख्येने विपुल असलात तरी तुमचा देव परमेश्वर ह्याचे न ऐकल्यामुळे त्यापैकी फारच थोडे शिल्लक राहाल.

[63]"तुमची भरभराट करायला आणि तुमची संख्या वाढवायला जसा त्याला आनंद वाटत होता तसाच आनंद त्याला तुमचा नाश करायला आणि तुम्हांला रसातळाला न्यायला वाटेल. तुम्ही जो देश काबीज करायला जात आहात तेथून तुम्हाला हुसकावून लावले जाईल. [64]परमेश्वर तुम्हाला पृथ्वीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्व लोकांमध्ये विखरून टाकील. तेथे तुम्ही काष्ठपाषाणाच्या मूर्तीची उपासना कराल. तुम्हाला आणि तुमच्या पूर्वजांना माहीत नसलेल्या खोट्यानाट्या देवांची उपासना कराल.

[65]"या इतर राष्ट्रांमध्ये तुम्हाला शांती लाभणार नाही. परमेश्वर तुमचे मन काळजीने पोखरून टाकील. तुमचे डोळे शीणतील तुम्ही बेचैन व्हाल. [66]तुम्ही नेहमी संकटग्रस्त आणि धास्तावलेले राहाल. तुम्हाला जिवाची खात्री वाटणार नाही. रात्रंदिवस तुम्ही झुरणीला लागाल. [67]सकाळी तुम्ही म्हणाल, 'ही रात्र असती तर बरे!' आणि रात्री म्हणाल, 'ही सकाळ असती तर किती बरे!' तुमच्या मनातील भीती आणि डोळ्यांना दिसणाऱ्या गोष्टी यामुळे असे होईल. [68]परमेश्वर तुम्हाला जहाजातून पुन्हा मिसरला पाठवील. जेथे तुम्हाला पुन्हा कधी परतून जावे लागणार नाही असे मी म्हणालो होतो तेथे परमेश्वर तुमची रवानगी करील. मिसरमध्ये तुम्ही शत्रूंचे दास म्हणून स्वत:ची विक्री करू बघाल पण कोणीही तुम्हाला विकत घेणार नाही.

## मवाबातील करार

29 इस्राएलांशी होरेब पर्वताजवळ परमेश्वराने पवित्र करार केला होता. त्याखेरीज, मवाबात आणखी एक पवित्र करार करायची परमेश्वराने मोशेला आज्ञा दिली. तो हा पवित्र करार होय.

[2]मोशेने सर्व इस्राएलांना जवळ बोलावले. तो त्यांना म्हणाला, "मिसरमध्ये परमेश्वराने जे जे केले ते सर्व तुम्ही पाहिले आहे. फारो, त्याचे सेवक आणि त्याचा देश यांचे परमेश्वराने काय केले ते तुम्ही पाहिले आहे. [3]ती संकटे, चमत्कार आणि विस्मयकारक गोष्टी तुम्ही पाहिल्या आहेत. [4]पण नेमके काय झाले हे तुम्हांला आजही समजू शकलेले नाही. तुम्ही जे पाहिलेत आणि ऐकलेत त्याचे खरे आकलन परमेश्वराने तुम्हाला होऊ दिलेले नाही.

[5]परमेश्वराने तुम्हांला वाळवंटातून चाळीस वर्षे चालवले. पण एवढ्या कालावधीत तुमचे कपडे विरले नाहीत की जोडे झिजले नाहीत. [6]तुम्हीं भाकरी खाल्ली नाही की द्राक्षारस अथवा मद्य प्यायले नाही. पण परमेश्वराने तुमची काळजी वाहिली. हा परमेश्वरच तुमचा देव आहे हे तुम्हांला कळावे म्हणून त्याने असे केले. [7]"तुम्ही येंथे आलात आणि हेशबोनचा राजा सीहोन आणि बाशानचा राजा ओग आपल्यावर चढाई करून आले. पण आपण त्यांचा पराभव केला. [8]त्यांचा देश आपण घेऊन तो रऊबेनी, गादी व मनश्शेचे अर्धे घराणे यांना ते इनाम म्हणून दिला. [9]या करारातील सर्व आज्ञा तुम्ही पाळल्यात तर तुम्हाला सर्व कार्यात असेच यश मिळत राहील.

[10]"आज तुम्ही सर्वजण म्हणजेच तुमच्यातील अंमलदार वडीलधारे, प्रमुख आणि सर्व इस्राएल तुमचा देव परमेश्वर ह्याच्यासमोर उभे आहात. [11]तुमची बायकामुले तसेच लाकूड तोड्यापासून पाणक्यापर्यंत तुमच्यातील सर्व उपरे हे ही इथे आहेत. [12]तुमचा देव परमेश्वर ह्याच्याशी करारबद्ध व्हायला तुम्ही इथे जमलेले आहात. परमेश्वर तुमच्याशी पवित्र करार करणार आहे. [13]त्याद्वारे तो तुम्हांला आपली खास प्रजा करणार आहे आणि तो तुमचा परमेश्वर बनणार आहे. त्याने हे तुम्हांला आणि अब्राहाम, इसहाक व याकोब या तुमच्या पूर्वजांना कबूल केले आहे. [14-15]हा शपथपूर्वक पवित्र करार फक्त आपल्याशी–आज इथे उपस्थित असलेल्यांबरोबरच नव्हे तर आज आपल्यामध्ये या ठिकाणी हजर नसलेल्या आपल्या वंशजांसाठीही आहे. [16]आपण मिसरमध्ये कसे राहात होतो ते तुम्हांला आठवत आहेच. वेगवेगळ्या राष्ट्रातून येथपर्यंतचा आपण प्रवास कसा केला याचीही तुम्हांला आठवण आहे. [17]त्या लोकांच्या लाकूड, पाषाण, चांदी, सोने यापासून बनवलेल्या आपल्याला तिरस्करणीय असलेल्या मूर्तीही पाहिल्यात. [18]आपल्या परमेश्वर देवापासून परावृत होऊन त्यांच्या दैवतांच्या भजनी लागलेला कोणी पुरुष, बाई, एखादे कुटुंब किंवा कूळ येथे नाही ना याची खात्रीकरून घ्या. अशी माणसे विषवल्लीसमान असतात. [19]"एखादा हे बोलणे ऐकूनही, 'मी मला हवे तेच करणार. माझे काहीही वाकडे होणार नाही' असे स्वत:चे समाधान करून घेत असेल. पण त्याने हे लक्षात ठेवावे की त्याचा त्याला त्रास तर होईलच पण सुक्याबरोबर ओले ही जळते या न्यायाने निरपराध्यांनाही त्रास होईल. [20-21]परमेश्वर अशा माणसाला क्षमा करणार

नाही. परमेश्वराचा त्याच्यावर कोप होईल. इतर सर्व इस्राएलांपासून अलग करून परमेश्वर त्याची नावनिशाणी पुसून टाकील. या ग्रंथातील सर्व शापांचा प्रत्यय त्या माणसाला स्वतःच्या बाबतीत येईल. या नियमशास्त्राच्या ग्रंथातील कराराचा हा एक भाग आहे.

[22]"या देशाची कशी वाट लागली हे पुढे तुमचे वंशज आणि दूरदूरच्या देशातील परकीय पाहतील. या देशातील विपत्ती आणि परमेश्वराने पसरवलेले रोग ते पाहतील. [23]येथील भूमी गंधक आणि खार यांच्यामुळे जळून वैराण होईल. तिच्यात गवताचे पाते देखील उगवणार नाही. सदोम, गमोरा, अदमा व सबोयीम ही शहरे परमेश्वराच्या कोपाने उद्ध्वस्त झाली तसेच या देशाचे होईल.

[24]"'परमेश्वराने या देशाचे असे का केले? त्याचा एवढा कोप का झाला?' असे इतर राष्ट्रातील लोक विचारतील. [25]त्याचे उत्तर असे की, आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याच्याशी केलेला करार इस्राएलांनी धुडकावून लावल्यामुळे परमेश्वराचा त्यांच्यावर कोप झाला. मिसरमधून या लोकांना बाहेर आणल्यावर परमेश्वराने त्यांच्याशी पवित्र करार केला होता तो यांनी मोडला. [26]हे इस्राएल इतर दैवतांची पूजा करू लागले. यापूर्वी त्यांना हे देव माहीत नव्हते. तसेच इतर दैवतांची पूजा करू नये असे परमेश्वराने त्यांना बजावले होते. [27]म्हणून त्यांच्यावर तो क्रुद्ध झाला व या ग्रंथातील शापवाणी त्यांच्या बाबतीत खरी करून दाखवली. [28]क्रोधायमान होऊन परमेश्वराने त्यांचे या देशातून उच्चाटन केले व आज ते जेथे आहेत तेथे त्यांची रवानगी केली?

[29]"काही गोष्टी आमचा देव परमेश्वर ह्याने गुप्त ठेवलेल्या आहेत. त्या फक्त त्यालाच माहीत. पण हे बाकी सर्व त्याने उघड केले आहे. आपल्याला व आपल्या पुढील पिढ्यांसाठी शिकवण देऊन ती नित्य पाळायला सांगितले आहे.

## इस्राएलांचे आपल्या भूमीत पुनरागमन

30 "मी सांगितलेल्या या सर्व गोष्टी तुमच्याबाबतीत घडतील. आशीर्वाद तसेच शापही खरे होतील. तुमचा देव परमेश्वर तुम्हांला इतर राष्ट्रांमध्ये हद्दपार करील. तेव्हा तुम्हांला या सर्व गोष्टींची आठवण होईल. [2]तेव्हा तुम्ही तुमचे वंशज तुमचा देव परमेश्वर ह्याचा धावा कराल. त्याला मनःपूर्वक शरण जाल. आणि मी आज दिलेल्या सर्व आज्ञांचे नीट पालन कराल. [3-4]तेव्हा तुमचा देव परमेश्वर तुमच्यावर प्रसन्न होईल, आणि तो तुम्हांला मुक्त करील. तुमची त्याने जेथे जेथे पांगापांग करून टाकली होती तेथून तो तुम्हाला परत आणील. मग ते देश किती का लांबचे असेनात! [5]पुन्हा आपल्या पूर्वजांच्या देशात तुम्ही याल आणि तो देश तुमचा होईल. परमेश्वर तुमचे कल्याण करील आणि पूर्वजांना मिळाले त्यापेक्षा कितीतरी अधिक तुम्हांला मिळेल. पूर्वी कधी नव्हती एवढी तुमची लोकसंख्या वाढेल. [6]तुमचा देव परमेश्वर तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना आपल्याकडे वळवील आणि त्याच्यावर तुम्ही मनःपूर्वक प्रेम कराल व सुखाने जगाल.

[7]"मग त्या संकटांनी तुमचा देव परमेश्वर तुमच्या शत्रूंना जेरीला आणील. कारण ते तुमचा द्वेष करून तुम्हाला अडचणीत आणायचा प्रयत्न करतील. [8]आणि तुम्ही पुन्हा परमेश्वराचे ऐकाल. आज मी देत असलेल्या सर्व आज्ञा तुम्ही पाळाल. [9]मी तुम्हाला सर्व कार्यात यश देईल. त्याच्या आशीर्वादाने तुम्हाला भरपूर संतती होईल. गायांना भरपूर वासरे होतील. शेतात भरघोसपीक येईल. तुमचा देव परमेश्वर तुमचे भले करील. तुमच्या पूर्वजांप्रमाणेच तुमचे कल्याण करण्यात त्याला आनंद वाटेल.

[10]पण तुम्ही तुमचा देव परमेश्वर ह्याने सांगितल्याप्रमाणे आचरण ठेवले पाहिजे. नियमशास्त्रातील ग्रंथात सांगितलेल्या आज्ञा व नियम यांचे कसोशीने पालन केले पाहिजे. संपूर्ण अंतःकरणाने व संपूर्ण जीवाने तुमचा देव परमेश्वर ह्याला अनुसरले पाहिजे. तर तुमचे कल्याण होईल.

## जीवन की मरण

[11]"जी आज्ञा मी आता तुम्हांला देत आहे ती पाळायला फारशी अवघड नाही. ती तुमच्या आवाक्याबाहेर नाही. [12]ती काही स्वर्गात नाही, की आम्ही ती पाळावी म्हणून कोण स्वर्गात जाऊन ती आमच्यापर्यंत आणील व आम्हांला ऐकवील? असे तुम्हांला म्हणावे लागणार नाही. [13]ती समुद्रापलीकडे नाही. 'आम्ही ती पाळावी म्हणून कोण समुद्र पार करून जाईल व तेथून आणून आम्हांला ऐकवील?' असे म्हणावे लागणार नाही. [14]हे वचन तर अगदी तुमच्याजवळ आहे. ते तुमच्याच मुखी आणि मनी वसत आहे. म्हणून तुम्हांला ते पाळता येईल.

[15]"आज मी तुमच्यापुढे जीवन आणि मृत्यू, चांगले आणि वाईट हे पर्याय ठेवले आहेत. [16]तुमच्या परमेश्वर देवावर प्रेम करा, त्याच्या मार्गाने जा व त्याच्या आज्ञा, नियम पाळा अशी माझी तुम्हांला आज्ञा आहे. म्हणजे तुम्ही जो प्रदेश आपलासा करायला जात आहात तेथे दीर्घकाळ राहाल, तुमच्या देशाची भरभराट होईल, तुम्हांला तुमचा देव परमेश्वर ह्याचे आशीर्वाद मिळतील. [17]पण तुम्ही परमेश्वराकडे पाठ फिरवलीत, त्याचे ऐकले नाहीत, इतर दैवतांचे भजनपूजन केलेत तर [18]मात्र तुमचा नाश ठरलेलाच हे मी तुम्हांला बजावून सांगतो. यार्देन नदी पलीकडच्या प्रदेशात मग तुम्ही फार काळ राहणार नाही.

[19]"आज स्वर्ग आणि पृथ्वीच्या साक्षीने मी तुम्हाला जीवन आणि मृत्यू या दोहोतून एकाची निवड करायला सांगत आहे. जीवनाचा पर्याय स्वीकारलात तर आशीर्वाद मिळेल. दुसऱ्याची निवड केलीत तर शाप मिळेल. तेव्हा जीवनाची निवड करा म्हणजे तुम्ही व तुमची मुलेबाळे जिवंत राहातील. [20]तुमचा देव परमेश्वर ह्याजवर प्रेम

करा. त्याच्या आज्ञा पाळा. त्याला सोडू नका. कारण परमेश्वर म्हणजेच जीवन. तसे केलेत तर अब्राहाम, इसहाक, व याकोब या तुमच्या पूर्वजांना वचन दिल्याप्रमाणे परमेश्वर तुम्हांला त्या प्रदेशात दीर्घायुष्य देईल."

## नवा नेता यहोशवा

31 मग मोशेने सर्व इस्राएलांना ह्या गोष्टी सांगितल्या.
2तो म्हणाला, "मी आता एकशेवीस वर्षाचा आहे.
माझ्याने आता तुमचे नेतृत्व होत नाही. शिवाय 'यार्देन नदीपलीकडे जायचे नाही असे,' परमेश्वरानेही मला सांगितले आहे.
3तुमचा देव परमेश्वर हा तुम्हांला साथ
देईल. तुमच्यासाठी तो इतर राष्ट्रांना पराभूत करील. त्यांच्याकडून तुम्ही त्या प्रदेशाचा ताबा घ्याल. पण परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे यहोशवा तुमचे नेतृत्व करील.

4"अमोऱ्यांचे राजे सीहोन आणि ओग यांचा परमेश्वराने संहार केला. तसेच तो याही वेळी तुमच्यासाठी करील.
5या राष्ट्रांचा पराभव करण्यात परमेश्वराचे तुम्हाला
साहाय्य होईल. पण त्यावेळी, मी सांगितले तसे तुम्ही वागले पाहिजे.
6शौर्य दाखवा. खंबीर पणाने वागा. त्या लोकांची
भीती बाळगू नका! कारण प्रत्यक्ष तुमचा देव परमेश्वर तुमच्या बरोबर आहे. तो तुम्हाला अंतर देणार नाही, तुमची साथ सोडणार नाही"

7मग मोशेने यहोशवाला बोलावले. सर्वांसमक्ष त्याला
सांगितले, "खंबीर राहा आणि शौर्य गाजव. या लोकांच्या पूर्वजांना परमेश्वराने जी भूमी द्यायचे कबूल केले आहे, तेथे तू त्यांना नेणार आहेस. ती काबीज करायला या इस्राएलांना तू मदत कर.
8परमेश्वर तुमच्या सोबतीला
तुमच्यापुढेच चालणार आहे. तो तुम्हाला सोडून जाणार नाही, तुम्हाला अंतर देणार नाही. तेव्हा खचून जाऊ नका आणि निर्भय व्हा."

## मोशे शिकवण लिहून काढतो

9नंतर मोशेने सर्व नियमशास्त्र लिहून याजकांना दिले.
हे याजक लेवी वंशातील होते. परमेश्वराच्या कराराचा पवित्र कोश वाहण्याचे काम त्यांचे होते. इस्राएलच्या वडिलधाऱ्या लोकांनाही मोशेने हे नियमशास्त्र दिले.
10मग
मोशे वडीलधाऱ्या लोकांशी बोलला. तो म्हणाला, "दर सात वर्षांच्या अखेरीला म्हणजेच कर्ज माफीच्या ठरविक वर्षी मंडपाच्या सणाच्या वेळी ही शिकवण तुम्ही सर्वांना वाचून दाखवा.
11यावेळी सर्व इस्राएलांनी तुमचा देव
परमेश्वर ह्याने त्याच्यासाठी निवडलेल्या पवित्र निवासस्थानी जमावे. तेव्हा त्यांना ऐकू जाईल अशा पद्धतीने तुम्ही हे नियमशास्त्र वाचून दाखवावे.
12पुरुष, बायका,
लहान मुले, गावातील परकीय अशा सर्वांना यावेळी एकत्र आणावे. त्यांनी ही शिकवण ऐकावी, परमेश्वर देवाचा आदर करावा. शिकवणीचे जीवनात आचरण करावे.
13ज्या पुढच्या पिढीला ही शिकवण माहीत नव्हती त्यांना
ती माहीत होईल. लौकरच तुम्ही जो देश आपलासा करायला चालला आहात तेथे ही मुलेबाळेही तुमचा देव परमेश्वर ह्याच विषयी आदर बाळगतील."

## परमेश्वराचे मोशे व यहोशवाला बोलावतो

14परमेश्वर मोशेला म्हणाला, "तुझा मृत्यू आता समीप
आला आहे. यहोशवाला घेऊन दर्शनमंडपात ये. म्हणजे मी त्याला आज्ञा देईन." तेव्हा मोशे व यहोशवा दर्शन मंडपात गेले.

15दर्शन मंडपाच्या प्रवेशद्वारी असलेल्या मेघस्तंभात
परमेश्वर प्रगट झाला.
16तो मोशेला म्हणाला, "तू आता
लौकरच मरण पावशील व आपल्या पूर्वजांना भेटशील. तेव्हा हे लोक माझ्यापासून परावृत्त होतील. ते माझ्याशी केलेला पवित्र करार मोडतील. माझी साथ सोडून त्या देशातील इतर खोट्या दैवतांची पूजा करायला लागतील.
17तेव्हा माझा त्यांच्यावर कोप होऊन मी त्यांना सोडून
जाईन. मी त्यांना मदत करायचे नाकारल्याने त्यांचा नाश होईल. त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल. त्यांच्यावर संकटे कोसळतील. तेव्हा ते म्हणतील की आपल्याला परमेश्वराची साथ नाही म्हणून आपल्यावर आपत्ती येत आहेत.
18पण त्यांनी इतर दैवतांची पूजा केल्याने,
दुष्कृत्ये केल्यामुळे मी त्यांना मदत करणार नाही.

19"तेव्हा तुम्ही हे गीत लिहून घ्या व इस्राएल लोकांना
शिकवा. त्यांच्याकडून ते तोंडपाठ करून घ्या. म्हणजे इस्राएल लोकांविरुद्ध ही माझ्याबाजूने साक्ष राहील.
20त्यांच्या
पूर्वजांना कबूल केलेल्या भूमीत मी त्यांना नेणार आहे. ही भूमी दुधामधाने समृद्ध आहे. तेथे त्यांची अन्नधान्याची चंगळ होईल. ते संपन्न जीवन जगतील. पण मग ते इतर दैवतांकडे वळतील व त्यांची पूजा करतील. माझ्यापासून ते परावृत होतील व कराराचा भंग करतील.
21त्यामुळे
त्यांच्यावर आपत्ती कोसळतील. त्यांना अनेक अडचणी येतील. त्याही वेळी हे गीत त्यांच्यामुखी असेल आणि त्यांच्या चुकीची साक्ष त्यांना पटेल. मी त्यांना त्या भूमीत अजून नेलेले नाही. पण त्यांच्या मनात तेथे गेल्यावर काय काय करायचे या बद्दल जे विचार चालू आहेत ते मला अगोदरच माहीत आहेत."

22तेव्हा त्याचदिवशी मोशेने ते गीत लिहून काढले,
आणि इस्राएल लोकांना ते शिकवले.

23मग नूनचा मुलगा यहोशवा याला परमेश्वर म्हणाला,
"हिंमत धर, खंबीर राहा. मी वचनपूर्वक देऊ केलेल्या प्रदेशात तू या इस्राएलांना घेऊन जाशील. मी तुझ्याबरोबर राहील."

## मोशे इस्राएलांना सावध करतो

24मोशेने सर्व शिकवण काळजीपूर्वक लिहून
काढल्यावर
25लेवींना आज्ञा दिली. (लेवी म्हणजे परमेश्वर

कराराचा कोश वाहणारे लोक.) मोशे म्हणाला, 26“हा
नियमशास्त्राचा ग्रंथ घ्या आणि परमेश्वराच्या कराराच्या
कोशात ठेवा. तुमच्याविरुद्ध हा साक्ष राहील. 27तुम्ही फार
ताठर आहात हे मला माहीत आहे. तुम्ही आपलाच ठेका
चालवता. मी तुमच्याबरोबर असतानाही तुम्ही
परमेश्वराविरुद्ध बंड केले आहे. तेव्हा माझ्यामागेही तुम्ही
तेच कराल. 28तुमच्या कुळातील अंमलदार व महाजन
यांना येथे बोलवा. स्वर्ग आणि पृथ्वीच्या साक्षीने त्यांना मी
चार गोष्टी सांगीन. 29माझ्या मृत्यूनंतर तुम्ही दुराचरण
करणार आहात हे मला माहीत आहे. मी सांगितलेल्या
मार्गापासून तुम्ही ढळणार आहात. त्यामुळे भविष्यात
तुमच्यावर संकटे कोसळतील. कारण परमेश्वराने निषिद्ध
म्हणून सांगितलेल्या गोष्टी तुम्ही करणार आहात. तुमच्या
दुष्कृत्याने तुम्ही परमेश्वराचा राग ओढवून घ्याल.”

### मोशेचे गीत

30सर्व इस्राएल लोक एकत्र जमल्यावर मोशेने हे संपूर्ण
गीत त्यांच्यासमोर म्हटले.

32 “हे आकाशा, ऐक मी काय म्हणतो ते. वसुंधरे
ऐक शब्द माझ्या मुखातले.
2पर्जन्याप्रमाणे माझ्या बोधाचा वर्षाव होईल. तो बोध
असेल जमिनीवरुन खळाळणाऱ्या पाण्यासारखा.
हिरवळीवर झिमझिमणाऱ्या पावसासारखा. झाडाझुडुपांवर
पडणाऱ्या पावसाच्या सरींसारखा.
3घोषणा* करीन मी परमेश्वराच्या नावाची. तुम्हीही
परमेश्वराची महती गा!
4“तो आहे दुर्ग आणि त्याची कृती परिपूर्ण! कारण
चोखाळतो तो उचित मार्ग! देवच खरा आणि विश्वासू
न्यायी आणि सरळ.
5तुम्ही त्याची मुले नाहीत. तुमची पापे त्याला मळीन
करतील. तुम्ही लबाड आहात.
6मूर्ख आणि निर्बुद्ध जन हो, परमेश्वराशी असे वागता?
तो तर तुमचा पिता, निर्माता कर्ता आणि धर्ता तोच.
7“आठवा पूर्वी काय घडले ते अनेक वर्षा पूर्वी काय
काय झाले ते ध्यानात आणा आपल्या बापाला विचारा,
तो सांगेल. महाजनांना विचारा, ते सांगतील.
8परात्पर देवाने लोकांची विभागणी केली, राष्ट्रा
राष्ट्रांमध्ये. प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र भूभाग दिला. देवाने
त्यांच्या सीमा आखल्या. देवदूतांइतकी राष्ट्रे त्याने बनविली.
9परमेश्वराचा वाटा त्याचे लोक होय. याकोब
परमेश्वराचा आहे.
10“याकोब (इस्राएल) सापडला त्याला वाळवंटात
भणभणत्या वाऱ्याच्या वैराण प्रदेशात. परमेश्वराने त्याला
आपल्या कवेत घेतले आणि डोळ्यात तेल घालून त्याला
सांभाळले.
11इस्राएलाला परमेश्वर गरुडासारखा आहे. गरुड पक्षीण
आपल्या पिलांना उडायला शिकवताना घरट्यातून ढकलते.
त्यांच्या संरक्षणार्थ त्यांच्याबरोबर तीही उडते. पिले पडली
झडली तर धरता यावे म्हणून पंख पसरते आणि पंखावर
बसवून त्यांना सुरक्षित जागी आणते. तसा परमेश्वर
इस्राएलला जपतो.
12“परमेश्वरानेच इस्राएलला पुढे आणले. दुसरा कोणी
देव मदतीला नव्हता.
13परमेश्वराच्याच पुढाकाराने त्याने या डोंगराळ
प्रदेशाचा ताबा घेतला. मग याकोबाने शेतात भरपूर पीक
घेतले. परमेश्वराने त्याला खडकातून मध दिला, त्या
कठीण खडकातून त्याच्यासाठी तेलही काढले.
14गाईम्हशींचे, शेळ्यामेंढ्याचे लोणी, आणि दूध, पुष्ट
मेंढ्या व कोकरे, बाशानचे उत्तम प्रतीचे बकरे, उत्कृष्ट
गहू हे परमेश्वराने त्यांना दिले. द्राक्षाची लाल मदिराही
इस्राएलांनो, तुम्ही प्यायलात.
15“पण यशुरुन (इस्राएल) माजला आणि उन्मत्त
बैलासारखा लाथा झाडू लागला. खाऊन पिऊन तो धष्ट
पुष्ट झाला! आणि त्याने आपल्या कर्त्या देवाचा त्याग
केला! आपले तारण करणारा दुर्गासारखा परमेश्वर तुच्छ
मानला.
16परमेश्वराच्या या प्रजेने इतर दैवतांची पूजा करायला
सुरुवात केली आणि परमेश्वराची इर्ष्या जागवली. मूर्ती
त्याला मान्य नाहीत, तर या लोकांनी मूर्ती केल्या व
परमेश्वराचा कोप ओढवला.
17खरे देव नव्हेत अशा दैवतांना त्यांनी यज्ञार्पणे केली.
अपरिचित दैवतांची पूजा केली. आपल्या पूर्वजांना पूर्वी
कधी माहीत नसलेल्या दैवतांची पूजा केली.
18आपल्या निर्माणकर्त्याचा दुर्गाचा त्यांनी त्याग केला.
जीवनदायी परमेश्वराला ते विसरले.
19“परमेश्वराने हे पाहिले व आपल्या प्रजेचा धिक्कार
केला. कारण प्रजेनेच त्याला क्रुद्ध केले होते!
20तो म्हणाला, ‘मी आता त्यांच्यापासून तोंड फिरवतो.
त्यांचा शेवट कसा होणार आहे ते मला माहीत आहे. ही
माणसे बंडखोर आहेत. अभ्यास न करणाऱ्या मुलांप्रमाणे
आहेत.
21मूर्तिपूजा करून यांनी माझा कोप ओढवला. मूर्ती
म्हणजे देव नव्हेत. क्षुल्लक मूर्ती करून त्यांनी मला क्रुद्ध
केले. तेव्हा त्यांना मत्सर वाटेल असे मी करीन. जे
एकसंध राष्ट्र नाही अशा लोकांमार्फत, मूढ राष्ट्राच्या योगे
मी यांना इर्ष्येस पेटवीन.
22माझा क्रोध धगधगणाऱ्या अग्नीप्रमाणे आहे.
अधोलोकाच्या तळापर्यंत तो जाळत जातो. पृथ्वी व
तिच्यावरील वनस्पती, पर्वतांचे पायथे यांनाही तो भस्मसात
करतो.

---

**घोषणा** किंवा “देवाला मान द्या” किंवा “देवाच्या महानेविषयी
बोला.”

23“मी इस्राएलांवर संकटे आणील. त्यांच्यावर मी माझ्या
बाणांचा नेम धरीन.
24भुकेने ते कासावीस होतील. भयंकर रोगराईने ते
नेस्तनाबूत होतील. वन्यपशू त्यांच्यावर सोडीन. विषारी
साप व सरपटणारे प्राणी त्यांना दंश करतील.
25रस्त्यावर सैन्य त्यांना मारेल व घरात ते भयभीत
होतील. तरुण पुरुष, स्त्रिया, लहानमुले व वृद्ध सर्वांना
सैन्य ठार करेल.
26लोकांच्या स्मृतीतून ते पुसले जातील इतका मी या
इस्राएलांचा नाश केला असता.
27पण त्यांचा शत्रू काय म्हणेल हे मला माहीत आहे.
‘आम्ही आमच्या सामर्थ्याने जिंकलो. इस्राएलांचा नाश
काही परमेश्वरामुळे झाला नाही,’ अशी ते बढाई मारतील,”
28“इस्राएल राष्ट्र विचारशून्य आहे, त्याला समज म्हणून
नाहीच.
29ते शहाणे असते तर त्यांना समजले असते. त्यांनी
पुढच्या परिणामांचा विचार केला असता.
30एक माणूस हजारांचा पाठलाग करू शकेल काय?
दोघेजण दहाहजारांना सळो की पळो करून सोडू शकतील
का? परमेश्वरानेच या जमावाला आपल्या शत्रूच्या
हवाली केले तरच ते शक्य आहे. खंद्या दुर्गासमान
असणाऱ्या परमेश्वराने त्यांना गुलामांसारखे विकले तरच
असे घडेल.
31आपल्या शत्रूंचा दुर्ग म्हणजे परमेश्वर आपल्या
अभेद्य किल्ल्यासारख्या परमेश्वराच्या तोडीचा नाही हे
तेही कबूल करतात.
32सदोम आणि गमोरा येथल्याप्रमाणे शत्रूंचे द्राक्षमळे
आणि शेते जमिनदोस्त केली जातील.
33त्यांची द्राक्षे कडू जहर आणि द्राक्षारस सापाच्या
विषारी गरळासमान आहे.
34“परमेश्वर म्हणतो अर्थात ही शिक्षा सध्या मी राखून
ठेवली आहे. माझ्या भांडारात ती बंदिस्त ठेवली आहे.
35अनवधानाने त्यांच्याहातून काही दुष्कृत्ये घडायची
मी वाट पाहात आहे. त्यांनी काही वावगे केले की त्यांचा
संकटकाळ आलाच म्हणून समजा मीत्यांना शिक्षा करीन.’
36“परमेश्वर आपल्या प्रजेची कसोटी पाहील. आपल्या
सेवकांवर दया दाखवील. पण गुलाम तसेच स्वतंत्र यांना
तो सत्ताहीन, असहाय्य करून सोडील.
37परमेश्वर म्हणेल, ‘कोठे आहेत ते खोटे देव? तुम्ही
आश्रयासाठी ज्याच्याकडे धाव घेतलीत तो कुठे आहे
तुमचा ‘दुर्ग’?
38त्या खोट्या दैवतांनी तुमच्या यज्ञातील लोणी तेवढे
गट्ट केले, तुम्ही अर्पण केलेल्यातील द्राक्षारस प्राशन केला.
तेव्हा त्या दैवतांनीच उठून यावं तुमच्या रक्षणाला!
39“तेव्हा आता पाहा, मीच खरा आणि एकमेव देव
आहे. अन्य कोणी नाही. लोकांचा तारक मी आणि मारकही
मीच, त्यांना घायाळ करणारा मी आणि त्यातून बरे
करणाराही मीच. माझ्या समर्थ हातांमधून कोणीही
कोणालाही सोडवू शकत नाही!
40आकाशाकडे बाहू उभारून मी हे वचन देत आहे.
मी सनातन आहे हे सत्य असेल तर या गोष्टी ही खऱ्या
होतील.
41माझी लखलखती तलवार परजून मी शत्रूंना शासन
करीन. ते याच शिक्षेला पात्र आहेत.
42माझे शत्रू ठार होतील. त्यांचा पाडाव होईल ते कैद
होतील. माझ्या बाणांची टोके त्यांच्या रक्ताने माखतील
आणि माझे तलवारीचे पाते शत्रू सैन्याचा शिरच्छेद करील.
43“समस्त राष्ट्रांनो, देवाचा प्रजेचा जयजयकार करा.
कारण हा देव आपल्या सेवकांच्या बाजूने उभा राहतो.
आपल्या सेवकांचा संहार करू पाहणाऱ्यांना शासन करतो.
शत्रूला योग्य अशी सजा देतो. आणि आपली प्रजा आणि
प्रदेश निर्मळ करतो.”

## मोशे गीत शिकवतो

44मोशेने या गीताचे शब्द सर्व इस्राएलांना ऐकू जातील
असे ऐकवले. नूनचा पुत्र यहोशवाही मोशेबरोबर होता.
45ही शिकवण देऊन झाल्यावर 46मोशे लोकांना म्हणाला,
“मी ज्या गोष्टी आज सांगतो त्या लक्षपूर्वक ऐका. आपल्या
मुलाबाळांनाही या नियमशास्त्राचे काटेकोरपणे पालन
करायला सांगा. 47त्यांचे महत्त्व कमी लेखू नका. या
आज्ञांवरच तुमचे जीवन अंवलबूंन आहे. त्यायोगेच तुम्ही
आपल्याला मिळणार असलेल्या त्या यार्देन नदीपलीकडच्या
प्रदेशात दीर्घकाळ वास्तव्य कराल.”

## नबो पर्वतावर मोशे

48त्याच दिवशी परमेश्वर मोशेशी बोलला. तो म्हणाला,
49“मवाब देशात, यरीहो शहराच्या समोर अबारीम
पर्वतांमध्ये जो नबो डोंगर आहे त्या डोंगरावर जा. मी
इस्राएलांना जो कनान देश देणार आहे तो तू तेथून पाहू
शकशील. 50या डोंगरावर तुझे निधन होईल. तुझा भाऊ
अहरोन हा जसा होर डोंगरावर मृत्यू पावल्यावर स्वजनांना
मिळाला तसेच तुझे होईल. 51कारण तुम्ही दोघांनीही
माझ्याविरुद्ध पाप केले आहे. कादेश जवळच्या मरीबा
झऱ्यापाशी तुम्ही होता. सीन वाळवंटातील ही गोष्ट आहे.
तेथे इस्राएलांसमोर तुम्ही माझा मान राखला नाही तसेच
मला पवित्र मानले नाही. 52तेव्हा मी इस्राएलांना देणार
असलेली भूमी तू पाहू शकतोस पण तुझे तेथे जाणे होणार
नाही.”

## मोशेचे आशीर्वाद

33 देवाचा भक्त मोशे याने इस्राएल लोकांना आपल्या
मृत्युपूर्वी असा आशीर्वाद दिला, मोशे म्हणाला.
2“परमेश्वर सीनाय येथून आला. उष:कालच्या
प्रकाशाप्रमाणे तो सेईर वरून आला, पारान डोंगरावरून

प्रकाशला दहाहजार देवदूतांसमवेत आला देवाचे समर्थ
सैनिक * त्याच्याबरोबर होते.

3परमेश्वराचे आपल्या लोकांवर खरंच फार प्रेम आहे.
त्याची पवित्र प्रजा त्याच्या हातात आहे. ते लोक त्याच्या
पायाशी बसून त्याच्याकडून शिकवण घेतात.

4मोशेने आम्हाला नियमशास्त्र दिले. ती शिकवण
याकोबच्या लोकांची ठेव आहे.

5इस्राएलचे सर्व लोक आणि त्यांचे प्रमुख आले तेव्हा
परमेश्वर यशुरुनचा राजा झाला.

## रऊबेनला आशीर्वाद

6“रऊबेनचे लोक मोजकेच असले तरी ते जगोत, त्यांना
मरण न येवो.”

## यहूदासाठी आशीर्वाद

7मोशेने यहूदाला हा आशीर्वाद दिला:

“परमेश्वरा, यहूदा तुझ्याकडे मदत मागेल तेव्हा त्याचे ऐक. त्याच्या लोकांची व त्यांची गाठभेट करून दे. त्याला शक्तिशाली कर आणि शत्रूला पराभूत करण्यात त्याला साहाय्यकारी हो.”

## लेवींना आशीर्वाद

8लेवींविषयी मोशे असे म्हणाला,

“लेवी तुझा खरा अनुयायी आहे. तो थुम्मीम व उरीम
बाळगतो. मस्सा येथे तू लेवींची कसोटी पाहिलीस. मरीबाच्या
झऱ्याजवळ, ते तुझेच आहेत याची तू कसोटी करून
घेतलीस.

9 हे परमेश्वरा, आपल्या कुटुंबियांपेक्षाही त्यांनी तुला
आपले मानले. आपल्या आईवडीलांची कदर केली नाही.
भाऊबंदांना ओळख दाखवली नाही. पोटच्या पोरांची पर्वा
केली नाही. पण तुझ्या आज्ञांचे पालन केले. तुझा पवित्र
करार पाळला.

10 ते तुझे विधी याकोबाला, नियमशास्त्र इस्राएलला
शिकवतील. तुझ्यापुढे धूप जाळतील. तुझ्या वेदीवर होमबली
अर्पण करतील.

11 परमेश्वरा, जे जे लेवींचे आहे त्याला आशीर्वाद दे.
ते जे करतील त्याचा स्वीकार कर. त्यांच्यावर हल्ला
करणाऱ्यांचा संहार कर. त्यांच्या शत्रूंना पार नेस्तनाबूत
करून टाक.”

## बन्यामीनला आशीर्वाद

12बन्यामीन विषयी मोशे म्हणाला, “बन्यामीन
परमेश्वराला प्रिय आहे. तो परमेश्वरापाशी सुरक्षित राहील.
देव त्याचे सदोदित रक्षण करील. आणि परमेश्वराचे
वास्तव्य त्याच्या प्रदेशात राहील.”*

## योसेफला आशीर्वाद

13योसेफा विषयी तो म्हणाला,

“योसेफच्या भूमीवर परमेश्वराची कृपादृष्टी असो.
परमेश्वरा, त्यांच्या देशात आकाशातून पावसाचा वर्षाव
कर आणि त्यांच्या भूमीतून मुबलक पाणी दे.

14 सूर्यामुळे उत्कृष्ट फलित त्यांच्या पदरात पडो. आणि
प्रत्येक महिना आपली उत्कृष्ट फळे त्याला देवो.

15टेकड्या आणि पुरातन पर्वत यांच्यातील अमूल्य जिन्नस
त्यांना मिळोत.

16धरतीचा उत्तमातील उत्तम ठेवा योसेफला मिळो.
योसेफची आपल्या भाऊबंदापासून ताटातूट झाली होती.
तेव्हा जळत्या झुडुपांतून, परमेश्वराचा दुवा त्याला मिळो.

17योसेफ माजलेल्या बैलासारखा आहे. त्याचे दोन पुत्र
बैलाच्या शिंगांप्रमाणे आहेत. ते लोकांवर चढाई करून
त्यांना पृथ्वीच्या सीमेपर्यंत ढकलतील. असे मनश्शेचे हजारो
आणि एफ्राइमचे लाखो आहेत.”

## जबुलून आणि इस्साखार यांना आशीर्वाद

18मोशे जबुलूनबद्दल म्हणाला,

“जबुलूना, बाहेर जाल तेव्हा आनंद करा. इस्साखारा
आपल्या डेऱ्यात आनंदाने राहा.

19 ते लोकांना आपल्या डोंगरावर बोलावतील. तेथे ते
योग्य यज्ञ करतील. समुद्रातील धन आणि वाळूतील खजिना
हस्तगत करतील.”

## गादला आशीर्वाद

20गादविषयी मोशे म्हणाला,

“गादाचा विस्तार करणारा देव धन्य होय. गाद सिंहासारखा
आहे. तो आधी दबा धरुन बसतो. आणि सावजावर
हल्ला करून त्याच्या चिंधड्या करतो.”

21स्वत:साठी तो उत्तम भाग ठेवतो. राजाचा वाटा स्वत:ला
घेतो. लोकांचे प्रमुख त्याच्याकडे येतात. जे परमेश्वराच्या
दृष्टीने न्यायाने, ते तो करतो. इस्राएलच्या लोकांसाठी जे
उचित तेच करतो.’

## दानला आशीर्वाद

22दान विषयी मोशे म्हणाला, “दान म्हणजे सिंहाचा
छावा. तो बाशान मधून झेप घेतो.”

---

**देवाचे समर्थ सैनिक** किंवा “जेथे त्याच्या पलटणी त्याच्या उजव्या बजूला होत्या अशा 10,000 दवदूतांपासून परमेश्वर आला.”

**त्याच्या प्रदेशात राहील.** शब्दश: “आणि तो त्याच्या स्कंधप्रदेशी राहील.” याचा अर्थ कदाचित असा असावा की बन्यामीन व यहुदा प्रांतांच्या सिमेच्या मधोमध यरुशलेमात देवाचे मंदिर असेल.

## नफतालीला आशीर्वाद

23नफताली विषयी मोशेने सांगितले, नफताली, तुला
सर्व चांगल्या गोष्टी “भरभरून मिळतील. तुझ्यावर
परमेश्वराचा आशीर्वाद राहील. गालील तलावाजवळचा
प्रदेश तुला मिळेल.”

## आशेरला आशीर्वाद

24आशेर विषयी मोशने असे सांगतिले, “आशेरला
सर्वात अधिक आशीर्वाद मिळोत. तो आपल्या बांधावांना
प्रिय होवो. त्याचे पाय तेलाने माखलेले राहोत.
25 तुमच्या दरवाजांचे अडसर लोखंडाचे व पितळेचे
असोत. तुमचे सामर्थ्य आयुष्यभर राहो.”

## मोशे देवाची स्तुती करतो

26 “हे यशुरुना! देवासारखा कोणी नाही. तुझ्या
साहाय्यासाठी, मेघांवर आरूढ होऊन तो आपल्या प्रतापाने
आकाशातून तुझ्या मदतीला येतो.
27 देव सनातन आहे. तो तुझे आश्रयस्थान आहे. देवाचे
सामर्थ्य सर्वकाळ चालते!. तो तुझे रक्षण करतो. तुझ्या
शत्रूंना तो तुझ्या प्रदेशातून हुसकावून लावेल. ‘शत्रूंना
नष्ट कर’ असे तो म्हणतो.
28 “म्हणून इस्राएल सुरक्षित राहील. याकोबची विहीर
त्यांच्या मालकीची आहे. धान्याने व द्राक्षारसाने संपन्न
अशी भूमी त्यांना मिळेल. त्या प्रदेशावर भरपूर पाऊस
पडेल.
29इस्राएला, तू आशीर्वादीत आहेस. इतर कोणतेही राष्ट्र
तुझ्यासारखे नाही. परमेश्वराने तुला वाचवले आहे.
भक्कम ढालीप्रमाणे तो तुझे रक्षण करतो. परमेश्वर म्हणजे
तळपती तलवार. शत्रूंना तुझी दहशत वाटेल. त्यांची पवित्र
स्थाने तू तुडवशील!”

## मोशेचा मृत्यू

34 मवाबातील यार्देन खोऱ्यातून पिसगा पर्वताच्या
माथ्यावरील नबो नामक शिखरावर मोशे
चढून गेला. यरीहो समोरील यार्देन पलीकडचा हा भाग.
परमेश्वराने मोशेला गिलादपासून दानपर्यंत सर्व प्रदेश
दाखवला. 2नफताली, एफ्राईम व मनश्शेचा सर्व प्रदेश
दाखवला. पश्चिमेकडल्या भूमध्य समुद्रापर्यंतचा यहूदाचा
सर्व प्रदेश दाखवला.
3तसेच नेगेव आणि सोअरा पासून यरीहो या खजुराच्या
झाडांच्या नगरापर्यंतचे खोरे हे ही दाखवले. 4परमेश्वर
मोशेला म्हणाला, “अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांना
कबूल केलेला हाच तो प्रदेश. त्यांच्या वंशजांना तो द्यायचे
मी त्यांना वचन दिले आहे. तुला मी तो पाहू दिला पण तू
तेथे जाणार नाहीस.”
5मग परमेश्वराचा सेवक मोशे त्या मवाबाच्या प्रदेशात
मरण पावला. असे घडणार हे परमेश्वराने त्याला सांगितले
होतेच. 6मवाबात मोशेचे परमेश्वराने दफन केले.
बेथ-पौरासमोरच्या खोऱ्यात हा भाग आला. पण मोशेची
कबर नेमकी कोठे आहे हे आजतागायत कोणाला कळलेले
नाही. 7मोशे वारला तेव्हा एकशेवीस वर्षाचा होता. तेव्हाही
त्याची तब्बेत ठणठणीत होती व दृष्टी चांगली होती. 8इस्राएल
लोकांनी त्याच्यासाठी तीस दिवस शोक केला. त्या काळात
ते मवाबातील यार्देन खोऱ्यात राहिले.

## नवा नेता यहोशवा

9मोशेने यहोशवावर आपले हात ठेवून त्याला नवा
नेता म्हणून नेमले होते. त्यामुळे नूनचा पुत्र यहोशवा याला
ज्ञानाचा आत्मा प्राप्त झाला होता. म्हणून इस्राएल लोक
त्याच्या आज्ञेत वागू लागले. परमेश्वराने मोशेला आज्ञा
केल्याप्रमाणे त्यांनी आचरण ठेवले.
10इस्राएलला मोशे सारखा दुसरा संदेष्टा मिळाला नाही.
परमेश्वराला मोशेचा प्रत्यक्ष परिचय होता. 11मिसरमध्ये
महान चमत्कार करून दाखवायला परमेश्वराने मोशेला
पाठवले. मिसरमध्ये फारो, त्याचे सेवक व सर्व लोकांनी
हे चमत्कार पाहिले. 12मोशेने करून दाखवले तसे
चमत्कार व आश्चर्यकारक गोष्टी दुसऱ्या कोणा संदेष्ट्याने
करून दाखवल्या नाहीत. इस्राएलच्या सर्व लोकांनी त्याची
ही कृत्ये पाहिली.

# यहोशवा

## देव यहोशवाची नेमणूक करतो

1 मोशे परमेश्वराचा सेवक होता. नूनाचा पुत्र यहोशवा मोशेचा मदतनीस होता. मोशेच्या निधनानंतर परमेश्वर यहोशवाशी बोलला. परमेश्वर म्हणाला, 2"माझा सेवक मोशे मरण पावला आहे आता तू आणि हे लोक यार्देन नदी पलीकडे जा. मी इस्राएल लोकांना देणार असलेल्या प्रदेशात तू गेले पाहिजेस. 3तुम्हाला हा प्रदेश द्यायचे मी मोशेला कबूल केले आहे. तेव्हा ज्याठिकाणी तुमचे पाऊल पडेल ते ठिकाण मी तुम्हाला दिले. 4वाळवंट व लबानोन पासून फरात महानदीपर्यंतचा हित्ती यांचा सर्व प्रदेश तुमचाच होईल. तसेच येथपासून पश्चिमेकडील भूमध्य समुद्रापर्यंत म्हणजेच मावळतीपर्यंतचा देश तुमच्या हद्दीत असेल. 5मोशेला दिली तशीच तुलाही मी साथ देईन. तुला आता कोणी तुझे आयुष्य असेपर्यंत अटकाव करू शकणार नाही. मी तुला सोडणार नाही, तुला अंतर देणार नाही.

6"यहोशवा, तू खंबीर हो, हिंमत धर. या लोकांचे नेतृत्व कर म्हणजे ते तो देश घेऊ शकतील. हा देश त्यांना द्यायचे मी त्यांच्या पूर्वजांना कबूल केले आहे. 7पण आणखी एका गोष्टीबद्दल तू खंबीर आणि समर्थ असले पाहिजेस. माझा सेवक मोशे याने तुला दिलेल्या आज्ञा कटाक्षाने पाळ. त्यांचे तंतोतंत पालन केलेस तर तू हाती घेतलेल्या सर्व कार्यात यशस्वी होशील. 8नियमशास्त्राच्या त्या ग्रंथात लिहिलेल्या सर्व गोष्टी नेहमी लक्षात ठेव. रात्रंदिवस त्या ग्रंथाचे मनन कर म्हणजे तुझ्या हातून त्याचे पालन होईल. असे वागलास तर अंगिकारलेल्या सर्व गोष्टीत सफल होशील. 9खंबीर आणि निर्भय राहण्याची मी तुला आज्ञा केली आहे ना? तेव्हा कचरू नकोस. परमेश्वर तू जेथे जाशील तेथे तुझ्या बरोबर आहे."

## यहोशवा नेतृत्व स्वीकारतो

10तेव्हा यहोशवाने लोकांमधील अधिकाऱ्यांना आज्ञा दिल्या. तो म्हणाला, 11"छावणीतून फिरून लोकांना अन्न वगैरेची तयारी करून सज्ज व्हायला सांगा. तीन दिवसाच्या आत आपल्याला यार्देन नदी पार करायची आहे. परमेश्वर देव देत आहे तो देश ताब्यात घ्यायला आपण निघत आहोत."

12मग रऊबेनी, गादी आणि मनश्शेच्या अर्ध्या कुळांच्या या लोकांशी यहोशवा बोलला. तो म्हणाला, 13"परमेश्वराचा सेवक मोशे याने काय सांगितले त्याची आठवण करा परमेश्वर देव तुम्हाला विसाव्याचे स्थान देणार असल्याचे त्याने सांगितले. परमेश्वर तो देश तुम्हाला देणार आहे. 14यार्देन नदीच्या पूर्वेकडील ही जमीन खरे तर परमेश्वराने तुम्हाला आधीच दिली आहे. तुमच्या बायकामुलांना व जनावरांना येथेच राहू द्या. पण सर्व योध्द्यांनी सशस्त्र होऊन, आपल्या बांधवांबरोबर यार्देन पलीकडे जावे. तुम्ही युध्दाची तयारी करून तो देश घ्यायला त्यांना मदत करावी. 15तुम्हाला परमेश्वराने विसाव्याची जागा दिली आहेच. आता तुमच्या या बांधवांनाही तो ती देईल. पण परमेश्वर देव देणार असलेली ती जमीन त्यांच्या ताब्यात येईपर्यंत त्यांच्या मदतीला थांबा. मग तुम्ही यार्देनच्या पूर्वेकडील या तुमच्या देशात परत येऊ शकता. परमेश्वराचा सेवक मोशे याने तो तुम्हाला दिला आहे."

16तेव्हा लोक म्हणाले, "तू आज्ञा केली आहेस त्याप्रमाणे आम्ही वागू. तू म्हणशील तेथे आम्ही जाऊ. 17मोशेचे म्हणणे ऐकले तसेच तुझेही सर्व ऐकू परमेश्वर देवाकडे फक्त आम्ही एक मागतो. तो मोशे बरोबर राहिला तसाच तुझ्या बरोबरही राहो. 18म्हणजे एखाद्याने तुझी आज्ञा पाळायला नकार दिला किंवा तुझ्याविरूध्द बंड केले तर तो मारला जाईल. तू मात्र बलवान व खंबीर राहा."

## यरीहो मध्ये हेर

2 नूनाचा मुलगा यहोशवा आणि सर्व लोक यांचा तळ शिट्टीम (अकेशिया) येथे होता. तेव्हा कोणाच्याही नकळत यहोशवाने दोन हेर पाठवले. "तुम्ही जाऊन तो देश व विशेषत: यरीहो पाहून या." असे सांगून त्याने त्या दोन हेरांना पाठवले.

त्या प्रमाणे ती माणसे यरीहोला गेली. रहाब नावाच्या एका वेश्येच्या घरी ते जाऊन राहिले.

2यरीहोच्या राजाला कोणीतरी सांगितले की, आज रात्री इस्राएलमधून काही माणसे येथे आपल्या देशातील दुर्बलता शोधण्यासाठी व टेहेळणीसाठी आली आहेत.

3तेव्हा राजाने रहाबला निरोप पाठवला "तुझ्याकडे वस्तीला आलेल्या त्या व्यक्तींना लपवू नकोस त्यांना बाहेर काढ. ते हेर म्हणून आलेले आहेत."

4तिने खरे तर त्या दोघांना लपवले होते. पण ती म्हणाली, "दोघेजण इथे आले होते खरे, पण कुठून आले हे मला

माहीत नाही. 5संध्याकाळी वेशीचे दरवाजे बंद व्हायच्या सुमाराला ते निघून गेले. लगेच पाठलाग केलात तर ते सापडू शकतील." 6(पण प्रत्यक्षात तिने त्यांना घराच्या छपरावर नेऊन अंबाडीच्या गंजीत लपवले होते.)

7त्यांच्या मागावर गेलेली माणसे वेशीच्या बाहेर पडली आणि लोकांनी वेशीचे दरवाजे लावून घेतले. त्या दोघांचा तपास करत ही माणसे यार्देन नदीपर्यंत गेली आणि नदी ओलांडायच्या सर्व जागांचा तपास करू लागली.

8इकडे हे दोन हेर झोपायची तयारी करत होते, पण रहाब वर जाऊन 9त्यांना म्हणाली, "परमेश्वराने हा देश तुम्हाला दिला आहे हे मला माहीत आहे. तुमची आम्हांला भीती वाटते. या देशातील सर्व लोक घाबरून गेले आहेत.
10कारण परमेश्वराने तुम्हाला कशी कशी मदत केली हे आम्ही ऐकले आहे. तुम्ही मिसरदेशामधून बाहेर पडताना त्याने तांबड्या समुद्राचे पाणी कसे आटवले हे आम्ही ऐकून आहोत. यार्देनच्या पूर्वेकडे असलेल्या त्या सीहोन आणि ओग या दोन अमोरी राजांचा नाश तुम्ही कसा केलात हे आमच्या कानावर आले. 11हे सर्व ऐकून आम्ही फार घाबरून गेलो आहोत. आता तुमच्याशी लढण्याचे शौर्य आमच्या कोणातच नाही. कारण वर स्वर्गात आणि खाली पृथ्वीवर तुमच्या परमेश्वर देवाची सत्ता आहे. 12तेव्हा तुम्ही मला एक वचन द्या. मी तुमच्यावर दया दाखवली आणि तुमच्या मदतीला आले. तेव्हा माझ्या कुटुंबाच्या बाबतीत तुम्ही दया दाखवा. तशी परमेश्वराची शपथ घ्या मला तसे वचन द्या. 13माझे वडील, आई, बहीण, भावंडे आणि त्यांचे परिवार आम्हा सर्वांना तुम्ही जिवंत ठेवाल, जिवे मारणार नाही असे वचन द्या."

14याला ते तयार झाले. ते म्हणाले, "तुमच्या करता आम्ही प्राणही देऊ. कोणालाही आम्ही काय करत आहोत हे सांगू नका. परमेश्वराने आमचा देश आम्हाला दिला की आम्ही तुमच्याशी दयाळूपणाने वागू. आमच्यावर विश्वास ठेव."

15या स्त्रीचे घर तटबंदीच्या भिंतीतच बांधलेले होते. तेव्हा तिने दोराच्या साहाय्याने या दोघांना खिडकीतून खाली उतरवले. 16मग ती म्हणाली, "आता पश्चिमेला जाऊन टेकड्यांमध्ये तीन दिवस लपून राहा. म्हणजे राजांच्या तपास करणाऱ्या माणसांच्या हाती तुम्ही लागणार नाही ती माणसे परतली की तुम्ही आपल्या वाटेने जा."

17यावर ते म्हणाले, "आम्ही तुला वचन दिले आहे पण एक गोष्ट कर. नाहीतर दिलेला शब्द पाळायची जबाबदारी आमच्यावर नाही. 18आमच्या सुटकेसाठी तू हा लाल दोर वापरला आहेस. आम्ही येथे परत येऊ तेव्हा खिडकीला हाच लाल दोर बांधून ठेव. तसेच तुझे आई-वडील, भावंडे वगैरे सर्व कुटुंबिय यांना या घरी एकत्र बोलाव. 19या घरात राहणाऱ्या सर्वांचे आम्ही रक्षण करू. त्यांच्यापैकी कोणालाही काही इजा झाल्यास त्याची जबाबदारी आमच्यावर राहील. पण येथून कोणी बाहेर पडल्यास तो मारला जाऊ शकेल मग आम्ही त्याला जबाबदार राहणार नाही. ती त्याचीच चूक असेल. 20तुझ्याशी आम्ही हा करार करत आहोत. पण तू आम्ही काय करत आहोत हे कोणाला सांगितलेस तर आम्ही या करारातून मुक्त होऊ."

21यावर ती म्हणाली, "तुमच्या सांगण्याप्रमाणेच होईल." मग तिने त्यांना निरोप दिला. ते बाहेर पडले त्यानंतर तिने तो लाल दोर खिडकीला बांधला.

22ती माणसे बाहेर पडून टेकड्यांमध्ये गेली. तेथे त्यांनी तीन दिवस मुक्काम केला. त्यांचा तपास करणाऱ्यांनी सर्वत्र शोध केला. व तीन दिवसांनंतर तपास सोडून देऊन ते लोक नगरात परत आले. 23मग हे दोन हेर टेकड्यांमधून बाहेर पडून नदी ओलांडून नूनाचापुत्र यहोशवाकडे आले. आपल्याला समजलेले सर्व काही त्यांनी यहोशवाच्या कानावर घातले. 24व ते म्हणाले, "परमेश्वराने हा प्रदेश खरोखरच आपल्याला दिला आहे. तेथील सर्वांची गाळण उडाली आहे."

## यार्देन नदीकाठचा चमत्कार

3 दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून यहोशवा सर्व इस्राएल लोकांसह अकाशियाहून (अथवा शिट्टिमाहून) निघून यार्देन नदीपर्यंत आला. नदी पार करण्यापूर्वी त्यांनी तेथे मुक्काम केला. 2तीन दिवसांनंतर अधिकारी छावणीतून फिरले. 3त्यांनी लोकांना आज्ञा दिल्या. ते म्हणाले, "लेवी याजक तुमच्या परमेश्वर देवाच्या कराराचा कोश वाहून नेताना तुम्हाला दिसतील तेव्हा त्यांच्या पाठोपाठ जा. 4पण फार जवळून जाऊ नका. त्यांच्या पासून सुमारे एक हजार यार्ड अंतर ठेवा. या पूर्वी कधी या वाटेने तुम्ही गेला नाहीत. तेव्हा ती कळावी म्हणून त्यांच्या मागून जा."

5मग यहोशवा लोकांना म्हणाला, "शुचिर्भूत आणि पवित्र व्हा कारण उद्या परमेश्वर तुमच्यामार्फत अद्भुत गोष्टी करणार आहे."

6मग याजकांना यहोशवाने कराराचा कोश घेऊन सर्वांच्या आधी जायला सांगितले. तेव्हा याजकांनी कोश उचलला व ते सर्वांपुढे चालत निघाले.

7परमेश्वर तेव्हा यहोशवाला म्हणाला, "आज मी सर्व इस्राएल लोकांच्या दृष्टीने तुझी थोरवी वाढविण्यास सुरुवात करीन. म्हणजे मग मोशेला मी साथ दिली तशीच तुलाही देणार आहे हे लोकांना कळेल. 8याजक कराराचा कोश वाहून नेतील. त्यांना सांग यार्देन नदीच्या किनाऱ्यापर्यंत जा आणि प्रवाहात थांबा."

9यहोशवा मग इस्राएल लोकांना म्हणाला, "इकडे या आणि आपल्या परमेश्वराची वचने लक्षपूर्वक ऐका. 10देव आपल्या संगती आहे याची ती साक्ष होय. तो कनानी, हित्ती, हिव्वी, परिज्जी, गिर्गाशी अमोरी व यबूसी या आपल्या शत्रूंचा खात्रीने पराभव करील. त्यांना त्या प्रदेशातून

हुसकावून लावील. [11]तुम्ही यार्देन पार करत असताना या
परमेश्वराच्या कराराचा कोश तुमच्या समोर असेल. [12]आता,
प्रत्येक कुळातील एक याप्रमाणे इस्राएल लोकांच्या बारा
कुळातून बारा जणांची निवड करा. [13]याजक परमेश्वराच्या
कराराचा कोश वाहतील. परमेश्वर म्हणजे साऱ्या विश्वाचा
मालक होय. यार्देन नदीतून तुमच्यापुढे तो कोश नेतील.
जेव्हा त्यांच्या टाचा नदीच्या प्रवाहाला स्पर्श करतील तेव्हा
प्रवाह वाहायचा थांबेल. पाणी आहे त्याठिकाणी थांबून
मागच्या मागे धरणाप्रमाणे अडवले जाईल."

[14]कराराचा कोश वाहणारे याजक निघाले आणि नदी
पार करून जाण्यासाठी सर्व लोकांनी मुक्काम हलवला.
त्या लोकांनी यार्देन नदी पार करायला सुरूवात केली.
[15](सुगीच्या दिवसात यार्देन दुथडी भरून वाहात असते
त्याप्रमाणे तिचा प्रवाह फुगलेला होता.) कोश वाहणारे
याजक नदीकाठी आले. त्यांनी पाण्यात पाऊल टाकले.
[16]आणि लगेच पाणी वाहायचे थांबले. पाण्याची जणू भिंत
होऊन ते मागे अडवले गेले. थेट आदाम (सारातान जवळचे
एक नगर) नगरापर्यंत पाणी सर्वदूर साठून राहिले.
यरीहोजवळ लोकांनी नदी पार केली. [17]तेथील जमीन
कोरडी झाली. याजक परमेश्वराच्या कराराचा कोश घेऊन
नदीच्या मध्यावर आले व थांबले. सर्व इस्राएल लोक
कोरड्या जमिनीवरून यार्देन पलीकडे निघून जाईपर्यंत ते
तिथेच थांबले.

## आठवण म्हणून घेतलेले दगड

4 सर्वजण नदी पार करून गेल्यानंतर परमेश्वर
यहोशवाला म्हणाला, [2]"आता बाराजणांची निवड
कर. प्रत्येक कुळातून एकेक घे. [3]याजक नदीत जेथे उभे
होते त्या जागेवरचे बारा दगड त्यांना निवडायला सांग. ते
बारा दगड उचलून, आज रात्री तुम्ही जेथे मुक्काम कराल
तिथे ठेवा."

[4]यहोशवाने मग प्रत्येक कुळातून एक याप्रमाणे बाराजण
निवडले. त्यांना जवळ बोलावून [5]तो म्हणाला, "तुमच्या
परमेश्वर देवाच्या पवित्र करार कोशासमोर नदीच्या
मध्यभागी जा. तेथून प्रत्येकाने एकएक दगड उचलून
आणा. इस्राएल मधील आपापल्या कुळाचे प्रतीक म्हणून
तो राहील. तेव्हा असा दगड खांद्यावर घेऊन या. [6]हा दगड
म्हणजे एक चिन्ह होय. 'या दगडांचा अर्थ काय?' असे पुढे
तुमची मुले तुम्हाला विचारतील. [7]परमेश्वराच्या कराराचा
पवित्र कोश वाहून नेत असताना नदी दुभंगली व
परमेश्वराने यार्देनेचा प्रवाह रोखला ही गोष्ट इस्राएलांच्या
कायम स्मरणात राहावी म्हणून हे दगड आहेत असे त्यांना
सांगा."

[8]इस्राएल लोकांनी यहोशवाचे ऐकले. त्यांनी नदीच्या
प्रवाहातून इस्राएलाच्या प्रत्येक कुळासाठी एक याप्रमाणे
बारा दगड उचलून आणले. परमेश्वराने यहोशवाला आज्ञा
केली त्याप्रमाणे ते वागले. ते दगड वाहून आणून त्यांनी
आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी नेऊन ठेवले.
[9]परमेश्वराच्या कराराचा पवित्र कोश घेऊन याजक ज्या
ठिकाणी थांबले तेथे यहोशवाने बारा दगड ठेवले. ते
आजही त्याठिकाणी आहेत.

[10]लोकांनी आता काय करावे हे सांगण्याची परमेश्वराने
यहोशवाला आज्ञा दिली. मोशेनेही यहोशवाला याच गोष्टी
सांगितल्या होत्या. हे सर्व होईपर्यंत परमेश्वराच्या कराराचा
कोश घेऊन याजक नदीच्या मध्यभागी उभे राहिले. आणि
लोकांनी भराभर नदी पार केली. [11]लोक नदी ओलांडून
गेल्यावर मग याजक पवित्र करारकोश घेऊन लोकांच्या
पुढे गेले.

[12]रऊबेनी, गादी आणि मनश्शाचा अर्धा वंशातील लोक
मोशेच्या सांगण्याप्रमाणे हत्यारबंद होऊन, नदी ओलांडून
इतरांच्यापुढे गेले. परमेश्वराने द्यायचा कबूल केलेला
प्रदेश मिळवून द्यायला ते उर्वरित इस्राएल लोकांना मदत
करणार होते. [13]सुमारे चाळीस हजार लोक युध्दाच्या
तयारीने परमेश्वरासमोर यरीहोच्या मैदानाकडे चालून गेले.

[14]सर्व इस्राएल लोकांच्या मनात त्या दिवशी परमेश्वराने
यहोशवाबद्दल थोर असे महत्व बिंबवले. तेव्हापासून पुढे
त्याचे आयुष्य असेपर्यंत त्यांनी मोशे प्रमाणेच यहोशवाविषयी
आदर बाळगला.

[15]याजक तो कोश घेऊन नदीच्या पात्रात उभे असताना
परमेश्वर यहोशवाला म्हणाला, [16]"याजकांना नदीतून
बाहेर यायला सांग."

[17]त्याप्रमाणे यहोशवाने याजकांना यार्देनबाहेर येण्याची
आज्ञा केली.

[18]यहोशवाचे ऐकून याजक करारकोश घेऊन नदीच्या
पात्रातून बाहेर आले. याजकांचे पाय जमिनीला लागताच
पाणी पुन्हा पूर्ववत वाहू लागले. नदी पुन्हा पहिल्यासारखी
दुथडी भरून वाहू लागली.

[19]पहिल्या महिन्याच्या दहाव्या दिवशी नदी ओलांडून
लोकांनी यरीहोच्या पूर्वेकडील गिलगाल येथे तळ दिला.
[20]नदीतून उचललेले बारा दगड त्यांनी आणले होतेच. ते
यहोशवाने गिलगाल येथे रचून ठेवले. [21]यहोशवा म्हणाला,
"'या दगडांचे महत्व काय? ते येथे कशासाठी?' असे उद्या
तुमची मुले तुम्हाला विचारतील. [22]तेव्हा त्यांना सांगा,
'यार्देन नदीच्या कोरड्या पात्रातून इस्राएल लोक कसे आले
त्याची ही आठवण आहे. [23]"तेव्हा तुमच्या परमेश्वर
देवाने नदीचा प्रवाह रोखला होता. आम्ही तांबडा समुद्र
ओलांडला त्यावेळी झाले तसेच येथेही लोकांनी नदी
ओलांडेपर्यंत नदीचे पात्र कोरडे होते. तांबडा समुद्रही
परमेश्वराने असाच आटवला होता.' [24]आपला परमेश्वर
अतिशय प्रतापी आहे हे जाणून येथील लोकांना त्याचा
धाक वाटावा म्हणून तुमच्या परमेश्वर देवाने असे केले."

5 तेव्हा इस्राएल लोक नदी ओलांडून येईपर्यंत
परमेश्वराने यार्देनचे पात्र कोरडे ठेवले ही हकीकत
यार्देनच्या पश्चिमेकडील अमोऱ्यांच्या सर्व राजांनी तसेच

भूमध्य समुद्राजवळील सर्व कनानी राजांनी ऐकली. आणि
भीतीने त्यांचा थरकाप उडाला. त्यानंतर इस्राएल लोकांचा
सामना करण्याचे धैर्य त्यांच्यात उरले नाही.

## इस्राएल लोकांची सुंता

2यावेळी परमेश्वराने यहोशवाला सांगितले, "गारेच्या
दगडाच्या सुऱ्या करून इस्राएल लोकांची सुंता कर."
3तेव्हा यहोशवाने गारेच्या सुऱ्या केल्या आणि गिबअथ
हा–अरालोथ येथे इस्राएल लोकांची सुंता केली.
4–7यहोशवाने त्यांची सुंता करण्याचे कारण असे :
इस्राएल लोकांनी मिसर सोडले तेव्हा सर्व लढवय्या पुरुषांची
सुंता झालेली होती. वाळवंटात असताना यापैकी बऱ्याच
जणांनी परमेश्वराचे ऐकले नाही. तेव्हा धान्याने संपन्न
असा हा देश या लोकांना पाहायला मिळणार नाही असे
परमेश्वराने शपथपूर्वक सांगितले हा देश आपल्याला
देण्याचे परमेश्वराने आपल्या पूर्वजांना वचन दिले होते.
पण या लोकांमुळे परमेश्वराने सर्वांना या वाळवंटात चाळीस
वर्षे रखडवले. या काळात ही माणसे मरून जावीत म्हणून
अशा प्रकारे त्या लढण्यास पात्र अशा माणसांचा त्या काळात
मृत्यू झाला आणि त्यांच्या मुलांनी त्यांची जागा घेतली.
पण त्या प्रवासात, वाळवंटात जन्मलेल्या मुलांपैकी
कोणाचीच सुंता झाली नव्हती म्हणून यहोशवाने हे काम
केले. 8यहोशवाने सर्वांची सुंता केल्यावर जखम भरून
येईपर्यंत सर्वजण तेथेच राहिले.

## कनानमधील पहिला वल्हांडणाचा सण

9तेव्हा परमेश्वर यहोशवाला म्हणाला, "तुम्ही मिसरमध्ये
गुलाम होतात. आणि या गोष्टीची तुम्हाला लाज वाटत
असे. पण आज मी हा कलंक धुवून काढला आहे."
म्हणून यहोशवाने त्या जागेचे नामकरण 'गिलगाल' असे
केले. आजही गिलगाल म्हणूनच तो भाग ओळखला जातो.
10यरीहोच्या पठारावर गिलगाल येथे मुक्काम असताना
इस्राएल लोकांनी वल्हांडणाचा सण साजरा केला. ती त्या
महिन्याची चतुर्दशीची संध्याकाळ होती. 11वल्हांडणाच्या
दुसऱ्या दिवशी तेथे त्यांनी पिकलेल्या धान्याचा हुरडा
खाल्ला. तसेच बेखमीर भाकर त्यांनी खाल्ली. 12दुसऱ्या
दिवसापासून स्वर्गातील खास अन्न म्हणजेच मान्ना येणे बंद
झाले. कनानातील भूमीत पिकलेले अन्न लोकांनी
खाल्ल्यानंतर हे झाले त्यावेळेपासून इस्राएलांना स्वर्गातील
खास अन्न मिळाले नाही.
13यरीहोजवळ असताना यहोशवाने समोर पाहिले तर
एक माणूस पुढे उभा असलेला त्याला दिसला. त्या
माणसाच्या हातात तलवार होती. यहोशवाने पुढे होऊन
त्याला विचारले, "तू आमच्या बाजूचा आहेस की शत्रूच्या
गोटातील?" 14त्यावर तो उत्तरला, "मी तुमचा शत्रू नव्हे.
परमेश्वराच्या सैन्याचा सेनापती या नात्याने नुकताच येथे
तुझ्यासमोर आलो आहे."
यावर यहोशवाने त्याला जमिनीवर डोके टेकवून
आदरपूर्वक अभिवादन केले आणि विचारले, "स्वामीची
काय आज्ञा आहे? मी आपला सेवक आहे."
15परमेश्वराच्या सैन्याचा सेनापती म्हणाला, "तुझी
पादत्राणे काढ कारण जेथे तू आत्ता उभा आहेस ती जागा
पवित्र आहे." यहोशवाने त्याचे ऐकले.

## यरीहो काबीज

6 यरीहो शहराच्या वेशी बंद होत्या. इस्राएल लोक जवळ
आल्यामुळे नगरातील लोक घाबरले होते. कोणी
नगराच्या बाहेर पडत नव्हते की आत येत नव्हते.
2तेव्हा परमेश्वर यहोशवाला म्हणाला, "तुमच्या हातून
मी यरीहो शहराचा पराभव करवीन. या शहराचा राजा
आणि सर्व योध्दे याचा तुम्ही पराभव कराल. 3रोज एकदा
सर्व सैन्यासह शहराभोवती फेऱ्या घाला. असे सहा दिवस
करा. 4सात याजकांनी मेंढ्यांच्या शिंगापासून केलेली
रणशिंगे घेऊन पवित्र करार कोशापुढे चालत जायला
सांग. सातव्या दिवशी शहराभोवती सात फेऱ्या घाला.
सातव्या दिवशी याजकांना रणशिंगे फुकीत फेरी घालायला
सांग. 5याजक रणशिंगांचा एकच कर्णकटू ध्वनी करतील
तेव्हा तो ध्वनी ऐकताच लोकांनाही मोठ्याने आरोळ्या
मारायला सांगावे. तसे केल्याने शहराची तटबंदी कोसळून
पडेल आणि लोक सरळ आत घुसतील."
6तेव्हा नूनाचा पुत्र यहोशवाने सर्व याजकांना बोलावले
त्यांना तो म्हणाला, "परमेश्वराचा पवित्र करारकोश घेऊन
चला. तसेच सात याजकांना रणशिंगे घेऊन करार कोशापुढे
चालायला सांगा."
7मग तो लोकांना म्हणाला, "आता निघा आणि शहराला
फेऱ्या घाला. सशस्त्र सैनिकांनी परमेश्वराच्या करार
कोशापुढे चालावे."
8यहोशवाचे सांगून झाल्यावर सात याजकांनी
परमेश्वरापुढे चालायला सुरूवात केली. आपली सात
रणशिंगे फुंकीत ते चालले होते. परमेश्वराचा पवित्र
करारकोश वाहणारे याजक त्यांच्यामागून चालले होते.
9सशस्त्र सैन्य सर्व सतत वेळ याजकांच्या पुढे चालत होते
आणि पवित्र करार कोशामागून पृष्ठरक्षक चालले होते
आणि रणशिंगे फुंकली जात होती. 10यहोशवाने लोकांना
युध्दगर्जना न करण्यास बजावले होते. तो म्हणाला, "आरडा
ओरडा करू नका. मी सांगेपर्यंत एक चकार शब्दही
तोंडातून काढू नका. सांगेन तेव्हाच गर्जना करा."
11मग यहोशवाने याजकांना परमेश्वराचा करारकोश
घेऊन नगराभोवती एक फेरी मारायला लावली. नंतर
सर्वांनी छावणीत परतून ती रात्र काढली.
12यहोशवा पहाटे उठला. याजकांनी परमेश्वराचा पवित्र
करारकोश उचलला. 13सात याजक सात रणशिंगे घेऊन
सज्ज झाले. परमेश्वराच्या पवित्र करारकोशापुढे रणशिंगे
वाजवत ते पुढे चालू लागले. सशस्त्रधारी सैनिक

त्यांच्यापुढून चालू लागले. परमेश्वराच्या पवित्र
कोशामागून पृष्ठ संरक्षक निघाले आणि सर्व सतत वेळ
रणशिंगे फुंकली जात होती. [14]दुसऱ्या दिवशी त्या सर्वांनी
नगराभोवती एकदा फेरी मारली. मग ते छावणीत परतले.
असे त्यांनी ओळीने सहा दिवस केले.

[15]सातव्या दिवशी ते पहाटे उठले. त्यांनी नगराला सात
वेळा फेऱ्या घातल्या. त्यांनी सर्व पूर्वी प्रमाणेच केले,
फक्त फेऱ्या तेवढ्या सात घातल्या. [16]सातव्यांदा नगराभोवती
फेरी घालताना याजकांनी रणशिंगे वाजवली. ती ऐकताच
यहोशवाने आज्ञा केली, "गर्जना करा हे शहर परमेश्वराने
तुम्हाला दिले आहे. [17]हे शहर आणि यातील सर्वकाही
परमेश्वराचे आहे.* फक्त रहाब ही वेश्या आणि तिच्या
घरातील मंडळी यांना धक्का लावू नका. रहाबने आपल्या
दोन हेरांना लपविले तेव्हा तिच्या घरातल्यांना मारू नका.
[18]बाकी सर्व गोष्टींचा नाश करा. लक्षात ठेवा त्यातील
काहीही घेऊ नका. तेथील एखादी वस्तू घेतलीत आणि
तळावर आणलीत तर तुमचा नाश होईल. सर्व इस्राएल
लोकांचाही त्यामुळे नाश होईल. [19]सोन्याचांदीच्या तसेच
तांब्या-लोखंडाच्या सर्व वस्तू परमेश्वराच्या आहेत. त्या
परमेश्वराच्या भांडारात जमा केल्या पहिजेत."

[20]याजकांनी रणशिंगे वाजवली. लोकांनी ती ऐकून
मोठ्याने जयघोष केला. त्याने तटबंदी कोसळली आणि
इस्राएल लोक सरळ नगरात घुसले. त्यांनी नगराचा पाडाव
केला. [21]लोकांनी शहरातील सर्व गोष्टींचा नाश केला.
तरुण आणि वृध्द पुरुष, तरुण आणि वृध्द स्त्रिया, जनावरे,
शेळ्या मेंढ्या, गाढवे अशा सर्व सजीवांची त्यांनी हत्या
केली."

[22]यहोशवा त्या दोन हेरांशी बोलला. तो त्यांना म्हणाला,
"त्या वेश्येच्या घरी जा आणि तिला व तिच्या घरातल्यांना
घेऊन या. तिला तुम्ही तसे वचन दिले आहे तेव्हा त्यांना
तेथून बाहेर काढा."

[23]तेव्हा ते दोन हेर रहाब कडे गेले आणि त्यांनी तिला
तसेच तिचे आईवडील भावंडे, घरातील इतर माणसे यांना
बाहेर काढले इस्राएल लोकांच्या छावणीबाहेर या सर्वांना
त्यांनी सुरक्षित जागी ठेवले.

[24]मग इस्राएल लोकांनी त्या नगराला आग लावली.
फक्त सोने, चांदी, तांबे व लोखंड यांच्या वस्तू
परमेश्वराप्रीत्यर्थ वगळून सर्व काही भस्मसात केले आणि
त्या वस्तू परमेश्वराच्या खजिन्यात जमा केल्या.
[25]यहोशवाने रहाब तिचे कुटुंबीय व तिच्या बरोबर असलेली
इतर माणसे यांना संरक्षण दिले. कारण यरीहोला त्याने
पाठवलेल्या दोन हेरांना तिने मदत केली होती. रहाबच्या
कुटुंबाचे वास्तव्य आजही इस्राएल लोकांमध्ये आहे.

[26]यावेळी यहोशवाने एक महत्वाची शपथ घातली. तो
म्हणाला:

"जो कोणी यरीहो पुन्हा उभारण्याचा प्रयत्न करील
त्याला परमेश्वराचा शाप भोगावा लागेल. जो या नगराची
पायाभरणी करेल त्याचा ज्येष्ठ पुत्र मरण पावेल. जो
याच्या वेशी उभारील त्याचा कनिष्ठ पुत्र मरेल."

[27]याप्रमाणे परमेश्वराने यहोशवाला साथ दिली आणि
यहोशवाची सर्व देशात ख्याती पसरली.

## आखान चे पातक

7 पण इस्राएल लोकांनी परमेश्वराचे ऐकले नाही.
यहूदाच्या वंशातील झिम्रीचा नातू व कर्मीचा मुलगा
आखान याने काही वस्तू स्वत:साठी ठेवून घेतल्या. त्या
नष्ट करून टाकल्या नाहीत. तेव्हा परमेश्वराचा इस्राएल
लोकांवर कोप झाला.

[2]यरीहोचा पाडाव केल्यावर यहोशवाने काही माणसे
आय येथे पाठवली. आय नगर बेथेलच्या पूर्वेला बेथ-आवेन
जवळ होते. तेथे जाऊन त्या प्रांतातील कच्चे दुवे हेरायला
त्याने त्यांना सांगितले. त्याप्रमाणे हेर तिकडे गेले.

[3]नंतर ते यहोशवाकडे परतून आले. ते म्हणाले, "आय
हा दुर्बल प्रांत आहे. तेव्हा सर्वांनी तेथे जाण्याची गरज नाही
दोन-तीन हजार माणसे तेथे लढायला पुरेशी होतील. सर्व
सैन्य लागणार नाही. कारण ते लोक थोडे आहेत."

[4-5]तेव्हा सुमारे तीन हजार माणसे आय येथे गेली.
आयच्या लोकांनी इस्राएलांची सुमारे छत्तीस माणसे ठार
केली. आणि इस्राएल लोकांनी पळ काढला. त्यांचा आयच्या
लोकांनी गावाच्या वेशीपासून ते दगडाच्या खाणीपर्यंत
पाठलाग केला. आयच्या लोकांनी त्यांना चांगले चोपून
काढले.

इस्राएल लोकांनी हे पाहिले तेव्हा घाबरून त्यांच्या तोंडचे
पाणी पळाले. [6]यहोशवाने हे ऐकले तेव्हा दु:खाने त्याने
आपली वस्त्रे फाडली. पवित्र करार कोशापुढे त्याने
लोटांगण घातले. संध्याकाळपर्यंत तो तसाच पडून राहिला.
इस्राएलच्या प्रमुखांनीही तसेच केले. दु:खाने, त्यांनीही
आपल्या डोक्यात माती घालून घेतली.

[7]यहोशवा म्हणाला, "हे प्रभू परमेश्वरा आम्हाला तू
यार्देन पार करून आणलेस. अमोऱ्यांच्या हातून आमचा
नाश व्हायला का आम्हाला येथपर्यंत आणलेस? नदीच्या
त्या तीरावरच आम्ही सुखासमाधानाने राहिलो असतो.
[8]परमेश्वरा मी माझ्या जिवाची शपथ घेतो. मला आता
बोलण्यासारखे काही उरले नाही. इस्राएल शत्रूला शरण
गेला आहे. [9]"आता कनानी तसेच या देशातील इतर
लोक हे ऐकतील. आणि आमच्यावर हल्ला करून
आम्हाला ठार करतील. तेव्हा आपले नाव राखण्यासाठी
तू काय करणार आहेस?"

---

**परमेश्वराचे आहे** ह्याचा प्रचलित अर्थ असा आहे की मंदिराच्या खजिन्यात ठेवलेल्या वस्तू किंवा दुसऱ्या लोकांनी वापरू नयेत म्हणून नाश करण्यात आलेल्या वस्तू.

10परमेश्वर यहोशवाला म्हणाला, “तू असा जमिनीवर
पालथा का पडला आहेस? ऊठ उभा राहा. 11इस्राएल
लोकांनी पाप केले आहे. त्यांनी आज्ञाभंग करून माझ्याशी
केलेला करार मोडला आहे. मी नष्ट करून टाकायला
सांगितलेल्या वस्तूपैकी काही त्यांनी ठेवून घेतल्या आहेत.
त्यांनी चोरी केली आहे. खोटे बोलून त्यांनी त्या स्वत:साठी
ठेवल्या आहेत. 12म्हणून इस्राएलाच्या सैन्याने युध्दात पाठ
फिरवून पळ काढला. त्यांच्या हातून चूक घडल्यामुळे ते
असे वागले. त्यांचा संहारच केला पाहिजे. मी आता तुम्हाला
मदत करणार नाही. मी सांगितले ते सर्व नष्ट करून
टाकल्याशिवाय मी तुम्हाला साथ देणार नाही.

13आता जा आणि लोकांना शुध्द कर. त्यांना सांग
‘शुध्द व्हा. उद्याची तयारी करा. नष्ट करायला सांगितलेल्या
वस्तू काही जणांनी ठेवून घेतल्या आहेत असे इस्राएलच्या
परमेश्वर देवाचे म्हणणे आहे. त्या वस्तूंचा त्याग
केल्याखेरीज तुम्हाला शत्रूचा पराभव करता येणार नाही.”

14“‘उद्या सकाळी सर्वजण परमेश्वरासमोर उभे राहा.
सर्व वंशांच्या लोकांनी परमेश्वरासमोर यावे. मग परमेश्वर
एका वंशातील लोकांना निवडील. तेव्हा त्यांनीच फक्त
पुढे यावे त्यातील एका कुळाची निवड करील. तेव्हा फक्त
त्या कुळातील लोकांनी परमेश्वराला सामोरे जावे. मग
त्या कुळातील प्रत्येक कुटुंबावर परमेश्वर दृष्टिक्षेप टाकील
आणि एका कुटुंबाला निवडील. मग त्या कुटुंबातील प्रत्येक
व्यक्तीकडे परमेश्वर पाहील. 15नष्ट करून टाकायला
पाहिजे होती अशी वस्तू त्याच्याकडे सापडल्यास तो पकडला
जाईल. तेव्हा त्या माणसाला जाळून टाकावे. तसेच
त्याच्याकडे असलेले सर्व काही त्याच्याबरोबर आगीत
टाकावे. या माणसाने परमेश्वराचा करार मोडून इस्राएल
लोकांना कलंक लावणारी गोष्ट केली आहे.’”

16दुसऱ्या दिवशी पहाटे यहोशवाने सर्व इस्राएल लोकांना
परमेश्वरासमोर आणले. सर्व वंशांचे लोक परमेश्वरापुढे
उभे राहिले. परमेश्वराने यहूदाच्या वंशाची निवड केली.
17तेव्हा यहूदाचे एकेक कूळ परमेश्वरापुढे हजर झाले.
त्यातून परमेश्वराने जेरहाचे कूळ निवडले. जेरहाच्या
कुळातील सर्व कुटुंबे परमेश्वरापुढे आली तेव्हा झिम्रीचे
कुटुंब पकडले गेले. 18मग यहोशवाने या कुटुंबातील सर्व
पुरुषांना परमेश्वरापुढे हजर व्हायला सांगितले.
परमेश्वराने कर्मीचा मुलगा आखान याला पकडले (कर्मी
झिम्रीचा मुलगा आणि झिम्री जेरहाचा)

19मग यहोशवा आखानला म्हणाला, “मुला, आता प्रार्थना
कर. इस्राएलांच्या परमेश्वर देवाचा मान राखून आपली
पापे त्याच्यापुढे कबूल कर. आता काहीही लपवून न
ठेवता तू काय केलेस ते मला सांग.”

20आखान म्हणाला, “हे खरे आहे. इस्राएलच्या परमेश्वर
देवाविरुद्ध वागून मी पाप केले आहे. मी केले ते असे.
21यरीहो नगर आणि त्यातील सर्व मालमत्ता काबीज
केल्यावर मी एक सुंदर शिनारी (बबिलोनियन) अंगरखा,
अंदाजे पाच पौंड चांदी आणि जवळपास एक पौंड सोन्याची
वीट पाहिली. त्याचा मला मोह पडला आणि त्या वस्तू मी
घेतल्या. माझ्या तंबूत या गोष्टी जमिनीत पुरून ठेवलेल्या
तुम्हाला सापडतील. चांदी अंगरख्याखाली दडवलेली आहे.”

22तेव्हा यहोशवाने काही माणसे तंबूकडे पाठवली. ती
धावतच तेथे गेली आणि त्यांना तंबूत लपवून ठेवलेल्या
या वस्तू मिळाल्या. चांदी अंगरख्याच्या खाली होती. 23त्या
माणसांनी या वस्तू तेथून बाहेर काढल्या त्या यहोशवा व
सर्व इस्राएल लोक ह्यांच्यापर्यंत आणून परमेश्वरापुढे
ठेवल्या.

24नंतर यहोशवा व समस्त इस्राएल लोकांनी जेरहचा
मुलगा आखान याला आखोर खोऱ्यात नेले. चांदी, सोने,
अंगरखा, आखानची मुलेबाळे, जनावरे, गाढवे,
शेळ्यामेंढ्या, त्याचा तंबू आणि होती नव्हती ती चीजवस्तू
हे ही नेले. 25तेव्हा यहोशवा म्हणाला, “तुझ्यामुळे आम्हाला
फार त्रास झाला आहे. पण आता परमेश्वरच तुला संकटात
टाकील” मग सर्व लोकांनी आखान आणि त्याचे कुटुंबीय
यांच्यावर ते मरेपर्यंत दगडांचा मारा केला. मग त्यांना सर्व
चीजवस्तूसह जाळून टाकले. 26त्यानंतर आखानाच्या
जळून गेलेल्या शरीरावर त्यांनी दगडांची रास रचली. हे
दगड आज ही तेथे आहेत. अशा तऱ्हेने परमेश्वराने
आखानावर आपत्ती आणली म्हणूनच त्या ठिकाणाचे नाव
आखोर ची दरी असे पडले. यानंतर परमेश्वराचा कोप
झाला नाही.

## आय नगराचा संहार

8 मग परमेश्वर यहोशवाला म्हणाला, “भिऊ नको,
हात पाय गाळू नको. सर्व योध्द्यांना घेऊन आय वर
चाल करून जा. आयच्या राजाचा पराभव करायला मी
मदत करीन. तेथील प्रजा, ते नगर आणि ती भूमी मी
तुमच्या हाती देईन. 2यरीहो नगर आणि त्यांचा राजा यांचा
तुम्ही पाडाव केलात तसाच आय नगराचा आणि राजाचाही
कराल. फक्त यावेळी सर्व संपत्तीची लूट तुम्ही स्वत:साठी
ठेवू शकता. येथील गुरेढोरे व संपत्ती तुम्ही आपापसात
वाटून घ्या. आता आपल्या सैन्याला नगराच्या पिछाडीला
दबा धरून बसण्यास सांग.”

3तेव्हा यहोशवाने सर्व सैन्यासह आय नगराकडे मोहरा
वळवला. आपल्या सैन्यातील तीस हजार उत्कृष्ट योध्द्यांची
निवड केली व त्यांना रातोरात पाठवले. 4त्यांना आज्ञा
केली, “मी काय सांगतो ते लक्षपूर्वक ऐका. नगराच्या
मागील बाजूस दबा धरून बसा. हल्ल्याच्या योग्य वेळेची
वाट पाहा. फार लांब जाऊ नका. टेहेळणी करत तयारीत
राहा. 5नगरावर हल्ला करायला लोकांना घेऊन मी पुढे
जाईन. नगरातील लोक आमचा सामना करायला समोर
येतील. तेव्हा आम्ही माघार घेऊन मागील वेळेप्रमाणे पळत
सुटू. 6हे लोक आमचा पाठलाग करत नगरापासून दूर
येतील. पूर्वीप्रमाणेच आपल्याला भिऊन हे पळ काढत

आहेत असे त्यांना वाटेल (त्यांचा हा समज कायम ठेवायला)
आम्ही पळत सुटू. [7]तेव्हा तुम्ही आपल्या लपण्याच्या जागा
सोडून बाहेर या आणि नगराचा ताबा घ्या. तुमचा देव
परमेश्वर तुम्हाला जिंकण्याचे सामर्थ्य देईल.

[8]"परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे वागा. माझ्याकडे लक्ष
असू द्या नगरावर हल्ला करण्याची मी आज्ञा देईन. तेव्हा
नगर काबीज करून त्याला आग लावा."

[9]मग यहोशवाने त्यांना रवाना केले. ते आयच्या पश्चिमेस
बेथेल व आय यांच्या दरम्यान एका जागी दबा धरून
बसले. आणि यहोशवा आपल्या इतर माणसांबरोबर त्या
रात्री राहिला.

[10]दुसऱ्या दिवशी पहाटे यहोशवाने सर्व लोकांना एकत्र
आणले यहोशवा व इस्राएलाच्या पुढाऱ्यांनी या लोकांसह
आय कडे मोर्चा वळवला. [11]सर्व सैन्य आयवर चाल
करून गेले. नगराजवळ पोचल्यावर त्यांनी उत्तरेस तळ
दिला. हे सैन्य आणि आय यांच्यामध्ये एक दरी होती.

[12]यहोशवाने मग जवळजवळ पाच हजार माणसांना
आयच्या पश्चिमेस बेथेल व आय यांच्या मध्ये दबा धरून
बसण्यास पाठवले. [13]अशाप्रकारे त्याने आपल्या सैन्याला
सज्ज ठेवले होते. मुख्य छावणी शहराच्या उत्तरेला होती.
इतर माणसे पश्चिमेला दबा धरून बसली होती. रात्री
यहोशवा त्या दरीत राहिला.

[14]आयच्या राजाने इस्राएलाचे सैन्य पाहिले तेव्हा तो व
नगरातील माणसे इस्राएलांशी युध्द करण्यास लगबगीने
निघाली. राजा नगराच्या पूर्वेला गेला. त्यामुळे नगराच्या
पिछाडीला लपलेले सैन्य त्याला दिसले नाही.

[15]आयच्या सैन्यापुढे आपली पीछेहाट होते आहे असे
यहोशवा व इस्राएलच्या लोकांनी भासवले आणि ते
वाळवंटाच्या दिशेला पूर्वेकडे पळत सुटले. [16]आयच्या
सैन्याने आरडाओरडा करत त्यांचा पाठलाग करायला
सुरूवात केली. नगरातील सर्व लोक यात सामील झाले.
नगरतील सगळे लोक नगर सोडून बाहेर पडले. [17]आय
आणि बेथेल मधील एकूणएक माणसे इस्राएल सैन्याच्या
पाठलागावर गेली. नगर मोकळे झाले. त्याचे रक्षण
करायला कोणी उरला नाही.

[18]तेव्हा परमेश्वर यहोशवाला म्हणाला, "आता तुझ्या
हातातील शस्त्र आय नगरावर उगार. मी हे नगर तुझ्या
हवाली करत आहे." तेव्हा यहोशवाने आयवर आपली
बरची उगारली. [19]दबा धरून बसलेल्या इस्राएलांनी हे
पाहताच आपल्या जागा सोडल्या आणि ते तात्काळ नगरावर
चालून गेले. नगरात शिरून त्यांनी त्याचा ताबा घेतला.
लगेचच त्यांनी नगरात जाळपोळ सुरू केली.

[20]आयचे लोक मागे वळून पाहतात तो त्यांना नगर
जळताना दिसले. धूर आकाशात चढत होता. हे पाहून
त्यांचे अवसान गळाले. इस्राएलांचा पाठलाग त्यांनी सोडून
दिला. त्याबरोबर इस्राएल लोकांनी धावायचे थांबले. माघारे
फिरून ते आयच्या लोकांबर तुटून पडले. आता आयच्या
लोकांना पळता भुई थोडी झाली. [21]आपल्या माणसांनी
नगराचा ताबा घेतला आहे आणि नगरातून धूर निघत
आहे हे पाहताच यहोशवाने व इस्राएल लोकांनी मागे
वळून आयच्या लोकांवर हल्ला केला. [22]ते पाहून लपून
राहिलेली आणखी माणसे त्यांच्यावर चाल करू आली.
अशाप्रकारे दोन्ही बाजूंनी चाल करून येऊन इस्राएलांनी
आयच्या लोकांची चांगलीच कोंडी केली. त्यांनी आयचा
पराभव केला. आय वासियांपैकी एकहीजण जिवंत राहिला
नाही की निसटून जाऊ शकला नाही. [23]आयच्या राजाला
मात्र जीवदान मिळाले. त्याला पकडून यहोशवापुढे हजर
करण्यात आले.

## युध्दाचे सारांशवर्णन

[24]या लढाईत इस्राएलाच्या सैन्याने आयच्या लोकांचा
मोकळ्या मैदानात तसेच वाळवंटात पाठलाग करत त्या
साऱ्यांची कत्तल केली. नंतर ते नगरात परतले व तेथे
उरलेल्या सर्वांची हत्या केली. [25]अशाप्रकारे आय मधील
सर्वजण त्यादिवशी मरण पावले. बायकापुरुष मिळून ती
बारा हजार माणसे होती. [26]हे नगर उध्वस्त करायचा
इशारा म्हणून यहोशवाने आपली बरची आयवर उगारलेली
होती आणि सर्वांचा संहार होईपर्यंत त्याने ती तशीच
उगारलेली ठेवली. [27]शहरातील गुरेढोरे आणि इतर
मालमत्ता इस्राएल लोकांनी स्वत:साठी ठेवली. परमेश्वराने
यहोशवाला आज्ञा दिल्या तेव्हा यासाठी अनुमती दिलेलीच
होती.

[28]यहोशवाने नंतर हे शहर बेचिराख करून टाकले.
तेथे निव्वळ दगडधोंड्यांची रास उरली. आजही तेथे तशीच
स्थिती आहे. [29]आयच्या राजाला यहोशवाने एका झाडावर
फाशी दिले आणि संध्याकाळपर्यंत त्याचे प्रेत तसेच तेथे
टांगत ठेवले. सूर्यास्ताच्या वेळी त्याने ते लोकांना
उतरवायला सांगितले. त्यांनी ते झाडावरून काढून
नगराच्या वेशीपाशी टाकले. व तो मृतदेह दगडाधोंड्यांनी
झाकून टाकला. तीही रास आज तशीच आहे.

## आशीर्वाद आणि शाप यांचे वाचन

[30]मग यहोशवाने एबाल पर्वतावर इस्राएल लोकांच्या
परमेश्वर देवासाठी वेदी बांधली. [31]परमेश्वराचा सेवक
मोशे याने वेद्या कशा बांधाव्यात हे इस्राएल लोकांना
सांगितले होते. तेव्हा, मोशेच्या नियमशास्त्रात लिहून ठेवल्या
बरहुकूम यहोशवाने ती बांधली. त्यासाठी कोणत्याही
हत्याराचा स्पर्श न झालेले अखंड पाषाण वापरले. अशा
वेदीवर त्यांनी होमार्पणे तसेच शांत्यार्पणे वाहिली.

[32]त्याठिकाणी समस्त इस्राएल लोकांसाठी म्हणून
यहोशवाने मोशेच्या नियमशास्त्राची पाषाणांवर नक्कल
करून ठेवली. [33]यावेळी सर्व वडीलधारी माणसे, अंमलदार,
न्यायाधीश व इतर इस्राएल लोक पवित्र करारकोशाभोवती
उभे होते. हा परमेश्वराचा पवित्र करारकोश वाहून नेणाऱ्या

लेवी याजकांसमोर ते उभे होते. उपस्थितात मूळचे इस्राएल लोक तसेच परकेही होते. त्यांच्यापैकी निम्मे एबाल पर्वतासमोर तर निम्मे गरिज्जीम पर्वतासमोर उभे राहिले. परमेश्वरचा सेवक मोशे याने आशीर्वादाच्या वाचनासाठी त्यांना तसे उभे राहायला सांगितले होते.

34मग यहोशवाने नियमशास्त्रातील आशीर्वचने आणि शापवाणी वाचून दाखवली त्यात एका शब्दाचाही फेरफार केला नाही. 35स्त्रिया, मुले, परकीय यांच्यासह सर्व इस्राएल लोक तेथे हजर होते. त्यांना मोशेच्या सर्व आज्ञा यहोशवाने वाचून दाखवल्या.

### गिबोनाच्या रहिवाश्यांचे यहोशवाशी कपट

9 यार्देन नदीच्या पश्चिमेकडील हित्ती, अमोरी, कनानी, हिव्वी तसेच यबूसी लोकांच्या राजांनी या आयवरील चढाई विषयी ऐकले. या लोकांची राज्ये डोंगराळ भागात तसेच मैदानी प्रदेशात थेट लबानोनपर्यंत भूमध्य समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्याने पसरली होती. 2हे सर्व राजे एक झाले आणि त्यांनी यहोशवा व इस्राएल लोक यांच्यावर चढाई करण्याचा बेत केला.

3यरीहो आणि आय या नगरांचा पाडाव यहोशवाने कसा केला हे गिबोनाच्या लोकांनी ऐकले. 4तेव्हा त्यांनी इस्राएलांना चकवण्याचा डाव आखला. त्यांची युक्ती अशी होती, प्रथम त्यांनी द्राक्षरसाचे जुने, झिजलेले, चामडी बुधले* घेतले आणि ते गाढवाच्या पाठीवर लादले. आपण फार दुरून आलो आहोत असे भासवायला जुनी गोणपाटेही गाढवांवर लादली. 5स्वत: झिजलेले जोडे आणि फाटकेतुटके कपडे घातले. विटलेल्या वाळलेल्या भाकरीची शिदोरी बांधून घेतली. अशाप्रकारे ते फार दुरून मजल दरमजल करत आल्यासारखे दिसू लागले. 6मग ते गिलगाल जवळच्या इस्राएल लोकांच्या छावणीपाशी आले. तेथे जाऊन ते यहोशवा आणि इस्राएल लोकांना म्हणाले, “आम्ही दूर देशाहून आलो आहोत आणि आम्हाला तुमच्याशी शांततेच्या कराराची बोलणी करायची आहेत.”

7त्यावर इस्राएल लोक या हिव्वी लोकांना म्हणाले, “कदाचित् तुम्ही खोटे बोलत असाल. आमच्या जवळपासच राहणारे असाल. तुम्ही कोण कुठले याची खातरजमा केल्याखेरीच आम्ही तुमच्याशी शांतीचा करार करणार नाही.”

8तेव्हा यहोशवाला हिव्वी म्हणाले, “आम्ही तुमचे दास आहोत”

पण यहोशवाने विचारले, “तुम्ही कोण? कोठून आलात?”

9त्या लोकांनी सांगितले, “आम्ही तुमचे दास आहोत. तुमच्या परमेश्वर देवाच्या सामर्थ्याची कीर्ती ऐकून आम्ही फार दूरवरून आलो आहोत. त्याने ज्या गोष्टी केल्या त्याबद्दल आम्ही ऐकले. मिसरमध्ये त्याने जे जे केले ते आमच्या ऐकण्यांत आले. 10हेशबोनचा राजा सीहोन आणि अष्टारोथ मधील बाशानचा राजा ओग, या यार्देनच्या पूर्वेकडील अमोऱ्यांच्या दोन राजांचा त्याने पराभव केला हे ही आम्हाला माहीत आहे. 11तेव्हा आमच्या प्रदेशातील रहिवासी आणि आमचे पुढारी म्हणाले, ‘प्रवासासाठी पुरेशी शिदोरी घ्या आणि इस्राएल लोकांची भेट घ्या त्यांना म्हणावे, “आम्ही तुमचे दास असून आमच्याबरोबर शांततेचा करार करा.”’

12“ही आमची भाकर बघा. आम्ही घरून निघालो तेव्हा ती ताजी आणि नरम होती. आता कशी विटलेली आणि वाळून गेली आहे ते तुम्ही बघतच आहा. 13“हे द्राक्षारसाचे बुधले पाहा. निघालो तेव्हा ते नवेकोरे आणि द्राक्षारसाने भरलेले होते. आता ते तडकलेले आणि जुने झाले आहेत. पाहा आमचे कपडे आणि जोडे एवढ्या लांबच्या प्रवासाने त्यांची कशी वाट लागली आहे.”

14हे लोक सांगत आहेत त्याचा खरेपणा पडताळून बघण्यासाठी इस्राएल लोकांनी भाकर चाखून बधितली पण परमेश्वराचा सल्ला घेतला नाही. 15यहोशवाने त्यांच्याशी शांततेचा करार करण्याचे मान्य केले, त्यांना जीवदान दिले. यहोशवाने दिलेल्या वचनाशी इस्राएलांची वडीलधारी मंडळीही सहमत झाली.

16ही माणसे आपल्या छावणीजवळच राहात असल्याचा इस्राएल लोकांना तीन दिवसांनंतर पत्ता लागला. 17तेव्हा इस्राएल लोक या लोकांच्या नगराला निघाले. गिबोन, कफीरा, बैराथ व किर्याथ-यारीम या त्यांच्या नगरांस ते तिसऱ्या दिवशी पोचले. 18पण या लोकांशी शांततेचा करार केलेला असल्यामुळे इस्राएली सैन्याने या नगरावर हल्ला केला नाही. तसे त्यांनी आपल्या परमेश्वर देवासमोर या लोकांना वचन दिले होते.

ज्या वडीलधाऱ्या पंच मंडळीनी हा करार केला त्यांच्याविरुद्ध इतर लोकांनी कुरकूर केली. 19पण पंच म्हणाले, “आम्ही खुद्द इस्राएलाच्या परमेश्वर देवासमोर त्यांना आपला शब्द दिला आहे. तेव्हा आता त्यांच्याविरुध्द लढता येणार नाही. 20आता आपल्याला त्यांना धक्का लावता येणार नाही त्यांना जीवदान दिले पाहिजे. आता त्यांना इजा केल्यास, त्यांना आपण दिलेला शब्द मोडला म्हणून देवाचा आपल्यावर कोप होईल. 21त्यांना जिवंत राहू द्या, पण आपले दास म्हणून ते आपले लाकूडतोडे, पाणक्ये म्हणून राहतील.” अशातऱ्हेने पंचांनी त्या लोकांना दिलेले शांततेचे अभिवचन पाळले.

22यहोशवाने गिबोनच्या लोकांना बोलावले व तो त्यांना म्हणाला, “तुम्ही आमच्याशी खोटे का बोललात? तुमचा प्रदेश तर आमच्या छावणीच्या जवळच आहे. पण आपण दूरदेशाहून आल्याचे तुम्ही आम्हाला सांगितलेत. 23“तेव्हा आता तुम्हाला अडचणींना तोड द्यावे लागेल. तुम्हा सर्वांना

---

**द्राक्षरसाचे ... बुधले** द्राक्षारस ठेवण्यासाठी जनावराच्या कातड्यापासून बनविलेला बुधला.

आमचे दास व्हावे लागेल. तुम्हाला देवाच्या घरासाठी
लाकूडतोडे व पाणक्ये म्हणून काम करावे लागेल."
24यावर गिबोनचे लोक म्हणाले, "तुम्ही आम्हाला ठार
कराल या भीतीने आम्ही खोटे बोललो. आम्ही असे ऐकले
की हा देश तुम्हाला द्यायची परमेश्वराने मोशे या आपल्या
सेवकाला आज्ञा केली आहे, तसेच येथे राहाणाऱ्या सर्वांना
ठार करायला ही देवाने तुम्हाला सांगितले आहे. म्हणून
आम्ही खोटे बोललो. 25आता आम्ही तुमचे दास आहोत.
आमच्याबाबतीत तुम्हाला योग्य वाटेल ते करा."
26अशाप्रकारे गिबोनचे लोक दास झाले पण यहोशवाने
त्यांना जीवदान दिले. इस्राएल लोकांपासून त्यांना वाचवले.
27यहोशवाने त्यांना इस्राएल लोकांचे दास केले. लाकडे
फोडणे आणि पाणी भरणे ही कामे ते इस्राएल लोकांसाठी
आणि परमेश्वराच्या वेदीसाठी करत राहिले. परमेश्वर
जे ठिकाण वेदीसाठी निवडील तेथे तेथे त्यांनी हे केले.
आजतागायत ते तसेच दास आहेत.

## सूर्य स्थिर राहिला तो दिवस

10 त्यावेळी यरुशलेमचा राजा अदोनीसदेक हा होता.
यहोशवाने आय चा पाडाव करुन ते पूर्ण उध्वस्त
केल्याचे त्याने ऐकले. यरीहो आणि त्याच्या राजाचेही
असेच झाल्याचे त्याला समजले. गिबोनच्या रहिवाश्यांनी
इस्राएलांशी शांतीचा करार केल्याचे ही त्याच्या कानावर
आले. आणि ते तर यरुशलेमच्या जवळच होते. 2तेव्हा
अदोनीसदेक व त्याचे लोक फार घाबरले. कारण गिबोन
काही आयसारखे छोटे नगर नव्हते. ते एखाद्या राजधानीचे
असावे तसे मोठे शहर * होते. तेथील लोक चांगले लढवय्ये
होते. साहाजिकच राजा अदोनीसदेक घाबरला. 3त्याने
हेब्रोनचा राजा होहाम, यर्मूथचा राजा पिराम, लाखीशचा
राजा याफीय आणि एग्लोनचा राजा दबीर यांना निरोप
पाठवला, 4"गिबोन ने यहोशवा व इस्राएल लोक यांच्याशी
शांतीचा करार केला आहे. तेव्हा गिबोनवर हल्ला
करण्यासाठी माझ्या बरोबर चला आणि मला मदत करा,"
अशी मदतीची याचना त्याने केली.
5तेव्हा यरुशलेमचा राजा, हेब्रोनचा राजा, यर्मूथचा राजा,
लाखीशचा राजा तसेच एग्लोनचा राजा या अमोऱ्यांच्या
पाच राजांनी आघाडी केली आणि आपले सैन्य घेऊन ते
गिबोनवर चढाई करून गेले. सैन्याने त्या शहराला वेढा
दिला आणि लढाईला सुरुवात केली.
6ते पाहून गिबोनच्या लोकांनी गिलगालच्या छावणीत
यहोशवाला निरोप पाठवला, "आम्हा दासांना एकटे पडू
देऊ नका आमच्या मदतीला या. विनाविलंब आमचे रक्षण
करा. डोंगराळ प्रदेशातील सर्व अमोरी राजांनी एकत्र येऊन
आमच्यावर हल्ला केला आहे."
7तेव्हा यहोशवा आपल्या सर्व सैन्यानिशी गिलगालमधून
बाहेर पडला. त्याच्याबरोबर खंदे लढवय्ये होते. 8परमेश्वर
यहोशवाला म्हणाला, "या सैन्याची भीती बाळगू नका.
त्यांचा पराभव करण्याची मी तुम्हाला आनुज्ञा देत आहे.
यांच्यापैकी कोणीही तुमचा पराभव करू शकणार नाही."
9यहोशवा आणि त्याचे सैन्य रातोरात निघून गिबोनला
पोहोंचले. यहोशवा येईल अशी शत्रूला सुतराम कल्पना
नव्हती. म्हणून त्याने हल्ला केला तेव्हा ते चकित झाले.
10परमेश्वराने इस्राएलाच्या हल्ल्यामुळे त्या सैन्याची त्रेधा
तिरपीट केली. इस्राएल लोकांनी त्यांचा पराभव करून
घवघवीत विजय मिळवला. गिबोनपासून बेथ-होरोनच्या
वाटेपर्यंत इस्राएलांच्या सैन्याने शत्रूचा पाठलाग केला, आणि
अजेका व मक्केदा पर्यंत त्यांचा पाठलाग करून त्यांना
ठार केले. 11इस्राएल सैन्य बेथ-होरोनपासून अजेकापर्यंत
पाठलाग करत असताना परमेश्वराने शत्रूवर आकाशातून
मोठमोठ्या गारांचा वर्षाव केला. त्या मारानेच अनेकजण
ठार झाले. इस्राएल सैन्याच्या तलवारीने जितके शत्रूसैन्य
प्राणाला मुकले त्यापेक्षा कितीतरी जास्त या गारांच्या
वर्षावाला बळी पडले.
12इस्राएल लोकांच्या हातून परमेश्वराने त्यादिवशी
अमोऱ्यांचा पराभव केला तेव्हा यहोशवा सर्व इस्राएल
लोकांसमोर उभा राहून म्हणाला,

"हे सूर्या, गिबोनावर स्थिर राहा. हे चंद्रा, स्थिर राहा
तू, अयालोनच्या खोऱ्यावर."

13तेव्हा लोकांनी शत्रूंचा पराभव करीपर्यंत सूर्य स्थिर
राहिला, चंद्र ही थांबून राहिला. याशारच्या पुस्तकात हे
लिहिलेले आहे. सूर्य पूर्ण दिवसभर आकाशाच्या मध्यभागी
थांबलेला होता. 14असे पूर्वी कधी घडले नव्हते आणि
नंतर ही कधी घडले नाही. परमेश्वराने त्या दिवशी
माणसाचे ऐकले. परमेश्वर खरोखरच त्यादिवशी
इस्राएलच्या बाजूने लढत होता.
15यानंतर सर्व सैन्यासह यहोशवा गिलगालच्या छावणीत
परतला. 16भर युध्दात त्या पाचही राजांनी पळ काढून
मक्केदा जवळच्या गुहेत आसरा शोधला होता. 17पण कोणी
तरी त्यांना तेथे लपलेले पाहिले. ते यहोशवाच्या कानावर
आले. 18तो म्हणाला, "गुहेचे तोंड प्रचंड दगड लावून बंद
करा. तिथे माणसांचा पाहारा बसवा 19पण तुम्ही स्वत:
तेथे थांबून राहू नका. शत्रूंचा पाठलाग करून त्यांच्यावर
मागून हल्ला करत राहा. शत्रूला त्यांच्या नगरात परतू
देऊ नका. कारण तुमच्या परमेश्वर देवाने तुम्हाला विजय
मिळवून दिला आहे."
20यहोशवा व इस्राएल लोक यांनी शत्रूला ठार केले
पण त्यातील काही कसेबसे सुटून नगरात जाऊन लपले.
त्यामुळे त्यांना जीवदान मिळाले. 21लढाई थांबल्यावर सर्व
लोक मक्केदा येथे यहोशवाकडे परत आले. पण इस्राएल

---

**राजधानीचे असावे तसे मोठे शहर** भक्कम, अतिसुरक्षित शहरे. ही शहरे आजूबाजूच्या लहान गांवाचे पण संरक्षण करीत.

लोकांविरुद्ध एकही शब्द काढण्याचे धैर्य कोणाचे झाले
नाही.
22यहोशवा म्हणाला, "आता ते गुहेच्या तोंडावरचे दगड
हलवून त्या पाच राजांना माझ्याकडे आणा." 23तेव्हा
यरुशलेम, हेब्रोन, यर्मूथ, लाखीश व एग्लोनच्या त्या राजांना
यहोशवाच्या माणसांनी बाहेर काढले. 24व यहोशवासमोर
हजर केले. यहोशवाने आपल्या सर्व लोकांना त्या ठिकाणी
बोलावले. आपल्या सैन्यातील अधिकाऱ्यांना तो म्हणाला,
"पुढे व्हा आणि या राजांच्या मानेवर पाय द्या." तेव्हा
अधिकाऱ्यांनी जवळ येऊन त्यांच्या मानेवर पाय दिले.
25यहोशवा आपल्या लोकांना म्हणाला, "खंबीर राहा
आणि हिंमत धरा, घाबरु नका इथून पुढे तुम्ही ज्यांच्याशी
लढाल त्या शत्रूचे परमेश्वर काय करुन टाकील ते मी
तुम्हाला दाखवतो आहे."
26मग यहोशवाने त्या पाच राजांना ठार केले. त्यांची
प्रेते पाच झाडांना लटकावली. संध्याकाळपर्यंत ती तशीच
लटकत ठेवली. 27सूर्यास्ताच्या वेळी त्याने ती झाडावरुन
उतरविण्यास सांगितली. ज्या गुहेत ते राजे लपले होते तिथे
ती यहोशवाच्या माणसांनी टाकून दिली आणि गुहेचे तोंड
मोठमोठे दगड लोटून बंद केले. ती प्रेते त्या गुहेत
आजतागायत आहेत.
28त्या दिवशी यहोशवाने मक्केदाचा पराभव केला. तेथील
राजा आणि नगरातील लोक यांना यहोशवाने ठार केले.
कोणीही वाचला नाही. यरीहोच्या राजाची केली तीच गत
यहोशवाने मक्केदाच्या राजाचीही केली.

## दक्षिणे कडील नगरांचा पाडाव

29मग सर्व इस्राएल लोकांसह यहोशवा मक्केदाहून
निघाला. ते सर्व लिब्ना येथे पोहोंचले व त्या नगरावर
त्यांनी हल्ला केला. 30परमेश्वराच्या कृपेने, हे नगर आणि
त्याचा राजा यांचा इस्राएल लोकांनी पराभव केला. तेथील
सर्वजण प्राणाला मुकले. कोणीही त्यातून जिवंत राहिला
नाही. आणि यरीहोच्या राजाचे केले तसेच इस्राएल लोकांनी
या राजाचेही केले.
31मग यहोशवा व सर्व इस्राएल लोक लिब्ना येथून
निघून लाखीशला आले. त्या नगराभोवती वेढा देऊन
मग त्यांनी चढाई केली. 32परमेश्वराने त्यांच्या हातून
लाखीशचाही पाडाव केला. दुसऱ्या दिवशी त्यांनी त्या
शहराचा पराभव करुन सर्व लोकांना ठार केले. लिब्नाचीच
पुनरावृत्ती येथे झाली. 33गेजेरचा राजा होराम लाखीशच्या
मदतीला आला होता पण यहोशवाने त्याच्या सैन्यासही
पराभूत केले. त्यांच्यापैकीही कोणी वाचू शकला नाही.
34मग लाखीशहून निघून सर्व इस्राएल लोक व यहोशवा
एग्लोन येथे आले. एग्लोन भोवती तळ देऊन त्यांनी त्या
शहरावर हल्ला केला. 35त्याच दिवशी त्यांनी ते शहर
काबीज करून सर्व लोकांना ठार केले. लाखीशमध्ये
जसे झाले तसेच येथेही झाले.
36एग्लोनहून ते पुढे हेब्रोनला गेले व हेब्रोनवर चढाई
केली. 37हेब्रोन शहर आणि त्याच्या भोवतालची छोटी
गावे त्यांनी काबीज केली. नगरातील सर्वांचा इस्राएल
लोकांनी संहार केला. एकूण एक लोक प्राणाला मुकले.
एग्लोन प्रमाणेच येथेही त्यांनी शहर उध्वस्त केले व
लोकांना ठार केले.
38मग यहोशवा व सर्व इस्राएल लोक मागे वळून दबीर
येथे आले व तेथील लोकांशी लढाई केली. 39त्यांनी ते
नगर व त्याच्या आसपासची गावे घेतली तसेच राजाचा
पराभव केला. नगरातील एकूण एक जणांना ठार केले.
हेब्रोन आणि लिब्ना ही नगरे व तेथील राजे यांची जी गत
केली तशीच दबीर व त्याच्या राजाचीही केली.
40अशाप्रकारे यहोशवाने डोंगराळ प्रदेश नेगेव,
पश्चिमेकडील व पूर्वेकडील डोंगर उताराचा भाग येथील
सर्व शहरांचा व राजांचा धुव्वा उडवला. इस्राएलच्या
परमेश्वर देवाने यहोशवाला सर्व लोकांचा संहार करण्यास
सांगितले होते. त्याप्रमाणे यहोशवाने कोणाला ही जिवंत
ठेवले नाही.
41कादेश बर्ण्यापासून गज्जापर्यंत सर्व नगरे यहोशवाने
काबीज केली. मिसरमधील गोशेन प्रांतापासून गिबोन
पर्यंतच्या कक्षेतील सर्व नगरे जिंकून घेतली. 42एकाच
मोहिमेत सर्व राजे व सर्व नगरे काबीज केली. इस्राएलचा
देव परमेश्वर इस्राएलच्या बाजूने लढत असल्यामुळेच
यहोशवाने हे केले. 43त्यांनंतर यहोशवा सर्व इस्राएलसह
आपल्या गिलगालच्या छावणीत परतला.

## उत्तरेकडील शहरांचा पराभव

11 या सर्व घटना हासोराचा राजा याबीन याने ऐकल्या.
तेव्हा त्याने अनेक राजांच्या फौजा एकत्र
आणण्याचे ठरवले. मादोनाचा राजा योबाब, शिम्रोनाचा
राजा, अक्षाफाचा राजा. 2तसेच उत्तरेत डोंगराळ प्रदेशात
व वाळवंटी भागात राज्य करीत असलेले राजे यांना
याबीनने त्याप्रमाणे कळवले. किन्नेरोथ, नेगेव येथील व
पश्चिमेकडील डोंगर उत्तरणीच्या भागातील राजांनाही
निरोप पाठवले. पश्चिमेकडील नाफोत दोर येथील राजाला
तसेच 3पूर्व व पश्चिमेच्या कनानी लोकांच्या राजांनाही
कळवले. अमोरी, हित्ती, परिज्जी व डेंगराळ प्रदेशातील
यबूसी लोकांना तसेच हर्मोन डोंगराच्या पायथ्याशी
असलेल्या मिस्पा जवळील हिव्वी लोकांनाही खबर दिली.
4तेव्हा या सर्व राजांच्या फौजा एकत्र आल्या. अगणित
योध्दे जमा झाले. घोडे, रथ बहुसंख्य होते. ती एक
अतिविशाल सेना होती असंख्य माणसांचा समुदाय
समुद्रकिनाऱ्यावरील वाळूच्या कणांसारखा पसरला होता.
5हे सर्व राजे मेरोम या लहानशा नदीजवळ भेटले. त्या
सर्वांनी तेथेच तळ ठोकला आणि ते इस्राएलविरुध्द लढाईची
आखणी करू लागले.

6तेव्हा परमेश्वर यहोशवाला म्हणाला, “या सैन्याला
घाबरू नको. मी तुमच्याहातून त्यांचा पराभव करवीन.
उद्या या वेळेपर्यंत तुम्ही त्या सर्वांचा संहार केलेला असेल.
त्यांच्या घोड्यांचे पाय तोडा व रथांना आगी लावा.”
7यहोशवा व त्याचे सैन्य यांनी शत्रूला विस्मयचकित
केले. मेरोम नदीपाशीच त्यांनी शत्रूवर हल्ला केला.
8इस्राएलच्या सैन्याने त्यांचा पराभव केला परमेश्वरानेच
त्यांना हे बळ दिले. इस्राएलने त्यांचा सीदोन महानगरापर्यंत
तसेच मिस्त्रपोथ-माईमापर्यंत व पूर्वेकडील मिस्पाच्या
खोऱ्यापर्यंत पाठलाग केला. शत्रुसैन्यातील सर्वांचा संहार
होईपर्यंत इस्राएल लोकांनी लढा दिला. 9परमेश्वराने
सांगितले होते तसेच यहोशवाने केले. त्यांच्या घोड्यांचे
पाय तोडले व रथ अगीच्या भक्ष्यस्थानी टाकले.
10मग मागे वळून यहोशवाने हासोर घेतले. हासोरच्या
राजाला त्याने ठार केले. (इस्राएलविरुद्ध लढणाऱ्या सर्व
राज्यांचे नेतृत्व हासोरने केले होते.) 11इस्राएल सैन्याने या
नगरातील सर्वांना ठार केले. सर्वांचा समूळनाश केला.
जिवंतपणाची खूण म्हणून शिल्लक ठेवली नाही. नंतर
नगराला आग लावली.
12यहोशवाने ही सर्व नगरे घेतली तेथील सर्व राजांना
ठार केले. या नगरांमधील सर्वच्या सर्व गोष्टींचा विध्वंस
केला. परमेश्वराचा सेवक मोशे याच्या आज्ञेप्रमाणे त्याने
हे केले. 13पण टेकड्यांवर वसवलेली कोणतीही नगरे
इस्राएल सैन्याने जाळली नाहीत. हासोर हे टेकडीवर वसलेले
व त्यांनी जाळलेले एकमेव नगर ते यहोशवाने जाळले.
14या नगरांमध्ये मिळालेली लूट इस्राएल लोकांनी
स्वत:करता ठेवली. तसेच तेथील जनावरेही घेतली. पण
तेथील लोकांना मारले कोणालाही जिवंत ठेवले नाही.
15परमेश्वराने आपला सेवक मोशे याला फार पूर्वीच ही
आज्ञा दिली होती. नंतर मोशेने हे यहोशवाला सांगितले
होते. यहोशवाने परमेश्वराचे ऐकले. परमेश्वराने मोशेला
सांगितले ते ते सर्व यहोशवाने न चुकता केले.
16अशाप्रकारे यहोशवाने त्या संपूर्ण प्रदेशातील सर्व
लोकांचा पराभव केला. डोंगराळ प्रदेश, नेगेव, गोशेनचा
सर्व प्रांत, पश्चिमेकडील डोंगरपायथा, यार्देनचे खोरे,
इस्राएलचा व त्याच्या आसपासचा डोंगराळ प्रदेश यावर
त्याने ताबा मिळवला. 17सेईर जवळच्या हालाक
डोंगरापासून हर्मोन पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या
लबानोनच्या खोऱ्यातील बालगाद पर्यंतचा सर्व प्रदेशही
यहोशवाने हस्तगत केला. तेथील सर्व राजांना बंदी करून
त्यांना ठार केले. 18अनेक दिवस या राजांशी त्याने हा
लढा दिला होता. 19या सर्व प्रदेशातील फक्त एकाच नगराने
इस्राएल लोकांशी शांततेचा करार केला. ते म्हणजे गिबोन
मधील हिव्वी. इतर सर्व नगरांचा युध्दात पाडाव झाला.
20आपण समर्थ आहोत असे त्यांना वाटावे अशी
परमेश्वराचीच इच्छा होती. जेव्हा ते इस्राएलविरुध्द
लढायला उभे राहतील, तेव्हा त्यांच्यावर दया न दाखवता
संहार करता येईल. मोशेला परमेश्वराने आज्ञा
दिल्याप्रमाणे, यहोशवा त्यांचा धुव्वा उडवेल (अशीच ती
योजना होती) 21हब्रोन, दबीर, अनाब व यहुदा या डोंगराळ
प्रदेशातील भागात अनाकी लोक राहात असत. यहोशवाने
त्यांच्याशी लढाई करुन तेथील लोकांचा व नगरांचा संपूर्ण
संहार केला. 22इस्राएलाच्या देशात एकही अनाकी माणूस
शिल्लक उरला नाही. गज्जा, गथ व अश्दोद येथे मात्र
काही अनाकी लोक जिवंत राहीले. 23परमेश्वराने मोशेला
फार पूर्वीच सांगून ठेवल्याप्रमाणे यहोशवाने सर्व इस्राएल
देश ताब्यात घेतला. परमेश्वराने कबूल केल्या प्रमाणे हा
प्रदेश इस्राएल लोकांना दिला. यहोशवाने इस्राएलाच्या
वंशांप्रमाणे त्यांची हिश्श्यांमध्ये वाटणी केली. अखेर युध्द
संपले आणि शांतता नांदू लागली.

## इस्राएलने पराभूत केलेले राजे

12 यार्देन नदीच्या पूर्वेकडील प्रदेशाचा इस्राएल
लोकांनी ताबा घेतला होता. आर्णोन खोऱ्यापासून
हर्मोन पर्वतापर्यंत आणि यार्देन खोऱ्याच्या पूर्वेकडील सर्व
भूभाग त्यांचा होता. त्यासाठी इस्राएल लोकांनी ज्या ज्या
राजांचा पराभव केला ते असे.
2हेशबोन नगरात राहणारा अमोरी लोकांचा राजा सीहोन.
आर्णोन खोऱ्याजवळच्या अरोएर पासून यब्बोक
नदीपर्यंतच्या प्रदेशावर त्याची सत्ता होती. त्या खोऱ्याच्या
मध्यापासून त्याची हद्द सुरु होत असे. अम्मोन्यांची सीमा
याला लागून होती. गिलादच्या अर्ध्या प्रदेशावर सीहोनची
सत्ता होती. 3यार्देन नदीच्या पूर्वेला गालिली सरोवरापासून
अराबाच्या समुद्रापर्यंत (मृत समुद्र) एवढ्या भागावर त्याचे
राज्य होते. तसेच बेथ-यशिमोथपासून दक्षिणेस पिसगा
टेकड्याच्या उत्तरणीपर्यंतचा भाग त्याच्याच हद्दीत होता.
4बाशानाचा राजा ओग यांचाही त्यांनी पराभव केला.
ओग हा रेफाई लोकांपैकी होता. अष्टारोथ व एद्रई येथे
तो राहात होता 5तसेच, हर्मोन पर्वत, सलका, बाशानाचा
सर्व भाग ही त्याच्याच आधिपत्याखाली होता. गशूरी व
माकाथी लोक राहात तेथपर्यंत त्याची सीमा भिडलेली
होती. अर्ध्या गिलादावर ही ओगची सत्ता होती. हेशबोनाचा
राजा सीहोन याच्या प्रदेशाशी हा भाग थांबत होता.
6परमेश्वराचा सेवक मोशे आणि इस्राएल लोक यांनी
या सर्व राजांचा पराभव केला होता. नंतर तो देश रऊबेनी,
गादी आणि मनश्शाचा अर्धा वंश यांना वतन म्हणून दिला
हेता.
7यार्देनच्या पश्चिमेकडील देशांतील राजांचा पराभव
इस्राएल लोकांनी यहोशवाच्या नेतृत्वाखाली केला. मग तो
देश बारा वंशांमध्ये विभागून यहोशवाने इस्राएल लोकांना
दिला. परमेश्वराने द्यायची कबूल केलेली हीच ती भूमी.
लबानोन खोऱ्यातील बालगाद आणि सेईर जवळचा हालाक
डोंगर यांच्या मधला हा भाग होय. 8डोंगराळ भाग,
पश्चिमेकडील पर्वतपायथा, यार्देनचे खोरे पूर्वेकडील डोंगर

वाळवंट आणि नेगेव एवढा भाग यात येतो. हित्ती, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी आणि यबूसी लोकांचे वास्तव्य या प्रदेशात होते. इस्राएल लोकांनी पराभूत केलेल्या राजांची यादी अशी:

| | | |
|---|---|---|
| 9 | यरीहोचा राजा बेथेल | 1 |
| | जवळील आयचा राजा | 1 |
| 10 | यरुशलेमचा राजा | 1 |
| | हेब्रोनाचा राजा | 1 |
| 11 | यर्मूथाचा राजा | 1 |
| | लाखीशाचा राजा | 1 |
| 12 | एग्लोचा राजा | 1 |
| | गेजेराचा राजा | 1 |
| 13 | दबीराचा राजा | 1 |
| | गेदेराचा राजा | 1 |
| 14 | हर्माचा राजा | 1 |
| | अरादाचा राजा | 1 |
| 15 | लिब्नाचा राजा | 1 |
| | अदुल्लामाचा राजा | 1 |
| 16 | मक्केदाचा राजा | 1 |
| | बेथेलचा राजा | 1 |
| 17 | तप्पूहाचा राजा | 1 |
| | हेफेराचा राजा | 1 |
| 18 | अफेकाचा राजा | 1 |
| | लशारोनाचा राजा | 1 |
| 19 | मादोनाचा राजा | 1 |
| | हासोराचा राजा | 1 |
| 20 | शिम्रोन–मरोनाचा राजा | 1 |
| | अक्षाफाचा राजा | 1 |
| 21 | तानखाचा राजा | 1 |
| | मगिद्दोचा राजा | 1 |
| 22 | केदेशाचा राजा | 1 |
| | कर्मेल जवळच्या यकनामाचा राजा | 1 |
| 23 | दोर पर्वतावरील दोराचा राजा | 1 |
| | गिलगाल येथील गोयीमचा राजा | 1 |
| 24 | तिरसाचा राजा | 1 |
| | असे एकंदर राजे. | 31 |

## काबीज करायचा राहिलेला प्रदेश

13 यहोशवा आता वृध्द झाला होता तेव्हा परमेश्वर
त्याला म्हणाला, "तुझे आता वय झाले आहे पण
अजून बराच प्रदेश काबीज करायचा राहिला आहे. 2पलिष्टी
आणि गशूरी यांचा प्रांत अजून घ्यायचा आहे. 3मिसरमधील
शीहोर नदीपासून उत्तरेस एक्रोनच्या सीमेपर्यंतचा भागही
अजून काबीज केलेला नाही. त्या भूमीवर अजूनही कनानी
लोकांचा ताबा आहे. गज्जा, अश्दोद, अष्कलोन, गथ व
एक्रोन या पलिष्ट्यांच्या पाच नेत्यांचा तुला पराभव करायचा
आहे. 4कनानी भूमीच्या दक्षिणेकडील अव्वी लोकांनाही
पराभूत करायचे आहे. 5गिबली लोकही अजून राहिले
आहेत. पूर्वेकडील, हर्मोन डोंगराखालच्या बाल–गादापासून
हमाथ येथे जायच्या ठिकाणापर्यंत सर्व लबानोन हा सुध्दा
आहेच.

6"लबानोनापासून मिस्रपोथ–माईमपर्यंत पसरलेल्या
डोंगराळ भागात सीदोनी राहतात. पण इस्राएल लोकांसाठी
मी या सर्वांना तेथून हुसकावून लावीन. इस्राएल लोकांमध्ये
तू जमिनीची वाटणी करशील तेव्हा या भागाचेही लक्षात
असू दे मी सांगितल्याप्रमाणे वाटे कर. 7आता, नऊ वंश
आणि मनश्शाचा अर्धा वंश यांच्यात या देशाचे भाग कर."

## जमिनीची वाटणी

8रऊबेनी, गादी आणि मनश्शाच्या उरलेल्या अर्ध्या
वंशातील लोक यांना त्यांचा जमिनीतील वाटा पूर्वीच
मिळालेला आहे. परमेश्वराचा सेवक मोशे याने यार्देनच्या
पूर्वेकडील भाग त्यांना दिला. 9आर्णोन खोऱ्या नजीकच्या
अरोएर पासून त्यांचा प्रदेश सुरु होतो. तो खोऱ्याच्या
मध्यावरील गावापर्यंत मेदबापासून दिबोनपर्यंतचे सलग
पठार त्यात मोडते. 10अमोऱ्यांचा राजा सीहोन याच्या
आधिपत्याखाली असलेली सर्व गावे या प्रदेशात होती. हा
राजा हेशबोनहून राज्य करत होता. अम्मोन्यांच्या
हद्दीपर्यंतची सर्व नगरे 11तसेच गिलादांचे नगर व गशूरी
आणि माकाथी यांचा प्रदेश येथपर्यंत ही जमीन भिडलेली
होती. हर्मोन पर्वत, सलकापर्यंतचा सर्व बाशान त्यांच्या
हद्दीत होता. 12बाशानमध्ये राज्य करीत असलेल्या ओगची
राजधानीही त्यात येत होती. पूर्वी तो अष्टारोथ व एद्रई
येथे राज्य करत असे ओग रेफाई लोकांपैकी होय. मोशेने
पूर्वी या लोकांचा पराभव करून त्यांची भूमी काबीज
केली होती. 13तरी इस्राएल लोकांनी गशूरी आणि माकाथी
यांना घालवून दिले नाही. ते लोक आजही इस्राएल
लोकांमध्ये राहात आहेत.

14फक्त लेवी वंशाला तेवढा जमिनीत वाटा मिळालेला
नाही त्याऐवजी, इस्राएलांच्या परमेश्वर देवाला अग्नीतून
केलेली अन्नार्पणे त्यांना मिळतात. परमेश्वरानेच त्यांना
तसे कबूल केले आहे.

15रऊबेनी वंशाला त्यांच्यातील कुळाप्रमाणे मोशेने जमीन
दिली. त्यांना मिळालेली जमीन अशी. 16आर्णोन
खोऱ्यानजीकच्या अरोएर पासून मेदबा नगरापर्यंत.
खोऱ्यामधले नगर व पठारी प्रदेश यात येतो. 17तसेच
हेशबोनपर्यंतची जमीन व पठारावरील सर्व नगरे या मुलखात
मोडतात. ही नगरे म्हणजे दीबोन, बामोथ–बाल
बेथ–बालमोन, 18याहस, कदेमोथ, मेफाथ,
19किर्या–थईम, सिन्मा व खोऱ्यातील पहाडावरील सरेथ
शहर, 20बेथ–पौर, पिसगाची उतरणी आणि बेथ–यशिमोथ.
21म्हणजेच हेशबोन येथील, अमोऱ्यांचा राजा सीहोन याच्या
अखत्यारीतील सर्व मुलुख व पठारावरील सर्व शहरे या

हद्दीत होती. मोशेने सीहोन राजाचा व मिद्यानचे मांडलीक अवी, रेकेम, सूर, हूर व रेबा यांचा पराभव केला होता. (हे सर्व मांडलीक राजे सीहोनच्या बाजूने लढले होते.) ते तेथेच राहणारे होते. 22बौराचा पुत्र बलाम यालाही इस्राएल लोकांनी पराभूत केले. (हा बलाम जादूटोणा करून भविष्य सांगत असे.) इस्राएल लोकांनी लढाईत पुष्कळ लोकांना ठार मारले. 23रऊबेनींना दिलेल्या जमिनीची हद्द यार्देन नदीच्या किनाऱ्यापर्यंत होती. तेव्हा ही नगरे व त्यांचे प्रदेश हीच रऊबेनी कुळातील लोकांना दिलेली भूमी होय.

24गाद वंशालाही त्याच्या कुळांप्रमाणे मोशेने जमिनीत वाटा दिला तो असा:

25याजेर आणि गिलादातील सर्व शहरे राब्बा जवळच्या अरोएरापर्यंतचा अम्मोनी लोकांचा अर्धा प्रदेशही मोशेने त्याना दिला. 26हेशबोनपासून रामाथ मिस्पापर्यंत व बतोनीम आणि महनाईमापासून दबीर पर्यंत, 27बेथहाराम, बेथ-निम्रा, सुक्कोथ, साफोन, हेशबोनाचा राजा सीहोन याच्या राज्याचा बाकीचा भाग. एवढा यार्देनच्या पूर्वेकडील खोऱ्याचा भाग त्यांचा होता. गालील सरोवराच्या टोकापर्यंत या जमिनीची हद्द होती. 28गाद वंशातील सर्व कुळांना मोशेने वर वर्णन केलेली नगरे व गावे यांच्यासकटचा प्रदेश दिला.

29मनश्शाच्या अर्ध्या वंशाला मोशेने दिलेली जमीन अशी;

30महनाईमापासून बाशानचा राजा ओग याच्या अधिपत्याखालील सर्व भूभाग, याईराची बाशानमधील सर्व नगरे (सगळी मिळून ती साठ होती.) 31अर्धा गिलाद, अष्टारोथ व एद्रई (ओग राजाने या तिन्ही शहरात वास्तव्य केले होते.) मनश्शेचा मुलगा माखीर याच्या कुळाला ही जमीन मिळाली. म्हणजेच त्या अर्ध्या वंशाला ही जमीन मिळाली.

32यार्देनच्या पलीकडे, यरीहोच्या पूर्वेला मवाबाच्या पठारावर या सर्वांचा तळ असताना मोशेने त्यांना हा प्रदेश दिला. 33लेवींना मोशेने जमिनीत वाटा दिला नाही. खुद्द इस्राएलाचा देव परमेश्वर हेच त्यांचे इनाम, हा परमेश्वराचा शब्द होता.

14 एलाजार याजक, नूनाचा पुत्र यहोशवा आणि इस्राएलमधील सर्व वंशांचे प्रमुख यांनी जमिनीच्या वाटण्या कशा करायच्या ते ठरविले. 2परमेश्वराने मोशेला याविषयी पूर्वीच आज्ञा दिली होती. तिला अनुसरुनच साडेनऊ वंशांच्या लोकांनी चिठ्ठ्या टाकून वाटे केले. 3अडीच वंशातील लोकांना मोशेने आधीच यार्देन नदीच्या पूर्वेकडील जमीन दिली होती. पण लेवींना इतरांप्रमाणे जमिनीत वाटा नव्हता. 4अशाप्रकारे बारा वंशातील लोकांना आपापल्या हिश्श्याची जमीन मिळाली. योसेफच्या वंशाची विभागणी मनश्शे व एफ्राईम अशा दोन वंशात झाली होती. त्यांनाही प्रत्येकी काही जमीन मिळाली. परंतु लेवींच्या वंशातील लोकांना जमितीत हिस्सा मिळाला नाही. त्यांना राहण्याकरता काही गावे दिली गेली. प्रत्येक वंशाच्या वाट्याच्या जमिनीत वस्तीसाठी गावे आणि गुराढोरांसाठी गायराने असा हिस्सा त्यांना मिळाला. 5परमेश्वराने मोशेला जशी आज्ञा दिली तसेच याबाबतीत इस्राएल लोकांनी केले.

## कालेबला त्याची जमीन मिळते

6एकदा यहूदा वंशातील काही लोक गिलगाल येथे यहोशवाकडे आले. कनिज्जी यफुन्नेचा मुलगा कालेब हाही त्यांच्यात होता. तो यहोशवाला म्हणाला, "कादेश-बर्ण्या येथे परमेश्वर काय म्हणाला ते तुला आठवते ना? तो आपला सेवक मोशे याच्याशी बोलत होता. आपल्या दोघांविषयी ते बोलणे होते. 7परमेश्वराचा सेवक मोशे याने देशाची टेहेळणी करायला मला पाठवले होते. मी तेव्हा चाळीस वर्षांचा होतो. मला त्या देशाविषयी काय वाटते ते मी परत आल्यावर मोशेला सांगितले. 8माझ्याबरोबर आलेल्यांनी लोकांना असे काही सांगितले की लोक घाबरुन गेले. पण परमेश्वर आपल्याला हा देश देणार आहे यावर माझा पूर्ण विश्वास होता. 9तेव्हा मोशेने मला त्यादिवशी वचन दिले. मोशे म्हणाला, 'तू जेथे पाऊल ठेवलेस ती भूमी तुला मिळेल. तुझी मुलेबाळे तेथे कायमची राहतील. तू परमेश्वरावर निष्ठा ठेवलीस म्हणून तो प्रदेश मी तुला देईन.'

10"आता परमेश्वराने शब्द दिल्याप्रमाणे मलाही पंचेचाळीस वर्षे जिवंत ठेवले आहे. एवढ्या कालावधीत आपण वाळवंटात भटकलो. आज मी पंच्याऐंशी वर्षांचा आहे. 11पण मोशेने मला पूर्वी कामगिरीवर पाठवले तेव्हा इतकाच आजही मी धडधाकट आहे. लढण्याची माझ्यात ताकद आहे. 12तेव्हा परमेश्वराने त्यावेळी कबूल केलेला डोंगराळ प्रदेश आता मला दे. मजबूत बांध्याचे अनाकी लोक तेथे राहतात, त्याची शहरे खूप मोठी असून चांगली सुरक्षित आहेत हे तू ऐकले आहेसच. पण परमेश्वराची साथ मला असेल तर त्याने सांगितल्याप्रमाणे मी त्यांना आजही हुसकावून लावू शकेन."

13यहोशवाने यफुन्नेचा मुलगा कालेब याला आशीर्वाद दिला. तसेच हेब्रोन हे शहर त्याला दिले. 14आजही ते शहर कनिज्जी यफुन्नेचा मुलगा कालेब याच्या वंशजांचेच आहे. कारण त्याने इस्राएलच्या परमेश्वर देवाची आज्ञा पाळली व त्याच्यावर विश्वास ठेवला. 15पूर्वी या शहराचे नाव किर्याथ-आर्बा असे होते. आर्बा हा अनाकी लोकांमधील सर्वात थोर पुरुष. त्याच्यावरून हे नाव पडले होते.

नंतर या देशात शांतता नांदू लागली.

## यहूदाचा प्रदेश

15 यहूदाला मिळालेल्या प्रदेशाच्या, त्या वंशातील कुळांप्रमाणे वाटण्या झाल्या. हा प्रदेश अदोमाच्या सीमेपर्यंत आणि तेमानलगतच्या सीन वाळवंटापर्यंत पार

दक्षिणेपर्यंत पसरला होता. 2दक्षिणेची सीमा क्षारसमुद्राच्या
दक्षिणे कडील टोकाशी सुरु होत होती. 3ती तशीच पुढे
अक्राब्बीमच्या चढणीकडून सीन वाळवंटावरुन
कादेश-बर्ण्याच्या दक्षिणेस जाऊन मग हेस्रोन वरुन अद्दार
पर्यंत जाते. तिथे एक वळण घेऊन कर्काकडे जाते. 4तेथून
ती सीमा असमोनास जाऊन मिसरच्या ओढ्यापर्यंत निघते.
तिचा शेवट भूमध्यसमुद्रापाशी होतो. ही झाली दक्षिण सीमा.
5यार्देन नदी समुद्राला मिळते तेथून क्षारसमुद्राच्या संपूर्ण
(पश्चिम) किनाऱ्यापर्यंत पूर्वेकडील हद्द.

यार्देन क्षार समुद्राला मिळते तेथे या प्रदेशाची उत्तरेकडील
हद्द सुरु होते. 6बेथ-हाग्लाच्या चढणीवरुन बेथ-अराबाच्या
उत्तरेकडे रऊबेनी बोहनच्या खडकापर्यंत ती जाते. 7तेथून
ती सीमा आखोर खोऱ्यापासून दबीरापर्यंत जाऊन उत्तरेला
गिलगालकडे वळते. हे गिलगाल अदुम्मीमाच्या चढणीसमोर
नदीच्या दक्षिणेला आहे. एन-शेमेश नावाच्या झऱ्याजवळून
गेल्यावर या सीमेचा शेवट एन रोगेल येथे होतो. 8तेथून ती
सीमा हिन्नोम पुत्राच्या खोऱ्यातून यबूसी म्हणजेच
यरुशलेमच्या दक्षिणेकडून पश्चिमेकडे हिन्नोमाच्या
खोऱ्यासमोर आणि रेफाईम खोऱ्याच्या उत्तर टोकाला
असलेल्या, पहाडाच्या माथ्यावर गेली आहे. 9तेथून ती
सीमा नफ्तोहाच्या झऱ्यापर्यंत जाते आणि एफ्रोन डोंगरातील
नगरांवरुन निघून बाला म्हणजेच किर्याथ-यारीम येथपर्यंत
पोचते. 10मग बालापासून ही सीमा पश्चिमेला सेईर
डोंगराकडे वळून यारीम डोंगर (म्हणजेच कसालोन) याच्या
उत्तरेकडल्या भागाजवळून जाते आणि बेथ-शेमेशकडे
उत्तरून तिम्नाकडे जाते. 11मग एक्रोनच्या उत्तरेकडे
असलेल्या टेकडीकडे आणि तेथून शिक्रोनापर्यंत पुढे
जाऊन बाला डोंगराजवळून यबनेलास पर्यंत जाऊन
भूमध्यसमुद्रापाशी तिचा शेवट होतो. 12भूमध्यसमुद्र ही
यहूदाच्या भूमीची पश्चिमेकडील हद्द. तेव्हा या चतु:सीमेच्या
आतील प्रदेशात यहूदाचे वंशज राहिले.

13यफुन्नेचा मुलगा कालेब याला यहूदाच्या प्रदेशातील
काही भूमी द्यायची परमेश्वराने यहोशवाला आज्ञा केली
होती. त्या आज्ञेप्रमाणे यहोशवाने कालेबला किर्याथ-आर्बा
(हेब्रोन) हे नगर दिले. (आर्बा हा अनाकचा पिता) 14शेशय,
अहीमान आणि तलमय या हेब्रोन मध्ये राहणाऱ्या तीन
अनाकी कुटुंबांना कालेबने तेथून घालवून दिले. 15मग
दबीरा येथे राहणाऱ्यांवर कालेब चढाई करुन गेला.
(दबीरला पूर्वी किर्याथ-सेफर असेही म्हणत.) 16कालेब
म्हणाला, "किर्याथ-सेफरचा मला पाडाव करायचा आहे.
जो कोणी या शहरावर चढाई करुन त्याचा पराभव करील
त्याला मी माझी मुलगी अखसा देईन. त्यांचे लग्न लावून
देईन."

17कनाज याचा मुलगा अथनिएल याने हे शहर घेतले.
तेव्हा कालेबने त्याचा अखसाशी विवाह करुन दिला.
18अखसा अथनिएलकडे आली. तेव्हा अथनिएलने
अखसाला आपल्या वडीलांजवळ आणखी जमीन मागायला
सांगितले. अखसा वडीलांकडे निघाली. ती गाढवावरून
उतरली तेव्हा कालेबने तिला विचारले "तुला काय हवे?"
19अखसा म्हणाली, "मला एक भेट द्या. तुम्ही मला
नेगेव मधील रखरखीत वाळवंटी जमीन दिलीत. आता
पाणी असलेली जमीन द्या" तेव्हा कालेबने तिच्या मनाप्रमाणे
केले. त्याने तिला त्या प्रदेशातील वरच्या व खालच्या
बाजूचे झरे दिले.

20यहूदाच्या वंशातील लोकांना परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणे भूमी मिळाली. त्यांच्यातील प्रत्येक
कुळाला वतन मिळाले. 21नेगेवच्या दक्षिणभागातील,
अदोमच्या सीमेजवळची सर्व नगरे त्यांना मिळाली. त्यांची
यादी खालीलप्रमाणे; कबसेल, एदेर, यागूर, 22कीना,
दीमोना, अदादा, 23केदेश, हासोर, इथनान, 24जीफ, टेलेम,
बालोथ, 25हासोर-हदत्ता, करीयोथ-हस्रोन म्हणजेच
हासोर, 26अमाम, शमा, मोलादा, 27हसर-गादा, हेष्मोन
व बेथ-पेलेट, 28हसर-शुवाल, बैर-शेबा, बिजोथा,
29बाला, ईयीम, असेम, 30एल्तोलाद, कसील व हर्मा,
31सिकलाग, मद्मन्ना, सन्सन्ना, 32लवावोथ, शिलहीम, अईन,
रिम्मोन. सर्व मिळून ही एकोणतीस नगरे व त्या भोवतालची
शेतजमीन. पश्चिमेकडील डोंगरपायथ्यावरची नगरेही
यहूदाच्या कुळातील लोकांना मिळाली. ती नगरे अशी.
33एष्टावोल, सरा, अषणा. 34जानोह, एन-गन्नीम, तप्पूहा,
एनाम, 35यर्मूथ अदुल्लाम, सोखो, अजेका, 36शारईम,
अदीथईम, गदेरा किंवा गदेरोथईम ही चौदा गावे व
भोवतालची शेतजमीन.

37शिवाय ही गावे सनान, हदाशा, मिग्दल गाद, 38दिलान,
मिस्पा, यकथेल, 39लाखीश, बसकाथ, एग्लोन, 40कब्बोन,
लहमाम, किथलीश, 41गदेरोथ, बेथ-दागोन, नामा व
मक्केदा ही सोळा नगरे व भोवतालचे वावर.
42लिब्ना, एथेर, आशान 43इफताह, आष्णा, नसीब,
44कईला, अकजीब आणि मारेशा ही नऊ नगरे व
आसपासची जमीन ही मिळाली.

45-46एक्रोन, त्या भोवतालची खेडी व जमीन तसेच
एक्रोनच्या पश्चिमेकडील भाग आणि आश्दोद जवळची
सर्व गावे व जमीन यहूदाच्या वंशजांना मिळाली.
47आश्दोदच्या भोवतालचा प्रदेश व गावे याबरोबरच त्यांना
गज्जा भोवतालचा प्रदेश व त्याच्या जवळची गावे ही मिळाली.
मिसरची नदी व भूमध्य समुद्र किनाऱ्यालगतचा प्रदेश
येथपर्यंत त्यांचा भूभाग पसरला होता.
48आणि डोंगराळ प्रदेशातील शामीर, यत्तीर, सोखो,
49दन्ना, किर्याथ-सन्ना (म्हणजेच दबीर) 50अनाब, एष्टमो,
अनीम, 51गोशेन, होलोन व गिलो ही अकरा नगरे व
आसपासची गावे त्यांना मिळाली.
52अराब, दूमा, एशान, 53यानीम, बेथ-तप्पूहा, अफेका,
54हुमटा, किर्याथ-अर्बा (म्हणजेच हेब्रोन) व सियोर ही
नऊ नगरे व त्या भोवतालची खेडी त्यांना मिळाली.
55मावोन कर्मेल जीफ, यूटा, 56इज्रेल, यकदाम, जानोह,

57काइन, गिबा, तिम्ना ही दहा नगरे व आसपासची गावे,
58हल्हूल, बेथ-सूर, गदोर, 59माराथ, बेथ-अनोथ,
एलतकोन ही सहा नगरे व त्या जवळची गावे ही सुध्दा
मिळाली.
60राब्बा व किर्याथ-बाल (म्हणजेच किर्याथ-यारीम)
ही दोन शहरेही त्यांना मिळाली.
61त्याचप्रमाणे वाळवंटातील काही गावेही. त्यांची यादी:
बेथ-अराबा, मिद्दीन व सखाखा, 62निबशान, क्षारनगर
व एन-गेदी ही सहानगरे व त्यांच्या भोवतालची खेडी.
63तथापि, यरुशलेममधील यबूसी लोकांना यहूदाचे सैन्य
बाहेर काढू शकले नाही. म्हणून यरुशलेम मध्ये आजही
यहूदांबरोबर यबूसी लोक राहतात.

## एफ्राईम आणि मनश्शे यांचा वाटा

16 योसेफच्या वंशजांच्या वाट्याची जमीन अशी: तिची
हद्द यरीहो जवळ यार्देन नदी पासून सुरु होते व
यरीहोच्या पूर्वेकडील जलाशयापर्यंत जाते. तेथून ती
बेथेलच्या डोंगराळ प्रदेशापर्यंत चढत जाते. 2मग ती बेथेल
(लूज) पासून अर्कीलोकांची सीमा अटारोथ येथपर्यंत जाते.
3मग ती पश्चिमेला वळून यफलेटी लोकांच्या सीमेजवळून
लोअर बेथ-होरोन जवळ व तेथून गेजेर कडून भूमध्य
समुद्राशी येऊन ठेपते.
4योसेफची मुले : मनश्शे व एफ्राईम यांच्या वंशजांना
मिळालेली जमीन अशी :
5एफ्राईमचा वाटा; अप्पर-बेथ-होरोन जवळच्या
अटारोथ अद्दार येथे पूर्वेकडील हद्द सुरु होते. 6मिखथाथ
जवळ पश्चिम हद्द सुरु होते. पूर्वेला ती तानथशिलोजवळ
वळून तशीच पुढे पूर्वेकडे यानोहा येथपर्यंत जाते.
7यानोहापासून अटारोथ व नारा येथपासून खाली येऊन
यरीहोला पोचून यार्देन नदीशी थांबते. 8तप्पूहापासून ही
सीमा पश्चिमेला काना ओढ्यापर्यंत जाते व समुद्राशी तिचा
शेवट होतो. ही एफ्राईमच्या लोकांना दिलेली जमीन सर्व
कुळांना त्यात वाटा मिळाला. 9एफ्राईमाची हद्दीलगतची
बरीचशी गावे तशी मनश्शेच्या हद्दीतील होती. पण एफ्राईम
लोकांना ती मिळाली. 10तथापी, गेजेर मध्ये राहणाऱ्या
कनानी लोकांना ते घालवू शकले नाहीत. तेव्हा कनानी
लोक अजूनही एफ्राईम लोकांमध्येच राहतात. व ते एफ्राईम
लोकांचे दास झाले.

17 मनश्शेच्या वंशजांनाही जमिनीत वाटा मिळाला.
मनश्शे हा योसेफचा मोठा मुलगा. आणि गिलादचा
पुढारी माखीर म्हणजे मनश्शेचा मोठा मुलगा. माखीर हा
मोठा लढवय्या होता. तेव्हा गिलाद आणि बाशान हे प्रदेश
माखीर कुटुंबाला मिळाले. 2मनश्शेच्या वंशातील इतर
कुळांनाही जमिनीत वाटा मिळाला. अबीयेजेर, हेलेक,
अस्त्रियेल, शेखेम, हेफेर व शमीदा हे ते योसेफ पुत्र
मनश्शे याच्या वंशातील पुरुष होते. यांच्या कुटुंबांना जमिनीत
हिस्से होते.
3सलाफहाद हा हेफेरचा पुत्र; आणि हेफेर गिलादचा.
गिलाद माखीरचा पुत्र आणि माखीर मनश्शे याचा.
सलाफहादला मुलगा नव्हता त्याला पाचही मुलीच होत्या.
महला, नोआ, हाग्ला, मिल्का व तिरसा ही त्यांची नावे.
4या मुली एलाजार हा याजक व नूनाचा पुत्र यहोशवा
तसेच पंच यांच्याकडे येऊन त्यांना म्हणाल्या, “आम्हाला
आमच्या पुरुष नातेवाइकांइतकाच वाटा द्यायला
परमेश्वराने मोशेला सांगितले होते.” तेव्हा एलाजारने
परमेश्वराची आज्ञा प्रमाण मानून त्यांनाही जमिनीत हिस्सा
दिला. त्यांच्या वडीलांच्या भावांना मिळाला असता तसाच
हिस्सा या मुलींना मिळाला.
5अशाप्रकारे मनश्शेच्या वंशाला यार्देन नदीच्या
पश्चिमेकडे दहा वाटे मिळाले. शिवाय नदीच्या दुसऱ्या
बाजूला गिलाद आणि बाशान हे दोन प्रांत होतेच. 6मनश्शेच्या
मुलींना मुलांप्रमाणेच वाटा मिळाला. मनश्शेच्या बाकीच्या
वंशजांना गिलाद प्रांत मिळाला. 7मनश्शेच्या जमिनी
आशेरपासून मिखमथाथपर्यंत पसरलेल्या होत्या. हा भूभाग
शखेम जवळचा. त्याची सीमा दक्षिणेला एन-तप्पूहा
भागापर्यंत गेलेली होती. 8तप्पूहा भोवतालची जमीन
मनश्शेची होती, पण खुद्द तप्पूहा गाव त्याच्या अखत्यारीत
नव्हते. ते मनश्शेच्या जमिनीच्या सीमेवर असून
एफ्राईमाच्या वंशजाचे होते. 9मनश्शेची हद्द तशीच पुढे
दक्षिणेला काना नदीपर्यंत जात होती. हा भाग मनश्शेच्या
वंशजांचा असला तरी नगरे एफ्राईमाच्या वंशजांच्या ताब्यात
होती. नदीच्या उत्तरेला मनश्शेच्या जमिनीची हद्द असून
ती पश्चिमेला भूमध्य समुद्रापर्यंत जात होती. 10दक्षिणेकडील
जमीन एफ्राईमची व उत्तरेकडील मनश्शेची होती. भूमध्य
समुद्र ही पश्चिमेकडील सीमा. ही सीमा उत्तरेकडील
मनश्शेची होती भूमध्य समुद्र ही पश्चिमेकडील सीमा. ही
सीमा उत्तरेला आशेरच्या जमिनीला आणि पूर्वेला
इस्साखारच्या जमिनीला भिडलेली होती.
11आशेर आणि इस्साखारच्या प्रांतातही मनश्शेच्या
वंशजांची काही नगरे होती. बेथ-शान, इब्लाम आणि त्या
भोवतालची खेडी मनश्शेच्या वंशजांची होती. ते दोर,
एन-दोर, तानख, मगिद्दो ही शहरे व त्यांच्या भोवतालची
छोटी गावे यात राहात होते. ते नफाथच्या तोज शहरात
देखील राहात होते. 12मनश्शेचे वंशज या शहराचा पाडाव
करु शकले नाहीत. तेव्हा कनानी लोक बाहेर न पडता
तेथेच राहिले. 13पण इस्राएल लोकाचे सामर्थ्य वाढले.
तेव्हा त्यांनी कनानी लोकांना आपल्या कामाला जुंपले.
असे असले तरी त्यांना इस्राएल लोकांनी घालवून दिले
नाही.
14योसेफाचे वंशज यहोशवाला म्हणाले, “तू आम्हाला
जमिनीत एकच वाटा दिलेला आहेस पण आमची संख्या
बरीच जास्त आहे. परमेश्वराने आम्हाला एवढी सगळी
जमीन दिलेली असताना तू आम्हाला एकच हिस्सा का
दिलास?”

15यहोशवा त्यावर म्हणाला, “तुमची संख्या वाढली असेल
तर मग त्या डोंगराळ प्रदेशात जा. सध्या ती जमीन परिज्जी
व रेफाई यांच्या मालकीची आहे. पण एफ्राईमाचा डोंगराळ
प्रदेश तुम्हाला अपुरा पडत असेल तर त्या जमिनीचा ताबा
घ्या.”
16योसेफचे वंशज म्हणाले, “एफ्राईसचा डोंगराळ प्रदेश
फारसा मोठा नाही हे खरेच, पण तेथील कनानी लोकांकडे
सामर्थ्यवान आयुधे आहेत, लोखंडी रथ आहेत. इज्रेलचे
खोरे, बेथ-शान आणि आसपासची गावे यांवर त्यांची
हुकमत आहे.” 17तेव्हा योसेफ पुत्र एफ्राईम व मनश्शे
यांना यहोशवा म्हणाला, “पण तुम्ही तर संख्येने केवढेतरी
आहात आणि तुमचे सामर्थ्यही मोठे आहे. तेव्हा तुम्हाला
एका हिश्श्यापेक्षा जास्त भाग मिळायलाच हवा. 18तुम्ही
तो डोंगराळ प्रदेश काबीज करा. ते जंगलच आहे. पण
झाडे तोडून तुम्ही राहायला चांगली सपाट जागा करून
घ्या. तो प्रदेश तुमच्या मालकीचा होईल. कनानी लोकांना
तुम्ही तेथून घालवून द्याल.ते लोक दणकट असले आणि
सशस्त्र सज्ज असले तरी तुम्ही त्यांना पराभूत कराल.”

## उर्वरित प्रदेशाची वाटणी

18 सर्व इस्राएल लोक शिला येथे एकत्र जमले. तेथे
त्यांनी सभामंडप उभारला. आता देश इस्राएल
लोकांच्या हाती आला होता. त्यांनी त्या भागातील शत्रूना
नामोहरण केले होते. 2देवाने वचन दिल्या प्रमाणे इस्राएल
वंशजातील सात कुळांना जमिनीचा हिस्सा अजून मिळाला
नव्हता.
3तेव्हा यहोशवा इस्राएल लोकांना म्हणाला, “तुम्ही
आपली जमीन ताब्यात घ्यायला कोठवर थांबणार? तुमच्या
पूर्वजांच्या परमेश्वर देवाने ती तुमच्या हवाली केली आहे.
4आता प्रत्येक वंशातून तीन तीन जणांची निवड करा.
त्यांना मी जमिनीची पाहणी करायला पाठवतो. त्यावरुन
ते त्या जमिनीचे वर्णन काढतील व माझ्याकडे परत येतील.
5त्यांनी जमिनीचे सात वाटे करावेत. दक्षिणे कडील भाग
यहूदाच्या लोकांकडे आहे. तो तसाच राहील. आणि
उत्तरेकडील जमीन योसेफच्या लोकांकडे आहे ती तशीच
राहील. 6पण तुम्ही फक्त जमिनीचे वर्णन लिहून आणा
आणि सात भाग पाडून माझ्याकडे या. कोणी कुठला
वाटा घ्यायचा ते आपल्या परमेश्वर देवाच्या म्हणण्यानुसार
ठरेल* 7लेवींना जमिनीत वाटा नाही. याजक म्हणून
परमेश्वराची सेवा करणे हाच त्यांचा वाटा. गादी, रऊबेनी
आणि मनश्शाच्या अर्धा वंशातील लोक यांना त्यांचा वाटा
मिळालेला आहेच. यार्देनच्या पूर्वेकडील भाग परमेश्वराचा
सेवक मोशे याने त्यांना यापूर्वीच दिलेला आहे.” 8तेव्हा
या कामासाठी निवडलेली मंडळी जमिनीच्या पाहणीसाठी
बाहेर पडली. त्या प्रदेशाचे वर्णन लिहून काढले व तो
यहोशवाकडे परत आणण्यासाठी ती निघाली. यहोशवा
त्या लोकांना म्हणाला, “जमिनीचे नीट निरीक्षण करुन
त्यांचे वर्णन तयार करा. मग ते घेऊन शिलो येथे मला
येऊन भेटा. तेथे मी चिठ्ठ्या टाकीन. म्हणजे परमेश्वराच्या
इच्छेनुसार जमिनीचे वाटप होईल.”
9तेव्हा हे लोक तिकडे गेले. त्यांनी नीट पाहणी करून
यहोशवासाठी तिचे वर्णन लिहून काढले. प्रत्येक नगराचा
अभ्यास करुन त्यांनी त्या प्रदेशाच्या सात वाटण्या केल्या.
वर्णन घेऊन मग ते शिलो येथे यहोशवाला भेटायला
आले. 10यहोशवाने शिलोला परमेश्वरासमोर चिठ्ठ्या
टाकल्या. अशा प्रकारे जमिनीची विभागणी होऊन प्रत्येक
वंशाला जमिनीत आपापला वाटा मिळाला.

## बन्यामीनचा वाटा

11यहूदा आणि योसेफ यांच्या मधला जमिनीचा हिस्सा
बन्यामीनच्या वंशाला मिळाला. त्याच्या वंशातील प्रत्येक
कुळाचा त्यात हिस्सा होता. त्यांना मिळालेली जमीन अशी.
12तिची उत्तरेकडील हद्द यार्देन नदीशी सुरु होऊन यरीहोच्या
उत्तर बाजूने जाते. मग ती पश्चिमेला डोंगराळ प्रदेशात
जाऊन बेथ-आवेनच्या पूर्वेला भिडते. 13तेथून ती दक्षिणेला
लूज (म्हणजेच बेथेल) कडे वळते व खाली अटारोथ
अद्दार येथवर जाते. अटारोथ-अद्दार हे बेथ-होरोनच्या
दक्षिणेकडील टेकडीवर आहे. 14तेथे ही हद्द दक्षिणेला
वळून टेकडीच्या पश्चिम बाजूने जाते. किर्याथ-बाल
(म्हणजेच किर्याथ-यारीम) येथे तिचा शेवट होतो. हे
यहूदाच्या वंशजांचे नगर ही झाली पश्चिम बाजू.
15दक्षिणेकडील हद्द किर्याथ-यारीम येथे सुरु होऊन
नफ्तोह नदीपर्यंत जाते. 16रेफाई खोऱ्याच्या उत्तरेकडील
बेन हिन्नोमच्या खोऱ्यानजीकच्या डोंगर पायथ्याकडे ती
उतरत जाते. तेथून यबूसी नगराच्या दक्षिणेला हिन्नोम
खोऱ्यात उतरुन एन-रोगेल कडे जाते. 17तेथे उत्तरेला
वळून एन-शेमेश कडे जाते. तशीच ती गलीलोथ पर्यंत
जाते. (गलीलोथ हे पर्वतांमधल्या अदुम्मीम खिंडीजवळ
आहे) रऊबेवाचा पुत्र बोहन याचे नाव दिलेल्या मोठ्या
थोरल्या खडकाकडे ही सीमा उतरते. 18बेथ-अराबाच्या
उत्तरेकडील प्रदेशात जाऊन मग ती अराबात खाली उतरते.
19बेथ-हाग्लाच्या उत्तरेला जाऊन क्षार समुद्राच्या उत्तर
किनाऱ्याशी तिचा शेवट होतो. येथे यार्देन नदी समुद्राला
मिळते. ही झाली दक्षिण हद्द.
20यार्देन नदी ही पूर्वेकडील हद्द. बन्यामिनाचा वंशजांना
मिळाला तो भाग हा. आता सांगितली ती तिची सीमारेषा.
21प्रत्येक कुटुंबाला जमीन मिळाली. त्यांची नगरे म्हणजे
यरीहो, बेथ होग्ला, एमेक-केसास, 22बेथ अराबा,
समाराईम व बेथेल, 23अव्वीम, पारा, आफ्रा,
24कफर-अम्मोनी, अफनी, गेबा ही बारा नगरे व
आसपासची गावे.

---

**देवाच्या म्हणण्यानुसार ठरेल** प्रदेश शब्दश “येथे मी आपला देव परमेश्वर ह्याच्यासमोर चिठ्ठ्या टाकीन.”

25गिबोन, रामा, बैरोथ, 26मिस्पा, कफीरा, मोजा
27रेकेम, इपैल, तरला, 28सेला, ऐलेफ, यबूसी
(म्हणजेच यरूशलेम गिबाथ आणि किर्याथ ही चौदा नगरे
आणि आसपासची गावे सुध्दा बन्यामीनाच्या वंशजांना
मिळाली.

## शिमोनचा वाटा

19 नंतर शिमोन वंशजांच्या सर्व कुळांतील लोकांना
यहोशवाने जमिनीतील हिस्सा दिला. यहूदाच्या
वाटणीची जमिनी मध्येच यांचाही वाटा होता. 2त्यांना
मिळालेला भाग असा; बैरशेबा (म्हणजेच शेबा), मोलादा,
3हसर-शुवाल, बाला, असेम, 4एलतोलद, बथूल, हर्मा,
5सिकलाग, बेथ-मर्काबोथ, हसर-सुसा 6बेथ-लबवोथ,
शारुहेन ही तेरा नगरे व आसपासचा भाग.
7अईन, रिम्मोन एतेर व आशान ही चार नगरे व
भोवतालची गावेही त्यांना मिळाली. 8तसेच बालथ-बैर
(म्हणजेच नेगेवमधील रामा) येथपर्यंत या नगरांच्या
चहूकडची गावेही त्यांना मिळाली शिमोनच्या वंशजांना
मिळालेला हा भूभाग. प्रत्येक कुळाला त्यात वाटणी
मिळाली. 9शिमोनचा प्रदेश यहूदाच्या वाटच्या जमिनीच्या
अंतर्गतच होता. यहूदाच्या लोकांची जमीन त्यांच्या गरजेच्या
मानाने खूपच जास्त होती, म्हणून शिमोनच्या लोकांना
त्यातच हिस्सा दिला.

## जबुलूनचा वाटा

10जबुलून हा आणखी एक वंश त्यांनाही कुळांप्रमाणे
वाटा मिळाला. त्यांच्या जमिनीची हद्द सारीद पर्यंत होती.
11ती पश्चिमेकडे वर मरल कडे जाऊन दब्बेशेथपर्यंत
जेमतेम पोचली. मग यकनाम झऱ्याच्या बाजूबाजूने गेली.
12तेथून पूर्वेला वळून सारीद पासून किसलोथ-ताबोर पर्यंत
गेली. तेथून दाबरथ व पुढे याफीय येथपर्यंत गेली. 13त्यानंतर
ती सीमा पूर्वेकडे गथ-हेफेर आणि इजा-कासीनकडे गेली.
आणि ती रिम्मोन येथे थांबली त्यानंतर ती वळण घेऊन
नेया कडे गेली.14नेया येथे वळसा घालून उत्तरेला
हन्नाथोनपर्यंत गेली व तिचा शेवट इफ्ता एलाच्या खिंडीपाशी
झाला. 15कट्टाथ, नहलाल, शुम्रोन इदला आणि बेथलहेम
ही नगरे या हद्दीच्या आत येत होती. ती एकंदर बारा नगरे
व आसपासची खेडी होती.
16जबुलूनच्या वाटणीची शहरे व भोवतालचा प्रदेश तो
हाच त्याच्या कुळातील सर्वांना यात वाटा मिळाला.

## इस्साखारचा वाटा

17चौथा हिस्सा इस्साखाराच्या वंशजांना त्यांच्या
कुळाप्रमाणे मिळाला. 18त्याना मिळालेली जमीन या प्रमाणे:
इज्रेल, कसुल्लोथ, शूनेम, 19हफराईम, शियोन, अनाहराथ
20रब्बीथ, किशोन, अबेस, 21रेमेथ, एन-गन्नीम, एन-हद्दा
आणि बेथ-पसेस.
22त्यांच्या प्रदेशाची हद्द ताबोर, शहसुमा व बेथ शेमेश
यांना लागून होती. यार्देन नदीशी ती थांबत होती. सर्व
मिळून सोळा नगरे व त्यांच्या आसपासची खेडी एवढा
त्यांचा भाग होता. 23इस्साखाराच्या वंशजांना, त्यांच्यातील
सर्व कुळांना मिळालेला हिस्सा तो हाच.

## आशेराचा वाटा

24पाचवा हिस्सा आशेरच्या वंशजांना मिळाला.
त्याच्यातील सर्व कुळांचे त्यात वाटे होते. 25त्यांना मिळालेली
जमीन ही; हेलकथ, हली, बटेन, अक्षाफ 26अल्लामेलेख,
अमाद, मिशाल पश्चिमेला त्यांची हद्द कर्मेल व
शिहोर-लिब्नाथ येथपर्यंत जाऊन 27पुढे पूर्वेला वळली.
बेथ दागोनकडे जाऊन जबुलूनला स्पर्श केला. आणि
इफ्ताह-एलच्या खोऱ्याला भिडली. नंतर बेथ एमेक आणि
नियेल यांच्या उत्तरेला गेली काबूलच्या उत्तरेला गेली.
28पुढे एब्रोन, रहोब, हम्मोन व काना येथपर्यंत जाऊन
मोठ्या सीदोन पर्यंत गेली. 29मग दक्षिणेला रामा व तिथून
सोर नामक भक्कम तटबंदीच्या नगराकडे वळली. तेथून
होसकडे जाऊन तिचा शेवट अकजीब, 30उम्मा व अफेक
व रहोब यांच्या जवळ समुद्रानजीक झाला. नगरे व
भोवतालचा प्रदेश मिळून ही बावीस होतात. 31हा भाग
आशेरच्या वंशजांना त्यांच्या कुळांबरहुकूम मिळाला.

## नफतालीचा वाटा

32सहावा हिस्सा नफतालीच्या वंशजांना, त्याच्यातील
कुळांना मिळाला. 33त्यांची सीमा साननीम जवळच्या
विशालवृक्षा पासून सुरु होते. हा हेलेफच्या जवळ आहे.
मग ही सीमा अदामी नेकेब व यबनेल यांच्यामधून लक्कुम
वरुन यार्देन नदीला भिडते. 34मग पश्चिमेला अजरोथ ताबोर
यांच्यातून हुक्कोकशी थांबते. दक्षिणेची हद्द जबुलूनला
लागून आहे आणि पश्चिम हद्द आशेरला. पूर्वेला ही सीमा
यार्देन नदीपासच्या यहुदापर्यंत आहे. 35या हद्दीच्या आत
काही मजबूत तटबंदीची शहरे आहेत. ती म्हणजे, सिद्दीम,
सेर, हम्मथ, रक्कथ, किन्नेरेथ, 36अदामा, राम, हासोर,
37केदेश, एद्रई, एन-हासोर,
38हरोन, मिग्दल-एल, हरेम, बेथ-अनाथ व
बेथ-शेमेस. ही शहरे व त्याच्या आसपासचा भाग मिळून
ही एकोणीस नगरे झाली. 39नफतालीला त्यांच्या कुळांप्रमाणे
ही सर्व शहरे व भोवतालची खेडी मिळाली.

## दानचा वाटा

40सातवा वाटा दानच्या वंशजांचा त्यांच्यातील प्रत्येक
कुळाला जमिनीत हिस्सा मिळाला. 41त्यांना मिळालेला
42शालब्बीन, अयालोन, इथला, 43एलोन, तिम्ना, एक्रोन,
44एलतके गिब्बथोन, बालाथ, 45यहूद, बने-बराक, गथ
रिम्मोन, 46मीयकोन, रक्कोन आणि याफोच्या समोरचा
प्रदेश.

47आपल्या वाटणीचा प्रदेश ताब्यात घ्यायला दानच्या वंशजांना त्रास झाला. त्यांच्या शत्रूचे सामर्थ्य अधिक होते. दानच्या लोकांना त्यांचा सहजासहजी पराभव करता आला नाही. तेव्हा दानच्या लोकांनी इस्राएलाच्या उत्तर भागाकडे जाऊन लेशेमशी त्यांनी लढाई केली. लढाईत लेशेमला हरवून त्यांचे लोक मारले. अशाप्रकारे दानचे लोक लेशेममध्ये राहू लागले. त्यांनी लेशेम हे नाव बदलून त्या शहराला आपल्या पूर्वजांचे दान हे नाव दिले. 48ही सर्व शहरे व भोवतालची खेडी दान वंशजांना मिळाली. त्यांच्यातील प्रत्येक कुटुंबाला हिस्सा मिळाला.

## यहोशवाचा वाटा

49अशाप्रकारे जमिनीची विभागणी आणि सर्व वंशांच्या लोकांना करायच्या वाटण्या हे काम प्रमुखांनी पार पाडले. ते झाल्यावर नूनाचा पुत्र यहोशवाला ही काही जमीन द्यायचे इस्राएलाच्या लोकांनी ठरवले. तशी परमेश्वराची आज्ञा होती. 50त्याला ही जमीन मिळावी अशी परमेश्वराने आज्ञा दिली होती. तेव्हा त्यानी एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील तिम्नाथ-सेरह हे नगर यहोशवाला दिले. यहोशवाने ते नगर मागितले होते. तेव्हा ते नगर आणखी बळकट करुन तो तेथे राहू लागला.

51अशाप्रकारे या जमिनीच्या वाटण्या इस्राएलच्या सर्व वंशांच्या लोकांमध्ये झाल्या. एलाजार हा याजक, नूनाचा पुत्र यहोशवा आणि वडीलधारी मंडळी या कामासाठी शिलो येथे जमली होती. परमेश्वरासमोर सभामंडपाच्या प्रवेशद्वारात ते एकत्र जमले. अशाप्रकारे हे वाटपाचे काम समाप्त झाले.

## आश्रयाची नगरे

20 मग परमेश्वर यहोशवाला म्हणाला, 2इस्राएल लोकांना सांग "मोशे मार्फत मी माझी आज्ञा तुमच्यापर्यंत पोचवली. मोशेने तुम्हाला सुरक्षिततेसाठी खास नगरे उभारायला सांगितले. 3एखाद्याच्या हातून चुकून मनुष्यवध झाला, व त्याचा खुनाचा उद्देश नसेल तर तो माणूस या नगरात आश्रयाला जाऊ शकतो.

4"त्याने असे करावे. पळून जाऊन अशा नगराशी पोचल्यावर वेशीपाशी थांबावे. तेथे गावातील वडीलधाऱ्यांना झालेली हकीकत सांगावी. मग त्यांनी त्याला आत येऊ द्यावे. त्याला आपल्यात राहण्यासाठी जागा द्यावी 5पण त्याचा पाठलाग करत येणारा माणूसही तेथे येऊन पोचेल तर तेव्हा या वडीलधाऱ्यांनी त्याला थोपवून धरावे. आश्रयासाठी आलेल्या व्यक्तीला त्यांच्या ताब्यात देऊ नये, त्यांनी त्याला संरक्षण द्यावे. कारण ज्याला मृत्यू आला त्याला या व्यक्तीने जाणून बुजून मारलेले नाही. ती चुकून योगायोगाने घडलेली गोष्ट होती. रागाच्या भरात, मारायचे ठरवून त्याने काही केले नाही. त्यावेळी ते चुकून झाले, इतकेच. 6न्यायनिवाडा होईपर्यंत त्याने त्या नगरात राहावे. किंवा तेथील मुख्य याजक हयात असेपर्यंत राहावे. नंतर जेथून आला त्या आपल्या स्वत:च्या नगरात, आपल्या घरी त्याने परत जावे."

7तेव्हा "आश्रयस्थाने" म्हणून इस्राएल लोकांनी काही नगरांची निवड केली. ती नगरे अशी;

नफतालीच्या डोंगराळ प्रदेशातील, गालील मधले केदेश, एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील शखेम, यहूदाच्या डोंगराळ प्रदेशातील किर्याथ-आर्बा (म्हणजेच हेब्रोन)

8यार्देनच्या पूर्वेला रऊबेनींच्या प्रदेशापैकी वाळवंटातील यरीहो जवळचे बेसेर, गाद वंशाच्या विभागापैकी गिलादमधील रामोथ. मनश्शेच्या वंशातील बाशानमधील गोलान.

9इस्राएल लोक किंवा त्यांच्यात राहणारे परकीय यांच्यापैकी कोणाच्याही हातून चुकून मनुष्यवध झाल्यास त्याने पळून जाऊन आश्रय घ्यावा म्हणून ही नगरे नेमली. म्हणजे त्या व्यक्तीला संरक्षण मिळेल व तिचा पाठलाग करणाऱ्याच्या हातून ती व्यक्ती मारली जाणार नाही. मग त्या नगरातील न्यायसभेने निवाडा करावा.

## याजक आणि लेवी यांच्यासाठी नगरे

21 मग लेवी घराण्याचे प्रमुख हे एलाजार याजक, नूनाचा पुत्र यहोशवा आणि इस्राएल लोकांच्या वेगवेगळ्या वंशाचे प्रमुख यांच्याशी बोलायला आले. 2ही भेट कनान देशातील शिलो येथे झाली. लेवी प्रमुख त्यांना म्हणाले, "आम्हाला राहण्यासाठी नगरे आणि आमच्या गुराढोरांना चरण्यासाठी कुरणे द्यावीत अशी आज्ञा परमेश्वराने मोशेला केली आहे." 3तेव्हा इस्राएल लोकांनी ही परमेश्वराची आज्ञा पाळली. त्यांनी पुढील नगरे आणि गायराने लेवींना दिली.

4कहाथी हे लेवी वंशातील एक कूळ, त्याच्यातील अहरोन याजकाच्या वंशजांना यहूदा शिमोन आणि बन्यामीन यांच्या वाटणीच्या प्रदेशातील तेरा नगरे मिळाली.

5एफ्राईम, दान आणि मनश्शाचा अर्धा वंश यांच्या मालकीच्या प्रदेशातील दहा नगरे उरलेल्या कहाथी कुळांना मिळाली.

6इस्साखार, आशेर, नफताली आणि बाशानमधील मनश्शेचा अर्धा वंश यांच्या भूभागातून गेर्षोनच्या वंशजांना तेरा नगरे मिळाली.

7मरारीच्या वंशजांना रऊबेन गाद आणि जबुलून यांच्या वाटच्या प्रांतातून बारा नगरे मिळाली.

8परमेश्वराने मोशेला दिलेली आज्ञा इस्राएल लोकांनी पाळली व लेवी लोकांना पुढील नगरे व त्याभोवतालची शिवारे दिली.

9यहूदा आणि शिमोनच्या वाटच्या प्रदेशातील नगरे दिली त्यांची नावे पुढे दिली आहेत. 10चिठ्ठ्या टाकल्या त्यात

पहिली चिठ्ठी कहाथी कुळातील लेवींची निघाल्यामुळे ही
नगरे त्यांची. 11किर्याथ-आर्बा त्यांना मिळाले (म्हणजेच
हेब्रोन. अनाकचा पिता आर्बा याचे नाव या नगराला मिळाले
होते.) त्याच्या आसपासची थोडी जमीनही गायरान म्हणून
त्यांना मिळाली. 12पण किर्याथ-आर्बाच्या भोवतालची शेते
व खेडी यफुन्नेचा पुत्र कालेब याची होती. 13तेव्हा त्यांनी
हेब्रोन नगर अहरोनच्या वंशजांना दिले. (हेब्रोन हे आश्रयाचे
नगर होते.) त्याखेरीज लिब्ना 14यत्तीर, एष्टमोवा, 15होलोन,
दबीर, 16अईन, युट्टा, आणि बेथ-शेमेश ही नगरे व गुरांसाठी
शिवारे दिली. अशाप्रकारे ही नऊ नगरे त्या दोन वंशांना
दिली.

17बन्यामीनच्या प्रदेशातील नगरे अहरोनच्या वंशजांना
मिळाली. ती म्हणजे, गिबोन, गेबा, 18अनाथोथ, अलमोन
ही चार नगरे व भोवतालची गायराने. 19अहरोनच्या
वंशातील याजकांना त्यांनी ही तेरा नगरे व शिवारे दिली.

20एफ्राईमच्या वाटच्या जमिनीतील नगरे कहाथी
वंशातील उर्वरित लोकांना मिळाली. ती अशी :
21एफ्राईमाच्या डोंगराळ प्रदेशातील शखेम हे आश्रयाचे
नगर, गेजेर, 22किबसाईम व बेथ-होरोन ही चार नगरे व
भोवतालची गायराने.

23दानच्या हिश्श्यातून एलएतके, गिब्बथोन,
24अयालोन, गथ-रिम्मोन ही चार गावे व गुरांसाठी शिवार
दिले.

25मनश्शाच्या अर्ध्या वंशाच्या मालकीच्या प्रदेशातून
तानख व गथ-रिम्मोन ही दोन नगरे व शिवारे दिली.

26कहाथी वंशाला अशी एकंदर दहा नगरे व आसपासची
गायराने मिळाली.

27लेवी वंशातील गेर्षोन कुळाला ही काही नगरे मिळाली.
ती अशी:

मनश्शाच्या अर्ध्या वंशातील लोकांनी त्यांना बाशान
मधील गोलान दिले (गोलान हे आश्रयस्थान होते.) बैश्तरा
देखील दिले. म्हणजेच एकंदर दोन नगरे व शिवार दिली.

28इस्साखारच्या वंशजांनी किश्शोन, दाबरथ 29यर्मूथ,
एलगन्नीम ही चार नगरे भोवतालची शिवारे दिली.

30आशेरच्या वंशाजांनी मिशाल, अब्दोन, 31हेलाकाथ,
रहोब, ही चार नगरे गुरांसाठी भोवतालचे थोडे गायरान
दिले.

32नफतालीच्या कुळातील लोकांनी गालील मधले केदेश
दिले. (केदेश हे आश्रयाचे नगर) नफतालींनी हम्मोथ दोर
आणि कर्तान ही ही दिली. म्हणजे एकंदर तीन नगरे व
गुरांना चरण्यासाठी भोवतालची शिवारे दिली.

33गेर्षोन वंशजांना अशी एकंदर तेरा नगरे व गायराने
मिळाली.

34मरारी हे लेवी वंशातील एक कूळ, त्यांना मिळालेली
नगरे अशी;

जबुलूनच्या वंशजांनी यकनाम, कर्ता 35दिम्ना नहलाल
ही चार नगरे व शिवार दिली.

36रऊबेनींनी बेसेर, याहस 37कदेमोथ, मेफाथ ही चार
नगरे व गायराने दिली.

38गाद वंशातील लोकांनी गिलादमधील रामोथ (हे
आश्रयाचे नगर) दिले. शिवाय महनाईम, 39हेशबोन, याजेर
अशी एकंदर चार नगरे व शिवारे दिली.

40अशाप्रकारे मरारी या लेवी वंशातील शेवटच्या
कुळाला बारा नगरे मिळाली.

41म्हणजे लेवी वंशाजांना सर्व मिळून अठ्ठेचाळीस नगरे
व गुरांना चारायला शिवारे मिळाली. इस्राएल लोकांमधील
इतर सर्व वंशांच्या लोकांच्या मालकीतील ही शहरे आणि
जमीन होती. 42प्रत्येक गावाला गायरान होते. सर्वच
नगराच्या बाबतीत हे खरे होते.

43अशाप्रकारे इस्राएल लोकांना दिलेला शब्द
परमेश्वराने खरा केला. कबूल केल्याप्रमाणे सर्व जमीन
त्याने लोकांना दिली. लोकांनी ती ताब्यात घेतली व ते
तेथे राहू लागले. 44तसेच परमेश्वराने त्यांच्या पूर्वजांना
शब्द दिल्याप्रमाणे, सगळीकडे सर्वत्र शांतता नांदू लागली.
यांना कोणताही शत्रू नामोहरण करु शकला नाही. उलट
परमेश्वराच्या करणीने शत्रूच इस्राएल लोकांच्या हाती
आला. 45अशाप्रकारे परमेश्वराने दिलेले प्रत्येक वचन
पुरे झाले. काहीही पुरे व्हावयाचे शिल्लक राहिले नाही.
प्रत्येक शब्द प्रत्यक्षात आला.

## तीन वंशाचे लोक स्वस्थानी परततात

22 यहोशवाने मग रऊबेनी, गादी आणि मनश्शाच्या
अर्ध्या वंशातील लोक यांना एकत्र बोलवले.
2त्यांना तो म्हणाला, "परमेश्वराचा सेवक मोशे याने
तुम्हाला जे जे सांगितले त्याप्रमाणे तुम्ही वागलात. माझ्याही
सर्व आज्ञा तुम्ही पाळल्यात. 3आजपर्यंत तुम्ही आपल्या
इस्राएल बांधवांनाही पाठिंबा दिलात. तुमच्या परमेश्वर
देवाने दिलेल्या सर्व आज्ञा तुम्ही काटेकोरपणे पाळल्या
आहेत. 4सर्व कठीण प्रसंगातून शांतता देण्याचे तुमच्या
परमेश्वर देवाने इस्राएल लोकांना वचन दिले होते. आणि
परमेश्वराने आपला शब्द खरा केला आहे. तेव्हा आता
तुम्ही आपल्या घरी जाऊ शकता. यार्देनच्या पूर्वेकडील
प्रदेश परमेश्वराचा सेवक मोशेने तुम्हाला दिला आहे.
तेथे तुम्ही आता जाऊ शकता. 5पण एक गोष्ट लक्षात
ठेवा मोशेचे नियम पाळत चला. परमेश्वर देवावर प्रेम
करा आणि त्याच्या आज्ञा पाळा. परमेश्वराच्या मार्गाने जा
आणि मनोभावे त्याची सेवा करा."

6एवढे बोलून यहोशवाने त्यांना निरोप दिला आणि ते
निघाले. ते आपल्या घरी परतले 7बाशानची भूमी मोशेने
मनश्शेच्या अर्ध्या वंशाला दिली होती. उरलेल्या दुसऱ्या
अर्ध्या वंशाला यार्देनच्या पश्चिमेकडील काही जमीन
यहोशवाने दिली. त्यांना आशीर्वाद देऊन यहोशवाने निरोप
दिला. 8तो म्हणाला, "तुम्हाला सर्व ऐश्वर्य मिळाले आहे.

भरपूर गुरेढोरे आहेत सोने, रुपे, मौल्यवान दागदागिने
तुमच्याकडे आहेत. सुंदर, तलम वस्त्रे आहेत. शत्रूच्या
लुटीतील अनेक वस्तू तुम्ही घेतल्या आहेत. त्यांची
आपापसात वाटणी करुन आता आपापल्या ठिकाणी परत
जा.”

9तेव्हा रऊबेनी, गादी आणि मनश्शेच्या वंशातील लोक
यांनी इस्राएल लोकांचा निरोप घेऊन प्रस्थान केले. ते
कनान देशातील शिलो येथे होते. तेथून निघून ते गिलाद
कडे गेले. मोशेने परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे जो प्रांत त्यांना
द्यायला सांगितला होता तेथे म्हणजेच आपल्या वतनाकडे
ते परत गेले.

10रऊबेन, गाद आणि मनश्शे या वंशातील लोक
गालिलोथ ठिकाणी आले. कनान देशातील यार्देन नदीच्या
जवळ हे आहे. या ठिकाणी त्यांनी एक मोठी वेदी बांधली.
11या तीन वंशांच्या लोकांनी ही वेदी बांधल्याची बातमी
शिलो येथे असलेल्या इतर इस्राएल लोकांनी ऐकली. कनान
देशाच्या सीमेजवळ गलिलोथ येथे ही वेदी बांधल्याचे त्यांच्या
कानावर आले. इस्राएलांच्या भागात यार्देन नदी जवळ हे
ठिकाण होते. 12या बातमीने क्रुध्द होऊन सर्व इस्राएल
लोकांनी एक होऊन या तीन वंशांच्या लोकांवर चढाई
करण्याचे ठरवले.

13इस्राएल लोकांनी रऊबेन, गाद व मनश्शे यांच्या
वंशजांशी बोलणी करण्यास काही जणांना पाठवले. एलाजार
याजकाचा मुलगा फिनहास हा त्यांचा प्रमुख होता.
14त्याखेरीज, शिलो येथे असलेल्या इस्राएलांच्या प्रत्येक
कुळातून एक अशा दहा जणांनाही पाठवले. हे दहाजण
आपापल्या कुळाचे प्रमुख होते.

15अशी अकरा माणसे गिलाद येथे गेली. रऊबेन, गाद
आणि मनश्शेच्या वंशातील लोक यांच्याशी बोलणी करताना
ते म्हणाले, 16“सर्व इस्राएल लोकांची विचारणा आहे की,
परमेश्वराविरुद्ध असलेली ही गोष्ट तुम्ही का केलीत?
तुम्ही हे बंड का केलेत? परमेश्वराच्या शिकवणी विरूध्द
ही वेदी तुम्ही का बांधलीत? 17पौराला काय झाले ते
आठवते ना? त्या पापाचे फळ आपण अजून भोगत आहोत.
त्या भंयकर पापाची शिक्षा म्हणून आपल्यावर आजारपण
ओढवले. त्यातून आपण अजूनही पूर्णत: बरे झालो नाही.
18आणि तरी तुम्ही तेच करतात! हे परमेश्वराविरुद्ध बंड
आहे. तुम्ही परमेश्वराला अनुसरण्याचे सोडून देणार आहात
काय? तुम्ही हे थांबवले नाहीत तर सर्व इस्राएल लोकांवर
परमेश्वराचा कोप होईल.

19“परमेश्वराच्या उपासनेला तुमची भूमी तुम्हाला
चांगली वाटत नसेल तर आमच्या भागात या. आमच्या
भागात परमेश्वराचे निवासस्थान आहे आमच्या वाट्याची
थोडी जमीन घेऊन हवे तर राहू शकता. पण परमेश्वराच्या
शिकवणुकी विरुद्ध वागू नका. आता आणखी वेदी बांधू
नका. परमेश्वर देवाच्या निवासमंडपात आमच्या येथे एक
वेदी आहेच.

20“जेरहाचा मुलगा आखान आठवतो का? त्याने, नष्ट
करुन टाकायच्या वस्तू विषयीची आज्ञा पाळायचे नाकारले.
देवाची आज्ञा त्याने एकट्याने मोडली पण शिक्षा मात्र सर्व
इस्राएल लोकांना झाली. आखान, त्याच्या पापामुळे मेला
पण आणखीही बरीच माणसे मरण पावली.”

21तेव्हा रऊबेन गाद आणि मनश्शेच्या वंशातील लोक
यांनी या अकरा जणांना उत्तर दिले. ते म्हणाले, 22“परमेश्वर
हाच आमचा देव आहे.* परमेश्वर हाच आमचा समर्थ
परमेश्वर आहे. आणि आम्ही हे का केले हे देवाला
माहीत आहे. तुम्हीही समजून घ्या. आम्ही केले ते उचितच
आहे हे तुमच्या लक्षात येईल. आम्ही चुकलो अशी तुमची
खात्री पटली तर आम्हाला जिवंत ठेवू नका. 23आम्ही
देवाचा नियम मोडला असेल तर परमेश्वरानेच आम्हाला
शिक्षा करावी. 24आम्ही ही वेदी होमार्पण धान्यार्पणा किंवा
शांति-अर्पण करण्यासाठी बांधली असे तुम्हाला वाटते
का? नाही, आम्ही ती त्यासाठी बांधली नाही. मग का
बांधली बरे? उद्या कदाचित् तुमचे वंशज आम्हाला
आपल्यापैकीच एक म्हणून ओळखणार नाहीत अशी
आम्हाला भीती वाटली. तुम्ही कोण इस्राएल लोकांच्या
परमेश्वर देवाची आराधना करणारे? असे कदाचित् ते
विचारतील. 25देवाने आम्हाला यार्देनच्या पलीकडच्या
तीरावरची जमीन दिली आहे. नदीमुळे आपण वेगळे पडलो
आहोत. उद्या तुमची मुले मोठी होऊन तुमच्या प्रदेशावर
सत्ता गाजवू लागली की, आम्हीही तुमच्यापैकीच आहोत
हे ती विसरतील मग ते म्हणतील, ‘हे रऊबेन आणि गाद
इस्राएलांपैकी नव्हेत’ आणि तुमचे वंशज आमच्या वंशजांना
परमेश्वराची आराधना करायला प्रतिबंध करतील.

26“म्हणून आम्ही ही वेदी बांधायचे ठरवले. पण यज्ञार्पणे
किंवा होमार्पणे करण्याच्या हेतूने ती बांधली नाही. 27तुमचा
आणि आमचा परमेश्वर एकच आहे हे दाखवणे हा वेदी
बांधण्यामागचा उद्देश होता. तुम्हा आम्हाला व पुढच्या
पिढ्यांना ही वेदी साक्ष राहील की हा आपला परमेश्वर
आहे. आम्ही परमेश्वराला यज्ञार्पणे, अन्नार्पणे, शांतिअर्पणे
करु. तुमच्याप्रमाणेच आम्हीही इस्राएल लोकांपैकी आहोत
हे तुमच्या वंशजांना कळावे अशी आमची इच्छा आहे.
28आम्ही इस्राएल नाही असे उद्या तुमची मुले म्हणाली तर
आमची मुले म्हणतील, ‘ही पाहा आमच्या वाडवडिलांनी
बांधलेली वेदी. ही वेदी तंतोतंत परमेश्वराच्या पवित्र
निवासस्थानामधील वेदीसारखीच आहे. ही आम्ही
यज्ञासाठी वापरत नाही. आम्ही ही इस्राएलचाच एक भाग
आहोत याची ही साक्ष आहे.’

29“परमेश्वराविरुद्ध बंड करावे असे खरोखरच
आम्हाला वाटत नाही. त्याच्या मार्गाने जायचे आम्ही

---

**परमेश्वर ... आमचा देव आहे** किंवा “याव्हे खरा देव आहे! याव्हे खरा देव आहे!” शब्दश: “एल-एलोहिम याव्हे! एल-एलोहिम याव्हे!”

थांबवणार नाही. परमेश्वराच्या निवासस्थानासमोरची वेदी
हीच खरी हे आम्हाला माहीत आहे. तीच परमेश्वर देवाची
आहे."

30रऊबेनी, गादी आणि मनश्शेचे लोक काय म्हणाले
ते फिनहास याजक व त्याच्या बरोबर आलेले इतर प्रमुख
यांनी ऐकले. त्यांना ते पटले. या लोकांचे म्हणणे खरे
आहे असे त्यांचे समाधान झाले. 31तेव्हा फिनहास याजक
त्यांना म्हणाला, "परमेश्वराची आपल्याला साथ आहे हे
आता आपण जाणतो. तुम्ही त्याच्याविरुध्द बंड केले नाही
हे आम्हाला कळले. आता परमेश्वर इस्राएल लोकांना
शिक्षा करणार नाही, म्हणून आम्हाला आनंद वाटतो."

32मग फिनहास आणि सर्व प्रमुख आपल्या घरी परतले.
रऊबेनी आणि गादी यांना गिलाद मध्ये सोडून कनान येथे
आले. त्यांनी इस्राएल लोकांना सर्व हकीकत सांगितली.
33इस्राएल लोकांचेही त्याने समाधान झाले. आनंद वाटून
त्यांनी परमेश्वराचे आभार मानले. रऊबेनी, गादी आणि
मनश्शे या लोकांविरुद्ध चढाई न करण्याचे त्यांनी ठरवले.
ते लोक जेथे राहात होते तो प्रदेश नष्ट न करण्याचे
त्यानी ठरवले.

34रऊबेनी आणि गादी यांनी या वेदीला नाव दिले, ते
असे, "परमेश्वर हाच देव आहे असा आमचा विश्वास
आहे ह्याची ही साक्ष."

## यहोशवाचे लोकांना प्रोत्साहन

23 परमेश्वराने इस्राएल लोकांना भोवतालच्या
शत्रूंपासून विसावा दिला. त्यांना सुरक्षित केले.
अशी अनेक वर्षे लोटली, आता यहोशवा बराच वृध्द
झाला होता. 2तेव्हा एकदा, इस्राएल लोकांमधील वडीलधारी
मंडळी, कुटुंबप्रमुख, न्यायाधीश, अंमलदार या सर्वांना
यहोशवाने भेटीसाठी एकत्र बोलावले. तो त्यांना म्हणाला,
"मी आता म्हातारा झालो. 3परमेश्वराने आपल्या शत्रूंची
काय परिस्थिती करुन टाकली ते तुम्ही पाहिले. आपल्याला
मदत करण्याच्या उद्देशाने त्याने ते केले. तुमचा परमेश्वर
देव तुमच्यासाठी लढला. 4यार्देन नदी आणि पश्चिमेला
भूमध्य समुद्र यांच्या मधली जमीन तुम्ही काबीज करू
शकता हे मी तुम्हाला सांगितल्याचे तुमच्या लक्षात असेलच.
ती भूमी तुम्हाला द्यायचे मी वचन दिले आहे, पण अजून
तुम्ही ती ताब्यात घेतली नाही. 5तेथील रहिवाश्यांना तुमचा
परमेश्वर देव घालवून देईल. तुम्ही ती आपल्या ताब्यात
घ्याल. तेथील लोकांना परमेश्वर हुसकावून लावील.
तुमच्यासाठी त्याने हे करायचे कबूल केले आहे.

6"परमेश्वराने दिलेल्या आज्ञा तुम्ही कटाक्षाने पाळल्या
पाहिजेत. मोशेच्या नियमशास्त्रान जे जे लिहिले आहे त्या
सर्वांचे पालन करा. त्याच्याकडे पाठ फिरवू नका. 7इस्राएल
नसलेलीही काही माणसे अजून आपल्यात आहेत. ती
त्यांच्या दैवतांची पूजा करतात. अशा लोकांशी मैत्री करु
नका. त्यांच्या दैवतांची सेवा किंवा पूजा करु नका.
8आपल्या परमेश्वर देवाचीच उपासना करा. पूर्वी तुम्ही हे
केले आहे व पुढेही करत राहा.

9"परमेश्वराने तुम्हाला तुमच्यापेक्षा बलाढ्य राष्ट्रांचा
पराभव करायला मदत केली आहे. त्याने त्या लोकांना
बाहेर पडायला भाग पाडले. कोणीही तुम्हाला आतापर्यंत
पराभूत करु शकले नाही. 10परमेश्वराच्या साहाय्याने,
एक इस्राएल माणूस शत्रूच्या हजार सैनिकांना सळो की
पळो करु शकतो. कारण खुद्द तुमचा परमेश्वर देवच
तुमच्या वतीने लढतो. असे करायचा परमेश्वराने शब्द
दिला आहे. 11तेव्हा तुम्ही आपल्या परमेश्वरावरच प्रेम
करत राहा.

12"आपल्या परमेश्वराच्या उपासनेत खंड पडू देऊ नका.
इस्राएली, खेरीज इतर लोकांशी मैत्री करू नका. त्यांच्याशी
लग्न संबंध ठेवू नका. पण या लोकांशी मैत्री ठेवलीत तर
13शत्रूला पराभूत करायला तुमचा परमेश्वर देव तुम्हाला
मदत करणार नाही. हे लोक तुमच्यासाठी सापळा ठरतील
डोळ्यांत धूर आणि धूळ जाऊन त्रास व्हावा तसा तुम्हाला
या लोकांमुळे त्रास होईल. मग तुम्हाला ही चांगली भूमी
सोडावी लागेल. परमेश्वराने तुम्हाला ती दिली, पण त्याच्या
आज्ञा पाळल्या नाहीत तर तुम्ही देशोधडीला लागाल.

14"माझी अखेर आता जवळ येऊन ठेपली आहे.
परमेश्वराने तुमच्यासाठी बऱ्याच महान गोष्टी केल्या हे
तुम्ही जाणता व खरोखरच त्यावर विश्वास ठेवता. त्याने
दिलेला शब्द पाळण्यात कुठेही कसूर केली नाही हे
तुम्हाला माहीत आहेच. आपल्याला दिलेले प्रत्येक वचन
त्याने पुरे केले. 15परमेश्वर देवाने आपल्याला जी काही
चांगली वचने दिली ती सर्व प्रत्यक्षात आली. पण तसेच
त्याचे दुसरे वचनही प्रत्यक्षात आल्याखेरीज राहणार नाही.
आपण चुकीने वागलो तर आपल्यावर संकटे ओढवतील
असाही त्याने शब्द दिला आहे. त्याने दिलेली ही चांगली
सुपीक जमीन सोडून आपल्याला जावे लागेल असेही त्याने
शपथपूर्वक उच्चारले आहे. 16तुम्ही तुमच्या परमेश्वर
देवाशी केलेल्या कराराचा भंग केलात तर असे घडेल.
इतर दैवतांच्या भजनी लागलात तर तुम्ही या जमीनीला
मुकाल. तेव्हा त्या इतर दैवतांची चुकूनसुध्दा पूजा करु
नका. तसे केलेत तर आपल्या परमेश्वराचा तुमच्यावर
कोप होईल. आणि मग त्याने दिलेल्या या चांगल्या प्रदेशातून
तो तुमची हकालपट्टी करेल."

## यहोशवाचा अखेरचा निरोप

24 यहोशवाने इस्राएल लोकांच्या सर्व वंशांना शखेम
येथे एकत्र बोलावले. इस्राएलीं पैकी वडीलधारी
मंडळी, न्यायाधीश, प्रमुख, अधिकारी या सर्वांना पुढे
बोलावले. ही मंडळी परमेश्वरासमोर उभी राहिली.

2मग यहोशवा सर्वांशी बोलला. तो म्हणाला, "इस्राएलच्या
परमेश्वर देवाचे तुम्हाला काय सांगणे आहे ते आता मी
तुम्हाला कळवतो.

फार पूर्वी तुमचे पूर्वज फरात नदीच्या पलीकडे
राहात होते. अब्राहाम आणि नाहोर यांचा बाप तेरह
याच्या काळातील लोकांविषयी मी बोलत आहे.
त्यावेळी हे लोक इतर दैवतांची पूजा करत होते.
3पण मी, परमेश्वराने, तुमचा पूर्वज अब्राहाम याला
नदीपलीकडल्या प्रदेशातून बाहेर काढले. कनान
देशात त्याला बराच प्रवास घडवला आणि त्याला
बरीच मुलेबाळे दिली. त्याला मी इसहाक हा त्याचा
पुत्र दिला. 4मग याकोब आणि एसाव हे दोन पुत्र
इसहाकाला दिले. सेईर डोंगरा भोवतालची जमीन
मी एसावला दिली. याकोब आणि त्याची
मुलेबाळे येथे राहिली नाहीत. ती मंडळी मिसर देशात
गेली.
5मग मी मोशे आणि अहरोन यांना मिसरला
पाठवले. त्यांच्यामार्फत मला माझ्या लोकांना
मिसरमधून बाहेर काढायचे होते. त्यासाठी मी
मिसरमधील लोकांना भयंकर त्रासदायक गोष्टींनी
पिडले. आणि तुमच्या पूर्वजांना मिसरमधून बाहेर
आणले. 6अशाप्रकारे तेथून सुटका झाल्यावर ते
समुद्रापर्यंत आले तरी मिसरमधील लोक त्यांचा
पाठलाग करत होते. रथ, घोडेस्वार यांच्यासह त्यांनी
पाठलाग केला. 7तेव्हा त्यांनी माझा म्हणजे
परमेश्वराचा धावा केला. म्हणून मी मिसरमधील
लोकांना अनेक संकटांनी हैराण केले. समुद्राला
त्यांना आच्छादून टाकायला लावले आणि त्यांना
त्याने बुडवले. मिसरच्या सैन्याची मी काय स्थिती
केली ती तुम्ही डोळ्यांनी पाहिलीच आहे.
त्यानंतर तुम्ही बरेच दिवस वाळवंटात काढलेत.
8मग मी तुम्हाला यार्देन नदीच्या पूर्वेकडील अमोरी
लोकांच्या प्रदेशात आणले. त्यांनी तुमच्याशी युध्द
केले पण मी तुमच्यामार्फत त्यांचा पराभव केला.
त्यांचा संहार करायचे सामर्थ्य मी तुम्हाला दिले. मग
तुम्ही त्या प्रदेशाचा ताबा घेतलात.
9त्यानंतर मवाबाचा राजा आणि सिप्पोरचा मुलगा
बालाक याने इस्राएल लोकां विरुद्ध लढण्याची तयारी
केली. त्याने बौराचा मुलगा बलाम याला
बोलावणे
पाठवून तुम्हाला शाप द्यायला सांगितले. 10पण मी
परमेश्वराने, बलामाचे म्हणणे ऐकायचे नाकारले.
तेव्हा बलामाने तुम्हाला आशीर्वादच दिला. आणि मी
तुमचे रक्षण करून तुम्हाला संकटातून बाहेर काढले.
11मग तुम्ही यार्देन नदी पार करुन यरीहो येथे
आलात. यरीहो मधील लोकांनी तुमच्याशी लढाई
केली. अमोरी, परिज्जी, कनानी, हित्ती, गिर्गाशी,
हिव्वी, यबूसी यांनीही लढाई केली. पण माझ्यामुळे
तुम्ही त्यांचा पराभव करु शकलात. 12तुमचे सैन्य
चाल करून गेल्यावर मी त्याच्यापुढे गांधील माश्शा
पाठवल्या. त्यांनी हैराण होऊन ते लोक चालते झाले.
तेव्हा तलवार किंवा धनुष्य न वापरताच तुम्ही त्या
प्रदेशाचा ताबा घेतलात.
13मी परमेश्वराने, तुम्हाला ती जमीन दिली.
तुम्हाला ती मिळवायला परिश्रम करावे लागले
नाहीत. माझ्यामुळे ती तुम्हाला मिळाली. ती शहरे
तुम्ही बांधली नाहीत–ती मी दिली. आता त्या
जमिनीवर आणि त्या नगरांमध्ये तुम्ही राहात
आहात. द्राक्षमळे आणि जैतून वृक्षांच्या बागा तुम्हाला
मिळाल्या पण त्या तुम्हाला लावाव्या लागलेल्या
नाहीत."

14मग यहोशवा लोकांना म्हणाला, "तुम्ही आत्ताच
परमेश्वराचे शब्द ऐकलेत. तुम्ही त्याची आदरपूर्वक
उपासना केली पाहिजे आणि प्रामाणिक पणाने त्याची सेवा
केली पाहिजे. तुमच्या पूर्वजांनी ज्या खोट्या दैवतांची पूजा
केली त्यांचा त्याग करा. फरात नदीच्या पलीकडे आणि
मिसरमध्ये ते फार पूर्वी घडून गेले. आता फक्त या
परमेश्वराचीच सेवा करा.
15"पण कदाचित् या परमेश्वराची सेवा करणे तुमच्या
मनात नसेल, तर ती निवड आजच करा. कोणाची उपासना
करायची ते ठरवा. फरात नदीच्या पलीकडच्या तीरावर
तुमचे पूर्वज राहात असताना त्यांनी ज्या दैवतांची पूजा
केली त्यांना तुम्ही भजणार का? की या प्रदेशात राहणाऱ्या
अमोऱ्यांचे दैवत आपले मानणार? तुमचे तुम्हीच ते ठरवा.
मी आणि माझे कुटुंबीय यांच्यापुरते बोलायचे तर आम्ही
याच परमेश्वराची सेवा करु."
16मग लोकांनी उत्तर दिले, "हाच आमचा परमेश्वर
त्याच्या सेवेत खंड पडणार नाही आम्ही इतर दैवतांची
पूजा करण्यासाठी आपल्या परमेश्वराला सोडणार नाही.
17आमच्या पूर्वजांना याच परमेश्वर देवाने मिसरमधून
बाहेर आणले. ते आम्ही जाणतो. तेथे आम्ही दास होतो.
पण परमेश्वराने तेथे आमच्यासाठी चमत्कार घडवले.
आम्हाला तेथून बाहेर आणले, एवढेच नव्हे तर इतर
प्रदेशांतून आम्ही प्रवास करताना त्यानेच आमचे रक्षण
केले. 18"तेथील रहिवाश्यांना पराभूत करायला त्यानेच
आम्हाला साहाय्य केले. आता आम्ही आहोत त्या भूमीवरील
अमोरी लोकांचा पराभव करायलाही परमेश्वराचीच
आम्हाला मदत झाली. तेव्हा आम्ही याच परमेश्वराची
सेवा करणार. तोच आमचा देव आहे."
19त्यावर यहोशवा म्हणाला, "हे खरे नाही. सतत या
परमेश्वराची सेवा करत राहणे तुम्हाला जमणार नाही.
हा परमेश्वर देव पवित्र आहे. आपल्या लोकांनी इतर
दैवतांची पूजा करण्याचा त्याला तिरस्कार वाटतो. तुम्ही
त्याच्याकडे पाठ फिरवलीत तर तो तुम्हाला क्षमा करणार
नाही. 20तुम्ही या परमेश्वराचा त्याग करुन इतर दैवतांच्या
भजनी लागलात तर तुमच्यावर संकटे कोसळतील.

परमेश्वर तुमचा नाश करील. आजवर त्याने तुमचे भले केले आहे पण त्याच्या विरुद्ध गेलात तर तो तुमचा नाश करील."

21तेव्हा लोक यहोशवाला म्हणाले, "नाही! आम्ही या परमेश्वराचीच सेवा करु."

22यहोशवा त्यांना म्हणाला, "एकदा प्रत्येकाने स्वत: कडे आणि येथे जमलेल्या लोकांकडे पाहावे. या परमेश्वराचीच सेवा करायचे ठरवले आहे याबद्दल तुमच्या सर्वांच्या मनात खात्री आहे का? तुम्ही सर्वजण याला साक्षी आहात का?"

लोक उत्तरले, "होय, नि:संशय! आम्ही सर्वांनी याच परमेश्वराची सेवा करायचे ठरवले आहे."

23तेव्हा यहोशवाने त्यांना सांगितले, "तर मग तुमच्यापैकी कोणाजवळ खोटे दैवत असतील तर ते टाकून द्या. इस्राएलांच्याच परमेश्वर देवावर मनोभावे निष्ठा ठेवा."

24लोक यहोशवाला म्हणाले, "आम्ही या परमेश्वर देवालाच मानतो. आम्ही त्याचेच फक्त ऐकू."

25मग यहोशवाने त्या दिवशी शखेम या नगतरात लोकांशी करार केला. त्यांनी पाळायचे नियम सांगितले.
26त्याने ही वचने परमेश्वराच्या नियमशास्त्रात लिहिली. मग एक मोठा दगड निवडून तो परमेश्वराच्या निवासस्थाना जवळच्या एला वृक्षाखाली उभा केला. हा दगड या कराराची साक्ष होय.

27मग यहोशवा सर्वांना उद्देशून म्हणाला, "आज आपण जे बोललो ते सर्व या दगडामुळे तुमच्या लक्षात राहील. परमेश्वर आज आमच्याशी बोलला तेव्हा हा दगड येथेच होता. तेव्हा आजच्या घटनेचे स्मरण म्हणून हा दगड राहिल. तुमच्याविरुद्ध हा साक्ष राहील. तुम्ही परमेश्वर देवाकडे पाठ फिरवायला लागलात तर हा तुम्हाला थोपवील."

28एवढे झाल्यावर यहोशवाने लोकांना घरी परतायला सांगितले. तेव्हा सर्वजण आपापल्या ठिकाणी परत गेले.

## यहोशवाचा मृत्यू

29यानंतर नूनाचा पुत्र यहोशवा मरण पावला. त्याचे वय तेव्हा एकशेदहा वर्षे होते.
30तिम्राथ सेरह या आपल्या वतनाच्या गावी त्याचे दफन करण्यात आले. गाश डोंगराच्या उत्तरेला एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात हे ठिकाण आहे.

31यहोशवाच्या हयातीत आणि त्याच्या निधनानंतरही इस्राएल लोकांनी परमेश्वराची सेवा केली. परमेश्वराने इस्राएलासाठी काय केले हे पाहिलेली वडीलधारी माणसे जिवंत असताना लोक परमेश्वराची उपासना करत राहिले.

## योसेफ घरी परतती

32इस्राएल लोकांनी मिसरमधून बाहेर पडताना योसेफच्या अस्थी बरोबर बाळगल्या होत्या. त्या त्यांनी शखेम येथे पुरल्या. शखेम नावाच्या माणसाचे वडील हमोर याच्या मुलाबाळांकडून याकोबने हा भूभाग शंभर रौप्यमुद्रांना विकत घेतला होता. हा प्रदेश योसेफच्या मुलाबाळांच्या मालकीचा झाला.

33अहरोनाचा मुलगा एलाजार हाही मरण पावला. एफ्राईमाच्या डोंगराळ प्रदेशातील गिबा येथे त्याचे दफन करण्यात आले .एलाजारचा पुत्र फिनहास याला गिबा हा प्रदेश मिळाला.

# शास्ते

### यहूदाची कनान्यांवर चढाई

1 यहोशवा वारला. त्यानंतर इस्राएल लोकांनी
परमेश्वराची प्रार्थना केली. ते म्हणाले, “कनानी
लोकांशी लढाई करण्यासाठी आमच्यापैकी कोणत्या
वंशाच्या लोकांनी प्रथम चढाई करावी?”
2परमेश्वर इस्राएल लोकांना म्हणाला, “यहूदाच्या
वंशातील लोकांनी प्रथम जावे. हा प्रदेश ताब्यात घेण्यास
मी त्यांना मदत करीन.”
3यहूदाच्या लोकांनी शिमोनच्या वंशातील आपल्या
बांधवांकडे मदतीची मागणी केली. ते म्हणाले, “परमेश्वराने
आपल्या सर्वांना जमिनीत हिस्सा द्यायचे अभिवचन दिले
आहे. आमची जमीन ताब्यात घेण्यासाठी तुम्ही आम्हाला
मदत केली तर तुमची जमीन ताब्यात घ्यायला आम्ही
तुमच्या मदतीला येऊ.” तेव्हा शिमोनचे लोक या लढाईत
यहूदी लोकांना साथ द्यायला तयार झाले.
4परमेश्वराच्या मदतीने यहूदाच्या लोकांनी कनानी
आणि परिज्जी यांचा पराभव केला. बेजेक नगरात यहूदाच्या
लोकांनी दहा हजार माणसे मारली. 5बेजेकचा राजा त्यांच्या
हाती आला. त्याच्याशी ते लढले. तसेच कनानी व परिज्जी
यांना पराभूत केले.
6बेजेकच्या राजाने पळून जायचा प्रयत्न केला. पण
यहूदाच्या लोकांनी त्याचा पाठलाग करुन त्याला पकडले.
त्याच्या हातापायाचे अंगठे तोडले. 7तेव्हा तो राजा म्हणाला,
“मी आत्तापर्यंत सत्तर राजांच्या हातापायांचे अंगठे कापले
आहेत. मी ताटाबाहेर टाकलेले अन्न त्यांना वेचून खावे
लागत होते. त्या राजांबरोबर मी ज्या गोष्टी केल्या त्याबद्दल
परमेश्वराने मला परतफेड केली आहे.” यहूदाच्या लोकांनी
मग त्या बेजेकच्या राजाला यरुशलेम येथे नेले. तेथेच तो
मरण पावला.
8यहूदाच्या लोकांनी यरुशलेमचाही युध्दात पाडाव केला.
ते ताब्यात घेतले. तलवारींचा वापर करुन त्यांनी तेथील
लोकांना कापून काढले. नंतर शहराला आग लावली.
9यहूदाचे लोक पुढे डोंगराळ प्रदेशात, नेगेबमध्ये तसेच
पश्चिमेकडील डोंगर पायथ्याशी राहणाऱ्या आणखी काही
कनानी लोकांवर चढाई करुन गेले. 10मग हेब्रोन (म्हणजेच
पूर्वीचे किर्याथ-आर्बा) या शहरात राहणाऱ्या कनानी
लोकांशी यहूद्यांनी लढाई केली. शेशय, अहीमन आणि
तलमय या तिघांना यहूद्यांनी पराभूत केले.

### कालेब आणि त्याची मुलगी

11येथून निघून यहूदाचे लोक पुढे दबीर येथे राहणाऱ्यांवर
चाल करुन गेले (दबीरचे नाव पूर्वी किर्याथ-सेफर असे
होते.) 12यहूदाच्या लोकांनी उठाव करण्यापूर्वी कालेब
त्यांना म्हणाला, “किर्याथ सेफरचा पाडाव व्हावा अशी
माझी इच्छा आहे. जो कोणी युध्दात हे नगर घेईल त्याला
मी माझी मुलगी अखसा देईन. ती त्याची पत्नी होईल.”
13कालेबला कनाज नावाचा धाकटा भाऊ होता. त्याचा
मुलगा अथनिएल. अथनिएलने किर्याथ-सेफर नगर
काबीज केले. तेव्हा कालेबने अथनिएलशी अखसाचा
विवाह करुन दिला.
14ती अथनिएल जवळ राहायला गेली. अथनिएलने
अखसाला आपल्या वडीलांजवळ आणखी थोडी जमीन
मागायला सांगितले. ती आपल्या वडीलांकडे गेली. ती
जेव्हा गाढवावरुन उतरली तेव्हा कालेबने तिला विचारले,
“काय झाले?”
15अखसा वडीलांना म्हणाली, “मला आशीर्वाद द्या. मला
तुम्ही नेगेबमधील कोरडे वाळवंट असलेली जमीन दिली
आहे. तेव्हा पाणी असलेली अशी काही जमीन मला द्या.”
तेव्हा कालेबने तिला हवेतसे वरच्या व खालच्या बाजूचे
झरेही दिले.
16केनी लोकांनी खजुरीच्या झाडांचे नगर (म्हणजेच
यरीहो) सोडले. ते यहूदा लोकांना सामील झाले. ते यहूदाच्या
वाळवंटात तेथील लोकांबरोबर राहू लागले. अराद
नगराजवळ नेगेबमध्ये हे ठिकाण आहे. (केनी हे मोशेच्या
सासऱ्याच्या वंशातील लोक होते.)
17काही कनानी लोक सफात नगरात राहात होते.
तेव्हा यहूदा आणि शिमोनच्या लोकांनी या कनान्यांवर
हल्ला केला. त्यांनी ते नगर पूर्णपणे उध्वस्त केले आणि
त्या नगराचे नाव हर्मा ठेवले.
18मग गज्जा व त्याभोवतालची खेडी तसेच अष्कलोन
व एक्रोन ही नगरे व त्यांच्या भोवतालची खेडी हा सर्व
प्रदेश यहूद्यांनी काबीज केला.
19या लढाईत परमेश्वर यहूद्यांच्या बाजूचा होता. त्यांनी
डोंगराळ प्रदेशातील जमीन घेतली पण खोऱ्यांमधील जमीन
घेण्यास ते असमर्थ ठरले. कारण तेथील लोकांकडे लोखंडी
रथ होते. 20हेब्रोन जवळची जमीन कालेबला द्यायची असे
मोशेने वचन दिले होते. त्याप्रमाणे ती जमीन कालेबच्या

वंशजांना मिळाली. अनाकच्या तिन्ही मुलांना कालेबच्या
लोकांनी तेथून हद्दपार केले.

### बन्यामीनचे वंशज यरुशलेममध्ये स्थायिक

21बन्यामीनचे वंशज यबूसी लोकांना यरुशलेममधून
हुसकावून लावू शकले नाहीत. त्यामुळे आजतागायत ते
यरुशलेममध्ये बन्यामीनी लोकां बरोबर राहात आहेत.

### योसेफचे वंशज बेथेल ताब्यात घेतात

22-23योसेफच्या वंशातील लोक बेथेल नगरावर हल्ला
करायला चाल करुन गेले. (बेथेलचे नांव पूर्वी लूज असे
होते.) योसेफच्या लोकांना परमेश्वराची साथ होती.
योसेफच्या लोकांनी आधी काही हेर बेथेलला पाठवले.
बेथेलचा पाडाव करण्याच्या दृष्टीने त्यांनी टेहेळणी केली.
24ती करत असताना त्यांना एक माणूस नगराबाहेर येताना
दिसला. त्याला ते म्हणाले, “आम्हाला या नगरात जायची
गुप्त वाट दाखव आम्ही या नगरावर हल्ला करणार आहोत.
तू आम्हाला एवढी मदत केलीस तर आम्ही तुला धक्का
लावणार नाही.”
25तेव्हा त्या माणसाने हेरांना एक गुप्त वाट दाखवली.
योसेफच्या लोकांनी बेथेलमधील लोकांना तलवारीने
कापून काढले. पण या माणसाला कोणतीही इजा पोचू
दिली नाही. तसेच त्याच्या कुटुंबियांनाही त्रास दिला नाही.
त्या सर्वांना त्यांनी कोठेही निघून जायला मोकळीक दिली.
26तेव्हा तो माणूस त्याच्या कुटुंबासह हित्ती लोकांच्या प्रदेशात
गेला व तेथे त्याने एक नगर उभे केले. त्याने त्या नगराचे
नाव लूज असे ठेवले आजही ते त्याच नावाने ओळखले
जाते.

### इतर वंशाच्या लोकांची कनान्यांशी लढाई

27बेथ-शान, तानख, दोर, इब्लाम आणि मगिद्दो ही
नगरे आणि त्यांच्या भोवतालची खेडी यातही कनानी
लोक राहात होते. मनश्शेच्या वंशातील लोक या सर्वांना
नगर सोडून द्यायला भाग पाडू शकले नाहीत. आणि त्यामुळे
कनानी लोक तिथेच राहिले. त्यानी आपला प्रदेश सोडायचे
नाकारले. 28पुढे इस्राएल लोक समर्थ बनले तेव्हा त्यांनी
या लोकांना आपले गुलाम म्हणून काम करायला लावले.
पण कनानी लोकांना शहर सोडून जायला ते भाग पाडू
शकले नाहीत.
29एफ्राईमच्या वंशजांच्या बाबतीतही असेच घडले. गेजेर
मध्ये कनानी राहात होते. त्यांना एफ्राईमचे वंशज देशातून
बाहेर काढू शकले नाहीत. तेव्हा हे कनानी लोक एफ्राईम
लोकांबरोबर गेजेरमध्ये राहू लागले.
30हीच गोष्ट जबुलूनच्या वंशजांच्या बाबतीतही घडली.
कित्रोन आणि नहलोल या शहरांमध्ये ही काही कनानी
राहात होते. त्यांना जबुलूनचे लोक बाहेर घालवू शकले
नाहीत. तेव्हा हे कनानी जबुलून लोकांबरोबरच राहिले.
जबुलून लोकांनी त्यांना आपल्या कामांसाठी गुलाम
केले.
31आशेर लोकांच्या बाबतीतही हेच झाले. अक्को, सीदोन,
अहलाब, अकजीब, हेल्बा, अफीक व रहोब या
नगरांमधील लोकांना आशेर यांनी बाहेर काढले नाही.
32कनान्यांना त्यांनी सक्तीने देश सोडायला लावला नाही.
तेव्हा कनानी त्यांच्या बरोबरच राहिले.
33नफतालींच्या बाबतीत हेच झाले. बेथ-शेमेश आणि
बेथ-अनाथ येथील लोकांना त्यांनी जबरदस्तीने बाहेर
घालवले नाही. नफताली त्या नगरांमधील लोकांबरोबर
राहू लागले. तेथील कनानी लोक नफतालींचे गुलाम
झाले.
34अमोरी लोकांनी दानच्या वंशजांना डोंगराळ भागातच
राहाणे भाग पाडले. त्यांना तेथेच राहावे लागले कारण
अमोरी त्यांना खाली खोऱ्यात उतरुन वस्ती करु देईनात.
35अमोरी लोकांनी हेरेस, अयालोन व शालबीम या
डोंगरांमध्ये राहायचे ठरवले. पुढे योसेफचे वंशज जसे
आणखी समर्थ बनले तसे त्यांनी अमोऱ्यांना आपले दास
म्हणून कामाला जुंपले. 36अमोऱ्यांची सीमा अक्रब्बीम
खिंडीपासून सेलापर्यंत व सेलावरुन पुढे डोंगराळ प्रदेशापर्यंत
होती.

### बोखीम येथे परमेश्वराचा दूत

2 परमेश्वराचा दूत गिलगाल नगरातून बोखीम या
नगरात आला. इस्राएल लोकांना त्याने परमेश्वराचा
संदेश सांगितला. संदेश असा होता; “मी तुम्हाला मिसरमधून
बाहेर आणले. तुमच्या पूर्वजांना वचन दिलेल्या प्रदेशापर्यंत
तुम्हाला आणले. तुमच्याशी केलेला करार मी मोडणार
नाही असे मी तुम्हाला सांगितले होते. 2त्यामुळे तुम्ही त्या
प्रदेशात राहणाऱ्यां लोकांशी करार करू नका. त्यांच्या
वेद्यां उध्वस्त करा असे मी तुम्हाला स्पष्ट सांगितले होते,
पण तुम्ही माझे ऐकले नाही.”
3“म्हणून मी म्हणतो, ‘आता या लोकांना त्यांचा देश
सोडून जायला मी भाग पाडणार नाही. तुमच्यापुढे ते समस्या
निर्माण करतील. त्यांचा पाश तुमच्याभोवती पडेल. त्यांच्या
खोट्या देवता जाळ्यांप्रमाणे तुम्हाला अडकवून टाकतील.’”
4देवदूताने परमेश्वराचा हा संदेश इस्राएल लोकांना
ऐकवल्यावर ते आक्रोश करु लागले. 5म्हणून त्या
ठिकाणाचे नाव त्यांनी बोखीम असे ठेवले. बोखीम येथे
त्यांनी परमेश्वरासाठी यज्ञ केले.

### आज्ञाभंग आणि पराभव

6मग यहोशवाने सर्वांना घरी जायला सांगितले. तेव्हा
सर्व वंशांचे लोक आपापल्या वतनाचा ताबा घ्यायला परतले.
7यहोशवाच्या हयातीत आणि त्याच्या मृत्यूनंतर, वडीलधारी
मंडळी जिवंत असे पर्यंत इस्राएलचे लोक परमेश्वराची
उपासना करत होते. या वृध्द मंडळीनी परमेश्वराने इस्राएल

लोकांसाठी केलेल्या महान गोष्टी पाहिल्या होत्या.
[8]परमेश्वराचा सेवक नूनपुत्र यहोशवा एकशेदहा वर्षांचा
होऊन वारला. [9]इस्राएल लोकांनी त्याचे दफन केले.
तिम्नाथ-हेरेस येथे, गाश डोंगराच्या उत्तरेस एफ्राईमच्या
डोंगराळ प्रदेशात त्याला मिळालेल्या जमिनीत त्याला त्यांनी
पुरले.

[10]जुन्या पिढीतील सर्व जण मृत्यू पावल्यानंतर नवीन
पिढी पुढे आली. त्यांना परमेश्वराविषयी आणि परमेश्वराने
इस्राएल लोकांसाठी काय केले याविषयी काहीही माहिती
नव्हती. [11]तेव्हा या इस्राएल लोकांनी परमेश्वराच्या दृष्टीने
वाईट अशी दुष्कृत्ये केली आणि बआल या दैवताच्या
भजनी लागले. हे निंद्य कृत्य करताना त्यांना परमेश्वराने
पाहिले. [12]परमेश्वराने इस्राएल लोकांना मिसरमधून
बाहेर आणले होते. आणि त्यांच्या पूर्वजांनी परमेश्वराची
उपासना केली होती. पण आता या इस्राएल लोकांनी
परमेश्वराचे अनुसरण करण्याचे सोडून दिले होते, आणि
त्यांच्या अवती भोवतीच्या लोकांच्या खोट्या दैवतांची पूजा
करायला सुरुवात केली होती. याचा परमेश्वराला संताप
आला. [13]इस्राएल लोकांनी आता परमेश्वराला सोडून
बआल आणि अष्टारोथ यांची उपासना करायला सुरुवात
केली.

[14]परमेश्वराचा इस्राएल लोकांवर कोप झाल्यामुळे
त्यांच्यावर शत्रू चाल करुन येऊ लागला व त्यांना लुटू
लागला. भोवताली राहणाऱ्या शत्रूंकडून ते पराभूत होऊ
लागले. इस्राएल लोकांना शत्रूपासून आपले रक्षण करता
येईना. [15]लढाईत त्यांना नेहमी अपयश येऊ लागले.
परमेश्वराची साथ आता त्यांना नसल्यामुळे ते पराजित
होऊ लागले. त्यांच्या भोवती राहणाऱ्या लोकांच्या दैवतांची
सेवा केल्यास इस्राएल लोकांना पराभव पत्करावा लागेल
हे परमेश्वराने आधीच बजावले होते.

[16]तेव्हा परमेश्वराने न्यायाधीश म्हणून, ओळखल्या
जाणाऱ्या नेत्यांची नेमणूक केली. हे नेते इस्राएलांचा ताबा
घेणाऱ्या शत्रुंपासून त्यांची सुटका करीत. [17]इस्राएल लोक
या न्यायाधीशांनाही जुमानीतनासे झाले. आपल्या
परमेश्वराशी इस्राएल लोक निष्ठावंत राहिले नाहीत ते
इतर दैवतांच्या भजनी लागले.* पूर्वी या इस्राएल लोकांचे
पूर्वज परमेश्वराच्या आज्ञा पाळत असत. पण आता त्यांच्या
वागणुकीत बदल झाला आणि परमेश्वराने सांगितलेला
मार्ग त्यांनी सोडून दिला.

[18]अनेकदा शत्रु इस्राएलांचा जाच करत. अशावेळी ते
मदतीसाठी परमेश्वराचा धावा करीत आणि तेव्हा त्यांची
दया येऊन परमेश्वर त्यांच्या सुटकेसाठी न्यायाधीशाला
पाठवी. परमेश्वर या न्यायाधीशांच्या बरोबर होता. म्हणून
इस्राएल लोकांचे दरवेळी शत्रूपासून रक्षण झाले. [19]पण
प्रत्येक न्यायाधीशाच्या मृत्यूनंतर ते पुन्हा पुन्हा पापाकडे
झुकत आणि अन्य दैवतांची उपासना करत आणि त्यांची
सेवा करत असत. त्यांच्या पूर्वजांपेक्षाही ते अधिक वाईट
वागत असत. त्यांच्या आडमुठ्या स्वभावामुळे आपल्या
दुर्वतनात फरक करायला त्यांनी नकार दिला.

[20]तेव्हा परमेश्वराचा इस्राएल लोकांवर अतिशय संताप
झाला व तो म्हणाला, “मी यांच्या पूर्वजांशी केलेला करार
या राष्ट्राने मोडला आहे. त्यांनी माझे ऐकले नाही. [21]तेव्हा
मी यापुढे त्यांच्या शत्रूंचा पराभव करुन इस्राएल लोकांचा
मार्ग मोकळा करत जाणार नाही. यहोशवा वारला तेव्हा
जी राष्ट्रे या भूमीत होती त्यांना मी येथेच राहू देईन.
[22]इस्राएल लोकांच्या कसोटीसाठी मी या राष्ट्रांचा वापर
करीन. आपल्या पूर्वजांप्रमाणे आताचे इस्राएल लोक
परमेश्वराची आज्ञा पाळतात का ते बघू.” [23]तेव्हा
परमेश्वराने इतर राष्ट्रांना त्या त्या ठिकाणी राहू दिले.
त्यांना तो देश लगेच सोडून जायची बळजबरी केली नाही.
त्यांचा पराभव करायला परमेश्वराने यहोशवाच्या सैन्याला
साहाय्य केले नाही.

3 [1–2]परमेश्वराने इतर राष्ट्रातील त्या लोकांना
इस्राएलींचा प्रदेश सोडण्यास भाग पाडले नाही.
परमेश्वराला इस्राएल लोकांची परिक्षा घ्यायची होती. या
पिढीतील इस्राएल लोकांनी कनानातील देश काबीज
करण्यासाठी लढाईत भाग घेतला नव्हता. तेव्हा त्या
राष्ट्रांमधील लोकांना परमेश्वराने तेथेच राहू दिले. (कधी
युद्ध माहीत नसलेल्या या इस्राएल लोकांना धडा
शिकवण्यासाठी परमेश्वराने असे केले.) तेथे राहू दिलेल्या
राष्ट्रांची नावे अशी. [3]पलिष्ट्यांचे पाच राजे, सर्व कनानी
लोक, सीदोनी, व बआल-हर्मोनच्या डोंगरापासून ते लेबो
हमाथपर्यंतच्या लबानोन डोंगरावर राहणारे हिव्वी. [4]या
योगे इस्राएल लोकांची परीक्षा पाहावी आणि मोशेमार्फत
त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या आज्ञा ते पाळतात की नाही हे
पाहावे म्हणून परमेश्वराने असे केले.

[5]कनानी, हित्ती, अमोरी, परिज्जी, हिव्वी आणि यबूसी
या लोकांबरोबर इस्राएल लोक राहिले. [6]इस्राएल लोकांनी
त्यांच्याशी बेटीव्यवहार केला. त्यांच्या मुलींशी लग्ने केली,
तसेच आपल्या मुली त्यांच्या मुलांना दिल्या. तसेच त्यांच्या
दैवतांची इस्राएल लोक उपासना करु लागले.

## पहिला न्यायाधीश अथनिएल

[7]इस्राएल लोक दुर्वर्तन करत आहेत हे परमेश्वराने
पाहिले. ते त्यांचा देव परमेश्वर ह्याला विसरले आणि
बआल हे दैवत व अशेरा देवी यांची उपासना करु लागले.
[8]त्यामुळे परमेश्वर इस्राएल लोकांवर संतप्त झाला.
मेसोपटेमियाचा राजा कुशन-रिशाथईम याचे करवी
परमेश्वराने इस्राएल लोकांचा पराभव होऊ दिला व त्याची
सत्ता त्यांच्यावर आणली. इस्राएल लोक आठ वर्षे त्यांच्या
अंमलाखाली होते. [9]तेव्हा इस्राएल लोकांनी मदतीसाठी

---

**आपल्या परमेश्वराशी … भजनीलागले** शब्दश, “वेश्येप्रमाणे इतर दैवतांकडे वळले.”

परमेश्वराचा धावा केला. तेव्हा परमेश्वराने अथनिएलला
त्यांच्या रक्षणासाठी पाठवले. कालेबचा धाकटा भाऊ
कनाज याचा अथनिएल मुलगा होता. त्याने इस्राएल लोकांचे
रक्षण केले. [10]अथनिएलावर परमेश्वराचा आत्मा आला
आणि तो इस्राएल लोकांचा न्यायाधीश झाला. त्याने इस्राएली
सैन्याला लढाईस नेले. परमेश्वराच्या मदतीने अथनिएल
ने कुशन-रिशाथईमचा पराभव केला. [11]आणि कनाजपुत्र
अथनिएलच्या मृत्यूपर्यंत चाळीस वर्षे त्या प्रदेशात शांतता
होती.

## दुसरा न्यायाधीश एहूद

[12]पुन्हा इस्राएल लोक परमेश्वराच्या दृष्टीने वाईट असे
आचरण करु लागले. ते परमश्वराने पाहिले. तेव्हा मवाबचा
राजा एग्लोन याला इस्राएल लोकांना पराभूत करण्याचे
सामर्थ्य परमेश्वराने दिले. [13]अम्मोनी आणि अमालेकी
लोकांची मदत त्याला मिळाली. त्यांनी इस्राएल लोकांवर
एकत्रित हल्ला केला. एग्लोनच्या सैन्याने इस्राएलवर विजय
मिळवला व त्यांना यरीहो हे खजुरीच्या झाडांचे नगर
सोडायला भाग पाडले. [14]पुढे एग्लोन या मवाबच्या राजाने
इस्राएलींवर अठरा वर्षे राज्य केले.

[15]त्यांनी पुन्हा परमेश्वराचा धावा केला तेव्हा
परमेश्वराने एहूदला लोकांच्या रक्षणासाठी पाठवले. एहूद
हा डावरा असून, बन्यामीनच्या वंशातील गेरा याचा मुलगा
होता. इस्राएल लोकांनी एहूदला नजराणा घेऊन एग्लोनकडे
पाठवले. [16]एहूदने एक अठरा इंच* लांबीची दुधारी तलवार
बनवून घेतली आणि ती उजव्या मांडीवर कपड्यांखाली
झाकली जाईल अशी बांधली.

[17]मग मवाबचा राजा एग्लोन याच्याकडे तो नजरणा
घेऊन गेला. (एग्लोन हा अतिशय लठ्ठ होता.) [18]एहूदने
एग्लोनला नजराणा दिला व तो बरोबर घेऊन आलेल्यांना
त्याने पाठवून दिले. [19][त्यांनी राजवाडा सोडला] जेव्हा
एहूद गिलगालमधील मुर्तीजवळ आला तेव्हा तो मागे फिरला
आणि राजाला भेटण्यासाठी परत गेला. एहूद राजा एग्लोनला
म्हणाला, “हे राजा, मी तुझ्यासाठी एक गुप्त संदेश आणला
आहे.”

राजाने त्याला गप्प बसायची खूण करुन सर्व
नोकरचाकरांना दालनाच्या बाहेर जायला सांगितले. [20]एहूद
राजाच्या अगदी जवळ गेला. एग्लोन आता आपल्या
राजवाड्याच्या दालनात अगदी एकटा होता.

तेव्हा एहूद म्हणाला, “तुला देवाकडून एक संदेश
आहे.” राजा सिंहासनावरुन उठला आता तो एहूदच्या
अगदी निकट होता. [21]राजा उठल्याबरोबर उजव्या
मांडीवर बांधलेली तलवार एहूदने डाव्या हाताने उपसली
आणि राजाच्या पोटात खुपसली. [22]तलवारीचे पाते थेट
मुठीपर्यंत राजाच्या शरीरात घुसले. राजाच्या अंगातील
चरबीने पाते बरबटले. तेव्हा एहूदने ती तशीच तेथे राहू
दिली.

[23]मग तो बाहेर पडला आणि दालनाचे दरवाजे बंद
करुन त्याने त्यांना कुलूप लावले. [24]एहूद बाहेर
पडल्याबरोबर सेवक आत शिरले. पाहतात तो दरवाजे
बंद केलेले. ते पाहून, राजा स्वच्छतागृहात असेल असे
त्यांना वाटले. [25]ते तसेच बाहेर बराच वेळ थांबले. शेवटी
त्यांना काळजी वाटायला लागली. किल्ली आणून त्यांनी
कुलूप उघडून दार उघडले. आत शिरतात तर जमिनीवर
त्यांना राजाचा मृतदेह पसरलेला दिसला.

[26]नोकर राजाच्या दालनाबाहेर वाट पाहात होते तेवढ्या
वेळात एहूद निसटून जाऊ शकला. मूर्तीवरुन पुढे जाऊन
तो सेईराकडे निघाला. [27]तो सेईरा येथे पोचला तेव्हा
लगेच त्याने एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात रणशिंग फुंकले.
इस्राएल लोकांनी तो आवाज ऐकला आणि ते खाली
उतरले. एहूद त्यांच्या पुढे निघाला. [28]तो म्हणाला, “माझ्या
मागोमाग या आपला शत्रू मवाब यांला पराभूत करायला
परमेश्वराने आपल्याला मदत केली आहे.”

तेव्हा इस्राएल लोक त्याच्या पाठोपाठ निघाले. यार्देन
नदी सहजगत्या पार करुन जिथून मवाब प्रदेशात जाता
येते अशा सर्व जागांचा त्यांनी ताबा घेतला. कोणालाही
त्यांनी यार्देन पार करु दिली नाही. [29]मवाबांपैकी
जवळजवळ दहाहजार शूर आणि कणखर लोकांना इस्राएल
लोकांनी ठार केले. एकही मवाब व्यक्ती पळून जाऊ
शकला नाही. [30]त्या दिवसापासून इस्राएल लोकांचे
मवाबांवर राज्य सुरु झाले. पुढे ऐंशी वर्षे त्या प्रदेशात
शांतता नांदली.

## तिसरा न्यायाधीश शमगार

[31]एहूदनंतर आणखी एक जण इस्राएल लोकांच्या
रक्षणाला आला तो म्हणजे अनाथचा मुलगा शमगार.
त्याने बैलाच्या आरीने पलिष्ट्यांपैकी सहाशे जणांना मारले.

## दबोरा, स्त्री न्यायाधीश

4 एहूदच्या मृत्यूनंतर पुन्हा लोकांनी परमेश्वराच्या
दृष्टीने निंद्य वर्तन करायला सुरुवात केली. [2]तेव्हा
परमेश्वराने कनानी राजा याबीन याला इस्राएल लोकांचा
पराभव करु दिला. हासोर नावाच्या नगरात हा राजा
राज्य करत होता. सीसरा हा त्याचा सेनापती होता. हरोशेथ
या नगरात सीसरा राहात होता. [3]सीसराकडे नऊशे लोखंडी
रथ होते. त्याच्या जुलमी राजवटीत इस्राएल लोक वीस
वर्षे होते. तेव्हा त्यांनी परमेश्वराकडे मदतीची याचना
केली.

[4]तेव्हा दबोरा नांवाची एक संदेष्ट्री होती. ती लप्पिदोथ
नांवाच्या माणसाची पत्नी होती. ती इस्राएल लोकांची
न्यायाधीश होती. [5]एक दिवस ती खजुरीच्या झाडाखाली
बसलेली असताना सीसराबद्दल विचार विनिमय

---

**अठरा इंच** शब्दश, “हातभर लांब.”

करण्यासाठी इस्राएल लोक तिच्याकडे आले. एफ्राईमच्या
डोंगराळ प्रदेशात रामा व बेथेल यांच्यामध्ये हे खजुरीचे
झाड होते. 6तिने बाराक नामक माणसाला बोलावणे
पाठवले. बाराक हा अबीनवामचा मुलगा होता. तो
नफतालीच्या भागातील केदेश या नगरात राहात असे.
दबोरा त्याला म्हणाली, "इस्राएल लोकांच्या परमेश्वराची
तुला आज्ञा आहे की, नफताली आणि जबुलून यांच्या
वंशातील दहाहजार पुरुषांना गोळा कर. त्यांना घेऊन
ताबोर डोंगराकडे जा. 7मी सेनापती सीसरा याला रथ
आणि सैन्य यासह किशोन नदीकडे तुझ्या दिशेला यायला
लावीन. तेथे सीसराचा पराभव करायला मी तुला मदत
करीन.

8त्यावर बाराक दबोराला म्हणाला, "तूही माझ्याबरोबर
येणार असलीस तर मी हे करीन. तू नसलीस तर मात्र
करणार नाही."

9दबोरा म्हणाली, "अर्थातच मी येणार आहेच पण तुझ्या
अशा वृत्तीमुळे सीसराचा पराभव होईल तेव्हा तुझी प्रतिष्ठा
राहणार नाही. परमेश्वर एका स्त्रीच्या हातून सीसराचा
पराभव करणार आहे."

आणि दबोरा बाराक बरोबर केदेश नगराला गेली.
10तेथे बाराकने जबुलून आणि नफताली यांच्या वंशातील
लोकांना बोलावून दहाहजार जणांना घेतले. दबोराही बाराक
बरोबर होती.

11हेबेर नावाचा एक माणूस केनी लोकांमध्ये होता. तो
आपल्या लोकांपासून वेगळा झाला होता. (केनी लोक
होबाबचे वंशज होते. होबाब म्हणजे मोशेचा सासरा)
केदेशजवळच्या साननीम येथे एलोन वृक्षाजवळ हेबेरने
तळ दिला होता.

12अबीनवामचा मुलगा बाराक ताबोर डोंगरापाशी आला
असल्याचे कोणीतरी सीसराला सांगितले. 13तेव्हा सीसराने
आपले नऊशे लोखंडी रथ आणि सर्व सैन्य एकत्र केले
हरोशेथपासून त्या सर्वांनी किशोन नदीच्या दिशेने मोर्चा
वळवला.

14तेव्हा दबोरा बाराकला म्हणाली, "आज सीसराचा
पराभव करायला परमेश्वर तुला मदत करणार आहे.
त्याने आधीच तुझा मार्ग मोकळा केला आहे हे तुला
माहीतच आहे." तेव्हा बाराक ताबोर डोंगरावरुन दहाहजार
माणसांसह निघाला. 15त्यांनी सीसरावर हल्ला चढवला.
लढाईत सीसरा, त्याचे रथ, सैन्य यांच्यामध्ये परमेश्वराने
गोंधळ माजवला त्यांना काय करावे हे सुचेना. बाराक व
त्याचे सैन्य यांनी सीसराच्या सैन्याचा पराभव केला. सीसरा
रथ सोडून पळाला. 16बाराकने सीसराच्या सैन्याशी लढाई
चालूच ठेवली. त्याने व त्याच्या सैन्याने सीसराच्या रथांचा
व सैन्याचा हरोशेथपर्यंत पाठलाग केला. तलवारीने ते
सैन्य कापून काढले. एकालाही जिवंत ठेवले नाही.

17पण सीसरा पळून गेला होता. तो हेबेरची बायको
याएल हिच्या तंबूकडे आश्रयाला गेला. केनी हेबेर आणि
हासोरचा राजा याबीन यांच्यात सलोख्याचे संबंध होते.
म्हणून सीसरा तेथे गेला. 18याएलने त्याला येताना पाहिले,
तेव्हा त्याला भेटायला ती पुढे झाली व म्हणाली, "आत
या, व निर्धास्त राहा." सीसरा आत आला. तिने त्याच्यावर
जाजम टाकून त्याला लपवले.

19सीसरा याएलला म्हणाला, "मला खूप तहान लागली
आहे. आधी मला थोडे पाणी प्यायला दे." याएलने त्याला,
चामड्याच्या बुधल्यात ती दूध भरुन ठेवत असे ते प्यायला
दिले. मग तिने त्याला पुन्हा लपवले.

20तो तिला म्हणाला, "तू तंबूच्या दारात जाऊन उभी
राहा आणि "आत कोणी आहे का?" असे कोणी विचारले
तर "नाही" म्हणून सांग."

21मग याएलने तंबू ठोकायची मोठी मेख व हातोडी
घेतली. व हळूच त्याच्याजवळ गेली. सीसरा खूप थकून
गाढ झोपला होता. तिने ती मेख त्याच्या कानशिलाजवळ
ठेवून हातोडीने ठोकली. त्याच्या डोक्यातून ती आरपार
घुसून पार जमिनीत रुतली. सीसरा मरण पावला.

22तेवढ्यात सीसराला शोधत बाराक याएलच्या तंबूपाशी
पोहोंचला. याएल त्याला पाहून बाहेर गेली व म्हणाली,
"आत या तुम्हाला हवा असलेला माणूस मी दाखवते."
तेव्हा याएल बरोबर बाराक आत शिरला तेथे त्याला मेख
मारलेल्या अवस्थेत मरुन पडलेला सीसरा दिसला.

23त्या दिवशी परमेश्वराने इस्राएल लोकांसाठी
कनान्यांचा राजा याबीन याचा पराभव केला.

24या याबीनला नामोहरम करत शेवटी त्याचा नाश
करीपर्यंत इस्राएल लोकांचे सामर्थ्य उत्तरोत्तर वाढत
गेले.

## दबोराचे गीत

5 इस्राएल लोकांनी सीसराचा पराभव केला त्या दिवशी
दबोरा आणि अबीनवामचा मुलगा बाराक यांनी हे
गीत गायले

2इस्राएलचे लोक युध्दाला तयार झाले* ते स्वेच्छेने
युध्दासाठी सज्ज झाले. परमेश्वराचा धन्यवाद करा.

3राजांनो ऐका, लक्ष द्या अधिपतींनो, मी परमेश्वराचे,
इस्राएल लोकांच्या परमेश्वराचे गीत स्वत: गाईन. त्याचे
स्तुति स्तोत्र म्हणीन.

4परमेश्वरा, पूर्वी जेव्हा तू सेईरमधून आलास, अदोम
भूमीतून तू कूच केलेस. तेव्हा पृथ्वी थरारली, आकाशाने
वर्षाव केला ढगातून वृष्टी झाली.

5पर्वतांचाही थरकाप झाला परमेश्वरापुढे, सीनाय
पर्वताच्या देवापुढे, इस्राएलांचा देव परमेश्वरापुढे.

---

**लोक युध्दाला तयार झाले** "ने त्यांनी इस्राएलला मार्ग दाखवला" किंवा "इस्राएलमध्ये पुरुषांनी आपले केस लांब वाढवले" असाही अर्थ होऊ शकतो. सैनिक अनेकदा परमेश्वराखातर केस वाढवत.

6अनाथचा मुलगा शमगार याच्या आणि याएलच्या
कारकिर्दीत राजमार्ग ओस पडले वाटसरुंचे तांडे आडवाटेने
जाऊ लागले.
7दबोरा तू येईपर्यंत इस्राएलची माता म्हणून तू उभी
राहीपर्यंत* इस्राएलमध्ये सैनिक नव्हते, नावालाही सैनिक
नव्हते.
8नगराच्या वेशीपाशी युध्द करायला परमेश्वराने नवे
नेते निवडले.* तेव्हा चाळीस हजार इस्राएल लोकांत
कोणाकडेही भाला किंवा ढाल नव्हती.
9ज्यांनी स्वेच्छेने युध्दावर जाण्याचे पत्करले त्या इस्राएल
लोकांच्या सेनाधिपती बरोबर माझे हृदय आहे.
परमेश्वराचा धन्यवाद करा.
10पांढऱ्या गाढवांवर बसणाऱ्यांना, खोगिराच्या
बिछायतीवर बसणाऱ्यांनो आणि वाटेने चालणाऱ्यांनो इकडे
लक्ष द्या.
11गुरांच्या पाणवठ्यावर आम्हाला झांजांचा नाद ऐकू
येतो. जेव्हा नगराच्या वेशीपाशी परमेश्वराच्या लोकांनी
लढाई केली आणि ते जिंकले तेव्हा लोक परमेश्वराच्या
पराक्रमाची गाथा गातात, आणि इस्राएलच्या सैनिकांचे
स्तुतिस्तोत्र म्हणतात.
12ऊठ दबोरा, जागी हो, गाणे म्हण! बाराका ऊठ,
अबीनवामाच्या मुला शत्रूंना बंदिवान कर.
13उरलेल्या मानकऱ्यांनो आता आपल्या नेत्यांकडे जा.
परमेश्वराचे लोकहो, तुम्ही माझ्यासाठी सैनिकांबरोबर
जा. परमेश्वराने इस्राएलच्या वीरांना विजय मिळवून दिला.
इस्राएलमधील जिवंत राहिलेले लोक बलवान लोकांवर
विजयी झाले.
14अमालेकच्या डोंगराळ प्रदेशातून एफ्राईमचे लोक
आले. हे बन्यामीन तुमच्या पाठोपाठ ते आले माखीरच्या
वंशातूनही सेनापती आले. जबुलूनच्या लोकांतील सरदार
तांब्याचा अधिकारदंड घेऊन आले.
15इस्साखारच्या नेत्यांचा दबोराला पाठिंबा होता, तसेच
ते बाराकशीही प्रामाणिक होते. ते खोऱ्यात पायी चालत
आले. रऊबेनी, तुमच्याही सैन्यात अनेक शूर सैनिक
आहेत.
16मग तुमच्या मेंढवाड्याच्या कुंपणाजवळ* बसून का
राहिलात? शूर रऊबेनी टोळीच्या सैनिकांनी युध्दाचा
गांभीर्याने विचार केला. पण तरी शेव्व्यामेंढ्यांसाठी
वाजवलेला पावा ऐकत ते घरीच थांबले.
17गिलाद लोक यार्देन नदीपलीकडल्या आपल्या
छावणीत तसेच बसून राहिले. आणि दान लोकांनो, तुम्ही
आपल्या गलबतांजवळ नुसते बसून का राहिलात? आशेर
लोक समुद्रकाठी, सुरक्षित बंदरात तळ ठोकून राहिले.
18पण जबुलून आणि नफताली यांनी मात्र डोंगरावरच्या
त्या युध्दात प्राणांची पर्वा न करता पराक्रम केला.
19कनानी राजेही लढाईत उतरले. कनानच्या राजांनी
तनाखमध्ये, मगिद्दोच्या जलाशयाजवळ लढाई केली. पण
कोणतीही लूट बरोबर घेऊन ते गेले नाहीत.
20स्वर्गातून आकाशातील तारे आपल्या कक्षेतून
सीसराशी लढले.
21किशोन या प्राचीन नदीने सीसराच्या सैन्याला वाहून
नेले. चला, प्राणपणाने झुंजू या.
22घोड्यांचे खूर जमिनीवर आपटले. सीसराच्या दणकट
घोड्यांना पळता भुई थोडी झाली.
23परमेश्वराच्या दूताने सांगितले, "मेरोज शहराला,
त्यातील रहिवाश्यांना शाप द्या, ते सैनिकांबरोबर
परमेश्वराच्या मदतीला धावून आले नाहीत."
24याएल ही केनी हेबेरची पत्नी सर्व स्त्रियांमध्ये तिचा
धन्यवाद होईल.
25सीसराने पाणी मागितले याएलने त्याला दूध दिले
राजाला साजेशा पात्रात तिने त्याला साय दिली
26मग याएलने आपला हात पुढे केला आणि तंबूची
मेख घेतली. कारागिराची हातोडी उजव्या हातात घेतली.
सीसरावर तिचा प्रयोग केला. त्याच्या डोक्यावर आरपार
घाव घातला.
27याएलच्या पायांमध्ये तो कोसळला. तो पडला तिथेच
तो राहिला याएलच्या पायाशी तो कोसळला तिथेच तो
पडला. तिथे तो आडवा झाला तिथेच गतप्राण झाला.
28सीसराच्या आईने खिडकीतून पाहिले आणि तिने
आकांत केला. सीसराची आई पडद्याआडून पाहू लागली
"सीसराच्या रथाला एवढा उशीर का? त्याच्या रथांचा
आवाज अजून कसा ऐकू येत नाही?"
29तिच्या चाणाक्ष दासीने, होय दासीने, तिला उत्तर
दिले,
30"माझी खात्री आहे. त्यांनी युध्द जिंकले. आता ते
पराभूत लोकांकडून लूट गोळा करत आहेत ती
आपसात वाटून घेत आहेत. प्रत्येक सैनिकाला एक-दोन
मुली ही मिळाल्या आहेत. बहुधा सीसराला भरतकाम
केलेल्या रंगीत वस्त्रांची लूट मिळाली. होय, सीसराला
बहुमोल कापडच मिळाले असावे,पराक्रमी सीसराला
पांघरण्यासाठी."
31परमेश्वरा, तुझ्या शत्रूंची अशीच अखेर होवो! आणि
तुझ्यावर प्रेम करणारे लोक उगवत्या सूर्याप्रमाणे उत्तरोत्तर
सामर्थ्यवान होवोत!

अशाप्रकारे त्या प्रदेशात चाळीस वर्षे शांतता नांदली.

---

**इस्राएलाची ... राहीपर्यंत** किंवा "येईपर्यंत, दबोरा, मी येईपर्यंत" किंवा "मी तुला, दबोरा, इस्राएलची माता म्हणून स्थान देईपर्यंत."

**नेवे नेते निवडले** किंवा "ते इतर परमेश्वरांची उपासना करू लागले, म्हणून वेशीपाशी लढावे लागले." येथे मूळ हिब्रूचा अर्थ लागत नाही.

**मेंढवाड्याच्या कुंपणाजवळ** किंवा "शेकोटीजवळ" किंवा "खोगिरांशेजारी."

## मिद्यानचे इस्राएल लोकांशी युध्द

6 नंतर पुन्हा इस्राएल लोकांनी परमेश्वराने निषिध्द
म्हणून सांगितलेल्या गोष्टी केल्या. तेव्हा परमेश्वराने
मिद्यानच्या लोकांच्या अंमलाखाली त्यांना सलग सात वर्षे
ठेवले.
2मिद्यानचे लोक बलशाली होतेच, पण इस्राएल लोकांशी
क्रौर्यानेही वागत. तेव्हा इस्राएल लोकांनी लपून बसण्यासाठी
डोंगरांमध्ये गुहा केल्या. गुहांमध्ये आणि दुर्गम अशा ठिकाणी
ते अन्नधान्य ठेवत. 3कारण मिद्यानी आणि पूर्वेकडील
अमालेकी वारंवार त्यांच्या पिकांची नासधूस करत. 4ते
या प्रदेशात तळ देत आणि इस्राएल लोकांनी पेरलेल्या
पिकांचा नाश करत. थेट गज्जा पर्यंतच्या जमिनीतील
उत्पन्नाची त्यांनी वाट लावली. त्यामुळे इस्राएल लोकांसाठी
काहीच शिल्लक राहिले नाही. शेळ्यामेंढ्या, गुरेढोरे,
गाढवे देखील त्यांना राहिली नाहीत. 5आपला कुटुंब कबिला
आणि जनावरे यांच्या सकट मिद्यानी लोकांनी येऊन तेथे
तळ ठोकला. टोळधाडीसारखे ते घुसले. ते लोक व त्यांचे
उंट यांची संख्या अक्षरश: अगणित होती. त्यांनी या प्रदेशात
येऊन त्याची नासधूस करायला सुरुवात केली. 6त्यामुळे
इस्राएल लोक कंगाल झाले. त्यांनी मदतीसाठी
परमेश्वराच्या नावाने आक्रोश करायला सुरुवात केली.
7मिद्यानी लोकांच्या छळणुकीमुळे इस्राएल लोकांनी
परमेश्वराचा धावा केला. 8तेव्हा परमेश्वराने एका
संदेष्ट्याला त्यांच्याकडे पाठवले. तो संदेष्टा इस्राएल लोकांना
म्हणाला, "इस्राएलच्या परमेश्वर देवाचे म्हणणे असे आहे,
'मिसरमध्ये तुम्ही गुलाम होता. तेथून मी तुम्हाला सोडवून
बाहेर आणले. 9मिसरच्या समर्थ लोकांपासून तुमची सुटका
केली. नंतर कनानी लोकांनी तुम्हाला जाच केला. पुन्हा
मी तुम्हाला वाचवले. त्यांना मी तो देश सोडायला लावला,
आणि त्यांची भूमी तुम्हाला दिली.' 10मग मी तुम्हाला
सांगितले, 'मी तुमचा देव परमेश्वर आहे. तुम्ही अमोरी
लोकांच्या देशात राहाल पण त्यांच्या दैवतांची उपासना
करु नका.' पण तुम्ही माझे ऐकले नाही."

## परमेश्वराच्या दूताची गिदोनशी भेट

11याच सुमाराला गिदोन नावाच्या माणसाकडे
परमेश्वराचा दूत आला. आणि अफ्रा येथे योवाशच्या
मालकीच्या ओक वृक्षाखाली बसला. योवाश अबियेजरच्या
कुळातील होता. गिदोन योवाशचा मुलगा होता. गिदोन
द्राक्षकुंडात गव्हाची झोडणी करत होता. परमेश्वराचा दूत
गिदोनच्या शेजारी बसला. गिदोन मिद्यानांपासून गहू लपवून
ठेवत होता. 12त्याला दर्शन देऊन परमेश्वराचा दूत
म्हणाला, "हे वीरा, परमेश्वर तुझ्याबरोबर असो."
13तेव्हा गिदोन म्हणाला, "परमेश्वर आमच्याबरोबर
आहे तर मग आमच्यावर ही वेळ का यावी? आमच्या
पूर्वजांसाठी त्याने मोठे चमत्कार केले असे ऐकले आहे.
परमेश्वराने आमच्या पूर्वजांना मिसरमधून सोडवले असे
ते सांगतात. पण परमेश्वराने तर आमची साथ सोडली
आहे. मिद्यानी लोकांच्या तावडीत आम्ही सापडलो आहोत."
14मग परमेश्वर गिदोनकडे वळला व म्हणाला, "तुझ्या
शक्तीचा वापर कर. मिद्यानी लोकांपासून इस्राएल लोकांची
सोडवणूक कर. त्यांना वाचवण्यासाठी मी तुला पाठवत
आहे."
15पण गिदोन उत्तरादाखल म्हणाला, "मला क्षमा कर
कारण मी इस्राएल लोकांना कसा काय वाचवू शकणार?
मनश्शेच्या वंशात सगव्व्यात दुबळे माझे कूळ आहे आणि
मी घरातला सर्वात धाकटा"
16तेव्हा परमेश्वर गिदोनला म्हणाला, "मी तुझ्या बरोबर
आहे तू मिद्यानी लोकांचा पराभव करू शकशील आपण
एकाच माणसाशी लढत आहोत असे तुला वाटेल."
17गिदोन परमेश्वराला म्हणाला, "तुझी माझ्यावर
कृपादृष्टी असली तर तू खरोखरच परमेश्वर असल्याची
मला खात्री पटवून दे. 18आणि कृपा करून येथेच थांब.
तुला अर्पण करायला मी भेट घेऊन येतो. तोपर्यंत येथून
निघून जाऊ नको."
तेव्हा परमेश्वर म्हणाला, "तू परत येईपर्यंत मी थांबतो.
19मग गिदोन गेला आणि त्याने एक करडू शिजवले.
शिवाय, वीस पौंड पीठ घेऊन त्याचे बेखमीर भाकरी
केल्या मग शिजवलेले मांस एका टोपलीत आणि त्याचा
रस्सा एका पातेल्यात घेतला. मग बेखमीर भाकरींसह ते
सर्व अन्न ओक वृक्षाखाली येऊन परमेश्वराला दिले."
20परमेश्वराचा दूत तेव्हा गिदोनला म्हणाला, "ते मांस
आणि बेखमीर भाकरी त्या खडकावर ठेव आणि त्यावर
रस्सा ओत." गिदोनने त्याप्रमाणे केले.
21परमेश्वराचा दूताच्या हातात एक काठी होती. तिच्या
टोकाने त्याने मांसाला व बेखमीर भाकरींना स्पर्श केला.
तत्क्षणी खडकातून अग्नी प्रकट झाला. मांस व भाकरी
जळून भस्मसात झाले आणि परमेश्वराचा दूत अदृश्य
झाला.
22तेव्हा गिदोनच्या लक्षात आले की इतका वेळ आपण
परमेश्वराच्या दूताशी बोलत होतो. तेव्हा तो चित्कारला,
"सर्व शक्तिमान परमेश्वरा! मी परमेश्वराच्या दूताला
समोरासमोर पाहिले!"
23तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, "शांत हो! घाबरु
नकोस. तू मरणार नाहीस."
24त्याठिकाणी गिदोनने परमेश्वराच्या उपासनेसाठी वेदी
बांधली. तिचे नाव "परमेश्वर म्हणजे शांती" असे ठेवले
अफ्रा येथे ही वेदी अजूनही आहे. अफ्रा म्हणजे अबियेजेर
कुटुंबाचे वसतिस्थान आहे.

## गिदोन बाल दैवताची वेदी उध्वस्त करतो

25त्याच रात्री परमेश्वर गिदोनशी बोलला. तो म्हणाला,
"तू तुझ्या वडीलांचा, सात वर्षाचा पूर्ण वाढलेला बैल घे.

तुझ्या वडीलांनी बआल या खोट्या दैवताची वेदी बांधली
आहे. तिच्या शेजारी लाकडी स्तंभही आहे. अशेरा या
देवीच्या सन्मानार्थ तो आहे. बैलाकरवी तू तुझ्या वडीलांच्या
मालकीची ती वेदी नष्ट कर आणि अशेरा स्तंभाची
मोडतोड कर. **26**मग परमेश्वर देवासाठी योग्य अशा वेदीची
उंचवट्यावर उभारणी कर. त्या वेदीवर या बैलाचा बळी
देऊन त्याला जाळ. या यज्ञापर्णासाठी अशेरा स्तंभाच्या
लाकडांचा वापर कर.”

**27**तेव्हा आपल्या दहा सेवकांच्या मदतीने गिदोनने
परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे केले. त्याने ते केले खरे पण
घरातील आणि नगरातील माणसे बघतील या भीतीने हे
काम त्याने दिवसाढवळ्या न करता रात्री केले.

**28**सकाळी लोक उठून बघतात तर बआलची वेदी
उध्वस्त झोलेली! वेदीच्या शेजारचा अशेरा स्तंभ मोडून
पडलेला. गिदोनने बांधलेली वेदी आणि तिच्यावर अर्पण
केलेल्या बैलालाही त्यांनी पाहिले.

**29**नगरातील लोक मग एकमेकांना विचारू लागले.
“आपली वेदी कोणी पाडली? आपला अशेरा स्तंभ कोणी
मोडला? या नवीन वेदीवर बैलाचे यज्ञार्पण कोणी केले?”
असे अनेक प्रश्न ते आपले कुतूहल शमवायला विचारु
लागले.

कोणीतरी त्यांना सांगितले, “योवाशचा मुलगा गिदोन
याने हे केले आहे.”

**30**तेव्हा नगरवासी योवाशकडे येऊन त्याला म्हणाले,
“तुझ्या मुलाला बाहेर आण. त्याने बआल वेदीची आणि
तिच्या शेजारच्या अशेरा स्तंभाची मोडतोड केलेली आहे.
तेव्हा त्याला मृत्युदंड दिलाच पाहिजे.”

**31**तेव्हा भोवतालच्या जमावाला योवाश म्हणाला, “तुम्ही
बआलाची बाजू घेणार का? त्याला तारणार का? जो
बआलाची बाजू घेईल त्याला सकाळपर्यंत मृत्युदंड दिला
जावा. बआल जर खरा देव असेल तर जेव्हा लोक
वेदीची मोडतोड करायचा प्रयत्न करतील तेव्हा स्वत:चे
रक्षण त्याने स्वत:च करुन दाखववे.” **32**योवाश पुढे
म्हणाला, “जर गिदोनने बआलच्या वेदीचा विध्वंस केला
आहे तर बआलाच त्याच्याशी वाद करु द्या.” त्या
दिवसापासून योवाशने गिदोनला नवे नाव दिले ते म्हणजे
यरुब्बाल.

## गिदोनकडून मिद्यानी लोक पराभूत होतात

**33**मिद्यानी, अमालेकी आणि पूर्वेकडील इतर लोक
एकत्र येऊन इस्राएल लोकांविरुध्द लढण्यास सज्ज झाले.
यार्देन पलीकडे जाऊन त्यांनी एज्रीलच्या खोऱ्यात तळ
दिला. **34**गिदोनच्या ठायी परमेश्वराच्या आत्म्याचा संचार
झाला आणि गिदोन सामर्थ्यवान बनला. अबियेजर
कुटुंबातील लोकांना आपल्या मागोमाग येण्याचे आवाहन
करण्यासाठी त्याने रणशिंग फुंकले. **35**मनश्शेच्या
वंशातील सर्व लोकांकडे त्याने दूत रवाना केले. दूतांनी
त्या लोकांना शस्त्रास्त्रे घेऊन युध्दासाठी सज्ज राहायला
सांगितले. आशेर, जबुलून आणि नफताली यांच्या कडेही
गिदोनने आपल्या दूतांकरवी असाच निरोप पाठवला. तेव्हा
तेही सर्व लोक गिदोनला येऊन मिळाले.

**36**मग गिदोन परमेश्वराला म्हणाला, “माझ्या हातून तू
इस्राएल लोकांना वाचवणार आहेस, याची मला साक्ष
पटव. **37**मी आता खळ्यात कातरलेली लोकर ठेवतो.
सर्व जमीन कोरडी राहून फक्त लोकरीवर दव पडलेले
आढळले तर मला समजेल की इस्राएल लोकांचा बचाव
करण्यासाठी म्हटल्याप्रमाणे तू माझा उपयोग करणार
आहेस.”

**38**आणि नेमके तसेच घडले. गिदोन दुसऱ्या दिवशी
भल्या पहाटे उठला आणि त्याने लोकर दाबून पाहिली
तर त्यातून वाटीभर पाणी निघाले.

**39**ते पाहून गिदोन परमेश्वराला म्हणाला, “माझ्यावर
रागवू नको. मला आणखी एक गोष्ट विचारू दे. लोकरीद्वारे
मला आणखी एकदा तुझी परीक्षा घ्यायची आहे. ह्या वेळी
आजूबाजूची जमीन दवाने भिजलेली असताना लोकर
मात्र कोरडी राहू दे.”

**40**परमेश्वराने त्या रात्री तसेच करुन दाखवले. फक्त
लोकर तेवढी कोरडी राहून भोवतालची जमीन दवाने
ओली झाली होती.

**7** यरूब्बाल (म्हणजेच गिदोन) आणि त्याच्या बरोबरचे
सर्व लोक यांनी सकाळी लौकर उठून हरोद
झऱ्याजवळ तळ दिला. आणि मिद्यानी लोकांचा तळ मोरे
नावाच्या डोंगराच्या पायथ्याजवळ एका खोऱ्यात होता. हे
ठिकाण गिदोनच्या तळाच्या उत्तरेस होते.

**2**तेव्हा परमेश्वर गिदोनला म्हणाला, “माझ्या मदतीने
तुम्ही मिद्यानी लोकांचा पराभव करु शकाल पण तुझ्या
सैन्यात जरुरीपेक्षा जास्त माणसे आहेत उद्या कदाचित हे
इस्राएल लोक मला विसरतील आणि आमचे रक्षण आम्ही
स्वत:च केले अशी प्रौढी मिरवतील. **3**तेव्हा आता एक
गोष्ट जाहीर कर. त्यांना सांग, “कोणी लढाईला घाबरत
असेल तर त्याने आत्ताच गिलाद डोंगर सोडून घरी परत
जावे.”

त्यावेळी बावीस हजार माणसे गिदोनला सोडून गेली.
तरी दहाहजार राहिली.

**4**तेव्हा परमेश्वर गिदोनला म्हणाला, “ही देखील फार
आहेत. त्यांना घेऊन खाली झऱ्याशी जा मी त्यांची परीक्षा
पाहतो. “याने तुझ्या बरोबर यावे” असे मी म्हणीन त्याच
माणसाने तुझ्याबरोबर जावे. ज्याने जाऊ नये असे सांगीन
तो तुझ्याबरोबर येणार नाही.”

**5**तेव्हा गिदोन त्या लोकांना झऱ्यापाशी घेऊन आला.
तेथे गिदोनला परमेश्वर म्हणाला, “आता या लोकांची मी
सांगतो त्याप्रमाणे विभागणी कर. जे कुत्र्याप्रमाणे जिभेने
लपलप करत पाणी पितील त्यांचा एक गट कर. जे गुडघे
टेकून वाकून पाणी पितील त्यांना दुसऱ्या गटात टाक.”

6पाण्याची ओंजळ तोंडाशी नेऊन कुत्र्याप्रमाणे लपक लपक करीत पिणारे तीनशेजण निघाले बाकी सर्व वाकून पाणी प्यायले 7परमेश्वर गिदोनला म्हणाला, "ही तीनशे माणसे मी निवडतो मिद्यानींच्या शत्रूंचा पराभव करण्यासाठी जे लपक लपक करत पाणी प्यायले त्यांचा मी उपयोग करुन घेईन मी त्यांच्या मार्फत इस्राएल लोकांचा बचाव करीन. इतरांना परत जाऊ दे."

8तेव्हा गिदोनने बाकीच्यांना परत पाठवून तीनशे जणांना आपल्या बरोबर राहू दिले. जे परत गेले त्यांची शस्त्रसामुग्री आणि रणवाद्ये तीनशे जणांनी ठेवून घेतली.

गिदोनच्या तळाच्या खालच्या खोऱ्यातच मिद्यानी लोकांचा तळ होता. 9रात्री परमेश्वर गिदोनशी बोलला तो म्हणाला "ऊठ मिद्यानी सैन्य मी आत्ताच तुझ्या हाती सोपवतो. त्यांच्या तळावर जा. 10तुला एकट्याला भीती वाटत असली तर तुझा सेवक पुरा याला बरोबर घेऊन जा. 11तेथे जाऊन ते लोक काय बोलतात ते नीट लक्ष देऊन ऐक म्हणजे मग तुला त्यांच्यावर हल्ला चढवायला भीती वाटणार नाही."

तेव्हा गिदोन आपल्या पुरा या सेवकासह शत्रूच्या शिबिराच्या कडेशी गेला. 12मिद्यानी, अमालेकी आणि पूर्वेकडील सर्व लोक त्या खोऱ्यात होते. त्यांचा जमाव टोळधाडीसारखा दिसत होता. किनाऱ्यावरील वाळुकणांइतके असंख्य उंट त्यांच्याबरोबर होते.

13शत्रूतळाशी येताच गिदोनला एकाचे बोलणे ऐकू आले. आपल्याला काय स्वप्न पडले ते तो आपल्या मित्राला सांगत होता. "पावाची एक गोल लादी मिद्यानी लोकांच्या तळापाशी घरंगळत आली. आणि तंबूला तिने इतक्या जोरात धक्का दिला की तंबू उलटला आणि पार आडवा झाला."

14त्या मित्राला या स्वप्नाचा अर्थ माहीत होता. तो म्हणाला, "याचा अर्थ एकच असू शकतो योवाशचा मुलगा गिदोन या इस्राएल लोकांबद्दल हे स्वप्न आहे. परमेश्वर त्याच्या करवी मिद्यानी सैन्याचा पाडाव करणार आहे."

15गिदोनने हा संवाद ऐकला तेव्हा त्याने परमेश्वरापुढे दंडवत घातले. मग तो आपल्या तळावर परत आला. लोकांना हाका मारुन तो म्हणाला, "चला, तयार व्हा. मिद्यान्यांचा पराभव करायला परमेश्वर आता मदत करणार आहे."

16मग गिदोनने आपल्या तीनशे माणसांचे तीन गट केले. प्रत्येकाला एक रणशिंग आणि एक रिकामा घडा दिला. घड्यामध्ये पेटती मशाल होती. 17मग गिदोनने सांगितले, "माझ्याकडे सर्वांचे लक्ष असू द्या. मी करतो तसे करा. शत्रूच्या तळापर्यंत माझ्या मागोमाग चला. तेथे पोचल्यावर मी करीन तसेच करा 18तुम्ही शत्रूच्या शिबिराला वेढा घाला. मी आणि माझ्या बरोबरची माणसे रणशिंग फुंकू तेव्हा तुम्हीही तसेच करा नंतर 'परमेश्वराचा जय असो, गिदोनचा जय असो' अशी गर्जना करा."

19त्याप्रमाणे गिदोन आणि त्याच्या बरोबर शंभरजण शत्रूच्या शिबिरापर्यंत गेले. ते पोहोंचले तेव्हा नुकताच शत्रूपक्षाने पहारा बदलला होता. रात्रीचा तो मधला प्रहर होता. गिदोन आणि त्याच्या बरोबरचे लोक यांनी आपली रणशिंगे फुंकली आणि घडे फोडले. 20त्याबरोबर तीनही गटातील लोकांनीही तसेच केले. त्यांच्या डाव्या हातात मशाली आणि उजव्या हातात रणशिंगे होती. ती फुंकत ते "परमेश्वराची तलवार, गिदोनची तलवार" अशा आरोळ्या मारत होते.

21गिदोनची माणसे होती तेथेच थांबली. पण आत मिद्यानी लोकांच्या तळावर पळापळ सुरु झाली. 22ही तीनशे माणसे रणवाद्ये वाजवत असताना, परमेश्वराने मिद्यानी लोकांना एकमेकांना तलवारीने ठार मारायला लावले. त्यांनी पळ काढला. सरेरा कडे बेथ-शिट्टा आणि टब्बाथ जवळच्या आबेल महोल नगराच्या सीमेपर्यंत हे शत्रूसैन्य पळून गेले.

23मग नफताली, आशेर आणि मनश्शे यांच्या वंशातील सैनिकांना मिद्यानी लोकांचा पाठलाग करायला सांगितले गेले. 24एफ्राईमच्या डोंगराळ भागात गिदोनने सर्वत्र आपले दूत पाठवले. निरोप असा होता "खाली या आणि मिद्यान्यांवर हल्ला करा. बेथ-बारा आणि यार्देन नदीपर्यंतचा प्रदेश रोखून धरा. मिद्यानी लोकांना निसटू देऊ नका."

तेव्हा एफ्राईमच्या वंशातील लोकांना त्यांनी बोलावले. त्यांनी बेथ-बारापर्यंत नदीलगतच्या प्रदेशाचा ताबा घेतला. 25एफ्राईम लोकांनी दोन मिद्यानी नेत्यांना पकडले. ओरेब आणि जेब हे दोन नेते होत. ओरेबचा खडक या ठिकाणापाशी त्यांनी ओरेबला मारले. जेबला जेबचे द्राक्षकुंड येथे मारले. एफ्राईम लोकांनी मिद्यान्यांचा पाठलाग सुरुच ठेवला. ओरेब आणि जेब यांची मुंडकी त्यांनी गिदोनला दाखवायला नेली. यार्देन नदीपलीकडे गिदोन होता.

8 एफ्राईम लोक गिदोनवर चिडले होते. त्यामुळे गिदोनला भेटले तेव्हा त्यांनी विचारले, "तू मिद्यान्यांवर चढाई केलीस तेव्हा आम्हाला का बोलावले नाहीस? आम्हाला तू अशी वागणूक का दिलीस?"

2गिदोनने तेव्हा एफ्राईम लोकांना सांगितले, "माझे तुमच्या इतके चांगले चाललेले नाही. आमच्यापेक्षा तुम्ही कितीतरी जास्त पीक घेता. आम्ही अबियेजर जितकी द्राक्षे काढतो त्यापेक्षा जास्त द्राक्षे तर तुम्ही तशीच मव्व्यात पडू देता, हे खरे नाही काय? 3याही वर्षी तुम्ही चांगले पीक घेतले आहे. ओरेब आणि जेब या दोन मिद्यानी नेत्यांना तर परमेश्वराने तुमच्या हाती सोपवले. तुम्ही जे केलेत त्याच्याशी मी माझ्या यशाची तुलना कशी करु?" गिदोनचे हे उत्तर ऐकून एफ्राईम लोकांचा राग बराच निवळला.

## गिदोन मिद्यानचे दोन राजे कैद करतो

4मग गिदोन आपल्या तीनशे माणसांसह यार्देन नदी उतरुन पलीकडे गेला. पाठलाग करताना ते सर्व थकलेले आणि भुकेलेले होते. 5गिदोन सुक्कोथ नगरातील लोकांना

म्हणाला, “माझे सैनिक फार थकले आहेत. त्यांना काहीतरी खायला द्या अजूनही आम्हाला जेबह आणि सलमुन्ना या मिद्यानी राजांचा पाठलाग करायचा आहे.”

6तेव्हा सुक्कोथ येथील अधिकारी म्हणाले, “आम्ही त्यांना खायला का द्यावे? अजून तर तुम्ही त्या दोन राजांना पकडलेलेही नाही.”

7त्यावर गिदोन म्हणाला, “तुम्ही आम्हाला अन्न देत नाही तर जेबह आणि सलमुन्ना यांना ताब्यात घ्यायला परमेश्वरच आमच्या मदतीला येईल. मग मी परत इथे येईन. तेव्हा वाळवंटातील काटेरी झुडुपांनी मी तुमची चामडी लोळवीन.”

8गिदोन मग सुक्कोथहून पनुएल शहराकडे निघाला. तेथील लोकांकडेही त्याने अन्नाची मागणी केली. पण पनुएल येथील लोकांनीही सुक्कोथ येथील लोकांनी दिले तसेच उत्तर दिले. 9तेव्हा गिदोन त्या लोकांना म्हणाला, “विजयी होऊन परत आल्यावर मी येथील मनोरा उध्वस्त करीन.”

10जेबह, सलमुन्ना आणि त्यांचे सैन्य कर्कोर नगरात होते. त्यांच्या सैन्यात पंधरा हजार माणसे होती. पूर्वेकडच्या लोकांमधून जगले वाचले ते एवढेच त्यांचे एक लाख वीस हजार शूर योध्दे मारले गेले. 11मग गिदोन आणि त्याचे लोक नोबह आणि यागबहा या शहरांच्या पूर्वेकडील राहुट्यांचा रस्ता धरून कर्कोर येथे आले व त्यांनी शत्रूवर हल्ला चढवला. शत्रू बेसावध होता. 12मिद्यान्यांचे राजे जेबह व सलमुन्ना पळून गेले. गिदोनने त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडले. शत्रूसैन्याचा गिदोनच्या सैन्याने पाडाव केला.

13त्यानंतर हेरेसच्या घाटातून योवाशपुत्र गिदोन आणि त्याच्याबरोबरचे सैन्य परत फिरले. 14गिदोनने सुक्कोथमधील एका तरुणाला पकडले आणि त्याला काही प्रश्न विचारले. त्या तरुणाने सुक्कोथ नगरातील अधिकारी आणि वडीलधारी अशा सत्याहत्तर जणांची नावे गिदोनला लिहून दिली.

15त्यानंतर गिदोन सुक्कोथला आला. नगरवासीयांना तो म्हणाला, “हे पाहा जेबह आणि सलमुन्ना. “तुझ्या दमलेल्या सैनिकांना आम्ही अन्न का द्यावे? तुम्ही अजून जेबह आणि सलमुन्ना यांना कुठे पकडले आहे? असे म्हणून माझी चेष्टा करत होतात नाही का?” 16नंतर गिदोनने शहरातील वडीलधाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी वाळवंटातील काटेरी झुडुपांनी फोडून काढले. 17पनुएल मधील मनोऱ्याचीही त्याने मोडतोड केली. नंतर नगरात राहणाऱ्या लोकांना ठार केले.

18मग गिदोन, जेबह आणि सलमुन्ना यांना म्हणाला, “तुम्ही ताबोर डोंगरावर काही माणसे मारलीत. ती दिसायला कशी होती?”

जेबह आणि सलमुन्ना म्हणाले, “ती तुझ्याप्रमाणेच चांगली राजबिंडी दिसत होती.”

19गिदोन म्हणाला, “ती माझी भावंडे होती. माझ्या आईची पोटची मुले. परमेश्वराशपथ, तुम्ही त्यांना मारले नसते तर मीही आता तुम्हाला मारले नसते”

20मग गिदोन आपल्या येथेर या ज्येष्ठ पुत्राला म्हणाला, “या राजांना मारुन टाक” पण येथेर पोरसवदा असल्यामुळे घाबरला. त्याला त्यांच्यावर तलवार चालवायचा धीर होईना.

21तेव्हा ते राजे गिदोनला म्हणाले, “चल पुढे हो आणि तूच आमच्यावर प्रहार कर. तू पुरुष आहेस. तूच हे कृत्य करु शकशील.” तेव्हा गिदोनने त्यांना ठार केले. त्यांच्या उंटांच्या गव्व्यातील चंद्रकोरीच्या आकाराचे दागिने त्याने काढून घेतले.

## गिदोन एफोद करतो

22मग इस्राएल लोक गिदोनला म्हणाले, “तू आम्हाला मिद्यानी लोकांच्या तावडीतून सोडवले आहेस तेव्हा आता तू आमच्यावर राज्य कर. तू तुझा मुलगा, तुझा नातू यांनीही आमच्यावर राज्य करावे.”

23पण गिदोन त्यांना म्हणाला, “खुद्द परमेश्वरच सत्ताधीश आहे. मी किंवा माझा मुलगा तुमच्यावर राज्य करणार नाही.”

24इस्राएल लोकांनी ज्या अनेकांचा पराभव केला त्यात इश्माएलीही होते. हे इश्माएली पुरुष सोन्याची कुंडले घालत. गिदोन इश्माएलींना म्हणाला, “तुम्ही जी लूट मिळवली आहे त्यातून तुमच्यापैकी प्रत्येकाने मला अशी सोन्याची कुंडले करुन द्या.”

25त्याला इस्राएल लोक आनंदाने कबूल झाले त्यांनी जमिनीवर एक अंगरखा पसरला. त्यावर प्रत्येकाने कुंडले टाकले. 26नंतर त्या सर्वांचे वजन केले ते त्रेचाळीस पौंड भरले. इस्राएल लोकांनी गिदोनला दिलेल्या इतर भेटवस्तू वेगळ्याच त्यांचे वजन यात धरलेले नाही. चंद्रकोरी, लोलक या आकारांची भूषणे, मिद्यानी राजांच्या अंगावरील जांभळी वस्त्रे, त्यांच्या उंटांच्या गव्व्यातील साखळ्या अशा विविध भेटीही त्यांनी दिल्या.

27या सोन्यातून गिदोनने एफोद बनवला तो त्याने आपल्या अफ्रा या गावी ठेवला. सर्व इस्राएल लोक त्याची पूजा करु लागले. परमेश्वरावरची त्यांची निष्ठा ढळून ते एफोदच्या नादी लागले. गिदोन आणि त्याचे कुटुंब यांना हा एफोद सापळ्याप्रमाणे ठरुन त्यांना पापाचरणासाठी प्रवृत्त करायला कारणीभूत झाला.

## गिदोनचा मृत्यू

28मिद्यान अशाप्रकारे इस्राएलांचा अंकित झाला. त्यांनी पुन्हा डोके वर काढले नाही. गिदोन जिवंत असेपर्यंत, पुढे चाळीस वर्षे त्या प्रदेशात शांतता नांदत होती.

29योवाशपुत्र यरुब्बाल गिदोन आपल्या घरी परतला. 30त्याला सत्तर मुलगे होते. कारण त्याला अनेक

बायका होत्या. 31शखेम शहरात त्याला एक उपपत्नी
होती. तिच्यापासून त्याला अबीमलेख नावाचा मुलगा
झाला.
32पुढे गिदोन बराच वृध्द होऊन मरण पावला. योवाशच्या
कबरीत त्याला पुरण्यात आले. अबियेजर लोक राहतात
त्या अफ्रा या गावात ही कबर आहे. 33गिदोनच्या मृत्यूनंतर
लगेचच इस्राएल लोक पुन्हा बआलच्या मागे लागले त्यांनी
बआल-बरीथ याला परमेश्वर मानले. 34भोवतालच्या
सर्व शत्रूपासून परमेश्वराने त्यांना वाचवले असले तरी
देखील इस्राएल लोकांना आपल्या परमेश्वराचा विसर
पडला. 35यरुब्बाल (गिदोन) याने त्यांच्यासाठी इतके केले
तरीसुध्दा त्याच्या कुटुंबीयांशी इस्राएल लोक एकनिष्ठ
राहिले नाहीत.

## अबीमलेखची कारकीर्द

9 यरुब्बाल (गिदोन) याचा अबीमलेख हा मुलगा. शखेम
येथे तो आपल्या आजोळी गेला आणि मामांना व
सर्व नातेवाईकांना म्हणाला, 2“शखेम नगरातील
वडीलधाऱ्यांना विचारा की, यरुब्बालच्या सत्तर मुलांच्या
सत्तेखाली राहणे चांगले की एकाच माणसाच्या
आधिपत्याखाली असणे चांगले? मी तुमचा नातेवाईक
आहे हे लक्षात ठेवा.”
3अबीमलेखच्या मामांनी शखेम नगरातील अधिकारी
मंडळींना हा प्रश्न विचारला. त्यांनीही अबीमलेखला
आपला पाठिंबा द्यायचे ठरवले. ते म्हणाले, “हा तर
आमचा बंधू आहे.” 4शखेमच्या या अधिकाऱ्यांनी
बआल-बेरीथच्या मंदिरातून सत्तर रौप्यमुद्रा अबीमलेखला
दिल्या. त्यातून अबीमलेखने काही रिकामटेकडी कसलाही
मुलाहिजा नसलेली माणसे आपल्या पदरी बाळगली. ती
सतत अबीमलेख बरोबर राहात असत.
5अबीमलेख अफ्रा येथे आपल्या वडीलांच्या गावी आला
व त्याने आपल्या सत्तर भावांची एकाचवेळी कत्तल केली.
फक्त त्यातला सगळ्यात धाकटा लपून बसल्यामुळे
बचावला. त्याचे नाव योथाम होते.
6मग शखेम आणि मिल्लो येथील नेते एकत्र आले.
शखेममधील स्तंभाजवळच्या एका वृक्षाखाली जमून त्यांनी
अबीमलेखला आपला राजा म्हणून घोषित केले.

## योथामची कहाणी

7हे वर्तमान योथामने ऐकले तेव्हा तो गेला आणि गरिज्जीम
डोंगरावर उभा राहून मोठ्याने लोकांशी बोलू लागला.

“शखेम नगरातील अधिकाऱ्यांनो ऐका. मग
परमेश्वरही तुमचे ऐकेल.”
8एक दिवस, आपल्याला कोणीतरी राजा असावा
असे सर्व झाडांच्या मनात आले. तेव्हा जैतून वृक्षाला
ती झाडे म्हणाली, “तू आमचा राजा हो.”
9जैतून वृक्ष त्यांना म्हणाला, “सर्व माणसे आणि
परमेश्वर माझ्यापासून जे तेल मिळते त्यासाठी माझी
स्तुती करतात. ते तेल करायचे सोडून मी नुसता
इतर झाडांवर डोलत राहू काय?”
10मग ती झाडे अंजीराच्या झाडाकडे गेली व
म्हणाली, “तू आमचा राजा हो.”
11पण अंजीराच्या झाडाने उत्तर दिले, “माझी गोड
आणि रसाळ फळे करायचे थांबवून मी इतर झाडांवर
डोलत राहायला जाऊ की काय?”
12तेव्हा ती झाडे द्राक्षवेलीकडे जाऊन म्हणाली,
“तू आम्हावर राज्य कर.”
13पण द्राक्षवेलीने उत्तर दिले, “माझ्या द्राक्षरसामुळे
माणसे, राजेलोक संतुष्ट होतात. ते करायचे सोडून
मी इतर झाडांवर हालत डोलत राहू का?”
14शेवटी ती सर्व झाडे काटेरी झुडुपाकडे जाऊन
म्हणाली, “तू ये आणि आम्हावर राज्य कर.”
15ते काटेरी झुडूप त्यांना म्हणाले, “तुम्हाला
खरोखरच मला राजा करायचे असेल तर माझ्या
सावलीत आश्रयाला या. तसे केले नाहीत तर काटेरी
झुडुपातून अग्नी निघून तो लबानोनचे गंधसरु भस्मसात
करील.”

16“आता, अबीमलेखला आपला राजा म्हणून घोषित
करताना तुम्ही पूर्णपणे प्रमाणिक राहिला असलात तर
त्याच्या कारकीर्दीत सुखात असा. यरुब्बाल आणि त्याचे
कुटुंबीय यांच्याशी तुमचे वर्तन योग्य असेल तर ठीकच
आहे. 17पण माझ्या वडीलांनी तुमच्यासाठी काय केले ते
आठवा ते तुमच्यासाठी झुंजले. मिद्यानापासून तुमचे रक्षण
करताना त्यांनी स्वत:चा जीव धोक्यात घातला. 18पण
आता तुम्ही त्यांच्या कुटुंबीयांकडे पाठ फिरवली आहे.
तुम्ही माझ्या वडालांच्या सत्तर मुलांना एकाच वेळी* ठार
केले आहे. अबीमलेखला तुम्ही शखेमचा राजा केले
आहे. तो तुमचा नातेवाईक म्हणून तुम्ही असे केलेत पण
तो निव्वळ दासीपुत्र आहे. 19यरुब्बाल आणि त्याचे कुटुंबीय
यांच्याशी तुम्ही खरोखरच प्रमाणिक असाल तर
अबीमलेखच्या राज्यात सुखी असा. तो ही तुमच्यावर
आंनदाने राज्य करो. 20पण तुमचे हे वागणे बरोबर नसेल
तर मात्र अबीमलेखच्या हातून शखेम आणि मिल्लो यांचा
नाश होवो. तसेच अबीमलेखचाही नाश होवो!”
21एवढे बोलून योथाम बैर या शहराला पळून गेला.
अबीमलेखाच्या भीतीने तो तेथेच राहिला.

## अबीमलेखची शखेमशी लढाई

22अबीमलेखने इस्राएल लोकांवर तीन वर्षे राज्य केले.
23–24अबीमलेखने यरुब्बालाच्या सत्तर मुलांची म्हणजे

---

**एकाच वेळी** शब्दश, “एकाच पाषाणावर.”

आपल्याच भावंडांची हत्या केली होती. या दुष्कृत्यात
त्याला शखेमच्या अधिकाऱ्यांची साथ होती. तेव्हा
अबीमलेख आणि हे अधिकारी यांच्यात परमेश्वराने
वैमनस्य निर्माण केले. अबीमलेख विरुद्ध या अधिकाऱ्यांनी
कपट कारस्थान करायला सुरुवात केली. 25आता त्यांना
अबीमलेख आवडेनासा झाला होता. त्यांनी वाटमारी
करायला डोंगरांवर माणसे ठेवली. या लूटमारीच्या बातम्या
अबीमलेखपर्यंत येऊन पोचल्या. 26याच सुमाराला एबेदचा
मुलगा गाल आपल्या भाऊ बंदांसह शखेम शहरी राहायला
आला. तेव्हा शखेमच्या वडीलधाऱ्यांनी गालवर विश्वास
टाकून राहायचे ठरवले.

27एक दिवस शखेममधील लोक द्राक्ष खुडणीसाठी
मळ्यामध्ये गेले. त्यांनी द्राक्षरस काढला आणि त्यांच्या
दैवतांच्या देवळात उत्सव केला. खाद्यपेयांची मेजवानी केली
आणि अबीमलेखला शिव्याशाप दिले.

28तेव्हा एबेदपुत्र गाल म्हणाला, “आपण शखेमचे लोक
आपण त्याच्या राजवटीत का राहावे? तो कोण समजतो
स्वत:ला? यरुब्बालच्या मुलांपैकी तो एक, बरोबर?
जबूलला अबीमलेखने अधिकारी केले आहे, खरे
ना?आपण अबीमलेखला जुमानता कामा नये. आपण
आपल्याच लोकांचे, हमोरच्या लोकांचे ऐकले पाहिजे.
(हमोर हा शखेमचा मूळ पुरुष)

29तुम्ही मला या लोकांचा सेनापती नेमले तर मी
अबीमलेखला नेस्तनाबूत करीन. “आपल्या सैन्याची
जमवाजमव कर आणि युध्दाला सज्ज हो, असे मी त्याला
आव्हान देईन.” 30जबूल शखेम नगराचा अधिकारी होता
त्याने हे ऐकले आणि तो संतापला. 31त्याने अरुमा येथे
दूत पाठवून अबीमलेखला हे वर्तमान पोचवले. तो संदेश
असा:

एबेदाचा मुलगा गाल आणि त्याचे भाऊबंद शखेम शहरात
येऊन राहिले आहेत. ते तुला त्रास देण्यासाठी कारस्थान
करत आहेत. त्यांनी सगळ्या शहरवासियांना तुझ्याविरुद्ध
फितवले आहे. 32तेव्हा तू आणि तुझी माणसे रातोरात
येऊन नगराच्या बाहेर शेतात लपून राहा.

33सकाळी सूर्य वर येताच शहरावर हल्ला चढवा. गाल
आणि त्याची माणसे तुझा प्रतिकार करायला येतील तेव्हा
त्यांचा चांगला समाचार घ्या.

34तेव्हा अबीमलेख आणि त्याचे सैनिक रात्रीच निघून
नगराकडे आले. चार तुकड्या करुन ते सैन्य शखेम
बाहेर दबा धरून बसले. 35इकडे एबेद पुत्र गाल बाहेर
पडून नगराच्या वेशीपाशी उभा राहिला तेव्हा अबीमलेख
आणि त्याचे सैन्य दबा धरुन बसले होते ते एकदम बाहेर
आले.

36गालने ते पाहिले व तो जबूलला म्हणाला, “ते पाहा
डोंगरमाथ्यावरुन लोक उतरत आहेत.”

जबूल त्याला म्हणाला, “तू पाहातोस त्या डोंगराच्या
सावल्या आहेत त्या तुला माणसांसारख्या वाटत आहेत.”

37पण गाल पुन्हा म्हणाला, “ती पाहा तिकडून काही माणसे
प्रदेशाची नाभी नानक जागा उतरुन येत आहेत. आणि
जादूगाराच्या वृक्षाजवळही कोणाचे तरी डोके मी पाहिले
आहे.”

38तेव्हा जबूल गालला म्हणाला, “मग आता तुझे बढाया
मारणे कुठे गेले? ‘अबीमलेख कोण? आम्ही त्याचे का
ऐकावे’ असे तू म्हणत होतास नाही का? त्यांना तू हसण्यावारी
नेलेस. आता जा आणि त्यांचा सामना कर.”

39तेव्हा गाल शखेमच्या लोकांचे नेतृत्व करुन लढाईला
बाहेर पडला. 40अबीमलेखच्या सैन्याने त्यांचा पाठलाग
केला. ते मागे आपल्या नगराच्या वेशीच्या दिशेने पळत
सुटले. गालची पुष्कळ माणसे तर तेथे पोहोंचायच्या आधीच
मारली गेली.

41तेव्हा अबीमलेख अरूमा या नगराला परतला. जबूलने
गाल आणि त्याचे भाऊबंद यांना शखेम सोडून जायला
भाग पाडले.

42दुसऱ्या दिवशी शखेमचे लोक आपापल्या शेतीवाडीवर
कामाला गेले असे अबीमलेखला कळले. 43त्याने आपल्या
सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. शखेमच्या लोकांवर त्याला
गनिमी काव्याने हल्ला करायचा होता म्हणून त्याने आपल्या
सैन्याला शेतात दबा धरून बसायला सांगितले. लोक
गावातून शेतावर जायला निघतात तोच त्याने त्यांच्यावर
हल्ला चढवला. 44अबीमलेख एका तुकडी बरोबर
शखेमच्या वेशीपाशी गेला. राहिलेल्या दोन तुकड्यांनी
शेतातील लोकांवर हल्ला करुन त्यांना ठार केले.

45दिवसभर लढाई चालली. अबीमलेखच्या सैन्याने
शखेम शहरावर ताबा मिळवला. तेथील लोकांना ठार
मारले. मग त्याने शहराची पूर्ण नासधूस करुन त्यावर
मीठ पसरले.

46शखेमच्या गढीमध्ये काही माणसे अजूनही होती. त्यांनी
हे ऐकले तेव्हा एल-बरीथ परमेश्वराच्या मंदिराच्या सर्वात
सुरक्षित खोलीमध्ये ती एकत्र जमली.

47हे ही अबीमलेखच्या कानावर आले. 48तेव्हा तो
आपल्या माणसांना घेऊन सलमोन डोंगरावर गेला. तेथे
त्याने कुऱ्हाडीने झाडांच्या काही फांद्या छाटल्या. त्या फांद्या
खांद्यावर घेतल्या. बरोबरच्या लोकांनाही त्याने वेळ न
दवडता तसेच करायला सांगितले. 49तेव्हा त्यांनीही फांद्या
तोडून घेतल्या व अबीमलेखच्या पाठोपाठ ते चालू लागले.
एल-बरीथच्या तळघरासमोर त्या रचून ठेवल्या मग त्यांनी
त्या ढिगाला आग लावली. त्या आगीत आतील सर्व माणसे
जळून खाक झाली. शखेमच्या मनोऱ्याजवळ राहाणारी
बायकापुरुष मिळून जवळ जवळ हजार माणसे त्या आगीच्या
भक्ष्यस्थानी पडली.

## अबीमलेखचा मृत्यू

50नंतर अबीमलेख आपल्या बरोबरच्या लोकांसह तेबेस
या नगरी गेला. तेही नगर त्यांनी काबीज केले. 51पण त्या

नगराच्या आत एक मजबूत गढी होती. तिच्यात नगरातील बायका, पुरुष, अधिकारी आश्रयाला गेले. आत जाताच त्यांनी दरवाजा पक्क ा बंद केला. मग ते गढीच्या छतावर चढून बसले. 52अबीमलेख व त्याची माणसे हल्ला करायला गढीपर्यंत आली. त्यांना गढीला आग लावायची होती. 53पण अबीमलेख गढीच्या दरवाजाशी थांबलेला असताना, वर चढून बसलेल्या एका बाईने त्याच्या डोक्यावर जाते टाकले. अबिमलेखच्या डोक्याला त्यामुळे भयंकर मार लागला. 54अबीमलेख आपल्या सशस्त्र नोकराला तेवढ्यात म्हणाला, “तुझी तलवार उपस आणि मला ठार कर “एका बाईने” अबीमलेखला मारले असे लोकांनी म्हणता कामा नये म्हणून तुझ्या हातून मला मरण येऊ दे.” तेव्हा त्याची शस्त्रे वाहून नेणाऱ्या सेवकाने त्याला तलवारीने भोसकले व अबीमलेख मरण पावला. 55ते पाहिल्यावर इस्राएल लोक आपापल्या घरी परतले.

56अशाप्रकारे, अबीमलेखला त्याच्या दुष्कृत्यांबद्दल परमेश्वराने सजा केली. आपल्या सत्तर भावाना ठार करुन त्याने आपल्या वडीलांचा घोर अपराध केला होता. 57शखेमच्या लोकांनाही त्यांच्या दुर्वर्तनाबद्दल परमेश्वराने शिक्षा केली. एकंदरीत योथामचा शाप खरा ठरला. (गिदोन यरुब्बालचा योथाम हा सर्वात धाकटा मुलगा.)

## सातवा न्यायाधीश तोला

10 अबीमलेखच्या मृत्यूनंतर इस्राएल लोकांच्या रक्षणासाठी देवाने तोला या न्यायाधीशाची योजना केली. तोला हा पुवाचा मुलगा आणि पुवा दोदोचा. तोला इस्साखारच्या वंशातील होता व एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील शामीर या नगरात राहात असे. 2तोलाने तेवीस वर्षे इस्राएल लोकांमध्ये काम केले. त्याच्या मृत्यूनंतर त्याला शामीरमध्ये पुरण्यात आले.

## पुढचा न्यायाधीश याईर

3तोलानंतर देवाने याईरची नेमणूक केली. तो गिलाद भागात राहणारा होता. त्याने बावीस वर्षे न्यायाधीश म्हणून काम पाहिले. 4याला तीस मुलगे होते आणि ते तीस गाढवांवर * बसून गिलादमधील तीस गावांचा कारभार पाहात असत. या गावांना अजूनही याईरची गावे म्हणून ओळखले जाते. 5याईरच्या मृत्यूनंतर त्याचे कामोन नगरात दफन करण्यात आले.

## अम्मोनी लोकांची इस्राएल लोकांबरोबर लढाई

6इस्राएल लोकांनी परमेश्वराला अमान्य असलेल्या गोष्टी पुन्हा करायला सुरूवात केली. बआल, अष्टारोथ, या दैवतांची तसेच अरामी, सीदोनी, मवाबी, अम्मोनी तसेच पलिष्टी या लोकांच्या दैवतांची त्यानी उपासना करायला सुरुवात केली. आपल्या परमेश्वरापासून ते दूर गेले, त्याची सेवा करणे त्यांनी थांबवले.

7तेव्हा परमेश्वराचा त्यांच्यावर कोप झाला. त्याने अम्मोनी आणि पलिष्टी या लोकांच्या हातून त्यांचा पराभव करवला. 8त्याच वर्षी गिलादांच्या प्रदेशात, यार्देन नदीच्या पूर्वेला राहणाऱ्या इस्राएल लोकांचा त्या लोकांनी संहार केला. हा प्रदेश अमोरी लोकांचा होता. या भागातील इस्राएल लोकांना अठरा वर्षे हाल अपेष्टा काढाव्या लागल्या. 9अम्मोनी लोक मग यार्देनच्या पलीकडे गेले यहूदा, बन्यामीन आणि एफ्राईम यांच्या वंशजांशी त्यांनी लढाया केल्या. अम्मोनी लोकांमुळे इस्राएल लोकांना फार त्रास भोगावा लागला.

10तेव्हा इस्राएल लोकांनी परमेश्वराचा धावा केला. ते म्हणाले, “परमेश्वरा, आम्ही दुष्कृत्य केले आहे. देवाला सोडून आम्ही बआल या भलत्या दैवताची उपासना केली आहे.”

11परमेश्वर इस्राएल लोकांना म्हणाला, “मिसरी, अमोरी, अम्मोनी, पलिष्टी अशा वेगवेगळ्या लोकांकडून जेव्हा जेव्हा तुम्हाला जाच झाला तेव्हा तेव्हा तुम्ही माझ्याकडे गाऱ्हाणे आणलेत. मी तुमची सुटका करत गेलो. 12सीदोनी, अमालेकी, मिद्यानी यांनीही तुम्हाला छळले तेव्हा तुम्ही माझ्याकडे आलात. तेव्हा ही मी तुम्हाला वाचवले. 13पण मला सोडून तुम्ही भलत्या दैवतांच्या पाठीमागे लागलात. तेव्हा आता पुन्हा मी तुमच्या मदतीला येणार नाही. 14त्या दैवतांची उपासना करायला तुम्हाला आवडते, तेव्हा आता त्यांनाच बोलवा आणि मदतीसाठी विनंती करा. त्यांनाच तुमचे संकटातून रक्षण करु द्या.”

15पण इस्राएल लोकांनी परमेश्वराची विनवणी केली. ते म्हणाले, “आमचे चुकले आम्हाला हवी ती शिक्षा दे, पण आता आम्हाला वाचव.” 16मग इस्राएल लोकांनी त्या परक्या दैवतांचा त्याग केला. परमेश्वराकडे ते पुन्हा एकदा वळले. त्यांचे हाल पाहून परमेश्वराला त्यांची दया आली.

## इफ्ताहताहची नेता म्हणून निवड

17अम्मोनी लोक युध्दासाठी एकत्र जमले. गिलाद प्रदेशात त्यांची छावणी होती. इस्राएल लोकही एकत्र आले. मिस्पा येथे त्यांनी तळ दिला. 18गिलाद प्रदेशातील लोकांचे नेते म्हणाले, “अम्मोनी लोकांवरील हल्ल्याचे जो कोणी नेतृत्व करील तो गिलाद प्रदेशातील आम्हा लोकांचा मुख्य होईल.”

11 इफ्ताह हा खंबीर लढवय्या असून तो गिलाद वंशातील होता. पण तो एका वेश्येचा मुलगा होता. याच्या वडीलांचे नाव गिलाद. 2गिलादच्या बायकोला खूप मुले झाली. ही मुले मोठी झाल्यावर त्यांना इफ्ताह आवडेनासा झाला त्यांनी त्याला आपले गाव सोडायला लावले. ते म्हणाले, तुला आमच्या वडीलांच्या मिळकतीतील

---

**तीस मुलगे ... तीस गाढवांवर** ते जबाबदार अधिकारी होते हे यातून सुचवायचे आहे. बहुधा ते नगरपिते असावेत.

हिस्सा मिळणार नाही. तू दुसऱ्या बाई पासून झालेला
आहेस." [3]भावांच्या या वर्तणुकीमुळे त्याला दूर जावे लागले.
तो टोब देशात जाऊन राहिला. तेव्हा तेथील काही रांगडी
माणसेही त्याला येऊन मिळाली.

[4]काही काळानंतर अम्मोनी लोकांची इस्राएल
लोकांबरोबर लढाई झाली. [5]यावेळी गिलादमधील
वडीलधारे नेते इफ्ताह कडे आले. टोब सोडून त्याने गिलाद
मध्ये परत यावे असे त्यांना वाटत होते.

[6]म्हणून ते त्याला म्हणाले, "अम्मोनी लोकांचा सामना
करायला तू आमचे नेतृत्व कर."

[7]पण इफ्ताह त्यांना म्हणाला, "तुम्हीच तर मला माझ्या
वडीलांचे घर सोडायला लावलेत. तुम्ही माझा तिरस्कार
करता. आता अडचणीत आल्यावर माझ्याकडे का
येता?"

[8]त्यावर ही वडीलधारी मंडळी म्हणाली, "अडचण
आहे म्हणून तर आम्ही तुझ्याकडे आलो आहोत. आता
कृपा करुन अम्मोन्यांच्या विरुद्ध उठाव करायला
आमच्या बरोबर चल. गिलादातील सर्वांचा तू सेनापती
होशील."

[9]तेव्हा इफ्ताह त्यांना म्हणाला, "या लढ्यासाठी माझी
तुम्हाला गरज आहे हे ठीक आहे. पण परमेश्वराच्या
मदतीने मी जिंकलो तर मी तुमचा नेता होईन."

[10]तेव्हा गिलादचे अधिकारी पुरुष इफ्ताहाला म्हणाले,
"आमचे सर्व बोलणे परमेश्वर ऐकत आहे. तू आम्हाला
जे जे करायला सांगशील ते ते आम्ही करु आम्ही हा
शब्द दिला आहे.

[11]तेव्हा इफ्ताह त्यांच्या बरोबर गेला. त्यांचा तो नेता
आणि सेनापती बनला. मिस्पा नगरात परमेश्वरासमोर
इफ्ताहने आपल्या सर्व शब्दांची उजळणी केली."

### अम्मोनी राजाला इफ्ताहचा संदेश

[12]इफ्ताहने अम्मोनी लोकांच्या राजाकडे दूता करवी
संदेश पाठवला तो असा; "अम्मोनी लोक आणि इस्राएल
लोक यांच्यामध्ये कोणताही तंटा बखेडा नसताना तू
आमच्यावर चढाई का करतोस?"

[13]त्यावर त्या राजाने इफ्ताहच्या दूतांना सांगितले,
"इस्राएल लोक मिसरमधून आले तेव्हा त्यांनी आमचा
प्रदेश बळकावला. आर्णोन नदीपासून थेट याब्बोक आणि
यार्देन नदीपर्यंतचा प्रदेश घेतला. म्हणून आम्ही लढत
आहोत. त्यांना आमची भूमी सलोख्याने परत करायला
सांगा."

[14]हा निरोप दूतांनी इफ्ताहकडे येऊन सांगितला.* तो
ऐकल्यावर इफ्ताहने पुन्हा अम्मोनी राजाला संदेश पाठवला.
[15]संदेश असा होता:

इफ्ताहचे म्हणणे असे, मवाब किंवा अम्मोनी
लोकांची भूमी इस्राएल लोकांनी बळकावलेली नाही.
[16]मिसरमधून बाहेर पडल्यावर इस्राएल लोक प्रथम
वाळवंटात गेले तेथून ते लाल समुद्राकडे गेले त्यानंतर
ते कादेश येथे आले. [17]त्यानी अदोमच्या राजाकडे
संदेश पाठवला. संदेश घेऊन जाणाऱ्या दूतांनी त्या
देशामधून जाऊ देण्याची राजाला विनंती केली. पण
अदोमच्या राजाने ती मानली नाही. तेव्हा असाच
संदेश आम्ही मवाबच्या राजालाही पाठवला. त्यानेही
ते झिडकारले. तेव्हा इस्राएल लोक कादेश येथे
राहिले.

[18]अदोम आणि मवाब या देशांना वळसा घालून
इस्राएल लोक वाळवंटामधून गेले. मवाबच्या पूर्वेकडे
त्यांनी अर्णोन नदीच्या पलीकडच्या तीरावर तळ
ठोकला. त्यांनी मवाबची सीमा ओलांडली नाही.
(अर्णोन नदी हीच मवाबची सीमा.)

[19]नंतर इस्राएल लोकांनी अमोऱ्यांचा राजा सीहोन
याच्याकडे दूत पाठवले. सीहोन हा हेशबोनचा राजा.
दूत सीहोनला म्हणाले, "आम्हा इस्राएल लोकांना
तुझ्या भूमीतून जाऊ दे आम्हाला आमच्या प्रदेशात
पोहोंचायचे आहे." [20]पण अमोऱ्यांचा राजा सीहोन
इस्राएल लोकांना आपल्या हद्दीतून जाऊ देईना. उलट
त्याने आपले सैन्य गोळा केले आणि याहस येथे तळ
दिला. इस्राएल लोकांशी अमोऱ्यांनी युध्द केले.
[21]यावेळी इस्राएलच्या परमेश्वर देवाने सीहोन आणि
त्याचे सैन्य यांचा पराभव करायला इस्राएल लोकांना
मदत केली. त्यामुळे अमोऱ्यांची भूमी ही इस्राएल
लोकांची मालमत्ता बनली. [22]अर्णोन नदीपासून
याब्बोक नदीपर्यंत आणि वाळवंटापासून यार्देन
नदीपर्यंत अमोऱ्यांचा सर्व प्रदेश इस्राएल लोकांच्या
ताब्यात आला.

[23]इस्राएलच्या परमेश्वर देवाने अमोऱ्यांना आपला
प्रदेश सोडून द्यायला भाग पाडले आणि तो प्रदेश
इस्राएल लोकांना दिला. आता इस्राएल लोकांना तो
प्रदेश सोडायला लावणे तुला जमेल असे तुला वाटते?
[24]कमोश या तुमच्या देवाने दिलेल्या भूमीत तुम्ही
खुशाल राहू शकता. म्हणजे आमच्या परमेश्वराने
दिलेल्या भूमीत आम्ही राहू. [25]मवाबचा राजा सिप्पोर
पुत्र बालाक याच्या पेक्षा तू चांगला आहेस का? तो
कोठे वाद घालत बसला? तो कधी इस्राएल लोकांशी
युध्द करायला सरसावला का? [26]हेशबोन शहर आणि
त्याच्या आसपासची गावे यात इस्राएल लोक गेली
तीनशे वर्षे राहात आहेत. अरोएर आणि त्याच्या
भोवतालची गावे, अर्णोन नदीच्या काठावरची गावे
या सर्व ठिकाणी इस्राएल लोक गेली तीनशे वर्षे
आहेत. त्या काळात तुम्ही कधी ती परत मिळवायचा
प्रयत्न का केला नाहीत? [27]इस्राएल लोकांनी तुमचे

---

**हा निरोप ... सांगितला** हिब्रू सांहितेत हे वाक्य नाही. प्राचीन ग्रीक भाषांतरातून हे घेतले आहे.

कधी वाकडे केले नाही पण तुम्ही मात्र त्यांच्यावर
अन्याय करत आहात. आता, इस्राएल लोकांची बाजू
न्यायाची आहे की अम्मोनी लोकांची याचा निर्णय
खुद्द तो न्यायाधीश परमेश्वरच करो!"

28पण इफ्ताहच्या या संदेशाकडे अम्मोनी लोकांच्या
राजाने सरळसरळ दुर्लक्ष केले.

### इफ्ताहचे नवस

29मग परमेश्वराचा आत्मा इफ्ताहमध्ये संचारला. इफ्ताह
गिलाद आणि मनश्शे यांच्या प्रदेशातून गिलादमधील मिस्पा
नगरात आला. तेथून तो अम्मोनी लोकांच्या प्रदेशात घुसला.
30इफ्ताह परमेश्वराला नवस बोलला तो म्हणाला, "तू
जर मला अम्मोन्यांचा पराभव करु दिलास तर, 31विजयी
झाल्यावर मी परत येईन तेव्हा माझ्या घरातून जो कोणी
मला सामोरा येईल त्याला मी तुला होमबली म्हणून अर्पण
करीन"
32मग इफ्ताहने अम्मोन्यांवर हल्ला चढवला. त्यांचा
पराभव करण्यात त्याला परमेश्वराचे साहाय्य झाले.
33अरोएर नगरापासून मिन्नीथ नगरापर्यंत वीस नगरे त्याने
काबीज केली. आबेल करामीम येथपर्यंत त्याने अम्मोन्यांचा
बीमोड केला. इस्राएल लोकांनी अम्मोन्यांचा पराभव केला.
अम्मोन्यांचा हा पराभव प्रचंड होता.
34इफ्ताह मिस्पा येथे परतला. तो घरी पोचतो तो त्याची
मुलगी त्याला सामोरी आली. त्याची ही एकुलती एक
मुलगी खंजिरी घेऊन नृत्य करत पुढे आली. इफ्ताहचे
तिच्यावर जिवापाड प्रेम होते तिच्याखेरीज त्याला दुसरे
मूलबाळ नव्हते. 35तिलाच प्रथम आलेली पाहताच
दु:खावेगाने तो अंगावरची वस्त्रे फाडू लागला. तो म्हणाला,
"मुली, सत्यानाश झाला. मला तू दु:खाच्या खाईत लोटले
आहेस. मी तर परमेश्वराला नवस बोललो आहे आणि
मला आता माझा शब्द फिरवता येणार नाही."
36तेव्हा ती त्याला म्हणाली, "बाबा, तुम्ही नवस बोलला
आहात तर तो फेडायलाच हवा. कबूल केलेत त्याप्रमणे
आता वागा. परमेश्वराने ही अम्मोन्यांचा पराभव करायला
तुम्हाला साहाय्य केलेच की नाही?"
37पुढे ती आपल्या वडीलांना म्हणाली, "पण माझ्यासाठी
एक करा. दोन महिने मला एकटीला राहू द्या. डोंगरांमध्ये
मी राहीन. आता माझे लग्न होणार नाही की मला मुलेबाळे
होणार नाहीत. तेव्हा मला आणि माझ्या सख्यांना गव्व्यात
गळे घालून शोक करू द्या." 38इफ्ताह म्हणाला, "खुशाल
तसे कर" त्याने दोन महिन्यांसाठी तिची रवानगी केली.
ती आणि तिच्या मैत्रिणी डोंगरांमध्ये राहिल्या. कुमारिका
म्हणूनच तिला मरण येणार म्हणून त्यांनी शोक केला.
39दोन माहिने असे गेल्यावर ती आपल्या बापाकडे
परत आली. इफ्ताहने परमेश्वराला नवस बोलल्याप्रमाणे
सर्व काही केले. इफ्ताहची मुलगी कुमारिकाच राहिली.
तेव्हा इस्राएलामध्ये एक प्रथा पडून गेली. 40गिलादमधील
इफ्ताहच्या मुलीचे सर्व इस्राएल स्त्रिया स्मरण ठेवतात
दरवर्षी चार दिवस त्या तिच्या प्रीत्यर्थ शोक करतात.

### इफ्ताह आणि एफ्राईम

12 एफ्राईमच्या लोकांनी सैन्याची जमवाजमव केली
आणि नदी ओलांडून ते साफोन येथे गेले. ते
इफ्ताहला म्हणाले, "अम्मोन्यांशी लढायला गेलास तेव्हा
तू आम्हाला मदतीसाठी का बोलावले नाहीस? आता आम्ही
तुझ्यासकट तुझ्या घराला आग लावतो."
2इफ्ताह म्हणाला, "अम्मोनी लोक आपल्याला वरचेवर
त्रास देत होते. म्हणून मी माझ्या सैन्यासह त्यांच्यावर चालून
गेलो. तेव्हा मी तुम्हाला बोलावले होते पण तुम्ही कुमक
पाठवली नाही. 3तुमची मदत मिळण्याची चिन्हे दिसेनात
तेव्हा मी माझा जीव धोक्यात घातला. नदी उतरुन मी
अम्मोन्यांशी लढायला गेलो. त्यांना नेस्तनाबूत करण्यात
परमेश्वराचे मला साहाय्य झाले. आता तुम्ही आज माझ्याशी
लढायला का आला आहात?"
4मग इफ्ताहने गिलादमधील लोकांना एकत्र केले. त्यांनी
एफ्राईमशी युध्द केले. ते युध्दात उतरले कारण एफ्राईम
लोकांनी गिलादांचा अपमान केला होता. ते म्हणाले होते,
"गिलादांनो, तुम्ही म्हणजे एफ्राईमांनी जीवदान दिलेले
पळपुटे आहात. तुम्हाला स्वत:चा प्रदेश सुध्दा नाही.
तुमच्यातील काही भाग एफ्राईमांचा तर काही मनश्शेचा
आहे." गिलादांनी एफ्राईमांचा पराभव केला. 5एफ्राईम
देशाकडे जाणारे यार्देन नदीचे उतार गिलादांनी ताब्यात
घेतले. कोणीही जिवंत राहिलेला एफ्राईम माणूस आला
आणि नदी ओलांडून जाऊ देण्याची विनंती करायला
लागला की गिलाद विचारत, "तू एफ्राईमचा आहेस का?"
तो म्हणे, "नाही" 6मग ते त्याला "शिब्बोलेथ" हा शब्द
उच्चारायला सांगत. एफ्राईम लोकांना तो नीट म्हणता येत
नसे. तो म्हणे, "सिब्बोलेथ" तेव्हा हा माणूस एफ्राईम
असल्याचे त्यांच्या ध्यानात येई. नदीच्या उतारापाशी त्याला
मारून टाकत. अशाप्रकारे त्यांनी बेचाळीस हजार एफ्राईम
माणसे मारली. 7इफ्ताह सहा वर्षे इस्राएल लोकांचा
न्यायाधीश होता. त्याचे निधन झाल्यावर गिलादमधील
त्याच्या गावी त्याचे दफन करण्यात आले.

### नंतरचा न्यायाधीश इब्सान

8मग बेथलहेममधील इब्सान याने न्यायाधीश म्हणून
इस्राएल लोकांचे काम पाहिले. 9त्याला तीस मुलगे आणि
तीस मुली होत्या त्याने आपल्या तीसही मुलींना गोत्राबाहेर
लग्ने जमवण्यास सांगितले आणि सर्व मुलांसाठी तशाच
बाहेरच्या मुली केल्या. इब्सान सात वर्षे न्यायाधीश होता.
10त्याच्या निधनानंतर बेथलहेममध्ये त्याचे दफन करण्यात
आले.

## न्यायाधीश एलोन

11त्यानंतर जबुलून वंशातील एलोन इस्राएलांचा
न्यायाधीश झाला. तो त्या जागी दहा वर्षे होता. 12मग तो
वारला तेव्हा जबुलूनमधील अयालोन येथे त्याच्यावर
अंत्यसंस्कार करण्यात आले.

## न्यायाधीश अब्दोन

13एलोन नंतर हिल्लेलचा मुलगा अब्दोन न्यायाधीश
झाला. तो पिराथोनचा होता. 14त्याला चाळीस मुलगे आणि
तीस नातू होते. ते सत्तर गाढवांवर स्वार होत. अब्दोन
आठ वर्षे इस्राएलांचा न्यायाधीश होता. 15पुढे त्याच्या
मृत्यूनंतर पिराथोन येथे त्याला पुरण्यात आले. एफ्राइम
प्रांतातील अमालेक्यांच्या डोंगराळ प्रदेशात पिराथोन हे
ठिकाण आहे.

## शमशोनचा जन्म

13 इस्राएल लोकांनी दुष्कृत्ये करायला सुरुवात केली
आहे असे पुन्हा परमेश्वराच्या लक्षात आले. तेव्हा
त्याने चाळीस वर्षे पलिष्ट्यांच्या हातात सत्ता दिली. 2सरा
नगरामध्ये मानोहा नावाचा एक माणूस होता. तो दान
वंशातील होता. त्याच्या बायकोला मूलबाळ होत नव्हते.
3एकदा परमेश्वराच्या दूताने तिला दर्शन दिले. तो तिला
म्हणाला, “तुला आजतागायत मूल झाले नाही पण आता
तू गरोदर राहशील आणि तुला मुलगा होईल. 4मात्र द्राक्षारस
किंवा मद्य पिऊ नको. तसेच कोणताही अशुद्ध पदार्थ
खाऊ नकोस. 5कारण तू गर्भवती राहून पुत्राला जन्म
देशील. तो परमेश्वराचा असेल. तो नाजीर होईल. त्याचे
जावळ काढू नको. जन्माला येण्याअगोदर पासूनच
परमेश्वराची त्याच्यावर कृपादृष्टी असेल. पलिष्ट्यांपासून
तो इस्राएलांचे रक्षण करील.”
6तिने आपल्या नवऱ्याला सर्व काही सांगितले. ती
म्हणाली, “देवाकडून एक माणूस माझ्याकडे आला होता.
त्याचे रूप देवाच्या देवदूताप्रमाणे भिती आणि आदर निर्माण
करणारे होते. त्याला पाहून मी भयभीत झाले. त्याचा
ठावठिकाणा मी विचारला नाही. त्यानेही त्याचे नाव
सांगितले नाही. 7पण तो मला म्हणाला, ‘तुला दिवस राहातील
आणि मुलगा होईल. मद्य किंवा द्राक्षारस पिऊ नको.
तसेच कोणतेही अशुध्द अन्न खाऊ नको. कारण हा
मुलगा जन्माला यायच्या आधीपासून मरेपर्यंत देवाचा नाजीर
असणार आहे.’”
8हे ऐकून मानोहाने परमेश्वराची प्रार्थना केली. तो
म्हणाला, “हे परमेश्वरा, त्या दूताला परत आमच्याकडे
पाठव या जन्माला येणाऱ्या मुलाचे संगोपन आम्ही कसे
करावे हे आम्हाला त्याच्याकडून पुन्हा ऐकू दे.”
9परमेश्वराने मानोहाची ही विनवणी ऐकली.
परमेश्वराचा दूत पुन्हा तिच्याकडे आला. ती शेतात बसली
होती आणि तिचा नवरा तिच्याजवळ पास नव्हता. 10“तो
पुन्हा आलाय त्यादिवशी आलेला माणूस आज परत येथे
आला आहे” असे सांगत ती धावतच नवऱ्याला बोलवायला
गेली. 11मानोहा उठून बायकोच्या मागोमाग गेला. त्या
माणसाजवळ आल्यावर त्याला म्हणाला, “पूर्वी माझ्या
बायकोशी बोलून गेलास तो तूच का?”
दूत म्हणाला, “हो, तोच मी”
12तेव्हा मानोहा म्हणाला, “आपल्या म्हणण्याप्रमाणे घडून
येवो त्या मुलाचा जीवनक्रम कसा असेल? तो काय काय
करील? आम्हाला सर्व काही सांग.”
13तेव्हा मानोहाला तो परमेश्वराचा दूत म्हणाला, “तुझ्या
बायकोला मी जे सांगितले त्याप्रमाणे तिने वागावे.
14द्राक्षवेलाचा कोणताही भाग तिने खाऊ नये. द्राक्षारस
किंवा मद्य पिऊ नये. अशुध्द अन्नाचे सेवन करु नये.
माझ्या आज्ञा कसोशीने पाळाव्यात.”
15मानोहा त्यावर परमेश्वराच्या दूताला म्हणाला, “तुम्ही
थोडावेळ आमच्यात राहा तुमच्या पाहुणचारासाठी आम्ही
करडू शिजवतो.”
16परमेश्वराचा दूत म्हणाला, “तुम्ही मला ठेवून घेतलेत
तरी मी तुमचे काही खाणार नाही. पण तुम्हाला काही
करायचेच असेल तर परमेश्वरासाठी होमार्पण करा.”
(हा खरच परमेश्वराचा दूत आहे याची मानोहाला कल्पना
नव्हती.)
17मानोहाने त्याला विचारले, “तुमचे नाव काय? तुमच्या
म्हणण्याप्रमणे सर्व घडून आल्यावर आम्ही तुमचा सन्मान
करु.”
18परमेश्वराचा दूत म्हणाला “माझे नाव कशाला
विचारता? ते अति आश्चर्यकारक* आहे. तुमचा त्यावर
विश्वास बसणार नाही.”
19मानोहाने मग एका करडाचा खडकावर बळी दिला
तो बली आणि धान्यार्पण परमेश्वराला व आश्चर्यकारक
कृत्ये करणाऱ्या त्या माणसाला अर्पण केले. 20मग जे जे
घडले ते मानोहा व त्याची पत्नी यांनी पाहिले वेदीवरुन
ज्वाळा आकाशाकडे झेपावत असताना त्यातूनच तो
परमेश्वरदूत स्वर्गस्थ झाला.
हे पाहताच उभयतांनी जमिनीवर लोटांगण घातले. 21तो
परमेश्वराचाच दूत असल्याची मानोहाची खात्री पटली.
पुन्हा मानोहा आणि त्याची पत्नी यांना त्याने दर्शन दिले
नाही. 22मानोहा बायकोला म्हणाला, “आपण आता खात्रीने
मरणार. कारण आपण प्रत्यक्ष देवाला पाहिले आहे.”
23पण ती नवऱ्याला म्हणाली, “आपण मरावे असे
परमेश्वराच्या मनात नाही. तसे असते तर त्याने आपले
होमार्पण, धान्यार्पण स्वीकारले नसते. आपल्याला जे दिसले
ते दाखवले नसते किंवा ज्या गोष्टी सांगितल्या त्या सांगितल्या
नसत्या”

---

**अति आश्चर्यकारक** अगम्य विस्मयकारक, नवलपूर्ण. पाहा यशय 9:6.

[24]यथावकाश तिला मुलगा झाला. तिने त्याचे नाव शमशोन ठेवले. तो मोठा होऊ लागला. त्याला परमेश्वराचा आशीर्वाद मिळाला. [25]सरा आणि अष्टावोल या नगरांमधल्या महने-दान नगरात तो असताना परमेश्वराच्या आत्म्याने शमशोनमध्ये आपल्या कार्याला सुरुवात केली.

## शमशोनचा विवाह

14 शमशोन तिम्ना येथे गेला असताना तिथे त्याने एक पलिष्टी तरुणी पाहिली. [2]घरी परतल्यावर तो आपल्या आईवडीलांना म्हणाला, "तिम्ना येथे मी एक पलिष्टी मुलगी पाहिली आहे. मला तिच्याशी लग्न करायचे आहे."

[3]पण त्याचे आईवडील त्याला म्हणाले, आपल्या नातेवाइकांच्या आणि इस्राएल लोकांच्या मुलीमध्ये तुझी पत्नी होण्यासारखी स्त्री नाही का? पलिष्ट्यांमधील मुलीशीच कशाला तुला लग्न करायला हवे? त्या लोकांची सुंताही झालेली नसते."

पण शमशोन म्हणाला, "तीच मुलगी मला हवी मला तिच्याशीच लग्न करायचे आहे." [4](परमेश्वराच्या मनात तसेच आहे हे शमशोनच्या आईवडीलांना ठाऊक नव्हते. पलिष्टी तेव्हा इस्राएलींवर सत्ता गाजवत होते. त्यांच्या विरुद्ध काहीतरी करायची संधी परमेश्वर पाहात होता.)

[5]शमशोन आपल्या आईवडीलांबरोबर तिम्ना येथे गेला. शहराजवळच्या द्राक्षमळ्यापर्यंत ते पोहोंचले. तिथे अचानक एका तरुण सिंहाने शमशोनवर झेप घेतली. [6]त्या क्षणी शमशोनमध्ये परमेश्वराच्या आत्म्याचा संचार झाला आणि करडू फाडावे तसे त्याने लीलया त्या सिंहाला नुसत्या हातांनी फाडून काढले. मात्र आपल्या या कृत्याचा त्याने आईवडीलांना सुगावा लागू दिला नाही.

[7]शमशोनने पुढे जाऊन त्या पलिष्टी तरुणीची भेट घेतली. तिच्याशी बोलणे केले. त्याला ती फार आवडली. [8]काही दिवसांनी तो तिच्याशी लग्न करायला परत जात असताना, त्या तरुण सिंहाचे कलेवर पाहायला वळला. त्याला त्याच्यावर मधमाश्यांनी पोळे केलेले दिसले. त्यात थोडा मधही होता. [9]तो हाताने काढून घेऊन वाटेने खात खात तो गेला. त्यातील थोडा त्याने घरी पोहोंचल्यावर आपल्या आईवडीलांनाही दिला. त्यांनीही तो चाखला. पण तो मध त्याने मृत सिंहाच्या शरीरावरुन काढून घेतला आहे हे त्याने त्याना सांगितले नाही.

[10]मग शमशोनचे वडील त्या पलिष्टी मुलीला पाहायला गेले. तेव्हा वराने मेजवानी द्यायची पध्दत होती त्याप्रमाणे शमशोनने मेजवानी दिली. [11]पलिष्टी लोकांनी हे पाहिले तेव्हा त्यांनी त्याच्या दिमतीला तीस माणसे पाठवली.

[12]त्यांना शमशोन म्हणाला, "मला तुम्हाला एक गोष्ट सांगायची आहे. ही मेजवानी सात दिवस चालणार आहे. मी तुम्हाला एक कोडे घालतो, त्याचे उत्तर त्या कालावधीत शोधून काढा तुम्हाला या कोड्याचा अर्थ सांगता आला तर मी तुम्हाला तीस सुती अंगरखे आणि तीस पोशाख देईन. [13]मात्र तुम्ही हरलात तर तीस सुती अंगरखे आणि तीस पोषाख तुम्ही मला द्यायचे." तेव्हा ती तीस माणसे म्हणाली, "ठीक आहे सांग तर तुझे कोडे."

[14]शमशोन ने कोडे घातले ते असे;

> भक्षकातून भक्ष्य निघाले आणि उग्रामधून मधुर
> निघाले तर ते काय?

त्या तीस जणांनी तीन दिवस उत्तर शोधायचा प्रयत्न केला, पण त्यांना काही अर्थ उमगेना.

[15]तेव्हा चौथ्या दिवशी* ते सगळे शमशोनच्या बायकोकडे आले. तिला म्हणाले, "आमची फजिती करायला इथे बोलावून घेतले आहे काय? काहीतरी युक्ती लढवून तू आपल्या नवऱ्याकडून या कोड्याचा अर्थ काढून घे. तसे केले नाहीस तर तुला आणि तुझ्या वडीलांच्या घरातील सर्वांना आम्ही घरादारासकट जाळून टाकू."

[16]तेव्हा शमशोनची बायको रडत शमशोनकडे गेली आणि त्याला म्हणाली, "तुझे माझ्यावर प्रेम नाही. तू माझा तिरस्कार करतोस. माझ्या लोकांना कोडे घालून त्याचे उत्तर मात्र तू मला सांगत नाहीस." शमशोनने उत्तर दिले, "मी माझ्या आईवडीलांनाही उत्तर सांगितलेले नाही, ते मी तुला का सांगावे?"

[17]मेजवानीच्या काळात पुढील सातही दिवस तिने आक्रोश केला तेव्हा अखेर सातव्या दिवशी त्याने तिला कोड्याचा अर्थ सांगितला. तिने त्याचा पिच्छाच पुरवला म्हणून त्याला सर्व सांगावे लागले. मग ती आपल्या माणसात परतली आणि त्यांना तिने उत्तर सांगितले.

[18]सातव्या दिवशी सूर्यास्तापूर्वी अशाप्रकारे पलिष्ट्यांना उत्तर मिळाले. ते शामशोनकडे येऊन म्हणाले,

> "मधापेक्षा मधुर ते काय? सिंहापेक्षा उग्र ते काय?"

तेव्हा शमशोन त्यांना म्हणाला,

> "तुम्ही माझी कालवड नांगराला जुंपली नसती तर तुम्हाला हे कोडे कधीच उलगडले नसते."

[19]मग शमशोन खूप संतापला. परमेश्वराचा आत्मा प्रचंड सामर्थ्यानिशी त्याच्यात संचारला. आणि अष्कलोनवर चालून जाऊन त्याने तीस पलिष्ट्यांचा वध केला. मृतांचे

---

**चौथ्या दिवशी** हिब्रू संहिते प्रमाणे "सातव्या दिवशी" हे प्राचीन ग्रीक भाषांतराप्रमाणे आहे.

कपडे आणि मालमत्ता त्याने काढून घेतली. ते सर्व त्याने
ज्यांनी कोडे उलगडले त्या सर्वां देऊन टाकले. मग तो
आपल्या वडीलांच्या घरी परतला.
20बायकोला मात्र त्याने आपल्याबरोबर घेतले नाही.
विवाह सोहळ्यातील एका माणसाला तिला देऊन टाकण्यात
आले.

## शमशोन पलिष्ट्यांना भस्म करतो

15 गव्हाच्या कापणीच्या हंगामात शमशोन आपल्या
बायकोच्या भेटीला निघाला. एक करडूही त्याने
भेटीदाखल घेतले. माझ्या पत्नीच्या दालनात मी जातो
असे तो म्हणाला.
पण तिच्या वडीलांनी त्याला आत जायला मज्जाव केला.
2ते त्याला म्हणाले, “तुला तर ती नकोशी झाली आहे
असे मला वाटले. म्हणून तुमच्या विवाहतील सोबत्याशी
मी तिचे लग्न लावून दिले. तिची धाकटी बहीण तिच्यापेक्षा
देखणी आहे. तेव्हा तू तिच्याशी लग्न कर.”
3पण शमशोन म्हणाला, “आता पलिष्ट्यांचे नुकसान
करायला मला चांगले निमित्त मिळाले आहे. मला आता
त्याबद्दल कोणी दोष देणार नाही.”
4मग बाहेर पडून त्याने तीनशे कोल्हे धरले दोन दोन
कोल्ह्यांच्या शेपट्या एकत्र बांधून तिथे एक एक मशाल
बांधली. 5त्याने त्या मशाली पेटवून दिल्या आणि सर्व
कोल्ह्यांना पलिष्ट्यांच्या धान्याच्या उभ्या पिकात धावायला
सोडले. त्यामुळे शेतातील कापणी झालेले, न झालेले असे
सर्व पीक भस्मसात झाले. एवढेच नव्हे तर द्राक्षाचे आणि
जैतुनाचे मळेही बेचिराख झाले.
6“कोणी केले हे सगळे?” पलिष्टी विचारु लागले.
कोणी तरी म्हणाले, “तिम्ना येथील एकाचा जावई
शमशोन हा या सगळ्याच्या पाठीमागे आहे. कारण त्याच्या
सासऱ्याने आपली मुलगी शमशोन ऐवजी त्यांच्या
विवाहातील सोबत्याला दिली.” हे ऐकल्यावर पलिष्ट्यांनी
शमशोनची बायको आणि तिचे वडील यांना जिवंत
जाळले.
7तेव्हा शमशोन पलिष्ट्यांना म्हणाला, “तुम्ही माझ्याशी
वाईट वागलात. आता मी ही तुमच्याशी वाईट वागेन
त्यानंतरच मी थांबेन.”
8शमशोनने मग पलिष्ट्यांवर हल्ला चढवला. त्यात
अनेक जण ठार झाले. त्यानंतर शमशोन एटाम
खडकांमधील गुहेत राहिला.
9इकडे पलिष्टी लोक यहूदात गेले आणि लेही या
ठिकाणी त्यांनी तळ दिला. तेथून त्यांनी युध्दाची तयारी
सुरु केली. 10तेव्हा यहूद्यांनी त्यांना विचारले, “तुम्ही
आमच्यावर हल्ला करण्यासाठी आलात काय?”
ते म्हणाले, “आम्ही शमशोनला ताब्यात घ्यायला आलो
आहोत. त्याला आम्हाला कैद करायचे आहे. त्याने आमच्या
लोकांशी केलेल्या वर्तणुकीची सजा त्याला द्यायची आहे.”
11हे ऐकल्यावर तीन हजार यहूदी एटाम खडकातील
गुहेपाशी शमशोनला भेटायला गेले. ते त्याला म्हणाले, “तू
हे काय केलेस? आपल्यावर पलिष्ट्यांचे राज्य आहे हे
तुला समजत नाही का?”
शमशोन म्हणाला, “ते माझ्याशी जसे वागले तशीच
त्यांना मी शिक्षा दिली आहे.”
12त्यावर ते लोक शमशोनला म्हणाले, “आम्ही तुझ्या
मुसक्या बांधून तुला पलिष्ट्यांच्या स्वाधीन करायला आलो
आहोत.”
शमशोन म्हणाला, “तुम्ही स्वत: मला इजा करणार
नाही एवढा शब्द तुम्ही मला द्या.”
13यहूदी म्हणाले, “मान्य आहे, आम्ही फक्त तुला बांधून
पलिष्ट्यांच्या हवाली करतो तुझ्या जिवाला धक्का लावणार
नाही.” त्याप्रमाणे त्यांनी शमशोनला दोन नवीन दोरखंडांनी
बांधून गुहेतून वर आणले.
14शमशोन लेही या ठिकाणी आला तेव्हा पलिष्टी लोक
त्याला सामोरे आले. ते आनंदाने आरोळ्या मारत होते
त्याच वेळी शमशोनमध्ये परमेश्वराच्या आत्म्याचा प्रचंड
सामर्थ्यानिशी संचार झाला. तेव्हा शमशोनचे दोरखंड जसे
काही वाखाच्या जळलेल्या दोरीप्रमाणे कुचकामी झाले
आणि त्यामुळे ते त्याच्या दंडांवरून आपोआप गळून पडले.
15तेव्हा शमशोनला तिथे एका मृत गाढवाचे जबड्याचे
हाड सापडले. त्याच्या साहाय्याने त्याने एक हजार पलिष्टी
लोकांना ठार केले.
16तेव्हा शमशोन म्हणाला,

गाढवाच्या जबड्याच्या हाडाने मारली मी माणसे हजार!
गाढवाच्या जबड्याच्या हाडाने रचली मी त्यांची उंच रास.*

17बोलणे संपल्यावर शमशोनने ते हाड तेथेच खाली
टाकले. म्हणून त्या जागेचे नाव पडले, ‘रामथ-लेही’
म्हणजेच जबड्याच्या हाडाची टेकडी.
18शमशोन तहानेने व्याकुळ झाला. तेव्हा त्याने
परमेश्वराचा धावा केला. तो म्हणाला, “तुझा मी दास
आहे. हा एवढा मोठा विजय तू मला मिळवून दिलास
तेव्हा आता मला तहानेने तू खचितच मरु देणार नाहीस?
ज्यांची सुंताही झालेली नाही अशा लोकांच्या तावडीत मी
सापडू नये.”
19तेव्हा देवाने लेहीत खडक फोडून एक भेग पाडली
आणि त्यातून पाणी बाहेर उसळले शमशोन ते पाणी पिऊन
ताजातवाना झाला. पुन्हा त्याच्या अंगात जोर आला. त्या
झऱ्याचे नाव त्याने एन-हक्कोरे म्हणजे “धावा
करणाऱ्याचा झरा” असे ठेवले. लेही शहरात हा झरा
अजूनही आहे.

---

**रास** हिब्रू मध्ये “रास” आणि “गाढव” यासाठी असलेल्या शब्दाचा उच्चार एकसारखा आहे.

20पलिष्ट्यांच्या अमदानीत शमशोन वीस वर्षे इस्राएलचा
न्यायाधीश होता.

## गज्जा नगरात शमशोन

16 एक दिवस शमशोन गज्जा या नगरात गेला. तेथे
त्याने एका वेश्येला पाहिले. ती रात्र त्याने
तिच्याकडे घालवली. 2कोणीतरी हे पाहून शमशोन आला
असल्याचे गज्जाच्या लोकांना सांगितले. तेव्हा ते त्याला
मारायला निघाले. त्या ठिकाणाला वेढा घालून ते
शमशोनची वाट पाहात दबा धरुन बसले. शहराच्या
वेशीपाशी त्यांनी पूर्ण रात्र काढली गप्प राहून रात्र भर
त्यांनी आपला सुगावा लागू दिला नाही. ते एकमेकांना
म्हणाले, "उजाडताच आपण त्याला मारु"
3पण शमशोन त्या वेश्येकडे मध्यरात्रीपर्यंतच राहिला.
अर्ध्या रात्रीच तो उठला. वेशीचे दरवाजे त्याने खिळखिळे
केले. ते दरवाजे, त्यांच्या चौकटी आणि अडसर हे सगळे
त्याने उचकटून काढले, खांद्यावर टाकले आणि हे सगळे
घेऊन तो हेब्रोन जवळच्या डोंगरमाथ्यावर गेला.

## शमशोन आणि दलीला

4पुढे शमशोन दलीला नामक स्त्रीच्या प्रेमात पडला. ती
सोरेक खोऱ्यातील होती. 5पलिष्ट्यांचे अधिकारी तिच्याकडे
जाऊन तिला म्हणाले, "शमशोनच्या अचाट शक्तीचे रहस्य
काय ते आम्हाला जाणून घ्यायचे आहे. तू ते त्याच्याकडून
युक्तीने काढून घे. म्हणजे मग त्याला जेरबंद कसे करायचे
ते पाहता येईल. त्याला कह्यात आणता येईल. एवढे केलेस
तर आम्ही तुला प्रत्येकी अठ्ठावीस पौंड चांदी देऊ."
6मग दलीला शमशोनला म्हणाली, "तुझ्या सामर्थ्याचे
रहस्य तरी काय? तुला ठाणबंद करुन हतबल करायचे
तरी कसे एखाद्याने?"
7शमशोन म्हणाला, "नव्या कोऱ्या, पुरत्या न वाळलेल्या
अशा सात धनुष्याच्या दोऱ्यांनी मला बांधले तरच ते
शक्य आहे कोणी हे केले तर मीही चार चौघांसारखा
दुर्बळ होईन."
8तेव्हा पलिष्टी अधिकाऱ्यांनी दलीलाला सात नव्या
प्रत्यंचा आणून दिल्या. त्या अजून पुरत्या वाळल्या देखील
नव्हत्या. दलीलाने त्यांनी शमशोनला जखडून टाकले.
9शेजारच्या खोलीत काही माणसे लपून बसली होती. दलीला
शमशोनला म्हणाली, "शमशोन, पलिष्टी लोक आता
तुला ताब्यात घेणार आहेत." पण शमशोनने त्या प्रत्यंचा
सहजगत्या तोडून टाकल्या जळलेल्या सुतळीची राख पडावी
इतक्या सहजपणे त्या गळून पडल्या. अशाप्रकारे पलिष्ट्यांना
काही शमशोनच्या सामर्थ्याचे रहस्य समजले नाही.
10तेव्हा दलीला त्याला म्हणाली, "तू माझ्याशी खोटे
बोललास. मला फसवलेस, खरे काय ते मला सांग तुला
कसे बांधून घालता येईल?"
11शमशोन म्हणाला, "नव्या, कधीही उपयोगात न
आणलेल्या दोरखंडांनी मला जखडायला हवे. तसे केले
तर मी अगदीच हतबल होऊन जाईन."
12तेव्हा दलीलाने नवेकोरे दोरखंड आणून त्याला बांधले.
दुसऱ्या खोलीत काही जण लपलेले होतेच. दलीला मोठ्याने
म्हणाली, "शमशोन, पलिष्टी लोक तुला पकडायला आले
आहेत!" पण याही वेळी शमशोनने ते दोरखंड सुतळीसारखे
तटकन तोडून टाकले.
13यावर ती त्याला म्हणाली, "बघ, पुन्हा तू खोटे बोललास!
मला बावळट ठरवलेस. आता तरी सांग तुला जखडून
टाकायची युक्ती."
शमशोनने सांगितले, "माझ्या केसांचे सात पेड करुन ते
मागाच्या ताण्यावर करकचून आवळले तरच ते शक्य
आहे."
शमशोनला झोप लागल्यावर दलीलाने हातमाग वापरुन
त्याच्या डोक्यावरील सात पेड विणून तिने. 14तंबूची खुंटी
ठोकून माग जमिनीवर पक्का रोवला. मग ती त्याला
म्हणाली, "शमशोन, पलिष्टी लोक तुझा ताबा घ्यायला
सज्ज आहेत." त्यावर शमशोनने खुंटी, माग हे सगळे
सहजगत्या उपटून टाकले.
15तेव्हा दलीला त्याला म्हणाली, "माझ्यावर तुझे प्रेम
आहे असे म्हणतोस आणि एवढाही विश्वास टाकत नाहीस
ना? आपले गुपित तू फोडायला तयार नाहीस. माझी फजिती
करायची ही तुझी तिसरी वेळ तुझ्या प्रचंड सामर्थ्याचे
गुपित तू अजूनही मला सांगितलेले नाहीस." 16तिने मग
त्याच्या मागे लकडाच लावला. तिच्या या रोजच्या
कटकटीमुळे मरण बरे असे त्याला वाटू लागले. 17शेवटी
त्याने तिला सर्व काही सांगून टाकले. तो म्हणाला,
"आजतागायत कधीही माझे केस कापलेले नाहीत. माझ्या
जन्माआधीच मला परमेश्वराला वाहिलेले आहे. तेव्हा
आता माझे मुंडन केले तर माझा शक्तिपात होईल व मी
चार चौघांसारखा सामान्य होईन."
18आता त्याने खरंच आपले मन मोकळे केले आहे हे
दलीलाच्या लक्षात आले. म्हणून पलिष्टी अधिकाऱ्यांना
तिने निरोप पाठवला, "आता शमशोनने आपले रहस्य
मला नक्की सांगितले आहे." तेव्हा ते आले. येताना तिला
वचन केलेले पैसेही घेऊन आले.
19आपल्या मांडीवर पडल्या पडल्या शमशोनला
झोप लागली आहे याची खात्री पटल्यावर तिने एकाला
बोलावले. त्याच्या कडून शमशोनच्या डोक्यावरील सात
बटांचे तिने मुंडन करवले. अशारितीने तिने त्याला
अगदी हतबल करुन टाकले. शमशोन गलितगात्र
आणि पराभवास योग्य झाला. त्याची शक्ती त्याला
सोडून गेली. 20मग ती त्याला म्हणाली, "शमशोन, पलिष्टी
लोक तुला जेरबंद करायला आले आहेत." तेव्हा तो
जागा झाला. त्याला वाटले, "पूर्वीप्रमाणेच याही वेळी मी
माझी सुटका करुन घेऊ शकेन." पण परमेश्वर

आपल्याला सोडून गेला आहे याची त्याला कल्पना
नव्हती.
21मग पलिष्ट्यांनी शमशोनला पकडले. त्यांनी त्याचे
डोळे फोडले. ते त्याला गज्जा शहरात घेऊन गेले. तो
निसटून जाऊ नये म्हणून त्याला त्यांनी साखळदंडांनी
आवळून बांधले. तसेच त्याला तुरूंगात ठेवले व जात्यावर
धान्य दळायला लावले. 22परंतु शमशोनचे केस पुन्हा
वाढू लागले.
23पलिष्ट्यांचे अधिकारी मोठा आनंदोत्सव साजरा
करायला एकदा एकत्र जमले. आपला देव दागोन याच्या
प्रीत्यर्थ ते मोठा यज्ञ करणार होते. कारण त्यांना वाटत
होते की शमशोन या शत्रूचा पाडाव करायला त्यांच्या ह्या
दैवताने त्यांना मदत केली होती. 24शमशोनची दशा पाहून
ते त्यांच्या दैवताची स्तुती करु लागले. ते म्हणाले,

“याने आमच्या देशाचा नाश केला आमची पुष्कळ
माणसे मारली परंतु आमच्या देवाच्या मदतीनेच आम्ही
त्याला ताब्यात घेऊ शकलो.”

25उत्सवाच्या ठिकाणी मौजमजा करण्यात लोक दंग
होते. ते म्हणाले, “शमशोनला समोर आणा. त्याची थोडी
चेष्टा करु.” तेव्हा शमशोनला तुरुंगातून बाहेर काढले
आणि लोक आपली करमणूक करुन घेऊ लागले.
देवळातील खांबांमध्ये त्यांनी त्याला उभे केले होते. 26एका
सेवकाने शमशोनचे हात घट्ट धरुन ठेवले होते. शमशोन
त्याला म्हणाला, “या देवळाला आधार देणाऱ्या दोन
खांबामध्ये मला उभे कर. म्हणजे मला हातानी चाचपडून
पाहता येईल. त्यांना रेलून मला उभे राहता येईल.”
27देवळात बायका–पुरुष सगव्व्यांची एकच गर्दी उसळली
होती. पलिष्ट्यांचे सर्व अधिकारी तेथे हजर होते. शिवाय
छपरावर तीन एक हजार माणसे होती. सर्वजण शमशोनची
गंमत पाहण्यात दंग होते. 28तेव्हा शमशोनने देवाचा धावा
केला. तो म्हणाला, “हे सर्वशक्तिमान परमेश्वरा, माझी
आठवण कर एकदा, फक्त एकदाच माझी शक्ती मला
परत दे. माझे डोळे फोडल्याबद्दल शिक्षा म्हणून एकदाच
या पलिष्ट्यांना मला धडा शिकवू दे.” 29एवढे म्हणून
देवळाच्या मधोमध असलेले ते दोन खांब शमशोनने घरले.
पूर्ण देवळाचा डोलारा या दोन स्तंभांवर उभा होता. आपल्या
सर्व शक्तीनिशी त्या स्तंभांना त्याने जोराचा रेटा दिला.
30“या पलिष्ट्यांच्या बरोबरच माझीही अखेर होईल.” एवढे
म्हणून त्याने जबरदस्त ताकद लावली. त्याबरोबर पूर्ण
देऊळ जमीनदोस्त झाले. अधिकाऱ्यांसह सर्व माणसे
त्याखाली सापडली. जिवंतपणी मारली त्यापेक्षा कितीतरीपट
माणसे शमशोनने अशाप्रकारे मरता मरता मारली.
31शमशोनचे भाऊ बंद आणि घरातील सर्व परिवार
तेथे जमा झाला. त्याचा मृतदेह त्यांनी घेतला आणि त्याच्या
वडीलांच्या कबरीतच त्याचाही अंत्यसंस्कार केला. सरा
आणि अष्टावोल यांच्या दरम्यान हे कबरस्थान आहे.
शमशोनाने वीस वर्षे इम्राएलसाठी न्यायनिवाडा केला.

## मीखाची मूर्तिपूजा

17 एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशात मीखा नामक एक
माणूस राहात होता. 2तो एकदा आपल्या आईला
म्हणाला, “तुझ्याजवळचे अठ्ठावीस पौंड रुपे कोणी तरी
चोरले होते, आठवते ना? तू त्याला शापही दिला होतास.
खंर तर ते मीच घेतले होते. माझ्याकडे ते आहे.”
त्याची आई त्याला म्हणाली, “मुला, परमेश्वर तुझे
भले करो.”
3मीखाने ते सर्व रुपे आपल्या आईला परत केले ती
म्हणाली, “हे मी आता परमेश्वरालाच अर्पण करते. मी ते
तुझ्या हवाली करते. तू देवाची एक मूर्ती करुन ती या
चांदीने मढव तेव्हा आता हे रुपे तूच घे.”
4पण त्याने ते न घेता आईलाच परत केले. तेव्हा तिने
त्यातील पाच पौंड रुपे सोनाराला दिले. सोनाराने एक
मूर्ती घडवून ती चांदीने मढवली. मूर्तीची प्रतिष्ठापना
मीखाच्या घरात करण्यात आली. 5त्याच्याकडे देवघर
होते. त्याने एफोद आणि आणखी काही मूर्ती केल्या.
आपल्या एका मुलाला पुरोहित म्हणून नेमले. 6(त्याकाळी
इस्राएलांवर राजा नव्हता तेव्हा प्रत्येकजण आपल्याला
योग्य वाटेल तसे करीत असे.)
7बेथलहेम येथे यहूदा कुळामध्ये एक तरुण लेवी होता.
8इतरत्र स्थायिक होण्याच्या विचाराने त्याने बेथलहेम
सोडले. असाच प्रवास करत करत तो मीखाच्या घरी
येऊन पोहोंचला. एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशातील मीखाच्या
घरी तो आल्यावर
9मीखाने त्याला विचारले, “बाबा रे, तू कोण? कोठून
आलास?”
या तरुणाने उत्तर दिले, “मी यहूदा बेथलहेम येथील
लेवी आहे. मी कोठेतरी आसरा शोधतोय”
10मीखा त्याला म्हणाला, “मग इथेच राहा. माझे वडील
आणि माझे पुरोहित म्हणून सेवा कर. वर्षाला मी तुला
चार औस रुपे तसेच अन्नवस्त्रही देईन.”
त्या लेवीने मीखाचे म्हणणे मानले. 11मीखाबरोबर
राहण्यास त्याने होकार दिला. मीखाच्या पोटच्या मुलापैकीच
तो एक होऊन गेला. 12मीखाने त्याच्यावर पौरोहित्य
सोपवले. तेव्हा तो त्याप्रमाणे मीखाच्या घरी राहू लागला.
13मीखा म्हणाला, “लेवी कुळातील माणूसच माझ्याकडे
पुरोहित म्हणून असल्यामुळे परमेश्वर माझे कल्याण
करील.”

## दान लोकांचा लईश नगरावर ताबा

18 त्याकाळी इस्राएलवर कोणी राजा नव्हता. त्या
सुमारास दान वंशातील लोक वस्ती करण्याच्या
उद्देशाने जागा पाहात होते. त्यांना अजून स्वत:ची अशी

भूमी नव्हती. इतर इस्राएलांप्रमाणे त्यांना त्यांचे वतन मिळाले नव्हते.

2तेव्हा दानवंशजांनी जागा हेरण्यासाठी पाच शूर माणसे निवडली ती सरा आणि अष्टावोल या प्रांतातली होती. सर्व कुळांचे प्रतिनिधित्व ती करत होती. जागा पाहाण्याचा आदेश मिळाल्यावर चांगल्या जागेच्या शोधार्थ हे पाचजण निघाले.

एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात आल्यावर मीखाच्या घराजवळ त्यांनी रात्रीपुरता मुक्काम केला. 3मीखाच्या घरापाशी ते आले तेव्हा त्यांना एका तरुण लेवी माणसाचा आवाज ऐकू आला. आवाज ओळखून ते घरापाशी थांबले, त्यानी लेवीला विचारले, "तू इथे कसा आलास? कोणी आणले तुला इथे? इथे तू काय करतोस?"

4मीखाने जे जे केले ते त्याने या लोकांना सांगितले तो म्हणाला, "मला त्याने वेतन देऊन नेमले आहे. मी त्याचा पुरोहित आहे." 5तेव्हा ते त्याला म्हणाले, "परमेश्वराजवळ तू आमच्यासाठी काहीतरी माग वस्ती करण्यास योग्य अशी जागा शोधण्यात आम्हाला यश येईल का, हे जाणण्याची आम्हांला इच्छा आहे."

6तो पुरोहित त्या पाच जणांना म्हणाला, "तुम्ही शांततेने जा. परमेश्वर तुम्हाला मार्ग दाखवेल."

7तेव्हा ते पाचजण तेथून निघाले. लईश या नगराशी ते आले. येथील लोकांचे जीवन सिदोनी लोकांसारखे आहे. ते निश्चिंत आहेत, सुखा समाधानात आहेत हे त्यांनी पाहिले. सर्व गोष्टींची तिथे सुबत्ता होती, शत्रूचा उपद्रव नव्हता. सीदोन पासून हा भाग लांब होता, तसेच अरामी लोकांशीही त्यांचा काही संबंध नव्हता.

8हे पाहून हे पाचजण सरा आणि अष्टावोल या आपल्या शहरांमध्ये परतले. तेथील भाऊबंदांनी त्यांना विचारले, "तुम्हांला काय आढळले?" 9ते म्हणाले, "आम्ही एक जागा हेरुन ठेवली आहे. ती फार सोयीची आहे. आता वेळ न दवडता आपण त्यांच्यावर हल्ला करु. जाऊन तिथला ताबा मिळवू. 10तेथे जागा भरपूर आहे, अन्नधान्य मुबलक आहे. तेथे गेल्यावर तुमच्या ते लक्षात येईलच. शिवाय, हल्ल्याची लोकांना कल्पनाही नसल्याने ते निर्धास्त आहेत. खरोखर परमेश्वराने ही जमीन आपल्याला दिली आहे."

11तेव्हा सरा आणि अष्टावोल येथून हल्लयाच्या तयारीने दान वंशातील सहाशे जण निघाले. 12लईशच्या वाटेवर असताना त्यांनी यहूदातील किर्याथ-यारीम येथे तळ ठोकला. म्हणूनच किर्याथ-यारीमच्या पश्चिमेकडील या भागाला अजूनही महाने दान म्हणजेच दान लोकांची छावणी म्हणून ओळखले जाते. 13येथून पुढे ते प्रवास करत एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात मीखाच्या घरापाशी येऊन पोचले.

14यापूर्वी येऊन लईश भोवतालचा प्रदेश पाहून गेलेले ते पाच जण आपल्या बरोबरच्या बाकीच्या लोकांना म्हणाले, "इथल्या एका घरात एफोद आहे. शिवाय काही मूर्ती, एक कोरीव आणि चांदीची मूर्ती एवढे सगळे आहे. काय करायचे माहीत आहे ना? जाऊन आपल्या ताब्यात घ्यायचे" 15आणि ते पाचजण मीखाच्या घराशी थांबले. तेथे तो तरुण लेवी होताच त्यांनी "तू कसा आहेस?" म्हणून विचारले 16बाकीची दान वंशातील सहाशे हत्यारबंद माणसे वेशीजवळ उभी होती. 17-18हे पाच जण घरात घुसले. त्यांनी सर्व कोरीव मूर्ती, घरातील बाकीच्या मूर्ती आणि चांदीची मूर्ती, एफोद हे सर्व लुटले तेव्हा तो लेवी पुरोहित बाहेर त्या सहाशे जणांच्या जमावाबरोबर होता. तो म्हणाला, "तुम्ही हे काय करत आहात?"

19ते पाच जण म्हणाले, "गप्प राहा, एक शब्दही काढू नकोस. आमच्या बरोबर चल. आमच्यातील वडीलधारा आणि याजक हो. आता तूच निवड कर. फक्त एका माणसाचा पुरोहित होऊन राहाणे बरे की, इस्राएलांच्या एका आख्ख्या वंशाचे याजक होणे बरे?"

20याने त्या लेवी तरुणाला आनंद झाला. त्याने तो एफोद, मूर्ती इत्यादी सर्व घेतले आणि दान वंशातील लोकांबरोबर निघाला.

21मग ही सहाशे दान माणसे, या लेवी तरुणाबरोबर निघाली. मीखाचे घर मागे टाकून ते आपल्या वाटेने गेले. लहान मुले, गुरेढोरे, सामानसुमान असा सर्व लवाजमा त्यांनी आपल्या पुढे ठेवला होता.

22ते बरेच पुढे गेल्यावर इकडे मीखाच्या जवळ राहणारे सर्व लोक एकत्र आले. त्यांनी दान लोकांचा पाठलाग केला व त्यांना गाठले. 23मीखाचे लोक दान लोकांच्या नावाने गर्जना करत होते. ते ऐकून दान लोक मागे वळून मीखाला म्हणाले, "काय गडबड आहे? तुम्ही का ओरडताय?"

24मीखा म्हणाला, "तुम्ही माझ्या मूर्ती पळवल्यात. मी त्या स्वत: घडवल्या आहेत. माझ्या पुरोहितालाही तुम्ही घेऊन चालला आहात. माझे आता काय राहिले? "काय गडबड आहे?" असे वर आणखी मलाच विचारता?"

25दान लोकांनी सांगितले, "तू वाद न घातलेला बरा. आमच्या पैकी काही फार रागीष्ट आहेत. तू ओरडलास तर ते तुझ्यावर हल्ला करतील. तू आणि तुझे कुटुंबीय उगीचच जिवाला मुकाल."

26एवढे बोलून दान लोक परत फिरले आणि आपल्या मार्गाला लागले. हे लोक आपल्याला भरी आहेत हे लक्षात घेऊन मीखाही घरी परतला.

27अशाप्रकारे मीखाच्या मूर्ती, पुरोहित हे सर्व मिळवून ते लईश येथे पोहोंचले. त्यांनी लईश येथील रहिवाश्यांवर हल्ला चढवला. सर्वत्र शांतता नांदत असताना, हल्ला होईल हे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते. लोकांना तरवारीने कापून काढून दान लोकांनी शहराला आग लावली. 28लईश येथील लोकांच्या मदतीला धावून येणारे कोणी नव्हते. सिदोन शहरापासून ते फार लांब होते तेव्हा तेथील

लोकांना मदतीसाठी तेथे येणे शक्य नव्हते आणि अरामी
लोकांशी त्यांचा कुठला करार झालेला नसल्याने तेही
आले नाहीत. बेथ-रहोबच्या ताब्यात असलेल्या खोऱ्यात
लईश हे शहर होते. दान लोकांनी तेथे नवे शहर वसवले
आणि तेथे ते राहू लागले. 29पूर्वीचे लईश हे नाव बदलून
त्यांनी त्याला दान हे नाव दिले. इस्राएलाचा एक वंशज
दान हा त्यांचा पूर्वज होता, त्याच्यावरुन हे नाव मिळाले.
30दान लोकांनी या मूर्तीची दान शहरात स्थापना केली.
गेर्षोमचा मुलगा योनाथन याला याजक म्हणून नेमले.
गेर्षोम हा मोशेचा मुलगा. इस्राएल लोकांचा पाडाव होऊन
त्यांनी बाबिलोनला बंदी म्हणून नेईपर्यंत योनाथन व त्याची
मुले दान वंशजांचे याजक म्हणून पौरोहित्य करत होती.
31मंदिर शिलो येथे असेपर्यंत दानचे लोक मीखाने केलेल्या
मूर्तीची पूजाअर्चा करत होते.

## एक लेवी आणि त्याची उपपत्नी

19 त्या काळी इस्राएल लोकांवर कोणी राजा नव्हता.
एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशात अगदी आडबाजूला
एक लेवी राहात असे.
यहूदातील बेथलहेम नगरातील एक बाई त्याची दासी
म्हणून त्याच्याजवळ राहात असे. 2एकदा त्या दोघांमध्ये
काही तरी वादावादी झाली आणि ती त्याला सोडून
बेथलहेमला आपल्या वडीलांकडे परत गेली. तिला जाऊन
चार महिने झाले. 3तेव्हा तिची समजूत घालून तिला परत
आणावे या उद्देशाने तिचा नवरा तेथे जायला निघाला.
एक नोकर आणि दोन गाढवे ही त्याने बरोबर घेतली
होती. तिच्या वडीलांच्या घरी तो पोहोंचला त्याला आलेले
पाहताच तिचे वडील आनंदाने त्याच्या स्वागताला पुढे
आले. 4त्यांनी या लेवीला आपल्याकडे राहायचा आग्रह
केला. तेव्हा त्यांच्या आदरातिथ्याचा स्वीकार करत तो
तीन दिवस तेथे राहिला.
5चौथ्या दिवशी सकाळी लौकर उठून त्याने निघायची
तयारी सुरु केली. पण मुलीचे वडील त्याला म्हणाले,
"काही तरी खाऊन घ्या आणि मगच निघा." 6सासरे
जावयांनी एकत्र बसून न्याहारी केली. पुन्हा मुलीचे वडील
म्हणाले, "आता आजच्या दिवस राहा, आराम करा. मग
दुपारनंतर निघा." मग दोघांची जेवणे झाली. 7लेवी जायच्या
तयारीत होता पण सासऱ्याच्या आग्रहामुळे पुन्हा त्याला
एक रात्र मुक्काम वाढवावा लागला.
8पाचव्या दिवशी सकाळी लौकर उठून लेवी जायला
निघाला. पण पुन्हा सासरा जावयाला म्हणाला, "न्याहारी
करुन घ्या ताजेतवाने व्हा दुपारपर्यंत थांबा." मग दोघांची
जेवणे झाली.
9लेवी, त्याची उपपत्नी आणि नोकर आता जायला
निघाले. पण तिचे वडील म्हणाले, "आता तर अंधारुन
आले आहे. दिवस मावळला. रात्री इथेच राहा आणि
सकाळी लौकर उठून आपल्या मार्गाला लागा."
10पण लेवीच्या मनातून आता तिथे मुक्काम करायचा
नव्हता. आपली गाढवे आणि उपपत्नी यांच्यासह तो निघाला.
वाटचाल करत तो यबूस (म्हणजेच यरुशलेम) पर्यंत आला.
11यबूसपर्यंत ते आले तेव्हा दिवस मावळत आला होता.
तेव्हा नोकर आपल्या मालकाला म्हणाला, "आज रात्रीचा
मुक्काम आपण या यबूसी लोकांच्या नगरात करु."
12पण हा लेवी मालक त्याला म्हणाला, "हे शहर
आपल्याला परके आहे. येथील लोक इस्राएल वंशाचे
नाहीत. तेव्हा इथे राहायला नको. आपण गिबा येथे जाऊ."
13तो पुढे म्हणाला, "चला तर, गिबा किंवा रामा यापैकी
एखादे शहर गाठू त्यापैकी एका शहरात रात्र काढू."
14आणि ते सगळे पुढे निघाले. गिबात शिरताशिरताच
सूर्यास्त होत होता. गिबा हा प्रदेश बन्यामीनच्या हद्दीत येत
होता.
15तेथे मुक्काम करायच्या उद्देशाने ते त्या शहराच्या
भर चौकात येऊन उभे राहिले. पण कोणीच त्यांना
रात्रीपुरता आसरा द्यायला पुढे आले नाही.
16एक म्हातारा माणूस तेव्हा शेतावरुन शहराकडे परतत
होता. एफ्राइमच्या डोंगराळ भागात त्याचे घर होते. पण
सध्या तो गिबा येथे राहात होता. (गिबा मधील लोक
बन्यामीनच्या वंशातील होते.) 17या वाटसरुना पाहून त्याने
विचारले, "तुम्ही कोण? कुठून आलात? कोठे निघालात?"
18तेव्हा लेवीने उत्तर दिले, "मी यहूदा मधील बेथलहेमला
गेलो होतो. आता मी परत माझ्या घराकडे चाललो आहे.
पण आज रात्री कोणीही आम्हाला राहायला बोलावले
नाही. एफ्राईमच्या डोंगराळ भागात अगदी एका टोकाला
मी राहातो. यहूदा बेथलहेमला गेलो होतो. आता घरी
निघालो आहे.19गाढवासाठी दाणावैरण, तसेच आम्हा
तिघांपुरते खायचे प्यायचे जिन्नस आमच्या जवळ आहेत.
तशी आम्हाला कशाची जरुरी नाही."
20यावर तो म्हातारा माणूस म्हणाला, "माझ्या घरी तुम्ही
खुशाल मुक्कामाला येऊ शकता. काही लागले सवरले
तर मी तुम्हाला देईन. पण या चौकात मात्र रात्रीचे राहू
नका." 21आणि त्याने त्या सर्वांना आपल्या घरी नेले.
गाढवांना वैरण दिले. या तिघांनी हातपाय धुतले आणि
थोडेफार खाऊन घेतले.
22हे सगळे मजेत गप्पागोष्टी करत बसले आहेत
तितक्यात गावातल्या काही वाह्यात गुंडांनी घराभोवती
गर्दी केली. दार वाजवायला सुरुवात केली. म्हाताऱ्या
घरमालकावर ते ओरडू लागले. "तुझ्याकडच्या पाहुण्याला
बाहेर काढ. लैंगिक मौजमजेसाठी तो आम्हाला हवा आहे."
असा एकच ओरडा त्यांनी चालवला.
23म्हाताऱ्याने बाहेर येऊन गुंडांना विनवले, "अरे बाबांनो
असे भलते सलते करु नका. तो आज माझा पाहुणा आहे.
असले दुष्ट पाप करु नका. 24घरात माझी मुलगी आहे
ती अजून कुमारी आहे. मी तिला व ह्या माणसाच्या
उपपत्नीला बाहेर काढून तुमच्या स्वाधीन करतो. त्यांचे

तुम्हाला काय हवे ते करा, परंतु या माणसाबरोबर असले
भयंकर पाप करु नका."
25पण ती माणसे काही केल्या ऐकेनात. शेवटी लेवीने
आपल्या उपपत्नीला बाहेर काढले आणि त्यांच्या हवाली
केले. त्या गुंडांनी रात्रभर तिला छळले, तिच्यावर बलात्कार
केला आणि पहाटे पहाटे तिला तिथे टाकून निघून गेले.
26पहाटे ती कशीबशी त्या घरात आपल्या धन्याजवळ
आली आणि पुढच्या दाराशीच पडली उजाडेपर्यंत ती तशीच
तिथे होती.
27सकाळी लेवी जायच्या तयारीसाठी म्हणून लौकर
उठला. बाहेर पडायला म्हणून त्याने दार उघडले तर
बाहेर ती पडली होती. तिचा हात उंबरठ्यावर पडला
होता. ती त्याच्या दारात पडलेली त्याची उपपत्नी होती.
28"चल ऊठ, आता जायचे आहे" असे तो तिला म्हणाला,
पण ती कुठून उत्तर देणार? ती केव्हाच गतप्राण झाली
होती.
त्याने तिला गाढवावर लादले आणि तो घरी निघाला.
29घरी पोहोंचल्यावर सुरीने त्याने तिचे बारा तुकडे केले.
इस्राएलच्या सर्व प्रदेशात त्याने ते पाठवून दिले.
30जो तो हे पाहून म्हणाला, "इस्राएलमध्ये कधीच असे
घडले नव्हते. मिसर सोडल्यापासून आजतागायत असे
झालेले कधीच आम्ही पाहिले नाही. तेव्हा यावर नीट
विचार करुन, व चर्चा करुन, काय करायचे ते सांगा."

## इस्राएल आणि बन्यामीन यांच्यामध्ये युध्द

20 तेव्हा इस्राएलमधील लोक मिस्पा येथे
परमेश्वरासमोर गोळा झाले. गिलादमधील
लोकांसह झाडून सर्व लोक हजर होते. 2इस्राएलाच्या सर्व
वंशातील वडिलधाऱ्या मंडळींनी या सभेत आपापल्या जागा
घेतल्या. चार लाखांचे सैन्य तलवारी घेऊन सज्ज होते.
3इस्राएल लोक मिस्पा येथे जमा झाल्याची बातमी बन्यामीन
लोकांच्या कानावर आली. आता ही भयंकर घटना घडली
कशी याची इस्राएलांनी विचारणा सुरु केली.
4तेव्हा त्या अत्याचाराला बळी पडलेल्या बाईचा नवरा
सर्व हकीकत सांगू लागला. तो म्हणाला, "बन्यामीनांच्या
अखत्यारीतील गिबा येथे मी आणि माझी उपपत्नी रात्रीच्या
मुक्कामासाठी राहिलो. 5रात्री तेथील लोकांनी आम्ही
उतरलो होतो त्या घराला गराडा घातला. त्यांना माझा
जीव घ्यायचा होता. त्यांनी तिच्यावर बलात्कार केला
आणि ती मेली. 6तेव्हा तिला येथपर्यंत आणून मी तिचे
तुकडे केले आणि तुम्हाला ते सर्व प्रांतात एकेक पाठवून
दिले. बन्यामीनी लोकांनी किती अघोर पाप केले आहे हे
कळावे म्हणून आपल्या वाटणीच्या बारा भागात ते मी
पाठवले. 7तेव्हा इस्राएलच्या लोकहो, तुम्हीच सांगा. आता
आपण कोणते पाऊल उचलायचे ते ठरवा."
8तेव्हा सर्व जण एकदिलाने उठून उभे राहिले आणि
एकमुखाने म्हणाले, "आता मागे फिरणे नाही. या कृत्याचा
बदला घेतल्याखेरीज कोणीही घराचे तोंड पाहणार नाही.
9आता असे करु गिबातील लोकांना धडा शिकवण्यासाठी
आधी चिठ्ठ्या टाकून परमेश्वराचा कौल घेऊ. 10मग सर्व
इस्राएल वंशातील शंभर पुरुषामागे दहा, हजारामागे शंभर
आणि दहा हजारातून हजारजण निवडू. ते सैन्याला रसद
पोचवतील. आपले सैन्य बन्यामीनांच्या गिबा शहरावर
तुटून पडेल. या बेशरम कृत्याबद्दल त्यांचे पारिपत्य करील."
11याबद्दल एकमत होऊन सर्व इस्राएल लोक गिबा
शहरापाशी जमा झाले. आपण काय करायला निघालो
आहोत याबद्दल त्यांचे एकमत होते. 12त्यांनी बन्यामीन
लोकांकडे संदेश पाठवला की तुमच्यापैकी काही जण या
अधम, लाजिरवाण्या कृत्याला जबाबदार आहेत. 13तेव्हा
त्यांना गिबा शहरातून बाहेर काढून आमच्या हवाली करा.
ते लोक आम्हाला द्या म्हणजे आम्ही त्याना ठार मारु.
इस्राएलींमधून ही कीड नाहीशी केली पाहिजे.
14पण इस्राएल मधील आपल्या भाऊबंदांच्या या दूताचे
म्हणणे बन्यामीनांनी ऐकले नाही. 15आणि बन्यामीनच्या
वंशातील लोकांनी आपली शहरे सोडली आणि ते गिबा
शहराकडे इस्राएलींशी लढण्यासाठी गेले. 16बन्यामीनांकडे
युध्दाचे खास प्रशिक्षण घेतलेले सव्वीस हजारांचे सैन्य
होते. शिवाय गिबाचे सातशे सैनिक होते.
17याखेरीज सातशे निवडक डावखुरे सैनिक होते. त्यांचे
वैशिष्ट्य असे की गोफणीने अचूक नेमबाजी करण्यात
त्यांचा हात धरणारे कुणी नव्हते. 18बन्यामीन वगळता,
इस्राएल लोकांच्या सर्व टोळ्यांनी चार लाख लढवय्ये
जमा केले त्या चार लाखांपैकी प्रत्येकाकडे तलवारी होत्या
त्यातील प्रत्येक जण प्रशिक्षित सैनिक होता. 19हे इस्राएल
लोक बेथेल येथे गेले बन्यामीनांवर आपल्यापैकी कोणी
आधी हल्ला करावा याबाबत त्यांनी परमेश्वराचा कौल
घेतला.

## प्रथम यहूदाने जावे असे परमेश्वराने सांगितले

20दुसऱ्या दिवशी पहाटे इस्राएलांनी गिबा समोर तळ
ठोकला. 21सर्व तयारीनिशी बन्यामीनांवर हल्ला करायला
ते गिबा नगराशी चालून गेले. 22बन्यामीनांचे सैन्य त्यांच्यावर
हल्ला करायला बाहेर पडले. लढाईच्या पहिल्या दिवशी
त्यांनी इस्राएलांच्या बावीस हजार जणांना ठार केले.
23–24यावर इस्राएल लोकांनी संध्याकाळ होईपर्यंत
परमेश्वराची करुणा भाकली. आपल्याच बांधवांवर पुन्हा
हल्ला करावा का, अशी त्यानी विचारणा केली.
परमेश्वराने त्यांना पुन्हा निर्धाराने चालून जाण्यास
सांगितले. तेव्हा एकमेकांना धीर देत आदल्या
दिवसाप्रमाणेच ते बन्यामीनांवर चाल करुन गेले.
25लढाईच्या दुसऱ्या दिवशी दोन्ही सैन्ये एकमेकांना
भिडली. 26बन्यामीनांनी इस्राएलांचा हल्ला परतवला आणि
त्यांनी आणखी अठरा हजार माणसांना ठार मारले. युध्दात
कामी आलेले सर्व सैनिक चांगले तरवारबहाद्दर होते.

27पुन्हा सर्व इस्राएल लोक बेथेल येथे आले. तेथे बसून
त्यांनी रडकुंडीला येऊन परमेश्वरापुढे गाऱ्हाणे मांडले.
दिवसभर त्यांच्यापैकी कोणीही अन्न घेतले नाही.
परमेश्वराला यज्ञार्पणे आणि शांति अर्पणे वाहिली. 28इस्राएल
लोकांनी परमेश्वराला प्रश्न विचारला (त्या काळी
परमेश्वराच्या कराराचा कोश बेथेल येथे होता)

29अहरोन पुत्र एलाजार याचा मुलगा फिनहास हा तेव्हा
याजक होता. इस्राएलांनी विचारले, “बन्यामीन आमचे
बांधवच आहेत. पुन्हा आम्ही त्यांच्यावर चाल करुन जावे
की ही लढाई संपुष्टात आणावी?” परमेश्वराने सांगितले,
“चाल करुन जा. उद्या मी तुमच्या हातून त्यांचा पराभव
करवतो.” 30मग इस्राएलांनी काही जणांना गिबा
शहराभोवती विखरुन दबा धरुन बसायला सांगितले. अशी
मांडणी केल्यावर तिसऱ्या दिवशी पूर्वीप्रमाणेच ते गिबावर
हल्ला करायला चाल करुन गेले. 31बन्यामीनांचे सैन्यही
गिबा शहराबाहेर पडून इस्राएलींसमोर युध्दाला सामोरे आले.
यावर इस्राएल लोकांनी एकाएकी लढाईतून पाठ फिरवली
आणि ते पळ काढू लागले. बन्यामीन त्यांचा पाठलाग
करत त्यांना ठार मारण्यासाठी त्याच्या मागे गेले. या
युक्तीने इस्राएल लोकांनी बन्यामीन सैन्याला आपल्या
शहरापासून पार दूरवर पळवत नेले.

बन्यामीनांनी पूर्वी प्रमाणेच या हल्ल्यात इस्राएलाचे सैन्य
कापून काढायला सुरुवात केली. रस्त्यात, शेतात अशी
जवळपास तीस माणसे त्यांनी ठार केली. येथून एक रस्ता
बेथेल शहराकडे आणि एक गिबाकडे जात होता.
32पूर्वीप्रमाणेच आपला जय होत आहे असे बन्यामीनांना
वाटले. इस्राएल पळ काढत होते. पण ती त्यांची एक चाल
होती. बन्यामीनांना शहरापासून लांब रस्त्यावर यायला
लावायचे असा त्यांचा डाव होता. 33असे करत ते
बआल-तामार येथे थांबले. गिबाच्या पश्चिमेला काही
इस्राएल लपून राहिले होते. त्यांनी गिबावर हल्ला केला.

34इस्राएलच्या दहाहजाराच्या निवडक सैन्याने गिबावर
चढाई केली. तेथे चांगलेच तुंबळ युध्द झाले. या भीषण
हल्ल्याची बन्यामीनांना आधी जराही चाहूल लागली नव्हती.

35परमेश्वराने इस्राएलांकडून बन्यामीनाचा पाडाव
करवला. त्यादिवशी बन्यामीनांचे पंचवीस हजार एकशे
सैनिक लढाईत कामी आले. ते सर्व चांगले खंदे लढवय्ये
होते. 36तेव्हा आपण हरलो आहोत हे बन्यामीनांच्या लक्षात
आले.

इस्राएल लोकांचे सैन्य आता मागे हटले. कारण गनिमी
काव्याने छापा घालण्यावर त्यांची भिस्त होती. त्यांची
माणसे गिबा येथे लपून बसली होती. 37दडून राहिलेले
लोक गिबात घुसले आणि त्यांनी शहरातील एकूण एक
सर्वांना तलवारीने कापून काढले. 38हे काम झाल्यावर
मोठ्ठा धूर करायचा असे त्यांचे ठरले होते. धुराचा लोट
पाहून काम फत्ते झाल्याचे बाकी इस्राएलांना कळेल असा
संकेत ठरला होता.

39–41बन्यामीनांनी इस्राएलांच्या तीस सैनिकांना मारले
तेव्हा त्यांना वाटले आपली दरवेळेप्रमाणेच जीत होत आहे.
पण मग त्यांनी शहरातून धूराचा लोट येताना पाहिले. मागे
पाहतात तर सर्व शहरात आग लागलेली. इस्राएल सैन्याने
पळ थांबवला. पाठ फिरवून ते युध्दाला भिडले. बन्यामीनी
लोक घाबरले भंयकर संकटाची आत्ता कुठे त्यांना कल्पना
आली.

42त्यांनी इस्राएलांच्या तावडीतून सुटका करुन घेऊन
पळ काढला. वाळवंटाच्या दिशेने ते पळू लागले पण
लढाईतून त्यांची सुटका होईना. आता शहरांतून इस्राएल
लोक बाहेर पडले आणि त्यांचा धुव्वा उडवला.
43बन्यामीनांना वेढा घालून त्यांना कोंडीत पकडले.
अशाप्रकारे सर्व बाजूंनी हैराण करुन, गिबाच्या पूर्वेला
त्यांना पुर्ण नेस्तनाबूत करुन टाकले.

44बन्यमीनांचे अठरा हजार खंदे योध्दे या लढाईत मरण
पावले.

45जे वाचले त्यांतील काही रिम्मोन खडकाकडे पळून
गेले. पण या वाटेवर इस्राएल लोकांनी त्यांचे पाच हजार
सैनिक टिपले. गिदोमपर्यंत त्यांनी पाठलाग चालूच ठेवला.
या ठिकाणी आणखी दोन हजार जणांना ठार मारले.

46या दिवशी बन्यामीनांची पंचवीस हजार माणसे मारली
गेली. लढाईत त्यांनी शौर्य गाजवले. 47पण बन्यामीनांची
सहाशे माणसे वाळवंटात निसटून गेली. ती पळ काढून
रिम्मोन खडकापर्यंत पोचली आणि तिथे त्यांनी चार महिने
तळ दिला.

48इस्राएल लोकांनी बन्यामीनाच्या प्रदेशात फिरुन तेथील
प्रत्येक गावातील एकूणएक लोकांना ठार केले. सर्व
गुरेढोरे मारली. नासधूस केली. सर्व शहरे भस्मसात
केली.

## उरलेल्या बन्यामीन पुरुषांच्या लग्नाचा प्रश्न

21 आपल्यापैकी कोणीही बन्यामीनांना आपल्या
मुली द्यायच्या नाहीत अशी इस्राएल लोकांनी
मिस्पा येथे प्रतिज्ञा केली होती.

2इस्राएल लोक मग बेथेल येथे गेले. संध्याकाळपर्यंत ते
तिथे परमेश्वरासमोर बसून राहिले. दुःखाने ते मोठमोठ्याने
ओरडत होते. 3ते म्हणाले, “परमेश्वरा, तूच आमचा
इस्राएलांचा परमेश्वर आहेस. आमच्यावर हे भयंकर संकट
का ओढवावे? आज आमच्यातला एक वंश का बरे नष्ट
व्हावा?”

4दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी एक वेदी बांधली आणि
यज्ञार्पणे, शांति अर्पणे केली. 5या मेळाव्याला हजर नाही
असा इस्राएलांपैकी कुठला वंश आहे का अशी चौकशी
त्यांनी सुरु केली. मिस्पा येथे या मेळाव्याला जे कोणी
येणार नाहीत अशांचा वध केला जाईल अशी गंभीर
प्रतिज्ञा त्यांनी केली होती म्हणून त्यांनी कसोशीने हा
शोध सुरु केला.

[6]आपल्या बन्यामीन बांधवांबद्दल त्यांना पुन्हा एकदा
वाईट वाटले. ते म्हणाले, “इस्राएलांचा एक वंश आज
जवळपास नष्ट झाला आहे. [7]बन्यामीनांना आपल्या मुली
द्यायच्या नाहीत अशी आपण परमेश्वरासमोर प्रतिज्ञा केली
आहे. मग उरलेल्या बन्यामीन पुरुषांची लग्ने व्हायची
कशी?”

[8]पुढे ते म्हणाले, “मिस्पा येथे आज इस्राएलाच्या कोणत्या
वंशाची गैरहजेरी आहे? येथे जमलेल्यात एक कोणीतरी
दिसत नाहीत एवढे खरे!” मग त्यांच्या लक्षात आले की
याबेश-गिलाद या शहरातून कोणीही आलेले नाही. [9]त्यांनी
सर्वांची मोजदाद करुन याबेश-गिलाद मधून कोणीही न
आल्याची खात्री करुन घेतली. [10]आणि इस्राएल लोकांनी
बाराहजारांचे सैन्य याबेश-गिलादवर पाठवले. त्यांनी
सैन्याला हुकूम केला, “तेथे जा आणि प्रत्येकाला तलवारीने
कापून काढा अगदी बायका मुलांना सुध्दा सोडू नका.
[11]हे तुम्ही केलेच पाहिजे. त्यांच्यातील कोणीही पुरुष
शिल्लक राहता कामा नये आणि अविवाहित कुमारिका
वगळता सर्व स्त्रियांनाही ठार करा.” सैनिकांनी या
आदेशाची अमलबजावणी केली. [12]या बाराहजार
सैनिकांना याबेश-गिलादमध्ये चारशे तरुण कुमारिका
आढळल्या त्यांना त्यांनी कनानातील शिलो येथील छावणीत
आणले.

[13]मग इस्राएल लोकांनी रिम्मोन खडकाजवळ राहात
असलेल्या बन्यामीन लोकांना निरोप पाठवून शांतीचा
संदेश दिला. [14]त्यामुळे ते इस्राएलमध्ये परत आले. इस्राएल
लोकांनी याबेश-गिलादमधील मुलींशी त्यांची लग्ने लावून
दिली. पण तरीही मुली कमीच पडल्या.

[15]इतर वंशांपासून परमेश्वराने त्यांना अशाप्रकारे वेगळे
केले म्हणून इस्राएल लोकांना या बन्यामीनांविषयी
फारच वाईट वाटले. [16]इस्राएलच्या वडिलधाऱ्यांना वाटले,
“बन्यामीनांच्या सर्व स्त्रिया तर मारल्या गेल्या मग आता
या मागे राहिलेल्या काही बन्यामीनांची लग्ने व्हायची कशी?
[17]त्यांचा वंश पुढे चालू राहिला पाहिजे. त्यांचे संसार पुढे
चालू राहिले नाहीत तर हा इस्राएल लोकांचा वंशच खुंटेल.
[18]पण आपण तर आपल्या मुलींची लग्ने त्यांच्याशी लावून
देऊ शकत नाही “जो कोणी आपली मुलगी बन्यामीनाला
देईल तो शापित असो” अशी आपण शपथ वाहिली आहे.
[19]यातून एक मार्ग आहे. शिलो नगरात दरवर्षी परमेश्वराचा
उत्सव असतो. तो आता आलाच आहे.” (शिलो हे नगर
बेथेलच्या उत्तरेला, बेथेलहून शखेमकडे जाणाऱ्या
रस्त्याच्या पूर्वेला आणि लबोनाच्या दक्षिणेला वसलेले
आहे.)

[20]तेव्हा आपल्याला सुचलेली युक्ती वडिलधाऱ्यांनी
बन्यामीन लोकांना सांगितली. ते म्हणाले, “तुम्ही
द्राक्षमळ्यात लपून बसा. [21]या उत्सवात शिलोच्या तरुण
मुली नृत्य करायला येतील. तिकडे लक्ष ठेवा त्या आल्या
की बाहेर पडा आणि यातील एकेकीला पळवा मग
आपल्या प्रांतात जाऊन त्यांच्याशी लग्न करा. [22]यामुलींचे
बाप किंवा भाऊ आमच्याकडे तक्रारी घेऊन येतील
पण आम्ही म्हणू, ‘बन्यामीनांविषयी सहानुभूती बाळगा.
करु द्या त्यांना लग्न. त्यांनी मुली नेल्या खऱ्या पण
युध्द तर केले नाही आपल्याशी. शिवाय यात आपली
शपथ मोडायचे पापही लागत नाही. कारण मुलींना
त्यांनी आपणहून नेले. आम्ही मुली देणार नाही अशी
तुमची प्रतिज्ञा होती. तिला धक्का लागलेला नाही.
तुम्ही कोठे आपल्या मुलींची त्यांच्याशी लग्ने लावून
दिलीत? बन्यामीनांनीच त्यांना तुमच्यातून उचलून नेले.
तेव्हा तुमची शपथ मोडलेली नाही.’”

[23]बन्यामीनांनी तात्काळ तसे केले. मुलींचे नृत्य
चाललेले असताना प्रत्येकाने स्वत:साठी एकेक मुलगी
घेतली आणि आपल्या प्रांतात परतले. त्यांच्याशी लग्न
केले. आपल्या प्रदेशात त्यांनी नगरे वसवली आणि तेथे
ते राहू लागले. [24]मग इस्राएल लोकही आपापल्या प्रदेशात,
कुळात, घरोघरी परतले.

[25]त्या काळी त्यांच्यावर कोणी राजा राज्य करत नव्हता.
त्यामुळे ज्याला जे योग्य वाटेल ते तो करी.

# रूथ

## यहूदामध्ये दुष्काळ

1 फारपूर्वी शास्त्यांच्या अमदानीत एकदा दुष्काळ पडला
आणि अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. तेव्हा
अलीमलेख नावाचा गृहस्थ आपली बायको आणि दोन
मुले यांच्यासह यहूदा बेथलेहेम सोडून मवाब या डोंगराळ
प्रांतात राहायला आला. 2त्याच्या बायकोचे नाव नामी
आणि मुलांची नावे महलोन आणि खिल्योन अशी होती.
हे लोक बेथलेहेम यहूदातील एफ्राथा कुळातील होते.
मवाबात येऊन ते राहू लागले.
3पुढे अलीमलेख वारला आणि त्याची बायको नामी व
दोन मुले मागे राहिली. 4नामीच्या मुलांनी मवाबातील
दोन मुलींशी लग्ने केली. एकाच्या बायकोचे नाव होते
अर्पा आणि दुसरीचे नाव रूथ. जवळपास दहा वर्षे ते तिथे
राहिले. 5आणि महलोन व खिल्योन दोघेही मरण पावले.
नामी तिचा नवरा आणि मुलं यांच्यावाचून एकटीच राहिली.

## नामी स्वगृही परततात

6यहूदात आता दुष्काळ राहिलेला नाही परमेश्वर
आपल्या लोकांच्या मदतीला धावून आला आहे, आणि
त्याने त्यांना अन्न पुरवलेले आहे असे मवाबात नामीच्या
कानावर आले. तेव्हा तिने घरी परत जायचे ठरवले
तिच्या सुनाही तिच्याबरोबर जायला तयार झाल्या. 7तेव्हा
त्या ज्या ठिकाणी राहात होत्या ते ठिकाण सोडून त्या
यहूदाला परत जायला निघाल्या.
8तेव्हा नामीने आपल्या सुनांना सांगितले, "तुम्ही आपल्या
माहेरी परत जा. मला आणि माझ्या मुलांना तुम्ही प्रेम
दिलेत. तुम्ही जशा आमच्याशी दयाळू आणि प्रेमळ राहिलात
तसाच परमेश्वरही तुमच्याशी राहो. 9परमेश्वर कृपेने
तुम्हाला नवरा, सुखाचे घरदार मिळो" एवढे म्हणून नामीने
त्यांचे चुंबन घेतले आणि तिघीना रडू कोसळले.
10"आम्हाला तुमच्याबरोबर आणि तुमच्याच लोकात
यायचे आहे" असे त्या दोघी नामीला म्हणू लागल्या.
11पण नामी त्यांना म्हणाली, "नाही मुलींनो तुम्ही
आपापल्या घरी जा. माझ्याबरोबर येऊन तरी काय फायदा?
मी ही अशी. माझ्या पोटी आणखी मुलगे नाहीत. नाहीतर
तुम्ही त्यांच्याशी लग्न केले असते. 12तेव्हा तुम्ही परत
गेलेले बरे. पुन्हा लग्न करायचेही माझे वय राहिले नाही
आणि अजून माझे लग्न झाले तरी त्याचा तुम्हाला काय
उपयोग? मला अगदी या घटकेला दिवस राहून दोन मुले
झाली तरी काय फायदा? 13ते वाढून लग्नाचे होई पर्यंत
तुम्हाला थांबावे लागेल. पतिप्राप्तीसाठी मी तुम्हाला एवढे
थांबवून ठेवू शकत नाही. माझ्या मनाला त्यामुळे फार
यातना होतील. आधीच मी खूप सोसले आहे. परमेश्वराने
माझी खूप परीक्षा पाहिली आहे."
14पुन्हा एकदा त्यांना रडू फुटले, मग अर्पाने चुंबन
घेऊन नामीचा निरोप घेतला. पण रूथ मात्र तिला
बिलगली.
15नामी तिला म्हणाली, "तुझी जाऊ बघ कशी आपल्या
लोकांत, आपल्या देवाकडे गेली, तूही तसेच केले पाहिजेस."
16पण रूथ हटून बसली आणि म्हणाली, "तुम्हाला सोडून
जायची माझ्यावर जबरदस्ती करू नका. मला माहेरी
जायला लावू नका. मी तुमच्याबरोबर येईन. जिथे तुम्ही
जाल तिथे मी येईन. जिथे तुम्ही पथारी टाकाल तिथेच
मीही पडेन. तुमचे लोक ते माझे लोक. तुमचा देव तो
माझा देव. 17तुम्ही जिथे मराल, तिथेच मी ही मरेन. जिथे
तुम्हाला तिथेच मला पुरावे. हा शब्द मी पाळला नाही तर
परमेश्वराने मला खुशाल शिक्षा करावी. आता आपली
ताटातूट फक्त मरणानेच."*

## घरी परततात

18रूथचा आपल्या बरोबरच यायचा निर्धार आहे हे
पाहिल्यावर नामीने तिचे मन वळवायचा प्रयत्न सोडून
दिला. 19त्या दोघी मजल दरमजल करत बेथलेहेमपर्यंत
आल्या. बेथलेहेममध्ये त्यांना पाहून लोकांना एकदम भरून
आले. "ही नामी की काय" असे ते म्हणू लागले.
20पण नामी म्हणाली, "मला नामी (आनंदी) का म्हणता?
'मारा' (म्हणजे कष्टी दु:खी) म्हणा. सर्वशक्तिमान देवाने
मला फार दु:ख दिले आहे. 21"येथून मी गेले तेव्हा सर्व
काही माझ्याकडे पुष्कळ होते. आता परमेश्वराने मला
रिकाम्या हाताने परत आणले आहे. परमेश्वरानेच
मला दु:खी केले. तेव्हा मला 'आनंदी' कशाला
म्हणता? सर्वशक्तिमान देवाने मला फार वाईट दिवस
दाखवले."

---

**तिथेच मीही ... मरणानेच** शब्दश "मृत्यूनेच सुटका केली तर,
नाहीतर खुशाल याहीपेक्षा जास्त शिक्षा परमेश्वराने करावी."

22अशा प्रकारे सातूच्या पिकाच्या हंगामाच्या सुरूवातीला नामी आणि तिची मवाबातील सून रूथ या दोघी मवाबातून बेथलेहेम यहूदा येथे परतल्या.

## रूथ आणि बवाज यांची भेट

2 बेथलेहेममध्ये बवाज नावाचा एक श्रीमंत गृहस्थ राहात असे. तो अलीमलेखच्या कुळातला म्हणजे नामीचा जवळचा नातलगच होता.
2एकदा रूथ नामीला म्हणाली, "मी आज शेतावर जाऊ का? कोणी दयाळू माणूस भेटला तर त्याच्या शेतात राहिलेले धान्य वेचून आणीन"
3नामीने तिला बरं म्हणून अनुमती दिली.

रूथ शेतावर गेली कापणी करणाऱ्यांच्या मागे फिरत उरले सुरले धान्य ती वेचू लागली योगायोग असा की हे शेत अलीमलेखाचा नातेवाईक बवाज याच्याच मालकीचे होते.

4थोड्या वेळाने बवाज बेथलेहेमहून शेतावर आला. परमेश्वर तुमच्याबरोबर असो असे म्हणून त्याने आपल्या मजुरांचा समाचार घेतला. मजुरांनीही परमेश्वर तुमचे भले करो असे म्हणून त्याचे उलट अभिष्टचिंतन केले.

5मजुरांवर देखरेख करणाऱ्या मुकादमाजवळ मग बवाजने ही मुलगी कोण म्हणून चौकशी केली.

6मुकादम म्हणाला, "नामीबरोबर मवाबातून आलेली तरूणस्त्री ती हीच.
7"ती आज सकाळी इथे आली आणि कापणी करणाऱ्यांच्या मागून धान्य वेचायची परवानगी तिने मागितली. सकाळपासून ती येथे आहे. तिचे घर त्या तिकडे आहे."*

8हे ऐकून बवाज तिला म्हणाला, "मुली, माझ्या शेतात राहून तुझ्यासाठी धान्य गोळा कर. दुसऱ्या कोणाच्या शेतावर जायची तुला गरज नाही. इथल्या कामावरच्या बायकांना धरून.
9त्यांच्या मागोमाग जा. तुला त्रास द्यायचा नाही असे मी माझ्या माणसांना बजावले आहे. तहान लागेल तेव्हा या लोकांसाठी पाणी भरून ठेवले आहे त्यातूनच पी."

10रूथने यावर बवाजला वाकून अभिवादन केले अणि ती म्हणाली, "माझ्याकडे तुमचे लक्ष गेले हे आश्चर्यच म्हणायचे, मी खरे तर परकी बाई पण तुम्ही माझ्यावर मोठीच दया केलीत."

11बवाज तिला म्हणाला, "तू आपल्या सासूला कशी मदत करतेस हे मी ऐकले आहे. आपला नवरा वारल्यावरही तू तिला धरून राहिली आहेस. आपले आई वडील आपला देश सोडून तू इथे, या देशात आलीस. इथले लोक तुला परकेच, पण नामी बरोबर तू आलीस
12तुझ्या या वागणुकीचे तुला चांगले फळ मिळेल. इस्राएलाचा परमेश्वर देव तुझ्यावर कृपादृष्टी ठेवील. त्याच्या आश्रयाला* तू आली आहेस तेव्हा तो तुझा सांभाळ करील."

13रूथ म्हणाली, "माझ्यावर तुमची मोठीच कृपा आहे. मी निव्वळ एक दासी, तुमच्या नोकराएवढीही माझी लायकी नाही. असे असूनही गोड बोलून तुम्ही माझ्या मनावर फुंकर घातली आहे."

14जेवायची वेळ झाली तेव्हा बवाज रूथला म्हणाला, "चल, थोडी भाकर आमच्या बरोबर खाऊन घे. या रसात बुडवून खा."

तेव्हा रूथ सर्व मजुरांबरोबर बसली. बवाजने तिला हुरडाही दिला. तिने पोटभर खाल्ले. अगदी ताटात उरेपर्यंत खाल्ले.
15मग ती उठली आणि राहिलेले धान्य गोळा करू लागली.

बवाज आपल्या मजुरांना म्हणाला, "कापलेल्या पेंढ्या मधूनही रूथला धान्य गोळा करू द्या आडकाठी करू नका.
16तसेच मुद्दाम तिच्यासाठी दाणे भरलेली कणसेही टाकत जा. तिला हवे तेवढे घेऊ द्या, पुरे म्हणू नका."

## नामी बवाजबद्दल ऐकते

17रूथ संध्याकाळपर्यंत शेतात होती. गोळा केलेल्या धान्याची तिने झोडणी केली. भुश्श्यातून दाणे बाहेर काढले. अर्धा बुशेले सातू निघाले.
18घरी आणून तिने ते सासूला दाखवले. उरलेले दुपारचे जेवणही तिला दिले.

19सासूने तिला विचारले, "कुठून एवढे धान्य गोळा केलेस? काम कोठे केलेस? तुझी दखल घेणाऱ्याचे भले होवो."

मग रूथने तिला सर्व हकीकत सांगितली. बवाज नावाच्या माणसाकडे आपण काम केल्याचे तिने सांगितले.

नामी सुनेला म्हणाली, "परमेश्वर त्याचे भले करो. मेलेल्यांना आणि हयात असलेल्यांना दया दाखवायचे त्याने चालू ठेवलेले आहे."
20बवाज आपल्या नातेवाईकांपैकी असून आपला त्राता असल्याचे तिने रूथला सांगितले.

21तेव्हा रूथ म्हणाली, "त्याने मला पुन्हा यायला सांगितले आहे. कापणी होईपर्यंत मजुरांबरोबर राहून धान्य गोळा कर असे तो म्हणाला आहे."

22नामी आपल्या सुनेला म्हणाली, "त्याच्याच कडल्या बायकांबरोबर तू शेतात गेलीस तर बरे. इतर कुठे गेलीस तर पुरुषांचा तुला उपद्रव होईल."
23अशा प्रकारे रूथ बवाजकडे तिथल्या बायकांबरोबर काम करत राहिली. सातूचा हंगाम संपेपर्यंत तिने धान्य गोळा केले. पुढे गव्हाच्या हंगामातही ती तेथे जात राहिली. अशा तऱ्हेने ती आपल्या सासूबरोबर म्हणजे नामी बरोबरच राहिली.

---

**तिचे घर ... आहे** किंवा त्या ठिकाणी तिने थोडा वेळ आराम केला.

**आश्रयाला** शब्दश "तू त्याच्या पंखाखाली आश्रयाला आला आहेस."

## धान्याचे खळे

3 काही दिवसांनी रूथची सासू नामी रूथला म्हणाली,
“मुली, आता मला तुझ्यासाठी नवरा आणि चांगले
घर शोधून काढायला हवें. त्यातच तुझे भले आहे. 2बवाज
त्यासाठी योग्य आहे तो आपला जवळचा आप्तच* आहे.
त्याच्याकडच्या कामकरी बायकांबरोबर तू काम केले
आहेस. आज रात्री तो खव्व्यात मळणीसाठी मुक्कामाला
असेल. 3तू न्हाऊन माखून तयार हो. चांगले ठेवणीतले
कपडे घाल आणि रात्री खव्व्यावर जा. बवाजचे जेवणखाण
होईपर्यंत त्याच्या नजरेला पडू नको. 4जेवण झाल्यावर तो
विश्रांती घ्यायला आडवा होईल. तुझे लक्ष असू दे म्हणजे
तो कुठे आहे ते तुला कळेल. तेव्हा तू पुढे हो आणि
त्याच्या पायावरचे पांधरूण काढून* तिथेच त्याच्याजवळ
पड लगेच काय करायचे ते तोच मग तुला सांगेल.”
5तेव्हा रूथने सासूच्या म्हणण्याप्रमाणे वागायचे कबूल
केले. 6ती खव्व्याकडे गेली. सासूने सांगितले होते त्याप्रमाणे
वागली.
7जेवणखाण झाल्यावर बवाज समाधानाने सुस्तावला.
धान्याच्या राशीजवळच झोपायला गेला. तेव्हा अजिबात
चाहूल लागू न देता रूथ तिथे गेली आणि त्याच्या पायावरचे
पांधरूण तिने दूर सारले. मग त्याच्या पायाशी पडून राहिली.
8मध्यरात्रीच्या सुमाराला बवाज झोपेतच कुशीवर वळला
आणि जागा झाला. आपल्या पायाजवळ एका बाईला पाहून
तो डचकला. 9ती कोण, काय हे त्याने विचारले.
ती म्हणाली, “मी रूथ तुमची दासी. तुम्ही आपले पंख
माझ्यावर पसरा* तुम्हीच माझे त्राते* आहात.” 10तेव्हा
बवाज म्हणाला, “परमेश्वर तुझे भले करो. माझ्यावर
तुझ्या प्रेमाची पाखर तू घातली आहेस. तू नामीशी आधी
वागलीस त्यापेक्षाही भलेपणाने तू माझ्याशी वागते आहेस.
तू तुझ्या जोगा गरीब, श्रीमंत अशा कोणत्याही तरूण
मनुष्याबरोबर गेली असतीस. पण तू तसे केले नाहीस.
11तेव्हा आता घाबरू नकोस. तू म्हणशील तसे मी करतो.
तू एक चांगली बाई आहेस हे गावातील लोकांना ठाऊक
आहे. 12शिवाय, मी तुमचा जवळचा नातलग आहे हेही
खरे. पण माझ्याहीपेक्षा जवळचा असा तुमचा एक आप्त
आहे. 13आजची रात्र तू इथेच राहा. तो तुला मदत करतो
का ते मी सकाळी त्याला विचारून बघतो. तो तयार
झाला तर उत्तमच. पण त्याने नकार दिला तर परमेश्वराची
शपथ मी तुझ्याशी लग्न करीन. अलीमलेखची गेलेली
जमीन तुम्हाला परत मिळवून देईन.* तेव्हा सकाळपर्यंत
इथेच थांब.”
14त्याप्रमाणे रूथ सकाळपर्यंत बवाजच्या पायाजवळ पडून
राहिली. फटफटायच्या आधीच अजून अंधार असतानाच
लोक एकमेकांना ओळखायला लागण्यापूर्वीच ती उठली.
बवाज तिला म्हणाला, “कालची रात्र तू इथे होतीस हे
कोणाला कळू द्यायचे नाही.” 15पुढे तो म्हणाला, “तू
पांघरलेला रूमाल काढ आणि समोर पसर.” तिने तो
पसरल्यावर त्याने एक बुशेल माप सातू त्यात टाकले.
तिच्या सासूसाठी ती भेट होती. नीट गाठोडे बांधून त्याने ते
तिच्या हवाली केले. मग तो शहरात निघून गेला.
16रूथ सासूकडे गेली. सासूने दाराशी येऊन कोण आहे
ते पाहिले.
रूथने घरात येऊन बवाज बरोबर जे जे घडले ते
सांगितले. 17ती म्हणाली, “त्याने तुमच्यासाठी भेट म्हणून
हे सातू दिले आहे. रिकाम्या हाताने तुमच्याकडे यायचे
नाही असे त्याने मला बजावले.”
18नामी म्हणाली, “मुली, पुढे काय होणार आहे हे
आपल्याला कळेपर्यंत धीर धर. अंगावर घेतलेले काम
पार पडेपर्यंत तो स्वस्थ बसणार नाही. दिवस मावळायच्या
आतच काय ते आपल्याला कळेल.”

## बवाज आणि दुसरा आप्त

4 बवाज मग वेशीजवळ चावडीपाशी गेला. तो नातलग
दिसेपर्यंत तिथे थांबला. त्याला पाहिल्यावर बवाजने
त्याला प्रेमाने बोलावले. आणि जवळ बसायला सांगितले,
तो माणूस आला आणि बवाजच्या जवळ बसला.
2बवाजने मग काही साक्षीदारांनाही गोळा केले. गावातील
दहा ज्येष्ठ मंडळींना बोलावले. त्यानाही बसवून घेतले.
3मग बवाज त्या नातेवाईकाला म्हणाला, “हे पाहा, नामी
मवाबच्या डोंगराळ प्रदेशातून आली आहे. अलीमलेखच्या
मालकीची जमीन तिने विकायला काढली आहे. 4हे पंच
आणि ज्येष्ठ मंडळी यांच्या साक्षीने तुला हे मी सांगायचे
ठरवले आहे. ही जमीन तुला परत विकत घ्यायची
असल्यास तू घेऊ शकतोस. पण नसेल तर तसे मला सांग
ही जमीन परत विकत घेण्याचा तुझ्यानंतर माझाच हक्क
आहे. तेव्हा तू ती विकत घेणार नसलास तर मी घेईन.”
5पुढे बवाज म्हणाला, “नामीची जमीन घेतलीस तर
मवाबहून आलेली विधवा रूथसुद्धा तुझी पत्नी होईल.
तिला मूल झाले की जमीन त्याच्या ताब्यात जाईल. म्हणजे
जमीनीचा ताबा तिच्या मृत पतीच्याच कुटुंबात राहील.”

---

**जवळचा आप्त** रूथला मुलेव्हावीत म्हणून हा तिच्याशी लग्न करु शकतो. याने त्या कुटुंबाची काळजी घेतली तरी मालमत्तेवर त्याचा हक्क नसतो. ती मृताच्या नावावर राहते.

**पायावरचे पाघंरुण काढून** आपला त्राता होण्याबद्दल ती बवाजला विनंती करते असे यातून सूचित होते.

**पंख माझ्यावर पसरा** किंवा “मला आपल्या पंखाखाली घ्या” रुथला मदत आणि रक्षण हवे आहे असा याचा अर्थ.

**त्राते** रूथशी, तिला मुलेबाळे व्हावीत म्हणून, लग्न करणारा. कुटुंबाची जबाबदारी घेतली तरी त्या कुटुंबावर व मालमत्तेवर त्याचा हक्क नाही ते हक्क रुथच्या मृत नवऱ्याचेच.

**अलीमलेखची ... देईन** शब्दश, मी तुला मुक्त करीन, तुझी सोडवणूक करीन.

[6]यावर तो आप्त म्हणाला, “मी काही ती जमीन घेत
नाही. मीच खरे तर ती घ्यायला हवी, पण मला ते शक्य
नाही कारण त्यामुळे कदाचित् मी माझ्या स्वत:च्या
जमिनीला मुकेन.* तेव्हा तू ती खुशाल घेऊ शकतोस.”
[7](पूर्वी इस्राएलमध्ये गहाण टाकलेल्या जमिनीची ती सोडवून
घेण्याचे व्यवहार करताना खरेदीचा पुरावा म्हणून तो
माणूस पायातला जोडा काढून दुसऱ्याला देत असे.)
[8]त्यानुसार तो नातलग म्हणाला, “जमीन तूच विकत घे”
आणि आपला जोडा काढून त्याने बवाजला दिला.
[9]बवाज मग तेथील सर्व श्रेष्ठवडीलधाऱ्या साक्षीदारांना
म्हणाला, “आज तुमच्या साक्षीने मी अलीमलेख, खिल्योन,
महलोन यांच्या मालकीचे सर्व काही नामीकडून विकत
घेत आहे. [10]रूथलाही बायको म्हणून मी विकत घेतो.
म्हणजे या मृत व्यक्तींची मिळकत त्यांच्याच घराण्यात
राहील. त्यांचे नाव त्यांच्या कुळातून, वतनातून पुसले
जाणार नाही. तुम्ही या सगव्व्याला साक्षी आहात.”
[11]अशाप्रकारे वेशीपाशी जमलेले सर्व लोक आणि
वडीलधारी माणसे म्हणाले,

परमेश्वर कृपेने तुझ्याकडे येणारी स्त्री, इस्राएल घराण्याची स्थापना करणाऱ्या राहेल व लेआ यांच्यासारखी होवो. एफ्राथा येथे तू कर्ता पुरुष हो. बेथलेहेममध्ये प्रख्यात हो

[12]तामारने यहूदापासून पेरेसला जन्म दिला त्याचे कूळ
थोर झालेतशीच तुलाही परमेश्वराच्या कृपेने रूथपासून
भरपूर संतती होवो. त्याच्यासारखेच तुझे घराणे मोठे होवो.

[13]त्यानंतर बवाजने रूथशी लग्न केले. तिला
परमेश्वराच्या दयेने दिवस राहून मुलगा झाला. [14]गावातील
बायका नामीला म्हणाल्या,

परमेश्वर धन्य आहे त्याने तुला हा मुलगा* दिला तो इस्राएलमध्ये कीर्तिवंत होईल.

[15]तुमचे तो पुनरुज्जीवन करेल वृध्दापकाळी तो तुमची
काळजी घेईल तुझ्या सुनेमुळे हे झाले तिने तुला हा
मुलगा दिला तिचे तुझ्यावर प्रेम आहे. सात मुलांपेक्षाही
तिची थोरवी अधिक आहे.

[16]नामीने बाळाला घेतले, आपल्या कुशीत घेतले. त्याचे
संगोपन केले. [17]शेजाऱ्यांनी त्याचे नाव ठेवले. बायका
म्हणाल्या, “नामीलाच हा मुलगा झाला आहे.” मग
शेजारणींनी त्याचे नाव ओबेद ठेवले. ओबेद इशायचा
पिता झाला. इशाय राजा दावीदचा पिता झाला.

## रूथ आणि बवाजची वंशावळ

[18]पेरेसची वंशावळ खालील प्रमाणे:

हस्तोनचा पिता पेरेस.
[19]हेस्तोन रामचा पिता. राम अम्मीनादाबचा पिता
[20]अम्मीनादाब नहशोनचा पिता नहशोन सल्मोनचा
पिता.
[21]सल्मोन बवाजचा पिता बवाज ओबेदचा पिता
[22]ओबेद इशायचा पिता इशाय दावीदचा पिता.

---

**जमिनीला मुकेन** याचा अर्थ असा रूथशी लग्न केल्यामुळे त्याची पहिली बायको आणी मुले यांचा त्याच्या जमिनीतील हिस्सा कमी होईल.

**मुलगा** रक्षण करणारा किंवा सोडवणूक करणारा या अर्थाने इथे हा शब्द वापरला आहे. आता हा मुलगा नामीच्या घरादाराची काळजी घेईल आणि अलीमलेखचे नाव पुढे चालवील असा त्या बायकांच्या म्हणण्याचा अर्थ.

# 1 शमुवेल

### एलकाना आणि त्याचे कुटुंबीय यांची शिलो येथे भक्ती

1 एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील रामा येथला, एलकाना
नावाचा एक गृहस्थ होता. हा एलकाना सूफ घराण्यातला
असून यरोहाम (किंवा यरामील )याचा मुलगा. यरोहाम
एलिहूचा मुलगा आणि एलिहू तोहूचा. तोहू, एफ्राईम
घराण्यातील सूफचा मुलगा होय.
2एलकानाला दोन बायका होत्या. एकीचे नाव हन्ना
आणि दुसरीचे पनिन्ना. पनिन्नाला मुलंबाळं होती, पण
हन्नाला मात्र अजून मूल झाले नव्हते.
3एलकाना दरवर्षी रामा या आपल्या गावाहून शिलो
येथे जात असे. तेथे तो यज्ञ आणि सर्वशक्तीमान
परमेश्वराची भक्ती करत असे. तेथे हफनी आणि फिनहास
हे एलीचे मुलगे याजक म्हणून पौरोहित्य करीत होते.
4एलकाना दर यज्ञाच्या वेळी पनिन्ना आणि तिची मुले
यांना त्यांच्या वाटचे अन्न देई. 5हन्नालाही तो समान वाटा
देई. परमेश्वराने तिची कूस उजवलेली नसतानाही तो देई,
कारण हन्नावर त्याचे खरेखुरे प्रेम होते.

### हन्नाचा पाण उतारा

6पनिन्ना दर वेळी काहीतरी बोलून हन्नाला दुखवी.
मूलबाळ नसल्यावरुन दूषणे देई. 7असे दरवर्षी चालायचे.
शिलो येथील परमेश्वराच्या मंदिरात सर्व कुटुंबीय जमले
की पनिन्नाच्या बोलण्यामुळे हन्ना कष्टी होई. एकदा असेच
एलकाना यज्ञ करीत असताना हन्ना दुःखीकष्टी होऊन
रडू लागली. ती काही खाईना. 8एलकाना ते पाहून म्हणाला,
“तू का रडतेस? तू का खात नाहीस? तू का दुःखी आहेस?
तुला मी आहे-मी तुझा नवरा आहे. तू असा विचार कर
की मी दहा मुलांपेक्षा अधिक आहे.”

### हन्नाची प्रार्थना

9सर्वांचे खाणे पिणे झाल्यावर हन्ना गूपचूप उठली आणि
परमेश्वराची प्रार्थना करायला गेली. एली हा याजक तेव्हा
परमेश्वराच्या पवित्रस्थानाच्या दरवाजाजवळ आपल्या
आसनावर बसला होता. 10हन्ना अतिशय खिन्न होती.
परमेश्वराची प्रार्थना करताना तिला रडू कोसळले.
11परमेश्वराला ती एक नवस बोलली. ती म्हणाली, “हे
सर्वशक्तिमान परमेश्वरा, माझे दुःख तू बघतोच आहेस.
माझा विसर पडू देऊ नकोस. तू मला मुलगा दिलास तर
मी तो तुलाच अर्पण करीन. तो परमेश्वराचा नाजीर
होईल. तो मद्यपान करणार नाही. त्याचे आम्ही जावळ
काढणार नाही.”
12हन्नाची प्रार्थना बराच वेळ चालली होती. त्यावेळी
एलीचे तिच्या तोंडाकडे लक्ष होते. 13ती मनोमन प्रार्थना
करत होती त्यामुळे तिचे ओठ हलत होते पण शब्द बाहेर
फुटत नव्हते. त्यामुळे ती दारूच्या नशेत आहे असे एलीला
वाटले. 14एली तिला म्हणाला, “तू फार प्यायलेली दिसतेस.
आता मद्यापासून दूर राहा.”
15हन्ना म्हणाली, “महाशय, मी कोणतेही मद्य घेतलेले
नाही. मी अतिशय त्रासलेली आहे. परमेश्वराला मी माझी
सर्व गाऱ्हाणी सांगत होते. 16मी वाईट बाई आहे असे समजू
नका. मी फार व्यथित आहे, मला फार दुःखं आहेत
म्हणून मी खूप वेळ प्रार्थना करीत होते इतकंच.”
17तेव्हा एली म्हणाला, “शांती ने जा. इस्राएलाच्या देवाकडे
जे मागणे तू केले आहे ते तो तुला देवो.”
18“तुम्ही माझ्यावर प्रसन्न आहात अशी आशा आहे.”
असे त्याला म्हणून हन्ना निघाली. तिने नंतर थोडे खाल्लेही.
आता तिला उदास वाटत नव्हते.
19दुसऱ्या दिवशी पहाटे उठून परमेश्वराची भक्ती
करुन एलकानाचे कुटुंबीय रामा येथे आपल्या घरी
परतले.

### शमुवेलचा जन्म

पुढे एलकाना आणि हन्नाचा संबंध आला तेव्हा
परमेश्वराला तिचे स्मरण झाले. 20यथावकाश तिला दिवस
राहिले व मुलगा झाला. हन्नाने त्याचे नाव शमुवेल ठेवले.
ती म्हणाली, “मी परमेश्वराकडे त्याला मागितले म्हणून
त्याचे नाव शमुवेल.”
21एलकाना त्या वर्षी यज्ञ करण्यासाठी आणि देवाला
बोललेले नवस फेडण्यासाठी शिलो येथे सहकुटुंब गेला
22हन्ना मात्र गेली नाही. ती म्हणाली, “मुलगा जेवण खाऊ
शकेल इतपत मोठा झाला की मी त्याला शिलोला घेऊन
जाईन. त्याला परमेश्वराला वाहीन. तो नाजीर होईल.
मग तो तिथेच राहील.”
23हन्नाचा पती एलकाना त्यावर म्हणाला, “तुला योग्य
वाटेल तसे कर. तो खायला लागेपर्यंत तू हवी तर घरीच

राहा. परमेश्वराने दिलेला आशीर्वाद खरा ठरो*". तेव्हा हन्ना घरीच राहिली कारण शमुवेल अंगावर पीत होता. त्याचे दूध तुटेपर्यंत ती राहिली.

### हन्ना शमुवेलला घेऊन शिलो येथे एलीकडे जाते

24तो पुरेसा मोठा झाल्यावर हन्ना त्याला शिलो येथे परमेश्वराच्या मंदिरात घेऊन आली. तिने तीन वर्षाचा एक गोऱ्हा वीस पौंड पीठ आणि द्राक्षरसाचा बुधला हे ही आणले.

25ते सर्व परमेश्वरासमोर गेले. एलकानाने नेहमी प्रमाणे परमेश्वरासमोर गोऱ्ह्याचा

बळी दिला.* मग हन्नाने मुलाला एलीच्या स्वाधीन
केले. 26ती एलीला म्हणाली "महाशय, माझ्यावर कृपादृष्टी
असू द्या मी खरे तेच सांगते. मीच इथे तुमच्याजवळ बसून
पूर्वी परमेश्वराजवळ याचना केली होती. 27परमेश्वराकडे
मी मुलगा मागितला आणि परमेश्वराने माझी इच्छा पूर्ण
केली. परमेश्वराने हा मुलगा मला दिला. 28आता मी तो
परमेश्वराला अर्पण करते. तो आयुष्यभर परमेश्वराची सेवा करील." हन्नाने मग मुलाला तिथेच ठेवले* आणि परमेश्वराची भक्ती केली.

### हन्नाचे धन्यवाद

2 हन्नाने परमेश्वराला धन्यवाद देणारे गीत म्हटले; "परमेश्वराबद्दल माझ्या मनात आनंद मावत नाही. त्याच्यामुळे मला सामर्थ्य आले* माझ्या शत्रुंना मी हसते.* माझ्या विजयाचा मला आनंद आहे!

2परमेश्वरासारखा पवित्र कोणी देव नाही. देवा, तुझ्यावाचून कोणी नाही. आमच्या देवासारखा अभेद्य दुर्ग दुसरा नाही.

3लोकहो, बढाया मारु नका. गर्वाने बोलू नका. कारण परमेश्वर सर्वज्ञ आहे. तोच लोकांचे नेतृत्व करतो आणि त्यांना न्याय देतो.

4शूरांची धनुष्यं भंगतात आणि दुर्बळ लोक शक्तीशाली होतात.

5पूर्वी ज्यांच्याकडे अन्नधान्याचे मुबलक साठे होते त्यांना आज अन्नासाठी मोल मजुरी करावी लागत आहे. आणि जे पूर्वी भुकेकंगाल होते ते आता आराम करत आहेत..आजपर्यंत नि:संतान होती तिला आज सात मुलं आहेत. पण मुलबाळ असलेली दु:खी आहे. कारण तिची मुलं तिच्यापासून लांब गेली आहेत.

6परमेश्वर लोकांना मरण देतो आणि परमेश्वरच त्यांना जीवन देतो. तोच अधोलोकाला नेतो आणि वरही आणतो.

7परमेश्वरच काहींना दरिद्री तर काहींना श्रीमंत करतो. काही लोकांना लाचार करतो तर काहींचा सन्मान परमेश्वरच करतो.

8गरीबांना धुळीतून उचलून त्यांचे दु:ख हरण* करतो. त्यांचा गौरव करुन त्यांना राजपुत्रांच्या बरोबरीने बसवतो, मानाचे स्थान देतो. जगाची निर्मिती परमेश्वरानेच केली. सर्वजगावर त्याचीच सत्ता आहे.*

9सज्जनांना तो आधार देतो. त्यांना लटपटू देत नाही. पण दुर्जनांचा संहार करतो. त्यांना गर्तेत ढकलतो दुर्जनांचे बळ अशा वेळी कुचकामी ठरते.

10शत्रूंचा तो नाश करुन त्याच्यावर गर्जेल. दूरदूरच्या प्रदेशांचाही तो न्याय करील. राजाला सामर्थ्य देईल.आपल्या खास राजाला बलवान करील."

11एलकाना आणि त्याचे कुटुंबीय रामा येथे परतले. मुलगा मात्र शिलो येथे एली याजकाच्या हाताखाली परमेश्वराच्या सेवेत राहिला.

### एलीचे कुपुत्र

12एलीची मुले वाईट होती. त्यांना परमेश्वराची पर्वा
नव्हती. 13याजकांनी लोकांना जशी वागणूक द्यावी तशी
ते देत नव्हते. खरी रीत अशी होती की लोकांनी यज्ञासाठी बळी आणल्यावर याजकांनी ते मांस शिजत ठेवायचे. याजकाच्या नोकराने तीन काटे असलेली आकडी
आणायची. 14तपेल्यात तो त्रिशूल खुपसून त्यावर येईल
तेवढेच मांस याजकाने स्वीकारायचे. शिलो येथे यज्ञासाठी येणाऱ्या सर्व इस्राएलीच्या बाबतीत याजकांनी असेच करायला हवे होते.

15पण एलीची मुले मात्र असे करत नसत. वेदीवर चरबीचे हवन करण्याआधीच त्यांचा नोकर लोकांजवळ येऊन म्हणे, "याजकांसाठी म्हणून थोडे मांस भाजायला द्या. शिजलेले मांस ते घेणार नाहीत."

16"हवन तर होऊ दे, मग हवे तेवढे त्यातून काढून घे," असे कोणी म्हणालेच तर तो नोकर म्हणे, "नाही, आत्ताच द्या नाहीतर मी जबरदस्तीने काढून घेईन."

17परमेश्वराला देण्यात येणाऱ्या यज्ञबली विषयी हफनी आणि फिनेहास यांना कोणताही आदरभाव नव्हता हेच

---

**आशीर्वाद खरा ठरो** हन्नाला जो आशीर्वाद दिला होता त्याचा संदर्भ बहुधा एलकानाच्या या बोलण्याला असावा.

**ते सर्व ... बळीदिला** प्राचीन ग्रीक अनुवादात आणि कुमरानची एक हिब्रू प्रत यात हा भाग आहे. प्रमाण हिब्रू संहितेत नाही.

**मुलाला तिथेच ठेवले** प्रमाण हिब्रू संहितेत आढळत नाही. कुमरानच्या एका प्राचीन हिब्रू प्रतीतून हा भाग घेतला आहे.

**सामर्थ्य** आले शब्दश: "परमेश्वरापुढे माझे शृंग उभारले आहे." शृंग हे सामर्थ्याचे प्रतीक मानले जाते.

**माझ्याशत्रूंना मी हसते** शब्दाश: "शत्रुवर माझे तोंड वासलेले आहे."

**दु:खहरण** शब्दश: "तो गरीबांना राखेतून वर काढतो."

**सर्वजगावर त्याचीच सत्ता आहे** शब्दश: "आधारस्तंभासकट सर्वजण परमेश्वराचे आहे परमेश्वराने या स्तंभावर जग वसवले."

यातून दिसून येईल. हे परमेश्वराविरुध्द असलेले मोठे पाप
होते.
18पण शमुवेल मात्र परमेश्वराची सेवा करत असे.
एफोद घालून तो मदत करी. 19त्याची आई दरवर्षी
त्याच्यासाठी लहानसा अंगरखा शिवत असे. दरवर्षी
नवऱ्याबरोबर शिलो येथे यज्ञासाठी जाताना ती तो घेऊन
जाई.
20एलकाना आणि त्याची बायको यांना एली मनापासून
आशीर्वाद देई. तो म्हणे, "हन्नापासून तुला आणखी संतती
होवो. परमेश्वराच्या आशीर्वादाने झालेला मुलगा तुम्ही
परमेश्वराला दिलात, तेव्हा तुम्हाला आणखी मुले होवोत."
हन्ना आणि एलकाना मग घरी परतत. 21परमेश्वराने
हन्नावर कृपा केली आणि तिला नंतर तीन मुलगे आणि
दोन मुली झाल्या. शमुवेल परमेश्वराच्या पवित्र सान्निध्यात
वाढत होता.

## एली आपल्या नीच मुलांवर नियंत्रण ठेवण्यात अयशस्वी

22एली आता म्हतारा होत चालला. शिलो येथे येणाऱ्या
इस्राएलींशी होणारे आपल्या मुलांचे वर्तन पुन्हा पुन्हा त्याच्या
कानावर येऊ लागले. दर्शन मंडपाच्या दाराशी सेवेत
असलेल्या बायकांशी त्यांनी कसा अतिप्रसंग केला हेही
त्याने ऐकले.
23तेव्हा तो मुलांना म्हणाला, "तुमचे प्रताप माझ्या
कानावर आले आहेत. अशी नीच कृत्ये तुम्ही का करता?
24मुलांनो, असे करत जाऊ नका. परमेश्वराचे लोक
तुमच्याविषयी फार वाईट बोलत आहेत. 25एका माणसाने
दुसऱ्या माणसाचा काही अपराध केला तर परमेश्वर
एकवेळ त्याच्या मदतीला येईल. पण परमेश्वराविरुध्दच
पातक केले तर त्याच्या मदतीला कोण धावून येणार?"
पण एलीच्या मुलांनी वडिलांच्या सांगण्याकडे साफ
दुर्लक्ष केले. तेव्हा परमेश्वराने या मुलांना मारायचे
ठरवले.
26शमुवेल मोठा होत चालला. परमेश्वर आणि लोक
त्याच्यावर प्रसन्न होते.

## एलीच्या घराण्याविषयी अरिष्ट सूचक भविष्य

27एकदा परमेश्वरचा संदेष्टा एलीकडे आला आणि
म्हणाला, "परमेश्वराने हा निरोप दिला आहे; 'तुझे पूर्वज
फारोच्या घराण्यात दास होते. तेव्हा मी त्यांच्या पुढे प्रगट
झालो. 28इस्राएलच्या सर्व घराण्यांमधून तुमच्याच
घराण्याची मी माझे याजक होण्यासाठी म्हणून निवड केली.
वेदीवर यज्ञबली अर्पण करावा, धूप जाळावा, एफोद घालावा
म्हणून मी तुम्हाला निवडले. इस्राएलचे लोक यज्ञ करतात
त्यातील मांस मी तुम्हाला घेऊ दिले. 29तेव्हा तुम्ही त्या
यज्ञाचा आणि देणग्यांचा आदर ठेवत नाही हे कसे?
माझ्यापेक्षा तू आपल्या मुलांचाच मान ठेवतोस? इस्राएल
लोक मला जे मांस वाहतात, त्यातील उत्कृष्ट भाग
स्वत:साठी घेऊन तू पुष्ट झाला आहेस.'
30"तुझे घराणेच निरंतर त्याची सेवा करील असे
इस्राएलचा देव जो परमेश्वर याने म्हटले होते खरे. पण
आता त्याचे म्हणणे असे आहे की, 'इथून पुढे असे होणार
नाही. माझा आदर ठेवतात त्यांचा मी मान राखीन. पण जे
अनादर करतात त्यांच्यावर संकटे कोसळतील. 31तुझ्या
सर्व वंशजांचा संहार करायची वेळ येऊन ठेपली आहे.
तुझ्या घराण्यातील कोणीही आता दीर्घायुषी होणार नाही.
32इस्राएलमध्ये सर्व चांगले घडेल. पण तुझ्या घरात मात्र
सगळी दुर्दशा होईल.* तुझ्या घरातले कोणी म्हातारा होई
पर्यंत जगणार नाही. 33माझ्या वेदीजवळ याजक म्हणून
सेवा करायला फक्त एकाला मी शिल्लक ठेवीन. त्याला
दीर्घायुष्य लाभेल. तो जराजर्जर होईपर्यंत जगेल. तुझे वंशज
मात्र तलवारीला बळी पडतील. 34हे सर्व खरेच घडणार
आहे याची प्राचीती मी तुला दाखवीन. तुझे दोनही मुलगे
हफनी आणि फिनहास, एकाच दिवशी मरतील. 35मी
एका विश्वासू याजकाची माझ्यासाठी निवड करीन. तो
माझे ऐकेल आणि माझ्या मनाप्रमाणे काम करील. या
याजकाच्या घराण्याला मी स्थिरस्थावर करीन. मी
निवडलेल्या राजापुढे तो सेवेत राहील.
36मग तुझ्या घरातील उरले सुरले लोक येऊन या
याजकापुढे नतमस्तक होतील. किरकोळ रक्क म किंवा
भाकरतुकडा याच्यासाठी ते पदर पसरतील आणि म्हणतील,
"माझ्या भाकरीची सोय व्हावी म्हणून याजकपदातील एखादे
काम मला द्या.'"

## परमेश्वराची शमुवेलला हाक

3 लहानगा शमुवेल एलीच्या हाताखाली परमेश्वराच्या
सेवेत मग्न होता. त्या काळी परमेश्वराने लोकांशी
प्रत्यक्ष बोलण्याचे प्रसंग फार क्वचित येत असत. तो सहसा
दृष्टांत देत नसे.
2एलीची दृष्टी आता अधू झाल्यामुळे तो जवळजवळ
आंधळाच झाला होता. एकदा तो रात्री झोपला होता.
3परमेश्वराचा पवित्र कोश परमेश्वराच्या पवित्र मंदिरात
होता, तेथे शमुवेल झोपलेला होता. परमेश्वरापुढचा दिवा
अजून जळत होता. 4तेव्हा परमेश्वराने शमुवेलला हाक
मारली. शमुवेल म्हणाला, "मी येथे आहे" 5एली आपल्याला
बोलवत आहे असे वाटल्याने तो लगबगीने एलीजवळ
गेला. त्याला म्हणाला, "मला बोलावलत ना? हा मी आलो."
पण एली म्हणाला, "मी नाही हाक मारली जा, जाऊन
झोप." शमुवेल झोपायला गेला. 6पुन्हा परमेश्वराने हाक
मारली. "शमुवेल." शमुवेल परत धावत एलीकडे गेला

---

**पण तुझ्या घरात... होईल** हा भाग प्राचीन ग्रीक अनुवाद किंवा कुमरानची एक हिब्रू प्रत यात नाही.

आणि आपण आल्याचे त्याने सांगितले. एली म्हणाला,
“मी कोठे बोलावलं तुला? जा, झोप.”
7परमेश्वर अजून शमुवेलशी कधी प्रत्यक्ष बोलला
नव्हता, त्याला त्याने दर्शन दिले नव्हते. त्यामुळे शमुवेलने
परमेश्वराला ओळखले नाही.
8परमेश्वराने शमुवेलला तिसऱ्यांदा हाक मारली.
शमुवेल पुन्हा उठून एलीकडे गेला. मला बोलवलेत म्हणून
मी आलो असे त्याने सांगितले.
परमेश्वरच या मुलाला हाक मारत आहे हे आता
एलीच्या लक्षात आले. 9तो शमुवेलला म्हणाला, “जाऊन
झोप. पुन्हा हाक आली तर म्हण, ‘हे परमेश्वरा, बोल हा
तुझा सेवक ऐकत आहे.’” तेव्हा शमुवेल परत जाऊन
झोपला. 10परमेश्वर आला आणि तिथे उभा राहिला.
पहिल्या सारखीच त्याने “शमुवेल, शमुवेल”, म्हणून हाक
मारली.
शमुवेल म्हणाला, “बोल, मी तुझा दास ऐकत आहे.”
11तेव्हा परमेश्वराने शमुवेलला सांगितले, “इस्राएलामध्ये
मी आता लौकरच काहीतरी करणार आहे. ते ऐकून
लोकांना धक्का बसेल. 12एली आणि त्याच्या कुटुंबियाबद्दल
मी जे बोललो होतो ते सर्व मी अथ पासून इतिपर्यंत करून
दाखवणार आहे. 13त्याच्या घराण्याचे पारिपत्य करीन
असे मी एलीला म्हणालो होतो. आपल्या बहकलेल्या मुलांचे
वागणे बोलणे परमेश्वराविरुध्द आहे हे त्याला माहीत
असून त्यांना तो ताळ्यावर आणू शकलेला नाही, म्हणून
मी हे करणार आहे. 14आता यज्ञ आणि अर्पण यांनी
त्याच्या घरच्यांची पापे धुतली जाणार नाहीत अशी मी
शपथ वाहिली आहे.”
15रात्र सरेपर्यंत शमुवेल आपल्या बिछान्यावर पडून
राहिला. सकाळ होताच उठून त्याने मंदिराची दारे उघडली.
आपल्याला झालेल्या दृष्टांताची हकीकत एलीला सांगायची
त्याला भीती वाटली. 16पण एलीनेच शमुवेलला प्रेमाने
हाक मारुन जवळ बोलावले. तेव्हा शमुवेल आज्ञाधारकपणे
जवळ उभा राहिला.
17एली म्हणाला, ”परमेश्वर तुझ्याशी काय बोलला?
मोकळेपणाने सर्व सांग. काही लपवलेस तर परमेश्वर
तुला शिक्षा करील.” 18तेव्हा काहीही न लपवता एलीला
शमुवेलने सर्व काही सांगितले. एली म्हणाला, “तो परमेश्वर
आहे. त्याला योग्य वाटेल ते तो करो.”
19शमुवेल वाढत होता. तेव्हा परमेश्वर त्याच्या बरोबर
होता. शमुवेलचे कुठलेही वचन त्याने खोटे ठरू दिले
नाही. 20परमेश्वराचा खरा संदेष्टा म्हणून दान पासून बैर
शेबापर्यंत सर्व इस्राएलमध्ये शमुवेलची ख्याती पसरली.
21शिलो येथे परमेश्वर त्याला दर्शन देत राहिला. म्हणजेच
आपल्या वचनाच्याद्वारे तो शमुवेलसमोर प्रगट झाला.
4 इस्राएलभर शमुवेलचे नाव झाले. एली आता फार
वृध्द झाला होता. त्याच्या मुलांचे दुर्वर्तन चालूच
होते.

### इस्राएलाचा पलिष्ट्यांकडून पराभव

याच सुमारास सर्व पलिष्टी इस्राएल लोकांविरुध्द एकत्र
आले. इस्राएल लोक त्यांच्याशी लढण्यास निघाले. त्यांचा
तळ एबन एजर येथे तर पलिष्ट्यांचा अफेक येथे होता.
2पलिष्टी इस्राएल लोकांवर चालून जायला सज्ज झाले.
अशाप्रकारे युद्धाला तोंड लागले.
पलिष्ट्यांनी इस्राएल लोकांचा पराभव केला. त्यांचे चार
हजार सैनिक मारले.3इस्राएली सैनिक आपल्या तळावर
परतले तेव्हा वडीलधाऱ्यांनी त्यांना विचारले, “परमेश्वराने
का बरे पलिष्ट्यांमार्फत आपला पराभव करवला? आपण
शिलोहून परमेश्वराच्या कराराचा कोश येथे आणू या.
म्हणजे या लढाईत परमेश्वर आपल्याबरोबर राहील आणि
शत्रू पासून आपले संरक्षण करील.”
4मग त्यांनी शिलो येथे माणसे पाठवली. त्यांनी तो
सर्वशक्तिमान परमेश्वराच्या कराराचा कोश आणला. त्या
कोशाच्या वरच्या बाजूला करुबांची बैठक होती.
परमेश्वराचे ते सिंहासन होते. कोश आणला तेव्हा त्या
बरोबर हफनी आणि फिनहास हे एलीचे दोन पुत्रही होते.
5सैन्याच्या तळावर जेव्हा परमेश्वराच्या कराराचा कोश
आणला तेव्हा सर्व इस्राएल लोकांमध्ये एकच जल्लोष
झाला. या जयघोषाने भूमीही दणाणली. 6पलिष्ट्यांपर्यंत हा
आवाज पोहोंचला तेव्हा इब्रींच्या छावणीत हा जल्लोष कसला
म्हणून ते विचारात पडले.
7परमेश्वराच्या पवित्र कराराचा कोश छावणीत आणला
गेल्याचे त्यांना कळले तेव्हा त्यांची भीतीने गाळण उडाली.
ते म्हणू लागले, “त्यांच्या तळावर परमेश्वर आला आहे.
आता आपले कसे होणार? असे यापूर्वी कधी झालेले
नाही. 8या शक्तिमान परमेश्वरापासून आता आपल्याला
कोण वाचवील, याची धास्ती पडली आहे. मिसरच्या
लोकांना नाना तऱ्हेच्या पीडांनी हैराण केले ते याच
परमेश्वराने. 9पण पलिष्ट्यांनो, धीर धरा. मर्दासारखे लढा.
पूर्वी हेच इस्राएल लोक आपले गुलाम होते. तेव्हा शौर्य
दाखवा, नाहीतर तुम्ही त्यांचे गुलाम व्हाल.”
10तेव्हा पलिष्ट्यांनी पराक्रमाची शर्थ करून इस्राएल
लोकांचा पाडाव केला. सर्व इस्राएली सैनिकांनी घाबरून
आपल्या छावणीकडे पळ काढला. त्यांचा तो दारून पराभव
होता. तीस हजार इस्राएली सैनिक मारले गेले. 11पलिष्ट्यांनी
परमेश्वराच्या कराराचा कोश घेतला आणि हफनी आणि
फिनहास या एलीच्या मुलांचा वध केला.
12त्या दिवशी एक बन्यामीन माणूस युद्धातून धावत
निघाला. दु:खाने तो कपडे फाडत होता, डोक्यात धूळ
घालून घेत होता. 13तो शिलो येथे पोहोंचला तेव्हा एली
वेशीजवळ आपल्या आसनावर बसला होता. त्याला
कराराच्या कोशाची काळजी वाटत होती म्हणून तो वाट
पाहात होता. त्याचवेळी या बन्यामीनाने तेथे येऊन सर्व
वृत्तांत सांगितला. लोक तो ऐकून आकांत करु लागले.
14–15एली आता अठ्याण्णव वर्षांचा झाला होता. आंधळा

झाल्यामुळे त्याला काय घडतेय हे दिसत नव्हते. पण त्याला
हा आक्रोश ऐकू येत होता. तेव्हा त्याने त्याबद्दल विचारले.
तेव्हा त्या बन्यामीन माणसाने एलीजवळ जाऊन सर्व
सांगितले 16तो म्हणाला, “मी नुकताच तेथून आलो आहे
मी आज युद्धातून पळून आलो आहे.”
एलीने त्याला सर्व हकीकत सांगायला सांगितले.
17तेव्हा तो म्हणाला, “इस्राएलींनी पळ काढला आहे.
इस्राएली सैन्यातील अनेक सैनिक प्राणाला मुकले. तुमची
दोन्ही मुले मेली आहेत. आणि परमेश्वराचा पवित्र
करारकोश पलिष्ट्यांनी ताब्यात घेतला आहे.
18करारकोशाचे वृत्त समजताच वेशीजवळ आसनावर
बसलेला एली तिथेच मागच्यामागे पडला आणि त्याची
मान मोडली. तो वृध्द आणि स्थूल झाला होता. तात्काळ
त्याचा प्राण गेला. वीस वर्षे तो इस्राएलचा शास्ता होता.

### वैभव गेले

19एलीची सून, फिनहासची बायको त्यावेळी गरोदर
होती. ती प्रसूत व्हायची वेळ येऊन ठेपली होती. कराराचा
कोश पळवल्याचे तसेच सासरा व नवरा यांचे निधन
झाल्याचे वृत्त तिच्या कानावर आले. ते ऐकताच त्या
धक्क्याने तिला कळा येऊ लागल्या आणि ती प्रसूत झाली.
20तिच्या मदतीला आलेल्या बायका म्हणाल्या, “आता
काळजी करु नको तुला मुलगा झालाय.” पण तिने लक्ष
दिले नाही की काही उत्तर दिले नाही. ती फक्त एवढेच
म्हणाली, “इस्राएलचे वैभव
मावळले.” तिने मुलाचे नाव ईखाबोद असे ठेवले आणि
ती गतप्राण झाली. 21करारकोशाचे हरण झाले, सासरा
व नवरा यांना मृत्यू आला म्हणून तिने मुलाचे नाव ईखाबोद
(हरपलेले वैभव) असे ठेवले. 22पलिष्ट्यांनी परमेश्वराचा
पवित्र करार कोश हस्तगत केला म्हणून “इस्राएलचे वैभव
गेले” असे ती म्हणाली.

### पवित्र कोशामुळे पलिष्ट्यांवर संकटे

5 पलिष्ट्यांनी परमेश्वराचा कोश घेतला. तो
एबन-एजर येथून अश्दोद येथे नेला. 2तो त्यांनी
दागोनच्या मंदिरात दागोनच्या जवळ ठेवला. 3दुसऱ्या दिवशी
अश्दोदचे लोक उठून पाहतात तो, दागोनची मूर्ती करार
कोशा जवळ जमीनीवर पालथी पडलेली आढळली. 4पण
दुसऱ्या दिवशी पुन्हा त्यांना ती जमिनीवर पडलेली आढळली
अश्दोदच्या लोकांनी ती मूर्ती उचलून पूर्ववत ठेवली.
यावेळी परमेश्वराच्या पवित्र करारकोशा जवळ पडताना
दागोनचे शिर आणि हात तुटून उंबरठ्यावर पडले होते.
धड तेवढे शाबूत होते. 5त्यामुळे अजूनही पुरोहित किंवा
इतर लोक अश्दोदला दागोनच्या देवळात शिरतात तेव्हा
उंबरठ्यावर पाऊल ठेवत नाही.
6अश्दोद आणि त्याच्या आसपासचा प्रदेश यातील
लोकांना परमेश्वराने सळो की पळो केले. त्यांना हर
प्रकारे त्रास दिला. लोकांच्या अंगावर गाठी, गळवे आले.
शिवाय परमेश्वराने उंदीर सोडून त्यांना हैराण केले. जमीन,
गलबतं यावर उंदरानी उच्छाद मांडला. गावातील लोक
भयभीत झाले होते. 7या घटना पाहून अश्दोदचे लोक
म्हणाले, “इस्राएलच्या परमेश्वराचा पवित्र करार कोश
येथे ठेवण्यात अर्थ नाही. आपल्यावर आणि आपल्या
देवावर त्या परमेश्वराचा कोप झाला आहे.”
8अश्दोदच्या लोकांनी पलिष्ट्यांच्या पाचही
अधिकाऱ्यांना एकत्र बोलावून या पवित्र कोशाचे काय
करावे याविषयी सल्लामसलत केली.
अधिकाऱ्यांनी हा पवित्र कोश गथ येथे हलवायला
सांगितला. त्यानुसार पलिष्ट्यांनी तो पवित्र करारकोश
हलवला.
9गथ येथे तो नेऊन ठेवल्यावर त्या शहरावर
परमेश्वराचा कोप ओढवला. त्यामुळे तेथील लोक भयभीत
झाले. लहान मोठी सगळी माणसे वेगवेगळ्या व्याधींनी
हैराण झाली. तेथील लोकांच्या अंगावर गळवे उठली.
10तेव्हा पलिष्ट्यांनी हा पवित्र कोश एक्रोन येथे हलवला.
एक्रोन येथे हा पवित्र कोश येताच तेथील लोक तक्रार
करु लागले. “इस्राएलच्या परमेश्वराचा हा पवित्र कोश
आमच्या एक्रोनमध्ये आणून आमचा जीव घ्यायचा आहे
का?” असे ते विचारु लागले. 11एक्रोनच्या लोकांनी सर्व
पलिष्टी अधिकाऱ्यांना एकत्र बोलावून सांगितले “तो पवित्र
कोश आमचे बळी घ्यायच्या आधी तो कोश होता तेथे
परत पाठवा.”
एक्रोनचे लोक फार घाबरले. परमेश्वराने त्यांना त्रस्त
करून सोडले. 12अनेक लोक मरण पावले. जे जगले
त्यांच्या अंगावर गळवे आली. एक्रोनच्या लोकांचा आक्रोश
आकाशाला भिडला.

### परमेश्वराच्या पवित्र कोशाची पाठवणी

6 पलिष्ट्यांनी हा पवित्र कोश आपल्या प्रदेशात सात
महिने ठेवला. 2त्यांनी याजकांना आणि शकुन
पाहणाऱ्यांना बोलावून विचारले “या कोशाचे आता काय
करायचे? तो परत कसा पाठवायचा ते सांगा.”
3याजक आणि शकुन पाहणारे म्हणाले, “तुम्ही हा कोश
परत पाठवणार असाल तर तो तसाच पाठवू नका. त्याच्या
बरोबर देणगीदाखल काही अर्पण पाठवा म्हणजे इस्राएलांचा
देव तुमच्या पापांचे हरण करील. तुम्ही बरे व्हाल.
शुध्द व्हाल. त्याचा क्रोध मावळावा म्हणून तुम्ही एवढे
करा.”*
4पलिष्ट्यानी विचारले, “इस्राएलच्या परमेश्वराने क्षमा
करावी म्हणून आम्ही कोणत्या भेटी अर्पण कराव्यात?”

---

**त्याचा क्रोध … एवढे करा** प्राचीन ग्रीक अनुवाद व कुमरानची एक हिब्रूप्रत यातून. प्रमाण हिब्रूमध्ये असे आहे. “परमेश्वर तुम्हाला शिक्षा करतच का राहिला हे मग तुम्हाला कळेल.”

याजक आणि शकुन पाहणारे यांनी सांगितले, “प्रत्येक
नगराचा एक असे तुम्ही पाच पलिष्टी अधिकारी आहात.
तुम्ही सर्व सारखेच हैराण झालेले आहात. तेव्हा,
गळवांसारख्या दिसणाऱ्या पाच सोन्याच्या प्रतिमा आणि
पाच सोन्याचे उंदीर करा. 5अशा पाच पाच प्रतिमा करून
त्या इस्राएलींच्या देवाला भरपाई म्हणून द्या. मग कदाचित्
तुमच्या प्रदेशाला, तुमच्या परमेश्वराला, व तुम्हाला होणारा
त्रास तो थांबवेल. 6मिसरचे लोक आणि फारो
यांच्यासारखा आडमुठेपणा करू नका. मिसरच्या लोकांना
देवाने शिक्षा केली. म्हणूनच इस्राएल लोक मिसर सोडून
जाऊ शकले.

7“एक नवीन गाडी तयार करून नुकत्याच व्यायलेल्या
दोन गाई तिला जुंपा त्या गाईंनी शेतात कधीच काम
केलेले नसावे. त्यांच्यावर जू चढवून मग त्यांची वासरे
माघारी गोठ्यात आणून बांधा. त्यांना आपल्या आईच्या
मागे जाऊ देऊ नका.* 8आता परमेश्वराचा पवित्र
करारकोश गाडीत ठेवा. त्याच्याशेजारी एका थैलीत त्या
सुवर्ण प्रतिमा ठेवा. तुमच्या पापक्षालनासाठी त्या
परमेश्वराला अर्पण केलेल्या आहेत. मग गाडी सरळ
जाऊ द्या. 9ती कशी जाते ते पाहा. गाडी बेथशेमेश कडे
इस्राएलांच्या प्रदेशात गेली तर या व्याधी, हे अरिष्ट
परमेश्वरामुळेच ओढवले होते असे समजू. पण गाई सरळ
त्या दिशेने गेल्या नाहीत, तर हा इस्राएलच्या परमेश्वराचा
कोप नव्हता, हे अरिष्ट असेच कोसळले असे आपण
समजू.”

10पलिष्ट्यांनी हा सल्ला मानून त्या प्रमाणे सर्व काही
केले. नुकत्याच व्यालेल्या दोन गाई त्यांनी मिळवल्या.
त्यांना गाडीला जुंपून वासरे गोठ्यात ठेवली. 11मग करार
कोश गाडीत चढवला. गळवे आणि उंदीर यांच्या सुवर्ण
प्रतिमांची थैलीही त्याशेजारी ठेवली. 12गाई सरळ बेथशेमेश
कडे निघाल्या. त्या हंबरत चालल्या होत्या व मुख्य रस्ता
सोडून इकडे तिकडे वळल्या नाहीत. बेथशेमेशच्या हद्दीपर्यंत
पलिष्ट्यांचे अधिकारी गाईंच्या मागोमाग होते.

13बेथशेमेशमधले शेतकरी त्या खोऱ्यात गव्हाची
कापणी करत होते. समोर पाहतात तो पवित्र करारकोश.
कोशाचे दर्शन झाल्यावर त्यांना अतिशय आनंद झाला
आणि ते धावतच जवळ गेले. 14–15बेथशेमेश येथील
यहोशवाच्या शेतात येऊन एका मोठ्या खडकापाशी गाडी
थांबली. स्थानिक लोकांनी त्या गाडीची लाकडे फोडली
आणि गाईंचा बळी दिला. परमेश्वराला तो अर्पण केला.
लेवींनी मग परमेश्वराचा पवित्र कोश उतरवला. तसेच
सुवर्ण प्रतिमांची थैली घेतली. कोश आणि ती थैली त्या
प्रचंड खडकावर ठेवली. बेथशेमेशच्या लोकांनी त्या दिवशी
परमेश्वराला यज्ञार्पणे वाहिली.

16त्या पाच पलिष्टी अधिकाऱ्यांनी हे सर्व नीट पाहिले
आणि ते त्याच दिवशी एक्रोन येथे परतले.

17अशाप्रकारे पलिष्ट्यांनी आपल्या पापक्षालनार्थ
परमेश्वराला गळवांच्या पाच सुवर्ण प्रतिमा दिल्या. प्रत्येक
पलिष्टी गावातर्फे एक अशा त्या होत्या. अश्दोद, गज्जा,
अष्कलोन, गथ, एक्रोन ही ती पाच गावे होत. 18सोन्याचे
उंदीरही करुन पाठवले. पाच पलिष्टी अधिकाऱ्यांच्या
अखत्यारीत जेवढी गावे येत होती त्यांच्या संख्येच्या प्रमाणात
ते होते. या प्रत्येक गावाभोवती तटबंदी असून सभोवार
खेडी होती.

बेथशेमेशच्या लोकांनी परमेश्वराचा पवित्र कोश त्या
खडकावर ठेवला. यहोशवाच्या शेतात तो खडक अजूनही
आहे. 19पण हा कोश दृष्टीस पडला तेव्हा तेथे याजक
नव्हते. तेव्हा बेथशेमेश मधली सत्तर माणसे परमेश्वराने
मारली. परमेश्वराने अशी कठोर शिक्षा करावी याबद्दल
बेथशेमेशच्या लोकांनी आक्रोश केला. 20ते म्हणाले, “त्या
कोशाचे जतन करील असा याजक कोठे आहे? इथून हा
कोश कोठे जायला पाहिजे?”

21किर्याथ–यारीम येथे एक याजक होता. लोकांनी
त्याच्याकडे संदेश पाठवला. “पलिष्ट्यांनी परमेश्वराचा
पवित्र कोश पाठवला आहे. तरी येऊन तो आपल्या नगरात
घेऊन जा” असा त्याला निरोप पाठवला.

7 किर्याथ यारीमचे लोक आले आणि परमेश्वराचा तो
पवित्र कोश घेऊन गेले. त्यांनी तो डोंगरावरील
अबीनादाबच्या घरात ठेवला. त्या परमेश्वराच्या कोशाची
जपणूक करण्यासाठी त्यांनी अबीनादाबचा मुलगा एलाजार
याला विधिवत पवित्र केले. 2पुढे हा कोश किर्याथ यारीम
येथे वीस वर्षे होता.

### परमेश्वर इस्राएलींचे रक्षण करतो

इस्राएली लोक पुन्हा परमेश्वराची भक्ती करु लागले.
3शमुवेलने तेव्हा लोकांना सांगितले, “तुम्ही खरोखरच
मन:पूर्वक परमेश्वराकडे वळला असाल तर इतर
देव–देवता, अष्टरोथ यांना निग्रहाने दूर सारा.
परमेश्वराचीच एकचित्ताने उपासना करा. केवळ त्याचीच
सेवा करा. मग परमेश्वर तुमची पलिष्ट्यांच्या तावडीतून
सोडवणूक करील.”

4तेव्हा मग इस्राएली लोकांनी बाल आणि अष्टारोथच्या
मूर्तींचा त्याग करून फक्त परमेश्वराची सेवा करायला
सुरुवात केली.

5शमुवेल त्यांना म्हणाला, “सर्व इस्राएली मिस्पा येथे
एकत्र या. मी परमेश्वराकडे तुमच्या साठी प्रार्थना करीन.”

6मग सर्व इस्राएल लोक मिस्पा येथे जमले. त्यांनी पाणी
आणून परमेश्वरापुढे ओतले. मग त्यांच्या उपासाला सुरुवात
झाली. अन्नपाणी वर्ज्य करून त्यांनी परमेश्वरापुढे आपल्या

---

**त्यांना … देऊनका** गाई आपल्या वासरांच्या पाठोपाठ गेल्या नाहीत म्हणजे परमेश्वर त्यांना मार्गदर्शन करत आहे व परमेश्वराने आपली भेट स्वीकारली आहे असा पलिष्टे त्याचा अर्थ लावीत.

पातकांची कबुली दिली. शमुवेल त्या वेळी इस्राएलमध्ये
न्याय निवाडा करत असे.
7मिस्पा येथील इस्राएलींच्या या मेळाव्याबद्दल पलिष्ट्यांनी
ऐकले. त्यांनी इस्राएली विरुध्द लढण्याची तयारी केली.
पलिष्टे येत आहेत ही बातमी ऐकून इस्राएलामध्ये घबराट
पसरली. 8ते शमुवेलला म्हणाले, “आमच्यासाठी
परमेश्वराकडे करायच्या प्रार्थनेत खंड पडू देऊ नकोस.
पलिष्ट्यांपासून आमचे रक्षण व्हावे असे परमेश्वराकडे
मागणे माग.”
9तेव्हा शमुवेलने एक आख्खे कोकरु परमेश्वराला
यज्ञात अर्पण केले. इस्राएलासाठी परमेश्वराकडे प्रार्थना
केली. परमेश्वराने त्याच्या प्रार्थनेला ओ दिली. 10हा होम
चालू असताना पलिष्ट्यांनी इस्राएलवर हल्ला केला.
त्यावेळी प्रंचड गडगडाट करून परमेश्वराने पलिष्ट्यांमध्ये
गोंधळ माजवला. प्रंचड गर्जनेमुळे घाबरुन ते गोंधळले.
सेनापतींचा सैन्यावरचा ताबा सुटला. त्यामुळे इस्राएलींनी
त्यांचा पराभव केला. 11मिस्पापासून पलिष्ट्यांचा पाठलाग
करत बेथ-कारपर्यंत नेले आणि सैन्याला कापून आणले.

## इस्राएलमध्ये शांतता

12देवाने ही जी मदत केली तिचे स्मरण लोकांना राहावे
म्हणून शमुवेलने मिस्पा आणि शेन यांच्या दरम्यान एका
दगडाची स्थापना केली. “परमेश्वराने आपल्याला येथवर
सहाय्य केले” असे म्हणून त्याने “सहाय्य दगड असे त्याचे
नामकरण केले. 13पराभूत झाल्यावर पुन्हा म्हणून
पलिष्ट्यांनी इस्राएलच्या भूमीत पाऊल टाकले नाही.
शमुवेलच्या उर्वरित आयुष्यात परमेश्वर पलिष्ट्यांच्या
विरुध्द होता. 14पलिष्ट्यांनी इस्राएलची काही नगरे काबीज
केली होती. एक्रोन पासून गथपर्यंतची ही नगरे आणि
त्याच्या आसपासची गावे इस्राएलींनी पुन्हा ताब्यात घेतली.
इस्राएल आणि अमोरी यांच्यातही शांततेचा करार झाला
15शमुवेलने आयुष्यभर इस्राएलसाठी न्यायनिवाडा केला.
16त्यासाठी तो जागोजाग हिंडला. बेथेल, गिलगाल, मिस्पा
या सर्व ठिकाणी तो दरवर्षी जाई त्या ठिकाणच्या लोकांचा
न्यायनिवाडा करी. 17पण रामा येथे त्याचे घर असल्यामुळे
तेथे त्याचे वारंवार जाणे होई. तेथूनच तो सर्व कारभार
पाही. रामा येथे त्याने परमेश्वरासाठी वेदी बांधली.

## इस्राएलींची राजासाठी मागणी

8 शमुवेल खूप म्हतारा झाला तेव्हा त्याने आपल्या
मुलांना इस्राएलचे न्यायाधिश म्हणून नेमले. 2मोठ्या
मुलाचे नाव योएल आणि दुसऱ्याचे नाव अबीया. बैर-शीबा
येथे राहून ते काम करु लागले. 3पण ते त्यांच्या
वडिलांसारखे वागले नाही. पैशाच्या लोभाने लाच खाऊन
ते न्यायनिवाड्यात फेरफार करीत. लोकांना फसवीत.
4तेव्हा इस्राएलची सर्व वडीलधारी मंडळी एकत्र जमून
रामा येथे शमुवेलला भेटायला गेली. 5शमुवेलला ते लोक
म्हणाले, “तुम्ही तर वृध्द झालात. तुमच्या मुलांचे वागणे
बरोबर नाही. ती तुमच्यासारखी नाहीत. तेव्हा इतर
राष्ट्रांप्रमाणेच आमच्यावर ही राज्यकारभार करण्यासाठी
राजा नेमा.”
6आपल्यावर शासन करण्यासाठी त्यांनी राजाची मागणी
करावी हे शमुवेलला ठीक वाटले नाही. तेव्हा त्याने
परमेश्वराची प्रार्थना केली. 7परमेश्वर त्याला म्हणाला,
“लोक म्हणतात तसे कर. त्यांनी काही तुला नाकारलेले
नाही. त्यांनी माझा धिक्कार केला आहे. त्यांना मी राजा
म्हणून नको आहे. 8हे त्यांचे वागणे नेहमीचेच आहे. मी
त्यांना मिसरमधून बाहेर आणले पण मला सोडून ते इतर
दैवतांच्या मागे लागले. आता ते तुझ्याशीही तसेच वागत
आहेत. 9त्यांचे ऐक आणि त्यांना हवे तसे कर. पण त्या
आधी त्यांना इशारा दे. राजाचा कारभार कसा असतो, तो
कशी सत्ता गाजवतो ते त्यांना सांग.”
10लोकांनी राजा मागितला, तेव्हा, शमुवेलने,
परमेश्वराने सांगितले ते सर्व त्यांना ऐकवले. 11तो म्हणाला,
“राजा आपली सत्ता कशी गाजवेल ते ऐका. तुमच्या मुलांना
तो तुमच्यापासून हिरावून घेईल. त्यांना बळजबरीने सैन्यात
दाखल करील. रथावर, घोड्यांवर स्वार व्हायला लावून
तो त्यांना युद्धाला जुंपील. तुमची मुले राजाच्या रथा पुढे
रक्षक म्हणून धावतील.
12काहीजण हजाराहजारावर तर काही पन्नास-पन्नास
सैनिकांवर नायक म्हणून नेमली जातील. काही मुलं
शेतीच्या कामात राबतील तर काहींना शस्त्रास्त्रे, रथाचे
भाग बनविणे या कामाला लावले जाईल.
13“राजा तुमच्या मुलींनाही कामाला लावील. अत्तरे
करणे, स्वयंपाक पाणी, भटारखान्यात राबणे ही कामे
त्यांच्याकडून करून घेईल.
14“तुमची उत्तम शेती, द्राक्षमळे, जैतुनांच्या बागा तुमच्या
कडून काढून घेऊन तो त्या आपल्या अधिकाऱ्यांच्या
हवाली करील. 15धान्यातील आणि द्राक्षांतील एकदशांश
हिस्सा तुमच्या कडून घेऊन राजा आपल्या अधिकाऱ्याना
आणि नोकरांना देईल.
16तुमचे नोकर, दासी, दुभती जनावरे, गाढवे
तुमच्याकडून काढून स्वतःच्या ताब्यात घेईल. 17तुमच्या
शेरडामेंढरांचा एक दशांश हिस्साही घेईल.
“तुम्ही त्याचे दास व्हाल. 18तुमच्यावर अशी वेळ आली
की मग असा राजा निवडल्याबद्दल परमेश्वराकडे गाऱ्हाणे
न्याल. पण तेव्हा परमेश्वर तुमचे ऐकणार नाही.”
19पण लोक शमुवेलचे ऐकायला तयार नव्हते ते म्हणाले,
“आम्हाला राजा हवाच आहे. 20मग आम्ही इतर राष्ट्रांच्या
बरोबरीला येऊ. तो आमचे नेतृत्व करील. आमच्यासाठी
लढाया करील.”
21शमुवेलने लोकांचे ऐकून घेतले आणि परमेश्वराला
त्यांचे म्हणणे जसेच्या तसे सांगितले. 22परमेश्वर म्हणाला,
“तू त्यांचे ऐकायलाच हवेस. त्यांच्यावर राजा नेम.”

मग शमुवेल इस्राएली लोकांना म्हणाला, “ठीक तर! तुम्हाला राजा मिळेल. आता सर्वजण आपापल्या गावी परत जा.”

### शौल आपल्या वडीलांच्या गाढवांच्या शोधात

9 अबीएलचा मुलगा कीश हा बन्यामीन घराण्यातील एक ख्यातनाम गृहस्थ होता. अबीएलचे वडील सरोर, सरोरचे वडील बखोरथ आणि बखोरथचे वडील अफीया अशी ही परंपरा होती. 2कीशला शौल नावाचा मुलगा होता. हा देखणा आणि तरुण असून देखणेपणात आणि उंचीच्या बाबतीत इस्राएलात त्याच्याशी बरोबरी करणारे कोणीही नव्हते. प्रत्येक इस्राएल मनुष्य त्याच्या खांद्याला लागे.

3एकदा कीशची गाढवे वाट चुकली. तेव्हा कीश शौलाला म्हणाला, “नोकारांपैकी कोणाला तरी बरोबर घेऊन गाढवांचा शोध घे.” 4शौल त्याप्रमाणे आपल्या वडीलांच्या गाढवांच्या शोधार्थ निघाला. एफ्राईमचा डोंगराळ प्रदेश, शलीशाच्या भोवतालचा प्रांत पालथा घातला तरी त्याला आणि त्याच्या नोकराला गाढवे सापडेनात. तेव्हा ते शालीम प्रांतात गेले. पण तिथेही शोध लागला नाही. म्हणून पुढे ते बन्यामीन प्रदेशातून हिंडले. पण गाढवे मिळाली नाहीतच.

5शेवटी ते दोघे सूफ या नगराशी आले. तेव्हा शौल आपल्या नोकराला म्हणाला, “आता आपण परतीच्या वाटेला लागलेले बरे. कारण गाढवांचा विचार सोडून देऊन वडील आता आपल्याच चिंतेत पडतील.”

6पण नोकर म्हणाला, “या गावात एक परमेश्वराचा माणूस संदेष्टा आहे. लोक त्याला मानतात. तो बोललेले खरे ठरते. तेव्हा आपण या गावात जाऊ. कदाचित् तो आपल्याला पुढचा मार्ग दाखवील.”

7शौल म्हणाला, “तर मग आपण जाऊच या पण त्याला द्यायचे काय? त्याला देण्यासारखे तर आपल्याजवळ काहीच नाही. आपल्याजवळचे फराळाचे सुध्दा संपले. मग त्याला काय देणार?”

8तेव्हा पुन्हा नोकाराने सांगितले, “माझ्याकडे थोडे पैसे* आहेत. तेच आपण त्या परमेश्वराच्या माणसाला देऊ. मग तो आपल्याला पुढची वाट दाखवेल.”

9–11शौल नोकराला म्हणाला, “ठीक आहे, चल जाऊ.” आणि ते तिकडे निघाले. चढण चढून जात असताना वाटेत त्यांना पाण्याला चाललेल्या काही तरुण मुली भेटल्या. त्यांना त्यांनी संदेष्ट्याचा पत्ता विचारला.

12तेव्हा त्या म्हणाल्या, “तो आत्ताच पुढे गेला आहे. लौकर पुढे जा. तो आजच या गावी आला आहे कारण लोक उच्च स्थानी शांत्यर्पण करणार आहेत. 13पुढे गेल्यावर तुम्हाला तो दिसेल. घाई केलीत तर भोजनासाठी तो भक्ती स्थळापाशी पोचायच्या अगादेर तुम्ही त्याला भेटू शकाल. तो यज्ञाला आशीर्वाद देतो म्हणून तो तिथे पोहोंचे पर्यंत लोक जेवायला सुरूवात करत नाहीत. म्हणून लौकर जा.” पूर्वी कोणी असे परमेश्वराला प्रश्न विचारायला निघाले, “चला, संदेष्ट्याकडे जाऊ” असे म्हणत असत. कारण तेव्हा परमेश्वराच्या माणसाला संदेष्टा म्हणत.

14तेव्हा शौल आणि त्याचा नोकर वर नगराच्या दिशेने जाऊ लागले. नगरात शिरतात तो त्यांना शमुवेल त्यांच्या दिशेने येताना दिसला. तो त्या यज्ञाच्या ठिकाणी जायला निघालाच होता.

15आदल्या दिवशी परमेश्वराने शमुवेलला सांगितले होते, 16“उद्या यावेळी मी तुझ्याकडे बन्यामीन घराण्यातील एकाला पाठवीन. त्याला तू अभिषेकपूर्वक इस्राएलवर राजा म्हणून नेम. पलिष्ट्यांपासून तो माझ्या लोकांना वाचवील. लोकांचे गाऱ्हाणे माझ्याकडे आले आहे. ते मी ऐकून घेतले आहे.”

17शौल शमुवेलच्या दृष्टीस पडताक्षणीच परमेश्वर म्हणाला, “हाच तो मी सांगितलेला माणूस. तो माझ्या लोकांवर राज्य करील.”

18शौलने शमुवेलला वेशीजवळ गाठले आणि तो म्हणाला, “संदेष्ट्यांचे घर कोठे आहे ते कृपा करून मला सांगाल का?”

19शमुवेल म्हणाला, “मीच तो तू पुढे हो आणि भक्तीच्या ठिकाणी जा. तुम्ही दोघेजण आज माझ्याबरोबर भोजन करा. उद्या सकाळी मी तुझी रवानगी करीन. तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे देईन. 20आणि तीन दिवसांपूर्वी हरवलेल्या त्या गाढवांची काळजी करू नकोस. ती सापडली आहेत. आता इस्राएलला तुझी गरज आहे. इस्राएलला तू आणि तुमच्या घराण्यातील सर्व हवे आहात.”

21शौल म्हणाला, “मी बन्यामीन घराण्यातला आहे. आमचे घराणे इस्राएल मधले सर्वात लहान घराणे आहे आणि बन्यामीन घराण्यात आमचे कुटुंब सगळ्यात छोटे आहे. मग इस्राएलला मी कशासाठी हवा आहे बरे?”

22शमुवेलने मग त्यांना आणि त्याच्या नोकराला भोजनाच्या ठिकाणी नेले. तेथे तीस एक लोकांना भोजनासाठी आणि यज्ञात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले होते. शमुवेलने या दोघांना पंगतीतल्या मानाच्या ठिकाणी बसवले. 23शमुवेल आचाऱ्याला म्हणाला, “मांसाचा मी तुला राखून ठेवायला सांगितलेला वाटा आण.”

24आचाऱ्याने मांडीचा भाग आणून शौलच्या पुढे ठेवला. शमुवेल म्हणाला, “तुझ्यासाठी मी हा राखून ठेवला आहे. या विशेष प्रसंगासाठी मी तो ठेवला होता. तो तू खा.” तेव्हा शौल शमुवेलच्या पंगतीला बसून जेवला.

25भोजन आटोपल्यावर ते उपासना स्थळाहून खाली नगरात आले. शमुवेलने शौलसाठी घराच्या गच्चीत बिछाना घातला. शौल तेथे झोपला. 26दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे

---

**थोडे पैसे** शब्दश: भाकरी शेकेल रुपे म्हणजे साधारण 1/10 औंस रुपे.

शमुवेलने शौलला जोरात हाक मारून उठवले. तो म्हणाला,
“ऊठ आता मी तुझी रवानगी करतो.” शौल उठला आणि
शमुवेल बरोबर घराच्या बाहेर पडला.
27शौल त्याचा नोकर आणि शमुवेल गावाच्या सीमेपाशी
आले. तेव्हा शमुवेल शौलला म्हणाला, “तुझ्या नोकराला
पुढे व्हायला सांग तुझ्यासाठी परमेश्वराचा संदेश आहे.”
तेव्हा नोकर पुढे चालू लागला.

## शौलचा राज्याभिषेक

10 शमुवेलने मग एका खास तेलाची कुपी घेतली
आणि शौलच्या मस्तकावर ती ओतली. शौलचे
चुंबन घेऊन तो म्हणाला, “परमेश्वराने त्याच्या प्रजेचा
नेता म्हणून तुला आभिषिक्त केले (निवडले) आहे. त्यांचा
तू अधिपती होशील. भोवतालच्या शत्रूंपासून त्यांचे रक्षण
करशील. त्यासाठीच परमेश्वराने तुझा अभिषेक केला
आहे हे खरे आहे. याची साक्ष पटवणाऱ्या या खुणा ऐक*
2येथून निघालास की तुला बन्यामीनांच्या हद्दीत सेल्सह
येथे राहेलीच्या कबरीजवळ दोन माणसे भेटतील. तुला ती
म्हणतील, ‘तुमची गाढवे मिळाली. तेव्हा तुमच्या वडिलांची
काळजी मिटली, पण आता ते तुमच्या काळजीत पडले
आहेत. आता माझ्या मुलाला कुठे शोधू असे ते म्हणत
आहेत.’”
3शमुवेल पुढे म्हणाला, “पुढे गेलास की तुला ताबोरचा
एला ओक वृक्ष लागेल. तिथे तुला देवाच्या भक्तीसाठी
बेथेलकडे निघालेली तीन माणसे भेटतील. त्यातल्या
एकाजवळ तीन तान्ही करडं दुसऱ्याजवळ तीन भाकरी
आणि तिसऱ्याकडे द्राक्षरसाचा बुधला असेल. 4ती माणसे
तुझी विचारपूस करतील. त्यांच्याजवळच्या दोन भाकरी
ते तुला देतील आणि तू त्या घेशील. 5मग तू गिबाथ
एलोहिम येथे पोचशील. या ठिकाणी पलिष्ट्यांचा किल्ला
आहे. या नगरात तू गेल्यावर भक्तीच्या उच्चस्थानाहून
खाली येणारे संदेष्टे तुला भेटतील. भविष्य कथन करतील
ते चालू असतानाच, परमेश्वराचा संचार झाल्याप्रमाणे ते
नृत्य गायनात मशगुल असतील. ते सतार, संबळ, सनई,
वीणा ही वाद्ये वाजवत असतील. 6तुझ्यात त्यावेळी
परमेश्वराच्या आत्म्याचा जोरदार संचार होऊन तू तू राहणार
नाहीस. अगदी वेगळाच होशील. त्यांच्याबरोबर तूही
भविष्यकथन करु लागशील. 7असे झाले की तुला जे
हवे ते तू साध्य करु शकशील. कारण परमेश्वराचीच
तुला साथ असेल.
8गिलगाल येथे तू माझ्याआधी जा. मग मी तिथे येईन.
यज्ञात होमार्पण आणि शांत्यर्पणे करीन. माझी तू सात
दिवस वाट पाहा. मग मी तुला भेटेन आणि काय करायचे
ते सांगेन.”

## शौल संदेष्ट्यासारखा वागतो.

9शमुवेलला निरोप देऊन शौल जायला निघताच
परमेश्वराने त्याचे आयुष्यच बदलून टाकले. सर्व खुणांचा
प्रत्यय त्याला त्या दिवशीच आला. 10शौल आपल्या
नोकरासह गिबाथ एलोहिम या टेकडीवर आला. तिथे
त्याला इतर संदेष्टे भेटले. परमेश्वराच्या आत्म्याचा जोरदार
संचार होऊन तो ही इतर संदेष्ट्यां प्रमाणे भविष्य करू
लागला. 11त्याला आधीपासून ओळखणाऱ्या लोकांनी हे
पाहिले. तेव्हा ते आपापसात याची चर्चा करू लागले.
“कीशच्या मुलाला काय झाले? तो ही संदेष्ट्यांपैकीच
आहे की काय?” असे म्हणू लागले. 12तिथे राहणारा एक
माणूस म्हणाला, “हो ना! हा यांचा नेता आहे असे दिसते.”*
तेव्हापासून “शौल संदेष्ट्यांपैकीच आहे की काय” अशी
म्हणंच पडली.

## शौल घरी परत येतो

13यानंतर शौल आपल्या घराजवळच्या
भक्तीस्थळापाशी पोचला.
14त्याला व त्याच्या नोकराला शौलच्या काकाने इतके
दिवस तुम्ही कोठे होतात म्हणून विचारले.
शौल म्हणाला, “आम्ही आपली गाढवे शोधायला गेलो
होतो. ती मिळाली नाहीत तेव्हा शमुवेलला भेटायला आम्ही
गेलो.”
15तेव्हा काका म्हणाला, “मग काय म्हणाला शमुवेल
ते सांग ना!”
16शौलने सांगितले, “गाढवांचा शोध लागला आहे असे
शमुवेल म्हणाला.” शमुवेलच्या इतर वक्तव्याबद्दल,
राज्याबद्दल त्याने काकाला काहीही सांगितले नाही.

## शमुवेल शौलला राजा म्हणून घोषित करतो

17शमुवेलने सर्व इस्राएली लोकांना मिस्पा येथे
परमेश्वराजवळ बोलावले. 18शमुवेल त्यांना तेव्हा म्हणाला,
“इस्राएलच्या परमेश्वर देवाचे म्हणणे असे आहे: इस्राएलला
मी मिसरमधून बाहेर काढले. मिसर आणि इतर राष्ट्रे
यांच्या जाचातून मुक्त केले. 19सर्व आपत्तीतून तुम्हाला
सोडवणाऱ्या परमेश्वराचाच आज तुम्ही त्याग करायला
निघालेला आहात. राजा हवा अशी तुमची मागणी आहे.
तेव्हा आता आपापल्या वंशांप्रमाणे, घराण्यांसकट
परमेश्वरापुढे हजर व्हा.”
20सर्व वंशातील लोकांना त्याने आपल्या जवळ बोलावले,
आणि राजाची निवड करायला सुरुवात केली. सर्वात
आधी शमुवेलने बन्यामीन वंशाची निवड केली. 21व
त्यापैकी प्रत्येक कुळाला क्रमाक्रमाने समोर बोलावले.
त्यातून मात्रीच्या कुळाची निवड केली. मग त्यांच्यापैकी

---

**हे खरे ... ऐक** हा भाग प्राचीन ग्रीक अनुवादातून घेतला आहे. हिब्रूसंहितेत नाही.

**हो ना ... दिसते** शब्दश: “आणि यांचा पिता कोण?” जो इतर संदेष्ट्यांचे नेतृत्व करतो व त्यांना शिकवतो त्याला पिता म्हणत.

प्रत्येकाला समोरून जायला सांगितले. अशा रीतीने कीशचा
मुलगा शौल याची निवड केली.
पण लोकांना शौल कुठे दिसेना. 22त्यांनी परमेश्वराला
विचारले, “शौल इथे आला आहे का?”
परमेश्वर म्हणाला, “शौल कोठारामागे लपून बसला
आहे.”
23लोकांनी धावत जाऊन त्याला तिथून बाहेर आणले.
तो सर्वांच्या घोळक्यात उभा राहिला. सगळ्यांपेक्षा तो उंच
होता. 24शमुवेल तेव्हा सर्व लोकांना उद्देशून म्हणाला,
“परमेश्वराने निवडलेला माणूस पाहा. याच्यासारखा
तुमच्यात कोणीही नाही.”
तेव्हा लोकांनी "राजा चिरायु होवो” म्हणून जयजयकार
केला. 25शमुवेलने राज्याचे सर्व नियम लोकांना समजावून
सांगितले. राजनीतीचा ग्रंथ लिहून परमेश्वरापुढे ठेवला
आणि लोकांना घरोघरी परतायला सांगितले.
26शौलही गिबा येथे आपल्या घरी गेला. शूर सैनिकांना
परमेश्वराकडून प्रेरणा मिळाली आणि त्यांनी शौलचे
अनुयायित्व पत्करले. 27पण काही कुरापती काढणारे
मात्र म्हणालेच, “हा काय आमचे रक्षण करणार?” शौलवर
टीका करत त्यांनी नजराणेही आणले नाहीत. पण शौल
काही बोलला नाही.

## अम्मोन्यांचा राजा नाहाश

अम्मोन्यांचा राजा नाहाश गादी आणि रूबेनी लोकांचा छळ करत होता. त्याने प्रत्येक इस्राएल माणसाचा उजवा डोळा काढला. कोणालाही त्यांच्या मदतीला जाऊ दिले नाही. यार्देन नदीच्या पुर्वेकडील एकाही इस्राएली पुरुषाची यातून सुटका झाली नाही. पण सात हजार इस्राएली माणसे मात्र अम्मोन्यांच्या तावडीतून कशीबशी सुटली आणि याबेश गिलाद येथे आली

11 साधारण महिन्याभरानंतर अम्मोनी राजा नाहाश
याने आपल्या सैन्यासह याबेश गिलादला वेढा दिला.
तेव्हा याबेशच्या लोकांनी नाहाशला निरोप पाठवला की
तू आमच्याशी करार केल्यास तुझ्या आधिपत्याखाली
आम्ही राहू. 2पण नाहाशने उत्तर दिले, “तुम्हा सर्वांचा
उजवा डोळा फोडून इस्राएलची नाचक्की करीन तेव्हाच
तुमच्याशी मी करार करीन.”
3तेव्हा याबेशमधील वडीलधारी मंडळी त्याला म्हणाली,
“आम्हाला सात दिवसाची मुदत दे. तेवढ्या वेळात आम्ही
इस्राएलभर आमचा संदेश देऊन माणसे पाठवतो. आमचा
बचाव करायला कोणीच आले नाही तर आम्ही आपण
होऊन तुझ्या स्वाधीन होऊ.”

## शौल याबेश-गिलादचे रक्षण करतो

4शौल राहात होता तेथे म्हणजे गिबा येथे याबेशचे दूत
येऊन पोचले. त्यांनी लोकांना हे सर्व सांगितले. तेव्हा
लोकांनी रडून आकांत मांडला. 5शौल तेव्हा आपली
गुरे चरायला घेऊन गेला होता. कुरणातून येतांना त्याने
लोकांचा आक्रोश ऐकला. तेव्हा त्याने विचारले, “हे
काय चालले आहे? लोकांना शोक करायला काय
झाले?”
तेव्हा लोकांनी त्याला दूताचे म्हणणे सांगितले. 6शौलने
ते ऐकून घेतले. त्याच वेळी त्याच्यात देवाच्या आत्म्याचा
संचार होऊन तो संतप्त झाला.
7त्याने एक बैलांची जोडी घेऊन तिचे तुकडे तुकडे
केले आणि दूतांना ते इस्राएलच्या सर्व प्रांतात फिरवायला
सांगितले. त्याचबरोबर ही दवंडी पिटायला सांगितली,
“सर्वजण शौल आणि शमुवेल यांच्या पाठीशी राहा.
यात हयगय झाल्यास त्याच्या गुरांचीही अशीच गत
होईल.”
परमेश्वराच्या धास्तीने लोक एकदिलाने एकत्र आले.
8शौलने बेजेक येथे या सर्वांना एकत्र बोलावले. तेथे
इस्राएल मधून तीन लाख आणि यहूदातून प्रत्येकी तीस
हजार माणसे होती.
9या सर्वांनी शौलच्या सुरात सूर मिसळून याबेशच्या
दूतांना सांगितले, “उद्या दुपारपर्यंत तुमच्या बचावासाठी
आम्ही येत आहोत असे याबेश गिलाद मधील लोकांना
सांगा.”
शौलचा हा निरोप दूतांनी पोचवल्यावर याबेशच्या
लोकांमध्ये आनंदी आनंद झाला. 10ते अम्मोनी राजा
नाहाश याला म्हणाले, “उद्या आम्ही तुमच्याकडे येतो मग
आमचे हवे ते कर.
11दुसऱ्या दिवशी सकाळी शौलने आपल्या सैन्याची
तीन गटात विभागणी केली. त्यांच्यासह शौलने दिवस
उजाडताच अम्मोन्यांच्या छावणीत प्रवेश केला. पहारा
बदलत असताना त्यांच्यावर हल्ला केला. दुपार व्हायच्या
आधीच अम्मोन्यांचा त्यांनी पराभव केला. अम्मोनी सैन्याची
दाणादाण उडाली. ते वाट सापडेल तिकडे पळत सुटले.
प्रत्येक जण वेगळ्या दिशेला गेला. कोणी दोन सैनिक
एका ठिकाणी नव्हते.
12एवढे झाल्यावर लोक शमुवेलला म्हणाले, “शौलला
विरोध करणारे, त्याचे राज्य नको असलेले कुठे आहेत
ते लोक? त्यांना आमच्या समोर आणा. त्यांनाही मारून
टाकतो.”
13पण शौल म्हणाला, “नाही आज कोणाचीही हत्या
आता करायची नाही. परमेश्वराने इस्राएलला तारले
आहे.”
14तेव्हा शमुवेल लोकांना म्हणाला, “चला आता आपण
सगळे गिलगाल येथे जाऊ. तेथे पुन्हा नव्याने शौलला
राजा म्हणून घोषित करू.”
15त्याप्रमाणे सर्वजण गिलगाल येथे जमले.
परमेश्वरासामोर त्यांनी शौलला राजा केले.
परमेश्वरासमोर शांत्यर्पणे केली. शौल आणि सर्व इस्राएली
यांनी उत्सव साजरा केला.

## शमुवेलचे राजाबद्दल लोकांसमोर भाषण

12 शमुवेल सर्व इस्राएलांना उद्देशून म्हणाला, “मी
सर्व काही तुमच्या म्हणण्याप्रमाणे केले आहे.
तुमच्यावर राजा नेमला आहे. 2तो आता तुमचे नेतृत्व
करील. मी आता म्हातारा झालो, थकलो पण माझी मुलं
तुमच्या बरोबर आहेत. मी अगदी लहान असल्यापासून
तुमचे नेतृत्व केले. 3हा मी इथे आहे. माझ्या हातून काही
चुकलेले असेल तर ते परमेश्वराला आणि तुम्ही
निवडलेल्या राजाला सांगा. मी कोणाचा बैल किंवा गाढव
चोरले आहे का? कोणाला दुखवले किंवा फसवले का?
कोणाकडून मी कधी पैसाच काय पण जोडा तरी लाच
म्हणून घेतला का? तसे असेल तर मी त्याची भरपाई
करीन.”
4यावर सर्व इस्राएलांनी उत्तर दिले, “नाही तुमच्या हातून
कोणतेही कुकर्म झालेले नाही. तुम्ही कधी आम्हाला
फसवले नाहीत की लाच घेतली नाहीत.”
5तेव्हा शमुवेल सर्वांना म्हणाला, “आज या घटनेला
परमेश्वर आणि त्याने निवडलेला राजा साक्षी आहेत.
तुमचे म्हणणे त्यांनी ऐकले आहे. माझ्याहातून काहीही
वावगे घडले नसल्याचे तुमचे मत त्यांना माहीत आहे.”
तेव्हा लोक एकमताने म्हणाले, “होय! परमेश्वर त्याला
साक्षी आहे.”
6मग शमुवेल म्हणाला, “काय काय घडले ते
परमेश्वराला माहीत आहे. मोशे आणि अहरोन यांना त्यानेच
नेमले. तुमच्या पूर्वजांनाही त्यानेच मिसरमधून सोडवले.
7आता सर्वजण येथे शांत उभे राहा म्हणजे परमेश्वराने
तुमच्यासाठी आणि तुमच्या पूर्वजांसाठी कोणकोणती
सत्कृत्ये केली ती मी तुम्हाला सांगतो.
8याकोब मिसरमध्ये गेल्यावर तेथील लोकांनी त्याच्या
वंशजांचे जिणे कठीण केले तेव्हा त्यांनी परमेश्वराची
करुणा भाकली. म्हणून परमेश्वराने मोशे आणि अहरोन
यांना पाठवले. त्यानी मग त्या तुमच्या पूर्वजांना मिसरमधून
सोडवले आणि या ठिकाणी आणले.
9“पण तुमचे पूर्वज आपला स्वामी जो परमेश्वर त्याला
विसरले. तेव्हा परमेश्वराने त्यांना सीसराचे गुलाम बनू
दिले. सीसरा हा हासोर येथील सैन्याचा सेनापती होता.
त्यानंतर परमेश्वराने त्यांना पलिष्टी आणि मवाबचा राजा
यांचे गुलाम बनवले. हे सर्व तुमच्या पूर्वजांबरोबर घडले.
10तेव्हा तुमच्या पूर्वजांनी परमेश्वराकडे मदतीची याचना
केली. ते म्हणाले, “आमच्या हातून पातक घडले.
परमेश्वराला सोडून बाल, अष्टारोथ या भलत्या दैवतांची
आम्ही भक्ती केली. पण आता आमची शत्रूच्या तावडीतून
सुटका कर म्हणजे आम्ही फक्त तुझीच सेवा करू.”
11“तेव्हा मग परमेश्वराने यरुबाबेल (गिदोन), बदान,
इफताह आणि शमुवेल यांना पाठवून शत्रूंपासून तुमची
सुटका केली. तेव्हा तुम्हाला स्वस्थता लाभली. 12पण मग
अम्मोन्यांचा राजा नाहाश याला तुमच्यावर चाल करून
येताना तुम्ही पाहिले आणि तुम्हाला संरक्षणासाठी राजा
असाव असे वाटले. प्रत्यक्ष परमेश्वर तुमचा देव राजा
असतानाही तुम्हाला असे वाटले. 13तेव्हा तोही तुम्हाला
मिळाला. परमेश्वरानेच त्याची निवड केली. 14परमेश्वर
तुमचे सतत रक्षण करील पण तुम्ही मात्र त्यासाठी खालील
गोष्टी पाळल्या पाहिजेत; सन्मानपूर्वक परमेश्वराची सेवा
करा. त्याच्या आज्ञेविरुध्द जाऊन कोणाशी लढू नका.
तुम्ही व तुमचा राजा यांनी परमेश्वर देवालाच मानावे.
असे वागल्याने परमेश्वर तुमचे रक्षण करील. 15पण
त्याचा अवमान केलात, त्याच्या आज्ञेविरुध्द बंड केलेत
तर तो तुमच्याकडे पाठ फिरवील. तुमचा व तुमच्या राजाचा
नाश करील.
16“आता स्तब्ध उभे राहा आणि परमेश्वराचे महान
कृत्य आपल्या डोळ्यांदेखत पाहा. 17सध्या गव्हाच्या
कापणीचे दिवस* आहेत. मी परमेश्वराची प्रार्थना करतो.
त्याने ढगांच्या गडाडाटासह पाऊस पाडावा अशी मी विनंती
करतो तेव्हा, राजाची मागणी करून आपण परमेश्वराच्या
दृष्टीने दुष्कृत्य केले आहे हे तुम्हाला कळेल.” 18आणि
शमुवेलने परमेश्वराची प्रार्थना केली. त्याच दिवशी
मेघगर्जनेसह जोरदार वृष्टी झाली. त्यामुळे लोकांनी
परमेश्वराची आणि शमुवेलची धास्ती घेतली.
19ते शमुवेलला म्हणाले, “आम्हा दासांच्या वतीने तुम्ही
परमेश्वराची प्रार्थना करा. आम्हाला मरू देऊ नका.
आमच्या हातून अनेक पातके घडली आहेत. राजाची
मागणी करून तर आम्ही त्यात आणखी भरच घातली
आहे.”
20शमुवेल त्यांना म्हणाला, “तुमच्या हातून पापे घडली
आहेत हे खरे पण घाबरून जाऊ नका. परमेश्वराला
अनुसरायचे सोडू नका. मनोभावे त्याची सेवा करा. 21मूर्ती
म्हणजे निरर्थक वस्तू. निव्वळ पुतळे. तेव्हा त्यांची पूजा
करू नका. मूर्ती तुमचे रक्षण करत नाहीत की मदतीला
येत नाहीत. त्या व्यर्थ होत.
22“पण परमेश्वर आपल्या लोकांचा त्याग करत नाही.
उलट त्याने मोठ्या प्रेमाने तुम्हाला आपले मानले आहे.
तेव्हा त्याच्या मोठ्या नावाखातर तो तुम्हाला सोडून देणार
नाही. 23आणि माझे म्हणाल, तर मी तुमच्या वतीने नेहमीच
प्रार्थना करत राहीन. तसे मी केले नाही तर परमेश्वराच्या
दृष्टीने ते मोठे पाप ठरेल चांगले आयुष्य जगायचा योग्य
मार्ग मी तुम्हाला दाखवत राहीन. 24पण तुम्ही परमेश्वराला
मानले पाहिजे. मनापासून त्याचीच सेवा केली पाहिजे.
त्याने तुमच्यासाठी जे चमत्कार केले ते आठवले पाहिजेत.
25पण तुम्ही आडमुठेपणा आणि दुष्टपणा दाखवलात तर
मात्र केरसुणीने केर झटकावा तसा, तुम्हाला तुमच्या
राजासह परमेश्वर नष्ट करून टाकील.”

---

**गव्हाच्या कापणीचे दिवस** या दिवसात पाऊस नसतो पाऊस पडल्यास नुकसान होते.

## शौलची पहिली चूक

13 आता शौलला राजा होऊन वर्ष झाले होते.
इस्राएलवरील त्याच्या सत्तेला दोन वर्षे झाल्यावर *
2त्याने इस्राएलमधून तीन हजार माणसे निवडली. त्यापैकी दोन हजार मिखमाश येथे त्याच्या बरोबर बेथेलच्या डोंगराळ प्रदेशात राहिली. हजार जण योनाथान बरोबर बन्यामीनमधील गिबा येथे राहिले. सैन्यातील इतर सर्वांना त्याने घरोघरी पाठवले.

3गिबा येथील छावणीतील पलिष्ट्यांचा योनाथानने पराभव केला. ते पलिष्ट्यांच्या सेनापतीच्या कानावर गेले. ते म्हणाले, "इब्री लोकांनी बंड केले आहे."

शौल म्हणाला, "नेमके काय घडले ते इब्रींना ऐकू द्या" आणि त्याने आपल्या लोकांना इस्राएलभर रणशिंग फुंकून ही बातमी सांगायला सांगितली.
4सर्व इस्राएलांच्या हे कानावर आले. त्यांना वाटले, "शौलने पलिष्ट्यांच्या नेत्याला मारले. तेव्हा पलिष्ट्यांना आता इस्राएलांबद्दल द्वेष वाटतो."

सर्व इस्राएलांना गिलगाल येथे शौलजवळ एकत्र जमायचा निरोप गेला.
5इस्राएलांशी सामना करायला पलिष्टे ही सिध्द झाले. पलिष्ट्यांचा सेनासागर किनाऱ्यावर जेवढे वाळूचे कण असतील तेवढे सैनिक त्यांच्याकडे होते. सेनासागर विशाल होता. त्यांच्याकडे तीन हजार रथ* आणि सहा हजारांचे घोडदळ होते. त्यांनी बेथ-आवेनच्या पूर्वेला मिखमाश येथे तळ दिला.

6आता आपण संकटात सापडले आहोत, पुरते पलिष्ट्यांच्या कचाट्यांत सापडलो आहोत हे इस्राएलांच्या लक्षात आले. ते गुहांमध्ये आणि खडकांच्या कपारीत लपून बसले. विवरं, विहिरी यात त्यांनी आश्रय घेतला.
7काही तर यार्देन नदी पलीकडे गाद, गिलाद या प्रांतात पळाले. शौल या वेळी गिलगाल येथेच होता. त्याच्या सैन्याचा भीतीने थरकाप उडाला होता.

8शमुवेलने गिलगाल येथे भेटतो असे शौलला सांगितले होते. त्याप्रमाणे शौलने सात दिवस त्याची वाट पाहिली. पण शमुवेल पोचला नाही तेव्हा सैन्य शौलला सोडून जायला लागले.
9तेव्हा शौल म्हणाला, "होमार्पणे आणि शांत्यर्पणे आणून द्या." ती आणल्यावर शौलने यज्ञार्पणे केली.
10त्याचे हे आटोपते आहे तोच शमुवेल तेथे पोचला. शौल त्याला भेटायला पुढे झाला.

11शमुवेलने विचारले, "तू काय केलेस?" शौल म्हणाला, "माझे सैन्य पांगले. तुम्हीही दिलेल्या वेळेत आला नाहीत. पलिष्ट्यांची सेना मिखमाश येथे जमली.
12तेव्हा मी विचार केला, पलिष्टी इथे गिलगाल मध्ये येऊन माझ्यावर हल्ला करतील आणि मी तर अजून परमेश्वराला मदतीचे आवाहनही केले नाही. तेव्हा मी हे होमार्पण करण्याचे धाडस केले आहे."

13शमुवेल म्हणाला, "तुझा हा मूर्खपणा आहे. परमेश्वर तुझा देव याची आज्ञा तू पाळली नाहीस. त्याचे म्हणणे ऐकले असतेस तर इस्राएलवर तुझ्या वंशाचे राज्य निरंतर राहिले असते.
14पण आता तुझे राज्य सतत राहाणार नाही. परमेश्वराला त्याचा शब्द मानणारा माणूस हवा आहे आणि तसा तो मिळाला आहे. तो आता नवा नेता बनेल. तू परमेश्वराची अवज्ञा केलीस म्हणून त्याने नवीन अधिपती नेमला आहे." आणि शमुवेल गिलगाल सोडून चालता झाला.

## मिखमाश येथे युद्ध

15शौल आपल्या उर्वरित सैन्यासह गिलगाल सोडून बन्यामीन मधील गिबा येथे गेला. त्याने बरोबरची माणसे मोजली. ती जवळपास सहाशे भरली.
16आपला मुलगा योनाथान आणि हे सैन्य यांसह तो गिबा येथे राहिला. मिखमाश येथे पलिष्ट्यांचा तळ होता.
17त्यांनी त्या भागातील इस्राएल रहिवाश्यांना धडा शिकवायचे ठरवले आणि निवडक सैन्याने हल्ला सुरु केला. पलिष्ट्यांच्या सैन्याच्या तीन तुकडया होत्या. पहिली तुकडी उत्तरेला अफ्राच्या वाटेने शुवाल जवळ गेली.
18दुसरी बेथ-होरोनच्या वाटेने आग्नेय दिशेला गेली आणि तिसरी टोळी वाळवंटाच्या दिशेला असलेल्या सबोईम दरी कडील वाटेने गेली.

19इस्राएलमध्ये लोहार नव्हते. त्यामुळे त्यांना लोखंडाच्या वस्तू करता येत नसत. पलिष्ट्यांनीही त्यांना ही विद्या शिकवली नाही कारण ते लोखंडी भाले, तलवारी करतील ही त्यांना धास्ती होती.
20पलिष्टी फक्त त्यांना धार लावून देत असत. तेव्हा इस्राएलांना फाळ, कुदळी, कुऱ्हाडी यांना धार लावायची असेल तेव्हा ते पलिष्ट्यांकडे जात.
21फाळ आणि कुदळीला धार लावण्यासाठी पलिष्टी लोहार 1/3 औंस रुपे घेत तर कुऱ्हाडी, दाताळे, अरी, पराण्या यांना धार लावायचा आकार 1/6 औंस रुपे एवढा होता.
22अशाप्रकारे युद्धाच्या दिवशी शौलच्या सैन्यातील एकाच्याही जवळ तलवार किंवा भाला नव्हता. शौल आणि त्याचा मुलगा योनाथान यांच्याजवळ तेवढी लोखंडी हत्यारे होती.

23पलिष्टी सैन्याच्या एका तुकडीने मिखमाशची खिंड रोखून धरली होती.

## योनाथानचा पलिष्ट्यांवर हल्ला

14 त्यादिवशी शौलचा मुलगा योनाथान आपल्या शस्त्रवाहक तरुण सेवकाला म्हणाला, "चल, आपण खिंडीपलीकडील पलिष्ट्यांच्या छावणीकडे जाऊ.

---

**आता शौलला ... वर्षे** झाल्यावर दुसरा अर्थ असा, "शौल राजा झाला तेव्हा 1 वर्षाचा होता. त्याने 2 वर्षे राज्य केले" हिब्रूमधील हा भाग अर्थ लावण्याच्या दृष्टीने अतिशय अवघड आहे. कदाचित् यातील आकडे वेगळे असू शकतील. प्राचीन ग्रीक अनुवादात हा भाग नाही.

**तीन हजार रथ** हिब्रू प्रमाणे "तीस हजार."

आपल्या वडीलांना मात्र त्याने हे सांगितले नाही.” 2शौल
तेव्हा गिबाच्या सीमेपाशी मिग्रोन येथील डाळिंबाच्या
झाडाखाली बसला होता. जवळच धान्याचे खळे होते. शौल
सोबत सहाशे माणसे होती. 3त्यातील एकाचे नाव अहीया.
शिलो येथे एली म्हणून परमेश्वराचा याजक होता. त्याच्या
जागी आता हा होता. अहीयाने एफोद घातला होता.
ईखाबोदचा भाऊ अहीदूब याचा हा मुलगा. ईखाबोद
फिनहासचा आणि फिनहास एलीचा मुलगा. योनाथान निघून
गेला हे लोकांना माहीत नव्हते.

4खिंडीच्या दोन्ही बाजूला मोठमोठे सुळके होते. योनाथानने
त्यांच्या मधून
पलिष्ट्यांच्या ठाण्यावर जायचे ठरवले. एका
सुळक्याचे नाव बोसेस व दुसऱ्याचे सेने असे होते. 5एक
सुळका उत्तरेला मिखमाशच्या दिशेने तर दुसरा
दक्षिणेला गिबाकडे वळलेला होता. 6योनाथान आपल्या
शस्त्रवाहक सेवकाला म्हणाला, “चल त्या परकीयांच्या
ठाण्यावर जाऊ. कदाचित परमेश्वर आपल्या हातून
त्यांचा पराभव करील. सैन्य कमी की जास्त याचा
परमेश्वराला काय फरक पडतो?” 7तेव्हा तो सेवक
म्हणाला, “तुम्ही म्हणाल तसे करू. मी आपल्याबरोबरच
आहे.”

8योनाथान म्हणाला, “चल तर! ही खिंड ओलांडून
त्यांच्या पहारेकऱ्यांपर्यंत जाऊ. त्यांना आपल्याला पाहू दे.
9‘आहात तिथेच थांबा, आम्ही तेथे येतो’ असे ते म्हणाले
तर आपण तिथेच थांबू. आपण पुढे जायचे नाही. 10पण
त्यांनी पुढे यायला सांगितले तर मात्र पुढे व्हायचे. तसे
झाले तर ती देवाची खूण समजायची. याचा अर्थ असा की
त्यांचा पराभव करण्याची परमेश्वराने आपणास मुभा दिली
आहे.”

11हे दोघे, पलिष्टी सैनिकांच्या नजरेच्या टप्प्यात
आले. ते सैनिक म्हणाले, “पाहा, ते बिळात लपून
राहिलेले इब्री आता बाहेर पडत आहेत.” 12त्या
छावणीतील पलिष्ट्यांनी या दोघांना “वर या म्हणजे चांगला
धडा शिकवतो” असे धमकावले. योनाथान आपल्या
सेवकाला म्हणाला, “चल माझ्या मागोमाग. परमेश्वर
आता आपल्या हातून पलिष्ट्यांना नेस्तनाबूत
करील.”

13-14योनाथान मग हाता पायांनी आधार घेत घेत तो
कडा चढून गेला. त्याचा सेवक त्याच्या पाठोपाठ होताच.
दोघांनी मिळून पलिष्ट्यांवर हल्ला चढवला. त्यांनी त्या
एक बिघा जमिनीवर पहिल्या चढाईत वीसजणांना ठार
केले. समोरुन येणाऱ्यांवर योनाथानने हल्ला केला आणि
त्यात जखमी झालेल्यांना योनाथानच्या सेवकाने मागोमाग
येऊन ठार केले.

15तेव्हा छावणीत, शेतात, किल्ल्यावर पसरलेल्या
सर्व पलिष्ट्यांमध्ये घबराट पसरली. चांगल्या शूर
सैनिकांनीही धास्ती घेतली. त्यांच्या पायाखालची
भूमी कंपायमान झाली आणि पलिष्टी भयभीत
झाले.

16इकडे बन्यामीनच्या भूमीतील गिबा येथे असलेल्या
शौलच्या रक्षकांनी पलिष्ट्यांना सैरावैरा पळताना पाहिले.
17शौल आपल्या रक्षकांना म्हणाला, “आपली माणसे मोजा.
कोण छावणी सोडून गेले ते पाहू.”

मोजणीतून योनाथान आणि त्याचा सेवक गेल्याचे लक्षात
आले.

18शौल अहीयाला म्हणाला, “परमेश्वराचा
पवित्रकराराकोश आण” (त्यावेळी देवाचा हा पवित्र
करारकोश इस्राएलांजवळ होता.) 19अहीयाशी बोलत
असताना शौल परमेश्वर काही सल्ला देईल म्हणून वाट
पाहात होता. इकडे पलिष्ट्यांच्या ठाण्यावरील गलबला व
गोंधळ वाढत चालला. शौलचा धीर सुटत चालला. शेवटी
तो याजक अहीया याला म्हणाला, “आता प्रार्थना पुरे. तु
थांब.”

20शौलने सैन्य जमा केले आणि तो युद्धाला भिडला.
पलिष्ट्यांची आता दाणादाण उडाली. इतकी की ते
आपापसातच लढू लागले. 21पूर्वी पलिष्ट्यांचे सेवक
असलेले काही इब्री सध्या पलिष्ट्यांच्या छावणीत होते. ते
आता शौल आणि योनाथान यांना जाऊन मिळाले.
22एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशात दडून राहिलेल्या इस्राएलांनी
पलिष्ट्यांच्या पलायनाची बातमी ऐकली. तेव्हा तेही युद्धात
उतरले आणि त्यांनी पलिष्ट्यांचा पाठलाग सुरु केला.

23अशाप्रकारे परमेश्वराने त्यादिवशी इस्राएलांचा बचाव
केला. युद्ध बेथ–आवेन कडे सरकले. जवळ जवळ दहा
हजाराचे सर्व सैन्य शौलच्या पाठीशी होते. एफ्राईमच्या
डोंगराळ परदेशातील सर्व नगरांमध्ये युद्ध पसरले.

## शौलची दुसरी चूक

24पण शौलच्या हातून त्या दिवशी मोठी चूक झाली.
सर्व इस्राएल लोक दमले भागलेले आणि भुकेले होते.
शौलने त्यांच्याकडून सक्तीने एक शपथ घेतली होती.
“संध्याकाळ व्हायच्या आत आणि शत्रूचा पाडाव करण्यापूर्वी
कोणी काही खाल्ले तर त्याला शासन होईल,” अशा त्या
शपथेमुळे कोणीही अन्नग्रहण केले नव्हते.

25-26लढत लढत लोक रानात शिरले. तिथे त्यांना
जमिनीवर मधाचे पोळे दिसले पण ते पाहूनही लोकांनी
त्यातील मधाला हात लावला नाही कारण शपथेचा धाक
त्यांच्या मनात होता. 27आपल्या वडीलांनी सर्वांना
बळजबरीने अशी शपथ घ्यायला लावली आहे याबद्दल
योनाथानला काहीच माहीत नव्हते. तेव्हा त्याने आपल्या
हातातील काठी पोळ्यात खुपसली आणि मध काढला.
थोडा मध खाल्ल्यावर त्याला चांगली तरतरी आली.

28एक सैनिक योनाथानला म्हणाला, “तुमच्या वडीलांनी
लोकांना शपथ घालून बजावले आहे की आज कोणी

काही खाल्ले तर त्याला शाप लागेल. म्हणून लोकांनी
काही खाल्लेले नाही. ते भुकेने व्याकुळ झाले आहेत.”
29योनाथान म्हणाला, “माझ्या वडीलांनी देशावर खूप संकटे
आणली आहेत. थोडासा मध खाताच मला पाहा कसे
ताजेतवाने वाटू लागले! 30लोकांनीही शत्रूच्या लूटीतून
थोडे खाल्ले असते तर बरे झाले असते. आपण यापेक्षा
जास्त पलिष्ट्यांना गारद करू शकलो असतो.”

31मिखमाशपासून अयालोन पर्यंत पलिष्ट्यांचा पाडाव
करता करता इस्राएल लोक फार थकून गेले होते. ते
भुकेलेही होते. 32त्यांनी पलिष्ट्यांची मेंढरे गुरे, वासरे लुटून
आणली होती. आता ते भुकेने इतके कासावीस झाले होते
की त्यांनी ती गुरे तिथेच जमिनीवर मारुन खाल्ली. त्यांचे
रक्तसुद्धा चाटले.

33तेव्हा एक जण शौलला म्हणाला, “पाहा, हा
परमेश्वराच्या दृष्टीने अपराध आहे. ही माणसे तर
रक्तासकट मांस खात आहेत.”

शौल म्हणाला, “तुम्ही पाप केले आहे. आता एक मोठा
दगड लोटून येथे आणा.” 34पुढे तो म्हणाला, “जा, त्या
लोकांना जाऊन सांगा की प्रत्येकाने बैल मेंढरे
माझ्यासमोर आणावी आणि मगच त्यांनी ती इथे कापावी.
असे पाप करू नका. रक्ताने भरलेले मांस खाऊ
नका.”

मग सर्वांनी आपापली जनावरे तेथे आणली आणि
मारली. 35तेव्हा शौलने स्वत:हून परमेश्वरासाठी वेदी
बांधली.

36तो म्हणाला, “आज रात्री आपण पलिष्ट्यांवर हल्ला
करू. त्यांचे सर्व हिरावून घेऊन त्या सर्वांना कापून काढू.”

सर्व सैन्याने त्याच्या म्हणण्याला साथ दिली.

पण याजक म्हणाला, “आपण परमेश्वराचा कौल मागू.”

37म्हणून शौलने परमेश्वराला विचारले, “आम्ही आज
पलिष्ट्यांवर चालून जाऊ का? तू आम्हाला त्यांचा पराभव
करू देशील का?” पण त्यादिवशी परमेश्वराने शौलला
उत्तर दिले नाही.

38तेव्हा शौल म्हणाला, सर्व अधिकाऱ्यांना,
लोकनायकांना माझ्यासमोर बोलवा. आज कोणाच्या हातून
पाप घडले आहे ते पाहू. 39इस्राएलला तारणाऱ्या
परमेश्वराची शपथ घेऊन मी सांगतो की अगदी माझा
पोटचा मुलगा योनाथान याच्याहातून अपराध घडला असेल
तरी त्याला देहान्त शासन होईल.” यावर कोणीही चकार
शब्द ही काढला नाही.

40मग शौल सर्व इस्राएलांना म्हणाला, “तुम्ही सर्व एका
बाजूला उभे राहा. मी आणि माझा मुलगा योनाथान दुसऱ्या
बाजूला होतो.”

सर्वांनी ते मानले.

41मग शौलाने प्रार्थना केली, “इस्राएलच्या परमेश्वरा,
देवा, आज तू माझी प्रार्थना का ऐकली नाहीस? मी किंवा
माझा मुलगा योनाथान याच्या हातून पाप घडले असेल तर
उरीम टाक आणि लोकांच्या हातून पाप घडले असेल तर
थुम्मीम टाक”

शौल आणि योनाथानच्या नावाने दान पडले आणि
लोक सुटले. 42शौल म्हणाला, “पुन्हा त्या टाका व दाखवा
की मी व माझा मुलगा योनाथान पैकी कोण दोषी आहे.”
मग योनाथान पकडला गेला.

43शौल त्याला म्हणाला, “तू काय केलेस ते सांग.”

योनाथान म्हणाला, “काठीच्या टोकावर मावेल एवढाच
मध तेवढा मी चाखला त्यासाठी मी प्राणार्पण करायला हवे
का?”

44शौल म्हणाला, “माझा शब्द पाळला गेला नाही तर
शासन करायला मी परमेश्वराला सांगितले आहे. तेव्हा
तुला मेलेच पाहिजे.”

45पण सर्व सैनिक शौलला म्हणाले, “योनाथानने आज
इस्राएलकडे विजय खेचून आणला आहे. तेव्हा त्याने मेलेच
पाहिजे का? खाचितच नाही. आम्ही परमेश्वरापुढे शपथ
घेऊन सांगतो की त्याच्या केसालाही धक्का लागणार नाही.
पलिष्ट्यांविरुद्ध लढायला परमेश्वराने योनाथानला मदत
केली आहे.” अशाप्रकारे लोकांनी योनाथानला वाचवले.
त्याला मृत्यूची सजा झाली नाही.

46शौलने पलिष्ट्यांचा पाठलाग केला नाही. पलिष्टी
आपल्या जागी परतले.

## शौलचा इस्राएलच्या शत्रूंशी लढा

47शौलने सर्व अधिकार आपल्या हाती घेऊन राज्य
स्थापित केले. मवाबी, अम्मोनी, अदोमी, सोबाचे राजे,
पलिष्टी इत्यादी इस्राएलच्या भोवतालच्या सर्व शत्रूशी युद्ध
केले. शौल जेथे जेथे गेला तेथे तेथे त्यांने शत्रूंचा पाडाव
केला. 48पराक्रम गाजवला. इस्राएलांची लूट करणाऱ्या
सर्व शत्रूंपासून इस्राएलांची सुटका केली. अमालेकांचाही
त्याने पराभव केला.

49योनाथान, इश्वी, आणि मलकीशुवा हे शौलचे मुलगे.
शौलच्या मोठ्या मुलीचे नाव मेरब आणि धाकटीचे मीखल.
50अहीनवाम ही त्याची पत्नी. ती अहीमासची मुलगी.

शौलचा काका नेर याचा मुलगा अबनेर त्याचा सेनापती
होता. 51शौलचे वडील कीश आणि काका नेर. ही
अबियेलची मुले.

52शौलने आयुष्यभर पराक्रम गाजवले. पलिष्ट्यांचा
त्याने कडवा प्रतिकार केला. त्याला कुठेही शूर, पराक्रमी
माणूस आढळला की त्याला तो सैनिकात भरती करून
घेई आणि अंगरक्षक म्हणून नेमी.

## शौल अमालेकांना नेस्तनाबूत करतो

15 एक दिवस शमुवेल शौलला म्हणाला, “इस्राएलचा
राजा म्हणून तुला राज्याभिषेक करायला
परमेश्वराने मला पाठवले. आता परमेश्वर काय म्हणतो
ते ऐक. 2सर्व शक्तिमान परमेश्वराचे म्हणणे आहे. “इस्राएल

लोक मिसर मधून बाहेर पडले तेव्हा अमालेकींनी त्यांना
कनानच्या वाटेवर अडवले. अमालेक्यांचे हे कृत्य मी
पाहिले आहे. 3तेव्हा आता त्यांच्याशी जाऊन लढ. त्यांचा
आणि त्यांच्या मालमत्तेचा पूर्णपणे बीमोड कर. काहीही
शिल्लक ठेवू नकोस. पुरुष, बायका, मुले, अगदी तान्ही
बाळेसुध्दा मारून टाक. त्याची गुरे, मेंढरे, उंट, गाढवे या
सर्वांचा संहार कर."
4तलाईम येथे शौलने सर्व सैन्याची जमवाजमव केली.
दोन लाखांचे पायदळ आणि यहूदातील दहा
हजार माणसे त्यात होती. 5मग शौल अमालेक
नगरापाशी जाऊन एका खोऱ्यात दबा धरून
बसला. 6केनी लोकांना तो म्हणाला, "तुम्ही अमालेक्यांची
संगत सोडून दूर निघून जा, म्हणजे मग आम्ही अमलेक्यांच्या
बरोबर तुमचा नाश करणार नाही. कारण मिसरमधून
इस्राएल बाहेर पडले तेव्हा तुम्ही त्यांच्याशी प्रेमाने वागला
होता." तेव्हा केनी लोक अमालेक्यांना सोडून निघून गेले.
7शौलने अमालेक्यांचा पराभव केला. हवीलापासून
मिसरच्या हद्दीजवळच्या शूरपर्यंत त्याने अमालेक्यांचा
पाठलाग केला. 8अगाग हा अमालेक्यांचा राजा होता.
त्याला शौलने ताब्यात घेतले. त्याला जिवंत ठेवून बाकी
अमालेकी लोकांना त्याने कापून आणले. 9सर्वच गोष्टींचा
संहार करायचे शौलच्या आणि त्याच्या सैन्याच्या जिवावर
आले. म्हणून त्यांनी अगागला जिवंत ठेवले. तसेच धष्टपुष्ट
गुरे, उत्तम मेंढरे, कोकरे आणि काही चांगल्या ठेवण्यायोग्य
गोष्टी त्यांनी ठेवल्या. जे टाकाऊ आणि कुचकामी त्याचा
नाश केला.

## शमुवेल शौलला त्याच्या पापांची जाणीव करून देतो

10यानंतर शमुवेलला परमेश्वरा कडून संदेश आला.
11परमेश्वर त्याला म्हणाला, "शौल आता मला अनुसरत
नाही. त्याला राजा केले याचे मला दु:ख होते. माझ्या
सांगण्याप्रमाणे तो आता वागत नाही. शमुवेलला हे ऐकून
फार खेद वाटला. रात्रभर त्याने अश्रू ढाळत परमेश्वराची
प्रार्थना केली.
12दुसऱ्या दिवशी पहाटे लौकर उठून तो शौलला
भेटायला गेला. पण तिथे गेल्यावर त्याला कळले की
शौल यहूदातील कर्मेल येथे गेला आहे. तिथे स्वत:च्या
सन्मानार्थ एक दगडी स्तंभ उभारून अनेक गावे फिरून
तो गिलगाल येथे येणार आहे.
तेव्हा शौल होता त्या ठिकाणी शमुवेल गेला. तिथे
अमालेक्याच्या लुटीतील पहिला भाग परमेश्वरा साठी
शौलने नुकताच यज्ञात अर्पण केला होता.
13शमुवेल शौलजवळ पोचला तेव्हा शौलने त्याला
अभिवादन केले. तो म्हणाला, "परमेश्वर तुमचे कल्याण
करो. मी परमेश्वराच्या आज्ञेत आहे." 14तेव्हा शमुवेल
म्हणाला, "मग मला हा कसला आवाज ऐकायला येत
आहे? शेरडामेंढरांचे केकारणे आणि गुरांचे हंबरणे याचा
अर्थ काय?" 15शौल म्हणाला, "सैनिकांनी ती गुरे
अमालेक्यांकडून लुटीत आणली आहेत. प्रभु
परमेश्वरासाठी यज्ञ अर्पण करायला म्हणून त्यांनी उत्तमोत्तम
गुरेमेंढरे बाजूला ठेवली आहेत. बाकीच्या सगळ्याचा मात्र
आम्ही संहार केला."16यावर शमुवेल शौलला म्हणाला,
"बस्स कर! काल रात्री परमेश्वर माझ्याशी काय बोलला
ते सांगतो."
शौल म्हणाला, "बरे तर, सांगा."
17शमुवेल सांगायला लागला, "पूर्वी तू स्वत:ला मोठा
समजत नव्हतास. पण तू सर्व इस्राएलांचा प्रमुख बनलास.
परमेश्वराने तुला राजा म्हणून नेमले. 18परमेश्वराने तुला
विशेष कामगिरीवर पाठवले. तो म्हणाला, 'सर्व
अमालेक्यांचा संहार कर. ते नीच असल्याने त्यांना शिल्लक
ठेवू नको. त्यांची नावनिशाणीही उरू देऊ नको. 19पण तू
परमेश्वराचे ऐकले नाहीस. तुला या गोष्टी ठेवायच्या होत्या
म्हणून परमेश्वराने जे करू नको म्हणून सांगितले ते तू
केलेस.'"
20शौल म्हणाला, "पण मी तर परमेश्वराची आज्ञा पाळली
आहे. त्याने पाठवले तिकडे मी गेलो. सर्व अमालेक्यांना
नष्ट केले. राजा अगाग याला तेवढे मी परत आणले.
21आणि सैनिकांनी जी निवडक गुरेमेंढरे घेतली ती गिलगाल
येथे यज्ञात तुमचा देव परमेश्वर ह्याला अर्पण करण्यासाठी."
22पण शमुवेल म्हणाला, "परमेश्वर जास्त प्रसन्न
कशामुळे होईल? यज्ञ आणि होमार्पणे देऊन की त्याच्या
आज्ञा पाळल्याने? त्याच्यासाठी यज्ञ करण्यापेक्षा
परमेश्वराची आज्ञा पाळणे केव्हाही श्रेयस्कर. मेंढराची
चरबी त्याला वाहण्यापेक्षा त्याचे ऐकणे चांगले.
23परमेश्वराची अवज्ञा करणे हे जादूटोण्याची पाप करण्या
इतकेच वाईट. आडमुठेपणाने आपल्याला हवं ते करणं हे
मूर्तिपूजेसारखंच पातक आहे. तू परमेश्वराचा आज्ञाभंग
केलास. तेव्हा परमेश्वरालाही तू राजा असणे आता मान्य
नाही."
24तेव्हा शौल शमुवेलला म्हणाला, "माझ्या हातून पाप
झाले आहे. मी परमेश्वराचे वचन पाळले नाही. तुम्ही
सांगितले तसे वागलो नाही. लोकांचा मला धाक वाटला
आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी वागलो. 25पण आता या
पापाबद्दल मला क्षमा करा. मी तुम्हाला ही विनवणी करतो.
माझ्या बरोबर चला. मी परमेश्वराची उपासना करीन."
26पण शमुवेल म्हणाला, "मी आता तुझ्याबरोबर परत
येणार नाही. तू परमेश्वराचा शब्द मोडलास तेव्हा
परमेश्वरही तुला इस्राएलच्या राजेपदावरून झुगारून देत
आहे."
27एवढे बोलून शमुवेल जायला निघाला तेव्हा शौलने
त्याच्या अंगरख्याचे टोक धरून त्याला थोपवायचा प्रयत्न
केला. यात अंगरखा फाटला. 28शमुवेल म्हणाला, "तू हा

अंगरखा फाडलास तसे इस्राएलचे राज्य तुझ्याकडून
परमेश्वराने हिसकावून घेतले आहे. तुझ्याच एका मित्राकडे
ते सोपवले आहे. तो तुझ्या पेक्षा भला आहे. 29परमेश्वर
इस्राएलचा देव असून तो सर्वकाळ आहे. परमेश्वर आपला
शब्द फिरवत नाही की विचार बदलत नाही. माणसासारखा
तो चंचल नव्हे." 30शौल म्हणाला, "ठीक आहे माझ्याहातून
पाप झाले आहे. पण कृपाकरून माझ्या बरोबर परत
चल. इस्राएलचे लोक आणि अधिकारी मंडळी यांच्यासमोर
माझा अवमान करू नको. तू बरोबर चल. मग मी प्रभु
परमेश्वराची उपासना करतो."
31शमुवेल त्या प्रमाणे शौलबरोबर गेला. शौलने
परमेश्वराची उपासना केली.
32शमुवेल म्हणाला, "आता अमालेक्यांचा राजा अगाग
याला माझ्या समोर आणा."
अगाग आला. त्याला साखळदंडांनी बांधले होते. त्याला
वाटले, "हा काही आपला जीव घेणार नाही."
33पण शमुवेल अगागला म्हणाला, "तुझ्या तलवारीने तू
मुलांना आई वेगळे केलेस. आता तुझ्या आईची गतीही
तशीच होईल." आणि त्याने गिलगाल येते परमेश्वरासमोर
अगागचे तुकडे तुकडे केले.
34मग शमुवेल तिथून निघाला. तो रामा येथे गेला.
शौल आपल्या गिबा येथील घरी परतला. 35पुढे आयुष्यभर
शमुवेलला शौलचे दर्शन झाले नाही. शौलबद्दल त्याला
फार वाईट वाटले. शौलला इस्राएलचा राजा केल्याबद्दल
परमेश्वरालाही खेद झाला.

## शमुवेल बेथलहेमला जातो

16 परमेश्वर शमुवेलला म्हणाला, "शौलसाठी तू
किती दिवस शोक करत बसणार आहेस? राजा
म्हणून मी त्याला झिडकारले तरी तू त्याच्याबद्दल वाईट
वाटून घेत आहेस? आपल्या शिंगात तेल भरून घे आणि
बेथलहेमला जायला नीघ. तुला मी इशाय नावाच्या
माणसाकडे पाठवतो. इशाय बेथलहेमला राहतो. त्याच्या
एका मुलाची मी राजा म्हणून निवड केली आहे."
2तेव्हा शमुवेल म्हणाला, "मी कसा जाऊ? ही गोष्ट
शौलने ऐकली तर तो माझा जीव घ्यायचा प्रयत्न करील."
परमेश्वर त्यावर त्याला म्हणाला, "तू बेथलहेमला जायला
नीघ, बरोबर एक वासरू घे. "मी परमेश्वराला यज्ञ
करायला चाललो आहे" असे म्हण.
3इशायला यज्ञासाठी बोलाव. मग मी काय करायचे ते
सांगीन. मी सांगेन त्या व्यक्तीला अभिषेक कर."
4शमुवेलने मग परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे केले. तो
बेथलहेम येथे आला. तेव्हा तेथील वडीलधाऱ्यांना धास्ती
वाटली. ते शमुवेलला भेटले. "आपली ही सलोख्याचीच
भेट आहे ना", असे त्यांनी शमुवेलला विचारले.
5शमुवेल म्हणाला, "होय, मी स्नेहभावाने आलो आहे.
मला परमेश्वरासाठी यज्ञ करायचा आहे. तयारीला लागा
आणि माझ्याबरोबर यज्ञासाठी या." शमुवेलने इशायला व
त्याच्या मुलांना तयार केले. त्यांनाही यज्ञात आमंत्रित
करून त्यात भाग घ्यायला सांगितले.
6इशाय आणि त्याची मुले आली तेव्हा शमुवेलने
अलियाबला पाहिले. शमुवेलला वाटले, "हाच तो
परमेश्वराने निवडलेला माणूस!"
7तेव्हा परमेश्वर शमुवेलला म्हणाला, "अलियाब
उंचापुरा आणि देखणा आहे. पण रूपावर जाऊ नको.
परमेश्वराची नजर माणसांसारखी नसते. तुम्ही बाह्यरूपाला
भाळता पण परमेश्वर अंतरंग पाहतो. अलियाब ही योग्य
व्यक्ती नव्हे."
8मग इशायने आपला दुसरा मुलगा अबीनादाब याला
बोलावले. तो शमुवेल समोरुन गेला. शमुवेल म्हणाला,
"हीही परमेश्वराची निवड नव्हे."
9मग इशायने शम्माला शमुवेलच्या समोर यायला
सांगितले. तेव्हाही शमुवेल म्हणाला, "हाही तो नव्हे."
10इशायने आपल्या सातही मुलांना शमुवेल पुढे हजर
केले. पण शमुवेल म्हणाला, "यापैकी कोणालाही
परमेश्वराने निवडलेले नाही."
11त्याने पुढे इशायला विचारले, "इथे तुझी सगळी मुलं
हजर आहेत ना?" इशाय म्हणाला, "नाही आणखी एक
आहे सगळ्यात धाकटा तो रानात मेंढरे राखायला गेला
आहे."
शमुवेल म्हणाला, "त्याला बोलावणे पाठवून इथे आण.
तो येईपर्यंत आपण जेवायला सुरुवात करायची नाही.
12इशायने मग कोणालातरी पाठवून आपल्या धाकट्या
मुलाला यायला सांगितले. तो अतिशय देखणा, तांबूस वर्णाचा
तरुण होता. परमेश्वर आता शमुवेलला म्हणाला, "ऊठ
आणि याला अभिषेक कर. हाच तो."
13शमुवेलने आपले तेलाने भरलेले शिंग उचलले आणि
इशायच्या या धाकट्या मुलावर सर्व भावंडांसमोर त्या
खास तेलाने अभिषेक केला. तेथून पुढे दावीदवर
परमेश्वराच्या आत्म्याचा जोरदार संचार होऊ लागला.
एवढे झाल्यावर शमुवेल रामा येथे परतला.

## शौलला दुष्ट आत्म्याचा त्रास

14इकडे परमेश्वराच्या आत्म्याने शौलची साथ सोडली.
परमेश्वराने पाठवलेला एक दुरात्मा त्याला त्रस्त करू
लागला. 15शौलचे नोकर त्याला म्हणाले "हा
परमेश्वराकडचा दुरात्मा तुम्हाला त्रास देत आहे.
16आम्हाला आज्ञा द्या आम्ही कोणी चांगला वीणा वाजवणारा
शोधतो. तुम्ही त्या दुरात्म्याने त्रस्त व्हाल तेव्हा हा वादक
वीणा वाजवेल. म्हणजे तो दुष्ट आत्मा तुम्हाला सोडून
जाईल आणि तुम्हाला बरे वाटेल."
17तेव्हा शौल आपल्या सेवकांना म्हणाला, "शोधा तर
असा कुणीतरी आणि त्याला माझ्याकडे आणा." 18यावर
एक चाकर म्हणाला, "इशाय नावाचा एक माणूस बेथलहेम

येथे राहतो. त्याचा मुलगा मला माहीत आहे. त्याला वीणा
वाजवता येते. तो चांगला लढवय्या सुध्दा आहे. तो तरतरीत,
देखणा असून परमेश्वराची त्याला साथ आहे." 19तेव्हा
शौलने इशायकडे संदेश पाठवला. निरोप्यांनी इशायला
सांगितले, "तुला दावीद म्हणून मुलगा आहे. तुझी मेंढरे तो
राखतो. त्याला माझ्याकडे पाठव."

20तेव्हा इशायने शौलसाठी काही भेटवस्तू घेतल्या. एक
गाढव, थोडी भाकरी, द्राक्षारसाचा एक बुधला आणि एक
करडू या वस्तू दावीदजवळ देऊन त्याला शौलकडे पाठवले.
21दावीद शौलकडे गेला आणि त्याच्या समोर उभा राहिला.
शौलला तो फारच आवडला. दावीद त्याचा शस्त्रवाहक
बनला.

22शौलने इशायला निरोप पाठवला, "दावीदला माझा
सेवक म्हणून इथेच राहू दे. त्याच्यावर माझा फार लोभ
आहे." 23मग जेव्हा जेव्हा शौल दुरात्म्या मुळे हैराण होई
तेव्हा तेव्हा दावीद वीणावादन करी. त्यामुळे दुरात्मा पळून
जाऊन शौलला दिलासा मिळे.

## गल्याथचे इस्राएलला आव्हान

17 पलिष्ट्यांनी आपापल्या सैन्यांची जमवाजमव केली
आणि ते यहूदामधील सोखो येथे जमले.
सोखो आणि अजेका यांच्यामध्ये अफसन्दम्मीन येथे
त्यांनी छावणी दिली.

2शौल आणि इस्राएलचे सैन्यही एकत्र आले. त्यांचा तळ
एलाच्या खोऱ्यात होता. पलिष्ट्यांशी लढायला शौलचे सैन्य
सज्ज झाले. 3खोऱ्याच्या दुतर्फा असलेल्या टेकड्यांवर ही
दोन्ही सैन्ये समोरासमोर ठाकली होती.

4पलिष्ट्यांकडे गल्याथ नावाचा कुशल योध्दा होता. तो
गथ येथील होता. त्याची उंची नऊ फुटापेक्षा* जास्त
होती. पलिष्ट्यांच्या छावणीतून तो बाहेर आला. 5पितळी
शिरस्त्राण आणि खवल्या खवल्यांचे चिलखत त्याने
परिधान केले होते. हे चिलखतही पितळी असून त्याचे
वजन जवळजवळ एकशेपंचवीस पौंड होते. 6त्याच्या
पायांवरही पितळी कवच असून पाठीवर पितळी बरची
होती. 7त्या बरचीचा लाकडी भाग विणकराच्या
दांडक्याएवढा होता. आणि बरचीचं पातं पंधरा पौंड वजनाचं
होतं एक ढाल वाहणारा सेवक गल्याथच्या समोर चालला
होता.

8गल्याथ रोज बाहेर पडे आणि इस्राएली सैनिकांना
ओरडून आव्हान देई. तो म्हणे, "तुम्ही येथे येऊन युध्दासाठी
का उभे आहात? तुम्ही शौलचे सेवक आहात. मी पलिष्टी
आहे. तुमच्यापैकी एकाला निवडा आणि माझ्याकडे पाठवा.
9त्याने मला मारले तर आम्ही पलिष्टी तुमचे दास बनू.
पण मी त्याला मारले तर मी जिंकलो आणि मग तुम्ही
आमचे दास व्हाल. तुम्हाला आमची चाकरी करावी
लागेल."

10तो असेही म्हणे, "आज मी इस्राएल सैन्याला तुच्छ
लेखतो. तुम्ही एकाला तरी पाठवा आणि आम्हाला लढू
द्या."

11गल्याथची हे आव्हान ऐकून शौल व त्याचे सैन्य
यांच्यात घबराट निर्माण झाली.

## दावीद आघाडीवर जातो

12यहूदातील बेथलहेम येथील इफ्राथ वंशामधल्या
इशायचा दावीद हा मुलगा. इशायला एकंदर आठ मुलगे
होते. शौलच्या कारकीर्दीत इशाय एक वयस्क गृहस्थ
होता. 13इशायचे तीन मोठे मुलगे शौलबरोबर युध्दाला
गेले होते. पाहिला अलीयाब, दुसरा अबीनादाब आणि तिसरा
शम्मा. 14दावीद सगळ्यात धाकटा होता. मोठी तीन मुलं
शौलच्या सैन्यात असली तरी 15दावीद अनेकदा बेथलहेमला
आपल्या वडिलांची मेंढरं राखायला शौलकडून येत जात
असे.

16इकडे हा पलिष्टी गल्याथ रोज सकाळ संध्याकाळ
इस्राएल सैन्यासमोर उभे राहून आव्हान देत होता. हा
त्याचा क्रम चाळीस दिवस चालला होता. 17एक दिवस
इशाय दावीदला म्हणाला, "आपल्या भावांसाठी एवढं
टोपलंभर शिजवलेले धान्य आणि हे दहा पावाच्या लाद्या
छावणीवर घेऊन जा. 18तसंच, तुझ्या भावांच्या
छावणीवरच्या हजारी अधिकाऱ्याला या पनीरच्या दहा
वड्या दे. भावांची खुशाली विचार. ते सुखरूप आहेत
याची पावती म्हणून माझ्यासाठी काहीतरी खूण आण.
19तुझे भाऊ शौल आणि इतर इस्राएली सैनिक यांच्या
बरोबर एलाच्या खोऱ्यात आहेत. पलिष्ट्यांबरोबर त्यांची
लढाई आहे."

20दुसऱ्या दिवशी दावीदाने आपली मेंढरे दुसऱ्या एका
मेंढपाळाच्या हाती सोपवली आणि तो इशायच्या
म्हणण्याप्रमाणे सर्व सामान घेऊन निघाला. दावीद आपली
गाडी घेऊन तळाशी पोचला तेव्हा सर्व सैनिक रणगर्जना
करत आपापल्या युध्दव्यूहातल्या जागांवर चालले होते.
21इस्राएलचे सैन्य आणि पलिष्टी समोरासमोर उभे होते.

22आपले सामान रसदीच्या राखणदारावर सोपवून दावीद
सैन्याकडे धावला. भावांचा शोध घेऊन. 23त्याने त्यांच्याशी
बोलायला सुरुवात केली.

तेवढ्यात पलिष्ट्यांचा गथ येथील झूंजार सैनिक गल्याथ
आपल्या सैन्यातून बाहेर येऊन नेहमी प्रमाणे इस्राएलला
आव्हान देऊ लागला. ते सर्व दावीदाने ऐकले. 24गल्याथला
पाहून इस्राएल सैनिकांनी भीतीने पळ काढला.

25त्यातला एक इस्राएली म्हणाला, "बघितलंस त्याला?
पाहून घे. हा गल्याथ पुन्हा पुन्हा येऊन इस्राएलची निर्भत्सना
करतो. जो कोणी त्याला ठार करील त्याला शौल राजा

---

**नऊ फूटापेक्षा** शब्दश: हात व 1 स्पन प्राचीन ग्रीक भाषांतरात आणि एका हिब्रू लेखात हे "4 हात व 1 स्पन" किंवा 6 फूट नऊ इंच एवढे आहे.

भरपूर द्रव्य देईल. आपल्या मुलीचे त्याच्याशी लग्न लावून
देईल. शिवाय इस्राएलमध्ये त्याचे घराणे स्वतंत्र करील."
26दावीदाने आपल्या आसपासच्या लोकांना विचारले,
"काय म्हणाला तो? या पलिष्ट्याला ठार करून
इस्राएलवरचा कलंक पुसून टाकणाऱ्याला इनाम काय
आहे? आणि हा गल्याथ तरी एवढा कोण? बोलूनचालून
परका.* एक पलिष्टी आमच्या जीवंत परमेश्वराच्या
सैन्याविरुद्ध बोलतो म्हणजे काय?" 27तेव्हा इस्राएली
सैनिकांनी पुन्हा एकदा दावीदला इनाम काय ते सांगितले.
28अलीयाबने दावीदला सैनिकांशी बोलत असताना पाहिले.
त्याला दावीदचा राग आला. अलीयाबने दावीदला रागाने
विचारले, "तू इथे का आलास? आणि वाळवंटात आपली
मेंढरे कोणापाशी सोडून आलास? मला माहीत आहे तू इथे
का आलास ते! तुला जे करायला सांगितले ते करायला
नको. नुसती लढाई बघत बसायला आलास."
29दावीद म्हणाला, "माझं काय चुकलं? मी फक्त बोलत
होतो."
30दावीदाने मग इतरांनाही तेच विचारले. पूर्वीसारखीच
उत्तरे त्याला मिळाली.
31काहींनी दावीदला बोलताना ऐकले. त्यांनी त्याला
शौल कडे नेले आणि दावीदचे शब्द त्याच्या कानावर
घातले. 32दावीद शौलला म्हणाला, "गल्याथच्या बोलण्याने
लोकांनी खचून जाता कामा नये. मी तुमच्या सेवेला हजर
आहे. त्या पलिष्ट्याचा मी सामना करतो."
33शौल त्याला म्हणाला, "तू त्याला युध्दात पुढे पडू
शकणार नाहीस. तू साधा सैनिकसुध्दा नाहीस.* गल्याथ
तर लहानपणापासून लढाईवर जातो आहे."
34पण दावीद म्हणाला, "मी माझ्या वडिलांची शेरडे-मेंढरे
राखतो. एकदा एक सिंह आणि अस्वल येऊन कळपातील
कोकरु उचलून घेऊन गेले. 35मी त्यांचा पाठलाग केला.
त्यांच्यावर हल्ला करून कोकराला त्याच्या तोंडातून
सोडवले. त्या हिंस्त्र पशूंनी माझ्यावर झेप घेतली पण
त्याच्या जबडयाखाली धरुन त्याला आपटून मी ठार केले.
36सिंह आणि अस्वल दोघांना मी मारले. त्या परक्या
गल्याथचीही मी तशीच गत करीन. आपल्या जीवंत
परमेश्वराच्या सैन्याची टर उडवतो. त्याला मृत्यूला सामोरे
जायलाच पाहिजे.
37परमेश्वराने मला सिंह आणि अस्वल यांच्या तावडीतून
सोडवले. तो मला या पलिष्ट्यांच्या हातूनही सोडवील."
तेव्हा शौल दावीदला म्हणाला, "ठीक तर! देव तुझे
रक्षण करो." 38शौलने आपली स्वत:ची वस्त्रे दावीदला
दिली. पितळी शिरस्त्राण आणि चिलखत त्याच्या अंगावर
चढवले.
39दावीदाने मग तलवार लावली आणि तो चालून पाहू
लागला. पण त्याला हालचाल जमेना कारण त्याला अशा
अवजड गोष्टींची सवय नव्हती.
तेव्हा तो म्हणाला, "हे सर्व चढवून मला लढता येणार
नाही. याची मला सवय नाही." आणि त्याने ते सगळे
उतरवले. 40एक काठी तेवढी हातात घेऊन तो वाहत्या
झऱ्यातले गुळगुळीत गोटे शोधायला बाहेर पडला. आपल्या
धनगरी बटव्यात त्याने पाच गोटे घेतले आणि हातात
गोफण घेऊन तो गल्याथच्या समाचाराला निघाला.

## दावीद गल्याथला ठार करतो

41गल्याथ हळू हळू पावले टाकत दावीद कडे येऊ
लागला. गल्याथचा मदतनीस ढाल धरुन त्याच्या पुढे चालला
होता. 42दावीदकडे बघून गल्याथला हसू फुटले. हा देखणा,
तांबूस वर्णाचा तरुण सैनिक नव्हे हे त्याच्या लक्षात आले.
43तो दावीदला म्हणाला, "ही काठी कशाला? कुत्र्याला
हाकलतात तसे मला हाकलणार आहेस की काय?" मग
गल्याथने आपल्या दैवतांची नावे घेऊन दावीदला
शिव्याशाप द्यायला सुरुवात केली. 44दावीदला तो म्हणाला,
"जवळ ये आज पक्ष्यांना आणि वन्य, प्राण्यांना तुझे मांस
खाऊ घालतो."
45यावर दावीद त्या पलिष्टी गल्याथला म्हणाल, "तुझी
तलवार, भाला-बरची यांच्या बळावर तू माझ्याकडे आला
आहेस. पण मी मात्र इस्राएलच्या सैन्याच्या सर्व शक्तिमान
परमेश्वराचे नाव घेऊन तुला सामोरा येत आहे. तू त्याला
दूषणे दिली होतीस. 46आज आमचा देव तुझा पराभव
करील. मी तुला ठार करीन. तुझे मुंडके छाटीन आणि
धड पशुपक्ष्यांना खायला टाकीन. सगळ्या पलिष्ट्यांची
आम्ही अशीच अवस्था करून टाकू. मग इस्राएलमधील
परमेश्वराचे अस्तित्व सगळ्या जगाला कळेल. 47लोकांचे
रक्षण करायला परमेश्वराला तलवार, भाल्यांची गरज
नसते हे इथे जमलेल्या सगळ्यांना कळून चुकेल. हे
परमेश्वराचे युध्द आहे. तुम्हा पलिष्ट्यांचा पराभव करायला
देव आमचा पाठिराखा आहे."
48गल्याथ तेव्हा दावीदवर हल्ला करायला सरसावला.
संथपणे तो जवळ जवळ सरकू लागला. तेव्हा दावीद
चपळपणे त्याला सामोरा गेला.
49थैलीतून एक दगड काढून गोफणीत घातला आणि
गोफण फिरवली. त्याबरोबर गल्याथच्या दोन डोळ्यांच्या
बरोबर मध्यभागी त्या दगडाचा नेम लागला. कपाळात
दगड घुसला आणि गल्याथ जमिनीवर पालथा पडला.
50अशा प्रकारे निव्वळ गोफण धोंड्याच्या साहाय्याने
त्याने पलिष्ट्याला ठार केले. दावीदकडे तलवार नव्हती.
51चपळाईने तो गल्याथच्या बाजूला जाऊन उभा
राहिला. गल्याथचीच तलवार म्यानातून काढून त्याने त्याचे

---

**परका** शब्दाश: अर्थ "सुंता न झालेला" त्यामुळे इस्राएलांबरोबर परमेश्वराने जो करार केला त्यात हा नव्हता म्हणून परका.

**सैनिकसुध्दा नाहीस** किंवा "तू एक पोर आहेस" हिब्रूमध्ये पोर"चा अर्थ "सेवक" किंवा "सैनिकांची शस्त्रे घरणारा मदतनीस" असाही होतो.

शिर धडावेगळे केले. पलिष्ट्याचा वध शेवटी असा
झाला.
आपला खंदा वीर गतप्राण झाल्याचे पाहताच इतर पलिष्टे
पळून गेले. 52तेव्हा यहूदा आणि इस्राएलच्या सैनिकांनी
गर्जना करत त्यांचा पाठलाग करायला सुरुवात केली.
गथच्या वेशीपर्यंत तसेच एक्रोनाच्या दिंडीदरवाजापर्यंत ते
पाठलाग करत गेले. अनेक पलिष्ट्यांना त्यांनी ठार केले.
शारईमच्या वाटेवर थेट गथ आणि एक्रोनपर्यंत त्यांचे मृतदेह
विखुरलेले होते. 53या पाठलागानंतर इस्राएल लोक
पलिष्ट्यांच्या छावणीवर आले आणि छावणी लुटली.
54दावीदाने या पलिष्ट्याचे शिर यरुशलेमला आणले
आणि त्याची शस्त्रास्त्रे आपल्या तंबूत ठेवली.

## शौलला दावीदची धास्ती

55शौलने दावीदला गल्याथशी लढायला जाताना पाहिले
आणि आबनेर या आपल्या सेनापतीला विचारले, "हा
तरुण कोणाचा मुलगा?"
आबनेर म्हणाला, "मला काहीच कल्पना नाही, धनी."
56शौल राजा म्हणाला, "याच्या वडीलांचा ठावाठिकाणा
शोधून काढा."
57गल्याथला ठार करुन परत आल्यावर दावीदला
आबनेर ने शौलकडे नेले. गल्याथचे मुंडके अजूनही
दावीदाच्या हातातच होते.
58शौलने त्याला विचारले, "तरुण मुला तुझे वडील
कोण आहेत? दाविद म्हणाला, "बेथलहेम येथील आपला
दास इशाय यांचा मी मुलगा."

## दावीद आणि योनाथान यांची घनिष्ठ मैत्री

18 शौलशी चाललेले दावीदचे बोलणे झाल्यावर
योनाथान मनाने दावीदाच्या निकट आला.
दावीदवर तो स्वत:इतकेच प्रेम करू लागला.
2त्या दिवसापासून शौलने दावीदला आपल्याजवळच
ठेवून घेतले. त्याला तो आपल्या वडीलांकडे परत जाऊ
देईना. 3योनाथानचे दावीदवर अपार प्रेम होते. त्याने
दावीदशी एक करार केला. 4योनाथानने आपल्या
अंगावरचा अंगरखा काढून दावीदला दिला. आपला गणवेष
इतकेच नव्हे तर धनुष्य, तलवार कमरबंद हे ही दिले.

## दावीदचे यश शौल पाहतो

5शौलने मग दावीदला अनेक लढायांवर पाठवले.
सगळीकडे त्याने विजय मिळवला. तेव्हा शौलने दावीदला
सेनापतिपद दिले. याने शौलच्या अधिकाऱ्यांसह सर्वजण
खूश झाले. 6दावीद पलिष्ट्यांचा सामना करायला लढाईवर
जाई तेव्हा मुक्कामावर परतताना इस्राएलमधल्या सर्व
गावातल्या स्त्रिया त्याच्या स्वागताला समोर येत. त्या
आनंदाने गात नाचत. डफ, वीणा वाजवत. शौलच्या समोरच
हे चाले. 7त्या म्हणत,

"शौलने हजार शत्रूंना ठार केले तर, दावीदाने लाखो
मारले."

8या गीतामुळे शौलची मर्जी फिरली आणि त्याला संताप
आला. "दावीद लाखो शत्रूंना ठार करतो आणि मी फक्त
हजारोंना मारतो असे या म्हणतात काय" 9तेव्हा पासून तो
दावीदकडे असूयेने आणि ईर्ष्येने पाहू लागला.

## शौलला दावीदचे भय

10दुसऱ्याच दिवशी शौल मध्ये दुष्ट आत्म्याचा संचार
झाला. शौल बेफाम होऊन बडबड करू लागला. दावीद
तेव्हा नित्याप्रमाणे वीणा वाजवत होता. 11शौलच्या हातात
तेव्हा भाला होता. शौलला वाटले, "याला आपण भिंतीशी
खिळवावे." शौलने मग दोनदा भाला नेम धरुन मारला
पण दोन्ही वेळा दावीद निसटला.
12दावीदला परमेश्वराची साथ होती. आणि शौलचा
त्याने त्याग केला होता. तेव्हा दावीदबद्दल शौलच्या मनात
धास्ती होती. 13शौलने दावीदला दूर पाठवले. हजार
सैनिकांचा अधिकारी म्हणून त्याला नेमले. दावीदाने या
सैन्याचे लढाईत नेतृत्व केले. 14परमेश्वर दावीदाच्या
पाठीशी होता. तेव्हा दावीदला सर्व ठिकाणी यश मिळाले.
15जिकडे तिकडे त्याची सरशी होताना पाहून शौलला
दावीदची आणखीच धास्ती वाटू लागली.
16पण इस्राएल आणि यहूदामधील सर्व लोकांचे मात्र
दावीदवर प्रेम होते. युध्दात त्यांच्या पुढे राहून त्यांच्यासाठी
त्याने लढाया केल्यामुळे त्यांचा दावीदवर जीव होता.

## आपल्या मुलीचे दावीदशी लग्न करून देण्याची शौलची इच्छा

17शौल मात्र दावीदाच्या जिवावर उठला होता. त्याला
पेचात पकडण्यासाठी शौलने एक योजना आखली. तो
दावीदला म्हणाला, "ही मेरब माझी मोठी मुलगी. तू हवे
तर हिच्यशी लग्न कर. मग तू आणखीच सामर्थ्यवान
होशील. तू माझ्या मुलासारखाच होशील. मग तू
परमेश्वराच्या वतीने लढाया कर." ही एक युक्ती होती.
प्रत्यक्षात शौलचा विचार वेगळाच होता. 'आता मला त्याचा
जीव घ्यायला नको. परस्पर पलिष्टीच त्याचा काटा
काढतील' असा त्याचा बेत होता.
18पण दावीद म्हणाला, "माझे घराणे तुमच्या तोलामोलाचे
नाही. मीही काही मोठा माणूस नव्हे. तेव्हा मी राजकन्येशी
कसा विवाह करु?"
19त्यामुळे जेव्हा मेरबचा विवाह दावीदशी व्हायचा तो
महोलाच्या अद्रीएलशी झाला.
20शौलची दुसरी मुलगी मीखल हिचे दावीदवर प्रेम
होते. लोकांनी ही गोष्ट शौलच्या कानावर घातली. तेव्हा
त्याला फारच आनंद झाला. 21त्याने विचार केला. "आता
मीखलमुळे माझा बेत सफल होईल. तिचे लग्न मी दावीदशी

करून देतो. मग पलिष्टी त्याचा वध करतील." आणि
दुसऱ्यांदा शौलने दावीदला लग्नाची अनुमती दिली.
22शौलने आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा दिल्या. त्यांना
तो म्हणाला, "त्याला विश्वासात घेऊन हळूच सांगा, 'राजाला
तू आवडतोस तू त्याच्या अधिकाऱ्यांच्या मर्जीतला आहेस.
तेव्हा राजाच्या मुलीशी तू लग्न कर.'"
23शौलच्या अधिकाऱ्यांनी दावीदला हे सर्व सांगितले.
पण तो म्हणाला, "राजाचा जावई होणं सोपं आहे अस
तुम्हाला वाटतं का? मी सामान्य, निर्धन माणूस तिच्यासाठी
खर्च कुठून करणार?"24दावीदचे मनोगत शौलच्या
अधिकाऱ्यांनी शौलला सांगितले.
25शौल त्यांना म्हणाला, "त्याला सांगा, राजाला
तुझ्याकडून हुंडा नको आहे. फक्त शत्रूंचा सूड उगवावा
म्हणून त्याला पलिष्ट्यांच्या शंभर अग्रत्वचा तेवढ्या हव्या
आहेत." हे अर्थात कपट होते. अशाने पलिष्टी दावीदचा
काटा काढतील असे त्याला वाटले.
26अधिकाऱ्यांनी हे सर्व दावीदला सांगितले. दावीदला
राजाचा जावई होणे पसंत पडले. तेव्हा त्याने भराभर पावले
उचलली. 27तो काही लोकांना बरोबर घेऊन पलिष्ट्यांवर
चालून गेला. त्याने दोनशे* पलिष्ट्यांना मारले. त्यांच्या
अग्रत्वचा काढून दावीदाने त्या शौलला दिल्या. कारण
राजाचा जावई व्हायचे त्याच्या मनात होते.
28शौलने दावीदशी मीखलचे लग्न करून दिले. दावीदला
परमेश्वराची साथ आहे आणि आपल्या मुलीचे, मीखलचे,
त्याच्यावर प्रेम आहे हे शौलच्या लक्षात आले. 29तेव्हा तो
मनातून आणखी धास्तावला. तो दावीदला सतत पाण्यात
पाहात होता.
30पलिष्ट्यांचे सरदार सतत इस्राएलींवर चालून जात.
पण दावीद दरवेळी त्यांना पराभूत करी. शौलचा तो एक
यशस्वी अधिकारी होता. त्यामुळे दावीदची ख्याती पसरली.

## योनाथानची दावीदला मदत

19 शौलने आपला मुलगा योनाथान आणि इतर
अधिकारी यांना दावीदचा वध करायला सांगितले.
पण योनाथानला दावीद अतिशय आवडत असे. 2-3त्याने
दावीदला सावध केले. त्याला सांगितले, "जपून राहा. शौल
तुला मारायची संधी शोधत आहे. सकाळी तू शेतात जाऊन
लप. मी ही वडीलांना घेऊन शेतात येतो. तू लपला असशील
तेथे येऊन थांबतो. तुझ्याबद्दल मग मी वडीलांशी बोलेन.
त्यांच्याकडून काही कळले की तुला सांगीन."
4योनाथान आपल्या वडीलांशी बोलला. दावीदबद्दल त्याने
चांगले उद्गार आणले. तो म्हणाला, "तुम्ही राजे आहात.
दावीद तुमचा सेवक. त्याने तुमचे काहीच वाकडे केलेले
नाही. तेव्हा तुम्हीही त्याला इजा पोचू देऊ नका. तो तुमच्याशी
चांगलाच वागत आलेला आहे. 5गल्याथ पलिष्ट्याचा वध
करताना त्याने आपले प्राण पणाला लावले. परमेश्वराने
इस्राएलला विजय मिळवून दिला. तुम्हालाही ते पाहून आनंद
झाला. मग तुम्ही त्याला का दुखावता? तो निरपराध
आहे. त्याला कशासाठी मारायचे?"
6शौलने योनाथानचे म्हणणे ऐकले आणि त्याला वचन
दिले. तो म्हणाला, "परमेश्वर असेपर्यंत दावीदाच्या जिवाला
धोका नाही."
7तेव्हा योनाथानने दावीदला बोलवून सर्व काही सांगितले.
मग त्याला तो शौलकडे घेऊन गेला. पूर्वीप्रमाणेच तो
त्याच्याकडे राहू लागला.

## पुन्हा दावीदला मारायचा शौलचा प्रयत्न

8पुन्हा युध्द सुरु झाले आणि दावीद पलिष्ट्यांशी लढायला
गेला. पलिष्ट्यांचा त्याने पराभव केला. त्यांनी पळ काढला.
9पण शौलवर परमेश्वराच्या दुष्ट आत्म्याचा संचार झाला.
शौल आपल्या घरात बसला होता. त्याच्या हातात भाला
होता. दावीद वीणा वाजवत होता. 10शौलने हातातील भाला
फेकून दावीदला भिंतीत चिणायचा प्रयत्न केला. पण दावीद
उडी मारून निसटला. भाल्याचा नेम चुकून तो भिंतीत
गेला. त्या रात्री दावीद पळून गेला.
11शौलाने काही जणांना दावीदाच्या घरी पाठवले. त्यांनी
त्याच्या घरावर पहारा दिला. रात्रभर ते बसून राहिले.
सकाळी त्याला मारावे असा त्यांचा बेत होता. पण दावीदाच्या
बायकोने, मीखलने, दावीदाला सावध केले. तिने त्याला
रातोरात पळून जाऊन जीव वाचवायला सांगितले. नाही
तर उद्या तुझा खून होईल असे ती त्याला म्हणाली. 12तिने
त्याला खिडकीतून पळून जायला मदत केली. दावीद
निसटला आणि पळाला. 13मीखलने घरातील देवतेची
मूर्ती घेतली आणि पलंगावर ठेवून त्यावर पांघरुण घातले.
बकरीचे केस डोक्याच्या ठिकाणी लावले.
14दावीदला पकडून आणण्यासाठी शौलने जासूद
पाठवले. पण मीखलने दावीद आजारी असल्याचे सांगितले.
15जासूद परतले. त्यांनी राजाला वर्तमान सांगितले. राजाने
त्यांना दावीदला पाहून यायला फर्मावले. शौल म्हणाला,
"त्याला माझ्यापुढे हजर करा. त्याला शक्य नसेल तर
पलंगावर झोपवूनच आणा. मग मीच त्याला मारतो."
16जासूद परत गेले त्याच्या शोधार्थ आत शिरतात तर
त्यांना पलंगावर पुतळा आढळला. बकरीचे केस
लावल्याचेही त्यांच्या लक्षात आले. 17शौल मीखलला
म्हणाला, "तू मला असे का फसवलेस? तू माझ्या शत्रूला
दाविदला पळून जायला मदत केलीस."
मीखल म्हणाली, "मी त्याला पळून जायला मदत केली
नाही तर तो माझा जीव घेईल असे म्हणाला."

## दावीद रामा येथे जातो

18दावीद जो पळाला तो रामा येथे शमुवेल कडे गेला.
शमुवेलला त्याने शौलने जे जे केले ते सर्व सांगितले. मग

---

**दोनशे** प्राचीन ग्रीक अमुवादात "100" आहे.

शमुवेल आणि दावीद संदेष्ट्यांच्या राहण्याच्या ठिकाणी गेले. दावीद तेथे राहिला.

19दावीद रामा नजीकच्या छावणीवर असल्याचे शौलला कळले. 20त्याने दावीदाच्या अटकेसाठी माणसे पाठली. पण ती माणसे तिथे पोहोंचली तेव्हा संदेष्टे संदेश देत होते. शमुवेल त्यांचे नेतृत्व करत उभा होता. शौलच्या निरोप्यांवर ही परमेश्वराच्या आत्म्याचा संचार होवून ते ही संदेश देऊ लागले.

21शौलच्या हे कानावर आल्यावर त्याने दुसरे दूत पाठवले. त्यांचीही तीच गत झाली. तेव्हा शौलने तिसऱ्यांदा जासूद पाठवले. तेही तसेच करू लागले. 22शेवटी शौल स्वत:च रामा येथे आला. सेखू येथील खळ्या जवळच्या मोठ्या विहिरीशी तो आला तेव्हा त्याने शमुवेल आणि दावीदाचा ठावठिकाणा विचारला.

लोक म्हणाले, “ते रामाजवळच्या तळावर आहेत.”

23तेव्हा शौल तेथे पोचला. परमेश्वराच्या आत्म्याचा संचार शौलमध्येही होऊन तोही संदेश देऊ लागला. रामा येथे पोचेपर्यंत त्याचे तेच चालले होते. 24नंतर त्याने अंगावरची वस्त्रे उतरवली. शमुवेलच्या समोर तो संदेश देऊ लागला. दिवसभर आणि रात्रभर तो विवस्त्र अवस्थेत होता. म्हणून लोक म्हणू लागले, “शौलही संदेष्ट्यांपैकी आहे की काय?”

## योनाथान आणि दावीद यांच्या मधला करार

20 दावीद रामा येथील शिबिरापासून दूर पळून गेला. योनाथानकडे येऊन तो म्हणाला, “माझं काय चुकलं? माझा अपराध तरी काय? तुझे वडील का माझ्या जिवावर उठले आहेत?”

2योनाथान म्हणाला, “हे काय भलतेच? ते कशाला तुझ्या जिवावर उठतील? मला सांगितल्या शिवाय ते कधीच कुठली गोष्ट करत नाहीत. कोणतीही महत्वाची किंवा क्षुल्लक गोष्ट असो, ते ती मला सांगतातच. मग तुझा वध करायची बाब ते कशी माझ्यापासून लपवून ठेवतील? तेव्हा हे काही खरं नव्हे!”

3तेव्हा दावीद म्हणाला, “आपण मित्र आहोत ही गोष्ट तुझे वडील चांगली जाणून आहेत. ते स्वत:शी म्हणाले, “योनाथानला हे कळता कामा नये. त्याला कळले तर तो हे दावीदला सांगेल.” पण परमेश्वराची आणि तुझ्या जीविताची शपथ घेवून सांगतो, मृत्यू माझ्याभोवती घोटाळतो आहे.”

4योनाथान मग दावीदला म्हणाला, “तू काय म्हणशील ते करायला मी तयार आहे.

5मग दावीद म्हणाला,“उद्या अमावस्ये निमित्त मेजवानी आहे. तेव्हा राजाच्या पंक्तीला मी असायला हवे. पण संध्याकाळपर्यंत मी शेतात लपून बसतो 6मी नसल्याचे तुझ्या वडीलांच्या लक्षात आले तर त्यांना सांग, ‘दावीदला बेथलहेमला तातडीने जायचे होते. त्याच्या सगळ्या कुटुंबाचा मासिक यज्ञ तेथे आहे. त्यात हजर राहायला जाण्यासाठी त्याने माझी परवानगी मागितली.’ 7तुझ्या वडीलांनी हे सहजगत्या मान्य केले तर मला काही धोका नाही. पण ते संतापले तर मात्र माझ्या जिवाला धोका आहे हे तू ओळख. 8योनाथान, माझ्यावर कृपा कर. मी तुझा दास आहे. परमेश्वराच्या साक्षीने तू माझ्याशी करार केला आहेस. मी अपराधी आढळल्यास खुशाल तू माझा वध कर. पण मला तुझ्या वडीलांकडे नेऊ नको.”

9यावर योनाथान म्हणाला, “अस घडणार नाही. ते तुझ्या वाईटावर आहेत. असं माझ्या लक्षात आलं तर मी तूला तसं सांगीन.”

10दावीद म्हणाला, “तुझ्याशी ते कठोरपणे वागले तर मला कोण खबर देईल?”

11तेव्हा योनाथानने सुचवले, “चल आपण शेताकडे जाऊ.” आणि ते दोघे ही शेतात गेले.

12तिथे योनाथान दावीदला म्हणाला, “देव जो, इस्राएलचा परमेश्वर या समोर मी तुला वचन देतो. माझ्या वडीलांच्या तुझ्याबद्दल काय भल्याबुऱ्या भावना आहेत ते मी जाणून घेईन. मग तीन दिवसात तुला तसं इथे याच शेतात कळवीन. 13त्यांच्याकडून तुला काही घातपात होणार असेल तर तुला त्याची कल्पना देईन. तुला सुखरूप निसटू देईन. माझ्याहातून यात हयगय झाल्यास परमेश्वर मला त्याची शिक्षा देवो. माझ्या वडीलांना परमेश्वराची साथ आहे तशीच तुला मिळो. 14मी हयात असेपर्यंत तुझा माझ्यावर लोभ असू दे. मी गेल्यावरही 15माझ्या कुटुंबावरील तुझ्या लोभात खंड न पडो. परमेश्वर तुझ्या वैऱ्यांचा पृथ्वीतलावरून नि:पात करील. 16मग त्या वेळी योनाथानच्या कुटुंबाला दावीदपासून वेगळे व्हावे लागले तरी बेहत्तर. देव दावीदाच्या शत्रूंना शासन करो.” मग योनाथानने दावीदाच्या घराण्याशी करार केला.

17योनाथानने मग दावीदला परस्परांवरील प्रेमाच्या आणाभाका परत घ्यायला लावल्या. दावीदावर त्याचे स्वत: इतकेच प्रेम होते म्हणून त्या प्रेमापोटी त्याने असे केले.

18योनाथान दावीदला म्हणाला, “उद्या अमावास्येची मेजवानी आहे. पंक्तीतील तुझे आसन रिकामे असेल त्यामुळे तुझी अनुपस्थिती माझ्या वडीलांच्या लक्षात येईल. 19या सगळ्यांला सुरुवात झाली तेव्हा तू जिथे लपला होतास त्याच ठिकाणी तू तिसऱ्या दिवशी थांब. त्या टेकडी जवळ माझी वाट पाहा. 20तिसऱ्या दिवशी मी तिथे येईन आणि नेमबाजी चालली आहे असे भासवीन. काही बाण मी मारीन. 21आणि हाताखालच्या मुलाला बाण शोधून आणायला पाठवीन. सर्वकाही ठीक असेल तर त्या मुलाला मी म्हणेन, ‘तू खूप लांब गेलास बाण माझ्या जवळ आहेत. तर ये व तो घे.’ जर मी असा म्हणालो तर तू खुशाल बाहेर ये मग, परमेश्वराच्या जीविताची शपथ, तुझ्या सुरक्षिततेची हमी माझ्यावर. कोणताही धोका तेव्हा नसेल.

22पण काही धोका असल्यास मी म्हणेन, 'बाण आणखी पुढे आहेत. जा, जाऊन आण.' तसे मी म्हटले तर मात्र तू निघून जा. प्रत्यक्ष परमेश्वरच तुला लांब पाठवत आहे असे समज. 23आपल्या दोघांमधला हा करार लक्षात ठेव. परमेश्वर याला साक्ष आहे."

24त्यानंतर दावीद शेतात लपून बसला.

### मेजवानीच्या प्रसंगी शौलचा दृष्टिकोण

अमावास्येच्या मेजवानीची वेळ झाली आणि राजा भोजनासाठी बसला. 25भिंती जवळच्या आपल्या नेहमीच्या आसनावर राजा बसला. त्याच्या समोर योनाथान होता. आबनेर शौलजवळ होता. दावीदाचे आसन मात्र रिकामे होते. 26त्यादिवशी शौल काहीच बोलला नाही. त्याला वाटले, "काही कारणाने आज तो शुचिर्भूत नसेल."

27दुसऱ्या दिवशी पुन्हा दावीदाचे आसन रिकामेच राहिले. तेव्हा मात्र शौल योनाथानला म्हणाला, "इशायचा मुलगा या प्रंसगी दिसत नाही. कालही नव्हता, आजही नाही. असे का?"

28योनाथानने सांगितले, "त्याने माझ्याजवळ बेथलहेमला जायची परवानगी मागितली." 29तो म्हणाला, "मला जायला हवे. बेथलहेमला आमच्या कुटुंबात यज्ञ आहे. माझ्या भावाने मला यायची आज्ञा केली आहे. आपल्या मैत्रीला स्मरून तू मला भावांना भेटायला जायची परवानगी दे." दावीद आज राजाच्या पंक्तीला नाही याचे हे कारण आहे."

30शौल योनाथानवर संतापला. तो म्हणाला, "अरे दासीपुत्रा, तू माझी अवज्ञा करतोस? आणि तू तिच्यासारखाच निपजलास. तू दावीदाच्या बाजूचा आहेस हे मला माहीत आहे. तू तुला आणि तुझ्या आईला लाज आणली आहेस. 31हा इशायचा मुलगा जिवंत असेपर्यंत तू राज्यावर येणार नाहीस. आत्ताच्या आत्ता दावीदला आणून हजर कर. त्याला मेलेच पाहिजे."

32योनाथान आपल्या वडीलांना म्हणाला, "त्याने काय केले? का म्हणून त्याने मेले पाहिजे?"

33यावर शौलने योनाथान वर आपला भाला फेकला आणि त्याचा जीव घ्यायचा प्रयत्न केला. तेव्हा, दावीदला मारायचा आपल्या वडीलांनी निश्चय केला आहे हे योनाथानच्या लक्षात आले. 34संतापाने तो पंक्तीतून चालता झाला. त्या रागात त्याने अन्नाला स्पर्शसुध्दा केला नाही. शौलने आपल्याला शरमिंदे केले आणि दावीदला मारायचे ठरवले म्हणून त्याला फार राग आला.

### दावीद आणि योनाथान निरोप घेतात

35दुसऱ्या दिवशी सकाळी योनाथान शेतावर आला. ठरल्याप्रमाणे दावीदला भेटायला तो आला. आपल्याबरोबर त्याने मदतनीस मुलाला पण आणले. 36त्याला तो म्हणाला, "धावत पुढे हो. मी बाण मारतो तो आण." मुलगा धावत जायला लागल्यावर योनाथानने त्याच्या डोक्यावरून बाण मारले. 37बाण पडले त्या ठिकाणी तो मुलगा पोचल्यावर योनाथान म्हणाला, "बाण आणखी पुढेच आहेत." 38मग तो म्हणाला, "जा धावत जा, लौकर आणि नुसता उभा राहू नको." मुलाने मग बाण उचलून गोळा करून आणले. 39काय चालले आहे याची त्या मुलाला अजिबात कल्पना नव्हती. फक्त योनाथान आणि दावीदला ते कळत होते. 40योनाथानने धनुष्यबाण त्या मुलाकडे दिले आणि त्याला तो म्हणाला, "आता तू गावात परत जा."

41मुलगा दिसेनासा झाल्यावर दावीद डोंगराच्या पलीकडे लपला होता तिथून बाहेर आला. त्याने योनाथानला तीनदा वाकून अभिवादन केले. मग त्यांनी परस्परांचे मुके घेतले. दोघेही रडू लागले. पण दावीदाचा आक्रोश योनाथानपेक्षा जास्त होता. 42योनाथान दावीदला म्हणाला, "शांत चित्ताने जा. परमेश्वराची शपथ घेऊन आपण मैत्रीच्या आणाशपथा घेतल्या आहेत. आपण आणि आपले वंशज यांना परमेश्वर, चिरंतन साक्षी आहे."

### दावीद अहीमलेख याजकाकडे जातो

21 मग दावीद निघून गेला आणि योनाथान आपल्या गावी परत आला. 2दावीद नोब नामक गावी अहीमलेख या याजकाला भेटायला गेला.

अहीमलेख त्याला भेटायला चार पावले पुढे चालून गेला. अहीमलेखला भीतीने कापरे भरले होते. दावीदला त्याने विचारले, "तू एकटाच का? तुझ्याबरोबर कोणीच नाही हे कसे?"

3दावीदाने सांगितले, "राजाच्या खास आज्ञेवरून मी आलो आहे. त्यानुसार हे काम गुप्त ठेवायचे आहे. त्याबद्दल कोणालाही काही कळू द्यायचे नाही. माझी माणसे विशिष्ट संकेतस्थळी मला भेटणार आहेत. 4आता आधी तुझ्या जवळ खायला द्यायला काय आहे ते सांग. पाच भाकरी किंवा जे असेल ते दे." 5तेव्हा याजक म्हणाला, "साधी भाकर तर आत्ता नाही पण पवित्र भाकर आहे. तुझ्या अधिकाऱ्यांचा बायकांशी संबंध आला नसेल तर त्यांना ती चालेल." 6दावीद म्हणाला, "आमचा बायकांशी संपर्क आलेला नाही. युध्दावरच काय पण अगदी सामान्य मोहिमेवर निघाले तरी आमची माणसे शुचिर्भूत असतात. मग या खास कामाबद्दल तर बोलायलाच नको."

7पवित्र भाकरी खेरीज दुसरी भाकर नव्हतीच. तेव्हा याजकाने दावीदला तीच दिली परमेश्वरापुढच्या पवित्र मेजावर याजक रोजच्या रोज ताजी भाकर ठेवत, त्यातली ही होती. 8दवेग नावाचा शौलचा एक अधिकारी त्या दिवशी तेथे होता. तो अदोमी असून शौलच्या मेंढपाळांचा प्रमुख होता. परमेश्वरासमोर त्याला थांबवून ठेवलेले*

---

**थांबवून ठेवलेले** होते कोणत्यातरी धार्मिक कारणासाठी दवेग तिथे होता किंवा अजाणता मनुष्य वधासारख्या एखाद्या गुन्ह्याबद्दल त्याला तिथे डांबून ठेवले होते.

होते. 9दावीदाने अहीमलेखला विचारले, “इथे भाला किंवा
तलवार आहे का? राजाचे काम फार निकडीचे असल्यामुळे
मला तातडीने निघावे लागले. त्यामुळे मी माझे शस्त्र
बरोबर आणू शकलो नाही.”
10पुरोहित म्हणाला, “गल्याथ या पलिष्ट्याला तू एलाच्या
खोऱ्यात मारलेस तेव्हा त्याची तलवार काढून घेतलीस.
तीच काय ती इथे आहे. एफोदच्या मागे एका कापडात ती
गुंडाळून ठेवलेली आहे. हवीतर ती घे.”
दावीद म्हणाला, “तीच दे. तिच्यासारखी दुसरी तलवार
नाही.”

## गथ येथील शत्रुकडे दावीद पळ काढतो

11शौलाकडून दावीद पळाला, तो गथचा राजा
आखीश याच्या कडे आला. 12आखीशच्या
अधिकाऱ्याला हे आवडले नाही. त्याचे अधिकारी म्हणाले,
“हा दावीद, इस्राएल भूमीचा राजा. इस्राएल याचे
गुणगान गातात. नाचत गात ते याच्याविषयी म्हणतात,
“शौलने हजार शत्रूंना मारले तर दावीदाने लाखोंचा वध
केला.”
13दावीदाने त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकले. गथचा
राजा आखीश याला सामोरे जायची त्याला भीती वाटली.
14म्हणून राजा व त्याचा दरबार यांच्यापुढे त्याने वेड्याचे
सोंग वठवले. प्रवेशद्वारावर थुंकला, दाढीवर लाळ ओघळू
दिली.
15आखीश हे पाहून आपल्या अधिकाऱ्यांना म्हणाला,
“पाहा, हा माणूस वेडा आहे. याला इथे कशाला येऊ
दिलेत? 16वेड्यांची इथे कमतरता आहे की काय?
माझ्यासमोर याचे वेडेचार चालायचे नाहीत. त्याला पुन्हा
इथे येऊ देऊ नका.”

## दावीदाची भटकंती

22 दावीद मग गथहून निघाला तो अदुल्लाम गुहेत
पोचला. दावीदाच्या भावांनी आणि नातलगांनी
हे ऐकले तेव्हा ते त्याला तिथे भेटायला गेले. 2वेगवेगळ्या
प्रकारे अडचणीत सापडलेले, कर्जबाजारी झालेले,
आयुष्याला त्रासलेले असे बरेच जण दावीदकडे आले.
त्याच्या भोवती अशी चारशे माणसे जमली. त्यांचा तो नेता
होता.
3अदुल्लामहून तो मवाबातील मिस्पा येथे गेला. मवाबच्या
राजाला तो म्हणाला, “परमेश्वराने माझे काय करायचे
ठरवले हे मला कळेपर्यंत कृपया माझ्या आईवडिलांना
तुमच्या आश्रयाने राहू द्या.” 4एवढे बोलून आपल्या
आईवडिलांना त्याने तिथे सोडले आणि स्वत: किल्ल्याकडे
परतला. 5पण गाद हा संदेष्टा दावीदला म्हणाला, “इथे राहू
नको. यहूदा प्रांतात जा.” तेव्हा दावीद निघाला आणि हरेथ
नामक वनात आला.

## अहीमलेखच्या कुटुंबियांचा शौलकडून वध

6दावीद आणि त्याच्या बरोबरचे लोक यांचा इतरांना
पत्ता लागला आहे हे शौलला कळले. तो गिबा येथे एका
टेकडीवर झाडाखाली बसला होता. हातात भाला होता.
सर्व अधिकारी त्याच्या भोवती उभे होते. 7शौल
त्यांना उद्देशून म्हणाला, “बन्यामीन लोकहो, ऐका हा
इशायपुत्र दावीद तुम्हाला शेत आणि द्राक्षमळे देईल असे
तुम्हाला वाटते का? तो तुम्हाला बढत्या देऊन शंभरांवर,
हजारांवर अधिकारी नेमील असे तुम्ही समजता का?
8माझ्याविरुद्ध तुम्ही कटकारस्थाने रचत आहात.
योनाथान बद्दल तुमच्या पैकी एकानेही मला विश्वासात
घेतले नाही. या इशायच्या मुलाबरोबर त्याचा करार झालेला
आहे हे कोणी मला सांगितले नाही. तुमच्या पैकी कोणी
माझी काळजी घेत नाही. योनाथानने दावीदला प्रोत्साहन
दिले हे तुमच्यापैकी कोणीही मला कळू दिले नाही. लपून
राहून माझ्यावर हल्ला करायला योनाथानने दावीदला,
माझ्या सेवकाला सांगितले. दावीदाचे सध्या तेच चालले
आहे.”
9अदोमी दवेग तेव्हा तिथेच होता. तो म्हणाला, “मी
दावीदला नोब येथे पाहिले. अहिटूबचा मुलगा अहीमलेख
याला भेटायला तो आला होता. 10अहीमलेखने दावीदासाठी
परमेश्वरापुढे प्रार्थना केली, दावीदला खायला दिले. शिवाय
त्याला गल्याथ या पलिष्ट्याची तलवार सुध्दा दिली.”
11हे ऐकून शौलने या याजकाला आपल्यापुढे हजर
करायची आज्ञा दिली. त्याच्या सर्व नातेवाईकांनाही
आणायला सांगितले. अहीमलेखचे नातेवाईक नोब येथे
पुरोहित होते. ते सर्व जण राजासमोर आले. 12शौल
अहीमलेखला म्हणाला, “अहीटूबच्या मुला, आता ऐक.”
अहीमलेख म्हणाला, “आज्ञा. सरकार.”
13शौल अहीमलेखला म्हणाला, “तू आणि इशायचा
मुलगा दावीद यांनी माझ्याविरुध्द कट का केलात? दावीदला
तू भाकर दिलीस व तलवारही पुरवलीस. त्याच्यासाठी
परमेश्वराजवळ प्रार्थना केलीस आणि आता दावीद हल्ला
करायला सज्ज आहे.”
14अहीमलेख म्हणाला, “दावीद अतिशय भरवशाचा
आहे. तुमच्या अधिकाऱ्यांमध्ये त्याच्याइतका विश्वासू
कोणी नाही. तो तुमचा जावईही आहे. तुमच्या अंगरक्षकांचा
तो प्रमुख आहे. तुमचे कुटुंबीय त्याला मान देतात.
15त्याच्यासाठी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करायची
ही पहिलीच वेळ नव्हे. मला किंवा माझ्या
नातेवाईकांना बोल लावू नका. आम्ही तुमचे सेवक आहोत.
काय चालले आहे याची आम्हाला अजिबात कल्पना
नाही.”
16पण राजा त्याला म्हणाला, “तू आणि तुझे नातेवाईक
यांना मृत्युदंड दिला पाहिजे.” 17राजाने मग आपल्या
जवळच्या रक्षकांना हुकूम केला, “परमेश्वराच्या
याजकांना ठार करा. त्यांनी दावीदाची बाजू घेतली म्हणून

त्यांना ही सजा आहे. दावीदाच्या पलायनाची त्यांना खबर असून त्यांनी मला तसे कळवले नाही.”

पण राजाच्या सेवकांनी परमेश्वराच्या याजकांवर शस्त्र उगारायला नकार दिला.

18तेव्हा शौल राजाने दवेगला आज्ञा केली, “याजकांना तू ठार कर.” तेव्हा अदोमी दवेगाने ती आज्ञा अंमलात आणली. दवेगने त्यादिवशी पंच्याऐंशी याजकांना जिवे मारले.

19नोब ही याजकांची नगरी होती. दवेगने तेथील सर्वांना ठार केले. पुरुष बायका, मुले, तान्ही बाळे, इतकेच नव्हे तर गायीगुरे, गाढवे, मेंढरे सुद्धा त्याने तलवारीने कापून काढली.

20पण त्यातून अब्याथार हा अहीमलेखचा मुलगा निसटला. अहीमलेख हा अहीटूबचा मुलगा. अब्याथार पळून जाऊन दावीदाला मिळाला. 21परमेश्वराच्या याजकांना शौलने ठार केल्याचे त्याने दावीदला सांगितले. 22तेव्हा दावीद अब्याथारला म्हणाला, “मी नोब येथे त्यादिवशी त्या अदोमी दवेगला पाहिले होते. तो शौलला ही खबर देईल हेही मला माहीत होते. तुझ्या वडीलांच्या कुटुंबाच्या मृत्यूला मीच जबाबदार आहे. 23शौल तुझ्या जिवावर उठला आहे तसा माझ्याही जीवावर उठला आहे. माझ्याजवळ राहा. भिऊ नको. माझ्याजवळ तू सुरक्षित राहशील.”

## कईला येथे दावीद

23 लोकांनी दावीदला सांगितले, पलिष्टी कईला विरुद्ध लढत आहेत. तेथील खळ्यावरचे धान्य ते लुटून नेत आहेत.

2दावीदाने परमेश्वराला विचारले, “पलिष्ट्यांवर मी हल्ला करू का?”

परमेश्वराने सांगितले, “जरुर पलिष्ट्यांवर हल्ला कर आणि कईलाचे रक्षण कर.”

3पण दावीद बरोबरचे लोक त्याला म्हणाले, “जरी आपण यहूदात आहोत, तरी किती भीतीच्या वातावरणात आपण इथे आहोत. मग प्रत्यक्ष पालिष्टी सैन्याजवळ गेल्यावर आपले काय होईल?”

4दावीदाने पुन्हा परमेश्वराला विचारले, परमेश्वराने पुन्हा सांगितले, “कईला येथे जा. पलिष्ट्यांचा पाडाव करायला मी तुम्हाला मदत करतो.” 5तेव्हा दावीद आपल्या लोकांबरोबर कईला येथे गेला. त्यांनी पलिष्ट्यांशी युध्द केले. पलिष्ट्यांचा पराभव करून त्यांची गुरे पळवली. अशाप्रकारे कईलाच्या लोकांचे त्यांनी रक्षण केले. 6(अब्याथार दावीदाकडे पळून आला तेव्हा त्याने आपल्याबरोबर एफोद आणला होता.)

7दावीद कईला येथे असल्याचे लोकांनी शौलला सांगितले. शौल म्हणाला, “परमेश्वरानेच दावीदला माझ्या हाती दिले आहे. दावीद आता चांगला अडकला आहे. दरवाजे आणि अडसर असलेल्या नगरात तो आता कोंडला गेला आहे.” 8शौलने मग युध्दासाठी आपल्या सैन्याला पुकारले. दावीदला आणि त्याच्या लोकांना घेरण्यासाठी ते कईलाला जायला निघाले.

9शौलची आपल्याविरुध्द मसलत चाललेली आहे हे दावीदला कळले. तेव्हा दावीदाने अब्याथार याजकाला एफोद आणण्यास सांगितले.

10मग दावीदाने प्रार्थना केली, “परमेश्वरा, इस्राएलच्या देवा! कईला येथे येऊन माझ्यामुळे संपूर्ण नगराचा विध्वंस करायचा शौलचा बेत आहे असे मी ऐकले. 11खरोखरच शौल येथे येईल का? येथील लोक मला शौलच्या हवाली करतील का? इस्राएलच्या परमेश्वर देवा, तुझ्या सेवकाला नीट सांग.”

परमेश्वराने शौल येणार असल्याचे सांगितले

12पुन्हा दावीदाने विचारले, “कईलाचे लोक मला आणि माझ्या साथीदारांना शौलच्या ताब्यात देतील का?” परमेश्वराने याचेही होय असे उत्तर दिले.

13तेव्हा दावीद आणि त्याच्या बरोबर आलेली सुमारे साहशे माणसे यांनी कईला सोडले. ते गावोगाव भटकंत राहिले. दावीद निसटल्याचे शौलला कळले. त्यामुळे तो तेथे आलाच नाही.

## दावीदाचा शौलकडून पाठलाग

14दावीद मग वाळवंटातील गढ्या, किल्ले यांच्या आश्रयाने राहू लागला. झीफच्या वाळवंटातील डोंगराळ भागातही तो राहिला. शौल दावीदाचा माग काढायचा प्रयत्न करत होता. पण परमेश्वराने दावीदला त्याच्या हाती लागू दिले नाही. 15झीफच्या वाळवंटात होरेश येथे असताना शौल आपल्या पाठलागावर येत आहे हे पाहून दावीद घाबरला. 16शौलचा मुलगा योनाथान दावीदला होरेश येथे भेटायला गेला. त्याने दावीदची परमेश्वरावरची श्रद्धा आणखी दृढ केली. 17योनाथान दावीदला म्हणाला, “घाबरू नको. माझ्या वडीलांकडून तुला दुखापत होणार नाही. तू इस्राएलचा राजा होशील. मी तुझ्या खालोखाल असेन. माझ्या वडीलांनाही हे माहीत आहे.” 18मग त्या दोघांनी परमेश्वरासमोर करार केला. तिथून योनाथान आपल्या घरी गेला. दावीद होरेश येथेच राहिला

## झीफचे लोक शौलला दावीद बद्दल सांगतात

19झीफचे लोक गिबा येथे शौल कडे येऊन म्हणाले, “दावीद आमच्या भागात लपून बसलेला आहे. यशीमोनच्या दक्षिणेला हकीला पर्वतावरील होरेशच्या गढीत तो आहे. 20हे राजा तू आता केव्हाही तिकडे ये दावीदला तुझ्या हवाली करणे हे आमचे कर्तव्यच आहे.” 21शौल त्यांना म्हणाला, “या मदतीबद्दल परमेश्वर तुमचे भले करो. 22आता त्याच्या बद्दल अधिक माहिती काढा. तो कुठे

आहे, त्याला कोणीकोणी पाहिले आहे याचा पत्ता लावा."
शौलने विचार केला, 'दावीद फार धूर्त आहे, तो माझ्यावर
कुरघोडी करायचा प्रयत्न करत आहे.' **23**पुढे तो म्हणाला,
त्याच्या दबा धरून बसायच्या सर्व जागा हेरुन ठेवा आणि
मग इथे येऊन मला सगळ्याची खबर द्या. मी मग
तुमच्याबरोबर येईन. त्या भागात दावीद असेल तर त्याला
शोधून काढीन. मग यहूदातील घराघरात शोधायची वेळ
आली तरी बेहत्तर."
**24**झीफचे लोक मग परत गेले. शौल तेथे नंतर गेला.
दावीद आणि त्याच्या बरोबरचे लोक यशीमोनच्या दक्षिणेला
मावोनच्या वाळवंटात होते. **25**शौल आणि त्याची माणसे
दावीदचा मागोवा काढत निघाली. पण लोकांनी त्याबद्दल
दावीदला सावध केले. तेव्हा तो मावोनच्या वाळवंटातील
खडका कडे गेला. शौलला तो मावोनच्या वाळवंटात
असल्याचे कळले म्हणून शौल तिकडे गेला.
**26**शौल डोंगराच्या एका बाजूला तर दावीद आणि त्याची
माणसे त्याच डोंगराच्या दुसऱ्या बाजूला होती. दावीद
शौलपासून निसटून जाण्याच्या घाईत होता. शौल आणि
त्याचे सैनिक दावीदला पकडण्यासाठी डोंगराला वेढा घालत
होते.
**27**तेवढ्यात एक निरोप्या शौलकडे आला. "पलिष्टी
आपल्यावर हल्ला करायला आले आहेत. ताबडतोब चला"
असा त्याने निरोप आणला.
**28**तेव्हा शौलने दावीदचा पाठलाग थांबवून पलिष्ट्यांकडे
कूच केले. म्हणून त्या खडकाला "निसटून जाण्याचा
खडक" (सेला हम्मालकोथ) असे नाव पडले. **29**दावीद
मग मावोनचे वाळवंट सोडून एन गेदीच्या गडावर राहिला.

## दावीदाने शौलला लज्जित केले

**24** शौलने पलिष्ट्यांचा पाठलाग करून त्यांना
घालवल्यावर लोक त्याला म्हणाले, "दावीद एन
गेदीजवळच्या वाळवंटात आहे."
**2**तेव्हा शौलने सर्व इस्राएलमधून तीन हजार माणसे
निवडली. त्यांना घेऊन तो दावीदाच्या शोधार्थ निघाला.
रानबकऱ्याच्या खडकाजवळ त्यांनी टेहेळणी केली.
**3**रस्त्यालगतच्या मेंढवाड्याजवळ शौल आला. तिथे एक
गुहा होती. शौल तिथे बहिर्दिशेकरता गेला. दावीद आणि
त्याच्या बरोबरचे लोक गुहेत पार आतल्या बाजूला होते.
**4**ते लोक दावीदला म्हणाले, "परमेश्वराने वर्तवलेला हाच
तो दिवस. तो म्हणाला होता, "मी शत्रूला तुमच्या ताब्यात
देईन मग तुम्ही त्याचे काहीही करा."
दावीद मग हळूच सरकत शौलजवळ पोचला. शौलच्या
अंगरख्याचा एक तुकडा त्याने हळूच कापून घेतला. शौलने
दावीदला पाहिले नाही. **5**दावीदला नंतर आपल्या कृत्याबद्दल
फार वाईट वाटले. **6**तो आपल्या सोबत्यांना म्हणाला, "माझ्या
धन्याच्या विरूद्ध अशी गोष्ट परमेश्वराने माझ्या हातून
पुन्हा होऊ देऊ नये. शौल हा परमेश्वराने निवडलेला
राजा आहे. त्या अभिषिक्त राजाच्या विरुद्ध मी असे काही
करता कामा नये." **7**आपल्या माणसांना थोपवण्यासाठी,
त्यांनी शौलला इजा करु नये म्हणून तो असे म्हणाला.
शौल गुहेतून बाहेर पडून चालायला लागला. **8**दावीद गुहेतून
बाहेर आला आणि त्याने शौलला साद घातली, "महाराज,
माझे स्वामी!"
शौलने मागे वळून पाहिले. दावीदाने मान लववून
त्याला अभिवादन केले. **9**शौलला तो म्हणाला, "दावीद
आपला घात करील असे लोक म्हणतात तेव्हा तुम्ही
त्यांच्याकडे का लक्ष देता? **10**मी तुमच्या केसाला धक्का
लावणार नाही. आता तुम्हीच पाहा. आज गुहेत परमेश्वराने
तुम्हाला माझ्या समक्ष आणले होते. पण मी तुमची गय
केली. तुमचा वध केला नाही. 'हे माझे धनी आहेत
शौल हा परमेश्वराचा अभिषिक्त राजा आहे. त्याला
मी धक्का लावणार नाही' असे मी म्हणालो. **11**हा
तुकडा पाहा तुमच्या अंगरख्याचा हा तुकडा मी कापून
घेतला. मी तुमचा जीव घेऊ शकलो असतो पण मी तसे
केले नाही. हे तुम्ही समजून घ्यावे अशी माझी इच्छा
आहे. तुमच्याविरुद्ध माझे कसलेही कारस्थान चाललेले
नाही हे कृपया घ्यानात घ्या मी तुमचे काहीही वाकडे
केलेले नाही. पण तुम्ही मात्र माझा जीव घेण्यास सारखे
टपलेले आहात. **12**परमेश्वरानेच याचा न्याय करावा.
माझ्याशी तुम्ही असे वागलात याचे परमेश्वराने शासन
खुशाल करावे, पण मी तुमच्या विरुद्ध लढणार नाही.
**13**एक जुनी म्हण आहे,

'वाईट लोकांपासून वाईटच निपजते.'

माझ्या हातून काहीच वाईट झालेले नाही. मी दुष्ट नाही.
मी तुमचा घात करणार नाही. **14**तुम्ही कोणाचा पाठलाग
करत आहात? कोणाविरुद्ध इस्राएलचा हा राजा युद्धासाठी
सज्ज आहे? तुम्ही ज्याचा पाठलाग करताय तो तुमच्या
वाईटावर नाही. हा तर निव्वळ मेलेल्या कुत्र्याचा किंवा
पिसवेचा पाठलाग झाला. **15**परमेश्वरालाच या गोष्टीचा
न्याय करु द्या. आपल्या दोघांमध्ये निवाडा करु द्या. मला
पठिंबा देवून माझेच खरे असल्याचे तो दाखवील. माझे
तुमच्यापासून रक्षण करील."
**16**दावीदचे बोलून झाले तेव्हा शौलने विचारले, 'दावीद,
माझ्या मुला, तुच हे बोलतो आहेस का?' शौलला रडू
फुटले. तो हमसाहमशी रडला.
**17**तो पुढे म्हणाला, "तुझे खरे आहे. माझे चुकले. तू
माझ्याशी नेहमी चांगलाच वागलास. पण मी मात्र वाईट
वागलो. **18**तू काय चांगले केलेस ते आत्ता सांगितलेस.
परमेश्वराने तुझ्यासमोर मला आणूनही तू मला मारले
नाहीस. **19**मी तुझा शत्रू नव्हे हे यावरून दिसतेच. शत्रू
आपल्या तावडीत सापडल्यावर त्याला कोणी असे जाऊ
देत नाही. शत्रूशी कोणी असे चांगले वागत नाही. आज तू

माझ्याशी ज्या चांगुलपणाने वागलास त्याचे तुला देव चांगले
फळ देईल. 20तू आता राजा होणार आहेस हे मला माहीत
आहे. तू इस्राएलवर राज्य करशील.
21आता मला एक वचन दे. परमेश्वराची शपथ घेऊन
तू माझ्या मुलाबाळांना मारणार नाहीस असे कबूल कर.
माझी नावनिशाणी नाहीशी करणार नाहीस असे कबूल
कर."
22तेव्हा दावीदाने त्याला तसे वचन दिले. शौलच्या
कुटुंबाचा संहार न करण्याचे कबूल केले. तेव्हा
शौल घरी परतला. दावीद आणि त्याची माणसे गडावर
परतली.

## दावीद आणि मूर्ख नाबाल

25 शमुवेल मरण पावला. तेव्हा सर्व इस्राएल लोकांनी
एकत्र जमून दुखवटा व्यक्त केला. शमुवेलचे
दफन त्यांनी रामा येथील त्याच्या घराजवळ केले. नंतर
दावीद पारानच्या वाळवंटाकडे गेला.
2मावोन येथे तेव्हा एक धनाढ्य माणूस राहात असे.
त्याच्याकडे तीन हजार मेंढरे आणि हजार बकऱ्या होत्या.
हा एकदा आपल्या मेंढरांची लोकर कातरायला कर्मेल
येथे गेला. 3हा कालेब वंशातला असून त्याचे नाव नाबाल
होते. त्याची बायको अबीगईल. ती हुशार तसेच सुंदर
होती. पण नाबाल मात्र नीच आणि दुष्ट होता.
4नाबाल त्याचे लोकर कातरण्याचे काम करत होता
तेव्हा दावीद वाळवंटात होता. त्याला काही नाबालची गोष्ट
कळली. 5तेव्हा दावीदाने दहा तरुणांना त्याच्याशी बोलायला
पाठवले. तो म्हणाला, "कर्मेलला जा. नाबालला भेटा
आणि माझ्यातर्फे त्याला नमस्कार सांगा." 6दावीदाने
याखेरीज नाबालसाठी निरोपही दिला. तो असा, "तुझे
आणि तुझ्या कुटुंबियांचे कुशल आहेना? तुझे सर्व व्यवस्थित
चालले आहेना? 7तुझ्याकडे लोकर कातरण्याचे काम
चालले आहे असे मी ऐकले. तुझ्याकडचे धनगर नुकतेच
इथे आले होते. त्यांना आमच्याकडून काहीही उपद्रव
झालेला नाही. कर्मेल येथे ते असताना त्यांच्याकडून आम्ही
काही घेतलेले नाही. 8तू त्यांनाही विचार तेही हेच सांगतील.
मी पाठवलेल्या या तरुणांवर लोभ असू दे. तुझ्या या
भरभराटीच्या काळात आम्ही तुझ्याकडे आलो आहोत.
तेव्हा या तरुणांना तू यथाशक्ती काही तरी द्यावेस. माझ्यासाठी,
तुझ्या या मित्र दावीदासाठी म्हणून एवढे कर."
9दावीदाच्या सांगण्याप्रमाणे ते तरुण नाबाल कडे गेले.
त्यांनी दावीदचा निरोप नाबालला सांगितला. 10पण नाबाल
त्यांच्याशी अतिशय क्षुद्रपणे वागला. तो म्हणाला, "कोण
हा दावीद? हा इशायचा मुलगा कोण? आजकाल बरेच
दास आपल्या मालकांकडून पळून जातात. 11भाकर आणि
पाणी माझ्याकडे आहे. तसेच या लोकर कातरणाऱ्या
माझ्या नोकरांसाठी काही मांस आहे. पण असल्या अनोळखी
लोकांना मी काहीही देणार नाही." 12हे एकून ते सगळे
दावीदकडे परत आले आणि नाबाल बोलला ते सर्व त्यांनी
त्याला सांगितले. 13तेव्हा दावीद त्यांना म्हणाला, "आता
तलवारी हाती घ्या" आणि दावीदसकट या सर्वांनी शस्त्र
उचलले. जवळजवळ चारशे जण दावीद बरोबर होते.
दोनशे माणसे तेथेच सामानसुमानाजवळ राहिली.

## अबीगईल हे संकट टाळते

14नाबालच्या एका सेवकाने अबीगईलला ही खबर दिली.
तो म्हणाला, "दावीदाने आपल्या धन्याकडे काही तरुणांना
भेटायला पाठवले होते. पण नाबाल त्यांच्याशी क्षुद्रपणे
वागला. 15त्या माणसांची वागणूक मात्र चांगली होती.
मेंढरांबरोबर आम्ही उघड्यावर होतो. दावीदची माणसेही
तेथेच वावरत होती. पण त्यांनी आमचे काहीही वाकडे
केले नाही. आमची कुठलीही गोष्ट चोरीला गेली नाही.
16दावीदाच्या लोकांनी आमचे दिवस रात्र रक्षण केले.
जणू त्यांनी आमच्या भोवती तटच उभारला होता. आम्ही
मेंढरांमागे असतांना त्यांचे आम्हाला संरक्षण होते.
17आता तुम्हीच विचार करून काय ते ठरवा. नाबालचे
कृत्य अविचारीपणाचे आहे. त्या मुळे आमच्या धन्यावर
आणि त्याच्या कुटुंबावर संकट ओढवणार आहे."
18अबीगईलने तेव्हा वेळ न गमावता दोनशे भाकरी,
द्राक्षारसाचे दोन बुधले, पाच मेंढरांचे रांधलेले मांस, पाच
मापे धान्य, द्राक्षाचे शंभर घड, आणि सुक्या अंजिराच्या
दोनशे ढेपा एवढे सामान गाढवांवर लादले. 19आपल्या
नोकरांना तिने सांगितले, "तुम्ही हे घेऊन पुढे व्हा. मी
आलेच." नवऱ्याला तिने ही गोष्ट सांगितली नाही.
20आपल्या गाढवावर बसून ती डोंगराच्या दुसऱ्या बाजूकडून
जायला लागली. तेव्हा तिला समोरून दावीद आणि त्याच्या
बरोबरची माणसे येताना दिसली.
21ती भेटायच्या आधी दावीद म्हणत होता, "वाळवंटात
मी नाबालच्या मालमत्तेचे रक्षण केले. त्याची मेंढरे चुकू
दिली नाहीत. मी काहीही अपेक्षा न ठेवता हे केले. त्याच्याशी
चांगले वागूनही तो आता असे वाईट वागत आहे. 22आता
मात्र त्याच्या कुटुंबातील एकजण जरी उद्यापर्यंत शिल्लक
राहिला तरी देव मला शिक्षा करील."
23तेवढ्यात अबीगईल तेथे पोचली. दावीदला पाहताच
ती लगबगीने गाढवावरून उतरली. दावीदला तिने वाकून
अभिवादन केले. 24त्याच्या पायाशी लोळण घेत ती त्याला
म्हणाली, "कृपया मला बोलू द्या. मी काय म्हणते ते ऐकून
घ्या. जे झाले त्याबद्दल दोष माझा आहे. 25तुमच्या माणसांना
मी पाहिले नाही. त्या नीच नाबालकडे लक्ष देऊ नका. तो
त्याच्या नावाप्रमाणेच आहे. त्याच्या नावाचा अर्थच नीच
असा आहे. आणि तो खरोखर तसाच आहे. 26निर्दोष
लोकांची हत्या तुमच्याहातून होण्यापासून परमेश्वराने
तुम्हाला वाचवले आहे. परमेश्वर जिवंत असेपर्यंत तुम्ही
येथे असेपर्यंत, तुमच्या वाईटावर असलेले लोक, तुमचे
शत्रु यांची गत नाबाल प्रमाणेच होईल असे वाटते. 27मी

आत्ता तुमच्यासाठी हे भेट म्हणून आणले आहे. तुमच्या
बरोबरच्या लोकांना हे सर्व द्या. 28माझ्याहातून घडलेल्या
चुकीबद्दल मला क्षमा करा. परमेश्वर तुमच्या घराण्यावर
कृपादृष्टी ठेवील. तुमच्या घराण्यातील खुप लोक राज्य
करतील. तुम्ही परमेश्वराच्या वतीने युद्ध करता म्हणून
परमेश्वर हे घडवून आणील. तुमच्या हयातीत तुमच्या
बद्दल लोकांच्या मनात कधीही किंतू उदभवणार नाही.
29कोणी तुमच्या जिवावर उठले तर परमेश्वर तुमचे रक्षण
करील. पण गोफणीतील धोंड्याप्रमाणे त्या मारेकऱ्याचा
मात्र जीव घेईल. 30परमेश्वराने तुमच्या भल्याचे आश्वासन
दिले आहे. आणि त्याचे वचन तो प्रत्यक्षात आणेल.
परमेश्वर तुम्हाला इस्राएलचा प्रमुख म्हणून नेमेल. 31निर्दोष
लोकांच्या हत्येचे पाप तुम्हाला लागणार नाही. तुम्ही असा
सूड उगवणार नाही. तुमची भरभराट होईल तेव्हा माझी
आठवण असू द्या."

32तेव्हा दावीद अबीगईलला म्हणाला, "परमेश्वराचे,
इस्राएलच्या परमेश्वराचे आभार मान. मला भेटायला
पाठवल्या बद्दल परमेश्वराची स्तुतीकर. 33तुझ्या
निर्णयाबद्दल देव तुझे भले करो. आज निरपराध लोकांच्या
हत्येपासून तू मला वाचवलेस. 34खरोखर परमेश्वराची
शपथ, तू लगबगीने आत्ता मला भेटायला आली नसतीस
तर उद्या सकाळपर्यंत नाबालच्या कुटुंबातील एकही जण
वाचला नसता."

35दावीदाने मग तिच्या भेटी स्वीकारल्या. तो तिला
म्हणाला, "तू आता निर्धास्तपणे जा. तुझी विनंती मी ऐकली
आहे. मी त्या प्रमाणे वागीन."

## नाबालचा मृत्यु

36अबीगईल नाबालकडे गेली. तो घरीच होता. राजाच्या
इतमामात खात पीत होता. मद्याच्या नशेत झिंगला होता व
मजेत होता. तेव्हा दुसऱ्या दिवशीपर्यंत ती त्याच्याशी या
विषयावर काहीच बोलली नाही. 37सकाळी नशा
उतरल्यावर तो पूर्ण भानावर आला. तेव्हा त्याच्या बायकोने
त्याला सर्व काही सांगितले. हे ऐकून त्याला हृदयविकाराचा
झटका आला आणि तो दगडासारखा कड़क बनला.
38जवळपास दहा दिवसानंतर परमेश्वराने त्याला मृत्युमुखी
लोटले. 36नाबालच्या मृत्युची बातमी दावीदाने ऐकली.
तेव्हा तो म्हणाला, परमेश्वर धन्य होय.नाबालने माझा
अपमान करायचा प्रयत्न केला. पण परमेश्वरानेच
मला वाचवले. माझ्या हातून अपराध घडणार होता. पण
नाबालच्या चुकीबद्दल परमेश्वराने त्याला मृत्युदंड दिला."

दावीदाने मग अबीगईल कडे निरोप पाठवला. तिला
आपली पत्नी होण्याविषयी विनंती केली. 40दावीदचे सेवक
कर्मेल येथे गेले आणि तिला म्हणाले, "दावीदाने आम्हाला
पाठवले आहे. तू त्याच्याशी लग्न करवेस अशी त्याची
इच्छा आहे." 41तिने नतमस्तक होऊन अभिवादन केले.
ती म्हणाली, "मी तुमची दासी आहे. तुमच्या सेवेला
तत्पर आहे. माझ्या धन्याच्या सेवकांचेही चरण धुण्यास
माझी तयारी आहे."*

42मग ती तात्काळ गाढवावर बसून, त्या सेवकांबरोबर
दावीदकडे निघाली. आपल्याबरोबर तिने पाच दासी घेतल्या.
दावीदची ती पत्नी झाली.

43इज्रेल येथील अहीनवाम ही सुध्दा दावीदची बायको
होती. तेव्हा अबीगईल आणि अहीनवाम अशा त्याच्या
दोन बायका झाल्या. 44शौलची मुलगी मीखल हिच्याशीही
त्याचे लग्न झाले होते, पण शौलने आपल्या मुलीला माहेरी
आणून तिचे पालती याच्याशी लग्न लावले. हा पालती
गल्लीम येथील असून लइश याचा मुलगा होता.

## दावीद आणि अबीशय शौलच्या छावणीवर

26 जीफचे रहिवासी गिबा येथे शौलला भेटायला
गेले. त्याला ते म्हणाले, "यशीमोन जवळच्या
हकीला डोंगरात दावीद लपून बसलेला आहे."

2शौल जीफच्या वाळवंटात गेला. त्याच्याबरोबर तेव्हा
इस्राएलचे निवडक तीन हजाराचे सैन्य होते. दावीदचा त्या
सर्वांनी जीफच्या वाळवंटात शोध घेतला. 3यशीमोन
समोरच्या मार्गावर हकीला डोंगरावरच शौलने तळ ठोकला.

दावीद वाळवंटातच होता. त्याला शौलच्या या पाठलागाचे
वृत्त समजले. 4तेव्हा त्याने काही हेर नेमले. त्यांच्याकडून
त्याला शौल हकीला येथे आल्याचे समजले. 5तेव्हा शौलच्या
तळावरच तो गेला. शौल आणि अबनेर त्याला झोपलेले
आढळले. (नेरचा मुलगा अबनेर हा शौलच्या सैन्याचा
प्रमुख होता.) शौल मध्यभागी झोपलेला असून बाकी
सर्वजण त्याच्याभोवती झोपलेले होते.

6दावीद हित्ती, अहीमलेख, आणि सरुवेचा मुलगा अहीशय
यांच्याशी बोलला. (अबीशय हा यवाबचा भाऊ). या दोघांना
दावीदाने विचारले, "माझ्याबरोबर शौलच्या तळावर
यायला कोण तयार आहे"

अबीशय म्हणाला, "मी येतो."

7रात्र झाली दावीद आणि अबीशय छावणीवर पोचले.
शौल मध्यभागी झोपलेला होता. त्याचा भाला उशाकडे
जमिनीत रोवलेला होता. अबनेर आणि इतर सैनिक
भोवताली झोपलेले होते. 8अबीशय दावीदला म्हणाला,
"आज परमेश्वराने शत्रुला तुमच्या हवाली केले आहे.
शौलच्याच भाल्याने मला त्याचा वध करू द्या. एकच
वार मी करीन." 9पण दावीद त्याला म्हणाला, "त्याला
ठार करू नको. परमेश्वराच्या अभिषिक्त राजावर हल्ला
करणाऱ्याला देव करील. 10परमेश्वराच्या जीविताची
शपथ, तोच शौलला शासन करील. शौलला नैसर्गिक
मृत्यू येईल किंवा युध्दात मरण येईल. 11पण परमेश्वराने
निवडलेल्या राजाला मारायची वेळ परमेश्वर माझ्यावर

---

**सेवकांचेही ... आहे** त्या काळात, कोणाचे पाय धुवायची तयारी
असणे यातून त्या माणसाची नम्रता दिसून येते.

आणणार नाही. तू फक्त त्याच्या उशाजवळचा भाला आणि पाण्याचा तांब्या उचल आणि मग आपण जाऊ”

12तेवढा भाला आणि पाण्याचा तांब्या घेऊन दावीद आणि अबीशय छावणीबाहेर पडले. घडलेली गोष्ट कोणालाही समजली नाही. कोणी पाहिले नाही. कोणी जागे झाले नाही. परमेश्वरामुळेच सर्वजण गाढ झोपेच्या अमलाखाली होते.

## दावीद शौलला पुन्हा शरमिंदे करतो

13दावीद नंतर खोरे ओलांडून पलीकडे गेला. शौलच्या छावणी समोरच्या डोंगर माथ्यावर तो उभा राहिला. दावीद आणि शौल यांच्या छावण्यांमध्ये बरेच अंतर होते. 14दावीदाने तेथून सैन्याला आणि अबनेरला हाका मारल्या. “अबनेर, ओ दे” असा पुकारा केला.

अबनेर म्हणाला, “तू कोण आहेस? राजाला हाका मारणारा तू कोण?”

15दावीद म्हणाला, “तू मर्द आहेस ना? इस्राएल मध्ये तुझ्या तोडीचा दुसरा कोणी आहे का? मग तू आपल्या धन्याचे रक्षण कसे केले नाहीस? एक सामान्य माणूस तुमच्या छावणीत शिरतो, धन्याला, राजाला मारायला येतो. 16आणि तुम्ही गाफील राहण्याची चूक करता. परमेश्वराच्या जीविताची शपथ, तुम्ही मृत्युदंडाला पात्र आहात. परमेश्वराच्या अभिषिक्त राजाला, तुमच्या स्वामीला तुम्ही संरक्षण देऊ शकत नाही. शौलच्या उशालगतचा भाला आणि पाण्याचा तांब्या याचा शोध घ्या बरे! कुठे आहेत या वस्तू?”

17शौलला दावीदचा आवाज ओळखू आला. तो म्हणाला, “दावीद मुला, तुझाच का हा आवाज?”

दावीद म्हणाला, “स्वामी मीच बोलतोय.” 18तो पुढे म्हणाला, “धनी, तुम्ही माझा पाठलाग का करत आहात? मी काय केले? माझा अपराध कोणता? 19राजेसाहेब, माझे ऐका. तुमच्या माझ्यावरील क्रोधाचे कारण परमेश्वर असेल तर तो माझ्या अर्पणाचा स्वीकार करील. पण माणसांनी तुम्हाला माझ्याविरुद्ध भडकवले असेल तर परमेश्वर त्यांचा सत्यानाश करो. या लोकांमुळेच मला परमेश्वराने दिलेल्या भूमीतून काढता पाय घ्यावा लागला. “दुसऱ्या कुठल्या परमेश्वराची उपासना कर, इथून चालता हो” असे यांनीच मला सांगितले. 20आता मरताना तरी परमेश्वराचे सान्निध्य मला लाभू द्या. इस्राएलचा राजा तर जणू क्षुल्लक पिसवेच्या शिकारीला निघालाय. डोंगरात तितराची पारध करतोय!”* 21यावर शौल म्हणाला, “मी पापी आहे. तू परत ये. दावीद, माझ्या मुला, माझ्या जिवाचे तुला मोल वाटते हे तू तुझ्या कृतीतून आज दाखवले आहेस तेव्हा आता तुला मी उपद्रव देणार नाही. मी अविचाराने वागलो. फार मोठी चूक केली.”

22दावीद त्याला म्हणाला, “हा राजाचा भाला इथे आहे. तुमच्यापैकी एखाद्या सेवकाने येऊन घेऊन जावा. 23आपल्या करणीचे फळ परमेश्वर आपल्याला देतो. आपल्या योग्य वागण्याचे बक्षीस मिळते, तसंच चुकीचीही शिक्षा भोगावी लागाते. तुझा पराभव करायची संधी आज मला परमेश्वराने दिली होती. पण परमेश्वराच्या अभिषिक्त राजाला मी इजा पोचू दिली नाही. 24तुझ्या आयुष्याचे मला किती महत्व वाटते ते मी आज दाखवले. तसाच माझा जीव परमेश्वराला मोलाचा वाटतो हे तो दाखवून देईल. तो माझी संकटातून मुक्तता करील.”

25तेव्हा दावीदला शौल म्हणाला, “देव तुझे कल्याण करो. दावीद, माझ्या मुला, तुझ्या हातून मोठी कार्ये होतील आणि तू यशस्वी होशील.”

मग दावीद आपल्या मार्गाने गेला आणि शौल स्वगृही आला.

## दावीद पलिष्ट्यांचा आश्रय घेतो

27 पण दावीद मनात म्हणाला, “कधीतरी शौल मला पकडेल आणि ठार मारेल. त्यापेक्षा पलिष्ट्यांच्या भूमीत आश्रय घेणे उत्तम. तेव्हाच इस्राएलमध्ये माझा शोध घ्यायचे शौल थांबवेल. माझी त्याच्या तावडीतून सुटका होईल.

2मग दावीद आपल्या बरोबरच्या सहाशे माणसांना घेऊन इस्राएल सोडून गेला. मवोखचा मुलगा आखीश याच्याकडे ते सगळे आले. आखीश गथचा राजा होता. 3दावीद मग आपल्या बरोबरचे लोक आणि त्यांचा परिवार यांच्यासह गथ येथे आखीशच्या राज्यात राहिला. इज्रेलची अहीनवाम आणि कर्मेलची अबीगईल या दावीदाच्या दोन बायकाही त्याच्यासह होत्या. अबीगईल म्हणजे नाबालची विधवा.

4दावीद गथ येथे पळून गेला असल्याचे लोकांकडून शौलला कळले. तेव्हा त्याने दावीदचा पाठलाग सोडून दिला.

5दावीद आखीशला म्हणाला, “माझ्यावर तुझी मेहेरनजर असेल तर या मुलखातील एखाद्या ठिकाणी मला राहायला जागा दे. मी केवळ एक सेवक आहे. मी असेच कुठेतरी राहायला पाहिजे, तुझ्याबरोबर इथे राजधानीच्या शहरी नव्हे.”

6तेव्हा आखीशने त्याला सिकलाग हे नगर वस्तीला दिले. ते तेव्हापासून आजतागायत यहूदांच्या राजांच्या ताब्यात आहे. 7दावीद त्या पलिष्ट्यांच्या मुलखात एक वर्ष चार महिने राहिला.

---

**डोंगरात तितराची पारध करतोय** डोंगराळ भागात तितराची शिकार करताना त्या पक्षांची दमछाक होईपर्यंत पाठलाग करत असत. मग त्यांना मारत. शौलने दावीदचा असाच पाठलाग चालवला होता. येथे शब्दिक कोटीही अभिप्रेत आहे. “तितर” आणि “हाका मारणे” (23–14) यासाठी असलेल्या हिब्रू शब्दांमध्ये नादसाम्य आहे.

## दावीद आखीशला फसवतो

8शूर जवळच्या तेलेमपासून पार मिसरपर्यंत जे अमालेकी आणि गशूरी लोक राहात त्यांच्यावर दावीदाने आपल्या माणसांसह हल्ले केले. त्यांचा पराभव करून त्यांना लुटले. 9त्या भागातील सर्वांना दावीदाने नेस्तनाबूत केले. त्यांची मेंढरे, गाई गुरे, गाढवे, उंट, कापड चोपड लुटून आखीशच्या स्वाधीन केले. पण त्याने या लोकांपैकी कोणालाही जिवंत ठेवले नाही.

10हे दावीदाने अनेकदा केले. कोणत्या लढाईवरून ही लूट आणली असे आखीशने दरवेळी विचारल्यावर दावीद प्रत्येक वेळी सांगत असे, “यहूदाच्या दक्षिण भागावर हल्ला केला.” किंवा “यरहमेलीच्या दक्षिण प्रांतात लढाई केली” किंवा “केनीच्या दक्षिण प्रदेशावर चढाई केली”*

11पराभूतांपैकी कोणालाही त्याने गथला जिवंत येऊ दिले नाही. दावीदला वाटायचे, “त्यांच्यापैकी कोणी इथे आले तर प्रत्यक्षात काय आहे ते आखीशला कळायचे.” पलिष्ट्यांच्या भूमीत असेपर्यंत दावीदाने असेच केले. 12दावीदाने आखीशचा विश्वास संपादन केला. आखीश मनात म्हणाला, “इस्राएलचे लोक आता दावीदचा द्वेष करतात. त्याच्याशी त्यांचा उभा दावा आहे. तेव्हा दावीद आता चिरकाल माझीच सेवा करील.”

## पलिष्टी युध्दाला सज्ज

28 तेव्हा पुढे पलिष्ट्यांनी इस्राएलवर स्वारी करायला सैन्याची जमवाजमव केली. आखीश दावीदला म्हणाला, “इस्राएलशी युद्ध करायला तू आणि तुझे लोक यांना माझ्या बाजूला असले पाहिजे हे लक्षात ठेव.”

2दावीद म्हणाला, “निश्चितच माझी कामगिरी पाहालच तुम्ही.” आखीश म्हणाला, “उत्तम. मी तुला माझा अंगरक्षक म्हणून नेमतो. तू माझ्या संरक्षणाची काळजी घेशील.”

## शौल आणि एन–दोर येथील एक बाई

3शमुवेल मरण पावला होता. सर्व इस्राएलांनी निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्याच्या गावी रामा येथे शमुवेलचे दफन केले होते. शौलने मांत्रिक आणि दैवज्ञ यांना इस्राएल मधून घालवून दिले होते. 4पलिष्ट्यांनी युद्धाच्या तयारीने शूनेम येथे तळ दिला. शौलने सर्व इस्राएलांना एकत्र आणून गिलबोवा येथे तळ दिला. 5पलिष्ट्यांचे सैन्य पाहून शौल घाबरला. त्याची छाती धडधडू लागली. 6त्याने परमेश्वराची प्रार्थना केली पण परमेश्वराने त्याला उत्तर दिले नाही. स्वप्न, संदेष्टे किंवा उरीम यापैकी कोणत्याही माध्यमातून देव त्याच्याशी बोलला नाही. 7शेवटी शौल आपल्या अधिकाऱ्यांना म्हणाला, एखाद्या भूतविद्याप्रवीण बाईला गाठा. तिलाच या युध्दाविषयी प्रश्न विचारतो. ते अधिकारी म्हणाले, “अशी एक बाई एन–दोन येथे आहे.” 8आपणच शौल आहोत हे ओळखू देऊ नये म्हणून वेष पालटून शौल दोन सेवकांना सोबतीला घेऊन रात्रीच त्या बाईकडे गेला. तिला म्हणाला, “पुढे काय होणार हे मला जाणून घ्यायचे आहे. तेव्हा आपल्या भूतविद्येचा प्रयोग करून, मी ज्याचे नाव घेईन त्याला इथे हजर कर.”

9तेव्हा ती बाई शौलला म्हणाली, “शौलने काय केले माहीत आहेना? त्याने सर्व भूताविद्याप्रवीण आणि भविष्यवादी लोकांना इस्राएलमधून हद्दपार केले आहे. मलाही त्यात अडकवून मारायचा तुझा विचार दिसतो.”

10शौलने परमेश्वराची शपथ घेऊन तिला वचन दिले की परमेश्वर जिवंत असेतो तुला शिक्षा होणार नाही.

11तेव्हा कोणाला समोर आणू असे तिने त्याला विचारले. शौल म्हणाला, शमुवेलला आण.

12आणि तसे झाले. शमुवेलला पाहताच ती मोठ्याने किंचाळली. शौलला ती म्हणाली, “तू मला फसवलेस तू शौल आहेस.”

13तेव्हा राजा म्हणाला, “घाबरू नकोस. तुला काय दिसते ते सांग.” ती म्हणाली, “मला एक आत्मा भूमीतून वर येताना दिसतोय.”

14शौलने विचारले, “तो दिसायला कोणासारखा आहे?” ती म्हणाली, “एक विशिष्ट प्रकारचा अंगरखा घातलेला एक वृध्द आहे.” तो शमुवेलच असल्याचे शौलच्या लक्षात आले. जमिनीपर्यंत वाकून त्याने त्याला अभिवादन केले. 15शमुवेल शौलला म्हणाला, “मला तू त्रास का दिलास? मला का उठवलेस?”

शौल म्हणाला, “मी अडचणीत सापडलो आहे. पलिष्टी माझ्यावर हल्ला करायला आले आहेत. परमेश्वराने माझी साथ सोडली आहे. त्याच्याकडून मला प्रतिसाद मिळत नाही. स्वप्न किंवा संदेष्टे यांच्यामार्फत मला उत्तरे मिळत नाहीत. म्हणून मी तुला बोलावले. मी काय करू ते तू सांग.”

16शमुवेल म्हणाला, “परमेश्वराने तुझा त्याग केला आहे. तो आता दावीद या तुझ्या शेजाऱ्याच्या बाजूचा आहे. तेव्हा मला का त्रास देतोस? 17परमेश्वराने माझ्या द्वारे जेजे सांगितले होते तेच तो आता करत आहे. तुझ्या हातातून राज्य खेचून घेऊन ते तो तुझ्या लगतच्या दुसऱ्यांच्या हाती सोपवत आहे हा शेजारी म्हणजे दावीद. 18तू परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागला नाहीस. परमेश्वराचा क्रोध किती आहे ते दाखवायला तू अमालेक्यांचा नाश करायाला हवा होतास, तसा तू केला नाहीस. म्हणून परमेश्वर आज तुझ्याशी असे वागत आहे. 19पलिष्ट्यांच्या हातून प्रभु तुझा आणि इस्राएल सैन्याचा पराभव करील आणि उद्या तू आणि तुझी मुले इथे माझ्याबरोबर असाल.” 20हे ऐकून शौलने जमिनीवर लोळण घेतली. शमुवेलच्या

**केनीच्या ... चढाई केली** यरहमेली, केनी हे सर्व प्रांत इस्राएलमधील होत. आपण आपल्याच लोकांविरुद्ध इस्राएलाविरुद्ध लढलो असा दावीदाने आखीशचा ग्रह करुन दिला.

भाकिताने त्याला कापरे भरले. त्याआधी दिवसभर आणि रात्र भर त्याने काही खाल्ले नव्हते म्हणून त्याच्या अंगात त्राण उरले नव्हते. 21 तेव्हा ती बाई शौलजवळ आली. तो घाबरल्याचे तिने पाहिले आणि त्याला ती म्हणाली, “पाहा, मी तुझ्या सेवेत आहे. तुझे म्हणणे मी ऐकले आहे. मला जे करायला सांगितले ते मी जीव धोक्यात घालून केले आहे.

22 आता कृपा करून माझे ऐक. मी खायला देते ते खा तरच तुला वाटचाल करायला तरतरी येईल.”

23 पण शौलने खायचा आग्रह निग्रहाने धुडकावून लावला. शेवटी शौल बरोबरच्या सेवकानीही तिच्याच सारखी त्याला खायची विनंती केली. तेव्हा अखेर शौलने त्यांचे म्हणणे मानले. जमिनीवरून उठून तो पलंगावर बसला. 24 एक चांगले धष्टपुष्ट वासरू त्या बाईकडे होते ते तिने पटकन् मारले. मग पीठ मळून त्याची खमीर विरहित भाकर भाजली. 25 शौल आणि त्याचे सेवक यांना खायला दिले. त्या सर्वांनी ते खाऊन त्याच रात्री तिचा निरोप घेतला.

## “दावीद आमच्या बरोबर येत नाही!”

29 पलिष्ट्यांनी आपल्या सर्व सैन्याला अफेक येथे एकत्र आणले. इज्रेल येथे एका झऱ्याजवळ इस्राएलांनी छावणी टाकली. 2 आपल्या शंभर शंभर आणि हजार हजार माणसांच्या समूहा बरोबर पलिष्टी अधिकारी चालले होते. दावीद आणि त्याची माणसे आखीश बरोबर पिछाडीला होती.

3 तेव्हा पलिष्ट्यांच्या सरदारांनी विचारले, “या इब्रींचे येथे काय काम?” आखीशने त्यांना सांगितले, “हा दावीद हा शौलच्या अधिकाऱ्यांपैकी एक होता. आता माझ्या बरोबर तो बराच काळ आहे. शौलला सोडून तो येथे आल्यापासून त्याच्यात मला काही वावगे आढळले नाही.”

4 पण त्या सरदारांना आखीशचा फार राग आला. ते म्हणाले, “या दावीदला परत पाठवा. त्याला दिलेल्या नगरात त्याने परत जावे. आमच्या बरोबर तो युध्दावर येता कामा नये. तो इथे राहिला तर शत्रूलाच आपल्या छावणीत घेतल्यासारखे होईल. आपली माणसे मारून तो त्यांच्या राजाला, शौलला, खूश ठेवील.

5 शौलने हजार शत्रू मारले, तर या दावीदाने लाखोंचा वध केला असे एक गाणे गात इस्राएल लोक जल्लोष करतात तोच हा दावीद.

6 तेव्हा आखीश दावीदला बोलावून म्हणाला, “परमेश्वराच्या जीविताची शपथ, तू माझ्याशी सचोटीने वागला आहेस. माझ्या सैन्यात तुला भरती करून घेणे मला आवडले असते. तू मला सामील झाल्यापासून मला तुझ्यात आक्षेपार्ह काही आढळले नाही. पण पलिष्टी अधिकाऱ्यांचे तुझ्याबद्दल चांगले मत नाही. 7 तेव्हा तू शांतपणे माघारी फीर. पलिष्टी अधिकाऱ्यांना काहीही उपद्रव देऊ नको.”

8 तेव्हा दावीदाने विचारले, “माझे काय चुकले? मी तुमच्याकडे आलो त्या दिवसापासून आजतागायत माझ्यात तुम्हाला काही दोषास्पद आढळले का? माझे स्वामी महाराज यांच्या शत्रूंचा मुकाबला मी का करू नये?’

9 आखीशने त्याला सांगितले, “मला तू आवडतोस. तू देवाने पाठवलेल्या दूतासारखाच आहेस. पण दावीदाने आमच्या बरोबर युध्दावर येऊ नये असे पलिष्टी सरदारांचे म्हणणे आहे. 10 उद्या सकाळी लौकर उठून तू आणि तुझ्या बरोबरची माणसे परत जा. तुम्हाला दिलेल्या नगरात जा. या सरदारांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष कर. तू भला माणूस आहेस उद्या उजाडताच निघून जा.”

11 तेव्हा दावीद आपल्या बरोबरच्या लोकांसह पहाटेच पलिष्ट्यांच्या देशात परतला आणि पलिष्ट्यांनी इज्रेलवर चढाई केली.

## अमालेक्यांची सिकलागवर स्वारी

30 दावीद आणि त्याची माणसे तिसऱ्या दिवशी सिकलाग येथे आली. अमालेक्यांनी सिकलाग आणि नेगेव भागावर हल्ला चढवून सिकलाग शहर भस्मसात केलेले त्यांनी पाहिले. 2 अमालेक्यांनी बायका, गावातील तरुण आणि वृध्द लोक यांना कैदी म्हणून नेले होते. त्यांनी कोणाला ठार केले नाही. पण धरून मात्र नेले.

3 दावीद आणि त्याच्या बरोबरची माणसे सिकलाग येथे येऊन पोचतात तो त्यांना शहर जळत असलेले दिसले. त्यांच्या बायका मुलेबाळे यांना नेण्यात आले होते. अमालेक्यांनी सर्वांना उचलून नेले होते. 4 दावीद आणि त्याच्या बरोबरचे लोक यांनी खूप आक्रोश केला. आक्रोश करून करून त्यांची शक्ती संपुष्टात आली. 5 इज्रेलची अहीनवाम आणि कर्मेल येथील नाबालची बायको आबीगईल या दावीदाच्या बायकांनाही नेले होते.

6 आपल्या सर्व मुलाबाळांना कैदी म्हणून धरून नेलेले पाहून सर्व सैन्याला दु:ख आणि संतापाने घेरले. दावीदला दगडांनी ठेचून मारावे असा विचार लोक बोलून दाखवू लागले. त्यामुळे दावीद फार व्याथित झाला. पण त्याच्या परमेश्वरवर भरवंसा ठेवून खंबीर राहिला. 7 अब्याथार या याजकाला त्याने आपला एफोद आणण्यास सांगितले.

8 दावीदाने मग परमेश्वराला विचारले, “आमच्या कुटुंबियांना धरून नेणाऱ्या शत्रूंचा पाठलाग करू का? शत्रू आमच्या तावडीत सापडेल का?” यावर परमेश्वराने सांगितले, “अवश्य त्यांच्या पाठलागावर जाऊन त्यांना पकड. आपल्या घरच्यांची तू सोडवणूक करशील.”

### दावीद व त्याचे लोक यांना मिसरी गुलाम भेटतो

9–10दावीदाने मग आपल्याबरोबर सहाशे जणांना घेतले
आणि ते सर्व बसोर नदीजवळ पोचले. त्यांच्यापैकी दोनशेजण
इतके थकले की त्यांना पुढे जाववेना. ते तिथेच राहिले.
तेव्हा उरलेली चारशे माणसे दावीद बरोबर पुढे
अमालेक्यांच्या पाठलागावर गेली. 11त्यांना एका शेतात
एक मिसरी आढळला. त्याला त्यांनी दावीदकडे नेले.
त्याला खाऊ पिऊ घातले. 12अंजिराच्या ढेपेचा एक तुकडा
आणि द्राक्षाचे दोन घड त्यांनी त्याला दिले. तेव्हा त्याला
बरे वाटू लागले. तीन दिवस आणि रात्री त्याच्या पोटात
अन्न पाणी गेले नव्हते. 13दावीदाने त्याला विचारले, “तुझा
मालक कोण? तू आलास कुठून?”

तो मिसरी म्हणाला, “मी मिसरी असून एका अमालेक्यांचा
गुलाम आहे. तीन दिवसांपूर्वी मी आजारी पडलो तेव्हा
माझ्या धन्याने मला सोडून दिले. 14करेथी राहतात त्या
नेगेव प्रदेशावर, यहूदा प्रांतावर व कालेब लोकांच्या दक्षिण
भागावर आम्ही हल्ले केले होते. सिकलागही आम्ही
जाळले.”

15दावीद त्याला म्हणाला, “आमच्या बायकामुलांना तुम्ही
नेलेत तिथे मला घेऊन जाशील का?”

तेव्हा तो मिसरी दास म्हणाला, “तुम्ही परमेश्वरापुढे
शपथ घेतलीत तर मी तुम्हाला मदत करीन. पण तुम्ही
मला मारणार नाही किंवा माझ्या धन्याकडे देणार नाही
असे मला वचन द्या.”

### दावीद अमालेक्यांचा पराभव करतो

16त्या मिसरी माणसाने दावीदला अमालेक्यांच्या
तळापर्यंत नेले. तेथे ते लोक खात पित आणि मौजमजा
करत इतस्तत: पसरले होते. पलिष्टी आणि यहूदा
प्रांतातून आणलेल्या लुटीचा ते मनसोक्त उपभोग घेत होते.
17दावीदाने त्यांच्यावर हल्ला करून त्यांना मारले.
सूर्योदयापासून दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत त्यांच्यात
लढाई झाली. अमालेक्यांपैकी चारशे तरुण आपापल्या
उंटांवर स्वार होऊन पळून गेले. ते वगळता कोणीही
वाचले नाही.

18आपल्या दोन बायकांसकट अमलेक्यांनी जे जे पळवले
होते ते सर्व दावीदाने परत मिळवले. 19कोणीही गहाळ
झाले नाही. मुलं, वृध्द, माणसं, मुलगे, मुली सर्व मैल्यावान
वस्तू ज्याच्या त्याला मिळाल्या. अमालेक्यांच्या लूटीतील
सर्व काही दावीदाने परत आणले. 20त्यांची सर्व शेरडे
मेंढरे आणि गुरे दावीदाने आणली. दावीदाच्या माणसांनी
त्यांना पुढे घातले आणि ते म्हणाले, “हे दावीदाने मिळवलेले
बक्षीस आहे.”

### सर्वांचे वाटे समान

21जे दमले भागलेले लोक दावीद बरोबर पुढे जाऊ
शकले नाहीत आणि बसोर नदीपाशीच थांबले होते तेथे,
त्या दोनशे जणांकडे दावीद आला. दावीद आणि त्याचे
सैन्य येताना पाहून ते त्यांना सामोरे आले. त्यांनी दावीदाच्या
सैन्याचे आगत स्वागत केले. दावीदाने त्यांचे क्षेम कुशल
विचारले. 22दावीद बरोबर गेलेल्यांमध्ये काही विघ्नसंतोषी
माणसे होती. ती म्हणाली, “ही दोनशे माणसे आपल्या
बरोबर पुढे आली नाहीत. तेव्हा त्यांना आपल्या लुटीतील
हिस्सा मिळणार नाही. त्यांची बायका मुले तेवढी ज्याची
त्याने घ्यावीत.”

23दावीद त्यांना म्हणाला, “नाही, असे वागू नका.
परमेश्वराने आपल्याला काय दिले त्याचा विचार करा.
परमेश्वरामुळे शत्रुचा पराभव आपण करू शकलो. 24तुम्ही
म्हणता ते कोणी ऐकणार नाही. जे इथे सामानसुमानाजवळ
थांबले ते आणि युध्दावर आले ते अशा सर्वांना सारखाच
वाटा मिळेल. वाटण्या समान होतील.” 25तेव्हापासून
इस्राएलसाठी हीच वहिवाट पडली; हाच नियम झाला.
आजतागायत तो चालू आहे.

26दावीद सिकलाग येथे आला. त्याने अमालेक्यांकडून
आणलेल्या लुटीतील काही वस्तू आपले मित्र, यहूदातील
वडीलधारी मंडळी यांना पाठवल्या. त्याने सांगितले,
“परमेश्वराच्या शत्रूकडून आणलेल्या लुटीतील ही भेट”
27बेथेल, दक्षिणेकडील रामोथ, यत्तोर, 28अरोएर,
सिफमोथ, एष्टमो, 29राखाल, येरहमेलीतील नगरे तसेच
केनीची नगरे, 30हर्मा, कोर आशान, अथाख, 31आणि
हेब्रोन अशा ज्या ज्या ठिकाणी दावीद आपल्या साथीदारांसह
फिरत असे तेथील वडीलधाऱ्यांनाही त्याने या लुटीतील
वस्तू पाठवल्या.

### शौलचा मृत्यू

31 पलिष्ट्यांची इस्राएलांशी लढाई झाली तेव्हा
इस्राएलांनी शत्रूपासून पळ काढला. बरेच इस्राएल
लोक गिलबोवा डोंगरात मारले गेले. 2शौल आणि त्याची
मुले यांच्याशी पलिष्टी निकराने लढले. योनाथान,
अबीनादाब आणि मलकीशुवा या शौलच्या मुलांचा
पलिष्ट्यांनी वध केला.

3युद्ध शौलच्या हाताबाहेर जाऊ लागले. तिरंदाजांनी
शौलवर बाणांचा वर्षाव केला आणि शौल चांगलाच घायाळ
झाला. 4तो आपल्या शस्त्रवाहक सेवकाला म्हणाला, “तुझी
तलवार उचल आणि माझ्यावर चालव. नाहीतर हे परकीय
मला भोसकून माझी टिंगल टवाळी करतील.” पण त्या
शस्त्रवाहकाने भेदरून या गोष्टीला नकार दिला.

तेव्हा शौलने आपली तलवार उपसली व स्वत:ला
भोसकले. 5शस्त्रवाहकाने शौल मेला हे पाहून आपली
तलवार काढली आणि आत्महत्या केली. शौल बरोबरच
त्याने देह ठेवला.

6अशा प्रकारे त्या दिवशी शौल, त्याची तीन मुले
आणि त्याचा शस्त्रवाहक असे सर्व एकदम मृत्युमुखी
पडले.

## शौलच्या मरणाचा पलिष्ट्यांना आनंद

[7]खोऱ्याच्या दुसऱ्या बाजूला राहणाऱ्या इस्राएली लोकांनी, इस्राएली सैन्याला पळ काढताना पाहिले. शौल आणि त्याची मुले मरण पावल्याचे त्यांना आढळले. तेव्हा त्यांनी ही आपापली गावे सोडून पलायन केले. त्या ठिकाणी मग पलिष्ट्यांनी वस्ती केली.

[8]दुसऱ्या दिवशी हे पलिष्टी मृतांच्या अंगावरील चीजवस्तू लुबाडायला आले. त्यांना शौल आणि त्याची तीन मुले गिलबोवा डोंगरात मरुन पडलेली आढळली.

[9]पलिष्ट्यांनी शौलचे मुंडके कापले आणि चिलखत, शस्त्रे पळवली सर्व देशभरच्या लोकांना आणि देवळांमधून त्यांनी हे वर्तमान कळवले. [10]शौलची शस्त्रे त्यांना अष्टारोथच्या देवळात ठेवली आणि त्याचा मृतदेह बेथ-शानच्या गावकुसावर टांगला.

[11]पलिष्ट्यांनी शौलची काय गत केली ते याबेश-गिलाद येथील रहिवाश्यांनी ऐकले. [12]तेव्हा तेथील सैनिक रातोरात तेथून निघून बेथ-शान येथे पोचले. तेथे गावकुसावर टांगलेला शौलचा मृतदेह त्यांनी काढला. शौलच्या मुलांची प्रेते ही काढली. याबेश येथे त्यांनी हे सर्व मृतदेह आणले आणि याबेश येथील सर्वांनी त्यांचे दहन केले. [13]मग त्यांच्या अस्थी काढून याबेश मधील झाडाखाली पुरल्या. सर्व लोकांनी सात दिवस उपास करून शोक प्रगट केला.

# 2 शमुवेल

### शौलाच्या निधनाचे वृत्त दावीदाला समजते

1 अमालेक्यांचा पाडाव करुन दावीद सिकलाग येथे परतला. शौलाच्या मृत्यूनंतर लगेचची ही घटना आहे. दावीदाला सिकलाग येथे येऊन दोन दिवस झाले होते.
2तिसऱ्या दिवशी तिथे एक तरुण सैनिक आला. तो शौलाच्या छावणीतला होता. त्याचे कपडे फाटलेले आणि डोके धुळीने माखलेले होते. सरळ दावीदापाशी येऊन त्याने लोटांगण घातले.
3दावीदाने त्याला "तू कोठून आलास?" म्हणून विचारले.
त्याने आपण नुकतेच इस्राएलांच्या छावणीतून आल्याचे सांगितले.
4तेव्हा दावीद त्याला म्हणाला, "मग युध्दात कोणाची सरशी झाली ते सांग बरे!"
तो म्हणाला, "लोकांनी लढाईतून पळ काढला. बरेच जण युध्दात कामी आले. शौल आणि त्याचा मुलगा योनाथान दोघेही प्राणाला मुकले.'
5दावीद त्या तरुणाला म्हणाला, "हे दोघे मेले हे तुला कसे कळले?"
6यावर तो तरुण सैनिक म्हणाला, "योगायोगाने मी गिलबोवाच्या डोंगरावरच होतो. तिथे शौल आपल्या भाल्यावर पडलेला मला दिसला. पलिष्ट्यांचे रथ आणि घोडेस्वार त्याच्या अगदी नजीक येऊन ठेपले होते.
7शौलाने मागे वळून पाहिले तेव्हा त्याला मी दिसलो. त्याने मला बोलावले आणि मी ओ दिली.
8त्याने माझी चौकशी केली. मी अमालेकी असल्याचे त्याला सांगितले.
9तेव्हा शौल म्हणाला, 'मला जबर दुखापत झाली आहे. तेव्हा मला मारुन टाक. एवीतेवी मी मरणाच्या दारातच उभा आहे.'
10त्याची जखमी अवस्था पाहता तो वाचणार नाही हे दिसतच होते तेव्हा मी त्याचा वध केला. मग त्याचा मुकुट आणि दंडावरचे आभूषण काढून घेतले. स्वामी महाराज, त्याच वस्तू येथे तुमच्यासाठी मी आणल्या आहेत."
11हे ऐकून दावीदाला इतके दु:ख झाले की त्या भरात त्याने आपले कपडे फाडले. त्याच्या सोबतच्या लोकांनीही त्याचे अनुसरण केले.
12दु:खाने त्यांनी आक्रोश केला. संध्याकाळ पर्यंत त्यांनी काही खाल्ले नाही. शौल, त्याचा मुलगा योनाथान त्याचप्रमाणे परमेश्वराचे लोक म्हणजे इस्राएलाचे लोक मृत्यु मुखी पडले या बद्दल त्यांनी शोक केला.

### दावीद त्या अमालेक्याच्या वधाचा हुकूम सोडतो

13शौलाच्या मृत्युची बातमी आणणाऱ्या त्या तरुण सैनिकाशी दावीद बोलला. त्याला दावीदाने विचारले, "तू कुठला?" त्याने सांगितले, "मी अमालेकी असून एका परदेशी माणसाचा मुलगा आहे."
14दावीदाने त्याला विचारले, "देवाने निवडलेल्या राजाचा वध करताना तुला भीती कशी वाटली नाही?"
15–16पुढे दावीद त्याला म्हणाला, "तुझ्या मृत्यूला तूच जबाबदार आहेस. परमेश्वराच्या अभिषिक्त राजाला आपण मारले असे तू बोलून चुकला आहेस. तू अपराधी आहेस याची तूच आपल्या तोंडाने साक्ष दिली आहेस." दावीदाने मग आपल्या एका तरुण सेवकाला बोलावून या अमालेक्याचा वध करण्यास फर्मावले. त्याप्रमाणे त्या इस्राएली तरूणाने अमालेक्याला मारले.

### शौल आणि योनाथानला उद्देशून दावीदाचे शोकगीत

17शौल आणि त्याचा पुत्र योनाथान यांना उद्देशून दावीदाने एक शोकपूर्ण गीत म्हटले.
18त्याने यहूद्यांना एक शोकगीत शिकवायला सांगितले हे शोकगीत धनुर्विलाप या नावाने ओळेखले जाते. याशारच्या पुस्तकात हे गीत लिहिलेले आहे.

19"हे इस्राएला, तुझे सौंदर्य तुझ्या डोंगरावर नष्ट झाले पाहा, हे शूर कसे धारातीर्थी पडले!
20ही बातमी गथ मध्ये सांगू नका अष्कलोनच्या रस्त्यांवर जाहीर करु नका. नाहीतर पलिष्ट्यांच्या त्या मुली (शहरे) आनंदित होतील. नाहीतर (सुंता न केलेल्या) त्या परकीयांच्या मुलींना (शहरांना) आनंद होईल.
21गिलबोवाच्या डोंगरावर पाऊस किंवा दव न पडो! तिथल्या शेतातून यज्ञात अर्पण करण्यापुरतेही काही न उगवो! कारण शूरांच्या ढालींना तिथे गंज चढला शौलची ढाल तेलपाण्यावाचून तशीच पडली
22योनाथानच्या धनुष्याने आपल्या वाटच्या शत्रुंचे पारिपत्य केले शौलाच्या तलवारीने ही आपले बळी घेतले. रक्ताचे पाट वाहवून त्यांनी लोकांना वधिले, बलदंडांची हत्या केली.
23शौल आणि योनाथान यांनी आयुष्यभर परस्परांवर प्रेम केले, एकमेकांना आनंद दिला मृत्यूनेही त्यांची ताटातूट

केली नाही. गरुडांहून ते वेगवान् आणि सिंहापेक्षा बलवान्
होते!
24इस्राएली कन्यांनो, शौलासाठी शोक करा. किरामिजी
वस्त्रे त्याने तुम्हाला दिली वस्त्रांवरचे सोन्याचे जरीकाम
त्याने दिले.
25युध्दात शूर पुरुष कामी आले गिलबोवाच्या डोंगरावर
योनाथानला मरण आले.
26बंधो, योनाथान, मी अतिशय दु:खी असून तुझ्यासाठी
फार अस्वस्थ आहे. तुझ्या सहवासाचा लाभ मला मिळाला.
स्त्रियांच्या प्रेमापेक्षाही तुझे माझ्यावरील प्रेम अधिक होते
27या युध्दात पराक्रमी पुरुषांचे पतन झाले त्यांची शस्त्रे
नष्ट झाली."

## दावीद आणि त्याचे लोक हेब्रोनला जातात

2 दावीदाने मग परमेश्वराला विचारले, "मी यहूदातील
एखाद्या नगरात जाऊ का?"
तेव्हा परमेश्वर म्हणाला, "हो खुशाल जा" दावीदाने
विचारले, "कुठे जाऊ?" देवाने सांगितले, "हेब्रोनला जा."
2तेव्हा दावीद आपल्या दोन्ही बायकांसह हेब्रोनला गेला.
(इज्रेलची अहीनवाम आणि कर्मेलच्या नाबालची विधवा
अबीगईल या त्याच्या दोन बायका) 3 आपल्या बरोबरच्या
लोकांनाही दावीदाने त्यांच्या त्यांच्या परिवारासकट सोबत
घेतले. हेब्रोन येथे आणि आसपासच्या गावांमध्ये या सर्वांनी
वस्ती केली.

## दावीदाचे याबेशच्या लोकांना धन्यवाद

4यहूदा येथील लोक मग हेब्रोनला आले आणि त्यांनी
दावीदाला अभिषेक करुन यहूदाचा राजा म्हणून घोषित
केले. मग त्याला ते म्हणाले, "याबेश गिलादच्या लोकांनी
शौलचा दफनविधी केला." 5तेव्हा दावीदाने याबेश
गिलादच्या लोकांकडे दूत पाठवून संदेश दिला, "आपला
स्वामी शौल याचा दफनविधी करुन तुम्ही जो दयाभाव
दाखवला आहे त्याबद्दल परमेश्वर तुमचे भले करो. 6देव
तुमच्याशी प्रामाणिक राहील, तुमच्यावर प्रेमाची पाखर
घालील. मीही तुमच्याशी दयाळूपणाने वागेन. कारण तुम्ही
हे काम केलेले आहे. 7आता खंबीर राहा आणि धैर्याने
वागा. आपला स्वामी शौल मरण पावला असला तरी
यहूदा वंशातील लोकांनी मला राज्याभिषेक केला आहे."

## ईश-बोशेथ राजा बनतो

8नेरचा मुला अबनेर हा शौलचा सेनापती होता. इकडे
तो शौलचा मुलगा ईश-बोशेथ याला घेऊन महनाईम
याठिकाणी आला. 9आणि त्याने ईश-बोशेथला गिलाद,
अशेर, इज्रेल, एफ्राईम, बन्यामीन आणि सर्व इस्राएल*
यांच्यावर राजा म्हणून नेमले. 10हा शौलाचा पुत्र
ईश-बोशेथ इस्राएलवर राज्य करु लागला तेव्हा चाळीस
वर्षांचा होता. त्याने दोन वर्षे कारभार पाहिला. पण यहूदा
वंशाचा पाठिंबा दावीदाला होता. 11दावीद हेब्रोनमध्ये राज्य
करत होता. त्याने यहूदांच्या घराण्यावर साडेसात वर्षे राज्य
केले.

## भयंकर झुंज

12नेरचा मुलगा अबनेर आणि शौलपुत्र ईश-बोशेथचे
सेवक महनाईम सोडून गिबोन येथे आले. 13सरुवेचा मुलगा
यवाब आणि दावीदचे सेवकही बाहेर पडून गिबोनला आले.
गिबोनच्या तलावाशी या दोन गटांची गाठ पडली. तलावाच्या
दोन बाजूला दोन्ही सैन्ये उतरली.
14अबनेर यवाबाला म्हणाला, "आपल्यातील तरुण
सैनिकांनी उठून समोरासमोर येऊन दोन हात करावे."
यवाब म्हणाला, "ठीक आहे होऊन जाऊ दे."
15तेव्हा दोन्ही बाजूचे तरुण सैनिक उठले. त्यांनी
आपापली संख्या पाहिली. शौलपुत्र ईश-बोशेथ याच्या
बाजूने झुंज द्यायला त्यांनी बन्यामीनच्या वंशातील बाराजण
निवडले आणि दावीदाच्या सैन्यातील बाराजणांना घेतले.
16प्रत्येकाने आपल्या प्रतिस्पर्ध्याचे मस्तक धरुन त्याच्या
कुशीत तलवार खुपसली. तेव्हा सर्व एकदम पडले. म्हणून
त्या जागेचे नाव हेलकथहसूरीम म्हणजेच "धारदार सुऱ्यांचे
क्षेत्र" असे पडले हे स्थळ गिबोनमध्ये आहे. 17त्या दिवशी
तेथे तुंबळ युध्द झाले. दावीदाच्या सैन्याने त्या दिवशी
अबनेर आणि इस्राएल लोक यांचा पराभव केला.

## अबनेरकडून असाएलचा वध

18यवाब, अबीशय आणि असाएल हे सरूवेचे तीन पुत्र.
त्यापैकी असाएल हा वेगवान धावपटू होता, अगदी
रानातल्या हरणासारखा चपळ होता. 19त्याने अबनेरचा
पाठलाग सुरु केला. अबनेरचा पाठलाग करताना
त्याने डावीकडे अथवा उजवीकडे वळून सुद्धा पाहिले
नाही. 20अबनेर ने मागे वळून विचारले, "तू असाएल
ना?"

## असाएलने होकार भरला

21[असाएलला इजा होऊ नये असे अबनेरला वाटत
होते.] म्हणून तो असाएलला म्हणाला, "माझा पाठलाग
थांबव. एखाद्या तरुण सैनिकाला धर. त्याचे चिलखत
स्वत:साठी घे." पण असाएलने त्याचे न ऐकता अबनेरचा
पाठलाग चालूच ठेवला.
22पुन्हा अबनेर त्याला म्हणाला, "हा पाठलाग थांबव
नाहीतर मला तुला मारावे लागेल आणि तसे झाले तर
तुझा भाऊ यवाब याला मी तोंड दाखवू शकणार नाही."
23तरीही असाएल ऐकेना. तेव्हा अबनेरने आपल्या भाल्याचे

**इस्राएल** कधी याचा अर्थ देशवाचक असतो इथे वंशवाचक म्हणून घ्यायचा आहे.

मागचे टोक असाएलच्या पोटात खुपसले. भाला सरळ त्याच्या पोटात घुसून पाठीतून निघाला. असाएलला तिथे तात्काळ मृत्यू आला.

### यवाब आणि अबीशय अबनेरच्या मागावर

असाएलचा मृतदेह तिथेच जमिनीवर पडलेला होता.
लोकांनी ते पाहिले आणि ते तिथेच थांबले. 24पण यवाब
आणि अबीशय यांनी अबनेरचा पाठलाग चालू ठेवला. ते
अम्मा टेकडीपाशी पोहोंचले तेव्हा सूर्य नुकताच मावळत
होता. (ही टेकडी गिबोन वाळवंटाच्या रस्त्यावरील गिहा
गावासमोर आहे.) 25बन्यामीनच्या घराण्यातील लोक
अबनेरकडे आले आणि या डोंगराच्या शिखरावर उभे
राहिले. 26तेव्हा यवाबाला हाक मारून अबनेरने त्याला
विचारले, "आपापसातील या प्राणघातक लढाया अशाच
चालू ठेवायच्या आहेत का? याचे पर्यवसान दुःखात होणार
आहे हे तू जाणतोसच. आपल्याच भाऊबंदांचा पाठलाग
थांबवायला तुझ्या लोकांना सांग." 27तेव्हा यवाब म्हणाला,
"तू हे सुचवलेस ते चांगले झाले. नाहीतर, देवाच्या जीविताची
शपथ, हे लोक सकाळच्या वेळी आपल्याच बांधवांचा
पाठलाग करत राहिले असते." 28आणि यवाबाने रणशिंग
फुंकले. त्याच्या बाजूच्या लोकांनी इस्राएल लोकांचा
पाठलाग थांबवला. एवढेच नव्हे तर त्यांनी पुढे इस्राएलांशी
युध्दही केले नाही.

29अबनेर आणि त्याच्या बरोबरची माणसे यांनी मग
रातोरात यार्देन खोऱ्यातून कूच केले. नदी पार करुन
महनाइमला पोचेपर्यंत ते वाटचाल करत होते.

30यवाबाने अबनेरचा पाठलाग थांबवला आणि तो
परतला. आपल्या लोकांना त्याने एकत्र केले तेव्हा असाएल
धरुन दावीदाच्या सेवकांपैकी एकोणीस जण बेपत्ता
असल्याचे त्याला आढळून आले. 31पण दावीदाच्या लोकांनी
बन्यामीनच्या कुळातील अबनेरची तीनशे साठ माणसे
मारली होती. 32दावीदाच्या लोकांनी असाएलचे दफन
बेथलहेम येथे त्याच्या वडीलांच्या थडग्यातच केले.

यवाब आणि त्याची माणसे रात्रभर प्रवास करुन उजाडता उजाडता हेब्रोन येथे पोचली.

### इस्राएल आणि यहूदा यांच्यात लढाई

3 दावीद आणि शौल यांच्या घराण्यांमध्ये दीर्घकाळ युध्द चालू राहिले. दिवसेंदिवस दावीदाची ताकद वाढत चालली तर शौलचे घराणे कमकुवत बनत गेले.

### हेब्रोन येथे दावीदाच्या सहा मुलांचा जन्म

2हेब्रोन येथे दावीदाला मुलगे झाले, त्यांचा क्रम असा
इज्रेलची अहीनवाम हिच्यापासून पाहिला मुलगा झाला तो
अम्मोन. 3दुसरा मुलगा किलाब, हा कर्मेलची नाबालची
विधवा अबीगईल हिचा मुलगा. अबशालोम तिसरा, गशूरचा
राजा तलमय याची मुलगी माका ही याची आई. 4अदोनीया
चवथा, हग्गीथ ही त्याची आई. शफाट्या पाचवा, त्याची
आई अबीटल. 5दावीदाची बायको एग्ला हिच्यापासून
सहावा इथ्राम झाला. हेब्रोनमध्ये जन्मलेले हे त्याचे सहा
पुत्र.

### अबनेर दावीदाला येऊन मिळण्याचे ठरवतो

6शौल आणि दावीद यांच्या घराण्यात चाललेल्या
लढायांमध्ये शौलाच्या सैन्यातील अबनेरचे बळ वाढत
चालले. 7शौलची रिस्पा नामक उपपत्नी होती. ती अय्याची
मुलगी. ईश-बोशेथ अबनेरला म्हणाला, "माझ्या
वडिलांच्या दासीशी तू शरीर संबध का ठेवतोस?"

8या बोलण्याचा अबनेरला संताप आला. तो म्हणाला,
"शौलशी आणि त्याच्या घराण्याशी मी एकनिष्ठ राहिलेलो
आहे. दावीदाच्या हातून मी तुमचा पराभव होऊ दिला
नाही. मी विश्वासघात केला नाही.* पण आता तू मला
या बाईच्या संदर्भात दूषण देत आहेस.

9–10आता मात्र मी निर्धाराने सांगतो की, देवाने भाकित
केल्याप्रमाणे सर्व घडेल. शौलाच्या घराण्याकडून राज्य
काढून घेऊन ते दावीदाकडे सोपवण्याचे भाकित
परमेश्वराने केले आहे. परमेश्वर दावीदाला इस्राएल आणि
यहूदा यांचा राजा करणार आहे. दानपासून बैर-शेब्यापर्यंत
त्याचे राज्य असेल. माझ्याहातून आता हे सर्व प्रत्यक्षात
आले नाही तर देव खुशाल माझे वाईट करो."

11ईश-बोशेथ हे ऐकून इतका घाबरला की त्याने
काहीही प्रत्युत्तर केले नाही.

12अबनेरने दूतांकरवी दावीदाला निरोप पाठवला, "ह्या
प्रदेशांवर कोणी राज्य करावे असे तुला वाटते?
माझ्याशबरोबर करार कर. म्हणजे इस्राएलचा राजा म्हणून
तुला मान्यता मिळवून द्यायला मी मदत करीन."

13यावर दावीद म्हणाला, "हे छान झाले, मी करार
करायला तयार आहे. आता माझे एक मागणे आहे.शौलची
मुलगी मीखल हिला आपल्याबरोबर आणलेस तरच मी
तुला भेटीन."

### पत्नी मीखलशी दावीदाची पुनर्भेट

14शौलचा मुलगा ईश-बोशेथ याच्याकडे दावीदाने
जासूदांकरवी निरोप पाठवला, "माझी पत्नी मीखल हिला
माझ्याकडे पाठवून द्यावे. ती मला देण्यात आलेली आहे.
तिच्या प्राप्तीसाठी मी शंभर पलिष्ट्यांचा वध केला होता."

15तेव्हा ईश-बोशेथने लईशचा मुलगा पालटीयेल
याच्याकडून मीखलला आणण्यास माणसे पाठवली.
16पालटीयेल हा मीखलचा नवरा. तो तिच्यामागोमाग
बहूरीम पर्यंत रडतरडत गेला. पण अबनेरने त्याला परत
जाण्यास सांगितले तेव्हा तो मागे फिरला.

---

**विश्वासघात केला नाही** शब्दशः अर्थ "मी यहूदाच्या कन्याचे डोके आहे काय?"

### अबनेरचे दावीदाला मदतीचे आश्वासन

17अबनेरने इस्राएलाच्या वडीलधाऱ्या मंडळीकडे निरोप
पाठवला, "दावीदाला राजा करावे असे तुमच्या मनात
होते. 18आता ते प्रत्यक्षात आणा. परमेश्वराने दावीद विषयी
म्हटले आहे 'पलिष्टी लोक आणि इतर शत्रू यांच्यापासून
मी माझ्या इस्राएल लोकांचे संरक्षण करीन. माझा सेवक
दावीद याच्यामार्फत मी हे करीन.'"

19अबनेरने हे सर्व हेब्रोन येथे दावीदाच्या कानावर
घातले. बन्यामीन घराण्यातील लोकांशीही तो या विषयी
बोलला. त्यांना आणि इस्राएल लोकांना ते चांगले वाटले.

20एवढे झाल्यावर तो आपल्या बरोबर वीस जणांना
घेऊन हेब्रोन येथे दावीदाकडे आला. दावीदाने अबनेर
आणि त्याच्या बरोबरचे हे सर्वलोक यांना मेजवानी दिली.

21अबनेर दावीदाला म्हणाला, "महाराज, सर्व इस्राएल
लोकांना मी आता आपल्या पायाशी एकत्र आणतो. ते
तुमच्याशी करार करतील. मग आपल्या इच्छेप्रमाणे तुम्ही
इस्राएलवर राज्य कराल."

तेव्हा दावीदाने अबनेरला निरोप दिला. अबनेर शांततेने
परत गेला.

### अबनेरचा मृत्यू

22इकडे यवाब आणि दावीदाचे लोक युध्दावरुन परत
आले. त्यांनी शत्रूकडून बऱ्याच मौल्यवान वस्तू लुटून
आणल्या. दावीदाने निरोप दिल्यावर अबनेर नुकताच
शांतचित्ताने तेथून गेला होता. तेव्हा हेब्रोन येथे दावीदाजवळ
तो अर्थातच नव्हता. 23यवाब सर्वसैन्यासह हेब्रोन येथे
आला. सैन्यातील लोक यवाबाला म्हणाले, "नेरचा मुलगा
अबनेर दावीदाराजाकडे आलेला होता आणि दावीदाने
त्याला शांत मनाने जाऊ दिले होते."

24तेव्हा यवाब राजाकडे आला आणि म्हणाला, "हे
आपण काय केलेत? अबनेर येथे आलेला असताना तुम्ही
त्याला तसेच जाऊ दिलेत! असे का? 25या नेरच्या मुलाला
तुम्ही ओळखताच. त्याचा यात कावा आहे. तो येथील
बित्तंबातमी काढायला आला होता." 26मग दावीदाकडून
निघून यवाबाने आपले दूत अबनेरच्या मागावर पाठवले.
त्यांनी त्याला सिरा विहिरीजवळ गाठले आणि परत आणले.
दावीदाला याची काहीच कल्पना नव्हती. 27हेब्रोन येथे
त्याला आणल्यावर यवाबाने त्याला गुप्त मसलत
करण्यासाठी म्हणून वेशीच्या आत घेतले आणि अबनेरच्या
पोटात वार केला. अबनेर गतप्राण झाला. यवाबाचा भाऊ
असाएल याला अबनेरने मारले होते त्याचा यवाबाने सूड
उगवला.

### दावीदाचा अबनेर करता शोक

28दावीदाला हे वृत्त समजले तेव्हा तो म्हणाला, "नेरचा
मुलगा अबनेर याच्या खुनाच्या बाबतीत मी आणि माझे
राज्य निर्दोष आहोत. परमेश्वर हे जाणतो. 29यवाब आणि
त्याचे कुटुंबीय या कृत्याला जबाबदार आहेत. तेव्हा अपराधी
ते आहेत. [याचे फळ त्यांना भोगावे लागेल] त्याच्या
वंशातील लोक महारोग, पंगुत्व यांनी ग्रासले जातील,
युध्दात मारले जातील. त्याची अन्नान्नदशा होईल."

30गिबोनच्या लढाईत अबनेरने असाएलला मारले.
आपल्या भावाच्या वधाचे प्रत्युत्तर म्हणून यवाब आणि
अबीशय यांनी अबनेरला मारले.

31–32दावीदाने यवाब व त्याच्या बरोबरचे सर्व लोक
यांना सांगितले, "तुमची ही वस्त्रे फाडा आणि शोक झाला
असल्याचे दाखवणारी वस्त्रे घाला. अबनेरच्या मृत्युबद्दल
दु:ख व्यक्त करा." त्यांनी हेब्रोन येथे अबनेरचे दफन
केले. दावीद अत्यंविधीला हजर होता. अबनेरच्या
कबरीपाशी राजा आणि इतर सर्व जण यांनी विलाप केला.

33तेथे दावीद राजाने हे शोकगीत म्हटले

"एखाद्या मूढ गुन्हेगाराप्रमाणे अबनेर मेला,नाही का?
34अबनेर, अरे, तुझ्या हातात बेड्या नव्हत्या, पाय
साखळदंडांनी बांधले नव्हते नाही रे, तुला कपटी लोकांनी
मारले."

मग पुन्हा सर्वांनी अबनेरसाठी शोक व्यक्त केला.
35दावीदाने काही तरी खाऊन घ्यावे म्हणून दिवसभर
लोकांनी त्याची मनधरणी केली. पण दावीदाने एक निर्धार
केला होता. "सूर्यास्तापूर्वी मी भाकर किंवा तत्सम काहीही
खाल्ले तरी देव मला शासन करो, मला संकटात टाको
'असे तो बोलला होता." 36लोकांनी हे सर्व पाहिले आणि
दावीद राजाची वर्तणूक पाहून त्यांना आनंद झाला.
37दावीदाने अबनेरला मारलेले नाही याबद्दल यहूदा आणि
इस्राएल लोकांची खात्री पटली.

38दावीद राजा आपल्या सेवकांना म्हणाला, "आज एक
महत्वाचा पुढारी इस्राएलमध्ये मारला गेला हे तुम्ही
जाणताच. 39त्याच दिवशी राजा म्हणून माझा राज्याभिषेक
झाला. सरुवेच्या मुलांचे हे वर्तन मला फार त्रासदायक
झाले आहे. परमेश्वर त्यांच्या गुन्ह्याबद्दल त्यांना तसेच
शासन करो."

### शौलाच्या घराण्यावर संकटे

4 हेब्रोन येथे अबनेर मरण पावल्याचे शौलाचा मुलगा
ईश-बोशेथ याला कळले. तेव्हा तो आणि इतर सर्व
लोक भयभीत झाले. 2तेव्हा दोन माणसे ईश-बोशेथला
भेटायला आले. ते दोघे सेनानायक असून रेखाब आणि
बाना ही त्यांची नावे. हे रिम्मोनचे मुलगे (रिम्मोन हा
बैरोथचा बैरोथ नगर बन्यामिन वंशाचे, म्हणून हे ही
बन्यामिनी होत. 3पण बैरोथ येथील सर्व लोक गित्तईम
येथे पळून गेले. अजूनही ते तिथेच आहे.)

4शौलाचा मुलगा योनाथान याला मफीबोशेथ नावाचा
मुलगा होता. इज्रेलहून शौल आणि योनाथान यांच्या
निधनाची बातमी आली तेव्हा हा मफीबोशेथ पाच वर्षांचा
होता. शत्रूच्या भीतीने त्याची दाई त्याला घेऊन पळाली.

पळापळीत तिच्या हातून तो खाली पडला आणि दोन्ही पायांनी अधू झाला.

5बैरोथच्या रिम्मोनची मुले, रेखाब आणि बाना ही दुपारच्या वेळी ईश-बोशेथच्या घरी गेली. ऊन असल्यामुळे ईश-बोशेथ तेव्हा आराम करत होता. 6-7गहू घेण्याच्या मिषाने रेखाब आणि बाना घरात घुसले. आपल्या शयनगृहात तेव्हा ईश-बोशेथ झोपला होता. त्याच्यावर हल्ला करुन या दोघांनी त्याला ठार मारले. त्याचे शिर धडावेगळे करुन ते बरोबर घेतले. मग यार्देनच्या खोऱ्यातून रात्रभर वाटचाल करत. 8ते हेब्रोन येथे पोचले. आणि दावीदाला त्यांनी ईश-बोशेथचे मस्तक अर्पण केले.

रेखाब आणि बाना दावीद राजाला म्हणाले, "शौल पुत्र ईश-बोशेथ या आपल्या शत्रूचे हे मस्तक. त्याने तुमच्या वधाचा प्रयत्न केला. त्याबद्दल आज परमेश्वरानेच शौलला आणि त्याच्या कुटुंबियांना तुमच्यासाठी शिक्षा केली."

9पण दावीद त्या दोघांना म्हणाला, "देवाशपथ परमेश्वरानेच मला आजपर्यंत सर्व संकटांतून सोडवले आहे.

10यापूर्वीही एकदा आपण चांगली बातमी आणली आहे असे वाटून एकाने मला सांगितले, पाहा शौल मेला त्याला वाटले या बातमीबद्दल मी त्याला बक्षीस देईन पण मी त्याला धरून सिकलाग येथे ठार केले. 11तुम्हालाही आता ठार करुन या भूमीवरुन नष्ट केले पाहिजे. कारण, आपल्या घरात, आपल्या बिछान्यावर झोपलेल्या एका चांगल्या माणसाला तुम्ही दुष्टाव्याने ठार केलेत."

12असे म्हणून दावीदाने आपल्या तरुण सैनिकांना रेखाब आणि बाना यांना ठार करायची आज्ञा दिली. तेव्हा या तरुणांनी त्यांचे हात पाय तोडून त्यांना हेब्रोन येथील तळ्यापाशी टांगले. मग हेब्रोन येथे अबनेरच्या कबरीजवळच त्यांनी ईश-बोशेथच्या मस्तकाचे दफन केले.

## इस्राएल लोक दावीदाला राजा करतात

5 इस्राएलच्या सर्व घराण्यांमधील लोक हेब्रोन येथे दावीद पाशी एकत्र आले आणि त्याला म्हणाले, "आपण इस्राएल लोकांना एकाच कुटुंबातले, एकाच रक्तामांसाचे आहोत.

2शौल राज्यावर होता तेव्हा सुध्दा तूच युध्दात आमचे नेतृत्व करत होतास इस्राएलांना युध्दावरुन तूच परत आणत होतास. खुद्द परमेश्वर तुला म्हणाला, 'माझ्या इस्राएल प्रजेचा तू मेंढपाळ होशील. इस्राएलवर राज्य करशील.'"

3मग इस्राएल मधील सर्व वडीलधारी मंडळी दावीद राजाला भेटायला हेब्रोन येथे आली. दावीदाने या सर्वांबरोबर परमेश्वरासमक्ष करार केला. त्यानंतर दावीदाला त्या सर्वांनी इस्राएलचा राजा म्हणून अभिषेक केला.

4दावीद राज्य करायला लागला तेव्हा तीस वर्षांचा होता. त्याने चाळीस वर्षे राज्य केले. 5हेब्रोनमध्ये यहूदावर त्याने साडेसात वर्षे राज्य केले आणि तेहतीस वर्षे सर्व इस्राएल आणि यहूदावर यरुशलेम मधून राज्य केले.

## दावीद यरुशलेम नगर जिंकतो

6राजाने आपले लोक बरोबर घेऊन यरुशलेम येथे राहणाऱ्या यबूसी लोकांवर स्वारी केली तेव्हा ते यबूसी दावीदाला म्हणाले, "तू आमच्या नगरात* प्रवेश करु शकणार नाहीस. आमच्या येथील आंधळे आणि पांगळे सुध्दा तुम्हाला थोपवतील." (दावीदाला आपल्या नगरात प्रवेश करणे जमणार नाही असे त्यांना वाटले म्हणून ते असे म्हणाले. 7तरीपण दावीदाने सियोन किल्ला घेतला. दावीद नगर असे त्याचे नाव पडले.)

8दावीद त्यादिवशी आपल्या लोकांना म्हणाला, "यबूसी लोकांचा पराभव करायचा असेल तर खंदकमार्गे जा आणि त्या आंधळ्या पांगळ्या' दावीदाच्या शत्रूंना गाठा."

यावरूनच, "आंधळे पांगळे यांना या घरात येता यायचे नाही" अशी म्हण पडली.

9दावीदाचा मुक्काम किल्लयात होता व त्याचे नाव "दावीदनगर" असे दिले. मिल्लो नामक भाग त्याने उभारला. नगराच्या आत त्याने आणखी बऱ्याच इमारती उभारल्या. 10सर्वशक्तिमान परमेश्वर त्याच्या बाजूचा होता म्हणून दावीद अधिकाधिक समर्थ होत गेला.

11सोरेचा राजा हीराम याने आपले दूत दावीदाकडे पाठवले. गंधसरूची झाडे, सुतार, गवंडी हे ही त्याने पाठवले. त्यांनी दावीदासाठी निवासस्थान उभारले. 12तेव्हा, परमेश्वराने आपल्याला खरोखरच इस्राएलाचा राजा केले आहे हे दावीदाला पटले. तसेच देवाने आपल्या लोकांसाठी, इस्राएल राष्ट्रासाठी, त्याच्या (दावीदाच्या) राज्याला महत्व दिले आहे हे ही त्याला उमगले. 13हेब्रोनहून आता दावीद यरुशलेम येथे आला. तेथे त्याने आणखी लग्ने केली आणि त्याच्याकडे आता अधिक दासी आणि बायका होत्या. यरुशलेम येथे त्याच्या आणखी काही मुलांचा जन्म झाला. 14त्याच्या या यरुशलेम येथे जन्मलेल्या मुलांची नावे अशी. शम्मुवा, शोबाब, नाथान, शलमोन, 15इभार, अलीशवा, नेफग, याफीय, 16अलीशामा, एल्यादा आणि अलीफलेट.

## दावीदाचे पलिष्ट्यांशी युध्द

17दावीदाला इस्राएल लोकांनी राज्याभिषेक केल्याचे पलिष्ट्यांनी ऐकले. तेव्हा त्याला शोधून त्याचा वध करण्यासाठी म्हणून ते निघाले. पण हे वृत्त समजल्यावर दावीद यरुशलेम येथील किल्ल्यात आला. 18पलिष्ट्यांनी रेफाईमच्या खोऱ्यात तळ दिला. 19दावीदाने परमेश्वराला विचारले, "मी पलिष्ट्यांवर चढाई करु का? तुझे साहाय्य मला लाभेल का?"

---

**तू ... नगर** यरुशलेम नगर डोंगरावर वसवलेले असून त्याच्या भोवती उंच तटबंदी आहे. म्हणून ते दुर्गम आहे.

परमेश्वर उत्तरला, “होय, पलिष्ट्यांच्या पराभवात मी
तुला खात्रीने मदत करील.”
[20]तेव्हा दावीद बाल-परासीम येथे गेला आणि
त्याने पलिष्ट्यांचा पराभव केला. दावीद तेव्हा म्हणाला,
“खिंडार पडलेल्या धरणातून पाणी घुसावे तसा
परमेश्वर माझ्यादेखत शत्रूवर तुटून पडला.” म्हणूनच
दावीदाने त्या जागेचे नाव “बाल परासीम” म्हणजेच खिंडार
पाडणारा प्रभू' असे ठेवले. [21]पलिष्ट्यांनी आपल्या देवांच्या
मूर्ति त्या ठिकाणीच टाकून दिल्या. दावीदाने आणि
त्याच्या माणसांनी त्या तेथून हलवल्या. [22]पलिष्ट्यांनी
पुन्हा एकदा रेफाईमच्या खोऱ्यात तळ दिला. [23]दावीदाने
प्रार्थना केली. यावेळी परमेश्वराने सांगितले, “तेथे जाऊ
नको त्यांना वळसा घालून पाठीमागे जा. मग तुतीच्या
झाडाजवळ त्यांच्यावर हल्ला कर. [24]तुम्ही झाडावर चढून
बसा. त्यांच्या सैन्याच्या चढाईचा आवाज तुम्हाला
झाडाच्या शेंड्यावरुन ऐकू येईल. तेव्हा मात्र झटपट उठाव
करा कारण परमेश्वराच पलिष्ट्यांच्या पाडावाला पुढे
होईल.”
[25]दावीदाने मग परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे हालचाली
केल्या. पलिष्ट्यांचा पराभव केला. गेबापासून गेजेरपर्यंत
त्यांचा पाठलाग करुन त्यांना घालवून दिले.

## देवाचा करारकोश यरुशलेममध्ये आणतात

6 दावीदाने पुन्हा इस्राएलमधून निवडक तीस हजार
माणसे निवडून सैन्य तयार केले. [2]त्यासह तो पवित्र
करार कोश यरुशलेमला आणण्यासाठी यहूदातील बाला
येथे गेला. देवाची उपासना करायची असली म्हणजे हा
कोश जेथे असेल तेथे लोकांना जावे लागे. हा पवित्र
करार कोश म्हणजे देवाचे सिंहासन आहे. करुब देवदूतांच्या
प्रतिकृती त्यावर होत्या. त्यावर परमेश्वर राजासारखा
बसलेला होता. [3]अबीनादाबच्या डोंगरावरील घरातून
दावीदाच्या लोकांनी हा पवित्र कोश आणला. मग तो
एका नव्या गाडीवर ठेवला. अबीनादाबचे मुलगे उज्जा
आणि अह्यो हे ती गाडी हाकीत होते.
[4]अबीनादाबच्या डोंगरावरील घरातून हा पवित्र कोश
त्यांनी वाहून आणला. अह्यो पवित्र कोशापुढे चालू लागला.
[5]तेव्हा देवदाराच्या लाकडापासून केलेली नानाविध वाद्ये
आणि वीणा, सारंगी, डफ, डमरु, झांजा वाजवत दावीद
आणि त्याच्या बरोबरचे सर्व इस्राएल लोक नाचत कोशापुढे
चालू लागले.
[6]ते सर्व नाखोनच्या खळ्यापाशी आले तेव्हा बैल
अडखळल्याने कोश गाडीतून पडायला लागला. तेव्हा
उज्जाने तो सावरला. [7]पण परमेश्वराचा त्याच्यावर कोप
होऊन उज्जाला मरण आले. पवित्र कोशाला स्पर्श करुन
त्याने देवाविषयी अनादर दाखवला. तेव्हा करार
कोशाशेजारीच उज्जा गतप्राण झाला. [8]या घटनेमुळे दावीद
फार खिन्न झाला आणि त्याने या जागेचे नाव “पेरेस-उज्जा”
म्हणजेच “उज्जाला शासन” असे ठेवले. आजही ते नाव
प्रचलित आहे.
[9]मात्र दावीदाला त्या दिवशी परमेश्वराचा धाक वाटू
लागला. तो मनात म्हणाला, “आता मी हा पवित्र कोश
माझ्याकडे कसा आणू?” [10]परमेश्वराचा पवित्र कोश
(पवित्र कोशाची पेटी) आपल्याबरोबर दावीद नगरात
आणण्याची दावीदाची इच्छा नव्हती आणि त्याने तो कोश
(दावीदानगरात न हलवता) एका बाजूस नेऊन गथच्या
ओबेद-अदोम याच्या घरी ठेवला. [11]तिथे तो कोश तीन
महिने होता. ओबेद-अदोमच्या कुटुंबाला देवाने आशीर्वाद
दिला. [12]पुढे लोक दावीदाला म्हणाले, “ओबेद अदोमच्या
कुटुंबाला आणि त्याच्या सर्व मालमत्तेला परमेश्वराचा
आशीर्वाद आहे. कारण पवित्र करार कोश तेथेच आहे.”
तेव्हा दावीदाने तो पवित्र कोश त्याच्या घरातून आपल्याकडे
आणला. यावेळी दावीदाचा आनंद गगनात मावत नव्हता.
[13]कोश वाहून नेणारे लोक सहा पावले चालून गेल्यावर
दावीदाने एक बैल आणि एक धष्टपुष्ट गोऱ्हा यांचा बळी
दिला. [14]सुती एफोद घालून दावीद परमेश्वरापुढे नाच
करत होता.
[15]दावीद आणि सर्व इस्राएल लोक आनंदाने बेभान
झाले होते. नगरात कोश आणताना ते जयजयकार करत
होते, शिंग वाजवत होते. [16]शौलाची मुलगी मीखल हे सर्व
खिडकीतून पाहात होती. कोश नगरात आणत असताना
दावीद त्यापुढे नाचत, उड्या मारत होता. मीखलने हे
पाहिले तेव्हा तिला खेद वाटला. दावीद स्वत:चे हसे करुन
घेत आहे असे तिला वाटले.
[17]या करार कोशासाठी दावीदाने राहुटी उभारली होती.
त्यात योग्य जागी इस्राएली लोकांनी तो ठेवला. मग दावीदाने
परमेश्वरापुढे होमार्पणे आणि शांत्यर्पणे वाहिली.
[18]हे झाल्यावर दावीदाने सर्वांना सर्वशक्तिमान
परमेश्वराच्या वतीने आशीर्वाद दिले. [19]शिवाय
इस्राएलाच्या प्रत्येक स्त्री पुरूषांस त्याने भाकरीचा तुकडा,
किसमिसाच्या ढेपेचा तुकडा आणि खजूर मिश्रित भाकरीचा
तुकडा दिला. मग सर्वजण आपापल्या घरी गेले.

## मीखलचा दावीदावरील राग

[20]दावीद मग घरातील सर्वांना आशीर्वाद द्यायला घरात
आला. तेव्हा शौलकन्या मीखल हिने त्याला गाठले आणि
ती म्हणाली, “इस्राएलाच्या राजाने आज आपला मान
राखला नाही. नोकरा चाकरांसमोर, दासी समोर त्या
मूर्खांपैकीच एक असल्याप्रमाणे तुम्ही आपले कपडे
काढलेत.*” [21]तेव्हा दावीद तिला म्हणाला, “तुझे वडील
किंवा तुझ्या घराण्यातील दुसरे कोणी या सर्वांना वगळून

**नोकरा चाकरा ... काढलेत** एफोद हे वस्त्र फक्त दावीदाच्या अंगावर होते. त्याने अंग किती झाकले जाते याची आज आपल्याला कल्पना नाही.

परमेश्वराने मला निवडले आहे. सर्व इस्राएलांचा मी नेता आहे. तेव्हा मी परमेश्वरापुढे असाच नाचतगात जाणार. 22मी याच्याही पुढची पायरी गाठीन. तुला आदर नसेल कदाचित् पण ज्या दासींचा तू उल्लेख केलास त्यांना माझ्याबद्दल आभिमान वाटतो.”

23शौलाची कन्या मीखल हिला मूलबाळ झाले नाही. ती तशीच विनापत्य वारली.

## दावीदाचा मंदिर बांधायचा बेत

7 राजा दावीद आपल्या नवीन घरात राहू लागला आणि परमेश्वराने त्याला भोवतालच्या सर्व शत्रूपासून विसावा दिला. 2एकदा नाथान या संदेष्ट्यास दावीद म्हणाला, “इथे मी गंधसरुच्या लाकडापासून केलेल्या डौलदार घरात राहतोय आणि परमेश्वराचा पवित्र कोश मात्र अजूनही राहुटीतच आहे. [त्या पवित्र कोशा साठी आता चांगला निवारा बांधायला हवा.”

3नाथान राजाला म्हणाला, “आपल्या मनात आहे तसे करा. परमेश्वराची तुम्हाला साथ आहे.”

4पण त्यादिवशी रात्री नाथानला परमेश्वराचे वचन ऐकू आले. परमेश्वर म्हणाला, 5“दावीद या माझ्या सेवकाला जाऊन सांग. ‘परमेश्वराचा निरोप असा आहे. माझ्यासाठी निवासस्थान बांधणारा तू नव्हेस. 6इस्राएल लोकांना मिसरमधून बाहेर काढले मी त्यावेळी कुठल्या ही घरात राहात नव्हतो मी राहूटीतूनच फिरलो. तेच माझे घर. 7इस्राएल लोकांबरोबर मी जेथे जेथे गेलो, त्या त्या ठिकाणी, माझ्या इस्राएल लोकांचे मेंढपाळ व्हा म्हणून ज्यांना मी सांगितले त्या इस्राएल वंशातील कोणालाही मी कधीही, माझ्यासाठी तू गंधसरूचे, घर का बांधले नाहीस? असे विचारले नाही.’

8“शिवाय दावीदाला हे ही सांग ‘सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो. तू कुरणात मेंढरांमागे फिरत होतास तेव्हाच मी तुला निवडले आहे. तेथून तुला काढून मी तुला इस्राएल लोकांचा नेता केले. 9तू जेथे जेथे गेलास तेथे तेथे तुला साथ दिली. तुझ्या शत्रूंचा तुझ्यासाठी पाडाव केला. पृथ्वीवरील इतर महान लोकांप्रमाणे मी तुला सुप्रसिद्ध करीन. 10–11माझ्या इस्राएल लोकांसाठी मी जागेची निवड केली. त्यांना राहायला हक्काची जागा दिली. त्यांना रुजवले. त्यांना जागोजाग भटकंती करायला लागू नये म्हणून मी हे केले. पूर्वी मी त्यांच्यावर शास्ते नेमले पण दुर्जनांनी त्यांना त्रास दिला. आता तसे घडणार नाही. तुझ्या सर्व शंत्रूपासून मी तुला शांती देतो. मी तुला असे अभिवचन देतो की तुझे घराणे कायमचे राजघराणे होईल.)

12“तुझे जीवन संपुष्टात आले म्हणजे मृत्यूनंतर तुझ्या पूर्वजांशेजारी तुझे दफन होईल. पण मी तुझ्या मुलांपैकीच कोणालातरी राजा करीन. 13तो माझ्या नावाप्रीत्यर्थ घर (मंदिर) बांधील. त्याचे राज्य मी नेहमीसाठी मजबूत करीन. 14मी त्याचा पिता आणि तो माझा पुत्र असेल. त्याच्या हातून पाप घडले तर लोकाकडून मी त्याला शासन घडवीन. तेच माझे चाबूक 15पण माझे त्याच्यावरचे प्रेम खंडित होणार नाही. त्याच्यावर माझी कृपादृष्टी राहील. शौलावरील माझा लोभ आणि प्रेम संपुष्टात आले. मी तुझ्याकडे वळलो तेव्हा तुझ्यासमोर मी त्याला दूर ढकलले. पण तुझ्या घराण्याच्या बाबतीत मी असे करणार नाही. 16राजसत्ता तुझ्याच वंशात चालू राहील याचा विश्वास बाळग. तुझे राज्य अबाधित राहील. तुझे सिंहासन टिकून राहील.”

17नाथानने दावीदाला हा दृष्टांत आणि देवाचे सर्व बोलणे ऐकवले.

## दावीदाची प्रार्थना

18यानंतर दावीद आत जाऊन परमेश्वरासमोर बसला आणि म्हणाला, “हे प्रभो, परमेश्वरा, मला एवढी किंमत तू का देतोस? माझे घराणे तुला महत्वाचे का वाटते? तू मला एवढे मोठे का केलेस? 19मी केवळ तुझा सेवक आहे. [तुझ्या माझ्यावर किती लोभ आहे!] पुढे माझ्या वंशजांबद्दलही तू असाच लोभ दाखवला आहेस. सर्वांशी तुझा व्यवहार नेहमी असाच असतो का? 20मी आणखी काय बोलणार? प्रभु परमेश्वरा, तू तुझ्या सेवकाला जाणतोसच. 21तू करणार म्हणालास आणि तुला तसे करायची इच्छा आहे तेव्हा या अदभुत गोष्टी खरोखरच घडतील. मला, तुझ्या सेवकाला, तू त्याची पूर्णकल्पनाही द्यायचे ठरवलेस. 22माझ्या प्रभो परमेश्वरा, तू खरोखरच महान आहेस. तुझ्यासारखा कोणी नाही. तुझ्याखेरीज अन्य कोणी देव नाही. तुझ्या लीला आम्ही ऐकल्या आहेत म्हणून आम्ही हे जाणतो.

23“पृथ्वीच्या पाठीवर इस्राएलसारखे राष्ट्र नाही. इस्राएलाची प्रजा ही खास प्रजा आहे. [ती गुलाम होती] तिला तू मिसरमधून सोडवलेस आणि मुक्त केलेस. तिला आपली प्रजा मानलेस. इस्राएलांसाठी तू महान आणि अद्भुत चमत्कार केलेस.

24तू निरंतर त्यांना स्वत:च्या कवेत घेतलेस. तू त्यांचा देव झालास.

25“आता तर, परमेश्वर देवा, या तुझ्या सेवकासाठी काही गोष्टी सिध्दीस नेणार आहेस. तुझ्या वचनाप्रमाणे कृपा करुन तसेच होऊ दे. माझा वंश सतत राज्य करु दे. 26मग तुझ्या नावाचा महिमा वाढेल. लोक म्हणतील, ‘सर्वशक्तिमान परमेश्वर देवाची इस्राएलवर सत्ता आहे. तुझी सेवा करायला सेवक दावीद याच्या घराण्याला बळ मिळू दे.’

27“सर्वशक्तिमान परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, तूच हे मला दाखवले आहेस. तू म्हणालास, ‘मी तुझ्यासाठी घर बांधीन’ म्हणून मी, तुझा सेवक तुझ्यापुढे ही प्रार्थना करण्याचे साहस करत आहे. 28प्रभो, परमेश्वरा तूच आमचा देव आहेस. तुझ्या सांगण्यावर माझा पूर्ण भरंवसा

आहे. या सर्व चांगल्या गोष्टी माझ्याबाबतीत तुझ्या या
सेवकाच्या बाबतीत घडणार आहेत असे तू म्हणालास.
29आता माझ्या घराण्याला आशीर्वाद दे. माझा वंश सातत्याने
चालू दे. हे प्रभो परमेश्वरा तूच तसे म्हणाला आहेस
आमच्यावर तुझ्या आशीर्वादाचे छत्र कायमचे राहील असा
तुझा आशीर्वाद आहे."

## दावीद अनेक युध्दे जिकंतो

8 यानंतर दावीदाने पलिष्ट्यांचा पराभव केला. आणि
त्यांच्या राजधानीच्या शहरावरील त्यांची सत्ता त्यांच्या
हातून काढून घेतली. 2मवाबातील लोकांचाही त्याने पराभव
केला. त्या सर्वांना त्याने जमिनीवर पडून रहायला लावले
आणि दोरीच्या सहाय्याने त्यांच्या रांगा केल्या त्यापैकी
दोन रांगांतील लोकांना ठार केले आणि तिसऱ्या रांगेतील
लोकांना जीवदान दिले. अशाप्रकारे मवाबातील हे लोक
दावीदाचे अंकित बनले. त्यांनी दावीदाला खंडणी दिली.

3रहोबचा मुलगा हजर हा सोबाचा राजा होता. फरात
नदीजवळच्या आपल्या जमिनीचा ताबा घ्यायला, तिची
हद्द निश्चित करायला दावीद तिकडे गेला तेव्हा त्याने या
हददेजरचा पराभव केला. 4सतराशे घोडेस्वार आणि
वीसहजारांचे पायदळ त्याने हददेजर कडून बळकावले.
रथाचे शंभर घोडे वगळता सर्व घोड्यांना त्याने कुचकामी
करुन टाकले.

5दिमिष्कामधील अरामी लोक हददेजरच्या मदतीला
आले. त्या बावीस हजार अरामींनाही दावीदाने ठार केले.
6मग त्याने दिमिष्कातील अरामात आपली ठाणी बसवली.
हे अरामी लोकही दावीदाचे अंकित झाले आणि त्यांनी
खंडणी आणली. दावीदाला परमेश्वराने तो जाईल तेथे
यश दिले. 7हददेजरच्या सैनिकांकडील सोन्याच्या ढाली
दावीदाने ताब्यात घेऊन त्या यरुशलेमला आणल्या
8"हददेजरच्या ताब्यातील बेटा आणि बेरोथा (हददेजरची
नगरे) येथील अनेक पितळी वस्तुही दावीदाने आणल्या.
9हमाथचा राजा तोई याने, दावीदाने हददेजरच्या संपूर्ण
सैन्याचा पाडाव केल्याचे ऐकले. 10तेव्हा त्याने आपला
मुलगा योराम याला राजा दावीद याच्याकडे पाठवले.
हददेजरशी लढाईकरुन त्याचा पाडाव केल्याबद्दल योरामने
त्याचे अभिनंदन करुन त्याला आशीर्वाद दिले. (हददेजरने
यापूर्वी तोईशी लढाया केलल्या होत्या) योरामने सोने,
चांदी आणि पितळेच्या भेटवस्तू दावीदासाठी आणल्या होत्या.
11दावीदाने त्या स्वीकारुन परमेश्वराला अर्पण केल्या.
या आधीच्या समार्पित वस्तूंबरोबरच त्या ठेवून दिल्या.
आपण पराभूत केलेल्या राष्ट्रांमधून दावीदाने लूट
आणलेली होती. 12दावीदाने अरामी, मवाबी, अम्मोनी,
पलिष्टी आणि अमालेकी यांचा पराभव केला. रहोबचा
मुलगा, सोबाचा राजा हददेजर याचा पराभव केला. 13क्षार
खोऱ्यातील अठरा हजार अरामींचा पाडाव करुन तो
परत आला तेव्हा त्याचा जयजयकार झाला. 14अदोम
मध्ये त्याने शिपायांची ठाणी बसवली. अदोमच्या सर्व प्रांतात
अशी ठाणी बसवली. अदोमलोक त्याचे अंकित झाले.
जेथे जाईल तेथे परमेश्वराने दावीदाला विजय मिळवून
दिला.

## दावीदाचे राज्य

15दावीदाची सत्ता सर्व इस्राएलवर होती. त्याने प्रजेला
न्यायाने धर्माने वागवले 16सरूवेचा मुलगा यवाब सेनापती
होता. अहीलुदाचा मुलगा यहोशाफाट हा अखबारनवीस
होता. 17अहीटुबाचा मुलगा सादोक आणि अब्याथारचा
मुलगा अहीमलेख हे याजक होते. सराया कार्यवाह होता.
18यहोयादचा मुलगा बनाया हा करेथी आणि पलेथी*
यांचा प्रमुख होता. दावीदाची मुले महत्वाचे नेते होते.

## शौलाच्या कुटुंबियांवर दावीदाची मेहेरनजर

9 दावीदाने विचारले, "शौलाच्या घराण्यातील कोणी
व्यक्ती अजून राहिली आहे का? योनाथान साठी
मला तिच्यावर दया दाखवली पाहिजे" 2सीबा नावाचा एक
चाकर शौलाच्या घराण्यातला होता. दावीदाच्या सेवकांनी
त्याला दावीदासमोर पाचारण केले. दावीदाने त्याला
विचारले, "तूच सीबा काय?" सीबा म्हणाला, "होय, मीच
तुमचा दास सीबा."

3तेव्हा राजा म्हणाला, "शौलाच्या घराण्यातील कोणी
आहे काय? देवाच्या कृपेचा लाभ त्याला मिळाला पाहिजे."
सीबा राजाला म्हणाला, "योनाथानचा मुलगाच आहे. तो
दोन्ही पायांनी पांगळा झाला आहे." 4तेव्हा दावीदाने सीबाला
त्याचा ठावाठिकाणा विचारला. सीबाने सांगितले, "तो
लो-दबार येथे, अम्मीएलचा मुलगा माखीर याच्या घरी
आहे." 5तेव्हा राजा दावीदाने योनाथानच्या मुलाला
आणण्यासाठी तेथे माणसे पाठवली. 6योनाथानचा मुलगा
मफीबोशेथ आला आणि राजापुढे नतमस्तक होऊन उभा
राहिला."मफीबोशेथ?" राजाने विचारले.

मफीबोशेथ म्हणाला, "होय, मीच तुमचा सेवक
मफीबोशेथ.'

7त्याला दावीद म्हणाला, "भिऊ नको. माझा तुझ्यावर
लोभ आहे. तुझ्या वडीलांसाठी मी एवढे करीन. तुझे
आजोबा शौल यांची सर्व जमीन मी तुला परत देईन.
माझ्या पंक्तीला नेहमी बसण्याचा मान तुला मिळेल."

8मफीबोशेथने पुन्हा दंडवत घातले. तो म्हणाला, "मेलेल्या
कुत्र्याला एवढीही माझी किंमत नाही. पण आपण या
सेवकावर कृपादृष्टी करत आहात." 9दावीदाने मग शौलचा
सेवक सीबा याला बोलवले. त्याला तो म्हणाला, "शौलाच्या

---

**करेथी आणि पलेथी** हे दावीदाचे खास अंगरक्षक. जुन्या आर्मेक भाषांतरात यांचा उल्लेख "धनुर्धर आणि दगडफेक करणारे" असा आहे. अचूक शिरसंधान करणारे, नेमबाजी करणारे असा अर्थ घेता येईल.

मालकीचे जे जे काही आहे ते मी या तुझ्या मालकांच्या
नातवाला, मफीबोशेथला दिले आहे. 10त्याची जमीन तू
कसायची. तुझी मुले आणि सेवक यांनी एवढे केले पाहिजे.
तुम्ही शेतात पीक काढा म्हणजे तुझ्या मालकाच्या नातवाचा
त्यावर निर्वाह होईल. पण तो नेहमी माझ्या पंक्तीला जेवेल."
सीबाला पंधरा मुलगे आणि वीस नोकर होते. 11सीबा
दावीदाला म्हणाला, "मी तुमचा दास आहे. माझ्या धन्याच्या,
राजाच्या हुकुमाप्रमाणेच मी वागेन." तेव्हा मफीबोशेथ
दावीदाच्या मुलांप्रमाणेच दावीदाच्या पंक्तीला बसून जेवू
लागला. 12मफीबोशेथला मीखा नावाचा लहान मुलगा
होता. सीबाच्या परिवारातील सर्व लोक मफीबोशेथचे
चाकर झाले. 13मफीबोशेथ दोन्ही पायांनी पांगळा होता.
यरुशलेम येथे त्याचे वास्तव्य होते. तो नित्य राजाच्या
टेबलावर भोजन करीत असे.

## दावीदाच्या दूतांचा हानून कडून अपमान

10 पुढे अम्मोन्यांचा राजा नाहाश मरण पावला.
त्याच्यानंतर त्याचा मुलगा हानून राज्यावर आला.
2दावीदाने विचार केला, "नाहाशचा माझ्यावर लोभ होता
तेव्हा त्याचा मुलगा हानून याच्याशी मी सौजन्याने वागेन."
दावीदाने मग हानूनला पितृशोक झाला म्हणून त्याच्या
सांत्वनासाठी आपल्या सेवकांना पाठवले.
तेव्हा ते सेवक अम्मोन्यांच्या प्रांतात आले. 3पण अम्मोनी
अधिकारी हानूनला, आपल्या धन्याला म्हणाले, "तुमच्या
सांत्वनासाठी माणसे पाठवून दावीद तुमच्या वडीलांचा मान
राखतोय, असे तुम्हाला वाटते का? उलट गुप्तपणे तुमच्या
प्रांतातील खबर काढायला त्याने या लोकांना पाठवले
आहे. त्यांचा तुझ्याविरुद्ध उठाव करायचा बेत आहे."
4तेव्हा हानूनने दावीदाच्या त्या सेवकांना ताब्यात घेतले,
आणि त्यांच्या दाढ्या अर्ध्या छाटल्या त्यांची कंबरेखालची
वस्त्रे मध्यभागी फाडून ठेवली. एवढे करुन त्यांना त्याने
परत पाठवले.
5लोकांकडून हे दावीदाला कळले तेव्हा त्याने आपल्या
या सेवकांची गाठ घेण्यास माणसे पाठवली. हे सेवक खूप
शरमिंदे झाले होते. दावीदाने त्यांना सांगितले, "तुमच्या
दाढ्या वाढून पूर्ववत होईपर्यंत यरीहो येथेच राहा. मग
यरुशलेम येथे या."

## अम्मोन्यांवर चढाई

6आपण दावीदाचे शत्रुत्व ओढवले आहे हे अम्मोन्यांच्या
लक्षात आले. तेव्हा त्यांनी बेथ-रहोब आणि सोबा येथील
अरामी माणसे मोलाने घेतली. अराम्यांचे पायदळ वीस
हजारांचे होते. शिवाय माका राजाची एक हजार माणसे
तसेच तोबचे बारा हजार सैनिक घेतले.
7दावीदाने हे ऐकले तेव्हा आपल्या लढाऊ सैन्यासह
यवाबाला पाठवले. 8अम्मोनी बाहेर पडून युध्दाला सज्ज
झाले. नगराच्या वेशीपाशी त्यांनी व्यूह रचला. सोबा आणि
रहोब येथील अरामी, तसेच माकाचे व तोबचे सैनिक हे
सर्व मिळून स्वतंत्रपणे युद्धासाठी उभे राहिले.
9अम्मोन्यांनी पुढून तसेच मागून आपल्याला घेरले आहे
हे यवाबाने पाहिले. तेव्हा त्याने इस्राएलातील उत्तम योध्द्यांची
निवड केली. त्यांना अराम्यांच्या विरुद्ध लढायला सज्ज
केले. 10मग आपला भाऊ अबीशय याच्या हवाली आणखी
काही माणसांना करुन अम्मोन्यांचा सामना करायला
सांगितले. 11यवाब अबीशयला म्हणाला, "अरीमी मला
भारी पडत आहेत असे दिसले तर तू माझ्या मदतीला ये.
जर अम्मोनी प्रबल आहेत असे लक्षात आले तर मी
तुझ्या मदतीला येईन. 12हिंमत बाळग आपल्या लोकांसाठी,
देवाच्या नगरांसाठी आपण पराक्रमाची शिकस्त करु.
परमेश्वर त्याला योग्य वाटेल तसे करील."
13यानंतर यवाबाने आपल्या लोकांसह अराम्यांवर चढाई
केली. अरामी लोकांनी त्यांच्या समोरुन पळ काढला.
14अराम्यांनी पलायन केलेले पाहताच अम्मोनीही
अबीशय समोरुन पळून गेले आणि आपल्या नगरात परतले.
अम्मोन्यांबरोबरच्या या लढाई नंतर यवाब यरुशलेमला
परतला.

## पुन्हा युध्द करण्याचा अराम्यांचा निर्णय

15इस्राएलानी आपला पराभव केला हे अराम्यांनी
पाहिले. तेव्हा ते सर्व एकत्र आले आणि त्यांनी [मोठे सैन्य
उभारले]
16हदरेजरने (फरात) नदीच्या पलीकडे राहाणाऱ्या
अराम्यांना एकत्र आणण्यासाठी माणसे पाठवली. हे अरामी
हेलाम येते आले. हदरेजरचा सेनापती शोबख याने त्यांचे
नेतृत्व केले.
17हे दावीदाच्या कानावर आले. तेव्हा त्याने सर्व
इस्राएलींना एकत्र आणले. यार्देन नदी पार करुन ते हेलाम
येथे गेले.
तेथे अराम्यांनी सर्व तयारीनिशी हल्ला केला. 18पण
दावीदाने अराम्यांचा पराभव केला. अराम्यांनी इस्राएल
लोकां समोरुन पळ काढला. दावीदाने सातशे रथांवरील
माणसे आणि चाळीस हजार घोडेस्वार यांना ठार केले.
अरामी सैन्याचा प्रमुख शोबख यालाही दावीदाने ठार केले.
19हदरेजरच्या मांडलीक राजांनीही इस्राएलांनी केलेला
हा पराभव पाहिला. तेव्हा त्यांनी इस्राएलांशी तह केला व
इस्राएलांचे ते चाकर झाले. पुन्हा अम्मोन्यांना मदत करायची
अम्मोन्यांनी धास्ती घेतली.

## दावीद बथशेबाला भेटतो

11 वसंत ऋतूमध्ये ज्यावेळी राजे युध्द मोहिमांवर
जातात त्यावेळी दावीदाने यवाबाला सर्व नोकरा
चाकरांचा लवाजमा आणि समस्त इस्राएलांना अम्मोन्यांच्या
संहारासाठी पाठवले. यवाबाच्या सैन्याने अम्मोन्यांच्या राब्बा
या राजधानीच्या शहराला वेढा घातला.

दावीद मात्र यरूशलेम येथेच राहिला. 2संध्याकाळी तो आपल्या पलंगावरुन उठला आणि राजमहालाच्या छतावरुन फिरु लागला. तिथून त्याला एक बाई स्नान करताना दिसली. ती अतिशय रुपवान होती. 3तेव्हा दावीदाने आपल्या सेवकवर्गाला बोलवून तिची माहिती काढली. सेवकाने सांगितले, “ती अलीयमची मुलगी बथशेबा उरीया हित्ती याची ती पत्नी.”

4तिला आपल्याकडे घेऊन यायला दावीदाने निरोप्याला पाठवले. ती आल्यावर दावीदाने तिच्याशी शरीरसंबंध केला. नंतर स्नान करुन शुध्द होऊन ती पुन्हा आपल्या घरी परतली. 5पण बथशेबा गर्भवती राहिली. दावीदाला तिने निरोप पाठवला. तिने सांगितले, “मी गरोदर आहे.”

### दावीद पाप लपवायचा प्रयत्न करतो

6दावीदाने यवाबाला निरोप पाठवला की उरीया हित्तीला माझ्याकडे पाठवा. तेव्हा यवाबाने उरीया हित्तीला दावीदकडे पाठवले. 7उरीया आल्यावर दावीद त्याच्याशी बोलला. उरीयाला त्याने यवाब, सर्व सैन्य, लढाई यांचे वर्तमान विचारले. 8मग म्हणाला, “घरी जा आणि आराम कर.” उरीया महालातून बाहेर पडला त्यानंतर त्याच्यासाठी राजातर्फे भेट पाठवण्यात आली 9पण उरीया घरी गेला नाही. तो महालाच्या बाहेरच दाराशी झोपून राहिला. राजाच्या सेवकवर्गा प्रमाणेच तो तिथे झोपला. 10उरीया घरी परतला नसल्याचे सेवकांनी दावीदाला सांगितले.

तेव्हा दावीद उरीयाला म्हणाला, “तू लांबून प्रवास करुन आला आहेस तू घरी का गेला नाहीस?”

11उरीया दावीदाला म्हणाला, “पवित्र करारकोश, इस्राएलचे सैनिक आणि यहूदा हे राहुट्यांमध्ये राहात आहेत. माझा धनी यवाब आणि महाराजांचे (दावीदाचे) सेवक ही खुल्या मैदानात तळ देऊन आहेत. अशा वेळी मीच तेवढे घरी जाऊन खाणे-पिणे, बायकोच्या सहवासात झोपणे योग्य होणार नाही.”

12दावीद उरीयाला म्हाणाला, “आजच्या दिवस इथे राहा. उद्या मी तुला युध्दभूमीवर पाठवतो.”

उरीयाने त्या दिवशी यरुशलेममध्येच मुक्क ाम केला. 13दुसऱ्या दिवशी सकाळी दावीदाने त्याला भेटायला बोलावले. दावीदाबरोबर उरीयाने जेवणखाण केले. दावीदाने त्याला बेहोश होईपर्यंत मद्य पाजले. पण तरी उरीया घरी गेला नाही. त्या संध्याकाळी तो राजाच्या सेवकांबरोबरच महालाच्या दाराशी झोपायला गेला.

### दावीदाचा उरीयाला मारण्याचा कट

14दुसऱ्या दिवशी सकाळी दावीदाने यवाबासाठी एक पत्र लिहून ते उरीयाला न्यायला सांगितले. 15त्या पत्रात दावीदाने लिहिले होते, “आघाडीवर जेथे तुंबळ युध्द चालले असेल तेथे उरीयाला पाठव. त्याला एकट्याला तेथे सोडा म्हणजे तो युध्दात कामी येईल.”

16यवाबाने नगराची टेहेळणी करुन सर्वात लढवय्ये अम्मोनी कोठे आहेत ते पाहिले आणि उरीयाला तेथे नेमले. 17राब्बा नगरातील लोक यवाब विरुद्ध चालून आले. दावीदाची काही माणसे मारली गेली. उरीया हित्ती हा त्यापैकी एक होता. 18नंतर यवाबाने युध्दातील हकिकतींचे साद्यंत वृत्त दावीदाला पाठवले. 19युध्दात जे जे झाले ते सर्व सांगायला त्याने आपल्या नोकराला सांगितले. 20यवाब सेवकाला म्हणाला, “कदाचित राजा संतापून म्हणेल, ‘यवाबाचे सैन्य नगराच्या इतके जवळ भिडले कसे? शत्रू तटाच्या भितीवरुन शिरसंधान करतील हे त्याला ठाऊक असायला हवे. 21तेबेसमध्ये यरुब्बेशेथचा मुलगा अबीमलेख याला एका बाईने मारले हे आठवते ना? तिने तटबंदीवरुन जात्याची तळी उचलून अबीमलेखवर टाकली. असे असताना हा इतक्या जवळ का गेला?’ राजा दावीद असे काही म्हणाला तर त्याला हे ही म्हणावे, ‘उरीया हित्ती हा तुमचा सेवकही यात मारला गेला.’”

22निरोप्याने दावीदाकडे जाऊन यवाबाने जे जे सांगयला सांगितले ते सर्व कथन केले. 23तो म्हणाला, “अम्मोन्यांनी आमच्यावर मैदानात हल्ला केला. आम्ही त्यांचा सामना करुन त्यांना नगराच्या वेशीपर्यंत पळवून लावले. 24मग तटबंदीवरील काही लोकांनी आपल्या शिपायांवर बाणांचा वर्षाव केला. त्यात काही जण ठार झाले. उरीया हित्ती हा तुमचा सेवकही त्यात प्राणाला मुकला.”

25दावीद त्या निरोप्याला म्हणाला, “यवाबाला सांग, ‘निराश होऊ नको, हिंमत सोडू नको. तलवारीने कोणाचाही संहार होऊ शकतो. राब्बावर आणखी जोरदार हल्ला चढवा. तुम्ही जिंकाल.’ यवाबाला माझा हा निरोप सांगून प्रोत्साहन दे.”

### दावीदाचा बथशेबाशी विवाह

26उरीया मरण पावल्याचे बथशेबाला कळले. तिने पतिनिधनाबद्दल शोक केला. 27काही काळाने तिचे दुःख ओसरल्यावर दावीदाने सेवकांकरवी तिला आपल्याकडे आणवले. ती त्याची पत्नी झाली आणि त्याच्या मुलाला तिने जन्म दिला. पण दावीदाचे हे नीच कृत्य परमेश्वराला पसंत पडले नाही.

### नाथान दावीदाशी बोलतो

12 परमेश्वराने नाथानला दावीदाकडे पाठवले. तेव्हा नाथान दावीदाकडे आला. नाथान म्हणाला, “एका नगरात दोन माणसे होती. एक श्रीमंत होता आणि एक गरीब. 2श्रीमंत माणसाकडे मेंढरे आणि गुरे भरपूर होती. 3पण गरीबाकडे त्याने विकत घेतलेल्या एका लहान मेंढी खेरीज काही नव्हते. त्याने त्या मेंढीला खाऊपिऊ घातले. या गरीब माणसाच्या मुलाबाळांबरोबर ती वाढली. त्याच्याच

अन्नातला घास ती खाई, त्याच्याच कपातले पाणी ती पिई.
त्याच्याच छातीवर डोके ठेवून झोपे, त्या गरीबाला ती मेंढी
मुलीसारखीच होती
4“एकदा एक प्रवासी श्रीमंत माणसाकडे आला. त्या
प्रवाश्याला खाऊपिऊ घालायची श्रीमंत माणसाची इच्छा
होती. पण आपल्या गुरामेंढरांमधून त्याला काही काढून
घ्यायचे नव्हते. तेव्हा त्याने त्या गरीब माणसाची मेंढी
घेतली. तिला मारले आणि त्या प्रवाश्यासाठी अन्न
शिजवले.”
5दावीदाला या श्रीमंत माणसाचा फारच राग आला. तो
नाथानला म्हणाला, “परमेश्वराची शपथ, या माणसाला
प्राणदंड मिळाला पाहिजे 6त्या मेंढीच्या चौपट पैसे त्याने
भरले पाहिजेत. कारण त्याचे हे भयंकर कृत्य करताना
त्याला दया आली नाही.”

## नाथान दावीदाला त्याच्या पापाबद्दल सांगतो

7तेव्हा नाथान दावीदाला म्हणाला, “तूच तो माणूस आहेस.
इस्राएलचा देव परमेश्वर म्हणतो, ‘इस्राएलचा राजा म्हणून
मी तुला अभिषेक केला. तुला शौलापासून वाचवले.
8त्याचे घरदार आणि बायका तुझ्या स्वाधीन केल्या. इस्राएल
आणि यहूदाचा तुला राजा केले. एवढे पुरेसे नव्हते म्हणून
तुला आणखीही देत राहिलो. 9असे असताना तू परमेश्वराची
आज्ञा का मोडलीस? त्याच्या दृष्टीने वाईट असे कृत्य का
केलेस? उरीया हित्तीला तू तलवारीने मारलेस आणि त्याच्या
बायकोचा स्वत:ची बायको म्हणून स्वीकार केलास. होय,
अम्मोन्यांच्या तलवारीने तू त्याचा वध करवलास. 10तेव्हा
आता ही तलवार तुझ्या कुटुंबाचा पिच्छा सोडणार नाही.
तू उरीया हित्तीच्या बायकोचे हरण केलेस. तुला माझी
पर्वा नाही हेच यातून दिसते.’
11“परमेश्वर म्हणतो, ‘आता तुझ्यावर संकटे
कोसळतील. अडचणींना सुरुवात तुझ्या घरातूनच होईल.
तुझ्या बायका तुझ्यापासून मी हिरावून घेऊन त्या तुझ्या
एका आप्ताच्याच हवाली करीन. तो तुझ्या बायका बरोबर
झोपेल आणि ही गोष्ट सर्वांसमक्ष घडेल. 12बथशेबाचा
उपभोग तू गुपचूप घेतलास पण हे मात्र सूर्याच्या साक्षीने,
सर्व इस्राएलां देखत होईल.’”
13मग दावीद नाथानला म्हणाला, “माझ्याहातून
परमेश्वराचा मोठाच अपराध घडला आहे.”
नाथान तेव्हा दावीदाला म्हणाला, “परमेश्वराने हा तुझा
अपराध पोटात घातला आहे. तू मरणार नाहीस. 14पण
परमेश्वराच्या शत्रूंना तू त्याचा उपहास करायला मोठेच
निमित्त दिलेस. तेव्हा हा तुझा मुलगा मरेल.”

## दावीद आणि बथशेबा यांच्या मुलाचा मृत्यू

15यानंतर नाथान घरी परतला. उरीयाची पत्नी बथशेबा
आणि दावीद यांना झालेला मुलगा परमेश्वराच्या कोपामुळे
खूप आजारी पडला. 16दावीदाने बाळासाठी देवाची प्रार्थना
केली. दावीदाने अन्नपाण्याचा त्याग केला. घरात जाऊन
रात्रभर जमिनीवर पडून राहिला.
17घरातील वडीलधाऱ्या माणसांनी येऊन दावीदाला
जमिनीवरुन उठवायचा खूप प्रयत्न केला. पण काही
केल्या दावीद तिथून हलेना. त्यांच्याबरोबर खायला
प्यायलाही त्याने नकार दिला. 18सातव्या दिवशी ते मूल
मरण पावले. मुलाच्या मृत्यूची बातमी दावीदाला द्यायला
त्याचे नोकर कचरु लागले. ते म्हणाले, “मुलगा जिवंत
असतानाही आम्ही दावीदशी बोलायला गेलो तरी तो ऐकत
नसे. मग आता तर मूल मरण पावले असे आम्ही सांगितले
तर तो आपल्या जिवाचे काही बरेवाईट करुन घेईल.”
19पण आपल्या नोकरांची कुजबूज दावीदाने ऐकली.
त्यावरुन मूल गेल्याचे तो मनोमन उमजला. त्याने नोकरांना
विचारले, “मूल गेले का?” नोकरांनी “होय” म्हणून उत्तर
दिले.
20तेव्हा दावीद जमिनीवरून उठला त्यांने आंघोळ केली,
कपडे बदलून तयार झाला. मग आराधना करण्यासाठी
परमेश्वराच्या मंदिरात गेला. त्यानंतर घरी जाऊन त्याने
खायला मागितले. सेवकांनी त्याला वाढले आणि तो
जेवला.
21दावीदाचे सेवक त्याला म्हणाले, “तुम्ही असे का
वागत आहात? मूल जिवंत असताना तुम्ही अन्नत्याग
केलात. शोक केलात पण मुलगा वारल्यावर मात्र तुम्ही
उठलात आणि खाल्लेत.”
22दावीदाने सांगितले, “मूल जिवंत होते तेव्हा मी अन्न
वर्ज्य केले आणि शोक केला कारण मला वाटले, न
जाणो, परमेश्वराला माझी दया येईल आणि बाळ जगेल
23पण आता ते गेलेच तेव्हा आता मी कशासाठी उपास
करु? मुलाचे तर प्राण मी परत आणू शकत नाही. ते
गेलेच. एक दिवस मीच त्याच्या भेटीला जाईन पण तो
आता परत येणे नाही.”

## शलमोनचा जन्म

24दावीदाने मग आपली बथशेबा हिचे सांत्वन केले
तिच्याशी त्याने शरीर संबंध केला. बथशेबा पुन्हा गरोदर
राहिली. तिला दुसरा मुलगा झाला. दावीदाने त्याचे नाव
शलमोन ठेवले. शलमोनावर परमेश्वराचा लोभ होता.
25त्याने नाथान या संदेष्ट्यामार्फत दावीदाला निरोप
पाठविला नाथानने त्याचे नांव यदीद्या, म्हणजेच देवाला
प्रिय’ असे ठेवले. देवाच्या वतीने नाथानने हे केले.

## दावीद राब्बा काबीज करतो

26अम्मोन्यांच्या राब्बावर हल्ला करुन यवाबाने हे
राजधानीचे नगर काबीज केले. 27यवाबाने निरोप्यामार्फत
दावीदाला निरोप पाठवला “राब्बाशी झुंज देऊन मी हे
जलनगर हस्तगत केले आहे. 28आता इतर लोकांना
एकत्र आणून या शहराचा ताबा घ्या. मी घेण्यापूर्वी हे

करा. मी जर आधी ताबा घेतला तर ते नगर माझ्या
नावाने ओळखले जाईल."
29दावीद मग सर्व लोकांना घेऊन राब्बाकडे गेला.
राब्बा येथे लढाई करुन त्याने त्याचा ताबा घेतला. 30त्यांच्या
राजाच्या मस्तकावरचा मुकुट* दावीदाने काढला हा
मुकुट सोन्याचा असून त्याचे वजन सुमारे पंचाहत्तर पौंड
होते. त्यात मौल्यवान रत्ने जडवलेली होती. तो मुकुट
लोकांनी दावीदाच्या मस्तकावर ठेवला. दावीदाने बऱ्याच
किंमती वस्तू आपल्याबरोबर आणल्या.
31राब्बा नगरातील लोकांनाही त्याने बाहेर नेले. त्यांना
कुऱ्हाडी, करवती, लोखंडी दाताळी यांनी काम करायला
लावले. त्यांच्याकडून जबरदस्तीने वीटकामही करुन
घेतले. सर्व आम्मोनी नगरांमध्ये दावीदाने असेच केले.
नंतर दावीद आपल्या सैन्यासह यरुशलेमला परतला.

## अम्नोन आणि तामार

13 दावीदाचा मुलगा अबशालोम याला तामार नावाची
बहीण होती. ती दिसायला फार सुरेख होती.
दावीदाला अम्नोन नावाचा आणखी एक मुलगा होता.
2त्याचे तामारवर प्रेम होते. तामार कुमारिका होती. तिच्याशी
वावगे वागण्याची त्याची छाती नव्हती. पण तिच्याविषयी
त्याच्या मनात अभिलाषा होती. तिच्याविषयी विचार करून
करून तो आजारी पडला.
3अम्नोनला योनादाब नावाचा मित्र होता. दावीदाचा भाऊ
शिमा याचा हा मुलगा. योनादाब धूर्त होता. 4तो अम्नोनला
म्हणाला, "दिवसेंदिवस तू क्षीण होत चालला आहेस. तू
तर राजपुत्र! खायची प्यायची रेलचेल असताना तू असा
अशक्त का होत आहेस? माझ्यापाशी मनमोकळे कर."
तेव्हा अम्नोन योनादाबला म्हणाला, "माझे तामार वर
प्रेम आहे, पण ती माझा सावत्र भाऊ अबशालोमची बहीण
आहे."
5योनादाब यावर अम्नोनला म्हणाला, "आता तू
आजारी पडल्याचे सोंग कर आणि झोपून जा. मग वडील
भेटायला आले की त्यांना सांग, 'तामारला माझ्याकडे
येऊ द्या. तिने मला खायला घालू द्या. माझ्या समोरच
तिला एखादा खाद्य पदार्थ तयार करु द्या. मग तो तिच्या
हातून मी खाईन'
6तेव्हा अम्नोन आजारी असल्याचे भासवून बिछान्यावर
झोपून राहिला. राजा दावीद त्याच्या समाचाराला आला.
त्याला तो म्हणाला, "तामारला माझ्याकडे पाठवा. तिला
इथे माझ्यादेखत दोन पोव्व्या करु द्या. आणि मला भरवू
द्या. मग मी त्या खाईन."
7दावीदाने तामारच्या दालनात तसा निरोप पाठवायची
व्यवस्था केली. तामारला नोकराने निरोप दिला, "आपला
भाऊ अम्नोन याच्या घरी जाऊन त्याच्यासाठी खायला
कर."

## तामार अम्नोनसाठी खायला करते

8तामार तेव्हा आपला भाऊ अम्नोन कडे गेली. तो
पलंगावरच होता. तिने थोडी कणीक घेऊन ती चांगली
मळून पोव्व्या केल्या अम्नोन हे सर्व पाहात होता. 9पोव्व्या
तयार झाल्यावर तव्यावरून काढून तिने त्या अम्नोनसाठी
ताटात मांडल्या पण अम्नोन ते काही केल्या खाईना. मग
आपल्या नोकरांना त्याने बाहेर निघून जाण्याची आज्ञा
देऊन तिथून घालवले. सर्व नोकर बाहेर पडले.

## अम्नोनचा तामारवर बलात्कार

10यानंतर अम्नोन तामारला म्हणाला, "ताट घेऊन
शयनगृहात ये आणि तिथे मला तू भरव."
तेव्हा ती ताट घेऊन भावाच्या शयनगृहात गेली. 11त्याला
ती भरवू लागली तोच त्याने तिचा हात धरला. तिला तो
म्हणाला, "हे बाहिणी, ये आणि माझ्याजवळ झोप."
12तामार त्याला म्हणाली, "भाऊ नको! अशी बळजबरी
तू माझ्यावर करु नकोस. ही मोठी शरमेची गोष्ट आहे.
असल्या भयंकर गोष्टी इस्राएलमध्ये कदापि घडता कामा
नयेत. 13मला कायम या लाजिरवाण्या गोष्टीचा कलंक
लागेल. लोकांच्या दृष्टीने तू इस्राएलामधल्या अनेक
मूर्खांपैकी एक ठरशील. तू कृपा करुन राजाशी बोल. तो
तुला माझ्याशी लग्न करायला अनुमती देईल."
14पण अम्नोनने तिच्या बोलण्याकडे साफ दुर्लक्ष केले.
शारीरिक दृष्ट्याही तो तिच्यापेक्षा शक्तीवान होता. तिला
न जुमानता त्याने तिच्यावर बलात्कार केला. 15मग
तिच्याबद्दल त्याच्या मनात तिटकारा निर्माण झाला. पूर्वी
त्याचे तिच्यावर जेवढे प्रेम होते त्यापेक्षा अधिक तो आता
तिचा द्वेष करु लागला. त्याने तिला तात्काळ तिथून निघून
जायला सांगितले. 16तामार त्याला म्हणाली, "नाही, आता
माझी अशी रवानगी करू नकोस. ते तर तुझ्या या आत्ताच्या
कृत्यापेक्षाही वाईट होईल."
पण त्याने तिचे म्हणणे झिटकारून टाकले. 17नोकरांना
बोलावून तो म्हणाला, "हिला आत्ताच्या आत्ता इथून बाहेर
काढा आणि दार बंद करून टाका."
18तेव्हा अम्नोनच्या नोकराने तिला तेथून बाहेर काढले
आणि दरवाजा लावून घेतला.
तामारने रंगीबेरंगी, पट्ट्यापट्ट्यांचा पायघोळ अंगरखा
घातला होता. राजकन्या लग्नापूर्वी असा पोषाख करत
असत.
19तामारने उद्विग्न मन:स्थितीत आपले कपडे फाडले
आणि डोक्यात राख घालून घेतली. डोक्यावर हात आपटून
ती शोक करु लागली.
20तेव्हा अबशालोम या तिच्या भावाने तिला विचारले,
"तू अम्नोनकडे गेली होतीस का? त्याने तुला त्रास दिला

---

**राजाच्या ... मुकुट** किंवा "मिल्कोमच्या मस्तकावरचा मुकुट"
अम्नोनी लोकांचा मिलकोम हा देव होता.

का? आता तू शांत हो. तो तुझा भाऊ आहे. तेव्हा त्याचे
काय करायचे ते आम्ही पाहू. तू याचा त्रास करुन घेऊ
नकोस." यावर तामार काही बोलली नाही. ती शांतपणे
अबशालोमच्या घरी राहायला गेली.
21हे सर्व राजा दावीदाच्या कानावर गेले. तो संतापला.
22अबशालोमला अम्नोनचा तिरस्कार वाटू लागला. तो
अम्नोनशी एक चकार शब्द बोलेना. अम्नोनने आपल्या
बहिणीशी जो अतिप्रसंग केला त्याने अबशालोम द्वेषाने
पेटून उठला होता.

### अबशालोमचा सूड

23दोन वर्षानंतर, मेंढरांची लोकर कातरणारे
अबशालोमचे काही लोक एफ्राइम जवळील
बालहासोरमध्ये आलेले होते. अबशालोमने राजाच्या सर्व
मुलांना ते पाहायला बोलावले. 24अबशालोम राजाकडे
जाऊन म्हणाला, "मेंढ्यांची लोकर कातरायला माझी माणसे
आलेली आहेत. आपल्या नोकरासहित येऊन हे दृश्य
पाहा." 25तेव्हा राजा दावीद त्याला म्हणाला, "मुला, आम्ही
सर्व जण येणं काही शक्य नाही. तुझ्यावरही त्याचा भार
पडेल." अबशालोमने दावीदाची खूप आर्जवे केली. दावीद
गेला नाही पण त्याने आपले आशीर्वाद दिले.
26अबशालोम म्हणाला, "तुम्ही नाही तर निदान माझा
भाऊ अम्नोन याला तरी पाठवा." राजा दावीद म्हणाला,
"तो तरी तुला कशासाठी बरोबर यायला हवा आहे?"
27पण अबशालोमने आपला हट्ट सोडला नाही. शेवटी,
अम्नोन आणि इतर सर्व मुले यांना अबशालोम बरोबर
जायला राजा दावीदाने संमती दिली.

### अम्नोनची हत्या

28अबशालोमने आपल्या नोकरांना आज्ञा दिली. तो
म्हणाला, "अम्नोनवर नजर ठेवा. मद्याचा आनंद घेत घेत
त्याला जेव्हा त्याची नशा चढेल तेव्हा मी तुम्हाला संकेत
करीन. मग त्याच्यावर हल्ला करुन तुम्ही त्याला ठार
करा. शिक्षेची भीती बाळगू नका. अखेर तुम्ही माझ्या
आज्ञेचे पालन करत आहात. धैर्याने आणि खंबीरपणाने
वागा."
29तेव्हा अबशालोमच्या नोकरांनी त्याचा शब्द पाळला.
अम्नोनला त्यांनी ठार केले. पण दावीदाची बाकीची सर्व
मुले निसटली. आपापल्या खेचरावर बसून ती पळाली.

### अम्नोनच्या वधाची बातमी दावीदाला समजते

30राजाचे मुलगे नगराच्या वाटेवर असतानाच राजा
दावीदाला या घडामोडीची खबर मिळाली, ती अशी,
"अबशालोमने राजाच्या सर्व मुलांना ठार केले. कोणालाही
त्यातून वगळले नाही." 31राजा दु:खाने आपले कपडे
फाडून जमिनीवर पडून राहिला. राजाच्या जवळ असणाऱ्या
इतर अधिकाऱ्यांनीही आपली वस्त्रे फाडली. 32पण,
दावीदाचा भाऊ शिमा याचा मुलगा योनादाब राजाला
म्हणाला, "सर्व मुले गेली असे समजू नकोस. फक्त अम्नोन
मरण पावला आहे. अम्नोनने तामार या आपल्या बहिणीवर
बलात्कार केला तेव्हा पासूनच अबशालोमच्या डोक्यात
ही योजना तयार होत होती. 33स्वामी, सर्व मुले मरण
पावली असे कृपा करुन समजू नका. फक्त अम्नोन
गेला."
34अबशालोमने पळ काढला नगराच्या वेशीवर एक
पहारेकरी उभा होता. त्याने डोंगरापलीकडून बऱ्याच
लोकांना येताना पाहिले. 35तेव्हा योनादाब राजाला म्हणाला,
"बघा, मी म्हटले ते खरे आहे की नाही? हे पाहा राजपुत्र
येत आहेत."
36योनादाबचे बोलणे संपत आले तोच राजपुत्र समोर
आले. ते सुध्दा मोठ्याने आक्रोश करत होते. दावीद आणि
त्याचे अधिकारीही शोक करु लागले. रडण्याचा
हलकल्लोळ उडाला. 37दावीद अम्नोनसाठी रोज अश्रू
ढाळे.

### अबशालोम गशूरला येतो

अम्मीहूरचा मुलगा तलमय गशूरचा राजा होता.
अबशालोम त्याच्याकडे आश्रयाला आला. 38गशूर येथे
तो तीन वर्षे राहिला. 39राजा दावीद अम्नोनच्या दु:खातून
सावरला. पण अबशालोमच्या आठवणीने तो व्याकुळ
होत असे.

### यवाब दावीदाकडे एका चतुर बाईला पाठवतो

14 अबशालोमच्या ओढीमुळे राजा बेचैन झालेला
आहे हे सरुवेचा मुलगा यवाब याला कळले.
2तेव्हा तकोवा येथे निरोप्याला पाठवून त्याने तेथील एका
चतुर बाईला बोलावणे पाठवले. तिला तो म्हणाला, "तू
खूप दु:खात असल्याचे ढोंग कर. त्याला शोभेसे कपडे
कर. नटू सजू नको. अनेक दिवस मृताचा शोक करीत
असलेल्या बाईसारखी तू दिसली पाहिजेस. 3राजाकडे जा
आणि मी सांगतो तसे त्याच्याशी बोल." यवाबाने मग
तिला काय बोलायचे ते सांगितले. 4मग तकोवा येथील
बाई राजाशी बोलली. तिने स्वत:ला जमिनीवर लवून व
राजापुढे नतमस्तक होऊन ती म्हणाली, "कृपाकरून मला
मदत करा."
5राजाने तिची विचारपूस करुन तिची अडचण जाणून
घेतली. ती म्हणाली, "मी एक विधवा बाई 6मला दोन
मुलगे होते. एकदा शेतात त्यांचे भांडण जुंपले, त्यांना
थोपवायलाही कोणी नव्हते. तेव्हा एकाने दुसऱ्याचा जीव
घेतला.
7आता सगळे घर माझ्याविरुद्ध आहे. सगळे मला म्हणतात
'आपल्या भावाचा जीव घेणाऱ्या त्या मुलाला आमच्या
स्वाधीन कर. त्याला आम्ही मारून टाकतो. कारण त्याने
आपल्या भावाला मारले.' माझा मुलगा हा आगीतल्या

शेवटच्या ठिणगी सारखा आहे. त्यांनी माझ्या मुलाचा
जीव घेतला तर ती आग नष्ट होईल. आपल्या वडिलांच्या
मालमत्तेचा तो एकुलता एक वारस आहे. तोही गेला तर
माझ्या मृत पतीची मालमत्ता दुसरा कोणी हडप करील
आणि या भूमीवर नावनिशाणीही राहणार नाही."
8हे ऐकून राजा तिला म्हणाला, "मी यात लक्ष घालतो.
तू घरी जा."
9तेव्हा ती बाई राजाला म्हणाली, "माझे स्वामी या
सगळ्याला मी जबाबदार आहे, मी दोषी आहे, तुम्ही आणि
तुमचे आसन निर्दोष आहेत."
10राजा दावीद म्हणाला, "तुझ्याविरुद्ध कोणी काही बोलले
तर त्याला माझ्याकडे आण तुला पुन्हा कोणी त्रास देणार
नाही."
11ती तकोवा येथील बाई पुन्हा राजाला म्हणाली,
"परमेश्वरा देवाच्या नावाची शपथ वाहून सांगा की या
लोकांचा तुम्ही बंदोबस्त कराल. त्यांना भावाचा खून
केल्याबद्दल माझ्या मुलाला शासन करायचे आहे. तेव्हा
त्याला धक्का पोहचणार नाही याचे मला आश्वासन द्या."
दावीद म्हणाला, "परमेश्वर असे पर्यंत कोणीही तुझ्या
मुलाला इजा करणार नाही. त्याच्या केसालाही धक्का
पोचणार नाही."
12मग ती म्हणाली, "माझे स्वामी, मला तुमच्याशी आणखी
काही बोलायचे आहे परवानगी असावी."
राजा म्हणाला, "बोल"
13त्यावर ती म्हणाली, "तुम्ही देवाच्या लोकांच्या विरुद्ध
योजना का केली आहे? होय, तुम्ही असे म्हणालात तेव्हा
तुम्ही स्वत: दोषी ठरता. कारण तुम्ही आपल्या घराबाहेर
घालवलेल्या मुलाला पुन्हा परत आणलेले नाही. 14आपण
सर्वच कधीना कधी मरण पावणार आहोत. जमिनीवर
पडलेल्या पाण्यासारखी आपली स्थिती होणार आहे.
सांडलेले पाणी पुन्हा भरता येत नाही. देव क्षमाशील आहे
हे तुम्ही जाणता. स्वसंरक्षणासाठी पळालेल्याच्या बाबतीतही
देवाची काही योजना असते. देव त्याला आपल्यापासून
पळायला लावत नाही. 15स्वामी, हेच सांगायला मी येथपर्यंत
आले. लोकांमुळे मी भयभीत झाले होते. मी मनाशी
म्हणाले, 'राजाशी मी बोलेन. कदाचित् तोच मला मदत
करील. 16तो माझे ऐकून घेईल. मला आणि माझ्या मुलाला
मारायला निघालेल्या माणसापासून माझा बचाव करील.
देवाने आपल्याला जे दिले त्यापासून हा माणूस आम्हाला
वंचित करू पाहात आहे.' 17स्वामी, तुमच्या शब्दांनी मला
दिलासा मिळेल हे मी जाणून होते. कारण तुम्ही
देवदूतासारखेच आहात. बरेवाईट तुम्ही जाणता. आणि देव
परमेश्वराची तुम्हाला साथ आहे."
18राजा दावीद त्या बाईला म्हणाला, "आता मी विचारतो
त्याचे उत्तर दे. माझ्यापासून काही लपवून ठेवू नकोस."
ती म्हणाली, "माझेस्वामी, विचारा" 19राजा म्हणाला,
"तुला हे सर्व बोलायला यवाबाने सांगितले का?"
ती म्हणाली, "होय महाराज तुमचे सेवक यवाब यांनीच
मला हे सर्व बोलायला सांगितले. 20अलिप्तपणे सर्व गोष्टी
न्याहाळता याव्यात म्हणूनच, स्वरुप बदलून सांगायची युक्ती
यवाबाने केली. तुम्ही देवदूता सारखेच चाणाक्ष आहात.
तुम्हाला या पृथ्वीवरील सर्व घटना समजतात."

### अबशालोम यरुशलेमला परततो

21राजा यवाबाला म्हणाला, "माझे वचन मी खरे
करीन, आता अबशालोमला परत आणा." 22यवाबाने
राजाला वाकून अभिवादन केले. राजाचे अभीष्ट
चिंतून तो म्हणाला, "तुम्ही माझ्यावर प्रसन्न आहात हे मी
जाणतो. माझी विनंती तुम्ही मान्य केलीत यावरुन मी
ताडले."
23मग यवाब गशूर येथे गेला आणि अबशालोमला
यरुशलेमला घेऊन आला. 24पण राजा दावीद म्हणाला,
"अबशालोमला त्याच्या घरी जाऊ दे. त्याला मला भेटता
मात्र येणार नाही." तेव्हा राजाचे तोंड न पाहताच अबशालोम
आपल्या घरी परतला.
25अबशालोमच्या देखणेपणाची लोक तोंड भरुन प्रशंसा
करत होते. इस्राएलमध्ये त्याचा रुपाला तोड नव्हती. त्याचा
देह नखशिखान्त निर्दोष, नितळ होता. 26दरवर्षाच्या
अखेरीस अबशालोम आपल्या माथ्यावरील केस कापून
त्याचे वजन करीत असे. ते पाच पौंड भरत. 27त्याला तीन
मुलगे आणि एक मुलगी होती. या मुलीचे नाव तामार
होते. तामार दिसायला सुंदर होती.

### अबशालोम यवाबाला भेटायला बोलावण्याची सक्ती करतो

28यरुशलेम मध्ये अबशालोम पूर्ण दोन वर्षे राहिला.
पण त्या कालावधीत राजा दावीदाला मात्र तो एकदाही
भेटू शकला नाही. 29तेव्हा अबशालोमने यवाबाकडे
आपल्या सेवकाला पाठवले. आपली राजाशी भेट घडवून
आणावी असा निरोप दूतांकरवी यवाबाला दिला. पण
यवाब अबशालोमकडे आला नाही. अबशालोमने त्याला
पुन्हा बोलावणे पाठवले तरीही तो येईना.
30तेव्हा मात्र अबशालोम आपल्या सेवकांना म्हणाला,
"माझ्या शेताला लागूनच यवाबाचे शेत आहे. त्यात जवाचे
पीक आले आहे ते पेटवून द्या"
अबशालोमच्या सेवकांनी त्याप्रमाणे यवाबाच्या शेतात
आग लावली. 31तेव्हा यवाबा उठून अबशालोमकडे आला
आणि त्याला म्हणाला "तुझ्या सेवकांनी माझ्या शेतात
जाळपोळ का केली?"
32अबशालोम यवाबाला म्हणाला, "मी निरोप पाठवून
तुला बोलावणे धाडले होते. तुला मी राजाकडे पाठवणार
होतो. गशूरहून त्याने मला का बोलावले ते मी तुला
त्याला विचारायला सांगणार होतो. मी त्याचे दर्शन घेऊ
शकत नसेन तर गशूरहून मी इथे येण्यात काय मतलब?

तेव्हा मला त्याला भेटू दे. माझा काही अपराध असला
तर त्याने मला खुशाल मारून टाकावे."

### अबशालोमची राजा दावीदाशी भेट

33तेव्हा यवाब राजाकडे आला आणि त्याने अबशालोमचे
मनोगत राजाला सांगितले. राजाने अबशालोमला बोलावले.
अबशालोम आला. त्याने राजाला वाकून अभिवादन केले.
राजाने त्याचे चुंबन घेतले.

### अबशालोमची अनेकांशी मैत्री

15 यानंतर अबशालोमने स्वत:साठी रथ आणि
घोड्यांची तजवीज केली. तो रथातून जात
असताना पन्नास जणांचा ताफा त्याच्यापुढे धावत असे.
2रोज लौकर ऊठून सकाळीच तो वेशीपाशी जाई आपल्या
अडचणी घेऊन निवाड्यासाठी राजाकडे जायला निघालेल्या
लोकांना भेटून त्यांच्याशी बोले. चौकशी करुन तो विचारी,
"तू कोणत्या शहरातून आलास?" तो सांगत असे.
"मी इस्राएलच्या अमुक अमुक वंशातला" 3तेव्हा
अबशालोम म्हणे, "तुमचे म्हणणे खरे आहे, पण राजा
तुमच्या अडचणीत लक्ष घालणार नाही."
4अबशालोम पुढे म्हणे, "मला कोणी येथे न्यायाधीश
म्हणून नेमले तर किती बरे होईल. तसे झाले तर फिर्याद
घेऊन येणाऱ्या प्रत्येकाला मी मदत करु शकेन. यांच्या
प्रकराणांना मी न्याय देऊ शकेन."
5अशावेळी कोणी त्याच्याजवळ येऊन त्याला
आभिवादन करु लागला तर अबशालोम त्या माणसाला
मित्रासारखी वागणूक देई. आपला हात पुढे करुन तो
त्याला स्पर्श करी. त्याचे चुंबन घेई. 6राजा दावीदाकडे
न्याय मागण्यासाठी आलेल्या सर्व इस्राएलांना तो असेच
वागवी. असे वागून त्याने सर्व इस्राएलांची मने जिंकली.

### दावीदाचे राज्य हस्तगत करण्याची अबशालोमची योजना

7पुढे चार वर्षानी* अबशालोम राजा दावीदाला म्हणाला,
"हेब्रोनमध्ये मी परमेश्वराला नवस बोललो होतो. तो
फेडण्यासाठी मला जाऊ दे. 8अराममधील गशूर येथे राहात
असताना मी तो बोललो होतो. परमेश्वराने मला पुन्हा
यरुशलेमला नेले तर मी परमेश्वराच्या सेवेला वाहून
घेईन असे मी बोललो होतो"
9तेव्हा राजा दावीदाने त्याला निश्चिंत होऊन जाण्यास
सांगितले. अबशालोम हेब्रोन येथे आला. 10पण त्याने
इस्राएलच्या सर्व वंशामध्ये हेर पाठवून लोकांना कळवले
"रणशिंग फुंकल्याचे ऐकल्यावर 'अबशालोम हेब्रोनचा
राजा झाला आहे' असा तुम्ही घोष करा." 11अबशालोमने
स्वत:बरोबर दोनशे माणसे घेतली. यरुशलेम सोडून ती
त्याच्या बरोबर निघाली. पण त्यांना त्याच्या बेताची कल्पना
नव्हती. 12अहिथोफेल हा तेव्हा दावीदाचा एक सल्लागार
होता. हा गिलो या गावाचा होता. यज्ञ करत असताना
अबशालोमने अहिथोफेलला गिलोहून बोलावून घेतले.
सर्व काही अबशालोमच्या योजने प्रमाणे सुरळीत चालले
होते. त्याला अधिकाधिक पाठिंबा मिळत होता.

### अबशालोमच्या बेताचा राजाला सुगावा लागतो

13एकाने दावीदाकडे येऊन वर्तमान सांगितले की
इस्राएलच्या लोकांचा कल अबशालोमकडे झुकत आहे.
14तेव्हा यरुशलेममध्ये आपल्या भोवती असलेल्या सर्व
सेवकांना दावीद म्हणाला, "आता आपण पळ काढला
पाहिजे. आपण येथून निसटलो नाही तर अबशालोमच्या
तावडीत सापडू. त्याने पकडायच्या आतच आपण तातडीने
निघून जाऊ. नाही तर तो आपल्यापैकी कोणालाही
शिल्लक ठेवणार नाही. यरुशलेमच्या लोकांना तो मारुन
टाकेल."
15तेव्हा राजाचे सेवक त्याला म्हणाले, "तुम्ही म्हणाल
ते करायला आम्ही तयार आहोत."

### दावीद आपल्या लोकांसह निसटतो

16आपल्या कुटुंबातील सर्वांसह राजा बाहेर पडला.
आपल्या दहा उपपत्न्यांना त्याने घराचे रक्षण करायला
म्हणून मागे ठेवले. 17राजा आणि त्याच्यामागोमाग सर्व
लोक निघून गेले. अगदी शेवटच्या घरापाशी ते थांबले
18त्याचे सर्व सेवक तसेच एकूणएक करेथी, पलेथी आणि
(सहाशे गित्ती) राजामागोमाग चालत गेले. 19गथ येथील
इत्तयला राजा म्हणाला, "तू ही आमच्याबरोबर कशाला
येतोस? मागे फिर आणि नवीन राजा अबशालोम याला
साथ दे. तू परकाच आहेस ही तुझी माय भूमी नव्हे. 20तू
कालच येऊन मला मिळालास. आम्ही वाट फुटेल तिकडे
जाणार. तू कशाला भटकंत फिरतोस? तेव्हा तुझ्या
बांधवांसह परत फिर. तुला प्रेमाची आणि न्यायाची वागणूक
मिळो."
21पण इत्तय राजाला म्हणाला, "परमेश्वराची शपथ,
तुम्ही जिवंत असेपर्यंत मी तुमची साथ सोडणार नाही.
आता जगणे, मरणे तुमच्याबरोबरच."
22दावीद इत्तयला म्हणाला, "मग चल तर किद्रोन ओहोळा
पलीकडे आपण जाऊ."
तेव्हा इत्तय आपल्या बरोबरच्या सर्व मुला-माणसांसह
किद्रोन ओहोळा पलीकडे गेला. 23सर्व लोक मोठ्याने
आकांत करत होते. राजाने ही किद्रोन झरा ओलांडला.
मग सर्व जण वाळवंटाकडे निघाले. 24सादोक आणि त्याच्या
बरोबरचे सर्व लेवी देवाचा करारकोश घेऊन निघाले

---

**चार वर्षांनी** काही जुन्या प्रतीनुसार "चाळीस वर्षांनी."

होते. त्यानी देवाचा पवित्रकोश खाली ठेवला. यरुशलेममधून सर्व लोक बाहेर पडेपर्यंत अब्याथार कोशाजवळ उभा राहून प्रार्थना म्हणत होता.*

25राजा दावीद सादोकला म्हणाला, "हा देवाचा पवित्र कोश यरुशलेमला परत घेऊन जा. परमेश्वराची कृपा असेल तर तो मला पुन्हा येथे आणेल. यरुशलेम आणि हे त्याचे मंदिर मला पुन्हा पाहता येईल. 26पण तो माझ्यावर प्रसन्न नसेल तर त्याच्या मनात असेल ते माझे होईल."

27पुढे राजा सादोक याजकाला म्हणाला, "तू द्रष्टा आहेस तू सुखरुप नगरात परत जा. तुझा मुलगा अहीमास आणि अब्याथारचा मुलगा योनाथान यांनाही घेऊन जा. 28हा प्रदेश ओलांडून वाळवंट लागते त्याठिकाणी मी तुझा संदेश येईपर्यंत थांबतो."

29तेव्हा देवाचा पवित्र करारकोश घेऊन सादोक आणि अब्याथार यरुशलेमला परतले आणि तिथेच राहिले.

### दावीदाचे अहिथोफेल विरुद्ध गाऱ्हाणे

30दावीद शोक करत जैतूनच्या डोंगरावर गेला. मस्तक झाकून, अनवाणी तो चालत राहिला. त्याच्याबरोबरच्या लोकांनीही त्याचे अनुकरण केले. तेही रडत होते.

31एकाने दावीदाला सांगितले, "अहिथोफेल हा अबशालोम बरोबर कारस्थाने करणाऱ्यांपैकी आहे." तेव्हा दावीदाने देवाची करुणा भाकली. तो म्हणाला, "परमेश्वरा, अहिथोफेलचा सल्ला निष्फळ ठरु दे." 32दावीद डोंगरमाथ्यावर पोहोंचला. येथे तो अनेकदा देवाची आराधना करत असे त्या वेळी हूशय अर्की त्याला भेटायला आला. त्याचा अंगरखा फाटलेला होता, त्याने डोक्यात माती घालून घेतलेली होती.

33दावीद हूशयला म्हणाला, "तू माझ्याबरोबर आलास तर एवढे लोक आहेत त्यात आणखी तुझा भार. 34पण तू यरुशलेमला परलास तर अहिथोफेलची मसलत तू धुळीला मिळवू शकशील. अबशालोमला सांग, 'महाराज, मी तुमचा दास आहे. मी तुमच्या वडीलांच्या सेवेत होतो, पण आता तुमची सेवा करीन.' 35सादोक आणि अब्याथार हे याजक तुझ्याबरोबर असतील. राजाच्या घरी जे ऐकशील ते सगळे त्यांच्या कानावर घालत जा. 36सादोकचा मुलगा अहीमास आणि अब्याथारचा योनाथान हे ही त्यांच्या बरोबर आहेत. त्यांच्या मार्फत तू मला खबर कळवत जा."

37तेव्हा दावीदाचा मित्र हुशय नगरात परतला. अबशालोम ही यरुशलेममध्ये आला.

---

**प्रार्थना म्हणत होता** शब्दाश: अर्थ "वर गलेला" त्याचा अर्थ "धूप जाळणे", "आहुती असा होतो देणे असा होऊ शकतो" किंवा तो पवित्र कोशाच्या बाजूला इत्तर लोक निघून जाईपर्यंत उभा राहिला.

### सीबा दावीदाला भेटतो

16 जैतूनच्या डोंगरमाथ्याच्या थोडे पुढे गेल्यावर, मफीबोशेथाचा सेवक सीबा दावीदाला भेटला. सीबाजवळ खोगीर घातलेली दोन गाढवे होती. दोनशे पाव, किसमिसाचे शंभर घड, अंजिरांच्या शंभर ढेपा आणि द्राक्षारसाचा बुधला एवढे सामान गाढवांवर लादलेले होते. 2राजा दावीदाने "हे सर्व कशासाठी?" म्हणून सीबाला विचारले

सीबा म्हणाला, "राजाच्या कुटुंबियांना बसण्यासाठी म्हणून ही गाढवे आहेत. पाव आणि फळे नोकरांना खाण्यासाठी आणि वाळवंटात चालून थकलेल्यांसाठी हा द्राक्षारस आहे."

3राजाने त्याला मफिबोशेथाचा ठावाठिकाणा विचारला

सीबाने सांगितले, "मफिबोशेथ यरुशलेममध्येच आहे. कारण 'आता माझ्या आजोबांचे राज्य मला इस्राएली परत देतील' असे त्याला वाटते." 4तेव्हा राजा सीबाला म्हणाला, "ठीक आहे, जे जे मफिबोशेथच्या मालकीचे होते ते मी आता तुला देत आहे."

सीबा म्हणाला, "मी आपल्या पाया पडतो. मी तुम्हाला आनंद देण्यास समर्थ होईन अशी मी आशा करतो."

### शिमी दावीदाला शाप देतो

5पुढे दावीद बहूरीमला आला. तेव्हा शौलाच्या घराण्यातील एकजण बाहेर आला. हा गेराचा मुलगा शिमी. तो दावीदाला पुन्हा पुन्हा शिव्याशाप देत चालला होता.

6त्याने दावीदावर आणि त्याच्या सेवकांवर दगडफेक करायला सुरवात केली. पण इतर लोकांनी आणि सैनिकांनी चहूकडून दावीदाला वेढा घातला. 7शिमी दाविदला शाप देतच होता, "चालता हो, तोंड काळं कर इथून. तू खूनी आहेस! 8देव तुला शासन करीत आहे. कारण शौलाच्या घरातील लोकांना तू मारलेस. त्याचे राज्य बळकावलेस. पण ते राज्य परमेश्वराने तुझा मुलगा अबशालोम याच्या हवाली केले आहे. तुझे आता हाल होत आहेत कारण तू खुनी आहेस."

9सरुवेचा मुलगा अबीशय राजाला म्हणाला, "या मेलेल्या कुत्र्यासारख्या नगण्य माणसाने तुम्हाला शिव्याशाप द्यावेत म्हणजे काय? स्वामी, मला त्याचा शिरच्छेद करु द्या."

10पण राजा त्याला म्हणाला, "सरुवेच्या मुलानो, मी काय करु? शिमी मला शाप देत आहे. पण परमेश्वरानेच त्याला तसे करायला सांगितले आहे."

11अबीशयला आणि इतर सर्व सेवकांना राजा पुढे म्हणाला, "माझा पोटचा मुलगा अबशालोमच माझ्या जिवावर उठला आहे. बन्यामीनच्या वंशातील या शिमीला तर मला मारायचा हक्क च आहे. त्याला हवे ते म्हणू द्या. देवानेच त्याला तशी बुध्दी दिली आहे. 12माझ्याबाबतीत घडणारे हे अन्याय कदाचित् परमेश्वर पाहील आणि

शिमीच्या या शिव्याशापाच्या बदल्यात उद्या तो माझे भलेच
करील.”

13दावीद आणि त्याच्या बरोबरचे लोक मग आपल्या
वाटेने तसेच पुढे गेले. शिमी त्यांच्या मागोमाग जात राहिला.
डोंगराच्या कडेने तो दुसऱ्या बाजूने जात होता. तो
दाविदाबद्दल खूप वाईट गोष्टी बोलत होता. दावीदावर तो
दगड आणि मातीही फेकत होता.

14राजा दावीद आणि बरोबरचे सर्व लोक यार्देन नदीजवळ
आले. दमल्यामुळे ते तेथे विश्रांतीला थांबले. म्हणून त्यांनी
विसावा घेतला व ते ताजेतवाने झाले.

15अबशालोम, अहिथोफेल आणि इस्राएलचे सर्व लोक
यरुशलेम येथे आले. 16दावीदाचा मित्र अर्की हूशय
अबशालोमकडे आला आणि त्याने अबशालोमची स्तुती
केली. तो म्हणाला, “राजा चिरायु होवो, राजा चिरायु
होवो”

17अबशालोम त्याला म्हणाला, “तू आपल्या मित्राची,
दावीदाची साथ का सोडलीस? तुही त्याच्याबरोबर यरुशलेम
का सोडले नाहीस?”

18हूशय म्हणाला, “परमेश्वर ज्याची निवड करेल
त्याला माझा पाठिंबा आहे. या आणि इस्राएल लोकांनी
आपली निवड केली आहे. म्हणून मी तुमच्या बाजूचा
आहे. 19पूर्वी मी तुमच्या वडीलांच्या सेवेत होतो. आता
त्यांच्या मुलाची सेवा केली पाहिजे. मी तुमची सेवा
करीन.”

## अबशालोम अहीथोफेलचा सल्ला मागतो

20अबशालोमने अहिथोफेलला विचारले “आम्ही काय
करावे ते सांग.”

21अहिथोफेल त्याला म्हणाला, “घराची राखण करायला
तुझ्या वडीलांनी त्यांच्या दासी येथेच ठेवल्या आहेत.
त्यांच्याशी तू संबंध ठेव मग तुझ्या वडीलांना तुझा तिरस्कार
वाटतो ही गोष्ट सर्व इस्राएलांमध्ये पसरेल. त्यामुळे त्या
सर्वांचा तुला पाठींबा मिळेल.”

22मग सर्वांनी घराच्या धाब्यावर अबशालोमसाठी राहुटी
ठोकली. अबशालोमने आपल्या वडीलांच्या दासींशी
लैंगिक सैंबंध ठेवले. ही गोष्ट सर्व इस्राएलांनी पाहिली.
23अहिथोफेलचा सल्ला दावीद आणि अबशालोम या
दोघांनाही उपयोगी पडला. लोकांना त्याचे म्हणणे देवाच्या
शब्दा इतके महत्वाचे वाटले.

## अहीथोफेलचा दावीद विषयी सल्ला

17 शिवाय अहिथोफेलने अबशालोमला सांगितले,
“मला आता बाराहजार माणसांची निवड करु दे
म्हणजे आज रात्रीच मी दावीदाचा पाठलाग करतो. 2तो
थकला भागलेला असताना, भयभीत झालेला असतानाच
मी त्याला पकडीन. हे पाहून त्याचे लोक पळ काढतील
फक्त राजा दावीदाचा मी वध करीन. 3बाकीच्यांना तुझा
समक्ष हजर करीन. तो मेल्याची खात्री झाली की सगळे
लोक बिनतक्रार परत येतील.”

4अबशालोम आणि इस्राएलमधील सर्व वडीलधारी
मंडळी यांना हा बेत पसंत पडला. 5पण तरीसुध्दा अबशालोम
म्हणाला, “हूशय अर्की यालाही बोलावून द्या. त्याचे म्हणणेही
मला ऐकून घ्यायचे आहे.”

## हूशय अहीथोफेलचा सल्ला धुडकावतो

6मग हूशय अबशालोमकडे आला. अबशालोम त्याला
म्हणाला, “अहिथोफेलची योजना अशी अशी आहे. तुला
त्यावर काय वाटते? तसे करावे की नाही ते सांग.”

7हूशय अबशालोमला म्हणाला, “अहिथोफेलचा सल्ला
आत्ता या घटकेला तरी रास्त नाही.” 8तो पुढे म्हणाला,
“तुमचे वडील आणि त्यांच्या बाजूचे लोक चांगले बळकट
आहेत हे तुम्ही जाणताच. त्यातून ते आत्ता पिल्लं हिरावून
नेलेल्या रानातल्या अस्वला सारखे चिडलेले आहेत. तुमचे
वडील एक कुशल योद्धा आहेत. ते भरवस्तीत रात्रभर
मुक्काम करणार नाहीत. 9एखाद्या गुहेत किंवा निर्जन
ठिकाणी ते कदाचित् गेले सुध्दा असतील त्यांना तुमच्या
लोकांवर आधी हल्ला केला तर लोक ते ऐकून म्हणतील,
‘अबशालोमचे लोक हरत चाललेले दिसत आहेत.’ 10मग
तर सिंहासारख्या शूरलोकांचेही धैर्य खचेल. कारण तुमचे
वडील पराक्रमी आहेत आणि त्यांच्या बाजूची माणसे शूर
आहेत हे सर्वच इस्राएल लोकांना ठाऊक आहे.

11“तेव्हा मी असे सुचवतो. तुम्ही दानपासून बैरशेबापर्यंत
समस्त इस्राएल लोकांना एकत्र आणा. म्हणजे
वाळवंटाप्रमाणे विशाल सैन्य तयार होईल मग तुम्ही स्वत:
युध्दात उतरा. 12दावीद जेथे लपला असेल तेथून आम्ही
त्याला धरून आणू. जमिनीवर दव पडावे तसे आम्ही
त्याच्यावर तुटून पडू. दावीदाला त्याच्या बरोबरच्या
माणसांसहित आम्ही ठार करु. कुणालाही सोडणार नाही.
13पण दावीदाने एखाद्या नगरात आश्रय घेतलेला असेल
तर दोरखंड आणून आम्ही सर्व इस्राएल लोकाचे ते नगर
ओढून दरीत ढकलू. मग एक धोंडासुध्दा त्याठिकाणी
शिल्लक राहणार नाही.”

14अबशालोम आणि सर्व इस्राएल लोक म्हणाले,
“अहिथोफेलपेक्षा हूशय अर्कीचा सल्ला श्रेयस्कर आहे.”
ती म्हणून सर्वांना पसंत पडली कारण ती परमेश्वराची
योजनाच होती. अबशालोमला अद्दल घडावी म्हणून
अहिथोफेलचा चांगला सल्ला थोपवून कुचकामी
ठरवण्याचा तो परमेश्वराचा बेत होता. अशा प्रकारे तो
अबशालोमला अद्दल घडवणार होता.

## हूशयचा दावीदाला सावधगिरीचा इशारा

15हूशयने हे सर्व सादोक आणि अब्याथार या याजकांच्या
कानावर घातले. अबशालोम आणि इस्राएलमधील वडील
मंडळी यांना अहिथोफेलने जे सुचवले ते हूशयने या दोघांना

सांगितले. तसेच आपण काय सुचवले तेही साविस्तर
सांगितले. हूशय म्हणाला, 16“आता त्वरा करा ताबडतोब
दावीद कडे निरोप जाऊ द्या. नदीच्या उताराजवळ राहू
नका असे त्यांना सांगा. ताबडतोब यार्देन नदी ओलांडून
जायला सांगा म्हणजे ते आणि त्यांच्या बरोबरची माणसे
पकडली जाणार नाहीत.”

17योनाथान आणि अहीमास ही याजकांची मुले
एन-रोगेल येथे थांबली. त्यांना गावात शिरताना कुणी
पाहू नये म्हणून एक दासी त्यांच्या कडे आली. तिने त्यांना
निरोप सांगितला तो त्यांनी राजा दावीदाकडे पोचवला.

18पण एका मुलाने योनाथान आणि अहीमास यांना
पाहिलेच. हे अबशालोमला सांगायला तो धावत
निघाला. योनाथान आणि अहीमास तेथून चटकन् निघाले.
ते बहूरीम येथे एकाच्या घरी पोचले. त्याच्या घराच्या
अंगणात एक विहीर होती. त्यात उतरुन ते लपले. 19त्या
माणसाच्या बायकोने आडावर एक चादर पसरुन वर
धान्य ओतले. त्यामुळे तिथे धान्याची रास आहे असे दिसू
लागले. तेव्हा तिथे योनाथान आणि अहीमास लपले
असतील अशी शंकाही कोणाला आली नाही.
20अबशालोमकडचे नोकर त्या घरातल्या बाईकडे आले.
त्यांनी योनाथान आणि अहीमासचा ठावाठिकाणा
विचारला.

ते थोड्या वेळापूर्वीच ओहळ ओलांडून गेल्याचे तिने
त्यांना सांगितले.

मग अबशालोमचे ते नोकर योनाथान आणि अहीमास
यांच्या शोधार्थ निघाले. पण ते कुठेच न सापडल्यामुळे हे
नोकर यरुशलेमला परत गेले. 21इकडे अबशालोमचे
नोकर निघून जातात, तो योनाथान आणि अहीमास
विहिरीतून बाहेर पडले. तडक राजा दावीदाकडे जाऊन
ते त्याला म्हणाले, “असाल तसे निघा आणि नदी ओलांडून
पलीकडे जा. अहिथोफेलने तुमच्याविरुध्द असे असे
सांगितले आहे.” 22तेव्हा दावीदाने आपल्या बरोबरच्या
लोकांसह यार्देन नदी ओलांडली. सूर्य वर यायच्या आत
सर्वजण पलीकडे पोहोंचले होते.

## अहीथोफेलची आत्महत्या

23इस्राएल लोकांनी आपला सल्ला मानला नाही हे
अहिथोफेलच्या लक्षात आले. त्याने गाढवावर खोगीर
टाकले आणि आपल्या गावाकडे प्रयाण केले. घरच्यांची
पुढली तरतूद केली आणि स्वत:ला फास लावून घेतला.
त्याच्या मृत्यूनंतर लोकांनी त्याचे त्याच्या वडीलांच्या
कबरीतच दफन केले.

## अबशालोम यार्देन पार करतो

24दावीद महनाइम येथे आला.

अबशालोमने सर्व इस्राएलींसमवेत यार्देन नदी ओलांडली.
25अबशालोमने अमासा याला सेनापती केले. यवाबाची
जागा अमासाने घेतली.* अमासा इस्राएली इथ्राचा मुलगा.
अमासाची आई अबीगल. सरुवेची बहीण नाहाश हिची ही
अबीगल मुलगी. (सरुवे यवाबाची आई.)

26अबशालोम आणि त्याच्या बरोबरचे इस्राएल लोकांनी
यांनी गिलाद प्रांतात मुक्काम केला.

## शोबी, माखीर आणि बर्जिल्ल्य

27दावीद महनाइम येथे आला. शोबी, माखीर आणि
बर्जिल्ल्य तेथेच होते. (नाहाशचा मुलगा शोबी हा
अम्मोन्यांच्या राब्बा नगरातला होता. अम्मीएलचा मुलगा
माखीर हा लो-दबार मधील तर बर्जिल्ल्य गिलादमधील
रोगलीमचा होता)

28–29ते म्हणाले, “हे वाळवंटातील लोक थकले भागलेले
आणि तहानलेले भुकेलेले असे आहेत.” त्यांनी दावीद
आणि इतर सर्व जणांसाठी बरेचसे खायचे प्यायचे पदार्थ
आणले. तसेच बिछाने, भांडीकुंडी सुध्दा ते घेऊन आले.
गहू जव, कणीक, हुरडा, शेंगा, डाळी, वटाणे, मध, लोणी,
मेंढरे तसेच गाईच्या दुधाचे पनीर याही वस्तू त्यांनी आणल्या.

## दावीदाची युध्दाची तयारी

18 दावीदाने आपल्या बरोबरच्या लोकांची शिरगणती
केली. मग, शंभर-शंभर, हजार हजार माणसांवर
अधिकारी, सरदार नेमले. 2सर्वांची त्याने तीन गटात
विभागणी केली. यवाब, अबीशय (यवाबाचा भाऊ आणि
सरुवेचा मुलगा) आणि गथ येथील इत्तय या तिघांना एकेक
गटाचे प्रमुख म्हणून नेमले आणि सर्वांची रवानगी केली.
तेव्हा राजा दावीद त्यांना म्हणाला, “मी ही तुमच्याबरोबर
येतो.” 3पण लोक म्हणाले, “नाही, तुम्ही आमच्याबरोबर
येता कामा नये. कारण आम्ही युध्दातून पळ काढला
किंवा आमच्यातले निम्मे लोक या लढाईत कामी आले
तरी अबशालोमच्या लोकांना त्याची फिकीर नाही. पण
तुम्ही एकटे आम्हा दहाहजारांच्या ठिकाणी आहात. तेव्हा
तुम्ही शहरात राहावे हे बरे. शिवाय गरज पडली तर
तुम्ही आमच्या मदतीला यालच.”

4तेव्हा राजा लोकांना म्हणाला, “मी तुमच्या
म्हणण्याप्रमाणे करीन.”

राजा मग वेशीपाशी उभा राहिला. सैन्य बाहेर पडले,
शंभर आणि हजाराच्या गटात ते निघाले.

## “तरुण अबशालोमशी सौम्यपणाने वागा!”

5यवाब, अबीशय आणि इत्तय यांना राजाने आज्ञा दिली,
“माझ्या साठी एक करा. अबशालोमशी सौम्यपणाने वागा.”
राजाची ही आज्ञा सर्वांच्या कानावर गेली.

---

**यवाबची … घेतली** यवाबचा पाठिंबा दावीदाला होता दावीदने
अबशालोमपासून पळ काढला तेव्हा यवाब दावीदच्या सैन्यातील
तीन सेनापतीपैकी होता.

## दावीदाच्या सैन्याकडून अबशालोमच्या सैन्याचा पराभव

[6]अबशालोमच्या इस्राएल सैन्यावर दावीदाचे सैन्य चालून
गेले. एफ्राईमच्या अरण्यात ते लढले. [7]दावीदाच्या सैन्याने
इस्राएलाचा पराभव केला. त्यांची वीस हजार माणसे
त्यादिवशी मारली गेली. [8]देशभर युध्द पेटले. त्या दिवशी
तलवारीला बळी पडली त्यापेक्षा जास्त माणसे जंगलामुळे
मेली.

[9]अबशालोमचा दावीदाच्या अधिकाऱ्यांशी सामना झाला
तेव्हा अबशालोम खेचरावर बसून निसटायचा प्रयत्न करु
लागला. ते खेचर एका मोठ्या एला वृक्षाच्या खालून जात
असताना त्याच्या जाडजूड फांद्यामध्ये अबशालोमचे डोके
अडकले. खेचर निघून गेले आणि अबशालोम अधांतरी
लोंबकळत राहिला.

[10]एकाने हे पाहिले आणि यवाबाला सांगितले,
"अबशालोमला मी एला वृक्षावरून लोंबकळताना
पाहिले."

[11]यवाब त्या माणसाला म्हणाला, "मग तू त्याचा वध
करुन त्याला जमिनीवर का पाडले नाहीस? मी तुला दहा
रौप्यमुद्रा आणि एक पट्टा इनाम दिला असता."

[12]तो माणूस म्हणाला, "तुम्ही हजार रौप्यमुद्रा देऊ केल्या
असत्या तरी मी राजकुमाराला इजा पोचू दिली नसती.
कारण तुम्ही, अबीशय आणि इत्तय यांना राजाने केलेला
हुकूम आम्ही ऐकला आहे. राजा म्हणाला होता, 'लहान
अबशालोमला घातपात होणार नाही याची काळजी घ्या.'
[13]अबशालोमला मी मारले असते तर राजाला ते समजलेच
असते. आणि तुम्ही मला शिक्षा केली असती."

[14]यवाब म्हणाला, "इथे वेळ दवडण्यात काही अर्थ
नाही."

अबशालोम अजून जिवंत असून एलावृक्षात अजून तसाच
लटकत होता. यवाबाने तीन भाले घेतले आणि ते
अबशालोमवर फेकले. भाले अबशालोमच्या हृदयातून
आरपार गेले. [15]यवाबाजवळ दहा तरुण सैनिक त्याचे
लढाईतील मदतनीस म्हणून होते. त्यांनी भोवती जमून
अबशालोमचा वध केला.

[16]यवाबाने रणशिंग फुंकले आणि लोकांना
अबशालोमच्या इस्राएली सैन्याचा पाठलाग थांबवायला
सांगितले. [17]यवाबाच्या माणसांनी अबशालोमचा मृतदेह
अरण्यातील एका खंदकात नेऊन टाकला. वर दगडांची
रास रचून तो खंदक भरुन टाकला.

अबशालोमबरोबर आलेल्या इस्राएलानी पळ काढला
आणि ते घरी परतले.

[18]अबशालोमने राजाच्या खोऱ्यात पूर्वीच एक स्तंभ
उभारलेला होता. आपले नाव चालवायला मुलगा नाही
म्हणून त्याने त्या स्तंभाला स्वत:चेच नाव दिले होते.
आजही तो "अबशालोम स्मृतिस्तंभ" म्हणून ओळखला
जातो.

## यवाब दावीदाकडे हे वृत्त पाठवतो

[19]सादोकचा मुलगा अहीमास यवाबाला म्हणाला, "मला
धावत जाऊन ही बातमी राजाला सांगू दे. परमेश्वराने
त्याच्या शत्रूचा नि:पात केला आहे हे मी त्याला
सांगतो."

[20]यवाब त्याला म्हणाला, "आज तुला दावीदाकडे ही
बातमी घेऊन जाता येणार नाही. नंतर जाऊन तू सांग पण
आज नको. कारण खुद्द राजाचा मुलगा मरण पावला
आहे."

[21]मग यवाब कूश येथील एकाला म्हणाला, "तू पाहिलेस
त्याचे वर्तमान राजाला जाऊन सांग."

त्या माणसाने यवाबला अभिवादन केले मग तो
दावीदाकडे निघाला. [22]सादोकचा मुलगा अहीमास याने
पुन्हा यवाबाकडे विनवणी केली "काय होईल ते होईल,
पण मलाही त्या कूशीच्या पाठोपाठ धावत जाऊ दे."

यवाब म्हणाला, "मुला, तू ही बातमी नेऊन काय
करणार? त्यासाठी काही तुला इनाम मिळायचे नाही."

[23]अहीमास म्हणाला, "त्याची मला पर्वा नाही मला
जाऊ द्या." तेव्हा यवाबाने त्याला परवानगी दिली.

अहीमास मग यार्देनच्या खोऱ्यातून धावत निघाला. त्याने
त्या कूशीला मागे टाकले.

## दावीद बातमी ऐकतो

[24]राजा वेशीच्या दोन दरवाजांमध्येच बसला होता. तेव्हा
पहारेकरी तटबंदीवरील छपरावर चढला. त्याने इकडे
तिकडे पाहिले तेव्हा त्याला एक माणूस धावत येताना
दिसला. [25]पहारेकऱ्याने हे राजाला ओरडून मोठ्याने
सांगितले.

राजा दावीद म्हणाला, "तो एकटाच असेल तर त्याचा
अर्थ तो काहीतरी बातमी घेऊन येत आहे."

धावता धावता तो माणूस शहराच्या जवळ येऊन पोचतोय
तोच

[26]पहारेकऱ्याने आणखी एकाला धावत येताना पाहिले.
पहारेकरी द्वाररक्षकाला म्हणाला, "तो पाहा, आणखी एक
माणूस एकटाच धावत येतोय."

तेव्हा राजा म्हणाला, "तो ही बातमी आणतोय."

[27]पहारेकरी म्हणाला, "पहिल्याचे धावणे मला सादोकचा
मुलगा अहीमास याच्यासारखे वाटते."

राजा म्हणाला, "अहीमास चांगला गृहस्थ आहे.
त्याच्याजवळ चांगलीच बातमी असणार"

[28]अहीमासने "सर्व कुशल असो" असे म्हणून राजाला
वाकून अभिवादन केले. पुढे तो म्हणाला, "देव
परमेश्वराला धन्यवाद द्या. धनीस्वामी, तुमच्याविरुध्द
ज्यांनी उठाव केला त्यांना परमेश्वराने पराभूत केले
आहे."

[29]राजाने विचारले, "अबशालोमचे कुशल आहे ना?"
अहीमास म्हणाला, "यवाबाने मला पाठवले तेव्हा मोठी

धांदल उडालेली दिसलेली पण ती कशाबद्दल हे मला
कळले नाही." 30राजाने मग त्याला बाजूला उभे राहून
थांबायला सांगितले. अहीमास त्याप्रमाणे पलीकडे झाला
आणि थांबला.
31मग तो कूशी आला तो म्हणाला, "माझ्या स्वामीसाठी
ही बातमी आहे. तुमच्या विरुद्ध पक्षाच्या लोकांना
परमेश्वराने चांगली अद्दल घडवली."
32राजाने त्याला विचारले, "अबशालोम ठीक आहे
ना?"
त्यावर कूशीने सांगितले, "तुमचे शत्रू आणि तुमच्या
वाईटावर असलेले लोक या सगळ्यांची त्या तरुण माणसा
सारखीच (अबशालोमसारखी) गत होवो."
33[यावरुन अबशालोम मरण पावला हे राजाला उमगले]
तो फार शोकाकुल झाला. वेशीवर बांधलेल्या खोलीत
तो गेला. तेथे त्याला रडू कोसळले. आपल्या
दालनात जाताना तो म्हणाला, "अबशालोम, माझ्या मुला,
तुझ्या ऐवजी मीच मरायला हवे होते रे पोरा!"

## यवाब दावीदाला खडसावतो

19 लोकांनी ही बातमी यवाबाला सांगितली. ते त्याला
म्हणाले, "राजा अबशालोमसाठी शोक करत
आहे. तो फार दु:खात आहे."
2दावीदाच्या सैन्याने त्या दिवशीची लढाई जिंकली होती.
पण लोकांसाठी मात्र तो दु:खाचा दिवस ठरला. राजा
आपल्या मुलाच्या मृत्यूमुळे दु:खात आहे हे ऐकून लोक
फार खिन्न झाले.
3ते शांतपणे नगरात परतले. युध्दात पराभूत होऊन
तिथून पळ काढलेल्या लोकांप्रमाणे ते दिसत होते. 4राजा
आपला चेहरा झाकून घेऊन आपला मुलगा अबशालोम
याच्या नावाने "अरे माझ्या मुला अबशालोम" असा मोठ्याने
आक्रोश करत होता.
5यवाब राजाच्या निवासस्थानी आला आणि त्याला
म्हणाला, "आपल्या सेवकांना तू आज मान खाली घालायला
लावली आहेस. तुझ्या सेवकांनी तुझा जीव वाचवला.
तुझी मुले, मुली, बायका दासी यांचे प्राण वाचवले. 6ज्यांनी
तुझा द्वेष केला त्यांच्यावर तू प्रेम दाखवतो आहेस आणि
ज्यांनी तुझ्यावर लोभ केला त्यांना तू दूर सारतो आहेस.
तुझी माणसे, तुझे सेवक यांना तुझ्या दृष्टीने काही किंमत
नाही हे तुझ्या वागण्यावरुन स्पष्ट झाले आहे. आज
अबशालोम जगला असता आणि आम्ही सर्व मेलो असतो
तर तुला फार आनंद झाला असता असे दिसते. 7आता
ऊठ आणि आपल्या सेवकांशी बोल. त्यांना प्रोत्साहन दे.
आत्ताच उठून तू हे ताबडतोब केले नाहीस तर आज
रात्रीपर्यंत तुझ्या बाजूला एकही माणूस उरणार नाही याची
मी परमेश्वरासमक्ष ग्वाही देतो आणि हा तुझ्या
बालपणापासूनच्या आयुष्यातला सर्वात मोठा आघात
असेल."
8तेव्हा राजा उठून वेशीपाशी गेला. राजा तेथे आल्याची
खबर सर्वत्र पसरली. तेव्हा सर्व जण राजाच्या दर्शनाला
जमले.

## दावीद पुन्हा राजा होतो

अबशालोमला पाठिंबा देणारे सर्व इस्राएल लोक
आपापल्या ठिकाणी पळून गेले होते. 9इस्राएलच्या सर्व
घराण्यातील लोक आता बोलू लागले "पलिष्टी आणि
आपले इतर शत्रू यांच्यापासून राजा दावीदाने आपल्याला
संरक्षण दिले. पण तो अबशालोमपासून पळून गेला.
10म्हणून अबशालोमची आपण राज्य करण्यासाठी निवड
केली. पण तो आता लढाईत मरण पावला आहे. तेव्हा
आपण आता पुन्हा दावीदाला राजा करु."
11सादोक आणि अब्याथार या याजकांना राजा दावीदाने
निरोप पाठवला, "यहूदातील वडीलधाऱ्यांशी बोला. त्यांना
सांगा, राजा दावीदाला गादीवर आणायला तुम्ही शेवटचे
घराणे का आहा? राजाने पुन्हा परतण्याविषयी सर्वच इस्राएल
लोकांची बोलणी चाललेली आहेत. 12तुम्ही माझे बांधव,
माझ्या कुटुंबातीलच आहात. मग राजाला परत आणणारे
तुम्ही शेवटचे घराणे का आहात? 13आणि अमासाला
सांगा, तुम्ही माझ्या कुटुंबाचाच भाग आहात. यवाबाच्या
जागी सेनापती म्हणून मी तुमची नेमणूक केली नाही तर
देव मला शासन करो."
14दावीदाने यहूदातील सर्व लोकांच्या हृदयाला हात
घातला त्यामुळे ते सर्व एकदिलाने राजी झाले. यहूदी
लोकांनी राजाला संदेश पाठवला की तुम्ही आणि तुमचे
अधिकारी, सेवक यांनी माघारे यावे.
15मग राजा दावीद यार्देन नदीपाशी आला. यहूदातील
लोक त्याला भेटायला गिलगाल येथे आले. राजाला यार्देन
नदी पार करुन आणण्याचा त्यांचा मानस होता.

## शिमीची क्षमायाचना

16गेराचा मुलगा शिमी हा बन्यामीनच्या घराण्यातील
होता. तो बहूरीम येथे राहात असे. यहूदातील लोकांसह
राजाची भेट घ्यायला तो लगबगीने आला. 17बन्यामीनच्या
वंशातील हजार माणसेही त्याच्याबरोबर आली. शौलाच्या
घराण्यातील सेवक सीबा हाही आला. आपले पंधरा मुलगे
आणि वीस नोकर यांनाही त्याने बरोबर आणले. राजा
दावीदाला भेटायला हे सर्व यार्देन नदीजवळ तात्काळ
पोहोंचले.
18राजाच्या कुटुंबियांना उतरुन घ्यायला ते यार्देनच्या
पलीकडे गेले. राजाला हवे ते करायला ते तयार होते.
राजा नदी ओलांडत असताना गेराचा मुलगा शिमी त्याच्या
भेटीला आला. शिमीने राजाला जमिनीपर्यंत लवून
अभिवादन केले. 19तो राजाला म्हणाला, "स्वामी, माझ्या
हातून घडलेल्या अपराधांचा विचार करु नका. महाराज,

तुम्ही यरुशलेम सोडून गेलात तेव्हाची माझी कृत्ये विसरुन
जा. [20]"मी पापी आहे हे तुम्ही जाणता. म्हणूनच योसेफच्या
घराण्यातून तुमच्या भेटीला आलेली मी पहिलीच व्यक्ती
आहे."

[21]पण सरुवेचा मुलगा अबीशय म्हणाला, "परमेश्वराने
निवडलेल्या राजाविषयी शिमीने शिव्याशाप दिले. तेव्हा
त्याला ठारच करायला हवे."

[22]दावीद म्हणाला, "सरुवेच्या मुलानो. मी तुमच्या बरोबर
कसे वागावे? तुमचे हे बोलणे आज माझ्या विरूद्ध आहे.
इस्राएलमध्ये कोणालाही ठार केले जाणार नाही कारण
आज मी इस्राएलचा राजा आहे."

[23]मग राजा शिमीला म्हणाला, "तू मरणार नाहीस."
आपण शिमीचा वध करणार नाही असे राजाने शिमीला
वचन दिले.*

## मफीबोशेथ दावीदाला भेटायला येतो

[24]शौलचा नातू मफीबोशेथ राजा दावीदाला भेटायला
आला. राजा यरुशलेम सोडून गेला तेव्हा पासून तो सुखरुप
परतेपर्यंत मफीबोशेथने स्वत:कडे फार दुर्लक्ष केले होते.
त्याने दाढी केली नाही, पायांची निगा राखली नाही की
कपडे धुतले नाहीत. [25]मफीबोशेथ यरुशलेमहून आला
तेव्हा राजा त्याला म्हणाला, "मी तेथून निघालो तेव्हा तूही
माझ्याबरोबर का बाहेर पडला नाहीस?"

[26]मफीबोशेथने सांगितले, "महाराज, माझ्या नोकराने,
सीबाने, मला फसवले, त्याला मी म्हणालो, 'मी पांगळा
आहे तेव्हा गाढवावर खोगीर चढव म्हणजे त्यावर बसून
मी राजाबरोबर जाईन' [27]पण त्याने माझ्याशी लबाडी केली.
माझ्याविरुद्ध तुझे कान फुंकले पण स्वामी, तुम्ही
देवदूतासारखे आहात. आपल्याला योग्य वाटेल ते करा.
[28]माझ्या आजोबांच्या घराण्याचा तुम्ही समूळ नाश करू
शकला असता पण तसे तुम्ही केले नाही. तुम्ही मला
आणखी काही जणाबरोबर आपल्या पंक्तीला बसवलेत.
तेव्हा मला काहीही तक्रार करायचा हक्क नाही."

[29]तेव्हा राजा मफीबोशेथला म्हणाला, "आता आपल्या
अडचणीविषयी आणखी काही सांगू नकोस. आता माझा
निर्णय ऐक. तू आणि सीबा जमीन विभागून घ्या."

[30]मफीबोशेथ राजाला म्हणाला, "महाराज ती सगळी
जमीन खुशाल घेऊ सीबाला द्या माझे धनी सुखरुप परत
आला यात सगळे आले."

## दावीद बर्जिल्ल्यला बोलवून घेतो

[31]गिलादचा बर्जिल्ल्य रोगलीमहून आला. दावीदाला तो
यार्देन नदीच्या पलीकडे पोचवायला आला. [32]बर्जिल्ल्यचे
वय झाले होते. तो ऐंशी वर्षांचा होता. राजा दावीदाचा
मुक्क्राम महनाईम येथे असताना त्याने दावीदाला अन्नधान्य
आणि इतर गोष्टी पुरवल्या होत्या. श्रीमंत असल्यामुळे तो
एवढे करु शकला. [33]दावीद त्याला म्हणाला, "नदी उतरुन
माझ्याबरोबर चल. तू यरुशलेममध्ये माझ्याबरोबर
राहिलास तर मी तुझा सांभाळ करीन."

[34]पण बर्जिल्ल्य राजाला म्हणाला, "तुला माझे वय माहीत
आहे का? यरुशलेमपर्यंत मी तुझ्याबरोबर येऊ शकेन
असे तुला वाटते का? [35]"मी ऐंशी वर्षांचा आहे. वार्धाक्यामुळे
मी आता बऱ्यावाईटाची पारख करु शकत नाही. खातोपितो
त्याची चव सांगू शकत नाही. गाणाऱ्या स्त्री पुरुषांच्या
आवाजाला दाद देऊ शकत नाही. राजा, माझ्या राजा
तुझ्यामागे माझे लोढणे कशाला लावून देऊ? [36]आता
मला तुझ्याकडून अनुग्रहाची अपेक्षा नाही. मी तुझा सेवक.
यार्देन नदी मी उतरुन तुझ्याबरोबर येतो. राजाने अशाप्रकारे
या बक्षिसाने परतफेड का करावी?" [37]पण मला पुन्हा
परत घरी जाऊ दे. म्हणजे माझ्या गावात मी देह ठेवीन
आणि माझ्या आईवडीलांच्या कबरीतच माझे दफन होईल.
पण किम्हनला आपला चाकर म्हणून बरोबर घेऊन
जाऊ शकतोस. महाराज आपल्या मर्जीप्रमाणे त्याला वागव.

[38]तेव्हा राजा म्हणाला, "तर किम्हाम माझ्याबरोबर
येईल. तुला स्मरुन मी त्याचे भले करीन. तुझ्यासाठी मी
काहीही करायला तयार आहे."

## दावीद घरी परततो

[39]राजाने बर्जिल्ल्यचे चुंबन घेऊन त्याला आशीर्वाद
दिले. बर्जिल्ल्य आपल्या घरी परतला. राजा इतर
लोकांबरोबर नदी ओलांडून पलीकडे गेला.

[40]नदी ओलांडून राजा गिलगाल येथे आला. किम्हाम
त्याच्याबरोबर होता. यहूदाचे सर्व लोक आणि निम्मे इस्राएल
लोक राजाला नदी ओलांडून पोचवायला आले.

## इस्राएलांचा यहूद्यांशी वाद

[41]सर्व इस्राएल लोक राजाकडे आले. ते म्हणाले, "आमचे
बांधव यहूदी यांनी तुमचा ताबा घेऊन तुम्हाला आणि
तुमच्या कुटुंबियांना यार्देन पार करुन आणले असे का?"

[42]तेव्हा सर्व यहूदी लोकांनी त्या इस्राएल लोकांना
सांगितले, "कारण राजा आमचा जवळचा आप्त आहे.
तुम्हाला एवढा राग का यावा? आम्ही राजाच्या अन्नाचे
मिंधे नाही. त्याने आम्हाला बक्षीसांची लालूचही दाखवली
नाही."

[43]इस्राएल लोक म्हणाले, "आमच्याकडे दावीदाचे दहा
हिस्से* आहेत. तेव्हा तुमच्यापेक्षा आमचा त्याच्यावर जास्त

---

**मग राजा शिमीला ... वचन दिले** दावीदाने शिमीला मारले नाही, पण पुढे काही वर्षांनी दावीदचा मुलगा शलमोन याने शिमीचा वध करण्याची आज्ञा दिली. पाहा 1 राजे 2:44-46.

**दहा हिस्से** राज्य विभागणीनंतर यहूदा आणि बन्यामीन मिळून यहूदांचे राज्य झाले उरलेले दहा घराणी इस्राएलांच्या राज्यात होती.

हक्क आहे. असे असून तुम्ही आमच्याकडे दुर्लक्ष केलेत. असे का? राजाला पुन्हा गादीवर बसवायचे आम्हीच आधी बोललो होतो."

पण यहूदींनी इस्राएल लोकांना यावर अतिशय तुच्छतेने उत्तर दिले. इस्राएल पेक्षाही यहूदींची भाषा कठोर होती.

### शबा दावीद विषयी इस्राएलांचे मन कुलषित करतो

20 शबा नावाचा एक माणूस तेथे होता. हा बिक्रीचा मुलगा. बन्यामीन घराण्यातील हा शबी अगदी कुचकामी पण खोडसाळ प्रवृत्तीचा होता. त्याने एकदा रणशिंग फुंकले आणि लोकांना गोळा केले आणि त्यांना म्हणाला,

"दावीदाकडे आपला भाग नाही. या इशायच्या मुलात आपला वाटा नाही इस्राएलींनो, चला आपापल्या डेऱ्यात परत."

2हे ऐकून सर्व इस्राएल लोक दावीदाला सोडून बिक्रीचा मुलगा शबा याच्या मागे गेले. पण यहूदी लोक मात्र यार्देन नदीपासून यरुशलेमपर्यंत राजाच्या पाठीशी राहिले.

3दावीद यरुशलेममधील आपल्या घरी परतला. आपल्या दहा दासींना त्याने घराच्या निगराणी साठी मागे ठेवले होते. त्यांना त्याने एका खास घरांत* ठेवले. त्यांच्यावर पहारा ठेवला. मरेपर्यंत या बायका तेथेच राहिल्या दावीदाने त्यांच्या उदरनिर्वाहाची सगळी नीट व्यवस्था केली पण पुन्हा त्यांच्याशी संबंध ठेवले नाहीत. त्यामुळे शेवटपर्यंत त्यांची स्थिती विधवेसारखी होती.

4राजा अमासाला म्हणाला, "यहूदाच्या लोकांना तीन दिवसात येऊन मला भेटायला सांग. त्यावेळी तूही बरोबर राहा."

5तेव्हा अमासा यहूदांना बोलवून आणायला रवाना झाला. पण राजाने सांगितल्यापेक्षा त्याला जास्त वेळ लागला.

### शबाला मारायची दावीदाची अबीशयला सूचना

6दावीद अबीशयला म्हणाला, "अबशालोमपेक्षाही हा बिक्रीचा मुलगा शबा आपल्या दृष्टीने धोकादायक आहे. तेव्हा माझ्या हाताखालच्यांना घेऊन त्याचा पाठलाग कर. तटबंदी असलेल्या नगरात तो जायच्या आधीच त्याला गाठायला हवे. एकदा तो मजबूत बंदोबस्त असलेल्या नगरात शिरला की त्याला पकडणे अवघड जाईल."

7तेव्हा यवाब, बिक्रीचा मुलगा शबा याच्या पाठलागासाठी यरुशलेमहून निघाला. त्याने बरोबर आपली माणसे, करेथी, पलेथी तसेच इतर सैनिक घेतले.

### यवाब अमासाचा वध करतो

8यवाब आणि त्याचे सैन्य गिबोनजवळच्या मोठ्या पहाडाशी आले तेव्हा अमासा त्यांना सामोरा आला. यवाबाच्या अंगावर चिलखत होते. त्याने कमरबंद बांधला होता आणि म्यानात तलवार होती. यवाब आमासाच्या दिशेने चालू लागला तेव्हा त्याची तलवार म्यानातून निसटून पडली. यवाबाने ती उचलली आणि हातात धरली. 9त्याने
अमासाला विचारले, "तुझे सर्व कुशल आहेना?"

आणि अमासाचे चुंबन घेण्यास यवाबाने आपला उजव्या हाताने अमासाची दाढी धरुन त्याला पुढे खेचले.
10यवाबाच्या डाव्या हातातील तलवारीकडे अमासाचे लक्ष नव्हते. पण तेवढ्यात यवाबाने अमासाच्या पोटात तलवार खुपसली, आणि त्याचा कोथळा बाहेर काढला. यवाबाला पुन्हा वार करावा लागलाच नाही. अमासा गतप्राण झाला.

### शबाचा शोध चालूच

यवाब आणि त्याचा भाऊ अबीशय यांनी बिक्रीचा मुलगा
शबा याचा शोध चालूच ठेवला. 11यवाबाच्या सैन्यातील
एक तरुण सैनिक अमासाच्या मृतदेहाजवळ उभा राहिला आणि म्हणाला, "यवाब आणि दावीदाला ज्यांचा पाठिंबा आहे त्यांनी यवाबामागे जावे."

12अमासा रस्त्याच्या मध्याभागी रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. येणारा जाणारा प्रत्येकजण थांबून हे दृष्य पाहतोय हे त्या तरुण सैनिकाच्या लक्षात आले. तेव्हा त्याने ते प्रेत रस्त्यावरुन ढकलत शेतात नेऊन टाकले.
त्याच्यावर एक कापड अंथरले. 13अमासाचा देह तिथून
हलवल्यावर लोक ते सरळ ओलांडून यवाबाच्या मागे चालू लागले. मग त्यांनी यवाबाबरोबर शबाचा पाठलाग सुरु केला.

### आबेल बेथ व माका येथे शबाचे पलायन

14इस्राएलांच्या सर्व वंशांमधून जात शबा आबेल व बेथ माका येथे गेला. सर्व बेरीही एकत्र येऊन शबाला मिळाले.
15यवाब आपल्या माणसांसहित आबेल बेथ माका येथे पोचला. त्याच्या सैन्याने नगराला वेढा दिला. तटबंदीभोवती त्यांनी माती कचऱ्याचा ढीग रचला. त्याच्यावरुन भिंत पार करणे त्यांना सोयीस्कर ठरले असते. त्याचबरोबर त्यांनी भिंत पाडण्यासाठी भिंतीतील दगड फोडायला सुरुवात
केली. 16नगरात एक चाणाक्ष बाई राहात होती. तिने
नगरातून मोठ्याने ओरडून सांगितले, "माझे ऐका. यवाबाला येथे यायला सांगा. मला त्याच्याशी काही बोलायचे आहे."
17यवाब तिच्याशी बोलायला गेला. तिने त्याला तूच यवाब का म्हणून विचारले.

यवाबाने होकार भरला. तेव्हा ती म्हणाली, "माझे
ऐक." यवाब म्हणाला, "सांग मी ऐकतोय." 18मग ती बाई
म्हणाली, "पूर्वी लोक म्हणत गरज पडली की आबेलमध्ये
यावे म्हणजे मागाल ते मिळते. 19इस्राएलमधील शांतताप्रिय,

---

**खास घरांत** दावीदाचा मुलगा अबशालोम याने या दासींशी लैंगिक संबंध ठेवून त्यांना भ्रष्ट केले होते पाहा 2 शमुवेल 16:21-22.

विश्वासू लोकांपैकी मी एक आहे. इम्राएलच्या एका
महत्वाच्या शहराची तुम्ही नासधूस करत आहात.
परमेश्वराच्या मालकीच्या वस्तुची तुम्ही मोडतोड का
करता?” [20]यवाब म्हणाला, “मला कशाचाच नाश करायची
इच्छा नाही. तुमच्या नगराची नासधूस मी करु इच्छित
नाही. [21]पण एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातील शबा नावाचा
एक माणूस तुमच्या नगरात आहे. दावीद राजाविरुध्द त्याने
बंड केले आहे. त्याला माझ्यापुढे हजर केलेत तर नगराला
धक्का लावणार नाही.”

तेव्हा ती बाई यवाबाला म्हणाली, “ठीक आहे. त्याचे
मुंडके भिंतीवरुन तुझ्याकडे टाकण्यात येईल.”

[22]मग तिने गावातील लोकांना शहाणपणाने आपले
म्हणणे पटवून दिले. तेव्हा लोकांना शबाचे मुंडके धडावेगळे
करुन ते यवाबाकडे तटबंदी पलीकडे फेकले.

यवाबाने रणशिंग फुंकले आणि सैन्याने नगर सोडले.
जो तो आपल्या घरी परतला आणि यवाब यरुशलेम येथे
राजाकडे आला.

## दावीद कडील लोक

[23]यवाब इम्राएलचा सेनापती होता. यहोयादचा मुलगा
बनाया हा करेथी आणि पलेथी यांचा प्रमुख होता. [24]अदोराम
हा कष्टकरीलोकांचा प्रमुख होता. अहीलुदाचा मुलगा
यहोशाफाट हा अखबारनवीस होता. [25]शवा कार्यवाह होता.
सादोक आणि अब्याथार हे याजक होते. [26]आणि याईरी
ईरा हा दावीदाचा मुख्य सेवक होता.

## शौलाच्या कुटुंबीयांना शासन

21 दावीदाच्या या कारकिर्दीत एकदा दुष्काळ पडला.
हा दुष्काळ तीन वर्षे टिकला. तेव्हा दावीदाने
परमेश्वराची प्रार्थना केली. परमेश्वराने सांगितले, “शौल
आणि त्याचे खुनी (रक्तपिपासू) घराणे यावेळच्या
दुष्काळाला जबाबदार आहेत. शौलने गिबोन्यांना मारले
म्हणून हा दुष्काळ पडला.” [2](गिबोनी म्हणजे इम्राएली
नव्हेत. ते अमोरी होत. इम्राएलींनी त्यांना दुखापत न
करण्याचे वचन दिले होते.* तरी शौलने गिबोन्यांच्या
वधाचा प्रयत्न केला. इम्राएली आणि यहूदा लोकांविषयीच्या
अति उत्साहामुळे त्याने तसे केले.)

गिबोन्यांना एकत्र बोलावून राजा दावीदाने त्यांच्याशी
बोलणे केले. [3]दावीद त्यांना म्हणाला, “तुमच्या साठी मी
काय करु?

“इम्राएलचा कलंक पुसला जाईल आणि तुम्ही या
परमेश्वराच्या प्रजेला आशीर्वाद द्याल यासाठी मी काय
करु शकतो?”

[4]तेव्हा गिबोनी दावीदाला म्हणाला, “शौलाच्या घराण्याने
जे केले त्याची सोन्यारुप्याने भरपाई होऊ शकत नाही.
पण त्यासाठी इम्राएलींना जिवे मारण्याचाही आम्हाला हक्क
नाही.”

दावीद म्हणाला, “ठीक तर, तुमच्यासाठी मी आता
काय करावे?”

[5]ते राजाला म्हणाले, “त्या माणसाने (शौलने)
आमच्याविरुद्ध कट केला. इम्राएली प्रदेशात राहणाऱ्या
आमच्या सर्व लोकांचा त्याने नि:पात करण्याचा प्रयत्न
केला. [6]तेव्हा शौलची सात मुले आमच्या हवाली कर.
शौलला परमेश्वराने राजा म्हणून निवडले होते. तेव्हा
शौलाच्या गिबा डोंगरावर त्याच्या मुलांना आम्ही
देवासमक्षच फाशी देऊ.”

राजा दावीद म्हणाला, “मला हे मान्य आहे. त्यांना मी
तुमच्या हवाली करतो.” [7]पण योनाथानचा मुलगा
मफीबोशेथ याला राजाने अभय दिले. योनाथान हा शौलचा
मुलगा. पण दावीदाने त्याला त्याच्या कुटुंबियांच्या
सुरक्षिततेचे वचन दिले होते. म्हणून मफीबोशेथला राजाने
इजा पोचू दिली नाही. [8]अरमोनी आणि मफीबोशेथ (हा
मफीबोशेथ वेगळा) ही शौलाला रिस्पा या पत्नीपासून
झालेली मुले. शौलला मखिल नावाची मुलगीही होती.
अद्रीएलशी तिचे लग्न झाले होते. महोलाथी येथील
बर्जिल्ल्यचा हा मुलगा. या दांपत्याची पाच मुलेही दावीदाने
ताब्यात घेतली. [9]या सात जणांना त्याने गिबोन्यांच्या स्वाधीन
केले. गिबोन्यांनी त्यांना गिबा डोंगरावर परमेश्वरासमोर
फाशी दिले. ते सातजण एकदमच प्राणाला मुकले. त्यांना
ठार केले गेले ते दिवस हंगामाच्या सुरुवातीचे होते. जवाच्या
पिकाच्या सुरुवातीचा तो [वसंतातील] काळ होता.

## दावीद आणि रिस्पा

[10]अय्याची मुलगी रिस्पा हिने शोकाकुलहोऊन एक
मोठे कापड त्या गिबाच्या खडकावर अंथरले. तेव्हापासून
पावसाला सुरुवात होईपर्यंत ते तसेच राहू दिले. रिस्पाने
रात्रंदिवस त्या मृत देहांची निगाराणी केली. दिवसा पक्ष्यांनी
आणि रात्री जंगली जनावरांनी त्याचे लचके तोडू नयेत
म्हणून राखण केली.

[11]शौलाची दासी रिस्पा काय करत आहे हे लोकांनी
दावीदाच्या कानावर घातले. [12]तेव्हा दावीदाने याबेश गिलाद
मधील लोकांकडून शौल आणि योनाथान यांच्या अस्थी
आणवल्या (शौल आणि योनाथान यांचा गिलबोवा येथे
वध झाल्यावर याबोश गिलादच्या लोकांनी त्या नेल्या
होत्या. बेथशान मधील भिंतीवर पलिष्ट्यांनी या दोघांचे
देह टांगले होते. पण बेथशानच्या लोकांनी येऊन
भरवस्तीतील ती प्रेते चोरुन नेली)

[13]याबेश-गिलाद मधून शौल आणि त्याचा पुत्र योनाथान
या दोघांच्या अस्थी दावीदाने आणल्या. तसेच त्या फाशी
दिल्या गेलेल्या सात जणांचे मृतदेहही आणले. [14]शौल

---

**इम्राएल लोकांना ... दिले होते** गिबोन्यांनी इम्राएल लोकांना फसवले, तेव्हाची यहोशवाच्या वेळची ही गोष्ट आहे. पाहा यहोशवा 9:3-15.

आणि योनाथानच्या अस्थी त्यांनी बन्यामीनच्या प्रदेशात पुरल्या. शौलचे वडील कीश यांच्या कबरीत त्या पुरल्या. राजाच्या आज्ञेबरहुकूम लोकांनी हे सर्व केले. तेव्हा देवाने लोकांची प्रार्थना ऐकली आणि तिला त्याने प्रतिसाद दिला.

## पलिष्ट्यांशी युध्द

15पलिष्ट्यांनी पुन्हा इस्राएलीशी युध्द पुकारले. तेव्हा दावीद आपल्या लोकांबरोबर पलिष्ट्यांशी युध्द करायला निघाला. पण यावेळी दावीद फार थकून गेला. 16त्यावेळी
तेथे रेफाई वंशातला इशबी-बनोब हा एक बलाढ्य माणूस होता. त्याच्या भाल्याचे वजनच साडेसात पौंड होते. त्याच्याजवळ नवी कोरी तलवार होती. दावीदाला मारायचा त्याने प्रयत्न केला. 17पण सरुवेचा मुलगा अबीशय याने
या पलिष्ट्याला मारले आणि दावीदाचे प्राण वाचवले.

तेव्हा दावीद बरोबरच्या लोकांनी दावीदाला शपथ घालून सांगितले "तुम्ही आता लढाईवर यायचे नाही. नाहीतर इस्राएल एका मोठ्या नेत्याला मुकेल."

18यानंतर गोब येथे पलिष्ट्यांशी आणखी एकदा लढाई झाली. तेव्हा हूशाथी सिब्बखय याने रेफाई वंशातील सफ याचा वध केला. 19गोब येथेच पुन्हा पलिष्ट्यांशी युध्द
झाले. तेव्हा बेथलहेमचा यारेओरगीम याचा मुलगा एलहानान याने गथचा गल्याथ याला ठार केले. विणकराच्या तुरीएवढा त्याचा भाला होता.

20गथ येथे आणखी एक युध्द झाले. तेथे एक धिप्पाड पुरुष होता. त्याच्या हातापायांना सहा सहा बोटे होती. म्हणजे एकंदर चोवीस. हाही रेफाई वंशातला होता. 21त्याने
इस्राएलला आव्हान दिले पण योनाथानने या माणसाचे प्राण घेतले. (हा योनाथान म्हणजे दावीदाचा भाऊ शिमी याचा मुलगा.)

22ही माणसे गथ येथील रेफाई वंशातील होती. दावीद आणि त्याचे लोक यांनी त्यांना ठार केले.

## दावीदाचे देवाप्रीत्यर्थ स्तुतिगीत

22 शौल आणि इतर शत्रू यांच्या हातून देवाने सोडवल्याबद्दल दावीदाने हे स्तुतिगीत म्हटले.

2परमेश्वर हा माझा दुर्ग माझा गड माझ्या सुरक्षिततेचा आधार

3तो माझा देव माझ्या संरक्षणासाठी मी या दुर्गाच्या, देवाच्या आश्रयाला जातो देव म्हणजे माझी संरक्षक ढाल आहे त्याचे सामर्थ्य माझे रक्षण करते. परमेश्वर म्हणजे माझी लपण्याची जागा माझ्या सुरक्षिततेचे ठिकाण उंच डोंगरात असलेले. क्रूर शत्रूपासून तो मला वाचवतो

4त्यांनी माझी चेष्टा केली. पण मी मदतीसाठी परमेश्वराचा धावा केला. आणि शत्रूपासून माझा बचाव करण्यात आला.

5[शत्रूंना माझा जीव घ्यायचा होता] मृत्यूच्या लाटा माझ्याभोवती थैमान घालत होत्या मृत्युसदनाला नेणाऱ्या पुराच्या लोंढ्यात मी सापडलो होतो.

6कबरीचे पाश माझ्या भोवती आवळले होते. मृत्यूचा सापळा माझ्यासमोर तयार होता.

7तेव्हा मी परमेश्वराचा धावा केला. होय, मी त्यालाच शरण गेलो. देव त्याच्या मंदिरात होता त्याने माझा धावा ऐकला. मदतीसाठी केलेला माझा आक्रोश त्याने ऐकला.

8तेव्हा धरती डळमळली, हादरली स्वर्गाचा पाया थरथरला कारण देवाचा कोप झाला होता.

9त्याच्या नाकपुड्यांतून धूर निघत होता मुखातून अग्निज्वाळा बाहेर पडत होत्या ठिणग्या बरसत होत्या.

10आकाश फाडून परमेश्वर खाली अवतरला. काळ्याकुट्ट ढगावर उभा राहिला.

11करुबावर आरुढ होऊन तो उडत होता. वाऱ्यावर स्वार झाला होता.

12परमेश्वराने दाट काळे ढग स्वत:भोवती तंबू सारखे वेढून घेतले होते. त्याने त्या दाट गडगडणाऱ्या मेघामध्ये पाणी भरुन ठेवले होते.

13त्याचा एवढा प्रखर प्रकाश पडला की निखारे धगधगू लागले.

14परमेश्वर आकाशातून गरजला त्याचा आवाज सर्वत्र दुमदुमला

15त्याने विजांचे बाण सोडले आणि शत्रूची दाणादाण उडाली परमेश्वराने विजा पाठवल्या आणि लोक भीतीने सैरावैरा पळाले

16परमेश्वरा, तुझ्या घनगंभीर आवाजात तू बोललास तेव्हा तुझ्या नाकपुड्यातील सोसाट्याच्या उच्छ्वासाने [समुद्राचे पाणीही मागे हटले] समुद्राचा तळ दिसू लागला, पृथ्वीचा पाया उघडा पडला.

17मला परमेश्वराने आधार दिला वरुन तो खाली आला. मला धरून त्याने संकटांच्या खोल पाण्यातून बाहेर काढले.

18शत्रू मला वरचढ होता त्यांना माझा मत्सर वाटला शत्रू बलाढ्य होता पण परमेश्वराने मला वाचवले

19मी अडचणीत होतो तेव्हा शत्रूने माझ्यावर हल्ला केला. पण देवाने मला आधार दिला.

20परमेश्वराचा माझ्यावर लोभ आहे म्हणून त्याने मला सोडवले. मला त्याने सुरक्षित स्थळी नेले.

21मी केले त्याचे फळ परमेश्वर मला देईल कारण मी योग्य तेच केले. मी गैर काही केले नाही, तेव्हा त्याचे चांगले फळ तो मला देईल.

22कारण मी परमेश्वराचे आज्ञापालन केले. देवाविरुध्द कोणताही आपराध मी केला नाही.

23परमेश्वराचे निर्णय मी नेहमी ध्यानात ठेवतो त्याच्या नियमांचे पालन करतो.

24माझे आचरण शुध्द आणि निर्दोष आहे.

25तेव्हा परमेश्वर त्याचे फळ मला देणारच. कारण माझी वर्तणूक योग्य आहे. त्याच्या दृष्टीने मी वावगे केलेले नाही. तेव्हा तो माझे भले करील.

26एखाद्याचे आपल्यावर खरे प्रेम असेल तर आपणही त्याची भरपाई खऱ्या प्रेमाने करु तो आपल्याशी प्रामाणिक असेल तर आपणही प्रामाणिक राहू.

27परमेश्वरा, जे लोक चांगले आणि शुध्द आचरणाचे आहेत त्यांच्याशी तूही तसाच वागतोस. पण दुष्ट आणि बदमाशांशी तूही कुटिलतेने वागतोस.

28परमेश्वरा, दीनांना तू मदत करतोस, गर्विष्ठांना धडा शिकवतोस

29परमेश्वरा, तू माझा दीप आहेस माझ्या भोवतीचा अंधकार तू उजळवून टाकतोस

30परमेश्वरा, तुझ्या मदतीनेच मी सैन्यावर चाल करु शकतो. देवाच्या मदतीनेच मी शत्रूंची भिंतसुध्दा पार करु शकतो.

31देवाची सत्ता सर्वंकष आहे. देवाचे वचन कसोटीला उतरलेले आहे. जे त्याच्यावर भरवसा टाकतात त्यांचे तो रक्षण करतो.

32या परमेश्वरा खेरीज दुसरा देव कोणता? याच्याखेरीज भक्क म दुर्ग कोण?

33देव माझा मजबूत दुर्ग आहे. सात्विक लोकांना तो आपल्या मार्गाने नेतो.

34देव मला हरणासारखे वेगाने पळण्यास मदत करतो. तो मला आत्मविश्वास देतो आणि उच्च स्थानावर तो मला अढळ ठेवतो.

35युध्दकलेत तो मला तरबेज बनवतो त्यामुळे माझे बाहू भक्क म धनुष्याने शिरसंधान करु शकतात.

36देवा, तूच मला वाचवलेस आणि जिंकायला मदत केलीस. शत्रूचा पाडाव करण्यात मला हात दिलास.

37माझ्या पायांत बळ दे म्हणजे मी न अडखळता ताठ चालू शकेन.

38शत्रूंचा नि:पात होईपर्यंत मला त्यांचा पाठलाग करायचा आहे. त्यांचा उच्छेद होई पर्यंत मी परतणार नाही.

39त्यांचा मी नाश केला. त्यांचा पराभव केला. आता ते शत्रू डोके वर काढू शकणार नाहीत. होय, ते माझ्या पायदळी तुडवले गेले.

40देवा, युध्दात तू मला वरचढ केलेस. शत्रूचा पाडाव केलास.

41त्यांना मला पाठ दाखवायला लावलेस, म्हणजे मी त्यांच्यावर वार करु शकेन.

42शत्रू मदतीसाठी याचना करु लागले पण कोणीही त्यांच्या मदतीला आले नाही. त्यांनी देवाचा धावाही केला त्यानेही त्यांच्याकडे पाठ फिरवली.

43माझ्या शत्रूची मी खांडोळी केली. जमिनीवरच्या धुळीसारखे ते क:पदार्थ बनले. त्यांचा मी चेंदामेंदा केला. चिखल तुडवावा तसे मी त्यांना तुडवले.

44माझ्यावर जे चाल करुन आले त्यांच्यापासून तू मला संरक्षण दिलेस. त्यांच्यावर राज्यकर्ता म्हणून मला नेमलेस.ज्यांना मी कधी बघितले नव्हते ती राष्ट्रे माझे दास झाली.

45आता दूर देशचे लोक माझे ऐकतात जेव्हा ते माझी आज्ञा ऐकतात. तात्काळ माझा शब्द मानतात. माझा त्यांना धाक वाटतो.

46भीतीने ते गर्भगळीत होतात. हे परदेशी लोक जिथे लपून बसले होते ती जागा सोडून भीतीने थरथर कापत बाहेर येतात.

47परमेश्वर जिवंत आहे. माझ्या दुर्गाची मी स्तुती करतो देव महान आहे. तो माझा रक्षणकर्ता दुर्ग आहे.

48त्यानेच माझ्या शत्रूंना धडा शिकवला. लोकांना माझ्या शासनामध्ये ठेवले.

49देवा, तू माझे वैऱ्यांपासून रक्षण केलेस. मला विरोध करणाऱ्यांचा पाडाव करण्याचे सामर्थ्य मला दिलेस. दुष्टांपासून मला वाचवलेस.

50म्हणून मी राष्ट्राराष्ट्रांमध्ये आभारपूर्वक तुझी स्तुतिस्तोत्रे गाईन. तुझे नामसंकीर्तन करीन.

51परमेश्वर राजाला युध्दात विजयी करतो. आपल्या अभिषिक्त राजाबद्दल परमेश्वर खरे प्रेम दाखवतो.दावीद आणि त्याचे वंशज यांचे तो निरंतर कल्याण करील.

## दावीदाचे अखेरचे बोल

23 दावीदाची ही अखेरची वचने;

इशायपुत्र दावीदाचा हा संदेश देवामुळे ज्याला थोरवी प्राप्त झाली त्याचा हा संदेश याकोबच्या देवाचा हा अभिषिक्त राजा इस्राएलचा गोड गळ्याचा गायक

2परमेश्वराचा आत्मा माझ्या मार्फत बोलला त्याचे शब्द माझ्या मुखी होते.

3इस्राएलचा देव हे बोलला इस्राएलचा दुर्ग मला म्हणाला, “जो न्यायाने राज्य करतो, जो देवाविषयी आदर बाळगून राज्य करतो

4तो माणूस उष: कालच्या प्रभे सारखा असेल, निरभ्र सकाळ असावी तसा असेल, पावसानंतर येणाऱ्या उन्हासारखा असेल पाऊस कसा तर ज्याच्यामुळे जमिनीतून कोवळे गवत तरारून येतं असा.”

5देवाने माझे घराणे बळकट व सुरक्षित केले. देवाने माझ्याबरोबर एक कायमचा करार केला. तो सर्व दृष्टींनी माझ्या भल्याकरताच आहे याची त्याने खातरजमा करून घेतली. त्याने असा मजबूत करार केला आणि आता तो त्याचा भंग करणार नाही. हा करार म्हणजे माझा उध्दारच होय. हा करार म्हणजेच मला हवे होते ते सर्व काही होय परमेश्वर माझ्या घराण्याची. भरभराट करील.

6पण दुष्ट माणसे काट्यांसारखी असतात लोक काटा धरून ठेवत नाहीत, फेकून देतात.

7त्याचा स्पर्श झाला तर लाकडी आणि पंचदातूचा भाला
टोचावा तशा वेदना होतात. [होय, असा माणूस काट्यासारखा
असतो] त्यांना आगीच्या भक्ष्य स्थानी टाकतील आणि ती
जळून खाक होतील.

## दावीदाचे सैन्य

8दावीदाच्या पदरी असलेल्या वीरांची नावे अशी;
योशेब–बश्शेबेथ तखमोनी. हा रथावरच्या सेवकांचा मुख्य
होता. असनी अदीनो म्हणूनही त्याला ओळखतात. त्याने
एका वेळी आठशे जणांना ठार केले.
9त्याच्या खालोखाल. अहोही येथील दोदय याचा मुलगा
एलाजार. पलिष्ट्यांना आव्हान दिले त्यावेळी दावीदाबरोबर
असलेल्या तीन वीरांपैकी एक. ते युध्दाच्या तयारीने आले,
पण इस्राएल सैनिक पळून गेले होते. 10थकून अंगात त्राण
राहिलं नाही तोपर्यंत एलाजार पलिष्ट्यांशी लढत राहिला.
तलवार घट्ट पकडून त्याने लढा चालू ठेवला. परमेश्वराने
त्या दिवशी मोठा विजय घडवून आणला. एलाजारची
युध्दात सरशी झाल्यावर मग लोक तिथे आले. पण शत्रू
सैनिकांच्या मृतदेहावरच्या वस्तू गोळा करायला तेवढे ते
आले.
11हरार येथील आगे याचा मुलगा शम्मा हा ही होता.
पलिष्टी चालून आले तेव्हा एका कडधान्याच्या शेतात हे
युध्द झाले. लोकांना पलिष्ट्यांसमोरुन पळ काढला. 12पण
शम्मा शेताच्या ऐन मध्यावर उभा राहिला आणि त्याने
एकट्याने त्यांना तोंड दिले. त्याने पलिष्ट्यांचा पराभव
केला. परमेश्वराने इस्राएलला त्यादिवशी मोठा विजय
मिळवून दिला.

## तीन शूर योध्दे

13दावीद एकदा अदुल्लामच्या गुहेत होता आणि पलिष्टी
सैन्याचा तळ खाली रेफाईच्या खोऱ्यात होता. त्यावेळी
तीस शूरांपैकी तिघेजण दावीदाकडे जायला म्हणून थेट
गुहेपर्यंत अक्षरश: सरपटत गेले.
14नंतर एकदा दावीद गडावर असताना पलिष्ट्यांची
टोळी बेथलहेम येथे होती. 15दावीद आपल्या गावाचे पाणी
पिण्यासाठी व्याकुळ झाला होता तो म्हणाला, "बेथलेहेमच्या
वेशीजवळच्या विहिरीतले पाणी मला कुणी आणून दिले
तर किती बरे होईल." खरोखरच कोणी तसे करावे
म्हणून तो बोलत नव्हता. तो आपला उगाच तसे
म्हणाला.
16पण या तीन शूरांनी पलिष्ट्यांच्या ठाण्यातून धाडसाने
तोंड देत मार्ग काढला. आणि बेथलहेमच्या वेशीजवळच्या
विहिरीतले पाणी काढून दावीदाला प्यायला आणून दिले.
दावीदाने ते प्यायचे नाकारले. त्याने ते परमेश्वराला अर्पण
म्हणून जमिनीवर ओतून टाकले. 17दावीद म्हणाला,
"परमेश्वरा, हे पाणी मी कसे पिऊ? हे पाणी मी प्यायलो
तर ज्यांनी आपले प्राण माझ्यासाठी धोक्यात घातले त्यांचे
रक्तच मी प्राशन केल्यासारखे होईल." म्हणून तो ते पाणी
प्याला नाही. त्या तीन शूर वीरांनी यासारखी अनेक
धाडसे केली.

## इतर शूर योध्दे

18सरूवेचा मुलगा यवाब याचा भाऊ म्हणजे
अबीशय. अबीशय या तीन वीरांचा नायक होता. आपल्या
भाल्याने त्याने तीनशे शत्रू सैनिकांना ठार केले, आणि
त्या तिघांमध्ये नाव मिळवले. 19त्या तिघांमध्ये तो सर्वाधिक
प्रसिद्ध होता. त्यांचा तो नायकही होता. पण तो त्यांच्यापैकी
नव्हता.
20यहोयादा याचा मुलगा बनाया हाही एक होता. तो
एका पराक्रमी माणसाचा पुत्र होता. तो कबसेल इथून
आलेला होता. बनायाने बरेच पराक्रम गाजवले.
मवाबमधील अरीएलच्या दोन मुलांना त्याने मारले. एकदा
बर्फ पडत असताना त्याने गुहेत शिरून सिंह मारला.
21एका धिप्पाड मिसरी माणसालाही त्याने मारले. या मिसरी
माणसाच्या हातात भाला होता तर बनायाच्या हातात फक्त
काठी. बनायाने त्याचा भाला हिसकावून घेतला आणि
त्याच्याच भाल्याने त्या मिसरी माणसाचा जीव घेतला.
22बनायाने अशी बरीच कृत्ये केली. त्यानेही या
तिघांइतकाच नावलौकिक मिळवला. 23तो तीस वीरांच्या
(तीस वीर–दावीदाच्या अतिशय शूर सैनिकांचा गट म्हणजे
हे लोक होत.) पेक्षा अधिक प्रसिद्ध होता. पण तरी पहिल्या
तिघांच्या पदाला तो पोचला नाही. दावीदाने त्याला आपल्या
अंगरक्षकांचा प्रमुख म्हणून नेमले.

## तीस शूर वीर

24यवाबाचा भाऊ असाएल हा त्या तिसातला एक
होता. बाकीच्या वीरांची नावे पुढीलप्रमाणे:
बेथलहेममधील दोदो याचा मुलगा एलहानान, 25शम्मा
हरोदी, अलीका हरोदी, 26हेलस पलती, इक्केश तकोई
याचा मुलगा ईरा, 27अबीयेजर अनाथोथी, मबुन्नय
हुशाथी, 28सलमोन अहोही, महरय नटोफाथी, 29बाना
नटोफाथी याचा मुलगा हेलेब, बन्यामीनच्या वंशातील,
गिबामधला रीबय याचा मुलगा इत्तय, 30बनाया पिराथोनी,
गाश झऱ्याजवळचा हिद्दय, 31अबी–अलबोन अर्वाथी,
अजमावेथ बरहूमी, 32अलीहाबा शालबोनी, याशेन
घराण्यातला योनाथान, 33शम्मा हारारी, शारार अरारी
याचा मुलगा अहीयाम, 34माकाथीचा मुलगा अहसबय
याचा मुलगा अलीफलेट, अहिथोफेल गिलोनी याचा मुलगा
अलीयम, 35हेस्री कर्मेली, पारय अर्बी 36सोबा मधील
नाथोन याचा मुलगा इगाल, बानी यादी, 37सेलक
अम्मोनी, सरुवेचा मुलगा यवाब याचा शस्त्रवाहक नहरय
बैरोथी, 38ईरा इथ्री, गारेब इथ्री, 39उरीया हित्ती, असे
एकंदर सदतीस.

## दावीद सैन्याची शिरगणती करायचे ठरवतो

24 इस्राएलवर परमेश्वराचा पुन्हा एकदा कोप
झाला. आणि त्याने दावीदाला इस्राएलांविरुध्द
चेतवले. दावीद म्हणाला, “आधी इस्राएल आणि यहूदा
यांची शिरगणती करा.”
2राजा दावीद सेनापती यवाबाला म्हणाला, “दानपासून
बैरशेबापर्यंत इस्राएलच्या झाडून सर्व वंशातील लोकांची
मोजदाद करा. म्हणजे मग मला लोकसंख्या किती आहे
ते कळेल.”
3पण यवाब राजाला म्हणाल, “आपले लोक कितीही
असोत देव परमेश्वर त्यांना शतगुणित करो. तुम्हाला हे
सर्व पाहायला मिळो पण तुम्हाला असे का करावेसे वाटते?”
4पण राजा दावीदाचे शब्द यवाबाच्या शब्दांपेक्षा प्रभावी
ठरले आणि त्यांनी यवाबाला आणि इतर सैन्याधिकाऱ्यांना
इस्राएल प्रजेची मोजदाद करण्यास सांगितले. तेव्हा ते सर्व
या कामाला लागले. 5यार्देन ओलांडून त्यांनी आरोएर
येथे तळ दिला. ही जागा नगराच्या उजवीकडे होती. (नगर
याजेरच्या वाटेवर, गादच्या खोऱ्याच्या मध्यावर आहे.)
6तेथून ते गिलादला आणि पुढे तहतीम होदशी या प्रदेशात
गेले. दान्यात आणि तिथून वळसा घेऊन सीदोन येथे गेले.
7सोर (तायर) हा गड आणि हिव्वी व कनानी यांची नगरे
इकडे ते गेले. तेथून यहूदा देशाच्या दक्षिण दिशेला बैर-शेबा
इथपर्यंत गेले. 8सगळा प्रदेश पालथा घालून ते नऊ महिने
वीस दिवसांनी यरुशलेम येथे पोचले.
9यवाबाने प्रजेच्या मोजदादीची यादी राजाला दिली.
इस्राएलमध्ये तलवारधारी पुरुष आठ लक्ष होते. यहूदात
ही संख्या पाच लक्ष होती.

## दावीदाला परमेश्वराकडून शिक्षा

10हे काम पार पाडल्यावर मात्र दावीदाला मनोमन
लाज वाटली. तो परमेश्वराला म्हणाला, “माझ्याहातून हे
मोठे पाप घडले आहे. या माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा
कर. माझा हा मोठाच मूर्खपणा झाला आहे.”
11दावीद सकाळी उठला तेव्हा दावीदाचा संदेष्टा गाद
याला देववाणी ऐकू आली. 12परमेश्वर त्याला म्हणाला,
“दावीदाला जाऊन सांग, ‘परमेश्वर म्हणतो, तुझ्यापुढे मी
तीन गोष्टी ठेवतो त्यापैकी एकीची निवड कर.’”
13गादने दावीदाकडे येऊन त्याला हे सर्व सांगितले. तो
दावीदाला म्हणाला, “तिन्हीपैकी एकीची निवड कर. तुझ्या
देशात सात वर्षे दुष्काळ पडावा, किंवा शत्रूंनी तीन महिने
तुझा पाठलाग करावा की तीन दिवस रोगराई पसरावी?
विचार कर आणि मी परमेश्वराला काय सांगावे ते सांग.”
14दावीद गादला म्हणाला, “मी पेचात सापडलो आहे
खरा! पण परमेश्वर दयाळू आहे. परमेश्वरच मला शिक्षा
देवो. लोकांच्या हाती मी पडू नये.”
15तेव्हा परमेश्वराने इस्राएलवर रोगराई ओढवू दिली.
सकाळी तिची सुरुवात होऊन नेमलेल्या काळपर्यंत ती
राहिली. दान पासून बैरशेबापर्यंत सत्तर हजार माणसे
मृत्युमुखी पडली. 16यरुशलेमच्या संहारासाठी देवदूताचा
हात उंचावला पण झाल्या गोष्टीबद्दल परमेश्वराला फार
वाईट वाटले. लोकांचा संहार करणाऱ्या देवदूताला
परमेश्वर म्हणाला, “आता पुरे तुझा हात खाली घे.”
तेव्हा हा देवदूत अरवना यबूसी याच्या खळ्याजवळ
होता.

## अरवनाचे खळे दावीद विकत घेतो

17लोकांना मारणाऱ्या देवदूताला दावीदाने पाहिले. दावीद
परमेश्वराला म्हणाला, “माझे चुकले माझ्या हातून पाप
घडले आहे. पण हे लोक मेंढरांसारखे माझ्या मागून
आले. त्यांचे काहीच चुकले नाही. तेव्हा तू मला आणि
माझ्या कुटुंबियांना शिक्षा कर.”
18त्या दिवशी गाद दावीद कडे आला. तो म्हणाला,
“अरवना यबूसीच्या खळ्यावर परमेश्वराप्रीत्यर्थ एक वेदी
बांध” 19दावीदाने मग परमेश्वराच्या इच्छेनुसार गादच्या
म्हणण्याप्रमाणे केले. तो अरवनाला भेटायला गेला.
20अरवनाने राजाला आणि त्याच्या सेवकांना येताना
पाहिले. त्याने पुढे होऊन जमिनीपर्यंत लवून नमस्कार
केला. 21अरवना म्हणाला, “माझे स्वामी का बरे आले
आहेत?”
दावीद म्हणाला, “तुझे खळे विकत घ्यायला. म्हणजे
मग मी परमेश्वरा प्रीत्यर्थ इथे एक वेदी बांधीन. मग
रोगराई संपुष्टात येईल.”
22अरवना म्हणाला, “स्वामींनी मनाला येईल ते अर्पण
करण्यासाठी घ्यावे. होमबलीसाठी हे बैल आहेत. इंधनासाठी
मळणीची औते आणि बैलांचे सामान आहे. 23महाराज,
हवे ते मी तुम्हाला देईन.” महराजांवर परमेश्वराची मर्जी
असावी अशीही कामना त्याने पुढे व्यक्त केली.
24पण राजा अरवनाला म्हणाला, “नाही, तुला मी खरे
सांगतो, मी ही जमीन विकतच घेणार आहे. फुकटात
मिळालेले मी होमबली म्हणून परमेश्वर देवाला अर्पण
करणार नाही.”
तेव्हा दावीदाने खळे आणि बैल पन्नास शेकेल चांदी
देऊन विकत घेतले. 25मग तेथे परमेश्वराप्रीत्यर्थ वेदी
बांधली. होमबली आणि शांत्यार्पणे केली.
परमेश्वराने त्याची प्रार्थना ऐकली. इस्राएलवरील
रोगराई परमेश्वराने संपुष्टात आणली.

# 1 राजे

### अदोनीयाची राजा होण्याची इच्छा

1 आता राजा दावीद फार वृध्द झाला होता. वयोमानामुळे
त्याला गारठा सहन होईना. नोकरांनी कितीही पांघरुणे
घातली तरी त्याला ऊब येईना. 2तेव्हा त्याचे सेवक त्याला
म्हणाले, "तुमच्या सेवेसाठी आम्ही एखादी तरुण मुलगी
बघतो. ती तुमच्या निकट झोपेल आणि तुम्हाला ऊब
देईल." 3आणि सेवकांनी या कामासाठी इस्राएलभर सुंदर
तरुण मुलीचा शोध सुरु केला. तेव्हा त्यांना शुनेम या
नगरात अबीशग नावाची मुलगी सापडली. त्यांनी तिला
राजाकडे आणले. 4ती अतिशय देखणी होती. तिने अतिशय
काळजीपूर्वक राजाची शुश्रूषा केली. असे असले
तरी राजाने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले नाहीत.
5अदोनीया हा दावीद आणि त्यांची पत्नी हग्गीथ यांचा
मुलगा. गर्वाने फुगून जाऊन त्याने स्वत: राजा व्हायचे
ठरवले. राजा व्हायच्या प्रबळ इच्छेने त्याने स्वत:साठी
एक रथ, घोडे आणि रथापुढे धावायला पन्नास माणसे
तयार केली. 6अदोनीया हा दिसायला सुंदर होता.
अबशालोम पेक्षा हा धाकटा. पण राजा दावीदने मात्र
अदोनीयाला 'हे तू काय चालवले आहेस?' म्हणून कधी
समज दिली नाही.
7सरुवेचा मुलगा यवाब आणि याजक अब्याथार यांच्याशी
अदोनीयाने बोलणे केले. त्याला नवीन राजा करण्यात
मदत करायचे त्यांनी ठरविले. 8पण पुष्कळांना
अदोनीयाच्या या हालचाली पसंत नव्हत्या. ते दावीदशी
एकनिष्ठ राहिले. सादोक हा याजक, यहोयादाचा मुलगा
बनाया, नाथान हा संदेष्टा, शिमी रेई आणि दावीदच्या
पदरी असलेले वीर हे ते लोक होत. ते राजाच्याच बाजूला
राहिले, हे लोक अदोनीयाला मिळाले नाहीत.
9एकदा एन-रोगेलजवळ जोहेलेथ खडकापाशी
अदोनीयाने मेंढरे, गुरे, पुष्ट वासरे यांचा शांत्यर्पण म्हणून
यज्ञ केला. आपले भाऊ, राजाची इतर मुले आणि यहूदातील
सर्व अधिकारी यांना बोलावणे पाठवले. 10पण
राजाच्या पदरचे खास शूर वीर, आपला भाऊ शलमोन,
बनाया आणि संदेष्टा नाथान यांना मात्र वगळले.

### शलमोनासाठी नाथान व बथशेबा मध्यस्ती करतात

11नाथान संदेष्ट्यांच्या हे कानावर गेले तेव्हा तो
शलमोनाची आई बथशेबा हिच्याकडे गेला. त्याने तिला
विचारले, "हग्गीथेचा मुलगा अदोनीया याचे काय
चालले आहे याचा तुला पत्ता आहे का? त्याने स्वत:ला
राजा म्हणून घोषित केले आहे आणि इकडे आपले
स्वामी दावीद यांना त्याचा पत्तासुद्धा नाही. 12तू आणि तुझा
मुलगा शलमोन यांच्या जिवाला धोका पोहोंचू शकतो.
यातून वाचायचा मार्ग मी तुला दाखवतो 13अशीच राजा
दावीदकडे जा आणि त्याला सांग, 'स्वामी तुम्ही मला
वचन दिले आहे.' त्याप्रमाणे माझा मुलगा शलमोन
तुमच्यानंतर गादीवर बसेल पण अदोनीया राजा होत आहे
हे कसे काय?' 14तुझे राजाशी बोलणे चाललेले असतानाच
मी तेथे येईन. तू तिथून निघून गेल्यावर मी राजाला सर्व
हकीगत सांगीन. म्हणजे तू बोललीस त्यात तथ्य आहे हे
राजाला पटेल."
15तेव्हा राजाला भेटायला बथशेबा त्याच्या शयनगृहात
गेली. राजा फारच थकला होता. शुनेमची अबीशग त्याची
सेवा करत होती. 16बथशेबाने राजाला लवून अभिवादन
केले. राजाने तिची चौकशी केली.
17बथशेबा त्याला म्हणाली, "महाराज, तुम्ही आपल्या
परमेश्वर देवासमक्ष मला वचन दिले आहे. 'माझ्यानंतर
शलमोन राजा होईल. तो या गादीवर बसेल' असे तुम्ही
म्हणाला आहात. 18आता तुमच्या नकळत अदोनीया
स्वत:च राजा व्हायच्या खटपटीत आहे. 19त्याने अनेक
गुरे आणि उत्तम मेंढरे कापून शांत्यर्पणाचा यज्ञ केला
आहे. त्याने सर्वांना आमंत्रित केले आहे. तुमची मुले,
याजक अब्याथार, सेनापती यवाब यांना त्याने बोलावले
आहे. पण तुमचा एकनिष्ठ पुत्र शलमोन याला मात्र बोलावणे
पाठवले नाही. 20महाराज, आता सर्व इस्राएल लोकांचे
तुमच्याकडे लक्ष लागले आहे. स्वत:नंतर तुम्ही कोणाला
राजा म्हणून घोषित करता याची ते वाट बघत आहेत.
21आपण प्राण सोडण्यापूर्वी नीट व्यवस्था केली पाहिजे.
तसे तुम्ही केले नाहीत तर तुमचे आपल्या वाडवडीलांच्या
शेजारी दफन झाल्यावर मी आणि शलमोन लोकांच्या
दृष्टीने गुन्हेगार ठरू."
22बथशेबा हे राजाशी बोलत असतानाच नाथान संदेष्टा
राजाला भेटायला आला. 23राजाच्या सेवकांनी त्याच्या
आगमनाची राजाला वर्दी दिली. "तेव्हा नाथान राजाच्या
समोर आला व खाली लवून अभिवादन केले. 24मग
नाथान म्हणाला, "महाराज, तुमच्यानंतर अदोनीया

राज्यावर येणार असे तुम्ही घोषित केले काय? आता राज्य अदोनीयाचे आहे असे तुम्ही ठरवले आहे काय? 25कारण आजच त्याने खाली खोऱ्यात जाऊन गुरे मेंढरे कापून शांत्यर्पणाचा यज्ञ केला आहे तुमची मुले, सेनापती, अब्याथार याजक यांना त्याचे आमंत्रण आहे. ते सगळे आत्ता त्याच्याबरोबर खाण्यापिण्यात दंग आहेत. 'राजा अदोनीया चिरायु होवो' म्हणून घोषणा देत आहेत. 26"पण मी, सादोक याजक यहोयादाचा मुलगा बनाया आणि तुमचा मुलगा शलमोन यांना मात्र त्याने बोलावलेले नाही. 27माझे स्वामी, राजाने आम्हाला विश्वासात न घेता हे सर्व केले आहे का? आपला वारस तुम्ही कृपा करुन जाहीर करा."

28तेव्हा राजा दावीद म्हणाला, "बथशेबाला आत यायला सांगा" त्याप्रमाणे बथशेबा राजासमोर आली.

29मग राजाने शपथपूर्वक वचन दिले: "परमेश्वर देवाने आत्तापर्यंत मला सर्व संकटातून सोडवले आहे. देवाला स्मरुन मी हे वचन देतो. 30पूर्वी मी जे वचन तुला दिले त्याप्रमाणे मी आज करणार आहे. इस्राएलच्या परमेश्वर देवाने हे वचन द्यायचे मला सामर्थ्य दिले, त्याप्रमाणे मी कबूल करतो की माझ्यानंतर तुझा पुत्र शलमोन राजा होईल. या सिंहासनावर माझ्यानंतर तो आरूढ होईल. मी दिलेला शब्द खरा करीन."

31बथशेबाने हे ऐकून राजाला वंदन केले व म्हणाली "राजा चिरायु होवो".

32मग दावीद राजा म्हणाला, "सादोक हा याजक, नाथान संदेष्टा आणि यहोयादाचा मुलगा बनाया यांना येथे बोलावून घ्या" तेव्हा ते तिघेजण राजाच्या भेटीला आले. 33राजा त्यांना म्हणाला, "माझ्या अधिकाऱ्यांना सोबत घ्या. माझा पुत्र शलमोन याला माझ्या स्वत:च्या खेचरावर बसवून गीहोन झऱ्याकडे जा. 34तेथे सादोक याजक आणि नाथान संदेष्टा यांनी त्याला इस्राएलचा नवा राजा म्हणून अभिषेक करावा. रणशिंग फुंकून जाहीर करावे की शलमोन हा आता नवा राजा आहे. 35मग त्याला घेऊन माझ्याकडे या. तो या सिंहासनावर बसेल आणि नवा राजा म्हणून माझी जागा घेईल. इस्राएल आणि यहूदाचा राजा म्हणून मी शलमोनला निवडले आहे."

36यहोयादाचा मुलगा बनाया राजाला म्हणाला, "आमेन! स्वामी, खुद्द परमेश्वर देवच याला मान्यता देईल. 37महाराज, आपल्याला परमेश्वराची साथ आहे. तो परमेश्वर असाच शलमोनाच्याही पाठीशी उभा राहील अशी मला आशा आहे. राजा शलमोनच्या राज्याची भरभराट होवो आणि माझे स्वामी, आपल्यापेक्षा ते अधिक बळकट होवो."

38सादोक, नाथान, बनाया आणि राजाचे सेवक यांनी राजा दावीदाच्या सांगण्याप्रमाणे केले. दावीदाच्या खेचरावर शलमोनाला बसवून ते गीहोन येथे गेले. 39सादोक याजकाने पवित्र मंडपातून तेल आणले. आणि त्या तेलाने सादोकने शलमोनाच्या मस्तकावर अभिषेक केला. त्यांनी कर्णा फुंकला आणि सर्वांनी "शलमोन राजा चिरायू होवो" असा एकच जयजयकार केला. 40मग शलमोनाबरोबर सर्वजण नगरात आले. येताना ते पावा वाजवत आले. लोकांना उत्साहाचे, आनंदाचे भरते आले होते. त्यांच्या जल्लोषाने धरणी कंप पावली.

41हे चाललेले असताना इकडे अदोनीया आणि त्याची पाहुणे मंडळी यांचे भोजन आटपत आलेले होते. त्यांनी हा कर्ण्यांचा आवाज ऐकला. यवाबाने विचारले, "हा कसला आवाज? नगरात काय चालले आहे?"

42यवाबाचे बोलणे संपत नाही तोच अब्याथार याजकाचा मुलगा योनाथान तिथे आला. अदोनीया त्याला म्हणाला, "ये तू भला माणूस आहेस. तेव्हा माझ्यासाठी तू चांगलीच बातमी आणली असशील."

43पण योनाथान म्हणाला, "नाही, तुम्हाला ही बातमी चांगली वाटणार नाही. राजा दावीदाने शलमोनाला राजा केले आहे. 44दावीदाने सादोक याजक, नाथान संदेष्टा, यहोयादाचा मुलगा बनाया आणि आपले सेवक यांना शलमोनाबरोबर पाठवले. त्यांनी शलमोनाला खुद्द राजाच्या खेचरावर बसवले. 45मग सादोक याजक आणि नाथान संदेष्टा यांनी गीहोन झऱ्याजवळ शलमोनाला अभिषेक केला. यानंतर ते सर्वजण नगरात परतले. लोक त्यांच्या मागोमाग गेले. नगरातील लोक त्यामुळे फार आनंदात आहेत. हा जल्लोष त्यांचाच आहे. 46शलमोन आता गादीवर बसला आहे. 47राजाचा सेवकवर्ग दावीदाचे अभिनंदन करत आहे. ते म्हणत आहेत, 'राजा दावीद थोर आहे. शलमोन त्याच्यापेक्षा थोर व्हावा अशी देवाजवळ आमची प्रार्थना आहे. देव शलमोनाला दावीदापेक्षाही कीर्तिवंत करो. त्याच्या राज्याची दावीदापेक्षाही भरभराट होवो.'

दावीद राजा तेथे जातीने हजर होता. पलंगावरच तो वाकून अभिवादन करत होता. 48आणि म्हणत होता, 'इस्राएलच्या परमेश्वर देवाचे गुणगान करा. परमेश्वराने माझ्या मुलांपैकीच एकाला सिंहासनावर बसवले आणि माझ्या डोळ्यादेखत हे झाले.'

49हे ऐकून अदोनीयाची पाहुणेमंडळी घाबरली आणि त्यांनी तिथून पळ काढला. 50अदोनीयाही शलमोन काय करील या धास्तीने घाबरला. तात्काळ तो वेदीपाशी गेला आणि वेदीचे दोन्ही शिंगे घट्ट पकडून बसला.* 51कोणीतरी शलमोनाला सांगितले, 'अदोनीया तुमच्या धास्तीने पवित्र मंडपात वेदीची शिंगे धरून बसला आहे. तो तिथून हलायला तयार नाही. 'शलमोन राजाने मला अभय द्यावे' असे तो म्हणत आहे.' 52तेव्हा शलमोन म्हणाला, "एक भला गृहस्थ असल्याचे अदोनीयाने सिध्द केले तर त्याच्या

---

**तात्काळतो ... बसला** दयेची याचना करत बसणे. आपले निरपराधित्व सिध्द करायला, पवित्र स्थानाजवळ जाऊन वेदीचे कोपरे धरून बसल्यास त्याला शिक्षा होत नसे.

केसालाही इजा होणार नाही. पण त्याने आगळीक केल्यास
त्याची गय केली जाणार नाही. तो मरण पावेल. 53मग
राजा शलमोनाने अदोनीयाकडे आपल्या माणसांना
पाठवले. ते त्याला राजाकडे घेऊन आले. अदोनीयाने
राजा शलमोनाला वाकून अभिवादन केले. शलमोनाने
त्याला घरी परत जाण्यास सांगितले."

## दावीद राजाचा मृत्यू

2 दावीद राजाचा मरणकाळ जवळ येऊन ठेपला होता.
तेव्हा त्याने शलमोनाला जवळ बोलवून सांगितले,
2"आता मी जाणार. मरण सगळ्यांनाच अटळ आहे. तूही
आता चांगला खंबीर, जबाबदार पुरुष झाला आहेस. 3आता
परमेश्वर देवाच्या सर्व आज्ञांचे काळजीपूर्वक पालन कर.
मोशेच्या नियमशास्त्रात लिहिलेल्या परमेश्वराच्या सर्व
आज्ञा, नियम व निर्णय काटेकोरपणे पाळ. त्यामुळे तू
जिथे जाशील तिथे, व जे कार्य हातात घेशील त्यात यशस्वी
होशील. 4तू परमेश्वराचे म्हणणे ऐकल्याने तो ही मला
दिलेली वचने पाळील. परमेश्वराने मला सांगितले आहे
'जर मी सांगितलेल्या मार्गाने मनापासून आणि
प्रामाणिकपणाने तुझी मुले चालली तर इस्राएलचा राजा
हा नेहमी तुझ्याच वंशातला असेल.'"
5दावीद पुढे म्हणाला, "सरुवेचा मुलगा यवाब याने काय
केले ते लक्षात आहे ना? त्याने इस्राएल सैन्याच्या दोन
सेनापतींना, नेराचा मुलगा अबनेर आणि येथेरचा मुलगा
अमासा यांना ठार केले आणि मुख्य म्हणजे हे शांततेच्या
काळात केले. त्याचा तलवार खोचायचा कमरबंद आणि
पायातले सैनिकी जोडे यांवर त्यांचे रक्त शिंपडले आहे.
त्याला मीच शासन करायला हवे होते. 6पण आता तू
राजा आहेस. तेव्हा तुला योग्य वाटेल तसा तू त्यांना धडा
शिकवू शकतोस. तो मारला जाईल याची तू खात्री करुन
घे. त्याला शांततेने म्हातारपणी मरण येता कामा नये.
7"गिलादच्या बर्जिल्ल्य याच्या मुलांवर लोभ असू दे.
त्यांच्याशी सख्य ठेव आणि तुझ्या पंगतीला त्यांना बसू दे.
तुझा भाऊ अबशालोम याच्यापासून मी पळ काढला तेव्हा
त्यांनीच मला मदत केली.
8"गेराचा मुलगा शिमी इकडे आसपासच आहे हे लक्षात
ठेव. तो बहूरीम मधल्या बन्यामीन वंशातला आहे. मी
महनाइमासला पळ काढला तेव्हा त्याने माझ्याविषयी फार
वाईट उद्गार काढले. पुढे तो मला यार्देन नदीजवळ
भेटायला आला. त्याला मी परमेश्वरासमक्ष वचन दिले
की मी त्याला ठार करणार नाही. 9पण आता त्याला तसा
सोडू नकोस. तू सुज्ञ आहेस. काय करायचे ते तुला समजते.
त्याला म्हातारपणी शांततेने मरु देऊ नकोस."
10मग दावीद मरण पावला. दावीद नगरात त्याचे दफन
झाले. 11हेब्रोनवर सात वर्ष आणि यरुशलेम येथे तेहतीस
वर्ष असे एकंदर चाळीस वर्षे त्यांने इस्राएलवर राज्य
केले.

## शलमोन राज्यावर ताबा मिळवितो

12आता शलमोन राजा होता. तो आपल्या वडीलांच्या
दावीदाच्या सिंहासनावर बसला. त्याच्या राजेपणाविषयी
आता कोणताही किंतु नव्हता.
13यानंतर हग्गीथेचा मुलगा अदोनीया शलमोनाची आई
बथशेबा हिच्याकडे गेला. बथशेबाने त्याला विचारले, "तू
सद्हेतूने आला आहेस ना?"
अदोनीया म्हणाला, "हो, ही शांतता भेट आहे. 14मला
तुमच्याशी काही बोलायचे आहे."
बथशेबा म्हणाली, "मग बोल."
15अदोनीया म्हणाला, "एक काळ असा होता की हे
राज्य माझे होते. तुम्हाला हे माहीत आहे. मी राजा आहे
अशीच इस्राएलच्या सर्व लोकांची भावना होती. पण पुढे
सगळे बदलले. आता माझा भाऊ गादीवर आहे.
परमेश्वरानेच त्याची निवड केली आहे. 16आता माझे
एक मागणे आहे. कृपा करुन नाही म्हणू नकोस."
बथशेबाने "तुला काय हवे?" असे विचारले.
17अदोनीया म्हणाला, "राजा शलमोन तुला नाही
म्हणणार नाही, तू सांगशील ते काहीही करील तेव्हा
शुनेममधल्या त्या अबीशग नावाच्या तरुणीशी मला लग्न
करायची संमती हवी आहे."
18बथशेबा म्हणाली, "ठीक आहे, मी राजाशी बोलते."
19मग बथशेबा राजा शलमोनाकडे गेली. तिला
पाहिल्यावर तो उठून उभा राहिला. मग तिला वंदन करुन
तो सिंहासनावर बसला. सेवकांना सांगून त्याने आईसाठी
दुसरे सिंहासन आणवले. ती त्याच्या उजव्या हाताला बसली.
20बथशेबा त्याला म्हणाली, "मला एक छोटीशी गोष्ट
तुझ्याजवळ मागायची आहे. कृपाकरुन नाही म्हणू नकोस."
राजा म्हणाला, "आई, तुला काय हवे ते माग मी नकार
देणार नाही."
21तेव्हा बथशेबा म्हणाली, "तुझा भाऊ अदोनीया याला
शुनेमच्या अबीशगेशी लग्न करु दे."
22राजा शलमोन आपल्या आईला म्हणाला,
"अदोनीयासाठी अबीशगेचीच मागणी कशाला करतेस?
त्याच्यासाठी हे राज्यच का मागत नाहीस? बोलून चालून
तो माझा मोठा भाऊ आहे. याजक अब्याथार आणि यवाब
त्याला पाठिंबा देतीलच."
23मग परमेश्वराची शपथ घेऊन शलमोन म्हणाला,
"अदोनीयाला मी याची अद्दल घडवीन. त्याला आता
प्राणाला मुकावे लागेल. 24इस्राएलचा राजा म्हणून
परमेश्वराने माझी निवड केली आहे. माझ्या वडीलांच्या
गादीवर त्याने मला बसवले आहे. आपण दिलेला शब्द
पाळून राज्याची सत्ता परमेश्वराने आमच्या घराण्यात
ठेवली आहे. तेव्हा आता त्याची शपथ घेऊन सांगतो की
अदोनीयाला आज मृत्युदंड होईल." 25राजा शलमोनाने
मग बनायाला आज्ञा दिली आणि बनायाने बाहेर
जाऊन अदोनीयाला ठार केले. 26मग राजा शलमोन

अब्याथार याजकाला म्हणाला, “तुलाही मी मारायला
हवे पण अनाथोथ येथल्या आपल्याघरी मी तुला जाऊ
देतो. माझ्या वडीलांबरोबर मार्गक्रमण करताना
परमेश्वराचा पवित्र करारकोश उचलून न्यायला तू मदत
केलीस म्हणून तुला मी यावेळी जिवे मारत नाही. शिवाय
त्यांच्या कठीण काळातही तू त्यांना साथ दिली आहेस”
27परमेश्वराचा याजक म्हणून त्याला यापुढे काम करता
येणार नाही असे शलमोनाने अब्याथार याजकाला
सांगितले. असे होणार हे परमेश्वराने सांगितलेच होते.
शिलो येथील याजक एली आणि त्याचे कुटुंब यांच्याविषयी
देवाने असेच सांगितले होते. अब्याथार याजक एलीच्या
कुटुंबातील होता.

28हे सर्व यवाबाच्या कानावर गेल्यावर तो भयभीत
झाला. त्याने अबशालोमला न देता अदोनीयाला पाठिंबा
दिला होता. म्हणून तो त्वरीत परमेश्वराच्या पवित्र मंडपात
गेला आणि वेदीची शिंगे घट्ट धरुन बसला. 29कोणीतरी
यवाब हा परमेश्वराच्या मंडपात वेदीपाशी आहे हे राजा
शलमोनाला सांगितले. तेव्हा शलमोनाने बनायाला
यवाबाला मारण्यासाठी पाठवले.

30बनाया परमेश्वराच्या पवित्र मंडपात जाऊन यवाबाला
म्हणाला, “तेथून बाहेर पड ही राजाची आज्ञा आहे.”

पण यवाबााने तेथेच मरण पत्करायला तयार असल्याचे
सांगितले.

तेव्हा बनायाने राजाकडे जाऊन त्याला हे सांगितले.
31तेव्हा राजाने बनायाला हुकूम केला, “तो म्हणतो तसे
कर त्याला तिथेच ठार कर. मग त्याचे दफन कर.
म्हणजे मग आमच्या घराण्यावरचा यवाबाचा कलंक
पुसला जाईल. यवाबाने निरपराधांची हत्या केली तो हा
कलंक होय. 32नेराचा मुलगा अबनेर आणि येथेरचा
मुलगा अमासा या आपल्यापेक्षा चांगल्या अशा दोन
माणसांना त्याने मारले होते. अबनेर इस्राएल सैन्याचा
सेनापती तर अमासा यहूदा सैन्याचा सेनापती होता. माझे
वडील दावीद यांना त्यावेळी या हत्येची कल्पना नव्हती.
तेव्हा परमेश्वरच यवाबाला त्याच्या कृत्यांबद्दल शासन
करत आहे. 33त्यांच्या हत्येबद्दल यवाब अपराधी आहे.
त्याच्या कुटुंबालाही हे ओझे कायमचे वागवावे लागेल.
पण दावीद, त्यांचे वंशज, त्याच्या घराण्यातील राजे
आणि त्याचे राज्य यांना देवाच्या कृपेने निरंतर शांतता
लाभेल.”

34तेव्हा यहोयादाचा मुलगा बनाया याने यवाबाला ठार
केले व वाळवंटातील त्याच्या घराजवळ त्याचे दफन
करण्यात आले. 35यवाबाच्या जागी मग शलमोनाने
बनायाची सेनापती म्हणून नेमणूक केली आणि
अब्याथारच्या जागी मुख्य याजक म्हणून सादोकची केली.
36मग त्याने शिमीला बोलावणे पाठवले. त्याला सांगितले,
“इथे यरुशलेममध्ये स्वत:साठी घर बांधून राहा. हे नगर
सोडू नको. 37हे नगर सोडून किद्रोन झऱ्यापलीकडे गेलास
तर त्या गुन्ह्याबद्दल तुला जीव गमवावा लागेल. तो तुझा
अपराध असेल.”

38तेव्हा शिमी म्हणाला, “ठीक आहे, महाराज मी तुमच्या
आज्ञेत आहे.” शिमी मग यरुशलेममध्येच बराच काळ
राहिला. 39पण तीन वर्षांनंतर शिमीचे दोन नोकर पळून
गेले. गथचा राजा आणि माकाचा मुलगा आखीश याच्याकडे
ते गेले. आपले चाकर गथ येथे असल्याचे शिमीला कळले.
40तेव्हा त्याने आपल्या गाढवावर खोगीर चढवले आणि
तो आखीश राजाकडे आपले नोकर शोधायला निघाला.
तिथे ते मिळाल्यावर त्यांना त्याने परत घरी आणले.

41शिमी यरुशलेमहून गथला जाऊन आल्याचे कोणीतरी
शलमोनाला सांगितले. 42तेव्हा शलमोनाने त्याला बोलावून
घेतले. शलमोन त्याला म्हणाला, ‘यरुशलेम सोडलेस तर
तुझा वध होईल हे मी तुला देवाची शपथ घेऊन सांगितले
होते. तू हे गाव सोडून इतरत्र गेलास तर तुझ्या मृत्यूला
तूच जबाबदार राहशील असे मी तुला बजावले होते. आणि
तू त्याला कबूल झाला होतास. माझा शब्द पाळायचे तू
मान्य केले होतेस. 43मग तू आज्ञाभंग का केलास? तू
वचन का मोडलेस? 44माझे वडील दावीद यांचे तू बरेच
अपराध केले आहेस त्याबद्दल आता परमेश्वरच तुला
शासन करील. 45पण मला परमेश्वराचे आशीर्वाद
राहतील. दावीदाचे राज्य तो सदासर्वकाळ सुरक्षित ठेवील.
46मग राजाने बनायाला शिमीचा वध करायची आज्ञा
दिली आणि बनायाने ती अंमलात आणली. आता
शलमोनाची आपल्या राज्यावर पूर्ण पकड बसली.”

## राजा शलमोन सूज्ञता मागतो

3 मिसरचा राजा फारो याच्या मुलीशी लग्न करुन
शलमोनाने फारोशी करार केला. शलमोनाने तिला
दावीद नगरात आणले. त्याच्या महालाचे आणि परमेश्वराचे
मंदिर बांधण्याचे काम तेव्हा चालू होते. यरुशलेमभोवती
तटबंदी उभारायचे कामही शलमोनाने हाती घेतले होते.
2मंदिर अजून बांधून पुरे झाले नव्हते त्यामुळे लोक यज्ञात
बली अर्पण करायला डोंगरमाथ्यासारख्या उंच ठिकाणी
जात. 3शलमोनही आपले वडील दावीद यांनी सांगितलेल्या
सर्व गोष्टींचे मन:पूर्वक पालन करुन परमेश्वरावरील
आपले प्रेम प्रकट करीत असे. दावीदाने सांगितलेल्या
गोष्टींखेरीज आणखीही एक गोष्ट तो करत असे. यज्ञ
करायला आणि धूप जाळायला तो उंच ठिकाणी जात
असे.

4गिबोन हे एक महत्वाचे उंचावरील ठिकाण असल्यामुळे
शलमोन एकदा यज्ञासाठी तिकडे गेला. तेथे त्याने एक
हजार होमार्पणे वाहिली. 5तो गिबोन येथे असतानाच
परमेश्वराने एका रात्री त्याला स्वप्नात दर्शन दिले देव
म्हणाला, “तुला काय हवे ते माग मी ते देईन.”

6शलमोन तेव्हा म्हणाला, “तुझा सेवक म्हणजेच माझे
वडील यांच्यावर तुझी कृपा होती. ते तुझ्या म्हणण्याप्रमाणे

वागले. ते भलेपणाने आणि योग्य मार्गाने जगले. त्याच्यानंतर त्याच्या मुलालाच गादीवर बसवून तू मोठाच दयाळूपणा दाखवला आहेस. 7माझ्या वडीलांनंतर, परमेश्वर देवा, तू मला राजा केले आहेस. पण मी अजाण मुलासारखाच आहे. माझे कर्तव्य बजावायला योग्य ते शहाणपण माझ्याजवळ नाही. 8मी तुझा सेवक तू निवडलेल्या अक्षरश: अगणित अशा लोकांपैकी एक आहे. शासकाला तर अनेक निर्णय करावे लागतात. 9तेव्हा राज्य करायला आणि लोकांशी न्यायबुध्दीने वागायला आवश्यक ते शहाणपण तू मला दे. त्यामुळे मला बऱ्यावाईटामधील फरक समजेल. त्याखेरीज एवढ्या लोकांवर राज्य करता येणे अशक्य आहे."

10शलमोनाने हे मागितले याचा परमेश्वराला फार आनंद झाला 11म्हणून देव त्याला म्हणाला, "तू स्वत:साठी दीर्घायुष्य किंवा सुखसमृध्दी मागितली नाहीस. तसेच शत्रूंचा नि:पात व्हावा असे म्हणाला नाहीस. तू फक्त न्यायबुध्दी आणि विवेक याची मागणी केलीस. 12तेव्हा तुझे मागणे मी मान्य करतो. तू ज्ञानी आणि चाणाक्ष होशील तुला एवढे शहाणपण लाभेल की तुझ्यासारखा भूतकाळात कधी झाला नाही आणि पुढे कधी होणार नाही. 13शिवाय तू न मागितलेल्या गोष्टीही बक्षीस म्हणून मी तुला देईन. आयुष्यभर तुला मानसन्मान आणि वैभव मिळेल. या जगात तुझ्या हयातीत तुझ्यासारखा थोर राजा कोणी असणार नाही. 14मी दाखवलेल्या मार्गाने चाल आणि माझ्या आज्ञा आणि नियम पाळ. आपल्या वडीलांप्रमाणेच वाग. असे वागलास तर तुलाही मी दीर्घायुषी करीन."

15शलमोन जागा झाला. परमेश्वर स्वप्नात येऊन आपल्याशी बोलला हे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर शलमोन यरुशलेमला जाऊन परमेश्वराच्या करारकोशापुढे उभा राहिला. शलमोनाने परमेश्वरासाठी होमार्पण केले. त्यात त्याने परमेश्वराला शांतीअर्पणे वाहिली. मग आपल्या राज्यकारभारात ज्यांची मदत झाली त्या सर्व वडिलधाऱ्यांना आणि सेवकांना मेजवानी दिली.

16एकदा दोन वेश्या शलमोनाकडे आल्या. राजापुढे त्या दोघी उभ्या राहिल्या. 17त्यातली एक म्हणाली, "महाराज, ही आणि मी एकाच घरात राहतो. आम्ही दोघी गर्भवती होतो आणि आमचे दिवस भरत आले होते. मी बाळाला जन्म दिला तेव्हा ही माझ्या जवळच होती.

18तीन दिवसांनंतर ही पण प्रसूत झाली. आमच्याखेरीज घरात आणखी कोणी नव्हते. आम्ही दोघीच काय त्या राहात होतो. 19एका रात्री ही बाळाला घेऊन झोपलेली असताना तिचे बाळ तिच्याखाली चेंगरुन मेले. 20तेव्हा मी झोपेत असताना त्या रात्रीच तिने माझे बाळ माझ्या कुशीतून घेतले आणि ते स्वत:कडे ठेवून आपले मृत बालक माझ्या अंथरुणावर ठेवले.

21दुसऱ्या दिवशी सकाळी उठून मी बाळाला पाजायला घेतले तर बाळ मृत असल्याचे माझ्या लक्षात आले. म्हणून मी बारकाईने न्याहाळले असता हे बाळ माझे नाही असे मला आढळले." 22पण तेवढ्यात ती दुसरी बाई म्हणाली, "नाही, जिवंत मूलच माझे आहे, मेलेले बाळ तुझे आहे."

पहिली त्यावर म्हणाली, "तू खोटे बोलतेस, मेले ते तुझे बाळ आणि जिवंत आहे ते माझे." अशाप्रकारे दोघींचाही राजासमोर कडाक्याचा वाद झाला.

23तेव्हा राजा शलमोन म्हणाला, "जिवंत मूल आपले आणि मेलेले बाळ दुसरीचे असे तुम्ही दोघीही म्हणता."

24राजाने मग आपल्या सेवकाला एक तलवार घेऊन यायला सांगितले. 25राजा शलमोन म्हणाला, "आता आपण असे करु. त्या जिवंत बाळावर वार करुन त्याचे दोन तुकडे करु आणि दोघींना एक एक देऊ."

26दुसरी बाई म्हणाली, "फार छान! बाळाचे दोन तुकडे करा. म्हणजे आमच्यापैकी कोणालाही ते मिळणार नाही."

पण पहिल्या बाईला, खऱ्या आईला, वात्सल्याचा उमाळा आला. ती राजाला म्हणाली, "नको, बाळाला मारु नका ते तिच्याकडेच राहू द्या."

27तेव्हा हे ऐकून राजा म्हणाला, "बाळाला मारू नका. त्याला पहिल्या बाईच्या हवाली करा. तीच खरी आई आहे. 28राजाचा हा निवाडा इस्राएलच्या लोकांच्या कानावर गेला. राजाच्या चाणाक्षपणाबद्दल त्यांना आदर वाटला. योग्य निर्णय घेण्याचे उच्च कोटीचे परमेश्वरी शहाणपण त्याच्याकडे आहे हे त्यांच्या लक्षात आले."

## शलमोनाचे साम्राज्य

4 समस्त इस्राएल लोकांवर राजा शलमोनाची सत्ता होती. 2त्याला शासनात मदत करणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांची नावे अशी

सादोकचा मुलगा अजऱ्या हा याजक होता

3शिशाचे मुलगे अलिहोरेफ आणि अहीया. न्यायालयातील घडामोडींची टिपणे ठेवणे हे त्यांचे काम होते. अहीलूदाचा मुलगा यहोशाफाट हा बखरकार होता.

4बनाया हा यहोयादाचा मुलगा सेनापती होता.

सादोक आणि अब्याथार याजक होते

5नाथानचा मुलगा अजऱ्या हा जिल्हाधिकाऱ्यांचा प्रमुख होता.

नाथानचा मुलगा जाबूद याजक असून राजाचा सल्लागार होता.

6अहीशार हा राजाच्या महालातील सर्व गोष्टींचा प्रमुख होता.

अब्दाचा मुलगा अदोनीराम गुलामांच्या खात्याचा प्रमुख होता.

7इस्राएलचे कारभाराच्या सोयीसाठी बारा भाग पाडलेले होते. प्रत्येक भागावर शलमोनाने कारभारी नेमले होते.

त्या त्या भागातून अन्नधान्य गोळा करुन राजाच्या
कुटुंबियांना देण्याची त्यांची जबाबदारी होती. बारा
कारभाऱ्यांपैकी प्रत्येकावर प्रतिवर्षी एक महिना ही पाळी
येई. 8त्या बारा कारभाऱ्यांची नावे अशी:

बेन-हूर हा एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशावर
अधिकारी होता.

9माकस, शालबीम, बेथ-शेमेश व एलोन
बेथ-हानान यांच्यावर बेन-देकेर हा कारभारी.

10अरुबोथ, सीखो आणि हेफेर या प्रांतावर
बेन-हेसेद हा कारभाही होता.

11बेन-अबीनादाब पूर्ण दोर प्रांतावर होता.
शलमोनाची मुलगी टाफाथ ही याची पत्नी.

12तानख, मगिद्दो व पूर्ण बेथ-शान म्हणजेच
सारतानाजवळ इज्रेएलच्या खाली बेथ-शानापासून
अबेल-महोला पर्यंत व यकमामाच्या उतारापर्यंत
अहीलूदाचा मुलगा बाना हा होता.

13रामोथ-गिलादवर बेन-गेबेर हा प्रमुख होता.
गिलादमधील मनश्शेचा मुलगा याईर याची सर्व गावे,
बाशानमधील अर्गोब प्रांत हे भाग त्याच्याकडे होते.
या भागात भक्क म तटबंदीची आणि दिंडी दरवाजावर
पंच धातूचा आगळा असलेली साठ नगरे होती.

14इद्दोचा मुलगा अहीनादाब महनाईम प्रांतावर होता.

15नफतालीवर अहीमास होता. त्यानेही शलमोनाची
मुलगी बासमथ हिच्याशी लग्न केले होते.

16हूशयाचा मुलगा बाना हा आशेर आणि आलोथ
यांच्यावर कारभारी होता.

17पारुहाचा मुलगा यहोशाफाट इस्साखारवर होता.

18एलाचा मुलगा शिमी बन्यामीनचा कारभारी होता.

19उरीचा मुलगा गेबेर गिलाद प्रांतावर होता.
अमोऱ्यांचा राजा सिहोन आणि बाशानचा राजा ओग
हे या प्रांतात राहात होते. गेबेर मात्र त्या प्रांताचा
एकमेव कारभारी होता.

20यहूदा आणि इस्राएलमध्ये समुद्रतीरावरील
वाळूकणांसारखी अगणित माणसे होती. ती खात, पीत व
मजाकरत आनंदाने जगत होती.

21युफ्राटिस नदीपासून पलिष्ट्यांच्या भूमीपर्यंत
शलमोनाची सत्ता होती. मिसरच्या सीमेला त्याची हद्द भिडली
होती. या देशांकडून शलमोनाला नजराणे येत आणि ते
आयुष्यभर त्याचा आदर करीत.

22-23शलमोनाला त्याच्या पंगतीला बसून जेवणाऱ्या
सर्वांसाठी दररोजच खालील अन्नपदार्थ लागत दीडशे
बुशेल मैदा तीनशेबुशेल कणीक दहा पुष्ट गुरे कुरणावर
चरलेली वीस गुरे, शंभर मेंढरे, हरण, सांबर, भेकर,
खाण्यायोग्य पक्षी. 24युफ्राटिस नदीच्या पश्चिमेकडील सर्व
देशांवर त्याची सत्ता होती. तिफसाहापासून गज्जापर्यंतचा हा
प्रदेश होय सर्वत्र शांतता नांदत होती. 25दान पासून
बैरशेबापर्यंतचे यहूदा आणि इस्राएलमधील सर्व लोक
निर्धास्तपणे व शांततेने राहात होते. आपापल्या अंजीर
वृक्षांखाली आणि द्राक्षबागांमध्ये ते निवांत होते.

26रथाच्या चारहजार घोड्यांसाठी पागा होत्या. तसेच
शलमोनाकडे बारा हजार घोडेस्वार होते. 27शिवाय ते
बारा कारभारी दर महिन्याला शलमोनाला सर्व
जीवनावश्यक गोष्टी पुरवत होते. राजाच्या पंगतीला बसून
जेवणाऱ्या सर्वांना ते पुरेसे होते. 28रथाच्या आणि स्वारीच्या
घोड्यांसाठी पुरेसा पेंढा आणि सातूही ते कारभाशी पुरवीत.
नेमलेल्या ठिकाणी प्रत्येकजण हे धान्य आणून टाकी.

## शलमोनाची सूज्ञता

29देवाने शलमोनाला भरपूर शहाणपण दिले होते. त्यामुळे
त्याला अनेक गोष्टी समजत. त्याची हुषारी कल्पनातीत
होती. 30पूर्वेकडील सर्वांपेक्षा शलमोनाचे शहाणपण अधिक
होते. मिसरमधल्यापेक्षा ते थोर होते. 31पृथ्वीच्या पाठीवर
त्याच्याइतका सूज्ञ कोणी नव्हता. एज्राही एथान तसेच
माहोलची मुले हेमान व कल्कोल व दर्दा यांच्यापेक्षा तो
शहाणा होता. त्याचे नाव इस्राएल राष्ट्रा बाहेर सर्वत्र दुमदुमत
होते. 32आपल्या आयुष्यात त्याने तीनहजार बोध वचने
आणि पंधराशे गीते लिहिली.

33निसर्गाविषयीही त्याला ज्ञान होते. लबानोनमधल्या
गंधसरुपासून भिंतीतून उगवणाऱ्या वनस्पतीपर्यंत सर्व
तऱ्हेच्या झाडांचे त्याला ज्ञान होते. प्राणी, पक्षी आणि
सरपटणारे प्राणी यांचेही त्याने वर्णन केले आहे.
34देशोदेशीचे लोक त्याच्याकडे ज्ञानार्जनासाठी येत. सर्व
राष्ट्रांचे राजे आपल्या पदरच्या हुशार माणसांना
शलमोनाकडून ज्ञान घ्यायला पाठवत.

## शलमोन मंदिर उभारतो

5 हिराम हा सोराचा (तायरचा) राजा होता. त्याचे
दावीदाशी सख्य होते. त्यामुळे त्याने शलमोन राज्यावर
आल्याचे कळताच आपल्या सेवकांना शलमोनाकडे
पाठवले. 2शलमोनाने राजा हिरामला असा निरोप
पाठवला. 3"माझे वडील सतत युध्दात गुंतलेले असल्यामुळे
त्यांना परमेश्वर देवासाठी मंदिर बांधता आले नाही. सर्व
शत्रूंचा पाडाव होईपर्यंत ते थांबले होते. 4परंतु आता
परमेश्वराने सर्व बाजूंनी माझ्या राज्याला शांतता दिली
आहे. मला आता शत्रू नाहीत. माझ्या लोकांना कोणताही
धोका नाही.

5"परमेश्वराने माझ्या वडीलांना एक वचन दिले होते.
परमेश्वराने सांगितले होते, 'तुझ्यानंतर मी तुझ्या मुलाला
राजा करीन. तो माझ्या सन्मानार्थ मंदिर बांधील' त्याप्रमाणे
माझ्या परमेश्वर देवाच्या सन्मानार्थ एक मंदिर उभारण्याची
माझी योजना आहे. 6त्यासाठी मला तुमची मदत हवी
आहे. तुम्ही तुमची माणसे लबानोन येथे पाठवा. तेथील
गंधसरुची झाडे त्यांना माझ्यासाठी कापायला सांगा. माझेही

चाकर मी त्यांच्याबरोबर पाठवीन. तुम्ही तुमच्या नोकरांची
जी मजुरी ठरवाल ती मी देईन. पण मला तुमची मदत
हवी आहे. आमचे सुतार तुमच्या सिदोनी सुतारांइतके
कुशल नाहीत."

7हिरामला शलमोनाचा निरोप ऐकून फार आनंद झाला.
तो म्हणाला, "दावीदाला एवढा ज्ञानी मुलगा या मोठ्या
देशावर राज्य करण्यासाठी दिल्याबद्दल मी परमेश्वराचे
आभार मानतो." 8मग हिरामने शलमोनाला असा संदेश
पाठवला "तुझे म्हणणे मला कळले. देवदार आणि गंधसरुची
तुला हवी तितकी झाडे मी तुला देईन. 9माझे नोकर ती
लबानोनपासून समुद्रापर्यंत वाहून आणतील मग त्याचे तराफे
करुन तुला हव्या त्या ठिकाणी समुद्रावरुन ते आणतील.
तेथे ते तराफे सोडवले जातील. मग तू ती झाडे घे."

10-11हिरामने शलमोनाला त्याच्या गरजेप्रमाणे सर्व
गंधसरू व देवदारुची झाडे दिली. आणि शलमोनाने हिरामला
त्याच्या कुटुंबासाठी दरवर्षी 1,20,000 बुशेल गहू आणि
1,20,000 गॅलन निर्भेळ तेल दिले. 12परमेश्वराने कबूल
केल्याप्रमाणे शलमोनाला शहाणपण दिले. आणि हिराम
व शलमोन या दोघांमध्ये सख्य निर्माण झाले. या दोन
राजांनी आपसात शांततेचा करार केला.

13शलमोनाने वेठबिगारीवर इस्राएलची 30,000 माणसे
या कामासाठी नेमली. 14अदोनीराम नावाच्या माणसाला
त्यांचा प्रमुख म्हणून नेमले. शलमोनाने या लोकांचे तीन
गट केले. प्रत्येक गटात 10,000 माणसे होती. प्रत्येक गट
लबानोनमध्ये एक महिना काम करी आणि घरी परतून
दोन महिने आराम करत. 15ऐंशी हजार लोकांना
शलमोनाने डोंगराळ भागात कामाला लावले. त्यांना
पाथरवटाचे काम होते. दगड वाहून नेणारी माणसे सत्तर
हजार होती. 16या कामकऱ्यांवर देखरेख करणारी तीन
हजार तीनशे माणसे होती. 17त्यांना शलमोनाने मोठे,
मौल्यवान चिरे मंदिराच्या पायासाठी म्हणून कातायला
सांगितले. ते फार काळजीपूर्वक कापण्यात आले. 18मग
शलमोन आणि हिरामच्या बांधकाम करणाऱ्यांनी आणि
गिबलोस येथल्या लोकांनी ते चांगले घडवले. मंदिर
उभारणीसाठी घडीव चिरे आणि ओंडके त्यांनी तयार
केले.

## मंदीराची बांधणी

6 अशा तऱ्हेने शलमोनाने मंदिर बांधायला सुरुवात
केली. इस्राएल लोकांनी मिसर देश सोडल्याला 480
झाली होती. इस्राएलाचा राजा म्हणून शलमोनाच्या
कारकीर्दीचे हे चौथे वर्ष होते. वर्षाचा दुसरा महिना जिव
चालू होता. 2मंदिराची लांबी 90 फूट, रूंदी 30 फूट आणि
उंची 45 फूट होती. 3मंदिराची देवडी 30फूट लांब आणि
15 फूट रूंद होती. मंदिराच्या रूंदीइतकीच या देवडीची
लांबी असून ती मंदिराच्या मुख्य भागाला लागूनच होती.
4मंदिराला अरूंद खिडक्या होत्या त्या बाहेरच्या बाजूने
अरूंद आणि आतल्या बाजूने रूंद होत्या. 5मंदिराच्या भोवती
अनेक खोल्या एका रांगेत बांधल्या होत्या. हे बांधकाम
तीनमजली होते. 6खोल्या मंदिराच्या भिंतीला लागून
असल्या तरी त्यांच्या तुळ्या या भिंतीत नव्हत्या. मंदिराच्या
भिंतीची रूंदी तळाकडे जास्त असून वर त्या निमुळत्या
होत होत्या. त्यामुळे या खोल्यांच्या एका बाजूची भिंत
तिच्या खालच्या भिंतीपेक्षा पातळ होती. तळमजल्यावरील
खोल्यांची रूंदी साडेसात फूट, पहिल्या मजल्यावरच्या
खोल्यांची 9 फूट तर त्यावरच्या खोल्यांची साडे दहा फूट
होती. 7भिंतीच्या बांधकामात कामगारांनी चांगले मोठे
चिरे वापरले होते. खाणीतूनच ते योग्य मापाने कातून
काढले होते. त्यामुळे मंदिरात ते बसवताना हातोड्या,
कुऱ्हाडी किंवा अन्य कुठल्या लोखंडी हत्याराचा आवाज
झाला नाही.

8तळमजल्यावरील खोल्यांना मंदिराच्या दक्षिणेकडून
आत जायला वाट होती. तिथून वरच्या मजल्यांवर जायला
आतून जिने होते.

9शेवटी शलमोनाचे मंदिराचे बांधकाम संपले. मंदिराचा
संपूर्ण अंतर्भाग गंधसरूच्या लाकडाने आच्छादलेला होता.
10मंदिराभोवतालच्या खोल्यांचेही काम झाले. प्रत्येक
मजल्याची उंची साडेसात फूट होती. त्यातील गंधसरुच्या
लाकडाचे खांब मंदिराला भिडले होते.

11यावेळी परमेश्वर शलमोनाला म्हणाला, 12"माझ्या
सर्व आज्ञा आणि नियम तू पाळलेस तर तुझे वडील दावीद
यांना कबूल केले ते सर्व मी तुझ्यासाठी करीन. 13तू
बांधत असलेल्या या मंदिरात इस्राएलपुत्रांमध्ये माझे वास्तव्य
राहील. इस्राएलच्या लोकांना सोडून मी जाणार नाही."

## मंदिराबद्दलचा तपशील

14शलमोनाने मंदिर बांधण्याचे काम पूर्ण केले.

15मंदिराच्या दगडी भिंतींना जमिनीपासून छतापर्यंत
गंधसरुच्या लाकडाचे आतून आच्छादन होते. दगडी जमीन
देवदारुच्या लाकडाने मढवलेली होती. 16मंदिराच्या आत
मागच्या बाजूला तीस फूट लांबीचा अत्यंतपवित्र गाभारा
होता. त्याच्याही भिंती खालपासून वरपर्यंत गंधसरुच्या
लाकडाने मढवलेल्या होत्या. 17मंदिराचा मुख्य दर्शनीभाग
या पवित्र गाभाऱ्यासमोर होता. हा साठ फूट लांब होता.
18हा भाग सुध्दा गंधसरुने मढवलेला होता.त्यातून भिंतीच्या
दगडाचे नखभरही दर्शन होत नव्हते. या लाकडावर फुले
आणि रानकाकड्या यांचे कोरीवकाम केलेले होते.

19आणखी मागे मंदिराच्या अंतर्भागात शलमोनाने
परमेश्वराच्या करारकोशासाठी गाभारा करवून घेतला
होता. 20याची लांबी, रूंदी आणि उंची प्रत्येकी तीस तीस
फूट होती. 21शलमोनाने हा गाभारा शुद्ध सोन्याने मढवला
होता. खोलीसमोर त्याने धूप जाळायला चौथरा बांधला
तोही सोन्याने मढवून त्याभोवती सोन्याच्या साखळ्या
लावल्या. 22अतिपवित्र गाभाऱ्यासमोरच्या वेदीसह सर्व

मंदिर सोन्याने मढवले होते. 23कारागिरांनी जैतून लाकडाचे
दोन करुब देवदूत बनवले. त्यांना पंख होते. करुब देवदूतांची
उंची प्रत्येकी 15 फूट होती. ते अतिपवित्र गाभाऱ्यात
ठेवले. 24–26हे दोन्ही करुब तंतोतंत एकाच आकाराचे,
एकाच मोजमापाचे होते. त्यांना प्रत्येकी दोन पंख असून
प्रत्येक पंख साडेसात फूट लांबीचा होता. पसरलेल्या दोन्ही
पंखांची रूंदी 15 फूट भरत होती. आणि प्रत्येक करुब
पंधरा फूट लांबीचा होता. 27हे करूब देवदूत आतल्या
अतिपवित्र गाभाऱ्यात बसवले होते. ते एकमेकांना लागून
असे ठेवले होते की त्यांचे पंख खोलीच्या बरोबर मध्यभागी
एकमेकांना भिडत होते. आणि बाहेरच्या बाजूला भिंतीच्या
कडेला स्पर्श करत होते. 28हे दोन करुब देवदूतही सोन्याने
मढवले होते.

29दर्शनी भाग आणि गाभारा यांच्या भिंतींवरही करुबांची
चित्रे कोरलेली होती. खजुरीची झाडे आणि फुलेही कोरली
होती. 30दोन्ही खोल्यांची जमीन सोन्याने मढवली होती.
31जैतूनाच्या लाकडाचे दोन दरवाजे कारागिरांनी करुन
ते अतिपवित्र गाभाऱ्याचे प्रवेशद्वार म्हणून लावले.
दारांभोवतालच्या महिरपीला पाच बाजू होत्या 32जैतून
लाकडाच्या या दारांवर करुब देवदूत, खजुरीची झाडे
आणि फुले कोरलेली असून ती सोन्याने मढवली होती.

33मुख्य भागालाही त्यांनी दरवाजे केले. जैतून लाकडाची
चौकट उभारुन 34फरच्या लाकडाचे दरवाजे केले.
35कारागिरांनी दोन दरवाजे केले आणि प्रत्येक दार दोन
झडपांचे होते त्यामुळे ते दुमडले जात असे. त्यावरही पुन्हा
करुब देवदूत, खजुरीची झाडे, फुले यांचे कोरीव काम
असून ती दारे सोन्याने आच्छादली होती. 36मग आतला
चौक बांधला. त्याभोवती भिंत बांधली. दगडी चिऱ्यांच्या
तीन ओळी आणि देवदाराची एक ओळ अशा त्या भिंती
होत्या.

37वर्षाचा दुसरा महिना जिव तेव्हापासून त्यांनी मंदिराच्या
कामाला सुरुवात केली. इस्राएलचा राजा म्हणून
शलमोनाच्या कारकीर्दीचे ते चौथे वर्ष होते. 38बूल महिन्यात
म्हणजेच वर्षाच्या आठव्या महिन्यात मंदिराचे बांधकाम
पूर्ण झाले. पण शलमोनाचे ते सत्तेवरचे अकरावे वर्ष होते.
म्हणजेच मंदिर बांधायला सात वर्षे लागली. मंदिराचे
बांधकाम नियोजित नमुन्या प्रमाणे तंतोतंत झाले.

## शलमोनाचा राजवाडा

7 राजा शलमोनाने स्वत:साठी महालही बांधला. त्याला
तेरा वर्षे लागली. 2लबानोनचे वनातील घरही त्याने
बांधले. ते 150 फूट लांब, 95 फूट रूंद आणि 45 फूट
उंच होते. देवदाराच्या स्तंभांच्या त्याला चार रांगा असून
प्रत्येक स्तंभावर नक्षीदार घुमटी होती. 3या स्तंभांवरुन
देवदाराच्या तुव्व्या घातलेल्या असून त्यावर छत म्हणून
देवदाराच्या लाकडाची पाटण होती. प्रत्येक ओळीत पंधरा
खांब अशा पंचेचाळीस खांबांवर तुव्व्या होत्या. 4भिंतींवर
समोरासमोर येतील अशा खिडक्यांच्या तीन ओळी होत्या.
5दोन्ही टोकांना तीन तीन दरवाजे होते. दाराची कवाडे
आणि चौकटी काटकोन चौकोनात होत्या.

6शलमोनाने एक द्वारमंडपही उभारला होता. हा
राजासनाचा मंडप 75 फूट लांब आणि 45 फूट रूंद होता.
दर्शनी बाजूला आधार देणाऱ्या स्तंभांची रांग होती.

7न्यायनिवाडा करण्यासाठीही त्याने एक दालन बांधून
घेतले. त्याला त्याने “न्यायासनाचा मंडप” असे नाव दिले
होते. हे दालनही जमिनीपासून छतापर्यंत गंधसरुच्या
लाकडाने आच्छादलेले होते.

8याच्याच आतल्या बाजूला त्याचे घर होते. त्याची बांधणी
न्यायासनाच्या मंडपासारखीच होती. मिसरच्या राजाची
मुलगी म्हणजे शलमोनची बायको हिच्यासाठीही त्याने
असाच महाल बांधून घेतला.

9या सर्व इमारतींच्या बांधकामात किंमती दगडी चिरे
वापरले होते. पुढून मागून घासून ते करवतीने योग्य मापाने
कातले होते. पायापासून वळचणीपर्यंत त्यांचाच वापर केला
होता. अंगणाभोवतालच्या भिंतीही याच बहुमूल्य दगडांनी
बांधल्या होत्या. 10पायासाठी वापरलेले चिरेही असेच प्रशस्त
व भारी होते. काहींची लांबी 15 फूट व इतरांची बारा
फूट होती. 11त्यांच्यावर आणखी चांगल्या प्रतीचे चिरे
आणि गंधसरुचे वासे होते. 12महाल, मंदिर आणि द्वारमंडप
यांच्या भोवताली भिंत होती. तिला दगडांच्या तीन ओळी
आणि गंधसरुच्या लाकडाची एक ओळ होती.

13राजा शलमोनाने सोराहून (तायरहून) हिराम नावाच्या
माणसाला निरोप पाठवून यरुशलेम येथे बोलावून घेतले.
14हिरामची आई नफताली वंशातील होती. त्याचे वडील
सोराचे (तायरचे) होते. ते चांगले तांबट होते पण ते मरण
पावले होते. हिराम हा एक अनुभवी आणि कसबी तांबट
होता. म्हणून राजाने त्यालाच बोलावून घेतले. त्यानेही हे
आमंत्रण स्वीकारले. राजाने हिरामला सर्व पितळी
कारागिरीवरील प्रमुख म्हणून नेमले. हिरामने पितळेपासून
बनवलेल्या सर्व वस्तू घडविल्या.

15हिरामने दोन पितळी स्तंभ घडवले. प्रत्येक स्तंभ
सत्तावीस फूट उंचीचा आणि अठरा फूट परिघाचा
होता. हे स्तंभ पोकळ असून पत्र्याची जाडी तीन इंच
होती.

16शिवाय त्याने साडेसात फूट उंचीचे दोन पितळी
महिरपदार खांबही बांधले. 17या खांबाच्या घुमट्यांना
आच्छादायला म्हणून दोन जाळीदार, साखळीची आच्छादने
केली. 18मग त्याने पितळेचे, डाळिंबांच्या आकाराचे
शोभिवंत कळस केले. घुमट्यांच्या जाळ्यांवर या
कळसांच्या दोन रांगा बसवल्या. 19साडेसात फूट उंचीचे जे
स्तंभ होते त्याच्या घुमट्या फुलाच्या आकाराच्या होत्या.
20या घुमट्या स्तंभांवर बसवलेल्या होत्या. परडीच्या
आकाराच्या जाळीवर त्या बसवलेल्या होत्या. या सगळ्या
कळसांच्या भोवती रांगेने वीस डाळिंबे लावली होती. 21हे

दोन पितळी स्तंभ हिरामने द्वारमंडपाशी लावले.
दाक्षिणेकडील खांबाला याखीन आणि उत्तरे कडील
खांबाला बवाज असे नाव ठेवले. 22फुलाच्या आकाराचे
कळस या खांबांवर चढवले आणि या दोन स्तंभांचे काम
संपले.
23यानंतर हिरामने पंच धातूचा एक गोल हौद
केला. याला त्याने “समुद्र” असे नाव दिले. याचा
परिघ पंचेचाळीस फूट होता. या काठापासून त्या काठापर्यंत
त्याची लांबी पंधरा फूट होती आणि खोली साडेसात फूट.
24या हौदाच्या कडेला बाहेरच्या बाजूला एक पट्टी बसवली
होती. तिच्या खाली पितळी रानकाकड्यांच्या दोन रांगा
होत्या. या काकड्या हौदाचाच एक भाग म्हणून
एकसंधपणे करुन घेतल्या होत्या. 25बारा पितळी
बैलांच्या पाठीवर हा हौद विसावलेला होता. बैलांची
तोंडे बाहेरच्या बाजूला होती. तिघांची तोंडे उत्तरेला,
तिघांची दाक्षिणेला, तिघांची पूर्वेला आणि तिघांची पश्चिमेला
होती. 26हौदाची जाडी तीन इंच रूंदीची होती. आणि वरची
कड कटोऱ्याच्या कडेसारखी अथवा फुलासारखी
उमललेली होती. यात अकरा हजार गॅलन पाणी मावत
असे.
27मग हिरामने दहा पितळी पालख्या केल्या. प्रत्येक
पालखी सहा फूट लांब, सहा फूट रूंद आणि साडे चार
फूट उंच होती. 28चौकटीत बसवलेल्या चौकोनी पत्र्यांनी
या पालख्या केल्या होत्या. 29पत्रे आणि चौकट यांच्यावर
पितळी सिंह, बैल व करुब देवदूत यांचे कोरीव काम
होते. सिंह आणि बैल यांच्याखाली फुलांची वेलबुट्टी
बसवलेली होती. 30प्रत्येक पालखीला पितळी धुऱ्यांवर
पितळेची चार चार चाके लावलेली होती आणि चारही
कोपऱ्यातून प्रशस्त घंगाळासाठी पितळी आधार दिलेले
होते. त्यांनाही फुलांचे सुबक काम केलेले होते. 31बैठकीला
वरच्या बाजूला चौकट होती. बैठकीपासून ती अठरा इंच
वर होती. घंगाळाचे वाटोळे तोंड सत्तावीस इंच व्यासाचे
होते. चौकटीवरही पुन्हा पितळेत कोरीवकामाची नक्षी
होती. चौकट मात्र गोल नसून चौकोनी होती. 32सांगाड्याच्या
खालची चार चाके सत्तावीस इंच व्यासाची होती. आणि
चाकांच्या धुऱ्या पालखीबरोबरच घडलेल्या, एकसंध
होत्या. 33रथाच्या चाकांसारखी ही चाके होती. आणि
त्याच्या धुऱ्या धावा, आरे आणि तुंबे असे सर्व काही
ओतीव पितळेचे होते.
34प्रत्येक पालखीच्या चारही कोपऱ्यांना आधार
दिलेले होते. तेही एकसंध होते. 35प्रत्येक पालखीला
वरून एक पितळेची पट्टी होती. तीही अंगचीच होती.
36पालखीची बाहे रची बाजू आणि चौकट यांच्यावर
करूब देवदूत, सिंह, खजूरीची झाडे यांचे कोरीवकाम
पितळेत केलेले होते. ही नक्षी अगदी भरगच्च असून
त्यात कुठेही मोकळी जागा नव्हती. शिवाय भोवताली
फुलांची नक्षी होती. 37हिरामने अशाप्रकारे अगदी
एकसारख्या एक अशा दहा पितळी पालख्या घडवल्या. हे
सर्व ओतीव काम होते त्यामुळे त्या तंतोतंत एकसारख्या
होत्या.
38हिरामने अशीच दहा गंगाळी केली. ती या दहा
पालख्यांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे होती. प्रत्येक गंगाळ
सहाफुटी होते. त्यात दोनशेतीस गॅलन पाणी मावू शकत
असे. 39मंदिराच्या उत्तरेला आणि दक्षिणेला त्याने पाच-पाच
पालख्या ठेवल्या. मंदिराच्या दक्षिणपूर्व कोपऱ्यात म्हणजेच
आग्नेय दिशेला हौदाची योजना केली.
40–45याखेरीज हिरामने वाडगी, पावडी, लहान गंगाळी
बनवली. शलमोनाने सांगितले ते सर्व हिरामने केले.
परमेश्वराच्या मंदिरासाठी हिरामने ज्या वस्तू घडवल्या
त्यांची यादी पुढीलप्रमाणे:

दोन स्तंभ स्तंभांच्या कळसांवर बसवायच्या दोन घुमट्या
त्यांच्या भोवतीच्या दोन जाळ्या या दोन जाळ्यांची चारशे
डाळिंबे. स्तंभांवरील घुमट्या आच्छादण्यासाठी प्रत्येक
जाळीला डाळिंबांच्या दोन-दोन रांगा. गंगाळासहित पालख्या
दहा पायातळी बारा बैल असलेला विशाल हौद याखेरीज
हंडे, पातेली, पावडी अशी परमेश्वराच्या मंदिरासाठी
वेगवेगळी पात्रे.

राजाच्या इच्छेखातर हिरामने हे केले. ते सर्व लखलखीत
पितळेचे होते. 46–47या सगळ्यासाठी किती पितळ लागले
ते राजाने बघितले नाही. वजन करायचे म्हटले तरी ते
खूपच होते. त्यामुळे या सर्व चीजवस्तूंचे नक्की वजन
कधीच माहीत झाले नाही. सुक्कोथ आणि सारतान
यांच्यामध्ये यार्देन नदीच्या तीरावर राजाने हे काम करायला
सांगितले. पितळ वितळवून मातीच्या साच्यात हे ओतकाम
करण्यात आले.
48–50शलमोनाने मंदिरासाठी सोन्याच्याही कितीतरी
वस्तू करवून घेतल्या. त्या अशा:

सोन्याचे मेज (देवाची सोन्याची वेदी समर्पित भाकर
ठेवण्यामाठी)
चोख सोन्याच्या दीपमाळा. (या अतिपवित्र
गाभाऱ्यासमोर डावीउजवीकडे पाच-पाच लावलेल्या
होत्या)
सोन्याची फुले, दिवे आणि चिमटे वाडगे दिवे
लखलखीत, उजळलेले ठेवायची साधने. पेले ताम्हने
शुद्ध सोन्याची रक्षापात्रे मंदिराची प्रवेशद्वारे.

51परमेश्वराच्या मंदिराचे हे काम शलमोनाने स्वत:च्या
पसंतीप्रमाणे करवून घेतले. मग आपले वडील दावीद
यांनी या हेतूने राखून ठेवलेल्या सर्व वस्तू बाहेर काढल्या.
त्या सर्व मंदिरात आणल्या. परमेश्वराच्या मंदिराच्या
खजिन्यात ही सोन्यारुप्याची चीजवस्तू जमा केली.

## करारकोशाची मंदिरात स्थापना

8 इस्राएलमधील सगळी वडीलधारी मंडळी,. सर्व
घराण्यांचे प्रमुख आणि कुटुंबातील मुख्य यांना राजा
शलमोनाने आपल्याबरोबर यरुशलेम येथे यायला
सांगितले. दावीद नगरातून करारकोश मंदिरात
आणण्यासाठी त्यांना त्याने बोलावले. 2तेव्हा इस्राएलाची
सर्व मंडळी एकत्र आली. तेव्हा एथानीम हा वर्षाचा सातवा
महिना चालू होता आणि ते दिवस मंडपाचा सण ह्या विशेष
उत्सवाचे होते.

3इस्राएलची सर्व वडीलधारी मंडळी एकत्र जमली. मग
याजकांनी परमेश्वराचा पवित्र करारकोश उचलला.
4त्याबरोबरच सभामंडप आणि तिथली सर्व पवित्र
उपकरणेही त्यांनी घेतली. या कामात याजकांना लेवींनी
मदत केली. 5राजा शलमोन व इस्राएलचे सर्व लोक
करार कोशाच्या समोर आले. तेथे त्यांनी अनेक बळी
अर्पण केले. तेथे त्यांनी इतकी गुरे मेंढरे अर्पिली की
त्यांची मोजदाद करता येणे शक्य नव्हते. 6मग याजकांनी
परमेश्वराचा तो करारकोश योग्य जागी ठेवला. मंदिरातील
अतिपवित्र गाभाऱ्याच्या आत करूबांच्या पंखाखाली तो
ठेवला. 7करूबांचे पंख पवित्र करारकोशावर पसरलेले
होते. पवित्र कोश आणि त्याचे दांडे पंखांनी झाकलेले
होते. 8हे दांडे इतके लांब होते की अतिपवित्र गाभाऱ्यापुढच्या
भागात उभे राहणाऱ्यालाही त्यांची टोके दिसत. बाहेरून
पाहणाऱ्याला मात्र ती दिसत नसत. हे दांडे अजूनही तेथे
आहेत.

9करारकोशाच्या आत दोन शिलालेख होते. होरेब येथे
मोशेने हे पेटीच्या आत ठेवले होते. इस्राएली लोक मिसर
देशातून बाहेर पडल्यावर होरेब या ठिकाणी परमेश्वराने
त्यांच्याबरोबर करार केला होता. 10अतिपवित्र
गाभाऱ्यात* हा पवित्र करारकोश ठेवल्यावर याजक
तेथून बाहेर पडले. त्याबरोबर मंदिर मेघाने व्यापले.
11परमेश्वराच्या तेजाने मंदिर भरुन गेल्यामुळे याजकांना
आपले काम चालू ठेवता येईना. 12तेव्हा शलमोन म्हणाला,

"आकाशात सूर्य तळपतो तो परमेश्वरामुळे, पण तो
स्वत:मात्र काळोख्या ढगात राहत
13तुला युगानुयूग राहाण्यासाठी हे मंदिर मी तुझ्यासाठी
बांधले आहे."

14सर्व इस्राएल लोक तेथे उभे होते. त्या समुदायाकडे
वळून शलमोनाने देवाला त्यांना आशीर्वाद द्यायला
सांगितले.

15शलमोन राजाने मग एक दीर्घ प्रार्थना म्हटली. ती
अशी;

"इस्राएलचा परमेश्वर देव महान आहे. माझे वडील
दावीद यांना दिलेल्या वचनाप्रमाणे त्याने सर्व काही केले.
परमेश्वर माझ्या वडीलांना म्हणाला,

16'माझ्या इस्राएली प्रजेला मी मिसरमधून बाहेर आणले.
पण या वंशातील कुठलेही नगर मी अजून माझे नाव
राखण्यासाठी माझे मंदिर उभारण्यासाठी निवडले नाही.
तसेच इस्राएल लोकांचा नेता म्हणूनही अजून कोणाची
निवड केली नाही. पण आता माझा जेथे सन्मान होईल
असे यरुशलेम हे नगर मी निवडले आहे आणि इस्राएल
लोकांचा अधिपती म्हणून मी दावीदाची निवड केली आहे.'

17"इस्राएलच्या परमेश्वर देवाच्या सन्मानार्थ मंदिर
बांधावे असे माझे वडील दावीद यांच्या फार मनात होते.
18पण परमेश्वर त्यांना म्हणाला, 'मंदिर उभारण्याची तुझी
तीव्र इच्छा मी जाणून आहे. अशी इच्छा तू बाळगलीस ते
चांगले आहे. 19पण तुझ्या हातून हे काम होणार नाही.
तुझा मुलगा हे मंदिर उभारून दाखवील.'

20"परमेश्वराने अशा पध्दतीने आपले वचन खरे करुन
दाखवले आहे. आता माझ्या वडीलांच्या गादीवर मी आलो
आहे. परमेश्वराच्या वचनाप्रमाणे इस्राएल लोकांवर माझी
सत्ता आहे. इस्राएलच्या परमेश्वर देवासाठी हे मंदिरही मी
बांधले आहे. 21त्यात पवित्र करारकोशासाठी एक गाभारा
करवून घेतला आहे. त्या कोशामध्ये परमेश्वराने आपल्या
पूर्वजांशी केलेला करार आहे. परमेश्वराने आपल्या
पूर्वजांना मिसरमधून बाहेर आणले तेव्हा केलेला तो करार
यात आहे."

22एवढे बोलून शलमोन परमेश्वराच्या वेदीपुढे उभा
राहिला. सर्व लोक त्याच्या समोर होते. दोन्ही हात
आकाशाच्या दिशेने पसरुन वर पाहात 23शलमोन म्हणाला,

"हे इस्राएलच्या परमेश्वर देवा, तुझ्या सारखा दुसरा
कोणी आकाशात किंवा पृथ्वीतलावर नाही. तू हा करार
केलास कारण तुझे आमच्यावर प्रेम आहे. तू आपला
करार पाळतोस. जे तू दाखवलेल्या मार्गाने जातात
त्यांच्याविषयी तू दयाळू आणि एकनिष्ठ असतोस. 24माझे
वडील दावीद या आपल्या सेवकाला तू वचन दिलेस
आणि ते खरे करुन दाखवलेस. आपल्या मुखाने तू वचन
दिलेस आणि तुझ्याच सामर्थ्यामुळे ते आज प्रत्यक्षात आले
आहे. 25माझ्या वडीलांना दिलेली इतर वचनेही. हे,
इस्राएलच्या परमेश्वर देवा, तू खरी करुन दाखव तू म्हणाला
होतास, 'दावीद, तुझ्याप्रमाणेच तुझ्या मुलांनीही माझे
काटेकोर आज्ञापालन केले पाहिजे. तसे झाले तर तुमच्याच
घराण्यातील कोणीतरी एकजण नेहमी इस्राएल लोकांवर
राज्य करील.' 26परमेश्वरा, इस्राएलच्या देवा, हा माझ्या
वडीलांना दिलेला शब्दही खरा ठरु दे अशी माझी प्रार्थना
आहे.

27"पण परमेश्वरा, तू खरोखरच इथे पृथ्वीवर
आमच्यामध्ये कायम राहाशील का? हे विस्तीर्ण आकाश

---

**गाभाऱ्यात** मेघ दाटून आल्यासारखे झाले इस्राएलींना परमेश्वराची
साथ आहे असा याचा अर्थ.

आणि स्वर्ग यांतही तू मावत नाहीस. तेव्हा हे मी बांधलेले
मंदिरही तुझ्यासाठी अपुरेच आहे. 28पण कृपाकरून माझी
प्रार्थना व कळकळीची विनंती ऐक. मी तुझा सेवक आणि
तू माझा परमेश्वर देव आहेस. आजची ही माझी प्रार्थना
ऐक. 29पूर्वी तू म्हणाला होतास, ‘येथे माझा सन्मान होईल.’
तेव्हा रात्रंदिवस या मंदिराकडे नजर असू दे. या मंदिरातील
माझी ही प्रार्थना ऐक. 30परमेश्वरा, इस्राएलचे सर्व लोक
आणि मी इथे येऊन तुझी प्रार्थना करु तेव्हा त्या प्रार्थना
ऐक. तुझे वास्तव्य स्वर्गात असते हे आम्हाला माहीत
आहे. तेथे त्या तुझ्या कानावर पडो आणि तू आम्हाला
क्षमा कर.

31“कोणाच्या हातून कुणाच्या विरुद्ध काही अपराध
घडल्यास त्याला या वेदीपुढे आणण्यात येईल. तो दुखावलेला
माणूस त्याच्यावर अन्याय करणाऱ्या माणसाविरुद्ध
शापवाणी उच्चारील तो निरपराध असेल तर तो तशी
ग्वाही देईल. आपण निर्दोष असल्याचे तो शपथपूर्वक
सांगेल. 32तेव्हा तू ते स्वर्गातून ऐकून निवाडा कर. जर तो
अपराधी असेल तर त्याला त्याप्रमाणे शिक्षा कर. तो जर
निरपराध असेल तर त्याच्या चांगुलपणाच्या प्रमाणात त्याला
बक्षीस देऊन त्याचे समर्थन कर.

33“कधी इस्राएलच्या लोकांच्या हातून पाप घडले तर
शत्रू त्यांचा पराभव करील. अशा वेळी हे लोक पुन्हा
तुझ्याकडे येऊन या मंदिरात प्रार्थना करतील, तुझी स्तोत्रे
गातील. 34तेव्हा स्वर्गातून ती ऐकून त्यांच्या पापांची क्षमा
कर. जो देश त्यांच्या पूर्वजांना तू दिलास तो त्यांना परत
दे.

35“कधी त्यांच्या पापाचा दंड म्हणून तू त्यांच्या भूमीवर
दुष्काळ पाडशील तेव्हा ते या ठिकाणाकडे येऊन तुझी
प्रार्थना करतील व तुझ्या नावाची स्तुती करतील. ते
त्यांच्या पापांपासून परावृत होतील. 36तेव्हा स्वर्गातून त्यांची
विनवणी ऐकून त्यांना क्षमा कर. त्यांना योग्य मार्गाने
चालायला शिकव. आणि परमेश्वरा, तू त्यांना दिलेल्या
भूमीवर पुन्हा पहिल्यासारखाच पाऊस पडू दे.

37“कधी जमीन ओसाड होऊन त्यावर कोणतेही पीक
येणार नाही. किंवा एखादा साथीचा रोग पसरेल. कधी
टोळधाड येऊन सगळे पीक फस्त करील. कधी शत्रूच्या
हल्ल्याला काही ठिकाणचे लोक बळी पडतील. किंवा
एखाद्या दुखण्याने लोक हैराण होतील. 38असे कधी
झाल्यास, एकाने जरी आपल्या पापाची कबुली दिली व
मंदिराकडे हात पसरुन क्षमा याचना केली. 39तरी त्याची
प्रार्थना ऐक. आपल्या स्वर्गातील निवासस्थानातूनच ती
ऐकून त्यांना क्षमा कर आणि मदत कर. लोकांच्या मनात
काय आहे हे तूच फक्त जाणतोस. तेव्हा प्रत्येकाचा योग्य
न्यायनिवाडा कर. 40आमच्या पूर्वजांना तू जी भूमी दिलीस
तिथे लोकांनी त्यांचे वास्तव्य तिथे असेपर्यंत तुझा आदर
ठेवून व भय धरुन राहावे म्हणून एवढे कर. 41–42“तुझी
थोरवी आणि सामर्थ्य इतर लोकांच्याही कानावर जाईल.
मग ते दूरदूरच्या ठिकाणांहून या मंदिरात प्रार्थनेसाठी येतील.
43तर तू स्वर्गातून त्यांचीही प्रार्थना ऐक. त्यांच्या मनासारखे
कर. म्हणजे इस्राएली लोकांप्रमाणेच या लोकांनाही
तुझ्याबद्दल भय आणि आदर वाटेल. तुझ्या सन्मानार्थ हे
मंदिर मी बांधले आहे हे मग सर्व लोकांना कळेल.

44“कधी तू आपल्या लोकांना शत्रूवर चढाई करायचा
आदेश देशील. तेव्हा तुझे लोक तू निवडलेल्या या नगराकडे
आणि तुझ्या सन्मानार्थ मी बांधलेल्या मंदिराकडे वळतील.
आणि ते तुझी प्रार्थना करतील. 45तेव्हा तू आपल्या
स्वर्गातील निवासस्थानातून त्यांची प्रार्थना ऐक आणि त्यांना
मदत कर.

46“लोकांच्या हातून काही पापही होईल. मी असं म्हणतो,
कारण माणसाचा तो स्वभावच आहे. अशावेळी
त्यांच्यावर संतापून तू त्यांचा शत्रूकडून पराभव
करवशील. शत्रू मग त्यांना कैदी करुन दूरदेशी नेतील.
47तिथे गेल्यावर मग हे लोक झाल्या गोष्टी विचारात
घेतील. त्यांना आपल्या पापांचा पश्चात्ताप होईल आणि ते
प्रार्थना करतील, ‘आम्ही चुकलो, आमच्या हातून पाप
घडले’ अशी ते कबुली देतील. 48ते कोठेतरी दूरच्या
देशात असतील पण ते जर परराज्यात असताना
अंत:करणपूर्वक तुझ्याकडे वळले आणि तू त्यांच्या पूर्वजांना
बहाल केलेल्या या भूमीच्या दिशेने, तू निवडलेल्या या
नगराच्या दिशेने आणि तुझ्या सन्मानार्थ मी बांधलेल्या या
मंदिराच्या दिशेने त्यांनी प्रार्थना केली तर 49तू ती आपल्या
स्वर्गातील ठिकाणाहून त्यांची प्रार्थना ऐक. 50त्यांच्या सर्व
पापांची क्षमा कर. तुझ्या विरुध्द गेल्याबद्दल त्यांना क्षमा
कर. त्यांच्या शत्रूंमध्ये त्यांच्या बद्दल दया उत्पन्न कर.
51ते तुझे लोक आहेत हे आठव तू त्यांना मिसरमधून
बाहेर आणलेस तापलेल्या भट्टीतून बाहेर काढावे तसे
त्यांना सोडवलेस हे लक्षात असू दे. 52“परमेश्वर देवा,
माझी आणि या इस्राएल लोकांची प्रार्थना कृपाकरुन ऐक.
त्यांनी केव्हाही याचना केली तरी त्यांच्या हाकेला प्रतिसाद
दे. 53पृथ्वीतलावरील सर्व माणसांमधून निवड करुन तू
यांना आपले म्हटले आहेस. तू आम्हाला एवढे
कबूल केले आहेस. मिसरमधून तू आमच्या पूर्वजांना
बाहेर नेलेस तेव्हा आपला सेवक मोशे याच्याकडून हे
कार्य करवून घेतलेस. 54शलमोनाने देवापुढे ही प्रार्थना
केली तेव्हा तो वेदीसमोर गुडघे टेकून बसला होता आणि
त्याने हात स्वर्गाच्या दिशेने उंच केले होते. प्रार्थना संपवून
तो उभा राहिला. 55मग त्याने इस्राएल लोकांना आशीर्वाद
द्यावेत अशी मोठ्या आवाजात देवाला विनंती केली.
शलमोन पुढे म्हणाला.”

56“परमेश्वराचे स्तवन करा. इस्राएल लोकांना विसावा
देण्याचे त्याने कबूल केले होते. त्याप्रमाणे त्यांने केले
आहे. आपला सेवक मोशे याच्यामार्फत त्याने आपल्या
फायद्याची अनेक वचने दिली होती. ती परमेश्वराने
सर्वच्यासर्व खरी करुन दाखवली आहेत. 57आपल्या

पूर्वजांना त्याने साथ दिली तशीच तो पुढे आपल्यालाही देवो. त्याने आम्हाला कधीही अंतर देऊ नये. 58आम्ही त्याला अनुसरावे. त्याच्या मार्गाने जावे. म्हणजेच आपल्या पूर्वजांना त्याने दिलेल्या आज्ञा, सर्व नियम, निर्णय यांचे आम्ही पालन करावे. 59आजची माझी प्रार्थना आणि माझे मागणे परमेश्वर सतत लक्षात ठेवो. हा राजा त्याचा सेवक आहे. त्याच्यासाठी आणि इस्राएल लोकांसाठी त्याने एवढे करावे. एकदिवसही त्यात खंड पडू देऊ नये. 60परमेश्वराने एवढे केले तर हा एकच खरा देव आहे हे जगभरच्या लोकांना कळेल. 61तुम्ही सर्वांनीही आपल्या परमेश्वर देवाशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक असले पाहिजे. त्याच्या सर्व आज्ञा आणि नियम यांचे पालन केले पाहिजे. आत्ताप्रमाणेच पुढेही हे सर्व चालू ठेवले पाहिजे."

62मग राजासहित सर्व इस्राएल लोकांनी परमेश्वरा समोर यज्ञबली अर्पण केले. 63शलमोनाने 22,000 गुरे आणि 1,20,000 मेंढरे मारली. ही शांत्यर्पणासाठी होती. अशाप्रकारे राजा आणि इस्राएल लोकांनी मंदिर परमेश्वराला अर्पण केले.

64मंदिरा समोरचे अंगणही राजा शलमोनाने त्या दिवशी अर्पण केले. त्याने तेथे होम बली, धान्य आणि आधी शात्यार्पणासाठी अर्पण केलेल्या जनावरांची चरबी हे सर्व तेथे अर्पण केले. परमेश्वरापुढील पितळेची वेदी त्या मानाने लहान असल्यामुळे त्याने हे अंगणात केले.

65शलमोनाने आणि त्याच्याबरोबर सर्वांनी त्यादिवशी मंदिरात उत्सव साजरा केला. हमाथ खिंडीपासून मिसरच्या सीमेपर्यंतच्या भागातील सर्व इस्राएल लोक तेथे हजर होते. हा समुदाय प्रचंड होता. सात दिवस त्यांनी परमेश्वराच्या सान्निध्यात खाण्या-पिण्यात आणि मजेत घालवले. आणखी सात दिवस त्यांनी आपला मुक्काम लांबवला. अशाप्रकारे हा सोहळा चौदा दिवस चालला. 66नंतर शलमोनाने सर्वांना घरोघरी परतायला सांगितले. राजाला धन्यवाद देऊन, त्याचा निरोप घेऊन सर्वजण परतले. परमेश्वराचा सेवक दावीद आणि इस्राएलचे सर्व लोक यांचे परमेश्वराने कल्याण केले म्हणून ते आनंदात होते.

## शलमोनाला पुन्हा देवाचे दर्शन

9 शलमोनाच्या मनात होते त्याप्रमाणे त्याने परमेश्वराचे मंदिर आणि महाल यांचे काम पूर्ण केले. 2यापूर्वी गिबोनमध्ये परमेश्वराने शलमोनाला दर्शन दिले होते त्याप्रमाणे पुन्हा दुसऱ्यांदा परमेश्वराने त्याला दर्शन दिले. 3परमेश्वर त्याला म्हणाला, "मी तुझी प्रार्थना ऐकली. तू मला केलेली विनंती ऐकली. तू हे मंदिर बांधलेस. मी आता ते स्थान पवित्र केले आहे. येथे माझा निरंतर सन्मान होत राहील. हे स्थान माझ्या ध्यानीमनी राहील. 4तुझे वडील दावीद यांच्या प्रमाणेच तू तुझी वर्तणूक ठेव. ते न्यायी आणि प्रामाणिक होते. तूही माझ्या आज्ञा पाळ, मी सांगितलेले सर्व करत राहा.

5"तू त्याप्रमाणे वागलास तर तुमच्या घराण्यातील व्यक्तीच नेहमी राजासनावर येईल. तुझ्या वडीलांना मी तसे वचन दिले होते. त्यांच्या वंशजांचीच सत्ता इस्राएलवर राहील असे मी म्हटले होते.

6-7"पण तू किंवा तुझी मुलेबाळे यांचा मार्ग भरकटला, माझ्या आज्ञांचे पालन झाले नाही, तुम्ही इतर दैवतांच्या भजनी लागलात तर मात्र मीच दिलेल्या या भूमीतून इस्राएलांना मी हुसकावून लावीन. इतर लोक तुमच्याकडे कुचेष्टेने बोट दाखवतील. तुमची टर उडवतील. मंदिर मी पवित्र केले आहे. येथे येऊन लोक माझे आदराने स्मरण करतील. पण माझे आज्ञापालन केले नाहीत तर ते मी जमीनदोस्त करीन. 8हे मंदिर नामशेष होईल. ते पाहणारे स्तंभित होतील आणि म्हणतील, 'परमेश्वराने या देशाचा आणि या मंदिराचा असा विध्वंस का बरे केला?' 9यावर इतर जण सांगतील, 'याला कारण या लोकांनी परमेश्वर देवाचा त्याग केला. परमेश्वराने यांच्या पूर्वजांना मिसरमधून सोडवले. पण या लोकांनी इतर देव आपलेसे केले. त्या दैवतांच्या हे भजनी लागले. म्हणून परमेश्वराने हे अरिष्ट त्यांच्यावर आणले.'"

10परमेश्वराचे मंदिर आणि महाल यांचे बांधकाम पूर्ण होण्यास राजा शलमोनाला वीस वर्षे लागली. 11त्यानंतर शलमोनाने सोराचा (तायर) राजा हिराम याला गालील प्रांतातील वीस नगरे दिली. कारण हिरामने मंदिर व राजमहाल या दोन्हीच्या बांधकामांमध्ये शलमोनला खूपच मदत केली होती. देवदार, गंधसरुचे लाकूड तसेच सोनेही हिरामने शलमोनाला लागेल तसे पुरवले होते. 12हिराम मग सोराहून (तायर) ही नगरे पाहण्यासाठी म्हणून आला. पण त्याला ती तितकीशी पसंत पडली नाहीत. 13राजा हिराम म्हणाला, "काय ही तू दिलेली नगरे?" या भूभागाला हिरामने काबूल प्रांत असे नाव दिले. आजही तो भाग काबूल म्हणूनच ओळखला जातो. 14हिरामने शलमोनाला मंदिराच्या बांधकामासाठी नऊहजार पौंड सोने पाठवले होते.

15शलमोनराजाने मंदिर आणि महाल यांच्या बांधकामासाठी वेठबिगारीवर मजूर लावले होते. त्यांच्याकडून राजाने आणखीही वास्तू बांधून घेतल्या. मिल्लो, यरुशलेमभोवतीचा कोट तसेच हासोर, मगिद्दो व गेजेर या नगरांची पुनर्बांधणी त्याने करवून घेतली.

16मिसरच्या राजाने पूर्वी गेजेर हे शहर युध्दात घेऊन मग ते जाळून टाकले होते. तेथे राहणाऱ्या कनानीं लोकांना त्याने ठार केले होते. या फारोच्या मुलीशी शलमोनाने लग्न केले होते. तेव्हा फारोने हे नगरही शलमोनाला लग्नातील आहेरादाखल दिले होते. 17शलमोनाने ते पुन्हा बांधून काढले. तसेच खालचे बेथ-होरोनही बांधले. 18तसेच बालाथ, तामार ही वाळवंटातील नगरे, 19अन्नधान्य

आणि इतर वस्तूंची गोदामे, त्याचे रथ आणि घोडे यांच्यासाठी वेगळ्या जागा बांधल्या. यरुशलेममध्ये, लबानोनमध्ये आणि आपल्या अधिपत्याखालील इतर प्रदेशात जे जे त्याला हवे ते ते बांधले.

[20]इस्राएल लोकांखेरीज त्या प्रदेशात अमोरी, हित्ती, परिज्जी, हिव्वी, यबूसी हेही लोक होते. [21]इस्राएल लोकांना त्यांचा पाडाव करता आलेला नव्हता. पण शलमोनाने त्यांना आपले गुलाम केले. आजही त्यांची स्थिती तशीच आहे. [22]इस्राएल लोकांना मात्र शलमोनाने आपले गुलाम केले नाही. इस्राएली लोक सैनिक, सरकारी अधिकारी, कारभारी, सरदार, रथाधिपती आणि चालक अशा पदांवर होते.

[23]शलमोनाने हाती घेतलेल्या कामांवर साडेपाचशे अधीक्षक होते. मजूरांवर ते देखरेख करीत. [24]फारोची मुलगी आपला महाल पूर्ण झाल्यावर दावीद नगरातून तेथे राहायला गेली. नंतर शलमोनाने मिल्लो बांधले.

[25]शलमोन वर्षातून तीनदा वेदीवर होमबली आणि शांतीबली अर्पण करीत असे. ही वेदी त्याने परमेश्वरासाठी बांधली होती. तो परमेश्वरापुढे धूपही जाळी. तसेच मंदिरासाठी लागणाऱ्या वस्तू पुरवत असे.

[26]एसयोन गेबेर येथे शलमोनाने गलबतेही बांधली. हे नगर अदोम देशात तांबड्या समुद्राच्या काठी एलोथजवळ आहे. [27]समुद्राबद्दल चांगली जाण असलेले लोक राजा हिरामच्या पदरी होते. हे खलाशी बरेचदा समुद्रावर जात. हिरामने त्यांना शलमोनाच्या आरमारात, शलमोनाच्या खलाश्यांबरोबर पाठवले. [28]शलमोनाची गलबते ओफिर येथे गेली आणि त्यांनी तेथून एकतीसहजार पाचशे पौंड सोने शलमोनाकडे आणले.

## शलमोनाच्या भेटीस शबाची राणी

10 शबाच्या राणीने शलमोनाची ख्याती ऐकली तेव्हा अवघड प्रश्न विचारून त्याची कसोटी पाहायला ती आली. [2]नोकरा चाकरांचा लवाजमा आणि मसाल्याचे पदार्थ, रत्ने, सोनेनाणे अशा बऱ्याच गोष्टी उंटांवर लादून ती यरुशलेमला आली. शलमोनाला भेटल्यावर तिने सुचतील ते सर्व प्रश्न विचारले. [3]शलमोनाने तिच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्याला कुठलाच प्रश्न अवघड वाटला नाही. [4]शलमोन अतिशय हुषार असल्याचे तिच्या लक्षात आले. त्याने बांधलेला सुंदर महालही तिने बघितला. [5]त्याच्या मेजावरचे खाणे, त्याच्या सेवकांचा वावर, शलमोनाच्या कारभाऱ्यांची उठबस आणि त्यांचा पोषाख, त्याने दिलेल्या मेजवान्या आणि मंदिरात केलेले यज्ञ हे सर्व शबाच्या राणीने पाहिले आणि ती आश्चर्याने थक्क झाली.

[6]ती राजाला म्हणाली, "तुझ्या चातुर्याबद्दल आणि कारभाराबद्दल मी माझ्या देशात बरेच ऐकले होते. ते वस्तुस्थितीला धरुनच होते. [7]पण हे सर्व माझ्या डोळ्यांनी बघेपर्यंत माझा त्यावर विश्वास बसत नव्हता. आता असे वाटते की ऐकले ते कमीच होते. तुझे ऐश्वर्य आणि बुध्दिमत्ता मला लोकांनी सांगितली त्यापेक्षा जास्तच आहे. [8]तुझ्या बायका* आणि कारभारी खरेच फार भाग्यवान आहेत. तुझ्या सेवेचे भाग्य त्यांना लाभते आणि तुझ्या ज्ञानाचा लाभ त्यांना होतो.

[9]परमेश्वर देव थोर आहे. तुझ्यावर प्रसन्न होऊन त्याने तुला इस्राएलचा राजा केले. परमेश्वराचे इस्राएलवर प्रेम आहे. म्हणूनच त्याने तुला राजा केले. तू नियमशास्त्राचे पालन करतोस आणि लोकांना न्यायाने वागवतोस."

[10]मग शबाच्या राणीने राजाला जवळजवळ 9,000 पौंड सोने नजर केले. शिवाय मसाल्याचे सुगंधी पदार्थ आणि मौल्यवान हिरेही दिले. इस्राएलमध्ये यापूर्वी कोणी आणले नसतील इतके मसाल्याचे पदार्थ एकट्या शबाच्या राणीने शलमोन राजाला दिले.

[11]हिरामच्या गलबतामधून ओफिरहून सोने आले. तसेच रक्तचंदनाचे लाकूड आणि भारी रत्नेही आली. [12]शलमोनाने या लाकडाचा वापर मंदिरात आणि महालात आधाराचे कठडे उभारायला केला. शिवाय वादकांसाठी वीणा, सतारीही त्यातून करवून घेतल्या. तसे लाकूड परत कोणी कधी इस्राएलमध्ये आणले नाही की त्यानंतर कोणी तसे लाकूड पाहिले नाही.

[13]दुसऱ्या देशाच्या राज्यकर्त्याला जे रीतीप्रमाणे भेटीदाखल द्यायचे ते सर्व शलमोन राजाने शबाच्या राणीला दिले. शिवाय तिला काय हवे ते विचारून तेही दिले. यानंतर राणी आपल्या लवाजम्यासहित मायदेशी निघून गेली. [14]शलमोन राजाला दरसाल जवळपास एकोणऐंशी हजार नऊशेवीस पौंड सोने मिळत राहिले. [15]या मालवाहू जहाजांखेरीज व्यापारी, सौदागर, अरबस्तानचे राजे तसेच नेमलेले सुभेदार यांच्याकडूनही सोने येत राहिले.

[16]शलमोन राजाने घडीव सोन्याच्या दोनशे मोठ्या ढाली केल्या. प्रत्येक ढालीचे वजन पंधरा पौंड होते. [17]तशाच पण जरा लहान तीनशे घडीव सोन्याच्या ढाली केल्या. त्यात चार पौंड सोने होते. "लबानोनचे वन" नामक वास्तूमध्ये त्याने या ठेवल्या.

[18]शिवाय शलमोनाने हस्तिदंताचे एक प्रशस्त सिंहासन करवले. ते सोन्याने मढवले होते. [19]सिंहासनाला सहा पायऱ्या होत्या. त्याची पाठ कमानदार होती. दोन्ही बाजूला हात होते. हातांच्या खाली दोन्ही बाजूला सिंह होते. [20]तसेच सहाही पायऱ्यांवर दोन-दोन सिंह होते. असे सिंहासन दुसऱ्या कोणत्याही राज्यात नव्हते.

[21]शलमोनाचे सर्व पेले आणि चषक सोन्याचे होते. "लबानोनचे वन" नामक वास्तूमधली सर्व शस्त्रास्त्रे आणि सामग्री शुद्ध सोन्याची होती. चांदीचे काहीही नव्हते. सोने

---

**बायका** बायका हा शब्द ग्रीक भाषांतरात आहे. हिब्रू मध्ये "पुरुष" असे आहे.

इतक्या मुबलक प्रमाणात होते की शलमोनाच्या कारकिर्दीत
लोकांच्या लेखी चांदीला काही किंमत नव्हती.
22राजाकडे अनेक मालवाहू जहाजांचा ताफा होता.
त्यांचा इतर देशांशी व्यापार चाले. ही जहाजे हिरामची
होती. दर तीन वर्षांनी ही जहाजे सोने, चांदी, हस्तिदंत
आणि जनावरे यांचा नवा साठा घेऊन येत.
23शलमोन हा पृथ्वीतलावरील सर्वात महान राजा होता.
त्याच्याकडे सर्वाधिक वैभव आणि बुध्दि चातुर्य होते.
24लोक त्याला पाहायला उत्सुक असत. देवाने त्याला
दिलेले बुध्दीचे वैभव त्यांना अनुभवायचे असे.
25ठिकठिकाणाहून दरवर्षी लोक त्याच्या भेटीला येत.
येताना प्रत्येकजण नजराणा आणी. सोन्या चांदीच्या वस्तू,
कपडे, शस्त्रे, मसाल्याचे पदार्थ, घोडे, खेचरे अशा अनेक
गोष्टी ते भेटीदाखल आणत.
26शलमोनाकडे खूप रथ आणि घोडे होते. त्याच्याकडे
चौदाशे रथ आणि बाराहजार घोडे यांचा संग्रह होता.
रथांसाठी त्याने खास नगरे उभारली आणि त्यात रथ
ठेवले. काही रथ त्याच्या जवळ यरुशलेममध्येही होते.
27राजाने इस्राएलला वैभवाच्या शिखरावर नेले. यरुशलेम
नगरात चांदी दगडधोंड्यासारखी आणि गंधसरुचे लाकूड
डोंगरटेकड्यांवर उगवणाऱ्या उंबराच्या झाडासारखे विपुल
होते.
28मिसर आणि क्यू येथून शलमोन घोडे आणवत असे.
त्याचे व्यापारी क्यूमध्ये ते खरेदी करत आणि तेथून ते
इस्राएल मध्ये आणत. 29मिसरचा एक रथ साधारण 15
पौंड चांदीला पडे, आणि घोड्याची किंमत पावणेचार पौंड
चांदी इतकी पडे. हित्ती आणि अरामी राजांना शलमोन हे
रथ आणि घोडे विकत असे.

## शलमोन आणि त्याचा जनानखाना

11 स्त्रियांबद्दल शलमोनाला आकर्षण होते. इस्राएल
देशाच्या बाहेरच्याही अनेक स्त्रिया त्याच्या
आवडत्या होत्या. फारोच्या मुलीखेरीज, हित्ती, मवाबी,
अम्मोनी, अदोमी, सिदोनी अशा परक्या देशातील
स्त्रियांनाही त्याने आपलेसे केले. 2परमेश्वराने पूर्वीच
इस्राएल लोकांना सांगितले होते "परक्या देशातील लोकांशी
विवाह संबंध ठेवू नका. तसे केलेत तर ते तुम्हाला त्यांच्या
दैवतांच्या भजनी लावतील." असे असूनही शलमोन या
बायकांच्या प्रेमात पडला. 3त्याला सातशे बायका होत्या.
(त्या सर्व इतर देशांच्या प्रमुखांच्या मुली होत्या) उपपत्नी
म्हणून त्याला आणखी तीनशे दासीही होत्या. ह्या बायकांनी
त्याला देवापासून दूर जाण्यास भाग पाडले. 4तो वृध्द झाला
तेव्हा त्याच्या बायकांनी त्याला इतर दैवतांकडे वळवले.
आपले वडील दावीद याच्या प्रमाणे शलमोन परमेश्वराशी
एकनिष्ठ राहिला नाही. 5सिदोनी लोकांच्या अष्टोरेथ
देवाची त्याने पूजा केली. तसेच अम्मोन्यांचे अमंगळ दैवत
मिलकोम यालाही त्याने भजले. 6अशाप्रकारे त्याने
परमेश्वराचा अपराध केला. आपले वडील दावीद
यांच्याप्रमाणे तो परमेश्वराला पूर्णपणे अनुसरला नाही.
7कमोश या मवाबी लोकांच्या भयंकर दैवताच्या पूजेसाठी
शलमोनाने एक पूजास्थळ बांधले. हे यरुशलेम नजीकच्या
टेकडीवर होते. त्याच टेकडीवर मोलख या अम्मोनी
लोकांच्या भयंकर दैवतासाठीही एक स्थळ केले. 8आपल्या
इतर, प्रत्येक देशातल्या बायकांसाठीही त्याने अशीच सोय
केली. त्या आपापल्या ठिकाणी धूप जाळत आणि आपापल्या
दैवतांसाठी यज्ञ करत.
9इस्राएलचा देव परमेश्वर याच्यापासून शलमोन परावृत्त
झाला. तेव्हा परमेश्वराचा शलमोनावर कोप झाला.
परमेश्वराने शलमोनाला दोनदा दर्शन दिले होते. 10इतर
दैवतांच्या मागे त्याने जाऊ नये असे बजावले होते. पण
शलमोनाने परमेश्वराच्या या आज्ञेचे उल्लंघन केले.
11तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, "तू आपण होऊन
आपल्या कराराचा भंग केला आहेस. माझी आज्ञा तू
पाळली नाहीस. तेव्हा तुझ्या कडून राज्य हिसकावून
घेण्याची मी प्रतिज्ञा करतो. तुझ्या एखाद्या सेवकाला मी ते
देईन. 12पण तुझे वडील दावीद यांच्यावर माझे प्रेम होते.
त्याखातर तू हयात असेपर्यंत मी तुलाच राज्यावर ठेवीन
तुझा मुलगा गादीवर बसेपर्यंत वाट पाहीन. मग त्याच्याकडून
ते घेईन. 13तरी सगळेच राज्य हिसकावून घेणार नाही.
एकाच घराण्यावर त्याची सत्ता ठेवीन. दावीदासाठी मी
एवढे करीन. तो माझा आवडता सेवक होता. तसेच
यरुशलेमसाठी मला एवढे केले पाहिजे कारण ते नगर मी
निवडले आहे."

## शलमोनाचे शत्रू

14आणि मग परमेश्वराने अदोममधल्या हदादला
शलमोनाचा शत्रू केले. हदाद अदोमच्या राजघराण्यातला
होता. 15त्याचे असे झाले दावीदाने पूर्वी अदोमचा पराभव
केला होता. यवाब तेव्हा दावीदाचा सेनापती होता. तो
अदोम येथे मृतांचे दफन करायला गेला. त्याने सर्वांची
कत्तल केली होती. 16यवाब आणि सर्व इस्राएल लोक
यांनी अदोममध्ये सहा महिने मुक्काम केला. त्या काळात
त्यांनी अदोममध्ये कुणाही पुरुषाला जिवंत ठेवले नाही.
17हदाद त्यावेळी अगदी लहान होता. तेव्हा तो मिसर येथे
पळून गेला. त्याच्या वडीलांचे काही सेवकही त्याच्याबरोबर
गेले. 18मिद्यानहून पुढे ते सर्व पारान येथे गेले. तिथे
त्यांना आणखी काही जण येऊन मिळाले. मग हा सगळा
जथा मिसरला गेला. मिसरचा राजा फारो याच्याकडे त्यांनी
आश्रय घेतला. फारोने हदादला राहायला एक घर आणि
थोडी जमीन देऊ केली. त्याच्या अन्नवस्त्राची सोय केली.
19फारोची हदादवर मर्जी बसली. तेव्हा त्याने आपल्या
मेहुणीशी त्याचे लग्नही लावून दिले. (तहपनेस ही राजाची
राणी होती) 20या तहपनेसच्या बहिणीचे हदादशी लग्न
झाले. त्यांना गनुबथ नावाचा मुलगा झाला. राणी

तहपनेसच्या संमतीने तो राजवाड्यात फारोच्या मुलां
बरोबरच वाढला.
21दावीदाच्या मृत्यूची खबर हदादने मिसरमध्ये ऐकली.
सेनापती यवाब मरण पावल्याचेही त्याला कळले. तेव्हा
हदाद राजा फारोला म्हणाला, “मला माझ्या मायदेशी परत
जाऊ दे.”
22तेव्हा फारो त्याला म्हणाला, “येथे तुला हवे ते सर्व
काही मी दिले आहे. असे असताना तू परत का जातोस?”
तेव्हा हदादने पुन्हा जाऊ देण्याबद्दल विनंती केली.
23देवाने शलमोनासाठी आणखी एक शत्रू निर्माण केला.
तो म्हणजे रजोन. हा एल्यादाचा मुलगा. सोबाचा राजा
हददेजर याचा रजोन हा सेवक होता. त्याच्याकडून तो
पळाला. 24दावीदाने सोबाच्या सैन्याचा पाडाव केल्यानंतर
रजोनने काही माणसे जमवली आणि त्या टोळीचा तो
नायक बनला. दिमिष्कामध्ये जाऊन मग तो राहिला.
तिथला राजा झाला 25अरामवर रजोनने राज्य केले.
इस्राएलबद्दल त्याला चीड होती, तेव्हा शलमोनाच्या संपूर्ण
कारकिर्दीत त्याचे इस्राएलशी वैरच होते. हदाद आणि
रजोन यांनी मिळून इसाएलला बराच त्रास दिला.
26नबाट याचा मुलगा यराबाम हा शलमोनाचा एक
सेवक. हा एफ्राईम घराण्यातला असून सरेदा नगरातील
होता. याच्या आईचे नाव सरुवा. त्याचे वडील वारले होते.
हा यराबाम पुढे राजाच्या विरुध्द गेला. 27त्याची कथा
अशी. मिल्लोचे बांधकाम आणि दावीदनगराच्या तटबंदीला
पडलेली खिंडारे बुजवण्याचे काम शलमोन करुन घेत
होता.
28यराबाम हा अंगापिडाने मजबूत होता. हा या कामाला
चांगला असल्याचे शलमोनाने हेरले आणि त्याला योसेफ
घराण्यातील कामगारांचा अधीक्षक म्हणून नेमले.
29एकदा यराबाम यरुशलेमच्या बाहेर गेला होता. तेव्हा
त्याला शिलो येथील अहीया नावाचा संदेष्टा वाटेत भेटला.
अहीयाने नवीन अंगरखा घातला होता. या दोघांखेरीज
तेव्हा त्या भागात आणखीकोणी नव्हते. 30अहीयाने आपला
अंगरखा काढला आणि त्याचे फाडून बारा तुकडे केले.
31मग अहीया यराबामला म्हणाला, “यातले दहा तुकडे
तू स्वत:जवळ ठेव. इस्राएलचा देव परमेश्वर याने सांगितले
आहे ‘शलमोनाच्या हातातून राज्य काढून घेऊन त्यातील
दहा वंशाचा अधिकार मी तुला देईन. 32आणि दावीदाच्या
घराण्यात फक्त एकाच वंशाची मालकी शिल्लक
ठेवीन. माझा सेवक दावीद आणि हे यरुशलेम नगर
यांच्या खातर मी एवढे करीन. इस्राएलच्या सर्व वंशांतून
मी यरुशलेम नगराची निवड केली आहे. 33शलमोनाने
माझा त्याग केला म्हणून मी त्याच्याकडून राज्य काढून
घेणार आहे. सिदोन्यांची देवी अष्टोरेथ, मवाबचा कमोश,
अम्मोन्यांचा मिलकोम या खोट्यानाट्या दैवतांचे तो
भजनपूजन करतो. जे योग्य आणि न्याय्य ते आता तो
करत नाही. माझ्या आज्ञा आणि नियम तो पाळत नाही.
त्याचे वडील दावीद ज्या पध्दतीने जगले तसे याचे नाही.
34तेव्हा आता त्याच्या घराण्यातून मी सत्ता काढून घेत
आहे. मात्र शलमोन जिवंत असेपर्यंत तोच गादीवर राहील.
माझा सेवक दावीद याच्या लोभाखातर मी एवढे करीन.
माझे सर्व नियम आणि आज्ञा दावीदने पाळल्या म्हणून मी
त्याला निवडले. 35पण त्याच्या मुलाच्या हातून मी राज्य
काढून घेणार आहे आणि यराबाम, दहा घराण्यावरील
सत्ता मी तुझ्या हाती सोपवीन. 36शलमोनाच्या मुलाची
एका वंशावरील सत्ता तशीच अबाधित ठेवीन. म्हणजे
यरुशलेममध्ये माझा सेवक दावीद याचा वंशजच सतत
राज्य करील. यरुशलेम हे नगर मी आपले स्वत:चे म्हणून
निवडले. 37बाकी तुला हवे तेथे तू राज्य करशील. सर्व
इस्राएलवर तुझी सत्ता चालेल.
38“माझ्या आज्ञांचे पालन करत तू योग्य मार्गाने आयुष्य
घालवलेस तर मी हे तुला देईन. दावीदाप्रमाणे माझी सर्व
आज्ञा आणि नियम पाळलेस तर माझी तुला साथ असेल.
दावीदा प्रमाणेच तुझ्याही घराण्याला मी राजघराणे करीन.
इस्राएल तुला देईन. 39शलमोनाच्या वर्तणुकीची शिक्षा मी
त्याच्या मुलांना करीन. पण काही काळापुरती, सर्वकाळ
नव्हे.’”

## शलमोनाचा मृत्यू

40शलमोनाने यराबामच्या वधाचा प्रयत्न केला. पण
यराबामने मिसरला पलायन केले. मिसरचा राजा शिशक
याच्याकडे तो गेला. शलमोनाच्या मृत्यूपर्यंत यराबाम तिथेच
राहिला. 41शलमोनाने सत्तेवर असताना बऱ्याच मोठमोठ्या
आणि सुज्ञपणाच्या गोष्टी केल्या. शलमोनचा इतिहास या
पुस्तकात त्या सर्व लिहिलेल्या आहेत. 42यरुशलेममधून
त्याने सर्व इस्राएलवर चाळीस वर्षे राज्य केले 43मग तो
वारला तेव्हा त्याच्या पूर्वजांशेजारी दावीदनगरामध्ये त्याचे
दफन करण्यात आले.

## नागरी युध्द

12 1–2शलमोनाकडून पळाल्यावर नबाटाचा मुलगा
यराबाम मिसरमध्ये गेला. तो अजून तिथेच होता.
शलमोनाच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर एफ्राईमच्या
डोंगराळ भागातील जेरेदा या आपल्या नगरात तो परतला.
शलमोन मरण पावला आणि आपल्या पूर्वजांना जाऊन
मिळाला. त्यानंतर त्याचा मुलगा रहबाम हा पुढचा राजा
झाला. 3त्याला राज्याभिषेक करायला सर्व इस्राएल लोक
शेखेम येथे जमले. रहबाम तिथे आला. लोक त्याला
म्हणाले, 4“तुझ्या वडीलांनी कामाच्या ओझ्याखाली
आम्हाला भरडून काढले. आता आमचे ओझे थोडे हलके
कर. आमच्यावर लादलेले मेहनतीचे जू काढ म्हणजे
आम्ही तुझी सेवा करु.” 5रहबाम म्हणाला, “तीन
दिवसांनंतर मला भेटा. तेव्हा मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर
देईन.” मग लोक निघून गेले. 6शलमोन ज्यांच्याशी

सल्लामसलत करत असे अशी काही वृध्द मंडळी होती. त्यांनाच राजा रहबामने याबाबतीत सल्ला विचारला. तो म्हणाला, “या लोकांना मी काय सांगू?”

7यावर ही वयोवृध्द मंडळी म्हणाली, “तू आज यांचा सेवक बनलास तर तेही तुझी सेवा करतील. त्यांच्याशी प्रेमाने, समजुतीने बोललास तर तेही आयुष्यभर तुझे काम करतील.”

8पण रहबामने हा सल्ला मानला नाही. आपल्या
समवयस्क मित्रांना त्यांचे मत विचारले. 9रहबाम त्यांना
म्हणाला, “माझ्या वडीलांच्या कारकिर्दीतल्यापेक्षा “या लोकांना कामाचा भार कमी करुन हवा आहे. त्यांना आता मी काय सांगू, त्यांच्याशी काय बोलू?”

10तेव्हा ते तरुण मित्र म्हणाले, “ते लोक येऊन असे म्हणत आहेत, ‘तुझ्या वडीलांनी आमच्याकडून बेदम कष्ट करवून घेतले, तर आता आमचे काम कमी करा,’ तर तू त्यांना बढाई मारून सांग, ‘माझ्या वडीलांच्या अख्ख्या
शरीरापेक्षा या माझ्या करंगळीत जास्त जोर आहे. 11माझ्या
वडीलांनी तुम्हाला कामाला जुंपले. मी ते काम आणखी वाढवीन. त्यांनी तुम्हाला चाबकाचे फटकारे मारले असतील तर मी असा झोडपीन की विंचू डसल्यासारखे तुम्हाला वाटेल.’”

12रहबामने त्या लोकांना “तीन दिवसांनी यायला” सांगितले होते. त्याप्रमाणे सर्व इस्राएल लोक तीन दिवसांनी
रहबामकडे आले. 13त्यावेळी राजा रहबाम त्यांच्याशी
अतिशय कठोरपणे बोलला. वडीलधाऱ्यांच्या सल्ल्याकडे
त्याने दुर्लक्ष केले. 14मित्रांच्या म्हणण्याप्रमाणे तो बोलला.
तो म्हणाला, “माझ्या वडीलांनी तुमच्यावर कष्टाचे काम लादले. मी तर तुम्हाला आणखीच कामाला लावीन. त्यांनी तुमच्यावर आसूड उगवले, पण मी तर असा मारीन की विंचवाच्या डंकासारख्या तुम्हाला वेदना होतील.”

15हे अर्थातच लोकांच्या मनासारखे नव्हते. परमेश्वरानेच हे घडवून आणले होते. नबाटाचा मुलगा यराबाम याला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी परमेश्वराने हे केले. शिलो येथील संदेष्टा अहिया याच्यामार्फत परमेश्वराने हे वचन दिले.

16नवा राजा आपले म्हणणे मानत नाही हे इस्राएली लोकांच्या लक्षात आले. तेव्हा ते राजाला म्हणाले, “आम्ही दावीदाच्या घराण्यातील थोडेच आहोत. काय? नाही! इशायच्या जमिनीत आम्हाला थोडाच वाटा मिळणार आहे काय? नाही! तेव्हा इस्राएलींनो, जा आपापल्या घरी. करु दे या दावीदाच्या मुलाला आपल्या घराण्यापुरतेच
राज्य.” एवढे बोलून ते निघून गेले. 17तरीही यहूदा
नगरांमध्ये राहणाऱ्या इस्राएलींवर त्याची सत्ता होतीच.
18अदोनीराम नावाचा एक माणूस सर्व कामगारांवर देखरेख करत असे. तेव्हा राजा रहबामने त्याला लोकांशी बोलणी करायला पाठवले. पण इस्राएल लोकांनी त्याच्यावर इतकी दगडफेक केली की तो प्राणाला मुकला. तेव्हा राजाने आपल्या रथात बसून पळ काढला आणि तो
यरुशलेम येथे आला. 19इस्राएल लोकांनी दावीदच्या
घराण्याविरुध्द बंड पुकारले. आजही त्या घराण्याशी त्यांचे वैर आहे.

20यराबाम परत आला आहे असे इस्राएल लोकांना कळले. तेव्हा त्यांनी सगळ्यांची सभा भरवून त्याला इस्राएलचा राजा म्हणून घोषित केले. फक्त एका यहूदाच्या घराण्याने तेवढा दावीदाच्या घराण्याला आपला पठिंबा दिला.

21रहबाम यरुशलेमला परतला. यहूदा आणि बन्यामीन यांच्या वंशातील सर्वांना त्याने एकत्र केले. एकंदर एकलक्ष ऐंशी हजाराचे सैन्य जमले. इस्राएल लोकांशी लढून आपले राज्य परत मिळवायचा रहबामचा विचार होता.

22शमाया नामक देवाच्या माणसाशी या सुमारास
परमेश्वर बोलला. तो म्हणाला, 23“शलमोनाचा मुलगा
आणि यहूदाचा राजा रहबाम, तसेच यहूदा आणि बन्यामीन
लोक यांना जाऊन सांग, 24‘आपल्या बांधवांशी तुम्ही लढू
नये अशी परमेश्वराची इच्छा आहे. सर्वजण आपापल्या ठिकाणी परत जा. या सगळ्यांचा करता करविता मीच होतो.’” या आदेशानुसार रहबामचे सैन्य माघारी गेले.

25शेखेम हे एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशातील नगर होते. ते चांगले मजबूत आणि सुरक्षित करुन यराबाम तेथे राहिला. पुढे त्याने पनुएल याही नगराची उभारणी केली.
26–27यराबाम मनाशीच म्हणाला, “लोक यरुशलेम इथल्या परमेश्वराच्या मंदिरात असेच जात राहिले तर मग दावीदाच्याच घराण्याची सत्ता त्यांना हवीशी वाटू लागेल. यहूदाचा राजा रहबाम याच्याच मागे ते जातील. मग ते
माझा वध करतील.” 28त्याने मग आपल्या
सल्लागाराबरोबर विचार विनिमय केला. त्यांनी त्याला एक तोड सुचवली. त्यानुसार यराबामने सोन्याची दोन वासरे करवून घेतली. मग तो लोकांना म्हणाला, “तुम्हाला यरुशलेमला उपासनेसाठी जायची गरज नाही. तुम्हाला
मिसरबाहेर ज्यांनी काढले तेच हे देव.”* 29राजाने मग
एक सोन्याचे वासरु बेथेल येथे आणि दुसरे दान या
शहरात बसवले. 30पण त्याने हे मोठे पाप केले होते.
इसाएलचे लोक बेथेल आणि दान येथे वासरांच्या पूजेसाठी
जाऊ लागले. पण हेही मोठेच पाप होते. 31उंचवट्याच्या
ठिकाणीही यराबामने देऊळे बांधली. त्यासाठी पुरोहितही त्याने फक्त लेवी वंशातले न निवडता इस्राएलच्या
वेगवेगळ्या वंशांमधून निवडले 32याखेरीज त्याने एक नवा
सणही सुरु केला. यहूदामधील वल्हांडणाच्या सणासारखाच हा होता. पण पहिल्या महिन्याच्या पंधराव्या दिवसाऐवजी हा आठव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी त्याने ठेवला.

---

**तुम्हाला … हे देव** आहरोनाने वाळवंटामध्ये सोन्याचे वासरु केले तेव्हा त्याने ही नेमके हेच सांगितले होते. पाहा निर्गम 32:4.

या दिवशी हा राजा बेथेल नगरातील वेदीवर यज्ञ करत
असे. तसेच त्याने केलेल्या वासरांना बळी अर्पण करत
असे. त्याने उंच ठिकाणी बांधलेल्या देवळांसाठी बेथेल
मधले पुरोहितही नेमले.
33अशाप्रकारे यराबामने इस्राएल लोकांसाठी आठव्या
महिन्याचा पंधरावा दिवस सण म्हणून ठरवला. त्यादिवशी
बेथेलमधल्या वेदीवर तो यज्ञ करत असे आणि धूप जाळत
असे.

## बेथेलविरुध्द देववाणी

13 परमेश्वराने आपल्या एका संदेष्ट्याला (देवाच्या
माणसाला) यहूदाहून बेथेल नगरीला पाठवले.
तो तेथे पोहोंचला तेव्हा राजा यराबाम वेदी पुढे धूप जाळत
होता. 2परमेश्वराने या संदेष्ट्याला वेदीविरुध्द बोलायची
आज्ञा केली होती त्याप्रमाणे तो म्हणाला,
"हे वेदी, परमेश्वराचे म्हणणे असे आहे. 'दावीदाच्या
कुळात योशीया नावाचा मुलगा जन्माला येईल. हे याजक
सध्या उंचवट्यावरील ठिकाणी पूजा करत आहेत. पण हे
वेदी, योशीया त्यांचेच देह तुला अर्पण करील. योशीया त्या
याजकांचा वध करील. आत्ता ते तुझ्यावर धूप जाळत
आहेत खरे पण योशीया, मानवी अस्थी तुझ्यावर जाळील.
मग तू निरुपयोगी ठरशील.'"
3हे निश्चित घडेल याचीही संदेष्ट्याने लोकांना चुणूक
दाखवली. तो म्हणाला, "परमेश्वराने सांगितले त्याची ही
साक्ष ही वेदी तडकेल आणि तिच्यावरची राख खाली
ओघळेल, असे परमेश्वराने सांगितले आहे."
4यराबाम राजाने संदेष्ट्याचे हे वेदीबद्दलचे बोलणे
बेथेलमध्ये ऐकले. तेव्हा वेदीवरील आपला हात उचलून
राजाने त्या माणसाकडे निर्देश करत म्हटले, "पकडा
त्याला" पण हे बोलत असताना राजाचाच हात लूळा
पडला. त्याला तो हलवता येईना 5तसेच, वेदी भंग पावली.
त्यावरील राख जमिनीवर पडली. संदेष्ट्याच्या तोंडून देवच
बोलत होता याचा तो पुरावाच होता. 6तेव्हा राजा यराबाम
त्या संदेष्ट्याला म्हणाला, "माझा हात बरा व्हावा म्हणून तू
कृपया तुझ्या परमेश्वर देवाची प्रार्थना कर."
तेव्हा त्याने देवाजवळ तशी विनंती केली आणि राजाचा
हात बरा झाला. राजाचा हात मग पूर्ववत झाला. 7राजा
त्या संदेष्ट्याला म्हणाला, "माझ्या बरोबर घरी चल.
काहीतरी खा मग मी तुला इनाम देईन."
8पण हा संदेष्ट्या म्हणाला, "अर्धे राज्य मला देऊ केलेस
तरी मी तुझ्याबरोबर घरी येणार नाही. इथे मी अन्नपाणी
घेणार नाही. 9काहीही न खाण्यापिण्याबद्दल परमेश्वराने
मला बजावले आहे. तसेच, येताना ज्या रस्त्याने आलो
त्याने परत जायचे नाही अशीही त्याची आज्ञा आहे."
10त्या प्रमाणे तो वेगळ्या रस्त्याला लागला. बेथेलला येताना
ज्या रस्त्याने आला त्याने तो गेला नाही. 11बेथेल नगरात
एक वृध्द संदेष्टा राहात होता. त्याच्या मुलांनी त्याला या
संदेष्ट्याने बेथेल मध्ये काय केले ते येऊन सांगितले.
यराबामला तो संदेष्टा काय म्हणाला तेही त्यांनी सांगितले.
12तेव्हा वृध्द संदेष्टा म्हणाला, "कोणत्या रस्त्याने तो
परतला?" तेव्हा मुलांनी आपल्या वडीलांना यहूदाच्या
संदेष्ट्याचा मार्ग दाखवला.
13त्या वृध्द संदेष्ट्याने मुलांना गाढवावर खोगीर
चढवायला सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी केल्यावर संदेष्टा
गाढवावरुन निघाला.
14हा वृध्द संदेष्टा त्या देवाच्या माणसाच्या मागावर
निघाला. तेव्हा तो एका वृक्षाखाली बसलेला आढळला.
वृध्द संदेष्ट्याने त्याला विचारले, "तूच का तो यहूदाहून
आलेला देवाचा माणूस?" (संदेष्टा)
यावर त्याने होकार दिला.
15तेव्हा वृध्द संदेष्टा म्हणाला, "माझ्याबरोबर घरी चल
आमच्याकडे जेव."
16पण हा देवाचा माणूस म्हणाला, "तुझ्याबरोबर मी
येऊ शकणार नाही. तसेच तेथे खाऊपिऊ शकणार नाही
17'तेथे काही खायचे प्यायचे नाही आणि गेलास त्या रस्त्याने
परतायचे नाही असे परमेश्वराने मला सांगितले आहे.'"
18यावर तो वृध्द संदेष्टा म्हणाला, "मीही तुझ्याप्रमाणेच
एक संदेष्टा आहे." आणि पुढे त्याने खोटेच सांगितले,
"मला नुकतेच परमेश्वराच्या दूताचे दर्शन झाले. त्याने
तुला माझ्या घरी घेऊन यायला आणि खाऊपिऊ घालायला
मला सांगितले आहे."
19तेव्हा तो देवाचा माणूस वृध्द संदेष्ट्याच्या घरी गेला
आणि तेथे त्याने जेवणखाण केले. 20ते मेजावर बसलेले
असताना परमेश्वर वृध्द संदेष्ट्याशी बोलला. 21वृध्द संदेष्टा
या यहूदातील देवाच्या माणासाला म्हणाला, "तू
परमेश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन केले आहेस असे परमेश्वर
म्हणाला, तू त्याच्या आज्ञेप्रमाणे वागला नाहीस.
22येथे काहीही खायला प्यायला परमेश्वराने तुला सक्त,
मनाई केली होती. तरी तू इथे आलास आणि जेवलास.
तेव्हा तुझे आता तुझ्या कुटुंबियाबरोबर दफन होणार नाही."
23या देवाच्या माणसाचे खाणे पिणे झाल्यावर वृध्द
संदेष्ट्याने त्याच्या गाढवावर खोगीर घातले आणि हा
यहूदाचा संदेष्टा (देवाचा माणूस) निघाला. 24परतीच्या
वाटेवर एका सिंहाने त्याच्यावर हल्ला चढवला आणि
त्याला मारून टाकले. देवाच्या माणसाचा मृतदेह रस्त्यातच
पडला होता. गाढव आणि सिंह त्याच्या प्रेताशेजारीच होते.
25इतर वाटसरूनी ते प्रेत आणि जवळ उभा राहिलेला
सिंह हे पाहिले. तेव्हा ती माणसे गावात आली आणि
त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेली ही घटना वृध्द
संदेष्ट्याला सांगितली.
26वृध्द संदेष्ट्याने या देवाच्या माणसाला फसवून
आणले होते. तेव्हा हे सर्व ऐकून तो म्हणाला, "असा हा
देवाचा माणूस. त्याने परमेश्वराचे म्हणणे ऐकले नाही.
तेव्हा परमेश्वरानेच त्याला मारायला सिंहाची

योजना केली. असे होणार असे परमेश्वराने सांगितले
होते."
27मग हा संदेष्टा आपल्या मुलांना म्हणाला, "माझ्या
गाढवावर खोगीर घाला." मुलांनी त्याचे ऐकले. 28तेव्हा
तो निघाला आणि वाटेवरच्या मृतदेहापाशी आला. सिंह
आणि गाढव अजूनही तिथेच होते. सिंहाने आपल्या भक्ष्याला
तोंड लावले नव्हते की गाढवाला इजा केली नव्हती.
29वृध्द संदेष्ट्याने तो मृतदेह गाढवावर ठेवला आणि
मृत्यूबद्दल शोक करायला आणि देहाचे दफन करायला
तो गावात आणला. 30त्याने तो आपल्याच घराण्याच्या
दफनभूमीत पुरला. त्याच्यासाठी शोक प्रकट केला. तो
म्हणाला, "माझ्या भावासारखाच तू मला होतास. मला
फार वाईट वाटते." 31मग त्याने त्याचे दफन केले. आपल्या
मुलांना तो म्हणाला, "मी मरण पावल्यावर माझेही याच
ठिकाणी दफन करा. माझ्या अस्थी याच्याशेजारीच विसावू
द्या. 32परमेश्वराने त्याच्या तोंडून वदवलेले सर्व प्रत्यक्षात
येईल. बेथेलची वेदी आणि शोमरोनच्या नगरातील उंच
देवळांबद्दल त्याने सांगितलेले खरे होईल."
33राजा यराबाममध्ये काहीही फरक पडला नाही. तो
दुष्कृत्ये करतच राहिला. वेगवेगळ्या कुळांमधल्या
माणसांची तो पुरोहित म्हणून निवड करत राहिला. हे
पूरोहित उंच देवळांमध्ये पूजा करत. ज्याला हवे त्याला
पुरोहित बनता येई. 34या पापामुळेच त्याच्या राज्याचा
सर्वनाश ओढवला.

## यराबामच्या मुलाचा मृत्यू

14 याच सुमारास यराबामचा मुलगा अबीया आजारी
पडला. 2तेव्हा यराबाम आपल्या बायकोला
म्हणाला, "तू शिलो येथे जाऊन तिथल्या अहीया या
संदेष्ट्याला भेट. मी इस्राएलचा राजा होणार हे भाकित
त्यानेच केले होते. तसेच वेष पालटून जा म्हणजे लोक
तुला माझी पत्नी म्हणून ओळखणार नाहीत. 3संदेष्ट्याला
तू दहा भाकरी, काही गोड पुऱ्या आणि मधाचा बुधला दे.
मग आपल्या मुलाबद्दल विचार. अहीया तुला काय ते
सांगेल."
4मग राजाने सांगितल्यावरुन त्याची बायको शिलोला
अहीया या संदेष्ट्याच्या घरी गेली. अहीया खूप वृध्द झाला
होता आणि म्हातारपणामुळे त्याला अंधत्वही आले होते.
5पण परमेश्वराने त्याला सूचना केली, "यराबामची बायको
आपल्या मुलाबद्दल विचारायला तुझ्याकडे येते आहे. तिचा
मुलगा फार आजारी आहे." मग अहीयाने तिला काय
सांगायचे तेही परमेश्वराने त्याला सांगितले.
यराबामची बायको अहीयाच्या घरी आली. लोकांना
कळू नये म्हणून तिने वेष पालटला होता. 6अहीयाला
दारात तिची चाहूल लागली तेव्हा तो म्हणाला, "यराबामची
बायको ना तू? आत ये आपण कोण ते लोकांनी ओळखू
नये म्हणून का धडपड करतेस? मला एक वाईट गोष्ट
तुझ्या कानावर घालायची आहे. 7परत जाशील तेव्हा
इस्राएलचा परमेश्वर देव काय म्हणतो ते यराबामला सांग.
परमेश्वर म्हणतो, 'अरे यराबाम, इस्राएलच्या समस्त प्रजेतून
मी तुझी निवड केली. तुझ्या हाती त्यांची सत्ता सोपवली.
8याआधी इस्राएलवर दावीदाच्या घराण्याचे राज्य होते. पण
त्यांच्या हातून ते काढून घेऊन मी तुला राजा केले. पण
माझा सेवक दावीद याच्यासारखा तू निघाला नाहीस तो
नेहमी माझ्या आज्ञेप्रमाणे वागत असे. मन:पूर्वक मलाच
अनुसरत असे. मला मान्य असलेल्या गोष्टीच तो करी.
9पण तुझ्या हातून अनेक पातके घडली आहेत. तुझ्या
आधीच्या कोणत्याही सत्ताधीशापेक्षा ती अधिक गंभीर
आहेत. माझा मार्ग तू केव्हाच सोडून दिला आहेस. तू
इतर देवदेवतांच्या मूर्ती केल्यास याचा मला खूप राग
आला आहे.
10तेव्हा यराबाम, तुझ्या घरात मी आता संकट निर्माण
करीन. तुझ्या घरातील सर्व पुरुषांचा मी वध करीन.
आगीत गवताची काडीही शिल्लक राहात नाही त्याप्रमाणे
मी तुझ्या घराण्याचा समूळ उच्छेद करीन. 11तुझ्या
घरातल्या ज्याला गावात मरण येईल त्याला कुत्री खातील
आणि शेतात, रानावनात मरणारा पक्ष्यांचे भक्ष्य होईल.
परमेश्वर हे बोलला आहे."
12अहीया संदेष्टा मग यराबामच्या बायकोशी बोलत
राहीला. त्याने तिला सांगितले, "आता तू घरी परत जा. तू
गावात शिरल्याबरोबर तुझा मुलगा मरणार आहे. 13सर्व
इस्राएल लोक त्याच्यासाठी शोक करतील आणि त्याचे
दफन करतील. ज्याचे रीतसर दफन होईल असा
यराबामच्या घराण्यातला हा एवढाच कारण फक्त
त्याच्यावरच इस्राएलचा देव परमेश्वर प्रसन्न आहे.
14परमेश्वर इस्राएलवर नवीन राजा नेमील. तो
यराबामच्या कुळाचा सर्वनाश करील. हे सगळे लौकरच
घडेल. 15मग परमेश्वर इस्राएलला चांगला तडाखा देईल.
इस्राएल लोक त्याने भयभीत होतील. पाण्यातल्या
गवतासारखे कापतील. इस्राएलच्या पूर्वजांना परमेश्वराने
ही चांगली भूमी दिली. तिच्यातून या लोकांना उपटून
परमेश्वर त्यांना युफ्राटिस नदीपलीकडे विखरुन टाकील.
परमेश्वर आता त्यांच्यावर भयंकर संतापलेला आहे,
म्हणून तो असे करील. अशेरा देवीचे स्तंभ त्यांनी उभारले
याचा त्याला संताप आला.
16आधी यराबामच्या हातून पाप घडले. मग त्याने इस्राएल
लोकांना पापाला उद्युक्त केले. तेव्हा परमेश्वर त्यांना
पराभूत करील."
17यराबामची बायको तिरसा येथे परतली. तिने घरात
पाऊल टाकताक्षणीच तिचा मुलगा वारला. 18सर्व इस्राएल
लोकांना त्याच्या मृत्यूचे दु:ख झाले. त्यांनी त्याचे दफन
केले. या गोष्टी परमेश्वराच्या भाकिताप्रमाणेच घडल्या.
हे वर्तवण्यासाठी त्याने त्याचा सेवक अहीया या संदेष्ट्याची
योजना केली होती. 19राजा यराबामने आणखीही बऱ्याच

गोष्टी केल्या लढाया केल्या, लोकांवर तो राज्य करत
राहिला. इस्राएलच्या राजांचा इतिहास या ग्रंथात, त्याने जे
जे केले त्याची नोंद आहे. 20बावीस वर्षे तो राजा म्हणून
सत्तेवर होता. नंतर तो मृत्यू पावला आणि आपल्या
पूर्वजांबरोबर त्याचे दफन झाले. त्याचा मुलगा नादाब
त्याच्यानंतर सत्तेवर आला.

21शलमोनाचा मुलगा रहबाम यहूदाचा राजा झाला तेव्हा
तो एक्के चाळीस वर्षाचा होता. यरुशलेममध्ये त्याने सतरा
वर्षे राज्य केले. परमेश्वराने स्वत:च्या सन्मानासाठी या
नगराची निवड केली होती. इस्राएलमधल्या इतर
नगरांमधून त्याने हेच निवडले होते. रहबामच्या आईचे
नाव नामा. ती अम्मोनी होती.

22यहूदाच्या लोकांच्या हातूनही अपराध घडले आणि
परमेश्वराने जे करु नका म्हणून सांगितले ते त्यांनी
केले. परमेश्वराचा कोप होईल अशा चुका त्यांच्या हातून
होतच राहिल्या. त्यांच्या पूर्वजांच्या पापांपेक्षाही त्यांची पापे
वाईट होती. 23या लोकांनी उंचवट्यावरील देऊळे, दगडी
स्मारके आणि स्तंभ उभारले. खोट्यानाट्या दैवतासाठी हे
सारे होते. प्रत्येक टेकडीवर आणि हिरव्यागार वृक्षाखाली
त्यांनी या गोष्टी बांधल्या.

24परमेश्वराच्या पूजेचा एक भाग म्हणून लैंगिक
उपभोगासाठी शरीरविक्रय करणारेही होते. अशी अनेक
दुष्कृत्ये यहूदाच्या लोकांनी केली. या प्रदेशात याआधी जे
लोक राहात असत तेही अशाच गोष्टी करत. म्हणून
देवाने त्यांच्याकडून तो प्रदेश काढून घेऊन इस्राएलच्या
लोकांना दिला होता.

25रहबामच्या कारकिर्दीचे पाचवे वर्ष चालू असताना
मिसरचा राजा शिशक याने यरुशलेमवर स्वारी केली.
26त्याने परमेश्वराच्या मंदिरातील आणि महालातील
खजिना लुटला. अरामचा राजा हददेजर याच्या
सैनिकांकडून दावीदाने ज्या सोन्याच्या ढाली आणल्या होत्या
त्याही त्याने पळवल्या. दावीदाने त्या यरुशलेममध्ये ठेवल्या
होत्या. सोन्याच्या सगळ्या ढाली शिशकने नेल्या. 27मग
रहबामने त्यांच्या ऐवजी दुसऱ्या ढाली केल्या, पण या मात्र
पितळी होत्या, सोन्याच्या नव्हत्या. महालाच्या दरवाजावर
रखवाली करणाऱ्यांना त्याने त्या दिल्या. 28राजा
परमेश्वराच्या मंदिरात जात असे तेव्हा प्रत्येक वेळी हे
शिपाई बरोबर असत. ते या ढाली वाहात आणि काम
झाल्यावर त्या ढाली ते परत आपल्या ठाण्यात भिंतीवर
लटकावून ठेवत.

29‘यहूदाच्या राजांचा इतिहास’ या ग्रंथात राजा रहबामच्या
सर्व गोष्टींची नोंद आहे. 30रहबाम आणि यराबाम यांचे
परस्परांत अखंड युध्द चाललेले होते.

31रहबाम वारला आणि त्याचे आपल्या पूर्वजांबरोबर
दफन झाले. दावीद नगरात त्याला पुरले. (याची आई
नामा ती अम्मोनी होती)

रहबामचा मुलगा अबीया नंतर राज्यावर आला.

## यहूदाचा राजा अबीया

15 नबाटाचा मुलगा यराबाम इस्राएलवर राज्य करत
होता. त्याच्या राजेपणाच्या कारकिर्दीचे अठरावे
वर्ष चालू असताना, त्याचा (रहबामचा) मुलगा अबीया
यहूदाचा पुढचा राजा झाला. 2अबीयाने तीन वर्षे राज्य
केले. याच्या आईचे नाव माका ही अबीशालोमची मुलगी.

3आपल्या वडीलांच्याच पापांची उजळणी याने केली.
आपले आजोबा दावीद यांच्याप्रमाणे तो परमेश्वर देवाशी
एकनिष्ठ नव्हता. 4दावीदावर परमेश्वराचे प्रेम होते.
त्याखातर त्याने अबीयाला यरुशलेमचे राज्य दिले.
परमेश्वराच्या कृपेने त्याला मुलगाही झाला यरुशलेमला
परमेश्वर दयेने सुरक्षिततताही लाभली. हे सर्व दावीदासाठीच
परमेश्वराने केले. 5दावीदाचे वर्तन परमेश्वराच्या
इच्छेनुसार, योग्य असेच होते. त्याने परमेश्वराच्या आज्ञांचे
नेहमीच पालन केले. उरीया हित्तीबद्दल घडलेले चुकीचे
वर्तन एवढाच काय तो अपवाद.

6रहबाम आणि यराबाम नेहमीच एकमेकांविरुध्द लढत
असत. 7अबीयाने आणखी जे काही केले त्याची नोंद
‘यहूदाच्या राजांचा इतिहास’ या पुस्तकात आहे.

अहीयाच्या संपूर्ण कारकिर्दीत अहीया आणि यराबाम
यांच्यात लढाई चालू असे. 8अबीयाला त्याच्या मृत्यूनंतर
दावीद नगरात पुरले. त्याचा मुलगा आसा राज्य करु
लागला.

## यहूदाचा राजा आसा

9यराबामच्या इस्राएलवरील राज्याच्या विसाव्या वर्षी
आसा यहूदाचा राजा झाला 10आसाने यरुशलेमवर
एक्के चाळीस वर्षे राज्य केले. त्याच्या आजीचे नाव माका.
ती अबीशालोमची मुलगी.

11आपला पूर्वज दावीद याच्या प्रमाणेच परमेश्वराच्या
मते जे योग्य तेच आसाने केले. 12त्याकाळी दैवतांच्या
नावाखाली शरीरविक्रय करणारे पुरुष होते. आसाने त्यांना
देशत्याग करायला लावले. तसेच त्याने आपल्या
वाडवडीलांनी केलेल्या मूर्तीही हलवल्या. 13आपली आजी
माका हिला आसाने राणी, होण्यापासून दूर केले. अंमगळ
दैवत अशेरा हिची एक मूर्ती या आजीनेही केली होती.
आसाने त्या मूर्तीची मोडतोड केली. किद्रोन खोऱ्यात ती
जाळून टाकली. 14उंचवट्यावरील पूजास्थळांची त्याने
नासधूस केली नाही, मात्र आयुष्यभर तो परमेश्वराशी
एकनिष्ठ राहिला.

15आसा आणि त्याचे वडील यांनी परमेश्वरासाठी काही
वस्तू करुन घेतल्या होत्या. सोन्याचांदीच्या वस्तू आणि
आणखी काही गोष्टी त्यात होत्या. त्या सर्व त्याने व्यवस्थित
मंदिरात जमा केल्या.

16आसा यहूदावर राज्य करीत असेपर्यंत इस्राएलचा
राजा बाशा याच्याशी त्याच्या लढाया चालत. 17बाशाने
यहूदावर चढाया केल्या. आसाच्या प्रदेशातील लोकांचे

येणेजाणे त्याला थांबवायचे होते. त्यामुळे रामा नगर त्याने
चांगले मजबूत केले. 18आसाने मग परमेश्वराच्या
मंदिराच्या खजिन्यातले आणि महालातले सोनेनाणे काढून
घेतले. आपल्या सेवकांच्या हाती ते सोपवून त्यांना त्याने
अरामचा राजा बेन हदाद यांच्याकडे पाठवले. बेनहदाद
हा तब्रिम्मोनचा मुलगा आणि तब्रिम्मोन हेज्योनचा.
बेनहदादची राजधानी दिमिष्क होती. 19आसाने आपल्या
संदेशात म्हटले होते, “माझे वडील आणि तुझे वडील
यांच्यात शांततेचा करार झाला होता. आता मला तुझ्याशी
करार करायचा आहे. तुला मी हा सोन्यारुप्याचा नजराणा
पाठवत आहे. इस्राएलचा राजा बाशा याच्याशी झालेल्या
कराराचा तू भंग कर म्हणजे तो माझ्या प्रदेशातून निघून
जाईल.”

20राजा बेनहदाद याने आसाशी करार केला आणि
इयोन, दान, आबेल-बेथ माका, गालिल सरोवरालगतची
गावे आणि नफतालीचा प्रांत यांच्यावर चढाई करायला
आपले सैन्य पाठवले. 21या हल्ल्याची बातमी बाशाच्या
कानावर गेली. तेव्हा त्याने रामा नगराच्या मजबुतीचे
काम सोडले, ते गाव सोडले आणि तिरसा या ठिकाणी तो
परतला. 22मग आसा राजाने यहूदातील सर्व प्रजेला
मदतीसाठी पाचारण केले एकही जण त्यातून सुटला नाही.
ते सर्व रामा येथे गेले. तिथून त्यांनी बाशाची दगड, लाकूड
वगैरे सर्व बांधकामसामग्री आणली. बन्यामीनमधील मेबा
आणि मिस्पा येथे हे सर्व सामान त्यांनी वाहून नेले. आसाने
ही नगरे चांगली भक्क म केली.

23आसाबद्दलच्या इतर गोष्टी, त्याचे पराक्रम, त्याने
बांधलेली नगरे या सगळ्यांची माहिती ‘यहूदाच्या राजांच्या
इतिहास’ या पुस्तकात लिहिलेली आहे. म्हातारपणी
आसा पायाच्या दुखण्याने बेजार झाला. 24त्याचे निधन
झाल्यावर त्याच्या पूर्वजांच्या दावीदनगरात त्याचे दफन
झाले. त्याच्यानंतर त्याचा मुलगा यहोशाफाट राज्य करु
लागला.

## इस्राएलचा राजा नादाब

25यहूदाचा राजा म्हणून आसाचे दुसरे वर्ष चालू असताना
यराबामचा मुलगा नादाब इस्राएलचा राजा झाला. त्याने
इस्राएलवर दोन वर्षे राज्य केले. 26नादाबने
परमेश्वरविरोधी कृत्ये केली. आपले वडील यराबाम
यांच्यासारखीच दुष्कृत्ये त्याने केली यराबामने इस्राएल
लोकांनाही पाप करायला लावले होते.

27बाशा हा अहीयाचा मुलगा. हे इस्साखारच्या
वंशातले. बाशाने नादाब राजाला मारायचा कट केला.
नादाब आणि इस्राएल लोक गिब्बथोन या पलिष्ट्यांच्या
नगराला वेढा घालत होते तेव्हाची ही गोष्ट आहे. बाशाने
या ठिकाणी नादाबला ठार केले. 28आसाचे हे यहूदाचा
राजा म्हणून तिसरे वर्ष होते. मग बाशा इसाएलचा राजा
झाला.

## इस्राएलचा राजा बाशा

29बाशा राजा झाल्यावर त्याने यराबामच्या कुळातील
सर्वांना ठार केले. कोणाचीही त्याने गय केली नाही.
शिलोचा संदेष्टा अहीया याच्यामार्फत परमेश्वराने जी
भविष्यवाणी केली होती तसेच हे झाले. 30राजा यराबामने
बरीच पापे केली होती, तसेच इस्राएल लोकांनाही ती
करायला लावली म्हणून हे घडले. इस्राएलचा परमेश्वर
देव याचा यराबामवर कोप झाला.

31‘इस्राएलच्या राजांचा इतिहास’ या पुस्तकात नादाबचे
इतर पराक्रम नोंदलेले आहेत. 32बाशा इस्राएलवर राज्य
करत असताना यहूदाचा राजा आसा याच्याशी त्याचे
सर्वकाळ युध्द चालले होते.

33आसाच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी अहीयाचा
मुलगा बाशा हा इस्राएलचा राजा झाला. तिरसामध्ये राहून
त्याने चोवीस वर्षे राज्य केले. 34पण परमेश्वराच्या मते
जे गैर ते त्याने केले. आपले वडील यराबाम यांनी केली
तीच पातके बाशानेही केली. यराबामने इस्राएल लोकांनाही
पापे करायला लावली होती.

16 यानंतर परमेश्वर हनानीचा मुलगा येहू याच्याशी
बोलला. हे बोलणे राजा बाशा याच्याविरुध्द होते.
2“तुला मी मोठे केले. माझ्या इस्राएली लोकांचा नायक
म्हणून तुला मी नेमले. पण तू यराबामच्या वाटेनेच गेलास.
इस्राएलींच्या पापाला कारणीभूत झालास. त्यांच्या पातकांनी
माझा क्रोध जागा झाला आहे. 3तेव्हा बाशा, मी तुझा
आणि तुझ्या कुटुंबाचा नाश करणार आहे. नबाटाचा मुलगा
यराबाम याच्या घराण्याचे केले तसेच मी तुझ्या बाबतीत
करीन. 4तुझ्या कुटुंबातील लोक नगरातल्या रस्त्यावर
मरतील. कुत्री त्यांची प्रेते खातील. जे रानावनात मरतील
ते पक्ष्यांचे भक्ष्य होतील.”

5इस्राएलच्या राजांचा इतिहास या ग्रंथात बाशाच्या इतर
पराक्रमांची हकीकत लिहीली आहे. 6बाशाच्या मृत्यूनंतर
तिरसा येथे त्याचे दफन झाले. त्याचा मुलगा एला हा
त्याच्यानंतर राज्य करु लागला.

7तेव्हा परमेश्वराने येहू या संदेष्ट्याला संदेश दिला. हा
संदेश बाशा आणि त्याचे कुटुंबीय यांच्या विरुध्द होता.
बाशाने परमेश्वराविरुध्द बरीच पापे केली होती. त्याचा
परमेश्वराला फार संताप आला होता. आधी यराबामच्या
कुटुंबाने केले तेच बाशाने केले. बाशाने यराबामच्या
कुळाचा संहार केला म्हणूनही परमेश्वराचा कोप झाला
होता.

## इस्राएलचा राजा एला

8यहूदाचा राजा म्हणून आसाचे सव्विसावे वर्ष चालू
असताना एला हा राजा झाला. एला हा बाशाचा मुलगा
तिरसामध्ये त्याने दोन वर्षे राज्य केले.

9जिम्री हा एला राजाचा अधिकारी होता. एलाच्या एकूण
रथांपैकी अर्धे जिम्रीच्या ताब्यात होते. तरीही त्याने

एलाविरुध्द कट केला. एला राजा तिरसा येथे अरसाच्या
घरी मद्याच्या धुंदीत होता. अरसा हा तिरसा येथील
महालावरचा मुख्य अधिकारी होता. 10जिम्रीने सरळ घरात
घुसून एला राजाला ठार केले. आसाचे हे यहूदाचा राजा
म्हणून सत्ताविसावे वर्ष होते. एलानंतर हा जिम्री इस्राएलचा
राजा झाला.

## इस्राएलचा राजा जिम्री

11जिम्रीने राज्यावर आल्याबरोबर बाशाच्या घरातील
सर्वांची हत्या केली. कोणालाही जिवंत ठेवले नाही.
बाशाच्या मित्रांनाही त्याने ठार केले. 12बाशाबद्दल येहू या
संदेष्ट्यामार्फत परमेश्वराने जी भविष्यवाणी उच्चारली
त्याप्रमाणेच बाशाच्या घराण्याचा उच्छेद झाला 13बाशा
आणि त्याचा मुलगा एला यांच्या पापांमुळे हे झाले. त्यांनी
स्वत: पापे केली आणि लोकांच्या पापांनाही ते कारण
झाले. त्यांनी अनेक मूर्ती केल्यामुळे परमेश्वराचा कोप
झाला.

14इस्राएलच्या राजांचा इतिहास या ग्रंथात एलाच्या
बाकीच्या गोष्टी आलेल्या आहेत.

15आसाचे यहूदाचा राजा म्हणून सत्ताविसावे वर्ष असताना
जिम्री इस्राएलचा राजा झाला. जिम्रीने तिरसा येथे सात
दिवस राज्य केले. त्याचे असे झाले, इस्राएलच्या सैन्याने
पलिष्ट्यांच्या गिब्बथोन येथे तळ दिला होता. ते चढाई
करण्याच्या तयारीत होते. 16जिम्रीने राजाविरुध्द केलेल्या
कारस्थानाची माहिती छावणीतल्या लोकांनी ऐकली. त्याने
राजाचा वध केल्याचे त्यांना कळले. तेव्हा त्यांनी अम्री
याला तिथल्या तिथे राजा केले. अम्री सेनापती होता.
17तेव्हा अम्री आणि सर्व इस्राएली यांनी गिब्बथोन सोडून
तिरसावर हल्ला केला. 18नगर कब्जात घेतलेले जिम्रीने
पाहिले. तेव्हा तो महालात घुसला आणि त्याने आग लावली.
महाल आणि तो, दोघेही आगीत भस्मसात झाले. 19आपल्या
पापांमुळेच तो मेला. परमेश्वराच्या दृष्टीने जे गैर ते त्याने
केले. यानेही यराबामप्रमाणेच दुष्कृत्ये केली. इस्राएलच्या
लोकांच्या पापांनाही यराबाम कारणीभूत झाला.

20इस्राएलच्या राजांचा इतिहास या ग्रंथात जिम्रीच्या
कारस्थानांची आणि बाकीच्या गोष्टींची माहिती आहे. एला
राजाविरुध्द तो बंड करुन उठला तेव्हाची हकीकतही या
पुस्तकात आहे.

## इस्राएलचा राजा अम्री

21इस्राएलच्या लोकांमध्ये दोन गट पडलेले होते. अर्धे
लोक गिनथचा मुलगा तिब्री याच्या बाजूचे असून त्याला
राजा करावे अशा मताचे होते. उरलेले अम्रीचे चाहते
होते. 22तिब्रीच्या बाजूला असलेल्या गटापेक्षा अम्रीला
पाठिंबा देणाऱ्यांचा गट वरचढ होता. त्यामुळे तिब्री मारला
गेला आणि अम्री राजा झाला. 23यहूदाचा राजा आसा
याला सत्तेवर आल्यावर एकतिसावे वर्ष चालू असताना
अम्री इस्राएलचा राजा झाला. अम्रीने इस्राएलवर बारा वर्षे
राज्य केले. त्यापैकी सहा वर्षे तो तिरसामध्ये होता. 24त्याने
शोमरोन टेकडी शेमर याच्याकडून सुमारे दीडशे पौंड
चांदी देऊन विकत घेतली. या टेकडीवर त्याने नगर
बांधले. शेमर या नावावरुनच त्याने नगराचे नाव शोमरोन
ठेवले.

25अम्रीच्या हातूनही परमेश्वराच्या दृष्टीने गैर गोष्टी
घडल्या. आपल्या आधीच्या सर्व राजांपेक्षा हा वाईट होता.
26नबाटाचा मुलगा यराबाम याने जी पापे केली तीच यानेही
केली. यराबामने इस्राएल लोकांनाही पापे करायला
लावली. त्यामुळे इस्राएलवर परमेश्वर देवाचा कोप
ओढवला. दीडदमडीच्या दैवतांची त्याने पूजा केली म्हणून
परमेश्वर संतापला.

27अम्रीच्या इतर गोष्टी आणि त्याचे पराक्रम याची
हकीकत इस्राएलच्या राजांचा इतिहास या ग्रंथात लिहिलेली
आहे.

28अम्री मरण पावल्यावर त्याचे शोमरोन येथे दफन
झाले. त्याच्यानंतर त्याचा मुलगा अहाब हा राज्य करु
लागला.

## इस्राएलचा राजा अहाब

29यहूदाचा राजा आसा याच्या कारकिर्दीच्या
अडतिसाव्या वर्षी अम्रीचा मुलगा अहाब इस्राएलचा
राजा झाला. शोमरोन या नगरातून त्याने इस्राएलवर
बावीस वर्षे राज्य केले. 30परमेश्वराने जे चुकीचे म्हणून
सांगितले होते, ते सर्व अहाबने केले. आपल्या आधीच्या
राजांपेक्षाही हा दुर्वर्तनी होता. 31नबाटाचा मुलगा यराबाम
याने केले ते तर अहाबने केलेच, पण ते पुरेसे वाटले
नाही म्हणून की काय त्याने आणखी ही दुष्कृत्ये
केली. एथबाल याची मुलगी ईजबेल हिच्याशी त्याने लग्न
केले. एथबाल हा सिदोन्यांचा राजा होता. त्यानंतर अहाब
बाल या दैवताच्या भजनी लागला. 32शोमरोन येथे त्याने
बालच्या पूजेसाठी देऊळ बांधले. वेदीही बांधली.
33अशेराच्या पूजेसाठी स्तंभ उभारला. आपल्या आधींच्या
राजापेक्षा याच्यावर इस्राएलच्या परमेश्वर देवाचा कोप
जास्त झाला.

34याच काळात बेथेलच्या हिएलने यरीहो नगर पुन्हा
बांधले. हे काम त्याने सुरु केले तेव्हा त्याचा मोठा मुलगा
अबीराम वारला. आणि नगराचे दरवाजे बांधून होत आले
तेव्हा त्याचा सर्वात धाकटा मुलगा सगूब हा वारला.
नूनचा मुलगा यहोशवा याच्यामार्फत परमेश्वराने जे
भाकित केले त्यानुसार हे घडले.*

---

**नूनचा मुलगा ... हे घडले** यहोशवाने यरीहोचा विध्वंस केला
तेव्हा तो म्हणाला होता की, जो पुन्हा हे नगर बांधील त्याचा
सर्वांत मोठा आणि सर्वांत धाकटा अशी मुले प्राणाला मुकतील.
पाहा यहोशवा 6:26.

## एलीया आणि दुष्काळ

17 गिलादमधील तिश्बी या गावात एलीया हा संदेष्टा होता. एलीया अहाब राजाला म्हणाला, "मी इस्राएलच्या परमेश्वर देवाचा सेवक आहे. त्याच्या सामर्थ्यावर मी हे सांगतो की येती काही वर्षे पाऊसच काय दंवसुध्दा पडणार नाही. पाऊस पडलाच तर माझ्या आज्ञेने पडेल."

2मग परमेश्वर एलीयाला म्हणाला, 3"हा भाग सोड आणि पूर्वेला जा. करीथ या ओहोळापाशी लपून राहा. यार्देन नदीच्या पूर्वेला हा ओहोळ आहे. 4त्या ओहोळाचे पाणी तू पी. कावळे तिथे तुला अन्न आणून देतील. त्यांना मी तसे सांगितले आहे." 5तेव्हा एलीया परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे यार्देन नदीच्या पूर्वेला असलेल्या करीथ या ओहोळा जवळ राहायला गेला. 6रोज सकाळ संध्याकाळ त्याला कावळे जेवण आणून देत. ओहोळाचे पाणी एलीया पीत असे.

7पाऊस नव्हताच, तेव्हा काही काळानंतर ओहोळ सुकला. 8तेव्हा परमेश्वर एलीयाला म्हणाला, 9"सिदोनमधील सारफथ येथे जाऊन राहा तेथे एक विधवा राहते. तिला मी तुला अन्न द्यायला सांगितले आहे."

10तेव्हा एलीया सारफथ येथे गेला. तो वेशीजवळ जातो तर त्याला एक बाई भेटली. ती विधवा होती. ती सरपण गोळा करत होती. एलीया तिला म्हणाला, "मला थोडे पाणी प्यायला मिळेल का?" 11ती पाणी आणायला निघाली तेव्हा एलीया तिला म्हणाला, 'मला एखादा भाकरीचा तुकडाही दिलास तर बरे!"

12तेव्हा ती बाई म्हणाली, "परमेश्वर देवाची शपथ सांगते, माझ्याकडे भाकर अजिबात नाही. थोडेसे पीठ शिल्लक आहे. आणि बरणीच्या तळाला थोडेसे तेल आहे. इथे मी सरपण गोळा करायला आले. ते घेऊन मी घरी जाईन, स्वयंपाक करीन तो शेवटचाच. माझा मुलगा आणि मी जेवू आणि मग भुकेने मरु."

13तेव्हा एलीया तिला म्हणाला, "काही काळजी करु नकोस. घरी जा आणि आत्ता म्हणालीस त्याप्रमाणे स्वयंपाक कर. पण आधी जे पीठ शिल्लक आहे त्याची लहानशी भाकर करुन मला आणून दे मग तुमच्या दोघांचा स्वयंपाक कर. 14इस्राएलचा परमेश्वर देव म्हणाला आहे, "तुझ्या डब्यातील पीठ कधी सरणार नाही. तुझ्या बरणीत नेहमीच तेल असेल. पुन्हा परमेश्वर पृथ्वीवर पाऊस पाडेपर्यंत असे चालेल.'"

15तेव्हा ती घरी गेली. एलीयाच्या सांगण्याप्रमाणे तिने केले. एलीया, ती आणि तिचा मुलगा यांना बरेच दिवसपर्यंत पुरेसे खायला मिळत गेले. 16पीठ आणि तेल कधीच संपले नाही. एलीयाला परमेश्वराने जे सांगितले त्याप्रमाणेच हे घडत गेले.

17काही दिवसांनंतर या बाईचा मुलगा आजारी पडला. त्याचे दुखणे वाढत गेले शेवटी त्याचा श्वास थांबला. 18तेव्हा ती बाई म्हणाली, "एलीया, तू तर संदेष्टा आहेस मला तुझी काही मदत होईल का? की माझ्या पापांची आठवण द्यायलाच तू आला आहेस? की माझ्या मुलाला मारायला आला आहेस?"

19एलीया तिला म्हणाला, "तुझ्या मुलाला माझ्याकडे आण." मग त्याने त्या मुलाला घेतले आणि वरच्या मजल्यावर तो गेला. आपल्या खोलीत, आपल्या बिछान्यावर त्याने त्याला ठेवले. 20एलीयाने मग प्रार्थना केली, "परमेश्वर देवा, या विधवेने मला तिच्या घरी आश्रय दिला आहे. तिच्यावर ही वेळ का आणतोस? तिच्या मुलाला तू मारणार का?" 21मग एलीयाने तीनदा त्याच्यावर पाखर घातल्यासारखे करुन प्रार्थना केली, "परमेश्वर देवा याला वाचव."

22एलीयाच्या हाकेला परमेश्वराने उत्तर दिले. मुलाचा श्वासोच्छवास पुन्हा सुरु झाला तो जिवंत झाला. 23एलीयाने मुलाला खाली आणले. त्याच्या आईकडे त्याला सोपवून एलीया म्हणाला, "बघ, तुझा मुलगा जिवंत आहे."

24ती बाई म्हणाली, "तू खरोखरच देवाचा माणूस आहेस हे मला पटले. खरोखरच परमेश्वर तुझ्यामार्फत बोलतो हे आता मला कळले."

## एलीया आणि बालचे संदेष्टे

18 लागोपाठ तिसऱ्या वर्षी पाऊस पडला नाही तेव्हा परमेश्वर एलीयाला म्हणाला, "अहाब राजाला जाऊन भेट मी लौकरच पाऊस पाडणार आहे." 2तेव्हा एलीया अहाबला भेटायला गेला.

शोमरोनमध्ये तेव्हा अन्नधान्याचे दुर्भिक्ष्य होते. 3अहाब राजाने आपल्या महालाचा प्रमुख ओबद्या याला बोलावणे पाठवले. (ओबद्या परमेश्वराचा खरा अनुयायी होता. 4एकदा ईजबेल परमेश्वराच्या सर्व संदेष्ट्यांना ठार करायला निघाली होती. तेव्हा ओबद्याने शंभर संदेष्ट्यांचे जीव वाचवले. पन्नास जण एका गुहेत, असे दोन गुहांमध्ये त्याने त्यांना लपवले. त्यांच्या अन्नपाण्याची तरतूद केली.) 5अहाब राजा ओबद्याला म्हणाला, "माझ्याबरोबर चल आपण सगळ्या ओहोळझऱ्यांचा शोध घेऊ. आपली खेचरे, घोडी तग धरुन राहतील इतपत चारा शोधून काढू म्हणजे मग आपल्याला आपले पशू मारावे लागणार नाहीत." 6त्या दोघांनी मग आपापसात पाहणी करायच्या प्रदेशाची वाटणी केली आणि सगळा प्रदेश पाण्यासाठी पायाखाली घातला. दोघेजण दोन वाटांनी गेले. 7ओबद्याला वाटेत एलीया भेटला. ओबद्याने त्याला ओळखून अभिवादन केले. ओबद्या त्याला म्हणाला, "एलीया? स्वामी, खरोखर तुम्हीच आहात का?"

8एलीया म्हणाला, "होय, मीच आहे. आता मी इथे असल्याचे आपल्या राजाला जाऊन सांग."

9तेव्हा ओबद्या म्हणाला, "तुमचा ठावठिकाणा मी अहाबला सांगितला तर तो मला मारुनच टाकील. मी

आपला काही अपराध केला नाही, मग तुम्ही माझ्या
जिवावर का उठलात? 10परमेश्वर देवाशपथ, राजा सर्वत्र
तुमचा शोध घेत आहे. त्यासाठी त्याने गावोगाव माणसे
पाठवली आहेत. जेथे जेथे तुम्ही सापडला नाहीत असे
कळले तिथे तिथे त्याने तिथल्या राजांना एलीया इथे नाही
असे शपथेवर सांगायला सांगितले. 11आणि आता तुम्ही
मला म्हणता, जा त्याला जाऊन सांग म्हणून! 12तुम्ही इथे
आहात म्हणून मी अहाब राजाला सांगितले तर परमेश्वराचा
आत्मा तुम्हाला दुसऱ्या एखाद्या ठिकाणी घेऊन जाईल.
अहाब राजाला मग इथे तुम्ही सापडणार नाही. मग तो
माझा जीव घेईल. मी लहानपणापासून देवाविषयी आदर
बाळगून आहे. 13मी काय केले ते तुम्हाला माहीत आहे
ना? ईजबेल परमेश्वराच्या संदेष्ट्यांना मारायला निघाली
होती तेव्हा मी एकेका गुहेत पन्नास असे शंभर संदेष्ट्यांना
दोन गुहांमध्ये लपवले होते. त्यांना खायला प्यायला दिले.
14आणि आता तुम्ही मला राजाला आपली खबर द्यायला
सांगत आहात. तो नि:संशय मला मारणार!”

15यावर एलीया त्याला म्हणाला, “सर्वशक्तिमान
परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो, आज मी राजासमोर
उभा राहाणार आहे, असे मी वचन देतो.”

16तेव्हा ओबद्या राजाकडे गेला. त्याने अहाब राजाला
एलीयाचा ठावठिकाणा सांगितला. राजा एलीयाला
भेटण्यासाठी आला.

17अहाबने एलीयाला पाहिले तेव्हा अहाब त्याला
म्हणाला, ‘इस्राएलला त्रस्त करुन सोडणारा तूच का तो?”

18एलीया यावर म्हणाला, “माझ्यामुळे इस्राएलवर संकट
आलेले नाही. ते तुम्ही आणि तुमचे वडील यांच्यामुळे
उद्भवलेले आहे. परमेश्वराच्या आज्ञा पाळायचे सोडून
तुम्ही इतर अमंगळ दैवतांच्या नादी लागलात तेव्हा हा
त्रास सुरु झाला. 19आता कर्मेल पर्वतावर समस्त इस्राएलींना
जमायला सांग. बालच्या साडेचारशे संदेष्ट्यांनाही तेथे
घेऊन ये. तसेच अशेरा देवीच्या चारशे संदेष्ट्यांनाही.
ईजबेल राणीचा त्या संदेष्ट्यांना पाठिंबा आहे.”

20तेव्हा, सर्व इस्राएलींना आणि संदेष्ट्यांना अहाबने कर्मेल
पर्वतावर बोलावून घेतले. 21एलीया तेथे सर्वसमोर आला
आणि म्हणाला, “कोणाच्या मागे जायचे हे तुम्ही केव्हा
ठरवणार? जर परमेश्वरच खरा देव असेल तर तुम्ही
त्याला अनुसरायला हवे. पण बाल खरा देव असेल तर
त्याला तुम्ही अनुसरा.”

लोक यावर काहीच बोलले नाहीत. 22तेव्हा एलीया
म्हणाला, “परमेश्वराचा संदेष्टा असा इथे मी अगदी एकटाच
आहे. दुसरा कोणीही नाही. पण बालचे चारशेपन्नास संदेष्टे
आहेत. 23तेव्हा दोन गोऱ्हे आणा. बालच्या संदेष्ट्यांनी
त्यातला एक घ्यावा. त्याला मारून त्याचे तुकडे-तुकडे
करावे. मग ते मांस लाकडे रचून त्यावर ठेवावे. विस्तव
मात्र पेटवू नका. दुसऱ्या गोऱ्ह्याचे मी तसेच करीन. मीही
विस्तव पेटवणार नाही. 24तुम्ही बालचे संदेष्टे मिळून तुमच्या
देवाची प्रार्थना करा. मी परमेश्वराची प्रार्थना करीन.
ज्याच्या प्रार्थनेने विस्तव पेटेल तोच खरा देव.”

ही कल्पना सर्व लोकांना पटली.

25मग एलीया बालच्या संदेष्ट्यांना म्हणाला, “तुम्ही
बरेचजण आहात, तेव्हा तुम्हीच आधी सुरुवात करा. एक
गोऱ्हा निवडा आणि आपल्या देवाची नावे घ्यायला लागा.
फक्त विस्तव लावू नका.”

26तेव्हा त्या संदेष्ट्यांनी एक गोऱ्हा घेतला आणि ते
तयारीला लागले. दुपारपर्यंत त्यांनी बालची प्रार्थना केली.
“बाल आमच्या हाकेला ओ दे” अशी त्यांनी विनवणी
केली. पण कसलाही आवाज आला नाही किंवा उत्तर
दिले नाही. आपण रचलेल्या वेदीभोवती ते संदेष्टे नाचले
तरी अग्नी काही प्रज्वलित झाला नाही.

27दुपारी एलीया त्यांची थट्टा करायला लागला. तो त्यांना
म्हणाला, “बाल खरंच देव असेल तर तुम्ही आणखी
मोठ्याने प्रार्थना करा. कदाचित् तो अजून विचारात असेल.
किंवा कदाचित् कामात गुंतलेला असेल. एखादेवेळी
प्रवासात किंवा झोपेत असेल. तेव्हा आणखी मोठ्याने
प्रार्थना करुन त्याला उठवा.” 28तेव्हा त्या सदेष्ट्यांनी
मोठमोठ्याने प्रार्थना केली. भाल्यांनी आणि सुऱ्यांनी
स्वत:वर वार करुन घेतले. (ही त्यांची पूजेची पध्दत
होती) त्यांचे अंग रक्ताळले. 29दुपार उलटली पण लाकडे
पेटली नाहीत. संध्याकाळच्या यज्ञाची वेळ होत आली
तोपर्यंत ते अंगात आल्यासारखे वागत राहिले. पण काहीही
घडले नाही बालकडून प्रतिसाद मिळाला नाही. कुठलाही
आवाज आला नाही. कारण ऐकणारेच कोणी नव्हते!

30मग एलीया सर्व लोकांना उद्देशून म्हणाला, “आता
सगळे माझ्याजवळ या.” तेव्हा सगळे त्याच्याभोवती जमले.
परमेश्वराच्या वेदीची मोडतोड झालेली होती. तेव्हा एलीयाने
आधी ते सर्व नीट केले. 31त्याला बारा दगड मिळाले.
प्रत्येकाच्या नावाचा एकेक याप्रमाणे बारा वंशांचे ते बारा
दगड होते. याकोबच्या बारा मुलांच्या नावाचे ते वंश होते.
याकोबलाच परमेश्वराने ‘इस्राएल’ या नावाने संबोधले
होते. 32परमेश्वराच्या सन्मानार्थ हे दगड वेदीच्या
डागडुजीसाठी एलीयाने वापरले. मग त्याने वेदीभोवती एक
चर खणला. सात गॅलन पाणी मावण्याइतकी त्याची खोली
आणि रूंदी होती. 33एलीयाने मग वेदीवर लाकडे रचली.
गोऱ्हा कापला. त्याचे तुकडे लाकडावर ठेवले. 34मग तो
म्हणाला, “चार घागरी भरून पाणी घ्या आणि ते मांसाच्या
तुकड्यावर आणि खालच्या लाकडांवर ओता.” ते
झाल्यावर दुसऱ्यांदा आणि मग तिसऱ्यांदा त्याने तसेच
करायला सांगितले. 35वेदीवरून वाहात जाऊन ते पाणी
खालच्या चरात साठले.

36दुपारच्या यज्ञाची वेळ झाली. तेव्हा संदेष्टा एलीया
वेदीपाशी गेला आणि त्याने प्रार्थना केली, “परमेश्वरा,
अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्या देवा, तूच इस्राएलचा
देव आहेस हे तू आता सिध्द करुन दाखवावेस अशी माझी

तुला विनंती आहे. हे सर्व तूच माझ्याकडून करवून घेतलेस
हे यांना कळू दे. मी तुझा सेवक आहे हे ही कळू दे. 37हे
परमेश्वरा, माझ्या विनवणीकडे लक्ष दे. तूच खरा परमेश्वर
देव आहेस हे यांना दाखव. म्हणजे तू त्यांना पुन्हा स्वत:जवळ
घेत आहेस हे त्यांना पटेल.”
38तेव्हा परमेश्वराने अग्नी पाठवला. यज्ञ, लाकडे,
दगड, वेदीभोवतीची जमीन हे सर्व पेटले. भोवतीच्या
चरातले पाणी सुध्दा त्या अग्नीने सुकून गेले. 39सर्वांच्या
देखतच हे घडले. तेव्हा लोकांनी जमिनीवर पालथे पडून
“परमेश्वर हाच देव आहे, परमेश्वर हाच देव आहे” असे
म्हटले.
40एलीया म्हणाला, “त्या बालच्या संदेष्ट्यांना पकडून
आणा. त्यांना निसटू देऊ नका” तेव्हा लोकांनी त्या
सगळ्यांना धरले एलीयाने मग त्यांना किशोन झऱ्याजवळ
नेले आणि तेथे सर्व संदेष्ट्यांची हत्या केली.

## पावसाचे आगमन

41एलीया मग अहाब राजाला म्हणाला, “जा, आता तू
तुझे खाणेपिणे उरकून घे कारण खूप जोराचा पाऊस
पडणार आहे” 42तेव्हा आहाब राजा त्यासाठी निघाला.
त्याचवेळी एलीया कर्मेल डोंगराच्या माथ्यावर चढून गेला.
तेथे पोहोंचल्यावर ओणवून, गुडघ्यांत डोके घालून बसला.”
43आणि आपल्या बरोबरच्या सेवकाला म्हणाला,
“समुद्राकडे पाहा.”
समुद्र दिसेल अशा जागी हा सेवक गेला पण परत
येऊन म्हणाला, “तिथे काहीच दिसले नाही” एलीयाने
त्याला पुन्हा जाऊन पाहायला सांगितले. असे सातवेळा
झाले. 44सातव्यांदा मात्र सेवक परत येऊन म्हणाला,
“एक लहानसा, मुठीएवढा ढग मला दिसला. समुद्रावरून
तो येत होता.”
तेव्हा एलीयाने त्या सेवकाला सांगितले, “अहाब राजाकडे
जाऊन त्याला रथात बसून ताबडतोब घरी जायला सांग.
कारण तो आत्ता निघाला नाही तर पावसामुळे त्याला
थांबावे लागेल.”
45पाहता पाहता आकाश ढगांनी भरून गेले. वारा सुटला
आणि मुसळधार पाऊस सुरु झाला. अहाब आपल्या रथात
बसून इज्रेलला परत जायला निघाला. 46यावेळी एलीयात
परमेश्वरी शक्ती संचारली. धावता यावे म्हणून त्याने आपले
कपडे सावरुन घट्ट खोचले आणि थेट इज्रेलपर्यंत तो
अहाबच्या पुढे धावत गेला.

## सिनाय पर्वतावर एलीया

19 अहाब राजाने घडलेली सर्व हकीकत ईजबेलला
सांगितली. सर्व संदेष्ट्यांना एलीयाने कसे
तलवारीने कापून काढले तेही सांगितले. 2तेव्हा ईजबेलने
एलीयाला दूताकरवी निरोप पाठवला. तो असा, “तू त्या
संदेष्ट्यांना मारलेस तसे मी तुला उद्या या वेळेपर्यंत मारणार
आहे. यात मला यश आले नाही तर देवतांनीच मला
मारावे.”
3एलीया हे ऐकून घाबरला. आपला जीव वाचवायला
त्याने पळ काढला. बरोबर त्याने आपल्या नोकराला
घेतले होते. यहूदामधील बैरशेबा येथे ते गेले. आपल्या
नोकराला तिथेच सोडून 4तो पुढे दिवसभर वाळवंट तुडवत
गेला. एका झुडुपाखाली तो बसला. आता मरण यावे असे
त्याला वाटले. एलीया म्हणाला, “आता हे पुरे झाले,
परमेश्वरा! मला आता मरु दे माझ्या पूर्वजांपेक्षा माझ्यात
काय बरे आहे?”
5एका झाडाखाली तो आडवा झाला आणि त्याला झोप
लागली. तेव्हा एक देवदूत तिथे आला आणि एलीयाला
स्पर्श करुन म्हणाला, “उठ खाऊन घे.” 6एलीया उठून
पाहतो तर निखाऱ्यावर भाजलेली गोड भाकर आणि
पाण्याचे मडके शेजारी ठेवलेले होते. एलीयाने ते खाल्ले,
पाणी प्याला आणि तो पुन्हा झोपी गेला.
7आणखी काही वेळाने तो देवदूत पुन्हा त्याच्याजवळ
आला त्याने त्याला स्पर्श केला आणि त्याला म्हणाला,
“ऊठ आणि थोडे खाऊन घे, नाहीतर पुढचा मोठा प्रवास
करायला तुला शक्ती राहणार नाही.” 8तेव्हा एलीया उठला
त्याने खाल्ले आणि पाणी प्याला. त्याबळावर पुढे तो
चाळीस दिवस आणि रात्री चालत राहिला. देवाचा डोंगर
होरेब येथपर्यंत तो चालला. 9तिथे एका गुहेत शिरुन त्याने
रात्र काढली.
तेव्हा परमेश्वर एलीयाशी बोलला. तो म्हणाला, “एलीया,
तू येथे का आला आहेस?”
10एलीया म्हणाला, “सर्व शक्तिमान परमेश्वर देवा, मी
आतापर्यंत तुझीच सेवा करत आलेलो आहे. माझ्याकडून
होईल तितके मी केले पण इस्राएलच्या लोकांनी तुझ्याशी
केलेल्या कराराचा भंग केलेला आहे. त्यांनी तुझ्या वेदीचा
विध्वंस केला. तुझ्या संदेष्ट्यांना मारले. मीच एकटा काय
तो अजून जिवंत आहे. पण आता ते माझ्याही जिवावर
उठले आहेत.”
11यावर परमेश्वर एलीयाला म्हणाला, “जा, या डोंगरावर
माझ्यासमोर उभा राहा. मी तुझ्या जवळून जातो” मग
जोराचा वारा सुटला. त्या सोसाट्याच्या वाऱ्याने डोंगरालाही
तडे जाऊन मोठ मोठे खडक परमेश्वरासमोर पडले. पण
त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. त्यानंतर धरणीकंप झाला,
पण त्यातही परमेश्वर नव्हता. 12धरणीकंपानंतर अग्नी
प्रकटला. पण त्यातही परमेश्वर नव्हता. अग्नी शमल्यावर
मात्र शांत, मंजुळ स्वर ऐकू आला.
13एलीयाने हा ध्वनी ऐकला तेव्हा अंगरख्याने चेहरा
झाकून घेऊन तो गुहेच्या दाराशी जाऊन उभा राहिला.
“एलीया, तू इथे का आला आहेस?” अशी वाणी त्याला
ऐकू आली.
14एलीया म्हणाला, “सर्व शक्तिमान परमेश्वर देवा,
आतापर्यंत मी तुझ्याच सेवेत आयुष्य घालवले आहे. पण

इस्राएल लोकांनी आपला करार मोडला आहे. त्यांनी तुझ्या वेदींचा विध्वंस केला. तुझ्या संदेष्ट्यांना ठार केले. मीच काय तो अजून जिवंत आहे. आणि आता ते माझ्या जिवावर उठलेत."

15तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, "आता मागे जा आणि वाळवंटातून जाणाऱ्या रस्त्याने दिमिष्काला पोहोंचेपर्यंत चालत जा. दिमिष्कामध्ये जा आणि अरामचा राजा म्हणून हजाएलला अभिषेक कर. 16निमशीचा मुलगा येहू याला इस्राएलचा राजा म्हणून अभिषेक कर. आणि आबेल महोला इथला शाफाटाचा मुलगा अलीशा याला पुढे तुझी जागा घेणारा संदेष्टा म्हणून अभिषेक कर.
17हजाएल अनेक पापी माणसांना ठार करेल. त्याच्या तावडीतून जे सुटतील त्यांना येहू मारील. आणि यातूनही कोणी निसटले तर त्याला अलीशा मारील. 18एलीया, इस्राएलमध्ये तूच काही एकटा निष्ठावान नाहीस. तेही बरेच जणांना मारतील. आणि तरीही, बालपुढे कधी वाकले नाहीत असे सातहजार लोक अजूनही आहेत. यांना मी जगू देईन. त्यांनी आयुष्यात कधी बालमूर्तीचे चुंबन घेतलेले नाही."

### अलीशा संदेष्टा होतो

19तेव्हा एलीया तिथून निघाला आणि शाफाटाचा मुलगा अलीशा याच्या शोधात निघाला. अलीशा तेव्हा आपली बारा एकरांची जमीन नांगरत होता. एलीया आला तेव्हा अलीशा अगदी शेवटच्या एकरात होता. एलीया अलीशा जवळ आला. एलीयाने मग आपला संदेष्ट्याचा खास अंगरखा अलीशावर पांघरला.* 20अलीशाने लगेच बैल सोडून दिले आणि तो एलीयाच्या मागे धावत गेला. अलीशा त्याला म्हणाला, "मला माझ्या आईवडीलांचा निरोप घेऊ दे. मग मी तुझ्याबरोबर येतो."

एलीया म्हणाला, "ठीक आहे, जा माझी काही हरकत नाही."

21अलीशाने मग आपल्या आईवडीलांसमवेत सणासुदीसारखे जेवण घेतले. त्याने आपली बैलांची जोडी कापली. त्यांच्या मानेवरचे जू सरपण म्हणून वापरले त्यावर बैलांचे मांस शिजवले. सर्व लोकांना जेवायला बोलावले. मग अलीशा एलीयाच्या पाठोपाठ गेला. एलीयाचा तो मदतनीस झाला.

### बेन-हदाद आणि अहाब यांच्यात लढाई

20 बेन-हदाद अरामचा राजा होता. त्याने आपल्या सर्व सैन्याची जमवाजमव केली. त्याच्या बाजूला बत्तीस राजे होते. त्यांच्याकडे घोडे आणि रथ होते. त्यांनी शोमरोनला वेढा घातला आणि युध्द पुकारले. 2इस्राएलचा
राजा अहाब याच्याकडे बेन-हदादने दूतांकरवी निरोप पाठवला. 3संदेश असा होता, "बेन-हदादचे म्हणणे आहे, 'तुमच्याकडील सोने रुपे तुम्ही मला द्यावे. तसेच तुझ्या बायका आणि मुलेही माझ्या हवाली करावी.'"

4यावर इस्राएलच्या राजाचे उत्तर असे होते, "महाराज मी तर आता तुमच्याच ताब्यात आहे, हे मला मान्य आहे. त्यामुळे जे माझे ते सर्व तुमचेच आहे."

5अहाबकडे हे दूत पुन्हा एकदा आले आणि म्हणाले, "बेनहदादचे म्हणणे असे आहे, 'तुझ्याजवळचा सोन्याचांदीचा ऐवज तसेच बायकामुले तू माझ्या स्वाधीन केली पाहिजेस.
6उद्याच मी माझ्या माणसांचे एक शोधपथक तिकडे पाठवणार आहे. ते तुझ्या तसेच तुझ्या कारभाऱ्यांच्या घराची झडती घेतील. तुमच्याजवळच्या सर्व मौल्यवान चीजा त्या माणसांच्या हवाली करा. ती माणसे त्या वस्तू मला आणून देतील.'"

7तेव्हा राजा अहाबने आपल्या देशातील सर्व वडीलधाऱ्या माणसांची सभा घेतली. अहाब त्यांना म्हणाला, "हे पाहा, बेन-हदाद हा विघ्न आणत आहे. आधी त्याने माझ्या जवळचे सोने-चांदी तसेच माझी बायका मुले मागितली. त्याला मी कबूल झालो. आणि आता त्याला सर्वच हवे आहे."

8यावर ती वडीलधारी मंडळी आणि इतर लोक म्हणाले, "त्याच्या म्हणण्याला मान तुकवू नको. तो म्हणतो तसे करु नको."

9तेव्हा अहाबने बेन-हदादकडे निरोप पाठवला. अहाबने सांगितले, "तुझी पहिली मागणी मला मान्य आहे. पण तुझ्या दुसऱ्या आज्ञेचे मी पालन करु शकत नाही."

बेनहदादला त्याच्या दूतांनी हा निरोप सांगितला. 10तेव्हा बेन-हदादकडून दुसरा निरोप आला. त्या निरोपात म्हटले होते, "शोमरोनचा मी पूर्ण विध्वंस करीन. तिथे काहीही शिल्लक उरणार नाही. आठवणी दाखल काही घेऊन यावे असेही माझ्या माणसांना काही राहणार नाही. असे झाले नाही तर देवाने माझे वाटोळे करावे."

11अहाब राजाचे त्याला उत्तर गेले. त्यात म्हटले होते. "बेनहदादला जाऊन सांगा की, जो चिलखत चढवतो त्याने, जो ते उतरवण्याइतक्या दीर्घ काळापर्यंत जगतो त्याच्या इतके फुशारुन जाऊ नये."

12राजा बेन-हदाद इतर राजांच्या बरोबर आपल्या तंबूत मद्यपान करत बसला होता. त्यावेळी हे दूत आले आणि राजाला हा संदेश दिला. त्याबरोबर बेनहदादने आपल्या माणसांना चढाईचा व्यूह रचायला सांगितले. त्याप्रमाणे लोकांनी आपापल्या जागा घेतल्या.

13त्याच वेळी इकडे एक संदेष्टा अहाब राजाक़डे आला. राजाला तो म्हणाला, "अहाब राजा , परमेश्वराचे तुला सांगणे आहे की, 'एवढी मोठी सेना बघितलीस? मी, प्रत्यक्ष परमेश्वर, तुझ्या हातून या सैन्याचा पराभव करवीन.

---

**अलीशावर पांघरला** आपल्याला प्रेषित म्हणून निवडले आहे हे या कृतीवरून अलीशाला कळले.

म्हणजे मग मीच परमेश्वर असल्याबद्दल तुझी खात्री
पटेल.'”
14अहाबने विचारले. “या पराभवासाठी तू कोणाला
हाताशी धरशील?”
तेव्हा तो संदेष्टा म्हणाला, “प्रांत अधिकाऱ्यांच्या
हाताखालच्या तरुणांची परमेश्वर मदत घेईल.”
यावर राजाने विचारले, “या सैन्याचे नेतृत्व कोण
करील?”
“तूच ते करशील” असे संदेष्ट्याने सांगितले.
15तेव्हा अहाब राजाने अधिकाऱ्यांच्या हाताखालच्या
तरुणांची कुमक गोळा केली. त्या तरुणांची संख्या दोनशे
बत्तीस भरली. मग राजाने इस्राएलच्या सर्व फौजेला एकत्र
बोलावले. तेव्हा ते एकंदर सात हजार होते.
16राजा बेन-हदाद आणि त्याच्या बाजूचे बत्तीस राजे
दुपारी आपापल्या तंबूमध्ये मद्यपान करण्यात आणि नशेत
गुंग होते. त्यावेळी अहाबने हल्ला चढवला. 17तरुण
मदतनीस आधी चालून गेले. तेव्हा शोमरोनमधून सैन्य
बाहेर आल्याचे राजा बेनहदादच्या माणसांनी त्याला
सांगितले. 18तेव्हा बेनहदाद म्हणाला, “ते हल्ला करायला
आले असतील किंवा सलोख्याची विनंती करायला आले
असतील. त्यांना जिवंत पकडा.”
19राजा अहाबच्या तरुणांची तुकडी पुढे होती आणि
इस्राएलचे सैन्य मागोमाग येत होते. 20प्रत्येक इस्राएलीने
समोरुन येणाऱ्याला ठार केले. त्याबरोबर अराममधली
माणसे पळ काढू लागली. इस्राएलच्या सैन्याने त्यांचा
पाठलाग केला. राजा बेनहदाद तर एका रथाच्या घोड्यावर
बसून पळाला.
21राजा अहाबने सेनेचे नेतृत्व करुन अरामच्या फौजेतील
सर्व घोडे आणि रथ पळवले. अरामचा दारुन पराभव
झाला. 22यानंतर तो संदेष्टा राजा अहाबकडे गेला आणि
म्हणाला, “अरामचा राजा बेनहदाद पुढच्या वसंत ऋतुत
पुन्हा तुझ्यावर चालून येईल. तेव्हा तू आता परत जा
आणि आपल्या सैन्याची ताकद आणखी वाढव.
काळजीपूर्वक आपल्या बचावाचे डावपेच आख.”

## बेन हदादची आणखी एक स्वारी

23राजा बेन-हदादचे अधिकारी त्याला म्हणाले,
“इस्राएलचे देव हे पर्वतराजीतले देव आहेत. आपण डोंगराळ
भागात लढलो. म्हणून इस्राएलांचा जय झाला. तेव्हा आता
आपण सपाटीवर लढू म्हणजे जिंकू. 24आता तुम्ही असे
करायला हवे त्या 32 राजांकडे सैन्याचे नेतृत्व न देता
त्यांच्या जागी सेनापती नेमा.
25“जेवढ्या सेनेचा संहार झाला तेवढी पुन्हा उभी करा.
घोडे आणि रथ मागवा. मग आपण सपाटीवर इस्राएल
लोकांचा सामना करु म्हणजे जय आपलाच.” बेनहदादने
हा सल्ला मानला आणि सर्व तजवीज केली. 26वसंत
ऋतुत बेनहदादने अराममधील लोकांना एकत्र आणले
आणि तो इस्राएलवरील हल्ल्यासाठी अफेक येथे आला.
27इस्राएलही युध्दाला सज्ज झाले. अरामी सैन्याविरुध्द
लढायला गेले. अराम्यांच्या समोरच त्यांनी आपला तळ
दिला. शत्रूसैन्याशी तुलना करता, इस्राएल म्हणजे शेरडांच्या
दोन लहान कळपांसारखे दिसत होते. अरामी फौजेने सगळा
प्रदेश व्यापला होता.
28एक देवाचा माणूस (संदेष्टा) इस्राएलच्या राजाकडे
एक निरोप घेऊन आला. निरोप असा होता. “परमेश्वर
म्हणतो, ‘मी डोंगराळ भागातला देव आहे असे या अरामी
लोकांचे म्हणणे आहे. सपाटीवरचा मी देव नव्हे असे
त्यांना वाटते. तेव्हा या मोठ्या सेनेचा मी तुमच्या हातून
पराभव करवणार आहे. म्हणजे संपूर्ण प्रदेशाचा मी
परमेश्वर आहे हे तुम्ही जाणाल. 29दोन्ही सेना सात दिवस
समोरासमोर तळ देऊन बसल्या होत्या. सातव्या दिवशी
लढाईला सुरुवात झाली. इस्राएल लोकांनी अरामचे
एकलक्ष सैनिक एका दिवसात ठार केले.”
30जे बचावले ते अफेक येथे पळून गेले. यातील सत्तावीस
हजार सैनिकांवर शहराची भिंत कोसळून पडली.
बेनहदादनेही या शहरात पळ काढला होता. तो एका
खोलीत लपला होता. 31त्याचे सेवक त्याला म्हणाले,
‘इस्राएलचे राजे दयाळू आहेत असे आम्ही ऐकून आहो.
आपण जाडे भरडे कपडे घालून आणि डोक्याभोवती दोरखंड
आवळून* इसाएलच्या राजाकडे जाऊ कदाचित् तो
आपल्याला जीवदान देईल सुध्दा.”
32त्या सर्वांनी मग भरडे कपडे घातले. डोक्याभोवती
दोरी बांधली आणि ते इस्राएलच्या राजाकडे आले. त्याला
म्हणाले, “तुमचा दास बेनहदाद तुमच्याकडे ‘जीवदान मागत
आहे.'”
अहाब म्हणाला, “म्हणजे तो अजून जिवंत आहे? तो
माझा भाऊच* आहे.”
33बेनहदादला अहाब ठार करणार नाही अशा अर्थाचे
त्याने काहीतरी आश्वासक बोलावे अशी बेनहदादच्या
बरोबरच्या लोकांची इच्छा होती. तेव्हा अहाबने बेनहदादला
भाऊ म्हटल्यावर ते ताबडतोब म्हणाले, “हो, बेनहदाद
तुमचा भाऊच आहे.”
अहाबने बेनहदादला “आपल्यासमोर बोलावून घेतले.”
त्याप्रमाणे तो आला. मग राजा अहाबने त्याला
आपल्याबरोबर रथात बसायला सांगितले.
34बेनहदाद अहाबला म्हणाला, “माझ्या वडीलांनी तुझ्या
वडीलांकडून जी गावे घेतली ती मी तुला परत करीन.
मग, माझ्या वडीलांनी शोमरोन मध्ये बाजारपेठा वसवल्या
तशा तुला दिमिष्कात करता येतील”

---

**जोडेभरडे ... आवळून** लीन होऊन ते शरणागती पत्करायला आले आहेत असा याचा अर्थ होतो.

**भाऊ** आपापसात शांततेचा करार करणारे एकमेकांना “भाऊ” म्हणून संबोधत. एकमेकांना एका कुटुंबातील मानत.

अहाब त्यावर म्हणाला, “या करारावर मी तुला मुक्त
करायला तयार आहे.” तेव्हा या दोन राजांनी आपसात
शांतिचा करार केला. मग राजा अहाबने राजा बेन-हदादला
मुक्त केले.

## अहाबला संदेष्ट्यांचा विरोध

35एका संदेष्ट्याने दुसऱ्या संदेष्ट्याला सांगितले, “मला
एक फटका मार.” परमेश्वराचीच तशी आज्ञा होती म्हणून
तो असे म्हणाला, पण दुसऱ्या संदेष्ट्याने तसे करायचे
नाकारले. 36तेव्हा पहिला संदेष्टा म्हणाला, “तू परमेश्वराची
आज्ञा पाळली नाहीस. तेव्हा तू इथून बाहेर पडशील तेव्हा
सिंह तुझा जीव घेईल” तो दुसरा संदेष्टा तेथून निघाला
तेव्हा खरोखरच सिंहाने त्याला ठार मारले.

37मग हा पहिला संदेष्टा एका माणसाकडे गेला. त्याला
त्याने स्वत:ला “फटका मारायला” सांगितले. त्या माणसाने
तसे केले आणि संदेष्ट्याला घायाळ केले. 38त्या संदेष्ट्याने
मग स्वत:च्या तोंडाभोवती एक फडके गुंडाळून घेतले.
त्यामुळे तो कोण हे कोणालाही ओळखू येऊ शकत नव्हते.
हा संदेष्टा मग वाटेवर राजाची वाट पाहात बसला. 39राजा
तिथून जात होता. तेव्हा संदेष्टा त्याला म्हणाला, “मी
लढाईवर गेलो होतो. आपल्यापैकी एकाने एका शत्रू
सैनिकाला माझ्यापुढे आणले आणि मला सांगितले,
“याच्यावर नजर ठेव. हा पळाला तर याच्या जागी तुला
आपला जीव द्यावा लागेल किंवा पंचाहत्तर पौंड चांदीचा
दंड भरावा लागेल. 40पण मी इतर कामात गुंतलो होतो.
तेव्हा तो माणूस पळून गेला.”

यावर इस्राएलचा राजा म्हणाला, “त्या सैनिकाला तू
निसटू दिलेस हा तुझा गुन्हा तुला मान्य आहे. तेव्हा निकाल
उघडच आहे. तो माणूस म्हणाला ते तू केले पाहिजेस.”

41आता त्या संदेष्ट्याने तोंडावरचे फडके काढले. राजाने
त्याला पाहिले आणि तो संदेष्टा असल्याचे त्याने ओळखले.
42मग तो संदेष्टा राजाला म्हणाला, “परमेश्वर म्हणतो,
‘मी ज्याचा वध करावा म्हणून सांगितले त्याला तू मोकळे
सोडलेस. तेव्हा आता त्याच्या जागी तू आहेस. तू मरशील.
तुझ्या शत्रूच्या ठिकाणी तुझे लोक असतील तेही जिवाला
मुकतील.’”

43यानंतर राजा शोमरोनला आपल्या घरी परतला. तो
अतिशय चिंताग्रस्त आणि खिन्न झाला होता.

## नाबोथचा द्राक्षमळा

21 अहाब राजाचा राजवाडा शोमरोनमध्ये होता.
त्याच्या महलाशेजारी एक द्राक्षाचा मळा होता.
तो नाबोथ नावाच्या माणसाचा होता. 2एकदा अहाब
नाबोथला म्हणाला, “तुझा मळा मला दे. तिथे मला भाजीचा
मळा करायचा आहे. तुझा मळा माझ्या महालाला लागूनच
आहे. त्याच्या ऐवजी मी तुला आणखी चांगला द्राक्षमळा
देईन. किंवा तुला हवे असेल तर याचा मोबदला मी
पैशात देईन.” 3नाबोथ म्हणाला, “माझी जमीन मी देणार
नाही. ती माझ्या कुटुंबाचे वतन आहे.”

4तेव्हा अहाब घरी परतला. पण तो नाबोथवर रागावलेला
होता. ईज्रेलचा हा माणूस जे बोलला ते त्याला आवडले
नाही. (नाबोथ म्हणाला होता, “माझ्या कुटुंबाची जमीन
मी तुम्हाला देणार नाही.) अहाब अंथरुणावर पडला त्याने
तोंड फिरवून घेतले आणि अन्नपाणी नाकारले.

5अहाबची पत्नी ईजबेल त्याच्याजवळ गेली.” त्याला
म्हणाली, “तुम्ही असे खिन्न का? तुम्ही जेवत का नाही?”

6अहाब म्हणाला, “इज्रेल येथल्या नाबोथला मी त्याचा
मळा मला द्यायला सांगितला. त्याची पूर्ण किंमत मी
मोजायला तयार आहे किंवा हवे तर दुसरी जमीन द्यायला
तयार आहे हे ही मी त्याला सांगितले. पण नाबोथ त्याचा
मळा द्यायला कबूल होत नाही.”

7ईजबेल त्याला म्हणाली, “पण तुम्ही तर इस्राएलचे
राजे आहात. उठा, काही तरी खा म्हणजे तुम्हाला बरे
वाटेल. त्याचा मळा मी आपल्याला मिळवून देईन.”

8ईजबेलने मग काही पत्रे लिहिली. पत्रांवर तिने अहाबची
सही केली. अहाबचा शिक्का वापरुन पत्रांवर तो शिक्का
उमटवला. मग तिने ही पत्रे नाबोथच्या गावच्या वडीलधाऱ्या
मंडळींना आणि थोरामोठ्यांना पाठवली. 9पत्रातला मजकूर
असा होता:

“एक दिवस उपवासाची घोषणा करा. मग गावातल्या
लोकांना एकत्र बोलवा. तिथे नाबोथविषयी बोलणे होईल.
10नाबोथबद्दल खोट्या गोष्टी सांगणारी काही माणसे जमवा.
नाबोथ राजाविरुध्द आणि देवाविरुध्द बोलला, हे आम्ही
ऐकले, असे त्या माणसांनी म्हणावे. एवढे झाल्यावर
नाबोथला गावाबाहेर घालवून दगडांनी ठेचून मारा.”

11इज्रेलमधल्या वयाने आणि मानाने वडिलधाऱ्या
(पुढाऱ्यांनी) अशा मंडळींनी ही आज्ञा मानली. 12त्यांनी
उपवासाचा म्हणून एक दिवस घोषित केला. त्या दिवशी
सर्व लोकांना सभेत बोलावले. नाबोथला सर्वांसमोर खास
आसनावर बसवले. 13मग, नाबोथ देवाविरुध्द आणि
राजाविरुध्द बोलल्याचे आपण ऐकले आहे असे दोन
माणसांनी सांगितले. तेव्हा लोकांनी नाबोथला गावाबाहेर
घालवले आणि तो मरेपर्यंत त्याच्यावर दगडांचा वर्षाव
केला.

14मग त्या प्रतिष्ठित माणसांनी ईजबेलकडे निरोप
पाठवला. “नाबोथचा वध झाला आहे.” असा तो निरोप
होता.

15ईजबेलने हे ऐकले तेव्हा ती अहाबला म्हणाली,
“नाबोथ मेला. आता तुम्हाला हवा होता तो मळा तुम्ही
जाऊन ताब्यात घेऊ शकता” 16यावर अहाबने तो द्राक्षमळा
आपल्या ताब्यात घेतला. 17यावेळी परमेश्वर एलीयाशी
बोलला. (एलीया हा तिश्बी येथील संदेष्टा) परमेश्वर
म्हणाला, 18“शोमरोनमधल्या राजा अहाबकडे जा तो

नाबोथाच्या द्राक्षमळ्यात असेल. तो त्या मळ्यावर कब्जा
करायला तिथे गेला आहे.
19अहाबला जाऊन सांग की परमेश्वर म्हणतो, ‘अहाब,
नाबोथला तू मारलेस. आता त्याचा मळा घ्यायला निघालास
तेव्हा आता मी सांगतो ते ऐक. नाबोथ मेला त्याच जागी तू
सुध्दा मरशील ज्या कुत्र्यांनी नाबोथाचे रक्त चाटले तीच
कुत्री त्याच ठिकाणी तुझे रक्त चाटतील.’”
20तेव्हा एलीया अहाबकडे गेला. अहाबने एलीयाला
पाहिले आणि तो म्हणाला, “तुला मी पुन्हा सापडलो. तू
नेहमीच माझ्याविरुध्द आहेस.”
एलीया म्हणाला, “हो, तुला मी पुन्हा शोधून काढले
आहे. तुझे आयुष्य तू परमेश्वराचे अपराध करण्यातच
घालवलेस. 21तेव्हा परमेश्वर तुला काय सांगतो ते ऐक,
‘मी तुझा नाश करीन. मी तुला आणि तुझ्या कुटुंबातील
सर्व पुरुषांना ठार करीन. 22नबाटाचा मुलगा यराबाम
याच्या कुटुंबासारखीच तुझ्या घराचीही वाताहत होईल.
बाशाच्या कुटुंबासारखीच तुझी दशा होईल. या दोन्ही
घराण्यांचा समूळ नाश झाला. तू माझा क्रोध जागा केलास.
इस्राएल लोकांनाही पाप करायला लावलेस.’ 23शिवाय
परमेश्वर असे म्हणतो, ‘तुझी बायको ईजबेल हिच्या
शरीरावर इज्रेल मध्ये कुत्री तुटून पडतील. 24तुझ्या
घरातल्या ज्याला कुणाला गावात मरण येईल त्याला कुत्री
खातील आणि जो कोणी शेतात मरेल तो पक्ष्यांचे भक्ष्य
होईल.’”
25अहाबने जितकी पापे केली, जितके अपराध केले
तेवढे कोणीच केले नाहीत. त्याची बायको ईजबेल हिने
त्याला हे सर्व करायला लावले. 26अहाबने आणखी एक
पातक केले ते म्हणजे त्या लाकडी ठोकळ्यांची, मूर्तींची
पूजा केली. अमोरी लोकांनीही हेच केले तेव्हा परमेश्वराने
त्यांच्याकडून हा प्रदेश काढून घेऊन इस्राएल लोकांना
दिला.
27एलीयाचे बोलून झाल्यावर अहाबला फार दुःख झाले.
दुःखाने त्याने अंगावरचे कपडे फाडले. मग विशेष
शोकवस्त्रे परिधान केली. त्याने अन्नत्याग केला. त्याच
कपड्यात तो झोपला. तो अतिशय दुःखी आणि खिन्न
झाला होता.
28परमेश्वर एलीया संदेष्ट्याला म्हणाला, 29“अहाब
माझ्यापुढे नतमस्तक झाला आहे असे दिसते. तेव्हा तो
जिवंत असेपर्यंत मी त्याला संकटात लोटणार नाही. त्याचा
मुलगा राज्यावर येईपर्यंत मी थांबेन. मग त्याच्या घराला
मी उपद्रव देईन.”

## मीखायाचा अहाबला सावधगिरीचा इशारा

22 पुढील दोन वर्षे इस्राएल आणि अराम यांच्यामध्ये
शांततेची गेली. 2तिसऱ्या वर्षी, यहूदाचा राजा
यहोशाफाट इस्राएलचा राजा अहाब याला भेटायला गेला.
3यावेळी अहाबने आपल्या अधिकाऱ्यांना विचारले,
“अरामच्या राजाने गिलाद मधील रामोथ आपल्याकडून
घेतले होते ते आठवते ना? ते परत मिळवण्यासाठी
आपण काहीच का केले नाही? रामोथ आपले असायला
हवे.” 4आणि अहाब राजा यहोशाफाटला म्हणाला, “तुम्ही
आमच्या बाजूने रामोथला अरामी सैन्याशी लढाल
का?”
यहोशाफाट म्हणाला, “अवश्य माझे सैन्य आणि घोडे
तुमचेच आहेत. 5पण प्रथम आपण परमेश्वराचा सल्ला
घेतला पाहिजे.”
6तेव्हा अहाबने संदेष्ट्यांची एक सभा घेतली. तेव्हा
तिथे चारशे संदेष्टे हजर होते. अहाबने त्यांना विचारले,
“आपण आत्ताच रामोथ येथे अरामी फौजेवर चालून जावे
का? की काही काळ थांबावे?”
संदेष्टे म्हणाले, “तुम्ही खुशाल आत्ताच हल्ला करा.
परमेश्वर तुम्हाला जय मिळवून देईल.”
7पण यहोशाफाटने शंका काढली, “परमेश्वराचा
आणखी कोणी संदेष्टा यांच्या खेरीज इथे आहे का? तसा
असेल तर त्यालाही देवाचे मत विचारलेले बरे.”
8राजा अहाब म्हणाला, “तसा आणखी एक संदेष्टा आहे.
इम्ला याचा मुलगा मीखाया. पण मी त्याचा द्वेष करतो.
कारण तो काही सांगतो तेव्हा माझ्याबद्दल कधीच चांगले
भविष्यकथन करत नाही. त्याचे बोलणे मला अप्रिय
वाटते.”
यहोशाफाट म्हणाला, “अहाब राजा, तुझे असे बोलणे
बरोबर नव्हे.”
9तेव्हा अहाब राजाने आपल्या एका सेवकाला मीखायाला
घेऊन येण्यास सांगितले.
10यावेळी दोन्ही राजे राजवस्त्रे घालून सिंहासनावर बसले
होते.
शोमरोनच्या वेशीजवळ न्यायदान चालते त्या ठिकाणी
ते होते. सर्व संदेष्टे त्यांच्या समोर उभे होते. त्यांचे
भविष्यकथन चालेले होते. 11त्यांच्यापैकी एक कनानाचा
मुलगा सिद्कीया हा होता. त्याने प्रचंड शक्तीचे प्रतीक
अशी लोखंडाची शिंगे केली होती. तो अहाबला
म्हणाला, “‘परमेश्वराचे म्हणणे, ‘ही शिंगे तू अरामी
सैन्याविरुध्द लढताना वापरावीस’ असे देवाचे म्हणणे
आहे. म्हणजे तू शत्रूचा पराभव करशील, त्याचा संहार
करशील.” 12सिद्कीयाचे हे म्हणणे इतर सर्वच संदेष्ट्यांना
पटले. पुढे सिद्कीया म्हणाला, “आता तुझ्या सैन्याने
चढाई करावी. रामोथ येथे अरामी सैन्यावर हल्ला
करावा. विजय तुमचाच आहे. परमेश्वर तुम्हाला यश
देईल.”
13हे चाललेले असतानाच एक सेवक मीखायाच्या शोधात
गेला. त्याला भेटून म्हणाला, “राजा या युध्दात विजयी
होईल असे सर्वच संदेष्ट्यांचे म्हणणे आहे. तेव्हा तूही
तसेच म्हणणे श्रेयस्कर ठरेल व ते सुरक्षितपणाचे होईल.”
14पण मीखाया म्हणाला, “नाही, कादापि नाही. जे परमेश्वर

माझ्याकडून वदवतो तेच मी सांगीन. माझी तशी प्रतिज्ञाच
आहे."
15मीखाया मग राजाकडे आला. राजाने त्याला विचारले,
"मीखाया, मी आणि राजा यहोशाफाट हातमिळवणी करु
ना? रामोथला अरामच्या सैन्यावर आता चढाई करु का?"
मीखाया म्हणाला, "हो तुम्ही आत्ताच ही लढाई करा.
परमेश्वर तुम्हाला यश देईल."
16पण अहाब त्याला म्हणाला, "तू हे परमेश्वराच्या
शक्तीने सांगत नाहीस. आपल्या मनचे सांगतो आहेस.
तेव्हा खरे काय ते सांग परमेश्वराचे म्हणणे सांग. कितीदा
मी तुला तेच सांगू?"
17तेव्हा मीखायाने सांगितले, "काय होणार ते मला
दिसते आहे. इस्राएलचे सैन्य डोंगरांवर इतस्तत: पसरेल.
मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखी त्यांची अवस्था होईल.
परमेश्वराचे म्हणणे असे आहे, 'यांना कोणी नेता नाही.
यांनी घरी जावे. लढाईच्या भानगडीत पडू नये.'"
18मग अहाब यहोशाफाटला म्हणाला, "पाहा, हेच बोललो
होतो ना मी! हा संदेष्टा कधीही माझ्याबद्दल चांगले
भविष्यकथन करत नाही. हा नेहमी अप्रिय गोष्टीच मला
ऐकवतो."
19इकडे परमेश्वराचे म्हणणे काय आहे ते मीखाया
सांगतच होता. मीखाया म्हणाला, "ऐका परमेश्वर काय
म्हणतो ते पाहा परमेश्वर स्वर्गात सिंहासनावर बसलेला
मी पाहिला. त्याचे दूत त्याच्या शेजारी उभे आहेत. 20देव
म्हणाला, 'अहाब राजाची कोणी फसगत करेल का? त्याने
रामोथला अरामवर हल्ला करावा असे मला वाटते. त्यात
त्याला मरण येईल.' तेव्हा आता काय करावे याबद्दल
देवदूतांमध्ये एकमत होईना. 21मग त्यापैकी एकजण
परमेश्वराकडे गेला आणि म्हणाला, 'मी हे काम करीन.'
22परमेश्वर त्याला म्हणाला, 'तू अहाबची फसगत कशी
करशील?' यावर तो देवदूत म्हणाला, 'मी अहाबच्या
संदेष्ट्यांमध्ये गोंधळ माजवून देईन. त्यांना मी राजाशी
खोटे बोलायला प्रवृत्त करीन संदेष्टे राजाला सांगतील ते
खोटे असेल.' यावर परमेश्वर म्हणाला, 'हे चांगले झाले
जा आणि अहाब राजाला या मोहात पाड तुला यश येईन.'"
23मीखायाचे सांगून झाले. मग तो म्हणाला, "तेव्हा खरी
हकीकत अशी आहे. परमेश्वरानेच तुमच्या संदेष्ट्यांना
खोटे बोलायला लावले आहे. तुमच्यावर मोठे संकट
ओढवावे असे परमेश्वरालाच वाटते."
24मग सिद्कीया हा संदेष्टा मीखायाजवळ गेला.
मीखायाला त्याने एक थापड मारली. सिद्कीया म्हणाला,
"माझ्यातली परमेश्वराची शक्ती संपली आहे आणि तो
आता तुझ्या मार्फतच बोलतो आहे अशी खरेच तुझी
समजूत आहे?"
25मीखाया म्हणाला, "लवकरच आपत्ती येणार आहे.
तेव्हा तू एका लहानशा खोलीत दडून बसशील तेव्हा माझे
म्हणणे खरे असल्याचे तुझ्या लक्षात येईल." 26तेव्हा अहाब
राजाने आपल्या एका सेवकाला मीखायाला पकडायचा
हुकूम केला. राजा म्हणाला, "याला धरा आणि
नगराधिकारी आमोन व राजपुत्र योवाश यांच्याकडे घेऊन
जा. 27मीखायाला तुरूंगात घालायला त्यांना सांगा. त्याला
फक्त भाकर आणि पाणी द्या. युध्दावरुन मी परत येईपर्यंत
त्याला तिथेच राहू द्या."
28मीखाया मोठ्याने म्हणाला, "मी काय म्हणतो ते सर्व
लोकहो ऐका. राजा, तू युध्दावरुन जिवंत परत आलास
तर परमेश्वरमाझ्या मार्फत बोलला नाही असे खुशाल
समजा."
29नंतर राजा अहाब आणि राजा यहोशाफाट
रामोथ येथे अरामच्या सैन्याशी लढायला गेले.
गिलाद प्रांतात हे युध्द झाले. 30अहाब यहोशाफाटला
म्हणाला, "आपण आता युध्दाचा व्यूह रचू. मला
राजा म्हणून कोणी ओळखणार नाही असे कपडे मी
घालीन. पण तू मात्र राजाला शोभेल असाच पोषाख
कर." अशाप्रकारे इस्राएलच्या राजाने अगदी
चारचौघांसारखे कपडे करुन युध्दाला सुरुवात
केली.
31अरामच्या राजाकडे बत्तीस रथाधिपती होते. त्या राजाने
या बत्तीस जणांना इस्राएलच्या राजाचा शोध घ्यायला
सांगितले. राजाला ठार करण्याबद्दल त्याने त्यांना बजावले.
32तेव्हा युध्द चालू असताना या रथाधिपतींनी राजा
यहोशाफाटला पाहिले. तोच इस्राएलचा राजा असे त्यांना
वाटले. त्यामुळे त्याचा ते वध करायला निघाले. यहोशाफाट
आरडाओरडा करु लागला. 33हा अहाब राजा नव्हे हे त्या
रथाधिपतींच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्याला मारले नाही.
34तेव्हा एका सैनिकाने, कोणावर नेम धरुन नव्हे असा
हवेतच एक बाण सोडला. हा बाण नेमका इस्राएलाचा
राजा अहाब याला लागला. शरीराचा जो छोटा भाग
चिलखताने झाकलेला नव्हता तिथे बाण लागला. तेव्हा
राजा अहाब आपल्या सारथ्याला म्हणाला, "मला बाण
लागला आहे. रथ येथून हलव. आपण या लढाईपासून
दुर जाऊ."
35युध्द मात्र चालूच राहिले. राजा अहाब आपल्या रथात
बसून राहिला. रथात टेकून बसून तो अरामच्या सैन्याकडे
पाहात होता. त्याला एवढा रक्तस्त्राव झाला की रथाच्या
बैठकीच्या भागात रक्ताचे थारोळे झाले. संध्याकाळच्या
सुमारास राजाला मृत्यू आला. 36सूर्यास्ताच्या वेळी
इस्राएलच्या सर्वसैन्याला आपापल्या प्रांतात घरोघरी जायचा
आदेश मिळाला.
37राजा अहाबला अशा तऱ्हेने मरण आले. काही जणांनी
त्याचा देह शोमरोनला आणला. त्याला त्यांनी तिथे पुरले.
38शोमरोनमधल्या तळ्यावर या लोकांनी अहाबचा रथ
धुतला. रथातील रक्त कुत्र्यांनी चाटले आणि त्या तळ्यातील
पाण्याने वेश्या स्नान करीत असत. परमेश्वराने जे जे
होईल असे सांगितले होते तसेच नेमके घडले.

39इस्राएलाच्या राजांचा इतिहास या ग्रंथात राजा अहाबच्या सर्व गोष्टींची नोंद केलेली आहे. आपला महाल सुशोभित करण्यासाठी त्याने हस्तिदंत कसे वापरले, त्याने नगरे
उभारली याबद्दलही या ग्रंथात सांगितलेले आहे. 40अहाब
मरण पावला व त्याला त्याच्या पूर्वजांशेजारी दफन करण्यात आले. त्याचा पुत्र अहज्या त्याच्या जागी राजा झाला.

## यहुदाचा राजा यहोशाफाट

41अहाब इस्राएलचा राजा झाल्यावर चौथे वर्ष चालू असताना यहोशाफाट यहूदाचा राजा झाला. यहोशाफाट*
हा आसाचा मुलगा. 42यहोशाफाट वयाच्या पस्तिसाव्या
वर्षी राजा झाला आणि यरुशलेममध्ये त्याने पंचवीस वर्षे राज्य केले. याच्या आईचे नाव अजूबा. ती शिल्हीची
मुलगी. 43यहोशाफाट चांगला राजा होता. हा आपल्या
वडीलांप्रमाणेच होता. परमेश्वराच्या दृष्टीने जे योग्य ते त्याने केले. पण यहोशाफाटने उंचावरील पूजास्थळे काढली नाहीत. लोक त्या ठिकाणी होम करणे, धूप जाळणे वगैरे
करत राहिले. 44इस्राएलच्या राजाशी त्याने शांततेचा करार
केला. 45राजा यहोशाफाट शूर होता. त्याने बऱ्याच लढाया
केल्या. त्याने जे केले त्याची हकीकत यहूदाच्या राजांचा
इतिहास या ग्रंथात आहे. 46धर्माच्या नावाखाली देह विक्रय
करणाऱ्या स्त्रीपुरुषांना यहोशाफाटने प्रार्थनास्थळांमधून हाकलून लावले. यहोशाफाटचे वडील आसा राज्य करीत असताना हे लोक त्या ठिकाणी होते.
47याच काळात अदोम प्रदेशाला राजा नव्हता. एक कारभारीच इथला कारभार पाहात असे. त्याची नेमणूक यहूदाचा राजा करी.

## यहोशाफाटचे आरमार

48राजा यहोशाफाटने काही मालवाहू गलबते बांधली. त्यात त्याचा हेतू ओफीरहून सोने आणण्याचा होता. पण ती तेथपर्यंत कधी पोहोंचू शकली नाहीत कारण एसयोन गेबेरच्या बंदरात त्यांची नासधूस करण्यात आली.
49इस्राएलचा राजा अहज्या याने यहोशाफाटला मदतीचा
हात दिला. त्याच्या माणसांबरोबर आपले खलाशी देण्याची तयारी दर्शवली. पण अहज्याची कुमक स्वीकारण्यास यहोशाफाटने नकार दिला.
50यहोशाफाट मरण पावला त्या नंतर दावीद नगरात आपल्या पूर्वजांबरोबर त्याचे दफन करण्यात आले. त्याच्या जागी त्याचा मुलगा यहोराम राज्य करु लागला.

## इस्राएलचा राजा अहज्या

51अहज्या अहाबचा मुलगा होता. यहोशाफाटच्या यहूदावरील सत्तेच्या सतराव्या वर्षी अहज्या इस्राएलचा राजा झाला. शोमरोन मध्ये त्याने दोन वर्षे राज्य केले.
52अहज्याने परमेश्वराचे अनेक अपराध केले. आपले
वडील अहाब, आई ईजबेल आणि नबाटाचा मुलगा यरोबाम या सगळ्यांनी केले तेच याने केले. या सर्व राज्यकर्त्यांनी
इस्राएली लोकांना आणखी पापात लोटले. 53आपल्या
वडीलांप्रमाणेच अहज्यानेही बाल या अमंगळ दैवताची पूजा केली. त्यामुळे इस्राएलचा देव परमेश्वर याचा कोप ओढवला. परमेश्वर अहाबवर संतापला होता तसाच अहज्यावर संतापला.

---

**अहज्या, यहोशाफाट, गलबते** यहोशाफाटची एसयोन गेबेर बंदरावर सत्ता होती. पण, लाल समुद्र, आफ्रिकेचे किनारे, अरबी द्वीपकल्प, पर्शियन आखात, आणि भारताचे किनारे याठिकाणी जायला इस्राएलला तो एकमेव मार्ग होता. यहोशाफाटला “मदत” करून इकडच्या या प्रदेशाचा ताबा मिळवता येईल असा अहज्याचा मनसुबा होता.

# 2 राजे

## अहज्यासाठी संदेश

1 अहाबच्या मृत्यूनंतर मवाब इस्राएल पासून वेगळा झाला.
2एकदा अहज्या आपल्या शोमरोनमधल्या घराच्या माडीवर बसला होता. तेव्हा तिथल्या लाकडी कठडयावरून तो खाली पडला आणि जबर जखमी झाला. अहज्याने मग आपल्या सेवकांना बोलावले आणि सांगितले. "एक्रोनचे दैवत बाल-जबूब याच्या पुरोहितांना मी या दुखण्यातून बरा होईन का ते विचारून या."
3पण एलीया तिश्बी याला परमेश्वराचा दूत म्हणाला, "राजा अहज्याने शोमरोनहून आपले काही दूत रवाना केले आहेत. त्यांना जाऊन भेट त्यांना म्हण, 'इस्राएलचा देव परमेश्वर आहे. तेव्हा एक्रोनचे दैवत बाल-जबूब याला विचारायला का जाता?
4राजा अहज्याला हा निरोप सांगा तू बाल-जबूब कडे आपले दूत पाठवलेस याबद्दल परमेश्वर काय म्हणतो ते ऐक तू आता अंथरूणावरून उठणार नाहीस. तुला मरण येईल.'" मग एलीया उठला आणि अहज्याच्या सेवकांना त्याने जाऊन हा निरोप सांगितला.
5तेव्हा ते दूत अहज्याकडे आले. अहज्याने त्यांना विचारले, "तुम्ही एवढ्या लौकर कसे आलात?"
6ते अहज्याला म्हणाले, "आम्हाला एकजण भेटायला आला होता. त्याने आम्हाला तुमच्याकडे परत येऊन परमेश्वराचा हा निरोप सांगायला सांगितले, 'इस्राएलात परमेश्वर आहे. तरी तू एक्रोनचे दैवत बाल-जबूब याच्याकडे आपल्या सेवकांना का पाठवलेस? ज्याअर्थी तू असे केलेस त्याअर्थी तू आता बरा होणार नाहीस. तू मृत्यू पावशील."
7अहज्या आपल्या दूतांना म्हणाला, "ज्याने तुम्हाला भेटून हे सांगितले तो दिसायला कसा होता?
8तेव्हा ते दूत म्हणाले, "तो एक केसाळ माणूस होता आणि त्याने कातडयाचा कंबरपट्टा बांधला होता.
तेव्हा अहज्या म्हणाला, "म्हणजे तो एलीया तिश्बी होता."

## अहज्याने पाठवलेले सरदार आगीत भस्मसात

9अहज्याने आपला एक सरदार पन्नास माणसांसह एलीयाकडे पाठवला. हा सरदार एलीयाकडे गेला. एलीया तेव्हा एका डोंगराच्या माथ्यावर बसला होता. तो सरदार एलीयाला म्हणाला, "हे देवाच्या माणसा (संदेष्ट्या), राजाने तुला खाली बोलावले आहे."
10एलीयाने या सरदाराला उत्तर दिले, "मी खरेच देवाचा माणूस (संदेष्टा) असेन तर आकाशातून अग्नी प्रकट होऊन तुला आणि या पन्नास जणांना भस्मसात करू दे."
तेव्हा आकाशातून अग्नी खाली आला आणि त्यात सरदारासह ती पन्नास माणसे जळून खाक झाली.
11अहज्याने दुसऱ्या सरदाराला पन्नास जणांसह पाठवले. तो सरदार एलीयाला म्हणाला, "हे देवाच्या माणसा, 'खाली ये असा राजाचा निरोप आहे.'"
12एलीयाने त्या सर्वांना सांगितले "मी परमेश्वराचा माणूस असेन तर आकाशातून अग्नी उतरून त्यात तुम्ही सर्व जळून जाल."
तेव्हा आकाशातून परमेश्वराचा अग्नी उत्पन्न झाला आणि त्यात ते सर्वजण जळून गेले.
13अहज्याने तिसऱ्या सरदाराला पन्नास जणांसह पाठवले. तो ही सरदार आपल्या बरोबरच्या लोकांसह एलीयाकडे आला. हा सरदार गुडघे टेकून बसला आणि एलीयाची त्याने विनवणी केली. तो म्हणाला, "हे देवाच्या माणसा, मी आणि माझ्याबरोबरचे हे पन्नासजण यांच्या प्राणांचे मोल तू जाणावेस.
14आधीचे दोन सरदार आणि त्यांच्या बरोबरची पन्नास पन्नास माणसे आकाशातून आलेल्या अग्नीत नष्ट झाली. पण आता आमच्यावर दया कर आणि आम्हाला जीवदान दे."
15तेव्हा परमेश्वराचा दूत एलीयाला म्हणाला, "या सरदाराबरोबर.जा व त्याला भिऊ नकोस."
तेव्हा एलीया त्या सरदाराबरोबर राजा अहज्याला भेटायला गेला.
16एलीया अहज्याला म्हणाला, "इस्राएलचा देव परमेश्वर आहे. तरी तू एक्रोनच्या बाल-जबूबकडे माणसे का पाठवलीस? तू असे केलेस म्हणून तू आता अंथरूणावरून उठणार नाहीस. तुला मरण येईल."

## अहज्याच्या जागी यहोराम

17अहज्या मरण पावला. परमेश्वराने एलीयाला सांगितले होते तसेच झाले. अहज्याला मुलगा नव्हता. तेव्हा अहज्यानंतर यहोराम राजा झाला. यहोशाफाटचा मुलगा यहोराम यहूदावर राज्य करत असताना दुसऱ्या वर्षी हा यहोराम राज्य करू लागला.
18'इस्राएलाच्या राजांचा

इतिहास' या ग्रंथात अहज्या ने केलेली बाकीची कृत्ये लिहिलेली आहेत.

## एलीयाला घेऊन जाण्याची परमेश्वराची योजना

2 एका वावटळीद्वारे एलीयाला स्वर्गास परमेश्वराने घेऊन जाण्याची वेळ जवळ येऊन ठेपली होती. एलीया अलीशाबरोबर गिलगालला गेला.

2एलीया अलीशाला म्हणाला, "तू येथेच थांब कारण परमेश्वराने मला बेथेलला जायला सांगितले आहे."

पण अलीशा म्हणाला, "परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो की मी तुम्हाला अंतर देणार नाही." तेव्हा ते दोघेही जण बेथेल येथे गेले.

3तेव्हा संदेष्ट्यांचा बेथेलमधला एक गट अलीशाला येऊन भेटला. आणि म्हणाला, "आज तुझ्या स्वामीला परमेश्वर घेऊन जाणार आहे हे तुला माहीत आहे ना?"

अलीशा म्हणाला, "होय, मला माहीत आहे, पण ह्या विषयासबंधी बोलू नका"

4एलीया अलीशाला म्हणाला, "तू येथेच थांब, कारण परमेश्वराने मला यरीहो येथे जायला सांगितले आहे."

पण अलीशा म्हणाला, "परमेश्वराची शपथ, मी तुम्हाला सोडून राहणार नाही." तेव्हा ते दोघे यरीहोला गेले.

5तेव्हा यरीहोचे संदेष्टे अलीशाकडे आले आणि म्हणाले, "परमेश्वर तुझ्या स्वामीला आज घेऊन जाणार आहे हे तुला माहीत आहे का?"

अलीशा म्हणाला, "हो, मला कल्पना आहे, पण त्याबद्दल आता बोलू नका."

6एलीया अलीशाला म्हणाला, "तू येथेच थांब कारण परमेश्वराने मला यार्देन नदीवर जायला सांगितले आहे."

अलीशा म्हणाला, "परमेश्वराची आणि तुमच्या आयुष्याची शपथ, मी तुम्हाला अंतर देणार नाही." तेव्हा ते दोघे तसेच पुढे निघाले.

7संदेष्ट्यांपैकी पन्नास जण त्यांच्या मागोमाग निघाले.
एलीया आणि अलीशा यार्देन नदीजवळ थांबले. ते पन्नास
जण मात्र बरेच लांब उभे राहिले. 8एलीयाने आपला अंगरखा
अंगातून काढला त्याची घडी घातली आणि पाण्यावर आपटली. त्याबरोबर पाणी मधोमध उजवीकडे आणि डावीकडे दुंभगले. अलीशा आणि एलीया मधल्या कोरडया वाटेने नदी पार करून गेले.

9नदी ओलांडल्यावर एलीया अलीशाला म्हणाला, "परमेश्वराने मला येथून घेऊन जायच्या अगोदर तुला माझ्याकडून काही हवे असल्यास सांग."

अलीशा म्हणाला, "तुमच्या ठायी असलेल्या आत्म्याचा दुप्पट वाटा मला मिळावा."

10एलीया म्हणाला, "ही तर फारच कठीण गोष्ट तू मागितलीस. मला तुझ्या जवळून घेऊन जातील तेव्हा तुला मी दिसलो तर हे शक्य आहे. नाहीतर नाही."

## परमेश्वर एलीयाला स्वर्गात नेतो

11एलीया आणि अलीशा बोलत बोलत पुढे चालले होते. तेवढयात अचानक काही घोडे आणि एक रथ तेथे अवतीर्ण झाले आणि त्यांनी एलीया आणि अलीशाला एकमेकांपासून दूर केले. तो रथ आणि घोडे अग्नीप्रमाणे होते नंतर एका वावटळीमधून एलीया स्वर्गात गेला.

12अलीशाने ते पाहिले आणि तो ओरडू लागला, "माझ्या बापा! माझ्या बापा! काय हा इस्राएलचा रथ आणि हे स्वर्गीय घोडे स्वार!"

अलीशाला एलीयाचे पुन्हा कधीच दर्शन झाले नाही.
अलीशाने दु:खाच्या भरात आपले कपडे फाडले.
13एलीयाचा अंगरखा जमिनीवर पडला होता तो अलीशाने
उचलला. अलीशाने पाण्यावर तडाका देऊन म्हटले, "एलीयाचा परमेश्वर देव कुठे आहे?"

14अलीशाने पाण्यावर वार केल्याबरोबर पाणी डावीउजवीकडे दुभंगले. मग अलीशा नदी पार करून गेला.

## संदेष्ट्यांकडून एलीयाची चौकशी

15यरीहो येथील संदेष्ट्यांनी अलीशाला पाहिल्यावर ते म्हणाले, "एलीयाच्या आत्म्याचा आता अलीशात प्रवेश झाला आहे." ते सर्वजण अलीशाला भेटायला आले. त्याला
त्यांनी जमिनीपर्यंत लवून अभिवादन केले. 16मग त्याला
ते म्हणाले, "हे बघ, आमच्याकडे पन्नास एक चांगली माणसे आहेत. त्यांना जाऊन तुझ्या स्वामीचा शोध घेऊ दे. कदाचित् परमेश्वराच्या आत्म्याने एलीयाला वर नेऊन पुन्हा कोठेतरी डोंगर-दऱ्यांमध्ये टाकले असेल."

पण अलीशा म्हणाला, "नाही, आता एलीयाचा शोध घ्यायला माणसे पाठवू नका."

17पण त्या संदेष्ट्यांनी खूप मिनतवाऱ्या करून अलीशाची पंचाईत करून टाकली. शेवटी अलीशा म्हणाला, "ठीक आहे, पाठवा त्यांना एलीयाच्या शोधात."

मग त्या संदेष्ट्यांनी पन्नास जणांना एलीयाच्या शोधार्थ पाठवले. त्यांनी एलीयाचा तीन दिवस शोध घेतला पण
त्यांचा प्रयत्न निष्फळ ठरला. 18शेवटी ती माणसे यरीहो
येथे अलीशा राहात होता तेथे आली. एलीयाचा शोध लागत नाही असे त्यांनी अलीशाला सांगितले. तेव्हा आपण या गोष्टीला नको म्हणत होतो असे अलीशाने त्यांना सांगितले.

## अलीशाकडून पाण्याचे शुध्दीकरण

19एकदा त्या नगरातील माणसे अलीशाला म्हणाली, "हे नगर फार चांगल्या ठिकाणी वसले आहे हे तुम्ही पाहताच आहात पण इथले पाणी खराब आहे. त्यामुळे या
जमिनीत पिके निघू शकत नाहीत." 20अलीशा त्यांना

म्हणाला, “एक नवीन पात्र घेऊन या आणि त्यात मीठ
घाला.”
तेव्हा लोकांनी एक पात्र त्याला दिले. 21अलीशा ते
घेऊन त्या झऱ्याच्या उगमापाशी गेला. तिथे त्याने मीठ
टाकले. मग तो म्हणाला, “परमेश्वर म्हणतो, ‘आता हे
पाणी मी शुध्द करत आहे. आता या पाण्याने मृत्यू ओढवणार
नाही की पिकाची वाढ खुंटणार नाही.’”
22अशाप्रकारे पाणी शुध्द झाले ते पाणी अजूनही चांगले
आहे. अलीशा म्हणाला होता तसेच झाले.

## अलीशाची मुलांकडून चेष्टा

23अलीशा मग त्या नगरातून बेथेलला आला. तो डोंगर
चढून जात होता आणि काही मुले गावातून डोंगर उतरत
होती. त्यांनी अलीशाची टिंगल करायला सुरूवात केली.
ती म्हणाली, “अरे टकल्या वर जा, ए टकल्या, वर जा.”
24अलीशाने मागे वळून त्यांच्याकडे पाहिले आणि शापवाणी
उच्चारली. त्याबरोबर जंगलातून दोन अस्वले बाहेर आली
आणि त्यांनी या मुलांवर हल्ला केला. बेचाळीस मुलांच्या
त्या अस्वलांनी चिंधड्या केल्या.
25अलीशाने बेथेल सोडून कर्मेल डोंगराचा रस्ता धरला.
आणि तिथून मग तो शोमरोनला गेला.

## इस्राएलचा राजा यहोराम

3 अहाबाचा मुलगा यहोराम हा शोमरोन मध्ये इस्राएलचा
राजा म्हणून सत्तेवर आला. यहोशाफाटचे ते यहूदाचा
राजा म्हणून अठरावे वर्ष होते. यहोरामने बारा वर्षे राज्य
केले. 2यहोरामने परमेश्वराच्या दृष्टीने गैर अशी कृत्ये
केली. पण आपल्या आईवडीलांसारखे त्याने केले नाही.
आपल्या वडीलांनी बाल मूर्तीच्या पूजेसाठी जो स्तंभ उभारला
होता तो त्याने काढून टाकला. 3पण नबाटचा मुलगा यराबाम
याने केली तीच पापे यहोरामनेही केली. शिवाय इस्राएल
लोकांनाही ती करायला लावली. यराबामच्या पापात त्याने
खंड पाडला नाही.

## मवाब इस्राएलपासून वेगळा होतो

4मेशा हा मवाबचा राजा होता. त्याच्याकडे मेंढयांचे बरेच
कळप होते. एक लक्ष मेंढया आणि एक लक्ष एडके यांची
लोकर तो इस्राएलच्या राजाला देत असे. 5पण अहाबच्या
मृत्यूनंतर तो इस्राएलच्या सत्तेपासून फुटून वेगळा झाला.
6यहोराम मग शोमरोन मधून बाहेर पडला आणि त्याने
सर्व इस्राएल लोकांना एकत्र केले. 7यहूदाचा राजा
यहोशाफाट याच्याकडे त्याने आपले दूत पाठवले. यहोरामने
निरोप पाठवला, “मवाबच्या राजाने बंड केले आहे तेव्हा
त्याच्यावर हल्ला करायला तुम्ही माझ्या बाजूने याल का?”
यहोशाफाटने सांगितले, “होय, मी जरूर येईन तुझ्या
माझ्यात काही भेदभाव नाही. माझे सैन्य, ते तुझे सैन्य
माझे घोडे ते तुझे घोडे.”

## तीन राजांची अलीशाकडे विचारणा

8“कोणत्या वाटेने हल्ला करायला जायचे” यहोशाफाटने
यहोरामला विचारले.
यावर, “अदोमच्या वाळवंटाच्या दिशेने” असे यहोरामने
सांगितले.
9इस्राएलचा राजा, यहूदा आणि अदोम यांच्या
राजांबरोबर निघाला. सात दिवस त्यांनी वाटचाल
केली. त्यांचे सैन्य, तसेच त्यांच्याबरोबरची जनावरे
यांच्यासाठी पुरेसे पाणी नव्हते. 10तेव्हा इस्राएलचा राजा
यहोराम म्हणाला, “मवाबांच्या हातून पराभव पत्करावा
लागावा म्हणून का परमेश्वराने आम्हा तीन राजांना एकत्र
आणले आहे.?” 11यावर यहोशाफाट म्हणाला, “येथे एखादा
परमेश्वराचा संदेष्टा नक्कीच असला पाहिजे. आपण काय
करावे असे परमेश्वराला वाटते ते आपण त्यालाच विचारू
या.”
यहोरामचा एक सेवक म्हणाला, “शाफाटचा मुलगा
अलीशा इथेच आहे. एलीयाच्या हातावर तो पाणी घालत
असे, त्याचा तो सेवक होता.”
12यहोशाफाट म्हणाला, “अलीशाच्या मुखातून
परमेश्वरच बोलतो.”
मग इस्राएलचा राजा यहोराम, यहोशाफाट आणि अदोमचा
राजा असे तिघे जण अलीशाकडे गेले.
13अलीशा यहोरामला म्हणाला, “माझ्याकडून तुला काय
पाहिजे? तू आपल्या वडीलांच्या किंवा आईच्या संदेष्ट्यांकडे
जा.”
तेव्हा इस्राएलचा राजा अलीशाला म्हणाला, “नाही, आम्ही
तुझ्याकडे आलो आहोत कारण मवाबांचा पराभव करायला
आम्हा तीन राजांना परमेश्वराने एकत्र आणले आहे.
आम्हाला तुझ्या मदतीची गरज आहे.”
14अलीशा म्हणाला, “मी यहुदाचा राजा यहोशाफाट
याचा आदर करतो व सर्वशक्तिमान परमेश्वराचा मी
सेवक आहे. त्याला स्मरून मी सांगतो की यहूदाचा राजा
यहोशाफाट याच्यामुळे मी येथे आलो आहे. मी
तुम्हाला खरे सांगतो जर यहूदाचा राजा यहोशाफाट
इथे नसता तर मी तुझी दखलही घेतली नसती.
15तेव्हा आता एखारू वीणावादकाला इथे बोलावून
आणा.”
एक वादक येऊन वीणा वाजवू लागला तेव्हा परमेश्वराचे
सामर्थ्य अलीशात आले. 16मग अलीशा म्हणाला,
“परमेश्वराचे म्हणणे असे आहे: या खोऱ्यात जागोजाग
खणून ठेवा 17परमेश्वर म्हणतो तुम्हाला वारा, पाऊस
काही दिसणार नाही पण तरीही हे खोरे पाण्याने भरून
जाईल. तुम्हाला आणि तुमच्या जनावरांना पाणी मिळेल.
18परमेश्वराला एवढे करणे सोपे आहे. मवाबांचाही तुम्हाला
तो पराभव करू देईल. 19प्रत्येक तटबंदीच्या व चांगल्या
बंदोबस्त आणि निवडक नगरांवर तुम्ही हल्ला कराल.
प्रत्येक चांगला वृक्ष तुम्ही तोडून टाकाल, पाण्याचे झरे,

विहिरी बुजवून टाकाल. दगडफेक करून चांगल्या शेतांची
नासाडी कराल.”
20नंतर सकाळी, सकाळच्या यज्ञाच्या वेळी, अदोमच्या
बाजूने पाण्याचा लोंढा आला आणि सगळे खोरे पाण्याने
भरले.
21राजे आपल्यावर हल्ला करायला आले आहेत हे
मवाबच्या लोकांनी ऐकले तेव्हा त्यांनी आपल्याकडच्या
युध्दात उतरता येण्याजोग्या सर्व पुरूषांना एकत्र केले.
युध्दासाठी सज्ज होऊन ते सीमेवर जाऊन थांबले. 22मवाबचे
लोक त्या दिवशी भल्या पहाटे उठले. उगवत्या सूर्याची
लाली खोऱ्यातल्या पाण्यात प्रतिबिंबित होऊन चमकत
होती. तेव्हा मवाबी लोकांना ते रक्ताचे पाटच वाटले. 23ते
म्हणाले, “ते बघा रक्त! या राजांची आपापसात लढाई
झालेली दिसते. त्यांनी परस्परांना मारले आहे. चला, आपण
त्या मृतदेहावरील मौल्यवान वस्तू लुटून आणू.”
24मवाबी लोक इस्राएलांच्या छावणीपाशी आले. तेव्हा
इस्राएल लोकांनी बाहेर येऊन मवाबी सैन्यावर हल्ला
केला. मवाबी लोक पळत सुटले. इस्राएल लोकांनी त्यांचा
पाठलाग करत त्यांच्या प्रदेशात शिरकाव केला. 25इस्राएल
लोकांनी त्यांची नगरे उध्वस्त केली. पिके उभी असलेल्या
त्यांच्या शेतात दगडांचा मारा केला. झरे, विहिरी बुजवल्या.
झाडे आडवी केली. कीर हरेसेथ येथपर्यंत इस्राएल लोकांनी
चढाई केली. कीर हरेसेथला वेढा घालून या नगराचाही
पाडाव केला. 26या लढाईला तोंड देणे आपल्याला जड
जात आहे हे मवाबाच्या राजाने जाणले. तेव्हा त्याने
तलवारधारी सातशे निवडक माणसे बरोबर घेतली आणि
वेढा फोडून अदोमच्या राजाला तो मारायला निघाला पण
त्याला ते जमले नाही.
27मग मवाबच्या राजाने आपल्या थोरल्या मुलाला बरोबर
घेतले. हा मुलगा त्याच्यानंतर गादीवर बसणार होता.
नगराच्या तटबंदीच्या भिंतीवर या राजाने आपल्या मोठ्या
मुलाचा यज्ञात बळी दिला. इस्राएल लोकांना या गोष्टीचा
धक्का बसला. मवाबच्या राजाला सोडून ते आपल्या देशात
चालते झाले.

## एका संदेष्ट्याच्या विधवेची अलीशाकडे मदतीसाठी याचना

4 संदेष्ट्यांपैकी एकजण वारला तेव्हा त्याची बायको
विधवा झाली. ती अलीशाकडे रडत रडत आली,
आणि म्हणाली, “माझा नवरा तुझा सेवक असल्यासारखा
होता. परंतु आता तो मरण पावला आहे. परमेश्वराचा तो
मान राखत असे हे तुला माहीत आहे. पण तो एका
माणसाचे देणे लागत होता. तो माणूस आता माझ्या मुलांना
गुलाम करून घ्यायला येतो आहे.”
2अलीशा म्हणाला, “मी तुला काय मदत करू? घरात
तुझ्या जवळ काय आहे ते सांग.”
तेव्हा ती बाई म्हणाली, “एका तेलाचा बुधला सोडला
तर माझ्याजवळ काहीही नाही.”
3यावर अलीशाने तिला सांगितले, “आता जा आणि
सगळ्या शेजाऱ्यांकडून रिकामी भांडी मागून आण. चांगली
बरीचशी आण. 4मग घराचे दार आतून लावून घे. फक्त तू
आणि तुझी मुलेच घरात राहा. ते सगळे तेल या रिकाम्या
भांड्यामध्ये ओत. आणि ती सगळी भरलेली भांडी एका
बाजूला ठेव.”
5मग ती बाई अलीशाकडून निघून आपल्या घरी आली
आणि तिने दार आतून लावून घेतले. फक्त ती आणि
तिची मुलेच काय ती घरात होती. मुलांनी रिकामी भांडी
आणली आणि ती त्यात तेल ओतत गेली. 6अशी अनेक
भांडी भरली शेवटी ती आपल्या मुलाला म्हणाली, “आणखी
एक भांडे घेऊन ये.”
पण एकही भांडे शिल्लक नव्हते तिचा एक मुलगा
तिला म्हणाला, “आता एकही भांडे उरले नाही” त्यावेळी
बुधल्यातले तेल संपले. 7मग ती अलीशाकडे आली आणि
तिने त्या परमेश्वराच्या माणसाला हे सांगितले. अलीशा
तिला म्हणाला, “आता हे तेल वीक आणि कर्जफेड कर.
उरेल त्या पैशावर तुझा आणि तुझ्या मुलांचा निर्वाह
चालेल.”

## शूनेममधली बाई अलीशाला एक खोली देते

8एकदा अलीशा शूनेम येथे गेला. तेथे एक प्रतिष्ठित
बाई राहात होती. तिने अलीशाला आपल्या घरी येऊन
जेवायचा आग्रह केला. त्यामुळे अलीशा जेव्हा जेव्हा तिकडून
जाई तेव्हा तेव्हा या बाईकडे जेवणासाठी मुक्काम करत
असे.
9एकदा ही बाई आपल्या नवऱ्याला म्हणाली, “पाहा
आपल्या इथे नेहमी येतो तो अलीशा परमेश्वराचा पवित्र
माणूस आहे, तो नेहमी आपल्या घरावरून जातो. 10तेव्हा
त्याच्यासाठी वर एक लहानशी खोली बांधू या आणि एक
पलंग, एक टेबल खुर्ची आणि दिव्याची सोय पण करू.
म्हणजे तो जेव्हा येईल तेव्हा त्याला उतरायला ही खोली
होईल.”
11मग एक दिवशी अलीशा त्या घरी आला. तेव्हा त्याने
त्या खोलीत आराम केला. 12अलीशाने तेव्हा आपला
सेवक गेहजी त्याला त्या शूनेमच्या बाईला बोलावून
आणायला सांगितले.
त्याप्रमाणे गेहजीने त्या बाईला बोलावले. ती येऊन
अलीशा पुढे उभी राहिली. 13अलीशा आपल्या नोकराला
म्हणाला, “तिला सांग, “तू आमची चांगली बडदास्त ठेवली
आहेस. तेव्हा मी तुझ्यासाठी काय करू? राजाशी किंवा
सेनापतीशी बोलू का?””
ती बाई म्हणाली, “मी सुखासमाधानाने माझ्या माणसांमध्ये
राहात आहे.” 14अलीशा गेहजीला म्हणाला, “आपण
तिच्यासाठी काय करू शकतो?”

गेहजी म्हणाला, “मला माहीत आहे की तिला मूलबाळ नाही आणि तिचा नवरा वृध्द आहे.”

15मग अलीशा म्हणाला, “बोलाव तिला”

गेहजीने पुन्हा तिला बोलावले ती येऊन दाराशी उभी राहिली. 16अलीशा तिला म्हणाला, “पुढील वसंत ऋतुत याच सुमारास तू आपल्या पोटच्या मुलाला कुशीत घेऊन बसलेली असशील.”

ती म्हणाली, “नाही, माझे स्वामी, तुम्ही परमेश्वराचे माणूस आहात, माझ्याशी खोटे बोलू नका.”

## शूनेमच्या बाईला मुलगा होतो

17या बाईला दिवस राहिले. अलीशा म्हणाला त्याप्रमाणेच वसंतात तिने एका मुलाला जन्म दिला.

18मुलगा मोठा होत होता. एकदा हा मुलगा शेतात कापणी चाललेली असताना वडीलांना आणि इतर लोकांना भेटायला गेला. 19तो वडीलांना म्हणाला, “माझे डोके पाहा किती भयंकर दुखत आहे.”

यावर त्याचे वडील आपल्या नोकराला म्हणाले, “याला त्याच्या आईकडे घेऊन जा.”

20नोकराने मुलाला त्याच्या आईकडे पोचवले. दुपारपर्यंत हा मुलगा आईच्या मांडीवर बसला होता. मग तो मेला.

## ही बाई अलीशाला भेटायला जाते

21या बाईने आपल्या मुलाला परमेश्वराचा माणूस अलीशाच्या पलंगावर ठेवले. खोलीचे दार लावून घेतले आणि ती बाहेर पडली.

22नवऱ्याला हाक मारून ती म्हणाली, “एक नोकर आणि एक गाढव माझ्याबरोबर रू. म्हणजे मी ताबडतोब, परमेश्वराच्या माणसाला (अलीशाला) भेटून येते.“

23त्या बाईचा नवरा तिला म्हणाला, “आजच त्याच्याकडे कशाला जातेस? आज अमावास्या नाही की शब्बाथ नाही.”

ती म्हणाली, “काही काळजी करू नका. सगळे ठीक होईल.”

24मग गाढवावर खोगीर चढवून ती नोकराला म्हणाली, “आता चल आणि भरभर जाऊ मी सांगितल्या शिवाय वेग कमी करू नको!”

25परमेश्वराच्या माणसाला (अलीशाला) भेटायला ती कर्मेल डोंगरावर गेली.

अलीशाने तिला दुरूनच येताना पाहिले. तो गेहजी या आपल्या नोकराला म्हणाला, “बघ, ती शूनेमची बाई येतेय
26पटकन धावत पुढे जा आणि तिची खबरबात विचार. तिचा नवरा, तिचा मुलगा यांचे कुशल विचार.”

गेहजीने तिला सर्व विचारले. तिने सर्व काही ठीक असल्याचे सांगितले.

27पण ती डोंगर चढून वर गेली. अलीशाला वंदन करून त्याचे पाय धरले. तिला दूर करायला गेहजी पुढे झाला. पण अलीशा त्याला म्हणाला, “तू मधे पडू नको, ती काळजीत आहे. परमेश्वराने मला याबद्दल सांगितले नाही. या बाबतीत त्याने मला अंधारात ठेवले.” (त्याने ही बातमी माझ्यापासून लपवली)

28मग ती शूनेमची बाई म्हणाली, “माझे स्वामी, मी मुलगा मागितला नव्हता. ‘मला खोटी आशा दाखवू नका’ असे मी म्हणाले होते.”

29तेव्हा अलीशा गेहजीला म्हणाला, “चल, निघायची तयारी कर. माझी काठी बरोबर घे. कुणाशीही बोलत थांबू नको. कोणी तुला भेटले तर नमस्कार करण्यापुरताही थांबू नको. कोणाच्या अभिवादनाला उत्तर देऊ नको. माझ्या काठीने त्या मुलाच्या चेहऱ्याला स्पर्श कर.”

30पण ती मुलाची आई म्हणाली, “परमेश्वरा शपथ आणि तुमची शपथ मी तुमच्या वाचून इथून हलणार नाही!”

तेव्हा अलीशा उठला आणि तिच्याबरोबर निघाला.

31अलीशा आणि ती बाई यांच्याअगोदरच गेहजी त्या घरी जाऊन पोचला. त्याने काठी त्या मुलाच्या चेहऱ्यावर टेकवली. पण ते मूल बोलले नाही की कसली चाहूल त्याला लागल्याचे दिसले नाही. तेव्हा गेहजी परत फिरला आणि अलीशाला म्हणाला, “मूल काही उठत नाही.”

## शूनेमच्या बाईचे मूल जगते

32अलीशा घरात आला. ते मूल त्याच्या अंथरूणावर मृतावस्थेत पडले होते. 33अलीशाने खोलीत शिरून दार लावून घेतले. आता खोलीत ते मूल आणि अलीशा अशी दोघंच होती. अलीशाने मग परमेश्वराची प्रार्थना केली.

34अलीशा पलंगाजवळ आला आणि मुलाच्या अंगावर पालथा पडला. त्याने आपले तोंड मुलाच्या तोंडावर आणि डोळे मुलाच्या डोळ्यावर टेकवले. आपले हात त्याच्या हातावर ठेवले. अशा प्रकारे अलीशाने त्याला अंगाशी घेतल्यावर त्या मुलाच्या अंगात ऊब निर्माण झाली.

35अलीशा मग खोलीतून बाहेर पडला आणि घरातल्या घरात एक चक्कर मारली. मग पुन्हा खोलीत शिरून मुलाच्या अंगावर पालथा पडला. मुलाला एकापाठोपाठ सात शिंका आल्या आणि त्याने डोळे उघडले. 36अलीशाने गेहजीला हाक मारून त्या शूनेमच्या बाईला बोलवायला सांगितले.

गेहजीने तिला तसे सांगितल्यावर ती अलीशासमोर येऊन उभी राहिली. अलीशा तिला म्हणाला, “घे आता मुलाला उचलून.”

37यावर त्या शूनेमच्या बाईने खोलीत शिरून अलीशाचे पाय धरले, मुलाला उचलून घेतले आणि बाहेर आली.

## अलीशा आणि विषारी शाकभाजी

38अलीशा गिलगाल येथे परत आला. तेव्हा त्या प्रदेशात दुष्काळ पडलेला होता. संदेष्ट्यांचा गट अलीशासमोर बसला

होता. अलीशा आपल्या सेवकाला म्हणाला, “एक मोठे
पातेले अग्निवर ठेव आणि या संदेष्ट्यांसाठी शाकभाजी
कर.”
39यावर एकजण रानात पाला गोळा करून आणायला
गेला. तेव्हा त्याला एक रानवेल दिसला. त्याची फळे
तोडून त्याने अंगरख्याच्या खिशात भरली. परत येऊन
त्याने ती फळे कापून अग्निवरच्या भांड्यात टाकली.
परंतु ती फळे कशाची आहेत ते काही त्या संदेष्ट्यांना
माहीत नव्हते.
40मग ही शाकभाजी सर्वांना खायला दिली. खायला
लागल्यावर सर्वजण अलीशाला ओरडून सांगायला लागले.
“परमेश्वराच्या माणसा, या भांड्यात तर विष आहे.”
शाकभाजी अपायकारक असल्याने त्यांना ते खाता
येईना.
41तेव्हा अलीशा म्हणाला, “थोडे पीठ आणा.” पीठ
आणून दिल्यावर अलीशाने ते मोठ्या भांड्यात घातले.
मग अलीशा म्हणाला, “आता हे सगव्व्यांना वाढा.”
आता त्या शाक भाजीत काही दोष राहिला नव्हता.

## अलीशा संदेष्ट्यांना खाऊ घालतो

42बाल-शालीश येथून एकदा एक माणूस आपल्या
नव्या पिकाची भाकर परमेश्वराच्या माणसासाठी घेऊन
आला. त्याने सातूच्या वीस भाकऱ्या आणि पोतेभरून
कोवळी कणसे आणली होती. तेव्हा अलीशा म्हणाला,
“हे सर्व या लोकांना खायला दे.”
43अलीशाचा सेवक म्हणाला, “काय? इथे तर शंभर
माणसे आहेत. एवढ्या सगव्व्यांना हे कसे पुरेल?”
पण अलीशाने त्याला सांगितले, “तू खुशाल ते आहे
तेवढे या सर्वांना दे. ‘ते पोटभर खातील आणि शिवाय
त्यातून उरेल,’ असे परमेश्वर म्हणतो.”
44मग अलीशाच्या नोकराने त्या संदेष्ट्यांसमोर सर्व
अन्न ठेवले. त्यांनी ते पोटभर खाल्यावरही काही अन्न
शिल्लक उरलेच. परमेश्वर म्हणाला तसेच झाले.

## नामानची समस्या

5 नामान हा अरामच्या राजाचा सेनापती होता. तो
राजाच्या लेखी फार महत्वाचा माणूस होता कारण
त्याच्या मार्फतच परमेश्वर अरामाच्या राजाला विजय
मिळवून देत असे. नामान चांगला शूर वीर होता खरा,
पण त्याला कोड होते.
2अरामी सैन्याच्या बऱ्याच फौजा इस्राएलमध्ये लढाईवर
गेल्या होत्या, तेथून त्या सैनिकांनी बरेच लोक गुलाम
म्हणून धरून आणले होते. एकदा त्यांनी इस्राएलमधून
एक लहान मुलगीही आणली. ती पुढे नामानच्या
बायकोची दासी झाली. 3ती नामानच्या बायकोला म्हणाली,
“आपल्या मालकांनी शोमरोनमधला संदेष्टा अलीशा
याला भेटावे असे मला वाटते. तो यांचे कोड बरे करू
शकेल.” 4नामान मग अरामच्या राजाकडे गेला. त्याने
राजाला ही इस्राएलची मुलगी काय म्हणाली ते सांगितले.
5त्यावर राजा म्हणाला, “तू आत्ताच जा. इस्राएलच्या
राजासाठी मी पत्र देतो.”
तेव्हा नामान इस्राएलला निघाला. आपल्याबरोबर त्याने
नजराणा घेतला. साडेसातशे पौंड चांदी, सहा हजार सुवर्णमुद्रा
आणि दहा वस्त्रांचे जोड घेतले. 6आपल्या राजाकडून
त्याने इस्राएलच्या राजासाठी पत्रही घेतले. पत्रात म्हटले
होते. “... आणि पत्रास कारण की माझ्या सेवेतील नामान
याला तुमच्याकडे पाठवत आहे. त्याचे कोड बरे
करावे.”
7इस्राएलच्या राजाने हे पत्र वाचले तेव्हा आपण दु:खी
आणि हतबल झालो आहोत हे दाखवण्यासाठी त्याने आपले
कपडे फाडून घेतले. तो म्हणाला, “मी परमेश्वर आहे
की काय? छे छे! जीवन आणि मृत्यू यावर माझी सत्ता
नाही. असे असताना अरामच्या राजाने कोड असलेल्या
माणसाला उपचारासाठी माझ्याकडे का बर पाठवावे?
तसा विचार केला तर यात काही तरी कारस्थान दिसते.
अरामचा राजा काही तरी कुरबूर सुरू करायच्या विचारात
आहे!”
8राजाचे हे दु:खाने कपडे फाडणे आणि अस्वस्थ होणे
संदेष्टा अलीशाच्या कानावर गेले. त्याने मग राजाला
निरोप पाठवला, “तू कपडे का फाडलेस? (तू एवढा
दु:खी का होतोस?) नामानला माझ्याकडे येऊ दे म्हणजे
इस्राएलमध्ये संदेष्टा असल्याचे त्याला कळेल.”
9तेव्हा नामान आपले रथ, घोडे यांसह अलीशाच्या
घराशी आला आणि दाराबाहेर थांबला. 10अलीशाने नोकरा
मार्फत नामानला निरोप पाठवला, “तू जाऊन यार्देन नदीच्या
प्रवाहात सात वेळा स्नान कर म्हणजे तुझी त्वचा रोगमुक्त
होईल. तू निर्मळ, नितळ होशील.”
11नामान हे ऐकून खूप रागावला आणि निघून गेला.
तो म्हणाला, “मला वाटले, अलीशा निदान बाहेर येईल,
माझ्या समोर येऊन उभा राहील. त्याच्या परमेश्वर देवाचे
नाव घेऊन आपला हात माझ्या अंगावरून फिरवील
आणि मला बरे करील. 12अबाना आणि परपर या
दिमिष्कातील नद्या इस्राएलमधील पाण्यापेक्षा निश्चितच
चांगल्या आहेत. मग त्यातच स्नान करून मी शुध्द का
होऊ नये?” एवढे बोलून संतापाने नामान तोंड फिरवून
निघून गेला.
13पण नामानचे नोकर त्याच्या पाठोपाठ गेले आणि
त्यांनी त्याला समजावले. ते म्हणाले. “स्वामी, संदेष्ट्याने
तुम्हाला एखादी मोठी गोष्ट करायला सांगितली असती
तर तुम्ही ती केली असती नाही का? मग एखादी साधीशी
बाब तुम्ही ऐकायलाच हवी नाही का? ‘आंघोळ कर.’
त्याने तू स्वच्छ, निर्दोष होशील एवढेच तर त्याने सांगितले.”
14तेव्हा नामानने अलीशाच्या म्हणण्याप्रमाणे केले. यार्देन

नदीत त्याने सात वेळा बुडी मारून स्नान केले. त्याने तो
स्वच्छ, नितळ झाला. त्याची त्वचा लहान बाळासारखी
कोमल झाली.
15नामान आणि त्याच्या बरोबरचे लोक अलीशा
संदेष्ट्याकडे आले. त्याच्यासमोर उभे राहून म्हणाले,
“इस्राएल मधल्या खेरीज दुसरा कोणी परमेश्वर
पृथ्वीतलावर नाही हे आता मला कळले. माझ्याकडून
कृपया, ही भेट घ्यावी.”
16पण अलीशा त्यांना म्हणाला, “मी परमेश्वराचा सेवक
आहे. आणि त्याची शपथ घेऊन सांगतो, मी कोणतीही
भेट वगैरे घेणार नाही.”
आपल्या भेटीचा स्वीकार करावा म्हणून नामानने
अलीशाला परोपरीने विनवले पण अलीशाचा नकारच
होता. 17तेव्हा नामान म्हणाला, “माझ्या कडून तुम्ही भेट
तर घेत नाहीच. मग एवढे करावे. माझ्या दोन खेचरावर
लादून नेता येईल इतकी इस्राएलची माती नेण्याची मला
मुभा **द्यावी**.* म्हणजे मी यापुढे दुसऱ्या कोणत्याही दैवतांना
होमबली अर्पण करणार नाही. फक्त परमेश्वरासाठीच
यज्ञ करीन. 18आणखी एका गोष्टीसाठी परमेश्वराने
मला क्षमा करावी अशी माझी कळकळीची विनंती
आहे. अरामचा राजा माझा स्वामी, रिम्मोनच्या खोट्या
दैवतांच्या पूजेला जातील. ते माझा आधार मागतील तेव्हा
मला ही तिथे नमन करावे लागेल. असे झाले असता
परमेश्वराने मला क्षमा करावी, माझी ही विनंती आहे.
19तेव्हा अलीशाने नामानला निर्धास्तपणे जायला सांगून
निरोप दिला.”
मग नामान तिथून निघाला आणि थोडा पुढे गेला
असेल तेवढ्यात 20अलीशाचा नोकर गेहजी याला वाटले,
“पाहा, माझ्या धन्याने या अरामच्या नामानला तसेच,
त्याच्या कडून भेट न स्वीकारता जाऊ दिले. मीच
आता धावत जाऊन त्याला गाठतो आणि काहीतरी
पदरात पाडून घेतो.” 21आणि गेहजी नामानच्या मागे
निघाला.
नामानने आपल्या मागून कोणाला तरी पळत येताना
पाहिले. तेव्हा तो रथातून उतरला. त्याला गेहजी दिसला.
नामान म्हणाला, “सगळे ठीक आहे ना?”
22गेहजी म्हणाला, “हो, तसे सगळे ठीक आहे. माझे
स्वामी अलीशा यांनी मला पाठवले आहे. त्यांनी सांगितले
आहे, ‘एफ्राईमच्या डोंगराळ प्रदेशातून संदेष्ट्यांची दोन तरूण
मुले आमच्याकडे आली आहेत. तेव्हा त्यांना पंचाहत्तर
पौंड चांदी आणि दोन वस्त्रांचे जोड द्या.’”
23नामान म्हणाला, “जरूर, ही घ्या दीडशे पौंड चांदी.”
नामानने गेहजीला ती चांदी घ्यायला लावली. नामानने ती
दीडशे पौंड चांदी दोन थैल्यांमध्ये भरली आणि दोन वस्त्रांचे
जोड घेतले. मग या वस्तू आपल्या दोन नोकरांच्या हवाली
करून गेहजीकडे त्या पोचवायला सांगितल्या.
24डोंगराशी आल्यावर गेहजीने नोकरांकडून ते सर्व
घेतले आणि त्यांना परत पाठवले. नोकर माघारी आले.
गेहजीने मग हा ऐवज आपल्या घरात लपवला.
25गेहजी आला आणि आपले स्वामी अलीशा यांच्यासमोर
उभा राहिला अलीशाने गेहजीला विचारले, “तू कुठे गेला
होतास?”
गेहजी म्हणाला, “मी कुठेच गेलो नव्हतो.”
26अलीशा त्याला म्हणाला, “हे खरे नव्हे, नामान तुला
भेटायला आपल्या रथातून उतरला तेव्हा माझे हृदय
तुझ्यापाशीच होते. पैसाअडका, कपडेलत्ते जैतूनाची फळे,
द्राक्षे, शेव्व्या, गायी, किंवा दास दासी भेटी दाखल
घेण्याची ही वेळ नव्हे. 27नामानचा रोग आता तुला
आणि तुझ्या मुलांना होईल. तुमच्यावर हे कोड सतत
राहिल.”
अलीशाकडून गेहजी निघाला तेव्हा त्याची त्वचा
बर्फासारखी पांढरी शुभ्र झाली होती. गेहजीला कोड उठले
होते.

## अलीशा आणि कुऱ्हाड

6 एकदा संदेष्ट्याची मुले अलीशाला म्हणाली, “आम्ही
राहतो ती जागा आम्हाला अपुरी पडते. 2यार्देन नदीवर
जाऊन आम्ही लाकूड तोडून आणतो. एकेकजण एकेक
ओंडका आणू आणि आमच्यासाठी तिथे राहायला घर
बांधू.”
अलीशा म्हणाला, “छान, जा आणि कामाला लागा.”
3एकजण म्हणाला, “आमच्याबरोबर चला.”
अलीशा म्हणाला, “ठीक आहे, येतो.”
4तेव्हा अलीशा त्या संदेष्ट्यांच्या मुलांबरोबर गेला. ते
यार्देन नदी जवळ आले आणि झाडे तोडायला लागले.
5झाड पाडत असताना एकाचे लोखंडी कुऱ्हाडीचे पाते
निसटले आणि पाण्यात पडले. तेव्हा तो ओरडला, “स्वामी,
मी तर ही कुऱ्हाड उसनी मागून आणली होती.”
6अलीशाने विचारले, “ती पडली कुठे?”
तेव्हा त्याने, लोखंडी कुऱ्हाडीचे पाते पडले ती जागा
दाखवली. अलीशाने मग एक काठी घेतली आणि ती त्या
जागी पाण्यात टाकली. त्याबरोबर ते पाते काठीबरोबर
तरंगत वर आले. 7अलीशा म्हणाले, “घे ते पाते उचलून.”
मग त्या माणसाने पुढे होऊन पाते उचलले.

## आरामच्या राजाचा इस्राएलच्या राजावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न

8अरामच्या राजाची इस्राएलशी लढाई चाललेली
असताना त्याने आपल्या सैन्याच्या अधिकाऱ्यांची एक
सभा बोलावली. राजा म्हणाला, “अमुक ठिकाणी दबा

---

**इथली माती ... द्यावी** इस्राएलाची माती पवित्र आहे तेव्हा आपल्या देशात गेल्यावर देवाच्या पूजेसाठी ती न्यावी अशी नामानची समजूत असावी.

धरून बसा आणि इम्राएली लोक येतील तेव्हा त्यांच्यावर हल्ला करा."

9पण संदेष्टा अलीशा याने इम्राएलच्या राजाला निरोप पाठवून सांगितले, "सावधगिरीने वागा. त्या ठिकाणी जाऊ नका. तेथे अरामी सैन्य लपून बसले आहे.
10ज्या जागेबद्दल अलीशाने सावधगिरीचा इषारा दिला त्या ठिकाणच्या आपल्या माणसांना इम्राएलच्या राजाने तसा निरोप पाठवला आणि बऱ्याच जणांचे प्राण वाचवले."

11या गोष्टीचा अरामच्या राजाला धक्का बसला. त्याने पुन्हा आपल्या अधिकाऱ्यांना बोलवून घेतले आणि त्यांना तो म्हणाला, "इम्राएलच्या राजासाठी कोण हेरगिरी करत आहे ते सांगा."

12तेव्हा त्या अधिकाऱ्यांपैकी एकजण म्हणाला, "स्वामी, आमच्यापैकी कोणीही हेर नाही. इम्राएलचा तो संदेष्टा अलीशाच त्यांच्या राजाला अनेक गुपिते सांगतो. अगदी तुमच्या शयनगृहात चाललेले बोलणे देखील!"

13तेव्हा अरामचा राजा म्हणाला, "कुठे आहे तो अलीशा. त्याला पकडायला मी माणसे पाठवतो!"

तेव्हा अरामच्या राजाच्या सेवकांनी त्याला, अलीशा दोथानमध्ये असल्याचे सांगितले.

14मग अरामच्या राजाने घोडे, रथ आणि बरेचसे सैन्य दोथान कडे रवाना केले. ते रात्री तेथे पोचले आणि त्यांनी नगराला वेढा घातला.
15अलीशाचा सेवक पहाटे उठला आणि बाहेर येऊन पाहतो तो, रथघोडे यांसह नगराभोवती सैन्य पसरलेले.

अलीशाचा सेवक अलीशाला म्हणाला, "स्वामी, आता आपण काय करायचे?"

16अलीशा म्हणाला, "घाबरू नको! अरामच्या सैन्यापेक्षा आपले सैन्य किती तरी मोठे आहे!"

17आणि अलीशाने प्रार्थना केली. तो म्हणाला, "परमेश्वरा, माझ्या सेवकाचे डोळे उघड म्हणजे त्याला नीट दिसेल."

परमेश्वराने त्या सेवकाचे डोळे उघडले. तेव्हा त्याला अलीशाच्या भोवती अग्नीचे घोडे आणि रथ डोंगरावर पसरलेले दिसले.

18हे अग्नीरथ आणि अग्नीचे घोडे खाली अलीशाजवळ उतरले. अलीशाने परमेश्वराची प्रार्थना करून म्हटले, "तू या लोकांना आंधळे करून टाकावेस अशी मी तुला विनंती करतो."

अलीशाच्या या विनंतीनुसार परमेश्वराने अरामी सैन्याला आंधळे केले.
19अलीशा त्या अरामी सैन्याला म्हणाला, "हा रस्ता बरोबर नाही तसेच तुम्हाला हवे ते नगरही हे नव्हे. माझ्या मागोमाग या म्हणजे तुम्ही ज्याच्या मागावर आहात तो माणूस मी तुम्हाला दाखवतो." अलीशाने मग त्या अरामी सैन्याला शोमरोनला नेले.

20ते शोमरोन येथे आले तेव्हा अलीशा म्हणाला, "परमेश्वरा, आता यांना दिसू दे. त्यांचे डोळे उघड."

परमेश्वराने मग त्यांचे डोळे उघडले. तेव्हा त्या सैन्याला आपण शोमरोनमध्ये असल्याचे कळले.
21इम्राएलच्या राजाने हे अरामी सैन्य पाहिले. राजा अलीशाला म्हणाला, "बाबा, मी यांना मारू का? त्यांना ठार करू का?"

22अलीशा म्हणाला, "नाही, यांना मारू नको. लढाईत ज्यांना पकडून आणले त्यांना तलवारीने किंवा धनुष्यबाणाने मारायचे नसते. या अरामी सैन्याला खायला प्यायला दे. थोडी भाकर आणि पाणी दे मग त्यांना आपल्या धन्याकडे परत जाऊ दे.
23इम्राएलच्या राजाने या सैन्याच्या जेवणाची व्यवस्था केली. मग त्या अरामी सैन्याचे खाणे पिणे झाल्यावर राजाने त्यांना परत पाठवले. ते सैन्य आपल्या राजाकडे परत आले. मग पुन्हा अरामी सैन्याची धाड इम्राएलवर आली नाही."

## शोमरोन मधील भयंकर दुष्काळ

24या नंतर, अरामचा राजा बेन-हदाद याने आपल्या सर्व सैन्याची जमवाजमव केली आणि शोमरोन नगराला वेढा दिला.
25या सैन्याने नगरात अन्न धान्य जाऊ देण्यास बंदी घातली. त्यामुळे शोमरोनमध्ये लोकांची अन्नान्न दशा झाली. गाढवाचे मुंडके ऐंशी रौप्यमुद्रांना आणि कबुतराची विष्ठा पाच रौप्यमुद्रांना विकली जाऊ लागली इतकी लोकांवर वाईट वेळ आली.

26असे चाललेले असताना इम्राएलचा राजा एकदा शहराच्या तटबंदीवरून चालला होता. तेव्हा एका बाईने त्याला मोठ्याने हाक मारली आणि सांगितले, "माझे स्वामी व प्रभू कृपाकरून मला मदत करा!"

27इम्राएलचा राजा तिला म्हणाला, "जर परमेश्वर तुला मदत करत नाही तरी मी कशी तुला मदत करू? माझ्या जवळ तुला देण्यासारखे काहीच नाही ना खळ्यांतले धान्य, ना द्राक्षकुंडातील द्राक्षारस."
28मग त्याने तिच्या समस्येविषयी विचारपूस केली. ती म्हणाली, "ही बाई मला म्हणाली, 'तुझा मुलगा दे म्हणजे आज आपण त्याला मारून खाऊ मग उद्या आपण माझा मुलगा खाऊ.'
29तेव्हा माझ्या मुलाला मारून त्याचे मांस शिजवून आम्ही खाल्ले. दुसऱ्या दिवशी मी तिला म्हणाले, 'आता तुझ्या मुलाला आण म्हणजे त्याला आपण खाऊ.' पण तिने आपल्या मुलाला लपवून ठेवले आहे."

30बाईचे हे बोलणे ऐकून राजा इतका व्यथित झाला की दुःखाच्या भरात त्याने आपले कपडे फाडले. तो तिथून पुढे गेला तेव्हा त्याने आतून जाडेभरडे कपडे घातलेले लोकांनी पाहिले. तेव्हा तो दुःखी आणि उदास आहे हे लोकांच्या लक्षात आले.

31राजा म्हणाला, "आज दिवस मावळे पर्यंत शाफाटच्या मुलगा अलीशा याचे मस्तक त्याच्या धडावर राहिले तर परमेश्वर मला हवे ते शासन करो!"

32राजाने अलीशाकडे एक दूत पाठवला. अलीशा आपल्या घरात बसला होता आणि गावातील वडीलधारी

मंडळी त्याच्या बैठकीत बसली होती. हा दूत तेथे पोचण्यापूर्वी
अलीशा त्या लोकांना म्हणाला, "हे बघा, तो इस्राएलचा
घातकी राजा माझा शिरच्छेद करण्यासाठी माणसे पाठवत
आहे. तेव्हा आता दूत येईल तेव्हा दार लावून घ्या. त्याला
अजिबात आत येऊ देऊ नका. त्याच्या मागोमाग त्याच्या
स्वामीच्या पावलांची चाहूल मला लागली आहे!"
33अलीशा हे बोलत असतानाच दूत त्याच्या जवळ आला.
त्याने निरोप दिला "हे संकट परमेश्वराकडूनच आले
आहे. आता मी त्याची आणखी वाट कशासाठी पाहू?"

7 अलीशा म्हणाला, 'परमेश्वराचा हा संदेश लक्षपूर्वक
ऐका, परमेश्वर म्हणतो 'उद्या या वेळेपर्यंत
अन्नधान्याची रेलचेल होईल. शिवाय ते स्वस्तही असेल.
शोमरोनच्या वेशीजवळच्या बाजारपेठेत एका शेकेलला
मणभर मैदा किंवा दोन मण सातू सहज मिळेल."
2तेव्हा राजाच्या अगदी निकट असलेला एक अधिकारी
अलीशाला म्हणाला, "परमेश्वराने आकाशाला खिंडारे
पाडली तरी असे घडणे शक्य नाही."

अलीशा त्याला म्हणाला, "आपल्या डोळ्यांनी तू ते
बघशीलच पण तू मात्र त्यातले काही खाऊ शकणार
नाहीस."

## अरामी छावणी रिकामी असल्याच कोडग्रस्त माणसांना आढळते

3वेशीजवळ कोड झालेली चार माणसे बसलेली होती.
ती आपापसात बोलताना म्हणाली, 'आपण मृत्यूची वाट
पाहात इथे कशाला बसलो अहोत? 4शोमरोनमध्ये अन्नाचे
दुर्भिक्ष आहे. आपण तिथे गेलो तरी मरणारच आहोत.
इथे थांबलो तरी मरणार आहोत. तेव्हा आपण अरामी
छावणीवरच जावे. त्यांनी जीवदान दिले तर जगू, त्यांनी
मारले तर मरून जाऊ.'
5तेव्हा ते चौघेजण संध्याकाळी अरामी सैन्याच्या
तळाजवळ आले. आणि अगदी टोकाशी जाऊन पाहतात
तर तिथे कोणाचाच पत्ता नाही. 6परमेश्वराच्या करणीने
अरामी लोकांना आपल्यावर घोडे, रथ, विशाल सेना
चालून येत आहे असा भास झाला तेव्हा ते आपापसात
म्हणाले, "इस्राएलच्या राजाने हित्ती आणि मिसरी राजांना
द्रव्य देऊ करून आपल्यावर चाल करून पाठवलेले
दिसते."
7आणि अरामी लोकांनी फार उशीर व्हायच्या आत
संध्याकाळीच तेथून पळ काढला. आपले तंबू, घोडे, गाढवे
सगळे जसेच्या तसेच टाकून ते प्राणभयाने तिथून पळाले.

## शत्रूच्या छावणीत कुष्ठरोगी

8शत्रूच्या छावणीजवळ आल्यावर, कोड झालेली ती
चार माणसे एका तंबूत शिरली. तिथे त्यांनी खाणे-पिणे
केले. तिथले कपडे -लत्ते आणि सोने चांदी त्यांनी
उचलली. सगळ्या गोष्टी त्यांनी लपवून ठेवल्या. मग
ते दुसऱ्या तंबूत शिरले. तिथली चीजवस्तू बाहेर
काढली, दुसरीकडे नेऊन ती लपवली. 9आणि मग ते
एकमेकांना म्हणाले, "आपण करतो ते बरे नाही. आज
आपल्याजवळ चांगली बातमी असून आपण गप्प आहोत.
सकाळी उजाडे पर्यंत जर आपण हे कुणाला सांगितले
नाही तर आपल्याला नक्कीच शासन होईल. तेव्हा आपण
आता राजवाड्यात राहणाऱ्या लोकांना या गोष्टीची वर्दी
देऊ."

## ही कुष्ठग्रस्त माणसे शुभवर्तमान देतात

10मग कोड झालेली ही माणसे आली आणि नगराच्या
रखवालदाराला हाक मारून म्हणाली, "आम्ही अराम्यांच्या
छावणीवर गेलो होतो, पण तिथे कुणाचीच चाहूल लागली
नाही. एकही माणूस तिथे नव्हता. तंबू मात्र तसेच उभे
होते. आणि घोडे, गाढवे जशीच्या तशी बांधून ठेवली
होती. माणसांचा मात्र पत्ता नव्हता."
11तेव्हा रखवालदारांनी मोठ्याने पुकारा करून
महालातील लोकांना ही खबर दिली. 12रात्रीची वेळ होती,
पण राजा अंथरूणावरून उठला आणि आपल्या
कारभाऱ्यांना म्हणाला, "या अरामी सैन्याचा डाव काय
आहे ते मी तुम्हाला सांगतो. आपण भुकेले आहोत हे
त्यांना माहीत आहे. म्हणून ते छावणी सोडून शेतात दडून
बसले आहेत. आपण नगर सोडून बाहेर पडलो की
आपल्याला जिवंत पकडायचे आणि त्यांनी नगरात घुसायचे
असा त्यांचा मनसुबा दिसतोय."
13यावर एक कारभारी राजाला म्हणाला, "गावात पाच
घोडे अजून कसेबसे जिवंत आहेत. त्यांच्यावर बसून
काहीजणांना तिथे जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहून येऊ
द्या. गावात माणसे कशीबशी तग धरून आहेत, तसेच हे
घोडे एवीतेवी मरणारच आहेत."
14तेव्हा दोन रथ जोडून काही माणसे निघाली. राजाने
त्यांना अरामी सैन्याच्या छावणीत पाठवून प्रत्यक्ष परिस्थिती
पाहून यायला सांगितले.
15हे लोक अरामी सैन्याच्या मार्गावर यार्देन नदी पर्यंत
गेले. वाटेवर सर्वत्र कपडे आणि शस्त्रे पडलेली त्यांना
आढळली. घाई घाईने पळून जाताना अरामी लोक या
वस्तूटाकून गेले होते. दूतांनी शोमरोनला परत येऊन हे
राजाला सांगितले.
16तेव्हा लोक अरामी छावणीकडे पळत सुटले आणि
त्यांनी तेथील मौल्यवान चीजवस्तू पळवल्या. प्रत्येकाला
भरपूर वस्तू मिळाल्या परमेश्वर म्हणाला होता तसेच
झाले. लोकांना एका शेकेलला मणभर मैदा किंवा दोन
मण सातू सहज घेता आला.
17आपल्या निकटच्या कारभाऱ्याला राजाने वेशीवर
द्वारपाल म्हणून नेमले पण लोक शत्रूच्या छावणीवर
अन्नासाठी तुटून पडले तेव्हा या द्वारपालाला तुडवून पुढे
गेले. त्यामुळे तो मरण पावला. अलीशा या संदेष्ट्याकडे

राजा आला होता तेव्हा त्याने जे जे सांगितले त्या बरहुकूमच हे घडले. [18]अलीशाने सांगितले होते, "लोकांना मणभर मैदा किंवा दोन मण सातू शोमरोनच्या वेशीजवळच्या बाजार पेठेत एका शेकेलला घेता येईल." [19]पण या कारभाऱ्याने तेव्हा अलीशाला सांगितले, "परमेश्वराने आकाशाला खिंडार पाडले तरी हे होणार नाही!" यावर अलीशा त्या कारभाऱ्याला म्हणाला, "तू हे सर्व आपल्या डोळ्यादेखत पाहशील पण तुला त्यातले काहीही खाता येणार नाही." [20]त्या कारभाऱ्याच्या बाबतीत नेमके तसेच झाले. लोक वेशीपाशी त्याला तुडवून त्याच्या अंगावरून गेले आणि तो मेला.

## अलीशा त्या शूनेमच्या बाईला स्थलांतर करायला सांगतो

8 अलीशामुळे जो मुलगा जीवंत झाला होता त्या मुलाच्या आईशी अलीशा बोलला. अलीशा म्हणाला, "तू आपल्या कुटुंबियासह दुसऱ्या देशात जा. कारण परमेश्वर या प्रदेशात दुष्काळ पाडणार आहे. आणि तो सात वर्षे चालेल."

[2]तेव्हा अलीशाच्या म्हणण्याप्रमाणे तिने केले. पलिष्ट्यांच्या देशात ती आपल्या कुटुंबियांसमवेत जाऊन सात वर्षे राहिली. [3]सात वर्षे उलटल्यावर ती पलिष्ट्यांच्या देशातून परत आली.

मग ती राजाला भेटायला निघाली. आपले घरदार आणि जमीन आपल्याला पुन्हा परत मिळावी यासाठी तिला राजाची मदत हवी होती.

[4]अलीशा संदेष्ट्याचा सेवक गेहजी याच्याशी राजा बोलत बसला होता. राजा गेहजीला म्हणाला, "अलीशाने जी मोठमोठी कृत्ये केली ती कृपा करून मला सांग."

[5]अलीशाने एका मृताला पुन्हा जिवंत कसे केले याविषयी गेहजी राजाला सांगत असतानाच जिच्या मुलाला अलीशाने जिवंत केले होते ती बाई राजासमोर आली. आपली जमीन आणि घर परत मिळावे यासाठी राजाची मदत मागायला ती आली होती. गेहजी म्हणाला, "स्वामी, हीच ती बाई आणि अलीशाने जीवदान दिले तो हाच मुलगा."

[6]राजाने त्या बाईची विचारपूस केली आणि ती राजाशी बोलली.

राजाने मग एका कारभाऱ्याला तिच्या मदतीला दिले आणि सांगितले, "तिच्या मालकीचे आहे ते सर्व तिला परत करा. तसेच, ती हा देश सोडून गेली तेव्हापासून आतापर्यंतचे तिच्या शेतातले उत्पन्न तिला द्या."

## बेन-हदाद हजाएलला अलीशाकडे पाठवतो

[7]अलीशा दिमिष्क येथे गेला. आरामचा राजा बेन-हदाद तेव्हा आजरी होता. एकाने त्याला सांगितले, "आपल्या इथे एक संदेष्टा आला आहे." [8]तेव्हा बेन-हदाद हजाएलला म्हणाला, "नजराणा घेऊन त्या संदेष्ट्याच्या भेटीला जा. मी या दुखण्यातून बरा होईन की नाही ते परमेश्वराला विचारायला त्याला सांग."

[9]तेव्हा हजाएल अलीशाच्या भेटीला गेला. दिमिष्कातील उत्तमोत्तम पदार्थांचा नजराणा तो अलीशासाठी घेऊन गेला. या गोष्टी त्याने चाळीस उंटांवर लादल्या होत्या. हजाएल अलीशाकडे जाऊन म्हणाला, "तुमचा शिष्य अरामचा राजा बेनहदाद याने मला तुमच्याकडे पाठवले आहे. या दुखण्यातून आराम पडेल का असे त्यांनी विचारले आहे."

[10]तेव्हा अलीशा हजाएलला म्हणाला, "बेन-हदादला जाऊन सांग, 'तू खात्रीने बरा होशील.'* पण तो मरणार आहे असे खरे म्हणजे परमेश्वराने मला सांगितले आहे."

## अलीशाचे हजाएलबद्दल भविष्यकथन

[11]एवढे बोलून मग देवाच्या माणसाने, हजाएल शरमिंदा होईपर्यंत त्याच्याकडे टक लावून पाहिले. नंतर अलीशाला रडू फुटले. [12]हजाएलने त्याला विचारले, "तुम्ही का रडत आहात?"

अलीशाने सांगितले, "इस्राएलवर तू अत्याचार करणार आहेस हे मला माहीत आहे म्हणून मला वाईट वाटते. त्यांची मजबूत नगरे तू जाळशील. आपल्या तलवारीने त्यांची तरूण माणसे कापून काढशील.

त्यांच्या लहान मुलांना ठार करशील त्यांच्या गरोदर बायकांना चिरशील."

[13]हजाएल म्हणाला, "मी पडलो कुत्र्यासारखा क्षुद्र माणूस एक दुबळामाणूस या मोठ्या गोष्टी मी कसल्या करणार!"

अलीशा म्हणाला, "तू अरामचा राजा होणार असे परमेश्वराने मला वर्तवले आहे."

[14]मग हजाएल तिथून निघाला आणि आपल्या धन्याकडे आला. बेन-हदाद हजाएलला म्हणाला, "अलीशा तुला काय म्हणाला?"

हजाएल म्हणाला, "तुम्ही जगणार आहात असे अलीशाने मला सांगितले."

## हजाएलकडून बेन-हदादचा वध

[15]पण दुसऱ्या दिवशी हजाएलने एक रजई घेतली आणि पाण्यात ती भिजवली मग ती बेनहदादच्या तोंडावर टाकली. त्याने बेन-हदाद गुदमरला आणि मरण पावला. अशा प्रकारे हजाएल नवा राजा झाला.

## यहोरामच्या कारकीर्दीची सुरवात

[16]यहोशाफाटचा मुलगा यहोराम यहूदाचा राजा होता. इस्राएलचा राजा अहाब याचा मुलगा योराम याच्या कारकिर्दीचे पाचवे वर्ष चालू असताना यहोराम इस्राएलच्या राज्यावर आला. [17]त्यावेळी यहोराम बत्तीस वर्षाचा होता.

---

**तू खात्रीने बरा होशील** काही जुन्या हिब्रू प्रतीनुसार "तू यातून उठणार नाहीस" असे आहे.

यरूशलेमवर त्याने आठ वर्षे राज्य केले. 18पण इस्राएलच्या इतर राजांप्रमाणेच यहोराम वागला. परमेश्वराच्या दृष्टीने गैर अशी कृत्ये त्याने केली. अहाबच्या घरचे लोक वागत तसाच तो वागला. त्याची बायको अहाबची मुलगी होती म्हणून त्याने तसे केले. 19पण परमेश्वराने आपला सेवक दावीद याला वचन दिलेले असल्यामुळे परमेश्वराने यहूदांचा नाश केला नाही. दावीदाच्या वंशातीलच कोणीतरी सतत गादीवर येईल असे वचन परमेश्वराने दावीदाला दिले होते.

20यहोरामच्या कारकिर्दीत अदोम यहूदापासून वेगळा झाला. अदोमी लोकांनी स्वत:च राजाची निवड केली.

21तेव्हा यहोराम आपले सर्व रथ घेऊन साईर येथे गेला. अदोमी सैन्याने त्याला वेढा घातला. यहोराम आणि त्याच्या बरोबरचे लोक यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला आणि आपली सुटका केली. यहोरामचे लोक पळाले आणि घरी परतले. 22अशाप्रकारे अदोमी यहूदांच्या सत्ते पासून वेगळे झाले आणि अजूनही ते तसेच मुक्त आहेत.

सुमारास लिब्नानेही बंड केले आणि यहूदापासून ते मुक्त झाले.

23"यहूदाच्या राजांचा इतिहास" या ग्रंथात यहोरामने जे जे केले त्याची नोंद आहे. 24यहोराम मरण पावला आणि दावीद नगरात आपल्या पूर्वजांसोबत त्याचे दफन झाले. यहोरामचा मुलगा अहज्या मग राज्य करू लागला.

## अहज्याच्या कारकिर्दीची सुरवात

25इस्राएलचा राजा अहाब याचा मुलगा योराम याच्या कारकिर्दीच्या बाराव्या वर्षी यहोरामचा मुलगा अहज्या यहुदाचा राजा झाला. 26त्यावेळी अहज्या बावीस वर्षाचा होता. त्याने यरूशलेममध्ये एक वर्ष राज्य केले. त्याच्या आईचे नाव अथल्या. इस्राएलचा राजा अम्री याची ती मुलगी. 27परमेश्वराने जे करू नये म्हणून सांगितले ते ते अहज्याने केले. तो अहाबचा जावई होता. त्यामुळे अहाबच्या घराण्यातल्या लोकांसारखीच त्याची वागणूक होती.

## हजाएलशी झालेल्या लढाईत योराम जखमी होतो

28अहाबचा मुलगा योराम याच्या बरोबर अहज्या रामोथ गिलाद येथे अरामचा राजा हजाएल याच्यावर चढाई करून गेला. अराम्यांनी योरामला जखमी केले. तेथे झालेल्या दुखापतीतून बरे होण्यासाठी म्हणून राजा योराम इस्राएलला परत गेला. इज्रेलच्या प्रदेशात तो गेला. त्याला भेटायला यहोरामचा मुलगा अहज्या ही इज्रेलला गेला.

## येहूचा अभिषेक करण्याचा अलीशाचा एका संदेष्ट्याच्या मुलाला आदेश

9 अलीशाने, एका तरूण संदेष्ट्याला बोलावले अलीशा त्याला म्हणाला, "तयार हो आणि ही तेलाची कुपी बरोबर घे. रामोथ गिलाद येथे जा. 2तेथे पोचल्यावर निमशीचा मुलगा यहोशाफाट याचा मुलगा येहू याला शोधून काढ. मग आत जाऊन त्याला त्याच्या भावांमधून उठवून आतल्या खोलीत ने. 3त्यानंतर ही तेलाची कुपी घेऊन त्याच्या मस्तकावर तेल ओत. तेव्हा 'परमेश्वर म्हणतो की इस्राएलचा राजा म्हणून मी तुला अभिषेक केला आहे,' असे म्हण. एवढे झाले की धावत परत ये. तेथे थांबू नकोस!"

4तेव्हा हा तरूण संदेष्टा रामोथ गिलाद येते आला 5तेथे पोचल्यावर त्याला सैन्यातील सरदार बसलेले आढळले. त्यांना तो म्हणाला, "तुमच्यासाठी एक निरोप आहे."

येहू म्हणाला, "आम्ही सर्वच इथे आहोत. निरोप नक्की कुणासाठी आहे?"

तेव्हा तो तरूण म्हणाला, "हे सरदारा, तुझ्याशीच; माझे काम आहे." 6यावर येहू उठून घरात आला. त्या तरूण संदेष्ट्याने त्याच्या मस्तकावर तेलाचा अभिषेक केला. येहूला तो म्हणाला, "इस्राएलचा परमेश्वर देव म्हणतो, "इस्राएलचा पुढचा राजा म्हणून मी तुला अभिषेक करत आहे. 7तुमचा राजा अहाब याच्या घराण्याचा तू संहार करावास. अशा तऱ्हेने मी माझे सेवक, संदेष्टे, परमेश्वराचे सर्व सेवक यांच्या वधाचा सूड घेऊन ईजबेलला शासन करणार आहे. 8म्हणजे अहाबचे घराणे नष्ट होईल. अहाबच्या घराण्यात एकही पुरूष संतान जिवंत राहणार नाही. मग ती इस्राएलमधील मुक्त व्यक्ती असो की गुलाम. 9नबाटचा मुलगा यराबाम तसेच अहीयाचा मुलगा बाशा यांच्या घराण्यासारखी अहाबच्या घराण्याची मी गत करून टाकीन. 10ईजबेलला इज्रेल भागात कुत्री खातील. तिचे दफन होणार नाही. एवढे बोलून हा तरूण संदेष्टा दार उघडून पळून गेला."

## येहूला राजा म्हणून सेवक घोषित करतात

11येहू पुन्हा राजाच्या सरदारंमध्ये आला. तेव्हा त्यांच्यातला एकजण म्हणाला, "येहू, सर्व कुशल आहे ना? तो वेडा तुझ्याकडे कशाला आला होता?"

येहू त्यांना म्हणाला, "तो माणूस आणि त्याचं वेडपट बोलणं तुम्हाला माहीत आहेच."

12तेव्हा ते सर्व म्हणाले, "नाही, नाही खर काय झालं ते सांग. काय म्हणाला तो?" तेव्हा मग तो तरूण संदेष्टा काय म्हणाला ते येहूने सरदारांना सांगितले. येहू म्हणाला, "तो मला म्हणाला, 'इस्राएलचा राजा म्हणून परमेश्वराच्या सांगण्यावरून मी तुला अभिषेक करत आहे.'" 13हे ऐकून मात्र त्यांनी ताबडतोब आपले अंगरखे उतरवले, येहूच्या समोरच्या पायऱ्यांवर ते ठेवले आणि शिंग फुंकून येहू राजा झाला असल्याची घोषणा केली.

## येहू इज्रेल येथे जातो

14निमशीचा मुलगा यहोशाफाट याचा मुलगा येहू याने योरामविरूध्द कट रचला.

यावेळी, अरामचा राजा हजाएल याच्यापासून
रामोथ-गिलादचे संरक्षण करण्यासाठी योराम सर्व
इस्राएलांसह झटत होता. 15राजा योरामने हजाएलशी झुंज
घेतली होती. पण अरामी लोकांनी योरामला जायबंदी
केले होते तेव्हा जखमा भरून येण्यासाठी तो इज्रेलला
गेला होता.

तेव्हा येहू त्या सगळ्या सरदारांना म्हणाला, "नवीन
राजा म्हणून मला तुमची मान्यता असेल तर ही बातमी
नगरातून इज्रेलमध्ये जाऊ देऊ नका."

16योराम इज्रेलमध्ये आराम करत होता. येहू रथात
बसून इज्रेलला गेला. यहूदाचा राजा अहज्या देखील तेव्हा
योरामला भेटायला इज्रेलला आला होता.

17इज्रेलमध्ये बुरूजावर एक पहारेकरी होता. त्याने येहूला
मोठ्या जमावानिशी येताना पाहिले. तो म्हणाला, "मोठाच
जमाव दिसतोय"

योरामने त्याला सांगितले, "कोणाला तरी घोड्यावरून
त्यांच्याकडे पाठव. ते सद्भावाने येत आहेत का ते त्या
स्वाराला विचारायला सांग."

18तेव्हा एक सेवक घोड्यावरून येहूला सामोरा गेला.
राजा योरामच्या वतीने त्याने येहूला विचारले, "तुमचे येणे
शांततेचे आहे ना?"

येहू त्याला म्हणाला, "शांतीशी तुला कर्तव्य नाही. असा
माझ्या मागेमाग ये."

पहारेकऱ्याने योरामला सांगितले, "आपला तिकडे
पाठवलेला माणूस अजून परत आलेला नाही."

19तेव्हा योरामने दुसऱ्या घोडेस्वाराला पाठवले. तो येहू
कडे आला आणि राजा योरामच्या वतीने सलोख्याचे
अभिवादन केले.

येहू म्हणाला, "तुला सलोख्याशी काय करायचे आहे?
असा माझ्या मागोमाग ये?"

20पहारेकऱ्याने योरामला सांगितले, "संदेश घेऊन
गेलेला दुसरा माणूसही परत आलेला नाही. रथ चालवणारा
तर वेड्यासारखा भरधाव रथ हाकतो आहे. निमशीचा
मुलगा येहू याच्यासारखीच पध्दत आहे. 21योरामने मग
स्वत:चा रथ तयार ठेवण्यास सांगितले."

तेव्हा सेवकाने योरामचा रथ आणला. इस्राएलचा राजा
योराम आणि यहूदाचा राजा अहज्या या दोघांनी आपापले
रथ येहूच्या दिशेने पळवले. इज्रेलचा नाबोथ याच्या शेतात
त्यांची येहूशी गाठ पडली.

22येहूला पाहून योरामने त्याला विचारले, "येहू तू
शांततेसाठीच आला आहेस ना?" येहू म्हणाला, "तुझी
आई ईजबेल हिचे व्यभिचार आणि चेटके चालू असेपर्यंत
कसली आली आहे शांतता?"

23योरामने ताबडतोब आपले घोडे वळवले आणि पळ
काढण्याच्या तयारीत तो अहज्याला म्हणाला, "अहज्या,
दगा आहे." 24पण येहूने सर्व शक्तीनिशी धनुष्य ओढून
योरामचा बरोबर दोन बाहूंच्यामध्ये वेध घेतला. बाण
योरामच्या हृदयातून आरपार गेला. योराम रथात मरून
पडला.

25येहूने आपल्या रथाचा सारथी बिदकर याला सांगितले,
"योरामचा मृतदेह उचल आणि तो इज्रेलचा नाबोथह्याच्या
शेतात फेकून दे आपण दोघे, योरामचा बाप अहाब
याच्याबरोबर बसून चाललो होतो तेव्हा हे असे घडणार
असे परमेश्वराने सांगितले होते, ते आठवते ना?
26परमेश्वर म्हणाला होता, 'नाबोथ आणि त्याची मुले
यांचे रक्त काल मला दिसले तेंव्हा या शेतात मी अहाबला
शिक्षा करीन.' प्रत्यक्ष परमेश्वरच असे म्हणाला. तेव्हा
उचल तो मृतदेह आणि परमेश्वराच्या म्हणण्याप्रमाणे दे
टाकून त्या शेतात!"

27यहूदाचा राजा अहज्या याने ते पाहिले आणि तेथून
पळ काढला. मळ्यातल्या एका घराच्या बाजूने तो गेला.
येहूने त्याचा पाठलाग केला. येहू म्हणाला, "अहज्याचाही
वध करा."

तेव्हा येहूच्या माणसांनी अहज्याला इब्लाम जवळच्या
गूरच्या रस्त्यावर जखमी केले. तेव्हा अहज्या मगिद्दोकडे
पळाला पण तिथेच मरण पावला. 28अहज्याच्या चाकरांनी
त्याचा मृतदेह रथातून यरूशलेम येथे आणला. त्याचे त्यांनी
दावीद नगरात त्याच्या पूर्वजांशेजारी दफन केले.

29योरामचे इस्राएलचा राजा म्हणून अकरावे वर्ष चालू
असताना अहज्या यहूदाचा राजा झाला होता.

## ईजबेलचा निघृण वध

30येहू इज्रेलला आला ते ईजबेलने ऐकले. तिने चांगले
प्रसाधन केले, केशभूषा केली आणि खिडकीत बसून
बाहेर बघू लागली. 31येहूने नगरात प्रवेश केला. ईजबेल
म्हणाली, "काय रे जिम्री? त्याच्या सारखेच तू ही आपल्या
स्वामीला मारलेस!"

32येहूने वर खिडकीकडे पाहात म्हटले, "माझ्या बाजूने
कोण आहे? बोला!"

तेव्हा खिडकीतून दोन तीन खोजांनी त्याच्याकडे पाहिले.
33येहू त्यांना म्हणाला, "त्या ईजबेलला खाली फेका."

तेव्हा त्या खोजांनी ईजबेलला खाली फेकून दिले.
भिंतीवर आणि घोड्यांवर तिचे रक्त उडाले. घोडे तिच्यावरून
चालून गेले. 34येहू घरात शिरला आणि त्याने फराळाच्या
पदार्थांचा समाचार घेतला. मग तो म्हणाला, "आता त्या
शापित बाईला घ्या व तिचे दफन करा कारण ती राजकन्या
होती."

35लोक तिला पुरायला पुढे झाले पण त्यांना तिच्या
देहाचा पत्ता लागला नाही. फक्त तीचे शिर, पाय आणि
हाताचे तळवे सापडले. 36तेव्हा लोकांनी येऊन येहूला
हे सांगितले. येहू त्यांना म्हणाला, "आपला सेवक एलिया
तिश्बी याच्या मार्फत परमेश्वराने हेच सांगितले होते.
एलिया म्हणाला होता. 'इज्रेलच्या परिसरात ईजबेलचा
देह कुत्री खातील. 37शेणखता सारखा तिचा देह

इस्रेलच्या भूमीवर पडेल. लोकांना तिचे प्रेत ओळखू येणार
नाही.'"

## शोमरोनच्या वडीलधाऱ्यांना येहूचे पत्र

10 शोमरोनमध्ये अहाबला सत्तर मुलगे होते.
शोमरोनमधील अधिकारी आणि वडीलधारी
मंडळी यांना येहूने पत्रे पाठवली. तसेच ज्यांनी या अहाबच्या
मुलाना वाढवले त्यांनाही पाठवली. पत्रात त्याने लिहिले.
2–3"हे पत्र मिळाल्यावर तुमच्या धन्याच्या मुलांपैकी जो
सगळ्यात गुणी आणि लायक मुलगा असेल त्याची निवड
करा. रथ, घोडे इत्यादी तुमच्या जवळ आहेच. तुमचे
वास्तव्यही मजबूत शहरात आहे. तुमच्याकडे शस्त्रास्त्रे
आहेत. तुम्ही ज्या मुलाची निवड कराल त्याला त्याच्या
बापाच्या सिंहासनावर बसवा. मग आपल्या धन्याच्या
घराण्यासाठी लढा रूा."
4पण हे वाचून ती अधिकारी आणि वडीलधारी मंडळी
फारच घाबरली. ते सर्व म्हणाले, "योराम आणि अहज्या
हे दोन राजे सुध्दा येहूला रोखू शकले नाहीत, तेव्हा
आम्ही काय त्याला अडवणार?"
5मग, अहाबच्या घराची देखभाल करणारा अधिकारी,
नगराधिकारी, वडीलधारी मंडळी आणि त्या मुलांचे पालक
यांनी येहूला खालील प्रमाणे संदेश पाठवला, "आम्ही तुझे
सेवक आहोत. तू म्हणशील ते आम्ही करू. आम्ही
कोणालाच राजा करत नाही. तुला योग्य वाटेल ते कर."

## शोमरोनच्या अधिकाऱ्यांकडून अहाबच्या मुलांची हत्या

6येहूने मग त्या अधिकाऱ्यांना आणखी एक पत्र पाठवले.
त्यात त्याने लिहिले, "तुमचा मला पाठिंबा असेल आणि
तुम्ही माझ्या आज्ञेत असाल तर अहाबच्या मुलांचा शिरच्छेद
करा. उरूा साधारण याच वेळेला त्यांना माझ्याकडे आणा."
अहाबला सत्तर मुले होती आणि नगरातील
अघिकाऱ्यांकडे ती होती. त्या अधिकाऱ्यांनी त्यांना
वाढवले होते. 7या अधिकाऱ्यांना हे पत्र मिळाले तेव्हा
त्यांनी या सर्वच्यासर्व सत्तर जणांना एकत्र आणून ठार
केले. मग त्यांची मस्तके टोपल्यांमध्ये भरली. या टोपल्या
इस्रेलला येहूकडे पाठवल्या. 8निरोप्याने येऊन येहूला
सांगितले, "या लोकांनी राजपुत्रांची मुंडकी आणली आहेत."
त्याला येहू म्हणाला, "नगराच्या वेशीजवळ त्या मुंडक्यांचे
दोन ढीग करून सकाळपर्यंत तिथे ठेवा."
9सकाळी येहू निघाला आणि लोकांपुढे उभा राहून
त्यांना म्हणाला, "तुम्ही निरपराध आहात. मी माझ्या
धन्याविरूध्द कट रचून त्याला ठार केले. पण अहाबच्या
या मुलांची हत्या कोणी केली? तुम्हीच त्यांना मारलेत.
10परमेश्वर बोलतो त्याप्रमाणेच सर्व घडते हे तुम्ही जाणून
घेतले पाहिजे. अहाबच्या कुटुंबाबद्दल परमेश्वराने
एलीयाकडून वदविले होते. आता परमेश्वराने आपण ज्या
गोष्टी करू म्हणून सांगितले होते त्या सर्व करून दाखवल्या
आहेत."
11आणि येहूने इस्रेलमधल्या अहाबच्या सर्व कुटुंबियांना
ठार केले. सर्व प्रतिष्ठित माणसे, जिवलग मित्र याजक
यांची त्याने हत्या केली. अहाबच्या नातलगांपैकी कोणीही
जिवंत राहिले नाही.

## अहज्याच्या नातलगांचा वध

12इस्रेल सोडून येहू शोमरोनला आला. वाटेत तो
मेंढपाळांच्या तळावर थांबला. मेंढपाळ लोकर कातरतात
त्या ठिकाणच्या एका घरात तो गेला. 13यहूदाचा राजा
अहज्या याच्या नातेवाईकांना तो भेटला. येहूने त्यांची
चौकशी केली, "तुम्ही कोण आहात?" ते म्हणाले, "आम्ही
यहूदाचा राजा अहज्या याचे नातेवाईक. राजाची मुले आणि
राजमातेची मुले यांची विचारपूस करायला आम्ही जात
आहोत."
14तेव्हा येहू आपल्या बरोबरच्या लोकांना म्हणाला,
"यांना जिवंत ताब्यात घ्या." तेव्हा येहूच्या लोकांनी त्यांना
ताब्यात घेतले. ते सगळे मिळून बेचाळीस होते. बेथ एकेद
जवळच्या विहिरीपाशी येहूने त्या सर्वांना ठार केले. येहूने
कोणालाही जिवंत ठेवले नाही.

## येहूची यहोनादाबशी भेट

15तिथून निघाल्यावर येहूला रेखाबचा मुलगा यहोनादाब
भेटला. तो येहूला भेटायलाच निघाला होता. येहूने त्याचे
कुशल विचारून म्हटले, "मी तुझा विश्वासू मित्र आहे,
तसाच तूही आहेस ना?"
यहोनादाब म्हणाला, "होय, मी तुझा विश्वासू मित्र आहे."
येहू म्हणाला, "तसे असेल तर मला तुझा हात दे."
आणि येहूने त्याचा हात धरून त्याला आपल्या रथात
घेतले.
16येहू यहोनादाबला म्हणाला, "चल माझ्या बरोबर.
परमेश्वराबद्दल मला किती उत्कटता आहे ती बघ."
तेव्हा यहोनादाब येहूबरोबर त्याच्या रथातून निघाला.
17शोमरोनला पोंचल्यावर येहूने अहाबचे जे कोणी कुटुंबीय
अजून जिवंत होते त्या सर्वांना मारले. एलीयाला परमेश्वराने
सांगितले होते ते सर्व येहूने केले.

## बाल देवतेच्या पूजकांना येहू बोलावतो

18येहूने मग सर्वांना एकत्र बोलावले. त्यांना तो
म्हणाला, "अहाबने बालची थोडी सेवा केली. पण येहू
मात्र बालची बरीच सेवा करणार आहे. 19आता बालच्या
सर्व पुरोहितांना आणि संदेष्ट्यांना बोलावून घ्या. तसेच जे
जे बालची पूजा करतात त्यांनाही बोलवा. यात कोणीही
गैरहजर असता कामा नये. बालसाठी मला मोठा यज्ञ
करायचा आहे. इथे जो येणार नाही त्याला मी ठार करीन
हे नक्की."

येहूची ही सर्व बतावणी होती. त्याला बालच्या पूजकांचा
संहार करायचा होता. 20येहू म्हणाला, “बालसाठी पवित्र
मेळ्याची तयारी करा.” तेव्हा पुरोहितांनी त्याची घोषणा
केली. 21येहूने मग इस्राएलभर संदेश पाठवला. बालचे
समस्त पूजक जमले. एकही मागे राहिला नाही. बालच्या
देवळात ते आल्यावर देऊळ भरून गेले.

22वस्त्र भांडार सांभाळणाऱ्याला येहू म्हणाला, “बालच्या
या सर्व पूजकांसाठी वस्त्रे दे.” तेव्हा त्याने सर्वांसाठी वस्त्रे
दिली.

23मग येहू आणि रेखाबचा मुलगा यहोनादाब बालच्या
देवळात शिरले. येहू तेथे जमलेल्या बालच्या सर्व पूजकांना
म्हणाला, “तुमच्यात कोणी परमेश्वराचा सेवक नाही ना
ते एकदा पाहून खात्री करून घ्या. बालची पूजा करणारेच
सर्व इथे आहेत ना ते पाहा.” 24यज्ञ आणि होमार्पणे
करण्यासाठी बालचे सर्व पूजक बालच्या देवळात शिरले.

बाहेर येहूने ऐंशीजणांना तयार ठेवले होते. त्यांना येहूने
सांगितले होते, “कोणालाही आतून निसटू द्यायचे नाही.
एखादा कोणी गेलाच तर त्याला जाऊ देणाऱ्याला आपला
जीव गमवावा लागेल.”

25स्वत: यज्ञात होमबली अर्पण केल्यावर लगेच
हुजऱ्यांना आणि सरदारांना येहूने सांगितले, “आता, आत
जा आणि बालची पूजा करणाऱ्यांना ठार करा. कोणालाही
देवळातून जिवंत बाहेर येऊ देऊ नका.”

तेव्हा सरदारांनी धारदार तलवारींनी सर्व पूजकांना ठार
केले. त्यांनी आणि हुजऱ्यांनी बाल देवतेच्या पूजकांचे
मृतदेह बाहेर टाकले ते बालदेवळाच्या गर्भगृहात गेले
26स्मृतिस्तंभ त्यांनी उखडून टाकले आणि देऊळ जाळले.
27बालच्या स्मृतिस्तंभाचा त्यांनी चुराडा केला बालच्या
देवळाचाही विद्ध्वंस केला. त्या देवळाचे त्यांनी प्रसाधनगृह
करून टाकले. अजूनही लोक त्याचा तसाच वापर
करतात.

28अशा प्रकारे इस्राएलमधली बालची पूजा येहूने मोडून
काढली. 29पण नबाटचा मुलगा यराबाम याने जी पापे
इस्राएलला करायला लावली त्यापासून येहू पूर्णपणे परावृत्त
झाला नाही. बेथेल आणि दान इथली सोन्याची वासरे
त्याने उध्वस्त केली नाहीत.

## इस्राएलवर येहूचे राज्य

30परमेश्वर येहूला म्हणाला, “तू चांगली कामगिरी
केलीस. माझ्या मते जे उचित तसेच तू वागलास. अहाबच्या
कुटुंबाचा मला हव्या त्या पध्दतीने तू विध्वंस केलास.
तेव्हा आता तुझ्या पुढच्या चार पिढ्या इस्राएलवर राज्य
करतील. 31पण परमेश्वराच्या नियमांना अनुसरून
मन:पूर्वक वर्तन ठेवणे येहूला जमले नाही. यराबामच्या
ज्या दुष्कृत्यांमुळे इस्राएल पापाच्या गर्तेत गेला ते
करण्यापासून तो स्वत:ला थोपवू शकला नाही.”

## हजाएलकडून इस्राएलचा पराभव

32याचवेळी परमेश्वराने इस्राएल प्रदेशाचे लचके
तोडायला सुरूवात केली. अरामचा राजा हजाएल याने
इस्राएलच्या सर्व सीमांवर पराभव केला. 33यार्देन नदीच्या
पूर्वेकडील प्रदेश त्याने जिंकला गाद, रऊबेन आणि मनश्शे
यांच्या कुटुंबांच्या ताब्यांतील प्रदेशासकट सगळा गिलाद
त्यात आला. तसेच अर्णोन खोऱ्यातील अरोएर पासून
गिलाद आणि बाशानपर्यंतचा प्रदेश हजाएलने जिंकला.

## येहूचा मृत्यू

34“इस्राएलच्या राजांचा इतिहास”या पुस्तकात येहूच्या
इतर पराक्रमांची नोंद आहे. 35येहू मरण पावला आणि
आपल्या पूर्वजांना मिळाला. लोकांनी त्याचे दफन
शोमरोनमध्ये केले. येहूचा मुलगा यहोआहाज त्यानंतर
इस्राएलचा राजा झाला. 36येहूने शोमरोन मधून इस्राएलवर
अठ्ठावीस वर्षे राज्य केले.

## अथल्या यहूदामध्ये राजाच्या सर्व मुलांचा वध करते

11 अथल्या ही अहज्याची आई. आपला मुलगा मरण
पावला हे पाहिल्यावर ती उठली आणि सर्व
राजघराण्याची तिने हत्या केली.

2यहोशेबा ही राजा योरामची मुलगी आणि अहज्याची
बहीण. योवाश हा राजाच्या अनेक मुलांपैकी एक. इतर
मुलांची हत्या होत असताना यहोशेबाने योवाशला बाजूला
घेतले आणि आपल्या झोपायच्या खोलीत लपवून ठेवले.
तिने योवाश आणि त्याची दाई यांना लपवले. यहोशेबा
आणि ती दाई यांनी योवाशला अथल्याच्या तावडीतून
सोडवले म्हणून तो मारला गेला नाही.

3योवाश आणि यहोशेबा मग परमेश्वराच्या मंदिरात
लपून राहिले. योवाश तिथे सहा वर्षे राहिला. यहूदावर
अथल्याचे राज्य होते.

4सातव्या वर्षी महायाजक यहोयादाने अधिकाऱ्यांना
बोलावून घेतले. परमेश्वराच्या मंदिरात त्या सगळ्यांना
बोलावले आणि यहोयादाने त्यांच्याशी एक करार करून
त्यांच्याकडून शपथ घेतली मग योवाश या राजपुत्राला
त्यांच्यापुढे आणले.

5यहोयादाने त्यांना एक आज्ञा केली. तो म्हणाला,
“तुम्हाला आता मी सांगतो तसे करायचे आहे. प्रत्येक
शब्बाथला तुमच्यापैकी एकतृतीयांश लोकांनी आत यायचे.
राजाचे त्याच्या घरात तुम्ही संरक्षण करायचे. 6दुसऱ्या
एकतृतीयांश लोकांच्या गटाने सूर वेशीवर थांबायचे. आणि
तिसऱ्या एकतृतीयांश गटाने पहारेकऱ्यांच्या मागे राहायचे.
योवाशच्या मागे तुमची अशी संरक्षक भिंत होईल. 7प्रत्येक
शब्बाथ दिवसाच्या अखेरीला तुमच्यापैकी दोनतृतीयांश
लोक परमेश्वराच्या मंदिराचे रक्षण करतील आणि राजा
योवाशला संरक्षण देतील. 8राजा योवाश जिथे जिथे जाईल

तिथे तिथे सर्ववेळ तुम्ही त्याच्याबरोबर राहिले पाहिजे. तुम्ही त्याच्याभोवती कडे करावे. प्रत्येक पहारेकऱ्याच्या हातात शस्त्र असेल आणि कोणीही आपल्या फार जवळ आल्यास तुम्ही त्याला मारून टाकावे."

9याजक यहोयाद याने ज्या ज्या आज्ञा दिल्या त्या सर्वांचे त्या अधिकाऱ्यांनी पालन केले. प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या माणसांना बरोबर घेतले. एका गटाने शनिवारी राजाचे रक्षण करायचे होते. आठवड्यातले इतर दिवस बाकीचे गट ते काम करणार होते. हे सर्व लोक यहोयादाकडे गेले.
10यहोयादाने भाले आणि ढाली अधिकाऱ्यांच्या हवाली केल्या. दावीदाने परमेश्वराच्या मंदिरात ठेवलेली शस्त्रे ती हीच.
11मंदिराच्या डाव्या टोकापासून उजव्या टोकापर्यंत हे रखवालदार हातात आपापली शस्त्रे घेऊन उभे राहिले. ते वेदी आणि मंदिर यांच्याभोवती तसेच राजा मंदीरात येई तेव्हा त्याच्या भोवती उभे राहात.

12या सर्वांनी योवाशला बाहेर काढले. त्याला त्यांनी मुकुट घातला आणि राजा व देव यांच्यातील करारलेख त्याला दिला. मग त्यांनी त्याला अभिषेक केला व राजा केले मग टाळ्यां वाजवून त्यांनी "राजा चिरायु होवो" म्हणून जयघोष केला.
13हुजऱ्यांचा आणि लोकांचा हा गलबला राणी अथल्याच्या कानावर गेला. तेव्हा ती परमेश्वराच्या मंदिरापाशी गेली.

14राजाची रीतीप्रमाणे स्तंभाजवळ उभे राहायची जी जागा तिथे अथल्याने राजाला उभे असलेले पाहिले. नेते आणि लोक कर्णे वाजवीत आहेत हे ही तिने पाहिले. लोकांना खूप आनंद झालेला आहे हे तिच्या लक्षात आले. कर्ण्यांचा आवाज ऐकून तिने नाराजी प्रदर्शित करण्याकरता आपली वस्त्रे फाडली आणि ती "फितुरी! फितुरी!" म्हणून ओरडू लागली.

15हुजऱ्यांवरील अधिकाऱ्यांना याजक यहोयादाने आज्ञा दिली, "अथल्याला मंदिराच्या आवाराबाहेर काढावे. तिच्या अनुयायांचा वध करावा. मात्र परमेश्वराच्या मंदिरात तो करू नये."

16पहारेकऱ्यांनी मग तिला पकडले आणि घोडे ज्या दारातून आत येत असत त्या दाराने तिला बाहेर काढून तिचा त्यांनी वध केला.

17यहोयादाने नंतर परमेश्वर, राजा आणि लोक यांच्यात करार केला. राजा आणि लोक या दोघांवरही परमेश्वराची सत्ता आहे असे त्या करारात होते. यहोयादाने या खेरीज राजा आणि लोक यांच्यातही एक करार केला. राजाची लोकांबाबत असलेली कर्तव्ये त्यात होती. तसेच लोकांनी राजाचे आज्ञापालन आणि अनुयायित्व करावे असे ही त्यात म्हटले होते.

18या नंतर सर्व लोक बाल या देवतेच्या देवळात गेले. त्यांनी बालच्या मूर्तीची तसेच तेथील वेरूंची नासधूस, मोडतोड केली. त्यांचे तुकडेतुकडे केले बालचा याजक मत्तान याला वेरूंसमोरच लोकांनी ठार केले.

याजक यहोयाद याने परमेश्वराच्या मंदिरावर पहारेकरी नेमले.
19सर्व लोकांना घेऊन तो परमेश्वराच्या मंदिराकडून राजाच्या निवासस्थानी गेला. राजाचे विशेष सुरक्षा सैनिक आणि अधिकारी राजाबरोबर होते. त्यांच्यापाठोपाठ बाकीचे लोक गेले. राजमहालाच्या प्रवेशद्वारापर्यंत ते गेले. राजा योवाश मग सिंहासनावर बसला.
20लोक आनंदात होते आणि नगरात शांतता नांदत होती. महालाजवळच राणी अथल्या तलवारीने मारली गेली.

21योवाश राजा झाला तेव्हा सात वर्षांचा होता.

## योवाशच्या सत्तेची सुरूवात

12 येहू इस्राएलचा राजा झाल्याच्या सातव्या वर्षी योवाश (म्हणजेच यहोआश) याच्या सत्तेला सुरवात झाली. योवाशने येरूशलेममध्ये चाळीस वर्षे राज्य केले. योवाशच्या आईचे नाव सिब्या, ती बैर-शेबा इथली होती.
2योवाशचे वर्तन परमेश्वराच्या दृष्टीने उचित असेच होते. त्याने आयुष्यभर परमेश्वराचे ऐकले. याजक यहोयाद याने शिकवले तसे तो वागत होता.
3पण उंचवट्यावरील पुजास्थळांना त्याने धक्का लावला नाही. लोक यज्ञ करायला, धूप जाळायला तिथे जातच राहिले.

## मंदिर दुरूस्तीची योवाशची आज्ञा

4-5योवाश याजकांना म्हणाला, "परमेश्वराच्या मंदिराची आर्थिक स्थिती चांगली आहे. लोकांनी मंदिराला बरेच काही दिले आहे. शिरगणती झाली तेव्हा लोकांनी कर भरला. केवळ इच्छेखातरही लोकांनी पैसे दिले. तुम्ही याजकांनी आता त्या पैशाचा विनियोग परमेश्वराच्या मंदिराच्या दुरूस्तीसाठी करायला हवा. प्रत्येक याजकाने आपापल्या यजमानांकडून मिळालेले पैसे या कामी वापरले पाहिजेत. परमेश्वराच्या मंदिरात काही मोडतोड झाली असेल तर या पैशातून तिची दुरूस्ती व्हावी."

6तरीही याजकांनी काहीही सुरू केले नाही. योवाशचे राजा म्हणून तेविसावे वर्ष चालू होते तोपर्यंत याजकांनी मंदिराची दुरूस्ती केलेली नव्हती.
7तेव्हा मात्र योवाशने यहोयाद आणि आणखी काही याजक यांना बोलावणे पाठवले. त्यांना तो म्हणाला, "अजूनही तुमच्या हातून मंदिराची दुरूस्ती का झाली नाही? आता आपापल्या लोकांकडून पैसे घेणे आणि ते पैसे वापरणे बंद करा. त्या पैशाचा विनियोग मंदिराच्या दुरूस्तीसाठीच झाला पाहिजे."

8याजकांनी लोकाकडून पैसे घेण्याचे थांबवण्याबद्दल आपली सहमती दर्शवली खरी पण मंदिराची दुरूस्ती करायची नाही असेही ठरविले.
9तेव्हा यहोयाद या याजकाने एक पेटी घेतली आणि तिच्या झाकणाला एक भोक ठेवले. ही पेटी त्याने वेदीच्या दक्षिण बाजूला ठेवली. लोक परमेश्वराच्या मंदिरात शिरल्याबरोबर ती पेटी दाराशीच होती. काही याजक उंबरठ्यापाशीच असत आणि

लोकांनी परमेश्वराला वाहिलेले पैसे ते उचलून या पेटीत
टाकत.
[10]मग लोकही मंदिरात आल्यावर पेटीतच पैसे टाकत.
राजाचा चिटणीस आणि मुख्य याजक अधून मधून येत
आणि पेटीत बरेच पैसे साठलेले दिसले की ते पैसे काढून
घेत. थैल्यांमध्ये भरून ते मोजत. [11]मग दुरूस्तीचे काम
करणाऱ्या मजुरांना ते पैसे देत. त्यात सुतार होते तसेच
परमेश्वराच्या मंदिराचे काम करणारे इतर गवंडीही होते
[12]दगड फोडणारे, दगडाचे घडीव चिरे बनवणारे यांना
देण्यासाठी तसेच लाकूड विकत घेणे दगड घडणे आणि
दुरूस्तीचे इतर सामान विकत घेण्यासाठी हे पैसे वापरले
जात.
[13–14]लोक परमेश्वराच्या मंदिरासाठी पैसे देत. पण
याजकांना ते चांदीची उपकरणी, कातऱ्या, वाडगे, कर्णे,
सोन्या-चांदीची तबके यासाठी वापरता येत नव्हते, तर
कारागिरांनाच ते पैसे दिले जात. त्या पैशाने ते मंदिराची
दुरूस्ती करत.
[15]कोणीही त्या पैशाची मोजदाद केली नाही की त्या
पैशाचा हिशेब कारगिरांना विचारला नाही इतके ते
कारागीर विश्वासू होते.
[16]आपल्याहातून घडलेल्या अपराधांचे, पापांचे
परिमार्जन व्हावे यासाठी अर्पणे करण्यासाठी लोक येत
तेव्हा ते पैसे देत, पण हा पैसा कारागिरांना देण्यासाठी
वापरला जात नसे. तो याजकांचा होता.

### योवाश हजाएलपासून यरूशलेमचे रक्षण करतो

[17]हजाएल अरामचा राजा होता. तो गथवर स्वारी करून
गेला. गथचा त्याने पाडाव केला आणि तो यरूशलेमवर
चढाई करायचा विचार करू लागला.
[18]योवाशच्या आधी त्याचे पूर्वज यहोशाफाट, यहोराम
आणि अहज्या हे यहूदाचे राजे होते. त्यांनी परमेश्वराला
बऱ्याच गोष्टी अर्पण केल्या होत्या. त्या मंदिरातच होत्या.
योवाशनेही बरेच काही परमेश्वराला दिले होते.
योवाशने ती सर्व चीजवस्तू, घरातील तसेच मंदिरातील
सोने बाहेर काढले. या मौल्यवान गोष्टी त्याने
अरामचा राजा हजाएल याला पाठवल्या. यरूशलेमला
त्यांची भेट झाली. हजाएलने त्या शहराविरूध्द लढाई
केली नाही.

### योवाशचा मृत्यू

[19]"यहूदाच्या राजांचा इतिहास" या ग्रंथात योवाशच्या
थोर कृत्यांची नोंद आहे.
[20]योवाशच्या कारभाऱ्यांनी योवाशाविरूध्द कट केला.
शिल्ला येथे जाणाऱ्या रस्त्यावरील मिल्लोच्या घरात त्यांनी
योवाशचा वध केला. [21]शिमाथचा मुलगा योजारवार आणि
शोमरचा मुलगा यहोजाबाद हे योवाशचे कारभारी होते.
त्यांनी हे कृत्य केले.

दावीद नगरात लोकांनी योवाशला त्याच्या पूर्वजांसमवेत
पुरले. योवाशचा मुलगा अमस्या त्याच्यानंतर राज्य करू
लागला.

### यहोआहाजच्या कारकिर्दीला सुरूवात

13 येहूचा मुलगा यहोआहाज शोमरोन मधून
इस्राएलवर राज्य करू लागला. अहज्याचा मुलगा
योवाश यहूदात राज्यावर आल्याला तेविसावे वर्ष चालू
होते तेव्हाची ही हकीकत. यहोआहाजने सतरा वर्षे राज्य
केले.
[2]परमेश्वराच्या दृष्टीने वाईट अशा गोष्टी यहोआहाजने
केल्या. नबाटचा मुलगा याराबाम याने इस्राएलला जी पापे
करायला लावली तीच यहोआहाजने केली, त्यात खंड
पडू दिला नाही. [3]मग परमेश्वराचा इस्राएलवर कोप झाला.
अरामचा राजा हजाएल आणि हजाएलचा मुलगा बेनहदाद
यांच्या हाती परमेश्वराने इस्राएलची सत्ता सोपवली.

### इस्राएली लोकांवर परमेश्वराची दया

[4]तेव्हा यहोआहाजने मदतीसाठी परमेश्वराची याचना
केली. देवानेही त्याची विनंती ऐकली. अरामच्या राजाने
इस्राएली लोकांचा केलेला छळ आणि इस्राएलांच्या हाल
अपेष्टा परमेश्वराने पाहिल्या होत्या.
[5]त्यातून इस्राएलला तारण्यासाठी परमेश्वराने एकाला
पाठवले. तेव्हा मग अराम्यांच्या हातून इस्राएलींची मुक्तता
झाली आणि इस्राएली लोक पूर्वीप्रमाणेच आपापल्या
मुक्कामी परतले. [6]तरीही याराबामच्या घराण्याने जी
पापे इस्राएल लोकांना करायला लावली ती करायचे
काही त्यांनी सोडले नाही. याराबामची सर्व पापाचरणे त्यांनी
चालूच ठेवली शोमरोनमध्ये अशेरा देवतेचे स्तंभ
त्यांनी ठेवलेच.
[7]अरामच्या राजाने यहोआहाजच्या सैन्याचा पराभव
केला. सैन्यातील बहुतेक लोकांना त्याने ठार केले. फक्त
पन्नास घोडेस्वार, दहा रथ आणि दहा हजारांचे पायदळ
एवढेच शिल्लक ठेवले. खळ्यातील धान्याच्या मळणीच्या
वेळी उडून जाणाऱ्या फोलकटाप्रमाणे यहोआहाजच्या
सैनिकांची अवस्था होती. [8]"इस्राएलच्या राजांचा इतिहास"
या पुस्तकात यहोआहाजने केलेली थोर कृत्ये लिहून
ठेवली आहेत. [9]पुढे यहोआहाज मरण पावला आणि
पूर्वजांसमवेत त्याचे दफन झाले. शोमरोनमध्ये लोकांनी
त्याला पुरले. त्याचा मुलगा योवाश (किंवा यहोआश)
त्याच्या जागी राज्य करू लागला.

### योवाशची इस्राएलचा राजा म्हणून कारकीर्द

[10]यहोआहाजचा मुलगा योवाश शोमरोनमध्ये इस्राएलचा
राजा झाला. यहूदाचा राजा योवाश याचे ते सदतिसावे वर्ष
होते. योवाशने इस्राएलवर सोळा वर्षे राज्य केले.
[11]परमेश्वराने जे जे करू नका म्हणून सांगितले ते सर्व

त्याने केले. नबाटचा मुलगा यराबाम याने इस्राएलला जी
पापे करायला लावली ती करण्याचे योवाशने सोडले तर
नाहीच, उलट तोही त्याच मार्गाने गेला. 12‘इस्राएलच्या
राजांचा इतिहास’ या पुस्तकात, योवाशने केलेले पराक्रम
आणि यहूदाचा राजा अमस्या याच्याशी झालेल्या लढाया
यांची हकीकत आलेली आहे. 13योवाशच्या निधनानंतर
त्याचे आपल्या पूर्वजांशेजारी दफन झाले. यराबाम
सिंहासनावर आला आणि योवाशचे शोमरोनमध्ये
इस्राएलच्या राजांबरोबर दफन झाले.

### योवाश अलीशाला भेटतो

14अलीशा आजारी पडला. त्या आजारातच पुढे तो
मरण पावला. इस्राएलचा राजा योवाश त्याला भेटायला
गेला. अलीशाबद्दल दुःखातिशयाने त्याला रडू आले. योवाश
म्हणाला, “माझ्या बापा, माझ्या बापा, ही इस्राएलच्या रथांची
आणि घोड्यांची वेळ आहे का?”*

15अलीशा योवाशला म्हणाला, “धनुष्य आणि काही
बाण घे.”

तेव्हा योवाशने धनुष्य व काही बाण घेतले 16अलीशा
मग राजाला म्हणाला, “धनुष्यावर हात ठेव.” योवाशने
त्याप्रमाणे केले. अलीशाने मग आपले हात राजाच्या हातांवर
ठेवले. 17अलीशा त्याला म्हणाला, “पूर्वेकडची खिडकी
उघड.” योवाशने खिडकी उघडली. तेव्हा अलीशाने त्याला
बाण मारायला सांगितले.

योवाशने बाण सोडला. अलीशा त्याला म्हणाला,
“परमेश्वराचा हा विजयाचा तीर होय. अरामवरील
विजयाचा बाण. अफेक येथे तू अराम्यांचा पाडाव करशील,
त्यांना नेस्तनाबूत करशील.”

18अलीशा पुढे म्हणाला, “बाण घे.” योवाशने ते घेतले.
अलीशाने मग इस्राएलच्या राजाला भूमीवर बाण मारायला
सांगितले.

योवाशने जमिनीवर तीन बाण मारले. मग तो थांबला.
19अलीशा संदेष्टा योवाशवर रागावला. तो त्याला म्हणाला,
“तू पाच सहावेळा तरी मारायला हवे होतेस. तरच तू
अराम्यांना पुरते नेस्तनाबूत करू शकला असतास. आता
तू फक्त तीनदाच त्यांचा पराभव करशील.”

### अलीशाच्या कबरवरचा चमत्कार

20अलीशाने देह ठेवला आणि लोकांनी त्याला पुरले.

पुढे वसंतात मवाबी सैन्यातील काहीजण इस्राएलला आले.
लढाईनंतर लूट करायला ते आले होते. 21काही इस्राएली
लोक एका मृताला पुरत असताना त्यांनी या सैनिकांना
पाहिले. तेव्हा त्या लोकांनी अलीशाच्या कबरीतच तो
मृतदेह टाकला आणि पळ काढला. अलीशाच्या अस्थींना
त्या देहाचा स्पर्श होताच तो मृत पुन्हा जिवंत झाला आणि
आपल्या पायावर उभा राहिला.

### योवाश अराम्यांकडून इस्राएल नगरे जिंकून घेतो

22यहोआहाजच्या कारकिर्दीमध्ये अरामचा राजा हजाएल
याने इस्राएलचा छळ केला होता. 23पण परमेश्वरालाच
इस्राएलची दया आली. इस्राएलवर त्याने आपली कृपादृष्टी
वळवली. अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्याशी त्याने
केलेल्या करारामुळे त्याने हे केले. परमेश्वराला इस्राएल
लोकांचा समूळ नाश करायचा नव्हता. त्याला त्यांना
अरूप टाकून रूायचे नव्हते.

24अरामचा राजा हजाएल मरण पावला. त्याच्यानंतर
बेन-हदाद राज्य करू लागला. 25मृत्यूपूर्वी हजाएलने
योवाशचे वडील यहोआहाज ह्यांच्या कडून युध्दात काही
नगरे हस्तगत केली होती. पण योवाशने ती आता हजाएलचा
मुलगा बेन-हदाद याच्याकडून परत मिळवली. योवाशने
बेनहदादचा तीनदा पराभव केला आणि इस्राएलची नगरे
जिंकून घेतली.

### अमस्याचे यहूदावर राज्य

14 योवाशचा मुलगा अमस्या यहुदाचा राजा झाला.
तेव्हा इस्राएलचा राजा यहोआहाज याचा मुलगा
योवाश गादीवर आल्याला दुसरे वर्ष होते. 2अमस्या राज्य
करू लागला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता. अमस्याने
यरूशलेममध्ये एकोणतीस वर्षे राज्य केले. अमस्याच्या
आईचे नाव यहोअदान. ही यरूशलेमची होती.
3परमेश्वराच्या दृष्टीने जे उचित तेच अमस्याने केले. पण
त्याबाबतीत तो आपला पूर्वज दावीद याच्या इतका पूर्णत्वाला
गेला नाही. आपले वडील योवाश यांनी केले तेच
अमस्याने केले.

4त्याने उंचवट्यावरील पुजास्थळे नष्ट केली नाहीत.
त्या ठिकाणी अजूनही लोक यज्ञ करीत तसेच धूप
जाळीत.

5राज्यावर त्याची चांगली पकड असतानाच, आपल्या
वडीलांचे मारेकरी असलेल्या अधिकाऱ्यांचा त्याने वध
केला. 6पण त्या मारेकऱ्यांच्या मुलांना त्याने मारले नाही
कारण मोशेच्या नियमशास्त्रात याबद्दलचे नियम सांगितलेले
आहेत. मोशेच्या नियमशास्त्रात परमेश्वराने पुढील आज्ञा
सांगितलेली आहे: “मुलांच्या गुन्ह्या करिता आईवडिलांना
मृत्युदंड देता कामा नये. तसेच, आईवडिलांनी जे केले
त्याबद्दल मुलांना मारले जाऊ नये. अपराधाचे शासन
अपराध करणाऱ्यालाच व्हावे.”

7मिठाच्या खोऱ्यात अमस्याने दहाहजार अदोम्यांना
मारले. या लढाईत सेला नगर त्याने घेतले आणि त्याचे
नाव “यकथेल” ठेवले अजूनही ते त्याच नावाने ओळखले
जाते.

---

**माझ्या बापा ... वेळ आहे का?** “देवाने तुम्हाला हिरावून
नेण्याची काही वेळ आहे?” असा याचा अर्थ पाहा 1 राजे 2:12.

### अमस्याची योवाशवर चढाई करण्याची इच्छा

8इस्राएलचा राजा येहू याचा मुलगा यहोआहाज त्याचा
मुलगा योवाश याच्याकडे अमस्याने संदेश पाठवला. संदेशात
म्हटले होते, “ऊठ, समोरसमोर एकमेकांना भिडून आपण
लढू.”
9तेव्हा योवाशने यहूदाचा राजा अमस्या याला उत्तर
पाठवले की, “लबानोनमधल्या काटेरी झुडुपाने
लबानोनमधल्या गंधसरूच्या वृक्षाला निरोप पाठवला,
“तुझ्या मुलीला माझ्या मुलाची बायको करून घ्यायचे
आहे.” पण लबानोनमधला एक वन्यपशू वाटेने जाताना
त्या काटेरी झुडुपाला तुडवून पुढे गेला. 10अदोमचा तू
पराभव केलास हे खरे पण त्या विजयाने तू उन्मत्त झाला
आहेस. पण आहेस तिथेच राहून बढाया मार. स्वत:ला
संकटात लोटू नको. हे ऐकले नाहीस तर तुझा आणि
तुझ्याबरोबर यहूदाचाही पाडाव होईल.”
11योवाशच्या या इषाऱ्याकडे अमस्याने दुर्लक्ष केले.
तेव्हा यहूदातील बेथ-शेमेश या ठिकाणी इस्राएलचा राजा
योवाश यहूदाचा राजा अमस्या याच्या समोर लढाईला
उभा ठाकला. 12इस्राएलने यहूदाचा पराभव केला.
यहूदातील एकूण एक सर्व माणसांनी आपापल्या तंबूत पळ
काढला. 13अहज्यापुत्र योवाशचा मुलगा यहूदाचा राजा
अमस्या याला इस्राएलचा राजा योवाश याने बेथशेमेश
येथे अटक केले. योवाशने अमस्याला यरूशलेम येथे
आणले. तेथे पोचल्यावर यरूशलेमच्या तटबंदीला योवाशने
एफ्राईमच्या दरवाज्यापासून कोपऱ्यातील दरवाजापर्यंत
जवळ जवळ सहाशे फुटांचे खिंडार पाडले.
14पण परमेश्वराच्या मंदिरातील आणि राजवाड्याच्या
खजिन्यातील सोने, चांदी आणि सर्व पात्रे योवाशने लुटली.
तसेच तेथील सर्व माणसांना बंदिवान केले. मगच तो
शोमरोनला परतला.
15यहूदाचा राजा अमस्या याच्याशी झालेल्या या
लढाईतील पराक्रमाबरोबरच योवाशने केलेल्या इतर
महान कृत्यांचीही नोंद “इस्राएलच्या राजांचा इतिहास” मा
पुस्तकात केलेली आहे. 16योवाश मरण पावला आणि
आपल्या पूर्वजांना जाऊन मिळाला. इस्राएलच्या राजांशेजारी
शोमरोनमध्ये त्याचे दफन झाले. योवाशनंतर त्याचा मुलगा
यराबाम गादीवर आला.

### अमस्याचा मृत्यू

17इस्राएलचा राजा यहोआहाज याचा मुलगा योवाश याच्या
मृत्यूनंतर अमस्या पंधरा वर्षे जिवंत होता. 18त्याने केलेल्या
सर्व थोर कृत्यांची नोंद “यहूदाच्या राजांचा इतिहास” या
पुस्तकात केलेली आहे. 19अमस्याविरूध्द यरूशलेममध्ये
लोकांनी कट केला. तेव्हा अमस्या लाखीश येथे पळाला.
पण लोकांनी माणसे पाठवून त्याचा लाखीशपर्यंत पाठलाग
केला. आणि त्यांनी अमस्याचा तेथे वध केला. 20लोकांनी
अमस्याचा मृतदेह घोड्यावर लादून परत आणला.
दावीदनगरात यरूशलेम येथे आपल्या पूर्वजांच्या समवेत
त्याचे दफन झाले.

### यहूदावर अजऱ्याचा अंमल

21मग यहूदाच्या सर्व लोकांनी अजऱ्याला राजा केले.
अजऱ्या तेव्हा सोळा वर्षांचा होता. 22राजा अमस्याच्या
निधनानंतर त्याला त्याच्या पूर्वजांशेजारी दफन करण्यात
आले. अजऱ्याने एलाथची पुन्हा उभारणी केली आणि
एलाथ यहूदाच्या स्वाधीन केले.

### दुसरा यराबाम याची इस्राएलवर सत्ता

23इस्राएलचा राजा योवाश याचा मुलगा यराबाम
शोमरोनमध्ये राज्य करू लागला तेव्हा यहूदाचा राजा
योवाश याचा मुलगा अमस्या याच्या कारकिर्दीचे पंधरावे
वर्ष होते. यराबामने एक्के चाळीस वर्षे राज्य केले.
24यराबामने परमेश्वराच्या दृष्टीने गैर अशी कृत्ये केली.
नबाटचा मुलगा यराबाम याने इस्राएलला जी पापे करायला
लावली तीच या यराबामने चालू ठेवली.
25लेबो-हमाथपासून अराबाच्या समुद्रापर्यंतची इस्राएलची
भूमी यराबामने पुन्हा संपादन केली. गथ-हेफेर मधला
संदेष्टा अमित्तयचा मुलगा योना याला इस्राएलच्या
परमेश्वराने सांगितले त्या प्रमाणेच हे घडले. 26इस्राएलचे
दास काय किंवा स्वतंत्र माणसे काय, सर्वच अडचणीत
आलेले आहेत, हे परमेश्वराने पाहिले. यातला कोणीच
इस्राएलला वर आणण्याच्या पात्रतेचा नाही हे त्याने
ओळखले 27इस्राएलचे नाव जगाच्या पाठीवरून पुसून टाकू
असे काही परमेश्वर म्हणाला नव्हता. तेव्हा योवाशचा
मुलगा यराबाम याच्यामार्फत परमेश्वराने इस्राएलला
तारले.
28“इस्राएलच्या राजांचा इतिहास” या पुस्तकात
यराबामच्या पराक्रमांची नोंद आहे. दिमिष्क आणि हमाथ
त्याने इस्राएलच्या भूमीला पुन्हा जोडले याचीही नोंद त्यात
आहे. (ही नगरे यहूदाच्या ताब्यात होती) 29यराबाम मरण
पावला आणि आपल्या पूर्वजांना जाऊन मिळाला.
यराबामचा मुलगा जखऱ्या राजा म्हणून गादीवर आला.

### अजऱ्याची यहूदातील कारकीर्द

15 इस्राएलचा राजा यराबाम याच्या कारकिर्दीच्या
सत्ताविसाव्या वर्षी यहूदाचा राजा अमस्या याचा
मुलगा अजऱ्या राजा झाला. 2तेव्हा अजऱ्या सोळा वर्षांचा
होता. त्याने यरूशलेममध्ये बावन्न वर्षे राज्य केले. त्याच्या
आईचे नाव यखल्या ती यरूशलेममधली होती. 3अजऱ्याचे
वर्तन आपल्या वडीलांप्रमाणेच परमेश्वराने सांगितले तसे
उचित होते. आपले वडील अमस्या जसे वागले तसाच
हाही वागला. 4परंतु उंचस्थानावरील पूजास्थळे त्याने नष्ट
केली नाहीत. त्या ठिकाणी लोक यज्ञ करीत तसेच धूप
जाळीत. 5परमेश्वराच्या अवकृपेने राजा अजऱ्या याला

कुष्ठरोग झाला. मरेपर्यंत तो त्यातून बरा झाला नाही.
तेव्हा तो वेगळा राहू लागला. त्याचा मुलगा योथाम याने
राजाच्या या घराची देखभाल केली आणि तोच लोकांचा
न्यायनिवाडा करू लागला.
6अजऱ्याने जे केले ते सर्व 'यहूदाच्या राजांचा इतिहास'
या पुस्तकात लिहून ठेवलेले आहे. 7अजऱ्याचे निधन
झाले. दावीदनगरात त्याचे पूर्वजांशेजारी दफन झाले. त्याचा
मुलगा योथाम त्याच्यानंतर राज्यावर आला.

## जखऱ्याची इस्राएलवर अल्पजीवी कारकीर्द

8यराबामचा मुलगा जखऱ्या याने इस्राएलवर
शोमरोनमध्ये सहा महिने राज्य केले. यहूदाचा राजा अजऱ्या
याच्या कारकिर्दीचे तेव्हा अडतिसावे वर्ष होते. 9जखऱ्याने
परमेश्वराच्या दृष्टीने निषिध्द अशी कृत्ये केली. याबाबतीत
तो आपल्या पूर्वजांप्रमाणेच वागला. नबाटचा मुलगा यराबाम
याने इस्राएलला जी पापे करायला लावली तीच याने
केली.
10मग याबेशचा मुलगा शल्लूम याने जखऱ्याविरूध्द
कट केला. इब्लाममध्ये त्याने जखऱ्याला ठार केले.
आणि स्वत: राज्यावर आला. 11जखऱ्याने ज्या काही
इतर गोष्टी केल्या त्या 'इस्राएलच्या राजांचा इतिहास' या
पुस्तकात लिहिलेल्या आहेत. 12अशा रीतीने परमेश्वराचा
शब्द खरा ठरला. येहूच्या चार पिढ्या इस्राएलवर राज्य
करतील असे परमेश्वराने येहूला सांगितले होते.

## शल्लूमची इस्राएलवर अल्प कारकीर्द

13याबेशचा मुलगा शल्लूम इस्राएलचा राजा झाला
तेव्हा उज्जीया यहूदाचा राजा झाल्याला एकोणचाळिसावे
वर्ष चालू होते. शल्लूमने शोमरोनमध्ये एक महिना राज्य
केले.
14गादीचा मुलगा मनहेम तिरसाहून शोमरोनमध्ये आला
त्याने शल्लूमला ठार केले. मग मनहेम स्वत: राजा
झाला.
15शल्लूमने जे केले ते सगळे, तसेच त्याने
जखऱ्याविरूध्द केलेला कट 'इस्राएलच्या राजांचा इतिहास'
या पुस्तकात लिहिलेले आहे.

## इस्राएलमध्ये मनहेमचे राज्य

16शल्लूमच्या मृत्यूनंतर मनहेमने तिफसाहचा तसेच
त्याच्या भोवतालच्या प्रदेशाचा पाडाव केला. लोकांनी
नगराची वेस उघाडायला विरोध केला तेव्हा त्यांनाही
नेस्तनाबुत करून त्याने गर्भवती स्त्रियांनाही कापून
काढले.
17यहूदाचा राजा अजऱ्या याच्या एकोणचाळिसाव्या वर्षात
गादीचा मुलगा मनहेम इस्राएलवर राज्य करू लागला.
मनहेमने शोमरोनमध्ये दहा वर्षे राज्य केले. 18मनहेमने
परमेश्वराच्या दृष्टीने गैर अशी कृत्ये केली. नबाटचा
मुलगा यराबाम याच्या ज्या पापांमुळे इस्राएलचा अध:पात
झाला तीच पापे मनहेमने केली.
19अश्शूरचा राजा पूल इस्राएलवर चाल करून आला.
तेव्हा पूलने आपल्याला पाठिंबा द्यावा आणि आपले राज्य
बळकट करावे या इरादाने मनहेमने पूलला पंचाहत्तर
पौंड चांदी भेट दिली. 20हा पैसा उभा करायला मनहेमने
श्रीमंत आणि वजनदार लोकांवर कर बसवला. प्रत्येकाला
त्याने वीस औंस चांदी कररूपाने द्यायला लावली. मग ही
रक्कम त्याने अश्शूरच्या राजाला दिली. तेव्हा अश्शूरचा
राजा परत फिरला. इस्राएलमध्ये तो राहिला नाही.
21मनहेमच्या पराक्रमांची नोंद 'इस्राएलच्या राजांचा
इतिहास' या पुस्तकात आहे.
22मनहेम मरण पावला आणि आपल्या पूर्वजांना मिळाला.
त्याच्यानंतर त्याचा मुलगा पेकह्या नवीन राजा झाला.

## पेकह्याची इस्राएलवर कारकीर्द

23अजऱ्याच्या यहूदावरील राज्याच्या पन्नासाव्या वर्षी
मनहेमचा मुलगा पेकह्या शोमरोन मधून इस्राएलवर राज्य
करू लागला. त्याने दोन वर्षे राज्य केले. 24परमेश्वराने
जे करू नका म्हणून सांगितले ते पेकह्याने केले. नबाटचा
मुलगा यराबाम याच्या ज्या पापांमुळे इस्राएलचे अध:पतन
झाले तीच पापे पेकह्याने केली.
25रमाल्या याचा मुलगा पेकह हा पेकह्याच्या सैन्याचा
सरदार होता. पेकहने पेकह्याला मारले. शोमरोन मध्ये
राजवाड्यातच त्याने हा वध केला. वधाच्या वेळी पेकह
बरोबर गिलादमधली पन्नास माणसे होती. यानंतर पेकह
राजा झाला. 26पेकह्याच्या सर्व पराक्रमांची नोंद 'इस्राएलच्या
राजांचा इतिहास' या पुस्तकात आहे.

## पेकहाची कारकीर्द

27रमाल्याचा मुलगा पेकह इस्राएलवर राज्य करू लागला
तेव्हा यहूदाचा राजा अजऱ्या याचे बावन्नावे वर्ष होते.
पेकहाने वीस वर्षे राज्य केले. 28पेकहाने परमेश्वराच्या
दृष्टीने गैर अशी कृत्ये केली. नबाटचा मुलगा यराबाम
याच्या पापांनी इस्राएलचा अध:पात झाला. पेकह त्याच
मार्गाने गेला.
29अश्शूरचा राजा तिग्लथ-पिलेसर हा इस्राएलवर चाल
करून आला. पेकह इस्राएलचा राजा होता तेव्हा हे घडले.
तिग्लथ-पिलेसरने इयोन, आबेल, बेथ माका, यानोह,
केदेश, हासोर, गिलाद, गालील आणि सर्व नफताली प्रांत
घेतला. तसेच तेथील सर्व लोकांना कैद करून अश्शूरला
नेले. 30एला याचा मुलगा होशे याने रमाल्याचा मुलगा
पेकह याच्याविरूध्द कट केला. होशेने पेकहला ठार
केले. पेकह नंतर मग होशे राजा झाला. उज्जीयाचा मुलगा
योथाम यहूदावर राज्य करीत असल्याच्या विसाव्या वर्षी
हे झाले. 31पेकहने जे पराक्रम केले त्याची नोंद 'इस्राएलच्या
राजांचा इतिहास' या पुस्तकात आहे.

## योथामचे यहूदावर राज्य

32उज्जीयाचा मुलगा योथाम यहूदावर राज्य करू लागला
तेव्हा रमाल्याचा मुलगा पेकह इस्राएलमध्ये राज्यावर
आल्याला दुसरे वर्ष चालू होते. 33योथाम तेव्हा पंचवीस
वर्षांचा होता. त्याने यरूशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले.
सादोकची मुलगी यरूशा ही त्याची आई. 34आपले वडील
उज्जीया यांच्या प्रमाणेच योथामही परमेश्वराच्या दृष्टीने
योग्य अशी कृत्ये करत होता. 35पण त्यानेही
उंचस्थानावरील पूजास्थळे नष्ट केली नाहीत. लोक तेथे
यज्ञ करत, धूप जाळत. परमेश्वराच्या मंदिराला योथामने
एक वरचा दरवाजा बांधला. 36‘यहूदांच्या राजाचा इतिहास’
या पुस्तकात योथामने केलेल्या पराक्रमांची नोंद आहे.
37अरामचा राजा रसीन आणि रमाल्याचा मुलगा पेकह
यांना याच वेळी परमेश्वराने यहूदावर चालून जायला
उद्युक्त केले.
38योथाम मरण पावला आणि आपल्या पूर्वजांशेजारी
त्याचे दफन झाले. दावीद नगर या आपल्या पूर्वजांच्या
नगरात त्याला पुरले. त्याच्या नंतर त्याचा मुलगा आहाज
नवा राजा झाला.

## यहूदाचा राजा आहाज

16 रमाल्याचा मुलगा पेकह इस्राएलचा राजा होता.
त्याच्या सतराव्या वर्षी योथामचा मुलगा आहाज
यहूदाचा राजा झाला. 2आहाज तेव्हा वीस वर्षांचा होता.
त्याने यरूशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले. परमेश्वराने
जी कृत्ये निषिध्द म्हणून सांगितली ती त्याने केली. आपला
पूर्वज दावीद याच्यासारखे तो परमेश्वराचे आज्ञापालन
करत नसे. 3त्याची वागणूक इस्राएलच्या राजांसारखी होती.
आपल्या मुलालाही त्याने अग्नीतून चालायला लावले.
इस्राएली आले तेव्हा परमेश्वराने ज्या लोकांना त्या
प्रदेशातून जबरदस्तीने हद्दपार केले त्यांच्यासारखी भीषण
कृत्ये आहाजने केली. 4उंचस्थानातील पुजास्थळे,
टेकड्यांवर तसेच प्रत्येक हिरव्यागर्द वृक्षाखाली त्याने यज्ञ
केले, धूप जाळला.
5अरामचा राजा रसीन आणि इस्राएलाचा राजा रमाल्याचा
मुलगा पेकह यरूशलेमवर स्वारी करून आले. रसीन
आणि पेकह यांनी आहाजला घेरले. पण ते त्याचा पराभव
करू शकले नाहीत. 6अरामचा राजा रसीन याने यावेळी
एलाथ हा भूभाग परत मिळवला. तेथून त्याने सर्व यहुदूंना
हुसकावून लावले. मग अरामी लोक त्याठिकाणी स्थायिक
झाले. अजूनही त्यांची तिथे वस्ती आहे.
7अश्शूरचा राजा तिग्लथ-पिलेसर याच्याकडे आहाजने
दूतामार्फत संदेश पाठवला की, “मी तुझा दास आहे, तुझ्या
मुलासारखाच आहे. अराम आणि इस्राएलचे राजे माझ्यावर
चाल करून आले आहेत. तेव्हा माझ्या मदतीला ये आणि
मला वाचव.” 8आहाजने याखेरीज परमेश्वराच्या
मंदिरातले आणि राजवाड्याच्या खजिन्यातले सोनेरूपे बाहेर
काढले. ते त्याने अश्शूरच्या राजाला नजराणा म्हणून
पाठवले.
9अश्शूरच्या राजानेही आहाजच्या हाकेला प्रतिसाद दिला
आणि दिमिष्कावर स्वारी केली. दिमिष्क सर करून
तेथील लोकांना त्याने कीर येथे पकडून नेले. रसीनलाही
त्याने ठार केले.
10अश्शूरचा राजा तिग्लथ-पिलेसर याला भेटायला
आहाज दिमिष्काला गेला. तेथील वेदी त्याने पाहिली.
तेव्हा तिचा नमुना आणि आराखडा त्याने उरीया या
याजकाला पाठवला. 11दिमिष्काहून आहाजने पाठवलेल्या
त्या नमुन्याबरहुकूम उरीया याजकाने वेदी उभारली. राजा
आहाज दिमिष्काहून परत येण्यापूर्वी त्याने काम पूर्ण केले.
12राजाने दिमिष्काहून येताच वेदी पाहिली. तिच्यावर
यज्ञ अर्पण केला. 13होमार्पण आणि धान्यार्पणही केले.
पेयार्पण केले तसेच शांतिअर्पणाचे रक्तही वेदीवर शिंपडले.
14आत्ताची वेदी आणि परमेश्वराचे प्रार्थनामंदिर
यांच्यामध्ये परमेश्वरासमोर जी पितळी वेदी होती ती
आहाजने तिथून हलवली आणि आपल्या वेदीच्या उत्तरेला
आणून ठेवली.
15मग उरीया याजकाला त्याने आज्ञा केली, “मोठ्या
वेदीवर सकाळचे होमार्पण, संध्याकाळचे धान्यार्पण,
देशातील सर्व लोकांचे पेयार्पण करीत जा. तसेच होमार्पणाचे
आणि यज्ञाचे रक्त त्या वेदीवर शिंपडत जा. पितळेची वेदी
देवाला प्रश्न विचारण्याकरता माझ्या साठी असावी.”
16उरीया याजकाने राजाची आज्ञा मानून त्याप्रमाणे
सर्वकाही केले.
17आहाजने मग बैठकी कापून त्याचे नक्षीदार कठडे
काढून टाकले. बैठकींची स्नान पात्रे काढून टाकली.
पितळी बैलांवरचा हौद काढून तो खाली फरसबंदीवर
ठेवला. 18शब्बाथ दिवसासाठी मंदिराच्या आत बांधलेली
आच्छादित जागा काढून टाकली. राजासाठी असलेले
बाहेरचे प्रवेशद्वारही आहाजने काढून टाकले.
परमेश्वराच्या मंदिरातून हे सर्व काढून त्याने अश्शूरच्या
राजाला दिले.
19‘यहूदाच्या राजांचा इतिहास’ या पुस्तकात आहाजचे
सर्व पराक्रम लिहिलेले आहेत.
20आहाजच्या निधनानंतर त्याचे दावीदनगरात
पूर्वजांशेजारी दफन करण्यात आले. आहाजनंतर त्याचा
मुलगा हिज्कीया नवा राजा झाला.

## होशेचे इस्राएलवर राज्य

17 एलाचा मुलगा होशे हा शोमरोनमधून इस्राएलवर
राज्य करू लागला. तेव्हा यहूदावर आहाजच्या
सत्तेचे ते बारावे वर्ष होते. होशेने नऊ वर्षे राज्य केले.
2परमेश्वराने ज्या कृत्यांचा निषेध केला होता तीच कृत्ये
होशेने केली. पण या पूर्वीच्या इस्राएलांच्या राजांइतकी
होशेची कारकीर्द वाईट नव्हती. 3अश्शूरचा राजा

शल्मनेसर होशेवर चाल करून आला. तेव्हा होशे
शल्मनेसरचा मांडलीक बनला. त्याला होशेने आपले रक्षण
करावे म्हणून कर दिला.
4पण होशेचे आपल्याविरूध्द कटकारस्थान चालू आहे
हे अश्शूरच्या या राजाच्या लक्षात आले, कारण होशेने
मिसरचा राजा सो याच्याकडे आपले दूत पाठवले होते.
तसेच दरवर्षीप्रमाणे त्या वर्षी होशेने करही भरला नव्हता.
तेव्हा अश्शूरच्या राजाने त्याला अटक करून कैदेत
टाकले.
5मग अश्शूरचा राजा इस्राएलमधून चाल करत
शोमरोनमध्ये येऊन ठेपला. त्याने शोमरोनशी तीन वर्षे
लढा दिला. 6होशेच्या कारकिर्दीच्या नवव्या वर्षी
अश्शूरच्या राजाने शोमरोन हस्तगत केले. इस्राएल
लोकांना त्याने कैद करून अश्शूरला नेले. त्यांना त्याने
हलहा येथे तसेच गोजानमधील हाबोर नदीजवळ आणि
मेदीलोकांच्या नगरात ठेवले. 7परमेश्वर देवाच्या
इच्छेविरूध्द इस्राएल लोकांनी पापे केली होती. म्हणून
असे घडले.
मिसरचा राजा फारो याच्या जाचातून परमेश्वराने इस्राएल
लोकांची सुटका केली होती. तरी इस्राएली लोकांनी इतर
दैवतांचे भजनपूजन सुरू केले. 8इतर लोकांचे ते अनुकरण
करू लागले. त्या लोकांना परमेश्वराने इस्राएलीखातर
तेथून हुसकावून लावले होते. शिवाय देवाऐवजी इस्राएल
लोकांनी राजाची सत्ता पत्करली. 9इस्राएल लोकांनी
परमेश्वर देवाविरूध्द ज्या गोष्टी चोरून केल्या त्या निषिध्द
होत्या.
लहान गावापासून मोठ्या शहरापर्यंत सर्व ठिकाणी त्यांनी
उंचस्थानावरील पुजास्थळे बांधली. 10प्रत्येक टेकडीवर
आणि हिरव्यागार झाडाखाली त्यांनी स्मृतिस्तंभ आणि
अशेराचे खांब उभारले.
11या सर्व ठिकाणी ते धूप जाळत. इस्राएली लोकांनी
तेथे येण्याआधी परमेश्वराने ज्या राष्ट्रांना त्या भूमीतून
घालवून दिले होते त्यांच्यासारखेच वर्तन इस्राएल लोकांनी
केले. त्या नीच कृत्यांनी परमेश्वर क्रुध्द झाला. 12त्यांनी
मूर्तिपूजा आरंभली. "ती कधीही करू नये" म्हणून
परमेश्वराने त्यांना बजावले होते.
13इस्राएल आणि यहूदा यांना समज देण्यासाठी
परमेश्वराने सर्व संदेष्टे आणि द्रष्टे यांचा उपयोग केला.
त्यांच्यामार्फत लोकांना सांगितले, "या गैरकृत्यांपासून मागे
फिरा. माझ्या आज्ञा आणि नियम पाळा. तुमच्या पूर्वजांना
जे नियम मी घालून दिले त्यांचे पालन करा. ते नियमशास्त्र
मी माझे सेवक असलेले संदेष्टे यांच्यामार्फत तुम्हांला
सांगितले आहे."
14पण लोकांनी या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. आपल्या
पूर्वजांसारखाच आडमुठेपणा त्यांनी केला. त्यांच्या पूर्वजांचा
देव परमेश्वर ह्यावर त्यांचा विश्वास नव्हता. 15या लोकांनी
परमेश्वराने पूर्वजांशी केलेले करार आणि नियम
धुडकावून लावले. परमेश्वराने बजावून सांगितले तिकडे
दुर्लक्ष केले. क्षुद्र दैवतांच्या नादी लागून त्यांनी काहीच
साधले नाही. आपल्या भोवतालच्या राष्ट्रांचे त्यांनी
अनुकरण चालवले. परमेश्वराने इस्राएल लोकांना जे
करू नका म्हणून सांगितले होते तेच ही राष्ट्रे करत
होती.
16परमेश्वर देवाच्या आज्ञा पाळणे इस्राएल लोकांनी
अजिबातच थांबवले. त्यांनी वासरांच्या दोन सुवर्णमूर्ती
केल्या, अशेराचे खांब उभारले, आकाशातील सर्व
ताऱ्यांची आणि बालदेवतेची त्यांनी पूजा केली. 17आपल्या
पोटच्या मुलामुलींचा अग्नीत बळी दिला. भविष्याचे कुतूहल
शमवण्यासाठी जादूटोणा आणि मंत्रतंत्र यांचा अवलंब केला.
परमेश्वराने ज्या कृत्यांचा धिक्कार केला तेच करण्यापायी
स्वत:लाही विकले आणि परमेश्वराचा कोप ओढवून
घेतला. 18या गोष्टींनी परमेश्वर क्रुध्द झाला आणि त्याने
यहूदाचे घराणे वगळता सर्व इस्राएलांना नामशेष करून
टाकले.

## यहूदा लोकांचेही अपराध

19पण यहूदातील लोकांनीही परमेश्वराच्या आज्ञा
मानल्या नाहीत. त्यांनी इस्राएल लोकांचा कित्ता गिरवला.
20परमेश्वराने सर्व इस्राएल लोकांचा धिक्कार केला.
त्यांना संकटात लोटले. इतरांकरवी त्यांचा नाश केला.
आणि अखेर इतरत्र हाकलून दृष्टीआड केले. 21दावीदाच्या
घराण्यापासून परमेश्वराने इस्राएल लोकांना तोडले. तेव्हा
इस्राएल लोकांना नबाटचा मुलगा यराबाम याला राजा
केले. यराबामने लोकांना परमेश्वरापासून आणखी दूर
ओढले यराबामने त्यांना मोठ्या पातकाचे धनी केले.
22यराबामच्या पावलांवर पाऊल ठेवून इस्राएल लोकांनी
पापे केली.
23परमेश्वराने त्यांना नजरेआड करीपर्यंत त्यांनी पापे
करणे सोडले नाही. परमेश्वराने असे होणार हे भाकीत
वर्तवले होतेच. ते सांगायला त्याने संदेष्ट्यांनाही पाठवले
होते. तेव्हा इस्राएल लोकांची त्यांच्या प्रदेशातून अश्शूरमध्ये
हकालपट्टी करण्यात आली. आजतागायत ते तिथेच आहेत.

## शोमरोनी लोकांची सुरूवात

24अश्शूरच्या राजाने इस्राएल लोकांना शोमरोनमधून
बाहेर काढले. त्यानंतर या राजाने बाबेल, कूथा, अव्वा,
हामाथ आणि सफरवाईम येथून लोक आणून शोमरोनमध्ये
त्यांना वसवले. या लोकांनी शोमरोनचा ताबा घेतला आणि
त्या भोवतालच्या गावांमध्ये ते राहू लागले. 25या लोकांनी
त्या प्रदेशात राहू लागल्यावर परमेश्वराचा मान राखला
नाही. तेव्हा त्यांच्यावर हल्ला करायला परमेश्वराने
त्यांच्यावर सिंह सोडले. या सिंहांनी काहीजणांचा बळी
घेतला. 26काही लोक अश्शूरच्या राजाला म्हणाले, "तू
ज्या लोकांना शोमरोनमध्ये आणून ठेवलेस त्यांना या

देशातील परमेश्वराचे नियम माहित नाहीत. म्हणून
परमेश्वराने त्यांच्यावर सिंह सोडले. या लोकांना त्या
परमेश्वराच्या नियमांचे ज्ञान नसल्यामुळे ते लोक मारले
गेले.”
27तेव्हा अश्शूरच्या राजाने आज्ञा दिली, “शोमरोनमधून
काही याजकांना तुम्ही आणले आहे. तरी अटक करून
आणलेल्यांपैकी एका याजकाला तिथे पाठवा. त्याला तिथे
राहू द्या. तो मग लोकांना परमेश्वराचे नियमशास्त्र
शिकवेल. 28तेव्हा, अश्शूरांनी शोमरोनमधून नेलेल्या
याजकांपैकी एकजण बेथेल येथे राहायला आला. त्याने
लोकांना परमेश्वराचा मान कसा राखावा ते शिकवले.”
29पण या लोकांनी स्वत:च्या दैवतांच्या मूर्ती बनवल्या
आणि शोमरोन मधील लोकांनी बांधलेल्या
उंचस्थानावरील पुजास्थळामध्ये त्या ठेवल्या. सर्वत्र त्यांनी
असेच केले. 30बाबेलमधल्या लोकांनी सुक्कोथ बनोथ ही
दैवते केली. कूथातील लोकांनी नेरगल केला.
हमाथमधील लोकांनी अशीमा केली, 31अव्वी या लोकांनी
निभज आणि तर्ताक केले. सफरवी यांनी आपले दैवत
अद्रम्मेलेक आणि अनम्मेलेक यांच्याप्रीत्यर्थ आपल्या
मुलांचा बळी दिला. 32पण तरी त्यांनी परमेश्वराविषयी
आदर बाळगला. उंचस्थानातील पुजास्थळांसाठी त्यांनी
आपल्यातूनच याजक निवडले. तिथे हे याजक यज्ञ करीत.
33परमेश्वराविषयी आदर बाळगून ते आपापल्या दैवतांचीही
पूजा करीत. आपल्या पूर्वीच्या राष्ट्रांत ते करीत तसेच
इथेही करीत.
34आजही हे लोक पूर्वीप्रमाणेच वागतात. ते परमेश्वराला
मानत नाहीत. इस्राएलांचे नियमशास्त्र ते पाळत नाहीत.
याकोबचे वंशज म्हणजे इस्राएल यांना परमेश्वराने ज्या
आज्ञा दिल्या त्या ते मानत नाहीत. 35परमेश्वराने इस्राएल
लोकांशी करार केला होता. त्यात परमेश्वर म्हणाला
होता, “इतर दैवतांची पूजा सेवा तुम्ही करता कामा नये
त्यांच्यासाठी यज्ञ करता कामा नयेत. 36फक्त परमेश्वर
देवालाच मानले पाहिजे त्यानेच तुम्हाला मिसरमधून बाहेर
काढले तुमच्या रक्षणासाठी परमेश्वराने आपले सामर्थ्य
पणाला लावले. तेव्हा परमेश्वराची उपासना करा आणि
त्याच्यासाठी यज्ञ करा. 37त्याने तुम्हाला ज्या आज्ञा, नियम,
करार, शिकवण लिहून दिली ती तुम्ही पाळलीच पाहिजे.
त्या सर्वांचे तुम्ही सर्व वेळ पालन केले पाहिजे इतर
देवीदेवतांच्या नादी लागता कामा नये. 38मी तुमच्याशी
केलेल्या कराराचा विसर पडू देऊ नका. इतर दैवतांच्या
भजनी लागू नका. 39फक्त परमेश्वर देवालाच भजा.
तरच तो तुम्हाला सर्व संकटांतून सोडवील.” 40पण इस्राएल
लोकांनी हे ऐकले नाही. ते पूर्वीप्रमाणेच वागत राहिले.
41आता ती इतर राष्ट्रे परमेश्वराचा आदर ठेवतात पण
स्वत:च्या देवतांच्या मूर्तींचीही पूजा करतात. त्यांची मुले
बाळे, नातवंडे आपल्या पूर्वजांचेच अनुकरण करत राहिली.
ती आजतागायत तशीच वागत आहेत.

## यहूदात हिज्कीया याच्या कारकिर्दीचा प्रारंभ

18 अहाजचा मुलगा हिज्कीया हा यहूदाचा राजा झाला.
एलाचा मुलगा होशे याच्या इस्राएलवरील सत्तेचे
तेव्हा तिसरे वर्ष होते. 2हिज्कीया पंचवीस वर्षाचा असताना
राज्यावर आला आणि त्याने यरूशलेममध्ये एकोणतीस
वर्षे राज्य केले. याच्या आईचे नाव अबी.* ही जखऱ्याची
मुलगी.
3आपला पूर्वज दावीद याच्याप्रमाणेच हिज्कीयाचे वर्तनही
परमेश्वराच्या दृष्टीने उचित असेच होते.
4हिज्कीयाने उंचस्थानावरील पुजास्थळे नष्ट करून
टाकली. तसेच स्मृतिस्तंभ, आणि अशेराचे खांबही पाडून
टाकले. इस्राएलचे लोक तेव्हा मोशेने केलेल्या पितळी
सापापुढे धूप जाळत असत. या पितळी सापाला
“नहुश्तान”* म्हणत. लोक याची पूजा करत म्हणून
हिज्कीयाने त्याचे तुकडे तुकडे केले.
5इस्राएलचा देव परमेश्वर याच्यावरच हिज्कीयाचा
विश्वास होता. हिज्कीयासारखा राजा यहूदात त्याच्या आधी
किंवा नंतरही झाला नाही. 6त्याची परमेश्वरावर निष्ठा
होती. त्यात त्याने खंड पडू दिला नाही. मोशेला परमेश्वराने
दिलेल्या आज्ञांचे हिज्कीयाने पालन केले. 7परमेश्वर
हिज्कीयाच्या बाजूचा होता. त्यामुळे त्याने जे जे केले त्यात
त्याला यश आले.
अश्शूरच्या राजाविरूध्द बंड करून हज्कीयाने त्याचे
मांडलिकत्व नाकारले. 8थेट गज्जा आणि त्याच्या
भोवतालच्या प्रदेशापर्यंत त्याने पलिष्ट्यांचा पराभव केला.
लहान खेड्यापासून मोठ्या नगरापर्यंत सर्व पलिष्टी गावे
त्याने जिंकली.

## अश्शूरांचा शोमरोनला वेढा

9अश्शूरचा राजा शल्मनेसर याने शोमरोनवर हल्ला
केला. त्याच्या सैन्याने नगराला वेढा दिला. हिज्कीयाच्या
यहूदावरील सत्तेच्या चौथ्या वर्षी (म्हणजेच एलाचा मुलगा
होशे याचे इस्राएलवरच्या अधिपत्याचे सातवे वर्ष असताना)
हे झाले.
10तीन वर्षांनी शल्मनेसरने शोमरोन घेतले. यहूदाचा
राजा हिज्कीया याच्या सहाव्या वर्षी हे झाले. (आणि अर्थातच
इस्राएलचा राजा होशे याच्या नवव्या वर्षी) 11अश्शूरच्या
राजाने इस्राएल लोकांना कैद करून अश्शूरला नेले.
त्यांना त्याने हलहा येथे, गोजानमधील हाबोर नदीजवळ
आणि मेदी नगरांमध्ये ठेवले.
12इस्राएल लोकांनी त्यांच्या परमेश्वर देवाची आज्ञा
पाळली नाही, परमेश्वराच्या कराराचा भंग केला.
परमेश्वराचा सेवक मोशे याचे करार पाळले नाहीत म्हणून

---

**अबी** किंवा “अबिया.”

**नहुश्तान** “पतिळ” आणि “साप” या शब्दांच्या अर्थाशी “नहुश्तान” या हिब्रू शब्दाचे साधार्म्य आहे.

हे सर्व झाले. लोकांनी परमेश्वराचा करार जुमानला
नाही, त्याची शिकवण ऐकली नाही.

### यहूदा घेण्याची अश्शूरची तयारी

13हिज्कीयाच्या चौदाव्या वर्षी अश्शूरचा राजा सन्हेरीब
याने यहूदातील सर्व मजबूत नगरांवर हल्ला चढवला. सर्व
नगरांचा त्याने पाडाव केला. 14तेव्हा यहूदाचा राजा
हिज्कीया याने अश्शूरच्या राजाला लाखीश येथे निरोप
पाठवला. निरोपात हिज्कीयाने म्हटले, "माझ्या हातून
चूक झाली आहे. तुम्हाला हवे ते भरायला मी तयार आहे.
पण माझ्यावर हल्ला करू नये."

यावर अश्शूरच्या राजाने यहूदाचा राजा हिज्कीया याला
अकरा टन चांदी आणि एक टन सोने अशी खंडणी
मागितली. 15हिज्कीयाने परमेश्वराच्या मंदिरातील आणि
राजवाड्याच्या खजिन्यातील सर्व चांदी बाहेर काढली.
16परमेश्वराच्या मंदिराचे दरवाजे आणि खांब सोन्याच्या
पत्र्याने मढवले होते ते सर्व काढून हिज्कीयाने घेतले
आणि हे सोने अश्शूरच्या राजाला दिले.

### अश्शूरचा राजा यरूशलेमला माणसे पाठवतो

17अश्शूरच्या राजाने मोठ्या सैन्यासोबत आपले तीन
महत्वाचे सेनापती यरूशलेममध्ये राजा हिज्कीयाकडे
पाठवले. तेव्हा ते लाखीश येथून यरूशलेमला निघाले.
वरच्या तलावाच्या पाटापाशी ते उभे राहिले. (परिटाच्या
शेताकडे जो रस्ता जातो त्या वाटेवर हा वरचा तलाव
आहे)
18तेथून त्यांनी राजाला निरोप पाठवला. राजाचा
खानगीकडील कारभारी एल्याकिम (हा हिल्कीयाचा
मुलगा) चिटणीस शेबना आणि नोंदणी लेखक व आसाफचा
मुलगा यवाह हे त्यांना भेटायला तेव्हा पुढे आले.
19तेव्हा एक सेनापती त्यांना म्हणाला, "अश्शूरचा महान
राजा काय म्हणतो ते हिज्कीयाला सांगा:

तू कशाचा भरवंसा धरतो आहेस? 20तुझ्या तोंडचे
शब्द पोकळ, अर्थहीन आहेत. तू म्हणालास,
"लढाईसाठी पुरेशी मसलत आणि सामर्थ्य
माझ्याजवळ आहे." पण माझ्यापासून फुटून
निघाल्यापासून तुला कोणाचा आधार आहे? 21काठी
म्हणून तू ज्याच्यावर रेलला आहेस तो तर मोडका
बांबू आहे. ही काठी म्हणजे मिसर. माणूस अशा
काठीवर विसंबून राहिला तर ती मोडून पडेल हातात
रूतेल आणि क्लेश देईल लोक विश्वास ठेवतात तो
मिसरचा राजा हा असा आहे. 22तू कदाचित् असे
म्हणशील, "आम्ही परमेश्वर देवावर भरवसा
ठेवतो." पण हिज्कीयाने परमेश्वराची उंचावरील
पूजास्थळे आणि वेदी काढून टाकल्या आणि "फक्त
यरूशलेममधील वेदीपुढेच आराधना करावी" असे
यहूदा आणि यरूशलेम येथील लोकांना सांगितले हे
मला माहीत आहे.
23आता माझा स्वामी अश्शूरचा राजा याच्याशी हा
करार कर. तुझ्याकडे घोड्यांवर स्वार व्हायला माणसे
असतील तर मी तुला दोन हजार घोडे द्यायचे कबूल
करतो. 24माझ्या स्वामीच्या सर्वात कनिष्ठ सेवकाचा
देखील तू पराभव करू शकणार नाहीस. रथ आणि
घोडेस्वार यांच्यासाठी तू मिसरवर अवलंबून आहेस.
25मी यरूशलेमचा संहार करायला चाल करून
आलोय तो काही परमेश्वराचा पाठिंबा असल्याशिवाय
नव्हे. परमेश्वर मला म्हणाला, "या देशावर स्वारी
करून त्याचा पूर्ण पाडाव कर."

26तेव्हा हिल्कीयाचा मुलगा एल्याकीम, शेबना आणि
यवाह हे सेनापतीला म्हणाले, "आमच्याशी तू कृपया अरामी
भाषेत बोल. आम्हाला ती भाषा कळते. यहूदी भाषेत बोलू
नको. कारण नाही तर तटबंदीवरील लोक आपले बोलणे
ऐकतील."
27पण रब-शाके त्यांना म्हणाला, "परमेश्वराने काही
मला फक्त तुझ्याशी आणि तुझ्या राजाशी बोलायला
पाठवलेले नाही तटबंदीवरील लोकांशीही मी बोलतो आहे.
तुमच्याबरोबरच त्यांनाही स्वत:चे मलमूत्र चाटायची वेळ
येणार आहे."*
28मग रबशाके यहूदी भाषेत मोठ्याने ओरडून म्हणाला,
"अश्शूरचा थोर राजा काय म्हणतो ते ऐका 29राजाचे
म्हणणे आहे, 'हिज्कीयाच्या भूलथापांना बळी पडू नका.
माझ्यापासून तो तुम्हाला वाचवू शकणार नाही.' 30तो
म्हणतो तसे परमेश्वरावर विसंबून राहू नका. हिज्कीया
तुम्हाला सांगतो, 'परमेश्वर आपल्याला वाचवील.
अश्शूरचा राजा आपल्या शहराचा पराभव करू शकणार
नाही.' 31पण हिज्कीयाचे ऐकू नका.
"कारण अश्शूरचा राजा म्हणतो 'माझ्याशी तह करा
आणि माझ्याकडे या. तसे केलेत तर आपापल्या
द्राक्षवेलीवरची, अंजिराच्या झाडावरची फळे तुम्हाला
खायला मिळतील. स्वत:च्या विहिरीचे पाणी प्यायला
मिळेल. 32तुमच्या भूमीसारख्याच दुसऱ्या भूमीत मी
तुम्हाला घेऊन जाईपर्यंत तुम्ही असे वागा. तरच तुम्ही
जगाल; मरणार नाही. आणि हिज्कीयाचे ऐकू नका. तो
तुमचे हृदयपरिवर्तन करू पाहात आहे. 'परमेश्वर
आपल्याला वाचवेल' असे तो म्हणतो. 33इतर दैवतांनी
आपले देश अश्शूरच्या राजाच्या तावडीतून सोडवले आहेत
असे अजून झाले आहे काय? कधीच नाही. 34कुठे आहेत

---

**तुमच्याबरोबरच ... येणार आहे** यरुशलेमला वेढा घालायचा अश्शूरच्या सैन्याचा बेत होता. लोकांना मग शहरात दाणागोटा आणि पाणी आणता आले नसते. अन्नान्नदशा झाल्यावर त्यांना आपले मलमूत्रच खायची वेळ आली असती.

हमाथ आणि अर्पद यांची दैवतं? सफरवाईम, हेना, इव्वा यांची दैवते कुठे गेले? त्यांनी शोमरोनचे माझ्यापासून रक्षण केले का? नाही. 35इतर राष्ट्रांच्या दैवतांनी आपापली भूमी माझ्यापासून सुरक्षित ठेवली का? नाही माझ्याहातून परमेश्वर यरूशलेम वाचवणार का? नाही."

36पण लोक गप्पच होते. ते सेनापतीला काहीही बोलले नाहीत. कारण "त्यांनी काहीही उत्तर द्यायचे नाही" अशी राजा हिज्कीयाची त्यांना आज्ञा होती.

37हिल्कीयाचा मुलगा एल्याकीम (एल्याकीम राजवाड्याचा कारभारी होता) चिटणीस शेबना आणि आसाफचा मुलगा यवाह (हा नोंदी करणारा होता.) हिज्कीयाकडे आले. शोकाकुल होऊन त्यांनी वस्त्रे फाडली होती. अश्शूरचा सेनापती काय म्हणाला ते त्यांनी हिज्कीयाला सांगितले.

## हिज्कीया यशया या भविष्यवादीशी बोलतो

19 राजा हिज्कीयाने सर्व हकीकत ऐकली. दु:ख आणि उद्वेग यांच्या भरात त्याने अंगावरची वस्त्रे फाडली आणि जाडेभरडे कपडे घालून तो परमेश्वराच्या मंदिरात गेला.

2कारभारी एल्याकीम, चिटणीस शेबना आणि वडीलधारे याजक यांना हिज्कीयाने आमोजचा मुलगा यशया या संदेष्ट्यांकडे पाठवले. त्यांनीही दु:ख प्रदर्शित करणारे जाडेभरडे कपडे घातले होते. 3ते यशयाला म्हणाले, "हिज्कीया म्हणतो, 'हा संकटाचा मानहानीचा दिवस आहे. मूल जन्माला येत आहे पण आईला प्रसूतीची शक्ती नसावी तसे झाले आहे. 4त्या सेनापतीचा स्वामी अश्शूरचा राजा याने त्याला आपल्या जिवंत देवाची निंदा करायला पाठवले होते. कदाचित् हे सर्व आपल्या परमेश्वर देवाच्या कानावर जाईल. शत्रूचा अंदाज चुकीचा आहे हे तो दाखवूनही देईल. तेव्हा अजून जे लोक आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना कर.'"

5राजा हिज्कीयाचे अधिकारी यशयाकडे गेले. 6यशया त्यांना म्हणाला, "हिज्कीयाला हा निरोप द्या. 'परमेश्वर म्हणतो माझ्या टवाळीचे जे उद्गार अश्शूरच्या राजाच्या सेनापतींनी काढले त्याने घाबरून जाऊ नका. 7मी आता त्याच्यात एका आत्म्याचा संचार करतो. एक अफवा तो ऐकेल आणि त्यामुळे तो स्वदेशी पळून जाईल आणि आपल्या देशातच त्याला तलवारीने मरण येईल असे मी करतो.'"

## अश्शूरच्या राजाचा पुन्हा हिज्कीयाला निरोप

8अश्शूरचा राजा लाखीश सोडून गेल्याचे सेनापतीने ऐकले. यहूदातील एक नगर लिब्ना याच्याविरूध्द तो लढत असल्याचे त्या सेनापतीला आढळले.

9कूशाचा राजा तिऱ्हाका आपल्याशी लढायला येत आहे अशी अफवा अश्शूरच्या राजाने ऐकली. तेव्हा अश्शूरच्या राजाने हिज्कीयाकडे पुन्हा निरोप घेऊन दूत पाठवले. निरोप असा होता.

10यहूदाचा राजा हिज्कीयाला सांगा
"तुम्ही ज्या परमेश्वरावर विसंबून आहात त्याच्याकडून फसगत करून घेऊ नका. तो म्हणतो, 'अश्शूरचा राजा यरूशलेमचा पराभव करणार नाही.' 11अश्शूरच्या राजाने इतर देशांचे काय केले ते तुम्ही ऐकलेच आहे. आम्ही ते पूर्ण धुळीला मिळवले. तेव्हा तुम्हीच तेवढे वाचणार का? नाही. 12त्या राष्ट्रांच्या देवतांनी त्यांचे रक्षण केले नाही. माझ्या पुर्वजांनी त्यांची धूळधाण केली. गोजान, हारान, रेसफ आणि तलस्सरातील एदेन हे त्यांनी नष्ट केले. 13हमाथ, अर्पाद, सफरवाईम, हेना आणि इव्वा यांचे राजे कुठे आहेत? त्यांचा पार धुव्वा उडाला आहे."

## हिज्कीयाची परमेश्वराजवळ प्रार्थना

14हिज्कीयाने जासूदांच्या हातून पत्र घेऊन ते वाचले. मग परमेश्वराच्या मंदिरात जाऊन परमेश्वरापुढे ते उघडून ठेवले. 15परमेश्वराची प्रार्थना करून हिज्कीया म्हणाला. "परमेश्वर देवा, करूबांच्यावर राजासनी बसणारा तूच इस्राएलचा देव आहेस. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राज्यांचा तू आणि एकमेव तूच नियंता आहेस आकाश आणि पृथ्वीचा तू निर्माता आहेस 16परमेश्वरा, माझे म्हणणे ऐक आपले डोळे उघड आणि हे पत्र पाहा. सन्हेरीबची जिवंत परमेश्वराचा अवमान करणारी वचने पाहा. 17खरोखरच परमेश्वरा असे घडले आहे. अश्शूरच्या राजाने ही सर्व राष्ट्रे नामशेष केली आहेत. 18तिथले दैवत त्याने आगीच्या भक्ष्यस्थानी टाकले. पण ते काही खरे देव नव्हते. माणसाने केलेल्या त्या लाकडाच्या आणि दगडाच्या मूर्ती होत्या. म्हणून तर अश्शूरच्या राजाला त्या नष्ट करता आल्या. 19तेव्हा परमेश्वर देवा आता आम्हाला या राजापासून वाचव. म्हणजे तूच खरा परमेश्वर आहेस हे जगातील सर्व राज्यांना कळेल."

20आमोजचा मुलगा यशया याने हिज्कीयाला निरोप पाठवला की, "इस्राएलचा परमेश्वर देव असे म्हणतो, 'अश्शूरचा राजा सन्हेरीब याच्या विषयी तू केलेले गाऱ्हणे मी ऐकले आहे.'

21"सन्हेरीबबद्दल परमेश्वराचा असा निरोप आहे

सीयोनच्या (म्हणजेच यरूशलेमच्या) कुमारी कन्येने तुला तुच्छ लेखून तुझा अपमान केला आहे. यरूशलेम कन्या तुझी पाठ वळली की तुझा उपहास करते.

22पण तू कोणाचा अपमान केलास? कोणाला क:पदार्थ लेखलेस? तू हे कोणाविरूध्द बोललास? इस्राएलच्या पवित्र

परमेश्वराविरूध्द तू गेलास. त्याच्यापेक्षा वरचढ
असल्याच्या आवेशात तू असा वागलास.
23परमेश्वराचा अवमान करायला तू दूत पाठवलेस. तू
म्हणालास, “माझे बहुसंख्य रथ घेऊन मी या उंच पर्वतावर,
लबानोनच्या अंतर्भागात आलो आहे. त्यांचे उंच गंधसरू
आणि उत्तम देवदारू मी तोडीन लबानोन मध्ये सर्वात
उंचावर असलेल्या घनदाट अरण्यात मी पोचलो आहे.
24मी विहिरी खणल्या आणि नव्या नव्या ठिकाणांचे
पाणी प्यालो. मिसरमधील नद्या सुकवून तो प्रदेश मी
पादाक्रांत केला.” 25तू असे म्हणालास खरा, पण परमेश्वर
काय म्हणाला ते तू ऐकले नाहीस काय?“पूर्वी, फार फार
पूर्वीच मी हे सर्व योजले होते आणि आता त्याप्रमाणेच
घडत आहे. मजबूत नगर उद्ध्वस्त होऊन तिथे नुसती
दगडांची रास उरली आहे, हे तुझ्याहातून घडले ते
माझ्यामुळेच. 26तेथील लोक समर्थ नव्हते. ते घाबरलेले
आणि गोंधळलेले होते. शेतातले गवत आणि पीक सरसकट
कापले जावे तसे ते होते. घराच्या धाब्यावरच गवत पूर्ण
वाढण्याआधीच करपून जावे तशी त्यांची स्थिती होती.
27तू कधी स्वस्थ बसतोस, कधी लढाईवर जातोस आणि
कधी घरी परततोस, तसेच माझ्याविरूध्द कधी उठतोस
ते मला माहीत आहे.
28माझ्या विरूध्द तू उठलास, तुझे उन्मत्त बोलणे मी
ऐकले. तेव्हा, मी आता तुझ्या नाकात वेसण घालतो
आणि तोंडात लगाम अडकवतो. मग तुला माघारे वळवून
ज्या रस्त्याने आलास त्याच वाटेने तुला परत फिरवतो.”

## हिज्कीयासाठी परमेश्वराचा संदेश

29“मी तुझ्या साहाय्यासाठी येणार आहे याची खात्री
पटावी म्हणून हे चिन्ह देतो. या वर्षी आपोआप धान्य
उगवेल ते तुम्ही खाल. दुसऱ्या वर्षी त्याच्या बियाणातून
उगवेल ते खाल. पण तिसऱ्या वर्षी मात्र तुम्ही स्वत:
पेरणी कराल त्यातून धान्य काढा. द्राक्षाची लागवड करा
आणि द्राक्षे खा. 30यहूदाच्या घराण्यातील उरल्यासुरल्या
लोकांचा वंश वाढेल. 31कारण काही जण बचावतील. ते
यरूशलेममधून बाहेर पडतील. सीयोन डोंगरातून काहीजण
येतील. परमेश्वराच्या तीव्र आवेशामुळे असे घडेल.
32“अश्शूरच्या राजाबद्दल परमेश्वर असे म्हणतो,

तो या शहरात पाऊल टाकणार नाही या नगरावर तो
बाण सोडणार नाही आपल्या ढाली तो येथे आणणार
नाही. या शहराच्या तटबंदीवर हल्ला करण्यासाठी तो
कचऱ्याचे ढीग रचणार नाही.
33तो आल्या वाटेने परत जाईल. या शहरात तो येणार
नाही असे परमेश्वर म्हणतो.
34या नगराचे रक्षण करून त्याला मी वाचवीन.
माझ्यासाठी आणि माझा सेवक दावीद याच्यासाठी मी हे
करीन.”

## अश्शूरच्या सेनेचा संहार

35त्या रात्री परमेश्वराचा दूत बाहेर पडला आणि त्यांने
अश्शूरांच्या छावणीतली एक लक्ष पंच्याऐंशी हजार माणसे
मारली. सकाळी लोक उठून पाहतात तर सर्वत्र प्रेतांचा
खच पडलेला.
36तेव्हा अश्शूरचा राजा सन्हेरीब निनवे येथे, जिथे तो
अगोदर होता तिथे निघून गेला. 37एक दिवस सन्हेरीब
आपले दैवत निस्रोख याच्या देवळात पूजा करत होता.
तेव्हा त्याचीच मुले अद्रम्मेलेक आणि शरेसर यांनी त्याला
तलवारीने मारले. मग ते अरारट* या देशात निघून
गेले. सन्हेरीबच्या जागी त्याचा मुलगा एसर-हद्दोन राज्य
करू लागला.

## हिज्कीया मरणासन्न अवस्थेत

20 याच सुमारास हिज्कीया आजारी पडून जवळ
जवळ मृत्युशय्येवरच होता. आमोजचा मुलगा
यशया हा संदेष्टा त्याच्याकडे गेला. तो हिज्कीयाला म्हणाला,
“परमेश्वराचे म्हणणे आहे, ‘तू आता घराच्या कारभाराची
निरवानिरव करावीस कारण तू फार काळ जगणार नाहीस
तुझा मृत्यू समीप आला आहे.’”
2तेव्हा हिज्कीयाने आपले तोंड भिंतीकडे वळवले.*
परमेश्वराची प्रार्थना करून तो म्हणाला, 3“परमेश्वरा,
मी तुझी मन:पूर्वक सेवा केली आहे हे लक्षात असू दे.
तुझ्या दृष्टीने जे उचित तेच मी केले.” एवढे बोलून तो
ओक्साबोक्शी रडला.
4यशया मधला चौक ओलांडून जाण्यापूर्वीच पुन्हा त्याला
परमेश्वराचे शब्द ऐकू आले. परमेश्वर म्हणाला, 5“पुन्हा
मागे फिर आणि माझ्या प्रजेचा नेता हिज्कीया याच्याशी
बोल. त्याला म्हणावे, “तुझा पूर्वज दावीद याचा परमेश्वर
देव म्हणतो: तू करूणा भाकलीस ती मी ऐकली आणि
तुझी अश्रू पाहिले. तेव्हा मी तुला बरे करतो तिसऱ्या
दिवशी तू परमेश्वराचे मंदिर चढून जाशील
6तुला मी आणखी पंधरा वर्ष आयुष्य दिले आहे.
अश्शूरच्या राजाच्या हातून तुझी आणि या नगराची मी
सोडवणूक करीन. या नगराचे मी रक्षण करीन. स्वत:साठी
तसेच माझा सेवक दावीद याला मी दिलेल्या वचनासाठी
मी हे करीन.’”
7मग यशया म्हणाला, “अंजीराचे मिश्रण* करून ते
याच्या दुखऱ्या भागावर लावा.”
तेव्हा त्यांनी अंजीरांचे मिश्रण करून हिज्कीयाच्या
दुखऱ्या भागावर त्याचा लेप दिला. तेव्हा हिज्कीया बरा
झाला.

---

**अरारट** पूर्व तुर्कस्थानातील उरार्तु प्राचीन नगर.

**तेव्हा ... वळवले** ही भिंत बहुधा देवळाच्या दिशेला असावी.

**अंजीराचे मिश्रण** अंजीराचा हा औषधी उपयोग होता.

### हिज्कीयाला झालेला संकेत

8हिज्कीया यशयाला म्हणाला, "परमेश्वराच्या कृपेने
माझ्या प्रकृतीला उतार पडेल आणि तिसऱ्या दिवशी मी
परमेश्वराचे मंदिर चढू शकेन याबद्दल काही खूण देता
येईल का?"

9यशया म्हणाला, "तुला काय हवे बोल. सावली दहा
पावले पुढे जाऊ दे* की मागे येऊ दे? परमेश्वराने
तुझ्या बाबतीत जे घडेल असे कबूल केले आहे त्याची ही
खूण आहे."

10हिज्कीया म्हणाला, "सावली दहा पावले पुढे जाणे
स्वाभाविक आहे. तेव्हा तसं नको, ती दहा पावले मागे
यावी."

11मग यशयाने परमेश्वराची प्रार्थना केली आणि
परमेश्वराने सावली दहा पावले मागे घेतली. जिथून ती
पुढे गेली होती तिथेच ती पूर्ववत आली.

### हिज्कीया आणि बाबेलचे लोक

12यावेळी बलदानचा मुलगा बरोदख-बलदान हा
बाबेलचा राजा होता. त्याने हिज्कीयाकडे संदेश आणि
भेटवस्तू पाठवल्या. हिज्कीया आजारी असल्याचे ऐकून
त्याने हे पाऊल उचलले. 13हिज्कीयाने त्याच्याकडून
आलेल्या माणसांचे आगतस्वागत केले. त्यांना आपल्या
घरातील सर्व मौल्यवान वस्तु दाखवल्या. सोने, चांदी,
मसाल्याचे पदार्थ, किंमती अत्तरे, शस्त्रास्त्रे असा आपला
सर्व खजिना त्यांना दाखवला. आपल्या घरातील आणि
राज्यातील कोणतीही गोष्ट त्याने त्यांना दाखवायची
शिल्लक ठेवली नाही.

14तेव्हा यशया संदेष्टा राजाकडे येऊन म्हणाला, "हे
लोक कोण? त्यांचे काय म्हणणे आहे?"

हिज्कीया म्हणाला, "हे फार लांबच्या प्रांतातून
बाबेलमधून आले आहेत."

15यशयाने विचारले, 'त्यांनी या घरातले काय काय
पाहिले?' हिज्कीयाने सांगितले, "त्यांनी सगळेच पाहिले.
माझे सगळे भांडार मी त्यांच्यापुढे उघडे केले."

16तेव्हा यशया म्हणाला, "आता परमेश्वराचा हा निरोप
ऐक. 17तुझ्या घरातील सर्व चीजवस्तू आणि तुझ्या पूर्वजांनी
जमवलेले सर्व धन आत्ता बाबेलला नेण्यात येईल. ती वेळ
आता येऊन ठेपली आहे. काही म्हणता काही मागे उरणार
नाही. ही परमेश्वराची वाणी आहे. 18बाबेलचे लोक तुझ्या
मुलांना घेऊन जातील. ती मुले बाबेलच्या राजावाड्यात
खोजे बनून राहतील." 19तेव्हा हिज्कीया यशायाला
म्हणाला, 'परमेश्वराचे म्हणणे योग्यच आहे.' तो पुढे
म्हणाला, "निदान माझ्या कारकिर्दीत तरी शांतता लाभेल
ना?"

20शहराला पाणीपुरवठा करणारी तळी आणि कालवे
यांच्यासकट हिज्कीयाने जी कामगिरी बजावली तिची नोंद
'यहूदाच्या राजांचा इतिहास' या पुस्तकात आहे. 21हिज्कीया
निधन पावला आणि त्याच्या पूर्वजांशेजारी त्याचे दफन
झाले. त्याचा मुलगा मनश्शे गादीवर आला.

### मनश्शेची यहूदावरील कलंकित कारकीर्द

21 मनश्शे राज्य करू लागला तेव्हा तो बारा वर्षांचा
होता. त्याने यरूशलेमवर पंचावन्न वर्षे, राज्य
केले. त्याच्या आईचे नाव हेफसीबा.

2परमेश्वराने जे करू नका म्हणून सांगितले तेच त्याने
केले. इतर राष्ट्रे करत तसे अमंगळ आचरण मनश्शेने
केले (आणि इस्राएली आले त्यावेळी याच राष्ट्रांना
परमेश्वराने तेथून हुसकून लावले होते.) 3हिज्कीयाने
नष्ट केलेली उंचस्थानावरील पुजास्थळे मनश्शेने पुन्हा
बांधली तसेच त्याने बालदेवतेसाठी वेदी बांधली आणि
इस्राएलचा राजा अहाब याच्याप्रमाणे अशेरा देवीचे स्तंभ
उभारले. मनश्शे नक्षत्रांची पूजाही करत असे.
4परमेश्वराच्या मंदिरात त्याने इतर देवतांच्या पूजेसाठी
वेद्या बांधल्या. (आपल्या नावाप्रीत्यर्थ परमेश्वराने हे मंदिर
केले होते.) 5याखेरीज या मंदिराच्या दोन्ही चौकांत मनश्शेने
आकाशातील नक्षत्रांसाठी वेद्या बांधल्या. 6आपल्या
मुलाचाच बळी देऊन मनश्शेने त्याला वेदीवर जाळले.*
जादूटोणा, मंत्रतंत्र, भुतंखेतं यांच्यामार्फत भविष्य जाणून
घ्यायचा मनश्शेला नाद होता.

परमेश्वराने जे जे गैर म्हणून सांगितले ते ते मनश्शे
करत गेला. त्याने परमेश्वराचा कोप झाला. 7मनश्शेने
अशेराचा कोरीव पुतळा करून तो मंदिरात ठेवला. या
मंदिराविषयी दावीद आणि दावीदचा मुलगा शलमोन यांना
परमेश्वर म्हणाला होता, "इस्राएलमधील सर्व नगरांमधून
मी यरूशलेमची निवड केली आहे. यरूशलेममधील
मंदिरात मी माझे नाव कायमचे ठेवीन. 8इस्राएल लोकांना
या भूमीतून बाहेर पडावे लागू नये याची मी दक्षता घेईन.
माझ्या सर्व आज्ञा तसेच मोशेची शिकवण त्यांनी तंतोतंत
पाळली तर त्यांची इथेच या भूमीत वसती राहील." 9पण
लोकांनी परमेश्वराचे ऐकले नाही. इस्राएल लोक इथे
येण्यापूर्वी कनानमधील राष्ट्रांनी जी वाईट वर्तणूक केली
त्यापेक्षाही मनश्शेचे वर्तन निंद्य होते. इस्राएल लोक या
भूमीत आले तेव्हा त्या राष्ट्रांना परमेश्वराने नष्ट केले
होते.

10तेव्हा परमेश्वराने आपल्या सेवक संदेष्ट्यांना हे
सांगायला सांगितले, 11"यहूदांचा राजा मनश्शे याने अत्यंत

---

**सावली ... जाऊ दे** हिज्कीयाने बांधलेले सूर्यघंटी यंत्र असावे. या इमारतीच्या पायऱ्यांवर ऊन पडले असता वेळ सांगता येत असावी.

**त्याला वेदीवर जाळले** अग्निदिव्य करायला लावले.

निरू कृत्ये केली आहेत. त्याच्या आधीच्या अमोऱ्यांपेक्षाही याचे वागणे भयंकर आहे. त्याच्या त्या मूर्तीमुळे त्याने यहूदालाही पाप करायला लावले आहे. 12तेव्हा इस्राएलचा परमेश्वर म्हणतो, 'यरूशलेम आणि यहूदा यांना मी आता अशा संकटाच्या खाईत लोटीन की ते ऐकूनच लोकांना धक्क ा बसेल. 13शोमरोनचे मापनसूत्र आणि अहाबच्या घराण्याचा ओळंबा मी यरूशलेमवर धरीन. थाळी घासूनपुसून पालथी करून ठेवावी तशी मी यरूशलेमची गत करीन. 14त्यातूनही काहीजण बचावतील. पण त्यांना मी तसेच सोडीन. त्यांना मी त्यांच्या शत्रूच्या ताब्यात देईन. ते त्यांना युध्दातील लुटीप्रमाणे कैदी करून नेतील. 15मी जे जे करू नका म्हणून बजावले ते ते त्यांनी केले त्याचे हे फळ होय. यांचे पूर्वज मिसरमधून बाहेर पडले त्या दिवसापासूनच यांनी मला संताप आणला आहे. 16शिवाय मनश्शेने अनेक निरपराध्यांची हत्या केली. संपूर्ण यरूशलेम त्याने रक्तलांछित केले. यहूरूंना त्याने जी पापे करायला लावली ती वेगळीच. परमेश्वराने जे करू नका म्हणून सांगितले ते मनश्शेने यहूदाला करायला लावले.'"

17मनश्शेची पापे आणि इतर कृत्ये 'यहूदाच्या राजांचा इतिहास' या पुस्तकांत लिहिलेली आहेत. 18मनश्शे मरण पावला आणि त्याचे आपल्या पूर्वजांच्या शेजारी दफन झाले. आपल्या घराच्या बगीच्यात त्याला पुरले. या बागेचे नाव "उज्जाची बाग" त्याच्या जागी त्याचा मुलगा आमोन राज्य करू लागला.

## आमोनची छोटी कारकीर्द

19आमोन राज्य करू लागला तेव्हा बावीस वर्षांचा होता. त्याने यरूशलेमवर दोन वर्षे राज्य केले. याच्या आईचे नाव मशुल्लेमेथ ही यटबा येथील हारूस याची मुलगी.

20आपले वडील मनश्शे यांच्याप्रमाणेच आमोननेही परमेश्वराच्या दृष्टीने गैर कृत्ये केली. 21तो आपल्या वडीलांसारखाच होता. वडीलांनी ज्या देवतांची पूजाअर्चा केली त्यांचीच पूजा आमोननेही आरंभली. 22आपल्या पूर्वजांचा परमेश्वर देव याचा मार्ग त्याने सोडला आणि परमेश्वराच्या इच्छेविरूध्द वागला.

23आमोनच्या सेवकांनी त्याच्याविरूध्द कट करून त्याच्या घरातच त्याला ठार केले. 24आणि ज्यांनी आमोनशी फितुरी केली त्या सेवकांना देशातील लोकांनी जिवे मारले. मग आमोनचा मुलगा योशीया याला लोकांनी राजा केले.

25आमोनने जी इतर कृत्ये केली ती सर्व "यहूदाच्या राजांचा इतिहास" या पुस्तकात लिहून ठेवलेली आहेत. 26उज्जाच्या बागेत आमोनचे दफन करण्यात आले. आमोनचा मुलगा योशीया राजा झाला.

## योशीयाचे यहूदावर राज्य

22 योशीया राज्य करू लागला तेव्हा आठ वर्षांचा होता. त्याने यरूशलेममध्ये एकतीस वर्षे राज्य केले. याच्या आईचे नाव यदीदा. ती बसकथमधील अदाया याची मुलगी.

2योशीयाचे वर्तन परमेश्वराला पटेल असेच होते. आपला पूर्वज दावीद याच्याप्रमाणे तो चालला. परमेश्वराच्या शिकवणुकी प्रमाणेच वागला. देवाला जसे पाहिजे तेच त्याने केले..

## मंदिराच्या दुरूस्तीचा आदेश

3मशुल्लामचा मुलगा असल्या याचा मुलगा शाफान चिटणीस याला योशीया राजाने आपल्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी परमेश्वराच्या मंदिरात पाठवले आणि सांगितले. 4"तिथे तू महायाजक हिल्कीया याच्याकडे जा. द्वारपालांनी लोकांकडून गोळा केलेले पैसे या याजकाकडे जमा व्हायला हवेत. हा परमेश्वराच्या मंदिरात जमा झालेला पैसा आहे.

5परमेश्वराच्या मंदिराच्या कामावर देखेरख करणाऱ्यांना याजकांनी यातील पैसे रूावेत. मंदिराची दुरूस्ती करणाऱ्या कारागिरांना देण्यासाठी या पैशाचा विनियोग व्हावा. 6सुतार, गवंडी, पाथरवट यांना तसेच लाकूड घेणे, चिरे घडवणे यासाठी पैसे रूावेत. 7दिलेल्या पैशाचा हिशेब मागू नये कारण ही मंडळी विश्वसनीय आहे."

## मंदिरात नियमशास्त्राचे पुस्तक

8महायाजक चिटणीस शाफान याला म्हणाला, "मला परमेश्वराच्या मंदिरात नियमशास्त्राचे पुस्तक सापडले आहे." मग ते पुस्तक याजक हिल्कीयाने शाफानला दिले. शाफानने ते वाचले.

9शाफानने परत येऊन राजाला सर्व वर्तमान सांगितले. तो म्हणाला, "तुझ्या सेवकांनी मंदिरातील सर्व पैसा एकत्र करून तो परमेश्वराच्या मंदिराच्या कामावर देखरेख करणाऱ्यांना त्यांनी दिला आहे." 10पुढे शाफान राजाला म्हणाला, "याजक हिल्कीया याने हे पुस्तकही मला दिले." शाफानने ते राजाला वाचून दाखवले.

11नियमशास्त्रातील वचने ऐकून राजाने अतीव दुःख प्रदर्शित करण्यासाठी आपली वस्त्रे फाडली. 12मग त्याने याजक हिल्कीया, शाफानचा मुलगा अहीकाम, मिखायाचा मुलगा अखबोर, शाफान चिटणीस आणि सेवक असाया यांना आज्ञा केली की, 13"आता जाऊन परमेश्वराचा कौल घ्या. मी, आपले लोक आणि सर्व यहूदा यांच्या वतीने त्याला या पुस्तकातील वचनांविषयी विचारा. परमेश्वराचा आपल्यावर कोप झाला आहे. कारण आपल्या पूर्वजांनी या पुस्तकातील वचनांचा भंग केला आहे.

आपल्यासाठी लिहून ठेवलेल्या सर्व गोष्टी त्यांनी आचरणात
आणल्या नाहीत.

## योशीया आणि संदेष्ट्री हुल्दा

14मग हिल्कीया याजक, अहीकाम, अखबोर, शाफान,
असाया हे सर्व हुल्दा या संदेष्ट्रीकडे गेले. हरहसचा मुलगा
तिकवा याचा मुलगा शल्लूम याची ती बायको शल्लूम
याजकांच्या कपड्यांचे खाते सांभाळी हुल्दा यरूशलेममध्ये
दुसऱ्या भागात राहात होती. हे सर्वजण तिच्याकडे गेले
आणि तिच्याशी बोलले."
15तेव्हा हुल्दा त्यांना म्हणाली, "इस्राएलचा देव परमेश्वर
म्हणतो: तुम्हाला माझ्याकडे ज्याने पाठवले त्याला सांगा
16'परमेश्वराचे म्हणणे आहे की, हा प्रदेश आणि तेथे
राहणारे लोक यांच्यावर आता मी अरिष्ट आणणार आहे.
यहूदाच्या राजाने त्या पुस्तकात वाचली तीच संकटे येतील.
17यहूदाच्या लोकांनी माझा त्याग केला. इतर दैवतांपुढे
त्यांनी धूप जाळला. त्यांनी मला संताप आणला. त्यांनी
अनेक मूर्तीही केल्या. म्हणून या प्रदेशावर माझा राग
आहे. न विझवता येणाऱ्या अग्नीसारखा माझा संताप असेल.'
18-19"यहूदाचा राजा योशीया याने तुम्हाला परमेश्वराचा
कौल घ्यायला पाठवले. योशीयाला हे सांगा: 'इस्राएलाचा
देव परमेश्वराची वचने तू ऐकलीस. हा प्रदेश आणि येथील
लोक यांच्याविषयी मी सांगितले ते ऐकलेस. तू मृदू मनाचा
आहेस. या गोष्टी ऐकून तुला दु:ख झाले. यरूशलेमवर
अरिष्ट येईल असे मी म्हणालो तेव्हा शोकाने तू वस्त्रे
फाडलीस आणि रडलास. म्हणून मीही तुझे ऐकले आहे."
हे परमेश्वराचे शब्द आहेत. 20मी तुझी तुझ्या पूर्वजांशी
भेट करून देईन. तुला मरण येईल आणि तू सुखाने
कबरीत पडशील. यरूशलेमवर येणारे अरिष्ट तुला
आपल्या डोळ्यांनी पाहावे लागणार नाही.'"
मग याजक हिल्कीया, अहीकाम, अखबोर, शाफान,
असाया यांनी हा संदेश राजाला सांगितला.

## लोक नियमशास्त्र ऐकतात

23 राजा योशीया याने यहूदा आणि यरूशलेम येथील
सर्व वडिलधाऱ्यांना निरोप पाठवून बोलावून
घेतले. 2मग राजा परमेश्वराच्या मंदिरात गेला. त्याच्या
मागोमाग यहूदा आणि यरूशलेम येथे राहणारे लोकही
गेले. अगदी सामान्य माणसापासून याजक, संदेष्टे
यांच्यासारख्या महत्वाच्या व्यक्तीपर्यंत झाडून सर्वजण
राजाच्या बरोबर गेले. मग राजाने परमेश्वराच्या मंदिरात
सापडलेले कराराचे पुस्तक काढून त्यातील सर्व वचने
सगळ्यांना ऐकू जातील अशी वाचली.
3स्तंभाजवळ उभे राहून राजाने परमेश्वराशी करार
केला. त्याने परमेश्वराची सर्व वचने, करार, नियम
पाळायचे कबूल केले. पुस्तकात लिहिलेले सर्व मनोभावे
पाळायचे त्याने आश्वासन दिले. राजाने केलेल्या या
कराराला पाठिंबा दर्शविण्यासाठी सर्वजण उठून उभे
राहिले.
4मग बालदैवत, अशेरा, नक्षत्रे यांच्या पूजेसाठी केलेली
सर्व पात्रे परमेश्वराच्या मंदिरातून बाहेर काढण्यात यावीत
अशी आज्ञा राजाने हिल्कीया, इतर याजक आणि द्वारपाल
यांना दिली. मग त्याने ती यरूशलेम बाहेरच्या किद्रोनच्या
शेतात जाळली. त्यांची राख बेथेल येथे नेली.
5यहूदाच्या राजांनी याजक म्हणून जी माणसे निवडली
होती ती सामान्य माणसे होती, आहरोन कुळातली नव्हती!
हे भोंदू याजक यहूदाच्या सर्व नगरामध्ये तसेच
यरूशलेमभोवतीच्या गावांतून उंचस्थानावरील
पूजास्थळांपुढे सर्रास धूप जाळत होते. बाल, सूर्य, चंद्र,
नक्षत्रे आणि आकाशातील इतर तारे यांच्यासाठी ते धूप
जाळत. मग हिज्कीयाने या याजकांवर बंदी घातली.
6योशीयाने परमेश्वराच्या मंदिरातून अशेराचा स्तंभ
हलवला. तो गावाबाहेर किद्रोन खोऱ्यात नेऊन जाळून
टाकला. नंतर त्याने जळलेल्या भागाच्या तुकड्यांची राख
केली. ती सामान्य लोकांच्या थडग्यांवर विखरून टाकली.
7परमेश्वराच्या मंदिरातील पुरूषवेश्यांची घरे योशीयाने
उद्ध्वस्त केली. बायकाही या घरांचा वापर करत आणि
अशेरा या देवतेच्या सन्मानार्थ लहान तंबू आच्छादने करत
असत.
8-9याजक या काळात यरूशलेमला यज्ञबळी आणून
मंदिरातील वेदीवर वाहात नव्हते. यहूदातील वेगवेगळ्या
शहरामध्ये हे याजक राहात होते. त्या त्या ठिकाणच्या
उंचस्थानावरील ठिकाणी ते धूप जाळत आणि यज्ञ करत.
गेबापासून बैर-शेब्यापर्यंत अशी उंचस्थाने होती. आणि हे
याजक आपली बेखमीर भाकर यरूशलेममधील मंदिरात
विशिष्ट ठिकाणी न खाता त्या त्या गावांमध्ये सामान्य
लोकांबरोबर बसून खात. पण राजाने ही उंचस्थाने मोडली
आणि याजकांना यरूशलेमला आणले. नगराधिकारी
यहोशवा याच्या वेशीजवळची डावीकडील उंचस्थानेही
योशीयाने उद्ध्वस्त केली.
10हिन्नोमच्या मुलाचे खोरे या ठिकाणी तोफेत हे एक
ठिकाण होते. तेथे लोक मोलख या दैवताला आपल्या
मुलांचा बळी देत आणि वेदीवर त्यांना जाळत. योशीयाने
हे स्थान पुन्हा वापरता येऊ नये अशातऱ्हेने भ्रष्ट करून
टाकले. 11पूर्वीच्या राजांनी परमेश्वराच्या मंदिराच्या
प्रवेशद्वाराशी एक रथ आणि काही घोडे ठेवलेले होते.
नाथान-मेलेक या अधिकाऱ्याच्या खोलीजवळ ही जागा
होती. हे घोडे आणि रथ सूर्य दैवतांच्या सन्मानार्थ* होते.
योशीयाने हे घोडे तेथून हलवले आणि रथ जाळून टाकला.
12आहाजच्या इमारतीच्या गच्चीत पूर्वी यहूदाच्या राजांनी
वेरू बांधल्या होत्या. परमेश्वराच्या मंदिराच्या दोन्ही

---

**सूर्य दैवतांच्या सन्मानार्थ** सूर्य हा रथ आकाशातून रोज नेतो अशी लोकांची समजूत होती.

चौकातही मनश्शेने वेरूा बांधल्या होत्या. योशीयाने या
सर्व वेरूांची मोडतोड करून किद्रोनच्या खोऱ्यात त्यांचे
भग्नावशेष टाकून दिले.
13यरूशलेमजवळच्या विध्वंसगिरी नावाच्या पहाडावर
राजा शलमोनने काही उच्चस्थाने पूर्वी बांधली होती.
पहाडाच्या ती दक्षिणेला होती. सिदोन्यांची अमंगळ दैवत
अष्टोरेथ, मवाब्यांची अमंगल दैवत कमोश आणि
अम्मोन्यांची अमंगल देवता मिलकोम यांच्यासाठीही
उच्चस्थाने त्याने बांधली होती. पण ही सर्व स्थाने राजा
योशीयाने भ्रष्ट केली. 14त्याने सर्वच्या सर्व स्मृतिस्तंभ
आणि अशेराचे खांब यांची पार मोडतोड केली आणि त्या
ठिकाणावर मृत माणसांच्या अस्थी पसरून टाकल्या.
15नबाटचा मुलगा यराबाम याने बांधलेली बेथेलमधली
वेदी आणि उच्चस्थानेही योशीयाने उध्वस्त केली. या
यराबामने इस्राएलला पाप करायला लावले होते. योशीयाने
त्या बांधकामांची मोडतोड करून त्याची अगदी माती केली.
अशेरा स्तंभही त्याने जाळून टाकला. 16योशीयाने डोंगरावर
इकडे तिकडे पाहिले तेव्हा त्याला काही कबरी दिसल्या.
तेव्हा त्याने माणसे पाठवून त्यांतील हाडे आणली. ती हाडे
त्याने वेदीवर जाळली आणि ते स्थान अपवित्र केले.
संदेष्ट्याने जो परमेश्वराचा संदेश घोषित केला होता त्या
प्रमाणेच हे झाले. यराबाम वेदीजवळ उभा असताना
संदेष्ट्याने हे सांगितले होते.

पुन्हा पाहिले तेव्हा योशीयाला संदेष्ट्याची कबर दिसली.
17योशीयाने विचारले, "हे थडगे कोणाचे?"

तेव्हा गावातील लोकांनी त्याला सांगितले, "हे यहूदातून
आलेल्या संदेष्ट्याचे थडगे. तू बेथेलच्या वेदीची जी दशा
करून टाकलीस त्याबद्दल त्याने फार पूर्वीच भाकित
केले होते."
18तेव्हा योशीया म्हणाला, "या थडग्याला धक्का लावू
नका तेथील अस्थी हलवू नका."
19शोमरोनच्या नगरामधील उच्चस्थानांवरील सर्व
दैवतेही योशीयाने उद्ध्वस्त केली. ही दैवते इस्राएलच्या
राजांनी बांधली होती आणि त्या मुळे परमेश्वराचा कोप
झाला होता. बेथेलमधील वेदीप्रमाणेच योशीयाने ह्या दैवतांची
गत करून टाकली.
20शोमरोन मधील उच्चस्थानांच्या सर्व याजकांना
योशीयाने ठार केले. त्या वेदीवरच त्याने त्यांना मारले.
वेदीवर माणसांची हाडे जाळली. अशाप्रकारे सर्व
पूजास्थळांची मोडतोड करून मग तो यरूशलेमला परतला.

## यहूदाचे लोक वल्हांडण साजरे करतात

21राजा योशीयाने सर्व लोकांना आज्ञा केली, "करारात
लिहिले आहे त्या पध्दतीने तुमच्या परमेश्वर देवासाठी
वल्हांडण सण साजरा करा."
22इस्राएलवर न्यायाधीश राज्य करत होते तेव्हापासून
लोकांनी वल्हांडण सण अशा पध्दतीने साजरा केला नव्हता.
यहूदाच्या किंवा इस्राएलच्या कोणत्याही राजाने त्यानिमित्त
उत्सव केला नव्हता. 23योशीयाचे राजा म्हणून अठरावे
वर्ष चालू असताना लोकांनी परमेश्वरासाठी हा सण साजरा
केला.
24यहूदा आणि यरूशलेममध्ये लोक पुजत असलेल्या
मांत्रिक (भूतसंचारी) चेटकी, गृहदेवता आणि अनेक
अमंगळ गोष्टींचा नाश योशीयाने केला. परमेश्वराच्या
मंदिरात याजक हिल्कीयाला जे नियमशास्त्राचे पुस्तक
सापडले त्या बरहुकूम योशीयाने हे केले. 25योशीयासारखा
राजा यापूर्वी झाला नव्हता. योशीया पूर्णपणे परमेश्वराचा
उपासक बनला मोशेच्या कराराचे पालन योशीयाइतक्या
काटेकोरपणे कुठल्याच राजाने केले नव्हते. आणि
त्यानंतरही तसा राजा झाला नाही.
26पण तरीही यहूदावरील परमेश्वराचा राग ओसरला
नाही. मनश्शेच्या वर्तनाबद्दल अजूनही त्याला राग होता.
27परमेश्वर म्हणाला, "मी इस्राएलांना हुसकावून लावले
तसेच यहूदांना करीन त्यांना मी नजरेपुढून घालवीन.
यरूशलेमचाही मी त्याग करीन. मीच ते नगर निवडले हे
खरे पण तेथील मंदिराची मी मोडतोड करीन "माझे नाव
राखणारी जागा" असे याच स्थळाबद्दल मी म्हणत होतो."
28'यहूदाच्या राजांचा इतिहास' या पुस्तकात योशीयाच्या
इतर गोष्टींची हकीकत आहे.

## योशीयाचा मृत्यू

29योशीयाच्या कारकिर्दीत, मिसरचा राजा फारो-नखो
याने फरात नदीजवळ अश्शूरच्या राजावर स्वारी केली.
तेव्हा योशीया फारो-नखोवर चाल करून गेला. पण
मगिद्दो येथे फारो-नखोने त्याला पाहिले आणि ठार केले.
30योशीयाच्या सेवकांनी त्याचा मृतदेह रथात घालून
मगिद्दोहून यरूशलेमला आणला. त्याला त्याच्या कबरीत
पुरले.

मग देशातील लोकांनी त्याचा मुलगा यहोआहाज याला
अभिषेक केला आणि त्याला पुढचा राजा केले.

## यहूदाचा राजा यहोआहाज

31यहोआहाज तेव्हा तेवीस वर्षांचा होता. त्याने
यरूशलेमवर तीन महिने राज्य केले. त्याच्या आईचे नाव
हमूटल. लिब्नाच्या यिर्मया याची ती मुलगी. 32यहोआहाज
परमेश्वराच्या दृष्टीने गैर वागला. त्याचे वर्तन आपल्या
पूर्वजांसारखेच होते.
33फारो-नखोने हमाथ देशातील रिब्ला येथे
यहोआहाजला बेड्या घातल्या. त्यामुळे यहोआहाजला
यरूशलेममध्ये राज्य करता येईना. फारो-नखोने
यहूदाकडून साडेसात हजार पौंड चांदी आणि पंचाहत्तर
पौंड सोने जबरदस्तीने वसूल केले.
34फारो-नखोने योशीयाचा मुलगा एल्याकीम याला राजा
केले एल्याकीम गादीवर आला. एल्याकीमचे नाव

फारो-नखोने बदलून यहोयाकीम केले; आणि यहोआहाजला मिसरला नेले. यहोआहाज तेथे मरण पावला.
[35]यहोयाकीमने फारोला सोने चांदी दिले तरी फारो-नखोला देण्यासाठी सामान्य लोकांवर कर बसवला. तेव्हा प्रत्येकाला आपल्या वाटचे थोडे थोडे सोने रूपे रूावे लागले. यहोयाकीमने मग फारोनखोला पैसे दिले.

[36]यहोयाकीम राजा झाला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता. त्याने यरूशलेमवर अकरा वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव जबूदा. ती रूमा येथील पदाया याची मुलगी.
[37]यहोयाकीमचे वर्तन परमेश्वराला न पटणारे होते. आपल्या पूर्वजांप्रमाणेच तो गैर वागला.

## राजा नबुखद्नेस्सरची यहूदावर स्वारी

24 यहोयाकीमच्या काळात बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर यहूदात आला. यहोयाकीमने तीन वर्षे त्याचे मांडलिकत्व पत्करले आणि नंतर फितूर होऊन त्याने बंड केले.
[2]यहोयाकीमविरूध्द परमेश्वराने बाबेल, अरामी, मवाबी आणि अम्मोनी लोकांच्या टोव्व्या पाठवल्या. आपल्या संदेष्ट्यांकरवी परमेश्वराने जे जे घडेल म्हणून सांगितले होते त्याप्रमाणेच घडत होते. यहूदाच्या संहारासाठी या टोव्व्या होत्या.

[3]यहूदा आपल्या नजरेसमोरून नाहीसे व्हावा म्हणून परमेश्वराच्या आज्ञेने हे झाले. मनश्शेची पापे याला कारणीभूत होती.
[4]मनश्शेने अनेक निरपराध्यांची हत्या केली. सारे यरूशलेम त्यांच्या रक्ताने माखले. या पापांना परमेश्वराजवळ क्षमा नव्हती.

[5]यहोयाकीमने बाकी जे काही केले त्याची नोंद "यहूदाच्या राजांचा इतिहास" या पुस्तकात आहे.
[6]यहोयाकीमच्या मृत्यूनंतर त्याचे आपल्या पूर्वजांशेजारी दफन झाले. त्याचा मुलगा यहोयाखीन राज्य करू लागला.

[7]मिसरच्या नदीपासून फरात नदीपर्यंत पूर्वी मिसरच्या ताब्यात असलेला सगळा प्रदेश बाबेलच्या राजाने बळकावल्यामुळे मिसरचा राजा मिसरसोडून आला नाही.

## नबुखद्नेस्सर यरूशलेम बळकावतो

[8]यहोयाखीन राजा झाला तेव्हा तो अठरा वर्षांचा होता. त्याने यरूशलेमवर तीन महिने राज्य केले. याच्या आईचे नाव नेहूष्टा. ती यरूशलेमच्या एलनाथानची मुलगी.
[9]यहोयाखीनने आपल्या वडीलांप्रमाणेच परमेश्वराच्या दृष्टीने गैर वर्तन केले.

[10]योवेळी बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याच्या
कारभाऱ्यांनी यरूशलेमला वेढा दिला. [11]नंतर
नबुखद्नेस्सर या नगरात आला. [12]यहूदाचा राजा
यहोयाखीन बाबेलच्या या राजाच्या भेटीला आला. यहोयाखीनची आई, त्याचे कार भारी, वडीलधारी मंडळी, सरदार हेही लोक त्याच्याबरोबर होते. तेव्हा बाबेलच्या राजाने यहोयाखीनला आपल्या ताब्यात घेतले. नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या आठव्या वर्षी हे झाले.

[13]यरूशलेमच्या परमेश्वराच्या मंदिरातली आणि राजवाड्यातली सर्व मौल्यवान चीजवस्तू नबुखद्नेस्सरने हस्तगत केली. राजा शलमोनने परमेश्वराच्या मंदिरात ठेवलेली सर्व सुवर्णपात्रे त्याने मोडून तोडून टाकली. हे परमेश्वराच्या भाकिताप्रमाणेच झाले.

[14]नबुखद्नेस्सरने यरूशलेममधली सगळी वडीलधारी मंडळी आणि धनवान लोक यांना कैद केले. दहाहजार लोकांना त्याने कैद केले. कुशल कामगार आणि कारागिर यांनाही त्याने पकडले. अगदी गरीबातला गरीब माणूस
वगळता कोणालाही मोकळे ठेवले नाही. [15]यहोयाखीनला
नबुखद्नेस्सरने बाबेलला कैदी म्हणून नेले. राजाची आई, बायका, सेवक, आणि गावातील प्रतिष्ठित लोक यांनाही
त्याने नेले. हे सर्व त्याचे कैदी होते. [16]सात हजाराचे सैन्य,
एक हजार कुशल कामगार आणि कारागीर यांनाही त्याने नेले. हे सर्व लोक युध्दात वाकबगार, तयार होते. त्यांना त्याने बाबेलला कैदी म्हणून नेले.

## राजा सिद्कीया

[17]बाबेलच्या राजाने मत्तन्या याला राजा केले. हा यहोयाखीनचा काका. त्याचे नाव बदलून सिद्कीया असे
ठेवले. [18]सिद्कीया राज्य करू लागला तेव्हा एकवीस
वर्षांचा होता. त्याने यरूशलेमवर अकरा वर्षे राज्य केले. याच्या आईचे नाव हमूटल. ती लिब्ना येथील यिर्मया
याची मुलगी. [19]सिद्कीया यहोयाखीनप्रमाणेच वर्तनाने
वाईट होता. परमेश्वराच्या आज्ञेविरूध्द तो वागला. [20]तेव्हा
परमेश्वराने संतापाने यरूशलेम आणि यहूदा यांची हकालपट्टी केली.

## सिद्कीयाच्या राज्याची अखेर

25 सिद्कीयाने बाबेलच्या राजाविरूध्द बंड केले आणि त्याच्या आज्ञा पाळण्याचे त्याने नाकारले. त्यामुळे बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर आपल्या सैन्यासह यरूशलेमवर चाल करून गेला. सिद्कीया राज्यावर आल्याचे ते नववे वर्ष, दहावा महिना, दहावा दिवस होता. नबुखद्नेस्सरच्या सैन्याने यरूशलेमला वेढा देऊन लोकांची ये जा रोखली. मग त्याने नगराभोवती कचऱ्याचे अडसर
निर्माण केले. [2]सिद्कीयाच्या कारकिर्दीचे अकरावे वर्ष
उजाडेपर्यंत हा वेढा चालू राहिला. [3]दुष्काळाने परिस्थिती
बिकट झाली होती. चौथ्या महिन्याच्या नवव्या दिवसापर्यंत नगरातील सामान्य माणसाची अन्नान्नदशा झाली.

[4]नबुखद्नेस्सरच्या सैन्याने शेवटी तटाला खिंडार पाडले. त्या रात्री राजा सिद्कीया आणि त्याचे सैन्य यांनी पलायन केले. त्यांनी पळून जाण्यासाठी दुहेरी तटबंदीमधल्या गुप्त वाटेचा आश्रय घेतला. ही वाट राजाच्या बागेजवळ होती. नगराभोवती शत्रूसैन्याचा वेढा होता पण सिद्कीया आणि

त्याचे सैन्य वाळवंटाच्या दिशेने निसटले. 5बाबेलच्या सैन्याने
त्यांचा पाठलाग केला. आणि त्यांना यरीहोजवळ गाठले.
तेव्हा सिद्कीयाचे सैन्य त्याला एकटा सोडून पळून गेले.
6बाबेलच्या लोकांनी राजा सिद्कीयाला धरून रिब्ला
येथे आपल्या राजाकडे नेले. या लोकांनी सिद्कीयाला
जबर शासन करण्याचे ठरवले. 7त्यांनी सिद्कीयाच्या
मुलांना त्याच्या नजरेसमोर जिवे मारले. नंतर सिद्कीयाचे
डोळे काढले आणि त्याला जेरबंद करून बाबेलला नेले.

### यरूशलेमचा विध्वंस

8बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याच्या कारकिर्दीच्या
एकोणिसाव्या वर्षी, पाचव्या महिन्यात सातव्या दिवशी
नबुखद्नेस्सर यरूशलेमवर चाल करून आला. नबुजरदान
हा राजाच्या उत्तम, निवडक सैन्याचा नायक होता. 9या
नबुजरदानने परमेश्वराचे मंदिर, राजवाडा आणि
यरूशलेममधील सर्व घरे जाळून टाकली. मोठमोठे वाडेही
त्याने उद्ध्वस्त केले.
10मग बाबेलच्या सैन्याने यरूशलेमची तटबंदी पाडली.
11नगरात अजून असलेले लोक नबुजरदानने ताब्यात
घेतले आणि त्यांच्यापैकी जे शरण यायला तयार होते
त्यांच्यासह सर्वांना कैदी म्हणून नेले. 12अगदीच दरिद्री
लोकांना तेवढे त्याने तेथेच राहू दिले. द्राक्षमळे आणि
शेतीची देखभाल करण्यासाठी त्याने त्यांना तिथे ठेवले.
13परमेश्वराच्या मंदिरातील सर्व पितळी पात्रांची
बाबेलच्या सैन्याने मोडतोड केली. पितळी खांब,
ढकलगाड्या, मोठमोठी पितळी घंगाळी यांची मोडतोड
करून ते पितळ त्यांनी बाबेलला नेले. 14इतर पात्रे, फावडी,
वाती कापण्याच्या कात्र्या, पळ्या, पितळी थाळ्या ही
परमेश्वराच्या मंदिरातली सर्व उपकरणेही त्यांनी घेतली.
15अग्निपात्रे, वाडगे, सोने-चांदीच्या लोभापायी
सोन्यारूप्याची भांडीही नबुजरदानने हस्तगत केली.
16–17अशाप्रकारे, नबुजरदानने बळकावलेल्या वस्तू:

दोन पितळी स्तंभ (प्रत्येक स्तंभाची उंची सत्तावीस फूट
त्यावरील कळस साडेचार फूट उंचीचे तेही पितळी असून
त्यावर जाळीकाम आणि डाळिंबाची नक्षी होती दोन्ही स्तंभ
अगदी सारखेच होते.)

एक मोठे पितळी घंगाळ परमेश्वराच्या मंदिरासाठी
शलमोनने करवून घेतलेल्या ढकलगाड्या यांत इतके
पितळ होते की त्याचे वजन करणे शक्य नव्हते.

### यहूदी लोकांना कैदी बनवण्यात येते

18नबुजरदानने मंदिरातून खालील लोकांना नेले मुख्य
याजक सराया दुय्यम याजक सफन्या आणि तीन द्वारपाल

19आणि शहरातून एक सैन्याधिकारी अजूनही नगरात
असलेले राजाचे पांच सल्लागार सैन्याधिकाऱ्याचा सचिव.
हा जनगणना प्रमुख असून सैनिकांची निवड करत असे.
शहरात सापडलेली साठ माणसेही त्याने घेतली.

20–21हमाथ प्रदेशातील रिब्ला येथे नबुजरदानने या
सर्वांना राजासमोर हजर केले. राजाने त्या सर्वांची तेथे
हत्या केली. अशाप्रकारे यहूदींना आपल्या भूमीतून बंदीवान
म्हणून जावे लागले.

### यहूदाचा अधिकारी गदल्या

22नबुखद्नेस्सरने काही लोकांना यहूदातच राहू दिले.
त्यात एकजण होता त्याचे नाव गदल्या. हा अहीकामचा
मुलगा आणि अहीकाम शाफानचा. या गदल्याला
नबुखद्नेस्सरने यहूदा प्रांतावर अधिकारी म्हणून नेमले.
23नथन्याचा मुलगा इश्माएल, कोरहाचा मुलगा
यहोहानान आणि नटोफाथी तन्हुमेथाचा मुलगा सराया व
माकाथीचा मुलगा याजन्या हे सैन्यातील सरदार होते. त्यांनी
बाबेलच्या राजाने गदल्याला अधिकारी केल्याचे ऐकले
म्हणून ते त्याला भेटायला मिस्पा येथे आले. 24गदल्याने
या सर्वांना अभय दिले आणि तो त्यांना म्हणाला, “बाबेलच्या
अधिकाऱ्यांचे भय बाळगू नका. या देशातच राहून
बाबेलच्या राजाशी एकनिष्ठ राहा. म्हणजे तुमचे भले
होईल.”
25अलीशामचा मुलगा नथन्या याचा मुलगा इश्माएल
हा राजसंतानांपैकी होता. त्याने आणखी दहाजणांसमवेत
सातव्या महिन्यात गदल्यावर हल्ला केला आणि सर्व यहूदी
तसेच खास्दी यांना मिस्पा येथे ठार केले. 26मग सर्व
सैन्याधिकारी आणि लोक मिसरला पळून गेले. बाबेलच्या
लोकांच्या धास्तीने कनिष्ठ पदावर असलेल्यापासून श्रेष्ठ
पदावर असलेल्यांपर्यंत सर्व पळाले.
27पुढे अबील मरोदख हा बाबेलचा राजा झाला. त्याने
यहूदाचा राजा यहोयाखीन याची कैदेतून सुटका
केली. यहोयाखीनला तोपर्यंत तुरूंगात पडून सदतीस
वर्षे झाली होती. अबील मरोदखने सत्तेवर आल्यावर
बाराव्या महिन्याच्या सत्ताविसाव्या दिवशी हे सुटकेचे
काम केले. 28यहोयाखीनच्या बाबतीत त्याचे धोरण
मवाळपणाचे होते. त्याने यहोयाखीनला इतर राजांपेक्षा
दरबारात उच्चासन दिले. 29अबील मरोदखने त्याला
तुरूंगातले कपडे बदलायला लावले. पुढे आयुष्यभर
यहोयाखीन अबील मरोदखच्या शेजारी मेजावर बसून जेवत
असे. 30अबील मरोदखने त्याला पुढे त्याच्या आयुष्यभर
रोज जेवण दिले.

# 1 इतिहास

## आदामापासून अब्राहामापर्यंतची वंशावळ

1 1–3आदाम, शेथ, अनोश, केनान, महललेल, यारेद, हनोख, मथुशलह, लामेख नोहा.*

4शेम, हाम आणि याफेथ ही नोहाची मुले.

## याफेथची मुले

5गोमर, मागोग, मादय, यावान, तुबाल, मेशेख, तीरास

6गोमरचे मुलगे: आश्कनाज, रीफाथ, तोगार्मा

7यावानचे मुलगे: अलीशा, तार्शीश, कित्तीम, रोदानीम

## हामचे मुलगे

8कूश, मिस्राईम (मिसर) पूट व कनान

9कूशचे मुलगे असे: सबा, हवीला, सब्ता, रामा, साब्तका, रामाचे मुलगे शबा आणि ददान.

10कूशचा वंशज निम्रोद हा जगातील सर्वात सामर्थ्यवान आणि शूर सैनिक झाला.

11मिस्राईमने लूदीम, अनामीम, लहाबीम, नाप्तुहीम 12पात्रुसीम, कास्लूहीम (याच्यापासून पलिष्टी झाले) व कफतोरीम यांना जन्म दिला.

13आणि कनानाचा ज्येष्ठ मुलगा सीदोन व त्यानंतर हेथ; 14यबूसी, अमोरी, गिर्गाशी, 15हिव्वी, अर्की, शीनी 16आर्वाही, समारी, हमाथी हे होत.

## शेमचे मुलगे

17एलाम, अश्शूर, अर्पक्षद, लूद आणि अराम हे शेमचे मुलगे. ऊस, हूल, गेतेर आणि मेशेख हे अरामचे मुलगे.

18शेलहचे वडील अर्पक्षद आणि एबरचे वडील शेलह.

19एबरला दोन मुलगे झाले. एकाचे नाव पेलेग (म्हणजे विभागणी) त्याला हे नाव पडायचे कारण याच्या हयातीत पृथ्वीवरील लोकांची भाषावार विभागणी झाली. पेलेगच्या भावाचे नाव यक्तान. 20यक्तानने अलमोदाद, शेलेफ, हसर्मावेथ, येरह, 21हदोराम, ऊजाल, दिक्ला, 22एबाल, अबीमाएल, शबा, 23ओफीर, हवीला, योबाब यांना जन्म दिला.

## अब्राहामची वंशावळ

24अर्पक्षद, शेलह, 25एबर, पेलेग, रऊ 26सरुग, नाहोर, तेरह, 27अब्राम (म्हणजेच अब्राहाम) ही सर्व शेमची मुले.

28इसहाक आणि इश्माएल ही अब्राहामची मुले. 29त्यांचे वंशज पुढीलप्रमाणे:

*हागार ची मुले*

नबायोथ हा इश्माएलचा पहिला मुलगा. इश्माएलची इतर मुले म्हणजे केदार, अदबेल, मिबसाम, 30मिश्मा, दुमा, मस्सा, हदद, तेमा 31यतूर, नापीश, केदमा. हे सर्व इश्माएलचे मुलगे.

*कटूराचे मुलगे*

32कटूरा ही अब्राहामची दासी होती. तिने जिम्रान, यक्षान, मदान, मिद्यान, इश्बाक, शूह यांना जन्म दिला. यक्षानला सबा व ददान हे मुलगे झाले.

33एफा, एफर, हनोख, अबीदा, एल्दा हे मिद्यानचे मुलगे. या सर्वांना कटूराने जन्म दिला.

*साराचे मुलगे*

34इसहाक हा अब्राहामचा मुलगा. एसाव आणि इस्राएल (याकोब) हे इसहाकचे मुलगे.

35एसावाचे मुलगे पुढीलप्रमाणे: अलीपाज, रगुवेल, यऊश, यालाम, कोरह.

36अलीपाजचे मुलगे असे: तेमान, ओमार, सपी, गाताम, कनाज. याखेरीज अलीपाज आणि तिम्ना यांना अमालेक नावाचा मुलगा होता.

37नहाथ, जेरह, शम्मा, मिज्जा हे रगुवेलचे मुलगे होत.

## सेईरचे अदोमी

38लोटान, शोबाल, सिबोन, अना, दीशोन, एसर व दीशान हे सेईराचे मुलगे.

39होरी आणि होमाम हे लोटानचे मुलगे. लोटानला तिम्ना नावाची बहीणही होती.

40आल्यान, मानहाथ, एबाल, शपी आणि ओनाम हे शोबालचे मुलगे. अय्या आणि अना हे सिबोनचे मुलगे. 41दीशोन हा अनाचा मुलगा आणि हमदान, एश्बान, यित्राण, करान हे दीशोनचे मुलगे.

---

**आदाम ते नोहा** ही यादी वंशजांची आहे, म्हणजे आदामाचा मुलगा शेथ, शेथचा अनोश याप्रकारे.

[42]बिल्हान, जावान, याकान हे एसेराचे मुलगे. ऊस व
अरान हे दीशानाचे मुलगे.

## अदोमचे राजे

[43]इस्राएलमध्ये राजांनी राज्य केले त्याच्या कितीतरी
आधी अदोममध्ये राजे होते. त्यांची नावे अशी: बौराचा
मुलगा बेला, बेलाच्या नगराचे नाव दीन्हाबा.

[44]बेलाच्या निधनानंतर जेरहचा मुलगा योबाब राजा
झाला. योबाब बस्रा येथील होता.

[45]योबाब मरण पावल्यानंतर त्याच्या जागी हूशाम गादीवर
आला. हा तेमानी देशातील होता.

[46]हूशामच्या मृत्यूनंतर बदादचा मुलगा हदाद याने राज्य
केले. त्याने मवाबच्या देशात मिद्यानचा पराभव केला.
हदादच्या नगराचे नाव अवीत होते.

[47]हदाद मरण पावल्यावर साम्ला राजा झाला. हा मास्रेका
येथील होता. [48]साम्ला मरण पावल्यावर त्याच्या जागी
शौल राज्यावर आला. हा युफ्राटिस नदीवरल्या रहोबोथचा
होता.

[49]शौल वारल्यावर अकबोरचा मुलगा बाल-हानान
राजा झाला.

[50]बाल-हानान वारल्यावर हदाद राजा झाला. त्याच्या
नगराचे नाव पाई असे होते. हदादच्या बायकोचे नाव
महेटाबेल. ही मात्रेद हिची मुलगी. मात्रेद मे-जाहाबची
मुलगी. [51]पुढे हदाद वारला. नंतर तिम्ना, आल्या, यतेथ,
[52]अहलीबामा, एला, पीनोन, [53]कनाज, तेमान मिब्सार,
[54]माग्दीएल, ईराम. हे अदोमचे नेते झाले.

## इस्राएलची मुले

2 रऊबेन, शिमोन, लेवी, यहूदा, इस्साखार, जबुलून,
[2]दान, योसेफ, बन्यामीन, नफताली, गाद व आशेर
हे इस्राएलचे मुलगे होत.

## यहूदाचे मुलगे

[3]एर, ओनान व शेला, ही यहूदाची मुले. बथ-शूवा या
कनानी स्त्रीपासून ही त्याला झाली. यहूदाचा पहिला मुलगा
एर वाईट प्रवृत्तीचा आहे हे परमेश्वराने जाणले होते त्यामुळे
एरला त्याने मारून टाकले. [4]यहूदाची सून तामार हिला
पेरेस आणि जेरह हे मुलगे झाले. असे यहूदाचे हे पाच
मुलगे.

[5]हेस्त्रोन आणि हामूल हे पेरेस चे मुलगे

[6]जेरहला पाच मुलगे होते. ते म्हणजे जिम्री, एथान,
हेमान, कल्कोल व दारा (दारदा).

[7]जिम्रीचा मुलगा कर्मी. कर्मीचा मुलगा आखार. आखार
ने युध्दात बळकावलेल्या वस्तू देवाला अर्पण करण्याऐवजी
ती लूट स्वत:

जवळच ठेवली. आणि इस्राएल लोकांवर पुष्कळ संकटे
आणली.

[8]एथानाचा मुलगा अजऱ्या.

[9]यरहमेल, राम आणि कालेब हे हेस्रोनचे मुलगे.

## रामचे वंशज

[10]अम्मीनादाब हा रामचा मुलगा. अम्मीनादाब हा
नहशोनचा पिता. नहशोन हा यहूदाच्या लोकांचा नेता
होता. [11]नहशोनचा मुलगा सल्मा. बवाज हा सल्माचा
मुलगा. [12]बवाजचा मुलगा ओबेद. आणि ओबेदचा मुलगा
इशाय. [13]इशायचा मुलगा अलीयाब. अलीयाब हा इशायचा
पहिला पुत्र. दुसरा अबीनादाब आणि तिसरा शिमा. [14]चवथा
नथनेल, पाचवा रद्दाय. [15]सहावा ओसेम, सातवा दावीदा.

[16]सरुवा आणि अबीगईल या त्यांच्या बहिणी अबीशय,
यवाब आणि असाएल हे तिघे सरुवाचे मुलगे. [17]अमासाची
आई अबीगईल अमासाचे वडील येथेर हे इश्माएली होते.

## कालेबचे वंशज

[18]हेस्रोनचा मुलगा कालेब. यरियोथची मुलगी अजूबा
ही कालेबची बायको.* या दोघांना मुले झाली. येशेर,
शोबाब आणि अर्दोन हे अजूबाचे मुलगे. [19]अजूबा
वारल्यानंतर कालेबने एफ्राथ हिच्याशी लग्न केले. त्यांना
मुलगा झाला. त्याचे नाव हूर. [20]हूरचा मुलगा उरी. ऊरीचा
मुलगा बसलेल.

[21]पुढे, वयाच्या साठाव्या वर्षी हेस्रोनने माखीरच्या मुलीशी
लग्न केले. माखीर म्हणजे गिलादचे वडील. हेस्रोन आणि
माखीरची मुलगी यांच्या शरीरसंबंधातून तिने सगूब याला
जन्म दिला. [22]सगूबचा मुलगा याईर. याईरची गिलाद प्रांतात
तेवीस नगरे होती. [23]पण गशूर आणि अराम यांनी ती सर्व
बळकावली. कनाथ आणि आसपासची खेडीपाडी ही
त्यापैकीच. अशी एकंदर साठ खेडी होती. ती सर्व, गिलादचा
बाप माखीर याच्या मुलांची होती.

[24]एफ्राथमधील कालेब येथे हेस्रोन मरण पावला. त्याची
बायको अबीया हिला त्याच्या मृत्यूनंतर त्याच्यापासून
झालेला अश्हूर हा मुलगा होता. हा अश्हूर म्हणजे
तकोवाचा बाप.

## यरहमेलची वंशज

[25]यरहमेल हा हेस्रोनचा पहिला मुलगा. राम, बुना,
ओरेन, ओसेम व अहीया ही यरहमेलची मुले. राम हा
त्यातला मोठा. [26]यरहमेलला दुसरी बायको होती, तिचे
नाव अटारा. ती ओनामची आई.

[27]यरहमेलाचा थोरला मुलगा राम याचे मुलगे मास,
यामीन आणि एकर हे होत.

[28]शम्मय व यादा हे ओनामचे मुलगे. नादाब आणि
अबीशूर हे शम्मयचे मुलगे.

---

**यरियोथची ... बायको** किंवा “अजूबा ही बायको आणि यरियोथ
या दोघीपासून कालेबला मुले झाली.”

29अबीशूराच्या बायकोचे नाव अबीहाईल. त्यांना दोन
मुलगे झाले ते म्हणजे अहबान आणि मोलीद.
30सलेद आणि अप्पईम हे नादाबचे मुलगे. यापैकी सलेद
निपुत्रिकच वारला.
31अप्पईमचा मुलगा इशी. इशीचा मुलगा शेशान.
शेशानचा मुलगा अहलय.
32शम्मयचा भाऊ यादा याला येथेर आणि योनाथान हे
दोन मुलगे होते. पैकी येथेर मुले बाळे न होताच वारला.
33पेलेथ आणि जाजा हे योनाथानचे मुलगे. ही झाली
यरहमेलची वंशावळ.
34शेशानला मुलगे नव्हते, फक्त मुली होत्या. शेशानकडे
मिसरचा एक नोकर होता. त्याचे नाव यरहा. 35त्याच्याशी
शेशानने आपल्या मुलीचे लग्न लावून दिले. त्यांना मुलगा
झाला, त्याचे नाव अत्ताय.
36अत्तायास नाथान नावाचा मुलगा झाला. त्याचा मुलगा
जाबाद.
37जाबादचा मुलगा एफ्लाल, एफलाल हा ओबेदचा
बाप. 38ओबेदचा मुलगा येहू, येहूचा मुलगा अजऱ्या.
39अजऱ्याने हेलसला जन्म दिला. आणि हेलसाने एलासा
याला जन्म दिला. 40एलासाचा मुलगा सिस्माया, सिस्मायाचा
मुलगा शल्लूम, 41शल्लूमचा मुलगा यकम्या, यकम्याचा
मुलगा अलीशामा.

## कालेबचे घराणे

42कालेब हा यरहमेलचा भाऊ. कालेबलाही मुलगे
झाले. त्यापैकी मेशा हा थोरला. मेशाचा मुलगा जीफ.
मारेशाचा मुलगा हेब्रोन.
43कोरह, तप्पूर, रेकेम आणि शमा हे हेब्रोनचे मुलगे.
44शमाने रहम याला जन्म दिला, रहमचा मुलगा यर्काम.
रेकेमचा मुलगा शम्मय, 45शम्मयचा मुलगा मावोन. मावोन
हा बेथसूरचा बाप. 46कालेबला एफा नावाची दासी होती.
तिला हारान, मोसा, गाजेज ही मुले झाली. हारान हा
गाजेजचा पिता. 47रेगेम, योथाम, गेशान, पेलेट, एफा व
शाफ हे यहदायचे मुलगे. 48माका ही कालेबची आणखी
एक दासी. शेबेर आणि तिऱ्हना हे तिचे मुलगे. 49शाफ
आणि शवा हे ही तिला झाले. शाफचा मुलगा मद्नान
आणि शवाचे मुलगे मखबेना आणि गिबा. अखसा ही
कालेबची मुलगी.
50कालेबची वंशावळ ही अशी आहे. होर हा कालेबचा
थोरला मुलगा. हा एफ्राथला झाला. हूरचे मुलगे
पुढीलप्रमाणे: किर्याथ-यारीमाचा संस्थापक शोबाल,
51बेथलहेमचा संस्थापक सल्मा आणि बेथ-गादेरचा
संस्थापक हारेफ.
52किर्याथ-यारीमची मुहूर्त मेढ रोवणारा शोबाल याचे
वंशज असे: हारोवे, मनुहोथमधील अर्धे लोक, 53आणि
किर्याथ-यारीममधील घराणी (कुळे). इथ्री, पूथी, शमाथी
आणि मिश्राई ही ती घराणी होत. त्यापैकी मिश्राईपासून
साराथी आणि एष्टाबुली हे झाले.
54सल्माचे वंशज याप्रमाणे: बेथलेहेम व नटोपाथी,
अटरोथ-बेथयवाब, अर्धे मानहतकर आणि सारी लोक.
55शिवाय तिराथी, शिमाथी, सुकाथी ही याबेसमध्ये राहणारी
लेखनिकांची घराणी. हे नकलनवीस म्हणजे रेखाबचा
संस्थापक हम्माथ याच्यापासून उत्पन्न झालेले केनी लोक
होते.

## दावीदाची मुलगे

3 दावीदाच्या काही मुलांचा जन्म हेब्रोन नगरात झाला.
त्यांची यादी अशी: अम्नोन हा त्यातला थोरला. इज्रेल
नगरातील अहीनवाम ही त्याची आई.
दानीएल हा दुसरा. कर्मेल यहूदा येथील अबीगईल ही
त्याची आई.
2तिसरा मुलगा अबशालोम. गश्शूरचा राजा तलमय
याची मुलगी माका हिचा हा मुलगा.
हग्गीथचा मुलगा अदोनीया हा चवथा.
3अबीटलचा मुलगा शफाट्या हा पाचवा.
दावीदाची पत्नी एग्ला हिचा इथ्रम हा सहावा. 4दावीदाच्या
या सहा मुलांचा जन्म हेब्रोन येथे झाला. दावीदाने तेथे
साडेसात वर्षे राज्य केले.
यरुशलेम येथे त्याने तेहतीस वर्षे राज्य केले. 5तिथे
जन्मलेली दावीदाची मुले खालीलप्रमाणे:
बथशूवाला चार मुलगे झाले. बथशूवा अम्मीएलची
मुलगी. शिमा, शोबाब, नाथान आणि शलमोन हे तिचे
मुलगे. 6–8इतर नऊ मुलगे असे: इभार, अलीशामा,
एलीफलेट नोगा, नेफेग, याफीय, अलीशामा, एल्यादा,
एलीफलेट. 9ही सर्व दावीदाची मुले. दासीपासून झालेले
आणखीही मुलगे त्याला होते. तामार ही दावीदाची मुलगी.

## दावीद नंतरचे यहूदाचे राजे

10शलमोनाचा मुलगा रहाबाम. त्याचा मुलगा अबीया,
त्याचा मुलगा आसा. आसाचा मुलगा यहोशाफाट, 11त्याचा
मुलगा योराम, योरामचा मुलगा अहज्या, अहज्याचा योवाश,
12योवाशचा मुलगा अमस्या, अमस्याचा मुलगा अजऱ्या,
त्याचा मुलगा योथाम. 13योथामचा मुलगा आहाज, त्याचा
मुलगा हिज्कीया, त्याचा मुलगा मनश्शे. 14मनश्शेचा मुलगा
आमोन, आमोनचा योशीया.
15योशीयाचे मुलगे: थोरला योहानान, दुसरा यहोयाकीम.
तिसरा सिद्कीया, चवथा शल्लूम. 16यहोयाकीमचे मुलगे:
यखन्या आणि त्याचा मुलगा सिद्कीया.

## बाबिलोनने यहूदाचा पाडाव केल्यानंतरची दावीदाची वंशावळ

17यखन्याला बाबिलोनमध्ये कैद केल्यानंतर त्याला
झालेल्या मुलांची नावे: शलतीएल, 18मल्कीराम, पदाया,

शेनस्सर, यकम्या, होशामा व नदब्या. 19पदायाचे मुलगे
याप्रमाणे: जरुब्बाबेल, शिमी. जरुब्बाबेलचे मुलगे मशुल्लाम
आणि हनन्या. या दोघांची बहीण शलोमीथ. 20जरुब्बाबेलाला
आणखीही पाच मुले होती. हशूबा, ओहेल, बरेख्या, हसद्या,
यूशब-हेसेद ही ती होत.
21पलट्या हा हनन्याचा मुलगा आणि पलट्याचा मुलगा
यशया, यशयाचा रफाया, रफायाचा अर्णान. अर्णानचा
मुलगा ओबद्या, ओबद्याचा मुलगा शखन्या.
22शखन्याचे वंशज याप्रमाणे: शमाया, शमायाला सहा
मुलगे: शमाया, हट्टूश, इगाल, बारीहा, नाऱ्या आणि शाफाट.
23नाऱ्याला तीन मुलगे: एल्योवेनय, हिज्कीया आणि
अज्रिकाम. 24एल्योवेनयला सात मुलगे होते. त्यांची नावे
अशी: होदव्या, एल्याशीब, पलाया, अक्कूब, योहानान,
दलाया, अनानी.

## यहूदाची आणखी काही घराणी

4 यहूदाच्या मुलांची नावे अशी: पेरेस, हेस्रोन, कर्मी,
हूर आणि शोबाल.
2शोबालचा मुलगा राया: त्याचा मुलगा यहथ. यहथाची
मुले अहूमय आणि लहद. सराथी लोक म्हणजे या दोघांचे
वंशज होत.
3इज्रेल, इश्मा व इद्बाश ही एटामाची मुले. त्यांच्या
बहिणीचे नाव हस्सलेलपोनी.
4पनुएलाचा मुलगा गदोर आणि एजेरचा मुलगा हूशा ही
हूरची मुले. हूर हा एफ्राथाचा मुलगा आणि एफ्राथा ही
बेथलेहेमची संस्थापक होती.
5अशूरचा मुलगा तकोवा. तकोवाला दोन बायका होत्या.
हेला आणि नारा. 6नाराला अहुज्जाम, हेफेर, तेमनी आणि
अहष्टारी हे मुलगे झाले. 7सेरथ, इसहार, एथ्रान आणि
कोस हे हेलाचे मुलगे. 8कोसने आनूब आणि सोबेबा यांना
जन्म दिला. हारुमचा मुलगा अहरहेल याच्या घराण्यांचा
प्रवर्तकही कोसच होता.
9याबेस एक फार चांगला माणूस होता. आपल्या भावांपेक्षा
तो भला होता. त्याची आई म्हणे, "याचे नाव याबेस ठेवले
कारण याच्यावेळी मला असह्य प्रसववेदना झाल्या."
10याबेसने इस्राएलाच्या देवाची प्रार्थना केली. याबेस
म्हणाला, "तुझा माझ्यावर वरदहस्त असू दे. माझ्या
प्रदेशाच्या सीमा वाढू देत. तू माझ्यासमीप राहा आणि
कोणाकडूनही मला इजा पोहोंचू देऊ नकोस. म्हणजे मी
सुखरुप राहीन." देवानेही त्याला त्याने जे मागितले ते
दिले. 11शूहाचा भाऊ कलूब. कलूबचा मुलगा महीर.
महीरचा मुलगा एष्टोन. 12बेथ-राफा, पासेहा आणि तहिन्ना
ही एष्टोनची मुले. तहिन्नाचा मुलगा ईर-नाहाश. हे रेखा
येथील लोक होत.
13अथनिएल आणि सराया ही कनाजची मुले. हथथ
आणि म्योनोथाय ही अथनिएलची मुले. 14म्योनोथायने
अफ्राला जन्म दिला.
आणि सरायाने यवाबला जन्म दिला. यवाब हा
गे-हराशीमचा संस्थापक. तेथील लोक कुशल कारागीर
असल्यामुळे त्यांनी हे नाव घेतले.
15यफुन्ने याचा मुलगा कालेब. कालेबची मुले म्हणजे
इरू, एला आणि नाम. एलाचा मुलगा कनज.
16जीफ, जीफा, तीऱ्या आणि असरेल हे यहल्ललेलचे
मुलगे.
17-18एज्राचे मुलगे येथेर व मरद, येफेर व यालोन.
मिर्याम, शम्माय आणि इश्बह ही मरदाची मुले. इश्बहचा
मुलगा एष्टमोवा. मरदची बायको मिसरची होती. तिने
येरेद, हेबेर आणि यकूथीएल यांना जन्म दिला. येरेदचा
मुलगा गदोर. सोखोचे वडील हेबेर. आणि यकूथीएल हे
जानोहाचे वडील. ही बिथ्याची मुले. बिथ्या ही फारोची
मुलगी. ही मिसरची असून मरदची बायको होती.
19मरदची बायको ही नहमची बहीण होती. मरदची ही
बायको यहूदाकडील होती. मरदच्या बायकोच्या मुलांनी
कईला आणि एष्टमोवा यांना जन्म दिला. कईला गार्मी
लोकांपैकी होता आणि एष्टमोवा माकाथी होता. 20अम्नोन,
रिन्ना, बेन-हानान, तिलोन हे शिमोनचे मुलगे. इशीचे
मुलगे जोहेथ आणि बेन-जोहेथ.
21-22यहूदाचा मुलगा शेला. एर, लादा, कोजेबा योकीम,
योवाश आणि साराफ ही शेलाची संतती. एर हा लेखाचा
पिता. लादा मारेशाचा आणि बेथ-अश्बेच्या विणकर
घराण्यांचा संस्थापक योवाश आणि साराफ यांनी मवाबी
बायकांशी लग्ने केली. त्यानंतर ते बेथलहेमला परतले.
या घराण्याच्या या नोंदी फार जुन्या आहेत. 23शेलाचे
वंशज हे कुंभार असून ते नेताईम आणि गदेरा येथे राजाच्या
चाकरीत होते.

## शिमोनाची संतती

24नमुवेल, यामीन, यारिब, जेरह, शौल हे शिमोनचे
मुलगे. 25शौलचा मुलगा शल्लूम. शल्लूमचा मुलगा
मिबसाम. मिबसामचा मुलगा मिश्मा.
26मिश्माचा मुलगा हम्मूएल. हम्मूएलचा मुलगा जक्कूर.
जक्कूरचा मुलगा शिमी. 27शिमीला सोळा मुलगे आणि
सहा मुली होत्या. पण शिमीच्या भावांना फार मुले बाळे
झाली नाहीत. त्यांची (कुटुंबे) मर्यादितच होती.
यहूदातील इतर काही घराण्यांप्रमाणे त्यांचा विस्तार
नव्हता.
28शिमीच्या वंशजातील लोक बैर-शेबा, मोलादा व
हसर-शुवाल, 29बिल्हा, असेम, तोलाद, 30बथुवेल, हर्मा,
सिकलाग, 31बेथमर्काबोथ, हसर-सुसीम, बेथ-बिरी व
शाराइम येथे राहत होते. दावीदराजा होईपर्यंत त्यांची तेथे
वस्ती होती. 32एटाम, अईन, रिम्मोन, तोखेन आणि आशान
ही या पाच गावांची नावे. 33बालापर्यंत पसरलेल्या
खेड्यापाड्यांमधूनही ते राहत होते. आपल्या वंशावळींची
नोंदही त्यांनीच ठेवली.

34–38त्यांच्या घराण्यातील वडिलधाऱ्या मंडळींच्या
नावांची यादी अशी आहे: मेशोबाब, यम्लेक, अमस्याचा
मुलगा योशा, योएल, येहू (योशिब्याचा मुलगा) सरायाचा
मुलगा योशिब्या, असिएलचा मुलगा सराया, एल्योवेनाय,
याकोबा, यशोहाया, असाया, अदिएल, यशीमिएल, बनाया,
जीजा हा शिफीचा मुलगा. शिफी हा अल्लोनचा मुलगा,
अल्लोन यदायाचा मुलगा, यदाया शिम्रीचा मुलगा, आणि
शिम्री शमायाचा मुलगा.
या सर्वांच्या कुटुंबांचा विस्तार चांगला झाला. 39ते
खोऱ्याच्या पूर्वेला गदोरच्या सीमेबाहेरही जाऊन पोहोंचले.
आपल्या गुरामेंढरांना चरायला कुरण हवे म्हणून जमिनीच्या
शोधात ते गेले. 40त्यांना चांगली गवताळ कुरणे मिळाली.
तेथील जमीन विस्तीर्ण होती. ही भूमी शांत व स्वस्थ
होती. हामचे वंशज पूर्वी या भागात राहत असत. 41हिज्कीया
यहूदाचा राजा होता त्यावेळची ही हकीकत. ते लोक
गदोरपर्यंत आले आणि हामच्या लोकांशी त्यांनी लढाई
केली. हामच्या लोकांच्या राहुट्या त्यांनी उद्ध्वस्त केल्या.
तेथे राहणाऱ्या मूनी लोकांनाही त्यांनी ठार केले. आजही
या भागात मूनीलोक आढळत नाहीत. तेव्हा या लोकांनी
तेथे वस्ती केली. मेंढरांसाठी कुरण असल्याने ते तेथे
राहिले.
42शिमोनच्या घराण्यातील पाचशे माणसे सेईर डोंगरावर
गेली. इशीचे मुलगे पलट्या, नाऱ्या, रफाया आणि उज्जियेल
यांनी त्यांना मार्गदर्शन केले. शिमोनी लोकांनी त्या ठिकाणी
वस्ती असणाऱ्या लोकांशी चकमकी केल्या. 43काही
अमालेकी लोकांचा त्यातूनही निभाव लागला ते तेवढे
अजून आहेत. त्यांना शिमोन्यांनी ठार केले. तेव्हा पासून
सेईरमध्ये अजूनही शिमोनी लोक राहत आहेत.

## रऊबेनाचे वंशज

5 1–3रऊबेन इस्राएलाचा थोरला मुलगा होता. तेव्हा
थोरल्या मुलाला मिळणारे सगळे विशेषाधिकार त्याला
मिळायला हवे होते. पण रऊबेनने आपल्या वडीलांच्या
पत्नीशीच शरीरसंबंध ठेवले त्यामुळे हे अधिकार
योसेफच्या मुलांना दिले गेले. या घराण्याच्या वंशावळीच्या
नोंदीत रऊबेनची थोरला मुलगा म्हणून नोंद नाही. यहूदा
आपल्या भावंडांपेक्षा पराक्रमी निघाला म्हणून पुढारीपण
त्याच्या घराण्यात गेले. मोठ्या मुलाला मिळायचे ते इतर
सर्व अधिकार मात्र योसेफाच्या घराण्याला मिळाले. हनोख,
पल्लू, हस्रोन आणि कर्मी हे रऊबेनचे मुलगे.
4योएलचे वंशज असे: योएलचा मुलगा शमाया. शमायाचा
मुलगा गोग. गोगचा शिमी. 5शिमीचा मुलगा मीखा. मीखाचा
मुलगा राया. रायाचा मुलगा बाल. 6बालचा मुलगा बैरा.
अश्शूरचा राजा तिल्गथ-पिल्नेसर याने बैराला आपल्या
घरातून पिटाळून लावले. आणि कैद केले. बैरा हा रऊबेनी
घराण्याचा अधिकारी पुरुष होता. 7योएलचे भाऊ आणि
त्यांची त्यांची घराणी यांची नोंद वंशावळींच्या नोंदीवरुनच
येथे केली आहे: ईयेल सर्वांत मोठा, मग जखऱ्या
8आणि बेला. बेला हा आजाजचा मुलगा. आजाज हा
शमाचा मुलगा. शमा योएलचा मुलगा. नबो आणि
बाल मौन येथपर्यंत ते अरोएर प्रांतात राहत होते. 9फरात
नदीच्या जवळ अगदी पूर्वेला वाळवंटाच्या कडेपर्यंत बेलाच्या
लोकांची वस्ती होती. गिलाद प्रांतात आपली गाई-गुरे
फार झाल्यामुळे त्यांना या बाजूला सरकावे लागले.
10शौलच्या कारकीर्दीत बेलाच्या लोकांनी हग्री लोकांशी
लढाई करुन त्यांचा पाडाव केला. त्यांच्याच तंबूत बेलाच्या
लोकांनी मुक्काम केला. तेथे राहून त्यांनी गिलादच्या
पूर्वेकडील सर्व प्रदेश पालथा घातला.

## गादचे वंशज

11रऊबेनी लोकांच्या शेजारीच गाद घराण्यातील
लोकांची वस्ती होती. बाशान प्रांतात सलका नगरापर्यंत
गाद घराण्यातील लोक राहत होते. 12योएल हा बाशान
मधला पहिला नायक. शाफाम दुसरा. मग यानयने त्याची
जागा घेतली. 13मीखाएल, मशुल्लाम, शबा, योरय, याकान,
जीया आणि एबर हे त्यांच्या घराण्यातील सात भाऊ. 14हे
अबीहईलचे वंशज. अबीहईल हूरीचा मुलगा. हूरी यारोहाचा
मुलगा आणि यारोहा गिलादचा. गिलाद मीखाएलचा.
मीखाएल यशीशायाचा मुलगा. यशीशाया यहदोचा मुलगा.
यहदो बूजाचा मुलगा. 15अही हा अब्दीएलचा मुलगा.
अब्दीएल गूनीचा मुलगा. अही हा त्या घराण्याचा प्रमुख.
16गाद घराण्यातील लोक गिलाद प्रांतात राहत होते.
बाशान, बाशानच्या आसपासची खेडी, शारोनच्या
आसपासची शिवारे एवढ्या भागात थेट सीमेपर्यंत राहत
होते.
17योथाम आणि यराबाम यांच्या काळात या लोकांच्या
नावांच्या नोंदी गाद वंशावळीमध्ये केल्या गेलेल्या
आहेत. योथाम यहूदाचा आणि यराबाम इस्राएलचा राजा
होता.

## युध्दनिपुण सैनिक

18मनश्शेच्या वंशातील अर्धे लोक आणि रऊबेनी व
गादी लोकांमधून 44,760 शूर सैनिक युध्दाला सज्ज असे
होते. लढाईमध्ये ते प्रवीण होते. ढाली, तलवारी ते बाळगून
होते. एवढेच नव्हे तर धनुष्य-बाण चालवणेही त्यांना
अवगत होते. 19हगरी, यतूर, नाफीश, नोदाब या लोकांशी
त्यानी लढाया केल्या. 20मनश्शे, रऊबेन आणि गाद
वंशातील लोक लढाईच्या वेळी देवाची प्रार्थना करीत.
देवावर भरवंसा असल्यामुळे ते मदतीची याचना करीत.
देव त्यांना साहाय्य करी. त्यामुळे त्यांना हग्री लोकांचा
पराभव करता आला. या लोकांबरोबरच्या इतर लोकांचाही
त्यांनी पाडाव केला. 21 50,000 उंट, 2,50,000
शेळ्यामेंढ्या, 2,000 गाढवे आणि 1,00,000 माणसे एवढे
त्यांनी हग्री लोकांकडून बळकावले. 22बरेच हग्री लोक

मारले गेले कारण देवाने रऊबेनींना लढाई जिंकायला
मदत केली. यानंतर मनश्शे, रऊबेन आणि गाद लोक
हग्री लोकांच्या भूप्रदेशात राहू लागले. बाबिलोन लोकांनी
इस्राएलांवर विजय मिळवून त्यांना कैद करुन नेईपर्यंत हे
लोक तिथेच राहिले.
23बाशानपासून बाल-हर्मोन, सनीर आणि हर्मोन डोंगर
येथपर्यंत मनश्शेच्या अर्ध्या वंशातील लोकांनी वस्ती केली.
तेथे त्यांची संख्या बरीच वाढली.
24मनश्शेच्या अर्ध्या [वंशातील घराण्याचे] प्रमुख
पुढीलप्रमाणे: एफेर, इशी, अलीएल, अज्रीएल, यिर्मया,
होदव्या, यहदीएल, हे सर्व शूर, वीर आणि नामांकित
होते. आपापल्या घराण्यांचे ते प्रमुख होते. 25पण आपल्या
पूर्वजांनी ज्याची उपासना केली त्या देवाशी त्यांनी गैरवर्तन
केले. देवाने ज्यांना नेस्तनाबूत केले होते त्या लोकांच्याच
खोट्या देवतांची त्यांनी उपासना केली.
26इस्राएलाच्या देवाने अश्शूरचा राजा पूल याच्या मनात
लढाईवर जाण्याची इच्छा जागवली. पूल म्हणजेच
तिल्गथ-पिल्नेसर. त्याने मनश्शे, रऊबेन आणि गाद
घराण्यातील लोकांशी लढाई केली. त्यांना त्याने ते होते
तिथून हुसकावून लावले आणि कैदी केले. पूलने मग
त्यांना हलह, हाबोर, हारा आणि गोजान नदीजवळ आणले.
तेव्हा पासून आजतागायत इस्राएलाच्या त्या घराण्यांतील
लोक तेथे राहत आहेत.

## लेवीचे वंशज

6 गेर्षोन, कहाथ आणि मरारी हे लेवीचे मुलगे.
2अम्राम, इसहार, हेब्रोन आणि उज्जीयेल हे कहाथचे
मुलगे.
3अहरोन, मोशे, मिर्याम हे अम्रामचे मुलगे. नादाब,
अबीहू, एलाजार व इथामार हे अहरोनचे मुलगे.
4एलाजारचा मुलगा फिनहास, फिनहासचा अबीशूवा.
5अबीशूवाचा मुलगा बुक्की. बुक्कीचा मुलगा उज्जी. 6उज्जीने
जरह्या याला जन्म दिला आणि जरहयाने मरायोथला.
7मरायोथ हा अमऱ्या याचा बाप. आणि अमऱ्या अहीटूबचा.
8अहीटूबचा मुलगा सादोक. सादोकचा मुलगा अहीमास.
9अहीमासचा मुलगा अजऱ्या. अजऱ्याचा मुलगा योहानन.
10योहाननचा, मुलगा अजऱ्या (शलमोनाने यरुशलेममध्ये
मंदिर बांधले तेव्हा हा अजऱ्याच याजक होता.) 11अजऱ्या
याने अमऱ्या याला जन्म दिला. अमऱ्याने अहीटूबला.
12अहीटूबचा मुलगा सादोक. सादोकचा मुलगा शल्लूम.
13शल्लूमचा मुलगा हिल्कीया. हिल्कीयाचा मुलगा
अजऱ्या. 14अजऱ्या म्हणजे सरायाचे वडील. सरायाने
यहोसादाकला जन्म दिला.
15यहूदा आणि यरुशलेम यांचा परमेश्वराने पाडाव केला
तेव्हा यहोसादाकला परागंदा व्हावे लागले. या लोकांना
युध्दकैदी म्हणून दुसऱ्या देशात जावे लागले. परमेश्वराने
हे सर्व नबुखद्नेस्सरच्या हातून घडवले.

## लेवीचे इतर वंशज

16गर्षोम, कहाथ आणि मरारी हे लेवीचे मुलगे.
17लिब्नी आणि शिमी हे गर्षोमचे मुलगे.
18अम्राम, इसहार, हेब्रोन, उज्जीयेल हे कहाथचे मुलगे.
19महली आणि मूशी हे मरारीचे मुलगे.
लेवी कुळातील घराण्यांची ही नावे. वडलांच्या
घराण्याप्रमाणे त्यांची वंशावळ दिलेली आहे.
20गर्षोमचे वंशज असे: गर्षोमचा मुलगा लिब्नी. लिब्नीचा
मुलगा यहथ. यहथया मुलगा जिम्मा. 21जिम्माचा मुलगा
यवाह. यवाहचा इद्दो. इद्दोचा मुलगा जेरह. जेरहचा यात्राय.
22कहाथचे वंशज असे: कहाथचा मुलगा अम्मीनादाब.
अम्मीनादाबचा कोरह. कोरहचा मुलगा अस्सीर.
23अस्सीरचा मुलगा एलकाना आणि एलकानाचा मुलगा
एब्यासाफ. एब्यासाफचा मुलगा अस्सीर. 24अस्सीरचा
मुलगा तहथ. तहथचा मुलगा उरीएल. उरीएलचा उज्जीया.
उज्जीयाचा शौल.
25अमासय आणि अहीमोथ हे एलकानाचे मुलगे.
26एलकानाचा मुलगा सोफय. सोफयचा मुलगा नहथ.
27नहथचा मुलगा अलीयाब. अलीयाबचा यरोहाम.
यरोहामचा एलकाना. एलकानाचा मुलगा शमुवेल.
28थोरला योएल आणि त्याच्या पाठीवरचा अबीया हे
शमुवेलचे मुलगे.
29मरारीचे मुलगे याप्रमाणे: मरारीचा मुलगा महली.
महलीचा लिब्नी. लिब्नीचा मुलगा शिमी. शिमीचा उज्जा.
30उज्जाचा मुलगा शिमा शिमाचा हग्गीया आणि त्याचा
असाया.

## मंदिरातील गायक

31कराराचा कोश तंबूत ठेवल्यावर दावीदाने
परमेश्वराच्या घरात गायनासाठी काही जणांची नेमणूक
केली. 32पवित्र निवास मंडपात हे लोक गायनसेवा करीत.
यरुशलेममध्ये शलमोनाने परमेश्वराचे मंदिर उभारले
तोपर्यंत त्यांनी ही सेवा केली. आपल्या कामाच्या
नियमानुसार ते वागत.
33गायनसेवा करणाऱ्यांची नावे अशी:
कहाथ घराण्यातील वंशज: हेमान हा गवई. हा योएलचा
मुलगा. योएल शमुवेलचा मुलगा. 34समुवेल एलकानाचा
मुलगा. एलकाना यरोहामचा मुलगा. यरोहाम अलीएलचा
मुलगा. अलीएल तोहाचा मुलगा. 35तोहा सूफचा मुलगा.
सूफ एलकानाचा मुलगा. एलकाना महथचा मुलगा. महथ
अमासयचा मुलगा. 36अमासय एलकानाचा मुलगा.
एलकाना योएलचा मुलगा. योएल अजऱ्याचा मुलगा.
अजऱ्या सफन्याचा मुलगा. 37सफन्या तहथचा मुलगा.
तहथ अस्सीरचा मुलगा. अस्सीर एब्यासाफचा मुलगा.
एब्यासाफ कोरहचा मुलगा. 38कोरह इसहारचा मुलगा.
इसहार कहाथचा मुलगा. कहाथ लेवीचा आणि लेवी
इस्राएलाचा मुलगा.

39आसाफ हेमानचा नातलग होता. हेमानच्या उजवीकडे
आसाफ उभा राहून सेवा करीत असे. आसाफ हा बरेख्या
याचा मुलगा. बरेख्या शिमाचा मुलगा. 40शिमा मिखाएलचा
मुलगा. मिखाएल बासेया याचा मुलगा. बासेया मल्कीया
याचा मुलगा. 41मल्कीया एथनीचा मुलगा. एथनी जेरहचा
मुलगा. जेरह हा अदाया याचा मुलगा. 42अदाया एतानाचा
मुलगा. एथाना हा जिम्मा याचा मुलगा. जिम्मा शिमीचा
मुलगा. 43शिमी यहथ याचा मुलगा. यहथ हा गर्षोम याचा
मुलगा. गर्षोम लेवीचा मुलगा.

44मरारीचे वंशज हेमान आणि आसाफ यांचे नातलग
होते. गाताना त्यांचा गट हेमानच्या डावीकडे उभा राहत
असे. एथान हा किशीचा मुलगा. किशी अब्दीचा मुलगा.
अब्दी मल्लूखचा मुलगा. 45मल्लूख हशब्याचा मुलगा.
हशब्या अमस्याचा मुलगा. अमस्या हा हिल्कीया याचा
मुलगा. 46हिल्कीया अमसीचा मुलगा. अमसी बानीचा
मुलगा. बानी शेमर मुलगा. 47शेमेर महलीचा मुलगा.
महली मूशीचा मुलगा. मूशी मरारीचा मुलगा. मरारी हा
लेवीचा मुलगा.

48हेमान आणि आसाफ यांचे नातलग हे लेवी घराण्यातील
होते. मंदिराच्या पवित्र निवासमंडपात काम करायला
लेवींची निवड झाली होती. पवित्र निवासमंडप म्हणजे
देवाचे घरच. 49होम करायच्या आणि धूप जाळायच्या
वेदींवर धूप जाळायची परवानगी मात्र फक्त अहरोनच्या
वंशजातील लोकांनाच होती. अहरोनचे हे वंशज देवाच्या
अत्यंत पवित्र गाभाऱ्यात नेमलेले सर्व काम करत. इस्राएली
लोकांना प्रायश्चित्त देऊन शुध्द करण्याचे समारंभही ते
करत. मोशे याने सांगितलेले नियम आणि विधी ते पाळत.
मोशे देवाचा सेवक होता.

## अहरोनचे वंशज

50अहरोनचे वंशज पुढीलप्रमाणे: अहरोनचा मुलगा
एलाजार. एलाजारचा मुलगा फिनहास. फिनहासचा मुलगा
अबीशूवा. 51अबीशूवाचा मुलगा बुक्की. बुक्कीचा मुलगा
उज्जी. उज्जीचा मुलगा जरह्या. 52जरह्याचा मुलगा मरायोथ.
मरायोथचा मुलगा अमऱ्या. अमऱ्याचा मुलगा अहीटूब.
53अहीटूबचा मुलगा सादोक आणि सादोकचा मुलगा
अहीमास.

## लेवी कुटुंबांची घरे

54अहरोनचे वंशज राहत त्या ठिकाणांची माहिती अशी.
त्यांना दिलेल्या जमिनीवर त्यांनी त्यांच्या वस्त्या उभारल्या.
कहथ कुटुंबांना त्या जमिनीतील पहिला वाटा मिळाला.
55हेब्रोन नगर आणि त्याच्या आसपासचे शिवार त्यांना
मिळाले. 56त्यापुढची जागा आणि हेब्रोन नगराजवळची
खेडी यफून्नेचा मुलगा कालेब याला मिळाली.
57अहरोनच्या वंशजांना हेब्रोन हे नगर मिळाले. हेब्रोन हे
आश्रयनगर होते. याखेरीज त्यांना लिब्ना, यत्तीर, एष्टमोवा,
58हीलेन, दबीर, 59आशान, युत्ता, आणि बेथ-शेमेश ही
नगरे त्यांच्या आसपासच्या शिवारांसकट मिळाली.
60बन्यामीनच्या वंशातील लोकांना गिबा, अल्लेमेथ,
अनाथोथ ही नगरे त्यांच्या आसपासच्या शिवारांसकट
मिळाली.

कहथच्या वंशजांना तेरा नगरे मिळाली.

61कहथच्या उरलेल्या काही वंशजांना मनश्शेच्या अर्ध्या
वंशांतून दहा नगरे मिळाली.

62गर्षोमच्या वंशजातील कुळांना तेरा नगरे मिळाली. ही
त्यांना इस्साखार, आशेर, नफताली आणि बाशान मधील
काही मनश्शे या वंशांच्या घराण्यांकडून मिळाली.

63मरारीच्या वंशजांतील कुळांना बारा नगरे मिळाली.
रऊबेनी, गाद आणि जबुलून यांच्या घराण्यांतून, चिठ्ठ्या
टाकून त्यांना ती मिळाली.

64ही नगरे व भोवतालची जमीन इस्राएल लोकांनी मग
लेवींना दिली. 65यहूदा, शिमोन आणि बन्यामीन यांच्या
घराण्यातून, चिठ्ठया टाकून, लेवी वंशजांना ती ती नगरे
देण्यात आली. 66एफ्राईमच्या वंशजांनी काही नगरे
कहाथच्या वंशजांना दिली. ती ही चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात
आली. 67त्यांना शखेम नगर मिळाले. शखेम हे आश्रयनगर
होय. गेजेर, 68यकमाम, बेथ-होरोन, 69अयालोन आणि
गथ-रिम्मोन हीही नगरे आसपासच्या जमिनीसकट त्यांना
मिळाली. एफ्राईमच्या डोंगराळ भागातील ही गावे होत.
70मनश्शेच्या अर्ध्या वंशातून इस्राएलांनी आनेर आणि
बिलाम ही गावे शिवारांसकट कहाथच्या वंशाच्या लोकांना
दिली.

## इतर लेवी कुटुंबांना मिळालेली घरे

71गर्षोमच्या वंशजांना बाशानमधील गोलान आणि
अष्टारोथ हे त्यांच्या भोवतालच्या शिवारासकट,
मनश्शेच्या अर्ध्या वंशाकडून मिळाले.

72-73त्याखेरीज गर्षोमच्या वंशजांना केदेश, दाबरथ,
रामोथ, आनेम ही नगरे भोवतालच्या शिवारासकट
इस्साखारच्या वंशजांकडून मिळाली.

74-75माशाल, अब्दोन, हूकोक, रहोब ही नगरे,
शिवारासकट, आशेर घराण्याकडून गार्षोन कुटुंबांना
मिळाली. 76गालीलमधले केदेश, हम्मोन, किर्याथाईम ही
शिवारासकट नगरे नफतालीच्या वंशातून गर्षोन वंशाला
मिळाली.

77आता उरलेले लेवी म्हणजे मरारी लोक त्यांना
योकनीम, कर्ता, रिम्मोनो आणि ताबोर ही नगरे जबुलूनच्या
घराण्याकडून मिळाली. नगराभोवतीची जमिनही अर्थातच
मिळाली.

78-79या खेरीज मरारींना वाळवंटातील बेसेर, याजा,
कदेमोथ, मेकाथ ही नगरे भोवतालच्या शिवारांसकट,
रऊबेनी लोकांकडून मिळाली. हे रऊबेनी यार्देन नदीच्या
पूर्वेला, यरीहोजवळ, राहत असत. 80-81मरारी कुटुंबांना

गाद वंशाकडून गिलादमधील रामोथ, महनाइम, हेशबोन, याजेर ही नगरे देखील आसपासच्या शिवारासकट मिळाली.

## इस्साखारचे वंशज

7 इस्साखारला चार मुलगे होते. त्यांची नावे अशी: तोला, पुवा, याशूब आणि शिम्मोन.

2उज्जी, रकाया, यरीएल, यहमय, इबसाम आणि शमुवेल हे तोलाचे मुलगे. ते सर्व आपापल्या घराण्यातली प्रमुख होते. ते आणि त्यांचे वंशज हे शूर लढवय्ये होते. त्यांची संख्या वाढून दावीदाच्या कारकिर्दीपर्यंत 22,600 इतकी झाली.

3इज्रह्या हा उज्जीचा मुलगा. मिखाएल, ओबद्या, योएल आणि इश्शीया हे इज्रह्याचे मुलगे. हे ही आपापल्या घराण्यांचे प्रमुख पुरुष होते. 4त्यांच्या घराण्यात 36,000 सैनिक युध्दाला तयार होते असे त्यांच्या वंशावळीच्या नोंदीवरून दिसते. बायका आणि मुले पुष्कळ असल्यामुळे यांचे घराणे मोठे होते.

5इस्साखारच्या सर्व घराण्यांमध्ये मिळून 87,000 लढवय्ये होते असे वंशावळींच्या नोंदींवरुन दिसते.

## बन्यामीनचे वंशज

6बन्यामीनला तीन मुलगे: बेला, बेकर आणि यदीएल.

7बेलाला पाच मुलगे होते: एस्बोन, उज्जी, उज्जीयेल, यरीमोथ आणि ईरी हे ते पाच होत. ते आपापल्या घराण्यांचे प्रमुख होते. त्यांच्यात 22,034 सैनिक होते असे घराण्याच्या नोंदींवरुन दिसते.

8जमीरा, योवाश, अलियेजर, एल्योवेनय, अम्री, यरेमोथ, अबीया, अनाथोथ व अलेमेथ हे बेकेर चे मुलगे. 9आपापल्या घराण्यांचे प्रमुख कोण ते त्यांच्या वंशावळीच्या नोंदीवरुन कळ्ते. त्यांच्याकडे 20,200 सैनिक होते, हे ही त्यावरुन कळ्ते.

10यदीएलचा मुलगा बिल्हान. बिल्हानची मुले, यऊश, बन्यामीन, एहूद, कनाना, जेथान, तार्शीश व अहीशाहर. 11यदीएलचे मुलगे हे त्यांच्या घराण्याचे प्रमुख होते. त्यांच्याकडे 17,200 सैनिक युध्दाला तयार होते. 12शुप्पीम आणि हुप्पीम हे ईरचे वंशज आणि अहेरचा मुलगा हुशीम.

## नफतालीचे वंशज

13यहसिएल, गूनी, येसर आणि शल्लूम हे नफतालीचे मुलगे.

हे सर्व बिल्हेचे वंशज.

## मनश्शेचे वंशज

14मनश्शेचे वंशज खालील प्रमाणे :

मनश्शे आणि त्याची अरामी दासी यांना अस्रीएल नावाचा मुलगा होता. माखीर हाही आणखी एक मुलगा होता. माखीर म्हणजे गिलादचा बाप. 15हुप्पीम आणि शुप्पीम या लोकांपैकी एका बाईशी माखीरने लग्न केले. तिचे नाव माका. माखीरच्या बहिणीचे ही नाव माका होते. या माकाचे दुसरे नाव सलाफहाद होते. हिला फक्त मुलीच झाल्या.

16माखीरची बायको माका हिला मुलगा झाला. तिने त्याचे नाव पेरेस ठेवले. त्याच्या (माखीरच्या) भावाचे नाव शेरेश. शेरेशचे मुलगे ऊलाम आणि रेकेम.

17ऊलामचा मुलगा बदान.

हे झाले गिलादचे वंशज. गिलाद हा माखीरचा मुलगा. माखीर मनश्शेचा मुलगा. 18माखीरची बहीण हम्मोलेखेथ हिला इशहोद, अबीयेजेर आणि महला हे मुलगे झाले. 19अह्यान, शेखेम, लिखी आणि अनीयाम हे शमीदचे मुलगे.

## एफ्राईमचे वंशज

20एफ्राईमची वंशावळ पुढीलप्रमाणे. एफ्राईमचा मुलगा शुथेलह. शुथेलहचा मुलगा बेरेद. बेरेदचा मुलगा तहथ. तहथचा एलादा. 21एलादाचा मुलगा तहथ. तहथचा मुलगा जाबाद. जाबादचा मुलगा शुथेलह.

गथ नगरात वाढलेल्या काही लोकांनी एजेर एलद यांना ठार मारले. कारण ते दोघे गथच्या लोकांची गुरे मेंढरे चोरुन नेत होते. 22एजेर आणि एलद हे एफ्राईमचे मुलगे होते. एजेर आणि एलद यांच्या निधनाचा शोक त्याने बरेच दिवस केला. त्याच्या बांधवांनी त्याचे सांत्वन केले. 23मग एफ्राईमचा बायकोशी संबंध येऊन त्याची बायको गर्भवती राहिली आणि तिने एका मुलाला जन्म दिला. एफ्राईमने या मुलाचे नाव बरीया ठेवले. घरात आधी वाईट घडून गेल्यामुळे त्याने हे नाव ठेवले. 24एफ्राईमच्या मुलीचे नाव शेरा. हिने खालचे आणि वरचे बेथ-होरोन आणि खालचे आणि वरचे उज्जनशेरा ही बांधली.

25रेफह हा एफ्राईमचा मुलगा. रेफहचा मुलगा रेशेफ. त्याचा मुलगा तेलह. तेलहचा मुलगा तहन. 26तहनचा मुलगा लादान. लादानचा मुलगा आम्मीहूद. आम्मीहूदचा अलीशामा. 27त्याचा मुलगा नून आणि नूनचा मुलगा यहोशवा.

28एफ्राईमच्या वंशजांची वतने आणि गावे पुढीलप्रमाणे त्या त्या ठिकाणी ते राहत होते: बेथेल व त्याच्या जवळपासची गावे. पूर्वेला नारान; पश्चिमेला गेजेर आणि आसपासची खेडी, शखेम आणि त्याच्या आसपासची खेडी अगदी थेट अय्या व त्या भोवतालच्या प्रदेशापर्यंत. 29मनश्शेच्या सीमेला लागून असलेली बेथ-शान, तानख, मगिद्दो, दोर ही नगरे व त्यांच्या भोवतालचा प्रदेश एवढ्या भागात इस्राएलचा मुलगा योसेफ याचे वंशज राहत होते.

## आशेरजे वंशज

30इम्ना, इश्वा, इश्वी, बरीया हे आशेरचे मुलगे. त्यांची बहीण सेराह. 31हेबेर, मालकीएल, हे बरीयाचे मुलगे. मालकीएलचा मुलगा बिर्जाविथ.

32यफलेट, शोमर, होथाम हे मुलगे आणि शूवा ही
बहीण यांच्या हेबेर हा बाप होता.
33पासख, बिह्माल, अश्वथ हे यफलेटचे मुलगे.
34अही, राहागा, यहूबा व अराम हे शेमेरचे मुलगे.
35शेमेरचा भाऊ हेलेम. त्याचे मुलगे सोफह, इम्ना,
शेलेश आणि आमाल.
36सोफहचे मुलगे सूहा, हर्नेफेर, शूवाल, बेरी व इम्ना,
37बेसेर, होद, शम्मा, शिलशा, इथ्रान, बैरा.
38यफुन्ने पिस्पा, अरा हे येथेरचे मुलगे.
39आरह, हन्निएल व रिस्या हे उल्लाचे मुलगे.
40हे सर्व आशेरचे वंशज. ते आपापल्या घराण्यांचे प्रमुख
होते. ते गुणसंपन्न शूर योध्दे होते. त्यांच्या वंशावळीच्या
नोंदीप्रमाणे 26,000 लढवय्ये पुरुष त्यांच्यात होते.

## राजा शौलच्या घराण्याचा इतिहास

8 बेला हा बन्यामीनचा ज्येष्ठ पुत्र. आश्बेल हा दुसरा
आणि अहरह हा तिसरा. 2चौथा नोहा व पाचवा
राफा.
3–5अद्दार, गेरा, अबीहूद, अबीशूवा, नामान, अहोह,
गेरा, शफूफान आणि हुराम हे बेलाचे मुलगे.
6–7एहूदचे वंशज खालील प्रमाणे: नामान, अहीया आणि
गेरा. हे गेबातील घराण्यांचे प्रमुख होते. त्यांना आपापली
गावे सोडायला लावून सक्तीने मानाहथ येथे नेण्यात आले.
गेराने त्यांना कैद केले. गेराने उज्जा आणि अहीहूद यांना
जन्म दिला.
8शहरयिमाने मवाबात आपल्या बायका हुशीम आणि
बारा यांना घटस्फोट दिला. यानंतर त्याला दुसऱ्या एका
बायकोपासून मुले झाली. 9–10ही त्याची बायको होदेश
हिच्यापासून त्याला योबाब, सिब्या, मेशा, मल्काम, यऊस,.
शख्या, मिर्मा हे मुलगे झाले. ते आपल्या वडलांच्या
घराण्यांचे प्रमुख होते. 11हुशीम पासून शहरयिमाला अबीटूब
आणि एल्पाल हे मुलगे झाले.
12–13एबर, मिशाम, शमेद, बरीया आणि शमा हे एल्पाचे
मुलगे. शमेदने ओनो आणि लोद व त्या आसपासची गावे
वसवली. बरीया आणि शमा हे अयालोनमधील घराण्यांचे
प्रमुख होते. त्यांनी गथ येथील रहिवाश्यांना हुसकावून
लावले.
14अह्यो, शाशक, यरेमोथ, 15जबद्या, अराद, एदर,
16मीखाएल, इश्पा, योहा हे बरीयाचे मुलगे. 17जबद्या,
मशुल्लाम, हिज्की, हेबेर, 18इश्मरय, इज्लीया, योबाब हे
एल्पालचे मुलगे.
19याकीम, जिखरी, जब्दी, 20एलीएनय, सिलथय,
अलीएल, 21अदाया, बराया, शिम्राथ हे शिमीचे मुलगे.
22इश्पान, एबर, अलीएल, 23अब्दोन, जिख्री, हानान,
24हनन्या, एलाम, अनथोथीया, 25इफदया, पनुएल हे
शाशकचे मुलगे होत.
26शम्शरय, शहऱ्या, अथल्या, 27यारेश्या, एलीया, जिख्री
हे यरोहामचे मुलगे.
28हे सर्व आपापल्या घराण्यांचे प्रमुख होते. तशी त्यांची
वंशावळींमध्ये नोंद आहे. ते यरुशलेम येथे राहत होते.
29गिबोनचा बाप यइएल. तो गिबोनमध्ये राहत होता.
त्याची बायको माका. 30त्याचा ज्येष्ठ पुत्र अब्दोन. सूर,
कीश, बाल, नादाब, 31गदोर, अह्यो, जेखर आणि मिकलोथ
ही इतर मुले. 32शिमा हा मिकलोथचा मुलगा. आपल्या
यरुशलेममधील बांधवांच्या जवळच हे सर्व राहत होते.
33कीशचा बाप नेर. कीश शौलचा बाप. आणि शौल
योनाथान, मलकीशुवा, अबीनादाब, एश्बाल यांचा.
34योनाथानचा मुलगा मरीब्बाल. मरीब्बाल मीखाचा
बाप.
35पीथोन, मेलेख, तरेया आणि आहाज हे मीखाचे मुलगे.
36यहोअद्दाचे वडील आहाज. यहोअद्दा आलेमेथ,
अजमाबेथ व जिम्री यांचा बाप होता. जिम्री हा मोसाचा बाप
होता. 37बिनाचा पिता मोसा. बिनाचा मुलगा राफा. राफाचा
एलासा. एलासाचा आसेल.
38आसेलला सहा मुलगे होते. ते म्हणजे अज्रीकाम,
बोखरु, इश्माएल, शाऱ्या, ओबद्या, हान.
39आसेलचा भाऊ एशेक. त्याचे मुलगे: ज्येष्ठ मुलगा
ऊलाम, दुसरा यऊष आणि तिसरा अलिफलेत. 40ऊलामचे
मुलगे शूर आणि उत्तम धनुर्धर होते. त्यांची वंशवेल चांगली
विस्तारली. मुले, नातवंडे मिळून 150 जण होते.
हे सर्व बन्यामीनचे वंशज.

9 इस्राएलच्या सर्व लोकांची नोंद वंशावळ्यांमध्ये
केलेली आहे. इस्राएलच्या राजाचा इतिहास या
पुस्तकात ती ग्रंथित केलेली आहे.

## यरुशलेममधील लोक

देवाशी एकनिष्ठ न राहिल्याने यहूदाच्या लोकांना बाबेल
येथे कैद करुन नेण्यात आले. 2त्यापैकी जे सगळ्यात
आधी आपल्या, गावात येऊन राहिले ते म्हणजे इस्राएल
लोक याजक, लेवी आणि मंदिरातील कामकरी वर्ग.
3यरुशलेममध्ये राहणाऱ्या यहूदा, बन्यामीन, एफ्राईम
आणि मनश्शे घराण्यातील लोक पुढीलप्रमाणे:
4ऊथय हा अम्मीहूदचा मुलगा. अम्मीहूद हा अम्रीचा
मुलगा. अम्री इम्रीचा मुलगा. इम्री बानीचा मुलगा. बानी
पेरेसच्या वंशजांपैकी. पेरेस हा यहूदाचा मुलगा.
5यरुशलेममध्ये राहणारे शिलोनी लोक असे: ज्येष्ठ
पुत्र असाया आणि त्याचे मुलगे.
6यरुशलेममधील जेरह चे वंशज म्हणजे यऊवेल आणि
त्याचे एकंदर 690 भाऊबंद.
7यरुशलेममधील बन्यामीन घराण्यातील लोक
पुढीलप्रमाणे: सल्लू हा मशुल्लामचा मुलगा. मशुल्लाम
होदव्याचा मुलगा. होदवा हस्सनुवाचा मुलगा. 8इबनया हा
यरहोरामचा मुलगा. एला उज्जीचा मुलगा. उज्जी मिख्रीचा

मुलगा. मशुल्लाम शफाट्याचा मुलगा. शफाट्या रगुवेलचा
मुलगा रगुवेल इबनीया याचा मुलगा. 9बन्यामीनच्या
वंशावळीवरुन असे दिसते की यरुशलेममध्ये हे एकंदर
256 होते. हे सर्व आपापल्या घराण्यांचे प्रमुख होते.

10यरुशलेममधील याजक पुढीलप्रमाणे: यदया,
यहोयारीब, याखीन, 11अजऱ्या. अजऱ्या हा हिल्कीयाचा
मुलगा. हिल्कीया मशुल्लामचा मुलगा. मशुल्लाम
सादोकचा. सादोक मरायोथचा आणि मरायोथ अहीटूबचा
मुलगा. अहीटूब हा देवाच्या मंदिरावरील प्रमुख अधिकारी
होता. 12यहोरामचा मुलगा अदाया होता. यहोराम हा
पशहूरचा मुलगा. पशहूर मल्कीयाचा, आणि अदीएलचा
मुलगा मसय. अदीएल यहजेराचा मुलगा, यहजेरा
मशुल्लामचा मुलगा, मशुल्लेम मशिल्लेमीथचा,
मशिल्लेमीथ इम्मेराचा मुलगा.

13असे एकंदर 1,760 याजक होते. ते आपापल्या
घराण्यांचे मुख्य होते. देवाच्या मंदिरातील सेवेच्या कामाची
जबाबदारी त्यांच्यावर होती.

14यरुशलेममधील लेवी घराण्यातले लोक याप्रमाणे:
हश्शूबचा मुलगा शमाया. हश्शूब अज्रीकामचा मुलगा.
अज्रीकाम हशब्याचा मुलगा. हशब्या हा मरारीच्या
वंशातला. 15याखेरीज बकूबकर, हेरेश, गालाल आणि
मतन्या हे ही यरुशलेममध्ये राहत होते. मतन्या मीखाचा
मुलगा. मीखा जिख्रीचा मुलगा. जिख्री आसाफचा मुलगा.
16ओबद्या शमाया याचा मुलगा. शमाया गालालचा मुलगा.
गालाल यदूथूनचा मुलगा. याखेरीज आसा याचा मुलगा
बरेख्या हाही तेथे राहत होता. आसा एल्कानाचा मुलगा.
एल्काना हा नटोफाथी लोकांच्या जवळच्या छोट्या गावांमध्ये
राहत होता.

17यरुशलेममधील द्वाररक्षक पुढीलप्रमाणे: शल्लूम,
अक्कूब, टल्मोन, अहीमान आणि त्यांचे नातलग. शल्लूम
हा त्यांच्यावरचा मुख्य. 18हे लोक आता राजाच्या
पूर्वेकडच्या प्रवेशद्वारापाशी उभे असतात. हे लेवीच्या
वंशातले होते. 19शल्लूम हा कोरे याचा मुलगा. कोरे हा
एब्यासाफचा मुलगा. एब्यासाफ कोरहचा मुलगा. शल्लूम
आणि त्याचे भाऊबंद हे द्वारपाल होते. ते कोरहच्या वंशातले
होते. पवित्र निवासमंडपाच्या द्वाररक्षणाचे काम त्यांच्याकडे
होते. आपल्या पूर्वजांप्रमाणेच ते हे काम पार पाडत होते.
त्यांच्या पूर्वजांकडेही हीच जबाबदारी होती.

20पूर्वी फिनहास द्वारपालाचा प्रमुख होता. फिनहास हा
एलाजारचा मुलगा. परमेश्वर फिनहासचा पाठीराखा होता.
21जखऱ्या पवित्र निवासमंडपाचा द्वारपाल होता.

22पवित्र निवासमंडपाचे रक्षण करणारे असे एकंदर
292 निवडक द्वाररक्षक होते. आपापल्या गावांच्या
वंशावळ्यांमध्ये त्यांची नावे लिहिलेली आहेत. त्यांचा
विश्वासूपणा पाहून दावीद आणि शमुवेल संदेष्टा यांनी
त्यांची नेमणूक केली होती 23परमेश्वराच्या मंदिराच्या,
पवित्र निवासमंडपाच्या प्रवेशद्वारांवर राखण करण्याची
जबाबदारी या द्वारपालांची आणि त्यांच्या वंशजांची होती.
24पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशी चार दिशांना प्रवेशद्वारे
होती. 25आसपासच्या गावांमध्ये राहणारे द्वारपालांचे
नातेवाईक वेळोवेळी त्यांच्या मदतीला येत. आले की सलग
सात दिवस मदतीला राहत.

26या सर्व द्वारपालांचे नायकत्व चार लेवी द्वारपालांकडे
होते. देवाच्या मंदिरातील खोल्या आणि खजिना यांची
जपणूक करण्याचे काम त्यांचे होते. 27देवाच्या मंदिरावर
पहारा करत ते रात्रभर जागे राहत. दररोज सकाळी मंदिराचे
दरवाजे उघडण्याचे काम त्यांच्याकडे होते.

28मंदिरात वापरायच्या पात्रांची देखभाल काही द्वारपाल
करत. ती पात्रे बाहेर काढताना आणि पुन्हा आत ठेवताना
ते ती मोजून ठेवत. 29लाकडी सामान, विशेष उपकरणे
यांच्यावर इतर काही द्वारपाल नेमलेले होते. पीठ, द्राक्षारस,
तेल, धूप, सुवासिक द्रव्य यांच्यावरही 30त्यांचीच देखरेख
होती. हे सुवासिक द्रव्य सिध्द करण्याचे काम याजकांचे
होते.

31अर्पणाच्या भाकरी भाजण्याच्या कामगिरीवर मत्तिथ्या
नावाचा लेवी होता. मत्तिथ्या हा शल्लूमचा थोरला मुलगा.
शल्लूम कोरा कुटुंबातील होता. 32कोरा कुटुंबातील काही
द्वार रक्षकांना शब्बाथच्या दिवशी मेजावर मांडायचा पाव
तयार करण्याचे काम सोपवलेले होते.

33लेवींपैकी जे घराण्यांचे प्रमुख आणि गायक होते ते
मंदिरातील खोल्यांत राहत असत. मंदिरातील कामाची
जबाबदारी रात्रंदिवस त्यांच्यावर असल्याने अमुकच असे
काम त्यांच्यावर सोपवलेले नव्हते. 34हे सर्व लेवी आपापल्या
घराण्यांचे प्रमुख होते. तशी वंशावळ्यांमध्ये नोंद आहे. ते
यरुशलेममध्ये राहत असत.

### शौल राजाच्या घराण्याचा इतिहास

35ईयेल म्हणजे गिबोनचे वडील. ईयेल गिबोन मध्येच
राहत होता. त्याच्या बायकोचे नाव माका. 36ईयेलच्या
ज्येष्ठ मुलाचे नाव अब्दोन. सूर, कीश, बाल, नेर आणि
नादाब त्याची आणखी मुले. 37शिवाय गदोर, अह्यो, जखऱ्या
आणि मिकलोथ ही त्याचीच मुले. 38मिकलोथने शिमामला
जन्म दिला. ईयेलचे कुटुंब यरुशलेममध्ये आपल्या
भाऊबंदाजवळच राहत होते.

39नेर हे कीशाचे वडील. कीश शौलाचे वडील. योनातान,
मलकी शुवा, अबीनादाब आणि एश्बाल ही शौलची मुले.

40मरीब्बाल हा योनाथानचा मुलगा. मीखा हा
मरीब्बालाचा मुलगा.

41पीथोन, मेलेख आणि तरहेया हे मीखाचे मुलगे.
42आहाजने यारा याला जन्म दिला.* आलेमेथ, अजमावेथ
आणि जिम्रीयांना याराने जन्म दिला. जिम्रीने मोसा याला
जन्म दिला. 43मोसाचा मुलगा बिना. बिनाचा मुलगा

---

**आहाजने … दिला** हिब्रूमध्ये असेच आहे.

रफाया. रफायाचा मुलगा एलासा आणि एलासाचा मुलगा
आसेल.

44आसेलला सहा मुलगे झाले. त्यांची नावे अशी:
अज्रीकाम, बोखरु, इश्माएल, शाऱ्या, ओबद्या आणि हानान.
ही झाली आसेलची मुले.

## शौल राजाचा मृत्यू

10 पलिष्टी इस्राएल लोकांशी लढले. इस्राएल
लोकांनी पळ काढला. गिलबोवा डोंगरात बरेच
इस्राएल लोक मारले गेले. 2पलिष्ट्यांनी शौल आणि त्याचे
मुलगे यांचा पाठलाग चालूच ठेवला. त्यांना पकडले आणि
ठार केले. योनाथान, अबीनादाब आणि मलकीशुवा या
शौलच्या मुलांना पलिष्ट्यांनी मारले. 3शौलाच्या त्यांनी
तीव्र मारा केला. धनुष्यबाणांनी वेध घेऊन त्याला सैन्याने
जायबंदी केले.

4तेव्हा आपल्या शस्त्रवाहकाला शौल म्हणाला, "तुझी
तलवार उपस आणि ती माझ्यावर चालव. नाहीतर हे
उपरे येऊन माझी विटंबना करतील."

पण शौलाच्या या शस्त्रवाहकाचा धीर झाला नाही.
त्याने शौलाला मारण्यास नकार दिला. तेव्हा शौलाने
स्वत:ची तलवार स्वत:ला मारण्यासाठी वापरली. तो स्वत:
तलवारीच्या टोकावर पडला. 5शौल मरण पावलेला पाहून
शस्त्रवाहाकाने तलवार उपसून त्यावर पडला व स्वत:चा
जीव घेतला. 6अशाप्रकारे शौल आणि त्याचे तीन मुलगे
यांना मरण आले. शौलाच्या कुटुंबाला एकदमच मृत्यू
आला.

7आपल्या सैन्याने पळ काढला आहे. तसेच शौल आणि
त्याचे मुलगे मेले हे खोऱ्यात राहणाऱ्या इस्राएल लोकांनी
पाहिले तेव्हा त्यांनीही आपली घरेदारे सोडून पळ काढला.
इस्राएल लोकांनी सोडलेल्या त्या नगरामध्ये पलिष्टी आले
आणि तेथेच राहू लागले.

8दुसऱ्या दिवशी हे पलिष्टी मृतांच्या अंगावरील मौल्यवान
चीजवस्तू लुटायला आले. तेव्हा गिलबोवा डोंगरावर त्यांना
शौल आणि त्याचे मुलगे यांचे मृतदेह सापडले. 9शौलाच्या
देहावरील वस्तू त्यांनी घेतल्या. त्याचे मस्तक आणि
चिलखत लांबवले. हे वर्तमान आपल्या दैवतांना आणि
लोकांना कळवायला त्यांनी देशभर दूत रवाना केले.
10पलिष्ट्यांनी शौलाचे चिलखता आपल्या देवळात आणि
शिर दागोनच्या देवळात टांगले.

11पलिष्ट्यांच्या या कृत्याची वार्ता याबेश गिलाद
नगरातील लोकांच्या कानावर गेली. 12तेव्हा त्यांच्यातील
शूर माणसे शौल आणि त्याची मुले यांचे मृतदेह आणायला
निघाली. ते मृतदेह त्यांनी याबेश गिलाद येथे आणले. तेथे
एका मोठ्या वृक्षाखाली त्यांनी त्यांच्या अस्थी पुरल्या आणि
सात दिवस उपवास केला.

13परमेश्वराशी प्रामाणिक नसल्याने शौलाला मरण
आले. शौलाने परमेश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन केले.
14शिवाय परमेश्वराला विचारण्याऐवजी भूतविद्या
जाणणाऱ्या बाईकडे जाऊन त्याने सल्ला विचारला. म्हणून
परमेश्वराने शौलाला मृत्युदंड दिला आणि इशायाचा मुलगा
दावीद याला राज्य दिले.

## दावीद इस्राएलचा राजा होतो

11 सर्व इस्राएल लोक हेब्रोन येथे दावीदाकडे जमले.
ते त्याला म्हणाले, "आम्ही तुझे भाऊबंद आहोत,
तुझ्याच रक्तामांसाचे आहोत. 2पूर्वी लढाईत तू आमचे
नेतृत्व केले आहेस. शौल राजा असतानाही तू ते केले
आहेस. परमेश्वर तुला म्हणाला, 'दावीदा, तू माझ्या इस्राएल
लोकांचा मेंढपाळ होशील. माझ्या लोकांचे नेतृत्व
करशील.'"

3इस्राएल लोकांमधील सर्व वडीलधारी मंडळी दावीद
राजाकडे हेब्रोन येथे आली. परमेश्वरासमोर दावीदाने
त्यांच्याशी करार केला. तेव्हा त्या पुढाऱ्यांनी दावीदास
अभिषेक केला. आता दावीद इस्राएलाचा राजा झाला.
शमुवेल मार्फत परमेश्वराने असे होणार असे वचन दिले
होते.

## दावीद यरुशलेम घेतो

4सर्व इस्राएल लोकांबरोबर दावीद यरुशलेम नगराकडे
गेला. यरुशलेमला त्याकाळी यबूस असे म्हणत असत;
आणि तेथे राहणाऱ्यांना यबूसी. ते नगरवासी 5दावीदाला
म्हणाले, "तू आमच्या नगरात पाऊल टाकू शकणार
नाहीस." तरीही दावीदाने त्यांचा पाडाव केलाच. दावीदाने
सियोनचा किल्ला घेतला. यालाच दावीदानगर हे नाव
पडले.

6दावीद म्हणाला, "यबूसी लोकांवरील हल्ल्याचे जो नेतृत्व
करील तो माझा सेनापती होईल." यवाबने हे नेतृत्व केले.
हा सरुवेचा मुलगा. यवाब सेनापती झाला.

7दावीदाने किल्ल्यातच आपला मुक्काम केला म्हणून
त्याला दावीद नगर नाव पडले. 8या किल्ल्याभोवती दावीदाने
नगराची उभारणी केली. मिल्लो पासून नगराच्या
तटबंदीपर्यंत त्याने ते बांधले. जेथे पडझड झाली होती तिथे
दुरुस्ती केली. 9दावीदाच्या मोठेपणात भर पडत गेली.
सर्वशक्तिमान परमेश्वर त्याच्या बाजूचा होता.

## दावीदाची फौज

10दावीदाच्या, खास सैनिकांच्या पुढाऱ्यांची नावे या यादीत
आहेत. दावीदाच्या राज्यात त्यांचेही बळ वाढले. त्यांनी
आणि समस्त इस्राएल लोकांनी दावीदाला पाठिंबा दिला
आणि त्याला राजा केले. देवाने कबूल केल्याप्रमाणेच हे
घडले

11दावीदाकडील खास सैनिकांची नावे अशी : याशबाम
हखमोनी. हा रथचालकांचा प्रमुख होता. याशबाम एकावेळी
तीनशे जणांना आपल्या भाल्याने ठार करु शकत असे.

[12]त्यानंतर दोदय अहोही याचा मुलगा एलाजार.
एलाजार तिघा पराक्रमींपैकी एक होता. [13]पसदम्मीम
येथे हा दावीदाबरोबर होता. पलिष्टे त्या ठिकाणी
लढायला आले होते. तेथे शेतात जवाचे पीक उभे
होते. इस्राएल लोक तेव्हा पळून गेले. [14]पण तीन शूर
वीर तिथेच पाय रोवून उभे राहिले आणि त्यांनी बचाव
करायचा प्रयत्न केला. पलिष्ट्यांचा त्यांनी पराभव
केला. परमेश्वराने इस्राएल लोकांना मोठा विजय मिळवून
दिला.

[15]एकदा, दावीद अदुल्लामच्या गुहेत होता. पलिष्ट्यांचे
सैन्य तिथून खाली रेफाईमच्या खोऱ्यात होते. त्यावेळी
तीस वीरांपैकी तिघेजण गुहेत असलेल्या दावीदाकडे जायला
जमिनीवरुन सरपटत रांगत निघाले. [16]आणखी एकदा
दावीद किल्ल्यांत असताना पलिष्ट्यांचे सैन्य बेथलहेममध्ये
होते. [17]तेव्हा आपल्या गावचे पाणी प्यावे असे दावीदाला
फार वाटले. तो म्हणाला, “बेथलहेमच्या वेशीजवळ विहीर
आहे तिच्यातले पाणी मला कोणी आणून दिले तर किती
बरे होईल.” त्याला पाणी हवे होते असे नाही पण तरी तो
हे म्हणाला.

[18]यावर त्या तिघांनी पलिष्ट्यांच्या छावणीतून मोठ्या
हिकमतीने वाट काढली, बेथलहेमच्या वेशीजवळच्या
विहिरीतील पाणी काढले आणि ते त्या तिघांनी दावीदाला
आणून दिले. दावीदाने ते पाणी प्यायला नकार दिला.
त्याने ते जमिनीवर ओतून परमेश्वराला अर्पण केले.
[19]दावीद म्हणाला, “देवा, हे पाणी मी कसे पिऊ? हे मी
प्यायलो तर ते इथपर्यंत आणायला ज्यांनी आपला जीव
धोक्यात घातला त्यांचे रक्तच प्यायल्यासारखे होईल.”
त्याने ते पाणी न प्यायचे कारण हे होय. त्या तीन शूरांनी
असे बरेच पराक्रम केले.

## दावीदाकडील आणखी शूर वीर.

[20]यवाबचा भाऊ अबीशय हा या तिघांचा प्रमुख होता.
त्याने आपल्या भाल्याने तीनशे जणांचा प्रतिकार केला
आणि त्यांना ठार केले. अबीशय त्या तिघांएवढाच प्रसिध्द
होता. [21]त्या तीन शूरांपेक्षा जास्त याने नाव कमावले. तो
त्या तिघामधला नसला तरी त्यांचा नायक झाला.

[22]यहोयादा हा एका बलाढ्य माणसाचा मुलगा होता.
यहोयादाचा मुलगा बनाया. हा कबसेल येथला होता. बनायाने
खूप पराक्रम केले. मवाबातील दोन अग्रगण्य माणसांना
त्याने ठार केले. एकदा बर्फ पडत असताना गुहेत शिरून
त्याने सिंहाचा वध केला. [23]मिसरच्या एका मजबूत
सैनिकालाही त्याने मारले. हा सैनिक साडेसात फूट उंचीचा
होता. त्याच्याजवळ चांगला लांब आणि भक्कम भाला
होता. विणकराच्या मागावरील तुळईएवढा हा भाला होता.
बनायाजवळ फक्त गदा होती. बनायाने त्या सैनिकाच्या
हातून भाला हिसकावून घेतला आणि त्यानेच त्या मिसर
सैनिकाला ठार केले. [24]यहोयादाचा मुलगा बनाया याने
असे बरेच पराक्रम केले. तीन शूरांप्रमाणेच त्याने नाव
मिळवले. [25]तीस शूरांपेक्षा बनायाचा बोलबाला जास्त झाला.
पण तो त्या तिघांपैकी नव्हता. दावीदाने बनायाला आपल्या
अंगरक्षकांचे प्रमुख म्हणून नेमले.

## तीस पराक्रमी वीर

[26]सैन्यातील शूर सैनिक (तीस वीर) पुढीलप्रमाणे:
यवाबचा भाऊ असाएल, बेथलेहेमच्या दोदोचा मुलगा
एलहानान, [27]हरोरी शम्मोथ, हेलस पलोनी, [28]तकोइच्या
इक्केशचा मुलगा ईरा, अनाथोथचा अबियेजेर [29]शिब्बखाय
हूशाथी, ईलाय अहोही, [30]महरय नटोफाथी, बाना नटोफाथी
याचा मुलगा हेलेद, [31]बन्यामीनांच्या संतानांमधला
गिबोथकर रीबय याचा मुलगा इत्तय, बनाया पिराथोनी,
[32]गाशच्या झऱ्यांजवळचा हूरय, अबीएल अर्बाथी,
[33]अजमावेथ बहरूमी, अलीहबा शालबोनी, [34]हामेश
गिजोनी याचे मुलगे, शागे हरारी याचा मुलगा योनाथान,
[35]साखार हरारी याचा मुलगा अहीयाम, ऊरचा मुलगा
अलीफल, [36]हेफेर मखेराथी, अहीया पलोनी, [37]हेस्त्री
कर्मेली, एजबयचा मुलगा नारय, [38]नाथानचा भाऊ योएल,
हग्रीचा मुलगा मिभार, [39]सेलक अम्मोनी, सरूवेचा मुलगा
यवाब याचा शस्त्रवाहक नहरय बैरोथी, [40]ईरा, इथ्री, गारेब,
इथ्री, [41]उरीया हित्ती, अहलयाचा मुलगा जाबाद,
[42]शीजा रउबेनी याचा मुलगा अदीना हा रउबेन्यांचा
अधिकारी व तीस शूरांपैकी एक, [43]माकाचा मुलगा हानान
आणि योशाफाट मिथनी, [44]उज्जीया अष्टराथी, होथाम
अरोएरी याचे मुलगे शामा ईयेल [45]शिम्रीचा यदीएल योहा
तीसी आणि त्याचा भाऊ योहा [46]अलीएल महवी व
एलनामचे मुलगे यरीबय आणि योशव्या व इथ्मा मवाबी,
[47]अलीएल, ओबेद न यासीएल मसोबायी.

## दावीदाला येऊन मिळालेले शूर वीर

12 दावीद सिकलागला असताना त्याच्याकडे
आलेल्यांची ही यादी. दावीद तेव्हा कीशचा मुलगा
शौल याच्या भयाने लपून राहत होता. या लोकांनी दावीदाला
लढाईत मदत केली. [2]धनुष्यबाण चालवणे किंवा गोफणगुंडा
मारणे या गोष्टी ते डाव्या उजव्या दोन्ही हातांनी सराईतपणे
करीत. बन्यामीनच्या वंशात जे शौलचे नातेवाईक होते
त्यांच्यापैकी हे होत. त्यांची नावे अशी:

[3]अहीएजर हा त्यांच्यातला प्रमुख. मग योवाश (गिबा
येथील शमा याचे हे मुलगे) त्यानंतर यजिएल आणि पलेट.
हे अजमावेथ याचे मुलगे. अनाथोथ येथील बराका व
येहू. [4]गिबोन येथील इश्माया (हा तीन वीरांपैकी एक
आणि त्या तीन वीरांचा प्रमुख.) गदेराथ लोकामधून यिर्मया,
यहजिएल, योहानान आणि योजाबाद. [5]एलूजय, यरीमोथ,
बाल्या, शमऱ्या, हरूफी शफट्या [6]एलकाना, इश्शीया,
अजरेल, योबेजर आणि याशबाम हे कोरही, [7]तसेच यहोहाम
गदोरी याचे मुलगे योएला आणि जबद्या.

## गाद वंशातील लोक

8गादी यांच्यातील काही लोक दावीदाकडे तो
वाळवंटातील गढीत असताना आले. ते चांगले शूर लढवय्ये
होते. ढाल वापरणे, भालाफेक यात ते वाकबगार होते. ते
सिंहासारखे उग्र आणि डोंगरातल्या हरणासारखे चपळ
होते. 9गाद वंशातील एजेर हा सैन्याचा प्रमुख होता. ओबद्या
दुसरा, अलीयाब तिसरा. 10मिश्मन्ना चवथा क्रमाकांवर
तर यिर्मया पाचव्या वर होता. 11अत्तय सहावा, एलीएल
सातवा, 12योहानन आठवा, एलजाबाद नववा, 13यिर्मया
दहावा, मखबन्नय अकरावा.
14हे गादी सैन्यातील सरदार होते. त्यांच्यातला
कनिष्ठसुध्दा शत्रूच्या शंभर जणांना भारी होता आणि
त्यांच्यातला खंदा वीर हजाराच्या सैन्याशी एकटा लढू
शकत असे. 15गादच्या घराण्यातील हेच सैनिक, वर्षाच्या
पहिल्या महिन्यात यार्देन नदी पार करुन गेले. नदीला
तेव्हा पूर आलेला होता. खोऱ्यात राहणाऱ्या लोकांना
त्यांनी पार पूर्वेला आणि पश्चिमेला पळवून लावले.

## इतर सैनिक दावीदाला येऊन मिळतात

16बन्यामिन आणि यहूदा वंशातील लोकही दावीदाला
गढीत येऊन मिळाले. 17दावीदाने त्यांचे स्वागत केले व
त्यांना तो म्हणाला, “मला मदत करायला तुम्ही सद्भावनेने
आला असाल तर तुमचे स्वागत असो. तुम्ही माझ्याकडे
या पण माझ्या हातून काही अपराध झालेला नसताना
कपट करायला आला असलात तर आमच्या पूर्वजांचा
देव ते पाहून तुम्हाला शासन करो.”
18अमासय हा तीस वीरांचा सरदार होता. त्याच्यात
परमेश्वरी आत्म्याचा साक्षात्कार झाला आणि तो म्हणाला,

“दावीदा, आम्ही तुझ्या बाजूचे आहोत इशायाच्या मुला,
आम्ही तुझ्या पाठीशी आहोत शांती असो! तुला साहाय्य
करणाऱ्यांनाही शांती असो. कारण देव तुझा पाठीराखा
आहे.”

तेव्हा दावीदाने त्यांना आपल्यात सामावून घेतले आणि
त्यांना सैन्याचे अधिकारी केले.
19मनश्शेच्या वंशातील काहीजणही दावीदाला येऊन
मिळाले. दावीद पलिष्टयांबरोबर शौलाशी लढायला गेला
तेव्हा ते आले. पण दावीदाने आणि त्याच्या सैन्याने
पलिष्ट्यांना फारशी मदत केली नाही. पलिष्ट्यांच्या
पुढाऱ्यांनी दावीदाची मदत घेण्याचा विचार केला पण मग
त्यांनी त्याला परत पाठवले. त्यांनी विचार केला, “दावीद
जर आपला स्वामी शौल याच्याकडे परत गेलाच तर
आपला शिरच्छेद होईल.”
20दावीद सिक्लागला गेला. त्याच्या बरोबर आलेले
मनश्शेचे लोक याप्रमाणे: अदनाह, योजाबाद, यदीएल,
मीखाएल, योजाबाद, अलीहू, आणि सिलथय. हे सर्व मनश्शे
वंशातील सरदार होते. 21लुटारूंना तोंड द्यायला त्यांनी
दावीदाला मदत केली. या लुटारूंच्या टोळ्या देशभर
लोकांना त्रस्त करत होत्या. मनश्शे वंशातील लोक
मात्र शूर होते. दावीदाच्या सैन्यात ते अधिकारपदावर चढले.
22दावीदाच्या मदतीला येणाऱ्यांत रोजच्यारोज भर पडत
गेली. त्यामुळे त्याचे सैन्य वरचढ होत गेले.

## हेब्रोन येथे दावीदाला येऊन मिळालेले आणखी काही लोक

23हेब्रोन नगरात दावीदाकडे आणखी बरेच लोक आले.
ते लढाईला तयार होते. शौलचे राज्य त्यांना दावीदाला
द्यायचे होते. असे घडणार हे परमेश्वराने सांगितलेच होते.
त्या लोकांची संख्या अशी:
24यहूदाच्या घराण्यातील 6,800 हत्यारबंद सैनिक ढाल
आणि भाले यांसह ते सज्ज होते.
25शिमोनच्या कुळातून 7,100 जण लढाईला तयार असे
शूर सैनिक होते.
26लेवीच्या कुळातून 4,600 जण. 27यहोयादा यांच्यात
होता. हा अहरोनच्या घराण्याचा पुढारी होता.
यहोयादाबरोबर 3,700 चे सैन्य होते. 28सादोक ही त्यांच्यात
होता. तो तरुण लढवय्या होता. आपल्या घराण्यातील बावीस
सरदार त्याने बरोबर आणले.
29बन्यामीनच्या वंशातील 3,000 जण होते. ते शौलचे
नातेवाईक होते. तो पर्यंत ते बहुतेक शौलच्या घराण्याशी
एकनिष्ठ होते.
30एफ्राइमच्या घराण्यातील 20,800 शूर सैनक ते सर्व
आपापल्या कुळात नावाजलेले होते.
31मनश्शेच्या वंशातील निम्मे म्हणजे 18,000 लोक
आले. दावीदाला राजा करण्यासाठी म्हणून त्यांना नावानिशी
बोलवून आणले होते.
32इस्साखारच्या घराण्यातील 200 जाणती, जबाबदार
माणसे आली. इस्राएलने केव्हा काय करणे योग्य आहे
याचे त्यांना चांगले भान होते. त्यांचे भाऊबंद त्यांच्या
सोबत, त्यांच्या आज्ञेत होते.
33जबुलून घराण्यातले 50,000 अनुभवी सैनिक तयार
होते. सर्व शस्त्रे ते कुशलतेने हाताळू शकत. दावीदाशी ते
एकनिष्ठ होते.
34नफतालीच्या घराण्यातून 1,000 सरदार आले.
त्यांच्याबरोबर ढाली आणि भाले बाळगणारे 37,000 लोक
होते.
35दानच्या वंशातून 28,000 जण युध्दाला तयार होते.
36आशेर मधले 40,000 सैनिक युध्दावर जायला तयार
असे होते.
37यार्देन नदीच्या पूर्वेकडील रऊबेनी, गादी आणि
मनश्शेच्या अर्ध्या वंशातील 1,20,000 लोक सर्व प्रकारच्या
हत्यारांसह सज्ज होते. 38हे सर्व जण पराक्रमी होते. दावीदाला
इस्राएलचा राजा करायचे याबाबतीत इतर इस्राएल लोकांची

एकवाक्यता होती. म्हणूनच ते हेब्रोन येथे एकत्र आले.
इस्राएलमधील इतर लोकांचीही दावीदाने राजा व्हावे हीच
इच्छा होती. 39या लोकांनी हेब्रोन येथे दावीद बरोबर तीन
दिवस घालवले. खाद्यपेयांचा आस्वाद घेतला कारण त्यांच्या
नातलगांनी सर्व सिध्दता केली होती. 40याखेरीज इस्साखार,
जबुलून, नफताली अशा आसपासच्या भागात राहणाऱ्यांनी
गाढंव, उंट, खेचरं, गुरं यांच्या पाठीवर लादून अनेक
खाद्यपदार्थ आणले. कणीक, अंजीराच्या ढेपा, मनुका,
द्राक्षारस, तेल, गुरे-मेंढरे असे बरेच काही आणले.
इस्राएलमध्ये आनंदीआनंद पसरला होता.

## करारकोश माघारी आणणे

13 दावीद आपल्या सैन्यातील अधिकाऱ्यांशी बोलला.
2मग दावीदाने इस्राएलमधील सर्व लोकांना एकत्र
बोलावले. तो त्यांना म्हणाला, "तुम्हाला जर हे योग्य
वाटत असेल आणि परमेश्वराचीही ती इच्छा असेल तर
इस्राएलच्या सर्व भागात पसरलेल्या आपल्या बांधवांसाठी
आपण एक संदेश पाठवू. आपापल्या नगरांत आणि खेड्यांत
त्यांच्याबरोबर जे याजक आणि लेवी आहेत त्यांनाही आपण
निरोप पाठवू. त्या सर्वांना आपण इकडे यायला सांगू.
3आपला करारकोश आपण पुन्हा यरुशलेममध्ये आणू.
शौल राजा असताना आपण करारकोशाची नीट देखभाल
केलेली नाही." 4दावीदाच्या या बोलण्याशी सर्व इस्राएल
लोक सहमत झाले. सर्वांना त्याचे म्हणणे पटले.

5मिसरमधील शीहोर नदीपासून लेबो हामाथच्या
प्रवेशापर्यंत पसरलेल्या सर्व इस्राएल लोकांना मग दावीदाने
एकत्र केले. किर्याथ यारीमहून हा कोश आणण्यासाठी ते
सर्व जमले. 6किर्याथ-यारीम म्हणजेच यहूदातील बाला
येथे दावीदासह सर्व इस्राएली पोचले. करारकोश म्हणजे
करूबांवरती राहणाऱ्या परमेश्वराचा करार कोश. तो
आणावा म्हणून ते आले.

7लोकांनी अबीनादाबच्या घरातून हा करारकोश
हलवला. तो नव्या गाडीवर चढवला. उज्जा आणि अह्यो हे
दोघेजण ही गाडी हाकत होते.

8दावीद आणि इस्राएल लोक देवापुढे जल्लोष करत
चालले. देवाची स्तुतिगीते गात, वीणा, सतार, डफ, झांजा,
कर्णे इत्यादी वाद्ये वाजवत ते चालले होते.

9किदोनच्या खळ्यापर्यंत ते पोचले. तेव्हा गाडी ओढणारे
बैल जरा अडखळले. त्यामुळे करारकोश अगदी पडायला
आला. तेवढ्यात उज्जाने कोशाला हात दिला.

10परमेश्वराचा उज्जावर कोप झाला. उज्जाने कोशाला
हात लावला म्हणून देवाने त्याला ठार केले. उज्जा तत्क्षणी
देवासमोर मरण पावला. 11देवाने उज्जावर असा राग काढावा
याचे दावीदाला वाईट वाटले. तेव्हा पासून आजतागायत
त्या ठिकाणाचे नाव "पेरेस-उज्जा" असे आहे.

12दावीदाला त्यादिवशी देवाची धास्ती वाटली.
दावीद म्हणाला, "आपल्या इथे मी परमेश्वराचा कोश
कसा आणू?" 13त्यामुळे त्याने दावीदानगराला तो
करारकोश आणला नाही. तेथेच त्याने करार कोश
ओबेद-अदोम याच्या घरी नेला. ओबेद-अदोम हा गथ
नगरातील होता. 14हा करारकोश त्याच्या घरात तीन
महिने होता. ओबेद-अदोमच्या घराला आणि त्याचे जे
काही होते त्या सगव्व्याला परमेश्वराने आपले आशीर्वाद
दिले.

## दावीदाच्या राज्याची भरभराट

14 हिराम सोराचा राजा होता. त्याने दावीदाकडे दूत
पाठवले. याखेरीज त्याने गंधसरुचे ओंडके, गवंडी,
सुतार हे देखील पाठवून दिले. दावीदासाठी घर बांधायला
म्हणून त्याने ही मदत केली. 2तेव्हा, परमेश्वराने
आपल्याला खरोखरच इस्राएलचा राजा केले आहे हे
दावीदाच्या लक्षात आले. दावीदावर आणि इस्राएलच्या
लोकांवर प्रेम असल्यामुळे देवाने दावीदाचे साम्राज्य विशाल
आणि मजबूत केले.

3यरुशलेम नगरातल्या आणखी काही स्त्रियांशी दावीदाने
लग्ने केली. त्याला आणखी मुले-मुली झाली.
4यरुशलेममध्ये जन्मलेल्या त्याच्या या मुलांची नावे अशी:
शम्मुवा, शोबाब, नाथान, शलमोन, 5इभार, अलीशवा,
एल्पलेट,

6नोगा, नेफेग, याफीय, 7अलीशामा, बेल्यादा,
अलीफलेट.

## दावीदाकडून पलिष्ट्यांचा पाडाव

8दावीदाला इस्राएलचा राजा केले आहे हे पलिष्ट्यांना
कळ्ळे तेव्हा ते दावीदाच्या मागावर निघाले. दावीदाला ही
बातमी कळ्ळी तेव्हा तो पलिष्ट्यांशी लढायला निघाला.
9पलिष्ट्यांनी रेफाईमच्या खोऱ्यात राहणाऱ्या लोकांवर
चढाई करुन त्यांना लुटले.

10दावीद देवाला म्हणाला, "पलिष्ट्यांवर मी प्रतिहल्ला
करु काय? मला तू त्यांचा पराभव करु देशील
काय?"

परमेश्वराने दावीदाला सांगितले, "जरुर जा. मी तुझ्या
हातून पलिष्ट्यांचा पराभव करवीन."

11मग दावीद आणि त्याची माणसे बाल-परासीम येथपर्यंत
जाऊन पोचली. त्यांनी पलिष्ट्यांचा पराभव केला. दावीद
म्हणाला, "धरणाला खिंडार पाडून पाणी घुसते त्याप्रमाणे
देवाने माझ्या शत्रूला मागे सारले आहे. माझ्या कडून
देवाने हे करवून घेतले." म्हणून आता त्या ठिकाणाचे
नाव बाल-परासीम-देवाने पाडलेले खिंडार-असे पडले
आहे.

12पलिष्ट्यांनी आपली दैवते तिथेच टाकून दिली.
दावीदाने आपल्या माणसांना त्या मूर्ती जाळून टाकायला
सांगितल्या.

## पलिष्ट्यांवर आणखी एक विजय

13रेफाईमच्या खोऱ्यात राहणाऱ्या लोकांवर पलिष्ट्यांनी
पुन्हा एकदा हल्ला केला. 14दावीदाने पुन्हा देवाची प्रार्थना
केली. देवाने त्या प्रार्थनेला ओ दिली. तो म्हणाला, “दावीदा,
तू पलिष्ट्यांवर हल्ला करायला जाशील तेव्हा समोरुन न
जाता पाठीमागून जा. तुतीच्या झाडांमागे लपून बस. त्या
झाडांवर चढून बस. 15तिथे तुला सैन्य चाल करुन जात
आहे याची चाहूल लागेल. तेव्हा पलिष्ट्यांवर हल्ला चढव.
मी (म्हणजे देव) पलिष्ट्यांवर हल्ला करायला पुढे होईन
आणि त्यांचा पराभव करीन.” 16दावीदाने देवाच्या
सांगण्याप्रमाणे केले. दावीदाने आपल्या लोकांसह
पलिष्ट्यांचा पाडाव केला. गिबोनपासून गेजेरपर्यंत त्यांनी
पलिष्ट्यांच्या सैन्याला झोडपून काढले. 17त्यामुळे दावीदाची
कीर्ती सर्वदूर पसरली. देवाने सर्व राष्ट्रांत दावीदाची दहशत
निर्माण केली.

## करारकोश यरुशलेममध्ये

15 दावीदाने दावीदानगरात स्वत:साठी घरे बांधली.
तसेच करारकोश ठेवण्यासाठी एक स्थान
उभारले. ते एका तंबूसारखे होते. 2मग दावीद म्हणाला,
“फक्त लेवींनाच करारकोश वाहून आणण्याची परवानगी
आहे. या कामासाठी आणि सर्वकाल परमेश्वराची सेवा
करण्यासाठीच लेवींची निवड झाली आहे.”
3या जागेपाशी करारकोश आणायला म्हणून दावीदाने
यरुशलेममधील सर्व इस्राएल लोकांना एकत्र बोलावले.
4अहरोनाचे वंशज आणि लेवी यांनाही यायला सांगितले.
5कहाथच्या घराण्यातील 120 माणसे होती. उरीयेल त्यांचा
प्रमुख होता. 6मरारीच्या कुळातले. 220 जण होते. असाया
हा त्यांचा नेता होता. 7गर्षोमच्या घराण्यातली 130 लोक
असून, योएल हा त्यांचा प्रमुख होता. 8अलीसाफानच्या
घराण्यापैकी 200 लोक होते. त्यांचा नेता शमाया होता.
9हेब्रोनच्या वंशातले 80 लोक होते. अलीएल त्यांच्या नेता
होता. 10उज्जियेलच्या घराण्यातले 112 जण असून
अमीनादाब हा प्रमुख होता.

## याजक आणि लेवी यांच्याशी दावीदाची बातचीत

11दावीदाने मग सादोक आणि अब्याथार याजकांना
बोलावले. तसेच उरीयेल, असाया, योएल, शमाया, अलीएल
आणि अम्मीनादाब या लेवीनाही बोलावून घेतले. 12दावीद
त्यांना म्हणाला, “तुम्ही लेवी घराण्यांचे प्रमुख आहात.
तुम्ही आणि सर्व लेवींनी शुचिर्भूत झाले पाहिजे. त्यानंतर
मी तयार केलेल्या जागेत तुम्ही तो करारकोश आणा.
13गेल्या वेळी हा कोश कसा आणावा याबद्दल आपण
परमेश्वराला विचारले नाही. तुम्हा लेवींनी तो आणला
नाही. म्हणून परमेश्वराने आपल्याला ती शिक्षा दिली.”
14इस्राएलच्या परमेश्वर देवाचा करारकोश आणता यावा
यासाठी मग सर्व याजक आणि लेवी शुचिर्भूत झाले. 15मोशेने
सांगितले होते त्याप्रमाणे करारकोश खांद्यावरुन
आणण्यासाठी लेवींनी विशेष प्रकारच्या काठ्या घेतल्या.
परमेश्वराने सांगितल्याप्रमाणेच त्यांनी तो करारकोश
आणला.

## गायक

16दावीदाने लेवी प्रमुखांना आपल्या गायकबंधूंना
बोलावून घ्यायला सांगितले. सतार, वीणा, झांजा ही वाद्ये
आणून त्यांना मंगलगीते म्हणायला सांगितले.
17लेवींनी मग हेमान आणि त्याचे भाऊ आसाफ आणि
एथान यांना नेमले. हेमान हा योएलचा मुलगा. आसाफ
बरेख्याचा मुलगा. एथान कुसायाचा मुलगा. हे सर्वजण
मरारीच्या घराण्यातले होते. 18याखेरीज लेवींचा आणखी
एक गट होता. जखऱ्या, बेन, यजीएल, शमीरामोथ, यहीएल,
उन्नी, अलीयाब, बनाया, मासेमा, मत्तिथ्या, अलीफलेह,
मिकनेया, ओबेद-अदोम आणि ईयेल हे ते होत. हे द्वारपाल
होते.
19हेमान, आसाफ आणि एथान यांनी पितळी झांजा
वाजवल्या. 20जखऱ्या, अजीएल, शमीरामोथ, यहीएल,
उन्नी, अलीयाब, मासेया, बनाया हे उच्च स्वरात सतारी
वाजवत होते. 21मत्तिथ्या, अलीफलेह, मिकनेया,
ओबेद-अदोम, ईयेल आणि अजज्या हे मंदसुरात वीणा
वाजवण्याच्या कामावर होते. त्यांचे हे नेहमीचेच काम
होते. 22लेवींचा प्रमुख कनन्या हा मुख्य गायक होता.
गायनात निपुण असल्यामुळे त्याच्यावर ही कामगिरी होती.
23बरेख्या आणि एलकाना हे करार कोशाचे रक्षक
होते. 24शबन्या, योशाफाट, नथानेल, अमासय, जखऱ्या,
बनाया आणि अलियेजर हे याजक करारकोशापुढे
चालताना कर्णे वाजवत होते. ओबेद-अदोम आणि यहीया
हे करार कोशाचे आणखी दोन रक्षक होते.
25दावीदा, इस्राएलमधील वडीलधारी मंडळी, सरदार
करार कोश ओबेद-अदोमच्या घरातून आणायला पुढे
गेले. सर्वजण अत्यंत आनंदात होते. 26करार कोश उचलून
आणणाऱ्यांना देवाने साहाय्य केले. त्यांनी सात गोऱ्हे
आणि सात मेंढे यांचे यज्ञार्पण केले.
27करारकोश वाहून नेणाऱ्या सर्व लेवींनी तलम वस्त्राचे
अंगरखे घातले होते. गायकप्रमुख कनन्या आणि इतर
सर्व गायक यांनी तलम झगे घातले होते. दावीदाचा अंगरखा
देखील तलम कापडाचा होता. शिवाय त्याने तशाच
कापडाचा एफोद सुध्दा घातला होता.
28अखेर सर्व इस्राएल लोकांनी करार कोश आणला.
जयघोष करत रण-शिंगाच्या नादांत, कर्णे, झांजा, सतारी,
वीणा वाजवत त्यांनी तो आणला.
29करार कोश दावीदनगरात पोहंचला तेव्हा शौलची
मुलगी मीखल हिने खिडकीतून पाहिले. दावीद
राजाला नाचताना, जल्लोष करताना पाहून त्याच्याबद्दलचा

तिचा आदर नाहीसा झाला. तिला त्याचा तो वेडगळपणा
वाटला.

16 लेवींनी करारकोश आत आणून दावीदाने
उभारलेल्या तंबूमध्ये तो ठेवला. मग त्यांनी देवाला
होमार्पणे आणि शांती अर्पणे वाहिली. 2हे झाल्यावर दावीदाने
परमेश्वराच्या नावाने लोकांना आशीर्वाद दिला. 3मग
त्याने एकूणएक इस्राएल स्त्री-पुरुषांना एकएक भाकर,
खजूर आणि किसमिस एवढे दिले.
4दावीदाने मग काही लेवींची करार कोशाच्या सेवेसाठी
निवड केली. इस्राएलच्या परमेश्वर देवाचे गुणगान गाणे,
त्याचे आभार मानणे, स्तुती करणे हे त्यांचे काम
होते. 5आसाफ हा पहिल्या गटाचा मुख्य होता. त्याचा गट
झांजा वाजवीत असे. जखऱ्या दुसऱ्या गटाचा प्रमुख होता.
इतर लेवी पुढीलप्रमाणे: उज्जियेल, शमिरामोथ, यहिएल,
मत्तिथ्या, अलीयाब, बनाया, ओबेद-अदोम, आणि ईयेल.
हे सतारी आणि वीणा वाजवत असत
6बनाया आणि याहजिएल हे याजक नेहमी करार
कोशापुढे रणशिंगे वाजवत. 7परमेश्वराची स्तुतिगीते
गाण्याचे काम दावीदाने आसाफला आणि त्याच्या भावांना
दिले.

## दावीदाचे आभारगीत

8परमेश्वराचे स्तवन करा. त्याला हाक मारा.
परमेश्वराने केलेली महान कृत्ये लोकांना सांगा.
9परमेश्वराची स्तोत्रे गा. त्याचे स्तवन म्हणा. त्याचे
चमत्कार इतरांना सांगा.
10परमेश्वराच्या पवित्र नावाचा अभिमान धरा.
परमेश्वराकडे येणाऱ्या तुम्हा सर्वांना आनंद मिळो.
11परमेश्वराकडे पाहा त्याचे सामर्थ्य बघा. मदतीसाठी
त्याला शरण जा.
12देवाच्या अद्भूत कृत्यांची आठवण ठेवा. त्याने केलेले
न्याय आणि चमत्काराची कृत्ये यांचे स्मरण करा.
13इस्राएलचे लोक परमेश्वराचे सेवक आहेत. याकोबाचे
वंशज हे परमेश्वराने निवडलेले खास लोक आहेत.
14परमेश्वर आमचा देव आहे. त्याच्या सामर्थ्याची साक्ष
सर्वत्र आहे.
15त्याच्या कराराचे स्मरण असू द्या. त्याने दिलेल्या
आज्ञा पुढील हजारो पिढ्यांसाठी आहेत.
16परमेश्वराने अब्राहामाशी केलेल्या कराराची आठवण
ठेवा. इसहाकाला त्याने दिलेल्या वचनाची आठवण असू
द्या.
17याकोबासाठी परमेश्वराने तोच नियम केला.
इस्राएलशी त्याने तसाच निरंतर करार केला.
18इस्राएलला परमेश्वर म्हणाला, "मी तुम्हाला कनानचा
प्रदेश देईन. ते वतन तुमचे असेल."
19त्यावेळी तुम्ही संख्येने अगदी थोडे होता, परक्या
प्रदेशात उपरे होता.
20तुम्ही एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात भटकत होता.
एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जात होता.
21पण परमेश्वराने कोणाकडूनही त्यांना दुःख होऊ
दिले नाही. परमेश्वराने राजांना तशी ताकीद दिली.
22परमेश्वराने या राजांना सांगितले, "माझ्या मर्जीतील
लोकांना दुखवू नका. माझ्या संदेष्ट्यांना दुखवू नका."
23पृथ्वीवरील समस्त लोकहो, परमेश्वराचे स्तवन करा.
परमेश्वराने आपल्याला वाचवल्याची शुभवार्ता रोज
सर्वांना सांगा.
24परमेश्वराच्या गौरवाची कृत्ये सर्व राष्ट्रांना कळवा
तो किती अद्भूत आहे ते सर्वांना सांगा.
25परमेश्वर थोर आहे. त्याची स्तुती केली पाहिजे इतर
दैवतांपेक्षा परमेश्वराचा धाक अधिक आहे.
26का बरे? कारण जगातले इतर सगळी दैवते म्हणजे
नुसत्या क्षुद्र मूर्ती पण परमेश्वराने आकाश निर्माण केले.
27परमेश्वराला महिमा आणि सन्मान आहे. देव तेजस्वी
लखलखीत प्रकाशाप्रमाणे आहे.
28लोक हो, सहकुटुंब परमेश्वराच्या महिम्याची आणि
सामर्थ्याची स्तुती करा.
29त्याचे माहात्म्य गा. त्याच्या नावाचा आदर करा.
त्याच्यापुढे आपली अर्पणे आणा. त्याची आराधना करा
आणि त्याच्या सात्विक सौंदर्याचे गुणगान करा.
30परमेश्वरासमोर सर्व पृथ्वीचा भीतीने थरकाप होतो
पण त्याने पृथ्वीला खंबीरपणा दिला. हे जग असे हलणार
नाही.
31 पृथ्वी आणि आकाश आनंदी असो सर्वत्र लोक
म्हणोत, "हे परमेश्वराचे साम्राज्य आहे."
32समुद्र आणि त्यात सामावलेले सर्व काही आनंदाने
गर्जना करो शेतमळ्यांची सृष्टी उल्हासित होवो.
33अरण्यातील वृक्ष परमेश्वरासमोर हर्षभरित होऊन
गातील कारण साक्षात परमेश्वरच जगाला न्याय देण्यासाठी
आलेला असेल.
34लोक हो, परमेश्वराचे कृतज्ञतेने स्मरण करा, कारण
तो चांगला आहे. त्याचे प्रेम चिरंतन आहे.
35परमेश्वराला सांगा, "देवा, तूच आमचा त्राता आहेस.
आमचे रक्षण कर, आम्हाला संघटित ठेव आणि इतर
राष्ट्रांपासून आमचा बचाव कर. मग आम्ही तुझे
नामसंकीर्तन करू. तुझा महिमा गाऊ."
36इस्राएलच्या परमेश्वर देवाचे अनादी काळापासून
स्तवन केले जाते. त्याची स्तुतिस्तोत्रे अखंड गायिली जावोत.

सर्व लोकांनी 'आमेन' म्हणून परमेश्वराचे स्तवन केले.
37आसाफ आणि त्याचे भाऊबंद यांना करार कोशाच्या
नित्य दैनंदिन सेवेसाठी दावीदाने नेमले. 38त्या कामात
त्यांना मदत करण्यासाठी दावीदाने ओबेद-अदोम आणि
आणखी 68 लेवी यांना ठेवले. ओबेद-अदोम आणि
होसा हे द्वाररक्षक होते. ओबेद-अदोम यदूथूनचा मुलगा.

39सादोक हा याजक आणि त्याच्याबरोबरचे इतर याजक
यांना दावीदाने गिबोन येथील उच्च स्थानी असलेल्या
परमेश्वराच्या निवासमंडपासमोर नेमले. 40दररोज सकाळी
आणि संध्याकाळी सादोक आणि इतर याजक होमार्पणासाठी
असलेल्या वेदीवर होमार्पणे करत असत. परमेश्वराने
इस्राएलला जे नियमशास्त्र दिले होते त्यातील नियमांचे
पालन करण्यासाठी ते असे करत होते. 41परमेश्वराची
कृपा निरंतर राहावी म्हणून त्याचे स्तुतिस्तोत्र गाण्यासाठी
हेमान, यदूथून व इतर लेवी यांची नेमणूक केली.
42हेमान आणि यदूथून यांना झांजा वाजवणे व कर्णे
फुंकणे हे काम होते. देवाची स्तुतिगीते गाईली जात असताना
इतर वाद्ये वाजवण्याचेही काम त्यांच्याकडे होते. यदूथूनचे
मुलगे द्वाररक्षक होते.
43हा कार्यक्रम संपल्यावर सर्व लोक घरोघरी गेले.
दावीदही आपल्या घराण्याला आशीर्वाद द्यायला घरी
परतला.

## देवाचे दावीदाला वचन

17 दावीद आपल्या घरी राहायला गेल्यावर एकदा
नाथान या संदेष्ट्यास म्हणाला, “मी गंधसरुच्या
लाकडाच्या घरात राहत असलो तरी परमेश्वराचा
करारकोश मात्र अजूनही एका तंबूतच आहे. देवासाठी
मंदिर बांधावे असा माझा विचार आहे.”
2तेव्हा नाथान म्हणाला, “तुझ्या मनात आहे ते कर,
देवाची तुला साथ आहे.”
3पण त्याच रात्री देवाचे वचन नाथानच्या स्वप्नात आले.
4देव त्याला म्हणाला, “माझा सेवक दावीद याला सांग:
‘परमेश्वर म्हणतो दावीदा, मला घर बांधून देण्याचे काम
तुझे नव्हे 5–6इस्राएल लोकांना मी मिसरमधून बाहेर काढले
तेव्हापासून आजतागायत मी घरात राहिलेलो नाही. माझा
मुक्काम तंबूतच पडलेला आहे. इस्राएलच्या लोकांचे पुढारी
म्हणून मी काही जणांना निवडले. त्यांनी माझ्या लोकांचा
मेंढपाळ करतात तसा काळजीपूर्वक सांभाळ केला.
इस्राएलच्या प्रदेशात मी फिरत असताना मी या पुढाऱ्यांना
कधीही असे म्हटले नाही की माझ्यासाठी तुम्ही गंधसरुचे
निवासस्थान का बांधले नाहीत?’
7“शिवाय, माझा सेवक दावीद याला हे ही सांग की,
सर्वशक्तिमान परमेश्वराचे असे म्हणणे आहे की, ‘तू
कुरणात मेंढपाळ होतास त्यातून मी तुला मुक्त केले हे तू
माझ्या इस्राएल लोकांचा राजा व्हावेस म्हणून. 8तुला मी
सर्वत्र साथ दिली. तुझ्या पुढे जाऊन तुझ्या शत्रूंचे पारिपत्य
केले. आता मी तुला थोर लोकांच्या रांगेत नेऊन बसवणार
आहे. 9माझ्या इस्राएल लोकांना मी एक कायमची जागा
देणार आहे. म्हणजे झाडांनी मुळे पसरावीत त्याप्रमाणे ते
त्या ठिकाणी पाय रोवून राहतील. त्यांना कसलाही त्रास
होणार नाही. दुष्ट लोकांपासून त्यांना आता कुठलीही
पीडा होणार नाही. 10पूर्वी काही तापदायक गोष्टी घडल्या,
पण मी माझ्या इस्राएल लोकांच्या रक्षणासाठी पुढारी नेमले
होते. आता मी सर्व शत्रूंचा बीमोड करीन.
“‘मी सांगतो की परमेश्वर तुझे घराणे चिरस्थायी
करील.* 11तुझ्या मृत्यूनंतर तू आपल्या पूर्वजांच्या रांगेत
जाऊन बसलास की तुझ्या मुलालाच मी राजा करीन.
तुझाच मुलगा राजा होईल. त्याचे राज्य मी बळकट करीन.
12तुझा मुलगा माझ्यासाठी मंदिर बांधेल. त्याचे घराणे
सर्वकाळ राज्य करील. 13मी त्याचा पिता होईन आणि तो
माझा पुत्र होईल. तुझ्याआधी शौल राजा होता. पण मी
त्याला दिलेला पाठिंबा काढून घेतला. तुझ्या मुलावरचे
माझे प्रेम मात्र कधीच आटणार नाही. 14माझे राज्य आणि
निवासस्थान यांचा तोच उत्तराधिकारी राहील. त्याची सत्ता
निरंतर चालेल.’”
15देवाची ही सर्व वचने आणि साक्षात्कार याविषयी
नाथानने दावीदाला सर्व काही सांगितले.

## दावीदाची प्रार्थना

16राजा दावीद नंतर पवित्र निवासमंडपात जाऊन
परमेश्वरासमोर बसला, आणि म्हणाला, “परमेश्वरदेवा,
मी आणि माझे घराणे यांच्यासाठी तू खूप केलेस. ते
का हे मला अजिबात समजत नाही. 17शिवाय, माझ्या
घराण्याचा भविष्यकाळही तू माझ्यापुढे उभा केला
आहेस. महत्वाच्या व्यक्ति प्रमाणे तू मला लेखीत आहेस.
18आणखी काय म्हणू? तू माझ्यासाठी खूप केलेस.
मी आपला तुझा एक सेवक आहे, हे तू जाणतोसच.
19परमेश्वरा तुझ्या मनोदयाखातर तू हा आश्चर्यकारक
गोष्ट माझ्यासाठी घडवून आणलीस. 20परमेश्वरा
तुझ्यासारखा खरोखरच कोणी नाही. तुझ्याशिवाय कोणीच
देव नाही. अशा अद्भूत गोष्टी दुसऱ्या कुठल्या
दैवताने केल्याचे आमच्या ऐकिवात नाही. 21इस्राएलसारखे
दुसरे कुठले राष्ट्र असेल का? जगाच्या पाठीवर
फक्त इस्राएल साठीच तू या महान गोष्टी घडवून आणल्यास.
आम्हाला मिसरमधून बाहेर काढून तू मुक्त केलेस.
तुझ्या कीर्तीत तू भर घातलीस. आपल्या लोकांच्या
अग्रभागी राहून तू इतरांना या भूमीतून हुसकून लावलेस.
22इस्राएल लोकांना आपल्या छत्राखाली सर्वकाळासाठी
घेऊन, परमेश्वरा तू त्यांचा देव झालास.
23“परमेश्वरा, मला आणि माझ्या घराण्याला तू हे वचन
दिले आहेस. ते सर्वकाल अबाधित राहो. तुझ्या
म्हणण्याप्रमाणे होवो. 24तुझ्यावरचा विश्वास सार्थ ठरो.
तुझ्या नावाबद्दल लोकांना आदर राहो. म्हणजे मग लोक
म्हणतील, ‘सर्वशक्तिमान परमेश्वर इस्राएलचा देव आहे.’
मी तुझा सेवक आहे. माझा वंश वाढून तुझ्या सेवेत मग्न
असो : हे माझे मागणे आहे.

---

**मी सांगतो … करील** दावीदाच्या घराण्यातील लोकांना यहोवा पिढ्यान्पिढ्या राजेपद बहाल करील असा त्याचा अर्थ.

25“देवा, तू आपल्या सेवकाशी हे बोललास. माझे घराणे
हे राजघराणे ठरेल असे तू स्पष्ट केलेस. त्यामुळेच धीर
येऊन मी हे मागणे मागत आहे. 26परमेश्वरा, तूच खरा
देव आहेस आणि माझे भले व्हावे म्हणून तू स्वत:
अभिवचन दिले आहे. 27परमेश्वरा माझ्या घराण्याला तू
दयाळूपणे आशीर्वादित केलेस. तसेच माझे घराणे सर्वदा
तुझी सेवा करेल असे तूच अभिवचन दिले आहे. तू
स्वत: माझ्या घराण्याला आशीर्वाद दिला आहेस. त्यामुळे
माझे घराणे सदोदित आशीर्वादीत होईल.”

## दावीदाचा साम्राज्यविस्तार

18 पुढे दावीदाने पलिष्ट्यांवर स्वारी करुन त्यांचा
पराभव केला. पलिष्ट्यांकडून त्याने गथ आणि
त्याच्या आसपासची गावे काबीज केली.

2मग त्याने मवाबवर हल्ला केला. मवाबी लोक दावीदाचे
अंकित झाले आणि त्याला खंडणी देऊ लागले.

3हदरेजरच्या सैन्याशीही दावीद लढला. हदरेजर हा
सोबचा राजा. दावीदाने त्या सैन्याशी हमाथ नगरापर्यंत
दोन हात केले. हदरेजर आपल्या राज्याची सीमा फरात
नदीपर्यंत वाढवू पाहात होता म्हणून दावीदाने हे केले.
4हदरेजरकडून त्याने 1,000 रथ, 7,000 सारथी, आणि
20,000 सैन्य एवढे घेतले. हदरेजरच्या रथांचे जवळपास
सर्व घोडेही दावीदाने जायबंदी केले. 100 रथांपुरते घोडे
मात्र त्याने शाबूत ठेवले.

5दिमिष्क नगरातील अरामी लोक हदरेजर याच्या
मदतीला आले, पण त्यांच्यापैकी 22,000 जणांनाही
दावीदाने जिवे मारले. 6अराममधील दिमिष्कात दावीदाने
ठाणी बसवली. अरामीलोक दावीदाचे अंकित होऊन त्याला
करभार देऊ लागले. अशाप्रकारे दावीद जाईल तेथे
परमेश्वराने त्याला विजयी केले.

7हदरेजरच्या सैन्यातील अधिकाऱ्यांच्या सोन्याच्या ढाली
दावीदाने काढून घेतल्या आणि यरुशलेमला आणल्या.
8टिमथ आणि कून या नगरांमधील पितळही हस्तगत केले.
ही नगरे देखील हदरेजरच्याच आधिपत्याखाली होती. पुढे
हे पितळ वापरून शलमोनाने मंदिरासाठी गंगाळ स्तंभ
आणि इतर वस्तू करवल्या.

9तोवू हा हमाथ नगराचा राजा होता आणि हदरेजर
सोबाचा. दावीदाने हदरेजरच्या सैन्याचा पाडाव केल्याची
बातमी तोवूच्या कानावर आली. 10तेव्हा त्याने हदोराम
या आपल्या मुलाला दावीदाचे क्षेमकुशल विचारण्यासाठी
आणि त्याचे अभिनंदन करण्यासाठी त्याच्याकडे पाठवले.
दावीदाने हदरेजरचा पराभव केल्यामुळे तोवूने पाऊल
उचलले. तोवू आणि हदरेजर यांच्यात लढाया होतच
असत. हदोरामने दावीदाला सोने, रुपे, पितळ यांपासून
बनवलेल्या वस्तूंचा नजराणा दिला. 11राजा दावीदाने त्या
वस्तू शुध्दीकरण करुन परमेश्वराला अर्पण केल्या.
अदोम, मवाब, अम्मोनी, पलिष्टी आणि अमालेकी
लोकांकडून आलेल्या वस्तूही त्याने अशाच परमेश्वराला
वाहिल्या.

12सरुवेचा मुलगा अबीशय याने क्षार खोऱ्यात अठरा
हजार अदोमी लोकांना मारले. 13अदोममध्ये अबीशयने
मजबूत ठाणी बसवली आणि सर्व अदोमी दावीदाचे सेवक
झाले. परमेश्वराने दावीदाला सर्वत्र जय मिळवून दिला.

## दावीदाचे प्रमुख कारभारी

14दावीदाने सर्व इस्राएलवर राज्य केले. त्याने प्रत्येक
नागरीकाला उचित अशी न्यायाची वागणूक दिली.
15सरुवेचा मुलगा यवाब हा दावीदाच्या सैन्याचा मुख्य
अधिकारी होता. अहीलुदाचा मुलगा यहोशाफाट दावीदाचा
वृत्तांत लेखक होता. 16सादोक आणि अबीमलेख याजक
होते. सादोक हा अहीटूबचा मुलगा आणि अबीमलेख हा
अब्याथारचा. शवूशा हा लेखनिक होता. 17यहोयादाचा
मुलगा बनाया हा करेथी व पलेथी लोकांवरील जबाबदार
अधिकारी होता. दावीदाचे मुलगे त्याच्याजवळ राहून
महत्वाचे कारभार सांभाळत.

## अम्मोन्याकडून दावीदाच्या लोकांचा अपमान

19 नाहाश हा अम्मोन्याचा राजा होता. त्याच्या
मृत्यूनंतर त्याचा मुलगा गादीवर आला. 2तेव्हा
दावीदाने विचार केला, “नाहाशचे माझ्याशी सलोख्याचे
संबंध होते. म्हणून त्याचा मुलगा हानून याच्याशी मी
प्रेमाचे संबंध ठेवीन.” असे म्हणून दावीदाने हानूनच्या
सांत्वनासाठी आपले दूत पाठवले. दावीदाचे हे सेवक
अम्मोनला हानूनकडे घेऊन गेले.

3तेव्हा अम्मोन्यांचे सरदार हानूनला म्हणाले, “या
देखाव्याने फसू नकोस. तुझे सांत्वन करणे किंवा तुझ्या
मृत वडीलांचा मान ठेवणे हा दावीदाचा हेतू नाही. दावीदाने
या लोकांना तुझा प्रदेश पाहून ठेवायला आणि हेरगिरी
करायला पाठवले आहे. त्याला तुझा प्रांत उद्ध्वस्त
करायचा आहे.” 4हे ऐकून हानून ने दावीदाच्या दूतांना
अटक केली आणि त्यांचे मुंडन केले.* त्यांची
कमरेपर्यंतची वस्त्रेही फाडली आणि त्यांना वाटेला
लावले.

5दावीदाचे सेवक या गोष्टींमुळे इतके शरमिंदे झाले की
त्यांच्याने घरी जाववेना. लोकांकडून दावीदाला ही बातमी
समजली तेव्हा दावीदाने त्यांच्यासाठी पुढीलप्रमाणे निरोप
पाठवला: “दाढी वाढेपर्यंत तुम्ही यरीहो येथे रहा मग इकडे
या.”

6आपण दावीदाचे वैर ओढवून घेतले आहे हे अम्मोनी
लोकांच्या लक्षात आले तेव्हा हानून आणि अम्मोनी लोक
यांनी मेसोपटेम्या येथून रथ आणि सारथी आणवण्यासाठी

---

**मुंडन केले** इस्राएल माणसाने मुंडन करणे हे मोशेच्या
नियमाविरुध्द होते.

75,000 पौंड चांदी खर्च केली. माका व सोबा या
अराममधील नगरांमधूनही त्यांनी रथ आणि स्वार
यांची खरेदी केली. 7अम्मोन्यांनी 32,000 रथ विकत
घेतले. माकाच्या राजालाही त्यांनी आपल्या सैन्यासह
मदतीला बोलावले व त्याचे मोल देऊ केले. तेव्हा त्यांनी
येऊन मेदबा नगराजवळ तळ ठोकला. खुद्द अम्मोनीही
नगराबाहेर पडून वेशीजवळ लढायला आले.

8अम्मोनी लढाईला सज्ज झाले आहेत हे ऐकून दावीदाने
यवाबाला इस्राएलच्या सर्व सैन्यासकट युध्दावर पाठवले.
9अम्मोनी लढायच्या जय्यत तयारीनिशी वेशीजवळ आले.
त्यांच्या मदतीला आलेले राजे मैदानात स्वतंत्रपणे उभे
होते.

10सैन्याच्या दोन तुकड्या आपल्याविरुध्द उभ्या
ठाकलेल्या असून त्यातली एक आपल्या मागे व एक पुढे
आहे हे यवाबने पाहिले. तेव्हा त्याने इस्राएली फौजेतील
निवडक लढवय्यांना अरामी सैन्यासमोर नियुक्त केले.
11उरलेल्या इस्राएली फौजेला अबीशयच्या हाताखाली
सोपवले. अबीशय हा यवाबचा भाऊ. हे सैन्य अम्मोन्याशी
लढायला गेले.

12यवाब अबीशयला म्हणाला, 'अरामचे सैन्य जर मला
भारी ठरले तर तू माझ्या मदतीला ये. आणि अम्मोनी
तुझ्यापेक्षा प्रबळ ठरले तर मी तुला सहाय्य करीन.
13आपल्या लोकांसाठी आणि देवाच्या या नगरांसाठी
लढताना आपण प्रयत्नांची शिकस्त करु, शौर्य गाजवू.
मग परमेश्वराला जे योग्य वाटेल ते तो करो."

14यवाब आपल्या सैन्यासह अरामी फौजेवर चालून
गेला. तेव्हा अरामच्या सैन्याने त्यांच्यापुढून पळ
काढला. 15अरामचे सैन्य माघार घेऊन पळून जात आहे
हे पाहताच अम्मोन्यांनीही पलायन केले. अबीशय आणि
त्याचे सैन्य यांच्याकडे त्यांनी पाठ फिरवली. अम्मोनी
आपल्या नगरात परतले आणि यवाब यरुशलेमला परत
आला.

16इस्राएलपुढे आपला पराभव झाला आहे हे अरामी
सरदारांनी पाहिले तेव्हा त्यांनी जासूद पाठवून फरात
नदीपलीकडील आपल्या लोकांना बोलवून घेतले. शोफख
हा हदरेजरच्या अरामी फौजेचा सेनापती होता. त्याच्या
नायकत्वाखाली ते आले.

17अरामी लढाईची जमवाजमव करत आहेत हे दावीदाने
ऐकले तेव्हा त्याने सर्व इस्राएल लोकांना एकत्र जमवले
आणि यार्देन नदीपलीकडे जाऊन आराम्यांच्या समोर व्यूह
रचला. सर्व तयारीनिशी त्यांनी अराम्यांवर हल्ला केला.
18इस्राएल लोकांसमोरुन अराम्यांनी पळ काढला. दावीदाने
व त्याच्या सैन्याने सात हजार अरामी सारथी आणि चाळीस
हजार अरामी सैन्य यांना ठार केले. अरामी सैन्याचा नेता
शोफख यालाही त्यांनी मारून टाकले.

19इस्राएलाने आपला पाडाव केला आहे हे हदरेजरच्या
अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी दावीदाशी तह
केला. ते दावीदाच्या अधिपत्याखाली आले. अराम्यांनी
पुन्हा अम्मोनी लोकांना मदत केली नाही.

## यवाबकडून अम्मोन्यांचा संहार

20 राजे लढाईच्या मोहिमेवर बाहेर पडतात अशावेळी
म्हणजे वर्षारंभी यवाब इस्राएलाचे सैन्य घेऊन
युध्दासाठी निघाला. पण दावीद यरुशलेममध्येच राहिला.
इस्राएलचे सैन्य अम्मोन्यांच्या नगरात शिरले आणि त्यांनी
तो मुलूख उद्ध्वस्त केला. मग त्यांनी राब्बा नगराकडे
आपला मोर्चा वळवला. त्यांनी नगराला वेढा घातला आणि
लोकांची नाकेबंदी केली. राब्बा नगर पडेपर्यंत यवाबने
इस्राएली सैन्यासह नगरावर हल्ला चालू ठेवला, व राब्बा
उद्ध्वस्त केले.

2दावीदाने, त्या लोकांच्या राजाच्या मस्तकावरील मुकुट
काढला. त्या सोन्याच्या रत्नजडित मुकुटाचे वजन
पंचेचाळीस पौंड होते. तो दावीदाच्या मस्तकावर ठेवण्यात
आला. राब्बा नगरातून आणखीही पुष्कळ लूट दावीदाला
मिळाली. 3राब्बातील लोकांना बाहेर काढून दावीदाने
त्यांच्याकडून करवती, कुऱ्हाडी, पहारी या हत्यारांनी
करायच्या कष्टाच्या कामाला जुंपले. अम्मोन्यांच्या सर्व
नगरांमध्ये दावीदाने हेच केले. मग दावीद आणि त्याचे
सैन्य यरुशलेमला परतले.

## धिप्पाड पलिष्ट्यांचा वध

4पुढे गेजेर येथे इस्राएल लोकांचे पलिष्ट्यांशी युध्द झाले.
या लढाईत सिब्बखय हूशाथी याने सिप्पय याला ठार
मारले. सिप्पय हा अत्यंत धिप्पाड व रेफाई वंशातला
होता. तेव्हा हे पलिष्टि लोक इस्राएलींना शरण आले.

5इस्राएलींची पुढे पुन्हा एकदा पलिष्ट्यांशी लढाई झाली.
त्यावेळी याईरचा मुलगा एलहानान याने गथच्या गल्याथचा
भाऊ लहमी याला ठार केले. लहमीचा भाला चांगला
लांबलचक आणि जाडजूड होता. हातमागाच्या तुरीसारखा
तो मोठा होता.

6गथ येथे पलिष्ट्यांशी इस्राएल लोकांची आणखी एकदा
लढाई झाली. या गावात तेव्हा एक प्रचंड आकारमानाचा
माणूस होता. त्याच्या हातापायांना प्रत्येकी सहासहा, अशी
एकंदर चोवीस बोटे होती. तो राक्षसपुत्रच होता. 7अशा
माणसाने इस्राएल लोकांचा उपहास केल्यावर योनाथानने
त्याला ठार केले. योनाथान हा शिमीचा मुलगा. शिमी
दावीदाचा भाऊ.

8पलिष्टे ही गथ नगरातील बलाढ्य लोकांची संतती.
दावीद व त्याचे सेवक यांनी त्यांचे पारिपत्य केले.

## इस्राएलच्या जनगणनेचे पातक

21 सैतान इस्राएल लोकांच्या विरुध्द होता. त्याने
दावीदाला इस्राएल लोकांची जनगणना करण्यास
प्रवृत्त केले. 2दावीद यवाबला आणि अधिकाऱ्यांना म्हणाला,

“इस्राएलमधील सर्व लोकांच्या मोजणीला लागा.
बैरशेब्यापासून दानपर्यंत सर्व प्रदेश पालथा घाला. कोणीही
वगळले जाता कामा नये. मग मला एकंदर संख्या किती
आहे ते येऊन सांगा.”

3यावर यवाब म्हणाला, “परमेश्वर आपले राष्ट्र आहे
त्यापेक्षा शंभर पटीने वाढवो. इस्राएलमधील सर्व लोक
आपले दास आहेत, तेव्हा माझे स्वामीराज, आपण ही
गोष्ट कशासाठी करता? त्याने इस्राएलचे लोक दोषी आणि
पातकी ठरतील.”

4पण राजा दावीद काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हता.
तेव्हा यवाबला राजाज्ञेप्रमाणे वागणे भाग पडले. यवाब
निघाला आणि लोकांची मोजणी करत त्याने सर्व प्रदेश
तुडवायला सुरुवात केली. मग यरुशलेमला परत येऊन
5दावीदाला त्याने एकंदर लोकसंख्या सांगितली.
इस्राएलमध्ये 11,00,000 तलवारधारी पुरुष होते आणि
यहूदात 4,70,000. 6यवाबाने लेवी आणि बन्यामीन यांच्या
घराण्यांची मोजदाद केली नव्हती कारण राजा दावीदाचा
हुकूम त्याला मान्य नव्हता. 7देवाच्या दृष्टीने दावीदाची ही
चूक होती म्हणून देवाने इस्राएलला शासन केले.

## इस्राएलला शासन

8मग दावीद देवाला म्हणाला, “माझ्या हातून हा मूर्खपणा
झाला आहे. इस्राएलमधील लोकांची मोजणी करुन मी
पाप केले आहे. या अपराधाबद्दल या तुझ्या सेवकाला तू
या पापाची क्षमा करावीस अशी मी विनवणी करतो.”

9–10गाद हा दावीदाचा संदेष्टा होता. त्याला परमेश्वर
म्हणाला, “जा, जाऊन दावीदाला सांग ‘परमेश्वराचे म्हणणे
असे आहे: तीन गोष्टीमधून निवड करायची संधी मी तुला
देतो. तू त्यांतील एक निवड. तू निवडशील ती शिक्षा मी
तुला करीन.”

11–12मग गाद दावीदाकडे गेला. दावीदाला तो म्हणाला,
“परमेश्वराचे म्हणणे असे आहे, ‘दावीद तुझ्या शिक्षेची
निवड तूच कर: अन्नधान्याच्या टंचाईची तीन वर्षे, किंवा
शत्रू तलवारीने तुझा पाठलाग करत आहे आणि तुला
पळता भुई थोडी झाली आहे असे तीन महिने किंवा
परमेश्वराच्या शिक्षेचे तीन दिवस. या काळात देशभर
भयंकर रोगराई पसरेल आणि परमेश्वराचा दूत इस्राएल
लोकांचा संहार करील.’ दावीद मला देवाने पाठवले आहे.
आता मी त्याला काय उत्तर देऊ ते तू ठरव आणि मला
सांग.”

13दावीद गादला म्हणाला, “मी भलत्याच संकटात
सापडलो आहे. माझ्या शिक्षेच्या बाबतीत माणूस काय
ठरवणार? परमेश्वर दयाघन आहे. मला शासन कसे
करायचे ते त्यालाच ठरवू दे.”

14तेव्हा परमेश्वराने इस्राएलभर रोगराई पसरवली. त्यात
70,000 लोक मृत्युमुखी पडले. 15यरुशलेमचा नाश
करायला देवाने दूत पाठवला. पण त्याने यरुशलेमच्या
संहाराला सुरुवात केली तेव्हा परमेश्वराला ते अरिष्ट
पाहून वाईट वाटले. परमेश्वराने हा संहार थांबवायचे
ठरवले. परमेश्वर त्या संहारक दूताला म्हणाला, “थांब,
पुरे झाले त्या वेळी” परमेश्वराचा दूत अर्णान यबूसी याच्या
खळ्याजवळ होत.

16दावीदाने वर पाहिले तेव्हा त्याला परमेश्वराचा दूत
आकाशात उभा असलेला दिसला. त्याने आपली तलवार
यरुशलेम नगरावर उपसलेली होती. दावीद आणि
पुढाऱ्यांनी नम्रपणे वाकून अभिवादन केले. या सर्वांनी
दुखवट्याच्या वेळी घालतात तसे शोक प्रदर्शित करणारे
कपडे घातलेले होते. 17दावीद देवाला म्हणाला, “पाप
माझ्या हातून घडले आहे लोकांच्या मोजणीचा हुकूम मी
दिला. माझे चुकले. इस्राएल लोक निरपराध आहेत.
परमेश्वरा, देवा शासन करायचे ते मला आणि माझ्या
कुटुंबियांना कर. पण तुझ्या लोकांचा जीव घेणारी ही
रोगाची साथ थांबव.”

18मग परमेश्वराचा दूत गादला म्हणाला, “परमेश्वराच्या
उपासनेसाठी दावीदाला एक वेदी बांधायला सांग. अर्णान
यबूसीच्या खळ्या जवळ त्याने ती बांधावी.” 19गादने हे
दावीदाला सांगितले. दावीद अर्णानच्या खळ्याकडे गेला.

20अर्णान तेव्हा गव्हाची मळणी करत होता. तो मागे
वळून पाहतो तर त्याला देवदूत दिसला. अर्णानचे चारही
मुलगे त्याला पाहून लपून बसले. 21दावीद अर्णान कडे
गेला. अर्णान खळ्यातून राजाजवळ गेला आणि त्याने
राजाला डोके जमिनीपर्यंत लववून नमस्कार केला.

22राजा त्याला म्हणाला, “तुझे हे खळे मला विकत दे.
त्याची पूर्ण किंमत मी तुला देईन. तेथे मला परमेश्वराच्या
उपासने करिता वेदी बांधायची आहे. म्हणजे ही जीवघेणी
मरी थांबेल.”

23अर्णान दावीद राजाला म्हणाला, “हे खळे मी तुम्हाला
दिले. तुम्ही आमचे स्वामी आणि पोशिंदे आहात. तुम्ही
त्याचे हवे ते करा. यज्ञात अर्पण करण्यासाठी मी बैलही
देईन. तसेच वेदीवरील होमात घालण्यासाठी लाकडी फळ्या,
आणि धन्यार्पणासाठी गहू हे ही सर्व मी तुम्हाला देईन.”

24तेव्हा राजा दावीद अर्णानला म्हणाला, “मी तुला त्याची
पूर्ण किंमत देईन. तुझ्याकडून काढून घेऊन मी ते परस्पर
परमेश्वराला वाहणार नाही. फुकट मिळालेला होमबली
मी अर्पण करणार नाही.”

25आणि दावीदाने खळ्याचे मूल्य म्हणून अर्णानला 25
पौंड सोने दिले. 26दावीदाने त्या जागी परमेश्वराच्या
उपासनेकरिता वेदी बांधली. तेथे त्याने होम आणि
शांती–अर्पणे केली. दावीदाने परमेश्वराची प्रार्थना केली.
त्याला उत्तर म्हणून परमेश्वराने स्वर्गातून अग्नी पाठवला.
तो दिव्य अग्नी नेमका होमार्पणाच्या वेदीवर पडला. 27मग
परमेश्वराने देवदूताला आपली तलवार म्यान करायला
सांगितले. 28अर्णानच्या खळ्यावर परमेश्वराने आपल्याला
उत्तर दिलेले पाहून दावीदाने परमेश्वरासाठी यज्ञ केले.

29(पवित्र निवासमंडप आणि होमार्पणाची वेदी, त्याकाळी
गिबोनमध्ये उच्च स्थानावर होती. इस्राएल लोक वाळवंटात
असताना मोशेने तो पवित्र निवासमंडप बांधला होता.
30परमेश्वराच्या दूताच्या तलवारीच्या धाकाने दावीद
देवापुढे पवित्र निवासमंडपाकडे जाण्यास घाबरत होता.)
22 दावीद म्हणाला, "हेच ते परमेश्वर देवाचे मंदिर.
इस्राएल लोकांनी होमबली अर्पण करण्याची
वेदीही इथेच बांधली जाईल."

## दावीदाची मंदिर उभारणीची योजना

2इस्राएलमध्ये जे परदेशी लोक राहत होते त्या सर्वांना
दावीदाने एक फर्मान काढून बोलवून घेतले. पाथरवटांची
निवड त्याने त्यांच्यातून केली. देवाच्या मंदिरासाठी दगडाचे
चिरे घडवण्याचे काम त्यांचे होते. 3दरवाजांसाठी लागणारे
खिळे आणि बिजागऱ्या यांच्यासाठी दावीदाने लोखंड
आणवले. पितळेचाही फार मोठा साठा त्याने केला. 4सीदोन
आणि सोर या नगरांतील लोकांनी गंधसरुचे लाकूड
दावीदाला दिले. ते ओंडके तर एवढे आले की त्यांची
मोजदाद करणे कठीण.
5दावीद म्हणाला, "आपण परमेश्वरासाठी भव्य
मंदिर उभारले पाहिजे. पण माझा मुलगा शलमोन अजून
लहान आहे. त्याचे शिक्षणही अद्याप पुरे झालेले नाही.
परमेश्वराचे मंदिर मात्र उत्कृष्ट झाले पाहिजे. असे देखणे
आणि भव्य की सगळ्या राष्ट्रांमध्ये त्याची कीर्ती व्हायला
हवी. त्यादृष्टीनेच मी परमेश्वराच्या मंदिराची योजना
आखीन." असे म्हणून दावीदाने आपल्या मृत्यूपूर्वी मंदिर
उभारणीची बरीच तयारी केली.
6मग त्याने आपला मुलगा शलमोन याला जवळ
बोलावले. इस्राएलचा परमेश्वर देव याच्यासाठी मंदिर
बांधण्याची दावीदाने त्याला आज्ञा केली. 7दावीद शलमोनला
म्हणाला, "मुला, परमेश्वर देवासाठी मंदिर बांधायची मला
फार इच्छा होती. 8पण परमेश्वर मला म्हणाला, 'दावीदा,
तू बऱ्याच लढाया केल्यास आणि त्यात अनेक लोक
मारले गेले. तेव्हा तुला माझ्यासाठी मंदिर बांधता येणार
नाही. 9मात्र तुझा मुलगा शांतताप्रिय आहे. मी त्याच्या
कारकिर्दीत शांतता लाभू देईन. त्याचे शत्रू त्याला त्रास
देणार नाहीत. त्याचे नाव शलमोन म्हणजे शांतताप्रिय
असेल. इस्राएलला त्याच्या काळात शांतता आणि स्वस्थता
लाभेल. 10तो माझ्याप्रीत्यर्थ मंदिर उभारील. तो माझा पुत्र
आणि मी त्याचा पिता होईन त्याचे राज्य मी बळकट
करीन. इस्राएलवर त्याच्या वंशजा पैकी एकजण सर्वकाळ
राज्य करील.'"
11दावीद म्हणाला, "मुला, तुला परमेश्वराची अखंड
साथ लाभो. तुला यश मिळो. परमेश्वर देवाने भाकीत
केल्याप्रमाणे तुझ्याहातून त्याचे मंदिर बांधून होवो.
12तो तुला इस्राएलचा राजा करील. लोकांचे नेतृत्व
करायला आणि परमेश्वर देवाचे नियम पाळायला तो
तुला ज्ञान आणि शहाणपण देवो. 13इस्राएलसाठी
परमेश्वराने मोशेला जे नियमशास्त्र सांगितले ते तू कसोशीने
पाळ म्हणजे तू यशस्वी होशील. घाबरु नको. दृढ राहा.
हिंमत बाळग.
14"शलमोन, परमेश्वराच्या मंदिराच्या वास्तूसाठी
मी खूप मेहनत घेतली आहे. 3,750 टन सोने आणि
37,500 टन चांदी मी जमवली आहे. लोखंड आणि पितळ,
तर मोजदाद करणे कठीण इतके आहे. दगड, लाकूड
यांचाही साठा मी केलाच आहे. शलमोन, त्यात तू भर
घालू शकतोस. 15पाथरवट आणि सुतार तुझ्या दिमतीला
आहेत. खेरीज प्रत्येक कामात कुशल अशी माणसे आहेत.
16सोने, चांदी, पितळ, लोखंड यांच्या कारागिरीत ते निपुण
आहेत. शिवाय हे कारागिर काही थोडे थोडके नाहीत.
असंख्य आहेत. तेव्हा आता कामाला सुरवात कर. तुला
परमेश्वराची साथ मिळो."
17दावीदाने मग इस्राएलमधील सर्व पुढारी मंडळींना
शलमोनला सहकार्य करण्याची आज्ञा केली. 18दावीद
त्यांना म्हणाला, "खुद्द परमेश्वर देवच तुमच्याबरोबर आहे.
त्याच्या कृपेने तुम्हाला शांतता लाभली आहे. आपल्या
भोवतालच्या शत्रूंना पराभूत करण्यात परमेश्वराने मला
साहाय्य केले. आता हा देश परमेश्वराच्या आणि तुमच्या
ताब्यात आहे. 19तेव्हा अंत:करणपूर्वक तुम्ही तुमच्या
परमेश्वर देवाला शरण जा आणि त्याचे ऐका. परमेश्वर
देवाचे पवित्र मंदिर बांधा. मग मंदिरांत पवित्र करारकोश
आणि इतर पवित्र वस्तू आणून ठेवा."

## लेवींची मंदिरातील सेवाकार्ये

23 आता दावीदाचे बरेच वय झाले होते. तेव्हा त्याने
आपला मुलगा शलमोन याला इस्राएलचा राजा
केले. 2इस्राएलमधील सर्व पुढारी मंडळी, याजक आणि
लेवी यांना दावीदाने बोलावून घेतले. 3तीस आणि त्याहून
अधिक वय असलेल्या लेवींची त्याने गणना केली. तसे
एकंदर 38,000 लेवी होते. 4दावीद म्हणाला, "यांच्यापैकी
24,000 लेवी परमेश्वराच्या मंदिराच्या कामावर देखरेख
करतील. 6,000 अंमलदार आणि न्यायाधीश म्हणून काम
करतील. 5 4,000 द्वारपाल होतील आणि 4,000 देवांची
स्तुतिगीते गातील. त्यांच्यासाठी मी खास वाद्ये करवून
घेतली आहेत. त्यांच्या साथीवर ते देवाची स्तुती करतील."
6लेवीचे मुलगे गेर्षोन, कहाथ आणि मरारी यांच्या
घराण्यानुसार त्याने सर्व लेवींची तीन गटांमध्ये विभागणी
केली.

## गेर्षोनचे कुळ

7गेर्षोन घराण्यात लादान आणि शिमी हे दोघे होते.
8लादान याला तीन मुले. यहीएल हा थोरला. नंतर जेथाम
व योएल. 9शिमीचे मुलगे असे शलोमोथ, हजिएल व
हरान. लादानच्या घराण्यांचे हे प्रमुख होते.

10शिमीला चार मुलगे. यहथ, जीजा, यऊश आणि बरीया.
11यहथ हा त्यांपैकी मोठा, दुसरा जीजा. यऊश आणि
बरीया यांना मात्र फार संतती नव्हती त्यामुळे त्यांचे दोघांचे
मिळून एकच घराणे धरले जाई.

## कहाथचे कुळ

12कहाथला चार मुलगे होते: अम्राम, इसहार, हब्रोन
आणि उज्जियेल. 13अहरोन आणि मोशे हे अम्रामचे मुलगे:
अहरोन आणि त्याच्या वंशजाची खास कामाकरता निवड
केली गेली होती. परमेश्वराच्या उपासनेच्या पवित्र
कामाच्या तयारीसाठी त्यांना कायमचे वेगळे काढले गेले
होते. परमेश्वरापुढे धूप जाळणे, परमेश्वराचे याजक म्हणून
सेवा करणे, परमेश्वराच्या वतीने लोकांना आशीर्वाद देणे
अशी त्यांची कामे होती.

14मोशे हा देवाचा संदेष्टा होता. त्याचे मुलगे लेवीच्या
वंशातच गणले जात. 15गेर्षोम आणि अलियेजर हे मोशेचे
मुलगे. 16शबुएल हा गेर्षोमचा मोठा मुलगा. 17रहब्या हा
अलियेजरचा मोठा मुलगा. हा एकुलता एक होता. रहब्याला
मात्र बरीच मुले झाली.

18शलोमीथ हा इसहारचा पहिला मुलगा.

19हेब्रोनचे मुलगे याप्रमाणे: यरीया मोठा, अमऱ्या दुसरा,
यहजिएल तिसरा, यकमाम चौथा.

20उज्जियेलचे मुलगे: पहिला मीखा आणि नंतरचा
इश्शिया.

## मरारीचे कुळ

21महली आणि मूशी हे मरारीचे मुलगे. एलाजार आणि
कीश हे महलीचे मुलगे. 22एलाजारला मुलीच झाल्या.
त्याला पुत्र नव्हता. या मुलींचे विवाह नात्यातच झाले. त्या
लग्न होऊन कीशच्या घराण्यात गेल्या. 23मूशीचे मुलगे:
महली, एदर आणि यरेमोथ.

## लेवींची कर्तव्ये

24हे झाले लेवीचे वंशज आपापल्या घराण्यांप्रमाणे त्यांची
शिरगणती झाली. ते घराण्यांचे प्रमुख होते. त्यांच्यापैकी
प्रत्येकाच्या नावाची नोंद झालेली आहे. जे वीस किंवा
त्याहून अधिक वयाचे होते त्यांनी परमेश्वराच्या मंदिरात
सेवा करणे हे त्यांचे काम.

25दावीद म्हणाला, "इस्राएलचा देव परमेश्वर याच्यामुळे
लोकांना शांती लाभली आहे. परमेश्वर यरुशलेममला
कायमच्या वास्तव्यासाठी आला आहे. 26तेव्हा लेवींना
पवित्र निवासमंडप आणि उपासनेतील इतर उपकरणे सतत
बाळगण्याची गरज नाही."

27लेवी कुळातील वंशजांची मोजदाद करणे ही दावीदाची
इस्राएल लोकांना अखेरची आज्ञा होती. त्यानुसार वीस
वर्षे आणि त्यापुढील वयाच्या माणसांची शिरगणती झाली.
28अहरोनच्या वंशजांना परमेश्वराच्या मंदीरातील सेवेत
मदत करणे हे लेवींचे काम होते. मंदिराचे आवार आणि
बाजूच्या खोल्या यांची देखभाल ही त्यांच्याकडे होती.
मंदिरातील सर्व पवित्र गोष्टी शुचिर्भूत ठेवणे ही त्यांची
जबाबदारी होती. देवाच्या मंदिरातील हे काम ते करत
असत. 29मंदिरातील विशेष भाकरी मेजावर ठेवणे, पीठ,
धान्यार्पण करण्याच्या वस्तू बेखमीर भाकरी यावर त्यांची
देखरेख होती. याखेरीज, तव्यावर भाजलेले, मळलेले सर्व
काही सिध्द करणे, मोजून मापून त्या वस्तूची तयारी
करणे हे ही काम त्यांच्याकडे होते. 30ते रोज
सकाळ-संध्याकाळ परमेश्वराचे आभार मानायला आणि
त्याची स्तुती करायला उभे राहत. 31शब्बाथच्या दिवशी,
नवचंद्र दर्शन आणि सणावाराला देवाची होमार्पणे ते तयार
करत. नित्य आराधनाही त्यांच्याकडेच होती. एका वेळी
किती लेवींनी हे करायचे याचे नियम घालून दिलेले होते.
32त्यांना नेमून दिल्याप्रमाणे ते वागत. पवित्र निवासमंडपाची
देखभाल करत. पवित्र स्थानाचा संभाळ करत. आपले
आप्त, याजक आणि अहरोनचे वंशज यांना ते सहाय्य
करत. याजकांना ते परमेश्वराच्या मंदिराच्या सेवेत मदत
करत.

## याजकांचे गट

24 अहरोनच्या मुलांची वर्गवारी अशी: नादाब,
अबीहू एलजार व इथामार हे अहरोनचे मुलगे.
2पण नादाब आणि अबीहू हे दोघे आपल्या वडीलांच्या
आधीच वारले. शिवाय त्यांना मुलेही झाली नव्हती. तेव्हा
एलाजार आणि इथामार हेच याजक झाले. 3प्रत्येकाला
नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडता यावीत म्हणून दावीदाने
एलाजार आणि इथामार यांच्या वंशजांची स्वतंत्र गटांत
विभागणी करुन टाकली. त्यासाठी दावीदाने सादोक आणि
अहीमलेख यांची मदत घेतली. सादोक हा एलाजारच्या
वंशातला आणि अहीमलेख इथामारच्या 4इथामारपेक्षा
एलाजारच्या घराण्यात वडीलधारी प्रमुख मंडळी अधिक
निघाली. एलाजारच्या घराण्यात सोळा जण प्रमुख होते तर
इथामारच्या घराण्यात आठ जण. 5दोन्ही घराण्यातील
पुरुषांची निवड चिठ्ठ्या टाकून केली गेली. काहीजणांना
पवित्रस्थानाच्या देखभालीचे मुखत्यार म्हणून नेमले तर
काहींना याजक म्हणून सेवेसाठी नेमले. हे सर्वजण एलाजार
आणि इथामार यांच्या घराण्यातलेच होते.

6शमाया लेखनिक होता. हा नथनेलचा मुलगा.
याचे घराणे लेवीचे होते सर्व वंशजांची नावे लि
हिण्याचे काम शमायाने केले. राजा दावीद आणि इतर
प्रमुख मंडळी-उदाहरणार्थ सादोक हा याजक, अहीमलेख,
याजक आणि लेवी यांच्या घराण्यातील
प्रमुख-यांच्यासमोर त्याने या नोंदी केल्या. अहीमलेख
हा अब्याथारचा मुलगा. दरवेळी चिठ्ठ्या टाकून त्यातून
एकाची निवड करण्यात येई. आणि शमाया त्या माणसाचे
नाव लिहून ठेवी. अशाप्रकारे एलाजार आणि इथामार

यांच्या कुळातील लोकांमध्ये कामाची वाटणी करण्यात आली.

7 यहोयारीबचा गट पहिला होता. दुसरा गट यदायाचा.
8 हारीमचा गट तिसरा. सोरीमचा गट चौथा.
9 मलकीयाचा पाचवा गट. सहावा गट मयामिनचा.
10 हक्कोसाचा सातवा गट. आठवा गट अबीयाचा.
11 नववा गट येशूवाचा. दहावा गट शकन्याचा.
12 अकरावा गट एल्याशिबाचा. बारावा गट याकीमचा.
13 तेरावा गट हुप्पाचा. चवदावा गट येशेबाबाचा.
14 पंधरावा गट बिल्गाचा. सोळावा गट इम्मेराचा.
15 सतरावा गट हेजीराचा. अठरावा गट हप्पिसेसाचा.
16 पथह्याचा गट एकोणिसावा. विसावा गट यहेजकेलाचा.
17 एकविसावा गट याखीनचा. बाविसावा गट गामूलचा.
18 तेविसावा गट दलायाचा. आणि चोविसावा गट माज्याचा.

19परमेश्वराच्या मंदिरात सेवा करण्यासाठी या सर्वांची क्रमाने नेमणूक करण्यात आली. इस्राएलचा परमेश्वर देव याने अहरोनला जे नियम घालून दिले त्याच नियमांचे पालन त्यांनी मंदिराच्या सेवेसाठी केले.

## इतर लेवी

20लेवीच्या इतर वंशजांची नावे खालीलप्रमाणे:

अम्रामच्या वंशातील मुलेबाळे: शूबाएल. शूबाएलचे वंशज: यहदाया.
21 रहब्याचे वंशज: इशिया. (हा सर्वात थोरला.)
22 इसहार घराण्यापैकी: शलोमोथ. शलोमोथच्या घराण्यातून: यहथ.
23 हेब्रोनचा मोठा मुलगा यरीया. हेब्रोनचा दुसरा मुलगा अमऱ्या. यहजियेल तिसरा आणि चौथा यकमाम.
24 उज्जियेलचा मुलगा मीखा. मीखाचा मुलगा शामीर.
25 इश्शिया हा मीखाचा भाऊ. इश्शियाचा मुलगा जखऱ्या.
26 मरारीचे वंशज: महली मूशी आणि याजीया.
27 मरारीचा मुलगा याजीया याची मुले: शोहम व जक्कूर.
28 एलाजार हा महलीचा मुलगा. पण एलाजारला पुत्रसंतती नव्हती.
29 कीशाचा मुलगा यरहमेल.
30 महली, एदर आणि यरीमोथ हे मूशीचे मुलगे.

लेवी घराण्यातील हे प्रमुख होत. आपापल्या घराण्याप्रमाणे त्यांची नोंद करण्यात आली. 31खास कामगिरीकरता त्यांची निवड करण्यात आली. अहरोनचे वंशज असलेले त्यांचे याजक नातलग यांच्याप्रमाणेच चिठ्ठ्या टाकून ही निवड झाली. राजा दावीदा, सादोक, अहीमलेख आणि याजक व लेवी घराण्यातील प्रमुख यांच्यासमोर त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या. कामाच्या नेमणुकीमध्ये घराण्यातील श्रेष्ठ आणि कनिष्ठ बांधव असा भेदभाव नव्हता.

## गायक वर्ग

25 दावीद आणि सैन्यातील अधिकारी यांनी मिळून
आसाफच्या मुलांना एका खास कामासाठी
निवडले. हेमान व यदूथून ही ती मुले. वीणा, सतारी
आणि झांजा ही वाद्ये, वाजवून देवाचा संदेश देणे असे
त्यांच्या कामाचे स्वरुप होते. हे काम करणाऱ्या लोकांची
यादी पुढीलप्रमाणे:
2आसाफाच्या कुटुंबातून जक्कूर, योसेफ, नथन्या आणि
अशेराला. दावीदाने आसाफला संदेश कथनासाठी निवडले
आणि आसाफने आपल्या या मुलांना.
3यदूथूनच्या घराण्यातून गदल्या, सारी, यशया, हशब्या
व मत्तिथ्या हे सहाजण. यदूथूनने यांना आपल्या हाताखाली
घेतले. यदूथून वीणा वाजवून संदेश देऊन, परमेश्वराचे
उपकारस्मरण आणि स्तवन करत असे.
4सेवा करायला हेमानचे वंशज होते ते असे बुक्कीया:
मत्तन्या, उज्जियेल, शबएल, यरीमोथ, हनन्या, हनानी,
अलियाथा, गिद्दल्ती, रोममती एजेर, याश्बकाशा, मल्लोथी,
होथीर आणि महजियोथ. 5हे सर्व हेमानचे मुलगे. हेमान
हा राजा दावीदाचा द्रष्टा होता. देवाने हेमानला वंशवृध्दीचे
वचन दिले होते. त्यानुसार हेमानला भरपूर मुलेबाळे झाली.
देवाने हेमानला चौदा मुलगे आणि तीन मुली दिल्या.
6परमेश्वराच्या मंदिरात गीते गाण्यासाठी हेमानने आपल्या
सर्व मुलांना हाताशी धरले. ही मुले झांजा, सतारी आणि
वीणा वाजवत, आणि देवाची सेवा करत. राजा दावीदाने
यांना निवडले होते. 7लेवी घराण्यातील हे लोक आणि
त्यांचे नातेवाईक गायनकलेत निपुण होते. परमेश्वराची
स्तुती गीते गाणारी अशी 288 माणसे होती. 8प्रत्येकाने
कोणते काम करायचे हे ठरवायला चिठ्ठया टाकल्या जात.
त्यांना एकसारखीच वागणूक मिळे. लहान थोर, गुरू-शिष्य
असा त्यांच्यात भेदभाव नव्हता. 9पहिली चिठ्ठी आसाफ
(योसेफ) याची निघाली. त्याची मुले आणि नातलग
यांच्यातून बारा जणांची निवड झाली.
दुसरी गादल्याची त्याची मुले आणि भाऊबंद यांच्यातून
बाराजणांना घेतले.
10जक्कूरचे मुलगे आणि भाऊबंद यांच्यामधून, तिसऱ्या
चिठ्ठीनुसार बाराजण घेतले.

11चवथी चिठ्ठी इस्त्रीची. त्याचे मुलगे आणि आप्त यांच्यामधून बारा.

12पाचवी नथन्याची. त्याच्या मुलां-नातलगामधून बारा.

13सहावी चिठ्ठी बुक्कीयाची. त्याचे मुलगे आणि भाऊबंद यांमधून बारा.

14सातवी यशरेलाची. त्याचे मुलगे आणि भाऊबंद यांमधून बारा.

15यशयाची आठवी. या चिठ्ठीनुसार मुलगे आणि भाऊबंद यांमधून बारा.

16नववी मत्तन्याची. त्याचे मुलगे आणि आप्त यांमधून बारा. 17दहावी शिमोची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा. 18अकरावी अजरेलाची. त्याचे मुलगे आणि नातलाग यांमधून बारा.

19बारावी हशब्याची. त्याचे मुलगे आणि त्याचे नातलग यांमधून बारा.

20तेरावी शूबाएलाची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा.

21चौदावी मतिथ्याची. त्याचे मुलगे आणि आप्त यांमधून बारा.

22पंधरावी यरेमोथची. त्याचे मुलगे आणि नातेवाईक यांमधून बारा.

23सोळावी हनन्याची. त्याचे मुलगे आणि भाऊबंद यांमधून बारा.

24सतरावी याश्बाकाशाची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा.

25अठरावी हनानीची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा.

26एकुणिसावी मल्लोथीची. त्याचे मुलगे आणि आप्त यांमधून बारा.

27विसावी अलीयाथची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा.

28एकविसावी होथीरची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा.

29बाविसावी गिद्दल्तीची. त्याचे मुलगे आणि आप्त यांमधून बारा.

30तेविसावी महजियाथची. त्याचे मुलगे आणि भाऊबंद यांमधून बारा. 31चोविसावी रोममती एजेरची. त्याचे मुलगे आणि नातलग यांमधून बारा.

## द्वारपालांची व्यवस्था

26 द्वारपालांचे गट: हे पहारेकरी कोरहाच्या घराण्यातील होते. त्यांची नावे अशी: मेशेलेम्या आणि त्याची मुलेबाळे. (आसाफच्या कुळातील कोरहचा हा मुलगा.) 2मेशेलेम्या याला मुलगे होते. जखऱ्या हा त्यांतला मोठा. यदिएल दुसरा, जबद्या तिसरा, यथनिएल चौथा 3अलाम पाचवा, यहोहानान सहावा, एल्योवेनय सातवा.

4आता ओबेद-अदोम, याची मुले. शामाया थोरला, अहोजाबाद दुसरा, यवाह तिसरा, साखार चौथा, नथनेल पाचवा, 5अम्मीएल सहावा, इस्साखार सातवा, पउलथय आठवा. देवाची ओबेद-अदोमवर खरोखच कृपादृष्टी होती.

6शमाया हा ओबेद-अदोमचा मोठा मुलगा. त्यालाही पुत्रसंतती होती. हे मुलगे चांगले कणखर योध्दे असल्यामुळे त्यांची आपल्या पितृकुळावर सत्ता होती. 7अथनी, रफाएल, ओबेद एलजाबाद, अलीहू आणि समख्या हे शमायाचे पुत्र. एलजाबादचे भाउबंद सर्व प्रकारच्या कामात कुशल होते. 8हे सर्व ओबेद-अदोमचे वंशज त्याची मुले, नातेवाईक असे सर्वच पुरुष पराक्रमी होते. ते सावध पहारेकरी होते. ओबेद-अदोमचे एकंदर 62 वंशज होते.

9मेशेलेम्याचे पुत्र आणि भाऊबंद मिळून अठराजण होते. ते सर्व पराक्रमी होते.

10मरारीच्या वंशातले द्वारपाल पुढीलप्रमाणे : त्यापैकी एक होसा. शिम्री या त्याच्या मुलाला ज्येष्ठपद दिले होते. खरे म्हणजे हा जन्माने थोरला नव्हे, पण त्याच्या वडीलांनी त्याला तो मान दिला होता. 11हिल्कीया दुसरा. टबल्या तिसरा. जखऱ्या चौथा. होसाला मुलगे आणि भाऊबंद मिळून तेराजण होते.

12द्वारपालांच्या गटांवर प्रमुख नेमलेले होते. आपल्या इतर भाऊबंदाप्रमाणेच द्वारपालांनाही परमेश्वराच्या मंदिरातील सेवेचे काम नेमून दिलेले होते. 13एकेका दरवाजाच्या रक्षणाची जबाबदारी एकेका घराण्याकडे दिलेली होती. एकेका दारासाठी चिठ्ठी टाकून हे काम सोपवले गेले. त्यात वयाने लहान मोठा असा भेदभाव नव्हता.

14शेलेम्याच्या वाटणीला पूर्वेकडचे दार आले. त्याचा मुलगा जखऱ्या याच्यासाठी नंतर चिठ्ठी टाकण्यात आली. हा सूज्ञ मंत्री होता. उत्तरेच्या द्वारासाठी त्याची निवड झाली. 15ओबेद-अदोमच्या वाटणीला दक्षिण दरवाजा आला. मौल्यवान चीजवस्तू ठेवलेल्या भांडाराचे रक्षण करण्याचे काम ओबेद-अदोमच्या मुलांकडे आले. 16शुप्पीम आणि होसा यांची निवड पश्चिम दरवाजासाठी आणि शल्लेकेथची, चढणीच्या वाटेवरील दरवाजासाठी झाली.

पहारेकरी एकमेकांलगत उभे असत. 17पूर्व दरवाजावर सहा लेवी, उत्तर दरवाजावर चार लेवी, दक्षिण दरवाजावर चार जण, भांडाराच्या रक्षणासाठी दोन लेवी दिवसभर सतत पहारा देत. 18पश्चिममेकडील शिवारावर चारजण पहारा देत. आणि त्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर दोन रक्षक असत.

19कोरह आणि मरारी यांच्या घराण्यातील द्वाररक्षकांच्या गटांची यादी पुढीलप्रमाणे:

## खजिणदार आणि दुसरे अधिकारी

20अहीया हा लेवी घराण्यातील होता. देवाच्या मंदिरातील मौल्यवान चीजवस्तूंच्या कोठारावर तो प्रमुख होता.

पवित्र उपकरणे ठेवलेल्या जागेची जबाबदारी अहीयावर होती.

21लादान हा गेर्षोनच्या वंशातील. यहीएली हा लादानच्या घराण्यातील प्रमुखांपैकी एक. 22जेथाम आणि त्याचा भाऊ योएल हे यहीएलीचे मुलगे. परमेश्वराच्या मंदिरातील मौल्यवान चीजवस्तूंच्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर होती.

23अम्रामी, इसहारी, हेब्रोनी आणि उज्जियेली यांच्या कुळांमधून आणखी काही प्रमुखांची नेमणूक करण्यात आली. 24अबुएल हा परमेश्वराच्या मंदिरातील भांडारावरचा नायक म्हणून नेमला गेला. अबुएल गेर्षोनचा मुलगा. गेर्षोम मोशेचा मुलगा.

25अबुएलाचे भाऊबंद पुढीलप्रमाणे: अलीयेजार कडून: रहब्या हा अलीयेजाचा मुलगा. रहब्याचा मुलगा यशया. यशयाचा मुलगा योराम. योरामचा मुलगा जिख्री. आणि जिख्रीचा मुलगा शलोमोथ. 26दावीदाने मंदिरासाठी जे जे जमवले होते त्या सगळ्यांवर शलोमोथ आणि त्याचे भाऊबंद यांची देखरेख होती.

सैन्यातील सरदारांनीही मंदिरासाठी वस्तू दिल्या होत्या. 27यापैकी काही युध्दात मिळालेली लूट होती. ती त्यांनी परमेश्वराच्या मंदिराच्या कामासाठी देऊन टाकली.

28शमुवेल हा द्रष्टा, कीशचा मुलगा शौल आणि

नेरचा मुलगा अबनेर, सरुवेचा मुलगा यवाब यांनी परमेश्वराला दिलेल्या पवित्र वस्तूंची देखभालही शलोमोथ आणि त्याचे भाऊबंद करत असत.

29कनन्या हा इसहार घराण्यातील होता. कनन्या आणि त्याची मुले यांना मंदिराबाहेरचे काम होते. इस्राएलच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सुरक्षाव्यवस्था आणि न्यायदान करणे ही कामे ते सांभाळत. 30हशब्या हा हेब्रोन घराण्यातला. यार्देन नदीच्या पश्चिमेकडे पसरलेल्या इस्राएलच्या भूमीवरील परमेश्वराचे कार्य आणि राज्याचा कारभार हशब्या आणि त्याचे भाऊबंद पाहात असत. या गटात 1,700 शूर वीर होते. 31हेब्रोन घराण्याच्या इतिहासावरुन असे दिसते की यरीया हा त्यांचा प्रमुख होता. चाळीस वर्षे राज्य केल्यावर दावीदाने जेव्हा शूर आणि कसबी पुरुषांचा शोध घेतला तेव्हा गिलाद मधल्या याजेर नगरात त्याला हेब्रोन घराण्यांत अशी माणसे आढळली.

32आपापल्या घराण्यांचे प्रमुख आणि पराक्रमी असे असे 2,700 नातलग यरीयाला होते. परमेश्वराचे कार्य आणि राज्याचे कामकाज यांसाठी, रऊबेनी, गादी आणि मनश्शेचा अर्धावंश यांच्यावर देखरेख करणारे असे हे 2,700 जण दावीदाने नेमले.

## सैन्याची व्यवस्था

27 राजाच्या सैन्यात नोकरीला असलेल्या इस्राएल लोकांची गणना अशी: त्यांचा प्रत्येक गट दर वर्षी एक महिना कामावर असे. राजाकडे चाकरीला असलेल्या लोकांमध्ये वेगवेगळ्या घराण्यांचे प्रमुख, सरदार, अधिकारी, सुरक्षा-अधिपती असे सर्वजण होते. प्रत्येक सैन्यगटात 24,000 माणसे होती.

2पहिल्या महिन्याच्या पहिल्या गटाचा प्रमुख याशबाम हा होता. याशबाम जब्दीएलचा मुलगा. याशबामच्या गटात 24,000 जण होते. 3तो पेरेसच्या वंशातला होता. पहिल्या महिन्याच्या सर्व सेनाधिकाऱ्याचा याशबाम प्रमुख होता.

4अहोह इथला दोदय दुसऱ्या महिन्याच्या सैन्याचा मुख्य असून त्याच्या गटात 24,000 माणसे होती.

5तिसऱ्या महिन्याचा तिसरा सेनापती बनाया. हा यहोयादाचा मुलगा. यहोयादा हा मुख्य याजक होता. बनायाच्या अधिपत्याखाली 24,000 माणसे होती. 6तीस प्रसिध्द शूरांमधला पराक्रमी सैनिक तो हाच. त्यांचा नायकही हाच होता. त्याचा पुत्र अम्मीजाबाद बनायाच्याच गटात प्रमुख होता. 7चौथ्या महिन्याचा चौथा सेनापती असाएल. हा यवाबचा भाऊ. असाएलचा मुलगा जबद्या हा पुढे आपल्या वडिलानंतर सेनापती झाला. असाएलचा तुकडीत 24,000 जण होते.

8शम्हूथ हा पाचवा सेनापती. पाचव्या महिन्याचा हा सेनापती इज्राही होता. त्याच्या तुकडीत 24,000 जण होते.

9इरा हा सहाव्या महिन्याचा सहावा सेनापती. हा इक्केशचा मुलगा असून तको नगरातला होता. त्याच्या तुकडीत 24,000 लोक होते.

10सातव्या महिन्याचा सातवा सेनापती हेलेस पलोनी हा होता. हा एफ्राइमच्या वंशातला होता. त्याच्या तुकडीत 24,000 लोक होते.

11आठव्या महिन्याचा आठवा सरदार जेरह वंशातला सिब्बखय हुशाथी हा होता. त्याच्या तुकडीत 24,000 जण होते. 12नवव्या महिन्याचा नववा सरदार बन्यामिनी वंशातला अबियेजेर अनाथोथी हा होता. त्याच्या गटात 24,000 सैनिक होते.

13दहाव्या महिन्याचा दहावा सेनापती महरय. हा जेरह कुळातला असून नटोफा इथला होता. त्याच्या तुकडीत 24,000 लोक होते.

14अकराव्या महिन्याचा अकरावा सेनापती बनाया. हा पिराथोनचा असून एफ्राइमच्या वंशातला होता. त्याच्या गटात 24,000 लोक होते.15बाराव्या महिन्याचा बारावा प्रमुख हेल्दय. या अथनिएल कुळातला आणि नटोफा इथला होता. त्याच्या तुकडीत 24,000 लोक होते.

## वेगवेगळ्या घराण्यांचे प्रमुख

16इस्राएलाच्या घराण्यांचे प्रमुख असे:

रऊबेन:

जिख्रीचा मुलगा अलीयेजर. शिमोन: माकाचा मुलगा शफट्या.

17 लेवी: कमुवेलचा मुलगा हशब्या. अहरोन: सादोक.

18 यहूदा: अलीहू. (हा दावीदाचा एक भाऊ). इस्साखार: मीखाएलचा मुलगा अम्री.
19 जबुलून: ओबद्याचा मुलगा इश्माया. नफताली: अज्रिएलचा मुलगा यरीमोथ.
20 एफ्राईम: अजऱ्याचा मुलगा होशेथ. पश्चिम मनश्शे: पदायाचा मुलगा योएल.
21 पूर्व मनश्शे: जखऱ्याचा मुलगा इद्दो. बन्यामीन: अबनेरचा मुलगा यासिएल.
22 दान: यरोहामचा मुलगा अजरेल.

हे झाले इस्राएलींच्या घराण्यांचे प्रमुख

## दावीदाने केलेली इस्राएल लोकांची जनगणना

23दावीदाने इस्राएलमधील पुरुषांची मोजदाद करायचे
ठरवले. इस्राएलच लोकसंख्या आकाशातील ताऱ्यांएवढी
करीन असे देवाने आश्वासन दिलेले असल्यामुळे
इस्राएलमध्ये लोकासंख्या वाढली होती. तेव्हा दावीदाने
वीस वर्षे वयाचे आणि त्या पुढच्या वयाचे पुरुष गणतीसाठी
विचारात घ्यायचे ठरवले. 24सरुवेचा मुलगा यवाब याने
मोजदाद करायला सुरुवात केली पण तो ते काम पूर्ण
करु शकला नाही. देवाचा इस्राएलच्या लोकांवर कोप
झाला. त्यामुळे ही गणती दावीद राजाच्या बखरीत नोंदलेली
नाही.

## राजाने नेमलेले व्यवस्थापक

25राजाच्या मालमत्तेची जपणूक करणारे आधिकारी
पुढीलप्रमाणे:

अदीएलचा मुलगा अज्मावेथ हा राजाच्या भांडारांचा प्रमुख होता. शेतीवाडी, नगरे, गावे आणि किल्ले इथे असलेल्या भांडारांचा प्रमुख योनाथान हा होता. हा उज्जीयाचा मुलगा.
26 कलूबचा मुलगा एज्री हा शेतात राबणाऱ्यांवरचा प्रमुख होता.
27 रामा येथील शीमी हा द्राक्षमळ्यांवरचा अधिकारी होता. शिफम येथील जब्दी हा द्राक्षमळ्यातून निघणारा द्राक्षारस आणि त्याची साठवण यावरचा अधिकारी होता.
28 गेदेरचा बाल-हानान हा जैतूनची झाडे आणि पश्चिमे कडच्या डोंगराळ भागातली उंबराची झाडे याचा प्रमुख होता. योवाश जैतूनच्या तेलाच्या कोठाराचा प्रमुख होता.
29 शारोनचा शिमय हा शारोन भोवतालच्या गाईगुरांचा मुख्य होता. अदलयचा मुलगा शाफाट हा दऱ्याखोऱ्यातील गुरांवरचा मुख्य होता.
30 इश्माएली ओबील हा उंटांवरचा प्रमुख होता. येहद्या मेरोनोथी गाढवांचा मुख्य होता.
31 याजीज हाग्री मेंढरांचा मुख्य होता.

राजा दावीदाच्या मालमत्तेचे हे सर्व रक्षणकर्ते होते.
32योनाथान हा सूज्ञ मंत्री आणि लेखनिक होता. हा
दावीदाचा काका. हखमोनी याचा मुलगा यहोएल याच्यावर
राजपुत्रांच्या लालनपालनाची जबाबदारी होती.
33अहीथोफेल राजाचा मंत्री आणि हूशय राजाचा मित्र
होता. हा अर्की लोकांपैकी होता. 34अहीथोफेलची जागा
पुढे यहोयादा आणि अब्याथार यांनी घेतली. यहोयादा हा
बनायाचा मुलगा. यवाब हा राजाचा सेनापती होता.

## मंदिर बांधणीची राजाची योजना

28 राजाने इस्राएल लोकांमधील सर्व पुढाऱ्यांना
एकत्र बोलावले. त्यांना त्याने यरुशलेमला
येण्यास सांगितले. घराण्यांचे प्रमुख, राजाचे सेनापती,
अधिकारी, अंमलदार, कोठारांची गुरांची, राजपुत्रांची
जबाबदारी उचलणारे राजाचे सर्व महत्वाचे अधिकारी,
शूर वीर आणि लढवय्ये या सर्वांना त्याने बोलावले.
2राजा दावीद त्यांच्यापुढे उभा राहून म्हणाला, “माझ्या
बांधवांनो आणि लोकांनो, माझे ऐका परमेश्वराचा
करारकोश ठेवण्यासाटी एक विश्रामधाम बांधावे
असा माझा मानस होता. देवाच्या पादासनासाठी एक
मंदिर बांधायचा माझा विचार होता. त्या मंदिराच्या
इमारतीचा आराखडाही मी तयार केला. 3पण देव मला
म्हणाला, ‘नाही दावीदा, तू माझ्यासाठी मंदिर उभारू नयेस.
तू एक लढवय्या असून तू अनेकांना ठार मारले आहेस.’
4“इस्राएलचा परमेश्वर देव याने इस्राएलच्या बारा
घराण्यांची धुरा सांभाळण्यासाठी यहूदा घराण्याची निवड
केली. आणि मग त्यातून परमेश्वराने माझ्या वडीलांच्या
घराण्याला अग्रणी केले. आता या कुटुंबातून देवाने
माझी इस्राएलचा कायमचा राजा म्हणून निवड केली.
मला इस्राएलचा राजा करावे अशी परमेश्वराची इच्छा
होती. 5देवाने मला भरपूर पुत्रसंतती दिली आहे. या
मुलांमधून परमेश्वराने शलमोनला माझा उत्तराधिकारी
म्हणून निवडले आहे. पण खरे पाहता इस्राएल हे
परमेश्वराचेच राज्य आहे. 6परमेश्वर मला म्हणाला,
‘दावीदा, माझे मंदिर आणि त्या भोवतालचे आवार याची
उभारणी तुझा पुत्र शलमोन याच्या हातून होईल. कारण
पुढे राजासनावर तो बसणार आहे. त्यासाठी मी त्याची पुत्र
म्हणून निवड केली आहे आणि मी त्याचा पिता आहे.
7माझ्या आज्ञा आणि नियम यांचे पालन करायला
शलमोनाने सुरवात केली आहे. त्याने कसोशीने हे
आज्ञापालन असेच पुढे चालू ठेवले तर त्याच्या राज्याला
मी सर्वकाळ स्थैर्य देईन.’”
8दावीद म्हाणाला, “तर आता सर्व इस्राएल बांधवांनो,
परमेश्वरासमोर आणि तुमच्यासमोर मी सांगतो की
परमेश्वर देवाच्या सर्व आज्ञा काटेकोरपणे पाळा. तरच

या सुपीक भूमीवर तुम्ही नांदाल. तुमच्यानंतर तुमचे वंशजही
इथेच निर्वेधपणे राहू शकतील.
9“आणि शलमोना, माझ्या मुला, आपल्या वडीलांच्या
देवाला जाणून घे. शुध्द मनाने देवाची सेवा कर. देवाच्या
सेवेत मनोमन आनंद मान. कारण परमेश्वरच सर्वांच्या
अंत:करणाचा ठाव घेतो. आपले सर्व विचार त्याला
कळतात. आपण मदतीसाठी परमेश्वराकडे गेलो तर
आपल्याला उत्तर मिळते. पण परमेश्वराकडे पाठ फिरवली
तर मात्र तो आपल्याला कायमचा सोडून जातो. 10शलमोन,
परमेश्वराने त्याचे पवित्र स्थान म्हणजे मंदिर बांधून
घेण्यासाठी तुझी निवड केली आहे हे चांगले लक्षात ठेव.
हिंमत बाळग आणि हे कार्य पूर्णत्वाला ने.” 11दावीदाने
मग मंदिराचा आराखडा, आपला मुलगा शलमोन याच्या
स्वधीन केला. मंदिराभोवतालचे आवार, त्यातील
इमारती, कोठाराच्या खोल्या, वरच्या मजल्यावरची आणि
आतल्या बाजूची दालने, दयासनाचे स्थान यांचाही त्या
आराखड्यात समावेश होता. 12मंदिराच्या सर्व भागांची
योजना दावीदाने केली होती, ती त्याने शलमोनाला दिली.
मंदिरा भोवतीचे अंगण आणि इतर बांधकामे यांच्या योजना
दावीदाने त्याला दिल्या. मंदिराच्या कोठाराच्या खोल्या
आणि मंदिराची पवित्र उपकरणे ठेवण्यासाठी असलेली
भांडारगृहे यांचेही नकाशे त्यात होते. 13याजक आणि
लेवी यांच्या गटांची माहिती दावीदाने शलमोनाला दिली
तसेच मंदिरातील सेवेचे काम आणि त्यात वापरायची
उपकरणे याबद्दलही त्याने शलमोनाला सांगितले.
14मंदिरातील सर्व वस्तूंसाठी किती सोने-चांदी वापरायची
हे सांगितले. 15सोन्या चांदीचे दिवे आणि दिवठणी
यांचे नमुने केलेले होते. त्यातील प्रत्येक दिवा आणि
दिवठण यासाठी नेमके किती चांदीसोने वापरायचे याची
दावीदाने शलमोनाला कल्पना दिली. वेगवेगळ्या ठिकाणी
गरजेप्रमाणे या दीपमाळा वापरायच्या होत्या. 16पवित्र भाकरी
ठेवायच्या मेजासाठी किती सोने-चांदी लागेल त्याचे वजन
शलमोनाला दावीदाने सांगितले. 17काटे, कटोरे, सुरया
यांना लागणारे निर्भेळ सोने, तबकांसाठी लागणारे
सोने-चांदी यांचे वजन दिले. 18धूप जाळण्यासाठी जी वेदी
करायची तिला लागणारे सोने किती हे ही त्याने सांगितले.
परमेश्वराच्या करारकोशावर जे करूब देवदूत आपले
पंख पसरून धरत होते त्यासह असलेले दयासन म्हणजेच
देवाचा रथ याचा नमुनाही शलमोनाला त्याने दिला. हे
करुब सोन्यात करायचे होते.
19दावीद म्हणाला, “हे सर्व नमुने परमेश्वराच्या
मार्गदर्शनाप्रमाणे लिहून ठेवलेले आहेत. त्या नमुन्यांतील
सर्व गोष्टी परमेश्वराने मला समजावून सांगितलेल्या
आहेत.”
20दावीद शलमोनाला पुढे म्हणाला, “धीर धर आणि न
भिता या कामाची सांगता कर. प्रत्यक्ष परमेश्वर, माझा
देव तुझ्या सोबत आहे, तेव्हा घाबरू नको. सर्व काम पुरे
होईपर्यंत तो तुला साथ देईल. ही साथ तो अर्धवट सोडणार
नाही. मंदिराचे बांधकाम तू पूर्णत्वाला नेशील. 21याजक
आणि लेवी यांचे वर्ग नेमले आहेत. ते देवाच्या मंदिराच्या
कामाला सज्ज आहेत. सर्वप्रकारच्या कामासाठी कुशल
कारागिर तुझ्याबरोबर आहेत. तुझी प्रत्येक आज्ञा
अधिकारी आणि सर्व लोक मानतील.”

## मंदिराच्या बांधकामासाठी दाने

29 राजा दावीद सर्व इस्राएल समुदायाला म्हणाला,
“देवाने शलमोनाला निवडले आहे. शलमोन
अजून कोवळा तरुण आहे. या कामासाठी काय करायला
लागेल त्याची त्याला पूर्ण कल्पना नाही. पण हे काम
फार महत्वाचे आहे. हे घर काही सामान्य माणसाचे नव्हे;
ते परमेश्वराचे देवाचे निवासस्थान आहे. 2माझ्या देवाच्या
मंदिराची योजना करण्यात मी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली
आहे. सर्व वस्तूंसाठी लागणारे सोने-चांदी, पितळ मी दिलेले
आहे. एवढेच नव्हे तर लोखंडाच्या वस्तूंसाठी लोखंड,
लाकडी सामानासाठी लाकूड जडावाच्या कामासाठी गोमेद,
पाषाण, विविधरंगी मौल्यवान रत्ने आणि शुभ्र संगमरवर
हे ही देऊ केले आहे. परमेश्वराच्या मंदिरासाठी अशा
अनेकविध गोष्टी मी दिल्या. 3हे देवाचे मंदिर बांधून व्हावे
असे मला मनापासून वाटते म्हणून सोन्या चांदीची माझी
ठेवही मी देत आहे. पवित्र मंदिरासाठी मी हे करत आहे.
4110 टन ओफीरचे शुध्द सोने, 260 टन निर्भेळ चांदी मी
दिली. मंदिराच्या भिंती या चांदीने मढवायच्या आहेत.
5कुशल कारागिरांनी मंदिरातील तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू
कराव्या म्हणून त्यासाठी लागणारे सोनेरूपे मी दिले. आता
तुम्हा इस्राएलींपैकी किती जण आज परमेश्वरासाठी काही
द्यायला तयार आहात?”
6तेव्हा, वडीलधारी मंडळी, इस्राएल घराण्यांचे प्रमुख
सरदार, अधिकारी, राजसेवेतील कारभारी यासर्वांनी
आपापल्या बहुमोल वस्तू देणगीदाखल दिल्या. 7देवाच्या
निवासस्थानासाठी त्यांनी दिलेल्या वस्तू पुढीलप्रमाणे: 190
टन सोने, 375 टन चांदी, 675 टन पितळ, आणि 3,750
टन लोखंड. 8ज्यांच्याकडे मौल्यवान रत्ने होती त्यांनी ती
परमेश्वराच्या मंदिरासाठी दिली. गेर्षोन घराण्यातील
यहीएल याच्याकडे त्यांनी ती सुपूर्द केली. 9या सर्व प्रमुख
मंडळींनी अगदी मनापासून आणि खुशीने, मुक्तहस्ताने
दिले. त्यामुळे सर्व लोकांमध्ये आनंद पसरला. राजा
दावीदालाही आनंद वाटला.

## दावीदाची भावपूर्ण प्रार्थना

10त्या समुदायापुढे दावीदाने परमेश्वराचे स्तुतिगीत
म्हटले. ते असे:

“हे परमेश्वर, इस्राएलच्या देवा, आमच्या पित्या,
सदासर्वकाळ तू धन्य आहेस.

[11]महिमा, पराक्रम, शोभा, विजय आणि सन्मान ही सर्व
तुझीच आहेत कारण स्वर्ग-पृथ्वीवर जे जे काही आहे ते
तुझेच आहे. परमेश्वरा, हे राज्य तुझेच आहे. या सागळ्यांचा
शास्ता आणि मुकुटमणी तूच आहेस.
[12] वैभव आणि सन्मान यांचा स्रोत तूच. सर्वांवर तुझा
अधिकार आहे. सत्ता आणि सामर्थ्य तुझ्या हातांत एकवटले
आहे. कोणालाही थोर आणि बलवान करणे तुझ्याच
हातात आहे.
[13] देवा, आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझ्या प्रतापी
नावाची स्तुती करतो.
[14] या सगळ्या गोष्टी देणारा मी कोण? किंवा हे लोक
तरी कोण? तुझ्यामुळेच त्या आमच्याकडे आल्या.
तुझ्याकडून मिळालेलेच आम्ही तुला परत करत आहोत.
[15] आमच्या पूर्वजांप्रमाणेच आम्ही सुध्दा या भूतलावरचे
तात्पुरते प्रवासी आहोत. आमचे अस्तित्व ओझरत्या
सावलीसारखे. ते थांबवणे आमच्या हाती नाही.
[16] हे परमेश्वर देवा, तुझे मंदिर उभारायला या सगळ्या
गोष्टी आम्ही जमा केल्या. तुझ्या सन्मानार्थ आम्ही हे
मंदिर बांधत आहोत पण ही सामग्री तुझ्यामुळेच प्राप्त
झालेली आहे. जे आहे ते सगळे तुझेच आहे.
[17] हे देवा, लोकांची तू पारख करतोस आणि त्यांच्या
भलेपणाने तुला आनंद होतो हे मी जाणतो. मी शुध्द
आणि प्रामणिक मनाने हे सगळे तुला सानंद अर्पण
करत आहे. हे सगळे तुझे लोक इथे हजर आहेत आणि
या सर्व वस्तू ते खुशीने तुला देत आहेत; हे मी पाहतो
आहे.
[18] अब्राहाम, इसहाक आणि इस्राएल या आमच्या
पूर्वजांचा, हे परमेश्वरा, तूच देव आहेस. त्यांनी उचित
तेच करावे म्हणून तू सर्वतोपरी सहाय्य कर. त्यांची मने
तुझ्याठायी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहावीत याची तू
काळजी घे.
[19] शलमोन तुझ्याशी एकनिष्ठ राहावा म्हणून त्याचे
मन तुझ्याठायी स्थिर कर. तुझ्या आज्ञा, नियम आणि
विधी यांचे पालन त्याने करावे, या सर्व गोष्टी कराव्या
आणि माझ्या नियोजित मंदिराची उभारणी त्याने करावी
म्हणून त्याला सात्विक मन दे."

[20]तेथे जमलेल्या सर्व लोकांना उद्देशून दावीद पुढे
म्हणाला, "आता आपल्या परमेश्वर देवाला धन्यवाद द्या."
तेव्हा आपल्या पूर्वजांनी ज्याची उपासना केली त्या
परमेश्वराला लोकांनी धन्यवाद दिले. राजाच्या आणि
परमेश्वराच्या सन्मानार्थ ते नतमस्तक झाले.

## शलमोन गादीवर येतो

[21]दुसऱ्या दिवशी लोकांनी परमेश्वराला यज्ञ अर्पण
केले. त्यांनी होमार्पणे वाहिली. 1,000 गोऱ्हे, 1000 एडके,
1,000 कोकरे आणि त्याबरोबर पेयार्पणे त्यांनी अर्पण
केली. शिवाय सर्व इस्राएलींसाठी त्यांनी आणखीही पुष्कळ
यज्ञ केले. [22]मग परमेश्वरासमोर सर्व लोकांनी खाद्यपेयांचा
मनमुराद आस्वाद लुटला.
दावीदाचा मुलगा शलमोन याला त्यांनी दुसऱ्यांदा
राज्याभिषेक केला.* राजपदासाठी शलमोनाला आणि
याजक म्हणून सादोकला अभिषेक केला गेला. हे सर्व
परमेश्वरासमोर झाले.
[23]त्यानंतर परमेश्वराच्या राजासनावर शलमोन
स्थानापन्न झाला. शलमोनाने आपल्या वडीलांची जागा
घेतली. राजा म्हणून तो यशस्वी ठरला. इस्राएलचे सर्व
लोक शलमोनाचे आज्ञापालन करत. [24]एकूणएक सरदार,
सैनिक आणि राजा दावीदाची मुले यांना तो राजा म्हणून
मान्य होता आणि ते सगळे त्याच्या आज्ञेत होते.
[25]परमेश्वराने शलमोनाची भरभराट केली. परमेश्वराच्या
कृपेने तो मोठा होत आहे हे इस्राएलींना ठाऊक होते.
राजाला शोभेल असा दरारा परमेश्वराने त्याला प्राप्त करून
दिला. इस्राएलाच्या या आधीच्या कोणाही राजाच्या वाट्याला
असे भाग्य आले नव्हते.

## दावीदाचा मृत्यू

[26–27]इशायाचा मुलगा दावीद याने संपूर्ण इस्राएलवर
चाळीस वर्षे राज्य केले. दावीद हेब्रोन नगरात सात वर्षे
राजा होता. मग यरुशलेममध्ये त्याची कारकीर्द 33 वर्षांची
होती. [28]पुढे वृध्द झाल्यावर दावीदाला मृत्यू आला. त्याला
सफल आणि दीर्घ आयुष्य लाभले. वैभव आणि सन्मान
यांची त्याला कमतरता नव्हती. त्याच्यानंतर त्याचा मुलगा
शलमोन राजा झाला.
[29]राजा दावीदाचे साद्यंत वृत्त संदेष्टा शमुवेल याच्या
ग्रंथात, संदेष्टा नाथानच्या ग्रंथात तसेच गाद या संदेष्ट्याचा
ग्रंथात नमूद केलेले आहे. [30]इस्राएलचा राजा म्हणून त्याने
जे जे केले ते सर्व या लेखनात आलेले आहे. त्याचे
पराक्रम आणि त्याची कारकीर्द, इस्राएल आणि
अवतीभवतीचे सर्व देश यांच्यावर या काळात गुदरलेले
प्रसंग याची हकीकत या ग्रंथांमध्ये आहे.

---

**दावीदाचा ... राज्याभिषेक केला** शलमोनाचा सावत्र भाऊ अदोनिया याने जेव्हा स्वत: गादीवर येण्याचा प्रयत्न केला तेव्हा शलमोनाला पहिल्यांदा राजा केले होते.

# 2 इतिहास

### विवेकबुध्दीसाठी शलमोनाची प्रार्थना

1 परमेश्वर देवाची शलमोनाला साथ असल्यामुळे दाविदाचा पुत्र शलमोन एक बलाढ्य राजा झाला. परमेश्वराने शलमोनाला थोर केले.

2 शलमोन सर्व इस्राएल लोकांशी म्हणजेच, सरदार, अधिकारी, न्यायाधीश, इस्राएलमधील प्रमुख मंडळी या सर्वांशी बोलला. 3 मग तो आणि त्याच्या बरोबरची ही सर्व मंडळी गिबोन येथील उच्चस्थानी गेली. परमेश्वराचा सभामंडप तेथे होता. परमेश्वराचा सेवक मोशे आणि इस्राएल लोक वाळवंटात असताना मोशेने तो बनवला होता. 4 दावीदाने परमेश्वराचा करारकोश किर्याथ यारीमाहून यरुशलेम येथे आणला होता. यरुशलेममध्ये तो ठेवण्यासाठी दावीदाने जागा तयार केली होती. करारकोशासाठी त्याने यरुशलेममध्ये तंबू उभारला होता. 5 उरीचा मुलगा बसलेल याने पितळी वेदी केली होती. ती वेदी गिबोन येथील परमेश्वराच्या निवासमंडपासमोर होती. म्हणून शलमोन आपल्या बरोबरच्या इस्राएल लोकांसह गिबोन येथे परमेश्वराचा सल्ला घेण्यासाठी गेला. 6 परमेश्वराच्या निवासमंडपासमोरील पितळी वेदी वर शलमोनाने 1,000 होमार्पणे केली.

7 त्यारात्री देवाने शलमोनाला दर्शन दिले. तो म्हणाला, “शलमोन, मी तुला काय द्यावे अशी तुझी इच्छा आहे ते मला माग.”

8 शलमोन परमेश्वराला म्हणाला, “माझे वडील दावीद यांच्यावर तुझी फार कृपा दृष्टी होती. त्यांच्याजागी तू मला नवीन राजा म्हणून निवडलेस. 9 आता, हे परमेश्वर देवा, त्यांना तू दिलेले वचन पूर्ण कर. एका फार मोठ्या राष्ट्राचा तू मला राजा केले आहेस. त्यातील प्रजेची संख्या धरतीवरील रज:कणांसारखी विपुल आहे. 10 एवढ्या लोकांना उचित मार्गाने नेण्यासाठी मला शहाणपण आणि ज्ञान दे. तुझ्या मदतीखेरीज एवढ्या बहुसंख्य लोकांवर राज्य करणे कोणालाच जमणार नाही.”

11 तेव्हा परमेश्वर शलमोनाला म्हणाला, “तुझे म्हणणे बरोबर आहे. तू धनसंपत्ती, ऐश्वर्य किंवा मानसन्मान यांची मागणी केली नाहीस. शत्रूंचा नि:पात व्हावा असेही मागितले नाहीस. स्वत:साठी दीर्घायुष्य मागितले नाहीस. यापैकी काहीही न मागता ज्यांचा मी तुला राजा केले त्या प्रजेसाठी धोरणीपणाने निर्णय घेता यावेत म्हणून तू शहाणपण आणि ज्ञान मागितलेस. 12 तेव्हा ते मी तुला देईनच पण त्याखेरीज मालमत्ता, ऐश्वर्य आणि मानसन्मानही देईन. तुझ्या आधीच्या कोणाही राजाला मिळाले नसेल एवढी संपत्ती व मानसन्मान देईन. पुढेही तुझ्याएवढे कोणत्याही राजाला मिळणार नाही.” 13 तेथून शलमोन गिबोन येथे उच्चस्थानी गेला. सभामंडपाकडून तो पुन्हा राजाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी यरुशलेम येथे गेला.

### शलमोनाचे सैन्यबल आणि संपत्ती

14 शलमोनाने सैन्यासाठी घोडे आणि रथ यांची जमवाजमव सुरु केली. त्याच्याकडे 1,400 रथ आणि 12,000 घोडेस्वार जमा झाले. त्यांना त्याने पागा आणि रथांसाठी जागा असलेल्या नगरांमध्ये ठेवले. काहींना त्याने आपल्याजवळ यरुशलेम येथेच ठेवून घेतले. 15 यरुशलेममध्ये त्याने चांदीसोन्याचा भरपूर साठा केला. सोने चांदी सामान्य दगडांसारखी विपुल होती तर गंधसरुचे लाकूड पश्चिमेकडच्या डोंगराळ भागात उंबराचे लाकूड असे तितके विपुल होते. 16 मिसर आणि क्यू येथून शलमोनाने घोडे आणवले होते. राजाचे व्यापारी क्यू येथे घोड्यांची खरेदी करत. 17 या व्यापाऱ्यांनी मिसरमधून 600 शेकेल चांदीला एकेक रथ आणि 150 शेकेल चांदीला घोडा या प्रमाणे ही खरेदी केली. हित्ती आणि अरामी राजांना मग ते हे रथ आणि घोडे विकत.

### शलमोनाचे मंदिराचे बांधकाम

2 परमेश्वराच्या नावाच्या सन्मानार्थ एक मंदिर तसेच स्वत:साठी एक राजमहालही बांधायचे शलमोनाने ठरवले. 2 डोंगरातून दगडाचे चिरे काढायला 80,000 पाथरवट आणि 70,000 मजूर त्याने नेमले. मजुरांच्या कामावर देखरेख करण्यासाठी शलमोनाने 3600 मुकादम नेमले.

3 सोराचा राजा हिराम याला शलमोनाने निरोप पाठवला, “माझे वडील दावीद यांना केलीत तशीच मला मदत करा. त्यांचे निवासस्थान बांधायला उपयोगी पडावे म्हणून तुम्ही गंधसरुचे लाकूड पाठवले होते. 4 मी माझ्या परमेश्वर देवाच्या नावाच्या सन्मानार्थ एक मंदिर बांधणार आहे. तेथे आम्ही रोज परमेश्वरासमोर सुगंधी धूप जाळू तसेच एका खास मेजावर पवित्र भाकर ठेवू. शिवाय, रोज सकाळ

संध्याकाळ, शब्बाथच्या दिवशी, दर नव चंद्रदर्शनी आणि
आमचा देव परमेश्वराने नेमून दिलेल्या सहभोजनाच्या
दिवशी आम्ही होमार्पणे वाहू. इस्राएल लोकांनी सर्वकाळ
पाळायचा हा नियमच आहे.
5“आमचा परमेश्वर हा सर्व देवतांपेक्षा श्रेष्ठ आहे.
म्हणून मी त्याच्यासाठी भव्य मंदिर उभारणार आहे. 6खरं
म्हणजे परमेश्वरासाठी निवासस्थान बांधणे कोणालाही
झालं तरी कसं शक्य आहे? स्वर्ग किंवा संपूर्ण विश्वही
त्याला सामावून घ्यायला अपुरे आहे. तेव्हा त्याच्यासाठी
म्हणून मंदिर बांधणे मलाही शक्य नाही. मी आपला
त्याच्या प्रीत्यर्थ धूप जाळण्यासाठी फक्त एक ठिकाण
बांधू शकतो. एवढेच
7“तर, सोने, चांदी, पितळ आणि लोखंड या धातुकामात
प्रवीण असा कारागिर तुम्ही माझ्याकडे पाठवून दिलात
तर बरे. त्याला जांभळे, किरमिजी आणि निळे वस्त्र
करता यावे. कोरीव कामाचेही त्याला चांगले शिक्षण
मिळालेले असावे. माझ्या वडलांनी निवडलेल्या इतर
कारागिरांबरोबर तो इथे यहूदा आणि यरुशलेममध्ये काम
करील. 8लबानोनमधून माझ्यासाठी गंधसरु, देवदार आणि
रक्तचंदन यांचे लाकूडही पाठवावे. लबानोनमधले तुझे
लाकूडतोड्ये चांगले अनुभवी आहेत हे मला माहीत आहे.
त्या तुमच्या सेवकाना माझे सेवक मदत करतील. 9मी
बांधायला घेतलेले मंदिर चांगले विशाल आणि सुंदर होणार
असल्यामुळे मला लाकूड मोठ्या प्रमाणावर लागणार आहे.
10लाकडासाठी वृक्षतोड करणाऱ्या तुमच्या सेवकांना मी
पुढीलप्रमाणे मेहनताना देईन: 1,25,000 बुशेल गहू,
1,25,000 बुशेल जव, 115,000 गॅलन द्राक्षारस आणि
1,15,000 गॅलन तेल.”
11हिरामने मग शलमोनाला उत्तर पाठवले. त्यात त्याने
असा निरोप पाठवला की, “शलमोन, परमेश्वराचे आपल्या
प्रजेवर प्रेम आहे. म्हणून तर त्याने तुला त्यांचा राजा
म्हणून नेमले.” 12हिराम पुढे म्हणाला, “इस्राएलचा
परमेश्वर देव धन्य असो. स्वर्ग आणि पृथ्वीची निर्मिती
त्यानेच केली. राजा दावीदाला त्याने सूज्ञ पुत्र दिला आहे.
शलमोन, तू सूज्ञ आणि विचारी आहेस. तू परमेश्वरासाठी
मंदिर तसेच स्वत:साठी राजवाडा बांधायला निघाला आहेस.
13हिराम अबी नावाचा एक कुशल कारागिर मी तुझ्याकडे
पाठवतो. 14त्याची आई दान वंशातील असून त्याचे वडील
सोर नगरातले होते. हा कारागिर सोने, चांदी, पितळ,
लोखंड, दगड आणि लाकूड यांच्या कामात तरबेज आहे.
जांभळे, निळे आणि अत्यंत तलम असे उंची किरमिजी
वस्त्र करण्यातही तो निपुण आहे. त्याला सांगितलेली
कोणतीही गोष्ट तो तिचे योग्य रेखाटन करून कोरून
काढू शकतो. तो तुझ्या आणि तुझ्या वडलांच्या, माझ्या
स्वामी दाविदाच्या कसबी कारागिरांबरोबर काम करील.
15“तुम्ही गहू, जव, तेल आणि द्राक्षारस देण्याचे कबूल
केले आहे ते सर्व आमच्या नोकरांना द्यावे. 16आणि
लबानोनमधून आम्ही तुम्हाला हवे तितके लाकूड झाडे
तोडून पाठवू. ओंडक्यांचे तराफे करून आम्ही ते इथून
समुद्रमार्गे यापो येथे पोचते करु. तेथून ते तुम्ही यरुशलेमला
न्यावे.”
17शलमोनाने यानंतर इस्राएलमधल्या सर्व उपऱ्या
लोकांची गणना केली. दावीदाने गणती केली होती
त्यानंतरची ही गणती. दावीद हा शलमोनाचा पिता. या
गणनेत त्यांना 1,53,600 उपरे लोक मिळाले. 18शलमोनाने
त्यापैकी 70,000 जणांना ओझी वाहायला निवडले आणि
80,000 लोकांना डोंगरातून दगड काढायच्या कामासाठी
निवडले. उरलेल्या 3,600 उपऱ्यांना या काम
करणाऱ्यांवर देखरेख करणारे मुकादम म्हणून नेमले.

## शलमोन मंदिर बांधतो

3 यरुशलेममधील मोरिया पर्वतावर शलमोनाने
परमेश्वराचे मंदिर बांधायला सुरुवात केली.
शलमोनाचे वडील दावीद याला परमेश्वराने याच मोरिया
पर्वतावर दर्शन दिले होते. दावीदाने तयार करून ठेवलेल्या
या जागेवर शलमोनाने मंदिर बांधले. ही जागा म्हणजेच ते
अर्णान यबूसीचे खळे. 2आपल्या कारकिर्दीच्या चौथ्या
वर्षातल्या दुसऱ्या महिन्याच्या दुसऱ्या दिवशी शलमोनाने
कामाला सुरुवात केली.
3शलमोनाने बांधायला घेतलेल्या परमेश्वराच्या
मंदिराच्या पायाची मोजमापे अशी: हा पाया 60 हात लांब
आणि 20 हात रूंद होता. तेव्हा प्रचलित असलेले जुने
क्युबिट परिमाण त्याने वापरले होते. 4मंदिराच्या समोरचा
द्वारमंडप 20 हात लांब आणि वीस हात उंच होता. त्याची
आतील बाजू शलमोनाने शुध्द सोन्याने मढवली होती.
5मोठ्या खोलीला सर्वबाजूंनी त्याने देवदारूच्या फळ्या
बसवल्या. त्यांवर शलमोनाने सोन्याचा पत्रा चढवला आणि
त्यावर खजुरीची झाडे व साखळ्या कोरुन काढल्या
6मौल्यवान रत्ने जडवून त्याने मंदिराच्या सौंदर्यात भर
घातली. यात वापरलेले सोने पर्वाइमचे होते. 7तुळया,
दाराचे खांब, भिंती, दरवाजे हे मंदिराचे आतले भागही
शलमोनाने सोन्याने मढवले. भिंतींवर त्याने करूब कोरून
काढले.
8यानंतर शलमोनाने मंदिरातला अत्यंत पवित्र गाभारा
बांधला. हे अत्यंत पवित्र स्थान 20 हात लांब आणि वीस
हात रूंद होते. मंदिराइतकीच त्याची रुंदी होती. गाभाऱ्याच्या
भिंतीही शलमोनाने सोन्याने मढवल्या. हे एकंदर 23 टन
सोने होते. 9सोन्याच्या खिळ्यांचे वजन 1 1/4 पौंड एवढे
होते. वरच्या मजल्यावरची दालने ही शलमोनाने सोन्याने
मढवली. 10अत्यंत पवित्र गाभाऱ्यात बसवण्यासाठी
शलमोनाने दोन करुब घडवले. हे करुबही कारागिरांनी
सोन्याने मढवले. 11करुबांच्या एकेका पंखाची लांबी 5
हात होती. त्यांची एकंदर लांबी 20 हात एवढी होती.
पाहिल्या करुबाचा एक पंख दालनाच्या एका बाजूच्या

भिंतीला स्पर्श करत होता तर दुसरा पंख दुसऱ्या करुबाच्या
एका पंखाला.
12आणि दुसऱ्या करुबाचा दुसरा पंख दालनाच्या दुसऱ्या
भिंतीला स्पर्श करत होता. 13अशाप्रकारे करुबांच्या पंखानी
वीस हात एवढे अंतर व्यापलेले होते. हे करुब पवित्र
गाभाऱ्याकडे तोंड करून उभे होते.
14निळ्या, जांभळ्या आणि उंची किरमिजी वस्त्राचा
पडदा करून घेऊन शलमोनाने त्यावरही करुब करवून
घेतले.
15मंदिरासमोर शलमोनाने दोन स्तंभ उभे केले. हे
स्तंभ 35 हात उंच होते. त्यांच्यावरचे कळस प्रत्येकी
5 हात उंचीचे होते. 16शलमोनाने साखळ्या करून
त्या कळसांवर ठेवल्या. या साखळ्यांना त्याने 100
शोभिवंत डाळिंबे कलाकुसर म्हणून लावली. 17हे स्तंभ
मंदिरासमोर डाव्याउजव्या हाताला उभे केले. उजव्या
बाजूच्या खांबाला शलमोनाने याखीम (संस्थापक) आणि
डावीकडच्या खांबाला बवाज (सामर्थ्यवान) अशी नावे
दिली.

## मंदिरातील बांधकाम आणि सामान

4 शलमोनाने वेदी पितळेची केली. ती 30 फूटलांब,
30 फूट रुंद आणि 18 फूट उंच होती. 2त्याने ओतीव
पितळेचे एक गंगाळदेखील केले. हे गोल असून त्याचा
व्यास 10 हात होता. त्याची उंची 5 हात आणि त्याचा
कडेचा परीघ 30 हात होता. 3या गंगाळाच्या खालच्या
बाजूस सभोवार कडेला बैलांच्या चित्रकृती घडवलेल्या
होत्या. त्यांची लांबी 10 हात होती. गंगाळ बनवतानाच या
बैलांच्या दोन रांगा ओतल्या होता. 4बारा घडीव बैलांनी हे
प्रशस्त गंगाळ तोललेले होते. तीन बैल पूर्वाभिमुख, तीन
पश्चिमाभिमुख, तीन उत्तराभिमुख तर तीन दक्षिणाभिमुख
होते. आणि गंगाळ त्यांच्यावर होते. सर्व बैलांचा मागील
भाग एकमेकांकडे आणि मध्यभागी आलेला होता. 5या
पितळी गंगाळाची जाडी 3 इंच होती. त्याची कड उमललेल्या
कमलपुष्पासारखी होती. त्यात 17,500 गॅलन पाणी मावू
शकत असे.
6याखेरीज शलमोनाने दहा तस्ते बनवली. ती त्याने
या गंगाळाच्या उजव्या बाजूला पाच आणि डाव्या बाजूला
पाच अशी बसवली. होमार्पणात वाहायच्या वस्तू धुवून
घेण्यासाठी ही दहा तस्ते होती. पण मुख्य पितळी गंगाळ
मात्र याजकांच्या वापरासाठी, होमार्पणाच्या वस्तू
वाहण्यापूर्वी धुण्यासाठी होते.
7शलमोनाने सोन्याच्या दहा दीपवृक्षही केले. हे त्याने
त्यांचे विधीनुसार बनविले, आणि मंदिरात ठेवले. डावीकडे
पाच आणि उजवीकडे पाच असे ते ठेवले. 8दहा मेजेही
शलमोनाने मंदिरात ठेवली. ती ही पाच डावीकडे आणि
पाच उजवीकडे अशी ठेवली. शिवाय सोन्याचे शंभर वाडगे
केले. 9याखेरीज शलमोनाने याजकांसाठी एक आवार
केले, एक प्रशस्त आवार आणि त्यांना दरवाजे केले.
आवारांत उघडणारे दरवाजे मढवण्यासाठी पितळ वापरले.
10एवढे झाल्यावर आग्नेयला मंदिराच्या उजवीकडे त्याने
ते मोठे पितळी गंगाळ ठेवले.
11हिराम या कारागिराने हंडे, फावडी व वाडगे बनवले.
शलमोनासाठी जे देवाच्या मंदिराचे काम त्याला करायचे
होते ते त्याने पूर्ण केले. 12दोन स्तंभ, स्तंभावरचे कळस,
त्यावरील जाळ्यांची दोन सुशोभने हे काम हिरामने केले
होते. 13त्या जाळीदार आच्छादनांवरील चारशे शोभिवंत
डाळिंबे हिरामनेच केली होती. प्रत्येक जाळीवर डाळिंबांच्या
दोन रांगा होत्या. स्तंभांवरचे कळस या जाळ्यांनी
आच्छादलेले होते. 14तिवया आणि तिवयांवरची गंगाळी
त्याने घडवली होती. 15मोठे पितळी गंगाळ आणि त्याला
आधार देणारे बारा बैल हिरामनेच केले. 16शलमोनासाठी
त्याने हंडे, फावडी, काटे इत्यादी मंदिरातली उपकरणे
केली. त्यासाठी लखलखीत, उजळ पितळ वापरलेले होते.
17या सर्व गोष्टीसाठी शलमोनाने आधी चिकणमातीचे नमुने
बनविले. त्यासाठी सुक्कोथ आणि सरेदा यांच्यामधली,
यार्देन खोऱ्यातली माती वापरली. 18शलमोनाने इतक्या
अगणित गोष्टी करवून घेतल्या की त्यांना पितळ किती
लागले याची मोजदाद कोणी केली नाही.
19याखेरीज आणखी काही गोष्टी शलमोनाने देवाच्या
मंदिरासाठी केल्या. सोन्याची वेदी, समर्पित भाकर ठेवण्याची
मेजे केली. 20सोन्याचे दीपवृक्ष आणि दिवे करवून घेतले.
आतल्या सर्वांत पवित्र गाभाऱ्याच्या समोर योजना
केल्याप्रमाणे लावण्यासाठी हे दिवे होते. 21याशिवाय फुले,
दिवे आणि निखारे उचलण्याचे चिमटे शुध्द सोन्याचे होते.
22कातऱ्या, वाडगे, कटोरे, अग्निपात्रे, या गोष्टीही
शलमोनाने सोन्यात घडवल्या. मंदिराची दारे, अत्यंत पवित्र
गाभाऱ्यातली दारे, आणि मुख्य दालनाचे दरवाजे हे ही
सोन्याचे होते.
5 मग शलमोनाने काढलेले परमेश्वराच्या मंदिराचे
सर्व काम समाप्त झाले. आपले वडील दावीद यांनी
मंदिरासाठी दिलेल्या सर्व वस्तू त्याने मग आत आणल्या.
सोन्या-रुप्याच्या सर्व वस्तू आणि इतर सामानसुमान त्याने
आणले. मंदिराच्या कोषागारात त्याने या सर्व वस्तू
ठेवल्या.

## पवित्र करारकोश मंदिरात आणण्यात येतो

2पुढे शलमोनाने परमेश्वराचा करारकोश
दावीदनगराहून म्हणजेच सीयोनमधून आणण्यासाठी
इस्राएल मधील सर्व वडीलधारी मंडळी, आपापल्या
घराण्यांचे प्रमुख, यांना यरुशलेम येथे बोलावून घेतले.
3सातव्या महिन्यातील मंडपाच्या सणाच्या दिवशी सर्व
इस्राएल लोक शलमोनाकडे आले.
4सर्व इस्राएलाचे वडीलधारे जमल्यावर लेवींनी
करारकोश उचलून घेतला. 5याजक आणि लेवी यांनी

मिळून तो यरुशलेमला आणला. दर्शन मंडप आणि तेथे
असलेली सर्व पवित्र उपकरणेही त्यांनी बरोबर आणली.
6राजा शलमोन आणि इस्राएलाचे लोक करारकोशाला
सामोरे गेले. कोशासमोर त्यांनी मेंढरांचे आणि गुराढोरांचे
बळी अर्पण केले. मोजदाद करता येऊ नये इतके प्राणी
त्यांनी बळी दिले. 7एवढे झाल्यावर, मंदिराच्या आतल्या
मुद्दाम तयार करवून घेतलेल्या सर्वांत पवित्र गाभाऱ्यात
याजकांनी तो परमेश्वराचा करारकोश आणला.
करुबांच्या पखांच्या बरोबर खाली तो त्यांनी ठेवला.
8कोशावरती करुबांच्या पखांनी आपले छत्र धरले होते.
कोश आणि त्याचे दांडे त्यांनी झाकले. 9हे दांडे सर्वांत
पवित्र गाभाऱ्यासमोरून दिसतील इतके लांब होते. पण
मंदिराच्या बाहेरुन ते दिसत नसत. आजपर्यंत ते तेथे आहेत.
10दोन दगडी पाट्यांखेरीज या करार कोशात काहीही
नव्हते. होरेब पर्वतावर मोशेने त्या दोन पाट्या या करार
कोशात ठेवल्या होत्या. इस्राएल लोक मिसरमधून बाहेर
पडल्यावर परमेश्वराने त्यांच्याशी जो करार केला तो या
होरेब पर्वतावरच.

11एवढे झाल्यावर याजक गाभाऱ्यातून बाहेर आले. ते
सर्व शुचिर्भूत झाले होते. ते सर्व नेमके कोणकोणत्या
गटातले होते हे यावेळी महत्वाचे नव्हते. आतून बाहेर
आल्यावर ते पुन्हा पवित्र झाले. 12मग सर्व लेवी गायक
वेदीच्या पूर्वेला उभे राहिले. आसाफ, हेमान आणि यदुथूनचे
सर्व गायक वर्ग हजर होते. त्यांची मुले आणि भाऊबंददेखील
आले होते. यासर्वांनी शुभ्र तलम वस्त्रे घातली होती. झांजा,
सारंग्या आणि वीणा ही वाद्ये त्यांनी हातात घेतली होती. या
लेवी गायकांबरोबर 120 याजक होते आणि ते कर्णे वाजवत
होते.

13गायन आणि वादन एका सुरात चालले होते. एका
सुरात त्यांनी परमेश्वराचे स्तवन केले आणि त्याला
धन्यवाद दिले. कर्णे, झांजा इत्यादी वाद्यांचा एक जल्लोष
उडाला. त्यांच्या गाण्याचा आशय असा होता: *परमेश्वराची
स्तुती कारण तो चांगला आहे. त्याची खरी प्रीति सर्वकाळ
राहाते.*

तेव्हा परमेश्वराचे सर्व मंदिर मेघाने भरुन गेले. 14त्या
मेघामुळे याजकांना तेथे सेवेला उभे राहता येईना, इतके
परमेश्वराच्या तेजाने देवाचे मंदिर भरून गेले होते.

6 मग शलमोन म्हणाला, “मी मेघासारख्या अंधकारात
वास करीन असे परमेश्वर म्हणाला आहे.
2परमेश्वरा, तुझ्या निवासासाठी मी हे घर बांधले आहे.
तू येथे चिरकाल राहावेस म्हणून हे उच्च कोटीचे घर
आहे.”

## शलमोनाचे भाषण

3मग शलमोनाने मागे वळून सर्व इस्राएल समुदायांना
आशीर्वाद दिला. आणि ते सर्व उभे राहिले. 4शलमोन पुढे
म्हणाला, “इस्राएलाच्या परमेश्वर देवाचे स्तवन करा.
माझे वडील दावीद यांच्याशी तो जे बोलला ते त्याने खरे
करून दाखवले आहे. परमेश्वर देवाने असे वचन दिले
होते 5‘माझ्या लोकांना मी मिसरमधून बाहेर आणल्यानंतर
इस्राएल वंशातील कोणतेही नगर मी माझ्या नावाचे घर
तिथे बांधले जावे म्हणून निवडले नाही. तसेच, माझ्या
इस्राएल लोकांचे आधिपत्य करण्यासाठी कोणाएकाची
निवडही केली नाही. 6पण आता यरुशलेम हे स्थान मी
माझ्यासाठी निवडले आहे आणि दावीदाला इस्राएल
लोकांवर नेमले आहे.’

7“इस्राएलचा देव परमेश्वर याच्या प्रीत्यर्थ माझे वडील
दावीद यांना मंदिर बांधायचे होते. 8पण परमेश्वर त्यांना
म्हणाला, ‘दावीद, माझ्या नावाने मंदिर बांधायचा विचार
तुझ्या मनात आला हे चांगले झाले. 9पण ते तू बांधू
शकत नाहीस पण तुझा मुलगा हे काम करील.’ 10आता
परमेश्वराने कबूल केले तसे झाले आहे. माझे वडील
दावीद यांच्या जागी मी नवीन राजा झालो आहे. मी इस्राएलचा
राजा आहे. असे होईल हे वचन परमेश्वराने दिले होते.
आणि मी इस्राएलचा देव परमेश्वर याच्या नावाने मंदिर
बांधले आहे 11मी करारकोश मंदिरात ठेवला आहे.
इस्राएलच्या लोकांशी परमेश्वराने केलेला करार या
कोशांत आहे.”

## शलमोनाची प्रार्थना

12शलमोन परमेश्वराच्या वेदीसमोर उभा राहिला. तेथे
जमलेल्या सर्व इस्राएल लोकांपुढे तो उभा होता. त्याने
आपले बाहू पसरले. 13बाहेरच्या आवारात प्रत्येकी 7
1/2 फूट लांबी, रुंदी आणि उंची असलेला एक पितळी
चौरंग शलमोनाने बसवला होता. त्यावर चढून तो समस्त
इस्राएल लोकांसमोर गुडघे टेकून बसला आणि त्याने
आकाशाकडे हात पसरले 14शलमोन म्हणाला,

“हे इस्राएलच्या परमेश्वर देवा, स्वर्गात किंवा पृथ्वीवर
तुझ्यासारखा दुसरा कोणीही देव नाही. तुझे जिवाभावाने
अनुसरण करणाऱ्या आणि योग्य आचरण करणाऱ्या
तुझ्या सेवकांना तुझे प्रेम आणि तुझी कृपा यांचे दिलेले
वचन पाळणारा तू परमेश्वर आहेस. 15आपला सेवक
दावीद याला दिलेले वचन तू पाळलेस. दावीद माझे वडील
होते. तू आपल्या मुखानेच त्यांना वचन दिलेस आणि
आज आपल्या हाताने ते प्रत्यक्षात आणले आहेस. 16तसेच
आता, हे इस्राएलच्या परमेश्वर देवा, दावीद या सेवकाला
दिलेले हे वचनही खरे कर. तू असे म्हणाला होतास:
‘माझ्यासमक्ष इस्राएलच्या गादीवर न चुकता तुझ्या
वंशातीलच कोणीतरी येत जाईल. मात्र तुझ्या मुलांनी
काटेकोर वर्तन केले पाहिजे. तुझ्याप्रमाणेच त्यांनीही माझा
करार पाळला पाहिजे.’ 17तेव्हा आता, हे इस्राएलच्या
परमेश्वर देवा, हे ही शब्द खरे होऊ देत. आपला सेवक
दावीद याला तू तसा शब्द दिला आहेस. 18“परमेश्वर
पृथ्वीवर लोकांमध्ये वस्ती करू शकत नाही ही गोष्ट, हे

देवा, आम्हाला माहीत आहे. आकाश आणि त्या पुढचे
अवकाशही तुला सामावून घ्यायला असमर्थ आहेत. या
मी बांधलेल्या मंदिरातही तू मावू शकत नाहीस हे आम्ही
जाणतो 19पण माझी एवढी प्रार्थना ऐक. मी करुणा भाकतो
तिच्याकडे लक्ष दे. परमेश्वर देवा, माझी आर्त हाक ऐक.
मी तुझा एक दास आहे. 20या मंदिराकडे अहोरात्र तुझी
दृष्टी असो असे मी तुला कळकळीने विनवतो. तुझे नाव
इथे राहील असे तू म्हणाला होतास. मी या मंदिराकडे
तोंड करून प्रार्थना करीन तेव्हा ती तू ऐक. 21तुझ्या
इस्राएल लोकांनी तसेच मी केलेल्या प्रार्थना तू ऐक. या
प्रार्थनास्थलाकडे तोंड करून आम्ही प्रार्थना करु तेव्हा
तिच्याकडे तू लक्ष दे. तुझ्या आकाशातील स्थानावरुन
तुझे इथे लक्ष असू दे. आमच्या प्रार्थना ऐक आणि आम्हाला
क्षमा कर.

22“एखाद्याने दुसऱ्याची काही आगळीक केल्याचा
आरोप त्याच्यावर आला आणि तो तुझे नाव घेऊन आपण
निर्दोष आहोत असे सांगू लागला तर तो वेदीसमोर तसे
शपथ घेऊन सांगत असताना, 23तू स्वर्गातून ऐक. तुझ्या
सेवकाचा योग्य न्यायनिवाडा कर. ज्याच्या हातून आगळीक
घडली असेल त्याला शासन कर. त्याच्यामुळे इतरांना
जसा त्रास झाला तसाच याला होऊ दे. ज्याचे वागणे उचित
होते तो निर्दोष असल्याचे सिध्द कर.

24“इस्राएल लोकांनी तुझ्याविरुध्द पाप केल्यामुळे जर
शत्रूंनी तुझ्या इस्राएल लोकांचा पराभव केला आणि
अशावेळी इस्राएल लोक तुझ्याकडे येऊन तुझ्या नावाने
क्षमायाचना करु लागले, या मंदिरात येऊन विनवणी
करु लगले तर 25तू स्वर्गातून ते ऐकून इस्राएल लोकांना
क्षमा कर. तू त्यांना आणि त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या
भूमीवर त्यांना पुन्हा परत आण. 26“इस्राएल लोकांनी
पाप केल्यामुळे आकाश बंद होऊन पर्जन्यवृष्टी झालीच
नाही आणि त्यावेळी पश्चात्तापाने इस्राएल लोकांनी मंदिराच्या
दिशेने पाहात क्षमायाचना केली, तू केलेल्या शिक्षेमुळे
पापाचरण थांबवले, 27तर स्वर्गातून त्यांचे ऐकून घे. त्याचे
ऐक आणि त्यांना माफ कर. इस्राएल लोक तुझे दास
आहेत. त्यांना जगण्याचा सन्मार्ग दाखव. तुझ्या भूमीवर
पाऊस पाड. ती तूच तुझ्या लोकांना दिलेली जमीन आहे.

28“कदाचित् एखादेवेळी दुष्काळ, भयानक साथीचा रोग,
किंवा पिकांवर रोग अथवा टोळ, नाकतोडे यांची धाड
अशी काही आपत्ती किंवा लोकांच्या राहत्या नगरांवर
शत्रूचा हल्ला झाला, असे काही झाल्यास 29तुझे इस्राएल
लोक तुझी करुणा भाकतील आणि प्रार्थना करतील. जो
तो आपले क्लेश किंवा दु:ख ओळखून, या मंदिराच्या
दिशेने बाहू उभारून प्रार्थना करु लागेल. 30तेव्हा तू ते
स्वर्गातून ऐक. तू स्वर्गात राहातोस. तू ऐकून त्यांना क्षमा
कर. प्रत्येकाचा मनोदय तुला माहीत असल्यामुळे
ज्याला जे योग्य असेल त्याला ते दे. मानवाचे मन
फक्त तूच ओळखतोस. 31असे झाले म्हणजे तू
आमच्या पूर्वजांना दिलेल्या या भूभागावर त्यांची वसती
असेपर्यंत लोक तुझा धाक बाळगतील आणि तुझे ऐकतील.

32“तुझ्या इस्राएल प्रजेपेक्षा वेगळा असा कोणी उपराही
कदाचित् दूर देशाहून इथे आलेला असेल. तुझ्या नावाची
महती, आणि तुझे समर्थ बाहू यांच्यामुळे तो आलेला असेल.
त्याने येऊन या मंदिराकडे पाहात प्रार्थना केली तर 33तू
ती स्वर्गातून ऐक. त्याची मागणी पुरव. म्हणजे इस्राएल
लोकांप्रमाणेच पृथ्वीवरील इतर लोकांनाही तुझ्या नावाचा
महिमा कळेल आणि त्यांना तुझ्याविषयी आदर वाटेल. हे
मी बांधलेले मंदिर तुझ्या नावाचे आहे हे पृथ्वीवरील सर्व
लोकांना कळेल.

34“शत्रूशी लढण्यासाठी जेव्हा तू आपल्या लोकांना
दुसऱ्या ठिकाणी पाठवशील आणि तिथून ते तू निवडलेल्या
या नगराच्या आणि मी बांधलेल्या मंदिराच्या दिशेने पाहात
प्रार्थना करु लागतील. 35तर तू स्वर्गातून त्यांची प्रार्थना
ऐक आणि त्यांच्या विनंती प्रमाणे त्यांना मदत कर.

36“पाप कोणाच्या हातून होत नाही? तेव्हा लोक तुझ्या
विरुध्द पाप करतील तेव्हा तुझा त्यांच्यावर कोप होईल.
तू शत्रूंकरवी त्यांचा पाडाव करशील, बंदी म्हणून त्यांना
बळजबरीने इथून दूरच्या किंवा एखाद्या जवळच्या ठिकाणी
नेले जाईल. 37पण तिथे त्यांचे हृदयपरिवर्तन होऊन,
परभूमीत कैदी होऊन पडलेले ते म्हणतील, ‘आम्ही चुकलो,
आमच्या हातून पाप घडले आहे. आम्ही दुराचरण केले
आहे.’ 38असतील तिथून ते अंतरीच्या उमाळ्याने तुला
शरण येतील. या देशाच्या तू त्याच्या पूर्वजांना दिलेल्या
देशाच्या दिशेने आणि तू निवडलेल्या नगराच्या दिशेने
पाहात ते प्रार्थना करतील. तुझ्या नावाखातर मी बांधलेल्या
या मंदिराच्या दिशेने पाहात ते प्रार्थना करतील. 39असे
होईल तेव्हाही तू तुझ्या स्वर्गातील निवासस्थानातून ऐक.
त्यांच्या विनवणीला कान दे, त्यांना मदत कर. ज्यांनी
तुझ्या विरूध्द पाप केले आहे अशा तुझ्या लोकांना क्षमा
कर. 40आता, हे परमेश्वरा, माझी तुला विनवणी आहे
की तू तुझे कान आणि डोळे उघड. आम्ही इथे बसून जी
प्रार्थना करणार आहोत ती लक्षपूर्वक ऐक.

41“आता, हे परमेश्वर देवा, तुझे सामर्थ्य मिरवणाऱ्या
या करारकोशाजवळ, आपल्या विश्रामस्थानी ये. तुझे
याजक उध्दाराने भूषित होवोत. तुझे भक्त या सुजनतेने
सुखी होवोत

42हे परमेश्वर देवा, तुझ्या अभिषिक्त राजाचा स्वीकार
कर. तुझा एकनिष्ठ सेवक दावीद याचे स्मरण असू दे.”

## मंदिराचे परमेश्वराला समर्पण

7 शलमोनाची प्रार्थना संपल्याबरोबर स्वर्गातून अग्नी
खाली उतरला आणि त्याने होमबली आणि यज्ञार्पणे
भस्मसात केली. परमेश्वराच्या लखलखीत तेजाने मंदिर
भरून गेले. 2त्या तेजाने दिपून याजकांनाही परमेश्वराच्या

मंदिरात जाता येईना. 3थेट स्वर्गातून अग्नी खाली येणे
आणि परमेश्वराचे तेज मंदिरावर पसरणे या गोष्टी
इस्राएलच्या समस्त लोकांनी पाहिल्या. तेव्हा त्यांनी
जमिनीपर्यंत लवून नमन केले, परमेश्वराला धन्यवाद
दिले आणि ते म्हणाले, *“परमेश्वर चांगला आहे त्याची
कृपा सर्वकाळ राहाते.”*
4मग शलमोनाने आणि सर्व इस्राएल लोकांनी
परमेश्वरापुढे यज्ञ केले. 5राजा शलमोनाने 22,000 बैल
आणि 1,20,000 मेंढरे वाहिली. राजा आणि प्रजा यांनी
देवाच्या मंदिराची प्रतिष्ठापना केली. ते फक्त उपासनेसाठी
वापरायचे होते. 6याजक आपल्या कामाला सिध्द झाले.
परमेश्वराच्या भजनाची वाद्ये घेऊन लेवी ही उभे राहिले.
राजा दावीदाने ही वाद्ये परमेश्वराच्या स्तवनासाठी करून
घेतली होती. “परमेश्वराचे स्तवन करा कारण त्याची
कृपा चिरंतन आहे” असे याजक आणि लेवी गात होते.
लेवींच्या समोर उभे राहून याजक कर्णे वाजवत होते. सर्व
इस्राएल लोक तिथे उभे होते.
7मंदिरासमोरचे मधले आवार शलमोनाने पवित्र केले.
या जागी त्याने होमार्पणे आणि शांतिअर्पणांची वपा वाहिली.
होमार्पणे, अन्नार्पणे आणि वपा यांचे प्रमाण एवढे प्रचंड
होते की पितळी वेदीवर ते सर्व मावेना म्हणून मधले
आवार त्याने वापरले.
8शलमोन आणि इस्राएल लोक यांनी सात दिवस हा
सण साजरा केला. हामाथच्या वेशीपासून ते मिसरच्या
झऱ्या पर्यंतच्या भागातले सगळे इस्राएल लोक इथे
आल्यामुळे शलमोनबरोबरचा जमाव खूपच मोठा होता.
9आठव्या दिवशी त्यांनी पवित्र सभा घेतली कारण त्या
आधी सात दिवस त्यांनी सण साजरा केला होता. वेदी
पवित्र करून ती परमेश्वराला समर्पण केली. ती फक्त
परमेश्वराच्या उपासनेसाठी वापरायची होती. सात दिवस
त्यांनी सण साजरा केला. 10सातव्या महिन्याच्या तेविसाव्या
दिवशी शलमोनाने लोकांना घरोघरी परतायला सांगितले.
दावीद, शलमोन आणि इस्राएल लोक यांच्यावर परमेश्वराने
कृपा केल्यामुळे लोक आनंदी झाले होते. त्यांची अंत:करणे
आनंदाने भरून गेली होती.

## शलमोनाला परमेश्वराचे दर्शन

11परमेश्वराचे मंदिर आणि राजगृह बांधण्याचे काम
शलमोनाने पार पाडले. परमेश्वराचे मंदिर आणि आपले
निवासस्थान यांच्याबाबतीत योजलेल्या सर्व गोष्टी त्याने
यशस्वीपणे पूर्ण केल्या. 12नंतर एकदा रात्री परमेश्वराने
शलमोनाला दर्शन दिले. तो शलमोनाला म्हणाला,
“शलमोना तुझी प्रार्थना मी ऐकली आहे. हे स्थळ यज्ञगृह
म्हणून मी निवडले आहे. 13कधी जर मी पर्जन्यवृष्टी
होऊ नये म्हणून आकाशमार्ग बंद केला, धान्य फस्त
करायला टोळधाड पाठवली किंवा रोगराईचा प्रसार केला
14आणि अशावेळी लोकांनी नम्र होऊन माझा धावा
करून माझ्या दर्शनाची इच्छा बाळगली, दुराचाराचा त्याग
केला तर मी स्वर्गातून त्यांच्या हाकेला ओ देईन. त्यांना
त्यांच्या पापाची क्षमा करीन आणि त्यांची भूमी संकटमुक्त
करीन.
15आता माझी दृष्टी या ठिकाणी वळलेली आहे. इथे
होणाऱ्या प्रार्थना ऐकायला माझे कान उत्सुक आहेत.
16हे मंदिर मी माझे म्हणून निवडले आहे. माझे नाव
इथे सदासर्वकाळ राहावे म्हणून मी हे स्थान पवित्र केले
आहे. माझी दृष्टी आणि माझे चित्त नेहमी या मंदिराकडे
लागलेले असेल.
17“शलमोना, तुझे वडील दावीद यांच्याप्रमाणेच तू
माझ्याशी वागलास, माझ्या आज्ञांचे पालन केलेस, माझे
विधी आणि नियम पाळलेस,
18तर मी तुला समर्थ राजा बनवीन आणि तुझे राज्य
महान होईल. तुझे वडील दावीद यांना मी तसे वचन दिले
आहे. त्यांना मी म्हणालो होतो, ‘दावीद तुझ्या घराण्यातील
पुरुषच इस्राएलच्या राजपदावर आरुढ होईल.’
19“पण जर माझ्या आज्ञा आणि नियम तू पाळले नाहीस.
इतर दैवतांची उपासना व सेवा केलीस, 20तर मात्र मी
दिलेल्या या भूमीतून इस्राएल लोकांना मी हुसकावून
लावीन. माझ्या नावाप्रीत्यर्थ असलेले हे पवित्र मंदिर मी
सोडून जाईन. इतकेच नव्हे तर ते इतर देशांमध्ये निंदेचा
विषय करीन. 21एकेकाळी पूज्य मानल्या गेलेल्या या
मंदिरावरुन जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येकाला आता आश्चर्य
वाटेल. ते लोक म्हणतील, ‘हा प्रदेश आणि हे मंदिर यांची
अशी अवस्था परमेश्वराने का केली बरे?’ 22तेव्हा त्यांना
इतर लोक सांगतील, ‘कारण आपल्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याचे या इस्राएल लोकांनी ऐकले नाही. या
लोकांना या परमेश्वरानेच मिसरमधून बाहेर आणले.
तरी हे इतर दैवतांच्या भजनी लागले. त्यांनी त्यांची उपासना
व सेवा केली. त्यांनी मूर्तिपूजा सुरु केली. म्हणून इस्राएल
लोकांवर परमेश्वराने हे अरिष्ट आणले.’”

## शलमोनाने बांधलेली नगरे

8 मंदिर आणि आपले घर बांधायला शलमोनाला
वीस वर्षे लागली. 2मग हिरामने दिलेली नगरे
शलमोनाने वसवली. त्या नगरांमध्ये काही इस्राएल
लोकांना वसती करण्यास मुभा दिली. 3पुढे शलमोनाने
हमाथ सोबा हे नगर जिंकून घेतले. 4वाळवंटातील
तदमोर हे नगरही त्याने वसवले. कोठारांसाठी म्हणून
त्याने हमाथमधली नगरे बांधली. 5वरचे बेथ-होरोन
आणि खालचे बेथ-होरोन यांची उभारणीही शलमोनाने
केली. ती त्याने भक्कम तटबंदीची नगरे केली. त्यांना
मजबूत कोट, वेशी आणि अडसर करवले. 6बालाथ आणि
अन्य कोठारे असलेली गावे यांची शलमोनाने पुनर्रचना
केली. रथ ठेवण्यासाठी तसेच घोडेस्वारांच्या वस्तीसाठीही
त्याने गावे वसवली. यरुशलेम, लबानोनसकट आपल्या

आधिपत्याखालील सर्व प्रदेशात शलमोनाने आपल्या
गरजेनुसार बांधकामे केली.
7–8इस्राएल लोक राहात असलेल्या प्रदेशात अनेक
परकी लोकही होते. ते म्हणजे हित्ती, अमोरी, परिज्जी,
हिव्वी आणि यबूसी. त्यांना शलमोनाने वेठबिगार केले.
हे लोक मूळचे इस्राएल नव्हते. या प्रदेशात राहून
गेलेल्या लोकांचे ते वंशज होते आणि इस्राएल लोकांनी
त्यांना अजून नष्ट केले नव्हते. ते अजूनही आहेत.
9इस्राएल लोकांपैकी कोणालाही शलमोनाने
वेठबिगारीसाठी सक्ती केली नाही. ते त्याचे योध्दे होते. ते
सैन्याधिकारी, रथाधिपती, स्वारांचे अधिकारी असे होते.
10काही इस्राएलीजण तर शलमोनाच्या अधिकाऱ्यांवर
अंमल गाजवणारे होते. असे प्रमुख अधिकारी 250 होते.
11शलमोनाने फारोच्या मुलीला, तिच्यासाठी बांधलेल्या
महालात दावीद नगराहून आणले. शलमोन म्हणाला, “ज्या
ज्या ठिकाणी परमेश्वराचा करारकोश ठेवण्यात आला,
ती सर्व स्थाने पवित्र आहेत. तेव्हा माझ्या बायकोने दावीद
नगरात राहू नये.”

12मग शलमोनाने वेदीवर परमेश्वराला होमार्पणे
वाहिली. मंदिराच्या प्रवेशमंडपासमोरच शलमोनाने ती वेदी
बांधली होती. 13मोशेच्या आज्ञेप्रमाणे शलमोन रोज होमार्पणे
करी. शब्बाथच्या दिवशी, नवचंद्र दर्शनीला, वर्षभरातल्या
तीन सणांना होमार्पणे करायची असत. बेखमीर भाकरीचा
सण, सप्ताहांचा सण, आणि मंडपांचा सण हे तीन वार्षिक
सण होत. 14आपल्या वडलांच्या सूचना शलमोनाने तंतोतंत
पाळल्या. परमेश्वराच्या सेवेसाठी त्याने याजकवर्गाच्या
नेमणुका केल्या. लेवींना त्यांची कामे पार पाडायला नेमले.
स्तुतिगीते म्हणणे आणि मंदिराच्या चाकरीतील रोजची
सेवाकार्ये बजावण्यात याजकांना मदत करणे ही लेवींची
कामे होती. याखेरीज शलमोनाने प्रत्येक प्रवेशद्वाराशी
द्वारपालांच्या गटांच्या नेमणुका केल्या. परमेश्वराला
मानणाऱ्या दावीदाने अशाच सूचना दिल्या होत्या. 15याजक
आणि लेवी यांना शलमोनाने ज्या सूचना दिल्या त्यात
इस्राएल लोकांनी बदल केला नाही की आज्ञाभंग केला
नाही. मौल्यवान वस्तू जतन करण्याविषयीच्या आज्ञांचाही
त्यांनी बदल केला नाही.

16शलमोनाची सगळी कामे सिध्दीला गेली. मंदिराच्या
कामाला सुरुवात केल्यापासून ते संपेपर्यंत त्यांचे व्यवस्थित
नियोजन केले होते. अशा रीतीने मंदिराचे काम तडीला
गेले.

17यानंतर शलमोन लाल समुद्रानजीकच्या अदोम
देशातील एस्योन-गेबेर आणि एलोथ या नगरांना गेला.
18हिरामने त्याच्याकडे आपली गलबते पाठवली.
समुद्रपर्यटनात तरबेज अशा हिरामच्या सेवकांनीच ती नेली.
शलमोनाच्या चाकरीतील लोकांबरोबर हे सेवक ओफिर
येथे गेले आणि तेथून 17 टन सोने आणून त्यांनी ते
शलमोनाला दिले.

## शबाच्या राणीची शलमोनाशी भेट

9 शलमोनाची कीर्ती शबाच्या राणीच्या कानावर गेली.
तेव्हा त्याची परीक्षा पाहायला म्हणून ती यरुशलेमला
आली. तिच्याबरोबर मोठा लवाजमा होता. मसाल्याचे पदार्थ,
सोनेनाणे, मौल्यवान रत्ने या गोष्टी उंटांवर लादून तिने
आणल्या होत्या. शलमोनाची भेट घेऊन ती त्याच्याशी
बोलली. तिला शलमोनाला बरेच प्रश्न विचारायचे होते.
2शलमोनाने तिच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. त्याला त्यातले
काहीच अवघड वाटले नाही. 3शबाच्या राणीने त्याच्या
सूज्ञपणाचा प्रत्यय घेतला, त्याचा महाल पाहिला. 4त्याच्या
मेजावरील अन्नपदार्थ तिने पाहिले, त्याच्या प्रमुख
कारभाऱ्यांची बैठक पाहिली. त्यांची कार्यपध्दती आणि
त्यांचे पोशाख पाहिले. शलमोनाचे मद्यपरिचारक आणि
त्यांचे पोशाख, परमेश्वराच्या मंदिरातील शलमोनाने
केलेली होमार्पणे हे सर्व तिने पाहिले आणि या दर्शनाने ती
थक्क झाली. 5मग ती राजा शलमोनाला म्हणाली, “तुझ्या
कामगिरीची आणि शहाणपणाची जी वर्णने मी माझ्या
देशात ऐकली ती खरीच आहेत. 6इथे येऊन स्वत: अनुभव
घेईपर्यंत मला त्या गोष्टी खऱ्या वाटत नव्हत्या. खरे तर
तुझ्या सूज्ञपणाची थोरवी निम्म्यानेही माझ्यापर्यंत पोचली
नव्हती. तुझ्याबद्दल जे ऐकले त्यापेक्षाही तू महान आहेस.
7तुझ्या बायका, तुझी माणसे आणि अधिकारी फार
भाग्यवान आहेत. तुझ्या सेवेत असतानाच त्यांना तुझ्या
शहाणपणाचा लाभ होतो. 8तुझा देव परमेश्वर ह्याची स्तुति
असो. तो तुझ्यावर प्रसन्न आहे आणि आपल्या वतीने
त्याने तुला राजा म्हणून सिंहासनावर बसवले आहे.
परमेश्वराचे इस्राएलवर प्रेम आहे आणि इस्राएल वर त्याचा
कायमचा वरदरस्त आहे. जे उचित आणि न्याय्य ते
करण्यासाठी त्याने तुला राजा केले आहे.”

9शबाच्या राणीने मग राजा शलमोन याला 4 1/2 टन
सोने, अनेक मसाल्याचे पदार्थ आणि किंमती रत्ने यांचा
नजराणा दिला. तिने दिले तसे मसाल्याचे जिन्नस शलमोनाला
कधीच कुणाकडून मिळाले नाहीत.

10हिराम आणि शलमोन यांच्या सेवकांनी ओफिरहून
सोने आणले. रक्तचंदनाचे लाकूड आणि मौल्यवान रत्नेही
त्यांनी आणली. 11परमेश्वराच्या मंदिराच्या आणि
राजमहालाच्या पायऱ्या तसेच गायकांच्या वीणा व सतारी
यासाठी शलमोनाने हे रक्तचंदन वापरले. रक्तचंदनाचा
वापर करून बनवलेल्या इतक्या सुंदर वस्तू यापूर्वी यहूदात
कधी कोणी पाहिल्या नव्हत्या. 12शबाच्या राणीला जे हवे
ते राजा शलमोनाने देऊ केले. त्याने जे देऊ केले ते तिने
आणलेल्या नजराण्यापेक्षा जास्तच होते. मग शबाची राणी
आपल्या लव्याजम्यासाहित आपल्या देशात परतली.

## शलमोनाची अवाढव्य संपत्ती

13शलमोनाला वर्षभरात जेवढे सोने मिळे त्याचे वजन
25 टन एवढे असे. 14याखेरीज, फिरस्ते व्यापारी आणि

विक्रेते खूप सोने आणत. अरबस्तानचे राजे आणि
वेगवेगळ्या प्रदेशांचे सुभेदार सोने-चांदी आणत, ते वेगळेच
15 सोन्याचे पत्रे ठोकून 200 मोठ्या ढाली राजा शलमोनाने
केल्या. अशाप्रत्येक ढालीला 7 1/2 पौंड वजनाचा सोन्याचा
पत्रा लागला. 16 याखेरीज अशा घडीव सोन्याच्या तीनशे
ढाली त्याने केल्या. त्यांना प्रत्येकी 3 3/4 पौंड सोने लागले.
या सोन्याच्या ढाली त्याने लबानोनच्या अरण्यमहालात
ठेवल्या.

17 राजा शलमोनाने हस्तिदंताचे मोठे सिंहासन केले.
ते शुध्द सोन्याने मढवले. 18 या सिंहासनाला सहा
पायऱ्या होत्या आणि सोन्याचे पादासन होते. दोन्ही
बाजूला हात टेकवता येतील अशी सिंहासनाला सोय
होती. आणि त्याला लागून एक एक सिंहाचा पुतळा होता.
19 सहा पायऱ्यांपैकी प्रत्येक पायरीच्या दोन्ही बाजूला एकेक
असे एकंदर 12 सिंह होते. दुसऱ्या कोणत्याही राज्यात
असे सिंहासन नव्हते. 20 राजाची सर्व पेयपात्रे सोन्याची
होती. लबानोनच्या अरण्यमहालातील सर्व घरगुती
वापरायच्या वस्तू शुध्द सोन्याने घडवलेल्या होत्या.
शलमोनाच्या काळात चांदी फारशी मौल्यवान मानली
जात नसे. 21 तार्शीश येथे जाणारी गलबते त्याच्याकडे
होती. हिरामची माणसे त्याच्या गलबतांतून मालाची
ने-आण करीत. सोन-रुपे, हस्तिदंत, वानरे आणि मोर
यांनी भरलेली ही गलबते दर तीन वर्षांनी तार्शीशहून
शलमोनाकडे येत.

22 वैभव आणि ज्ञान या बाबतीत पृथ्वीच्या पाठीवरील
कोणत्याही राजापेक्षा शलमोन महान झाला. 23 त्याच्या
सल्लामसलतीचा लाभ घ्यायला सर्व ठिकाणचे राजे
शलमोनाकडे येऊ लागले. परमेश्वरानेच शलमोनाला
जो सूज्ञपणा दिला होता तो पाहायाला ते येत असत.
24 हे राजे दरवर्षी येताना शलमोनासाठी नजराणे घेऊन
येत. त्यात सोन्यारुप्याच्या वस्तू, कपडे, चिलखते,
मसाले, घोडे आणि खेचरे ह्यांचा समावेश असे.

25 घोडे आणि रथ यांच्यासाठी शलमोनाकडे 4,000
ठाणी होती. त्याच्यापदरी 12,000 रथचालक होते. त्यांची
सोय त्याने मुद्दाम वसवलेल्या नगरात आणि स्वत:ला
लागतील तेवढ्यांची यरुशलेममध्ये केली होती. 26 फरात
नदीपासून पलिष्ट्यांचा देश आणि मिसरची सीमा
येथपर्यंतच्या सर्व राजांवर शलमोनाचा अधिकार होता.
27 राजा शलमोनाकडे चांदी ही दगडधोंडे असावे इतकी
आणि गंधसरुची झाडे, डोंगराळ देशातल्या उंबराच्या
झाडांइतकी विपुल होती. 28 मिसर आणि इतर देशामधून
लोक शलमोनासाठी घोडे आणत.

## शलमोनाचा मृत्यू

29 शलमोनाने सुरुवातीपासून शेवटपर्यंत ज्यागोष्टी
केल्या त्या नाथान या संदेष्ट्याच्या इतिहासात तसेच,
अहीया शिलोनी याच्या संदेशलेखात आणि इद्दो या
भविष्यवत्याच्या ‘इद्दोची दर्शने’ यात नोंदवलेल्या आहेत.
नबाटाचा मुलगा यराबाम याविषयीही इद्दोने लिहिलेले
आहे. 30 शलमोनाने यरुशलेममधून इस्राएलवर चाळीस
वर्षे राज्य केले. 31 मग तो आपल्या पूर्वजांना मिळाला.
लोकांनी त्याचे दावीदनगरात दफन केले. शलमोनाचा
मुलगा रहबाम हा पुढे शलमोनाच्या जागी राज्य करु
लागला.

## रहबामचे अविचारी वर्तन

10 रहबाम शखेम येथे गेला कारण त्याला राजा
करण्यासाठी सर्व इस्राएल लोक तेथे गेले होते.
2 यावेळी यराबाम मिसरमध्ये होता कारण त्याने राजा
शलमोनापुढून पळ काढला होता. यराबाम हा नबाटाचा
मुलगा. रहबाम राजा होणार हे त्याने ऐकले म्हणून तो
मिसरहून आला. 3 तेव्हा इस्राएल लोकांनी यराबामलाही
आपल्याबरोबर येण्यास सांगितले. अशा तऱ्हेने यराबाम
आणि सर्व इस्राएल लोक रहबामकडे आले. त्याला ते
म्हणाले, “रहबाम, 4 तुमच्या वडलांनी आमचे आयुष्य फार
जिकिरीचे केले होते. त्यांनी जणू आमच्या मानेवर जू
ठेवले होते. ते आता हलके करा म्हणजे आम्ही तुमच्या
आज्ञेत राहू.”

5 यावर रहबाम त्यांना म्हणाला, “तुम्ही तीन दिवसांनी
परत या.” तेव्हा लोक निघून गेले.

6 राजा रहबामने मग आपल्या वडलांच्या पदरी असणाऱ्या
वडीलधाऱ्या मंडळींशी चर्चा केली. रहबाम त्यांना म्हणाला,
“मी या लोकांशी काय बोलावे? मला या बाबतीत तुमचा
सल्ला हवा आहे.”

7 तेव्हा ती वयोवृध्द मंडळी रहबामला म्हणाली, “तू या
लोकांशी प्रेमाने वागलास, त्यांना संतुष्ट केलेस आणि
त्यांच्याशी गोड बोललास तर ते चिरकाल तुझी सेवा
करतील.”

8 पण रहबामने त्यांचा हा सल्ला मानला नाही. तो मग
आपल्या पदरी असलेल्या आणि आपल्या बरोबर लहानाचे
मोठे झालेल्या तरुण मंडळींशी बोलला. 9 रहबाम त्यांना
म्हणाला, “तुम्ही मला काय सल्ला द्याल? आपण लोकांना
काय सांगावे? त्यांना आपले ओझे हलके करून हवे
आहे. माझ्या वडलांनी त्यांच्या मानेवर ठेवलेले जूं आता
त्यांना मी हलके करायला हवे आहे.”

10 तेव्हा त्याच्या पिढीची ती तरुण मुले रहबामला म्हणाली,
“तुमच्याकडे आलेल्या लोकांना तुम्ही असे सांगावे. लोक
तुम्हाला म्हणाले की, ‘मानेवर जूं ठेवल्याप्रमाणे तुमच्या
वडलांनी आम्हाला कठोर जिणे जगायला लावले. तुम्ही
आता ते हलके करावे असे आम्हाला वाटते.’ पण रहबाम,
तुम्ही त्यांना असे सांगावे, ‘माझी करंगळी माझ्या वडीलांच्या
कमरेपेक्षा जाड असेल. 11 माझ्या वडीलांनी तुमच्यावर
फार ओझे लादले ना! मी तर ते अधिकच भारी करणार

आहे. माझ्या वडलांनी तुम्हाला चाबकांचे फटकारे मारले.
मी त्या चाबकांना धातूची अणकुचीदार टोके लावून शासन
करीन.'"
12"यराबाम आणि सर्व लोक तीन दिवसांनी रहबामकडे
आले." राजा रहबामने त्यांना तसेच सांगितले होते. 13रहबाम
त्यांच्याशी यावेळी अविचारीपणाने बोलला. मोठ्यांचा सल्ला
त्याने मानला नाही. 14तरुणांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे तो
बोलला. तो लोकांना म्हणाला, "माझ्या वडीलांनी तुमच्यावर
फार ओझे लादले ते मी अधिकच भारी करीन. त्यांनी
तुम्हाला चाबकाने शासन केले असेल पण मी टोकदार
धातूची टोके जोडलेल्या चाबकांनी शासन करीन." 15राजा
रहबामने लोकांचे ऐकून घेतले नाही. तो असे बोलला
कारण हा बदल परमेश्वरानेच घडवून आणला होता.
अहीया मार्फत परमेश्वर यराबामशी जे बोलला होता
ते प्रत्यक्षात यावे म्हणूनच त्याने अशी वेळ येऊ
दिली. अहीया हा शिलोनी लोकांपैकी होता आणि यराबाम
नबाटाचा मुलगा होता.
16राजा रहबामने आपल्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले हे
इस्राएल लोकांच्या लक्षात आले. ते राजाला म्हणाले,
"आम्ही काय दावीदाच्या घराण्यातले आहोत का? मुळीच
नाही! इशायच्या जमिनीत आमचा वाटा आहे का? नाही!
तेव्हा इस्राएल लोकांनो, आपण आपले आपापल्या घरी
जाऊ या. दावीदाच्या मुलाला आपल्या घरच्यांवरच राज्य
करु द्या." सर्व इस्राएल लोक मग घरोघर गेले. 17पण
यहूदाच्या नगरांमध्ये राहाणारे काही इस्राएल लोक होते.
रहबाम त्यांच्यावर राज्य करत राहिला.
18हदोराम हा वेठबिगारांवरचा मुकादम होता.
रहबामने त्याला इस्राएल लोकांकडे पाठवले. पण
इस्राएल लोकांनी त्याच्यावर दगडफेक करून त्याला
मरेपर्यंत मारले. इकडे रहबामने रथाचा आश्रय घेतला
आणि त्वरेने पळ काढला. तो यरुशलेमला पळून गेला.
19तेव्हापासून आजतागायत इस्राएलचे दावीदाच्या घराण्याशी
वैर आहे.

11 यरुशलेमला आल्यावर रहबामने 1,80,000 उत्तम
योध्दे जमवले. यहूदा आणि बन्यामिन या
घराण्यांमधून त्याने ही निवड केली. इस्राएलशी युध्द करून
स्वत:कडे राज्य खेचून आणण्यासाठी त्याने ही जमवाजमव
केली. 2पण परमेश्वराचा माणूस शमाया याच्याकडे
परमेश्वराचा संदेश आला. परमेश्वर त्याला म्हणाला,
3"शमाया, यहूदाचा राजा, शलमोनपुत्र रहबाम याच्याशी तू
बोल. तसेच यहूदा आणि बन्यामिन इथल्या इस्राएल
लोकांशीही बोल. त्यांना म्हणावे. 4परमेश्वराचे म्हणणे
असे आहे 'आपल्या बांधवांशीच लढू नका. प्रत्येकाने
घरी जावे. मीच हे सर्व व्हायला कारणीभूत आहे.'" तेव्हा
राजा रहबाम आणि त्याचे सैन्य यांनी परमेश्वराचा संदेश
मानला आणि ते परतले. यराबामवर त्यांनी हल्ला केला
नाही.

### रहबाम यहूदाचे सामर्थ्य वाढवतो

5रहबाम यरुशलेममध्ये राहिला. हल्ल्यांचा प्रतिकार
करायला सज्ज अशी भक्क म नगरे त्याने यहूदात उभारली.
6बेथलेहेम, एटाम, तकोवा, 7बेथ-सूर, शोखो, अदुल्लाम,
8गथ, मारेशा, सीफ, 9अदोरइम, लाखीश, अजेका, 10सोरा,
अयालोन व हेब्रोन या नगरांची डागडुजी केली. यहूदा
आणि बन्यामिन मधली ही गावे चांगली भक्क म करण्यात
आली. 11नगरे मजबूत झाल्यावर रहबामने त्यांच्यावर
नायक नेमले. अन्नसामग्री, तेल, द्राक्षारस यांचा साठा
त्याने तेथे केला. 12प्रत्येक नगरात ढाली आणि भाले
यांचा पुरवठा करून गावे अधिकच मजबूत केली. यहूदा
आणि बन्यामिन मधील ही नगरे आणि तेथील लोक
यांना रहबामने आपल्या नियंत्रणाखाली ठेवले.
13समस्त इस्राएलमधील याजक आणि लेवी रहबामशी
सहमत होते. ते त्याला येऊन मिळाले. 14लेवींनी आपली
शेती आणि शिवारे सोडली आणि ते यहूदा व यरुशलेम
येथे आले. परमेश्वराप्रीत्यर्थ याजकाचे काम करायला
यराबाम आणि त्याचे मुलगे यांनी लेवींना प्रतिबंध केला
म्हणून ते आले. 15यराबामने बोकड आणि वासरे यांच्या
मूर्ती उच्चस्थानी स्थापन केल्या आणि त्यांच्या पूजेसाठी
आपले याजक निवडले.
16इस्राएलच्या सर्व वंशातील जे लोक इस्राएलचा देव
परमेश्वर याच्याशी एकनिष्ठ होते ते ही, लेवींनी इस्राएल
सोडल्यावर, परमेश्वराला यज्ञार्पणे करण्यासाठी
यरुशलेमला आले. 17त्यामुळे यहूदाचे राज्य बळकट झाले.
त्यांनी शलमोनाचा पुत्र रहबाम याला तीन वर्षे पाठिंबा
दिला. या काळात त्यांनी दावीद आणि शलमोन
यांच्यासारखेच आचरण ठेवले.

### रहबामचे घराणे

18रहबामने महलथशी विवाह केला. तिचे वडील
यरीमोथ आणि तिची आई अबीहईल. यरीमोथ हा दावीदाचा
मुलगा. अबीहईल अलीयाबची मुलगी आणि अलीयाब हा
इशायचा मुलगा. 19महलथपासून रहबामला यऊश,
शमऱ्या आणि जाहम हे मुलगे झाले. 20मग रहबामने
माकाशी विवाह केला. माका ही अबशालोमची नात.
माकाला रहबामपासून अबीया, अत्थय, जीजा आणि
शलोमीथ ही मुले झाली. 21रहबामचे आपल्या इतर पत्नी
आणि उपपत्नी यांच्यापेक्षा माकावर अधिक प्रेम होते.
माका अबशालोमची नात. रहबामला अठरा पत्नी आणि
साठ उपपत्नी होत्या. त्याला अठ्ठावीस मुलगे आणि साठ
मुली होत्या. 22अबीयाला रहबामने सर्व भावडांमध्ये
अग्रक्रम दिला. कारण त्याला राजा करावे असा त्याचा
मानस होता. 23रहबामने मोठ्या चतुराईने आपल्या सर्व
मुलांना यहूदा आणि बन्यामिनमधील नगरांमध्ये विखरुन
ठेवले. त्यांना उत्तम रसद पुरवली. त्यांची लग्ने लावून
दिली.

## मिसरचा राजा शिशक याची यरुशलेमवर स्वारी

12 रहबामचे सामर्थ्य वाढले. त्याने आपले राज्य
बळकट केले. पण त्याचबरोबर त्याने आणि
इस्राएल लोकांनी परमेश्वराच्या नियमशास्त्राचे पालन
करण्याचे थांबवले. 2रहबामच्या कारकिर्दीच्या पाचव्या
वर्षी शिशकने यरुशलेमवर हल्ला चढवला. शिशक हा
मिसरचा राजा होता. रहबाम आणि यहूदाचे लोक यांनी
परमेश्वराचा मार्ग सोडल्यामुळे असे झाले. 3शिशककडे
12,000 रथ, 60,000 घोडेस्वार आणि अगणित पायदळ
होते. त्याच्या सैन्यात लुबी, सुक्की व कुशी हे लोक होते.
4यहूदातील भक्कम नगरांचा पाडाव केल्यावर शिशकने
आपले सैन्य यरुशलेमला आणले.

5तेव्हा शमाया हा संदेष्टा रहबाम आणि वडीलधारी
मंडळी यांच्याकडे आला. शिशकच्या धास्तीने ही सर्व
वडीलधारी मंडळी यरुशलेमला जमली होती. शमाया
रहबामला आणि या सर्वांना म्हणाला, “परमेश्वराचे म्हणणे
असे आहे ‘रहबाम, तू आणि यहूदाचे लोक यांनी माझा
त्याग केला आहे. तुमचे आचरण माझ्या नियमांच्या विरुध्द
आहे. तेव्हा मीही तुम्हाला सोडून शिशकच्या हाती दिले
आहे.’”

6तेव्हा यहूदाची ती वडीलधारी मंडळी आणि रहबाम
यांना पश्चात्ताप झाला आणि ते विनम्र झाले. “परमेश्वर
म्हणतो ते खरे आहे.” असे त्यांनी उदगार काढले.

7ते नम्र झाले आहेत हे परमेश्वराने पाहिले. तेव्हा
पुन्हा शमायाला परमेश्वराचा संदेश आला. परमेश्वर त्याला
म्हणाला, “राजा आणि ही मंडळी माझ्यापुढे नम्र झाल्यामुळे
मी त्यांचा नाश करणार नाही. त्यांना तारीन. शिशक
मार्फत त्यांना मी माझ्या कोपाचे लक्ष्य करणार नाही.
8पण यरुशलेमचे लोक शिशकचे चाकर होतील. माझी
सेवा आणि इतर देशांतील राजाची सेवा यामधला भेद
त्यांना कळावा म्हणून ते त्याचे अंकित होतील.”

9शिशकने यरुशलेमवर स्वारी केली आणि
परमेश्वराच्या मंदिरातील खजिना लुटून नेला. शिशक
हा मिसरचा राजा होता. राजमहालातील खजिनाही त्याने
लुटला. शलमोनाने केलेल्या सोन्याच्या ढाली त्याने हस्तगत
केल्या. 10त्या सोन्याच्या ढालीऐवजी रहबामने पितळेच्या
ढाली केल्या. त्या त्याने महालाचे संरक्षण करणाऱ्या
द्वारपालांना दिल्या. 11राजा परमेश्वराच्या मंदिरात जात
असे तेव्हा ते ढाली घेऊन पुढे होत. नंतर त्या पहारेदारांच्या
खोलीत ठेवून देत.

12रहबाम असा नम्र झाल्यामुळे परमेश्वराचा
त्याच्यावरील कोप शमला. त्याचा परमेश्वराने पूर्ण नायनाट
केला नाही. शिवाय यहूदात थोडा चांगुलपणाही शिल्लक
होता.

13रहबामने यरुशलेममध्ये आपले सामर्थ्य वाढवले. तो
राज्यावर आला तेव्हा एक्के चाळीस वर्षांचा होता. त्याने
यरुशलेममध्ये सतरा वर्षे राज्य केले. इस्राएलच्या सर्व
वंशांमधून परमेश्वराने यरुशलेमची निवड केली होती.
आपले नाव राहावे म्हणून त्याने यरुशलेम निवडले होते.
रहबामच्या आईचे नाव नामा; नामा अमोनीण नगरातली
होती. 14रहबामने वाईट गोष्टी केल्या कारण परमेश्वराच्या
आज्ञांचे पालन करण्याविषयी त्याने मनात निश्चय केला
नव्हता.

15शमाया हा संदेष्टा आणि इद्दो हा द्रष्टा यांच्या इतिहासात
रहबामने आपल्या कारकीर्दीत केलेल्या सर्व गोष्टींची
साद्यंत हकीकत आहे. शमाया आणि इद्दो वंशाळींचा इतिहास
लिहीत. रहबाम आणि यराबाम या दोघांमध्ये नित्य लढाया
होत. 16रहबामने मृत्यूनंतर आपल्या पूर्वजांबरोबर विश्रांती
घेतली. दावीदनगरात त्याचे दफन झाले. त्याचा मुलगा
अबीया गादीवर आला.

## यहूदाचा राजा अबीया

13 इस्राएलचा राजा यराबामच्या कारकीर्दीच्या
अठराव्या वर्षी अबीया यहूदाचा राजा झाला. 2त्याने
यरुशलेममध्ये तीन वर्षे राज्य केले. मीखाया ही अबीयाची
आई. गिबा नगरातील उरीएलची ती मुलगी. अबीया आणि
यराबाम यांच्यामध्ये लढाई जुंपली. 3अबीयाच्या सैन्यात
400,000 शूर योध्दे होते. अबीयाने लढाईत त्यांचे नेतृत्व
केले. यराबामकडे 800,000 सैनिक होते. यराबाम
अबीयाशी युध्द करायला सज्ज झाला.

4एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशातील समाराइम पर्वतावर
उभे राहून अबीया म्हणाला, “यराबाम आणि समस्त इस्राएल
लोकांनो, ऐका, 5दावीद आणि त्याची मुले यांनी इस्राएलवर
सर्वकाळ राज्य करावे असा इस्राएलाच्या परमेश्वर देवानेच
त्यांना आधिकार दिला आहे हे ध्यानात घ्या. देवाने दावीदाशी
तसा मिठाचा करारच केला आहे.* 6पण यराबामने
त्याचा स्वामी जो राजा त्याच्याकडे पाठ फिरवली. यराबाम
नबाटाचा मुलगा. नबाट हा दावीदाचा पुत्र शलमोनाच्या
सेवकांपैकी एक. शलमोन दावीदाचा मुलगा. 7मग
कुचकामी आणि वाईट माणसांशी यराबामशी दोस्ती झाली.
यराबाम आणि ही वाईट माणसे शलमोनाचा मुलगा रहबाम
याच्या विरुद्ध होती. रहबाम तरुण आणि अनुभवी होता.
त्याला यराबाम आणि त्याचे अधम मित्र यांच्यावर वचक
बसवता आला नाही. 8“आता तुम्ही लोकांनी परमेश्वराचे
राज्य म्हणजे दावीदाच्या मुलांची सत्ता असलेल्या राज्याचा
पराभव करण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही संख्ये ने
वरचढ आहात आणी यराबामने तुमच्यासाठी देव म्हणून
बनवलेली सोन्याची वासरे तुमच्याकडे आहेत.
9परमेश्वराचे याजक आणि लेवी यांना तुम्ही हाकलून

---

**परमेश्वराने ... केला आहे** एकत्र मीठ खाणे याचा अर्थ मैत्रीचा करार आजन्म पाळणे. परमेश्वराने दावीदाशी केलेला करार हा असा अतूट आहे असे इथे अबीयाला सांगायचे आहे.

लावले आहे. हे याजक अहरोनचे वंशज आहेत त्यांच्या
जागी तुम्ही आपले याजक नेमले आहेत. अशा गोष्टी
इतर देशातले लोक करतात. कोणीही उठून एक गोऱ्हा
किंवा सात एडके आणून स्वत:वर संस्कार केला की तो
जे खरे परमेश्वरच नव्हेत त्यांचा याजक बनतो.

10“पण आमच्यासाठी परमेश्वर हाच आमचा देव आहे.
आम्ही त्याच्याकडे पाठ फिरवलेली नाही. त्याचा त्याग
केलेला नाही. परमेश्वराची सेवा करणारे याजक अहरोनचे
वंशज आहेत. लेवी त्यांना परमेश्वराच्या सेवेत मदत
करतात. 11परमेश्वराला ते होमार्पणे वाहतात, तसेच दररोज
सकाळ संध्याकाळ सुवासिक धूप जाळतात. मंदिरातील
मुद्दाम करवून घेतलेल्या मेजावर समर्पित भाकर मांडतात.
रोज संध्याकाळी ते सोन्याच्या दीपवृक्षावरील दिवे लावतात.
आम्ही आपल्या परमेश्वर देवाची काळजीपूर्वक सेवा
करतो. पण तुम्ही परमेश्वराला सोडले आहे. 12खुद्द
परमेश्वर आमच्या बाजूचा आहे. तोच आमचा शास्ता
असून त्याचे याजक आमच्या बाजूला आहेत. तुम्ही जागे
व्हावे व परमेश्वराकडे यावे म्हणून देवाचे याजक कर्णे
वाजवत आहेत. इस्राएल लोकांनो, आपल्या पूर्वजांचा
परमेश्वर ह्याच्या विरुध्द लढू नका, कारण त्यात तुम्हाला
यश येणार नाही.”

13पण यराबामने सैन्याच्या एका तुकडीला अबीयाच्या
सैन्यामागे दबा धरुन राहायला सांगितले. त्यांनी अबीयाच्या
सैन्याला पाठीमागून वेढा घातला. 14यहूदातील या सैन्याने
जेव्हा आपल्या भोवताली पाहिले तेव्हा यराबामच्या सैन्याने
आपल्याला मागून पुढून वेढल्याचे त्यांच्या लक्षात आले.
तेव्हा यहूदा लोकांनी परमेश्वराचा धावा सुरु केला आणि
याजकांनी कर्णे वाजवले. 15मग अबीयाच्या सैन्यातील
लोकांनी आरोळ्या ठोकल्या. त्याबरोबर देवाने यराबामच्या
सैन्याचा पराभव केला. अबीयाच्या यहूदा सैन्याने
यराबामच्या इस्राएली सैन्याचा पाडाव केला. 16इस्राएल
लोकांनी यहूदासमोरुन पळ काढला. देवाने यहूदांच्या हातून
इस्राएल लोकांचा पराभव केला. 17अबीयाने केलेल्या या
दारुण पराभवात इस्राएलचे 5,00000 योध्दे मारले गेले.
18अशाप्रकारे त्यावेळी इस्राएल लोक हरले आणि यहूदा
जिंकले. आपल्या पूर्वजांच्या परमेश्वर देवावर विसंबून
राहिल्यामुळेच यहुदा सैन्याने विजय मिळवला.

19अबीयाच्या सैन्याने यराबामच्या सैन्याचा पाठलाग
केला. बेथेल, यशाना आणि एफ्रोन ही नगरे आणि त्यांच्या
आसपासची खेडी एवढा प्रदेश यराबामकडून अबीयाच्या
सैन्याने बळकावला.

20अबीयाच्या हयातीत पुन्हा यराबाम डोके वर काढू
शकला नाही. परमेश्वराने यराबामवर प्रहार केला आणि
तो मेला. 21अबीयाचे सामर्थ्य मात्र वाढले. त्याने चौदा
बायका केल्या. त्याला बावीस मुलगे आणि सोळा मुली
झाल्या. 22इद्दो या भविष्यवाद्याच्या नोंदवह्यांमध्ये अबीयाने
केलेल्या इतर सर्व गोष्टी लिहून ठेवलेल्या आहेत.

14 अबीयाला पुढे आपल्या पूर्वजांसोबत चिरविश्रांती
मिळाली. दावीदनगरात लोकांनी त्याचे दफन
केले. त्याचा मुलगा आसा हा त्याच्यानंतर राज्य करु
लागला. आसाच्या कारकिर्दीत लोकांना दहा वर्षे शांतता
लाभली.

## यहूदाचा राजा आसा

2आसाने परमेश्वर देवाच्या दृष्टीने न्याय्य आणि
उचित असा कारभार केला. 3त्याने मूर्तिपूजेसाठी
वापरात येणाऱ्या चमत्कारिक वेद्या काढून टाकल्या.
उच्च स्थाने पाडली आणि पवित्र मानले जाणारे स्तंभ
फोडून टाकले. आसाने अशेरा देवीचे खांबही उदध्वस्त
केले. 4त्याने यहूदी लोकांना परमेश्वर देवाला अनुसरायची
आज्ञा केली. त्यांच्या पूर्वजाचा देव तोच. त्या परमेश्वराने
घालून दिलेल्या आज्ञा आणि नियम पाळायला फर्मावले.
5यहूदाच्या सगळ्या नगरांमधली उच्च स्थाने आणि धूप
जाळायच्या वेद्या आसाने काढून टाकल्या. आसाच्या
कारकीर्दीत त्यामुळे राज्यात शांतता नांदत होती. 6या
काळात आसाने यहूदात भक्कम तटबंदीची नगरे बांधली.
परमेश्वराने शांतता दिल्यामुळे या काळात आसा युध्दमुक्त
राहिला.

7आसा यहूदातील लोकांना म्हणाला, “ही नगरे बांधून
त्याभोवती तटबंदी करु. त्यांना कोट, बुरुज, वेशी आणि
अडसर करु. या प्रदेशात आपण राहात आहोत, तेव्हाच हे
करु. परमेश्वर देवाला अनुसरल्यामुळे हा देश आपल्याला
मिळाला आहे. त्याने आपल्याला स्वास्थ्यही दिले आहे.”
तेव्हा त्यांनी ते बांधले व यश मिळविले.

8आसाच्या सैन्यात यहूदाच्या वंशातील 3,00,000 जण
आणि बन्यामिन वंशातील 2,80,000 लोक होते. यहूदा
लोकांकडे मोठ्या ढाली अणि भाले होते. बन्यामिनाकडे
लहान ढाली होत्या. तसेच धनुष्य-बाण होते. हे सर्व पराक्रमी
आणि बलवान लढवय्ये होते.

9पुढे जेरहने आसावर स्वारी केली. जेरह हा कूशी
होता. त्याच्या कडे 1,000,000 सैनिक आणि 300 रथ
होते. जेरह आपल्या सैन्याला घेऊन थेट मारेशा नगरापर्यंत
आला. 10आसा त्याच्याशी सामना करायला निघाला.
मारेशा जवळच्या सफाथाच्या खोऱ्यात त्याने आपले सैन्य
उभे केले.

11आसा आपल्या परमेश्वर देवाला हाक मारुन म्हणाला,
“परमेश्वरा, या बलाढ्य सेनेपुढे आम्हा दुर्बलांना तूच मदत
करु शकतोस. तूच आमच्या मदतीला उभा राहा. आम्ही
तुझ्यावर भरवंसा ठेवून आहोत. तुझे नाव घेऊनच आम्ही
या विशाल सेनेला तोंड देणार आहोत. परमेश्वर देवा,
तुझ्यावर कोणी विजय मिळवू नये.” 12मग परमेश्वराने
आसाच्या यहूदा सेनेकडून कूशी सैन्याचा पराभव करवला.
कूशी सैन्याने पळ काढला. 13आसाच्या सैन्याने गरारपर्यंत
कुशींचा पाठलाग केला. त्यात कूशींची एवढी प्राणहानी

झाली की पुन्हा लढाईला उभे राहायचे बळ त्यांच्यात
राहिले नाही. परमेश्वरापुढे आणि त्याच्या सैन्यापुढे ते पार
धुळीस मिळाले. आसाच्या लोकांनी कूशींच्या मौल्यवान
वस्तू लुटल्या. 14गरारच्या आसपासच्या सर्व गावांचा
आसाच्या सैन्याने पराभव केला. तिथल्या लोकांनी
परमेश्वराची धास्ती घेतली. या गावांमध्ये लुटण्यासारखे
बरेच काही होते. ते आसाच्या सैन्याने घेतले. 15मेंढपाळांच्या
वस्त्यांवर आसाच्या सैन्याने धाड घातली. तेथून त्यांनी
बरीच मेंढरे आणि उंट घेतले आणि ते यरुशलेमला परतले.

## आसाने केलेले बदल

15 ओबेदचा मुलगा अजऱ्या याच्यात परमेश्वराच्या
आत्म्याचा संचार झाला. 2अजऱ्या आसाच्या
भेटीला गेला आणि म्हणाला, “आसा मी काय म्हणतो ते
ऐक. यहूदा आणि बन्यामिन लोकहो, तुम्हीही ऐका. जर
तुम्ही परमेश्वराबरोबर राहिलात तर तो तुमच्याबरोबर
राहील. जर तुम्ही त्याचा शोध केलात तर तो तुम्हाला
भेटेल. पण तुम्ही त्याला सोडलेत तर तो ही तुम्हाला
सोडेल. 3इस्राएलला दीर्घकाळ पर्यंत खरा देव असा नव्हता,
तसेच शिकवायला याजक किंवा नियमशास्त्र नव्हते 4पण
अडचणीत सापडल्यावर इस्राएल लोक पुन्हा परमेश्वर
देवाकडे वळाले, तो इस्राएलचा देव आहे. त्यांनी देवाचा
शोध घेतला आणि त्यांना तो सापडला.

5त्या धकाधकीच्या काळात कोणीही सुरक्षितपणे प्रवास
करू शकत नव्हता. सगव्व्याच देशामध्ये अराजकाची
स्थिती होती. 6देश असोत की नगरे सगळी एकमेकांविरुध्द
लढत होती. कारण परमेश्वराने सर्व प्रकारच्या संकटांनी
त्यांना त्रस्त केले होते. 7पण आसा, तू व इस्राएल लोकहो
तुम्ही हतबल होऊ नका, धीर सोडू नका. यहूदांनो
बन्यामिनांनो हिंमतीने वागा. तुमच्या सद्वर्तनाचे फळ
तुम्हाला मिळेल.”

8आसाला या शब्दांनी आणि ओबेद या संदेष्ट्याच्या
संदेशाने धीर आला. त्याने यहूदा आणि बन्यामिनमधील
अमंगल मूर्ती हटवल्या. एफ्राइमचा जो डोंगराळ प्रदेश
त्याने ताब्यात घेतला होता त्या प्रदेशातल्या गावांमधल्या
मूर्तीही काढून टाकल्या. मंदिराच्या प्रवेशद्वारातील
परमेश्वराच्या वेदीची डागडुजी केली.

9मग त्याने यहूदा आणि बन्यामिनमधील सर्व लोक
तसेच एफ्राइम, मनश्शे व शिमोन वंशातील जे लोक
इस्राएल राष्ट्रातून यहूदांत आले होते त्यांना एकत्र बोलावले.
आसाचा देव परमेश्वर याची त्याला साथ आहे हे पाहून
लोक मोठ्या संख्येने आले.

10आसाच्या कारकिर्दीच्या पंधराव्या वर्षाच्या तिसऱ्या
महिन्यात आसा आणि हे सर्व लोक यरुशलेममध्ये एकत्र
जमले. 11त्यांनी 700 गुरे, 7,000 मेंढरे यांचे बली
परमेश्वराला अर्पण केले. ही गुरे आणि लूट त्यांनी शत्रू
कडून आणली होती. 12तिथे त्यांनी जिवाभावाने परमेश्वर
देवाची सेवा करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या
पूर्वजांचाही देव हाच होता.

13जो परमेश्वर देवाची सेवा करणार नाही त्याला ठार
करण्याचे ठरवले. मग अशी व्यक्ती लहान असो की
मोठी, स्त्री असो की पुरुष 14आसा आणि हे सर्व लोक
यांनी परमेश्वरापुढे शपथ वाहिली. त्यांनी मोठ्याने जयघोष
केला. कर्णे आणि रणशिंगे या वाद्यांचा नाद केला.
15मनोभावे शपथ घेतल्यामुळे सर्व यहूदा लोकांना
मनापासून आनंद झाला. एकचित्ताने ते परमेश्वराला शरण
गेले. त्यांनी देवाचा शोध घेतला असता तो त्यांना सापडला
होता. परमेश्वराने त्यांना चहूबाजूंनी स्वास्थ्य दिले.

16आसा राजाने आपली आई माका हिलाही राजमाता
पदावरुन दूर केले. कारण तिने अमंगळ अशा अशेरा
देवीच्या स्तंभाची स्थापना केली होती. त्याने तो स्तंभ
मोडून तोडून टाकला आणि किद्रोन खोऱ्यात जाळून
टाकला. 17यहूदातील उच्च स्थाने त्याने काढून टाकली
नाहीत तरी पण तो आमरण परमेश्वराशी एकनिष्ठ राहिला.

18मग त्याने व त्याच्या वडलांनी परमेश्वरासाठी करवून
घेतलेल्या सोन्याचांदीच्या पवित्र वस्तू पुन्हा मंदिरात
आणल्या. 19आसाच्या पस्तिस वर्षांच्या कारकीर्दीत मग
पुन्हा युध्द झाले नाही.

## आसाची अखेरची वर्षे

16 आसाच्या राज्याच्या छत्तिसाव्या वर्षी बाशाने
यहूदावर स्वारी केली. बाशा हा इस्राएलचा राजा.
रामा हे नगर निवडून त्याने त्याची मजबुती केली. यहूदाचा
राजा आसा याच्याकडे कोणालाही येण्याजाण्याला प्रतिबंध
व्हावा हा त्याचा त्यामागचा हेतू होता.

2तेव्हा आसाने परमेश्वराच्या मंदिरातील आणि
राजमहालातील सोने आणि चांदी काढून घेतली. अरामचा
राजा बेन-हदाद दिमिष्काला राहात होता. आसाने
त्याच्याकडे सोने, आणि चांदी पाठवून त्याला निरोप
पाठवला,

3“आपण आपसात एक करार करु. आपल्या दोघांच्या
वडीलांमध्येही तसा करार केलेला होता. मी माझ्याकडचे
सोने-रुपे तुझ्याकडे पाठवत आहे. इस्राएलचा राजा बाशा
याच्याबरोबरचा तुझा करार मोड म्हणजे तो माझ्याकडे
पाठ फिरवेल आणि मला त्रस्त करणार नाही.”

4बेन-हदाद या गोष्टीशी सहमत झाला. त्याने इस्राएली
नगरांवर आपले सैन्याचे सरदार पाठवले. त्या सरदारांनी
ईयोन, दान आबेल मईम या नगरांवर हल्ला केला. कोठारे
असलेल्या नफतालीच्या नगरांवरही त्यांनी चढाई केली.
5या चढायांचे वृत्त बाशाच्या कानावर गेले. तेव्हा त्याने
रामानगराच्या मजबुतीचे काम अर्धवट सोडून दिले. 6राजा
आसाने मग सर्व यहूदींना बोलावले. या लोकांनी रामा
नगर बांधण्यासाठी वापरलेले दगड, लाकूड ही सामग्री
हस्तगत केली. त्यांनी ती गेबा आणि मिस्पा या नगरांच्या

बांधकामासाठी वापरली. 7यावेळी हनानी नावाचा द्रष्टा
यहूदाचा राजा आसा याच्याकडे आला व त्याला म्हणाला,
“आसा तू मदतीसाठी तुझ्या परमेश्वर देवावर भरवंसा न
ठेवता अरामच्या राजावर अवलंबून राहिलास. तू
परमेश्वराचे साहाय्य घ्यायला हवे होतेस. पण तू
परमेश्वराचा धावा केला नाहीस म्हणून अरामचे सैन्य
तुझ्या हातातून सुटून गेले आहे. 8कूशी आणि लुबी यांचे
सैन्य तर केवढे बलाढ्य होते! त्यांच्याकडे कितीतरी रथ
आणि स्वार होते. पण तेव्हा तू परमेश्वरावर भरवंसा
ठेवलास आणि परमेश्वराने तुला विजय मिळवून दिला.
9अखिल पृथ्वीवर कोणाची आपल्यावर श्रध्दा आहे याचा
शोध परमेश्वराची नजर सतत घेत असते व अशांना तो
आपले पाठबळ देतो. पण आसा, तू मात्र मूर्खपणा केला
आहेस. तेव्हा यापुढे तुला लढायांना तोंड द्यावे लागेल.
10हनानीच्या या बोलण्याचा आसाला राग आला व क्रोधाच्या
भरात त्याने हनानीला तुरूंगात डांबले. कधी कधी आसा
काही लोकांशी फार निर्दयतेने वागे.” 11‘यहूदा आणि
इस्राएल राजांचा इतिहास’ या पुस्तकात आसाच्या
कारभाराचे साद्यंत वर्णन आहे. 12आपल्या राज्याच्या
एकोणचाळीसाव्या वर्षी तो पायाच्या दुखण्याने बेजार झाला.
त्याचा आजार खूप बळावला तरी त्याने दुखण्यात
परमेश्वराचा धावा केला नाही. त्याने वैद्यांकरवी इलाज
करून घेतला. 13आपल्या कारकीर्दीच्या 41 व्या वर्षी तो
वारला व आपल्या पूर्वजांबरोबर त्याने चिरविश्रांती घेतली.
14दावीदनगरात त्याने आधीच स्वत:साठी करून घेतलेल्या
कबरीत लोकांनी त्याचे दफन केले. विविध सुवासिक
द्रव्ये आणि मसाले घातलेल्या बिछान्यावर लोकांनी त्याला
ठेवले. त्याच्या सन्मानार्थ सुगंधी द्रव्ये जाळली.*

## यहूदाचा राजा यहोशाफाट

17 आसाच्या जागी आता यहोशाफाट यहूदाचा राजा
झाला. यहोशाफाट हा आसाचा मुलगा. इस्राएलला
तोंड देता यावे म्हणून यहोशाफाटने यहूदाचे बळ वाढवले.
2त्याने यहूदाच्या सर्व तटबंदीच्या नगरांमध्ये सैन्याच्या
तुकड्या ठेवल्या. आसाने काबीज केलेल्या एफ्राइमच्या
नगरांमध्ये तसेच यहूदामध्ये त्याने ठाणी बसवली.

3यहोशाफाटला परमेश्वराचा पाठिंबा होता कारण लहान
वयातच त्याने आपले पूर्वज दावीद यांच्यासारखी सत्कृत्ये
केली होती. ते बाल देवतेच्या भजनी लागला नाही. 4आपल्या
पूर्वजांच्या देवालाच तो शरण गेला. परमेश्वराच्या आज्ञा
त्याने पाळल्या. इतर इस्राएल लोकांसारखा तो वागला
नाही. 5परमेश्वराने यहोशाफाटला यहूदाचा खंबीर राजा
केले. यहूदा लोकांनी यहोशाफाटसाठी नजराणे आणले
त्यामुळे त्याला धन तसेच मानसन्मान मिळाला.
6परमेश्वराच्या मार्गाने वाटचाल करण्यात यहोशाफाटचे
मन रमले. यहूदा प्रांतातील उच्च स्थाने आणि अशेरा
देवीचे खांब त्याने काढून टाकले.

7आपल्या राज्याच्या तिसऱ्या वर्षात त्याने सरदारांना
नगरांमधून लोकांना शिकवण द्यायला पाठवले.
बेन-हईक, ओबद्या, जखऱ्या, नखनेल आणि मीखाया हे
ते सरदार होत. 8त्यांच्याबरोबर शमाया, नथन्या, जबद्या,
असायेल, शामीरामोथ, यहोनाथान, अदोनीया, तोबीया
आणि तोब अदोनीया या लेवींचीही त्याने रवानगी केली.
अलीशामा व यहोराम हे याजकही त्याने पाठवले. 9हे
सरदार, लेवी आणि याजक या सर्वांनी लोकांना शिकवले.
परमेश्वराच्या नियमशास्त्राचे पुस्तक त्यांनी बरोबर घेतले
होते. यहूदातल्या गावोगावी जाऊन ते लोकांना शिकवत
गेले. 10यहूदाच्या आसपासच्या देशांनी परमेश्वराची धास्ती
घेतली होती. त्यामुळे त्यांनी यहोशाफाटवर स्वारी करून
युध्दाला तोंड फोडले नाही. 11काही पलिष्टे यहोशाफाटसाठी
भेटी आणत. या राजाचे वर्चस्व ते जाणून असल्यामुळे
रुपेही आणत. काही अरबी शेव्व्या-मेंढ्या घेऊन येत.
त्यांनी असे 7,700 मेंढे आणि 7,700 बोकड त्याला दिले.
12यहोशाफाटचे सामर्थ्य असे दिवसेंदिवस वाढत चालले.
त्याने यहूदात किल्ले आणि कोठारे बांधली. 13या
कोठारांच्या गावामध्ये त्याने भरपूर साठा केला.
यरुशलेममध्ये यहोशाफाटने चांगली लढाऊ माणसेही
ठेवली. 14आपापल्या घराण्यांप्रमाणे त्यांची गणती झालेली
होती. ती पुढीलप्रमाणे: यहूदातील सरदार असे: अदना हा
3,00,000 सैनिकांचा सेनापती होता. 15यहोहानानच्या
हाताखाली 280,000 सैनिक होते. 16जिख्रीचा मुलगा
अमस्या हा त्या खालोखाल 2,00,000 जणांचा मुख्य होता.
त्याने आपणहून परमेश्वराच्या सेवेला वाहून घेतले होते.
17बन्यामिनांच्या वंशातील सरदार असे: एल्यादाच्या
अखत्यारीत 2,00,000 सैनिक धनुष्यबाण आणि ढाली
वापरण्यात तरबेज होते. एल्यादा हा एक अतिशय शूर
योध्दा होता. 18यहोजाबादकडे युध्दसज्ज असे 1,80,000
जण होते. 19ही सर्व फौज राजा यहोशाफाट याच्या सेवेत
होती. या खेरीज यहूदाभरच्या नगरांमधील किल्ल्यांवर
त्याने माणसे नेमली होती.

## मीखायाचा राजा अहाबला इशारा

18 यहोशाफाटला भरपूर धनदौलत आणि
मानसन्मान मिळाला. राजा अहाबच्या घराण्याशी
सोयरीक जुळवून त्याने त्याच्याशी सलोखा केला.*
2त्यानंतर काही वर्षांनी यहोशाफाट शोमरोन येथे अहाबच्या

---

**त्याच्या … जाळली** सुवासिक द्रव्ये जाळली असा अर्थ “होऊ शकतो, तसेच लोकांनी त्याचे दहन केले” असाही अर्थ निघू शकतो.

**राजा अहाबच्या … सलोखा केला** यहोशाफाटचा मुलगा यहोराम याचे अहाबची मुलगी अथल्या हिच्याशी लग्न झाले. पाहा 2 इतिहास 21:6.

भेटीला गेला. त्याप्रसंगी यहोशाफाट आणि त्याच्याबरोबरचे
लोक यांच्याप्रीत्यर्थ अहाबने बरीच गाईगुरे आणि
शेव्व्यामेंढ्या यांचे बळी दिले. अहाबने यहोशाफाटला
रामोथ-गिलादावर चढाई करण्यास प्रवृत्त केले. 3अहाब
त्याला म्हणाला, “रामोथगिलादावरील स्वारीत तूही
माझ्याबरोबर सहभागी होशील का?” अहाब इस्राएलचा
राजा होता आणि यहोशाफाट यहूदाचा. यहोशाफाट त्याला
म्हणाला, “तू आणि मी काही वेगळे नाही. माझी माणसे
ती तुझीच माणसे. आम्ही अवश्य लढाईत भाग घेऊ.”
4यहोशाफाट पुढे असेही म्हणाला, “पण त्याआधी
परमेश्वराचा आदेशही घेऊ या.”

5तेव्हा राजा अहाबने सुमारे चारशे संदेष्ट्यांना बोलावून
विचारले, “आम्ही रामोथ-गिलादावर स्वारी करावी की
नाही?” तेव्हा ते संदेष्टे राजा अहाबला म्हणाले, “जरुर
जा. कारण परमेश्वर रामोथ-गिलादचा पराभव करील.”

6पण यहोशाफाट म्हणाला, “यांच्याखेरीज परमेश्वराचा
संदेष्टा इथे कोणी आहे का? परमेश्वराला त्याच्या
संदेष्ट्यामार्फतच आपण विचारायला हवे.”

7तेव्हा अहाब यहोशाफाटला म्हणाला, “इथे तसा एकजण
आहे. त्याच्या मार्फत आपण परमेश्वराला विचारु शकतो.
पण मला त्याच्याकडून कधीच अनुकूल संदेश मिळत
नाही. नेहमी प्रतिकूल संदेशच तो मला देतो, त्यामुळे मला
त्याचा द्वेष वाटतो. त्याचे नाव मीखाया. तो इम्लाचा मुलगा.”
पण यहोशाफाट म्हणाला, “अहाब, तू असे म्हणू नयेस.”

8तेव्हा अहाबने आपल्या एका कारभाऱ्याला बोलावून
“इम्लाचा मुलगा मीखाया याला लगेच घेऊन यायला
सांगितले.”

9इस्राएलचा राजा अहाब आणि यहूदाचा राजा यहोशाफाट
राजवस्त्रे परिधान करून शोमरोन नगराच्या वेशीजवळच्या
खव्व्यात आपापल्या सिंहासनांवर विराजमान झाले होते.
त्यांच्यासमोर ते चारशे संदेष्टे भविष्यकथन करत होते.
10कनानचा मुलगा सिदकीया याने लोखंडाची शिंगे करून
आणली होती. तो म्हणाला, “परमेश्वर म्हणतो ‘अरामी
लोकांना या शिंगांच्या सहाय्याने तुम्ही नेस्तनाबूत कराल.’”

11इतर सर्व संदेष्ट्यांनीही तेच सांगितले. ते म्हणाले,
“रामोथ-गिलाद वर चालून जा. तुम्ही विजयी व्हाल.
परमेश्वर तुझ्या हातून म्हणजे राजाच्या हातून अराम्यांचा
पराभव करील.”

12मीखायाला आणायला गेलेला निरोप्या त्याला
म्हणाला, “मीखाया, ऐक सगव्व्या संदेष्ट्यांचे म्हणणे एकच
आहे. राजाची सरशी होईल असे ते म्हणतात. तेव्हा तूही
तसेच म्हणावेस. तू ही चांगले उद्गार काढ.”

13पण मीखाया म्हणाला, “परमेश्वराची शपथ तो वदवेल
तसेच मी बोलणार.”

14मीखाया मग अहाब राजाकडे आला. राजा
त्याला म्हणाला, “मीखाया, आम्ही रामोथ-गिलादवर
स्वारी करावी की नाही?” मीखाया म्हणाला, “खुशाल
चढाई करा. परमेश्वर तुमच्या हातून त्यांचा पराभव
करवेल.”

15राजा अहाब मीखायाला म्हणाला, “परमेश्वराचे नाव
उच्चारुन सत्य तेच सांग असे मी कितीदा तुला निक्षून
सांगितले!”

16यावर मीखाया राजाला म्हणाला, “मेंढपाळाविना मेंढरे
असावीत तसे मी इस्राएल लोकांना डोंगरांवर विखुरलेले
पाहिले. परमेश्वर म्हणाला, ‘यांना कोणी शास्ता नाही. ही
आपापल्या घरी सुखरुप जावोत.’”

17इस्राएलचा राजा अहाब यहोशाफाटला म्हणाला,
“मीखाया मला कधीच परमेश्वराचा शुभसंदेश देत नाही.
तो नेहमी प्रतिकूलच बोलतो असे मी तुला म्हणालोच
होतो.”

18मीखाया म्हणाला, “परमेश्वराचा संदेश काय आहे
तो ऐका परमेश्वराला मी आपल्या सिंहासनावर बसलेले
पाहिले. स्वर्गातील सर्व सेना त्याच्या भोवताली उभी होती.
19परमेश्वर म्हणाला, ‘इस्राएलचा राजा अहाब याला
रामोथ-गिलादावर हल्ला करायला कोण बरे युक्तीने प्रवृत्त
करील? म्हणजे अहाबचा तिथच शेवट होईल.’
परमेश्वराभोवती उभ्या असलेल्या अनेक जणांनी
अनेकविध गोष्टी सुचवल्या.

20मग एक आत्मापुढे आला आणि परमेश्वरासमोर
उभा राहून म्हणाला, ‘मी अहाबला फशी पाडतो.’
परमेश्वराने त्या आत्म्याला विचारले, ‘कसे बरे?’ 21तेव्हा
तो म्हणाला, ‘अहाबच्या संदेष्ट्यांच्या तोंडून असत्य वदवणारा
आत्मा असे मी रुप घेईन.’ तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला,
‘तू अहाबला मोहात पाडू शकशील. चल, जा आपल्या
कामगिरीवर.’

22“अहाब, आता तूच पाहा. परमेश्वराने तुझ्या
संदेष्ट्यांच्या तोंडी असत्य बोलणाऱ्या आत्म्याचा संचार
केला आहे. तुझ्यावर अरिष्ट येणार असे परमेश्वराने
बोलून दाखवले आहे.”

23तेवढ्यात सिद्कीयाने पुढे होऊन मीखायाच्या थोबाडीत
मारले. सिद्कीया हा कनानचा मुलगा. तो म्हणाला,
“मीखाया, मला सोडून परमेश्वराचा आत्मा तुझ्याशी
बोलायला गेला तो कोणत्या दिशेने?” 24मीखाया म्हणाला,
“सिद्कीया, घराच्या अगदी आतल्या खोलीत तू लपायला
पळ काढशील तेव्हा तुला ते कळेल.”

25राजा अहाब म्हणाला, “मीखायाला नगराचा सुभेदार
आमोन आणि राजपुत्र योवाश यांच्याकडे घेऊन जा
26आमोन आणि योवाश यांना म्हणावे, ‘राजाचे म्हणणे
असे: मीखायाला कैदेत टाका. मी युध्दावरुन परतेपर्यंत
त्याला भाकर आणि पाणी याखेरीज काहीही
खायला-प्यायला देऊ नका.’”

27मीखाया म्हणाला, “अहाब तू लढाईनंतर सुखरुप परत
आलास तर परमेश्वर माझ्यामार्फत बोललेला नाही असे
खुशाल समज. लोकहो, माझे हे शब्द लक्षात ठेवा.”

## रामोथ-गिलाद येथे अहाबचे मरण

28इस्राएलचा राजा अहाब आणि यहूदाचा राजा
यहोशाफाट यांनी रामोथ-गिलादवर हल्ला चढवला.
29राजा अहाब यहोशाफाटला म्हणाला, "युध्दात मी वेषांतर
करतो. तू मात्र राजवस्त्रेच घाल." आणि त्याप्रमाणे राजा
अहाबने वेषांतर केले आणि दोनही राजे लढाईला भिडले.
30अरामच्या राजाने आपल्या रथांवरच्यासरदारांना
आज्ञा केली होती की, "इस्राएलचा राजा अहाब याच्यावरच
फक्त हल्ला करा. बाकी लहान थोर कोणाशीही लढू
नका." 31त्या सरदारांनी यहोशाफाटला पाहिले तेव्हा त्यांना
वाटले, "हाच अहाब इस्राएलचा राजा." म्हणून त्यांनी
यहोशाफाटकडे मोहरा वळवला. पण यहोशाफाट मोठ्याने
ओरडला आणि परमेश्वर त्याच्या मदतीला आला. त्याने
त्या सरदारांना यहोशाफाटपासून दूर वळवले. 32हा
इस्राएलचा राजा नाही असे सरदारांच्या लक्षात आले तेव्हा
त्यांनी त्याचा पाठलाग सोडून दिला.

33पण कोण्याएका सैनिकाने सहज म्हणून, लक्ष्य
निश्चित न करता, धनुष्यातून एक बाण सोडला आणि तो
नेमका चिलखताच्या सांध्यातून अहाबच्या शरीरात रुतला.
अहाब आपल्या सारथ्याला म्हणाला, "मागे वळ आणि
मला युध्द भूमीतून बाहेर काढ. मी जखमी झालो आहे."
34त्यादिवशी घनघोर युध्द झाले. अराम्यांकडे तोंड करून
अहाब आपल्या रथात संध्याकाळपर्यंत टेकून बसला.
संध्याकाळी त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

19 यहूदाचा राजा यहोशाफाट यरुशलेममध्ये आपल्या
घरी सुखरुप परतला. 2हनानीचा मुलगा येहू हा
द्रष्टा होता. तो यहोशाफाटला सामोरा गेला. येहू
यहोशाफाटला म्हणाला, "दुष्टांच्या मदतीला तू का गेलास?
परमेश्वराचा द्वेष करणाऱ्यांबद्दल तुला आपुलकी का
वाटावी? म्हणूनच परमेश्वराचा तुझ्यावर कोप झाला आहे.
3पण तू काही चांगल्या गोष्टीही केल्या आहेस. या देशातून
तू अशेराचे खांब हटवलेस आणि परमेश्वराला अनुसरायचे
तू मन:पूर्वक ठरवले आहेस."

## यहोशाफाट न्यायाधीशांची नेमणूक करतो

4यहोशाफाट यरुशलेममध्ये राहात असे, त्याने पुन्हा
एकदा बैर-शेब्यापासून एफ्राइमच्या डोंगराळ प्रदेशापर्यंत
फिरुन लोकांच्या भेटी घेतल्या. त्याने लोकांना पुन्हा एकदा
त्यांच्या पूर्वजांचा देव परमेश्वर याच्याकडे वळवले. 5तसेच
त्याने यहूदामध्ये आणि यहूदाच्या प्रत्येक तटबंदीच्या नगरांत
न्यायाधीश नेमले. 6यहोशाफाटने या न्यायाधीशांना
सांगितले, "तुम्ही जे करायचे ते विचारपूर्वक करा. कारण
लोकांसाठी नव्हे तर परमेश्वरासाठी तुम्ही न्याय करत
आहात. तुमच्या निर्णयाला त्याची साथ असेल. 7तुम्ही
सर्वांनी परमेश्वराचे भय बाळगावे. तुम्ही जे काही कराल
ते सांभाळून काळजीपूर्वक करा कारण आपला परमेश्वर
देव न्यायी आहे. लोकांच्या बाबतीत तो पक्षपाती नाही.'
आणि लाच घेऊन न्याय फिरवणे हे ही त्याच्या नीतीत
बसत नाही."

8यानंतर यहोशाफाटने यरुशलेममध्ये काही परमेश्वराचे
लेवी, याजक तसेच इस्राएल घराण्यांतील वडीलधारी मंडळी
यांना न्यायाधीश म्हणून नेमले. परमेश्वराच्या नियमांना
अनुसरुन त्यांनी यरुशलेममधल्या रहिवाश्यांच्या वादांचा
निकाल लावायचा होता. 9यहोशाफाटने त्यांना आज्ञापूर्वक
सांगितले की, "परमेश्वराचे भय धरून विश्वसनीय रितीने
आणि मन:पूर्वक ही सेवा करा. 10वध, कायदा, नियम,
आज्ञा, किंवा एखादा न्याय यासंबंधी तुमच्याकडे वाद येतील.
हे वाद नगरात राहणाऱ्या तुमच्या बांधवांकडूनच उपस्थित
केले जातील. अशा सर्व बाबतीत प्रत्येक वेळी लोकांना
सांगा की त्यांनी परमेश्वराविरुध्द पाप करु नये. हे तुम्ही
निष्ठेने पार पाडले नाहीत तर तुमच्यावर आणि या तुमच्या
भाऊबंदांवर परमेश्वराचा कोप ओढवेल. एवढे करा म्हणजे
तुमच्या मनात अपराधभाव राहणार नाही. 11अमऱ्या हा
मुख्य याजक आहे. परमेश्वराच्या बाबतीतल्या सर्व
गोष्टींमध्ये त्याचे वर्चस्व राहील आणि इश्माएलचा मुलगा
जबद्या, राजाच्या बाबतीतल्या सर्व गोष्टीविषयी मुखत्यार
म्हणून नेमलेला आहे. जबद्या हा यहूदा वंशाचा
अधिकारी आहे. लेवी हे लेखनिक कारभारी म्हणून
तुमच्या दिमतीला आहेत. जे जे कराल ते धैर्याने करा.
उचित तेच करणाऱ्यांना परमेश्वराची साथ असो."

## यहोशाफाटवर युध्दाचा प्रसंग

20 यानंतर मवाबी, अम्मोनी आणि काही
मऊनीलोक युध्दाच्या हेतूने यहोशाफाटवर
चालून आले. 2काही लोकांनी येऊन यहोशाफाटला खबर
दिली की, "मृतसमुद्राच्या पलीकडून अराम देशाकडून
मोठी सेना तुमच्यावर चाल करून येत आहे. ती
हससोन-तामार!" (म्हणजेच एन-गेदी येथे येऊन ठेपली
सुध्दा.) 3यहोशाफाट घाबरला आणि त्याने याबाबतीत
परमेश्वराला काय करावे विचारायचे ठरवले. त्याने
यहूदामध्ये सर्वांसाठी उपवासाची घोषणा केली. 4तेव्हा
यहूदातून, यहूदाच्या सर्व नगरांमधून लोक यहूदाच्या
साहाय्याची परमेश्वराकडे याचना करायला जमले.

5यहोशाफाट परमेश्वराच्या मंदिरात नवीन अंगणासमोर
होता. यहूदा आणि यरुशलेमच्या लोकांमध्ये तो उभा
राहिला. 6तो म्हणाला,

"आमच्या पूर्वजांच्या परमेश्वर देवा, स्वर्गातील परमेश्वर
तूच आहेस. सर्व राष्ट्रांमधल्या सर्व राज्यांचा तूच शास्ता
आहेस. सगळे सामर्थ्य आणि सत्ता तुझ्या ठायी आहे. कोणीही
तुझ्याविरुध्द जाऊ शकत नाही. 7तूच आमचा परमेश्वर
आहेस या प्रदेशातील रहिवाश्यांना तू हाकलून लावलेस.
तुझ्या या इस्राएलांदेखतच तू हे केलेस. तुझा मित्र अब्राहाम
याच्या वंशजांना तू ही भूमी कायमची बहाल केलीस.
8अब्राहामाचे वंशज या प्रदेशात राहिले आणि तुझ्या

नावाखातर त्यांनी मंदिर बांधले. 9ते म्हणाले, ‘तलवार,
शासन, रोगराई किंवा दुष्काळ यांच्यारुपाने आमच्यावर
अरिष्ट कोसळले असता आम्ही या मंदिरासमोर, आणि
तुझ्यापुढे उभे राहू. या मंदिराला तुझे नाव दिले आहे.
संकटाच्या वेळी आम्ही तुझा मोठ्याने धावा करु. आमची
हाक ऐकून तू आम्हाला सोडव.’

10“पण यावेळी अम्मोन, मवाब आणि सेइर पर्वत या
भागातले हे लोक आहेत. इस्राएल लोक मिसरहून आले
तेव्हा इस्राएल लोकांना तू त्यांच्या प्रदेशात प्रवेश करु
दिला नाहीस. त्यामुळे इस्राएल लोकांनी तिकडे पाठ
फिरवली आणि त्यांचे उच्चाटन केले नाही. 11पण तेव्हाच
त्यांचा नायनाट न केल्याचे हे काय फळ मिळाले पाहा, ते
आम्हाला आमच्या प्रदेशातून हुसकावून लावायला निघाले
आहेत. हा प्रदेश तू आम्हाला बहाल केला आहेस.

12“देवा, या लोकांना चांगले शासन कर. आमच्यावर
चाल करून येणाऱ्या या भल्या थोरल्या सेनेला तोंड
द्यायचे सामर्थ्य आमच्यात नाही. आम्हाला काही सुचेनासे
झाले आहे. म्हणून आम्ही मदतीसाठी तुझ्याकडे आलो
आहोत.”

13यहूदातील सर्व मंडळी आपल्या बायका आणि तान्ह्या
मुलांसकट सर्व मुलाबाळांना घेऊन परमेश्वरासमोर उभी
होती. 14तेव्हा यहजीएल याच्यात परमेश्वराच्या आत्म्याचा
संचार झाला. यहजीएल हा जखऱ्याचा मुलगा. जखऱ्या
बनायाचा मुलगा. बनाया यईएलचा मुलगा. आणि यईएल
मत्तन्याचा मुलगा. यहजीएल लेवी असून आसाफच्या
वंशातला होता. या सभेत 15यहजीएल म्हणाला, “राजा
यहोशाफाट, तसेच यहूदा आणि यरुशलेममधील
रहिवाश्यांनो, मी काय म्हणतो ते ऐका. परमेश्वराचा
संदेश असा आहे. ‘एवढी मोठी सेना पाहून घाबरुन जाऊ
नका किंवा काळजी करु नका. हे युध्द तुमचे नव्हे तर
परमेश्वराचे युध्द आहे. 16उद्या त्यांचा सामना करायला
जा आणि लढा. ते सीसच्या खिंडीतून वर येत आहेत.
दरीच्या टोकाला यरुएल वाळवंटाच्या दुसऱ्या बाजूला तुमची
त्यांच्याशी गाठ पडेल.

17तुम्हाला या लढाईत लढावे असे लागणारच नाही.
आपल्या जागी ठाम उभे राहा. परमेश्वराने तुमचे रक्षण
केलेले तुम्हाला आढळून येईल. यहूदा आणि यरुशलेम
लोक हो, भिऊ नका, चिंता करु नका. परमेश्वर तुमच्या
बरोबर आहे. तेव्हा उद्या त्यांच्यावर चालून जा.’”

18यहोशाफाटने मस्तक भूमीपर्यंत लववले. यहूदा आणि
यरुशलेममधील सर्व लोक यांनी परमेश्वरापुढे दंडवत
घातले. त्या सर्वांनी परमेश्वराची आराधना केली. 19कहाथ
आणि कोरह या घराण्यांतील लेवी इस्राएलच्या परमेश्वर
देवाची भजने म्हणण्यास उभे राहिले. उच्च स्वरात त्यांनी
परमेश्वराची भजने म्हटली. 20यहोशाफाटचे सैन्य
भल्यासकाळी तकोवाच्या वाळवंटात गेले. ते निघत
असताना यहोशाफाट समोर उभा राहून त्यांना म्हणाला,
“यहूदा आणि यरुशलेम नगरांमधील लोकहो, ऐका.
आपल्या परमेश्वर देवावर श्रध्दा ठेवा आणि खंबीरपणे
उभे राहा. परमेश्वराच्या संदेष्ट्यांवर विश्वास ठेवा. जय
तुमचाच आहे.”

21यहोशाफाटने लोकांना प्रोत्साहन दिले व सुचना दिल्या.
परमेश्वराचे स्तवन करणारी माणसे त्याने निवडली.
परमेश्वर पवित्र आणि कल्याणकारी आहे म्हणून त्याचे
स्तवन करण्यासाठी त्याने या गायकांना नेमले. त्यानी
सैन्यासमोर उभे राहून स्तुतिगीते म्हटली. ते म्हणाले,
“परमेश्वराचे स्तवन करा कारण त्याची प्रीति सर्वकाळ
आहे.” 22लोकांनी देवाची स्तुतिगीते म्हणण्यास सुरुवात
केल्याबरोबर परमेश्वराने चाल करून आलेल्या अम्मोनी,
मवाबी आणि सेइर पर्वतांतील लोकांशी गनिमी काव्याने
लढणारी फौज मोक्याच्या जागी बसवली. 23अम्मोनी आणि
मवाबी लोक सेइर पर्वतातल्या लोकांशी लढू लागले.
अम्मोन्यांनी आणि मवाब्यांनी त्यांचा पुरता संहार केला.
सेइरातल्या लोकांचा बीमोड केल्यानंतर त्यांनी एकमेकांचा
नाश केला.

24यहूदा लोक वाळवंटातील टेहळणीच्या बुरुजापाशी
आले. शत्रूचे विशाल सैन्य कुठे दिसते का हे ते पाहू
लागले पण त्यांना फक्त जमिनीवर विखुरलेले मृतदेह
तेवढे दिसले. कोणीही जिवंत राहिला नव्हता. 25यहोशाफाट
आणि त्याचे सैन्य लुटीसाठी मृतदेहांपाशी आले. त्यात
त्यांना खूप गुरेढोरे, धन, कपडेलत्ता आणि मौल्यवान
वस्तू मिळाल्या. त्या त्यांनी स्वत:ला घेतल्या. लूट एवढी
होती की ती यहोशाफाट आणि त्याचे लोक यांना नेता
येईना. ती प्रेतांमधून काढून न्यायला त्यांना तीन दिवस
लागले.

26चौथ्या दिवशी यहोशाफाट आणि त्याचे सैन्य बराखच्या
खोऱ्यात जमले. याठिकाणी त्यांनी परमेश्वरला, धन्यवाद
दिले. म्हणून आजही या खोऱ्याचे नाव “आशीर्वादाचे
खोरे” असे आहे.

27मग यहोशाफाटने समस्त यहूदा आणि यरुशलेम
लोकांना यरुशलेम येथे माघारे नेले. परमेश्वराने त्यांच्या
शत्रूचा पाडाव केल्यामुळे त्यांच्यात आनंदीआनंद पसरला
होता. 28यरुशलेमला येऊन ते सतारी, वीणा व कर्णे घेऊन
परमेश्वराच्या मंदिरात गेले. 29परमेश्वराने इस्राएलच्या
शत्रु सैन्याशी लढा दिला हे ऐकून सर्व देशांमधल्या सर्व
राज्यांमध्ये परमेश्वराविषयी धाक निर्माण झाला. 30त्यामुळे
यहोशाफाटच्या राज्यात शांतता नांदली. देवाने
यहोशाफाटला सर्व बाजूंनी स्वास्थ्य दिले.

## यहोशाफाटच्या कारकीर्दीचा अस्त

31यहोशाफाटने यहूदा देशावर राज्य केले. राज्यावर
आला तेव्हा तो पस्तीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेमवर
पंचवीस वर्षे राज्य केले. यहोशाफाटच्या आईचे नाव अजूबा
ही शिल्हीची मुलगी. 32आपले वडील आसा यांच्याप्रमाणेच

यहोशाफाट योग्य मार्गाने वागला. तो मार्ग त्याने सोडला
नाही. परमेश्वराच्या दृष्टीने भले तेच यहोशाफाटने केले.
33पण उच्चस्थाने काढण्यात आली नव्हती. लोकांनीही
आपले मन आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराकडे वळवले
नव्हते.

34"हनानीचा पुत्र येहू याच्या बखरीमध्ये यहोशाफाटच्या
बाकीच्या कृत्यांची साद्यंत नोंद आहे. 'इस्राएलच्या राजांचा
इतिहास' या ग्रंथातही या गोष्टींचा समावेश करून त्यांची
नोंद केली आहे. 35इस्राएलचा राजा अहज्या याच्याशी पुढे
यहूदाचा राजा यहोशाफाट याने करार केला. यहोशाफाट
ने हे वाईट केले.

36तार्शीश नगराला जायच्या गलबतांबद्दल हा करार
होता. एसयोन-गेबर येथे त्यांनी या गलबतांची बांधणी केली.
37पुढे अलियेजर ने यहोशाफाटविरुध्द भविष्य सांगितले.
मारेशा नगरातला दोदावाहू याचा अलियेजर हा मुलगा.
तो म्हणाला, "यहोशाफाट, तू अहज्याशी हातमिळवणी
केलीस म्हणून परमेश्वर तुझ्या कामांचा विध्वंस करील."
आणि जहाजे फुटली. त्यामुळे यहोशाफाट आणि अहज्या
यांना ती तार्शीशला पाठवता आली नाहीत.

21 पुढे यहोशाफाट वारला. त्याचे त्याच्या पूर्वजांजवळ
दफन केले. दावीद नगरात त्याला पुरले.
यहोशाफाटच्या जागी त्याचा मुलगा यहोराम गादीवर बसला.
2अजऱ्या, यहीएल, जखऱ्या, अजऱ्या, मीखाएल व शफट्या
हे यहोरामचे भाऊ, व यहोशाफाटचे मुलगे. यहोशाफाट
हा यहूदाचा राजा होता. 3यहोशाफाटने आपल्या मुलांना
यहूदातील तटबंदीच्या नगरांखेरीज सोन्या-रुप्याच्या आणि
अन्य किंमती वस्तू भेटीदाखल दिल्या. यहोराम मात्र ज्येष्ठ
पुत्र असल्यामुळे त्याला त्याने राज्य दिले.

## यहूदाचा राजा यहोराम

4यहोराम आपल्या वडीलांच्या जागी गादीवर आला आणि
सत्ताधीश बनला. त्याने आपल्या सर्व भावांचा तसेच
इस्राएलमधील काही वडीलधाऱ्यांचा तलवारीने वध केला.
5वयाच्या बत्तिसाव्या वर्षी सत्तेवर येऊन यहोरामने
यरुशलेममध्ये आठ वर्षे राज्य केले. 6अहाबच्या
घराण्याप्रमाणे, इस्राएलच्या राजांच्या राहणीला अनुसरुनच
याचे वागणे होते. कारण अहाबाच्या मुलीशी यहोरामने
लग्न केले होते. परमेश्वराच्या दृष्टीने वाईट अशा गोष्टी
त्याने केल्या. 7पण परमेश्वराने दावीदाला वचन दिलेले
असल्यामुळे परमेश्वर दावीदाच्या घराण्याचे उच्चाटन करु
शकत नव्हता. दावीदाच्या वंशाचा दिवा सतत तेवत राहील
असा परमेश्वराने दावीदाशी करार केला होता.

8यहोरामच्या कारकीर्दीत अदोमने यहूदाच्या सत्तेविरुध्द
बंड पुकारले. अदोमच्या लोकांनी स्वत: आपला राजा
निवडला. 9तेव्हा आपले सर्व सेनापती आणि रथ यांच्यासह
यहोराम अदोमवर चाल करून गेला. अदोमी सैन्याने
त्यांना वेढा घातला. पण यहोरामने रात्रीची वेळ साधून
त्यांच्यावर प्रतिहल्ला केला. 10तेव्हा पासून आजतागायत
अदोमची यहूदाशी बंडखोरी चालू राहिली आहे. लिब्ना
नगरातील लोकांनीही यहोरामची सत्ता झुगारली. यहोरामने
आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याचा त्याग केल्यामुळे
असे झाले. 11यहोरामने यहूदातील पहाडांवर प्रार्थनेसाठी
उच्चस्थाने बांधली. असे करण्याने, परमेश्वराला लोकांनी
जसे वागावे असे वाटत होते त्यात खंड पडला. यहोरामने
यहूदा लोकांना परमेश्वरापासून दूर नेले.

12एलीया या संदेष्ट्याकडून यहोरामला असा संदेश आला:
"परमेश्वर देवाने असे सांगितले आहे. तुझे पूर्वज दावीद
यांचा हा परमेश्वर आहे, परमेश्वर म्हणतो, 'यहोराम,
तुझे आचरण आपले वडील यहोशाफाट यांच्या सारखे
नाही. यहूदाचा राजा आसा याच्यासारखे तुझे वर्तन नाही.
13उलट तू इस्राएलच्या राजांचा कित्ता गिरवला आहेस.
यहूदा आणि यरुशलेममधील लोकांना तू परमेश्वराच्या
इच्छेविरुध्द वागायला लावले आहेस. अहाब आणि त्याचे
घराणे यांनी हेच केले. ते परमेश्वराशी एकनिष्ठ राहिले
नाहीत. तू स्वत:च्या भावांची हत्या केलीस. ते तुझ्यापेक्षा
वर्तणुकीने चांगले होते. 14तेव्हा परमेश्वर आता तुझ्या
लोकांना जबर शासन करणार आहे. तुझी मुले, बायका,
मालमत्ता यांना परमेश्वर शिक्षा करणार आहे. 15तुला
आतड्यांचा भयंकर आजार होईल आणि तो दिवसे दिवस
बळावेल. त्यात तुझी आतडी बाहेर पडतील.'"

16कूशी लोकांच्या शेजारचे अरब आणि पलिष्टी लोक
यांना परमेश्वराने यहोरामविरुध्द भडकावले. 17या
लोकांनी यहूदावर स्वारी केली आणि त्यांनी राजाच्या
महालातली सगळी घनदौलत लुटून नेली. यहोरामच्या
बायकामुलांनाही त्यानी पळवले. फक्त यहोआहाज हा
सगळ्यात धाकटा मुलगा तेवढा बचावला.

18या सगळ्या घडामोडींनंतर परमेश्वराने यहोरामला
आतड्यांच्या असाध्य अशा रोगाने आजारी केले. 19त्या
आजारात दोन वर्षांनी त्याची आतडी बाहेर आली. असह्य
वेदना होऊन तो मरण पावला. लोकांनी त्याच्या वडलांच्या
सन्मानार्थ जसा मोठा अग्नी पेटवला होता तसा यहोरामच्या
सन्मानार्थ पेटवला नाही. 20यहोराम सत्तेवर आला तेव्हा
बत्तीस वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये आठ वर्षे राज्य
केले. त्याच्या मृत्यूचे कोणालाही दु:ख झाले नाही. लोकांनी
दावीदनगरातच त्याचे दफन केले, पण राजासाठी असलेल्या
कबरीत नव्हे.

## यहूदाचा राजा अहज्या

22 यहोरामच्या जागी यरुशलेमच्या लोकांनी
यहोरामचा सर्वांत धाकटा मुलगा अहज्या याला
राजा केले. यहोरामच्या छावणीवर हल्ला करायला
आलेल्या अरबांबरोबर जे लोक आले होते त्यांनी

यहोरामच्या इतर सर्व थोरल्या मुलांना मारून टाकल्यामुळे
यहूदात अहज्या राज्य करु लागला. 2त्यावेळी तो बावीस
वर्षांचा होता. त्याने यरुशलेमवर एक वर्ष राज्य केले.
त्याच्या आईचे नाव अथल्या. तिच्या वडलांचे नाव अम्री.
3अहज्याची वागणूकही अहाबच्या घराण्याप्रमाणेच होती.
कारण अहज्याच्या आईने त्याला दुराचरण करण्यास प्रवृत्त
केले. 4अहाबच्या कुटुंबियांनी केले तसेच, परमेश्वराला
मान्य नसलेले पापाचरण अहज्याने केले. अहज्याच्या
वडलांच्या मृत्यूनंतर अहाबच्या घराण्याने त्याला सल्ला
द्यायला सुरूवात केली. त्याचे हे सल्ले अहज्याच्या भल्याचे
नव्हते. बदसल्ल्यामुळेच त्याचा मृत्यू ओढवला. 5अहाब
कुटुंबाच्या मसलतीनुसार अहज्या राजा योरामच्या बरोबर
अरामचा राजा हजाएल याच्याशी लढण्यास रामोथ-गिलाद
येथे गेला. योराम हा इस्राएलचा राजा अहाब याचा मुलगा.
योराम या लढाईत अराम्यांकडून जायबंदी झाला. 6तेव्हा
तो दुखण्याला उतार पडावा यासाठी इज्रेल येथे परतला.
रामोथ येथे अरामचा राजा हजाएल याच्याशी लढताना तो
घायाळ झाला होता. योरामला भेटायला म्हणून अहज्या
इज्रेल येथे गेला. यहूदाचा राजा यहोराम याचा अहज्या हा
मुलगा. योरामच्या वडलांचे नाव अहाब. दुखापतीमुळे तो
इज्रेला आला होता.

7अहज्या (किंवा यहोआहाज) योरामला भेटायला
आलेला असतांना परमेश्वराने अहज्याला मृत्युमुखी
धाडले. त्याचे असे झाले की आल्याबरोबर अहज्या
योरामबरोबर निमशीचा मुलगा येहू याला भेटायला गेला.
अहाबच्या घराण्याच्या नाशासाठी परमेश्वराने येहूची
योजना केली होती. 8अहाबच्या घराण्याला शासन
करीत असता येहूला यहूदाचे सरदार आणि अहज्याच्या
सेवेत असलेले अहज्याचे आप्त आढळले. त्या सरदारांना
आणि आप्तांना येहूने ठार केले. 9यानंतर येहूने अहज्याचा
शोध घेतला. येहूच्या माणसांनी त्याला तो शोमरोनमध्ये
लपायच्या प्रयत्नात असताना पकडले. अहज्याला त्यांनी
येहूसमोर हजर केले, नंतर त्यांनी त्याला ठार केले आणि
त्यांनी त्याचे दफन केले. ते म्हणाले, “अहज्या हा
यहोशाफाटचा वारस. यहोशाफाट जिवाभावाने
परमेश्वराला शरण गेला होता.” यहूदाचे राज्य
सांभाळण्याइतके अहज्याचे घराणे समर्थ राहिले नव्हते.

## राणी अथल्या

10अथल्या ही अहज्याची आई. तिने आपला मुलगा
मरण पावला आहे हे पाहिल्यावर यहूदाच्या सर्व राजवंशाचा
संहार केला. 11पण यहोशबाथ हिने अहज्याचा मुलगा
योवाश याला लपवले. योवाश आणि त्याची दाई यांना
तिने आतल्या शयनगृहात ठेवले. यहोशबाथ ही राजा
यहोरामची मुलगी आणि यहोयादा या याजकाची पत्नी.
अहज्या तिचा भाऊ यहोशबाथने योवाशला लपवल्यामुळे
अथल्या त्याला मारू शकली नाही. 12परमेश्वराच्या
मंदिरात त्याला याजकांच्या सहवासात सहा वर्षे लपवून
ठेवले होते. या काळात अथल्याने राणी म्हणून अंमल
चालवला.

## संदेष्टा यहोयादा आणि राजा योवाश

23 यहोयादाने सहा वर्षांनंतर आपले सामर्थ्य
दाखवले. त्याने यरोहामचा मुलगा अजऱ्या
यहोहानानचा मुलगा इश्माएल, ओबेदचा मुलगा अजऱ्या,
अदायाचा मुलगा मासेया आणि जिक्रीचा मुलगा
अलीशाफाट या मुख्य अधिकाऱ्यांशी करार केला. 2त्यांनी
यहूदाभर फिरुन यहूदात विखुरलेल्या लेवींना आणि
इस्राएलच्या कुलप्रमुखांना एकत्र आणले. मग ते सर्व
यरुशलेम येथे गेले. 3तेथे देवाच्या मंदिरात सर्व समुदायाने
राजाशी करार केला.

यहोयादा या लोकांना म्हणाला, “परमेश्वर दावीदाच्या
संततीविषयी जे बोलला आहे त्याला अनुसरुन राजाचा
मुलगा गादीवर येईल. 4आता तुम्ही करायचे ते असे:
तुमच्यापैकी जे एक तृतीयांश याजक आणि लेवी
शब्बाथच्या दिवशी कामाला येतात त्यांनी मंदिरावर पहारा
करावा. 5एकतृतीयांश लोकांनी राजमहालावर पहारा
करावा, आणि उरलेल्या एकतृतीयांश लोकांनी वेशीपाशी
असावे. यांच्याखेरीज बाकी सर्व लोकांनी परमेश्वराच्या
मंदिराच्या आवारात राहावे. 6कोणालाही परमेश्वराच्या
मंदिरात येऊ देऊ नये. सेवा करणारे याजक आणि लेवी
यांनाच काय ते परमेश्वराच्या मंदिराच्या आत येता येईल
कारण ते शुचिर्भूत असतात. पण इतरांनी परमेश्वराने
नेमून दिलेली आपापली कामे करायची आहेत. 7लेवींनी
राजाच्या निकट राहायचे. प्रत्येकाजवळ आपली तलवार
सज्ज असावी. कोणी मंदिरात घुसायचा प्रयत्न केल्यास
त्याला ठार करावे. सर्वांनी राजाची सावलीसारखी सोबत
करावी.”

8लेवी आणि यहूदा या सर्व लोकांनी यहोयादा या याजकाने
ज्या आज्ञा केल्या त्या सर्वांचे पालन केले. यहोयादाने
याजकांपैकी कोणाचीही गय केली नाही. त्यामुळे
शब्बाथच्या दिवशी आळीपाळीने आत येणाऱ्या व
कामावरुन बाहेर जाणाऱ्या सर्वांची व्यवस्था केली. 9दावीद
राजाचे भाले, छोट्या ढाली आणि मोठ्या ढाली ही शस्त्रे
देवाच्या मंदिरामध्ये ठेवलेली होती. यहोयादा याजकाने
शंभर सैनिकांच्या तुकड्यांच्या प्रमुखांना त्या दिल्या. 10आणि
त्यांनी कुठे, कसे उभे राहायचे ते सांगितले. प्रत्येकाजवळ
आपापले शस्त्र होते. मंदिराच्या थेट उजव्या कोपऱ्यापासून
डाव्या बाजूपर्यंत ही शस्त्रधारी माणसे उभी राहिली. वेदी,
मंदिर आणि राजा यांच्याजवळ ती उभी होतीच. 11मग
त्यांनी राजपुत्राला बाहेर आणले आणि त्याच्या मस्तकावर
मुगुट चढवला. त्याच्या हाती आज्ञापट दिला. योवाशला
त्यांनी राजा केले. यहोयादा आणि त्याची मुले यांनी त्याला

अभिषेक केला. “राजा चिरायु होवो” असे ते सर्वजण
म्हणाले.
12मंदिराकडे लगबगीने जाणाऱ्या लोकांचा गलका आणि
राजाचा जयजयकार अथल्याने ऐकला. तेव्हा ती मंदिरात
लोकांकडे आली. 13पाहते तो तिला राजा दिसला.
प्रवेशद्वाराशी तो राजस्तंभाजवळ उभा होता. कर्णे वाजवणारे
कारभारी आणि लोक राजा जवळ उभे होते. देशभरचे
लोक कर्णे वाजवून आनंद व्यक्त करत होते. गाणारे वाद्ये
वाजवत होते आणि त्यांनी म्हटलेल्या स्तवनगीतापाठोपाठ
लोक म्हणत होते. तेव्हा आपली तीव्र नापसंती
दाखवण्यासाठी अथल्याने आपले कपडे फाडले आणि
“फितुरी, फितुरी” असे ती ओरडली.
14याजक यहोयादा याने सेनापतींना पुढे आणले. त्यांना
तो म्हणाला, “तिला सैन्याच्या रांगांमधून बाहेर काढा.
तिच्या मागे जो जाईल त्याला तलवारीने मारून टाका.”
मग याजकाने सैन्याला आज्ञा दिली, “परमेश्वराच्या मंदिरात
अथल्याचा वध करु नका.” 15राजमहालाच्या
घोडावेशीजवळ अथल्या पोचताच सैनिकांनी तिला पकडले
आणि त्याठिकाणी तिला जिवे मारले.
16यहोयादाने मग सर्व लोक आणि राजा यांच्याबरोबर
एक करार केला. आपण सर्व परमेश्वराचे लोक आहोत
असा तो करार होता. 17मग सर्वजण बआल देवतेच्या
मंदिरात गेले आणि त्या मूर्तीची त्यांनी नासधूस केली.
तिथल्या इतर मूर्ती आणि वेदीदेखील मोडून तोडून टाकल्या.
बआलच्या वेदीपुढेच त्यांनी बआलचा याजक मत्तान याला
ठार केले. 18यहोयादाने मग परमेश्वराच्या मंदिरातील
याजकांची नेमणूक केली. हे याजक लेवी होते आणि
दावीदाने त्यांना मंदिराचे मुखत्यारपद दिले होते. मोशेच्या
नियमशास्त्राप्रमाणे परमेश्वराला होमबली अर्पण करणे,
हे त्यांचे काम होते. दावीदाच्या आज्ञेनुसार आनंदाने गायन
करत त्यांनी होमबली अर्पण केले. 19सर्वार्थाने
शुध्द-शुचिर्भूत होऊनच मंदिरात यावे, तसे नसणाऱ्याना
अडवले जावे म्हणून यहोयादाने परमेश्वराच्या मंदिराच्या
प्रवेशद्वाराशीच द्वारपाल नेमले.
20सर्व सैन्याधिकारी, लोकनायक, सरदार आणि सर्व
प्रजा यांना यहोयादाने आपल्याबरोबर घेतले. मग त्याने
राजाला परमेश्वराच्या मंदिराबाहेर काढले. तिथून वरच्या
वेशीतून ते राजमहालात पोचले. तेथे त्यांनी राजाला
सिंहासनावर बसवले. 21अथल्याचा तलवारीने वध झाला
त्या नंतर यहूदा लोकांमध्ये आनंदी आनंद पसरला आणि
यरुशलेम नगर शांत झाले.

## योवाशकडून मंदिराची पुनर्बांधणी

24 योवाश राजा झाला तेव्हा सात वर्षांचा होता.
त्याने यरुशलेममध्ये चाळीस वर्षे राज्य केले.
त्याच्या आईचे नाव सिब्या. ही बैर–शेबा नगरातली होती.
2यहोयादा हयात असेपर्यंत योवाशची वागणूक
परमेश्वराच्या दृष्टीने उचित अशी होती. 3यहोयादाने
योवाशला दोन बायका करून दिल्या. त्याला मुले बाळे
झाली.
4पुढे योवाशने परमेश्वराच्या मंदिराची पुन्हा उभारणी
करण्याचे ठरवले. 5तेव्हा त्याने याजक आणि लेवी यांना
बोलवून घेतले आणि त्यांना तो म्हणाला, “यहूदामधील
सर्व गावांमध्ये जा आणि इस्राएल लोकांकडून वार्षिक
कर गोळा करा. त्या पैशातून देवाच्या मंदिराच्या दुरुस्तीचे
काम हाती घ्या. या कामाला विलंब लावू नका.” पण
लेवींनी याबाबतीत तत्परता दाखवली नाही.
6तेव्हा राजा योवाशने मुख्य याजक यहोयादा याला
बोलावून घेतले आणि विचारले की, “लेवींना तू यहूदा
आणि यरुशलेममधून कर गोळा करायला का लावले
नाहीस? परमेश्वराचा सेवक मोशे आणि इस्राएली लोक
यांनी हा कर पवित्र सभामंडपासाठी म्हणून वापरलेला
आहे.”
7पूर्वी अथल्याच्या मुलांनी देवाच्या मंदिरात घुसून
तिथल्या पवित्र वस्तू बाल दैवतांच्या पूजेसाठी वापरल्या
होत्या. अथल्या ही एक दुष्ट बाई होती.
8राजा योवाशच्या आज्ञेवरुन एक पेटी तयार करून ती
परमेश्वराच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराशी ठेवण्यात आली.
9लेवींनी मग यहूदा यरुशलेममध्ये दवंडी पिटली.
परमेश्वरासाठी बसवलेला कर भरायला त्यांनी लोकांना
सांगितले. इस्राएल लोक वाळवंटात असताना परमेश्वराचा
सेवक मोशे याने तो इस्राएल लोकांवर बसवला होता.
10तेव्हा अधिकाऱ्यांनी आणि लोकांनी मोठ्या आनंदाने
कर आणून पेटीत जमा केला. पेटी भरेपर्यंत ते पैसे देत
गेले.
11लेवी पेटी भरली की राजाच्या कारभाऱ्यांकडे जमा
करत. पैशाने भरलेली ती पेटी पाहून राजाचे सचिव आणि
मुख्य याजकाचा कारभारी येऊन त्यातले पैसे काढून
घेत. पेटी पुन्हा पहिल्या जागी नेऊन ठेवली जाई. असे
अनेकदा होऊन मुबलक पैसा जमा झाला. 12राजा योवाश
आणि यहोयादा यांनी मग ही रक्कम परमेश्वराच्या मंदिराचे
काम करणाऱ्यांच्या हवाली केली. या लोकांनी
परमेश्वराच्या मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी कसबी सुतार,
कोरीव काम करणारे, लोखंड पितळ या धातूंमध्ये काम
करणारे कारागीर यांना मजुरीवर कामाला घेतले.
13या कामावर देखरेख करणारे लोक अतिशय विश्वासू
होते. परमेश्वराच्या मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम पूर्ण
झाले. देवाचे मंदिर पुन्हा पूर्वीसारखेच नीटनेटके आणि
पहिल्यापेक्षा भक्कम झाले. 14कारागिरांचे काम
आटोपल्यावर उरलेली रक्कम त्यांनी योवाश आणि
यहोयादा यांना आणून दिली. त्या पैशातून परमेश्वराच्या
मंदिरातील सेवेची उपकारणे आणि होमबलीसाठी
वापरायची पात्रे बनविण्यात आली. त्यानी याशिवाय
सोन्यारुप्याचे कटोरे व इतर पात्रे केली. या परमेश्वराच्या

मंदिरात यहोयादाचे आयुष्य असे तोवर याजक दररोज
होमबली अर्पण करत असत.

15पुढे यहोयादा वयोवृध्द झाला. तो दीर्घायुषी होऊन
वारला. मृत्युसमयी त्याचे वय 130 वर्षे इतके होते.
16दावीदनगरात इतर राजांच्या कबरी शेजारीच त्याचे
लोकांनी दफन केले. देवासाठी आणि त्याच्या मंदिरासाठी
त्याने इस्राएलमध्ये बऱ्याच चांगल्या गोष्टी आपल्या हयातीत
केल्या म्हणून लोकांनी त्याचे या ठिकाणी दफन केले.

17यहोयादा मरण पावल्यावर यहूदाच्या सरदारांनी राजा
योवाशला येऊन मुजरा केला. राजाने त्यांचे ऐकून घेतले.
18पुढे राजा आणि हे सरदार यांनी परमेश्वर देवाच्या
मंदिराचा त्याग केला. त्यांचे पूर्वज या परमेश्वर देवाला
शरण गेले होते पण यांनी अशेरा देवीचे खांब आणि इतर
मूर्ती यांची पूजा सुरु केली. राजा आणि सरदार यांच्या या
अपराधांमुळे यहूदा आणि यरुशलेमच्या लोकांवर देवाचा
कोप झाला. 19लोकांना परत आपल्याकडे वळवायला
परमेश्वराने त्यांच्याकडे संदेष्ट्यांना पाठवले. संदेष्ट्यांनी
लोकांना परमेश्वराच्या क्रोधाची पूर्वकल्पना दिली पण
लोक ऐकेनात.

20तेव्हा जखऱ्यामध्ये परमेश्वराच्या आत्म्याचा संचार
झाला. जखऱ्या हा यहोयादा या याजकाचा मुलगा. जखऱ्या
लोकांपुढे उभा राहून म्हणाला, “देव म्हणतो, ‘तुम्ही
परमेश्वराच्या आज्ञांचे उल्लंघन का करता? तुम्हाला
यश येणार नाही. तुम्ही परमेश्वराचा त्याग केलात. आता
परमेश्वरही तुम्हाला सोडून देत आहे.’”

21पण लोकांनी जखऱ्याविरुध्द कट केला. राजाने
लोकांना जखऱ्याचा वध करण्याचा हुकूम दिला.
तेव्हा लोकांनी त्याला दगडफेक करून मारले. हे
त्यांनी मंदिराच्या आवारातच केले. 22जखऱ्याचे
वडील यहोयादा यांनी दाखवलेले सौजन्य राजा योवाश
विसरला. यहोयादाच्या मुलाला जखऱ्याला राजाने ठार
केले. जखऱ्या मृत्यूपूर्वी म्हणाला, “हे पाहून परमेश्वर
तुला शासन करो.”

23वर्ष अखेरीला अरामच्या सैन्याने योवाशवर हल्ला
केला. यहूदा आणि यरुशलेमवर हल्ला करून त्यांनी सर्व
सरदारांची हत्या केली. तेथील सर्व धन लुटून त्यांनी ते
दिमिष्काच्या राजाकडे पाठवले. 24अराम्यांच्या सैन्यात
फार थोडे लोक होते तरी यहूदाच्या मोठ्या सेनेवर
परमेश्वराने त्यांना विजय मिळवून दिला. आपल्या पूर्वजांचा
देव परमेश्वर याचा यहूदा लोकांनी त्याग केल्यामुळे
परमेश्वराने योवाशला हे शासन केले. 25अरामी योवाशला
घायाळ अवस्थेत सोडून गेले तेव्हा योवाशच्या सेवकांनीच
त्याच्याविरुध्द कट केला. यहोयादा या याजकाच्या मुलाला,
जखऱ्याला योवाशने मारल्यामुळे ते या कारस्थानाला
प्रवृत्त झाले. योवाशला त्यांनी त्याच्या शय्येवरच ठार केले.
दावीदनगरात लोकांनी त्याला मूठमाती दिली. पण राजांच्या
दफन भूमीत त्याचे दफन केले नाही. 26जाबाद आणि
यहोजाबाद हे ते फितूर सेवक. जाबादच्या आईचे नाव
शिमथ. ही अम्मोनची होती. यहोजाबादच्या आईचे नाव
शिम्रिथ. ही मवाब येथील होती. 27योवाशचे पुत्र, त्याला
सांगितलेली मोठी शिक्षा आणि त्याने केलेला देवाच्या
मंदिराचा जीर्णोध्दार याविषयी राजांच्या बखरीत
(राजाविषयी) लिहिले गेले आहे. योवाशचा मुलगा अमस्या
हा त्याच्यानंतर राजा झाला.

## यहूदाचा राजा अमस्या

25 अमस्या राजा झाला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता.
नंतर त्याने यरुशलेममध्ये एकोणतीस वर्षे राज्य
केले. याच्या आईचे नाव यहोअदान. ती यरुशलेमची होती.
2त्याची वर्तणूक परमेश्वराला पटेल अशी होती पण त्यात
मन:पूर्वकता नव्हती. 3अमस्या शक्तिशाली राजा झाला
मग त्याने आपल्या वडलांच्या मारेकऱ्यांची हत्या केली.
4पण त्याच्या मुलांना त्याने ठार केले नाही कारण याबाबतीत
मोशेच्या नियमशास्त्रातली आज्ञा त्याने पाळली.
परमेश्वराची आज्ञा अशी आहे, “मुलांच्या अपराधासाठी
आईवडलांना आणि आईवडलांच्या अपराधासाठी मुलांना
मृत्युदंड देऊ नये. ज्याच्या हातून अपराध झाला त्या
व्यक्तीलाच देहदंड व्हावा.”

5अमस्याने सर्व यहूदा लोकांना एकत्र केले आणि त्यांच्या
घराण्यांवर सेनापती आणि सेनानायक यांच्या नेमणुका
केल्या. समस्त यहूदा आणि बन्यामिन सैनिकांवर या
प्रमुखांचा अंमल होता. युध्दात भाग घेण्यासाठी वय वर्षे
किमान वीस आणि त्यापुढील वयाचे सैनिक निवडले.
भाले आणि ढाली या आयुधांनी सज्ज असे सैनिक त्याने
मोजले. ते एकंदर 3,00,000 निवडक सैनिक युध्दाला
तयार होते. 6यांच्याखेरीज आणखी 1लक्ष सैन्याची कुमक
अमस्याने इस्राएलकडून मागवली. त्यासाठी त्याने 3 3/4
टन चांदी एवढी किंमत मोजली. 7पण यावेळी देवाचा एक
माणूस अमस्याकडे येऊन त्याला म्हणाला, “हे राजा,
इस्राएलच्या सैन्याला आपल्याबरोबर घेऊ नकोस.
एफ्राइमच्या वंशजांना म्हणजेच इस्राएलच्या लोकांना
परमेश्वराची साथ नाही. 8तू भले कितीही तयारी करून
लढाईत उतरलास तरी तुझा जय पराजय होणे देवाच्याच
हातात आहे.”

9यावर अमस्या त्या देवाच्या माणसाला म्हणाला, “पण
इस्राएली सैन्याला मी पैसे देऊन बसलो आहे, त्याचे काय?”
देवाचा माणूस म्हणाला, “परमेश्वराकडे अलोट संपत्ती
आहे, तो तुला त्यापेक्षा कितीतरी जास्त देऊ शकेल.”

10तेव्हा अमस्याने इस्राएलच्या सैन्याला एफ्राइमला परत
पाठवले. या कृत्यामुळे इस्राएली सैन्य, यहुदाचा राजा आणि
यहूदाचे लोक यांच्यावर संतापले आणि रागानेच घरी
परतले.

11यानंतर अमस्याने मोठेच धाडस करून अदोम
देशातील मिठाच्या खोऱ्यावर हल्ला चढवला. अमस्याच्या

सैन्याने या ठिकाणी सेइर मधील 10,000 लोकांना ठार
केले. 12आणखी 10,000 जणांना बंदिवान केले. त्यांना
धरुन खडकाच्या माथ्यावर नेले आणि एवढ्या उंचीवरुन
त्यांचा कडेलोट केला. खालच्या दगडधोंड्यांवर त्यांचे देह
छिन्नविच्छिन्न होऊन पडले.

13नेमक्या याचवेळी इस्राएली सैन्याने यहूदातील काही
नगरांवर हल्ला चढवला. त्यांनी बेथ-होरोनपासून थेट
शोमरोनपर्यंत गावे उद्ध्वस्त केली. 3000 लोकांना जिवे
मारले आणि मौल्यवान चीजवस्तू लुटल्या. अमस्याने
आपल्याला लढाईत सामील करून न घेतल्यामुळे हे
इस्राएली सैन्य भडकले होते.

14अदोम्यांचा पाडाव करून अमस्या आपल्या नगरात
परतला. येताना त्याने सेइरमधील लोकांच्या देवाच्या मूर्ती
बरोबर आणल्या आणि त्यांची पूजाअर्चा सुरु केली. या
दैवतांना वंदन करून तो त्यांच्यापुढे धूप जाळू लागला.
15या कृतीमुळे परमेश्वराचा अमस्यावर कोप झाला.
परमेश्वराने संदेष्ट्याला अमस्याकडे पाठवले. संदेष्टा
राजाला म्हणाला, “अमस्या, त्या लोकांच्या दैवतांची पूजा
तू का करत आहेस? त्या दैवतांना तर स्वत:च्याच लोकांचे
तुझ्यापासून रक्षण करता आले नाही.”

16अमस्या संदेष्ट्याच्या या बोलण्यावर म्हणाला, “आम्ही
तुला राजाचा सल्लागार म्हणून नेमलेले नाही, तेव्हा तू
गप्प राहावे हे चांगले नाहीतर जिवाला मुकशील.” संदेष्टा
गप्प बसला पण नंतर म्हणाला, “देवाने तुझा नाश करायचे
निश्चित केले आहे. कारण तू करु नये त्या गोष्टी केल्यास
आणि माझे ऐकले नाहीस.”

17यहूदाचा राजा अमस्या याने यावर आपल्या
सल्लागारांबरोबर विचार विनिमय केला. मग योवाशला
त्याने निरोप पाठवला की, “आपली एकदा प्रत्यक्ष गाठ
पडली पाहिजे.” योवाश हा यहोआहाजचा मुलगा आणि
यहोआहाज येहूचा. येहू इस्राएलचा राजा होता.

18इस्राएलचा राजा योवाश याने यहूदाचा राजा अमस्या
याच्याकडे आपले उत्तर पाठवले. योवाशने दृष्टांत दिला
तो असा: “लबानोन मधल्या एका काटेरी झुडुपाने
लबानोनच्याच एका गंधसरुला निरोप पाठवला की, ‘तुझ्या
मुलींचे माझ्या मुलाशी लग्न व्हावे.’ पण तेवढ्यात ते झुडुप
तिथून जाणाऱ्या एका वन्यपशूच्या पायाखाली तुडवले गेले.
19‘मी अदोमचा पराभव केला.’ असे तू खुशाल म्हण.
तू हे प्रौढीने म्हणतो आहेस खरे पण तू आपल्या घरी
स्वस्थ बसावेस हे बरे. उगीच नसत्या फंदात पडून अडचणीत
येऊ नकोस! पण तू तसे केलेस तर तू स्वत:च्या आणि
त्याबरोबर यहूदाच्या नाशाला कारणीभूत होशील.”

20पण अमस्याने या निरोपाला दाद दिली नाही. देवाच्याच
मनात तसे होते. यहूदाच्या लोकांनी अदोमी लोकांच्या
दैवताचे भजनपूजन सुरु केल्यामुळे इस्राएलकडून यहूदाचा
पराभव करायचे परमेश्वराने योजले होते. 21तेव्हा
इस्राएलचा राजा योवाश आणि यहूदाचा राजा अमस्या
यांची बेथ-शेमेश नगरात समोरासमोर गाठ पडली.
बेथ-शेमेश यहूदातच आहे. 22इस्राएलने यहूदाचा पराभव
केला. झाडून सर्व यहूद्यांनी या लढाईतून पळ काढला.
23योवाशने बेथ-शेमेश येथे अमस्याला पकडले आणि
यरुशलेमला नेले. अमस्याच्या वडलांचे नाव योवाश.
योवाशचे वडील यहोआहाज. योवाशने एफ्राइम वेशीपासून
कोपऱ्याच्या वेशीपर्यंतची यरुशलेमच्या तटबंदीची 600
हात लांबीची भिंत पार मोडून तोडून टाकली.

24सर्व सोनेरुपे तसेच मंदिरातील उपकरणी, भांडी देखील
त्याने हस्तगत केली. देवाच्या मंदिरातील वस्तूंची देखभाल
करण्याची जबाबदारी ओबेदअदोमची होती.
राजमहालातील चीजवस्तूही योवाशने लुटली. काही जणांना
बंदिवान केले. या सगळ्यासह तो शोमरोनला परतला.

25योवाशच्या मृत्यूनंतर अमस्या पंधरा वर्षे जगला.
अमस्याचे वडील म्हणजे यहुदाचा राजा योवाश. 26यहूदा
आणि इस्राएलमधील राजांचा इतिहास या पुस्तकात,
अमस्याने बाकी जे जे केले त्याची साद्यंत हकीकत आली
आहे.

27अमस्याने परमेश्वराचे आज्ञापालन करायचे
थांबवल्यावर यरुशलेमच्या लोकांनी त्याच्याविरुध्द
कट केला. तेव्हा तो लाखीश येथे पळून गेला. पण
लोकांनी त्याच्या मागावर माणसे पाठवून त्याचा तेथे
वध केला. 28अमस्याचा मृत देह मग लोकांनी घोड्यावर
लादला आणि यहूदानगरात आणून त्याला पूर्वजांशेजारी
पुरले.

## यहूदाचा राजा उज्जीया

26 अमस्याचा मुलगा उज्जीया याला यहूदाच्या
लोकांनी गादीवर बसवले. उज्जीया तेव्हा सोळा
वर्षांचा होता. 2उज्जीयाने एलोथ नगर पुन्हा बांधून काढले
आणि यहूदाच्या स्वाधीन केले. अमस्याच्या मृत्यूनंतरची
ही घटना.

3उज्जीया सोळा वर्षांचा असताना राजा झाला. पुढे त्याने
यरुशलेमवर 52 वर्षे राज्य केले. त्याच्या आईचे नाव
यखिल्या. ती यरुशलेमची होती. 4उज्जीयाचे वर्तन
परमेश्वराच्या दृष्टीने योग्य असे होते. आपले वडील
अमस्या यांच्याप्रमाणे त्याने देवाचे अनुसरण केले.
5जखऱ्याच्या हयातीत त्याने देवाचे अनुसरण केले.
आदरपूर्वक परमेश्वराला मानणे त्याला जखऱ्याने
शिकवले. तो असे वागत असे तोपर्यंत परमेश्वर देवाने
त्याचे कल्याण केले.

6उज्जीयाने पलिष्ट्यांबरोबर युध्द केले. गथ, यब्ने व
अश्दोदचे कोट पाडून टाकले. अश्दोद जवळ व
पलिष्ट्यांच्या वस्तीत इतरत्र उज्जीयाने नगरे वसवली.
7पलिष्टे, गुरबालमधले अरब आणि मऊनी यांच्याशी
झालेल्या लढायांमध्ये परमेश्वराने उज्जीयाला साहाय्य केले.
8अम्मोनी लोक उज्जीयाला कर देत असत. उज्जीयाचे

सामर्थ्य इतके वाढले की त्याची कीर्ती मिसरच्या सीमेपर्यंत
पोहोंचली.
9यरुशलेममध्ये कोपऱ्यातली वेस, खोऱ्याची वेस आणि
कोट वळसा घेतो तेथे उज्जीयाने बुरुज बांधून तटबंदीला
बळकटी आणली. 10वाळवंटातही त्याने बुरुज बांधले.
अनेक विहिरी खणल्या. डोंगराळ भागात आणि सपाटीवर
त्याची बरीच गुरेढोरे होती. तसेच तेथील सुपीक भागात
शेतकरी होते. द्राक्षबागांच्या निगराणीसाठी देखील त्याची
माणसे होती. उज्जीयाला शेतीची आवड होती.
11उज्जीयाच्या सैन्यात चांगले लढवय्ये होते. ईयेल हा
चिटणीस आणि मासेया हा कारभारी हे दोघे त्यांची गटागटात
विभागणी करत. हनन्या या एका सेनानायकच्या हाताखाली
हे दोघेजण होते. ईयेल आणि मासेया यांनी केलेल्या
गणतीप्रमाणे सैन्य टोळी टोळीने लढाईवर जाई. 12सैन्यात
एकंदर 2,600 प्रमुख लढवय्ये नेतृत्व करीत. 13शत्रूवर
तुटून पडणाऱ्या 307,500 वीरांच्या सैन्याचे ते प्रमुख होते.
राजाच्या बाजूने ते शत्रूवर चालून जात. 14या सर्व सेनेला
उज्जीयाने ढाली, भाले, शिरस्त्राणे, चिलखते, धनुष्य आणि
गोफणगुंडे अशी शस्त्रास्त्रे दिली. 15काही हुशार
कारागिरांनी शोधून काढलेली यंत्रेही उज्जीयाने
यरुशलेममध्ये बनवून घेतली. ती त्याने बुरुजांवर आणि
तटाच्या कोंपऱ्यांवर बसवली. ही यंत्रे बाण व मोठ्या
दगडांचा मारा करीत असत. उज्जीया फार प्रसिध्द झाला.
उज्जीयाचे नाव त्यामुळे सर्वदूर पसरले. त्याची कुमक
वाढली आणि तो बलवान झाला.
16पण सामर्थ्य वाढल्यावर तो गर्विष्ठ झाला आणि त्यामुळे
त्याचा नाश ओढवला. परमेश्वरावर त्याची निष्ठा राहिली
नाही. धूप जाळण्यासाठी असलेल्या वेदीवर धूप
जाळण्यासाठी तो परमेश्वराच्या मंदिरात गेला. 17तेव्हा
याजक अजऱ्या आणि आणखी ऐंशी शूर याजक
त्याच्यापाठोपाठ तिथे गेले. 18त्यांनी उज्जीयाची चूक दाखवून
दिली. ते त्याला म्हणाले, “उज्जीया, परमेश्वराला धूप
जाळणे हे तुझे काम नव्हे. तू ते करु नयेस. अहरोनचे
वंशज आणि याजक यांचेच ते काम आहे. धूप जाळण्याच्या
या पवित्र कामासाठी ते नेमलेले आहेत. तेव्हा या पवित्र
गाभाऱ्यातून तू बाहेर ये. परमेश्वराच्या आज्ञेचे तू उल्लंघन
केले आहेस. परमेश्वर देवाकडून तुझा गौरव होणार
नाही.”
19पण उज्जीयाला या बोलण्याचा राग आला. त्याच्या
हाती धूपपात्र होते. याजकांवर तो संतापला असताना पाहता
पाहता त्याच्या कपाळावर कोड उठले. परमेश्वराच्या
मंदिरात धूप जाळण्याच्या वेदीच्या जवळ याजकांसमक्षच
हे घडले. 20मुख्य याजक अजऱ्या आणि इतर याजक
उज्जीयाकडे बघतच राहिले. त्याच्या कपाळावरचे कोड
त्यांनी पाहिले. त्याबरोबर त्यांनी उज्जीयाला तातडीने
मंदिराबाहेर घालवले. परमेश्वराने शासन केल्यामुळे
उज्जीयाही लगेचच चालता झाला. 21राजा उज्जीया कुष्ठरोगी
झाला. मंदिरात त्याला मज्जाव होता. तो एका स्वतंत्र घरात
राहू लागला. त्याचा मुलगा योथाम हा राजघराण्याचा
कारभारी बनला आणि लोकांचे शासन करु लागला.
22उज्जीयाची इतर सर्व कृत्ये आमोजाचा मुलगा यशया
संदेष्टा याने अथपासून इतीपर्यंत लिहिलेली आहेत.
23उज्जीया मरण पावला आणि त्याच्या पूर्वजांजवळ त्याचे
दफन झाले. राजांसाठी असलेल्या दफनभूमीच्या शेजारच्या
जागेत त्याला पुरले. ‘कारण तो कुष्ठरोगी होता.’ उज्जीयाच्या
नंतर त्याचा मुलगा योथाम राजा झाला.

## यहूदाचा राजा योथाम

27 योथाम राजा झाला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता.
त्याने यरुशलेममध्ये 16 वर्षे राज्य केले. त्याच्या
आईचे नाव यरुशा. ती सादोकची मुलगी. 2योथाम
परमेश्वराच्या दृष्टीने उचित तेच करीत असे. आपले
वडील उज्जीया यांच्याप्रमाणेच तो परमेश्वराच्या आज्ञेत
राहिला. पण त्याचे वडील जसे परमेश्वराच्या मंदिरात धूप
जाळायला गेले तसे मात्र त्याने केले नाही. लोकांचे दुर्वर्तन
चालूच होते. 3परमेश्वराच्या मंदिराचा वरचा दरवाजा
योथामने पुन्हा करवला. ओफेलच्या कोटावर त्याने बरेच
बांधकाम केले. 4यहूदाच्या डोंगराळ प्रदेशात नगरे वसवली.
जंगलात किल्ले आणि बुरुज बांधले. 5अम्मोन्यांचा राजा
आणि त्यांचे सैन्य यांच्यावर योथामने चढाई केली आणि
त्यांचा पराभव केला. त्यामुळे पुढील तीनवर्षे अम्मोनी
योथामला 3 3/4 टन चांदी, 62,000 बुशेल गहू (किंवा
10,000 कोर) गहू आणि तेवढेच जव दरवर्षी देत असत.
6परमेश्वर देवाने सांगितल्याप्रमाणे मन:पूर्वक आचरण
केल्यामुळे योथामचे सामर्थ्य वाढले. 7त्याने केलेल्या इतर
गोष्टी आणि लढाया यांची हकीकत ‘इस्राएल व यहूदा
राजांचा इतिहास’ या पुस्तकात लिहिलेली आहे. 8योथाम
गादीवर आला तेव्हा पंचवीस वर्षांचा होता. त्याने
यरुशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले. 9पुढे योथाम मरण
पावला आणि त्याचे त्याच्या पूर्वजांशेजारी दफन
केले गेले. दावीदनगरांत लोकांनी त्याला पुरले.
योथामच्या जागी आहाज हा त्याचा मुलगा राज्य करु
लागला.

## यहूदाचा राजा आहाज

28 आहाज राजा झाला तेव्हा वीस वर्षांचा होता.
त्याने यरुशलेममध्ये सोळा वर्षे राज्य केले.
आपला पूर्वज दावीद वागला तसे आहाजचे वर्तन नव्हते.
त्याचे आचरण परमेश्वराला मान्य होणारे नव्हते.
2इस्राएलच्या राजांच्या दुर्वर्तनाचा त्याने कित्ता गिरवला.
त्याने बआल देवतेच्या ओतीव मूर्ती पूजेसाठी केल्या. 3बेन
हिन्नोमच्या खोऱ्यात त्याने धूप जाळला. आपल्या पोटच्या
मुलांना त्याने अग्नीमध्ये आहूती करून बळी दिले. या
प्रदेशात राहणारे लोक जे भयंकर पाप करीत तेच त्याने

केले. इस्राएल लोकांनी या भूमीवर पाऊल ठेवले तेव्हा
परमेश्वराने त्या लोकांना तिथून घालवले होते. 4आहाजने
उंच स्थानी, डोंगरावर तसेच प्रत्येक हिरव्यागार वृक्षाखाली
यज्ञ केले आणि धूप जाळला.

5–6आहाजच्या या पापांमुळे परमेश्वर देवाने अरामच्या
राजाच्या हातून आहाजचा पराभव करविला. अरामच्या
राजाने व त्याच्या सैन्याने आहाजचा पाडाव करून यहूदाच्या
लोकांना कैद केले व दिमिष्काला नेले. इस्राएलचा राजा
पेकह याच्याकडूनही परमेश्वराने आहाजचा पराभव
करवला. पेकहच्या वडलांचे नाव रमाल्या. पेकहच्या
सैन्याने एका दिवसात यहूदाचे 1,20,000 शूर सैनिक
ठार केले. आपले पूर्वज ज्या परमेश्वर देवाला शरण गेले
त्या परमेश्वराची साथ सोडल्यामुळे यहूदी लोकांचा असा
पराभव झाला. 7जिख्री हा एफ्राइममधला एक शूर योध्दा.
त्याने राजा आहाजचा मुलगा मासेया, राजमहालाचा प्रमुख
कारभारी अज्रीकाम आणि राजाच्या खालोखाल दुसऱ्या
क्रमांकाचा अधिकारी एलकाना यांना ठार मारले.

8इस्राएलच्या सैन्याने यहूदात राहणाऱ्या 2,00,000
जणांना पकडून नेले. हे सर्व त्यांचे नातलगच होते. या
कैद्यांमध्ये बायका मुलेही होती. तसेच यहूदातील किंमती
वस्तूही लुटून नेल्या. ही लूट आणि बंदिवान यांना ताब्यात
घेऊन ते शोमरोन या नगरात आले. 9तिथे ओदेद नावाचा
परमेश्वराचा एक संदेष्टा होता. शोमरोनला आलेल्या
इस्राएली सैन्याला तो भेटला. ओदेद त्यांना म्हणाला, "तुमच्या
पूर्वजांचा देव परमेश्वर याच्यामुळे तुम्ही यहूदी लोकांचा
पराभव करु शकलात कारण परमेश्वराचा यहूद्यांवर
कोप झाला होता. पण तुम्ही अतिशय नीच पध्दतीने यहूद्यांना
मारलेत, त्यांना शासन केलेत. त्यामुळे आता परमेश्वराच्या
क्रोधाचा रोख तुमच्यावर आहे. 10यहूदाच्या व यरुशलेमच्या
लोकांना गुलाम करण्याचा तुमचा मानस आहे.
परमेश्वराच्या दृष्टीने तुम्ही हे पाप केले आहे. 11आता
माझे ऐका. पकडून आणलेल्या या आपल्या भावाबहिणींना
परत पाठवून द्या. परमेश्वराला तुमचा अनावर संताप
आला आहे."

12एफ्राइमच्या काही प्रमुख मंडळींनी इस्राएलच्या
सैनिकांना लढाईवरुन परतताना पाहिले. तेव्हा या प्रमुखांनी
सैनिकांना भेटून चांगली समज दिली. योहानानचा मुलगा
अजऱ्या, मशिल्लेमोथचा मुलगा बरेख्या, शल्लूमचा मुलगा
यहिज्कीया, आणि हदलाईचा मुलगा अमासा ही ती नेते
मंडळी होत. 13ती इस्राएली सैन्याला म्हणाली, "यहूदाच्या
कैद्यांना इकडे आणू नका. तसे केलेत तर तो परमेश्वराचा
आपण केलेला मोठा अपराध ठरेल. आपल्या पापांमध्ये
त्यामुळे आणखी भर पडेल. इस्राएलवर परमेश्वराचा कोप
होईल."

14तेव्हा त्या सैनिकांनी कैदी आणि लुटलेली चीजवस्तू
हे इस्राएल लोकांच्या आणि त्या प्रमुखांच्या हवाली केले.
15तेव्हा अजऱ्या, बरेख्या, यहिज्कीया आणि अमासा यांनी
पुढे होऊन कैद्यांना जवळ केले. त्यांतील उघड्या
नागड्या लोकांना त्यांनी लुटीतले कपडेलत्ते दिले. जे
अनवाणी होते त्यांना पादत्राणे दिली. त्या सर्वांना त्यांनी
खाऊ पिऊ घातले. मर्दनासाठी तेल दिले. एवढे झाल्यावर
या प्रमुखांनी चालायचे त्राण नसलेल्या कैद्यांना गाढवावर
बसवले आणि या सर्वांना त्यांनी यरीहो या त्यांच्या गावी
घरी नेऊन सोडले. यरीहोला खजुरीच्या झाडांचे नगर
असेही म्हणतात. मग ही चार वडीलधारी मंडळी शोमरोनला
परतली.

16–17याचवेळी अदोमच्या लोकांनी यहूदावर चढाई
करून त्यांचा पाडाव केला. अदोम्यांनी यहूदी लोकांना
कैद करून नेले. तेव्हा राजा आहाजने अश्शूरच्या राजाकडे
मदत मागितली. 18पलिष्ट्यांनीही डोंगराळ तळवटीच्या
भागातल्या गावांवर आणि दक्षिण यहूदावर हल्ला केला.
बेथ–शेमेश, अयालोन, खदेरोथ, सोखो, तिम्ना आणि गिम्जो
ही गावे त्यांच्या आसपासच्या खेड्यांसह काबीज केली.
19परमेश्वराने यहूदाला संकटांनी जेरीला आणले कारण
यहूदाचा राजा आहाज याने यहूद्यांना दुर्वर्तनाला प्रवृत्त केले
होते. आहाजने परमेश्वराचे उल्लंघन केले होते.
20तिल्गथ–पिल्नेसर हा अश्शूरचा राजा. यानेही आहाजला
मदत करण्याऐवजी त्रासच दिला. 21आहाजने परमेश्वराच्या
मंदिरातील, राजमहालातील तसेच सरदारांच्या घरातील
धनदौलत घेऊन अश्शूरच्या राजाला दिली पण त्याचाही
फायदा झाला नाही.

22या संकटकाळात आहाजच्या दुर्वर्तनात आणखी भरच
पडली. तो परमेश्वरापासून दुरावला. 23दिमिष्काच्या
लोकांच्या दैवतांसाठी त्याने यज्ञ केले. या दिमिष्कांनी
त्याला हरवले होते. तेव्हा त्याने विचार केला, "अरामचे
लोक ज्या देवाची पूजा करतात ते देव त्यांना साहाय्य
करतात. तेव्हा मी ही त्यांच्यासाठी यज्ञ केले तर ते मला
सोडवतील." म्हणून आहाज त्या दैवतांना शरण गेला.
त्याच्या या कृत्यांमुळेच त्याचा आणि इस्राएल लोकांचा
नाश होत गेला. 24आहाजने देवाच्या मंदिरातली सगळी
उपकरणी गोळा करून त्यांची मोडतोड करून विल्हेवाट
लावली. परमेश्वराच्या मंदिराची दारे त्याने बंद करून
घेतली. वेद्या केल्या आणि त्या यरुशलेममध्ये चौका चौकात
बसवल्या. 25यहूदातील सर्व गावांमध्ये इतर देवतांच्या पूजेला
धूप जाळण्यासाठी म्हणून उंच स्थाने केली. अशाप्रकारे
वागून आपल्या पूर्वजांच्या परमेश्वर देवाचा त्याने क्रोध
ओढवून घेतला.

26आहाजच्या बाकीच्या गोष्टी आणि त्याचे सुरुवातीपासून
शेवटपर्यंतचे आचरण 'यहूदा व इस्राएल राजांचा इतिहास'
या पुस्तकात लिहिलेले आहे. 27आहाज मरण पावला
आणि त्याच्या पूर्वजांशेजारी त्याचे दफन झाले. यरुशलेम
नगरात लोकांनी त्याला पुरले. पण इस्राएलच्या इतर राजांचे
जेथे दफन झाले त्या जागी मात्र नव्हे. आहाजचा मुलगा
हिज्कीया हा पुढे राजा झाला.

## यहूदाचा राजा हिज्कीया

29 हिज्कीया वयाच्या पंचविसाव्या वर्षी राजा झाला.
त्याने यरुशलेममध्ये एकोणतीस वर्षे राज्य केले.
त्याच्या आईचे नाव अबीया. ती जखऱ्याची मुलगी.
2हिज्कीयाची वागणूक परमेश्वराच्या दृष्टीने उचित अशी
होती. आपला पूर्वज दावीद याच्या प्रमाणेच त्याचे वर्तन
सुयोग्य असे.

3हिज्कीयाने परमेश्वराच्या मंदिराचे दरवाजे उघडले
आणि दुरुस्ती करून ते मजबूत केले. राजा झाल्याबरोबर
आपल्या कारभाराच्या पहिल्या महिन्यातच त्याने हे केले.
4–5सर्व याजक आणि लेवी यांना त्याने एकत्र बोलावले
आणि मंदिराच्या पूर्वेकडील मोकळ्या चौकात त्यांची सभा
घेतली. हिज्कीया त्यांना म्हणाला, “लेवी हो, ऐका, देवाच्या
सेवेसाठी शुचिर्भूत व्हा. या पवित्र कार्यासाठी परमेश्वर
देवाच्या मंदिराची सिध्दता करा. परमेश्वर हा आपल्या
पूर्वजांनी मानलेला देव आहे. ज्या वस्तूं इथल्या नाहीत
त्या इथून काढून टाका. त्या वस्तू म्हणजे घाण असून त्या
हे पवित्र मंदिर भ्रष्ट करतात. 6आपल्या पूर्वजांनी
परमेश्वराची संगत सोडली आणि त्याच्या मंदिराकडे पाठ
फिरवली. 7त्यांनी मंदिराचे प्रवेशद्वार बंद केले आणि दिवे
विझू दिले. इस्राएलच्या परमेश्वराच्या पवित्र गाभाऱ्यात
परमेश्वरासाठी धूप जाळणे, होमार्पणे करणे बंद पडले.
8म्हणून यहूदा यरुशलेमच्या लोकांवर परमेश्वर कोपला.
त्याने लोकांना शासन केले. परमेश्वराचा क्रोध पाहून
इतर लोक विस्मयचकित झाले आणि घाबरले. यहूदी
लोकांबद्दल त्यांना तिरस्कार आणि शरम वाटली. ही
वस्तुस्थिती तुम्हांला माहीत आहे. तुम्ही ती पाहतच आहात.
9म्हणूनच युध्दात आपले पूर्वज मारले गेले. आपली बायका
पोरे कैदी झाली. 10म्हणून मी, हा हिज्कीया, इस्राएलच्या
परमेश्वर देवाशी करार करणार आहे. म्हणजे आपल्यावर
त्याचा राग राहणार नाही. 11तेव्हा मुलांनो, आता, आळसात
वेळ घालवू नका. परमेश्वराने त्याच्या सेवेसाठी तुमची
निवड केली आहे. मंदिरात त्याची सेवाचाकरी करणे,
धूप जाळणे यासाठी तुम्हाला त्याने निवडले आहे.”

12–14तेव्हा जे लेवी कामाला लागले ते पुढीलप्रमाणे:
कहाथ घराण्यातले अमासयचा मुलगा महथ आणि
अजऱ्याचा मुलगा योएल. मरारी कुळातला अब्दीचा मुलगा
कीश आणि यहल्लेलेलाचा मुलगा अजऱ्या. गर्षोनी
कुळातला जिम्माचा मुलगा यवाह आणि यवाहचा मुलगा
एदेन, अलीसाफानच्या घराण्यातील शिम्री आणि ईएल
आसाफच्या घराण्यातील जखऱ्या व मत्तन्या. हेमानच्या
कुळातील यहीएल आणि शिमी, यदुथूनच्या कुळातील
शमाया आणि उज्जियेल. 15मग या लेवींनी आपल्या
भाऊबंदांसह एकत्र येऊन मंदिराच्या शुध्दतेसाठी सर्व तयारी
केली. परमेश्वराने राजामार्फत केलेली आज्ञा त्यांनी
पाळली. मंदिराच्या स्वच्छतेसाठी ते आत शिरले.
16परमेश्वराच्या मंदिरात जेवढ्या अशुध्द आणि तिथल्या
वातावरणाशी विसंगत वस्तू त्यांना सापडल्या त्या सगळ्या
गोळा करून त्यांनी मंदिराच्या अंगणात आणून ठेवल्या.
तिथून त्या उचलून त्यांनी किद्रोन खोऱ्यात नेऊन टाकल्या.
17पहिल्या महिन्याच्या प्रतिपदेला लेवींनी पवित्रीकरणाच्या
कामाला सुरुवात केली. आठव्या दिवशी ते परमेश्वराच्या
मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत आले. परमेश्वराच्या मंदिराची
सर्व तऱ्हेची शुध्दता होऊन ते पवित्र व्हायला आणखी
आठ दिवस लागले. पहिल्या महिन्याच्या सोळाव्या दिवशी
त्यांचे काम पूर्ण झाले.

18त्यानंतर ते राजा हिज्कीया याच्याकडे गेले. राजाला
ते म्हणाले, “परमेश्वराचे मंदिर, होमार्पणाची वेदी आणि
तीवरील सर्व भांडी आम्ही शुध्द केल्या आहेत. समर्पित
भाकरीचे मेज आणि त्याची सर्व उपकरणेही शुध्द केली
आहेत. 19राजा आहाजने आपल्या कारकिर्दीत
गैरवर्तनातून जी उपकरणे फेकून दिली होती त्यांचीही
शुध्दी करून आम्ही ती मांडली आहेत. ती आता देवाच्या
वेदीसमोरच आहेत.”

20दुसऱ्या दिवशी सकाळी, नगरातील सर्वा सरदारांना
बरोबर घेऊन राजा हिज्कीया परमेश्वराच्या मंदिरात गेला.
21त्यांनी सात बैल, सात मेंढे, सात कोकरे आणि सात
बोकड पापार्पणासाठी आणले. यहूदाचे राज्य, परमेश्वराचे
पवित्र स्थान आणि यहूदीलोक यांच्या शुध्दीप्रीत्यर्थ हे
प्राणी होते. अहरोनचे वंशज असलेल्या याजकांना
हिज्कीयाने ते प्राणी परमेश्वराच्या वेदीवर अर्पण करायची
आज्ञा केली. 22त्याप्रमाणे याजकांनी बैल कापले आणि
त्यांचे रक्त वेदीवर शिंपडले. मग मेंढे कापून त्यांचे रक्त
वेदीवर शिंपडले. मग त्यांनी कोकरे कापली आणि त्यांचे
रक्त वेदीवर शिंपडले. 23–24यानंतर याजकांनी राजा व
समुदाय यांच्यापुढे बोकडांना आणले. हे बोकड
पापार्पणासाठी होते. याजकांनी बोकडांवर हात ठेवून त्यांना
मारले. बोकडांचे रक्त वेदीवर शिंपडून याजकांनी पापार्पण
केले. परमेश्वराने इस्राएल लोकांना क्षमा करावी म्हणून
हे विधी याजकांनी केले. सामस्त इस्राएल लोकांसाठी
होमार्पण आणि पापार्पण करावे अशी राजाची आज्ञा होती.

25दावीद, राजाचा द्रष्टा गाद आणि संदेष्टा नाथान यांच्या
आज्ञेबरहुकूम राजा हिज्कीयाने झांजा, सतारी व वीणा
वाजवण्यासाठी परमेश्वराच्या मंदिरात लेवींची नेमणूक
केली. परमेश्वराने संदेष्ट्यांमार्फत तशी आज्ञा केली होती.
26त्या प्रमाणे दावीदाची वाद्ये घेऊन लेवी आणि कर्णे घेऊन
याजक उभे राहिले. 27मग हिज्कीयाने वेदीवर होमार्पण
करण्याची आज्ञा केली. त्याला सुरुवात होताच परमेश्वराचे
भजन स्तवनही सुरु झाले. कर्णे आणि इस्राएलचा राजा
दावीद याची वाद्ये यांचा गजर सुरु झाला. 28होमार्पण चालू
असेपर्यंत समुदाय अभिवादन करत होता. गायक गात
होते आणि कर्णे वाजवणे चालू होते. 29होमार्पणाचे विधी
झाल्यावर राजा हिज्कीयासकट सर्व लोकांनी मस्तके
लववून परमेश्वराची आराधना केली. 30हिज्कीया आणि

सरदार यांनी लेव्यांना परमेश्वराची स्तोत्रे गाण्याची आज्ञा
केली. तेव्हा त्यांनी दावीद आणि द्रष्टा आसाफ यांनी
रचलेली स्तोत्रे म्हटली. या स्तवनांनी ते आनंदित झाले.
सर्वांनी लवून नमस्कार करून देवाची आराधना केली.
31हिज्कीया म्हणाला, “यहूदातील लोकहो, तुम्ही आता
स्वत:ला परमेश्वराच्या हवाली केले आहे. तेव्हा जवळ
येऊन यज्ञाची आणि उपकारस्मरणाची अर्पणे आणा.”
तेव्हा लोकांनी ती अर्पणे आणली. ज्यांना हवी होती त्यांनी
होमार्पणेही आणली. 32मंदिरात एकंदर होमार्पणे आणली
गेली त्याची मोजदाद पुढीलप्रमाणे: सत्तर बैल, शंभर मेंढे,
दोनशे कोकरे. त्यांचे परमेश्वराला होमार्पण करण्यात
आले. 33सहाशे बैल आणि तीन हजार शेरडेमेंढरे हे
परमेश्वराला वाहिलेले पशू. 34होमबलीसाठी आणलेल्या
एवढ्या पशूंची कातडी काढणे, कापणे हे तेवढ्या याजकांच्या
आवाक्याबाहेरचे होते. तेव्हा त्यांच्या बांधवांनी लेवींनी
त्यांना या कामात मदत केली आणि इतर याजक पुढच्या
सेवेसाठी पवित्र होण्याच्या तयारीला लागले. या पवित्र
होण्याच्या बाबतीत याजकांपेक्षा लेवी अधिक काटेकोर
होते. 35होमबली पुष्कळ होते. शांतिअर्पणांच्या पशूंची चरबी
आणि पेयार्पणेही विपुल होती. 36परमेश्वराने आपल्या
प्रजेसाठी हे जे सर्व घडवून आणले त्यामुळे हिज्कीया
आणि सगळे लोक आनंदित झाले. हे सर्व इतक्या जलद
घडून आले म्हणून त्यांना विशेषच आनंद झाला.

## हिज्कीया वल्हांडणाचा सण साजरा करतो

30 हिज्कीयाने इस्राएल आणि यहूदामधील सर्व
लोकांना निरोप पाठवले: तसेच एफ्राइम आणि
मनश्शेच्या लोकांना पत्रे लिहिली. इस्राएलचा परमेश्वर
देव याच्याप्रीत्यर्थ वल्हांडणाचा सण साजरा करायला
यरुशलेमतील परमेश्वराच्या मंदिरात यावे असे त्याने त्या
निरोप पत्रांद्वारे कळवले. 2यरुशलेममधील मंडळी आणि
सर्व सरदार यांच्याशी विचार विनिमय करून राजा
हिज्कीयाने वल्हांडणाचा सण दुसऱ्या महिन्यात साजरा
करायचे ठरवले. 3सणासाठी पुरेशा याजकांचे पवित्रीकरण
झाले नव्हते तसेच यरुशलेममध्ये सगळे लोक जमले
नव्हते म्हणून नेहमीच्या वेळेला हा सण साजरा करता
येणे शक्य नव्हते. 4तेव्हा राजासकट सर्व मंडळींना ही
गोष्ट पसंत पडली. 5बैर-शेबा पासून दान पर्यंत इस्राएलभर
त्यांनी दवंडी पिटली. वल्हांडणासाठी यरुशलेमला यायला
सर्व लोकांना आवाहन करण्यात आले. मोशेच्या
नियमशास्त्रात सांगितलेल्या पारंपारिक पध्दतीने बहुसंख्य
लोकांनी फार वर्षात हा सण साजरा केला नव्हता. 6त्यामुळे
निरोप्यांनी राजाचा संदेश इस्राएल आणि यहूदाभर फिरवला.
त्याचा मसुदा असा होता:

इस्राएल लोक हो, अब्राहाम, इसहाक आणि इस्राएल
(याकोब) यांच्या परमेश्वर देवाकडे परत फिरा.
म्हणजे अश्शूर राजांच्या तावडीतून सुटून जे सुखरूप
राहिले आहेत त्यांना परमेश्वर जवळ करील. 7आपले
वडील किंवा भाऊबंद यांचे अनुकरण करु नका.
परमेश्वर त्यांचा देव होता, पण त्यांनी त्याच्याकडे
पाठ फिरवली. तेव्हा त्यांच्याविषयी परमेश्वराने
इतरांच्या मनात घृणा निर्माण केली व त्यांना निंदेला
प्रवृत्त केले. त्यामुळे झालेली दुर्दशा तुम्ही पाहिली
आहेच. 8आपल्या पूर्वजांसारखे ताठर बनू नका.
मनोभावे परमेश्वराला शरण जा मंदिराच्या पवित्र
गाभाऱ्याकडे या. परमेश्वराने ते पवित्रस्थान कायमचे
पवित्र केले आहे. परमेश्वर देवाची सेवा करा. तरच
परमेश्वराचा तुमच्यावर भडकलेला कोप शांत
होईल. 9तुम्ही परमेश्वराकडे परत फिरलात तर
ज्याने तुमच्या भाऊबंदांना आणि लेकरांना कैद करून
नेले त्यांना दयेचा पाझर फुटेल आणि तुमचे भाऊबंद
आणि लेकरे आपल्याकडे परत येतील. परमेश्वर
तुमचा देव दयाळू आणि कृपाळू आहे. त्याच्या
आसऱ्याला गेलात तर तो तुमचा धिक्कार करणार
नाही.

10एफ्राइम आणि मनश्शेच्या प्रदेशात निरोप्ये गावोगाव
फिरले. ते पार जबुलून पर्यंत गेले. पण लोकांनी मात्र
उपहासाने वागून त्यांची हेटाळणी केली. 11आशेर, मनश्शे
आणि जबुलून मधल्या काहींनी मात्र असे न करता
विनम्रतेने यरुशलेमला प्रयाण केले. 12पुढे परमेश्वराच्या
कृपेनेच असे घडून आले की राजा हिज्कीया आणि त्याचे
सरदार यांच्या आज्ञेप्रमाणे वागायला यहूदाचे लोक तयार
झाले. अशा रितीने त्यांनी देवाचा शब्द पाळला.

13दुसऱ्या महिन्यात बेखमीर भाकरीचा सण साजरा
करण्यासाठी लोक प्रचंड संख्येने यरुशलेममध्ये जमले.
तो एक विशाल समुदाय होता. 14यरुशलेममधल्या खोट्या
नाट्या दैवतांसाठी उभारलेल्या वेद्या तसेच धूप जाळायच्या
वेद्या या लोकांनी उखडून टाकल्या आणि किद्रोन खोऱ्यात
नेऊन टाकून दिल्या. 15दुसऱ्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी
त्यांनी वल्हांडणाच्या यज्ञपशूचा बळी दिला. याजक आणि
लेवी यांनी तेव्हा लज्जित होऊन स्वत:ला पवित्र केले
आणि होमबली परमेश्वराच्या मंदिरात आणले. 16देवाचा
माणूस मोशेच्या नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे ते
आपापल्या जागी स्थानापन्न झाले. याजकांनी लेवींच्या
हातून रक्त घेऊन ते वेदीवर शिंपडले. 17तेथे जमलेल्या
पुष्कळशा लोकांनी स्वत:चे शुध्दीकरण केलेले नव्हते
त्यामुळे वल्हांडणाचे यज्ञपशू मारायचा त्यांना अधिकार
नव्हता. अशांसाठी ते काम लेवींनाच करावे लागत होते.
लेवींनी सर्व यज्ञपशूंचे परमेश्वराकरता शुध्दीकरण केले.

18–19एफ्राइम, मनश्शे, इस्साखार आणि जबुलून इथून
आलेल्या बऱ्याच लोकांनी वल्हांडणासाठी योग्य तऱ्हेने
स्वत:चे शुद्धीकरण केलेले नव्हते. ही पध्दत मोशेच्या

नियमशास्त्राला सोडून होती. पण हिज्कीयाने त्यांच्या वतीने
प्रार्थना केली. तो म्हणाला, "परमेश्वर देवा, तू भला
आहेस. तुझी आराधना योग्य तऱ्हेने व्हावी असे या लोकांना
मनापासून वाटते. पण धर्मशास्त्राप्रमाणे त्यांनी शुध्दीकरण
केलेले नाही. त्यांना क्षमा कर. आमच्या पूर्वजांपासूनचा
तूच आमचा देव आहेस. अत्यंत पवित्र स्थानाच्या
नियमाप्रमाणे त्यांच्यापैकी कोणी शुचिर्भूत झालेले नसले
तरी तू त्यांना क्षमा कर." 20राजा हिज्कीयाने केलेली
प्रार्थना परमेश्वराने ऐकली आणि लोकांना क्षमा केली.
21इस्राएलच्या प्रजेने यरुशलेममध्ये बेखमीर भाकरीचा
उत्सव सात दिवस साजरा केला. लोक आनंदात होते.
लेवी आणि याजक यांनी रोज मन:पूर्वक परमेश्वराची
स्तुतिस्त्रोत्रे गाईली. 22परमेश्वराची सेवा कशी करावी
याचे उत्तम ज्ञान असलेल्या लेवींना राजा हिज्कीया उत्तेजन
देत होता. सणाचे सात दिवस आनंदात घालवत लोकांनी
शांतिअर्पणे वाहिली आणि आपल्या पूर्वजांच्या परमेश्वर
देवाला धन्यवाद दिले.

23वल्हांडणाचा सण आणखी सात दिवस साजरा करावा
असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे आणखी सात दिवस त्यांनी
या सणाप्रीत्यर्थ आनंदात घालवले. 24हिज्कियाने 1000
बैल आणि 7000 मेंढरे व पुढाऱ्यांनी 1000 बैल व 10000
मेंढरे मारून खाण्यासाठी या समुदायाला दिली. त्यासाठी
बऱ्याच याजकांना शुचिर्भूत व्हावे लागले. 25यहूदातील
सर्व लोक, याजकवर्ग, लेवी, इस्राएलमधील समुदाय तसेच
इस्राएलमधून यहूदात आलेले विदेशी प्रवासी हे सर्वजण
अतिशय खुशीत होते. 26यरुशलेममध्ये आनंदीआनंद
पसरला होता. इस्राएलचा राजा दावीद याचा मुलगा शलमोन
याच्या कारकिर्दीनंतर आजतागायत असा आनंदाचा प्रसंग
कधी घडलाच नव्हता. 27याजक व लेवी यांनी उठून
लोकांना आशीर्वाद देण्याची परमेश्वराला प्रार्थना केली.
परमेश्वराने त्यांचे ऐकले. त्यांची प्रार्थना स्वर्गातील आपल्या
पवित्र स्थानी परमेश्वराला ऐकू गेली.

## राजा हिज्कीयाच्या सुधारणा

31 अशा तऱ्हेने वल्हांडणाच्या उत्सवाची समाप्ती
झाली. यरुशलेममध्ये त्यासाठी जमलेले इस्राएल
लोक यहूदात आपापल्या गावी परतले. तिथे गेल्यावर
त्यांनी दैवतांच्या दगडी मूर्ती फोडून टाकल्या. या खोट्या
नाट्या दैवतांची पूजा होत असे. अशेराचे खांबही त्यांनी
उखडून टाकले. यहूदा आणि बन्यामिन प्रांतातील
सर्वच्यासर्व उंच स्थाने आणि वेद्या त्यांनी उद्ध्वस्त केल्या.
एफ्राइम आणि मनश्शे या प्रदेशातील लोकांनीही तेच
केले. गैर देवतांच्या प्रार्थनेसाठी बनवण्यात आलेल्या
सगळ्या गोष्टींचा त्यांनी नाश केला. तेव्हाच सर्व इस्राएल
लोक घरोघरी गेले.

2लेव्यांची आणि याजकांची गटागटां मध्ये विभागणी
केलेली होती. त्यापैकी प्रत्येक गटाला आपापले विशेष
कामकाज नेमून दिलेले होते. राजा हिज्कीयाने त्या सर्वांना
आपला कारभार हाती घ्यायला सांगितले. होमार्पणे व
शांतिअर्पणे वाहणे हे लेवींचे व याजकांचे नेमलेले काम
होते. तसेच मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ परमेश्वराची
स्तुतिस्तोत्रे म्हणणे व परमेश्वराच्या मंदिरात सेवा करणे
हे ही त्यांचे काम होते. 3यज्ञात अर्पण करण्यासाठी म्हणून
हिज्कीयाने आपल्या पशुधनातील काही पशू दिले. सकाळ
संध्याकाळच्या दैनिक होमार्पणांखातर त्यांचा विनियोग
करण्यात आला. शब्बाथ, नवचंद्रदर्शनी व इतर नैमित्तिक
कार्ये या दिवशीही होमार्पणे होत असत. हे परमेश्वराच्या
नियमशास्त्रानुसार होत असे. 4आपल्या उत्पन्नातील
ठराविक हिस्सा लोकांना लेवी व याजक यांना द्यावा
लागत असे. तो त्यांनी द्यावा अशी आज्ञा राजा हिज्कीयाने
केली. त्यामुळे नियतकार्य निर्वेधपणे प्रभूच्या
नियमशास्त्रानुसार करणे याजकांना व लेवींना शक्य झाले.
5ही आज्ञा सर्व प्रजेच्या कानी गेली. त्याबरोबर इस्राएल
लोकांनी आपले धान्याचे पीक, द्राक्ष, तेल, मध आणि
इतर बागायती उत्पन्न या सगळ्याचा एकदशांश भाग आणून
दिला.

6यहूदातील नगरवासी इस्राएली व यहूदी लोकांनीही
आपली गुरे आणि शेळ्यामेंढ्या यांचा दहावा हिस्सा जमा
केला. परमेश्वर देवाप्रीत्यर्थ आखून दिलेल्या जागेत
धान्याच्याही राशी त्यांनी आणून ओतल्या. त्यांनी या सर्व
वस्तूंचे ढीग रचले.

7लोकांनी या सर्व वस्तू आणून टाकायला तिसऱ्या
महिन्यात सुरुवात केली आणि सातव्या महिन्यात हे
काम संपले. 8राजा हिज्कीया आणि इतर सरदार यांनी
जेव्हा या राशी पाहिल्या तेव्हा त्यांनी परमेश्वराला आणि
इस्राएलच्या प्रजेला धन्यवाद दिले.

9राजाने मग याजकांना आणि लेवींना या गोळा झालेल्या
वस्तूंविषयी विचारले. 10तेव्हा सादोकच्या घराण्यातला
मुख्य याजक अजऱ्या हिज्कीयाला म्हणाला की, "लोक
परमेश्वराच्या मंदिरात धान्य व या सगळ्या गोष्टी अर्पण
करायला लागल्यापासून आम्हाला पोटभर खायला मिळू
लागले आहे. अगदी तृप्त होईपर्यंत खाऊनही एवढे उरले
आहे. परमेश्वराने आपल्या प्रजेला खरोखरच दुवा दिला
आहे, म्हणून तर इतके शिल्लक राहीले आहे."

11हिज्कीयाने मग याजकांना परमेश्वराच्या मंदिरात
कोठारे तयार ठेवायला सांगितली. त्याची आज्ञा अंमलात
आणली गेली. 12याजकांनी परमेश्वरासाठी अर्पण केलेल्या
वस्तू धान्याचा अथवा पशूंचा दहावा हिस्सा, इतर काही
वाहिलेल्या गोष्टी आत आणल्या आणि मंदिरातील
कोठारात जमा केल्या. कोनन्या लेवी हा या भांडारावरचा
प्रमुख अधिकारी होता. शिमी त्याच्या हाताखाली होता.
शिमी कोनन्याचा भाऊ होता. 13यहीएल, अजऱ्या, नहथ,
असाएल, यरीमोथ, योजाबाद, अलीएल, इस्मख्या, महथ
व बनाया यांच्यावर कोनन्या आणि शिमी या दोन भावांची

देखरेख होती. राजा हिज्कीया आणि देवाच्या मंदिराचा
प्रमुख अधिकारी अजऱ्या यांनी या माणसांची निवड केली.
14लोकांनी देवाला स्वखुशीने अर्पण केलेल्या सगळ्या
गोष्टींवर कोरेची देखरेख होती. परमेश्वराला वाहिलेल्या
या गोष्टींचे वाटप करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती.
तसेच परमेश्वराला आलेल्या पवित्र भेटवस्तूंची वाटणी
करण्याचेही काम त्याचेच होते. कोरे पूर्वेकडच्या
प्रवेशद्वाराचा द्वारपाल होता. त्याच्या वडलांचे नाव इम्ना
लेवी. 15एदेन, मिन्यामीन, येशूवा, शमाया, अमऱ्या व
शखन्या हे कोरेचे मदतनीस होते. याजक राहात त्या
नगरात ते निष्ठेने आपली सेवा रुजू करत. याजकांच्या
प्रत्येक गटांमधील आपापल्या भाऊबंदांना त्यांच्या वाटणीचा
हिस्सा देत. हे वाटप करताना ते लहान मोठा अशा सर्वानाच
सारखाच भाग देतअसत. 16लेवी घराण्याच्या इतिहासात
ज्यांची नावे नोंदलेली होती असे, तीन वर्षे किंवा त्यापेक्षा
जास्त वयाचे जे लेवी पुरुष परमेश्वराच्या मंदिरात नेमून
दिलेल्या दैनंदिन कामासाठी जात त्यांना त्यांची वाटणी हे
मदतनीस देत. अशाप्रकारे लेवींच्या प्रत्येक गटाला काम
नेमून दिलेले होते.

17याजकांना त्यांच्या वाटणीचा हिस्सा मिळत असे. ज्या
लेवींची आपापल्या पितृकुळाप्रमाणे नोंद झाली होती त्यांना
आणि किमान वीस वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठ्या
असलेल्या लेवींना त्यांची वाटणी मिळत असे. त्यांच्यावरील
जबाबदारीचे स्वरुप आणि त्यांचा गट यावर त्याचे प्रमाण
ठरत असे. 18ज्या लेवींची वंशावळ्यांमध्ये नोंद झालेली
होती त्या सर्वांच्या मुलाबाळांना, बायकांना मुलगे व मुली
यांनाही आपापला हिस्सा मिळे. परमेश्वराच्या सेवेसाठी ते
नेहमीच शुचिर्भूत होऊन तत्पर असत म्हणून त्यांना हे
दिले जाई. 19अहरोन वंशातील काही याजकांची लेवी
राहात असत त्या गावांमध्ये शेत-शिवारे होती. काही
अहरोनचे वंशज नगरांमध्येही राहात होते. तेव्हा त्या
नगरातील माणसांची नावानिशी निवड करून त्यांना
आपल्या उत्पन्नातला वाटा या अहरोनवंशजांना द्यायला
निवडले होते. वंशावळीत नोंदवलेले सर्वजण आणि पुरुष
लेवी यांना हा वाटा मिळे.

20राजा हिज्कीयाने अशाप्रकारे यहूदात चांगली
कामगिरी केली. परमेश्वर देवाच्या दृष्टीने जे योग्य, बरोबर
आणि सत्य ते त्याने केले. 21हाती घेतलेल्या प्रत्येक कामात
त्याला यश आले, उदाहरणार्थ, देवाच्या मंदिरातील
उपासना, नियमशास्त्राचे पालन, परमेश्वराला शरण जाणे.
हिज्कीयाने हे सर्व मनापासून केले.

## अश्शूरच्या राजाचा हिज्कीयाला उपद्रव

32 हिज्कीयाने परमेश्वरावर भरवंसा ठेवून
केलेल्या सगळ्या गोष्टी प्रत्यक्षात उतरल्यावर
अश्शूरचा राजा सन्हेरीब यहूदावर चाल करून आला.
नगराच्या तटबंदीबाहेर त्याने आपल्या सैन्यासह तळ
ठोकला. आतील नगरांचा पाडाव करून ती जिंकून घ्यायचा
त्याने बेत केला. 2यरुशलेमवर हल्ला करायला सन्हेरीब
आला आहे हे हिज्कीयाला कळले. 3तेव्हा तो आपल्या
सरदारांशी आणि सैन्याच्या अधिकाऱ्यांशी बोलला. त्यांच्या
साहाय्याने व त्यांच्याशी मसलत करून राजाने
नगराबाहेरच्या झऱ्यांचे पाणी अडवायचा एकमताने निर्णय
घेतला. त्या सर्वांनी त्याला मदत केली. 4झरे आणि आपल्या
प्रांतामधून वाहणारी नदी लोकांनी एकत्र येऊन अडवली.
ते म्हणाले, "अश्शूरच्या राजाला आत्ता इथवर आल्यावर
पाणी कुठले मिळायला?" 5हिज्कीयाने पुढील
उपाययोजनेने यरुशलेमची मजबुती वाढवली. तटबंदीची
भिंत जिथे जिथे ढासळली होती तिथे तिथे बांधून काढली.
भिंतीवर बुरूज बांधले. तटबंदीबाहेर दुसरा कोट केला.
यरुशलेमच्या जुन्या भागाची पूर्वेची बाजू आणखी भक्कम
केली. शस्त्रे आणि ढाली आणखी करवून घेतल्या.
6–7हिज्कीयाने प्रजेवर सेनानायकांच्या नेमणुका केल्या,
आणि नगराच्या वेशीजवळच्या चौकात त्यांची सभा घेऊन
त्यांच्याशी उत्तेजनपर बातचीत केली. हिज्कीया त्यांना
म्हणाला, "हिंमत बाळगा आणि दृढ राहा. अश्शूरच्या
राजाची किंवा त्याच्या विशाल सेनेची धास्ती घेऊ नका.
आपली ताकद त्यांच्यापेक्षा जास्त आहे. 8अश्शूरच्या
राजाजवळ फक्त मनुष्यबळ आहे. आपल्या बाजूला मात्र
साक्षात परमेश्वर देव आहे. तोच आपल्याला मदत करील."
आपल्या युध्दात तोच लढेल अशाप्रकारे हिज्कीयाचे धीराचे
बोलणे ऐकून लोकांना त्यावर विश्वास बसला आणि
त्यांना हुरूप आला.

9अश्शूरचा राजा सन्हेरीब याने लाखीशचा पराभव
करण्याच्या हेतूने आपल्या सैन्यासह लाखीश नगराजवळ
तळ दिला होता. तेथून त्याने यहूदाचा राजा हिज्कीया
आणि यरुशलेममधील यहूदी लोक यांच्यासाठी आपल्या
सेवकांमार्फत निरोप पाठवला. 10सेवक म्हणाले की,
"अश्शूरचा राजा सन्हेरीब याचा संदेश असा आहे.
'यरुशलेमला वेढा पडला असताना कशाच्या भरवंशावर
तुम्ही तिथे राहता? 11हिज्कीयाचा हा तुम्हाला फसवण्याचा
डाव आहे. यरुशलेममध्ये अडकून तुम्ही तहानभुकेने
व्याकुळ होऊन मरावे असा त्याचा अंतःस्थ हेतू आहे. तो
तुम्हाला म्हणतो, "अश्शूरच्या राजापासून आपला देव
परमेश्वर आपले रक्षण करील." 12पण त्यानेच
परमेश्वराची उंच स्थाने आणि वेद्या काढून टाकल्या.
तुम्हा यहूदी आणि यरुशलेमच्या लोकांना त्याने सांगितले
की तुम्ही फक्त एकाच वेदीवर उपासना केली पाहिजे
आणि धूप जाळला पाहिजे. 13माझ्या पूर्वजांनी आणि मी
इतर देशांतल्या लोकांची कशी अवस्था करून टाकली
ती तुम्हाला माहीत आहे. त्या देशांतले दैवते काही आपल्या
लोकांना वाचवू शकले नाहीत. मलाही ते त्यांचा नाश
करण्यापासून परावृत्त करु शकले नाहीत. 14माझ्या
पूर्वजांनी इतर देशांना मातीला मिळवले. आपल्या लोकांना

विनाशातून सोडवण्याची माझ्यासमोर कोणत्याही देवताची
प्राज्ञा नाही. तेव्हा तुमचे दैवत तरी तुम्हाला वाचवू शकेल
असे वाटते का? 15हिज्कीयाच्या बतावणीला बळी पडू
नका. आमच्या पासून आपल्या प्रजेचे रक्षण करण्यात
कोणत्याच राष्ट्राच्या दैवताला अद्यापि यश आलेले नाही.
तेव्हा तुमचा संहार करण्याला तुमचे दैवत माझ्या हातून
तुम्हांला वाचवू शकेल असे समजू नका.'"

16अश्शूरच्या राजाच्या सेवकांनी परमेश्वर देवाची आणि
देवाचा सेवक हिज्कीया याची निंदानालस्ती केली.
17अश्शूरच्या राजाने पत्रांमध्ये परमेश्वर देवा विषयी
अपमानकारक मजकूरही लिहिला. तो असा होता. "इतर
देशांच्या दैवतांना मी केलेल्या संहारापासून आपल्या प्रजेला
वाचवता आले नाही. तद्वतच हिज्कीयाचा देवही मला
त्याच्या प्रजेचा नाश करण्यापासून थोपवू शकणार नाही."
18मग अश्शूरच्या राजाच्या सेवकांनी तटबंदीवर उभ्या
असलेल्या यरुशलेमच्या लोकांना घाबरवण्यासाठी हिब्रू
भाषेत मोठ्याने आरडाओरडा केला. असे करून यरुशलेम
नगर ताब्यात घ्यायचा त्यांचा विचार होता. 19जगभरचे
लोक ज्या दैवतांची पूजा करतात त्या दैवतांविषयी हे
सेवक वाईटसाईट बोलत राहिले. हे परमेश्वर म्हणजे
लोकांनी निव्वळ हातांनी बनवलेल्या मूर्ती. यरुशलेमच्या
परमेश्वरालाही या सेवकांनी त्या देवतांच्याच रांगेला
बसवले.

20यामुळे राजा हिज्कीया आणि आमोजचा मुलगा यशया
संदेष्टा यांनी या प्रश्नावर स्वर्गाकडे तोंड करून मोठ्याने
प्रार्थना केली. 21तेव्हा अश्शूरच्या राजाच्या छावणीवर
परमेश्वराने आपला दूत पाठवला. या दूताने अश्शूरांचे
सगळे सैन्य, त्यातील सरदार आणि अधिकारी यांना मारुन
टाकले. एवढे झाल्यावर अश्शूरचा राजा माघार घेऊन
आपल्या देशात परत गेला. त्याच्या प्रजेला त्याची शरम
वाटली. राजा त्याच्या दैवताच्या देवळात गेला. तिथे त्याच्या
पोटच्या मुलांनी तलवारीने त्याला ठार केले. 22अशाप्रकारे
परमेश्वराने अश्शूरचा राजा सन्हेरीब आणि त्याचे सैन्य
यांच्यापासून हिज्कीया आणि यरुशलेमचे लोक यांचे संरक्षण
केले. परमेश्वराला हिज्कीयाची आणि यरुशलेमच्या प्रजेची
काळजी होती. 23बऱ्याच जणांनी परमेश्वराला वाहायला
भेटवस्तू आणल्या. यहूदाचा राजा हिज्कीया याच्यासाठी
ही नजराणे आणले. या घटनेपासून सर्व राष्ट्रांना
हिज्कीयाबद्दल आदर वाटू लागला.

24या काळातच हिज्कीयाला आजारपणाने घेरले आणि
तो मरणासन्न झाला. त्याने परमेश्वराची प्रार्थना केली.
परमेश्वर त्याच्याशी बोलला आणि परमेश्वराने त्याला
एक संकेत दिला.* 25पण हिज्कीयाला गर्व वाटू लागला
होता. त्यामुळे त्याने परमेश्वराने दाखवलेल्या
दयाळूपणाबद्दल त्याला धन्यवाद दिले नाहीत. या गोष्टीमुळे
हिज्कीयावर आणि यहूदा व यरुशलेमच्या लोकांवर
परमेश्वर कोपला. 26पण हे लोक आणि हिज्कीया यांचे
हृदयपरिवर्तन झाले आणि त्यांची वर्तणूक बदलली.
त्यांच्यात नम्रता आली. त्यामुळे हिज्कीयाच्या हयातीत
परमेश्वराचा रोष त्यांच्यावर ओढवला नाही.

27हिज्कीयाची भरभराट झाली. त्याला मानसन्मान
मिळाला. चांदी, सोने, किंमती रत्ने, मसाल्याचे पदार्थ,
ढाली इत्यादी नाना तऱ्हेच्या वस्तू ठेवण्यासाठी त्याने कोठारे
केली. 28धान्य, नवीन मद्य, तेल या लोकांकडून आलेल्या
गोष्टी ठेवायलाही कोठारे बांधली. गुरेढोरे आणि मेंढ्या
यांच्यासाठी कोंडवाडे बांधले. 29हिज्कीयाने नवीन नगरे
वसवली. सर्व तऱ्हेचे पशू आणि मेंढरे यांचे कळप
त्याच्याकडे होते. देवदयेने हिज्कीयाला समृध्दी आली.
30याच हिज्कीयाने गीहोनचा यरुशलेममधला वरचा प्रवाह
अडवून त्याला दावीद नगराच्या पश्चिमेकडून सरळ खाली
आणले होते. हिज्कीयाला त्याने हाती घेतलेल्या प्रत्येक
कार्यात यश मिळाले.

31एकदा देशात घडलेल्या चमत्कारांविषयी चौकशी
करायला बाबेलच्या अधिपतींनी त्याच्याकडे राजदूत
पाठवले. तेव्हा हिज्कीयाची पारख करावी आणि त्याचे
मन जाणून घ्यावे म्हणून देवाने त्याला एकटे सोडले.

32हिज्कीयाने केलेल्या इतर गोष्टी आणि त्याचा
लोकांविषयीचा दयाळूपणा, त्याची धार्मिक कृत्ये, त्याची
परमेश्वरा प्रती एकनिष्ठा याविषयी 'आमोजचा मुलगा
यशया संदेष्टा याचे दृष्टांत आणि 'यहूदा व इस्राएल राजांचा
इतिहास' या ग्रंथांमध्ये लिहिलेले आहे. 33हिज्कीया मरण
पावला आणि त्याचे आपल्या पूर्वजांशेजारी दफन झाले.
दावीदाच्या वंशजांच्या कबरींपाशी डोंगरावर लोकांनी त्याचे
दफन केले. हिज्कीया मरण पावला तेव्हा यहूदा आणि
यरुशलेममधील लोकांनी त्याला सन्मानपूर्वक निरोप
दिला. हिज्कीयाच्या जागी त्याचा मुलगा मनश्शे गादीवर
आला.

## यहूदाचा राजा मनश्शे

33 मनश्शे यहूदाचा राजा झाला तेव्हा बारा वर्षांचा
होता. त्याने यरुशलेममध्ये पंचावन्न वर्षे राज्य
केले. 2त्यांचे आचरण परमेश्वराच्या दृष्टीने वाईट असे
होते. वाईट वर्तणुकीमुळे ज्या देशांना परमेश्वराने
इस्राएलपुढून हुसकून लावले त्यांच्या निंद्य प्रथांचेच
मनश्शेने अनुकरण केले 3हिज्कीयाने जी उंचस्थाने
उद्ध्वस्त केली होती तीच मनश्शेने पुन्हा बांधली. त्याने
बआल देवतांसाठी वेद्या केल्या आणि अशेराचे स्तंभ उभे
केले. नक्षत्रांपुढे नतमस्तक होऊन तो त्या तारांगणांची
पूजाही करत असे. 4परमेश्वराच्या मंदिरात त्याने त्या
भलत्यासलत्या देवतांसाठी वेद्या बांधल्या. "माझे नाव

---

**परमेश्वर ... संकेत दिला** हिज्कीयाची हकीकत आणि परमेश्वराने त्याला आणखी पंधरा वर्षे जीवदान कसे दिले याविषयी पाहा यशया 38:1–8.

यरूशलेममध्ये चिरकाल राहील” असे याच मंदिराबद्दल
परमेश्वराने म्हटले होते. 5या मंदिराच्या दोन्ही अंगणांत
मनश्शेने सर्व नक्षत्रांसाठी वेद्या बांधल्या.
6बेन हिन्नोमच्या खोऱ्यात त्याने आपल्या पोटच्या
मुलांचा यज्ञात बळी दिला. रमल, जादूटोणा, चेटूक यातही
तो पारंगत होता. चेटूक करणारे आणि मृतात्म्यांशी संबंध
ठेवणारे यांच्याशी मनश्शेचे संबंध होते. परमेश्वराने निषिध्द
मानलेली बरीच कृत्ये मनश्शेने केली. त्याच्या या
गैरवर्तनामुळे परमेश्वराचा संताप झाला. 7मनश्शेने एका
कोरीव मूर्तीची स्थापनाही देवाच्या मंदिरात केली. या
मंदिराविषयी दावीद व त्याचा पुत्र शलमोन यांना देव असे
म्हणाला होता, “या मंदिरात आणि यरुशलेममध्ये माझे
नाव चिरंतन काल राहील. इस्राएलच्या सर्व कुळांमधून
मी यरुशलेमला निवडले. 8त्यांच्या पूर्वजांना कबूल केलेल्या
प्रदेशातून मी आता इस्राएल लोकांना बाहेर पडू देणार
नाही. पण त्यांना दिलेल्या आज्ञा मात्र त्यांनी कसोशीने
पाळल्या पाहिजेत. मोशेमार्फत त्यांना दिलेल्या विधी, नियम
व आज्ञा त्यांनी पाळायला हवेत.”
9मनश्शेने मात्र यहूदा लोक आणि यरुशलेमचे लोक
यांना दुराचरणाला प्रवृत्त केले. इस्राएल लोकांपूर्वी ज्या
राष्ट्रांना परमेश्वराने हुसकावून लावले त्यांच्यापेक्षाही हे
लोक दुराचरणी होते.
10परमेश्वर मनश्शेशी व इतर लोकांशी बोलला पण
कोणीही परमेश्वराचे ऐकले नाही. 11तेव्हा अश्शूरच्या
राजाच्या सेनापतीकरवी परमेश्वराने यहूदावर हल्ला
केला. या सेनापतींनी मनश्शेला आकड्यांनी जखडून
पकडले. त्याच्या हातात पितळी बेड्या ठोकल्या. अशा
रितीने मनश्शेला कैद करून त्यांनी बाबेलला नेले.
12मनश्शेचे हाल झाले तेव्हा त्याने परमेश्वर देवाची करुणा
भाकली. त्याच्या पूर्वजांच्या देवासमोर मनश्शे नम्र झाला.
13त्याने देवाची प्रार्थना केली व मदतीसाठी याचना केली.
मनश्शेचा धावा ऐकून परमेश्वराला त्याची दया आली.
म्हणून त्याला पुन्हा यरुशलेमला आणून परमेश्वराने त्याला
गादीवर बसवले. परमेश्वर हाच खरा देव आहे हे तेव्हा
मनश्शेला पटले.
14या घटनेनंतर मनश्शेने दावीद नगराभोवती आणखी
एक कोट बांधला. हा कोट गीहोनच्या पश्चिमेकडील
खोऱ्यात मासळी दरवाजाजवळ ओफेल टेकडी सभोवती
असून खूप उंच होता. यहूदामधील सर्व तटबंदीच्या
नगरांमध्ये त्याने अधिकारी नेमले. 15परक्या देवतांच्या
मूर्ती त्याने हटवल्या. परमेश्वराच्या मंदिरातील मूर्ती काढून
टाकली. मंदिराच्या टेकडीवर तसेच यरुशलेममध्ये
बांधलेल्या वेद्यांही काढून यरुशलेम नगराबाहेर टाकून
दिल्या. 16नंतर त्याने परमेश्वराची वेदी स्थापन केली
आणि त्यावर शांतिअर्पणे आणि उपकार स्मरणाची अर्पणे
वाहिली. समस्त यहूदी लोकांना त्याने इस्राएलाचा परमेश्वर
देव याची उपासना करायची आज्ञा केली. 17लोक अजूनही
उंचस्थानी यज्ञ करीतच होते पण आता ते फक्त त्यांच्या
परमेश्वर देवा प्रीत्यर्थ करीत होते. 18मनश्शेची बाकीची
कृत्ये तसेच त्याने केलेली देवाची प्रार्थना तसेच परमेश्वर
देवाच्यावतीने द्रष्टे त्याच्याशी जे बोलले ती वचने हे सगळे
इस्राएलच्या राजांच्या बखरीत लिहिलेले आहे. 19मनश्शेची
प्रार्थना आणि परमेश्वराला त्याचे गाऱ्हणे ऐकून करुणा
वाटणे हे ‘द्रष्टयांच्या बखरीत आहे. मनश्शेला उपरती
होण्यापूर्वीची त्याची पापे व दुर्वर्तने, उंच स्थाने व अशेरा
स्तंभ जिथे उभारले ती स्थाने याचेही तपशील याच बखरीत
आहेत. 20पुढे मनश्शे वारला व पूर्वजांबरोबर त्याचे दफन
झाले. त्याच्या राजमहालातच लोकांनी त्याला पुरले. त्याच्या
जागी त्याचा मुलगा आमोन राज्य करु लागला.

## यहूदाचा राजा आमोन

21आमोन विसाव्या वर्षी यहूदाचा राजा झाला. तो
यरुशलेममध्ये दोन वर्षे गादीवर होता. 22परमेश्वराच्या
दृष्टीने निषिध्द अशी कृत्ये त्याने केली. आपले वडील
मनश्शे यांच्याप्रमाणेच तो परमेश्वराच्या इच्छेविरुध्द
वागला. वडीलांनी करून घेतलेल्या कोरीव मूर्तीपुढे यज्ञ
करून त्याने त्यांची पूजा केली. 23पुढे त्याचे वडील मनश्शे
जसे परमेश्वराला नम्रपणे शरण गेले तसा तो गेला नाही.
उलट त्याची दुष्कृत्ये वाढतच चालली. 24आमोनच्या
सेवकांनी कट रचून त्याची त्याच्या महालातच हत्या केली.
25पण राजा आमोन विरुध्द कारस्थान करणाऱ्यांचा यहूदी
लोकांनी काटा काढला. मग आमोनचा मुलगा योशीया
याला लोकांनी राजा केले.

## यहूदाचा राजा योशीया

34 योशीया राजा झाला तेव्हा आठ वर्षांचा होता.
त्याने यरुशलेममध्ये एकतीस वर्षे राज्य केले.
2त्याचे वर्तन योग्य प्रकारचे होते. परमेश्वराची त्याच्या
कडून जशी अपेक्षा होती तसेच तो वागला. आपला पूर्वज
दावीद याच्याप्रमाणे त्याने सत्कृत्ये केली. सन्मार्गावरुन तो
ढळला नाही. 3आपल्या कारकीर्दीच्या आठव्या वर्षीच तो
आपला पूर्वज दावीद याच्या परमेश्वराच्या भजनी लागला.
योशीयाने लहान वयातच हा मार्ग पत्करला आणि
कारकीर्दीच्या बाराव्या वर्षी यहूदा आणि यरुशलेममधील
उंच स्थाने, अशेरा देवीचे खांब, कोरीव आणि ओतीव
मूर्ती यांची मोडतोड केली. 4लोकांनी त्याच्या समोरच
बआलदेवतांच्या मूर्ती फोडून टाकल्या. वरच्या भागात
असलेल्या धूप जाळण्याच्या वेद्या योशीयाने उद्ध्वस्त केल्या.
ओतीव आणि कोरीव मूर्तीचाही त्याने पार चुरा करून
टाकला आणि हे चूर्ण, ज्या लोकांनी बआलदेवतांसाठी
यज्ञ केले त्यांच्या कबरींवर पसरले. 5बआलदेवतांची पूजा
करणाऱ्या याजकांच्या अस्थी देखील त्याने त्यांच्याच
वेद्यांवर जाळून टाकल्या. अशाप्रकारे यहूदा आणि
यरुशलेममधून योशीयाने मूर्तिपूजेचा पुरा बीमोड केला.

6मनश्शे, एफ्राइम, शिमोन, नफताली येथपर्यंतच्या शहरांतून आणि त्यांच्या आसपासच्या पडीक खेड्यांमधूनही* त्याने हेच केले. 7मूर्तिभंजन, अशेरा खांबांची मोडतोड, वेद्यांचा विध्वंस बआलदेवतेच्या धूपाच्या वेद्या उखडणे ही इस्राएलभरची मोहीम उरकल्यावर योशीया यरुशलेमला परतला.

8योशीयाने राज्याची सूत्रे हाती घेतल्याच्या अठराव्या वर्षी शाफान, मासेया, आणि योवाह यांना परमेश्वराचे देवाचे मंदिर दुरुस्तीसाठी पाठवले. शाफानच्या वडलांचे नाव असल्या, मासेया हा नगराचा कारभारी होता आणि योवाहचे वडील योवाहाज. योवाह हा बखरकार होता. यहूदा आणि मंदिर यांच्या शुध्दीकरणासाठी मंदिराच्या डागडुजीचे हे काम योशीयाने अंगावर घेतले. 9ही माणसे हिल्कीया या मुख्य याजकाकडे गेली. मनश्शे, एफ्राइम आणि उर्वरित सर्व इस्राएलमधून लोकांनी देवाच्या मंदिरासाठी दिलेला पैसा लेवी द्वारपालांनी जमा केला होता. सर्व यहूदा प्रांत, बन्यामिनचा प्रदेश आणि यरुशलेममधून देखील त्यांनी पैसे जमा केले होते. ही रक्कम हिल्कीयाकडे त्यांनी सुपूर्द केली. 10मग, परमेश्वराच्या मंदिराच्या बांधकामावर देखरेख करणाऱ्यांना लेवींनी हे पैसे दिले आणि देखरेख करणाऱ्यांना परमेश्वराच्या मंदिराची दुरूस्ती करण्यासाठी कामगारांना दिले. 11ताशीव चिरे, लाकूड यांच्या खरेदीसाठी गवंडी, सुतार या लोकांना पैसे देण्यात आले. मंदिराच्या दुरूस्तीसाठी आणि कडीपाटासाठी लाकूड लागले. यहूदाच्या राजांनी या पूर्वी मंदिराची योग्य देखभाल न केल्यामुळे मंदिराच्या इमारती जीर्ण झाल्या होत्या. 12–13कामगारांनी मन लावून काम केले. यहथ व ओबद्या हे मरारी कुळातील लेवी देखरेख करत होते. कहाथी वंशातील जखऱ्या आणि मशुल्लाम हे ही देखरेखीच्या कामावर होते. वाद्ये वाजवण्यात निपुण असलेले लेवीसुध्दा कारागिरांवर आणि मजुरांवर देखरेख करत होते. चिटणीस, कारभारी आणि द्वारपाल म्हणूनही काही लेवी काम करत होते.

## नियमशास्त्राचा ग्रंथ सापडतो

14परमेश्वराच्या मंदिरातील पैसा लेवी बाहेर आणत असताना हिल्कीया या याजकाला मोशेमार्फत आलेला नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला. 15तेव्हा हिल्कीयाने शाफान या चिटणीसाला असा ग्रंथ सापडल्याचे सांगून शाफानला तो दिला. 16शाफानने तो योशीयाकडे आणला. राजाला तो म्हणाला, “तुझे सेवक तुझ्या सूचनांबरहुकूम वागत आहेत. 17परमेश्वराच्या मंदिरातील पैसा घेऊन त्यातून ते देखरेख करणाऱ्यांना आणि मजुरांना वेतन देत आहेत” 18शाफान पुढे राजाला म्हणाला, “याजक हिल्कीयाने मला हे पुस्तक दिले आहे.” शाफानने मग राजाला पुस्तकातील मजकूर वाचून दाखवला. 19तो शास्त्रग्रंथ ऐकत असता राजा योशीयाने उद्वेगाने कपडे फाडले. 20आणि हिल्कीया, शाफानचा मुलगा अहीकाम, मीखाचा मुलगा अब्दोन, चिटणीस शाफान आणि आपला सेवक असाया यांना योशीयाने आज्ञा केली की. 21“माझ्या आणि इस्राएल व यहूदा येथे आता शिल्लक असलेल्या लोकांच्या वतीने परमेश्वराला जाऊन विचारा. या पुस्तकातील वचनांविषयी त्याला विचारा. आपल्या पूर्वजांनी परमेश्वराचे म्हणणे न जुमानल्यामुळे परमेश्वराचा आपल्यावर कोप झाला आहे. आपल्या पूर्वजांचे वर्तन या पुस्तकातील वचनांना अनुसरुन नव्हते.”

22हिल्कीया आणि राजाचे सेवक* हुल्दा या संदेष्टीकडे गेले. हुल्दा ही शल्लूमची बायको. शल्लूम ताकहतचा आणि ताकहत इस्त्राचा मुलगा. इस्त्रा राजाच्या वस्त्रागाराचा प्रमुख होता. हुल्दा यरुशलेमच्या नवीन भागात राहात होती. हिल्कीया आणि राजाचे सेवक यांनी तिला सर्व हकीगत सांगितली. 23हुल्दा त्यांना म्हणाली, “इस्राएलचा परमेश्वर देव याचे म्हणणे असे आहे: ‘राजा योशीयाला म्हणावे: 24परमेश्वर म्हणतो, ‘या प्रदेशावर आणि इथे राहणाऱ्या लोकांवर मी अरिष्ट आणणार आहे. यहूदाच्या राजाला जे पुस्तक वाचून दाखवण्यात आले. त्यातील मजकुरात आहेत ती सर्व संकटे त्यांच्यावर ओढवतील.

25माझ्याकडे पाठ फिरवून इतर देवतांपुढे त्यांनी धूप जाळला म्हणून मी असे करणार आहे. आपल्या दुष्कृत्यांमुळे लोकांनी मला कुध्द केले आहे. या क्रोधाचा अंगार त्यांच्यावर बरसेल आणि तो शांत होणार नाही.’

26“पण यहूदाचा राजा योशीया याला सांग. त्यानेच तुला माझ्याकडे पाठवले आहे की तू नुकतेच जे ऐकलेस त्याविषयी इस्राएलाचा परमेश्वर देव म्हणतो: 27‘योशीया, पश्चात्तापाने तू माझ्यापुढे विनम्र झालास. खेदाने आपले कपडे फाडलेस. तू रडलास. तू मृदू अंत:करणाचा असल्यामुळे 28तुझ्या पूर्वजांकडे मी तुला नेईन* तुला शांत मरण येईल. या प्रदेशावर आणि लोकांवर जी संकटे कोसळतील ती तुला पाहायला लागणार नाहीत.’” हिल्कीया आणि राजाचे सेवक या सर्वांनी हा निरोप राजाला येऊन सांगितला.

29तेव्हा राजा योशीयाने यहूदा आणि यरूशलेममधील सर्व वडीलधाऱ्यांना भेटीसाठी एकत्र बोलावले. 30राजा परमेश्वराच्या मंदिरात गेला. यहूदातील सर्व प्रजा, यरुशलेममधील सर्व थोर तसेच सामान्य माणसे, याजक आणि लेवी हे सर्व राजासोबत होते. परमेश्वराच्या मंदिरात सापडलेल्या कराराच्या ग्रंथातील सर्व वचने तेथे राजाने त्यांना वाचून दाखवली. 31मग राजा उभा राहिला. त्याने

---

**आसापाची पडीक खेडी** येथे अर्थाचा पुरा उलगडा होत नाही.

**राजाचे सेवक** हिब्रू लेखनामध्ये “राजाचे सेवक” हे शब्द नाहीत.

**पूर्वजांकडे मी तुला नेईन** याचा अर्थ “योशीयाला मरण येईल.”

परमेश्वराशी करार केला. परमेश्वराला अनुसरायचे,
त्याचे आज्ञा, नियम आणि विधी पाळायचे त्याने कबूल
केले. हे सर्व त्याने मन:पूर्वक करायचे मान्य केले.
नियमशास्त्रातील वचनांप्रमाणे वागायचे कबूल केले. 32मग
त्याने यरुशलेम आणि बन्यामिन मधील लोकांना ही या
करारपालनात सामील करून घेतले. यरुशलेमचे लोक
आपल्या पूर्वजांच्या देवाचा करार पाळू लागले.
33इस्राएलमध्ये वेगवेगळ्या देशांमधल्या विविध मूर्ती होत्या.
पण त्या सर्व अनिष्ट मूर्ती योशीयाने फोडून तोडून टाकल्या.
इस्राएल लोकांना त्याने परमेश्वर देवाची सेवा करायला
लावले. आणि योशीया जिवंत असेपर्यंत लोक आपल्या
पूर्वजांचा देव परमेश्वर याचीच उपासना करत होते.

## योशाया वल्हांडणाचा सण साजरा करतो

35 राजा योशीयाने यरुशलेमात परमेश्वराप्रीत्यर्थ
वल्हांडणाचा उत्सव केला. पहिल्या महिन्याच्या
चौदाव्या दिवशी वल्हांडणाचा यज्ञपशू कापला गेला.
2परमेश्वराच्या मंदिराची कामे पार पाडण्यासाठी योशीयाने
याजक नेमले आणि त्यांच्या कार्यात त्यांना प्रोत्साहन दिले.
3इस्राएल लोकांना शिक्षण देणाऱ्या आणि परमेश्वराच्या
सेवेसाठी शुचिर्भूत होणाऱ्या लेव्यांना योशीया म्हणाला,
"दावीद पुत्र शलमोनाने बांधलेल्या या मंदिरात पवित्र
करारकोश ठेवा. दावीद इस्राएलचा राजा होता. यापुढे
पवित्र करारकोश वारंवार खांद्यावरून वाहू नका.
परमेश्वर देवाची सेवा करा. देवाची प्रजा म्हणजे इस्राएलचे
लोक त्यांची सेवा करा. 4आपापल्या घराण्यांप्रमाणे तुमचा
जो क्रम ठरला आहे त्यानुसार मंदिरातील सेवेसाठी सिध्द
व्हा. राजा दावीद आणि त्याचा मुलगा राजा शलमोन यांनी
आखून दिल्याप्रमाणे आपापली कर्तव्ये पार पाडा.
5आपापल्या घराण्यांच्या वर्गवारीप्रमाणे, भाऊबंदांबरोबर
पवित्र स्थानी उभे राहा. म्हणजे तुम्हाला आपापसात सहकार्य
करता येईल. 6वल्हांडणाचे यज्ञपशू कापा, परमेश्वरासाठी
स्वत:चे पवित्रीकरण करा. इस्राएल बांधवांसाठी यज्ञपशू
तयार ठेवा. परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे सर्व काही यथासांग
पार पाडा. या आज्ञा परमेश्वराने आपल्याला मोशेमार्फत
दिल्या आहेत."

7वल्हांडणासाठी योशीयाने 30,000 शेरडे मेंढरे यज्ञपशू
म्हणून इस्राएल लोकांना दिली. या खेरीज 3000 बैल
दिले. हे पशुधन त्याच्या खाजगी मालमत्तेतील होते. 8या
उत्सवा निमित्त योशीयाच्या सरदारांनीदेखील लोकांना,
लेवींना आणि याजकांना पशूंचे आणि वस्तूंचे मुक्त वाटप
केले. मुख्य याजक हिल्कीया, जखऱ्या आणि यहीएल हे
मंदिराचे प्रमुख कारभारी होते. त्यांनी 2,600 शेरडे मेंढरे
आणि 300 बैल एवढे पशू वल्हांडणाचे बळी म्हणून
याजकांना दिले. 9कोनन्या आणि त्याचे भाऊ शमाया व
नथनेल यांनी तसेच हशब्या, ईयेल व योजाबाद यांनी
लेवींना 500 कोकरे मेंढरे व 500 बैल वल्हांडणाचे
यज्ञपशू म्हणून दिले. कोनन्या इत्यादी मंडळी लेव्यांची
प्रमुख होती.

10वल्हांडणाच्या उपासनेची सर्व सिध्दता झाल्यावर
याजक आणि लेवी आपापल्या जागी स्थानापन्न झाले.
तशी राजाज्ञाच होती. 11वल्हांडणाचे कोकरे मारली गेली.
लेवींनी त्या पशूंची कातडी काढून रक्त याजकांना दिले.
याजकांनी हे रक्त वेदीवर शिंपडले. 12त्यांनी मग हे पशू
परमेश्वराला होमार्पण करण्यासाठी वेगवेगळ्या घराण्याच्या
लोकांकडे स्वाधीन केले. हा अर्पणाचा विधी मोशेच्या
नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे करायचा होता. 13लेवींनी
वल्हांडणाच्या यज्ञपशूंचे मांस विधिवत भाजले. पातेल्यांत,
हंड्यांत आणि कढ्यांमध्ये त्यांनी ही पवित्रार्पणे शिजवली
आणि तत्परतेने लोकांना ती नेऊन दिली. 14हे काम
उरकल्यावर लेवींना स्वत:साठी आणि अहरोनचे वंशज
असलेल्या याजकांसाठी मांस मिळाले. कारण हे याजक
होमबली आणि चरबी अर्पण करण्यात रात्र पडेपर्यंत गुंतले
होते. 15आसाफच्या घराण्यातील लेवी गायक राजा दावीदाने
नेमून दिलेल्या आपापल्या जागांवर उभे होते. आसाफ,
हेमान आणि राजाचा संदेष्टा यदुथून हे ते होत. प्रत्येक
प्रवेशद्वारावरील द्वारपालांना आपल्या जागा सोडायची गरज
नव्हती कारण त्यांच्या लेवी बांधवांनी वल्हांडणाच्या सणाची
त्यांच्यासाठी करायची सगळी तयारी केली होती.

16तेव्हा राजा योशीयाच्या आज्ञेनुसार परमेश्वराच्या
उपासनेची सर्व तयारी त्या दिवशी पूर्ण झाली. वल्हांडणाचा
उत्सव झाला आणि परमेश्वराच्या वेदीवर होमबली अर्पण
करण्यात आले. 17सर्व उपस्थित इस्राएल लोकांनी
वल्हांडणाचा आणि बेखमीर भाकरीचा सण सात दिवस
साजरा केला. 18शमुवेल संदेष्ट्याच्या काळापासून हा सण
एवढ्या मोठ्या प्रमाणात साजरा झाला नव्हता. इस्राएलच्या
कुठल्याच राजाच्या कारकीर्दीत हे झाले नव्हते. राजा
योशीया, याजक, लेवी, यहूदा आणि इस्राएलमधून आलेले
लोक आणि यरुशलेमची प्रजा यांनी वल्हांडणाचा उत्सव
थाटामाटाने केला. 19योशीयाच्या कारकिर्दीच्या अठराव्या
वर्षी हा वल्हांडणाचा उत्सव झाला.

## योशीयाचा मृत्यू

20योशीयाने मंदिरासाठी सर्व चांगल्या गोष्टी केल्या. पुढे
मिसरचा राजा नखो, फरात नदीजवळच्या कर्कमीश
नगराविरुध्द लढण्यासाठी सैन्यासह चालून आला. योशीया
त्याला लढाईसाठी सामोरा गेला. 21पण नखोने आपल्या
वकीलांमार्फत त्याला कळवले की, "राजा योशीया, मला
तुझ्याशी कर्तव्य नाही. मी तुझ्याशी लढायला आलेलो
नाही. माझ्या शत्रूंवर चालून आलो आहे. देवानेच मला
त्वरा करायला सांगितले. परमेश्वराची मला साथ आहे
तेव्हा तू त्रास घेऊ नकोस. तू मला विरोध केलास तर देव
तुझा नाश करील." 22पण योशीया मागे हटला नाही.
त्याने नखोला तोंड द्यायचे ठरवले. आणि वेष पालटून तो

लढाईत उतरला. देवाच्या आज्ञेविषयी नखोने जे सांगितले
ते योशीयाने ऐकले नाही. तो मगिद्दोच्या खोऱ्यात युध्दासाठी
सज्ज झाला. **23**या लढाईत योशीयावर बाणांचा वर्षाव झाला.
तो आपल्या सेवकांना म्हणाला, “मी घायाळ झालो आहे,
मला इथून घेऊन जा.”
**24**तेव्हा सेवकांनी योशीयाला त्याच्या रथातून उतरवून
त्याने तिथे आणलेल्या दुसऱ्या रथात बसवले आणि
योशीयाला त्यांनी यरुशलेमला नेले. यरुशलेममध्ये
योशीयाला मरण आले. त्याच्या पूर्वजांना पुरले तेथेच
योशीयाला पुरण्यात आले. योशीयाच्या मृत्यूने यहूदा आणि
यरुशलेमच्या लोकांना फार दु:ख झाले. **25**यिर्मयाने
योशीयाप्रीत्यर्थ शोकगीते लिहिली आणि गायिली. ती
विलापगीते आजही इस्राएलचे स्त्रीपुरुष गातात. योशीयाची
ही गीते गाण्याचा पायंडाच पडला आहे. विलापगीताच्या
पुस्तकात ही लिहिलेली आहेत.
**26–27**आपल्या कारकिर्दीत योशीयाने ज्या इतर गोष्टी
केल्या त्या ‘इस्राएल आणि यहूदा राजांचा इतिहास’ या
पुस्तकात अथपासून इतीपर्यंत नोंदवलेल्या आहेत. त्याची
परमेश्वरावरची निष्ठा आणि त्याचे आज्ञापालन याविषयी
त्यात लिहिले आहे.

## यहोआहाज, यहूदाचा राजा

**36** यहूदाच्या लोकांनी यरुशलेमचा नवा राजा म्हणून
यहोआहाजाची निवड केली. यहोआहाज हा
योशीयाचा मुलगा. **2**तो यहूदाचा राजा झाला तेव्हा तेवीस
वर्षांचा होता. त्याने यरुशलेममध्ये तीन महिने राज्य केले.
**3**त्यानंतर मिसरचा नखो याने यहोआहाजला कैद केले.
नखोने यहूदाच्या लोकांवर 3 3/4 टन चांदी आणि 75
पौंड सोने एवढा दंड बसवला. **4**यहोआहाजचा भाऊ
एल्याकीम याला नखोने यहूदा-यरुशलेमचा राजा केले.
यानंतर नखोने त्याचे नामांतर करून यहोयाकीम असे
ठेवले आणि यहोआहाजला मिसरला नेले.

## यहूदाचा राजा यहोयाकीम

**5**यहोयाकीम पंचविसाव्या वर्षी यहूदाचा राजा झाला.
त्याने यरुशलेममध्ये अकरा वर्षे राज्य केले. यहोयाकीमने
परमेश्वर देवाच्या दृष्टीने वाईट गोष्टी केल्या. त्याने
परमेश्वर देवा विरूध्द पाप केले.
**6**बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने यहूदावर हल्ला
केला. त्याने यहोयाकीमला कैद केले आणि त्याला पितळी
बेड्या ठोकल्या. तशा अवस्थेत त्याला नबुखद्नेस्सरने
बाबेलला नेले. **7**नबुखद्नेस्सरने परमेश्वराच्या मंदिरातील
काही वस्तू हस्तगत करून त्या बाबेलला नेल्या आणि
स्वत:च्या घरात ठेवल्या. **8**यहोयाकीमच्या इतर गोष्टी,
त्याची दुष्कृत्ये आणि त्याचे अपराध हे सर्व ‘इस्राएल व
यहूदी राजांचा इतिहास’ या पुस्तकात लिहिलेले आहेत.
यहोयाकीमच्या जागी त्याचा मुलगा यहोयाखीन राज्य करु
लागला.

## यहूदाचा राजा यहोयाखीन

**9**यहोयाखीन यहूदाचा राजा झाला तेव्हा अठरा वर्षांचा
होता. यरुशलेममध्ये त्याची कारकीर्द तीन महिने आणि
दहा दिवस होती. परमेश्वराला अमान्य असलेले वर्तन
करून त्याने पाप केले. **10**राजा नबुखद्नेस्सरने वर्षारंभी
काही सेवक पाठवून यहोयाखीनला परमेश्वराच्या
मंदिरातील बहुमोल खजिन्यासह बाबेलला आणवले.
यहोयाखीनच्या नातलगांपैकी सिद्कीया याला
नबुखद्नेस्सरने यहूदा व यरुशलेमचा राजा केले.

## यहूदाचा राजा सिद्कीया

**11**सिद्कीया यहूदाचा राजा झाला तेव्हा एकवीस वर्षांचा
होता. त्याने यरुशलेममध्ये अकरा वर्षे राज्य केले.
**12**परमेश्वराच्या दृष्टीने निंद्य असे त्याचे वर्तन असे.
परमेश्वराचे आदेश संदेष्टा यिर्मया याच्याकडून येत असत.
त्याच्यापुढेही सिद्कीया विनम्र झाला नाही आणि यिर्मयाचे
त्याने ऐकले नाही.

## यरुशलेमचा विनाश

**13**सिद्कीयाने नबुखद्नेस्सर विरुध्द उठाव केला.
नबुखद्नेस्सरने पूर्वी सिद्कीया कडून स्वत:शी
एकनिष्ठतेची शपथ वाहवली होती. सिद्कीयाने तेव्हा
देवाची शपथ घेऊन तसे वचन दिले होते. पण तरीही
सिद्कीयाने आडमुठेपणा केला आणि आपला आयुष्यक्रम
बदलून इस्राएलच्या परमेश्वर देवाचे आज्ञापालन करायचे
नाकारले. **14**शिवाय याजकांचे प्रमुख, आणि यहूदातील
वडीलधारी मंडळी यांचे दुराचरण वाढत चालले आणि
त्यांनी अधिकाधिक पातके केली. ते परमेश्वराच्या बाबतीत
अप्रामाणिक झाले. इतर देशांची अमंगळ कृत्यांची उदाहरणे
त्यांनी समोर ठेवली. या प्रमुखांनी यरुशलेममधल्या
परमेश्वराने पवित्र केलेल्या मंदिराची धूळदाण केली.
**15**त्यांच्या पूर्वजांच्या परमेश्वर देवाने लोकांना सावध
करण्यासाठी पुन्हापुन्हा संदेष्टे पाठवले. आपल्या प्रजेविषयी
आणि मंदिराविषयी त्याच्या मनात करुणा होती म्हणून
परमेश्वर असे वागला. त्यांचा अथवा मंदिराचा नाश होऊ
नये असे परमेश्वराला वाटत होते. **16**पण या परमेश्वराच्या
प्रजेने मात्र संदेष्ट्यांची टर उडवली. त्यांनी देवाच्या
संदेष्ट्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. देवाच्या संदेशांची
हेटाळणी केली. अखेर देवाचा क्रोध अनावर झाला.
आता त्याचा संताप थोपवता येणे अशक्य झाले. **17**तेव्हा
बाबेलच्या राजाला देवाने यहूदा व यरुशलेमवर स्वारी
करायला लावले. बाबेलच्या राजाने मंदिरात असलेल्या
तरूणांनाही ठार केले. यहूदा व यरुशलेममधील लोकांवर
त्याने दयामाया दाखवली नाही. लोकांना जिवे मारताना

तरूण-वृध्द, स्त्री-पुरुष, रोगी-निरोगी असा भेदाभेद
बाळगला नाही. देवानेच नबुखद्नेस्सरला यहूदा व
यरुशलेमच्या लोकांना शासन करायची मुभा दिली होती.
18देवाच्या मंदिरातील सर्व चीजवस्तू त्याने बाबेलला नेली.
इतकेच नव्हे तर राजाच्या व सरदारांच्या किंमती वस्तूही
नेल्या. 19नबुखद्नेस्सरने व त्याच्या सैन्याने मंदिराला आग
लावली, यरुशलेमची तटबंदी उद्ध्वस्त केली, राजा आणि
सरदार यांच्या मालकीची घरे जाळली. यरुशलेममधील
प्रत्येक मौल्यवान वस्तू लुटून नेली किंवा नष्ट केली.
20अजूनही हयात असलेल्या लोकांना नबुखदनेस्सरने
बाबेलला नेऊन गुलाम केले. पुढे पारसाचे राज्य येऊन
त्यांनी बाबेलचा पराभव करेपर्यंत हे गुलाम तेथेच राहिले.
21अशाप्रकारे, यिर्मयाकडून इस्राएल बद्दल परमेश्वराने
जे वदवले ते प्रत्यक्षात आले. परमेश्वर यिर्मयाद्वारे म्हणाला
होता: "हे ठिकाण सत्तर वर्षे निर्मनुष्य आणि उजाड राहील.
लोकांनी न पाळलेल्या शब्बाथच्या भरपाईसाठी असे
होईल."

22कोरेश पारसाचा राजा असताना पहिल्याच वर्षी
परमेश्वराने त्याला एक फर्मान काढायला प्रेरणा दिली.
यिर्मयाच्या तोंडून वदवलेली भविष्यवाणी प्रत्यक्षात
येण्यासाठी परमेश्वराने त्याला ही स्फूर्ती दिली. कोरेशने
आपल्या दूतांकरवी राज्यभर असा संदेश पाठवला की,

23पारसचा राजा कोरेश म्हणतो: स्वर्गातील परमेश्वर
देव याने मला या पृथ्वीचा सम्राट केले आहे. त्याच्यासाठी
यरुशलेममध्ये मंदिर बांधायची जबाबदारीही माझ्यावर
सोपवली आहे. आता तुमच्यापैकी देवाला मानणारे सर्वजण
निर्धास्तपणे यरुशलेमला जाऊ शकता. परमेश्वर देव
तुमच्या बरोबर असो.

# एज्रा

## कोरेशची कैद्य मदत

1 कोरेश पारसचा राजा असताना त्याच्या कारकीर्दीच्या
पहिल्या वर्षी परमेश्वराने त्याला एक घोषणा करायला
उद्युक्त केले. कोरेशने राज्यभर या फर्मानाची दवंडी
पिटवली तसेच ते लिहूनही काढले. यिर्मयाच्या तोंडून
परमेश्वराने वदविलेले वचन प्रत्यक्षात यावे म्हणून देवाची
ही प्रेरणा होती. घोषणा पुढीलप्रमाणे होती:

2पारसचा राजा कोरेश म्हणतो:

“स्वर्गातील देव परमेश्वर याने पृथ्वीवरील सर्व
राज्ये मला दिली आहेत; यहूदातील यरुशलेम येथे
त्याचे मंदिर बांधण्यासाठी त्याने मला निवडले.
3यरुशलेममध्ये असलेला देव हाच इस्राएलचा
परमेश्वर आहे. तुमच्या पैकी देवाचे जे लोक असतील
त्यांचे तो भले करो, अशी मी प्रार्थना करतो. त्यांना
यहूदातील यरुशलेममध्ये जाऊन परमेश्वरासाठी
मंदिर बांधू द्यावे. 4आणि इस्राएलांपैकी जे कोणी शत्रूच्या
तावडीतून बचावले असतील त्यांना ते असतील त्या
ठिकाणच्या लोकांनी साहाय्य करावे. त्यांना चांदी,
सोने, गायी-गुरे इत्यादी गोष्टी द्याव्यात.
यरुशलेममधील मंदिरासाठी स्वखुशीने दाने द्यावीत.”

5तेव्हा यहूदा व बन्यामीनच्या घराण्यातील
वडीलधाऱ्यांनी यरुशलेमला निघायची तयारी केली; मंदिर
बांधण्यासाठी ते यरुशलेमला चालले होते. ज्यांना ज्यांना
देवाने प्रेरणा दिली होती असे सगळेच यरुशलेमला जायला
तयार झाले. 6त्यांच्या शेजाऱ्यांनी त्यांना उदारपणे अनेक
भेटवस्तू दिल्या. चांदी, सोने, पशू अशा मौल्यवान ऐवजाचा
त्यात समावेश होता. 7शिवाय नबुखद्नेस्सरने यरुशलेमच्या
मंदिरातील वस्तू काढून ज्या ठिकाणी त्याने आपले
खोटे देव ठेवले होते. अशा स्वत:च्या मंदिरात ठेवल्या
होत्या, त्या राजा कोरेशने बाहेर काढल्या. 8पारसच्या
कोरेश राजाने आपला कोशाधिकारी मिथ्रदाथ याला हे
काम सांगितले. त्याने त्या काढून शेशबस्सर या यहूदी
प्रमुखाच्या स्वाधीन केल्या
9मिथ्रदाथने काढून आणलेल्या मंदिरातील वस्तू
पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| | सोन्याची तबके | 30 |
| | चांदीची तबके | 1,000 |
| | सुऱ्या व | 29 |
| 10 | सोन्याचे कटोरे | 30 |
| | त्याचप्रकारचे चांदीचे कटोरे | 410 |
| | इतर पात्रे | 1,000 |

11चांदी-सोन्याच्या सर्व मिळून 5,400 वस्तू होत्या.
बाबेलमधून कैदी यरुशलेमला परत आले त्यावेळी
शेशबस्सराने या सर्व वस्तू आणल्या.

## परत आलेल्या कैद्यांची यादी

2 पूर्वी, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने ज्यांना कैद
करून बाबेलला नेले होते ते बंदिवासातून मुक्त होऊन
यरुशलेम आणि यहूदा येथील आपापल्या प्रांतात परतले.
जो तो आपापल्या गावी परतला. 2शेशबस्सर म्हणजेच
जरुब्बाबेल याच्याबरोबर जे आले ते असे: येशूवा, नहेम्या,
सराया, रएलाया, मर्दखय, बिलशान, मिस्पार, बिग्वई,
रहूम व बाना. परत आलेल्या इस्राएलींची नावानिशी यादी
आणि संख्या पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| 3 | पारोशाचे वंशज | 2,172 |
| 4 | शफाट्याचे वंशज | 372 |
| 5 | आरहाचे वंशज | 775 |
| 6 | येशूवा व यवाब यांच्या घराण्यातील पहथमवाबा चे वंशज | 2,812 |
| 7 | एलामाचे वंशज | 1,254 |
| 8 | जत्तूचे वंशज | 945 |
| 9 | जक्कृाईचे वंशज | 760 |
| 10 | बानीचे वंशज | 642 |
| 11 | बेबाईचे वंशज | 623 |
| 12 | अजगादाचे वंशज | 1,222 |
| 13 | अदोनिकामचे वंशज | 666 |
| 14 | बिग्वईचे वंशज | 2,056 |
| 15 | आदीनाचे वंशज | 454 |
| 16 | हिज्कीयाच्या घराण्यातील आटेरचे वंशज | 98 |
| 17 | बेसाईचे वंशज | 323 |

18 योराचे वंशज 112
19 हाशूमाचे वंशज 223
20 गिबाराचे वंशज 95
21 बेथलहेमा नगरातील 123
22 नटोफा नगरातील 56
23 अनाथोथ मधील 128
24 अजमावेथ मधील 42
25 किर्याथ-आरीम, कफीरा आणि
बैरोथ येथील 743
26 रामा व गेबा मधील 621
27 मिखमासमधील 122
28 बेथेल आणि आय येथील 223
29 नबो येथील 52
30 मग्वीशचे लोक 156
31 एलामनावाच्या दुसऱ्या गावचे 1,254
32 हारीम येथील 320
33 लोद, हादीद आणि ओनो येथील 725
34 यरीहो नगरातील 345
35 सनाहाचे 3,630

36 याजक पुढीलप्रमाणे:
येशूवाच्या घराण्यातील
यदायाचे वंशज 973
37 इम्मेराचे वंशज 1,052
38 पशहूराचे वंशज 1,247
39 हारीमाचे वंशज 1,017

40 लेवींच्या घराण्यातील लोक पुढीलप्रमाणे:
होदव्याच्या घराण्यातील येशूवा व कदमीएल यांचे
वंशज 74

41 गायक असे:
आसाफचे वंशज 128

42 मंदिराच्या द्वारपालांचे वंशज:
शल्लूम, आहेर, तल्मोन, अक्कूवा,
हतीत आणि शोबाई यांचे वंशज 139

43 मंदिरातील पुढील विशेष सेवेकऱ्यांचे वंशज:
सीहा, हसूफा, तब्बाबोथ,
44 केरोस, सीहा, पादोन,,
45 लबाना, हगबा, अकूबा,
46 हागाब, शम्लाई, हानान,
47 गिद्देल, गहर, राया,
48 रसीन, नकोदा, गज्जाम,
49 उज्जा, पासेह, बेसाई,
50 अस्ना, मऊनीम, नफूसीम
51 बकबुक हकूफ, हरहुर,
52 बस्लूथ, महीद, हर्षा,
53 बर्कोस, सीसरा, तामह,
54 नसीहा, हतीफा

55 शलमोनाच्या सेवकांचे वंशज:

सोताई, हसोफरत, परूदा,
56 जाला, दर्कोन, गिद्देल,
57 शफाट्या, हत्तील, पोखेरेथ-हस्सबाईम, आमी
58 मंदिरातील चाकर आणि शलमोनच्या सेवकांचे
वंशज 392

59 तेल-मेलह, तेलहर्षा, करुब, अद्दान, इम्मेर या
ठिकाणांहून काहीजण यरुशलेमला आले होते पण आपण
इस्राएलच्या घराण्यातलेच वारसदार आहोत हे त्यांना सिध्द
करता आले नाही ते असे:

60 दलाया, तोबीया आणि नकोदाचे वंशज 652

61 याजकांच्या घराण्यातील हबया, हक्कोस, बर्जिल्लय,
(गिलादच्या बर्जिल्लयच्या मुलीशी जो लग्न करेल तो
बर्जिल्ल्यचा वंशज मानला जातो) यांचे वंशज.

62 आपल्या घराण्याची वंशावळ ज्यांना शोधूनही मिळाली
नाही ते, आपले पूर्वज याजक होते हे सिध्द करु न
शकल्याने याजक होऊ शकले नाहीत. त्यांची नावे
याजकांच्या यादीत नाहीत. 63 त्यांनी परमपवित्र मानले गेलेले
अन्न खायचे नाही असा आदेश अधिपतीने काढला. उरीम
व थुम्मीम घातलेला याजक देवाला कौल मागायला
उभा राहीपर्यंत त्यांना हे अन्न खाण्यास मनाई होती.
64–65 एकंदर 42,360 लोक परत आले. त्यामध्ये त्यांच्या
7,337 स्त्री-पुरुष चाकरांची गणती केलेली नाही.
त्यांच्याबरोबर 200 स्त्रीपुरुष गायकही होते.
66–67 त्यांच्यासोबत 736 घोडे, 245 खेचरे, 435 उंट आणि
6,720 गाढवे होती.
68 हे सर्वजण यरुशलेममध्ये परमेश्वराच्या मंदिराजवळ
आले. मग अनेक घराण्याच्या प्रमुखांनी मंदिराच्या
बांधकामासाठी देणगीदाखल भेटी दिल्या. उद्ध्वस्त
झालेल्या मंदिराच्या जागी त्यांना नवीन मंदिराची वास्तू
उभारायची होती. 69 या वास्तूसाठी त्यांनी यथाशक्ती दिलेली
दाने अशी: सोने 1,100 पौंड, चांदी 3 टन, याजकांचे
अंगरखे 100.
70 याजक, लेवी आणि इतर काही लोक यांनी
यरुशलेममध्ये आणि त्याच्या आसपास वस्ती केली.
त्यांच्यात मंदिरातील गायक, द्वारपाल, सेवेकरी हे ही होते
इतर इस्राएली लोक आपापल्या मूळ गावी स्थायिक झाले.

## वेदीची पुनर्बांधणी

3 इस्राएल लोक आपापल्या नगरात सातव्या महिन्यांत
परतले, तेव्हा एकमनाने सर्व जण यरुशलेममध्ये एकत्र
आले. 2योसादाकचा मुलगा येशूवा याने शल्तीए लचा
मुलगा जरुब्बाबेल आणि इतर बरोबर असलेल्या लोकांच्या
सहकार्याने, होमार्पणे वाहण्यासाठी इस्राएलच्या देवाची वेदी
बांधली. देवाचा एकनिष्ठ सेवक मोशे याच्या नियमशास्त्रात
सांगितल्याप्रमाणे तिचे बांधकाम झाले.
3आपल्या लगतच्या राष्ट्रातील लोकांची धास्ती वाटत
असूनही तिला न जुमानता त्यांनी वेदी बांधली जुना पाया
तसाच ठेवून त्यांनी त्यावर वेदी उभारली आणि तिच्यावर
ते सकाळ संध्याकाळ होमार्पणे वाहू लागले. 4मग त्यांनी
मोशेच्या नियमशस्त्राला अनुसरुन रोज ठराविक
संख्यचे होमबली अर्पण करून मंडपांचा सण साजरा
केला. 5त्यांनंतर नित्याचे होमार्पण, नवचंद्रदिनी करायचे
होमार्पण आणि परमेश्वराच्या आदेशाप्रमाणे सणांचे आणि
दिवसांचे बळी द्यायला त्यांनी सुरुवात केली. याखेरीज
लोकांनी परमेश्वराला स्वेच्छेनेही अनेक गोष्टी अर्पण
केल्या. 6अशाप्रकारे, अजून मंदिर बांधून झालेले नसूनही
सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून इस्राएल लोकांनी
परमेश्वराला होमबली वाहायला सुरुवात केली.

## मंदिराची पुनर्बांधणी

7बंदिवासातून परत आलेल्या लोकांनी पाथरवटांना
आणि सुतारांना द्रव्य पुरवले. अन्नधान्य, द्राक्षारस आणि
तेलही दिले. सोरी आणि सीदोनच्या लोकांकडून
लबानोनहून गंधसरुची लाकडे मागवण्याचा मोबदला
म्हणून त्यांनी या वस्तू दिल्या. शलमोनाने पहिल्यांदा हे
मंदिर बांधताना आणले तसे या लोकांना हे ओंडके
जलमार्गाने योफा या समुद्र किनाऱ्यालगतच्या शहरात
आणवायचे होते. या वाहतुकीला पारसचा राजा कोरेश
याने परवानगी दिली.
8शल्तीएलचा मुलगा जरुब्बाबेल आणि योसादाकचा
मुलगा येशूवा यांनी यरुशलेमच्या मंदिरात परतल्याच्या
दुसऱ्या वर्षी दुसऱ्या महिन्यात कामाला सुरुवात
केली. इतर याजक, लेवी हे त्यांचे बांधव व
बंदिवासातून यरुशलेमला परतलेले एकूण सर्वजण
त्यांच्या बरोबरीने कामाला लागले. परमेश्वराचे मंदिर
बांधण्याच्या कामावर देखरेख करण्यासाठी त्यांनी वीस
वर्षे व त्यापुढील वयाच्या लेवींना नेमले. 9देखरेख
करणाऱ्यांची नावे अशी: येशूवा आणि त्याची मुले,
कदमीएल आणि त्याची मुले हे यहूदाचे वंशज, हेनादाद
आणि त्याचे लेवी भाऊबंद.
10मंदिराचा पाया घालण्याचे काम पूर्ण झाल्यावर
याजकांनी आपला याजकीय पोषाख घातला आणि हाती
कर्णे घेतले. आसाफाच्या मुलांनी झांजा घेतल्या. भजनासाठी
ते आपापल्या जागी उभे राहिले. इस्राएलचा राजा दावीद
याने पूर्वीच त्यांची ही व्यवस्था ठरवून दिली होती. 11'देवाची
स्तुती करा कारण देव चांगला आहे, तो सर्वकाळ
प्रेम करतो' अशी स्तुतिगीते त्यांनी

आळीपाळीने* गायिली. मंदिराचा पाया घातला गेला
म्हणून त्यांनी परमेश्वराचा जयजयकार केला. त्यांनी
मोठ्याने घोषणा दिल्या आणि परमेश्वराची स्तुती केली.
12पण यावेळी वृध्द याजक, लेवी आणि
घराण्या-घराण्यांतील वडीलधारी मंडळी यांना मात्र रडू
आवरेना, कारण त्यांनी पूर्वीचे मंदिर बघितलेले होते.
त्याच्या देखणेपणाची त्यांना आठवण झाली. नवीन मंदिर
पाहून ते मोठ्याने रडले. इतर लोकांचा आनंदाने जयघोष
चालू असताना या मंडळींना रडू येत होते. 13हे आवाज
खूप दूरपर्यंत ऐकू जात होते. एकंदर आवाज एवढा मोठा
होता की त्यातला रुदनस्वर कोणता व हर्षध्वनी कोणता
हे ओळखू येत नव्हते.

## मंदिराच्या बांधकामाला विरोध

4 1-2त्या भागातील बरेच लोक यहूदा आणि बन्यामीन
यांचे विरोधक होते. बंदिवासातून आलेले लोक
परमेश्वरासाठी मंदिर बांधत आहेत हे या विरोधकांना
कळले तेव्हा ते जरुब्बाबेल आणि घराण्यांचे प्रमुख
यांच्याकडे येऊन म्हणाले, "आम्हालाही तुमच्या
बांधकामात मदत करु द्या. तुमच्याप्रमाणेच आम्हीही या
देवाला मदतीसाठी विनवितो. अश्शूरचा राजा एसर हद्दोन
याने आम्हाला इकडे आणल्यापासून तुमच्या या देवासाठी
आम्ही होमार्पण करीत आलो आहोत."
3पण जरुब्बाबेल, येशूवा आणि इस्राएलची इतर
वडीलधारी मंडळी त्यांना म्हणाली, "आमच्या या मंदिराच्या
बांधकामात तुमची मदत चालणार नाही. प्रभूचे, इस्राएलच्या
परमेश्वराचे मंदिर फक्त आम्हीच बांधू शकतो. पारसाचा
राजा कोरेश याची तशी आज्ञा आहे."
4याचा त्या लोकांना फार राग आला. त्यांनी मग, यहुद्यांना
त्रास द्यायला सुरुवात केली. त्यांना नाऊमेद करून
मंदिर बांधण्यापासून परावृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न
केला. 5यहूद्यांचा मंदिर बांधावयाचा संकल्प सिध्दीला
जाऊ नये म्हणून विरोधकांनी पैसे चारुन मंत्र्यांना
फितवले. त्या मंत्र्यांनी यहूद्यांचा मंदिर बांधण्याचा बेत बंद
पाडण्यासाठी सतत कारस्थाने केली. पारसाच्या कोरेश
राजाची कारकीर्द संपून दारयावेश राजा सत्तेवर येईपर्यंत
असेच चालले.
6त्या विरोधकांनी यहुद्यांना थांबवण्यासाठी पारसाच्या
राजाला सुध्दा पत्र लिहिले: ज्यावेळी अहश्वेरोश पारसाचा
राजा झाला त्यावेळी त्यांनी हे पत्र लिहिले.

---

**आळीपाळीने** लेवींचा एक गट गीताचा एक भाग म्हणतो व दुसरा गट त्या पाठोपाठ दुसरा भाग म्हणतो अशा प्रकारे गायची गीते. येथे स्तोत्रसंहिता 111-118 स्तोत्रसंहिता 136 ही असावीत.

## यरुशलेमच्या बांधकामाला विरोध

[7]पुढे अर्तहशश्त पारसाचा राजा झाल्यावर पुन्हा या
विरोधकांपैकी काहींनी यहूद्यांविरुध्द कागाळ्यांचे आणखी
एक पत्र त्याला लिहिले. बिश्लाम, मिथ्रदाथ, ताबेल व
त्यांचे साथी यांनी हे पत्र लिहिले. हे पत्र अरामी भाषेत व
अरामी लिपीत लिहिले होते.
[8]यानंतर मुख्य मंत्री रहूम आणि लेखक शिमशय यांनी
यरुशलेम येथील लोकांविरुध्द अर्तहशश्त राजाला पत्र
पाठवले. पत्राचा मजकूर असा होता:

[9]मुख्य अधिकारी रहूम चिटणीस शिमशय आणि
टर्पली, अफर्शी, अर्खवी, बाबेली, सुसा येथील एलामी,
यांच्यावरील महत्वाचे अधिकारी यांच्याकडून
[10]शिवाय, आसनपर या थोर आणि बलाढ्य राजाने
शोमरोन आणि फरात नदीच्या पश्चिम प्रदेशात आणून
वसवलेले लोक यांच्याकडून,

[11]राजा अर्तहशश्त यास,

फरात नदीच्या पश्चिमेकडील प्रदेशात राहणारे
आम्ही तुमचे सेवक.

[12]राजा अर्तहशश्त यास आम्ही तुम्हाला कळवू
इच्छितो की तुम्ही पाठवून दिलेले यहूदी कैदी येथे
पोचले आहेत. ते आता पुन्हा नव्याने नगर बांधत
आहेत. यरुशलेम हे वाईट शहर आहे इथल्या लोकांनी
नेहमीच इतर राजांविरुध्द उठाव केला आहे. आता
हे यहुदी पाया घालणे, तटबंदीची भिंत बांधणे अशी
कामे* करत आहेत.
[13]राजा अर्तहशश्त, यरुशलेमभोवतीचा हा कोट
पुरा झाला की हे लोक तुमच्या सन्मानार्थ कर,
जकात वगैरे भरणे थांबवतील व त्यामुळे तुमचा
मोठा तोटा होईल हे तुमच्या ध्यानी यावे.
[14]राजाच्या बाबतीत आमचे म्हणून एक कर्तव्य
आहे; वरील गोष्टी घडू नयेत असे आम्हाला वाटते
म्हणून माहितीखातर आम्ही हे पत्र लिहीत आहोत.
[15]राजा अर्तहशश्त, तुमच्या आधी जे राजे होऊन
गेले त्यांच्या कामकाजाचे वृत्तांत तुम्ही पहावा असे
आम्ही सुचवू इच्छितो. त्या बखरीवरुन तुमच्या
लक्षात येईल की यरुशलेमने इतर राजाविरुध्द उठाव
करून त्यांना नेहमीच जेरीला आणले आहे पूर्वापार
हे चालत आलेले आहे, म्हणूनच यरुशलेम धुळीला
मिळाले.

[16]राजा अर्तहशश्त, आम्ही सांगू इच्छितो की हे
नगर आणि त्याभोवतीचा कोट बांधून पुरा झाला
की फरात नदीच्या पश्चिमेकडील भागावरचा तुमचा
अंमल संपुष्टात येईल.

[17]यावर राजा अर्तहशश्तने पुढील उत्तर पाठविले:

मुख्य राजमंत्री रहूम, लेखक शिमशय आणि
शोमरोन व फरात नदीच्या पश्चिमेला राहणारे
त्यांच्याबरोबरचे लोक यांस:
[18]तुम्ही पाठवलेल्या पत्राचा अनुवाद करून मला
वाचून दाखवण्यात आला. [19]माझ्या आधीच्या
राजांच्या कारभाराचे वृत्तांत काढून पाहायचा मी
आदेश दिला. त्यावरुन असे लक्षात आले की
यरुशलेमला राजाच्या विरुध्द बंड करणाऱ्यांचा मोठा
इतिहास आहे. फितुरीचे आणि बंडाचे प्रकार तेथे
सतत घडत आले आहेत.
[20]यरुशलेम आणि फरात नदीच्या पश्चिम प्रदेशावर
राज्य करणारे पराक्रमी राजे होऊन गेले. त्या राजांना
लोक कर, जकात व खंडणी देत असत.
[21]आता तुम्ही त्या लोकांना काम थांबवायचा हुकूम
दिला पाहिजे. मी आज्ञा देईपर्यंत या नगराचे बांधकाम
होता कामा नये. [22]माझा हुकूम पाळला जात आहे
याची खात्री करून घ्या. आपण यरुशलेम येथील
बांधकाम चालू राहू देता कामा नये. ते चालू राहिले
तर यरुशलेमकडून येणाऱ्या पैशाचा ओघ थांबेल.

[23]राजा अर्तहशश्तने पाठवलेल्या या पत्राची प्रत राजमंत्री
रहूम, लेखक शिमशय आणि त्यांच्या बरोबरचे लोक
यांना वाचून दाखवण्यात आली. त्या बरोबर ते सर्वजण
ताबडतोब यरुशलेममधील यहूद्यांकडे गेले आणि त्यांनी
सक्तीने बांधकाम थांबविले.

## राजा दारयावेशला ततनइचे पत्र

[24]त्यामुळे यरुशलेममधील मंदिराचे काम स्थगित झाले.
पारसाचा राजा दारयावेश याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या
वर्षापर्यंत ते तसेच राहिले.

5 त्यावेळी हाग्गय आणि इद्दोचा मुलगा जखऱ्या हे संदेष्टे
देवाच्या वतीने संदेश सांगू लागले. यहूदा व
यरुशलेममधील यहूद्यांना त्यांनी उत्तेजन दिले. [2]तेव्हा
शल्तीएलचा मुलगा जरुब्बाबेल आणि योसादाकचा मुलगा
येशूवा यांनी यरुशलेममधील मंदिराच्या कामाला सुरुवात
केली, देवाच्या सर्व संदेष्ट्यांनी त्यांना याबाबतीत सहाय्य
केले. [3]त्यावेळी ततनइ हा फरात नदीच्या पश्चिमेकडील
प्रदेशाचा अधिकारी होता. तो, शथर–बोजनइ आणि त्यांचे
सोबती जरुब्बाबेल, येशूवा आणि इतर जे बांधकाम करत
होते त्यांच्याकडे गेले. त्यांना ततनइ व त्याच्याबरोबरच्या

---

**पाया ... अशी कामे** नगराच्या मजबुतीसाठी, रक्षणासाठी असे करतात. पण यहूदी जणू राजाविरुध्द उठाव करायच्या तयारीत आहेत असा या लोकांना राजाचा समज करुन द्यायचा होता.

लोकांनी विचारले, “तुम्हाला हे मंदिर पुन्हा बांधायला
परवानगी कोणी दिली? 4हे बांधकाम करणाऱ्या माणसांची
नावे काय?”
5तरी पण यहूदी नेत्यांवर देवाची कृपादृष्टी होती. त्यामुळे
राजा दारयावेशला ही खबर लेखी कळवून त्याचे उत्तर
येईपर्यंत त्यांना मंदिराचे काम थांबवता आले नाही आणि
बांधकाम चालूच राहिले.
6फरात नदीच्या पश्चिमेकडील प्रदेशाचा अधिकारी
ततनइ, शथर-बोजनइ आणि त्यांच्याबरोबरचे मान्यवर
लोक यांनी राजा दारयावेशला जे पत्र पाठवले त्याची ही
प्रत. 7त्यात असे लिहिले होते:.

राजा दारयावेशचे कुशल असो.
8हे राजा, आम्ही यहूदाप्रांतात गेल्याचे तुम्हाला माहीत
आहे. आम्ही महान परमेश्वराच्या मंदिराकडे गेलो.
यहुदातील लोक मोठे दगड वापरुन हे मंदिर नव्याने
बांधित आहेत. भिंतीत लांबरुंद लाकडे घालत आहेत.
यहुदी लोक हे काम मोठया झपाट्याने आणि मेहनत
घेऊन करत आहेत. ते झटून काम करीत असल्यामुळे
लवकरच बांधकाम पुरे होईल.
9या कामाच्या संदर्भात आम्ही तेथील
वडीलधाऱ्यांकडे चौकशी केली. त्यांना विचारले,
“तुम्हाला हे मंदिराचे बांधकाम करायला कोणी
परवानगी दिली?” 10आम्ही त्यांची नावेही विचारुन
घेतली. त्यांचे पुढारीपण करणाऱ्यांची नावे
तुम्हाला कळावीत म्हणून आम्हाला ती टिपून
ठेवायची होती. 11त्यांनी आम्हाला पुढीलप्रमाणे उत्तर
दिले:

“आम्ही आकाश आणि पृथ्वीच्या देवाचे सेवक
आहोत. फार पूर्वी इस्राएलच्या एका थोर राजाने
बांधून पूर्ण केलेल्या मंदिराचेच आम्ही पुन्हा बांधकाम
करत आहोत. 12आमच्या पूर्वजांच्या वागणुकीने
देवाचा कोप ओढवला. तेव्हा परमेश्वराने त्यांना
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याच्या हाती दिले.
नबुखद्नेस्सराने मंदिराचा विध्वंस केला आणि
लोकांना जबरदस्तीने कैद करून बाबेलला नेले.
13कोरेश बाबेलचा राजा झाल्यावर पहिल्या वर्षातच
त्याने मंदिराची पुन्हा उभारणी करण्याचा विशेष
हुकूमनामा काढला. 14तसेच, पूर्वीच्या मंदिरातून जी
सोन्यारुप्याची पात्रे होती ती काढून बाबेलच्या खोट्या
देवतेच्या देवळात ठेवली होती, ती कोरेशाने बाहेर
काढली. नबुखद्नेस्सराने ती पूर्वी यरुशलेममधून
काढून बाबेलच्या खोट्या देवतेच्या देवळात आणली
होती. राजा कोरेशने ती शेशबस्सरच्या (म्हणजेच
जरुब्बाबेलाच्या) स्वाधीन केली. त्याला कोरेशने
अधिकारी म्हणून नेमले.”
15नंतर कोरेश शेशबस्सरला (जरुब्बाबेलला)
म्हणाला, “ही सोन्यारुप्याची पात्रे घे आणि
यरुशलेममधील मंदिरात ठेव. मंदिर पूर्वी जिथे होते
त्याचठिकाणी पुन्हा बांध.”
16तेव्हा शेशबस्सरने (जरुब्बाबेलने) यरुशलेममध्ये
येऊन मंदिराचा पाया घातला तेव्हापासून आजतागायत
ते काम चाललेले आहे पण अजून पूर्ण झालेले
नाही.
17तेव्हा आता हवे असल्यास राजाने अधिकृत
कागदपत्रे नीट तपासून पाहावीत. यरुशलेममधील
मंदिर पुन्हा बांधायची राजा कोरेशने खरोखरच आज्ञा
दिली आहे का ते पडताळून पाहावे आणि या बाबतीत
आपण काय ठरविले आहे ते राजाने आम्हाला कृपया
लेखी कळवावे.

## दारयावेशचा आदेश

6 तेव्हा राजा दारयावेशने आपल्या आधीच्या राजांच्या
कागदपत्रांचा दप्तरखान्यात शोध घेण्याचा आदेश दिला.
बाबेलच्या जामदारखान्यातच ही कागदपत्रे ठेवलेली होती.
2मेदी प्रांतातील अखमथा किल्ल्यात (राजवाड्यात) एक
गुंडाळी सापडली. तिच्यावर पुढीलप्रमाणे मजकूर लिहिलेला
होता :

अधिकृत टिपण: 3कोरेश राजाच्या
कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी यरुशलेममधील
मंदिराच्या बाबतीत राजाने असा आदेश दिला की,
देवाचे मंदिर पुन्हा बांधले जावे. तेथे यज्ञ अर्पण करता
यावेत. मंदिराचा पाया बांधून काढावा. मंदिराची उंची
90 फूट आणि रुंदी 90 फूट असावी. 4भोवतालच्या
भिंतीत मोठ्या पाषाणांचे तीन थर आणि मोठ्या
लाकडाचा एक थर असावा. मंदिराच्या बांधकामाचा
खर्च राजाच्या तिजोरीतून केला जावा. 5मंदिरातील
सोन्यारुप्याच्या वस्तू पुन्हा आपापल्या जागी ठेवल्या
जाव्यात. नबुखद्नेस्सरने त्या यरुशलेमच्या मंदिरातून
हलवून बाबेलला आणल्या होत्या. त्यांची पुन्हा मंदिरात
स्थापना व्हावी.
6तेव्हा आता मी दारयावेश, फरात नदीच्या
पश्चिमेकडील प्रांताचा अधिकारी ततनइ, शथर
बोजनइ आणि त्यांचे त्या प्रांतातील इतर कारभारी
यांना असा आदेश देतो की त्यांनी यरुशलेममधून
दूर जावे. 7कामगारांना त्रास देऊ नये. देवाच्या
प्रार्थनास्थळाच्या कामात व्यत्यय आणू नये. यहुदी
अधिकारी आणि यहूदी वडीलधारी मंडळी यांना हे
मंदिर पूर्वी होते त्याचठिकाणी पुन्हा बांधू द्यावे.
8आता माझा आदेश असा आहे: देवाच्या मंदिराचे
बांधकाम करणाऱ्या यहूदी वडीलजनांसाठी असे
करा. मंदिराच्या बांधकामाचा पूर्ण खर्च राजाच्या

खजिन्यातून दिला जावा. हा पैसा फरात नदीच्या
पश्चिमेकडील प्रांतांमधून येणाऱ्या करातून जमा होईल.
या गोष्टी विनाविलंब करा म्हणजे कामाला खीळ
बसणार नाही. 9त्या लोकांना लागेल ते द्या. स्वर्गातील
देवाच्या होमार्पणासाठी त्यांना गोऱ्हे, मेंढे, कोकरे
इत्यादी ज्या गोष्टी लागतील त्या द्या. यरुशलेममधील
याजकांनी गहू, मीठ, द्राक्षारस तेल वगैरे मागीतल्यास
त्यांना त्या वस्तू तात्काळ आणि रोजच्या रोज पुरवा.
10स्वर्गातील देवाला प्रसन्न करणारे होम या यहूदी
याजकांनी अर्पण करावे आणि त्यांनी माझ्यासाठी व
माझ्या मुलासाठी देवाकडे प्रार्थना करावी म्हणून
त्यांना जे जे लागेल ते सर्व द्या.
11माझी आणखी एक आज्ञा: माझ्या आज्ञेत कोणी
फेरफार केल्यास त्याच्या घराचे लाकूड काढून ते
त्याच्या शरीरात घुसवावे आणि त्याच्या घराची
राखरांगोळी करून केवळ दगडांच्या ढिगाऱ्यात त्याचे
रूपांतर करावे.
12परमेश्वराने यरुशलेममध्ये आपले नाव चिरंतन
केले आहे. तेव्हा मला वाटते की या आज्ञेत बदल
करणाऱ्या व्यक्तीचा मग ती व्यक्ती राजा असो की
आणखी कोणी, देव त्यांचा नि:पात करील. कोणी
त्याच्या यरुशलेममधील या मंदिराचा विध्वंस करायचा
प्रयत्न केल्यासही देव त्याचा नाश करील.
मी, दारयावेश, हा हुकूम करीत आहे. त्याची
तात्काळ आणि पूर्ण अंमलबजावणी व्हावी.

## मंदिराच्या बांधकामाची समाप्ती आणि प्रतिष्ठापना

13फरात नदीच्या पश्चिमेकडील प्रांताचा अधिकारी
ततनइ, शथर-बोजनइ आणि त्यांचे सोबती यांनी मग
राजा दारयावेशच्या हुकुमाचे पालन केले. त्यांनी ही आज्ञा
कसोशीने आणि ताबडतोब पाळली. 14यहुदी वडीलधाऱ्या
मंडळींचे मंदिराचे काम चालूच राहिले. हाग्गय हा संदेष्टा
आणि इद्दोचा मुलगा जखऱ्या यांनी प्रोत्साहन दिल्यामुळे
त्यात त्यांना यश आले. इस्राएलच्या देवाच्या आज्ञेप्रमाणे
आणि पारसचे राजे कोरेश, दारयावेश व अर्तहशश्त यांच्या
आदेशानुसार यांनी मंदिर बांधून पुरे केले. 15हे मंदिर
राजा दारयावेशच्या कारकिर्दीच्या सहाव्या वर्षी अदार *
महिन्याच्या तृतीयेला पुरे झाले.
16इस्राएल लोकांनी या मंदिराची प्रतिष्ठापना मोठ्या
आनंदाने साजरी केली. बदिवासातून सुटून परत आलेले
याजक, लेवी आणि इतर सर्व जण या उत्सवात सहभागी
झाले.
17प्रतिष्ठापनेच्या वेळी त्यांनी शंभर बैल, दोनशे मेंढे,
चारशे कोकरे होमात अर्पण केले. तसेच इस्राएलच्या
पापार्पणासाठी बारा बकरेही अर्पण केले. इस्राएलींच्या बारा
घराण्यासाठी प्रत्येकी एक असे ते होते. 18यरुशलेममधील
या मंदिराच्या सेवेसाठी त्यांनी मोशेच्या ग्रंथात
लिहिल्याप्रमाणे, याजकांची आणि लेव्यांची त्यांच्या-त्यांच्या
वर्गानुसार योजना केली.

## वल्हांडण

19बंदिवासातून परत आलेल्या लोकांनी पहिल्या
महिन्याच्या चौदाव्या दिवशी वल्हांडण सण पाळला.
20वल्हांडण सण साजरा करण्यासाठी याजक आणि लेवी
यांनी शुचिर्भूत होऊन स्वत:ला शुध्द केले. कैदेतून सुटून
आलेले आपले भाऊबंद याजक आणि ते स्वत: या सर्व
यहुद्यांसाठी लेवींनी वल्हांडणाच्या कोकराचा बळी दिला.
21बंदिवासातून परतून आलेल्या समस्त इस्राएल लोकांनी
वल्हांडणाचे भोजन केले. त्या देशाच्या मूर्तिपूजक लोकांच्या
अशुध्दतेपासून दूर व्हावे म्हणून इतरांनीही शुचिर्भूत होऊन
त्या भोजनाचा आस्वाद घेतला. इस्राएलचा परमेश्वर याला
मदतीसाठी शरण जाता यावे म्हणून त्यांनी हे शुध्दीकरण
केले. 22बेखमीर भाकरींचा सण त्यांनी मोठ्या उत्साहाने
सात दिवस साजरा केला. परमेश्वराने अश्शूरच्या राजाचे
मनपरिवर्तन केले होते त्यामुळे त्या राजाने त्यांना मंदिराच्या
बांधकामात मदत केली. अशा तऱ्हेने परमेश्वराने लोकांना
सुखी केले.

## एज्राचे यरुशलेममध्ये आगमन

7 या घडामोडी नंतर,* पारसचा राजा अर्तहशश्त
याच्या कारकीर्दीत एज्रा बाबेलहून यरुशलेमला
आला. एज्रा हा सरायाचा मुलगा, सराया अजऱ्याचा, अजऱ्या
हिल्कीयाचा मुलगा. 2हिल्कीया शल्लूमचा, शल्लूम
सादोकचा, सादोक अहीटूबचा, 3अहीटूब अमऱ्याचा
मुलगा, अमऱ्या अजऱ्याचा. आणि अजऱ्या मरोयाथचा
मुलगा. 4मरोयाथ जरह्याचा, जरह्या उज्जीचा, आणि उज्जी
हा बुक्कीचा मुलगा. 5बुक्की अबीशूवाचा, अबीशूवा
फिनहासचा, व फिनहास एलाजारचा आणि एलाजार हा
प्रमुख याजक अहरोन याचा मुलगा होय.
6एज्रा बाबेलहून यरुशलेमला आला. एज्रा अध्यापक
होता. मोशेच्या नियमशास्त्रात तो चांगला पारंगत होता.
इस्राएलचा देव परमेश्वर याने हे मोशेचे नियमशास्त्र दिले.
एज्राला परमेश्वराची साथ असल्यामुळे राजा अर्तहशश्तने
त्याला हवे ते सर्व देऊ केले. 7एज्राबरोबर बरेच इस्राएली
लोक आले. त्यांच्यात याजक होते, लेवी होते, गायक,
द्वारपाल आणि मंदिराचे सेवेकरी होते. राजा अर्तहशश्तच्या
कारकिर्दीच्या सातव्या वर्षी हे सर्व यरुशलेमला आले.

---

**अदार** म्हणजे फेब्रुवारी-मार्च काही प्राचीन प्रतीमध्ये “अदारचा तेविसावा दिवस” अशी नोंद आहे.

**घडामोडी नंतर** एज्रा 6 आणि एज्रा 7 यांच्यामध्ये 58 वर्षाचा कालखंड गेलेला आहे. एस्तेरचा ग्रंथ या दोन प्रकरणांच्यामध्ये मोडतो.

8अर्तहशशतच्या कारकिर्दीच्या सातव्या वर्षातल्या पाचव्या
महिन्यात एज्रा यरुशलेममध्ये आला 9पहिल्या महिन्याच्या
प्रतिपदेला एज्रा आणि मंडळींनी बाबेल सोडले आणि पाचव्या
महिन्याच्या प्रतिपदेला ते यरुशलेमला पोचले. एज्रावर
परमेश्वर देवाचा वरदहस्त होता.
10एज्राने परमेश्वराच्या नियमशास्त्राचे सर्व वेळ
मन:पूर्वक अध्ययन आणि पालन केले. त्याला
(परमेश्वराचे) हे आदेश आणि नियम इस्राएल लोकांनी
शिकवायचे होते, तसेच त्यांच्याकडून तसे आचरण करून
घ्यायचे होते.

## राजा अर्तहशशतचे एज्राला पत्र

11एज्रा याजक आणि अध्यापक होता. इस्राएलला
परमेश्वराने दिलेल्या आज्ञा आणि नियम यांचे त्याला
चांगले ज्ञान होते त्याला राजा अर्तहशशतने जे पत्र लिहिले
त्याची ही प्रत:

12* राजा अर्तहशशत कडून,

याजक आणि स्वर्गातील देवाच्या नियमशास्त्राचा
अध्यापक एज्रा यास,
अभिवादन! 13माझा आदेश असा आहे: माझ्या
राज्यातील ज्या कोणाला एज्रा बरोबर यरुशलेमला
जायचे असेल तो जाऊ शकतो. मग ती व्यक्ती कोणीही
असो, याजक अथवा इस्राएलचा लेवी.
14एज्रा, मी आणि माझे सात मंत्री तुला पाठवत
आहोत. तू यहूदा आणि यरुशलेमला जावेस. देवाचे
नियमशास्त्र तुझ्याकडे आहेच. त्याचे पालन लोक
कसे काय करत आहेत ते तू पाहावेस.
15इस्राएलच्या देवाला मी आणि माझे मंत्री सोने-चांदी
पाठवत आहोत. ते तू तुझ्याबरोबर न्यावेस. देव
यरुशलेममध्ये आहे. 16सर्व बाबेलभर फिरुन तू
लोकांकडून तसेच याजक व लेवी यांच्याकडून देणग्या
गोळा कराव्यास. स्वखूशीने दिलेल्या त्या वस्तू
यरुशलेममधील त्यांच्या देवाच्या मंदिरासाठी आहेत.
17या पैशातून तू बैल, मेंढरे, कोकरे घे. तसेच त्या
सोबतची धान्यार्पणे आणि पेयार्पणेही विकत घे. मग
ती यरुशलेममधील तुमच्या देवाच्या मंदिरातील
वेदीवर अर्पण कर. 18यातून उरेल त्या सोन्यारुप्याचा
विनियोग तू आणि तुझे भाऊबंद, देवाला रुचेल त्या
मार्गाने हवा तसा करा. 19तुमच्या परमेश्वराच्या
मंदिरातील उपासनेसाठी या सर्व गोष्टी आहेत, त्या
तिकडे घेऊन जा. 20मंदिरासाठी आणखीही काही
गोष्टी तुम्हाला लागत असतील तर त्याही तुम्ही
घ्या. त्यासाठी राजाच्या खजिन्यातून पैशाची उचल
करा.
21आता, मी, राजा अर्तहशशत, असा आदेश काढतो
की फरात नदीच्या पश्चिमेकडील भागातले जे
खजिनदार आहेत त्यांनी एज्राला हवे ते पुरवावे. कारण
एज्रा हा स्वर्गातील देवाच्या नियमशास्त्राचा अध्यापक
आणि याजक आहे. याची अंमलबजावणी पूर्णत्वाने
आणि ताबडतोब करावी. 22एज्राला द्यायच्या गोष्टी
पुढीलप्रमाणे: चांदी 3 3/4टन, गहू 600 बुशेल,
द्राक्षारस 600 गॅलन, जैतुनाचे तेल 600 गॅलन, एज्राला
पाहिजे तितके मीठ. 23एज्राला जे जे मिळावे असा
स्वर्गातील देवाचा आदेश आहे ते ते सर्व त्याला
विनाबिलंब आणि पुरेपूर द्यावे. हे सर्व स्वर्गातील
परमेश्वराच्या मंदिरासाठी आहे. देवाचा माझ्या
राज्यावर किंवा माझ्या मुलांवर कोप व्हायला नको.
24एज्रा, मंदिरातील याजक, लेवी, गायक, द्वारपाल,
मंदिरातील सेवेकरी, किंवा मंदिरातील कामाशी
संबंधित इतर कोणी यांना कर द्यायला लावणे
नियमाविरुध्द आहे. हे तुम्ही लोकांनी समजून घ्यावे
अशी माझी इच्छा आहे. त्यांनी कोणताही कर, खंडणी,
जकात भरायची नाही. 25तुझे देवाविषयीचे ज्ञान
वापरुन तू धार्मिक आणि नागरी क्षेत्रात न्यायाधीश
नेमावेस. तसा अधिकार मी तुला देतो. फरात
नदीच्या पश्चिमेकडील भागातल्या लोकांचे ते
न्यायाधीश होतील. देवाचे नियमशास्त्र जाणणाऱ्या
सर्वांवर ते नागरी आणि धार्मिक न्यायाधीश नियुक्त
करतील. आणि ज्यांना देवाच्या आज्ञा माहीत
नाहीत अशांना ते त्या शिकवतील. 26जो कोणी तुमच्या
देवाच्या आज्ञा किंवा राजाचे आदेश पाळणार नाही
त्याला शासन झाले पाहिजे. त्याला मृत्युदंड द्यायचा
की हद्दपार करायचे की द्रव्यदंड करायचे की कैदेत
टाकायचे ते त्याने केलेल्या गुन्ह्याच्या स्वरुपावर
अवलंबून राहील.

## एज्राचे स्तोत्र

27आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याला धन्यवाद!
यरुशलेममधील परमेश्वराच्या मंदिराचा जीर्णोध्दार करावा
अशी इच्छा परमेश्वरानेच राजाच्या मनात निर्माण केली.
28राजा, त्याचे मंत्री आणि अधिकारी यांच्या डोळ्या
देखतच परमेश्वराने माझ्यावर कृपा केली. परमेश्वराचा
पाठिबा लाभल्यामुळे मला धैर्य आले. इस्राएलातील
पुढारी मंडळींना बरोबर घेऊन मी यरुशलेमला निघालो.

## एज्राबरोबर जाणाऱ्या कुटुंबप्रमुखांची यादी

8 बाबेलहून यरुशलेमला माझ्याबरोबर, (म्हणजे
एज्राबरोबर) आपापल्या घराण्यातली जी वडीलधारी
मंडळी आणि इतर लोक आले त्यांची नावे आता देतो.

---

**वचन 12** इथून पुढच्या मजकुराची भाषा हिब्रू नसून अरामी
आहे.

अर्तहशश्त राजाच्या कारकीर्दीत आम्ही यरुशलेमला
आलो. त्या सर्वांची नावे पुढीलप्रमाणे: 2फिनहासाच्या
वंशजांमधला गर्षोम, इथामारच्या वंशजांमधला दानीएल,
दावीदच्या वंशजांपैकी हट्टूश, 3शखन्याच्या वंशजातील
परोशाच्या वंशजांमधला जखऱ्या, आणि आणखी 150
जण, 4पहथ-मवाबाच्या वंशजातल्या जरह याचा मुलगा
एल्यहोवेनय आणि त्याच्याबरोबरचे 200 लोक, 5जट्टूच्या
वंशजातल्या यहजोएलचा मुलगा शखन्या आणि 300 पुरुष.
6आदीनच्या वंशजातल्या योनाथानाचा मुलगा एबद आणि
त्याच्याबरोबचे 50 जण. 7एलामाच्या वंशजातल्या
अथल्याचा मुलगा यशाया आणि त्याच्याबरोबरचे 70 जण.
8शफाट्याच्या वंशजातल्या मीखाएलचा मुलगा जबद्या आणि
त्याच्याबरोबरचे 80 जण. 9यवाबच्या वंशजातील यहीएलचा
मुलगा ओबद्या आणि आणखी 218 जण. 10बानीच्या
वंशजातल्या योसिफ्याचा मुलगा शलोमिथ आणि त्याच्या
बरोबरचे 160 लोक. 11बेबाईच्या वंशजातील बेबाईचा
मुलगा जखऱ्या आणि त्याच्याबरोबरचे 28 लोक.
12अजगादच्या वंशजातल्या हक्क ाटानाचा मुलगा योहानान
आणि त्याच्याबरोबरचे 110 लोक. 13अदोनीकामच्या
वंशजातले शेवटचे म्हणजे अलीफलेट, येऊएल, शमाया
आणि त्यांच्याबरोबरचे 60 जण 14आणि बिगवईच्या
कुळातले उथई, जक्कू व त्यांच्याबरोबरचे 70 जण.

### यरुशलेमला परत

15मी (म्हणजे एज्राने) या सर्व लोकांना अहवाकडे
वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहाजवळ बोलावून घेतले. त्या
ठिकाणी आमचा तीन दिवस मुक्क ाम होता. तेथे मला
असे समजले की या लोकांमध्ये याजक होते पण लेवी
नव्हते. 16तेव्हा, अलियेजर, अरीएल, शमाया, एलनाथान,
यारीब, एलनाथान, नाथान, जखऱ्या, आणि मशल्लूम या
प्रमुखांना आणि योयारीब व एलनाथान या अध्यापकांना
मी निरोप पाठवून बोलवून आणले. 17त्यांना इद्दोकडे
पाठवले. इद्दो हा कासिफ्या नगराचा मुख्य. त्याला आणि
त्याच्या नातलगांना काय सांगायचे हे मी या मंडळींना
सांगितले होते. इद्दोचे नातलाग कासिफ्याच्या मंदिरातील
सेवेकरी होते. परमेश्वराच्या मंदिरातील सेवाचाकरी
प्रीत्यर्थ माणसे मिळावीत म्हणून मी माझ्या लोकांना इद्दोकडे
पाठवले. 18देवाचा आमच्यावर वरदहस्त असल्यामुळे
इद्दोच्या नातलगांनी आमच्याकडे काहीजणांना पाठवले.

लेवी वंशजातील महलीच्या वंशातला एक हुषार
माणूस शेरेब्या महली हा लेवीच्या मुलांपैकी एक.
लेवी हा इस्राएलांच्या वंशातलाच. शेरेब्याचे मुलगे
आणि भाऊ यांनाही त्यांनी पाठवले. त्या वंशंजातील
एकंदर अठराजण आमच्याकडे आले.
19मरारी वंशातील हशब्या आणि यशाया आणि
त्यांचे भाऊ व भाचे, असे एकंदर वीस जण.

20शिवाय त्यांनी मंदिरातल्या सेवाचाकरीसाठी
दोनशेवीस जणांना पाठवले. या लोकांच्या पूर्वजांना
दावीदाने आणि प्रमुख अधिकाऱ्यांनी लेवींचे मदतनीस
म्हणून निवडले होते. त्या सर्वांची नावे यादीत
लिहिलेली होती.

21तिथे अहवा नदी किनारी मी सर्वांनी उपवास करावा
अशी घोषणा केली. देवापुढे नम्र व्हावे आणि आमची
मुलंबाळे, साधनसंपत्ती यांच्यासह आमचा पुढचा प्रवास
सुखरुप व्हावा हा आमचा उपवासामागचा हेतू होता.
22प्रवासातल्या सुरक्षिततेसाठी राजाक़डे सैनिक आणि
घोडेस्वार मागायचा मला संकोच वाटला. वाटचालीत शत्रूचा
धोका होता. संरक्षण मगायचा संकोच वाटण्याचे कारण
म्हणजे आम्ही राजा अर्तहशश्तला म्हणालो होतो, "जो
देवावर विश्वास ठेवतो त्याची देव पाठराखण करतो. पण
देवाकडे पाठ फिरवली तर देवाचा कोप होतो." 23म्हणून
आम्ही आमच्या प्रवासासाठी उपवास आणि देवाची प्रार्थना
केली. परमेश्वरानेही आमचा धावा ऐकला.
24तेव्हा मी याजकांमध्ये जे प्रमुख होते अशा बारा जणांची
निवड केली. मी शेरेब्या, हशब्या आणि त्यांचे आणखी
दहा भाऊ यांची निवड केली. 25मंदिरासाठी देण्यात आलेले
सोने, चांदी आणि इतर चीजवस्तू यांचे नीट वजन करून
या गोष्टी मी या बारा याजकांना दिल्या. या वस्तू राजा
अर्तहशश्त, त्याचे मंत्री, प्रमुख अधिकारी, आणि
बाबेलमधील इस्राएल लोक यांनी दिल्या होत्या. 26मी वजन
केले त्याप्रमाणे चांदी 25 टन भरली, चांदीची तबके आणि
इतर वस्तू 3 3/4 टन भरल्या. सोने 3 3/4 टन होते.
27शिवाय मी सोन्याचे वीस कटोरे त्यांना दिले, त्यांचे
वजन एकोणीस पौंड भरले. याखेरीज, सोन्याइतकीच
किंमती अशी चकचकीत पितळेची दोन सुंदर तकबे मी
त्यांना दिली. 28मग मी त्या बारा याजकांना म्हणालो,
"तुम्ही तसेच या वस्तू देखील देवाच्या दृष्टीने पवित्र आहेत.
लोकांनी हे सोने चांदी आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर
याच्यासाठी दिलेली आहे. 29तेव्हा त्यांची काळजीपूर्वक
जपवणूक करा. या गोष्टी यरुशलेममधील मंदिराच्या
प्रमुखांच्या हवाली करेपर्यंत त्यांची जबाबदारी तुमच्यावरच
आहे. तुम्ही या वस्तू मुख्य लेवी आणि इस्राएलमधील
वडीलधारी मंडळी यांच्या हाती सोपवा. ते त्यांचे वजन
करून त्या गोष्टी यरुशलेममधील मंदिराच्या खोल्यांमध्ये
ठेवतील."
30यावर, एज्राने वजन करून दिलेल्या खास भेटवस्तू
आणि चांदी सोने याजकांनी व लेवींनी ताब्यात घेतले.
यरुशलेममधील मंदिरात त्यांना घेऊन जाण्यास सांगण्यात
आले.
31पहिल्या महिन्याच्या बाराव्या दिवशी आम्ही अहवा
नदीपासून यरुशलेमला जायला निघालो. देवाची
आमच्यावर कृपा असल्यामुळे त्याने वैरी आणि वाटमारे

यांच्यापासून आमचे संरक्षण केले. 32आम्ही यरुशलेमला
पोचलो. तेथे तीन दिवस विश्रांती घेतली. 33चौथ्या दिवशी
मंदिरात गेलो आणि सोने-चांदी व इतर वस्तू वजन करून
उरीया याजकाचा मुलगा मरेमोथ यांच्याकडे दिल्या. तेव्हा
फिनहासचा मुलगा एलाजार तसेच येशूवाचा मुलगा
योजाबाद आणि बिन्नुईचा मुलगा नोअद्या हे लेवी, एवढे
जण मरेमोथ बरोबर होते. 34आम्ही प्रत्येक गोष्टीची मोजणी,
वजन केले आणि एकंदर वजनाची नोंद केली.

35त्यांनंतर बंदिवासातून परत आलेल्या यहुद्यांनी
इस्राएलच्या देवाला यज्ञार्पणे वाहिली. सर्व इस्राएलकरता
बारा बैल, शहाण्णव मेंढे, सत्याहत्तर नर कोकरे,
पापार्पणासाठी बारा बोकड एवढे सगळे त्यांनी देवाला यज्ञात
अर्पण केले.

36मग या लोकांनी राजा अर्तहशश्तने दिलेले पत्र राजाच्या
अधिकाऱ्यांना तसेच फरात नदीच्या पश्चिमेकडील
भागावरच्या अधिकाऱ्यांना दिले. तेव्हा या सर्व
अधिकाऱ्यांनी इस्राएल लोकांना आणि मंदिराला सहाय्य
केले.

## यहुदी नसलेल्यांशी मिश्रविवाह

9 हे सर्व आटोपल्यावर मग इस्राएलींमधली नेते मंडळी
माझ्याकडे आली. ती मला म्हणाली, “एज्रा, इस्राएल
लोकांनी आपल्या अवतीभवती राहणाऱ्या इतर
लोकांपासून स्वत:ला वेगळे ठेवलेले नाही. याजक आणि
लेवी सुध्दा वेगळे राहात नाहीत. कनानी, हित्ती, परिज्जी,
यबूसी, अम्मोनी, मवाबी, मिसरी आणि अमोरी लोक ज्या
अमंगळ गोष्टी करतात त्यांचा प्रभाव इस्राएलांवर पडतो.
2इस्राएल लोकांनी या इतर लोकांशी विवाहसंबंध ठेवले
आहेत. इस्राएल लोकांनी आपले वेगळेपण टिकवले पाहिजे.
पण त्यांचे यहुदी नसलेल्या इतरांशी विवाहसंबंधामुळे मिश्रण
झाले आहे. इस्राएलच्या लोकांचे नेते आणि अधिकारी
यांनीच या बाबतीत वाईट उदारहण घालून दिले आहे.”
3हे ऐकून मी उद्विग्न झालो. माझी मन:स्थिती प्रकट करायला
मी माझा अंगरखा आणि वस्त्रे फाडली. डोक्यावरचे आणि
दाढीचे केस उपटले. माझ्या मनाला धक्का बसल्यामुळे
अस्वस्थ होऊन मी खाली बसलो. 4तेव्हा देवाच्या आज्ञा
मानणाऱ्या सर्व लोकांचा भीतीने थरकाप झाला.
बंदिवासातून आलेले इस्राएली लोक देवावर निष्ठा असणारे
नव्हते म्हणून ते घाबरले; मला ही धक्का बसला;
संध्याकाळच्या होमार्पणांची वेळ होईपर्यंत मी तिथे बसून
राहिलो; सर्वजण माझ्याभोवती जमले.

5होमार्पणांची वेळ झाली तेव्हा मी उठलो; अंगावरची
वस्त्रे आणि अंगरखा फाटलेला अशा स्थितीत मी गुडघे
टेकून हात पसरुन देवापुढे बसलो. मी अतिशय लज्जित
अशा अवस्थेत होतो. 6तेव्हा मी ही प्रार्थना केली:

हे परमेश्वरा, तुझ्याकडे पाहायची मला लाज वाटत
आहे; मला लाज वाटते कारण आमच्या पापांची संख्या
आमच्या मस्तकांच्या संख्येपेक्षा जास्त झाली आहे; आमचे
अपराध वाढून स्वर्गापर्यंत पोचले आहेत. 7आमच्या
वाडवडीलांच्या वेळे पासून आतापर्यंत आम्ही अनेक पापांचे
दोषी आहोत. आमच्या पापांची शिक्षा आमचे राजे आणि
याजक यांना भोगावी लागली. परकी राजांनी आमच्यावर
आक्रमण करून आमच्या लोकांना पकडून नेले. आमची
संपत्ती लुटून त्या राजांनी आम्हाला लज्जित केले आजही
तेच चालले आहे.

8पण आता तू अखेर आमच्यावर दया केली आहेस.
बंदिवासातून सुटका करून तू आमच्यापैकी काही जणांना
या पवित्रस्थानी परतून येऊ दिलेस. आम्हाला दास्यमुक्त
करून तू आम्हाला जीवदान दिलेस. 9आम्ही गुलामच
आहोत. पण तू आम्हाला आमच्या गुलामगीरीत आम्हाला
सोडून गेला नाहीस. तू आमच्यावर दया केलीस. पारसाच्या
राजांना तू आमच्याबाबतीत दयाळू केलेस. तुझे मंदिर
उद्ध्वस्त झाले होते, पण त्याचा जीर्णोध्दार आमच्या हातून
व्हावा म्हणून तू आम्हाला जीवदान दिलेस. यहूदा आणि
यरुशलेमच्या संरक्षणासाठी भिंत बांधावी म्हणून तू
साह्यकारी झालास.

10पण, देवा, आता आम्ही काय बोलावे,? आम्ही पुन्हा
तुझ्या मार्गापासून दूर चाललो आहोत. 11देवा, तुझे सेवक,
संदेष्टे यांच्यामार्फत तू आम्हाला त्या आज्ञा दिल्यास. तू
म्हणालास, “तुम्ही जो प्रदेश ताब्यात घेऊन त्यात वास्तव्य
करणार आहात तो वाया गेलेला देश आहे. तिथे राहणाऱ्या
लोकांच्या अमंगळ कृत्यांनी तो अशुध्द झाला आहे; हा
सर्वच प्रदेश त्या लोकांनी विटाळून टाकला आहे. आपल्या
पापांनी ही भूमी त्यांनी अमंगळ केली आहे. 12तेव्हा इस्राएल
लोकांनो, तुमच्या मुलांशी त्यांच्या मुला-मुलींच्या
सोयरिकी जुळवू नका. त्यांच्याशी संबंध ठेवू नका. त्यांच्या
स्वास्थाची इच्छा करू नका. त्यांच्या ऐश्वर्याची इच्छा
करू नका. माझ्या आदेशांचे पालन करा म्हणजे तुम्ही
बलशाली व्हाल आणि या भूमीवर चांगल्या गोष्टी भोगाल.
हा प्रदेश आपल्या मुलाबाळांना सुपूर्द कराल.”

13आमच्यावर जी संकटे आली त्याला आम्हीच
कारणीभूत आहोत. आम्ही दुर्वर्तन केले आणि त्याची
आम्हाला खंत आहे. पण, परमेश्वरा, आमच्या अपराधांच्या
मानाने तू आम्हाला केलेले शासन कमीच आहे. आम्ही
जे भयंकर गुन्हे केले त्यांची जबरदस्त शिक्षा आम्हाला
व्हायला हवी होती. आणि तू तर आमच्यापैकी काही
जणांना बंदिवासातूनही सोडवलेस. 14तेव्हा तुझ्या आदेशांचा
भंग करता कामा नये हे आम्हाला कळले आहे. आम्ही
त्या लोकांशी लग्नव्यवहार करता कामा नयेत. त्या
लोकांमध्ये दुर्वर्तन फार आहे. आम्ही त्यांच्याशी लग्ने
जुळवणे चालूच ठेवले तर तू आमचा नायनाट करशील
मग मात्र इस्राएलंपैकी एकही माणूस जिवंत राहणार नाही.

15देवा, इस्राएलच्या परमेश्वरा, तू फार चांगला आहेस.
तू आमच्यापैकी काहींना अजून जिवंत ठेवले आहेस.

आम्ही अपराधी आहोत हे आम्हाला मान्य आहे. आमच्या
पापाचरणामुळे आम्हाला तुझ्यापुढे उभे राहता येत नाही.

## लोकांची पापाची कबुली

10 एज्रा प्रार्थना करत असताना आणि पापांची कबुली
देत असताना मंदिरापुढे पडून आक्रोश करत
होता त्यावेळी इस्राएली बायका-पुरुष, मुले यांचा मोठा
समुदाय त्याच्या भोवती जमला होता ते ही सर्वजण आक्रंदन
करत होते 2त्यावेळी एलाम वंशातल्या यहिएलचा मुलगा
शखन्या एज्राला म्हणाला, “आपण देवाचे वचन पाळले
नाही आपल्या आसपास राहणाऱ्या लोकांमध्ये आपण
विवाह केले. पण एवढे करूनही इस्राएलींच्या बाबतीत
अजून आशा जागा आहे. 3तर आता, एज्रा आणि देवाच्या
धर्मशास्त्राचा धाक असलेले लोक यांच्या उपदेशानुसार
आपण त्या बायका आणि त्यांची संतती यांना देशाबाहेर
घालवून देण्याची आपल्या देवासमोर शपथ वाहू या.
परमेश्वराने घालून दिलेले नियम पाळू या 4एज्रा, आता
ऊठ ही तुझी जबाबदारी आहे. आमच्या पाठिंब्याने तू ती
धैर्याने पार पाड.”

5तेव्हा एज्रा उठला. प्रमुख याजक, लेवी आणि सर्व
इस्राएली लोक यांच्याकडून त्याने आपल्या म्हणण्यानुसार
वागण्याची शपथ घेतली. 6मग एज्रा मंदिराच्या समोरच्या
भागातून उठून एल्याशीबचा मुलगा यहोहानान याच्या
दालनात गेला. यहोहानानने एज्रा समोर अन्नपाण्याला
स्पर्शही केला नाही. यरुशलेमहून परत आलेल्या
इस्राएलींच्या पापांनी तो व्यथित झाला होता. 7त्यानेमग
यहुदा आणि यरुशलेमच्या प्रत्येक ठिकाणी दवंडी पिटवली.
बंदिवासातून आलेल्या समस्त यहुदी लोकांना त्याने
यरुशलेममध्ये जमायला सांगितले 8आणि जो कोणी तीन
दिवसाच्या आत यरुशलेमला येणार नाही त्याची सर्व
मालमत्ता जप्त होईल आणि अशा व्यक्ति आपल्या जातीत
वाळीत सदस्य म्हणून राहू शकणार नाही असेही
अधिकाऱ्यांनी आणि वडीलधाऱ्यांनी एकमताने ठरवले.

9त्यानुसार यहुदा आणि बन्यामीन यांच्या घराण्यातील
सर्व पुरुषमंडळी तीन दिवसांच्या आत यरुशलेममध्ये
जमली. हे लोक मंदिराच्या चौकात एकत्र आले. तो नवव्या
महिन्याचा विसावा दिवस होता. एकत्र येण्यामागचे कारण
आणि प्रचंड पाऊस यांच्यामुळे सर्वजण अतिशय कंपित
झाले होते. 10एज्रा याजक त्यांच्यासमोर उभा राहून म्हणाला,
“तुम्ही देवाचे वचन पाळले नाही. परक्या स्त्रियांशी तुम्ही
विवाह केलेत. या कृत्यामुळे इस्राएलच्या पापात तुम्ही भर
टाकली आहे 11आता देवासमोर आपले अपराध कबूल
करा. आपल्या पूर्वजांच्या देवाची आज्ञा तुम्ही पाळली
पाहिजे. तुमच्या मध्ये राहणारे लोक आणि आपल्या परक्या
बायका यांच्यापासून वेगळे व्हा.”

12यावर त्या जमावाने एज्राला खणखणीत आवाजात
उत्तर दिले की, “एज्रा, तू म्हणतोस ते खरे आहे. तुझ्या
सांगण्याप्रमाणे आम्हाला वागले पाहिजे. 13पण आम्ही
पुष्कळजण आहोत शिवाय हा पावसाळा आहे त्यामुळे
आम्ही बाहेर थांबू शकत नाही. आमचा अपराध फार
तीव्र असल्यामुळे हा एकदोन दिवसात सुटण्यासारखा प्रश्न
नाही. 14या समुदायाच्या वतीने आमच्यातूनच काहींना
मुखत्यार नेमावे प्रत्येक नगरातल्या ज्या रहिवाश्यांनी
परकीय बायकांशी लग्ने केली आहेत त्यांनी यरुशलेमला
नेमलेल्या वेळी यावे त्या त्या नगरातील न्यायाधीश आणि
वडीलधारी मंडळी यांनीही त्यांच्याबरोबर यावे. असे झाले
की मग देवाचा आमच्यावरचा क्रोध मावळेल.”

15असाएलचा मुलगा योनाथान आणि तिकवाचा मुलगा
यहज्या तसेच मशुल्लाम व शब्बथई लेवी अशा मोजक्याच
लोकांनी या योजनेला विरोध केला.

16यरुशलेमला आलेल्या बाकी सर्व इस्राएली लोकांनी
या योजनेला संमती दिली. एज्राने प्रत्येक घराण्यातून एकेका
प्रमुख व्यक्तीची नेमणूक केली. त्या प्रत्येकाच्या नावाने
निवडले गेली. हे नियुक्त केलेले सर्वजण दहाव्या महिन्याच्या
पहिल्या दिवशी प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने विचार
करायला बसले 17आणि पहिल्या महिन्याच्या पहिल्या
दिवशी मिश्रविवाहांची चौकशी समाप्त झाली.

## परक्या स्त्रियांशी लग्न केलेल्यांची नावे

18याजकांच्या ज्या वंशजांनी परकीय स्त्रियांशी विवाह
केले त्यांची नावे पुढील प्रमाणे:

योसादाकचा मुलगा येशूवा याच्या वंशातील आणि त्याच्या
भाऊबंदांच्या वंशातील मासेया, अलियेजर, यारीब, गदल्या.
19या सर्वांनी आपापल्या बायकांना घटस्फोट द्यायचे कबूल
केले आणि दोषमुक्तीखातर कळपातला एकएक एडका
अर्पण केला.

20इम्मेरच्या वंशातले हनानी व जबद्या,

21हारीमच्या वंशातले मासेया, एलीया, शमाया, यहीएल
व उज्जीया,

22पशहूरच्या वंशातले एल्योवेनय, मासेया, इश्माएल,
नथनेल, योजाबाद, एलासा,

23लेव्यांपैकी योजाबाद, शिमी, कलाया उर्फ-कलीटा,
पूथह्या, यहूदा आणि अलियेजर,

24गायकांपैकी एल्याशीब, द्वारपालांमधले, शल्लूम,
तेलेम, ऊरी,

25इस्राएलींमधले परोशाच्या वंशातले रम्या व यिज्जीया,
मल्कीया, मियानीन, एलाजार, मल्कीया, बनाया,
26एलामच्या वंशातले मत्तन्या, जखऱ्या, यहीएल, अब्दी,
यरेमोथ व एलीया, 27जत्तूच्या वंशातले एल्योवेनय,
एल्याशीब, मत्तन्या, यरेमोथ, जाबाजाबाद, अजीजा,

28बेबाईच्या वंशातील यहोहानान, हनन्या, जब्बइ,
अथलइ

29बानीच्या वंशातील मशुल्लाम, मल्लूख, आदाया,
याशूब, शाल आणि रामोथ,

30पहथ-मवाबच्या वंशातील अदना, कलाल, बनाया,
मासेया, मत्तन्या, बसलेल, विन्नूई, मनश्शे,
31आणि हारीमच्या वंशातील अलीयेजर, इश्शीया,
मल्कीया, शमाया, शिमोन, 32बन्यामीन, मल्लूख, शमऱ्या,
33हाशूमच्या वंशातील मत्तनई, मत्तथा, जाबाद,
अलीफलेट, यरेमई, मनश्शे, शिमी, 34बानीच्या वंशातले
मादइ, अम्राम, ऊएल 35बनाया, बेदया, कलूही, 36बन्या
मरेमोथ, एल्याशीब, 37मत्तन्या, मत्तनइ, व यासू
38बानी व बिन्नूइ, शिमी, 39शेलेम्या, नाथान, अदाया,
40मखनदबइ, शाशइ, शारइ, 41अजरएल, शेलेम्या,
शमऱ्या
42शल्लूम, अमऱ्या, योसेफ,
43नबोच्या वंशातील ईयेल, मत्तिथ्या, जाबाद, जबिना,
इद्दो, योएल, बनाया. 44वरील सर्वांनी परकीय बायकांशी
लग्ने केली होती. त्यापैकी काहींना या संबंधातून संतती
झाली होती.

# नहेम्या

## नहेम्याची प्रार्थना

1 नहेम्या हा हखल्याचा मुलगा. त्याची ही वचने: किसलेव
महिन्यात मी, नहेम्या, शूशन या राजधानीत होतो.
राजा अर्तहशश्तच्या कारकीर्दीचे तेव्हा विसावे वर्ष होते.
2मी शूशन येथे असताना माझा हनानी नावाचा एक भाऊ
आणि यहुदातील काही लोक तेथे आले. त्यांच्याकडे मी
तेथे राहणाऱ्या यहुद्यांची चौकशी केली. हे यहुदी म्हणजे
बंदिवासातून सुटून अजून यहुदातच राहणारे लोक होते.
यरुशलेम नगराचीही खुशाली मी त्यांना विचारली.
3हनानी आणि त्याच्या बरोबरचे लोक म्हणाले, “नहेम्या,
बंदिवासातून सुटून यहुदात राहणारे हे लोक मोठ्या बिकट
परिस्थितीत आहेत. त्यांच्यापुढे बऱ्याच अडचणी असून
त्यांची अप्रतिष्ठा चालली आहे. कारण यरुशलेमची तटबंदी
कोसळून पडली आहे. तसेच तिच्या वेशी जळून खाक
झाल्या आहेत.”
4यरुशलेमच्या लोकांची आणि नगराच्या तटबंदीची ही
हकीकत ऐकून मी अत्यंत उद्विग्न झालो. मी खाली बसलो
व रडू लागलो. मला अतिशय दु:ख झाले. कित्येक दिवस
मी उपवास केला आणि स्वर्गातील देवाची प्रार्थना केली.
5मी पुढीलप्रमाणे प्रार्थना केली.

हे परमेश्वरा, स्वर्गातील देवा, तू मोठा सर्वशक्तीमान
देव आहेस. तुझ्यावर प्रेम करणाऱ्या आणि तुझ्या
आज्ञा पाळणाऱ्या लोकांशी केलेला प्रेमाचा करार
पाळणारा तू परमेश्वर आहेस.
6तुझा सेवक अहोरात्र तुझी प्रार्थना करत आहे,
ती तू कृपा करून डोळे आणि कान उघडे कर व
ऐक. तुझ्या सेवकांच्या म्हणजेच इस्राएलींच्या वतीने
मी प्रार्थना करत आहे. आम्ही इस्राएलींनी तुझ्याविरुध्द
जी पापे केली त्यांची मी कबुली देत आहे. मी कबूल
करतो की मी तुझ्याविरुध्द पाप केले तसेच
माझ्या
वडीलांच्या घराण्यातील लोकांनीही केले. 7आम्हा
इस्राएलींची वर्तणूक तुझ्या दृष्टीने वाईट होती. तुझा
सेवक मोशे याला तू दिलेल्या आज्ञा, शिकवण आणि
नियम यांचे पालन आम्ही केले नाही.
8आपला सेवक मोशे याला दिलेली शिकवण तू
कृपया आठव. त्याला तू म्हणाला होतास, “तुम्ही
इस्राएल लोक एकनिष्ठ राहिला नाहीत तर दुसऱ्या
राष्ट्रांमध्ये मी तुम्हाला विखरुन टाकीन. 9पण तुम्ही
माझ्याकडे परत आलात आणि माझ्या आज्ञा पाळल्यात
तर मी असे करीन: आपापली घरे बळजबरीने
सोडायला लागून पृथ्वीच्या अंतापर्यंत देशोधडीला
लागलेल्या तुमच्यातल्या लोकांनाही मी
ठिकठिकाणांहून एकत्र आणीन. माझे नाव ठेवावे
म्हणून जे ठिकाण मी निवडले तिथे मी त्यांना परत
आणीन.”
10इस्राएल लोक तुझे सेवक असून ते तुझे लोक
आहे. तुझ्या प्रचंड सामर्थ्याने तू या लोकांना सोडवलेस.
11तेव्हा, हे परमेश्वरा, माझी विनवणी कृपा करून
ऐक. मी तुझा सेवक आहे. तुझ्या नावाविषयी भीतियुक्त
आदर दाखवण्याची इच्छा असलेल्या तुझ्या सेवकांची
ही प्रार्थना तू ऐकावीस. मी राजाचा मद्य चाखणारा
सेवक* आहे, हे परमेश्वरा, तुला हे माहीत आहेच.
तेव्हा कृपा करून आज माझ्या मदतीला ये. राजाजवळ
मी मदतीची याचना करीन तेव्हा मला साहाय्य कर.
मला यश दे आणि राजाची मर्जी राखण्यात मला
मदत कर.

## राजा अर्तहशश्त नहेम्याला यरुशलेमला पाठवतो

2 राजा अर्तहशश्तच्या कारकीर्दीच्या विसाव्या वर्षी
नीसान महिन्यात राजासमोर द्राक्षारस आणला गेला.
मी तो उचलला आणि राजाला दिला. या पूर्वी मी कधी
राजाच्या सहवासात असताना उदास नव्हतो पण यावेळी
मात्र कष्टी होतो. 2म्हणून राजाने मला विचारले, “तुला
बरे वाटत नाही का? तू असा खिन्न का दिसतोस? तू
मनातून दु:खी दिसतोस.”
तेव्हा मी फार घाबरलो. 3पण, भ्यायलेला असूनही मी
राजाला म्हणालो, “राजा चिरायू होवो! माझ्या पूर्वजांचे
जिथे दफन झाले आहे ते नगर उद्ध्वस्त झाले आहे.
म्हणून मी दु:खी आहे. नगराच्या वेशीसुध्दा आगीत जळून
गेल्या आहेत.”

---

**राजाचा मद्य चाखणारा सेवक** एक महत्त्वाचे पद हा सेवक कायम राजाच्या अगदी निकट असून तो कोणी राजावर विषप्रयोग करत नाही ना याची खात्री करण्यासाठी राजाचे मद्य आधी चाखून बघतो.

4यावर राजा मला म्हणाला, “तुझ्यासाठी मी काय करावे असे तुला वाटते?”

उत्तर देण्यापूर्वी मी स्वर्गातील देवाची प्रार्थना केली. 5मग मी राजाला म्हणालो, “राजाची मर्जी असेल आणि मी तुमच्याशी भलेपणाने वागलो असेन तर कृपया मला माझ्या पूर्वजांचे जिथे दफन झाले आहे त्या यहुदातील यरुशलेम नगराला पाठवावे. तिथे जाऊन नगराची पुन्हा उभारणी करण्याची माझी इच्छा आहे.”

6राणी राजाजवळच बसली होती. त्या दोघांनी मला विचारले, “तुला या कामासाठी जाऊन यायला किती दिवस लागतील? तू परत केव्हा येशील?”

राजा मला जाऊ द्यायला आनंदाने तयार झाला म्हणून मी ही त्याला विशिष्ट मुदत सांगितली. 7मी पुढे राजाला असेही म्हणालो, “राजाची माझ्यावर मेहेरनजर असेल तर माझी आणखी एक विनंती आहे. फरात नदीच्या पश्चिमेकडील अधिकाऱ्यांसाठी काही पत्रे मला द्यावीत. म्हणजे ती त्यांना दाखवल्यावर यहुदाच्या वाटेवर त्यांच्या हद्दीतून सुखरुप जायला ते मला परवानगी देतील. 8शिवाय दरवाजे, भिंती, प्रार्थनामंदिराच्या भोवतालच्या भिंती आणि माझे घर यांच्यासाठी मला मजबूत लाकूड लागणार आहे. त्यासाठी राजाचा वनाधिकारी आसाफ याला द्यायला मला पत्र द्यावे.”

राजाने मला तशी पत्रे आणि मी मागितले ते सर्व काही दिले. देवाची माझ्यावर कृपा असल्यामुळे राजाने हे दिले.

9मग मी फरात नदीच्या पश्चिमेकडे असलेल्या, प्रदेशाच्या अधिकाऱ्यांकडे गेलो. त्यांना राजाने दिलेली पत्रे दिली. राजाने माझ्यासोबत सैन्यातले अधिकारी आणि घोडेस्वारही पाठवले होते. 10सनबल्लट आणि तोबीया यांना माझा बेत ऐकून माहीत होता. इस्राएलींच्या मदतीसाठी कोणी एक जण आला आहे याने ते नाराज झाले व रागावले. सनबल्लट होरोन या गावचा होता आणि तोबीया अम्मोनी आधिकारी होता.

## नहेम्या यरुशलेमच्या तटबंदीची पाहणी करतो

11–12मी यरुशलेमला गेलो आणि तीन दिवस राहिलो. मग रात्री सोबत काहीजणांना घेऊन बाहेर पडलो. यरुशलेमसाठी काही करण्याचा जो विचार देवाने माझ्या मनात जागवला होता त्याबद्दल मी कोणाशी काही बोललो नव्हतो. मी ज्या घोड्यावर बसलो होतो तो वगळता आणखी घोडे माझ्याबरोबर नव्हते. 13अंधार असतानाच खोऱ्याच्या वेशीतून मी बाहेर पडलो. मकरकूप विहिर आणि राखेच्या ढिगाची वेस यांच्या दिशेने मी कूच केले. यरुशलेमची मोडलेली तटबंदीची भिंत आणि त्यातील आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली प्रवेशद्वारे यांची पाहणी केली. 14मग कारंजाचे प्रवेशद्वार आणि राजाचा तलाव यांच्याकडे गेलो. पण माझा घोडा पलीकडे जाऊ शकेल इतकीही जागा नसल्याचे जवळ गेल्यावर माझ्या लक्षात आले. 15तेव्हा मी अंधारातच भिंतीची बारकाईने तपासणी करत खोऱ्यातून वरती गेलो. शेवटी मी मागे वळलो आणि परतून खोऱ्याच्या वेशीतून आत शिरलो. 16इस्राएली अधिकारी आणि महजन यांना माझा ठावठिकाणा माहीत नव्हता. माझे काय चालले आहे ते त्यांना माहीत नव्हते. यहुदी, याजक, राजाचे कुटुंबीय, अधिकारी आणि जे बांधकामाचे काम करणार होते यांच्यापैकी कोणालाही मी काही बोललो नव्हतो.

17मग मी या सगळ्यांना म्हणालो, “इथे आपल्याला काय त्रास आहे तो तुम्ही पाहातच आहात. यरुशलेम उजाड आणि उद्ध्वस्त झाले आहे. त्याच्या वेशी आगीत जळून गेल्या आहेत. चला, आता आपण यरुशलेमची तटबंदी पुन्हा बांधू या. म्हणजे आपली आणखी अप्रतिष्ठा होणार नाही.”

18देवाची माझ्यावर कृपा असल्याचेही मी त्यांना सांगितले. राजा माझ्याशी काय बोलला ते मी त्यांना सांगितले. तेव्हा ते लोक म्हणाले, “आपण आत्ताच कामाला लागू या!” म्हणून आम्ही या सत्कार्याला सुरुवात केली. 19पण आम्ही पुन्हा बांधकाम करत असल्याची खबर होरोनचा सनबल्लट, अम्मोनी अधिकारी तोबीया आणि अरबी गेशेम यांना लागली. त्यांनी अगदी नीच पातळीवर जाऊन आमचा उपहास केला. ते म्हणाले, “हे काय करताय तुम्ही? राजाविरुध्द बंड करणार आहात का?”

20पण मी त्यांना असे म्हणालो: “स्वर्गातील देवच आम्हाला यश देईल. आम्ही देवाचे सेवक असून आम्ही हे नगर पुन्हा उभारू. या कामात तुम्ही काही मदत करु शकणार नाही. तुमच्या कुटुंबातील कोणीही यरुशलेममध्ये राहिलेले नाही. तुमच्या मालकीची जमीन येथे नाही. या जागेत असायचा तुम्हाला काही अधिकार नाही.”

## तटबंदीचे बांधकाम करणारे

3 मुख्य याजकाचे नाव होते एल्याशीब. एल्याशीब आणि त्याचे याजक बांधव उठून कामाला लागले आणि त्यांनी मेंढेवेस बांधली. त्यांनी पवित्र परमेश्वरासाठी प्रार्थनापूर्वक तिची प्रतिष्ठापना केली. दरवाजे भिंतीत बसवले. हमेयाचा बुरुज (म्हणजे शंभराचा बुरुज) आणि हनानेल बुरुज इथपर्यंत या याजकांनी यरुशलेमच्या तटबंदीचे काम केले. त्यांनी पवित्र परमेश्वरासाठी आपल्या कामाची प्रार्थनापूर्वक प्रतिष्ठापना केली.

2याजकांच्या शेजारी यरीहोच्या लोकांनी भिंत बांधली आणि इम्रीचा मुलगा जक्कूर याने यरीहोच्या लोकांच्या कामालगत भिंतीचे बांधकाम केले. 3हस्सनाच्या मुलांनी मत्स्यवेस बांधली. तुळ्या घातल्या. दरवाजे बसवले. या दरवाजांना कड्या आणि अडसर घातले. 4उरीयाचा मुलगा

मरेमोथ याने या तटबंदीच्या पुढच्या भागाची डागडुजी केली.
(उरीया हा हक्कोस याचा मुलगा.)

बरेख्याचा मुलगा मशुल्लाम याने त्याच्या पुढच्या भागाचे
काम केले. (बरेख्या मशेजबेलचा मुलगा.)

बानाचा मुलगा सादोक याने त्यापुढील भागाची दुरुस्ती
केली.

5 तकोवाच्या लोकांनी भिंतीच्या त्यापुढच्या भागाची
डागडूजी केली. पण तकोवाच्या नेत्यांनी मात्र आपला
राज्यपाल नहेम्या याच्यासाठी काम करायला नकार दिला.

6 यहोयादा आणि मशुल्लाम यांनी जुन्या वेशीची दुरुस्ती
केली. यहोयादा पासेहाचा मुलगा आणि मशुल्लाम
बसोदयाचा मुलगा. त्यांनी तुळया बसवल्या आणि दरवाजे
बिजागऱ्यांनी जोडले. नंतर कड्या व अडसर बसवले.

7 गिबोन आणि मिस्पा येथील लोकांनी भिंतीच्या पुढील
भागाचे काम केले. गिबोन मधला मलत्या आणि मेरोनोथ
येथला यादोन आणि गिबोन आणि मिस्पा येथील लोकांनी
हे काम केले. गिबोन आणि मिस्पा हा भाग फरात नदीच्या
पश्चिमेकडील भागाच्या राज्यपालांच्या सत्तेखाली होता.

8 हरह याचा मुलगा उज्जियेल याने पुढच्या भागाची
डागडुजी केली. उज्जियेल सोनार होता. हनन्या हा सुगंधी
द्रव्ये करणाऱ्यांपैकी होता. या लोकांनी रुंद कोटापर्यंत
यरुशलेमची डागडुजी केली.

9 हूरचा मुलगा रफाया याने भिंतीचा पुढील भाग बांधून
काढला. यरुशलेमच्या अर्ध्या भागाचा हा राज्यपाल होता.

10 हरूमफाचा मुलगा यदाया याने भिंतीच्या पुढच्या भागाचे
काम केले. आपल्या स्वत:च्या घरालगतच्या भिंतीची
डागडुजी त्याने केली. त्याच्या पुढचा भाग हशबन्याचा
मुलगा हत्तूश याने बांधला. 11 हारीमचा मुलगा मल्कीया
आणि पहथ-मवाबचा मुलगा हश्शूब यांनी पुढच्या भागाची
दुरूस्ती केली. तसेच भट्टी बुरुज ही बांधला.

12 हल्लोहेशचा मुलगा शल्लूम याने त्यापुढचा भाग दुरुस्त
केला. या कामात त्याच्या मुलींनी त्याला मदत केली.
शल्लूम यरुशलेमच्या अर्ध्या भागाचा आधिकारी होता.

13 हानून नावाचा एक जण आणि जानोहे येथे
राहाणारे लोक यांनी खोऱ्याच्या वेशीची दुरुस्ती
केली. ही वेस बांधून त्यांनी दारे बिजागऱ्यांवर उभी केली.
मग या दारांना त्यांनी कड्या व अडसर घातले.
शिवाय त्यांनी पाचशे यार्ड लांबीची भिंतही दुरुस्त केली.
थेट उकिरड्याच्या वेशीपर्यंत त्यांनी ही डागडुजी केली.

14 रेखाबचा मुलगा मल्कीया याने ही उकिरड्याची वेस
बांधली. मल्कीया बेथ-हक्करेम या जिल्ह्याचा राज्यपाल
होता. त्याने वेस दुरुस्त केली. दरवाजे बिजागऱ्यांसह लावले.
या दरवाजांना कड्या, अडसर घातले.

15 कोलहोजेचा मुलगा शल्लूम याने कारंज्याची वेस
दुरुस्त केली. शल्लूम मिस्पा जिल्ह्याचा अधिकारी होता.
त्याने वेस बांधून तिला छप्पर केले. वेशीचे दरवाजे
बिजागऱ्यांसह लावले. मग दारांना कड्या व अडसर
बसवले. शिवाय त्याने राजाच्या बागेलगतच्या सिल्लोम
तळ्याची भिंतही बांधली. दावीद नगरातून पायऱ्या उतरतात
तिथपर्यंत त्याने डागडुजी केली.

16 अजबूकचा मुलगा नहेम्या याने पुढचा भाग दुरुस्त
केला. नहेम्या बेथसूरच्या अर्ध्या जिल्ह्याचा अधिकारी
होता. दावीदच्या कबरेसमोरच्या भागापर्यंत त्याने डागडुजी
केली. तसेच बांधून काढलेला तलाव आणि वीरगृह इथपर्यंत
त्याने काम केले.

17 लेवी घराण्यातील लोकांनी पुढचे काम केले. बानीचा
मुलगा रहूम याच्या हाताखाली या लोकांनी काम केले.
हशब्याने पुढच्या भागाची डागडुजी केली. नहेम्या कईला
जिल्ह्याचा तो अधिकारी होता. त्याने आपल्या जिल्ह्यातर्फे
दुरुस्त्या केल्या.

18 त्याच्याभावांनी पुढचे काम केले. हेनदादचा मुलगा
बवई याच्या हाताखाली त्यांनी काम केले. कईलाच्या
उरलेल्या निम्म्या भागाचा बवई अधिकारी होता.

19 नंतर येशूवाचा मुलगा एजेर याने पुढचे दुरुस्तीचे
काम पार पाडले. एजेर मिस्पाचा राज्यपाल होता.
शस्त्रागारापासून भिंतीच्या कोपऱ्यापर्यंतच्या भिंतदुरुस्तीचे
काम त्याने केले 20 जक्कायाचा मुलगा बारुख याने पुढची
दुरुस्ती केली. बारुखने खूप मेहनत घेऊन कोपऱ्यापासून
पुढे एल्याशीबच्या घराच्या प्रवेशद्वारापर्यंतचे काम केले.
एल्याशीब हा मुख्य याजक होता. 21 हक्कोसचा मुलगा
उरीया. उरीयाचा मुलगा मेरेमोथ याने एल्याशीबच्या घराच्या
दारापासून थेट घराच्या शेवटपर्यंत भिंतीचे काम केले.
22 भिंतीच्या पुढच्या भागाची दुरुस्ती त्या भागात राहणाऱ्या
याजकांनी* केली.

23 बन्यामीन आणि हश्शूब यांनी आपापल्या घरासमोरील
भिंत दुरुस्त केली. अनन्याचा मुलगा मासेया.मासेयाचा
मुलगा अजऱ्या. याने आपल्या घरालगतच्या भिंतीचे
दुरस्तीचे काम केले.

24 हेनादादचा मुलगा बिन्नुई याने अजऱ्याच्या घरापासून,
भिंतीचे वळण आणि पुढचा कोपरा येथपर्यंतचे काम केले.

25 उजई याचा मुलगा पलाल याने बुरजालगतच्या
भिंतीच्या वळणापासूनची दुरुस्ती केली. हा बुरुज राजाच्या
वरच्या घराजवळ होता. म्हणजेच राजाच्या पहारेकऱ्यांच्या
चौकालगत होता. त्यांनंतर परोशचा मुलगा पदाय याने
दुरुस्ती केली.

26 ओफेल टेकडीवर मंदिराचे सेवेकरी राहात असत.
त्यांनी जलवेशीच्या पूर्वेपर्यंत आणि तिच्या नजीकच्या
बुरुजापर्यंतचे भिंतदुरुस्तीचे काम केले.

27 पुढे तकोवाच्या लोकांनी मोठ्या बुरुजापासून ते थेट
ओफेल टेकडीपर्यंतचा उरलेला भाग दुरुस्त केला.

---

**त्या भागात राहणरे याजक** "यार्देन नदीच्या खोऱ्यात राहणारे
याजक असाही" अर्थ असू शकेल.

28घोडा वेशीवरचा भाग याजकांनी दुरुस्त केला. प्रत्येक
याजकाने आपापल्या घरापुढच्या भागाची दुरुस्ती केली.
29इम्मेरचा मुलगा सादोक याने आपल्या घरापुढच्या भिंतीची
डागडुजी केली. शखन्याचा मुलगा शमाया याने पुढचा
भाग दुरुस्त केला. शमाया हा पूर्ववेशीचा राखणदार होता.
30शलेम्याचा मुलगा हनन्या याने आणि सालफचा सहावा
मुलगा हानून याने भिंतीची पुढची दुरुस्ती केली.

बरेख्याचा मुलगा मशुल्लाम याने आपल्या घरापुढची
भिंत दुरुस्त केली. 31मंदिराचे सेवेकरी आणि व्यापारी
यांच्या घरापर्यंतच्या भिंतीच्या भागाची दुरुस्ती मल्कीया
याने केली. हा भाग तपासणी वेशीसमोर येतो. भिंतीच्या
कोपऱ्यावरील जागे खोलीपर्यंतच्या भिंतीची दुरुस्ती
मल्कीयाने केली. मल्कीया सोनार होता. 32कोपऱ्यावरील
खोली आणि मेंढरांची वेस यांच्या दरम्यानच्या भिंतीची
दुरुस्ती सोनार आणि व्यापारी यांनी केली.

## सनबल्लट आणि तोबीया

4 आम्ही यरुशलेमचा कोट बांधून काढत आहोत हे
सनबल्लटच्या कानावर गेले. तेव्हा तो फार संतापला
आणि नाराज झाला. त्याने यहूद्यांचा उपहास करायला
सुरुवात केली. 2सनबल्लटने आपले मित्र आणि शोमरोन
येथील सैन्य यांच्याशी बातचीत केली. तो म्हणाला, "हे
दुबळे यहुदी करताहेत तरी काय? आपण त्यांची गय करु
असे त्यांना वाटते? आपण यज्ञ करु असे त्यांना वाटते की
काय? अगदी एका दिवसात आपण सगळे बांधकाम पुरे
करु असे त्यांना वाटत असावे. या उकिरड्यातून आणि
घाणीतून ते पुन्हा दगडांना सजीव करु शकणार नाहीत. ते
निव्वळ राखेचे आणि उकिरड्याचे ढीग आहेत."
3तोबीया अम्मोनीची सनबल्लटला साथ होती. तोबीया
म्हणाला, "यहूद्यांनी हे कसले बांधकाम आरंभले आहे?
एक लहानसा कोल्हा त्यावर चढून गेला तरी तो हा दगडी
कोट पाडून टाकील."
4नहेम्याने देवाची प्रार्थना केली. तो म्हणाला, "आमच्या
देवा, आमची प्रार्थना ऐक. हे लोक आमचा तिरस्कार
करतात. सनबल्लट आणि तोबीया आमचा अपमान करत
आहेत.त्या वाईट गोष्टी त्यांच्यावरच उलटव. त्यांना
लाजिरवाणे कर. त्यांना निर्वासित अवस्थेत कैदी कर.
5त्यांच्या अपराधांची क्षमा करु नकोस. तसेच तुझ्या
डोळ्यादेखत केलेल्या पापांना क्षमा करु नकोस. त्यांनी
बांधकाम करणाऱ्यांचा अपमान केला आहे. आणि त्यांना
नाउमेद केले आहे."
6यरुशलेमचा कोट आम्ही बांधला. पूर्ण नगराभोवती
तटबंदी बांधून काढली. पण तिची उंची असायला हवी
त्यापेक्षा निम्मीच होती. लोकांनी मनापासून काम केले
म्हणून आम्ही एवढे केले. 7पण सनबल्लट तोबीया, अरबी,
अम्मोनी आणि अश्दोदी यांचा मात्र फार संताप झाला.
लोकांनी यरुशलेमच्या भिंतीचे काम सुरुच ठेवले आहे हे
त्यांनी ऐकले. भिंतीला पडलेली भगदाडे ते बुजवत आहेत
हे ही त्यांच्या कानावर आले. 8तेव्हा या सर्वांनी एकत्र
येऊन यरुशलेम विरुध्द हल्ला करण्याचा कट केला.
यरुशलेममध्ये गोंधळ उडवायचा त्यांनी बेत केला. शहरावर
चाल करून येऊन हल्ला करायचे त्यांनी ठरवले. 9पण
आम्ही आमच्या देवाची प्रार्थना केली. आणि त्यांना तोंड
द्यायला सज्ज असावे म्हणून आम्ही रात्रंदिवस पहारा
करण्यासाठी भिंतींवर राखणदार नेमले.
10आणि त्यावेळी यहुदी लोक म्हणाले, "बांधकामावरचे
लोक थकत चालले आहेत. वाटेत खूपच घाण आणि
केरकचरा माजला आहे. कोटाचे बांधकाम आम्ही चालू
ठेवू शकत नाही. 11आणि आपले शत्रू म्हणताहेत, 'यहुदींना
काही समजायच्या किंवा दिसायच्या अगोदरच आपण
त्यांच्यात शिरकाव केलेला असेल. आपण त्यांना मारुन
टाकू म्हणजे कामच थांबेल.'"
12मग आमच्या शत्रूंच्या मध्ये राहणारे जे यहुदी लोक
होते त्यांनी आम्हाला पुढील गोष्ट दहादा सांगितली,
"आपल्या शत्रूने आम्हाला चहूबाजूंनी वेढले आहे. पाहावे
तिकडे तेच आहेत."
13तेव्हा मी कोटाभोवतालच्या सर्वात सखल जागांच्या
मागे काही जणांना ठेवले. भिंतीतील भगदाडांजवळ त्याना
ठेवले. आपापल्या तलवारी, भाले आणि धनुष्यांसह कुटुंबेच
मी नेमली. 14सगळी परिस्थिती मी डोळ्याखालून घातली.
आणि मग उभा राहून मी महत्वाची घराणी, अधिकारी
आणि इतर लोक यांना म्हणालो, "आपल्या शत्रूची धास्ती
बाळगू नका. लक्षात ठेवा, आमचा प्रभु, परमेश्वर जो
महान आणि सामर्थ्यशाली आहे त्याचे स्मरण करा. आपले
भाऊबंद मुलगे, मुली यांच्याकरता तुम्ही लढा दिला पाहिजे.
आपल्या बायका आणि घरेदारे यांच्यासाठी लढले पाहिजे."
15आपले बेत आम्हाला कळून चुकले आहेत हे मग
आमच्या शत्रूंनी ऐकले. देवाने त्यांचे बेत धुळीला मिळवले
हे त्यांना समजले. तेव्हा आम्ही पुन्हा कोटाच्या कामाला
लागलो. जो तो आपापल्या ठिकाणी जाऊन आपल्या वाटचे
काम करु लागला. 16त्या दिवसापासून माझ्याकडची निम्मी
माणसे तटबंदीचे काम करत होती. आणि उरलेले निम्मे
लोक भाले, ढाली, धनुष्य, चिलखत यासह राखणीला
सज्ज होते. भिंतीचे बांधकाम करणाऱ्या सर्व यहुदी लोकांच्या
पाठीमागे सैन्यातील अधिकारी उभे होते. 17बांधकाम
करणारे आणि त्यांचे मदतनीस यांच्या एका हातात
बांधकामाची अवजारे तर दुसऱ्या हातात शस्त्रे होती.
18तलवार कमरेला बांधूनच प्रत्येकजण बांधकाम करत
होता. सावधगिरीच्या इषाऱ्याचे रणशिंग वाजवणारा माणूस
माझ्या शेजारीच होता. 19मग मी प्रमुख घराणी, अधिकारी
आणि इतर लोक यांच्याशी बोललो. त्यांना मी म्हणालो
"ही एक प्रचंड कामगिरी आहे आणि आपण भिंतीलगत

विखुरलेलो आहोत. एकमेकापासून लांब अंतरावर आहोत. [20]तेव्हा कर्ण्याचा आवाज कानी पडताच त्या ठिकाणी धावत या. तेथे आपण एकत्रगोळा होऊ आणि देवच आपल्यासाठी लढेल."

[21]तेव्हा आम्ही यरुशलेमच्या कोटाचे काम चालूच ठेवले. अर्ध्या लोकांजवळ भाले होते. पहाट उजडल्यापासून ते थेट रात्री आकाशात चांदण्या दिसू लागेपर्यंत आम्ही काम करत होतो.

[22]त्यावेळी मी लोकांना असेही म्हणालो, "प्रत्येक बांधकाम करणाऱ्याने आपल्या मदतनीसासह रात्री यरुशलेमच्या आत राहिले पाहिजे. म्हणजे रात्री ते राखणदार म्हणून आणि दिवसा कामगार म्हणून काम करतील."

[23]तेव्हा आमच्यापैकी कोणीही अंगावरचे कपडे उतरवले नाहीत. मी, माझे भाऊ, माझी माणसे, आणि राखणदार यांच्यापैकी कोणीही नाही. सदा सर्वकाळ

आम्ही सर्वजण शस्त्रसज्ज होतो-अगदी पाणवठ्यावर जात असू तेव्हा ही.

## नहेम्याची गरिबांना मदत

5 अनेक गरीब लोकांनी आपल्या यहुदी बांधवांविरुध्द तक्रार करायला सुरुवात केली. [2]त्यांच्यापैकी काहीजण म्हणू लागले, "आम्हाला बरीच मुले बाळे आहेत. आम्हाला खायला मिळावे आणि आम्ही जिवंत राहावे यासाठी आम्हांला धान्य तर मिळाले पाहिजे."

[3]इतर काही म्हणत होते, "सध्या दुष्काळ आहे. धान्यासाठी आम्हाला आमची शेंत, द्राक्षमळे आणि घरे गहाण टाकावी लागत आहेत."

[4]आणखी काही म्हणत, "आमची शेते आणि द्राक्षमळे यांच्यावर आम्हाला राजाचा कर भरावा लागत आहे. पण तो भरणे परवडत नसल्यामुळे आम्हाला पैसे उसने घ्यावे लागत आहेत. [5]ते श्रीमंत लोक पाहा! आम्ही त्यांच्यासारखेच तर आहोत. त्यांच्या मुलांसारखीच आमची मुले आहेत. पण आम्हांला आमची मुले मुली गुलाम म्हणून विकावी लागली. काहींना तर आपल्या मुलींना गुलाम म्हणून विकणे भाग पडलेले आहे. आम्ही असहाय आहोत. आमची शेती आणि द्राक्षमळे तर गेलेच. ते आता इतर लोकांच्या मालकीचे आहेत."

[6]या तक्रारी ऐकल्या तेव्हा मला अतिशय संताप आला. [7]पण मी स्वत:ला शांत केले आणि मग श्रीमंत कुटुंबे आणि कारभारी यांच्याकडे गेलो. त्यांना म्हणालो, "तुम्ही लोकांना जी रक्कम कर्जाऊ देता तिच्यावर व्याज द्यायची तुम्ही या आपल्याच माणसांना बळजबरी करत आहात. ते तुम्ही थांबवले पाहिजे." मग मी सर्व लोकांना एकत्र बोलावले. [8]त्यांना मी म्हणालो, "आपले यहुदी बांधव इतर देशामध्ये गुलाम म्हणून विकले गेले होते. त्यांना पुन्हा विकत घेऊन मुक्त करण्याचे आपण सर्वतोपरी प्रयत्न केले. आणि आता पुन्हा तुम्ही त्यांना गुलामासारखे विकत आहा!"

ते श्रीमंत लोक आणि अधिकारी गप्प राहिले. त्यांना काही बोलायला जागा उरली नाही. [9]तेव्हा मी त्यांच्याशी बोलत राहिलो. मी म्हणालो, "तुम्ही जे करत आहात ते बरोबर नाही. देवाविषयी भय आणि आदर बाळगावा हे तुम्ही जाणता. इतर लोकांसारखी लाजिरवाणी कृत्ये तुम्ही करु नयेत. [10]माझे लोक,

माझे भाऊ आणि मी सुध्दा लोकांना पैसे आणि धान्य उधार देत आहोत. पण त्यावरचे व्याज त्यांना सक्तीने द्यायला लावणे थांबवले पाहिजे. [11]त्यांची शेती, द्राक्षमळे, जैतुनाचे मळे आणि घरे तुम्ही त्यांना आत्ताच्या आत्ता परत करा. त्यांना लावलेले व्याजही तुम्ही परत करा. त्यांना जे पैसे, धान्य, नवीन द्राक्षारस आणि तेल तुम्ही कर्जाऊ दिलेत त्यावर तुम्ही एक टक्का व्याज लावले आहे. ते तुम्ही त्यांना परत करा."

[12]यावर ते श्रीमंत लोक आणि अधिकारी म्हणाले, "आम्ही ते परत करु आणि आम्ही त्यांच्या कडून आधिक काही मागणार नाही. नहेम्या, आम्ही तुझ्या म्हणण्याबरहुकूम वागू."

मग मी याजकांना बोलावून घेतले. श्रीमंत लोक आणि अधिकारी जे बोलले त्याप्रमाणे वागण्याचे मी त्यांना देवासमोर वचन द्यायला लावले. [13]मग मी माझ्या वस्त्रावरच्या चुण्या झटकत म्हणालो, "आपले वचन जो पाळत नाही त्या प्रत्येकाची गत देव अशीच करतो. देव त्यांना त्यांच्या घरातून झटकून टाकील. ज्यासाठी त्यांनी कामधंदा केला ते त्यांच्यापासून हिरावून घेतले जाईल. तो माणूस सर्वस्वाला मुकेल."

माझे सांगून झाले. आणि सर्वजण त्याच्याशी सहमत झाले. ते सर्व म्हणाले, "आमेन!" मग त्यांनी परमेश्वराचे गुणगान केले. आपल्या वचनाप्रमाणे लोक वागले.

[14]शिवाय, यहुद्यांच्या भूमीवर राज्यपाल म्हणून माझी नेमणूक असतानाच्या त्या काळात मी अथवा माझ्या भाऊबंदांनी राज्यपालाच्या दर्जाचे अन्न घेतले नाही. माझ्या अन्नासाठी लोकांवर कर भरायची सक्ती मी केली नाही अर्तहशश्त राजाच्या कारकीर्दीच्या विसाव्या वर्षापासून बत्तिसाव्या वर्षापर्यंत* मी अधिकारी होतो. मी यहुदाचा बारा वर्षे अधिकारी होतो. [15]पण माझ्या आधी सत्तेवर असलेल्या राज्यपालांनी लोकांना त्रस्त केले. या अधिकाऱ्यांनी लोकांना प्रत्येकी एक पौंड चांदी बळजबरीने द्यायला लावली. लोकांना त्यांनी अन्न आणि द्राक्षारस द्यायला भाग पाडले. या राज्यपालांच्या हाताखालच्या प्रमुखांनीही लोकांवर सत्ता गाजवली आणि त्यांचे जिणे खडतर केले. पण मी देवाविषयी भय आणि आदर बाळगला, त्यामुळे अशा गोष्टी केल्या नाहीत. [16]यरुशलेमची तटबंदी

---

**अर्तहशश्त … वर्षापर्यंत** म्हणजे ख्रि.पू. 444-432 या काळात.

उभारायला मी कष्ट घेतले. भिंतीचे काम करायला माझी सर्व माणसे एकत्र आली. आम्ही कोणाची जमीन बळकावली नाही!

[17]शिवाय माझ्या मेजावर मी नेहमीच दीडशे यहूदींना अगत्याने जेवायला घालत असे. शिवाय आसपासच्या राष्ट्रांतून आलेल्या लोकांनाही मी जेवू घालत असे.
[18]मेजावर माझ्या पंक्तीला बसणाऱ्यांसाठी म्हणून रोजचे अन्नाचे प्रमाण पुढीलप्रमाणे असे: एक गाय, सहा निवडक मेंढरे आणि वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी शिवाय दहा दहा दिवसांच्या अंतराने सर्व प्रकारचे द्राक्षारस माझ्या मेजावर पुरवण्यात येत. तरीही, अधिकाऱ्यांसाठी ज्या प्रकारच्या अन्नाची मुभा असते त्याची मागणी मी कधीही केली नाही. माझ्या अन्नाची किंमत म्हणून मी लोकांना कर भरायची सक्ती कधीही केली नाही. लोकांचे काम अतिशय कष्टाचे आहे हे मी जाणून होतो. [19]देवा, या लोकांकरीता मी जे भले केले ते ध्यानात असू दे.

## आणखी समस्या

6 पुढे, आम्ही भिंत बांधल्याचे सनबल्लट, तोबीया, गेशेम हा अरब आणि आमचे इतर शत्रू यांनी ऐकले. भिंतीतली भगदाडे आम्ही बुजवली पण वेशीचे दरवाजे अजून बसवले गेले नव्हते. [2]तेव्हा सनबल्लट आणि गेशेम यांनी मला असा निरोप पाठवला: "नहेम्या, ये. आपण एकमेकांना भेटू. ओनोंच्या मैदानावर केफिरिम या गावात आपण एकत्र जमू." पण त्यांचा हेतू मला इजा करण्याचा होता.

[3]तेव्हा मी माझ्या निरोप्यांमार्फत पुढीलप्रमाणे निरोप पाठवला: "एका महत्वाच्या कामात असल्यामुळे मी खाली येऊ शकत नाही. तुम्हाला भेटायला आल्यामुळे काम थांबावे असे मला वाटत नाही."

[4]सनबल्लट आणि गेशेम यांनी हाच निरोप माझ्याकडे चार वेळा पाठवला. आणि मी ही त्यांना प्रत्येक वेळी हेच उत्तर पाठवले. [5]मग, पाचव्या वेळी सनबल्लटने आपल्या मदतनीसा करवी हाच निरोप मला दिला. यावेळी त्याच्याकडे उघडे पत्र होते. [6]पत्रातला मजकूर असा होता. "येथे एक अफवा पसरली आहे. लोक सर्वत्र तेच बोलत आहेत. खेरीज, गेशेमच्या म्हणण्याप्रमाणे त्यात तथ्य आहे. तू आणि यहुदी मिळून राजाविरुध्द बंड करायच्या बेतात आहात असे लोक म्हणतात. म्हणूनच तुम्ही यरुशलेमच्या तटबंदीचे बांधकाम करत आहात. तू यहुदी लोकांचा नवा राजा होणार असेही लोक म्हणतात. [7]"यहुदात राजा आहे. असे स्वत:बद्दल घोषित करायला तू यरुशलेममध्ये संदेष्टे नेमले आहेस अशीही एक अफवा आहे.

नहेम्या, राजा अर्तहशशतच्या हे सगळे कानावर जाईल हे मी तुला बजावून ठेवतो. तेव्हा, ये आपण एकदा भेटून त्याबद्दल बोलू."

[8]तेव्हा मी सनबल्लटला उलट उत्तर पाठवले की, "तू म्हणतोस तसे काही चाललेले नाही. या केवळ तुझ्याच मनातल्या कल्पना आहेत."

[9]आमचे शत्रू आम्हाला भीती दाखवायचा प्रयत्न करत होते. ते मनात म्हणत होते, "यहुदी घाबरतील आणि काम चालू ठेवण्याची उमेद त्यांच्यात राहणार नाही. मग भिंतीचे काम पुरे होणार नाही."

मग मी प्रार्थना केली, "देवा, मला बळ दे."

[10]मी एकदा दलायाचा मुलगा शमाया याच्या घरी गेलो. दलाया हा महेतबेलचा मुलगा. शमायाला आपल्या घरीच थांबून राहावे लागले होते. तो म्हणाला,

"नहेम्या, आपण देवाच्या मंदिरात भेटू. आत पवित्र जागेत जाऊन आपण दरवाजे बंद करु. कारण लोक तुला मारायला येत आहेत. ते आज रात्रीच तुला मारायला येतील."

[11]पण मी शमायाला म्हणालो, "माझ्यासारख्याने पळून जावे? जीव बचावण्यासाठी माझ्यासारख्या माणसाने मंदिरात जाऊन बसू नये. मी जाणार नाही."

[12]शमायाला देवाने पाठवले नव्हते हे मला माहीत होते. त्याने माझ्याविरुध्द भाकीत केले कारण तोबीया आणि सनबल्लटने त्याला त्याबद्दल पैसे चारले होते, हे मी जाणून होतो. [13]मला हैराण करून घाबरवावे यासाठी शमायाला पैसे दिले जात होते. घाबरुन जाऊन लपून बसण्यासाठी मंदिरात जाण्याचे पाप माझ्या हातून व्हावे अशी त्यांची इच्छा होती. तसे झाले असते तर माझी अप्रतिष्ठा करायला आणि माझी अपकीर्ती करायला माझ्या शत्रूंना ते एक कारण मिळाले असते.

[14]देवा, कृपा करून तोबीया आणि सनबल्लट यांची आठवण ठेव. त्यांनी केलेली दुष्कृत्ये आठव. मला भय दाखवणारी नोवद्या ही संदेष्ट्री आणि इतर संदेष्टे यांचे ही स्मरण असू दे.

## भिंत बांधून झाली

[15]मग अलूल महिन्याच्या पंचविसाव्या दिवशी यरुशलेमच्या भिंतीचे काम समाप्त झाले. भिंतीचे काम व्हायला बावन्न दिवस लागले. [16]कोट बांधण्याचे काम पूर्ण झाल्याचे आमच्या सर्व शत्रूंनी ऐकले. ते पूर्ण झाल्याचे आमच्या भोवतींच्या सर्व राष्ट्रांनी पाहिले आणि त्यांचे धैर्य गळून गेले. कारण आमच्या देवाच्या मदतीने हे काम झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

[17]शिवाय, तटबंदीचे काम पूर्ण झाल्यानंतरच्या काळात यहुदातील श्रीमंत लोक तोबीयाला सारखी पत्रे पाठवत होती. तोबीया त्यांना उत्तरे देत होता. [18]यहुदातील बऱ्याच लोकांनी त्याच्याशी प्रामाणिक राहायचे त्याला वचन दिले

होते म्हणून ते ही पत्रे पाठवत होते. कारण, आरहाचा
मुलगा शखन्या याचा तोबीया जावई होता. आणि तोबीयाचा
मुलगा योहानान याचे मशुल्लामच्या मुलीशी लग्न झाले
होते. मशुल्लाम हा बरेख्याचा मुलगा. 19आणि पूर्वी या
लोकांनी तोबीयाला एक खास वचन दिले होते. त्यामुळे
तोबीया किती चांगला आहे हे ही माणसे मला सारखी
सांगत. आणि मी काय करत असे ते तोबीयाला सांगत
राहात. मला भयभीत करण्यासाठी मग तोबीया मला पत्रे
पाठवी.

7 तेव्हा तटबंदीचे काम पुरे झाले मग आम्ही वेशीवर
दरवाजे बसवले. वेशींवर पहारा करायला माणसे
नेमली. मंदिरात गायनाला आणि याजकांना मदत करायला
माणसे नेमून दिली. 2यानंतर माझा भाऊ हनानी याला मी
यरुशलेमचा अधिकार सोपवला. हनन्या नावाच्या दुसऱ्या
एकाला गढीचा मुख्याधिकारी म्हणून निवडले. हनानीची
निवड मी केली कारण तो अत्यंत प्रामाणिक होता आणि
इतरांपेक्षा देवाबद्दल तो अधिक भय बाळगत असे. 3नंतर
हनानी आणि हनन्या यांना मी म्हणालो, “सूर्य चांगला वर
येऊन ऊन तापल्यावरच तुम्ही रोज वेशीचे दरवाजे उघडा
आणि सूर्यास्तापूर्वीच दरवाजे लावून घ्या. यरुशलेममध्ये
राहणाऱ्यांमधून पहारेकऱ्यांची निवड करा. त्यापैकी काही
जणांना नगराच्या रक्षणासाठी मोक्याच्या जागी ठेवा. आणि
इतरांना आपापल्या घराजवळ पहारा करु द्या.”

## बंदिवासातून परतणाऱ्यांची यादी

4आता नगर चांगले विस्तीर्ण आणि मोकळे होते. पण
वस्ती अगदी कमी होती आणि घरे अजून पुन्हा बांधून
काढली गेली नव्हती. 5तेव्हा सर्व लोकांनी एकदा एकत्र
जमावे असे देवाने माझ्या मनात आणले. सर्व वंशावळ्यांची
यादी करावी म्हणून मी सर्व महत्वाची माणसे, अधिकारी,
सामान्य लोक यांना एकत्र बोलावले. बंदिवासातून जे
सगळ्यात आधी परत आले त्यांच्या वंशवळ्यांच्या याद्या
मला सापडल्या त्यात मला जे लिहिलेले सापडले ते
पुढीलप्रमाणे:
6बंदिवासातून परत आलेले या प्रांतातले लोक असे.
बाबेलचा राजा नबुखदनेस्सर याने या लोकांना बाबेलला
कैद करून नेले होते. हे लोक यरुशलेम आणि यहुदा
येथे परतले. जो तो आपापल्या गावी गेला. 7जरुब्बाबेल
बरोबर परत आले ते लोक असे: येशूवा, नहेम्या, अजऱ्या,
राम्या, नहमानी, मर्दखय, बिलशान, मिस्पेरेथ बिग्वई,
नहूम आणि बाना. इस्राएलचे जे लोक परतले त्यांची नावे
आणि संख्या पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| 8 | परोशचे वंशज | 2,172 |
| 9 | शेफट्याचे वंशज | 372 |
| 10 | आरहचे वंशज | 652 |
| 11 | येशूवा आणि यवाब यांच्या वंशावळीतील पहथमवाबचे वंशज | 2,818 |
| 12 | एलामचे वंशज | 1,254 |
| 13 | जत्तूचे वंशज | 845 |
| 14 | जक्काईचे वंशज | 760 |
| 15 | बिन्नुईचे वंशज | 648 |
| 16 | बेबाईचे वंशज | 628 |
| 17 | अजगादचे वंशज | 2,322 |
| 18 | अदोनीकामचे वंशज | 667 |
| 19 | बिग्वईचे वंशज | 2,067 |
| 20 | आदीनाचे वंशज | 655 |
| 21 | हिज्कीयाच्या कुटुंबातील ओटेरचे वंशज | 98 |
| 22 | हाशुमाचे वंशज | 328 |
| 23 | बेसाईचे वंशज | 324 |
| 24 | हारिफाचे वंशज | 112 |
| 25 | गिबोनाचे वंशज | 95 |
| 26 | बेथलहेम आणि नटोफा या गावांमधली माणसे | 188 |
| 27 | अनाथोथ गावची माणसे | 128 |
| 28 | बेथ-अजमावेथ मधले लोक | 42 |
| 29 | किर्याथ-यारीम, कपीरा व बैरोथ या गावातली | 743 |
| 30 | रामा आणि गेबा इथली | 621 |
| 31 | मिखमास या गावची | 122 |
| 32 | बेथल आणि आय इथली | 123 |
| 33 | नबो या दुसऱ्या एका गावची | 52 |
| 34 | एलाम या दुसऱ्या गावची | 1,254 |
| 35 | हारिम या गावचे लोक | 320 |
| 36 | यरीहो या गावचे लोक | 345 |
| 37 | लोद, हादीद व ओनो या गावाचे | 721 |
| 38 | सनावाचे | 3,930 |

39याजक पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| | येशूवाच्या घराण्यातली यदाया याचे वंशज | 973 |
| 40 | इम्मेराचे वंशज | 1,052 |
| 41 | पशहूराचे वंशज | 1,247 |
| 42 | हारिमाचे वंशज | 1,017 |

43लेवीच्या घराण्यातील माणसे पुढील प्रमाणे:

| | |
|---|---|
| होदयाच्या कुळातली कदमीएलच्या घराण्यातील येशूवाचे वंशज | 74 |

44गाणारे असे:
आसाफाचे वंशज 148

45द्वारपाल पुढील प्रमाणे:

शल्लूम, आटेर, तल्मोन, अक्कूब, हतीता, शोबा
यांचे वंशज 138

46हे मंदिराचे विशेष सेवेकरी:
सीहा, हशूफा, तबायोथ, यांचे वंशज
47 केरोस, सीया, पादोन
48 लेबोना, हगाबा, सल्माई
49 हानान, गिद्देल, गहार
50 राया,रसीन, नकोदा
51 गज्जाम, उज्जा. पासेहा
52 बेसई, मऊनीम, नफूशेसीम
53 बकबूक, हकूफ, हईराचे
54 बसलीथ, महीद, हर्शा
55 बर्कोस, सीसरा, तामहा
56 नसीहा आणि हतीफा

57शलमोनच्या सेवकांचे वंशज :
सोताई, सोफेरेथ, परीदा
58 याला, दर्कोन, गिद्देल
59 शफाट्या, हत्तील, पोखेरेथ-हस्सबाईम
आणि आमोन.
60 मंदिराचे सेवेकरी आणि शलमोनच्या
सेवकांचे वंशज मिळून 392

61तेल मेलह, तेल-हर्षा, करुब, अद्दोन व इम्मेर या
गावांमधून काही लोक यरुशलेमला आले होते, पण आपली
घराणी मूळ इस्राएलींमधलीच आहेत हे त्यांना खात्रीलायक
सांगता येत नव्हते. ते लोक असे:

62 दलाया, तोबीया आणि नकोदा
यांचे वंशज 642

63आणि याजकांच्या घराण्यातील वंशज असे:

हबाया, हक्कोस, बर्जिल्लय (गिलादच्या
बर्जिल्लयच्या मुलीशी लग्न करणाऱ्याची गणना
बर्जिल्लयच्या वंशजात होई)

64काही असे होते की त्यांना आपल्या वंशावळीचा
इतिहास शोधूनही सापडला नाही. याजक म्हणून काम
करता यावे यासाठी आपण याजकांचेच पूर्वज आहोत हे
काही त्यांना सिध्द करता आले नाही. त्यामुळे त्यांना
याजक म्हणून सेवा करता आली नाही. त्यांची नावे
याजकांच्या यादीमध्ये समाविष्ट झाली नाहीत. 65अत्यंत
पवित्र अन्न या लोकांनी खाऊ नये अशी राज्यपालाने
त्यांना आज्ञा दिली. ऊरीम व थुम्मीम घातलेल्या मुख्य
याजकाने या बाबतीत देवाची अनुज्ञा घेईपर्यंत त्यांनी या
अन्नातले काही खायचे नव्हते.
66–67परत आलेल्या जथ्थ्या मध्ये सगळे मिळून एकंदर
42,360 लोक होते. यात 7,337 स्त्री-पुरुष सेवकांची
गणना केलेली नाही. शिवाय त्यांच्यामध्ये 245
गायकगायिका होत्या. 68–69त्यांच्याजवळ 736 घोडे, 245
खेचरे,435 उंट आणि 6,720 गाढवे होती.
70घराण्यांच्या काही प्रमुखांनी कामाला हातभार म्हणून
पैसे दिले. राज्यपालने एकोणिस पौंड सोने भांडाराला दिले.
शिवाय पन्नास वाडगे आणि याजकांसाठी 530 वस्त्रे दिली.
71घराण्याच्या प्रमुखांनी कामाला साहाय्य म्हणून भांडाराला
375 पौंड सोने दिले. याखेरीज 1 1/ 3 टन चांदी देखिल
दिली. 72इतर सर्व लोकांनी मिळून 375 पौंड सोने, 1
1/ 3 टन चांदी आणि याजकांसाठी 67 वस्त्रे दिली.
73अशाप्रकारे याजक, लेवींच्या घराण्यातील लोक,
द्वारपाल, गायक आणि मंदिरातील सेवेकरी आपापल्या
गावी स्थिरावले. इतर इस्राएल लोकही आपापल्या गावी
स्थायिक झाले. आणि सातव्या महिन्यापर्यंत सर्व इस्राएल
लोक स्वत:च्या गावांमध्ये स्थिरस्थावर झाले.

## एज्राचे नियमशास्त्राचे पठण

8 त्या वर्षीच्या सातव्या महिन्यात सर्व इस्राएल लोक
एकत्र आले. त्यांच्यामध्ये इतकी एकजूट होती की
ते एकमेकांशी अगदी तद्रूप झाले होते. पाणी वेशीच्या
समोरच्या मोकळ्या जागेत ते जमले. त्या सर्वांनी शिक्षक
एज्राला मोशेच्या नियमशास्त्राचे पुस्तक बाहेर काढायला
सांगितले. परमेश्वराने इस्राएल लोकांना सांगितले ते
नियमशास्त्र हेच. 2तेव्हा एज्राने तेथे जमलेल्या लोकांसमोर
नियमशास्त्र आणले. त्या वर्षीच्या सातव्या महिन्याचा तो
पहिला दिवस होता.* या सभेला स्त्रिया-पुरुष आणि
ज्यांना ज्यांना वाचलेले समजत होते असे सर्वजण होते.
3एज्राने या नियमशास्त्रातून पहाटेपासून दुपारपर्यंत मोठ्या
आवाजात वाचून दाखवले. एज्रा पाणीवेशीसमोरच्या
मोकळ्या चौकाकडे तोंड करून उभा होता. समस्त
स्त्रीपुरुषांना आणि वाचलेले समजत होते इतपत मोठे
असलेल्या सर्वापुढे त्याने वाचले. सर्व लोकांनी
नियमशास्त्राचे हे पठण काळजीपूर्वक आणि लक्ष देऊन
ऐकले. 4एज्रा एका उंच लाकडी मंचावर उभा होता.
खास या प्रसंगाकरताच तो करवून घेतला होता. मतिथ्य,

**सातव्या महिन्याचा पहिला दिवस होता प्रार्थनेचा विशेष दिवस होता. लोकांनी तेव्हा एकत्र येऊन सहभोजन केले.**

शेमा, अनाया, उरीया, हिल्कीया आणि मासेया हे एज्राच्या
उजव्या बाजूला उभे होते तर पदाया, मीशाएल, मल्खीया,
हाशूम, हश्बद्दाना, जखऱ्या, आणि मशुल्लाम हे डावीकडे
होते.
5आणि एज्राने ग्रंथ उघडला. एज्रा उंच मंचावर सर्वांसमोर
उभा असल्यामुळे सगळ्यांना तो दिसत होता. एज्राने
नियमशास्त्राचा ग्रंथ उघडल्याबरोबर लोक उभे राहिले.
6एज्राने परमेश्वराची, थोर परमेश्वराची स्तुती केली तेव्हा
सर्व लोकांनी आपले हात वर करून "आमेन! आमेन!"
असा उद्‌गार काढला. मग सर्वांनी खाली वाकून, मस्तक
जमिनीपर्यंत लववून परमेश्वराला वंदन केले.
7बाजूला उभे असलेले लेवी घराण्यातील लोक
समुदायाला नियमशास्त्र समजावून सांगत होते. त्या लेवींची
नावे अशी: येशूवा, बानी, शेरेब्या, यामीन, अक्कूब,
शब्बथई, होदीया, मासेया, कलीता, अजऱ्या, योजाबाद,
हानान व पेलाया, 8या लेवींनी देवाच्या नियमशास्त्राचा
ग्रंथ वाचला. त्याचा अर्थ स्पष्टकरून लोकांना समजेल
असा उलगडून सांगितला. ज्याचे पठण चालले होते ते
लोकांना समजावे म्हणून त्यांनी हे विवरण केले.
9यानंतर नहेम्या हा राज्यपाल, याजक व शिक्षक एज्रा
आणि लोकांना स्पष्टीकरण करून सांगणारे लेवी हे बोलले.
ते म्हणाले, "तुमचा परमेश्वर देव याचा आजचा हा खास
पवित्र दिवस आहे. आज दु:खी राहू नका आणि शोक
करु नका." कारण नियमशास्त्रातील देवाची वचने ऐकत
असताना लोक रडू लागले होते म्हणून त्यांनी हे सांगितले.
10नहेम्या म्हणाला, "आता जा आणि सुग्रास अन्न खा,
गोड पेये प्या. ज्यांना असे खाणेपिणे करता आलेले नाही
त्यांना आपल्यातले काही खाद्य-पेय पाठवा. परमेश्वराचा
हा पवित्र दिवस आहे. दु:खी राहू नका. कारण परमेश्वराचा
आनंदच तुम्हाला सामर्थ्य देणार आहे."
11लेवी घराण्यातील लोकांनी जमलेल्या लोकांना शांत
केले. लेवी म्हणाले, "शांत व्हा, उगे राहा. आजचा दिवस
पवित्र आहे. शोक करु नका."
12मग सर्व लोक मेजवानी घ्यायला गेले. खाद्यपेयात
त्यांनी इतरांना सहभागी करून घेतले. अतिशय आनंदात
त्यांनी हा विशेष दिवस साजरा केला. परमेश्वराची जी
वचने शिक्षक त्यांना समजावून सांगत होते ती त्यांना
अखेर समजली.
13यानंतर त्या महिन्याच्या दुसऱ्या दिवशी सर्व घराण्यांचे
प्रमुख एज्राला तसेच याजकांना व लेवींना भेटायला गेले.
नियमशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी ते शास्त्री एज्रा भोवती
जमले.
14–15परमेश्वराने मोशेमार्फत लोकांना हे नियमशास्त्र
दिले. त्यात यांना अभ्यासातून असे सापडले की, वर्षाच्या
सातव्या महिन्यात इस्राएल लोकांनी तात्पुरत्या राहूट्यांत
राहावे. लोकांनी सर्व नगरांमध्ये आणि यरुशलेमभर फिरुन
अशी घोषणा करावी, "डोंगराळ भागामध्ये जाऊन
वेगवेगळ्या प्रकारच्या जैतून वृक्षांच्या फांद्या आणाव्या.
देवदारू, खजुरी आणि सावली देणाऱ्या वृक्षांच्या फांद्या
आणाव्या आणि त्यांची तात्पुरते मांडव उभारावेत.
नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे करावे."
16तेव्हा लोक बाहेर पडले आणि त्यांनी तशा फांद्या
आणल्या. त्यांतून त्यांनी स्वत:साठी तात्पुरते मांडव बनवले.
प्रत्येकाने आपापल्या धाब्यावर आणि आपापल्या अंगणात
मांडव उभारले. मंदिराच्या अंगणात, पाणी वेशी समोरच्या
चौकात आणि एफ्राईम वेशी जवळही त्यांनी मांडव घातले.
17बंदिवासातून परत आलेल्या सर्वच्या सर्व इस्राएल लोकांनी
असे मांडव घातले. त्यात ते राहिले. नूनचा मुलगा यहोशवा
याच्या काळापासून ते आजतागायत इस्राएलींनी हा मंडपाचा
सण अशाप्रकारे साजरा केला नव्हता. सर्वांना अतिशय
आनंद झाला होता.
18या सणाच्या काळात एज्राने त्यांना रोज नियमशास्त्र
वाचून दाखवले. सणाच्या पहिल्या दिवसापासून अखेरच्या
दिवसापर्यंत एज्राने हे पठण केले. इस्राएलींनी सात दिवस
हा सण साजरा केला. नियमशास्त्राला अनुसरुन आठव्या
दिवशी ते सर्वजण खास सभे साठी एकत्र जमले.

## इस्राएलींचा पापाचा कबुलीजबाब

9 त्याच महिन्याच्या चोविसाव्या दिवशी सर्व इस्राएल
लोक उपवासासाठी एकत्र जमले. आपल्याला शोक
झाला आहे हे सूचित करणारे कपडे त्यांनी घातले होते.
तसेच आपली विमनस्कता दाखवण्यासाठी त्यांनी केसात
राख घालून घेतली होती. 2मूळ इस्राएली लोक परकी
लोकांमध्ये न मिसळता वेगळा गट करून उभे होते.
इस्राएलींनी मंदिरात उभे राहून आपल्या तसेच आपल्या
पूर्वजांच्या पापांची कबुली दिली. 3तीन तास तिथे उभे
राहून त्यांनी परमेश्वर देवाच्या नियमशास्त्राच्या ग्रंथाचे
वाचन केले. पुढे आणखी तीन तास त्यांनी आपल्या पातकांचे
कबुलीजबाब दिले आणि खाली वाकून परमेश्वराची
उपासना केली.
4मग लेवी जिन्यावर उभे राहिले. या लेवींची नावे
पुढीलप्रमाणे: येशूवा, बानी, कदमीएल, शबन्या, बुन्नी,
शेरेब्या बानी, आणि कनानी. त्यांनी खूप मोठ्याने परमेश्वर
देवाचा धावा केला. 5मग पुढील हे लेवी पुन्हा बोलले:
येशुवा, बानी, कदमीएल, बानी, हशबन्या, शेरेब्या, होदीया,
शबन्या आणि पथह्या. ते म्हणाले, "उभे राहा आणि आपला
परमेश्वर देव याचे स्तवन करा."

देवाचे अस्तित्व पहिल्यापासून आहे आणि परमेश्वर
चिरकाल राहील. लोक तुझ्या वैभवशाली नावाचे स्तवन
करोत. तुझे नाम स्तुती आणि आशीर्वाद यांच्या पलीकडे
उंचावले जावो.

6तू देव आहेस, परमेश्वरा, तूच फक्त देव आहेस.
आकाश तू निर्माण केलेस. स्वर्ग आणि त्यातील सगळे
काही तू केलेस. ही पृथ्वी आणि तिच्यावरील सर्व काही
तू निर्माण केलेले आहेस. सर्व समुद्र आणि त्यांच्यातील
सगळ्याचा तूच निर्माता आहेस! तू सगळ्यात जीव ओतलेस.
स्वर्गातील देवदूत तुला वाकून अभिवादन करतात व
तुझी उपासना करतात.
7हे परमेश्वरा, तूच देव आहेस. तू अब्रामाची निवड
केलीस. बाबेलमधील (खास्द्यातील) ऊर नगरातून त्याला
तू बाहेर काढून त्याला अब्राहाम असे नाव दिलेस.
8तो तुझ्याशी प्रामाणिक आणि निष्ठावान आहे असे
पाहून त्याच्याशी तू करार केलास. कनानी, हित्ती, अमोरी,
परिज्जी, यबूसी आणि गिर्गाशी यांचा देश त्याला द्यायचे
वचन दिलेस. अब्राहामाच्या वंशजांना हा भूभाग द्यायचे तू
वचन दिलेस आणि तू ते पाळलेस. कारण, तू भला
आहेस.
9मिसरमधील आमच्या पूर्वजांच्या यातना तू पाहिल्यास.
आणि त्यांनी तांबड्या समुद्राजवळ मदतीसाठी केलेला
धावा तू ऐकलास.
10फारोला तू चमत्कार दाखवलेस. त्याचे अधिकारी
आणि त्याची प्रजा यांच्यासाठी आश्चर्यकारक कृत्ये
केलीस. आमच्या त्या पूर्वजांपेक्षा आपण चांगले आहोत
असे मिसरचे लोक समजत होते, हे तू जाणून होतास.
पण तुझी थोरवी तू सिध्द करून दाखवलीस. अजूनही
त्यांना त्या गोष्टीचे स्मरण आहे.
11त्यांच्या डोळ्यादेखत तू तांबडा समुद्र दुभंगून
दाखवलास. आणि ते कोरड्या जमिनीवरुन चालत गेले.
मिसरचे सैन्य त्यांचा पाठलाग करत होते पण तू त्या
शत्रूला समुद्रात फेकून दिलेस आणि ते समुद्रात दगड
बुडावा तसे बुडून गेले.
12दिवसा तू त्यांना (आमच्या पूर्वजांना) मेघस्तंभाने
मार्गदर्शन केलेस आणि रात्री तू अग्निस्तंभ वापरलास.
अशा प्रकारे त्यांचा मार्ग प्रकाशमान करत तू त्यांना वाट
दाखवलीस.
13मग तू सीनाय पर्वतावर उतरलास, त्यांच्याशी
आकाशातून बोललास, तू त्यांना चांगले नियम घालून
दिलेस, त्यांना खरी शिकवण दिलीस. चांगले नियम आणि
आज्ञा तू त्यांना घालून दिल्यास.
14शब्बाथ या तुझ्या विश्रांतीच्या खास दिवसाचा त्यांना
परिचय करून दिलास. तुझा सेवक मोशे याच्या हस्ते तू
त्यांना आज्ञा, नियम आणि धर्मशास्त्र दिलेस.
15ते भुकेले होते म्हणून तू त्यांना आकाशातून अन्न
दिलेस. ते तहानलेले होते, म्हणून त्यांना खडकातून पाणी
दिलेस. आणि तू त्यांना म्हणालास, ‘या, ही जमीन घ्या,
आपल्या शक्तिसामर्थ्याने त्यांच्यासाठी तू जमीन संपादन
केलीस.
16पण आमचे पूर्वज उन्मत्त झाले. अहंमन्य बनले. आणि
त्यांनी तुझ्या आज्ञांचे पालन करायचे नाकारले.
17ते ऐकेनात तू जी आश्चर्यकारक कृत्ये त्यांच्यासमोर
केलीस ती ते विसरले. ते हट्टी झाले, त्यांच्या बंडखोरपणामुळे
त्यांनी मिसरला परत जायचे ठरवले आणि पुन्हा गुलाम
होण्यासाठी. पण तू क्षमाशील देव आहेस. तू दयाळू आणि
कृपाळू आहेस. तू सहनशील व प्रेमळ आहेस म्हणून तू
त्यांना सोडले नाहीस
18त्यांनी सोन्याच्या वासरांच्या मूर्ती केल्या आणि
‘आम्हाला मिसर मधून सोडवणारे हेच ते देव’ असे ते
म्हणाले. तरी तू त्यांचा त्याग केला नाहीस.
19तू कृपावंत आहेस. म्हणूनच तू त्यांना वाळवंटात
सोडून दिले नाहीस. दिवसा तू त्यांच्यावरुन मेघस्तंभ
काढून घेतला नाहीस. तू त्यांना मार्ग दाखवत राहिलास.
रात्रीही तू त्यांच्यावरचा अग्निस्तंभ काढून टाकला नाहीस
त्यांच्या पुढचा मार्ग उजळत तू त्यांना वाट दाखवत राहिलास.
20त्यांना शहाणपण येण्यासाठी तू त्यांना आपला सदात्मा
दिलास. अन्न म्हणून त्यांना मान्ना दिलास. त्यांना तहान
लागलेली असताना त्यांना पाणी दिलेस.
21चाळीस वर्षे तू त्यांची काळजी वाहिलीस. वाळवंटात
त्यांच्या सर्व गरजा भागल्या. त्यांचे कपडे जीर्ण झाले
नाहीत त्यांच्या पावलांना सूज आली नाही की दुखापत
झाली नाही.
22हे परमेश्वरा, त्यांना तू राज्ये आणि राष्ट्रे दिलीस.
फार लोकवस्ती नसलेली लांबलांबची ठिकाणे दिलीस.
हेशबोनच्या राजाचा म्हणजे सिहोनचा प्रांत त्यांना मिळाला.
बाशानचा राजा ओग याचा भूभाग त्यांना मिळाला.
23त्यांच्या वंशजांची संख्या तू आकाशातील तारकाप्रमाणे
विपुल केलीस. त्यांच्या पूर्वजांना कबूल केलेल्या प्रदेशापर्यंत
त्यांना तू नेऊन पोचवलेस. त्यांनी पुढे जाऊन तो प्रदेश
ताब्यात घेतला.
24या वंशजांनी तो प्रदेश घेतला. तेथे राहणाऱ्या
कनान्यांचा त्यांनी पराभव केला. तूच त्यांच्या हातून हा
पराभव करवलास. हे देश, तिथले लोक आणि राजे
यांच्याशी तू त्यांना मन मानेल तसे वागू दिलेस
25त्यांनी मजबूत नगरांचा कब्जा घेतला. सुपीक प्रदेश
त्यांनी मिळवला. उत्तम वस्तूंनी भरलेली घरे त्यांना मिळाली
खोदलेल्या विहिरी त्यांना आयत्या मिळाल्या. द्राक्षमळे,
जैतूनाची झाडे आणि पुष्कळशी फळझाडे त्यांना मिळाली.
खाऊन पिऊन ते तृप्त झाले, पुष्ट झाले. तू त्यांना दिलेल्या
मनोहारी गोष्टीचा त्यांनी उपभोग घेतला.
26आणि मग ते तुझ्यावर उलटले. तुझ्या शिकवणीचा
त्यांनी त्याग केला. त्यांनी तुझ्या संदेष्ट्यांचा वध केला.
या संदेष्ट्यांनी लोकांना सावध केले होते. त्यांना ते परत
तुझ्या मार्गावर आणू पाहात होते. पण आमच्या पूर्वजांनी
मात्र तुझ्याविरुद्ध भयंकर दुराचरण केले.

27म्हणून तू त्यांना शत्रूच्या ताब्यात जाऊ दिलेस. शत्रूने त्यांना फार हैराण केले. अडचणीत सापडल्यावर आमच्या पूर्वजांनी मदतीसाठी तुला आवाहन केले आणि स्वर्गातून तू त्यांचा धावा ऐकलास. तू फार कनवाळू आहेस. म्हणून त्यांच्या रक्षणार्थ तू लोकांना पाठवलेस. आणि या लोकांनी त्यांची शत्रू पासून सुटका केली.

28मग निवांतपणा लाभल्यावर आमच्या पूर्वजांनी पुन्हा ती दुष्कृत्ये करायला सुरुवात केली. तेव्हा तू शत्रू कडून त्यांचा पाडाव करवलास आणि शासन करवलेस. त्यांनी मदतीसाठी तुझा धावा केला. तो तू स्वर्गातून ऐकलास आणि त्यांच्या मदतीला गेलास किती बरे तू कनवाळू आहेस! असे अनेकदा घडले.

29तू त्यांना बजावलेस. तू त्यांना तुझ्या शिकवणीकडे परतायला सांगितलेस. पण ते फार अहंमन्य झाले होते. तुझ्या आज्ञा ऐकायचे त्यांनी नाकारले. तुझ्या नियमाप्रमाणे आचरण करणारा खरेखुरे जीवन जगतो. पण आमच्या पूर्वजांनी तुझ्या नियमाचा भंग केला. ते दुराग्रही झाले होते. त्यांनी तुझ्याकडे पाठ फिरवली त्यांनी तुझे ऐकायचे नाकारले.

30आमच्या पूर्वजांच्या बाबतीत तू खूप सहनशीलता दाखवलीस. अनेक वर्षे तू त्यांना गैरवर्तन करु दिलेस. आपल्या आत्म्याने तू त्यांना बजावलेस. त्यांना समज द्यायला संदेष्टे पाठवलेस पण आमच्या पूर्वजांनी ऐकले नाही. तेव्हा त्यांना तू इतर देशातल्या लोकांच्या हवाली केलेस.

31पण तू किती दयाळू आहेस. तू त्यांचा समूळ संहार केला नाहीस. त्यांचा तू त्याग केला नाहीस. देवा, तू किती कृपाळू आणि दयाळू आहेस.

32हे देवा, तू महान देव आहेस. दरारा उत्पन्न करणारा आणि पराक्रमी योध्दा आहेस तू निष्ठा बाळगणारा आहेस. तू करार पाळतोस आमच्यावर अनेक आपत्ती आल्या आणि आमच्या अडचणींना तू महत्व देतोस आम्ही सर्वजण, आमचे राजे आणि नेते, आमचे याजक आणि संदेष्टे या सर्वांवर अरिष्ट आले. अश्शूर राजाच्या काळापासून आजतागायत भयानक गोष्टी ओढवल्या.

33पण देवा, आमच्या बाबतीत जे घडले त्या सगळ्या गोष्टींच्या बाबतीत तुझे खरे होते. तुझे बरोबर होते आणि आम्ही चुकत होतो

34आमचे राजे, नेते, याजक आणि पूर्वज यांनी तुझे नियमशास्त्र पाळले नाही. तुझ्या आज्ञा ऐकल्या नाहीत. तू दिलेल्या खबरदारीच्या सूचनाकंडे त्यांनी दुर्लक्ष केले.

35स्वत:च्या राज्यात राहात असताना देखील आमच्या पूर्वजांनी तुझी सेवा केली नाही. त्यांनी दुष्कृत्ये करायचे थांबवले नाही. तू त्यांना बहाल केलेल्या अनेक उत्तमोत्तम गोष्टींचा त्यांनी उपभोग घेतला. सुपीक जमीन आणि विशाल प्रदेश याचा त्यांनी उपभोग घेतला. पण तरीही स्वत:च्या वाईट कृत्यांना त्यांनी आळा घातला नाही.

36आणि आता आम्ही गुलाम झालो आहोत. या भूमीत, आमच्या पूर्वजांनी इथली फळे चाखावी आणि इथे पिकणाऱ्या चांगल्या गोष्टींचा आस्वाद घ्यावा म्हणून तू त्यांना दिलेल्या या भूमीत आम्ही गुलाम आहोत.

37या जमिनीत मुबलक पीक येते पण आम्ही पाप केले, त्यामुळे तू आमच्यावर नेमलेल्या राजांच्या पदरीच हे पीक जाते. या राजांचे आमच्यावर आणि आमच्या गुराढोरांवर नियंत्रण आहे. ते मन मानेल तसे वागतात. आम्ही मोठ्या संकटात आहोत.

38या सगळ्या गोष्टींमुळे आम्ही करार करत आहोत. तो बदलता येणार नाही. तो आम्ही लेखी करत आहोत. आमचे अधिकारी, लेवी, याजक हे या करारावर स्वाक्षऱ्या करून त्यावर शिक्क ामोर्तब करत आहेत.

# 10

त्या मोहरबंद करारातील नावे पुढीलप्रमाणे: प्रांताधिपती नहेम्या. हा हखल्याचा मुलगा.
सिदकीया, 2सराया, अजऱ्या, यिर्मया, 3पश्हूर, अमऱ्या,
मल्खीया, 4हत्तश, शबन्या, मल्लूख, 5हारिम, मरेमोथ,
ओबद्या, 6दानीएल, गिन्नथोन, बारुख, 7मशुल्लाम, अबीया,
मियामीन, 8माज्या, बिल्गई, आणि शमया. ज्यांनी त्या करारावर आपल्या नावाची मुद्रा उठवली त्यापैकी ही याजकांची नावे झाली.

9आणि लेव्यांची पुढीलप्रमाणे: अजन्याचा मुलगा येशूवा,
हेनादादच्या घराण्यातला बिन्नइ, कदमीएल, 10आणि त्यांचे
भाऊ : शबन्या, होदीया, कलीता, पलाया, हनान, 11मीखा,
रहोब, हशव्या, 12जक्कूर, शेरेब्या, शबन्या, 13होदीया, बानी,
बनीनू.

14आपल्या नावाची मोहोर उठवणाऱ्यांमधले लोकांचे
नेते हे: परोश, पहथ-मवाब, एलाम, जात्तू, बानि, 15बुन्नी,
अजगाद, बेबाई, 16अदोनीया, बिग्वइ, आदीन, 17आटेर,
हिज्कीया, अज्जूर, 18होदीया, हाशूम, बेसाई, 19हारीफ,
अनाथोथ, नोबाई, 20मप्पीयाश, मशुल्लाम, हेजीर,
21मशेजबेल, सादोक, यद्दूवा, 22पलट्या, हानान, अनया,
23होशेया, हनन्या, हशशूब, 24हल्लोहेश, पिल्हा, शोबेक,
25रहूम, हश्बना, मासेया, 26अहीया, हनान, अनान,
27मल्लूख, हारिम आणि बाना.

28–29मग ह्या सर्व लोकांनी देवापुढे विशेष शपथ घेतली. आणि जर आपण ही शपथ पाळली नाही तर दुर्घटना घडू देत अशी त्यांनी मागणी केली. या सर्व लोकांनी देवाचे नियमशास्त्र पाळायची शपथ वाहिली. देवाचे हे नियमशास्त्र आम्हाला त्यांचा सेवक मोशे याच्या कडून मिळालेले आहे. या लोकांनी आपल्या परमेश्वराच्या देवाच्या सर्व आज्ञा, नियम, आणि शिकवण यांचे काळजीपूर्वक पालन करण्याचे वचन दिले. हे वचन पुढील लोकांनी दिले.

वरील लोकांखेरीज उरलेले सर्व लोक याजक, लेवी, द्वारपाल, गायक, मंदिराचे सेवक आणि अवतीभवतीच्या इतर लोकांपासून वेगळे झालेले इस्राएलमधील सर्व लोक देवाचे नियमशास्त्र पाळण्यासाठी ते आपण होऊन वेगळे झाले. त्याचबरोबर त्यांच्या सर्व बायका, आणि सावधानपणे ऐकू शकतील आणि समजू शकतील असे त्यांचे सर्व मुलगे आणि मुली. या सर्व लोकांनी आपले बांधव आणि महत्वाच्या व्यक्तींसमवेत देवाचे नियमशास्त्र पाळण्याची शपथ घेतली. आणि जर आपण देवाचे हे नियमशास्त्र पाळले नाही तर आपल्यावर अरिष्टे कोसळण्यासबंधीचा शापही त्यांनी स्वीकारला.

30"आमच्या भोवतींच्या प्रदेशातील लोकांमध्ये आम्ही आमच्या मुलींची लग्ने होऊ देणार नाही तसेच त्यांच्या मुली आमच्या मुलांसाठी करून घेणार नाही असे आम्ही वचन देतो.

31"शब्बाथ दिवशी आम्ही काम करणार नाही. शब्बाथ दिवशी किंवा दुसऱ्या कोणत्याही पवित्र दिवशी आमच्या भोवतीच्या प्रदेशातील लोकांनी धान्य किंवा इतर काही वस्तू विकायला आणल्या तर त्यांची खरेदी आम्ही करणार नाही. दर सातव्या वर्षी आम्ही जमीन पडीक ठेवू, तिची मशागत करणार नाही. तसेच त्या वर्षी सर्व देणेकऱ्यांना आम्ही ऋ णातून मुक्त करु.

32"मंदिराच्या सेवेच्या सर्व आज्ञा पाळायची जबाबदारी आम्ही घेत आहोत. देवाच्या मंदिराची काळजी घेण्यासाठी म्हणून एकतृतीयांश शेकेल आम्ही दरवर्षी देऊ.
33मंदिरातील मेजावर याजकांनी ठेवायच्या धान्यार्पणाची समर्पित भाकर, रोजचे अन्नार्पण आणि होमार्पण, शब्बाथ, नवचंद्रदिनी आणि नैमित्तिक सण यादिवशी करायची अर्पणे, इस्राएलींच्या शुध्दीकरणासाठी करायची पवित्रार्पणे आणि पापार्पणे, देवाच्या मंदिराच्या कामी येणारा खर्च हे सर्व खर्च या पैशातून भागतील.

34"दरवर्षी नेमलेल्या वेळी मंदिरात लाकडाची अर्पणे आणावी म्हणून आम्ही सर्वांनी याजक, लेवी व सर्व लोक यांनी चिठ्ठ्या टाकल्या आहेत. त्या चिठ्ठ्यांनुसार प्रत्येक कुटुंबाने परमेश्वर देवाच्या वेदीवर जाळण्यासाठी लाकूड आणायचे आहे. नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे आपल्याला हे करायलाच हवे.

35"आमच्या शेतातले पहिले पीक आणि फळझाडांची पहिली फळे दरवर्षी परमेश्वराच्या मंदिरात आणायची आमची जबाबदारी आहे हे आम्ही कबूल करतो.

36"नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे आम्ही पुढील गोष्टीही करु: आमचा पहिला पुत्र आणि आमची गुरेढोरे, शेळ्या मेंढ्या यांचे पहिले पिलू यांना आम्ही आमच्या देवाच्या मंदिरात सेवेला असलेल्या याजकांकडे आणू.

37"तसेच परमेश्वराच्या मंदिरातील कोठारांसाठी याजकांकडे पुढील गोष्टी आणू: पिठाचा पहिला उंडा, धान्यार्पणाचा पहिला भाग, आमच्या सर्व वृक्षांच्या फळांचा पहिला बहार, नवीन काढलेला द्राक्षारस आणि तेल यांचा पहिला भाग, या गोष्टी. तसेच लेवींना आमच्या पिकातला एक दशांश भाग देऊ. कारण ते सर्व नगरांतून आमच्या उत्पन्नाचा दहावा भाग घेतात.
38लेवी या धान्याचा स्वीकार करतील तेव्हा अहरोनाच्या वंशातील एखादा याजक त्यांच्याबरोबर असावा. मग लेवींनी ते धान्य देवाच्या, मंदिरात आणावे व मंदिराच्या कोठारांमध्ये जमा करावे.
39इस्राएल लोक आणि लेवी यांनी धान्य, नवीन द्राक्षरस आणि तेल यांची अर्पणे कोठारामध्ये आणावीत. मंदिरासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी तिथे असतात तसेच सेवा करणारे याजक, गायक आणि द्वारपाल यांचेही वास्तव्य तिथे असते.

"देवाच्या मंदिराची आम्ही नीट जपवणूक करु असे आम्ही वचन देतो."

## यरुशलेममध्ये नव्याने आलेले लोक

11 आता इस्राएली लोकांचे नेते यरुशलेम नगरात राहायला आले. बाकीच्या इस्राएलीपैकी कोणी कोणी जायचे ते ठरवायचे होते. म्हणून त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या. दर दहाजणापैकी एकाने यरुशलेम या पवित्र नगरात राहावे आणि उरलेल्या नऊ जणांनी आपापल्या गावी वस्ती करावी असे ठरले.
2काही लोक स्वखुषीने यरुशलेममध्ये राहायला तयार झाले. त्याबद्दल इतरांनी त्यांना धन्यवाद दिले व आशीर्वाद दिले.
3जे प्रांताचे नेते यरुशलेममध्ये राहायला गेले ते असे. (काही इस्राएल लोक, याजक, लेवी, मंदिराचे सेवेकरी आणि शलमोनच्या सेवकांचे वंशज यहुदाच्या गावामध्ये राहात होते. वेगवेगळ्या गावांमध्ये ते आपापल्या वतनात होते.
4यरुशलेममध्ये काही यहुदी आणि बन्यामिनी घराण्यातील व्यक्ती राहात होत्या.)

यरुशलेममध्ये आलेले यहुदाचे वंशज पुढीलप्रमाणे: उज्जीयाचा मुलगा अथाया, (उज्जीया जखऱ्याचा मुलगा, जखऱ्या अमऱ्याचा मुलगा आणि अमऱ्या शफाट्याचा. शफाट्या महललेलचा. महललेल हा पेरेसचा वंशज)
5बारूखचा मुलगा मासेया (बारूख हा कोल-होजचा मुलगा, कोलहोजे हजाया चा मुलगा, हजाया अदायाचा, अदाया योयारीबचा, योयारीब जखऱ्याचा आणि जखऱ्या शेलहचा मुलगा.)
6पेरेसच्या यरुशलेममध्ये राहणाऱ्या वंशजांची संख्या 468 होती.हे सर्व शूर पुरुष होते.

7यरुशलेममध्ये राहायला गेलेले बन्यामीनचे वंशज असे: मशुल्लामचा मुलगा सल्लू (मशूल्लाम योएदचा मुलगा, योएद पदायाचा, पदाया कोलायाचा मुलगा, कोलाया मासेयाचा, मासेया ईथीएलचा आणि ईथीएल यशायाचा)
8यशायाच्या पाठोपाठ गब्बई आणि सल्लाई होते. ते एकंदर 928 जण होते.
9जिखरीचा पुत्र योएल त्यांचा प्रमुख होता. हसनुवाचा पुत्र यहुदा हा यरुशलेम नगराच्या दुसऱ्या विभागाचा अधिकारी होता.

10यरुशलेममध्ये राहायला आलेले याजक पुढीलप्रमाणे:
योयारीबचा मुलगा यदया, याखीन, 11हिल्कीयाचा मुलगा
सराया (हिल्कीया मशुल्लामचा मुलगा, मशुल्लाम
सादोकचा, सादोक मरायोमचा, मरायोम अहीटूबचा.
अहीटूब देवाच्या मंदिराचा अधीक्षक होता.) 12आणि त्यांचे
822 भाऊबंद मंदिराचे काम करत होते. आणि यरोहामचा
मुलगा अदाया (यरोहाम पलल्याचा मुलगा, पलल्या
अम्झीचा, अम्झी जखऱ्याचा मुलगा, जखऱ्या पश्हूरचा
आणि पश्हूर मल्कीयाचा) 13मल्कीयाचे 242 भाऊबंद
(हे सर्वजण आपापल्या पितृकुळांचे प्रमुख होते) अजरेलचा
मुलगा अमशसइ (अजरेल अहजईचा मुलगा, अहजई
मशिल्लेमोतचा, मशिल्लेमोथ इम्मेरचा) 14आणि इम्मेरचे
128 भाऊबंद (हे सर्व शूर सैनिक होते. हगदोलीमचा पुत्र
जब्दीएल त्यांचा अधिकारी होता.)

15यरुशलेममध्ये राहायला गेलेले लेवी पुढीलप्रमाणे:
हश्शूबचा मुलगा शमया, (हश्शूब अज्रीकामचा मुलगा,
अज्रीकाम हशब्याचा, हशब्या बुन्नीचा) 16शब्बथई आणि
योजाबाद हे दोघे लेव्यांचे प्रमुख होते आणि देवाच्या
मंदिराबाहेरच्या कारभाराचे ते प्रमुख होते.) 17मत्तन्या,
(हा मीखाचा मुलगा मीखा जब्दीचा आणि जब्दी आसाफचा.
आसाफ गानवृंदाचा प्रमुख होता. ईशस्तुती आणि प्रार्थनागीते
म्हणताना तो आरंभ करी व लोक पाठोपाठ म्हणत.) व
बकबुक्या (भाऊबंदांमध्ये त्याचा अधिकार दुसरा होता)
आणि शम्मूवाचा मुलगा अब्दा, (शम्मूवा गालालाचा मुलगा,
गालाल यदुथूनाचा) 18अशाप्रकारे यरुशलेम या पवित्र
नगरात 284 लेवी राहायला गेले. 19यरुशलेममध्ये गेलेले
द्वारपाल असे: अक्कूब, तल्मोन आणि त्यांचे 172 भाऊबंद
नगराच्या दरवाजांवर ते पहारा करत.

20बाकीचे इस्राएली लोक आणि याजक तसेच लेवी
यहूदाच्या वेगवेगळ्या नगरांमध्ये आपापल्या वडिलोपार्जित
वतनांमध्ये राहिले. 21मंदिराचे सेवेकरी ओफेल टेकडीवर
राहात. सीहा आणि गिश्पा हे या सेवेकऱ्यांचे प्रमुख होते.

22उज्जी हा यरुशलेममधील लेवींचा प्रमुख होता. उज्जी
हा बानीचा मुलगा. (बानी हशब्याचा, हशब्या मत्तन्याचा,
मत्तन्या मीखाचा मुलगा. उज्जी हा आसाफचा वंशज.
आसाफचे वंशज गायक असून देवाच्या मंदिरातील सेवेची
जबाबदारी त्यांच्यावर होती. 23ते राजाज्ञा पाळत. गायकांनी
दररोज काय करायचे ते आज्ञेत सांगितलेले असे. 24राजाचा
हुकूम काय आहे हे पथह्या लोकांना सांगत असे. (पथह्या
हा मशेजबेल याचा मुलगा. मशेजबेल जेरहच्या वंशातला
होता. जेरह यहूदाचा पुत्र.)

25यहूदाच्या वंशातील लोक ज्या गावागावांमध्ये राहात
ती गावे अशी: किर्याथ आर्बात व त्याच्या आसपासची
खेडी, दिबोन आणि त्याच्या भोवतालची खेडी, यकब्सेल
आणि त्या भोवतालची खेडी, 26आणि येशूवा, मोलादा,
बेथ–पलेत ही नगरे व त्यांच्या आसपासची गावे, 27हसर
शूवाल, बैरशेबा आणि त्यांच्या भोवतालची खेडी,
28सिक्लाग, मकोना व त्यांच्या भोवतालची गावे,
29एनरिम्मोन, सारया, यर्मूथ 30जानोहा, अदुल्लम ही नगरे
आणि त्यांच्या आसपासची गावे, लाखीश आणि त्याच्या
भोवतालची शेतीवाडी, अजेका आणि त्याभोवतीची खेडी.
अशाप्रकारे यहुदाचे लोक बैरशेबापासून हिन्नोमच्या
खोऱ्यापर्यंतच्या भागात राहात होते.

31गेबातील बन्यामीनच्या कुळातले वंशज मिखमाश,
अया, बेथेल ही नगरे व त्या भोवतालची खेडी 32अनाथोथ,
नोब, अनन्या, 33हासोर, रामा, गित्तइम, 34हादीद, सबोइम,
नबल्लट, 35लोद, ओना आणि कारागिरांचे खोरे येथे
राहात होते. 36लेवींच्या कुळातील लोकांचे काही गट
बन्यामीनांच्या प्रदेशात गेले.

## याजक व लेवी

12 यहुदाच्या प्रदेशात परत आलेले याजक व लेवी
पुढीलप्रमाणे: शल्तीएलचा मुलगा जरूब्बाबेल
आणि येशूवा यांच्याबरोबर ते आले. त्यांच्या नावांची यादी:
अशी सराया, यिर्मया, एज्रा, 2अमऱ्या, मललूख, हत्तूश,
3शखन्या, रहूम, मरेमोथ, 4इद्दो, गिन्नथोई, अबीया,
5मियामीन, माद्या, बिलगा, 6शमया, योयरीब, यदया, 7सल्लू,
आमोक, हिल्कीया, यदया, हे लोक येशूवाच्या कारकिर्दीत,
याजक आणि त्यांचे नातलग यांचे प्रमुख होते.

8लेवी असे: येशूवा, बिन्नुइ, कदमीएल, शेरेब्या, यहूदा,
आणि मत्तन्या. हे लोक तसेच मत्तन्याचे नातेवाईक देवाच्या
स्तुतिस्तोत्रांचे प्रमुख होते. 9बकबुक्या आणि उन्नी हे या
लेव्यांचे नातलग होते. देवाच्या स्तुतिउपासनेच्या वेळी हे
दोघे त्यांच्या पलीकडे उभे राहात. 10येशूवा योयाकीमचा
पिता. योयाकीम एल्याशीबाचा जन्मदाता. एल्याशीबाचा
मुलगा योयादा. 11योयादाने योनाथानला जन्म दिला आणि
योनाथानने यद्दवाला. 12योयाकीमच्या काळात याजकांच्या
घराण्यांचे मुख्य असलेले लोक पुढील प्रमाणे:

सरायाच्या घराण्याचा प्रमुख मराया. यिर्मयाच्या
घराण्याचा प्रमुख हनन्या

13एज्राच्या घराण्याचा प्रमुख मशुल्लाम. अमऱ्याच्या
घराण्याचा प्रमुख यहोहानान.

14मल्लूखीच्या घराण्याचा प्रमुख योनाथान शबन्याच्या
घराण्याचा प्रमुख योसेफ

15हरिमच्या घराण्याचा प्रमुख अदना. मरामोथच्या
घराण्याचा प्रमुख हेलकइ.

16इद्दोच्या घराण्याचा प्रमुख जखऱ्या. गिन्नथोनच्या
घराण्याचा प्रमुख मशुल्लाम.

17अबीयाच्या घराण्याचा प्रमुख जिख्री. मिन्यामिन आणि
मोवद्या यांच्या घराण्याचा प्रमुख पिल्तय.

18बिलगाच्या घराण्याचा प्रमुख शम्मूवा शमयाच्या
घराण्याचा प्रमुख यहोनाथान.

19योयारीबच्या घराण्याचा प्रमुख मत्तनय. यदयाच्या
घराण्याचा प्रमुख उज्जी.

20सल्लयाच्या घराण्याचा प्रमुख कल्लय आमोकच्या
घराण्याचा प्रमुख एबेर

21हिल्कीयाच्या घराण्याचा प्रमुख हशब्या यदायाच्या
घराण्याचा प्रमुख नथनेल.

22एल्याशीब, योयादा, योहानान व यद्दवा यांच्या दिवसात
ज्या लेव्यांच्या आणि याजकांच्या घराण्यांचे प्रमुख होते
त्यांची नावे पारसी राजा दारयावेश याच्या कारकिर्दीत
लिहून ठेवलेली आहेत. 23लेवी घराण्यातील वंशजांच्या
कुटुंबप्रमुखांची नावे एल्याशीबचा मुलगा योहानान याच्या
काळापर्यंत इतिहासाच्या पुस्तकात लिहिलेली आहेत.
24लेव्यांचे प्रमुख असे होते: हशब्या, शेरेब्या, कदमीएलचा
मुलगा येशूवा, आणि त्यांचे भाऊ देवाची गौरव गीते आणि
स्तोत्रे गाण्यासाठी हे भाऊ त्यांच्या पलीकडे उभे राहात.
एक समूह दुसऱ्या समूहाला प्रत्युत्तर करी. देवाचा माणूस
दावीद याची तशीच आज्ञा होती.

25दरवाजांच्या पलीकडच्या कोठारांवर पहारे करणाऱ्या
द्वारपालांची नावे अशी: मत्तन्या, बकबुक्या, ओबद्या,
मशुल्लाम, तल्मोन, अक्कूब, 26हे द्वारपाल योचाकीमच्या
कारकिर्दीत सेवेत होते. योयाकीम हा येशूवाचा मुलगा
आणि येशूवा योसादाकचा. नहेम्या हा राज्यपाल आणि
एज्रा हा याजक व लेखक यांच्याच काळात हे द्वारपाल
होते.

## यरुशलेमच्या तटबंदीचे समर्पण

27यरुशलेमची तटबंदीची भिंत लोकांनी अर्पण केली.
त्यांनी सर्व लेव्यांना यरुशलेमला एकत्र आणले.
यरुशलेमची भिंत अर्पण करायच्या समारंभासाठी हे लेवी
आपापल्या गावांहून आले. देवाची स्तुतिगीते आणि
धन्यवादगीते गाण्यासाठी ते आले. त्यांनी झांजा, सतार व
वीणा ही वाद्ये वाजवली.

28–29शिवाय सर्व गायक देखील यरुशलेम भोवतालच्या
गावांहून यरुशलेमला आले. नटोफा, बेथ–गिलगाल, गेबा
आणि अजमावेथ ही ती गावे होत. यरुशलेम भोवतालच्या
प्रदेशात या गायकांनी आपल्यासाठी ही छोटी गावे वसवली
होती.

30नंतर याजक व लेवी यांनी समारंभपूर्वक स्वत:चे
शुध्दीकरण केले. त्यानंतर त्यांनी बाकीचे लोक, वेशी,
यरुशलेमची भिंत यांनाही शुध्द करण्याचा समारंभ केला.

31यहुदाच्या नेत्यांना मी वर जाऊन तटबंदीवर थांबायला
सांगितले. देवाला धन्यवाद देण्यासाठी गायकांचे दोन मोठे
वृंदही मी नेमले. त्यातल्या एका गटाने राखेच्या ढिगाच्या
वेशीकडे उजवीकडच्या भिंतीच्या वर जावयाचे होते.
32होशया आणि यहुदाचे निम्मे अधिकारी त्यांच्या मागोमाग
गेले. 33अजऱ्या, एज्रा, मशुल्लाम, 34यहूदा, बन्यामीन,
शमया, यिर्मया हे ही त्यांच्या पाठोपाठ होते. 35काही याजकही
त्यांच्यापाठोपाठ रणशिंग वाजवत भिंतीकडे निघाले.
जखऱ्या देखील त्यांच्या मागे निघाला. (जखऱ्या
योनाथानचा मुलगा, योनाथान शमयाचा मुलगा, शमया
मत्तन्याचा, मत्तन्या मिखाचा, मिखाचा जक्कूरचा आणि
जक्कूर आसाफचा मुलगा) 36आसाफचे भाऊ म्हणजे
शमया, अजरेल, मिललई, गिललइ, माई, नथनेल, यहूदा,
हनानी हे ही वाद्ये घेऊन निघाले. ही वाद्ये देवाचा माणूस
दावीद याने केली होती. भिंत अर्पण करण्यासाठी जो
लोकांचा गट आलेला होता त्यांना एज्रा हा लेखक पुढे
घेऊन गेला. 37झऱ्याच्या वेशीपाशी ते पोहोंचले. पायऱ्या
चढून ते थेट दावीदनगरापर्यंत गेले. नगराच्या तटंबदीच्या
भिंतीवर ते होते. दावीदच्या घरावरुन चालत जाऊन ते
पाण्याच्या वेशीकडे गेले.

38गायकांचा दुसरा गट दुसऱ्या दिशेला, डावीकडे
निघाला. भिंतीच्यावर ते पोचेपर्यंत मी त्यांच्या पाठोपाठ
होतो. अर्धे लोकही त्यांच्या मागोमाग गेले. भट्ट्यांच्या
दुर्गावरुन ते रुंद कोटाकडे गेले. 39मग ते पुढील वेशींवरुन
गेले. एफ्राईमची वेस जुनी वेस, मत्स्य वेस. हनानेलचा दुर्ग
आणि शतकाचा दुर्ग यांच्यावरुन ते पुढे गेले. मेंढरांच्या
वेशीपर्यंत जाऊन ते पहाऱ्याच्या वेशीजवळ ते थांबले
40मग गायकांचे दोन्ही समूह देवाच्या मंदिरात आपापल्या
जागी गेले. मी माझ्या जागी उभा राहिलो. अधिकाऱ्यांपैकी
निम्म्यांनी मंदिरातील आपापल्या जागा घेतल्या.

41मग पुढील याजक आपापल्या जागी उभे राहिले:
एल्याकीम, मासेया, मिन्यामीन, मीखाया, एल्योएनाई,
जखऱ्या, हनन्या या याजकांजवळ त्यांचे रणशिंग होते.
42मग मासेया, शमाया, एलाजार, उज्जी, यहोहानान,
मल्खीया, एलाम व एजेर हे याजक मंदिरात आपापल्या
जागी उभे राहिले.

मग यिज्र ह्याच्या अधिपत्याखाली या दोन्ही गायक गटांनी
गायनाला सुरुवात केली. 43या खास दिवशी याजकांनी
बरेच यज्ञ केले. सर्वजण अतिशय आनंदात होते. देवाने
सर्वांना आनंदित केले होते. बायका आणि मुलेसुध्दा
अतिशय हर्षभरित झाली होती. दूरवरच्या लोकांनाही
यरुशलेममधला आनंदाचा जल्लोष ऐकू येत होता.

44त्यादिवशी कोठारांवरील लोकांच्या नेमणुका केल्या
आपल्या झाडांची पहिली फळे वहिली आणि धान्यातला
एकदशांश वाटा लोक घेऊन आले. कोठारप्रमुखांनी या
वस्तू कोठारात ठेवल्या. सेवेत असलेले याजक व लेवी
यांच्याबद्दल यहुद्यांना अतिशय समाधान होते. म्हणून त्यांनी
कोठारात ठेवायला पुष्कळशा गोष्टी आणून दिल्या.
45याजक आणि लेवी यांनी देवासाठी करायची ती सर्व
कृत्ये केली. लोकांच्या शुध्दीकरणाचे विधी त्यांनी पार
पाडले. गायक व द्वारपाल यांनी आपली कामगिरी बजावली.

दावीद आणि शलमोन यांच्या आज्ञेबरहुकूम त्यांनी सर्व यथसांग केले. [46](फार पूर्वी, दावीदच्या काळी आसाफ गायकांचा मुख्य होता. त्याच्याजवळ देवाची स्तुतिगीते आणि धन्यवादगीते पुष्कळ होती.

[47]अशाप्रकारे जरुब्बाबेल आणि नहेम्या यांच्या काळांत समस्त इस्राएली लोकांनी गायक आणि द्वारपाल यांच्यासाठी रोजच्या रोज लागेल ते दिले. इतर लेव्यांसाठीही लोकांनी काही रक्क म बाजूला ठेवली. आणि अहरोनच्या वंशजांसाठी (म्हणजेच याजकांसाठी) लेव्यांनी पैसे वेगळे ठेवले.

## नहेम्याच्या अखेरच्या आज्ञा

13 त्यादिवशी मोशेचे पुस्तक सर्व लोकांना ऐकू जाईल अशाप्रकारे मोठ्याने वाचले गेले. त्या पुस्तकात त्यांना हा नियम लिहिलेला आढळला: कोणत्याही अम्मोनी आणि मवाबी व्यक्तीला देवाच्या लोकांमध्ये कधीही मिसळता येणार नाही. [2]या लोकांनी इस्राएली लोकांना अन्न आणि पाणी दिले नव्हते म्हणून हा नियम लिहिला गेला. शिवाय बलामने इस्राएलींना शाप द्यावा म्हणून या लोकांनी त्याला पैसेही दिले होते. पण आपल्या देवाने त्या शापाचे आशीर्वादात रूपांतर केले. [3]त्यामुळे इस्राएलींनी जेव्हा हा नियम ऐकला तेव्हा त्यांनी त्याचे पालन केले. या परकी लोकांच्या प्रजेपासून ते वेगळे झाले.

[4–5]पण हे होण्यापूर्वीच एल्याशीबने तोबीयाला मंदिरात एक खोली दिली होती. एल्याशीब हा याजक देवाच्या मंदिरातील कोठाराचा रक्षक होता. आणि तो तोबीयाचा जिवलग मित्र होता. ही खोली धान्यार्पणे,

धूप, मंदिरातील पात्रे व इतर वस्तू ठेवण्यासाठी वापरली जात असे. तिथले लेवी, गायक व द्वारपाल यांना लागणारा धान्याचा एकदशांश भाग, नवीन द्राक्षरस, आणि तेल या गोष्टीही तिथे ठेवल्या जात तरीही एल्याशीबने ती खोली तोबीयाला दिली.

[6]हे सर्व होत होते तेव्हा मी यरुशलेममध्ये नव्हतो. बाबेलच्या राजाकडे मी परत गेलो होतो. बाबेलचा राजा अर्तहशश्त याच्या कारकिर्दीच्या बत्तिसाव्या वर्षी मी बाबेलला गेलो होतो. नंतर मी राजाकडे यरुशलेमला परत जायची परवानगी मागितली. [7]आणि मी यरुशलेमला परतलो. एल्याशीबच्या वर्तनाची ही दु:खद बातमी मी यरुशलेममध्ये ऐकली. आपल्या देवाच्या मंदिरात एल्याशीबने तोबीयाला खोली दिलेली होती. [8]एल्याशीबच्या या वर्तनाने मी अतिशय क्रुध्द झालो. तोबीयाचे सगळे सामान मी खोलीबाहेर फेकून दिले. [9]त्या खोल्या शुध्द आणि स्वच्छ करून घ्यायची मी आज्ञा दिली. मग मंदिरातील पात्रे, वस्तू, धान्यार्पणे, धूप वगैरे मी पूर्ववत तिथे ठेवले.

[10]लोकांनी लेव्यांना त्यांचा वाटा दिलेला नाही हे ही माझ्या कानावर आले. त्यामुळे लेवी आणि गायक आपापल्या शेतांवर कामाला गेले होते. [11]म्हणून मी अधिकाऱ्यांना सांगितले की त्यांचे चुकले. मी त्यांना विचारले, "तुम्ही देवाच्या मंदिराची देखभाल का केली नाही.?" मग मी सर्व लेव्यांना बोलवून घेतले. मंदिरातील आपापल्या जागी आपापल्या कामावर जायला त्यांना सांगितले. [12]त्यानंतर यहुदातील सर्व लोकांनी पिकाचा एकदशांश वाटा, नवीन द्राक्षारस आणि तेल मंदिरात आणले. या सगळ्या गोष्टी कोठारात ठेवण्यात आल्या.

[13]कोठारांवर या माणसांना मी नेमले: शलेम्या हा याजक, सादोक शिक्षक, आणि पदाया नावाचा लेवी. मत्तन्याचा मुलगा जक्कू र याचा मुलगा हनान याला त्यांचा मदतनीस म्हणून नेमले. ही माणसे विश्वासार्ह आहेत हे मला माहीत होते. आपल्या नातलगांना नेहमी लागणाऱ्या वस्तूंचे वाटप करणे हे त्यांचे काम होते.

[14]देवा, मी केलेल्या या गोष्टींचे स्मरण असू दे. माझ्या देवाचे मंदिर आणि तिथली सेवा यांसाठी मी श्रध्देने जे केले त्याची आठवण ठेव.

[15]यहुदात त्या काळात मी शब्बाथ दिवशी लोकांना काम करताना पाहिले. द्राक्षारसासाठी द्राक्षे तुडवताना मी त्यांना पाहिले. धान्य आणून ते गाढवांवर लादताना मी पाहिले. द्राक्षे, अंजीर आणि इतर बऱ्याच गोष्टी शहरात नेताना मी लोकांना पाहिले. शब्बाथ दिवशी ते या सर्व गोष्टी यरुशलेममध्ये आणत होते. तेव्हा मी त्याबद्दल त्यांना ताकीद दिली. शब्बाथ दिवशी अन्नधान्याची विक्री करायची नाही हे मी त्यांना सांगितले.

[16]तेव्हा सोरे नगरातील काही लोक यरुशलेममध्ये राहात होते. ते मासे आणि आणखी पुष्काळशा गोष्टी शब्बाथ दिवशी यरुशलेममध्ये आणून विकत. आणि यहुदी लोक त्या विकत घेत. [17]यहुदातील मान्यवर लोकांना मी हे चुकीचे असल्याचे सांगितले. त्यांना मी म्हणालो, "तुम्ही ही फार वाईट गोष्ट करत आहात. तुम्ही शब्बाथाला अपवित्र करीत आहात. शब्बाथाला तुम्ही इतर दिवसांसारखाच एक करत आहात. [18]तुमच्या पूर्वजांनी याच गोष्टी केल्या हे तुम्ही जाणता. म्हणूनच देवाने आपल्यावर आणि आपल्या नगरावर अरिष्ट आणले. आता इस्राएलवर आणखी संकटे येतील असे तुम्ही वागत आहा. कारण शब्बाथ दिवस बाटवून त्यांचे महत्व तुम्ही घालवत आहात."

[19]म्हणून मी केले ते असे: दर शुक्रवारी रात्री अंधार पडण्यापूर्वी द्वारपालांना मी यरुशलेमच्या वेशींचा कडेकोट बंदोबस्त करायला सांगितले. शब्बाथ दिवस होऊन गेल्याखेरीज दरवाजे उघडायचे नाहीत असा आदेश दिला. माझी काही माणसे मी वेशीवर उभी केली. शब्बाथ दिवशी कोणताही माल यरुशलेममध्ये येत नाही याची खात्री करून घ्यायला मी त्यांना सांगितले.

[20]एक दोन वेळेला व्यापाऱ्यांना आणि विक्रेत्यांना यरुशलेमबाहेर रात्र काढावी लागली. [21]पण मी त्या

व्यापाऱ्यांना आणि विक्रेत्यांनाही समज दिली. मी त्यांना
म्हणालो, “कोटाच्या भिंतीलगत रात्री मुक्काम करु नका.
पुन्हा तुम्ही तसे केल्यास तुम्हाला पकडण्यात येईल.”
तेव्हा पासून ते पुन्हा शब्बाथ दिवशी त्यांच्या वस्तू विकायला
आले नाहीत.

22मग मी लेवींना त्यांच्या शुध्दीकरणाची आज्ञा दिली.
ते पार पाडल्यावर त्यांना वेशींची राखण करायची होती.
शब्बाथ हा पवित्र दिवस म्हणून राखून ठेवला होता याची
खात्री करण्यासाठी असे केले होते.

देवा, या गोष्टी केल्याबद्दल कृपया माझे स्मरण ठेव.
माझ्यावर लोभ असू दे आणि तुझे महान प्रेम मला मिळू
दे.

23त्या काळात माझ्या असेही लक्षात आले की काही
यहुदी लोकांनी अश्दोदी, अम्मोनी आणि मवाबी बायकांशी
लग्ने केली आहेत. 24आणि या विवाहातून झालेल्या
संततीपैकी निम्म्या मुलांना यहूदी भाषा बोलता येत नव्हती.
ही मुले अश्दोदी, अम्मोनी किंवा मवाबी भाषा बोलत
होती. 25तेव्हा मी त्या पुरुषांना त्यांचा हा दोष दाखवला.
त्यांचा मी धिक्कार केला. काहींना मारहाण करून त्यांचे
केस उपटले. त्यांना देवाची शपथ घ्यायला लावली. त्यांना
मी म्हणालो, “त्या लोकांच्या मुलींशी लग्ने करु नका.
तुमच्या मुलांशी या परक्या लोकांच्या मुलींची लग्ने होऊ
देऊ नका. तुमच्या मुलींना त्या परक्या लोकांच्या
मुलांशी लग्ने करु देऊ नका. 26अशा विवाहांमुळेच
शलमोनाच्या हातून पाप झाले. हे तुम्हाला माहीत
आहे. शलमोनसारखा थोर राजा किती तरी राष्ट्रांमध्ये
नव्हता. देवाचा शलमोनवर लोभ होता. देवाने सर्व
इस्राएलवर शलमोनला राजा केले. पण परक्या स्त्रियांमुळे
शलमोनही पाप करायला उद्युक्त झाला. 27आणि आता
तुम्हीही तसेच भयंकर पातक करत आहात असे मी
ऐकतो. तुम्ही देवाशी एकनिष्ठ नाही. तुम्ही परक्या स्त्रियांशी
विवाहबध्द होत आहात.”

28योयादा हा मुख्य याजक एल्याशीब याचा मुलगा.
योयादाचा एक मुलगा होरोनच्या सनबल्लटचा जावई होता.
त्याला मी हा देश सोडायला लावले. त्याला मी पळून
जायला भाग पाडले.

29माझ्या देवा, या लोकांना शासन कर. त्यांनी याजकपणा
अपवित्र केला. त्याला ते क्षुल्लक समजले. याजक आणि
लेवी यांच्याशी तू केलेला करार त्यांनी पाळला नाही.
30म्हणून मी याजक आणि लेवी यांना शुध्द केले.
सर्व परकी माणसे आणि त्यांनी शिकवलेल्या चमत्कारिक
परकीय गोष्टी यांची मी हकालपट्टी केली. लेवी आणि
याजक यांना त्यांची कामे आणि जबाबदाऱ्या दिल्या.
31लाकूड आणि झाडांची पहिली फळे यांच्या भेटी लोक
योग्य वेळी आणतील याची मी व्यवस्था केली. देवा, या
सत्कृत्यांसाठी माझी आठवण ठेव.

# एस्तेर

## राणी वश्तीचा आज्ञाभंग

1 राजा अहश्वेरोशच्या कारकिर्दीतील गोष्ट.
हिंदुस्तानपासून कूश पर्यंत एकशेसत्तावीस प्रांतांवर तो
राज्य करत होता. 2शूशन या राजधानीच्या नगरातून
राजा अहश्वेरोश राज्य करीत असे.
3आपल्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी त्याने आपले
प्रधान आणि अधिकारी यांना मेजवानी दिली. पारस आणि
मेदय या प्रांतांमधले सैन्याधिकारी आणि महत्वाचे
कारभारीही त्या ठिकाणी होते. 4या मेजवान्या एकशेऐंशी
दिवस चालल्या. या काळात राजा अहश्वेरोशने आपल्या
राज्याच्या ऐश्वर्याचे प्रदर्शन केले. आपल्या प्रासादाचे
राजेशाही सौंदर्य आणि वैभव त्याने सर्वांना दाखवले.
5एकशेऐंशी दिवसांचा हा काळ संपल्यावर राजा
अहश्वेरोशने आणखी एक मेजवानी दिली. ती सात दिवस
चालली. राजवाडयाच्या अंतर्भागातील उद्यानात ही मेजवानी
होती. तिथे शूशन या राजधानीच्या शहरातील समस्त
लहान थोरांना आमंत्रित केले होते. 6या आतल्या उद्यानात
अळशीच्या सुताचे पांढरे निळे शोभेचे पडदे खोलीभर
टांगले होते. हे पडदे पांढऱ्या जांभळ्या अळशीच्या दोऱ्यांनी
रुप्याच्या कड्यांमध्ये अडकवून संगमरवरी स्तंभांना लावले
होते. तेथील मंचक सोन्यारुपाचे असून जांभा, संगमरवर
शिंप आणि इतर मूल्यवान खड्यांच्या नक्षीदार फरशीवर
ठेवलेले होते. 7सुवर्णपात्रांतून द्राक्षारस दिला होता. ही
पात्रेही नानाविविध तऱ्हांची होती. राजा अतिशय उदार
असल्यामुळे द्राक्षारस भरभरुन देण्यात आला. 8सर्व
आमंत्रितांना मनसोक्त द्राक्षारस देण्यात यावा अशी राजाने
आपल्या सेवकांना आज्ञा दिली होती व सेवक राजाची
आज्ञा पाळत होते.
9राणी वश्ती हिनेही राजमहालातील स्त्रियांना मेजवानी
दिली.
10-11मेजवानीच्या सातव्या दिवशी राजा अहश्वेरोश
द्राक्षारस प्याल्याने उत्तेजित मन:स्थितीत होता. तेव्हा
आपल्या तैनातीत असलेल्या महूमान, बिजथा, हरबोना,
बिगथा, अवगथा, जेथर आणि कर्खस या सात खोजांना
त्याने राणीला राजमुगुट घालून आपल्याकडे आणण्यास
सांगितले. राणी खूप सुंदर होती. तेव्हा आपले सर्व अधिकारी
व सरदार यांच्यासमोर तिने आपले रुप दाखवावे अशी
त्याची इच्छा होती.
12पण त्या सेवकांनी जेव्हा राणी वश्तीला राजाची
ही आज्ञा सांगितली तेव्हा तिने येण्यास नकार दिला.
तेव्हा राजा फार संतापला. 13–14पंडिताचा आणि
ज्योतिष्यांचा सल्ला घ्यायची राजाची प्रथा होती.
त्यानुसार कायदे जाणणाऱ्या पंडितांशी राजा बोलला.
ही सुज्ञ मंडळी राजाला जवळची होती. त्यांची नावे
अशी: कर्शना, शेथार, अदमाथा, तार्शीश, मेरेस, मर्सना
ममुखान. हे सातजण पारस आणि मेदय मधले अत्यंत
महत्वाचे अधिकारी होते. राजाला भेटण्याचा त्यांना
विशेषाधिकार होता. राज्यातले ते सर्वात उच्च पदावरील
अधिकारी होते. 15राजा ने त्यांना विचारले "राणी वश्तीवर
काय कायदेशीर कारवाई करावी कारण तिने राजाची
जी आज्ञा खोजांमार्फत दिली होती तीचे उल्लंघन केले
आहे."
16तेव्हा ममुखानाने सर्व अधिकाऱ्यांसमक्ष राजाला
सांगितले, "राणी वश्तीच्या हातून प्रमाद घडलेला आहे.
तिची ही गैरवर्तणूक केवळ राजाच्याच विरुध्द नव्हे तर
राज्यातील सर्व सरदार व प्रजा यांच्याविरुध्द आहे. 17माझे
म्हणणे असे आहे की राणी वश्ती अशी वागली हे इतर
सर्व बायकांना समजेल. त्या उद्या आपल्या नवऱ्यांचा
शब्द डावलतील. त्या आपापल्या नवऱ्यांना म्हणतील,
'अहश्वेरोश राजाने राणीला आपल्यापुढे आणायला
सांगितले पण तिने यायला नकार दिला.'
18"राणीचे कृत्य आजच पारस आणि मेदय इथल्या
अधिकाऱ्यांच्या बायकांच्या कानावर गेले आहे. त्यांच्यावर
तिच्या या वर्तणुकीचा प्रभाव पडेल. त्या बायकाही मग
राजाच्या अधिकाऱ्यांशी तसेच वागतील. त्यातून अनादर
आणि संताप फैलावेल.
19"तर राजाची मर्जी असल्यास एक सूचना करतो.
राजाने एक राजकीय फर्मान काढावे आणि त्यात काही
फेरबदल होऊ नये म्हणून पारसी आणि मेदय यांच्या
कायद्यात ते लिहून ठेवावे. राजाज्ञा अशी असेल की वश्तीने
पुन्हा कधीही राजा अहश्वेरोशच्या समोर येऊ नये. तसेच
तिच्यापेक्षा जी कुणी चांगली असेल तिला राजाने पट्टराणी
करावे. 20राजाच्या या विशाल साम्राज्यात ही आज्ञा एकदा
जाहीर झाली की सर्व बायका आपापल्या नवऱ्यांशी
आदराने वागतील. लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्या बायका
आपल्या नवऱ्याचा मान ठेवतील."

21 या सल्ल्याने राजा आणि त्याचा अधिकारी वर्ग
आनंदित झाला. ममुखानची सूचना राजा अहश्वेरोशने
अंमलात आणली. 22 राजा अहश्वेरोशने सर्व राज्यभर
खलिते पाठवले. प्रत्येक प्रांतात पाठवायचा खलिता त्या
प्रांताच्या भाषेत होता. प्रत्येक राष्ट्राला तिथल्या भाषेत पत्र
गेले. प्रत्येक पुरुषाची आपल्या घरात सत्ता चालावी असे
त्या पत्रांमध्ये सर्वांना समजेल अशा भाषेत लिहिलेले होते.

## एस्तेरला राणीपद मिळते

2 काही काळानंतर राजा अहश्वेरोशचा राग शमला.
त्याला वश्तीची आणि तिच्या वागण्याची आठवण
झाली. तिच्याविषयी आपण दिलेल्या आज्ञा आठवल्या.
2 तेव्हा राजाच्या व्यक्तिगत सेवेतील सेवकांनी सुचवले,
“राजासाठी तरुण, सुंदर कुमरीकांचा शोध घ्यावा.
3 आपल्या राज्यातील प्रत्येक प्रांतातून राजाने एकेक
अधिकारी निवडावा. त्या अधिकाऱ्यांनी सर्व सुरेख,
सुकुमार कुमारीकांना शूशन या राजधानीत घेऊन यावे.
त्यांना अंत:पुरात ठेवावे. तेथे अंत:पुराचा प्रमुख व हेगे या
खोजाच्या निगराणीखाली त्यांना ठेवावे. उत्याने त्यांना तेल
आणि सुगंधित द्रव्य देऊन त्यांच्यावर सौंदर्य उपचार
करावेत. 4 त्यांच्यामधून मग जी मुलगी राजाला पसंत पडेल
तिला वश्तीच्या ऐवजी राणीपद मिळावे.” राजाला ही सूचना
आवडली आणि त्याने ती मान्य केली.

5 यावेळी बन्यामीनच्या घराण्यातील मर्दखय नावाचा एक
यहुदी शूशन या राजधानीच्या शहरात होता. मर्दखय हा
याईरचा मुलगा आणि याईर शिमईचा मुलगा आणि शिमई
कीशचा मुलगा होता. 6 बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने
यहुदाचा राजा यखन्या याचा पाडाव करून त्याला
यरुशलेमेहून नेले तेव्हा त्या लोकांमध्ये मर्दखय होता.
7 त्याला हदस्सा नावाची एक चुलत बहीण होती. तिला
आईवडील नसल्यामुळे मर्दखयनेच तिचा सांभाळ केला
होता. तिचे आईवडील वारलें तेव्हा मर्दखयने तिला आपली
मुलगी मानून तिला वाढवले. हदस्सालाच एस्तेर म्हणत.
ती अतिशय रुपवती आणि सुरेख होती.

8 राजाची आज्ञा लोकांपर्यंत पोचल्यावर पुष्कळ मुलींना
राजधानी शूशन येथे आणले गेले. त्यांना हेगेच्या
देखभालीखाली ठेवण्यात आले. त्या मुलींमध्ये एस्तेरही
होती. एस्तेरलाही राजवाड्यात हेगेकडे सोपवले गेले. हेगे
राजाच्या जनानखान्याचा प्रमुख होता. 9 हेगेला एस्तेर
आवडली. तिच्यावर त्याची मर्जी बसली. त्यामुळे त्याने
तिला ताबडतोब सौंदर्योपचार आणि खास आहार दिला.
राजवाड्यातील सात दासींची हेगेने निवड केली आणि
एस्तेरच्या दिमतीला त्यांना नेमले. एस्तेरला आणि त्या
सात दासींना त्याने अंत:पुरातील सगळ्यात चांगल्या जागी
हलवले. 10 आपण यहुदी आहोत हे एस्तेरने कुणालाही
संगितले नव्हते. मर्दखयने बजावल्यामुळे तिने आपल्या
कुटुंबाची पार्श्वभूमी कोणालाही सांगितली नव्हती.
11 एस्तेरची खबरबात जाणून घेण्यासाठी मर्दखय रोज
अंत:पुराच्या अवतीभवती फेऱ्या घाली.

12 राजा अहश्वेरोशकडे जाण्याची पाळी येण्यापूर्वी प्रत्येक
मुलीला पुढील सोपस्कारातून जावे लागे. तिला बारा महिने
सौंदर्योपचार घ्यावे लागत. त्यापैकी सहा महिने गंधरसाच्या
तेलाचे व सहा महिने सुंगधी द्रव्ये आणि प्रसाधने यांचे
उपचार होत. 13 आणि राजाकडे जायच्या वेळी अशी पध्दत
होती: अंत:पुरातील जी गोष्ट हवी ती तिला मिळत
असे. 14 संध्याकाळी ती राजाकडे जाई. सकाळी ती दुसऱ्या
अंत:पूरात परत येत असे. तिथे शाशगज नांवाच्या खोजाकडे
तिला हवाली केले जाई. शाशगज हा राजाच्या उपपत्न्यांची
देखरेख करणारा खोजा होता. राजाला जी मुलगी पसंत
पडेल तिला तो नांव घेऊन बोलवे. एरवी या मुली पुन्हा
राजाकडे जात नसत.

15 एस्तेरची राजाकडे जायची पाळी आली तेव्हा तिने
काहीही मागून घेतले नाही. राजाच्या अंत:पुराचा प्रमुख
खोजा हेगे याने जे सुचवले ते पाळण्याची तिची इच्छा
होती. (मर्दखयचा काका अबीहइल याची ती मुलगी.
मर्दखयने तिला आपली मुलगी मानली होती) ज्या कोणी
एस्तेरला पाहीली त्यांना ती आवडली. 16 तेव्हा अहश्वेरोश
राजाच्या महालात एस्तेरची रवानगी झाली. तो राजाच्या
कारकिर्दीच्या सातव्या वर्षातला दहावा म्हणजे तेबेथ महिना
होता.

17 इतर सर्व मुलींपेक्षा राजाला एस्तेर आवडली. तिच्यावर
त्याचा लोभ जडला. इतर सर्व कुमारींहून त्याला ती पसंत
पडली. तेव्हा राजा अहश्वेरोशने एस्तेरच्या मस्तकावर
राजमुकुट चढवून वश्तीच्या जागी तिला राणी केले.
18 आपले सर्व प्रमुख अधिकारी आणि सेवक यांना त्याने
एस्तेरसाठी मोठी मेजवानी दिली. सर्व प्रांतांमध्ये त्याने
सुट्टी जाहीर केली. आपल्या उदारत्वामुळे त्याने लोकांना
बक्षीसे दिली.

## मर्दखयला कटाचा सुगावा लागतो

19 सर्व मुली दुसऱ्यांदा एकत्र जमल्या तेव्हा मर्दखय
राजद्वारी बसला होता. 20 एस्तेरने आपण यहुदी असल्याचे
अजूनही गुपित ठेवले होते. आपली कौटुंबिक पार्श्वभूमी
तिने कोणाला कळू दिली नव्हती. मर्दखयनेच तिला तसे
बजावले होते. तो तिचा सांभाळ करत असताना ती त्याचे
ऐकत असे तशीच ती अजूनही त्याच्या आज्ञेत होती.

21 मर्दखय राजद्वारी बसलेला असताना, बिग्थान व तेरेश
प्रवेशद्वारा वरील राजाचे पहारेकरी, राजावरील रागाने,
राजा अहश्वेरोशला मारून टाकण्याचा कट करु लागले.
22 पण मर्दखयाला त्यांचा बेत कळल्यामुळे त्याने राणी
एस्तेरला खबर दिली. राणी एस्तेरने मर्दखयला या कटाचा
सुगावा लागला असे राजाला सांगितले. 23 मग या बातमीचा
तपास करण्यात आला. मर्दखयची खबर खरी असल्याचे
आढळून आले. ज्या पहारेकऱ्यांनी राजाच्या खुनाचा कट

केला होता त्यांना फाशी देण्यात आली. या सर्व गोष्टी
राजासमक्ष राजांच्या इतिहासग्रंथात नोंदवून ठेवण्यात
आल्या.

## हामानचा यहुदींच्या संहाराचा बेत

3 या सर्व घडामोडी झाल्यानंतर राजाने अगागी हामानाचा
गौरव केला. अगागी हामान हा हम्मदाथा याचा मुलगा.
राजाने हामानला बढती देऊन इतर सर्व अधिकाऱ्यांपेक्षा
मानाची जागा त्याला दिली. 2राजाच्या आज्ञेनुसार
राजद्वारावरील राजाचे सर्व सेवक हामानपुढे नतमस्तक
होऊन त्याला मान देऊ लागले. पण मर्दखयने त्याच्यापुढे
मान तुकवण्याचे किंवा त्याला मान द्यायचे नाकारले.
3तेव्हा प्रवेशद्वारावरील राजाच्या इतर सेवकांनी मर्दखयला
विचारले, “हामानला मुजरा करायची राजाची आज्ञा तू
का पाळत नाहीस?”

4राजाचे सेवक मर्दखयला रोज हेच विचारू लागले
तरी हामानला मुजरा करायची राजाज्ञा मर्दखयने पाळली
नाहीच. तेव्हा या सेवकांनी हामानला हे सांगितले. हामान
आता मर्दखयच्या बाबतीत काय करतो ते त्यांना पाहायचे
होते. आपण यहुदी असल्याचे मर्दखयने या सेवकांना
सांगितले होते. 5मर्दखय आपल्याला मुजरा करत नाही
किंवा आपली मान तुकवत नाही हे हामानने पाहिले
तेव्हा तो संतापला 6मर्दखय यहूदी आहे हे हामानला कळले
होते. पण फक्त मर्दखयला जिवे मारून त्याचे समाधान
होणार नव्हते. मर्दखयसारख्या सर्वांना, अहश्वेरोशच्या
राज्यातल्या सर्वच्या सर्व यहुदींना कसे मारता येईल याचा
विचार तो करु लागला. 7राजा अहश्वेरोशच्या
कारकिर्दीच्या बाराव्या वर्षातल्या नीसान या पहिल्या
महिन्यात हामानने विशेष दिवस आणि महिना
निवडण्यासाठी चिठ्ठ्या टाकल्या. त्यानुसार अदार हा बारावा
महिना निवडला. (त्या काळात अशा चिठ्ठ्यांना “पूर”
म्हणत.) 8मग हामान राजा अहश्वेरोशकडे येऊन म्हणाला,
“राजा अहश्वेरोश, तुझ्या साम्राज्यात सर्व प्रांतांमध्ये विशिष्ट
गटाचे लोक विखुरलेले आहेत. इतर लोकांपेक्षा ते स्वत:ला
वेगळे ठेवतात. इतरांपेक्षा त्यांचे रीतिरिवाज वेगळे आहेत.
शिवाय ते राजाचे कायदे पाळत नाहीत. अशा लोकांना
तुझ्या राज्यात राहू देणे हिताचे नाही.

9“राजाची मर्जी असल्यास एक सूचना करतो: या
लोकांचा संहार करण्याची आज्ञा द्यावी. 10,000 रौप्यमुद्रा
मी राजाच्या खजिन्यात* जमा करीन या पैशाचा विनियोग
ही गोष्ट अंमलात आणणाऱ्या लोकांना मोबदला देण्यासाठी
करता येईल.”

10तेव्हा राजाने आपली राजमुद्रा बोटातून काढून
हामानाला दिली. अगागी हामान हम्मदाथा याचा मुलगा
होता. तो यहुद्यांचा शत्रू होता. 11राजा मग हामानला म्हणाला,
“हे धन ठेव. त्या लोकांना तुला काय द्यायचे ते दे.”

12त्यानंतर पहिल्या महिन्याच्या तेराव्या दिवशी राजाच्या
लेखकांना बोलावले गेले. त्यांनी हामानच्या आज्ञा प्रत्येक
प्रांताच्या भाषेत लिहून काढल्या. प्रत्येक लोकसमूहाच्या
भाषेत त्यांनी त्या लिहिल्या. राजाचे कारभारी, वेगवेगळ्या
प्रांतांचे अधिकारी, आणि वेगवेगळ्या लोकसमूहांचे नेते
यांनाही त्यांनी लिहिले. राजा अहश्वेरोशच्या नावाने त्यांनी
ते लिहिले आणि राजमुद्रा उठवून ते आदेश त्यांनी मुद्रांकित
केले.

13जासूदांनी ही पत्रे राजाच्या सर्व प्रांतात नेऊन दिली.
सर्व यहुद्यांचा नाश करावा, त्यांना ठार करावे, त्यांचा
समूळ उच्छेद करावा असा राजाचा आदेश होता. तरुण व
वृध्द माणसे, बायका मुले सगळ्यांचा त्यात समावेश होता.
एकाच दिवशी सर्व यहुद्यांना ठार करावे असे त्या आदेशात
म्हटले होते. तो दिवस म्हणजे अदार महिन्याचा, बाराव्या
महिन्याचा तेरावा दिवस. यहुद्यांची सर्व मालमत्ता काढून
घ्यावी असाही आदेश होता.

14हा आदेश असलेल्या पत्राची प्रत कायदा म्हणून द्यायची
होती. प्रत्येक प्रांतात हा कायदा लागू होणार होता आणि
राज्यातल्या सर्व लोकांना तो कळवण्यात येणार होता,
जेणेकरून त्या दिवशी ते लोक तयार राहिले असते.
15राजाच्या हुकूमानुसार सर्व जासूद तातडीने निघाले. शूशन
राजावाड्यातून हा हुकूम निघाला. राजा आणि हामान
पेयपान करायला बसले पण शूशन नगर मात्र चिंताक्रांत
झाले.

## मर्दखय मध्यस्थीसाठी एस्तेरला राजी करतो

4 जे काही झाले ते मर्दखयच्या कानावर आले.
यहुद्यांविरुध्द राजाने काढलेला हुकूम त्याला समजला
तेव्हा त्याने आपली वस्त्रे फाडली. शोकाची वस्त्रे परिधान
करून डोक्याला राख फासून तो नगरातून मोठयाने
आक्रोश करत आणि रडत निघाला. 2पण तो फक्त राजाच्या
प्रवेश द्वारापर्यंतच पोचू शकला. शोकाची वस्त्रे घातलेल्या
कोणालाही तिथून आत जाण्यास मनाई होती. 3राजाचा
हुकूम ज्या ज्या प्रांतात पोचला तिथे तिथे यहुद्यांमध्ये
शोककळा पसरली आणि ते आक्रोश करु लागले. उपवास
करून आणि मोठयाने ते आकांत करु लागले. डोक्यात
राख घालून आणि शोकवस्त्रे घालून बहुतेक यहुदी राखेत
पडून राहिले.

4एस्तेरच्या दासी आणि खोजे तिच्याकडे आले आणि
त्यांनी तिला मर्दखयविषयी सांगितले. तेव्हा राणी एस्तेर
अतिशय दु:खी आणि नाराज झाली. शोकाच्या वस्त्रांऐवजी
घालायला तिने मर्दखयकडे चांगली वस्त्रे पाठवली. पण
तो ती घेईना. 5एस्तेरने मग हथाकला बोलावले. हथाक
हा तिच्या सेवेसाठी निवडलेला राजाच्या खोजांपैकी एक
जण होता. मर्दखय एवढा कशाने त्रस्त झाला आहे हे

---

**राजाच्या खजिन्यात** ठार मारून हामानने त्यांची मालमत्ता जप्त
करुन खुप पैसे गोळा करण्याची आशा धरली होती.

शोधून काढायची एस्तेरने त्याला आज्ञा दिली. 6राजद्वारासमोरच्या नगरातल्या मोकळया जागेत मर्दखय होता तिथे हथाक गेला. 7मर्दखयने मग हथाकला त्याच्या बाबतीत जे जे झाले ते सर्व सांगितले. यहुद्यांचा वध करण्याबद्दल राजाच्या खजिन्यात नेमकी किती रक्कम जमा करायचे हामानने वचन दिले आहे ते ही त्याने हथाकला सांगितले. 8यहूद्यांच्या वधाच्या राजाज्ञेची प्रतही मर्दखयने हथाकला दिली. हा हुकूम शूशन नगरात सर्वत्र दिला गेला होता. हथाकने एस्तेरला तो हुकूम दाखवून सर्व काही तिला सांगावे अशी त्याची इच्छा होती. एस्तेरने राजाकडे जाऊन मर्दखय आणि तिचे लोक यांच्यासाठी दयेची याचना व मदत करण्यास हथाकने तिला प्रवृत्त करावे असेही त्याने सांगितले.

9हथाकने एस्तेरकडे येऊन तिला, मर्दखय म्हणाला ते सगळे सांगितले,

10मग मर्दखयसाठी एस्तेरने हथाकजवळ निरोप दिला: 11“मर्दखय, राजाचे सर्व अधिकारी आणि राजाच्या प्रदेशातील सर्व लोक हे जाणून आहेत की न बोलावता जो राजाकडे जाईल त्या व्यक्तीसाठी मग तो पुरुष असो की स्त्री राजाचा एकच कायदा आहे तो म्हणजे मृत्युदंड. मात्र राजाने आपला सुवर्ण राजदंड त्या व्यक्तीपुढे केल्यास हा कायदा अंमलात आणला जात नाही. राजाच्या तेवढ्या कृतीने त्या माणसाला जीवदान मिळते. आणि मला तर राजाकडून गेल्या तीस दिवसात बोलावणे आलेले नाही”

12–13मग एस्तेरचा हा निरोप मर्दखयला मिळाला. मर्दखयला तिचा निरोप मिळाल्यावर त्याने आपले उत्तर पाठवले. “राजमहालात राहतेस म्हणून तू यातून सुटशील असे समजू नकोस. 14तू आत्ता गप्प बसलीस तर यहुद्यांना दुसऱ्या ठिकाणाहून मदत आणि स्वातंत्र्य मिळेल. पण तू आणि तुझे पितृकुळ यांचा मात्र नाश होईल. आणि कोणी सांगावे, या अशा काळासाठीच कदाचित तुझी राणी म्हणून निवड झाली असेल.”

15–16तेव्हा एस्तेरने मर्दखयला हे उत्तर पाठवले: “मर्दखय, शूशन मधील सर्व यहुद्यांना एकत्र घेऊन ये आणि माझ्यासाठी सर्वजण उपास करा. तीन दिवस आणि तीन रात्र काहीही खाऊ पिऊ नका. मी तुमच्यासारखाच उपास करीन, तसेच माझ्या दासीदेखील करतील. आपल्या उपवासानंतर मी राजाकडे जाईन. राजाने मला बोलावलेले नसताना त्याच्याकडे जाणे नियमाविरुध्द आहे हे मला माहीत आहे. पण तरी मी जाईन. मग मी मेले तर मेले.”

17तेव्हा मर्दखय निघून गेला. एस्तेरने त्याला जे करायला सांगितले तसे त्याने केले.

## एस्तेर राजाशी बोलते

5 तिसऱ्या दिवशी एस्तेरने आपली राजवस्त्रे परिधान केली आणि ती राजमहालाच्या आतल्या भागात जाऊन उभी राहिली. ती उभी होती तो राजमंदिरासमोरचा भाग होता. राजमंदिरात राजा सिंहासनावर बसला होता आणि त्याचे तोंड लोक आत येत त्या दिशेलाच होते. 2त्यामुळे राजाने एस्तेर राणी चौकात उभी राहिलेली पाहिली. तिला पाहून तो खुष झाला. आपल्या हातातला सोन्याचा राजदंड त्याने तिच्या दिशेने पुढे केला. तेव्हा राणी आत शिरली आणि राजाजवळ गेली. सुवर्णराजदंडाच्या दुसऱ्या टोकाला तिने स्पर्श केला.

3मग राजाने तिला विचारले, “राणी एस्तेर तुला कसली काळजी लागली आहे? तुला काय विचारायचे आहे? तुला तू मागशील ते मी देईन, अगदी अर्धे राज्यदेखील देईन.”

4एस्तेर म्हणाली, “तुमच्यासाठी आणि हामानसाठी मी भोजन तयार केले आहे. तुम्ही आणि हामान या भोजनाला आज यावे”

5तेव्हा राजा म्हणाला, “हामानला ताबडतोब घेऊन या म्हणजे आम्हाला एस्तेरच्या म्हणण्याप्रमाणे जाता येईल.”

राजा आणि हामान मग एस्तेरने आखलेल्या भोजन समारंभाला गेले. 6ते द्राक्षारस घेत असताना पुन्हा राजाने एस्तरेला विचारले, “आता सांग एस्तेर तुला काय हवे आहे? हवे ते माग. मी ते तुला देईन. बोल तर काय पाहिजे? तुला काय हवे ते देईन, अगदी अर्धे राज्यसुध्दा देईन.”

7एस्तेर म्हणाली, “मला मागायचे ते असे: 8राजाची माझ्यावर कृपादृष्टी असेल आणि मी मागेन ते द्यायला राजा खुशीने तयार असेल तर राजा आणि हामान यांनी उद्याही यावे. उद्या मी राजासाठी आणि हामानसाठी आणखी एक मेजवानी देईन. मला खरोखर काय हवे ते मी उद्या सांगीन.”

## हामानचा मर्दखयवर राग

9हामान त्यादिवशी अतिशय आनंदात आणि चांगल्या मन:स्थितीत राजमहालातून निघाला. पण मर्दखयला राजद्वाराशी पाहाताच त्याला मर्दखयचा आतिशय संताप आला. हामान तिथून निघाला तेव्हा मर्दखयने त्याला मान न दिल्यामुळे हामान रागाने वेडापिसा झाला. मर्दखय हामानला घाबरत नव्हता आणि त्याचाच हामानला राग आला. 10पण आपल्या रागाला आवर घालून हामान घरी आला. मग आपले मित्र आणि बायको जेरेश यांना त्याने बोलावले. 11आपल्या ऐश्वर्याची बढाई मारायला त्याने सुरुवात केली. आपली पुत्रसंतती, राजाने केलेले आपले अनेक प्रकारचे सन्मान, राजाने आपल्याला दिलेले सर्वोच्च अधिकाराचे स्थान या सगव्व्यांची तो बढाई मारु लागला. 12हामान पुढे म्हणाला, “एवढच नाहीतर राणी एस्तेरने आज दिलेल्या मेजवानीला राजाबरोबर फक्त मलाच काय ते तिने बोलावले. पुन्हा उद्याही राणीने मला राजाबरोबर बोलावले आहे. 13पण या सव्व्या गोष्टींचा मला तेवढा आनंद होत नाही. तो यहुदी मर्दखय जोपर्यंत राजद्वाराशी

बसलेला आहे तोपर्यंत मला खराखुरा आनंद मिळणार
नाही"
14मग हामानची पत्नी जेरेश आणि त्याचे सगळे मित्र
यांनी एक सूचना मांडली ते म्हणाले, "त्याला फाशी
देण्यासाठी एक स्तंभ उभारायला सांग तो 75 फूट उंच
असू दे. मग सकाळी राजाला त्यावर मर्दखयला फाशी
द्यायला सांग. त्यानंतर राजाबरोबर खुशाल मेजवानीला
जा म्हणजे तुला आनंद होईल."
हामानला ती सूचना आवडली म्हणून त्याने फाशीचा
स्तंभ उभारायची आज्ञा केली.

## मर्दखयचा सन्मान

6 त्याच दिवशी रात्री राजाला झोप येईना. म्हणून त्याने
एका सेवकाला कालवृत्तांत आणायला सांगून वाचून
दाखवायला सांगितला. (एखाद्या राजाच्या कारकिर्दीतील
सगळ्या घडामोडी या राजांच्या इतिहासग्रंथात नोंदवलेल्या
असतात.) 2सेवकाने तो वृत्तांत राजाला वाचून दाखवला.
राजा अहश्वेरोशला ठार करण्याच्या कटाबद्दलचा मजकूर
त्याने वाचला. राजद्वारावर पहारा करणाऱ्या बिग्थान आणि
तेरेश या राजाच्या दोन सेवकांनी राजाचा वध करायचा
कट रचला होता पण मर्दखयला या कटाचा सुगावा लागला
आणि त्याने ही बातमी एकाला दिली. त्याची ती हकीकत
होती.
3त्यावर राजाने विचारले, "त्याबद्दल मर्दखयचा सन्मान
कसा केला गेला? त्याला काय इनाम दिले?"
तेव्हा सेवक राजाला म्हणाले, "मर्दखयसाठी काहीच
केले गेले नाही।"
4हामान तेव्हा नुकताच राजमहालाबाहेरच्या आवारात
शिरत होता. आपण उभारायला सांगितलेल्या वधस्तंभावर
मर्दखयला फाशी द्यायला त्याला राजाला सांगायचे होते.
राजाला त्याची चाहूल लागली. राजा म्हणाला, "आत्ता
चौकात कोण आले?" 5राजाचे सेवक म्हणाले, "हामान
चौकात थांबला आहे।"
तेव्हा राजा म्हणाला, "त्याला आत घेऊन या"
6हामान आत आला तेव्हा राजाने त्याला विचारले,
"हामान, राजाला एखाद्याचा सन्मान करायचा असेल तर
त्याच्यासाठी काय करावे?"
हामानने मनातल्या मानात विचार केला, "राजाला
सन्मान करावासा वाटेल असा माझ्याखेरीज दुसरा कोण
असणार? माझाच गौरव करण्याबद्दल राजा बोलत आहे
हे नक्की."
7तेव्हा हामान राजाला म्हणाला, "राजाला ज्याचा सन्मान
करायचा आहे त्याच्यासाठी हे करावे, 8राजाने स्वत:
परिधान केलेले राजवस्त्र नोकरांमार्फत आणावे. राजा
ज्या घोड्यावर बसतो तो घोडाही आणावा. राजाच्या मस्तकी
ठेवतात तो राजमुगुट आणावा. 9मग राजाच्या एखाद्या
महत्वाच्या अधिकाऱ्याच्या हाती राजवस्त्र आणि घोडा या
गोष्टी सोपवाव्यात. राजाला ज्याचा सन्मान करायचा आहे
त्याच्या अंगावर या अधिकाऱ्याने ती वस्त्रे घालावीत आणि
त्याला घोड्यावर बसवून नगरातील रस्त्यांवर फिरवावे.
या अधिकाऱ्याने त्या व्यक्तीला पुढे घेऊन नेताना घोषित
करावे की "राजाला ज्याचा सन्मान करायचा असतो
त्याच्यासाठी असे केले जाते."
10"मग जा पटकन" राजा हामानला म्हणाला, "वस्त्र
आणि घोडा घेऊन ये आणि तू सुचवलेस त्याप्रमाणे सगळे
यहुदी मर्दखय साठी कर. मर्दखय राजद्वाराजवळच बसलेला
आहे. तुझ्या सुचनेप्रमाणे सर्व काही कर"
11तेव्हा हामानने वस्त्र आणि घोडा आणला. मर्दखयला
ते वस्त्र घालून त्याला घोड्यावर पुढे बसवून नगरातील
रस्त्यांवर फिरवले. मर्दखय पुढे चालून त्याने ललकारी
दिली, "राजा एखाद्याच्या सन्मानार्थ असे करतो."
12एवढे झाल्यावर मर्दखय राजद्वाराशी परतला. पण
हामान घाईघाईने घरी परतला. शरमिंदेपणाने खाजील
होऊन त्याने आपले तोंड झाकून घेतले. 13आपली बायको
जेरेश आणि आपले सगळे मित्र यांना त्याने जे जे झाले ते
सगळे सांगितले, हामानची बायको आणि त्याला सल्ला
देणारे मित्र त्याला म्हणाले, "मर्दखय यहुदी असेल तर
तुझी जीत होणे शक्य नाही. तुझ्या अध:पाताला सुरुवात
झाली आहे. तुझा विनाश होईल हे नक्की."
14हे सगळे हामानशी बोलत असतानाच राजाचे
खोजे हामानच्या घराकडे आले. एस्तेरने आयोजित
केलेल्या मेजवानीला निघायची त्यांनी त्याला घाई
केली.

## हामानला फाशी

7 तेव्हा राजा आणि हामान राणी एस्तेरकडे भोजनाला
गेले. 2मेजवानीच्या या दुसऱ्या दिवशी ते द्राक्षारस
घेत असताना राजाने पुन्हा एस्तेरला विचारले, "राणी
एस्तेर, तुला काय हवे आहे? काहीही माग. ते तुला
मिळेल. काय हवे तुला? तुला मी काहीही देईन. अगदी
अर्धे राज्य देखील."
3तेव्हा राणी म्हणाली, "राजा, तुला मी आवडत असेन
आणि तुझी मर्जी असेल तर कृपा करून मला जगू दे.
माझ्या लोकांनाही जगू दे, एवढेच माझे मागणे आहे. 4कारण,
पुरते नेस्तनाबूत होण्यासाठी, मारले जाण्यासाठी मी आणि
माझे लोकविकले गेलो आहोत. आमची नुसती गुलाम
म्हणून विक्री झाली असती तरी मी गप्प राहिले असते.
कारण राजाला तसदी देण्याइतकी ती समस्या गंभीर ठरली
नसती."
5तेव्हा राजा अहश्वेरोशने राणी एस्तेरला विचारले,
"असे तुमच्या बाबतीत कोणी केले? तुझ्या लोकांच्या
बाबतीत असे करण्याचे धाडस करणारा कोण तो माणूस?"
6एस्तेर म्हणाली, "तो आपल्या समोरच आहे. हाच तो
दुष्ट हामान आमचा शत्रू."

तेव्हा राजा आणि राणीसमोर हामान भयभीत झाला. 7राजाला अतिशय संताप आला. द्राक्षारस तसाच टाकून तो उठला आणि बाहेर राजबागेत गेला. पण हामान आपले प्राण वाचवण्याची याचना करत आत राणी एस्तेरजवळच थांबला. राजाने आपला वध करायचे ठरवले आहे याची कल्पना असल्यामुळे तो आपल्या प्राणांची भीक मागू लागला. 8बागेतून राजा मेजवानीच्या दालनात येत असतानाच, ज्या आसनावर एस्तेर बसली होती त्यावर हामानला पडताना राजाने पाहिले. तेव्हा संतापून राजा म्हणाला, “मी घरात असतानाच राणीवर जबरदस्ती करणार आहेस की काय?”

राजा असे म्हणाल्याबरोबर सेवक आत आले आणि त्यांनी हामानचे तोंड झाकले. 9हर्बोना नावाचा राजाचा खोजा म्हणाला, “हामानच्या घराजवळ पंचाहत्तर फूट उंचीचा वधस्तंभ उभारला आहे. मर्दखयला फाशी द्यायला त्याने तो उभारला होता. तुम्हाला ठार करायचा कट उघडकीला आणून ज्याने तुम्हाला मदत केली तोच हा मर्दखय.”

राजा म्हणाला, “हामानला त्या स्तंभावरच फाशी द्या.” 10तेव्हा मर्दखयसाठी उभारलेल्या स्तंभावर हामानला फाशी देण्यात आली. तेव्हा राजाचा क्रोध शमला.

## यहुदींच्या मदतीसाठी राजाचा आदेश

8 यहूद्यांचा शत्रू असलेल्या हामानच्या मालकीची सर्व मालमत्ता त्याच दिवशी राजा अहश्वेरोशने राणी एस्तेरला दिली. मर्दखयशी असलेले नाते एस्तेरने राजाला सांगितले. त्यानंतर मर्दखय राजाकडे आला. 2राजाला आपली मुद्रा हामानकडून परत मिळाली होती. ती आपल्या बोटातून काढून राजाने मर्दखयला दिली. मग एस्तेरने मर्दखयला हामानच्या मालमत्तेचा प्रमुख नेमले.

3एस्तेर मग राजाशी पुन्हा बोलली. त्याच्या पायाशी स्वत:ला झोकून देऊन ती रडू लागली. अगागी हामानने आखलेली दुष्ट योजना राजाने रद्द करावी म्हणून त्याची विनवणी करु लागली. यहुद्यांना अपाय करण्याचा बेत हामानने आखला होता.

4मग राजाने आपला सोन्याचा राजदंड एस्तेरपुढे केला. एस्तेर उठली आणि राजापुढे उभी राहिली. 5मग ती म्हणाली, “राजा, तुला मी आवडत असेन आणि तुझ्या मनास येत असेल तर कृपया माझ्यासाठी एवढे कर. तुला ही कल्पना चांगली वाटत असेल तर कृपया तू असे कर. तुझी माझ्यावर मर्जी असल्यास हामानने पाठवलेला आदेश रद्द करणारा आदेश लिही. राजाच्या अंमलाखाली असलेल्या सर्व प्रांतांतील यहुद्यांच्या संहाराचा कट अगागी हामानने केला होता. आणि तो अंमलात आणण्यासाठी त्याने तशा आज्ञा पाठवल्या होत्या. 6माझ्या लोकांवर ही भयंकर आपत्ती आलेली मला पाहवणार नाही. माझ्या लोकांची हत्या माझ्याने पाहवणार नाही.”

7राजा अहश्वेरोशने राणी एस्तेर आणि मर्दखय यांना उत्तर दिले. राजा त्यांना म्हणाला, “हामान यहुद्यांविरुध्द होता म्हणून त्याची मालमत्ता मी एस्तेरला दिली. आणि माझ्या शिपायांनी त्याला वधस्तंभावर फाशी दिले आहे. 8आता राजाच्या अधिकारात दुसरा आदेश लिहा. तुम्हाला सर्वात उत्तम वाटेल अशा पध्दतीने यहुद्यांना साहाय्यकारी होईल असा तो असू द्या. मग राजाच्या विशेष मुद्रेने त्या हुकामावर शिक्का उठवा. राजाच्या अधिकारात लिहिलेले आणि राजमुद्रेने मुद्रित केलेले राज्यकारभार विषयक पत्र कोणालाही रद्द करता येत नाही.”

9राजाच्या लेखकांना ताबडतोब बोलवण्यात आले. तिसऱ्या म्हणजे शिवान महिन्याच्या तेविसाव्या दिवशी हे झाले. सर्व यहुदी आणि हिंन्दूस्तानपासून कूशपर्यंतच्या एकशेसत्तावीस प्रांतांमधील अधिपती, अधिकारी आणि सरदार यांना उद्देशून मर्दखयने दिलेले सर्व आदेश त्या लेखकांनी लिहून काढले. प्रत्येक प्रांताच्या भाषेत ते लिहिण्यात आले. प्रत्येक भाषिक गटाच्या भाषेत त्यांचा अनुवाद करण्यात आला. यहुद्यांच्या भाषेत आणि त्यांच्या लिपीत ते आदेश लिहिले गेले. 10मर्दखयने राजा अहश्वेरोशच्या नावाने आदेश काढले. मग ते राजाच्या मुद्रेने मुद्रांकित केले. आणि जासूदांकरवी घोड्यावरुन पाठवले. खास राजासाठी जोपासलेल्या वेगवान घोड्यांवरुन हे जासूद गेले.

11त्या पत्रांमधील राजाचे आदेश असे होते:

> प्रत्येक नगरातील यहुद्यांना स्वसंरक्षणासाठी एकत्र जमण्याचा अधिकार आहे. कोणत्याही प्रांतातील कोणतेही सैन्य त्यांच्यावर आणि त्यांच्या बायकामुलांवर चालून आले तर त्या सैन्याला ठार करण्याचा, त्याला पुरते नेस्तनाबूत करण्याचा हक्क त्यांना आहे. आपल्या शत्रूची मालमत्ता ताब्यात घ्यायचा, तिची नासधूस करायचा यहुद्यांना अधिकार आहे.

12अदारच्या म्हणजे बाराव्या महिन्यातल्या तेराव्या दिवशी यहुद्यांवर कारवाई करायची असे ठरले होते. त्यामुळे यहुद्यांना राजा अहश्वेरोशच्या सर्व प्रांतांत असा प्रतिकार करायची मुभा होती. 13राजाच्या आज्ञापत्राची प्रत पाठवायची होती. हे आज्ञापत्र म्हणजे कायदाच होता. प्रत्येक प्रांतात तो कायदा लागू होता. राजाच्या साम्राज्यातील सर्व प्रदेशांमध्ये तो जाहीर केला गेला. यहूद्यांनी या विशिष्ट दिवशी तयार राहावे, त्यांना शत्रूला शह देता यावा म्हणून हा आदेश पाठवला गेला. 14राजाच्या घोड्यांवर स्वार होऊन जासूद तातडीने निघाले. राजानेच त्यांना वेळ न गमावता जायला लावले. हाच आदेश शूशन राजधानीतही दिला गेला.

15मर्दखय राजाकडून निघाला. त्याने राजाकडचा विशेष पोषाख घातला होता. त्याचे कपडे निळ्या आणि पांढऱ्या

रंगाचे होते. मोठा सोन्याचा मुकुट त्याने घातला होता. तलम सणाचा जांभळा झगा त्याने वर चढवला होता. शूशनमध्ये आनंदोत्सव साजरा करण्यात आला. लोक अतिशय आनंदात होते. 16यहूद्यांच्या दृष्टीने ती पर्वणी होती. त्यामुळे त्यादिवशी जल्लोषाचे वातावरण होते.

17ज्या ज्या प्रांतात आणि नगरात राजाची आज्ञा पोचे तिथे तिथे यहुद्यांमध्ये आनंद आणि उल्हास पसरे त्यांनी भोजनसमारंभ केले. इतरांमधले बरेच लोकही यहूदी बनले. कारण त्यांना यहूद्यांची भीती वाटू लागली.

## यहूद्यांचा विजय

9 बाराव्या (अदार) महिन्याच्या तेराव्या दिवशी लोकांना राजाच्या आज्ञेचे पालन करायचे होते. यहुद्यांच्या शत्रूंनी त्यादिवशी यहुद्यांचा पाडाव करण्याचे योजले होते. पण आता परिस्थिती बदलली होती. जे यहुद्यांचा द्वेष करत होते त्या शत्रूंपेक्षा यहुदी आता वरचढ झाले होते. 2आपल्याला नेस्तनाबूत करु पाहणाऱ्या लोकांचा जोरदार प्रतिकार करता यावा म्हणून राजा अहश्वेरोशच्या राज्यातील सर्व ठिकाणचे यहुदी एकत्र आले. त्यामुळे त्यांच्याविरुध्द जायची कोणामध्येच ताकद नव्हती. यहुद्यांना ते लोक घाबरले. 3शिवाय, सर्व प्रांतामधले अधिकारी, अधिपती, सरदार, आणि राजाचे कारभारी यांनी यहुद्यांना साहाय्य केले. कारण ते सगळे मर्दखयला घाबरत होते. 4मर्दखय राजवाड्यातील अतिमहत्वाची व्यक्ती झाला होता. त्याचे नांव राज्यातील सर्वापर्यंत पोचले होते आणि ते सगळे त्याचे महत्व जाणून होते. मर्दखयचे सामर्थ्य उत्तरोत्तर वाढत गेले.

5यहूद्यांनी आपल्या सर्व शत्रूंचा पाडाव केला. तलवार चालवून त्यांनी शत्रूला ठार केले व शत्रूंचा विध्वंस केला. आपला तिरस्कार करणाऱ्या शत्रूचा त्यांनी मन:पूत समाचार घेतला. 6शूशन या राजधानीच्या शहरात यहूद्यांनी पाचशेजणांचा वध करून धुव्वा उडवला. 7शिवाय त्यांनी पुढील लोकांना ठार केले. पर्शन्दाथा, दलफोन, अस्पाथा, 8पोराथा, अदल्या, अरीदाथा, 9पर्मशता, अरीसई, अरीदय, वैजाथा, 10हे हामानचे दहा पुत्र होते. हम्मदाथाचा मुलगा हामान यहुद्यांचा शत्रू होता. यहुद्यांनी या सर्वांना ठार केले खरे पण त्यांची मालमत्ता लुटली नाही.

11राजधानी शूशनमध्ये, त्या दिवशी किती जण मारले गेले ते राजाच्या कानावर आले. 12तेव्हा राजा एस्तेर राणीला म्हणाला, "हामानच्या दहा मुलांसकट यहुद्यांनी शूशनमध्ये 500 लोकांना मारले. आता राज्याच्या इतर प्रांतांत काय व्हावे अशी तुझी इच्छा आहे? मला सांग म्हणजे मी तसे करवून घेईन. माग म्हणजे मी तसे करीन."

13एस्तेर म्हणाली, "राजाची मर्जी असेल तर शूशनमध्ये यहुद्यांना आजच्यासारखेच उद्या करु दे. हामानच्या दहा मुलांचे देहही स्तंभावर टांगा."

14तेव्हा राजाने तशी आज्ञा दिली. शूशनमध्ये तोच कायदा दुसऱ्या दिवशीही चालू राहिला. हामानच्या दहा मुलांना टांगले गेले. 15अदार महिन्याच्या चौदाव्या दिवशी शूशनमधील यहुदी एकत्र जमले. त्यांनी शूशनमधल्या 300 जणांना जिवे मारले पण त्यांच्या संपत्तीची लूट केली नाही.

16त्याच वेळी इतर प्रांतांमधले यहुदीदेखील एकत्र जमले. आपल्या संरक्षणासाठी आपले सामर्थ्य वाढावे म्हणून ते जमले. मग त्यांनी आपल्या शत्रूचा काटा काढला. शत्रुपक्षांपैकी 75,000 जणांना त्यांनी ठार केले पण त्यांच्या मालमत्तेमधले काही घेतले नाही. 17अदार महिन्याच्या तेराव्या दिवशी हे घडले चौदाव्या दिवशी यहुद्यांनी विश्रांती घेतली. तो दिवस त्यांनी आनंदोत्सवात घालवला.

## पुरीमचा उत्सव

18शूशनमधील यहूदी अदार महिन्याच्या तेराव्या आणि चौदाव्या दिवशी एकत्र आले होते. मग पंधराव्या दिवशी त्यांनी आराम केला. पंधरावा दिवस हा त्यांचा आनंदोत्सवाचा होता. 19म्हणून गावोगावी आणि खेडोपाडी राहणारे यहुदी अदारच्या चतुर्दशीला पुरीम साजरा करतात. त्यांचा सण चतुर्दशीला असतो. त्या दिवशी ते मेजवान्या देतात आणि भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात.

20मर्दखयने जे जे झाले ते सगळे लिहून काढले. मग त्याने राजा अहश्वेरोशच्या प्रांतातील जवळदूरच्या सर्व प्रांतातील यहुद्यांना पत्रे पाठवली. 21दरवर्षी अदार महिन्याच्या चौदाव्या आणि पंधराव्या दिवशी यहुद्यांना पुरीम साजरा करायला सांगायला त्याने ती पत्रे लिहिली. 22या दिवशी यहुद्यांनी आपल्या शत्रूचा काटा काढला म्हणून या दिवशी आनंदोत्सव साजरा करावा. या महिन्यात त्यांच्या शोकाचे रुपांतर आनंदात झाले म्हणून हा महिनाही उत्सवासारखा साजरा करावा. या महिन्यात त्यांच्या आक्रोशाचे रुपांतर आनंदोत्सवाच्या दिवसात झाले. मर्दखयाने सर्व यहुद्यांना पत्रे लिहिली. सणासुदीचे दिवस म्हणून त्याने हे दिवस त्यांना साजरे करायला सांगितले. या दिवशी त्यांनी मेजवान्या द्याव्यात, भेटवस्तूंची देवाणघेवाण करावी आणि गरिबांना भेटवस्तू द्याव्यात.

23मर्दखयने त्यांना लिहिल्याप्रमाणे करायला यहूदी तयार झाले. हा उत्सव पुढेही चालू ठेवायला त्यांनी मान्य केले.

24हम्मदाथाचा मुलगा अगागी हामान सर्व यहुद्यांचा शत्रू होता. त्याने यहुद्यांचा नायनाट करण्याचे कपटी कारस्थान रचले होते. यहुद्यांच्या संहारासाठी त्याने चिठ्ठी टाकून दिवस ठरवला होता. 25हामानने असे केले पण एस्तेर राजाशी बोलायला गेली. त्यामुळे त्याने नवीन आज्ञा दिल्या त्या आज्ञांमुळे हामानचे कारस्थान फसले एवढेच नव्हे तर हामान आणि त्याचे कुटुंब यांच्यावर त्यामुळे अरिष्ट कोसळले. त्यामुळे हामान आणि त्याचे पुत्र यांना फाशीच्या स्तंभांवर टांगण्यात आले.

[26–27]त्याकाळी चिठ्ठयांना “पुरीम” म्हणत, म्हणून या दिवसाला “पुरीम” नाव पडले. मर्दखयने पत्र लिहून यहुद्यांना हा दिवस साजरा करायला सांगितले. त्यामुळे यहुद्यांनी दरवर्षी हे दोन दिवस स णासारखे साजरे करायची प्रथा सुरु केली. आपल्यावर काय ओढवले होते त्याची आठवण राहावी म्हणून त्यांनी तसे ठरवले. यहुदी आणि त्यांच्याबरोबरचे लोक दरवर्षी हे दोन दिवस न चुकता साजरे करतात. [28]प्रत्येक पिढी आणि प्रत्येक कुटुंब या दिवसांची आठवण ठेवते. सर्व प्रांतांमध्ये आणि सर्व खेड्यापाड्यांमध्ये हा दिवस साजरा केला जातो. पुरीमचे हे दिवस साजरे करण्याची प्रथा यहूदी कधीही सोडणार नाहीत. यहूद्यांचे वंशजही हा सण नेहमी लक्षात ठेवतील.

[29]मग अबीहईलची मुलगी राणी एस्तेर आणि यहुदी मर्दखय यांनी पुरीमविषयी एक फर्मान लिहिले. हे दुसरे पत्र ही पूर्णपणे सत्य आहे हे सिध्द करण्यासाठी त्यांनी ते फर्मान राजाच्या पूर्ण अधिकारानिशी काढले. [30]राजा अहश्वेरोशच्या राज्यातील 127 प्रांतांमधील समस्त यहुद्यांना मर्दखयने पत्रे लिहिली. या सणाने शांतता निर्माण व्हावी आणि लोकांमध्ये परस्पर विश्वास असावा हा सणाचा उद्देश असल्याचे मर्दखयने लोकांना सांगितले. [31]पुरीम साजरा करायला लोकांना सांगण्यासाठी मर्दखयने ही पत्रे लिहिली. आणि हा नवीन सण केव्हा साजरा करायचा हे ही त्याने सांगितले. यहुदी मर्दखय आणि राणी एस्तेर यांनी यहुद्यांसाठी आदेश पाठवले होते. यहुद्यांमध्ये आणि त्यांच्या वंशजामध्ये हा दोन दिवसांचा सण पक्क ा रुजावा म्हणून त्या दोघांनी ही कृती केली. इतर सणांच्या दिवशी जसे ते उपवास करून आणि शोक करून तो सण आठवणीने पाळतात तसा हा सण त्यांनी इथून पुढे पाळावा. [32]पुरीमचे नियम एस्तेरच्या पत्राने मुक्रर झाले. आणि या गोष्टींची लेखी नोंद पुस्तकात झाली.

## मर्दखयचा सन्मान

10 राजा अहश्वेरोशने लोकांवर कर बसवले. राज्यातील तसेच समुद्रकिनाऱ्याकडच्या दुरवरच्या नगरातील लोकांनाही कर भरावे लागले. [2]आणि अहश्वेरोशने जे पराक्रम केले ते पारस आणि मेदय राजांच्या इतिहासाच्या पुस्तकात लिहिले आहेत. मर्दखयने केलेल्या इतर गोष्टीही या इतिहासग्रंथांमध्ये लिहिलेल्या आहेत. राजाने मर्दखयला महत्पदावर नेले. [3]राजा अहश्वेरोशच्या खालोखाल यहुदी मर्दखयचे स्थान होते. त्याचे यहुदी बांधव त्याला फार मान देत. कारण लोकांच्या भल्यासाठी तो खूप मेहनत घेई. मर्दखयमुळे सर्व यहुद्यांना शांतता लाभली.

# ईयोब

## धार्मिक माणूस ईयोब

1 ऊर देशात ईयोब नावाचा एक माणूस राहात होता.
तो फार चांगला व श्रध्दाळू माणूस होता. ईयोब देवाची
भक्ती करीत असे. ईयोब वाईट गोष्टीपासून दूर राहात
असे. 2ईयोबला सात मुले आणि तीन मुली होत्या. 3ईयोब
जवळ 7000 मेंढ्या, 3000 उंट, 1000 बैल आणि 500
गाढवी होत्या. तसेच खूप नोकरही होते. पूर्वेकडच्या
देशांतील तो सर्वात श्रीमंत माणूस होता.

4ईयोबची मुले आळीपाळीने आपापल्या घरांत भोजन
समारंभ करीत असत आणि आपल्या बहिणींनाही बोलवीत
असत. 5मुलांच्या भोजन समारंभानंतरच्या सकाळी ईयोब
सर्वांत आधी उठून प्रत्येक मुलासाठी होमार्पणे करीत
असे. तो म्हणे. "कदाचित् भोजन समारंभाच्यावेळी माझ्या
मुलांनी निष्काळजीपणाने पाप केले असेल." आपली मुलं
देवाची उपासना करायला योग्य व्हावीत म्हणून ईयोब
असे करीत असे.

6नंतर एके दिवशी देवपुत्र (देवदूत) परमेश्वराला
भेटायला आले. त्यांच्याबरोबर सैतानही होता. 7परमेश्वराने
सैतानाला विचारले, "तू कोठे होतास?"

सैतानाने उत्तर दिले, "मी पृथ्वीवर इकडे तिकडे हिंडत
फिरत होतो."

8मग परमेश्वर सैतानाला म्हणाला, "तू माझा सेवक,
ईयोबला पाहिलेस का? पृथ्वीवर त्याच्यासारखा कुणीही
नाही. तो खरोखरच फार चांगला सात्विक माणूस आहे.
तो देवाची भक्ती करतो. तो वाईट गोष्टींपासून दूर राहातो."

9सैतानाने उत्तर दिले, "होय, पण त्याच्याजवळ देवाची
भक्ती करण्यामागे सबळ कारण आहे. 10तू नेहमी त्याचे,
त्याच्या कुटुंबाचे व त्याच्या मालमत्तेचे रक्षण करतोस. तो
जे जे काही करतो त्यांत तू त्याला यशस्वी करतोस. तू
त्याला आशीर्वाद दिला आहेस. तो इतका श्रीमंत आहे की
सर्व देशभर त्याचे पशुधन पसरलेले आहे. 11पण जर तू
त्याच्या जवळ जे काही आहे त्या सगळ्यावर आघात
केलास तर तो तुझ्या तोंडावर तुझी निंदा करील हे मी
खात्रीपूर्वक सांगतो."

12नंतर परमेश्वर सैतानाला म्हणाला. "बरं आहे, तू
त्याच्याजवळ असलेल्या वस्तूंचे काहीही करु शकतोस.
पण तू त्याच्या अंगाला मात्र हात लावायचा नाहीस." मग
सैतान परमेश्वरापुढून निघून गेला.

## ईयोब सर्वकाही गमावतो

13एक दिवस ईयोबच्या सर्वांत मोठ्या मुलाकडे त्याची
इतर मुले व मुली जेवत होते व द्राक्षारस पीत होते.
14तेव्हा एक निरोप्या ईयोब कडे आला व म्हणाला, "बैल
नांगरीत होते आणि गाढवे जवळच चरत होती. 15परंतु
शबाई लोक आमच्यावर चाल करून आले आणि त्यांनी
तुझी गुरे पळवून नेली. त्यांनी माझ्याखेरीज इतर सर्व
नोकरांना मारून टाकले. तुला हे सांगण्यासाठी मी एकटा
स्वत:चा कसाबसा बचाव करून आलो आहे."

16पहिला निरोप्या हे सांगत असतानाच दुसरा निरोप्या
ईयोबकडे आला. तो म्हणाला, "आकाशातून वीज पडून
तुझ्या मेंढ्या व नोकर-चाकर जळून गेले. फक्त मीच
तेवढा बचावलो आहे व तुला सांगायला आलो आहे."

17दुसरा निरोप्या हे सांगत असतानाच आणखी एक
निरोप्या आला. तिसरा निरोप्या म्हणाला, "खास्द्यांनी तीन
टोळ्या आपल्यावर हल्ला करण्यासाठी पाठवल्या. त्यांनी
हल्ला करून उंट पळवून नेले आणि नोकरांना मारून
टाकले. फक्त मीच त्यातून सुटून तुला सांगायला आलो
आहे."

18तिसरा निरोप्या हे सर्व सांगत असताना आणखी एक
निरोप्या तिथे आला. चौथा निरोप्या म्हणाला, "तुझी मुले
व मुली तुझ्या मोठ्या मुलाकडे खात होते व द्राक्षारस पीत
होते. 19तेव्हा वाळवंटातून सोसाट्याचा वारा आला आणि
त्याने तुझे घर पडले. घर तुझ्या मुलामुलींवर पडल्यामुळे
ते मेले. केवळ मीच त्यातून बचावलो व तुला सांगायला
इथे आलो."

20ईयोबने जेव्हा हे ऐकले तेव्हा आपल्याला खुप दु:ख
झाले आहे हे दाखविण्यासाठी त्याने आपले कपडे फाडले,
डोक्यावरचे केस काढले व जमिनीवर पडून त्याने देवाची
आराधना सुरु केली. 21तो म्हणाला:

"मी जेव्हा या पृथ्वीवर आलो तेव्हा नागवाच होतो व
माझ्याजवळ काहीही नव्हते. मी जेव्हा मरेन व हे जग
सोडून जाईन तेव्हाही मी नागवाच असेन आणि माझ्याजवळ
काहीही नसेल. परमेश्वर देतो व तोच ते परतही घेतो.
परमेश्वराचे नाव धन्य असो.

22या रीतीने ईयोबच्या हातून पाप घडले नाही. देवाने
चूक केली आहे असे काही तो बोलला नाही.

## सैतान ईयोबला पुन्हा त्रास देतो

2 आणखी एके दिवशी देवपुत्र परमेश्वराला भेटायला
आले. त्यांच्याबरोबर सैतानही होता. सैतान
परमेश्वराला भेटायला आला होता. [2]परमेश्वर सैतानाला
म्हणाला, “तू कुठे गेला होतास?”
सैतान परमेश्वराला उत्तर देत म्हणाला, “मी पृथ्वीवरच
इकडे तिकडे भटकत होतो.”
[3]नंतर परमेश्वर सैतानाला म्हणाला, “माझा सेवक
ईयोब याच्याकडे तू लक्ष देत होतास का? सर्व पृथ्वीवर
त्याच्यासारखा कोणीही नाही. तो खरोखरच फार चांगला
व विश्वासू आहे. तो देवाची भक्ती करतो. तो वाईट
गोष्टींपासून दूर राहातो. तू मला निष्कारण त्याच्या जवळच्या
सर्व गोष्टींचा नाश करायला सांगितलेस आणि तरीही तो
विश्वासू राहिला आहे.”
[4]सैतानाने उत्तर दिले, “कातडीला कातडी* मनुष्य जिवंत
राहाण्यासाठी सर्व काही देऊ शकतो. [5]परंतु जर तू तुझ्या
शक्तीचा वापर त्याला शारीरिक इजा करण्यासाठी केलास
तर तो तुला तुझ्या तोंडावर शाप* देईल.”
[6]तेव्हा परमेश्वर सैतानाला म्हणाला, “ठीक आहे. तो
आता तुझ्या हाती आहे. मात्र त्याला मारण्याची परवानगी
मी तुला देत नाही.”
[7]मग सैतान परमेश्वराकडून निघाला. त्याने ईयोबाला
ठणकणारी गळवे दिली. ईयोबच्या सर्वांगावर तळव्यापासून
डोक्यापर्यंत गळवे होती. [8]म्हणून ईयोब कचऱ्याच्या
ढीगाजवळ बसला. आपली गळवे खाजविण्यासाठी त्याने
खापराचा तुकडा वापरला. [9]ईयोबची बायको त्याला
म्हणाली, “तू अजूनही देवाशी निष्ठावान आहेस का? तू
देवाला शाप देऊन मरून का जात नाहीस?”
[10]ईयोबने बायकोला उत्तर दिले, “तू एखाद्या मूर्ख
बाईसारखी बोलत आहेस. देव जेव्हा आपल्याला चांगल्या
गोष्टी देतो तेव्हा आपण त्यांचा स्वीकार करतो. तसाच
आपण संकटांचाही स्वीकार तक्रार न करता केला
पाहिजे.” त्याच्या संकटकाळातसुध्दा ईयोबने पाप केले
नाही. तो देवाच्याविरुध्द बोलला नाही.

## ईयोबचे तीन मित्र त्याच्या भेटीसाठी येतात

[11]ईयोबचे तीन मित्र म्हणजे अलीफज तेमानी, बिल्दद
शूही आणि शोफर नामाथी या तिन्ही मित्रांनी ईयोबवर
आलेल्या संकटांविषयी ऐकले होते. ते आपली घरे सोडून
एका ठिकाणी भेटले. ईयोबला भेटून त्याला सहानुभूती
दाखवावी व त्याचे सांत्वन करावे याबद्दल त्यांचे एकमत
झाले. [12]परंतु बऱ्याच अंतरावरून जेव्हा त्यांनी ईयोबला
पाहिले तेव्हा तो ईयोबच आहे याची त्यांना खात्री वाटेना.
तो खूप वेगळा दिसत होता. त्यांनी मोठ्याने रडायला सुरुवात
केली. आपले दुःख प्रकट करण्यासाठी त्यांनी आपले
कपडे फाडले आणि धूळ आपल्या डोक्यावर उडवून घेतली.
[13]नंतर तिन्ही मित्र सात दिवस व सात रात्री ईयोबबरोबर
बसून राहिले. ईयोबशी कुणी एक शब्दही बोलले नाही
कारण ईयोब किती सहन करत आहे ते त्यांना दिसत
होते.

## इयोब आपल्या जन्मदिवसाला शाप देतो

3 नंतर ईयोबने आपले तोंड उघडले आणि आपल्या
जन्मदिवसाला शाप दिला. [2–3]तो म्हणाला,

“मी ज्या दिवशी जन्मलो तो दिवस कायमचा नष्ट
होवो. ज्या रात्री ‘तो मुलगा आहे’ असे म्हटले गेले ती रात्र
कधीच आली नसती तर बरे झाले असते असे मला
वाटते.
[4]तो दिवस काळाकुट्ट झाला असता, देवाला त्याचे
विस्मरण झाले असते, त्या दिवशी उजेड पडला नसता तर
फार बरे झाले असते.
[5]तो दिवस मृत्यूसारखा काळा होवो. ढगही त्या दिवशी
लपले असते आणि काळ्या ढगांनी प्रकाशाला घाबरवले
असते तर बरे झाले असते असे मला वाटते.
[6]अंधाराने त्या रात्रीला ठेवून घ्यावे. दिनदर्शिकेतून ती
रात्र नष्ट होवो. तिचा अंर्तभाव कुठल्याही महिन्यात होऊ
नये.
[7]त्या रात्रीतून काहीही निर्माण होऊ नये. आनंददायी
आवाज त्या रात्री ऐकू न येवोत.
[8]जादुगाराने शापवाणी उच्चारावी आणि माझ्या
जन्मदिवसाला शापावे. ते लिव्याथानाला चेतविण्यास सदैव
तत्पर असतात.
[9]त्या दिवसाचे पहाटेचे तारे काळे होवोत. त्या रात्रीला
पहाटेच्या प्रकाशाची वाट बघू दे पण तो प्रकाश कधीही न
येवो. सूर्याचे पहिले किरण तिला कधीही न दिसोत.
[10]का? कारण त्या रात्रीने माझ्या जन्माला अटकाव
केला नाही. ही संकटे बघण्यापासून तिने मला परावृत
केले नाही.
[11]मी जन्माला आलो तेव्हाच का मरून गेलो नाही? मी
जन्मत:च का मेलो नाही?
[12]माझ्या आईने मला आपल्या मांडीवर का घेतले?
तिने मला स्तनपान का दिले?
[13]मी जर जन्मत:च मेलो असतो तर आता मी अगदी
शांत असतो. पूर्वी होऊन गेलेल्या राजेलोकांच्यात आणि
विद्वानांच्यामध्ये मी झोपी गेलो असतो आणि विश्रांती घेतली
असती तर किती बरे झाले असते.
[14]त्या लोकांनी आपल्यासाठी प्रासाद आणि शहरे बांधली
परंतु आता ती ओसाड आणि उध्वस्त झाली आहेत.

---

**कातडीला कातडी** शारीरिक वेदना टाळण्यासाठी माणूस काहीही करायला तयार होतो.

**शाप** दुसऱ्याचे वाईट चिंतणे, त्याचे वाईट होवो असे बोलून दाखविणे.

15 ज्या राजांनी आपली थडगी वा घरे सोन्या रुप्यांनी भरली त्यांच्या बरोबरच माझेही दफन झाले असते तर बरे झाले असते.

16 मी जन्मत:च मेलेले आणि जमिनीत पुरले गेलेले मूल का झालो नाही? दिवसाच्या प्रकाशाचा किरणही न पाहिलेले मूल मी असतो तर बरे झाले असते.

17 वाईट लोक थडग्यात गेल्यानंतरच त्रास देण्याचे थांबवितात. आणि जे लोक दमलेले असतात त्यांना थडग्यात विश्रांती मिळते.

18 थडग्यात कैद्यांनाही विसावा मिळतो. तेथे त्यांना रक्षकांचे ओरडणे ऐकू येत नाही.

19 थडग्यात, स्मशानात अनेक प्रकारचे लोक असतात, लहान थोर सर्व तेथे असतात, गुलामांचीही तेथे आपल्या मालकापासून सुटका होते.

20 "दु:खी कष्टी लोकांनी का जगत राहायचे? ज्याचा आत्मा कटू आहे अशाला जीवन का द्यायचे?

21 ज्याला मरायचे आहे त्याला मरण येत नाही, दु:खी माणूस गुप्त खजिन्यापेक्षा मृत्यूच्या शोधात असतो.

22 ते लोक थडगे दिसल्यावर अधिक सुखी होतील. आपली कबर मिळाली की आनंदी होतील.

23 परंतु देव त्यांचे भविष्य नेहमी गुप्त ठेवतो आणि त्यांच्या भोवती संरक्षक भिंत उभारतो.

24 जेव्हा खायची प्यायची वेळ होते तेव्हा मी दु:खाचा नि:श्वास टाकतो सुखाचा नाही! माझ्या तक्रारी, माझे गाऱ्हाणे पाण्यासारखे बाहेर ओतले जाते.

25 काहीतरी भयानक घडणार असल्याची मला सतत धास्ती वाटत होती. आणि तेच घडले. जे भयानक घडणार आहे अशी भीती वाटत होती तेच माझ्या बाबतीत घडले.

26 मी शांत होऊ शकत नाही. मी स्वस्थ राहू शकत नाही. मी विसावा घेऊ शकत नाही. मी अतिशय अस्वस्थ आहे.

## अलीफज म्हणतो:

4 1–2 तेमानच्या अलिफाजाने उत्तर दिले:
"मी काहीतरी बोललेच पाहिजे. मी जर काही म्हटले तर तू अस्वस्थ होशील का?"

3 ईयोब, तू खूप लोकांना शिकवलं आहेस. अशक्त हातांना तू शक्ती दिली आहेस.

4 खाली पडणाऱ्या लोकांना तू तुझ्या शब्दांनी सावरले आहेस. ज्यांच्यात स्वत:हून उभे राहण्याचे बळ नव्हते त्यांना तू सबळ केले आहेस.

5 पण आता तुझ्यावर संकटे आली असताना तू खचला आहेस. संकटे कोसळल्यावर तू कष्टी झाला आहेस.

6 तू देवाची भक्ती करतोस. तुझा त्याच्यावर विश्वास आहे. तू चांगला माणूस आहेस आणि तीच तुझी आशा असू दे.

7 "ईयोब, तू याचा विचार कर. निष्पाप माणसाचा कधी नाश केला गेला नाही. चांगल्या लोकांचा कधीच नि:पात होत नाही.

8 मला काही अन्यायी आणि आयुष्य कष्टी करणारे लोक माहित आहेत, पण अशा लोकांना नेहमी शासन होते.

9 असे लोक देवाच्या शिक्षेमुळे मारले जातात. देवाचा क्रोध त्यांना नष्ट करतो.

10 वाईट लोक सिंहासारखी गर्जना करतात आणि गुरगुर करतात. परंतु देव त्यांना मुके करतो आणि त्यांचे दात पाडतो.

11 हे वाईट लोक ठार मारण्यासाठी ज्यांना कोणी प्राणी मिळत नाही अशा सिंहाप्रमाणे असतात. ते मरतात आणि त्यांची मुले इतस्तत: भटकत राहातात.

12 "माझ्याकडे गुप्तपणे एक निरोप आला आणि माझ्या कानी त्याची कुजबुज पडली.

13 त्यामुळे एखाद्या भयंकर स्वप्नाने झोप चाळवावी तशी माझी झोप चाळवली गेली.

14 मी घाबरलो. माझा थरकाप झाला. माझी सगळी हाडे थरथर कापू लागली.

15 एक आत्मा अगदी माझ्या चेहऱ्याजवळून गेला आणि माझ्या शरीरावरचे सगळे केस उभे राहिले.

16 तो आत्मा निश्चल उभा राहिला पण ते काय होते ते मला दिसू शकले नाही. माझ्या डोळ्यांसमोर एक आकार होता आणि सर्वत्र शांतता होती. आणि नंतर मला एक हलका आवाज ऐकू आला:

17 'देवापेक्षा माणूस जास्त बरोबर असू शकत नाही. माणूस त्याच्या निर्मात्यापेक्षा अधिक पवित्र असू शकत नाही.

18 हे बघा, देव त्याच्या स्वर्गातील दूतांवर देखील विश्वास टाकू शकत नाही. त्याला स्वत:च्या दूतांमध्ये सुध्दा काही दोष आढळतात.

19 तेव्हा माणसे नक्कीच वाईट आहेत. ते मातीच्या घरात राहातात (म्हणजे त्यांचे शरीर नाशवंत आहे) आणि या मातीच्या घरांचा पाया मातीतच असतो. ते पतंगापेक्षाही (किड्यापेक्षाही) अधिक सहजतेने चिरडले जातात.

20 माणसे सकाळपासून संध्याकाळपर्यंत मरत असतात आणि ते कोणाच्या लक्षातही येत नाही. ते मरतात आणि कधीच परत न येण्यासाठी निघून जातात.

21 त्यांच्या तंबूच्या दोऱ्या वर खेचल्या जातात* आणि ते शहाणपणा न मिळवताच मरतात.'

5 "ईयोब, हवे तर तू कुणाला हाक मार. पण तुला कुणीही ओ देणार नाही. देवदूतांपैकी कुणाकडेही तू वळू शकत नाहीस.

---

**त्यांच्या ... जातात** करण्यासाठी हे प्रतीक वापरलेले तंबूच्या दोऱ्यांप्रमाणे त्यांच्या आयुष्याच्या दोऱ्या तोडल्या जातात.

2मुर्खाचा अनावर राग त्याला मारुन टाकतो. मूर्खाचा संतापच त्याचा घात करतो.

3अगदी वैभवात असेल असे ज्याबद्दल वाटले असा एक मूर्ख मला दिसला पण अचानक त्याचा घात झाला.*

4त्याच्या मुलांना कुणीही मदत करु शकले नाही. कोर्टात त्यांच्या बाजूने लढायला कुणीही नव्हते.

5भुकेल्या माणसांनी त्याची उभी पिके खाऊन टाकली. काट्याकुट्यात वाढलेले धान्यही त्यांनी सोडले नाही. लोभी माणसांनी सर्व काही नेले.

6वाईट दिवस धुळीतून येत नाहीत आणि संकटे मातीतून उगवत नाहीत.

7अग्नीतून ठिणग्या उडतात तशी संकटे झेलण्यासाठीच माणूस जन्माला येतो.

8पण ईयोब, मी जर तुझ्या जागी असतो तर देवाकडेच गेलो असतो. त्याला माझे गाऱ्हाणे सांगितले असते.

9देव ज्या आश्चर्यकारक गोष्टी करतो त्या माणसाला समजत नाहीत. त्याच्या अद्भुत गोष्टींची सीमा नाही.

10देव पृथ्वीवर पाऊस आणतो. शेतांना पाणी देतो.

11तो नम्र लोकांना उच्चस्थानी बसवतो आणि दु:खी जीवांना खूप आनंदी करतो.

12देव धूर्तांचे कार्य बंद पाडतो आणि त्यांना सफलता मिळू देत नाही.

13तो विद्वानांना त्यांच्याच कचाट्यात पकडतो त्यामुळे त्यांचे कार्य सिध्दीस जात नाही. (मसलत फुकट जाते) ते दिवसासुध्दा ठेचाळतात.

14ते धूर्त, भर दिवसासुध्दा अडखळतात. भर दुपारच्या वेळेला ते आंधळ्यासारखे त्यांचा रस्ता चाचपडत जातात.

15देव गरीबांना मरणापासून वाचवतो. त्यांची धूर्तांच्या कचाट्यातून मुक्तता करतो.

16म्हणूनच गरीबांना आशा वाटते. देव अन्यायी लोकांना नष्ट करतो.

17"देव ज्याला चांगल्या मार्गावर आणतो तो नशीबवान होय. म्हणून सर्वशक्तिमान देवाच्या शिक्षेबद्दल तक्रार करु नकोस.

18देव त्याने केलेल्या जखमांवर मलमपट्टी करतो. तो दुखापत करतो पण त्याचे हात ती बरी करतात.

19देव तुला सहा प्रकारच्या संकटांतून तारील. आणि सात संकटांत तुला काहीही अपाय होणार नाही.

20दुष्काळात देव तुला मृत्यूपासून वाचवेल आणि युध्दातही तो तुझे मृत्यूपासून रक्षण करेल.

21लोक त्यांच्या धारदार जिभेने तुझ्याबद्दल वाटेल ते बोलतील परंतु देव तुझे रक्षण करेल. जेव्हा काही वाईट घडेल तेव्हा तुला घाबरुन जाण्याची गरज नाही.

22तू विनाशात व दुष्काळात हसशील. तुला रानटी पशूंची भीती वाटणार नाही.

23तू देवाशी करार केला आहेस तेव्हा मैदानातले खडकही तुझ्या या करारात सहभागी आहेत. रानटी पशूही तुझ्याशी सलोखा करतील.

24तू शांती व समाधानात राहशील कारण तुझा तंबू सुरक्षीत आहे. तू तुझ्या संपत्तीची मोजदाद केलीस तर तुला त्यात काही कमतरता आढळणार नाही.

25तुला खूप मुले असतील. पृथ्वीवर जितकी गवताची पाती आहेत तितकी मुले तुला असतील.

26हंगामाच्या वेळेपर्यंत वाढणाऱ्या गव्हासारखा तू असशील. हो तू अगदी म्हातारा होईपर्यंत जगशील.

27"ईयोब, आम्ही या साऱ्यांचा अभ्यास केला आहे आणि ते सर्व खरे आहे. म्हणून तू आमचे ऐक. आणि त्यातून स्वत:साठी काही शिक."

## ईयोब अलीफजला उत्तर देतो

6 1–2नंतर ईयोबने उत्तर दिले:
"जर माझ्या दु:खाचे वजन करता आले आणि माझ्या कष्टांना वजनाच्या काट्यात तोलता आले तर तुम्ही माझ्या दु:खाची कल्पना करु शकाल.

3माझे दु:ख समुद्रातल्या वाळूपेक्षा जड आहे. म्हणूनच मी मूर्खासारखी बडबड करतो असे वाटते.

4त्या सर्वशक्तीमान देवाचे बाण माझ्यात आहेत. माझ्या आत्म्याला त्या बाणांच्या विषाची जाणीव होते. देवाची भयानक शस्त्रे माझ्या विरुध्द सज्ज आहेत.

5काहीही वाईट घडलेले नसते तेव्हा तुझे शब्द सहजपणे बोलता येतात. रानटी गाढवसुध्दा खायला गवत असले की कसली तक्रार करीत नाही. आणि गायसुध्दा तिला तिचा चारा मिळाला की मुकाट असते.

6अन्न मिठाशिवाय चांगले लागत नाही आणि अंड्यातल्या पांढऱ्या भागाला काही चव नसते.

7मी त्याला स्पर्शही करु शकत नाही. तसल्या बेचव अन्नाची मला शिसारी येते. तुमचे शब्दही मला आता तसेच वाटायला लागले आहेत.

8"मी जे मागेन ते मला मिळायला पाहिजे असे मला वाटते. मला जे हवे ते देवाने द्यायला पाहिजे असे मला वाटते.

9मला देवाच्या हातून मरण हवे. त्याने मला चिरडून टाकावे.

10आणि जेव्हा तो मला मारेल तेव्हा मला एका गोष्टीचे समाधान मिळेल, एका गोष्टीबद्दल मी आनंदी असेन, या सगळ्या दु:खातही मी पवित्र परमेश्वराच्या आज्ञेचा कधीही भंग केला नाही.

11"माझी शक्ती आता संपली आहे, त्यामुळे जगण्याची इच्छा माझ्यात नाही. माझे काय होणार आहे याची मला काहीच कल्पना नाही. त्यामुळे ज्याच्यासाठी धीर धरावा असे काही कारण उरलेले नाही.

---

**घात झाला** किंवा "त्याच्या घराला अवचित शाप मिळाला."

12 मी पाषाणासारखा शक्तीमान नाही. माझे शरीर पितळेचे बनलेले नाही.
13आता स्वत:ला सावरायची ताकद माझ्यात नाही. का? कारण यश माझ्यापासून हिरावून घेण्यात आले आहे.
14"एखाद्यावर संकट आले तर त्याच्या मित्रांनी त्याला दया दाखवावी आणि आपला मित्र सर्वशक्तीमान देवापासून दूर गेला तरी माणसाने मित्राशी निष्ठा ठेवली पाहिजे.
15पण मित्रांनो, तुम्ही मात्र निष्ठावान नाही. मी तुमच्यावर विसंबून राहू शकत नाही. जे कधी वाहतात, कधी वाहात नाहीत अशा ओढ्यासारखे तुम्ही आहात. ओढे जेव्हा हिमाने आणि
16वितळणाऱ्या बर्फाने गच्च होतात व दुथडी भरुन वाहू लागतात तसे तुम्ही आहात.
17जेव्हा हवामान उष्ण आणि कोरडे होते तेव्हा पाणी वाहात नाही आणि ओढे नाहीसे होतात.
18व्यापारी त्याची नागमोडी वळणे शोधत वाळवंटात जातात परंतु ते दिसेनासे झालेले असतात.
19तेमाच्या व्यापाऱ्यांनी पाणी शोधले. शबाच्या प्रवाशांनी आशेने त्याचा शोध घेतला.
20त्यांना पाणी सापडण्याची खात्री होती परंतु त्यांची निराशा झाली.
21आता तुम्ही त्या ओढ्यासारखे आहात. तुम्ही माझ्या संकटांना पाहून घाबरता.
22मी तुम्हाला मदत मागितली का? नाही. पण तुम्ही आपणहून मला उपदेश केला.
23'माझे शत्रूपासून रक्षण करा! क्रूर लोकांपासून मला वाचवा!' असे मी तुम्हाला म्हटले का?
24"आता तुम्ही मला शिकवा म्हणजे मी शांत होईन. माझी काय चूक झाली ते मला दाखवा.
25प्रामाणिक शब्द नेहमीच सामर्थ्यशाली असतात. परंतु तुमचे वादविवाद काहीच सिध्द करु शकत नाहीत.
26माझ्यावर टीका करण्याचा तुमचा उद्देश आहे का? तुम्ही आणखी कंटाळवाणे बोलणार आहात का?
27पोरक्या मुलांच्या वस्तू जिंकून घेण्यासाठी तुम्ही जुगार खेळायलाही तयार आहात. तुम्ही तुमच्या मित्रालाही विकून टाकाल.
28पण आता माझ्याकडे लक्षपूर्वक पाहा. मी तुमच्याशी खोटे बोलणार नाही.
29तुम्ही आता तुमचा विचार बदला. अन्यायी होऊ नका. पुन्हा विचार करा. मी काहीही चूक केलेली नाही.
30मी खोटे बोलत नाही आणि खऱ्या-खोट्यातला फरक मला कळतो."

7 ईयोब म्हणाला:
"मनुष्याला पृथ्वीवर खूप धडपड करावी लागते. त्याचे आयुष्य मजुराच्या आयुष्यासारखे असते.
2गुलामाप्रमाणे माणसालाही उन्हातान्हात काम केल्यानंतर थंडगार सावलीची गरज भासते. माणूस काम केल्यानंतर पगाराच्या दिवसाची वाट बघणाऱ्या मजुराप्रमाणे आहे.
3महिन्या मागून महिने निराशेत निघून गेले. माझ्या वाट्याला रात्रीमागून रात्र कष्टाचीच आली.
4मी झोपी जाण्याच्या वेळी विचार करतो उठण्यासाठी किती वेळ आहे याचा आणि रात्र संपतच नाही. सूर्य उगवेपर्यंत मी या कुशीवरुन त्या कुशीवर तळमळत असतो.
5माझे शरीर किड्यांनी आणि घाणींनी भरलेले आहे. माझी कातडी सोलवटलेली आणि वाहत्या जखमांनी भरलेली आहे.
6"माझे दिवस विणकऱ्याच्या मागापेक्षा भरभर जातात आणि माझे आयुष्य आशेशिवाय संपते.
7देवा, माझे आयुष्य म्हणजे केवळ श्वास आहे हे आठव. मी पुन्हा कधीही काही चांगले पाहणार नाही.
8आणि तुम्ही मला पुन्हा कधीही पाहणार नाही. तुम्ही मला शोधाल तेव्हा मी गेलेला असेन.
9ढग दिसेनासा होतो आणि निघून जातो. त्याचप्रमाणे माणूस मरतो आणि थडग्यात पुरला जातो. तो पुन्हा कधीही परत येत नाही.
10तो त्याच्या जुन्या घरात कधीही परत येणार नाही. त्याचे घर त्याला ओळखणार नाही.
11"तेव्हा मी गप्प बसणार नाही. मी बोलेन. माझ्या आत्म्याला क्लेश होत आहेत. माझा आत्मा अगदी कडू जहर झाला आहे म्हणून मी तक्रार करीन.
12देवा, तू माझ्यावर पाहारा का करीत आहेस? मी समुद्र आहे की त्यातला अक्राळ विक्राळ प्राणी?
13माझे अंथरुणच मला स्वस्थता देऊ शकेल. माझा बिछानाच मला विश्रांती आणि स्वास्थ्य देईल.
14पण देवा, मी जेव्हा स्वस्थ पडतो तेव्हा तू मला भयानक स्वप्नांनी घाबरवतोस. आणि तुझ्या दृष्टांतांनी मला भय वाटते.
15म्हणून जगण्यापेक्षा गुदमरुन मरणे मी पसंत करतो.
16मी माझ्या जीवनाचा तिरस्कार करतो. मी आशा सोडून दिली आहे. मला जगण्याची आसक्ती नाही. मला एकटा सोडून दे. माझ्या जीवनाला काही अर्थ नाही.
17देवा, माणूस तुला इतका महत्वाचा वाटतो? तू त्याला इतका आदर का दाखववावास? तू त्याची दखल तरी का घेतोस?
18तू त्याला रोज सकाळी का भेटतोस? आणि क्षणाक्षणाला त्याची परीक्षा का घेतोस?
19देवा, तू एक क्षणभरही माझ्यावरची तुझी नजर वळवीत नाहीस. तू मला एक क्षणही एकटा सोडीत नाहीस.
20देवा, तू लोकांवर नजर ठेवतोस. मी पाप केले असले तरी मी आता काय करु शकतो? तू मला तुझे लक्ष्य का बनवत आहेस? मी तुझ्यासाठी एक समस्या बनलो आहे का?

21तू मला माझ्या पापाबद्दल क्षमा का करून टाकीत नाहीस? मी लवकरच मरेन आणि माझ्या थडग्यात जाईन. तू नंतर माझा शोध घेशील पण मी गेलेला असेन."

## बिल्ददद ईयोबशी बोलतो:

8 नंतर शूहीच्या बिल्ददने उत्तर दिले,
2"तू किती वेळपर्यंत असा बोलत राहणार आहेस? तुझे शब्द सोसाट्याच्या वाऱ्यासारखे उडत आहेत.

3देव नेहमीच न्यायी असतो. तो सर्वशक्तिमान देव बरोबर असलेल्या गोष्टी कधीच बदलत नाही.

4तुझ्या मुलांनी देवाविरुध्द काही पाप केले असेल म्हणून त्यांना देवाने शिक्षा केली.

5परंतु ईयोब, आता तू त्याच्या कडे लक्ष दे आणि त्या सर्वशक्तिमान देवाची दयेसाठी आवर्जून प्रार्थना कर.

6तू जर चांगला आणि पवित्र असलास तर तुला मदत करण्यासाठी तो त्वरित येईल. तुझे कुटुंब तुला परत देईल.

7नंतर तुझ्याकडे सुरुवातीला होते त्यापेक्षा किती तरी अधिक असेल.

8"वृध्दांना त्यांचे पूर्वज काय काय शिकले ते विचार.

9आपण अगदी कालच जन्माला आलो आहोत असे आपल्याला वाटते. सर्व जाणून घेण्याच्या दृष्टीने आपण खूप लहान आहोत. छायेप्रमाणे आपले पृथ्वीतलावरचे दिवस खूप कमी आहेत.

10तुला कदाचित् वृध्द शिकवू शकतील. ते जे शिकले तेच तुलाही शिकवतील."

11बिल्दद म्हणाला: "लव्हाळी वाळवटांत उंच वाढू शकतात का? गवत (बोरु) पाण्याशिवाय उगवू शकेल का?

12नाही, पाणी जेव्हा आटून जाते, तेव्हा तेही सुकून जातात. आणि कापून त्यांचा उपयोग ही करून घेता येत नाही कारण ते खूपच लहान असतात.

13जे लोक देवाला विसरतात ते या गवतासारखे असतात. जो देवाला विसरतो त्याला आशा नसते.

14माथा टेकवण्यासाठी त्याच्या जवळ कुठेही जागा नसते. त्याची सुरक्षितता कोळ्याच्या जाळ्यासारखी असते.

15तो जर कोळ्याच्या जाळ्यावर टेकला तर ते मोडेल. त्याने त्याचा आधार घेतला तरी ते त्याला आधार देऊ शकणार नाही.

16मनुष्य खूप पाणी व सूर्यप्रकाश मिळालेल्या वनस्पतीसारखा आहे. तिच्या फांद्या सर्व बागेत पसरतात.

17तिची मुळे खडकांभोवती आवळली जातात आणि खडकांवरही उगवण्याचा प्रयत्न करतात.

18परंतु ती वनस्पती तिच्या जागेवरुन हलवली तर मरते आणि कुणालाही तिथे ती कधी होती हे कळत नाही.

19परंतु ती वनस्पती आनंदी असते कारण तिच्याच जागी दुसरी वनस्पतीवाढत असते.

20देव निरागस लोकांना सोडून देत नाही. तो वाईट माणसांना मदतही करत नाही.

21देव तुझे तोंड हास्याने भरून टाकेल आणि तुझे ओठ आनंदी चित्कारांनी!

22पण तुझे शत्रू मात्र लज्जेची वस्त्रे घालतील आणि दुष्ट माणसांची घरे नष्ट होतील."

## ईयोब बिल्ददला उत्तर देतो:

9 मग ईयोब उत्तरा दाखल म्हणाला:
2"तू जे काही म्हणत आहेस ते खरे असल्याची जाणीव मला आहे, परंतु देवापुढे माणूस कसा बरोबर ठरेल?

3मनुष्य देवाशी वाद घालू शकत नाही. देव हजार प्रश्न विचारु शकतो आणि माणसाला त्याच्या एकाही प्रश्नाचे उत्तर देता येत नाही.

4देव खूप विद्वान आहे आणि त्याची शक्ती अमर्याद आहे. देवाशी युध्द करु शकणारा माणूस जखमी झाल्याशिवाय कसा राहील?

5देव क्रोधित झाला की पर्वत हलवतो आणि लोकांना ते कळत देखील नाही.

6पृथ्वीचा थरकाप करण्यासाठी देव भूकंप पाठवतो. देव पृथ्वीचा पायाच हलवून टाकतो.

7देव सूर्याशी बोलू शकतो आणि त्याला उगवू देत नाही. ताऱ्यांनी चमकू नये म्हणून देव त्यांना लपवू शकतो.

8देवाने एकट्याने आकाश निर्माण केले. तो सागराच्या लाटांवर चालतो.

9देवाने सप्तर्षि, मृगशील व कृत्तिका यांना निर्माण केले. दक्षिणेकडचे आकाश* ओलांडणारे ग्रहही त्यानेच निर्माण केले.

10लोकांना न कळणाऱ्या आश्चर्यकारक गोष्टीही देवानेच निर्मिल्या. देवाच्या अद्भुत कृत्यांची सीमा नाही.

11देव जेव्हा माझ्या जवळून जातो तेव्हा मी त्याला बघू शकत नाही. तो जातो तरी त्याची महानता माझ्या लक्षात येत नाही.

12देवाने जरी काही घेतले तरी त्याला कोणीही अडवू शकत नाही. 'तू काय करीत आहेस?' असे त्याला कुणी विचारु शकत नाही.

13देव त्याचा क्रोध काबूत ठेवणार नाही. राहाबाचे मदतनीससुध्दा देवाला घाबरतात."

14म्हणून मी देवाशी वाद घालू शकत नाही. त्याच्याशी काय बोलावे ते मला सुचणार नाही.

---

**आकाश** शब्दा: "दक्षिणेकडच्या खोल्या," किंवा "तेमानच्या खोल्या" कदाचित हे ग्रह असू शकतील किंवा तारकापुंज किंवा राशींच्या बारा तारका. विषुववृत्ताच्या दक्षिणेला या तारका दक्षिण आकाश पार करताना दिसतात.

15मी निष्पाप आहे, पण मी त्याला उत्तर देऊ शकणार
नाही. मी केवळ माझ्या देवाची कृपादृष्टी मिळावी म्हणून
याचना करु शकतो.
16मी हाक मारल्यानंतर त्याने ओ दिली तरी तो माझे
ऐकतो यावर मी विश्वास ठेवणार नाही.
17देव मला चिरडण्यासाठी वादळे पाठवील. काहीही
कारण नसताना तो मला जखमा देईल.
18देव मला माझा श्वास परत घेऊ देणार नाही. तो
मला अधिक कष्ट देईल.
19मी देवाचा पराभव करु शकत नाही. तो सर्वशक्तिमान
आहे. मी त्याला न्यायालयात खेचू शकत नाही आणि
त्याला माझ्या बाबतीत न्यायी बनवू शकत नाही. देवाला
न्यायालयात नेण्यासाठी बळांचा वापर कोण करेल?
20मी निष्पाप असलो तरी, माझे बोलणेच मला अपराधी
बनवते. मी निष्पाप आहे, पण मी बोलल्यावर माझे तोंडच
मला अपराधी शाबीत करते.
21मी निष्पाप आहे, पण काय विचार करावा ते मला
कळत नाही. मी माझ्याच आयुष्याचा धिक्कार करतो.
22मी स्वत:शीच म्हणतो: 'सगळ्याच्याच बाबतीत हे घडते.
पापी लोकांसारखेच निष्पाप लोकही मरतात. देवच
सगळ्यांचे जीवन संपवतो.'
23काही तरी भयानक घडते आणि निष्पाप माणूस मरतो
तेव्हा देव त्याला फक्त हसतो का?
24एखादा वाईट माणूस सत्ता बळकावतो तेव्हा देव
पुढाऱ्यांना जे घडते आहे ते बघण्यापासून दूर ठेवतो का?
हे जर खरे असेल तर देव म्हणजे आहे तरी कोण?
25"माझे दिवस एखाद्या धावपटू पेक्षाही वेगाने धावतात.
माझे दिवस उडून जातात आणि त्यात सुखाचा लवलेशही
नसतो.
26भूर्जपत्रापासून बनवलेली जहाज जशी वेगात जाते
तसे माझे दिवस वेगात सरतात. गरुडाने आपल्या भक्ष्यावर
झडप घालावी त्या प्रमाणे माझे दिवस अतिशय वेगात
जातात.
27"मी जरी म्हणालो, 'की मी तक्रार करणार नाही,
माझे दु:ख विसरेन, मी चेहऱ्यावर हास्य आणेन.
28तरी त्यामुळे काहीही बदल होणार नाही. दु:खाचे
मला अजूनही भय वाटते.
29मी आधीच अपराधी ठरवला गेलो आहे. मग प्रयत्न
तरी कशाला करायचे? मी म्हणतो, 'विसरुन जा सारे!'
30मी माझे अंग बर्फाने धुतले आणि हात साबणाने
स्वच्छ केले.
31तरीही देव मला घाणीच्या खड्ड्यात ढकलेल. नंतर
माझे स्वत:चे कपडे देखील माझा तिरस्कार
करतील.
32देव माझ्यासारखा माणूस नाही. म्हणूनच मी त्याला
उत्तर देऊ शकत नाही. आम्ही न्यायालयात एकमेकांना
भेटू शकणार नाही.
33दोन्ही बाजू* ऐकून घेणारा कुणी मध्यस्थ असावा
असे मला वाटते. मध्यस्थ आम्हा दोघांना सारख्याच न्यायाने
तोलणारा असावा.
34देवाच्या शिक्षेची छडी दूर करणारा कुणी असावा
असे मला वाटते. त्यामुळे देव मला भीती घालू शकणार
नाही.
35नंतर देवाला न घाबरता मला जे काही म्हणायचे
आहे ते मी म्हणू शकेन. परंतु आता मात्र मी तसे करु
शकत नाही.

10 मी माझ्या स्वत:च्या आयुष्याचा तिरस्कार करतो
म्हणून मी मुक्तपणे तक्रार करीन. माझा आत्मा
कडू जहर झालेला आहे म्हणून मी आता बोलेन.
2मी देवाला म्हणेन, 'मला दोष देऊ नकोस. मी काय
चूक केली आहे ते मला सांग. माझ्याविरुध्द तुझ्या मनात
काय आहे?
3देवा, मला कष्ट देण्यात तुला सुख वाटते का? तुझ्या
निर्मिती विषयी तुलाच आस्था नसावी असे वाटते, की
वाईट लोकांनी ज्या मसलती केल्या त्या बाबतीत तू समाधानी
आहेस?
4देवा, तुला मानवी डोळे आहेत का? लोकांना दिसते ते
तुला दिसते का?
5तुझे आयुष्य आमच्या आयुष्याइतकेच लहान आहे
का? ते माणसाच्या आयुष्याइतकेच थोडे आहे का? नाही
तर मग त्या विषयी तू कसे जाणून घेतोस?
6तू माझ्या चुका शोधत असतोस, माझी पापं धुंडाळीत
असतोस.
7मी निष्पाप आहे हे तुला माहित आहे. परंतु तुझ्या
हातातून मला कुणीही वाचवू शकणार नाही.
8देवा, तुझ्या हातांनी माझी निर्मिती केली, माझ्या
शरीराला आकार दिला. परंतु आता तेच हात माझ्याभोवती
आवळले जात आहेत आणि माझा नाश करीत आहेत.
9देवा, जरा आठव तू मला मातीसारखे बनवलेस. आता
तूच परत माझी माती करणार आहेस का?
10तू मला दुधासारखे ओतलेस आता दही
घुसळणाऱ्याप्रमाणे तू मला घुसळून बदलणार आहेस का?
11हाडे आणि स्नायू यांनी तू मला एकत्र बांधलेस. नंतर
तू मला कातडीचे आणि मांसाचे कपडे चढविलेस.
12तू माझ्यात प्राण ओतलेस आणि माझ्याशी अंत्यत
दयाळू राहिलास. तू माझी काळजी वाहिलीस आणि माझ्या
जीवाचे रक्षण केलेस.
13परंतु तू हे तुझ्या हृदयात लपवून ठेवलेस तू तुझ्या
हृदयात याची गुप्तपणे आखणी केलीस हे मला माहित
आहे. तुझ्या मनात हेच होते याची जाणीव मला आहे.
14मी पाप करतो तेव्हा तू माझ्यावर नजर ठेवतोस
कारण त्यामुळेच माझ्या पापाबद्दल तू मला शिक्षा करशील

---

**दोन्ही बाजू** ऐकून घेणारा– शब्दाश: "मध्यस्थ" किंवा "पंच."

15पाप केल्यावर मी अपराधी असेन आणि माझ्या दृष्टीने ते फारच वाईट असेल. परंतु मी निष्पाप असूनही माथा उंच करु शकत नाही. मला खूप लाज वाटते आणि मी गोंधळून जातो.

16मी जेव्हा यशस्वी होतो आणि मला गर्व चढू लागतो तेव्हा शिकाऱ्याने सिंहाची शिकार करावी तशी तू माझी शिकार करतोस. तू तुझे सामर्थ्य पुन्हा माझ्याविरुध्द दाखवितोस.

17माझी चूक सिध्द करण्यासाठी तुझ्याकडे नेहमीच कुणीतरी असते. माझ्यावरचा तुझा राग अधिकच भडकेल. तू माझ्याविरुध्द सैन्याची आणखी कुमक पुन: पुन्हा आणशील.

18म्हणून देवा, तू मला जन्माला तरी का घातलेस? मी कुणाच्या दृष्टीस पडण्याआधीच मेलो असतो तर बरे झाले असते.

19मी जगलोच नसतो तर बरे झाले असते. माझ्या मातेच्या उदरातून मला सरळ थडग्यातच नेले असते तर किती चांगले झाले असते.

20–21 माझे आयुष्य जवळ जवळ संपले आहे, म्हणून तू मला एकटे सोड. जिथून कुणीही परत येत नाही तिथे म्हणजे अंधार आणि मृत्यूच्या जागी जाण्यापूर्वी जो काही थोडा वेळ माझ्यासाठी उरला आहे त्याचा मला उपभोग घेऊ दे.

22काळोखाच्या गर्भात, मृत्यूलोकात जाण्यासाठी जो थोडा वेळ अजून आहे तो मला सुखाने घालवू दे, जिथून कुणीही परत येत नाही अशा काळोखाने दाट छायेने आणि गोंधळाने भरलेल्या, ज्या जागी प्रकाशसुध्दा अंधकारमय आहे अशा जागी जाण्यापूर्वी मला सुखाने जगू दे.'"

## सोफर ईयोबशी बोलतो

11 नंतर नामाथीच्या सोफरने ईयोबला उत्तर दिले:तो म्हणाला,

2"शब्दांच्या या भाडिमाराला उत्तर द्यायलाच हवे. ह्या सगळ्या बोलण्याने ईयोब बरोबर ठरतो का? नाही.

3ईयोब, आमच्याजवळ तुला द्यायला उत्तर नाही असे तुला वाटते का? तू देवाला हसशील तेव्हा तुला कुणी ताकीद देणार नाही असे तुला वाटते का?

4ईयोब तू देवाला म्हणतोस, 'मी जे बोलतो ते बरोबर आहे आणि मी शुध्द पवित्र आहे हे तू बघू शकतोस.'

5ईयोब देवाने तुला उत्तर द्यावे आणि तू चुकतो आहेस हे तुला सांगावे असे मला वाटते.

6देव तुला ज्ञानाचे रहस्य सांगू शकेल. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात हे तो तुला सांगेल. तुला जेवढी शिक्षा करायला हवी तेवढी देव करत नाही हे तू समजून घे.

7"ईयोब, तू देवाला खरोखरीच समजू शकतोस असे तुला वाटते का? त्या सर्वशक्तिमान देवाला समजणे अशक्य आहे.

8त्याचं शहाणपण स्वर्गाच्या उंचीइतकं आहे, तू काय करु शकतोस? ते मृत्यूच्या ठिकाणापेक्षा शेओलपेक्षा खोल आहे. तू काय जाणू शकतोस?

9देव पृथ्वीपेक्षा मोठा आहे आणि सागरापेक्षा महान आहे.

10"देवाने जर तुला कैद करून न्यायालयात न्यायचे ठरवले, तर त्याला कोणीही अडवू शकत नाही.

11कवडीमोलाचा कोण आहे ते देवाला माहीत आहे. तो ज्या वाईट गोष्टी बघतो त्या त्याच्या लक्षात राहातात.

12रानटी गाढव माणसाला जन्म देऊ शकत नाही. आणि मूर्ख माणूस कधीही शहाणा होऊ शकणार नाही.

13"पण ईयोब फक्त देवाची सेवा करण्यासाठी तू तुझ्या मनाची तयारी केली पाहिजेस आणि तू तुझे हात त्याची उपासना करण्यासाठी त्याच्या दिशेने उचलले पाहिजेस.

14तुझ्या घरात असलेले पाप तू दूर ठेवले पाहिजेस. तुझ्या डेऱ्यात वाईट गोष्टींना थारा देऊ नकोस.

15तरच तू उजळ माथ्याने देवाकडे बघू शकशील. तू न भीता सर्व सामर्थ्यानिशी उभा राहू शकशील.

16नंतर तू तुझे दु:ख विसरशील. तुझे दु:ख निचरा झालेल्या पाण्यासारखे वाहून जाईल.

17भर दुपारच्या सूर्य प्रकाशापेक्षाही तुझे आयुष्य चमकदार होईल. आयुष्यातील अंधार सकाळच्या सूर्याप्रमाणे चमकेल.

18नंतर तुला सुरक्षित वाटेल. कारण तेव्हा तिथे आशा असेल. देव तुझी चिंता वाहील आणि तुला विश्रांती देईल.

19तू विश्रांती घेण्यासाठी आडवा होऊ शकशील आणि तुला कोणीही त्रास देणार नाही. तुझ्याकडे खूप लोक मदतीसाठी येतील.

20वाईट लोकही मदतीची अपेक्षा करतील. परंतु त्यांची संकटापासून सुटका नाही त्यांची आशा त्यांना मृत्यूकडे नेईल."

## ईयोब उत्तर देतो

12 नंतर ईयोबने उत्तर दिले:

2"तुम्हीच फक्त शहाणे आहात असे तुम्हाला वाटते याबद्दल माझी खात्री आहे. तुम्ही मेल्यानंतर तुमच्याबरोबरच शहाणपणाही जाईल असे तुम्हाला वाटते.

3माझेही मन तुमच्या मनाइतकेच चांगले आहे, मीही तुमच्या इतकाच हुशार आहे. कोणालाही दिसेल की सत्य आहे.

4"माझे मित्र मला आता हसत आहेत. ते म्हणतात,
'त्याने देवाची प्रार्थना केली आणि त्याला उत्तर मिळाले.
केवळ त्यामुळेच एवढ्या सगळ्या वाईट गोष्टी त्याच्या
बाबतीत घडल्या.' मी चांगला आहे मी निष्पाप आहे, पण
तरीही ते मला हसतात. 5ज्यांच्यावर संकटे येत नाहीत
तेच लोक संकटे कोसळलेल्या लोकांना हसतात. तेच
लोक खाली पडलेल्याला मारतात.

6परंतु चोरांचे तंबू समृध्द होतात. जे लोक देवाला क्रोध आणतात ते शांततेने राहातात. केवळ त्यांची स्वत:ची शक्तीच त्यांचा देव असतो.

7“तुम्ही प्राण्यांना विचारा, ते तुम्हाला शिकवतील किवा हवेत उडणाऱ्या पक्ष्यांना विचारा ते तुम्हाला सांगतील.

8किंवा पृथ्वीला विचारा, ती तुम्हाला शिकवेल. समुद्रातल्या माशांना त्यांचे शहाणपण सांगू द्या.

9या सर्व गोष्टी देवाने निर्माण केल्या आहेत हे सर्वांना ठाऊक आहे.

10जगणारा प्रत्येक प्राणी आणि श्वास घेणारा प्रत्येक माणूस देवाच्या अधिपत्याखाली असतो.

11ज्याप्रमाणे तोंडाला आवडत्या आणि नावडत्या अन्नातील फरक कळतो त्याप्रमाणे कानालाही शहाणपणाच्या आणि मूर्खपणाच्या शब्दातील फरक कळतो.

12‘वृध्द माणसे शहाणी असतात. दीर्घायुष्याने समजुतदारपणा येतो.’

13ईयोब आणखी म्हणाला,: “देवाच्या ठायी विद्वत्ता आणि सामर्थ्य आहेत. त्याच्याजवळ चांगला उपदेश आणि समजूतदारपणाही आहे.

14देव जेव्हा एखादी गोष्ट उध्वस्त करतो तेव्हा लोकांना ती परत उभारता येत नाही. देवाने जर एखाद्याला तुरुंगात टाकले तर लोक त्याची सुटका करु शकत नाहीत.

15देवाने जर पाऊस पडू दिला नाही तर पृथ्वी सुकून जाईल आणि जर त्याने पावसाला मोकळे सोडले तर सारी पृथ्वी जलमय होऊन जाईल.

16देव सर्वशक्तीमान आहे आणि तो नेहमीच जिंकतो. जिंकणारे आणि हरणारे सर्वच देवाचे आहेत.

17देव उपदेशकांना त्यांच्या विद्वत्तेपासून वंचित करतो आणि पुढाऱ्यांना मूर्खासारखे वागायला लावतो.

18राजांनी जरी लोकांना तुरुंगात डांबले तरी देव त्यांची सुटका करतो. आणि त्यांना सामर्थ्यवान बनवतो.

19तो याजकांचे सामर्थ्य काढून घेतो आणि मंदिरातील सेवकांना फारसे महत्व देत नाही.

20देव विश्वासू उपदेशकांना गप्प बसवतो आणि वृध्दांची विद्वत्ता काढून घेतो.

21तो पुढाऱ्यांचे महत्व कमी करतो आणि शासकांची सत्ता काढून घेतो.

22देवाला काळीकुट्ट रहस्ये माहित असतात. मृत्युलोकातल्या काळोखापेक्षा अधिक काळोख असलेल्या ठिकाणी तो प्रकाश पाठवतो.

23तो राष्ट्रांना महान आणि सामर्थ्यवान बनवतो आणि नंतर तो ते नष्ट करतो. तो देशांना मोठे होऊ देतो आणि नंतर त्यांतील लोकांना विखरवून टाकतो.

24देव नेत्यांना मूर्ख बनवतो. तो त्यांना वाळवंटात इकडे तिकडे मार्गहीन भटकायला लावतो.

25हे नेते अंधारात वाट शोधणाऱ्या माणसाप्रमाणे असतात. दारू प्यायलेल्या माणसाला जसे आपण कुठे जात आहोत ते कळत नाही, तसे ते असतात.”

13 ईयोब म्हणाला: “हे सर्व मी पूर्वी पाहिले आहे, तू जे म्हणालास ते सर्व मी आधीच ऐकले आहे. त्या सर्व गोष्टी मला समजतात. 2तुला जेवढे माहीत आहे तेवढेच मलाही माहीत आहे. मी तुझ्या इतकाच हुशार आहे. 3परंतु मला तुझ्याशी वाद घालायचा नाही. मला सर्वशक्तीमान देवाशी बोलायचे आहे. मला देवाबरोबर माझ्या संकटांविषयी बोलायचे आहे. 4तुम्ही तिघेजण खोटे बोलून तुमचे अज्ञान लपवीत आहात. ज्या वैद्याला कुणालाही बरे करता येत नाही अशा निरुपयोगी वैद्यासारखे तुम्ही आहात. 5तुम्ही गप्प बसावे अशी माझी इच्छा आहे. ती तुम्हाला करता येण्याजोगी सर्वात शहाणपणाची गोष्ट असेल.

6“आता माझ्या युक्तिवादाकडे लक्ष द्या मी काय म्हणतो ते ऐका.

7तुम्ही देवासाठी खोटे बोलाल का? तुमचे खोटे बोलणे देवाच्या इच्छेनुसार आहे असे तुम्हाला वाटते का?

8तुम्ही माझ्याविरुध्द देवाचा बचाव करीत आहात का? तुम्ही मुळीच न्यायाने वागत नाहीत तो देव आहे म्हणून तुम्ही त्याची बाजू घेत आहात.

9जर देवाने अगदी जवळून तुमची तपासणी केली तर, त्याला काही तरी चांगले आढळेल का? तुम्ही लोकांना जसे मूर्ख बनवू शकता तसेच देवालाही बनवू शकाल असे तुम्हाला वाटते का?

10तुम्ही जर एखादा माणूस महत्वाचा आहे म्हणून न्यायालयात त्याची बाजू घेतलीत तर देव तुमच्यावर टीका करेल हे तुम्हाला माहीत आहे.

11देवाचे मोठेपण तुम्हाला घाबरवते. तुम्ही त्याला भीता.

12तुमचे युक्तिवाद कुचकामाचे आहेत. तुमची उत्तरे कवडीमोलाची आहेत.

13“आता जरा गप्प बसा आणि मला बोलू द्या! माझे जे काही होईल ते मला मान्य आहे.

14मी मलाच संकटात लोटीन आणि माझ्याच हातात माझेच जीवन धरीन? *

15देवाने मला मारुन टाकले तरी मी देवावरच विश्वास ठेवीन. पण मी त्याच्या समोर माझा बचाव करीन.

16आणि देवाने जर मला जिवंत राहू दिले तर ते मी बोलण्याइतका धीट होतो म्हणूनच असेल. पापी माणूस देवाच्या डोळ्याला डोळा भिडवू शकणार नाही.

17मी काय म्हणतो ते लक्षपूर्वक ऐका. मला नीट सांगू द्या.

---

**मी … जीवन धरीन** या वाक्याचा अर्थ असा असू शकेल माणूस गप्प बसण्यासाठी स्वत:चीच जीभ चावतो आणि स्वत:च्या वेदनेबद्दल काहीच बोलत नाही.

[18]मी आता माझ्या बचावाला सिध्द झालो आहे. मी माझे मुद्दे काळजीपूर्वक मांडीन. मला माहीत आहे की मी बरोबर आहे हे मी दाखवून देईन.
[19]माझे चुकले आहे असे जर कुणी दाखवून दिले तर मी गप्प बसेन.
[20]"देवा, तू मला फक्त दोन गोष्टी दे, मग मी तुझ्यापासून लपणार नाही.
[21]मला शिक्षा देणे बंद कर आणि तुझ्या भयानक गोष्टींनी मला भयभीत करण्याचे थांबव.
[22]नंतर मला हाक मार. मी तुला ओ देईन किंवा मला बोलू दे आणि तू मला उत्तर दे.
[23]मी किती पापे केली आहेत? मी काय चुका केल्या आहेत? तू मला माझी पापे आणि माझ्या चुका दाखव.
[24]देवा, तू मला का चुकवीत आहेस? आणि मला शत्रूसारखे का वागवीत आहेस?
[25]तू मला घाबरवतो आाहेस का? मी वाऱ्यावर उडणारे एक पान मात्र आहे. तू गवताच्या एका काडीवर आक्रमण करीत आहेस.
[26]देवा, तू माझ्याबद्दल फार कटू बोलतोस. मी तरुणपणात जी पापे केली त्याबद्दल तू मला कष्ट भोगायला लावतो आहेस का?
[27]तू माझ्या पायात बेड्या घातल्या आहेस. माझ्या प्रत्येक पावलावर तू पाळत ठेवतोस, माझी प्रत्येक हालचाल तू टिपतोस.
[28]म्हणून मी कुजलेल्या लाकडासारखा, कसरीने खाल्लेल्या कापडासारखा क्षीण होत चाललो आहे"

14 ईयोब म्हणाला: "आपण सर्व मनुष्यप्राणी आहोत. आपले आयुष्य अगदी कमी आणि कष्टांनी भरलेले आहे. [2]माणसाचे आयुष्य फुलासारखे आहे. तो लवकर वाढतो आणि मरुन जातो. माणसाचे आयुष्य छायेसारखे आहे. ती थोडा वेळ असते आणि नंतर नाहीशी होते. [3]ते खरे आहे पण देवा, माझ्याकडे एका माणसाकडे तू लक्ष देशील का? आणि तू माझ्याबरोबर न्यायालयात येशील का? आपण दोघेही आपापली मते मांडू या का?

[4]"परंतु एखाद्या घाणेरड्या वस्तूचे स्वच्छ वस्तूशी काय साम्य असू शकते काहीच नाही.
[5]माणसाचे आयुष्य मर्यादित आहे देवा, माणसाने किती जगायचे ते तूच ठरवतोस. तूच त्याची मर्यादा निश्चित करतोस आणि ती कुणीही बदलू शकत नाही.
[6]देवा, म्हणून तू आमच्यावर नजर ठेवणे बंद कर. आम्हाला एकटे सोड. आमची वेळ संपेपर्यंत आमचे हे कष्टप्रद आयुष्य आम्हाला भोगू दे.
[7]"वृक्षाला तोडून टाकले तरी त्याच्याबाबतीत आशा असते. ते पुन्हा वाढू शकते त्याला नवीन फांद्या फुटतच राहतात.
[8]त्याची मुळे जरी जमिनीत जुनी झाली आणि त्याचे खोड जमिनीत मरुन गेले.
[9]तरी ते पाण्यामुळे पुन्हा जिवंत होते. आणि त्याला नवीन रोपासारख्या फांद्या फुटतात.
[10]परंतु माणूस जेव्हा मरतो तेव्हा तो संपतो. माणूस मरतो तेव्हा तो कायमचा जातो.
[11]नद्या सुकून जाईपर्यंत तुम्ही समुद्रातील पाणी घेऊ शकता. तरीही माणूस मरून जातो.
[12]माणूस मरतो तेव्हा तो झोपतो आणि पुन्हा कधीही उठत नाही. आकाश नाहीसे होईपर्यंत मेलेला माणूस उठणार नाही. मनुष्यप्राणी* त्या झोपेतून कधीच जागा होत नाही.
[13]"तू मला माझ्या थडग्यात लपवावेस असे मला वाटते. तुझा राग निवळेपर्यंत तू मला तिथे लपवावेस. नंतर तू तुझ्या सोयीने माझी आठवण करु शकतोस.
[14]मेलेला माणूस पुन्हा जिवंत होऊ शकतो का? मी माझी सुटका होईपर्यंत वाट बघत राहीन.
[15]देवा तू मला हाक मारशील आणि मी तुला उत्तर देईन.
मग जे तू मला निर्माण केलेस तो मी तुला महत्वाचा वाटेन.
[16]तू माझी प्रत्येक हालचाल निरखशील. पण माझ्या पापांची तुला आठवण होणार नाही.
[17]तू माझी पापे एखाद्या पिशवीत बांधून ठेवावीस असे मला वाटते. ती पिशवी मोहोरबंद कर आणि फेकून दे.
[18]"डोंगर पडतात आणि नष्ट होतात. मोठमोठे खडक फुटतात आणि त्यांच्या ठिकऱ्या होतात.
[19]खडकावरुन वाहणारे पाणी त्यांची झीज करते. पुरामुळे जमिनीवरची माती वाहून जाते. त्याचप्रमाणे देवा, तू माणसाची आशा नष्ट करतोस.
[20]तू त्याचा संपूर्ण पराभव करतोस आणि मग तू तेथून निघून जातोस. तू त्याला दु:खी करतोस आणि त्याला नेहमीसाठी मृत्यूलोकात पाठवून देतोस.
[21]त्यांच्या मुलांना मानसन्मान प्राप्त झाला तर ते त्याला कळत नाही. त्याच्या मुलांनी काही चुका केल्या तर त्या त्याला कधी दिसत नाहीत.
[22]त्या माणसाला फक्त त्याच्या स्वत:च्या शारीरिक दु:खाची जाणीव असते. आणि तो केवळ स्वत:साठीच रडतो."

## अलीफज ईयोबला उत्तर देतो

15 नंतर तेमानच्या अलीफजने ईयोबला उत्तर दिले:
[2]"ईयोब, जर तू खरोखरच शहाणा असशील तर तू पोकळ शब्दांनी उत्तर देणार नाहीस. शहाणा माणूस गरम हवेने इतका भरलेला नसतो.

---

**मनुष्यप्राणी** शब्दश: "स्त्रीपासून जन्मला आलेला."

3विद्वान निरुपयोगी शब्दांनी आणि निरर्थक बोलण्याने वाद घालत बसेल असे तुला वाटते का?

4ईयोब तुला जर तुझ्या मनाप्रमाणे वागू दिले तर कोणीही माणूस देवाला मान देणार नाही आणि त्याची प्रार्थना करणार नाही.

5तुझ्या बोलण्यावरुन तुझे पाप चांगले कळते. ईयोब तू हुशारीने बोलून तुझे पाप लपवायचा प्रयत्न करीत आहेस.

6तू चुकत आहेस हे सिध्द करण्याची मला आवश्यकता वाटत नाही. का? कारण तू तुझ्या तोंडाने जे बोलतोस ते तू चुकत असल्याचे सिध्द करतात. तुझे स्वत:चेच ओठ तुझ्याविरुध्द बोलतात.

7“ईयोब, जन्माला येणारा तू पहिलाच माणूस आहेस असे तुला वाटते का? टेकड्या निर्माण व्हायच्या आधीच तू जन्मलास का?

8तू देवाच्या गुप्त मसलती ऐकल्यास का? केवळ तूच एक शहाणा माणूस आहेस असे तुला वाटते का?

9ईयोब, तुझ्यापेक्षा आम्हाला जास्त माहिती आहे. तुला न कळणाऱ्या गोष्टी आम्हाला समजतात.

10केस पांढरे झालेले लोक आणि वृध्द आमच्याशी सहमत आहेत. होय, तुझ्या वडिलांपेक्षा वृध्द असलेले लोक आमच्या बाजूला आहेत.

11देव तुझे सांत्वन करतो पण ते तुला पुरेसे वाटत नाही. देवाचा निरोप आम्ही तुला अगदी हळुवारपणे दिला आहे.

12ईयोब, तू का समजून घेत नाहीस? तू सत्य का पाहात नाहीस?

13तू हे रागाचे शब्द उच्चारतोस तेव्हा तू देवाच्या विरुध्द जातोस.

14“मनुष्य कधीही निष्कलंक असू शकत नाही. मनुष्यप्राणी देवापेक्षा अधिक बरोबर असू शकत नाही.

15देव त्याच्या पवित्र दूतांवर विश्वास ठेवत नाही. देवाशी तुलना करता स्वर्गसुध्दा निर्मळ नाही.

16मनुष्यप्राणी सर्वात वाईट आहे, तो अशुध्द आणि कुजलेला आहे. तो वाईट गोष्टी पाण्यासारख्या पितो.

17“ईयोब, तू माझे ऐक मी तुला नीट सांगतो. मला जे माहीत आहे ते मी तुला सांगतो.

18विद्वानांनी ज्या गोष्टी मला सांगीतल्या, त्या मी तुला सांगतो. विद्वानांच्या पूर्वजांनी त्यांना या गोष्टी सांगीतल्या. त्यांनी माझ्यापासून कुठलीही गुप्त गोष्ट लपवून ठेवली नाही.

19ते त्यांच्या देशात एकटे राहात होते, तिथून दुसऱ्या देशांतील लोक जात नसत. त्यामुळे इतरांनी कुणी त्यांना काही विचित्र कल्पना सांगितल्या नाहीत.

20हे विद्वान लोक म्हणाले, “दुष्ट माणूस जीवनभर यातना भोगतो. क्रूर माणूस मरण येईपर्यंत भीतीने कापत असतो. (क्रूर माणसाचे दिवस भरलेले असतात. तो त्या दिवसांत ही यातना भोगतो).

21त्याला प्रत्येक आवाजाची भीती वाटते. जेव्हा आपण सुरक्षित आहोत असे त्याला वाटते तेव्हा त्याचा शत्रू त्याच्यावर हल्ला करतो.

22दुष्ट माणूस निराश झालेला असतो. व त्याला अंधारातून सुटका होण्याची आशा नसते. त्याला मारण्यासाठी तलवार टपून बसलेली असते.

23तो इकडे तिकडे भटकत राहातो परंतु त्याचे शरीर गिधाडांचे अन्न असते. आपला मृत्यू अगदी जवळ आला आहे हे त्याला माहीत असते.

24त्याला काळजी आणि यातना भयभीत करतात. एखाद्या राजाप्रमाणे त्याला नष्ट करण्यासाठी त्या त्याच्यावर हल्ला करतात.

25का? कारण दुष्ट मनुष्य देवाची आज्ञा मानायला तयार नसतो. तो त्याच्या मुठी देवासमोर नाचवतो. तो सर्वशक्तिमान देवाचा पराभव करायचा प्रयत्न करतो.

26दुष्ट माणूस अतिशय हट्टी असतो. तो जाड आणि मजबूत ढालीने देवावर हल्ला करतो.

27“माणूस श्रीमंत आणि धष्टपुष्ट असू शकतो.

28पण त्याचे शहर धुळीला मिळेल. त्याच्या घराचा नाश होईल. त्याचे घर रिकामे होईल.

29दुष्ट माणूस फार दिवस श्रीमंत राहू शकत नाही. त्याची संपत्ती खूप दिवस टिकत नाही. त्याची पिके जास्त वाढत नाहीत.

30दुष्ट माणसाची काळोखापासून सुटका नसते. तो त्या झाडासारखा असतो ज्याची पाने रोगामुळे मरतात आणि वारा त्यांना दूर उडवून नेतो.

31निरुपयोगी गोष्टींवर विश्वास ठेवून दुष्ट माणसाने स्वत:चीच फसवणूक करून घेऊ नये, का? कारण त्याला त्यातून काहीही मिळणार नाही.

32आयुष्य संपायच्या आधीच दुष्ट माणूस म्हातारा आणि शुष्क झालेला असेल. तो पुन्हा कधीही हिरव्या न होणाऱ्या फांदीसारखा असेल.

33दुष्ट माणूस द्राक्ष न पिकता गळून गेलेल्या द्राक्षाच्या वेलीसारखा असेल. तो फूल गळून गेलेल्या जैतून झाडाप्रमाणे असेल.

34का? कारण ज्यांच्या जवळ देव नसतो त्यांच्याजवळ काहीही नसते. जे लोक पैशावर प्रेम करतात त्यांची घरे आगीत भस्मसात होतात.

35दुष्ट माणसे सतत दुष्टपणा करण्यासाठी आणि त्रास देण्यासाठी योजना आखत असतात. ते लोकांना फसविण्यासाठी योजना तयार करतात.”

## ईयोब अलीफजला उत्तर देतो

16 नंतर ईयोबने उत्तर दिले,
2“या सर्व गोष्टी मी पूर्वी ऐकल्या आहेत. तुम्ही तिघे जण मला त्रास देता, आराम नव्हे.

3तुमची लांबलचक भाषणे कधीही संपत नाहीत. तुम्ही
वाद घालणे का सुरु ठेवले आहे?
4जर तुमच्यावर माझ्यासारखे संकट आले असते, तर
जे आता तुम्ही म्हणत आहात तेच मीही म्हणू शकलो
असतो. मी तुमच्याविरुध्द शहाणपणाच्या गोष्टी सांगू शकलो
असतो आणि माझे डोके तुमच्यासमोर हलवू शकलो असतो.
5पण मी तुम्हाला धीर देऊ शकलो असतो आणि माझ्या
बोलण्याने तुमच्यात आशा निर्माण केली असती.
6"परंतु मी काहीही बोललो तरी माझ्या यातना कमी
होत नाहीत. पण मी बोललो नाही तर मला शांती लाभत
नाही.
7देवा, खरोखरच तू माझी शक्ती हिरावून घेतली आहेस.
तू माझ्या सर्व कुटुंबाचा नाश केला आहेस.
8तू मला खूप बारीक व अशक्त केले आहे म्हणून मी
अपराधी आहे असे लोकांना वाटते.
9"देव माझ्यावर हल्ला करतो. तो माझ्यावर रागावला
आहे आणि तो माझे शरीर छिन्न विछिन्न करतो. तो
माझ्याविरुध्द दात खातो, माझ्या शत्रूचे डोळे माझ्याकडे
तिरस्काराने बघतात.
10लोक माझ्या भोवती जमले आहेत. ते माझी थट्टा
करतात व तोंडावर मारतात.
11देवाने मला दुष्ट लोकांच्या स्वाधीन केले आहे. त्याने
क्रूर माणसांना मला त्रास द्यायची परवानगी दिली आहे.
12मी अगदी मजेत होतो. पण देवाने मला चिरडून टाकले.
हो त्याने माझी मान पकडली आणि माझे तुकडे तुकडे
केले. त्याने माझा निशाण्यासारखा उपयोग केला.
13त्याचे धनुर्धारी मला घेरतात. तो माझ्या मुत्रपिंडात
बाण सोडतो. तो दया दाखवीत नाही. तो माझे मूत्राशय
धरतीवर रिकामे करतो.
14देव माझ्यावर पुन्हा पुन्हा हल्ला करतो. युध्दातल्या
सैनिकाप्रमाणे तो माझ्यावर चाल करून येतो.
15"मी फार दु:खी आहे म्हणून मी दु:खाचे कपडे घालतो.
मी इथे धुळीत आणि राखेत बसतो आणि मला पराभूत
झाल्यासारखे वाटते.
16रडल्यामुळे माझा चेहरा लाल झाला आहे. माझ्या
डोळ्याभोवती काळी वर्तुळे आहेत.
17मी कुणाशीही दुष्टपणाने वागलो नाही. तरीही माझ्या
बाबतीत या वाईट गोष्टी घडल्या. माझ्या प्रार्थना नेहमी
बरोबर आणि शुध्द असतात.
18"हे धरतीमाते, माझ्यावर जे जुलूम झाले आहेत ते
लपवू नकोस. मी न्यायासाठी भीक मागतो आहे ते थांबवू
नकोस.
19स्वर्गात कदाचित् माझ्या बाजूचा कुणीतरी असेल.
कदाचित् मला पाठिंबा देणारा आणि माझा बचाव करणारा
कुणी तिथे असेल.
20माझा मित्र माझ्यासाठी बोलतो. पण माझे डोळे
देवासमोर अश्रू ढाळतात.
21जशी एखादी व्यक्ति आपल्या मित्रासाठी वादविवाद
करते तसा तो माझ्याविषयी देवाबरोबर बोलतो.
22"मी अगदी थोड्या वर्षातच पुन्हा कधीही परतून न
येणाऱ्या जागी जाणार आहे (मृत्युलोक).

17 माझा आत्मा भंगला आहे. मी आशा सोडून दिली
आहे. माझे आयुष्य जवळ जवळ संपले आहे
आणि थडगे माझी वाट पाहात आहे.
2लोक माझ्याभोवती उभे राहातात आणि मला हसतात.
ते मला चिडवतात. माझा अपमान करतात. तेव्हा मी
फक्त बघत राहतो.
3"देवा, तुझा मला खरोखरच पाठिंबा आहे हे मला
दाखव. दुसरे कुणीही मला पाठिंबा देणार नाही.
4"तू माझ्या मित्रांच्या मनाची कवाडे बंद करून टाकलीस
आणि आता त्यांना काही कळत नाही. कृपा करून तू
त्यांना विजयी होऊ देऊ नकोस.
5"लोक काय म्हणतात ते तुला माहीत आहे 'एखादा
माणूस मित्राला* मदत करण्यासाठी स्वत:च्या मुलांकडे
दुर्लक्ष करतो' परंतु माझे मित्र मात्र माझ्या विरुध्द गेलेत.
6देवाने माझे नाव म्हणजे सर्वासाठी एक शिवी केली.
लोक माझ्या तोंडावर थुंकतात.
7दु:ख आणि यातना यांनी मी जवळ जवळ आंधळा
झालो आहे, माझे शरीर छायेप्रमाणे अतिशय बारीक झाले
आहे.
8यामुळे चांगले लोक फार व्यथित झाले आहेत. देवाची
पर्वा न करणाऱ्या लोकांमुळे निष्पाप लोक व्यथित होतात.
9पण चांगली माणसे मात्र न्यायाने जीवन जगत राहातात.
निष्पाप लोक अधिक सामर्थ्यवान होतात.
10"पण तुम्ही सर्व एकत्र या आणि या सगळ्यात माझीच
चूक आहे हे मला दाखवून द्या. तुमच्या पैकी कुणीही
विद्वान नाही.
11माझे आयुष्य संपत चालले आहे. माझ्या योजना धुळीला
मिळवल्या गेल्या आणि माझी आशा नष्ट झाली.
12माझे मित्र गोंधळून गेले आहेत. त्यांना रात्र
दिवसासारखी वाटते. अंधार प्रकाशाला पळवून लावतो
असे त्यांना वाटते.

13"थडगेच माझे नवीन घर असेल अशी मी आशा
करतो. अंधाऱ्या थडग्यांत माझे अंथरुण घालण्याची इच्छा
मी धरतो.
14'तू माझा जन्मदाता आहेस' असे मी थडग्याला आणि
किड्यांना 'माझी आई' किंवा 'बहीण' म्हणू शकेन.
15परंतु मला जर तेवढी एकच आशा असेल, तर मला
मुळीच आशा नाही. मला जर तेवढी एकच आशा असेल
तर लोकांना मी आशे शिवायच दिसेन.

---

**तुला माहीत आहे ... मित्र** शब्दश: "तो मित्रांना काही भाग देण्याचे वचन देतो आणि त्याची मुले आंधळी होतात."

16माझी आशा माझ्याबरोबरच मरेल का? ती सुध्दा
मृत्युलोकात जाईल का? आम्ही बरोबरच मातीत जाऊ
का?"

## बिल्दद ईयोबला उत्तर देतो

18 नंतर शूहीच्या बिल्ददने उत्तर दिले:

2"ईयोब, तू बोलणे केव्हा बंद करणार आहेस? शांत
राहा आणि लक्ष दे. आम्हाला काही बोलू दे.
3आम्ही पशूसारखे मूर्ख आहोत असे तू का मानतोस?
4ईयोब तुझा राग तुलाच अधिक त्रासदायक होत आहे.
केवळ तुझ्यासाठी लोकांनी हे जग सोडून जावे का? देव
केवळ तुझ्या समाधानासाठी डोंगर हलवेल असे तुला
वाटते का?
5"हो दुष्ट माणसाचा प्रकाश नाहीसा होईल. त्याचा
अग्नी पेटणे बंद होईल.
6त्यांच्या घरातला प्रकाश अंधकारमय होईल. त्यांच्या
जवळचा दिवा विझेल.
7त्याची पाऊले पुन्हा दमदारपणे व भरभर पडणार नाहीत.
तो हळु हळु चालेल आणि अशक्त बनेल. त्याच्या दुष्ट
मसलती त्याचा अध:पात करतील.
8त्याचेच पाय त्याला सापळ्यात अडकवतील. तो
आपणहून सापळ्यात जाईल आणि त्यात अडकेल.
9सापळा त्याची टाच पकडेल. त्याला घट्ट पकडून
ठेवेल.
10जमिनीवरची दोरी त्याला जाळ्यात अडकवेल. सापळा
त्याची त्याच्या मार्गातच वाट बघत असेल.
11दहशत चहुबाजूंनी त्याची वाट पाहात आहे. भीती
त्याच्या प्रत्येक पावलावर पाठलाग करीत आहे.
12वाईट संकटे त्याच्यासाठी भुकेली आहेत. विध्वंस
आणि अरिष्ट तो पडण्याचीच वाट पहात आहेत.
13भयानक रोग त्याची कातडी खाऊन टाकेल. तो
त्याचे हातपाय कुजवेल.
14दुष्ट माणूस त्याच्या घराच्या सुरक्षिततेपासून दूर नेला
जाईल. त्याला भयाच्या राजापुढे हजर करण्यासाठी दूर
नेले जाईल.
15त्याच्या घरात काहीही शिल्लक राहाणार नाही. का?
कारण त्याच्या घरात सर्वत्र जळते गंधक विखरण्यात
येईल.
16त्याची खालची मुळे सुकून जातील आणि वरच्या
फांद्या मरतील.
17पृथ्वीवरील लोकांना त्याची आठवण राहाणार नाही.
आता त्याची आठवण कुणालाही येणार नाही.
18लोक त्याला प्रकाशापासून दूर अंधारात ढकलतील.
लोक त्याचा पाठलाग करून या जगातून पळवून लावतील.
19त्याला मुले आणि नातवंडे असणार नाहीत. त्याच्या
कुटुंबातले कुणीही जिवंत असणार नाही.
20पश्चिमेकडचे लोक जेव्हा या दुष्ट माणसाचे काय
झाले ते ऐकतील तेव्हा त्यांना धक्का बसेल. आणि पूर्वेकडचे
लोक भयाने बधीर होतील.
21दुष्ट माणसाच्या घराचे खरोखरच असे होईल. जो
माणूस देवाची पर्वा करीत नाही त्याच्याबाबतीत असेच
घडेल."

## ईयोब उत्तरला

19 नंतर ईयोबने उत्तर दिले:
2"तुम्ही मला किती वेळ त्रास देणार आहात?
आणि शब्दांनी मला मोडणार आहात?
3तुम्ही आतापर्यंत दहा वेळा माझा अपमान केला आहे.
तुम्ही माझ्यावर हल्ला करता तेव्हा अजिबात लाज, शरम
बाळगीत नाही.
4"मी पाप केले असेल तर तो माझा प्रश्न आहे. तुम्हाला
त्याचा उपद्रव होत नाही.
5तुम्ही माझ्यापेक्षा चांगले आहात एवढेच तुम्हाला
दाखवायचे आहे, माझी संकटे माझ्या चुकीमुळेच निर्माण
झाली आहेत असे तुम्ही (उगीचच) म्हणता.
6परंतु देवानेच माझ्यावर अन्याय केला आहे. त्यानेच
मला पकडण्यासाठी सापळा रचला.
7'त्याने मला दुखवले' असे मी ओरडतो. पण मला
उत्तर मिळत नाही. मी मदतीसाठी जोरात ओरडलो तरी
न्यायासाठी असलेले माझे रडणे कुणाला ऐकू येत नाही.
8मी पुढे जाऊ नये म्हणून देवाने माझ्या मार्गात अडथळा
आणला. त्याने माझा मार्ग अंधारात लपविला.
9देवाने माझी प्रतिष्ठा धुळीला मिळवली. त्याने माझ्या
डोक्यावरचा मुकुट काढून घेतला.
10माझा सर्वनाश होईपर्यंत देव मला चाऱ्ही बाजूंनी
झोडपतो. एखादे झाड मुळासकट उपटून काढावे त्याप्रमाणे
त्याने माझ्या आशा उपटून नेल्या.
11त्याचा क्रोध मला जाळीत आहे. तो मला त्याचा शत्रू
म्हणतो.
12देव त्याचे सैन्य माझ्यावर हल्ला करण्यासाठी पाठवतो.
ते माझ्याभोवती मोर्चा उभारतात. ते माझ्या डेऱ्याभोवती
छावणी टाकतात.
13"देवाने माझ्या भावांना माझा द्वेष करायला भाग पाडले.
माझ्या सर्व मित्रांमध्ये मी परका झालो आहे.
14माझे नातलग मला सोडून गेले. माझे मित्र मला
विसरले.
15माझ्या घरी येणारे पाहुणे आणि माझ्या दासी मला
परका आणि परदेशातला समजतात.
16"मी माझ्या नोकराला बोलावतो पण तो उत्तर देत
नाही. मी मदतीसाठी याचना केली तरी माझा नोकर
उत्तर देणार नाही.
17माझी बायको माझ्या श्वासाच्या वासाचा तिरस्कार
करते. माझे भाऊ माझा तिरस्कार करतात.

18लहान मुलेदेखील मला चिडवतात. मी त्यांच्याजवळ जातो तेव्हा ते माझ्याबद्दल वाईटसाईट बोलतात.
19माझे जवळचे मित्रदेखील माझा तिरस्कार करतात. माझे ज्यांच्यावर प्रेम आहे ते लोक देखील माझ्याविरुध्द गेले आहेत.
20"मी इतका कृश झालो आहे की माझी कातडी हाडांवर लोबंते. आता माझ्यात जिवंतपणाचा मागमुसही उरलेला नाही.
21"माझी दया येऊ द्या. मित्रांनो, तुम्हाला माझी दया येऊ द्या! का? कारण देव माझ्यावर उलटला आहे.
22देव जसा माझा छळ करीत आहे तसा तुम्ही पण माझा छळ का करीत आहात? मला सतत त्रास देण्याचा तुम्हाला कंटाळा येत नाही का?
23"मी जे बोलतो ते कुणीतरी लक्षात ठेवून पुस्तकात लिहून ठेवावे असे मला वाटते. माझे शब्द पाषाणात कोरुन ठेवायला हवेत असे मला वाटते.
24मी जे बोलतो ते लोखंडी कलमाने शिश्यावर किंवा पाषाणावर कोरुन कायम करायला हवे असे मला वाटते.
25माझा बचाव करणारा कोणी तरी आहे याची मला खात्री आहे. तो हयात आहे हे मला माहीत आहे. आणि शेवटी तो या पृथ्वीतलावर येऊन उभा राहील आणि माझा बचाव करील.
26मी जेव्हा माझे शरीर सोडून जाईन तेव्हा आणि माझी कातडी नष्ट होईल तेब्हा सुध्दा मी देवाला पाहू शकेन.
27मी देवाला माझ्या डोळ्यांनी बघेन. अन्य कुणी नाही, तर मी स्वत:च त्याला पाहीन. आणि त्यामुळे मी किती हुरळून गेलो आहे ते मी सांगू शकत नाही.
28तुम्ही कदाचित् म्हणाल: 'आपण ईयोबचा छळ करु. त्याला दोषी ठरवण्यासाठी काहीतरी कारण शोधून काढू.
29परंतु तुम्हाला स्वत:लाच तलवारीची भीती वाटायला हवी. का? कारण देव दोषी माणसांना शिक्षा करतो. देव तुम्हाला शिक्षा करण्यासाठी तलवारीचा उपयोग करेल. नंतर तुम्हाला कळेल की न्यायाचीसुध्दा वेळ यावी लागते."

## सोफर उत्तर देतो

20 नंतर नामाथीचा सोफर म्हणाला:
2"ईयोब, तुझे त्रस्त झालेले विचार मला तुला उत्तर द्यायला भाग पाडत आहेत. माझ्या मनात कोणते विचार चालले आहेत ते मी तुला लगेच सांगायला हवे.
3तुझ्या उत्तरांनी तू आमचा अपमान केला आहेस परंतु मी शहाणा आहे. उत्तर कसे द्यायचे ते मला माहीत आहे.
4–5"वाईट मनुष्याचा आनंद जास्त काळ टिकत नाही तुला हे माहीत आहे. आदाम या पृथ्वीतलावर आला त्या अतिप्राचीन काळापासूनचे हे सनातन सत्य आहे. जो माणूस देवाची पर्वा करीत नाही तो फारच थोडा काळ सुखी होतो.
6दुष्ट माणसाचा अहंकार गगनाला जाऊन भिडेल आणि त्याचे मस्तक ढगांपर्यंत पोहोचू शकेल.
7परंतु त्याच्या विष्ठेप्रमाणे त्याचा मात्र नाश झालेला असेल. जे लोक त्याला ओळखतात ते विचारतील, 'तू कुठे आहे?'
8तो एखाद्या स्वप्नासारखा* उडून जाईल व तो कोणालाही सापडणार नाही. त्याला घालवून देण्यात येईल आणि एखाद्या दु:स्वप्नासारखा तो विसरलाही जाईल.
9ज्या लोकांनी त्याला पाहिले होते, त्यांना तो पुन्हा दिसणार नाही. त्याचे कुटुंब पुन्हा कधी त्याच्याकडे बघणार नाही,
10दुष्ट माणसाने गरीब लोकांकडून जे काही घेतले होते ते त्याची मुले परत करतील. दुष्ट माणसाचे स्वत:चे हातच त्याची संपत्ती परत करतील.
11तो तरुण होता तेव्हा त्याची हाडे मजबूत होती. परंतु आता इतर अवयवांप्रमाणे त्यांची सुध्दा माती होईल.
12"दुष्टाला वाईट गोष्टी चांगल्या वाटतात. तो त्यांची चव नीट कळावी म्हणून त्या आपल्या जिभेखाली ठेवतो.
13दुष्ट माणसाला वाईट गोष्टी आवडतात म्हणून तो त्यांना सोडीत नाही. गोडगोळीसारखं तो त्या आपल्या तोंडात ठेवतो.
14परंतु त्या वाईट गोष्टीच त्याच्या पोटात विष होतील. त्याच्या आत त्याचे सर्पाच्या विषासारखे कडू जहर होईल.
15दुष्ट माणसाने श्रीमंती गिळली तरी तो ती ओकून टाकेल. देव त्याला ती ओकायला भाग पाडेल.
16दुष्ट माणसाचे पेय म्हणजे सर्पाचे विष. सर्पाचा दंशच त्याला मारून टाकील.
17नंतर दुष्ट मनुष्य मधाने आणि दुधाने भरून वाहाणाऱ्या नद्या बघण्याचे सौख्य अनुभवू शकणार नाही.
18दुष्ट माणसाला त्याचा नफा परत करणे भाग पडेल. त्याने जे सुख मिळवण्यासाठी कष्ट केले ते सुख भोगण्याची परवानगी त्याला मिळणार नाही.
19का? कारण त्याने गरीबांना कष्ट दिले. त्यांना वाईट वागवले. त्याने त्यांची काळजी घेतली नाही. त्यांच्या वस्तू हिसकावून घेतल्या. दुसऱ्यांनी बांधलेली घरे त्यानी बळकावली.
20"दुष्ट माणूस कधीही समाधानी नसतो. त्याची श्रीमंती त्याला वाचवू शकत नाही.
21 तो खातो तेव्हा काहीही शिल्लक ठेवीत नाही. त्याचे यश टिकणार नाही.
22 दुष्ट मनुष्याकडे जेव्हा भरपूर असेल तेव्हा तो संकटांनी दबून जाईल. त्याच्या समस्या त्याच्यावर कोसळतील.

---

**वाईट स्वप्न** किंवा "रात्रीचे दृश्य."

[23] दुष्ट माणसाने त्याला हवे तितके खाल्ल्यानंतर देव त्याचा क्रोधाग्नी त्याच्यावर फेकेल. देव दुष्टावर शिक्षेचा पाऊस पाडेल.
[24]दुष्ट मनुष्य तलवारीला भिऊन पळून जाण्याचा प्रयत्न करेल. परंतु पितळी बाण त्याचा बळी घेईन.
[25]पितळी बाण त्याच्या शरीरातून आरपार जाईल. त्याचे चकाकणारे टोक त्याचे आतडे भेदील आणि तो भयभीत होईल.
[26] त्याच्या खजिन्याचा नाश होईल. मानवाने उत्पन्न केला नाही असा अग्नी त्याचा नाश करेल. अग्नी त्याच्या घरातल्या सर्व वस्तूंचा नाश करेल.
[27] दुष्ट माणूस अपराधी आहे हे स्वर्ग सिध्द करेल. पृथ्वी त्याच्याविरुध्द साक्ष देईल.
[28]देवाच्या क्रोधाने निर्माण झालेल्या पुरात त्याच्या घरातली चीजवस्तू वाहून जाईल.
[29] दुष्ट माणसाच्या बाबतीत हे करायचे असे देवाने ठरवले आहे. देवाने ठरवलेले हे त्याचे प्रारब्ध आहे."

## ईयोब उत्तर देतो

21 नंतर ईयोबने उत्तर दिले:
[2]"मी काय म्हणतो ते ऐक. माझे सांत्वन करण्याची ती तुझी पध्दत असू दे.
[3]मी बोलेन तेव्हा तू थोडा धीर धर. माझे बोलणे संपल्यावर तू माझी थट्टा करु शकतोस.
[4]"मी लोकांविरुध्द तक्रार करीत नाही. मी अधीर झालो आहे त्याला काही कारण आहे.
[5]माझ्याकडे बघितल्यावर तुला धक्का बसेल. तुझे हात तोंडावर ठेव आणि माझ्याकडे अचंब्याने बघत रहा.
[6]माझ्यावर आलेल्या प्रसंगांचा विचार करायला लागलो म्हणजे मला भीती वाटते आणि माझ्या शरीराचा थरकाप होतो.
[7]दुष्ट माणसांना जास्त आयुष्य का असते? ते वृध्द आणि यशस्वी का होतात?
[8]दुष्ट माणसे आपली मुले बाळे मोठी होत असलेली बघतात. आपली नातवंडे बघायला ती जिवंत राहतात.
[9]त्यांची घरे सुरक्षित असतात आणि त्यांना भय नसते. दुष्टांना शिक्षा करण्यासाठी देव आपली छडी वापरीत नाही.
[10]त्यांचे बैल प्रजोत्पादनात असफल होत नाही. त्यांच्या गायींना वासरे होतात आणि वासरे जन्मत:च मृत्युमुखी पडत नाहीत.
[11]दुष्ट लोक आपल्या मुलांना कोकरा प्रमाणे बाहेर खेळायला पाठवतात. त्यांची मुले सभोवती नाचत असतात.
[12]ते तंतुवाद्याच्या आणि वीणेच्या आवाजावर गातात आणि नाचतात.
[13]दुष्ट लोक त्यांच्या आयुष्यात यशाचे सुख अनुभवतात. नंतर ते मरतात आणि दु:खी न होता थडग्यात जातात
[14]परंतु दुष्ट लोक 'आम्हाला एकटे सोड. तू आम्हाला जे करायला सांगतोस त्याची आम्हाला पर्वा नाही' असे देवाला सांगतात.
[15]आणि दुष्ट लोक म्हणतात, 'सर्वशक्तिमान देव कोण आहे? आम्हाला त्याची चाकरी करण्याची गरज नाही. त्याची प्रार्थना करण्यात काही अर्थ नाही.'
[16]"दुष्ट लोकांचा त्यांच्या यशात स्वत:चा काही वाटा नसतो हे खरे आहे. मी त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागू शकत नाही.
[17]परंतु देव दुष्ट माणसांचा प्रकाश किती वेळा मालवू शकतो? किती वेळा त्यांच्यावर संकटे कोसळतात? देव त्यांच्यावर रागावून त्यांना शिक्षा करतो का?
[18]देव दुष्ट लोकांना वाऱ्यावर गवत किंवा धान्याची टरफले उडवतात तसे उडवून देतो का?
[19]पण तू म्हणतोस 'देव वडिलांच्या पापाबद्दल मुलाला शिक्षा करतो.' नाही देवाने दुष्टालाच शिक्षा करायला हवी. तेव्हाच त्या दुष्टाला कळेल की त्याला त्याच्या पापाची शिक्षा मिळत आहे.
[20]पापी माणसाला शिक्षा भोगू दे. त्याला सर्वशक्तिमान देवाच्या रागाचा अनुभव घेऊ दे.
[21]दुष्टाचे आयुष्य संपल्यावर तो मरतो. तो मागे राहिलेल्या कुटुंबाची पर्वा करीत नाही.
[22]"देवाला कुणीही ज्ञान शिकवू शकत नाही. देव मोठ्या पदावर असलेल्या लोकांचाही न्यायनिवाडा करतो.
[23]एखादा माणूस संपूर्ण आणि यशस्वी जीवन जगल्यानंतर मरतो. त्याने अत्यंत सुरक्षित आणि स्वास्थ्यपूर्ण जीवन जगलेले असते.
[24]त्याचे शरीर चांगले पोसलेले होते आणि त्याची हाडे मजबूत होती.
[25]परंतु दुसरा माणूस अत्यंत हालाखीचे जीवन जगतो व मरतो. त्याचे अंत:करण कडवट झालेले असते. त्याने काहीही चांगले भोगलेले नसते.
[26]शेवटी हे दोघेही बरोबरच मातीत जातील. किडे त्यांना झाकून टाकतील.

[27]"पण तू कसला विचार करीत आहेस ते मला माहीत आहे. कोणत्या डावपेचांनी मला दु:ख द्यायची तुझी इच्छा आहे हे मला माहीत आहे.
[28]तू कदाचित् म्हणशील 'मला चांगल्या माणसाचे घर दाखव. आता मला दुष्ट माणसे कोठे राहतात ते दाखव.'
[29]"तू प्रवाशांबरोबरच बोलला असशील आणि तू त्यांच्याच गोष्टी खऱ्या धरुन चालशील.
[30]संकटे कोसळतात तेव्हा दुष्ट माणसे त्यातून वाचतात. देवाच्या क्रोधातून ते सहीसलामत सुटतात.
[31]दुष्टांनी केलेल्या वाईट कृत्यांबद्दल त्यांना कुणी शिक्षा करत नाही. त्यांच्या तोंडावर कुणी त्याबद्दल टीका करीत नाही.

32दुष्ट माणूस स्मशानात गेल्यावर तेथील रक्षक त्याच्या थडग्याची देखभाल करतो.

33म्हणून दरीतली माती देखील दुष्ट माणसासाठी सुखावह असेल. व त्याच्या अंत्ययात्रेत हजारो लोक सामील होतील.

34“म्हणून तुमच्या पोकळ शब्दांनी तुम्ही माझे सांत्वन करु शकणार नाही. तुमची उत्तरे माझ्या उपयोगाची नाहीत.”

## अलीफज उत्तर देतो

22 मग तेमानीच्या अलीफजने उत्तर दिले:

2“देवाला आपल्या मदतीची गरज आहे का? नाही. अतिशय विद्वान माणसाचा सुध्दा देवाला फारसा उपयोग नाही.

3तुमचे योग्य तऱ्हेने जगणे देवाला काही मदत करते का? नाही.तुम्ही त्या सर्वशक्तिमान देवाचे अनुसरण केलेत तर त्यातून त्याला काही मिळते का? नाही.

4“ईयोब, देवाने तुला दोषी ठरवून शिक्षा का द्यावी? तू त्याला भितोस तू त्याची भक्ती करतोस म्हणून?

5“नाही. तो तसे करतो कारण तू खूप पाप केले आहेस. ईयोब, तू पाप करणे कधीच थांबवले नाहीस.

6कदाचित् तू तुझ्या भावाला काही पैसे दिले असशील आणि त्याने ते परत करावे म्हणून त्याच्याकडून एखादी वस्तू गहाण ठेवून घेतली असशील. कदाचित् तू गरीबाकडून त्याची वस्त्रे पैशासाठी गहाण ठेवून घेतली असशील. तसे करण्याला कदाचित् काही सबळ कारणही नसेल.

7तू कदाचित् थकलेल्या आणि भुकेल्या लोकांना पाणी आणि अन्न दिले नसशील.

8ईयोब, तुझ्याकडे पुष्कळ शेतजमीन आहे आणि लोक तुला मान देतात.

9पण कदाचित् तू विधवांना काहीही न देता घालवून दिले असशील, ईयोब, तू कदाचित पोरक्या मुलांची फसवणूक केली असशील.

10म्हणूनच तुझ्या भोवती सापळे आहेत आणि अचानक आलेल्या संकटांनी तू घाबरून जात आहेस.

11म्हणूनच सर्वत्र इतका अंधार आहे की तुला काही दिसत नाही आणि तू पुराच्या पाण्याने चहुबाजूंनी वेढला आहेस.

12“देव स्वर्गाच्या सर्वात उंच भागात राहतो. तारे किती उंचावर आहेत ते बघ. देव सर्वात उंच ताऱ्यांमधून खाली वाकून बघतो,

13पण ईयोब, तू कदाचित् म्हणशील देवाला काय समजते? देव काळ्याकुट्ट ढगांतून आपल्याकडे बघून निवाडा करु शकतो का?

14आकाशाच्या किनाऱ्यावरुन चालताना त्याने आपल्याला बघू नये म्हणून दाट ढग त्याला आपल्यापासून लपवतात.

15“ईयोब, दुष्ट लोक पूर्वी ज्या जुन्या वाटेवरुन चालत गेले त्याच वाटेवरुन आज तू चालतो आहेस.

16त्या दुष्टांची मरणघटिका जवळ येण्यापूर्वीच त्यांचा नाश करण्यात आला. ते पुरात वाहून गेले.

17त्या लोकांनी देवाला सांगितले, ‘आम्हाला एकटे सोड तो सर्वशक्तिमान देव आम्हाला काहीही करु शकत नाही.’

18आणि देवानेच त्याची घरे चांगल्या वस्तूंनी भरली होती. नाही मी दुष्टांच्या उपदेशाचे पालन करु शकत नाही.

19चांगले लोक दुष्टांचे निर्दालन झालेले पाहतील आणि संतोष पावतील. भोळे लोक वाईट लोकांना हसतात.

20‘खरोखरच आमच्या शत्रूंचा नाश झाला आहे. त्यांची संपत्ती आगीत नष्ट होत आहे.’

21“ईयोब, तू आता देवाला शरण जा. त्याच्याशी सलोखा कर. तू हे केलेस तर तुला खूप चांगल्या गोष्टी मिळतील.

22त्यांच्या वचनांचा स्विकार कर. तो काय म्हणतो त्याकडे नीट लक्ष दे.

23ईयोब, तू सर्वशक्तिमान देवाकडे परत ये म्हणजे तुझी स्थिती पूर्ववत् होईल. परंतु तू तुझ्या घरातून वाईट गोष्टींचे उच्चाटन केले पाहिजेस.

24तू तुझ्या जवळ असलेल्या सोन्याला मातीमोल मानले पाहिजेस. तू तुझ्या सर्वात चांगल्या सोन्याला दरीतल्या दगडाएवढी किंमत दिली पाहिजेस.

25सर्वशक्तिमान देवच तुझे सोने असू दे. त्यालाच तुझा चांदीचा ढीग समज.

26नंतर तू सर्वशक्तिमान देवाला अनुभवू शकशील. तू त्याच्याकडे बघू शकशील.

27तू त्याची प्रार्थना करशील आणि तो तुझे ऐकेल आणि ज्या गोष्टी करण्याचे तू वचन दिले होतेस त्या गोष्टी तू करशील.

28तू जर काही करायचे ठरवलेस तर तू त्यात यशस्वी होशील. आणि तुझा भविष्यकाळ खरोखरच उज्ज्वल असेल.

29देव अहंकारी लोकांना मान खाली घालायला लावतो. परंतु विनम्र लोकांना तो मदत करतो.

30नंतर तू चुका करणाऱ्या लोकांना मदत करु शकशील. तू देवाजवळ प्रार्थना केलीस तर तो त्या लोकांना क्षमा करेल. का? कारण तू अतिशय पवित्र असशील.”

## ईयोब उत्तर देतो

23 नंतर ईयोबने उत्तर दिले:

2“तरीही मी आज कडवटपणे तक्रार करीन. का? कारण मी अजूनही दु:खी आहे.

3देवाला कुठे शोधावे ते मला माहीत असेत तर किती बरे झाले असते. देवाकडे कसे जावे ते मला कळते तर किती बरे झाले असते.

4मी देवाला माझी कथा सांगितली असती. माझा निरपराधीपणा सिध्द करण्यासाठी मी सतत वाद घातला असता.

5देवाने माझ्या युक्तिवादाला कसे प्रत्युत्तर दिले असते ते मला कळले असते तर किती बरे झाले असते. मला देवाची उत्तरे समजून घ्यायची आहेत.

6देव माझ्याविरुध्द त्याच्या सामर्थ्याचा उपयोग करेल का? नाही. तो मी काय म्हणतो ते ऐकेल.

7मी सत्यप्रिय माणूस आहे. देव मला माझी गोष्ट सांगू देईल. नंतर माझा न्यायाधीश मला मुक्त करील.

8“पण मी जर पूर्वेकडे गेलो, तर देव तेथे नसतो. मी पश्चिमेकडे गेलो तर तिथेही मला देव दिसत नाही.

9देव दक्षिणेत कार्यमग्न असला तरी मला तो दिसत नाही. देव जेव्हा उत्तरेकडे वळतो तेव्हाही तो मला दिसत नाही.

10परंतु देवाला मी माहीत आहे. तो माझी परीक्षा घेत आहे. आणि मी सोन्यासारखा शुध्द असेन याकडे तो लक्ष पुरवेल.

11मी नेहमीच देवाच्या इच्छेनुसार जगत आलो आहे. आणि मी त्याचा मार्ग चोखाळणे कधीच थांबवले नाही.

12मी त्याच्या आज्ञेचे पालन केले. मी माझ्या अन्नापेक्षा देवाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दांवर अधिक प्रेम करतो.

13“परंतु देव कधी बदलत नाही. देवासमोर कुणीही उभा राहू शकणार नाही. देव त्याला हवे ते करु शकतो.

14माझ्या बाबतीत देवाने जे योजिले आहे तेच तो करेल. माझ्यासाठी त्याच्या बऱ्याच योजना आहेत.

15म्हणूनच मी देवाला भितो. मी या गोष्टी समजू शकतो आणि म्हणून मला देवाची भीती वाटते.

16देव माझे हृदय कमजोर बनवतो आणि मी माझे धैर्य गमावून बसतो. सर्वशक्तिमान देव मला घाबरवतो.

17माझ्या बाबतीत ज्या वाईट गोष्टी घडल्या त्या माझ्या चेहऱ्यावरच्या काळ्या ढगाप्रमाणे आहेत. परंतु तो काळोख मला गप्प बसवू शकणार नाही.

24 “त्या सर्वशक्तिमान देवाला माणसाच्या आयुष्यातल्या सर्व गोष्टी कशा माहीत असतात? परंतु त्याच्या भक्तांना मात्र त्याच्याबद्दल काहीच माहीत नसते.”

2“लोक शेतातली हद्द दर्शविणाऱ्या खुणा जास्त जमीन मिळवण्यासाठी सरकवतात. लोक पशूंचे कळप चोरुन दुसऱ्या रानात चरायला नेतात.

3ते अनाथ मुलांची गाढवे चोरतात. ते विधवेची गाय पळवून नेतात आणि त्यांच्या ऋणाची ती जोपर्यंत परतफेड करत नाही तोपर्यंत ती गाय आपल्याकडे ठेवून घेतात.

4ते गरीब लोकांना घरादाराशिवाय इकडे तिकडे हिंडायला लावतात. सगळ्या गरीबांना या दुष्टांपासून लपून राहावे लागते.

5“गरीब लोक वाळवंटात हिंडून अन्न शोधणाऱ्या मोकाट गाढवाप्रमाणे आहेत ते अन्नाच्या शोधात लवकर उठतात. ते मुलाबाळांना अन्न देण्यासाठी रात्रीपर्यंत काम करतात.

6गरीब लोकांना शेतात गवत आणि चारा कापत रात्रीपर्यंत काम करावे लागते. त्यांना श्रीमंतांच्या शेतातली द्राक्षे वेचावी लागतात.

7त्यांना रात्री कपड्यांशिवाय झोपावे लागते. थंडीपासून रक्षण करण्यासाठी त्यांच्याजवळ पांघरुण नसते.

8ते डोंगरावर पावसात भिजतात. थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी त्यांच्याजवळ काही नसते म्हणून ते मोठ्या खडकांना चिकटून बसतात.

9दुष्ट लोक स्तनपान करणारे बाळ आईजवळून घेतात. ते गरीबाच्या त्याने काढलेल्या कर्जाबद्दल तारण म्हणून ठेवून घेतात.

10गरीबांजवळ कपडे नसतात. म्हणून काम करताना ते उघडेच असतात. ते दुष्टांसाठी धान्याच्या पेंढ्या वाहतात पण स्वत: मात्र उपाशीच राहतात.

11ते ऑलिव्हचे तेल काढतात. द्राक्षाचा रस काढतात. व त्यासाठी द्राक्षकुंडात द्राक्षं तुडवतात. परंतु त्यांच्याजवळ मात्र पिण्यासाठी काही नसते.

12शहरात मरायला टेकलेल्या माणसांचे दु:खद रडणे ऐकू येते. ते दु:खी कष्टी लोक मदतीसाठी हाका मारतात. परंतु देव ते ऐकत नाही.

13“काही लोक प्रकाशाविरुद्द बंड करतात. देवाला काय हवे आहे हे जाणून घ्यायची त्यांची इच्छा नसते. देवाच्या इच्छेप्रमाणे जगणे त्यांना आवडत नाही.

14खुनी सकाळी लवकर उठतो आणि गरीब व असहाय्य लोकांना ठार मारतो. तो रात्रीच्या वेळी चोर बनतो.

15ज्या माणसाला व्यभिचार करायचा आहे तो रात्रीची वाट बघतो. ‘मला कुणीही बघणार नाही’ असे त्याला वाटते.’ पण तरीही तो त्याचा चेहरा झाकतो.

16रात्रीच्या वेळी अंधार असतो तेव्हा दुष्ट लोक दुसऱ्यांची घरे फोडतात. पण दिवसा ते स्वत:ला त्यांच्या घरांत कोंडून घेतात. ते प्रकाशाला टाळतात.

17त्या दुष्टांना काळीकुट्ट रात्र सकाळसारखी वाटते. त्या भयंकर काळोखाची भयानकता त्यांना चांगलीच माहीत असते.

18 “पुरात जशा वस्तू वाहून जातात तशी दुष्ट माणसे वाहून नेली जातात. त्यांनी त्यांच्या शेतात द्राक्ष गोळा करु नयेत म्हणून त्यांच्या जमिनीला शाप दिला जातो.

19हिवाळ्यातल्या बर्फापासून मिळालेले त्यांचे पाणी उष्ण आणि कोरडी हवा शोषून घेते. त्याप्रमाणे त्या पापी लोकांना थडग्यात नेले जाते.

20हा दुष्ट माणूस मरेल आणि त्याची आईदेखील त्याला विसरुन जाईल. त्याची प्रेयसी म्हणजे त्याचे शरीर खाणारे किडे असतील. लोक त्याची आठवण ठेवणार नाहीत. त्यामुळे दुष्टपणा लाकडासारखा मोडून पडेल.

21दुष्ट माणसे वांझ बायकांना त्रास देतात आणि ते विधवांना मदत करायचे नाकारतात.

22सामर्थ्यवान लोकांना नष्ट करण्यासाठी दुष्ट आपली शक्ती खर्ची घालतात. दुष्ट माणसे सामर्थ्यवान बनू शकतात परंतु त्यांना त्यांच्या आयुष्याची खात्री नसते.

23दुष्टांना थोड्या वेळासाठी सुरक्षित आणि निर्धास्त वाटते. आपण सामर्थ्यवान व्हावे असे त्यांना वाटते.

24दुष्ट लोक थोड्या काळापुरते यशस्वी होतात. परंतु नंतर ते जातात. धान्याप्रमाणे त्यांची कापणी होते, इतर लोकांप्रमाणे दुष्टांनादेखील कापले जाते.

25"या गोष्टी खऱ्या आहेत हे मी शपथपूर्वक सांगतो. मी खोटे बोललो हे कोण सिध्द करेल? मी चुकलो हे कोण दाखवेल?"

## बिल्दद ईयोबला उत्तर देतो

# 25

नंतर शूहीच्या बिल्ददने ईयोबला उत्तर दिले:

2"देव राजा आहे. प्रत्येकाने देवाला मान दिला पाहिजे आणि त्याचे भय बाळगले पाहिजे. देव त्याच्या स्वर्गीय राज्यात शांती राखतो.

3कुठलाही माणूस त्याचे तारे* मोजू शकत नाही. देवाचा सूर्य सर्व लोकांवर उगवतो.

4देवाशी तुलना करता कुठलाही माणूस चांगला नाही. कुठलाही मनुष्यप्राणी पवित्र असणार नाही.

5देवाला चंद्र सुध्दा तेजोमय आणि पवित्र वाटत नाही. देवाच्या दृष्टीला तारे देखील पवित्र वाटत नाहीत.

6माणसे तर त्याच्या दृष्टीने पवित्रतेत खूपच कमी पडतात. मनुष्यप्राणी एखाद्या अळीप्रमाणे (मॅगॉट) आहे. तो कवडीमोलाच्या जंतूप्रमाणे आहे."

## ईयोब बिल्ददला उत्तर देतो

# 26

नंतर ईयोबने बिल्ददला उत्तर दिले:

2"बिल्दद, सोफर आणि अलीफज तुम्ही दुर्बल माणसासाठी खूप मोठे साहाय्य आहात. हो तुम्हीच दुबळ्या हातांना पुन्हा जोमदार बनवले. (हे ईयोबचे बोलणे उपरोधक आहे)

3"विद्वत्ताहीन माणसाला तुम्ही फार चांगला उपदेश केला. तुम्ही किती विद्वान आहात ते तुम्ही दाखवून दिलेत.

4हे बोलण्यासाठी तुम्हाला कुणाची मदत मिळाली? कुणाच्या आत्म्याने तुम्हांला याची प्रेरणा दिली?

5"मेलेल्या माणसाचा आत्मा भयाने पृथ्वीच्या खाली पाण्यात घाबरतो.

6परंतु देव मृत्युलोकात स्वच्छपणे बघू शकतो. मृत्यु देवापासून लपून राहात नाही.

7देवाने रिकाम्या पोकळीत दक्षिणेकडचे आकाश सरकवले. देवाने पृथ्वी निराधार टांगली, अधांतरी ठेवली.

8"देव घनदाट ढगांना पाण्याने भरतो. परंतु त्या वजनाने तो ढगांना फुटू देत नाही.

9देव पूर्ण चंद्राचा चेहरा झाकून टाकतो. तो त्याच्यावर ढग पसरवतो आणि त्याला लपवतो.

10देवाने सागरावर एक वर्तुळ आखले आणि प्रकाश काळोखापासून वेगळा करण्यासाठी क्षितिज निर्माण केले.

11देव जेव्हा धमकी देतो तेव्हा आकाशाला आधार देणारा पाया भयाने थरथरायला लागतो.

12देवाची शक्ती सागराला शांत करते. देवाच्या विद्वत्तेने राहाबाच्या मदतनीसांना नष्ट केले.

13देवाचा नि:श्वास आकाश स्वच्छ करतो. देवाच्या हातांनी पळून जाणाऱ्या सापाला नष्ट केले.

14देव ज्या काही अनामिक गोष्टी करतो त्यापैकी या काही गोष्टी आहेत. आपण देवाची एखादी लहानशी कुजबुज ऐकतो, देव किती सामर्थ्यवान आणि शक्तिशाली आहे. हे कोणालाच कळत नाही."

# 27

नंतर ईयोब आपले बोलणे पुढे चालू ठेवत म्हणाला:

2"खरोखरच देव आहे. आणि तो आहे हे जसे खरे आहे तसेच तो माझ्या बाबतीत अन्यायी होता हे ही खरे आहे. होय, त्या सर्वशक्तिमान देवाने माझे जीवन कडू करून टाकले.

3परंतु जोपर्यंत माझ्यात जीव आहे आणि देवाचा जिवंत श्वास माझ्या नाकात आहे तोपर्यंत,

4माझे ओठ वाईट गोष्टी बोलणार नाहीत आणि माझी जीभ खोटे सांगणार नाही.

5तुम्ही बरोबर आहात हेही मी कधी मान्य करणार नाही. मी निरपराध आहे हेच मी मरेपर्यंत सांगत राहीन.

6मी ज्या चांगल्या गोष्टी केल्या त्यांना मी चिकटून राहीन. चांगले वागणे मी कधीही सोडणार नाही. मरेपर्यंत माझे मन मला कधीही खाणार नाही.

7"लोक माझ्याविरुध्द उभे राहिले. वाईट माणसांना जशी शिक्षा होते तशी माझ्या शत्रूंना व्हावी अशी मी आशा करतो.

8जर एखादा माणूस देवाला मानत नसेल तर तो मेल्यावर त्याला कसलीच आशा राहाणार नाही. देव त्याचे आयुष्य संपवतो तेव्हा त्याला आशा करायला जागा नसते.

9त्या दुष्ट माणसावर संकटे येतील आणि तो देवाच्या मदतीसाठी रडेल. पण देव त्याचे ऐकणार नाही.

10त्याने सर्वशक्तिमान देवाशी बोलून आनंद मिळवायला हवा होता. त्याने नेहमी देवाची प्रार्थना करायला हवी होती.

11 "मी तुम्हाला देवाच्या सामर्थ्याविषयी सांगू शकेन. सर्वशक्तिमान देवाच्या योजना मी तुमच्या पासून लपवणार नाही.

---

**त्याचे तारे** किंवा "त्याचे सैन्य" याचा अर्थ देवाचे स्वर्गातील सैन्य.

12तुम्ही देवाचे सामर्थ्य तुमच्या डोळ्यांनी पाहिले आहे. मग तुम्ही असे निरर्थक का बोलता?

13देवाने वाईट लोकांसाठी हीच योजना आखली होती. आणि सर्वशक्तिमान देवाकडून दुष्टांना हेच मिळाले होते.

14दुष्ट माणसाला खूप मुले असतील परंतु त्याची मुले लढाईत मरतील. दुष्ट माणसाच्या मुलांना पुरेसे खायला मिळणार नाही.

15त्याची सर्व मुले मरतील आणि त्याच्या विधवेला दु:ख वाटणार नाही.

16दुष्ट माणसाला इतकी चांदी मिळेल की ती त्याला मातीमोल वाटेल, त्याला इतके कपडे मिळतील की ते त्याला मातीच्या ढिगाप्रमाणे वाटतील.

17परंतु चागंल्या माणसाला त्याचे कपडे मिळतील आणि निरपराध्याला त्याची चांदी मिळेल.

18दुष्ट माणूस घर बांधेल परंतु ते जास्त दिवस टिकणार नाही. ते कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे किंवा रखवालदाराच्या तंबूप्रमाणे असेल.

19दुष्ट माणूस झोपी गेल्यावर श्रीमंत होईल. परंतु जेव्हा तो डोळे उघडेल तेव्हा त्याची श्रीमंती नष्ट झालेली असेल.

20तो घाबरेल, महापुराने आणि वादळाने सर्वकाही वाहून न्यावे तसे होईल.

21पूर्वेचा वारा त्याला वाहून नेईल आणि तो जाईल. वादळ त्याला त्याच्या घरातून उडवून लावेल.

22दुष्ट माणूस वादळाच्या शक्तीपासून पळून जाण्याचा प्रयत्न करील परंतु कसलीही दयामाया न दाखवता वादळ त्याच्यावर आदळेल.

23दुष्ट माणूस पळून गेला म्हणून लोक टाळ्या वाजवतील. तो आपल्या घरातून पळून जात असता लोक शिट्या मारतील.

28 “लोकांना जेथून चांदी मिळते अशा खाणी असतात आणि लोक जेथे सोने वितळवतात आणि ते शुध्द करतात अशा जागा असतात.

2लोक जमिनीतून लोखंड काढतात. दगडांमधून तांबे वितळवले जाते.

3मजूर गुहेत दिवा नेतात. ते गुहेत अगदी खोलवर शोध घेतात. ते अगदी खोल अंधारात दगडांचा शोध घेतात.

4ते अशुध्द धातूचा शोध घेत घेत अगदी खोलवर जातात. लोकांच्या राहाण्याच्या जागेपासून ते खूप लांबवर आणि खोलवर जातात. जिथे आजपर्यंत कोणीही गेला नसेल तिथे ते जातात. ते दोरीला लोंबकळत इतरांपेक्षा खूप खोल जातात.

5वरच्या जमिनीत धान्य उगवते. परंतु जमिनीच्या खाली काही वेगळेच असते, धातू शुध्द असतो अगदी अग्नीत वितळवल्यासारखा.

6जमिनीच्या खाली इंद्रनील मणी आणि शुध्द सोन्याचे दाणे असतात.

7रानटी पक्ष्यांना भूपृष्ठाखालील वाटांविषयी काही माहिती नसते. कुठल्याही बहिरी ससाण्याने त्या अंधारवाटा पाहिलेल्या नसतात.

8रानटी जनावरे त्या वाटांवरुन गेलेली नसतात. सिंहही त्या वाटेने गेलेला नसतो.

9मजूर अगदी कठीण खडक खोदतात. ते मजूर डोंगर पोखरतात आणि त्यांना बोडके करतात.

10मजूर खडकातून बोगदा खणतात आणि खडकातला खजिना बघतात.

11पाणी अडवण्यासाठी मजूर धरण बांधतात. ते दडलेल्या वस्तू बाहेर प्रकाशात आणतात.

12“पण माणसाला शहाणपण कुठे मिळेल? समजूतदारपणा शोधण्यासाठी आपल्याला कुठे जावे लागेल?

13शहाणपण किती मोलाचे आहे ते आपल्याला कळत नाही. पृथ्वीवरचे लोक जमीन खणून शहाणपण शोधू शकत नाहीत.

14महासागर म्हणतो, ‘माझ्याजवळ शहाणपण नाही.’ सागर म्हणतो, ‘माझ्याजवळीही ते नाही.’

15तुम्ही शुध्द सोने देऊन शहाणपण विकत घेऊ शकत नाही. ते विकत घेण्यासाठी जगात तेवढी चांदी नाही.

16तुम्ही ओफिरच्या सोन्याने किंवा मौल्यवान शोहमच्या खड्याने वा नीलमण्याने शहाणपण विकत घेऊ शकत नाही.

17शहाणपण सोन्यापेक्षा किंवा स्फटिकापेक्षा मौल्यवान असते. सोन्यात जडवलेले मौल्यवान खडेही शहाणपण विकत घेऊ शकत नाही.

18शहाणपण पोवळ्यापेक्षा वा स्फटिकापेक्षाही मौल्यवान आहे. माणकापेक्षा ही त्याचे मोल अधिक आहे.

19इथिओपियातले पीत स्फटिक शहाणपणापेक्षा अधिक मौल्यवान नाहीत. शुध्द सोन्याने तुम्ही तो विकत घेऊ शकत नाही.

20“मग शहाणपणा कुठून येतो? समजूतदारपणा आपल्याला कुठे मिळेल?

21पृथ्वीवरील सर्व जिवंत प्राण्यापासून शहाणपण लपवून ठेवले आहे. आकाशातले पक्षीसुध्दा ते बघू शकत नाहीत.

22मृत्यू आणि विनाश* म्हणतात, ‘आम्हाला शहाणपण सापडले नाही. आम्ही त्याबद्दलच्या फक्त अफवाच ऐकल्या आहेत.’

23“फक्त देवालाच शहाणपणाकडे नेणारा मार्ग माहीत आहे. फक्त देवालाच तो कुठे आहे ते माहीत आहे.

24देवाला पृथ्वीचे अगदी शेवटचे टोकसुध्दा दिसू शकते. त्याला आकाशाखालचे सर्व काही दिसते.

---

**मृत्यू आणि विनाश** शब्दश: “अबदोन” “मृत्यू आणि विनाश” या साठी हिब्रू शब्द, विनाशकारी किंवा “विनाशाची जागा.”

25देवाने वाऱ्याला त्यांची शक्ती दिली. सागराला किती मोठे करायचे ते त्यानेच ठरवले.

26पावसाला कोठे पाठवायचे ते त्यानेच ठरवले आणि वादळाने कुठे जायचे तेही त्यानेच ठरवले.

27त्याच वेळी देवाला शहाणपण दिसले आणि त्याने त्याचा विचार केला. शहाणपणाचे मूल्य किती आहे ते त्याने जोखले आणि त्या शहाणपणाला संमती दिली.

28आणि देव लोकांना म्हणाला, "परमेश्वराची भीती बाळगा व त्याला मान द्या तेच शहाणपण आहे. वाईट गोष्टी करु नका तोच समजूतदारपणा आहे."

## ईयोब त्याचे बोलणे चालू ठेवतो

29 ईयोबने बोलणे सुरु ठेवले तो म्हणाला:

2"काही महिन्यांपूर्वी देव जसा माझ्यावर लक्ष ठेवून होता आणि माझी काळजी घेत होता, तसेच माझे आयुष्य आताही असते तर किती बरे झाले असते.

3तेव्हा देवाचा प्रकाश माझ्यावर प्रकाशत होता आणि मला अंधारातून चालताना प्रकाश दाखवत होता. तसेच आताही असायला हवे होते असे मला वाटते.

4मी जेव्हा यशस्वी होतो आणि देव माझा मित्र होता त्या दिवसांची मी आशा करतो. त्या दिवसात माझ्यावर देवाचे कृपाछत्र होते.

5जेव्हा सर्वशक्तिमान देव माझ्याबरोबर होता आणि माझी मुले माझ्या जवळ होती त्या दिवसांची मी आशा धरतो.

6त्या दिवसांत माझे आयुष्य अतिशय चांगले होते. मी माझे पाय मलईत धूत असे. माझ्याकडे उत्तम प्रकारची पुष्कळ तेले होती.

7"त्या दिवसांत मी नगराच्या वेशीपर्यंत जात असे आणि नगरातल्या वृध्दांबरोबर सार्वजनिक ठिकाणी बसत असे.

8सगळे लोक मला मान देत. मला येताना बघून तरुण माझ्या वाटेतून बाजूला होत आणि वृध्द उठून उभे राहात. मला आदर देण्यासाठी ते उठून उभे राहात असत.

9लोकप्रमुख बोलणे थांबवीत आणि इतरांना शांत राहाण्याची सूचना देण्यासाठी तोंडावर बोट ठेवीत.

10महत्वाचे लोक सुध्दा बोलताना त्यांचा आवाज लहान करीत. होय, तेव्हा त्यांची जीभ टाळूला चिकटण्यासारखी वाटे.

11लोक माझ्या बोलण्याकडे लक्ष देत. आणि माझ्याबद्दल चांगले बोलत असत. मला भेटणारा प्रत्येकजण माझी स्तुती करी.

12का? कारण जेव्हा एखादा गरीब मदतीची याचना करायचा तेव्हा मी त्याला मदत करीत असे आणि पोरक्या मुलाकडे लक्ष द्यायला कुणी नसले तर मी मदत करीत असे.

13मृत्युपंथाला लागलेला माणूस मला आशीर्वाद देत असे. मी गरजू विधवांना मदत करीत असे.

14सत्याने जगणे म्हणजे जणू माझे वस्त्र होते. माझे योग्य वागणे म्हणजे माझा अंगरखा आणि डोक्यावरची पगडी होती.

15मी आंधळ्यांची दृष्टी होतो. त्यांना जिथे जायचे असेल तिथे मी नेत असे. मी अपंगांचे पाय होतो त्यांना हवे तिथे मी उचलून नेत असे.

16गरीब लोकांना मी वडिलांसारखा वाटत असे. मला माहीत नसलेल्या लोकांनादेखील मी मदत करीत असे. मी कोर्टात न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना मदत करीत असे.

17मी दुष्ट लोकांचे सामर्थ्य नष्ट केले. मी निरपराध लोकांचा त्यांच्यापासून बचाव केला.

18"मला नेहमी वाटायचे मी खूप वर्षे जगेन, मला स्वत:च्या घरातच मृत्यू येईल.

19मी खूप पाणी शोषून घेऊ शकणारी मुळे असलेल्या व ज्याच्या फांद्या दवाने ओल्या झालेल्या आहेत अशा झाडासारखा असेन, असे मला वाटत असे.

20मला रोज नवतरुण झाल्यासारखे वाटत असे. रोज नवीन बाण सोडण्याइतकी शक्ती आपल्यात आहे असे मला वाटत असे.

21"पूर्वी लोक माझे ऐकत असत माझ्या उपदेशाची वाट पाहात ते शांत बसत.

22मी माझे बोलणे संपवल्यानंतर ऐकणाऱ्यांना आणखी काही बोलायचे नसे. माझे शब्द त्यांच्या कानावर हळूवारपणे पडत.

23पावसाची वाट पाहिल्यासारखी ते माझ्या बोलण्याची वाट पाहात. वसंतातल्या पावसासारखे ते माझे शब्द पिऊन टाकत.

24काही लोकांनी आशा सोडून दिली होती. त्यांचे धैर्य खचले होते. परंतु मी त्यांच्याबरोबर हसलो. माझ्या हास्याने त्याना बरे वाटले.

25मी त्यांचा प्रमुख असूनही त्यांच्याबरोबर राहाण्याचे ठरवले. आपल्या सैन्याबरोबर तळ ठोकून बसलेल्या राजासारखा दु:खी असलेल्यांचे सांत्वन करणाऱ्या राजासारखा मी होतो.

30 परंतु आता माझ्यापेक्षा लहान माणसे देखील माझी थट्टा करत आहेत. आणि त्याचे पूर्वज इतके कवडी मोलाचे होते की मी त्यांना माझ्या मेंढ्यांची राखण करणाऱ्या कुत्र्यांमध्ये देखील ठेवले नसते.

2त्या तरुणांचे वडील मला मदत करण्याच्या दृष्टीने अगदीच कुचकामाचे आहेत. ते म्हातारे झाले आहेत आणि दमले आहेत. आता त्यांचे स्नायू टणक आणि जोमदार राहिलेले नाहीत.

3ते मृतप्राय झाले आहेत. खायला नसल्यामुळे त्यांची उपासमार होत आहे व म्हणून ते वाळवटांतील धूळ खात आहेत.

4ते वाळवटांतील क्षार-झुडपे उपटून घेतात. रतम नावाच्या झाडाची मुळे खातात.
5त्यांना दुसऱ्या माणसांपासून दूर ठेवण्यात येते. ते चोर दरोडेखोर असल्याप्रमाणे लोक त्यांच्यावर ओरडत असतात.
6त्यांना नदीच्या कोरड्या पात्रात, डोंगराळ भागातील गुहेत किंवा जमिनीतील विवरात राहावे लागते.
7ते झाडाझुडपात आक्रोश करतात. काटेरी झुडपात एकमेकांच्या आश्रयाने राहातात.
8ते काडी इतकेही मोल नसलेले लोक आहेत. काहीही नाव नसलेल्या या लोकांना त्यांच्या देशातून हाकलून दिले आहे.
9"अशा लोकांची मुले माझी चेष्टा करणारी गाणी गातात. त्यांच्या दृष्टीने माझे नाव म्हणजे एक शिवी आहे.
10ते तरुण माझा तिरस्कार करतात ते माझ्यापासून लांब उभे राहातात. ते माझ्यापेक्षा उच्च आहेत असे त्यांना वाटते. ते माझ्या तोंडावर थुंकतात सुध्दा.
11देवाने माझ्या धनुष्याची प्रत्यंचा काढून घेतली आणि मला दुबळा बनवले. ती तरुण माणसे स्वत:ला न थोपविता रागाने माझ्याविरुध्द वागतात.
12ते माझ्या उजव्या भागावर वार करतात. ते माझ्या पायावर वकरून पाडतात. एखाद्या शहरावर सैन्याने चालून जावे तसे मला वाटते. माझ्यावर हल्ला करून माझा नाश करण्यासाठी माझ्या तटबंदीला मातीचे चढाव बांधतात.
13मी पळून जाऊ नये म्हणून ते रस्त्यावर पहारा देतात. माझा नाश करण्यात त्यांना यश मिळते. कुणाच्या मदतीची त्यांना गरज नसते.
14ते भिंतीला भोक पाडतात. ते त्यातून आत घुसतात आणि माझ्यावर दरडी कोसळतात.
15भीतीने माझा थरकाप झाला आहे. वाऱ्याने सगळे काही उडून जावे त्याप्रमाणे त्यांनी माझी प्रतिष्ठा उडवून लावली आहे. माझी सुरक्षितता ढगांप्रमाणे नाहीशी झाली आहे.
16"माझे आयुष्य आता गेल्यातच जमा आहे आणि मी लवकरच मरणार आहे. दु:खानी भरलेल्या दिवसांनी मला वेढून टाकले आहे.
17माझी सगळी हाडे रात्री दुखतात. वेदना मला कुरतडणे थांबवत नाहीत.
18देवाने माझ्या कोटाची कॉलर खेचून माझे कपडे आकारहीन केले आहेत.
19देवाने मला चिखलात फेकून दिले आणि माझी राख व कचरा झाला.
20देवा मी मदतीसाठी तुझी याचना करतो पण तू उत्तर देत नाहीस. मी उभा राहातो व तुझी प्रार्थना करतो पण तू माझ्याकडे लक्ष देत नाहीस.
21देवा तू माझ्याशी फार नीचपणे वागतोस. तू तुझ्या बळाचा उपयोग मला दु:ख देण्यासाठी करतोस.
22देवा तू सोसाट्याच्या वाऱ्याने मला उडवून लावतोस. देवा तू मला वादळात फेकून देतोस.
23तू मला माझ्या मृत्यूकडे नेत आहेस हे मला माहीत आहे. प्रत्येक जिवंत माणसाला मरावे हे लागतेच.
24"परंतु जो आधीच दु:खाने पोळला आहे आणि मदतीची याचना करीत आहे त्याला कुणी अधिक दु:ख देणार नाही.
25देवा, मी संकटात सापडलेल्यांसाठी मदतीची याचना केली होती हे तुला माहीत आहे. गरीबांसाठी माझे हृदय तीळ तीळ तुटत होते हे ही तुला माहीत आहे.
26परंतु मी जेव्हा चांगल्याची अपेक्षा करीत होतो तेव्हा माझ्या वाट्याला वाईट गोष्टी आल्या. मला उजेड हवा होता तेव्हा अंधार मिळाला.
27मी आतून अगदी मोडून गेलो आहे. माझ्या वेदना कधीच थांबत नाहीत आणि वेदना आणखी येणारच आहेत.
28मी सदैव दु:खी असतो, पण मला स्वास्थ्य लाभत नाही. मी लोकांच्यात उभा राहून मदतीसाठी ओरडतो.
29रानटी कुत्र्यांसारखा व वळवंटातील शहामृगासारखा मी एकटा आहे.
30माझी कातडी काळी पडली आहे आणि शरीर तापाने फणफणले आहे.
31माझे वाद्य दु:खी गाणे गाण्यासाठीच लावले गेले आहे. माझ्या बासरीतून रडण्याचेच सूर उमटत आहेत.

31 "रस्त्यातल्या मुलीकडे अभिलाषेने न बघण्याचा करार मी माझ्या डोळ्यांशी केला आहे.
2तो सर्वशक्तिमान देव लोकांना काय करतो? तो त्याच्या स्वर्गातील घरातून लोकांची परतफेड कशी करतो?
3देव दुष्टासाठी संकटे आणि विनाश पाठवतो. आणि जे चुका करतात त्यांच्यासाठी अरिष्टे पाठवतो.
4मी जे काही करतो ते देवाला दिसते. माझी प्रत्येक हालचाल तो बघतो.
5"मी खोटे बोललो नाही व लोकांना फसविण्याचा प्रयत्न केलेला नाही.
6जर देव योग्य तागडी वापरेल तर त्याला समजेल की मी निरपराध आहे.
7मी जर योग्य मार्गापासून दूर गेलो असेन आणि माझ्या डोळ्यांनी जर माझ्या मनाला वाईटाकडे वळवले असेल किंवा माझे हात पापांनी बरबटलेले असतील
8तर इतरांना मी पेरलेले धान्य खाऊ दे. आणि माझे पीक उपटून घेऊ दे.
9"माझ्या मनात स्त्रियांबद्दल लंपट भावना उत्पन्न झाली असेल किंवा शेजाऱ्याच्या बायको बरोबर व्यभिचार करण्यासाठी त्याच्या घराचे दार उघडण्याची मी वाट पहात असेन.
10तर माझ्या बायकोला दुसऱ्याचे अन्न शिजवू दे आणि दुसऱ्यांना तिची शय्यासोबत करु दे.

11का? कारण लैंगिक पाप लज्जास्पद आहे. या पापाला
शिक्षा झालीच पाहिजे.
12लैंगिक पाप माझ्या सर्वस्वाचा नाश करील. सर्वस्वाचा
होम करणारी ती आग आहे.
13“माझे गुलाम माझ्या विरुध्द तक्रार करतात तेव्हा मी
न्यायाने वागण्याचे मान्य केले नाही,
14तर मी जेव्हा देवासमोर जाईन तेव्हा मी काय करू?
देवाने माझ्या वागण्याचा जाब विचारला तर मी काय
उत्तर देऊ?
15देवाने मला माझ्या आईच्या शरीरात निर्माण केले
आणि त्यानेच माझ्या गुलामांनाही घडवले. देवाने आपल्या
सर्वांचीच आईच्या पोटात निर्मिती केली आहे.
16“मी गरीबांना मदत करणे कधीच अमान्य केले नाही.
मी विधवांना नहेमीच त्यांना ज्याची गरज असते ते दिले.
17मी माझ्या अन्नाविषयी कधीच स्वार्थी नव्हतो. मी
पोरक्यांना नेहमी अन्न दिले आहे.
18मी जन्मभर पोरक्यांचा बाप बनलो. मी विधवांची
काळजी वाहिली.
19जेव्हा जेव्हा मला कपडे नाहीत म्हणून दु:खी होणारे
लोक दिसले किंवा कोट नसलेले गरीब लोक दिसले.
20त्यांना मी नेहमी कपडे दिले. मी माझ्या मेंढ्यांची
लोकर त्यांना उबदार ठेवण्यासाठी वापरली आणि त्यांनी
अंत:करणापासून मला आशीर्वाद दिले.
21माझ्या दाराजवळ एखादा पोरका मुलगा मदतीसाठी
आलेला मला दिसला तर मी त्याच्यावर कधीही हात
उगारला नाही.*
22मी जर कधी असे केले तर माझा हात माझ्या
खांद्यांपासून निखळून पडो मी जर कधी असे केले तर
माझा हात माझ्या खांद्याच्या सांध्यातून तुटून पडो.
23परंतु यापैकी कुठलीही वाईट गोष्ट मी केली नाही.
मला देवाच्या शिक्षेची भीती वाटते. परमेश्वराच्या महतीला
मी* घाबरतो.
24“मला माझ्या श्रीमंतीचा कधीच भरंवसा वाटला नाही.
देव मला मदत करेल याचा मला नेहमीच विश्वास वाटला.
‘तू माझी आशा आहेस असे’ मी शुध्द सोन्याला कधीच
म्हटले नाही.
25मी श्रीमंत होतो पण मला त्याचा अभिमान नव्हता.
मी खूप पैसे कमावले पण मी सुखी झालो नाही.
26मी चकाकत्या सूर्याची किंवा सुंदर चंद्राची कधीच
पूजा केली नाही.
27सूर्य, चंद्राची पूजा करण्याइतका मूर्ख मी कधीच
नव्हतो.
28ते सुध्दा शिक्षा करण्यासारखेच पाप आहे. मी जर
त्या गोष्टींची पूजा केली असती तर सर्वशक्तिमान देवाचा
विश्वासघात केल्यासारखे झाले असते.

29“माझ्या शत्रूंचा पाडाव झाल्याचा मला कधीच आनंद
वाटला नाही. माझ्या शत्रूंवर संकट कोसळल्यामुळे मी
त्यांना कधी हसलो नाही.
30माझ्या शत्रूंना शाप देऊन आणि त्यांच्या मरणाची
इच्छा करून मी माझ्या तोंडाला कधी पाप करायला
लावले नाही.
31मी अपरिचितांना अन्न देतो हे माझ्या घरातील सर्वांना
माहीत आहे.
32परदेशी लोकांना रात्रीच्या वेळी रस्त्यावर झोपायला
लागू नये म्हणून मी त्यांना माझ्या घरी बोलावतो.
33इतर लोक त्यांचे पाप लपवायचा प्रयत्न करतात
परंतु मी माझा अपराध लपवायचा कधीच प्रयत्न केला
नाही.
34लोक काय म्हणतील याची भीती मी कधीच बाळगली
नाही. मी भीतीपोटी कधीच गप्प बसलो नाही. भीतीमुळे
मी बाहेर पडायला कचरलो नाही. मला लोकांच्या
तिरस्काराची भीती वाटत नाही.
35“माझे कुणीतरी ऐकावे असे मला वाटते. मला माझी
बाजू मांडू द्या. सर्वशक्तिमान देवाने मला उत्तर द्यावे अशी
माझी इच्छा आहे. त्याच्या दृष्टीने मी काय चूक केली ती
त्याने लिहून काढावी असे मला वाटते.
36नंतर मी ती खूण माझ्या गळ्याभोवती घालेन. मी ती
राजमुकुटाप्रमाणे माझ्या मस्तकावर ठेवेन.
37देवाने जर असे केले तर मी जे काही केले त्याचे
स्पष्टीकरण देऊ शकेन. एखाद्या पुढाऱ्याप्रमाणे माझे
मस्तक उंच करून मी देवाकडे येऊ शकेन.
38“मी दुसऱ्याकडून त्याची जमी हिसकावून घेतली
नाही. माझी जमीन चोरुन घेतली आहे असा आरोप
माझ्यावर कुणीही करु शकणार नाही.
39मी शेतकऱ्यांना माझ्या शेतातून मिळणाऱ्या
धान्याबद्दल नेहमी मोबदला दिला आहे. आणि जे जमिनीचे
मालक आहेत त्यांच्याकडून जमीन घेण्याचा प्रयत्न मी
कधीही केला नाही.
40मी यापैकी कुठलीही वाईट गोष्ट केली असेल तर
माझ्या शेतात गहू आणि सातू या ऐवजी काटे आणि गवत
उगवू दे ” ईयोबचे शब्द इथे संपले.

## अलीहू युक्तिवादात आपली भर घालतो

32 नंतर ईयोबच्या तीन मित्रांनी ईयोबला उत्तर देणे
सोडून दिले. त्यांनी ते सोडून दिले कारण ईयोबला
स्वत:च्या निर्दोषपणाविषयी खात्री होती. 2परंतु तिथे अलीहू
नावाचा तरुण मुलगा होता. अलीहू बरखेलचा मुलगा
होता. बरखेल बूजचा वंशज होता. अलीहू राम

---

**एक विसावे कडवे** किंवा “मला न्यायालयात पाठिंबा मिळत आहे असे दिसले तरी मी पोरक्याला कधी धमकी दिली नाही.”

**परमेश्वराच्या ... मी** किंवा “मी परमेश्वरापुढे उभा राहू शकलो नाही.”

घराण्यातील होता. अलीहू ईयोबवर खूप रागावला.
का? कारण ईयोब आपण स्वत: बरोबर आहोत असे
म्हणत होता. ईयोब म्हणत होता की आपण देवापेक्षाही
अधिक न्यायी आहोत. 3अलीहू ईयोबच्या तीन
मित्रांवरदेखील रागावला. का? कारण ईयोबचे तीन मित्र
ईयोबच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकले नाहीत. ईयोब चुकला
हे ते सिध्द करु शकले नाहीत. 4अलीहू तिथे सगळ्यांत
लहान होता. म्हणून तो सगळ्यांचे बोलणे संपेपर्यंत
थांबला. नंतर आपण बोलायला सुरुवात करावी असे
त्याला वाटले. 5परंतु नंतर अलीहूला दिसले की ईयोबच्या
तीन मित्रांकडे काहीच बोलायचे उरले नाही. म्हणून त्याला
राग आला. 6म्हणून त्याने बोलायला सुरुवात केली. तो
म्हणाला:

"मी खूप तरुण आहे आणि तुम्ही वृध्द आहात. म्हणून
तुम्हाला काही सांगायला मी घाबरत होतो.

7मी माझ्याशीच विचार केला. 'वृध्दांनी आधी बोलायला
पाहिजे. वृध्द खूप वर्ष जगलेले असतात, त्यामुळे ते खूप
गोष्टी शिकलेले असतात.'

8परंतु देवाचा आत्मा लोकांना शहाणे करतो. त्या
सर्वशक्तिमान देवाचा 'नि:श्वास' लोकांना समजण्यास मदत
करतो.

9केवळ वृध्द माणसेच तेवढी शहाणी नसतात. केवळ
वृध्दांनाच चांगले वाईट कळते असे नाही.

10"तेव्हा कृपा करून माझे ऐका! मी तुम्हांला माझे
विचार सांगतो.

11मी तुमचे बोलणे संपेपर्यंत धीर धरला. तुम्ही ईयोबला
जी उत्तरे दिलीत ती मी ऐकली.

12तुम्ही ज्या गोष्टी सांगितल्या त्या मी लक्षपूर्वक ऐकल्या.
तुमच्या पैकी कुणीही ईयोबवर टीका केली नाही.
तुमच्यापैकी एकानेही त्याच्या मुद्यांना उत्तरे दिली नाहीत.

13तुम्ही तिघे तुम्हांला शहाणपण मिळाले असे म्हणू
शकत नाही. ईयोबच्या मुद्यांना देवानेच उत्तरे दिली पाहिजेत,
माणसांनी नाही.

14ईयोबने त्याचे मुद्दे माझ्यासमोर मांडले नाहीत. म्हणून
तुम्ही तिघांनी ज्या मुद्यांचा उपयोग केला त्यांचा उपयोग मी
करणार नाही.

15"ईयोब, हे तिघेही वाद हरले आहेत. त्यांच्या जवळ
बोलायला आणखी काही उरले नाही. त्यांच्या जवळ आणखी
उत्तरे नाहीत.

16ईयोब, यांनी तुला उत्तरे द्यावीत म्हणून मी थांबलो
होतो. परंतु ते आता गप्प आहेत. त्यांनी तुझ्याशी वाद
घालणे आता बंद केले आहे.

17म्हणून आता मी तुला माझे उत्तर देतो. होय मला
काय वाटते ते मी तुला आता सांगतो.

18मला इतके काही सांगायचे आहे की मी आता फुटून
जाईन की काय असे वाटते.

19मी द्राक्षरसाच्या न फोडलेल्या बाटलीसारखा आहे.
द्राक्षरसाच्या नव्या बुधल्याप्रमाणे मी फुटण्याच्या बेतात
आहे.

20म्हणून मला बोललेच पाहिजे तरच मला बरे वाटेल.
मी बोलले पाहिजे आणि ईयोबच्या मुद्यांना उत्तरे दिली
पाहिजेत.

21मी इतर कुणाला वागवतो त्याप्रमाणे ईयोबला वागवले
पाहिजे. मी त्याच्याशी उगीचच चांगले बोलायचा प्रयत्न
करणार नाही. मला जे बोलायला हवे तेच मी बोलेन.

22 एकापेक्षा दुसऱ्याला अधिक चांगले वागवणे मला
शक्य नाही. मी जर असे केले तर देव मला शिक्षा
करेल.

33 "ईयोब, आता माझ्याकडे लक्ष दे. मी काय म्हणतो
ते लक्षपूर्वक ऐक.

2मी आता बोलायला तयार झालो आहे.

3माझे अंत:करण प्रामाणिक आहे. म्हणून मी प्रामाणिक
शब्दच बोलेन. मला जे माहीत आहे त्याबद्दल मी सत्य
तेच सांगेन.

4देवाच्या आत्म्याने मला निर्माण केले. मला
सर्वशक्तिमान देवाकडून जीवन मिळाले.

5ईयोब, माझे बोलणे ऐक आणि तुला शक्य झाले तर
मला उत्तर दे. माझ्याशी वाद घालण्याकरता तुझी उत्तरे
तयार ठेव.

6देवासमोर तू आणि मी सारखेच आहोत. आपल्याला
निर्माण करण्यासाठी देवाने माती वापरली.

7ईयोब, माझी भीती बाळगू नकोस. मी तुझ्याशी कडक
वागणार नाही.

8"पण ईयोब, तू जे बोललास ते मी ऐकले.

9तू म्हणालास, 'मी शुध्द आहे, मी निरपराध आहे, मी
काहीही चूक केली नाही. मी अपराधी नाही.

10मी काही चूक केली नाही तरीही देव माझ्याविरुध्द
आहे. देवाने मला शत्रूप्रमाणे वागवले आहे.

11देवाने माझ्या पायाला साखळदंड बांधले. देव माझी
प्रत्येक हालचाल बघतो.'

12"परंतु ईयोब, तू या बाबतीत चुकतो आहेस. आणि
तुझी चूक मी सिध्द करून दाखवेन. का? कारण देवाला
कोणत्याही माणसापेक्षा अधिक माहिती असते.* 13ईयोब,
तू देवाशी वाद घालत आहेस. देवाने तुला सर्व काही नीट
सांगावे असे तुला वाटते.

14परंतु देव जे काही करतो ते खरोखरच स्पष्ट करून
सांगत असेल. कदाचित् देव निराळ्या रीतीने बोलत असेल
आणि लोकांना ते समजत नसेल.

15–16देव कदाचित् लोकांशी रात्री ते झोपेत असताना
स्वप्नात किंवा दृष्टांतात बोलत असेल आणि तेव्हा देवाची
ताकीद ऐकून ते खूप भयभीत होत असतील.

---

**देव ... असते** किंवा "देव माणसापेक्षा खूपच महान आहे."

[17]देव लोकांना चुकीच्या गोष्टी करणे बंद करण्याची ताकीद देतो आणि गर्व न करण्याचेही सांगतो.

[18]देव लोकांना मृत्युलोकात जाण्यापासून वाचविण्यासाठी ताकीद देत असतो. देव हे सारे माणसाला नष्ट होण्यापासून वाचविण्यासाठी करतो.

[19]"किंवा एखाद्याला देवाचा आवाज तेव्हा ऐकू येईल जेव्हा तो देवाने केलेल्या शिक्षेमुळे अंथरुणात पडून दुःख भोगत असेल. देव त्याला दुःख देऊन ताकीद देत असतो. तो माणूस वेदनेने इतका तळमळत असतो की त्याची सगळी हाडे दुखतात.

[20]नंतर तो माणूस खाऊ शकत नाही. तो वेदनेने इतका तळमळतो की चांगल्या अन्नाचासुध्दा त्याला तिरस्कार वाटतो.

[21]त्याचे शरीर इतके क्षीण होते की तो जवळ जवळ दिसेनासा होतो. त्याची सगळी हाडे दिसतात.

[22]तो मृत्यूलोकांजवळ येऊन ठेपतो आणि त्याचे जीवन मरणपंथाला लागलेले असते.

[23]"देवाजवळ हजारो देवदूत असतात. कदाचित् त्यांच्याच पैकी एखादा त्या माणसावर लक्ष ठेवून असेल. तोच देवदूत त्याच्याबद्दल बोलेल आणि त्याच्या चांगल्या कृत्यांबद्दल सांगेल.

[24]देवदूत त्याच्याशी दयेने वागेल. कदाचित् देवदूत देवाला सांगेल. 'या माणसाला मृत्युलोकात जाण्यापासून वाचव. त्याच्या पापाची किंमत मोजण्याचा दुसरा एक मार्ग मला सापडला आहे.'

[25]नंतर त्या माणसाचे शरीर पुन: तरुण आणि जोमदार बनेल. तो तरुणपणी जसा होता तसाच पुन्हा होईल.

[26]तो देवाची प्रार्थना करेल आणि देव त्याला उत्तर देईल. तो माणूस आनंदाने ओरडेल आणि देवाची भक्ती करेल. नंतर तो मनुष्य पुन्हा चांगले जीवन जगायला लागेल.

[27]नंतर तो लोकांना कबुली देईल. तो म्हणेल, 'मी पापकर्म केले. मी चांगल्याचे वाईट केले. पण देवाने मला जितकी वाईट शिक्षा करायला हवी होती तितकी केली नाही.

[28]देवाने माझ्या आत्म्याला मृत्युलोकात जाण्यापासून वाचवले. आता मी पुन्हा आयुष्य उपभोगू शकतो.'

[29]"देव त्या माणसासाठी या गोष्टी पुन्हा पुन्हा करतो.

[30]का? त्या माणसाला ताकीद देण्यासाठी आणि त्याच्या आत्म्याला मृत्युलोकात जाण्यापासून वाचवण्यासाठी देव असे करतो असे केल्यामुळे तो त्याचे आयुष्य उपभोगू शकेल.

[31]"ईयोब, मी काय म्हणतो त्याकडे लक्ष दे. माझे ऐक! तू गप्प रहा आणि मला बोलू दे.

[32]पण ईयोब, जर तुला माझे बोलणे पटत नसेल तर तू खुशाल बोल. मला तुझे मुद्दे सांग. कारण मला तुझे बोलणे सुधारायचे आहे.

[33]परंतु ईयोब, तुझ्याजवळ बोलण्यासारखे काही नसेल तर माझे ऐक. तू गप्प रहा आणि मी तुला शहाणपण शिकवेन."

34 नंतर अलीहूने आपले बोलणे चालूच ठेवले तो म्हणाला:

[2]"शहाण्या माणसांनो मी काय सांगतो ते ऐका. हुशार माणसांनो, माझ्याकडे लक्ष द्या.

[3]तुमची जीभ ज्या अन्नाला स्पर्श करते त्याची चव तिला कळते आणि तुमच्या कानांवर जे शब्द पडतात ते त्यांना पारखता येतात.

[4]तेव्हा आपण आता या मुद्यांची तपासणी करु या आणि काय योग्य आहे याचा निर्णय करु या. काय चांगले आहे ते आपण सगळ्यांनी बरोबर शिकू या.

[5]ईयोब म्हणतो, 'मी, ईयोब निष्पाप आहे, आणि देव माझ्या बाबतीत न्यायी नाही.

[6]मी निरपराध आहे, परंतु माझ्याविरुध्द लागलेला निकाल मला खोटारडा ठरवतो. मी निरपराध असूनही मला खूप कष्ट भोगायला लागले.'

[7]"ईयोबसारखा आणखी कुणी आहे का? तुम्ही ईयोबची मानहानी केली तरी तो त्याकडे दुर्लक्ष करतो.

[8]ईयोब वाईटांशी मैत्री करतो त्याला दुष्टांबरोबर राहायला आवडते.

[9]मी असे का म्हणतो? कारण ईयोब म्हणतो की, 'माणूस जर देवाला खुश करायला लागलो तर त्याला त्यापासून काहीही मिळणार नाही.'

[10]"तुम्हाला समजू शकते, म्हणून तुम्ही माझे ऐका. जे वाईट आहे ते देव कधीही करणार नाही. तो सर्वशक्तिमान देव कधीच चुकणार नाही.

[11]एखादा माणूस जे काही करतो त्याबद्दल देव त्याची परतफेड करील. देव लोकांना त्यांच्या लायकीप्रमाणे देतो

[12]हे सत्य आहे देव कधीही चुकत नाही, सर्वशक्तिमान देव नेहमीच न्यायी असतो.

[13]देवाला कुणीही पृथ्वीवरचा अधिकारी म्हणून निवडले नाही. सगळ्या जगाची काळजी देवावर कुणी सोपवली नाही. सारे काही देवानेच निर्माण केले आहे आणि सारे त्याच्याच नियंत्रणाखाली आहे.

[14]जर देवाने पृथ्वीवरील लोकांचा आत्मा आणि श्वास घेऊन

[15]टाकायचे ठरवले तर पृथ्वीवरील सर्वजण मरतील. सगळ्याची परत माती होईल.

[16]"जर तुम्ही शहाणे असाल तर मी काय म्हणतो त्याकडे लक्ष द्याल.

[17]जो माणूस न्यायी होण्यासंबंधी तिरस्कार करतो तो कधीच राज्यकर्ता होऊ शकत नाही. ईयोब, देव शक्तिमान आणि चांगला आहे. तू त्याला अपराधी ठरवू शकशील असे तुला वाटते का?

18एक देवच असा आहे जो राजांना ‘तुम्ही कवडीमोलाचे आहात’ असे म्हणू शकतो. देव पुढाऱ्यांना, ‘तुम्ही वाईट आहात.’ असे सांगू शकतो.

19देव इतरांपेक्षा पुढाऱ्यांवर अधिक प्रेम करीत नाही. देव गरीब माणसांपेक्षा श्रीमंतांवर अधिक प्रेम करत नाही. का? कारण त्यानेच प्रत्येकाला निर्माण केले आहे.

20माणसे अर्ध्यारात्री एकाएकी मरुन जातात. ते आजारी पडतात आणि मरतात. अगदी शक्तिशाली लोकसुध्दा, कारण नसताना मरतात.

21“लोक जे करतात ते देव बघतो. देव माणसाची प्रत्येक हालचाल बघत असतो.

22जगात कुठेही अशी अंधारी जागा नाही जिथे वाईट माणसे देवापासून लपून बसू शकतील.

23देवाला लोकांची अधिक परीक्षा घेण्यासाठी वेळ ठरवण्याची गरज नसते. लोकांचा न्यायनिवाडा करण्यासाठी त्यांना समोर आणण्याची गरजही देवाला भासत नाही.

24“शक्तिशाली लोकांनी वाईट कृत्ये केल्यावर देवाला त्यांना प्रश्न विचारण्याची गरज वाटत नाही. तो सहजपणे त्यांचा नाश करु शकतो आणि त्यांच्या जागी इतरांना पुढारी बनवू शकतो.

25तेव्हा लोक काय करतात ते देवाला माहीत असते. म्हणूनच देव रात्रीतून दुष्टांचा पराभव करतो आणि त्यांचा नि:पात करतो.

26वाईट माणसांनी जी दुष्कृत्ये केली असतील त्याबद्दल देव त्यांना शिक्षा करतो. आणि जिथे इतर लोक त्यांना पाहू शकतील अशा ठिकाणी देव त्यांना शिक्षा करतो.

27का? कारण वाईट माणसांनी देवाची आज्ञा पाळायचे थांबवले आणि देवाला हवे ते करण्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले.

28हे दुष्ट लोक गरीबांना कष्ट देतात, आणि मदतीसाठी देवाकडे याचना करायला भाग पाडतात.

29देव गरीबांची मदतीसाठी हाक ऐकतो. परंतु गरीबांना मदत करायची नाही असे देवाने ठरवले तरी देवाला कुणी अपराधी ठरवू शकणार नाही. देवाने जर लोकांपासून लपून राहायचे असे ठरवले तर कोणालाही तो सापडू शकणार नाही. तो लोकांवर आणि राज्यांवर राज्य करणारा राज्यकर्ता आहे.

30परंतु जर एखादा माणूस वाईट असेल आणि इतरांना पाप करायला भाग पाडत असेल तर देव त्या माणसाला कधीही राज्यकर्ता होऊ देणार नाही.

31जर तो माणूस देवाला म्हणेल की, “मी अपराधी आहे. यापुढे मी पाप करणार नाही.

32देवा, मी जरी तुला बघू शकत नसलो, तरी तू मला जगण्याचा योग्य मार्ग दाखव. मी जरी चुका केल्या असल्या तरी मी त्या पुन्हा करणार नाही.’ तरच असे घडेल.

33“ईयोब, तुला देवाने बक्षीस द्यावे असे वाटते. परंतु तू मात्र बदलायला तयार नाहीस. ईयोब, हा तुझा निर्णय आहे. माझा नाही. तुला काय वाटते ते मला सांग.

34शहाणा माणूस माझे ऐकेल. शहाणा माणूस म्हणेल.

35‘ईयोब एखाद्या अज्ञानी माणसासारखे बोलत आहे. तो जे काही बोलतो ते अर्थहीन आहे.’

36ईयोबला अजून शिक्षा करायला हवी असे मला वाटते. का? कारण ईयोब एखाद्या वाईट माणसासारखे आपल्याला उत्तर देत आहे.

37ईयोब त्याच्या पापात बंडाची भर घालीत आहे. ईयोब इथे आपल्यासमोर बसून आपला अपमान करतो आहे आणि देवाची थट्टा करतो आहे.”

35 अलीहूने आपले बोलणे चालू ठेवले. तो म्हणाला:

2“ईयोब, ‘मी देवापेक्षा अधिक बरोबर आहे’ हे तुझे म्हणणे योग्य नाही.

3आणि ईयोब तू देवाला विचारतोस ‘जर एखाद्या माणसाने देवाला खुश करण्याचा प्रयत्न केला तर त्याला काय मिळेल? मी जर पाप केले नाही तर त्यामुळे माझे काय चांगले होणार आहे?’

4“ईयोब, मी (अलीहू) तुला आणि तुझ्या मित्रांना उत्तर देण्याची इच्छा करतो.

5ईयोब, तुझ्यापेक्षा उंच असणाऱ्या आकाशाकडे, ढगांकडे बघ.

6ईयोब, तू पाप केलेस तर त्यामुळे देवाला कसली इजा होत नाही. तुझ्याकडे पापांच्या राशी असल्या तरी त्यामुळे देवाला काही होत नाही.

7आणि ईयोब, तू खूप चांगला असलास तरी त्यामुळे देवाला कसली मदत होत नाही. देवाला तुझ्याकडून काहीच मिळत नाही.

8ईयोब, तू ज्या चांगल्या आणि वाईट गोष्टी करतोस त्यांचा परिणाम तुझ्यावर आणि तुझ्यासारख्या इतरांवर होतो. त्यामुळे देवाला मदत होते किंवा त्याला दु:ख होते असे नाही.

9“जर वाईट लोकांना दु:ख झाले तर ते मदतीसाठी ओरडतील. ते सामर्थ्यवान लोकांकडे जातात आणि मदतीची याचना करतात.

10परंतु जे वाईट लोक देवाकडे मदत मागत नाहीत. ते असे म्हणणार नाहीत: ‘मला निर्माण करणारा देव कुठे आहे? लोक दु:खी कष्टी असले की देव त्यांना मदत करतो. आता तो कुठे आहे?’

11‘देवाने आम्हाला पशुपक्ष्यांपेक्षा शहाणे बनवले आहे तेव्हा तो कुठे आहे?’

12“किंवा त्या वाईट माणसांनी देवाकडे मदत मागितली तरी देव त्यांना उत्तर देणार नाही. का? कारण ते लोक अतिशय गर्विष्ठ आहेत आपण फार मोठे आहोत. असे त्यांना अजूनही वाटते.

13देव त्यांच्या तुच्छ याचनेकडे लक्ष देणार नाही हे खरे आहे. सर्वशक्तिमान देव त्यांच्याकडे लक्ष देणार नाही.

14तेव्हा ईयोब, तू जेव्हा असे म्हणशील की देव तुला दिसत नाही तेव्हा देव तुझ्याकडे लक्ष देणार नाही. तू देवाला भेटण्याची आणि त्याला तू निरपराध आहेस हे पटवून देण्याच्या संधीची वाट पहात आहेस असे म्हण.

15“ईयोब, देव वाईट लोकांना शिक्षा करत नाही असे तुला वाटते. तो पापाकडे लक्ष देत नाही असेही तुला वाटते.

16म्हणून ईयोब त्याचे निरर्थक बोलणे चालूच ठेवतो. आपण खूप मोठे असल्याचा आव ईयोब आणतो. परंतु आपण काय बोलत आहोत हे ईयोबला कळत नाही हे सहजपणे समजून येते.”

36 अलीहू बोलणे चालू ठेवून म्हणाला:
2“तू माझ्यासाठी आणखी थोडा धीर धर. देवाने मला आणखी बोलायला सांगितले आहे.

3मी माझे ज्ञान सगळ्यांना वाटतो. देवाने मला निर्माण केले आणि देव न्यायी आहे हे मी सिध्द करेन.

4ईयोब, मी खरे बोलत आहे आणि मी काय बोलतो आहे ते मला समजत आहे.

5“देव अतिशय सामर्थ्यवान आहे, पण तो लोकांचा तिरस्कार करीत नाही. तो सामर्थ्यवान असून फार सूज्ञ आहे.

6देव दुष्टांना जगू देणार नाही आणि तो गरीबांना नेहमीच न्यायाने वागवितो.

7जे लोक योग्य रीतीने वागतात त्यांच्यावर देव नजर ठेवतो. तो चांगल्या लोकांना राज्य करु देतो. तो चांगल्यांना सदैव मान देतो.

8म्हणून जर कुणाला शिक्षा झाली व त्यांना साखळदंडानी वा दोरीनी बांधून ठेवण्यात आले तर त्यांनी नक्कीच काही वाईट केले असणार.

9आणि त्यांनी काय चूक केली ते देव त्यांना सांगेल. देव त्यांना सांगेल की त्यांनी पाप केले आहे. देव त्यांना ते गर्विष्ठ होते असे सांगेल.

10देव त्या लोकांना त्याची ताकीद आणि सुधारणेच्या सूचना ऐकायला भाग पाडेल. तो त्यांना पाप न करण्याची आज्ञा देईल.

11जर त्या लोकांनी देवाचे ऐकले, त्याची आज्ञा मानली, तर देव त्यांना यशस्वी करेल. आणि ते त्यांचे आयुष्य सुखाने जगतील.

12परंतु जर त्यांनी देवाची आज्ञा पाळायचे नाकारले तर त्यांचा नाश होईल. त्यांना ज्ञान न होता मरण येईल.

13जे लोक देवाची पर्वा करीत नाहीत ते सदा कटू (रागावलेले) असतात. देवाने जरी त्यांना शिक्षा केली तरी ते देवाकडे मदत मागायला तयार नसतात.

14ते लोक पुरुष वेश्यासारखे अगदी तरुणपणी मरतील.

15परंतु देव दु:खी लोकांना त्यांच्या दु:खातून सोडवील. देव त्या दु:खाचा उपयोग लोकांना जागवण्यासाठी आणि त्यांनी त्याचे ऐकावे यासाठी करतो.

16“ईयोब, देवाला तुला मदत करायची इच्छा आहे. तू तुझ्या दु:खातून बाहेर पडावेस असे देवाला वाटते. तुझे आयुष्य साधे सरळ असावे अशी त्याची इच्छा आहे. तुझ्या जेवणाच्या टेबलावर अन्नाची रेलचेल असावी असे त्याला वाटते.

17परंतु ईयोब, आता तुला अपराधी ठरवण्यात आले आहे, म्हणून तुला दुष्टांप्रमाणे शिक्षा करण्यात आली.

18ईयोब, तू श्रीमंतीमुळे मूर्ख बनू नकोस. पैशामुळे तू आपला विचार बदलू नकोस.

19आता तुझा पैसा तुझ्या कामी येणार नाही. आणि सामर्थ्यवान माणसे तुला मदत करणार नाहीत.

20आता रात्र होण्याची इच्छा मनी बाळगू नकोस. लोक रात्री पसार व्हायचा प्रयत्न करतात. आपण देवापासून लपून राहू शकू असे त्यांना वाटते.

21ईयोब, तू खूप त्रास भोगला आहेस पण म्हणून वाईटाची निवड करु नकोस. चूक न करण्याची दक्षता घे.

22“देवाजवळ खूप शक्ती आहे. तो जगातला सगळ्यात मोठा गुरु आहे.

23काय करावे ते देवाला कुणी सांगू शकत नाही ‘देवा तू अयोग्य केलेस’ असे कुणी त्याला म्हणू शकत नाही.

24“देवाने जे काही केले त्याबद्दल नेहमी त्याची स्तुती करायची आठवण ठेव. लोकांनी देवाच्या स्तुतीवर अनेक गाणी रचली आहेत

25देवाने काय केले ते प्रत्येकाला दिसते. दूरदूरच्या देशांतील लोकांनाही देवाचे महान कार्य दिसतात.

26होय, देव महान आहे परंतु त्याची महानता आपल्याला कळत नाही. आणि देवाचे अस्तित्व कधीपासून आहे तेही आपल्याला माहीत नाही.

27“देव पृथ्वीवरुन पाणी घेऊन त्याचे धुके आणि पाऊस यात रूपांतर करतो.

28अशा रीतीने ढग पाऊस पाडतात आणि तो खूप लोकांवर पडतो.

29देव ढगांची पखरण कशी करतो किंवा आकाशात ढगांचा गडगडाट कसा होतो ते कुणाला कळत नाही.

30बघ, देव विजेला पृथ्वीवर सर्वदूर पाठवतो आणि समुद्राचा खोल भागही त्यात येतो.

31देव त्याचा उपयोग राष्ट्रांना काबूत ठेवण्यासाठी करतो आणि त्यांना भरपूर अन्न देतो.

32देव आपल्या हातांनी विजेला पकडतो आणि त्याला हवे तेथे पडण्याची तिला आज्ञा करतो.

33मेघांच्या गडगडाटामुळे वादळाची सूचना मिळते. जनावरांना सुध्दा वादळाची चाहूल लागते.

37 “गडगडाट व वीजा ह्यांची मला भिती वाटते. तेव्हा माझ्या हृदयाची धडधड वाढते.

[2]प्रत्येक जण लक्षपूर्वक ऐका! देवाचा आवाज गडगडाटासारखा वाटतो. देवाच्या मुखातून येणारा गडगडाटासारखा आवाज ऐका.

[3]देव त्याच्या विजेला सर्व आकाशात चमकण्यासाठी पाठवतो. ती सर्व पृथ्वीभर चमकते.

[4]वीज चमकते तेव्हा देव गडगडाटी आवाज काढतो. देव त्याच्या अद्भुत आवाजात गर्जतो. वीज चमकल्यानंतर देवाची गर्जना ऐकू येते.

[5]"देवाचा गडगडाटी आवाज अद्भुत आहे. देव आपल्याला न कळणाऱ्या महान गोष्टी करत असतो.

[6]देव 'हिमाला पृथ्वीवर पडण्याची आज्ञा करतो.' देव 'पावसाला पृथ्वीवर जोरात पड असे सांगतो.'

[7]देवाने निर्माण केलेल्या सर्व लोकांना तो काय करु शकतो हे कळावे म्हणून देव या गोष्टी करतो हा त्याचा पुरावा आहे.

[8]पशू त्यांच्या घरकुलात जातात आणि तेथेच राहतात.

[9]दक्षिणेकडून चक्रीवादळ येते. उत्तरेकडून थंड वारे येतात.

[10]देवाच्या नि:श्वासाने बर्फ होते आणि समुद्र गोठतो.

[11]देव ढगांना पाण्याने भरतो आणि तो ते पसरवतो.

[12]तो ढगांना सर्व पृथ्वीभर पसरण्याची आज्ञा करतो. देव जी आज्ञा देतो ती ढग पाळतात.

[13]देव लोकांना शिक्षा करण्यासाठी ढग आणतो, पूर आणतो किंवा त्याचे प्रेम व्यक्त करण्यासाठी पाणी आणतो.

[14]"ईयोब, एक क्षणभर थांब आणि लक्ष दे. थांब आणि देव ज्या अद्भुत गोष्टी करतो त्यांचा विचार कर.

[15]ईयोब, देव ढगांवर आपला अधिकार कसा गाजवतो ते तुला माहीत आहे का? तो विजेला कसे चमकावितो ते तुला माहीत आहे का?

[16]ढग आकाशात कसे तरंगतात ते तुला कळते का? देव ज्या अद्भुत गोष्टी करतो त्याचे ढग हे केवळ एक उदाहरण आहे. आणि देवाला त्याबद्दल सारे माहीत आहे.

[17]परंतु ईयोब तुला या गोष्टी माहीत नाहीत. तुला फक्त एवढेच माहीत आहे की दक्षिणेकडून गरम वारे वाहतात तेव्हा तुला घाम येतो, तुझे कपडे अंगाला चिकटतात आणि सगळे काही स्तब्ध असते.

[18]ईयोब, तू देवाला आकाश पसरवण्यात आणि ते आरशाप्रमाणे चकचकीत करण्यात मदत करु शकशील का?

[19]"ईयोब, देवाला आम्ही काय सांगायचे ते तू आम्हांला सांग. काय बोलावे ते आम्हाला कळत नाही कारण आम्हाला जास्त माहिती नाही.

[20]मला देवाशी बोलायचे आहे असे मी म्हणणार नाही. तसे म्हणणे म्हणजे स्वत:चा नाश करून घेणे आहे.

[21]माणूस सूर्याकडे बघू शकत नाही. वाऱ्याने ढग पळवून लावले की तो फार तेजस्वी आणि चकचकीत दिसतो.

[22]आणि देवसुध्दा तसाच आहे. देवाची सुवर्णप्रभा दक्षिणेकडील पर्वतावरुन* चमकते. देवाच्या भोवती तेजोवलय असते.

[23]तो सर्वशक्तिमान देव महान आहे. आपण त्याला समजू शकत नाही. तो सामर्थ्यवान आहे. परंतु तो आपल्याशी चांगला आणि न्यायाने वागतो. देवाला आपल्याला त्रास द्यायची इच्छा नसते.

[24]म्हणूनच लोक देवाला मान देतात. परंतु देव आपल्या शहाणपणाचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांना मान देत नाही."

## देव ईयोबशी बोलतो

38 नंतर परमेश्वर वावटळींतून ईयोबशी बोलला. तो म्हणाला:

[2]"जो मूर्खासारखा बोलत आहे तो हा अज्ञानी मनुष्य कोण आहे?*

[3]ईयोब, स्वत:ला सावर* आणि मी जे प्रश्न विचारतो त्याची उत्तरे द्यायला तयार हो.

[4]"ईयोब, मी पृथ्वी निर्माण केली तेव्हा तू कुठे होतास? तू स्वत:ला इतका शहाणा समजत असशील तर मला उत्तर दे.

[5]तू जर एवढा चलाख असशील तर जग इतके मोठे असावे हे कुणी ठरवले ते सांग. मोजायच्या दोरीने ते कुणी मोजले का?

[6]पृथ्वीचा पाया कशावर घातला आहे? तिची कोनशिला कुणी ठेवली?

[7]जेव्हा ते घडले तेव्हा पहाटेच्या ताऱ्यांनी गायन केले आणि देवपुत्रांनी आनंदाने जयजयकार केला.

[8]"ईयोब, जेव्हा समुद्र पृथ्वीच्या पोटातून बाहेर पडला तेव्हा दरवाजे बंद करून त्याला कुणी अडवला?

[9]त्यावेळी मी त्याला मेघांनी झाकले आणि काळोखात गुंडाळले.

[10]मी समुद्राला मर्यादा घातल्या आणि त्याला कुलुपांनी बंद केलेल्या दरवाजाबाहेर थोपविले.

[11]मी समुद्राला म्हणालो, 'तू इथपर्यंतच येऊ शकतोस या पलिकडे मात्र नाही. तुझ्या उन्मत्त लाटा इथेच थांबतील.'

[12]"ईयोब, तुझ्या आयुष्यात तू कधीतरी पहाटेला आरंभ करायला आणि दिवसाला सुरू व्हायला सांगितलेस का?

[13]ईयोब, तू कधी तरी पहाटेच्या प्रकाशाला पृथ्वीला पकडून दुष्ट लोकांना त्यांच्या लपायच्या जागेतून हुसकायला सांगितलेस का?

---

**पर्वत** किंवा "दक्षिण" किंवा "झाफॉज."

**कोण आहे?** किंवा "हा कोण मनुष्य आहे जो मूर्ख शब्दात सल्ला लपवतो आहे."

**स्वत:ला सावर** शब्दश: "तुझा कमरेचा बंध (सैनिका) माणसासारखा घट्ट कर." म्हणजे "युध्दाला तयार हो."

14पहाटेच्या प्रकाशात डोंगरदऱ्या नीट दिसतात.
दिवसाच्या प्रकाशात ह्या जगाचा आकार अंगरख्याला
असलेल्या घडीप्रमाणे ठळक दिसतात. ओल्या मातीवर
उमटलेल्या ठशाप्रमाणे त्या जागा दिसतात.
15दुष्ट लोकांना दिवसाचा प्रकाश आवडत नाही. प्रकाश
दैदीप्यमान असतो तेव्हा त्यांना त्यांच्या वाईट गोष्टी करता
येत नाहीत.
16"ईयोब, सागराला जिथे सुरुवात होते तिथे अगदी
खोल जागेत तू कधी गेला आहेस का? समुद्राच्या तळात
तू कधी चालला आहेस का?
17ईयोब, मृत्युलोकात नेणारे दरवाजे तू कधी पाहिलेस
का? काळोख्या जगात नेणारे दरवाजे तू कधी बघितलेस
का?
18ईयोब, ही पृथ्वी किती मोठी आहे ते तुला कधी
समजले का? तुला जर हे सर्व माहीत असेल तर मला
सांग.
19"ईयोब, प्रकाश कुठून येतो? काळोख कुठून येतो?
20ईयोब, तू प्रकाशाला आणि काळोखाला ते जिथून
आले तेथे परत नेऊ शकशील का? तिथे कसे जायचे ते
तुला माहीत आहे का?
21ईयोब, तुला या सर्व गोष्टी नक्कीच माहीत असतील.
तू खूप वृध्द आणि विद्वान आहेस मी तेव्हा या गोष्टी
निर्माण केल्या तेव्हा तू जिवंत होतास होय ना?*
22"ईयोब, मी ज्या भांडारात हिम आणि गारा ठेवतो
तिथे तू कधी गेला आहेस का?
23मी बर्फ आणि गारांचा साठा संकटकाळासाठी, युध्द
आणि लढाईच्या दिवसांसाठी करून ठेवतो.
24ईयोब, सूर्य उगवतो त्या ठिकाणी तू कधी गेला आहेस
का? पूर्वेकडचा वारा जिथून सर्व जगभर वाहातो तिथे तू
कधी गेला आहेस का?*
25जोरदार पावसासाठी आकाशात पाट कोणी खोदले?
गरजणाऱ्या वादळासाठी कुणी मार्ग मोकळा केला?
26वैराण वाळवंटात देखील कोण पाऊस पाडतो?
27निर्जन प्रदेशात पावसाचे खूप पाणी पडते आणि गवत
उगवायला सुरुवात होते.
28ईयोब, पावसाला वडील आहेत का? दवबिंदू कुठून
येतात?
29हिमाची आई कोण आहे? आकाशातून पडणाऱ्या
हिमकणास कोण जन्म देतो?
30पाणी दगडासारखे गोठते. सागराचा पृष्ठभागदेखील
गोठून जातो.
31"ईयोब, तू कृत्तिकांना बांधून ठेवू शकशील का?
तुला मृगशीर्षाचे बंध सोडता येतील का?
32ईयोब, तुला राशीचक्र योग्यवेळी आकाशात आणता
येईल का? किंवा तुला सप्तर्षीना त्यांच्या समूहासह मार्ग
दाखवता येईल का?
33ईयोब, तुला आकाशातील नियम माहीत आहेत का?
तुला त्याच नियमांचा पृथ्वीवर उपयोग करता येईल का?
34"ईयोब, तुला मेघावर ओरडून त्यांना तुझ्यावर वर्षाव
करायला भाग पाडता येईल का?
35तुला विद्युतलतेला आज्ञा करता येईल का? ती
तुझ्याकडे येऊन, 'आम्ही आलो आहोत काय आज्ञा आहे?'
असे म्हणेल का? तुझ्या सांगण्याप्रमाणे ती तुला हवे तिथे
जाईल का?
36"ईयोब, लोकांना शहाणे कोण बनवतो? त्यांच्यात
अगदी खोल शहाणपण कोण आणतो?
37ईयोब, ढग मोजण्याइतका विद्वान कोण आहे? त्यांना
पाऊस पाडायला कोण सांगतो?
38त्यामुळे धुळीचा चिखल होतो आणि धुळीचे लोट
एकमेकास चिकटतात.
39"ईयोब, तू सिंहासाठी अन्न शोधून आणतोस का?
त्यांच्या भुकेल्या पिल्लांना तू अन्न देतोस का?
40ते सिंह त्यांच्या गुहेत झोपतात. ते गवतावर दबा धरुन
बसतात आणि भक्ष्यावर तुटून पडतात.
41ईयोब, डोंब कावळ्याला कोण अन्न देतो? जेव्हा त्याची
पिल्ले देवाकडे याचना करतात आणि अन्नासाठी चारी
दिशा भटकतात तेव्हा त्यांना कोण अन्न पुरवितो?

39 "ईयोब, पहाडी बकऱ्या कधी व्यायतात ते तुला
माहीत आहे का? हरिणी आपल्या
बछड्याला जन्म देताना तू पाहिले आहेस का?
2ईयोब पहाडी बकरी आणि हरिणी किती महिने आपल्या
पिलांना पोटात वाढवतात ते तुला माहीत आहे का? त्यांची
जन्माला यायची वेळ कोणती ते तुला माहीत आहे का?
3ते प्राणी लोळतात प्रसूतिवेदना सहन करतात आणि
त्यांची पिल्ले जन्माला येतात.
4ती बछडी शेतात मोठी होतात. नंतर ती आपल्या आईला
सोडून जातात आणि पुन्हा कधीही परतून येत नाहीत.
5ईयोब, रानटी गाढवांना कोणी सोडून दिले? त्यांची
दोरी सोडून त्यांना कोणी मोकळे केले?
6मी (देव) रानटी गाढवांना वाळवंटात घर दिले. मी
त्यांना राहाण्यासाठी क्षारभूमी दिली.
7रानटी गाढवे गजबजलेल्या शहरांना हसतात (त्यांना
शहरातला गजबजाट आवडत नाही) आणि त्यांना कुठलाही
माणूस आव घालू शकत नाही.
8रानगाढवे डोंगरात राहतात. तेच त्यांचे कुरण आहे. ते
आपले अन्न तिथेच शोधतात.
9"ईयोब, गवा [रानटी बैल] तुझी सेवा करायला तयार
होईल का? तो रात्री तुझ्या खळ्यावर राहील का?

---

**कडवी 19–21** देवाला असे खरोखरच म्हणायचे नाही. या प्रकारच्या बोलण्याला उपरोध म्हणतात. कुणालाही खरे वाटू नये अशा प्रकारचे हे बोलणे असते.

**कडवे 24** किंवा जिथे धुके चोहीकडे पसरते आणि पूर्वीकडचा वारा ते सर्व पृथ्वीभर नेतो अशी जागा कुठे आहे?

10ईयोब, गवा तुला त्याच्या गळ्यात दोरी बांधू देईल
का? आणि तू त्याला तुझे शेत नांगरायला लावू शकशील
का? 11गवा खूप बलवान असतो, परंतु तो तुझे काम
करील असा विश्वास तुला वाटतो का?
12तो तुझे धान्य शेतातून गोळा करेल आणि खळ्यात
नेईल असा भरवसा तुला वाटतो का?
13“शहामृगी आपले पंख आनंदाने फडफडवते. परंतु
तिला उडता येत नाही. तिचे पंख आणि पिसे करकोचाच्या
पंखासारखी नाहीत.
14शहामृगी आपली अंडी जमिनीत घालते आणि ती
वाळूत उबदार होतात.
15आपल्या अंड्यांवरुन कुणी चालत जाईल किंवा रानटी
प्राणी ती फोडतील हे ती विसरते.
16शहामृगी आपल्या पिलांना सोडून जाते. ती जणू स्वत:ची
नाहीतच असे ती वागते. तिची पिल्ले मेली तरी तिला
त्याची पर्वा नसते. काम निष्कळ झाल्याचे सुखदु:ख तिला
नसते.
17का? कारण मी (देव) शहामृगीला शहाणे केले नाही.
शहामृगी मूर्ख असते. मीच तिला तसे केले आहे.
18परंतु शहामृगी जेव्हा पळण्यासाठी उठते तेव्हा ती
घोड्याला आणि घोडेस्वाराला हसते, कारण ती कुठल्याही
घोड्यापेक्षा जोरात पळू शकते.
19“ईयोब, तू घोड्याला त्याची शक्ती दिलीस का? तू
त्याच्या मानेवर त्याची आयाळ ठेवलीस का?
20ईयोब, तू घोड्याला टोळाप्रमाणे लांब उडी मारायला
सांगितलेस का? घोडा जोरात फुरफुरतो* आणि लोक
त्याला घाबरतात.
21घोडा बलवान आहे म्हणून आनंदात असतो. तो
आपल्या खुराने जमीन उकरतो आणि धावत युध्दभूमीवर
जातो.
22घोडा भीतीला हसतो, तो कशालाही भीत नाही. तो
युध्दातून कधीही पळ काढीत नाही.
23सैनिकाचा भाता घोड्याच्या बाजूला हलत असतो.
त्याचा स्वार जे भाले आणि इतर शस्त्रे बाळगतो ते उन्हात
चमकतात.
24घोडा फार अनावर होतो. तो जमिनीवर* जोरात
धावतो. तो जेव्हा रणशिंग फुकलेले ऐकतो तेव्हा तो एका
जागी स्थिर राहू शकत नाही.
25रणशिंग ऐकू येते तेव्हा घोडा घाई करतो. त्याला
दुरुनही लढाईचा वास येतो. सेनापतींनी दिलेल्या आज्ञा
आणि युध्दातले इतर अनेक आवाज त्याला ऐकू येतात.
26“ईयोब, तू ससाण्याला पंख पसरुन दक्षिणेकडे*
उडायला शिकवलेस का?
27ईयोब, गरुडाला आकाशात उंच उडायला शिकवणारा
तूच का? तूच त्याला त्याचे घरटे उंच पहाडावर बांधायला
सांगितलेस का?
28गरुड उंच सुळक्यावर राहातो. तीच त्याची तटबंदी
आहे
29गरुड त्याच्या तटबंदीवरुन आपले भक्ष्य शोधतो.
गरुडाला एवढ्या उंचीवरुन आपले भक्ष्य दिसू शकते.
30गरुड प्रेताभोवती गोळा होतात आणि त्यांची पिल्ले
रक्त पितात.”

40 परमेश्वर ईयोबला म्हणाला:
2“ईयोब, तू सर्वशक्तिमान देवाशी वाद घातलास. तू मला
चूक केल्याबद्दल दोषी ठरवलेस. आता तू चुकलास हे तू
कबूल करशील का? तू मला उत्तर देशील का?”
3मग ईयोबने देवाला उत्तर दिले तो म्हणाला:
4“मी अगदी नगण्य* आहे. मी काय बोलू? मी तुला
उत्तर देऊ शकत नाही. मी माझा हात माझ्या तोंडावर
ठेवतो.
5मी एकदा बोललो होतो. पण आता अधिक बोलणार
नाही.” मी दोनदा बोललो पण मी आता अधिक बोलणार
नाही.”
6नंतर परमेश्वर वादळातून पुन्हा ईयोबशी बोलला. तो
म्हणाला:
7“ईयोब, तू आता कंबर कसून* उभा राहा आणि मी
जे प्रश्न विचारतो त्याची उत्तरे द्यायला सिध्द हो.
8“ईयोब, मी न्यायी नाही असे तुला वाटते का? मी
काही चूक केल्याचा आरोप करून तू स्वत:चे निरपराधित्व
सिध्द करु पहात आहेस.
9ईयोब तुझे बाहू देवाच्या बाहूंइतके शक्तिशाली आहेत
का? देवाच्या आवाजासारखा तुझा आवाज गडगडाटी आहे
का?
10जर तू देवासारखा असलास तर तुला स्वत:बद्दल
अभिमान वाटू दे. आणि तुला मान मिळू दे. तू जर
देवासारखा असलास तर तू मानमरातब आणि वैभव
कपड्यांसारखे घालू शकतोस.
11तू जर देवासारखा असलास तर तू तुझा राग दाखवू
शकतोस आणि गर्विष्ठ लोकांना शिक्षा करु शकतोस.
गर्विष्ठांना मान खाली घालायला लावू शकतोस.
12होय ईयोब त्या गर्विष्ठांकडे बघ आणि त्यांना नम्र
कर. वाईट लोकांना जागच्या जागी चिरडून टाक.
13त्यांना चिखलात पुरुन टाक. त्यांचे शरीर गुंडाळून
थडग्यात टाकून दे.

---

**फुरफुरणे** घोडयाचा आवाज.

**धावतो ... जमिनीवर** शब्दश: “जमीन गिळून टाकतो.”

**दक्षिण** किंवा “नेमान कडे.”

**नगण्य** किंवा “बिनमहत्वाचा.”

**कंबर कसून** शब्दश: “सैनिकासारखा कंबर कसून” याचा अर्थ “युध्दाला तयार हो.”

14ईयोब, तू जर या सगळ्या गोष्टी करु शकशील तर मी सुध्दा तुझी स्तुती करीन. आणि तु तुझ्या सामर्थ्याने स्वत:ला वाचवू शकतोस हे मी मान्य करीन.

15"ईयोब, तू बेहेमोथ कडे बघ. मी (देवाने) तुला आणि बेहेमोथला एकाच वेळी निर्माण केले. बेहेमोथ गायीसारखे गवत खातो.

16बेहेमोथच्या अंगात बरीच शक्ती आहे. त्याच्या पोटातले स्नायू खूप बळकट आहेत.

17बेहेमोथची शेपटी देवदाराच्या झाडासारखी उभी राहते. त्याच्या पायातले स्नायूही बळकट आहेत.

18"बेहेमोथची हाडे पितळेसारखी बळकट आहेत. त्यांचे पाय म्हणजे जणू लोखंडाच्या कांबी.

19बेहेमोथ हा अतिशय आश्चर्यकारक प्राणी मी (देवाने) निर्माण केला आहे. परंतु मी त्याचा पराभव करु शकतो.

20डोंगरावर जिथे जंगली श्वापदे खेळतात तिथले गवत बेहेमोथ खातो.

21तो कमळाच्या झाडाखाली झोपतो. बेहेमोथ दलदलीतल्या लव्हाळ्यात लपतो.

22कमळाचे झाड बेहेमोथला आपल्या सावलीत लपवते. तो नदीजवळ उगवणाऱ्या एका वृक्षाखाली (विलोवृक्ष) राहतो.

23नदीला पूर आला तर बेहेमोथ पळून जात नाही. यार्देन नदीचा प्रवाह त्याच्या तोंडावर आदळला तरी तो घाबरत नाही.

24बेहेमोथचे डोळे कुणीही बांधू शकणार नाही आणि त्याला सापळ्यात अडकवू शकणार नाही.

41 "ईयोब, तुला लिव्याथानाला गळ टाकून पकडता येईल का? तुला त्याची जीभ दोरीने बांधता येईल का?

2ईयोब, तुला लिव्याथानाच्या नाकातून दोरी घालून त्याला वेसण घालता येईल का? किंवा त्याच्या जबड्यात गळ घालता येईल का?

3ईयोब, लिव्याथान तुझ्याकडे सोडून देण्यासाठी याचना करील का? तो तुझ्याशी मृदू शब्दात बोलेल का?

4ईयोब, लिव्याथान तुझ्याशी करार करून जन्मभर तुझा दास होऊन राहील का?

5ईयोब, तू पक्ष्याशी जसा खेळशील तसा लिव्याथानाशी खेळशील का? तू त्याला दोरीने बांधशील का? म्हणजे तुझ्या सेवक मुली त्याच्याशी खेळू शकतील?

6ईयोब मच्छीमार तुझ्याकडून लिव्याथानाला विकत घेण्याचा प्रयत्न करतील का? ते त्याचे तुकडे करून ते व्यापाऱ्यांना विकण्याचा प्रयत्न करतील का?

7ईयोब, तू लिव्याथानाच्या कातडीत किंवा डोक्यात भाला फेकशील का?

8"ईयोब, तू एकदा का लिव्याथानावर हात टाकलास तर पुन्हा तसे कधी करु शकणार नाहीस. ती कशा प्रकारची लढाई असेल याचा एकदा विचार कर.

9तू लिव्याथानाचा पराभव करु शकशील असे तुला वाटत असेल तर ते विसरुन जा. तशा आशेला जागाच नाही. त्याच्याकडे नजर टाकताच तुझी भीतीने गाळण
उडेल. 10एकही माणूस त्याला जागे करून त्याचा राग ओढवून घेण्याइतका शूर नाही. "माझ्याविरुध्द उभा राहाणाराही कुणी नाही.*

11मी (देव) कुणाचाही देणेकरी नाही. या नभोमंडळाखाली जे जे आहे ते सर्व माझे आहे.*

12"ईयोब, मी तुला लिव्याथानाच्या पायांविषयी, त्याच्या शक्तीविषयी आणि त्याच्या ऐटदार बांध्याविषयी सांगेन.

13कुणीही त्याची कातडी छेदू शकत नाही. त्याची कातडी चिलखतासारखी* आहे.

14लिव्याथानाला त्याचा जबडा उघडायला कुणीही भाग पाडू शकत नाही. त्याच्या तोंडातल्या दातांची लोकांना भीती वाटते.

15लिव्याथानाच्या पाठीवर ढालीसारख्या खवल्यांच्या रांगा एकमेकांना चिकटून आहेत.

16ते खवले एकमेकांना इतके चिकटले आहेत की त्यातून हवासुध्दा जाऊ शकत नाही.

17त्याचे खवले एकमेकांशी घट्ट बांधलेले आहेत. ते एकमेकांशी इतके घट्ट बांधलेले आहेत की कुणी ते ओढून वेगळे करु शकत नाही.

18लिव्याथान जेव्हा शिंकतो तेव्हा वीज चमकल्यासारखी वाटते. त्याचे डोळे पहाटेच्या प्रकाशासारखे चमकतात.

19त्याच्या तोंडातून आगीचे लोळ बाहेर पडतात. आगीच्या ठिणग्या निघतात.

20उकळत्या भांड्याखाली ठेवलेल्या जळत्या गवतातून निघतो तसा धूर त्याच्या नाकातून येतो.

21लिव्याथानाच्या श्वासानी कोळसे पेटतात आणि त्याच्या तोंडातून ज्वाला बाहेर पडतात.

22लिव्याथानाची मान मजबूत आहे. लोक त्याला घाबरतात आणि त्याच्यापासून दूर पळत सुटतात.

23त्याच्या कातडीवर एकही मऊ भाग नाही. ती लोखंडासारखी कठीण आहे.

24लिव्याथानाचे हृदय पाषाणासारखे आहे. त्याला भीती वाटत नाही. ते पाट्यासारखे आहे. जात्याच्या खालच्या
तळीसारखे ते आहे. 25लिव्याथान उठून उभा राहिला की शूर वीरही घाबरतात. लिव्याथानाने त्यांची शेपटी हलवली की ते पळून जातात.

---

**माझ्या ... नाही** किंवा "त्याच्या विरुध्द उभा राहून लढणारा कुणीही नाही."

**मी देव ... आहे** किंवा "लिव्याथानाजवळ येऊन कुणी ही जिवंत राहिलेला नाही" "या आकाशाखालचा कुणीही."

**चिलखत** किंवा "त्याच्याजवळ कुणीही लगाम घेऊन जाऊ शकत नाही."

[26]तलवारी, भाले आणि तीर त्याच्यावर फेकले तरी ते त्याला न लागता परत येतात. त्या शस्त्रांनी त्याला काहीही इजा होत नाही.

[27]तो लोखांडाची कांब गवताच्या काडीसारखी मोडू शकतो. कुजलेले लाकूड जसे पटकन मोडते तसे तो पितळ मोडतो.

[28]तो बाणांना घाबरुन पळून जात नाही. वाळलेल्या गवताप्रमाणे दगड त्याच्यावर आपटून परत येतात.

[29]जेव्हा लाकडी गदा त्याच्यावर आपटली जाते तेव्हा त्याला ते गवत आपटल्याप्रमाणे वाटते. लोक त्याच्यावर भाले फेकतात तेव्हा तो हसतो.

[30]लिव्याथानाच्या शरीरावरची कातडी तीक्ष्ण, टणक खापरासारखी आहे. तो चिखलात कुळक फिरवल्याप्रमाणे तास पाडतो.

[31]लिव्याथान पाण्याला उकळी आल्याप्रमाणे हलवतो.
तो त्याला उकळत्या तेलाच्या भांड्याप्रमाणे तो त्यावर बुडबुडे
आणतो. [32]लिव्याथान पोहतो तेव्हा तो आपल्यामागे मार्ग
तयार करतो. तो पाणी ढवळून टाकतो आणि आपल्यामागे
पांढरा फेस ठेवतो.

[33]पृथ्वीवरचा एकही पशू लिव्याथानासारखा नाही. तो एक भीतिविरहित प्राणी आहे.

[34]लिव्याथान गर्विष्ठ प्राण्याला कमी (तुच्छ) लेखतो. तो सगळ्या रानटी श्वापदांचा राजा आहे. आणि मी, परमेश्वराने त्याला निर्माण केले आहे"

## ईयोब परमेश्वराला उत्तर देतो

42 नंतर ईयोबने परमेश्वराला उत्तर दिले, तो म्हणाला:

[2]"परमेश्वरा सर्वकाही तूच करु शकतोस ते मला माहीत आहे. तू योजना आखतोस आणि त्या प्रत्यक्षात येण्यास कोणीही आणि काहीही प्रतिबंध करु शकत नाही.

[3]परमेश्वरा, तू प्रश्न विचारलास. 'हा अज्ञानी माणूस कोण आहे जो असे मूर्खासारखे* बोलतो आहे?' परमेश्वरा मला ज्या गोष्टी कळत नव्हत्या त्यांच्याविषयीच मी बोलत होतो. ज्या गोष्टी समजणे माझ्या आवाक्याबाहेरचे होते त्यांच्याविषयी मी बोलत होतो.

[4]"परमेश्वरा, तू मला म्हणालास, 'ईयोब, तू ऐक, मी
बोलेन. मी तुला प्रश्न विचारेन आणि तू मला उत्तर
दे.' [5]"परमेश्वरा, मी तुझ्याबद्दल पूर्वी ऐकले होते. परंतु
आता मी माझ्या डोळ्यांनी तुला बघतो आहे.

[6]आणि परमेश्वरा आता मलाच माझी लाज वाटते. मला पश्चात्ताप होत आहे. मी आता धुळीत आणि राखेत* बसून माझे मन आणि माझे आयुष्य बदलण्याचे वचन देत आहे."

## परमेश्वर ईयोबचे ऐश्वर्य परत देतो

[7]परमेश्वराचे ईयोबाशी बोलणे झाल्यावर तो तेमानीच्या
अलीफजला म्हणाला, "मला तुझा आणि तुझ्या दोन मित्रांचा
राग आला आहे. का? कारण तुम्ही माझ्याबद्दल योग्य
बोलला नाही. परंतु ईयोब माझा सेवक आहे. तो
माझ्याविषयी बरोबर बोलला. [8]म्हणून अलीफज, आता
सात बैल आणि सात एडके घे. ते घेऊन माझ्या सेवकाकडे,
ईयोबाकडे जा. त्यांना मार आणि त्यांचा स्वत:साठी होमबली
अर्पण कर. माझा सेवक ईयोब तुमच्यासाठी प्रार्थना करेल
आणि मी त्याच्या प्रार्थनेला उत्तर देईन. मग मी तुम्हाला
योग्य असलेली शिक्षा देणार नाही. तुम्ही अतिशय मुर्ख
होता म्हणून तुम्हाला शिक्षा करायला हवी. तुम्ही
माझ्याविषयी नीट बोलला नाही. परंतु माझा सेवक ईयोब
मात्र माझ्याबद्दल अगदी योग्य बोलला."

[9]तेव्हा अलीफज तेमानी , बिल्दद शूही आणि सोफर
नामाथीचा यांनी देवाचे ऐकले. नंतर परमेश्वराने ईयोबाच्या
प्रार्थनेला उत्तर दिले. [10]ईयोबाने त्याच्या मित्रांसाठी प्रार्थना
केली आणि परमेश्वराने ईयोबाला पुन्हा यशस्वी केले.
देवाने त्याला पूर्वी त्याच्याकडे होते त्यापेक्षा दुप्पट दिले.
[11]ईयोबाचे सगळे भाऊ आणि बहिणी त्याच्या घरी आले.
ईयोबाला जो कोणी ओळखत होता तो ही त्याच्याकडे
आला. त्यांनी ईयोबबरोबर भोजन घेतले. त्यांनी ईयोबाचे
सांत्वन केले. परमेश्वराने ईयोबावर इतकी संकटे आणली
त्याचे त्यांना वाईट वाटले. प्रत्येकाने ईयोबाला चांदीचा
तुकडा* आणि सोन्याची अंगठी दिली.

[12]परमेश्वराने ईयोबाच्या आयुष्याच्या उत्तरार्धावर
त्याच्या पूर्वार्धापेक्षा अधिक कृपा केली. ईयोबाकडे आता
14,000 मेंढ्या, 6,000 उंट, 2,000 गायी आणि 1,000
गाढवी आहेत. [13]ईयोबाला सात मुले आणि तीन मुली
झाल्या. [14]ईयोबाने त्याच्या पहिल्या मुलीचे नाव यमीमा,
दुसऱ्या मुलीचे नाव कसीया ठेवले. तिसऱ्या मुलीचे नाव
केरेन हप्पूक ठेवले. [15]त्याच्या मुली त्या देशातील सर्वात
सुंदर मुली होत्या, ईयोबाने त्याच्या मुलींना त्याच्या
मालमत्तेतला वाटा दिला. त्यांच्या भावांनासुध्दा ईयोबच्या
मालमत्तेतला वाटा मिळाला.

[16]अशा तऱ्हेने ईयोब 140 वर्षे जगला. तो त्याची मुले,
नातवंडे, पंतवंडे पाहीपर्यंत जगला. [17]नंतर ईयोब मरण
पावला. ईयोब चांगले आयुष्य जगला. तो अगदी वयोवृध्द
होऊन मेला.

---

**कोण ... मूर्खासारखे** "मूर्ख शब्दांत सल्ला लपवीत आहे असा कोण आहे?"

**धूळ आणि राख** आपण खूप दु:खात आहोत असे दाखविण्यासाठी लोक धुळीत आणि राखेत बसत असत.

**चांदीचा तुकडा** शब्दश: "केशीय" पितृसत्ताक पध्दत अस्तित्वात होती तेव्हा हे माप वापरीत असत. पाहा उत्पत्ति 33:19 आणि यहोशवा 24:32.

# स्तोत्रसंहिता

## भाग पहिला

### स्तोत्र 1

[1]माणसाने जर वाईट लोकांचा सल्लामानला नाही,तो पापी लोकांसारखा राहिला नाही आणि देवावर * विश्वास न ठेवणाऱ्या लोकांबरोबर राहाणे त्याला आवडले नाही तर तो माणूस खरोखरच सुखी होईल.
[2]चांगल्या माणसाला परमेश्वराची शिकवण आवडते तो त्याबद्दल रात्रंदिवस विचार करत असतो.
[3]त्यामुळे तो माणूस ओढ्याच्या कडेला लावलेल्या झाडासारखा शक्तिशाली होऊ शकतो तो योग्यवेळी फळे येणाऱ्या झाडासारखा असतो तो पाने असलेल्या व न मरणाऱ्या झाडासारखा असतो तो जे काही करतो ते यशस्वी होते.

[4]परंतु वाईट लोक असे नसतात ते वाऱ्यावर उडून जाणाऱ्या फोलपटासारखे असतात.
[5]न्यायालयातील खटल्याचा निवाडा करण्यासाठी जर चांगले लोक एकत्र आले तर वाईट लोकांना अपराधी ठरविले जाईल ते पापीलोक निरपराध
ठरविले जाणार नाहीत.
[6]का? कारण परमेश्वर चांगल्यांचे रक्षण करतो आणि वाईटाचे निर्दालन करतो.

### स्तोत्र 2

[1]इतर राष्ट्रांचे लोक इतके का रागावले आहेत?
ती राष्ट्रे अशा मूर्खासारख्या योजना का आखीत आहेत?
[2]त्यांचे राजे आणि पुढारी एकत्र येऊन परमेश्वराशी आणि त्याने निवडलेल्या राजांशी भांडले.
[3]ते पुढारी म्हणाले, "आपण देवाविरुध्द आणि त्याने निवडलेल्या राजाविरुध्द उभे राहूआपण त्यांच्यापासून स्वतंत्र होऊ."
[4]परंतु माझे स्वामी स्वर्गातील राजा त्या लोकांना हसतो.
[5–6]देव रागावला आहे आणि तो त्या लोकांना सांगत आहे, "मी या माणसाची राजा म्हणून निवड केली तो सियोन पर्वतावर राज्य करेल सियोन हा माझा खास पर्वत आहे." यामुळे ते दुसरे पुढारी भयभीत झाले आहेत.
[7]आता मी तुम्हाला परमेश्वराच्या कराराविषयी सांगतो परमेश्वर मला म्हणाला, "आज मी तुझा बाप झालो! आणि तू माझा मुलगा झालास.
[8]जर तू विचारले तर मी तुला राष्ट्रे देईन या पृथ्वीवरची सगळी माणसे तुझी होतील.
[9]लोखंडाची कांब जशी मातीच्या भांड्याचा* नाश करते तसा तू त्या राष्ट्रांचा नाश करू शकशील."
[10]म्हणून राजांनो तुम्ही शहाणे व्हा राज्यकर्त्यांनो हा धडा शिका.
[11]परमेश्वराच्या आज्ञांचे भीतीयुक्त पालन करा.
[12]तुम्ही देवपुत्राशी प्रामाणिक आहात हे दाखवा. तुम्ही जर असे केले नाही तर तो रागावेलआणि तुमचा नाश करेल जे परमेश्वरावर विश्वास ठेवतात ते सुखी असतात. पण इतरांनी मात्र सावधगिरी बाळगली पाहिजे. तो आता आपला राग प्रकट करण्याच्या बेतात आहे.

### स्तोत्र 3

*दावीद आपला मुलगा अबशालोम याच्याकडून पळाला तेव्हाचे दावीदाचे स्तोत्र.*

[1] परमेश्वरा मला खूप शत्रू आहेत. खूप लोक माझ्या विरुध्द गेले आहेत.
[2]बरेच लोक माझ्याबद्दल बोलत आहेत ते लोक म्हणतात, "देव त्याला वाचवणार नाही."
[3]परंतु परमेश्वरा, तूच माझी ढाल आहेस तूच माझे वैभव आहेस परमेश्वरा मला महत्व* देणारा तूच आहेस.
[4]मी परमेश्वराची प्रार्थना करेन आणि तो मला त्याच्या पवित्र डोंगरावरून उत्तर देईल!
[5]मी पडून विश्रांती घेतो तरी मी जागा होईन हे मला माहीत आहे. मला हे कसे कळते? कारण परमेश्वर मला सांभाळतो माझे रक्षण करतो.

---

**माणूस ... देव** किंवा "जो दुष्टांचा सल्ला मानत नाही किंवा पापाच्या मार्गाने जात नाही वा टिंगल करणाऱ्याच्या घरात राहात नाही त्याला आशीर्वाद मिळतात."

**लोखंडाची ... भांड्याचा** किंवा तू त्यांची लोखंडी कांबीने काळजी घेशील. तू त्यांना मातीच्या भांड्याप्रमाणे फोडशील.

**तूच ... महत्व** शब्दश: "तू माझे वैभव आहेस तू माझे मस्तक उचलणारा आहेस."

6माझ्याभोवती हजारो सैनिक असतील. परंतु मी या शत्रूंना घाबरणार नाही.
7परमेश्वरा जागा हो! देवा मला वाचव तू फार शक्तिशाली आहेस तू जरमाझ्या शत्रूंच्या थोबाडीत मारलीस तर त्यांचे सगळे दात पडतील.
8परमेश्वरा, जय तुझाच आहे. परमेश्वरा तू कृपा करून तुझ्या लोकांवर दया कर.

## स्तोत्र 4

***प्रमुख गायकासाठी तंतुवाद्याच्या साथीने गावयाचे दावीदाचे स्तोत्र.*** *

1माझ्या चांगल्या देवा, मी तुझी प्रार्थना करीन तेव्हा मला उत्तर दे माझी प्रार्थना ऐक आणि माझ्याशी दयाळू अंतकरणाने वाग. मला माझ्या संकटांपासून थोडी तरी मुक्ती दे.
2लोकहो! तुम्ही आणखी किती काळ माझ्याविषयी वाईट बोलत राहाणार आहात? तुम्ही माझ्याबद्दल सांगण्यासाठी नवीन काहीतरी खोटेनाटे शोधत असता आणि माझ्याविषयी तसले खोटे सांगणे तुम्हाला आवडते.
3परमेश्वर आपल्या चांगल्या माणसांचे ऐकतो हे तुम्हाला माहीत आहे म्हणून मी जेव्हा जेव्हा त्याची प्रार्थना करतो तेव्हा तेव्हा तो माझे ऐकतो.
4जर तुम्हाला कसला त्रास होत असेल तर तुम्ही रागवा, पण पाप करू नका. तुम्ही झोपायच्यावेळी त्या गोष्टीचा विचार करा आणि शांत पडून राहा.
5देवाला चांगल्या गोष्टींचे होमार्पण करा आणि परमेश्वरावर विश्वास ठेवा.
6बरेच लोक म्हणतात "आम्हाला देवाचा चांगुलपणा कोण दाखवेल? परमेश्वरा, आम्हाला तुझे तेजस्वी मुख पाहू दे."
7परमेश्वरा, तू मला खूप सुखी केलेस. सुगीच्या दिवसात जेव्हा धनधान्याची आणि द्राक्षारसाची समृध्दी असते तेव्हा मला जितका आनंद होतो त्यापेक्षा मी आता अधिक आनंदी आहे.
8मी अंथरुणावर पडतो आणि अगदी समाधानात झोपतो का? कारण परमेश्वरा, तू मला सुरक्षित ठेवून झोपवतोस.

## स्तोत्र 5

***प्रमुख गायकासाठी बासरीवरील दावीदाचे स्तोत्र.***

1परमेश्वरा, माझे शब्द ऐक. मी जे सांगायचा प्रयत्न करत आहे ते समजून घे.
2माझ्या देवा! माझ्या राजा! माझी प्रार्थना ऐक.
3परमेश्वरा, मी रोज सकाळी तुला माझी भेट अर्पण करतो. मी तुझ्याकडे मदतीच्या अपेक्षेने पाहातो आणि तू माझी प्रार्थना ऐकतोस.
4देवा, तुला वाईट गोष्टी आवडत नाहीत. वाईट लोकांनी तुझ्या जवळ असणे तुला आवडत नाही. वाईट लोक तुझी उपासना करू शकत नाहीत.
5मूर्ख तुझ्याकडे येऊ शकत नाहीत. जे लोक नेहमी दुष्टपणा करतात त्यांना तू दूर पाठवतोस.
6जे लोक खोटं बोलतात त्यांचा तू सर्वनाश करतोस. जे लोक दुसऱ्यांना त्रास देण्यासाठी गुप्त योजना आखतात ते परमेश्वराला आवडत नाहीत, परमेश्वर त्यांचा द्वेष करतो.
7परमेश्वरा, मी तुझ्या विपुल कृपेमुळे तुझ्या मंदिरात येईन. मी पवित्र मंदिरात भीतीपोटी आणि तुझ्याबद्दलच्या आदरापोटी नतमस्तक होईन.
8परमेश्वरा, तू मला जगण्याचा खरा मार्ग दाखवलोक माझ्यातल्या दुबळेपणाच्या शोधात असतात. म्हणून कसे जगावे ते तू मला दाखव.
9ते लोक खरे बोलत नाहीत. ते खऱ्याचे खोटे करणारे खोटारडे आहेत त्यांची तोंडे रिकाम्या थडग्यासारखी आहेत ते लोकांशी चांगलं बोलतील पण तेही त्यांना सापळ्यात अडकवण्यासाठीच.
10देवा, तू त्यांना शिक्षा कर. त्यांना त्यांच्याच सापळ्यात अडकू दे. ते लोक तुझ्याविरुध्द गेले आहेत. म्हणून तू त्यांना त्यांच्या असंख्य गुन्ह्यांबद्दल शिक्षा कर.
11परंतु जे लोक देवावर विश्वास ठेवतात त्यांना सुखी राहू दे.त्यांना कायमचे सुखी कर. देवा, ज्या लोकांना तुझे नांव आवडते त्यांचे रक्षण कर त्यांना शक्ती दे.
12परमेश्वरा, जेव्हा तू चांगल्या माणसांसाठी चांगल्या गोष्टी करतोस तेव्हा तू त्यांचे रक्षण करणाऱ्या मोठ्या ढालीसारखा आहेस.

## स्तोत्र 6

***प्रमुख गायकासाठी तंतुवाद्यावरील शेमीनीथवरचे* दावीदाचे स्तोत्र.***

1परमेश्वरा, रागाने मला सुधारू नकोस. रागावू नकोस आणि मला शिक्षा करू नकोस.
2परमेश्वरा माझ्यावर दया कर. मी आजारी आहे आणि अशक्त झालो आहे. मला बरे कर, माझी हाडे खिळखिळी झाली आहेत.
3माझे सर्व शरीर थरथरत आहे. परमेश्वरा मला बरे करण्यासाठी तुला आणखी किती वेळ लागणार आहे?*

---

**दावीदाचे स्तोत्र** याचा अर्थ "दावीदने हे गाणे लिहिले" किंवा "ते त्याच्यासाठी होते असा होऊ शकेल."

**शेमीनीथ हे** कदाचित एखादे वाद्य असावे वाद्य लावण्याची काही खास पध्दत किंवा मंदिरातील वाद्यवृंदात वाद्य वाजवणारे महात्वाचे गट, गाणी वाजवणारा गट.

**परमेश्वर ... आहे** "मी परमेश्वरा, तुझ्यासाठी किती वेळ?"

[4]परमेश्वरा, तू परत ये व मला पुन्हा शक्ती दे. तू दयाळू आहेस म्हणून मला वाचव.
[5]मेलेली माणसे थडग्यात तुझी आठवण काढू शकत नाहीत. मृत्युलोकातले लोक तुझे गुणवर्णन करू शकत नाहीत. म्हणून तू मला बरे कर.
[6]परमेश्वरा, सबंध रात्र मी तुझी प्रार्थना केली. माझ्या अश्रूंमुळे माझे अंथरुण ओले झाले आहे. माझ्या अंथरुणातून अश्रू ठिबकत आहेत. तुझ्याजवळ अश्रू ढाळल्यामुळे मी आता शक्तिहीन, दुबळा झालो आहे.
[7]माझ्या शत्रूंनी मला खूप त्रास दिला. त्यांचे मला खूप वाईट वाटत आहे. आता माझे डोळे रडून रडून क्षीण झाले आहेत.
[8]वाईट लोकांनो, तुम्ही इथून निघून जा. का? कारण परमेश्वराने माझे रडणे ऐकले आहे.
[9]परमेश्वराने माझी प्रार्थना ऐकली. त्याने माझ्या प्रार्थनेचा स्वीकार केला आणि त्याने मला उत्तर दिले.
[10]माझे सर्व शत्रू व्यथित आणि निराश होतील. एकाएकी काहीतरी घडेल आणि ते लज्जित होऊन निघून जातील.

## स्तोत्र 7

*दावीदने परमेश्वरापाशी गायलेले स्तोत्र हे स्तोत्र बन्यामिनी कुटुंबातील कुशाचा मुलगा शौल याच्या संबंधी आहे.*

[1]परमेश्वरा, माझ्या देवा, माझा तुझ्यावर विश्वास आहे. माझा पाठलाग करणाऱ्या लोकांपासून मला वाचव मला सोडव.
[2]तू जर मला मदत केली नाहीस तर सिंहाच्या तावडीत सापडलेल्या एखाद्या प्राण्यासारखी माझी अवस्था होईल मला दूर नेले जाईल आणि कुणीही मला वाचवू शकणार नाही.
[3]परमेश्वर देवा मी काहीही चूक केलेली नाही. मी चूक केली नसल्याबद्दल खात्रीपूर्वक सांगतो.
[4]मी माझ्या मित्रांशी दुष्टावा केला नाही आणि मी मित्रांच्या शत्रूंना मदतही केली नाही.
[5]जर हे खरे नसेल तर मला शिक्षा कर. शत्रू माझा पाठलाग करो, मला पकडो व मला मारो. त्याला माझे जीवन जमिनीत तुडवू दे आणिमाझा जीव मातीत ढकलू दे.
[6]परमेश्वरा ऊठ, आणि तुझा क्रोध दाखव माझा शत्रू रागावलेला आहे म्हणून तू त्याच्या पुढे उभा राहा आणि त्याच्या विरुध्द लढ. परमेश्वरा ऊठ आणि न्यायाची मागणी कर.
[7]परमेश्वरा, लोकांचा निवाडा कर. सगळे देश तुझ्याभोवती गोळा कर आणि लोकांचा निवाडा कर.
[8]परमेश्वरा, माझा निवाडा कर. मी बरोबर आहे हे सिध्द कर मी निरपराध आहे हे सिध्द कर.
[9]वाईटांना शिक्षा कर आणि चांगल्यांना मदत कर. देवा तू चांगला आहेस आणि तू लोकांच्या हृदयात डोकावून बघू शकतोस.
[10]ज्याचे हृदय सच्चे आहे अशांना देव मदत करतो म्हणून तो माझे रक्षण करेल.
[11]देव चांगला न्यायाधीश आहे आणि तो त्याचा क्रोध केव्हाही व्यक्त करू शकतो.
[12]देवाने एकदा निर्णय घेतल्यानंतर तो त्याचे मन बदलत नाही .
[13]देवाकडे लोकांना शिक्षा करायची शक्ती आहे.*
[14] काही लोक सतत वाईट गोष्टी करण्याच्या योजना आखत असतात. ते गुप्त योजना आखतात आणि खोटे बोलतात.
[15]ते दुसऱ्यांना जाळ्यात पकडतात आणि त्यांना इजा करतात. परंतु ते स्वतच्याच जाळ्यात अडकतीलआणि त्याना कुठली तरी इजा होईल.
[16]त्यांना योग्य अशी शिक्षा मिळेल. ते इतरांशी फार निर्दयपणे वागले. त्यांनाही योग्य अशीच शिक्षा मिळेल.
[17]मी परमेश्वराची स्तुती करतो, कारण तो चांगला आहे मी त्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या नावाची स्तुती करतो.

## स्तोत्र 8

*प्रमुख गायकासाठी गित्तीथ सुरावर* बसवलेले दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वरा, माझ्या स्वामी तुझे नाव पृथ्वीवरील नावात सर्वात चांगले आहे, थोर आहे. तुझ्या नावाने तुला स्वर्गात गौरव प्राप्तकरून दिला आहे.
[2]मुला बाळांच्या मुखातून तुझे गुणगान ऐकू येते तुझ्या शत्रूंना गप्प बसवण्यासाठी तू हे सारे करतोस.
[3]परमेश्वरा, तू तुझ्या हातांनी निर्माण केलेल्या आकाशाकडे मी बघतो तू केलेल्या चंद्र आणि ताऱ्यांकडे मी बघतो. आणि मला आश्चर्य वाटते.
[4]लोक तुला इतके महत्वाचे का वाटतात? तू त्यांची आठवण तरी का ठेवतोस? लोक* तुझ्यासाठी इतके महत्वाचे का आहेत? तू त्यांची दखल तरी का घेतोस?

---

**देवाकडे ... आहे** शब्दश: "तो पाठ फिरवणार नाही तो त्याची तलवार परजेल. तो त्याचा बाण घेऊन निशाणावर नेम धरेल. त्याने मृत्यूचे शस्त्र तयार केले आहे. त्याने त्याचे अग्नीबाण तयार केले आहेत."

**गित्तीथच्या सुरावर** हे कदाचित एखादे वाद्य असू शकेल. किंवा देवळातील वाद्यवृंदात वाद्य वाजवणारा वादक. पाहा 1 इतिहास 15:21, 16:4–7.

**लोक ... लोक** शब्दश: "माणूस माणसाचा मुलगा" किंवा एनॉश. आदमाचा मुलगा, माणसे आदमाची आणि एनॉशची वंशज आहेत असे सांगण्याची ही हिब्रू पध्दत आहे. नवीन शास्त्रात याचा उपयोग एक माणसाचा, येशूचा किताब म्हणून केला आहे.

[5]परंतु लोक तुला महत्वाचे वाटतात. तू त्यांना जवळ जवळ देवच बनवलेस आणि तू लोकांना गौरवाचे आणि मानाचे मुकुट चढवितोस.
[6]तू लोकांना तू निर्माण केलेल्या सर्व गोष्टींचे अधिपत्य दिलेस.
[7]लोक मेंढ्या, गाय, बैल आणि रानातले वन्य पशू यांच्यावर राज्य करतात.
[8]ते आकाशातल्या पक्ष्यांवर आणि सागरात पोहणाऱ्या माशावर राज्य करतात.
[9]परमेश्वरा, आमच्या स्वामी तुझे नाव पृथ्वीवरील सर्व नावात अतिशय चांगले आहे, अद्भुत आहे.

## स्तोत्र 9

***प्रमुख गायकासाठी मूथ लाब्बेन या सुरावर बसवलेले दावीदाचे स्तोत्र.***

[1]मी अगदी मनापासून परमेश्वराची स्तुती करतो. परमेश्वरा, तू ज्या अद्भुत गोष्टी केल्या आहेस त्याबद्दल मी सांगेन.
[2]तू मला खूप सुखी करतोस. सर्वशक्तिमान देवा, मी तुझ्या नामाचा महिमा गातो.
[3]माझे शत्रू तुझ्यापासून दूर जाण्यासाठी पळाले. परंतु ते पडले आणि त्यांचा नाश झाला.
[4]तू सगळ्यात न्यायी आहेस तू तुझ्या सिंहासनावर न्यायाधीश म्हणून बसलास. परमेश्वरा, तू माझे गाऱ्हाणे ऐकलेस आणि तू माझा न्यायनिवाडा केलास.
[5]तू दुसऱ्या लोकांवर टीका केलीस. परमेश्वरा, तू त्यांचा नाश केलास. तू त्यांची नावे जिवंत माणसांच्या यादीतून कायमची पुसून टाकलीस.
[6]शत्रूचा निपात झाला परमेश्वरा, तू त्यांच्या शहरांचा नाश केलास. आता केवळ पडकी घरे उभी आहेत त्या दुष्ट लोकांच्या आठवणी खातर आता काहीही शिल्लक उरले नाही.
[7]परंतु परमेश्वर अनंत काळ राज्य करतो. त्याने त्याचे राज्य सामर्थ्यवान बनवले आहे, हे त्याने जगात न्यायव्यवस्था यावी म्हणून केले.
[8]परमेश्वर पृथ्वीवरील सर्वांनाच न्यायाने वागवतोआणि सर्व देशांनाही तो एकाच मापाने तोलतो.
[9]खूप लोक सापळ्यात अडकले आणि दुखी झाले कारण त्यांच्या पुढे असंख्य संकटे होती. संकटांच्या ओझ्याखाली ते लोक चेंगरले गेले आहेत. परमेश्वरा, त्यांना आश्रयदेणारी एक चांगली जागा तू बन.
[10]ज्या लोकांना तुझे नाव माहीत आहे ते तुझ्यावर विश्वास ठेवतात. परमेश्वरा, जर लोक तुझ्याकडे आले, तर त्यांना मदत केल्याशिवाय परत पाठवू नकोस.
[11]सीयोनमध्ये राहाणाऱ्या लोकांनो, तुम्ही परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वराने ज्या महान गोष्टी केल्या त्याबद्दल इतर देशांना सांगा.
[12]जे परमेश्वराकडे मदतीसाठी गेले* त्यांची आठवण त्याने ठेवली त्या गरीब लोकांनी मदतीची याचना केली आणि परमेश्वर त्यांना विसरला नाही.
[13]मी देवापाशी ही प्रार्थना केली "परमेश्वरा माझ्यावर दया कर. बघ माझे शत्रू मला त्रास देत आहेत. माझे 'मृत्यूच्या दारा' पासून रक्षण कर.
[14]नंतर यरूशलेमच्या द्वारात परमेश्वरा, मी तुझी स्तुती गाईन. तू माझे रक्षण केलेस म्हणून मी खूप आनंदात असेन."
[15]ती इतर राष्ट्रे दुसऱ्या लोकांना सापळ्यात पकडण्यासाठी खड्डे खणतात. परंतु ते स्वतच त्या खड्यांत पडले. दुसऱ्यांना पकडण्यासाठी त्यांनी जाळे लावले. परंतु ते स्वतच त्या जाळ्यात अडकले.
[16]परमेश्वराने त्या वाईट लोकांना पकडले. परमेश्वर वाईट कृत्ये करणाऱ्यांना शिक्षा करतो हे ते शिकले हिग्गायोन.*
[17]जे लोक देवाला विसरतात ते वाईट असतात. ते लोक मृत्युलोकात जातील.
[18]कधी कधी देव संकटात असलेल्यांना विसरतो असे वाटते. त्या गरीबांना काही आशा नाही असेही वाटते. परंतु देवत्यांना कायमचा कधीच विसरत नाही.
[19]परमेश्वरा, ऊठ आणि राष्ट्रांचा न्याय कर. आपण सामर्थ्यवान आहोत असा विचार लोकांना करू देऊ नकोस.
[20]लोकांना धडा शिकव. आपण केवळ माणसे आहोत हे त्यांना कळू दे.

## स्तोत्र 10

[1]परमेश्वरा, तू इतक्या दूर का राहतोस? संकटात पडलेले लोक तुला पाहू शकत नाहीत.
[2]गर्विष्ठ आणि दुष्ट लोक वाईट योजना आखतात. आणि गरीब लोकांना त्रास देतात.
[3]दुष्ट लोक आपल्याला हव्या असलेल्या गोष्टींबद्दल बढाया मारतात. आधाशी लोक देवाला शाप देतात. अशा रीतीने दुष्ट लोक आपण परमेश्वराला तुच्छ मानतो असे दाखवून देतात.
[4]वाईट लोक देवाची प्रार्थना न करण्याइतके गर्विष्ठ आहेत ते त्यांच्या सर्व वाईट योजना आखतात आणि जगात देवच नसल्यासारखे वागतात.

---

**मदतीसाठी गेले** शब्दश: "रक्त मागितले जर एखादा माणूस मारला गेला तर त्याचे कुटुंबीय कोर्टात न्याय मागण्यासाठी जातात." इथे याचा अर्थ जो इतरांकडून दुखावला गेला आहे त्याच्याकडे देव न्यायाधीश म्हणून लक्ष देतो.

**हिग्गायोन** किवा "ध्यान चिंतन" याचा अर्थ गाण्याच्या वेळी शांत होऊन चिंतन करण्याची वेळ असाही होऊ शकेल.

[5]दुष्ट लोक नेहमीच काहीतरी वेडे वाकडे करीत असतात. देवाचे नियम आणि शहाणपणाच्या गोष्टी त्यांच्या लक्षात देखील येत नाहीत. देवाचे शत्रू त्यांच्या शिकवण्याकडे लक्ष देत नाहीत.
[6]आपले काहीही वाईट होणार नाही असे त्या लोकांना वाटते ते म्हणतात "आपण मजा करू आणि आपल्याला कधीही शिक्षा होणार नाही."
[7]ते लोक नेहमी शाप देत असतात.ते लोकांबद्दल नेहमी वाईट बोलत असतात. ते सतत वाईट योजना आखत असतात.
[8]ते गुप्त जागी लपून बसतात आणि लोकांना पकडण्यासाठी वाट पाहातात. ते दुसऱ्यांना त्रास देण्यासाठी लपतात ते निष्पाप लोकांना ठार मारतात.
[9]ते दुष्ट लोक खाण्यासाठी एखादा प्राणी पकडणाऱ्या सिंहासारखे असतात. ते गरीबांवर हल्ला करतात. दुष्टांनी तयार केलेल्या सापळ्यात गरीब अडकतात.
[10]ते दुष्ट गरीब आणि आधीच पीडलेल्या लोकांना पुन्हा पुन्हा त्रास देतात.
[11]"देव आपल्याला विसरला, तो आपल्यापासून कायमचा दूर गेला. आपल्यावर काय प्रसंग आलेला आहे हे देव बघत नाही" असा विचार गरीब लोक करतात.
[12]परमेश्वरा, ऊठ! आणि काहीतरी कर. देवा, दुष्टांना शिक्षा कर गरीबांना विसरू नकोस.
[13]वाईट लोक देवाविरुध्द का जातात? कारण देव आपल्याला शिक्षा करणार नाही असे त्यांना वाटते.
[14]परमेश्वरा, ते लोक अतिशय दुष्ट आणि वाईट गोष्टी करतात ते तू बघतोस तू त्याकडे लक्ष दे आणि काहीतरी कर. संकटांनी पिडलेले लोक तुझ्याकडे मदतीसाठी येतात. परमेश्वरा, निराधाराला मदत करणारा तूच एक आहेस. म्हणून त्यांना मदत कर.
[15]परमेश्वरा, दुष्टांचे निर्दालन कर.
[16]त्या लोकांना तुझ्या भूमीतून घालवून दे.
[17]परमेश्वरा, गरीबांना काय हवे ते तू ऐकलेस. त्यांची प्रार्थना ऐक आणि त्यांना काय हवे ते दे.
[18]परमेश्वरा आई बाप नसलेल्या पोरक्या मुलांचे रक्षण कर. दुखी लोकांना आणखी कष्ट सोसायला लावू नकोस. दुष्टांना इथे राहायला भीती वाटेल इतके त्यांना घाबरवून सोड.

## स्तोत्र 11

[1]माझा परमेश्वरावर विश्वास आहे, मग तू मला पळून जाऊन लपावयास का सांगितलेस? तू मला म्हणालास "पक्ष्यासारखा उडून तुझ्या डोंगरावर जा."
[2]दुष्ट लोक शिकाऱ्यासारखे असतात. ते अंधारात लपून बसतात. ते धनुष्याची दोरी खेचतात. ते त्यांचा बाण लक्ष्यावर रोखतात आणि तो चांगल्या आणि सत्यवादी माणसाच्या हृदयात सरळ सोडतात.
[3]त्यांनी सगळ्या चांगल्या गोष्टींचा* असा नाश केला तर काय होईल? मग चांगली माणसे काय करतील?.
[4]परमेश्वर त्याच्या पवित्र राजप्रासादात राहतो. तो स्वर्गात त्याच्या सिंहासनावर बसतो आणि जे काही घडते ते तो बघतो परमेश्वर त्याच्या डोळ्यांनी लोकांकडे अगदी बारकाईने पाहातो ते चांगले आहेत की वाईट आहेत ते तो बघत असतो.
[5]परमेश्वर चांगल्या लोकांचा शोध घेतो. दुष्टांना दुसऱ्यांना त्रास द्यायला आवडते आणि परमेश्वर अशा दुष्ट लोकांचा तिरस्कार करतो.
[6]तो त्यांच्यावर जळते निखारे आणि तप्त गंधक ओतेल दुष्टांना फक्त तप्त आणि चटका देणारा वाराच मिळेल.
[7]परंतु परमेश्वर चांगला आहे आणि चांगले कृत्य करणारे लोक त्याला आवडतात. चांगले लोक त्याच्याजवळ असतील आणि त्याचे दर्शन घेतील.

## स्तोत्र 12

*प्रमुख गायकासाठी शेमीनिथ सुरावरचे दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वरा, मला वाचव! सर्व चांगले लोक आता गेले आहेत. आता पृथ्वीवर खराखूरा भक्त उरलेला नाही.
[2]लोक त्यांच्या शेजाऱ्यांशी खोटे बोलतात. प्रत्येकजण शेजाऱ्याची खोटी स्तुती करून त्याला चढवतो.
[3]परमेश्वराने खोटे बोलणारे ते ओठ कापून टाकले पाहिजेत परमेश्वराने मोठमोठ्या गोष्टी सांगणाऱ्या जभा छाटून टाकल्या पाहिजेत.
[4]ते लोक म्हणतात, "आम्ही योग्य प्रकारे खोटे बोलून मोठे होऊ कसे बोलायचे ते आम्हाला समजते म्हणून आमचा कोणीही मालक होऊ शकणार नाही."
[5]परंतु परमेश्वर म्हणतो, "वाईट लोक गरीबांकडून वस्तू चोरतात ते अगतिक लोकांकडून वस्तू काढून घेतात. परंतु आता मी तिथे उभा राहून त्या गरीब असहाय्य लोकांची बाजू घेईन आणि त्यांचे रक्षण करीन."
[6]परमेश्वराचे शब्द खरे आणि शुध्द आहेत. ते अग्नीत वितळवलेल्या चांदी सारखे शुध्द आहेत. ते सात वेळा वितळवलेल्या चांदी सारखे शुध्द आहेत.
[7]परमेश्वरा, त्या अगतिक लोकांची काळजी घे. त्यांचे आता आणि पुढेही कायम रक्षण कर.
[8]ते दुष्ट लोक आपण कुणीतरी मोठे आहोत असा आव आणतात पण ते खरोखर खोट्या दागिन्याप्रमाणे आहेत. ते खूप किमती वाटतात पण फारच स्वस्त* असतात.

---

**चांगल्या गोष्टी** शब्दशः "जर पायाचाच नाश झाला जर?" पायाच ढासळला तर!

**ते ... स्वस्त शब्दशः** "दुष्ट लोक माणसाजवळच्या क्षुद्र वस्तूप्रमाणे ऐट दाखवतात."

## स्तोत्र 13

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.*

1परमेश्वरा, तू मला आणखी किती काळ विसरून
जाणार आहेस? तू मला कायमचाच विसरणार आहेस
का? किती काळापर्यंत तू माझा स्वीकार करायला नकार
देणार आहेस? *
2तू मला विसरला आहेस की नाही याबद्दल मी किती
काळ संभ्रमात राहू! माझ्या हृदयातले हे दुख मी किती
काळ सोसू? माझे शत्रू माझ्यावर आणखी किती काळापर्यंत
विजय मिळवणार आहेत?
3परमेश्वरा, माझ्या देवा, माझ्याकडे बघ. माझ्या प्रश्नांचे
उत्तर दे. मला उत्तर कळू दे. नाही तर मी मरून जाईन.
4जर तसे घडले तर माझा शत्रू म्हणेल, "मी त्याच्यावर
विजय मिळवला" माझ्या शत्रूने जर माझा पराभव केला
तर तो खूष होईल.
5परमेश्वरा, मी तुझ्या प्रेमाखातर तुझ्या मदतीची अपेक्षा
केली. तू मला वाचवलेस आणि मला सुखी केलेस.
6मी परमेश्वरासाठी आनंदाचे गाणे गातो कारण
त्याने माझ्यासाठी कितीतरी चांगल्या गोष्टी केल्या
आहेत.

## स्तोत्र 14

1दुष्ट माणूस मनातल्या मनात म्हणतो, "देव नाही"
पापी लोक फार भयानक आणि कुजक्या गोष्टी
करतात त्यांच्यातला एकही जण चांगल्या गोष्टी करीत
नाही.
2परमेश्वर स्वर्गातून खाली पाहात होता. त्याला शहाणे
लोक शोधायचे होते शहाणेलोक मदतीसाठी देवाकडे
वळतात.
3परंतु प्रत्येकजण देवापासून दूर गेला आहे. सर्वलोक
वाईट झाले आहेत. एकही माणूस चांगली गोष्ट करत
नव्हता.
4दुष्टांनी माझ्या माणसांचा नाश केला. दुष्टांना देव
माहीत नाही. त्यांच्याकडे खायला* खूप अन्न असते
आणि ते परमेश्वराची उपासना करीत नाहीत.
5–6 त्या दुष्टांना गरीब माणसाच्या उपदेशाकडे लक्ष
द्यायचे नव्हते. का? कारण तो गरीब माणूस देवावर
अवलंबून होता. परंतु देव त्याच्या चांगल्या माणसांबरोबर
असतो. म्हणून वाईट लोकांना भीती वाटण्याजोगे बरेच
काही असते.
7सियोनमध्ये इस्राएलला कुणी वाचवले? परमेश्वरच
इस्राएलला वाचवतो. परमेश्वराच्या माणसांना दूर नेण्यात
आले आणि त्यांना जबरदस्तीने कैदी बनवले गेले. परंतु
परमेश्वर त्याच्या माणसांना परत आणील नतंर याकोब
(इस्राएल) खूप आनंदी होईल.

## स्तोत्र 15

*दावीदाचे गाणे.*

1परमेश्वरा, तुझ्या पवित्र तंबूत कोण राहू शकेल?
तुझ्या पवित्र डोंगरावर कोण राहील?
2जो माणूस शुध्द जीवन जगतो, चांगल्या गोष्टी करतो,
अगदी मनापासून सत्य बोलतो तोच माणूस तुझ्या डोंगरावर
राहू शकेल.
3तशा प्रकारचा माणूस दुसऱ्यांबद्दल वाईट बोलत नाही
तो स्वतच्या कुंटुबाविषयी लाजिरवाणे असे काही सांगत
नाही. त्यांना त्रास होईल असे काही करत नाही. तो
त्याच्या शेजाऱ्याशी वाईट वागत नाही.
4तो माणूस देवाची हेटाळणी करणाऱ्या माणसाबद्दल
आदर दाखवीत नाही. परंतु तो जे लोक परमेश्वराची
सेवा करतात अशा सर्वांचा आदर करतो. त्याने जर
शेजाऱ्याला वचन दिले असेल, तर तो त्या वचनाला
जागतो. *
5जर त्या माणसाने कोणाला पैसे दिले असतील तर तो
कर्जावर व्याज आकारत नाही. आणि तो निरपराध
लोकांना त्रास देण्यासाठी पैसे घेणार नाही. जर कोणी त्या
चांगल्या माणसाप्रमाणे वागला तर तो नेहमी देवाच्या जवळ
राहील. *

## स्तोत्र 16

*दावीदाचे मिक्ताम *नावाचे स्तोत्र*

1देवा, माझे रक्षण कर कारण मी तुझ्यावर अवलंबून
आहे.
2मी परमेश्वराला म्हणालो "परमेश्वरा, तू माझा प्रभु
आहेस माझ्याकडे असलेली प्रत्येक चांगली गोष्ट मला
तुझ्याकडून मिळाली आहे"
3परमेश्वर त्याच्या पृथ्वीवरील भक्तांसाठी अनेक
अद्भुत गोष्टी करतो. परमेश्वर त्या लोकांवर खरोखरच
प्रेम करतो हे तो दाखवतो.

---

**तू माझा ... आहेस?** शब्दशः "तुझा चेहरा माझ्या पासून लपव."

**नाश केला ... खाणे** हिब्रू भाषेत "नाश" केला म्हणजे "खाल्ले" असा शब्दांच्या या खेळाचा अर्थ दुष्ट लोक देवाच्या भक्तांना दुःख देतात असा होऊ शकतो. आणि तरीही त्या दुष्टांना चांगल्या वस्तू मिळत राहातात. यामुळे लेखक गोंधळात पडतो.

**त्याने ... जागतो** किंवा वाईट गोष्टी न करण्याचे वचन देणारा आणि तो कधीही वाईट गोष्टी करीत नाही.

**तो ... राहील** शब्दाश, "ज्या माणसाला कधीही हलवले जाणार नाही."

**दावीदाचे मिक्ताम** "मिक्तामचा" अर्थ स्पष्ट होत नाही. परंतु त्याचा अर्थ: "नीट योजलेले गाणे" असा होऊ शकेल. हे गाणे कदाचित् दावीदने लिहिले असेल वा त्याला अर्पण केले असेल.

[4]परंतु जे लोक उपासनेसाठी दुसऱ्या देवाकडे वळतात त्यांना दुख भोगावे लागते. ते त्या मूर्तीना रक्ताची भेट देतात. मी त्यात सहभागी होणार नाही. मी त्या मूर्तींची नावेसुध्दा घेणार नाही.
[5]माझा वाटा आणि माझा प्याला परमेश्वराकडूनच येतो. परमेश्वरा, तू माझा सांभाळ करतोस तुच मला माझा वाटा देतोस.
[6]माझा वाटा फारच अद्‌भुत आहे माझे वतन सुंदर आहे.
[7]मी परमेश्वराची स्तुती करतो कारण त्याने मला चांगले शिकवले रात्रीच्या वेळी मला अगदी आतल्या गाभ्यातून आज्ञा मिळाल्या.
[8]मी परमेश्वराला नेहमी माझ्या पुढे ठेवतो आणि मी त्याची उजवी बाजू कधीही सोडणार नाही.
[9]त्यामुळे माझे हृदय आणि माझा आत्मा आनंदीत राहील माझे शरीरही सुरक्षित असेल.
[10]का? कारण परमेश्वरा, तू माझ्या आत्म्याला मृत्युलोकात राहू देणार नाहीस. तुझ्याशी इमानदार असणाऱ्याला तू थडग्यात सडू देणार नाहीस.*
[11]तू मला नीट कसे जगावे ते शिकवशील परमेश्वरा, केवळ तुझ्या सान्निध्यात असणेही संपूर्ण समाधान देणारे असेल. तुझ्या उजव्या बाजूला राहण्याने कायमचे समाधान लाभेल.

## स्तोत्र 17

*दावीदाची प्रार्थना.*

[1]परमेश्वरा, न्यायासाठी, प्रामाणिकपणासाठी माझी प्रार्थना ऐक. माझ्या प्रार्थनेकडे लक्ष दे. माझी खरी प्रार्थना ऐक.
[2]तू माझ्या बाबतीत योग्य ते निर्णय घेशील. तू सत्य बघू शकतोस.
[3]तू माझ्या हृदयात खोलवर पाहिलेस. तू रात्रभर माझ्या बरोबर होतास तू मला प्रश्न विचारलेस आणि तुला काहीही चूक आढळली नाही, मी वाईट गोष्टी करण्याची योजना आखलेली नाही.
[4]एखाद्याला जितके शक्य आहे तितक्या प्रयत्न पूर्वक मी तुझ्या आज्ञा पाळायचा प्रयत्न केला.
[5]मी तू आखून दिलेल्या मार्गावरून गेलो. माझ्या पायांनी जगण्याचा तुझा मार्ग कधीही सोडला नाही.
[6]देवा, मी जेव्हा जेव्हा तुला हाक मारली तेव्हा तेव्हा तू मला ओ दिलीस म्हणून आता तू माझे ऐक.
[7]देवा, जे तुझ्यावर विश्वास ठेवतात त्यांना तू मदत करतोस. ते लोक तुझ्या उजवीकडे उभे राहतात तेव्हा आता तुझ्या एका भक्ताची प्रार्थना ऐक.
[8]तुझ्या डोळ्यातल्या बुब्बुळाप्रमाणे माझे रक्षण कर. मला तुझ्या पंखाच्या सावली खाली लपव.
[9]परमेश्वरा, जे वाईट लोक माझा निपात करायला निघाले आहेत त्यांच्यापासून मला वाचव माझ्याभोवतीचे जे लोक मला दुख द्यायला निघाले आहेत, त्यांच्यापासून माझे रक्षण कर.
[10]ते वाईट लोक देवाचे न ऐकण्याइतके गर्विष्ठ झाले आहेत आणि ते स्वतच्याच बढाया मारत आहेत.
[11]त्या लोकांनी माझा पाठलाग केला आता ते माझ्या अवती भोवती आहेत आणि माझ्यावर हल्ला करायच्या तयारीत आहेत.
[12]ते दुष्ट लोक दुसरा प्राणी मारून खाण्यासाठी लपून बसलेल्या सिंहासारखे आहेत. ते सिंहासारखे हल्ला करण्यासाठी लपून बसतात.
[13]परमेश्वरा, ऊठ! आणि शत्रूकडे जा. त्यांना शरण यायला लाव. तुझ्या तलवारीचा उपयोग कर. आणि मला दुष्टापासून वाचव.
[14]परमेश्वरा, तुझ्या शक्तीचा उपयोग करून, या दुष्टांना इहलोकातून नाहीसे कर. परमेश्वरा, तुझ्याकडे मदतीसाठीखूप लोक येतात. त्या लोकांकडे या आयुष्यात फारसे काही नसते. त्या लोकांना खूप अन्न दे. त्यांच्या मुलांना जे काही हवे ते दे. त्यांच्या मुलांना इतके अन्न दे की ते त्यांच्याही मुलांना पुरुन उरेल.
[15]मी न्यायासाठी प्रार्थना केली. म्हणून परमेश्वरा, मी तुझा चेहरा बघेन आणि तुला बघून मी पूर्ण समाधानी होईन.

## स्तोत्र 18

*प्रमुख गायकासाठी परमेश्वराचा सेवक दावीदयाचे स्तोत्र. दावीदाने हे स्तोत्र परमेश्वराने त्याला शौलापासून आणि इतर शत्रूंपासून वाचवलेतेव्हा लिहिले.**

[1]तो म्हणाला, "परमेश्वरा, तू माझे सामर्थ्य आहेस मी तुझ्यावर प्रेम करतो."
[2]परमेश्वर माझा खडक माझा किल्ला माझी संरक्षक जागा आहे. माझा देव माझा खडक आहे. मी माझ्या रक्षणासाठी त्याच्याकडे धाव घेतो. देव माझी ढाल आहे. त्याची शक्ती नेहमी माझे रक्षण करते.* परमेश्वर माझी उंच डोंगरावरची लपण्याची जागा आहे.
[3]त्यांनी माझी चेष्टा केली. परंतु मी ज्याची स्तुती केली जावी अशा परमेश्वराचा धावा केला आणि शत्रूंपासून माझे रक्षण झाले.
[4]माझे शत्रू मला मारण्याचा प्रयत्न करीत होते. मृत्यूच्या दोऱ्या माझ्या भोवती होत्या मृत्युलोकात नेणाऱ्या पुरात मी सापडलो होतो.

---

**सडला ... नाहीस** शब्दाश, "ऱ्हास होत असलेला बघणे" किंवा, "प्रेते सडतात ती जागा बघणे."

**स्तोत्र 18** हे स्तोत्र. 2 शमुवेल 22 मध्येही मिळाले.

**त्याची ... रक्षण करते** किंवा "तो माझ्या मुक्तीची तुतारी आहे."

5थडग्याच्या दोऱ्या माझ्या भोवती होत्या. मृत्यूचा सापळा माझ्या पुढ्यात होता.

6सापळ्यात अडकल्यावर मी परमेश्वराचा धावा केला. होय, मी देवाला माझ्या मदतीसाठी बोलावले. देव त्याच्या मंदिरात होता. त्याने माझा आवाज ऐकला. त्याने माझी मदतीची हाक ऐकली.

7पृथ्वी हादरली आणि कंपित झाली. स्वर्गाचा पाया हादरला. का? कारण परमेश्वर क्रोधित झाला होता.

8देवाच्या नाकातून धूर आला देवाच्या तोंडातून अग्नीच्या ज्वाळा निघाल्या. त्याच्या अंगातून ठिणग्या उडाल्या.

9परमेश्वराने आकाश फाडले आणि तो खाली आला तो घट्ट काळ्या ढगावर उभा राहिला.

10परमेश्वर उडत होता तो उडणाऱ्या करूबावर आरुढ होऊन वाऱ्यावर उंच उडत होता.

11परमेश्वर त्याच्या सभोवती तंबूसारख्या पसरलेल्या काळ्या ढगात लपला होता. तो गडगडणाऱ्या दाट ढगात लपला होता.

12नंतर देवाचे चमचमते तेज ढगातून बाहेर पडले. तेथे गारा पडल्या आणि विजांचा चमचमाट झाला.

13परमेश्वराने ढगामधून गडगडाट केला, त्या सर्वशक्तिमान देवाने आपला आवाज ऐकवला तेथे गारा पडल्या आणि विजांचा कडकडाट झाला.

14परमेश्वराने त्याचे बाण सोडले आणि शत्रूची दाणादाण उडाली परमेश्वराने विजेचे लोळ फेकून लोकांची त्रेधा उडवली.

15परमेश्वरा, तू धमकावून बोललास आणि सोसाट्याचा वारा तुझ्या मुखातून बाहेर पडला पाणी हटवले गेले आणि आम्हाला समुद्राचा तळ दिसू शकला. आम्हाला पृथ्वीचा पाया बघता आला.

16परमेश्वर वरून खाली आला आणि त्याने माझे रक्षण केले. परमेश्वराने मला धरले आणि खोल पाण्यातून (संकटांतून) बाहेर काढले.

17माझे शत्रू माझ्यापेक्षा शक्तिमान होते. ते लोक माझा तिरस्कार करीत होते माझे शत्रू मला खूप भारी होते म्हणून देवाने माझे रक्षण केले.

18मी संकटात असताना शत्रूंनी हल्ला केला. परंतु माझ्या मदतीसाठी परमेश्वर तेथे होता.

19परमेश्वर माझ्यावर प्रेम करतो. म्हणून त्याने माझी सुटका केली. तो मला सुरक्षित जागी घेऊन गेला.

20मी निरपराध असल्यामुळे परमेश्वर मला माझे बक्षीस देईल मी काही चूक केली नाही म्हणून तो माझ्यासाठी चांगल्या गोष्टी करेल.

21का? कारण मी परमेश्वराची आज्ञा पाळली मी माझ्या देवाविरुध्द पाप केले नाही.

22परमेश्वराच्या सर्व निर्णयांची मी नेहमी आठवण ठेवतो. मी त्याचे नियम पाळतो.

23मी त्याच्या समोर स्वत ला शुध्द आणि निरपराध राखले. मी वाईट गोष्टींपासून स्वतला राखले.

24म्हणून परमेश्वर मला माझे फळ देईल. का? कारण मी निरपराध आहे. देव पाहातो की मी काहीच चूक करीत नाही म्हणून तो माझ्यासाठी चांगल्या गोष्टी करील.

25परमेश्वरा, जर एखादा माणूस तुझ्यावर खरोखरच प्रेम करत असेल तर तू त्याला तुझे खरे प्रेम दाखवशील. जर एखादा माणूस तुझ्याशी खरा वागला तर तू देखील त्याच्याशी खरा वागशील.

26परमेश्वरा, जे लोक चांगले आणि शुध्द असतात त्यांच्याशी तू चांगला आणि शुध्द असतोस परंतु अगदी नीच आणि कुटिल असणाऱ्यांना तू नामोहरण करतोस.

27परमेश्वरा, तू दीनांना मदत करतोस पण तू गर्विष्ठांना खाली पाहायला लावतोस.

28परमेश्वरा, तू माझा दिवा लावतोस देव माझ्या भोवतालचा अंधार उजळतो.

29परमेश्वरा, तुझ्या मदतीने मी सैनिकांबरोबर पळू शकतो. देवाच्या मदतीने मी शत्रूच्या भिंतीवर चढू शकतो.

30देवाची शक्ती परिपूर्ण आहे. परमेश्वराच्या शब्दांची परीक्षा घेतली गेली आहे. जे त्याच्यावर विश्वास टाकतात त्यांचे तो रक्षण करतो.

31परमेश्वराखेरीज इतर कुठलाही देव नाही. आपल्या देवाखेरीज इतर खडक इथे नाहीत.

32देव मला शक्ति देतो शुध्द जीवन जगण्यासाठी तो मला मदत करतो.

33देव मला हरणासारखे जोरात पळण्यासाठी मदत करतो. तो मला उंचावर स्थिर ठेवतो.

34देव मला युध्दाचे शिक्षण देतो. त्यामुळे माझे हात शक्तिशाली बाण सोडू शकतात.

35देवा, तू माझे रक्षण केलेस आणि मला जिंकायला मदत केलीस तू मला तुझ्या उजव्या हाताने आधार दिलास माझ्या शत्रूचा पराभव करण्यासाठी तू मला मदत केलीस.

36माझ्या पायांना आणि घोट्यांना तू शक्ती दिलीस. त्यामुळे मी न पडता चालू शकलो.

37नंतर मी माझ्या शत्रूंचा पाठलाग करू शकतो आणि त्यांना पकडू शकतो त्यांचा नायनाट झाल्याशिवाय मी परत येणार नाही.

38मी माझ्या शत्रूंचा पराभव करीन. ते पुन्हा उभे राहू शकणार नाहीत. माझे सगळे शत्रू माझ्या पायाखाली असतील.

39देवा, तू मला युध्दात शक्तिमान बनवलेस तू माझ्या शत्रूंना माझ्यासमोर पडायला लावलेस.

40तू मला माझ्या शत्रूची मान धरायची संधी दिलीस आणि मी माझ्या शत्रूचा संहार केला.

41माझ्या शत्रूंनी मदतीसाठी हाका मारल्या परंतु तेथे त्यांचे रक्षण करायला कोणीच नव्हते. त्यांनी परमेश्वराला सुध्दा बोलावले पण त्याने उत्तर दिले नाही.
42मी माझ्या शत्रूचे मारुन तुकडे केले. त्यांची अवस्था वाऱ्यावर उडणाऱ्या धुळीप्रमाणे झाली मी त्यांचे लहान लहान तुकडे केले.
43माझ्याशी लढणाऱ्या लोकांपासून मला वाचव.मला त्या राष्ट्रांचा प्रमुख कर जे लोक मला माहीत देखील नाहीत ते लोक माझी सेवा करतील.
44ते लोक माझ्या विषयी ऐकतील आणि लगेच माझ्या आज्ञांचे पालन करतील. ते परदेशी मला घाबरतील.
45ते परदेशी गलितगात्र होतील. ते त्यांच्या लपण्याच्या जागेतून भीतीने थरथर कापत बाहेर येतील.
46परमेश्वर जिवंत आहे, मी माझ्या खडकाची स्तुती करतो देव मला वाचवतो तो महान आहे.
47देवाने माझ्यासाठी माझ्या शत्रूंना शिक्षा केली, त्याने त्या राष्ट्रांना माझ्या सत्ते खाली आणले.
48परमेश्वरा, तू माझी माझ्या शत्रूपासून सुटका केलीस जे लोक माझ्याविरुध्द उभे राहिले त्यांचा पराभव करण्यासाठी तू मला मदत केलीस. तू मला क्रूर माणसांपासून वाचवलेस.
49परमेश्वरा, म्हणून मी तुझी स्तुती करतो म्हणून मी तुझ्या नावाचे देशांत गुणगान गातो.
50परमेश्वर त्याच्या राजाला अनेक युध्द जिंकायला मदत करतो तो त्याने निवडलेल्या राजाला आपले खरे प्रेम देतो. तो दावीदाशी आणि त्याच्या वंशजांशी कायमचा प्रामाणिक राहील.

## स्तोत्र 19

***प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.***

1स्वर्ग देवाचा महिमा गातात. आणि आकाश देवाने आपल्या हाताने ज्या चांगल्या गोष्टी केल्या आहेत त्या दाखवते.
2प्रत्येक नवा दिवस त्या गोष्टींबद्दल अधिक काही सांगतो आणि प्रत्येक रात्र देवाच्या सामर्थ्याची अधिकाधिक रूपे दाखवते.
3तुम्हांला एखादे भाषण किंवा शब्द खरोखरच ऐकू येत नाही. तुम्हांला ऐकू येण्यासारखा एखादा आवाज ते करीत नाहीत.
4परंतु त्यांचा "आवाज" सर्व जगभर जातो त्यांचे "शब्द" पृथ्वीच्या टोकापर्यंत जातात. आकाश म्हणजे जणू सूर्याचे घरच आहे.
5सूर्य त्याच्या झोपायच्या खोलीतून आनंदी नवऱ्या मुलासारखा बाहेर येतो. सूर्य त्याच्या परिक्रमेची सुरुवात अधीर झालेल्या एखाद्या धावपटू सारखी करतो.
6सूर्य आकाशाच्या एका कोपऱ्यापासून सुरुवात करतो आणि तो आकाशाच्या दुसऱ्या टोकापर्यंत जातो. त्याच्या उष्णतेपासून काहीही लपून राहू शकत नाही. परमेश्वराची शिकवणही तशीच आहे.
7परमेश्वराची शिकवण अतिशय योग्य आहे.ती देवाच्या लोकांना शक्ती देते. परमेश्वराच्या करारावर विश्वास ठेवणे शक्य आहे. त्यामुळे मूर्ख लोकांना शहाणे बनण्यास मदत होते.
8परमेश्वराचे नियम योग्य आहेत ते लोकांना सुखी करतात परमेश्वराच्या आज्ञा चांगल्या आहेत त्या लोकांना जीवन जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात.
9परमेश्वराची भीती शुध्द आहे. ती अखंड सहन करावी लागेल. परमेश्वराचे निर्णय चांगले आणि योग्य आहेत. ते संपूर्णत बरोबर आहेत.
10परमेश्वराची शिकवण अतिशय शुध्द अशा सोन्यापेक्षा ही किंमती आहे. ती मधाच्या पोळ्यातून मिळणाऱ्या, शुध्द मधापेक्षाही गोड आहे.
11परमेश्वराच्या शिकवणी नेत्याच्या सेवकाला इशारा दिला. चांगल्या गोष्टींचे पालन केल्यामुळे चागंले फळ मिळते.
12कोणालाही आपल्या सगळ्या चुका दिसू शकत नाहीत. म्हणून मला गुप्त पाप करू देऊ नकोस.
13परमेश्वरा, जी पापे करायची इच्छा मला होते. ती मला करू देऊ नकोस. त्या पापांना माझ्यावर राज्य करू देऊ नकोस. तू जर मला मदत केलीस तर मी शुध्द होईनआणि माझ्या पापांपासून मुक्त होईन.
14माझ्या शब्दांनी आणि माझ्या विचारांनी तुला आनंद व्हावा असे मला वाटते. परमेश्वरा, तू माझा खडक आहेस. मला वाचवणारा फक्त तूच आहेस.

## स्तोत्र 20

***प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.***

1जेव्हा तुम्ही संकटात असाल तेव्हा परमेश्वर तुमच्या हाकेला धावून येवो याकोबाचा देव तुमच्या नावाला महत्वप्राप्त करून देवो.
2देव त्याच्या पवित्र स्थानातून तुम्हाला मदत पाठवो. तो तुम्हाला सियोनातून साहाय्य करो.
3तुम्ही देवाला जे जे होमबली अर्पण केले त्याची त्याला आठवण राहो तुमचे सर्व त्याग तो स्वीकारो.
4तुम्हाला जे काही हवे ते देव तुम्हाला देवो. तुमच्या सगळ्या योजना तो प्रत्यक्षात आणो.
5देव तुम्हाला मदत करेल तेव्हा आम्हाला आनंद होईल. देवाच्या नावाचा जयजयकार करू या तुम्ही परमेश्वराला जे जे काही मागाल ते सर्व तो तुम्हाला देवो अशी मी आशा करतो.
6परमेश्वर त्याने निवडलेल्या राजाला मदत करतो हे आता मला कळले. देव त्याच्या पवित्र स्वर्गात होता आणि त्याने स्वत च निवडलेल्या राजाला उत्तर दिले. देवाने

आपल्या महान सामर्थ्याचा राजाला वाचवण्यासाठी उपयोग केला.

[7]काही लोक त्यांच्या रथांवर भरंवसा ठेवतात आणि काही आपल्या सैन्यावर विश्वास ठेवतात परंतु आम्ही परमेश्वराच्या, आमच्या देवाच्या नावावर विश्वास ठेवतो आणि त्याच्या नावाचा धावा करतो.

[8]त्या दुसऱ्या लोकांचा पराभव झाला. ते युध्दात मारले गेले परंतु आपण जिंकलो आपण विजयी झालो.

[9]परमेश्वराने त्या निवडलेल्या राजाला वाचवले देवाने निवडलेल्या राजाने मदतीसाठी हाक मारली आणि देवाने उत्तर दिले.

## स्तोत्र 21

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वरा, तुझी शक्ती राजाला सुखी बनवते तू त्याला वाचवतोस तेव्हा सुध्दा तो सुखावतो.

[2]राजाला ज्या गोष्टी हव्या होत्या त्या तूच त्याला दिल्यास. राजाने काही गोष्टींची मागणी केली आणि परमेश्वरा, त्याने जे मागितले ते तू त्याला दिलेस.

[3]परमेश्वरा, तू राजाला खरोखरच आशीर्वाद दिलास. तू त्याच्या मस्तकावर सोनेरी मुकुट ठेवलास.

[4]त्याने तुझ्याकडे जीवनाची मागणी केली आणि तू ते त्याला दिलेस,देवा, तू राजाला कधीही न संपणारे चिरंजीव आयुष्य दिलेस.

[5]तू राजाला विजयी केलेस आणि त्याला गौरव प्राप्त करून दिलेस. तू त्याला मान आणि स्तुती दिलीस.

[6]देवा, तू राजाला अनंत काळासाठी आशीर्वाद दिलास. राजा तुझा चेहरा पाहतो तेव्हा त्याला खूप आनंद होतो.

[7]राजाचा परमेश्वरावर विश्वास आहे, सर्वशक्तिमान परमेश्वर त्याला निराश करणार नाही.

[8]देवा, तू तुझ्या सर्व शत्रूंना तू किती सामर्थ्यवान आहेस ते दाखवशील. तुझ्या सामर्थ्याने तुझा तिरस्कार करणाऱ्यांचा पराभव होईल.

[9]भट्टीतली आग अनेक वस्तू जाळू शकते. परमेश्वरा, तू जेव्हा राजाबरोबर असतोस तेव्हा तो भट्टीसारखा असतो. त्याचा क्रोध अग्नीसारखा जळतो आणि तो त्याच्या शत्रूंचा नाश करतो.

[10]त्याच्या शत्रूंच्या कुटुंबाचा नाश होईल ते पृथ्वीवरून निघून जातील.

[11]का? कारण परमेश्वरा, त्या लोकांनी तुझ्याविरुध्द वाईट गोष्टींची योजना आखली परंतु ते यशस्वी झाले नाहीत.

[12]परमेश्वरा, तू त्या लोकांना तुझे गुलाम बनवलेस तू त्यांना दोराने बांधून ठेवलेस. तू त्यांच्या मानेभोवती दोर बांधलेस. तू त्यांना गुलामाप्रमाणे वाकायला लावलेस.

[13]हे देवा, तुझ्या सामर्थ्याने उच्चपदाला चढ आपण परमेश्वराच्या महानतेचे गाणे गाऊ या.

## स्तोत्र 22

*प्रमुख गायकासाठी "पहाटेचे हरिण" या सुरांवर बसवलेले दावीदाचे स्तोत्र.*

[1]माझ्या देवा, माझ्या देवा तू मला का सोडून गेलास? तू इतका दूर आहेस की मला मदत करू शकणार नाहीस. तू इतका दूर आहेस की मी मदतीसाठी मारलेल्या हाका तुला ऐकू येणार नाहीत.

[2]माझ्या देवा, मी तुला दिवसा हाक मारली परंतु तू उत्तर दिले नाहीस आणि मी रात्रीही तुला हाका मारणे चालूच ठेवले.

[3]देवा, पवित्र असा केवळ तूच आहेस तू राजा म्हणून बसतोस तूच इस्राएलची प्रशंसा आहेस.

[4]आमच्या पूर्वजांनी तुझ्यावर विश्वास ठेवला. होय देवा, त्यांनी तुझ्यावर विश्वास ठेवला आणि तू त्यांना वाचवलेस.

[5]देवा आमच्या पूर्वजांनी तुला मदतीसाठी बोलावलेआणि त्यांची शत्रूंपासून सुटका झाली. त्यांनी तुझ्यावर विश्वास टाकला पण त्यांची निराशा झाली नाही.

[6]म्हणून मी कीटक आहे का? मी मनुष्य नाही का? लोकांना माझी लाज वाटते, लोक माझा तिरस्कार करतात.

[7]माझ्याकडे जो बघतो तो माझा उपहास करतो. ते त्यांचे डोके हलवतात आणि जीभ बाहेर काढून मला वेडावून दाखवतात.

[8]ते मला म्हणतात "तू परमेश्वराला तुला मदत करायला सांग. कदाचित् तो तुला मदत करेल. तू जर त्याला इतका आवडत असशील तर कदाचित् तो तुझी सुटका करेल."

[9]देवा, हे सत्य आहे की मी ज्याच्यावर अवलंबून राहावे असा फक्त तूच आहेस. मी जन्मल्यापासून तू माझी काळजी घेत आला आहेस. मी माझ्या आईचे दूध पीत होतो तेव्हापासून तू मला आश्वासन दिले आहेस. आणि माझे सांत्वन केले आहेस.

[10]मी जन्माला आलो त्या दिवसापासून तू माझा देव आहेस मी माझ्या आईच्या शरीरातून बाहेर आलो तेव्हापासून तू मला तुझ्या छत्राखाली आणले आहेस.

[11]तेव्हा देवा मला सोडू नकोस, संकटे जवळ आली आहेत आणि मला मदत करायला कोणीही नाही.

[12]माझ्याभोवती लोक आहेत ते बळकट बैलासारखे माझ्या चहु बाजूला आहेत.

[13]प्राण्यांवर गुरगुर करणाऱ्या वत्यांना फाडणाऱ्या सिंहासारखे त्यांचे तोंड उघडे आहे.

[14]माझी शक्ती जमिनीवर सांडलेल्या पाण्यासारखी नाहीशी झाली आहे, माझी हाडे वेगवेगळी झाली आहेत माझे धैर्यही नाहीसे झाले आहे.

15फुटलेल्या खापरा प्रमाणे माझे तोंड सुकले आहे.
माझी जीभ टाळूला चिकटली आहे. तू मला “मृत्यूच्या
धुळीत” ठेवले आहेस.
16“कुत्री” माझ्या भोवती आहेत मला दुष्टांच्या
घोळक्यांनी सापळ्यात पकडले आहे सिंहाप्रमाणे त्यांनी
माझ्या हातापायालाजखमा केल्या आहेत.*

17मला माझी हाडे दिसू शकतात. लोक माझ्याकडे
टक लावून पाहतात आणि पाहातच राहतात.
18ते माझे कपडे त्यांच्यांत वाटून टाकतात आणि माझ्या
लांब झग्यासाठी त्यांनी चिठ्ठ्या* टाकल्या आहेत.
19परमेश्वरा, मला सोडून जाऊ नकोस तूच माझी शक्ती
हो, लवकर ये आणि मला मदत कर.
20परमेश्वरा माझे आयुष्य तलवारी पासून वाचव माझे
मौल्यवान आयुष्य त्या कुत्र्यांपासून वाचव.
21सिंहाच्या जबड्यापासून माझे रक्षण कर. बैलाच्या
शिंगापासून माझे रक्षण कर.*
22परमेश्वरा, मी माझ्या भावांना तुझ्याबद्दल सांगेन.
सभेत मी तुझे गुणगान गाईन.
23जे लोक परमेश्वराची उपासना करतात त्यांनी
त्याची स्तुतीही करावी. इस्राएलाच्या वंशजांनो,
परमेश्वराला मान द्या. इस्राएलाच्या वंशजांनो,
परमेश्वराची भीती बाळगा आणि त्याचा आदर
करा.

24का? कारण परमेश्वर संकटात सापडलेल्या गरीब
लोकांना मदत करतो. परमेश्वराला त्यांची लाज वाटत
नाही. परमेश्वर त्यांचा तिरस्कार करत नाही. जर लोकांनी
परमेश्वराला मदतीसाठी बोलावले तर तो त्यांच्यापासून
लपून बसणार नाही.
25परमेश्वरा, मोठ्या सभेतले माझे गुणगान तुझ्यापासूनच
आले. त्या सगळ्या भक्तांसमोर मी ज्या ज्या गोष्टींचे वचन
दिले त्या सर्व मी करीन.

26गरीब लोक खातील आणि समाधानी राहातील. जे
लोक परमेश्वराला शोधत आले, त्यांनी त्याची स्तुती
करावी. तुमचे हृदय सदैव आनंदी राहो.

27दूरदूरच्या परदेशातील लोकांना परमेश्वराची
आठवण येवो. आणि ते परमेश्वराकडे परत येवोत. सगळ्या
परक्या देशांतील लोक परमेश्वराची उपासना करोत.
28का? कारण परमेश्वराच राजा आहे तो सगळ्या
देशांवर राज्य करतो.
29बलवान व निरोगी लोक भोजन करून देवापुढे
नतमस्तक झाले आहेत. तसं पाहिलं तर जे सर्व लोक
मरणार आहेत व जे आधीच मेलेले आहेत ते सर्वजण
देवापुढे नतमस्तक होतील.
30आणि भविष्यात आपले वंशज परमेश्वराची सेवा
करतील. लोक त्याच्याविषयी सर्वकाळ सांगत राहातील.
31परमेश्वराने खरोखरच ज्या चांगल्या गोष्टी
केल्याआहेत त्या विषयी प्रत्येक पिढी पुढच्या पिढीला
सांगेल.

## स्तोत्र 23

*दावीदाचे स्तोत्र.*

1परमेश्वर माझा मेंढपाळ आहे, मला ज्याचीगरज आहे
ते मला नेहमी मिळत राहील.
2तो मला हिरव्या कुरणात झोपू देतो. तो मला संथ
पाण्याजवळ नेतो.
3तो त्याच्या नावाच्या भल्यासाठी माझ्या आत्म्याला नवी
शक्ती देतो. तो खरोखरच चांगला आहे हे दाखवण्यासाठी
तो मला, चांगुलपणाच्या मार्गाने नेतो.
4मी जरी थडग्यासारख्या* भयाण अंधकाराने भरलेल्या
दरीतून गेलो तरी मला कसल्याही संकटाचे भय वाटणार
नाही का? कारण परमेश्वरा, तू माझ्याबरोबर आहेस.
तुझी काठी आणि आकडी माझे सांत्वन करतात.
5परमेश्वरा, तू माझे ताट माझ्या शत्रूंसमोर तयार केलेस
तू माझ्या डोक्यावर तेल घातलेस माझा प्याला आता
भरून वाहू लागला आहे.
6माझ्या उरलेल्या आयुष्यात चांगुलपणा आणि दया सदैव
माझ्या बरोबर असतील. आणि मी परमेश्वराच्या मंदिरात
अनंतकाळापर्यंत बसेन.*

## स्तोत्र 24

*दावीदाचे स्तोत्र.*

1पृथ्वी आणि तिच्यावरील सर्व काही परमेश्वराचे
आहे. जग आणि जगातील सर्व लोक परमेश्वराचे आहेत.
2परमेश्वराने पाण्यावर पृथ्वी निर्माण केली. ती त्याने
नद्यांवर निर्माण केली.

---

**सिंहासारखा … आहेत** जुन्या ग्रीक भाषांतराप्रमाणे “त्यांनी माझे हात आणि पाय आरपार टोचले.” हिब्रूभाषेत सिंहासारखा म्हणजे “त्यांनी आरपार घातले टोचले.”

**चिठ्ठ्या** भाग्य काडी, दगड किंवा हाडाचे तुकडे फासा म्हणून वापरणे पाहा नीतिसूत्रे 16:33.

**माझे रक्षण करतो … कर** किंवा “तू मला बैलाच्या शिंगापेक्षा अधिक इजा करतोस” किंवा तू मला “बैलाच्या शिंगावरुन उत्तर दिलेस” याचा अर्थ “या माणसाने देवाचे उत्तर तो जेव्हा न्याच्या भोवती असलेल्या माणसांकडे बघत होता तेव्हा ऐकले.”

**मी … थडगे** किंवा “मरणाची काळी दरी” वा “खूप अंधारी दरी.”

**आणि … बसेन** किंवा “मी देवाच्या मंदिरात् पुन्हा पुन्हा खूप वेळपर्यंत जाईन.”

3परमेश्वराच्या डोंगरापर्यंत कोण जाऊ शकेल? परमेश्वराच्या पवित्र मंदिरात कोण उभा राहू शकतो?

4तिथे कोण उपासना करू शकतो? ज्या लोकांनी वाईट कृत्ये केली नाहीत, ज्यांचे हृदय शुध्द आहे, ज्यांनी माझ्या नावाचा उपयोग असत्य सत्य वाटावे यासाठी केला नाही आणि जे खोटे बोलले नाहीत व ज्यांनी खोटी आश्वासने दिली नाहीत असेच लोक तिथे आराधना करू शकतील.

5चांगले लोक इतरांना आशीर्वाद देण्यासाठी परमेश्वराला विनंती करतात. ते चांगले लोक देवाकडे, त्यांच्या त्रात्याकडे चांगुलपणाची मागणी करतात.

6ते चांगले लोक देवाचा मार्ग अवलंबतात. ते याकोबाच्या देवाकडे मदतीसाठी जातात.

7वेशींनो, आपले मस्तक उंच करा. जुन्या दरवाजांनो, उघडा म्हणजे तो गौरवशाली राजा आत येईल.

8तो गौरवशाली राजा कोण आहे? परमेश्वरच तो राजा आहे. तोच बलवान सैनिक आहे परमेश्वरच तो राजा आहे, तोच युध्दातला नायक आहे.

9वेशींनो, तुमची मस्तके उंच करा. प्राचीन दरवाजांनो, उघडा म्हणजे तो गौरवशाली राजा आत येईल.

10तो गौरवशाली राजा कोण आहे? सर्वशक्तिमान परमेश्वरच तो राजा आहे तोच तो गौरवशाली राजा आहे.

## स्तोत्र 25

***दावीदाचे स्तोत्र.***

1परमेश्वरा, मी स्वतला तुझ्याकडे सुपूर्द करतो.

2देवा, माझा तुझ्यावर विश्वास आहे आणि माझी निराशा होणार नाही. माझे शत्रू मला हसणार नाहीत.

3एखाद्याने तुझ्यावर विश्वास टाकला तर त्याची निराशा होणार नाही परंतु दगाबाज मात्र निराश होतील. त्यांना काहीही मिळणार नाही.

4परमेश्वरा तुझे मार्ग आत्मसात करण्यासाठी मला मदत कर. मला तुझे मार्ग शिकव.

5मला मार्ग दाखव आणि मला तुझे सत्य शिकवतू माझा देव आहेस, माझा तारणारा आहेस मी रोज तुझ्यावर विश्वास टाकतो.

6परमेश्वरा, माझ्याशी दयाळू राहायचे लक्षात असू दे तुझ्याजवळचे नेहमीचे कोवळे प्रेम मला दाखव.

7माझे पाप आणि तरूणपणी मी ज्या वाईट गोष्टीकेल्या त्या लक्षात ठेवू नकोस परमेश्वरा, तुझ्या चांगल्या कीर्तीसाठी माझी प्रेमाने आठवण ठेव.

8परमेश्वर खरोखरच चांगला आहे. तो पापी माणसांना जगण्यासाठी योग्यमार्ग दाखवतो.

9तो दीन माणसांना त्यांचे मार्ग दाखवतो तो त्यांचे न्यायीपणाने नेतृत्व करतो.

10जे लोक परमेश्वराचे करार आणि वचने पाळतात त्यांच्याशी तो सच्चा आणि दयाळू असतो.

11परमेश्वरा, मी अनेक चुकीच्या गोष्टी केल्या. परंतु तुझा चांगुलपणा दाखवण्यासाठीतू मला त्याबद्दल क्षमा केलीस.

12जर एखाद्याने परमेश्वराच्या मार्गाने जायचे ठरवले तर देव त्याला उत्तम रीतीने कसे जगायचे ते दाखवील.

13तो माणूस चांगल्या गोष्टींचे सुख उपभोगीलआणि त्याची मुले देवाने त्याला जी जमीन द्यायचे वचन दिले होते त्या जमिनीचे मालक बनतील.

14परमेश्वर त्याचे रहस्य त्याच्या भक्तांना सांगतो. तो त्याच्या भक्तांना त्याचे करार शिकवतो.

15मी नेहमी परमेश्वराकडे मदतीसाठी दृष्टी वळवतो. तो नेहमी माझी संकटातून मुक्तता करतो.

16परमेश्वरा, मी दुखी व एकाकी आहे. माझ्याकडे वळ व मला दया दाखव.

17माझी माझ्या संकटांतून मुक्तता कर. माझ्या समस्या सोडवण्यासाठी मला मदत कर.

18परमेश्वरा, माझ्या यातनांकडे व संकटांकडे पाहा. मला माझ्या सर्व पापांबद्दल क्षमा कर.

19माझ्या सर्व शत्रूंकडे नजर टाक. ते माझा तिरस्कार करतात व मला दुख देतात.

20देवा, माझे रक्षण कर आणि मला वाचव. माझा तुझ्यावर विश्वास आहे, तेव्हा माझी निराशा करू नकोस.

21देवा तू खरोखरच चांगला आहेस. माझा तुझ्यावर विश्वास आहे म्हणून तू माझे रक्षण कर.

22देवा, इस्राएलाच्या लोकांचे त्यांच्या सर्व शत्रूंपासून रक्षण कर.

## स्तोत्र 26

***दावीदाचे स्तोत्र.***

1परमेश्वरा, माझा न्याय कर. मी सच्चे आयुष्य जगलो हे सिध्द कर. मी परमेश्वरावर विश्वास ठेवणे कधीही सोडले नाही.

2परमेश्वरा, माझी चौकशी कर माझी परीक्षा घे. माझ्या हृदयात आणि मनात अगदी जवळून पाहा.

3मी नेहमीच तुझे कोवळे प्रेम बघतो. मी तुझ्या सत्याच्या आधाराने जगतो.

4मी कपटी लोकांबरोबर जात नाही, मी ढोंगी लोकांची कधीही संगत धरीत नाही.

5मी त्या दुष्टांच्या टोळीचा तिरस्कार करतो. मी त्या दुष्टांच्या टोळीत कधीही सामील होणार नाही.

6परमेश्वरा, मी हात स्वच्छ धुवून तुझ्या वेदीजवळ आलो आहे.

7परमेश्वरा, मी तुझे स्तुतीपर गाणे गातो तू ज्या ज्या आश्चर्यकारक गोष्टी केल्या आहे सत्यांची गाणी मी गातो.

[8]परमेश्वरा, मला तुझे मंदिर आवडते. मला तुझा तेजस्वी तंबू आवडतो.
[9]परमेश्वरा, मला पाप्यांच्या यादीत बसवू नकोस. त्या खुन्यांबरोबर मला मारू नकोस.
[10]ते लोक इतरांना फसवतील. वाईट गोष्टी करण्यासाठी ते पैसाही घेतील.
[11]परंतु मी निरपराध आहे. म्हणून देवा माझ्यावर दया कर आणि मला वाचव.
[12]मी सर्व धोक्यांपासून सुरक्षित आहे. परमेश्वरा, तुझे भक्त भेटतात तेव्हा मी तुझी स्तुती करतो.

## स्तोत्र 27

*दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वरा, तू माझा प्रकाश आहेस आणि माझा तारणारा आहेस. मला कुणाचीही भीती बाळगायला नको. परमेश्वरच माझी आयुष्यभराची सुरक्षित जागा आहे. म्हणून मी कुणालाही भीत नाही.
[2]माझे शत्रू जेव्हा माझ्यावर कदाचित् हल्लाकरतील ते कदाचित् माझ्या शरीराचा नाशकरायचा प्रयत्न करतील. माझे शत्रू माझ्यावर हल्ला करून माझा नाश करण्याचा प्रयत्न करतील.
[3]परंतु माझ्या सभोवती सैन्य असले तरी मी घाबरणार नाही. युध्दात लोकांनी माझ्यावर हल्ला केला तरी मी घाबरणार नाही. का? कारण माझा परमेश्वरावर विश्वास आहे.
[4]मला परमेश्वराजवळ फक्त एकाच गोष्टीची मागणी करायची आहे. मला हे मागायचे आहे, "मला आयुष्यभर परमेश्वराच्या मंदिरात बसू द्या म्हणजे मी परमेश्वराचे सौंदर्य बघेन आणि त्याच्या राजवाड्याला भेट देईन."
[5]मी संकटात सापडलो की परमेश्वर माझे रक्षण करील. तो मला त्याच्या तंबूत लपवेल तो मला त्याच्या सुरक्षित जागी नेईल.
[6]माझ्या शत्रूंनी माझ्या भोवती वेढा घातला आहे. परंतु त्यांचा पराभव करायला परमेश्वर मला मदत करील नंतर मी त्याच्या डेऱ्यात बळी अर्पण करीन. मी बळी देताना आनंदाने ओरडेन. मी परमेश्वराला आदर दाखविण्यासाठी गाणीगाईन, वाद्ये वाजवीन.
[7]परमेश्वरा, माझा आवाज ऐक मला उत्तर दे. माझ्याशी दयेने वाग.
[8]परमेश्वरा मला तुझ्याशी बोलायचे आहे. मला अगदी माझ्या हृदयातून तुझ्याशी बोलायचे आहे. परमेश्वरा, मी तुझ्यासमोर तुझ्याशी बोलायला आलो आहे.
[9]परमेश्वरा, माझ्यापासून असा दूर जाऊ नकोस. तुझ्या सेवकावर रागावू नकोस आणि दूर जाऊ नकोस. मला मदत कर! मला दूर लोटू नकोस. मला सोडू नकोस. देवा, तूच माझा तारणारा आहेस.
[10]माझे आईवडील मला सोडून गेले. परंतु परमेश्वराने मला घेतले आणि त्याचे बनवले.
[11]परमेश्वरा, मला शत्रू आहेत म्हणून तू मला तुझे मार्ग शिकव. मला योग्य गोष्टी करायला शिकव.
[12]मला माझ्या शत्रुंचा बळी होऊ देऊ नको त्यांनी माझ्याबद्दल खोटेनाटे सांगितले. मला दुख देण्यासाठी त्यांनी माझ्याबद्दल खोटे सांगितले.
[13]मला खरोखरच असा विश्वास वाटतो की मरण्याआधी मला परमेश्वराचा चांगुलपणा दिसेल.
[14]परमेश्वराच्या मदतीची वाट बघ. सामर्थ्यवान आणि धीट हो व परमेश्वराच्या मदतीची वाट पहा.

## स्तोत्र 28

*दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वरा, तू माझा खडक आहेस. मी तुला मदतीसाठी बोलवीत आहे. माझ्या प्रार्थनेला तुझे कान बंद करू नकोस. तू जर माझ्या मदतीच्या हाकेला उत्तर दिले नाहीस तर मी थडग्यातल्या मेलेल्या माणसासारखा आहे असे लोकांना वाटेल.
[2]परमेश्वरा, मी माझे बाहू उभारून तुझ्यापवित्र जागेकडे तोंड करून प्रार्थना करतो. मी तुला साद घालीन त्यावेळी माझे ऐक माझ्यावर दया दाखव.
[3]परमेश्वरा, मी वाईट कृत्ये करणाऱ्या दुष्ट लोकांसारखा आहे असे मला वाटत नाही. ते लोक त्यांच्या शेजाऱ्यांना "शांती या शब्दाने अभिवादन करतात. परंतु मनात मात्र ते शेजाऱ्यांचे वाईटच चिंतीत असतात.
[4]परमेश्वरा, ते लोक दुसऱ्यांचे वाईट करतात म्हणून त्यांचे वाईट होऊ दे. त्यांना त्यांच्या कर्माप्रमाणे शिक्षा कर.
[5]वाईट लोकांना परमेश्वराची चांगली कृत्ये कळत नाहीत. नाही, त्यांना ते कळू शकत नाही. ते फक्त नाश करण्याचा प्रयत्न करतात.
[6]परमेश्वराची स्तुती कर. त्याने माझी दयेसाठी केलेली प्रार्थना ऐकली.
[7]परमेश्वर माझी शक्ती आहे. तो माझी ढाल आहे. मी त्याच्यावर विश्वास ठेवला व त्याने मला मदत केली. मी खूप आनंदी आहे आणि मी त्याची स्तुती करणारी गाणी गातो.
[8]परमेश्वर त्याने निवडलेल्या लोकांचे रक्षण करतो. परमेश्वर त्याला वाचवतो. परमेश्वर त्याची शक्ती आहे.
[9]देवा, तुझ्या लोकांना वाचव जे तुझे आहेत त्यांना आशीर्वाद दे. त्याना वाट दाखव व त्यांना सदैव क्षमा कर, त्यांना उचलून घे.

## स्तोत्र 29

[1]देवाच्या मुलांनो, परमेश्वराची स्तुती करा. त्याच्या गौरवाची व सामर्थ्याची स्तुती करा.

2परमेश्वराची स्तुती करा आणि त्याच्या नावाचा आदर करा. तुमच्या खास कपड्यात त्याची उपासना करा.
3परमेश्वर समुद्रासमोर त्याचा आवाज चढवतो गौरवशाली देवाचा आवाज समुद्रावरील मेघ गर्जनेसारखा वाटतो.
4परमेश्वराच्या आवाजातून त्याची शक्ती कळते. त्याचा आवाज त्याचे गौरव दाखवते.
5परमेश्वराच्या आवाजामुळे खूप मोठा देवदारूवृक्ष तुकडे तुकडे होऊन पडतो. परमेश्वर लबोनानच्या देवदार वृक्षाचे तुकडे तुकडे करतो.
6परमेश्वर लबोनानचा थरकाप उडवतो, तो छोट्या वासराप्रमाणे नाचत आहे असे वाटते. सिर्योन थरथरतो तो छोट्या करड्या प्रमाणे उड्या मारत आहे असे वाटते.
7परमेश्वराचा आवाज विजेच्या चकचकाटासहित आघात करतो.
8परमेश्वराचा आवाज वाळवंटाला कंपित करतो कादेशचे वाळवंट परमेश्वराच्या आवाजाने हादरते.
9परमेश्वराच्या आवाजाने हरणाला भीती वाटते तो जंगलांचा नाश करतो. परंतु त्याच्या राजवाड्यात लोक त्याच्या महानतेची स्तुती करतात.
10महापुराच्यावेळी परमेश्वर राजा होता आणि परमेश्वरच राजा राहणार आहे.
11परमेश्वर त्याच्या लोकांचे रक्षण करो. परमेश्वर त्याच्या माणसांना आशीर्वाद देवो.

## स्तोत्र 30

***दावीदाचे एक स्तोत्र, हे स्तोत्र मंदिरअर्पण करण्याच्या वेळचे आहे.***

1परमेश्वरा, तू मला माझ्या संकटांतून वर उचललेस. तू माझ्या शत्रूंना माझा पराभव करू दिला नाहीस आणि त्यांना मला उद्देशून हसण्याची संधी दिली नाहीस म्हणून मी तुला मान देईन.
2परमेश्वरा, माझ्या देवा मी तुझी प्रार्थना केली आणि तू मला बरे केलेस.
3तू मला थडग्यातून वर उचललेस तू मला जगू दिलेस तू मला खड्ड्यात झोपलेल्या मृत लोकात राहू दिले नाहीस.
4देवाचे भक्त परमेश्वराची स्तुती करतात. त्याच्या पवित्र नावाचा महिमा गातात.
5देव रागावला होता म्हणून त्याचा निर्णय होता “मृत्यू.” परंतु त्याने त्याचे प्रेम दाखवले आणि मला “जीवन” दिले आदल्या रात्री मी झोपताना रडत होतो परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी मी आनंदी होतो व गात होतो.
6मी जेव्हा सुरक्षित व निर्धास्त होतो तेव्हा मला कोणीच अपाय करणार नाही असे वाटले.
7होय, परमेश्वरा तू माझ्याशी दयाळू पणे वागत होतास तेव्हा कोणीही माझा पराभव करू शकणार नाही असे मला वाटत होते. परंतु तू माझ्यापासून काही काळापुरता दूर गेलास आणि मला खूप भीती वाटली.
8देवा, मी तुझ्याकडे वळलो आणि तुझी प्रार्थना केली. मी तुला मला दया दाखवण्याची विनंती केली.
9मी म्हणालो, “देवा, मी मेल्यावर खाली थडग्यात गेलो तर चांगले होईल का? मेलेले लोक मातीत नुसते झोपतात. ते तुझी स्तुती करत नाहीत. आम्ही तुझ्यावर किती अवलंबून आहे हे ते इतरांना सांगू शकत नाहीत.
10परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक आणि माझ्यावर दया कर. परमेश्वरा, मला मदत कर.”
11मी तुझी प्रार्थना केली आणि तू मला मदत केलीस. तू माझे रडणे नाचण्यात बदलवलेस. तू माझे दुखाचे कपडे काढून टाकलेस आणि मला सुखात गुंडाळलेस.
12परमेश्वरा, माझ्या देवा मी तुझी सतत स्तुती करीन. अगदीच निशब्दता कधीच असू नये म्हणून मी हे करीन. तुझी स्तुती करण्यासाठी नेहमीच कुणीतरी असेल.

## स्तोत्र 31

***प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.***

1परमेश्वरा, मी तुझ्यावर अवलंबून आहे, माझी निराशा करू नकोस मला वाचव व माझ्यावर दया कर.
2देवा, माझे ऐक त्वरीत येऊन मला वाचव माझा खडक हो. माझे सुरक्षित स्थळ हो. माझा किल्ला हो. माझे रक्षण कर.
3देवा, तू माझा खडक आहेस तेव्हा तुझ्या नावाखातर पुढे हो व मला मार्गदर्शन कर.
4माझ्या शत्रूंनी माझ्यासमोर सापळा रचला आहे. त्यांच्या सापळ्यापासून मला वाचव तूच माझी सुरक्षित जागा आहेस.
5परमेश्वरा आम्ही विश्वास ठेवू शकू असा देव तूच आहेस. मी माझे आयुष्य तुझ्या हाती सोपवले. मला तार!
6जे लोक खोट्या देवाची पूजा करतात त्यांचा मी तिरस्कार करतो. मी केवळ परमेश्वरावर विश्वास ठेवतो.
7देवा, तुझा दयाळू पणा मला आनंदी बनवतो तू माझे कष्ट पाहिले आहेस. तुला माझ्या संकटाची जाणीव आहे.
8तू माझ्या शत्रूंना मला घेऊन जाऊ देणार नाहीस तू मला त्यांच्या सापळ्यातून मुक्त करशील.
9परमेश्वरा, माझ्यावर खूप संकटे आली आहेत. म्हणून माझ्यावर दया कर. मी इतका दुखी कष्टी झालो आहे कीमाझे डोळे क्षीण झाले आहेमाझ्या पोटासह माझे आंतले अवयव दुखत आहेत.
10माझ्या आयुष्याचा दुखात शेवट होणार आहे माझी वर्षे सुस्कार टाकण्यात निघून जाणार आहेत. माझी संकटे माझी शक्ती पिऊन टाकत आहेत. माझी शक्ती मला सोडून जात आहे.

11माझे शत्रू माझा तिरस्कार करतात आणि माझे सगळे
शेजारी सुध्दा माझा तिरस्कार करतात माझे सगळे
नातेवाईक मला रस्त्यात बघतात तेव्हा ते मला घाबरतात
आणि मला चुकवतात.
12मी हरवलेल्या हत्यारासारखा आहे लोक मला पूर्णपणे
विसरुन गेले आहेत.
13लोक माझ्याबद्दल जे भयंकर बोलतात ते मी ऐकतो.
ते लोक माझ्याविरुध्द गेले आहेत ते मला मारण्याची
योजना आखत आहेत.

14परमेश्वरा माझा तुझ्यावर विश्वास आहे. तूच माझा
देव आहेस.
15माझे जीवन तुझ्या हाती आहे. मला माझ्या शत्रूंपासून
वाचव. काही लोक माझा पाठलाग करीत आहेत
त्यांच्यापासून माझे रक्षण कर.
16कृपा करून तुझ्या सेवकाचे स्वागत कर आणि त्याचा
स्वीकार कर. माझ्यावर दया कर आणि माझे रक्षण
कर.
17परमेश्वरा, मी तुझी प्रार्थना केली कारण मला निराश
व्हायचे नव्हते. वाईट लोक निराश होतील. ते मुकाटपणे
थडग्यात जातील.
18ते वाईट लोक गर्व करतात. आणि चांगल्या
माणसांविषयी खोटे सांगतात. ते वाईट लोक अतिशय
गर्विष्ठ आहेत परंतु खोटं बोलणारे त्यांचे ओठ लवकरच
गप्प होतील.

19देवा, तू तूझ्या भक्तांसाठी खूप अद्‌भुत गोष्टीलपवून
ठेवल्या आहेस. तुझ्यावर जे विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी
तू सर्वांसमोर चांगल्या गोष्टी करतोस.
20वाईट लोक चांगल्या माणसांना त्रास देण्यासाठी एकत्र
येतात. ते दुष्ट लोक भांडणे सुरु करण्याचा प्रयत्न करतात.
परंतु तू चांगल्या लोकांना लपवतोस आणि त्यांचे रक्षण
करतोस. तू त्यांचे तुझ्या निवाऱ्यात रक्षण करतोस.
21परमेश्वर धन्य आहे! त्याने त्याचे माझ्यावरील खरे
प्रेम, शहर शत्रूंनी वेढलेले असताना अत्यंत आश्चर्यकारक
रीतीने व्यक्त केले.
22मी घाबरलो आणि म्हणालो, “देव मला पाहू शकणार
नाही अशा जागेत मी आहे.” परंतु देवा, मी तुझी प्रार्थना
केली आणि तू माझी मदतीसाठी मोठ्याने केलेली प्रार्थना
ऐकलीस.
23देवाच्या भक्तांनो, तुम्ही परमेश्वरावर प्रेम करा.
परमेश्वर त्याच्यावर विश्वास टाकणाऱ्या लोकांचे रक्षण
करतो. परंतु जे लोक स्वतच्या सामर्थ्याचा गर्व करतात
त्यांना तो शिक्षा करतो. परमेश्वर त्यांना योग्य अशीच
शिक्षा देतो.
24परमेश्वराच्या मदतीची वाट बघत असणाऱ्या लोकांनो
बलवान व धैर्यवान व्हा.

## स्तोत्र 32

*दावीदाचे एक स्तोत्र.*

1ज्याच्या अपराधांना क्षमा केली गेली आहे तो अत्यंत
सुखी आहे ज्याचे अपराध पुसले गेले आहेत तो फार
सुखी आहे.
2परमेश्वर ज्याला निरपराध म्हणतो तो सुखी आहे. जो
स्वतचे गुप्त अपराध लपवीत नाही तो सुखी आहे.
3देवा, मी पुन्हा पुन्हा तुझी प्रार्थना केली परंतु माझ्या
गुप्त अपराधांची वाच्यता केली नाही प्रत्येक प्रार्थनेच्या
वेळी मी क्षीण होत गेलो.
4देवा, रात्रंदिवस तू माझे आयुष्य अधिक बिकट करीत
गेलास, मी उष्ण उन्हाळी दिवसांतील जमिनीसारखा शुष्क
होत गेलो.
5परंतु नंतर मी परमेश्वरा पुढे माझे अपराध कबूल
करण्याचा निर्णय घेतला. परमेश्वरा, मी तुला माझे अपराध
सांगितले. आणि तू मला माझ्या सर्व अपराधांबद्दल क्षमा
केलीस.
6याच कारणासाठी देवा तुझ्या सर्व भक्तांनी तुझी प्रार्थना
करायला हवी. संकटे जेव्हा महापुरासारखी येतात तेव्हा
ती तुझ्या भक्तांपर्यंत नक्कीच जाणार नाहीत.
7देवा, तू माझी लपण्याची जागा आहेस. तू माझे माझ्या
संकटांपासून रक्षण करतोस तू माझ्या भोवती कडे करतोस
आणि माझे रक्षण करतोस म्हणून मी तू मला कसे वाचवलेस
त्याचे गाणे गातो.
8 परमेश्वर म्हणतो, “मी तुला आयुष्य कसे जगायचे
याविषयी मार्गदर्शन करीन. मी तुझे रक्षण करीन आणि
तुझा मार्गदर्शक होईन.
9म्हणून घोड्यासारखा वा गाढवासारखा मूर्ख होऊ नकोस
त्या प्राण्यांना आवरण्यासाठी लगाम वापरायलाच हवा या
गोष्टीशिवाय ते प्राणी तुमच्या जवळ येणार नाहीत.”
10वाईट लोकांना खूप दुख भोगावे लागेल, परंतु जे
परमेश्वरावर विश्वास ठेवतात त्यांच्या भोवती देवाच्या
खऱ्या प्रेमाचे कडे आहे.
11चांगल्या लोकांनो! परमेश्वराच्या ठायी आपला आनंद
व सुख व्यक्त करा. शुध्द मनाच्या सर्व लोकांनो आनंदी
व्हा!

## स्तोत्र 33

1चांगले लोकहो! परमेश्वरापाशी आनंद व्यक्त करा.
न्यायी लोकांनो त्याची स्तुती करा.
2वीणा वाजवून परमेश्वराचे स्तवन करा. दहा तारांच्या
वीणेवर परमेश्वराचे गुणगान गा.
3त्याच्यासाठी नवे गाणे गा. आनंदीहून चांगल्या रीतीने
वाजवा.
4देवाचा शब्द खरा असतो तो जे काही करतो त्यावर
तुम्ही विसंबून राहू शकता.
5देवाला चांगलुपणा आणि न्यायी वृत्ती आवडते.
परमेश्वराने पृथ्वी त्याच्या प्रेमाने भरून टाकली.

6परमेश्वराने आज्ञा केली आणि जगाची निर्मिती झाली
देवाच्या तोंडातल्या श्वासाने पृथ्वीवरील सर्व गोष्टी निर्माण
झाल्या.
7देवाने समुद्रातील पाणी एका ठिकाणी आणले. तो
समुद्राला त्याच्या जागेवर ठेवतो.
8पृथ्वीवरील प्रत्येकाने परमेश्वराची भीती बाळगली
पाहिजे आणि त्याला मान दिला पाहिजे या जगात राहणाऱ्या
प्रत्येकाने त्याला भ्यायला पाहिजे.
9का? देव फक्त आज्ञा करतो आणि त्याप्रमाणे गोष्टी
घडतात. आणि त्याने जर “थांब” म्हटले तर ती गोष्ट
थांबते.
10राष्टांचा उपदेश कवडी मोलाचा आहे तो त्यांच्या
सगळ्या योजनांचा नाश करू शकतो.
11परंतु परमेश्वराचा उपदेश सदैव चांगला असतो त्याच्या
योजना पिढ्यान्पिढ्या चांगल्या असतात.
12ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे ते लोक सुखी
आहेत. देवाने त्यांची विशेष माणसं म्हणून निवड केली.
13परमेश्वराने स्वर्गातून खाली पाहिले. त्याला सर्व लोक
दिसले.
14त्याने त्याच्या सिंहासनावरुन पृथ्वीवर राहणाऱ्या
लोकांकडे पाहिले.
15देवाने प्रत्येकाचे मन निर्माण केले. प्रत्येक जण काय
विचार करतो ते देवाला माहीत असते.
16राजा त्याच्या स्वतच्या सामर्थ्याने सुरक्षित राहू शकत
नाही. शूर सैनिक त्याच्या स्वतच्या शक्ती मुळे सुरक्षित
राहू शकत नाही.
17घोडे युध्दात विजय मिळवू शकत नाहीत. त्यांची शक्ती
तुम्हाला पळून जायला मदत करू शकत नाही.
18परमेश्वर त्याच्या भक्तांवर नजर ठेवतो आणि त्यांची
काळजी घेतो जे लोक त्याची भक्ती करतात त्यांचे तो
रक्षण करतो.
19देव त्यांना मरणापासून वाचवतो ते भुकेले असतील
तेव्हा त्यांना तो शक्ती देतो.
20म्हणून आपण परमेश्वरासाठी थांबू. तो आपली मदत
आणि ढाल आहे.
21देव आपल्याला आनंदी करतो. आम्ही त्याच्या पवित्र
नावावर खरोखरच विश्वास ठेवतो.
22परमेश्वरा, आम्ही मनापासून तुझी उपासना करतो
म्हणून तू तुझे महान प्रेम आम्हाला दाखव.

## स्तोत्र 34

***दावीदाचे स्तोत्र दावीद अबिमलेखापुढे वेड्यासारखा वागला तेव्हा त्याने दावीदाला हाकलून दिले. अशा रीतीने दावीदत्याला सोडून गेला.***

1मी परमेश्वराला नेहमी धन्यवाद देईन. माझ्या ओठांवर
नेहमी त्याची स्तुती असेल.
2विनम्र लोकांनो ऐका आणि आनंदी व्हा माझ्या मनाला
परमेश्वराचा गर्व वाटतो.
3देवाच्या महानते बद्दल माझ्या बरोबर सांगत चला
आपण त्याच्या नावाला प्रतिष्ठा देऊ या.
4मी देवाकडे मदतीसाठी गेलो आणि त्याने माझे ऐकले.
मला ज्या सर्व गोष्टींची भीती वाटत होती त्यापासून त्याने
मला वाचवले.
5देवाकडे मदतीसाठी वळा तुमचा स्वीकार होईल लाज
वाटून घेऊ नका.
6या गरीब माणसाने परमेश्वराकडे मदत मागितली आणि
परमेश्वराने माझे ऐकले. त्याने माझी सर्व संकटांतून
मुक्तता केली.
7परमेश्वराचा दूत त्याच्या भक्तांभोवती छावणी बांधतो
परमेश्वराचा दूत त्यांचे रक्षण करतो व त्यांना संकट मुक्त
करतो.
8परमेश्वराचा अनुभव घ्या आणि तो किती चांगला
आहे ते शिका जो परमेश्वरावर अवलंबून असतो तो
खरोखरच सुखी होईल.
9परमेश्वराच्या पवित्र लोकांनी त्याची भक्ती केली
पाहिजे. परमेश्वराच्या भक्तांसाठी सुरक्षित अशी दुसरी
जागा नाही.
10शक्तिशाली माणसे दुबळी आणि भुकेली बनतील.
परंतु जे लोक देवाकडे मदतीसाठी जातात त्यांना चांगल्या
गोष्टी मिळतील.
11मुलांनो माझे ऐका आणि मी तुम्हाला परमेश्वराला
कसा मान द्यायचा ते शिकवीन.
12जर एखाद्याचे जीवनावर प्रेम असेल आणि त्याला
जर खूप आणि चांगले जगायचे असेल तर
13त्याने वाईट गोष्टी बोलायला नकोत. त्याने खोटे
बोलायला नको.
14वाईट कृत्ये करणे सोडून द्या. चांगली कृत्ये करा.
शांतीसाठी काम करा. शांती गवसे पर्यंत तिच्या मागे
धावा.
15परमेश्वर चांगल्या लोकांचे रक्षण करतो. तो त्यांची
प्रार्थना ऐकतो.
16परंतु परमेश्वर वाईट कृत्ये करणाऱ्या लोकांच्या
विरुध्द आहे. तो त्यांचा सर्वनाश करतो.
17परमेश्वराची प्रार्थना करा, तो तुमचे ऐकेल. तो तुम्हाला
तुमच्या सर्व संकटांतून वाचवेल.
18काही लोकांवर खूप संकटे येतात आणि ते गर्व
करायचे थांबवतात. परमेश्वर अशा लोकांच्या जवळ
असतो. तो त्या विनम्र लोकांचे रक्षण करतो.*

---

**काही ... लोकांचे रक्षण करतो** शब्दश: “देव हृदय विदीर्ण झालेल्या लोकांच्या जवळ असतो. तो निरुत्साही लोकांना वाचवतो.”

19चांगल्या लोकांच्या मागे अनेक संकटे येतील. परंतु परमेश्वर त्यांना त्यांच्या प्रत्येक संकटातून वाचवतो.

20परमेश्वर त्याच्या सर्व हाडाचे रक्षण करेल. त्यांचे एकही हाड तो मोडू देणार नाही.

21परंतु संकटे वाईट माणसांना मारुन टाकतील चांगल्या माणसांच्या सगळ्या शत्रूंचा नाश होईल.

22परमेश्वर त्याच्या सेवकांच्या आत्म्यांना वाचवतो. ते लोक त्याच्यावर अवलंबून असतात तो त्यांचा विनाश होऊ देणार नाही.

## स्तोत्र 35

*दावीदाचे स्तोत्र.*

1परमेश्वरा माझ्या लढाया लढ. माझे युध्द कर.

2परमेश्वरा ढाल आणि साऱ्या शरीराचे रक्षण करणारी मोठी ढाल. उचल. ऊठ आणि मला मदत कर.

3भाला आणि भाल्यासारखे दिसणारे शस्त्र यांनी माझा पाठलाग करणाऱ्या लोकांशी लढ परमेश्वरा, माझ्या जीवाला सांग, "मी तुझे रक्षण करीन."

4काही लोक मला मारायचा प्रयत्न करीत आहेत त्यांची निराशा करून त्यांना शरम वाटेल असे कर. त्यांना पाठ फिरवून पळून जायला लावते लोक मला दुख द्यायच्या योजना आखत आहेत. त्यांना गोंधळात अडचणीत टाक.

5त्या लोकांना वाऱ्यावर उडूनजाणारा कोंडा बनव. परमेश्वराच्या दूतांकरवी त्यांचा पाठलाग होऊ दे.

6परमेश्वरा, त्यांचा मार्ग अंधारा आणि निसरडा होऊ दे. परमेश्वराचा दूत त्यांचा पाठलाग करू दे.

7मी काहीही चूक केली नाही तरी त्या लोकांनी मला जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केला.

8म्हणून परमेश्वरा, त्यांना त्यांच्याच सापळ्यात अडकू दे. त्यांना त्यांच्याच जाळ्यात अडकून पडू दे. एखादे अनामिक संकट त्यांच्यावर कोसळू दे.

9नंतर मी परमेश्वराचा आनंद लुटीन. त्याने माझे रक्षण केले की मी आनंदी होईन.

10माझी सर्व हाडे म्हणतील, "परमेश्वरा, तुझ्यासारखा कोणीही नाही परमेश्वरा, तू सामर्थ्यवान लोकांपासून गरीबांना वाचवतोस तू सामर्थ्यवानां पासून वस्तू घेऊन त्या गरीबांना आणि असहाय लोकांना देतोस."

11साक्षिदारांचा समूह मला दुख द्यायचे कारस्थान करीत आहे. ते लोक मला प्रश्न विचारतील आणि ते काय बोलतात ते मला कळत नाही.

12मी फक्त चांगल्याच गोष्टी केल्या आहेत परंतु लोक माझ्या विरुध्द वाईट गोष्टी करतील. परमेश्वरा, मी ज्या चांगल्या गोष्टींसाठी पात्र आहे त्या मला दे.

13जेव्हा ते लोक आजारी पडले तेव्हा मला वाईट वाटले अन्न न खाऊन मी माझे दुख प्रकट केले. त्यांच्यासाठी प्रार्थना करून मी हेच मिळवले का?

14मी त्या लोकांसाठी सुतकी कपडे घातले. मी त्या लोकांना माझ्या मित्रांसारखे किंवा भावासारखे

वागवले. आई मेल्यावर रडणाऱ्या माणसाप्रमाणे मी दुखी आहे. त्या लोकांसाठी दुख व्यक्त करायचे म्हणून मी काळे कपडे घातले. दुखात नतमस्तक होऊन मी वावरलो.

15परंतु मी जेव्हा चूक केली तेव्हा ते लोक मला हसले ते लोक सच्चे मित्र नव्हते. मी त्यांना नीट ओळखत देखील नव्हतो परंतु ते माझ्या भोवती गोळा झाले आणि ते त्यांनी माझ्यावर हल्ला केला.

16त्यांनी वाईट भाषा वापरली आणि माझी चेष्टा केली. त्यांनी माझ्यावरचा त्यांचा राग कराकरा दातखाऊन व्यक्त केला.

17परमेश्वरा, या वाईट गोष्टी घडत असताना तू किती वेळ नुसता बघत राहाणार आहेस? ते लोक माझा नाश करण्याचा प्रयत्न करीत आहेत परमेश्वरा, माझे प्राण वाचव माझे प्रियप्राण त्या वाईट लोकांपासून वाचव. ते सिंहासारखे आहेत.

18परमेश्वरा, मोठ्या सभेत मी तुझी स्तुती करेन. मी सामर्थ्यवान लोकांबरोबर असेन तेव्हा तुझी स्तुती करेन.

19माझे खोटे बोलणारे शत्रू हसत राहाणार नाहीत. त्यांच्या गुप्त योजनांमुळे माझ्या शत्रूंना खरोखरच शिक्षा होईल.*

20माझे शत्रू शांतीच्या योजना आखत नाहीत. या देशातील शांततापूर्ण लोकांना त्रास देण्यासाठीच माझे शत्रू गुप्तपणे योजना आखत आहेत.

21माझे शत्रू माझ्या विषयी वाईट बोलत आहेत. ते खोट बोलतात आणि म्हणतात, "हा तू काय करतोस ते आम्हाला माहीत आहे."

22परमेश्वरा, काय घडत आहे ते तुला तरी दिसतं आहे ना? मग गप्प बसू नकोस मला सोडून जाऊ नकोस.

23परमेश्वरा, जागा हो! ऊठ माझ्या देवा, माझ्या परमेश्वरा माझ्यासाठी लढ आणि मला न्याय दे.

24परमेश्वरा, देवा तुझ्या न्यायी बुध्दीने मला न्याय देत्या लोकांना मला हसू देऊ नकोस.

25 "आम्हाला हवे होते ते मिळाले, "असे त्या लोकांना म्हणू देऊ नकोस. परमेश्वरा, "आम्ही त्याचा नाश केला" असे त्यांना म्हणू देऊ नकोस.

26माझ्या सगळ्या शत्रूंना शरम वाटावी, ते गोंधळून जावेत अशी माझी इच्छा आहे.माझ्या बाबतीत वाईट गोष्टी घडल्या तेव्हाते लोक आनंदी होते ते माझ्यापेक्षा चांगले आहेत असे त्यांना वाटत होते. म्हणून ते लोक अपमानाने आणि लाजेने झाकोळून जावोत.

---

**खात्रीने ... शिक्षा होईल** शब्दश: "जे लोक माझा तिरस्कार करतात ते नेत्रपल्लवी करतील का?"

[27]काही लोकांना माझे चांगले व्हावे असे वाटते. ते सर्व
लोक सुखी होवोत ते लोक नेहमी म्हणतात, "परमेश्वर
महान आहे त्याच्या सेवकाचे भले व्हावे अशी त्याची
इच्छा आहे."
[28]म्हणून परमेश्वरा तू किती चांगला आहेस ते मी
लोकांना सांगेन. मी रोज तुझी स्तुती करेन.

## स्तोत्र 36

*प्रमुख वादकासाठी परमेश्वराचा सेवक*
*दावीद याचे स्तोत्र.*

[1]वाईट माणूस जेव्हा असे म्हणतो "मी देवाला भिणार
नाही, त्याला मान देणार नाही" तेव्हा तो फार वाईट गोष्ट
करतो.
[2]तो माणूस स्वतशीच खोटे बोलतो त्याला स्वतच्या
चुका दिसत नाहीत म्हणून तो क्षमेची याचना करीत नाही.
[3]त्याचे शब्द खोटे असतात त्यांना कवडीची किंमत
असते तो शहाणा होत नाही किंवा सत्कृत्य करायला
शिकत नाही.
[4]सर्व रात्रभर तो चुकीच्या किंवा वाईट गोष्टींच्या योजना
आखतो. तो उठल्यावर काहीही चांगले करीत नाही.
परंतु तो काही वाईट करायला नकारही देत नाही.
[5]परमेश्वरा, तुझे खरे प्रेम आकाशापेक्षाही उत्तुंग आहे.
तुझी इमानदारी ढगांपेक्षा उंच आहे.
[6]परमेश्वरा तुझा चांगुलपणा सर्वात उंचपर्वतापेक्षाही उंच
आहे तुझा न्यायीपणा सर्वात खोल, समुद्रापेक्षाही खोल
आहे. परमेश्वरा तू मनुष्याला आणि प्राण्यांना वाचवतोस.
[7]तुझा प्रेमळ दयाळूपणा सगळ्यांत किंमती आहे. माणसे
आणि देवदूत तुझ्याकडे संरक्षणासाठी येतात.
[8]परमेश्वरा तुझ्या घरातल्या चांगल्या वस्तूंमुळे त्यांना
नवा जोम येतो. तू त्यांना तुझ्या अद्भुत नदीतून मनसोक्त
पिऊ देतोस.
[9]परमेश्वरा जीवनाचे कारंजे तुझ्यातून उडते. तुझा
प्रकाश आम्हाला प्रकाश दाखवतो.
[10]परमेश्वरा जे तुला खरोखरच ओळखता तत्यांच्यावर
प्रेम करणे तू चालूच ठेव. जे लोक तुझ्याशी प्रामाणिक
आहेत त्यांच्यासाठी तुझा चांगुलपणा असू दे.*
[11]परमेश्वरा गर्विष्ठ लोकांना मला सापळ्यात अडकवू
देऊ नकोस. वाईट लोकांना मला पकडू देऊ नकोस.
[12]त्याच्यां थडग्यावर "इथे वाईट लोक पडले. त्यांना
चिरडण्यात आले. ते आता पुन्हा कधीही उभे राहू शकणार
नाहीत. "असे लिहून ठेव.

## स्तोत्र 37

[1]तू दुष्टांवर चिडू नकोस. वाईट कर्म करणाऱ्यांचा
हेवा करू नकोस.
[2]वाईट लोक चटकन पिवळ्या पडणाऱ्या आणि मरून
जाणाऱ्या गवतासारखे व हिरव्या वनस्पती सारखे असतात.
[3]तू जर परमेश्वरावर विश्वास ठेवलास आणि चांगल्या
गोष्टी केल्यास तर तू खूप जगशील आणि ही जमीन ज्या
चांगल्या गोष्टी देते त्यांचा उपभोग घेशील.
[4]परमेश्वराची आनंदाने सेवा कर म्हणजे तो तुला जे
काही हवे ते आनंदाने देईल.
[5]परमेश्वरावर अवलंबून राहा. त्याच्यावर विश्वास ठेव.
आणि तो जे करणे आवश्यक असेल ते करेल.
[6]परमेश्वर तुझा चांगुलपणा आणि न्यायीपणा दुपारच्या
उन्हासारखा तळपू देईल.
[7]परमेश्वरावर विश्वास ठेव आणि त्याच्या मदतीची
वाट पाहा दुष्ट लोक यशस्वी झाले तर वाईट वाटून घेऊ
नको सदुष्ट लोक कुकर्म करण्याच्या योजना आखतील
आणि त्यात यशस्वी होतील तेव्हा वाईट वाटून घेऊ नकोस.
[8]रागावू नकोस, संताप करून घेऊ नकोस. तुला स्वतला
दुष्कर्म करावेसे वाटेल इतका संतापू नकोस.
[9]का? कारण दुष्टांचा नाश होणार आहे. परंतु जे लोक
परमेश्वराकडे मदतीची याचना करतात त्यांना देवाने कबूल
केलेली जमीन मिळेल.
[10]थोड्याच काळानंतर इथे दुष्ट लोक राहाणार नाहीत.
तू त्यांना शोधण्याचा प्रयत्न करू शकतोस पण ते निघून
गेलेले असतील.
[11]विनम्र लोकांना देवाने कबूल केलेली जमीन मिळेल.
आणि ते शांती व समाधानात जगतील.
[12]दुष्ट लोक चांगल्या माणसांविरुध्द वाईट गोष्टी
करण्याच्या योजना आखतात. दुष्ट लोक चांगल्या
माणसांसमोर आपल्या रागाचे प्रदर्शन दात ओठ खाऊन
करतात.
[13]परंतु आपला प्रभु त्या दुष्टांना हसतो. त्यांचे काय
होणार आहे ते त्याला माहीत आहे.
[14]दुष्ट लोक त्यांचे धनुष्य घेऊन बाण सरसावतात.
त्यांना गरीब, लाचार लोकांना मारायचे आहे.
[15]परंतु त्यांचे धनुष्य मोडेल व त्यांच्या तलवारी त्यांच्याचा
छातीत घुसतील.
[16]मूठभर चांगले लोक वाईटांच्या जमावापेक्षा चांगले
असतात.
[17]का? कारण दुष्टांचा नाश होईल आणि परमेश्वर
चांगल्यांची काळजी घेतो.
[18]परमेश्वर शुध्द माणसांचे आयुष्यभर रक्षण करतो
त्यांचे वतन सदैव त्याच्याजवळ राहाते.
[19]संकटाच्यावेळी चागल्या माणसांचा नाश होणार नाही.
भुकेच्या वेळा येतील तेव्हा त्यांच्याकडे खायला भरपूर
अन्न असेल.
[20]वाईट माणसे परमेश्वराचे शत्रू आहेत आणित्या
माणसांचा नाश होणार आहे त्यांच्या दऱ्या कोरड्या
पडतीलआणि जळून जातील. त्यांचा संपूर्ण नाश होईल.

---

**तुझ्याशी ... असू दे** किंवा "प्रामाणिक मनाचा."

[21]वाईट माणूस पैसे चटकन् उसने घेतो आणि कधीही परत करीत नाही. परंतु चांगला माणूस उदारहस्ते इतरांना देतो.

[22]जर चांगल्या माणसाने लोकांना आशीर्वाद दिले तर त्या माणसांना देवाने कबूल केलेली जमीन मिळेल परंतु जर त्याने त्यांच्या वाईटाची इच्छाप्रकट केली तर त्यांचा नाश होईल.

[23]परमेश्वर सैनिकाला सावधगिरीने चालण्यास मदत करतो. परमेश्वर त्याला पडण्यापासून सावरतो.

[24]जर सैनिक पळत पळत त्याच्या शत्रूवर चढाई करत असेल तर परमेश्वर त्याचा हात धरुन त्याला पडताना सावरतो.

[25]मी तरुण होतो आणि आता म्हातारा झालो आहे. आणि देवाने चांगल्या माणसांचा त्याग केल्याचे मी कधी पाहिले नाही चांगल्या माणसांची मुले अन्नासाठी भीक मागताना मी कधी पाहिली नाहीत.

[26]चांगला माणूस दुसऱ्यांना सढळ हाताने देतो आणि चांगल्या माणसाची मुले म्हणजे जणू ईश्वरी कृपाच असते.

[27]जर तू वाईट गोष्टी करायला नकार दिलास आणि चांगल्या गोष्टी केल्यास तर तू सर्वकाळ जगशील.

[28]परमेश्वराला न्याय आवडतो. तो त्याच्या भक्तांना मदत केल्याशिवाय राहात नाही. तो त्याच्या भक्तांचे नेहमी रक्षण करेल पण दुष्टांचे निर्दालन करेल.

[29]चांगल्या माणसांना देवाने कबूल केलेली जमीन मिळेल ते सदैव त्या जमिनीवर राहातील.

[30]चांगला माणूस चांगला उपदेश करतो आणि त्याचे निर्णय सर्वांसाठी योग्य असतात.

[31]परमेश्वराची शिकवण त्याच्या (मनात) हृदयात असते. तो योग्य मार्गाने जगण्यांचे सोडून देत नाही.

[32]परंतु दुष्ट लोक चांगल्यांना दुखी करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढताततें चांगल्यांना मारण्याचा प्रयत्न करतात.

[33]परंतु परमेश्वर त्यांना तसे करू देत नाही. तो चांगल्यांना दोषी ठरवू देणार नाही.

[34]परमेश्वर सांगतो तसे करा परमेश्वराच्या मदतीची वाट पाहा. त्याला अनुसरा दुष्टांचा नाश होईल, परंतु परमेश्वर तुम्हाला महत्व देईल आणि देवाने कबूल केलेली जमीन तुम्हाला मिळेल.

[35]मी फोफावलेल्या सशक्त झाडासारखा दुष्टमाणूस पाहिला होता.

[36]परंतु नंतर तो नाहीसा झाला, मी त्याला शोधले पण तो मला सापडला नाही.

[37]शुध्द आणि सत्यवादी राहाशांती करणाऱ्यांना खूप संतती लाभेल.

[38]परंतु जे लोक नियम पाळत नाहीत त्यांचा नाश होईल. आणि त्यांच्या संततीला देश सोडून जाणे भाग पडेल.

[39]परमेश्वर चांगल्या माणसांना तारतो ते जेव्हा संकटात सापडतात तेव्हा परमेश्वर त्यांची शक्ती होतो.

[40]परमेश्वर चांगल्या माणसांना मदत करतो आणि त्यांना तारतो चांगले लोक परमेश्वरावर अवलंबून असतात आणि तो त्यांचे वाईट लोकांपासून रक्षण करतो.

## स्तोत्र 38

*स्मरण दिवसाचे दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वरा, तू माझ्यावर टीका करतोस तेव्हा रागावू नकोस तू मला वळण लावतोस तेव्हा क्रोधित होऊ नकोस.

[2]परमेश्वरा, तू मला इजा केलीस तुझे बाण माझ्या शरीरात खोलवर रुतले आहेत.

[3]तू मला शिक्षा केलीस. आता माझे सर्व शरीर दुखत आहे. मी पाप केले आणि तू मला शिक्षा केलीस. त्यामुळे माझी सर्व हाडे दुखत आहेत.

[4]मी दुष्कृत्य करण्याचा अपराध केला आहे आणि तो अपराध माझ्या खांद्यावर खूप मोठे ओझे असल्यासारखा आहे.

[5]मी मूर्खपणा केला आता मला दुर्गंधीयुक्त जखमांनी पछाडले आहे.

[6]मी धनुष्यासारखा वाकलो आहे आणि मी दिवसभर उदास असतो.

[7]मला ताप आला आहे आणि माझे सर्वशरीर दुखत आहे.

[8]मी फार अशक्त झालो आहे मी वेदनांमुळे कण्हत आहे आणि ओरडत आहे.

[9]प्रभु तू माझे ओरडणे ऐकलेस माझे उसासे तुझ्यापासून लपून राहिले नाहीत.

[10]माझे हृदय धडधडत आहे. माझी शक्ती निघून गेली आहे आणि माझी दृष्टीही जवळ जवळ गेलेली आहे.

[11]माझ्या आजारपणामुळे माझे मित्र आणि शेजारी मला भेटायला येत नाहीत. माझे आप्तही माझ्याजवळ येत नाहीत.

[12]माझे शत्रू माझ्याविषयी वाईट बोलतात. ते असत्य आणि अफवा पसरवीत आहेत. ते सदैव माझ्याबद्दलच बोलत असतात.

[13]परंतु मी काहीही ऐकू न येणाऱ्या बहिऱ्यामाणसासारखा आहे. मी बोलू न शकणाऱ्या मुक्यामाणसासारखा आहे.

[14]लोक ज्याच्याबद्दल वाईट बोलतात परंतु त्याला मात्र ते ऐकू येत नाही अशा माणसासारखा मी आहे. मी वादविवाद करून माझे शत्रू चूक आहेत हे सिध्द करू शकत नाही.

[15]म्हणून परमेश्वरा तू माझा बचाव कर. देवा, तूच माझ्यावतीने बोल.

[16]मी जर काही बोललो तर माझे शत्रू मला हसतील. मी आजारी आहे हे ते बघतील आणि मला चुकाकेल्याची शिक्षा मिळत आहे असे म्हणतील.

[17]मी चूक केल्याबद्दल अपराधी आहे. हे मला माहीत आहे मला माझे दुख विसरता येत नाही.

18परमेश्वरा, मी ज्या वाईट गोष्टी केल्यात्याबद्दल तुला
सांगितले. मला माझ्या दुष्कर्माबद्दल दुख होते आहे.
19माझे शत्रू जिंवत आहेत व निरोगी आहेत आणि
त्यांनी (माझ्याबद्दल) बरेच खोटेनाटे सांगितले आहे.
20माझे शत्रू माझ्याविरुध्द वाईट गोष्टी करतात आणि
मी मात्र त्यांच्यासाठी चांगल्या गोष्टी केल्या. मी केवळ
सत्कर्म करण्याचा प्रयत्न केला परंतु ते लोक माझ्यावर
उलटले.
21परमेश्वरा, मला सोडू नकोस. देवा माझ्याजवळ राहा.
22लवकर ये आणि मला मदत कर. माझ्या देवा मला
वाचव!.

## स्तोत्र 39

*प्रमुख गायकासाठी यदुथुनासाठी दावीदाचे स्तोत्र*

1मी म्हणालो "मी जे बोलेन त्याबद्दल काळजी घेईन मी
माझ्या जिभेला पाप करू देणार नाही."
2मी दुष्टांबरोबर असलो की माझे तोंड बंद ठेवीन. मी
बोलायला नकार दिला मी काही चांगलेसुध्दा बोललो
नाही. मी फार चिडलो होतो.
3मी फार रागावलो होतो आणि मी जितका जास्त त्याचा
विचार करत गेलो तितका अधिक मी रागावत गेलो.
म्हणून मी काही तरी बोललो.
4माझे काय होईल? हे परमेश्वरा, मला सांग मी किती
दिवस जगेन? ते मला सांग, माझे आयुष्य किती लहान
आहेते मला कळू दे.
5परमेश्वरा, तू मला अगदी कमी आयुष्य दिलेस. माझे
आयुष्य म्हणजे तुझ्या दृष्टीने काहीच नाही. प्रत्येकाचे
आयुष्य केवळ ढगासारखे असते. कुणीही सदासर्वकाळ
जगत नाही.
6आपण जे आयुष्य जगतो ते खोट्याप्रतिबिंबासारखे असते.
आपली सगळी संकटे निष्कारणच असतात. आपण नेहमी
वस्तू गोळा करीत असतो पण त्या कोणाला मिळणार
आहेत ते आपल्यालामाहीत नसते.
7तेव्हा प्रभु, मला काही आशा आहे का? तूच माझी
आशा आहेस!
8परमेश्वरा, तूच मला मी केलेल्या पापांपासून वाचवतू
मला दुष्ट माणसाला वागवितात तसे वागवू नकोस.
9मी माझे तोंड उघडणार नाही. मी काही बोलणार
नाही. परमेश्वरा जे करायला हवे होते ते तू केलेस.
10देवा, आता मला शिक्षा करणे सोडून दे जर तू ते
सोडून दिले नाहीस तर तू माझानाश करशील.
11परमेश्वरा, तू चूक केल्याबद्दल शिक्षा करतोस. त्या
रीतीने तू लोकांना जगण्याचा योग्य मार्ग दाखवतोस आमची
शरीरे म्हातारी होऊन कसरीने खाल्लेल्या कापडासारखी
जीर्ण होतातआमचे आयुष्य चटकन् नाहीसा
होणाऱ्याढगासारखे आहे.
12परमेश्वरा माझी प्रार्थना ऐक, मी तुझ्यासाठी जेशब्द
आकांताने बोलतो ते ऐक माझे अश्रू बघ. या आयुष्यात
तुझ्याबरोबर चालणारा मी केवळ एक प्रवासी आहे. माझ्या
सर्व पूर्वजांप्रमाणे मी येथे केवळ थोड्याकाळासाठी राहाणार
आहे.
13परमेश्वरा, माझ्याकडे बघू नकोस. मरण्याच्या
आधी मला आनंदी राहू दे. मी थोड्याच वेळात जाणार
आहे.

## स्तोत्र 40

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.*

1मी परमेश्वराला बोलावले आणि त्याने माझी हाक
ऐकली. त्याने माझे ओरडणे ऐकले.
2परमेश्वराने मला विनाशाच्याखड्ड्यातून उचलले. त्याने
मला चिखलातून बाहेर काढले. त्याने मला उचलले
आणि खडकावर ठेवले, त्याने माझे पाय स्थिर केले.
3परमेश्वराने माझ्या मुखात नवीन गाणे घातले. माझ्या
देवाच्या स्तुतीचे गाणे. बरेच लोक माझ्या बाबतीत घडलेल्या
घटना बघतील. ते देवाची उपासना करतील, ते देवावर
विश्वास ठेवतील.
4जर एखाद्याचा परमेश्वरावर विश्वास असला तर तो
माणूस खरोखरच सुखी होईल. जर तो राक्षसांकडे आणि
चुकीच्यादेवाकडे वळला नाहीतर तो खरोखरच सुखी
होईल.
5परमेश्वरा, देवा तू खरोखरच आश्चर्यजनक गोष्टी
केल्या आहेस तू आमच्यासाठी आश्चर्यकारक योजना
आखल्या आहेस परमेश्वरा, तुझ्यासारखा कुणीही नाही.
तू केलेल्या गोष्टीबद्दल मी पुन्हा पुन्हा सांगतराहीन
मोजण्यासाठी अशा असंख्य गोष्टी आहेत.
6परमेश्वरा, हे समजून घ्यायला तू मला मदत केलीस.*
तुला बळी किंवा धान्याच्या भेटी नको असतात. होमार्पणे
किंवा पापार्पणे तुला नको असतात.
7म्हणून मी म्हणालो "बघ, मी येत आहे. माझ्याविषयी
पुस्तकात हे लिहिले होते.
8माझ्या देवा, तुझे मानस पूर्ण करण्यात मला आनंद
आहे मी तुझी शिकवण अभ्यासली आहे.
9मी विजयाची चांगली बातमी मोठ्यासभेत सांगितली मी
माझे तोंड बंद ठेवले नाही. परमेश्वरा, तुला ते माहीत
आहे.
10परमेश्वरा, मी तुझ्या चांगुलपणाबद्दल सांगितले. मी
त्या गोष्टी मनात लपवून ठेवल्या नाही. परमेश्वरा, मी
लोकांना सांगितले की ते रक्षणासाठी तुझ्यावर अवलंबून
राहू शकतात. मी तुझा दयाळूपणा आणि तुझी निष्ठा
सभेतल्या लोकांपासून लपवून ठेवली नाही.

---

**परमेश्वर ... केलीस** शब्दश: "तू माझे कान खोदलेस" जुने
ग्रीक भाषांतर "तू माझ्यासाठी शरीर निर्माण केलेस."

11म्हणून परमेश्वरा तुझी करूणा माझ्यापासून लपवून ठेवू नकोस. तुझा दयाळूपणा आणि निष्ठा माझे सतत रक्षण करो."

12माझ्याभोवती दुष्टांची गर्दी झाली आहे ते मोजण्या न येण्याइतके आहेत माझ्या पापांनी माझी कोंडी केली आहे. आणि मी त्यांपासून पळू शकत नाही. माझ्या डोक्यावर असलेल्या केसांपेक्षा माझी पापे जास्त आहेत. माझे धैर्य नाहीसे झाले आहे.

13परमेश्वरा, माझ्याकडे धाव घे आणि मला वाचव. परमेश्वरा लवकर ये आणि मला मदत कर.

14ते वाईट लोक मला मारायचा प्रयत्न करीत आहेत. परमेश्वरा त्या लोकांना लज्जित कर आणि त्यांची निराशा कर. ते लोक मला दुख देणार आहेत. त्यांना शरमेने पळून जायला लाव.

15ते वाईट लोक माझी थट्टा करतात. त्यांना गोंधळायला लावून बोलता येणार नाही असे कर.

16परमेश्वरा, जे लोक तुझ्या शोधात आहेत त्यांना सुखी करत्या लोकांना नेहमी "परमेश्वराची स्तुती करा"असे म्हणू दे.त्या लोकांना तुझ्याकडून रक्षणकरून घेणे आवडते.

17प्रभु, मी केवळ एक गरीब, असहाय माणूस आहे. मला मदत कर. मला वाचव. माझ्या देवा, खूप उशीर करू नकोस.

## स्तोत्र 41

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र*

1जो माणूस गरीबांना यशस्वी होण्यासाठी मदत करतो त्याला अनेक आशीर्वाद मिळतील. संकट येईल तेव्हा परमेश्वर त्याला वाचवेल.

2परमेश्वर त्या माणसाचे रक्षण करेल आणि त्याचा जीव वाचवेल पृथ्वीवर त्या माणसाला आशीर्वाद मिळेल देव त्या माणसाचा त्याच्या शत्रूकडून नाश होऊ देणार नाही.

3तो माणूस जेव्हा आजारी पडून अंथरुणावरअसेल तेव्हा परमेश्वर त्याला शक्ती देईल. तो आजारात अंथरुणावर पडला तरी परमेश्वर त्याला बरे करील.

4मी म्हणालो, "परमेश्वरा, माझ्यावर दया कर. मी तुझ्या विरुध्द पाप केले,पण मला क्षमा कर आणि मला बरे कर."

5माझे शत्रू माझ्याविषयी वाईट बोलतात. ते म्हणतात, "तो कधी मरेल आणि विस्मरणात जाईल?"

6काही लोक मला भेटायला येतात परंतु त्यांच्या मनात काय आहे ते सांगत नाहीत. ते माझ्याबद्दलची काही बातमी मिळवण्यासाठी येतात. नंतर ते जातात आणि त्यांच्या अफवा पसरवतात.

7माझे शत्रू माझ्याबद्दलच्या वाईट गोष्टी कुजबुजतात ते माझ्याविरुध्द वाईट गोष्टींच्या योजना आखतात.

8ते म्हणतात, "त्याने काही तरी चूक केली म्हणूनच तो आजारी आहे तो कधीच बरा होऊ नये अशी मी आशा करतो."

9माझा सगळ्यात चांगला मित्र माझ्याबरोबर जेवला. मी त्याच्यावर विश्वास ठेवला. पण आता तो माझ्याविरुध्द गेला आहे.

10म्हणून परमेश्वरा, माझ्यावर दया कर. मला उठू दे.मग मी त्यांची परत फेड करीन.

11परमेश्वरा, माझ्या शत्रूंना मला दुख द्यायला संधी देऊ नकोस. तरच मला कळेल की तू माझा स्वीकार केला आहेस.

12मी निरपराध होतो आणि तू मला पाठिंबा दिला होतास तू मला उभे राहू दे मग मी सदैव तुझी चाकरी करीन.

13इस्राएलाच्या देवाचा जयजयकार असो. तो नेहमी होता आणि नेहमी राहील आमेन आमेन.

# भाग दुसरा

## स्तोत्र 42

*प्रमुख गायकासाठी कोरहाच्या कुटूंबाकडून मास्कील*

1हरणाला झऱ्याच्या पाण्याची तहान लागते. त्याचप्रमाणे देवा माझा आत्मा तुझ्यासाठी तहानेला आहे.

2माझा आत्मा जिवंत देवासाठी तहानेला आहे. मी त्याला भेटायला केव्हा जाऊ शकेन?

3रात्रंदिवस माझे अश्रूच माझे अन्न झाले आहे. सर्व वेळ माझा शत्रू थट्टा करून म्हणत आहे, "कुठे आहे तुझा देव?"

4म्हणून मला या सर्व गोष्टी आठवू दे. मला माझे मन रिकाम करू दे. जमावाला मी देवाच्या मंदिरापर्यंत नेल्याची मला आठवण आहे. खूप लोकांबरोबर स्तुतीचे आनंदी गाणे गाऊन सण साजरा केल्याची मला आठवण आहे.

5मी दुखी का व्हावे? मी इतके का तळमळावे? मी देवाकडून मदतीसाठी थांबले पाहीजे. त्याची स्तुती करण्याची मला पुन्हा संधी मिळेल. तो मला वाचवेल!.

6देवा, मी खूप दुखी आहे म्हणूनच मी तुला बोलावले. मी यार्देनच्या दरीपासून हर्मोनच्या डोंगरावर आणि मिसहारच्या टेकडीवर गेलो.

7या समुद्रापासून त्या समुद्रापर्यंत मी तुझ्यालाटांचा आपटण्याचा आवाज ऐकला. समुद्रातल्या लाटांसारखी संकटे माझ्यावर पुन्हा कोसळली परमेश्वरा तुझ्या लाटा माझ्यावर चहु बाजूंनी आदळत आहेत. तुझ्या लाटांनी मला पूर्णपणे झाकले आहे.

8दररोज व रात्रीही परमेश्वर त्याचे खरे प्रेम दाखवतो म्हणून माझ्याजवळ त्याच्यासाठी एक गीत आहे व एक प्रार्थना आहे.

[9]मी देवाशी माझ्या खडकाशी बोलतो मी म्हणतो
“परमेश्वरा, तू मला का विसरलास? माझ्या शत्रूच्या
क्रूरतेमुळे मी इतके दुख का सहन करावे?”
[10]माझ्या शत्रूंनी मला मारण्याचा प्रयत्न केला. “तुझा
देव कुठे आहे?”असे जेव्हा ते मला विचारतात तेव्हा ते
माझा तिरस्कार करत आहेत असे दाखवतात.
[11]मी इतका दुखी का आहे? मी इतका खिन्न का
आहे? मी देवाच्या मदतीची वाट बघितली पाहिजे.
त्याची स्तुती करण्याची संधी मला पुन्हा मिळेल. तो मला
वाचवेल.

## स्तोत्र 43

[1]देवा तुला न अनुसरणारा एक माणूस इथे आहे. तो
कपटी आहे आणि तो खोटे बोलतो देवा मी बरोबर आहे
हे सिध्द कर. माझा बचाव कर. मला त्या माणसापासून
वाचव.
[2]देवा, तू माझे सुरक्षित स्थान आहेस तू मला का
सोडलेस? माझ्या शत्रूंपासून कशी सुटका करायची ते तू
मला का दाखवले नाहीस?
[3]देवा, तुझा प्रकाश आणि सत्य माझ्यावर उजळू दे
तुझा प्रकाश आणि सत्य मला मार्ग दाखवेल. ते मला
तुझ्या पवित्र डोंगराकडे नेतील. ते मला तुझ्या घराकडे
नेतील.
[4]मी देवाच्या वेदीजवळ जाईन मला अत्यंत सुखी
करणाऱ्या देवाकडे मी येईन देवा, माझ्या देवा मी तुझी
वीणा वाजवून स्तुती करीन.
[5]मी इतका खिन्न का आहे? मी इतका का तळमळतो
आहे? मी देवाच्या मदतीची वाट पहायला हवी. मला
देवाची स्तुतीकरायची आणखी संधी मिळेल. तो मला
वाचवेल.

## स्तोत्र 44

*प्रमुख गायकासाठी कोरहाच्या*
*कुटुंबासाठी मास्कील*

[1]देवा, आम्ही तुझ्याबद्दल ऐकले आहे. आमच्या वडिलांनी
तू त्यांच्या आयुष्यात काय केलेस ते सांगितले, खूप पूर्वी
तू काय केलेस तेही त्यांनी सांगितले.
[2]देवा, तू तुझ्या सर्व शक्तीने हा देश इतर लोकांपासून
घेतलास आणि तो आम्हाला दिलास तू त्या परदेशी
माणसांना चिरडलेस तू त्यांना हा देश सोडायला भाग
पाडलेस.
[3]हा देश आमच्या वडिलांच्या तलवारीने मिळवलेला
नाही. त्यांच्या कणखर बाहूंनी त्यांना विजयी केले नाही.
हे घडले कारण तू त्यांच्या बरोबर होतास देवा तुझ्या
पराक्रमी शक्तीमुळे आमचे वाडवडील वाचलेका? कारण
तू त्यांच्यावर प्रेम केलेस.
[4]देवा, तू माझा राजा आहेस आज्ञा दे आणि याकोबाच्या
माणसांना विजयाप्रत ने.
[5]देवा, तुझ्या मदतीने आम्ही शत्रूला मागे रेटू. तुझ्या
नावाने आम्ही आमच्या शत्रूवर चालून जाऊ.
[6]माझ्या धनुष्यबाणांवर माझा विश्वास नाही. माझी
तलवार मला वाचवू शकणार नाही.
[7]देवा, तू आम्हाला मिसर पासून वाचवलेस. तू आमच्या
शत्रूंना लाजवले आहेस.
[8]आम्ही रोज देवाची स्तुती करू आम्ही तुझ्या नावाची
सदैव स्तुती करत राहू.
[9]परंतु देवा, तू आम्हाला सोडून गेलास. तू आम्हाला
अडचणीत टाकलेस तू आमच्याबरोबर लढाईत आला
नाहीस.
[10]तू आमच्या शत्रूंना आम्हाला मागे रेटू दिलेस. शत्रूंनी
आमची संपत्ती घेतली.
[11]तू आम्हाला मेंढ्यासारखे खायचे अन्न म्हणून देऊन
टाकले तू आम्हाला राष्टांमध्ये इतस्तत विखरून टाकले.
[12]देवा, तू आम्हाला कवडीमोलाने विकलेस. तू
किंमतीसाठी घासाघीस देखील केली नाहीस.
[13]तू शेजाऱ्यांमध्ये आमचे हसे केलेस. आमचे शेजारी
आम्हाला हसतात. ते आमची मस्करी करतात.
[14]आम्ही म्हणजे लोकांनी सांगितलेली हसवणूक आहोत,
ज्यांना स्वत चा देश नाही असे लोकही आम्हाला हसतात
आणि मान हलवतात.
[15]मी लाजेने वेढला गेलो आहे. दिवसभर मला माझी
लाज दिसते.
[16]माझ्या शत्रूंनी मला अडचणीत आणले माझे शत्रू
माझी चेष्टा करून जशास तसे वागायचा प्रयत्न करतात.
[17]देवा, आम्ही तुला विसरलो नाही तरीही तू आम्हाला
या सगळ्या गोष्टी करतोस आम्ही तुझ्याबरोबर केलेल्या
करारनाम्यावर सही केली तेव्हा खोटे बोललो नाही.
[18]देवा, आम्ही तुझ्यापासून दूर गेलो नाही. आम्ही तुझा
मार्ग चोखाळणे बंद केले नाही.
[19]परंतु देवा, तू आम्हाला कोल्हे राहातात त्या जागेत
चिरडलेस मृत्यूसारख्या अंधाऱ्याजागेत तू आम्हाला
झाकलेस.
[20]आम्ही आमच्या देवाचे नाव विसरलो का? आम्ही
परक्या देवाची प्रार्थना केली का? नाही.
[21]देवाला खरोखरच या गोष्टी माहीत असतात. त्याला
आपल्या हृदयातल्या अगदी आतल्या गुप्त गोष्टीही माहीत
असतात.
[22]देवा आम्ही रोज तुझ्यासाठी मारले जात आहोत.
मारण्यासाठी नेल्या जाणाऱ्या मेंढ्यांप्रमाणे आम्ही आहोत.
[23]प्रभु, ऊठ तू का झोपला आहेस? ऊठ आम्हाला
कायमचा सोडून जाऊ नकोस.
[24]देवा, तू आमच्यापासून लपून का राहात आहेस?तू
आमची दुखं आणि संकट विसरलास का?

[25]तू आम्हाला घाणीत ढकलून दिले आहेस आम्ही धुळीत* पोटावर पडलो आहोत.

[26]देवा, ऊठ! आम्हाला मदत कर. मेहेरबानी करून आम्हाला वाचव.

## स्तोत्र 45

***प्रमुख गायकासाठी कोरहाच्या कुटुंबाचे शोशन्नीमया सुरांवर बसवलेले मास्कील प्रीतीचे स्तोत्र***

[1]मी राजासाठी या गोष्टी लिहितो तेव्हा माझे मन सुंदर शब्दांनी भरून जाते. एखाद्या कसबी लेखकाच्या लेखणीतून शब्द यावेत त्याप्रमाणे माझ्या जिभेतून शब्द येतात.

[2]तू कोणाही पेक्षा खूप सुंदर आहेस. तू चांगला वक्ता आहेस. म्हणून देव तुला सदैव आशीर्वाद देईल.

[3]तुझी तलवार म्यानात ठेव हे सर्वशक्तीमान, तुझा गौरवशाली गणवेश परिधान कर.

[4]तू खूप अद्भूत दिसतोस जा आणि चांगल्यासाठी वन्यायासाठी होत असलेली लढाई जिंकून ये. तुझा बलवान उजवा हात विस्मयजनक गोष्टी करण्यासाठी वापर.

[5]तुझे बाण तीक्ष्ण आहेत. तू खूप लोकांचा पराभव करशील ते तुझ्यापुढे जमिनीवर पडतील.

[6]देवा* तुझे सिंहासन नेहमी साठी आहे. चांगुलपणा हा तुझा राजदंड आहे.

[7]तुला चांगुलपणा आवडतो आणि तू वाईटाचा तिरस्कार करतो म्हणून देवा, तुझ्या देवाने तुलाच तुझ्या मित्रांचा* राजा निवडले.

[8]तुझ्या वस्त्रांना बोळ, अगरू, ऊद आणि दालचिनी यांचा सुगंध येतो. हस्तिदंताने अच्छादलेल्या महालातून तुला आनंदीत करण्यासाठी संगीत ऐकू येते.

[9]राजांच्या मुली करवल्या आहेत. तुझी वधू तुझ्या उजव्या हाताला शुध्द सोन्याचा मुगुट धारण करून उभी आहे.

[10]मुली, माझे ऐक, लक्षपूर्वक ऐक म्हणजे तुला कळेल. तुझी माणसे आणि तुझ्या वडिलांचे कुटुंबयांना विसरून जा.

[11]राजाला तुझे सौंदर्य आवडते. तो तुझा नवा नवरा (स्वामी) असेल. तू त्याला मान देशील.

[12]सोराचे लोक तुझ्यासाठी भेटी आणतील. श्रीमंत लोक तुला भेटायची इच्छा धरतील.

[13]राजकन्या म्हणजे एक किमती आणि सोन्यात मढवलेला सुंदर हिरा आहे.

[14]सुंदर वस्त्रप्रावरणांनी सजलेल्या वधूला राजाकडे नेले जाते. तिच्या करवल्या तिच्या मागून जातात.

[15]त्या अतिशय आनंदात आहेत.आनंदविभोर होऊन त्या राजाच्या राजवाड्यात प्रवेश करतात.

[16]राजा, तुझी मुले तुझ्यानंतर राज्य करतील. तू त्यांना तुझ्या संपूर्ण राज्याचे अधिपती करशील.

[17]मी तुझे नाव सदैव प्रसिध्द राहील असे करीन. लोक सदैव तुझी स्तुती करतील.

## स्तोत्र 46

***प्रमुख गायकासाठी कोरहाच्या मुलांसाठी आलामोथ* सुरांवर बसवलेले गाणे***

[1]देव आमचे सामर्थ्य साठवण्याचे भांडार आहे. आम्ही संकटकाळी त्याच्याजवळ नेहमीमदत शोधू शकतो.

[2]म्हणून जेव्हा भूकंप होतात आणि पर्वत समुद्रात पडतात तेव्हा आम्हाला भीती वाटत नाही.

[3]समुद्र जेव्हा खवळतो आणि पर्वत थरथर कापायला लागतात तेव्हा ही आम्हाला भीती वाटत नाही.

[4]एक नदी आहे आणि तिचे ओढे नाले देवाच्या शहरात, सर्वशक्तिमान देवाच्या सर्वांत पवित्र शहरात सुख-समृध्दी आणतात.

[5]देव त्या शहरात आहे म्हणून त्याचा कधीही नाश होणार नाही देव सूर्योदयाच्या पूर्वीच मदत करेल.

[6]जेव्हा परमेश्वर रागाने गर्जेल आणि पृथ्वी कोलमडेल तेव्हा ती राज्ये भीतीने थरथर कापतील. ती राष्ट्रे पडतील.

[7]तो सर्वशक्तिमान परमेश्वर आपल्या बरोबर आहे. याकोबाचा देव ही आपल्यासाठी सुरक्षित जागा आहे.

[8]परमेश्वर ज्या शक्तिशाली गोष्टी करतो त्या बघ, तो पृथ्वीवर ज्या भयंकर गोष्टी आणतो त्या बघ.

[9]परमेश्वर पृथ्वीवर कुठेही युध्दे थांबवू शकतो तो सैनिकांचे धनुष्य मोडून त्यांचे भाले तोडू शकतो तो त्यांचे रथ आगीत जाळू शकतो.

[10]देव म्हणतो, “शांत राहा आणि मी देव आहे हे लक्षात घ्या. मी राष्ट्रांचा पराभव करतो व जगाला ताब्यात ठेवतो.”

[11]तो सर्वशक्तिमान परमेश्वर आपल्याबरोबर आहे. याकोबाचा देव ही आपली सुरक्षित जागा आहे.

## स्तोत्र 47

***प्रमुख गायकासाठी कोरहाच्या मुलांचे स्तोत्र***

[1]लोकहो! तुम्ही टाळ्या वाजवा. तुम्ही सर्व लोक देवाशी आनंदाने जल्लोष करा.

---

**तू ... आम्ही धुळीत** यावरुन लोकाना गुलामाप्रमाणे वागणूक मिळत होती. गुलामांना त्यांच्या मालकाला खाली वाकून सलाम करावा लागे.

**देव हे** देवासाठी लिहिले असेल किंवा कवी येथे “देव” हे नाव राजासाठी वापरत असेल.

तुला ... **मित्र** शब्दश: “तुझ्यावर आणि तुझ्या मित्रांवर खारु तेल ओतले. देवळात गोळा करून ठेवलेले खास तेल.” त्या तेलाने राजा, पुजारी आणि देवदूत यांना मालिश केली जाई.

**आलामोथ** हा संगीतातील एक शब्द असावा याचा अर्थ “बासरीसारखा” किंवा “उंच स्वरातील” असा असू शकले. पाहा 1 इतिहास 15:21.

2 सर्वशक्तिमान परमेश्वर भीतिदायक आहे. तो सर्व पृथ्वीवरील महान राजा आहे.

3 त्याने आपल्याला दुसऱ्या लोकांचा पराभव करायला मदत केली. त्याने ते देश आपल्या अधिपत्याखाली आणले.

4 देवाने आपल्यासाठी आपल्या प्रदेशाची निवड केली. त्याने त्याला आवडणाऱ्या याकोबासाठी हा अद्भुतरम्य देश निवडला.

5 परमेश्वर बिगुलाच्या आणि तुतारीच्या आवाजात आपल्या सिंहासनाकडे जातो.

6 देवाचे गुणगान करा. आपल्या राजाची स्तुतिपर गाणीगा.

7 देव सर्व जगाचा राजा आहे. त्याच्या स्तुतिपर गाणे गा.

8 देव त्याच्या पवित्र सिंहासनावर बसतो. तो सगळ्या देशांवर राज्य करतो.

9 देशांचे प्रमुख अब्राहामाच्या देवाच्या लोकांना भेटतात. सर्व देशांचे प्रमुख देवाचे आहेत. देव त्या सगळ्यांपेक्षा थोर आहे.*

## स्तोत्र 48

***एक गाणे कोरहाच्या मुलांचे स्तोत्र***

1 परमेश्वर थोर आहे आपल्या देवाच्या शहरात, त्याच्या पवित्र पर्वतावर लोक त्याची स्तुति करतात.

2 देवाचे पवित्र शहर सुंदर आहे. त्याचे सौंदर्य सर्व पृथ्वीवर आनंद आणते सियोन पर्वत सगळ्यात उंच आणि पवित्र पर्वत आहे. हे त्या महान राजाचे शहर आहे.

3 इथे त्या शहराच्या राजवाड्यांत देवाला किल्ला म्हणतात.

4 एकदा काही राजे भेटले. त्यांनी या शहरावर हल्ला करायची योजना आखलीते सगळे चालून आले.

5 त्यांनी पाहिले आणि ते विस्मित झाले. ते घाबरले आणि पळत सुटले.

6 भयाने त्यांना घेरले, भीतीने त्यांचा थरकाप झाला.

7 देवा, तू पूर्वेकडच्या जोरदार वाऱ्याचा उपयोग केलास आणि त्यांची मोठी जहाजे मोडलीस.

8 होय, आम्ही ती गोष्ट ऐकली पण आम्ही ते सर्वशक्तिमान परमेश्वराच्या शहरात, आमच्या देवाच्या शहरात घडत असलेले पाहिले. देव ते शहर सदैव सामर्थ्यवान बनवतो.

9 देवा, आम्ही तुझ्या मंदिरात तुझ्या प्रेमळ दयेचा लक्षपूर्वक विचार करतो.

10 देवा तू प्रसिध्द आहेस.पृथ्वीवर सगळीकडे लोक तुझी स्तुती करतात तू किती चांगला आहेस ते प्रत्येकाला माहीत आहे.

11 देवा, सियोन पर्वत आनंदी आहे यहूदाची शहरे तुझ्या चांगल्या निर्णयामुळे उल्हासित झाली आहेत.

12 सियोन भोवती फिरा, शहर बघा बुरुज मोजा.

13 उंच भिंती बघा, सियोनच्या राजवाड्याचे कौतुक करा. नंतर तुम्ही पुढच्या पिढीला त्याबद्दल सांगू शकाल.

14 देव खरोखरच नेहमी आपला देव असेल. तो आपल्याला सदैव मार्गदर्शन करेल.

## स्तोत्र 49

***प्रमुख गायकासाठी कोरहाच्या मुलांचे गाणे***

1 सर्व राष्ट्रांनो, हे ऐका पृथ्वीवरील सर्व जनहो! हे ऐका.

2 प्रत्येकाने, गरीब, असो वा श्रीमंत हे ऐकले पाहिजे.

3 मी तुम्हाला काही शहाणपणाच्या आणि हुशारीच्या गोष्टी सांगणार आहे.

4 मी त्या गोष्टी ऐकल्या आणि आता माझ्या वीणेच्या साथीवर मी त्या तुम्हाला गाऊन दाखवतो.

5 संकटे आली तर मला भीती का वाटावी?दुष्टांनी मला घेरले आणि सापळ्यात अडकवले तर मी का घाबरू?

6 काही लोकांना वाटते की त्यांची सत्ता आणि संपत्ती त्यांचे रक्षण करील परंतु ते लोक मूर्ख आहेत.

7 कुणीही मानवी मित्र तुम्हाला वाचवू शकणार नाही आणि तुम्ही देवाला लाच देऊ शकत नाही.

8 स्वतचे आयुष्य कायमचे विकत घेण्याइतका पैसा कुणाकडेच नसतो. सदैव जिवंत राहाण्याचा हक्क विकत घेण्याइतका.

9 पैसा कुणाकडेच नसतो व शरीर थडग्यात कुजू नये म्हणून ते वाचविण्यासाठी ही कुणाकडे पैसे नसतात.

10 शहाणी माणसेही मूर्ख लोकांसारखीच मरतात. आणि इतर लोक त्यांची सर्व संपत्ती घेतात.

11 थडगे हेच सर्वांचे सर्वकाळचे नवीन घर असते. आणि त्यांच्याकडे किती जमीन आहे यामुळे त्यात काहीही फरक पडत नाही.

12 श्रीमंत लोक सर्वकाळ जगू शकत नाहीत. ते प्राण्यासारखेच मरतात.

13 आपल्या संपत्तीवर भरवसा ठेवणाऱ्या अशामूर्ख लोकांचे असेच होते.

14 ते लोक मेंढ्यांप्रमाणे आहेत. थडगे त्यांची लेखणी आहे.मरण त्यांचा मेंढपाळ आहे. एका सकाळी त्यांच्या शरीराचा थडग्यात नाश होईल आणि ते कुजेल तेव्हा चांगले लोक आनंद करतील.

15 परंतु देव किंमत चुकवून माझा जीव वाचवेल. तो मला थडग्याच्या सामर्थ्यापासून वाचवेल.

16 लोक केवळ श्रीमंत आहेत म्हणून त्यांची भीती बाळगू नकोस.लोकांकडे मोठी, वैभवशाली घरे आहेत म्हणून त्यांची भीती बाळगू नकोस.

---

**देव ... आहे** किंवा “देव फारच उच्च वृत्तीचा आहे” पाचव्या कडव्यात वापरलेल्या हिब्रू शब्द हाच आहे. त्यावरुन समजते की देव वर गेला आणि सिंहासनावर बसला.

17 ते लोक मरतील तेव्हा एकही गोष्ट बरोबर घेऊन जाणार नाहीत. या सुंदर वस्तूपैकी एकही वस्तू ते बरोबर नेणार नाहीत.

18 आपल्या जीवनात आपण किती चांगल्या गोष्टी केल्या आहेत ह्याविषयी एखादी श्रीमंत व्यक्ति स्वतचेच अभिनंदन करील व लोकही त्याची स्तुति करतील.

19 परंतु त्याला त्याच्या पूर्वजांकडे जाण्याची वेळ येईलच आणि नंतर तो दिवसाचा प्रकाश पुन्हा बघू शकणार नाही.

20 लोक श्रीमंत असूनही समजू शकणार नाहीत. ते प्राण्यांप्रमाणेच मरण पावतील.

## स्तोत्र 50

### *असाफचे स्तोत्र*

1 परमेश्वर, देवांचा देव बोलला आहे. तो पृथ्वीवरील पूर्व पाश्चिमे कडील सर्व लोकांना बोलावतो.

2 सियोन पर्वतावरुन चमकत असलेला देव सुंदर आहे.

3 आमचा देव येत आहे आणि तो गप्प राहाणार नाही. त्याच्यासमोर आग लागली आहे. त्याच्याभोवती वादळ घोंगावत आहे.

4 आमचा देव पृथ्वीला आणि आकाशाला त्याच्या माणसांचा निवाडा करण्यासाठी बोलावतो.

5 देव म्हणतो, "माझ्या भक्तांनो माझ्याभोवती गोळा व्हा. माझ्या उपासकांनो, या आपण एकमेकाशी करार केला आहे."

6 देव न्यायाधीश आहे आणि आकाश त्याच्या चांगुलपणा विषयी सांगत असते.

7 देव म्हणतो, "माझ्या लोकांने माझे ऐका! इस्राएलाच्या लोकांनो मी तुमच्या विरुध्द माझा पुरावा देईन. मी देव आहे. तुमचा देव आहे.

8 मी तुमच्या होमबलीं बद्दल तक्रार करीत नाही. इस्राएलाच्या लोकांनो, तुम्ही तुमची होमार्पणे माझ्याकडे केव्हाही आणा. तुम्ही मला ती रोज द्या.

9 मी तुमच्या घरातून बैल घेणार नाही. मी तुमच्या गोठ्यातून बकऱ्या घेणार नाही.

10 मला त्या प्राण्यांची गरज नाही. जंगलातले सगळे प्राणी आधीच माझ्या मालकीचे आहेत हजारो पर्वतावरील सगळे प्राणी माझ्याच मालकीचे आहेत.

11 उंच पर्वतावरील प्रत्येक पक्षी मला माहीत आहे डोंगरावर हलणारी प्रत्येक वस्तू माझ्या मालकीची आहे.

12 मी भुकेला नाही मी जरी भुकेला असतो तरी तुमच्याकडे अन्न मागितले नसते. मी जगाचा मालक आहे आणि जगातील प्रत्येक वस्तू माझ्या मालकीची आहे.

13 मी बैलाचे मांस खात नाही. मी बकऱ्यांचे रक्त पीत नाही."

14 म्हणून तुमचे कृतज्ञता उपहार आणा आणि देवाबरोबर असण्यासाठी या तुम्ही सर्वशक्तिमान देवाला वचने दिली. तेव्हा आता कबूल केलेल्या वस्तू त्याला द्या.

15 देव म्हणतो, "इस्राएलाच्या लोकांनो, तुम्ही संकटात असाल तेव्हा माझी प्रार्थना करा. मी तुम्हाला मदत करीन. आणि नंतर तुम्ही मला मान देऊ शकाल."

16 देव दुष्ट लोकांना म्हणतो, "तुम्ही लोक माझ्या कायद्यांबद्दल बोलता. तुम्ही माझ्या कराराबद्दल बोलता.

17 मी तुम्हाला योग्य ते बोला असे सांगतो तेव्हा तुम्ही त्याचा तिरस्कार का करता? मी सांगितलेल्या गोष्टींकडे तुम्ही दुर्लक्ष का करता?

18 तुम्ही चोराला बघता आणि त्याच्याबरोबर राहाण्यासाठी तुम्ही पळत सुटता. तुम्ही व्यभिचार करणाऱ्या लोकांबरोबर झोपता.

19 तुम्ही वाईट गोष्टी सांगता आणि खोटे बोलता.

20 तुम्ही इतरांविषयी सतत वाईट बोलता. स्वतच्या भावाविषयी सुध्दा!

21 तुम्ही वाईट गोष्टी करता आणि तरीही मी गप्प बसावे असे तुम्हाला वाटते तुम्ही काही बोलत नाही. आणि मी ही गप्प राहावे असे तुम्हाला वाटते. पण मी मुळीच गप्प बसणार नाही. मी हे तुम्हाला स्वच्छ सांगेन आणि तुमच्या तोंडावर टीका करीन.

22 तुम्ही लोक देवाला विसरला आहात. मी तुम्हाला फाडून टाकण्यापूर्वीच तुम्ही हे सारे लक्षात घ्या जर तसे घडले तर तुम्हाला कोणीही वाचवू शकणार नाही.

23 म्हणून जर एखाद्याने कृतज्ञता पूर्वक होमार्पण केले तर तो खरोखच मला मान देतो. जर एखाद्या माणसाने त्याचे आयुष्य बदलले आणि तो चांगले वागू लागला तर मी त्याला देवाच्या रक्षणाची शक्ती दाखवेन."

## स्तोत्र 51

### *प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र दावीदाने बथशेबाबरोबर पाप केल्यानंतर भविष्यवेता नाथान त्याच्याकडे आला तेव्हाचे स्तोत्र*

1 देवा, माझ्यावर दया कर तुझ्या अतिशय प्रेमळ दयाळूपणाने आणि तुझ्या महान कृपेने माझी पापे पुसून टाक.

2 देवा माझे अपराधीपण खरवडून घालवून टाक. माझी पापे धुऊन टाक, मला पुन्हा स्वच्छ कर.

3 मी पाप केले हे मला माहीत आहे. ती पापे मला नेहमी दिसतात.

4 तू ज्या गोष्टी चुकीच्या आहेत असे सांगतोस त्याच मी केल्या. देवा मी तुझ्याविरुध्द पाप केले. मी त्या पापांची कबुली देतो म्हणजे लोकांना कळेल की मी चुकलो आणि तू बरोबर होतास. तुझे निर्णय योग्य आहेत.

[5]मी पापातच जन्मलो आणि पापातच माझ्या आईने माझा गर्भ धारण केला.
[6]देवा, मी खरोखरच प्रामाणिक व्हावे असे वाटत असेल तर शहाणपण माझ्या आत खोलवर ठेव.
[7]मला शुध्द करण्यासाठी तू एजोब वनस्पती वापर आणि विधी कर. मला आंघोळ घाल म्हणजे मी बर्फापेक्षा शुभ्र होईन.
[8]मला सुखी कर पुन्हा आनंदी कसे व्हायचे ते मला सांग. तू जी हाडे चिरडून टाकलीस ती पुन्हा आनंदी होऊ दे.
[9]माझ्या पापांकडे बघू नकोस ती पुसून टाक.
[10]देवा माझ्यात पवित्र हृदय निर्माण कर. माझा आत्मा पुन्हा बलशाली कर.
[11]मला दूर लोटू नकोस आणि तुझा पवित्र आत्मा माझ्यातून काढून घेऊ नकोस.
[12]मी तुझ्या मदतीमुळे आनंदी झालो, मला पुन्हा तुझा आनंद दे, माझा आत्मा सबळ कर आणि तुझ्या आज्ञा पाळणारा कर.
[13]पापी लोकांनी कसे राहावे अशी तुझी इच्छा आहे त्याप्रमाणे मी त्यांना शिकवीन. आणि ते तुझ्याकडे परत येतील देवा, मला खुनी समजू नकोस.
[14]देवा, तूच माझा त्राता आहेस. तू किती चांगला आहेस ते सांगणारे गाणे मला गाऊ दे.
[15]प्रभु, मी माझे तोंड उघडीन आणि तुझे गुणगान करीन.
[16]तुला बळी नको आहेत. तुला नको असणारे बळी मी देणार नाही.
[17]देवाला हवी असलेला बळी म्हणजे विदीर्ण झालेला आत्मा होय. देवा, तू चिरडले गेलेल्या आणि विदीर्ण झालेल्या हृदयाकडे पाठ फिरवणार नाहीस.
[18]देवा, तू सियोनाशी चांगला आणि दयाळू राहा.
यरुशलेमच्या भिंती बांध.
[19]नंतर तू चांगले बळी उपभोगू शकशील आणि होमार्पणे ही तू उपभोगशील. आणि लोक पुन्हा तुझ्या वेदीवर बैलांचा बळी देतील.

## स्तोत्र 52

***प्रमुख गायकासाठी दावीदाचे मास्कील (बोधपर स्तोत्र) दावीद अहीमलेखाच्या घरी आला आहे असे दवेगअदोमीने शौलाकडे येऊन सांगितले त्यावेळचे स्तोत्र***

[1]बलवान पुरुषा, तू तुझ्या दुष्कर्मांची बढाई का करीत आहेस?तू देवाला एक कलंक आहेस. तू दिवसभर वाईट गोष्टी करण्याच्या योजना आखतोस.
[2]तू मूर्खासारख्या योजना आखतोस आणि तुझी जीभ धारदार वस्तऱ्यासारखी भयंकर आहे. तू नेहमी खोटे बोलतोस आणि कुणाची तरी फसवणूक करण्याच्या बेतात असतोस.
[3]तू चांगल्यापेक्षा वाईटावर अधिक प्रेम करतोस. तुला खरे बोलण्यापेक्षा खोटे बोलणे अधिक आवडते.
[4]तुला आणि तुझ्या खोटे बोलणाऱ्या जिभेला लोकांना त्रास द्यायला आवडते.
[5]म्हणून देव तुझा कायमचा नाश करेल. तो तुला पकडून तुझ्या घरातून बाहेर खेचेल तो तुला मारून टाकेल आणि तुझा निर्वंश करेल.
[6]चांगले लोक ते बघतील आणि त्यावरुन. ते देवाला घाबरायला आणि त्याचा आदर करायला शिकतील. ते तुला हसतील
[7]व म्हणतील, "जो देवावर अवलंबून नव्हता त्याचे काय झाले पाहा त्याची संपत्ती आणि त्याचे खोटे बोलणे त्याला वाचवू शकेल असे त्याला वाटत होते."
[8]पण देवाच्या मंदिरात मी हिरव्यागार व दीर्घकाळ जगणाऱ्या जैतून झाडासारखा आहे. मी देवाच्या प्रेमावर सदैव विश्वास ठेवतो.
[9]देवा, तू केलेल्या गोष्टींबद्दल मी सर्वकाळ तुझी स्तुती करतो. तुझ्या इतर भक्तांप्रमाणे मी ही तुझ्या नावावर विश्वास ठेवतो.

## स्तोत्र 53

***प्रमुख गायकासाठी महलथ * सुरांवर बसवलेले दावीदाचे मास्कील (शिक्षण).***

[1]केवळ मूर्ख माणूसच देव नाही असा विचार करतो. तसले लोक भ्रष्टाचारी, वाईट, द्वेषपूर्ण असतात आणि ते कसले ही सत्कृत्य करीत नाहीत.
[2]देव खरोखरच स्वर्गात आहे आणि तो आपल्यावर नजर ठेवतो. देवाला शोधणाऱ्या शहाण्या लोकांच्या शोधात देव आहे.
[3]परंतु प्रत्येक जण देवापासून दूर गेला आहे. प्रत्येक जण वाईट आहे. कोणीही काही सत्कृत्य करीत नाही, अगदी एकही नाही.
[4]देव म्हणतो, "त्या दुष्टांना सत्य माहीत आहे. पण ते माझी प्रार्थना करीत नाहीत. दुष्ट लोक अन्न खायला जसे तत्पर असतात तसेच ते माझ्या लोकांचा नाश करायला तत्पर झाले आहेत."
[5]परंतु त्या दुष्टांना भीती वाटेल पूर्वी कधीही भ्याले नव्हते इतके ते भीतील. ते दुष्ट लोक इस्राएलचे शत्रू आहेत. देवाने त्या दुष्टांना नाकारले आहे. म्हणून देवाची माणसे त्यांचा पराभव करतील. आणि देव त्या दुष्टांची हाडे इतस्तत फेकेल.
[6]सियोनातून इस्राएलला कोण विजय मिळवून देईल? देव त्यांना विजय मिळवण्यात मदत करेल, देव त्याच्या

---

**महलथ** संगितातील एक शब्द हे सुराचे नाव असावे किंवा नाचणे अथवा ओरडणे असा त्याचा अर्थ असावा.

माणसांना हद्दपारीतून परत आणेल याकोबाला हर्ष होईल
आणि इसाएलखूप आनंदी होईल.

## स्तोत्र 54

*प्रमुख गायकासाठी तंतुवाद्यावरचे दावीदाचे मास्कील यावेळी जिफी लोक शौलाकडे येऊन म्हणाले, "दावीद आमच्या लोकांत लपला आहे असे आम्हाला वाटते."*

1देवा, तुझ्या अधिकाराचा उपयोग करून मला वाचव.
तुझे महान सामर्थ्य वापर आणि मला मुक्त कर.
2देवा, माझी प्रार्थना ऐक मी काय म्हणतो ते ऐक.
3जे देवाची उपासना करत नाहीत असे परके माझ्या
विरुध्द गेले आहेत आणि शक्तिशाली लोक मला मारायला
निघाले आहेत.
4पाहा, माझा देव मला मदत करेल. माझा मालक
मला साहाय्य करेल.
5जे लोक माझ्याविरुध्द गेले आहेत त्यांना देव शिक्षा
करेल. देव माझ्याशी प्रमाणिक असेल आणि तो त्या
लोकांचा नाश करेल.
6देवा, मी तुला खुशीने अर्पणे देईन. परमेश्वरा, मी
तुझ्या चांगल्या नावाची स्तुती करेन.
7परंतु मी तुला सर्व संकटांतून सोडवण्याची विनंती
करीत आहे. माझ्या शत्रूंचा पराभव झाल्याचे मला
पाहू दे.

## स्तोत्र 55

*प्रमुख गायकासाठी तंतुवाद्यावरचे दावीदाचे मास्कील*

1देवा, माझी प्रार्थना ऐक कृपा करून माझी दयेची
प्रार्थना टाळू नकोस.
2देवा, कृपा करून माझे ऐक आणि मला उत्तर दे मला
माझ्या तक्रारी सांगू दे.
3माझे शत्रू माझ्याविरुध्द वाईट बोलले तो दुष्ट माणूस
माझ्यावर ओरडला. माझे शत्रू रागात होते आणि त्यांनी
माझ्यावर हल्ला केला त्यांनी माझ्यावर संकटाचा पाऊस
पाडला.
4माझे हृदय धडधडत आहे मी खूप घाबरलो आहे.
5मी भीतीने थरथर कापत आहे. मी भयभीत झालो
आहे.
6मला कबूतरासारखे पंख असते तर किती बरे झाले
असते. मी उडून विश्रांतीसाठी एखादी जागा शोधली असती.
7मी खूप दूर वाळवंटात गेलो असतो.
8मी पळून जाईन मी माझी सुटका करेन. मी संकटांच्या
वादळापासून दूर पळून जाईन.
9प्रभु त्यांचा खोटेपणा बंद कर.* या शहरात मला खूप
हिंसा आणि भांडणे दिसत आहेत.
10माझ्या भोवती संकटे आहेत. दिवस रात्र आणि
शहराच्या सर्व भागात संकटे आहेत या शहरात महाभयंकर
घटना घडत आहेत.
11रस्त्यावर बरेच गुन्हे घडत आहेत. लोक सर्वत्र खोटे
बोलत आहेत आणि फसवणूक करत आहेत.
12जर शत्रूंनीच माझा अपमान केला तर मी तो सहन
करू शकेन. जर शत्रूंनीच माझ्यावर हल्ला केला तर मी
लपू शकेन.
13परंतु मला संकटात टाकणारा तू आहेस माझा मित्र,
माझा साथी, माझा दोस्त.
14आपण आपली गुपितं एकमेकांना सांगितली आपण
देवाच्या मंदिरात बरोबर प्रार्थना केली.
15माझे शत्रू त्यांची वेळ यायच्या आधीच मरावेत अशी
माझी इच्छा आहे, जिवंतपणीच त्यांचे दफन व्हावे असे
मला वाटते. का? कारण ते त्यांच्या घरात भयंकर गोष्टी
करण्याच्या योजना आखतात.
16मी देवाला मदतीसाठी हाक मारीन आणि परमेश्वर
माझे रक्षण करील.
17मी देवाशी सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी बोलतो.
मी देवाला माझ्या तक्रारी सांगतो आणि तो त्या नीट
ऐकतो.
18मी पुष्कळ लढाया लढलो आहे. पण देवाने मला
नेहमीच सोडविले व सुखरूप परत आणले.
19देव माझ्या बोलण्याकडे लक्ष देतो. तो अनादि अनंत
काळचा राजा मला मदत करेल.
20माझे शत्रू त्यांचे जीवन बदलणार नाहीत. ते देवाला
घाबरत नाहीत. आणि त्याला मान ही देत नाहीत.
21माझे शत्रू त्यांच्या मित्रांवर हल्ले करतात. ज्या गोष्टी
करण्याचे त्यांनी कबूल केलेले असते त्या ते करत नाहीत.
22माझे शत्रू गोड बोलण्यात पटाईत आहेत. ते शांतीविषयी
बोलतात आणि प्रत्यक्षात मात्र युध्दाच्या योजना आखतात.
त्यांचे शब्द लोण्यासारखे मऊ असतात परंतु ते सुरीसारखे
कापतात.
23तू तुझ्या चिंता परमेश्वराकडे सोपव. आणि तो तुझी
काळजी घेईल. परमेश्वर चांगल्या लोकांचा कधीही
पराभव होऊ देणार नाही.
24देवा, त्या खोटारड्या आणि खुनी माणसांना त्यांचे
आयुष्य अर्धे राहिलेले असतानाच त्यांच्या थडग्यात पाठव.
आणि माझे म्हणशील तर, माझा तुझ्यावर भरंवसा आहे.

## स्तोत्र 56

*प्रमुख गायकासाठी "दूर ओकच्या झाडावर असलेला पारवा" या चालीवर आधारलेले दावीदाचे मास्कील. पलिष्ट्यांनी त्याला गाथमध्येपकडले त्या वेळचे स्तोत्र*

1देवा, लोकांनी माझ्यावर हल्ला केला म्हणून तू
माझ्यावर दया कर. ते माझा पाठलाग करीत आहेत
आणि रात्रंदिवस माझ्याशी लढत आहेत.

---

**खोटेपणा बंद कर** शब्दश: त्यांच्या भाषा "गोंधळात टाकतात" उत्पत्ति 11:7 मधील गोष्टीप्रमाणे.

2माझ्या शत्रूंनी माझ्यावर दिवसभर हल्ला केला. मोजता
न येण्याइतके लढणारे तिथे आहेत.
3मी जेव्हा घाबरतो तेव्हा तुझ्यावर भरंवसा ठेवतो.
4माझा देवावर विश्वास आहे. म्हणून मी भीत नाही
लोक मला त्रास देऊ शकत नाहीत. देवाच्या वचनाबद्दल
मी त्याचे गुणगान करीन.
5माझे शत्रू माझ्या शब्दांचा विपर्यास करतात. ते नेहमी
माझ्या विरुध्द दुष्ट कारवाया करतात.
6ते एकत्र लपतात आणि मला मारण्यासाठी माझी प्रत्येक
हालचाल टिपतात.
7देवा, त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल त्यांना दूर पाठवून दे.परक्या
राष्टांचा राग सहन करण्यासाठीत्यांना दूर पाठवून दे.
8मी खूप चिंताक्रांत झालो आहे. मी किती रडलो ते
तुला माहीत आहे. तू माझ्या अश्रूंची नक्कीच मोजदाद
ठेवली असशील.
9म्हणून मी तुला बोलावेन तेव्हा तू माझ्या शत्रूंचा पराभव
कर. तू ते करू शकशील हे मला माहीत आहे, कारण तू
देव आहेस.
10मी देवाच्या वचनाबद्दल त्याची स्तुती करतो.
परमेश्वराने मला वचन दिले म्हणून मी त्याचे गुणगान
करतो.
11माझा देवावर भरंवसा आहे म्हणून मला भीती वाटत
नाही. लोक मला त्रास देऊ शकणार नाहीत.
12देवा, मी तुला खास वचने दिली आहेत आणि मी ती
वचने पाळणार आहे. मी तुला माझे धन्यवाद अर्पण करणार
आहे.
13का? कारण तू मला मृत्यूपासून वाचवलेस तू मला
पराभवापासून वाचवलेस म्हणून केवळ जिवंत असलेले
लोकच जो प्रकाश पाहू शकतात अशा प्रकाशात मी
त्याला अनुसरेन.

## स्तोत्र 57

***प्रमुख गायकासाठी "नष्ट करू नकोस" याचालीवर बसवलेले दावीदाचे मास्कील तो शौलापासून गुहेत पळून गेला तेव्हाचे***

1देवा, माझ्यावर दया कर. दयाळू हो कारण माझा
आत्मा तुझ्यावर भरंवसा ठेवतो. संकटे टळेपर्यंत मी
तुझ्याकडे रक्षणासाठी आलो आहे.
2मी सर्वशक्तिमान परमेश्वराकडे मदतीसाठी प्रार्थना
करीत आहे आणि देव माझी पूर्णपणे काळजी घेत आहे.
3तो स्वर्गातून मला मदत करतो आणि मला वाचवतो
मला त्रास देणाऱ्या लोकांचा तो पराभव करतो देव त्याचे
खरे प्रेम मला दाखवतो.
4माझे जीवन संकटात आहे, माझ्याभोवती माझे शत्रू
आहेत. ते माणसे खाणाऱ्या सिंहाप्रमाणे आहेत. त्यांचे दात
भाल्याप्रमाणे आणि बाणाप्रमाणे तीक्ष्ण आहेत. आणि त्यांची
जीभ तलवारीसारखी धारदार आहे.
5देवा, तू स्वर्गापेक्षाही उंच आहेस आणि तुझा महिमा
सर्व पृथ्वीवर पसरला आहे.
6माझ्या शत्रूंनी माझ्यासाठी सापळा रचला. ते मला
सापळ्यात पकडण्याचा प्रयत्न करतात. मी त्यात पडेन
परंतु शेवटी तेच त्या खड्ड्यात पडतील.
7परंतु देव मला सुरक्षित ठेवील. तो मला साहसी करील
मी त्याचे गुणगान गाईन.
8माझ्या आत्म्या, जागा हो. सतारींनो आणि वीणांनो,
तुमचे संगीत सुरु करा. आपण पहाटेला जागवू या.
9माझ्या प्रभु, मी सर्वांकडे तुझी स्तुती करतो. मी सर्व
देशात तुझ्या स्तुतीची गीते गातो.
10तुझे खरे प्रेम आकाशातल्या सर्वात उंचावरील ढगाहून
उंच आहे.
11देव स्वर्गापेक्षा खूप गौरवी आहे. त्याचा महिमा सर्व
पृथ्वीवर आहे.

## स्तोत्र 58

***प्रमुख गायकासाठी "नष्ट करू नको" या चालीवर आधारित दावीदाचे मिक्ताम***

1न्यायाधीशांनो, तुम्ही तुमच्या निर्णयात न्यायी आहात
काय? तुम्ही लोकांचा न्यायाने निवाडा करीत आहात
काय?
2नाही, तुम्ही फक्त वाईट गोष्टी करण्याचाच
विचार करता. तुम्ही या देशात हिंसक कृत्ये करीत
आहात.
3त्या वाईट लोकांनी जन्मल्याबरोबर दुष्कर्म करायला
सुरुवात केली. ते जन्मापासूनच खोटारडे होते.
4ते सापासारखेच भयंकर आहेत आणि नागाप्रमाणे त्यांना
ऐकू येत नाही. ते सत्य ऐकायला नकार देतात.
5नागाला गारुड्याचे संगीत वा गाणे ऐकू येत नाही.
आणि ती दुष्ट माणसे या सारखी आहेत.
6परमेश्वरा, ती दुष्ट माणसे सिंहासारखी आहेत. म्हणून
परमेश्वरा तू त्यांचे दात पाड.
7ते लोक वाहून जाणाऱ्या पाण्याप्रमाणे नाहीसे होवोत.
ते रस्त्यातल्या गवताप्रमाणे तुडवले जावोत.
8चालताना विरघळून जाणाऱ्या गोगलगायी प्रमाणे ते
विरघळून जावोत. जन्मत मेलेल्या व दिवसाचा प्रकाश न
पाहिलेल्या बाळा प्रमाणे त्यांचे होवो.
9भांडे तापविण्यासाठी काट्या पेटवितात. तेव्हा त्यात
चटकन् जळणाऱ्या काट्यांप्रमाणे त्यांचे होवो.
10वाईट लोकांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल जर त्यांना
शिक्षा झाली तर चांगल्या माणसाला आनंद होईल, तो त्या
दुष्टांच्या रक्तात आपले पाय धुवेल.
11असे जेव्हा घडेल तेव्हा लोक म्हणतील "चांगल्या
माणसांना त्यांचे फळ मिळाले. जगाला न्याय देण्यासाठी
देव खरोखर आहे."

## स्तोत्र 59

***प्रमुख गायकासाठी “नष्ट करू नकोस” याचालीवर आधारलेले दावीदाचे मिक्ताम दावीदला मारण्यासाठी शौलाने त्याच्या घरावर नजर ठेवायला माणसे पाठविली त्या वेळचे.***

1देवा, मला माझ्या शत्रूंपासून वाचव माझ्याशी लढायला जे लोक आले आहेत त्यांच्यावर विजय मिळवण्यासाठी मला मदत कर.

2वाईट कृत्ये करणाऱ्यांपासून मला वाचव. मला त्या खुन्यांपासून वाचव.

3बघ, ते बलवान लोक माझी वाट पहात आहेत. ते मला मारण्यासाठी थांबले आहेत. परंतु मी पाप केले नाही किंवा कुठला गुन्हा केला नाही.

4ते माझा पाठलाग करीत आहेत परंतु मी काहीही चूक केली नाही परमेश्वरा, ये आणि स्वतच बघ.

5तू सर्वशक्तिमान परमेश्वर आहेस. इस्राएलचा देव आहेस. ऊठ आणि त्या लोकांना शिक्षा कर. त्या दुष्ट देशद्रोह्यांना अजिबात दयामाया दाखवू नकोस.

6ते दुष्ट लोक संध्याकाळच्या वेळी गावात येणाऱ्या कुत्र्यांसारखे गुरगुरत आणि शहरातून फिरत येतात.

7त्यांच्या धमक्या आणि अपमानित करणारे शब्द ऐक. ते अतिशय दुष्ट गोष्टी बोलतात आणि कुणी ते ऐकेल याची त्यांना पर्वा नसते.

8परमेश्वरा, त्यांना हास, त्या सर्वांचा उपहास कर.

9देवा, तू माझी शक्ती आहेस. मी तुझी वाट पाहात आहे देवा, तू माझी उंच पर्वतावरील सुरक्षित जागा आहेस.

10देव माझ्यावर प्रेम करतो. आणि तो मला जिंकण्यासाठी मदत करतो. तो मला माझ्या शत्रूंचा पराभव करण्यासाठी मदत करील.

11देवा, तू त्यांना फक्त मारुन टाकू नकोस नाही तर माझे लोक त्यांना विसरुन जातील. माझ्या रक्षणकर्त्या तू त्यांची दाणादाण उडव आणि तुझ्या शक्तीने त्यांचा पराभव कर.

12ते दुष्ट लोक शाप देतात आणि खोटे बोलतात. ते ज्या गोष्टी बोलले त्याबद्दल त्यांना शिक्षा कर. त्यांचा अंहकार त्यांना सापळ्यात अडकवू दे.

13रागाने तू त्यांचा नाश कर, त्यांचा सर्वनाश कर.

नतंर लोकांना कळेल की देव याकोबाच्या लोकांवर आणि सर्व जगावर राज्य करतो.

14ते दुष्ट लोक गुरगुरणाऱ्या कुत्र्यांप्रमाणे रात्री शहरातून हिंडत येतात.

15ते खाण्यासाठी अन्न शोधतील पण त्यांना काही मिळणार नाही. आणि झोपायला जागाही मिळणार नाही.

16परंतु मी तुझी स्तुती करणारे गाणे गाईन. रोज सकाळी मी तुझ्या प्रेमाचा आनंद घेईन का? कारण तू माझी उंच पर्वतावरची सुरक्षित जागा आहेस आणि संकटात मी तुझ्याकडे धाव घेऊ शकतो.

17मी तुझे गुणवर्णन करणारे गाणे गाईन. का? कारण तू माझी उंच पर्वतावरील सुरक्षित जागा आहेस.माझ्यावर प्रेम करणारा देव तूच आहेस.

## स्तोत्र 60

***प्रमुख गायकासाठी “कराराची लिली” या चालीवर बसवलेले शिकवण्यासाठी लिहिलेले दावीदाचे मिक्ताम, अराम नहराईम आणि अराम सोबा याच्याशी तो लढला आणि क्षाराच्या खोऱ्यात परत गेल्यावर 12,000 अदोमातील सैनिकांचा त्याने पराभव केला तेव्हाचे स्तोत्र.***

1देवा, तू आमच्यावर रागावला होतास म्हणून तू आमचा त्याग केलास आणि आमचा नाश केलास. कृपाकरून आमच्याकडे परत ये.

2तू पृथ्वी हादरवलीस आणि तिला दुभंगवलेस, सारे जग कोलमडून पडले. आता ते पुन्हा एकत्र आण.

3तू तुझ्या लोकांना खूप त्रास दिलास. आम्ही दारू पिऊन झोकांड्या खाणाऱ्या आणि खाली पडणाऱ्या लोकांप्रमाणे आहोत.

4जे तुझी उपासना करतात त्यांना तू इशारा दिला होतास, त्यामुळे आता ते शत्रूंपासून सुटका करून घेऊ शकतील.

5तू तुझी महान शक्ती वापर आणि आम्हाला वाचव.माझ्या प्रार्थनेला उत्तर दे आणि तू ज्यांच्यावर प्रेम करतोस त्या लोकांना वाचव.

6देव त्याच्या मंदिरात म्हणाला मी युध्द जिंकेन आणि विजयामुळे आनंदी होईन. मी ही जमीन माझ्या लोकांबरोबर वाटून घेईन. मी त्यांना शखेम आणि सुक्कोथाचे खोरे देईन.

7गिलाद आणि मनश्शे माझे असेल, एफ्राईम माझे शिरस्त्राण असेल आणि यहुदा माझा राजदंड असेल.

8मवाब माझे पाय धुण्याचे पात्र असेल, अदोम माझा जोडा नेणारा गुलाम असेल. मी पलिष्टी लोकांचा पराभव करीन आणि माझ्या विजयाबद्दल ओरडून सांगेन.

9मला त्या शक्तिशाली आणि सुरक्षित शहरात कोण नेईल? अदोमशी लढायला मला कोण नेईल?

10देवा, हे करण्यासाठी मला फक्त तूच मदत करू शकतोस परंतु तू आम्हाला सोडून गेलास. तू आमच्या सैन्याबरोबर गेला नाहीस.

11देवा, तू आम्हाला शत्रूचा पराभव करण्यासाठी मदत कर. कारण लोक आम्हाला मदत करू शकत नाहीत.

12फक्त देवच आम्हाला बलवान करू शकतो देव आमच्या शत्रूचा पराभव करू शकतो.

## स्तोत्र 61

***प्रमुख गायकासाठी तंतुवाद्यावरचे दावीदाचे एक स्तोत्र***

1देवा, माझे प्रार्थना गीत ऐक. माझ्या प्रार्थनेकडे लक्ष दे.

[2]मी कुठेही असलो कितीही अशक्त असलो तरी मी
तुला मदतीसाठी हाक मारीन. तू मला अगदी उंचावरच्या
सुरक्षित जागी घेऊन जा.
[3]तूच माझी सुरक्षित जागा आहेस. माझ्या शत्रूपासून
माझे रक्षण करणारा तू बळकट किल्ला आहेस.
[4]तुझ्या तंबूत मला कायमचे राहायला पाहिजे, जेथे तू
माझे रक्षण करू शकशील अशा ठिकाणी मला लपण्याची
इच्छा आहे.
[5]देवा, मी तुला काही देण्याचे वचन दिले होते ते तू
ऐकले होतेस परंतु तुझ्या उपासकांजवळ जे काही आहे ते
तुझेच आहे.
[6]राजाला भरपूर आयुष्य देत्याला कायमचे राहू दे.
[7]त्याला देवाजवळ चिरकाल राहू दे. तुझ्या खऱ्या प्रेमाने
तू त्याचे रक्षण कर.
[8]आणि मी तुझ्या नावाचा सदैव जयजयकार करीन.
ज्या गोष्टी करण्याचे मी वचन दिलेत्या मी रोज करीन.

## स्तोत्र 62

### *प्रमुख गायकासाठी यदूथूनाच्या चालीवरचे दावीदाचे स्तोत्र.*

[1]देवाने माझा उध्दार करावा म्हणून मी धीराने वाट
पहात आहे. माझे तारण त्याच्याकडूनच येते.
[2]देव माझा किल्ला आहे. तो मला तारतो. देव माझी
उंच डोंगरावरची सुरक्षित जागा आहे. खूप मोठे सैन्यदेखील
माझा पराभव करू शकणार नाही.
[3]किती काळ तू माझ्यावर चाल करून येणार आहेस?मी
एका बाजूला कललेल्या भिंतीसारखा आहे,केव्हाही
पडणाऱ्या कुंपणासारखा आहे.
[4]ते लोक माझा नाश करण्याच्या योजना आखत आहेत.ते
माझ्याबद्दल खोटनांट सांगतात ते लोकांमध्ये माझ्याबद्दल
चांगल बोलतात पण गुप्तपणे ते मला शाप देतात.
[5]मी अगदी धीर धरून देवाने मला वाचवण्याची वाट
बघत आहे.देव माझी एकुलती एक आशा आहे.
[6]देव माझा किल्ला आहे. देव मला तारतो देव माझी
उंच डोंगरावरील सुरक्षित जागा आहे.
[7]माझा गौरव आणि माझा विजय देवाकडूनच येतो तो
माझा भक्क म किल्ला आहे तो माझी सुरक्षित जागा आहे.
[8]लोक हो! देवावर सदैव विश्वास ठेवा. तुम्ही देवाला
तुमच्या सर्व समस्या सांगा देव आपली सुरक्षित जागा
आहे.
[9]लोक खरोखरच मदत करू शकत नाहीत. तुम्ही
मदतीसाठी लोकांवर खरोखरच विश्वास टाकू शकत
नाही. देवाशी तुलना करता ते हवेतल्या फुंकरीसारखे न
गण्य आहेत.
[10]बळजबरीने वस्तू हिसकावून घेण्यात शक्तीवर विसंबून
राहू नका. चोरी केल्यामुळे तुमच्या पदरात काही
पडणारआहे असे समजू नका. आणि तुम्ही श्रीमंत
झाल्यामुळे तुमची श्रीमंती आता तुमच्या कामी येईल याचाही
भरंवसा ठेवू नका.
[11]फक्त एकाच गोष्टीवर भरवसा ठेवण्यासारखा आहे
असे देव म्हणतो “शक्ती देवापासून येते.”
[12]प्रभु, तुझे प्रेम खरे आहे.माणूस ज्या गोष्टी करतो त्या
नुसार तू त्याला बक्षिस देतोस वा शिक्षा करतोस.

## स्तोत्र 63

### *दावीदाचे एक स्तोत्र तो यहुदाच्या रानात होता त्या वेळचे*

[1]देवा, तू माझा देव आहेस आणि तू मला खूप हवा
आहेस. माझा आत्मा आणि माझे शरीर तुझ्यासाठी शुष्क,
बरड आणि पाणी विरहित जमिनी प्रमाणे तहानलेले आहे.
[2]होय, मी तुला तुझ्या मंदिरात पाहिले. मी तुझी शक्ती
आणि तुझा गौरव पाहिला.
[3]तुझे प्रेम आयुष्यापेक्षा चांगले आहे. माझे ओठ तुझी
स्तुती करतात.
[4]होय, मी जीवनात तुझी स्तुती करीन तुझ्या नावासाठी
मी माझे बाहू प्रार्थनेत उभारीन.
[5]चांगले अन्न खाल्ल्याप्रमाणे मी तृप्त होईन. आणि माझे
तोंड तुझी स्तुती करील.
[6]अंथरुणावर झोपल्यावर मला तुझी आठवण येईल
मध्यरात्री मी तुझी आठवण काढेन.
[7]तू मला खरोखरच मदत केली आहेस. तू माझे रक्षण
केलेस म्हणून मी आनंदी आहे.
[8]माझा आत्मा तुला धरून ठेवतो आणि तू माझा हात
धरतोस.
[9]काही लोक मला मारण्याचा प्रयत्न करीत आहेत.
परंतु त्यांचा नाश होईल. ते खाली त्यांच्या थडग्यात जातील.
[10]त्यांना तलवारीने मारले जाईल. रानटी कुत्री त्यांची
प्रेते खातील.
[11]परंतु राजा त्याच्या देवाबरोबर आनंदात असेल. आणि
ज्या लोकांनी त्यांच्या आज्ञा पाळायचे वचन दिले ते त्याची
स्तुती करतील का? कारण त्याने त्या खोटे बोलणाऱ्यांचा
पराभव केला.

## स्तोत्र 64

### *प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र*

[1]देवा, माझे ऐक. माझ्या शंत्रूंनी मला घाबरविले आहे.
त्यांच्यापासून मला वाचव.
[2]माझे माझ्या शत्रूंच्या गुप्त योजनांपासून रक्षण कर. त्या
दुष्ट लोकांपासून मला लपव.
[3]त्यांनी माझ्याबद्दल अगदी वाईट खोटं सांगितलं आहे.
त्यांच्या जिभ धारदार तलवारी सारख्या आहेत. त्यांचे
कटू शब्द बाणाप्रमाणे आहेत.
[4]ते लपून बसतात आणि त्यांचे बाण एका साध्याभोळ्या
आणि प्रामाणिक माणसावर फेकतात.

[5]वाईट करण्यासाठी ते एकमेकांना प्रोत्साहन देतात व सापळे रचण्याबाबत चर्चा करतात. "आपले सापळे कोणीही बघणार नाही" असे ते एकमेकांना सांगतात.

[6]लोक अतिशय कुटिल असू शकतात. लोक काय विचार करतात ते कळणे अवघड आहे.

[7]परंतु देवदेखील त्याचे "बाण" मारु शकतो आणि त्यांना काही कळण्या आधीच वाईट लोक जखमी होतात.

[8]वाईट लोक इतर लोकांना त्रासदायक गोष्टी करण्याच्या योजना आखतात. परंतु देव त्यांच्या योजना निष्फळ बनवतो. आणि त्या त्रासदायक गोष्टी त्यांच्याच वाट्याला येतील असे करतो. आणि नंतर जो कोणी त्यांना पाहातो तो मस्तक विस्मयाने हलवतो.

[9]देवाने काय केले ते लोक पाहातील. ते इतरांना देवाबद्दल सांगतील, त्यामुळे सगळ्यांना देवाबद्दल अधिक काही कळेल आणि त्याला आदर देण्याचे ही त्यांना कळेल.

[10]परमेश्वराची सेवा करण्यास चांगल्या व्यक्तिला आनंद वाटतो. तो देवावर विसंबून राहातो. चांगल्या प्रामाणिक लोकांनी हे पाहिल्यावर ते देवावर विश्वास ठेवतात.

## स्तोत्र 65

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.*

[1]सियोनातील देवा, मी तुझी स्तुती करतो. मी कबूल केल्याप्रमाणे तुला अर्पण करीत आहे.

[2]तू केलेल्या गोष्टींबद्दल आम्ही लोकांना सांगतो. आणि तू आमची प्रार्थना ऐकतोस. तू तुझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाची प्रार्थना ऐकतोस.

[3]जेव्हा आमची पापे आम्हांला खूप जड होतात तेव्हा तू माफ करतोस आणि त्यांची भरपाई करतोस.

[4]देवा, तू तुझ्या लोकांची निवड केलीस. आम्ही तुझ्या मंदिरात येऊन तुझी प्रार्थना करावी यासाठी तू आमची निवड केलीस आणि आम्ही खूप आनंदी आहोत. तुझ्या मंदिरातल्या आणि तुझ्या पवित्र राजवाड्यातल्या सगळ्या सुंदर विस्मयकारक गोष्टी आमच्या जवळ आहेत.

[5]देवा, आम्हाला वाचव. चांगले लोक तुझी प्रार्थना करतात आणि तू त्यांच्या प्रार्थनेला उत्तर देतोस. तू त्यांच्यासाठी आश्चर्यकारक गोष्टी करतोस. सर्व जगभरचे लोक तुझ्यावर विश्वास ठेवतात.

[6]देवाने त्याच्या शक्तीने पर्वत निर्माण केले. आपण त्याची शक्ती आपल्या भोवती सर्वत्र पाहतो.

[7]देवाने उन्मत्त झालेल्या खवळलेल्या समुद्राला शांत केले. देवाने पृथ्वीवर लोकांचे "महासागर" निर्माण केले.

[8]सर्व जगातील लोक तू केलेल्या विस्मयजनक गोष्टींनी आश्चर्यचकित झाले आहेत. सूर्योदय आणि सुर्यास्त आम्हाला खूप आनंदी बनवतात.

[9]तू जमिनीची काळजी घेतोस तू तिच्यावर सिंचन करतोस आणि तिला धान्य उगवायला सांगतोस. देवा तू झरे पाण्याने भरतोस आणि पिकांना वाढू देतोस.

[10]तू नांगरलेल्या जमिनीवर पाऊस पाडतोस. तू शेतजमीन पाण्याने भिजवतोस. तू जमीन पावसाने भुसभुशीत करतोस. आणि तू त्यावर छोट्या रोपट्यांना उगवू देतोस.

[11]तू नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या हंगामाने करतोस तू भरपूर पिकांनी गाड्या भरतोस.

[12]वाळवंट आणि डोंगर गवताने भरले आहेत.

[13]आणि कुरणे मेंढ्यांनी झाकली गेली आहेत. दऱ्या धान्यांनी भरल्या आहेत. प्रत्येक जण आनंदाने गात आहे आणि ओरडत आहे.

## स्तोत्र 66

*प्रमुख गायकासाठी स्तुतिगीत*

[1]पृथ्वीवरील सारे काही आनंदाने देवाचा जय जयकार करीत आहे.

[2]देवाच्या गौरवी नावाचा जय जयकार करा. स्तुतिगीतांनी त्याचा सन्मान करा.

[3]त्याचे काम किती आश्चर्यजनक आहे, चांगले आहे ते त्याला सांगा देवा, तुझी शक्ती महान आहे तुझे शत्रू तुझ्या पुढे नतमस्तक होतात. ते तुला घाबरतात.

[4]सगळ्या जगाला तुझी उपासना करू दे प्रत्येकाला तुझ्या नावाचा महिमा गाऊ दे.

[5]देवाने केलेल्या गोष्टी बघा त्या गोष्टी आम्हाला आश्चर्यचकित करतात.

[6]देवाने समुद्राचे कोरडे वाळवंट बनवले त्याची आनंदी माणसे चालत नदीच्या पलिकडे गेली.

[7]देव त्याच्या महान शक्तिमुळे जगावर राज्य करतो देव सगळीकडच्या लोकांवर लक्ष ठेवतो, त्याच्याविरुध्द कुणीही बंड करू शकत नाही.

[8]लोकहो! आमच्या देवाची स्तुती करा. त्याची स्तुती करणारी गीते मोठ्याने गा.

[9]देवाने आम्हाला जीवन दिले. देव आम्हाला संरक्षण देतो.

[10]लोक चांदीची अग्नि परीक्षा करतात तशी देवाने आमची परीक्षा पाहिली.

[11]देवा, तू आम्हाला सापळ्यात अडकू दिलेस. तू आमच्यावर जड ओझी लादलीस.

[12]तू आमच्या शत्रूंना आमच्यावरुन चालू दिलेस. तू आम्हाला पाण्यातून आणि आगीतून फरफटत नेलेस. परंतु तू आम्हाला सुरक्षित ठिकाणी आणलेस.

[13–14]म्हणून मी तुझ्या मंदिरात तुला होमबली अर्पण करण्यासाठी बळी घेऊन येईन मी संकटात होतो तेव्हा तुझ्याकडे मदत मागितली. मी तुला अनेक वचने दिली, आता मी वचन दिल्याप्रमाणे तुला त्या गोष्टी देत आहेत.

[15]मी तुला पापार्पण करीत आहे. मी तुला धुपासहित मेंढ्या अर्पण करीत आहेत. मी तुला बैल आणि बोकड अर्पण करीत आहे.

16देवाची उपासना करणाऱ्या सर्वांनो, इकडे या देवाने
माझ्यासाठी काय केले ते मी तुम्हाला सांगतो.
17मी त्याची प्रार्थना केली, मी त्याची स्तुती केली.
18माझे मन शुध्द होते म्हणून माझ्या प्रभुने माझे ऐकले.
19देवाने माझे ऐकले. त्याने माझी प्रार्थना ऐकली.
20देवाची स्तुती करा देव माझ्यापासून दूर गेला नाही.
त्याने माझी प्रार्थना ऐकली. देवाने मला त्याचे प्रेम दाखवले.

## स्तोत्र 67

*प्रमुख गायकासाठी तंतुवाद्यावरचे दावीदाचे स्तुतिगीत*

1देवा, मला दया दाखव. आणि आशीर्वाद दे कृपाकरून
आमचा स्वीकार कर!
2देवा, पृथ्वीवरील प्रत्येक माणूस तुझ्या मार्गाविषयी
समजून घेईल अशीमी आशा करतो. तू लोकांना कसा
तारतोस ते प्रत्येक देशाला बघू दे.
3देवा, लोक तुझी स्तुती करू देत सर्व लोक तुझी स्तुती
करू देत.
4सगळ्या राष्टांना हर्ष होऊ दे आणि ते सुखी होऊ दे.
का? कारण तू लोकांचा योग्य रीतीने न्याय करतोस
आणि तू प्रत्येक देशावर राज्य करतोस.
5देवा, लोक तुझी स्तुती करोत सर्व लोक तुझी स्तुती
करोत.
6देवा, आमच्या देवा, आम्हाला आशीर्वाद दे.आमची
जमीन आम्हाला खूप पीक देवो.
7देव आम्हाला आशीर्वाद देवो आणि पृथ्वीवरील सर्व
लोक देवाला घाबरोत आणि त्याला मान देवोत.

## स्तोत्र 68

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तुतिगीत*

1देवा, ऊठ आणि तुझ्या वैऱ्यांची दाणादाण उडव. त्याचे
सगळे वैरी त्याच्यापासून दूर पळोत.
2तुझे वैरी वाऱ्यावर दूरवर जाणाऱ्या धुरासारखे दूरवर
जावोत. आगीत वितळणाऱ्या मेणाप्रमाणे तुझ्या वैऱ्यांचा
सर्वनाश होवो.
3परंतु चांगले लोक आनंदात आहेत. चांगल्या लोकांचा
देवाबरोबर आनंदात वेळ जातो. चांगले लोक आनंदात
जगतात आणि सुखी होतात.
4देवासाठी गाणे म्हणा त्याच्या नावाचे गुणगान करा,
देवासाठी रस्ता तयार करा. तो त्याच्या रथात बसून
वाळवंटातून जातो त्याचे नाव याह आहे. त्याच्या नावाची
स्तुती करा.
5देव त्याच्या पवित्र मंदिरात अनाथांचा बाप होतो. तो
विधवांची काळजी घेतो.
6देव एकाकी लोकांना घर देतो देव त्याच्यामाणसांना
तुरुंगातून बाहेर काढतो ते फार आनंदी आहेत. परंतु जे
लोक देवाच्या विरुध्द जातात ते त्याच्या आगीसारख्या
तुरुंगात राहातील.

7देवा, तू तुझ्या माणसांना मिसरमधून बाहेर काढलेस.
तू वाळवंटातून चालत गेलास.
8आणि भूमी थरथरली देव, इस्राएलचा देव सिनाय
डोंगरावर आला आणि आकाश वितळायला लागले.
9देवा, थकलेल्या जीर्ण झालेल्या भूमीला पुन्हा शक्ती
येण्यासाठी तू पाऊस पाठवलास.
10तुझे प्राणी पुन्हा त्या ठिकाणी आले. देवा, तू तिथल्या
गरीब लोकांना बऱ्याच चांगल्या वस्तू दिल्यास.
11देवाने आज्ञा केली आणि बरेच लोक चांगली बातमी
सांगण्यासाठी गेले.
12शक्तिमान राजांची सैन्ये पळून गेली. सैनिकांनी
युध्दातून घरी आणलेल्या वस्तूंची विभागणी बायका घरी
करतील. जे लोक घरीच राहिले होते ते ही संपत्तीत वाटा
घेतील.
13त्यांना कबुतराचे चांदीने मढवलेले पंख मिळतील
त्यांना सोन्याने मढवलेले आणि चकाकणारे पंख
मिळतील."
14देवाने साल्मोन डोंगरावर शत्रूंच्या राजाची दाणादाण
उडवली त्यांची अवस्था पडणाऱ्या हिमासारखी झाली.
15बाशानचा पर्वत उंच सुळके असलेला मोठा पर्वत
आहे.
16बाशान, तू सियोन पर्वताकडे तुच्छतेने का पाहतोस?
देवाला तो पर्वत (सियोन) आवडतो, परमेश्वराने कायमचे
तिथेच राहाणे पसंत केले.
17परमेश्वर पवित्र सियोन पर्वतावर येतो. त्याच्या मागे
त्याचे लाखो रथ असतात.
18तो उंच पर्वतावर गेला, त्याने कैद्यांची पलटण बरोबर
नेली. त्याने माणसांकडून जे त्याच्या विरुध्द होते
त्यांच्याकडूनही नजराणे घेतले. परमेश्वर, देव तेथे
राहाण्यासाठी गेला.
19परमेश्वराची स्तुती करा. तो रोज आपल्याला आपले
ओझे वाहायला मदत करतो देव आपल्याला तारतो.
20तो आपला देव आहे आपल्याला तारणारा तोच तो
देव आहे. परमेश्वर, आपला देव आपल्याला मरणापासून
वाचवतो.
21देवाने त्याच्या शत्रूंचा पराभव केला हे तो दाखवून
देईल.* जे त्याविरुध्द लढले. त्यांना देव शिक्षा
करील.
22माझा धनी म्हणाला, "मी शत्रूला बाशान पर्वतावरून
परत आणीन मी शत्रूला पश्चिमेकडून परत
आणीन.
23 म्हणजे तुम्हाला त्यांच्या रक्तातून चालत जाता येईल.
तुमच्या कुत्र्यांना त्यांचे रक्त चाटता येईल."

---

**देवाने … दाखवून देईल** शब्दश: "देव त्याच्या शत्रूच्या मस्तकाचा चेंदामेंदा करेल, तो अपराधी वृत्तीने चाललेल्या केसाळ कवटीचा चेंदामेंदा करेल."

24विजयाच्या मिरवणुकीचे नेतृत्व करणाऱ्या देवाला
लोक बघतात.माझा देव, माझा राजा विजयांच्या
मिरवणुकीचे नेतृत्व करीत आहे, ते लोक बघतात.
25गायक वाजत गाजत पुढे येतील. नंतर तरुण मुली
खंजिऱ्या वाजवतील. त्यांच्या नंतर वाद्य वाजवणारे
असतील.
26मोठ्या मंडळात देवाचा जय जयकार करा. इस्राएलाच्या
लोकांनो परमेश्वराची स्तुती करा.
27छोटा बन्यामीन त्यांचे नेतृत्व करीत आहे. आणि तेथे
यहूदाचे मोठे कुटुंब जबुलूनाचे नेते आणि नफतालीचे नेते
आहेत.
28देवा, आम्हाला तुझी शक्ती दाखव. तू पूर्वी आमच्यासाठी
तुझी शक्ती वापरलीस ती दाखव.
29राजे त्यांची संपत्ती तुझ्याकडे आणतील, तुझ्या
यरुशलेममधील प्रासादात ती आणतील.
30त्या "प्राण्यानी" तुला हवे ते करावे म्हणूनतू तुझ्या
काठीचा उपयोग करत्या देशातील "बैलांना" आणि
"गायींना" तुझ्या आज्ञेचे पालन करायला लाव. तू त्या
देशांचा युध्दात पराभव केला आहेस आता त्यांना तुझ्यासाठी
चांदी आणायला सांग.
31त्यांना मिसरमधून संपत्ती आणायला सांग देवा,
इथिओपियातल्या लोकांना त्यांची संपत्ती तुझ्याकडे
आणायला भाग पाड.
32पृथ्वीवरच्या राजांनो, देवासाठी गाणे म्हणा,
त्याच्यासाठी स्तुतिगीते गा.
33देवासाठी गाणे म्हणादेव पुरातन आकाशातून त्याचा
रथ नेतो, त्याचा जोरदार आवाज ऐका.
34तुमच्या इतर देवांपेक्षा हा देव अधिक शक्तिमान आहे
इस्राएलाचा देव त्याच्या लोकांना अधिक शक्तिमान बनवतो.
35देव त्याच्या मंदिरात भीतिदायक दिसतो. इस्राएलचा
देव त्याच्या लोकांना शक्ती आणि सामर्थ्य देतो.देवाचे
गुणगान करा.

## स्तोत्र 69

***प्रमुख गायकासाठी "भूकमल"***
***या चालीवरचे दावीदाचे स्तोत्र.***

1देवा, मला माझ्या सर्व संकटांपासून वाचव. पाणी आता
माझ्या तोंडापर्यंत चढले आहे.
2इथे उभे राहाण्यासाठीही काही नाही. मी बुडत चाललो
आहे. चिखलात बुडत आहे. मी खोल पाण्यात आहे आणि
लाटा माझ्यावर येऊन आदळत आहेत मी आता लवकरच
बुडणार आहे.
3मी मदतीसाठी याचना करून थकलो आहे. माझा
घसा दुखत आहे. मी थांबलो आणि डोळे दुखेपर्यंत तुझ्या
मदतीची वाट पाहिली.
4मला माझ्या डोक्यावरील केसांपेक्षाही जास्त शत्रू आहेत.
ते विनाकारण माझा तिरस्कार करतात. माझा नाश व्हावा
म्हणून ते हरप्रकारे प्रयत्न करतात. माझे शत्रू माझ्याविषयी
खोटे सांगतात. मी चोरी केली असे त्यांनी खोटेच
सांगितलेआणि नंतर मी न चोरलेल्या वस्तूंसाठी त्यांनी
मला किंमत मोजायला भाग पाडले.
5देवा, मी मूर्खासारखा वागलो ते तुला माहीत आहे. मी
माझी पापे तुझ्यापासून लपवून ठेवू शकत नाही.
6प्रभु, सर्वशक्तीमान परमेश्वरा, तुझ्या भक्तांना माझी
लाज वाटू देऊ नकोस. इस्राएलाच्या देवा, तुझी उपासना
करणाऱ्यांना माझ्यामुळे अडचणीत येऊ देऊ नकोस.
7माझा चेहरा लाजेने झाकला गेला आहे. मी तुझ्यासाठी
ही लाज जवळ बाळगतो.
8माझे भाऊ मला परक्याप्रमाणे वागवतात. माझ्या आईची
मुले मला परदेशी असल्याप्रमाणे वागवतात.
9तुझ्या मंदीराविषयीच्या माझ्या तीव्र भावना माझा नाश
करीत आहेत. जे लोक तुझी चेष्टा करतात त्यांच्याकडून
मी अपमानित होतो.
10मी रडतो, उपवास करतो आणि त्यामुळे ते माझी
चेष्टा करतात.
11माझे दुख दाखवण्याकरता मी जाडेभरडे कपडे वापरतो
आणि लोक माझ्याविषयी विनोदी किस्से सांगतात.
12ते सार्वजनिक ठिकाणी माझ्याबद्दल बोलतात. मद्य
पिणारे लोक माझ्यावर गाणी रचतात.
13माझ्याविषयी म्हणशील तर परमेश्वरा, ही माझी
तुझ्यासाठी प्रार्थना आहे तू माझा स्वीकार करावास असे
मला वाटते. तू मला तारशील असा विश्वास मला वाटते.
14मला चिखलातून बाहेर काढ मला चिखलात बुडू
देऊ नकोस. माझा तिरस्कार करणाऱ्या लोकांपासून मला
वाचव. मला ह्या खोल पाण्यापासून वाचव.
15लाटांमुळे मला बुडू देऊ नकोस खोल खड्ड्यांना माझा
घास घेऊ देऊ नकोस. थडग्याच्या जबड्यात मला जाऊ
देऊ नकोस.
16परमेश्वरा, तुझे प्रेम चांगले आहे. मला तुझ्या खऱ्या
प्रेमाने उत्तर दे तुझ्यातल्या सगळ्या दयाबुध्दीने तू माझ्याकडे
वळ आणि मला मदत कर.
17तुझ्या सेवाकापासून दूर जाऊ नकोस, मी संकटात
आहे, लवकर ये मला मदत कर.
18ये माझ्या आत्म्याचा उध्दार कर. मला माझ्या
शत्रूंपासून सोडव.
19तुला माझी लाज ठाऊक आहे माझे शत्रू माझा प्राण
उतारा करतात ते तुला माहीत आहे. या गोष्टी करताना
तू त्यांना पाहिले आहेस.
20शरमेने मला गाडून टाकले आहे. लाजेमुळे मी
लवकरच मरणार आहे. मी सहानुभूतीसाठी ताटकळलो
आहे पण मला ती मिळाली नाही कुणीतरी माझे सांत्वन
करेल म्हणून मी वाट पाहिली, पण कुणीही आले नाही.
21त्यांनी मला विष दिले अन्न नव्हे. त्यांनी मला आंब
दिली द्राक्षारस नाही.

22त्यांचे ताट अन्नाने भरलेले आहे त्यांच्या टेबलाजवळ बसून जेवताना त्यांना खूप सुरक्षित वाटते. हेच जेवण त्यांचा नाश करो अशी माझी इच्छा आहे.

23ते आंधळे व्हावेत आणि त्यांच्या पाठी अशक्तव्हाव्यात अशी मी आशा करतो.

24 त्यांना तुझ्या क्रोधाची चव घेऊ दे.

25त्यांची घरे रिकामी कर. त्यांत कुणालाही राहू देऊ नकोस.

26त्यांना शिक्षा कर म्हणजे ते पळून जातील त्यानंतर त्यांच्याजवळ बोलण्यासाठी दुख आणि जखमा खरोखरच असतील.

27त्यांनी ज्या वाईट गोष्टी केल्या त्याबद्दल त्यांना शिक्षा कर. तू किती चांगला असू शकतोस ते त्यांना दाखवू नकोस.

28जिवंत माणसांच्या यादीतून त्यांचे नाव पुसून टाक त्यांचे नाव चांगल्या लोकांच्या यादीत लिहू नकोस.

29मी खिन्न आणि दुखी आहे देवा, मला वर उचल, मला वाचव.

30मी गाण्यातून देवाच्या नावाची स्तुती करीन. मी त्याची धन्यवादाच्या गाण्यातून स्तुती करीन.

31यामुळे देव आनंदित होईल. एखादा बैल मारून संपूर्ण प्राणी देवाला अर्पण करण्यापेक्षा हे कितीतरी चांगले.

32गरीबांनो तुम्ही देवाची उपासना करण्यासाठी आलात. या गोष्टी कळल्याने तुम्हाला आनंद होईल.

33परमेश्वर गरीबांचे, दीनांचे ऐकतो परमेश्वराला तुरुंगातले लोक अजूनही आवडतात.

34देवाची स्तुती करा स्वर्ग आणि पृथ्वी, समुद्र आणि त्यातील सर्व गोष्टी तुम्ही सर्वांनी त्याची स्तुती करा.

35परमेश्वर सियोनाला वाचवेल. परमेश्वर यहुदाची नगरे परत बसवील. ती जमीन ज्यांच्या मालकीची होती ते लोक तिथे पुन्हा राहातील.

36त्याच्या सेवकाच्या वंशजांना ती जमीन मिळेल. ज्या लोकांना त्याचे नाव आवडते ते लोक तिथे राहातील.

## स्तोत्र 70

*प्रमुख गायकासाठी लोकांना आठवण देण्यासाठी लिहिलेले दावीदाचे एक स्तोत्र.*

1देवा, माझा उध्दार कर. देवा, लवकर ये आणि मला मदत कर.

2लोक मला मारायचा प्रयत्न करीत आहेत त्यांची निराशा कर त्यांची मानखंडना कर. लोकांना माझ्या बाबतीत वाईटगोष्टी करायच्या आहेत ते पडावेत आणि त्यांना लाज वाटावी असी माझी इच्छा आहे.

3लोकानी माझी चेष्टा केली त्याबद्दल त्यांना योग्य ती शिक्षा व्हावी आणि त्यांना शरम वाटावी अशी मला आशा वाटते.

4जे लोक तुझी उपासना करतात ते खूप खूप सुखी व्हावेत असे मला वाटते. ज्या लोकांना तुझी मदत हवी आहे त्या लोकांना नेहमी तुझी स्तुती करणे शक्य होईल अशी मला आशा वाटते.

5मी गरीब आणि असहाय्य माणूस आहे. देवा, लवकर ये आणि मला वाचव. देवा, फक्त तूच माझी सुटका करू शकतोस. उशीर करू नकोस.

## स्तोत्र 71

1परमेश्वरा, माझा तुझ्यावर विश्वास आहे. त्यामुळे माझी कधीही निराशा होणार नाही.

2तुझ्या चांगुलपणात तू मला वाचवशील. तू माझी सुटका करशील, माझ्याकडे लक्ष दे आणि मला वाचव.

3माझा किल्ला हो, सुरक्षित ठिकाणी धावत जाण्याचे माझे घर तू हो तू माझे सुरक्षित ठिकाण माझा खडक आहेस. तेव्हा मला वाचवण्याची आज्ञा दे.

4देवा, तू मला दुष्ट लोकांपासून वाचव. मला वाईट, पापी लोकांपासून वाचव.

5प्रभु, तू माझी आशा आहेस मी तरुण मुलगा असल्यापासूनच तुझ्यावर विश्वास टाकला आहे.

6जन्माला यायच्या आधीपासूनच मी तुझ्यावर अवलंबून आहे मी माझ्या आईच्या शरीरात होतो तेव्हा पासूनच तुझ्यावर विसंबून होतो मी नेहमीचतुझी प्रार्थना केली.

7तू माझ्या शक्तीचा ठेवा आहेस म्हणून मी दुसऱ्यांसाठी एक उदाहरण झालो.

8तू केलेल्या अद्भुत गोष्टींचे मी नेहमी गुणगान करीत असतो.

9केवळ मी आता म्हातारा झालो आहे म्हणून मला दूर लोटू नकोस माझी शक्ती क्षीण होत असताना मला सोडून जाऊ नकोस.

10माझ्या शत्रूंनी माझ्याविरुध्द योजना आखल्या आहेत. ते लोक खरोखरच एकत्र आले, भेटले आणि मला मारण्याची योजना त्यांनी आखली.

11माझे शत्रू म्हणाले, “जा त्याला पकडा देवाने त्याला सोडले आहे आणि कोणीही माणूस त्याला मदत करणार नाही.”

12देवा, मला सोडून जाऊ नकोस. देवा, त्वरा कर! ये आणि मला वाचव.

13माझ्या शत्रूंचा पराभव कर. ते मला इजा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना त्याबद्दल लाज वाटावी अशी माझी इच्छा आहे.

14नंतर मी तुझ्यावर नेहमीच विश्वास ठेवीन आणि मी तुझी जास्त जास्त स्तुती करीन.

15तू किती चांगला आहेस ते मी लोकांना सांगेन तू जेव्हा जेव्हा मला वाचवलेस त्याबद्दलही मी सांगेन ते प्रसंग मोजता न येण्याइतके अगणित होते.

[16]मी तुझ्या मोठेपणाबद्दल सांगेन, परमेश्वरा, माझ्या प्रभु मी केवळ तुझ्याबद्दल आणि तुझ्या चांगुलपणाबद्दल बोलेन.

[17]देवा, तू मला मी लहान मुलगा होतो तेव्हापासून शिकवीत आहेस आणि आजच्या दिवसापर्यंत मी लोकांना तू करीत असलेल्या अद्भुत गोष्टींबद्दल सांगितले.

[18]आता मी म्हातारा झालो आहे आणि माझे केस पांढरे झाले आहेत. पण देवा, तू मला सोडून जाणार नाहीस हे मला माहीत आहे. मी प्रत्येक नव्या पिढीला तुझ्या सामर्थ्याबद्दल आणि महानतेबद्दल सांगेन.

[19]देवा, तुझा चांगुलपणा आकाशापेक्षाही उंच आहे. देवा, तुझ्यासारखा देव कुठेही नाही. तू अद्भुत गोष्टी केल्या आहेस.

[20]तू मला संकटे आणि वाईट काळ दाखविलास परंतु तू मला त्या प्रत्येकातून वाचविलेस आणिमला जिवंत ठेवलेस. मी कितीही खोल बुडालो तरी तू मला माझ्या संकटांतून वर खेचलेस.

[21]पूर्वीपेक्षाही महान गोष्टी करण्यास मला मदत कर. माझे सांत्वन करणे चालूच ठेव.

[22]आणि मी तंतुवाद्य वाजवून तुझी स्तुती करीन. देवा, तुझ्यावर विश्वास टाकणे शक्य आहे असे गाणे मी गाईन माझ्या तंतुवाद्यावर मी इस्राएलाच्या पवित्रदेवासाठी गाणी वाजवीन.

[23]तू माझ्या आत्म्याचा उध्दार केलास. माझा आत्मा आनंदी होईल. मी माझ्या ओठांनी स्तुतिगीते गाईन.

[24]माझी जीभ नेहमी तुझ्या चांगुलपणाची गाणी गाईल आणि ज्या लोकांना मला ठार मारायची इच्छा होती त्यांचा पराभव होईल आणि ते कलंकित होतील.

## स्तोत्र 72

***शलमोनासाठी स्तोत्र***

[1]देवा, तू राजाला तुझ्यासारखे योग्य निर्णय घेण्यासाठी मदत कर. आणि राजाच्या मुलाला तुझ्या चांगुलपणा विषयी शिकायला मदत कर.

[2]तुझ्या लोकांना चांगला न्याय मिळावा म्हणून राजाला मदत कर तुझ्या गरीब लोकांसाठी चांगले आणि शहाणपणाचे निर्णय घेण्यासाठी त्याला मदत कर.

[3]पृथ्वीवर सगळीकडे शांती आणि न्याय नांदू दे.

[4]राजाला गरीबांविषयी न्यायी राहू दे. त्याला असहाय लोकांना मदत करू दे. त्यांना जे त्रास देतात त्या लोकांना त्याला शिक्षा करू दे.

[5]जो वर सूर्य चमकतो आहे आणि चंद्र आकाशात आहे तोवर लोकांनी राजाला मान द्यावा आणि त्याची भीती बाळगावी असे मला वाटते. लोक त्याला सदैव मान देतील आणि त्याची भीती बाळगतील अशी आशा मी करतो.

[6]राजाला शेतात पडणाऱ्या पावसासारखे असू दे त्याला पृथ्वीवर पडणाऱ्या पर्जन्यासारखे असू दे.

[7]तो जो पर्यंत राजा आहे तो पर्यंत चांगुलपणा उमलू दे जो पर्यंत चंद्र आहे तो पर्यंत शांती नांदू दे.

[8]त्याचे राज्य एका समुद्रापासून दुसऱ्या समुद्रापर्यंत आणि युफ्रेटस नदीपासून पृथ्वीच्या दुसऱ्या टोकापर्यंत वाढू दे.*

[9]वाळवंटात राहाणाऱ्या सर्व लोकांना त्याच्या समोर मुजरे करू दे. त्याच्या सर्व शत्रूंना त्याच्यापुढे घाणीत तोंड घालून मुजरे करू दे.

[10]तार्शीशच्या आणि दूरदूरच्या देशांच्या राजांना त्याच्यासाठी भेटी आणू दे. शबा आणि सबाच्या राजांना त्याच्यासाठी खंडणी आणू दे.

[11]सागळ्या राजांना आमच्या राजासमोर मुजरे करू दे सगळी राष्टे त्याच्या सेवेत राहू दे.

[12]आमचा राजा असहाय्याला मदत करतो. आमचा राजा गरीब आणि असहाय्य लोकांना मदत करतो.

[13]गरीब आणि असहाय्य लोक त्याच्यावरअवलंबून असतात. राजा त्यांना जिवंत ठेवतो.

[14]जे दुष्ट लोक त्यांना दुख द्यायचा प्रयत्न करतात त्यांच्यापासून राजा त्यांना वाचवतो. राज्याला त्या गरीबांचे आयुष्य खूप मोलाचे वाटते.

[15]राजा चिरायु होवो! आणि त्याला शबाकडून सोने मिळू दे राज्यासाठी नेहमी प्रार्थना करा त्याला रोज आशीर्वाद द्या.

[16]शेतात खूप धान्य पिकू द्या डोंगरावरही खूप धान्य उगवू द्या. शेती लबानोन मधील शेतीसारखी सुपीक होऊ द्या आणि शहरे गवताने भरलेल्या शेतासारखी माणसांनी भरु द्या.

[17]राजाला सदैव प्रसिध्द होऊ द्या. जो पर्यंत सूर्य तळपतो आहे तो पर्यत लोकांना त्याची आठवण राहू द्या. त्याला लोकांना आशीर्वाद देऊ द्या. आणि लोकांना त्याला आशीर्वाद देऊ द्या.

[18]परमेश्वर देवाची, इस्राएलाच्या देवाची स्तुती करा. फक्त देवच अशा अद्भूत गोष्टी करू शकतो.

[19]त्याच्या गौरवपूर्ण नावाची सदैव स्तुती करा. त्याच्या गौरवाने सारे जग भरु द्या. आमेन आमेन.

[20]इशायाचा मुलगा दावीद याच्या प्रार्थना इथे संपल्या.

# भाग दिसरा

## स्तोत्र 73

***आसाफाचे स्तोत्र***

[1]देव इस्राएल बरोबर खरोखरच चांगला वागला. शुध्द हृदय असलेल्या लोकांशी देव चांगला वागतो.

[2]मी जवळ जवळ घसरलो आणि पाप करायला लागलो.

---

**युफ्रेटस ... वाढू दे** याचा अर्थ बहुधा भूमध्य समुद्राच्या आसपासचे देश असा करतात.

[3]दुष्ट लोक यशस्वी होतात हे मी पाहिलेआणि मी त्या गार्विष्ठ लोकांचा मत्सर करायला लागलो.

[4]ते लोक आरोग्य संपन्न आहेत. त्यांना जीवन जगण्यासाठी लढा द्यावा लागत नाही.*

[5]त्या गर्विष्ठ लोकांना आपल्यासारखे दुखभोगावे लागत नाही. दुसऱ्या लोकांवर येतात तशी संकटे त्यांच्यावर येत नाहीत.

[6]म्हणून ते अतिशय गर्विष्ठ आणि तिरस्करणीय लोक आहेत. ते ज्या प्रकारची आभूषणे आणि भपकेदार कपडे घालतात त्या वरून हे कळून येते.

[7]जर त्या लोकांना एखादी गोष्ट आवडली तर ते सरळ जातात आणि ती घेऊन येतात. त्यांना जे काही करायची इच्छा होते ते ते करतात.

[8]ते दुसऱ्यांविषयी दुष्ट आणि वाईट गोष्टी बोलतात ते गर्विष्ठ आणि दुराग्रही आहेत. आणि दुसऱ्या लोकांचा कसा फायदा उठवायचा याचा ते सतत विचार करीत असतात व त्याप्रमाणे योजना आखतात.

[9]आपण म्हणजेच देव असे त्या गर्विष्ठ लोकांना वाटते आपण पृथ्वीचे राज्यकर्ते आहोत असे त्या लोकांना वाटते.

[10]म्हणून देवाची माणसे सुध्दा त्यांच्याकडे वळतात आणि त्यांनी सांगितलेली कामे करतात

[11]ते दुष्ट लोक म्हणतात, "आम्ही काय करतो ते देवाला माहीत नाही, सर्वशक्तिमान देवाला ते माहीत नाही."

[12]ते गर्विष्ठ लोक दुष्ट आहेत पण ते श्रीमंत आहेत आणि अधिक श्रीमंत होत आहेत.

[13]मग मी माझेच मन शुध्द का करू? मी माझे हात स्वच्छ का करू.

[14]देवा, मी दिवसभर त्रास भोगतो आणि तू मला रोज सकाळी शिक्षा देतोस.

[15]देवा, मला इतर लोकांशी याबद्दल बोलायची इच्छा होती. परंतु त्यामुळे तुझ्या माणसांचा विश्वासघात केल्यासारखे झाले असते हे मला माहीत होते.

[16]या गोष्टी समजण्याचा मी खूप प्रयत्न केला पण तुझ्या मंदिरात येण्यापूर्वी ते माझ्यासाठी फारच कठीण होते.

[17]मी देवाच्या मंदिरात गेलो आणि नंतर मला कळले.

[18]देवा, तू त्या लोकांना खरोखरच एका धोकादायक परिस्थितीत टाकले आहेस. खाली पडून सर्वनाश ओढवून घेणे त्यांना फारच सोपे झाले आहे.

[19]अचानक संकटे येऊ शकतात आणि नंतर त्या गर्विष्ठ माणसांचा नाश होतो. भयंकर गोष्टी घडू शकतात आणि मग त्यांचा सर्वनाश होतो.

[20]परमेश्वरा, ते लोक म्हणजे झोपून उठल्यावर विसर पडणाऱ्या स्वप्नासारखे आहेत. आपल्या स्वप्नात येणाऱ्या राक्षसाप्रमाणे तू त्या लोकांना अदृष्य करशील.

[21–22]मी फार मूर्ख होतो मी श्रीमंत आणि दुष्ट माणसांचा विचार केला आणि मी गोंधळून गेलो. देवा, मी गोंधळलो होतो आणि तुझ्यावर रागावलो होतो. मी एखाद्या मूर्ख आणि अज्ञानी प्राण्यासारखा वागलो.

[23]मला जे जे लागेल ते सर्व माझ्याजवळ आहे. मी नेहमी तुझ्या जवळ असतो. देवा, तू नेहमी माझा हात धरतोस.

[24]देवा, तू मला मार्ग दाखव तू मला चांगला उपदेश कर आणि नंतर तू मला गौरवाप्रत नेशील.

[25]देवा, स्वर्गातही तू माझ्याजवळ असशील आणि जेव्हा तू जवळ असशील तेव्हा या पृथ्वीवरचे मला आणखी काय हवे असणार?

[26]कदाचित् माझ्या शरीराचा आणि मनाचा नाश होईल परंतु माझ्याजवळ मला आवडत असलेला खडक आहे. देव सदैव माझ्याजवळ असतो.

[27]देवा, जे लोक तुला सोडून जातात ते लोक हरवतील जे लोक तुझ्याशी प्रामाणिक नाहीत त्यांचा तू नाश करशील.

[28]मी मात्र देवाकडे आलो आहे. आणि ती माझ्यासाठी अतिशय चांगली गोष्ट आहे. मी परमेश्वराला माझा प्रभु आणि माझी सुरक्षित जागा बनवले देवा, तू माझ्यासाठी ज्या गोष्टी केल्यास त्याबद्दल सांगण्यासाठी मी आलो आहे.

## स्तोत्र 74

***आसाफाचे मास्कील***

[1]देवा, तू आम्हाला कायमचाच सोडून गेलास का? देवा, तू तुझ्या माणसांवर अजूनही रागावलेला आहेस का?.

[2]तू खूप दिवसांपूर्वी ज्या लोकांना विकत घेतलेस. त्यांची आठवण ठेव तू आम्हाला वाचवलेस आता आम्ही तुझे आहोत ज्या सियोनाच्या डोंगरावर तू राहिलास त्याची आठवण तुला होते का?

[3]देवा, ये आणि या प्राचीन अवशेषांमधून चाल. शत्रूंनी ज्या पवित्र जागेचा नाश केला तिथे परत ये.

[4]शत्रूंनी मंदिरात युध्द गर्जना केल्या ते युध्द जिंकले आहे हे दाखविण्यासाठी त्यांनी मंदिरात झेंडे फडकवले.

[5]फावड्याने गवत कापणाऱ्यासारखे शत्रुचे सैनिक दिसत होते.

[6]देवा, त्यांनी कुऱ्हाडीचा आणि हातोडीचा उपयोग करून तुझ्या मंदिरातील कोरीव काम तोडून टाकले.

[7]त्या सैनिकांनी तुझे पवित्र स्थान जाळून टाकले तुझ्या नावाला गौरव प्राप्त करून देण्यासाठी ते मंदिर बांधले होते पण त्यांनी ते मातीत मिळवले.

[8]शत्रूंनी आमचा संपूर्ण नाश करायचे ठरवले. त्यांनी देशातील प्रत्येक पवित्र स्थानजाळून टाकले.

[9]आम्हाला आमचे एकही चिन्ह दिसू शकले नाही आता कोणी संदेष्टे राहिले नाही कुणालाही काय करावे ते कळत नाही.

---

**त्यांना … लागत नाही** शब्दश: "त्यांना मरताना काही पाश नसतात."

[10]देवा, आणखी किती काळ शत्रू आमची चेष्टा करणार आहेत? तू त्यांना कायमचीच तुझ्या नावाचा अनादर करायची परवानगी देणार आहेस का?
[11]देवा, तू आम्हाला इतकी मोठी शिक्षाका दिलीस? तू तुझी महान सत्ता वापरलीस आणि आमचा संपूर्ण नाश केलास.
[12]देवा, तू खूप काळापासून आमचा राजा आहेस या देशात लढाया जिंकायला तू आम्हाला मदत केलीस.
[13]देवा, लाल समुद्र दुभागण्यासाठी तू तुझ्या शक्तीचा उपयोग केलास.
[14]समुद्रातल्या मोठ्या राक्षसांचा तू पराभव केलास लिव्याथानाचे डोके तू ठेचलेस आणि त्याचे शरीर प्राण्यांना खाण्याकरता ठेवून दिलेस.
[15]तू नद्या नाल्यांना पाणी आणतोस आणि तूच नद्या कोरड्या करतोस.
[16]देवा, तू दिवसावर आणि रात्रीवर नियंत्रण ठेवतोस. सूर्य आणि चंद्र तूच निर्माण केलेस.
[17]पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट तूच सीमित केलीस.
तूच उन्हाळा आणि हिवाळा निर्माण केलास.
[18]देवा, या गोष्टींची आठवण ठेव. शत्रूंनी तुझा प्राण उतारा केला ते लक्षात असू दे. ती मूर्ख माणसे तुझ्या नावाचा तिरस्कार करतात.
[19]त्या जंगली प्राण्यांना तुझे कबुतर घेऊ देऊ नकोस. तुझ्या गरीब माणसांना कायमचे विसरु नकोस.
[20]आपला करार आठव या देशातील प्रत्येक अंधाऱ्या कोपऱ्यात हिंसा आहे.
[21]देवा, तुझ्या माणसांना वाईट वागणुक मिळाली. त्यांना आणखी दुख होणार नाही असे पाहा. गरीब आणि असहाय्य लोक तुझी स्तुती करतात.
[22]देवा, ऊठ! आणि युध्द कर! त्या मूर्खांनी तुला आव्हान दिले याची आठवण ठेव.
[23]तुझ्या शत्रूंच्या आरोळ्या विसरु नकोस त्यांनी तुझा पुन्हा पुन्हा अपमान केला आहे.

## स्तोत्र 75

### *प्रमुख गायकासाठी "नष्ट करू नकोस" या चालीवरचे आसाफाचे स्तोत्र*

[1]देवा, आम्ही तुझी स्तुती करतो. आम्ही तुझी स्तुती करतो. तू जवळ आहेस आणि लोक तू करत असलेल्या अद्भुत गोष्टींबद्दल सांगतात.
[2]देव म्हणतो "मी न्यायदानाची वेळ निवडली, मी बरोबर न्याय करीन.
[3]पृथ्वी आणि तिच्यावरील सारे काही थरथर कापेल आणि पडायला येईल पण मी त्याला स्थिरता देईन."
[4–5] "काही लोक गर्विष्ठ असतात. ते शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत असे त्यांना वाटते परंतु मी त्यांना सांगतो, 'फुशारक्या मारू नका. एवढे गर्विष्ठ बनू नका.'
[6]या पृथ्वीवर एखाद्या व्यक्तीला मोठा बनवू शकेल अशी कोणतीही शक्ती नाही.*
[7]देव न्यायाधीश आहे. कोणी मोठे व्हायचे ते देवच ठरवतो. देव एखाद्याला वर उचलतो आणि त्याला मोठे बनवतो. देव एखाद्याला खाली उतरवतो आणि त्याला मोठा करत नाही.
[8]देव दुष्टांना शासन करण्यास तयार आहे. परमेश्वराच्या हातात पेला आहे तो पेला विषयुक्त द्राक्षारसाने भरलेला आहे. तो तो द्राक्षारस ओतेल आणि दुष्ट लोक तो शेवटच्या थेंबापर्यंत पितील.
[9]मी नेहमी लोकांना याबद्दल सांगेन मी इस्राएलाच्या देवाचे गुणगान करीन.
[10]मी दुष्टांकडून सत्ता काढून घेईन. आणि मी चांगल्या लोकांकडे सत्ता देईन.

## स्तोत्र 76

### *प्रमुख गायकासाठी तंतुवाद्यावरचे आसाफाचे स्तोत्र*

[1]यहुदातील लोकांना देव माहीत आहे. इस्राएलमधील लोक देवाच्या नावाला मान देतात.
[2]देवाचे मंदिर शालेममध्ये आहे. देवाचे घर सियोन डोंगरावर आहे.
[3]देवाने त्या ठिकाणी धनुष्य बाण, ढाली, तलवारी आणि इतर शस्त्रांचा नाश केला.
[4]देवा, तू ज्या डोंगरावर शत्रूचा पराभव केलास त्या डोंगरावरुन परतताना तू वैभवशाली दिसतोस.
[5]त्या सैनिकांना आपण खूप बलवान आहोत असे वाटत होते परंतु आता ते रणांगणावर मरून पडले आहेत. त्यांची शरीरे आता त्यांच्या जवळच्या वस्तू ओरबाडल्या गेल्यामुळे उघडी पडली आहेत. या शूर सैनिकांपैकी कुणीही स्वत चे रक्षण करू शकला नाही.
[6]याकोबाचा देव त्या सैनिकांवर ओरडला आणि ते सैन्य त्यांचा रथ आणि घोडे यांच्यासकट मरून पडले.
[7]देवा, तू भयकारी आहेस. तू रागावतोस तेव्हा तुझ्याविरुध्द कुणीही उभा राहू शकत नाही.
[8–9]परमेश्वर न्यायाधीश म्हणून उभा ठाकला. त्याने त्याचे निर्णय जाहीर केले. देवाने देशातल्या दीन लोकांना वाचवले त्याने स्वर्गातून निर्णय दिला सर्व पृथ्वी शांत आणि घाबरलेली होती.
[10]तू जेव्हा दुष्टांना शिक्षा करतोस तेव्हा देवा लोक तुला मान देतात. तू तुझा क्रोध दाखवतोस आणि वाचलेले लोक शक्तिमान होतात.
[11]लोकहो! तुम्ही तुमच्या परमेश्वराला, देवाला वचने दिलीत आता तुम्ही जी वचने दिलीत ती पूर्ण करा प्रत्येक

---

**एखाद्या व्यक्तीला ... शक्ती नाही** शब्दश: पूर्वेकडून किंवा पश्चिमेकडूनही नाही आणि वाळवंटातील पर्वताकडूनही नाही.

ठिकाणचे लोक देवाला घाबरतात आणि त्याला मान देतात ते देवासाठी भेटी आणतात.
12देव मोठ्या नेत्यांचा सुध्दा पराभव करतो. पृथ्वीवरचे सर्व राजे त्याला घाबरतात.

## स्तोत्र 77

*प्रमुख गायकासाठी यदूथून सुरावर आधारलेले आसाफाचे स्तोत्र.*

1मी देवाला मदतीसाठी जोरात हाक मारली, देवा मी तुझी प्रार्थना करतो. माझ्याकडे लक्ष दे.
2माझ्या प्रभु, मी संकटात असतो तेव्हा तुझ्याकडे येतो मी रात्रभर तुझ्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला माझ्या आत्म्याने शांत व्हायला नकार दिला.
3मी देवाचा विचार करतो आणि मला काय वाटते ते त्याला सांगण्याचा प्रयत्न करतो पण मला ते शक्य नाही.
4तू मला झोपू देत नाहीस, मी काही तरी बोलायचा प्रयत्न केला पण मी फारच गोंधळलेल्या मनस्थितीत होतो.
5मी सतत भूतकाळाचा विचार करीत राहिलो खूप दिवसांपूर्वी घडलेल्या घटनांचा मी विचार करत होतो.
6रात्री मी माझ्या गाण्याचा विचार करण्याचा प्रयत्न करतो. मी स्वतशीच बोलतो आणि समजून घेण्याचा प्रयत्न करतो.
7मी आश्चर्य करतो, “आमचा प्रभु आपल्याला कायमचा सोडून गेला का? तो आपल्याला कधी तरी परत घेईल का?
8देवाचे प्रेम कायमचे नाहीसे झाले का? तो आपल्याशी कधी तरी परत बोलेल का?
9देव दयेचा अर्थ विसरला का? त्याच्या कृपेचे आता रागात परिवर्तन झाले का?”
10नंतर मी विचार केला, “जी गोष्ट मला राहून राहून खटकते आहे ती ही ‘सर्वशक्तिमान सर्वोच्च असा देव त्याची शक्ती घालवून बसला आहे का?’”
11परमेश्वराने काय केले ते मला आठवते आहे. देवा, खूप पूर्वी तू ज्या अद्भूत गोष्टी केल्यास त्या मला आठवतात.
12तू केलेल्या गोष्टींचा मी विचार केला. मी त्या गोष्टींबद्दल विचार केला.
13देवा, तुझे मार्ग पवित्र आहेत, देवा, तुझ्यासारखा महान कोणीही नाही.
14अद्भुत गोष्टी करणारा देव तूच आहेस. तू लोकांना तुझी महान शक्ती दाखवलीस.
15तू तुझ्या शक्तीने लोकांना वाचवलेस तू याकोबाच्या आणि योसेफाच्या वंशजांना वाचवलेस.
16देवा, पाण्याने तुला पाहिले आणि ते घाबरले. खोल पाणी भयाने थरथरले.
17दाट ढगांनी पाणी खाली सोडले, लोकांनी वरच्या उंच ढगातला गडगडाट ऐकला. नंतर तुझे विजांचे बाण ढगातून चमकू लागले.
18तिथे ढगांचा भयानक गडगडाट होत होता. विजांनी जगाला प्रकाशमय केले होते. पृथ्वी हलली आणि थरथरली.
19देवा, तू खोल पाण्यातून चाललास. तू खोल समुद्र ओलांडलास, पण तुझे पाऊल कुठेही उमटले नाही.
20तू मोशेच्या आणि अहरोनच्या मदतीने तुझ्या माणसांना मेंढ्यांप्रमाणे मार्गदर्शन केलेस.

## स्तोत्र 78

*आसाफाचे मास्कील.*

1लोकहो! माझी शिकवण ऐका, मी काय सांगतो ते ऐका!
2मी तुम्हांला ही गोष्ट सांगेन. मी तुम्हांला ही जुनी गोष्ट सांगेन.
3आम्ही ती गोष्ट ऐकली आणि आम्हाला ती चांगली माहीत आहे. आमच्या वाडवडिलांनी आम्हाला ती गोष्ट सांगितली होती.
4आणि आम्ही ती विसरणार नाही. आमचे लोक शेवटच्या पिढीपर्यंतती गोष्ट सांगत राहातील आम्ही परमेश्वराची स्तुती करू आणि त्याने केलेल्या अद्भुत गोष्टीबद्दल सांगत राहू.
5परमेश्वराने याकोबा बरोबर करार केला. देवाने इस्राएलला कायदा दिला. देवाने आमच्या पूर्वजांना आज्ञा दिल्या. त्याने आमच्या पूर्वजांना त्यांच्या वंशजांना नियम शिकवायला सांगितला.
6नवीन मुले जन्माला येतील तीच पुढे मोठी होतील आणि ती त्यांच्या मुलांना गोष्टी सांगतील या प्रमाणे लोकांना अगदी शेवटच्या पिढीपर्यंत नियम समजेल.
7म्हणून ते सगळे लोक देवावर विश्वास ठेवतील. देवाने जे केले ते ते विसरणार नाहीत. ते अत्यंत सावधगिरीने त्याच्या आज्ञा पाळतील.
8जर लोकांनी त्यांच्या देवाच्या आज्ञा त्यांच्या मुलांना शिकविल्या तर ती मुले त्यांच्या पूर्वजांसारखी होणार नाहीत त्यांचे पूर्वज देवाविरुध्द गेले. त्यानी देवाच्या आज्ञा पाळायचे नाकारले. ते लोक फार हट्टी होते ते देवाच्या आत्म्याशी प्रामाणिक नव्हते.
9एफ्राइमच्या लोकांजवळ शस्त्रे होती. परंतु ते रणांगणावरून पळून गेले.
10त्यांनी देवाबरोबर झालेला त्यांचा करार पाळला नाही. त्यांनी त्याची शिकवण आचरायला नकार दिला.
11एफ्राईमचे लोक देवाने केलेल्या महान गोष्टी विसरले. देवाने दाखवलेल्या अद्भुत गोष्टी ते विसरले.
12मिसर देशातल्या सोअन प्रांतात देवाने त्यांच्या वाडवडिलांना त्याची महान शक्ती दाखवली.

13देवाने लाल समुद्र दुभंगला आणि लोकांना पलिकडे नेले, पाणी एखाद्या भिंतीसारखे त्यांच्या दोन्ही बाजूला उभे होते.

14देव रोज त्यांना उंच मेघाच्या साहायाने दिवसा व रात्री अग्नीच्या प्रकाशात मार्ग दाखवीत नेत असे.

15देवाने वाळवंटात पाषाण फोडला त्याने लोकांना पृथ्वीच्या गर्भातून पाणी दिले.

16देवाने खडकातून नदीसारखे खळखळणारे पाणी बाहेर आणले.

17परंतु लोकांनी देवाविरुध्द पाप करणे चालूच ठेवले. ते वाळवंटात सुध्दा सर्वशक्तिमान परमेश्वराच्या विरुध्द गेले.

18नंतर त्या लोकांनी देवाची परीक्षा घ्यायचे ठरवले. त्यांनी त्यांची भूक भागवण्यासाठी देवाकडे अन्नाची मागणी केली.

19त्यांनी देवाविरुध्द तक्रारी केल्या ते म्हणाले, “देव आम्हांला वाळवंटात अन्न देऊ शकेल का?

20त्याने दगडाला प्रहार केला आणि त्यातून पुरासारखे पाणी बाहेर येऊ लागले तो आम्हांला भाकरी आणि मांस नक्कीच देईल.”

21त्या लोकांनी म्हटलेले परमेश्वराने ऐकले.देव याकोबावर फार रागावला देव इस्राएलवर फार रागावला.

22का? कारण लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. देव त्यांना वाचवील यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही.

23–24पण नंतर देवाने ढग बाजूला केले आणि त्यातून त्याने त्यांच्यावर अन्नासाठी मान्नाचा वर्षाव केला. आकाशाचे दरवाजे उघडावेत तसा हा प्रकार होता आणि आकाशातील गोदामातून धान्याचा वर्षाव होत राहिला.

25लोकांनी देवदूताचे अन्न खाल्ले देवाने त्यांचे समाधान करण्यासाठी भरपूर अन्न पाठवले.

26–27 देवाने पूर्वेकडचा घोंगावणारा वारा पाठवला आणि त्यांच्यावर लावे पक्षी पावसाप्रमाणे कोसळले देवाने तेमानकडून वारा वाहायला लावला आणि निळे आकाश काळे झाले कारण आकाशात खूप पक्षी होते.

28ते पक्षी छावणीच्या अगदी मध्य भागी, त्या लोकांच्या तंबूच्या अवती भोवती पडले.

29त्यांच्याकडे भरपूर खायला होते परंतु त्यांनी त्यांच्या भुकेलाच पाप करायला लावले.

30त्यांना त्यांची भूक आवरली नाही, म्हणून त्यांनी ते पक्षी रक्त काढल्याशिवायच खाल्ले.

31देव त्यांच्यावर खूप रागावला आणि त्याने त्यांतल्या अनेकांना मारुन टाकले. त्यातल्या अनेक निरोगी तरुण माणसांना देवाने मारले.

32परंतु लोकांनी पुन्हा पाप केले देव ज्या अद्भुत गोष्टी करतो त्यांवर ते अवलंबून राहिले नाहीत.

33म्हणून देवाने त्यांचे कवडी मोलाचे आयुष्य भयानक संकटात संपवले.

34देवाने जेव्हा जेव्हा त्यातल्या काहींना ठार मारले तेव्हा तेव्हा उरलेले लोक पुन्हा त्याच्या कडे वळले ते देवाकडे धावत परतले.

35देव त्यांचा खडक आहे. याची आठवण त्यांना आली सर्वशक्तिमान देवाने त्यांना वाचवले याची त्यांना आठवण झाली.

36आपण देवावर प्रेम करतो असे ते म्हणाले परंतु ते खोटे बोलले, ते मनापासून बोलत नव्हते.

37त्यांचे मन खरोखरच देवाजवळ नव्हते. ते कराराशी प्रमाणिक नव्हते.

38परंतु देव दयाळू होता. देवाने त्यांना त्यांच्या पापांबद्दल क्षमा केली आणि त्याने त्यांचा नाश केला नाही. देवाने अनेक वेळा स्वतचा राग आवरला. त्याने स्वतला खूप राग येऊ दिला नाही.

39ती केवळ माणसेच आहेत याची देवाने आठवण ठेवली. लोक वाऱ्याप्रमाणे आहेत. तो वाहातो आणि ओसरतो.

40त्या लोकांनी वाळवंटात देवाला अनेक संकटांत टाकले त्यांनी त्याला खूप दुखी केले.

41मग लोकांनी पुन्हा पुन्हा देवाच्या सहनशक्तीची परीक्षा घेतली, त्यांनी इस्राएलाच्या पवित्र परमेश्वराला खूप दुख दिले.

42ते लोक देवाची शक्ती विसरले. देवाने त्यांचा किती वेळा त्यांच्या शत्रूंपासून बचाव केला हे ते विसरले.

43मिसर देशातल्या चमत्कारा बाबत ते विसरले. सोअन प्रांतातला चमत्कारही ते विसरले.

44देवाने नद्यांचे रक्तात रूपांतर केले. मिसरमधले लोक पाणी पिऊ शकले नाहीत.

45देवाने चावणाऱ्या माशांचे थवे पाठवले. ते मिसरमधल्या लोकांना चावले, देवाने बेडूक पाठवले. त्यांनी मिसरमधल्या लोकांच्या आयुष्याचा नाश केला.

46देवाने त्यांची पिके नाकतोड्यांच्या हवाली केली आणि इतर झाडांवर टोळ धाड पाठवली.

47देवाने त्यांच्या द्राक्षवेलींचा नाश करण्यासाठी गारांचा पाऊस पाडला आणि झाडांचा नाश करण्यासाठी त्याने बर्फाचा उपयोग केला.

48देवाने गारांच्या वर्षावाने त्यांच्या प्राण्यांचा नाश केला आणि त्यांच्या पशुधनावर त्याने वीज पाडली.

49देवाने मिसरच्या लोकांना आपला राग दाखवला. त्याने त्याचे विध्वंसक दूत त्यांच्याविरुध्द पाठवले.

50देवाने आपला राग व्यक्त करण्यासाठी एक मार्ग शोधला त्याने त्या लोकांपैकी कुणालाही जगू दिले नाही. त्याने त्यांना एका भयंकर रोगाचे बळी केले.

51देवाने मिसरमध्ये जन्मलेल्या सर्व पहिल्या मुलांना मारुन टाकले. त्याने हाम कुटुंबात जन्मलेल्या पहिल्या मुलांनाही मारले.

52नंतर देवाने इस्राएलला मेंढपाळा सारखे नेले त्याने
त्याच्या लोकांना मेंढ्यासारखे वाळवंटात नेले.
53त्याने त्याच्या माणसांना काळजीपूर्वक मार्गदर्शन केले
देवाच्या माणसांना कशाचीच भीती वाटली नाही. देवाने
त्यांच्या शत्रूंना लाल समुद्रात बुडविले.
54देवाने त्याच्या माणसांना त्याच्या पवित्र देशात त्याने
त्याच्या सामर्थ्याने घेतलेल्या डोंगरावर नेले.
55देवाने इतर देशांना ती जमीन सोडून जायला भाग
पाडले देवाने प्रत्येक कुटुंबाला जमिनीचा त्यांचा हिस्सा
दिला. देवाने इस्राएलाच्या प्रत्येक कुटुंबाला राहायला स्वतचे
घर दिले.
56परंतु त्यांनी सर्वशक्तिमान देवाची परीक्षा घेतली आणि
त्याचे त्याला खूप वाईट वाटले. त्या लोकांनी देवाच्या
आज्ञा पाळल्या नाहीत.
57इस्राएलाच्या लोकांनी देवाकडे पाठ फिरवली.
जसे त्याचे पूर्वज त्याच्याविरुध्द गेले तसेच ते त्याच्या
विरुध्द गेले. ते वाकवलेल्या धनुष्याप्रमाणे अतिशय वाईट
होते.
58इस्राएलाच्या लोकांनी प्रार्थनेसाठी उंच जागा बांधल्या
आणि देवाला क्रोधित केले. त्यांनी चुकीच्या देवाचे पुतळे
केले आणि देवाला असूया आणली.
59देवाने हे ऐकले आणि तो खूप रागावला देवाने
इस्राएलला पूर्णपणे झिडकारले.
60देवाने शिलोहचा पवित्र तंबू सोडून दिला. देव लोकांच्या
बरोबर त्यांच्या तंबूत राहिला.
61देवाने इतर देशांना त्याच्या माणसांना पकडू दिले.
शत्रूनी देवाचे "सुंदर रत्न" घेतले.
62देवाने त्याच्या माणसांवरचा त्याचा राग व्यक्त केला
त्याने त्यांना युध्दात मरू दिले.
63तरुण माणसे जळून मेली आणि ज्या मुलींशी ते लग्न
करणार होते त्यांनी विवाहाची गाणी म्हटली नाहीत.
64याजक मारले गेले पण विधवा त्यांच्यासाठी रडल्या
नाहीत.
65शेवटी आमचा प्रभु झोपेतून उठलेल्या माणसासारखा,
खूप द्राक्षारस प्यायलेल्या सैनिकासारखा उठला.
66देवाने त्याच्या शत्रूंना माघार घ्यायला भाग पाडलेआणि
त्यांचा पराभव केला.देवाने त्याच्या शत्रूचा पराभव केला
आणि त्यांना कायमची नामुष्की आणली.
67परंतु देवाने योसेफाच्या कुटुंबाला झिडकारले देवाने
एफ्राईमच्या कुटुंबाचा स्वीकारकेला नाही.
68नाही, देवाने यहुदाच्या कुटुंबाला निवडले देवाने
त्याच्या आवडत्या सियोन पर्वताची निवड केली.
69देवाने त्याचे पवित्र मंदिर उंच पर्वतावर बांधले. देवाने
त्याचे मंदिर पृथ्वीसारखे कायमचे राहील असे बांधले.
70देवाने दावीदला स्वतचा खास सेवक म्हणून निवडले.
दावीद मेंढ्यांच्या वाड्यांचे रक्षण करीत होता. परंतु देवाने
त्याला त्याच्या कामापासून दूर नेले.
71दावीद मेंढ्यांची काळजी घेत होता. परंतु देवाने त्याला
त्या कामापासून दूर नेले. देवाने दावीदला त्याच्या
माणसांकडे, याकोबाच्या माणसांकडे, इस्राएलाच्या
माणसांकडे आणि देवाच्या मालमत्तेकडे लक्ष देण्याचे काम
करायला सांगितले.
72आणि दावीदने त्यांना शुध्द मनाने मार्ग दाखवला
त्याने त्याना शहाणपणाने मार्ग दाखवला.

## स्तोत्र 79

### *आसाफाचे स्तोत्र*

1देवा, काही लोक तुझ्या माणसांशी लढायला आले.
त्या लोकांनी तुझ्या पवित्र मंदिराचा नाश केला. त्यांनी
यरूशलेम उध्वस्त केले.
2शत्रूंनी तुझ्या सेवकांची प्रेते रानटी पक्ष्यांना खाण्यासाठी
ठेवली त्यांनी तुझ्या भक्तांची प्रेते रानटी पशूंना खाण्यासाठी
ठेवली.
3देवा, शत्रूंनी तुझी इतकी माणसे मारली की रक्त
पाण्यासारखे वाहायला लागले. प्रेते पुरायला एखादा
माणूसही उरला नाही.
4आमच्या भोवतालच्या लोकांनी आमचा पाणउतारा
केला आमच्या भोवतालची माणसे आम्हाला पाहून हसली
आणि त्यांनी आमची चेष्टा केली.
5देवा, तू आमच्यावर कायमचाच रागावणारआहेस का?
देवा, तुझे भावनोद्रेक आम्हाला आगीत असेच जाळत
राहणार आहेत का?
6देवा, तू तुझा राग ज्या देशांना तू माहीत नाहीस अशा
देशांकडे वळव जे देश तुझी उपासना करीत नाहीत अशा
देशांकडे तुझा राग वळव.
7त्या देशांनी याकोबाचा नाश केला त्यांनी याकोबाच्या
देशाचा सर्वनाश केला.
8देवा, कृपा करून आमच्या पूर्वजांनी केलेल्या पापाची
शिक्षा आम्हाला करू नकोस. आम्हांला लवकरात
लवकर तुझी दया दाखव.आम्हांला तुझी खूप खूप गरज
आहे.
9देवा, रक्षणकर्त्या, आम्हाला मदत कर. आम्हाला वाचव
त्यामुळे तुझ्या नावाला गौरव प्राप्त होईल. आमची पापे
तुझ्या नावाच्या भल्यासाठी पुसून टाक.
10इतर देशांना "कुठे आहे तुमचा देव? तो तुम्हाला
मदत करू शकत नाही का?"असे म्हणू देऊ नकोस.
देवा, त्या लोकांना शिक्षा कर म्हणजे आम्ही ते बघू शकू
तुझ्या सेवकांना मारल्याबद्दल त्यांना शिक्षा कर.
11कैद्यांच्या कण्हण्याकडे लक्ष दे देवा, मारण्यासाठी
ज्यांची निवड झाली होती त्यालोकांना तुझ्या सामर्थ्याने
वाचव.
12देवा, आमच्या भोवतालच्या माणसांनी आम्हांला जो
त्रास दिला त्याबद्दल त्यांना सात वेळा शिक्षा दे तुझा अपमान
केल्याबद्दल त्यांना शिक्षा कर.

13आम्ही तुझी माणसे आहोत, आम्ही तुझ्या कळपातल्या
मेंढ्या आहोत. आम्ही सदैव तुझी स्तुती करू. देवा, आम्ही
अगदी सर्वकाळ तुझी स्तुती करू.

## स्तोत्र 80

*प्रमुख गायकासाठी "भूकमळे" या चालीवर बसवलेले आसाफाचे स्तोत्र.*

1इस्राएलाच्या मेंढपाळा, माझे ऐक. तू योसेफाच्या मेंढ्यांना
(माणसांना)मार्ग दाखवतोस. राजा म्हणून तू करूबांच्या
आसनावर बसतोस. आम्हाला तुला बघू दे.
2इस्राएलाच्या मेंढपाळा, तुझे मोठेपण एफ्राइम आणि
बन्यामीन व मनश्शे यांच्यासमोर दाखव. ये आणि आम्हाला
वाचव.
3देवा, आमचा पुन्हा स्वीकार कर आणि आम्हाला
वाचव.
4सर्वशक्तिमान परमेश्वर देवा, तू आमच्या प्रार्थना कधी
ऐकशील? आमच्यावर तू सदैव रागावलेलाच राहाणार
आहेस का?

5तू तुझ्या लोकांना अन्न म्हणून अश्रू दिलेस. तेच
त्यांचे प्यायचे पाणी होते.
6तू आम्हाला आमच्या शेजाऱ्यांच्या भांडणाचे निमित
केलेस. आमचे शत्रू आम्हाला हसतात.
7सर्वशक्तिमान देवा, पुन्हा आमचा स्वीकार कर. आमचा
स्वीकार कर आणि आम्हाला वाचव.
8भूतकाळात तू आम्हाला अतिशय महत्वाच्या
वनस्पतीसारखे वागवलेस. तू तुझी ही "वेल" मिसर
देशाच्याबाहेर आणलीस. तू इतर लोकांना ही जमीन सोडून
जायला भाग पाडलेस आणि तू तुझी "वेल" इथे
लावलीस.
9तू त्या "वेलीसाठी" जमीन तयार केलीस. त्या "वेलीची"
मुळं जोमाने वाढावीत म्हणून प्रयत्न केलेस. थोड्याच
अवधीत ती वेल सर्व देशभर पसरली.
10तिने डोंगरांना आच्छादून टाकले मोठ्या देवदारूच्या
वृक्षांवर सुध्दा तिच्या पानांनी छाया घातली.

11तिच्या वेली भूमध्य समुद्रापर्यंत पसरल्या तिचे कोंब
युफ्रेटस नदीपर्यंत गेले.
12देवा, तुझ्या "वेलीचे" रक्षण करणाऱ्या भिंतीतू का
पाडून टाकल्यास? आता जो कोणी तिथून जातो तो तिची
द्राक्षे तोडतो.
13रानडुकरे येऊन तुझ्या "वेलीवर" चालतात. रानटी
पशू येतात आणि तिची पाने खातात.
14सर्वशक्तिमान देवा, परत ये स्वर्गातून खाली तुझ्या
"वेलीकडे" बघ आणि तिचे रक्षण कर.
15देवा, तू तुझ्या हाताने कापलेल्या' 'वेलीकडे" बघ. तू
वाढवलेल्या तुझ्या लहान वेलाकडे बघ.
16तुझी "वेल" वाळलेल्या शेणाप्रमाणे (गोवरीप्रमाणे)
आगीत जळून गेलीतू तिच्यावर रागावला होतास आणि तू
तिचा नाश केलास.
17देवा, तुझ्या उजव्या बाजूला उभ्या असलेल्या तुझ्या
मुलाला मदत कर. तू वाढवलेल्या तुझ्या मुलाला मदत
कर.
18तो तुला सोडून परत जाणार नाही. त्याला जगू दे
आणि तो तुझ्या नावाचा धावा करेल.
19सर्वशक्तिमान परमेश्वर देवा, आमच्याकडे परत
ये.आमचा स्वीकार कर. आम्हाला वाचव.

## स्तोत्र 81

*प्रमुख गायकासाठी गित्तीथ चालीवर बसवलेले आसाफचे स्तोत्र.*

1आनंदी राहा आणि आमची शक्ती असलेल्या देवासमोर
गाणे गा इस्राएलाच्या देवासमोर आनंदाने ओरडा.
2संगीताची सुरुवात करा. डफ वाजवा. सतार आणि
वीणा वाजवा.
3अमावास्येला एडक्याच्या शिंगाचा कर्णा वाजवा.
पौर्णिमेला ही एडक्याच्या शिंगाचा कर्णा वाजवा. याचवेळी
आपला सण सुरु होतो.
4हा इस्राएल देशाचा नियम आहे. देवाने याकोबाला
हीच आज्ञा केली.
5जेव्हा देवाने त्याला मिसरमधून दूर नेले तेव्हा त्याने
योसेफाबरोबर हा करार केला. मिसरमध्येच आम्ही
आम्हाला न समजणारी भाषा ऐकली.
6देव म्हणतो, "मी तुमच्या खांद्यावरचे ओझे उचलले.
तुमच्या खांद्यावरची कामगाराची टोपली तुम्हाला टाकायला
लावली.
7तुम्ही लोक संकटात होता. तुम्ही मदतीसाठी हाका
मारल्या आणि मी तुमची मुक्तता केली. मी वादळी ढगात
लपलो होतो आणि मी तुम्हाला उत्तर दिले. मी मरीबाच्या
पाण्याजवळ तुमची परीक्षा घेतली."
8"लोकहो! माझे ऐका, मी तुम्हाला माझा करार देईन
इस्राएल कृपा करून माझे ऐक.
9परदेशी लोक ज्या चुकीच्या देवाची पूजा करतात
त्यापैकी कुठल्याही देवाची पूजा करू नकोस.
10मी, परमेश्वराच तुमचा देव आहे मी तुम्हाला मिसरच्या
प्रदेशातून बाहेर आणले. इस्राएल, तुझे तोंड उघड मग मी
तुला खायला घालीन."
11 "परंतु माझ्या लोकांनी माझे ऐकले नाही. इस्राएलने
माझी आज्ञा पाळली नाही.
12म्हणून मी त्यांना जे करायची इच्छा होती ते करू
दिले. इस्राएलने सुध्दा त्याला हवे ते केले.
13जर माझ्या लोकांनी माझे ऐकले, जर इस्राएल माझ्या
इच्छे प्रमाणे राहिला.

[14]तर मी त्यांच्या शत्रूंचा पराभव करीन. जे लोक
इस्राएलवर संकटे आणतात त्यांना मी शिक्षा करीन.
[15]परमेश्वराचे शत्रू भीतीने थरथर कापतील. त्यांना
कायमची शिक्षा होईल.
[16]देव त्याच्या माणसांना सगळ्यात चांगला गहू देईल
देव त्याच्या माणसांना त्यांचे समाधान होईपर्यंत मध देईल."

## स्तोत्र 82

### *आसाफाचे स्तोत्र*

[1]देव देवांच्या सभेत उभा राहातो. तो देवांच्या सभेत
न्यायाधीश आहे.
[2]देव म्हणतो, "तू किती काळपर्यंत लोकांना विपरीत
न्याय देणार आहेस? दुष्टांना तू आणखी किती काळ
शिक्षा न करताच सोडून देणार आहेस?"
[3]"गरीबांना आणि अनाथांना संरक्षण दे. त्या गरीब
लोकांच्या हक्कांचे रक्षण कर.
[4]त्या गरीब, असहाय्य लोकांना मदत कर. त्यांचे
दुष्टांपासून रक्षण कर."
[5]"काय घडते आहे ते त्यांना* कळत नाही. त्यांना
काही समजत नाही. ते काय करीत आहेत ते त्यांना
कळत नाही. त्यांचे जग त्यांच्या भोवती कोसळत आहे."
[6]मी (देव) म्हणतो, "तुम्ही देव आहात तुम्ही सर्वशक्तिमान
देवाची मुले आहात."
[7]परंतु तुम्ही मरणार आहात इतर लोक मरतात त्याप्रमाणे
तुम्ही मराल इतर पुढारी मरतात त्याप्रमाणे तुम्ही मराल.
[8]देवा, ऊठ! तू न्यायाधीश हो. देवा, तू सर्व देशांचा
पुढारी हो.

## स्तोत्र 83

### *आसाफाचे स्तोत्र*

[1]देवा, गप्प राहू नकोस. तुझे कान बंद करू नकोस.
देवा, कृपा करून काही तरी बोल.
[2]देवा, तुझे शत्रू तुझ्याविरुध्द योजना आखत आहेत. ते
लवकरच हल्ला करतील.
[3]ते तुझ्या लोकांविरुध्द गुप्त योजना आखत आहेत. ते तू
ज्या माणसांवर प्रेम करतोस त्या माणसांविरुध्दच्या योजनाची
चर्चा करत आहेत.
[4]ते शत्रू म्हणत आहेत, "या त्यांचा पूर्णनि पात करू
यानंतर कोणालाही "इस्राएल" या शब्दाची आठवण सुध्दा
येणार नाही."
[5]देवा, ते सगळे लोक तुझ्याविरुध्द आणि तू आमच्याशी
केलेल्या करारा विरुध्द लढण्यासाठी एकत्र आले.
[6–7]ते शत्रू आमच्याशी लढण्यासाठी एकत्र आलेअदोम
आणि इश्माएलीचे लोक, मवाब आणि हागारचे वंशज
गाबाल, अम्मोन अमालेकचे लोक, पलेशेथ आणि सोरचे
लोक. ते सगळे लोक आमच्याशी लढायला एकत्र आले.
[8]अश्शूरही त्यांना मिळाले. त्यांनी लोटाच्या वंशजांना
खूप बलशाली बनवले.
[9]देवा, तू जसा मिद्यानचा, सीसरा व याबीन यांचा किशोन
नदीजवळ पराभव केलास तसाच तू शत्रूचा पराभव कर.
[10]तू त्यांचा एन-दोर येथे पराभव केलास आणि त्यांची
प्रेते जमिनीवर कुजली आणि त्यांचे खत बनले.
[11]देवा, शत्रूच्या प्रमुखाचा पराभव कर. तू ओरेब व
जेब यांचे जे केलेस तेच त्यांचेही कर जेबह व सलमुन्ना
यांचे जे केलेस तसेच त्यांचे ही कर.
[12]देवा, ते लोक आम्हाला जबरदस्तीने तुझ्या वस्तीवरून
जायला सांगत होते म्हणजे त्यांना तिचा ताबा घेता येईल.
[13]देवा, तू त्यांना गवतासारखे वाऱ्यावर उडवून लाव
वाऱ्याने वाळलेलं गवत इतस्तत पसरतं तस तू त्यांना
पसरवून दे.
[14]अग्नी जसा जंगलाचा व डोंगराचा नाश करतो तसा तू
शत्रूचा नाश कर.
[15]देवा, वादळात धूळ जशी उडून जाते तसे तू त्या
लोकांचा पाठलाग करून त्यांना उडवून लाव. त्यांना
गदगदा हलव आणि तुफानात उडवून दे.
[16]देवा, आपण खरोखरच अशक्त आहोत हे त्यांना
कळून येऊ दे नंतर त्यांना तुझ्या नावाचा धावा करायची
इच्छा होईल.
[17]देवा, त्या लोकांना खूप घाबरवून सोड आणि त्यांना
कायमचे लज्जित कर. त्यांना काळीमा फास आणि त्यांचा
नाश कर.
[18]नंतर त्यांना तू देव आहेस हे कळेल. तुझे नाव
यहोवा आहे हे त्यांना कळेल तू सर्वशक्तिमान देवच सर्व
जगाचा देव आहेस हे ही त्यांना कळेल.

## स्तोत्र 84

### *प्रमुख गायकासाठी गित्तीथच्या चालीवर बसवलेले कोरहाच्या मुलांचे स्तुतिगीत.*

[1]सर्वशक्तिमान परमेश्वरा, तुझे मंदिर खरोखरच सुंदर
आहे.
[2]परमेश्वरा, मला वाट पाहाण्याचा मनस्वी कंटाळा
आला आहे. मला तुझ्या मंदिरात यायचे आहे. माझ्यातला
कण कण जिवंत देवाजवळ जायला उत्सुक आहे.
[3]सर्वशक्तिमान परमेश्वरा, माझ्या राजा, माझ्या देवा,
चिमण्यांना आणि पाकोळ्यांना देखील घरे असतात. ते
पक्षी तुझ्या सिंहासनाजवळ त्यांचे घरटे बांधतात आणि
तिथे त्यांना पिल्ले होतात.
[4]तुझ्या मंदिरात राहाणारे लोक खूप सुखी असतात.ते
नेहमी तुझी स्तुती करतात.

---

**ते त्याना** अर्थ कदाचित् काय घडते आहे ते ज्यांना कळत नाही असे गरीब लोक असा असावा किंवा "देवांना" हे कळत नाही की त्यांच्यामुळे जगाचा नाश होतो आहे कारण ते न्यायी नाहीत आणि ते योग्य गोष्टी करीत नाहीत.

5जे लोक तुला त्यांच्या शक्तीचा स्त्रोत मानतात ते खूप सुखी असतात, ते तुला त्यांचे नेतृत्व करू देतात.*

6ते बाका दरीतून जातात तेव्हा देव तिला झऱ्याचे शिशिरातल्या पावसाने निर्माण केलेल्या जलाशयांचे स्वरूप देतो.*

7लोक देवाला भेटण्यासाठी सियोनाला जाताना एका शहरातून दुसऱ्या शहरात जातात.

8सर्वशक्तिमान परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक याकोबाच्या देवा, माझे ऐक.

9देवा, आमच्या रक्षणकर्त्याचे रक्षण कर. तू निवडलेल्या राजाला दया दाखव.

10तुझ्या मंदिरातला एक दिवस इतर ठिकाणच्या हजार दिवसांपेक्षा चांगला आहे. माझ्या देवाच्या प्रवेशद्वारापाशी उभे राहाणे हे वाईट माणसाच्या घरात राहाण्यापेक्षा चांगले आहे.

11परमेश्वर आमचा रक्षणकर्ता आणि आमचा गौरवशाली राजा आहे. देव आम्हाला दयेचा आणि गौरवाचा आशीर्वाद देतो जे लोक परमेश्वराची प्रार्थना करतात आणि त्याचे ऐकतात त्यांना परमेश्वर प्रत्येक चांगली गोष्ट देतो.

12सर्वशक्तिमान परमेश्वरा, जे लोक तुझ्यावर विश्वास ठेवतात ते खरोखरच सुखी असतात.

## स्तोत्र 85

*प्रमुख गायकासाठी कोरहाच्या मुलांचे स्तुतिगीत*

1परमेश्वरा, तुझ्या देशाला दया दाखव. याकोबाचे लोक परदेशात कैदी आहेत. कैद्यांना त्यांच्या देशात परत आण.

2परमेश्वरा, तुझ्या माणसांना क्षमा कर. त्यांची पापे पुसून टाक.

3परमेश्वरा, रागावणे सोडून दे. क्रोधित होऊ नकोस.

4देवा, तारणहारा, आमच्यावर रागावणे सोडून दे. आणि आमचा पुन्हा स्वीकार कर.

5तू आमच्यावर कायमचा रागावणार आहेस का?

6कृपा करून आम्हाला पुन्हा जगू दे. तुझ्या लोकांना सुखी कर.

7परमेश्वरा, आम्हाला वाचव आणि तू आमच्यावर प्रेम करतोस ते दाखव.

8परमेश्वर देव काय म्हणाला ते मी ऐकले. तो म्हणाला की त्याच्या लोकांसाठी येथे शांती असेल, जर ते त्यांच्या मूर्ख जीवन पध्दतीकडे परत वळले नाहीत तर त्याच्या भक्तांना शांती लाभेल.

9देव लवकरच त्याच्या भक्तांना वाचवील. आम्ही परत मानाने आमच्या जमिनीवर राहू.

10देवाचे खरे प्रेम त्याच्या भक्तांना भेटेल. चांगुलपणा आणि शांती त्यांचे चुंबन घेऊन त्यांचे स्वागत करील.

11पृथ्वीवरचे लोक देवाशी प्रामाणिक राहातील आणि स्वर्गातला तो देव त्यांच्याशी चांगला वागेल.*

12परमेश्वर आपल्याला खूप चांगल्या गोष्टी देईल. जमीन खूप चांगली पिके देईल.

13देवाच्या समोर चांगुलपणा जाईल आणि त्याच्यासाठी मार्ग तयार करील.

## स्तोत्र 86

*दावीदाची प्रार्थना*

1मी गरीब, असहाय्य माणूस आहे. परमेश्वरा माझे ऐक आणि माझ्या प्रार्थनेला उत्तर दे.

2परमेश्वरा मी तुझा भक्त आहे. कृपा करून माझे रक्षण कर. मी तुझा सेवक आहे. तू माझा देव आहेस. माझा तुझ्यावर विश्वास आहे. म्हणून मला वाचव.

3माझ्या प्रभु, माझ्यावर दया कर मी दिवसभर तुझी प्रार्थना करीत आहे.

4प्रभु, माझे जीवन तुझ्या हाती दिले आहे. मला सुखी कर, मी तुझा सेवक आहे.

5प्रभु, तू चांगला आणि दयाळू आहेस. तुझी माणसे तुला मदतीसाठी हाका मारतात तू त्या माणसांवर खरोखरच प्रेम करतो.

6परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक. दयेसाठी माझी प्रार्थना ऐक.

7परमेश्वरा, मी तुझी संकट काळात प्रार्थना करीत आहे. तू मला उत्तर देशील हे मला माहीत आहे.

8देवा, इथे तुझ्यासारखा कुणीही नाही. तू जे केलेस ते कोणीही करू शकणार नाही.

9प्रभु तूच प्रत्येकाला निर्माण केलेत ते सर्व येतील आणि तुझी उपासना करतील आणि तुझ्या नावाला मान देतील अशी मी आशा करतो.

10देवा, तू महान आहेस. तू अद्भुत गोष्टी करतोस. तू आणि फक्त तूच देव आहेस.

11परमेश्वरा, मला तुझे मार्ग शिकव. मी तुझी सत्ये जगेन तुझी सत्ये पाळीन. तुझ्या नावाचा जप ही माझ्या आयुष्यातली सगळ्यात महत्वाची गोष्ट करायला मला मदत कर.

12देवा, माझ्या प्रभु मी अगदी मनापासून तुझी स्तुती करतो मी तुझ्या नावाला सदैव मान देईन.

---

**ते ... देतात** शब्दश: "त्यांच्या हृदयात मोठे रस्ते आहेत" याचा अर्थ कदाचित् लोक सणासाठी यरूशलेमला जात आहेत असाही होईल.

**ते ... स्वरूप देतो** किंवा "शिक्षक आशीर्वाद देतात" हे कदाचित् वेगळ्या अर्थाने असे सांगणे असेल की देव आमचा गुरु आहे आणि तो आम्हाला अनेक आशीर्वाद देतो.

**पृथ्वीवरचे लोक ... चांगला वागेल** शब्दश: "इमानदारी जमिनीतून उगवेल आणि चांगुलपणा आकाशातून खाली बघेल."

13देवा, तुझे माझ्यावर खूप प्रेम आहे तू माझे
मृत्यूलोकापासून रक्षण करतोस.
14गर्विष्ठ लोक माझ्यावर हल्ला करतात देवा, वाईट
लोकांचा समूह मला ठार मारण्याचा प्रयत्न करीत आहे
आणि ते लोक तुला मान देत नाहीत.
15प्रभु, तू दयाळू आणि कृपाळू देव आहेस. तू सहनशील
निष्ठावान आणि प्रेमपूर्ण आहेस.
16देवा, तू माझे ऐकतोस हे मला दाखव तू माझ्यावर
दया कर. मी तुझा दास आहे. मला शक्ती दे. मी तुझा
सेवक आहे मला वाचव.
17देवा, तू मला वाचवणार आहेस याची प्रचीती मला
दाखव माझ्या शत्रूंना ती खूण दिसेल आणि ते निराश
होतील. तू माझी प्रार्थना ऐकलीस आणि तू मला मदत
करणार आहेस हे यावरुन दिसून येईल.

## स्तोत्र 87

*कोरहाच्या मुलाचे स्तुतिगीत*

1देवाने आपले मंदिर यरुशलेमच्या पवित्र डोंगरावर
बांधले.
2परमेश्वराला सियोनचे द्वार इस्राएलमधल्या इतर
ठिकाणापेक्षा अधिक आवडते.
3हे देवाच्या नगरी लोक तुझ्याबद्दल आश्चर्यजनक गोष्टी
सांगतात.
4देव त्याच्या सर्व माणसांची यादी ठेवतो त्यापैकी काही
मिसर आणि बाबेल मध्ये राहातात. त्यापैकी काहींचा
जन्म पलेशेथ, सोर आणि कूश येथे झाला.
5सियोनात जन्मलेल्या प्रत्येकाला देव ओळखतो.
सर्वशक्तिमान देवाने ते नगर बांधले.
6देव त्याच्या सर्व लोकांविषयीची यादी ठेवतो. प्रत्येकाचा
जन्म कुठे झाला ते त्याला माहीत आहे.
7देवाचे लोक यरुशलेमला खास सण साजरा करण्यासाठी
जातात. ते खूप आनंदी आहेत. ते गाणी गातात, नाच
करतात. ते म्हणतात, "सगळ्या चांगल्या गोष्टी
यरुशलेममधून येतात."

## स्तोत्र 88

*कोरहाच्या मुलाचे स्तुतीगीत प्रमुख गायकासाठी हेमान एज्राही याचे दुखद आजाराविषयीचे मास्कील*

1परमेश्वरा, देवा, तू माझा तारणारा आहेस. मी रात्रंदिवस
तुझी प्रार्थना करीत आहे.
2कृपा करून माझ्या प्रार्थनेकडे लक्ष दे. दयेखातर
माझी प्रार्थना ऐक.
3माझ्या आत्म्याला हे दुख पुरेसे आहे. मी आता लवकरच
मरणार आहे.
4लोक मला आताच मृत आहे असे समजून वागवतात.
मी जगायला अगदी शक्तिहीन आहे असे समजून वागवतात.
5मला तू मृत माणसात शोध मी थडग्यात असलेल्या
प्रेतासारखा आहे. ज्याला तू विसरलास असा एक मृतात्मा,
तुझ्यापासून आणि तुझ्या निगराणीपासून दूर गेलेला असा
एक.
6तू मला जमिनीतल्या त्या खड्ड्यांत टाकलेस. होय, तूच
मला त्या अंधाऱ्या जागेत ठेवलेस.
7देवा, तू माझ्यावर रागावला होतास आणि तू मला
शिक्षा केलीस.
8माझे मित्र मला सोडून गेले. ज्याला कोणीही स्पर्श
करू इच्छीत नाही. अशा माणसाप्रमाणे ते मला टाळतात.
मी घरात बंद झालो आहे आणि मी बाहेर पडू शकत
नाही.
9अतिदुखाने रडल्यामुळे माझे डोळे दुखत आहेत.
परमेश्वरा, मी सतत तुझी प्रार्थना करीत आहे. माझे बाहू
उभारून मी तुझी प्रार्थना करत आहे.
10परमेश्वरा, तू मृतांसाठी चमत्कार करतोस का? भुते
उठून तुझी स्तुती करतात का? नाही.
11थडग्यातले मृत लोक तुझ्या प्रेमाबद्दल बोलू शकत
नाहीत. मृत्युलोकातील मृतलोक तुझ्या इमानीपणाविषयी
बोलू शकत नाहीत.
12अंधारात पडलेले मृतलोक तुझी अद्भुत कृत्ये पाहू
शकत नाहीत. विस्मृतीच्या जगातले मृतलोक तुझ्या
चांगुलपणाविषयी बोलू शकत नाहीत.
13परमेश्वरा, मी तुला मदत करण्याविषयी विचारत
आहे. प्रत्येक दिवशी पहाटे मी तुझी प्रार्थना करतो.
14परमेश्वरा, तू माझा त्याग का केलास? तू माझे
ऐकायला नकार का देतोस?
15मी तरुणपणापासूनच अशक्त आणि आजारी आहे. मी
तुझा राग सोसला आहे आणि मी असहाय्य आहे.
16परमेश्वरा, तू माझ्यावर रागावला होतास आणि शिक्षा
मला मारून टाकीत आहे.
17दुख आणि वेदना सदैव माझ्याबरोबर असतात. मी
माझ्या दुखात आणि वेदनात बुडून मरत आहे असे मला
वाटते.
18आणि परमेश्वरा, तूच माझ्या आप्तेष्टांना आणि इष्ट
मित्रांना मला सोडून जाण्यास भाग पाडलेस. केवळ भयाण
अंधकार माझी सोबत करत माझ्याजवळ राहिला.

## स्तोत्र 89

*एथान एज्राहीचे मास्कील*

1मी सदैव परमेश्वराच्या प्रेमाचे गाणे गाईन मी सदैव
त्याच्या इमानदारीचे गाणे गाईन.
2परमेश्वरा, तुझे प्रेम सार्वकालिक आहे यावर माझा
विश्वास आहे. तुझी इमानदारी आकाशाइतकी अथांग
आहे.
3देव म्हणाला, "मी निवडलेल्या राजाशी करार केला
मी दावीदला, माझ्या सेवकाला वचन दिले.

[4]दावीद, मी तुझा वंश चालू राहील असे करीन तुझे राज्य सदैव राहील असे मी करीन."

[5]परमेश्वरा, तू अद्भुत गोष्टी करतोस याबद्दल स्वर्ग तुझी स्तुती करतात. लोक तुझ्यावर अवलंबून राहू शकतात. पवित्र लोकांची सभा याबद्दलचे गाणे गाते.

[6]स्वर्गातला कोणीही परमेश्वरासमान नाही. "देवा" पैकी कुणाचीही परमेश्वराशी तुलना होऊ शकत नाही.

[7]देव पवित्र लोकांना भेटतो. ते देवदूत त्याच्या सभोवती असतात. ते देवाला घाबरतात आणि त्याला मान देतात. ते भयग्रस्त होऊन त्याच्या भोवती उभे राहातात.

[8]सर्वशक्तिमान परमेश्वरा, देवा, तुझ्यासारखा कुणीही इथे नाही. आम्ही तुझ्यावर संपूर्ण विश्वास टाकू शकतो.

[9]तू गर्वाने समुद्रावर राज्य करतोस तू त्याच्या क्रोधित लाटांना शांत करू शकतोस.

[10]देवा, तू राहाबचा पराभव केलास तू तुझ्या बलवान बाहूंनी तुझ्या शत्रूंना इतस्तत पांगवलेस.

[11]देवा, स्वर्गातल्या आणि पृथ्वीवरच्या सर्वगोष्टी तुझ्या आहेत तूच जग आणि त्यातल्या सर्वगोष्टी निर्माण केल्यास.

[12]उत्तरेकडच्या आणि दक्षिणेकडच्या सर्व गोष्टी तूच निर्माण केल्यास ताबोर पर्वत आणि हार्मोन पर्वत तुझ्या नावाचा जयजयकार करतात.

[13]देवा, तुझ्याजवळ शक्ती आहे तुझीशक्ती महान आहे. विजय तुझाच आहे.

[14]तुझे राज्य सत्य आणि न्याय यावर वसलेले आहे. प्रेम आणि सत्य तुझ्या सिंहासनासमोर सेवक आहेत.

[15]देवा, तुझे इमानी भक्त खरोखरच सुखी आहेत. ते तुझ्या दयेच्या प्रकाशात जगतात.

[16]तुझे नाव त्यांना नेहमी आनंद देते. ते तुझ्या चांगलुपणाची स्तुती करतात.

[17]तू त्यांची अद्भुत शक्ती आहेस. त्यांची शक्ती तुझ्यापासूनच येते.

[18]परमेश्वरा, तू आमचा रक्षणकर्ता आहेस. इस्राएलचा पवित्र देव आमचा राजा आहे.

[19]तू तुझ्या भक्तांशी दृष्टांतात बोललास. आणि म्हणालास, "मी गर्दीतला एक माणूस निवडला आणि त्या माणसाला महत्व दिले. मी त्या तरुण सैनिकाला बलवान केले.

[20]माझा सेवक दावीद मला सापडला आणि मी त्याला माझ्या खास तेलाने अभिषेक केला.

[21]मी दावीदला माझ्या उजव्या हाताने आधार दिलाआणि माझ्या शक्तीने मी त्याला बलवान केले.

[22]त्या निवडलेल्या राजाचा शत्रू पराभव करू शकला नाही. दुष्टलोक त्याचा पराभव करू शकले नाहीत.

[23]मी त्याच्या शत्रूंना संपवले जे लोक माझ्या निवडलेल्या राजाचा तिरस्कार करीत होते त्यांचा मी पराभव केला.

[24]माझ्या निवडलेल्या राजावर मी नेहमी प्रेम करीन आणि त्याला मदत करीन. मी त्याला नेहमी सामर्थ्यवान बनवेन.

[25]मी माझ्या निवडलेल्या राजाला समुद्राच्या हाती सोपवले,तो नद्यांना काबून ठेवेल.

[26]तो मला म्हणेल, 'तुम्ही माझे वडील आहात तू माझा देव आहेस माझा खडक माझा तारणारा आहेस.'

[27]आणि मी त्याला माझा पहिला मुलगा बनवेन. तो पृथ्वीवरचा महान राजा असेल.

[28]माझे प्रेम त्या राजाचे सदैव रक्षण करेल त्याच्या बरोबरचा माझा करार कधीही संपणार नाही.

[29]त्याचा वंश सदैव चालू राहील स्वर्ग असेपर्यंत त्याचे राज्य असेल.

[30]जर त्याचे वंशज माझा कायदा पाळायचे थांबवतील आणिमाझ्या आज्ञा पाळणे बंद करतील तर मी त्यांना शिक्षा करेन.

[31]जर त्या निवडलेल्या राजाच्या वंशजांनी माझे नियम मोडले.

[32]आणि माझ्या आज्ञांकडे दुर्लक्ष केले तर मी त्यांना जबरदस्त शिक्षा करेन.

[33]परंतु त्या लोकांवरचे माझे प्रेम मी कधीच बाजूला करणार नाही. मी त्यांच्याशी नेहमी निष्ठावान राहीन.

[34]मी दावीदशी झालेला माझा करार मोडणार नाही. मी आमचा करार बदलणार नाही.

[35]माझ्या पवित्रतेतून मी त्याला वचन दिले आहे. आणि मी दावीदशी खोटे बोलणार नाही.

[36]दावीदाचा वंश सदैव चालू राहील. त्याचे राज्य सूर्य असे पर्यंत राहील.

[37]ते चंद्राप्रमाणे सदैव राहील. आकाश या कराराचा पुरावा आहे त्या करारावर तुम्ही विश्वास ठेवू शकता."

[38]पण देवा, तू तुझ्या निवडलेल्या राजावर रागावलास आणि तू त्याला एकटे सोडून दिलेस.

[39]तू तुझा करार पाळला नाहीस. तू राजाचा मुकुट धुळीत फेकून दिलास.

[40]तू राजाच्या नगरातील भिंती पाडल्यास. तू त्याचे सर्व किल्ले उध्वस्त केलेस.

[41]लोक जाता जाता त्याच्या वस्तू चोरतात. त्याचे शेजारी त्याला हसतात.

[42]तू राजाच्या सर्व शत्रूंना आनंदी केलेस. तू त्याच्या शत्रूंना युध्द जिंकू दिलेस.

[43]देवा, तू त्यांना स्वत चे रक्षण करायला मदत केलीस. तू तुझ्या राजाला युध्द जिंकायला मदत केली नाहीस.

[44]तू त्याला युध्द जिंकू दिले नाहीस. तू त्याचे सिंहासन जमिनीवर फेकलेस.

[45]तू त्याचे आयुष्य कमी केलेस. तू त्याला शरम आणलीस.

[46]परमेश्वरा, हे किती काळ चालणार आहे?तू आमच्याकडे सदैव दुर्लक्ष करणार आहेस का?तुझा राग अग्नीसारखा सदैव धुमसत राहाणारआहे का?

47माझे आयुष्य किती लहान आहे ते लक्षात ठेव तू आम्हाला छोटे आयुष्य जगण्यासाठी व नंतर मरून जाण्यासाठी निर्माण केलेस.

48कोणीही माणूस जगून कधीही मरणार नाही असे होणार नाही. कोणीही थडगे चुकवू शकणार नाही.

49देवा, तू पूर्वी दाखवलेले प्रेम कुठे आहे?तू दावीदला त्याच्या कुटुंबाशी इमान राखण्याचे वचन दिले होतेस.

50–51प्रभु, तुमच्या सेवकाचा लोकांनी कसा अपमान केला होता ते लक्षात ठेवा. परमेश्वरा, तुझ्या शत्रूंनी केलेल्या सर्व अपमानांना मला तोंड द्यावे लागले.त्या लोकांनी तू निवडलेल्या राजाचा अपमान केला.

52परमेश्वराला सदैव दुवा द्या. आमेन आमेन.

# भाग चौथा

## स्तोत्र 90

*देवाचा माणूस मोशे याची प्रार्थना*

1प्रभु तू सदैव आमचे घर बनून राहिला आहेस.

2देवा, पर्वत जन्मण्याआधी आणि पृथ्वी व जग निर्माण होण्याआधी तूच देव होतास देवा, तू पूर्वी होतास. आणि पुढेदेखील असशील.

3तूच लोकांना या जगात आणतोस आणि तूच त्यांची पुन्हा माती करतोस.

4तुझ्यासाठी हजारो वर्षे म्हणजे कालचा दिवस, कालची रात्र.

5तू आम्हाला झाडून टाकतोस. आमचे आयुष्य स्वप्नासारखे आहे. सकाळ झाली की आम्ही मेललो असतो. आम्ही गवतासारखे आहोत.

6गवत सकाळी उगवते आणि संध्याकाळीते वाळते व मरणाला टेकते.

7देवा, तू रागावतोस तेव्हा आमचा नाश होतो. आम्हाला तुझ्या रागाची भीती वाटते.

8तुला आमच्या सर्व पापांची माहिती आहे. देवा, तू आमचे प्रत्येक गुप्त पाप पाहतोस.

9तुझा राग आमचे आयुष्य संपवू शकतो एखाद्या कुजबुजी सारखे आमचे आयुष्य विरून जाऊ शकते.

10आम्ही कदाचित् 70 वर्षे जगू आणि जरा सशक्तअसलो तर 80 वर्षे आमचे आयुष्य कठोर परिश्रम आणि दुख यांनी भरलेले आहे. आणि नंतर आमचे आयुष्य अवचित् संपते आणि आम्ही उडून जातो.

11देवा, तुझ्या रागाच्या संपूर्ण शक्तीची कुणालाच जाणीव नाही. परंतु देवा, आमची भीती आणि तुझ्याबद्दलचा आदर तुझ्या रागाइतकाच महान आहे.

12आमचे आयुष्य खरोखरच किती छोटेआहे ते आम्हाला शिकव म्हणजे आम्ही खरेखुरे शहाणे बनू शकू.

13परमेश्वरा, नेहमी आमच्याकडे परत ये. तुझ्या सेवकाशी दयेने वाग.

14तुझ्या प्रेमाने आम्हांला रोज सकाळी न्हाऊ घाल. आम्हाला सुखी होऊ दे आणि समाधानाने आयुष्य जगू दे.

15तू आम्हाला आयुष्यात खूप संकटे आणि खिन्नता दिलीस.आता आम्हांला सुखी कर.

16तू तुझ्या सेवकांसाठी कोणत्या अद्भुत गोष्टी करू शकतोस ते त्यांना बघू दे.

17देवा, प्रभु, आमच्यावर दया कर. आम्ही जे जे करतो त्यात आम्हाला यश दे.

## स्तोत्र 91

1तुम्ही लपण्यासाठी परात्पर देवाकडे जाऊ शकता. तुम्ही संरक्षणासाठी सर्वशक्तिमान देवाकडे जाऊ शकता.

2मी परमेश्वराला म्हणतो, “तू माझी सुरक्षित जागा आहेस माझा किल्ला, माझा देव आहेस मी तुझ्यावर विश्वास ठेवतो.”

3देव तुम्हाला अवचित् येणाऱ्या संकटांपासून आणि भयानक रोगांपासून वाचवेल.

4तुम्ही रक्षणासाठी देवाकडे जाऊ शकता.पक्षी जसा आपले पंख पसरून पिल्लांचे रक्षण करतो तसा तो तुमचे रक्षण करील देव तुमचे रक्षण करणारी ढालआणि भिंत असेल.

5रात्री तुम्हाला घाबरण्यासारखे काहीही नसेल आणि तुम्हाला दिवसाही शत्रूंच्या बाणांची भीती वाटणार नाही.

6अंधारात येणाऱ्या रोगाची किंवा दुपारी येणाऱ्या भयानक आजाराची तुम्हाला भीतीवाटणार नाही.

7तुम्ही 1,000 शत्रूंचा पराभव कराल तुमचा उजवा हात 10,000 शत्रू सैनिकांचा पराभव करेल. तुमचे शत्रू तुम्हाला स्पर्शसुध्दा करू शकणार नाहीत.

8तुम्ही नुसती नजर टाकलीत तरी त्या दुष्टांना शिक्षा झालेली तुम्हाला दिसेल.

9का? कारण तुम्ही परमेश्वरावर विश्वास ठेवता. परात्पर देवाला तुम्ही तुमची सुरक्षित जागा बनवले आहे.

10तुमचे काहीही वाईट होणार नाही. तुमच्या घरात रोगराई असणार नाही.

11देव तुमच्यासाठी त्याच्या दूतांना आज्ञा देईल आणि तुम्ही जिथे जिथे जाल तिथे तिथे ते तुमचे रक्षण करतील.

12तुम्हाला दगडाची ठेच लागू नये म्हणून ते त्यांच्या हातांनी तुम्हाला धरतील.

13तुमच्याजवळ सिंहावरुन आणि विषारी सापांवरुन चालण्याची शक्ती असेल.

14परमेश्वर म्हणतो, “जर एखादा माणूस माझ्यावर विश्वास ठेवेल,तर मी त्याचे तारण करीन. जे माझे अनुयायी माझी उपासना करतात त्यांचे मी रक्षण करतो.

15माझे भक्त मला मदतीसाठी हाक मारतात. आणि मी त्यांना ओ देतो.ते संकटात असतील तेव्हा मी त्यांच्याजवळ असेन. मी त्यांची सुटका करीन आणि त्यांना मान देईन.

[16]मी माझ्या भक्तांना खूप आयुष्य देईन."आणि त्यांना
वाचवीन.

## स्तोत्र 92

*शब्बाथचे स्तुतिगीत.*

[1]परमेश्वराची स्तुती करणे चांगले असते. परात्पर
देवा, तुझ्या नावाचे उपकारस्मरण करणे चांगले
असते.
[2]तुझ्या प्रेमा बद्दल सकाळी गाणे आणि रात्री, तुझ्या
इमानीपणाबद्दल जयजयकार करणे चांगले असते.
[3]देवा, तुझ्यासाठी दहा तारांच्या वीणेवर आणि सतारीवर
संगीत वाजवणे चांगले असते.
[4]परमेश्वरा, तू ज्या गोष्टी केल्यास त्यामुळे तू आम्हाला
खरोखरच सुखी केले आहेस, आम्ही त्याबद्दल आनंदाने
गातो.
[5]परमेश्वरा, तू फारच महान गोष्टी केल्यास तुझे विचार
समजून घेणे आम्हाला फार जड जाते.
[6]तुझ्याशी तुलना करता माणसे म्हणजे मूर्ख जनावरे
आहेत. ज्याला काहीही कळू शकत नाही अशा मूर्खासारखे
आम्ही आहोत.
[7]वाईट लोक तणाप्रमाणे जगतात आणि मरतात.आणि
ते ज्या कवडीमोलाच्या गोष्टी करतात त्या गोष्टींचा
कायमचा नाश होतो.
[8]परंतु परमेश्वरा, तुला सदैव मान मिळेल.
[9]परमेश्वरा, तुझ्या सगळ्या शत्रूंचा नाश होईल. वाईट
गोष्टी करणाऱ्या सर्व लोकांचा नाश होईल.
[10]पण तू मला बलवान बनवशील मी ताकदवान शिंग
असलेल्या मेंढ्यासारखा असेन. पण तू माझी माझ्या खास
कामासाठी निवड केलीस. तू तुझे ताजेतवाने करणारे
तेल माझ्यावर ओतलेस.
[11]मी माझे शत्रू माझ्याभोवती बघतो. ते भल्या
मोठ्या बैलाप्रमाणे माझ्यावर चालकरून येण्याच्या
तयारीत आहेत ते माझ्याबद्दल काय बोलतात ते मी
ऐकतो.
[12–13]परंतु चांगला माणूस वाढणाऱ्या खजुराच्या
झाडाप्रमाणे असतो.

चांगला माणूस लबानोनमधल्या मोठ्या देवदार
वृक्षासारखा असतो.

चांगली माणसे परमेश्वराच्या मंदिरात लावलेल्या मजबूत
वृक्षासारखी असतात. आमच्या देवाच्या मंदिरातील अंगणात
ती झपाट्याने वाढतील.
[14]ते जुने झाल्यावरही फळे देत राहातील. ते सशक्त
हिरव्या झाडासारखे असतील.
[15]परमेश्वर चांगला आहे हे प्रत्येकाला दाखवण्यासाठी
ती (चांगली माणसे) तेथे आहेत तो माझा खडक असून
तो काहीही चुकीचे करत नाही.

## स्तोत्र 93

[1]परमेश्वर राजा आहे. त्याने ऐश्वर्य आणि सामर्थ्य
वस्त्राप्रमाणे पांघरले आहे तो सज्ज आहे त्यामुळे सर्व जग
सुरक्षित आहे. ते कंपित होणार नाही.
[2]देवा, तुझे राज्य कायमचे अस्तित्वात राहिले आहे
देवा, तू सदैव जीवंत आहेस.
[3]परमेश्वरा, नद्यांचा आवाज प्रचंड मोठा आहे.
आदळणाऱ्या लाटांचा आवाज खूप मोठा आहे.
[4]समुद्राच्या आदळणाऱ्या लाटा फार ताकदवान आहेत
आणि त्यांचा आवाज खूप मोठा आहे. परंतु वरचा परमेश्वर
अधिक ताकदवान आहे.
[5]परमेश्वरा, तुझे नियम सदैव राहातील.*तुझे पवित्र
मंदिर खूप काळ उभे राहील.

## स्तोत्र 94

[1]परमेश्वरा, तू लोकांना शासन करणारा देव आहेस
असा तू देव आहेस जो येतो आणि लोकांसाठी शासन
आणतो.
[2]तू संपूर्ण पृथ्वीचा न्यायाधीश आहेस. गर्विष्ठ दुष्ट
माणसांना योग्य अशी शिक्षा दे.
[3]परमेश्वरा, दुष्ट लोक किती काळ मजा करीत राहाणार
आहेत? परमेश्वरा किती काळ?
[4]आणखी किती काळ हे गुन्हेगार त्यांनी केलेल्या
गुन्ह्यांबद्दल गौरवोद्‌गार काढणार आहेत?
[5]परमेश्वरा, ते तुझ्या माणसांना त्रास देतात. त्यांनी तुझ्या
माणसांना यातना भोगायला लावल्या.
[6]ते दुष्ट लोक विधवांना आणि आपल्या देशात आलेल्या
परकीयांना ठार मारतात. ते अनाथ मुलांचा खून करतात.
[7]आणि ते म्हणतात की या वाईट गोष्टी करताना
परमेश्वर त्यांना बघत नाही. ते म्हणतात की जे काही
घडते आहे ते इस्राएलाच्या देवाला माहीत नाही.
[8]तुम्ही दुष्ट लोक, मूर्ख आहात. तुम्ही तुमचा धडा
कधी शिकणार? तुम्ही वाईट लोक किती मूर्ख आहात!
तुम्ही समजण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे.
[9]देवानेच आपले कान केलेत तेव्हा त्यालाही कान
असलेच पाहिजेत आणि जे काही घडते ते तो ऐकू
शकतो.देवानेच आपले डोळे केलेत. तेव्हा त्यालाही डोळे
असलेच पाहिजेत आणि जे काही घडते ते तो पाहू शकतो.
[10]देव त्या लोकांना शिस्त लावेल. देव लोकांना काय
करायचे ते शिकवेल.
[11]लोक काय विचार करतात ते देवाला माहीत असते.
लोक म्हणजे वाऱ्याचा झोत आहे हे देवाला माहीत आहे.
[12]परमेश्वर ज्या माणसाला शिस्त लावेल तो सुखी
होईल देव त्या माणसाला जगण्याचा योग्यमार्ग शिकवेल.

---

**तुझे ... राहतील** किंवा "तुझ्या करारावर विश्वास ठेवणे
खरोखरच शक्य आहे."

[13]देवा, तू त्या माणसाला संकटात शांत राहाण्यास शिकवशील. तू त्या माणसाला वाईट लोक थडग्यात जाईपर्यंत शांत राहाण्यास मदत करशील.
[14]परमेश्वर त्याच्या माणसांना सोडून जाणार नाही. तो त्याच्या माणसांना मदत केल्याशिवाय सोडून जाणार नाही.
[15]न्याय प्रस्थापित होईल आणि तो न्यायीपणा आणेल. आणि नंतर प्रामाणिक आणि चांगले लोक तेथे येतील.
[16]वाईट लोकांशी लढायला मला कोणीही मदत केली नाही. वाईट कृत्य करणाऱ्या लोकांशी लढण्यासाठी माझ्या बरोबरीने कोणीही उभे राहिले नाही.
[17]आणि जर परमेश्वराने मला मदत केली नसतीतर मी मेलो असतो.
[18]मी पडायला आलेलो आहे हे मला माहीत आहे, पण परमेश्वराने त्याच्या भक्तांना आधार दिला.
[19]मी खूप चिंताग्रस्त आणि उदास होतो. परंतु परमेश्वरा, तू माझे सांत्वन केलेस.
[20]देवा, तू दुष्ट न्यायाधीशांना मदत करीत नाहीस. ते वाईट न्यायाधीश कायद्याचा दुरुपयोग करून लोकांचे आयुष्य कठीण करतात.
[21]ते न्यायाधीश चांगल्या माणसांवर हल्ला करतात. ते निरपराधी लोक अपराधी आहेत असे म्हणतात. आणि त्यांना ठार मारतात.
[22]परंतु परमेश्वर माझी उंच पर्वतावरची सुरक्षित जागा आहे. देव माझा खडक माझी सुरक्षित जागा आहे.
[23]देव त्या दुष्ट न्यायाधीशांना त्यांनी केलेल्या वाईटकृत्याबद्दल शिक्षा करेल त्यांनी पाप केले म्हणून देव त्यांचा नाश करेल. परमेश्वर आपला देव त्या दुष्ट न्यायाधीशांचा सर्वनाश करेल.

## स्तोत्र 95

[1]चला, परमेश्वराची स्तुती करू या. जो खडक आपल्याला वाचवतो त्याचे गुणगान करू या.
[2]परमेश्वराला धन्यवाद देणारी गाणे गाऊ या. त्याला आनंदी स्तुती गीते गाऊ या.
[3]का? कारण परमेश्वर मोठा देव आहे इतर "देवांवर" राज्य करणारा तो महान राजा आहे.
[4]सगळ्यांत खोल दऱ्या आणि सर्वांत उंच पर्वत परमेश्वराचे आहेत.
[5]महासागरही त्याचाच आहे-त्यानेच तो निर्माण केला. देवाने स्वतच्या हाताने वाळवंट निर्माण केले.
[6]चला, आपण त्याची वाकून उपासना करू या. ज्या देवाने आपल्याला निर्माण केले त्याची स्तुती करू या.
[7]तो आपला देव आहे आणि आपण त्याची माणसे. आपण जर त्याचा आवाज ऐकला तर आपण त्याची मेंढरे होऊ.
[8]देव म्हणतो, "तू मरिबात आणि मस्साच्या वाळवंटात जसा हटवादी होतास तसा होऊ नकोस.
[9]तुझ्या पूर्वजांनी माझी परीक्षा पाहिली त्यांनी माझी पारख केली आणि मी काय करू शकतो ते त्यांना दिसले.
[10]मी त्या लोकांच्या बाबतीत चाळीस वर्षे सहनशील राहिलो आणि ते प्रामाणिक नव्हते हे मला माहीत आहे. त्या लोकांनी माझी शिकवण आचरणात आणायचे नाकारले.
[11]म्हणून मी रागावलो आणि शपथ घेतली की ते माझ्या विसाव्याच्या जागेत प्रवेश करणार नाही."

## स्तोत्र 96

[1]परमेश्वराने ज्या नवीन गोष्टी केल्या त्यांची स्तुती करण्यासाठी नवे गाणे गा. सगळ्या जगाने परमेश्वराच्या स्तुतीचे गाणे गावे.
[2]परमेश्वराला गाणे गा. त्याच्या नावाचा जयजयकार करा. चांगली बातमी सांगा. तो रोज आपला उध्दार करतो ते सांगा.
[3]लोकांना सांगा की देव खरोखरच अद्भुत आहे. देव सगळीकडे ज्या विस्मयजनक गोष्टीकरतो त्याबद्दल सांगा.
[4]परमेश्वर महान आहे आणि स्तुतीला योग्य आहे. तो इतर "देवांपेक्षा" भयंकर आहे.
[5]इतर देशांतले "देव" केवळ पुतळे आहेत. पण परमेश्वराने मात्र स्वर्ग निर्माण केला.
[6]त्याच्या समोर सुंदर तेजोवलय असते. देवाच्या पवित्र मंदिरात शक्ती आणि सौंदर्य असते.
[7]कुटुंबांनो आणि राष्ट्रांनो, परमेश्वरासाठी स्तुतीपर आणि गौरवपर गीते गा.
[8]परमेश्वराच्या नावाचा जयजयकार करा. तुमची अर्पणे घेऊन मंदिरात जा.
[9]परमेश्वराची त्याच्या सुंदर मंदिरात उपासना करा. पृथ्वीवरचा प्रत्येक माणूस परमेश्वराची उपासना करो.
[10]सगळ्या राष्ट्रांना सांगा की परमेश्वर राजा आहे म्हणून जगाचा नाश होणार नाही. परमेश्वर लोकांवर न्यायाने राज्य करेल.
[11]स्वर्गांनो, सुखी राहा! पृथ्वीमाते आनंदोत्सव कर. समुद्र आणि त्यातील प्राण्यांनो आनंदोत्सव करा.
[12]शेते आणि त्यात उगवणारे सर्व सुखी व्हा. जंगलातल्या वृक्षांनो गा आणि सुखी व्हा.
[13]परमेश्वर येत आहे म्हणून आनंदी व्हा परमेश्वर जगावर राज्य करायला येत आहे. तो जगावर न्यायाने आणि सत्याने राज्य करेल.

## स्तोत्र 97

[1]परमेश्वर राज्य करतो आणि पृथ्वी आनंदित होते. दूरदूरचे प्रदेश आनंदित होतात.
[2]परमेश्वराच्या भोवती दाट काळे ढग आहेत. चांगुलपणा आणि न्याय त्याच्या राज्याला मजबुती आणतात.
[3]अग्नी परमेश्वराच्या पुढे जातो आणि शत्रूंचा नाश करतो.

4त्याची वीज आकाशात चमकते. लोक ती बघतात आणि घाबरतात.
5परमेश्वरासमोर पर्वत मेणासारखे वितळतात. ते पृथ्वीच्या मालकासमोर वितळतात.
6आकाशांनो, त्याच्या चांगुलपणा विषयी सांगा प्रत्येक माणसाला देवाचे वैभव बघू द्या.
7लोक त्यांच्या मूर्तीची पूजा करतात. ते त्यांच्या “देवाला” नावाजतात. परंतु त्या लोकांना लाज वाटेल. त्यांचे “देव” परमेश्वरापुढे झुकतील आणि त्याची प्रार्थना करतील.
8सियोन ऐक आणि आनंदी हो यहुदाच्या शहरांनो, आनंदी व्हाका? कारण परमेश्वर योग्य निर्णय घेतो.
9परात्पर परमेश्वरा, तू खरोखरच पृथ्वीचा राजा आहेस. तू इतर “देवापेक्षा” खूपच चांगला आहेस.
10जे लोक परमेश्वरावर प्रेम करतात त्यांना वाईट गोष्टी आवडत नाहीत म्हणून देव त्याच्या लोकांना वाचवतो. देव त्याच्या भक्तांना दुष्टांपासून वाचवतो.
11चांगल्या लोकांवर प्रकाश आणि सुख चमकते.
12चांगल्या माणसांनो, परमेश्वरात आनंदी व्हा. त्याच्या पवित्र नावाला मान द्या.

## स्तोत्र 98

*स्तुतिगान*

1परमेश्वराने नवीन आणि अद्भुत गोष्टी केल्या म्हणून त्याच्यासाठी नवीन गाणे गा.
2त्याच्या पवित्र उजव्या बाहूने त्याच्याकडे विजय परत आणला.
3परमेश्वराने राष्टांना त्याची उध्दाराची शक्ती दाखवली. परमेश्वराने त्यांना त्याचा चांगुलपणा दाखवला.
4त्याच्या भक्तांना इस्राएलाच्या लोकांशी असलेला देवाचा प्रामाणिकपणा आठवला. दूरच्या प्रदेशातील लोकांना देवाची वाचवण्याची शक्ती दिसली.
5पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसा, परमेश्वराचा जयजयकार कर. त्वरेने त्याचे गुणवर्णन करायला सुरुवात कर.
6वीणे, परमेश्वराची स्तुती करा. वीणेच्या झंकारांनो, त्याची स्तुती करा.
7कर्णे आणि शिंग वाजवून आपल्या राजाचे, परमेश्वराचे गुणवर्णन करा.
8समुद्र, पृथ्वी आणि त्यावरील सर्व वस्तूंना जोर जोरात गाऊ द्या.
9नद्यांनो, टाव्व्या वाजवा पर्वतांनो, सगळ्यांनी बरोबर गाणे गा.
10परमेश्वरासमोर गा. कारण तो जगावर राज्य करायला येत आहे. तो जगावर न्यायाने राज्य करेल तो लोकांवर चांगुलपणाने राज्य करेल.

## स्तोत्र 99

1परमेश्वर राजा आहे म्हणून राष्ट्रांना भीतीने थरथरु द्या. देव करूबांच्यावर राजा म्हणून बसतो म्हणून जगाला भीतीने थरथरू द्या.
2सियोन मधला परमेश्वर महान आहे. तो सर्व लोकांवरचा महान नेता आहे.
3सर्व लोकांना तुझ्या नावाचा जयजयकार करू दे.देवाचे नाव भीतीदायक आहे. देव पवित्र आहे.
4बलवान राजाला न्यायीपणा आवडतो. देवा, तू चांगुलपणा निर्माण केलास तू चांगुलपणा आणि प्रमाणिकपणा याकोबमध्ये (इस्राएलमध्ये) आणलास.
5परमेश्वर, आपला देव त्याची स्तुती करा. आणि त्याच्या पवित्र पादासनाजवळ त्याची उपासना करा.
6मोशे आणि अहरोन हे त्याचे याजक होते आणि शमुवेल त्याचे नाव घेणाऱ्यांपैकी एक होता. त्यांनी परमेश्वराची प्रार्थना केली आणि त्याने त्यांना उत्तर दिले.

7देव उंच ढगांतून बोलला त्यांनी त्याच्या आज्ञा पाळल्या आणि देवाने त्यांना नियम दिले.
8परमेश्वरा, देवा, तू त्यांच्या प्रार्थनेला उत्तर दिलेस तू त्यांना दाखवलेस की तू क्षमाशील देव आहेस आणि तू वाईट गोष्टी केल्याबद्दल लोकांना शिक्षा करतोस.
9त्याच्या पवित्र पर्वतासमोर वाका आणि त्याची प्रार्थना करा. परमेश्वर, आपला देव खरोखरच पवित्र आहे.

## स्तोत्र 100

*धन्यवाद स्तोत्र.*

1हे पृथ्वी, परमेश्वरासाठी गा.
2परमेश्वराची सेवा करताना आनंदी राहा. परमेश्वरासमोर आनंदी गाणी घेऊन या.
3परमेश्वरच देव आहे हे लक्षात घ्या. त्यानेच आपल्याला निर्माण केले. आपण त्याची माणसे आहोत. आपण त्याची मेंढरे आहोत.
4त्याच्या शहरात धन्यवादाची गाणी घेऊन या. त्याच्या मंदिरात स्तुतिगीते घेऊन या. त्याला मान द्या. त्याच्या नावाचा जयजयकार करा.
5परमेश्वर चांगला आहे. त्याचे प्रेम चिरंजीव आहे. आपण त्याच्यावर कायम विश्वास टाकू शकतो.

## स्तोत्र 101

*दाविदाचे गीत*

1मी प्रेम आणि न्याय याबद्दल गाईन, परमेश्वरा, मी तुला गाण्यातून आळवीन.
2मी अगदी कसोशीने पवित्र शुध्द आयुष्य जगेन. परमेश्वरा, तू माझ्याकडे कधी येशील?

3मी माझ्यासमोर कुठलीही मूर्ती ठेवणार नाही. जे लोक
असे तुझ्याविरुध्द जातात त्यांचा मला तिरस्कार वाटतो.
मी तसे करणार नाही.
4मी प्रामाणिक राहीन. मी वाईट कृत्ये करणार नाही.
5जर एखादा माणूस त्याच्या शेजाऱ्याबद्दल गुप्तपणेवाईट
गोष्टी बोलत असेल तर मी त्या माणसाला थांबवेन. मी
लोकांना गर्विष्ठ होऊ देणार नाही. आणि ते इतरांपेक्षा
चांगले आहेत असे त्यांना वाटू देणार नाही.
6ज्यांच्यावर विश्वास टाकता येईल अशा माणसांनामी
देशभर शोधेन आणि केवळ त्याच लोकांना मी माझी
सेवा करू देईन. जे लोक शुध्द आयुष्य जगतात तेच माझे
सेवक होऊ शकतील.
7मी खोटे बोलणाऱ्यांना माझ्या घरात थारा देणार नाही.
मी खोटारड्यांना माझ्याजवळ फिरकू देणार नाही.
8मी या देशात राहणाऱ्या वाईट लोकांचानेहमी नाश
करेन. दुष्ट लोकांनी परमेश्वराचे शहर सोडून जावे यासाठी
मी त्यांच्यावर जबरदस्ती करेन.

## स्तोत्र 102

***दुखी माणसाची प्रार्थना तो अगदी दुबळा असतो आणि त्याला त्याची कैफियत परमेश्वरासमोर मांडायची असते तेव्हाचे स्तोत्र.***

1परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक आणि माझ्या मदतीसाठी
मारलेल्या हाकेकडे लक्ष दे.
2परमेश्वरा, मी संकटात असताना माझ्याकडे पाठ फिरवू
नकोस. माझ्याकडे लक्ष दे. मी मदतीसाठी ओरडेन तेव्हा
मला लगेच ओ दे.
3माझे आयुष्य धुराप्रमाणे निघून जात आहे. हळू हळू
विझत चाललेल्या आगीप्रमाणे माझे आयुष्य आहे.
4माझी शक्ती निघून गेली आहे. मी वाळलेल्या, मरणाला
टेकलेल्या गवताप्रमाणे आहे. मी जेवण करण्याचे सुध्दा
विसरलो.
5माझ्या दुखामुळे माझे वजन कमी होत आहे.
6मी वाळवंटात राहणाऱ्या घुबडाप्रमाणे एकाकी आहे.
जुन्या पडझड झालेल्या इमारतीतल्या घुबडाप्रमाणे मी
एकाकी आहे.
7मी झोपू शकत नाही. मी छपरावर असलेल्या एकाकी
पक्ष्याप्रमाणे आहे.
8माझे शत्रू नेहमी माझा अपमान करतात. ते माझी
चेष्टा करतात. आणि मला शाप देतात.
9माझे अन्न हे माझे सर्वात मोठे दुख आहे. माझे अश्रू
माझ्या पेयात पडतात.
10का? कारण परमेश्वरा, तू माझ्यावर रागावला आहेस
तू मला वर उचललेस पण नंतर मला दूर फेकून दिलेस.
11दिवस अखेरीला पडणाऱ्या लांब सावल्यांप्रमाणे माझे
आयुष्य आता जवळ जवळ संपत आले आहे. मी वाळलेल्या
आणि मरायला टेकलेल्या गवतासारखा आहे.
12पण परमेश्वरा, तू सदैव असशील तुझे नाव सदा
सर्वकाळ राहील.
13तू उंच जाशील आणि सियोन पर्वताचे सांत्वन
करशील तू सियोनला दया दाखवण्याची वेळ आता
आली आहे.
14तुझ्या सेवकांना सियोनचे दगड आवडतात. त्यांना
त्या शहराची धूळपण आवडते.
15लोक परमेश्वराच्या नावाची उपासना करतील. देवा,
पृथ्वीवरील सर्व राजे तुला मान देतील.
16परमेश्वर सियोन पुन्हा बांधेल लोक पुन्हा त्याचे
गौरव बघतील.
17देवाने जिवंत ठेवलेल्या लोकांच्या प्रार्थनेला तो उत्तर
देईल. देव त्यांची प्रार्थना ऐकेल.
18पुढील पिढीसाठी या गोष्टी लिहून ठेव. आणि पुढे ते
लोक परमेश्वराची स्तुती करतील.
19परमेश्वर त्या वरच्या पवित्र जागेतून खाली पाहील.
परमेश्वर स्वर्गातून खाली पृथ्वीकडे पाहील.
20आणि तो कैद्यांची प्रार्थना ऐकेल. ज्यांना मृत्युदंड
झाला आहे त्यांना तो सोडवेल.
21नंतर सियोनमधले लोक परमेश्वराबद्दल सांगतील.
ते यरुशलेममध्ये त्याच्या नावाची स्तुती करतील.
22सगळी राष्ट्रे एकत्र येतील राज्ये परमेश्वराची एकत्र
सेवा करतील.
23मला माझ्या शक्तीने दगा दिला. माझे आयुष्य कमी
झाले.
24म्हणून मी म्हणालो, "मला तरुणपणी मरू देऊ नकोस.
देवा, तू कायमचाच जगणार आहेस!
25तू खूप पूर्वी जग निर्माण केलेस. तू तुझ्या हातांनी
आकाश निर्माण केलेस.
26जग आणि आकाश संपेल पण तू मात्र सदैव असशील.
ते कापडाप्रमाणे जीर्ण होतील आणि कपड्यांसारखे तू त्यांना
बदलशील ते सगळे बदलले जातील.
27पण देवा, तू मात्र कधीच बदलला जाणार नाहीस. तू
सर्वकाळ राहाशील.
28आज आम्ही तुझे सेवक आहोत. आमची मुले इथे
राहातील. आणि त्यांचे वंशजसुध्दा तुझी उपासना करायला
इथे असतील."

## स्तोत्र 103

***दावीदाचे स्तोत्र***

1माझ्या आत्म्या परमेश्वराचा जयजयकार कर. माझ्या
शरीराच्या प्रत्येक भागाला त्याच्या पवित्र नावाची स्तुती
करू दे.
2माझ्या आत्म्या, परमेश्वराचा जयजयकार कर. आणि
तो खरोखरच दयाळू आहे हे विसरु नकोस.
3देवा, आम्ही केलेल्या सर्व पापांबद्दल क्षमा कर. तो
आमचे सर्व आजार बरे करतो.

4देव थडग्यापासून आमचे आयुष्य वाचवतो आणि तो आम्हांला प्रेम आणि सहानुभूती देतो.
5देव आम्हाला खूप चांगल्या गोष्टी देतो. तो आम्हाला गरूडासारखे परत तरुण बनवतो.
6परमेश्वर न्यायी आहे. जे लोक इतरांकडून दुखी झाले आहेत त्यांना देव न्याय देतो त्यांच्यासाठी देव न्याय आणतो.
7देवाने मोशेला नियम शिकवले, देव ज्या सामर्थ्यशाली गोष्टी करू शकतो त्या त्याने इस्राएलला दाखवल्या.
8परमेश्वर सहानुभूतिपूर्ण आणि दयाळू आहे. देव सहनशील आणि प्रेमाचा सागर आहे.
9परमेश्वर नेहमीच टीका करीत नाही. परमेश्वर आमच्यावर सदैव रागावलेला राहात नाही.
10आम्ही देवाविरुध्द पाप केले पण त्याने आम्हाला त्या पापाला साजेशी शिक्षा केली नाही.
11देवाचे त्याच्या भक्तांबद्दलचे प्रेम हे स्वर्ग पृथ्वीवरजितक्या उंचीवर आहे तितके आमच्यावर आहे.
12आणि देवाने आमची पापे पूर्व आणि पश्चिम एकमेकींपासून जितक्या अंतरावर आहेत तितक्या अंतरावर नेऊन ठेवली.
13वडील मुलांच्या बाबतीत जितके दयाळू असतात तितकाच दयाळू परमेश्वर त्याच्या भक्तांच्या बाबतीत असतो.
14देवाला आमच्याबद्दल सारे काही माहीत असते. आम्ही धुळीपासून निर्माण झालो आहोत हे देवाला माहीत आहे.
15आमचे आयुष्य कमी आहे हे देवाला माहीत आहे. त्याला माहीत आहे की आम्ही गवताप्रमाणे आहोत.
16आम्ही एखाद्या छोट्या रानफुलासारखे आहोत हेदेवाला माहीत आहे. ते फूल लवकर वाढते. गरम वारा वाहायला लागला की ते मरते. आणि थोड्याच वेळात ते फूल कुठे वाढत होते ते देखील कुणी सांगू शकत नाही.
17परंतु परमेश्वराने त्याच्या भक्तांवर नेहमीच प्रेम केले आणि तो सदैव त्याच्या भक्तांवर प्रेम करीत राहाणार आहे. देव त्यांच्या मुलांशी आणि मुलांच्या मुलांशीदेखील चांगला वागणार आहे.
18जे लोक देवाचा करार पाळतात त्यांच्याशी देव चांगला असतो. जे त्याच्या आज्ञा पाळतात त्यांच्याशी देव चांगला असतो.
19देवाचे सिंहासन स्वर्गात आहे आणि तो चराचरावर राज्य करतो.
20देवदूतांनो, परमेश्वराची स्तुती करा. देवदूतांनो, तुम्ही देवाची आज्ञा पाळणारे सामर्थ्यवान सैनिक आहात. तुम्ही देवाचे ऐकता आणि त्याची आज्ञा पाळता.
21परमेश्वराच्या सगळ्या सैन्यांनो देवाची स्तुती करा. तुम्ही त्याचे सेवक आहात. देवाला जे हवे ते तुम्ही करा.
22परमेश्वराने सगळीकडच्या सर्व वस्तू केल्या. देव चराचरावर राज्य करतो. आणि त्या सगळ्यांनी परमेश्वराची स्तुती केली पाहिजे. माझ्या आत्म्या परमेश्वराची स्तुती कर.

## स्तोत्र 104

1माझ्या आत्म्या, परमेश्वराची स्तुती कर.परमेश्वरा, माझ्या देवा, तू खूप महान आहेस. तू तेज आणि गौरव पांघरले आहेस.
2माणसाने अंगरखा घालावा तसातू प्रकाश घालतोस. तू आकाशाला पडद्या प्रमाणे पसरवितोस.
3देवा, तू तुझे घर त्यांच्यावर बांधतोस तू दाटढगांचा रथाप्रमाणे उपयोग करतोस आणि वाऱ्याच्या पंखावर बसून तू आकाशातून संचार करतोस.
4देवा, तू तुझ्या दूतांना वाऱ्यासारखे बनवलेस आणि तुझ्या सेवकांना * अग्नीसारखे.
5देवा, तू पृथ्वीला तिच्या पायावर अशा तऱ्हेनेउ भारलेस की तिचा कधीही नाश होणार नाही.
6तू तिला पाण्याने गोधडीसारखे आच्छादलेस. पाण्याने डोंगरही झाकले गेले.
7परंतु तू आज्ञा केलीस आणि पाणी ओसरले. देवा, तू पाण्याला दटावलेस आणि ते ओसरले.
8पाणी डोंगरावरून खाली दरीत वाहात गेले आणि नंतर ते तू त्याच्यासाठी केलेल्या जागेत गेले.
9तू समुद्राला मर्यादा घातलीस आणि आता पाणी पृथ्वीला कधीही झाकून टाकणार नाही.
10देवा, तू पाण्याला ओढ्यातून झऱ्यात जायला लावतोस. ते डोंगरातल्या झऱ्यातून खाली वाहात जाते.
11झरे सगळ्या रानटी श्वापदांना पाणी देतात.रानगाढवे देखील तिथे पाणी पिण्यासाठी येतात.
12पानपक्षी तेथे वस्ती करतात. ते जवळच्याच झाडांच्या फांद्यांवर बसून गातात.
13देव डोंगरावर पाऊस पाठवतो. देवाने केलेल्या गोष्टी पृथ्वीला जे काही हवे ते सर्व देतात.
14देव जनावरांना खाऊ घालण्यासाठी गवत उगवतो. तो वाढवण्यासाठी आपल्याला वनस्पती देतो. त्यावनस्पती आपल्याला जमिनीतून अन्न देतात.
15देव आपल्याला आनंदित करणारा द्राक्षारस देतो. आपली कातडी मऊ करणारे तेल देतो. आणि आपल्याला बलवान बनवणारे अन्न देतो.
16लबानोन मधले मोठे देवदार वृक्ष परमेश्वराचे आहेत. परमेश्वराने ती झाडे लावली आणि तो त्यांना लागणारे पाणी देतो.
17पक्षी त्या झाडांत आपली घरटी बांधतात. मोठे करकोचे देवदारूच्या झाडातच राहातात.

---

**देवा ... सेवक** हे दोन प्रकारच्या दूतांविषयीचे बोलणे आहे. करूब दूत आणि सेराफ दूत. हिब्रू भाषेत सेराफचा अर्थ “अग्नी” असा आहे.

18रानबकऱ्या उंच पर्वतावर राहातात. मोठ मोठे खडक कोल्ह्यासारख्या प्राण्याची लपून बसायची जागा आहे.

19देवा, तू आम्हाला सण केव्हा येतो ते कळण्यासाठी चंद्र दिलास. आणि सूर्याला केव्हा मावळायचे ते नेहमीच कळते.

20तू काळोखाला रात्र केलेस अशा वेळी रानटी जनावरे बाहेर येतात आणि इकडे तिकडे फिरतात.

21सिंह हल्ला करताना गर्जना करतात. जणू काही ते देवाकडे तू देत असलेल्या अन्नाची मागणी करीत आहेत.

22नंतर सूर्य उगवतो आणि प्राणी आपापल्या घरी परत जाऊन विश्रांती घेतात.

23नंतर लोक त्यांचे काम करायला जातात आणि ते संध्याकाळपर्यंत काम करतात.

24परमेश्वरा, तू अनेक अद्भुत गोष्टी केल्या आहेस तू केलेल्या गोष्टींनी पृथ्वी भरली आहे. तू केलेल्या गोष्टींत आम्हाला तुझे शहाणपण दिसते.

25समुद्राकडे बघ, तो किती मोठा आहे! आणि त्यात किती तरी गोष्टी राहातात. तिथे लहान मोठे प्राणी आहेत. मोजता न येण्याइतके.

26समुद्रात जहाजे जातात. आणि लिव्याथान, तू निर्माण केलेला समुद्रप्राणी, समुद्रात खेळतो.

27देवा, या सगळ्या गोष्टी तुझ्यावरअवलंबून आहेत. तू त्यांना योग्य वेळी अन्न देतोस.

28देवा, तू सर्व प्राणीमात्रांना त्यांचे अन्न देतोस तू तुझे अन्नाने भरलेले हात उघडतोस आणि ते त्यांची तृप्ती होईपर्यंत खातात.

29आणि जेव्हा तू त्यांच्यापासून दूर जातोस तेव्हा ते घाबरतात. त्यांचे आत्मे त्यांना सोडून जातात. ते अशक्त बनतात आणि मरतात आणि त्यांच्या शरीराची परत माती होते.

30पण परमेश्वरा, तू जेव्हा तुझा आत्मा पाठवतोस तेव्हा ते सशक्त होतात आणि तू जमीन पुन्हा नव्या सारखी करतोस.

31परमेश्वराचे वैभव सदैव राहो! परमेश्वराला त्याने केलेल्या गोष्टींपासून आनंद मिळो.

32परमेश्वराने पृथ्वीकडे नुसते बघितले तरीती थरथर कापते. त्याने पर्वताला नुसता हात लावला तरी त्यातून धूर येईल.

33मी आयुष्यभर परमेश्वराला गाणे गाईन. मी जिवंत असे पर्यंत परमेश्वराचे गुणगान करीन.

34मी ज्या गोष्टी बोललो त्यामुळे त्याला आनंद झाला असेल असे मला वाटते. मी परमेश्वराजवळ आनंदी आहे.

35पाप पृथ्वीवरुन नाहीसे होवो. दुष्ट लोक कायमचे निघून जावोत. माझ्या आत्म्या परमेश्वराची स्तुती कर. परमेश्वराची स्तुती कर.

## स्तोत्र 105

1परमेश्वराला धन्यवाद द्या. त्याच्या नावाचा धावा करा. राष्ट्रांना तो करत असलेल्या अद्भुत गोष्टींबद्दल सांगा.

2परमेश्वराला गाणे गा. त्याची स्तुतिगीते गा. तो ज्या अद्भुत गोष्टी करतो त्याबद्दल सांगा.

3परमेश्वराच्या पवित्र नावाचा अभिमान बाळगा. तुम्ही लोक परमेश्वराला शोधत आला सुखी व्हा.

4शक्तीसाठी परमेश्वराकडे जा. मदतीसाठी नेहमी त्याच्याकडे जा.

5तो ज्या आश्चर्यकारक गोष्टी करतो त्याची आठवण ठेवा त्याचे चमत्कार आणि त्याचे शहाणपणाचे निर्णय याची आठवण ठेवा.

6तुम्ही त्याचा सेवक अब्राहाम याचे वंशज आहात तुम्ही याकोबाचे, देवाने निवडलेल्या माणसाचे वंशज आहात.

7परमेश्वर आपला देव आहे. परमेश्वर सर्व जगावर * राज्य करतो.

8परमेश्वर देवाच्या कराराची सदैव आठवण ठेवा. हजारो पिढ्या त्याच्या आज्ञांची आठवण ठेवा.

9देवाने अब्राहाम बरोबर करार केला. देवाने इसहाकला वचन दिले.

10नंतर त्याने याकोबासाठी नियम केला. देवाने इस्राएल बरोबर करार केला. तो सदैव राहील.

11देव म्हणाला, “मी तुला कनानची जमीन देईन. ती जमीन तुझ्या मालकीची होईल.”

12अब्राहामचे कुटुंब लहान होते, तेव्हा देवाने हे वचन दिले ते केवळ काही वेळ तिथे घालवणारे परके लोक होते.

13ते एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात प्रवास करत होते.

14पण देवाने लोकांना त्यांना वाईट वागणूक देऊ दिली नाही. देवाने राजांना त्यांना दुख न देण्याची ताकीद दिली.

15देव म्हणाला, “मी निवडलेल्या माणसांना दुख देऊ नका. माझ्या संदेष्ट्यांचे काही वाईट करू नका.”

16देवाने त्या देशात दुष्काळ आणला. लोकांना खायला पुरेसे अन्न नव्हते.

17पण देवाने योसेफ नावाच्या माणसाला त्यांच्या पुढे पाठवले. योसेफ गुलाम सारखा विकला गेला.

18त्यांनी योसेफाच्या पायाला दोर बांधले. त्यांनी त्याच्या मानेभोवती लोखंडी कडे घातले.

19योसेफाने सांगितलेल्या गोष्टी प्रत्यक्ष घडेपर्यंत तो गुलामच राहिला. परमेश्वराच्या संदेशामुळे योसेफ बरोबर होता हे सिध्द झाले.

20तेव्हा मिसरच्या राजाने त्याला मोकळे सोडले राष्ट्रांच्या प्रमुखाने त्याला तुरुंगातून बाहेर काढले.

---

**परमेश्वर … जग** शब्दशः “त्याच्या आज्ञा सर्व पृथ्वीवर आहेत.”

[21]त्याने योसेफला आपल्या घराचा मुख्य नेमले. योसेफने
त्याच्या मालकीच्या सर्व वस्तूंची काळजी घेतली.
[22]योसेफने इतर प्रमुखांना सूचना दिल्या. योसेफने
वृध्दांना शिकवले.
[23]नंतर इस्राएल मिसरमध्ये आला. याकोब हामच्या
देशातच राहिला.
[24]याकोबाचे कुटुंब खूप मोठे झाले. ते त्यांच्या शत्रूंपेक्षा
खूप बलवान झाले.
[25]म्हणून मिसरचे लोक याकोबच्या कुटुंबाचा द्वेष करू
लागले. त्यांनी त्याच्या गुलामांविरुध्द योजना आखल्या.
[26]म्हणून देवाने त्याचा सेवक मोशे आणि देवाने
निवडलेला त्याचा याजक अहरोन यांना पाठविले.
[27]देवाने मोशे आणि अहरोन यांचा हामच्या देशात अनेक
चमत्कार करण्यात उपयोग करून घेतला.
[28]देवाने अतिशय दाट काळोख पाठवला, पण
मिसरमधल्या लोकांनी त्याचे ऐकले नाही.
[29]म्हणून देवाने पाण्याचे रक्तात रूपांतर केलेआणि सगळे
मासे मेले.
[30]त्यांचा देश बेडकांनी भरून गेला. राजाच्या
शयनकक्षात देखील बेडूक होते.
[31]देवाने आज्ञा केली आणि माशा व चिलटे आली. ती
सगळीकडे होती.
[32]देवाने पावसाचे गारात रूपांतर केले. सर्व देशांत विजा
पडल्या.
[33]देवाने त्यांच्या द्राक्षांच्या वेली व अंजीराची झाडे
नष्ट केली देवाने त्यांच्या देशातले प्रत्येक झाड नष्ट
केले.
[34]देवाने आज्ञा केली आणि टोळ व नाकतोडे आले. ते
संख्येने इतके होते की ते मोजता येत नव्हते.
[35]टोळ व नाकतोड्यांनी देशातली सर्व झाडे खाऊन
टाकली. त्यांनी शेतातली सर्व पिके खाल्ली.
[36]आणि नंतर देवाने त्यांच्या देशातल्या सर्व पहिल्या
अपत्यांना ठार मारले. देवाने त्यांच्या मोठ्या मुलांना मारले.
[37]नंतर देवाने त्याच्या माणसांना मिसरबाहेर काढले.
त्यांनी बरोबर सोने आणि चांदी आणली. देवाचा कुठलाही
माणूस ठेच लागून पडला नाही.
[38]देवाचे लोक गेल्याचे पाहून मिसरला आनंद झाला.
कारण त्यांना देवाच्या लोकांची भीती वाटत होती.
[39]देवाने ढग पांघरुणासारखे पसरले. देवाने अग्निचा
खांबाचा रात्री प्रकाशासाठी उपयोग केला.
[40]लोकांनी अन्नाची मागणी केली आणि देवाने लावे
आणले. देवाने त्यांना स्वर्गातली भाकरी भरपूर दिली.
[41]देवाने खडक फोडला आणि त्यातून पाणी उसळून
बाहेर आले. वाळवटांत नदी वाहू लागली.
[42]देवाला त्याच्या पवित्र वचनाची आठवण होती. देवाला
त्याचा सेवक अब्राहाम याला दिलेल्या वचनाची आठवण
आली.
[43]देवाने त्याच्या माणसांना मिसरमधून बाहेर आणले.
लोक आनंदाने नाचत बागडत, गाणी म्हणत बाहेर आले.
[44]देवाने त्याच्या माणसांना इतर लोक राहात असलेला
देश दिला. देवाच्या माणसांना इतरांनी काम करून
मिळवलेल्या वस्तू मिळाल्या.
[45]देवाने असे का केले? त्याच्या माणसांनी त्याचे नियम
पाळावे म्हणून त्यांनी त्याची शिकवण काळजीपूर्वक
आचरावी म्हणून. परमेश्वराची स्तुती करा.

## स्तोत्र 106

[1]परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वर चांगला आहे म्हणून
त्याला धन्यवाद द्या. देवाचे प्रेम सदैव राहील.
[2]परमेश्वर खरोखरच किती महान आहे याचे वर्णन
कुणीही करू शकणार नाही. देवाची जितकी स्तुती
करायला हवी तितकी कुणीही करू शकणार नाही.
[3]जे लोक देवाच्या आज्ञा पाळतात ते सुखी असतात. ते
लोक सदैव चांगली कृत्ये करतात.
[4]परमेश्वरा, तू जेव्हा तुझ्या माणसांशी दयाळू असतोस
तेव्हा माझी आठवण ठेव. मलाही वाचवायचे आहे हे
लक्षात ठेव.
[5]परमेश्वरा, तू तुझ्या माणसांसाठी ज्या चांगल्यागोष्टी
करतोस त्यांत मला वाटेकरी होऊ दे. मला तुझ्या
माणसांबरोबर आनंदी होऊ दे. मला ही तुझ्या माणसांबरोबर
तुझा अभिमान वाटू दे.
[6]आम्ही आमच्या पूर्वजांसारखेच पाप केले. आम्ही
चुकलो. आम्ही दुष्कृत्ये केली.
[7]परमेश्वरा, मिसरमधले आमचे पूर्वज तू केलेल्या
चमत्कारांपासून काहीही शिकले नाहीत. ते लाल
समुद्राजवळ होते तेव्हा आमचे पूर्वज तुझ्याविरुध्द गेले.
[8]परंतु देवाने आमच्या पूर्वजांचा उध्दार केला तो केवळ
त्याच्या नावा खातर देवाने त्याची महान शक्ती
दाखविण्यासाठी त्यांना वाचवले.
[9]देवाने आज्ञा केली आणि लाल समुद्र कोरडा झाला.
देवाने आमच्या पूर्वजांना खोल समुद्रातून वाळवंटासारख्या
कोरड्या प्रदेशात नेले.
[10]देवाने आमच्या पूर्वजांना त्यांच्या शत्रूंपासून वाचवले.
देवाने त्यांची त्यांच्या शत्रूंपासून सुटका केली.
[11]देवाने त्यांच्या शत्रूंना समुद्रात झाकून टाकले. शत्रूंपैकी
एकही जण सुटू शकला नाही.
[12]नंतर आमच्या पूर्वजांचा देवावर विश्वास बसला. त्यांनी
त्याच्यावर स्तुतिसुमने उधळली.
[13]परंतु आमचे पूर्वज लवकरच देवाने केलेल्या गोष्टी
विसरलेत्यांनी देवाचा उपदेश ऐकला नाही.
[14]आमचे पूर्वज वाळवंटात भुकेले झाले. आणि त्यांनी
शुष्क झालेल्या भूमीत देवाची परीक्षा पाहिली.
[15]परंतु देवाने त्यांना त्यांनी मागितलेल्या गोष्टी दिल्या.
पण त्याने त्यांना भयानक रोगही दिला.

16लोकांना मोशेचा मत्सर वाटला. त्यांनी अहरोनचा, परमेश्वराच्या पवित्र याजकाचा हेवा केला.

17म्हणून देवाने त्या मत्सरी लोकांना शिक्षा केली. जमीन दुभंगली आणि तिने दाथानला गिळले. नंतर ती मिटली आणि तिने अबिरामच्या समुदायाला झाकून टाकले.

18नंतर अग्नीने त्या जमावाला जाळले. अग्नीने त्या दुष्टांना जाळून टाकले.

19त्या लोकांनी होरेब पर्वतावर सोन्याचे वासरु केले. त्यांनी मूर्तीपूजा केली.

20त्या लोकांनी त्याच्या वैभवशाली देवाची गवतखाणाऱ्या बैलाच्या मूर्तीबरोबर अदलाबदल केली.

21देवाने आमच्या पूर्वजांना वाचवले. पण ते मात्र त्याला पूर्णपणे विसरले. ज्या देवाने मिसरमध्ये चमत्कार केलेत्या देवाला ते विसरले.

22देवाने हामच्या देशात अद्भुत गोष्टी केल्या. देवाने लाल समुद्राजवळ भयानक गोष्टी केल्या.

23देवाला त्या लोकांचा नाश करायची इच्छा होती. परंतु मोशेने त्याला थोपवले मोशे देवाचा निवडलेला सेवक होता देव खूप रागावला होता. पण मोशेने त्याचा मार्ग अडविला म्हणून देवाने लोकांचा नाश केला नाही.*

24परंतु नंतर त्या लोकांनी कनानच्या सुंदर देशात जायला नकार दिला. त्या देशात राहाणाऱ्या लोकांचा पराभव करायला देव मदत करेल यावर विश्वास ठेवायला त्यांनी नकार दिला.

25आमच्या पूर्वजांनी देवाचे ऐकायला नकार दिला.

26म्हणून देवाने शपथ घेतली की ते वाळवंटात मरतील.

27देवाने वचन दिले की मी दुसऱ्या लोकांना त्यांच्या वंशजांचा पराभव करू देईन देवाने वचन दिले की मी आमच्या पूर्वजांना भिन्नभिन्न राष्ट्रांमध्ये विखरवून टाकीन.

28नंतर बआल पौर येथे देवाचे लोक बआलची पूजा करण्यास एकत्र जमले. ते जंगली भोजनावळीत सामील झाले आणि मेलेल्या* लोकांना अर्पण केलेले बळी त्यांनी खाल्ले.

29देव त्याच्या माणसांवर खूप रागावला, देवाने त्यांना खूप आजारी पाडले.

30पण फीनहासने देवाची प्रार्थना केली* आणि देवाने आजार थांबवला.

31फीनहासने चांगली गोष्ट केली हे देवाला माहीत होते. देव याची सदैव आठवण ठेवील.

32मरीबा येथे लोक खूप रागावले. आणि त्यांनी मोशेला काही तरी वाईट करायला लावले.

33त्या लोकांनी मोशेला खूप अस्वस्थ केले म्हणून मोशे विचार करण्यासाठी न थांबता बोलला.

34परमेश्वराने लोकांना कनानमध्ये राहाणाऱ्याइतर देशाचा नाश करायला सांगितले. पण इस्राएलाच्या लोकांनी देवाची आज्ञा पाळली नाही.

35ते इतर लोकांत मिसळले आणि ते लोक जे करीत होते तेच त्यांनीही केले.

36ते लोक देवाच्या माणसांसाठी सापळा बनले. ते लोक ज्या देवाची प्रार्थना करीत होते त्याच देवाची पूजा करायला देवाच्या माणसांनी सुरुवात केली.

37देवाच्या माणसांनी स्वतचीच मुले मारली आणि मुले त्या राक्षसांना अर्पण केली.

38देवाच्या माणसांनी निरपराध लोकांना ठार मारले. त्यांनी स्वतच्या मुलांना ठार मारले आणि त्यांना त्या खोट्या देवाला अर्पण केले.

39म्हणून देवाची माणसे त्या इतर माणसांबरोबरअमंगल झाली. देवाची माणसे त्यांच्या देवाशी प्रामाणिक राहिली नाहीत. आणि इतर लोकांनी जी कृत्ये केली तीच त्यांनीही केली.

40देव त्याच्या माणसांवर रागावला. देवाला त्यांचा कंटाळा आला.

41देवाने त्याच्या माणसांना इतर देशांना देऊन टाकले. देवाने त्याच्या शत्रूंना त्यांच्यावर राज्य करू दिले.

42देवाच्या माणसांच्या शत्रूंनी त्यांना आपल्या काबूत ठेवले. आणि त्यांचे आयुष्य कठीण केले.

43देवाने त्याच्या माणसांना खूप वेळा वाचवले. पण ते देवाविरुध्द गेले आणि त्यांना जे करायचे होते ते त्यांनी केले. देवाच्या माणसांनी खूप वाईट गोष्टी केल्या.

44पण जेव्हा जेव्हा देवाची माणसे संकटात होती तेव्हा तेव्हा त्यांनी देवाला मदतीसाठी हाक मारली आणि प्रत्येक वेळी देवाने त्यांची प्रार्थना ऐकली.

45देवाने नेहमी आपल्या कराराची आठवण ठेवली. आणि आपल्या महान प्रेमाने त्यांचे सात्वन केले.

46इतर देशांनी त्यांना कैदी बनवले पण देवाने त्यांना त्याच्या माणसांशी दयाळू राहायला सांगितले.

---

**तेविसावे कडवे** किंवा “देव म्हणाला तो त्यांचा नाश करेल पण त्याने निवडलेल्या मोशेने कुपणामध्ये उभे राहून त्याच्या रागाला विनाश करण्यापासून दूर ठेवले.” यावरून मोशे शत्रूंच्या सैनिकांबरोबर भिंतीतील भगदाडात उभा राहून शहरासाठी (इस्राएल) शत्रू सैन्याबरोबर (देवाचा राग) लढत होता असे दिसते.

**जंगली भोजन ... मेलेले** किंवा “मेलेल्या पुतळ्यांना” मान देण्यासाठी दिलेले बळी खाणे. खोट्या देवांना किंवा मृतलोकांना मान देण्यासाठी लोक बरेचदा थडग्याजवळ भेटत. ही भोजने रानटी जंगली असत कारण लोक तिथे मद्य पिऊन बेहोश होत आणि कित्येक लैंगिक पाप करीत.

**प्रार्थना केली** किंवा मध्यस्थी केली न्याय दिला. फीनेहासने केवळ देवाजवळ प्रार्थनाच केली असे नाही तर त्याने लोकांना ही पाप करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पाहा गणना 25:1–16.

47परमेश्वरा, देवा आमचे रक्षण कर इतर देशातून
आम्हाला गोळाकर म्हणजे आम्ही तुझ्या पवित्र नावाचे
आभार मानू आणि तुझे गुणगान करू.
48परमेश्वराला, इस्राएलाच्या देवाला धन्यवाद द्या. देव
नेहमी राहात आला आहे आणि तो सदैव राहाणार आहे.
आणि सगळे लोक म्हणाले, “आमेन! परमेश्वराची स्तुती
करा.”

## भाग पांचवा

### स्तोत्र 107

1परमेश्वराला धन्यवाद द्या. कारण तो चांगला आहे.
त्याचे प्रेम कायम राहाणार आहे.
2परमेश्वराने ज्याचा उध्दार केला आहे अशा प्रत्येक
माणसाने हे शब्द म्हटले पाहिजेत. परमेश्वराने त्यांना
त्यांच्या शत्रूपासून वाचवले.
3परमेश्वराने त्याच्या माणसांना वेगवेगळ्या देशातून
गोळा करून आणले. त्याने त्याना पूर्व-पश्चिम,
उत्तर-दक्षिण या दिशांतून आणले.
4त्यांतले काही वाळवंटात फिरले. ते राहाण्यासाठी जागा
शोधत होते पण त्यांना शहर सापडले नाही.
5ते खूप भुकेले आणि तान्हेले होते आणि अशक्त होत
होते.

6नंतर त्यांनी परमेश्वराला मदती साठी हाक मारली
आणि त्याने त्यांना त्यांच्या संकटातून वाचवले.
7देव त्यांना सरळ जेथे त्यांना राहायचे होते त्या शहरात
घेऊन गेला.
8परमेश्वराला त्याच्या प्रेमाबद्दल आणि तो ज्या अद्भुत
गोष्टी लोकांसाठी करतो त्याबद्दल धन्यवाद द्या.
9देव तान्हेल्या आत्म्याचे समाधान करतो. देव भुकेल्या
आत्म्याला चांगल्या वस्तूंनी भरतो.
10देवाची काही माणसे कैदी होती आणि काळ्याकुट्ट
तुरूंगात गजांच्या आडबंद होती.
11का? कारण ते देवाने सांगितलेल्या गोष्टीं विरुध्द
भांडलेत्यांनी परात्पर देवाचा उपदेश ऐकायला नकार
दिला.
12त्या लोकांनी केलेल्या गोष्टींबद्दल देवाने त्यांचे आयुष्य
कठीण केले. ते अडखळले आणि पडले. आणि त्यांना
मदत करायला तेथे कुणीही नव्हते.
13ते लोक संकटात होते म्हणून त्यांनी परमेश्वराला
मदतीसाठी हाक मारली. आणि त्याने त्यांना त्यांच्या
संकटापासून वाचवले.
14देवाने त्यांना त्यांच्या अंधार कोठडीतूनबाहेर
काढले,ज्या दोराने त्यांना बांधले होते तो दोर देवाने तोडला.
15त्याच्या प्रेमाबद्दल आणि तो लोकांसाठी ज्याअद्भुत
गोष्टी करतो त्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद द्या.
16देव आपल्याला आपल्या शत्रूंचा पराभव करायला
मदत करतो. देव त्यांचे तांब्याचे दरवाजे मोडू शकतो. देव
त्यांच्या दरवाज्यावरचे लोखंडीगज तोडू शकतो.

17पापयुक्त जीवन पध्दतीमुळे काही लोक मूर्ख बनतात.
आणि अपराधी भावनेमुळे त्यांना पीडा होते.
18त्या लोकांनी खायचे नाकारले आणि ते जवळ जवळ
मेले.
19ते संकटात होते म्हणून त्यांनी परमेश्वराला मदतीसाठी
हाक मारली आणि त्याने त्यांना संकटातून वाचवले.
20देवाने आज्ञा केली आणि त्यांना बरे केले. म्हणून ते
लोक थडग्यात जाण्यापासून बचावले.
21परमेश्वराला त्याच्या प्रेमाबद्दल व तोलोकांसाठी करत
असलेल्या अद्भुत गोष्टींबद्दल धन्यवाद द्या.
22परमेश्वराने जे काही केले त्याबद्दलत्याला धन्यवाद
म्हणून बळी अर्पण करा. परमेश्वराने केलेल्या गोष्टी
आनंदाने सांगा.
23काही लोक बोटीतून समुद्रापार जातात. त्यांचे व्यवसाय
त्यांना महासागरापार घेऊन गेले.
24त्या लोकांनी परमेश्वर काय करू शकतो ते पाहिले.
त्याने समुद्रावर ज्या अद्भुत गोष्टी केल्या त्या त्यांनी
पाहिल्या.
25देवाने आज्ञा केली आणि जोराचा वारा वाहायला
लागला लाटा उंच उंच जायला लागल्या.
26लाटांनी त्यांना खूप उंच आकाशापर्यंत उंच नेले.
आणि खोल समुद्रात खाली टाकले. वादळ इतके भयंकर
होते की लोकांचे धैर्य नाहीसे झाले.
27ते अडखळत होते आणि प्यायलेल्या माणसासारखे
पडत होते. खलाशी म्हणून असलेले त्यांचे कसब निरूपयोगी
होते.
28ते संकटात सापडले म्हणून त्यांनी परमेश्वराला
मदतीसाठी हाक मारली आणि त्याने त्यांना संकटापासून
वाचवले.
29देवाने वादळ थांबवले. त्याने लाटांना शांत केले.
30समुद्र शांत झाला म्हणून खलाशी आनंदित झाले.
आणि देवाने त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या इच्छित स्थळी
आणून पोहोचवले.
31परमेश्वराला त्याच्या प्रेमाबद्दल आणि तो लोकांसाठी
करीत असलेल्या अद्भुत गोष्टींबद्दल धन्यवाद द्या.
32देवाची मोठ्या सभेत स्तुती करा. वयोवृध्द प्रमुख
एकत्र येतात तेव्हा त्याची स्तुती करा.

33देवाने नदीचे वाळवंटात रूपांतर केले. देवाने झऱ्यांचे
वाहाणे बंद केले.
34देवाने सुपीक जमिनीचे क्षारयुक्त ओसाड जमिनीत
रूपांतर केले का? कारण त्या ठिकाणी वाईट लोक
राहात होते.

[35]देवाने वाळवंटाचे पाण्याची तळी असलेल्या जमिनीत रूपांतर केले. देवाने कोरड्या जमिनीतून पाण्याचे झरे वाहायला लावले.

[36]देवाने भुकेल्या लोकांना चांगल्या प्रदेशातून नेले. आणि त्यांनी तिथे राहाण्यासाठी शहर वसवले.

[37]त्या लोकांनी त्यांच्या शेतात बी पेरलेत्यांनी त्यांच्या शेतात द्राक्षं पेरली आणि त्यांना चांगले उत्पन्न आले.

[38]देवाने त्या लोकांना आशीर्वाद दिला. त्यांचे कुटुंब वाढले. त्यांच्या जवळ खूप जनावरे होती.

[39]अरिष्टे आणि संकटे यांमुळे त्यांची कुटुंब लहान आणि अशक्त राहिली.

[40]देवाने त्यांच्या प्रमुखाला लज्जित केले आणि ओशाळवाणे वाटायला लावले आणि त्याला खाली पाहायला लावले. देवाने त्यांना रस्ते नसलेल्या वाळवंटातून हिंडायला लावले.

[41]पण नंतर देवाने त्या गरीब लोकांची संकटातून मुक्तता केली आणि आता त्यांची कुटुंब मेंढ्यांच्या कळपासारखी मोठी आहेत.

[42]चांगले लोक हे बघतात आणि आनंदी होतात. पण दुष्ट लोक ते बघतात आणि काय बोलावे ते त्यांना सुचत नाही.

[43]जर एखादा माणूस शहाणा असला तर त्याला या गोष्टी आठवतील नंतर त्याला देवाचे प्रेम म्हणजे खरोखर काय ते कळून येईल.

## स्तोत्र 108

***दावीदाचे एक स्तुतिगीत.***

[1]देवा, मी तयार आहे. मी गुणगान गायला मनापासून तयार आहे.

[2]वीणांनो आणि सतारींनो, आपण सुर्याला जाग आणू या.

[3]परमेश्वरा, आम्ही तुझी इतर देशांत स्तुती करू. आम्ही इतर लोकांत तुझी स्तुती करू.

[4]परमेश्वरा, तुझे प्रेम आकाशापेक्षाही उंच आहे. तुझे प्रेम सर्वांत उंच अशा ढगापेक्षाही उंच आहे.

[5]देवा, स्वर्गाच्याही वर उंच जा. सर्व जगाला तुझे वैभव पाहु दे.

[6]देवा, तुझ्या मित्रांना वाचवण्यासाठी हे कर. आणि माझ्या प्रार्थनेला उत्तर दे. आणि तुझी महान शक्ती उध्दार करण्यासाठी वापर.

[7]देव त्याच्या मंदिरात बोलला, "मी युध्द जिंकेन आणि विजयाबद्दल आनंदी होईन. आणि मी ही जमीन माझ्या माणसांत वाटून टाकीन. मी त्यांना शखेम आणि सुक्कोथाचे खोरे देईन.

[8]गिलाद आणि मनश्शे माझी असतील. एफ्राईम माझे शिरस्त्राण असेल. यहुदा माझा राजदंड असेल.

[9]मवाब माझे पाय धुण्याचे पात्र असेल. अदोम माझी पादत्राणे नेणारा सेवक असेल. मी पलिष्ट्यांचा पराभव करीन. आणि विजयाबद्दल हर्षनाद करीन."

[10]मला शत्रूच्या किल्ल्यात कोण नेईल? मला अदोमशी लढायला कोण नेईल?

[11]देवा, फक्त तूच मला या गोष्टी करायला मदत करू शकतोस. पण तू आम्हाला सोडून गेलास. तू आमच्या सैन्याबरोबर गेला नाहीस.

[12]देवा, आम्हाला आमच्या शत्रूचा पराभव करायला मदत कर. लोक आम्हांला मदत करू शकत नाहीत.

[13]फक्त देवच आम्हाला बलवान करू शकतो. देव आमच्या शत्रूचा पराभव करू शकतो.

## स्तोत्र 109

***प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तोत्र.***

[1]देवा, माझ्या प्रार्थनेला तुझे कान बंद करू नकोस.

[2]दुष्ट लोक माझ्याविषयी खोटंनांट सांगत आहेत. ते माझ्याबद्दल असत्य गोष्टी सांगत आहेत.

[3]लोक माझ्याबद्दल द्वेषयुक्त गोष्टी सांगत आहेत. ते कारण नसताना माझ्यावर हल्ला करत आहेत.

[4]मी त्यांच्यावर प्रेम केले पण ते माझा द्वेष करतात. म्हणून देवा, मी आता तुझी प्रार्थना करतो.

[5]मी त्या लोकांसाठी चांगल्या गोष्टी केल्या पण ते माझ्यासाठी वाईट गोष्टी करत आहेत. मी त्यांच्यावर प्रेम केले पण ते माझाद्वेष करत होते.

[6]माझ्या शत्रूंनी वाईट गोष्टी केल्या त्याबद्दल त्याला शिक्षा कर. तो चुकला आहे हे सिध्द करण्यासाठी एखादा माणूस शोध.

[7]माझा शत्रू चुकला आणि तो अपराधी आहे हे न्यायाधीशांना ठरवू दे. माझा शत्रू जे काही बोलतो त्यामुळे त्याची परिस्थिती अधिकच बिघडते.

[8]माझ्या शत्रूला लवकर मरू दे. त्याचा व्यवसाय दुसऱ्या माणसाला मिळू दे.

[9]माझ्या शत्रूच्या मुलांना अनाथ आणि त्याच्या बायकोला विधवा कर.

[10]त्यांना त्यांचे घर गमावू दे आणि त्यांना भिकारी होऊ दे.

[11]माझ्या शत्रूंच्या धनकोंना त्याच्याकडचे सगळे घेऊ दे. आणि परक्यांना त्याच्या सर्व श्रमांचे फळ घेऊ दे.

[12]माझ्या शत्रूंशी कुणीही दयाळू असू नये असे मला वाटते. त्याच्या मुलांना कुणी दया दाखवू नये असे मला वाटते.

[13]माझ्या शत्रूचा संपूर्ण नाश कर. पुढच्या पिढीला त्याचे नाव सर्व गोष्टीवरुन काढून टाकू दे.

[14]परमेश्वराला माझ्या शत्रूच्या वडिलांच्या पापांची आठवण करून दिली जाईल असे मला वाटते. आणि

त्याच्या आईची पापे कधीही पुसली जाऊ नयेत असे मला वाटते.

15परमेश्वराला त्या पापांची सदैव आठवण राहील अशी मी आशा करतो. आणि तो लोकांवर माझ्या शत्रूला पूर्णपणे विसरुन जायची शक्ती करेल अशी मी आशा करतो.

16का? कारण त्या दुष्ट माणसाने कधीही काहीही चांगले केले नाही त्याने कधीच कुणावर प्रेम केले नाही. त्याने गरीब, असहाय्य लोकांचे आयुष्य कष्टी केले.

17त्या दुष्ट माणसाला दुसऱ्या लोकांचे वाईट कर असे सांगायला आवडायचे म्हणून त्या वाईट गोष्टी त्या माणसालाच होऊ दे. तो दुष्ट माणूस लोकांचे भले होवो असे कधीही म्हणाला नाही. म्हणून त्याचेही भले होऊ देऊ नकोस.

18शाप हेच त्याचे कपडे असू दे. शाप हेच त्याचे पिण्याचे पाणी असू दे. शाप हेच त्याच्या शरीरावरचे तेल असू दे.

19शाप त्या दुष्ट माणसांच्या शरीराभोवती गुंडाळण्याचे वस्त्र असू दे. आणि शापच त्यांच्या कमरे भोवतीचा पट्टा असू दे.

20परमेश्वर या सगळ्या गोष्टी माझ्या शत्रूंच्याबाबतीत करील अशी मी आशा करतो. जे लोक मला ठार मारायचा प्रयत्न करीत आहेत त्या सर्वांना परमेश्वर या गोष्टी करेल अशी मी आशा करतो.

21परमेश्वरा, तू माझा प्रभु आहेस. म्हणून तुझ्या नावाला गौरव प्राप्त होईल अशा रीतीने मला वागव. माझ्यावर तुझे खूप प्रेम आहे म्हणून मला वाचव.

22मी फक्त एक गरीब, असहाय्य माणूस आहे. मी खरोखरच दुखी आहे आणि माझे हृदयविदीर्ण झाले आहे.

23दिवसाच्या शेवटी येणाऱ्या लांब सावल्यांप्रमाणे माझे आयुष्य संपले आहे असे मला वाटते. कुणीतरी झटकून टाकलेल्या किड्याप्रमाणे मी आहे असे मला वाटते.

24मी भुकेला असल्यामुळे माझ्या गुडघ्यातली शक्ती क्षीण झाली आहे. माझे वजन घटते आहे आणि मी बारीक होत आहे.

25वाईट लोक माझा अपमान करतात. ते माझ्याकडे बघतात आणि त्यांच्या माना हलवतात.

26परमेश्वरा, देवा, मला मदत कर. तुझे खरे प्रेम दाखव आणि माझा उध्दार कर.

27नंतर त्या लोकांना तू मला मदत केल्याचे कळेल. तुझ्या शक्तीनेच मला मदत केली हे त्यांना कळेल.

28ते वाईट लोक मला शाप देतात. परंतु परमेश्वरा, तू मला आशीर्वाद देऊ शकतोस. त्यांनी माझ्यावर हल्ला केला म्हणून त्यांचा पराभव कर नंतर मी, तुझा सेवक आनंदी होईन.

29माझ्या शत्रूंना लाज आण. त्यांना त्यांची लाजच अंगरख्या प्रमाणे घालायला लाव.

30मी परमेश्वराला धन्यवाद दिले. खूप लोकांसमोर मी त्याची स्तुती केली.

31का? कारण परमेश्वर असहाय्य लोकांच्या मदतीसाठी उभा राहातो जे लोक त्यांना ठार मारायची शिक्षा देतात त्यांच्यापासून देव त्यांना वाचवतो.

## स्तोत्र 110

*दावीदाचे एक स्तुतीगीत.*

1परमेश्वर माझ्या प्रभुला म्हणाला, "मी तुझ्या शत्रूंना तुझ्या नियंत्रणाखाली ठेवीन. माझ्याजवळ माझ्या उजव्या बाजूला बस."

2परमेश्वर तुझे राज्य वाढवायला मदत करेल. तुझे राज्य सियोनपाशी सुरु होईल आणि ते तू तुझ्या शत्रूंवर त्यांच्या देशात जाऊन राज्य करशील.

3तू तुझ्या सैन्याची जमावाजमव करशील त्यावेळी तुझे लोक स्वयंसेवक बनून दाखल होतील. त्यांचा खास पोशाख परिधान करतील आणि भल्या पहाटे एकत्र जमतील हे तरुण लोक जमिनीवर जसे दव पडते त्याप्रमाणे तुझ्याभोवती असतील.*

4परमेश्वराने वचन दिले आहे आणि आता तो त्याचे मन बदलणार नाही. "तू सदैव याजक राहिला आहेस मलकिसदेक होता तसा याजक तू आहेस."

5माझा प्रभु तुझ्या उजव्या बाजूला आहे तो रागावेल तेव्हा इतर सर्व राजांचा पराभव करील.

6देव सर्व राष्ट्रांचा न्यायनिवाडा करील सर्व जमीन प्रेतांनी झाकली जाईल आणि बलवान राष्ट्रांच्या नेत्यांना देव शिक्षा करील.

7राजा वाटेत झऱ्याचे पाणी पितो. तो खरोखरच त्याचे मस्तक उचलेल आणि अतिशय सामर्थ्यवान* होईल.

## स्तोत्र 111

1परमेश्वराची स्तुती करा जिथे चांगले लोक एकत्र येतात त्या सभेत मी परमेश्वराला अगदी मनापासून धन्यवाद दिले.

2परमेश्वर अद्भुत गोष्टी करतो दे वाकडून येणाऱ्या चांगल्या गोष्टीलोकांना हव्या असतात.

3देव खरोखरच तेजस्वी उत्कृष्ट आणि अद्भुत गोष्टी करतो. त्याचा चांगुलपणा सदैव असतो.

---

**हे तरुण ... असतील** हेकडवे हिब्रूत समजायला खूप अवघड आहे शब्दश: "जन्मापासून पवित्र तेज तुझेच आहे तुझे तारुण्यांचे दव तुझ्यासाठी अरुणोदयासारखे आहे.

**त्याचे ... सामर्थ्यवान** शब्दश: "तो त्यांचे डोके वर उचलेल याचा अर्थ तो पाणी प्यायल्यानंतर त्याचे डोके वर उचलेल. असा असावा किंवा देव त्याला खूप बलवान आणि महत्व असलेला करेल असा असावा इथे लेखकाला दोन्ही अर्थ अभिप्रेत असावेत."

[4]परमेश्वर कृपाळू आणि दयाळू आहे हे आपल्या लक्षात राहावे म्हणून देव अद्भुत गोष्टी करीत असतो.
[5]देव त्याच्या भक्तांना अन्न देतो. देवाला त्याचा करार नेहमी आठवतो.
[6]देवाने ज्या सामर्थ्यवान गोष्टी केल्या त्यावरून तो आपल्या माणसांना त्यांची जमीन देत आहे हे कळून आले.
[7]देव जे करतो ते चांगले आणि न्यायी असते. त्याच्या सर्व आज्ञांवर विश्वास ठेवणे शक्य असते.
[8]देवाच्या आज्ञा सर्वकाळ असतात. त्या आज्ञा देण्यामागची देवाची कारणे खरी आणि शुध्द होती.
[9]देव आपल्या माणसांना वाचवतो. देवाने आपला करार सर्वकाळासाठी केला, देवाचे नाव भीतिदायक आणि पवित्र आहे.
[10]शहाणपणाची सुरुवात देवाबद्दलच्या भीतीने आणि आदराने होते. जे लोक देवाचे आज्ञाधारक असतात ते शहाणे असतात. देवाला सदैव स्तुतिगीते गायली जातील.

## स्तोत्र 112

[1]परमेश्वराची स्तुती करा. जो माणूस परमेश्वराला भितो आणि त्याचा आदर करतो तो आनंदी राहील. त्या माणसाला देवाच्या आज्ञा आवडतात.
[2]त्याचे वंशज पृथ्वीवर महान होतील. चांगल्या लोकाच्या वंशजांना खरोखरच आशीर्वाद लाभतील.
[3]त्या माणसाचे कुटुंब श्रीमंत होईल आणि त्याचा चांगुलपणा सदैव राहील.
[4]चांगल्या लोकांना देव म्हणजे अंधारात चमकणारा प्रकाश वाटतो. देव चांगला, दयाळू आणि कृपाळू आहे.
[5]माणसाने दयाळू आणि उदार असणे चांगले असते. माणसाने त्याच्या व्यापार उद्योगात सचोटीने वागणे चांगले असते.
[6]तो माणूस कधीही पडणार नाही. चांगला माणूस सदैव आठवणीत राहील.
[7]त्याला वाईट बातमीची भीती वाटणार नाही. त्या माणसाचा विश्वास दृढ असेल कारण त्याचा परमेश्वरावर विश्वास आहे.
[8]ज्याच्याजवळ दृढ विश्वास आहे त्याला भीती वाटणार नाही. तो त्याच्या शत्रूचा पराभव करेल.
[9]तो माणूस सहजपणे गरीबांना वस्तू देतो आणि त्याचा चांगुलपणा सदैव असतो.
[10]दुष्ट लोक हे बघतात आणि रागावतात. ते रागाने त्यांचे दांत खातील आणि नंतर ते नाहीसे होतील दुष्ट लोकांना जे खूप हवेहवेसे वाटते ते मिळणार नाही.

## स्तोत्र 113

[1]परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वराच्या सेवकांनो त्याची स्तुती करा. परमेश्वराच्या नावाचे गुणगान करा.
[2]परमेश्वराचे नाव आता आणि सदैव धन्य व्हावे असे मला वाटते.
[3]पूर्वेला सूर्य उगवतो तिथपासून ते तो जिथे मावळतो तिथपर्यंत परमेश्वराच्या नावाचे गुणगान व्हावे असे मला वाटते.
[4]परमेश्वर सगळ्या देशांपेक्षा उंच आहे. त्याचे तेज आकाशापेक्षा उंच जाते.
[5]कुणीही माणूस आमचा देव, जो परमेश्वर आहे त्याच्यासारखा नाही. देव स्वर्गात उंच बसतो.
[6]देव आमच्या वर इतका उंच आहे की त्याला आकाश आणि पृथ्वी यांकडे खाली वाकून बघावे लागते.
[7]देव गरीब लोकांना घाणीतून वर उचलतो. देव भिकाऱ्यांना कचऱ्याच्या ढिगातून काढतो.
[8]आणि देव त्या लोकांना महत्व देतो.
देव त्या लोकांना महत्वाचे नेते बनवतो.
[9]स्त्रीला मूल होत नसेल तर देव तिला मुले देईलआणि तिला आनंदी करेल परमेश्वराची स्तुती करा.

## स्तोत्र 114

[1]इस्राएलने मिसर देश सोडला. याकोबाने (इस्राएल) तो परका देश सोडला.
[2]यहुदा त्याचे निवडक राष्ट्र बनले इस्राएल त्याचे राज्य झाले.
[3]लाल समुद्राने हे पाहिले आणि तो पळून गेला. यार्देन नदी वळली आणि पळाली.
[4]पर्वत मेंढ्यांसारखा नाचला. टेकड्या कोकरासारख्या नाचल्या.
[5]लाल समुद्रा, तू का पळून गेलास? यार्देन नदीतू का वळलीस आणि का पळून गेलीस?
[6]पर्वतांनो तुम्ही मेंढ्यांसारखे का नाचलात? आणि टेकड्यांनो तुम्ही कोकरासारखेका नाचलात?
[7]पृथ्वी प्रभुसमोर, याकोबाच्या देवासमोर थरथर कापली.
[8]देवानेच खडकातून पाणी वहायला लावले देवानेच कठीण खडकातून झरे वाहायला लावले.

## स्तोत्र 115

[1]परमेश्वरा, आम्हाला कुठलाही सन्मान मळायला नको. सन्मान तुझा आहे, तुझ्या प्रेमामुळे आणि आमच्या तुझ्यावर असलेल्या विश्वासामुळे सन्मान तुझा आहे.
[2]आमचा देव कुठे आहे, याचा राष्ट्रांना का विचार पडावा?
[3]देव स्वर्गात आहे आणि त्याला हवे ते तो करतो.
[4]त्या देशांचे "देव" सोन्या चांदीचे नुसते पुतळे आहेत. कुणीतरी केलेले ते नुसते पुतळे आहेत.
[5]त्या पुतळ्यांना तोंड आहे पण बोलता येत नाही. त्यांना डोळे आहेत पण बघता येत नाही.

[6]त्यांना कान आहेत पण ऐकू येत नाही त्यांना नाक आहे पण वास घेता येत नाही.

[7]त्यांना हात आहेत पण हाताने स्पर्श करत नाही. त्यांना पाय आहेत पण चालता येत नाही आणि त्यांच्या घशातून कुठलाही आवाज येत नाही.

[8]ज्या लोकांनी असे पुतळे केले आणि त्यावर जे विश्वास ठेवतात ते त्या पुतळ्यांसारखेच होतात.

[9]इस्राएलाच्या लोकांनो, परमेश्वरावर विश्वास ठेवा. परमेश्वराच त्यांची शक्ती आणि ढाल आहे.

[10]अहरोनच्या कुटुंबा, परमेश्वरावर विश्वास ठेव.परमेश्वराच त्यांची शक्ती आणि ढाल आहे.

[11]परमेश्वराच्या भक्तांनो, परमेश्वरावर विश्वास ठेवा. परमेश्वराच त्यांची शक्ती आणि ढाल आहे.

[12]परमेश्वर आमची आठवण ठेवतो. परमेश्वर आम्हाला आशीर्वाद देईल. परमेश्वर इस्राएलला आशीर्वाद देईल. परमेश्वर अहरोनच्या कुटुंबाला आशीर्वाद देईल.

[13]परमेश्वर त्याच्या लहान आणि मोठ्या भक्तांना आशीर्वाद देईल.

[14]परमेश्वर तुला आणि तुझ्या मुलांना अधिकाधिक आशीर्वाद देईल. अशी मी आशा करतो.

[15]परमेश्वरानेच स्वर्ग व पृथ्वी निर्माण केली आणि परमेश्वर तुमचे स्वागत करतो.

[16]स्वर्ग परमेश्वराचा आहे. पण त्यांने लोकांना पृथ्वी दिली.

[17]मृत लोक परमेश्वराची स्तुती करीत नाहीत.जे लोक खाली थडग्यात आहेत ते परमेश्वराची स्तुती करीत नाहीत.

[18]पण आता आम्ही परमेश्वराला धन्यवाद देतो आणि आम्ही त्याला सदैव धन्य मानू. परमेश्वराची स्तुती करा.

## स्तोत्र 116

[1]परमेश्वर माझी प्रार्थना ऐकतो ते मला खूप आवडते.

[2]मी त्याला मदतीसाठी हाक मारतो आणि ती तो ऐकतो ते मला खूप आवडते.

[3]मी जवळ जवळ मेलो होतो. मृत्यूचे दोर माझ्या भोवती आवळले गेले होते. माझ्या भोवती थडगे आवळले जात होते. मी खूप घाबरलो होतो आणि चिंतित झालो होतो.

[4]नंतर मी परमेश्वराचे नाव घेतले. मी म्हणालो, “परमेश्वरा, मला वाचव.”

[5]परमेश्वर खूप चांगला आणि कृपाळू आहे. देव दयाळू आहे.

[6]परमेश्वर असहाय्य लोकांची काळजी घेतो. मला कोणाची मदत नव्हती आणि परमेश्वराने माझा उध्दार केला.

[7]माझ्या आत्म्या शांत हो! परमेश्वर तुझी काळजी घेतो आहे.

[8]देवा, तू माझ्या आत्म्याला मृत्यूपासून वाचवले स.तू माझे अश्रू थोपविलेस. तू मला पतनापासून वाचविलेस.

[9]मी सजीवांच्या भूमीत परमेश्वराची सेवा करणे चालूच ठेवीन.

[10] “माझा सत्यानाश झाला” असे मी म्हणालो तरी मी विश्वास ठेवणे चालूच ठेवले.

[11]मी घाबरलो होतो तेव्हा सुध्दा मी म्हणालो, होतो सगळे लोक खोटारडे आहेत.

[12]मी परमेश्वराला काय देऊ शकतो? माझ्या जवळ जे आहे ते मला परमेश्वरानेच दिले आहे.

[13]त्याने मला वाचवले म्हणून मी त्याला पेय अर्पण करीन*आणि मी परमेश्वराला त्याच्या नावाने हाक मारीन.

[14]मी परमेश्वराला कबूल केलेल्या गोष्टी देईन. आता मी त्याच्या लोकांसमोर जाईन.

[15]परमेश्वराच्या एखाद्या भक्ताचा मृत्यू परमेश्वराच्या दृष्टीने महत्वपूर्ण असतो. परमेश्वरा, मी तुझा सेवक आहे.

[16]मी तुझा सेवक आहे. मी तुझी दासी असलेल्या स्त्रीचा मुलगा आहे. परमेश्वरा, तू माझा पहिला गुरु आहेस.

[17]मी तुला धन्यवाद म्हणून स्तुति अर्पण करीन. मी परमेश्वराचे नामस्मरण करीन.

[18]मी कबूल केलेल्या गोष्टी परमेश्वराला देईन. आता मी त्याच्या सर्व लोकांसमोर जाईन.

[19]मी यरुशले ममधल्या मंदिरात जाईन. परमेश्वराचा जयजयकार करा.

## स्तोत्र 117

[1]सर्व देशांनो, परमेश्वराची स्तुती करा. सर्व लोकांनो परमेश्वराची सुती करा.

[2]देव आपल्यावर खूप प्रेम करतो आणि देव आपल्याशी सदैव खरा वागतो. परमेश्वराचा जयजयकार करा!

## स्तोत्र 118

[1]परमेश्वर चांगला आहे म्हणून त्याचा सन्मान करा. त्याचे खरे प्रेम सदैव चालू राहील.

[2]इस्राएल, म्हण “त्याचे खरे प्रेम सदैव चालू राहील.”

[3]याजकांनो, म्हणा, “त्याचे खरे प्रेम सदैव चालू राहील.”

[4]परमेश्वराची उपासना करणाऱ्या लोकांनो, म्हणा, “त्याचे खरे प्रेम सदैव चालू राहील.”

[5]मी संकटात होतो म्हणून परमेश्वराला मदतीसाठी हाक मारली. परमेश्वराने मला उत्तर दिले आणि मला सोडवले.

[6]परमेश्वर माझ्या बरोबर आहे म्हणून मी घाबरणार नाही. लोक मला त्रास देण्यासाठी काहीही करू शकणार नाहीत.

[7]परमेश्वर मला मदत करणारा आहे. माझ्या शत्रूंचा पराभव झालेला मी बघेन.

[8]परमेश्वरावर विश्वास ठेवणे हे लोकांवर विश्वास ठेवण्यापेक्षा अधिक चांगले.

9परमेश्वरावर विश्वास ठेवणे हे तुमच्या नेत्यावर विश्वास ठेवण्यापेक्षा अधिक चांगले.
10बऱ्याच शत्रूंनी मला घेरले होते. परंतु परमेश्वराच्या शक्तीमुळे मी माझ्या शत्रूंचा पराभव केला.
11शत्रूंनी मला पुन्हा पुन्हा घेरले, मी त्यांचा परमेश्वराच्या शक्तीने पराभव केला.
12शत्रूंनी मला मधमाशांच्या थव्याप्रमाणे घेरले होते. परंतु त्यांचा पटकन् जळून जाणाऱ्या झुडपाप्रमाणे लवकरच नाश झाला. मी त्यांचा परमेश्वराच्या शक्तीने पराभव केला.

13माझ्या शत्रूने माझ्यावर हल्ला केला आणि माझा जवळ जवळ सर्वनाश केला परंतु परमेश्वराने मला मदत केली.
14परमेश्वर माझी शक्ती आणि माझे विजयगान आहे. परमेश्वर मला वाचवतो.
15चांगल्या लोकांच्या घरात चाललेला विजयोत्सव तुम्ही ऐकू शकता. परमेश्वराने पुन्हा त्याच्या महान ताकतीचे दर्शन घडवले.
16परमेश्वराचे हात विजयामुळे उंचावले आहेत. परमेश्वराने पुन्हा त्याच्या महान ताकतीचेदर्शन घडवले.
17मी जगेन आणि मरणार नाही आणि परमेश्वराने काय काय केले ते मी सांगेन.
18परमेश्वराने मला शिक्षा केली परंतु त्याने मला मरू दिले नाही.
19चांगल्या दरवाजांनो, माझ्यासाठी उघडा. मी आत येईन आणि परमेश्वराची उपासना करीन.
20ते परमेश्वराचे दरवाजे आहेत आणि केवळ चांगले लोकच त्यातून आत जाऊ शकतात.
21परमेश्वरा, माझ्या प्रार्थनेला उत्तर दिलेस म्हणून मी तुला धन्यवाद देतो. तू माझा उध्दार केलास म्हणून मी तुला धन्यवाद देतो.
22इमारत बांधणाऱ्यांना जो दगड नको होता तो कोनाशिला झाला.
23हे परमेश्वराने घडवून आणले आहे आणि ते अतिशय अद्‌भुत आहे असे आम्हाला वाटते.
24आजचा दिवस परमेश्वरानेच घडवला आहे. आपण आज मौज करू आणि सुखी होऊ.
25 लोक म्हणाले, "परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वराने आपला उध्दार केला.*
26परमेश्वराचे नाव घेऊन येणाऱ्या माणसाचे स्वागत करा. "याजकांनी उत्तर दिले, "परमेश्वराच्या घरी आम्ही तुझे स्वागत करतो."

**परमेश्वराची ... उध्दार केला** शब्दश: "परमेश्वरा कृपा करू आम्हाला वाचव. आम्हाला यशस्वी कर." युध्द जिंकून परत येणाऱ्या राजाला मान देण्यासाठी ही विजयी आरोळी आहे.

27परमेश्वर देव आहे आणि तो आपला स्वीकार करतो. बळी देण्यासाठी कोकराला बांधून ठेवा आणि त्याला वेदीच्या कोपऱ्यावर न्या.
28परमेश्वरा, तू माझा देव आहेस आणि मी तुला धन्यवाद देतो. तुझी स्तुती करतो.
29परमेश्वर चांगला आहे म्हणून त्याची स्तुती करा. त्याचे खरे प्रेम सदैव टिकणारे आहे.

## स्तोत्र 119

### आलेफ

1शुध्द आयुष्य जगणारे लोक सुखी आहेत. ते लोक परमेश्वराची शिकवण पाळतात.
2जे लोक परमेश्वराचा करार पाळतात ते सुखी आहेत ते परमेश्वराच्या आज्ञा मनापासून पाळतात.
3ते लोक वाईट गोष्टी करीत नाहीत. ते परमेश्वराच्या आज्ञा पाळतात.
4परमेश्वरा, तू आम्हाला तुझ्या आज्ञा दिल्यास आणि त्या आज्ञा पूर्णपणे पाळायला तू आम्हाला सांगितलेस.
5परमेश्वरा, मी जर नेहमी तुझे नियम पाळले.
6तर मी जेव्हा तुझ्या आज्ञांचा अभ्यास करीन तेव्हा मला कधीही लाज वाटणार नाही.
7मी जेव्हा तुझा चांगलुपणा आणि न्यायीपणा यांचा अभ्यास करीन तेव्हा मी तुला खरोखरच मान देईन.
8परमेश्वरा, मी तुझ्या आज्ञा पाळेन. तेव्हा कृपाकरून मला सोडून जाऊ नकोस.

### बेथ

9तरुण माणूस शुध्द आयुष्य कसे जगू शकेल? तू दिलेली शिकवण आचरणात आणून.
10मी मनापासून देवाची सेवा करायचा प्रयत्न करतो. देवा, तुझ्या आज्ञा पाळण्यासाठी मला मदत कर.
11मी काळजीपूर्वक तुझी शिकवण अभ्यासतो. का? म्हणजे मी तुझ्याविरुध्द पाप करणार नाही.
12परमेश्वरा, तुझे कल्याण असो मला तुझे नियम शिकव.
13मी तुझ्या सगळ्या शहाणपणाच्या निर्णयांबद्दल बोलेन.
14तुझ्या कराराचा अभ्यास करणे मला इतर कशाही पेक्षा आवडते.
15मी तुझ्या नियमांबद्दल चर्चा करेन. मी तुझी जीवन जगण्याची पध्दत आचरेन.
16मला तुझे नियम आवडतात. मी तुझे शब्द विसरणार नाही.

### गीमेल

17माझ्याशी, तुझ्या सेवकाशी चांगला वाग, म्हणजे मी जिवंत राहू शकेन. आणि तुझ्या आज्ञा पाळू शकेन.

[18]परमेश्वरा, माझे डोळे उघड मला तुझ्या शिकवणीकडे
बघू दे. आणि तू केलेल्या अद्भुत गोष्टीबद्दल वाचू दे.
[19]मी या देशात परका आहे. परमेश्वरा, तुझी शिकवण
माझ्या पासून लपवू नकोस.
[20]तू घेतलेल्या निर्णयांचा मला सतत अभ्यास करावासा
वाटतो.
[21]परमेश्वरा, तू गर्विष्ठ लोकांवर सदैव टीका करतोस.
त्यांचे वाईट होईल. ते तुझ्या आज्ञा पाळायचे नाकारतात.
[22]मला शरम वाटू देऊ नकोस. मला लाज आणू नकोस.
मी तुझा करार पाळला आहे.
[23]नेते सुध्दा माझ्या विषयी वाईट बोलतात.पण परमेश्वरा,
मी तुझा सेवक आहे आणि मी तुझ्या नियमांचा अभ्यास
करतो.
[24]तुझा करार माझा सर्वांत चांगला मित्र आहे. तो मला
चांगला उपदेश करतो.

### दालेथ

[25]मी लवकरच मरणार आहे. परमेश्वरा, आज्ञा कर
आणि मला जगू दे.
[26]मी तुला माझ्या आयुष्या बद्दल सांगितले आणि तू
मला उत्तर दिलेस. आता मला तुझे नियम शिकव.
[27]परमेश्वरा, तुझे नियम समजून घेण्यासाठी मला मदत
कर. तू ज्या आश्चर्यकारक गोष्टी केल्या आहेस त्या
मला अभ्यासू दे.
[28]मी खिन्न आणि दमलेलो आहे. आज्ञा कर आणि
मला परत बलवान बनव.
[29]परमेश्वरा, मला खोटं जगू देऊ नकोस. मला तुझ्या
शिकवणीने मार्गदर्शन कर.
[30]परमेश्वरा, मी तुझ्याशी इमानदार राहायचे ठरवले.
मी अगदी काळजीपूर्वक तू शहाणपणाने घेतलेल्या निर्णयांचा
अभ्यास करतो.
[31]मी तुझ्या कराराशी चिकटून राहातो. परमेश्वरा,
माझी निराशा करू नकोस.
[32]मी तुझ्या आज्ञांचे आनंदाने पालन करीन. परमेश्वरा,
तुझ्या आज्ञा मला आनंदित करतात.

### हे

[33]परमेश्वरा, मला तुझे नियम शिकव आणि मी त्यांचे
पालन करीन.
[34]मला तुझी शिकवण समजून घ्यायला मदत करआणि
मी ती पूर्णपणे पाळीन.
[35]परमेश्वरा, मला तुझ्या आज्ञांच्या मार्गाकडे घेऊन
जा.मला जीवन जगायचा तो मार्ग अगदी मनापासून
आवडतो.
[36]श्रीमंत कसे व्हायचे हे शिकवण्यापेक्षा मला तुझ्या
कराराचा विचार करण्यासाठी मदत कर.
[37]परमेश्वरा, कवडी मोलाच्या गोष्टीं कडे मला बघू
देऊ नकोस. मला तुझ्या मार्गाने जीवन जगायला मदत
कर.
[38]तू जे कबूल केलेस ते तुझ्या सेवकासाठी कर. मग
लोक तुला मान देतील.
[39]परमेश्वरा, मला ज्या शरमेची भीती वाटते ती घेऊन
जा.तुझे शहाणपणाचे निर्णय चांगले आहेत.
[40]बघ, मला तुझ्या आज्ञा आवडतात. मला चांगले वागव
आणि मला जगू दे.

### वाव

[41]परमेश्वरा, मला तुझे खरे प्रेम दाखव. कबूल
केल्याप्रमाणे तू मला वाचव.
[42]त्यावेळी ज्या लोकांनी माझा पाणउतारा केला होता
त्यांना द्यायला माझ्याजवळ उत्तर असेल परमेश्वरा, तू
सांगतोस त्या गोष्टींवर माझा खरोखरच विश्वास आहे.
[43]मला नेहमी तुझ्या खऱ्या शिकवणी बद्दल बोलू
दे.परमेश्वरा, मी तुझ्या शहाणपणाच्या निर्णयावर अवलंबून
आहे.
[44]परमेश्वरा, मी सदैव तुझ्या शिकवणुकी प्रमाणे चालेन.
[45]म्हणजे मी मुक्त होईनका? कारण मी तुझे नियम
पाळायचा आटोकाट प्रयत्न करतो.
[46]मी तुझ्या कराराबद्दल राजांजवळ बोलेन आणि ते
मला शरमिंदे करणार नाहीत.
[47]मला तुझ्या आज्ञांचा अभ्यास करायला आवडते.
परमेश्वरा, मला त्या आज्ञा आवडतात.
[48]परमेश्वरा, मी तुझ्या आज्ञांची स्तुती करतो. मला
त्या आवडतात आणि मी त्यांचा अभ्यास करीन.

### जायिन

[49]परमेश्वरा, तू मला दिलेल्या वचनाची आठवण ठेव.
ते वचन माझ्या मनात आशा निर्माण करते.
[50]मी पीडित होतो दुखी होतो आणि तू माझे सांत्वन
केलेस. तुझ्या शब्दांनी मला परत जगायला लावले.
[51]जे लोक स्वतला माझ्यापेक्षा चांगले समजतात त्यांनी
माझा सतत अपमान केला. पण मी तुझ्या शिकवणी
नुसार वागणे सोडले नाही.
[52]मी नेहमी तुझ्या शहाणपणाच्या निर्णयांची आठवण
ठेवतो. परमेश्वरा, तुझे निर्णय मला समाधान देतात, माझे
सांत्वन करतात.
[53]दुष्ट लोक तुझी शिकवण आचरणे सोडून देतात. ते
पाहिले की मला राग येतो.
[54]घरात तुझे नियम हीच माझी गाणी आहेत.
[55]परमेश्वरा, रात्री मला तुझे नाव आणि तुझी शिकवण
आठवते.
[56]असे घडते कारण मी अगदी काळजी पूर्वक तुझी
आज्ञा पाळतो.

## हेथ

57परमेश्वरा, तुझ्या आज्ञा पाळणे हेच माझे कर्तव्य आहे, असा निर्णय मी घेतला आहे.
58परमेश्वरा, मी पूर्णपणे तुझ्यावर अवलंबून आहे. वचन दिल्याप्रमाणे तू माझ्याशी दयाळूपणे वाग.
59मी माझ्या आयुष्याचा अगदी काळजी पूर्वक विचार केला आणि मी तुझ्या कराराकडे परत आलो.
60अजिबात उशीर न करता मी तुझ्या आज्ञा पाळायला धावत आलो.
61वाईट लोकांनी माझ्याविषयी काही अनुदार उद्गार काढले. पण परमेश्वरा, मी तुझी शिकवण विसरलो नाही.
62मी मध्यरात्री तू घेतलेल्या तुझ्या चांगल्या निर्णयांबद्दल तुला धन्यवाद देण्यासाठी उठतो.
63जो कुणी तुझी उपासना करतो त्याचा मी मित्र आहे. जो कुणी तुझ्या आज्ञा पाळतो त्याचा मी मित्र आहे.
64परमेश्वरा, तुझे खरे प्रेम पृथ्वी व्यापून टाकते. मला तुझे नियम शिकव.

## तेथ

65परमेश्वरा, तू माझ्यासाठी, तुझ्या सेवकासाठी चांगल्या गोष्टी केल्यास. तू ज्या गोष्टी करण्याचे वचन दिले होते सत्याच गोष्टी केल्यास.
66परमेश्वरा, योग्य निर्णय घेण्याविषयीचे ज्ञान मला दे. माझा तुझ्या आज्ञांवर विश्वास आहे.
67दुख सोसण्यापूर्वी मी बऱ्याच चुकीच्या गोष्टी केल्या परंतु आता मी तुझ्या आज्ञा काळजी पूर्वक पाळतो.
68देवा, तू चांगला आहेस आणि तू चांगल्या गोष्टी करतोस. मला तुझे नियम शिकव.
69जे लोक स्वतला माझ्यापेक्षा चागले समजतात त्यांनी माझ्याबद्दल खोटं सांगितलं पण परमेश्वरा, मी तरी ही अगदी मनापासून तुझ्या आज्ञा पाळणे चालूच ठेवले.
70ते लोक फार मूर्ख* आहेत पण मला तुझ्या शिकवणीचा अभ्यास करणे फार आवडते.
71मी दुख सोसले ते चांगले झाले. त्यामुळेच मला तुझे नियम समजले.
72परमेश्वरा, तूझी शिकवण माझ्यासाठी फार चांगली आहे. ती सोन्याच्या व चांदीच्या हजार तुकड्यांपेक्षा चांगली आहे.

## योद

73परमेश्वरा, तूच मला निर्माण केलेस आणि तू मला तुझ्या हाताचा आधार देतोस. तुझ्या आज्ञा शिकण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी मला मदत कर.
74परमेश्वरा, तुझे भक्त मला पाहातात आणि मला मान देतात. तू जे सांगतोस त्यावर मी विश्वास ठेवतो म्हणून ते आनंदी आहेत.
75परमेश्वरा, तुझे निर्णय योग्य असतात हे मला माहीत आहे. आणि तू मला शिक्षा केलीस तेही योग्यच होते.
76आता तुझ्या खऱ्या प्रेमाने माझे सांत्वन कर. तू वचन दिल्याप्रमाणे माझे सांत्वन कर.
77परमेश्वरा, माझे सांत्वन कर आणि मला जगू दे. मला तुझी शिकवण मनापासून आवडते.
78जे लोक स्वतला माझ्यापेक्षा चांगले समजतात त्यांनी माझ्याविषयी खोटं सांगितलं त्यालोकांना आता लाज वाटेल अशीमी आशा करतो.परमेश्वरा, मी तुझ्या कराराचा अभ्यास करतो.
79तुझे भक्त माझ्याकडे परत येतीलअशी मी आशा करतो. म्हणजे मग ते तुझ्या कराराचा अभ्यास करू शकतील.
80परमेश्वरा, मला तुझ्या आज्ञा पूर्णपणे पाळू दे. म्हणजे मला लाज वाटणार नाही.

## काफ

81परमेश्वरा, तू माझा उध्दार करशील म्हणून वाट बघता बघता मी आता मरुन जाणार आहे पण परमेश्वरा, तू जे सांगतोस त्यावर माझा विश्वास आहे.
82तू ज्या गोष्टींचे वचन दिले होतेस त्या शोधता शोधता माझे डोळे अगदी थकून गेले आहेत परमेश्वरा, तू कधी माझे सांत्वन करणार आहेस?
83मी जरी उकिरड्यावरच्या द्राक्षारसाच्या बुधलीसारखा झालो असलो तरी मी तुझे नियम विसरणार नाही.
84मी किती काळ जगणार आहे? परमेश्वरा, जे लोक मला तुरुंगात माझा छळ करतात. त्यांना तू कधी शिक्षा करणार आहेस?
85काही गार्विष्ठ लोकांनी खोटे बोलून माझ्या शरीरात सुरा खुपसला आणि ते तुझ्या शिकवणी विरुध्द आहे.
86परमेश्वरा, लोक तुझ्या सगळ्या आज्ञांवर विश्वास ठेवू शकतात माझ्यावर खटला भरण्याची चूक त्यांनी केली. मला मदत कर.
87त्या लोकांनी जवळ जवळ माझा सर्वनाश केला. पण मी तुझ्या आज्ञा पाळणे बंद केले नाही.
88परमेश्वरा, मला तुझे खरे प्रेम दाखव आणि मला जगू दे. तू जे सांगशील ते मी करेन.

## लामेद

89परमेश्वरा, तूझा शब्द सदैव चालू असतो. तुझा शब्द स्वर्गात सदैव चालू असतो.
90तू सदा सर्वदा इमानदार असतोस. परमेश्वरा, तू पृथ्वी निर्माण केलीस आणि ती अजूनही आहे.

---

**ते ... मूर्ख** किंवा “त्यांच्या मनाला हे समजून घेणे.”

91तुझ्या नियमांमुळे ती अजूनही आहे आणि ती गुलामाप्रमाणे तुझे नियम पाळते.
92जर तुझी शिकवण मला एखाद्या मित्राप्रमाणे वाटली नसती तर माझ्या दुखाने माझा सर्वनाश झाला असता.
93परमेश्वरा, मी तुझ्या आज्ञा कधीच विसरणार नाही कारण त्यांनी मला जगू दिले.
94परमेश्वरा, मी तुझा आहे म्हणून माझा उध्दार कर का? कारण तुझ्या आज्ञा पाळण्याची मी शिकस्त करतो.
95दुष्टांनी माझा नाश करायचा प्रयत्न केला. पण तुझ्या कराराने मला शहाणे बनवले.
96तुझ्या नियमांखेरीज इतर गोष्टींना मर्यादा असतात.

## मेम

97परमेश्वरा, मला तुझी शिकवण खूप आवडते. मी सतत तिच्याबद्दल बोलत असतो.
98परमेश्वरा, तुझ्या आज्ञा मला माझ्या शत्रूंपेक्षा शहाणे करतात. तुझे नियम नेहमी माझ्याजवळ असतात.
99मी माझ्या सगळ्या शिक्षकांपेक्षा शहाणा आहे. कारण मी तुझ्या कराराचा अभ्यास करतो.
100जुन्या पुढाऱ्यांपेक्षा मला जास्त कळते कारण मी तुझ्या आज्ञा सांभाळतो.
101तू मला प्रत्येक पावलाला चुकीच्या मार्गावर जाण्यापासून दूर ठेवतोस. म्हणून परमेश्वरा, मी तू जे सांगशील ते करू शकतो.
102परमेश्वरा, तू माझा गुरु आहेस म्हणून मी तुझे नियम पाळणे बंद करणार नाही.
103माझ्या तोंडात तुझे शब्द मधापेक्षाही गोड आहेत.
104तुझी शिकवण मला शहाणा करते. त्यामुळे मी चुकीच्या शिकवणीचा तिरस्कार करतो.

## नून

105परमेश्वरा, तुझे शब्द दिव्याप्रमाणे माझा मार्ग उजळतात.
106तुझे नियम चांगले आहेत. मी ते पाळायचे वचन देतो. आणि मी दिलेले वचन पाळीन.
107परमेश्वरा, मी खूप काळ दुख भोगले आहे. कृपा करून आज्ञा दे आणि मला पुन्हा जगू दे.
108परमेश्वरा, माझ्या स्तुतीचा स्वीकार कर आणि मला तुझे नियम शिकव.
109माझे आयुष्य नेहमीच धोक्यात असते पण मी तुझी शिकवण विसरलो नाही.
110दुष्ट लोक मला जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न करतात. पण मी तुझ्या आज्ञा मोडल्या नाहीत.
111परमेश्वरा, मी सदैव तुझ्या कराराप्रमाणे वागेन त्यामुळे मला खूप आनंद होतो.
112मी अगदी नेहमी प्रयत्नपूर्वक तुझे नियमपाळायचा प्रयत्न करीन.

## सामेख

113परमेश्वरा, जे लोक तुझ्याशी पूर्णपणे प्रामाणिक नाहीत त्या लोकांचा मी तिरस्कार करतो पण मला तुझी शिकवण आवडते.
114मला लपव आणि माझे रक्षण कर. परमेश्वरा, तू जे काही सांगतोस त्यावर माझा विश्वास आहे.
115परमेश्वरा, वाईट लोकांना माझ्याजवळ फिरकू देऊ नकोस आणि मी माझ्या देवाच्या आज्ञा पाळीन.
116परमेश्वरा, कबूल केल्याप्रमाणे तू मला आधार दे आणि मग मी जगेन माझा तुझ्यावर विश्वास आहे म्हणून माझी निराशा करू नकोस.
117परमेश्वरा, मला मदत कर म्हणजे माझा उध्दार होईल मी नेहमीच तुझ्या आज्ञांचा अभ्यास करीन.
118परमेश्वरा, तुझे नियम मोडणाऱ्या प्रत्येकाला तू परत पाठव. का? कारण जेव्हा त्यांनी तुझ्यासांगण्या प्रमाणे वागायचे कबूल केले तेव्हा ते खोटे बोलले.
119परमेश्वरा, तू वाईट लोकांना पृथ्वीवर कचऱ्याप्रमाणे फेकून दे. हणजे मग मी तुझ्या करारावर सदैव प्रेम करीन.
120परमेश्वरा, मला तुझी भीती वाटते मी घाबरतो आणि तुझ्या नियमांना मान देतो.

## ऐन

121जे योग्य आहे आणि चांगले आहे तेच मी केले परमेश्वरा, ज्या लोकांना मला त्रास द्यायची इच्छा आहे त्याच्या हाती मला सोडून देऊ नको.
122माझ्याशी चांगला वागशील असे मला वचन दे. परमेश्वरा, मी तुझा सेवक आहे त्या गर्विष्ठ लोकांना मला त्रास द्यायला लावू नकोस.
123परमेश्वरा, तुझ्या मदतीची आणि तुझ्या चांगल्या शब्दाची वाट बघून माझे डोळे आता शिणले आहेत.
124मी तुझा सेवक आहे. मला तुझे खरे प्रेम दाखव. मला तुझे नियम शिकव.
125मी तुझा सेवक आहे, मला समजून घ्यायला मदत कर. म्हणजे मला तुझा करार समजू शकेल.
126परमेश्वरा, आता काही तरी करायची तुझी वेळ आली आहे. लोकांनी तुझे नियम मोडले आहेत.
127परमेश्वरा, शुध्दातल्या शुध्द सोन्यापेक्षा मला तुझ्या आज्ञा आवडतात.
128मी काळजी पूर्वक तुझ्या सर्व आज्ञा पाळतो.* मला खोटी शिकवण आवडत नाही.

---

**मी काळजीपूर्वक ... आज्ञा पाळतो** हे हिब्रूत समजायला अवघड आहे.

## पे

129परमेश्वरा, तुझा करार अद्‌भुत आहे म्हणूनच मी
तो पाळतो.
130जेव्हा लोक तुझा शब्द समजून घ्यायला सुरुवात
करतात तेव्हा ते त्यांना योग्य तऱ्हेने जीवन कसे जगायचे
ते सांगणाऱ्या प्रकाशासारखे असते. तुझे शब्द अगदी साध्या
लोकांना देखील शहाणे करतात.
131परमेश्वरा, मला खरोखरच तुझ्या आज्ञांचा अभ्यास
करायचा आहे. मी जोर जोरात श्वासोच्छवास करणाऱ्या
आणि अधीरतेने वाट बघणाऱ्या माणसासारखा आहे.
132देवा, माझ्याकडे बघ आणि माझ्याशी दयाळूपणे वाग.
जे लोक तुझ्या नावावर प्रेम करतात त्यांच्यासाठी योग्य
गोष्टी कर.
133परमेश्वरा, कबूल केल्याप्रमाणे मला मार्गदर्शन कर.
माझे काहीही वाईट होऊ देऊ नकोस.
134परमेश्वरा, जे लोक मला त्रास देतात त्यांच्यापासून
मला वाचव. आणि मी तुझ्या आज्ञा पाळीन.
135परमेश्वरा, तुझ्या सेवकाचा स्वीकार कर आणि
मला तुझे नियम शिकव.
136लोक तुझ्या शिकवणुकी प्रमाणे वागत नाहीत म्हणून
मी अश्रूंच्या नद्या वाहवल्या आहेत.

## त्सादे

137परमेश्वरा, तू चांगला आहेस आणि तुझे नियम
योग्य आहेत.
138तू आम्हाला करारात चांगले नियम दिलेस त्यावर
आम्ही खरोखरच विश्वास ठेवू शकतो.
139माझ्या तीव्र भावना माझा नाश करीत आहेत. माझे
शत्रू तुझ्या आज्ञा विसरले म्हणून मी फारच अस्वस्थ
झालो आहे.
140परमेश्वरा, आम्ही तुझ्या शब्दांवर विश्वास ठेवू
शकतो याबद्दलचा पुरावाआमच्याजवळ आहे. आणि मला
ते आवडते.
141मी एक तरुण आहे आणि लोक मला मान देत
नाहीत. पण मी तुझ्या आज्ञा विसरत नाही.
142परमेश्वरा, तुझा चांगलुपणा सदैव राहो आणि तुझ्या
शिकवणुकीवर विश्वास ठेवणे शक्य आहे.
143माझ्यावर खूप संकटे आली आणि वाईट वेळा ही
आल्या परंतु मला तुझ्या आज्ञा आवडतात.
144तुझा करार नेहमीच चांगला असतो. तो समजण्यासाठी
मला मदत कर म्हणजे मी जगू शकेन.

## कोफ

145मी अगदी मनापासून तुला बोलावतो परमेश्वरा,
मला उत्तर दे मी तुझ्या आज्ञा पाळीन.
146परमेश्वरा, मी तुला बोलावतो माझा उध्दार करआणि
मी तुझा करार पाळीन.
147तुझी प्रार्थना करण्यासाठी मी सकाळी लवकर उठतो
तू ज्या गोष्टी सांगतोस त्यावर मी विश्वास ठेवतो.
148तुझ्या वचनाचा अभ्यास करण्यासाठी रात्रभर मी
जागा राहिलो.
149तुझ्या सगळ्या प्रेमासकट माझ्याकडे लक्ष दे
परमेश्वरा, ज्या गोष्टी योग्य आहेत असेतू सांगतोस त्या
कर आणि मला जगू दे.
150लोक माझ्याविरुध्द वाईट योजना आखीत आहेत ते
लोक तुझ्या शिकवणुकी प्रमाणे वागत नाहीत.
151परमेश्वरा, तू माझ्या खूप जवळ आहेस आणि तुझ्या
सगळ्या आज्ञांवर विश्वास ठेवणे शक्य आहे.
152मी खूप पूर्वी तुझ्या करारावरुन शिकलो की तुझी
शिकवण सदैव राहाणार आहे.

## रेश

153परमेश्वरा, माझे दुख बघ आणि माझी सुटका कर.
मी तुझी शिकवण विसरलो नाही.
154परमेश्वरा, माझ्यासाठी माझी लढाई लढ. तू वचन
दिल्याप्रमाणे मला जगू दे.
155दुष्ट लोक जिंकणार नाहीत कारण ते तुझे नियम
पाळत नाहीत.
156परमेश्वरा, तू खूप दयाळू आहेस तू ज्या गोष्टी योग्य
आहेत असे सांगतोस त्या कर आणि मला जगू दे.
157मला दुख देण्याचा प्रयत्न करणारे अनेक शत्रू मला
आहेत पण मी तुझ्या कराराप्रमाणे वागणे सोडले नाही.
158मी त्या विश्वासघातक्यांना बघतो. परमेश्वरा, ते
तुझा शब्द पाळत नाहीत. आणि मी त्यांचा तिरस्कार
करतो.
159बघ, मी तुझ्या आज्ञा पाळण्याचा आटोकाट प्रयत्न
करतो. परमेश्वरा, तुझ्या सगळ्या प्रेमासकट मला जगू दे.
160परमेश्वरा, अगदी सुरुवाती पासून तुझे सर्व शब्द
विश्वसनीय होते. आणि तुझे चांगले नियम सदैव राहातील.

## शीन

161शक्तिमान पुढाऱ्यांनी माझ्यावर विनाकारण हल्ला
केला. पण मी फक्त तुझ्या नियमांना भितो आणि मान
देतो.
162परमेश्वरा, तुझा शब्द मला आनंदी करतो नुकताच
एखादा खजिना सापडलेल्या माणसासारखा मी आनंदित
होतो.
163मला खोटे आवडत नाही. मला त्याचा वीट आहे
पण परमेश्वरा, मला तुझी शिकवण आवडते.
164मी दिवसातून सात वेळा तुझ्या चांगल्या नियमांसाठी
मी तुझी स्तुती करतो.
165जे लोक तुझ्या शिकवणुकीवर प्रेम करतात त्यांना
खरी शांती लाभेल. कुठलीही गोष्ट त्यांचा अधपात
घडवणार नाही.

[166]परमेश्वरा, तू माझा उध्दार करावास म्हणून मी वाट बघत आहे. मी तुझ्या आज्ञा पाळल्या आहेत.

[167]मी तुझ्या कराराप्रमाणे वागलो, परमेश्वरा, मला तुझे नियम खूप आवडतात.

[168]मी तुझा करार आणि तुझ्या आज्ञा पाळल्या. परमेश्वरा, मी जे काही केले ते सर्व तुला माहीत आहे.

### ताव

[169]परमेश्वरा, माझे आनंदी गाणे ऐक तू कबूल केल्याप्रमाणे मला शहाणा कर.

[170]परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक. वचन दिल्याप्रमाणे माझा उध्दार कर.

[171]तू मला तुझे नियम शिकवलेस म्हणून मी एकदम गुणगान गायला सुरुवात केली.

[172]तुझ्या शब्दाला उत्तर देण्यासाठी मला मदत कर. आणि मला माझे गाणे म्हणू दे. परमेश्वरा, तुझे नियम चांगले आहेत.

[173]परमेश्वरा, मला मदत करण्यासाठी माझ्यापर्यंत पोहोच कारण मी तुझ्या आज्ञांप्रमाणे वागणे पसंत केले.

[174]परमेश्वरा, तू माझा उध्दार करावास असे मला वाटते. पण तुझी शिकवण मला आनंद देते.

[175]परमेश्वरा, मला जगू दे आणि तुझे गुणगान करू दे. तुझ्या निर्णयाला मला मदत करू दे.

[176]मी हरवलेल्या मेंढीप्रमाणे रस्ता चुकलो. परमेश्वरा, मला शोधायला ये. मी तुझा सेवक आहे आणि मी तुझ्या आज्ञा विसरलो नाही.

## स्तोत्र 120

*वर मंदिरांत जाण्याच्या वेळचे स्तोत्र.*

[1]मी संकटात होतो, मी परमेश्वराला मदतीसाठी हाक मारली आणि त्याने मला वाचवले.

[2]परमेश्वरा, माझ्याविषयी खोट बोलणाऱ्या लोकांपासून मला वाचव त्या लोकांनी खऱ्या नसलेल्या गोष्टी सांगितल्या.

[3]खोटारड्यांनो तुम्हाला काय मिळणार आहे ते माहीत आहे का? त्यापासून तुमचा काय फायदा होणार आहे ते तुम्हाला माहीत आहे का?

[4]सैनिकाचे अणकुचीदार बाण आणि जळते निखारे तुम्हाला शिक्षा म्हणून मिळतील.

[5]खोटारड्यांनो, तुमच्याजवळ राहाणे म्हणजे मेशेखात राहाण्यासारखे आहे, केदारच्या तंबूत राहाण्यासारखे आहे

[6]शांतीचा तिरस्कार करणाऱ्या लोकांजवळ मी खूप काळ राहिलो आहे.

[7]मी म्हणालो, मला शांती हवी, म्हणून त्यांना युध्द हवे आहे.

## स्तोत्र 121

*वर मंदिरांत जाण्याच्या वेळेचे स्तोत्र.*

[1]मी वर डोंगरांकडे बघतो. पण माझी मदत खरोखर कुठून येणार आहे?

[2]माझी मदत परमेश्वराकडून, स्वर्ग व पृथ्वी यांच्या निर्मात्याकडून येणार आहे.

[3]देव तुला खाली पडू देणार नाही. तुझा पाठीराखा झोपी जाणार नाही.

[4]इस्राएलचा पाठीराखा झोपाळू होत नाही. देव कधीही झोपत नाही.

[5]परमेश्वर तुझा पाठीराखा आहे तो त्याच्या महान शक्तीने तुझे रक्षण करतो.

[6]दिवसा सूर्य तुला दुख पोहोचवणार नाही. आणि रात्री चंद्र तुला इजा करणार नाही.

[7]परमेश्वर तुझे प्रत्येक संकटापासून रक्षण करील. परमेश्वर तुझ्या आत्म्याचे रक्षण करील.

[8]परमेश्वर तुला जाण्या-येण्यात मदत करील परमेश्वर तुला आता मदत करील आणि सदैव मदत करत राहील.

## स्तोत्र 122

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे दाविदाचेस्तोत्र.*

[1]"आपण परमेश्वराच्या मंदिरात जाऊ या, "असे लोक म्हणाले तेव्हा मी खूप आनंदात होतो.

[2]आपण इथे आहोत. यरुशलेमच्या दरवाजात उभे आहोत.

[3]हे नवीन यरुशलेम आहे. हे शहर पुन्हा एक एकत्रित शहर म्हणून वसवण्यात आले.

[4]कुटुंबांचे जथे जिथे जातात ती हीच जागा इस्राएलचे लोक तिथे परमेश्वराच्या नावाचे गुणगान करण्यासाठी जातात. ही कुटुंबे देवाची आहेत.

[5]राजांनी त्या ठिकाणी लोकांना न्याय देण्यासाठी सिंहासने मांडली. दावीदाच्या वंशातील राजांनी आपली सिंहासने त्या ठिकाणी मांडली.

[6]यरुशलेममध्ये शांती नांदावी म्हणून प्रार्थना करा. "जे लोक तुझ्यावर प्रेम करतात त्यांना इथे शांती मिळेल, अशी मी आशा करतो. तुझ्या चार भिंतींच्या आत शांती असेल अशी मी आशा करतो. तुझ्या मोठ्या इमारतीत, सुरक्षितता असेल अशी मी आशा करतो."

[7]माझ्या भावांच्या आणि शेजाऱ्यांच्या भल्यासाठी तिथे शांती नांदो अशी मी आशा करतो.

[8]आपला देव, आपला परमेश्वर, त्याच्या मंदिराच्या भल्यासाठी या शहरात चांगल्या गोष्टी घडाव्यात अशी मी प्रार्थना करतो.

## स्तोत्र 123

*वर व मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र.*

[1]देवा, मी वर बघून तुझी प्रार्थना करतो. तू स्वर्गात राजा म्हणून बसतोस.

[2]गुलाम त्यांना लागणाऱ्या वस्तूंसाठी मालकावर अवलंबून असतात.
[3]त्याच प्रमाणे आपण परमेश्वरावर, आपल्या देवावर अवलंबून असतो. आपल्यावर दया करावी म्हणून आपण देवाची वाट बघतो.
[4]परमेश्वरा, आमच्याशी दयाळू राहा खूप काळापासून आमचा अपमान होत आला आहेम्हणून तू दयावंत हो.
[5]गर्विष्ठ लोकांनी आमचा खूप काळ अपमान केला. ते इतर लोकांपेक्षा चांगले आहेत असे त्यांना वाटते.

## स्तोत्र 124

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे दावीदाचे स्तोत्र.*

[1]परमेश्वर जर आपल्या बाजूला नसता तरआपले काय झाले असते? इस्राएल, मला उत्तर दे.
[2]लोकांनी आपल्यावर हल्ला केला तेव्हा जर परमेश्वर आपल्या बाजूला नसता तर आपले काय झाले असते?
[3]आपले शत्रू आपल्यावर जेव्हा रागावले असते तेव्हा त्यांनी आपल्याला जिवंत गिळले असते.
[4]आपल्या शत्रूंचे सैन्य महापुरासारखे आपल्या अंगावरून गेले असते. नदी प्रमाणे त्यांनी आपल्याला बुडवले असते.
[5]गर्विष्ठ लोकांनी वर वर चढणाऱ्या पाण्याप्रमाणे आपल्या तोंडापर्यंत येऊन आपल्याला बुडवले असते.
[6]परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वराने आपल्या शत्रूंना आपल्याला पकडू दिले नाही आणि ठार मारू दिले नाही.
[7]जाळ्यात सापडलेल्या आणि नंतर त्यातून सुटलेल्या पक्ष्याप्रमाणे आपण आहोत. जाळे तुटले आणि आपण त्यातून सुटलो.
[8]परमेश्वराकडून आपली मदत आली. परमेश्वराने पृथ्वी आणि स्वर्ग निर्माण केला.

## स्तोत्र 125

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र*

[1]जे लोक परमेश्वरावर विश्वास ठेवतात ते सियोन पर्वतासारखे आहेत. ते कधीही थरथरणार नाहीत. ते सदैव असतील.
[2]यरुशलेमच्या सभोवती पर्वत आहेत आणि परमेश्वर त्याच्या माणसांभोवती आहे. तो त्याच्या माणसांचे सदैव रक्षण करील.
[3]दुष्ट लोक चांगल्या माणसांच्या जमिनीवर कधीही ताबा मिळवू शकणार नाहीत. जर तसे घडले तर चांगले लोकही वाईट वागायला लागतील.
[4]परमेश्वरा, तू चांगल्या लोकांशी चांगला राहा ज्या लोकांची मने शुध्द आहेत त्यांच्याशी तू चांगला राहा.
[5]दुष्ट लोक वाईट गोष्टी करतात. परमेश्वर त्या दुष्ट लोकांना शिक्षा करील. इस्राएलमध्ये शांती नांदू दे.

## स्तोत्र 126

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र*

[1]परमेश्वर जेव्हा आपली परत सुटका करील तेव्हा ते स्वप्नासारखे असेल.
[2]आपण हसत आनंदाचे गाणे गात असू. इतर देशांतील लोक म्हणतील,"इस्राएलाच्या लोकांसाठी परमेश्वराने फार चांगली गोष्ट केली."
[3]होय, परमेश्वराने जर आपल्यासाठी ती चांगलीगोष्ट केली तर आपण खूप आनंदी होऊ.
[4]परमेश्वरा, वाळवंटातले झरे पुन्हा पाण्याने भरून वहायला लागतात. तसं आम्हाला पुन्हा मुक्त कर.
[5]एखादा माणूस बी पेरते वेळी दुखी असू शकेल. पण तो जेव्हा पीक गोळा करतो तेव्हा तो आनंदी असतो.
[6]तो जेव्हा बी शेतात नेतो तेव्हा तो दुखी होईल. पण तो जेव्हा धान्य घरी आणतो तेव्हा आनंदी असतो.

## स्तोत्र 127

*शलमोनाचे वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र.*

[1]जर परमेश्वर घर बांधीत नसेल तर ते बांधणारे लोक त्यांचा वेळ व्यर्थ घालवीत आहेत जर परमेश्वर शहरावर नजर ठेवीत नसेल तर पहारेकरी त्यांचा वेळ वाया घालवीत आहेत.
[2]भाकरी मिळवण्यासाठी लवकर उठणे आणि रात्री उशीरापर्यंत जागणे म्हणजे वेळेचा अपव्यय आहे. देव ज्या लोकांवर प्रेम करतो त्यांची तो ते झोपेत असताना देखील काळजी घेतो.
[3]मुले म्हणजे परमेश्वराने दिलेले नजराणे आहेत आईच्या शरीरातून मिळालेले ते फळ आहे.
[4]तरुण माणसाची मुले सैनिकाच्या भात्यातील बाणांसारखी आहेत.
[5]जो माणूस त्याचा भाता मुलांनी भरून टाकेल तो सुखी होईल.
[6]त्या माणसाचा कधीही पराभव होणार नाही त्याची मुले सार्वजानिक ठिकाणी*त्याच्या शत्रूंविरुध्द त्याचे रक्षण करतील.

## स्तोत्र 128

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र.*

[1]परमेश्वराचे सर्व भक्त सुखी आहेत. ते देवाच्या इच्छे प्रमाणे जगतात.
[2]तू ज्या गोष्टींसाठी काम करतोस त्या गोष्टींचा तू उपभोग घेशील तू आनंदी राहाशील आणि तुझ्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडतील.

---

**सार्वजनिक ठिकाणी** शब्दाश: "दारवाजा" याचा अर्थ एखाद्या माणसाची मुले शत्रूनी त्याला कोर्टात खेचले तर त्याचा बचाव करीत.

3 घरी तुझी बायको सुफलीत द्राक्षवेलीसारखीअसेल. मेजाभोवती तुझी मुले तू लावलेल्या जैतूनाच्या झाडांसारखी असतील.

4 परमेश्वर अशा रीतीने त्याच्या भक्तांना आशीर्वाद देईल.

5 परमेश्वर तुला सियोनवरून आशीर्वाद देवो. परमेश्वराच्या आशीर्वादाचा तू यरुशलेममध्ये जन्मभर आनंद उपभोगावा अशी आशा करतो.

6 आणि तू तुझी नातवंडे पाही पर्यंत जगशीलअशी मी आशा करतो. इस्राएलमध्ये शांती नांदू दे.

## स्तोत्र 129

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र*

1 "मला आयुष्यभर खूप शत्रू होते." इस्राएल, आम्हाला त्या शत्रूंबद्दल सांग.

2 मला आयुष्यभर खूप शत्रू होते पण ते कधीही विजयी झाले नाहीत.

3 माझ्या पाठीत खोल जखमा होईपर्यंत त्यांनी मला मारले. मला खूप मोठ्या आणि खोल जखमा झाल्या.

4 पण परमेश्वराने दोर कापले आणि मला त्या दुष्टांपासून सोडवले.

5 जे लोक सियोनचा तिरस्कार करीत होते, त्यांचा पराभव झाला. त्यांनी लढणे थांबवले आणि ते पळून गेले.

6 ते लोक छपरावरच्या गवतासारखे होते. ते गवत वाढण्या आधीच मरून जाते.

7 ते गवत कामगाराला मूठभरही मिळू शकत नाही. धान्याचा ढीग करण्याइतकेही ते नसते.

8 त्यांच्या जवळून जाणारे लोक,"परमेश्वर तुला आशीर्वाद देवो" असे म्हणणार नाहीत. लोक त्यांचे स्वागत करून, "आम्ही परमेश्वराच्या नावाने तुम्हाला आशीर्वाद देतो" असे म्हणणार नाहीत.

## स्तोत्र 130

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र*

1 परमेश्वरा, मी खूप मोठ्या संकटात आहे. म्हणून मी तुला मदतीसाठी हाक मारीत आहे.

2 माझ्या प्रभु, माझ्याकडे लक्ष दे. माझ्या मदतीच्या हाकेला ओ दे.

3 परमेश्वरा, तू जर लोकांना खरोखरच त्यांच्यासगळ्या पापांबद्दल शिक्षा केलीस तर कुणीही माणूस जिवंत राहाणार नाही.

4 परमेश्वरा, तुझ्या माणसांना क्षमा कर. म्हणजे मग तुझी उपासना करण्यासाठी लोक असतील.

5 मी मदतीसाठी परमेश्वराची वाट पाहतो आहे. माझा आत्मा त्याची वाट बघत आहे. परमेश्वर जे सांगतो त्यावर माझा विश्वास आहे.

6 मी माझ्या प्रभुची वाट बघत आहे. मी सकाळ होण्याची खूप वाट पाहात असलेल्या रक्षकांसारखा आहे.

7 इस्राएल, परमेश्वरावर विश्वास ठेव. केवळ परमेश्वराजवळच खरे प्रेम मिळते परमेश्वर पुन्हा पुन्हा आपला उध्दार करतो आणि परमेश्वर इस्राएलला त्याच्या सर्व पापांबद्दल क्षमा करील.

## स्तोत्र 131

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र*

1 परमेश्वरा, मी गर्विष्ठ नाही. मी कुणीतरी मोठा आहे असे मी वागत नाही मी खूप भव्य असे काही करायचा प्रयत्न करत नाही मी माझ्या आवाक्या बाहेरच्या गोष्टींची चिंता कधीच करत नाही.

2 मी अगदी अविचल आहे. माझा आत्मा शांत आहे.

3 माझा आत्मा आईच्या कुशीत समाधान पावलेल्या बाळासारखा अविचल आणि शांत आहे.

4 इस्राएल, परमेश्वरावर विश्वास ठेव. त्याच्यावर आता आणि सदैव विश्वास ठेवत राहा.

## स्तोत्र 132

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र.*

1 परमेश्वरा, दावीदाला किती त्रास झाला त्याची आठवण ठेव.

2 दावीदाने परमेश्वराला वचन दिले. दावीदाने याकोबाच्या सर्वशक्तिमान देवाला खास वचन दिले.

3 दावीद म्हणाला "मी माझ्या घरात जाणार नाही. मी माझ्या अंथरुणावर झोपणार नाही. मी झोपणार नाही.

4 माझ्या डोळ्यांना विश्रांती घेऊ देणार नाही.

5 मी या पैकी कुठलीही गोष्टी जो पर्यंतपरमेश्वरासाठी, याकोबाच्या सर्वशक्तिमान देवासाठी घर सापडत नाही तो पर्यंत करणार नाही."

6 आम्ही याबद्दल एफ्राथात ऐकले. आम्हाला कराराची पेटी किरिआथ येआरिम मध्ये सापडली.

7 आपण पवित्र तंबूत जाऊ यादेव, ज्या पादासनावर आपले पाय विसाव्यासाठी ठेवतो त्या पादासनाजवळ आपण प्रार्थना करू या.

8 परमेश्वरा, तुझ्या विश्रांतीस्थानावरून तुझ्या शक्तिमान कोशासह उठ.

9 परमेश्वरा, तुझे याजक चांगुलपणा ल्याले आहेत. तुझे भक्त खूप आनंदी आहेत.

10 तुझा सेवक दावीद याच्या भल्यासाठी, निवडलेल्या राजाला नकार देऊ नकोस.

11 परमेश्वराने दावीदाला वचन दिले. परमेश्वराने दावीदाशी प्राणाणिक राहाण्याचे वचन दिले. राजे दावीदाच्या कुटुंबातूनच येतील असे वचन परमेश्वराने दिले.

12 परमेश्वर म्हणाला, "दावीद, जर तुझ्या मुलांनी माझा करार पाळला आणि मी त्यांना शिकवलेले नियम पाळले तर तुझ्या कुटुंबातील कुणीतरी नेहमी राजा होईल."

13परमेश्वराने त्याच्या मंदिरासाठी सियोनपर्वत निवडला. त्याच्या वसती साठी त्याला ती जागा पाहिजे होती.

14परमेश्वर म्हणाला, "ही जागा सदैव माझी राहील मी माझ्यासाठी ही जागा निवडली. मी नेहमी इथे राहीन.

15मी या शहराला भरपूर अन्न मिळो असा आशीर्वाद देईन. गरीब लोकांना देखील भरपूर खायला मिळेल.

16मी याजकांना तारणाचे वस्त्र लेववीन. आणि माझे भक्त इथे खूप आनंदी होतील.

17मी या जागेवर दावीदाला बलवान बनवीन. मी माझ्या निवडलेल्या राजाला दिवा देईन.

18मी दावीदच्या शत्रूंना लाजेने झाकून टाकीन परंतु मी दावीदाचे राज्य वाढेल असे करीन."

## स्तोत्र 133

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे दावीदाचे स्तोत्र.*

1जेव्हा देवाचे लोक शांततेने एकत्र नांदतात तेव्हा ते खरोखरच खूप चांगले आणि आल्हाददायक असते.

2ते गोड वास असलेल्या, याजकाच्या डोक्यावर ओतलेल्या तेलासारखे, अहरोनाच्या दाढीतून ओघळणाऱ्या तेलासारखे, अहरोनाच्या खासकपड्यातून ओघळणाऱ्या तेलासारखे वाटते.

3हर्मोन पर्वतावरून सियोनवर पडणाऱ्या हळूवार पावसासारखे वाटते.

4सियोन पर्वतावरच परमेश्वराने त्याचे आशीर्वाद, त्याचे शाश्वत जीवनाचे आशीर्वाद दिले.

## स्तोत्र 134

*वर मंदिरात जाण्याच्या वेळचे स्तोत्र.*

1परमेश्वराच्या सर्व सेवकांनो, त्याची स्तुती करा. तुम्ही सेवकांनी मंदिरात रात्रभर सेवा केली.

2सेवकांनो, तुमचे बाहू उभारा आणि परमेश्वराचे स्तोत्र गा.

3आणि परमेश्वर तुम्हाला सियोनवरून आशीर्वाद देवो. परमेश्वराने स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केली.

## स्तोत्र 135

1परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वराच्या नावाची स्तुती करा. परमेश्वराच्या सेवकांनो, त्याची स्तुती करा.

2त्यांचे गुणवर्णन करा. परमेश्वराच्या मंदिरात उभे राहाणाऱ्या लोकांनो, आमच्या देवाच्या मंदिराच्या अंगणात उभे राहणाऱ्यांनो, त्याची स्तुती करा.

3परमेश्वर चांगला आहे म्हणून त्याची स्तुती करा. त्याच्या नावाचे गुणगान करा. कारण तो चांगला आहे.

4परमेश्वराने याकोबाला निवडले. इस्राएल देवाचा आहे.

5परमेश्वर महान आहे हे मला माहीत आहे. आमचा प्रभु सगळ्या देवांपेक्षा महान आहे.

6परमेश्वर त्याला हवे ते पृथ्वीवर आणि स्वर्गात समुद्रात आणि खोल महासागरात करत असतो.

7देव सर्व पृथ्वीभर ढग तयार करतो. विजा आणि पाऊस तयार करतो आणि वाराही तयार करतो.

8देवाने मिसर मधले सगळे पहिल्यांदा जन्माला आलेले पुरुष आणि प्राणी मारून टाकले.

9देवाने मिसरमध्ये अनेक अद्भूत आणि चमत्कारिक गोष्टी केल्या देवाने फारो आणि त्याच्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत या गोष्टी केल्या.

10देवाने पुष्कळ राष्ट्रांचा पराभव केला. देवाने शक्तिशाली राजांना मारले.

11देवाने अमोऱ्याच्या सिहोन राजाचा पराभव केला. देवाने बाशानच्या ओग राजाचा पराभव केला. देवाने कनानमधल्या सर्व राष्ट्रांचा पराभव केला.

12आणि देवाने त्यांची जमीन इस्राएलला दिली. देवाने ती जमीन त्याच्या लोकांना दिली.

13परमेश्वरा, तुझे नाव सदैव प्रसिध्द राहील. परमेश्वरा, लोकांना तुझी नेहमी आठवण येईल.

14परमेश्वराने राष्ट्रांना शिक्षा केली. पण परमेश्वर त्याच्या सेवकांबरोबर दयाळू होता.

15दुसऱ्या लोकांचे देव केवळ सोन्याचांदीचे पुतळे होते. त्यांचे देव म्हणजे लोकांनी केलेले पुतळे होते.

16त्या पुतळ्यांना तोंड होते पण ते बोलू शकत नव्हते. त्या पुतळ्यांना डोळे होते पण ते पाहू शकत नव्हते.

17पुतळ्यांना कान होते पण ते ऐकू शकत नव्हते. त्या पुतळ्यांना नाक होते पण ते वास घेऊ शकत नव्हते.

18आणि ज्या लोकांनी हे पुतळे केले तेही या पुतळ्यांसारखेच होतील. का? कारण त्यांनी त्या पुतळ्यांवर मदतीसाठी विश्वास टाकला होता.

19इस्राएलाच्या कुटुंबांनो, परमेश्वराचे स्तोत्र गा. अहरोनाच्या कुटुंबांनो, परमेश्वराचे स्तोत्र गा.

20लेवीच्या कुटुंबांनो, परमेश्वराचे स्तोत्र गा. परमेश्वराच्या भक्तांनो, परमेश्वराचे स्तोत्र गा.

21परमेश्वराला सियोनहून त्याचे घर असले ल्या यरुशलेममधून धन्यवाद मिळोत. परमेश्वराची स्तुती करा.

## स्तोत्र 136

1परमेश्वराची स्तुती करा कारण तो चांगला आहे. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

2देवांच्या देवाची स्तुती करा. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

3परमेश्वरांच्या परमेश्वराची स्तुती करा. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

4देवाची, जो एकमेव अद्भुत चमत्कार करतो त्याची स्तुती करा. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

5ज्याने आकाश निर्माण करण्यासाठी शहाणपणा वापरला त्याची, देवाची स्तुती करा. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

6देवाने समुद्रावर शुष्क जमीन ठेवली. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
7देवाने मोठा प्रकाश निर्माण केला. त्याचे प्रेम सदैव असते.
8दिवसावर राज्य करण्यासाठी देवाने सूर्याची निर्मिती केली. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
9देवाने रात्रीवर राज्य करण्यासाठी चंद्र आणि चांदण्यांची निर्मिती केली. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
10देवाने मिसरमध्ये जन्मलेल्या पहिल्या पुरुषांना आणि प्राण्यांना मारले. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
11देवाने इस्राएलला मिसरमधून बाहेर काढले. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
12देवाने त्याची महान शक्ती आणि बळ दाखविले. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
13देवाने लाल समुद्र दोन भागात विभागला. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
14देवाने इस्राएलला समुद्रामधून नेले. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
15देवाने फारोला आणि त्याच्या सैन्याला लाल समुद्रात बुडवले त्याचे खरे प्रेम सदैव असते.
16देवाने त्याच्या माणसांना वाळवंटातून नेले. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
17देवाने शक्तिशाली राजांचा पराभव केला. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
18देवाने बलवान राजांचा पराभव केला. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
19देवाने अमोऱ्यांच्या सिहोन राजाचा पराभव केला. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
20देवाने बाशानच्या ओग राजाचा पराभव केला. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

21देवाने त्यांची जमीन इस्राएलला दिली. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
22देवाने ती जमीन इस्राएलला नजराणा म्हणून दिली. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
23आमचा पराभव झाला तेव्हा देवाने आमची आठवण ठेवली. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
24देवाने आम्हाला आमच्या शत्रूंपासून वाचवले. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
25देव प्रत्येक माणसाला अन्न देतो. त्याचे खरे प्रेम सदैव असते.
26स्वर्गातल्या देवाची स्तुती करा. त्याचे खरे प्रेम सदैव असते.

## स्तोत्र 137

1आम्ही बाबेलच्या नद्यांजवळ बसलो आणि सियोनची आठवण काढून रडलो.
2आम्ही जवळच्या वाळुंज झाडावर आमच्या वीणा ठेवल्या.
3बाबेलमध्ये आम्हाला पकडणाऱ्यांनी आम्हाला गायला सांगितले. त्यांनी आम्हाला आनंदी गाणे गायला सांगितले. त्यांनी आम्हाला सियोनचे गाणे गायला सांगितले.
4परंतु परक्या देशात आम्ही परमेश्वराचे गाणे गाऊ शकत नाही.
5यरुशलेम, मी जर तुला कधी विसरलो, तर मी पुन्हा कधीही गाणे वाजवणार नाही असे मला वाटते.
6यरुशलेम मी जर तुला कधी विसरलो, तर मी पुन्हा कधी गाणे म्हणणार नाही, असे मला वाटते. मी तुला कधीही विसरणार नाही असे मी वचन देतो.
7यरुशलेम नेहमी माझा सर्वात मोठा आनंद असेल असे मी वचन देतो.
8बाबेल, तुझा नाश होईल. जो तुला तुझ्या योग्य अशी शिक्षा देईल त्याला देव आशीर्वाद देईल.तू जसा आम्हाला दुख देतोस तसेच दुख जो तुला देईल त्याला धन्यवाद.
9जो माणूस तुझी मुले धरतो आणि त्यांना दगडावर आपटून ठार मारतो त्याचा धन्यवाद असो.

## स्तोत्र 138

*दावीदाचे स्तोत्र.*

1देवा, मी अगदी मनापासून तुझी स्तुती करतो. मी सर्व देवांसमोर तुझे गाणे गाईन.
2देवा, मी तुझ्या पवित्र मंदिरासमोर नतमस्तक होतो. मी तुझ्या नावाची, तुझ्या खऱ्या प्रेमाची आणि तुझ्या इमानदारीची स्तुती करतो. तू तुझ्या शब्द सामर्थ्याबद्दल प्रसिध्द आहेस. आता तर तू ते अधिकच वाढवले आहेस.
3देवा, मी तुला मदतीसाठी हाक मारली आणि तू मला ओ दिलीस. तू मला शक्ती दिलीस.
4परमेश्वरा, पृथ्वीवरचे सर्व राजे तुझे बोलणे ऐकतील तेव्हा ते तुझी स्तुती करतील.
5ते परमेश्वराच्या पध्दतीचे गुणगान करतील कारण परमेश्वराची महिमा अगाध आहे.
6देव फार महत्वाचा आहे पण तो दुबळ्यालोकांचा कैवारी आहे गर्विष्ठ लोक काय करतात ते देवाला माहीत आहे परंतु तो त्यांच्यापासून दूर राहातो.
7देवा, मी जर संकटात सापडलो तर मला जिवंत ठेव. जर माझे शत्रू माझ्यावर रागावले तर त्यांच्यापासून माझे रक्षण कर.
8परमेश्वरा, तू कबूल केलेल्या वस्तू मला दे. परमेश्वरा, तुझे खरे प्रेम सदैव असते. परमेश्वरा, तू आमची निर्मिती केलीस, आता आम्हाला सोडू नकोस.

## स्तोत्र 139

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तुतिगीत.*

1परमेश्वरा, तू माझी परीक्षा घेतलीस तुला माझ्याबद्दल सर्व काही माहीत आहे.

2मी केव्हा बसतो आणि केव्हा उठतो ते तुला माहीत आहे तुला माझे विचार खूप दुरुनही कळतात.

3परमेश्वरा, मी कुठे जातो आणि केव्हा झोपतो ते तुला कळते. मी जे जे करतो ते सर्व तुला माहीत आहे.

4परमेश्वरा, मला काय म्हणायचे आहे ते तुला माझे शब्द तोंडातून बाहेर पडायच्या आधीच कळते.

5परमेश्वरा, तू माझ्या सभोवताली आहेस. माझ्या पुढे आणि माझ्या मागे आहेस तू तुझा हात हळूवारपणे माझ्यावर ठेवतोस.

6तुला जे सर्वकाही माहीत आहे त्याचे मला आश्चर्य वाटते ते समजून घेणे मला खूप कठीण वाटते.

7मी जिथे जिथे जातो तिथे तिथे तुझा आत्मा असतो. परमेश्वरा, माझी तुझ्यापासून सुटका नाही.

8परमेश्वरा, मी जर स्वर्गात गेलो तर तिथे तू असतोस मी जर खाली मृत्यूलोकात गेलो तर तिथे ही तू असतोस.

9परमेश्वरा, मी जर पूर्वेकडे, जिथे सूर्य उगवतो तिथे गेलो तर तिथे ही तू असतोस. मी जर पश्चिमेकडे समुद्रावर गेल ोतर तिथे ही तू असतोस.

10तिथेही तुझा उजवा हात मला धरतो. आणि तू मला हाताने धरून नेतोस.

11परमेश्वरा, कदाचित् मी तुझ्यापासून लपण्याचा प्रयत्न करीन आणि म्हणेन, “दिवस रात्रीत बदलला आहे आणि आता काळोख मला खरोखरच लपवेल.”

12पण परमेश्वरा, काळोख देखील तुझ्यासाठी पुरेसा दाट नाही तुझ्यासाठी रात्र दिवसासारखीच प्रकाशमय आहे.

13परमेश्वरा, तू माझे संपूर्ण शरीर निर्माण केलेस मी माझ्या आईच्या गर्भात होतो तेव्हाच तुला माझ्याबद्दल सर्वकाही माहीत होते.

14परमेश्वरा, मी तुझी स्तुती करतो. तू मला अद्भुत आणि अतिशय सुंदररीतीने निर्मिलेस तू जे केलेस ते खूपच अद्भुत आहे हे मला चांगलेच माहीत आहे.

15तुला माझ्याबद्दल सारे माहीत आहे माझे शरीर आईच्या गर्भात लपून आकार घेत होते तेव्हा तू माझी हाडे वाढत असताना पाहिलीस.

16माझे अवयव वाढत असताना तू पाहिलेस तू तुझ्या पुस्तकात त्यांची यादी केलीस. तू माझी रोज पाहणी केलीस. त्यातला एकही अवयव हरवलेला नाही.

17तुझे विचार मला महत्वाचे आहेत, देवा तुला खूप माहिती आहे.

18मी जर ती मोजू लागलो तर ती वाळूच्या कणांपेक्षाही जास्त असेल. आणि जेव्हा माझी झोप संपेल तेव्हामी तुझ्याजवळच असेन.

19देवा, दुष्ट लोकांना मारून टाक. त्या खुन्यांना माझ्यापासून दूर ने.

20ते वाईट लोक तुझ्याबद्दल वाईट बोलतात. ते तुझ्या नावाविषयी वाईट गोष्टी सांगतात.

21परमेश्वरा, जे लोक तुझा तिरस्कार करतात त्यांचा मी तिरस्कार करतो. जे लोक तुझ्याविरुध्द जातात त्यांचा मी तिरस्कार करतो.

22मी त्यांचा संपूर्ण तिरस्कार करतो. तुझे शत्रू माझेही शत्रू आहेत.

23परमेश्वरा, माझ्याकडे बघ आणि माझे मन जाण माझी परीक्षा घे आणि माझे विचार जाणून घे.

24माझ्या मनात काही दुष्ट विचार आहेत का ते बघ आणि मला “सनातन मार्गाचा” रस्ता दाखव.

## स्तोत्र 140

*प्रमुख गायकासाठी दावीदाचे स्तुतीगीत*

1परमेश्वरा, मला दुष्ट लोकांपासून वाचव दुष्टांपासून माझे रक्षण कर.

2ते लोक वाईट गोष्टी करण्याच्या योजना आखत आहेत. ते लोक नेहमी भांडणाला सुरुवात करतात.

3त्यांच्या जिभा विषारी सापासारख्या आहेत. जणु काही त्यांच्या जिभेखाली सापाचे विष आहे.

4परमेश्वरा, मला दुष्ट लोकांपासून वाचव. वाईट लोकांपासून माझे रक्षण कर. ते लोक माझा पाठलाग करतात, आणि मला त्रास द्यायचा प्रयत्न करतात.

5त्या गर्विष्ठ लोकांनी माझ्यासाठी सापळा रचला. त्यांनी मला पकडण्यासाठी जाळे पसरले त्यांनी माझ्या मार्गात सापळा लावला.

6परमेश्वरा, तू माझा देव आहेस. परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक.

7परमेश्वरा, तू माझा बलदंड प्रभु आहेस. तू माझा रक्षणकर्ता आहेस. लढाईत माझे डोके वाचवणाऱ्या शिरस्त्राणासारखा तू आहेस.

8परमेश्वरा, त्या दुष्ट लोकांच्या इच्छापूर्ण होऊ देऊ नकोस. त्यांच्या योजना यशस्वी होऊ देऊ नकोस.

9परमेश्वरा, माझ्या शत्रूंना जिंकू देऊ नकोस. ते लोक वाईट योजना आखत आहेत. पण त्या वाईट गोष्टी त्यांच्याच बाबतीत घडू दे.

10त्यांच्या डोक्यावर निखारे ओत. माझ्या शत्रूंना आगीत फेकून दे. त्यांना वर चढून पुन्हा कधीही बाहेर येता येणार नाही अशा खड्ड्यात फेकून दे.

11परमेश्वरा, त्या खोटारड्यांना जगू देऊ नकोस. त्या वाईट लोकांचे वाईट होऊ दे.

12परमेश्वर गरीब लोकांचा योग्य तऱ्हेने न्याय करील हे मला माहीत आहे. देव असहाय्य लोकांना साहाय्य करील.

[13]परमेश्वरा चांगले लोक तुझ्या नावाची स्तुती करतील.
चांगले लोक तुझी उपासना करतील.

## स्तोत्र 141

*दावीदाचे एक स्तुतिगीत*

[1]परमेश्वरा, मी तुला मदतीसाठी हाक मारली. मी तुझी
प्रार्थना करतो तेव्हा तू लक्ष दे त्वरा कर आणि मला
मदत कर.
[2]परमेश्वरा, माझ्या प्रार्थनेचा स्वीकार कर. ती
जळणाऱ्या धूपाप्रमाणे असू दे. ती संध्याकाळच्या अर्पणा
प्रमाणे असू दे.
[3]परमेश्वरा, मी जे बोलतो त्यावर नियंत्रण ठेवायला
मला मदत कर. मी बोलतो त्यावर लक्ष ठेवायला मला
मदत कर.
[4]माझ्यात वाईट गोष्टी करायची इच्छा उत्पन्न होऊ
देऊ नकोस. वाईट लोक चुकीच्या गोष्टी करतात तेव्हा
मला त्यांच्यात जाऊ देऊ नकोस. वाईट लोकांना ज्या
गोष्टी करायला आवडते त्यात मला भाग घेऊ देऊ नकोस.
[5]चांगला माणूस माझ्या चुका दुरुस्त करू शकतो. तो
त्याचा दयाळूपणाच होईल. तुझे भक्त माझ्यावर टीका
करू शकतात. त्यांना करण्यासाठी ती चांगली गोष्ट असेल.
मी ती स्वीकारीन परंतु वाईट लोक ज्या वाईटगोष्टी करतात
त्याच्याविरुध्द मी नेहमी प्रार्थना करीन.
[6]त्यांच्या राज्यकर्त्यांना शिक्षा होऊ दे. नंतर लोकाना
कळेल की मी खरे बोलत होतो.
[7]लोक जमीन खणतात आणि नांगरतात आणि
सभोवताली घाण टाकतात. त्याच रीतीने हाडे त्यांच्या
थडग्यांभोवती विखरून टाकली जातील.
[8]परमेश्वरा, माझ्या प्रभु मी तुझ्याकडे मदतीच्या अपेक्षेने
पाहातो. मी तुझ्यावर विश्वास ठेवतो. कृपा करून मला
मरू देऊ नको.
[9]वाईट लोक माझ्यासाठी सापळे रचतात. मला त्यांच्या
सापळ्यात पडू देऊ नकोस त्यांना मला पकडू देऊ नकोस.
[10]वाईट लोकांना त्यांच्याच सापळ्यात पडू दे आणि
मला कसलीही इजा न होता दूर जाऊ दे.

## स्तोत्र 142

*दावीदाचे मास्कील तो गुहेत असतानाची प्रार्थना.*

[1]मी परमेश्वराला मदतीसाठी हाक मारीन. मी
परमेश्वराची प्रार्थना करीन.
[2]मी परमेश्वराला माझ्या समस्यांबद्दल सांगेन. मी
परमेश्वराला माझ्या संकटांबद्दल सांगेन.
[3]माझ्या शत्रूंनी माझ्यासाठी सापळा रचला आहे मी
आता आशा सोडण्याच्या तयारीत आहे. पण माझे काय
होत आहे ते परमेश्वराला माहीत आहे.
[4]मी भोवताली बघतो पण मला माझे कुणीही
मित्र दिसत नाहीत. पळून जाण्यासाठी मला कुठलीही
जागा नाही. मला वाचवण्याचा कुणीही प्रयत्न करीत
नाही.
[5]म्हणून मी परमेश्वराकडे मदतीची याचना करतो.
परमेश्वरा, तूच माझी सुरक्षित जागा आहेस तूच मला जगू
देऊ शकतोस.
[6]परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐकमला तुझी फार गरज
आहे. जे लोक माझा पाठलाग करतात त्यांच्यापासून मला
वाचव. ते लोक मला फार भारी आहेत.
[7]हा सापळा टाळण्यासाठी मला मदत कर. म्हणजे मी
तुझ्या नावाचे गुणगान करीन. आणि चांगले लोक माझ्या
बरोबर आनंदोत्सव करतील कारण तू माझी काळजी
घेतलीस.

## स्तोत्र 143

*दावीदाचे स्तुतिगीत.*

[1]परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक, माझ्या प्रार्थने कडे
लक्ष दे आणि नंतर माझ्या प्रार्थनेला उत्तर दे. तू खरोखरच
चांगला आणि निष्ठावान आहेस हे मला दाखव.
[2]माझा, तुझ्या सेवकाचा न्यायनिवाडा करू नकोस.
कारण हे देवा, कोणीही जिवंत व्यक्ती तुझ्या दृष्टीने
निरपराधी ठरत नाही.
[3]पण माझे शत्रू माझा पाठलाग करीत आहेत. त्यांनी
माझे आयुष्य घाणीत बरबाद केले आहे. ते मला खूप पूर्वी
मेलेल्या लोकांसारखे अंधाऱ्याथडग्यात लोटत आहेत.
[4]मी आशा सोडण्याच्या तयारीत आहे. माझा धीर सुटत
चालला आहे.
[5]पण पूर्वी घडलेल्या घटना मला आठवत आहेत तू ज्या
गोष्टी केल्यास त्यांचा मी विचार करतो तू आपल्या महान
शक्तीने ज्या गोष्टी केल्यास त्या बद्दल मी बोलत आहे.
[6]परमेश्वरा, मी माझे बाहू उभारून तुझी प्रार्थना करतो.
तहानेली जमीन जशी पावसाची वाट बघते तशी मी तुझ्या
मदतीची वाट बघत आहे.
[7]परमेश्वरा, त्वरा करून मला उत्तर दे. माझा धीर
आता सुटला आहे. माझ्यापासून दूर जाऊ नकोस. मला
मरू देऊ नकोस आणि थडग्यात पडलेल्या मेलेल्या
माणसांप्रमाणे मला होऊ देऊ नकोस.
[8]परमेश्वरा, या सकाळी मला तुझे खरे प्रेम दाखव.
माझा तुझ्यावर विश्वास आहे. मी ज्या गोष्टी करायला
हव्या त्या मला दाखव. मी माझे आयुष्य तुझ्या हाती
सोपवले आहे.
[9]परमेश्वरा, मी तुझ्याकडे संरक्षणासाठी येतो. माझ्या
शत्रूपासून माझे रक्षण कर.
[10]मी जे करावे असे तुला वाटते ते मला दाखव. तू
माझा देव आहेस तुझे चांगले मन आत्मा मला साध्या
देशात घेऊन जाऊ दे.
[11]परमेश्वरा, मला जगू दे. म्हणजे लोक तुझ्या
नावाची स्तुती करतील. तू खरोखरच चांगला आहेस

हे मला दाखव आणि माझ्या शत्रूपासून माझे रक्षण कर.

[12]परमेश्वरा, मला तुझे प्रेम दाखव. जे शत्रू मला ठार मारायचा प्रयत्न करीत आहेत त्यांचा पराभव कर. का? कारण मी तुझा सेवक आहे.

## स्तोत्र 144

### *दावीदाचे स्तोत्र*

[1]परमेश्वर माझा खडक आहे. परमेश्वराला धन्यवाद द्या. परमेश्वर मला युध्दाचे शिक्षण देतो. परमेश्वर मला लढाईसाठी तयार करतो.

[2]परमेश्वर माझ्यावर प्रेम करतो. परमेश्वर माझी पर्वतावरची उंचसुरक्षित जागा आहे परमेश्वर माझी सुटका करतो. परमेश्वर माझी ढाल आहे मी त्याच्यावर वश्वास ठेवतो. परमेश्वर मला माझ्या लोकांवर राज्य करायला मदत करतो.

[3]परमेश्वरा, तुला लोक महत्वाचे का वाटतात? आम्ही तुझ्या लक्षात तरी कसे येतो?

[4]माणसाचे आयुष्य म्हणजे हवेचा झोत, माणसाचे आयुष्य म्हणजे नाहीशी होत जाणारी सावली.

[5]परमेश्वरा, आकाश फाड आणि खाली ये, पर्वतांना हात लाव आणि त्यांतून धूर बाहेर येईल.

[6]परमेश्वरा, विजेला पाठव आणि माझ्या शत्रूला पांगव तुझे बाण सोड आणि त्यांना पळवून लाव.

[7]परमेश्वरा, स्वर्गातून खाली पोहोच आणि मला वाचव. मला या शत्रूंच्या समुद्रात बुडू देऊ नकोस. मला त्या परक्यांपासून वाचव.

[8]हे शत्रू खोटारडे आहेत. ते खऱ्या नसलेल्या गोष्टी सांगतात.

[9]परमेश्वरा, मी तू करत असलेल्या अद्‌भुत गोष्टींबद्दलचे नवे गाणे गाईन. मी तुझी स्तुती करेन. आणि दहा तारांची वीणा वाजवेन.

[10]परमेश्वर राजांना त्यांच्या लढाया जिंकायला मदत करतो. परमेश्वराने त्याचा सेवक दावीद याला त्याच्या शत्रूंच्या तलवारीपासून वाचवले.

[11]मला या परक्यांपासून वाचव. हे शत्रू खोटारडे आहेत. ते खऱ्या नसलेल्या गोष्टी सांगतात.

[12]आमची तरुण मुले बळकट झाडांसारखी आहेत. आमच्या मुली राजवाड्यातल्या सुंदर सजावटीप्रमाणे आहेत.

[13]आमची धान्यांची कोठारे वेगवेगळ्या धान्यांनी भरलेली आहेत. आमच्या शेतात हजारो मेंढ्या आहेत.

[14]आमचे सैनिक सुरक्षित आहेत. कुठलाही शत्रू आत येण्याचा प्रयत्न करीत नाही. आम्ही लढाईवर जात नाही. आमच्या रस्त्यात लोक ओरडत नाहीत.

[15]अशावेळी लोक खूप आनंदी असतात. जर परमेश्वर त्यांचा देव असेल तर लोक खूप आनंदी असतात.

## स्तोत्र 145

### *दावीदाचे स्तोत्र*

[1]देवा, राजा, मी तुझी स्तुती करतो. मी तुझ्या नावाला सदैव धन्यवाद देतो.

[2]मी तुझी रोज स्तुती करतो. तुझ्या नावाचे रोज गुणगान करतो.

[3]परमेश्वर महान आहे लोक त्याची खूप स्तुती करतात. त्याने केलेल्या महान गोष्टींची आपण मोजदाद करू शकत नाही.

[4]परमेश्वरा, लोक तुझी तू केलेल्या गोष्टींबद्दल सदैव स्तुती करतील तू महान गोष्टी करतोस त्याबद्दल ते सांगतील.

[5]तुझे राजवैभव आणि तेज अद्‌भुत आहे मी तुझ्या अद्‌भुत चमत्काराबद्दल सांगेन.

[6]परमेश्वरा तू ज्या चमत्कारपूर्ण गोष्टी करतोस त्याबद्दल लोक सांगतील तू ज्या महान गोष्टी करतोस त्याबद्दल मी सांगेन.

[7]तू ज्या चांगल्या गोष्टी करतोस त्याबद्दल लोक सांगतील. लोक तुझ्या चांगुलपणाचे गाणे गातील.

[8]परमेश्वर दयाळू आणि कृपाळू आहे. परमेश्वर सहनशील आणि प्रेमळ आहे.

[9]परमेश्वर प्रत्येक मनुष्याशी चांगला वागतो. तो त्याने निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीवर दया करतो.

[10]परमेश्वरा, तू ज्या गोष्टी करतोस त्यामुळे तुला गौरव प्राप्त होतो. तुझे भक्त तुला धन्यवाद देतात.

[11]तुझे राज्य किती महान आहे हे ते सांगताततू किती महान आहेस हे ते सांगतात.

[12]म्हणून परमेश्वरा, तू ज्या महान गोष्टी करतोस त्याबद्दल इतर लोकांनाही कळते. तुझे राज्य किती महान आणि अद्‌भुत आहे हे त्या लोकांना कळते.

[13]परमेश्वरा, तुझे राज्य सदैव राहील. तू सदैव राज्य करशील.

[14]जे लोक खाली पडले आहेत त्यांना परमेश्वर उचलतो. जे लोक संकटात आहेत त्यांना परमेश्वर मदत करतो.

[15]परमेश्वरा, सर्व प्राणीमात्र अन्नासाठी तुझ्याकडे बघतात. आणि तू त्यांना योग्य वेळी त्यांचे अन्न देतोस.

[16]परमेश्वरा, तू तुझे हात उघडतोस आणि तू प्रत्येक प्राणीमात्राला जे लागेल ते सर्व देतोस.

[17]परमेश्वर जे काही करतो ते सर्व चांगले असते. तो जे करतो ते सर्व तो किती चांगला आहे, ते दाखवते.

[18]जे कोणी परमेश्वराला मदतीसाठी बोलावतात त्या सर्वांच्या तो खूप जवळ असतो. जो त्याची अगदी मनापासून प्रार्थना करतो त्याच्या अगदी जवळ तो असतो.

[19]भक्तांना जे हवे असते ते परमेश्वर करतो. परमेश्वर त्याच्या भक्तांचे ऐकतो. तो त्यांच्या प्रार्थनेला उत्तर देतो आणि त्यांना वाचवतो.

20जे परमेश्वरावर प्रेम करतात त्यांचे तो रक्षण करतो. परंतु परमेश्वर वाईट लोकांचा नाश करतो.
21मी परमेश्वराची स्तुती करेन प्रत्येकाने त्याच्या पवित्र नावाचा सतत जयजयकार करावा असे मला वाटते.

## स्तोत्र 146

1परमेश्वराची स्तुती करा. माझ्या आत्म्या, परमेश्वराची स्तुती कर.
2मी आयुष्यभर परमेश्वराची स्तुती करीन. मी आयुष्यभर त्याचे गुणगान करीन.
3तुमच्या नेत्यांवर मदतीसाठी अवलंबून राहू नका. लोकांवर विश्वास टाकू नका का? कारण लोक तुम्हाला वाचवू शकत नाहीत.
4लोक मरतात आणि त्यांचे दफन केले जाते आणि नंतर मदतीच्या त्यांच्या सगळ्या योजनाही जातात.
5पण जे लोक देवाला मदतीबद्दल विचारतात ते सुखी असतात. ते लोक परमेश्वरावर, त्यांच्या देवावर अवलंबून असतात.
6परमेश्वराने स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केली. परमेश्वराने समुद्र आणि त्यातल्या सर्व गोष्टी निर्माण केल्या. परमेश्वर त्यांचे सदैव रक्षण करील.
7जे लोक दुखी कष्टी आहेत त्यांच्यासाठी परमेश्वर योग्य गोष्टी करतो. तो भुकेल्यांना अन्न देतो. तुरुंगात बंद असलेल्यांना तो सोडवतो.
8परमेश्वर आंधळ्यांना पुन्हा दिसू लागण्यासाठी मदत करतो. संकटात असलेल्या लोकांना परमेश्वर मदत करतो परमेश्वराला चांगले लोक आवडतात.
9परमेश्वर आपल्या देशातल्या परक्यांचे रक्षण करतो. परमेश्वर विधवांची आणि अनाथांची काळजी घेतो. परंतु परमेश्वर वाईट लोकांचा नाश करतो.
10परमेश्वर सदैव राज्य करील सियोन तुझा देव सदैव राज्य करीत राहील परमेश्वराची स्तुती करा.

## स्तोत्र 147

1परमेश्वर चांगला आहे म्हणून त्याची स्तुती करा. आपल्या देवाचे गुणगान करा. त्याची स्तुती करणे चांगले आणि आल्हाददायक आहे.
2परमेश्वराने यरुशलेम बांधले. इस्राएलाच्या ज्या लोकांना कैदी म्हणून नेले होते त्यांना देवाने परत आणले.
3देव त्यांच्या विदीर्ण हृदयावर फुंकर घालतो आणि त्यांच्या जखमांना मलम पट्टी करतो.
4देव तारे मोजतो आणि त्याला प्रत्येक ताऱ्याचे नाव माहीत असते.
5आपला प्रभु खूप मोठा आहे. तो फार शक्तीवान आहे. त्याला माहीत असलेल्या गोष्टींना मर्यादा नाही.
6परमेश्वर नम्र लोकांना मदत करतो. परंतु तो वाईट लोकांना अडचणीत टाकतो.
7परमेश्वराला धन्यवाद द्या. आपल्या देवाची वीणेवर स्तुती करा.
8देव ढगांनी आकाश भरून टाकतो. देव पृथ्वीसाठी पाऊस निर्माण करतो. देव डोंगरावर गवत उगवतो.
9देव प्राण्यांना अन्न देतो देव लहान पक्ष्यांना अन्न भरवतो.
10युध्दातले घोडे आणि बलवान सैनिक त्याला आनंद देत नाहीत.
11जे लोक त्याची प्रार्थना करतात त्यांच्या बरोबर परमेश्वर आनंदी असतो. जे लोक त्याच्या खऱ्या प्रेमावर विश्वास ठेवतात त्यांच्याबरोबर देव आनंदी असतो.
12यरुशलेम, परमेश्वराची स्तुती कर. सियोन तुझ्या देवाची स्तुती कर.
13यरुशलेम, देव तुझे दरवाजे बुलंद बनवतो आणि देव तुझ्या शहरातल्या लोकांना आशीर्वाद देतो.
14देवाने तुझ्या देशात शांती आणली. म्हणून युध्दात शत्रूंनी तुझे धान्य नेले नाही. आणि अन्न म्हणून तुझ्याकडे भरपूर धान्य आहे.
15देव पृथ्वीला आज्ञा करतो आणि ती त्या आज्ञा त्वरित पाळते.
16जमीन लोकरी सारखी संपूर्ण पांढरी होई पर्यंत देव हिमवर्षाव करतो. देव गोठलेले बर्फधुळीसारखे हवेत उडू देतो.
17देव, आकाशातून दगडाप्रमाणे गारांचावर्षाव करतो. तो जी थंडी पाठवतो तिचा सामना कुणीही करू शकत नाही.
18नंतर देव दुसरी आज्ञा देतो आणि पुन्हा गरम वारे वाहू लागतात. बर्फ वितळायला लागते आणि पाणी वाहायला लागते.
19देवाने याकोबाला (इस्राएल) त्याची आज्ञा दिली. देवाने इस्राएलला त्याचे नियम दिले.
20देवाने हे दुसऱ्या कोणत्याही देशासाठी केले नाही. देवाने दुसऱ्या लोकांना त्याचे नियम शिकवले नाहीत. परमेश्वराची स्तुती करा.

## स्तोत्र 148

1परमेश्वराची स्तुती करा. स्वर्गातल्या देवदूतांनो स्वर्गातून परमेश्वराची स्तुती करा.
2सर्व देवदूतांनो परमेश्वराची स्तुती करा. त्याच्या सर्व सैनिकांनो, त्याची स्तुती करा.
3सूर्य-चंद्रांनो परमेश्वराची स्तुती करा. ताऱ्यांनो आणि आकाशातील दिव्यांनो, त्याची स्तुती करा.
4सर्वांत उंचावरच्या स्वर्गातल्या परमेश्वराची स्तुती करा. आकाशावरील जलाशयांनो, त्याची स्तुती करा.
5परमेश्वराच्या नावाचा जयघोष करा का? कारण देवाने आज्ञा केली आणि आपली सर्वांची निर्मिती झाली.

6देवाने या सगळ्या गोष्टींची निर्मिती त्या सदैव राहाव्यात
म्हणून केली देवाने कधीही न संपणारे नियम केले.
7पृथ्वीवरच्या सर्व गोष्टींनो, परमेश्वराची स्तुती करा.
महासागरातल्या सागरी प्राण्यांनो, परमेश्वराची स्तुती करा.
8देवाने अग्नी आणि गारा, बर्फ आणि धूर आणि सर्व
वादळे निर्माण केली.
9देवाने टेकड्या आणि पर्वत फळ झाडे आणि देवदार
वृक्ष निर्मिले.
10देवाने सर्व जंगली प्राणी आणि पशू सरपटणारे प्राणी
आणि पक्षी निर्माण केले.
11देवाने पृथ्वीवरचे राजे आणि देश निर्माण केले. त्यानेच
नेते आणि न्यायाधीश निर्मिले.
12देवाने तरुण आणि तरुणी निर्मिल्या. देवाने वृध्द आणि
तरुण माणसे निर्माण केली.
13परमेश्वराच्या नावाचा गुणगौरव करा. त्याच्या नावाला
सदैव मान द्या. स्वर्गातल्या आणि पृथ्वीवरच्या सर्वांनो
त्याची स्तुती करा.
14देव त्याच्या माणसांना बलवान करील. लोक त्याच्या
भक्तांची स्तुती करतील लोक इस्राएलची स्तुती करतील.
हेच ते लोक ज्यांच्यासाठी देव लढतो. परमेश्वराची स्तुती
करा.

## स्तोत्र 149

1परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वराने ज्या नवीन गोष्टी
केल्यात्याबद्दलचे नवे गाणे गा. ज्या सभेत त्याचे भक्त
भेटतातत्या सभेत त्याचे गुणगान करा.
2इस्राएलाच्या लोकांना त्यांच्या निर्मात्याबरोबर
आनंदोत्सव साजरा करू द्या. सियोनच्या लोकांना त्यांच्या
राजाबरोबरआनंद उपभोगू द्या.
3त्या लोकांना डफाच्या आणि वीणेच्या तालावर नाच
करून देवाची स्तुती करू द्या.
4परमेश्वर त्याच्या लोकांबरोबर सुखी आहे देवाने
त्याच्या विनम्र लोकांसाठी अद्भुत गोष्ट केली त्याने त्याचा
उध्दार केला.
5देवाच्या भक्तांनो तुमच्या विजयाबद्दल आनंदी व्हा.झोपी
गेल्यावरही आनंदी राहा.
6लोकांना देवाजवळ त्याचे गुणगान करू द्या. आणि
त्यांना त्यांच्या तलवारी हातात घेऊ द्या.
7त्यांना त्यांच्या शत्रूंना शिक्षा करू द्या. त्यांना त्या
लोकांना शिक्षा करू द्या.
8देवाचे लोक त्या राजांना आणि महत्वाच्या लोकांना
साखळंदडाने बांधतील.
9देवाने आज्ञा केल्याप्रमाणे देवाचे लोक त्यांना शिक्षा
करतील. देवाचे सगळे भक्त त्याला मान देतात. परमेश्वराचे
गुणगान करा

## स्तोत्र 150

1परमेश्वराची स्तुती करा देवाची त्याच्या मंदिरात स्तुती
करा. त्याच्या सामर्थ्याची स्वर्गात स्तुती करा.
2देव ज्या महान गोष्टी करतो त्याबद्दल त्याची स्तुती
करा. ह्यह्य त्याच्या सर्व मोठेपणाबद्दल त्याची स्तुती करा.
3तुतारी आणि कर्णा वाजवून देवाचे गुणगान करा.
सतारीवर आणि वीणेवर त्याचे गुणगान करा.
4डफ वाजवून आणि नाचून देवाची स्तुती करा.
तंतुवाद्यावर आणि बासरीवर त्याचे गुणगान करा.
5जोर जोरात टाळ वाजवून देवाची स्तुती करा.
झणझणणाऱ्या झांजांवर त्याचे गुणगान करा.
6प्रत्येक जिवंत वस्तू परमेश्वराची स्तुती कर.
परमेश्वराची स्तुती कर.

# नीतिसूत्रे

## प्रस्तावना

1 हे शब्द म्हणजे दावीदचा मुलगा शलमोन याची शहाणपणाची शिकवण आहे. तो इस्राएलचा राजा होता. 2लोक शहाणे व्हावेत आणि त्यांना योग्य गोष्ट कोणती ते कळावे म्हणून हे शब्द लिहिले गेले. या शब्दांमुळे लोकांना खरे शिक्षण समजण्यास मदत होईल. 3हे शब्द लोकांना जगण्याची सर्वोत्कृष्ट पध्दत शिकवतील. लोक न्यायी, इमानी आणि चांगले राहाण्याचा योग्य मार्ग शिकतील. 4ज्या लोकांना शहाणपण शिकण्याची गरज आहे, त्यांना हे शब्द शहाणपण शिकवतील. तरुण माणसे या शब्दांपासून शिकू शकतील. 5या शब्दांतली शिकवण शहाण्या माणसांनी सुध्दा अतिशय काळजीपूर्वक ऐकली पाहिजे, तरच ते अधिक शिकू शकतील आणि अधिक शहाणे होतील. आणि जे लोक चांगले वाईट ओळखण्यात तरबेज आहेत त्यांना अधिक चांगले समजू शकेल. त्या 6नंतरच लोकांना शहाणपणाच्या गोष्टींचा आणि म्हणींचा अर्थ समजू शकेल. शहाणे लोक ज्या गोष्टी सांगतात त्या लोकांना समजू शकतील.

7पहिली गोष्ट म्हणजे माणसाने परमेश्वराला मान दिला पाहिजे आणि त्याची आज्ञा पाळली पाहिजे. नंतर त्याला खरे ज्ञान मिळायला सुरुवात होईल. पण ज्या लोकांना पाप आवडते ते शहाणपणाचा आणि योग्य शिकवणीचा तिरस्कार करतात.

## शलमोनाचा त्याच्या मुलांस उपदेश

8मुला,* तू तुझ्या वडिलांची शिकवण पाळली पाहिजेस. आणि तू तुझ्या आईची शिकवणही पाळायला हवीस. 9तुझ्या आईचे आणि वडिलांचे शब्द म्हणजे तुझे मस्तक सुशोभित करणारा फुलांचा मुकुट आहे. ते शब्द म्हणजे तुझ्या गळ्याभोवती असलेली सुंदर माळ आहे.

## कुसंगतीपासून दूर राहाण्याची सूचना

10मुला, ज्या लोकांना पाप आवडते ते लोक तुला प्रलोभने दाखवतील. तू त्यांचे ऐकू नकोस. 11ते पापी म्हणतील, “आमच्याबरोबर चल. आपण लपू आणि कोणाला तरी मारण्याची वाट बघू. 12आपण कोणत्या तरी निरपराध माणसावर हल्ला करू आपण त्या माणसाला मारू आणि त्याला मृत्युलोकात पाठवू. 13आपण किमती वस्तूंची चोरी करू. आपण त्या माणसाचा सर्वनाश करू व त्याला कबरेत पाठवू. आपण अशा वस्तूंनी आपले घर भरू. 14तेव्हा आमच्याबरोबर ये आणि या गोष्टी करायला आम्हाला मदत कर. आपल्याला ज्या गोष्टी मिळतील त्या आपण वाटून घेऊ.”

15मुला, ज्या लोकांना पाप आवडते त्यांच्या मागे जाऊ नकोस. ते ज्या रस्त्यावर राहातात त्या रस्त्यावर एक पाऊलही टाकू नकोस. 16ते लोक दुष्कृत्य करायला नेहमी तयार असतात. त्यांची नेहमी लोकांना ठार मारण्याची इच्छा असते.

17लोक पक्ष्यांना पकडण्यासाठी जाळे पसरतात. पण पक्षी जेव्हा तुम्हाला बघत असतो तेव्हा त्याला पकडण्यासाठी जाळे टाकण्यात अर्थ नसतो. 18ते वाईट लोक लपतात व कोणाला तरी मारण्यासाठी वाट बघतात पण खरोखर तेच त्या सापळ्यात अडकतील. त्यांच्या सापळ्यामुळे त्यांचाच नाश होईल. 19आधाशी लोकांचे असेच असते. ते नेहमी दुसऱ्यांच्या वस्तू घेतात. त्या वस्तूंनीच त्यांचा नाश होतो.

## चांगली स्त्री –ज्ञान

20ऐका! ज्ञान (रूपी स्त्री) लोकांना शिकवायचा प्रयत्न करीत आहे. ती रस्त्यात आणि बाजारात ओरडत आहे. 21ती गजबजलेल्या रस्त्याच्या कोपऱ्यावरून बोलावत आहे. लोकांनी तिचे ऐकावे म्हणून शहराच्या दरवाजाशी प्रयत्न करीत आहे. ज्ञान* (रूपी स्त्री) म्हणते.

22“तुम्ही लोक मूर्ख आहात. तुम्ही आणखी किती काळ मूर्ख गोष्टी करीत राहाणार आहात? तुम्ही ज्ञानाची थट्टा

---

**मुला** नीतिसूत्रांचे हे पुस्तक पौगंडावस्थेतून तारुण्यात पदार्पण करणाऱ्या मुलासाठी लिहिले गेले असावे. हे पुस्तक त्याला देवावर प्रेम करणारा आणि त्याला मान देणारा एक जबाबदार तरुण कसे व्हायचे ते शिकवते.

**ज्ञान** शलमोन, ज्ञान आणि मूर्खता या दोन स्त्रिया आहेत असे चित्र वापरतो. शलमोन त्याला लिहित आहे त्या तरुणाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या स्त्रिया करीत आहेत. ज्ञान रूपी स्त्री ही चांगली स्त्री आहे आणि ती त्या तरुणाला शहाणा व्हायला आणि देवाच्या आज्ञा पाळायला सांगते. मूर्खता ही वाईट स्त्री आहे आणि ती त्या तरुणाला मूर्ख व्हायला आणि पाप करायला सांगते.

किती काळ करीत राहाणार आहात? तुम्ही ज्ञानाचा किती काळ तिरस्कार करणार आहात? 23तुम्ही माझ्या सल्ल्याकडे आणि शिकवणुकीकडे लक्ष दिले असते तर मला जे माहित आहे ते सर्व मी तुम्हाला सांगितले असते. मला जे सर्व माहित आहे ते तुम्हाला सांगितले असते. मी माझे सर्व ज्ञान तुम्हाला दिले असते.

24“परंतु तुम्ही माझे ऐकायला नकार दिला. मी मदत करायचा प्रयत्न केला. मी माझा हात दिला. पण तुम्ही माझी मदत झिडकारली. 25तुम्ही दूर गेलात आणि माझ्या सल्ल्यांकडे दुर्लक्ष केले. तुम्ही माझे शब्द स्वीकारायला नकार दिलात. 26म्हणून मी तुमच्या संकटांना हसेन. तुमच्यावर संकटे आलेली पाहून मला आनंद होईल. 27मोठ्या वादळांप्रमाणे तुमच्यावर मोठी संकटे येतील. जोरदार वाऱ्याप्रमाणे तुमच्यावर समस्या आघात करतील. तुमची संकटे आणि दुःख तुम्हाला खूप मोठ्या ओझ्यासारखे वाटेल.

28“या सर्व गोष्टी घडतील तेव्हा तुम्ही माझी मदत मागाल. पण मी तुम्हाला मदत करणार नाही. तुम्ही मला शोधाल पण मी तुम्हाला सापडणार नाही. 29मी मदत करणार नाही कारण तुम्हाला माझे ज्ञान नको होते. तुम्ही परमेश्वराची भीती बाळगायला आणि त्याला मान द्यायला नकार दिला. 30तुम्ही माझा सल्ला ऐकायला नकार दिलात. मी तुम्हाला योग्य मार्ग दाखवला तेव्हा तुम्ही माझे ऐकले नाही. 31म्हणून आता तुम्ही तुमच्या मार्गाने चला. तुम्ही तुमच्या वाईट मार्गाने जीवन जगलात म्हणून तुम्ही तुमचा सर्वनाश करून घेणार आहात.

32“मूर्ख लोक मरतात कारण त्यांनी ज्ञानाचा मार्ग चोखाळायला नकार दिलेला असतो. त्यांचा मूर्ख मार्ग चोखाळण्यात त्यांना आनंद मिळतो. आणि त्यानेच त्यांचा नाश होतो. 33परंतु जो माझी आज्ञा पाळतो तो सुरक्षित राहातो. तो समाधानी असतो. त्याला वाईट गोष्टींची भीती बाळगायचे कारण उरत नाही.”

## ज्ञानाचे ऐका

2 मुला, मी ज्या गोष्टी सांगतो त्याचा स्वीकार कर. माझ्या आज्ञा लक्षात ठेव. 2ज्ञानाचे ऐक. आणि ते समजून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा कर. 3ज्ञानासाठी ओरड आणि समजून घेण्यासाठी आवाज चढव. 4ज्ञानाचा चांदीसारखा शोध घे. गुप्तधनाप्रमाणे त्याचा शोध घे. 5जर तू या गोष्टी केल्यास तर तू परमेश्वराला मान द्यायला शिकशील. तू खरोखरच देवाविषयी शिकशील.

6परमेश्वर ज्ञान देतो. ज्ञान आणि समज त्याच्या मुखातून येते. 7तो चांगल्या आणि प्रामाणिक माणसांना मदत करतो. सरळ मार्गावर चालणाऱ्या लोकांसाठी तो ढालीसारखा आहे. 8जे लोक इतरांशी न्यायाने वागतात त्यांचे तो रक्षण करतो. त्याच्या पवित्र लोकांचे तो रक्षण करतो.

9म्हणून परमेश्वर तुला त्याचे ज्ञान देईल. नंतर तुला चांगल्या न्यायाच्या आणि योग्य गोष्टी कळतील. 10ज्ञान तुझ्या हृदयात येईल. आणि तुझा आत्मा ज्ञानामुळे आनंदित होईल.

11ज्ञान तुझे रक्षण करील. आणि समज तुला सांभाळेल. 12ज्ञान आणि समज तुला दुष्ट लोकांसारखे चुकीचे जीवन जगण्यापासून परावृत्त करतील. ते लोक बोलतानाही दुष्टपणा करतात. 13त्यांनी चांगुलपणा सोडला आणि आता ते पापाच्या अंधकारात राहात आहेत. 14त्यांना चूक करण्यात आनंद वाटतो. आणि त्यांना पापाचे वाईट मार्ग आनंदित करतात. 15त्या लोकांवर विश्वास टाकणे शक्य नाही. ते खोटं बोलतात आणि फसवतात. पण तुझे ज्ञान आणि तुझी समज तुला या सर्व गोष्टींपासून दूर ठेवेल.

16-17ज्ञान तुला अनोळखी स्त्रीपासून वाचवील. दुसऱ्या देशातली एखादी स्त्री गोड शब्दांनी तुला तिच्याबरोबर पाप करायला प्रवृत्त करेल. त्या स्त्रीने तरुणपणी लग्न केले. पण तिने नवऱ्याला सोडले. तिने देवासमोर तिचे लग्नाचे वचन पाळले नाही. पण ज्ञान तुला तिला ‘नाही’ म्हणायला मदत करील. 18तिच्या बरोबर घरात जाणे म्हणजे विनाशाकडे नेणारे पहिले पाऊल उचलणे. जर तू तिच्या मागे गेलास तर ती तुला तुझ्या कबरेकडे घेऊन जाईल. 19ती उघड्या कबरेसारखी आहे. जे लोक तिच्याकडे आत जातात ते जीवनाला मुकतात आणि पुन्हा कधीच परत येत नाहीत.

20ज्ञान तुला चांगल्या लोकांचे उदाहरण पुढे ठेवून चालायला व त्यांच्याप्रमाणे जगायला मदत करील. 21चांगले प्रमाणिक लोक स्वतःच्या जमीनीवर राहातील. साधे प्रमाणिक लोक स्वतःची जमीन राखतील. 22परंतु दुष्ट लोक त्यांच्या जमीनीला मुकतील. जे लोक खोटे बोलतात व फसवतात त्यांना त्यांच्या जमिनीपासून दूर नेले जाईल.

## योग्य जगणे तुझ्या आयुष्यात भर घालेल

3 मुला, माझी शिकवण विसरू नकोस. मी तुला ज्या गोष्टी करायला सांगतो त्या लक्षात ठेव. 2मी तुला ज्या गोष्टी करायला सांगतो त्या तुला अधिक दीर्घ आणि अधिक सुखी आयुष्य देतील.

3प्रेम करणे कधी सोडू नकोस. नेहमी इमानदार आणि प्रामाणिक राहा. या गोष्टी तुझाच एक घटक बनव. त्यांना तुझ्या मानेभोवती बांध. त्या गोष्टी तुझ्या हृदयावर कोर. 4म्हणजे तू शहाणा होशील व देवाला व लोकांना तुझ्याबद्दल आनंद वाटेल.

## परमेश्वरावर विश्वास ठेव

5परमेश्वरावर संपूर्ण विश्वास ठेव. तुझ्या स्वतःच्या ज्ञानावर अवलंबून राहू नकोस. 6तू जी प्रत्येक गोष्ट करशील ती करताना देवाचा विचार कर. म्हणजे तो तुला मदत करील. 7तुझ्या स्वतःच्या शहाणपणावर

अवलंबून राहू नकोस. पण परमेश्वराला मान दे आणि
वाईट गोष्टींपासून दूर राहा. [8]तू जर हे केलेस तर ते
तुझ्या शरीराला औषधाप्रमाणे बरे करील किंवा पेयाप्रमाणे
तुझ्या हाडांना ताजेतवाने करील.

## परमेश्वराला दे

[9]तुझ्या संपत्तीने परमेश्वराला मान दे. तुझ्या जवळच्या
सर्वांत चांगल्या गोष्टी त्याला दे. [10]नंतर तुझ्या सर्व गरजा
पूर्ण होतील. तुझे कोठार धान्याने भरेल. आणि तुझी पिंपे
द्राक्षारसाने भरून वाहातील.

## परमेश्वराच्या शिक्षेचा स्वीकार कर

[11]मुला, परमेश्वर तुला कधी कधी तू चूक करीत
आहेस हे दाखवून देईल. पण या शिक्षेमुळे तू रागावू
नकोस. त्यापासून शिकायचा प्रयत्न कर. [12]का? कारण
परमेश्वर ज्यांच्यावर प्रेम करतो त्यांनाच सुधारतो.
होय,मुलावर प्रेम करणाऱ्या व त्याला शिक्षा करणाऱ्या
बापासारखा देव आहे.

## ज्ञान-प्राप्तीचे आशीर्वाद

[13]ज्या माणसाला ज्ञान मिळेल तो खूप सुखी होईल.
त्याला जेव्हा समजायला लागते तेव्हाच त्याला आशीर्वाद
मिळतात. [14]ज्ञानामुळे जे लाभ होतात ते रूप्यापेक्षा चांगले
आहेत. ज्ञानापासून मिळणारे लाभ उत्कृष्ट सोन्यापेक्षा
चांगले आहेत. [15]ज्ञान रत्नांपेक्षा अधिक मौल्यवान आहे.
तुम्ही त्यांची अपेक्षा कराल त्यापैकी कोणतीही गोष्ट
ज्ञानाइतकी मौल्यवान असणार नाही.

[16]ज्ञान तुम्हाला मोठे आयुष्य संपत्ती आणि मानसन्मान
देते. [17]ज्ञान असलेले लोक शांतीत आणि समाधानात
जगतात. [18]ज्ञान जीवनाच्या वृक्षाप्रमाणे आहे. जे लोक
त्याचा स्वीकार करतात त्यांना संपूर्ण आयुष्य लाभते. जे
लोक ज्ञान धारण करतात ते खरोखरच सुखी होतात.

[19]परमेश्वराने पृथ्वी निर्माण करण्यासाठी ज्ञानाचा वापर
केला. परमेश्वराने आकाश निर्माण करण्यासाठी ज्ञान
वापरले. [20]परमेश्वराने समुद्र निर्माण करण्यासाठी त्याचे
ज्ञान वापरले. आणि पावसाचे ढग तयार करण्यासाठी
ज्ञान वापरले.

[21]मुला, तुझे ज्ञान आणि समज ही नेहमी सांभाळून
ठेव. या गोष्टी सोडू नकोस. [22]ज्ञान आणि समज तुला
जीवन देतील. आणि ते अधिक सुंदर करतील. [23]नंतर तू
सुरक्षिततेचे जीवन जगशील आणि कधीही पडणार नाहीस.
[24]तू जेव्हा झोपशील तेव्हा घाबरणार नाहीस. तू विश्रांती
घेशील तेव्हा तुझी झोप शांत असेल. [25-26]अचानक
येणाऱ्या संकटास घाबरू नकोस. परमेश्वर तुला शक्ती
देईन. आणि वाईट लोक तुला काय करतील ह्याला
घाबरू नको. परमेश्वर तुझे रक्षण करील व तुझा जीव
वाचवील.

## उचित जगण्याचे ज्ञान

[27]जेव्हा शक्य होईल तेव्हा ज्यांना मदतीची गरज असते
त्यांच्यासाठी चांगली गोष्ट करा. [28]जर तुमच्या शेजाऱ्याने
काही मागितले आणि ते तुमच्याजवळ असले तर त्याला
ते लगेच द्या. "त्याला उद्या यायला सांगू नका."

[29]तुमचा शेजारी विश्वासाने तुमच्याजवळ राहातो तेव्हा
शेजाऱ्याला त्रास देण्याच्या योजना आखू नका. तुम्ही
स्वत:च्या सुरक्षिततेसाठी एकमेकांच्या जवळ राहता.

[30]योग्य कारणाशिवाय एखाद्याला कोर्टात नेऊ नका.
जर त्याने तुम्हाला काही केले नसेल तर तसे करू नका.

[31]काही लोकांना चटकन् राग येतो. आणि ते लगेच
वाईट गोष्ट करतात. तुम्ही तसे करू नका. [32]का? कारण
परमेश्वर वाईट लोकांचा तिरस्कार करतो. परंतु परमेश्वर
चांगल्या लोकांचा पाठीराखा असतो.

[33]परमेश्वर वाईट लोकांच्या कुटुंबाविरुध्द असतो. परंतु
जे लोक योग्य रीतीने जगतात त्यांच्या कुटुंबांना तो आशीर्वाद
देतो.

[34]जर एखादा माणूस गर्विष्ठ असला आणि दुसऱ्यांची
चेष्टा करत असला तर परमेश्वर त्याला शिक्षा करील
आणि त्याची चेष्टा करील. पण परमेश्वर नम्र लोकांशी
दयाळू असतो.

[35]शहाणे लोक सन्मान प्राप्त होईल असे जीवन जगतात
परंतु मूर्ख लोक लाज वाटण्यासारखे जीवन जगतात.

## शहाणपणाचे आणि समजुतदारपणाचे महत्व

4 मुलांनो, तुमच्या वडिलांच्या शिकवणुकीकडे लक्ष
द्या. लक्ष दिले की तुम्हाला कळेल. [2]का? कारण
मी जे सांगतो ते महत्वाचे आहे आणि चांगले आहे. म्हणून
माझी शिकवण कधीही विसरु नका.

[3]एकेकाळी मी सुध्दा लहान होतो. मी माझ्या वडिलांचा
लहान मुलगा होतो. आणि माझ्या आईचा एकुलता एक.
[4]आणि माझ्या वडिलांनी मला शिकवले. ते मला म्हणाले,
"मी जे सांगतो ते लक्षात ठेव. माझ्या आज्ञा पाळ. म्हणजे
तू जिवंत राहाशील. [5]ज्ञान आणि समजूतदारपणा मिळव.
माझे शब्द विसरू नकोस. माझ्या शिकवणुकीप्रमाणे वाग.
[6]ज्ञानापासून दूर जाऊ नकोस. ज्ञान तुझे रक्षण करील.
ज्ञानावर प्रेम कर म्हणजे ते तुझे रक्षण करील."

[7]तुम्ही ज्ञान मिळवण्याचा निश्चय करता तेव्हाच ज्ञानाची
सुरुवात होते. म्हणून तुमच्याकडे जे काही आहे त्याचा
उपयोग करून ज्ञान मिळवा. म्हणजे तुम्ही ज्ञानी व्हाल.
[8]ज्ञानावर प्रेम करा म्हणजे ते तुम्हाला मोठे करील. तुम्ही
ज्ञानाला महान करा म्हणजे ते तुम्हाला मान मिळवून
देईल. [9]ज्ञान तुमच्यासाठी सौंदर्य आणि वैभव यांचा मुकुट
आहे. ते तुम्हाला मुक्त करते.

[10]मुला, माझे ऐक. मी जे सांगतो ते कर म्हणजे तू खूप
जगशील. [11]मी तुला ज्ञानाविषयी शिकवत आहे. मी तुला
सरळ मार्गाने नेत आहे. [12]तू जर याच मार्गाने गेलास तर

तू सापळ्यात अडकणार नाहीस. तू पळू शकशील पण
अडखळणार नाहीस. तू ज्या गोष्टी करण्याचा प्रयत्न
करशील त्यात सुरक्षित राहाशील. 13या धड्यांची नेहमी
आठवण ठेवा. हे धडे विसरू नका. ते तुमचे जीवन आहे.
14दुष्ट लोक जो मार्ग आचरतात त्यावरून जाऊ नका.
तसे जगू नका. त्यांच्यासारखे व्हायचा प्रयत्न करू नका.
15वाईटापासून दूर राहा. त्याच्या जवळ जाऊ नका. त्याच्या
जवळून सरळ निघून जा. 16वाईट लोक कोणते तरी
वाईट कृत्य केल्याशिवाय झोपू शकत नाहीत. त्यांना
दुसऱ्यांना त्रास दिल्याशिवाय झोप येत नाही. 17ते
दुष्टपणापासून बनवलेली भाकर खातात आणि हिंसेचे
मद्य पितात. (दुष्टपणा केल्याशिवाय ते राहू शकत नाहीत.)
18चांगले लोक पहाटेच्या प्रकाशासारखे असतात. सूर्य
उगवतो आणि दिवस प्रकाशित आणि आनंदमय होतो.
19पण वाईट लोक रात्रीसारखे असतात. ते काळोखात
हरवून जातात आणि दिसू न शकणाऱ्या वस्तूंना अडखळून
पडतात.
20मुला, मी जे सांगितले त्याक़डे लक्ष दे. माझे शब्द
लक्षपूर्वक ऐक. 21तू माझ्या शब्दांना तुला सोडून जायला
लावू नकोस. मी सांगतो ते लक्षात ठेव. 22जे माझी शिकवण
ऐकतील त्यांना जीवन मिळेल. माझे शब्द शरीराला
आरोग्यासारखे आहेत. 23तुझ्या हृदयाला काळजीपूर्वक
जप. कारण तेथूनच जीवनप्रवाह वाहतात.
24सत्याला वाकवू नकोस आणि खऱ्या नसलेल्या गोष्टी
सांगू नकोस. खोटे बोलू नकोस. 25तुझ्या समोर असलेल्या
चांगल्या आणि शहाण्या ध्येयांपासून दूर जाऊ नकोस.
26तू जे करशील त्या बाबतीत सावध राहा. चांगले आयुष्य
जग. 27सरळ मार्ग सोडू नकोस. चांगला आणि योग्य मार्ग
धर पण वाईटा पासून नेहमी दूर राहा.

## व्यभिचारापासून दूर राहाण्याचे शहाणपण

5 मुला, माझ्या शहाणपणाच्या शिकवणुकीकडे लक्ष
दे. माझ्या समजूत निर्माण करणाऱ्या शब्दाकडे लक्ष
दे. 2नंतर तुला जगण्याचा योग्य मार्ग कळेल. तुझे शब्द तू
शहाणा आहेस हे दाखवून देतील. 3दुसऱ्या माणसाची
बायको खूप मोहक असेल. तीच्या मुखातून बाहेर पडणारे
शब्द खूप गोड व आकर्षक असतील. 4पण शेवटी त्यामुळे
कटुता व दु:खच मिळेल. ते दु:ख विषापेक्षाही कडवट
असेल. आणि तलवारीपेक्षा धारदार असेल. 5तिचे पाय
मृत्यूलाच जाऊन भिडतात. ती तुला सरळ कबरेत नेईल.
6तिच्या मागे जाऊ नकोस. तिने योग्य मार्ग सोडला आहे
आणि ते तिला माहीत नाही. काळजीपूर्वक राहा. जीवनाचा
योग्य मार्ग आचर.

## व्यभिचार तुझा सर्वनाश करेल

7मुलांनो, आता माझे ऐका. मी जे सांगतो ते विसरू
नका. 8जी स्त्री व्यभिचार करते तिच्यापासून दूर राहा.
तिच्या घराच्या दाराजवळ सुध्दा जाऊ नका. 9जर तुम्ही
गेलात तर तुम्ही लोकांच्या मनातल्या तुमच्या विषयीच्या
आदराला मुकाल. तुमचा गेलेला मान दुसरे लोक घेतील.
शेवटी तुम्ही तुमच्या जीवनाला मुकाल. दुष्ट लोक ते
तुमच्यापासून हिरावून घेतील. 10तुम्हाला माहीत नसलेले
लोक तुमची संपत्ती घेतील. तुम्ही ज्या गोष्टी मिळवण्यासाठी
कष्ट केलेत त्या गोष्टी ते लोक घेतील. 11तुम्ही आयुष्याच्या
शेवटी कष्टी व्हाल. तुमचे शरीर आणि मन सर्व काही
नाश पावेल. 12–13नंतर तुम्ही म्हणाल, “मी माझ्या
आई-वडिलांचे का ऐकले नाही? मी शिस्त पाळायला
नकार दिला. मी सुधारायला नकार दिला. 14आता शेवटी
मला दिसते की माझे आयुष्य वाया गेले आहे. आणि
सगळ्या लोकांना माझी लाज दिसते आहे.”

## तुमचे स्वत:चे आयुष्य उपभोगा

15–16तुझ्या विहिरीतून वाहणारे पाणीच फक्त पी. आणि
तुझे पाणी रस्त्यावर वाहून जाऊ देऊ नकोस. [तू फक्त
तुझ्या बायको बरोबरच लैंगिक संबंध ठेवायला हवेस.
तुझ्या घराबाहेरच्या मुलांचा बाप होऊ नकोस. 17तुझी
मुले फक्त तुझीच असायला हवीत. घराबाहेरच्या इतर
लोकांबरोबर त्यांची भागीदारी असायला नको. 18म्हणून
तुझ्या बायकोबरोबर सुखी राहा. तरुणपणी जिच्याबरोबर
लग्न केलेस तिलाच उपभोग. 19ती सुंदर हरिणीसारखी
आहे. गोजिरवाण्या हरिणाच्या पाडसासारखी आहे. तिचे
प्रेम तुझे समाधान करो. तू तिच्या प्रेमात बंदीवान हो.
20दुसऱ्याच्या बायकोकडून तू असा बंदीवान होऊ नकोस.
तुला दुसऱ्याच्या बायकोच्या प्रेमाची गरज नाही.
21तू जे काही करतोस ते परमेश्वराला स्पष्ट दिसते.
तू कुठे जातोस ते परमेश्वर बघतो. 22दुष्ट माणसाची पापे
त्याला जाळ्यात पकडतील त्याची पापे दोरीप्रमाणे
त्याला पकडतील. 23तो दुष्ट माणूस मरेल कारण
त्याने शिस्त नाकारली. तो स्वत: च्या मूर्खपणामुळेच
अडकला जाईल.

## एखाद्याला कर्ज मिळवून देण्यात मदत करण्यातले धोके

6 मुला, दुसऱ्याच्या कर्जाला जामीन राहू नकोस. त्या
माणसाला कर्जाची परतफेड करता आली नाही तर
तू ते परत करण्याचे वचन का दिलेस? तू दुसऱ्याच्या
कर्जाची हमी घेतलीस का? 2तर मग तू अडकलास. तुला
तुझ्या शब्दांनीच अडकवले. 3तू त्या माणसाच्या शक्तीखाली
आलास. मग त्याच्याकडे जा आणि स्वत:ला सोडव. त्याच्या
कर्जापासून तुझी सुटका करण्यासाठी त्याची भीक माग.
4विश्रांतीसाठी वा झोपण्यासाठी सुध्दा थांबू नकोस.
5शिकाऱ्यापासून हरिण जसे दूर पळते तसा तू सापळ्यापासून
दूर राहा. जाळ्यातून उडून जाणाऱ्या पक्ष्याप्रमाणे स्वत:ला
सोडव.

### आळशी असल्यामुळे धोके

6आळशी माणसा, तुला मुंगी सारखे व्हायला हवे. मुंगी
काय करते ते बघ. मुंगी पासून शीक. 7मुंगीला राजा
नाही, वरिष्ठ नाही की नेता नाही. 8पण उन्हाळ्यात ती
सगळे अन्न गोळा करते. मुंगी तिचे अन्न साठवते आणि
हिवाळ्यात तिच्याजवळ भरपूर अन्न असते.

9आळशी माणसा, तू किती वेळ झोपून राहाणार आहेस?
तू विश्रांतीतून केव्हा उठणार आहेस? 10आळशी माणूस
म्हणतो, "मला थोडी झोप हवी. मी इथे थोड्या वेळासाठी
पडतो." 11परंतु तो झोपतच राहातो. आणि गरीब होत
राहातो. लवकरच त्याच्याजवळ काहीही नसेल. चोर
अचानक येऊन सर्व काही घेऊन जातो त्याचप्रमाणे त्याला
अचानक गरीबी येईल.

### दुष्ट माणूस

12दुष्ट आणि कवडीमोल माणूस खोटे बोलतो. आणि
वाईट गोष्टी सांगतो. 13तो डोळे मिचकावतो आणि लोकांना
मूर्ख बनविण्यासाठी खुणा करतो. 14तो माणूस दुष्ट असतो,
तो नेहमी वाईट गोष्टी करण्याच्या योजना आखतो. तो
सगळीकडे संकटे आणतो. 15पण त्याला शिक्षा होईल.
त्याच्यावर अचानक संकट येईल. त्याचा त्वरित नाश
होईल. आणि त्याला काहीही मदत मिळू शकणार नाही.

### परमेश्वर ज्याचा तिरस्कार करतो त्या सात गोष्टी

16परमेश्वर या सहा, नाही सात गोष्टींचा तिरस्कार
करतो.

17डोळे, जे माणूस गर्विष्ठ आहे हे दाखवतात. जीभ, जी
खोटे बोलते, हात, जे निरपराध्यांना ठार मारतात.

18हृदय जे वाईट गोष्टी करण्याच्या योजना आखते.
पाय जे वाईट गोष्टी करायला धाव घेतात.

19माणूस जो खोटे बोलतो आणि कोर्टात खऱ्या नसलेल्या
गोष्टी सांगतो. माणूस जो वादविवादाला सुरुवात करतो
आणि दुसऱ्यांमध्ये भांडणे लावून देतो.

20माझ्या मुला, तुझ्या वडिलांची आज्ञा लक्षात ठेव.
आणि तुझ्या आईची शिकवण विसरू नकोस. 21त्यांचे
शब्द नेहमी लक्षात ठेव. त्यांच्या शिकवणीला तुझ्या
आयुष्याचाच एक भाग बनव. 22त्यांची शिकवण तुला
जिथे जायचे असेल तिथे नेईल. तू झोपलास की ती तुझ्यावर
लक्ष ठेवेल आणि तू जेव्हा उठशील तेव्हा ती तुझ्याशी
बोलेल आणि तुला मार्ग दाखवील.

23तुझ्या आईवडिलांची शिकवण आणि आज्ञा
प्रकाशाप्रमाणे असून त्या तुला योग्य मार्ग दाखवतात. ते
तुला योग्य मार्ग दाखवतात आणि जीवनाचा मार्ग आचरायला
शिकवतात. 24त्यांची शिकवण तुला दुष्ट स्त्रीकडे
जाण्यापासून परावृत्त करते. नवऱ्याला सोडून आलेल्या
बाईच्या भुरळ पाडणाऱ्या बोलण्यापासून ते शब्द तुझे रक्षण
करतात. 25ती स्त्री सुंदर असेल. पण ते सौंदर्य तुझ्यात
जळू देऊ नकोस आणि तुला त्याची भुरळ पडू देऊ नकोस.
तू तिच्या डोळ्यांनी जायबंदी होऊ नकोस. 26वेश्येचा
मोबदला एक भाकरीचा असेल. पण दुसऱ्याच्या बायकोची
किंमत म्हणून तुला तुझे जीवित द्यावे लागेल.

27जर एखाद्याने स्वत:वर निखारे ओतले तर त्याचे
कपडेसुध्दा जळतील. 28जरा एखादा माणूस निखाऱ्यांवर
चालला तर त्याचे पाय भाजतील. 29दुसऱ्या माणसाच्या
बायकोबरोबर झोपणाऱ्याचेही असेच होते. त्या माणसाला
दु:ख भोगावे लागते.

30–31माणूस भुकेला असला तर तो अन्नाची चोरी
करतो. जर तो पकडला गेला तर त्याला चोरलेल्या
अन्नाच्या सात पट अन्न द्यावे लागते. त्याच्या जवळ असेल
नसेल ते सर्व त्याला त्याबद्दल द्यावे लागते. पण इतर
लोक समजून घेतात. ते त्याच्या बद्दलचा आदर घालवत
नाहीत.

32पण जो माणूस व्यभिचाराचे पाप करतो तो मूर्ख
असतो. तो स्वत:चा नाश करीत असतो. तो स्वत:च त्याच्या
नाशाला कारणीभूत असतो. 33लोकांना त्याच्याबद्दल
वाटणारा आदर नाहीसा होतो. आणि त्याच्यावरचा लज्जेचा
डाग कधीही धुतला जाणार नाही. 34त्या स्त्रीचा नवरा
मत्सरी होईल, त्या नवऱ्याला खूप राग येईल. त्या दुसऱ्या
माणसाला शिक्षा करण्यासाठी तो काय वाट्टेल ते करेल.
35त्याचा राग शांत करण्यासाठी कितीही पैसा दिला तरी
तो पुरेसा ठरणार नाही.

### शहाणपण (ज्ञान) तुला व्यभिचारापासून परावृत्त करेल

7 मुला, माझे शब्द लक्षात ठेव. मी देतो त्या आज्ञा
विसरू नकोस. 2माझ्या आज्ञा पाळ म्हणजे तुला
जीवन मिळेल. माझ्या शिकवणुकीला तुझ्या आयुष्यातली
एक महत्वाची गोष्ट बनव. 3माझ्या आज्ञा आणि माझी
शिकवण सदैव तुझ्याजवळ राहू दे. त्यांना तुझ्या बोटांभोवती
बांध. तुझ्या हृदयावर ते कोरून ठेव. 4शहाणपणाला
बहिणीसारखे वागव. समजुतदारपणाला तुझ्या कुटुंबाचाच
एक घटक बनव. 5नंतर ते तुझा दुसऱ्या स्त्रीपासून बचाव
करतील. ते तुला तिच्या पापाकडे नेणाऱ्या गोड शब्दांपासून
वाचवतील.

6एक दिवस मी माझ्या खिडकीतून पाहिले आणि मला
7बरेच मूर्ख तरुण दिसले. मला एक तरुण दिसला जो
खूपच मूर्ख होता. 8त्याने वाईट स्त्रीच्या घराचा रस्ता
धरला. त्याला भेटण्यासाठी ती घरातून बाहेर आली. 9तेव्हा
अंधार होत होता–सूर्य मावळत होता व रात्र पडायला सुरूवात
झाली होती. 10ती स्त्री त्याला भेटायला घरातून बाहेर
आली. तिने वेश्येसारखा पोशाख केला होता. तिने
त्याच्याबरोबर पाप करायचे ठरवले. 11तिला पापाची पर्वा
नव्हती. तिला चांगल्या वाईटाची पर्वा नव्हती. ती कधीच

घरी राहात नसे. 12ती नेहमी रस्त्यातून हिंडे. ती संकटांना
बोलावत सर्वत्र हिंडे. 13तिने त्या तरुणाला पकडले आणि
त्याचे चुंबन घेतले. लाज न वाटता ती म्हणाली, 14“आज
मी (शांत्यर्पणाची) मेजवानी दिली. मी जे द्यायचे वचन
दिले होते ते सर्व मी दिले आणि अजूनही माझ्याकडे खूप
अन्न उरले आहे. 15म्हणून मी तुला माझ्याकडे येण्याचे
आमंत्रण देण्यासाठी बाहेर आले. मी तुलाच शोधत होते.
आणि आता तू मला सापडलास. 16मी माझ्या अंथरुणावर
स्वच्छ चादर टाकली आहे. त्या मिसर देशातल्या सुंदर
चादरी आहेत. 17मी माझ्या अंथरुणावर अत्तर शिंपडले
आहे. मी बोळ, अगरु आणि दालचिनीचा वापर केला
आहे. 18चल, आपण सकाळ होईपर्यंत प्रेम करु या. आपण
रात्रभर उपभोग घेऊ. 19माझा नवरा दूर गेला आहे. तो
व्यवसायासाठी बाहेरगावी गेला आहे. 20त्याने दूरच्या
प्रवासासाठी पुरेसे पैसे बरोबर घेतले आहेत. तो दोन आठवडे
घरी येणार नाही.”*

21त्या बाईने त्या तरुणाला भुलविण्यासाठी हे शब्द
वापरले. तिच्या गोड बोलण्याला तो भुलला. 22आणि तो
तरुण तिच्या मागोमाग जाळ्यात गेला. तो कत्तलखान्यात
नेल्या जाणाऱ्या बैलाप्रमाणे होता. शिकारी ज्याच्या हृदयात
बाण सोडायला. 23तयार आहेत अशा हरिणाप्रमाणे तो
होता. तो ज्या संकटात होता ते त्याला कळले नाही.

24मुलांनो आता माझे ऐका. माझ्या शब्दांकडे लक्ष द्या.
25दुष्ट स्त्रीला तुमचा कब्जा घेऊ देऊ नका. तिच्या
मार्गावरून जाऊ नका. 26तिने खूप माणसांना पाडले
आहे. तिने खूप जणांचा नाश केला आहे. 27तिचे घर
म्हणजे मृत्यूचा सापळा आहे. तिचा मार्ग सरळ मरणातच
जातो.

## ज्ञान, एक चांगली स्त्री

8 ऐक, ज्ञान आणि समजूतदारपणा तुला तू एकावेस
म्हणून तुला बोलावत आहेत.

2ते टेकडीच्या माथ्यावर जिथे रस्ते मिळतात, तिथे उभे
आहेत.

3ते शहराच्या दरवाजाशी आहेत. ते उघड्या दरवाजातून
बोलावत आहेत.

4ज्ञान (रूपी स्त्री) म्हणते, “लोक हो! मी तुम्हाला बोलावत
आहे. मी सगळ्या लोकांना बोलावत आहे.

5तुम्ही जर मूर्ख असाल, तर शहाणे व्हायला शिका.
मूर्ख माणसांनो समजून घ्यायला शिका.

6लक्ष द्या! मी ज्या गोष्टी शिकवतो त्या महत्वाच्या
आहेत. मी तुम्हाला फक्त योग्य असलेल्या गोष्टीच सांगतो.

7माझे शब्द खरे आहेत. मला वाईटाचा, खोट्याचा
तिरस्कार वाटतो.

8मी ज्या गोष्टी सांगतो त्या न्याय्य आहेत. माझ्या शब्दांत
काहीही चुकीचे अथवा खोटे नाही.

9जो माणूस समजूतदार आहे त्याला या गोष्टी स्पष्ट
दिसतात. ज्ञानी माणूस या गोष्टी समजू शकतो.

10माझ्या शिस्तीचा स्वीकार करा. ती रूप्यापेक्षाही
मौल्यवान आहे. ती शुध्द सोन्यापेक्षाही मौल्यवान आहे.

11ज्ञान मोत्यापेक्षा, अधिक मौल्यवान आहे. ते
माणसाला हव्या असलेल्या कुठल्याही गोष्टीपेक्षा
मौल्यवान आहे.”

## ज्ञानरूपी स्त्री काय करते

12“मी ज्ञान आहे. मी चांगल्या न्यायाने जगते. तुम्ही
मला ज्ञानाबरोबर आणि चांगल्या योजनांबरोबर पाहू
शकता.

13जर एखादा माणूस परमेश्वराला मान देत असला तर
तो वाईटाचा तिरस्कार करेल. मी (ज्ञान) गर्वाचा आणि
जे लोक इतरांपेक्षा स्वत:ला मोठे समजतात अशा लोकांचा
तिरस्कार करते. मी वाईट मार्ग आणि खोटे बोलणाऱ्या
तोंडांचा तिरस्कार करते.

14परंतु मी लोकांना योग्य निर्णय घेण्याचे सामर्थ्य देते
आणि योग्य चांगला न्याय देते. मी समजूतदारपणा आणि
शक्ती देते.

15राजे राज्य करताना माझा उपयोग करतात. राज्यकर्ते
चांगले कायदे करण्यासाठी माझा उपयोग करतात.

16प्रत्येक चांगला राज्यकर्ता त्याच्या अंमलाखाली
असलेल्या लोकांवर राज्य करण्यासाठी माझा उपयोग
करून घेतो.

17मी (ज्ञान), माझ्यावर जे प्रेम करतात त्यांच्यावर
प्रेम करते. आणि जे लोक मला शोधायचा खूप प्रयत्न
करतात त्यांना मी हटकून सापडते.

18माझ्याजवळही देण्यासाठी श्रीमंती आणि मानमरातब
आहेत. मी खरी संपत्ती आणि यश देते.

19मी ज्या गोष्टी देते त्या शुध्द सोन्यापेक्षा चांगल्या
असतात. आणि माझे नजराणे शुद्ध चांदीपेक्षा चांगले
असतात.

20मी लोकांना योग्य मार्गावर आणते. मी त्यांना योग्य
न्यायाच्या मार्गाने नेते.

21जे माझ्यावर प्रेम करतात त्यांना मी संपत्ती देते. होय,
मी त्यांची घरे खजिन्यांनी भरून टाकीन.

22खूप पूर्वी सुरुवातीला परमेश्वराने प्रथम माझीच
निर्मिती केली.

23आरंभीला मला निर्माण केले गेले. जगाची सुरुवात
होण्यापूर्वी मी निर्माण झाले.

24महासागराच्या आधी माझा जन्म झाला. पाणी उत्पन्न
होण्याआधी मी होते.

---

**तोदोन … येणार नाही** आठवडे शब्दश तो पौर्णिमेपर्यंत घरी येणार नाही. सहभोजन अमावास्येला झाले असावे असे यावरून दिसते. अमावस्या म्हणजे हिब्रू लोकांच्या महिन्याचा पहिला दिवस.

25पर्वतांच्या आधी माझा (ज्ञानाचा) जन्म झाला.
डोंगरांच्या आधी माझा जन्म झाला.
26परमेश्वराने पृथ्वी निर्माण करण्याआधीच मी जन्मले.
शेतांच्या आधी माझा जन्म झाला. देवाने पृथ्वीवरची पहिली
धूळ निर्माण करण्याआधीच माझा जन्म झाला होता.
27परमेश्वराने आकाशाची निर्मिती केली तेव्हा मी तिथे
होते. परमेश्वराने कोरड्या भूमीभोवती सीमा आखण्यासाठी
वर्तूळ काढले तेव्हा मी तिथे होते. त्याने सागराला सीमित
केले तेव्हा मी तिथे होते.
28परमेश्वराने आकाशात ढग ठेवण्याआधी माझा
जन्म झाला. आणि परमेश्वराने समुद्रात पाणी ठेवले
तेव्हाही मी तिथे होते.
29परमेश्वराने सागराच्या पाण्याला सीमाबध्द केले तेव्हा
ही मी होते. पाणी परमेश्वराच्या संमती शिवाय चढू शकत
नाही. परमेश्वराने पृथ्वीचा पाया घातला तेव्हा मी तिथे
होते.
30एखाद्या कसलेल्या कामगारासारखी मी त्याच्या बाजूला
होते. माझ्यामुळे परमेश्वर रोज आनंदी असे. मी त्याचा
आनंद होते.
31त्याने निर्माण केलेल्या जगाविषयी परमेश्वर उत्सुक
होता. तो तिथे निर्माण केलेल्या लोकांबद्दल आनंदी होता.
32“मुलांनो, आता माझे ऐका. जर तुम्ही माझा मार्ग
अनुसरला तर तुम्हीही आनंदी व्हाल.
33माझी शिकवण ऐका आणि शहाणे व्हा. ऐकायला
नकार देऊ नका.
34जो माझे ऐकतो तो सुखी होतो. तो रोज माझ्या दारावर
पाहारा देतो. तो माझ्या दाराजवळ थांबतो.
35ज्या माणसाला मी सापडते. त्याला जीवन सापडते.
त्याला परमेश्वराकडून चांगल्या गोष्टी मिळतील.
36पण जो माझ्याविरुध्द पाप करतो तो स्वत:लाच इजा
करून घेतो. जे लोक माझा तिरस्कार करतात ते मरणाला
कवटाळतात.”

## ज्ञानरूपी स्त्री आणि मूर्खता

9 ज्ञानरूपी स्त्रीने आपले घर बांधले. त्यात तिने सात
खांब* ठेवले. 2तिने [ज्ञानरूपी स्त्रीने] मांस शिजवले
आणि द्राक्षारस तयार केला. तिने अन्न तिच्या टेबलावर
ठेवले. 3नंतर तिने आपल्या नोकरांकरवी शहरातील
लोकांना तिच्याबरोबर टेकडीवर भोजन करण्यासाठी
येण्याचे आमंत्रण पाठविले. ती म्हणाली, 4“ज्या लोकांना
शिकण्याची आवश्यकता वाटते त्यांनी यावे.” तिने मूर्ख
लोकांनाही बोलावले. ती म्हणाली, 5“या माझ्या ज्ञानाचे
अन्न खा. आणि मी तयार केलेला द्राक्षारस प्या. 6तुमचे
जुने, मूर्खपणाचे मार्ग सोडून द्या. मग तुम्हाला आयुष्य
मिळेल. समजूतदारपणाचा मार्ग अनुसरा.”
7जर तुम्ही गर्विष्ठ माणसाला तो चुकत आहे हे सांगण्याचा
प्रयत्न केला तर तो तुमच्यावर केवळ टीका करेल. तो
माणूस देवाच्या शहाणपणाची चेष्टा करतो. जर तुम्ही दुष्ट
माणसाला तो चुकत आहे असे सांगितले तर तो तुमची
चेष्टा करेल. 8म्हणून जर एखादा माणूस तो इतरांपेक्षा
चांगला आहे असे म्हणत असेल तर त्याला तो चुकतो
आहे असे सांगू नका. तो त्या बद्दल तुमचा तिरस्कार
करेल. पण जर तुम्ही शहाण्या माणसाला मदत करण्याचा
प्रयत्न केलात तर तो तुमचा आदर करेल. 9जर तुम्ही
शहाण्या माणसाला शिकवलेत तर तो अधिक शहाणा
होईल. जर तुम्ही शहाण्या माणसाला शिकवलेत तर तो
अधिक शिकेल.
10परमेश्वराचा आदर करणे ही ज्ञान मिळवण्याची
पहिली पायरी आहे. परमेश्वराविषयी ज्ञान मिळवणे ही
समजूतदारपणा मिळवण्याची पहिली पायरी आहे. 11जर
तुम्ही शहाणे असाल तर तुमचे आयुष्य अधिक वाढेल.
12जर तुम्ही शहाणे होत असाल तर तुमच्या भल्यासाठीच
शहाणे होत असता. पण तर तुम्ही गर्विष्ठ झालात आणि
दुसऱ्या लोकांची चेष्टा करू लागलात तर तुमच्यावर
येणाऱ्या संकटांबद्दल तुम्हीच जबाबदार ठरता.
13मूर्ख माणूस हा कर्कश बोलणाऱ्या वाईट स्त्रीसारखा
असतो. तिच्याजवळ ज्ञान नसते. 14ती तिच्या घराच्या
दाराजवळ बसते. ती शहरातल्या टेकडीवर तिच्या खुर्चीवर
बसते. 15आणि जेव्हा लोक निघून जातात तेव्हा ती त्यांना
बोलावते. त्या लोकांना तिच्यात काही रस नसतो. तरीही
ती म्हणते, 16“या ज्या लोकांना शिकणे आवश्यक आहे
त्यांनी या.” तिने मूर्ख लोकांनाही बोलावले. 17पण ती
(मूर्खता) म्हणते, “जर तुम्ही पाणी चोरले तर ते पाणी
तुमच्या पाण्यापेक्षा अधिक चवदार लागते. जर तुम्ही भाकर
चोरली तर ती तुम्ही केलेल्या भाकरीपेक्षा अधिक चवदार
लागते.”
18आणि त्या मूर्ख गरीब लोकांना हे माहीत नव्हते की
तिचे घर फक्त भूतांनी भरलेले आहे. तिने (मूर्खता)
त्यांना मृत्युलोकातल्या अगदी खोल भागात बोलावले
होते.

## शलमोनाची नीतिसूत्रे

10 ही शलमोनाची नीतिसूत्रे (शहाणपणाच्या गोष्टी)
आहेत शहाणा मुलगा त्याच्या वडिलांना सुखी
करतो. पण मूर्ख मुलगा त्याच्या आईला अतिशय दु:खी
करतो.
2जर एखाद्याने वाईट गोष्टी करून पैसे मिळवले तर ते
पैसे कवडी मोलाचे असतात. पण सत्कर्म तुम्हाला
मरणापासून वाचवू शकते.

---

**सात खांब** प्राचिन मिसर देशातील बऱ्याच घरात चार चार प्रमुख खोल्या असत आणि छताला आधार देण्यासाठी सात खांब असत. यावरून ज्ञानरूपी स्त्रीकडे चांगले भक्क म घर होते असे दिसते.

[3]परमेश्वर चांगल्या लोकांची काळजी घेतो. तो त्यांना हवे असलेले अन्न देतो. परंतु परमेश्वर वाईट लोकांकडून त्यांना हव्या असलेल्या गोष्टी काढून घेतो.

[4]आळशी माणूस गरीब राहील. पण जो माणूस कष्ट करील तो श्रीमंत होईल.

[5]हुशार मुलगा योग्य वेळी धान्य गोळा करतो. पण हंगामाच्या वेळी झोपणारा आणि धान्य गोळा न करणारा मुलगा लाज आणतो.

[6]लोक देवाला चांगल्या माणसाला आशीर्वाद द्यायला सांगतात. वाईट लोक त्या चांगल्या गोष्टी म्हणतील परंतु त्याचे शब्द त्यांच्या वाईट योजना* फक्त लपवतात.

[7]चांगली माणसे चांगल्या आठवणी मागे ठेवतात. पण वाईट माणसे लवकर विसरली जातात.

[8]चांगला, इमानी माणूस सुरक्षित असतो. परंतु कुटिल, फसवणारा माणूस मात्र पकडला जातो.

[9]शहाण्या माणसाला जर एखाद्याने काही करायला सांगितले तर तो त्या आज्ञा पाळतो. परंतु मूर्ख माणूस वाद घालतो आणि स्वत:वर संकट ओढवून घेतो.

[10]जो माणूस सत्य लपवतो तो संकटे निर्माण करतो. जो माणूस उघडपणे बोलतो तो शांती* निर्माण करतो.

[11]चांगल्या माणसाच्या शब्दांमुळे आयुष्य चांगले होते. पण दुष्टाच्या शब्दांतून त्याच्या मनातला वाईटपणा तेव्हढा दिसतो.

[12]मत्सरामुळे वादविवाद होतात. पण प्रेम लोकांनी केलेल्या प्रत्येक चुकीच्या गोष्टीला क्षमा करते.

[13]शहाणे लोक ऐकायला योग्य अशा गोष्टी बोलतात. पण मूर्ख लोकांनी सुधारावे म्हणून त्यांना शिक्षा करायला हवी.

[14]शहाणे लोक शांत असतात आणि नवीन गोष्टी शिकतात. पण मूर्ख लोक बोलतात आणि संकटे ओढवून घेतात.

[15]संपत्ती श्रीमंत माणसाचे रक्षण करते आणि गरिबी गरिबांचा नाश करते.

[16]जर एखाद्याने चांगले कृत्य केले तर त्याला बक्षीस मिळते. त्याला आयुष्य दिले जाते. पण दुष्टावा केवळ शिक्षा आणतो.

[17]जो माणूस शिक्षेपासून काही शिकतो तो इतरांनासुध्दा जगायला शिकवू शकतो. पण जो माणूस शिकायला नकार देतो तो लोकांना चुकीच्या मार्गाने नेतो.

[18]जो माणूस त्याचा मत्सर लपवतो तो खोटे बोलत असतो. पण केवळ मूर्खच पसरवता येण्यासारख्या अफवा शोधण्याचा प्रयत्न करतो.

[19]जो माणूस खूप बडबड करतो तो संकटांना आमंत्रण देतो. शहाणा माणूस गप्प राहायला शिकतो.

[20]चांगल्या माणसाचे शब्द शुध्द चांदीसारखे असतात. पण दुष्ट माणसाचे विचार कवडीमोलाचे असतात.

[21]चांगल्या माणसांच्या शब्दामुळे अनेकांना मदत होते. पण मूर्खाची मूर्खता त्यालाच मारू शकते.

[22]परमेश्वराच्या आशीर्वादाने तुला खरी संपत्ती मिळेल. आणि ती आपल्याबरोबर संकटे आणणार नाही.

[23]मूर्ख माणसाला चुका करायला आवडते. परंतु शहाणा माणूस ज्ञानाने खुश होतो.

[24]दुष्ट माणसाला ज्या गोष्टींची भीती वाटते त्या गोष्टींकडूनच त्याचा पराभव होतो. पण चांगल्या माणसाला मात्र हव्या असलेल्या गोष्टी मिळतात.

[25]दुष्टांचा नाश त्यांच्या संकटांमुळे होतो. पण चांगली माणसे नेहमी बलवान राहातात.

[26]आळशी माणसाला तुमच्यासाठी, काहीही करायला सांगू नका. तुमच्या तोंडात शिरलेल्या आंबेप्रमाणे किंवा डोव्व्यांत गेलेल्या धुराप्रमाणे तो तुम्हाला चीड आणील.

[27]जर तुम्ही परमेश्वराचा आदर करीत असाल तर तुम्ही खूप जगाल. पण दुष्टाची त्याच्या आयुष्यातली अनेक वर्ष कमी होतील.

[28]चांगले लोक ज्या गोष्टींची आशा करतात त्या त्यांना आनंद मिळवून देतात. ज्या गोष्टींची आशा वाईट लोक करतात त्या त्यांना विनाश आणतात.

[29]परमेश्वर चांगल्या माणसांचे रक्षण करतो. पण जे लोक चुका करतात त्यांचा परमेश्वर नाश करतो.

[30]चांगले लोक नेहमी सुरक्षित असतात. पण दुष्टांना जबरदस्तीने देश सोडणे भाग पडते.

[31]चांगले लोक शहाणपणाच्या गोष्टी सांगतात. पण जो संकटे आणणाऱ्या गोष्टी सांगतो त्याचे ऐकणे लोक बंद करतात

[32]चांगले लोक बोलण्याच्या योग्य गोष्टी जाणतात. पण वाईट लोक संकटे आणणाऱ्या गोष्टीच बोलतात.

11 काही लोक नीट वजन न करणारा तराजू वापरतात. ते लोकांना फसविण्यासाठी असा तराजू वापरतात. परमेश्वराला असले खोटे तराजू आवडत नाही. पण खरा असलेल्या तराजूमुळे परमेश्वराला आनंद होतो.

[2]जे लोक गर्विष्ठ आहेत ते बिनमहत्वाचे ठरतील. पण जे लोक विनम्र आहेत ते शहाणेही होतील.

[3]चांगल्या, इमानदार लोकांना प्रामाणिकपणा मार्गदर्शन करतो. पण दुष्ट लोक जेव्हा दुसऱ्यांना फसवतात तेव्हा ते स्वत:चाच नाश करून घेतात.

[4]ज्या दिवशी देव लोकांचा न्याय करतो त्या दिवशी पैशाला काही किंमत नसते. परंतु चांगुलपणा लोकांना त्यांच्या मरणापासून वाचवतो.

---

**वाईट लोक … वाईट योजना** “हिंसाचार दुष्ट लोकांचा चेहरा झाकून टाकेल.”

**माणूस … शांतता** हे प्राचीन ग्रीक भाषांतरावरून आले आहे. हिब्रूत आठव्या कडव्याचा उत्तरार्ध पुन्हा वापरला आहे.

5जर चांगला माणूस इमानी असला तर त्याचे आयुष्य सोपे असेल. पण दुष्ट माणसाचा मात्र त्याने केलेल्या वाईट गोष्टीमुळे नाश होईल.

6इमानी माणसाला चांगुलपणा वाचवतो. पण दुष्ट मात्र त्यांनी केलेल्या वाईट गोष्टींच्या सापळ्यात अडकतात.

7दुष्ट माणूस मेल्यानंतर त्याला आशेला जागा नसते. तो ज्या ज्या गोष्टींची आशा ठेवतो त्या सर्व कवडीमोल असतात.

8चांगल्या माणसांचा संकटापासून बचाव होईल. आणि ती संकटे दुष्ट माणसांवर येतील.

9दुष्ट माणूस काहीतरी बोलून लोकांना दुखवू शकतो. पण चांगल्या माणसांचे त्यांच्या शहाणपणामुळे रक्षण होते.

10चांगली माणसे जेव्हा यशस्वी होतात तेव्हा सर्व शहर आनंदी होते. जेव्हा दुष्टांचा नाश होतो तेव्हा लोक आनंदाने ओरडू लागतात.

11इमानदार लोक त्यांचे आशीर्वाद देतात तेव्हा शहर मोठे होते. पण दुष्टांच्या बोलण्यामुळे शहराचा नाश होऊ शकतो.

12ज्या माणसाला चांगली समज बुध्दी नसते तो त्याच्या शेजाऱ्याबद्दल वाईट बोलतो. परंतु शहाण्या माणसाला केव्हा गप्प बसायचे ते कळते.

13जो माणूस दुसऱ्या लोकांबद्दल काही गुप्त गोष्टी सांगतो तो गुप्तता पाळत नाही. (म्हणून त्याच्यावर विश्वास टाकणे शक्य नसते.) पण जो माणूस विश्वासू असतो तो अफवा पसरवत नाही.

14कमजोर नेत्यांमुळे देश गर्तेत जातो. पण बरेच चांगले उपदेशक असले तर तो देश सुरक्षित असतो.

15जर तुम्ही दुसऱ्या माणसाचे कर्ज फेडण्याची हमी घेतलीत तर तुम्हाला त्या बद्दल पश्चात्ताप करावा लागेल. पण जर तुम्ही त्याला तसे व्यवहार करायला नकार दिलात तर तुम्ही सुरक्षित राहाल.

16दयाळू आणि कोमल स्त्री आदराला पात्र होते. जे लोक जुलमी आहेत ते केवळ पैसा मिळवतात.

17दयाळू माणसाला लाभ होईल. पण जो माणूस उलट्या काळजाचा असतो तो स्वत:वर संकटे ओढवून घेतो.

18दुष्ट माणूस दुसऱ्यांना फसवतो आणि त्यांचे पैसे घेतो. पण जो माणूस न्यायी आहे आणि जो योग्य गोष्टी करतो त्याला फलप्राप्ती होते.

19चांगुलपणा खरोखरच जीवन आणतो. पण दुष्ट माणसे दुष्टपणाकडे वळतात आणि मरण मिळवतात.

20जे लोक आनंदाने दुष्टपणा करतात त्यांचा परमेश्वर तिरस्कार करतो. पण जे लोक योग्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्याबद्दल परमेश्वर आनंदी असतो.

21दुष्टांना खरोखरच शासन होईल. ही गोष्ट खरी आहे. आणि चांगल्या लोकांना सोडून देण्यात येईल.

22जर स्त्री सुंदर असून मूर्ख असली तर ते डुकराच्या नाकात सुंदर सोन्याची नथ असल्यासारखे असते.

23चांगल्या लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे गोष्टी मिळाल्या तर त्यांतून अधिक चांगले निर्माण होते. पण दुष्टांना जर त्यांच्या इच्छेप्रमाणे गोष्टी मिळाल्या तर त्यामुळे संकटेच येतात.

24जर एखादा माणूस उदारहस्ते देत असेल तर त्याला अधिक मिळेल. पण एखाद्याने द्यायला नकार दिला तर तो गरीब होईल.

25जो उदार होऊन देतो त्याला लाभ होतो. जर तुम्ही दुसऱ्याना मदत केली तर तुम्हाला अधिक फायदा होईल.

26जो अधाशी माणूस त्याचे धान्य विकायला नकार देतो त्याच्यावर लोक रागावतात. पण जो माणूस दुसऱ्यांना खायला मिळावे म्हणून आपले धान्य विकतो त्याच्याबद्दल लोकांना आनंद वाटतो.

27जो माणूस दुसऱ्यांचे भले करायचा प्रयत्न करतो त्याचा लोक आदर करतात. जो माणूस वाईट गोष्टी करतो त्याच्या वाटेला फक्त संकटे येतात.

28जो माणूस आपल्या श्रीमंतीवर विश्वास ठेवतो तो पिवळ्या झालेल्या पानासारखा खाली पडतो. परंतु चांगला माणूस नव्या हिरव्या पानाप्रमाणे वाढत राहील.

29जर एखाद्याने त्याच्या कुटुंबावर संकटे आणली तर त्याला काहीही मिळणार नाही आणि शेवटी मूर्खाला शहाण्या माणसाची जबरदस्तीने सेवा करावी लागेल.

30चांगला माणूस ज्या गोष्टी करतो त्या जीवनवृक्षासारख्या असतात. शहाणा माणूस लोकांना नवे आयुष्य देतो.

31जर पृथ्वीवर चांगल्या माणसांना बक्षीस मिळाले तर दुष्टांनासुध्दा त्याच्या पात्रतेनुसार काही तरी मिळेल.

12

जर एखाद्याला चांगले व्हायचे असेल तर त्याची चूक दाखवल्यावर त्याला राग यायला नको. ज्याला चूक दाखवलेली आवडत नाही तो मूर्ख असतो.

2परमेश्वर चांगल्या माणसांबरोबर आनंदी असतो. पण परमेश्वर दुष्ट माणसाला अपराधी ठरवतो.

3दुष्ट माणसे कधीही सुरक्षित नसतात. पण चांगली माणसे सुरक्षित आणि निर्धास्त असतात.

4नवरा चांगल्या बायकोबद्दल आनंदी आणि अभिमानी असतो. पण जर बाई आपल्या नवऱ्याला लाज आणत असेल. तर ती त्याच्या शरीरातल्या आजारा सारखी असते.

5चांगले लोक त्यांनी ज्या योजना आखलेल्या असतात त्यात न्यायी आणि इमानी असतात. पण दुष्टांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका.

6दुष्ट लोक दुसऱ्यांना दु:ख देण्यासाठी आपल्या शब्दांचा वापर करतात. पण चांगल्या माणसाचे शब्द एखाद्याला संकटापासून वाचवू शकतात.

7दुष्ट माणसांचा नाश होतो आणि त्यांचा मागमूसही राहात नाही. पण चांगल्या माणसाची आठवण मात्र तो गेल्यानंतरही येत राहाते.

8 लोक विद्वानाची स्तुती करतात पण ते मूर्खांचा आदर करीत नाहीत.

9 खूप मोठा माणूस नसूनही खूप काम करणे हे खायला काही नसताना मोठेपणाचा आव आणण्यापेक्षा चांगले असते.

10 चांगला माणूस त्याच्या प्राण्यांची काळजी घेतो. पण दुष्ट माणूस दयाळू असू शकत नाही.

11 जो शेतकरी आपल्या शेतात कष्ट करतो त्याच्याकडे पुरेसे अन्न असते. पण जो माणूस फालतू गोष्टीत वेळ घालवतो तो मूर्ख असतो.

12 दुष्ट माणसाजवळ नेहमी चुकीच्या गोष्टी करायला असतात. पण चांगल्या माणसाजवळ जी शक्ती असते ती मुळाप्रमाणे खोल गेलेली असते.

13 दुष्ट माणूस मूर्ख गोष्टी करतो. स्वत:च शब्दात अडकतो. पण चांगला माणूस त्या प्रकारच्या संकटातून सुटतो.

14 जो चांगल्या गोष्टी सांगतो त्याबद्दल त्यांला बक्षीस मिळते. त्याचप्रमाणे तो जे काम करतो ते त्याला लाभ मिळवून देते.

15 मूर्ख माणसाला नेहमी स्वत:ची पध्दत सर्वश्रेष्ठ वाटते. पण विद्वान माणूस दुसरे लोक जे सांगतात तेही ऐकतो.

16 मूर्ख माणसाला फार लवकर राग येतो. पण हुशार माणूस कुणी काही चुकीचे बोलले तर चटकन् क्षमा करतो.

17 जर एखादा माणूस खरे बोलत असेल तर तो ज्या गोष्टी सांगतो त्यातही तो प्रामाणिक असतो. पण जर एखादा खोटं बोलत असेल तर त्याचे बोलणे संकटाकडे नेते.

18 जर एखादा माणूस विचार न करता बोलत असेल तर ते शब्द तलवारीसारखे लागतात. पण शहाणा माणूस काळजी पूर्वक बोलतो. त्याचे शब्द दु:खावर फुंकर मारतात.

19 जर माणूस खोटे बोलला तर त्याचे शब्द लगेचच वाया जातात. पण सत्य मात्र सदैव राहाते.

20 दुष्ट लोक नेहमी संकटे आणतात. पण जे लोक शांततेसाठी काम करतात ते आनंदी असतात.

21 चांगल्या लोकांवर दुर्दैव कोसळत नाही. पण दुष्टांवर मात्र अनेक संकटे येतात.

22 परमेश्वर खोटं बोलणाऱ्यांचा तिरस्कार करतो. पण परमेश्वर खरे बोलणाऱ्या लोकांबरोबर आनंदी असतो.

23 हुशार माणूस त्याला जे माहीत आहे ते सर्व सांगत नाही. पण मूर्ख माणूस त्याला जे माहीत आहे ते सर्व सांगतो आणि तो मूर्ख आहे हे दाखवतो.

24 जे लोक खूप काम करतात त्यांना इतर कामगारांवर देखरेख करण्याचे काम देतात. पण आळशी माणसाला गुलामासारखे राबावे लागते.

25 काळजी माणसाचे सुख हिरावून घेते. पण प्रेमळ शब्द त्याला आनंदी करू शकतात.

26 चांगला माणूस आपले मित्र काळजीपूर्वक निवडतो. पण दुष्ट माणूस नेहमी चुकीचे मित्र निवडतो.

27 आळशी माणूस त्याला हव्या असलेल्या गोष्टी मागे जाणार नाही पण जो माणूस खूप कष्ट करतो त्याच्याकडे श्रीमंती येते.

28 जर तुम्ही योग्य रीतीने जगलात तर तुम्हाला खरे जीवन मिळेल. सदैव जगण्याचा तोच मार्ग आहे.

13 शहाण्या माणसाला त्याचे वडील काही सांगत असले तर तो लक्षपूर्वक ऐकतो. पण अभिमानी माणूस लोक त्याला योग्य ते सांगायला लागले तर तो ते ऐकत नाही.

2 चांगल्या माणसांना चांगले बोलल्याबद्दल फळ मिळते. पण दुष्ट माणसांना नेहमी चुकाच करायच्या असतात.

3 जो माणूस आपल्या बोलण्याबद्दल काळजी घेतो तो त्याचा जीव वाचवतो. पण जो विचार न करता बोलतो त्याचा नाश होतो.

4 आळशी माणसाला गोष्टी हव्या असतात पण त्या त्याला कधीही मिळणार नाहीत. पण ते खूप कष्ट करतात त्यांना हव्या असलेल्या गोष्टी मिळतील.

5 चांगले लोक खोट्याचा तिरस्कार करतात. दुष्टांना लाज वाटायला लावली जाईल.

6 चांगुलपणा चांगल्या, इमानी माणसाचे रक्षण करतो. पण ज्या माणसाला पाप करायला आवडते त्याचा दुष्टपणा नाश करतो.

7 काही लोक श्रीमंतीचा आव आणतात पण त्यांच्या जवळ मात्र काहीच नसते. दुसरे लोक आपण गरीब आहोत असे भासवतात पण ते खरोखरच श्रीमंत असतात.

8 श्रीमंत माणसाला जीव वाचवण्यासाठी पैसे मोजावे लागतात पण गरीबांना अशा धमक्या कधीच मिळत नाहीत.

9 चांगला माणूस हा दैदीप्यमान दिव्यासारखा असतो. पण दुष्ट माणूस चटकन् विझणाऱ्या दिव्यासारखा असतो.

10 जे लोक स्वत:ला इतरांपेक्षा शहाणे समजतात ते संकटे ओढवून घेतात. पण जे लोक दुसऱ्यांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकून घेतात ते शहाणे असतात.

11 जर एखादा माणूस पैसे मिळवण्यासाठी फसवाफसवी करील तर त्याचे पैसे लवकरच जातील. पण जो माणूस कष्ट करून पैसे मिळवतो त्याचे पैसे वाढतात.

12 आशा नसली की हृदय दु:खी असते. तुम्हाला हवी असलेली गोष्ट मिळाली की तुम्हाला खूप आनंद होतो.

13 जर एखाद्या माणसाने इतर लोक त्याला मदत करण्याचा प्रयत्न करत असतील तेव्हा त्यांचे ऐकले नाही तर त्याच्यावर संकटे येतील पण जो माणूस दुसऱ्यांनी सांगितलेल्या गोष्टींचा मान राखतो त्याला त्याचे फळ मिळते.

14 शहाण्या माणसाची शिकवण आयुष्य देते. ते शब्द तुम्हाला मृत्यूचा फास चुकवायला मदत करतील.

[15]लोकांना चांगली अक्क ल असलेला माणूस आवडतो. पण ज्या माणसावर विश्वास टाकणे शक्य नसते त्याचे आयुष्य कठीण असते.
[16]शहाणा माणूस कृती करण्याआधी विचार करतो. परंतु मूर्ख माणूस त्याच्या कृतीने तो मूर्ख आहे हे दर्शवितो.
[17]जर दूतावर विश्वास ठेवणे शक्य नसेल तर त्याच्याभोवती संकटे येतील. पण जर माणसावर विश्वास ठेवणे शक्य झाले तर तिथे शांती नांदेल.
[18]जर एखाद्याने त्याच्या चुकांपासून शिकायला नकार दिला तर तो गरीब आणि लाज वाटणारा होईल. पण जर एखाद्याने त्याच्या वरील टीकेकडे लक्ष दिले तर त्याला त्याचा फायदा होईल.
[19]जर एखाद्या माणसाला काही हवे असले आणि नंतर ते त्याला मिळाले तर त्याला खूप आनंद होईल. पण मूर्खांना फक्त दुष्टावा हवा असतो. ते बदलायला तयार नसतात.
[20]शहाण्या लोकांशी मैत्री करा म्हणजे तुम्ही शहाणे व्हाल. पण जर तुम्ही मूर्खांशी मैत्री केली तर तुम्ही संकटात सापडाल.
[21]पापी जिथे जातील तिथे संकटे त्यांचा पाठलाग करतात. पण चांगल्या माणसांच्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडतात.
[22]चांगल्या माणसाकडे त्याच्या मुलांना आणि नातवंडांना द्यायला संपत्ती असेल. आणि शेवटी चांगल्या माणसाला दुष्ट लोकांकडचे सर्व काही मिळेल.
[23]गरीब माणसाकडे खूप धान्य पिकवणारी चांगली जमीन असू शकते. पण तो वाईट निर्णय घेतो आणि उपाशी राहातो.
[24]जर एखाद्याचे आपल्या मुलांवर खरोखच प्रेम असेल तर तो त्यांचे चुकल्यावर त्यांना काठीने मारायलाही कमी करणार नाही. ते चुकीने वागल्यावर तो त्यांना शिस्त लावेल. जर तुमचे तुमच्या मुलावर प्रेम असेल तर तुम्ही त्याला योग्य वेळी काळजीपूर्वक शिकवाल.
[25]चांगल्या लोकांना समाधान होईपर्यंत खायला मिळेल. चांगल्या लोकांना त्यांना हव्या असलेल्या गोष्टी खरोखरच मिळतील. पण दुष्ट लोकांचे पोट रिकामेच राहील. दुष्ट लोकांना महत्वाच्या गोष्टींशिवाय राहावे लागेल.

14 शहाणी स्त्री तिच्या शहाणपणाचा उपयोग तिचे घर जसे असायला हवे तसे करण्यासाठी करते. पण मूर्ख बाई तिच्या मूर्खपणामुळे घराचा सत्यानाश करते.
[2]जो माणूस योग्य रीतीने जगतो तो परमेश्वराला मान देतो. पण जो माणूस इमानदार नसतो तो परमेश्वराचा तिरस्कार करतो. [3]मूर्ख व गर्विष्ठ माणसाचे शब्द त्याच्यावर संकटे आणतात. पण शहाण्या माणसाचे शब्द त्याला वाचवतात.
[4]जर काम करायला गायी नसल्या तर धान्याचे कोठार रिकामे राहील. लोक गायीच्या शक्तीचा उपयोग चांगले पीक काढण्यासाठी करून घेऊ शकतात.
[5]सत्यवादी माणूस खोटे बोलत नाही. तो चांगला साक्षीदार असतो. पण ज्या माणसावर विश्वास टाकणे शक्य नसते तो कधीच खरे सांगत नाही. तो वाईट साक्षीदार असतो.
[6]जे लोक देवाची थट्टा करतात ते ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करतील, पण त्यांना ते कधीच मिळत नाही. ज्यांचा देवावर विश्वास आहे ते खरोखर शहाणे आहेत. त्यांच्याजवळ ज्ञान सहजपणे येते.
[7]मूर्खाशी मैत्री करू नका. तो तुम्हाला काहीही शिकवू शकणार नाही.
[8]हुशार लोक शहाणे असतात. कारण ते ज्या गोष्टी करतात त्याचा काळजीपूर्वक विचार करतात. पण मूर्ख लोक मूर्ख असतात कारण आपण दुसऱ्यांना फसवून जगू शकतो असे त्यांना वाटत असते.
[9]मूर्ख माणूस त्याने केलेल्या वाईट गोष्टींसाठी किंमत मोजण्याच्या कल्पनेला हसतो. पण चांगले लोक त्यासाठी क्षमा मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करतात.
[10]जर एखादा माणूस दु:खी असला तर फक्त त्यालाच ते दु:ख जाणवत असते. त्याचप्रमाणे जर माणूस आनंदी असला तर तो आनंद जाणवू शकेल असा तो एकटाच असतो.
[11]वाईट माणसाच्या घराचा नाश होईल. पण चांगल्या माणसाचे घर सदैव राहील.
[12]लोकांना वाटत असते हाच मार्ग बरोबर आहे. पण तो मार्ग फक्त मरणाकडे नेतो.
[13]माणूस जरी हसत असला तरी तो मनातून दु:खी असू शकतो. आणि हसल्यावरही खिन्नता तिथे तशीच राहाते.
[14]दुष्ट माणसांना त्यांनी केलेल्या चुकांबद्दल पूर्ण किंमत मोजावी लागेल. आणि चांगल्या माणसांना चांगल्या कृत्यांबद्दल बक्षीस मिळेल.
[15]मूर्ख जे ऐकतो त्यावर विश्वास ठेवतो. पण शहाणा माणूस प्रत्येक गोष्टीचा काळजीपूर्वक विचार करतो.
[16]शहाणा माणूस परमेश्वराचा आदर करतो आणि वाईटापासून दूर राहतो. पण मूर्ख विचार न करता गोष्टी करतो. तो लक्षपूर्वक गोष्टी करत नाही.
[17]जो माणूस चटकन् रागावतो तो मूर्खासारख्या गोष्टी करतो. शहाणा मनुष्य सहनशील असतो.
[18]मूर्खांना त्यांच्या मूर्खपणाबद्दल शिक्षा होते. पण शहाण्यांना ज्ञानाचा लाभ होतो.
[19]चांगले लोक वाईटांबरोबर लढताना जिंकतील, वाईटांना त्यांच्यापुढे नतमस्तक होणे भाग पडेल.
[20]गरीबाला मित्र नसतात, शेजारीही नसतो. पण श्रीमंताला खूप मित्र असतात.
[21]जो शेजाऱ्याला पाण्यात पाहातो, तो पाप करतो. जर सुखी व्हायचे असेल तर त्या गरीबांशी दयाळू राहा.
[22]जो दुष्ट गोष्टींच्या योजना आखतो तो चूक करतो. पण जो चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करतो

त्याच्याजवळ प्रेम करणारे आणि त्याच्यावर विश्वास
ठेवणारे मित्र असतात
23जर तुम्ही कष्ट केलेत तर तुम्हाला लागणाऱ्या गोष्टी
तुमच्या जवळ असतील. पण जर तुम्ही काही न करता
फक्त बोलतच राहिलात तर तुम्ही गरीबच राहाल.
24शहाण्यांना संपत्तीचे बक्षीस मिळते. पण मूर्खांना
मूर्खपणाचे बक्षीस मिळते.
25जो माणूस खरे सांगतो तो इतरांना मदत करतो. जो
खोटे बोलतो तो इतरांना दु:ख देतो.
26जो परमेश्वराचा आदर करतो तो सुरक्षित असतो
आणि त्याची मुलेही सुरक्षितपणे जगतात.
27परमेश्वराबद्दलची आदर युक्त भीती खरे जीवन देते.
त्यामुळे माणूस मरणाच्या जाळ्यातून वाचतो
28जर राजा खूप लोकांवर राज्य करत असला तर तो
महान असतो. पण जर तिथे लोकच नसले तर त्या राजाची
काहीच किंमत नसते.
29सहनशील माणूस खूप हुशार असतो. ज्या माणसाला
चटकन् राग येतो तो आपण मूर्ख आहोत, हे सिध्द
करतो.
30जर एखाद्याच्या मनात शांती असली तर त्याचे शरीर
निरोगी असते. पण मत्सर त्याच्या शरीरात आजार निर्माण
करतो.
31जो माणूस गरीबांवर संकटे आणतो तो आपण देवाचा
आदर करीत नाही हे दाखवतो. देवानेच दोघांनाही
निर्माण केले आहे. पण जर एखादा गरीबांशी
कनवाळूपणे वागला तर तो देवाचा आदर करतो हे
दिसून येते.
32संकटाच्यावेळी दुष्ट माणसाचा पराभव होतो. पण
चांगली माणसे मरणाच्या दारातही विजयी होतात.
33शहाणा माणूस नेहमी शहाण्या गोष्टींचा विचार करतो.
पण मूर्खाला शहाणपणाबद्दल काहीही माहिती नसते.
34चांगुलपणा देशाला महान बनवतो. पण पाप कुठल्याही
लोकांना लाज आणते.
35राजाजवळ जेव्हा शहाणे नेते असतात तेव्हा राजा
आनंदी असतो. पण मूर्ख नेत्यांवर राजा रागावतो.

15 शांतपणे दिलेल्या उत्तरामुळे राग निघून जातो.
पण तिखट उत्तरामुळे राग वाढतो.
2शहाणा माणूस बोलतो तेव्हा इतरांना ऐकावेसे वाटते.
पण मूर्ख माणूस केवळ मूर्खताच बडबडतो.
3सगळीकडे काय चालले आहे ते परमेश्वर बघतो.
परमेश्वर सगळ्या माणसांना बघत असतो. चांगल्या आणि
वाईट.
4दयेचे मायेचे शब्द म्हणजे जणू जीवनवृक्ष. पण खोट्या
शब्दांमुळे माणसाची उमेद खचते.
5मूर्ख माणूस त्याच्या वडिलांच्या उपदेशाकडे लक्ष देत
नाही. पण जेव्हा लोक शहाण्या माणसाला शिकवण्याचा
प्रयत्न करतात तेव्हा तो लक्षपूर्वक ऐकतो.
6चांगले लोक पुष्कळ बाबतीत श्रीमंत असतात. पण
दुष्टाकडे ज्या गोष्टी असतात त्यामुळे त्याच्यावर संकटे
येतात.
7शहाणे लोक बोलतात तेव्हा नवीन माहिती मिळते.
पण मूर्ख लोक ऐकण्यासारखे काही बोलत नाहीत.
8दुष्ट माणसे ज्या गोष्टी अर्पण करतात त्या परमेश्वराला
आवडत नाहीत. पण परमेश्वर चांगल्या माणसाची प्रार्थना
ऐकून आनंदी होतो.
9दुष्ट लोक ज्या प्रकारे जगतात ते परमेश्वराला आवडत
नाही. जे लोक सत्कृत्य करायचा प्रयत्न करतात त्यांच्यावर
परमेश्वर प्रेम करतो.
10जर एखाद्या माणसाने चुकीने जगायला सुरुवात केली
तर त्याला शिक्षा होईल. आणि ज्या माणसाला योग्य अयोग्य
सांगितलेले आवडत नाही त्याचा नाश होईल.
11परमेश्वराला सर्व माहीत असते. मृत्युलोकांत काय
घडते ते देखील त्याला माहीत असते. म्हणून लोकांच्या
मनात आणि हृदयात काय चालले आहे ते परमेश्वराला
नक्कीच ठाऊक असेल.
12मूर्खाला तो चुकत आहे हे सांगितलेले आवडत नाही.
आणि तो माणूस शहाण्या माणसाला माहिती विचारायला
नकार देतो.
13माणूस जर आनंदी असला तर त्याच्या चेहऱ्यावर
आनंद दिसेल. पण जर एखादा मनातून दु:खी असला तर
त्याचा आत्मा ते दु:ख दाखवेल.
14शहाणा माणूस अधिक ज्ञान मिळवायचा प्रयत्न करतो.
पण मूर्खाला अधिक मूर्खताच हवी असते.
15काही गरीब लोक नेहमी खिन्न असतात. पण मनातून
आनंदी असलेल्या लोकांसाठी जीवन म्हणजे एक मोठा
समारंभ असतो.
16गरीब राहून परमेश्वराचा आदर करणे हे श्रीमंत
होऊन खूप संकटे भोगण्यापेक्षा चांगले असते.
17प्रेम असते त्या ठिकाणी थोडेसे खाणे हे तिरस्कार
असलेल्या ठिकाणी भरपूर खाण्यापेक्षा चांगले असते.
18लवकर रागावणारे लोक संकटे आणतात. पण संयमी
माणूस शांतता आणतो.
19आळशी माणसाला सगळीकडे संकटे मिळतील पण
इमानदार माणसासाठी आयुष्य सोपे असेल.
20शहाणा मुलगा त्याच्या वडिलांना सुखी करतो. पण
मूर्ख माणूस त्याच्या आईला लाज आणतो.
21मूर्ख गोष्टी करण्यात मूर्खाला आनंद मिळतो. पण
चांगला माणूस योग्य गोष्टी काळजीपूर्वक करतो.
22जर एखाद्याला पुरेशी माहिती मिळाली नाही तर त्याच्या
योजना कोसळतील. पण जर एखाद्याने शहाण्या
लोकांच्या बोलण्याकडे लक्ष दिले तर तो यशस्वी
होईल.
23चांगले उत्तर दिल्यावर माणूस आनंदी होतो. आणि
योग्य वेळी योग्य शब्द फारच चांगला असतो.

[24]शहाण्या माणसाने केलेली गोष्ट यशाकडे नेते आणि त्या गोष्टी त्याला मृत्यूकडे जाण्यापासून वाचवतात.

[25]गर्विष्ठ माणसाकडे असलेल्या सगळ्या गोष्टींचा परमेश्वर नाश करील. पण विधवेकडे असलेल्या गोष्टींचे परमेश्वर रक्षण करतो.

[26]परमेश्वराला दुष्ट विचार आवडत नाहीत. पण परमेश्वर मायेच्या शब्दांनी आनंदी होतो.

[27]जर एखाद्याने काही वस्तू मिळवण्यासाठी फसवणूक केली तर तो त्याच्या कुटुंबावर संकटे आणतो. पण जर एखादा माणूस खरा असला आणि लाच घेण्याविषयी त्याच्या मनात घृणा असेल तर तो जगू शकेल.

[28]चांगले लोक उत्तर देण्याआधी विचार करतात. पण दुष्ट लोक विचार करण्याआधी बोलतात आणि त्यामुळे त्यांच्यावर संकटे येतात.

[29]परमेश्वर दुष्टांपासून खूप दूर आहे. पण तो चांगल्या माणसांच्या प्रार्थना नेहमी ऐकतो.

[30]जो माणूस हसतो तो इतरांना आनंद देतो आणि चांगली बातमी ऐकून लोकांना अधिक चांगले वाटते.

[31]जो माणूस त्याचे चुकते आहे असे सांगितल्यावर ऐकतो तो शहाणा असतो.

[32]जर एखाद्याने शिकायला नकार दिला तर तो स्वत:लाच इजा करून घेतो. तू चुकतो आहेस असे सांगितलेले जो ऐकून घेतो तो अधिकाधिक गोष्टी समजू शकतो.

[33]जो माणूस परमेश्वराचा आदर करतो तो शहाणे व्हायला शिकतो. परमेश्वराचा आदर करण्यासाठी माणसाने खरोखरच विनम्र व्हायला हवे.

16 लोक त्यांच्या योजना तयार करतात. पण परमेश्वरच त्या योजना प्रत्यक्षात आणतो.

[2]माणसाला तो जे करतो ते बरोबर आहे असे वाटते. पण माणसाने केलेल्या गोष्टी मागच्या खऱ्या कारणांचा न्यायनिवाडा परमेश्वरच करतो.

[3]तुम्ही जे जे करता त्या सगळ्याच्या मदतीसाठी परमेश्वराकडे वळा म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल.

[4]परमेश्वराकडे सगळ्यासाठी योजना आहेत. आणि परमेश्वराच्या योजनेत दुष्ट माणसांचा नाश होईल.

[5]जो माणूस आपण इतरांपेक्षा चांगले आहोत, असा विचार करतो त्याचा परमेश्वर तिरस्कार करतो. परमेश्वर त्या सर्व गर्विष्ठ लोकांना नक्कीच शिक्षा करील. [6]खरे प्रेम आणि इमानदारी तुम्हाला शुध्द* करील. परमेश्वराचा आदर करा म्हणजे तुम्ही वाईटापासून खूप दूर राहाल.

[7]जर एखादा माणूस चांगले आयुष्य जगत असेल, परमेश्वराला खुष करत असेल तर त्या माणसाचे शत्रूदेखील त्याच्याबरोबर शांतता राखतील.

[8]योग्य मार्गाने थोडेसे मिळवणे हे फसवणूक करून खूप मिळवण्यापेक्षा चांगले आहे.

[9]माणूस त्याला ज्या गोष्टी करायच्या आहेत त्याबद्दलच्या योजना करू शकतो. पण काय घडेल ते मात्र परमेश्वरच ठरवतो.

[10]राजा बोलतो तेव्हा त्याचे शब्द म्हणजे कायदा असतो. त्याचे निर्णय नेहमी योग्य असायला हवेत

[11]परमेश्वराला सर्व काटे आणि तराजू योग्य असायला हवे असतात. त्याला सर्व व्यापारातील करार न्यायी असायला हवे असतात.

[12]राजे लोक वाईट गोष्टी करणाऱ्यांचा तिरस्कार करतात. चांगुलपणा त्याच्या राज्याला मजबूत करील.

[13]राजाला सत्य ऐकायचे असते. राजांना खोटे न बोलणारे लोक आवडतात.

[14]जेव्हा राजा रागावतो तेव्हा तो कुणालाही ठार मारू शकतो. आणि शहाणा माणूस राजाला आनंदी ठेवायचा प्रयत्न करतो.

[15]राजा जेव्हा आनंदी असतो तेव्हा जीवन सगळ्यांसाठी चांगले असते. राजा जर तुमच्यावर खुष असला तर ते वसंतात ढगातून पडणाऱ्या पावसासारखे असते.

[16]ज्ञान हे सोन्यापेक्षा अधिक किंमती आहे. समजुतदारपणा चांदीपेक्षा अधिक मौल्यवान आहे.

[17]चांगले लोक वाईटापासून दूर राहाण्याचा प्रयत्न करीत आपले आयुष्य जगतात. जो माणूस जीवनात काळजी घेतो तो आपल्या आत्म्याचे रक्षण करतो.

[18]जर माणूस गर्विष्ठ असला तर तो सर्वनाशाच्या संकटात असतो. जर एखादा माणूस आपण इतरांपेक्षा चांगले आहोत, असा विचार करत असला तर तो पराभवाच्या संकटात असतो.

[19]विनम्र राहून गरीब लोकांबरोबर राहणे हे जे लोक स्वत:ला इतरांपेक्षा चांगले समजतात, त्यांच्याबरोबर राहून श्रीमंतीचे वाटेकरी होण्यापेक्षा चांगले असते.

[20]जर एखादा माणूस लोकांच्या शिकवण्याकडे लक्ष देईल तर त्याचा फायदा होईल. आणि जो माणूस परमेश्वरावर विश्वास ठेवतो त्याला आशीर्वाद मिळतो.

[21]माणूस शहाणा आहे की नाही ते लोकांना कळेल. आणि जो माणूस अतिशय काळजीपूर्वक आपले शब्द निवडतो तो ज्ञानात भर घालतो.

[22]ज्यांच्याकडे ज्ञान आहे त्या लोकांना ते खरेखरे आयुष्य देते. पण मूर्ख अधिक मूर्ख व्हायला शिकतात.

[23]शहाणा माणूस नेहमी बोलण्याआधी विचार करतो आणि तो जे शब्द बोलतो ते चांगले आणि ऐकण्यायोग्य असतात.

[24]मायेचे शब्द मधासारखे असतात. त्यांचा स्वीकार करणे सोपे असते आणि ते प्रकृतीसाठी चांगले असतात.

[25]एखादा मार्ग लोकांना योग्य वाटतो. पण तो मार्ग मृत्यूकडे नेतो.

---

खरे ... **शुध्द** किंवा “भरपाई कर.” हिब्रूत याचा अर्थ एखाद्याचे पाप झाकणे किंवा “नाहीसे करणे असा होतो.”

[26]कामगाराची भूक त्याला काम करायला लावते. त्याची भूक त्याला खाण्यासाठी काम करायला लावते.
[27]कवडीमोल माणूस वाईट गोष्टींच्या योजना आखतो. त्याचा उपदेश आगीप्रमाणे नाश करतो.
[28]संकट आणणारे लोक नेहमी समस्या निर्माण करतात. आणि जो माणूस अफवा पसरवतो तो जवळच्या मित्रात समस्या निर्माण करतो.
[29]जो माणूस लवकर रागावतो तो त्याच्या शेजाऱ्याला आमिष दाखवून वळवतो. तो त्यांना वाईट मार्गाने नेतो.
[30]जो माणूस डोळे मिचकावतो आणि हसतो तो चुकीच्या आणि वाईट गोष्टींच्या योजना आखतो.
[31]जी माणसे चांगले आयुष्य जगली त्यांचे पांढरे केस म्हणजे वैभवाचा मुकुट आहे.
[32]सहनशील असणे हे शक्तिमान सैनिक असण्यापेक्षा चांगले आहे. स्वत:च्या रागाला काबूत ठेवणे हे सबंध शहर आपल्या काबूत आणण्यापेक्षा चांगले आहे.
[33]लोक निर्णय घेण्यासाठी फासे टाकतात. पण निर्णय नेहमी देवाकडून येतात.

17 मुबलक अन्नाने भरलेल्या भांडणयुक्त घरापेक्षा कोरड्या भाकरीचा तुकडा शांतीने खाणे बरे!
[2]सेवकाचा हुशार मुलगा मालकाच्या आळशी मुलावर ताबा मिळवील. तो हुशार मुलगा मालकाचे सर्व काही घेईल.
[3]सोने आणि चांदी शुध्द करण्यासाठी आगीत टाकतात. लोकांची मने मात्र परमेश्वर शुध्द करतो.
[4]दुष्ट माणूस इतर लोक वाईट गोष्टी सांगतात त्या ऐकतो. जे लोक खोटे बोलतात ते खोटे ऐकतात सुध्दा.
[5]काही लोक गरीबांची थट्टा करतात. ज्यांच्यापुढे समस्या असतात त्यांना ते हसतात. या वरून असे दिसते की ते वाईट लोक, ज्या देवाने त्यांची निर्मिती केली त्या देवाचा आदर करीत नाहीत. त्यांना शिक्षा होईल.
[6]नातवंडे म्हाताऱ्या माणसांना आनंदी बनवतात. आणि मुलांना त्यांच्या आईवडिलांचा अभिमान असतो.
[7]मूर्खाने खूप बोलणे शहाणपणाचे नसते. तसेच राज्यकर्त्याने खोटे बोलणे शहाणपणाचे नसते.
[8]काही लोकांना कुठेही गेले तरी लाच म्हणजे दैवी मंत्र वाटते आणि ती कामही करते असे वाटते.
[9]एखाद्याने तुमचे काही वाईट केल्यानंतर जर तुम्ही त्याला क्षमा करू शकला तर तुम्ही मित्र बनू शकता. पण जर तुम्ही त्याची करणी सतत मनात ठेवली तर त्यामुळे मैत्रीत बाधा येईल.
[10]हुशार माणूस तंबी दिल्या बरोबर शिकतो. परंतु मूर्ख माणूस शंभर फटके मारल्यावरही शिकत नाही.
[11]वाईट माणसाला केवळ चुकाच करायच्या असतात. शेवटी देव त्याला शिक्षा करायला देवदूत पाठवेल.
[12]मूर्खाला भेटण्यापेक्षा, जीची पिल्ले चोरीला गेलीत अशा चवताळलेल्या अस्वलाच्या मादीला तोंड देणे बरे!
[13]जे लोक तुमच्यासाठी चांगल्या गोष्टी करतात त्यांच्यासाठी तुम्ही वाईट गोष्टी करू नका. तुम्ही जर तसे केलेत तर तुम्हाला आयुष्यभर संकटांना सामोर जावे लागेल.
[14]वादाला तोंड फोडणे हे धरणात भोक करण्यासारखे आहे. वाद मोठा होण्याच्या आतच तो बंद करा.
[15]दोषी नसणाऱ्याला शिक्षा करणे आणि दोषी असणाऱ्यांचे समर्थन करणे या दोन गोष्टी परमेश्वराला आवडत नाहीत.
[16]मूर्खाकडचा पैसा वाया जातो. का? कारण तो मूर्ख पैशाचा वापर शहाणा होण्यासाठी करत नाही.
[17]मित्र नेहमी प्रेम करतो. खरा भाऊ संकटाच्या वेळीसुध्दा मदत करतो.
[18]केवळ मूर्खच दुसऱ्या माणसाच्या कर्जाची हमी देईल.
[19]ज्या माणसाला वाद घालायला आवडतो त्याला पाप करायलाही आवडते. जर तुम्ही स्वत:चीच भलावण केली तर तुम्ही संकटांना आमंत्रण देता.
[20]वाईट माणसाला नफा होणार नाही. जो माणूस खोटे बोलतो त्याच्यावर संकटे येतील.
[21]मूर्ख मुलगा असलेले वडील दु:खी होतील. मूर्खाचे वडील सुखी नसतील.
[22]आनंद चांगल्या औषधासारखा असतो. पण दु:ख हे आजारासारखे असते.
[23]वाईट माणूस दुसऱ्यांना फसवण्यासाठी गुप्ततेने पैसे घेतो.
[24]शहाणा माणूस नेहमी सर्वांत चांगली गोष्ट करण्याचा विचार करतो. पण मूर्ख माणूस दूरच्या जगाचे स्वप्न पाहातो.
[25]मूर्ख मुलगा वडिलांसाठी दु:ख आणतो आणि जिने त्याला जन्म दिला त्या आईसाठी वेदना आणतो.
[26]काहीही चूक केली नसताना एखाद्याला शिक्षा करणे चूक आहे. जे नेते प्रामाणिक असतात त्यांना शिक्षा करणे चूक आहे.
[27]शहाणा माणूस शब्द काळजीपूर्वक वापरतो. शहाणा माणूस लवकर रागावत नाही.
[28]मूर्ख माणूस जर गप्प बसला तर तो सुध्दा शहाणा वाटतो. जर तो काही बोलला नाही तर तो शहाणा आहे असे लोकांना वाटते.

18 काही लोकांना इतरांभोवती राहायला आवडत नाही. त्यांना जे पाहिजे तेच ते करतात. आणि त्यांना जर कुणी उपदेश केला तर ते अस्वस्थ होतात.
[2]मूर्खाला इतरांपासून शिकायची इच्छा नसते. त्याला फक्त स्वत:च्याच कल्पना सांगायच्या असतात.
[3]लोकांना वाईट माणूस आवडत नाही. लोक त्या मूर्खाची चेष्टा करतात.
[4]शहाण्या माणसाचे शब्द शहाणपणाच्या खोल विहिरीतून उसळून वर येणाऱ्या पाण्यासारखे असतात.

5लोकांचा न्यायनिवाडा करताना तुम्ही न्यायी असायला हवे. जर तुम्ही दोषी माणसाला सोडून दिले तर ते चांगल्या लोकांवर अन्याय केल्यासारखे होईल.

6मूर्ख माणूस त्याच्या बोलण्यामुळे स्वत:वर संकट ओढवून घेतो. त्याचे शब्द भांडण सुरु करू शकतात.

7मूर्ख माणूस बोलतो तेव्हा स्वत:चाच नाश करून घेतो. त्याचेच शब्द त्याला अडचणीत आणतात

8लोकांना नेहमी अफवा ऐकायला आवडतात. ते पोटात जाणाऱ्या चांगल्या अन्नासारखे असते.

9जो माणूस कामात ढिला आणि मंद असतो. तो त्या गोष्टींचा कामाचा नाश करणाऱ्या माणसाइतकाच वाईट असतो.

10परमेश्वराच्या नावात खूप शक्ती आहे. तो बळकट बुरूजाप्रमाणे आहे. चांगले लोक त्यांच्याकडे जाऊ शकतात आणि सुरक्षित होतात.

11श्रीमंती आपले रक्षण करेल असे श्रीमंतांना वाटते. ती बळकट किल्ल्याप्रमाणे आहे असे त्यांना वाटते.

12गर्विष्ठ माणसाचा लवकरच नाश होईल. पण विनम्र माणसाचा गौरव होईल.

13तुम्ही उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी इतरांना त्यांचे बोलणे संपवू द्या. त्यामुळे तुम्ही गोंधळणार नाही आणि मूर्खही ठरणार नाही.

14आजारपणात माणसाचे मन त्याला जिवंत ठेवू शकते. पण जर आता सारे काही व्यर्थ आहे असे त्याला वाटत असेल तर सारीच आशा संपते.

15शहाण्या माणसाला नेहमी अधिक शिकायची इच्छा असते. तो माणूस नेहमी अधिक ज्ञान मिळवण्यासाठी लक्षपूर्वक ऐकत असतो.

16जर तुम्हाला महत्वाच्या माणसाला भेटायची इच्छा असेल तर त्याला नजराणा द्या. नंतर तुम्ही त्याला सहजपणे भेटू शकता.

17सुरुवातीला बोलणारा माणूस नेहमी बरोबर आहे असे तोपर्यंत वाटत असते, जोपर्यंत कुणीतरी येऊन त्याला प्रश्न विचारीत नाही.

18दोन बलवान माणसे वाद घालत असली तर तो वाद चिठ्ठ्या टाकून सोडवणे चांगले.

19जर तुम्ही मित्राचा अपमान केलात तर त्याला परत जिंकणे हे बळकट तटबंदी असलेले शहर जिंकण्यापेक्षा कठीण असते. आणि वादविवाद लोकांना एकमेकांपासून राजवाड्याच्या प्रवेशद्वारांवरील आडव्या बळकट खांबांइतके दूर नेतात.

20तुम्ही जे बोलता त्याचा तुमच्या आयुष्यावर परिणाम होतो. जर तुम्ही चांगले बोललात तर तुमच्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडतील. जर तुम्ही वाईट बोललात तर वाईट गोष्टी घडतील.

21जीवन किंवा मरणही देणारे शब्द जीभ बोलू शकते. आणि ज्यांना बोलायला आवडते त्यांनी त्यांच्या बोलण्याच्या परिणामाचा स्वीकार करायची तयारी ठेवली पाहिजे.

22जर तुम्हाला बायको मिळाली, तर तुम्हाला चांगली गोष्ट मिळाली असे होईल. परमेश्वर तुमच्यावर खुश आहे असे ते दर्शवते.

23गरीब माणूस मदतीची भीक मागेल. पण श्रीमंत माणूस उत्तर देतानासुध्दा मग्रूर असतो.

24काही मित्रांबरोबर असणे आनंददायी असते. पण जवळचा मित्र भावापेक्षाही चांगला असतो.

19 गरीब आणि प्रामाणिक असणे हे खोटे बोलणारा आणि लोकांना फसवणारा मूर्ख माणूस असण्यापेक्षा चांगले असते.

2काही गोष्टींविषयी खूप उत्साह दाखविणे एवढेच पुरेसे नसते. तुम्ही काय करीत आहात ते तुम्हाला कळले पाहिजे. एखादी गोष्ट करण्यासाठी एकदम् पुढे घुसू नये, नाही तर तुम्ही ती चुकीची कराल.

3माणसाचा स्वत:चा मूर्खपणा त्याच्या आयुष्याचा नाश करतो पण तो दोष मात्र परमेश्वराला देतो.

4जर एखादा माणूस श्रीमंत असेल त्याची संपत्ती त्याला खूप मित्र देते. पण जर माणूस गरीब असेल तर त्याचे सर्व मित्र त्याला सोडून जातात.

5जो माणूस दुसऱ्याबद्दल खोटे सांगेल त्याला शिक्षा होईल. तो माणूस खोटे सांगतो तो सुरक्षित राहाणार नाही.

6पुष्कळांना राज्यकर्त्यांबरोबर मैत्री करायची असते आणि जो माणूस नजराणे देतो त्याच्याबरोबर तर सर्वांनाच मैत्री करायची असते.

7माणूस जर गरीब असला तर त्याचे कुटुंबही त्याच्याविरुध्द असते आणि त्याचे सगळे मित्र त्याच्यापासून दूर जातात. तो गरीब माणूस मदतीची याचना करतो. पण ते त्याच्या जवळपासही फिरकत नाहीत.

8जर एखाद्याचे स्वत:वर खूपच प्रेम असेल तर तो शहाणा होण्याचा प्रयत्न करील, तो समजून घेण्याचा खूप प्रयत्न करील आणि त्याला त्याचे बक्षिस मिळेल.

9जो माणूस खोटे बोलतो त्याला शिक्षा होईल. आणि जो खोटे बोलणे चालूच ठेवतो त्याचा सत्यानाश होईल.

10मूर्ख माणूस श्रीमंत असायला नको. ते गुलामाने राजपुत्रांवर राज्य करण्यासारखे आहे.

11जर माणूस शहाणा असला तर त्याचा शहाणपणा त्याला सहनशीलता देतो. आणि तो जेव्हा चूक करणाऱ्यांना क्षमा करतो. तेव्हा तर ते खूपच चांगले असते.

12राजा रागावतो तेव्हा ते सिंहाच्या गर्जनेसारखे वाटते. पण तो जर तुमच्यावर खुश असला तर ते हळुवार पावसासारखे वाटते.

13मूर्ख मुलगा त्याच्या वडिलांचा सर्वनाश करू शकतो आणि वाद घालणारी बायको सतत टपटप पडणाऱ्या पाण्यासारखी चीड आणणारी असते.

14लोकांना त्यांच्या आई–वडिलांकडून घरे आणि पैसा मिळतो. पण चांगली बायको परमेश्वराकडून मिळालेला नजराणा आहे.

15आळशी माणसाला भरपूर झोप मिळेल पण तो खूप उपाशीही असेल.

16जर माणसाने कायद्याचे पालन केले तर तो स्वत:चेच रक्षण करतो. पण जर तो या गोष्टीला महत्व देत नसेल तर तो मारला जातो.

17गरीब माणसांना पैसे देणे हे परमेश्वराला कर्ज देण्यासारखे आहे. त्यांच्याशी दयेने वागल्याबद्दल परमेश्वर परतफेड करील.

18तुमच्या मुलाला शिकवा व तो चुकत असेल तर त्याला शिक्षा करा. तीच एक आशा आहे. तुम्ही जर हे करायला नकार दिला तर तुम्ही त्याला स्वत:चा नाश करायला मदत करीत आहात.

19जर एखाद्याला चटकन् राग येत असेल तर त्याची किंमत त्याला चुकवावी लागते. जर तुम्ही त्याला त्याच्या संकटातून वाचवत राहिलात तर तो पुन्हा पुन्हा त्याच गोष्टी करील.

20उपदेश ऐका आणि शिका. नंतर तुम्ही शहाणे व्हाल.

21माणूस बऱ्याच योजना आखतो. पण फक्त परमेश्वराच्याच योजना प्रत्यक्षात येतात.

22लोक खरे आणि प्रामाणिक असावेत अशी इच्छा केली जाते, म्हणून खोटे असण्यापेक्षा गरीब असणे चांगले.

23जो माणूस परमेश्वराचा आदर करतो त्याचे आयुष्य चांगले असते. आयुष्यात समाधानी असतो आणि त्याला संकटांची चिंता नसते.

24आळशी माणूस स्वत:च्या भूकेसाठी करायच्या गोष्टी देखील करणार नाही. तो ताटातले अन्न तोंडात टाकायचे कामसुध्दा करीत नाही.

25जर एखादा माणूस स्वत:ला इतरांपेक्षा चांगला समजत असेल तर त्याला शिक्षा करायला पाहिजे. नंतर मूर्ख धडा शिकतील. शहाण्या माणसावर टीका केली तर तो शिकतो.

26एखाद्याने वडिलांची चोरी केली आणि आईला घर सोडायला लावले तर तो खूप वाईट आहे. तो माणूस स्वत:ला लाज आणतो आणि स्वत:चा अनादर करतो.

27तुम्ही जर सुचना ऐकायला नकार दिलात तर तुम्ही मूर्खासारख्या चुका करत राहाल.

28जर साक्षीदार प्रामाणिक नसला तर योग्य न्याय असणार नाही. दुष्ट माणसांच्या बोलण्याने गोष्टी अधिक वाईट होतील. 29जो माणूस स्वत:ला इतरांपेक्षा चांगला समजतो त्याला इतर लोक शिक्षा करतील. मूर्ख माणसासाठी जी शिक्षा राखून ठेवली होती ती त्याला मिळेल.

**20** द्राक्षारस आणि मद्य यांमुळे लोकांचा स्वत: वरचा ताबा जातो. ते खूप जोरात बोलतात आणि फुशारकी मारायला लागतात. ते झिंगलेले असतात आणि मूर्खासारख्या गोष्टी करायला लागतात.

2राजाचा राग सिंहगर्जनेसारखा असतो. तुम्ही जर राजाला राग येऊ दिला तर तुम्ही तुमचे प्राणदेखील गमावू शकता.

3कुठलाही मूर्ख वादविवादाला सुरूवात करू शकतो. म्हणून जो वादविवादाला नकार देतो त्याचा तुम्ही आदर करू शकता.

4आळशी मनुष्य बी पेरायचादेखील आळस करतो. म्हणून हंगामाच्या वेळी तो अन्न शोधतो, पण त्याला काहीही मिळत नाही.

5चांगला उपदेश हा खोल विहिरीतून घेतलेल्या पाण्यासारखा असतो. परंतु शहाणा माणूस दुसऱ्याकडून शिकण्याचा आटोकाट प्रयत्न करतो.

6बरेच लोक आपण प्रामाणिक आणि प्रेमळ आहोत असे सांगतात. पण खरोखरच असा माणूस सापडणे कठीण असते.

7चांगला माणूस चांगले आयुष्य जगतो आणि त्याच्या मुलांना आशीर्वाद मिळतात.

8जेव्हा राजा बसून लोकांचा न्यायनिवाडा करतो तेव्हा त्याला स्वत:च्या डोळ्यांनी वाईट गोष्टी बघता येतात.

9कुठलाही माणूस आपण प्रयत्नांची पराकाष्टा केली असे खरोखरच म्हणू शकेल का? मी पाप केले नाही असे कुणी खरोखर सांगू शकेल का? नाही.

10जे लोक चुकीची वजने आणि तराजू वापरून लोकांना फसवतात त्यांचा परमेश्वर तिरस्कार करतो.

11लहान मूल सुध्दा आपल्या कृतीने आपण चांगले आहोत की वाईट ते दाखवू शकते. त्या मुलाकडे लक्षपूर्वक पाहून तो प्रामाणिक आणि चांगला आहे की नाही ते तुम्ही समजू शकता.

12आपल्याला बघायला डोळे आणि ऐकायला कान आहेत आणि ते परमेश्वरानेच आपल्यासाठी केले आहेत.

13जर तुम्हाला झोपायला आवडत असेल तर तुम्ही गरीब व्हाल. पण तुमच्या वेळेचा काम करून उपयोग करा आणि तुम्हाला भरपूर खायला मिळेल.

14एखादा माणूस तुमच्याकडून काही विकत घेतो तेव्हा तो म्हणतो, "हे योग्य नाही, याची किंमत फार आहे." नंतर तोच माणूस इतरांना जाऊन सांगतो की त्याने फार चांगला व्यवहार केला.

15सोने आणि हिरे माणसाला श्रीमंत बनवतात. परंतु जर एखाद्याला तो काय बोलतो आहे हे कळत असेल तर त्याची किंमत खूपच जास्त असते.

16तुम्ही जर दुसऱ्या माणसाच्या कर्जासाठी स्वत:ला जामीन ठेवलेत तर तुम्ही तुमचे कपडे सुध्दा घालवून बसाल.

17तुम्ही जर फसवून कुठली गोष्ट घेतलीत तर ती चांगली आहे असे तुम्हाला कदाचित् वाटेल. पण शेवटी ती कवडीमोलाचीच ठरेल.

18योजना आखण्याआधी चांगला सल्ला घ्या. तुम्हाला जर युध्द सुरू करायचे असेल तर मार्गदर्शनासाठी चांगल्या लोकांना शोधा.

19जो माणूस इतरांबद्दल काही गोष्टी सांगतो, त्यांच्यावर विश्वास ठेवणे शक्य नसते. म्हणून जो खूप बोलतो त्याच्याशी मैत्री करू नका.

20जर एखादा माणूस त्याच्या आईविरुध्द किंवा वडिलांविरुध्द बोलला तर तो अंधार होणारा प्रकाश आहे.

21जर तुम्हाला सहज संपत्ती मिळाली असेल तर तिची तुम्हाला किंमत नसते.

22जर कुणी तुमच्याविरुद्ध काही केले तर त्याला शिक्षा करायचा तुम्हीच प्रयत्न करू नका. परमेश्वरासाठी थांबा. शेवटी तोच तुम्हाला विजयी बनवेल.

23काही लोक फसवी वजने आणि मापे वापरतात. ते त्याचा उपयोग लोकांना फसवण्यासाठी करतात. ते परमेश्वराला आवडत नाही. त्यामुळे त्याला आनंद होत नाही.

24प्रत्येकाच्या बाबतीत जे काय घडते ते परमेश्वर ठरवतो. म्हणून आपल्या आयुष्यात काय घडणार आहे ते माणसाला कसे काय कळेल?

25देवाला काही वस्तू देण्याचे वचन देण्याआधी विचार करा. नंतर तुम्ही तसे वचन द्यायला नको होते असे तुम्हाला वाटू शकेल.

26दुष्ट लोक कोणते ते शहाणा राजाच ठरवील. आणि तो राजाच त्या लोकांना शिक्षा करील.

27मनुष्याचा आत्मा परमेश्वराचा दीप होय. माणसाच्या मनात काय आहे ते परमेश्वराला कळू शकते.

28राजा जरा प्रामाणिक आणि सत्यवचनी असला, तर तो त्याची सत्ता राखू शकतो. त्याचे खरे प्रेम त्याचे राज्य बळकट ठेवते.

29आपण तरुण माणसाचे त्याच्या शक्तीबद्दल कौतुक करतो. पण आपण वृध्दाला त्याच्या पांढऱ्या केसांमुळे मान देतो. त्यावरून तो पूर्ण आयुष्य जगाला हे दिसते.

30आपल्याला शिक्षा झाली तर आपण चुका करणे थांबवू. दु:ख माणसाला बदलू शकते.

21 शेतकरी शेताला पाणी देण्यासाठी खड्डे खणतात. पाण्याला दिशा देण्यासाठी ते वेगवेगळे खड्डे बुजवतात. त्याच रीतीने परमेश्वर राजाच्या मनावर ताबा मिळवतो. राजाने जिथे जावे असे परमेश्वराला वाटते तिथे परमेश्वर त्याला नेतो.

2माणूस जे जे करतो ते सर्व बरोबर आहे असे त्याला वाटते. पण लोक काही गोष्टी करतात या मागची खरी कारणे योग्य की अयोग्य ते परमेश्वरच ठरवतो.

3ज्या गोष्टी योग्य व न्यायी आहेत त्याच करा. बळी अर्पण करण्यापेक्षा अशा गोष्टीच परमेश्वराला आवडतात.

4गर्विष्ठ दृष्टी व गर्विष्ठ विचार पापरूप आहेत. माणूस पातकी आहे हेच ते दर्शवितात.

5काळजीपूर्वक केलेल्या योजनांमुळे फायदा होतो. पण जर तुम्ही काळजी घेतली नाही आणि घाई घाईत गोष्टी केल्या तर तुम्ही गरीब व्हाल.

6जर तुम्ही श्रीमंत होण्यासाठी लबाडी केलीत तर तुमची संपत्ती लवकरच नाहीशी होईल आणि तुमची संपत्तीच तुम्हाला मरणाचा मार्ग दाखवील.

7दुष्ट लोक ज्या वाईट गोष्टी करतात त्या त्यांचा नाश करतील. ते लोक योग्य गोष्टी करायला नकार देतात.

8वाईट लोक नेहमी दुसऱ्यांना फसवायचा प्रयत्न करतात. पण चांगले लोक विश्वासू आणि न्यायी असतात.

9सतत वाद घालणाऱ्या बायकोबरोबर घरात राहाण्यापेक्षा घराच्या छतावर राहाणे अधिक चांगले.

10दुष्ट लोकांना नेहमी वाईट गोष्टी करायच्या असतात आणि ते लोक त्यांच्या भोवतालच्या लोकांना दया दाखवत नाहीत.

11जे लोक देवाची चेष्टा करतात त्यांना शिक्षा करा म्हणजे मूर्ख लोक धडा शिकतील. ते शहाणे होतील आणि नंतर त्यांना अधिकाधिक ज्ञान मिळेल.

12देव चांगला आहे. दुष्ट लोक काय करतात ते देवाला माहीत आहे आणि तो त्यांना शिक्षा करील.

13जर एखाद्याने गरीब लोकांना मदत करायला नकार दिला तर जेव्हा त्याला मदतीची गरज भासेल तेव्हा त्याला ती मिळणार नाही.

14जर एखादा माणूस तुमच्यावर रागावला असला तर त्याला खाजगीरित्या एक भेट द्या. गुप्त भेट राग थोपवते.

15योग्य न्याय चांगल्या लोकांना आनंदी बनवतो. पण तोच दुष्ट लोकांना घाबरतो.

16जर एखाद्याने शहाणपणाचा मार्ग सोडला तर तो विनाशाकडे जातो.

17जर एखाद्याला मजा करणे हेच अत्यंत महत्वाचे वाटत असेल तर तो गरीब होईल. जर त्या माणसाला द्राक्षारस आणि अन्न खूप आवडत असेल तर तो कधीही श्रीमंत होणार नाही.

18दुष्ट लोक चांगल्या माणसांवर जे अत्याचार करतात त्याची किंमत त्यांना मोजावी लागते. जे लोक अप्रामाणिक असतात त्यांना प्रामाणिक लोकांवर केलेल्या अत्याचाराची किंमत मोजावी लागते.

19वाद घालणाऱ्या रागीट बायकोबरोबर राहाण्यापेक्षा वाळवंटात राहाणे अधिक चांगले.

[20]शहाणा माणूस त्याला लागणाऱ्या गोष्टी साठवून ठेवतो. पण मूर्ख माणूस त्याला मिळालेल्या वस्तू लगेच संपवून टाकतो.

[21]जो माणूस नेहमी प्रेम आणि दया दाखवायचा प्रयत्न करतो त्याला चांगले आयुष्य, संपत्ती आणि मान मिळेल.

[22]शहाण्या माणसाला जवळ जवळ सगळ्या गोष्टी येतात. बलदंड माणसे ज्याचा बचाव करीत आहेत अशा शहरावर तो हल्ला करू शकतो आणि जी भिंत त्यांचे रक्षण करील असा त्यांना विश्वास वाटतो, तिचाही तो नाश करू शकतो.

[23]माणसाने जर आपण काय बोलतो याची काळजी घेतली तर तो बऱ्याच संकटांतून सुटू शकेल.

[24]गर्विष्ठ माणसाला आपण इतरांपेक्षा चांगले आहोत असे वाटत असते. तो वाईट आहे हे तो आपल्या करणीने दाखवतो.

[25–26]आळशी माणूस अधिकाचा हव्यास धरून आपला नाश करून घेतो. तो स्वतःचा नाश करतो कारण तो त्या गोष्टींसाठी कष्ट करायला नकार देतो पण चांगला माणूस दान देतो कारण त्याच्याकडे भरपूर असते.

[27]वाईट लोक जेव्हा, त्याला बळी अर्पण करतात तेव्हा परमेश्वर आनंदी नसतो. खास करून त्यावेळी, ज्यावेळी वाईट लोक त्याच्याकडून काहीतरी घेण्याचा प्रयत्न करतात.

[28]जो माणूस खोटे बोलतो त्याचा सर्वनाश होतो. जो कोणी ते खोटे बोलणे ऐकेल त्याचा पण नाश होईल.

[29]चांगल्या माणसाला त्याचे नेहमी बरोबर असते हे माहीत असते. पण दुष्ट माणसाला तसा आव आणावा लागतो.

[30]परमेश्वर ज्याच्या विरुद्ध आहे अशी योजना यशस्वी करून दाखविणारा एकही शहाणा माणूस नाही.

[31]लोक युध्दासाठी घोड्यांसकट सर्व तयारी करू शकतात, पण परमेश्वराने त्यांना विजय मिळवून दिल्याखेरीज ते युध्द जिंकू शकत नाहीत.

22 आदरणीय असणे हे श्रीमंत असण्यापेक्षा अधिक चांगले. चांगले नाव असणे हे सोन्या चांदीपेक्षा अधिक महत्वाचे आहे.

[2]गरीब लोक आणि श्रीमंत लोक सारखेच असतात. सर्वांना परमेश्वरानेच निर्माण केले आहे.

[3]शहाण्या लोकांना संकट येताना दिसते आणि ते वाटेतून बाजूला होतात. पण मूर्ख लोक सरळ संकटात जातात आणि त्यामुळे सोसत राहातात.

[4]परमेश्वराला मान द्या आणि विनम्र राहा. नंतर तुम्हाला संपत्ती, मान आणि खरे जीवन मिळेल.

[5]वाईट लोक अनेक संकटांच्या जाळ्यात अडकले आहेत. पण जो माणूस आपल्या आत्म्याची काळजी करतो तो संकटांपासून दूर राहातो.

[6]लहान मुलाला जगण्याचा योग्य मार्ग लहानपणीच शिकवा. मग तो जेव्हा मोठा होईल तेव्हा त्याच मार्गाने जगेल.

[7]गरीब लोक श्रीमंतांचे गुलाम असतात. जो माणूस कर्ज घेतो तो जो कर्ज देतो त्याचा गुलाम असतो.

[8]जो माणूस संकटे पसरवतो तो संकटांचे पीक घेतो. आणि शेवटी त्या माणसाचा नाश होईल त्याने इतरांना दिलेल्या त्रासांमुळेच त्या माणसाचा नाश होईल.

[9]जो मनुष्य स्वखुशीने आनंदाने देतो त्याला आशीर्वाद मिळेल. कारण तो आपले अन्न गरिबांबरोबर वाटून खातो.

[10]जर एखादा माणूस स्वतःला इतरांपेक्षा चांगला समजत असेल तर त्याला जबरदस्तीने जायला भाग पाडा. जेव्हा तो माणूस जाईल तेव्हा त्याच्याबरोबर संकटही जाईल. नंतर वाद आणि फुशारक्याही बंद होतील.

[11]जर तुम्ही शुध्द मनावर आणि प्रेमळ शब्दांवर प्रेम करीत असाल तर राजाही तुमचा मित्र होईल.

[12]जे लोक परमेश्वराला ओळखतात त्यांच्यावर तो नजर ठेवतो आणि त्यांचे रक्षण करतो. पण जे त्याच्याविरुध्द जातात त्यांचा तो नाश करतो.

[13]आळशी माणूस म्हणतो, "मी आता कामाला जाऊ शकत नाही. बाहेर सिंह आहे आणि तो मला खाईल."

[14]व्यभिचाराचे पाप हा एक सापळा आहे. जो माणूस या सापळ्यात अडकतो त्याच्यावर परमेश्वर खूप रागावतो.

[15]मुले मूर्खपणाच्या गोष्टी करीत असतात. पण तुम्ही जर त्यांना शिक्षा केली तर त्या गोष्टी न करायलाही ते शिकतील.

[16]या दोन गोष्टी तुम्हाला गरीब बनवतील. स्वतःला श्रीमंत बनवण्यासाठी गरीबांना त्रास देणे आणि श्रीमंतांना नजराणे देणे.

## शहाणपणाच्या तीस म्हणी

[17]मी काय सांगतो ते ऐका. मी तुम्हाला विद्वानांनी जे सांगितले ते शिकवतो. या शिकवणीपासून शिका.
[18]तुम्ही जर या म्हणी लक्षात ठेवल्या तर ते तुमच्या दृष्टीने फार चांगले होईल. तुम्ही जर हे शब्द म्हणू शकलात तर तुम्हाला त्यांची मदत होईल.
[19]मी तुम्हाला आता या गोष्टी शिकवेन. तुम्ही परमेश्वरावर विश्वास ठेवावा अशी माझी इच्छा आहे.
[20]मी तुमच्यासाठी तीस म्हणी लिहिल्या. हे शब्द म्हणजे उपदेश आणि शहाणपण आहे.
[21]हे शब्द तुम्हाला खऱ्या आणि महत्वाच्या गोष्टी सांगतील. नंतर तुम्ही तुमच्याकडे पाठवलेल्यांना ज्यांनी तुम्हाला विचारले त्यांना तुम्ही चांगली उत्तरे देऊ शकता.

*-1-*

[22]गरिबांची चोरी करणे सोपे असते. पण ते करू नका आणि न्यायालयात या गरीब लोकांचा फायदा घेऊ नका.
[23]परमेश्वर त्यांच्या बाजूला आहे. तो त्यांना साहाय्य करतो

आणि त्यांच्याकडून ज्यांनी वस्तू घेतल्या त्या वस्तू तो परत घेईल.

*-2-*

24जो खूप लवकर रागावतो त्या माणसाशी मैत्री करू नका. जो पटकन् वेडा होतो त्या माणसाजवळ जाऊ नका. 25जर तुम्ही गेलात तर तुम्ही त्याच्यासारखेच व्हायला शिकाल. आणि तुमच्यावरही त्याच्यावर येतात तशीच संकटे येतील.

*-3-*

26दुसऱ्याच्या कर्जासाठी जामीन राहाण्याचे वचन देऊ नका. 27जर तुम्ही त्याचे कर्ज फेडू शकला नाही, तर तुम्ही तुमच्या जवळचे सर्व घालवून बसाल. तुमचे झोपायचे अंथरुण तुम्ही का घालवता?

*-4-*

28खूप पूर्वी तुमच्या पूर्वजांनी जमीन–जायदादीची आखून दिलेली रेषा पुसू नका.

*-5-*

29जर एखादा माणूस त्याच्या कामात तरबेज असला तर तो राजांची चाकरी करण्यायोग्य असतो. त्याला बिनमहत्वाच्या लोकांसाठी काम करावे लागणार नाही.

*-6-*

23 जेव्हा तुम्ही महत्वाच्या लोकांबरोबर बसता आणि खाता तेव्हा तुम्ही कुणाबरोबर आहात याचे भान ठेवा. 2जरी तुम्हाला खूप भूक लागलेली असली तरी कधीही जास्त खाऊ नका. 3आणि तो जे चांगले पदार्थ वाढतो तेही जास्त खाऊ नका. तो कदाचित् एखादा डाव असू शकेल.

*-7-*

4श्रीमंत होण्याचा प्रयत्न करताना तब्येतीची हेळसांड करू नका. तुम्ही शहाणे असाल तर धीर धराल. 5पैसा फार लवकर जातो. जणूकाही त्याला पंख फुटतात आणि तो पक्ष्यासारखा उडून जातो.

*-8-*

6स्वार्थी माणसाबरोबर खाऊ नका. आणि त्याला जे खास भोजन आवडते त्यापासून दूर राहा. 7जो नेहमी किंमतीचा विचार करणारा माणूस आहे. तो कदाचित् तुम्हाला म्हणेल, ‘खा आणि प्या’ पण त्याला ते खरोखरच हवे आहे असे नाही. 8आणि तुम्ही जर त्याचे अन्न खाल्ले तर तुम्ही आजारी पडाल आणि तुम्हाला शरम वाटेल.

*-9-*

9मूर्खाला शिकवायचा प्रयत्न करू नका. तो तुमच्या शहाणपणाच्या शब्दांची थट्टा करील.

*-10-*

10जुनी जमीन जायदादीची रेषा कधीही सरकवू नका. आणि निराधार मुलाची जमीन कधीही बळकावू नका. 11परमेश्वर तुमच्या विरुध्द जाईल. परमेश्वर शक्तिशाली आहे आणि तो त्या निराधार मुलाचे रक्षण करील.

*-11-*

12तुमच्या शिक्षकाचे ऐका आणि जेवढे शिकता येईल तेवढे शिका.

*-12-*

13गरज पडेल तेव्हा मुलाला नेहमी शिक्षा करा. तुम्ही त्याला चापट मारली तर त्याला ती लागणार नाही. 14चापटी मारून तुम्ही त्याला मृत्यूपासून वाचवू शकाल.

*-13-*

15मुला, तू जर शहाणा झालास तर मी खूप आनंदी होईन. 16तू योग्य गोष्टी बोलू लागलास, तू योग्य गोष्टी बोलताना मी ऐकले तर मला खूप आनंद होईल.

*-14-*

17दुष्ट लोकांचा मत्सर करू नका. पण परमेश्वराचा आदर करण्यासाठी नेहमीच प्रयत्नांची पराकाष्ठा करा. 18आशेला नेहमीच जागा असते. आणि ती आशा अमर आहे.

*-15-*

19म्हणून मुला, लक्ष दे आणि शहाणा हो. योग्य रीतीने जगण्याची काळजी घे. 20खूप खाणाऱ्या आणि खूप द्राक्षारस पिणाऱ्या लोकांशी मैत्री करू नकोस 21जे लोक खूप खातात आणि पितात ते गरीब होतात. ते फक्त खातात, पितात आणि झोपतात आणि लवकरच त्यांच्याजवळ काहीही उरत नाही.

*-16-*

22तुझे वडील तुला ज्या गोष्टी सांगतात त्या ऐक. तुझ्या वडिलांशिवाय तू कधीही जन्माला आला नसतास. तुझी आई म्हातारी झाली तरी तिचा आदर कर. 23सत्य, शहाणपण, शिक्षण आणि समजूतदारपणा या गोष्टी पैसे मोजून घेण्याइतक्या मौल्यवान आहेत. आणि त्यांचे मूल्य त्या विकून टाकता न येण्याइतके अधिक आहे. 24चांगल्या माणसाचे वडील खूप आनंदी असतात. एखाद्याचे मूल जर शहाणे असेल तर ते खूप आनंद देते. 25म्हणून तुमच्या

आई-वडिलांना तुमच्याबरोबर आनंदी होऊ द्या. तुमच्या आईला आनंद घेऊ द्या.

*-17-*

26मुला, मी जे सांगतो ते लक्षपूर्वक ऐक. माझे आयुष्य तुझ्यासमोर उदाहरणादाखल राहू दे. 27वेश्या आणि वाईट स्त्रिया म्हणजे सापळे आहेत. त्या खोल विहिरीसारख्या आहेत. त्यातून कधीही बाहेर पडता येत नाही. 28वाईट स्त्री चोरासारखी तुमची वाट बघत असते. आणि ती पुष्कळ पुरुषांना पाप करायला लावते.

*-18-*

29–30जे लोक खूप द्राक्षारस पितात आणि कडक मद्य घेतात, त्यांच्याकरता ते खूप वाईट आहे. ते लोक खूप भांडणे आणि वाद-विवाद करतात. त्यांचे डोळे पण लाल असतात. ते अडखळतात आणि पडतात. ही सगळी संकटे त्यांना टाळता आली असती.

31म्हणून द्राक्षारसापासून सावध राहा. तो सुंदर आणि लाल दिसतो. तो पेल्यात चकाकतो आणि तुम्ही पिता तेव्हा तो अगदी सरळपणे जातो. 32पण शेवटी तो सापासारखा चावतो.

33द्राक्षारसामुळे तुम्ही चित्रविचित्र गोष्टी बघायला लागता. तुमचे मन गोंधळून जाते. 34तुम्ही जेव्हा झोपता तेव्हा तुम्ही खवळलेल्या समुद्रावर आहात असे तुम्हाला वाटेल आपण जहाजावर झोपलो आहोत असे तुम्हाला वाटेल. 35तुम्ही म्हणाल, "त्यांनी मला मारले पण मला ते कळलेसुध्दा नाही. त्यांनी मला खूप मारले पण मला ते आठवत नाही. आता मी जागा होऊ शकत नाही. मला आणखी प्यायला द्या."

*-19-*

24 वाईट लोकांचा मत्सर करू नका. त्यांच्याबरोबर तुमचा वेळ वाया घालवू नका. 2ते त्यांच्या मनात वाईट गोष्टी करण्याच्या योजना आखत असतात. ते फक्त त्रास देण्याच्या गोष्टी बोलत असतात.

*-20-*

3चांगली घरे शहाणपण आणि समजूतदारपणा यावर आधारलेली असतात. 4आणि सर्व मौल्यवान आणि प्रसन्न करणाऱ्या संपत्तीने खोल्या भरल्या जातात.

*-21-*

5शहाणपण माणसाला अधिक सामर्थ्यवान बनवते. ज्ञान माणसाला शक्ती देते. 6युध्द सुरु करण्याआधी तुम्ही काळजीपूर्वक योजना आखली पाहिजे. तुम्हाला जर (युध्द) जिंकायचे असेल तर तुम्हाला अनेक चांगले मार्गदर्शक हवेत.

*-22-*

7मूर्ख लोकांना शहाणपण कळू शकत नाही. आणि लोक जेव्हा महत्वाच्या गोष्टींची चर्चा करतात तेव्हा मूर्ख माणूस काहीही बोलू शकत नाही.

*-23-*

8जर तुम्ही नेहमी त्रास देण्याच्याच योजना आखत असाल तर लोकांना तुम्हीच त्रास देणारे आहात हे कळेल आणि ते तुमचे ऐकणार नाहीत. 9मूर्ख माणूस ज्या गोष्टी करायच्या ठरवतो ते पाप असते. जो स्वत: ला इतरांपेक्षा चांगला समजतो त्याचा लोक तिरस्कार करतात.

*-24-*

10जर तुम्ही संकटाच्या वेळी दुर्बळ असाल तर तुम्ही खरोखरच दुर्बळ आहात.

*-25-*

11जर लोक एखाद्याला ठार मारण्याचे ठरवीत असतील तर तुम्ही त्याला वाचवायला हवे. 12"माझा त्याच्याशी काही संबंध नाही" असे तुम्ही म्हणू शकत नाही. परमेश्वराला सर्व माहीत असते. आणि तुम्ही काही गोष्टी का करता ते त्याला माहीत असते. परमेश्वर तुमच्यावर लक्ष ठेवतो. त्याला सर्व कळते. आणि तुम्ही ज्या गोष्टी करता त्याबद्दल परमेश्वर तुम्हाला बक्षीस देईल.

*-26-*

13मुला, मध खा, तो चांगला असतो. मधाच्या पोव्व्यामधला मध गोड असतो. 14त्याचप्रमाणे शहाणपण तुमच्या आत्म्यासाठी चांगले असते. तुमच्या जवळ शहाणपण असेल तर तुमच्या जवळ आशाही असेल आणि तुमची आशा कधीही मावळणार नाही.

*-27-*

15चांगल्या माणसाकडून काही चोरू पाहणाऱ्या किंवा त्याचे घर बळकावू पहाणाऱ्या चोरासारखे होऊ नका. 16चांगला माणूस जर सात वेळा पडला तर तो पुन्हा उभा राहतो. पण वाईट लोकांचा संकटात नेहमी पराभव होईल.

*-28-*

17तुमचा शत्रू संकटात असतो तेव्हा आनंद मानू नका. तो पडतो तेव्हा आनंदून जाऊ नका. 18जर तुम्ही तसे केलेत तर परमेश्वर ते बघेल आणि परमेश्वराला तुमच्याविषयी आनंद वाटणार नाही. नंतर परमेश्वर कदाचित् तुमच्या शत्रूला मदत करील.

*-29-*

19दुष्ट लोकांना तुम्हाला काळजीत पडायला लावू देऊ नका आणि दुष्टांचा मत्सर करू नका. 20या दुष्ट लोकांना आशा नसते. त्यांचा प्रकाश काळोख होईल.

*-30-*

21मुला, परमेश्वराचा आणि राजाचा आदर कर. आणि जे लोक त्यांच्या विरुध्द आहेत त्यांच्यात सामील होऊ नकोस. 22का? कारण त्या प्रकारच्या माणसांचा लगेच नाश होऊ शकतो. देव आणि राजा त्यांच्या शत्रूंसाठी किती संकटे निर्माण करू शकतात हे तुम्हाला माहीत नाही.

## आणखी नीतिसूत्रे

23हे शहाण्या माणसाचे शब्द आहेत. न्यायाधीशाने अगदी न्यायी असले पाहिजे. एखादा माणूस त्याच्या माहितीतला आहे म्हणून त्याला त्याने पाठिंबा देऊ नये. 24जर न्यायाधीशाने अपराधी माणसाला 'तू जाऊ शकतोस' असे सांगितले तर लोक त्याच्याविरुध्द जातील. आणि राष्ट्रे त्याच्याविरुध्द वाईट गोष्टी बोलतील. 25पण जर न्यायाधीशाने अपराध्याला शासन केले तर सर्व लोक आनंदी होतील. 26खरे उत्तर सर्वांना आनंदी करते. ते ओठावरच्या चुंबनासारखे वाटते.

27शेतात पेरणी करण्याआधी तुमचे घर बांधू नका. धान्य पिकवण्याची तुमची तयारी आहे याची आधी खात्री करा. मग घर बांधा.

28काही चांगले कारण असल्याशिवाय कुणाच्याही विरुध्द बोलू नका. खोटे सांगू नका.

29"त्याने मला दु:ख दिले म्हणून मीही त्याला तसेच करीन. त्याने मला त्रास दिला म्हणून मी त्याला शिक्षा करीन." असे म्हणू नका.

30मी आळशी माणसाच्या शेताजवळून जात होतो. मी शहाणा नसलेल्या माणसाच्या द्राक्षाच्या मळ्याजवळून जात होतो. त्या 31शेतात सगळीकडे तण माजले होते. क्षुल्लक वनस्पती तिथे वाढत होत्या. आणि शेताभोवतालची भिंत तुटली होती आणि पडायला आली होती. 32मी ते बघितले आणि त्याचा विचार करू लागलो. व नंतर त्या गोष्टींपासून मी धडा शिकलो. 33"थोडीशी झोप, थोडी विश्रांती, हाताची घडी आणि वामकुक्षी." 34या गोष्टी तुम्हाला लवकरच गरीब करतील. तुमच्याकडे काहीही नसेल चोर घर फोडून घरात आला आणि सारे काही घेऊन गेल्यासारखे ते असेल.

## शलमोनाची आणखी नीतिसूत्रे

25 ही शलमोनाची आणखी काही नीतिसूत्रे आहेत. यहुदाचा राजा हिज्कीया याच्या नोकरांनी या शब्दांची नक्कल केली.

2काही गोष्टी आपल्याला माहीत नसाव्यात अशी देवाची इच्छा असते. या गोष्टी आपल्यापासून लपवून ठेवायचा देवाला हक्क आहे. पण राजा ज्या गोष्टी शोधून काढतो त्याबद्दल त्याला मान मिळतो.

3आकाश उंच आपल्या डोक्यावर आहे आणि जमीन आपल्या पायाखाली. राजांच्या मनाचेही तसेच आहे. आपण ते समजू शकत नाही.

4चांदीतल्या निरुपयोगी वस्तू काढून ती शुध्द केली तर कामगार त्यापासून सुंदर वस्तू बनवू शकतो. 5त्याचप्रमाणे राजापासून त्याचे दुष्ट उपदेशक दूर केले तर चांगुलपणा त्याचे राज्य भक्कम करील.

6राजासमोर स्वत:ची फुशारकी मारू नका. आपण प्रसिध्द आहोत असे म्हणू नका. 7राजाने स्वत:च तुम्हाला आमंत्रण दिलेले अधिक चांगले. पण तुम्ही स्वत: होऊनच गेलात तर इतर लोकांसमोर तुम्हाला गोंधळल्यासारखे होईल.

8तुम्ही काही बघितले असेल तर त्याबद्दल न्यायाधीशाला सांगण्याची घाई करू नका. तुम्ही चुकत आहात हे दुसऱ्याने सिध्द केले तर तुम्ही गोंधळून जाल.

9जर तुमचे आणि दुसऱ्या माणसाचे एकमत होत नसेल तर काय करायचे ते आपसात ठरवा आणि दुसऱ्याच्या गुप्त गोष्टी कुणाला सांगू नका. 10तुम्ही जर त्या सांगितल्या तर तुम्हाला लाज वाटेल. आणि तुमचे वाईट झालेले नाव तुम्ही कधीही घालवू शकणार नाही.

11तुम्ही जर योग्य वेळी चांगली गोष्ट सांगितली तर ते चांदीच्या तबकातले सोन्याचे सफरचंद असेल.

12जर शहाण्या माणसाने तुम्हाला समज दिली असेल तर ती शुध्द सोन्याच्या अंगठ्यापेक्षा किंवा दागिन्यांपेक्षा अधिक किंमती असल.

13विश्वासू दूताची किंमत ज्यांनी त्याला पाठविले असेल त्यांच्या इतकीच असते. तो उन्हाळ्यातील हंगामाच्या दिवसांतल्या थंडगार पाण्यासारखा आहे.

14जे लोक भेटी देण्याचे वचन देतात पण देत मात्र कधीच नाहीत ते पाऊस न आणणारे ढग आणि वारा यांसारखे आहेत.

15धीराचे बोलणे माणसाच्याच काय पण राजाच्या विचारातही बदल करू शकते. हळूवार बोलणे फार परिणामकारक असते.

16मध चांगला असतो पण तो खूप खाऊ नका. तुम्ही जर तो खूप खाल्लात तर तुम्हाला त्याचा तिटकारा येईल. 17त्याचप्रमाणे तुमच्या शेजाऱ्याच्या घरात सारखे जाऊ नका. जर तुम्ही सारखे गेलात तर तो तुमचा तिरस्कार करायला लागेल.

18जो माणूस खरे सांगत नाही तो धोकादायक असतो. तो सोटा, तलवार किंवा तीक्ष्ण बाण यांसारखा असतो. 19खोटे बोलणाऱ्यावर संकटकाळी विश्वास टाकू नका. तो माणूस दुखणाऱ्या दातासारखा वा जायबंदी

झालेल्या पायासारखा असतो. तुम्हाला त्याची तेव्हा
सर्वांत जास्त गरज असते तेव्हाच तो तुम्हाला इजा करत
असतो.

20दु:खी माणसासमोर आनंदी गीत गाणे हे त्याला थंडी
वाजत असताना त्याच्या अंगावरील कपडे काढून
टाकण्यासारखे आहे. ते सोड्यात शिरका मिसळण्यासारखे
आहे.

21तुमचा शत्रू जर भुकेला असला तर त्याला खायला
अन्न द्या. तो जर तहानेला असला तर त्याला प्यायला
पाणी द्या. 22तुम्ही जर असे केलेत तर त्याला लाज वाटेल.
त्याच्या डोक्यावर जळते निखारे टाकल्यासारखे ते असेल.
आणि परमेश्वर तुम्हाला बक्षीस देईल कारण तुम्ही तुमच्या
शत्रूशी चांगले वागलात.

23उत्तरेकडून वाहणारा वारा पाऊस आणतो त्याचप्रमाणे
चुगल्या राग आणतात.

24वाद घालणाऱ्या बायकोबरोबर घरात राहाण्यापेक्षा
छपरावर राहाणे अधिक चांगले.

25खूप लांबच्या स्थळाहून आलेली, चांगली बातमी ही
तुमच्या नहानलेल्या जीवाला थंडगार पाण्यासारखी असते.

26जर चांगला माणूस दुबळा झाला आणि वाईट माणसाचा
मार्ग आक्रमू लागला तर ते चांगल्या पाण्यात माती
कालवल्यासारखे असते.

27जर तुम्ही खूप मध खाल्लात तर तो तुमच्यासाठी
योग्य नाही. त्याचप्रमाणे स्वत:साठी खूप मानमरातब
घेण्याचा प्रयत्न करू नका.

28जर माणूस स्वत:वर ताबा मिळवू शकत नसेल तर
तो तटबंदी मोडून पडलेल्या शहरासारखा आहे.

## मूर्खांबद्दलची नीतिसूत्रे

26 उन्हाळ्यात बर्फ पडायला नको आणि पीक
कापणीच्यावेळी पाऊस पडायला नको असतो.
त्याचप्रमाणे लोकांनी मूर्खांचा आदर करायला नको.

2एखाद्याने तुमच्या बाबतीत काही वाईट घडावे असे
म्हटले तर काही काळजी करू नका. तुम्ही जर काही
चूक केली नसेल तर काहीच वाईट घडणार नाही. अशा
माणसाचे शब्द तुमच्या जवळून उडून जाणाऱ्या व कधीच
न थांबणाऱ्या पक्ष्याप्रमाणे असतात.

3घोड्याला चाबकाचे फटकारे लागतात. बैलाच्या
नाकात वेसण घालावी लागते आणि मूर्खाला खरपूस मार
द्यावा लागतो.

4एक वाईट परिस्थिती: मूर्खाने जर तुम्हाला मूर्खासारखा
प्रश्न विचारला तर मूर्खासारखे उत्तर देऊ नका. नाहीतर
तुम्ही सुध्दा मूर्खासारखेच दिसाल. 5पण मूर्खाने जर मूर्ख
प्रश्न विचारला तर तुम्हीही त्याला मूर्ख उत्तर द्या. नाहीतर
तो मूर्ख आपण खूप हुशार आहोत असे समजेल.

6तुमचा निरोप द्यायला मूर्खाला कधीही सांगू नका.
तुम्ही जर तसे केलेत तर ते तुमचे पाय कापून
टाकल्यासारखे होईल. संकटाला आमंत्रण दिल्यासारखे
होईल.

7मूर्ख जेव्हा शहाण्यासारखे बोलायचा प्रयत्न करतो
तेव्हा ते लंगड्याने चालण्याचा प्रयत्न केल्यासारखे वाटते.

8मूर्खाला आदर दाखवणे हे गोफणीला दगड
बांधण्यासारखे आहे.

9मूर्ख जेव्हा काहीतरी शहाणपणाचे बोलण्याचा प्रयत्न
करतो तेव्हा ते झिंगलेल्या माणसाने हातात रूतलेला काटा
काढण्याचा प्रयत्न केल्यासारखे वाटते.

10मूर्खाला किंवा वाटेवरच्या कोणालाही मोलाने काम
करायला सांगणे धोकादायक असू शकते. त्यामुळे कोणाला
इजा होईल ते सांगता येणार नाही.

11कुत्रा अन्न खातो. नंतर त्याला बरे वाटेनासे होते
आणि तो उलटी करतो. कुत्रा नंतरही ते ओकलेले पुन्हा
खातो. मूर्ख माणूसही असाच असतो. तो मूर्खांसारख्या
गोष्टी पुन्हा पुन्हा करतो.

12जर एखादा माणूस शहाणा नसताना स्वत:ला शहाणा
समजत असेल तर तो मूर्खापेक्षाही वाईट आहे.

## आळशी माणसाची नीतिसूत्रे

13आळशी माणूस म्हणतो, "मी माझे घर सोडू शकत
नाही. रस्त्यात सिंह आहे."

14आळशी माणूस दारासारखा असतो. दार जसे
बिजागरीवर मागे पुढे हलते तसा तो अंथरुणावर हलत
असतो. तो इकडे तिकडे कुठेही जात नाही.

15आळशी माणूस स्वत:चे अन्न उचलून तोंडात
घालण्यातदेखील आळशीपणा करतो.

16आळश्याला आपण खूप हुशार आहोत असे वाटते.
सात माणसे त्यांच्या कल्पनांसाठी योग्य कारणे देऊ
शकतात. त्यांच्यापेक्षाही आपण हुशार आहोत असे त्याला
वाटते.

17दोन माणसांच्या वादातला भाग बनणे हे फार
धोकादायक असते. ते रस्त्याने चालताना कुत्र्याला त्याचे
कान धरून पकडण्यासारखेच असते.

18-19जो माणूस एखाद्याला फसवतो आणि नंतर तो केवळ
गंमत करीत होता असे म्हणतो तेव्हा ते वेड्याने अग्नीबाण
हवेत फेकून कुणाला तरी अपघाती करण्यासारखेच आहे.

20शेकोटीत जर लाकडे नसतील तर ती शेकोटी विझून
जाते. त्याचप्रमाणे अफवा नसतील तर वाद संपून जातात.

21लोणारी कोळसा कोळश्याला पेटता ठेवतो आणि
लाकूड शेकोटी पेटती ठेवते. त्याचप्रमाणे जे लोक संकटे
निर्माण करतात तेच वाद चालू ठेवतात.

22लोकांना गप्पा-टप्पा आवडतात. ते चांगले अन्न
खाल्ल्यासारखे असते.

23दुष्ट योजना लपवण्यासाठी वापरलेले चांगले शब्द हे
मातीच्या भांड्यावर चांदीचा मुलामा चढवल्यासारखे असते.
24दुष्ट मनुष्य आपल्या बोलण्याने चांगले दिसण्याचा प्रयत्न

करतो. पण तो आपल्या दुष्ट योजना आपल्या मनात लपवण्याचा प्रयत्न करतो. 25तो ज्या गोष्टी सांगतो त्या जरी चांगल्या वाटल्या तरी त्यावर विश्वास ठेवू नका. त्याचे मन दुष्ट कल्पनांनी भरलेले आहे. 26तो त्याच्या दुष्ट योजना चांगल्या शब्दांनी लपवतो. पण तो फारच नीच असतो आणि शेवटी तो ज्या वाईट गोष्टी करतो त्या सर्वांना दिसतील.

27जर एखाद्याने दुसऱ्याला जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न केला तर तो स्वतःच त्यात अडकतो जर एखाद्याने दुसऱ्यावर दरड टाकण्याचा प्रयत्न केला तर तो स्वतःच त्या दरडीखाली चिरडून जाईल.

28जो माणूस खोटे बोलून ज्या लोकांना दुःख देतो त्यांचा तो तिरस्कार करीत असतो. आणि तो जर त्याच्या मनात नसताना काही बोलला तर तो स्वतःलाच दुःखी करीत असतो.

27 भविष्यात काय घडेल याबद्दलच्या फुशारक्या मारू नका. उद्या काय घडेल ते तुम्हाला माहीत नसते.

2स्वतःचीच स्तुती कधीही करू नका. ती दुसऱ्यांना करू द्या.

3दगड खूप वजनदार असतो आणि वाळू वाहून न्यायला कठीण असते. पण मूर्खांनी आणलेली संकटे सहन करणे या दोन्ही पेक्षा कठीण असते.

4राग क्रूर आणि नीच असतो त्यामुळे सर्वनाश होतो. पण मत्सर त्याहीपेक्षा वाईट असतो.

5उघड टीका ही गुप्त प्रेमापेक्षा चांगली असते.

6मित्र तुम्हाला कधीतरी दुःख देईल पण त्याची तसे करायची इच्छा नसते. शत्रू वेगळा असतो. शत्रू जरी तुमच्याशी कधी दयाबुध्दीने वागला तरी त्याला तुम्हाला दुःख द्यायचीच इच्छा असते.

7तुम्हाला जर भूक नसेल तर तुम्ही मधदेखील खाणार नाही. पण जर तुम्ही भुकेले असाल तर तुम्ही काहीही खाल. ते चवीला वाईट असले तरीही.

8घरापासून दूर असलेला माणूस म्हणजे घरट्यापासून दूर असलेला पक्षी.

9अत्तर आणि गोड वास असलेल्या वस्तू तुम्हाला आनंद देतात. पण संकटे तुमच्या मनाची शांती घालवतात.

10तुमच्या आणि तुमच्या वडिलांच्या मित्रांना विसरू नका. आणि तुम्ही संकटात असाल तर मदतीसाठी दूरच्या तुमच्या भावाच्या घरी जाऊ नका. जवळच्या शेजाऱ्याला विचारणे हे दूरवरच्या तुमच्या भावाकडे जाण्यापेक्षा चांगले असते.

11मुला शहाणा हो. त्यामुळे मला आनंद वाटेल. नंतर जो कुणी माझ्यावर टीका करेल त्याला मी उत्तर देऊ शकेन.

12शहाण्या लोकांना संकटांचा सुगावा लागला आणि ते त्यांच्या मार्गातून बाजूला होतात. पण मूर्ख सरळ संकटात जातात आणि त्यामुळे दुःखी होतात.

13जर तुम्ही दुसऱ्याच्या कर्जाबद्दल स्वतः जामीन राहिलात तर तुम्हाला तुमचे कपडेदेखील गमवावे लागतील.

14"सुप्रभात" च्या आरोळीने तुमच्या शेजाऱ्याला भल्या पहाटे उठवू नका. तो त्याला आशीर्वादाऐवजी शाप समजेल.

15सतत वाद घालण्याची इच्छा धरणारी बायको पावसाळ्याच्या दिवसात सतत गळणाऱ्या पाण्यासारखी असते. 16त्या बाईला थांबवणे हे वाऱ्याला थांबवण्यासारखे आहे. हाताने तेल पकडण्यासारखे असते.

17लोखंडाच्या सुरीला धार करण्यासाठी लोखंडाचेच तुकडे वापरतात. त्याचप्रमाणे लोक एकमेकांना धारदार बनविणे एकमेकापासूनच शिकतात.

18जो माणूस अंजिराच्या झाडाची निगा राखतो तो त्याची फळे खाऊ शकतो. तसेच जो माणूस त्याच्या धन्याची काळजी घेतो त्याला बक्षीस मिळते. त्याचा मालक त्याची काळजी घेईल.

19माणसाने पाण्यात पाहिले तर त्याला स्वतःचा चेहरा दिसेल. त्याचप्रमाणे माणसाचे हृदय तो माणूस खरा कसा आहे ते दाखविते.

20मृतलोक आणि नाश ह्यांची कधीही तृप्ती होत नाही. त्याचप्रमाणे माणसाच्या डोळ्यांतील वासना कधी शमत नाही.

21सोने आणि चांदी शुध्द करण्यासाठी लोक अग्नीचा वापर करतात. त्याच रीतीने माणसाची परीक्षा लोक त्याची स्तुती करतात त्यावरून होते.

22मूर्खाला दळून तुम्ही त्याचे पीठ केले तरी त्याचा मूर्खपणा तुम्ही घालवू शकणार नाही.

23तुमच्या मेंढ्यांची आणि पशुधनाची काळजी घ्या. त्यांची तुम्ही उत्तम प्रकारे निगा राखत आहात याची खात्री करा. 24संपत्ती कायम टिकत नाही. राष्ट्रेसुध्दा कायम राहात नसतात. 25गवत कापल्यानंतर पुन्हा नवीन उगवते. टेकडीवर उगवणारे गवत कापा. 26तुमच्या मेंढ्यांवरची लोकर कापा आणि तुमचे कपडे करा. तुमच्या काही बकऱ्या विका आणि जमीन विकत घ्या. 27तुमच्यासाठी आणि तुमच्या कुटुंबासाठी शेळीचे बरेच दूध असेल. त्यामुळे तुमच्या सेवकमुली निरोगी राहतील.

28 वाईट लोकांना सगळ्याचीच भीती वाटते. कोणी त्यांचा पाठलाग करत नसले तरी ते दूर पळतात. पण चांगला माणूस सिंहासारखा शूर असतो.

2जर देशाने आज्ञा पाळायला नकार दिला तर तिथले बरेचसे वाईट नेते केवळ थोड्या काळापुरतेच राज्य करू शकतील. पण जर देशाला एकच शहाणा नेता असला तर देश खूप काळापर्यंत राहील. 3राजाने जर गरीब लोकांवर संकटे आणली तर तो पीक उद्ध्वस्त करणाऱ्या जोरदार पावसासारखा असतो.

4तुम्ही जर कायदा पाळायला नकार दिलात तर तुम्ही वाईट लोकांच्या बाजूचे होत. पण तुम्ही कायदा पाळलात तर तुम्ही त्यांच्या विरुध्द असता.

[5]वाईट लोकांना न्याय कळत नाही. पण जे परमेश्वरावर प्रेम करतात त्यांना सर्वकाही कळते.

[6]गरीब असून प्रामाणिक असणे हे श्रीमंत असून वाईट असण्यापेक्षा चांगले असते.

[7]जो माणूस कायद्याचे पालन करतो तो हुशार असतो. पण जो माणूस क्षुल्लक माणसांशी मैत्री करतो तो त्याच्या वडिलांना लाज आणतो.

[8]जर तुम्ही गरीबांना फसवून श्रीमंत झालात तर तुम्ही लवकरच संपत्ती गमवाल. जो माणूस त्यांच्याशी दयाळू असतो त्याच्याकडे ती जाईल.

[9]जर एखाद्याने देवाच्या शिकवणुकीकडे लक्ष द्यायला नकार दिला तर देव त्याची प्रार्थना ऐकायला नकार देईल.

[10]वाईट माणूस चांगल्या माणसांना दु:ख देण्याच्या योजना आखतो. परंतु वाईट माणूस त्याच्याच जाळ्यात अडकेल आणि चांगल्या माणसाच्या बाबतीत चांगल्या घटना घडतील.

[11]श्रीमंत लोकांना नेहमी आपण खूप शहाणे आहोत असे वाटत असते. पण शहाणा असलेला गरीब माणूस खरे काय ते पाहू शकतो.

[12]चांगले लोक नेते बनले की सर्वजण आनंदी असतात. पण वाईट माणूस निवडून आला की सर्व लपून बसतात.

[13]माणसाने जर त्याची पापे लपवायचा प्रयत्न केला तर तो कधीही यशस्वी होणार नाही. पण जर त्याने त्याच्या पापांची कबुली दिली आणि लोकांना सांगितले की त्याचे चुकले तर देव आणि इतर लोक त्याला दया दाखवतील.

[14]जर एखाद्याने नेहमी परमेश्वराचा आदर केला तर त्याला आशीर्वाद मिळेल. पण जर तो हट्टी असला आणि त्याने परमेश्वराचा आदर करायला नकार दिला तर त्याच्यावर संकटे येतील.

[15]दुष्ट माणूस जेव्हा दुबळ्या लोकांवर राज्य करतो तेव्हा तो रागावलेल्या सिंहासारखा किंवा अस्वलासारखा लढाईला तयार असतो.

[16]जर राज्यकर्ता शहाणा नसला तर तो त्याच्या हाताखालच्या लोकांना दु:ख देतो. पण जर राज्यकर्ता प्रामाणिक असला आणि त्याला फसवणे आवडत नसले तर तो खूप काळपर्यंत राज्य करेल.

[17]जर एखाद्याने कुणाला ठार मारण्याचा अपराध केला असेल. तर त्याला कधीही मन:शांती लाभणार नाही. त्या माणसाला कधीही आधार देऊ नका.

[18]माणूस जर योग्य जीवन जगत असला तर तो सुरक्षित असेल. पण जर तो दुष्ट असेल तर तो त्याची शक्ती घालवून बसेल.

[19]जो माणूस खूप काम करतो त्याला भरपूर खायला मिळेल. पण जो स्वप्ने बघण्यात वेळ घालवतो तो गरीबच राहील.

[20]जो देवाची भक्ती करतो त्याला देव आशीर्वाद देईल. पण जो माणूस फक्त श्रीमंत होण्याचा प्रयत्न करतो त्याला शिक्षा होईल.

[21]न्यायाधीशाने नेहमी न्यायी असले पाहिजे. एखाद्याला तो चांगला ओळखतो म्हणून त्याला मदत करता कामा नये. पण काही न्यायाधीश थोड्याशा पैशांसाठी त्यांचे निर्णय बदलतात.

[22]स्वार्थी माणसाला फक्त श्रीमंत व्हायचे असते. त्याला हे कळत नाही की तो गरीब होण्याच्या मार्गाला लागला आहे.

[23]जर तुम्ही एखाद्याला तो चुकतो आहे असे सांगून मदत केलीत तर तो नंतर तुमच्याबद्दल आनंदी होईल. लोकांबरोबर नेहमी गोडगोड बोलण्यापेक्षा हे खूप चांगले.

[24]काही लोक त्यांच्या आई वडिलांची चोरी करतात. "ह्यात काही चूक नाही" असे ते म्हणतात. पण तो माणूस घरात येऊन सगळ्याचा नाश करणाऱ्या माणसाइतकाच दोषी आहे.

[25]स्वार्थी. माणूस संकटे निर्माण करतो. पण जो परमेश्वरावर विश्वास ठेवतो त्याला बक्षीस मिळते.

[26]जर एखादा माणूस स्वत:वरच विश्वास ठेवेल तर तो मूर्ख आहे. पण जर तो शहाणा असेल तर तो संकटातून सुटेल.

[27]जर एखाद्याने गरीब लोकांना दिले तर त्याच्या सगळ्या गरजा पूर्ण होतील. पण जर एखाद्याने गरीबांना मदत करायला नकार दिला तर त्याच्यावर खूप संकटे येतील.

[28]दुष्ट माणूस जर राज्य करण्यासाठी निवडून आला तर लोक लपून बसतील. पण त्या दुष्टाचा जर पराभव झाला तर चांगले लोक पुन्हा राज्य करतील.

# 29

जर एखादा माणूस हट्टी असेल आणि प्रत्येक वेळी त्याला 'तू चुकतो आहेस' असे कुणी सांगितल्यावर खूप राग येत असेल, तर त्या माणसाचा नाश होईल. तिथे आशेला जागा नाही.

[2]राज्यकर्ता जर चांगला असेल तर सगळे लोक आनंदी असतात. पण वाईट माणूस राज्य करत असेल तर सगळेजण तक्रार करतात.

[3]जर एखाद्या माणसाला शहाणपण आवडत असेल तर त्याच्या वडिलांना आनंद वाटतो. पण जर एखादा माणूस वेश्येवर पैसा खर्च करत असेल तर तो त्याची संपत्ती गमावून बसेल.

[4]राजा जर न्यायी असला तर राष्ट्र बलशाली होते. पण राजा स्वार्थी असला आणि लोकांना त्यांच्या गोष्टी करून घेण्यासाठी त्याला पैसे द्यावे लागत असले तर ते राष्ट्र कमजोर होईल.

[5]जर एखादा माणूस गोड बोलून आपले काम करून घेण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो स्वत:साठीच सापळा तयार करीत असतो.

[6]वाईट लोकांचा त्यांच्याच पापामुळे पराभव होतो पण चांगला माणूस गाणे गाऊन आनंदी राहातो.

[7]चांगल्या माणसांना गरीबांसाठी योग्य गोष्टी करायची इच्छा असते पण दुष्ट लोक मात्र पर्वा करीत नाहीत. [8]जे लोक स्वत:ला इतर लोकांपेक्षा चांगले समजतात ते संकटे आणू शकतात. ते सगव्व्या शहरांना गोंधळात टाकू शकतात. पण जे शहाणे असतात ते शांती राखतात.

[9]शहाणा माणूस जर मूर्खाबरोबर त्याच्या समस्या सोडवायला लागला तर तो मूर्ख वाद घालेल व मूर्खासारख्या गोष्टी करेल आणि त्या दोघांचे कधीही एकमत होणार नाही.

[10]खुनी लोक नेहमी प्रामाणिक माणसांचा तिरस्कार करतात. त्या दुष्टांना प्रामाणिक आणि चांगल्या लोकांना * ठार मारायचे असते.

[11]मूर्खाला चटकन् राग येतो पण शहाणा माणूस धीर धरतो आणि स्वत:ला काबूत ठेवतो.

[12]राजाने जर खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवला तर त्याचे सगळे अधिकारी वाईट ठरतील.

[13]गरीब माणूस आणि जो गरीबांची चोरी करतो तो माणूस एका दृष्टीने सारखेच आहेत. त्या दोघांना परमेश्वरानेच केले.

[14]राजा जर गरीबांच्या बाबतीत न्यायी असला तर तो खूप काळ राज्य करेल.

[15]मार आणि शिकवण मुलासाठी चांगली असते. जर आईवडिलांनी मुलांना त्यांना हवे ते करू दिले तर तो त्याच्या आईला लाज आणेल.

[16]जर देशावर वाईट लोक राज्य करीत असतील, तर सगळीकडे पाप नांदेल पण शेवटी चांगल्या माणसांचा जय होईल.

[17]तुमचा मुलगा जर चुकत असेल तर त्याला शिक्षा करा नंतर तुम्हाला त्याच्याबद्दल गर्व वाटेल. तो तुम्हाला कधीही लाज आणणार नाही.

[18]जर देवाने देशाला मार्ग दाखवला नाही तर त्या देशात शांतता नांदणार नाही. पण जर देशाने देवाचे कायदे पाळले तर तो सुखी होईल.

[19]जर तुम्ही फक्त सेवकाशी बोललात तर तो त्याचा धडा शिकणार नाही. तो सेवक तुमचे शब्द समजू शकेल पण तो ते पाळणार नाही.

[20]जर एखादा माणूस विचार न करता बोलत असेल तर त्याच्या बाबतीत आशेला जागा नाही. जो विचार न करता बोलतो त्याच्यापेक्षा मूर्खाच्या बाबतीत आशेला अधिक जागा आहे.

[21]जर तुम्ही तुमच्या सेवकाला तो जे जे मागेल ते ते सर्व दिले तर शेवटी तो चांगला सेवक होणार नाही.

[22]रागावलेला माणूस संकटे आणतो आणि जो माणूस पटकन् रागावतो तो अनेक पापांचा अपराधी असतो.

[23]माणसाचा गर्व त्याला खाली आणतो. जर एखाद्याला तो इतरापेक्षा चांगला आहे असे वाटत असेल तर त्यामुळे त्याचा नाश होईल. पण जर एखादा माणूस विनम्र असेल तर इतर लोक त्याचा आदर करतील.

[24]बरोबर काम करणारे दोन चोर एकमेकांचे शत्रू असतात. एक चोर दुसऱ्याला धमकी देईल त्यामुळे जर त्याला जबरदस्तीने कोर्टात खरे बोलावे लागले तर तो बोलायला खूपच घाबरेल.

[25]भीती ही सापव्व्यासारखी असते. पण जर तुमचा परमेश्वरावर विश्वास असेल तर तुम्ही सुरक्षित असाल.

[26]खूप लोकांना राज्यकर्त्यांशी मैत्री करायची असते. पण फक्त परमेश्वरच लोकांचा योग्य न्याय करतो.

[27]चांगले लोक प्रामाणिक नसलेल्यांचा तिरस्कार करतात. आणि दुष्ट लोक प्रामाणिक असलेल्यांचा तिरस्कार करतात.

## याकेहचा मुलगा अगूर याची नातीसूत्रे

30 ही याकेहचा मुलगा अगूर याची नीतिसूत्रे आहेत. हा त्याचा इथिएल आणि युकाल * यांना निरोप आहे.

[2]मी पृथ्वीवरचा सगळ्यात वाईट माणूस आहे, मी जितके समजून घ्यायला हवे होते तितके मी समजू शकत नाही.
[3]मी शहाणा व्हायला शिकलो नाही, आणि मला देवाबद्दल काहीही माहीत नाही.

[4]स्वर्गातल्या गोष्टीबद्दल आजपर्यंत कोणीही काहीही शिकला नाही. कोणीही वाऱ्याला कधी हातात पकडू शकला नाही. कोणीही पाण्याला कपड्यात पकडू शकला नाही. पृथ्वीच्या सीमा कोणालाही माहीत नाहीत. जर कोणी ह्या गोष्टी करू शकला तर तो कोण असेल? त्याचे कुटुंब कुठे असेल.?

[5]देवाने म्हटलेला प्रत्येक शब्द परिपूर्ण असतो. जे लोक देवाकडे जातात त्यांच्यासाठी देव म्हणजे एक सुरक्षित जागा असते. [6]म्हणून देव ज्या गोष्टी सांगतो त्या बदलण्याचा प्रयत्न करू नका. तुम्ही जर तसे केलेत तर तो तुम्हाला शिक्षा करेल आणि तुम्ही खोटे बोलता हे सिध्द करेल.

[7]देवा मी मरण्याआधी तुला दोन गोष्टी करायला सांगणार आहे. [8]खोटे न बोलण्यासाठी मला मदत कर आणि मला खूप श्रीमंत वा खूप गरीब करू नकोस. मला रोज लागणाऱ्या गोष्टीच फक्त दे. [9]माझ्याकडे जर गरजेपेक्षा जास्त असेल तर तुझी मला गरज नाही असे मला वाटायला लागेल. पण मी जर गरीब असलो तर मी कदाचित् चोरी करेन. त्यामुळे मी देवाच्या नावाला लाज आणेन.

---

**ते ... लोक** किंवा ““पण चांगला, सत्यवचनी मनुष्य त्याचा जीव वाचवतो.”

**हा ... युकाल** किंवा “हा माणूस म्हणाला, ‘मी खूप अशक्त आहे.मी खूप अशक्त आहे, पण मी यशस्वी होईन.’”

[10]सेवकाजवळ त्याच्या धन्याबद्दल कधीही वाईट गोष्टी सांगू नका. जर तुम्ही सांगितल्या तर धनी तुमच्यावर कधीही विश्वास ठेवणार नाही. तुम्हीच अपराधी आहात असे त्याला वाटेल.

[11]काही लोक त्यांच्या वडिलांविरुध्द बोलतात आणि ते त्यांच्या आईबद्दल आदर दाखवीत नाहीत.

[12]काही लोकांना आपण चांगले आहोत असे वाटत असते पण ते खरोखरच वाईट असतात.

[13]काही लोक स्वत:ला फार चांगले समजतात. आपण दुसऱ्यांपेक्षा खूप चांगले आहोत असे त्यांना वाटते.

[14]असे काही लोक असतात ज्यांचे दात तलवारीसारखे असतात त्यांचे जबडे सुरी सारखे असतात. ते गरीबांकडून सर्व काही हिसकावण्यात त्यांचा वेळ खर्ची घालतात.

[15]काही लोकांना जे जे घेणे शक्य असते ते ते घ्यायला आवडते. ते फक्त 'मला दे,' 'मला दे' एवढेच म्हणत असतात.
तीन गोष्टी कधीही समाधानी नसतात, खरे म्हणजे चार,
ज्याना कधीही पुरेसे मिळत नाही. [16]मृत्यूची जागा, वांझ
स्त्री, पाऊस हवा असलेली कोरडी जमीन आणि रूद्र भीषण, न विझवता येणारी आग.

[17]जो माणूस त्याच्या वडिलांची चेष्टा करतो वा त्याचा आईचे ऐकत नाही त्याला शिक्षा होईल. त्याचे डोळे गिधाडाने वा एखाद्या रानटी पक्ष्याने खाण्याइतके वाईट त्याच्या बाबतीत घडेल.

[18]तीन गोष्टी माझ्या समजण्यापलिकडे आहेत, खरं
म्हणजे चार गोष्टी, ज्या मी समजू शकत नाही. [19]आकाशात
उडणारा गरूड, दगडावर चालणारा साप, समुद्रात जाणारे जहाज आणि स्त्रीच्या प्रेमात पडलेला पुरुष

[20]जी स्त्री नवऱ्याशी एकनिष्ठ नसते ती तिने काहीही चूक केलेली नाही असे वागते. ती खाते, आंघोळ करते आणि तिने काहीही चूक केली नाही असे म्हणते.

[21]तीन गोष्टी पृथ्वीवर संकटे आणतात, खरे म्हणजे
चार गोष्टी, ज्यांचा भार पृथ्वी पेलू शकत नाही. [22]राजा
होणारा सेवक, मूर्ख माणूस ज्याच्याकडे त्याला लागणाऱ्या
सर्व वस्तू आहेत. [23]प्रेम न मिळालेली तरीही नवरा
मिळवणारी स्त्री आणि मालकिणीवर सत्ता गाजवणारी नोकर असलेली मुलगी

[24]पृथ्वीवरच्या चार गोष्टी अगदी लहान आहेत पण त्या अतिशय शहाणपणाच्या आहेत.

[25]मुंग्या अगदी लहान आणि दुर्बल असतात पण तरी ही त्या उन्हाळाभर अन्न साठवतात.

[26]ससा अगदी लहान प्राणी आहे. पण ते खडकात आपले घर करतात.

[27]टोळांना राजा नसतो पण तरीही ते एकत्र काम करू शकतात.

[28]पाली हाताने पकडण्याइतक्या लहान असतात. पण तुम्ही त्यांना राजाच्या घरातदेखील पाहू शकता.

[29]तीन गोष्टी चालताना फार महत्वाच्या वाटतात, खरे म्हणजे चार.

[30]सिंह सर्व प्राण्यात सगव्व्यात बलवान आहे. त्याला कशाचीही भीती वाटत नाही.

[31]गर्वाने चालणारा कोंबडा, बकरी आणि त्याच्या लोकांमध्ये असलेला राजा.

[32]जर तुम्ही मूर्ख असाल आणि इतरांपेक्षा आपण चांगले आहोत असे तुम्हाला वाटत असेल आणि तुम्ही वाईट गोष्टींच्या योजना आखत असाल तर तुम्ही ते थांबवा आणि तुम्ही काय करीत आहात याचा विचार करा.

[33]जर एखादा माणूस दूध घुसळत असेल तर तो लोणी काढतो. जर एखाद्याने कुणाला नाकावर ठोसा मारला, तर त्यातून रक्त येईल. त्याचप्रमाणे, जर तुम्ही लोकांना राग येण्यासारखे काही केले तर तुम्ही संकटे निर्माण कराल.

## लमुएल राजाची नीतिसूत्रे

31 ही लमुएल राजाची नीतिसूत्रे आहेत त्याच्या आईने त्याला या गोष्टी शिकवल्या.
[2]तू माझा मुलगा आहेस. मी प्रेम करत असलेला मुलगा.
ज्यासाठी मी प्रार्थना केली होती तोच मुलगा तू आहेस.
[3]तुझी शक्ती स्त्रियांवर खर्च करू नकोस. स्त्रियामुळेच
राजांचा नाश होतो त्यांच्यापायी स्वत:चा नाश करू नकोस.
[4]लमुएला, द्राक्षारस पिणे हे राजांच्या दृष्टीने शहाणपणाचे
नसते. मद्याची इच्छा धरणे हे राज्यकर्त्यांच्या दृष्टीने
शहाणपणाचे नसते. [5]ते कदाचित् खूप पितील आणि कायदा
काय म्हणतो ते विसरून जातील. नंतर ते गरीबांचे सर्व
हक्क काढून घेतील. [6]गरीब लोकांना मद्य द्या. जे लोक
संकटात आहेत त्यांना द्राक्षारस द्या. [7]ते नंतर पितील
आणि ते गरीब आहेत हे विसरून जातील. ते पितील आणि त्यांची सर्व संकटे विसरतील.

[8]जर एखादा माणूस स्वत:ला मदत करू शकत नसेल
तर तुम्ही त्याला मदत करा. जे लोक संकटात आहेत त्या
सर्वांना तुम्ही मदत केली पाहिजे. [9]ज्या गोष्टी योग्य आहेत
हे तुम्हाला माहीत आहे त्या गोष्टीसाठी लढा आणि सर्वांना योग्य रीतीने न्याय द्या. गरीबांच्या आणि ज्या लोकांना तुमची गरज आहे अशा लोकांच्या न्यायाचे रक्षण करा.

## सर्वगुणसंपन्न बायको

[10]* सर्वगुणसंपन्न स्त्री शोधणे खूप कठीण आहे. पण तिचे मोल जड–जवाहिऱ्यापेक्षा अधिक आहे.

---

10 ते 31 कडवी हिब्रूत यातील प्रत्येक कडवे वर्ण मालेतील पुढच्या वर्णाने सुरु होते. म्हणजेच ही कविता स्त्रीचे सगळे "अ पासून ज्ञ" पर्यंतचे चांगले गुण दाखवते.

[11]तिचा नवरा तिच्यावर अवलंबून असतो. तो कधीही गरीब होणार नाही.

[12]ती तिच्या आयुष्यभर नवऱ्याचे कल्याण करते. ती त्याच्यावर कधीही संकटे आणीत नाही.

[13]ती नेहमी लोकर आणि कापड तयार करण्यात मग्न असते.

[14]ती दूरच्या प्रदेशातील मेंढीसारखी असते. ती सर्व ठिकाणाहून घरी अन्न आणते.

[15]ती भल्या पहाटे उठते तिच्या कुटुंबासाठी अन्न शिजवते आणि नोकर मुलींना काय करायचे ते सांगते.

[16]ती जमिनी बघते आणि विकत घेते. तिने साठवलेल्या पैशांचा उपयोग करून ती द्राक्षाचे मळे लावते.

[17]ती खूप काम करते. ती खूप शक्तिवान आहे. आणि सर्व काम करण्यात तरबेज आहे.

[18]तिने केलेल्या गोष्टी जेव्हा ती विकते तेव्हा तिला नेहमी नफा होतो. आणि ती रात्री उशीरापर्यंत काम करते.

[19]ती स्वत:चे सूत स्वत: कातते आणि स्वत:चे कपडे विणते.

[20]ती नेहमी गरीबांना देते आणि ज्यांना गरज असते अशांना मदत करते.

[21]जेव्हा बर्फ पडतो [म्हणजेच फार थंडी असते] तेव्हा ती आपल्या कुटुंबाची काळजी करत नाही. तिने त्या सर्वांना चांगले, गरम कपडे दिलेले असतात.

[22]ती अंथरूणावर टाकायला चादरी आणि पांघरायला पांघरूणे तयार करते. चांगल्या कापडापासून केलेले कपडे ती वापरते.

[23]लोक तिच्या नवऱ्याचा आदर करतात. तो देशाचा एक नेता असतो.

[24]ती खूप चांगली उद्योगी-स्त्री असते. ती कपडे आणि पट्टे तयार करते आणि ती त्या वस्तू त्या व्यापाऱ्यांना विकते.

[25]ती खूप ताकतवान आहे आणि लोक तिला मान देतात ती भविष्याबद्दल विश्वास आहे.

[26]ती शहाणपणाचे बोल बोलते. ती लोकांना प्रेमळ व दयाळू असावे असे शिकविते.

[27]ती कधीही आळशी नसते. ती तिच्या घरातील गोष्टींची काळजी घेते.

[28]तिची मुले तिच्याबद्दल चांगले बोलतात. तिचा नवरा तिच्याबद्दल अभिमान बाळगतो आणि म्हणतो,

[29]“चांगल्या स्त्रिया खूप आहेत. पण तू सर्वांत चांगली आहेस.”

[30]मोहकता आणि सौंदर्य तुम्हाला फसवू शकेल. पण जी स्त्री परमेश्वराचा आदर करते तिची प्रशंसा केली पाहिजे.

[31]तिला साजेसे बक्षीस तिला द्या. लोकांमध्ये तिची प्रशंसा करा. तिने ज्या गोष्टी केल्या आहेत त्याबद्दल तिची स्तुती करा.

# उपदेशक

1 हे गुरूकडून आलेले शब्द आहेत. हा गुरू दाविदाचा
मुलगा आणि यरुशलेमचा राजा होता.
2सारे काही व्यर्थ आहे. गुरू म्हणतात, "सगळे म्हणजे
वेळेचा अपव्यय आहे.* 3आयुष्यात केलेल्या अपार
कष्टांमुळे माणसाला खरोखरच काही प्राप्त होते का?*
नाही.

### काहीही बदलत नाही

4लोक जगतात आणि लोक मरतात. पण पृथ्वी मात्र
सदैव असते. 5सूर्य उगवतो आणि मावळतो. आणि नंतर
तो पुन्हा त्याच ठिकाणाहून उगवण्यासाठी धावपळ करतो.
6वारा दक्षिणेकडे आणि उत्तरेकडे वाहतो. वारा गोल
गोल घुमतो आणि नंतर त्याने ज्या ठिकाणाहून वाहायला
सुरवात केली होती तिथून तो परत वाहायला लागतो.
7सगळ्या नद्या पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणी वाहातात, त्या
सागराला जाऊन मिळतात पण समुद्र भरून जात नाही.
8शब्द सगळ्या गोष्टी* पूर्णपणे सांगू शकत नाहीत. पण
लोक बोलणे* चालूच ठेवतात. शब्द पुन्हा पुन्हा आपल्या
कानावर येतात. पण आपले कान तृप्त होत नाहीत. आणि
आपण जे बघतो ते बघून आपल्या डोळ्यांचेही पारणे फिटत
नाही.

### काहीच नवीन नाही

9सुरुवातीपासून गोष्टी जशा होत्या तशाच त्या राहतात.
जे आता पर्यंत करण्यात आले तेच करण्यात येणार. या
आयुष्यात नवीन असे काहीच नसते.
10एखादा माणूस म्हणेल, "बघा हे नवीन आहे." पण ती
गोष्ट तर नेहमीच होती. आपल्याही आधी ती इथे होती.
11खूप पूर्वी घडलेल्या गोष्टी लोकांच्या लक्षात रहात
नाहीत. आज घडलेल्या गोष्टी भविष्यात लोकांच्या लक्षात
राहाणार नाहीत आणि नंतर आपल्या आधीच्या लोकांनी
काय केले ते नंतरच्या लोकाच्या लक्षात राहाणार नाही.

### शहाणपण सुख आणते का?

12मी, गुरू उपदेशक यरुशलेममध्ये इस्राएलचा राजा
होतो. 13मी अभ्यास करायचा निश्चय केला आणि माझ्या
शहाणपणाचा उपयोग या जीवनात ज्या गोष्टी केल्या जातात
त्या शिकून घेण्यासाठी करायचे ठरवले. मला कळले की
देवाने आपल्याला करायला दिलेली ही फार कठीण गोष्ट
आहे. 14मी पृथ्वीवर केल्या गेलेल्या सर्व गोष्टींकडे पाहिले
आणि त्या सर्व गोष्टी वेळ वाया घालवण्यासारख्या आहे
असे मला वाटले. त्या वारा पकडण्यासारख्या* आहे असे
वाटले. 15या गोष्टी तुम्ही बदलू शकत नाही. जर एखादी
वस्तू वाकडी असली तर ती सरळ आहे असे तुम्ही म्हणू
शकत नाही. आणि एखादी वस्तु हरवली असली, तर ती
आहे असे तुम्ही म्हणू शकत नाही.
16मी स्वत:शीच म्हणालो: "मी खूप शहाणा आहे. माझ्या
आधी ज्या राजांनी यरुशलेमवर राज्य केले त्या सर्वांपेक्षा
मी शहाणा आहे. शहाणपण आणि ज्ञान म्हणजे खरोखर
काय ते मला माहीत आहे."
17शहाणपण आणि ज्ञान हे मूर्खपणाच्या गोष्टींचा विचार
करण्यापेक्षा किती चांगले आहे हे समजून घेण्याचे मी
ठरवले. पण शहाणा होणे हे वाऱ्याला पकडण्यासारखे
आहे हे मला कळले. 18अतिशहाणपणाने निराशा येते.
ज्या माणसाला खूप शहाणपण मिळते त्यालाच खूप दु:खही
मिळते.

### "मौज-मजा" करण्याने सुख मिळते का?

2 मी स्वत:शी म्हणालो, "मी मौज-मजा करायला हवी.
जितका शक्य होईल तितका आनंद मी उपभोगायला
हवा." पण हेही अगदीच टाकाऊ आहे हे मला समजले.
2सतत हसत राहणे हाही एक मूर्खपणाच आहे. मौजमजा
करण्यातून काहीही चांगले घडत नाही.
3म्हणून माझे मन शहाणपणाने भरता भरता माझे शरीर
मद्याने (द्राक्षारसाने) भरायचे असे मी ठरवले. मी हा

---

**सगळे काही ... आहे** हिब्रू भाषेत हा शब्द म्हणजे "वाफ किंवा श्वास" किंवा "ज्याची काही किंमत नाही असे काही तरी अर्थशून्य, चुकीचे वा वेळ वाया घालवणारे."

**प्राप्त होते का?** शब्दश: "सूर्याखाली."

**शब्द ... गोष्टी** शब्दश: "सगळे शब्द (गोष्टी) खोटे असतात."

**पण ... बोलणे** हिब्रूत याचे असेही भाषांतर करता येईल. "माणूस बोलू शकत नाही."

**वारा पकडण्यासारख्या** किंवा "हे चैतन्याला त्रासदायक आहे." त्रासदायक शब्दाचा अर्थ "विनवणे" असाही होऊ शकेल. आणि "चैतन्यांचा" अर्थ "वारा असाही होईल."

मूर्खपणा करायचे ठरवले कारण मला सुखी व्हायचा मार्ग शोधायचा होता. लोकांना त्यांच्या छोट्याशा आयुष्यात चांगले करण्यासारखे असे काय आहे ते मला शोधायचे होते.

### अतोनात कष्ट केल्याने सुख मिळते का?

[4]नंतर मी महान गोष्टी करायला सुरुवात केली. मी घरे बांधली, मी स्वत:साठी द्राक्षाचे मळे लावले. [5]मी बागा लावल्या आणि मोठमोठे बगिचे केले. मी सर्व प्रकारची फळझाडे लावली. [6]मी माझ्यासाठी तळी निर्माण केली. आणि त्या तळ्यांचा उपयोग मी माझ्या वाढणाऱ्या झाडांना पाणी देण्यासाठी केला. [7]मी पुरुष आणि स्त्री गुलामांना विकत घेतले, आणि माझ्या घरातही गुलामांचा जन्म झाला. माझ्याजवळ खूप मोठया गोष्टी होत्या. माझ्याजवळ जनावरांची खिल्लारे आणि मेंढ्यांचे कळप होते. यरुशलेममधील कोणाही माणसाजवळ नसतील इतक्या गोष्टी माझ्याजवळ होत्या.

[8]मी स्वत:साठी सोने आणि चांदी गोळा केली. मी राजांकडून, त्यांच्या देशांकडून संपत्ती घेतली. माझ्यासाठी गाणे म्हणणारे स्त्री पुरुष माझ्याजवळ होते. कोणालाही हव्याहव्याशा वाटणाऱ्या गोष्टी माझ्याजवळ होत्या.

[9]मी खूप श्रीमंत आणि प्रसिध्द झालो. माझ्या आधी यरुशलेममध्ये राहणाऱ्या कोणाही माणसा पेक्षा मी मोठा होतो आणि माझे शहाणपण मला मदत करण्यासाठी नेहमी तयार होते. [10]माझ्या डोळ्यांना जे जे दिसे आणि हवेसे वाटे ते मी मिळवले. मी जे केले त्यामुळे माझे मन प्रसन्न असे आणि हा आनंद माझ्या कष्टांचे फळ होते.

[11]परंतु नंतर मी ज्या ज्या गोष्टी केल्या त्यांच्याकडे पाहिले. मी जे कष्ट केले त्यांच्याकडे पाहिले. आणि ते सर्व म्हणजे वेळेचा अपव्यय होता असे मी ठरवले. वाऱ्याला पकडण्यासारखेच ते होते. आपण जीवनात जे काही करतो त्यापासून काहीही लाभ होत नाही.

### कदाचित शहाणपणच उत्तर असेल

[12]कोठलाही माणूस राजापेक्षा अधिक काही करू शकत नाही. एखाद्या राजाने तुम्हाला जे करावेसे वाटते ते आधीच केलेले असते. आणि राजा ज्या गोष्टी करतो त्या करणे म्हणजेही वेळेचा अपव्यय आहे हेही मला समजले. म्हणून मी पुन्हा पुन्हा शहाणे व मूर्ख होण्याचा आणि वेड्या गोष्टी करण्याच्या बाबतीत विचार करू लागलो. [13]शहाणपण हे मूर्खपणापेक्षा चांगले आहे. जसा प्रकाश अंधारापेक्षा चांगला आहे. [14]ते असे आहे: शहाणा माणूस त्याच्या मनाचा उपयोग डोळ्यांप्रमाणे, त्याला जिथे जायचे आहे तिथे जाण्यासाठी करतो. परंतु मूर्ख मात्र अंधारात चालणाऱ्या माणसासारखा असतो.

परंतु मूर्ख आणि शहाणा हे दोघेही सारख्याच रीतीने नाश पावतात. दोघेही मरतात. [15]मी स्वत:शीच विचार केला, "'मूर्खाच्या बाबतीत ज्या गोष्टी घडतील त्याच माझ्याही बाबतीत घडतील तर मग मी शहाणा होण्यासाठी एवढी पराकाष्ठा का केली?" मी स्वत:शीच म्हणालो, "शहाणे असणेही निरुपयोगीच आहे." [16]शहाणा आणि मूर्ख दोघेही मरणारच आणि लोक शहाण्या माणसाचे अथवा मूर्ख माणसाचे सदैव स्मरण कधीच ठेवणार नाहीत. त्यांनी जे जे केले ते सर्व लोक भविष्यात विसरून जातील. म्हणून शहाणा माणूस आणि मूर्ख माणूस दोघेही समान आहेत.

### आयुष्यात खरे सुख आहे का?

[17]यामुळे मला जीवनाचा तिरस्कार वाटायला लागला. जीवनातील सर्व गोष्टी वाऱ्याला पकडण्याचा प्रयत्न करण्यासारख्या निरुपयोगी आहेत या विचाराने मला खूप दु:ख झाले.

[18]मी जे अपार कष्ट केले त्याचा मी तिरस्कार करू लागलो. मी खूप कष्ट केले. परंतु त्या कष्टांनी मी जे मिळवले ते माझ्यानंतर जे लोक राहतील त्याना मिळणार आहे. मी त्या गोष्टी माझ्याबरोबर नेऊ शकणार नाही. [19]मी जो अभ्यास केला आणि काम करून जे मिळवले त्याच्यावर इतरांचीच सत्ता राहणार आहे आणि तो माणूस शहाणा आहे की मूर्ख ते मला माहीत नाही. हेही निरर्थकच आहे.

[20]म्हणून मी माझ्या सर्व कामांबद्दल दु:खी झालो. [21]माणूस आपले सर्व ज्ञान, शहाणपण आणि कौशल्य वापरून कष्ट करू शकतो. पण तो माणूस मरेल आणि इतरांना त्याच्या कष्टाचा फायदा मिळेल. त्या लोकांनी कष्ट केले नाहीत तरी त्यांना सगळे काही मिळेल. त्यामुळे मला खूप दु:ख झाले. ते योग्य नाही आणि शहाणपणाचेही नाही.

[22]माणसाने खूप कष्ट केल्यावर आणि भांडल्यावर त्याला आयुष्यात खरोखर काय मिळते? [23]आयुष्यभर त्याला दु:ख, मनस्ताप आणि कष्टच मिळतात. त्याचे मन रात्रीदेखील स्वस्थ नसते. हे सुध्दा शहाणपणाचे नाही.

[24–25]एक तरी माणूस असा आहे का ज्याने माझ्यापेक्षा जास्त प्रयत्न करून आयुष्य उपभोगले? नाही. आणि मी हे शिकलो: माणसाला करता येण्यासारखी सर्वांत चांगली गोष्ट म्हणजे खाणे, पिणे आणि त्याला करायला लागणारे काम आवडीने करणे. हे सर्व देवाकडून* येते हेही मी पाहिले. [26]जर माणसाने चांगले कृत्य केले आणि देवाला प्रसन्न केले तर देव त्याला शहाणपण, ज्ञान आणि आनंद देईल. पण जो माणूस पाप करतो त्याला वस्तू गोळा करायचे आणि त्यांचे ओझे वहायचे काम मिळेल. देव वाईट माणसाकडून घेतो आणि चांगल्या माणसाला देतो. पण

---

**हे ... देव** किंवा "माणूस सगळ्यात चांगले जे कार्य करू शकतो ते म्हणजे खाणे, पिणे आणि कामाचा आनंद घेणे. हे देवाकडून येते हे मी पाहिले. 25 देवाशिवाय कोणीही आयुष्याचा आनंद घेऊ शकत नाही."

त्याचे सर्व काम निरुपयोगी आहे. हे वारा पकडण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

### वेळ आहे

3 सगळ्या गोष्टी करण्यासाठी योग्य वेळ असते. आणि पृथ्वीवरील सर्व गोष्टी योग्य वेळेलाच होतील.

2जन्माला येण्याची आणि मरण्याचीही वेळ असते. रोप लावण्याची आणि ते उपटून टाकण्याचीही वेळ असते.

3ठार मारण्याची आणि बरे करण्याची पण वेळ असते. सगळ्याचा नाश करण्याची आणि पुन्हा परत सर्व उभारायचीही वेळ असते.

4रडण्याची आणि हसण्याचीही वेळ असते. दु:खी होण्याची आणि आनंदाने नाचायचीही वेळ असते.

5हातातली शस्त्रे खाली टाकण्याची वेळ असते आणि ती पुन्हा उचलण्याची ही वेळ असते.* कुणाला तरी मिठी मारण्याचीही वेळ असते आणि ती मिठी सैल करण्याचीही योग्य वेळ असते.

6काहीतरी शोधण्याचीही वेळ यावी लागते आणि ते हरवले आहे हे जाणण्याचीही वेळ असते. गोष्टींचा संग्रह करण्याची वेळ असते आणि त्या फेकून देण्याचीही वेळ असते.

7वस्त्र फाडण्याचीही वेळ असते. आणि ते शिवण्याचीही वेळ असते. गप्प बसण्याचीही वेळ असते आणि बोलण्याचीही वेळ असते.

8प्रेम करण्याचीही वेळ असते आणि द्वेष करण्याचीही वेळ असते. युध्द करण्याची वेळ असते आणि शांतीचीही वेळ असते.

### देव त्याच्या जगावर सत्ता गाजवतो

9खूप कष्ट केल्यानंतर माणसाला खरोखरच काही मिळते का? नाही. 10देवाने आपल्याला जे कष्ट करायला लावले ते सगळे मी पाहिले. 11देवाने आपल्याला या जगाबद्दल* विचार करण्याची शक्ती दिली. पण देव जे काही करतो ते आपण पूर्णपणे कधीही समजून घेऊ शकणार नाही. आणि तरीही देव सारे काही अगदी योग्य वेळी करीत असतो.

12मला समजलेली आणि लोकांनी करण्यासारखी अशी योग्य गोष्ट म्हणजे सुखी असणे, आणि आयुष्य असे पर्यंत आनंद लुटणे. 13प्रत्येक माणसाने खावे, प्यावे आणि कामाचा आनंद लुटावा असे देवाला वाटते. या देवाने दिलेल्या भेटी आहेत.

14देव जे काही करतो ते सदैव राहणार आहे असे मी समजतो. देवाच्या कामात लोक आणखी काही मिळवू शकणार नाहीत आणि ते देवाच्या कामातून काही वजाही करू शकणार नाहीत. लोकांनी त्याला मान द्यावा म्हणून देवाने हे सारे केले आहे. 15पूर्वी ज्या गोष्टी घडल्या त्या घडल्या. आपण त्या आता बदलू शकत नाही. आणि पुढेही जे काही घडणार आहे ते आपण बदलू शकणार नाही. पण ज्या लोकांना वाईट वागणूक मिळते त्यांना मदत करायची देवाची इच्छा आहे.*

16मीही आयुष्यात या गोष्टी बघितल्या, मी पाहिले की न्यायालये न्यायाने आणि चांगुलपणाने भरलेली पाहिजेत. पण आता तेथे दुष्ट प्रवृत्ती आहेत. 17म्हणून मी स्वत:शीच म्हटले, “देवाने सगळ्या गोष्टींची वेळ ठरवली आहे आणि त्याने लोक ज्या गोष्टी करतात त्यांचा न्याय करण्यासाठी ही योग्य वेळ ठरवली आहे. देव चांगल्या आणि वाईट लोकांचा न्याय करील.”

### लोक खरोखरच पशूसारखे आहेत का?

18लोक एकमेकांना ज्या गोष्टी करतात त्यांचा मी विचार केला आणि मी स्वत:शीच म्हणालो, “आपण पशूंसारखे आहोत, हे लोकांना कळावे असे देवाला वाटते. 19माणूस पशूपेक्षा चांगला आहे का? नाही! का? कारण सर्वच निरर्थक आहे. पशूंच्या आणि माणसांच्या बाबतीत सारख्याच गोष्टी घडतात. ते दोघे ही मरतात. माणूस आणि पशू यांचा श्वास सारखाच आहे. मेलेला पशू मेलेल्या माणसापेक्षा वेगळा आहे का? 20माणसांच्या आणि पशूंच्या शरीराचा नाश सारख्याच प्रकारे होतो. ते जमीनीतून आले आणि शेवटी ते तिथेच जातील. 21माणसाच्या आत्म्याचे काय होते हे कोणाला माहीत आहे? माणसाचा आत्मा वर देवाकडे जातो की पशूचा आत्मा खाली जमिनीत जातो हे कुणाला माहीत आहे?

22म्हणून मी पाहिले की माणूस जे काही करतो ते त्याने आनंदाने करावे हे उत्तम. त्याच्याकडे फक्त तेच आहे. माणसाने भविष्याची मुळीच चिंता करू नये. का? कारण भविष्यात काय घडणार आहे ते पहाण्यासाठी माणसाला कुणीही मदत करू शकणार नाही.

### मरणे सगळ्यात चांगले आहे का?

4 खूप लोकांना वाईट वागणूक दिली गेल्याचे मी पुन्हा पाहिले. आणि या दु:खी लोकांचे सांत्वन करायला कुणीही नाही, हे ही मी पाहिले. दुष्ट लोकांकडेच सर्व सत्ता असते, हे मी पाहिले. आणि ते ज्या लोकांना दु:ख देतात त्यांचे सांत्वन करायलाही कुणी नसते, हे ही मी पाहिले. 2जे लोक जिवंत आहेत त्यांच्यापेक्षा मेलेल्या लोकांची अवस्था चांगली आहे असे मला वाटते. 3आणि

---

**हातातली ... वेळ असते** शब्दश: “दगड फेकून देण्याची आणि गोळा करण्याचीही वेळ असते.”

**देवाने ... जगाबद्दल** किंवा “भविष्य जाणून घेण्याची इच्छा.”

**15 वे कडवे** किंवा “आता जे घडते ते पूर्वीही घडले. भविष्यात ज्या गोष्टी घडणार आहेत त्या पूर्वी घडून गेल्या आहेत. देव या गोष्टी पुन्हा पुन्हा घडवतो.”

जे लोक जन्मत:च मरतात त्यांच्यासाठी तर सर्व खूपच चांगले आहे. का? कारण या जगात जी वाईट कृत्ये केली जातात ती त्यांनी कधी पाहिली नाहीत.

### इतके कष्ट का करायचे?

[4]नंतर मी विचार केला, "लोक इतके कष्ट का करतात?" लोक यश मिळवायचा प्रयत्न करतात आणि इतरांपेक्षा चांगले होतात. का? कारण लोक मत्सरी असतात. लोकांकडे आपल्यापेक्षा अधिक असावे असे त्यांना वाटत नाही. हे अविचारी आहे. हे वारा पकडण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

[5]काही लोक म्हणतात, "हाताची घडी घालून स्वस्थ बसणे हा मूर्खपणा आहे. तुम्ही जर काम केले नाही तर उपाशीपोटी मराल." [6]कदाचित ते सत्य असेल. पण मी म्हणतो की तुमच्याजवळ जे आहे त्यात समाधान मानणे हे अधिकाधिक मिळवण्यासाठी झगडण्यापेक्षा खूप चांगले आहे.

[7]ज्या गोष्टीचा अर्थ लागत नाही असे काही तरी मी पुन्हा पाहिले: [8]एखाद्याचे कुटुंब नसेल. त्याला मुलगा किंवा भाऊ नसेल. परंतु तो खूप काबाडकष्ट करत राहील. त्याच्या जवळ जे आहे त्यात त्याला कधीही समाधान वाटणार नाही. आणि तो इतके करतो की तो जरा थांबून स्वत:ला कधीही विचारत नाही, "मी इतके कष्ट का करीत आहे? मी आयुष्याचा उपभोग का घेत नाही?" ही देखील एक अतिशय वाईट आणि अविचारी गोष्ट आहे.

### मित्र आणि कुटुंबीय शक्ती देतात

[9]एकापेक्षा दोन माणसे बरी. दोन माणसे एकत्र काम करीत असली तर त्यांना त्यापासून अधिक मिळते.

[10]जर एखादा माणूस पडला तर दुसरा त्याला मदत करू शकतो. पण जर माणूस एकटा असताना पडला तर ते वाईट असते. त्याला मदत करायला तिथे कुणीही नसते.

[11]जर दोन माणसे एकत्र झोपली तर त्यांना ऊब मिळेल. पण जो माणूस एकटाच झोपतो त्याला उबदार वाटणार नाही, त्याला ऊब मिळणार नाही.

[12]शत्रू एकाच माणसाचा पराभव करू शकतो. पण त्याला दोघांचा पराभव करता येत नाही. आणि तीन माणसे तर आधिकच भारी असतात. ते तीन भाग वळून केलेल्या दोरीसारखे असतात. ती दोरी तोडणे कठीण असते.

### लोक, राजकारण आणि लोकप्रियता

[13]गरीब पण शहाणा असलेला तरुण नेता हा वृध्द आणि मूर्ख राजापेक्षा चांगला असतो. तो वृध्द राजा त्याला दिलेल्या इशाऱ्यांकडे लक्ष देत नाही. [14]कदाचित तो तरुण राजा जन्माने गरीब असेल किंवा तो तुंरूगातून राज्य करायला आला असेल. [15]पण मी आयुष्यात लोकांना बघितले आहे आणि मला हे माहीत आहे, लोक त्या तरुणाचेच ऐकतील. तोच नवीन राजा बनेल. [16]खूप लोक त्या तरुणाच्या मागे जातील, पण नंतर त्या लोकांना तो आवडेनासा होईल. हाही अविचारच आहे. हे वारा पकडण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

### शब्द देण्याआधी काळजी घ्या

5 देवाची उपासना करायला जाताना काळजी घ्या. मूर्ख लोकांप्रमाणे यज्ञ करण्यापेक्षा देवाचे ऐकणे चांगले आहे. मूर्ख लोक बरेचदा वाईट गोष्टी करतात आणि ते त्यांना कळत देखील नाही. [2]देवाला वचन देताना तुम्ही काळजी घ्या. देवाशी बोलताना काळजी घ्या. भावनाशील होऊन लगेच बोलायला सुरुवात करू नका. देव स्वर्गात असतो आणि तुम्ही पृथ्वीवर. म्हणून देवाला फक्त काही मोजक्या गोष्टीच सांगायची आवश्यकता असते. ही म्हण खरी आहे:

[3]खूप काळजी केल्यामुळे वाईट स्वप्ने पडतात आणि मूर्खाकडून खूप शब्द बोलले जातात.

[4]जर तुम्ही देवाला वचन दिले असेल तर ते पाळा. ती वचने पाळायला वेळ लावू नका. देव मूर्खांबद्दल आनंदी नसतो. जे देण्याचे वचन तुम्ही देवाला दिले होते ते त्याला द्या. [5]कसलेच वचन न देणे हे काही तरी वचन देऊन त्याची पूर्तता न करण्यापेक्षा चांगले असते. [6]म्हणून तुमच्या शब्दामुळे स्वत:ला पाप करायला लावू नका. "मी जे बोललो ते मला बोलायचे नव्हते." असे याजकाला म्हणू नका. तुम्ही जर असे केलेत तर देव तुमच्या शब्दांवर खरोखरच रागावेल आणि तुम्ही ज्याच्यासाठी कष्ट केलेत त्या सर्वाचा नाश करील. [7]तुमची निरर्थक स्वप्ने आणि पोकळ बडबड तुम्हाला संकटात लोटणार नाही याची काळजी घ्या. तुम्ही देवाला मान द्यायला हवा.

### प्रत्येक राजावर एक राजा असतो

[8]काही देशांत गरीब लोकांवर खूप कष्ट करायची सक्ती केली जाते. गरीबांच्या बाबतीत हे अन्यायकारक आहे हे तुम्ही जाणता. हे गरीबांच्या हक्का विरुध्द आहे. पण आश्चर्य वाटून घेऊ नका. जो राजा त्यांना हे करायला भाग पाडतो त्याला भाग पाडणारा ही एक राजा आहे, आणि या दोघांना भाग पाडायला लावणारा आणखी एक राजा आहे. [9]राजाही गुलाम आहे–त्याचा देशच त्याचा मालक आहे.*

---

**सत्ताधारी ... त्याचा मालक आहे** किंवा "एक राज्यकर्ता त्याच्यापेक्षा उच्च राज्यकर्त्याकडून फसवला गेला" आणि ते दोघे त्यांच्यापेक्षा उच्च राज्याकर्त्याकडून फसवले गेले. "राजालासुध्दा नफ्यातील त्याचा वाटा मिळतो देशाची संपत्ती त्यांच्यात विभागली जाते."

## संपत्ती सुख विकत घेऊ शकत नाही

10जो माणूस पैशावर प्रेम करतो तो त्याच्याजवळ असलेल्या संपत्ती बद्दल कधीही समाधानी राहू शकणार नाही. जो माणूस संपत्तीवर प्रेम करतो त्याला अधिक संपत्ती मिळाली तरी तो समाधानी राहणार नाही. हा ही अविचार आहे.

11एखाद्याकडे जास्त संपत्ती असेल तर ती खर्च करण्यासाठी त्याला मित्रांची आवश्यकता असते. त्यामुळे श्रीमंत माणसाला काहीच लाभ होत नाही. तो फक्त त्याच्या संपत्ती कडे पाहू शकतो.

12जो माणूस दिवसभर कष्ट करतो तो घरी येऊन शांतपणे झोपतो. त्याला खायला कमी असले किंवा नसले तरी ते महत्वाचे नसते. पण श्रीमंत माणूस त्याच्या संपत्तीची चिंता करतो आणि त्यामुळे त्याला झोप येत नाही.

13मी या आयुष्यात एक अतिशय वाईट गोष्ट घडलेली पाहिली. माणूस भविष्यासाठी पैसे साठवतो. 14पण काही तरी वाईट घडते आणि त्याची संपत्ती जाते. त्यामुळे त्याच्या मुलाला द्यायला त्याच्याजवळ काहीही राहात नाही.

## आपण येतो तेव्हा आपल्याजवळ काही नसते आणि जातानाही आपल्याजवळ काही राहात नाही

15माणूस त्याच्या आईच्या उदरातून जगात येतो तेव्हा काहीही न घेता येतो. आणि तो माणूस जेव्हा मरतो तेव्हाही तो त्याच प्रकारे जातो, काहीही न घेता. तो गोष्टी मिळवण्यासाठी खूप कष्ट करतो पण तो जेव्हा मरतो तेव्हा तो बरोबर काहीही नेत नाही. तो ज्या रीतीने जगात येतो त्याच रीतीने जातो. 16हे फारच वाईट आहे म्हणून “वारा पकडण्याचा प्रयत्न करण्यात माणसाला काय मिळते?” 17त्याला फक्त दु:खाने आणि खिन्नतेने भरलेले दिवस मिळतात. आणि शेवटी तो निराश, आजारी आणि रागीट बनतो.

## आयुष्यातील काम आनंदाने करा

18मी पाहिले आहे की, माणूस करू शकेल अशी चांगली गोष्ट पुढीलप्रमाणे आहे: माणासाने पृथ्वीवरील त्याच्या लहानशा आयुष्यात खावे, प्यावे आणि काम करण्यात आनंद मिळवावा. देवाने त्याला काही दिवसांचेच आयुष्य दिले आहे आणि फक्त तेव्हढेच त्याच्याजवळ आहे.

19जर देवाने एखाद्याला संपत्ती, मालमत्ता आणि या गोष्टींचा उपभोग घेण्याची शक्ती दिली असेल तर त्याने त्याचा उपभोग घेतला पाहिजे. त्याच्याकडे ज्या गोष्टी आहेत त्यांचा स्वीकार त्याने केला पाहिजे, आणि त्याचे कामही आनंदाने केले पाहिजे. ती देवाने दिलेली भेट आहे. 20माणसाला जगण्यासाठी खूप वर्षे नसतात. म्हणून त्याने आयुष्यभर या सगळ्या गोष्टींची आठवण ठेवली पाहिजे. देव त्याला त्याचे आवडते काम करण्यात गुंतवून ठेवील.

## संपत्ती सुख आणीत नाही

6 मी या आयुष्यात आणखी एक गोष्ट बघितली आहे, जी योग्य नाही. ती समजायला फार कठीण आहे: 2देव माणसाला खूप संपत्ती, धनदौलत आणि मानमरातब देतो, त्या माणसाजवळ त्याला पाहिजे असलेल्या सर्व गोष्टी आणि त्याला जे जे हवे ते सर्व असते, परंतु देव त्याला या सगळ्याचा उपभोग घेऊ देत नाही. कोणीतरी अनोळखी येतो आणि सारे काही घेऊन जातो. ही अतिशय वाईट आणि निरर्थक गोष्ट आहे.

3एखादा माणूस खूप वर्षे जगेल आणि कदाचित त्याला 100 मुले असतील. परंतु जर तो माणूस चांगल्या गोष्टीत समाधानी नसला आणि तो मेल्यावर त्याची कोणाला आठवणही आली नाही तर जन्मत:च मेलेल्या मूल त्या माणसापेक्षा खूप बरे आहे असे मला वाटते. 4मूल मेलेले निपजणे ही अतिशय निरर्थक गोष्ट आहे. ते मूल लगेच निनावीच एका काळोख्या कबरेत पुरले जाते. 5त्या मुलाला कधीही सूर्यदर्शन होत नाही. त्या मुलाला कधीही काहीही माहीत होत नाही. अशा मुलाला आयुष्यात देवाने दिलेल्या गोष्टींचा उपभोग घेऊ न शकणाऱ्या माणसापेक्षा अधिक विसावा मिळतो. 6तो माणूस कदाचित 2000 वर्षे जगेल, पण त्याने जर आयुष्याचा उपभोग घेतला नाही तर जन्मत:च मेलेल्या मुलाने त्याच्यापेक्षा सगळ्यात सोपा मार्ग* शोधला असे म्हणावे लागते.

7माणूस खूप कष्ट करतो. का? स्वत:चे पोट भरण्यासाठी. पण तो कधीही समाधानी असत नाही. याच रीतीने शहाणा माणूस मूर्खा 8पेक्षा अधिक चांगला नसतो. गरीब राहून आयुष्य जसे सामोरे येते तसा त्याचा स्वीकार करणे हे अधिक चांगले. आपल्याजवळ जे आहे. 9त्यात समाधान मानणे हे अधिकाची हाव धरण्यापेक्षा बरे आहे. कारण अधिकाची हाव धरणे निरर्थक आहे. ते अधिक वाऱ्याला पकडण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.*

10–11माणूस, म्हणजे ज्यासाठी त्याला निर्माण केले गेले तो एक माणूस आणि त्याबद्दल वाद करणे निरर्थक आहे. माणूस या विषयी देवाजवळ वाद घालू शकत नाही. का? कारण देव माणसापेक्षा शक्तिशाली आहे. आणि खूप वेळ वाद घातला तरी त्यात बदल होणार नाही.

12माणसाच्या छोट्याश्या आयुष्यात त्याच्यासाठी पृथ्वीवर काय चांगले आहे ते कोणाला कळणार? त्याचे आयुष्य सावलीप्रमाणे सरकते. पुढे काय घडणार आहे ते त्याला कोणीही सांगू शकणार नाही.

---

**तो माणूस ... सोपा मार्ग** किंवा “सर्व एकाच ठिकाणी जातात हे खरे नाही का?”

**त्यात ... आहे पकडणे** किंवा “तुम्हाला जे दिसते ते घेणे हे हव्या असलेल्या गोष्टींमागे धावण्यापेक्षा चांगले असते. हे सुध्दा वाऱ्याला पकडण्यासारखेच आहे.”

## शहाणपणाच्या शिकवणुकींचा संग्रह

7 चांगले नाव (मान मरातब) असणे हे चांगले अत्तर जवळ असण्यापेक्षा अधिक चांगले असते. ज्या दिवशी माणूस मरतो तो दिवस, ज्या दिवशी तो जन्मतो त्या दिवसापेक्षा चांगला असतो.

2प्रेतयात्रेला जाणे हे एखाद्या समारंभाला जाण्यापेक्षा चांगले असते. का? कारण सगव्ळ्या माणसांना मरणे भाग असते आणि प्रत्येक जिवंत माणसाने हे मान्य करायला हवे.

3दु:ख हे हास्यापेक्षा चांगले असते. का? कारण जेव्हा आपला चेहरा दु:खी असतो तेव्हा आपले हृदय चांगले होते.

4शहाणा माणूस मरणाचा विचार करतो पण मूर्ख माणूस फक्त वेळ चांगला जाण्याचाच विचार करतो.

5शहाण्या माणसाकडून टीका होणे हे मूर्खाकडून स्तुती होण्यापेक्षा चांगले असते.

6मूर्खाच्या हास्याची काहीच किंमत नसते. ते भांडे गरम करण्यासाठी काट्यांचा जाळ करण्यासारखे आहे. काटे लवकर जळून जातात आणि भांडे मात्र गरम होत नाही.

7एखाद्याने पुरेसे पैसे दिले तर शहाणा माणूससुध्दा त्याचे शहाणपण विसरुन जाईल. तो पैसा त्याच्या समजूतदारपणाचा नाश करतो.

8कुठल्याही गोष्टीची सुरुवात करण्यापेक्षा एखादी गोष्ट संपवणे अधिक चांगले असते. सहनशील आणि प्रेमळ असणे हे गर्विष्ठ आणि अधीर असण्यापेक्षा चांगले असते.

9चटकन राग येऊ देऊ नका. का? कारण रागावणे हा मूर्खपणा आहे.

10“पूर्वी आयुष्य खूप चांगले होते.” असे कधीच म्हणू नका. “काय झाले?” शहाणपण हा प्रश्न आपल्याला कधीच विचारू देत नाही.

11जर तुमच्याजवळ मालमत्ता असेल तर तिच्या जोडीला शहाणपण असणे अधिक चांगले. शहाण्या लोकांना* खरोखरच जास्त संपत्ती मिळते. 12शहाणपण व पैसा संरक्षण करू शकतो. तथापि शहाणपणाने मिळविलेले ज्ञान अधिक चांगले असते कारण ते जीवन वाचविते.

13देवाने केलेल्या गोष्टी पाहा. एखादी गोष्ट चुकीची आहे असे तुम्हाला वाटले तरी तुम्ही ती बदलू शकत नाही. 14जेव्हा आयुष्य चांगले असते तेव्हा त्याचा उपभोग घ्या आणि जेव्हा ते कठीण असते तेव्हा देव आपल्याला चांगल्या आणि कठीण अशा दोन्ही वेळा देतो हे लक्षात ठेवा. आणि भविष्यात काय घडणार आहे ते कोणालाही कळत नाही.

## लोक खरोखर चांगले नसू शकतात

15माझ्या छोट्याशा आयुष्यात मी सगळे काही पाहिले आहे. चांगली माणसे तरुणपणीच मेलेली मी पाहिली आहेत. आणि वाईट माणसे खूप वर्षे जगलेली मी पाहिली आहेत.
16–17म्हणून स्वत:ला का मारायचे? खूप चांगले किंवा खूप वाईट होऊ नका. आणि खूप शहाणे किंवा खूप मूर्खही होऊ नका. तुमची वेळ येण्या आधीच तुम्ही का मरावे?

18यांतले थोडे आणि त्यातले थोडे असे व्हायचा प्रयत्न करा. देवाचे भक्त सुध्दा काही चांगल्या गोष्टी आणि काही वाईट गोष्टी करतात. 19–20या पृथ्वीवर सदैव चांगल्या गोष्टी करणारा आणि कधीही पाप न करणारा असा माणूस नाही.

शहाणपण माणसाला शक्ती देते. एक शहाणा माणूस दहा मूर्ख नेत्यांपेक्षा अधिक बलवान असतो.

21लोक बोलतात त्या सर्व गोष्टींकडे लक्ष देऊ नका. तुमचा नोकर तुमच्याविषयी वाईट बोलत असलेला तुम्ही ऐकाल. 22आणि तुम्ही सुध्दा इतरांविषयी बरेचदा वाईट बोललेले आहा हे तुम्हाला माहीत आहे. 23मी माझे शहाणपण वापरून या गोष्टींचा विचार केला. मला खरोखरच शहाणे व्हायचे होते. पण ते अशक्य होते. 24गोष्टी अशा का आहेत ते मला खरोखरच कळत नाही. हे कोणालाही कळणे फार कठीण आहे. 25मी खूप अभ्यास केला आणि खरे शहाणपण शोधण्याचा कसून प्रयत्न केला. मी प्रत्येक गोष्टींसाठी कारण शोधण्याचा प्रयत्न केला. मी काय शिकलो? मला हे कळले की दुष्ट असणे हा मूर्खपणा आहे. आणि मूर्खासारखे वागणे हा शुध्द वेडेपणा आहे.

26मला हे सुध्दा कळले की काही स्त्रिया सापव्ळ्यासारख्या धोकादायक असतात. त्यांची हृदये जाळ्यासारखी असतात आणि त्यांचे बाहू साखव्ळ्यांसारखे असतात. या स्त्रियांकडून पकडले जाणे मरणापेक्षाही भयंकर असते. जो माणूस देवाची भक्ती करतो तो अशा स्त्रियांपासून दूर राहातो. पण पापी माणूस मात्र त्यांच्या कडून पकडला जाईल.

27–28गुरू म्हणतात, “मी या सगळ्या गोष्टी एकत्र केल्या कारण त्यांचे उत्तर काय येते ते मला पहायचे होते. मी अजूनही उत्तर शोधत आहे. परंतु मला हे मात्र मिळाले. मला हजारात एक चांगला माणूस मिळाला. पण मला एकही चांगली स्त्री मिळाली नाही.

29“मी आणखी एक गोष्ट शिकलो. देवाने माणसाला चांगले बनवले. पण माणसांनीच वाईट होण्याचे अनेक मार्ग शोधून काढले.”

## शहाणपण आणि सत्ता

8 शहाणा माणूस ज्या प्रमाणे गोष्टी समजू शकतो आणि गोष्टींचे निराकरण करू शकतो त्याप्रमाणे इतर कोणीही करू शकत नाही. त्याचे शहाणपण त्याला आनंदी बनवते. त्यामुळे दु:खी चेहरा आनंदी होतो.

---

**शहाणे लोक** शब्दश: “सूर्य बघू शकणारे लोक.” याचा अर्थ शहाणे लोक त्यांना ज्या गोष्टी करायच्या असतात त्या आधी नीट बघतात आणि मगच करतात.

2तुम्ही नेहमी राजाची आज्ञा पाळली पाहिजे असे मी
म्हणतो. तुम्ही हे करा कारण देवाला तुम्ही तसे वचन
दिले आहे. 3राजाला काही गोष्टी सुचवताना भीती बाळगू
नका आणि चुकीच्या गोष्टी करायला मदतही करू नका.
पण राजा त्याला (स्वत:ला) आनंद देणाऱ्याच आज्ञा देतो
हे लक्षात ठेवा. 4राजाला आज्ञा करण्याचा अधिकार आहे.
आणि काय करायचे हे त्याला कोणीही सांगू शकत नाही.
5जो माणूस राजाच्या आज्ञा पाळतो तो माणूस सुरक्षित
राहातो. शहाण्या माणसाला हे करायची योग्य वेळ माहीत
असते आणि योग्य गोष्टी केव्हा करायच्या हे ही त्याला
माहीत असतात.
6माणसाकडे सगळ्या गोष्टी करण्यासाठी योग्य वेळ आणि
योग्य मार्ग असतो. आणि प्रत्येकाने संधीनुसार काय करायचे
ते ठरवायचे असते. तो अनेक संकटांत असला तरी त्याने
या गोष्टी केल्या पाहिजेत. 7कारण काय घडेल या बद्दल
त्याला खात्री नसते. का? कारण भविष्यात काय होईल ते
त्याला कुणीही सांगू शकत नाही.
8आपल्या आत्म्याला सोडून जाण्यापासून परावृत्त
करण्याची शक्ती कोणाकडेही नसते. स्वत:चे मरण थांबवणे
हे कोणाच्याही हाती नसते. युध्दात वाटेल तिथे जाण्याचे
स्वातंत्र्य सैनिकाला नसते. त्याप्रमाणे जर एखाद्याने दुष्कृत्य
केले तर ते कृत्य त्याची पाठ सोडणार नाही.
9मी या सगळ्या गोष्टी पाहिल्या. या जगात घडणाऱ्या
गोष्टी विषयी मी खूप विचार केला. लोक नेहमी दुसऱ्यांवर
राज्य करण्यासाठी सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करतात
आणि हे त्यांच्यासाठी वाईट आहे.
10दुष्ट माणसांची भव्य आणि सुंदर प्रेतयात्रा मी पाहिली.
प्रेतयात्रेहून परत जाताना लोक मेलेल्या दुष्टांबद्दल चांगले
बोलत होते. ज्या शहरात दुष्टांनी खूप वाईट गोष्टी केल्या
त्याच शहरात हे घडले. हे फारच अविचारी आहे.

## न्याय, बक्षिसे आणि शिक्षा

11लोकांना त्यांनी केलेल्या वाईट गोष्टींबद्दल कधीच
ताबडतोब शिक्षा केली जात नाही. त्यांना शिक्षा देण्यास
विलंब लागतो आणि त्यामुळे इतरांनाही वाईट गोष्टी
करण्याची इच्छा होते.
12पापी शंभर दुष्कृत्य करेल आणि तरी ही त्याला
भरपूर आयुष्य मिळेल. असे असले तरी देवाची आज्ञा
पाळणे आणि त्याला मान देणे हे अधिक चांगले असते.
13दुष्ट लोक देवाला मान देत नाहीत म्हणून त्यांना खरोखरच
चांगल्या गोष्टी मिळणार नाहीत. त्या दुष्टांना भरपूर आयुष्य
लाभणार नाही. त्यांचे आयुष्य सूर्य अस्ताला जाताना लांब
लांब होणाऱ्या सावल्यांसारखे नसेल.
14पृथ्वीवर घडणारी आणखी एक गोष्ट अशी आहे जी
योग्य वाटत नाही. वाईट गोष्टी वाईट माणसांच्या बाबतीत
घडाव्या आणि चांगल्या गोष्टी चांगल्या माणसांच्या बाबतीत.
पण कधी कधी चांगल्या माणसांचे वाईट होते आणि वाईट
माणसांचे चांगले हे योग्य नाही. 15म्हणून मी विचार केला
की आयुष्य आनंदात घालवणे हे अधिक महत्वाचे आहे.
का? कारण आयुष्यात करायची सगळ्यात चांगली गोष्ट
म्हणजे खाणे, पिणे आणि मजा करणे. त्यामुळे देवाने
लोकांना पृथ्वीवरील त्यांच्या आयुष्यात करण्यासाठी जे
काम दिले आहे ते आनंदाने करायला त्यांना थोडी मदत
होईल.

## देव जे काही करतो ते सर्व आपल्याला कळत नाही

16लोक या आयुष्यात जे करतात त्याचा मी नीट अभ्यास
केला. लोक किती व्यग्र होते ते मी पाहिले. ते रात्रंदिवस
काम करतात, ते जवळ जवळ कधीच झोपत नाहीत.
17देव ज्या असंख्य गोष्टी करतो त्याही मी पाहिल्या आणि
देव पृथ्वीवर ज्या गोष्टी करतो त्या लोकांना कळणे शक्य
नसते. एखादा माणूस ते समजून घेण्याचा प्रयत्न करील
पण त्याला ते अशक्य आहे. एखाद्या विद्वान माणसाने जरी
असे म्हटले की त्याला देवाचे काम समजते, तरी ते खरे
नसते. त्या सर्व गोष्टी कळणे कोणालाही शक्य नाही.

## मृत्यू न्याय्य आहे का?

9 मी या सगळ्या गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला.
चांगल्या आणि शहाण्या माणासांचे काय होते आणि
त्यांनी काय करावे हे सर्व देवाच्या हातात असते. आपला
तिरस्कार केला जाईल की आपल्यावर प्रेम केले जाईल
याबद्दल लोकांना काहीही माहीत नसते. आणि भविष्यात
काय होणार या बद्दल ही त्यांना काही माहीत नसते.
2पण एक गोष्ट मात्र सर्वांच्या बाबतीत घडते ती म्हणजे
आपण सर्व मरतो. मरण वाईट माणसांना आणि चांगल्या
माणसांनाही येते. जी माणसे शुध्द आहेत त्यांनाही मरण
येते आणि जी शुध्द नाहीत त्यांनाही येते. जे लोक यज्ञ
करतात त्यांनाही मरण येते आणि जे यज्ञ करत नाहीत
त्यांनाही मरण येते. चांगला माणूस पापी माणसासारखाच
मरेल. जो माणूस देवाला काही खास वचने देतो तो, जो
अशी वचने द्यायला घाबरतो त्या माणसासारखाच मरेल.
3या आयुष्यात ज्या गोष्टी घडतात त्यातली सगव्ळ्यात
वाईट गोष्ट म्हणजे सर्वांचा शेवट सारखाच होतो. लोक
नेहमी दुष्ट आणि मूर्खपणाचा विचार करतात. ही गोष्ट
सुध्दा वाईटच आहे हे विचार मरणाकडे नेतात. 4जो माणूस
अजून जिवंत आहे त्याच्याबाबतीत आशेला जागा आहे. तो
कोण आहे याला महत्व नाही. पण हे म्हणणे खरे आहे:

"जिवंत कुत्रा मेलेल्या सिंहापेक्षा चांगला असतो."

5जिवंत माणसांना ते मरणार आहेत हे माहीत असते.
पण मेलेल्यांना काहीच माहीत नसते. मेलेल्यांना कुठलेच
बक्षिस मिळत नाही. लोक त्यांना लवकरच विसरतात.
6माणूस मेल्यानंतर त्याचे प्रेम, त्याचा द्वेष, मत्सर हे सर्व

जाते. आणि मेलेला माणूस पृथ्वीवर घडणाऱ्या गोष्टीत कधीच भाग घेणार नाही.

### जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत आयुष्याचा उपभोग घ्या

[7]तेव्हा आता जा, तुमचे अन्न खा आणि त्याचा आनंद उपभोगा. द्राक्षारस (मद्य) प्या आणि आनंदी व्हा. तुम्ही या गोष्टी केल्या तर देवाला ते बरेच वाटेल. [8]चांगले कपडे घाला आणि चांगले दिसा. [9]प्रेम असलेल्या पत्नीबरोबर आयुष्य आनंदात घालवा. तुमच्या छोट्याशा आयुष्यातील प्रत्येक दिवसाचा आनंद लुटा. देवाने तुम्हाला पृथ्वीवर छोटे आयुष्य दिले आहे आणि फक्त तेव्हढेच तुमच्याकडे आहे हे जाणून या आयुष्यात तुम्हाला जे काम करायचे आहे त्याचा आनंद लुटा. [10]प्रत्येक वेळी जे काम असेल ते उत्तम प्रकारे करा. कबरेत काम नसते. तिथे विचार नसतात, ज्ञान नसते आणि शहाणपणही नसते. आणि आपण सर्व त्या मृत्युलोकात जाणार आहोत.

### चांगले नशीब? वाईट नशीब? आपण काय करू शकतो?

[11]मी या आयुष्यात योग्य नसलेल्या आणखीही काही गोष्टी पाहिल्या. सगव्यांत जोराने धावणारा धावपटू शर्यत जिंकत नाही; सर्वशक्तीमान सैन्य नेहमीच लढाई जिंकते असे नाही. सर्वांत शहाण्या माणसाला त्याने कमावलेले अन्न नेहमीच खाता येते असे नाही, खूप हुशार असलेल्या माणसाला संपत्ती मिळते असे नाही आणि सुशिक्षित माणसाला त्याच्या योग्य अशी स्तुती नेहमी लाभत नाही. वेळ आली की त्या सर्वांच्या बाबतीत वाईट गोष्टी घडतात.

[12]पुढच्या क्षणी काय घडणार आहे ते माणसाला कळत नाही. तो जाळ्यात अडकलेल्या माश्यासारखा असतो. माशालाही काय घडणार आहे ते माहीत नसते. तो सापळ्यात अडकलेल्या पक्ष्यासारखा असतो. पक्ष्यालाही पुढे काय घडणार आहे ते माहीत नसते. त्याच प्रमाणे माणूसही अचानक घडणाऱ्या वाईट गोष्टीच्या सापळ्यात अडकतो.

### शहाणपणाचे सामर्थ्य

[13]मी या आयुष्यात शहाणपणाची गोष्ट करणारा माणूस पाहिला. आणि ते मला फार महात्वाचे वाटते. [14]थोडे लोक असलेले एक लहान शहर होते. एक महान राजा त्या शहराविरुध्द लढला आणि त्याने त्याचे सैन्य त्या शहराभोवती ठेवले. [15]पण त्या शहरात एक विद्वान होता. तो विद्वान गरीब होता. पण त्याने आपल्या शहाणपणाचा उपयोग शहर वाचवण्यासाठी केला. सगळे काही संपल्यानंतर लोक त्या गरीब माणसाला विसरुन गेले. [16]पण मी अजूनही म्हणेन की शहाणपण शक्तीपेक्षा चांगले आहे. ते लोक त्या गरीबाचे शहाणपण विसरून गेले. आणि तो जे काही म्हणाला त्याकडे लक्ष देणेही त्यांनी सोडून दिले. पण तरीही शहाणपण चांगले असते यावर माझा अजूनही विश्वास आहे.

[17]विद्वान माणसाने शांतपणे उच्चारलेले काही शब्द हे मूर्ख राजाने* ओरडून सांगितलेल्या शब्दांपेक्षा चांगले असतात.

[18]शहाणपण हे युध्दातल्या तलवारी आणि भाले यापेक्षा चांगले असते. पण एक मूर्ख अनेक चांगल्यांचा नाश करू शकतो.

10 थोड्या मेलेल्या माशा सगव्यांत चांगल्या अत्तरालासुध्दा वाईट वास आणतात. त्याचप्रमाणे थोडासा मूर्खपणा खूपशा शहाणपणाचा आणि सन्मानाचा नाश करू शकतो.

[2]विद्वान माणसाचे विचार त्याला योग्य दिशेने नेतात. पण मूर्खाचे विचार त्याला अयोग्य दिशेकडे नेतात. [3]मूर्ख त्याचा मूर्खपणा रस्त्यावरून जात असतानासुध्दा दाखवतो. तेव्हा तो मूर्ख आहे हे सर्वांना दिसते.

[4]तुमचे वरिष्ठ तुमच्यावर रागावले आहेत म्हणून तुम्ही तुमची नोकरी सोडू नका. जर तुम्ही शांत राहिलात आणि मदत केलीत तर तुम्ही तुमच्या घोडचुकाही* दुरुस्त करू शकाल.

[5]मी आयुष्यात जे काही पाहिले त्यात ही एक गोष्ट आहे आणि ती योग्य नाही. राजे लोक करतात तशी ती एक चूक आहे. [6]मूर्खांना महत्वाची जागा दिली जाते आणि श्रीमंतांना बिनमहत्वाच्या जागा दिल्या जातात. [7]जे लोक नोकर व्हायच्या लायकीचे असतात त्यांना घोड्यावरून जाताना मी पाहिले आणि जे लोक राजे व्हायच्या योग्यतेचे होते त्यांना मूर्खाबरोबर गुलामासारखे जाताना मी पाहिले.

### प्रत्येक कामात संकटे असतात.

[8]जो माणूस खड्डा खणतो, तो त्याच खड्ड्यात पडू शकतो. जो माणूस भिंत पाडून टाकतो त्याला साप चावण्याची शक्यता असते. [9]जो माणूस मोठ मोठे दगड हलवतो त्याला त्यामुळेच इजा होऊ शकते. आणि जो माणूस झाडे तोडतो तो संकटात असतो. ती झाडे त्याच्याच अंगावर पडण्याची शक्यता असते.

[10]पण शहाणपण कुठलेही काम सोपे करते. धार नसलेल्या सुरीने कापणे कठीण असते. पण एखाद्याने जर

---

**विद्वात ... राजाने** किंवा “शहाण्या माणसाचे शब्द शांतपणे ऐकून घेणे हे मूर्खांच्यात राज्यकर्त्याचे ओरडणे ऐकण्यापेक्षा चांगले आहे.”

**जर तुम्ही ... घोडचुकाही चुका** शब्दश: “बरे करणारा मोठी पापेसुध्दा नाहीशी करतो.” बरे करणारा म्हणजे जो क्षमाशील असतो आणि इतरांना मदत करतो असा माणूस.

सुरीला धार लावली तर कापणे सोपे जाते. शहाणपण तसेच आहे.

[11]एखाद्याला सापावर ताबा कसा मिळवायचा ते माहीत असते. पण तो माणूस जवळपास नसताना कोणाला साप चावला तर त्या कौशल्याचा उपयोग नसतो. ते कौशल्य निरुपयोगी ठरते. शहाणपणही तसेच आहे.

[12]विद्वान माणसाचे शब्द स्तुतीला पात्र ठरतात. पण मूर्खाचे शब्द त्याचा नाश ओढवतात.

[13]मूर्ख माणूस मूर्ख गोष्टींनी सुरुवात करतो. शेवटी तर तो वेड्यासारख्या गोष्टी सांगायला लागतो. [14]मूर्ख माणूस नेहमी तो काय करणार आहे याबद्दल बोलत असतो. पण भविष्यात काय घडणार आहे ते कोणालाच माहीत नसते. नंतर काय घडेल ते कोणीच सांगू शकत नाही.

[15]मूर्ख माणूस घरी जाण्याचा रस्ता शोधून काढण्याइतका हुशार नसतो म्हणून त्याला आयुष्यभर कष्ट उपसावे लागतात.

### कामाचे महत्व

[16]राजा जर लहान मुलासारखा असला तर ते देशाच्या दृष्टीने फार वाईट असते. आणि जर राजे लोक आपला सर्व वेळ खाण्यात घालवत असतील तर तेही देशाच्या दृष्टीने वाईट असते. [17]पण राजा जर चांगल्या घराण्यातून* आलेला असेल तर ते देशाच्या दृष्टीने चांगले असते. आणि जर राजांनी आपल्या खाण्यापिण्यावर ताबा मिळवला तर तेही देशासाठी चांगले असते. ते राजे सशक्त होण्यासाठी खातात-पितात, नशा चढण्यासाठी नाही.

[18]जर एखादा माणूस कामाच्या बाबतीत खूप आळशी असेल तर त्याचे घर गळायला लागेल आणि त्याचे छत कोसळून पडेल.

[19]लोकांना खायला आवडते, आणि द्राक्षारस (मद्य) आयुष्य आनंदी करतो, पण पैसा अनेक समस्यांची उकल करतो.

### अफवा

[20]राजाबद्दल वाईट बोलू नका. त्याच्याबद्दल वाईट विचारसुध्दा करू नका. श्रीमंत लोकांबद्दलसुध्दा वाईट बोलू नका. तुम्ही तुमच्या घरात एकटेच असलांत तरी सुध्दा. का? कारण एक छोटासा पक्षी उडून जाईल व त्यांना तुम्ही काय काय बोलला ते सांगेल.

### संकटांचा सामना दृढतेने करा

11 जिथे जिथे जाल तिथे तिथे तुम्ही चांगल्या गोष्टी करा.* तुम्ही ज्या चांगल्या गोष्टी कराल त्या तुमच्याकडे परत येतील.

[2]तुमच्याकडे जे काही आहे त्याची वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणूक करा* पृथ्वीवर कोणत्या वाईट गोष्टी घडतील त्याची तुम्हाला कल्पना नसते.

[3]तुम्ही पुढील गोष्टीबद्दल खात्री बाळगा. जर ढग पाण्याने भरलेले असतील तर ते पृथ्वीवर पाऊस पाडतील. झाड जर उत्तरेकडे वा दक्षिणेकडे पडले तर ते जिथे पडते तिथेच राहते.

[4]पण काही गोष्टींविषयी तुम्हाला खात्री नसते. त्याबाबतीत तुम्हाला संधी शोधावी लागते. जर एखादा माणूस चांगल्या हवामानाची वाट बघत बसला तर तो कधीच पेरणी करू शकणार नाही. आणि जर एखादा माणूस प्रत्येक ढगाकडून पाऊस पाडण्याची अपेक्षा करू लगला तर त्याला आपले पीक कधीच घेता येणार नाही.

[5]वाऱ्याची दिशा तुम्हाला माहीत नसते. आणि आईच्या शरीरात तिचे बाळ कसे वाढते ते आपल्याला माहीत नसते. त्याच प्रमाणे देव काय करील तेही तुम्हाला माहीत नसते. सर्व गोष्टी तोच घडवून आणतो.

[6]म्हणून अगदी पहाटेलाच पेरणीला सुरुवात करा आणि संध्याकाळपर्यंत थांबू नका. का? कारण कोणती गोष्ट तुम्हाला श्रीमंत बनवेल हे तुम्हाला माहीत नसते. कदाचित तुम्ही जे जे काही कराल ते ते यशस्वी होईल.

[7]जिवंत असणे चांगले असते. सूर्याचा प्रकाश पहाणे छान असते. [8]तुम्ही कितीही जगलात तरी तुम्ही आयुष्याचा प्रत्येक दिवस उपभोगला पाहिजे. पण तुम्ही मरणार आहात याची आठवण ठेवा. तुम्ही जिवंत असाल त्यापेक्षा अधिक काळ मेलेले असाल. आणि मेल्यानंतर तुम्ही काहीच करू शकत नाही.

### तुम्ही तरुण आहात तो पर्यंत देवाची सेवा करा

[9]तेव्हा तरुणांनो! जो पर्यंत तरुण आहात तो पर्यंत आयुष्याचा उपभोग घ्या, आनंदी व्हा. मनाला जे करावेसे वाटते ते करा. तुम्हाला जे काही करण्याची इच्छा आहे ते करा. पण तुम्ही जे जे कराल त्यावरून देव तुमचा न्याय करील हे लक्षात ठेवा. [10]रागाला तुमच्यावर ताबा मिळवू देऊ नका. आणि शरीराला पाप करायला प्रवृत्त करू

---

**चांगल्या घराण्यातून** शब्दश: "स्वतंत्र लोकांचा मुलगा." जो माणूस कधीच गुलाम नव्हता आणि त्याचे आईवडिलही कधी गुलाम नव्हते.

**चांगल्या गोष्टी करा** किंवा "तुम्ही भाकरी पाण्यावर फेकून दे."

**गुंतवणूक करा** किंवा "एक भाग सातांना किंवा आठांना द्या."

नका.* आयुष्याच्या पहाटे तरुण असताना लोक मूर्खपणाच्या गोष्टी करीत असतात.

## वृध्दत्वाचे प्रश्न

12 तरुणपणीच वृध्दापकाळाचे वाईट दिवस येण्याआधी, “मी माझे आयुष्य वाया घालवले”* असे तुम्ही म्हणण्याचे दिवस येण्याआधी आपल्या निर्मात्याची आठवण ठेवा.

2सूर्य, चंद्र आणि तारे तुमच्या नजरेला दिसणार नाहीत अशी वेळ येण्याआधी, तरुणपणीच आपल्या निर्मात्याची आठवण ठेवा. संकटे तर पाठोपाठ येणाऱ्या वादळाप्रमाणे पुन्हा पुन्हा येत राहतात.

3त्या वेळी तुमच्या बाहूतील शक्ती निघून गेलेली असेल. तुमचे पाय अशक्त होतील आणि ते वाकतील. तुमचे दात पडतील. आणि तुम्हाला खाता येणार नाही. तुमचे डोळे स्पष्टपणे बघू शकणार नाहीत. 4तुम्हाला नीट ऐकूही येणार नाही. तुम्हाला रस्त्यावरचा गोंधळ ऐकू येणार नाही. धान्य दळताना येणारा जात्याचा आवाज देखील तुम्हाला शांत वाटेल. बायकांची गाणी तुम्ही ऐकू शकणार नाही. पण साध्या पक्ष्याच्या गाण्याचा आवाजसुध्दा तुम्हाला सकाळी जाग आणील, कारण तुम्ही झोपू शकणार नाहीत.

5तुम्हाला उंचावरच्या ठिकाणांची भीती वाटेल. तुमच्या वाटेत येणाऱ्या प्रत्येक लहान वस्तूला अडखळून तुम्ही पडाल अशी तुम्हाला भीती वाटेल. बदामाच्या झाडांवरील फुलासारखे तुमचे केस पांढरे होतील. तुम्ही चालताना नाकतोडयासारखे स्वत:ला ओढाल. तुमची जगण्याची इच्छा* नाहीशी होईल आणि नंतर तुम्ही तुमच्या कायमच्या घरी (कबरेत) जाल. शोक करणारे लोक* अत्यसंस्कारासाठी रस्त्यावर जमा होतील आणि तुमचे प्रेत स्मशानात नेतील.

## मृत्यू

6तरुण असेपर्यंत तुमच्या निर्मात्याची आठवण ठेवा. चंदेरी दोर तुटण्याआधीआणि सोनेरी भांडे फुटण्याआधी, तळाशी फुटलेल्या काचेच्या भांड्यासारखे तुमचे आयुष्य निरुपयोगी होण्याआधी, विहिरीवर ठेवलेले दगडी झाकण फुटून आत पडून निरुपयोगी होते तसे तुमचे आयुष्य निरुपयोगी होण्याआधी.

7तुमचे शरीर मातीपासून निर्माण झाले आणि जेव्हा तुम्ही मराल तेव्हा तुमचे शरीर परत मातीला मिळेल. पण तुमचा आत्मा देवाकडून आला आणि जेव्हा तुम्ही मराल तेव्हा तुमचा आत्मा परत देवाकडे जाईल.

8सगळ्या गोष्टी इतक्या निरर्थक आहेत. गुरू म्हणतात की हे सगळे म्हणजे वेळेचा अपव्यय आहे.

## सारांश

9गुरू अतिशय शहाणे होते. त्यांनी त्यांचे शहाणपण लोकांना शिकवायला वापरले. गुरूनी शहाणपणाच्या गोष्टींचा अभ्यास केला आणि त्यांची नीट रचना केली.* 10त्यांनी योग्य शब्द शोधण्याचा खूप प्रयत्न केला. आणि त्यांनी खऱ्या आणि विसंबण्याजोग्या शिकवणुकी लिहिल्या.

11विद्वान माणसाचे शब्द हे प्राण्यांना योग्य मार्गाने नेणाऱ्या चाबकासारखे असतात. ती शिकवण न तुटणाऱ्या खुंट्यासारखी असते. तुम्हाला जगण्याचा योग्य मार्ग दाखविण्यासाठी तुम्ही त्या शिकवणुकीवर विश्वास ठेवू शकता. शहाणपणाच्या त्या सर्व गोष्टी त्या एकाच मेंढपाळाकडून (देवाकडून) येतात. 12म्हणून मुला, त्या शिकवणुकींचा अभ्यास कर पण इतर पुस्तकांविषयी सावध रहा. लोक नेहमी पुस्तके लिहीत असतात. आणि खूप अभ्यास तुम्हाला कंटाळा आणेल.

13–14आता या पुस्तकांत* लिहिलेल्या सर्व गोष्टींकडून तुम्ही काय शिकणार आहात? माणसाला करता येण्यासारखी सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे देवाला मान देणे आणि त्याच्या आज्ञा पाळणे. का? कारण देवाला लोक करतात त्या सर्व गुप्त गोष्टी सुध्दा माहीत असतात. त्याला सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टीं विषयी माहिती असते. लोकांनी केलेल्या गोष्टींचा तो न्यायनिवाडा करील.

---

**करायला प्रवृत्त करू नका** किंवा “गोष्टींची काळजी करू नका. संकटांपासून स्वत:चे रक्षण करा.”

**मी माझे आयुष्य वाया घालवले** शब्दश: “मी त्याच्यापासून आनंद मिळवू शकत नाही.” किंवा “आता म्हातारा झाल्यानंतर मी जीवन उपभोगू शकत नाही.” असाही होईल.

**जगण्याची इच्छा** किंवा “भूक”, “वासना” इथे हिब्रू शब्द समजायला अवघड आहे.

**शोक करणारे लोक** कोणी मेले की लोक रडतात. बायबलच्या काळी व्यावसायिक रडणारे असत. लोक एखाद्याच्या अंत्ययात्रेच्यावेळी खूप दु:ख झाले आहे हे दाखवण्यासाठी त्यांना भाड्याने घेत.

**रचना केली** या हिब्रू शब्दाचा अर्थ “सरळ करणे, रचणे, बरोबर करणे, संपादित करणे” असा आहे.

**आता ... पुस्तक** शब्दश: “सर्व काही ऐकल्यानंतर गोष्टीचा सारांश.”

# गीतरत्न

1 शलमोनाचे सर्वांत सुंदर गीत

### प्रेयसी आपल्या प्रियकरास:

2चुंबनांनी मला झाकून टाक कारण तुझे प्रेम द्राक्षरसापेक्षा चांगले आहे.

3तुझ्या अत्तराचा खूप चांगला वास येत आहे, पण तुझे नाव मात्र उत्तम अत्तरापेक्षाही गोड आहे. त्यामुळेच तरुणी तुझ्यावर प्रेम करतात.

4मला तुझ्याबरोबर ने. आपण पळून जाऊ.

राजाने मला त्याच्या खोलीत नेले.

### यरुशलेममधील स्त्रिया पुरुषाला

आम्ही आनंदोत्सव करू आणि तुझ्यासाठी आनंदित होऊ. तुझे प्रेम द्राक्षारसापेक्षा चांगले आहे हे लक्षात ठेव. तरुणी तुझ्यावर योग्य कारणासाठी प्रेम करतात.

### ती स्त्रियांशी बोलते

5यरुशलेमच्या मुलींनो, मी काळी आणि सुंदर आहे. मी तेमान आणि शलमोनाच्या तंबूंसारखी काळी आहे.

6मी किती काळी आहे, सूर्याने मला किती काळे केले आहे याकडे बघू नका. माझे भाऊ माझ्यावर रागावले होते. त्यांनी माझ्यावर त्यांच्या द्राक्षांच्या मळ्याची काळजी घ्यायची सक्ती केली. त्यामुळे मला स्वत:ची* काळजी घेता आली नाही.

### ती त्याच्याशी बोलते

7मी माझ्या आत्म्यासकट तुझ्यावर प्रेम करते. मला सांग: तू तुझ्या मेंढ्यांना कुठे खायला दिलेस? तू त्यांना दुपारी कुठे विश्रांती घेऊ दिलीस? मी तुझ्याबरोबर यायला हवे. नाही तर मी तुझ्या मित्रांच्या मेंढ्यांची काळजी घेणारी, अशी भाडोत्री स्त्रीसारखी ठरेन

### तो तिच्याशी बोलतो

8तू खूप सुंदर स्त्री आहेस. काय करायचे ते तुला नक्कीच माहीत आहे. मेंढ्यांच्या मागे मागे जा. तुझ्या लहान बकऱ्यांना मेंढपाळाच्या तंबूंजवळ खाऊ घाल.

9फारोचा रथ ओढणाऱ्या घोड्यांना घोडी* जशी उद्दीपित करते त्यापेक्षाही जास्त तू मला उद्दीपित करतेस.* त्या घोड्यांच्या चेहेऱ्यांच्या बाजूंवर आणि गळ्यात सुंदर अलंकार आहेत.

10–11हे तुझ्यासाठी केलेले अलंकार: डोक्याभोवतीचा सोन्याचा पट्टा आणि चांदीचा हार. तुझे सुंदर गाल सोन्याने अलंकृत केले आहेत. तुझा गळा चांदीच्या अलंकारांनी सुंदर दिसत आहे.

### ती म्हणते

12माझ्या अत्तराचा वास बिछान्यावर लवंडलेल्या राजापर्यंत जातो.

13माझ्या वक्षस्थळांमध्ये रात्रभर विसावलेला माझा प्रियकर माझ्या गळ्यात असलेल्या सुगंधी द्रव्याच्या पिशवीसारखा आहे

14माझा प्रियकर एन-गेदीमधील द्राक्षाच्या मळ्याजवळील मेंदीच्या फुलांच्या गुच्छा सारखा आहे.

### तो म्हणतो

15प्रिये, तू किती सुंदर आहेस! तू फारच सुंदर आहेस. तुझे डोळे कबुतरासारखे आहेत.

### ती म्हणते

16प्रियकरा, तू सुध्दा सुस्वरूप आहेस आणि मोहक आहेस. आपला बिछाना किती आल्हाददायक आणि सुखावह आहे.

17आपल्या घराच्या तुळ्या गंधसरूच्या लाकडाच्या आहेत. छताचे वासे देवदारूच्या लाकडाची आहे.

2 मी शारोनाचे कुंकुमपुष्प (गुलाबपुष्प) आहे. दरीतले कमलपुष्प आहे.

### तो म्हणतो

2प्रिये इतर स्त्रियांमध्ये तू काट्यांतल्या कमलीपुष्पासारखी आहेस.

---

**मी स्वत:** शब्दश: “माझ्या स्वत:चा द्राक्षाचा मळा.”

घोड्यांना … **घोडा** रथ ओढण्यासाठी फक्त घोडेच वापरत असत.

**फारोचा … करतेस** शब्दश “प्रिये, मी तुझी फारोच्या रथाच्या घोडीशी तुलना करतो.”

### ती म्हणते

3प्रियकरा इतर पुरुषांमध्ये तू रानटी झाडांमध्ये असलेल्या
सफरचंदाच्या झाडासारखा आहेस.

### ती स्त्रियांशी बोलते.

मला माझ्या प्रियकराच्या सावलीत बसायला आवडते.
त्याचे फळ मला गोड लागते.
4माझ्या सख्याने मला द्राक्षारसाच्या घरात आणले.
माझ्यावर प्रेम करायची त्याची इच्छा होती.
5मनुका देऊन माझ्यात शक्ती आणा. सफरचंद खाऊ
घालून मला ताजेतवाने करा. कारण मी प्रेमज्वराने अशक्त
झाले आहे.
6माझ्या सख्याचा डावा बाहू माझ्या मस्तकाखाली आहे
आणि त्याच्या उजव्या बाहूने त्याने मला धरले आहे.
7यरुशलेमच्या स्त्रियांनो मला वचन द्या. तुम्हाला वनातील
हरिणींची आणि रानमृगांची शपथ घालून विनवते की
माझी तयारी होईयर्पंत* प्रेम जागृत करू नका.

### ती पुन्हा बोलते

8मी माझ्या सख्याचा आवाज ऐकते. तो येत आहे
डोंगरावरून उड्या मारत, टेकड्यांवरून बागडत येत आहे.
9माझा प्रियकर मृगासारखा, हरिणाच्या पाडसासारखा
आहे. आमच्या भिंतीच्या पलिकडे उभ्या असलेल्या,
खिडकीतून डोकावणाऱ्या, झरोक्यातून* पहाणाऱ्या माझ्या
प्रियकराला बघा.
10माझा प्रियकर माझ्याशी बोलतो, "प्रिये, हे सुंदरी ऊठ
आपण दूर जाऊ या!"
11बघ आता हिवाळा संपला आहे. पाऊस आला आणि
गेला.
12शेतात फुले उमलली आहेत, आता गाण्याचे दिवस
आले आहेत. ऐक कबूतरे परतली आहेत.
13अंजिराच्या झाडावर अंजिर लागले आहेत व वाढत
आहेत. बहरलेल्या द्राक्षवेलींचा गंध येत आहे. प्रिये, सुंदरी,
ऊठ आपण आता दूर जाऊ या."
14माझ्या कबुतरा, उंच कड्यावरच्या गुहेत लपलेल्या,
पर्वतात लपलेल्या माझ्या कबुतरा, मला तुला बघू दे. तुझा
आवाज ऐकू दे. तुझा आवाज अतिशय गोड आहे आणि तू
खूप सुंदर आहेस.

### ती स्त्रियांशी बोलते

15आमच्यासाठी कोल्ह्यांना पकडा. लहान कोल्ह्यांनी
द्राक्षाच्या मळ्यांचा नाश केला आहे. आता आमचे द्राक्षाचे
मळे फुलले आहेत.

16माझा प्रियकर माझा आहे आणि मी त्याची. माझा
सखा कमलपुष्पांवर जगतो.
17जेव्हा दिवस शेवटची घटका मोजतो आणि सावल्या
लांब पळून जातात प्रियकरा पर्वताच्या कड्यावरच्या*
हरिणासारखा किंवा लहान हरिणासारखा परत फीर.

### ती म्हणते

3 रात्रीच्या वेळी मी माझ्या बिछान्यात माझे प्रेम असलेल्या
पुरुषाला मी शोधते. मी त्याला शोधले पण तो मला
सापडला नाही.
2मी आता उठेन. मी शहराभोवती फिरेन. मी रस्त्यांवर
आणि चौकांत माझे प्रेम असलेल्या पुरुषाला शोधीन. मी
त्याला शोधले पण मला तो सापडला नाही.
3शहरात पहारा देणाऱ्या पहारेकऱ्यांना मी सापडले. मी
त्यांना विचारले, "माझे प्रेम असलेल्या पुरुषाला तुम्ही
पाहिलेत का?"
4मी पहारेकऱ्यांना सोडून निघाले होते. इतक्यात मला
माझे प्रेम असलेला पुरुष सापडला. मी त्याला धरले. मी
त्याला जाऊ दिले नाही. मी त्याला माझ्या आईच्या घरी
नेले. तिच्या खोलीत जिने मला जन्म दिला, तेथे नेले.

### ती स्त्रियांशी बोलते

5यरुशलेमच्या स्त्रियांनो, रानहरिणी आणि मृगी यांच्या
साक्षीने मला वचन द्या. मी जो पर्यंत तयार होत नाही तो
पर्यंत प्रेम जागवू नका, प्रेम जागृत करू नका.

### तो आणि त्याची वधू

6खूप लोकांच्या समूहाबरोबर वाळवंटातूनयेणारी ही स्त्री
कोण आहे?गंधरस व ऊद आणि इतर धूवासिक द्रव्ये
गाळल्यानंतर होणाऱ्या धुरासारखे त्यांच्या मागे धुळीचे
लोट उडत आहेत.
7ही बघ, शलमोनाची प्रवासाला जाण्याची खुर्ची! साठ
सैनिक, इस्राएलचे शक्तिमान सैनिक तिचे रक्षण करीत
आहेत.
8ते सगळे प्रशिक्षित लढवय्ये आहेत. त्यांच्या बाजूला
त्यांच्या तलवारी आहेत. रात्री येणाऱ्या कुठल्याही संकटाचा
मुकाबला करायला ते तयार आहेत.
9राजा शलमोनाने स्वत:साठी प्रवासी खुर्ची तयार केली.
लाकूड लबानोनहून आणले.
10चांदीचे खांब केले. पाठ सोन्याची केली. बैठक
जाभळ्या रंगाच्या कापडाने मंढवली. त्यावर यरुशलेमच्या
स्त्रियांनी प्रेमाने कलाकुसर केली.
11सियोनेच्या स्त्रियांनो, बाहेर या, आणि राजा शलमोनाला
पाहा. ज्या दिवशी त्याचे लग्न झाले, ज्या दिवशी तो खूप

---

**माझी तयारी होईयर्पंत** किंवा "जोपर्यंत इच्छा आहे."

**आमच्यां ... झरोक्यातून** किंवा "खिडकीवरचा जाळीचा लाकडी पडदा."

**प्रियकरा पर्वताच्या कड्यावर** किंवा "बेथरचा पर्वत" किंवा "मसाल्याचा पर्वत."

आनंदी होता, त्या दिवशी त्याच्या आईने त्याच्या मस्तकावर ठेवलेला मुकुट पाहा.

### तो तिच्याशी बोलतो

4 प्रिये, तू किती सुंदर आहेस! सखे, तू खूप सुंदर आहेस. तुझ्या बुरख्याआड तुझे डोळे कपोतासारखे दिसतात. तुझे केस लांब आणि गिलाद पर्वताच्या उतारावरून धावत जाणाऱ्या मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे हेलकावणारे आहेत.

[2]तुझे दात नुकतीच आंघोळ करून आलेल्या बकऱ्या सारखे आहेत. त्या सर्व जुळ्यांना जन्म देतात आणि त्यांच्या पैकी कुणीही आपले बाळ गमावलेले नाही.

[3]तुझे ओठ लाल रंगाच्या रेशमाच्या धाग्याप्रमाणे आहेत. तुझे मुख सुंदर आहे. घुंगटाखाली तुझ्या कपाळाच्या दोन बाजू डाळिंबाच्या दोन फोडींप्रमाणे आहेत.

[4]तुझी मान दाविदाच्या मनोऱ्याप्रमाणे बारीक आणि लांब आहे. त्या मनोऱ्यांच्या भिंती बलशाली सैनिकांच्या एक हजार ढालींनी शोभिवंत केल्या होत्या.*

[5]तुझी वक्षस्थळे कमलपुष्पांत चरत असलेल्या जुळ्या हरिणश्रावकासारखी आहेत, मृगीच्या जुळ्या पाडसासारखी आहेत.

[6]दिवस शेवटच्या घटका मोजत आहेत आणि सावल्या दूर पळत आहेत. तेवढ्या वेळात मी त्या गंधरसाच्या उदाच्या पर्वतावर जाईन.

[7]प्रिये, तू सगळीच फार सुंदर आहेस. तुझ्यात कुठेही काहीही दोष नाही.

[8]लबोनान मधून माझ्या वधू, तू माझ्याबरोबर ये. लबानोनमधून माझ्याबरोबर ये. अमानाच्या शिखरावरून माझ्याबरोबर ये, सनीर व हर्मोन यांच्या शिखरावरून माझ्याबरोबर ये. सिंहाच्या गुहेतून, चित्यांच्या पर्वतावरून माझ्याबरोबर ये.

[9]माझ्या प्रिये, माझ्या वधू, तू मला उद्दीपित बनवतेस. फक्त तुझ्या एका डोळ्याने, तुझ्या गळ्यातल्या हारातील एका रत्नाने तू माझे हृदय चोरले आहेस.

[10]माझ्या प्रिये, माझ्या वधू तुझे, प्रेम फार सुंदर आहे. तुझे प्रेम द्राक्षारसापेक्षा चांगले आहे. तुझ्या अत्तराचा वास इतर सुगंधी द्रव्यापेक्षा चांगला आहे.

[11]माझ्या वधू, तुझ्या ओठातून मध गळतो. तुझ्या जिभेखाली मध आणि दूध आहे. तुझ्या कपड्यांना अत्तरासारखा गोड सुवास आहे.

[12]माझ्या प्रिये, माझ्या वधू, तू कुलुपबंद केलेल्या बागेसारखी शुध्द आहेस. तू बंदिस्त तळ्यासारखी, कारंज्यासारखी आहेस.

[13]तुझे अवयव डाळिंबाने आणि इतर फळांनी सर्व प्रकारच्या सुगंधी पदार्थांनी, मेंदी, [14]जटामासी, केशर, वेखंड व दालचिनी इत्यादींनी भरलेल्या बागेसारखे आहेत. तुझे अवयव उदाची झाडे, गंधरस व अगरू व इतर सुगंधी झाडांनी भरलेल्या बागेसारखे आहेत.

[15]तू बागेतल्या कारंज्यासारखी, ताज्या पाण्याच्या विहिरीसारखी, लबानोनच्या पर्वतावरून वाहात जाणाऱ्या पाण्यासारखी आहेस.

### ती म्हणते

[16]उत्तरेकडच्या वाऱ्या, ऊठ! दक्षिणवाऱ्या ये, माझ्या बागेवरून वाहा. तिचा गोड सुगंध सर्वत्र पसरव. माझ्या सख्याला त्याच्या बागेत प्रवेश करू दे आणि तिथली गोड फळे चाखू दे.

### तो म्हणतो

5 माझ्या प्रिये, माझ्या वधू, मी माझ्या बागेत गेलो. मी माझा गंधरस व माझी सुगंधी द्रव्ये घेतली. मी माझा मध व मधाचे पोळे खाल्ले. मी माझा द्राक्षारस व दूध प्यालो.

### स्त्री प्रेमिकांशी बोलते

प्रिय मित्रांनो, खा, प्या. प्रेमाने धुंद व्हा.

### ती म्हणते

[2]मी झोपलेली आहे. पण माझे हृदय जागे आहे. माझा प्रियकर दार वाजवतो ते मी ऐकते. "प्रिये माझ्यासाठी दार उघड.माझ्या प्रेमा, माझ्या कबुतरा, माझ्या सर्वोत्कृष्टा! माझे डोके दवाने ओले झाले आहे. माझे केस रात्रीच्या धुक्याने ओले झाले आहेत."

[3]"मी माझा पोषाख काढून टाकला आहे. मला तो पुन्हा घालायचा नाही. मी माझे पाय धुतले आहेत. मला ते पुन्हा घाण करायचे नाहीत."

[4]पण माझ्या प्रियकराने फटीतून हात घातला* आणि माझे हृदय त्याच्यासाठी हेलावले.*

---

**तुझे ... होत्या** केलेले किंवा "तुझी मान दगडाच्या ओळींनी बांधलेल्या दाविदाया मनोऱ्यासारखी आहे." याचा अर्थ तिने गळ्यात एकावर एक अनेक माळा घातल्या होत्या. त्या दगडांच्या ओळीसारख्या दिसत होत्या.

**पण ... हात घातला** किंवा "त्याचा हात ओढला एका अर्थाने याचा संबंध कुलुप आणि किल्लीशी असू शकेल." काही जुन्या किल्ल्या हातासारख्या असत. किल्ली दारातून एका छिद्रात आत सरकवत आणि "बोटे" खास छिद्रात नीट बसत. यामुळे खिटी सरकत असे व कुलुप उघडत असे वा बंद होत असे.

**माझे ... हेलावले** शब्दश: "त्याच्यासाठी माझी आंतडी तुटली."

5माझ्या प्रियकराला दार उघडायला मी उठले. माझ्या हातातून गंधरस गळत होता. इतर सुवासिक द्रव्ये माझ्या बोटांतून कुलुपाच्या कडीवर गळत होती.

6मी माझ्या प्रियकरासाठी दार उघडले. पण माझा प्रियकर तोंड फिरवून निघून गेला होता. तो गेला तेव्हा मी जवळ जवळ गतप्राण झाले.* मी त्याला शोधले पण तो मला सापडू शकला नाही. मी त्याला हाक मारली पण त्याने मला ओ दिली नाही.

7शहरावर पहारा करणाऱ्या पहारेकऱ्यांना मी दिसले. त्यांनी मला मारले, इजा केली. भिंतीवरच्या पहारेकऱ्यांनी माझा अंगरखा घेतला.

8यरुशलेमच्या स्त्रियांनो! मी तुम्हाला सांगते, जर तुम्हाला माझा प्रियकर दिसला, तर त्याला सांगा की मी प्रेमविव्हळ झाले आहे.*

## यरुशलेमच्या स्त्रिया तिला उत्तर देतात

9सुंदर स्त्रिये! तुझा प्रियकर इतर प्रियकरांहून वेगळा कसा? तो इतर प्रियकरांपेक्षा चांगला आहे का? म्हणूनच तू आम्हाला वचन द्यायला सांगत आहेस का?

## ती यरुशलेमच्या स्त्रियांना उत्तर देते

10माझा प्रियकर उन्हाने काळवंडला आहे व तेजस्वी दिसतो. तो दहा हजार माणसात उठून दिसेल.

11त्याचे मस्तक शुध्द सोन्याप्रमाणे आहे. त्याचे केस कुरळे आहेत आणि डोंबकावळ्यासारखे काळे आहेत.

12त्याचे डोळे झऱ्याजवळच्या कबुतरासारखे आहेत, दुधाच्या थारोळ्यातील कबुतरासारखे आहेत कोंदणातल्या हिऱ्यासारखे आहेत.

13त्याचे गाल मसाल्याच्या पदार्थांच्या बागेप्रमाणे आहेत, अत्तरासाठी वापरण्यात येणाऱ्या फुलांसारखे आहेत. त्याचे ओठ सुगंध गळणाऱ्या कमलपुष्पाप्रमाणे आहेत.

14त्याचे बाहू रत्नांनी जडवलेल्या सोन्याच्या कांबीप्रमाणे आहेत. त्याचे शरीर नीलमणी जडवलेल्या मऊ हस्तिदंतासारखे आहे.

15त्याचे पाय सोन्याचा पाया असलेल्या संगमरवरी खांबासारखे आहेत. तो लबानोनमधल्या गंधसरुच्या झाडासारखा उंच उभा राहतो.

16होय, यरुशलेमच्या स्त्रियांनो, माझा प्रियकर खूप हवाहवासा वाटणारा आहे. त्याचे तोंड सर्वांत गोड आहे. तोच माझा प्रियकर, तोच माझा सखा आहे.

## यरुशलेमच्या स्त्रिया तिच्याशी बोलतात

6 सुंदर स्त्रिये! तुझा प्रियकर कुठे गेला आहे? आम्हाला सांग म्हणजे आम्ही त्याला शोधण्यात तुला मदत करू शकू.

## ती यरुशलेमच्या स्त्रियांना उत्तर देते

2माझा प्रियकर त्याच्या बागेत गेला. मसाल्याच्या फुलांच्या ताटव्यात गेला. तो बागेत खाऊ घालायला आणि कमलपुष्पे गोळा करायला गेला.

3मी माझ्या प्रियकराची आहे. तो माझा आहे. कमलपुष्पात खाऊ घालणारा तोच माझा प्रियकर आहे.

## तो तिच्याशी बोलतो

4प्रिये तू तिरझा नगरीप्रमाणे सुंदर आहेस. यरुशलेमसारखी आल्हाददायक आहेस आणि तटबंदी असलेल्या शहरासारखी भयंकर आहेस.

5माझ्याकडे बघू नकोस! तुझे डोळे मला उद्दीपित करतात. लहान बकऱ्या गिलाद पर्वताच्या उतारावरून नाचत खाली जातात तसे तुझे केस लांब आणि मोकळे आहेत.

6तुझे दात नुकत्याच आंघोळ करून आलेल्या बकरीसारखे पांढरे शुभ्र आहेत. त्या सगळ्या जुळ्यांना जन्म देतात आणि त्यांच्यापैकी एकीचेही बछडे दगावलेले नाही.

7बुरख्याखाली असलेली तुझी कानशिले डाळींबाच्या फोडींसारखी आहेत.

8तिथे कदचित 60 राण्या आणि 80 दासी* असतील आणि तरुण स्त्रिया अगणित असतील.

9पण माझ्यासाठी मात्र फक्त एकच स्त्री आहे. माझे कबुतर, माझी सर्वोत्कृष्ट स्त्री. ती तिच्या आईची लाडकी आहे. आईचे सगळ्यात आवडते अपत्य आहे. तरुण स्त्रिया तिला पाहतात आणि तिची स्तुती करतात. राण्या आणि दासीसुध्दा तिची स्तुती करतात.

## स्त्रिया तिची स्तुती करतात

10ती तरुण स्त्री कोण आहे? ती पहाटेप्रमाणे चमकते आहे, ती चंद्रासारखी सुंदर आहे. सूर्यासारखी तेजस्वी आहे आणि आकाशातल्या सैन्याप्रमाणे भयंकर आहे.

## ती म्हणते

11मी आक्रोडाच्या राईतून दरीतली फळे बघायला गेले. द्राक्षाच्या वेली फुलल्या आहेत का, डाळींबाना कळ्या आल्या आहेत का, ते बघायला गेले.

---

**तो ... झाले** किंवा “तो बोलला तेव्हा माझा आत्मा बुडाला.”

**मी ... आहे** शब्दश: “मला प्रेमज्वर झाला आहे.”

**दासी** किंवा “रखेली.” गुलाम स्त्रिया त्या पुरुषाजवळ त्याच्या बायकोसारख्या रहात.

[12]मला काही कळायच्या आतच माझ्या आत्म्याने मला राजाच्या लोक* रथात ठेवले.

### यरुशलेमच्या स्त्रिया तिला बोलावतात

[13]शुलामिथ, परत ये, परत ये. म्हणजे आम्ही तुला बघू शकू, ती महानेम नाच करीत असताना टक लावून का तू शुलामिथकडे पहात आहेस?

### तो तिच्या सौंदर्याची स्तुती करतो

7 राजकन्ये, त्या चपलांमधे तुझे पाय सुंदर दिसतात. कलाकाराने केलेल्या दागिन्यासारखा तुझ्या माड्यांचा बांक आहे.

[2]तुझी बेंबी गोल कपासारखी आहे, ती द्राक्षारसाशिवाय कधीही रिकामी नसो. तुझे पोट सभोवती कमलपुष्पे ठेवलेल्या गव्हाच्या राशीसारखे आहे.

[3]तुझी वक्षस्थळे तरुण हरिणीच्या जुव्या पाडसांसारखी आहेत.

[4]तुझी मान हस्तिदंती मनोऱ्यासारखी आहे. तुझे डोळे बाथ रब्बिमच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या हेशबोनच्या तळ्यांसारखे आहेत. तुझे नाक दमास्कसकडे बघणाऱ्या लबानोनच्या मनोऱ्यासारखे आहे.

[5]तुझे मस्तक कार्मेलसारखे आहे आणि तुझ्या मस्तकावरचे तुझे केस रेशमासारखे आहेत. तुझे लांब मोकळे केस राजालासुध्दा बांधून ठेवतात.

[6]तू किती सुंदर आहेस! किती आल्हाददायक आहेस! सुंदर, आनंद देणारी तरुण स्त्री!

[7]तू उंच आहेस, नारळाच्या झाडासारखी उंच आहेस.आणि तुझे वक्ष त्या झाडावर लागलेल्या फळांच्या घोसासारखे आहेत.

[8]मला त्या झाडावर चढून त्याच्या फांद्यांना धरायला आवडेल.

तुझी वक्षस्थळे द्राक्षाच्या घोसासारखी आणि तुझ्या श्वासाचा सुगंध सफरचंदासारखा असू दे.

[9]तुझे तोंड सर्वात उंची द्राक्षारसाप्रमाणे सरळ माझ्या प्रेमाकडे वाहणाऱ्या, झोपलेल्याच्या ओठांत जाणाऱ्या द्राक्षारसाप्रमाणे असू दे.

### ती त्याच्याशी बोलते

[10]मी माझ्या प्रियकराची आहे आणि मी त्याला हवी आहे.

[11]प्रियकरा, ये आपण शेतावर जाऊ. आपण खेड्यात रात्र घालवू.

[12]आपण सकाळी लवकर उठून द्राक्षाच्या मळ्यात जाऊ. द्राक्षाच्या वेली फुलल्या आहेत की नाहीत ते पाहू. आणि जर डाळींब बहरत असतील तर प्रियकरा, तेथे मी तुला माझे प्रेम अर्पण करीन.

[13]पुत्रदात्रीचा वास घे आणि आपल्या दाराजवळ असलेल्या इतर सुंदर फुलांचाही वास घे. होय, प्रियकरा, मी तुझ्यासाठी अनेक चांगल्या आनंददायी नव्या आणि जुन्या, गोष्टी राखून ठेवल्या आहेत.

8 माझ्या आईचे दुध पिणाऱ्या माझ्या लहानग्या भावासारखा तू असावास असे मला वाटते. तू जर मला बाहेर दिसलास तर मी तुझे चुंबन घेईन आणि त्यात काही गैर आहे असे कुणीही म्हणणार नाही. [2]मी तुला माझ्या आईच्या घरात घेऊन जाईन. जिने मला शिकवले तिच्या खोलीत मी तुला नेईन. मी तुला माझ्या डाळींबांपासून बनवलेले मसाल्यांनी युक्त असे मद्य देईन.

### ती स्त्रियांशी बोलते

[3]त्याचा डावा बाहू माझ्या डोक्याखाली आहे आणि त्याचा उजवा बाहू मला धरत आहे.

[4]यरुशलेमच्या स्त्रियांनो, मला वचन द्या. माझी तयारी होईपर्यंत प्रेमाला जागवू नका, चेतवू नका.

### यरुशेलमच्या स्त्रिया म्हणतात

[5]वाळवंटातून, प्रियकराच्या अंगावर रेलत येणारी ही स्त्री कोण आहे?

### ती त्याच्याशी बोलते

मी तुला सफरचंदाच्या झाडाखाली उठवले, जिथे तुझ्या आईने तुला प्रसवले, जिथे तुझा जन्म झाला तेथे.

[6]तू तुझ्या हृदयावर जी मोहोर धारण करतोस, किंवा तुझ्या बोटात तुझा शिक्का असलेली अंगठी घालतोस त्याप्रमाणे तू मला तुझ्या अगदी जवळ ठेव. प्रेम मृत्यूसारखेच शक्तिशाली आहे. वासना थडग्यासारखी शक्तिमान आहे. त्याच्या ठिणग्या ज्वाला बनतात आणि त्याची खूप मोठी आग होते.

[7]प्रेमाला पूर नष्ट करू शकत नाही, नद्या प्रेमाला बुडवू शकत नाहीत. जर एखाद्याने आपल्या जवळचे सर्वकाही प्रेमासाठी उधळून दिले तर त्याला बोल लावला जाईल. त्याचा तिरस्कार होईल.

### तिचे भाऊ बोलतात

[8]आम्हाला एक लहान बहीण आहे आणि तिच्या वक्षस्थळांची अजून पूर्ण वाढ झालेली नाही. जर एखादा माणूस मला तिच्याशी लग्न करायचे आहे असे सांगत आला तर आम्ही काय करायचे?

---

**राजाचे लोक** किंवा “आम्मिनादिब” किंवा “माझे राजे लोक.”

[9]ती जर भिंत असती तर आम्ही तिच्याभोवती चांदीची महिरप उभारली असती. ती जर दार असती तर तिच्या भोवती आम्ही देवदारूची फळी ठेवली असती.

### ती तिच्या भावांना उत्तर देते

[10]मी भिंत आहे आणि माझी वक्षस्थळे माझे मनोरे आहेत. आणि तो माझ्या बाबतीत पूर्ण समाधानी आहे.*

### तो म्हणतो

[11]शलमोनचा बाल हामोनला एक द्राक्षाचा मळा होता. त्याने माणसांना मळ्याचे प्रमुख नेमले आणि प्रत्येकाने 1000 शेकेल चांदीच्या मूल्याइतकी द्राक्षे आणली.

[12]शलमोना, तू तुझे 1000 शेकेल* ठेवून प्रत्येकाला त्याने आणलेल्या द्राक्षाच्या मोबदल्यात 200 शेकेल दे. पण मी माझा स्वत:चा द्राक्षाचा मळा मात्र ठेवणार आहे.

### तो तिच्याशी बोलतो

[13]तू इथे या बागेत बस. मित्र-मैत्रिणी तुझा आवाज ऐकत आहेत. मलाही तो ऐकू दे!

### ती त्याच्याशी बोलते.

[14]माझ्या प्रियकरा, तू लवकर चल. मसाल्याच्या पर्वतावरील हरिणासारखा वा तरुण हरिणासारखा हो.

---

**तो ... आहे** शब्दश: "त्याच्या डोळ्यात मला शांती मिळते" हिब्रूत हे "शलमोन" आणि "शुलमित या नावासारखे आहे."

**1000 शेकेल** जवळ जवळ 25 पौंड.

# यशया

1 आमोजचा मुलगा यशया ह्याला पुढीलप्रमाणे देवाचा दृष्टान्त झाला आणि यहूदा व यरुशलेम येथे पुढे घडणाऱ्या गोष्टी देवाने यशयाला दाखविल्या उज्जीया, योथाम, आहाज आणि हिज्कीया या यहूदी राजांच्या काळात घडून येणाऱ्या गोष्टी यशयाने पाहिल्या.

### देवाची स्वत:च्याच लोकांविरुध्द तक्रार

2हे स्वर्गा आणि हे पृथ्वी, परमेश्वर काय म्हणतो ते ऐका. परमेश्वर म्हणतो,

“मी माझ्या मुलांचे पालनपोषण केले त्यांना लहानाचे मोठे केले. पण तीच मुले माझ्यावर उलटली.
3गाय आपल्या मालकाला ओळखते. गाढवालासुध्दा, आपला मालक आपल्याला कोठे खायला देणार ते, कळते. पण इस्राएल लोक मला जाणत नाहीत. माझ्या लोकांना काही समजत नाही.”

4इस्राएल हे राष्ट्र पापांनी भरले आहे. अन्याय, दुष्कृत्ये ह्यांचा बोजा त्यांच्यावर पडला आहे. पापी कुटुंबातील दुर्वर्तनी मुलांप्रमाणे इस्राएल लोक वागत आहेत. त्यांनी परमेश्वराचा त्याग केला आहे. इस्राएलच्या पवित्र देवाचा त्यांनी अपमान केला आहे. त्यांनी त्याचा त्याग केला व त्याला एखाद्या परक्या माणसाप्रमाणे वागवले.
5देव म्हणतो, “मला तुम्हाला सतत शिक्षा का करावी लागावी? मी तुम्हाला शिक्षा केली तरी तुम्ही सुधारत नाही. तुम्ही माझ्याविरुध्द बंड करीतच राहता. सध्या प्रत्येकाचे डोके व हृदय कमकुवत झाले आहे. 6तुमच्या पायापासून डोक्यापर्यंत शरीराच्या प्रत्येक अवयवावर जखमा, घाव व वाहते व्रण आहेत. त्या वाहत्या व्रणाची तुम्ही काळजी घेतली नाही. तुमच्या जखमा तेल सोडून नरम केल्या नाहीत आणि त्यावर पट्टीही बांधली नाही.
7“तुमच्या देशाचा नाश झाला आहे. तुमची शहरे जाळली गेली आहेत. तुमच्या शत्रूंनी तुमचा देश काबीज केला आहे. सैन्यांनी एखादा देश उद्ध्वस्त करावा तशी तुमची भूमी झाली आहे. 8सीयोनची मुलगी (यरुशलेम) द्राक्षांच्या बागेतील रिकाम्या खोपटाप्रमाणे झाली आहे. तिची अवस्था काकडीच्या शेतातील जुन्या घराप्रमाणे झाली आहे. शत्रूने पराभूत केलेल्या नगराप्रमाणे ती दिसते.” 9सर्व शक्तिमान परमेश्वराने काही लोकांना जिवंत ठेवले नसते तर सदोम अथवा गमोरा ह्या शहरांप्रमाणे आपला संपूर्ण नाश झाला असता.

### देव खऱ्या भक्तीचा भुकेला

10सदोमच्या नेत्यांनो, परमेश्वराचा संदेश ऐका गमोराच्या लोकांनो, देवाच्या शिकवणुकीकडे लक्ष द्या. 11देव म्हणतो, “तुम्ही माझ्यापुढे सतत यज्ञबलि का करता? मला तुमच्या मेंढ्यांच्या, वासरांच्या चरबीच्या, आणि बैल, कोकरे आणि बकऱ्यांच्या यज्ञबलिंचा आता वीट आला आहे.
12तुम्ही माझ्या दर्शनाला येता तेव्हा माझ्या अंगणातील प्रत्येक गोष्ट तुडविता. असे करायला तुम्हाला कोणी सांगितले?
13“माझ्यासाठी निरर्थक यज्ञबलि देणे थांबवा माझ्यापुढे जळणाऱ्या धुपाचा मला वीट आला आहे. चंद्रदर्शन शब्बाथ व सुटी यांच्या निमित्ताने होणाऱ्या मेजवान्या मला आवडत नाहीत. धार्मिक सभेत तुम्ही करीत असलेली दुष्कृत्ये मला अजिबात पसंत नाहीत. 14तुमच्या मासिक सभा व मेळावे यांची मला मनापासून घृणा वाटते. ह्या सभांचे मला ओझे झाले आहे. मी ह्याला कंटाळलो आहे.
15“प्रार्थना करण्यासाठी उचललेल्या तुमच्या हाताकडे मी लक्ष देणार नाही. तुम्ही कितीही प्रार्थना केली तरी ऐकणार नाही. का? कारण तुमचे हातरक्ते माखले आहेत.
16“शुचिर्भूत व्हा. स्वच्छ व्हा. तुमची दुष्कृत्ये थांबवा. मला वाईट गोष्टी बघायच्या नाहीत. चुकीचे वागू नका. 17चांगल्या गोष्टी करायला शिका. दुसऱ्यांशी न्यायाने वागा. जे दुसऱ्यांना क्लेष देतात त्यांना शासन करा. अनाथ मुलांना मदत करा. विधवांना साहाय्य करा.”
18परमेश्वर म्हणतो, “या, आपण या गोष्टींची चर्चा करू या. तुमची पातके कितीही काळीकुट्ट (शब्दश: शेंदरासारखी लाल) असली तरी ती धुता येतील आणि तुम्ही हिमाप्रमाणे पांढरेशुभ्र व्हाल. जरी तुमची पापे लाल असली तरी तुम्ही शुभ्र लोकरीसारखे व्हाल.
19“तुम्ही माझे म्हणणे ऐकाल तर ह्या देशातील चांगल्या वस्तू तुम्हाला प्राप्त होतील. 20माझे म्हणणे न ऐकणे हे माझ्याविरुध्द जाण्यासारखे होईल आणि शत्रू तुमचा नाश करेल.”
स्वत: परमेश्वराने या गोष्टी सांगितल्या.

### यरुशलेमची देवावर श्रध्दा नाही

21देव म्हणतो, “यरुशलेमेकडे पाहा. ही नगरी माझ्यावर
श्रध्दा ठेवणारी आणि माझ्या मताप्रमाणे वागणारी होती.
आताच तिला असे वारांगनेप्रमाणे वागायला काय झाले?
आता ती माझ्या म्हणण्याप्रमाणे वागत नाही. यरुशलेमला
प्रामाणिक बनवली पाहिजे. यरुशलेममध्ये राहणाऱ्या
लोकांनी देवाच्या इच्छेप्रमाणे राहिले पाहिजे. पण सध्या
तेथे खुनी लोक राहतात.
22“चांगुलपणा हा चांदीसारखा असतो. पण तुझ्या चांदीला
काहीही मोल राहिलेले नाही. तुझ्या द्राक्षरसात
(चांगुलपणात) पाणी मिसळल्याने तो पातळ झाला आहे.
23तुझे सत्ताधीश बंडखोर व चोरांचे साथीदार झाले आहेत.
तुझे सगळे सत्ताधीश लाच मागतात. चुकीच्या गोष्टी
करण्यासाठी ते पैसे घेतात. लोकांना फसविण्यासाठी ते
पगार घेतात. ते अनाथ मुलांना मदत करीत नाहीत आणि
विधवांच्या गरजांकडे लक्ष देत नाहीत.”
24यामुळे प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा
सामर्थ्यवान ईश्वर म्हणतो, “माझ्या शत्रूंनो, मी तुम्हाला
शिक्षा करीन. तुम्ही मला जास्त त्रास देऊ शकणार नाही.
25चांदी स्वच्छ करण्यासाठी लोक एक रसायन वापरतात.
मी तसेच करीन. आणि तुझी दुष्कृत्ये धुवून काढीन. मी
तुझ्यातील सर्व निरर्थक गोष्टी काढून टाकीन.
26सुरुवातीला होते त्याप्रमाणे मी न्यायाधीश नेमीन.
पूर्वीप्रमाणेच मंत्री नेमीन मग तुला सर्वजण ‘चांगली व
निष्ठावंत नगरी म्हणतील.’”
27देव कल्याण करणारा आहे आणि तो योग्य त्याच
गोष्टी करतो. म्हणूनच सीयोनचा व जे त्याला शरण येतील
अशा लोकांचा, देव उध्दार करेल. 28पण सर्व गुन्हेगारांचा
आणि पापी लोकांचा नाश होईल. (हे लोक परमेश्वराचे
ऐकणारे नाहीत.)
29भविष्यात, ज्या ओकच्या झाडांची लोक पूजा करतात
व ज्या खास बागांमध्ये जाऊन मूर्तींची पूजा करतात, त्या
झाडांची व बागांची लोकांना लाज वाटेल. 30असे होण्याचे
कारण तुम्ही त्या पाने गळून जाणाऱ्या ओकच्या झाडांप्रमाणे
किंवा पाणी नसल्याने सुकत चाललेल्या बागांप्रमाणे व्हाल.
31बलाढ्य माणसे लहानशा वाळलेल्या लाकडाच्या
ढलपीप्रमाणे होतील. त्यांची कर्मे आग लावणाऱ्या
ठिणगीसारखी असतील. ती बलाढ्य माणसे व त्यांची कर्मे
ह्यांना एकदमच आग लागेल आणि ती आग कोणीही
विझवू शकणार नाहीत.

2 आमोजचा मुलगा यशया याला यहुदा व यरुशलेम
यांच्या बद्दल दृष्टान्त झाला.
2शेवटच्या दिवसात, परमेश्वराचे मंदिर असलेला डोंगर
सर्व डोंगरांपेक्षा उंच होईल. तो टेकड्यांपेक्षा उंच उचलला
जाईल. सर्व देशांतील लोक तेथे जातील. 3पुष्कळ लोक
तेथे जातील. ते म्हणतील, “आपण परमेश्वराच्या डोंगरावर
जाऊ या. आपण याकोबच्या देवाच्या मंदिरात जाऊ या.
मग देव, त्याचा जगण्याचा मार्ग आपल्याला दाखवील.
आणि आपण त्या मार्गाने जाऊ.”
देवाच्या शिकवणुकीची सुरुवात, परमेश्वराच्या संदेशाचा
आरंभ यरुशलेममधील सीयोनच्या डोंगरात होईल. व तो
सर्व जगात पोहोचेल. 4नंतर सर्व देशांतील लोकांचा न्याय
देवच करील. देव माणसा-माणसांतील वाद मिटवील.
लोक लढण्यासाठी शस्त्र वापरणार नाहीत. लोक आपल्या
तलवारी मोडून त्यांचे फाळ करतील आणि भाल्यांचे
कोयते करतील. लोक एकमेकांविरुध्द लढणार नाहीत.
इत:पर युध्दाचे शिक्षण दिले जाणार नाही.
5याकोबच्या वंशजांनो, या आपण परमेश्वराच्या
प्रकाशातून चालू या. 6तुम्हाला हे सांगायचे कारण तुम्ही
तुमच्या लोकांपासून दूर गेलात तुमचे लोक पूर्वेकडील
चुकीच्या कल्पनांनी भारावून गेले आहेत. पलिष्ट्यांप्रमाणे
ते भविष्य सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी
परकीयांच्या कल्पनांचा स्वीकार केला आहे. 7दुसरीकडून
आणलेल्या सोन्याचांदीने तुमचा देश भरलेला आहे.
तुमच्याकडे खूप खजिने आहेत, असंख्य घोडे व रथ
आहेत. 8तुमचा देश लोक पूजत असलेल्या मूर्तींनी भरून
गेला आहे. लोकच त्या मूर्ती घडवितात आणि त्यांची पूजा
करतात. 9दिवसेंदिवस लोक वाईट होत चालले आहेत. ते
नीच पातळीवर पोहोचले आहेत. देवा, तू नक्कीच त्यांना
क्षमा करणार नाहीस. हो ना?

### देवाच्या शत्रूंच्या मनांत देवाबद्दल भय

10येथून चालते व्हा. कडेकपारीमागे धुळीत लपून बसा.
तुम्ही परमेश्वराची भीती बाळगली पाहिजे आणि त्याच्या
महान सामर्थ्यापासून लपून राहिले पाहिजे.
11गर्विष्ठांचा गर्व गळून पडेल आणि ते शरमिंदे होऊन
माना खाली घालतील. अशा वेळी फक्त परमेश्वरच
ताठ मानेने उभा असेल.
12परमेश्वराने एक दिवस निश्चित केला आहे. त्या
दिवशी परमेश्वर गर्विष्ठ व फुशारक्या मारणाऱ्या लोकांना
शिक्षा करील. मग त्या लोकांचे महत्व कमी होईल.
13जरी हे लोक लबानोनामधील उंच गंधसरुप्रमाणे वा
बाशानमधील मोठ्या एला वृक्षांप्रमाणे असले तरी देव
त्यांना शिक्षा करील. 14हे गर्विष्ठ लोक उतुंग पर्वत उंच
टेकड्या व 15उंच मनोरे आणि उंच भक्कम भिंतीप्रमाणे
असले तरी देव त्यांना शिक्षा करील. 16हे गर्विष्ठ लोक
तार्शीशहून* येणाऱ्या प्रचंड मालवाहू जहाजांप्रमाणे (ह्या
जहाजांत महत्वाचा माल भरलेला असतो.) असले तरीसुध्दा
देव त्यांना शिक्षा करील.
17त्या वेळी गर्विष्ठांचा गर्व गळून पडेल. ते माना खाली
घालतील व फक्त परमेश्वरच ताठ मानेने उभा राहील.

---

**तार्शीशची जहाचे** अथवा गलबते बहुधा विशिष्ट प्रकारची
मालवाहू जहाजे

18सर्व मूर्ती (खोटे देव) नाहीशा होतील. 19लोक कडेकपारीच्या मागे व जमिनीच्या भेगांत लपून बसतील. लोकांना परमेश्वर व त्याचे सामर्थ्य ह्यांचे भय वाटेल. जेव्हा परमेश्वर भूकंप घडवून आणील तेव्हा हे असे घडेल.

20त्या वेळी लोक आपल्याजवळील सोन्याचांदीच्या मूर्ती फेकून देतील. (लोकांनी ह्या मूर्ती पूजेसाठी घडविल्या होत्या.) वटवागुळे व चिचुंद्र्या राहतात अशा बिळांत लोक त्या मूर्ती टाकून देतील. 21मग परमेश्वराला व त्याच्या सामर्थ्याला भिऊन सर्व कडेकपारीत लपतील. हे सर्व परमेश्वराने घडवून आणलेल्या भूकंपाच्या वेळी घडून येईल.

## इस्राएलने देवावर श्रध्दा ठेवावी

22जर तुम्हाला स्वत:चे रक्षण करायचे असेल तर तुम्ही दुसऱ्या लोकांवर विश्वास ठेवू नका. शेवटी ती माणसेच आहेत म्हणजेच मर्त्य आहेत. म्हणूनच त्यांना देवाप्रमाणे सामर्थ्यवान समजू नका.

3 माझे म्हणणे समजून घ्या. यहुदा व यरुशलेम ज्यावर अवलंबून आहेत अशा सर्व गोष्टी तो प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर काढून घेईल. देव त्यांची भाकरी व पाणी बंद करील. 2तो (देव) वीरांचा व मोठ्या योध्द्यांना दूर करील. न्यायासनावर बसणारे, भोंदू संदेष्टे, मांत्रिक व तथाकथित वडीलधारी मंडळी इत्यादींना दुसरीकडे नेऊन ठेवील. 3देव सैनिक शासक व शासनकर्ते यांना दूर करील. निपुण सल्लागार व जादूटोणा करून भविष्यकथन करण्याचा प्रयत्न करणारे चाणाक्ष लोक यांनाही दूर ठेवील.

4देव म्हणतो, "तरुण मुले नेतेपदी बसतील अशी परिस्थिती मी निर्माण करीन. 5प्रत्येकजण दुसऱ्याविरुध्द उभा राहील, लहान थोरांचा मान राखणार नाहीत व सामान्य प्रतिष्ठितांचा आदर करणार नाहीत."

6त्या वेळी एखादा उठेल व आपल्या घरातील एकद्या भावाला पकडेल व त्याला म्हणेल "तुझ्याजवळ अंगरखा आहे, तर मग ह्या विध्वंस झालेल्या अवशेषांवर तूच नेता होशील."

7पण तो भाऊ उभाराहील व म्हणेल, "माझ्याच घरात पुरेसे अन्न, वस्त्र नाही. मी तुम्हाला काय मदत करु शकत नाही? तुम्ही मला तुमचा नेता करू नका."

8हे घडेल कारण यरुशलेम अडखळले आहे व त्याने चूक केली आहे. यहुदाने देवाला अनुसरायचे थांबवले आणि त्याचे पतन झाले. यरुशलेम व यहुदा यांची वाणी आणि कृती परमेश्वराच्या विरुध्द आहे. परमेश्वराच्या तेजस्वी डोळ्यांना हे सर्व स्पष्टपणे दिसत आहे.

9चुकीची कृत्ये केल्याची अपराधी भावना लोकांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. आपल्या पापांबद्दल त्यांना गर्व वाटत आहे. ते सदोम शहरातील रहिवाशांसारखे झाले आहेत. आपली पापे कोण पाहत आहे ह्याची त्यांना पर्वा नाही. हे त्यांच्या दृष्टीने फारच वाईट आहे. त्यांनी स्वत:ला आपत्तीत लोटले आहे.

10सज्जनांना सांगा की त्यांचा उत्कर्ष होईल. सत्कृत्यांचे फळ त्यांना मिळेल. 11पण दुर्जनांची काही धडगत नाही. त्यांना खूप त्रास होईल. त्यांच्या दुष्कृत्यांची त्यांना सजा मिळेल. 12लहान बालके मोठ्यांचा पराभव करतील. अबलांचे राज्य येईल. माझ्या लोकांनो, तुमच्या मार्गदर्शकांनी तुम्हाला योग्य मार्गापासून परावृत्त केले व चुकीच्या मार्गाने नेले.

## देवाचा स्वत:च्या लोकांबद्दल निर्णय

13परमेश्वर स्वत:च लोकांचा न्यायनिवाडा करील. 14वडीलधारी मंडळी व नेते यांनी केलेल्या कृत्यांविरुध्द परमेश्वर न्याय देईल.

परमेश्वर म्हणतो, "तुम्ही लोकांनी द्राक्षांची बाग(यहुदा) जाळली आहे. तुम्ही गरिबांच्या वस्तू बळकावल्या व स्वत:च्या घरात भरल्या. 15माझ्या लोकांना दुखवायचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? गरिबांना धुळीत मिळवायचा तुम्हाला काय हक्क आहे?" माझा प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणाला.

16परमेश्वर म्हणतो, "सीयोनमधल्या स्त्रिया फार गर्विष्ठ झाल्या आहेत. आपण इतर लोकांपेक्षा. उच्च आहोत हे दाखवीत त्या ताठ मानेने वावरत असतात. त्या डोळे मारीत, आपल्या पैंजणांचा आवाज करीत ठुमकत चालतात."

17माझा प्रभु सीयोनच्या स्त्रियांच्या डोक्यांत व्रण करील. त्यांचे सर्व केस गळून पडतील. 18–23त्या वेळी परमेश्वर ह्या स्त्रियांना ज्यांचा अभिमान वाटतो अशा सर्व गोष्टी म्हणजे पैजण, चंद्रसूर्याप्रमाणे असलेले हार, कर्णभूषणे, तोडे, बुरखे, गळपट्टे, पायातल्या साखळ्या, कमरपट्टे, अत्तरांच्या बाटल्या, ताईत, विशेष प्रकारच्या अंगठ्या, नथी, उंची रेशमी वस्त्रे, शेले व शाली, बटवे, आरसे, सुती वस्त्रे, फेटे, लांब शाली काढून घेईल.

24आता या स्त्रियांजवळ मधुर सुवासाची अत्तरे आहेत पण देव त्यांना शिक्षा करील त्या वेळी त्या अत्तरांना बुरशी येऊन कुजट घाण येईल. आता या स्त्रिया कमरपट्टे वापरतात पण त्या ऐवजी दोऱ्या वापरण्याची वेळ त्यांच्यावर येईल. आता त्या विविध केशरचना करतात पण नंतर त्यांच्या डोक्यावर केसच नसतील. त्यांचे केशवपन होईल. त्यांच्या मेजवान्यांसाठी असलेल्या विशेष वस्त्रप्रावरणांऐवजी त्यांना जे कपडे घालावे लागतील त्यातून त्यांची वाईट स्थिती दिसून येईल. त्यांच्या चेहेऱ्यावरील सौंदर्यखुणांच्या जागी भाजल्याचे डाग पडतील.

25त्याच वेळी लढाईत तुमची माणसे तलवारीने मारली जातील. वीर लढाईत कामी येतील. 26वेशीजवळ असलेल्या सभा-संमेलनाच्या जागी शोककळा पसरेल. चोर व

लुटारुंनी सर्वस्व लुटलेल्या स्त्रीप्रमाणे यरुशलेम नगरी
एकटीच बसून शोक करेल.

4 त्यावेळी सात स्त्रिया एका माणसाला पकडून
म्हणतील, “आम्ही आमचे अन्न व वस्त्र स्वत:
मिळवू. फक्त तू आमच्याशी लग्न कर. तुझे नाव आम्हाला
लावू दे. कृपया आमच्या अब्रूचे रक्षण कर.”
2ह्याच वेळी परमेश्वराचे रोपटे (यहुदा) खूप सुंदर व
महान होईल. त्या वेळी इस्राएलमध्ये राहणाऱ्यांना भूमीतून
पिकणाऱ्या सर्व गोष्टींचा अभिमान वाटेल. 3त्यावेळी सीयोन
व यरुशलेम येथे जे लोक राहत असतील त्यांना पवित्र
मानले जाईल. देवाची कृपा झाल्याने त्यांची नावे खास
यादीत समाविष्ट केली गेली आहेत. त्या सर्व लोकांच्या
बाबतीत हे घडेल. त्या सर्व यादीतील लोकांना जिवंत
राहण्याचीसंमत्तीदिली जाईल.
4सीयोनमधील स्त्रियांचे रक्त परमेश्वर धुवून टाकील.
यरुशलेमलाही परमेश्वर निर्मळ करील. देव न्यायीपणाचा
आत्मा वापरुन योग्य न्याय करील आणि प्रत्येक गोष्ट
जळणाऱ्या आत्म्याद्वारे शुध्द करील.
5ह्यावेळी आपण आपल्या लोकांच्या पाठीशी उभे आहोत
हे देव सिध्द करील. दिवसा तो धुराचा ढग तयार करील
व रात्री अग्नीचा झगझगीत प्रकाश निर्माण करील. प्रत्येक
इमारतीवरच्या आकाशात आणि सीयोनच्या डोंगरावरील
मेळाव्याच्या जागेवरदेवाच्याकृपेच्याह्या निशाण्या दिसतील.
संरक्षणासाठी प्रत्येक माणसावर आच्छादन असेल. 6हे
आच्छादन म्हणजे सुरक्षित ठिकाण असेल.तेमाण साचा
उन्हापा सून बचाव करील तसेच सर्व प्रकारच्या पुरांपासून
आणि पावसापासून रक्षण करण्यासाठी लपून बसण्याची
ती सुरक्षित जागा असेल.

## इस्राएल देवाचे नंदनवन

5 मी माझ्या मित्रासाठी (देवासाठी) गाणे गाईन. हे गाणे,
माझ्या मित्राच्या द्राक्षमळ्याच्या (इस्राएलच्या)
प्रेमासंबंधी असेल.

माझ्या मित्राचा द्राक्षमळा अतिशय सुपीक जमिनीत होता.
2माझ्या मित्राने खणून जमीन साफसूफ केली. तिच्यामध्ये
अतिशय उत्तम प्रतीच्या द्राक्षाची लागवड केली. त्याने
मळ्याच्या मध्यभागी एक मनोरा बांधला. द्राक्षाचे उत्तम
पीक येईल अशी त्याला आशा होती पण त्यातून निकृष्ट
प्रतीचीच फळे आली.
3म्हणून देव म्हणाला, “यरुशलेममध्ये राहणाऱ्या
लोकांनो व यहूदात राहणाऱ्या लोकांनो, माझा आणि
माझ्या द्राक्षमळ्याचा जरा विचार करा.
4माझ्या द्राक्षमळ्यासाठी मी आणखी काय करू शकलो
असतो?मला जे करणे शक्य होते ते सर्व मी केले मी
चांगल्या पिकाची आशा केली पण पीक वाईट आले.असे
का झाले?
5आता मी माझ्या द्राक्षमळ्याचे काय करणार आहे ते
तुम्हाला सांगतो.

मळ्याच्या संरक्षणासाठी लावलेले काटेरी कुंपण काढून
मी जाळून टाकीन. त्याच्या आवाराची दगडी भिंत फोडून
दगड पायाने तुडवीन.
6मी माझा द्राक्षमळा उजाड करीन. कोणीही वेलीची
काळजी घेणार नाही. कोणीही त्या मळ्यात काम करणार
नाही. त्यात तण व काटेकुटे माजतील. तेथे पाऊस न
पाडण्याची मी ढगांना आज्ञा करीन.”

7सर्वशक्तिमान परमेश्वराच्या मालकीचा द्राक्षमळा
म्हणजे इस्राएल हा देश होय. ज्या द्राक्षवेली परमेश्वराला
प्रिय आहेत त्या म्हणजे यहुदी लोक होत.

परमेश्वराने न्यायाची आशा केली पण तेथे फक्त हत्याच
घडली. परमेश्वराने प्रामाणिकपणाची आशा धरली पण
तेथे फक्त वाईट रितीने वागविलेल्या लोकांचे आक्रोश
होते.

8अजिबात जागा शिल्लक राहणार नाही अशारीतीने
घराला घर व शेताला शेत जोडणाऱ्यांना तुमचा धिक्कार
असो. परन्तु परमेश्वर तुम्हाला शिक्षा करील. असे हे
तुम्हाला देशात एकाकी राहण्यास भाग पाडेपर्यंत चालू
राहील.* 9सर्वशक्तिमान परमेश्वराने मला हे सांगितले
व मी ऐकले, “आता तेथे खूप घरे आहेत पण मी नक्की
सांगतो की ती सर्व उध्वस्त होतील. मोठी व सुंदर घरे तेथे
आहेत पण ती सर्व रिकामी पडतील. 10तेव्हा दहा एकराच्या
द्राक्षाच्या मळ्यातून अगदी थोडा द्राक्षरस मिळेल आणि
खूप पोती बियाणे वापरले तरी अगदी थोडे पीक येईल.”
11लवकर उठून नशा आणणाऱ्या पेयाच्या शोधास
लागणाऱ्यांनो तुमचा धिक्कार असो. तुम्ही मद्यापानाने धुंद
होऊन रात्री उशिरापर्यंत जागत राहता. 12मद्य, सारंगी,
डफ, बासरी आणि इतर वाद्ये यांच्या संगतीत तुम्ही मेजवान्या
करता आणि परमेश्वराची करणी तुम्हाला दिसत नाही.
परमेश्वराने आपल्या हाताने अनेक गोष्टी घडवल्या आहेत
पण त्या तुमच्या लक्षात येत नाहीत. हे तुमच्या दृष्टीने
अजिबात चांगले नाही.
13परमेश्वर म्हणतो, “माझ्या लोकांना पकडून नेले
जाईल. का? कारण ते समजदार नाहीत. त्यांच्यातील
उच्चपदस्थांची उपासमार होईल. त्यांतील बहुसंख्य तहानेने
तळमळतील. 14पण ती सर्व मोठी माणसे मरतील व
(शिओल)अधोलोकात अधिक भर पडेल. मृत्यु आपला

---

**असे हे … चालू राहील** ह्याचा अर्थ “बहुधा सर्व जमीन श्रीमंतांची होईल असा होतो. योबेल वर्षात (लेवी. 25:8–34) संपत्तीचा जो कायदा सांगितला आहे त्याच्या हे विरुध्द आहे.”

अजस्त्र जबडा पसरेल आणि ते सर्व लोक खाली अधोलोकात जातील."

15लोक हीनदीन होतील. गर्विष्ठ माणसांच्या माना खाली जातील. 16सर्वशक्तिमान परमेश्वर प्रामाणिकपणाने योग्य न्याय करील आणि लोकांना त्याची महानता कळेल. पवित्र देव योग्य त्याच गोष्टी करेल आणि लोक त्याचा आदर करतील. 17देव इस्राएल लोकांना त्यांचा देश सोडून जाण्यास भाग पाडेल. सर्व भूमी ओसाड होईल. शेळ्या-मेंढ्यांना मोकळे कुरण मिळेल. एकेकाळी श्रीमंतांची मालकी असलेल्या जमिनीवर कोकरे चरतील.

18त्या लोकांकडे पाहा लोक दोरांनी गाड्या खेचून नेतात तसे ते आपले गुन्हे व पापे वाहून नेत आहेत. 19ते लोक म्हणतात, "देवाने त्याच्या इच्छेप्रमाणे जे करायचे ते लवकरात लवकर करावे, म्हणजे आम्हाला काय घडणार आहेतेतरी कळेल. परमेश्वराचीइच्छा लवकर पूर्ण व्हावी म्हणजे आम्हांला त्याची योजना कळेल."

20ते लोक चांगल्या गोष्टी वाईट आहेत व वाईट गोष्टी चांगल्या आहेत असे म्हणतात. ते प्रकाशाला अंधार व अंधाराला प्रकाश समजतात. त्यांना आंबट गोड लागते व गोड आंबट लागते. 21ते स्वत:ला फार चलाख समजतात. त्यांना वाटते आपण फार बुध्दिमान आहोत. 22मद्य पिण्यात त्यांची प्रसिध्दी आहे आणि मद्याचे मिश्रण करण्यात ते तरबेज आहेत. 23जर त्यांना पैसे चारले तर गुन्हेगारालाही ते माफ करतील पण ते सज्जनांना प्रामाणिकपणे न्याय मिळू देणार नाहीत. 24अशा लोकांचे वाईट होईल. ज्याप्रमाणे आगीमध्ये पाने आणि गवत जळून भस्मसात होते त्याप्रमाणे त्यांच्या वंशजांचा पूर्णपणे नाश होईल. अंकुर मरून धुळीला मिळावा अथवा आगीत फूल जळून त्याची राख वाऱ्यावर कोठल्या कोठे उडून जावी तसाच त्यांच्या वंशजांचा समूळ नाश होईल.

त्या लोकांनी, सर्वशक्तिमान परमेश्वराची आज्ञा मानण्यास, नकार दिला. इस्राएलच्या पवित्र देवाच्या संदेशाचा त्यांनी तिरस्कार केला. 25म्हणून परमेश्वर त्यांच्यावर रागावला आहे. तो आपला हात त्यांच्यावर उगारेल आणि त्यांना शिक्षा करील. मग डोंगरसुध्दा भीतीने कापतील. मृतदेह कचऱ्याप्रमाणे रस्त्यावर पडतील. पण तरीही देवाचा राग शांत होणार नाही. त्याचा हात लोकांना शिक्षा करण्याकरीता उगारलेलाच राहील.

## इस्राएलला शिक्षा करण्यासाठी देव सैन्ये आणील

26पाहा! दूरच्या राष्ट्रांना देव खूण करीत आहे, झेंडा उभारून तो त्या राष्ट्रांना आवाहन करीत आहे दूरवरून शत्रू येत आहे. लवकरच तो या देशात प्रवेश करील. तो फार वेगाने येत आहे. 27शत्रू कधीच थकत नाहीत वा खाली पडत नाहीत. ते कधीच पेंगुळत नाहीत अथवा गाढ झोपून राहत नाहीत. ते नेहमीच शस्त्रसज्ज असतात. त्यांच्या पादत्राणांचे बंद कधीच तुटत नाहीत. 28त्यांचे बाण तीक्ष्ण आहेत. त्यांची धनुष्ये सज्ज आहेत. त्यांच्या घोड्यांचे खूर दगडासारखे कठीण आहेत. त्यांच्या रथांच्या मागे धुळीचे लोट उठतात.

29ते गर्जना करतात आणि त्या गर्जना एखाद्या तरुण सिंहाच्या गर्जनेइतक्या मोठ्या असतात. जे लोक त्यांच्याशी लढतात त्यांना ते गुरगुरत पकडतात. लोक झगडतात आणि पळून जाण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांना वाचविणारा तेथे कोणीही नसतो. 30मग ते "सिंह" समुद्रगर्जना करतात. बंदिवासातील लोकांची नजर खाली वळते. त्यांच्या डोळ्यांपुढे अंधकार पसरतो. अंधकाराशिवाय तेथे काहीच असत नाही. सर्व प्रकाश या अंधकारातच लुप्त होतो.

## देव यशयाला संदेष्टा होण्यास बोलावतो

6 उज्जीया राजाच्या मृत्यूच्या वर्षीच मी माझ्या प्रभूला पाहिले. तो एका उच्च व विलक्षण सुंदर सिंहासनावर बसला होता. त्याच्या पायघोळ पोशाखाने सर्व मंदिर भरून गेले होते. 2देवदूत परमेश्वराभोवती उभे होते. प्रत्येक देवदूताला सहा पंख होते. त्यातील दोन पंखांनी ते चेहरा झाकीत. दोनने पाय झाकीत व उरलेल्या दोन पंखांनी उडत. 3ते देवदूत एकमेकांशी बोलत होते. ते म्हणत होते, "पवित्र, पवित्र, पवित्र सर्वशक्तिमान परमेश्वर परमपवित्र आहे. त्याची प्रभा सगळ्या पृथ्वीला व्यापून राहिली आहे." देवदूतांचे आवाज फार मोठे होते. 4त्यांच्या आवाजाने मंदिराच्या दाराची चौकट हादरली नंतर मंदिर धुराने भरून गेले.

5मी फारच घाबरलो. मी म्हणालो, "हाय रे देवा! आता माझा नाश होणार देवाशी संवाद करण्याइतका मी पवित्र किंवा शुध्द नाही आणि मी ज्या माणसांत राहतो, तीही देवाशी प्रत्यक्ष बोलण्याइतकी शुध्द नाहीत.* तरीसुध्दा राजाधिराज, सर्वशक्तिमान परमेश्वराला मी पाहिले आहे."

6तेथे वेदीवर अग्नी प्रज्वलित केलेला होता एका सराफ देवदूताने चिमट्याने त्यातील निखारा उचलला. सराफा देवदूत तो निखारा घेऊन माझ्याकडे उडत आला. 7त्या निखाऱ्याचा स्पर्श त्याने माझ्या तोंडाला केला नंतर तो देवदूत म्हणाला, "हे बघ! ह्या निखाऱ्याच्या स्पर्शाने तुझी सर्व दुष्कृत्ये नाहिशी झाली आहेत. तुझी पापे आता पुसली गेली आहेत." 8नंतर मला माझ्या परमेश्वराचा आवाज ऐकू आला. परमेश्वर म्हणाला, "मी कोणाला पाठवू! आमच्यासाठी कोण जाईल?"

मग मी म्हणालो, "हा मी तयार आहे, मला पाठव."

9नंतर परमेश्वर म्हणाला, "जा आणि ह्या लोकांना सांग: 'काळजीपूर्वक ऐका पण समजून घेऊ नका.

---

**मी देवाशी … शुध्द नाहीत** शब्दश: अर्थ मी अशुध्द ओठ असलेला माणूस आहे आणि मी ज्या माणसांत राहतो, त्यांचे ओठही अशुध्द आहेत.

काळजीपूर्वक पाहा पण शिकू नका.’ 10लोकांना गोंधळात टाक, लोक जे ऐकतील आणि पाहतील ते त्यांना समजणार नाही असे कर. तू असे केले नाहीस तर कदाचित् लोक जे कानांनी ऐकतील आणि डोळ्यांनी पाहतील, तेच खरे समजतील. असे जर झाले तर ते मला शरण येतील आणि बरे होतील.”

11नंतर मी विचारले, ‘प्रभू, मी हे असे किती दिवस करू?’ परमेश्वर उत्तरला, “लोक पळून जाऊन शहरे निर्जन होईपर्यंत, आता भरलेली घरे निर्मनुष्य होईपर्यंत, किंबहुना ही सर्व भूमी उजाड व वैराण होईपर्यंत तू असे कर.”

12परमेश्वर लोकांना दूर पळवून लावील ह्या देशात खूप मोठी ओसाड जमीन तयार होईल. 13पण लोकसंख्येचा दहावा हिस्सा ह्या भूमीवर राहतील. त्यांचा नाश होणार होता तरीही ते परमेश्वराकडे परत येतील. हे लोक एलाच्या झाडाप्रमाणे असतील. एलाचे झाड कापले तरी बुडखा शिल्लक राहतोच. हे राहिलेले लोक त्या बुडख्याप्रमाणे असतील. हे लोक खास बीज म्हणजेच देवाची लाडकी लेकरे असतील.

## सिरीयावर संकट

7 यहुदाचा राजा आहाज हा योथामचा पुत्र व योथाम हा उज्जीयाचा पुत्र आहाजच्याकारकिर्दीत रसीन हा सिरीयावर राज्य करीत होता तर रमाल्याचा पुत्र पेकह हा इस्राएलचा राजा होता. एकदा रसीन व पेकह हे दोघे यरुशलेमवर चाल करून गेले. पण त्यांना ते शहर काही जिंकता आले नाही.

2“सिरीया आणि एफ्राइम (इस्राएल) यांच्या सैन्यांची एकजूट झाली आहे आणि त्यांनी एकत्र तळ ठोकला आहे,” असे दाविदच्या वंशजाला कळविण्यात आले.”

जेव्हा राजा आहाज ह्याला हा. संदेश कळला तेव्हा तो व त्याची प्रजा अतिशय घाबरून गेले. रानातील वृक्ष वाऱ्याने ज्याप्रमाणे कापतात तशीच भीतीने त्यांची स्थिती झाली.

3तेव्हा परमेश्वर यशयाला म्हणाला, “धोब्याच्या शेताकडे जाणाऱ्या रस्त्यावर जेथे वरच्या डोहाला पाणी मिळते तेथे तू व तुझा मुलगा शआर-याशूब असे दोघे आहाजला भेटा व त्याच्याशी बोला.

4“आहाजला सांगा, ‘सावध राहा पण शांत राहा भिऊ नकोस. रसीन आणि रमाल्याचा पुत्र ह्यांना घाबरू नकोस. ते दोघे जळलेल्या काड्यांप्रमाणे आहेत. पूर्वी त्यांच्यात आग होती पण आता ते नुसते धुमसताहेत! रसीन, सिरीया आणि रमाल्याचा पुत्र हे खूप चिडले आहेत. 5त्यांनी तुझ्याविरुध्द कट केला आहे. ते म्हणाले, 6आपण चाल करून जाऊ आणि यहुदाविरुध्द लढून यहुदा जिंकू. आपण आपापसात यहुदाची वाटणी करू आणि ताबेलाच्या पुत्राला यहुदाच्या गादीवर बसवू. असा त्यांचा बेत आहे.’”

7“पण त्यांचा बेत सिध्दीस जाणार नाही. असे काही घडणार नाही. असे माझा परमेश्वर प्रभू म्हणाला. 8आता एफ्राइम (इस्राएल) एक राष्ट्र आहे पण 65 वर्षांनी ते राष्ट्र म्हणून राहाणार नाही. तेव्हा, जोपर्यंत रसीन हा दमास्कसचा राजा आहे 9आणि एफ्राईमची (इस्राएलची) राजधानी शोमरोन येथे रमाल्याचा पुत्र राज्य करीत आहे तोपर्यंत, रसीन व रमाल्याचा पुत्र यांनी केलेला बेत सिध्दीस जाणार नाही. तू जर ह्या संदेशावर विश्वास ठेवला नाहीस तर तुझी लोकांनीही तुझ्यावर विश्वास ठेवू नये.”

## इम्मानुएल-देव आमच्या बरोबर आहे

10परमेश्वर आहाजशी बोलतच राहिला 11परमेश्वर म्हणाला, “ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत हे सिध्द करण्यासाठी तू काही निशाणी मागून घे. तू तुला हवी असलेली निशाणी माग. ती निशाणी पाताळातून येवो अगर आकाशातून.”

12पण आहाज म्हणाला, ‘पुरावा म्हणून मी कोठलीही निशाणी मागणार नाही. मी परमेश्वराची परीक्षा पाहणार नाही.’

13तेव्हा यशया म्हणाला, “हे दाविदाच्या वंशजा, लक्षपूर्वक ऐक. तू लोकांच्या सहनशीलतेचा अंत पाहातोस. हे पुरेसे नाही म्हणून आता तू देवाच्या सहनशीलतेचा अंत पाहत आहेस का? 14तेव्हा देव माझा प्रभु तुला स्वत:हून चिन्ह देईल.”

त्या कुमारिकेकडे पाहा* ती गर्भवती आहे. ती मुलाला जन्म देईल. ती त्याचे नाव इम्मानुएल ठेवील.

15इम्मानुएल मध व लोणी खाईल. अशा रीतीने जगत असतानाच ह्यातूनच तो चांगले करावे व वाईट सोडावे हे शिकेल.

16पण तो चांगल्या वाईट गोष्टीतील फरक कळण्याइतका मोठा होण्याआधी एफ्राइम (इस्राएल) व सिरीया हे वैराण बनलेले असतील.

“तुला आता त्या दोन राजांची भीती वाटते.

17पण खरे म्हणजे तू परमेश्वराला भ्यायला पाहिजेस. का? कारण परमेश्वर तुझ्या वाट्याला काही काळ क्लेश देईल. ते क्लेश यहूदातून एफ्राइमच्या निघून जाण्याच्या वेळेप्रमाणे असतील, त्यानंतर असे क्लेश आताच तुमच्या वाट्याला येतील. तुझ्या वडिलांच्या वंशजांना आणि तुझ्या प्रजेला हे क्लेश सोसावे लागतील. देव काय करील बरे? देव अश्शूरच्या राजाला तुझ्याविरुध्द लढण्यास भाग पाडील.

---

**त्या कुमारिकेकडे पाहा** ह्याचा दुसरा अर्थ “त्या कुमारिकेकडे पाहा. ती गर्भवती होऊन तिला पुत्र होईल.” प्राचीन ग्रीक अनुवादावरून, ख्रि. पू. 150 च्या सुमारास केल्या गेलेल्या भाषांतरातून हा अर्थ घेतला गेल्याची शक्यता आहे.

18"त्यावेळी परमेश्वर 'माशा' व 'मध माश्यांना'
बोलावील. 19वाळवटांतील झऱ्याजवळच्या खडकाळ
दऱ्यांत, झाडांझुडपांत व पाणथळ जागांत ते आपला तळ
ठोकतील. 20परमेश्वर अश्शूर देशाचा उपयोग यहुदाला
शिक्षा करण्यासाठी करून घेईल. अश्शूर देशाला भाडोत्री
म्हणून घेऊन त्याचा उपयोग वस्तऱ्याप्रमाणे केला जाईल.
देव जणू काही ह्या वस्तऱ्याचा उपयोग करून यहुदाचे
डोके, पाय भादरेल आणि त्याची हजामतही करील.

21"त्यावेळी प्रत्येक माणूस एक कालवड व दोन मेंढरे
पाळू शकेल. 22त्या माणसाला पुरेल एवढे लोणी त्याला
त्यांच्या दुधापासून मिळेल. देशातील प्रत्येक माणूस त्या
वेळी लोणी व मध खाऊन राहील. 23आता ह्या देशातील
भूमीवर एक हजार द्राक्षवेली असलेले द्राक्षमळे आहेत.
प्रत्येक द्राक्षवेलीची किमंत एक हजार चांदीची नाणी एवढी
आहे. 24पण हे द्राक्षमळे काट्यांकुट्यांनी व तणांनी
भरून नष्ट होतील. ह्या भूमीत जंगल माजेल. व तिचा
उपयोग शिकारीसाठीच होईल. 25एकेकाळी ज्या
टेकड्यांवर लोक शेती करून धान्य पिकवीत होते त्या
टेकड्यांवर काट्याकुट्यांचे रान माजेल. कोणीही माणूस
तिकडे फिरकणार नाही. फक्त मेंढ्या व गुरेढोरे तिकडे
जातील."

## अश्शूर लवकरच येईल

8 परमेश्वर मला म्हणाला, "एक मोठी गुंडाळी घे
आणि टाकाने त्यावर पुढील शब्द लिही,
'महेर-शालाल-हाश-बज.' (याचा अर्थ- 'लवकरच येथे
लूटालूट व चोऱ्या होतील.')"

2साक्षीदार म्हणून विश्वास टाकता येईल अशा काही
लोकांना मी गोळा केले. (ते होते उरिया हा याजक व
यबरेख्याचा मुलगा जखऱ्या) त्यांच्या समोरच मी लिहिले.
3नंतर मी संदेष्ट्रीशी समागम केला. ती गर्भवती होऊन
तिला पुत्र झाला. "परमेश्वराने मला त्याचे नाव
महेर-शालाल-हाश-बज असे ठेवण्यास सांगितले.
4कारण तो मुलगा 'आई-बाबा' असे बोलायला
लागण्यापूर्वीच देव दमास्कसची व शोमरोनची सर्व धनसंपत्ती
काढून अश्शूरच्या राजाला देईल."

5पुन्हा एकदा परमेश्वर माझ्याशी बोलला. 6माझा प्रभु,
म्हणाला, "हे लोक संथ वाहणारे शिलोहाचे पाणी
नाकारतात. ते रसीन व रमाल्याचा पुत्र (पेकह) यांच्या
सहवासात आनंद मानतात. 7पण मी, परमेश्वर, अश्शूरच्या
राजाला त्याच्या सर्व शक्तीनीशी तुमच्यावर आक्रमण
करण्यास भाग पाडीन. युफ्राटिस नदीच्या लोंढ्याप्रमाणे ते
येतील. पुराचे पाणी चढत जाऊन नदीच्या किनाऱ्यावरून
बाहेर ओसंडून वाहते तसेच ते येतील. 8नदीचा काठ
ओलांडून बाहेर पसरलेल्या पाण्याप्रमाणे अश्शूरचे सैन्य
सर्व यहुदाभर पसरेल. ते यहुदाच्या गळ्यापर्यंत चढेल व
जवळजवळ यहुदाला बुडवून टाकील.

"इम्मानुएल, हे पुराचे पाणी सर्व देशाला व्यापेपर्यंत
पसरत राहील."

## परमेश्वर आपल्या भक्तांचे रक्षण करतो

9सर्व राष्ट्रांनो, युध्दाची तयारी करा, तुम्ही पराभूत व्हाल,
दुरवरच्या सर्व देशांनो, ऐका! लढाईची तयारी करा, तुमचा
पराभव होईल.

10लढण्याचे बेत करा, ते सिध्दीस जाणार नाहीत. तुम्ही
तुमच्या सैन्याला हुकूम करा, पण त्याचा काहीही उपयोग
होणार नाही. का? कारण देव आमच्या पाठीशी आहे.

## यशयाला इशारा

11परमेश्वर माझ्याशी त्याच्या महान सामर्थ्यानिशी
बोलला 'मी ह्या लोकांच्या मार्गाने जाऊ नये. असे
परमेश्वराने मला बजावले. परमेश्वर म्हणाला, 12"दुसरे
त्यांच्याविरुध्द कट करीत आहेत, असे ते म्हणत आहेत.
तू त्या गोष्टींवर विश्वास ठेवू नकोस, ज्या गोष्टींना हे
लोक घाबरतात, त्या गोष्टींना घाबरू नकोस. त्या गोष्टींची
मुळीच भीती बाळगू नकोस."

13सर्वशक्तिमान परमेश्वर हाच असा आहे की त्याचे
भय मानावे. त्याचाच फक्त आदर करावा. त्यालाच फक्त
पवित्र मानावे. 14तु जर परमेश्वराचा मान राखलास, तो
पवित्र आहे असे मानलेस, तर तो तुला अभय देईल, पण
जर तू त्याचा अनादर केलास, तर देव रस्त्यावरील
दगडाप्रमाणे होईल आणि तुम्ही लोक त्यावर ठेचकाळून
पडाल इस्राएलंचा दोन घराण्यांना तो दगंड अडखळवतो.
यरुशलेमच्या सर्व लोकांचा परमेश्वरच सापळा आहे.
15(पुष्कळ माणसे ह्याच अडथळ्याला अडखळून पडतील
व त्यांची हाडे मोडतील. ते सापळ्यात अडकतील व पकडले
जातील.)

16यशया म्हणाला, "करार करा व त्यावर शिक्क ामोर्तब
करा माझ्या शिकवणुकीचे भविष्यकाळासाठी जतन करा.
माझ्या शिष्यांसमोर हे करा. 17तो करार असा:

परमेश्वराने आपल्याला मदत करावी म्हणून मी वाट
पाहीन याकोबच्या वंशजांची परमेश्वराला लाज वाटते तो
त्यांच्याकडे पाहण्याचे नाकारतो. पण मी परमेश्वराची
प्रतीक्षा करीन. तो आम्हाला वाचवील.

18"माझी मुले आणि मी इस्राएल लोकांकरिता निशाणी
आणि पुरावे आहोत. सीयोनच्या डोंगरावर राहणाऱ्या
सर्वशक्तिमान परमेश्वराने आम्हाला पाठविले आहे."

19काही लोक "काय करावे ते ज्योतिषी व जादूटोणा
करणारे यांना विचारा" असे म्हणतात. (ते ज्योतिषी व
जादूटोणा करणारे कुजबुजतात व आपल्याला गुपित समजते
असे लोकांना वाटावे म्हणून पक्षांप्रमाणे बोलतात.) पण मी
सांगतो की तुम्ही मदतीसाठी देवाला हाक मारावी. ते

ज्योतिषी आणि जादूटोणा करणारे मृतांची मदत घेतात.
सजीवांनी मृतांची मदत का घ्यावी?
20तुम्ही शिकवणुकीप्रमाणे वागा व कराराचे पालन
करा. तुम्ही ह्या आज्ञांचे पालन केले नाही तर तुम्ही
चुकीच्या आज्ञांचे पालन कराल. (चुकीच्या आज्ञा म्हणजे
ज्योतिषी व जादूटोणा करणारे ह्यांनी दिलेल्या आज्ञा होत.
त्या आज्ञांना काही अर्थ नाही त्या आज्ञांचे पालन करून
तुम्हाला काहीही मिळणार नाही.)
21तुम्ही चुकीच्या आज्ञांचे पालन कराल तर देशावर
संकटे येतील आणि उपासमार होईल. लोकांची उपासमार
झाल्यावर लोक संतापतील व ते राजा आणि त्याचे देव
ह्यांच्याविरुध्द बोलू लागतील. मग मदतीसाठी देवाकडे
पाहतील. 22जर त्यांनी त्यांच्या आजूबाजूला पाहिले तर
त्यांना संकटे आणि निराशेचा अंधकार दिसेल, बळजबरीने
देश सोडून जावे लागणाऱ्या लोकांचे अतीव दुःख त्यांना
दिसेल आणि जे लोक या अंधकारात अडकतील त्यांना
आपली सुटका करून घेता येणार नाही.

## नवा दिवस येत आहे

9 पूर्वी लोकांनी जबुलून व नफताली या प्रांताना महत्व
दिले नाही पण पुढील काळात देव त्या भूमीला श्रेष्ठ
बनवील समुद्राजवळील भूमी, यार्देन नदीच्या पलीकडचा
प्रदेश व यहुदी सोडून दुसरे जे लोक राहतात तो गालील
प्रदेश म्हणजे ही भूमी होय.
2आता तेथील लोक अधोलोका सारख्या अंधकारात
दिवस कंठीत आहेत पण ते तेजस्वी प्रकाश पाहतील.
पाताळासारख्या अंधकारमय प्रदेशात सध्या ते लोक राहत
आहेत पण त्यांना "तेजस्वी प्रकाश" दिसेल.
3देवा, तूच त्या राष्ट्राच्या वाढीचे कारण होशील, तेथल्या
लोकांना तू सुखी करशील ते लोक त्यांचा आनंद
तुझ्याजवळ व्यक्त करतील. सुगीच्या काळातील
आनंदासारखा हा आनंद असेल. जेव्हा लोक लढाईतील
जिंकलेल्या गोष्टींचा वाटा घेतात तेव्हा होणाऱ्या
आनंदाप्रमाणे हा आनंद असेल. 4असे का? कारण तू
त्यांचा मोठा भार उतरवशील. त्यांच्या पाठीवरील जोखड
काढून घेशील, तुझ्या लोकांना शिक्षा करण्यासाठी शत्रू
वापरीत असलेली छडी तू काढून घेशील. तू मिद्यानचा
पराभव केलास त्या वेळेप्रमाणेच ही स्थिती असेल.
5लढाईत वापरलेला प्रत्येक बूट आणि रक्ताळलेला
प्रत्येक गणवेश ह्यांचा नाश होईल. ह्या गोष्टींची होळी
केली जाईल. 6असामान्य बालकाच्या जन्माच्यावेळी ह्या
गोष्टी घडतील. देव आम्हाला पुत्र देईल. हा पुत्र लोकांच्या
नेतृत्वाची जबाबदारी घेईल. त्याचे नाव असेल "अदभुत
सल्लागार, सामर्थ्यशाली देव, चिरंजीव पिता, शांतीचा
राजपुत्र." 7त्याच्या राज्यात सामर्थ्य आणि शांती नांदेल.
आणि दाविदच्या वंशाच्या ह्या राजाच्या काळात ती वाढतच
जाईल. हा राजा सदासर्वकाळ सदाचार आणि प्रामाणिक
न्यायबुध्दीने राज्य करील.

सर्वशक्तिमान परमेश्वराला त्याच्या लोकांबद्दल
अतिशय प्रेम आहे. ह्या प्रेमापोटीच ह्या सर्व गोष्टी घडून
येतील.

## देव इस्राएलला शिक्षा करील

8याकोबाच्या (इस्राएलच्या) लोकांविरुध्द माझ्या
परमेश्वराने आज्ञा दिली आहे. ती खरी ठरेल. 9मग
एफ्राइमच्या (इस्राएलच्या) प्रत्येक माणसाला, एवढेच नव्हे
तर शोमरोनच्या नेत्यांना कळून चुकेल की देवाने
आपल्याला शिक्षा केली आहे.
सध्या ती माणसे फार गर्विष्ठ व बढाईखोर झाली आहेत,
ते म्हणतात. 10"ह्या विटा पडल्या तर आम्ही पुन्हा बांधकाम
करु आणि तेही भक्कम दगडांचे. ही लहान झाडे कापली
जातील पण आम्ही त्यांच्या जागी उंच व भक्कम असे नवे
वृक्ष लावू."
11म्हणून परमेश्वर इस्राएलच्याविरुध्द लढण्यासाठी
लोकांना समर्थ करील. परमेश्वर रसीनच्या शत्रूंना
इस्राएलविरुध्द उठवील. 12परमेश्वर पूर्वेकडून अरामी
लोकांना व पश्चिमेकडून पलिष्ट्यांना आक्रमण करायला
लावील. हे शत्रू आपल्या सैन्यबळावर इस्राएलचा पराभव
करतील. पण एवढे झाले तरी परमेश्वराचा इस्राएलवरचा
राग शांत होणार नाही. परमेश्वर लोकांना आणखी शिक्षा
करण्याच्या विचारात असेल.
13देवाने लोकांना शिक्षा केली तरी ते पाप करायचे
थांबवणार नाहीत. ते देवाला शरण येणार नाहीत. ते
सर्वशक्तिमान परमेश्वराला अनुसरणार नाहीत. 14म्हणून
परमेश्वर इस्राएलचे डोके व शेपूट कापून टाकील. एका
दिवसात परमेश्वर फांदी व देठ कापून टाकील.
15(इस्राएलचे डोके म्हणजे तेथील वडीलधारी मंडळी व
प्रतिष्ठित नेते आणि शेपूट म्हणजे असत्य कथन करणारे
तोतये संदेष्टे.)
16लोकांचे नेतृत्व करणारे त्यांना चुकीच्या मार्गाने नेतात
आणि त्यांच्या मागून जाणाऱ्या लोकांचा नाश होतो. 17सर्वच
लोक पापी आहेत. म्हणून परमेश्वर तरुणांवर प्रसन्न
नाही आणि परमेश्वर त्यांच्या विधवांवर व अनाथांवरही
दया करणार नाही. ते सर्व देव सांगतो त्याच्या विरुध्द
वागतात. ते खोटे बोलतात. त्यामुळे देवाचा क्रोध शमणार
नाही. व देव त्यांना शिक्षा करीतच राहील.
18कुकर्म हे ठिणगीसारखे असते. प्रथम, ते तण व
काटेकुटे जाळते. नंतर रानातील झाडेझुडपे पेट घेतात
आणि शेवटी त्याचा वणवा होऊन सगळेच त्याचे भक्ष्य
होते.
19सर्वशक्तिमान परमेश्वर रागावला आहे म्हणून सर्व
भूमी जाळली जाईल. सर्व माणसेही त्यात जाळली जातील.
कोणीही आपल्या भावाला वाचविण्याचा प्रयत्न करणार

नाही. 20माणसे उजवीकडचे काही तरी पकडून खायला
बघतील, पण त्यांची भूक भागणार नाही. मग ते डावीकडचे
काही तरी खातील पण त्यांची भूक तरीही भागणार नाही.
मग प्रत्येक जण वळेल आणि स्वत:चेच शरीर खाईल.
21(मनश्शे एफ्राईमशी आणि एफ्राईम मनश्शेशी लढेल व
नंतर दोघेही यहुदाच्या विरोधात उभे राहतील.)

परमेश्वर अजूनही इस्राएलवर रागावला आहे. तो तेथील
लोकांना शिक्षा करण्याच्या तयारीत आहेत.

10 अन्यायकारक कायदे करणाऱ्यांकडे पाहा घातक
निर्णय लिहिणाऱ्या लेखकांकडे पाहा, लोकांना
जगणे कठीण होईल असे कायदे ते करतात. 2ते गरिबांशी
न्यायाने वागत नाहीत. गरिबांचे हक्क ते डावलतात. विधवांना
व अनाथांना लुबाडण्यास ते लोकांना मुभा देतात.

3कायदे करणाऱ्यांनो, तुम्हाला तुमच्या कृत्याचा जाब
द्यावा लागेल, तेव्हा तुम्ही काय सांगाल? दूरच्या देशातून
तुमचा विध्वंस येत आहे. तेव्हा मदतीसाठी कोठे धावाल?
तुमची धनसंपत्ती तेव्हा उपयोगी पडणार नाही. 4कैद्याप्रमाणे
तुम्हाला वाकावे लागेल, मृताप्रमाणे तुम्हाला जमिनीवर
पडावे लागेल. पण एवढ्यानेही भागणार नाही. कारण
अजूनही देवाचा राग शांत झाला नसेल. अजूनही देव
शिक्षा करण्याच्या तयारीत असेल.

5देव म्हणेल, “मी अश्शूरचा उपयोग छडीप्रमाणे करीन.
रागाच्या भरात मी अश्शूरकडून इस्राएलला शिक्षा करीन.
6पापे करणाऱ्या लोकांविरुध्द लढण्यासाठी मी अश्शूरला
पाठवीन. मला त्या लोकांचा अतिशय राग आला आहे
म्हणून मी अश्शूरला त्यांच्यावर चाल करून जाण्याची
आज्ञा करीन. अश्शूर त्यांचा पराभव करील व त्यांची
सर्व संपत्ती लुटून नेईल. रस्त्यातील कचऱ्याप्रमाणे इस्राएल
अश्शूरच्या पायाखाली तुडविला जाईल.

7“पण मी अश्शूरचा उपयोग करून घेणार आहे हे
त्याला कळत नाही. मी त्याचा साधन म्हणून उपयोग
करीन असे त्याच्या लक्षात येत नाही. अश्शूरला फक्त
इतर लोकांचा नाश करायचा आहे, खूप राष्ट्रांचा घात
करण्याचा त्याचा बेत आहे. 8कदाचित् आपण जिंकलेल्या
आणि त्याच्या हुकमतीखाली असलेल्या प्रदेशांच्या राजांचा
अश्शूर येथे निर्देश करत असेल. अश्शूर स्वत:शीच
म्हणतो, ‘माझे सर्व राजपुत्र राजेच नाहीत का?* 9कालनो
शहर कर्कमीश शहरासारखे, हमाथ अर्पादसारखे व
शोमरोन दमास्कससारखे आहे. 10मी त्या दुष्ट राज्यांचा
पराभव केला आणि आता मी त्यांच्यावर सत्ता गाजवितो.
त्यांच्या पूजेच्या मूर्ती यरुशलेममधील व शोमरोनमधील
मूर्तीपेक्षा चांगल्या आहेत. 11मी शोमरोनचा व तेथील
मूर्तीचा पराभव केला. तसेच मी यरुशलेमचे करीन.’”

12सीयोनचा डोंगर व यरुशलेम यांच्याबाबतीत योजलेल्या
गोष्टी माझा परमेश्वर पार पाडील. नंतर तो अश्शूरला
शिक्षा करील. अश्शूरचा राजा फार गर्विष्ठ आहे. त्याच्या
अहंकारामुळे त्याने अनेक दुष्कृत्ये केली आहेत. म्हणून
परमेश्वर त्याला शिक्षा करील.

13अश्शूरचा राजा म्हणतो, “मी फार सुज्ञ आहे. माझ्या
चातुर्याच्या व सामर्थ्याच्या बळावर मी फार मोठ्या गोष्टी
केल्या आहेत. मी पुष्कळ राष्ट्रांना पराभूत केले आहे.
मी त्यांची संपत्ती लुटली आणि तेथील लोकांना गुलाम
केले. मी फार सामर्थ्यवान आहे. 14पक्ष्याच्या घरट्यातून
एखाद्याने सहज अंडी काढून घ्यावीत त्याप्रमाणे माझ्या ह्या
दोन हातांनी ह्या सर्वांची संपत्ती घेतली आहे. पक्षी नेहमी
घरटी व अंडी सोडून जातो. आणि घरट्याचे रक्षण करण्यास
कोणीच नसते. तेथे एकही पक्षी चिवचिवाट करायला
अथवा पंख व चोच ह्याने टोचा मारायला नसतो. त्यामुळे
लोक सहज अंडी काढून घेऊ शकतात. अगदी असेच मी
सर्व जगातील माणसांना लुटले. मला थांबविणारा कोणीही
नव्हता.”

## देव अश्शूरचे सामर्थ्य नियंत्रित करतो

15कुऱ्हाड चालविणाऱ्यापेक्षा, कुऱ्हाड श्रेष्ठ नसते.
करवत, कापणाऱ्यापेक्षा श्रेष्ठ नसते. पण अश्शूरला मात्र
वाटते की तो देवापेक्षा श्रेष्ठ व सामर्थ्यवान आहे. एखाद्या
माणसाने एखादी काठी उचलून तिने एखाद्याला शिक्षा
करावी व त्याबद्दल काठीने स्वत:ला त्या माणसापेक्षा
श्रेष्ठ व सामर्थ्यवान समजावे, तसेच हे आहे.

16अश्शूर स्वत:ला श्रेष्ठ समजतो पण सर्वशक्तिमान
परमेश्वर एक भयानक रोग अश्शूरमध्ये पसरवील.
ज्याप्रमाणे रोगी माणसाचे वजन घटते, त्याप्रमाणे अश्शूरचे
वैभव व सामर्थ्य घटेल. नंतर अश्शूरचे वैभव नष्ट होईल.
तो रोग सर्वभक्षक आगीप्रमाणे असेल. 17इस्राएलचा प्रकाश
(देव) अग्नीप्रमाणे होईल. पवित्र देव ज्वालेप्रमाणे होईल.
तण व काटेकुटे प्रथम जाळणाऱ्या आगीप्रमाणे तो असेल.
18नंतर आग पसरते आणि मोठे वृक्ष, द्राक्षमळे जळून
जातात. व सर्वांत शेवटी प्रत्येक गोष्ट जळून नष्ट
होते–अगदी माणसेसुध्दा, तसेच तेव्हा होईल आणि
अश्शूरचा देवाकडून नाश होईल. अश्शूर कुजणाऱ्या
ओंडक्याप्रमाणे होईल. 19हाताच्या बोटावर मोजण्याइतके
वृक्ष जंगलात उभे असतील. लहान मूलही ते मोजू शकेल.

20त्यावेळी याकोबचे जे वंशज इस्राएलमध्ये राहत
असतील ते त्यांना मारणाऱ्या माणसावर अवलंबून राहणे
सोडतील आणि इस्राएलच्या पवित्र परमेश्वरावर मनापासून
श्रध्दा ठेवायला शिकतील. 21याकोबचे हे राहिलेले वंशज
पुन्हा सामर्थ्यशाली देवाला अनुसरतील.

22समुद्रकाठच्या वाळूच्या कणांप्रमाणे तुझे लोक खूप
असले तरी त्यातील फक्त थोडेच परमेश्वराकडे परत
येतील. ते देवाकडे वळतील पण त्यापूर्वी देशाचा नाश

---

**माझे सर्व … नाहीत का?** बहुधा अश्शूर त्याने जिंकलेल्या आणि त्याच्या राज्यसत्तेखाली असणाऱ्या राजांबद्दल हा निर्देश करीत असावा.

केला जाईल. देवाने घोषित केले आहे की तो देश उध्वस्त
करणार आहे. नंतर चांगुलपणा देशात येईल. तो दुथडीभरुन
वाहाणाऱ्या नदीसारखा असेल. 23माझा प्रभू, सर्वशक्तिमान
परमेश्वर, निश्चित ह्या संपूर्ण प्रदेशाचा नाश घडवून
आणील.

24माझा प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “माझ्या
सीयोनवासीयांनो, अश्शूरला घाबरू नका. मिसरने पूर्वी
तुम्हाला जसे हरविले होते तसेच अश्शूर तुम्हाला हरवील.
जणू काही अश्शूर तुम्हाला काठीने मारील. 25पण थोड्या
काळात माझा राग शांत होईल. अश्शूरने तुम्हाला दिलेली
शिक्षा मला पुरेशी वाटेल.”

26पूर्वी सर्वशक्तिमान परमेश्वराने मिद्यानला ओरेबाच्या
खडकाजवळ हरविले होते, त्याप्रमाणेच परमेश्वर
अश्शूरवर हल्ला करून त्याला चाबकाने फोडून काढील.
पूर्वी परमेश्वराने मिसरला शिक्षा करताना, आपल्या
हातातील दंडाने समुद्र दुभंगून आपल्या लोकांना समुद्रपार
केले व मिसरच्या लोकांना बुडविले. अशाच तऱ्हेने
परमेश्वर अश्शूरपासून आपल्या लोकांना वाचवील.

27अश्शूर तुझ्यावर जी संकटे आणील ती तुला
ओझ्याप्रमाणे अथवा जोखडाप्रमाणे खांद्यावर वाहावी
लागतील पण लवकरच ते ओझे उतरविले जाईल. तुझे
सामर्थ्य (देव) ते जोखड मोडून टाकील.

## अश्शूरच्या सैन्याचा इस्राएलवर हल्ला

28अश्शूरचे सैन्य अयाथ जवळून (“भग्न अवशेषा”
जवळून) प्रवेश करील मिग्रोन (“मळणीची जागा”) तुडवून
ते जाईल मिखमाशात (“गुदामात”) ते आपले अन्नधान्य
ठेवील. 29ते ‘उताराच्या’ (माबाराच्या) येथे नदी ओलांडतील
गेबा येथे ते मुक्काम करतील. रामा घाबरून जाईल.
शौलच्या गिबातील माणसे पळून जातील.

30बाथ गल्लीम, मोठ्याने ओरड, लईशा, ऐक. अनाथोथ,
मला उत्तर दे. 31मदमेनाचे रहिवासी पळत आहेत. गेबीमचे
रहिवासी लपून बसत आहेत. 32ह्या दिवशी सैन्य नोब येथे
मुक्काम करील आणि यरुशलेममधील टेकडी सीयोन
हिच्याविरुध्द लढण्याची तयारी करील.

33लक्ष द्या. आपला प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर, प्रचंड
वृक्ष (अश्शूर) कापून टाकील. आपल्या सामर्थ्याच्या
बळावर देव हे करील. श्रेष्ठ व प्रतिष्ठित लोकांचे महत्व
तो कमी करील. 34परमेश्वर त्याच्या कुऱ्हाडीने जंगल
तोडील आणि लबानोनमधील प्रचंड वृक्ष (प्रतिष्ठित लोक)
कोसळतील.

## शांतीचा राजा येत आहे

11 इशायाच्या बुंध्याला (वंशाला) अंकुर (मूल) फुटून
वाढू लागेल. ती फांदी इशायाच्या मुळाची असेल.
2परमेश्वराचा आत्मा त्या मुलात असेल. तो आत्मा त्याला
सुज्ञपणा, समजूत, मार्गदर्शन आणि सामर्थ्य देईल. हा आत्मा
परमेश्वराला जाणून घेण्यास व श्रध्दा ठेवण्यास त्या मुलाला
शिकवील. 3परमेश्वराचे भय वाटण्यातच त्या मुलाला
आनंद वाटेल. तो त्याच्या डोळ्यांना जे दिसते वा कानांनी
जे ऐकू येते, त्याच्यावरून निर्णय घेणार नाही.

हा मुलगा गोष्टी जशा दिसतात त्या वरुन लोकांची
पारख करणार नाही. तो जे ऐकेल त्यावरून लोकांची
परीक्षा करणार नाही. 4–5तो गरिबांना प्रामाणिकपणे व
सरळपणे न्याय देईल. ह्या देशातील गरिबांसाठी ज्या गोष्टी
करण्याचे त्याने ठरविले असेल त्या तो न्यायबुध्दीने करील.
त्याने जर काही लोकांना फटकावयाचे ठरविले तर तो
तशी आज्ञा देईल आणि त्या माणसांना फटके बसतील.
त्याने दुष्टांना मारायचे ठरविले, तर त्याच्या आज्ञेने त्यांना
ठार मारले जाईल. चांगलुपणा व प्रामाणिकपणा ह्या मुलाला
सामर्थ्य देईल. ते त्याचे संरक्षक कवच असतील.

6त्या वेळेला लांडगे मेंढरांबरोबर सुखशांतीने राहतील,
वाघ कोकरांबरोबर शांतपणे झोपेल. वासरे, सिंह, आणि
बैल शांततेने एकत्र राहतील आणि एक लहान मुलगा
त्यांना वळवील. 7गायी आणि अस्वले एकत्र गुण्यागोविंदाने
राहतील. सगळ्यांची पिल्ले एकत्र राहतील आणि कोणीच
कोणाला इजा करणार नाही. सिंह गाईसारखे चारा खातील.
एवढेच नव्हे तर सापही माणसाला दंश करणार नाहीत.
8तान्हे मूलसुध्दा नागाच्या वारुळाजवळ खेळू शकेल. ते
सापाच्या बिळात त्याचा हात घालू शकेल.

9ह्या सगळ्या गोष्टीवरून, तेथे शांती नांदेल, हेच दिसते.
कोणीही माणूस दुसऱ्याला दुखविणार नाही. माझ्या पवित्र
डोंगरावर राहणारे लोक वस्तूंचा नाश करू इच्छिणार
नाहीत. का? कारण लोकांना परमेश्वराची खरी ओळख
पटेल. समुद्रात जसे अथांग पाणी असते, तसेच त्यांना
परमेश्वराबद्दल खूपच ज्ञान झालेले असेल.

10त्या वेळेला इशायाच्या घराण्यात एक विशेष व्यक्ती
असेल ती व्यक्ती ध्वजाप्रमाणे असेल हा “ध्वज” सर्व
राष्ट्रांना त्याच्याभोवती जमण्याचे आवाहन करील. सर्व
राष्ट्रे, त्यांनी करायच्या कार्याबद्दल ह्या ‘ध्वजाकडे’ विचारणा
करतील तो जेथे असेल तेथे वैभव नांदेल.

11त्या वेळेला माझा प्रभू (देव) मागे राहिलेल्या लोकांपर्यंत
पुन्हा पोहोचेल. असे तो दुसऱ्यांदा करील. आणि त्यांना
बाहेर आणील (अश्शूर, उत्तर मिसर, द्रक्षिण मिसर,
इथिओपिया, एलाम, बॅबिलॉन, हमाथ आणि पृथ्वीवरील
दूरची सर्व राष्ट्रे येथे असलेल्या ह्या त्याच्या लोकांना तो
बाहेर आणील.

12देव “तो ध्वज” सर्व लोकांची निशाणी म्हणून उभारेल.
इस्राएल व यहुदा येथील लोकांना बळजबरीने देशाच्या
बाहेर घालवून देण्यात आले ते पृथ्वीवरील दूरदूरच्या
देशात विखुरले. पण देव त्यांना एकत्र आणील.

13तेव्हा एफ्राइमला (इस्राएलला) यहुदाचा मत्सर वाटणार
नाही. यहुदाला कोणी शत्रूच राहणार नाहीत. यहुदा
एफ्राइमला (इस्राएलला) काही त्रास देणार नाही. 14पण

एफ्राइम (इस्राएल) व यहुदा दोघे मात्र पलिष्ट्यांवर हल्ला करतील. आकाशात उडणाऱ्या दोन पक्ष्यांनी जमिनीवरील किड्याकाटकावर झडप घालावी तसेच हे दोन देश पलिष्ट्यांवर तुटून पडतील. दोघे मिळून पूर्वेकडच्या लोकांना लुटतील व अदोम, मवाब, व अम्मोन ह्यांच्या वर राज्य करतील.

15पूर्वी परमेश्वराला राग आला व त्याने समुद्र दुभंगून
आपल्या माणसांना मिसरमधून बाहेर काढले आता पण
तसेच होईल परमेश्वर युफ्राटिस नदी दुभंगवेल. तो नदीवर
हातातील दंड मारील आणि तिचे सात लहान नद्यांत विभाजन
करील. त्या नद्या खोल नसतील. लोक त्या चालत सहज
पार करू शकतील. 16ह्यामुळे अश्शूरमध्ये मागे राहिलेल्या
त्याच्या लोकांना अश्शूर सोडून जाता येईल. हे देवाने
मिसरमधून इस्राएली लोकांना बाहेर काढले, त्या वेळे
प्रमाणेच असेल.

## देवाचे स्तुतिस्तोत्र

12 त्या वेळेला तू म्हणशील:
"परमेश्वरा, मी तुझे स्तवन करतो तू माझ्यावर
रागावला होतास पण आता राग सोड तुझ्या प्रेमाची प्रचिती
दे."

2देव माझा तारक आहे माझी त्याच्यावर श्रध्दा आहे.
मी निर्भय आहे तो मला तारतो.परमेश्वर हीच माझी
शक्ती आहे. तो मला तारतो म्हणूनच मी त्याचे स्तुतिस्तोत्र
गातो.

3–4तारणाच्या झऱ्यातून तुम्ही पाणी घ्या म्हणजे सुखी
व्हाल आणि म्हणाल, "परमेश्वराची स्तुती असो. त्याच्या
नावाची उपासना करा. त्याच्या करणीची माहिती लोकांना
सांगा."

5परमेश्वराचे स्तुतिस्तोत्र गा कारण त्याने महान कार्य
केले आहे. देवाबद्दलची ही वार्ता सर्व जगात पसरवा सर्व
लोकांना हे कळू द्या.

6सीयोनवासीयांनो, तुम्ही गजर करा. कारण इस्राएलचा
एकमेव पवित्र देव समर्थपणे तुमच्यामध्ये आहे. तेव्हा
आनंदी व्हा..

## देवाचा बाबेलोनला संदेश

13 आमोजचा मुलगा यशया ह्याला देवाने
बाबेलोनबद्दल दु:खदायक हा संदेश दिला. 2देव
म्हणाला,

"जेथे काहीही उगवत नाही अशा ओसाड डोंगरावर ध्वज उभारा. लोकांना हाका मारा.हातांनी खुणा करा. त्यांना प्रतिष्ठितासाठी असलेल्या दारातून प्रवेश करायला सांगा."

3देव पुढे म्हणाला,

"मी त्या लोकांना इतरांपासून वेगळे केले आहे. मी स्वत: त्याच्यावर सत्ता गाजवीन. मी रागावलो आहे मी माझ्या योध्दयांना त्या लोकांना शिक्षा करण्यासाठी, गोळा केले आहे मला ह्या सुखी लोकांचा अभिमान वाटतो.

4"डोंगरावर मोठा आवाज होत आहे तो लक्षपूर्वक ऐका.
खूप माणसांच्या गोंगाटासारखा तो आवाज आहे कारण
पुष्कळ राज्यातील माणसे एकत्र येत आहेत. सर्वशक्तिमान
परमेश्वर त्याच्या सैन्याला एकत्र बोलावीत आहे.

5दूरच्या प्रदेशातून परमेश्वर व हे सैन्य येत आहे.
क्षितिजापलीकडून ते येत आहेत. ह्या सैन्याचा उपयोग
परमेश्वर आपला राग व्यक्त करण्याचे शस्त्र म्हणून
करणार आहे. हे सैन्य सर्व देशाचा नाश करील."

6परमेश्वराने ठरविलेला खास दिवस जवळ आला आहे.
तेव्हा आक्रोश करा व शोक करा शत्रूकडून तुमची लूट
होण्याची वेळ जवळ येत आहे सर्व शक्तिमान देव हे
घडवून आणील. 7लोकांचे धैर्य गळेल. त्यांची भीतीने
गाळण उडेल. 8प्रत्येक माणूस भेदरलेला असेल. बाळंत
होत असलेल्या स्त्रीप्रमाणे भितीने त्यांच्या पोटात गोळा
उठेल. त्यांची तोंडे अग्नीप्रमाणे लाल होतील. सर्वांच्याच
तोंडावर ही कळा पाहून ते आश्चर्यचकीत होतील.

## देवाचा बाबेलोनविरुध्द न्याय

9पाहा परमेश्वराचा खास दिवस येत आहे. तो फारच
भयानक दिवस असेल. देव फारच संतप्त होईल. आणि तो
देशाचा नाश करील. ह्या देशातील पापी लोकांना देश
सोडण्यास तो भाग पाडील. 10आकाश अंधकारमय होईल.
सूर्य, चंद्र, तारे प्रकाश देणार नाहीत.

11देव म्हणतो, "मी जगात वाईट गोष्टी घडवून आणीन
पाप्यांना त्यांच्या पापांबद्दल मी शिक्षा करीन. मी गर्विष्ठांचे
गर्वहरण करीन. दुसऱ्यांशी क्षुद्र वृत्तीने वागणाऱ्या
बढाईखोरांचा तोरा उतरवीन. तेव्हा थोडेच लोक शिल्लक
राहतील. 12दुर्मिळ सोन्याप्रमाणे चांगले लोकही थोडेच
राहतील आणि शुध्द सोन्याहून त्यांची किंमत जास्त असेल.
13माझ्या रागाने मी आकाशाला हलवेन व पृथ्वी तिच्या
स्थानावरून ढळविली जाईल."

हे सर्व, सर्वशक्तिमान परमेश्वर रागावेल तेव्हा घडून
येईल. 14त्या वेळी बाबेलोनमधील प्रजा घायाळ हरणाप्रमाणे
पळ काढेल मेंढपाळ नसलेल्या मेंढराप्रमाणे ते सैरावैरा
धावतील प्रत्येकजण आपल्या देशात व आपल्या लोकात
पळून जाईल. 15पण शत्रू त्यांचा पाठलाग करील. आणि
शत्रूच्या हाती सापडणाऱ्याला शत्रू तलवारीने ठार मारील.
16त्यांची घरे लुटली जातील. त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार
होतील, त्यांच्या डोळ्यादेखत लहान मुलांना मरेपर्यंत मारले
जाईल.

17देव म्हणतो, "पाहा! बाबेलोनवर हल्ला करण्यासाठी
मी मेदीचे सैन्य वापरीन. मेदीच्या सैन्याला चांदी, सोने दिले

तरी ते हल्ला करीतच राहील. 18ते बाबेलोनमधील तरुणांवर हल्ला करून त्यांना मारतील मुलांना ते दया दाखविणार नाहीत. लहानग्यांची ते कीव करणार नाहीत. सदोम व गमोरा यांच्याप्रमाणे बाबेलोनचा संपूर्ण नाश होईल. देव सर्वनाश घडवून आणील मागे काहीही उरणार नाही.

19"बाबेलोन सर्व देशांहून सुंदर आहे. बाबेलोनच्या रहिवाशांना आपल्या शहराबद्दल गर्व आहे. 20पण बाबेलोनचे सौंदर्य टिकणार नाही. भविष्यकाळात लोक तेथे राहणार नाहीत. अरब आपले तंबू तेथे ठोकणार नाहीत. मेंढपाळ मेंढ्या चारण्यास तेथे येणार नाहीत. 21वाळवंटातील जंगली प्राण्यांशिवाय तेथे कोणी राहणार नाही. बाबेलोनमधील घरे ओस पडतील. वटवाघुळांची व घुबडांची तेथे वस्ती असेल बोकडांच्या रूपातील पिशाच्चे त्या घरात खेळतील. 22बाबेलोनच्या भव्य आणि सुंदर इमारतीतून रानकुत्री आणि लांडगे केकाटतील बाबेलोन नष्ट होईल. त्याचा शेवट जवळ आला आहे. मी त्याचा नाश लांबणीवर टाकू देणार नाही."

## इस्राएल घरी परत येईल

14 पुढील काळात, परमेश्वर याकोबाला प्रेमाची पुन्हा प्रचिती देईल. तो इस्राएली लोकांची पुन्हा निवड करील. तो त्यांना त्यांची जमीन परत देईल. यहुद्यां व्यतिरिक्त अन्य लोक त्यांना येऊन मिळतील. ते एकत्र होतील आणि त्यांचा एकच वंश याकोबाचा वंश होईल. 2इतर राष्ट्रे इस्राएलला त्याची जमीन परत देतील, इतर राष्ट्रांतील स्त्री पुरुष इस्राएलचे गुलाम होतील. पूर्वी ह्याच लोकांनी इस्राएलच्या प्रजेला गुलाम होण्यास भाग पाडले होते. पण आता इस्राएलच त्यांचा पराभव करील व त्यांच्यावर राज्य करील. 3परमेश्वर तुमचे कष्ट कमी करून सुख व आराम देईल. पूर्वी तुम्ही गुलाम होता. लोक तुम्हाला राबवून घेत. पण परमेश्वर तुमचे कष्ट नाहीसे करील.

## बाबेलोनच्या राजाबद्दलचे गाणे

4त्या वेळी बाबेलोनच्या राजाबद्दलचे हे गाणे तुम्ही म्हणायला लागाल राजा आमच्यावर राज्य करीत.

असताना नीचपणे वागत होता पण आता त्याची सत्ता नष्ट झाली.

5परमेश्वर दुष्ट राजांचा राजदंड मोडतो. परमेश्वर त्यांची सत्ता काढून घेतो.

6रागाच्या भरात बाबेलोनच्या राजाने लोकांना फटकावले. तो नेहमीच लोकांना फटकावत असे. त्या दुष्ट राजाने क्रोधाने लोकांवर सत्ता गाजवली. तो नेहमीच लोकांना दुखवत असे.

7पण आता संपूर्ण देशाला स्वास्थ्य मिळाले आहे. देश शांत आहे. लोक उत्सव, समारंभ करू लागले आहेत.

8तू दुष्ट राजा होतास. पण आता तू संपला आहेस. लबानोनमधील गंधसरू व सरुवृक्षसुध्दा आनंदित झाले आहेत. वृक्ष म्हणतात, "राजाने आम्हाला कापून टाकले होते. पण आता राजाच पडला आहे. तो आता कधीच उठणार नाही."

9राजा, तू येणार म्हणून अधोलोकात खळबळ उडाली आहे. पृथ्वीवरच्या नेत्यांच्या आत्म्यांना, तू येणार म्हणून जागे करीत आहे, सिंहासनावरून त्यांना उठवीत आहे, ते तुझ्या आगमनाची तयारी करतील.

10ते सर्व तुझी चेष्टा करतील. ते म्हणतील, "आता तू अगदी आमच्याप्रमाणे निर्जीवकलेवर झाला आहेस."

11तुझा गर्व अधोलोकात पाठविला आहे. तुझ्या सारंगीचा नाद तुझ्या गर्विष्ठ आत्म्याचे आगमनच घोषित करीत आहे अळ्या तुझे शरीर खाऊन टाकतील तू अळ्यांच्या अंथरूणावर झोपशील व कीटकांचे पांघरूण घेशील.

12तू प्रभाततार्‍याप्रमाणे होतास पण आता तू आकाशातून खाली पडला आहेस. पूर्वी सर्व राष्ट्रे तुझ्यापुढे नेहमीच वाकत होती पण आता तू संपला आहेस.

13तू नेहमीच स्वत:ला सांगायचास, "मी परात्पर देवासारखा होईन. मी आकाशात उंच जाईन. देवाच्या तारागणाच्यावर उच्चस्थानी मी माझे सिंहासन स्थापन करीन. मी पवित्र साफोन डोंगरावरच्या देवसभेत बसून देवांना भेटीन.

14मी मेघांवर आरोहण करुन वेदीवर जाईन. मी परात्पर देवासारखा होईन."

15पण तसे घडले नाही. तू देवाबरोबर आकाशात गेला नाहीस. तुला अधोलोकात, पाताळात आणले गेले.

16लोक तुझ्याकडे निरखून पाहतील व तुझ्याबद्दल विचार करतील. तू एक कलेवर आहेस हे ते पाहतील आणि म्हणतील, "पृथ्वीवर सगळीकडे ज्याने प्रचंड भय निर्माण केले होते तो हाच का?

17ज्याने शहरांचा विध्वंस करून सर्व जमिनीचे वाळवंट केले तो हाच मनुष्य का? ज्यांने युध्दात लोकांना कैदी केले व त्यांना घरी जाऊ दिले नाही तो हाच का?"

18पृथ्वीवरील प्रत्येक राजा वैभवात मरण पावला प्रत्येकजण आपापल्या थडग्यात विसावा घेत आहे.

19पण, हे दुष्ट राजा, तुला तुझ्या थडग्याच्या बाहेर टाकले आहे. तू झाडाच्या तोडलेल्या फांदीप्रमाणे आहेस. लढाईत मारल्या गेलेल्या सैनिकाला बाकीचे सैनिक तुडवून जातात तशी तुझी स्थिती आहे. आता तुझ्यात व इतर कलेवरात काहीही फरक नाही तुला कफनात गुंडाळले आहे.

20इतर खूप राजे मृत्यू पावले, व आपापल्या थडग्यात विसावले पण तुला त्यांच्यात जाता येणार नाही. का? कारण तू स्वत:च्याच देशाचा विध्वंस केलास स्वत:च्याच प्रजेला ठार मारलेस. तुझी मुले तुझ्यासारखा नाश करीत राहू शकणार नाहीत. त्यांना परावृत्त केले जाईल.

21त्याच्या मुलांना ठार मारण्याची तयारी करा
कारण त्यांचे वडील गुन्हेगार आहेत. त्याची मुले
नातेवाईक, नातवंडे कधीही ह्या देशावर राज्य करणार
नाहीत. ते, पुन्हा कधीही ह्या जगात, त्यांची शहरे
वसविणार नाहीत.

22सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणाला, “मी स्वत: त्या
लोकांविरुध्द लढण्यास उभा राहीन. मी प्रसिध्द शहर
बाबेलोनचा नाश करीन. मी सर्व बाबेलोनवासीयांचा नाश
करीन. त्यांची मुले, नातवंडे, पतवंडे ह्यांचा नाश करीन.”
हे सर्व स्वत: परमेश्वर बोलला.
23परमेश्वर पुढे म्हणाला, “मी बाबेलोनचे रूप बदलून
टाकीन. ती जागा लोकांना नव्हे तर जनावरांना
राहण्यालायक करीन. त्या जागी दलदल करीन ‘नाशरूपी
झाडूने’ मी बाबेलोन स्वच्छ करीन.” सर्वशक्तिमान
परमेश्वर असे म्हणाला.

## देव अश्शूरला पण शिक्षा करील

24सर्वशक्तिमान परमेश्वराने वचन दिले आहे.
परमेश्वर म्हणाला, “मी वचन देतो मी सांगितल्याप्रमाणे
गोष्टी घडून येतील. मी योजल्याप्रमाणे सर्व होईल. 25मी
माझ्या देशात अश्शूरच्या राजाचा नाश करीन. माझ्या
डोंगरावर मी त्या राजाला पायाखाली तुडवीन. त्याने माझ्या
माणसांना त्याचे गुलाम केले, त्यांच्या मानेवर जोखड
घातले. यहुदाच्या मानेवरील जोखड दूर केले जाईल.
त्याच्यावरील ओझे दूर सारले जाईल. 26माझ्या
लोकांकरिता मी हा बेत केला आहे. मी माझ्या हाताचा
(बळाचा) सर्व राष्ट्रांना शिक्षा करण्यासाठी उपयोग
करीन.”
27जेव्हा परमेश्वरच संकल्प करतो तेव्हा कोणीच तो
रद्द करू शकत नाही. जेव्हा लोकांना शिक्षा करण्यासाठी
परमेश्वरच हात उगारतो, तेव्हा कोणीच त्याला थांबवू
शकत नाही.

## देवाचा पलेशेथविरुध्द संदेश

28राजा आहाजच्या मृत्यूच्या वर्षीच ही शापवाणी झाली.
29पलेशेथ देशा, तुला पराभूत करणारा राजा गेला
म्हणून तुला आनंद झाला आहे. पण खरे तर तुला आनंद
व्हायचे काही कारण नाही. हे खरे आहे की त्या राजाची
सत्ता संपली आहे. पण राजाचा मुलगा गादीवर बसेल व
राज्य करील. हे एका सापाने दुसऱ्या अती विषारी सापाला
जन्म दिल्यासारखे होईल. हा नवा राजा तुझ्या दृष्टीने
चपळ व भयानक सापासारखा असेल. 30पण माझी गरीब
प्रजा मात्र सुखाने खाईल. त्यांची मुले सुरक्षित राहतील.
माझे गरीब लोक सुखशांतीने राहतील. पण मी तुझ्या
कुळाचा उपासमारीने अंत करीन. तुझ्या कुळातील उरलेले
सर्व लोक मरतील.
31नगरच्या वेशीजवळील प्रजाजनांनो, रडा.
नगरवासीयांनो, आक्रोश करा. पलेशेथ मधील सर्व लोक
भयभीत होतील. त्यांचे धैर्य गरम मेणाप्रमाणे वितळून
जाईल. उत्तरेकडे पाहा! धुळीचा लोट उठला आहे.
अश्शूरचे सैन्य येत आहे. त्या सैन्यातील सर्व माणसे बलवान
आहेत. *
32ते सैन्य त्यांच्या देशात निरोप पाठवील. ते जासूद
त्यांच्या लोकांना काय सांगतील? ते सांगतील की
पलेशेथचा पराभव झाला आहे. पण परमेश्वराने
सीयोनला बलवान बनवले व सर्व गरीब तिकडे
आश्रयासाठी गेले.

## मवाबला देवाचा संदेश

15 मवाबबद्दल ही शापवाणीएका रात्रीत आर मवाब
लुटले गेले. त्या रात्री शहराचा नाश केला गेला
एका रात्री सैन्याने कीर मवाब लुटले. त्या रात्री शहराचा
नाश केला गेला.
2राजघराणे व दीबोनमधील लोक गाऱ्हाणे गायला
पूजास्थानाला जात आहेत. नबो व मेदबा यांच्यासाठी
मवाबचे लोक रडत आहेत. आपले दु:ख प्रकट
करण्यासाठी सर्वांनी मुंडन केले आहे व दाढी केली
आहे.
3मवाबमधील सर्वांनी घरादारातील सर्वांनी काळे कपडे
घातले आहेत व ते रडत आहेत.
4हेशबोन व एलाले येथील लोक एवढ्यामोठ्याने रडत
आहेत की त्यांचा आवाज दूरच्या याहसा शहरापर्यंत ऐकू
येत आहे एवढेच काय पण सैनिकही गर्भगळीत होऊन
भीतीने कापत आहेत.
5मवाबच्या दु:खाने माझे मन रडत आहे. लोक
बचावासाठी धावत आहेत. ते दूर सोअर व एगलाथ
शलिशीयापर्यंत पळतात. लूहीथच्या चढणीवर ते रडत रडत
चढत आहेत. होरोनाइमच्या वाटेवर लोक मोठ्याने आक्रोश
करीत जात आहेत.
6पण निम्रीमाचे पाणी आटले आहे. सर्व झाडेझुडपे वाळली
आहेत. कोठेच हिरवेपणा नाही.
7म्हणून लोक स्वत:ची संपत्ती गोळा करून मवाब
सोडतात. ते ही संपत्ती घेऊन वाळुंजच्या खाडीपलीकडे
जातात.
8मवाबमध्ये सगळीकडे रडणे ऐकू येत आहे. लांब
असलेल्या एग्लाइममधील लोक रडत आहेत आणि
बैर-एलिममध्येही आक्रोश सुरु आहे.
9दीमोनचेपाणी रक्ताने लालभडक झाले आहे. मी
परमेश्वर दीमोनवर आणखी संकटे आणीन. मवाबमधील
काही थोडी माणसे शत्रूच्या हातातून निसटली आहेत

---

**त्या सैन्यातील ... आहेत** ह्याचा दुसरा अर्थ “त्यांच्यातील कोणीही
मागे राहणार नाही.”

पण मी त्यांच्यावर त्यांना खाऊन टाकण्यासाठी सिंह पाठवीन.

16 तुम्ही लोकांनी राजाला नजराणा पाठविला पाहिजे. तुम्ही सेला येथील कोकरू वाळवंटामार्गे सीयोनकन्येच्या डोंगरावर (यरुशलेमला) पाठविले पाहिजे.

2मवाबच्या स्त्रिया अर्णोन नदी ओलांडण्याचा प्रयत्न करतील. त्या मदतीसाठी सैरभैर धावतील. त्यांची स्थिती, घरटे मोडल्यामुळे जमिनीवर पडलेल्या चिमुकल्या पाखराप्रमाणे होईल.

3त्या म्हणतात, "आम्हाला मदत करा आम्ही काय करावे ते सांगा. जशी सावली दुपारच्या उन्हापासून आपले रक्षण करते, तसे शत्रूपासून आमचे रक्षण करा. आम्ही शत्रूला चुकवून पळत आहोत. आम्हाला लपवा. आम्हाला शत्रूच्या ताब्यात देऊ नका."

4मवाबमधील लोकांना बळजबरीने त्यांची घरे सोडावी लागली. म्हणून त्यांना तुमच्या देशात राहू द्या. शत्रूंपासून त्यांना लपवा. लुटालूट थांबेल. शत्रूचा पराभव होईल. दुसऱ्यांना त्रास देणारे ह्या भूमीतून जातील.

5नंतर नवा राजा गादीवर बसेलतोदाविदाच्या वंशातला असेल. तो सत्यप्रिय, प्रेमळ व दयाळू असेल. तो खरेपणाने न्याय देईल. तो योग्य व बरोबर अशाच गोष्टी करील.

6आम्ही मवाबवासीयांच्या गर्वाविषयी व अहंकाराविषयी ऐकले आहे. ते दांडगट व बढाईखोर आहेत. पण त्यांच्या बढाया निरर्थक आहेत. 7त्या गर्वामुळे सर्व देशाला दु:ख भोगावे लागेल. सर्व मवाबवासीयांना रडावे लागेल लोक दु:खी होतील. पूर्वीच्या गोष्टी त्यांना हव्याशा वाटतील कीर हेरेसेथमध्ये तयार झालेले अंजिराचे केक त्यांना हवे असतील. 8हेशबोनमधील मळे व सिब्मेच्या द्राक्षवेली सुकून गेल्या म्हणून लोकांना वाईट वाटेल. परकीय राजांनी द्राक्षवेली तोडून टाकल्या. शत्रूचे सैन्य दूर याजेरपर्यंत पसरले आहे. ते वाळवंटापासून समुद्रापर्यंत पसरले आहे.

## मवाबाविषयी शोकगीत

9"द्राक्षांचा नाश झाला म्हणून मी याजेर व सिब्मे यांच्याबरोबर शोक करीन. सुगीचा मोसम येणार नाही म्हणून मी हेशबोन व एलाले यांच्याबरोबर रडीन. उन्हाळी फळे पण नसतील आणि हर्षोल्लास पण नसेल.

10कारमेलमध्ये (द्राक्षमळ्यात) आनंदगान होणार नाही. सुगीच्या काळातील आनंद मी कोणालाही होऊ देणार नाही. द्राक्ष मद्य काढण्यासाठी तयार आहेत पण ती नासून जातील.

11म्हणून मला मवाबबद्दल आणि कीर हेरेसबद्दल फार वाईट वाटते या शहरांबद्दल मला खरोखरच अतिशय वाईट वाटते.

12मवाबवासी त्यांच्या प्रार्थनास्थळी जाऊन प्रार्थना करण्याचा प्रयत्न करतील पण काय घडले ते त्यांना दिसेल ते इतके दुर्बल झालेले असतील की प्रार्थना करण्याची शक्ती त्यांच्यात नसेल."

13मवाबबद्दलच्या ह्या गोष्टी परमेश्वराने बऱ्याच वेळा सांगितल्या. 14आणि आता परमेश्वर म्हणतो, "तीन वर्षांत सर्व लोक आणि लोक ज्या वस्तूंचा अभिमान बाळगत होते त्या सर्व वस्तू नाहीशा होतील. तेथे अगदी थोडे लोक उरतील."

## देवाचा सिरीयाला संदेश

17 दमास्कसला हा शोक संदेश आहे.परमेश्वर म्हणतो की पुढील गोष्टी दमास्कसला घडतील.

"आता दमास्कस एक शहर आहे. पण त्याचा नाश होईल. फक्त पडझड झालेल्या इमारती तेथे शिल्लक राहतील.

2लोक अरोएराची शहरे सोडून जातील. त्या ओसाड शहरांतून शेळ्यामेंढ्यांचे कळप मुक्तपणे हिंडतील. त्यांना हाकलायला तेथे कोणी माणूस नसेल.

3एफ्राइमची (इस्राएलची) किल्ले असलेली शहरे नष्ट होतील. दमास्कसचे सरकार पडेल. इस्राएलला जे घडले तेच सिरीयात घडेल. सगळी प्रतिष्ठित माणसे दूर केली जातील." सर्वशक्तिमान परमेश्वराच्या म्हणण्याप्रमाणे ह्या गोष्टी घडतील.

4त्या वेळी याकोबाची (इस्राएलची) सर्व संपत्ती नष्ट होईल. आजारी माणसाप्रमाणे याकोब दुबळा व बारीक होईल.

5रेफाईम खोऱ्यातील धान्याच्या मोसमाप्रमाणे तो काळ असेल. मजूर शेतात पिकलेली पिके कापून गोळा करतात. नंतर कणसे तोडून ते धान्य गोळा करतात.

6तो काळ जैतूनच्या मोसमाप्रमाणेही असेल. लोक झाड हलवून जैतूनची फळे पाडतात. पण काही झाडावर राहतातच उंचावरच्या फांद्यावर चार-पाच फळे राहून जातातच. ह्या शहरांचेही असेच होईल. सर्वशक्तिमान परमेश्वराने हे सांगितले आहे.

7त्या वेळी लोक देवाकडे म्हणजे आपल्या जन्मदात्याकडे पाहतील. त्यांना इस्राएलच्या पवित्र देवाचे दर्शन होईल. 8लोक, स्वत:च्या हाताने केलेल्या वेद्यांकडे जाणार नाहीत. त्यांनी खोट्या देवांसाठी तयार केलेल्या अशेरा स्तंभाचा आणि धूपाच्या वेद्यांचा ते मान ठेवणार नाहीत.

9त्या वेळेला किल्ले असलेली सर्व शहरे ओस पडतील. इस्राएलचे लोक येण्याआधी त्या भूमीवर जसे डोंगर आणि जंगले होती* त्याप्रमाणे ती शहरे होतील. पूर्वी इस्राएली

**इस्राएलचे लोक ... जंगले होती** ह्याचा दुसरा एक अर्थ 'तेथे होराइट व आमोराइट लोक होते.'

लोकांना येताना पाहून तेथे राहणारे लोक पळून गेले.
भविष्यात परत एकदा देश ओस पडेल. 10असे घडण्याचे
कारण तू तुला वाचवणाऱ्या देवाला विसरलास. देव हे
तुझ्यासाठी सुरक्षित आश्रयस्थान आहे, हे तुझ्या लक्षात
राहिले नाही.

दूरच्या देशांतून तू चांगल्या जातीच्या द्राक्षवेली आणल्यास
तू त्यांची लावणी करशील पण त्या वाढणार नाहीत.
11एके दिवशी तू द्राक्षवेलींची लागवड करशील, त्या
वाढाव्या म्हणून प्रयत्न करशील. दुसऱ्या दिवसापासून
त्या वाढूही लागतील पण सुगीच्या काळात तू फळे गोळा
करायला जाशील तेव्हा तुला सगळे सुकून गेलेले दिसेल.
रोगाने सर्व वेली मरून जातील.

12समुद्राच्या गर्जनेप्रमाणे येणारा पुष्कळ लोकांचा
आक्रोश ऐक. ते मोठ्याने रडत आहेत. लाटा कमेकीवर
आदळून उठणाऱ्या आवाजाप्रमाणे हा आक्रोश आहे.
13लोकांची स्थितीही त्या लाटांप्रमाणेच होईल. देव त्यांची
कानउघाडणी करील आणि ते लांबवर धावत सुटतील.
लोकांची स्थिती वाऱ्यावर उडून जाणाऱ्या फोलपटाप्रमाणे
होईल. वावटळीत उडून जाणाऱ्या गवताप्रमाणे त्यांची
अवस्था होईल.
14त्या रात्री सर्व माणसे अतिशय भयभीत होतील.
उजाडण्यापूर्वी सर्व नष्ट झालेले असेल. त्यामुळे आमच्या
शत्रूंना काहीही मिळणार नाही ते ह्या भूमीवर पाय ठेवतील
तेव्हा येथे काहीही उरलेले नसेल.

## देवाचा इथिओपियाला संदेश

18 इथिओपियामधील नद्यांकाठच्या प्रदेशाकडे पाहा.
तेथे इतके कीटक आहेत की त्यांचे गुणगुणणे
तुम्ही ऐकू शकाल. 2तेथील लोक बांबूच्या नावातून समुद्र
पार करतात.

शीघ्रगती दुतांनो, त्या उंच आणि बलवान लोकांकडे
जा. (ह्या उंच व धडधाकट लोकांना इतर लोक घाबरतात.
त्याचे राष्ट्र बलशाली आहे. त्यांच्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राचा
पराभव केला आहे. त्यांचा देश नद्यांनी विभागलेला आहे.)
3त्यांना इशारा करा की त्यांचे काहीतरी वाईट होणार
आहे. त्या राष्ट्रांचे वाईट होताना जगातील सर्व लोक
पाहतील. डोंगरावर फडकणाऱ्या ध्वजाप्रमाणे ही गोष्ट
सर्वांना स्वच्छ दिसेल. ह्या उंच लोकांबाबत घडणारी गोष्ट
जगातील सर्व लोक रणशिंगाच्या आवाजाप्रमाणे स्पष्टपणे
ऐकतील.
4परमेश्वर मला म्हणाला, "माझ्यासाठी तयार केलेल्या
ठिकाणी मी असेन.* मी शांतपणे ह्या गोष्टी घडताना
पाहीन. 5उन्हाळ्यातील प्रसन्न दिवशी दुपारी लोक विश्रांती
घेत असतील. (उन्हाळा असल्यामुळे पाऊस अजिबात
नसेल. फक्त सकाळी दव असेल.) तेव्हाच काहीतरी
भयानक घडेल. सगळीकडे फुले फुललेली असतील,
द्राक्षे पिकत असतील, पण सुगीचा हंगाम येण्याआधीच
शत्रू येईल व सर्व झाडे कापून टाकील तो द्राक्षाच्या वेली
तोडून फेकून देईल. 6त्या वेली डोंगरावरील पक्ष्यांच्या
आणि जंगली जनावरांच्या उपयोगी पडतील. उन्हाळ्यात
पक्षी त्यात राहतील आणि थंडीत जंगली जनावरे त्या
खाऊन टाकतील."
7त्या वेळेला, सर्वशक्तिमान परमेश्वराला अर्पण
करण्यासाठी खास वस्तू आणल्या जातील. ह्या वस्तू,
उंच आणि धडधाकट लोक, देवाच्या स्थळी सीयोनच्या
डोंगरावर आणतील. (ह्या उंच व धडधाकट लोकांना
सर्व लोक घाबरतात. त्यांचे राष्ट्र बलाढ्य आहे. ते
इतर राष्ट्रांना हरवते. हे राष्ट्र नद्यांनी विभागले गेले
आहे.)

## देवाचा मिसरला संदेश

19 मिसरबद्दल शोक संदेश पाहा, परमेश्वर, जलद
गतीने जाणाऱ्या मेघावर आरूढ होऊन येत आहे.
देव मिसरमध्ये प्रवेश करील आणि तेथील खोटे देव
भीतीने थरथर कापू लागतील मिसर खरा धैर्यवान होता
पण त्याचे धैर्य गरम मेणाप्रमाणे वितळून जाईल.
2देव म्हणतो, "मी मिसरमधील लोकांना त्यांच्याच
लोकांविरुध्द लढायला लावीन. भावाभावात लढाई
होईल शेजारी शेजाऱ्याच्याविरुध्द जाईल. शहरे
एकमेकांच्या विरुध्द जातील. प्रदेश एकमेकांच्या
विरोधात जातील. 3मिसरच्या लोकांचे बेत मी उधळून
टाकीन. मिसरवासी गोंधळून जातील. ते काय करावे
याबाबत त्यांचे खोटे देव, चाणाक्ष लोक, जादूगार, मांत्रिक
यांचा सल्ला घेतील. पण त्याचा काहीही उपयोग होणार
नाही.
4प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "मी मिसरला
कठोर शासकाच्या हातात देईन. एक सामर्थ्यवान राजा
मिसरवर राज्य करील. 5नाईल नदी कोरडी पडेल. समुद्र
आटतील." 6सर्व नद्यांच्या पाण्याला दुर्गंध येईल. सर्व कालवे
सुकतील आणि मिसरमधील पाणी नाहीसे होईल.
पाणवनस्पती कुजून जातील. 7नदीकाठची झाडे सुकतील,
मरतील व वाऱ्यावर उडून जातील. नदीच्या रूंदट पात्रातील
वनस्पतीसुध्दा मरतील.
8"नाईल नदीत मच्छिमारी करणारे कोळी दु:खाने
रडतील. कारण ते अन्नासाठी नाईल नदीवर विसंबून
असतात. पण तीच कोरडी होईल. 9विणकर फार दु:खी
होतील. कारण त्यांना कापड तयार करण्यासाठी आंबाडी
लागते. पण नदी कोरडी पडल्यामुळे त्यात आंबाडी होणार
नाही. 10पाण्यावर बांध बांधणाऱ्यांना काम न राहिल्याने
तेसुध्दा कष्टी होतील.

---

**माझ्यासाठी ... असेन** बहुधा हे ठिकाण म्हणजे यरुशलेममधील मंदिर असावे.

11"सोअनचे नेते मूर्ख आहेत. फारोचे 'शहाणे सल्लागार' चुकीचा सल्ला देतात. हे नेते स्वत:ला शहाणे समजतात. ते म्हणतात की आम्ही पूर्वीच्या राजघराण्यातील आहोत. पण ते स्वत:ला जेवढे शहाणे समजतात तेवढे ते नाहीत."

12मिसर देशा, तुझे ते सुज्ञ लोक कोठे आहेत? त्यांना सर्वशक्तिमान परमेश्वराने मिसरबद्दल काय योजले आहे ते समजले पाहिजे. त्यांनी तुला काय घडणार आहे ते सांगितले पाहिजे.

13सोअनाच्या नेत्यांना मूर्ख बनविले गेले आहे. नोफाचे नेते खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवतात. म्हणून ते सर्व मिसरला चुकीच्या मार्गाने नेतात. 14परमेश्वराने नेत्यांना गोंधळात टाकले आहे. ते स्वत: भरकटतात आणि मिसरला चुकीच्या वाटेने नेतात. ते जे काय करतात ते चूकच असते. ते मद्यप्यांसारखे मळमळून येऊन गडबडा लोळत आहेत. 15नेत्यांना करण्यासारखे आता काही नाही. (हे नेते म्हणजे "डोके व शेपूट," "शेंडे व बुडखे" आहेत.)

16त्या वेळी मिसरवासी घाबरलेल्या बायकांसारखे दिसतील. ते सर्वशक्तिमान परमेश्वराला भितील. देव शिक्षा करण्यासाठी हात उगारील व त्यांची घाबरगुंडी उडेल. 17यहुद्यांच्या भूमीला मिसरमधील सर्व लोक घाबरतील. मिसरमधील प्रत्येकजण यहुदाचे नाव ऐकताच भयभीत होईल. असे होण्याचे कारण हेच की सर्वशक्तिमान परमेश्वराने मिसरमध्ये भयानक गोष्टी घडून आणण्याची योजना आखली आहे. 18ह्या वेळेला मिसरमधील पाच शहंरातील लोक यहुद्यांची कनान भाषा बोलतील. त्या पाच शहरांपैकी एका शहराचे नाव "ईर-हरेस" असेल.

ह्या शहरांत राहणारे लोक सर्व शक्तिमान परमेश्वरला अनुसरण्याची शपथ वाहतील. 19तेव्हा मिसरच्या मध्यावर परमेश्वरासाठी एक वेदी असेल. व परमेश्वराविषयी आदर दाखविण्यासाठी मिसरच्या सीमेवर एक स्मारक उभारले जाईल. 20सर्वशक्तिमान परमेश्वराच्या सामर्थ्यशाली कृत्यांची मिसरमधील ही निशाणी आणि पुरावा असेल. केव्हाही लोकांनी परमेश्वराकडे मदतीसाठी धावा केला की परमेश्वर मदत पाठवील. लोकांचे रक्षण व बचाव करण्यास देव एका माणसाला पाठवील हा माणूस अत्याचार करणाऱ्यापासून लोकांना सोडवील.

21त्या वेळेला मिसरवासीयांना परमेश्वराची खरी ओळख होईल. ते देवावर प्रेम करतील. ते देवाची उपासना करतील आणि बळी अर्पण करतील. ते परमेश्वराला नवस बोलतील आणि ते फेडतील.

22परमेश्वर मिसरमधील लोकांना शिक्षा करील. नंतर परमेश्वर त्यांना क्षमा करील. ते परमेश्वराला शरण जातील. परमेश्वर त्यांच्या प्रार्थनेला पावेल व त्यांना क्षमा करील.

23त्या वेळी मिसर ते अश्शूर असा महामार्ग असेल. त्यामुळे मिसर व अश्शूर त्यांच्यामधे ये-जा होईल. मिसर अश्शूरच्या बरोबरीने वागेल.

24त्या वेळी इस्राएल, अश्शूर व मिसर एकत्र येऊन राज्य करतील. हा देशाच्या दृष्टीने ईश्वराचा कृपाप्रसादच ठरेल. 25सर्वशक्तिमान परमेश्वर ह्या देशांवर कृपा करील. तो म्हणेल, "मिसरवासीयांनो, तुम्ही माझे आहात अश्शूरच्या रहिवाशांनो, तुम्हाला तर मीच घडवलय्! इस्राएलच्या लोकांनो, मी तर तुमचा स्वामी आहे. तुम्हासर्वांना माझे आशीर्वाद!"

## अश्शूर मिसर व कूश पराभव करील

20 सर्गोन अश्शूरचा राजा होता. त्याने तर्तानला अश्दोदवर स्वारी करायला पाठविले. तर्तानने चढाई करून ते शहर जिंकून घेतले. 2त्या वेळेला आमोजचा मुलगा यशया याला परमेश्वर म्हणाला, "जा तुझ्या अंगावरील शोकप्रदर्शक कपडे व जोडे काढ." यशयाने परमेश्वराच्या आज्ञेच पालन केले आणि तो उघडा व अनवाणी चालला.

3तेव्हा परमेश्वर म्हणाला, "यशया तीन वर्षे उघडा व अनवाणी फिरला. हा मिसर व कूशयाला संकेत आहे. 4अश्शूरचा राजा त्यांना कैद करील व त्यांच्या देशापासून त्यांना दूर घेऊन जाईल. आबालवृध्दांना वस्त्रे व जोडे काढून नेले जाईल व त्यांना संपूर्ण नग्न केले जाईल. मिसरचें लोक लज्जित होतील. 5जे कुशकडे मदतीची अपेक्षा करीत होते. त्यांचा अपेक्षाभंग होईल. मिसरच्या वैभवाने लोक आश्चर्यचकीत झाले होते परंतु ते लज्जित होतील."

6समुद्रकाठी राहणारे लोक म्हणतील, "त्या देशांवर आम्ही मदतीसाठी विश्वास टाकला, अश्शूरच्या राजापासून रक्षण करण्यासाठी त्यांच्याकडे धाव घेतली पण त्यांचाच पराभव झाला, मग आता आमचा निभाव कसा लागणार?"

## देवाचा बाबेलोनला संदेश

21 बाबेलोनबद्दल (समुद्राजवळचे वाळवंट) देवाचा शोक संदेश.

वाळवंटातून काहीतरी येत आहे. नेगेबच्या वाळवंटातून येणाऱ्या वादळाप्रमाणे ते आहे. भयंकर देशातून ते येत आहे.

2काहीतरी भयंकर घडणार असल्याचा दृष्टान्त मला होत आहे. विश्वासघातकी तुझ्याविरुध्द जाताना मला दिसत आहे. लोक तुझी संपत्ती लुटून नेताना मी पाहतोय, एलाम, जा आणि लोकांवर चढाई कर. मादया, शहराला वेढा घाल आणि त्याचा पाडाव कर. त्या शहरातील सर्व दुष्कृत्ये मी नाहीशी करीन.

3भयंकर गोष्टी पाहून मी घाबरलो आहे. भीतीने माझ्या पोटात गोळा उठतो त्या भीतीच्या वेदना प्रसूतिवेदनेप्रमाणे आहेत. जे मी ऐकतो त्याने भयभीत होतो, जे पाहतो

त्यामुळे भीतीने माझा थरकाप होतो. [4]मी चिंताग्रस्त आहे आणि भीतीने थरथर कापत आहे. माझी प्रसन्न संध्याकाळ काळरात्र बनली आहे.

[5]लोकांना वाटते सारे काही ठीक चालले आहे. लोक म्हणत आहेत "जेवणाची तयारी करा. खा. प्या." त्याच वेळी तिकडे सैनिक म्हणत आहेत "टेहळणीदार ठेवा. सेनाधिकाऱ्यांनो, उठा व ढाली सज्ज करा."

[6]माझा प्रभू मला म्हणाला, "जा आणि ह्या शहराचे रक्षण करण्यासाठी पहारेकऱ्याची नेमणूक कर. तो जे जे पाहील त्याची त्याने वर्दी द्यावयास हवी. [7]जर त्या रखवालदाराने घोडेस्वारांच्या रांगा, गाढवे किंवा उंट पाहिले तर त्याने अतिशय काळजीपूर्वक चाहूल घेतली पाहिजे."
[8]मग एके दिवशी रखवालदाराने इशारा दिला. सिंहनाद करून रखवालदार म्हणाला, "हे प्रभु! रोज मी टेहळणी बुरुजावरून टेहळणी करीत असतो रोज रात्री माझा खडा पहारा असतो. [9]पण पाहा! ते येत आहेत! लोकांच्या व घोडेस्वारांच्या रांगा मला दिसत आहेत!"

नंतर दूत म्हणाला, "बाबेलोनचा पराभव झाला. ते जमीनदोस्त झाले. बाबेलोनच्या खोट्या देवांच्या सर्व मूर्तींची मोडतोडहोऊन त्या धुळीला मिळाल्या आहेत."

[10]यशया म्हणाला, "माझ्या लोकांनो, सर्वशक्तिमान परमेश्वराने, इस्राएलच्या देवाने जे मला ऐकवले, ते मी तुम्हाला सांगितले. खळ्यातील धान्याप्रमाणे तुम्ही झोडपले जाल."

## देवाचा एदोमला संदेश

[11]दुमाविषयीचा शोक संदेश.
सेईराहून (एदोमहून) मला एकजण भेटायला आला. तो म्हणाला, "रखवालदारा, रात्र किती राहिली? अंधार सरायला अजून किती वेळ आहे?"
[12]रखवालदार उत्तरला, "सकाळ होत आहे पण परत रात्र होईल. तुम्हाला काही विचारायचे असल्यास परत या* व मग विचारा."

## देवाचा अरेबियाला संदेश

[13]अरेबियाविषयी शोक संदेश
ददानींच्या काफल्याने अरेबियाच्या वाळवंटातील काही झाडांखाली रात्र काढली.
[14]त्यांनी तहानेलेल्या प्रवाशांना पाणी दिले. तेमा देशातील लोकांनी प्रवाशांना अन्न दिले.

**परत या** याचा अर्थ 'हृदयपरिवर्तन करा, पश्चाताप करा' असाही होऊ शकतो.

[15]ते प्रवासी, त्यांना ठार मारायला उठलेल्या तलवारीपासून व युध्द करायला सज्ज असलेल्या धनुष्यांपासून दूर पळत होते. ते घनघोर युध्दापासून दूर पळत होते.

[16]ह्या गोष्टी घडून येतील असे माझ्या प्रभु परमेश्वराने मला सांगितले. परमेश्वर म्हणाला, "एक वर्षात (सालदाराच्या मोजणीप्रमाणे) केदारचे वैभव लयाला जाईल. [17]त्या वेळी अगदी थोडे धनुर्धारी, केदारचे महान योध्दे, मागे उरतील." इस्राएलच्या परमेश्वर देवाने सांगितले आहे.

## देवाचा यरुशलेमला संदेश

22 दृष्टान्ताच्या दरीविषयी शोक संदेश.
लोकहो, तुमचे काय बिघडले आहे? तुम्ही घराच्या छपरावर का लपला आहात?
[2]पूर्वी हे शहर फार गजबजलेले होते. येथे गलबलाट होता आणि शहर सुखी होते. पण आता परिस्थिती बदलली आहे. तुझे लोक मारले गेले पण तलवारीच्या वाराने नव्हे. तुझे लोक मेले हे खरे, पण लढताना नव्हे.
[3]तुझे नेते एकत्र होऊन खूप लांब जरी पळून गेले, तरी ते पकडले गेले. ते पकडले गेले ते धनुष्याचा उपयोग न करता. ते सर्व नेते एकत्रितपणे पळून गेले पण पकडले गेलेच.
[4]म्हणून मी म्हणतो, "माझ्याकडे बघू नका, मला रडू द्या. माझ्या लोकांच्या नाशाबद्दल माझे सांत्वन करू नका."

[5]परमेश्वराने एक विशेष दिवस निश्चित केला आहे त्या दिवशी तेथे दंगली व गोंधळ होईल दृष्टान्ताच्या दरीत लोकांची तुडवातुडवी होईल. शहराची तटबंदी पाडली जाईल दरीतील लोक डोंगर माथ्यावर असलेल्या शहरातील लोकांकडे बघून आरडाओरडा करतील. [6]एलामचे घोडदळ भाते अडकवून लढाईसाठी दौड करील. कीरवासीयांच्या ढालींचा खणखणाट होईल. [7]तुझ्या खास दरीत सैन्यांची गाठ पडेल. रथांनी दरी भरून जाईल. घोडदळ शहराच्या वेशीपाशी ठेवले जाईल. [8]तेव्हा यहुदी लोक रानातील राजवाड्यात ठेवलेल्या शस्त्रांचा उपयोग करू पाहतील.
शत्रू यहुदाचे तट पाडतील. [9–11]दावीदाच्या शहरांच्या भिंतींना भगदाडे पडायला सुरवात होईल. आणि तुम्हाला ती स्पष्टपणे दिसतील. मग तुम्ही घरांची मोजदाद कराल आणि तुम्ही घरांचे दगड तटाची भगदाडे बुजवायला वापराल. पाणी साठविण्यासाठी दोन भिंतीत जागा करून तुम्ही जुन्या झऱ्याचे पाणी सोडाल.
तुमच्या बचावासाठी तुम्ही हे सर्व कराल पण ज्याने हे सर्व केले त्या देवावर तुम्ही श्रध्दा ठेवणार नाही. ज्याने

फार पूर्वीच या गोष्टी करून ठेवल्या त्या देवाकडे तुमचे लक्षच जाणार नाही.

12म्हणून माझा प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर तुमच्या मृत मित्रांसाठी शोक करण्यास व रडण्यास सांगेल. लोक मुंडन करून शोकप्रदर्शक वस्त्रे घालतील.

13पण पाहा! आता लोक आनंदात आहेत. ते आनंदोत्सव साजरा करत आहेत. ते म्हणत आहेत,

गुरे, मेंढ्या मारा. आपण उत्सव साजरा करू. आपण जेवण करू, मद्यपान करू कारण उद्या आपल्याला मरायचे आहे.

14सर्वशक्तिमान परमेश्वराने सांगितलेल्या ह्या गोष्टी मी स्वत: माझ्या कानाने ऐकल्या. "तुमच्या दुष्कृत्यांबद्दल तुम्ही अपराधी आहात. या अपराधांबद्दल क्षमा करण्यापूर्वीच तुम्ही मराल याची मला खात्री आहे." माझ्या प्रभूने, सर्वशक्तिमान परमेश्वराने मला हे सांगितले.

## देवाचा शेबनाला संदेश

15माझ्या प्रभूने, सर्वशक्तिमान परमेश्वराने मला सांगितले, 'राजप्रासादातील कारभारी शेबना याच्याकडे जा. तो राजवाड्याचा कारभार पाहतो.
16राजप्रासादातील त्या नोकराला जाब विचार, 'येथे काय करीत आहेस? तुझ्या कुटुंबातील कोणाचे येथे दफन केले आहे का? तू येथे थडगे का खणीत आहेस?"

यशया म्हणाला, "हा माणूस पाहा, हा स्वत:चे थडगे महत्वाच्या जागी खणत आहे खडक फोडून तो स्वत:चे थडगे खणत आहे."

17–18"हे माणसा, परमेश्वर तुला चिरडून टाकील. परमेश्वर तुझा लहानसा चेंडू करून तुला दुसऱ्या मोठ्या देशात भिरकावून देईल. तेथेच तू मरशील."

परमेश्वर म्हणाला, "तुला तुझ्या रथांचा फार गर्व आहे पण त्या दूरदेशातील तुझ्या नवीन राजाचे रथ तुझ्यापेक्षा चांगले असतील. त्याच्या राजवाड्यात तुझे रथ शोभणार नाहीत.
19येथल्या महत्वाच्या पदावरून तुला कमी करायला मी भाग पाडीन. तुझा नवा राजा तुला महत्वाच्या पदावरून दूर करील.
20त्या वेळी मी माझा सेवक आणि हिल्कीयाचा मुलगा एल्याकीम ह्याला बोलावीन.
21"मी तुझी वस्त्रे व राजदंड काढून एल्याकीमला देईन. तुझे महत्वाचे पद त्याला देईन. तो सेवक यरुशलेमच्या लोकांना व यहूद्याच्या कुटुंबीयांना पित्याप्रमाणे असेल.

22"दावीदाच्या घराची किल्ली मी एल्याकीमच्या ताब्यात देईन. त्याने उघडलेले दार उघडेच राहील. कोणीही ते बंद करू शकणार नाही. त्याने बंद केलेले दार बंदच राहील. ते कोणीही उघडू शकणार नाही. त्याच्या वडिलांच्या घरात त्याला महत्वाचे स्थानप्राप्त होईल.
23अतिशय कठीण पृष्ठभागावरठोकून बसवलेल्या खिळ्याप्रमाणे मी त्याला मजबूत करीन.
24त्याच्या वडिलांच्या घरातील महत्वाच्या व पूज्य वस्तू त्याच्या ताब्यात जातील. आबालवृद्ध त्याच्यावर अवलंबून असतील. हे अवलंबून राहणेभक्क म खिळ्याला अडकविलेल्या छोट्या ताटल्या व मोठ्या पाण्याच्या बाटल्यांप्रमाणे असेल.

25"आता, कठीण पृष्ठभागावर ठोकून बसविलेला खिळा (शेबना) त्या वेळी कमकुवत होऊन तुटून पडेल. तो खिळा जमिनीवर तुटून पडल्याने त्याला अडकविलेल्या वस्तूंचा नाश होईल. नंतर मी दृष्टान्तात सांगितल्याप्रमाणे सर्व होईल." (परमेश्वराने सांगितले असल्यामुळे ह्या गोष्टी घडतील)

## देवाचा लेबाननला संदेश

23 सोरविषयी शोक संदेश तार्शीशच्या गलबतावरील प्रवाशांनो, तुमची गलबते जेथे लागतात ते बंदर उध्वस्त झाले आहे तेव्हा शोक करा. (कित्तीहून परतणाऱ्या गलबतांवरील प्रवाशांना ही बातमी सांगितली गेली.)

2समुद्रकाठी राहणाऱ्या लोकांनो, दु:खाने स्तब्ध व्हा. सोर हे "सीदोनचे व्यापारी केंद्र आहे." तेथील व्यापारी समुद्रपार जाऊन व्यापार करतात आणि धनदौलत आणतात.
3ते समुद्रमार्गे जाऊन धान्याचा शोध घेतात. नाईल नदीच्या तीरावर पिकलेले धान्य ते विकत घेतात आणि इतर राष्ट्रांत विकतात.

4सीदोन, तू खरे म्हणजे जास्त खिन्न व्हायला पाहिजेस. का? कारण आता समुद्र व समुद्रातील किल्ला म्हणजे सोर म्हणतात,

"मला मुले नाहीत. मी प्रसूतिवेदना अनुभवल्या नाहीत. मी मुलांना जन्म दिला नाही. मी मुलांना वाढवले नाही."

5मिसरला सोरची वार्ता कळेल. ह्या वार्तेने मिसरला धक्का बसेल दु:ख होईल.

6गलबतांनो, तुम्ही तार्शीशला माघारी जाणे बरे! समुद्रकाठी राहणाऱ्या लोकांनी खिन्न व्हायला पाहिजे.

7पूर्वी तुम्ही सोरमध्ये मजा केली. आरंभापासून त्या शहराची वाढ होत आहे. त्या शहरवासीयांनी उपजीविकेसाठी दूरवर प्रवास केला आहे.

8सोर शहराने पुष्कळ नेते दिले. तेथील व्यापारी म्हणजे जणूराजपुत्रच. व्यापाऱ्यांना सगळीकडे मान मिळतो. मग सोरविरुध्द कट कोणी रचला?

9ही सर्वशक्तिमान परमेश्वराचीच करणी होती. त्याने सोरचे महत्व कमी करायचे ठरविले.

10तार्शीशच्या गलबतांनो, तुम्ही स्वदेशी परत जाणे योग्य. लहान नदी जशी पार करतात, तसा समुद्र पार करा. तुम्हाला आता कोणीही अडवणार नाही.

11परमेश्वराने आपला हात समुद्रापर्यंत पसरला आहे. सोरविरुध्द लढण्यासाठी तो राज्यांना गोळा करीत आहे.

त्याने, तार्शीशचे सुरक्षित ठिकाण सोर नष्ट करण्याची
कनानला आज्ञा दिली आहे.
12परमेश्वर म्हणतो, “सीदोनच्या कुमारिके, तुझा नाश
होईल. तू पुन्हा आनंदित होणार नाहीस.” पण सोरचे रहिवासी
म्हणतात, “सायप्रस आम्हाला मदत करील.” पण जरी
तुम्ही समुद्र पार करून सायप्रसला गेलात, तरी तुम्हाला
तेथे आराम करायला जागा मिळणार नाही.
13मग सोरचे लोक म्हणतात, “बाबेलोनमधील लोक
आम्हाला मदत करतील.” पण खास्द्यांच्या भूमीकडे
(बाबेलोनकडे) पाहा. बाबेलोन आता देश राहिलेला नाही.
अश्शूरने बाबेलोनवर हल्ला केला आणि त्याच्या भोवती
युध्दस्तंभ उभारले. सुंदर घरातील सर्व चीजवस्तू सैनिकांनी
लुटल्या. अश्शूरांनी बाबेलोनला जंगली जनावरांना
राहण्यायोग्य बनविले. त्यांनी बाबेलोनला पूर्णपणे उजाड
केले.
14तार्शीशच्या गलबतांनो, तुमचे सुरक्षिततेचे
ठिकाण-सोर-हे नष्ट केले जाणार आहे म्हणून तुम्ही
शोक करा.

15सत्तर वर्षे सोर शहराला लोक विसरून जातील. (हा
एका राज्याच्या कारकिर्दी इतका कालखंड आहे.) सत्तर
वर्षांनंतर सोरची स्थिती पुढील गाण्यातील वेश्येसारखी
असेल.

16पुरुषांच्या विस्मरणात गेलेल्या वारांगने, तुझी सारंगी
उचल आणि शहरातील रस्त्यातून फीर. सारंगीवर सुरेल
गाणे वाजव. तुझे गाणे पुन्हा पुन्हा म्हण. म्हणजे लोकांना
तुझी आठवण होईल.

17सत्तर वर्षांनंतर परमेश्वर सोरबद्दल फेरविचार
करील. आणि आपला निर्णय देईल. तेथे परत व्यापार
सुरू होईल. ती पृथ्वीवरील सर्व देशांची वारांगना होईल.
18पण तिने मिळविलेला पैसा ती जवळ ठेवणार नाही.
व्यापारात तिला झालेला फायदा परमेश्वरासाठी राखून
ठेवला जाईल. तो फायदा, ती परमेश्वराची सेवा
करणाऱ्यांना देईल. मग परमेश्वराची सेवा करणाऱ्यांना
पोटभर अन्न मिळेल. ते चांगले कपडे घालतील.

## देव इस्राएलला शिक्षा करील

24 पाहा! परमेश्वर ह्या देशाचा नाश करील. ही
भूमी पूर्णपणे स्वच्छ करील. परमेश्वर लोकांना
बळजबरीने दूर जायला लावील.
2त्या वेळेला सामान्य लोक आणि याजक यांना एकाच
मापाने मोजले जाईल. गुलाम व मालक हे सारखेच समजले
जातील. दासी आणि मालकीण यांच्यात फरक केला
जाणार नाही. खरीददार व विक्रेते, कर्ज घेणारे व कर्ज
देणारे आणि धनको व ऋणको ह्यांत भेद केला जाणार
नाही. 3सर्व लोकांना देशातून बळजबरीने हाकलून दिले
जाईल. सर्व संपत्ती लुटली जाईल. परमेश्वराच्या आज्ञेवरून
हे घडेल. 4देश ओस पडून त्याच्यावर शोककळा पसरेल.
जग ओसाड व दु:खी होईल. ह्या देशातील महान नेते
दुबळे होतील.
5ह्या देशातील लोकांनी देशाला ओंगळ केले. हे कसे
झाले? देवाच्या शिकवणुकीविरुध्द जाऊन त्यांनी चुकीचे
आचरण केले. देवाचे नियम त्यांनी मानले नाहीत. पूर्वी
लोकांनी देवाबरोबर करार केला पण ती त्यांनीच मोडला.
6ह्या देशात राहणारे लोक दुष्कृत्यांचे धनी आहेत. म्हणून
देवाने हा देश नष्ट करायचा पण केला. लोकांना शिक्षा
होईल. फारच थोडे वाचतील.
7द्राक्षवेली सुकत चालल्या आहेत. नवीन मद्य खराब
आहे. पूर्वी लोक सुखी होते. पण आता तेच लोक दु:खी
झाले आहेत. 8लोकांचे आनंदप्रदर्शन थांबले आहे. सगळे
आनंदनाद थांबले आहेत. सारंगीतून आणि डफातून उठणारे
आनंदसंगीत बंद पडले आहे. 9लोक मद्य पिताना आनंदगीते
म्हणत नाहीत. मद्याची चव कडू झाली आहे.
10“संपूर्ण गोंधळ” हेच नाव या शहराला शोभेल. शहराचा
नाश झाला आहे. लोक घरात प्रवेश करू शकत नाहीत.
दारांना अडसर घातले आहेत. 11बाजारात लोक अजूनही
मद्याची मागणी करतात पण त्यात पूर्वीचा आनंद नाही.
सगळीच मजा गेली आहे. 12सर्वत्र पडझड झाली आहे.
वेशीसुध्दा कोलमडून पडल्या आहेत.

13सुगीच्या काळात, लोक जैतूनची फळे झाडावरून
पाडतात. पण काही झाडावर राहतातच अनेक देशांमध्ये
असलेल्या ह्या देशाचे देखील असेच होईल.
14वाचलेले लोक आरडाओरड सुरु करतील त्यांचा
आवाज महासागराच्या गर्जनेपेक्षा मोठा असेल.
परमेश्वराची महानता पाहून ते आनंदित होतील.
15ते लोक म्हणतील, “पूर्वेकडच्या लोकांनो,
परमेश्वराचे स्तवन करा. दूरच्या देशांतील लोकांनो,
इस्राएलच्या परमेश्वर देवाचे स्तवन करा.”
16जगाच्या कानाकोपऱ्यातून देवाचे स्तुतिस्तोत्र
आपल्याला ऐकायला येतील. ह्या गीतांतून खऱ्या देवाची
स्तुती असेल. पण मी म्हणतो, “पुरे पुष्कळ झाले मी
ज्या गोष्टी पाहतो त्या भयानक आहेत. लोकांच्या
विरुध्द विश्वासघातकी उठले आहेत. व त्यांना त्रास देत
आहेत.
17ह्या देशात राहणाऱ्या लोकांवर येणारे संकट मला
दिसत आहे. त्यांची भीती, त्यांच्या पुढे असलेले खाचखळगे
व सापळे मला दिसतात.
18लोकांना संकटाची चाहूल लागून ते घाबरून जातील.
काही लोक सैरावैरा पळतील. पण ते खाचखळग्यात पडतील
आणि सापळ्यात अडकतील. त्यातील काही खड्ड्यातून
चढून बाहेर येतील.पण ते दुसऱ्या सापळ्यात अडकतील,”

आकाश फाटेल आणि प्रलय होईल. पृथ्वीचा पाय कापू
लागेल.
19धरणीकंप होऊन जमीन दुभंगेल.
20पृथ्वीला पापांचा भार झाला आहे. म्हणून ती त्या
ओझ्याखाली दबून जाईल. पृथ्वी एखाद्या खिळखिळ्या
झालेल्या घरासारखी उगमगेल. एखाद्या मद्यप्याप्रमाणे
कोसळेल आणि पुन्हा उठणार नाही.
21 त्या वेळी, परमेश्वर, स्वर्गातील सैन्यांचा स्वर्गात व
पृथ्वीवरील राजांचा पृथ्वीवर, न्यायानिवाडा करील.
22खूप राजे एकत्र जमतील आणि त्यांना तुरुंगात टाकले
जाईल. पण शेवटी, बऱ्याच काळानंतर, त्यांना न्याय दिला
जाईल.
23यरुशलेममधील सीयोन पर्वतावर परमेश्वराचेराज्य
असेल. त्या देवाचे तेज नेत्यांना दिसेल. त्याच्या तेजापुढे
चंद्र ओशाळेल आणि सूर्याला लाज वाटेल.

## देवाचे स्तुतिस्तोत्र

25 प्रभू, तू माझा परमेश्वर आहेस. मला तुझ्याबद्दल
आदर वाटतो व तुझे मी स्तवन करतो. तू आश्चर्य
घडवली आहेस. तू पूर्वी केलेले भाकीत पूर्णपणे खरे
ठरले आहे. तू सांगितलेली प्रत्येक गोष्ट जशीच्या तशी
घडली आहे.
2तू ज्या शहराचा नाश केलास, ते शहर मजबूत तटबंदीने
सुरक्षित केलेले होते. पण आता तेथे फक्त दगडांचा खच
पडला आहे परकीयांचा राजवाडा जमीनदोस्त केला गेला
आहे. तो परत कधीच बांधला जाणार नाही.
3बलाढ्य राष्ट्रातील लोक तुला मान देतील. क्रूर
राष्ट्रांतील शहरे तुला घाबरतील.
4परमेश्वरा, तू गरजू गरीब लोकांचा आसरा आहेस.
त्यांच्यापुढील अनेक समस्या त्यांना खच्ची करू पाहतात
पण तू त्यांचे रक्षण करतोस. परमेश्वरा, तू उन्हापावसापासून
रक्षण करणाऱ्या निवाऱ्यासारखा आहेस. पीडा या तुफान
वादळ व पावसासारख्या असतात. पण पावसाची झड
भिंतीवर आपटून खाली पडते. घरातल्या लोकांना तिचा
त्रास होत नाही.
5शत्रू आरडाओरडा करून गोंगाट करतो. भयंकर शत्रू
आव्हाने देतो. पण देवा तू त्यांचा बंदोबस्त करतोस. ज्याप्रमाणे
उन्हाळ्यात वाळवंटातील झाडेझुडपे सुकून जमिनीवर गळून
पडतात, त्याप्रमाणे तू शत्रूचा पराभव करून त्यांना तुझ्यापुढे
गुडघे टेकायला लावतोस. ज्याप्रमाणे मोठे ढग उष्णतेचा
ताप कमी करतात, त्याप्रमाणे तू भयंकर शत्रूच्या गर्जना
थांबवतोस.

## देवाची त्याच्या भक्तांना मेजवानी

6त्या वेळेस, सर्वशक्तिमान परमेश्वर, डोंगरावरील सर्व
लोकांना मेजवानी देईल. मेजवानीत उत्कृष्ट अन्नपदार्थ
व उंची मद्य असेल. मांस कोवळे व चांगल्या प्रतीचे असेल.
7सध्या बुरख्याने सर्व राष्ट्रे आणि लोक झाकून गेले
आहेत. हा बुरखा म्हणजेच “मृत्यू” होय. 8पण मृत्यूवर
पूर्णपणे मात करता येईल, आणि परमेश्वर, माझा प्रभू,
प्रत्येक चेहऱ्यावरचा प्रत्येक अश्रू पुसून टाकील. पूर्वी
त्याच्या लोकांनी दु:ख भोगले पण देव पृथ्वीवरचे दु:ख
दूर करील. परमेश्वराने सांगितले असल्यामुळेच हे सर्व
घडून येईल.

9तेव्हा लोक म्हणतील, “हा आपला देव आहे. आपण
ज्याची वाट पाहत आहोत तोच हा. तो आपले रक्षण
करायला आला आहे. आपण त्या आपल्या परमेश्वराची
वाट पाहत आहोत, म्हणून जेव्हा परमेश्वर आपले रक्षण
करील तेव्हा आनंद साजरा करू आणि सुखी होऊ.”
10परमेश्वराचे सामर्थ्य ह्या डोंगरावर असल्याने मवाबचा
पराभव होईल. परमेश्वर कचऱ्याच्या ढिगातील गवताच्या
काडीप्रमाणे शत्रूला पायाखाली तुडवील.
11पोहणाऱ्या माणसाच्या हाताप्रमाणे परमेश्वर स्वत:चा
हात लांब करील आणि लोकांना ज्यांचा अभिमान आहे
अशा सर्व गोष्टी तो जमा करील. लोकांनी घडविलेल्या
सर्व सुंदर वस्तू परमेश्वर गोळा करील आणि दूर फेकून
देईल.
12लोकांनी बांधलेल्या उंच भिंती व सुरक्षित जागा
परमेश्वर पाडून टाकून धुळीला मिळवील.

## देवाचे स्तवनगीत

26 त्या वेळेस, यहुदात, लोक पुढील गाणे म्हणतील

परमेश्वराने आम्हाला तारण दिले आहे. भक्कम तटबंदी
व पुरेशी संरक्षणव्यवस्था असलेले आमचे शहर अभेद्य
आहे.
2वेशी उघडा म्हणजे देवाची चांगली शिकवण मानणारे
सज्जन लोक आत प्रवेश करतील.
3परमेश्वरा, तुझ्यावर विसंबून असणाऱ्यांना आणि
तुझ्यावर श्रध्दा ठेवणाऱ्यांना, तू खरी शांती देतोस.
4म्हणून नेहमी परमेश्वरावर विश्वास ठेवा, कारण
परमेश्वर हा तुमच्यासाठी निरंतर सुरक्षित आसरा आहे.
5पण परमेश्वर उद्दाम शहराचा नाश करील, आणि
तेथील लोकांना शिक्षा करील. परमेश्वर ते मोठे शहर
धुळीला मिळवील.
6नंतर दीनदुबळे त्याचे भग्नावशेष पायाखाली
तुडवतील.
7प्रामाणिकपणा हे सज्जनांचे ब्रीद असते. सज्जन सत्याच्या
सरळ मार्गाने जातात, आणि देवा तू तो मार्ग सुकर व
सुलभ करतोस.
8पण परमेश्वरा, तू न्याय कसा करतोस ते बघण्यास
आम्ही उत्सुक आहोत. आमचे आत्मे तुला व तुझ्या नांवाला
कायम स्मरणात ठेवू इच्छितात.

[9]प्रत्येक रात्रीबरोबर तुझ्याशी एकरूप होण्याची आमची इच्छा आहे, आणि प्रत्येक पहाटेबरोबर माझ्यातील आत्मा तुझ्याशी समरस होऊ इच्छितो. जेव्हा तू न्याय देशील तेव्हा लोकांना जगण्याचा योग्य मार्ग सापडेल.

[10]पापी माणसावर तू फक्त दयाच करीत राहिलास तर तो कधीच सत्कृत्य करायला शिकणार नाही. वाईट माणूस चांगल्या लोकांत राहिला तरी वाईट गोष्टीच करील: दुष्टाला परमेश्वराची महानता कदाचित कधीच कळणार नाही.

[11]पण परमेश्वरा, तू त्यांना शिक्षा करण्यास तयार हो. नक्कीच ते हे पाहातील नाही का? परमेश्वरा, तुझ्या लोकांबद्दल असलेले तुझे भक्कम प्रेम तू पाप्यांना दाखव. मग ते नक्कीच खजील होतील. तुझे शत्रू नक्कीच त्यांच्याच आगीत भस्मसात होतील.

[12]परमेश्वरा, आम्ही तडीस नेलेल्या सर्व गोष्टी तूच आमच्यासाठी केल्या आहेस तेव्हा आम्हाला शांती दे.

## देव त्यांच्या लोकांना नवजीवन देईल

[13]परमेश्वरा, तू आमचा देव आहेस. पूर्वी आम्ही इतर भोंदू देवांना अनुसरलो आम्ही त्यांना जवळ केले. पण आता लोकांनी फक्त तुझेच नाव घ्यावे असे आम्हाला वाटते.

[14]ते मृत देव जीवंत होणार नाहीत. त्यांची भुते आता उठणार नाहीत. तू त्यांचा नाश करायचे ठरविलेस आणि त्यांची आठवण देणाऱ्या सर्व खाणाखुणा तू नष्ट केल्यास.

[15]तुझ्या आवडत्या राष्ट्राला तू मदत केलीस. इतर लोकांना त्या राष्ट्राचा पराभव करण्यापासून थांबविलेस.

[16]परमेश्वरा, संकटात असताना लोक तुझे स्मरण करतात तू शिक्षा केल्यास लोक मनात तुझा धावा करतात.

[17]परमेश्वरा, आम्ही तुझ्याबरोबर नाही. प्रसूति वेदना होऊन रडणाऱ्या स्त्रीसारखेआम्ही आहोत. ती वेदनेने विव्हळते.

[18]त्याचप्रमाणे आम्हाल वेदना आहेत. आम्ही जन्म देतो पण तो फक्त वाऱ्याला. आम्ही जगासाठी नवीन लोक तयार करत नाही. आम्ही देशासाठी तारण आणत नाही.

[19]परंतु परमेश्वर म्हणतो, "तुझे लोक मेले असले तरी जिवंत होतील. आमच्या माणसांचे मृतदेह सजीव होतील. मृतांनो, थडग्यातून उठा आणि आनंदित व्हा. तुमच्यावर पडलेले दव हे जणू नव्या दिवसाचा प्रकाश आहे. तो प्रकाश नवाकाळ येत आहे हे दाखवितो. मृत लोकांना आता जमिनीत पुरले आहे पण त्यांना नवजीवन मिळेल."

## देवाचा न्याय बक्षिस किंवा शिक्षा

[20]माझ्या लोकांनो, आपापल्या खोल्यांत जा. दारे लावून घ्या. थोड्या वेळ खोलीतच लपून बसा. देवाचा राग शांत होईपर्यंत लपून राहा.

[21]परमेश्वर दुष्कृत्यांबद्दल, जगातील लोकांचा न्यायनिवाडा करण्यासाठी देव आपले स्थान सोडून येईल. मारल्या गेलेल्या लोकांचे रक्त पृथ्वी त्याला दाखवील.

27 भूमी यापुढे मृतांना झाकून ठेवणार नाही. त्या वेळेला लिव्याथान ह्या कपटी सर्पाचा परमेश्वर न्यायनिवाडा करील. वेटोळे घालून बसलेल्या लिव्याथान सर्पाला परमेश्वर आपल्या मोठ्या, कठीण व बलवान तलवारीने शिक्षा करील. समुद्रातील प्रचंड धुडाला तो मारील.

[2]तेव्हा लोक रम्य द्राक्षमळ्याबद्दलचे गाणे म्हणतील.

[3]"मी स्वत: परमेश्वर, त्या बागेची निगा राखीन. मी योग्य वेळी बागेला पाणी देईन. रात्रंदिवस मी त्या बागेची राखण करीन. कोणीही बागेची नासधूस करणार नाही.

[4]मी रागवलेलो नाही, पण युध्द झाले आणि बागेभोवती कोणी काटेरी कुंपण घातले तर मी तेथे जाऊन ते नष्ट करीन.

[5]जर कोणी व्यक्ति माझ्याकडे आश्रयासाठी आली व तिला माझ्याबरोबर शांतता करावयाची असली तर तिला माझ्याकडे येऊ द्या, व माझ्याबरोबर शांती करु द्या.

[6]ज्याप्रमाणे खोलवर गेलेली मुळे झाडालाभक्क म आधार देतात, त्याप्रमाणे माझ्याकडे आलेली ही माणसे याकोबचे हात मजबूत करतील. ही माणसे, फुलू लागलेल्या झाडाप्रमाणे, इस्राएलचा विकास करतील. फळांनी बहरलेल्या वृक्षाप्रमाणे इस्राएलची मुले हा देश व्यापून टाकतील."

## देव इस्राएलला दूर पाठवून देईल

[7]परमेश्वर त्याच्या लोकांना कशी शिक्षा करील? पूर्वी जसा शत्रूंनी लोकांना त्रास दिला, तसाच आता परमेश्वर देईल का? पूर्वी जसे अनेक लोक मारले गेले तसेच आता परमेश्वर करील का? तो लोकांना मारील का?

[8]इस्राएलला दूर पाठवून परमेश्वर हा वाद निकालात काढील. परमेश्वर इस्राएलची निर्भर्त्सना करील. वाळवंटातील गरम वाऱ्याप्रमाणे त्याचे शब्द जळजळीत असतील.

[9]याकोबाच्या अपराधांना क्षमा कशी केली जाईल? काय केले असता त्याची पापे नाहिशी होतील? पुढील गोष्टी घडून येतील: वेदीतील चिऱ्यांचा चुरा केला जाईल. पूजेसाठी घडविलेल्या खोट्या देवांच्या मूर्ती व बांधलेल्या वेदी या सर्व नष्ट केल्या जातील.

[10]त्या वेळेला तटबंदी असलेले शहर वाळवंटाप्रमाणे ओसाड होईल. सर्व लोक दूर पळून गेलेले असतील. ते शहर चरायचे कुरण होईल. तेथे वासरे चरतील. गुरे वेलींची पाने खातील.

[11]वेली सुकतील, त्यांच्या फांद्या तुटून पडतील आणि, बायका त्या सरपणासाठी वापरतील. लोक समजून

घेण्याचे नाकारतात. म्हणून त्यांना घडविणारा देव त्यांची समजूत घालणार नाही. आणि तो त्यांच्यावर दया करणार नाही.

12त्या वेळेस परमेश्वर त्याच्या लोकांना इतरांपासून वेगळे करील. परमेश्वर युफ्राटिसपासून सुरवात करून मिसरच्या नदीपर्यंतच्या सर्व लोकांना गोळा करील.

एक एक करून तुम्ही इस्राएलचे सर्व लोक एकत्र गोळा व्हाल. 13माझी बरीच माणसे अश्शूरमध्ये गमावली आहेत. माझी काही माणसे मिसरला पळून गेली आहेत. पण त्या वेळी प्रचंड तुतारी फुंकली जाईल आणि ते सर्व लोक यरुशलेमला परत येतील. ते सर्व जण त्या पवित्र डोंगरवरील देवापुढे नमन करतील.

## उत्तर इस्राएलला इशारा

28 शोमरोनकडे पाहा. एफ्राइममधील मद्यप्यांना त्या शहराचा फार गर्व आहे. आजूबाजूला सुपीक दरी असलेल्या टेकडीवर ते शहर वसले आहे. शोमरोनमधील रहिवाशांना आपले शहर फुलांच्या सुंदर मुकुटाप्रमाणे वाटते. पण ते मद्यपान करून धुंद झाले आहेत आणि हा "सुंदर मुकुट" सुकून चालला आहे.

2पाहा! माझ्या प्रभूकडे एक सशक्त व शूर वीर आहे. तो गारपिटीप्रमाणे व पावसाच्या झडीप्रमाणे येईल. वादळाप्रमाणे किंवा महापुराप्रमाणे तो या देशात येईल आणि हा मुकुट (शोमरोन) धुळीत फेकून देईल.

3एफ्राइममधील मद्यप्यांना "सुंदर मुकुटाप्रमाणे" असलेल्या त्यांच्या शहराचा अभिमान आहे, पण ते शहर पायाखाली तुडविले जाईल.

4सभोवती सुपीक दरी असलेल्या टेकडीवर ते शहर वसले आहे. पण तो "सुंदर फुलांचा मुकुट" सुकत चालला आहे उन्हाळ्यात झाडावर प्रथम आलेल्या अंजिरांप्रमाणे ह्या शहराची स्थिती होईल. जेव्हा माणूस झाडांवर अंजिरे पाहतो तेव्हा तो त्यांपैकी एक तोडतो आणि खाऊन टाकतो.

5त्या वेळेला, सर्वशक्तिमान परमेश्वर स्वत: "सुंदर फुलांचा मुकुट" होईल. जे काही देवाला अनुसरणारे लोक म्हणजेच देवाचे लोक मागे उरले असतील, त्यांच्याकरिता देव "सुंदर फुलांचा मुकुट" होईल. 6परमेश्वर, त्याच्या लोकांवर राज्य करणाऱ्या न्यायाधीशांना सद्बुध्दी देईल. वेशीपाशी लढणाऱ्या लोकांना परमेश्वर सामर्थ्य देईल. 7पण सध्या ते नेते मद्याने धुंद झाले आहेत. याजक व संदेष्टे सर्वच जण द्राक्षरस व मद्य पिऊन धुंद झाले आहेत. ते अडखळून पडतात. संदेष्टे आपली स्वप्ने पाहताना मद्याच्या नशेत असतात. न्यायधीश न्यायनिवाडा करताना मद्याच्या धुंदीत असतात. 8सर्व मेज ओकारीने भरलेले आहेत. कोठेही स्वच्छ जागा राहिलेली नाही.

## स्वत:च्या लोकांना मदत करण्याची देवाची इच्छा

9लोकांना धडा शिकविण्याचा परमेश्वर प्रयत्न करीत आहे. त्याची शिकवण लोकांच्या लक्षात यावी म्हणून तो प्रयत्नशील आहे. पण लोक परवा परवापर्यंत आईचे दूध पिणाऱ्या तान्ह्या मुलांप्रमाणे वागतात. 10म्हणून परमेश्वर लहान बाळांशी बोलावे तसा त्यांच्याशी बोलतो,

एक हुकूम इकडे, एक हूकूम तिकडे; एक नियम इकडे, एक नियम तिकडे, एक धडा इकडे, एक धडा तिकडे.*

11परमेश्वर ह्या लोकांशी वेगळ्याच पध्दतीने बोलेल किंवा त्यांच्याशी वेगळ्याच भाषेचा वापर करील.

12पूर्वीच्या काळी, देव लोकांना म्हणाला, "येथे विश्रांतीची जागा आहे ही शांत जागा आहे थकलेल्यांना येथे येऊन विश्रांती घेऊ द्या. ही शांतीची जागा आहे."

पण लोकांनी देवाचे ऐकले नाही. 13लोकांना देवाचे बोलणे परक्या भाषेसारखे अनाकलनीय वाटले.

एक हुकूम इकडे, एक हुकूम तिकडे, एक नियम इकडे, एक नियम तिकडे, एक धडा इकडे; एक धडा तिकडे.

लोकांनी स्वत:ला पाहिजे ते केले. म्हणून ते मागे पडून पराभूत झाले, ते सापळ्यात अडकले आणि पकडले गेले.

## देवाचा न्याय कोणाला चुकला नाही

14यरुशलेमच्या नेत्यांनो, तुम्ही परमेश्वराचा संदेश ऐकावा पण सध्या तुम्ही त्याचे ऐकायचे नाकारता. 15तुम्ही लोक म्हणता, "आम्ही मृत्यूबरोबर करारनामा केला आहे. अधोलोकाशी आम्ही करार केला आहे म्हणून आम्हांला शिक्षा होणार नाही. शिक्षा आमचे काही वाकडे करू शकणार नाही. कारण आम्ही कपट व असत्य याच्यांमागे लपून बसू."

16यासाठी परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, "सियोनमध्ये मी कोनशिला बसवीन. हा एक अमूल्य दगड असेल. ह्या महत्वाच्या दगडावर सर्व बांधकाम उभारले जाईल. त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांची निराशा होणार नाही.

---

**एक हुकूम ... धडा तिकडे** सर्वत्र शिकवण कसे लिहावे हे लहान मुलांना शिकविण्यासाठी असलेले हे, बहुधा, हिब्रू शिशुगीत असावे. ते लहान मुलांच्या बोलासारखे किंवा परक्या भाषेसारखे वाटते. पण त्याचे भाषांतर पुढीलप्रमाणे करता येईल "इकडे अधिकार, तिकडे अधिकार, इकडे नियम तिकडे नियम, इकडे धडा तिकडे धडा."

[17]“भिंतीचा सरळपणा पाहण्यासाठी लोक जसा ओळंबा वापरतात, तसाच योग्य गोष्ट दाखविण्यासाठी मी न्यायबुध्दी व चांगुलपणा ह्यांचा वापर करीन.

“तुम्ही पापी, तुमच्या कपटाच्या व असत्याच्या मागे लपण्याचा प्रयत्न करता, पण तुम्हांला शिक्षा होईल. मी वादळाप्रमाणे अथवा पुराप्रमाणे येऊन तुमच्या लपायच्या जागा नष्ट करीन. [18]तुमचा मृत्यूशी असलेला करारनामा पुसला जाईल. अधोलोकाशी तुमचा झालेला करार तुम्हांला उपयोगी पडणार नाही.

“कोणीतरी येईल आणि तुम्हाला शिक्षा करील. तुमचा कचरा करून तुम्हाला पायाखाली तुडवील. [19]तो माणूस येऊन तुम्हाला घेऊन जाईल. तुमची शिक्षा भयंकर असेल. ती सकाळी सुरू होईल व रात्री उशिरापर्यंत चालू राहील.

[20]“मग तुम्हांला पुढील कथा समजेल. एक माणूस त्याच्या उंचीच्या मानाने खूपच आखूड असलेल्या अंथरूणावर झोपायचा प्रयत्न करत होता. त्याचे पांघरूणसुध्दा त्याला पूर्ण पणे पांघरता येईल इतपत रूंद नव्हते. त्याचे अंथरूण आणि पांघरूण दोन्ही निरुपयोगी होती. अगदी त्याप्रमाणे तुमचे करार निरुपयोगी ठरलेले आहेत.”

[21]परासीम डोंगरावरच्या प्रमाणे परमेश्वर लढाई करील. गीबोन दरीत ज्याप्रमाणे तो रागावला होता त्याप्रमाणे तो रागावेल.* नंतर परमेश्वर त्याला पाहिजे ते घडवून आणील. तो काही विलक्षण गोष्टी करील, पण तो त्याचे काम तडीस नेईल. परमेश्वराचे कार्य अगाध आहे. [22]आता तुम्ही त्या गोष्टीविरुध्द लढू नका. लढलात तर तुमच्या भोवतीचा फास अधिक आवळला जाईल.

मी ऐकलेल्या शब्दांत फरक होणार नाही. सर्वशक्तिमान परमेश्वराच्या, पृथ्वीच्या नियंत्याच्या, तोंडचे हे शब्द आहेत म्हणून त्या गोष्टी घडून येतीलच.

## देव योग्य शिक्षा करतो

[23]मी सांगत असलेला संदेश लक्षपूर्वक ऐका. [24]शेतकरी सतत शेत नांगरतो का? नाही. तो सतत मशागत करतो का? नाही. [25]तो जमिनीची मशागत करतो आणि मग पेरणी करतो. तो निरनिराळ्या बियांची पेरणी निरनिराळ्या तऱ्हेने करतो. तो बडिशेप विखरून टाकतो, जिरे शेतात फेकतो तर गहू ओळीत पेरतो. तो सातू विशिष्ट जागेत पेरतो तर शेताच्याकडेला काठ्या गहू पेरतो.

[26]तुम्हाला शिकविण्यासाठी आमचा देव उदाहरणे देत आहे. ह्यावरून दिसून येईल की देव विवेकबुध्दीने लोकांना शिक्षा करतो. [27]मोठ्या दातेरी फळीने शेतकरी बडिशेप मळतो का? नाही. मोहरी मळण्यासाठी शेतकरी त्यावरून गाडीचे चाक फिरवितो का? नाही. शेतकरी बडिशेप व मोहरी मळण्यासाठी लहान काठी वापरतो.

[28]पाव करताना बाई पीठ मळते पण सारखी सारखी ते तिंबत नाही. परमेश्वर लोकांना शिक्षा करताना असेच करतो. तो गाडीचे चाक अंगावर घालण्याची त्यांना भीती दाखविल पण पूर्णपणे चिरडून टाकणार नाही. तो घोड्यांच्या टापांखाली त्यांना तुडवू देणार नाही. [29]हा धडा सर्वशक्तिमान परमेश्वराने स्वत: दिला आहे. देव चांगलाच सल्ला देतो. तो खरोखरच ज्ञानी आहे.

## यरुशलेमबद्दल देवाचे प्रेम

29 देव म्हणतो, “अरीएलकडे पाहा. तेथे दाविदाने तळ ठोकला होता. त्या शहराची सुटी वर्षानुवर्षे सुरूच आहे. [2]मी अरीएलला शिक्षा केली आहे. त्यामुळे ते शहर दु:ख व शोक यांनी भरून गेले आहे. पण तरीसुध्दा ते माझे अरीएल आहे. [3]अरीएल, मी तुझ्यासभोवती सैनिक ठेवले आहेत. मी तुझ्याविरुध्द मोर्चे बांधले आहेत. [4]तुझा पराभव झाला तुला जमीनदोस्त केले गेले. आता भुताप्रमाणे जमिनीतून येणारा तुझा आवाज मी ऐकतो. तुझे शब्द, धुळीतून आल्याप्रमाणे येतात.”

[5]धुळीच्या कणांप्रमाणे खूप परके येथे आहेत. ते क्रूर लोक, वाऱ्यावर उडणाऱ्या फोलकटाप्रमाणे आहेत. [6]सर्वशक्तिमान परमेश्वराने भूकंप, मेघगर्जना व मोठा गडगडाट यांच्याद्वारे तुला शिक्षा केली. तेव्हा सगळीकडे वादळे, वावटळी व सर्वनाशक आग पसरली होती. [7]अनेक राष्ट्रे अरीएलविरुध्द लढली. ते सर्व रात्रीच्या दु:स्वप्नासारखे होते. सैन्यांनी अरीएलला वेढा घातला आणि शिक्षा केली. [8]पण त्या सैन्यांनाही ते स्वप्नासारखेच वाटेल. त्यांना पाहिजे असलेले मिळणार नाही. उपाशी माणसाला अन्नाबद्दलचे स्वप्न पडावे तसेच ते असेल. जेव्हा असा माणूस जागा होतो, तेव्हा तो भुकेलेलाच असतो. तहानेलेल्याने पाण्याचे स्वप्न पाहावे तसेच ते असेल. तो जागा झाला तरी त्याची तहान भागलेली नसते.

सियोनविरुध्द लढणाऱ्या राष्ट्रांची अशीच स्थिती आहे. त्या राष्ट्रांना जे हवे आहे ते मिळणार नाही.

[9]तुम्ही विस्मित व आश्चर्यचकीत व्हा. तुम्ही धुंद व्हाल पण मद्याने नव्हे. तुम्ही झोक जाऊन पडाल पण दारूने नव्हे.

[10]परमेश्वर तुम्हाला झोपेची गुंगी आणील. परमेश्वर तुमचे डोळे मिटेल. (संदेष्टे हेच तुमचे डोळे आहेत) परमेश्वर तुमची डोकी झाकील. (संदेष्टे हेच तुमची डोकी आहेत.)

[11]हे असे घडेल असे मी तुम्हाला सांगतो पण तुम्हाला माझे म्हणणे कळणार नाही. माझे शब्द, मोहरबंद केलेल्या पुस्तकाप्रमाणे आहेत. तुम्ही असे पुस्तक वाचता येणाऱ्याला देऊन त्याला वाचायला सांगू शकता. पण तो म्हणेल. “मी हे पुस्तक वाचू शकत नाही. ते मोहरबंद आहे. मी ते

---

**परासीन डोंगरावरच्या ... तो रागावेल** 1 इति. 14:8–17.

उघडू शकत नाही.” 12किंवा तुम्ही असे पुस्तक वाचता
न येणाऱ्याला देऊन त्यास ते वाचायला सांगू शकता. तो
म्हणेल, “मला वाचता येत नसल्याने मी हे पुस्तक वाचू
शकत नाही.”

13माझा प्रभू म्हणतो, “हे लोक, माझ्यावर त्यांचे प्रेम
आहे, असे म्हणतात ते शब्दांनी माझ्याबद्दलचा आदर
व्यक्त करतात. पण त्यांची मने माझ्यापासून फार दूर
आहेत. त्यांचा माझ्याबद्दलचा आदर, म्हणजे फक्त त्यांनी
पाठ केलेले व माणसांनी घालून दिलेले नियम आहेत.
14म्हणून मी शक्तिशाली व चमत्कारिक गोष्टी करून
या लोकांना विस्मित करीत राहीन. त्यांच्यातील सुज्ञ
स्वत:तील शहाणपण गमावतील. त्यांना काही समजू
शकणार नाहीत.”

15ते लोक परमेश्वरापासून काही लपविण्याचा प्रयत्न
करतात. ते त्यांची दुष्कृत्ये अंधारात करतात. ते लोक
स्वत:शीच म्हणतात, “आम्हांला कोणीही पाहू शकत नाही.
आम्ही कोण आहोत हे कोणालाही माहीत नाही.”

16तुम्ही गोंधळलेले आहात. तुम्हाला वाटते की चिखल
व कुंभार सारखेच. तुम्हाला वाटते की एखाद्याने तयार
केलेली वस्तूच त्या तयार करणाऱ्याला सांगेल, “तू मला
घडवले नाहीस.” असे म्हणणे म्हणजे मातीच्या भांड्याने
कुंभाराला “तुला काही समजत नाही” असे सांगण्यासारखेच
होय.

## चांगला काळ येत आहे

17हे सत्य आहे: काही काळानंतर कर्मेलच्या
डोंगरावरील भूमीप्रमाणे लबानोनची भूमी सुपीक होईल
आणि कर्मेलच्या भूमीवर घनदाट जंगल माजेल. 18बहिरा
पुस्तकातील शब्द ऐकू शकेल आणि आंधळा अंधारातून
आणि धुक्यातून पाहू शकेल. 19परमेश्वर दरिद्री लोकांना
सुखी करील आणि ते लोक इस्राएलच्या पवित्रदेवाबद्दल
हर्ष व्यक्त करतील.

20कोते आणि कंजूष लोक व दुष्कृत्ये करण्यात आनंद
मानणारे लोक नाहीसे होतील तेव्हा हे घडून येईल. 21(हे
लोक सज्जनांना खोटे पाडतात. लोकांना न्यायालयात खेचून
जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न करतात. ते भोळ्या लोकांना
उध्वस्त करण्याचा यत्न करतात.

22म्हणून परमेश्वर याकोबच्या वंशजांशी बोलतो. (ह्याच
परमेश्वराने अब्राहामला मुक्त केले होते.) परमेश्वर
म्हणतो, “याकोब, (इस्राएलमधील लोकांनो,) आता
तुम्हाला ओशाळवाणे व लज्जित व्हावे लागणार नाही.
23तो त्याची सर्व मुले पाहील आणि तो माझ्या नावाला
पवित्र म्हणेल मी ह्या मुलांना स्वत:च्या हाताने घडविले
आहे आणि ही मुले म्हणतील की याकोबाचा पवित्र देव
हा असामान्य आहे. ही मुले इस्राएलाच्या देवाचा आदर
करतील. 24ह्यातील पुष्कळांना काही कळत नव्हते म्हणून
त्यांनी चुकीच्या गोष्टी केल्या. त्यांना काही समजले नाही
पण ते धडा शिकतील.”

## इस्राएलने देवावर विश्वास ठेवावा, मिसरवर नाही

30 परमेश्वर म्हणतो, “ह्या मुलांकडे पाहा! ती माझ्या
आज्ञा पाळत नाहीत. ते योजना करतात, पण
माझी मदत मागत नाहीत. ते इतर लोकांबरोबर मैत्रीचा
करार करतात. पण माझ्या आत्म्याला तो नको असतो.
हे लोक त्यांच्या पापात आणखी भर घालीत आहेत. 2ही
मुले मिसरकडे मदत मागायला जात आहेत. पण ते जे
करीत आहेत, ते योग्य आहे का; असे मला विचारावे,
असे त्यांना वाटत नाही. फारो त्यांचा बचाव करील असे
त्यांना वाटते. मिसरने त्यांचे रक्षण करावे अशी त्यांची
इच्छा आहे.

3“पण मी सांगतो की मिसरमध्ये लपण्याने तुमचा काही
फायदा होणार नाही. मिसर तुमचे रक्षण करू शकणार
नाही. 4तुमचे नेते सोअनला आणि तुमचे राजदूत हानेसला
गेले आहेत. 5पण त्यांची निराशा होईल. त्यांना मदत करू
न शकणाऱ्या देशावर ते विसंबले आहेत. मिसर काहीच
उपयोगाचा नाही. मिसर काही मदत करणार नाही. उलट
तो तुम्हाला लज्जित व ओशाळवाणे करील.”

## यहुदाविषयी देवाचा संदेश

6नेगेवमधल्या प्राण्यांविषयी शोक संदेश:

नेगेव ही धोकादायक जागा आहे. ही भूमी सिंह, फुरसे
वउडणारेसापह्यांनीव्यापलेलीआहे.पण काही लोक
नेगेवमधूनचप्रवासकरीतआहेत.ते मिसरला जात आहेत.
त्यांनी आपली धन संपत्ती गाढवांवर व उटांवर लादली
आहे. ह्याचा अर्थ त्यांना मदत न करू शकणाऱ्या राष्ट्रांवर
ते विसंबले आहेत. 7मिसरला काही अर्थ नाही. मिसरच्या
मदतीला काही किंमत नाही. म्हणून मी मिसरला ‘स्वस्थ
बसणारा रहाब’ असे म्हणतो.

8आता तू हे पाटीवर लिही म्हणजे सर्व लोकांना ते
दिसेल आणि हे तू पुस्तकातही लिही म्हणजे भविष्यात दूर
असलेल्या शेवटच्या दिवसांसाठी ते उपयोगी पडेल.

9पालकांचे न ऐकणाऱ्या मुलांसारखे हे लोक
आहेत. ते खोटे बोलतात आणि परमेश्वराच्या
शिकवणुकीकडे लक्ष देण्यास नकार देतात. 10ते
संदेष्ट्यांना म्हणतात, “आम्ही काय करावे हे तुम्ही
दिव्य दृष्टीने पाहू नका. आम्हाला सत्य सांगू नका.
आम्हाला बऱ्या वाटतील, आवडतील अशाच गोष्टी
सांगा. आमच्यासाठी फक्त चांगल्याच गोष्टी तुमच्या
दिव्य दृष्टीने बघा. 11खऱ्या घडणाऱ्या गोष्टी बघायचे
टाळा. आमच्या रस्त्यातून दूर व्हा. इस्राएलच्या पवित्र
देवाबद्दल आमच्याशी बोलू नका.”

## यहुदाला फक्त देवाकडूनच मदत मिळते

12इस्राएलचा पवित्र देव म्हणतो, “परमेश्वराने दिलेला
संदेश तुम्ही स्वीकारायचे नाकारले आहे. तुम्ही लोक
जुलूम व कपट यांवर विसंबून राहता. 13लढाया व खोटेपणा
करून तुम्ही अपराध केला आहे म्हणून तडे गेलेल्या उंच
भिंतीप्रमाणे तुमची स्थिती होईल ही भिंत पडेल व तिचे
तुकडे तुकडे होतील. 14तुमची स्थिती मातीच्या बरणीप्रमाणे
होईल. ही बरणी फुटल्यास तिचा चक्का चूर होतो. हे बारीक
तुकडे काही उपयोगाचे नसतात. ह्या तुकड्यांनी तुम्ही
विस्तवातले निखारे काढू शकत नाही. किंवा डोहातले
पाणी काढू शकत नाही.”

15परमेश्वर, माझा प्रभू, इस्राएलचा पवित्र देव म्हणतो,
“तुम्ही मला शरण आलात, तर तुम्ही वाचाल. शांतता
आणि विश्वास हीच तुमची शक्ती आहे.”

पण तुम्हाला हेच नको आहे. 16तुम्ही म्हणता, “नाही!
आम्हाला पळून जायला घोडे हवेत.” ते खरेच आहे.
तुम्हाला घोड्यांवरून पळून जावे लागेल. पण शत्रू तुमचा
पाठलाग करील. शत्रूचा वेग तुमच्यापेक्षा जास्त असेल.
17शत्रूपक्षातील एकाने धमकी दिल्यास तुमची हजारो माणसे
पळून जातील. पाचजणांनी धमकी दिल्यास तुमचे सर्वच
लोक पळून जातील. तुमच्या सैन्यातील फक्त एकच गोष्ट
शिल्लक राहील. व ती म्हणजे टेकडीवरचा ध्वजस्तंभ.

18तुमच्यावर दया करण्याची परमेश्वराची इच्छा आहे.
परमेश्वर वाट पाहत आहे. परमेश्वराला प्रकट होऊन
तुमचे सांत्वन करायचे आहे. परमेश्वर देव न्यायी आहे.
त्याच्या मदतीची इच्छा करणाऱ्या प्रत्येक माणसाला तो
आशीर्वाद देईल. 19यरुशलेमच्या सियोन डोंगरावर
परमेश्वराची माणसे राहतील. तुमचा शोक थांबेल तुमचे
रडणे परमेश्वर ऐकेल व तुमचे सांत्वन करील. परमेश्वर
तुमचे म्हणणे ऐकेल आणि तुम्हाला मदत करील.

## देव त्याच्या लोकांना मदत करील

20माझ्या प्रभूने, देवाने, पूर्वी तुम्हाला दुःख व यातना
दिल्या. त्या रोजच्या भाकरीसारख्या व पाण्यासारख्याच
होत्या. देव तुमचा शिक्षक आहे आता यापुढे तो तुमच्यापासून
लपून राहाणार नाही. तुम्ही त्याला तुमच्या डोळ्यांनी प्रत्यक्ष
पाहाल. 21नंतर, जर तुम्ही चुकलात आणि चुकीच्या मार्गाने
गेलात (डावीकडे वा उजवीकडे) तर तुमच्या मागून आवाज
येईल, “हा मार्ग बरोबर आहे. तुम्ही ह्या मार्गाने जावे.”

22तुमच्या मूर्ती सोन्या-चांदीने मढविलेल्या आहेत. ह्या
खोट्या देवांनी तुम्हाला पापांच्या घाणीत लोटले आहे. पण
तुम्ही त्यांची पूजा करण्याचे सोडून द्याल. तुम्ही त्या देवांना
कचऱ्याप्रमाणे वा विटाळाच्या कपड्यांप्रमाणे फेकून
द्याल.*

23त्या वेळेला परमेश्वर पाऊस पाडील. तुम्ही बी पेराल
आणि भूमी तुम्हाला अन्न देईल. त्या वेळी पीक मुबलक
येईल. तुमच्या गुरांना भरपूर चारा मिळेल, मेंढ्यांना
चरायला खूप मोठे रान मिळेल. 24तुमच्या गुरांना आणि
गाढवांना भरपूर आंबोण मिळेल. सगळीकडे अन्नधान्याचा
सुकाळ होईल. गुरांपुढे आंबोण पसरण्यासाठी तुम्हाला
कुदळफावड्याचा उपयोग करावा लागेल. 25प्रत्येक
डोंगरावरून व प्रत्येक टेकडीवरून पाण्याचे झरे वाहतील.
पुष्कळ लोक मारले गेल्यावर आणि बुरूज ढासळल्यावर
हे सर्व घडून येईल.

26त्या वेळी, चंद्राचा प्रकाश सूर्यप्रकाशाप्रमाणे प्रखर
होईल आणि सूर्यप्रकाश आतापेक्षा सातपट प्रखर होईल.
एकादिवसाचा सूर्यप्रकाशआठवड्यातील सूर्यप्रकाशाइतका
असेल. परमेश्वर जेव्हा त्याच्या जखमी लोकांना मलमपट्टी
करील आणि माराने झालेल्या त्यांच्या जखमा बऱ्या करील
तेव्हा असे घडेल.

27पाहा! परमेश्वराचे नाव दुरवरून येत आहे, दाट
धुराचे ढग पसरविणाऱ्या आगीप्रमाणे त्याचा राग आहे.
परमेश्वराचे तोंड रागाने भरले आहे. त्याची जीभ
ज्वालेप्रमाणे दिसत आहे.

28परमेश्वराचा श्वास (आत्मा), पाणी वाढत जाऊन
गळ्यापर्यंत पोहोचणाऱ्या एखाद्या मोठ्या नदीप्रमाणे आहे.
परमेश्वर राष्ट्रांचा न्याय करील. हा न्याय कसा असेल?
तर ‘नाशाच्या चाळणीतून’ राष्ट्रांना चाळून काढल्याप्रमाणे
तो असेल. जसे लगाम घालून जनावरांना ताब्यात ठेवले
जाते तसे लोकांना लगाम घालून परमेश्वर नियंत्रणात
ठेवील.

29त्या वेळेला तुम्ही आनंदगीते गाल. सुटीच्या दिवसातील
रात्रीप्रमाणे हा काळ असेल. परमेश्वराच्या डोंगरावर
जाताना तुम्हाला आनंद वाटतो, इस्राएलच्या खडकाकडे
जाताना (परमेश्वराच्या उपासनेला जाताना) बासरीचा स्वर
ऐकून तुम्हाला हर्ष होतो, तसाच हा आनंद असेल.

30परमेश्वर आपला प्रचंड आवाज लोकांना ऐकायला
भाग पाडील. परमेश्वराचा शक्तिशाली हात रागाने खाली
पृथ्वीवर येताना पाहण्यास परमेश्वर लोकांना भाग पाडेल.
सर्व जाळून टाकणाऱ्या अग्नीप्रमाणे हा हात असेल.
मुसळधार पाऊस व गारपीट करणाऱ्या वादळाप्रमाणे देवाचे
सामर्थ्य असेल. 31परमेश्वराचा आवाज ऐकून अश्शूर
घाबरून जाईल. परमेश्वर दंडाने अश्शूरला मारील.
32डफावर व सारंगीवर संगीत वाजवावे तसे परमेश्वर
अश्शूरला मारील. आपल्या हाताने शक्तीने परमेश्वर
अश्शूरचा पराभव करील.

33पूर्वीपासून तोफेत तयार करून ठेवले आहे. ते
राजासाठी तयार केले आहे. ते पुष्कळ खोल आणि रूंद
केले आहे. त्यात लाकडाचा ढीग आणि विस्तव आहे.
परमेश्वराचा श्वास (आत्मा) जळत्या गंधकाच्या
प्रवाहाप्रमाणे येऊन ते जाळून टाकील.

---

**तुम्ही ... फेकून द्याल** “तुम्ही त्या देवांना महिन्याच्या कपड्यांप्रमाणे फेकून द्याल तुम्ही त्यांना म्हणाल, ‘दूर जा.’”

## इस्राएलने देवाच्या सामर्थ्यावर विसंबावे

31 मदत मागण्यासाठी मिसरमध्ये जाणारे ते लोक
पाहा ते घोडे मागतात. घोडे आपला बचाव करतील
असे त्यांना वाटते. मिसरमधील रथ आणि घोडेस्वार
आपल्याला वाचवतील असा या लोकांचा समज आहे.
मिसरचे सैन्य मोठे असल्याने आपण सुरक्षित आहोत असेच
त्यांना वाटते. हे लोक इस्राएलच्या पवित्र देवावर विश्वास
ठेवत नाहीत. ते परमेश्वराची मदत मागत नाहीत.

2पण खरा ज्ञानी परमेश्वर आहे. त्यांच्यावर संकटे
आणणारा परमेश्वरच असेल. परमेश्वराची आज्ञा
बदलण्याची ताकद लोकांत असणार नाही. पापी
लोकांच्याविरुध्द (यहुदाच्याविरुद्द) देव उभा राहील आणि
लढेल. ह्या पापी लोकांना मदत करणाऱ्या लोकांविरुध्द
म्हणजे मिसरच्या लोकांविरुध्दही देव लढेल.

3मिसरमधील लोक फक्त माणसे आहेत देव नाहीत.
मिसरमधील घोडे फक्त प्राणी आहेत पण आत्मे नाहीत.
परमेश्वर स्वत:चा हात लांब करील आणि मदतनीसाचा
(मिसरचा) पराभव होईल. त्याची मदत घेणारे लोक (यहुदा)
पडतील. त्या सर्व लोकांचा बरोबरच नाश केला
जाईल.

4परमेश्वराने मला सांगितले, "जेव्हा एखादा सिंह किंवा
त्याचा छावा, खाण्यासाठी, जनावर पकडतो तेव्हा तो त्या
मारलेल्या प्राण्यापाशी उभा राहून डरकाळ्या फोडतो. त्या
वेळी कोणीही त्या शक्तिशाली सिंहाला घाबरवू शकत
नाही. जरी माणसे आली आणि त्यांनी आरोळ्या ठोकल्या
तरी तो सिंह भिणार नाही. लोकांनी कितीही कोलाहल
केला तरी तो सिंह पळून जाणार नाही."

ह्याचप्रमाणे सर्वशक्तिमान परमेश्वर खाली उतरून
सियोन पर्वतावर येईल. तो तेथे लढेल. 5पक्षी ज्याप्रमाणे
घिरट्या घालून आपल्या घरट्याचे रक्षण करतात,
त्याचप्रमाणे सर्वशक्तिमान परमेश्वर यरुशलेमचे रक्षण
करील. परमेश्वर तिला वाचवील. परमेश्वर यरुशलेमचे
"वरून जाऊन" रक्षण करील.

6इस्राएलच्या मुलांनो, तुम्ही देवाच्याविरुध्द गेलात. तुम्ही
देवाकडे परत यावे. 7मग, तुम्ही बनविलेल्या सोन्या चांदीच्या
मूर्तींची पूजा करणे लोक बंद करतील. त्या मूर्ती तयार
करून तुम्ही खरोखरच पाप केले.

8इस्राएलच्या ईशान्येकडील एकेकाळी शक्तिशाली
असलेले हे (अश्शूर) राष्ट्र तलवारीच्या बळावर पराभूत
होईल. पण ही तलवार मानवाची नसेल. अश्शूरचा
नाश होईल. पण हा नाश मानवाच्या तलवारीने होणार
नाही. देवाच्या तलवारीमुळे अश्शूर पळून जाईल.
पण त्यातील तरुणांना पकडून गुलाम केले जाईल.
9त्याच्या संरक्षणाच्या जागा नष्ट केल्या जातील. त्यांचे
नेते पराभूत होतील आणि ते त्यांचा ध्वज सोडून देतील
म्हणजेच त्यांची सत्ता नाहीशी होईल. परमेश्वराने या सर्व
गोष्टी सांगितल्या आहेत. परमेश्वराची शेकोटी (वेदी)
सियोनवर आहे. परमेश्वराची भट्टी (वेदी) यरूशलेममध्ये
आहे.

## नेत्यांनी सज्जन आणि प्रामाणिक असावे

32 मी सांगतो ते ऐका सगळीकडे चांगुलपणा नांदावा
अशा तऱ्हेने राजाने राज्य करावे. नेत्यांनी
लोकांना मार्गदर्शन करताना न्याय निर्णय घ्यावेत. 2असे
जर झाले तर वारा व पाऊस ह्यापासून बचाव करण्यासाठी
जसा अडोसा असतो तसा राजा निवाऱ्याची जागा होईल.
वाळवंटातील झऱ्याप्रमाणे अथवा उष्ण प्रदेशातील मोठ्या
खडकाखालील सावलीसारखा लोकांना तो वाटेल. 3लोक
मदतीसाठी त्याच्याकडे धाव घेतील व त्याचे म्हणणे ते
खरोखरच ऐकतील. 4आता जे लोक गोंधळलेले आहेत
त्यांना त्या वेळी सर्व समजून येईल. आता स्पष्ट बोलू न
शकणारे लोक त्या वेळी स्पष्टपणे व लवकर बोलतील.
5दुष्ट आणि अनीतीमान लोकांना कोणी थोर म्हणणार
नाही. जे लोक गुप्त योजना करतात त्यांना लोक मान
देणार नाहीत.

6मूर्ख माणूस मूर्खपणाच्या गोष्टी सांगतो आणि मनात
वाईट गोष्टींचे बेत आखतो. त्याला चुकीच्याच गोष्टी
करायच्या असतात. तो परमेश्वराबद्दल वाईटसाईट बोलतो.
तो भुकेलेल्यांना अन्न खाऊ देत नाही. तहानेलेल्यांना
पाणी पिऊ देत नाही. 7तो मूर्ख दुष्टपणाचा उपयोग
हत्यारासारखा करतो. गरीबांना लुबाडण्याच्या योजना तो
करतो. तो गरीबांबद्दल खोटेनाटे सांगतो आणि ह्यामुळे
गरीब न्यायापासून वंचित होतात.

8परंतु भला नेता चांगल्या गोष्टींच्या योजना आखतो
आणि ह्या चांगल्या गोष्टीच त्याला भला नेता बनवितात.

## कठीण काळ येत आहे

9तुम्ही काही स्त्रिया आता शांत आहात. तुम्हाला आता
सुरक्षित वाटते आहे. पण तुम्ही जरा उभे राहून माझे
म्हणणे ऐकावे. 10आता तुम्हाला सुरक्षित वाटते पण आणखी
एक वर्षाने तुम्ही अडचणीत याल. का? कारण तुम्ही
पुढच्या वर्षी द्राक्षे गोळा करू शकणार नाही. पुढच्या वर्षी
द्राक्षाचे पीक येणार नाही.

11स्त्रियांनो, आता तुम्ही शांत आहात पण तुम्हाला भिती
वाटली पाहिजे. आता तुम्हाला सुरक्षित वाटते, पण तुम्ही
चिंता केली पाहिजे. तुमची चांगली वस्त्रे काढा आणि
शोकप्रदर्शक कपडे घाला. ते कपडे तुमच्या कमरेभोवती
गुंडाळा. 12दु:खाने भरलेल्या छातीवर शोकप्रदर्शक कपडे
चढवा. रडा! कारण तुमची शेते उजाड झाली आहेत.

तुम्हाला द्राक्षे देणारे तुमचे द्राक्षमळे ओस पडले आहेत.
13माझ्या लोकांच्या भूमीसाठी शोक करा. कारण तेथे
फक्त काटेकुटे आणि तण माजतील. एकेकाळी आनंदाने
भरलेल्या शहरासाठी व हर्षभरित घरांसाठी आता शोक
करा.

14लोक राजधानी सोडून जातील. राजवाडा व बुरुज
रिकामी पडतील. लोक घरांत न राहता गुहेत राहतील.
रानगाढवे व मेंढ्या शहरात राहतील. जनावरे गवत खाव्यास
तेथे जातील.
15–16देव वरून त्याचा आत्मा आम्हांला देईपर्यंत असेच
घडत राहील. आता या भूमीवर चांगुलपणा राहिला नाही.
ही भूमी जणू वाळवंट झाली आहे. पण भविष्यात, ते
वाळवंट कर्मेल प्रमाणे होईल. तेथे योग्य न्याय नांदेल
आणि कर्मेल हिरव्यागार रानासारखे होईल. चांगुलपणा
तेथे वस्ती करील. 17तो चांगलुपणा कायमची शांती आणि
सुरक्षितता आणील. 18माझे लोक शांतीच्या सुंदर मळ्यात
राहतील. माझी माणसे सुरक्षिततेच्या तंबूत राहतील. ते
निवांत आणि शांत जागी राहतील.
19पण ह्या गोष्टी घडण्यापूर्वी जंगल उजाड झालेच पाहिजे,
शहराचा पाडाव झाला पाहिजे. 20तुम्ही काहीजण प्रत्येक
झऱ्याकाठी बी पेरा. तुमच्या गुरांना आणि गाढवांना मोकळे
सोडा. व तेथे चरू द्या. तुम्ही लोक खूप सुखी व्हाल.

## पाप फक्त आणखी पापाला जन्म देते

33 पाहा! तुम्ही युध्द करता आणि दुसऱ्यांच्या वस्तू
चोरता. पण त्यांनी तुमचे काहीही चोरले नाही.
तुम्ही दुसऱ्यांविरुध्द उठता पण त्यांनी तुमच्याविरुध्द कधीच
उठाव केला नाही. म्हणून जेव्हा तुम्ही चोरी करायचे
थांबवाल तेव्हा ते तुमच्या वस्तू चोरतील. तुम्ही लोकांविरुध्द
उठाव करायचे सोडाल तेव्हा ते तुमच्याविरुध्द उठाव
करतील.

मग तुम्ही म्हणाल:
2“परमेश्वरा, आमच्यावर दया कर. आम्ही तुझ्या
मदतीची वाट पाहिली. परमेश्वरा, रोज आम्हाला शक्ती
दे. संकटकाळी आमचे रक्षण कर.
3तुझा प्रचंड आवाज लोकांना घाबरवितो. आणि ते
तुझ्यापासून दूर पळतात. तुझी महानता राष्ट्रांना पळून
जाण्यास भाग पाडते.”

4तुम्ही लोकांनी युध्दात वस्तू चोरल्या. त्या तुमच्याकडून
परत घेतल्या जातील. खूप लोक येतील आणि तुमची
संपत्ती लुटतील. टोळधाड ज्याप्रमाणे सर्व पीक फस्त करते
तसे हे होईल.
5परमेश्वर महान आहे. तो उच्च स्थानी राहातो. परमेश्वर
सियोनमध्ये प्रामाणिकपणा व चांगुलपणा भरतो.
6यरुशलेमा तू श्रीमंत आहेस. देवाच्या शहाणपणात व
ज्ञानात तू श्रीमंत आहेत. तू तारणात श्रीमंत आहेस. तू
परमेश्वराचा आदर करतो व तेच तुला श्रीमंत करते.
म्हणून लक्षात असू दे की तू सतत राहाशील.
7पण ऐक! बाहेर देवदूत रडत आहेत. शांती आणणारे
दूत फार जोराने रडत आहेत. 8रस्ते नष्ट केले गेले
आहेत. रस्त्यावर कोणीही नाही. लोकांनी केलेले
करार मोडले आहेत. साक्षीदारांच्या पुराव्यावर विश्वास
ठेवायला लोक तयार नाहीत. कोणी कोणाला मान देत
नाही. 9भूमी शोक करीत मरणपंथाला लागली आहे.
लबानोन मरत आहे आणि शारोन दरी कोरडी व ओसाड
झाली आहे. बाशान व कर्मेल यामध्ये एकेकाळी
सुंदर झाडे होती. पण आता त्या झाडांची वाढ खुंटली
आहे.
10परमेश्वर म्हणतो, “आता मी उठून माझी महानता
दाखवीन. आता मी लोकांना माझे महत्व पटवीन. 11तुम्ही
लोकांनी निरर्थक गोष्टी केल्यात. त्या गोष्टी वाळलेल्या
गवताप्रमाणे वा पेंढ्यातील काडीप्रमाणे आहेत. त्यांची किंमत
शून्य आहे. तुमचा आत्मा* अग्नीप्रमाणे आहे. तो तुम्हाला
जाळील. 12लोकांची हाडे चुन्याप्रमाणे* होईपर्यंत म्हणजेच
हाडांचा भुगा होईपर्यंत लोक जाळले जातील. काटे आणि
वाळलेली झुडपे ह्यांच्याप्रमाणे चटकन ते जळतील.
13“दूर देशांत राहणाऱ्या लोकांनो, मी काय केले ते
ऐका. माझ्याजवळ राहणाऱ्या, लोकांनो, माझे सामर्थ्य
जाणा.”
14सियोनमधील पापी घाबरले आहेत. दुष्कृत्ये केलेले
भीतीने कांपत आहेत. ते म्हणतात, “ह्या नाश
करणाऱ्या अग्नीपासून आपल्याला कोणी वाचवू शकेल
का? निरंतर जळणाऱ्या ह्या अग्नीजवळ* कोणी राहू
शकेल का?”
15हो! पैशासाठी दुसऱ्यांना जे त्रास देत नाहीत असे
प्रामाणिक लोक या अग्नीमधूनही वाचतील. ते लोक
लाच घेत नाहीत. दुसऱ्याची हत्या करण्याच्या बेताला ते
नकार देतात. दुष्कृत्यांच्या योजनांकडे ते पाहण्याचे
टाळतात. 16ते लोक उच्च स्थानावर सुरक्षित राहतील.
उंच पर्वतांवरील दुर्ग त्यांचे रक्षण करतील. त्यांना नेहमीच
अन्न व पाणी मिळेल.
17तुम्ही स्वत:च्या डोळ्यांनी राजाला (देवाला) त्याच्या
सुंदर रूपात पाहाल. तुम्ही महान भूमी पाहाल. 18–19तुम्ही
तुमच्या भूतकाळातील संकटांबद्दल विचार कराल. तुम्ही
विचार कराल, “ते दुसऱ्या देशातील लोक कोठे ओहेत?
ते आम्हाला न समजणारी भाषा बोलत. दुसऱ्या देशातील
ते अधिकारी आणि कर गोळा करणारे कोठे आहेत?
आमच्या संरक्षक बुरुजांची मोजदाद करणारे हेर कोठे
आहेत? ते सर्व नाहीसे झाले.”

---

**आत्मा** ह्या शब्दाचा अर्थ “देवाचे तेज,” “प्रभा,” “चैतन्य” वा “वैभव” असाही होतो.

**चुना** हा पाढरा पदार्थ बांधकामाचा चुना अथवा सिमेंट तयार करण्यासाठी नेहमी वापरतात. चुना, हाडे, शिंपले किंवा चुनखडीचा दगड जाळून तयार करतात.

**निरंतर जळणारा अग्नी** ह्याचा अर्थ बहुधा देव, इस्राएलचा अग्नी (प्रकाश) असावा.

### देव यरुशलेमचे रक्षण करील

20आमच्या धार्मिक सणांच्या नगरीकडे सियोनकडे पाहा,
विश्राम करण्याच्या सुंदर जागेकडे, यरुशलेमकडे पाहा.
यरुशलेम, कधीही न हालणाऱ्या तंबूसारखी आहे. त्याच्या
घट्ट रोवलेल्या मेखा कधीही उखडल्या जाणार नाहीत.
त्याच्या दोऱ्या कधीही कापल्या जाणार नाहीत. 21–23का?
कारण सर्वशक्तिमान परमेश्वर तेथे आहे. त्या भूमीवर
झरे व रूंद पात्रांच्या नद्या आहेत. पण तेथे शत्रूंच्या नावा
अथवा जहाजे नसतील. त्या नावांवर काम करणारे तुम्ही
लोक दोऱ्या सोडतात तसेच काम सोडू शकाल. तुम्ही
डोलकाठी पुरेशी घट्ट करू शकणार नाही. तुम्हाला शीड
उभारता येणार नाही का? कारण परमेश्वर आमचा
न्यायाधीश आहे. परमेश्वरच आमचे कायदे करतो.
परमेश्वर आमचा राजा आहे. तो आमचे रक्षण करतो.
म्हणून तो आम्हाला खूप संपत्ती देईल. पंगूनासुध्दा युध्दात
खूप धन मिळेल. 24येथे राहणारा कोणीही "मी विटलो
आहे" असे म्हणणार नाही. ज्यांना क्षमा केली गेली आहे
असेच लोक तेथे राहतात.

### देव त्याच्या शत्रूंना शिक्षा करील

34 सर्व राष्ट्रांनो, जवळ येऊन ऐका. सर्व लोकांनी
कान देऊन ऐकावे. पृथ्वी व तीवर राहणाऱ्या
सर्व लोकांनी ह्या गोष्टी ऐकाव्या. 2परमेश्वर सर्व राष्ट्रांवर
व त्यांच्या सैन्यांवर रागावला आहे. परमेश्वर त्या सर्वांचा
नाश करील. तो त्या सर्वांना मरायला भाग पाडील.
3त्यांचीप्रेतेबाहेरटाकलीजातील.त्यातूनदुर्गंधीयेईलवत्यातील
रक्तडोंगरावरून ओघळेल. 4आकाश कागदाच्या
गुंडाळीप्रमाणे गुंडाळले जाईल. द्राक्षा च्यावेलीवर
चीसुकलेलीपानेवासुकलेलीअंजिरेअंजिराच्याझाडावरूनग
ळूनपडावीतत्याप्रमाणेतारेगळूनपडतील.आकाशातीलसर्व
तारे वितळून जातील. 5परमेश्वर म्हणतो, "माझी
आकाशातील तलवार रक्ताने माखेल तेव्हा हे सर्व घडेल."
पाहा! परमेश्वराची तलवार अदोमला आरपार कापील.
परमेश्वराने तेथील लोकांना अपराधी ठरविले आहे आणि
त्यांना मेलेच पाहिजे.* 6बळींच्या रक्ताने परमेश्वरा चीतल
वारमाखली आहे. मेंढ्या आणि बकरेह्यांच्या
रक्तानेभरलीआहे. एडक्याच्या मूत्र पिंडाच्या चरबीचे तिला
वंगण मिळाले आहे. कारण देवाने बस्रा मध्येना शकरण्याची
आणि अदोम मध्ये कत्तल करण्याची वेळ निश्चित केली
आहे. 7 म्हणून मेंढे, गुरेढोरे व मस्त बैल मारले जातील.
त्यांच्या रक्ताने जमीन माखेल. त्यांच्या चरबीने माती
झाकली जाईल.

8देवाने शिक्षेची वेळ ठरवली असल्याने ह्या गोष्टी घडून
येतील. लोकांनी सियोनवर केलेल्या अन्यायाची भरपाई
करण्याचे वर्ष परमेश्वराने निश्चित केले आहे. 9अदोमच्या
नद्या उकळत्या डांबराप्रमाणे होतील. तेथील भूमी उकळत्या
गंधकाप्रमाणे होईल. 10आग रात्रंदिवस पेटत राहील.
कोणीही ती विझविणार नाही. अदोममधून निघणारा धूर
कायमचा राहील. ती भूमी कायमची नाश पावेल. कोणीही,
त्या भूमीतून, पुन्हा कधीही प्रवास करणार नाही. 11पक्षी
आणि लहान सहान प्राणी तिचा ताबा घेतील. घुबडे आणि
डोमकावळे तेथे वस्ती करतील. त्या भूमीला "रिकामे
वाळवंट"* असे नाव पडेल. 12प्रतिष्ठित नागरिक आणि
नेते नाहीसे होतील. त्यांना राज्य करायला काहीही शिल्लक
राहणार नाही.

13तेथल्या सुंदर घरांतून काटेकुटे आणि रानटी झुडुपे
वाढतील. त्या घरांतून जंगली कुत्रे व घुबडे राहतील.
जंगली प्राणी तेथे वस्ती करतील. तेथे वाढलेल्या गवतात
मोठमोठे पक्षी घरटी बांधतील. 14रानमांजरे तरसांबरोबर
तेथे राहतील. रानबोकडा आपल्या मित्रांना हाका मारतील.
निशाचरांना विश्रांतीचे ठिकाण मिळेल. 15साप तेथे वारूळे
करतील आणि अंडी घालतील. अंडी फुटून छोटे छोटे
साप त्या अंधाऱ्या जागेत वळवळतील. स्त्रिया जशा
घोळक्याने आपल्या मैत्रिणींना भेटायला जातात, तशीच
गिधाडे मेलेल्या प्राण्यांचे मांस खाण्यास गोळा होतील.

16परमेश्वराच्या पाटीकडे पाहा. त्यावर लिहिलेले
वाचात्यातूनकाहीहीसुटलेलेनाही.तेप्राणीसर्व
एकत्रयेतीलअसेचत्यावरलिहिलेआहे. 'मी त्यांना एकत्र
आणीन. असे देव म्हणाला म्हणून देवाचा आत्मा त्यांना
एकत्र करील. 17त्यांचे काय करायचे ते देवाने ठरविले,
नंतर देवाने त्यांच्यासाठी जागा निवडली. देवाने रेघ काढून
त्यांना त्यांची जागा दाखविली. ते प्राणी ती जागा कायमची
व्यापतील. वर्षानुवर्षे ते तेथे राहतील.

### देव त्याच्या लोकांचे सांत्वन करील

35 शुष्क वाळवंट सुखी होईल. वाळवंट आनंदी होईल
आणि फुलासारखे फुलेल. 2वाळवंट फुलणाऱ्या
फुलांनी भरून जाईल आणि आपला आनंद दाखवेल. त्या
वेळी वाळवंट जणू आनंदाने नाचत असल्याचे भासेल.
लेबानोनचे बन, कर्मेलची टेकडी व शारोनची दरी
ह्यांच्याप्रमाणे ते सुंदर होईल. सर्व लोकांनी परमेश्वराचे
गौरव पाहिल्यामुळे हे सर्व घडेल. लोक आमच्या देवाचे
लावण्य पाहतील.

3दुर्बल हात बळकट करा. दुर्बळ पाय घट्ट करा. 4लोक
घाबरले व गोंधळले आहेत. त्यांना सांगा, "सामर्थ्यवान

---

**परमेश्वराने तेथील ... मेलेच पाहिजे** हिब्रूमध्ये ह्या वाक्याचा अर्थ असा की हे लोक पूर्णपणे देवाचे आहेत आणि ते देवाला मिळाले नाहीत तर त्यांनी मेलेच पाहिजे.

**रिकामे वाळवंट** "ते ह्या शहराला शून्यतेच्या दोरीने मोजतील आणि आभावाच्या मापाने तोलतील." उत्पत्ती किंवा प्रारंभ 1:2 मध्ये ह्या शब्दांची उजाड पृथ्वीचे वर्णन केले आहे.

व्हा. भीऊ नका.” तुमचा देव येऊन तुमच्या शत्रूला शिक्षा
करील. तो येईल आणि तुमच्या वर कृपा करील. परमेश्वर
तुमचे रक्षण करील. 5मग आंधळे पुन्हा डोळस होतील.
त्यांचे डोळे उघडतील. बाहिरे ऐकू शकतील. त्यांना
श्रवणशक्ती मिळेल. 6पंगु हरणांप्रमाणे नाचतील. मुके
आनंदगीते गाऊ लागतील. वाळवंटात झरे वाहू लागतील,
तेव्हा असे होईल. कोरड्या जमिनीतून झरे वाहतील. 7आता
लोक मृगजळे पाहतात. पण त्या वेळेला खऱ्या पाण्याची
तळी दिसतील. कोरड्या जमिनीत विहिरी खोदलेल्या
असतील. जमिनीतून पाणी वाहील. जेथे एकेकाळी
जंगली जनावरे वावरली, तेथे मोठ्या पाणवनस्पती
वाढतील.
8त्या वेळेला तेथे रस्ता असेल. ह्या महामार्गाला “पवित्र
मार्ग” असे नाव मिळेल. पापी लोकांना त्या रस्त्यावरून
जाण्यास परवानगी नसेल. कोणीही मूर्ख त्या मार्गाकडे
जाणार नाही. फक्त सज्जन माणसेच त्या मार्गावरून
चालतील. 9त्या मार्गावर कोणताही धोका असणार नाही.
तेथे लोकांना मारणारे सिंह नसतील, हिंस्त्र श्वापदे नसतील.
देवाने रक्षिलेले त्या मार्गावरून चालतील.
10देव त्याच्या लोकांना मुक्त करील आणि ते लोक
त्याला शरण येतील. सियोनमध्ये येताना लोक गात येतील.
त्यांना कायमचा आनंद मिळेल. तो आनंद त्यांच्या
डोक्यावरील मुकुटाप्रमाणे असेल. ते आनंदाने व हर्षाने
भारून जातील. दु:ख आणि शोक दूर सरेल.

## अश्शूरची यहुदावर स्वारी

36 हिज्कीया यहुदाचा राजा होता. सन्हेरीब अश्शूरचा
राजा होता. हिज्कीयाच्या कारकिर्दीच्या चौदाव्या
वर्षी सन्हेरीबने यहुदाच्या तटबंदी असलेल्या नगरांविरुध्द
उठाव केला आणि त्यांचा पाडाव केला. 2सन्हेरीबने
आपल्या सेनापतीला यरुशलेमवर स्वारी करण्यासाठी
पाठविले. सेनापती लाखीशहून निघाला आणि
यरुशलेममध्ये हिज्कीया राजाकडे गेला. त्याने आपले
शक्तिशाली सैन्य बरोबर घेतले होते. परटाच्या
शेताजवळच्या रस्त्याकडे ते गेले हा रस्ता वरच्या डोहातून
पाणी वाहून आणणाऱ्या चराजवळ होता.
3यरुशलेममधील तिघेजण सेनापतीशी बोलणी
करण्याकरिता गेले. हिज्कीयाचा मुलगा एल्याकीम,
आसाफचा मुलगा यवाह आणि शेबना हे ते तिघे होत.
ह्यातील एल्याकीम हा राजाचा कारभारी होता. यवाह हा
राजाच्या कारकिर्दीची नोंद ठेवणारा होता. तर शेबना
राजाचा चिटणीस होता.
4सेनापती त्या तिघांना म्हणाला, “तुम्ही जाऊन हिज्कीया
राजाला अश्शूरचा महान राजा काय सांगतो ते सांगा.

सम्राटाचे म्हणजेच अश्शूरच्या राजाचा असा प्रश्न
आहे की, तुला मदत मिळावी म्हणून तू कशावर
पूर्णपणे विश्वास ठेवतोस? 5सामर्थ्याच्या व चातुर्याच्या
योजना ह्यावर तू विश्वास ठेवत असशील तर ते
सगळे पोकळ आहे हे मीच तुला सांगतो. मग तू
माझ्याविरुध्द का लढत आहेस? आता मी तुला असे
विचारतो की तू तुझ्या मदतीसाठी कोणावर विश्वास
ठेवतोस? 6तू त्यासाठी मिसरवर विसंबतोस का? पण
मिसर पिचलेल्या काठीसारखा आहे. तू त्याच्यावर
आधारासाठी टेकलास तर तुला फक्त इजा होईल
आणि तुझ्या हाताला जखम होईल. मिसरवर
मदतीसाठी अवलंबून असलेले कोणीही मिसरचा राजा
फारो याच्यावर भरवसा ठेवू शकत नाही.”
7तू कदाचित् म्हणशील “आम्हाला मदत मिळावी
म्हणून मी परमेश्वर, आमचा देव, ह्यावर पूर्णपणे
विश्वास टाकतो.” पण मी सांगतो की हिज्कीयाने
देवाच्या वेद्या व पूजेसाठी असलेली उच्चासने ह्यांचा
नाश केला. हे खरे आहे हो ना? आणि हे ही खरे
आहे की हिज्कीयाने यहुदाला आणि यरुशलेमला
सांगितले “तुम्ही यरुशलेममध्ये असलेल्या वेदीचीच
फक्त पूजा करा.”
8तुम्हाला अजूनही आमच्याशी लढायचे असेल तर
माझा प्रभु, अश्शूरचा राजा, तुमच्याबरोबर एक करार
करील. तो असा तुमच्याकडे दोन हजार घोड्यांवर
स्वार होऊन लढण्यास पुरेसे घोडेस्वार असतील तर
मी तुम्हाला दोन हजार घोडे देईन. 9पण एवढे केले
तरी तुम्ही आमच्या राजाच्या एका गुलामालासुध्दा
हरवू शकणार नाही. त्याच्या सर्वांत खालच्या
पातळीवर असलेल्या अधिकाऱ्याचाही पराभव करू
शकणार नाही. मग तुम्ही मिसरच्या घोड्यांवर व
रथांवर का अवलंबून राहता?
10शिवाय हेही लक्षात ठेवा की मी या देशात येऊन
लढलो तेव्हा परमेश्वर माझ्याच बाजूला होता. मी
शहरांचा नाश केला तेव्हा परमेश्वर माझ्याच पाठीशी
होता. परमेश्वरानेच मला सांगितले, “ऊठ ह्या देशात
जा आणि त्याचा नाश कर.”

11एल्याकीम, शेबना व यवाह ह्या यरुशलेममधल्या
तिघांनी सेनापतीला सांगितले, “कृपया आमच्याशी अरामी
भाषेत बोला. आमच्या यहुदी भाषेत बोलू नका. तुम्ही
यहुदी भाषेत बोललात तर कोटावरील लोकांना तुमचे
बोलणे समजेल.”
12पण सेनापती म्हणाला “माझ्या स्वामीने, मला, ह्या
गोष्टी, फक्त तुम्हाला किंवा तुमच्या हिज्कीया राजालाच
सांगण्यासाठी पाठविलेले नाही. कोटाच्या भिंतींवर
बसलेल्या लोकांनाही हे सांगण्यासाठी मला माझ्या राजाने
पाठविले आहे. त्या लोकांनाही पुरेसे अन्न वा पाणी मिळणार
नाही. त्यांनाही तुमच्याप्रमाणेच स्वत:ची विष्ठा खावी लागेल
व स्वत:चे मूत्र प्यावे लागेल.”

13नंतर सेनापती उभा राहिला व खूप मोठ्या आवाजात यहुदी भाषेत बोलला. 14सेनापती म्हणाला, “सम्राटाचे म्हणजे अश्शूरच्या राजाचे म्हणणे ऐका:

हिज्कीयाकडून तुम्ही फसवले जाऊ नका. तो तुमचे रक्षण करू शकणार नाही. 15‘परमेश्वरावर विश्वास ठेवा. परमेश्वर तुमचे रक्षण करील. परमेश्वर अश्शूरच्या राजाकडून शहराचा पराभव होऊ देणार नाही.’ असे हिज्कीया म्हणेल तेव्हा तुम्ही विश्वास ठेवू नका.

16हिज्कीयाचे हे म्हणणे ऐकू नका. अश्शूरच्या राजाचे म्हणणे ऐका. अश्शूरचा राजा म्हणतो, “आपण एक करार करू तुम्ही शहराबाहेर माझ्याकडे यावे. नंतर प्रत्येकाला घरी जाण्यास मोकळीक मिळेल. प्रत्येकाला आपापल्या द्राक्षवेलींची द्राक्षे व आपापल्या अंजिराच्या झाडाची अंजिरे खाण्यास मुभा मिळे. प्रत्येकाला स्वत:च्या विहिरीचे पाणी पिता येईल. 17मी परत येऊन तुमच्यातील प्रत्येकाला स्वदेशच वाटावा अशा देशात घेऊन जाईपर्यंत तुम्हाला असे राहता येईल. त्या नव्या देशात तुम्हाला चांगले अन्नधान्य व नवे मद्य मिळेल. त्या देशात अन्नधान्य व द्राक्षमळे असतील.”

18हिज्कीयाकडून फसवले जाऊ नका. तो म्हणतो, “परमेश्वर आपल्याला वाचवील.” पण मी तुम्हाला विचारतो की कोठल्या राष्ट्रातील देवाने आपल्या राष्ट्रातील लोकांना अश्शूरच्या सामर्थ्यापासून वाचाविले आहे? कोणीही नाही. आम्ही त्या प्रत्येकाला पराभूत केले. 19हमाथ आणि अर्पाद यांचे देव कोठे आहेत? ते हरले आहेत. सफरवाईमचे देव कोठे आहेत? तेही हरले आहेत शोमरोनच्या देवांनी तेथील लोकांना माझ्या सामर्थ्यापसून वाचविले का? नाही. 20माझ्या सामर्थ्यापासून एखाद्या राष्ट्रातील लोकांना वाचविले आहे अशा एका तरी देवाचे नाव मला सांगा. मी त्या सर्वांचा पराभव केला. म्हणूनच म्हणतो की परमेश्वर माझ्या सामर्थ्यापासून यरुशलेमला वाचवू शकणार नाही.”

21यरुशलेममधील लोक अगदी शांत होते त्यांनी सेनापतीला उत्तर दिले नाही. “सेनापतीला उत्तर देऊ नका” असा हुकूम हिज्कीयाने त्यांना दिला होता.

22नंतर राजाचा कारभारी (हिज्कीयाचा मुलगा एल्याकीम) राजाचा चिटणीस (शेबना) व राजाच्या कारकिर्दीची नोंद ठेवणारा (आसाफचा मुलगा यवाह) ह्यांनी आपले कपडे फाडले, (ह्याचा अर्थ त्यांना फार दु:ख झाले होते.) ते तिघे हिज्कीयाकडे गेले व त्यांनी सेनापतीचे सर्व म्हणणे त्याला सांगितले.

## हिज्कीया देवाची मदत मागतो

37 हिज्कीयाने सेनापतीचा निरोप ऐकला. निरोप
ऐकताच त्याने आपले कपडे फाडले. नंतर त्याने
शोकप्रदर्शक कपडे घातले व तो परमेश्वराच्या मंदिरात
गेला.2हिज्कीयाने कारभारी (एल्याकीम) चिटणीस
(शेबना) आणि याजकातील वडिलधारी मंडळी (नेते)
ह्यांना अमोजचा मुलगा यशया या प्रेषिताकडे पाठविले.
त्या सगळ्यांनी खास शोकप्रदर्शक कपडे घातले.

3ते तिघे यशयाला म्हणाले, “आजचा दिवस विशेष
शोकाचा व दु:खाचा समजावा असा हिज्कीया राजाने हुकूम
दिला आहे. हा दिवस फार दु:खाचा असेल. कळा सुरू
व्हाव्यात पण प्रसूती होऊ नये तसा हा दिवस असेल.
4सेनापतीने सांगितलेल्या गोष्टी, परमेश्वर तुमचा देव
कदचित् ऐकेल. अश्शूरच्या राजाने प्रत्यक्षातील देवाबद्दल
वाईटसाईट बोलण्यास आपल्या सेनापतीला पाठविले आणि
परमेश्वराने, तुमच्या देवाने. ती निंदा ऐकली. इस्राएलमध्ये
राहिलेल्या थोड्या लोकांसाठी प्रार्थना करा.”

5–6हिज्कीयाचे नोकर यशयाकडे गेले. यशया त्यांना
म्हाणाला, “तुझ्या धन्याला पुढील गोष्टी सांग : परमेश्वर
म्हणतो, ‘तुम्ही सेनापतीकडून जे ऐकले त्याने घाबरून
जाऊ नका. माझ्याबद्दल अश्शूरची “मुले” जे वाईट बोलत
आहेत त्यावर विश्वास ठेवू नका. 7पाहा! मी माझा आत्मा
अश्शूरविरुध्द पाठवीन. अश्शूरच्या राजाला, त्याच्या
देशाला असलेल्या धोक्याच्या सुचनेचा वृत्तांत समजेल मग
तो त्याच्या देशाला परत जाईल. त्या वेळी त्याच्याच देशात
मी त्याला तलवारीने मारीन.’”

## अश्शूरचे सैन्य यरुशलेम सोडते

8–9अश्शूरच्या राजाला एक वृत्तांत कळला तो वृत्तांत
असा होता: “कूशचा राजा तिऱ्हाका तुमच्यावर स्वारी
करण्यास येत आहे.” म्हणून अश्शूरच्या राजाने लाखीश
सोडले व तो लिब्नाला गेला. सेनापतीने हे ऐकले व तो
राजा लढत होता तेथे म्हणजे लिब्नाला गेला नंतर सेनापतीने
हिज्कीयाकडे दूत पाठविले. सेनापती म्हणाला, 10“तुम्ही
पुढील गोष्टी यहुदाचा राजा हिज्कीया याला सांगाव्या: तू
ज्या देवावर विश्वास ठेवतोस त्याच्याकडून फसू नको.

‘देव अश्शूरच्या राजाकडून यरुशलेमचा पराभव
होऊ देणार नाही.’” असे म्हणू नको.

11ऐक! तू अश्शूरच्या राजांबद्दल ऐकले आहेस.
अश्शूरच्या सैन्याने प्रत्येक देशाचा पराभव केला
आहे. अश्शूरचा राजा तुझा पराभव करून तुला
ठार मारील. 12त्या सर्व पराभूत झालेल्या लोकांना
त्यांच्या देवांनी वाचविले का? नाही माझ्या पूर्वजांनी
त्यांचा नाश केला. माझ्या सैन्याने गोजान, हारान,
रेसफ व तलस्सारातील एदेनमध्ये राहणाऱ्या लोकांचा
पराभव केला. 13हमाथ आणि अर्पाद येथील राजे

कोठे आहेत? सफरवाईमचा राजा कोठे आहे? हेनाचा
व इव्वाचा राजा कोठे आहे? ते सर्व संपले नाश
पावले.

## हिज्कीया देवाची प्रार्थना करतो

14हिज्कीयाने दूतांकडून संदेश घेऊन वाचला. नंतर
हिज्कीया परमेश्वराच्या मंदिरात गेला. हिज्कीयाने तो
संदेश उघडून परमेश्वरापुढे ठेवला. 15तो परमेश्वराची
प्रार्थना करू लागला. तो म्हणाला:

16सर्वशक्तिमान परमेश्वरा, इस्राएलच्या देवा,
करूब देवदूतांचा राजा म्हणून तू सिंहासनी बसतोस.
देवा, तुझी आणि तुझीच सत्ता पृथ्वीवरील सर्व राज्यांवर
चालते. तूच स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केलीस.
17परमेश्वरा माझे म्हणणे ऐक डोळे उघड आणि
सन्हेरिबकडून आलेला संदेश पाहा. सन्हेरिबने मला
हा संदेश पाठविला, त्यात जिवंत देवाची म्हणजेच
तुझी निंदानालस्ती केली आहे.
18परमेश्वरा, अश्शूरच्या राजाने खरोखरीच सर्व
देश व त्यांची भूमी यांचा नाश केला आहे. 19त्याने
त्या देशांतील देव जाळले आहेत पण ते देव खरे
नव्हते. माणसाने घडविलेले ते पुतळे होते. ते फक्त
लाकूड व दगडच होते. म्हणून ते हरवले व नष्ट
झाले. 20पण तू परमेश्वर आमचा देव आहेस म्हणून
अश्शूरच्या राजाच्या बळापासून आम्हाला वाचव.
म्हणजे सर्व देशांना कळेल की परमेश्वरच फक्त
खरा देव आहेस.

## देवाचे हिज्कीयाला उत्तर

21नंतर आमोजचा मुलगा यशया याने हिज्कीयाला निरोप
पाठविला यशया म्हणाला, "इस्राएलचा देव परमेश्वर
म्हणतो. 'तू परमेश्वराची, इस्राएलच्या देवाची, प्रार्थना
केलीस. सन्हेरिबकडून आलेल्या निरोपासाठी ती प्रार्थना
होती. मी ती प्रार्थना ऐकली आहे.'
22"सन्हेरिब बाबत परमेश्वराचा संदेश असा आहे:

'अश्शूरच्या राजा, सियोनची वधू (यरुशलेम) तुला
महत्व देत नाही. ती तुला हसते. यरुशलेमची कुमारी
मुलगी, तुझी टर उडविते.
23अश्शूरच्या राजा, तू माझी निंदा केलीस. तू माझी
चेष्टा केलीस. मी कोण आहे हे तुला माहीत आहे का?
पापण्या उंचावून स्वर्गाकडे पाहा. मग तुला दिसेल की
इस्राएलच्या पवित्र देवाची तू निंदा केली आहेस.
24परमेश्वर, माझ्या प्रभुविरुध्द बोलण्यासाठी तू तुझ्या
नोकरांचा उपयोग केलास. तू म्हणालास, "मी फार
सामर्थ्यवान आहे माझ्याजवळ पुष्कळ रथ आहेत. माझ्या
बळावर मी लबानोनला हरविले. मी तेथील उंच डोंगरावर
चढलो. मी तेथील सर्व उंच झाडे (सैन्ये) तोडली, मी
तेथील उंच डोंगरावर व घनदाट जंगलात जाऊन आलो.
25मी विहिरी खणल्या व नवीन ठिकाणी पाणी प्यायलो.
मी मिसरच्या नद्या सुकवल्या व त्या प्रदेशावरून चालत
गेलो."
26"पण देव म्हणतो, "अश्शूरच्या राजा, मी, देवाने फार
पूर्वीच हे केले आहे हे तू ऐकलेच असशील. फार वर्षापूर्वी
मी अश्शूरला निर्मिले मीच तुला येथवर आणले. मीच
तुला त्या शहरांचा नाश करण्याची परवानगी दिली. माझे
काम करून घेण्यासाठी आणि त्या शहरांना दगडधोड्यांच्या
राशीत बदलण्यासाठी मी तुझा उपयोग केला.
27त्या शहरात राहणारे लोक दुबळे होते. ते घाबरलेले
व खजील झालेले होते. शेतात वाढणाऱ्या तणाप्रमाणे ते
लोक होते. घराच्या छपरावर उगवणाऱ्या गवतासारखे ते
होते. ते उंच होण्यापूर्वीच वाळवंटातील गरम झळांनी जळून
जाते.
28मी तुझ्या सैन्याबद्दल व तुझ्या लढायांबद्दल सर्व जाणतो.
तू कधी विश्रांती घेतलीस, कधी युध्दावर गेलास व
युध्दावरून घरी कधी परतलास हे सर्व मला माहीत आहे.
तू माझ्यावर रागावला आहेस, हे ही मला ठाऊक आहे.
29तू माझ्यावर रागावला आहेस व माझी निंदा केली
आहेस. तुझे बोलणे मी ऐकले. म्हणून मी तुला शिक्षा
करीन. मी तुझ्या नाकात वेसण घालीन. तुला लगाम
घालीन आणि तू ज्या रस्त्याने माझ्या देशात आलास,
त्याच रस्त्याने मी तुला माझ्या देशातून हाकलून देईन."

## हिज्कीयाला परमेश्वराचा संदेश

30नंतर परमेश्वर हिज्कीयाला म्हणाला, "हिज्कीया,
माझे हे बोलणे खरे आहे हे दाखविण्यासाठी मी तुला खूण
देईन. ह्या वर्षी धान्य पेरले जाणार नाही. म्हणून या वर्षी
तुम्हाला मागच्या वर्षांच्या पिकातील जुनं धान्य खावे लागेल.
पण तीन वर्षांत तुम्ही पेरलेले धान्य खाल. तुम्ही पिकाची
कापणी कराल आणि तुमच्याजवळ खाणे मुबलक असेल
तुम्ही द्राक्षांची लागवड कराल आणि द्राक्षे खाल.
31"यहुदाच्या वंशातील काही लोक वाचले त्या थोड्या
लोकांचे खूप मोठे राष्ट्र होईल. मुळे खोलवर रूजून
भक्कम वाढणाऱ्या झाडांप्रमाणे ते लोक असतील मुळे
खोल रुजलेल्या झाडांना खूप फळे लागतात. त्याचप्रमाणे
ह्या लोकांना पुष्कळ संतती होईल. 32जिवंत राहिलेले
थोडे लोक यरुशलेममधून येतील सियोनच्या डोंगरावरून
वाचलेले येतील." सर्वशक्तिमान परमेश्वराच्या तीव्र
प्रेमामुळे हे होईल.
33म्हणून अश्शूरच्या राजाला परमेश्वराचा संदेश असा
आहे.

"तो ह्या शहरात प्रवेश करणार नाहीस तो ह्या शहराच्या
दिशेने एकसुध्दा बाण मारणार नाहीत. तो ढाली घेऊन ह्या

शहराशी लढण्यास पुढे सरसावणार नाही. तो वेशीच्या
भिंतीला उतरंड बांधणार नाहीस.
34तो आला त्याच रस्त्याने स्वत:च्या देशाला परत जाईल.
तो ह्या शहरात प्रवेश करणार नाहीस हा परमेश्वराने
दिलेला संदेश होता.
35देव म्हणतो:मी ह्या शहराचे रक्षण करीन. आणि
त्याला वाचवीन. मी हे माझ्यासाठी आणि माझा सेवक
दाविदासाठी करीन."

36मग परमेश्वराच्या दूताने जाऊन अश्शूरच्या
तळावरील 185,000 माणसांना ठार मारले. सकाळी उठून
लोक पाहतात तो त्यांच्या सभोवती प्रेते पडलेली. 37मग
अश्शूरचा राजा, सन्हेरिब निनवेला परत गेला आणि
तेथेच राहिला.
38एके दिवशी, सन्हेरीब त्याच्या निस्त्रोख देवाच्या देवळात
पूजा करीत असताना, त्याच्या दोन मुलांनी, अद्रम्मेलेक
व शरेसर यांनी, त्यास तलवारीने ठार मारले. मग ते
अराराटला पळून गेले. म्हणून सन्हेरीबचा मुलगा
एसर-हद्दोन अश्शूरचा राजा झाला.

## हिज्कीयाचा आजार

38 ह्या वेळेस, हिज्कीया फार आजारी पडला. जवळ
जवळ तो मेलाच होता. अमोजचा मुलगा यशया
हा संदेष्टा त्याला भेटायला गेला.
यशया राजाला म्हणाला, "परमेश्वराने मला तुला
सांगायला सांगितले आहे 'तू लवकरच मरशील, म्हणून
तू गेल्यावर तुझ्या घरातील लोकांनी काय करावे हे तू
त्यांना सांगावेस. तू ह्या आजारातून उठणार नाहीस.'"
2हिज्कीया मंदिराच्या दिशेला वळला आणि त्याने प्रार्थना
करण्यास सुरवात केली. तो म्हणाला, 3"परमेश्वरा, मी
नेहमीच शुध्द मनाने आणि प्रामाणिकपणाने तुझ्यासमोरच
जगलो, हे कृपया लक्षात असू दे. मी तू सांगितलेल्या
चांगल्या गोष्टीच नेहमी केल्या." मग हिज्कीया कळवळून
रडू लागला.
4यशयाला परमेश्वराकडून संदेश मिळाला,
5"हिज्कीयाकडे जाऊन त्याला सांग परमेश्वर, तुझ्या
पूर्वजाचा, दाविदाचा, देव म्हणतो, 'मी तुझी प्रार्थना ऐकली
आणि तुझे दु:खाश्रू पाहिले, मी तुझ्या आयुष्यात पंधरा वर्षे
वाढवीन. 6मी अश्शूराच्या राजापासून तुझा व ह्या शहराचा
बचाव करीन.'"
22पण हिज्कीयाने यशयाला विचारले, "मी बरा होईन
ह्याची खात्री पटण्यासाठी परमेश्वराचा संकेत काय असेल?
मी परमेश्वराच्या मंदिरात जाण्यायोग्य होईन हे कसे
ओळखायचे?"
7-8परमेश्वर जे म्हणतो ते करतो हे दाखविण्याची ही
खूण असेल. "सूर्यास्तानंतर सूर्य क्षितिजाखाली गेल्यामुळे
आहाजच्या पायऱ्यांवर पडणारी सावली मी दहा पावले
मागे आणीन. सूर्यास्त होताच सूर्याची सावली दहा पावले
मागे जाईल."
21मग यशया हिज्कीयाला म्हणाला, "अंजिरे वाटून तू
तुझ्या दुखऱ्या भागावर लाव. मग तू बरा होशील."
9आजारातूनउठल्यावरहिज्कीयानेलिहिलेले हे पत्र:

10मी म्हातारा होईपर्यंत जगावे असे मीच स्वत:शी म्हटले
होते. पण अधोलोकाच्या दारातून जाण्याची माझी वेळ
आली, आता मला सर्व काळ तेथेच काढावा लागेल असे
मला वाटते.
11म्हणून मी म्हणालो, "मी याह परमेश्वराला जिवंतांच्या
भूमीवर यापुढे कधी पाहणार नाही. मी पृथ्वीवर राहणाऱ्या
लोकांना पाहणार नाही.
12माझे घर, माझा मेंढपाळाचा तंबू जमीनदोस्त केला
जात आहे आणि माझ्यापासून हिसकावून घेतला गेला.
जसे मागावरचे कापड कापून त्याची गुंडाळी केली जाते,
तसा मी संपलो आहे. तू माझे आयुष्य अल्प काळातच
संपविलेस.
13सबंध रात्रभर मी सिंहगर्जनेप्रमाणे मोठमोठयाने
रडलो. सिंहाने हाडेसुध्दा खाऊन नष्ट करावीत तशा
माझ्या आशा नष्ट झाल्या. तू माझे आयुष्य फार लवकर
संपविलेस.
14मी कबुतराप्रमाणे घुमलो, पक्ष्याप्रमाणे कलकललो,
माझे डोळे थकले, तरीही मी स्वर्गाकडे बघत राहिलो.
माझ्या प्रभू, मी खूप निराश झालो आहे. मला मदत
करशील असे वचन दे."
15मी काय बोलू? माझ्या प्रभूने काय घडणार ते मला
सांगितले.आणि माझा प्रभूच ते घडवून आणील माझ्या
मनाला खूप क्लेश झाले म्हणून आता माझ्या सगळ्या
आयुष्यात मी नम्र होईन.
16माझ्या प्रभू, या कठीण काळाचा उपयोग माझ्यात
परत आत्मा आणण्यासाठी कर. मला शुध्द व निरोगी
व्हायला मदत कर. मला परत जिवंत कर.
17पाहा! माझ्या अडचणी संपल्या. मला आता शांतता
मिळाली आहे. तू माझ्यावर खूप प्रेम करतोस. तू मला
थडग्यात सडू दिले नाहीस तू माझे अपराध पोटात घातलेस.
(मला क्षमा केलीस) माझी पापे दूर फेकलीस.
18मृत तुझी स्तुतिस्तोत्रे गात नाहीत. अधोलोकातील
लोक तुझे स्तवन करीत नाहीत. मृत तुझ्या मदतीची
आशा करीत नाहीत. ते जमिनीतील खड्ड्यात जातात आणि
परत कधीही बोलत नाहीत.
19माझ्याप्रमाणे जिवंत असणारी माणसे तुझी स्तुती
करतात. म्हणून वडिलांनी मुलांना तुझ्यावर विश्वास
ठेवायला हरकत नाही असे सांगावे.
20मी म्हणतो, "परमेश्वराने माझे रक्षण केले. म्हणून
आम्ही आयुष्यभर परमेश्वराच्या मंदिरात गाऊ व वाद्य
वाजवू."

## बाबेलचे दूत

39 त्या वेळेला, बलदानचा मुलगा मरोदख बलदान
बाबेलचा राजा होता. मरोदखने हिज्कीयाच्या
आजारपणाबद्दल आणि त्याच्या बरे होण्याविषयी ऐकले,
म्हणून त्याने हिज्कीयाला पत्रे व भेटी पाठविल्या. 2ह्या
भेटींमुळे हिज्कीयाला आनंद झाला. म्हणून त्याने आपल्या
राज्यातील अगदी खास अशा गोष्टी मरोदखच्या माणसांना
पाहू दिल्या. हिज्कीयाने आपली संपत्ती त्यांना दाखविली.
त्यात चांदी, सोने, अमूल्य तेले आणि अत्तरे होती. युध्दात
वापरलेल्या तलवारी आणि ढालीही हिज्कीयाने त्यांना
दाखविल्या. त्याने जमविलेल्या सर्व वस्तू मरोदखच्या
माणसांना दाखविल्या. त्याने आपल्या घरातील व राज्यातील
सर्व काही दाखविले.
3संदेष्टा यशया, हिज्कीया राजाकडे गेला आणि त्याने
विचारले, "ही माणसे काय म्हणत होती? ती कोठून आली
होती?" हिज्कीया उत्तरला, "ती फार दूरच्या देशातून
माझ्याकडे आली होती. ती बाबेलमधून आली होती."
4मग यशयाने विचारले, "तुझ्या राज्यात त्यांनी काय
काय पाहिले?"
हिज्कीया उत्तरला, "माझ्या राजवाड्यातील प्रत्येक गोष्ट
त्यांनी पाहिली. माझी सर्व संपत्ती मी त्यांना दाखविली."
5यशया हिज्कीयाला म्हणाला, "सर्वशक्तिमान
परमेश्वराचे म्हणणे ऐक. 6'भविष्यात, तुझ्या पूर्वजांनी आणि
तू आतापर्यंत जे जमविले आहे ते सर्व लुटले जाईल आणि
बाबेलला नेले जाईल.' सर्वशक्तिमान परमेश्वराने हे
सांगितले. 7तू ज्यांना जन्म देशील त्या तुझ्या मुलांना बाबेलचा
राजा घेऊन जाईन. बाबेलच्या राजवाड्यात तुझी मुले नोकर
म्हणून राहतील."
8हिज्कीया यशयाला म्हणाला, "परमेश्वरचे हे बोल
ऐकायला बरे वाटतात." (हिज्कीयाला वाटले मी राजा
असताना सगळीकडे शांतता असेल, कसलाही त्रास असणार
नाही." म्हणून तो असे म्हणाला.)

## इस्राएलची शिक्षा संपेल

40 तुमचा देव म्हणतो,
"माझ्या लोकांचे सांत्वन करा, माझ्या लोकांचे
सांत्वन करा.
2यरुशलेमशी ममतेने बोला यरुशलेमला सांगा: 'तुझ्या
सेवेचा काळ संपला तुझ्या पापांची किंमत तू मोजली
आहेस.'" परमेश्वराने यरुशलेमला शिक्षा केली. तिने
केलेल्या प्रत्येक पापाकरिता दोनदा शिक्षा केली.
3ऐका! कोणीतरी ओरडत आहे, "परमेश्वरासाठी
वाळवंटातून मार्ग काढा. आमच्या देवासाठी वाळवंटात
सपाट रस्ता तयार करा.
4प्रत्येक दरी भरून काढा. प्रत्येक डोंगर आणि टेकडी
सपाट करा. वेडेवाकडे रस्ते सरळ करा. खडकाळ जमीन
गुळगुळीत करा.
5मग देवाची प्रभा फाकेल आणि सर्व लोक एकत्रितपणे
परमेश्वराचे तेज पाहतील. हो! स्वत: परमेश्वराने हे सर्व
सांगितले आहे."
6एक आवाज आला, "बोल!" मग माणूस म्हणाला, "मी
काय बोलू?" आवाज म्हणाला, हे बोल: "सर्व माणसे
गवतासारखी आहेत. माणसाचा चांगुलपणा कोवळ्या
गवताच्या पात्यासारखा आहे.
7परमेश्वराकडून येणाऱ्या जोरदार वाऱ्याने हे गवत
सुकते व मरते, सर्व माणसे गवतासारखी आहेत हेच सत्य
आहे."
8"गवत सुकते आणि फुले कोमेजतात पण आमच्या
देवाची वाणी सदासर्वकाळ राहते."

## तारण: देवाची सुवार्ता

9सियोन, तुझ्याकडे सांगण्यासाठी एक सुर्वाता आहे.
उंच डोंगरावर चढून जा आणि ही सुवार्ता ओरडून सांग.
यरुशलेम, तुझ्यासाठी चांगली वार्ता आहे.घाबरू नकोस.
मोठ्याने बोल.
यहुदातील सर्व शहरांना ही वार्ता सांग, "हा पाहा तुमचा
देव!
10परमेश्वर, माझा प्रभू सर्व सामर्थ्यानिशी येत आहे
लोकांवर अधिकार चालविण्यासाठी तो त्याचे सामर्थ्य
वापरील तो आपल्या लोकांसाठी बक्षिस आणील. तो
त्यांचा मोबदला चुकता करील.
11ज्याप्रमाणे मेंढपाळ मेंढ्या वळवतो त्याप्रमाणे परमेश्वर
आपल्या लोकांना वळवेल. परमेश्वर आपल्या हाताने
(सामर्थ्याने) त्यांना एकत्र गोळा करील. तो लहान मेढ्यांना
हातांत उचलून घेईल व त्या लहानग्यांच्या आया
परमेश्वराच्या बाजूबाजूने चालतील.

## देवाने जग निर्मिले-तो त्याचे आधिपत्य करतो

12आपल्या ओंजळीने समुद्राचे पाणी कोणी मोजले?
आकाशाचे मोजमाप करण्यासाठी कोणी आपला हात
वापरला? पृथ्वीवरची धूळ वाडग्याने कोणी मापली? डोंगर
आणि टेकड्या तराजूने कोणी तोलल्या? हे सर्व करणारा
परमेश्वर होता.
13काय करावे हे कोणीही माणसाने परमेश्वराला
सांगितले नाही. त्याने ज्या गोष्टी केल्या, त्या कशा कराव्या
हे ही परमेश्वराला कोणी माणसाने सांगितले नाही.
14परमेश्वराने कोणा माणसाची मदत मागितली का?
कोणा माणसाने परमेश्वराला प्रामाणिकपणा शिकविला
का? परमेश्वराला कोणा माणसाने ज्ञान दिले का? कोणी
परमेश्वराला शहाणपण शिकविले का? नाही. या गोष्टी
परमेश्वराला अगोदरच माहीत होत्या.
15हे बघा! राष्ट्र हा परमेश्वराच्या सृष्टीचा फार सूक्ष्म
अंश आहे राष्ट्र हे बादलीतल्या पाण्याच्या एका थेंबाप्रमाणे
आहे. जर परमेश्वराने सर्व राष्ट्रे गोळा करून त्याच्या

तराजूच्या पारडयात टाकली तर ती धुळीच्या लहान लहान
कणांप्रमाणे दिसतील.
16परमेश्वरापुढे होम करायला लबानोनमधील सर्व
झाडेही पुरणार नाहीत. आणि त्याच्यापुढे बळी देण्यासाठी
तेथील सर्व प्राणी मारले तरी अपुरेच पडतील.
17तुलनेने देवापुढे जगातील सर्व राष्टे म्हणजे काहीच
नाहीत. देवाच्या तुलनेत जगातील सर्व राष्ट्रांची किंमत
शून्य आहे.

### लोक देवाची कल्पनाच करू शकत नाहीत

18देवाची तुलना तुम्ही कशाशी करू शकता का? नाही.
तुम्ही देवाचे चित्र काढू शकता का? नाही.
19पण काहीजण लाकूड आणि दगड यांपासून मूर्ती तयार
करतात आणि त्यांनाच देव मानतात. एक कारागीर मूर्ती
तयार करतो. दुसरा तिला सोन्याने मढवतो आणि तिच्यासाठी
चांदीच्या साखळ्या करतो.
20पायासाठी तो न कुजणारे विशेष प्रकारचे लाकूड
निवडतो. नंतर तो चांगला सुतार शोधतो आणि “देवाच्या”
मूर्तीसाठी भक्क म पाया तयार करतो.
21तुम्हाला सत्य नक्क ीच माहीत आहे. नाही का? तुम्ही
नक्क ीच त्याबद्दल ऐकले आहे. फार पूर्वी नक्क ीच कोणीतरी
तुम्हाला ते सांगितले आहे. ही पृथ्वी कोणी निर्मिली हे
तुम्ही जाणता.
22परमेश्वरच खरा देव आहे तो पृथ्वीगोलावर
स्थानापन्न होतो. त्याच्या तुलनेत लोक म्हणजे नाकतोडे
आहेत. त्याने कापडाच्या गुंडाळीप्रमाणे आकाश उलगडून
उघडले. आकाशाखाली बसण्यासाठी त्याने ते तंबूच्या
कनातीप्रमाणे ताणले.
23तो अधिपतींना निरुपयोगी करतो आणि जगातील
न्यायाधीशांना पूर्णपणे कवडीमोल ठरवितो.
24ते राजे (अधिपती) रोपट्यांप्रमाणे आहेत. जमिनीत
लावल्यावर ती रूजायच्या आधीच देवाच्या जोरदार वाऱ्याने
ती “रोपटी” सुकतात आणि मरतात व वारा त्यांना गवताच्या
काडीप्रमाणे दूर उडवून देतो.
25पवित्र देव म्हणतो, “तुम्ही माझी तुलना कोणाशी
करू शकता का? नाही. कोणीही माझ्या बरोबरीचे नाही.
26आकाशाकडे पाहा. हे तारे कोणी निर्मिले? ही
आकाशातील ‘सेना’ कोणाची निर्मिती आहे. प्रत्येक
ताऱ्याला त्याच्या नावाने कोण ओळखतो? खरा देव
फार बलवान व सामर्थ्यवान आहे. म्हणून त्यातील एकही
तारा हरवत नाही.”
27याकोब, हे खरे आहे इस्राएल, तू ह्यावर विश्वास
ठेवावा. मग तुम्ही “मी कसा जगतो हे परमेश्वराला दिसू
शकत नाही. देव मला शोधून शिक्षा करणार नाही.” असे
का म्हणता?
28परमेश्वर देव फार सुज्ञ आहे, हे तुम्ही नक्क ीच ऐकले
आहे व तुम्हाला ते माहीतही आहे. देवाला ज्ञान असलेली
प्रत्येक गोष्ट माणूस शिकू शकत नाही. परमेश्वर कधी
दमत नाही, आणि त्याला विश्रांतीची गरज नाही. जगातील
दूरदूरची स्थळे परमेश्वरानेच निर्मिली. परमेश्वर चिरंजीव
आहे.
29परमेश्वर दुबळ्यांना सबळ व्हायला मदत करतो. तो
लोकांना शक्तीशिवाय सामर्थ्यवान होण्यास कारणीभूत
होतो.
30तरूण माणसे थकतात आणि त्यांना विश्रांतीची गरज
वाटते. लहान मुलेसुध्दा अडखळतात आणि पडतात.
31पण परमेश्वरावर विश्वास ठेवणारे, ज्याप्रमाणे गरूड
पंख पसरून वर उडतात, त्याप्रमाणे पुन्हा सामर्थ्यशाली
होतात. ही माणसे न दमता धावतात व न थकता चालतात.

### परमेश्वर निर्माता आणि चिरंजीव आहे

41 परमेश्वर म्हणतो, “दूरवरच्या देशांनो, शांत व्हा
आणि माझ्याकडे या. राष्ट्रांनो, शूर व्हा. येऊन
माझ्याशी बोला. आपण एकत्र जमून कोणाचे बरोबर आहे
ते ठरवू.
2माझ्या पुढील प्रश्नांना उत्तरे द्या:पूर्वेकडून येणाऱ्या
माणसाला कोणी उठविले? चांगलुपणा त्याच्याबरोबर आहे.
तो त्याच्या तलवारीच्या जोरावर राष्ट्रांना पराभूत करतो
मग त्यांची जणू माती होते तो तीर सोडतो आणि राजांना
जिंकतो. वाऱ्याने गवताची काठी उडावी तसे ते दूर पळतात.
3तो सैन्याचा पाठलाग करतो पण त्याला कधीच ईजा
होत नाही पूर्वी कधीही न गेलेल्या ठिकाणी तो जातो.
4ह्या गोष्टी कोणी घडवून आणल्या? हे कोणी केले?
सुरवातीपासून लोकांना कोणी बोलाविले? मी, परमेश्वराने,
या गोष्टी केल्या आरंभापासून मी म्हणजे परमेश्वर आहे.
आरंभापूर्वीही मी येथे होतो आणि सर्व संपल्यावर मीच
येथे असेन.5अती दूरच्या सर्व स्थळांनो, पाहा आणि भिऊन
असा! पृथ्वीवरच्या दूरवरच्या सर्व ठिकाणांनो, भीतीने
थरथर कापा! इकडे या आणि माझे ऐका.”आणि ते आले.

6“कामगार एकमेकांना मदत करतात. ते बळकटी
येण्यासाठी एकमेकांना उत्तेजन देतात. 7एकजण मूर्ती
करण्यासाठी लाकूड कापतो. तो सोन्याचे काम
करणाऱ्याला उत्तेजन देतो. दुसरा हातोडीने धातू मऊ
करतो. तो ऐरणी वर घाव घालणाऱ्याला उत्तर देतो हा
शेवटचा कामगार म्हणतो, ‘हे काम चांगले झाले. सोने
आता निघून येणार नाही.’ नंतर तो खिळ्याने मूर्ती पायावर
पक्क ी बसवितो. मग मूर्ती खाली पडू शकत नाही आणि
ती कधीही सरकत नाही.”

### फक्त परमेश्वरच आपले रक्षण करू शकतो

8परमेश्वर म्हणतो, “इस्राएल, तू माझा सेवक आहेस.
याकोब, मी तुझी निवड केली. तू अब्राहामच्या वंशातील
आहेस. आणि अब्राहामवर प्रेम केले.

[9]पृथ्वीवर खूप लांब, दूरच्या देशात होतास, पण मी तुला बोलाविले व सांगितले, ‘तू माझा सेवक आहेस.’ मी तुझी निवड केली आणि मी कधीच तुझ्याविरुध्द गेलो नाही.

[10]काळजी करू नकोस मी तुझ्याबरोबर आहे घाबरू नकोस. मी तुझा देव आहे. मी तुला मदत करीन. मी माझ्या चांगलुपणाच्या उजव्या हाताने तुला आधार देईन.

[11]बघ! काही लोक तुझ्यावर रागावले आहेत. पण ते लज्जित होतील. तुझे शत्रू नाहीसे होतील व कायमचे निघून जातील.

[12]तू तुझ्याविरुध्द असणाऱ्या लोकांना शोधशील पण ते तुला सापडू शकणार नाहीत. ते संपूर्णपणे नाहीसे होतील.

[13]मी परमेश्वर तुझा देव आहे मी तुझा उजवा हात धरतो आहे, मी तुला सांगतो: घाबरू नकोस मी तुला मदत करीन.

[14]बहुमोल यहुदा, घाबरू नकोस. इस्राएलमधील माझ्या लाडक्या लोकांनो, भिऊ नका. मी खरोखरच तुम्हाला मदत करीन.” परमेश्वराने स्वत:च ह्या गोष्टी सांगितल्या. जो तुम्हाला वाचवितो तोच इस्राएलचा पवित्र देव हे बोलला.

[15]“मी तुम्हाला कोऱ्या मळणीयंत्राप्रमाणे केले आहे. त्या यंत्राला खूप तीक्ष्ण दाते आहेत. शेतकरी त्याचा उपयोग टरफलांपासून धान्य वेगळे करण्याकरिता करतात. त्याचप्रमाणे तुम्ही डोंगर पायाखाली तुडवून चिरडून टाकाल तुम्ही टेकडयांची अवस्था धान्याच्या भुसकटाप्रमाणे कराल.

[16]तुम्ही त्या फेकून द्याल आणि वाऱ्याबरोबर वाहत जाऊन त्या सगळीकडे विखुरल्या जातील. नंतर तुम्ही परमेश्वराबद्दल आनंद मानाल. तुम्हाला इस्राएलच्या पवित्र (देवाबद्दल) अभिमान वाटेल.”

[17]“गरीब आणि गरजू पाण्याचा शोध घेतात. पण त्यांना पाणी मिळू शकत नाही. ते तहानेलेले आहेत. त्यांच्या तोंडाला कोरड पडली आहे. मी त्यांनी केलेली आळवणी ऐकेन. मी इस्राएलचा देव, त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही.

[18]वैराण टेकड्यांवर मी नद्या वाहायला लावीन आणि दऱ्यांतून झऱ्याचे पाणी वाहायला लावीन. मी वाळवंटाचे रूपांतर पाण्याने भरलेल्या सरोवरात करीन. त्या शुष्क भूमीवर पाण्याचे झरे वाहतील.

[19]वाळवंटात गंधसरू, बाभूळ, ऑलिव्ह (तेल) सरू, देवदारू आणि भद्रदारू हे वृक्ष वाढतील.

[20]लोक हे सर्व पाहतील आणि परमेश्वराच्या सामर्थ्यामुळेच हे सर्व झाले आहे हे त्यांना कळेल. हे सर्व घडवून आणणारा एकमेव पवित्र (देव) आहे हे लोकांना हे सर्व पाहिल्यावर कळेल.”

## परमेश्वराचे खोट्या देवांना आवाहन

[21]परमेश्वर, याकोबचा राजा म्हणतो, “या आणि तुमचे काय मुद्दे आहेत ते मला सांगा तुमचे त्याबद्दलचे पुरावे मला दाखवा आणि मग आपण काय बरोबर आहे ते ठरवू. [22]तुमच्या मूर्तीनी (खोट्या देवांनी) यावे व काय घडत आहे ते सांगावे.

“सुरवातीला काय झाले? भविष्यात काय घडणार आहे? ते आम्हाला सांगा. आम्ही लक्षपूर्वक ऐकू. मग नंतर काय घडणार आहे ते आम्हाला कळेल. [23]काय घडेल हे समजण्यासाठी कोणत्या गोष्टी आम्ही पाहाव्या ते आम्हाला सांगा. मग आमचा तुमच्यावर खरोखरचे देव म्हणून विश्वास बसेल. काहीतरी चांगले किंवा वाईट करा म्हणजे आम्हाला तुम्ही प्रत्यक्षात आहात जिवंत आहात हे दिसेल व आम्ही तुम्हाला अनुसरु.

[24]“बघा! तुम्ही शून्य किंमतीचे आहात तुम्ही काहीच करू शकत नाही फक्त कवडी किंमतीची माणसेच तुमची पूजा करू इच्छितात.”

## परमेश्वर, स्वत:च खरा परमेश्वर आहे, हे सिध्द करतो

[25]“मी उत्तरेकडील एका माणसाला* उठविले तो उगवत्या सूर्याच्या दिशेकडून म्हणजे पूर्वेकडून येत आहे. तो माझी उपासना करतो. कुंभार ज्याप्रमाणे चिखल तुडवितो, त्याप्रमाणे तो विशिष्ट माणूस राजांना तुडवेल.”

[26]हे सर्व घडण्यापूर्वी आम्हाला कोणी सांगितले? त्याला आम्ही देव म्हणावे, तुमच्या कोणात्या मूर्तीने हे सांगितले का? नाही. त्या मूर्तीपैकी कोणीही आम्हाला काहीही सांगितले नाही. त्या मूर्ती एक शब्दसुध्दा बोलत नाहीत. आणि आपण बोललेले ते खोटे देव ऐकू शकत नाहीत.

[27]सियोनला ह्या गोष्टीबद्दल सांगणारा पहिला मी म्हणजेच परमेश्वर आहे. मी यरुशलेमला दूताबरोबर संदेश पाठविला.“पाहा! तुझे लोक परत येत आहेत.”

[28]मी त्या खोट्या देवांना पाहिले. काहीही सांगण्याइतके ते शहाणे नाहीत. मी त्यांना प्रश्न विचारले, पण त्यांनी एकही शब्द उच्चारला नाही.

[29]ते सगळे देव कवडीमोलाचे आहेत. ते काही करू शकत नाहीत. त्या मूर्ती शून्य किंमतीच्या आहेत.

## परमेश्वराचा खास सेवक

42 “माझ्या सेवकाकडे पाहा. मी त्याला आधार देतो. मी ज्याला निवडले आहेअसा तो एक आहे आणि मी त्याच्यावर खूष आहे. मी माझा आत्मा त्याच्यात घालतो. तो न्याय्यमार्गाने राष्ट्रांना न्याय देईल.

---

**उत्तरेकडील एक माणूस** हा बहुधा पर्शियाचा राजा कोरेश असावा त्यांने इ.स.पू. 550–530 या काळात राज्य केले. तो यशयाच्या मृत्यूनंतर 150 वर्षे जगला.

[2]तो रस्त्यात आवाज चढवणार नाही. तो रडणार अथवा किंचाळणार नाही.
[3]तो सभ्य असेल तो पिचलेला बांबूसुध्दा मोडणार नाही. मिणमिणणारी वातसुध्दा तो विझविणार नाही. तो प्रामाणिकपणाने न्याय देईल आणि सत्य शोधून काढेल.
[4]जगाला न्याय प्रस्थापित करीपर्यंत तो दुर्बळ होणार नाही वा चिरडला जाणार नाही. दूरदूरच्या ठिकाणचे लोक त्याच्या शिकवणुकीवर विश्वास ठेवतील."

## परमेश्वर जगाचा अधिपती व निर्माता आहे

[5]परमेश्वराने, खऱ्या देवाने या गोष्टी सांगितल्या: (परमेश्वराने आकाश निर्माण केले. परमेश्वराने ते जगावर पसरले. पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट त्यानेच निर्माण केली. पृथ्वीवरील सर्व लोकात त्याने प्राण घातला, चालणाऱ्या प्रत्येक माणसात चैतन्य घातले.)

[6]मी, परमेश्वराने, तुला योग्य गोष्टी करण्यासाठी बोलाविले आहे मी तुझा हात धरीन आणि तुझे रक्षण करीन. मी लोकांबरोबर केलेल्या कराराची तू खूण असशील सर्वांना प्रकाश देणाऱ्या दिव्यासारखा तू असशील.
[7]आंधळ्यांचे डोळे तू उघडशील आणि ते पाहू शकतील. खूप लोक तुरुंगात आहेत, त्यांना तू मुक्त करशील खूप लोक अंधारात राहतात, त्यातून तू त्यांना बाहेर काढशील.
[8]"मी परमेश्वर आहे माझे नाव यहोवा मी माझे गौरव दुसऱ्यांना देणार नाही. माझ्याकरिता असलेली स्तुती मी मूर्तीच्या (खोट्या देवांच्या) वाट्याला येऊ देणार नाही.
[9]काही गोष्टी घडतील असे मी सुरवातीलाच सांगितले होते त्या गोष्टी घडल्या आणि आता काही गोष्टी घडायच्या पूर्वीच मी त्याबद्दल सांगत आहे आणि भविष्यात तसेच घडेल."

## देवाचे स्तुतिस्तोत्र

[10]परमेश्वरासाठी नवीन स्तोत्र गा. दूरवरच्या देशांतील सर्व लोकांनो, समुद्रावरून सफर करणाऱ्या सर्वांनो, समुद्रातील सर्व प्राण्यांनो, दूरच्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांनो, परमेश्वराची स्तुती करा.
[11]वाळवंटांनो, नगरांनो, केदार मधील शेतांनो, परमेश्वराचे स्तुतिस्तोत्र गा. सेलातील लोकांनो, आनंदाने गा. तुमच्या उंच डोंगरकड्यावरून गा.
[12]परमेश्वराचा गौरव करा. दूरवरच्या देशातील लोकांनो, त्याची स्तुती करा.
[13]परमेश्वर शूर सैनिकाप्रमाणे बाहेर जाईल लढण्यास सज्ज असलेल्या माणसाप्रमाणे तो असेल. तो खूप उत्तेजित होईल. तो आरोळी ठोकेल आणि मोठ्याने ओरडेल. तो त्याच्या शत्रूचा पराभव करील.

## देव खूप संयमी आहे

[14]"बराच वेळ मी काही बोललो नाही. मी संयम ठेवला आणि गप्प राहिलो. पण आता प्रसूतिवेदना होणाऱ्या स्त्रीसारखा मी मोठ्याने ओरडेन. मी खूप जोराने व मोठ्याने श्वासोच्छवास करीन.
[15]मी टेकड्या आणि पर्वत नष्ट करीन. तेथे वाढणारी सर्व झाडेझुडपे मी सुकवून टाकीन. मी नद्यांच्या जागी कोरडी जमीन निर्माण करीन. तळी आटवीन.
[16]आंधळ्यांना कधीही माहीत नसलेल्या मार्गाने मी घेऊन जाईन. पूर्वी कधीही ते गेले नव्हते अशा स्थळी मी त्यांना नेईन. मी त्यांच्यासाठी अंधार प्रकाशात बदलीन. खडबडीत जमीन गुळगुळीत करीन. मी कबूल केलेल्या गोष्टी करीन. मी माझ्या लोकांचा त्याग करणार नाही.
[17]पण काही लोकांनी मला अनुसरायचे थांबविले आहे, त्यांच्याजवळ सोन्याने मढविलेल्या मूर्ती आहेत. ते त्यांना म्हणतात, 'तुम्हीच आमचे देव आहात.' ते त्या खोट्या देवांवर विश्वास ठेवतात. पण त्या लोकांची निराशा होईल.

## देवाचे म्हणणे ऐकण्यास इस्राएलचा नकार

[18]"तुम्ही बहिऱ्यांनी माझे म्हणणे ऐकावे. आंधळ्यांनी नजर उचलून मला पाहावे.
[19]ह्या सर्व जगात, सर्वात आंधळा माझा सेवक आहे. मी ज्याला जगात पाठवितो तो माझा दूत सर्वात बहिरा आहे. माझा स्वत:चा माणूस परमेश्वराचा सेवक सर्वांत अधिक आंधळा आहे.
[20]माझ्या सेवकाने काय करायला हवे ते त्याला दिसते पण तो माझी आज्ञा पाळत नाही. तो कानाने ऐकू शकतो पण माझे म्हणणे ऐकण्याचे तो नाकारतो."
[21]सेवकाने चांगले व्हावे व परमेश्वराच्या अद्भुत शिकवणुकीचा परमेश्वराच्या प्रमाणिकपणाखातर आदर करावा असे परमेश्वराला वाटते.
[22]पण लोकांकडे पाहा. दुसऱ्यांनी त्यांना पराभूत करून लुटले आहे. सर्व तरुण घाबरले आहेत. ते तुरुंगात बंद केले गेले आहेत. दुसऱ्या लोकांनी त्यांच्याकडून पैसा काढून घेतला आहे. त्यांना वाचविणारा कोणीही नाही. दुसऱ्यांनी त्यांचा पैसा घेतला आणि "तो परत दे" असे म्हणायला तेथे कोणीही नव्हते.

[23]तुमच्यातील कोणी देवाचे म्हणणे ऐकले आहे का?
नाही पण तुम्ही ते लक्षपूर्वक ऐकावे व काय घडले आहे
त्याचा विचार करावा. [24]याकोबची व इस्राएलची संपत्ती
लुटायला कोणी लावली? परमेश्वरानेच त्यांना तसे
करण्याची परवानगी दिली. आपण परमेश्वराच्या विरुध्द
वागून पाप केले आहे. म्हणून परमेश्वराने लोकांना आपली
संपत्ती लुटू दिली. इस्राएलमधील लोकांना परमेश्वराच्या
इच्छेप्रमाणे जगायचे नव्हते. त्यांनी परमेश्वराची शिकवण
ऐकली नाही. [25]म्हणून परमेश्वर त्यांच्यावर रागावला.

देवाने त्यांच्याविरुध्द मोठी युध्दे घडवून आणली. इस्राएलच्या
लोकांभोवती जणू आग भडकावी तसे हे होते. पण काय
घडत आहे त्यांना कळले नाही. ते जणू जळत होते पण
काय होत होते ते समजावून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला
नाही.

## देव नेहमीच त्याच्या लोकांबरोबर असतो

43 याकोब, परमेश्वराने तुला जन्म दिला. इस्राएल,
परमेश्वराने तुला निर्मिले. आता देव म्हणतो,
“भिऊ नकोस मी तुझे रक्षण करीन. मी तुला निवडले
आहे. तू माझा आहेस. 2जेव्हा तू अडचणीत असतोस,
तेव्हा मी तुझ्या पाठीशी असतो. जेव्हा तू नद्या ओलांडशील
तेव्हा इजा होणार नाही. आगीमधून चालताना तुला भाजणार
नाही. ज्वाळा तुला पोळणार नाहीत. 3का? कारण मी
स्वत: तुझा परमेश्वर आहे. मी, इस्राएलचा पवित्र देव
तुझा तारणहार आहे. मी तुझ्या मोबदल्यात मिसर देश
दिला. तुला माझा करण्यासाठी मी इथिओपिआ व सेबा
यांचे दान केले. 4तू माझ्या दृष्टीने फार महत्वाचा आहेस.
म्हणून मी तुझा आदर करतो. मी तुझ्यावर प्रेम करतो.
तुझ्यासाठी मी सर्व लोक आणि सर्व राष्ट्रे दान करीन.”

## देव त्याच्या मुलांना घरी परत आणेल

5“म्हणून घाबरू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे मी
तुझ्या सर्व मुलांना गोळा करून तुझ्याकडे आणीन, मी
त्यांना पूर्व आणि पश्चिम दिशेकडून गोळा करीन. 6मी
उत्तरेला म्हणेन : माझे लोक मला परत दे. मी दक्षिणेला
सांगेन, माझ्या लोकांना तुरूंगात ठेवू नको. दूरदूरच्या
ठिकाणांहून माझ्या मुलांमुलींना माझ्याकडे परत आण.
7जी माणसे माझी आहेत, जी माझे नाव लावतात, त्या
सर्वांना माझ्याकडे आण. मी त्या लोकांना माझ्यासाठी
निर्मिले आहे मीच त्यांना घडविले व ते माझे आहेत.”

## इस्राएल हा देवाचा जगातील साक्षीदार आहे

8देव म्हणतो, “डोळे असून आंधळे व कान असून
बहिरे असणाऱ्यांना लोकांना बाहेर आणा. 9सर्व लोकांनी
आणि सर्व राष्ट्रांनीसुध्दा एकत्र जमावे. त्यांच्यातील एखादा
खोटा देव, आरंभी काय घडले याबद्दल कदाचित सांगू
इच्छित असेल, त्यांनी आपल्याबरोबर साक्षीदार आणावेत.
साक्षीदारांनी सत्य सांगावे त्यावरून ते बरोबर आहेत हे
सिध्द होईल.”

10परमेश्वर म्हणतो, “तुम्ही लोक माझे साक्षीदार आहात.
मी निवडलेले तुम्ही लोक माझे सेवक आहात माझ्यावर
विश्वास ठेवायला लोकांना तुम्ही मदत करावी म्हणून मी
तुम्हाला निवडले आहे. ‘मीच तो आहे,’ मीच खरा देव
आहे. हे तुम्हाला कळावे म्हणून मी तुमची निवड केली.
माझ्याआधी कोणी देव नव्हता आणि माझ्यानंतर कोणी
देव नसेल. 11मी स्वत:च परमेश्वर आहे मी एकमेव
आहे. दुसरा कोणीही तारणकर्ता नाही. मीच एकटा आहे.
12तुमच्याशी बोलला तो मीच होतो. मी तुम्हाला वाचवले
मी तुम्हाला त्या गोष्टी सांगितल्या आहेत. तुमच्या पाठीशी
कोणी परका नव्हता. तुम्हीच माझे साक्षीदार आहात. मी
देव आहे.” (परमेश्वर स्वत:च हे बोलला.) 13“मीच अक्षय
असतो. मी जे काही करतो, ते कोणीही बदलू शकत
नाही. माझ्या सामर्थ्यापासून लोकांना कोणीही वाचवू शकत
नाही.”

14परमेश्वर, इस्राएलचा पवित्र देव तुमचे रक्षण करतो.
देव म्हणतो, “मी तुझ्यासाठी बाबेलला सैन्य पाठवीन. खूप
लोकांना बंदी केले जाईल. त्या खास्दी (खाल्डियन)
लोकांना त्यांच्याच नावांतून दूर नेले जाईल. [खास्दयांना
(खाल्डियन लोकांना) त्यांच्या नावांचा फार गर्व आहे.]
15मी परमेश्वर तुमचा पवित्र देव आहे. मी इस्राएल निर्मिले.
मी तुमचा राजा आहे.”

## देव त्याच्या लोकांचे पुन्हा रक्षण करील

16परमेश्वर समुद्रातून मार्ग काढील. त्याच्या
लोकांकरिता खवळलेल्या पाण्यातून तो रस्ता तयार करील.
देव म्हणतो, 17“जे लोक रथ, घोडे व सैन्ये यांच्यानिशी
माझ्याशी लढतात त्यांचा पराभव होईल. ते पुन्हा उठणार
नाहीत त्यांचा नाश होईल. पणत्यातील ज्योत मावळावी
तसे ते नाहीसे होतील. 18म्हणून आरंभी घडलेल्या गोष्टी
आठवू नका. फार पूर्वी घडलेल्या गोष्टींचा विचार करू
नका. 19का? कारण मी आता नव्या गोष्टी घडवून आणीन.
आता तुम्ही कोवळ्या रोपट्याप्रमाणे वाढाल. हे सत्य आहे,
हे नक्कीच तुम्हाला माहीत आहे. मी खरोखरच वाळवंटातून
रस्ता तयार करीन. कोरड्या भूमीवर नद्या निर्माण करीन.
20हिंस्र पशुसुध्दा माझे आभार मानतील. मोठे प्राणी आणि
पक्षी मला मान देतील. मी जेव्हा वाळवंटात पाणी आणि
कोरड्या जमिनीवर नद्या निर्माण करीन तेव्हा ते माझा
आदर करतील. मी निवडलेल्या, माझ्या लोकांना पाणी
मिळावे म्हणून मी हे करीन. 21ह्या लोकांना मी निर्मिले
आहे. ते माझी स्तुतिस्तोत्रे गातील.

22“याकोब, तू माझी प्रार्थना केली नाहीस का? कारण
इस्राएल मला विटला आहे. 23तू तुझ्या मेंढ्या होमबलि
देण्यासाठी माझ्याकडे आणल्या नाहीस तू माझा मान राखला
नाहीस. तू मला बळी अर्पण केले नाहीस. मला होमबलि
अर्पण करावे म्हणून मी तुला बळजबरी केली नाही. तू
तुला वीट येईपर्यंत धूप जाळावा असा आग्रह मी धरला
नाही. 24मला तृप्त करण्यासाठी लागणाऱ्या अर्पणांसाठी
आणि धुपासाठी तू स्वत:चा पैसा वापरला नाहीस. उलट
तुझ्या पापांचे ओझे माझ्यावर लादलेस तुझ्या दुष्कृत्यांचा
मला वीट येईपर्यंत तू पाप केलेस.

25“मी, आणि फक्त मीच तुझी पापे धुतो. मी हे माझ्या
आनंदासाठी करतो. मी तुझी पापे लक्षात ठेवणार नाही.
26पण तू मात्र माझी आठवण ठेवावीस आपण एकत्र येऊन

योग्य काय ते ठरवावे. तू केलेल्या गोष्टी तू सांगाव्यास आणि त्या योग्य आहेत हे दाखवावे. 27तुझ्या पूर्वजांनी पाप केले आणि तुझे शिक्षक माझ्याविरुध्द वागले. 28म्हणून मी तुझ्या पवित्र राज्यकर्त्यांना अपवित्र करीन. मी याकोबला संपूर्णपणे माझा होण्यास भाग पाडीन.* इस्राएलमध्ये वाईट घडेल."

## परमेश्वर हाच खरा देव आहे

44 "याकोब, तू माझा सेवक आहेस. माझे ऐक इस्राएल, मी तुला निवडले आहे. मी काय म्हणतो ते ऐक. 2मी परमेश्वर आहे. मी तुला निर्माण केले. तुला तुझे हे रूप देणारा मी आहे. तू आईच्या गर्भात असल्यापासून मी तुला मदत केली. याकोबा, माझ्या सेवका, घाबरू नकोस. यशुरूना, मी तुझी निवड केली.

3"मी तहानेलेल्यांसाठी पाण्याचा वर्षाव करीन. मी कोरड्या जमिनीवर झरे निर्माण करीन. मी तुझ्या संततीमध्ये माझा आत्मा घालीन. आणि वंशजांना आशीर्वाद देईन. ते वाहत्या पाण्याच्या झऱ्याप्रमाणे असतील. 4झऱ्याकाठी वाढणाऱ्या झाडांप्रमाणे ते जगातील लोकांत वाढतील.

5"एकजण म्हणेल, 'मी परमेश्वराचा आहे' दुसरा 'याकोबचे' नाव लावील आणखी एक आपली सही 'मी परमेश्वराचा' अशी करील, तर आणखी एक स्वत:ला 'इस्राएल' म्हणवून घेईल."

6परमेश्वर इस्राएलचा राजा आहे सर्वशक्तिमान परमेश्वर इस्राएलला वाचवितो. परमेश्वर म्हणतो, "मीच फक्त देव आहे. दुसरे कोणीही देव नाहीत. मीच आरंभ आहे आणि मीच अंत आहे. 7माझ्यासारखा दुसरा कोणीही देव नाही. जर असा कोणी असेल, तर त्याने आता बोलावे. त्याने यावे व तो माझ्यासारखा आहे हे सिध्द करावे. मी ह्या लोकांना निर्माण केल्यापासून जे घडले आणि जे अनंत काळ घडत राहील ते काय ते त्याने मला सांगावे भविष्यात काय घडणार आहे हे त्याला माहीत असल्याचे त्याने काही खुणेने पटवून द्यावे. 8घाबरू नका. काळजी करू नका. मी काय घडणार हे नेहमीच तुम्हाला सांगितले आहे. तुम्ही लोक माझे साक्षीदार आहात. दुसरा कोणीही देव नाही. मीच एकमेव देव आहे. दुसरा कोणीही 'खडक' नाही. मला माहीत आहे की मी एकमेव आहे."

## खोटे देव निरुपयोगी आहेत

9काही लोक मूर्ती करतात. (म्हणजेच खोटे देव करतात.) पण त्यांचा काही उपयोग नाही. लोक त्या मूर्तीवर प्रेम करतात पण त्यांना काही किंमत नाही. हे लोक त्या मूर्तीचे साक्षीदार आहेत पण ते काही पाहू शकत नाहीत. ते काही जाणत नाहीत. आपल्या कृत्यांबद्दल लज्जित व्हावे एवढेही ज्ञान त्यांना नाही.

10हे खोटे देव कोणी घडवले? ह्या निरुपयोगी मूर्ती कोणी निर्माण केल्या? 11कारगिरांनी त्या तयार केल्या. ते सर्व कारगीर माणसेच होती देव नव्हते. त्या सर्व लोकांनी एकत्र येऊन ह्या गोष्टीबद्दल विचार केला तर ते लज्जित होतील व घाबरतील.

12एकजण लोखंड चिमट्यात धरून विस्तवावर तापवितो. मग तो त्यावर घणाचे घाव घालतो आणि त्यातून मूर्ती तयार होते. हा कारागीर आपल्या बळकट हातांचा उपयोग करतो पण तो उपाशी असताना त्याची शक्ती कमी होते. पाणी न मिळाल्यास तो अशक्त होतो.

13दुसरा कारागीर ओळंबा आणि कर्कटक यांच्या साहाय्याने लाकडावर कापण्यासाठी रेषा आखून घेतो. मग छिन्नीने लाकडातून तो मूर्ती कोरतो. तो मोजपट्टीने मूर्तीचे मोजमाप करतो. अशा तऱ्हेने कारागीर हुबेहूब मनुष्याप्रमाणे दिसणारी मूर्ती करतो आणि ही माणसाची मूर्ती घरात बसून राहण्यापलीकडे काहीही करीत नाही.

14माणूस गंधसरू, देवदारू वा कधी कधी अल्लोनची झाडे तोडतो (त्या माणसाने ती झाडे वाढवलेली नव्हती. ती जंगलात आपल्या सामर्थ्याने वाढली. जर कोणी भद्रदारू लावला तर पावसामुळे तो वाढतो.) 15तो ह्या झाडांचा उपयोग सरपणासाठी करतो. तो झाडांच्या बारीक ढलप्या करतो आणि त्यांचा उपयोग अन्न शिजविण्यासाठी व ऊबेसाठी करतो. एखाद्या लाकडाच्या ढलपीने अग्नी प्रज्वलित करून तो भाकरी भाजतो आणि त्याच लाकडाच्या तुकड्याचा उपयोग तो देवाची मूर्ती करण्यासाठी करतो व त्या देवाची पूजा करतो. तो देव म्हणजे माणसाने तयार केलेला पुतळा आहे. पण माणूस त्यापुढे नतमस्तक होतो. 16माणूस अर्ध्याहून अधिक लाकूड जाळतो. अग्नीचा उपयोग तो अन्न शिजविण्यासाठी करतो. तो पोटभर जेवतो. अग्नीचा उपयोग स्वत:ला ऊबदार ठेवण्यासाठी तो करतो. मग तो म्हणतो, "छान! मला ऊब आली. अग्नीच्या प्रकाशात मी पाहूही शकतो." 17पण थोडे लाकूड शिल्लक आहे. मग त्यापासून मूर्ती करून तो त्या मूर्तीलाच देव म्हणतो. तो तिच्यापुढे वाकतो आणि तिची पूजा करतो. तो प्रार्थना करतो, "तू माझा देव आहेस. माझे रक्षण कर."

18त्या लोकांना ते काय करीत आहे कळत नाही. त्यांना काही समजत नाही. जणू काही त्यांच्या डोळ्यावर पडदा पडला आहे, त्यामुळे ते पाहू शकत नाही. त्यांची हृदये (मने) समजून घ्यायचा प्रयत्न करीत नाहीत. 19त्यांनी ह्या गोष्टींचा कधीच विचार केला नाही. त्यांना काही समजत नसल्याने त्यांनी असा विचार केला नाही "अर्धे लाकूड मी जाळले. त्या विस्तवावर मी भाकरी भाजली, मांस शिजविले. मग मी जेवलो आणि उरलेल्या लाकडातून मी ही भयानक वस्तू तयार केली. मी लाकडाच्या ओंडक्याचीच पूजा करीत आहे."

---

**याकोबला ... भाग पाडीन** हिब्रूमध्ये ह्या वाक्याचा अर्थ असा की हे लोक पूर्णपणे देवाचे आहेत आणि ते देवाला मिळाले नाहीत तर त्यांनी मेलेच पाहिजे.

[20]त्या माणसाला, तो काय करीत आहे, ते कळत नाही. तो गोंधळलेला आहे. त्यामुळे त्याचे मन त्याला चुकीच्या मार्गाने नेते. तो स्वत:ला वाचवू शकत नाही. तो चूक करतोय हे त्याला दिसत नाही. “मी हातात धरलेली मूर्ती म्हणजे खोटा देव आहे” असे तो म्हणणार नाही.

## परमेश्वर, खरा देव इस्राएलला मदत करतो

[21]“याकोबा, ह्या गोष्टी लक्षात ठेव. इस्राएला, तू माझा सेवक आहेस. हे लक्षात ठेव. मी तुला निर्माण केले. तू माझा सेवक आहेस. म्हणून इस्राएल, तू मला विसरू नकोस.

[22]तुझी पापे मोठ्या ढगासारखी होती. पण मी ती सर्व पुसून टाकली. ढग हवेत विरून जातो तशी तुझी पापे दिसेनाशी झाली. मी तुला सोडविले आणि तुझे रक्षण केले. म्हणून तू माझ्याकडे परत ये.”

[23]परमेश्वराने महान गोष्टी केल्या म्हणून आकाश आनंदात आहे खोलवरची भूमीसुध्दा सुखात आहे. डोंगर गाण्यातून देवाचे आभार मानीत आहेत. रानातील सर्व वृक्ष आनंदात आहेत. का? कारण परमेश्वराने याकोबला वाचविले. परमेश्वराने इस्राएलसाठी फार मोठ्या गोष्टी केल्या.

[24]तू आता आहेस तसा तुला परमेश्वराने बनविले. तू आईच्या गर्भात असताना परमेश्वराने हे केले. परमेश्वर म्हणतो, “मी, परमेश्वराने प्रत्येक गोष्ट निर्माण केली. मी स्वत: आकाश तेथे ठेवले आणि माझ्यासमोर जमीन पसरली.”

[25]खोटे संदेष्टे खोट्या गोष्टी सांगतात. पण परमेश्वर त्यांचा खोटेपणा उघड करतो. जादूटोणा करणाऱ्यांना परमेश्वर मूर्ख बनवितो. शहाण्यांनासुध्दा परमेश्वर गोंधळात टाकतो. त्यांना वाटते आपल्याला फार समजते पण देव त्यांना हास्यास्पद बनवितो. [26]लोकांना संदेश देण्यासाठी परमेश्वर त्याच्या सेवकांना पाठवितो. आणि परमेश्वर त्या संदेशातील गोष्टी खऱ्या करून दाखवितो. लोकांनी काय करावे हे सांगण्यासाठी परमेश्वर दूत पाठवितो आणि त्यांचा सल्ला योग्य आहे हे परमेश्वर दाखवून देतो.

## यहुदाची पुनर्बांधणी करण्यासाठी देव कोरेशला निवडतो

[26]परमेश्वर यरुशलेमला म्हणतो, “तुझ्यात परत लोक राहू लागतील.” परमेश्वर यहुदातील नगरांना म्हणतो, “तुमची पुनर्बांधणी होईल.” ज्या शहरांचा नाश झाला, त्या शहरांना परमेश्वर म्हणतो, “मी तुम्हाला परत शहराचे रूप देईन.”

[27]परमेश्वर खोल पाण्याला आटून जायला सांगतो “तो म्हणतो की मी तुमचे झरे सुकवीन.”

[28]परमेश्वर कोरेशला म्हणतो, “तू माझा मेंढपाळ आहेस. मला पाहिजे ते तू करशील. तू यरुशलेमला म्हणशील, ‘तुझी पुनर्बांधणी केली जाईल.’तू मंदिराला सांगशील, ‘तुझा पाया परत घातला जाईल.’”

## इस्राएलाच्या मुक्तीसाठी देवाकडून कोरेशची निवड

45 परमेश्वराने स्वत: निवडलेल्या राजाला, कोरेशला पुढील गोष्टी सांगितल्या,

“मी कोरेशचा उजवा हात धरीन. इतर राजांकडून सत्ता काढून घेण्यास मी त्याला मदत करीन. नगराच्या वेशी कोरेशला थोपवू शकणार नाहीत. मी वेशी खुल्या करीन. आणि कोरेश आत जाईल.”

[2]“कोरेश, तुझ्या सैन्याच्या पुढे मी चालीन. मी डोंगर भुईसपाट करीन. मी वेशीचे जस्ताचे दरवाजे मोडीन. त्यावरील लोखंडी सळ्या तोडीन.

[3]तुला मी अंधारातून वाचविणारी संपत्ती देईन. मी तुला गुप्त धन देईन. मीच परमेश्वर आहे,हे तुला कळावे म्हणून मी हे करीन. मी इस्राएलचा देव आहे, व मी तुला नावाने हाका मारत आहे.

[4]“माझा सेवक याकोब, आणि माझे निवडलेले लोक, म्हणजे इस्राएल ह्यांच्यासाठी मी हे करतो.कोरेश, मी तुला नावाने हाक मारीत आहे. तू मला ओळखत नाहीस, पण मी तुला नावाने ओळखतो.

[5]मी परमेश्वर आहे मीच फक्त देव आहे दुसरा कोणीही देव नाही. मी तुला वस्त्रे घातली, पण तरीही तू मला ओळखत नाहीस.

[6]“मी एकटाच देव आहे. हे मी ह्या सर्व गोष्टी करतो, त्यावरून लोकांना कळेल. मीच परमेश्वर आहे, दुसरा कोणीही देव नाही’ हे पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सर्व लोकांना कळेल.

[7]मी प्रकाश निर्माण केला आणि अंधारही. मी शांती निर्माण केली तशी संकटेही. मी परमेश्वर आहे व ह्यासर्व गोष्टी मी करतो.

[8]“आकाशातील ढगांतून चांगुलपणा पृथ्वीवर पडो. पृथ्वी दुभंगो तारण वाढो, आणि त्याचबरोबर चांगुलपणा वाढो. मी परमेश्वराने त्याला निर्मिले आहे.

## देव त्याच्या निर्मितीचे नियंत्रण करतो

[9]“ह्या लोकांकडे पाहा ते त्यांच्या निर्मात्याशीच वाद घालीत आहेत. माझ्याशी वाद घालणाऱ्यांकडे पाहा. ते खापराच्या तुकड्यासारखे आहेत. कुंभार भांडे करण्यासाठी मऊ, ओला चिखल वापरतो पण चिखल त्याला ‘तू काय करतोस?’ असे विचारीत नाही. निर्मितीला निर्मात्याला प्रश्न विचारण्याची हिंमत नसते. हे लोक त्या चिखलासारखे आहेत. [10]आई-वडील मुलांना जन्म देतात पण मुले वडिलांना ‘तुम्ही आम्हाला जीवन का दिले’ किंवा आईला

'तुम्ही आम्हाला जन्म का दिला?' असे विचारू शकत नाहीत."

11परमेश्वर इस्राएलचा पवित्र देव आहे, त्याने इस्राएलची निर्मिती केली. परमेश्वर म्हणतो,

"माझ्या मुलांनो, तुम्ही मला काही खूण दाखविण्यास सांगितले. मी केलेल्या गोष्टी दाखविण्याचा तुम्ही मला हुकूम दिला.

12म्हणून पाहा! मी पृथ्वी व तीवर राहणारी सर्व माणसे निर्माण केली. मी माझ्या हाताने आकाश केले, आणि मी आकाशातील सर्व सैन्यांवर हुकूमत ठेवतो.

13कोरेशला चांगल्या गोष्टी करण्यासाठी मीच शक्ती दिली.* मी त्याचे काम सोपे करीन. कोरेश माझी नगरी पुन्हा वसवेल. तो माझ्या लोकांना मुक्त करील. तो माझ्या लोकांना मला विकणार नाही. ह्या गोष्टी करण्यासाठी मला त्याला काही द्यावे लागणार नाही. लोक मुक्त केले जातील. आणि त्यासाठी मला काही मोजावे लागणार नाही." सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

14परमेश्वर म्हणतो, "मिसर आणि इथिओपिआ श्रीमंत आहेत. पण इस्राएल, तुला ती संपत्ती मिळेल. सेबाचे उंच लोक तुझ्या मालकीचे होतील. ते गळ्यात साखळ्या अडकविलेल्या अवस्थेत तुझ्यामागून चालतील (म्हणजेच ते तुझे गुलाम होतील) ते तुझ्यापुढे वाकतील आणि तुझी विनवणी करतील.''इस्राएल, देव तुझ्या बरोबर आहे दुसरा कोणीही देव नाही.

15देवा, तुला लोक पाहू शकत नाहीत तू इस्राएलचा तारणारा आहेस.

16पुष्कळ लोक खोटे देव तयार करतात. पण अशा लोकांची निराशा होईल. ते सगळे लोक लज्जित होऊन दूर जातील.

17पण परमेश्वर इस्राएलला वाचवील आणि हे तारण निरंतर सुरूच राहील. परत कधीही इस्राएलला लज्जित व्हावे लागणार नाही.

18परमेश्वरच फक्त देव आहे. त्यानेच आकाश व पृथ्वी निर्मिली. परमेश्वराने पृथ्वीला तिच्या जागी ठेवले. परमेश्वराने पृथ्वी निर्मिली तेव्हा त्याला ती रिकाती नको होती. ती पुढे जगावी म्हणून त्याने ती निर्मिली. तिच्यावर राहता यावे म्हणून त्याने ती निर्माण केली "मीच परमेश्वर आहे दुसरा कोणीही देव नाही.

19मी गुप्तपणे कधी बोललो नाही. मी मोकळेपणानेच बोललो. मी जगाच्या अंधाऱ्या कोपऱ्यात माझे शब्द लपविले नाहीत. रिकाम्या जागी मला शोधा' असे मी याकोबच्या लोकांना कधीही सांगितले नाही. मी परमेश्वर आहे. मी नेहमीच सत्य बोलतो. खऱ्या गोष्टीच मी सांगतो."

## परमेश्वर स्वत:च फक्त देव आहे हे तो सिध्द करतो

20"तुम्ही लोक दुसऱ्या राष्ट्रातून पळालेले आहात. तेंव्हा गोळा व्हा आणि माझ्यासमोर या. (हे लोक स्वत:जवळ खोट्या देवाच्या मूर्ती बाळगतात ते त्या त्यांना वाचवून न शकणाऱ्या देवांची हे लोक प्रार्थना करीत राहतात. ते काय करीत आहेत हे त्यांना कळत नाही. 21त्या लोकांना माझ्याकडे यायला सांगा ह्या सर्व गोष्टींबद्दल त्यांना एकत्रितपणे बोलू द्या.)

"पुष्कळ वर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टींबद्दल तुम्हाला कोणी सांगितले? फार पूर्वीपासून तुम्हाला या गोष्टी कोण सांगत आले आहे? मी, देवाने, एकमेव परमेश्वराने, तुम्हाला या गोष्टी सांगितल्या. मीच फक्त देव आहे. माझ्यासारखा आणखी दुसरा कोणी आहे का? चांगला दुसरा देव आहे का? दुसरा कोणी देव त्याच्या लोकांना वाचवितो का? नाही कोणीही दुसरा देव नाही. 22दूरदूरच्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांनी देवाचे अनुसरण करणे थांबवले. तुम्ही मला अनुसरावे व स्वत:चे रक्षण करून घ्यावे. मीच देव. दुसरा देव नाही. मीच फक्त देव आहे.

23"मी माझ्या सामर्थ्याच्या जोरावर वचन देईन. आणि जेंव्हा मी एखादी गोष्ट व्हावी म्हणून मी हूकूम देतो तेंव्हा ती होतेच. मी वचन देतो की प्रत्येकजण माझ्यापुढे (देवापुढे) नमन करेल. प्रत्येकजण मला अनुसरण्याचे वचन देईल.
24लोक म्हणतील 'चांगलुपणा आणि सामर्थ्य फक्त परमेश्वराकडूनच मिळते.'"

काही लोक देवावर रागावतात पण परमेश्वराचे साक्षीदार येतील आणि परमेश्वराने केलेल्या गोष्टींबद्दल सांगतील, मग परमेश्वरावर रागावणारे लोक लाजेने माना खाली घालतील. 25परमेश्वर, इस्राएलच्या लोकांना सत्कृत्य करायला मदत करील, व लोक त्यांच्या देवाबद्दल अभिमान बाळगतील.

## खोटे देव अर्थशून्य आहेत

46 बेल आणि नेबो माझ्यापुढे वाकतात. ते खोटे देव म्हणजे फक्त मूर्ती आहेत. लोक त्या मूर्तीना जनावरांच्या पाठीवर लादतात त्या मूर्ती म्हणजे वाहून न्यावी लागणारी फक्त ओझी आहेत. खोटे देव लोकांना दमविण्याव्यतिरिक्त काहीही करीत नाहीत. 2त्या सर्व खोट्या देवांना नमावे लागेल ते सर्व जमीनदोस्त होतील. ते पळून जाऊ शकणार नाहीत त्यांना कैद्याप्रमाणे धरून नेले जाईल.

3"याकोबाच्या वंशजांनो, आणि इस्राएलमधील वाचलेल्या लोकांनो, ऐका! तुम्ही आईच्या गर्भात असल्यापासून मी तुम्हाला आधार देत आलो आहे. मी तुम्हाला नेहमीच आधार देत आलो आहे. 4तुम्ही जन्मल्यावर मीच तुम्हाला आधार दिला. आणि तुम्ही वृध्द झाल्यावर, तुमचे केस पिकल्यावरही मीच तुम्हाला

---

**कोरेशला ... मीच शक्ती दिली** "मी त्याला उठविले. जे बरोबर होते तेच मी केले असा बहुधा अर्थ असावा."

आधार देईन, कारण मी तुम्हाला निर्माण केले. मी तुम्हाला
आधार देतच राहीन व तुमचे रक्षण करीन.
5“तुम्ही माझी तुलना दुसऱ्या कोणाशी करू शकता
का? नाही! कोणीही माणूस माझ्याबरोबरीचा नाही. तुम्ही
माझ्याबद्दल सर्वच जाणू शकत नाही. माझ्यासारखे काही
नाही. 6काही लोकांजवळ भरपूर सोने-चांदी असते. सोने
त्यांच्या बटव्यातून गळत असते. चांदी ते तराजूने तोलतात.
हे लोक कारागिराला पैसे देऊन लाकडापासून खोटा देव
तयार करून घेतात. नंतर ते त्या देवाची पूजा करतात.
त्याच्यापुढे नतमस्तक होतात. 7ते स्वत:च्या खांद्यांवरून
तो खोटा देव वाहून नेतात. तो देव निरुपयोगी आहे.
लोकांना त्यास वाहून न्यावे लागते. लोक मूर्ती जमिनीवर
बसवितात. तो देव हालू शकत नाही. तो त्याची जागा
सोडून लांब जाऊ शकत नाही. लोक त्याच्याशी ओरडून
बोलले तरी तो उत्तर देणार नाही, तो देव म्हणजे फक्त
एक मूर्ती आहे, ती लोकांना संकटातून वाचवू शकणार
नाही.
8“तुम्ही लोकांनी पापे केली तुम्ही त्याबद्दल पुन्हा विचार
करावा. ह्या गोष्टी लक्षात ठेवा आणि खंबीर व्हा. 9पूर्वी
घडलेल्या गोष्टी आठवा. मी देव आहे हे लक्षात ठेवा.
दुसरा कोणताच देव नाही. ते खोटे देव माझ्यासारखे
नाहीत.
10अखेरीला काय होणार हे मी तुम्हाला आरंभीच
सांगितले, फार वर्षांपूर्वी, ज्या गोष्टी घडल्या नव्हत्या, त्या
मी तुम्हाला सांगितल्या म्हणजेच त्या गोष्टी घडण्यापूर्वी
अनेक वर्षे मी त्या घडणार असल्याचे तुम्हाला सांगितले.
मी योजतो, तसेच घडते मला पाहिजे ते मी घडवून आणतो.
11मी पूर्वेकडून एका माणसाला बोलवीत आहे. तो माणूस
गरुडासारखा असेल. तो अती दूरच्या देशातून येईल. आणि
मी ठरविलेल्या गोष्टी तो करील. मी हे करीन असे
तुम्हाला सांगत आहे आणि मी ते करीनच. मी त्याला
घडविले आहे. मी त्याला आणीन.
12“तुमच्यातील काहीजणांना आपल्याजवळ प्रचंड
सामर्थ्य आहे असे वाटते. पण तुम्ही सत्कृत्ये करीत नाही,
माझे ऐका. 13मी चांगल्या गोष्टी करीन. लवकरच मी
माझ्या लोकांना वाचवीन. मी सियोनचे तारण करीन.
आणि माझा गौरव इस्राएलला देईन.”

## बाबेलला देवाचा संदेश

47 “धुळीत पड आणि तेथेच बस! खास्दयांच्या
(खाल्डियनांच्या) कुमारिके, जमिनीवर बस.
तू आता सत्तेवर नाहीस. लोक तुला नाजूक, कुमारी
समजणार नाहीत.
2तू आता खूप मेहनत केली पाहिजेस. तुझी चांगली
वस्त्र आणि बुरखा उतरव तू जात्यावर धान्य दळले पाहिजेस.
पुरुष तुझे पाय पाहू शकतील एवढे तुझे वस्त्र वर उचलून
धर आणि नद्या पार कर.तुझा देश सोड.
3पुरुष तुझा देह पाहतील आणि तुझा भोग घेतील. तुझ्या
दुष्कृत्यांची किंमत मी तुला मोजायला लावीन. आणि
कोणीही तुझ्या मदतीला येणार नाही.”
4“माझे लोक म्हणतात, ‘देवाने आम्हाला वाचविले.
त्याचे नाव आहे सर्वशक्तिमान परमेश्वर. इस्राएलचा पवित्र
एकमेव देव.’”
5“बाबेल, तेथेच शांत बसून राहा खास्दयांच्या
(खाल्डियनांच्या) कन्ये, अंधारात जा, का? कारण तू
यापुढे ‘राज्याची राणी’ राहणार नाहीस.
6“मी माझ्या लोकांवर रागावलो होतो ते लोक माझे
आहेत पण मी रागावलो असल्याने त्यांचे महत्व कमी
केले. मी त्यांना तुझ्या ताब्यात दिले. तू त्यांना शिक्षा
केलीस. पण तू त्यांना अजिबात दया दाखविली नाहीस. तू
वृध्दांनासुध्दा खूप मेहनत करायला लावलीस.
7तू म्हणालीस, ‘मी चिरकाल राहीन. मी नेहमीच राणी
होईन.’ तू त्या लोकांना वाईट वागविलेस. हे तुझ्या लक्षात
आले नाही काय घडेल याचा तू विचार केला नाहीस.
8तेव्हा ‘सभ्य स्त्रिये,’ आता माझे ऐक! तुला आता
सुरक्षित वाटते व तू स्वत:शीच म्हणतेस, ‘मीच तेवढी
महत्वाची व्यक्ती आहे. माझ्यासारखे महत्वाचे कोणीही
नाही. मी कधीच विधवा होणार नाही. मला नेहमीच
संतती होईल.’
9एके दिवशी, एका क्षणात तुझ्याबाबत पुढील दोन गोष्टी
घडतील. पहिली तू तुझी मुले गमावशील आणि नंतर
दुसरी म्हणजे तू तुझा पती गमावशील. हो! ह्या गोष्टी
तुझ्याबाबत खरोखरच घडतील. तुझी सर्व जादू आणि
तुझ्या प्रभावी युक्त्या तुला वाचविणार नाहीत.
10तू दुष्कृत्ये केलीस आणि तरी तुला सुरक्षित वाटते.
मनातल्या मनात म्हणतेस ‘माझी दुष्कृत्ये कोणालाच दिसत
नाहीत.’ तुझे शहाणपण आणि ज्ञान तुला वाचवील असे
तुला वाटते. ‘मीच एकमेव आहे. माझ्यासारखे महत्वाचे
कोणी नाही’ असा विचार तू स्वत:शीच करतेस.
11“पण तुझ्यावर संकटे येतील हे केव्हा होईल ते तुला
कळणार नाही. पण तुझा नाश जवळ येत आहे तू ती
संकटे थोपवू शकणार नाहीस. काय होते आहे हे कळायच्या
आतच तुझा नाश होईल.
12“जादूटोणा आणि चेटूक शिकण्यासाठी तू आयुष्यभर
मेहनत केलीस.तेव्हा आता त्याचा उपयोग करायला सुरवात
कर. कदाचित् त्या युक्त्या तुझ्या उपयोगी पडतील कदाचित्
तू कोणाला घाबरवू शकशील.
13तुला खूप सल्लागार आहेत. त्यांनी दिलेल्या सल्याचा
तुला वीट आला का? मग ग्रहनक्षत्रे पाहून ज्योतिष
सांगणाऱ्यांना पाठव. ते तुला महिन्याची सुरवात कधी
आहे हे सांगतात तर कदाचित् तुझा त्रास कधी सुरु होणार
हे ही सांगू शकतील.
14“पण ही माणसे स्वत:चा बचाव करण्यासही समर्थ
असणार नाहीत. ते गवताच्या काडीप्रमाणे जळतील. ते

इतक्या चटकन् जळतील की भाकरी भाजायला निखारे पेटणार नाहीत की उबेला आगोटी राहणार नाही.

15“तू ज्या गोष्टींसाठी मेहनत घेतलीस त्या गोष्टींच्या बाबतीत असेच होईल. तू आयुष्यभर ज्यांच्याबरोबर व्यापार केलास ते सर्व तुला सोडून जातील प्रत्येक जण आपापल्या मार्गाने जाईल. तुला वाचवायला कोणीही राहणार नाही.”

## देव त्याच्या जगावर अधिपत्य करतो

48 परमेश्वर म्हणतो, “याकोबाच्या वंशजांनो, माझे ऐका. तुम्ही, जे ‘इस्राएलच्या’ नावाने ओळखले जाता. तुम्ही यहुदाच्या वंशातील आहात. तुम्ही वचने देताना परमेश्वराचे नाव घेता. तुम्ही इस्राएलच्या देवाची स्तुती करता. पण हे तुम्ही सच्चे पणाने आणि खरेपणाने करीत नाही.”

2हो ते पवित्र नगराचे नागरिक आहेत. ते इस्राएलच्या देवावर अवलंबून राहतात. सर्वशक्तिमान परमेश्वर अशी त्याची ख्याती आहे.

3“मी तुम्हाला फार पूर्वीच भविष्यात घडणाऱ्या गोष्टीबद्दल सांगितले. मी तुम्हाला त्यांच्याबद्दल सांगितले आणि अचानक त्या गोष्टी घडवून आणल्या

4मी तसे केले, कारण तुम्ही हट्टी होतात व ते मला माहीत होते. मी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवायला तुम्ही नकार दिलात. जस्ताप्रमाणे कठीण आणि लोखंडाप्रमाणे न वाकणारा असा तुमचा हट्ट होता.

5म्हणूनच गोष्टी घडायच्या कितीतरी आधी मी तुम्हाला त्या गोष्टीबद्दल सांगितले, असे सांगण्याचे कारण हेच की आम्ही आमच्या सामर्थ्यावर हे सर्व केले असे तुम्ही म्हणू नये. ‘आमच्या मूर्तींनी हे सर्व घडवून आणले’ असे तुम्ही म्हणू नये म्हणून मी हे केले.”

## इस्राएलला शुध्द करण्यासाठी देव त्याला शिक्षा करतो

6“तुम्ही काय घडले ते पाहिलेत व ऐकलेत. म्हणून तुम्ही ही वार्ता इतरांना सांगावी. आता मी तुम्हांला माहीत नसलेल्या नवीन गोष्टी सांगीन.

7ह्या गोष्टी पूर्वी घडून गेलेल्या नाहीत. ह्या आता घडत असणाऱ्या गोष्टी आहेत. या आधी तुम्ही कधी या गोष्टींबद्दल ऐकले नसेल. त्यामुळे ‘आम्हांला हे अगोदरच माहीत होते’ असे तुम्ही म्हणू शकणार नाही.

8 “पण जरी मी तुम्हाला भविष्यात काय घडणार आहे हे सांगितले तरी ते ऐकून घ्यायला तुम्ही अजूनही नकार द्याल. तुम्ही काहीही शिकणार नाही. मी सांगितलेली कोणतीही गोष्ट तुम्ही केव्हाही ऐकली नाही. तुम्ही माझ्याविरुध्द जाल हेमला सुरवातीपासूनच माहीत होते. तुम्ही जन्मल्यापासून माझ्याविरुध्द बंड पुकारले आहे.

9पण मी सहन करीन. हे मी माझ्यासाठी करीन. तुमच्यावर रागावून तुमचा नाश करीत नाही म्हणून लोक माझी स्तुती करतील. मी केलेल्या प्रतीक्षेबद्दल तुम्ही माझे स्तवन कराल.

10“पाहा! मी तुम्हांला शुध्द करीन. लोक चांदी शुध्द करण्यासाठी गरम भट्टीचा उपयोग करतात मी तुम्हांला संकटात टाकून शुध्द करीन.

11हे मी माझ्यासाठी करीन. मला कमी लेखून तुम्हांला चालणार नाही. माझे वैभव आणि प्रशंसा मी खोट्या देवांच्या वाट्याला जाऊ देणार नाही. माझे नाव मी दूषित का होऊ द्यावे?

12“याकोबा, माझे ऐक, इस्राएल, मी तुला माझे होण्यासाठी बोलाविले,तेव्हा माझे ऐक. मीच आरंभ आहे आणि मीच अंत आहे.

13मी माझ्या हाताने पृथ्वी निर्माण केली माझ्या उजव्या हाताने आकाश निर्माण केले आणि मी जर त्यांना हाक मारली तर ती माझ्यासमोर गोळा होतील.

14“तुम्ही सगळे इकडे या आणि माझे ऐका. कोणात्याही खोट्या देवाने असे असे होईल म्हणून तुम्हाला सांगितले का? नाही.”देव इस्राएलवर प्रेम करतो बाबेलबाबत आणि खास्द्यांबाबत देव त्याला पाहिजे ते करील.

15परमेश्वर म्हणतो, “मी त्याला बोलवीन, असे मी तुम्हाला सांगितले आहे, मी त्याला आणीन आणि मी त्याला यशस्वी करीन.

16इकडे या आणि माझे ऐका. बाबेल राष्ट्र म्हणून जगायला लागले तेव्हा मी तेथे होतो आणि आरंभापासून मी स्पष्टपणे बोललो का तर लोकांना मी काय म्हणालो ते समजावे.”

नंतर यशया म्हणाला, “आता परमेश्वर माझा देव, मला आणि त्याच्या आत्म्याला पुढील गोष्टी सांगायला तुमच्याकडे पाठवितो.
17मी परमेश्वर तुमचा तारणारा, इस्राएलचा पवित्र देव म्हणतो,

“मीच परमेश्वर तुमचा देव आहे. मी तुम्हाला सत्कृत्ये करायला शिकवितो. तुम्ही कोणत्या मार्गाने जावे ह्याचे मी मार्गदर्शन करतो.

18तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या असत्या तर पूर्ण भरून वाहणाऱ्या नदीप्रमाणे शांती तुमच्याकडे आली असती, समुद्राच्या परत परत येणाऱ्या लाटांप्रमाणे चांगल्या गोष्टी पुन्हा पुन्हा तुमच्याकडे आल्या असत्या.

19तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या असत्या तर वाळूच्या कणांप्रमाणे खूप संतती तुम्हाला झाली असती आणि तुमचे नाव माझ्यासमोर काढून टाकले गेले नसते अथवा नष्ट केले गेले नसते.

20माझ्या लोकांनो, बाबेल सोडा, खास्दयापांसून पळा, ही वार्ता लोकांना आनंदाने सांगा.जगातील दूरदूरच्या ठिकाणी ही बातमी पोहोचवा. लोकांना सांगा, “परमेश्वराने त्याचा सेवक याकोब याची सुटका केली.

21परमेश्वराने त्याच्या लोकांना वाळवंटातून पार नेले
पण ते तहानेलेले राहिले नाहीत का? कारण देवाने आपल्या
माणसांसाठी खडकातून पाणी वाहायला लावले. त्याने
खडक फोडला आणि पाणी बाहेर वाहू लागले."
22पण परमेश्वर म्हणतो, "पाप्यांना शांती मिळणार
नाही."

## देव त्याच्या खास सेवकाला बोलावितो

49 दूरदूरच्या ठिकाणी राहणाऱ्या सर्व लोकांनो,
माझे म्हणणे ऐका. जगातील सर्व लोकांनो, माझे
ऐका माझ्या जन्मापूर्वीच परमेश्वराने त्याची सेवा
करण्यासाठी मला निवडले मी आईच्या गर्भात असतानाच
त्याने माझी निवड केली.
2परमेश्वर त्याचे म्हणणे माझ्याकडून वदवितो. तो माझा
उपयोग धारदार तलवारीसारखा करतो. त्याच्या ओंजळीत
मला लपवून तो माझे रक्षणही करतो. परमेश्वर टोकदार
बाणाप्रमाणे माझा उपयोग करतो, पण तो त्याच्या भाल्यात
मला लपवितोही.
3परमेश्वर मला म्हणाला, "इस्राएल, तू माझा सेवक
आहेस. मी तुझ्याबाबत विस्मयकारक गोष्टी करीन."
4मी म्हणालो, "मी निरर्थक मेहनत केली. स्वत: झिजून
झिजून निरुपयोगी झालो पण काहीही उपयोगी पडणारे
केले नाही. मी माझी सर्व शक्ती खर्च केली पण माझ्याहातून
काहीच झाले नाही. तेव्हा आता काय करायचे. ते
परमेश्वरानेच ठरविले पाहिजे देवानेच मला काय फळ
द्यायचे ते निश्चित केले पाहिजे.
5मी परमेश्वराचा सेवक व्हावे, याकोबला आणि
इस्राएलला मी परत देवाकडे न्यावे, म्हणून मला देवाने
जन्माला घातले. परमेश्वर माझा सन्मान करील. मला
देवाकडून शक्ती मिळेल."

परमेश्वर मला म्हणाला,
6"तू माझा फार महत्वाचा सेवक आहेस. इस्राएलचे
लोक कैदी आहेत. पण त्यांना माझ्याकडे परत आणले
जाईल. याकोबच्या वंशजांचा गोतावळा माझ्याकडे परत
येईल. पण तुझे काम दुसरेच आहे, ते ह्या कामा पेक्षा
महत्वाचे आहे. मी तुला सर्व राष्ट्रांना प्रकाश देणारा दिवा
करीन.जगातील सर्व माणसांचे रक्षण करण्याचा माझा
मार्ग तू होशील."
7परमेश्वर, इस्राएलचा पवित्र देव, इस्राएलला वाचवितो
देव म्हणतो, "माझा सेवक नम्र आहे. तो अधिपतींची सेवा
करतो पण लोक त्याचा तिरस्कार करतात पण राजे
त्याला पाहतील आणि उभे राहून त्याला मान देतील.
मोठे नेते त्याच्यापुढे वाकतील."परमेश्वराला, इस्राएलच्या
पवित्र देवाला हे व्हायला पाहिजे आहे म्हणून असे घडेल,
परमेश्वर विश्वासू आहे. ज्याने तुला निवडले तोच तो
आहे.

## तारणाचा दिवस

8परमेश्वर म्हणतो, "माझी दया दाखविण्याची एक खास
वेळ असेल. त्यावेळेला मी तुझ्या आळवणीची दखल घेईन.
तुला वाचविण्याचा विशेष दिवस असेल. तेव्हा मी तुला
मदत करीन. मी तुझे रक्षण करीन. माझा लोकांबरोबर
झालेल्या कराराचा तू पुरावा असशील. देशाचा आता
नाश झाला आहे पण ती जमीन तू ज्याची त्याला परत
देशील.
9तू कैद्यांना बाहेर येण्यास सांगशील अंधारात राहणाऱ्या
लोकांना तू म्हणशील 'अंधारातून बाहेर या' प्रवास करताना
लोकांना खायला मिळेल. ओसाड टेकड्यांवरही त्यांना
अन्न मिळेल.
10लोक उपाशी राहणार नाहीत. ते तहानेलेही राहणार
नाहीत. तळपणारा सूर्य आणि उष्ण वारे त्यांना इजा करणार
नाहीत का? कारण देव त्यांचे दु:ख हलके करील आणि
त्यांना घेऊन जाईल तो त्यांना पाण्याच्या झऱ्याजवळ घेऊन
जाईल.
11"मी माझ्या लोकांसाठी रस्ता तयार करीन. डोंगर
सपाट करीन आणि खोलगट रस्त्यावर भर घालून ते
उंच करीन.
12"पाहा! दूरदूरच्या ठिकाणाहून लोक माझ्याकडे येत
आहेत उत्तर आणि पश्चिम दिशांकडून ते माझ्याकडे येत
आहेत. मिसरमधील सीनीहूनही (आस्वानहूनही) लोक
येत आहेत."
13हे स्वर्गा आणि हे पृथ्वी, आनंदित व्हा. डोंगरांनो,
आनंदाचा कल्लोळ करा का? कारण परमेश्वर लोकांचे
दु:ख हलके करतो. गरिबांवर तो दया करतो.

## सियोन – परित्यक्ता स्त्री

14पण आता सियोन म्हणते, "परमेश्वराने मला सोडून
दिले माझा प्रभु मला विसरला."
15पण मी म्हणतो, "आई आपल्या बाळाला विसरू शकते
का? नाही. आपल्या गर्भातून जन्मलेल्या मुलाला विसरू
शकते का? नाही. आई आपल्या मुलाला विसरु शकत
नाही आणि मी (परमेश्वर) तुला विसरू शकत नाही.
16पाहा! मी तुझे नाव माझ्या हातावर लिहिले आहे. मी
नेहमी तुझाच विचार करतो.
17तुझी मुले तुझ्याकडे परत येतील. लोकांनी तुझा
पराभव केला पण ते लोक तुला एकटी सोडतील."

## इस्राएलचे लोक परततात

18वर पाहा, तुमच्या सभोवती पाहा. तुझी मुले एकत्र
गोळा होऊन तुझ्याकडे येत आहेत. परमेश्वर म्हणतो,
"मी प्रत्यक्ष आहे आणि मी तुला पुढील गोष्टींचे वचन
देतो. तुझी मुले गळ्यात शोभून दिसणाऱ्या रत्नांप्रमाणे
होतील. नववधूने गळ्यात घालायच्या हाराप्रमाणे ती
होतील.

19आता तुझा नाश केला गेला आहे आणि तुझा पराभव
झाला आहे. तुझा देश कुचकामी आहे. पण थोड्या
काळानंतर, तुझ्या भूमीवर खूप खूप लोक असतील.
तुझा नाश करणारे खूप दूर जातील.
20तुझ्या हरवलेल्या मुलांसाठी तू दु:खी झालीस. पण ती
मुले तुला म्हणतील, 'ही जागा फारच लहान आहे. आम्हाला
राहायला मोठी जागा दे.'
21मग तू मनाशी म्हणशील, 'ही सर्व मुले मला कोणी
दिली? हे फार चांगले आहे. मी दु:खी होते आणि एकटी
होते. माझा पराभव केला गेला आणि मला माझ्या
माणसांपासून दूर केले गेले. मग ही मुले मला कोणी
दिली? पाहा मला एकटी सोडले, ही सर्व मुले कोठून
आली?'"
22परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, "बघ, मी हात उंचावून
राष्ट्रांना खूण करीन. मी सर्व लोकांना दिसावा म्हणून
माझा ध्वज उंच धरीन नंतर ते तुझी मुले तुझ्याकडे
आणतील. ते त्यांना खांद्यांवरून आणि हातांतून आणतील.
23राजे तुझ्या मुलांचे शिक्षक असतील. राजकन्या त्यांची
काळजी घेतील. ते राजे व राजकन्या तुझ्यापुढे वाकतील.
ते तुझ्या पायाची धूळ आपल्या मस्तकी लावतील. मग
तुला कळेल की मीच परमेश्वर आहे. आणि माझ्यावर
जो विश्वास ठेवतो त्याची निराशा होत नाही."
24जेव्हा एखादा शूर वीर युध्दात संपत्ती जिंकतो, तेव्हा
तुम्ही ती त्याच्याकडून काढून घेऊ शकत नाही. जेव्हा
एखादा बलवान शिपाई तुरुंगावरपहारा करतो तेव्हा कैदी
तुरुंगातून निसटू शकत नाही.
25पण परमेश्वर म्हणतो, "कैदी पळून जातील. कोणीतरी
त्यांना त्या कडक पहाऱ्यातून दूर नेईल.हे कसे होईल?
तुझी लढाई मी लढेन. मी तुझ्या मुलांना वाचवीन.
26"त्या लोकांनी तुला दुखावले पण त्यांना स्वत:चेच
मांस खायला मी लावीन. स्वत:च्याच रक्ताची त्यांना
मद्यासारखी धुंदी चढेल. मी तुला वाचविले हे प्रत्येकाला
माहीत होईल याकोबच्या सामर्थ्यवान परमेश्वराने तुझे
रक्षण केले हे सर्वांना समजेल."

## लोकांनी पापे केल्यामुळे इस्राएलला शिक्षा केली गेली

50 परमेश्वर म्हणतो, "इस्राएलच्या लोकांनो, मी,
तुमची आई यरुशलेमला, घटस्फोट दिला असे
तुम्ही म्हणता. पण मी तिला घटस्फोट दिला हे सिध्द
करणारे कायदेशीर कागदपत्रे आहेत का? माझ्या मुलांनो,
मी कोणाचे पैसे देणे लागतो का? कर्ज फेडण्यासाठी मी
तुम्हांला विकले का? नाही. तुम्ही केलेल्या दुष्कृत्यांमुळे
मी तुम्हाला देऊन टाकले. तुमच्या आईने केलेल्या पापांमुळे
मी तिला दूर केले.
2मी घरी आलो तर घरी कोणीच नव्हते. मी खूप हाका
मारल्या पण कोणीच उत्तर दिले नाही. मी तुमचे रक्षण
करू शकणार नाही असे तुम्हाला वाटते का? तुमच्या
सर्व संकटातून वाचविण्याचे सामर्थ्य माझ्यापाशी आहे.
बघा! जर मी समुद्राला वाळून जाण्याची आज्ञा दिली, तर
तो वाळून जाईल.मग पाणी नसल्याने मासे मरतील आणि
त्यांना दुर्गंधी सुटेल.
3मी आकाश काळे करू शकतो. मी काळोखाने आकाश
शोकप्रदर्शक कपड्याइतके काळे करू शकतो."

## देवाचा सेवक खरोखरच देवावर अवलंबून आहे

4परमेश्वर, माझ्या प्रभूने, मला शिकविण्याची क्षमता
दिली. तेव्हा आता या दु:खी लोकांना मी शिकवितो. रोज
सकाळी तो मला उठवितो व विद्यार्थ्यांप्रमाणे शिकवितो.
5परमेश्वर, माझा प्रभू, मला शिकायला मदत करतो
आणि मीही त्याच्याविरुध्द कधी गेलो नाही. मी त्याला
अनुसरण्याचे सोडणार नाही. 6मी त्या लोकांना मला मारू
देईन. मी माझ्या दाढीचे केस त्यांना ओढू देईन. ते जेव्हा
माझी निंदा करतील आणि माझ्या तोंडावर थुकंतील तेव्हा
मी माझे तोंड लपविणार नाही. 7परमेश्वर माझा प्रभु मला
मदत करील. म्हणूनच लोकांनी माझी निंदा केली तरी
मला त्रास होणार नाही. मी भक्क म होईन. माझी निराशा
होणार नाही हे मला माहीत आहे.
8परमेश्वर माझ्या पाठीशी आहे. मी निष्पाप आहे हे तो
जाणतो, म्हणून मी अपराधी आहे असे कोणीही म्हणू
शकणार नाही. मी चुकत आहे असे कोणाला सिध्द करावेसे
वाटत असेल तर त्याने माझ्याकडे यावे. आपण परीक्षा
पाहू. 9पण लक्षात ठेवा, माझा प्रभु मला मदत करतो.
म्हणून कोणीही मला पापी ठरवू शकणार नाही. ते सर्व
लोक जीर्ण जुन्या वस्त्राप्रमाणे होतील. कसर त्यांना खाईल.
10परमेश्वराला मानणारे लोक परमेश्वराच्या सेवकाचे
ऐकतात. तो सेवक, काय घडणार आहे हे माहीत नसताना,
पूर्णपणे देवावर विश्वास ठेवून जगतो. त्याला देवाच्या
नावाबद्दल खात्री वाटते आणि तो त्यावर अवलंबून राहातो.
11"पाहा! तुम्ही लोक स्वत:च्या इच्छेप्रमाणे राहू इच्छिता.
तुम्ही स्वत:चा अग्नी पेटविता आणि मशाली पाजळता.
तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे राहा. पण तुम्हाला शिक्षा होईल.
स्वत:च पेटविलेल्या आगीत तुम्ही पडाल आणि जळाल
मी हे घडवून आणीन."

## इस्राएलने अब्राहामसारखे व्हावे

51 "तुम्ही काही लोक चांगले जीवन जगण्यासाठी
प्रयत्नांची पराकाष्ठा करता. तुम्ही मदतीसाठी
परमेश्वराकडे धाव घेता. माझे ऐका. तुम्ही तुमचे वडील
अब्राहाम यांच्याकडे पाहावे तुम्हाला ज्यापासून कापून
काढले तो तो खडक आहे. 2अब्राहाम तुमचा पिता आहे.
तुम्ही त्याच्याकडे पाहावे. जिने तुम्हाला जन्म दिला त्या
साराकडे तुम्ही पाहावे. मी बोलाविले तेव्हा अब्राहाम एकटा
होता. मी त्याला आशीर्वाद दिला आणि त्याने मोठ्या वंशाचा
आरंभ केला. त्याचा वंश खूप वाढला."

3त्याचप्रमाणे परमेश्वर सियोनचे आणि तिच्या उदध्वस्त
ठिकाणांचे सांत्वन करील. परमेश्वराला तिच्याबद्दल आणि
तिच्या लोकांबद्दल खूप वाईट वाटेल. तो तिच्यासाठी खूप
काही करील. परमेश्वर वाळवटांचे रूप बदलेल. ते
एदेनच्या बागेसारखे होईल. ती ओसाड जमीन देवाच्या
बागेसारखी होईल. तेथील लोक खूप खूप सुखी होतील.
ते आनंद व्यक्त करतील. ते आभाराची व विजयाची गीते
गातील.

4"माझ्या लोकांनो, माझे ऐका.नियम माझ्यापासूनच पुढे
सुरु होतील.मी लोकांना प्रकाश ठरेल असा न्याय ठरवीन.
5मी न्यायी आहे हे मी लवकरच दाखवीन. मी लवकरच
तुम्हाला वाचवीन. मी माझ्या सामर्थ्याच्या बळावर सर्व
राष्ट्रांचा न्यायनिवाडा करीन. दूरदूरची ठिकाणे माझी वाट
पाहत आहेत. ते त्यांच्या मदतीसाठी माझ्या सामर्थ्याची
वाट पाहत आहेत.
6वर स्वर्गाकडे पाहा खाली पृथ्वीवर तुमच्या सभोवती
पाहा. धुक्याच्या ढगाप्रमाणे आकाश नाहीसे होईल. पृथ्वी
वृध्द होईल.पृथ्वीवरची माणसे मरतील, पण माझे तारण
अनंत कालापर्यंत चालू राहील. माझ्या चांगुलपणाला अंत
नाही.
7ज्यांना चांगुलपणा म्हणजे काय ते कळते त्यांनी माझे
ऐकावे. माझ्या शिकवणुकीप्रमाणे वागणाऱ्यांनी मी काय
सांगतो ते ऐकावे. दुष्टांना घाबरू नका. त्यांनी तुमची निंदा
केली तरी भिऊ नका.
8का? त्यांची अवस्था जुन्या वस्त्राप्रमाणे होईल. कसर
त्याना खाईल. ते लाकडाप्रमाणे होतील. वाळवी त्यांना
खाईल. पण माझा चांगुलपणा चिरंतन राहील. माझे तारण
अखंड चालू राहील."

## देवाचे स्वत:चे सामर्थ्य त्याच्या लोकांना वाचवील

9परमेश्वराच्या बाहूंनो जागे व्हा (सामर्थ्या) जागा हो
ऊठ आणि बलवान हो. प्राचीन काळी वापरली होतीस
तशी तुझी शक्ती वापर. राहाबचा पराभव करणारी शक्ती
तूच आहेस. तू आक्राळ-विक्राळ मगरीचा पराभव केलास.
10समुद्र आटवायला तू कारणीभूत झालास मोठ्या
डोहातील पाणी तू आटविलेस. समुद्रातील अती सखोल
भागाचा तू रस्ता केलास. तुझे लोक त्या रस्त्यावरून पार
झाले आणि वाचविले गेले.
11परमेश्वर त्याच्या लोकांचे रक्षण करील. ते आनंदाने
सियोनला परततील. ते खूप खूप सुखी होतील. त्यांचे सुख
त्यांच्या डोक्यांवरील मुकुटांप्रमाणे निरंतर राहील. ते
आनंदाने गात राहतील. सर्व दु:ख कायमचे नाहीसे होईल.
12परमेश्वर म्हणतो, "मीच तो एकमेव ज्याने तुमचे
दु:ख हलके केले. मग तुम्ही लोकांना का भ्यावे? ती
जन्म मृत्यु पावणारी माणसेच आहेत. ते फक्त मनुष्यप्राणी
आहेत. ते गवताप्रमाणे मरतात."

13परमेश्वराने तुम्हाला निर्माण केले. त्याच्या सामर्थ्याने
त्याने पृथ्वी निर्माण केली. आपल्या सामर्थ्याच्या जोरावरच
त्याने पृथ्वीवर आकाश पसरविले. पण तुम्ही तुमचा
निर्माता, देव आणि त्याच्या सामर्थ्याला विसरता म्हणूनच
तुम्हाला दुखविणाऱ्या आणि रागावलेल्या माणसाला तुम्ही
नेहमी घाबरता. त्या लोकांनी तुमच्या नाशाचा कट केला,
पण आता ते कोठे आहेत? ते सर्व गेले.
14तुरुंगातील कैद्यांना लवकरच सोडून देण्यात येईल. ते
तुरुंगात कुजून मरणार नाहीत. त्यांना पोटभर अन्न मिळेल.
15"मी, परमेश्वर, तुमचा देव आहे, मी समुद्र घुसळतो
आणि लाटा निर्माण करतो." (सर्वशक्तिमान परमेश्वर
हेच त्याचे नाव आहे.)
16"माझ्या सेवका, मी माझे शब्द तुझ्या तोंडी घालीन.
मी तुला माझ्या हाताने झाकून तुझे रक्षण करीन. नवीन
स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण करण्यासाठी मी तुझा उपयोग
करीन. इस्राएलला 'तुम्ही माझे लोक आहात.' हे सांगण्यास
मी तुला सांगीन."

## देवाने इस्राएलला शिक्षा केली

17ऊठ, ऊठ, यरुशलेम, जागी हो. परमेश्वर तुझ्यावर
फार रागावला होता. म्हणून तुला शिक्षा झाली. विषाचा
प्याला प्यायला लागावा तशी ही शिक्षा होती. तू तो विषाचा
प्याला प्यायलीस.

18यरुशलेममध्ये खूप लोक होते. पण त्यातील कोणीही
तिचे नेते झाले नाहीत. तिने वाढविलेली कोणीही मुले,
तिला पुढे नेण्यास, मार्गदर्शक झाली नाहीत. 19दोन-दोनच्या
गटाने यरुशलेमवर संकटे आली चोरी आणि नुकसान,
भूक आणि युध्द.
तू संकटात असताना तुला कोणीही मदत केली नाही.
कोणी तुझ्यावर दया केली नाही. 20तुझे लोक दुबळे
होऊन जमिनीवर पडले आणि तिथेच पडून
राहिले.प्रत्येकचौकाततेपडूनराहिले.तेजणू जाळ्यात
पकडलेले प्राणी होते. त्यांना आणखी शिक्षा
सहननहोईपर्यंतपरमेश्वरानेरागानेत्यांनाशिक्षा केली. जेव्हा
देव त्यांना म्हणाला की मी तुम्हाला आणखी शिक्षा करीन,
तेव्हा ते अगदीच लोळागोळा झाले.
21ऐक, बिचाऱ्या यरुशलेम. ऐक मद्यप्याप्रमाणे तू दुबळी
झाली आहेस. पण तू मद्य घेतले नाहीस. "त्या विषाच्या
प्याल्याने" तुला दुर्बल केले आहे.
22तुझा देव, प्रभू परमेश्वर, त्याच्या लोकांसाठी लढेल.
तो तुला म्हणतो, "मी हा 'विषाचा प्याला' (शिक्षा) तुझ्यापासून
दूर करीत आहे. मी आता तुझ्यावर रागावणार नाही.
ह्यापुढे माझ्या रागामुळे तुला शिक्षा होणार नाही. 23आता
तुला ज्यांनी त्रास दिला त्यांच्यावर मी माझा राग काढीन
व त्यांना शिक्षा करीन. त्या लोकांनी तुला ठार
मारण्याचाप्रयत्नकेला.तेतुलाम्हणाले,'आमच्यापुढे

वाक.आम्हीतुलातुडवूनजाऊ.' त्यांनी बळजबरीने तुला वाकविले आणि माती तुडवल्याप्रमाणे ते तुझ्या पाठीवरून चालले. तू जणू काही त्यांचा रस्ता होतीस."

## इस्राएलला वाचविले जाईल

52 ऊठ, सियोन ऊठ. कपडे घालून तयार हो. बलशाली हो. पवित्र यरुशलेम, तुझी सुंदर वस्त्रे परिधान कर. ज्यांनी देवाला अनुसरायचे नाकारले आहे* असे लोक पुन्हा कधीही तुझ्यात प्रवेश करणार नाहीत. ते लोक शुध्द आणि निर्मळ नाहीत.

2तुझ्या अंगावरची धूळ झटक चांगली वस्त्रे परिधान कर. यरुशलेम, सियोनकन्ये, तू उठून बस, तू कैदी होतीस. पण आता तुझ्या गळ्याभोवती आवळल्या गेलेल्या पाशापासून स्वत:ची मुक्तता कर.

3परमेश्वर म्हणतो,"तुला पैशासाठी विकले नव्हते. म्हणून, तुझी मुक्तता करण्यासाठी, मी पैशाचा उपयोग करणार नाही."

4परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, "माझ्या माणसांनी प्रथम मिसरमध्ये वस्ती केली आणि मग ते गुलाम झाले, नंतर अश्शूरने त्यांना गुलाम केले. 5काय घडले आहे ते आता पाहा दुसऱ्या एका राष्ट्राने माझ्या लोकांना ताब्यात घेतले आहे. माझ्या लोकांना गुलामाप्रमाणे ताब्यात घेणारे हे राष्ट्र कोणते? माझ्या लोकांना गुलाम म्हणून घेताना त्यांनी काहीही किंमत मोजली नाही. हे राष्ट्र माझ्या लोकांवर सत्ता गाजविते. त्यांची थट्टा करते. ते लोक नेहमीच माझी निंदा करतात."

6परमेश्वर म्हणतो, 'असे घडले आहे. पण त्यामुळेच माझ्या लोकांना माझी ओळख पटेल. मी कोण आहे हे त्यांना कळेल. लोकांना माझा लौकिक कळेल. आणि त्यांच्याशी बोलणारा मी म्हणजेच तो* आहे हे समजेल.'

7"शांती प्रस्थापित झाली आहे चांगुलपणा आला आहे. तारण झाले आहे. सियोन, तुमचा देव हाच राजा आहे." अशी घोषणा देवदूताकडून ऐकणे असे शुभवर्तमान घेऊन टेकड्यांवरून येणारा देवदूताचा आवाज ऐकणे ही खरोखरच विस्मयकारक गोष्ट आहे.

8टेहळणी करणारे* आरडाओरडा करतात. ते सर्व मिळून आनंद व्यक्त करीत आहेत का? कारण त्यांच्यातील प्रत्येकाने परमेश्वराला सियोनला परत येताना पाहिले आहे.

9यरुशलेमा, तुझ्या नाश झालेल्या इमारती पुन्हा आनंदित होतील. तुम्ही सर्व मिळून आनंद साजरा कराल का? कारण परमेश्वराने त्याच्या लोकांना सुखी केले आहे. त्याने यरुशलेमला मुक्त केले आहे.

10परमेश्वर त्याची पवित्र शक्ती सर्व राष्ट्रांना दाखवील. देव त्याच्या लोकांना कसे वाचवितो हे अती दूरच्या सर्व देशांना दिसेल.

11तुम्ही लोकांनी बाबेल सोडावे. ते ठिकाण सोडा, याजकांनो, पुजेचे साहित्य नेण्यासाठी स्वत:ला शुध्द करा. अपवित्र गोष्टींना स्पर्श करू नका.

12तुम्ही बाबेल सोडाल. पण ते तुम्हाला घाईने बाबेल सोडण्याची सक्ती करणार नाहीत. ते लोक तुम्हाला पळून जाण्यास भाग पाडणार नाहीत. तुम्ही निघून याल. आणि परमेश्वर तुमच्याबरोबर असेल. परमेश्वर तुमच्या पुढे असेल. आणि इस्राएलचा देव तुमच्या पाठीशी असेल.*

## यातना भोगणारा देवाचा सेवक

13"माझ्या सेवकाकडे पाहा. तो नक्कीच यशस्वी होईल.* त्याला अतिशय महत्व येईल. भविष्यात लोक त्याचा आदर करतील. त्याला मान देतील.

14"माझ्या सेवकाला पाहून खूप लोकांना धक्का बसला. त्याला इतकी दुखापत झाली होती की मनुष्य म्हणून त्याला ओळखणे त्यांना शक्य नव्हते.
15पण त्यांना अधिकच आश्चर्य वाटेल. राजे त्यांच्याकडे आश्चर्याने पाहातील पण ते एकही शब्द बोलणार नाहीत. माझ्या सेवकाची गोष्ट ह्या लोकांनी ऐकलेली नाही. काय झाले ते त्यांनी पाहिले. त्यांनी जरी ती गोष्ट ऐकली नसली तरी त्यांना ती सर्व समजलेली आहे."

53 "आम्ही जाहीर केलेल्या गोष्टींवर खरा विश्वास कोणी ठेवला? परमेश्वराने केलेली शिक्षा खरोखरी कोणी स्वीकारली?

2तो एखाद्या रोपट्याप्रमाणे परमेश्वरासमोर वाढला. ओसाड जमिनीवर वाढणाऱ्या अंकुराप्रमाणे तो होता. त्याच्यात काही विशेष नव्हते. त्याला विशेष शोभा नव्हती. आपण त्याच्याकडे पाहिल्यावर तो आपल्याला आवडावा असे त्याच्यात काहीही वैशिष्ट्य नव्हते. 3लोकांनी त्याची चेष्टा केली. आणि त्याचे मित्र त्याला सोडून गेले. तो खूप

---

**ज्यांनी ... नाकारले आहे** शब्दश: अर्थ "ज्यांची सुंता झालेली नाही व जे शुध्द नाहीत असे लोक."

**मी म्हणजेच तो** हे हिब्रूमधील देवाच्या नावासारखे शब्द आहेत. ते शब्द 'देव चिरंजीव आहे' व तो त्याच्या लोकांबरोबर असतो हे दाखवितात निर्ग. 3:13–17 पाहावे.

**टेहळणी करणारे** शहराच्या तटबंदीवर उभे राहून निरोपे वा दूत किंवा संकटे शहरावर येत आहेत का ह्यावर नजर ठेवणारे. येथे बहुदा संदेष्ट असा अर्थ असावा.

**देव ... असेल** देव तुमचे रक्षण करील निर्ग. 14:19,20 शी तुलना करावी.

**तो ... होईल** "तो फार सुज्ञ आहे" अथवा "तो लोकांना शिकवून सुज्ञ करील."

दु:खी व व्यथित माणूस होता. घृणा व दु:ख म्हणजे काय
हे त्याला चांगले समजले होते. लोक त्याच्याकडे साधे
पाहण्याचेही कष्ट घेत नव्हते. तो आमच्या लक्षातही आला
नाही.
4पण त्याने आमचा त्रास स्वत: चा मानला. त्याने
आमचे दु:ख आणि वेदना स्वत: भोगल्या आम्हाला
वाटले की देव त्यालाच शिक्षा करीत आहे, त्याने
केलेल्या कर्मांबद्दल त्याला ताडन करीत आहे. 5पण
आमच्या दुष्कृत्यांबद्दल त्याला दु:ख भोगावे लागले.
आमच्या अपराधांमुळे तो भरडला गेला. आमचे कर्ज,
आमची शिक्षा, त्याच्यावर लादली गेली. त्याने दु:ख
सहन केले. म्हणून आम्ही बरे झालो. 6पण त्याने एवढे
सगळे केल्यानंतरही आपण मेंढ्यांप्रमाणे भरकटत गेलो.
आम्ही प्रत्येकजण स्वत: च्या मार्गाने गेलो परमेश्वराने
आपल्याला अपराधातून मुक्त केल्यावर आणि आपले
अपराध त्याच्या नावावर केल्यावर आपण असे
वागलो.
7त्याला इजाही झाली आणि शिक्षाही झाली. पण त्याने
कधीही तक्रार केली नाही. ठार मारायला नेणाऱ्या
मेंढीप्रमाणे तो अगदी गप्प राहिला. मेंढ्यांची लोकर
कापताना तो जसा शांत असतो तसा तो शांत होता. स्वत:चा
बचाव करण्यासाठी त्याने कधीही तोंड उघडले नाही.
8लोकांनी बळजबरीने त्याला नेले आणि त्याला योग्य
न्याय दिला नाही. त्याला मृत्युलोकातून उचलून
आणल्यामुळे त्याच्या वारसांविषयी कोणी काहीही सांगू
शकत नाही. माझ्या लोकांच्या पापाची किंमत मोजण्यासाठी
त्याला शिक्षा केली गेली.
9तो मेल्यावर त्याला श्रीमंताबरोबर पुरले. त्याने काहीही
चूक केली नव्हती. तो कधीही खोटे बोलला नाही पण
तरीही त्याच्या बाबतीत हे घडून आले.
10परमेश्वराने त्याला चिरडून टाकण्याचे ठरविले
आणि परमेश्वराने दु:ख भोगलेच पाहिजे असे निश्चित
केले. म्हणून सेवक स्वत: चा बळी देण्यास तयार
झाला. पण त्याला नवे जीवन मिळेल आणि तो खूप खूप
जगेल. तो त्याच्या लोकांना पाहील. परमेश्वराच्या
इच्छेप्रमाणे, सेवकाने करायच्या, सर्व गोष्टी तो पूर्ण
करील.
11त्याच्या आत्म्याला खूप क्लेश होतील. पण
चांगल्या गोष्टी घडताना तो पाहील. तो जे शिकेल
त्याबद्दल तो समाधान पावेल. माझा सज्जन सेवक, अनेक
लोकांना त्यांच्या अपराधांतून, मुक्त करील. आणि
त्यांच्या पापांचे ओझे स्वत:च्या खांद्यावर घेईल.
12ह्यामुळेच मी त्याला सर्व लोकांत श्रेष्ठ बनवीन.
बलवान माणसांबरोबर त्याला प्रत्येक गोष्टीत वाटा
मिळेल. मी त्याच्यासाठी हे सर्व करीन कारण तो
लोकांसाठी जगला आणि मेला. लोकांनी त्याला गुन्हेगार
म्हटले. पण त्याने पुष्कळ लोकांच्या पापांचे ओझे स्वत:
वाहिले. आणि आता तो पापी लोकांकरीता बोलतो
आहे."

## देव त्याच्या लोकांना घरी आणेल

54 स्त्रिये, सुखी हो. तुला मुले नाहीत. पण तू सुखी
असावेस. परमेश्वर म्हणतो, "एकट्या असणाऱ्या
बाईला, *नवरा असणाऱ्या बाईपेक्षा जास्त मुले होतील."
2तुझा तंबू मोठा कर. तुझी दारे सताड उघड. तुझ्या
घराचा आकार वाढव तुझा तंबू मोठा आणि मजबूत कर.
3का? कारण तुझा पसारा खूप वाढणार आहे. खूप
राष्ट्रातील लोक तुझ्या मुलांना येऊन मिळणार आहेत.
तुझे वंशज राष्ट्रांची व्यवस्था लावतील आणि नाश झालेल्या
शहरातून पुन्हा तुझी मुले वस्ती करतील.
4घाबरू नकोस. तुझी निराशा होणार नाही. लोक तुझी
निंदा करणार नाहीत. तुला ओशाळवाणे व्हावे लागणार
नाही. तू तरुण असताना तुला लज्जित व्हावे लागले. पण
आता तू ते विसरशील. पती गेल्यावर तुझी झालेली
अप्रतिष्ठा तुला आठवणार नाही.
5कारण तुझा पती हा तुझा निर्माता म्हणजेच देव
आहे.त्याचे नाव सर्वशक्तिमान परमेश्वर आहे. इस्राएलला
वाचविणारा एक तोच आहे तो इस्राएलचा पवित्र देव आहे.
आणि त्याला सर्व पृथ्वीचा पवित्र देव म्हटले जाईल.
6तू परित्यक्ता स्त्रीप्रमाणे होतीस. तू मनातून फार दु:खी
होतीस. पण देवाने तुला आपली मानले. पतीने तरुणपणीच
सोडून दिलेल्या स्त्रीप्रमाणे तुझी अवस्था होती. पण
परमेश्वराने तुला आपली मानले.
7देव म्हणतो, "मी तुला सोडले ते थोड्या वेळापुरतेच.
मी तुला माझ्यात सामावून घेईन आणि तुझ्यावर कृपा
करीन.
8मला खूप राग आला होता म्हणून मी थोड्या वेळापुरता
तुझ्यापासून लपून बसलो. पण मी तुझ्यावर अखंड कृपा
करून तुझे दु:ख हलके करीन." परमेश्वर, तुझा तारणहार
असे म्हणाला.

## देव त्याच्या लोकांवर नेहमीच प्रेम करतो

9देव म्हणतो, "नोहाच्या काळात प्रलय आणून मी जगाला
शिक्षा केली होती ते आठव.पण, पुन्हा प्रलय घडवून जग
नष्ट करणार नाही असे वचन मी नोहाला दिले होते.
त्याचप्रमाणे मी आता तुला वचन देतो की मी तुझ्यावर
कधी रागावणार नाही आणि तुझी खरडपट्टी ही काढणार
नाही."
10परमेश्वर म्हणतो, "एकवेळ डोंगर नाहीसे
होतील,टेकड्यांचे रूपांतर धुळीत होईल.पण माझी

---

**एकट्या असणाऱ्या बाईला** ह्या साठी असणाऱ्या हिब्रू शब्दाचा अर्थ "नाश" झालेला वा झालेली असा आहे. येथे अर्थ "यरुशलेम नाश पावलेली नगरी असा असावा."

तुझ्यावरची कृपा कधीही नाहीशी होणार नाही. मी स्थापन केलेली शांती चिरंतन राहील." तुझ्यावर कृपा करणारा परमेश्वरच हे सगळे सांगत आहे.

11"बिचाऱ्या नगरी, वादळाप्रमाणे शत्रू तुझ्यावर चालून आले आणि कोणीही तुझे सांत्वन केले नाही. पण मी तुला पुन्हा उभारीन. तुझ्या वेशीच्या पायासाठी मी अतिशय चांगला चुना वापरीन. मी पाया घालताना इंद्रनील वापरीन.

12वेशीच्या भिंतीवरील दगड माणकांचे बसवीन. वेशीच्या दारासाठी मी चकाकणारी रत्ने वापरीन. वेशीसाठी मी हिरेमाणके वापरीन.

13तुझी मुले देवाला अनुसरतील. आणि तो त्यांना शिक्षण देईल. मग तुझ्या मुलांना खरोखरच शांतता मिळेल.

14चांगुलपणाच्या पायावर तुझी उभारणी होईल. म्हणून क्रौर्य आणि भय यांपासून तू सुरक्षित असशील. तुला कशाची भीती बाळगण्याचे कारण पडणार नाही. कशापासूनही तुला इजा होणार नाही.

15माझे कोणतेही सैन्य तुझ्याविरुध्द लढणार नाही. आणि समजा कोणी तुझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केलाच तर तू त्याचा पराभव करशील.

16"बघ! मी लोहार निर्मिला. तो विस्तव फुलावा म्हणून हवा फुंकतो. मग तापलेल्या लोखंडापासून त्याला पाहिजे तसे हत्यार तो बनवितो. त्याचप्रमाणे मी 'नाश' करणारा घडविला आहे.

17"लोक तुझ्याविरुध्द लढण्यासाठी शस्त्रे तयार करतील. पण ती शस्त्रे तुझा पराभव करणार नाहीत. काही लोक तुझ्याविरुध्द बोलतील पण जो असे बोलेल त्याला त्याची चूक दाखवून दिली जाईल."

देव म्हणतो, "देवाच्या सेवकांना काय मिळेल? त्यांना माझ्याकडून आलेल्या चांगल्या गोष्टी मिळतील."

## देव खरी तृप्ती देणारे "अन्न" देतो

55 "तहानलेल्यांनो, या आणि पाणी प्या. तुमच्याजवळ पैसा नसला तरी काळजी करू नका. या आणि पोटभर खा, प्या. अन्न आणि मद्य ह्यासाठी पैसे पडणार नाहीत.

2जे खरोखरचे 'अन्न' नाही त्यासाठी पैसे वाया का घालविता? तुम्हाला ज्यापासून समाधान मिळत नाही असे काम तुम्ही का करता? माझे लक्षपूर्वक ऐका म्हणजे तुम्हाला चांगले अन्न मिळेल. तुमच्या जीवाला तृप्ती देणाऱ्या अन्नाचा आनंद तुम्हाला मिळेल.

3मी काय सांगतो ते लक्ष देऊन ऐका. म्हणजे तुम्ही जगाल तुम्ही माझ्याकडे या. मी तुमच्याशी चिरकालासाठी करार करीन. हा करार मी दावीदबरोबर केलेल्या करारासारखा असेल. मी दावीदला वचन दिले होते की मी अखंड त्याच्यावर प्रेम करीन व त्याच्यावर विश्वास ठेवीन. तुम्ही त्या करारावर विश्वास ठेवू शकता.

4मी, सर्व राष्ट्रांकरिता, दावीदला माझ्या सामर्थ्याचा साक्षीदार केले. दावीद अनेक देशांचा राजा आणि सेनापती होईल असे मी त्याला वचन दिले."

5आता, काही राष्ट्रे कोठे आहेत हे तुम्हाला माहीत नाही. पण त्यांची आणि तुमची भेट होईल. त्या राष्ट्रांना, तुम्ही माहीत नाही. पण ती राष्टे तुमच्याकडे धाव घेतील. परमेश्वराची, तुमच्या देवाची इच्छा असल्यामुळे हे असे घडून येईल. इस्राएलचा पवित्र देव तुमचा आदर करीत असल्याने हे असे होईल.

6म्हणून फार उशीर होण्याआधी परमेश्वराला शोधा. तो जवळ असतानाच त्याला बोलवा.

7दुष्टांनी दुष्टपणाने जगणे थांबवावे. त्यांनी वाईट विचार सोडून द्यावे. त्यांनी परमेश्वराला शरण यावे. मग परमेश्वर त्यांचे दु:ख हलके करील. आमचा देव क्षमाशील आहे म्हणून त्यांनी परमेश्वराला शरण जावे.

## लोक देवाला समजू शकत नाहीत:

8परमेश्वर म्हणतो, "तुमचे विचार माझ्यासारखे नाहीत. तुमचे मार्ग माझ्या मार्गासारखे नाहीत.

9स्वर्ग पृथ्वीपेक्षा उंच आहे. त्याचप्रमाणे माझे मार्ग आणि विचार तुमच्यापेक्षा उच्च आहेत." परमेश्वर स्वत: असे म्हणाला.

10"पाऊस वा बर्फ आकाशातून पडल्यावर पुन्हा आकाशात जात नाही तर तो जमीन भिजवितो, नंतर जमिनीतून रोपे अंकुरतात आणि वाढतात. त्यापासून शेतकऱ्यांना बी मिळते आणि लोकांना धान्य मिळते. धान्याची लोक भाकरी करतात.

11तसेच माझ्या तोंडातून निघालेले शब्द परत येत नाहीत तर त्या शब्दाप्रमाणे गोष्टी घडतात. म्हणजेच माझे शब्द मला पाहिजे असलेल्या गोष्टी घडवून आणतात. मी त्यांना ज्या गोष्टी करण्यासाठी पाठविलेले असते त्या गोष्टी करण्यात ते यशस्वी होतात.

12माझे शब्द आनंदाने बाहेर जातील आणि शांती घेऊन येतील. डोंगर आणि टेकड्या आनंदाने नाचू लागतील.शेतांतील झाडे आनंदाने टाळ्या वाजवतील.*

13जेथे झुडुपे होती, तेथे देवदारू वाढतील. काट्याकुट्यांच्या जागी मेंदी उगवेल. ह्या गोष्टी परमेश्वराला सुप्रसिध्द करतील. ह्या गोष्टी म्हणजे परमेश्वराच्या सामर्थ्याचे पुरावे असतील. हे पुरावे कधीही नष्ट होणार नाहीत."

---

**माझे ... वाजवतील** शब्दश: अर्थ जेव्हा परागंदा अवस्थेतून तुम्ही आनंदाने बाहेर पडाल आणि शांतीने पुढे जाल तेव्हा पर्वत व टेकड्या तुमच्यापुढे गाणी गात येतील आणि रानातील झाडे टाळ्या वाजवतील.

## सगळी राष्ट्रे परमेश्वराला अनुसरतील

56 परमेश्वराने पुढील गोष्टी सांगितल्या, “सगळ्या
लोकांशी न्याय्यबुध्दीने वागा. योग्य गोष्टीच करा
का? लवकरच माझे तारण तुमच्यापर्यंत येऊन पोहोचेल
माझा चांगुलपणा लवकरच सर्व जगाला दिसेल.” 2जो
देवाचा शब्बाथचा नियम पाळतो त्याला देवाचा आशीर्वाद
मिळेल. जो माणूस पाप करीत नाही. तो सुखी होईल.
3यहुदी नसलेले काही लोक देवाला येऊन मिळतील. ह्या
लोकांनी असे म्हणू नये “देव त्याच्या लोकांबरोबर आमचा
स्वीकार करणार नाही.” नपुसंकाने असे म्हणू नये “मी
म्हणजे वठलेला वृक्ष आहे. मला मुले होऊ शकत नाहीत.”
4–5ह्या नपुसकांनी असे म्हणू नये कारण परमेश्वर
म्हणतो, “ह्यातील काही शब्बाथचा नियम पाळतात. मला
पाहिजे त्याच गोष्टी निवडून करतात. खरोखरच ते माझ्या
कराराप्रमाणे* वागतात. म्हणून मी माझ्या मंदिरात त्यांच्या
स्मरणार्थ एक शिला ठेवीन. माझ्या नगरात त्यांच्या नावांचे
स्मरण केले जाईल. मी त्यांना संततीपेक्षा काही चांगल्या
गोष्टी देईन. मी त्यांना चिरंतन राहणारे नाव ठेवीन. मी
त्यांना माझ्या माणसांतून तोडून अलग करणार नाही.”
6यहुदी नसलेले काही लोक परमेश्वराची सेवा
करण्यासाठी आणि परमेश्वराच्या प्रेमाखातर स्वत:हून
परमेश्वराला येऊन मिळतील. ते परमेश्वराचे सेवक
होण्यासाठी येतील. ते शब्बाथचा दिवस हा उपासनेचा
विशेष दिवस मानतील. आणि काटेकोरपणे माझ्या कराराचे
(नियमांचे) सतत पालन करतील.
7परमेश्वर म्हणतो, “मी त्या लोकांना माझ्या पवित्र
डोंगरावर आणीन. माझ्या प्रार्थनाघरात मी त्यांना सुखी
करीन. त्यांनी मला अर्पण करण्यासाठी आणलेले होमबली
आणि मला वाहण्यासाठी आणलेल्या वस्तू मला आवडतील.
का? कारण माझे मंदिर सर्व राष्ट्रांचे प्रार्थनाघर होईल.”
8परमेश्वर, माझा प्रभू असे म्हणाला.

इस्राएलच्या लोकांना सक्तीने त्यांचा देश सोडावा लागला.
पण परमेश्वर पुन्हा त्यांना एकत्र गोळा करील. परमेश्वर
म्हणतो, “मी ह्या लोकांना मोळा करून एकत्र करीन.”

## देव त्याची सेवा करण्याकरिता सर्व लोकांना आमंत्रण देतो

9वन्य पशूंनो, या व खा.
10रक्षक (संदेष्टे) आंधळे आहेत.ते काय करीत आहेत
ते त्यांना समजत नाही. न भुंकणाऱ्या कुत्र्यांप्रमाणे ते
आहेत. ते फक्त आडवे पडून झोपा काढतात. हो! त्यांना
झोपायला आवडते.
11ते भुकेल्या कुत्र्यांप्रमाणे आहेत. त्यांचे कधीच समाधान
होत नाही. मेंढपाळांना आपण काय करीत आहोत हे
माहीत नाही. ते त्यांच्या भटकल्या गेलेल्या मेंढ्यांप्रमाणे
आहेत.ते हावरट आहेत. त्यांना फक्त स्वत:चा लाभ हवा
आहे.
12ते येऊन म्हणतात, “आम्ही थोडा द्राक्षरस पिऊ. आम्ही
थोडे मद्य पिऊ. आम्ही उद्याही असेच करु. फक्त थोडे
जास्त मद्य पिऊ.”

## इस्राएल देवाला अनुसरत नाही

57 सर्व सज्जन माणसे नष्ट झाली. ह्याची कोणी
साधी दखलही घेतली नाही. सज्जन लोक एकत्र
जमले पण का ते त्यांना कळत नाही, तेव्हा संकटापासून
वाचविण्यासाठी सज्जनांना दूर नेले गेले हे कोणालाही
समजले नाही.
2पण शांती येईल. लोक स्वत:च्या खाटल्यावर विश्रांती
घेतील. आणि देवाच्या इच्छेप्रमाणे ते जीवन जगतील.
3“चेटकिणीच्या मुलांनो, इकडे या. तुमच्या वडिलांनी
व्यभिचार केला. त्यामुळे ते अपराधी आहेत. तुमची आई
देहविक्रय करते. तुम्ही इकडे या.
4तुम्ही दुष्ट आणि खोटारडी मुले आहात. तुम्ही माझी
चेष्टा करता. तुम्ही मला वेडावून दाखविता. तुम्ही मला
जीभ काढून दाखविता.
5तुम्हाला प्रत्येकाला हिरव्या झाडाखाली फक्त खोट्या
देवांची पूजा करायची आहे. प्रत्येक झऱ्याकाठी तुम्ही
मुले ठार मारता आणि खडकाळ प्रदेशात त्यांचे बळी
देता.
6नदीतल्या गुळगुळीत गोट्यांची पूजा करायला तुम्हाला
आवडते. त्यांची पूजा करण्यासाठी तुम्ही त्यांच्यावर मद्य
ओतता, त्यांना बळी अर्पण करता. पण तुम्हाला त्या
दगडांशिवाय काही मिळत नाही. ह्यामुळे मला आनंद होतो
असे तुम्हाला वाटते का? नाही. मला ह्यामुळे अजिबात
आनंद होत नाही. प्रत्येक टेकडीवर व उंच डोंगरावर
तुम्ही तुमचे अंथरुण तयार करता.*
7तुम्ही ह्या ठिकाणी जमता आणि बळी अर्पण करता.
8मग तुम्ही त्या अंथरूणात शिरता आणि त्या खोट्या
देवांवर प्रेम करता. अशाप्रकारे वागणे हे माझ्याविरुध्द
आहे. असे वागून तुम्ही पापे करता. तुम्ही त्या देवांवर प्रेम
करता. त्यांची नग्न शरीरे पाहायला तुम्हाला आवडते.
प्रथम तुम्ही माझ्याबरोबर होता. पण त्यांच्यासाठी तुम्ही
मला सोडले. माझी आठवण तुम्हाला करून देणाऱ्या
वस्तू तुम्ही लपवून ठेवता. तुम्ही अशा वस्तू दारामागे वा

---

**करार** साधारण “करार”चा अर्थ देवाने इस्राएलाशी मोशेच्या मार्फत केलेला करार असा केला जातो. पण येथे पुढे दिलेल्या ओळींतील करारासंबंधी उल्लेख आलेला असावा. येथे यशयाशी केलेला करार असा अर्थ असावा. यशया 53:3 पाहावे.

**प्रत्येक टेकडीवर ... तयार करता** ह्या ठिकाणी लोक खोट्या देवांची पूजा करीत. त्यांना वाटे की हे खोटे देव त्यांना चांगले धान्यधुन्य व खूप संतती देतील.

दाराच्या खांबामागे लपवून ठेवता व मग त्या खोट्या देवांकडे जाऊन त्यांच्याबरोबर करार करता.

9तुम्ही मोलेखला चांगले दिसावे म्हणून तेले आणि अत्तरे वापरता. तुम्ही तुमचे दूत अती दूरच्या देशांत पाठविले. हे तुमचे कृत्य तुम्हाला अधोलोकात पोहोचवील.

## इस्राएलने देवावर विश्वास ठेवावा, मूर्तीवर नाही

10"ह्या गोष्टी करण्यासाठी तुम्ही खूप मेहनत केली. पण तुम्ही कधीच दमला नाहीत. तुम्हाला या गोष्टींमुळे आनंद मिळत असल्याने तुम्हाला नवीन शक्ती प्राप्त झाली.

11तुम्हाला माझी आठवण झाली नाही. तुम्ही माझी दखलही घेतली नाही. मग तुम्ही कोणाची काळजी करीत होता? तुम्ही कोणाला भीत होता? तुम्ही खोटे का बोललात? पाहा! मी बराच वेळ गप्प बसलो आणि तुम्ही माझा मान ठेवला नाहीत.

12मी तुमच्या 'चांगुलपणाबद्दल' आणि सर्व 'धार्मिक' कृत्यांबद्दल सांगू शकलो असतो पण त्या गोष्टीत काही अर्थ नाही.

13जेव्हा तुम्हाला मदतीची जरूर असते, तेव्हा तुम्ही तुमच्याभोवती जमविलेल्या खोट्या देवांची करूणा भाकता. पण मी तुम्हाला सांगतो की वाऱ्याची फुंकर सुध्दा त्या देवाना दूर उडवून देईल. झंझावात त्यांना तुमच्यापासून दूर नेईल. पण माझ्यावर विसंबणाऱ्याला जमीन मिळेल. माझा पवित्र डोंगर त्याचा होईल.

## परमेश्वर त्याच्या लोकांना वाचवेल

14रस्ता मोकळा करा. रस्ता मोकळा करा. माझ्या लोकांकरिता रस्ता मोकळा करा.

15देव अती उच्च व परम थोर आहे. देव चिरंजीव आहे. त्याचे नाव पवित्र आहे देव म्हणतो,मी उंच आणि पवित्र जागी राहतो हे खरे पण मी दु:खी आणि लीन यांच्याबरोबरही असतो. मनाने नम्र असलेल्यांना आणि दु:खी लोकांना मी नवजीवन देईन.

16मी अखंड लढाई करीत राहणार नाही. मी नेहमी रागावणार नाही. मी सतत रागावलो तर माणसाचा आत्मामीत्याला दिलेले जीवन - माझ्यासमोर मरून जाईल.

17ह्या लोकांनी पापे केली म्हणून मला राग आला. मग मी इस्राएलला शिक्षा केली. मी रागावलो असल्याने त्यांच्यापासून तोंड फिरविले.इस्राएलने मला सोडले त्याला पाहिजे त्या ठिकाणी तो गेला.

18इस्राएल कोठे गेला ते मी पाहिले. म्हणून मी त्याला बरे करीन. (क्षमा करीन.) मी त्याचे दु:ख हलके करीन आणि त्याला बरे वाटावे म्हणून शब्दांची फुंकर घालीन. मग त्याला व त्याच्या लोकांना वाईट वाटणार नाही.

19मी त्यांना 'शांती' हा नवा शब्द शिकवीन. माझ्या जवळ वा दूर असणाऱ्यांना मी शांती देईन. मी त्या लोकांना बरे करीन. त्यांना क्षमा करीन." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या

20पण पापी हे खवळलेल्या समुद्राप्रमाणे असतात. ते गप्प बसत नाहीत, शांत राहत नाही. ते रागावतात आणि खवळलेल्या समुद्राप्रमाणेच चिखल ढवळून काढतात माझा देव म्हणतो, 21"पाप्यांना कधी शांती मिळत नाही."

## देवाला अनुसरण्यास लोकांना सांगितले पाहिजे

58 तुम्हाला शक्य असेल तेवढ्या जोरात ओरडा. थांबू नका. रणशिंगाच्या आवाजाप्रमाणे मोठ्याने ओरडा. लोकांनी केलेल्या चुका त्यांना सांगा. याकोबाच्या वंशजांपुढे त्यांच्या पापांचा पाढा वाचा.

2म्हणजे माझी उपासना करायला ते रोज येतील. माझे मार्ग जाणून घ्यायची लोकांना इच्छा होईल. योग्यरीतीने जगणारे ते राष्ट्र होईल. देवाच्या चांगल्या आज्ञांचे पालन करण्याचे ते सोडणार नाहीत. त्यांना योग्य न्याय देण्यास ते मला सांगतील. न्याय निर्णयासाठी त्यांना देवाकडे जावेसे वाटेल.

3आता ते लोक म्हणतात, "तुझ्याबद्दल आदर दाखविण्यासाठी आम्ही उपास करतो. तू आमच्याकडे का पाहत नाहीस? तुझा मान राखण्यासाठी आम्ही आमच्या शरीरांना क्लेश करून घेतो. तू आमची दखल का घेत नाहीस?"

पण परमेश्वर म्हणतो, "विशेष दिवशी उपास करून तुम्ही तुम्हालाच पाहिजे ते करता* तुम्ही तुमच्या शरीराला क्लेश देत नाही तर तुमच्या नोकरांना शिक्षा करता.
4तुम्ही भुकेले आहात. पण ती भूक अन्नाची नाही, भाकरीची नाही तर भांडणाची आणि लढाईची आहे. तुमच्या पापी हातांनी लोकांना मारण्यासाठी तुम्ही भुकेले आहात. तुम्ही माझ्याकरिता उपास करीत नाही. माझी स्तुती करण्याची तुमची इच्छा नाही. 5त्या विशेष दिवसांत उपास करून आपल्या शरीरांना लोकांनी क्लेश दिलेले पाहण्याची माझी इच्छा आहे असे तुम्हाला वाटते का? मला लोकांना दु:खी असलेले पाहावेसे वाटते असे तुम्हाला वाटते का? लोकांनी वाळलेल्या झाडांप्रमाणे माना झुकवाव्या व शोकप्रदर्शक कपडे घालावे अशी माझी इच्छा आहे. असे तुम्हाला वाटते का? लोकांनी राखेत बसून त्यांचे दु:ख मला दाखवावे अशी माझी इच्छा आहे, असे तुम्हाला वाटते का? विशेष दिवसांत उपास करून तुम्ही हे सर्व करता, परमेश्वराला हेच पाहिजे असे तुम्हाला वाटते का?

**तुम्ही … करता** "अटोन्मेंटच्या दिवशी, तो दिवस पाळण्या ऐवजी तुम्ही तुमचे उद्योगधंदे करीत राहता" असा ह्याचा बहुधा अर्थ असावा.

6"मला कोणत्या प्रकारचा दिवस अभिप्रेत आहे ते मी तुम्हाला सांगीन. तो दिवस लोकांच्या मुक्ततेचा असावा, त्या दिवशी लोकांची ओझी तुम्ही हलकी करावी, अडचणीत असलेल्या लोकांना त्यातून सोडवावे, त्यांच्या खांद्यावरची ओझी तुम्ही उतरवावी.
7भुकेलेल्यांना तुम्ही आपल्या घासातील घास द्यावा, बेघरांना शोधून तुमच्या घरात त्यांना आसरा द्यावा, उघड्या माणसाला तुम्ही तुमचे कपडे द्यावे अशी माझी इच्छा आहे. अशा लोकांना मदत करताना मागे-पुढे पाहू नका. ती तुमच्यासारखीच माणसे आहेत."

8तुम्ही ह्या गोष्टी केल्यात तर पहाटेच्या प्रकाशाप्रमाणे तुमचे भाग्य उजळेल. तुमच्या जखमा भरून येतील. तुमचा "चांगुलपणा" (देव) तुमच्या पुढे चालेल आणि परमेश्वराचे गौरव तुमच्या पाठीमागून येईल.
9नंतर तुम्ही परमेश्वराला हाक मारल्यास परमेश्वर तुमच्या हाकेला ओ देईल. तुम्ही त्याचा धावा केल्यास तो म्हणेल, "हा मी येथे आहे."

## देवाच्या लोकांनी योग्य तेच केले पाहिजे

लोकांना त्रास देण्याचे व त्यांच्या दु:खाचे ओझे वाढविण्याचे तुम्ही थांबवावे. तुम्ही लोकांना कटू शब्द वापरू नयेत आणि प्रत्येक गोष्टीबद्दल दोष देऊ नये.
10भुकेलेल्यांची तुम्हाला दया यावी व त्यांना तुम्ही अन्न द्यावे. संकटात असलेल्यांना तुम्ही मदत करावी. त्यांच्या गरजा भागवाव्या. मग अंधकारातून तुमचे भाग्य चमकून उठेल. तुम्हाला कसलेही दु:ख होणार नाही. मध्यान्हीच्या सूर्यप्रकाशाप्रमाणे तुमचे भाग्य तळपेल.

11परमेश्वर नेहमीच तुम्हाला मार्गदर्शन करील. ओसाड प्रदेशात तो तुमचा आत्मा तृप्त करील. तो तुमची हाडे मजबूत करील. भरपूर पाणी मिळणाऱ्या बागेप्रमाणे तुम्ही व्हाल. सतत वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणे तुम्ही असाल.

12पुष्कळ वर्षे तुमच्या शहरांचा नाश झाला. पण नवीन शहरे वसविली जातील. आणि त्या शहरांचा पाया अनेक वर्षे टिकून राहील. तुम्हाला "कुंपण पक्के करणारा आणि रस्ते व घरे बांधणारा" असे नांव मिळेल.

13तुम्ही देवाच्या शब्बाथच्या नियमाविरुध्द वागून पाप करण्याचे थांबवाल. आणि विशेष दिवशी स्वत:च्या खुषीकरिता काही करण्याचे टाळाल तेव्हा हे घडून येईल. तुम्ही शब्बाथला आनंदाचा दिवस मानावे. परमेश्वराच्या विशेष दिवसाचा तुम्ही मान राखावा. रोज तुम्ही जे करता आणि जे बोलता ते करण्याचे वा बोलण्याचे टाळून तुम्ही त्या दिवसाचा मान राखावा.

14मग तुम्ही परमेश्वराजवळ त्याच्या कृपेची मागणी करू शकता. परमेश्वर तुम्हाला पृथ्वीवर उच्च जागी नेईल आणि तुमचे वडील याकोब यांच्या मालकीच्या सर्व गोष्टी तो तुम्हाला देईल.परमेश्वरानेच हे सर्व सांगितले असल्यामुळे हे सर्व घडून येईल.

## पाप्यांनी आपले जीवन बदलावे

59 हे पाहा, परमेश्वराचे सामर्थ्य तुम्हाला वाचवायला पुरेसे आहे. तुम्ही त्याची मदत मागता. ते तो ऐकू शकतो.
2तुमच्या पापांनी देवाचे तोंड लपवले आहे. त्यामुळे तो तुमचे बोलणे ऐकत नाही.

3तुमचे हात घाणेरडे आहेत. ते रक्ताने माखले आहेत तुमची बोटे अपराधांमुळे झाकली गेली आहेत. तुमची तोंडे खोटे बोलतात. तुमची जीभ वाईट गोष्टी बोलते.
4कोणीही दुसऱ्याबद्दल खरे सांगत नाही. लोक न्यायालयात एकमेकांविरुध्दफिर्याद गुदरतात आणि ते दावा जिंकण्यासाठी खोट्या वादांवर विसंबतात. ते एकमेकांबद्दल खोटे सांगतात. ते संकटांनी घेरलेले आहेत. ते पापाला जन्म देतात.
5विषारी सर्पाच्या अंड्यातून विषारी सर्पच निघतो. तसेच ते पापाला जन्म देतात. विषारी सर्पाचे अंडे तुम्ही खाल्ले तर तुम्ही मराल. आणि ते तुम्ही फोडले तर त्यातून सर्पच निघेल.

लोक खोट्या गोष्टी सांगतात-ह्या खोट्या गोष्टी कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे असतात.
6त्यांनी बनविलेल्या जाळ्याचा उपयोग कपड्यांसाठी होऊ शकत नाही. तुम्ही तुमचे अंग त्याने झाकू शकत नाही.

काही लोक दुष्कृत्ये करतात आणि दुसऱ्यांना इजा करण्यासाठीच आपल्या हाताचा उपयोग करतात.
7आपल्या पायांचा उपयोग ते पापांकडे पळण्यासाठी करतात. निष्पाप लोकांना मारण्याची त्यांना घाई असते. ते दुष्ट विचार करतात. मारामारी आणि चोरी हेच; त्यांच्या जगण्याचे मार्ग असतात.

8त्यांना शांतीचा मार्ग माहीत नसतो. त्यांच्या जीवनात अजिबात चांगुलपणा नसतो. त्यांचे मार्ग प्रामाणिक नसतात त्याच्याप्रमाणे जीवन जगणाऱ्या कोणालाही कधीही जीवनात शांतता लाभणार नाही.

## इस्राएलचे पाप संकट आणते

9सगळा प्रामाणिकपणा आणि चांगुलपणा गेला आहे. आमच्याभोवती फक्त अंधार आहे. म्हणून आम्ही उजेडासाठी थांबले पाहिजे. आम्ही तेजस्वी प्रकाशाची आशा करतो. पण आम्हाला फक्त अंधारच मिळाला आहे.

10आम्ही डोळे नसलेल्याप्रमाणे आहोत. आंधळ्यांप्रमाणे आम्ही भिंतीपाशी धडपडतो. रात्री अडखळून पडावे तसे आम्ही पडतो. दिवसासुध्दा आम्ही पाहू शकत नाही. दुपारी आम्ही मेलेल्या माणसांप्रमाणे पडतो.

11आम्ही सर्व, फार दुखी आहोत. आम्ही दु:खाने पारवे व अस्वले यांच्याप्रमाणे कण्हतो. लोक प्रामाणिक होण्याची आम्ही वाचविले जाण्याची वाट पाहत आहोत पण अजून तरी कोठे प्रामाणिकपणा नाही. आम्ही वाचविले

जाण्याची वाट पाहत आहोत. पण तारण अजून खूप दूर आहे.

12का? कारण आम्ही देवाविरुध्द वागून खूप खूप पापे केली. आपली पापे आम्ही चुकलो ते दाखवितात. ह्या गोष्टी करून आम्ही अपराध केला हे आम्हाला माहीत आहे.

13आम्ही पाप केले आणि परमेश्वराविरुध्द गेलो. आम्ही त्याच्यापासून दूर गेलो आणि त्याला सोडले. आम्ही देवाच्याविरुध्द दुष्ट बेत केले आम्ही वाईट गोष्टींचा विचार केला व मनात दुष्ट बेत केले.

14न्याय आमच्यापासून दूर गेला आहे. प्रामाणिकपणा दूर उभा आहे. सत्य रस्त्यात पडले आहे चांगुलपणाला शहरात प्रवेश नाही.

15सत्य गेले आणि सत्कृत्य करण्याचा प्रयत्न करणारे लुबाडले गेले. परमेश्वराने पाहिले पण त्याला कोठेच चांगुलपणा सापडला नाही. परमेश्वराला हे आवडले नाही.

16परमेश्वराने पाहिले पण त्याला कोणीही ठामपणे उभा राहून लोकांना मदत करताना दिसला नाही. म्हणून परमेश्वराने स्वत:चे सामर्थ्य आणि चांगुलपणा वापरला आणि लोकांना वाचविले.

17परमेश्वराने युध्दाची तयारी केली. त्याने चांगुलपणाचे चिलखत घातले, तारणाचे शिरस्त्राण घातले, शिक्षेचे कपडे घातले दृढ प्रेमाचा अंगरखा घातला.

18परमेश्वर त्याच्या शत्रूवर रागावला आहे.म्हणून परमेश्वर त्यांना त्यांच्या लायकीप्रमाणे शिक्षा करील. परमेश्वर त्याच्या शत्रूंवर रागावला असल्यामुळे सर्व देशांतील लोकांना तो शिक्षा करील. त्यांच्या पात्रतेप्रमाणे तो त्यांना शिक्षा देईल.

19नंतर पक्ष्चिमेकडील लोक घाबरतील आणि परमेश्वराला मान देतील. पूर्वेकडचे लोक घाबरतील आणि देवाच्या गौरवांचा आदर करतील. देवाने सोडलेल्या झंझावातामुळे, वेगाने वाहणाऱ्या नदीप्रमाणे, देव जलद गतीने येईल.

20मग तारणारा सियोनला येईल आधी पाप केलेल्या पण नंतर देवाला शरण आलेल्या याकोबच्या लोकांकडे तो येईल.

21परमेश्वर म्हणतो, "मी त्या लोकांबरोबर एक करार करीन. मी तुमच्यात घातलेला माझा आत्मा आणि तुमच्या तोंडात घातलेले माझे शब्द कधीही तुम्हाला सोडून जाणार नाहीत, असे मी तुम्हाला वचन देतो. ते पिढ्यान् पिढ्या तुमच्याबरोबर राहतील ते आताही तुमच्याबरोबर असतील आणि चिरकाल तुमच्याबरोबर राहतील."

## देव येत आहे

60 "यरुशलेम, माझ्या ज्योती, ऊठ. तुझा प्रकाश (देव) येत आहे. परमेश्वराची प्रभा तुझ्यावर फाकेल.

2आता अंधाराने जग व्यापले आहे आणि लोक अंधारात आहेत. पण परमेश्वराचा प्रकाश तुझ्यावर पडेल, त्याची प्रभा तुझ्यावर पसरेल.

3राष्ट्रे तुझ्या प्रकाशाकडे (देवाकडे) येतील. राजे तुझ्या तेजस्वी प्रकाशाकडे येतील.

4तुझ्या सभोवती पाहा! बघ, लोक तुझ्या भोवती जमून तुझ्याकडे येत आहेत. ती तुझी दूरवरून येणारी मुले आहेत आणि त्याच्याबरोबर, तुझ्या मुलीही येत आहेत.

5हे भविष्यात घडून येईल. त्यावेळी तू तुझ्या लोकांना पाहशील. तुझा चेहरा मग आनंदाने उजळेल. प्रथम तू घाबरशील. पण नंतर तुझ्या भावना अनावर होतील. समुद्रापलीकडील सर्व संपत्ती तुझ्यापुढे ठेवली जाईल. राष्ट्रांचे सर्व धन तुला मिळेल.

6मिद्यान आणि एफा येथील उंटाचे कळप तुझी भूमी ओलांडतील. शेबातून उंटाची रीघ लागेल. ते सोने आणि सुंगधी द्रव्ये आणतील. लोक परमेश्वराची स्तुतिस्तोत्रे गातील.

7लोक केदारमधील सर्व मेंढ्या गोळा करून तुला देतील. नबायोथचे मेंढे ते तुझ्याकडे आणतील तू ती जनावरे माझ्या वेदीवर अर्पण करशील आणि मी त्यांचा स्वीकार करीन. मी माझे सुंदर मंदिर आणखी सुंदर करीन.

8लोकांकडे पाहा! आकाशात वेगाने ढग सरकावेत त्याप्रमाणे ते घाईने तुझ्याकडे येत आहेत ते जणू घरट्याकडे उडत येणारे पारवे आहेत.

9दूरचे देश माझी वाट पाहत आहेत मोठी मालवाहू जहाजे प्रवासास सज्ज आहेत. दूरच्या देशातून तुझ्या मुलांना आणण्याकरिता ती जहाजे तयार आहेत. परमेश्वराचा तुझ्या देवाचा, इस्राएलच्या पवित्र देवाचा, सन्मान करण्यासाठी ती मुले आपल्याबरोबर चांदी-सोने आणतील. परमेश्वर तुझ्यासाठी आश्चर्यकारक गोष्टी करतो.

10दुसऱ्या देशातील मुले तुझी तटबंदी पुन्हा बांधतील, राजे तुझी सेवा करतील "मी जेव्हा रागावलो तेव्हा मी तुला फटकावले. पण आता तुझ्यावर दया करण्याची माझी इच्छा आहे.म्हणून मी तुझे दु:ख हलके करीन.

11तुझे दरवाजे सदोदित उघडे राहतील. दिवस असो वा रात्र ते कधीही बंद होणार नाहीत. राष्ट्रे आणि राजे, त्यांची संपत्ती तुझ्याकडे आणतील.

12जे राष्ट्र अथवा जे राज्य तुझी सेवा करीत नाही त्याचा नाश होईल.

13लबानोनमधील मौल्यवान चिजा तुला दिल्या जातील. लोक सुरु देवदारू आणि भद्रदारू तुला आणून देतील. माझे पवित्र स्थान सुंदर करण्यासाठी या झाडांच्या लाकडाचा उपयोग केला जाईल. ही जागा म्हणजे जणू काही माझ्या सिंहासनासमोरील चौरंग आहे आणि मी त्याला फार महत्व देईन.

14पूर्वीच्या काळी ज्या लोकांनी तुला दुखावले, तेच आता तुझ्यापुढे नमतील. पूर्वी ज्यांनी तुझा तिरस्कार केला

तेच आता तुझ्या पायाशी वाकतील. तेच लोक तुला
'परमेश्वराची नगरी,' 'इस्राएलच्या पवित्र देवाचे सियोन
म्हणून संबोधतील.'"

## नवे इस्राएल शांतीची भूमी

15"तुला पुन्हा कधीही एकटे सोडले जाणार नाही. पुन्हा
कधीही तुझा तिरस्कार केला जाणार नाही. तुला पुन्हा
कधीही ओस पाडले जाणार नाही. मी तुला चिरकालासाठी
मोठी करीन. तू चिरंतन सुखी होशील.
16राष्ट्रे तुला पाहिजे ती प्रत्येक गोष्ट देतील. हे म्हणजे
मुलाने आईचे स्तनपान करावे तसे असेल.
पण तू राजांच्या संपत्तीचे 'पान' करशील. मग तुला
समजेल की तो मी आहे, जो तुला वाचवितो, तो परमेश्वर
मी आहे. तुला कळेल की याकोबाचा महान देव तुझे
रक्षण करतो.
17"आता तुझ्याजवळ तांबे आहे, मी तुला सोने आणीन.
आता तुझ्याजवळ लोखंड आहे, मी तुला चांदी आणून
देईन. मी तुझ्याजवळील लाकडाचे तांबे करीन. तुझ्या
खडकांचे लोखंड करीन. मी तुझ्या शिक्षेचे रूपांतर शांतीत
करीन. आता लोक तुला दुखावतात, पण तेच तुझ्यासाठी
चांगल्या गोष्टी करतील.
18"तुझ्या देशात पुन्हा कधीही हिंसेची वार्ता ऐकू येणार
नाही. लोक तुझ्या देशावर पुन्हा कधीही चढाई करणार
नाहीत. आणि तुला लुटणार नाहीत. तू तुझ्या वेशीला
'तारण' आणि तुझ्या दरवाजांना 'स्तुती' अशी नावे देशील.
19"या पुढे तुला रात्रंदिवस चंद्र सूर्य नव्हे तर परमेश्वर
प्रकाश देईल. परमेश्वर तुझा चिरकालाचा प्रकाश होईल.
तुझा देवच तुझे वैभव असेल.
20तुझा 'सूर्य' कधी मावळणार नाही आणि 'चंद्राचा' क्षय
होणार नाही. कारण परमेश्वर तुझा अक्षय प्रकाश असेल.
तुझा दु:खाचा काळ संपेल.
21"तुझे सर्व लोक सज्जन असतील. त्यांना कायमची
भूमी मिळेल. मी त्या लोकांना निर्माण केले. मी माझ्या
स्वत:च्या हातांनी तयार केलेली ती सुंदर रोपटी आहेत.
22सर्वात लहान कुटुंबाचा मोठा समूह होईल. सर्वांत
लहान कुटुंबाचे मोठे बलवान राष्ट्र होईल. योग्य वेळी मी,
परमेश्वर, त्वरेने येईन. मी ह्या गोष्टी घडवून आणीन."

## परमेश्वराचा मुक्तीचा संदेश

61 परमेश्वराचा सेवक म्हणतो, "परमेश्वराने, माझ्या
प्रभूने, त्याचा आत्मा माझ्यात घातला. गरीब
लोकांना चांगली बातमी सांगण्यासाठी आणि दु:खी लोकांचे
सांत्वन करण्यासाठी देवाने मला निवडले. बंदिवानांची
आणि कैद्यांची मुक्तता झाली आहे हे सांगण्यासाठी देवाने
मला पाठविले. 2परमेश्वराच्या कृपासमयाची घोषणा
करण्यासाठी देवाने मला पाठविले. देव पापी लोकांना
कधी शिक्षा करणार आहे हे त्यांना सांगण्यासाठी देवाने
मला धाडले. दु:खी लोकांचे दु:ख हलके करण्यासाठी
देवाने मला पाठविले. 3सियोनच्या दु:खी लोकांकडे देवाने
मला पाठविले. मी त्यांना उत्सवासाठी तयार करीन. त्यांच्या
डोक्यांवरची राख मी झटकून टाकीन आणि मी त्यांना
मुकुट देईन. मी त्याचे दु:ख दूर करीन. त्यांना सुखाचे
तेल देईन. मी त्यांचा शोक नाहीसा करीन आणि त्यांना
सणासुदीची वस्त्रे घालायला देईन. देवाने मला त्या लोकांना
'चांगले वृक्ष' आणि 'परमेश्वराची सुंदर रोपटी' अशी नावे
ठेवण्यासाठी पाठविले आहे.
4"त्या वेळेला नाश केली गेलेली जुनी शहरे पुन्हा
वसविली जातील. ती आरंभी होती तशी नव्याने केली
जातील. फार फार वर्षांपूर्वी नाश पावलेली शहरे
नव्यासारखी केली जातील.
5"नंतर तुमचे शत्रू तुमच्याकडे येतील आणि तुमच्या
मेंढ्यांची काळजी घेतील. तुमच्या शत्रूंची मुले तुमच्या
शेतांतून आणि मळ्यांतून कामे करतील. 6तुम्हाला
'परमेश्वराचे याजक', 'आमच्या देवाचे सेवक' असे म्हटले
जाईल. जगातील सर्व राष्ट्रांची संपत्ती तुम्हाला मिळेल आणि
ती मिळाल्याबद्दल तुम्हाला अभिमान वाटेल.
7"पूर्वीच्या काळी लोकांनी तुमची अप्रतिष्ठा केली,
तुमची निंदा केली. इतर लोकांपेक्षा तुमची अप्रतिष्ठा
जास्त झाली. म्हणून तुमच्या जमिनीतून तुम्हाला इतरांपेक्षा
दुप्पट पीक मिळेल. तुम्हाला अखंड आनंद मिळेल. 8असे
का घडेल? कारण मी परमेश्वर आहे आणि मला
प्रामाणिकपणा आवडतो. मला चोरी व प्रत्येक चुकीच्या
गोष्टीचा तिरस्कार वाटतो. म्हणून मी लोकांना योग्य तेच
फळ देईन. मी माझ्या लोकांबरोबर कायमचा करार
केला आहे. 9सर्व राष्ट्रांतील एकूण एक लोक माझ्या
लोकांना ओळखतील माझ्या राष्ट्रातील मुलांना प्रत्येकजण
ओळखेल. त्यांना पाहताच कोणालाही कळून येईल की
ह्यांना परमेश्वराचा आशीर्वाद मिळाला आहे."

## देवाचा सेवक तारण व चांगुलपणा आणतो

10'परमेश्वर मला अत्यंत सुखी ठेवतो. देवामुळे मी
सर्वस्वी सुखी आहे. परमेश्वर मला तारणाचे कपडे घालतो.
हे कपडे स्वत:च्या लग्नात घालायच्या कपड्यांप्रमाणे सुंदर
आहेत. परमेश्वर चांगुलपणाचा अंगरखा मला घालतो.
वधूवेशाप्रमाणे हा अंगरखा सुंदर आहे.
11जमीनीमुळे रोपे वाढतात. लोक शेतांत बी पेरतात.
ते बी जमिनीत रूजून वाढते. त्याचप्रमाणे परमेश्वर
चांगुलपणा वाढवील," सर्व राष्ट्रांत त्याची प्रशंसा अधिकच
वाढवील.'

## नवी यरुशलेम चांगुलपणाने भरलेली नगरी

62 "मी सियोनवर प्रेम करतो. म्हणून मी तिच्यावतीने
बोलेन. मी यरुशलेमवर प्रेम करतो म्हणून मी
बोलायचे थांबणार नाही. चांगुलपणा तेजस्वी प्रकाशाप्रमाणे

चमकेपर्यंत आणि तारण तेजस्वी ज्योतीप्रमाणे जळायला लागेपर्यंत मी बोलेन.

2मग सगळी राष्ट्रे तुझा चांगुलपणा पाहतील. सर्व राजे तुझी प्रतिष्ठा पाहतील मग तुला नवे नाव मिळेल. परमेश्वर स्वत: तुला नवे नाव ठेवील.

3परमेश्वराला तुझा फार अभिमान वाटेल.तू परमेश्वराच्या हातातील सुंदर मुकुटाप्रमाणे होशील.

4'देवाने त्याग केलेली माणसे' असे तुम्हाला कधीही कोणी म्हणणार नाही. तुमच्या भूमीला 'देवाने नाश केलेली' असे कोणी केव्हाही म्हणणार नाही उलट, तुम्हाला 'देवाची आवडती माणसे' असे म्हणतील तुमच्या भूमीला 'देवाची वधू' म्हणतील का? कारण परमेश्वर तुमच्यावर प्रेम करतो आणि तुमची भूमी त्याच्या मालकीची आहे.

5एखादा तरूण एखाद्या स्त्रीवर प्रेम करतो.मग तो तिच्याशी लग्न करतो व ती त्याची पत्नी होते.त्याचप्रमाणे ही भूमी तुझ्या मुलांची होईल.नवविवाहित माणूस खूप सुखी असतो,तसाच देव तुझ्याबरोबर सुखी होईल."

## देव त्याने दिलेली वचने पाळील

6"यरुशलेम, तुझ्या वेशीवर मी रखवालदार (संदेष्टा) ठेवतो. ते रखवालदार गप्प बसणार नाही. रांत्रदिवस ते प्रार्थना करीत राहतील."रखवालदारांनो, तुम्ही देवाची प्रार्थना करीत राहिले पाहिजे त्याच्या वचनाची आठवण तुम्ही त्याला करून दिली पाहिजे. कधीही प्रार्थना करायचे थांबू नका.

7पृथ्वीवरच्या सर्व लोकांनी स्तुती करण्याइतपत यरुशलेमला परमेश्वर प्रशंसनीय करीपर्यंत तुम्ही त्याची प्रार्थना केली पाहिजे.

8परमेश्वराने वचन दिले. परमेश्वराचे सामर्थ्य हाच त्या वचनाचा पुरावा आहे, व ते वचन पूर्ण करायला परमेश्वर आपले सामर्थ्य वापरील. परमेश्वर म्हणतो, "तुमचे अन्न आणि तुम्ही बनविलेले मद्यमी तुमच्या शत्रूंना पुन्हा देणार नाही,असे मी तुम्हाला वचन देतो.

9जो अन्न मिळवतो, तोच ते खाईल आणि तो परमेश्वराची स्तुती करील द्राक्षे गोळा करणारा त्या द्राक्षापासून निघणारे मद्य पिईल. हे सर्व माझ्या पवित्र भूमीवर घडेल."

10दरवाजातून आत या लोकांसाठी रस्ता मोकळा करा. रस्ता तयार करा. रस्त्यावरील दगड बाजूला काढा. लोकांकरिता निशाणी म्हणून ध्वज उंच उभारा.

11ऐका! परमेश्वर दूरवरच्या देशांशी बोलत आहे "सियोनच्या लोकांना सांगा पाहा! तुमचा तारणारा येत आहे. त्याचे बक्षिस त्याच्याजवळ आहे त्याचे कर्म त्याच्या समोर आहे."

12त्याच्या लोकांना "पवित्र लोक" "परमेश्वराने वाचविलेले लोक" असे म्हटले जाईल व यरुशलेमला "देवाला हवी असणारी नगरी," "देव जिच्या बरोबर आहे ती नगरी" असे म्हटले जाईल.

## परमेश्वर त्याच्या लोकांना न्याय देतो

63 अदोमाहून हा कोण येत आहे?तो बस्राहून येतो. त्याची वस्त्रे लालभडक आहेत. तो त्या वस्त्रांत अत्यंत सुंदर दिसत आहे. तो त्याच्या सामर्थ्यामुळे ताठ मानेने चालत आहे तो म्हणतो,"माझ्याजवळ तुम्हाला वाचवायचे सामर्थ्य आहे आणि मी सत्य बोलतो"

2"तुझी वस्त्रे लालभडक का? ती, द्राक्षांचा रस काढण्यासाठी द्राक्षावरून चालणाऱ्या माणसांच्या कपड्यासारखी आहेत."

3तो उत्तरतो, "मी स्वत:च द्राक्षकुंडावरून चाललो मला कोणी मदत केली नाही. मी रागावलो होतो आणि मी द्राक्षे तुडविली. तो रस माझ्या वस्त्रांवर उडाला. म्हणून माझी वस्त्रे आता मळीन झाली आहेत.

4मी लोकांना शिक्षा करण्यासाठी वेळ निश्चित केली. आता लोकांना वाचविण्याची आणि त्यांना संरक्षण देण्याची वेळ माझ्यावर आली आहे.

5मी सभोवर पाहिले. पण मला मदत करण्यासाठी कोणीही नव्हते. कोणीही मला मदत केली नाही म्हणून मला आश्चर्य वाटले. म्हणून मी माझ्या लोकांना वाचविण्यासाठी माझे स्वत:चे सामर्थ्य वापरले. माझ्या स्वत:च्या रागाची मला मदत झाली.

6मी रागावलो होतो तेव्हा मी लोकांना पायाखाली तुडविले. मी वेडा झालो होतो तेव्हा त्यांना शिक्षा केली. मी त्यांचे रक्त जमिनीवर ओतले."

## परमेश्वराला त्याच्या लोकांबद्दल करूणा वाटत होती

7परमेश्वर कृपाळू आहे ह्याचे मी स्मरण ठेवीन. परमेश्वराची स्तुती करण्याचे स्मरण मी ठेवीन. इस्राएलच्या घराण्याला परमेश्वराने खूप चांगल्या गोष्टी दिल्या. परमेश्वर आमच्यावर कृपा करीत आला आहे. परमेश्वराने आमच्यावर दया केली.

8परमेश्वर म्हणाला, "ही माझी माणसे आहेत. ही मुले खोटे बोलत नाहीत." म्हणून त्यांना परमेश्वराने वाचविले.

9लोकांपुढे अनेक संकटे होती. पण परमेश्वर त्यांच्याविरुध्द नव्हता. परमेश्वराला त्यांच्याबद्दल प्रेम आणि सहानुभूती वाटत होती. म्हणूनच त्याने त्यांचे रक्षण केले, त्याने त्याचा खास देवदूत त्यांचे रक्षण करण्यासाठी पाठविला. त्याने त्यांना उचलले व नेले आणि सर्वकाळ तो त्यांची काळजी घेईल.

10पण लोक परमेश्वराच्याविरुध्द उलटले.त्यांनी पवित्र आत्माला दु:ख दिले. म्हणून परमेश्वर त्यांचा शत्रू झाला मग परमेश्वर त्यांच्याविरुध्द लढला.

11पण पूर्वी काय घडले याची परमेश्वराला अजून आठवण आहे. मोशे आणि त्याची माणसे त्याला आठवतात. त्यांना समुद्रपार करणारा तोच एकमेव परमेश्वर आहे. परमेश्वराने त्याच्या मेंढपाळांना (संदेष्ट्यांना) कळप

(माणसे) वळवायला लावले. पण मोशेला आपला आत्मा
देणारा तो परमेश्वर आता कोठे आहे?
12परमेश्वराने मोशेला उजव्या हाताने पुढे नेले.
परमेश्वराने आपल्या विलक्षण सामर्थ्याचा उपयोग मोशेला
पुढे नेण्यासाठी केला. लोकांना समुद्रातून पलीकडे जाता
यावे म्हणून परमेश्वराने पाणी दुभंगविले. असे चमत्कार
घडवून देवाने आपली कीर्ती वाढविली.
13परमेश्वराने खोल समुद्रातून लोकांना पलीकडे नेले.
घोडा जसा वाळवंट पार करतो,त्याप्रमाणे लोक न पडता
पार झाले.
14ज्याप्रमाणे गाय शेतातून चालताना पडत नाही, त्याप्रमाणे
लोक समुद्र ओलांडताना पडले नाहीत. देवाच्या आत्म्याने
लोकांना विश्रांतिस्थानाला नेले. सर्व काळ लोक सुरक्षित
राहिले. परमेश्वरा, ह्याप्रमाणे तू लोकांना पुढे नेलेस. तू
लोकांना मार्गदर्शन केलेस. आणि तुझ्या नावाभोवती
अदभुततेचे वलय निर्माण केलेस.

## देवाने त्याच्या लोकांना मदत करावी म्हणून देवाची प्रार्थना

15परमेश्वरा, स्वर्गातून खाली पाहा. आता काय घडत
आहे ते पाहा तुझ्या स्वर्गातील महान आणि पवित्र घरातून
खाली आमच्याकडे बघ. आमच्याबद्दलचे तुझे ते आत्यंतिक
प्रेम कोठे आहे? तुझ्या अंत:करणातून येणारी तुझी.ती
सामर्थ्यशाली कृत्ये कोठे आहेत? माझ्याकरिता असलेली
तुझी दया कोठे आहे? तुझे कृपा युक्त प्रेम तू माझ्यापासून
का लपवून ठेवीत आहेस?
16हे बघ! तू आमचा पिता आहेस. अब्राहामला आम्ही
माहीत नाही. इस्राएल (याकोब) आम्हाला ओळखत नाही.
परमेश्वरा, तूच आमचा पिता आहेस. आम्हाला नेहमी
वाचविणारा तूच एक आहेस.
17परमेश्वरा, तू आम्हाला तुझ्यापासून दूर का ढकलीत
आहेस? तुला अनुसरणे तू आम्हाला कठीण का करीत
आहेस? परमेश्वरा, आमच्याकडे परत ये. आम्ही तुझे
सेवक आहोत. आमच्याकडे ये. आणि आम्हाला मदत
कर. आमची कुटुंबे तुझ्या मालकीची आहेत.
18तुझी पवित्र माणसे स्वत:च्या देशात अगदी थोडा काळ
राहिली. नंतर आमच्या शत्रूंनी तुझे पवित्र मंदिर पायाखाली
तुडविले.
19काही लोक तुला अनुसरत नाहीत. ते तुझे नाव
धारण करीत नाहीत. आम्ही त्या माणसांसारखे होतो.

64 जर तू आकाश फाडून खाली पृथ्वीवर उतरलास
तर प्रत्येक गोष्ट बदलेल. डोंगर तुझ्यासमोर
वितळतील.
2जळणाऱ्या झुडुपांप्रमाणे डोंगर जळतील. विस्तवावरच्या
पाण्याप्रमाणे डोंगराला उकळी फुटेल.मग तुझ्या शत्रूंना
तुझ्याबद्दल कळेल. तुला पाहिल्याबरोबर सर्व राष्ट्रे भीतीने
कापू लागतील.
3पण तू हे करावेस असे आम्हाला खरोखरच वाटत
नाही. डोंगर तुझ्यासमोर वितळतील.
4तुझ्या लोकांनी, खरोखर कधीच, तुझे ऐकले नाही,
तू सांगितलेल्या गोष्टींकडे कधीच खरोखर लक्ष दिले
नाही. कोणीही तुझ्यासारखा देव अजून पाहिला नाही.
तुझ्याशिवाय दुसरा देव नाही-फक्त तूच आहेस. लोकांनी
संयम पाळल्यास आणि तुझ्या मदतीची वाट पाहिल्यास, तू
त्यांच्यासाठी महान गोष्टी करशील.
5जे लोक सत्कृत्यात आनंद मानतात,त्यांच्याबरोबर तू
असतोस. ते लोक तुझ्या चालीरीतींची आठवण ठेवतात.
पण देवा, पूर्वी आम्ही तुझ्याविरुध्द जाऊन पाप केले.
म्हणून तू आमच्यावर रागावलास. आता, आमचे रक्षण
कसे होणार?
6आम्ही सगळे पापांनी मळीन झालो आहोत. आमचा
सर्व चांगुलपणा जुन्या मळलेल्या कपड्यांप्रमाणे आहे. आम्ही
सर्व पिकल्या पानांप्रमाणे आहोत.आमच्या पापांनी
आम्हाला,वारा जसा पाचोळा दूर वाहून नेतो,तसे दूर नेले
आहे.
7आम्ही तुझी उपासना करत नाही.आम्ही तुझ्या नांवावर
विश्वास ठेवत नाही.तुला अनुसरण्यासाठी आम्ही उत्सुक
नाही.म्हणून तू आमच्याकडे पाठ फिरविलीस.आम्ही
तुझ्यापुढे असहाय्य आहोत.कारण आम्ही पापी आहोत.
8पण, परमेश्वरा, तू आमचा पिता आहेस आम्ही
मातीप्रमाणे आहोत आणि तू कुंभार आहेस तुझ्या हातांनी
आम्हाला घडविले आहे.
9परमेश्वरा, सतत आमच्यावर रागावू नकोस.आमची
पापे कायमची लक्षात ठेवू नकोस.कृपया आमच्याकडे
लक्ष दे.आम्ही तुझी माणसे आहोत.
10तुझ्या पवित्र नगरी ओस पडल्या आहेत.त्या आता
वाळवंटाप्रमाणे झाल्या आहेत.सियोनचे वाळवंट झाले
आहे.यरुशलेमचा नाश झाला आहे.
11आमचे पवित्र मंदिर जाळले गेले आहे.ते आमच्या
दृष्टीने महान होते.आमच्या पूर्वजांनी तेथे तुझी पूजा
केली.आमच्या सर्व चांगल्या गोष्टींचा आता नाश झाला
आहे.
12तुझे आमच्याबद्दलचे प्रेम दाखविण्यापासून,ह्या गोष्टी,
तुला नेहमीच दूर ठेवतील का?तू असाच सतत गप्प राहशील
का?तू कायमच आम्हाला शिक्षा करशील का?

## सर्व लोकांना देवाचे ज्ञान होईल

65 परमेश्वर म्हणतो, “माझ्याकडे सल्ला
मागण्याकरिता न आलेल्या लोकांनाही मी मदत
केली. जे मला शोधत नव्हते, त्यांनाही मी सापडलो. माझे
नाव धारण न करणाऱ्या राष्ट्राबरोबर मी बोललो. मी
म्हणालो, ‘मी येथे आहे! मी येथे आहे!’
2“माझ्या विरुध्द गेलेल्या लोकांना स्वीकारायच्या
तयारीत मी उभा राहिलो. ते माझ्याकडे येतील म्हणून मी

त्यांची वाट पाहत होतो. पण ते त्यांच्या वाईट मार्गाप्रमाणेच
जगत राहिले. त्यांच्या मनांत आले ते त्यांनी केले. 3ते
लोक माझ्यासमोर असे वागून मला राग आणतात. ते
त्यांच्या खास बागांत होमार्पण अर्पण करतात आणि धूप
जाळतात. 4ते थडग्यांजवळ बसून मृतांकडून संदेश येण्याची
वाट पाहतात? एवढेच नाही तर, ते मृत शरीरांजवळ राहतात.
ते डुकराचे मांस खातात. त्यांचे काटे आणि सुऱ्या कुजलेल्या
मांसाने माखून घाण झाल्या आहेत.

5"पण हे लोक दुसऱ्या लोकांना सांगतात, 'माझ्याजवळ
येऊ नकोस. मी तुला शुध्द केल्याशिवाय मला शिवू
नकोस.' ते लोक माझ्या डोळ्यांत जाणाऱ्या धुराप्रमाणे
आहेत. त्यांचा अग्नी सतत जळत असतो."

## इस्राएलला शिक्षा झालीच पाहिजे

6"हे बघा, हा हिशेब चुकता केलाच पाहिजे. हा हिशेब,
तुम्ही पापे करून अपराध केल्याचे दाखवितो. हा हिशेब
चुकता केल्याशिवाय मी गप्प बसणार नाही. आणि तुम्हाला
शिक्षा करून मी हा हिशेब चुकता करीन.

7"तुमची आणि तुमच्या वडिलांची पापे सारखीच आहेत."
परमेश्वर म्हणतो, "त्यांनी डोंगरावर धूप जाळून ही पापे
केली. त्या टेकड्यांवर त्यांनी माझी अप्रतिष्ठा केली. म्हणून
मी त्यांना प्रथम शिक्षा केली. त्यांना मिळायला हवी होती
तीच शिक्षा मी त्यांना दिली."

## देव इस्राएलचा संपूर्ण नाश करणार नाही

8परमेश्वर म्हणतो, "द्राक्षांत जेव्हा नवा रस भरतो,
तेव्हा लोक तो पिळून काढून घेतात, पण ते द्राक्षांचा संपूर्ण
नाश करीत नाहीत. कारण ती द्राक्षे अजून उपयोगात येऊ
शकतात. मी माझ्या सेवकांच्या बाबतीत असेच करीन.
मी त्यांना संपूर्णपणे नष्ट करणार नाही. 9मी याकोबच्या
(इस्राएलच्या) काही लोकांना ठेवीन. यहूदातील काही
लोकांना माझा डोंगर मिळेल. माझे सेवक तेथे राहतील.
तेथे राहण्यासाठी मी लोकांची निवड करीन. 10मग शारोन
दरी मेंढ्यांचे चरण्याचे कुरण होईल. अखोरची दरी गुरांचे
विसाव्याचे ठिकाण होईल. ह्या सर्व गोष्टी, माझ्या लोकांसाठी
मला शोधणाऱ्या लोकांसाठी होतील.

11"पण तुम्ही परमेश्वराचा त्याग केला म्हणून तुम्हाला
शिक्षा होईल. माझ्या पवित्र डोंगराला तुम्ही विसरला. तुम्ही
गादाची पूजा करायला सुरवात केली. तुम्ही मनीवर खोट्या
देवावर विसंबता. 12पण मी तुमचे भविष्य ठरवितो. आणि
मी तुम्हाला तलवारीने मारायचे ठरविले आहे. तुम्ही सर्व
मारले जाल का? कारण मी तुम्हाला बोलाविले आणि
तुम्ही मला ओ द्यायचे नाकारले. मी तुमच्याशी बोललो
पण तुम्ही माझे ऐकले नाही. मी ज्यांना पापे म्हणतो, त्या
गोष्टी तुम्ही केल्या. मला आवडत नसलेल्या गोष्टी करायचे
तुम्ही ठरविले."

13तेव्हा, परमेश्वर, माझा प्रभू असे म्हणाला, "माझ्या
सेवकांना खायला मिळेल, पण तुम्ही पापी भुकेले राहाल.
माझ्या सेवकांना पाणी मिळेल, पण तुम्ही तहानलेले राहाल.
माझे सेवक सुखी होतील, पण तुम्ही लज्जित व्हाल.

14माझ्या सेवकांच्या हृदयांत चांगुलपणा असल्याने ते
सुखी होतील. पण तुम्ही दुष्ट प्रवृत्तीचे लोक रडाल, कारण
तुमच्या हृदयांत वेदना असतील, तुमचा तेजोभंग होईल,
आणि तुम्ही खूप दुःखी व्हाल.

15माझ्या सेवकांना तुमची नावे शिव्यांसारखी वाटतील."
परमेश्वर, माझा प्रभू, तुम्हाला ठार मारील तो त्याच्या
सेवकांना मात्र नव्या नावाने बोलावील.

16आता लोक भूमीचे आशीर्वाद मागतात. पण
भविष्यात ते खऱ्या देवाचे आशीर्वाद मागतील लोक
आता शपथ घेताना भूमीच्या बळावर विश्वास टाकतात.
पण पुढील काळात ते खऱ्या देवावर विश्वास ठेवतील
का? कारण पूर्वीचे सर्व त्रास विसरले जातील. माझ्या
लोकांना पुन्हा कधीही त्या त्रासांची आठवण येणार
नाही.

## नवीन काल येत आहे

17"मी नवा स्वर्ग आणि नवी पृथ्वी निर्माण करीन.
लोक भूतकाळाची आठवण ठेवणार नाहीत.त्यांना त्यातील
एकही गोष्ट आठवणार नाही.

18माझे लोक सुखी होतील.ते अखंड आनंदात राहतील
का?मी जे निर्माण करीन त्यामुळे असे होईल.मी यरुशेमला
आनंदाने भरून टाकीन आणि त्यांना सुखी करीन.

19"मग यरुशलेमबरोबर मलाही आनंद होईल.मी माझ्या
लोकांबरोबर सुखी होईन.त्या नगरीत पुन्हा कधीही आक्रोश
व दुःख असणार नाही.

20तेथे पुन्हा कधीही अल्पायुषी मुले जन्माला येणार
नाहीत. त्या नगरीत कोणीही माणूस अल्प वयात मरणार
नाही. आबालवृध्द दीर्घायुषी होतील. शंभर वर्षे जगणाऱ्याला
तरुण म्हटले जाईल. पण पापी माणूस जरी शंभर वर्षे
जगला तरी त्याच्यावर खूप संकटे येतील.

21"त्या नगरीत घर बांधणाऱ्याला त्या घरात राहायला
मिळेल. आणि द्राक्षाचा मळा लावणाऱ्यालात्या मळ्यातील
द्राक्षे खायला मिळतील.

22एकाने घर बांधायचे व त्यात दुसऱ्याने राहायचे किंवा
एकाने द्राक्ष मळा लावायचा व दुसऱ्याने त्या मळ्यातील
द्राक्षे खायची असे तेथे पुन्हा कधीही होणार नाही. माझे
लोक वृक्षांएवढे जगतील. मी निवडलेले लोक, त्यांनी
स्वत: तयार केलेल्या गोष्टींचा, आनंद लुटतील.

23स्त्रियांना बाळंतपणाचा त्रास कधीच होणार नाही.
बाळंतपणात काय होईल ह्याची त्यांना भिती वाटणार नाही.
परमेश्वर माझ्या सर्व लोकांना व त्यांच्या मुलांना
आशीर्वाद देईल.

[24]त्यांनी मागण्या आधीच त्यांना काय पाहिजे ते मला समजेल.आणि त्यांचे मागणे पुरे होण्याआधीच मी त्यांना मदत करीन.

[25]लांडगे आणि कोकरे, सिंह आणि गुरे एकत्र जेवतील. माझ्या पवित्र डोंगरावरील कोणाही माणसाला जमिनीवरचा साप घाबरविणार नाही. अथवा चावणार नाही. "परमेश्वराने ह्या सर्व गोष्टी सांगितल्या.

## देव सर्व राष्ट्रांना न्याय देईल

66 देव असे म्हणाला, "आकाश माझे सिंहासन आहे आणि पृथ्वी हे माझे पाय ठेवण्याचे आसन आहे. मग तुम्ही माझ्यासाठी घर बांधू शकाल असे तुम्हाला वाटते का? नाही. तुम्हाला ते शक्य नाही. तुम्ही मला विश्रांतीसाठी जागा देऊ शकाल का? नाही. तुम्ही जागा देऊ शकणार नाही.

[2]मी स्वत:च सर्व गोष्टी निर्माण केल्या. मी घडविल्या म्हणून या सर्व गोष्टी येथे आहेत." परमेश्वर असे म्हणाला, "मला सांगा, मी कोणत्या लोकांची काळजी घेतो? मी गरीब आणि नम्र लोकांची काळजी घेतो.हे लोक फार दु:खी आहेत.माझ्या शब्दांचे पालन करणाऱ्या लोकांची मी काळजी घेतो.

[3]काही लोक बैलांना मारून होमार्पण देतात,पण ते लोकांनाही चोपतात ते लोक होमार्पण अर्पण करण्यासाठी मेंढ्या मारतात पण ते कुत्र्यांच्याही माना मुरगळतात. ते डुकराचे रक्त मला अर्पण करतात. ते लोक आठवणीने धूप जाळतात, पण ते त्यांच्या शून्य किंमतीच्या मूर्तीवरही प्रेम करतात. ते लोक त्यांचे स्वत:चे मार्ग निवडतात. माझे मार्ग निवडत नाहीत. ते त्यांच्या भयानक मूर्तीवर प्रेम करतात.

[4]म्हणून मी त्यांच्याच युक्त्या वापरायचे ठरविले आहे. ह्याचाच अर्थ ते ज्या गोष्टींना फार भितात, त्या वापरून मी त्यांना शिक्षा करीन. मी त्या लोकांना बोलाविले पण त्यांनी ऐकले नाही. मी त्यांच्याशी बोललो, पण त्यांना ते ऐकू आले नाही म्हणून मी त्यांच्यासाठी तीच गोष्टी करीन. मी ज्यांना पापे म्हटले, त्या गोष्टी त्यांनी केल्या मला न आवडणाऱ्या गोष्टी त्यांनी निवडल्या."

[5]परमेश्वराच्या आज्ञा पाळणाऱ्या लोकहो तुम्ही परमेश्वर ज्या गोष्टी सांगतो त्या ऐकाव्या. "तुमच्या भावांनी तुमचा तिरस्कार केलाते तुमच्याविरुध्द गेले, कारण तुम्ही मला अनुसरलात. तुमचे भाऊ म्हणाले, 'परमेश्वराचा सन्मान केला गेल्यावर आम्ही परत तुमच्याकडे येऊ. मग आम्हाला तुमच्याबरोबर राहण्यात आनंद होईल.'त्या वाईट लोकांना शिक्षा केली जाईल."

## शिक्षा आणि नवे राष्ट्र

[6]ऐका! नगरातून आणि मंदिरातून मोठा आवाज येत आहे. परमेश्वर शत्रूला शिक्षा करीत असल्याचा तो आवाज आहे. त्यांना योग्य शिक्षा देव करीत आहे. [7-8]"कळा आल्याशिवाय बाई मुलाला जन्म देत नाही. आपण जन्म दिलेल्या मुलाला पाहण्यासाठी बाईला कळा सहन कराव्या लागतात. त्याचप्रमाणे कोणीही नव्या जगाचा आरंभ एका दिवसात झालेला पाहिला नाही. एक दिवसात नवीन राष्ट्र उभे राहिल्याचे कोणीही ऐकलेले नाही. राष्ट्राला प्रथम प्रसूतिवेदनांसारख्या वेदना व्हाव्याच लागतात. प्रसूतिवेदनांनंतर सियोन तिच्या मुलांना जन्म देईल.
[9]त्याचप्रमाणे मीसुध्दा नवीन निर्मिती होऊ न देता वेदना होऊ देणार नाही."

परमेश्वर पुढे म्हणतो, "जर मी तुम्हाला प्रसूतिवेदना दिल्या तर तुम्हाला नवीन राष्ट्र मिळाल्याशिवाय राहणार नाही असे मी तुम्हाला वचन देतो." तुमचा देव असे म्हणाला.

[10]यरुशलेम, सुखी हो! यरुशलेमवर प्रेम करणारे तुम्ही लोकहो, सुखी व्हा! यरुशलेमला दु:खकारक गोष्टी घडल्या म्हणून तुमच्यातील काही लोकांना दु:ख झाले आहे. पण आता तुम्ही सुखी व्हावे.

[11]का? कारण आईच्या स्तनातून येणाऱ्या दुधासारखी दया तुम्हाला मिळेल,ते "दूध" तुम्हाला खरी तृप्ती देईल. तुम्ही ते दूध प्याल आणि तुम्ही यरुशलेमच्या वैभवाने खरोखरीच आनंदित व्हाल.

[12]परमेश्वर म्हणतो, "पाहा! मी तुम्हाला शांती देईन. मोठ्या नदीप्रमाणे ही शांती वाहत वाहत तुमच्याकडे येईल. पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांच्या संपत्तीचा ओघ तुमच्याकडे येईल. पुराप्रमाणे हा संपत्तीचा ओघ येईल. तुम्ही लहान मुलासारखे व्हाल. तुम्ही 'दूध' प्याल. मी तुम्हाला उचलून कडेवर घेईन. मी तुम्हाला मांडीवर खेळवीन.

[13]तुम्ही यरुशलेममध्ये आरामात राहाल.आई जशी मुलाला आराम देते,तसा मी तुम्हाला देईन."

[14]खरोखरी आनंद देणाऱ्या गोष्टी तुम्हाला दिसतील. तुम्ही स्वतंत्र व्हाल आणि गवताप्रमाणे वाढाल. परमेश्वराचे सेवक त्याचे सामर्थ्य पाहतील आणि परमेश्वराचे शत्रू त्याचा राग अनुभवतील.

[15]पाहा! परमेश्वर अग्नी घेऊन येत आहे. परमेश्वराचे सैन्य धुळीचे लोट उडवीत येत आहे. आपल्या रागाचा उपयोग परमेश्वर लोकांना शिक्षा करण्यासाठी करील. परमेश्वर रागावल्यावर त्या लोकांना अग्नीच्या ज्वाळांनी शिक्षा करील. [16]परमेश्वर लोकांना न्याय देईल. मग तो लोकांना अग्नीने आणि त्याच्या तलवारीने नाश करील. परमेश्वर खूप लोकांचा नाश करील.

[17]हे लोक त्यांच्या खास बागांमध्ये पूजा करण्यासाठी शुचिर्भूत व्हावे म्हणून स्नान करतात. ते एकमेकांच्या मागून खास बागांमध्ये जातात. मग ते मूर्तीची पूजा करतात. पण परमेश्वर त्या सर्व लोकांचा नाश करील.

"ते लोक डुक्क र, उंदीर ह्यांचे मांस व इतर घाणेरडया गोष्टी खातात. पण ह्या सर्व लोकांचा एकत्रितपणे नाश केला जाईल." (परमेश्वराने स्वत: ह्या गोष्टी सांगितल्या)

18"ते लोक दुष्ट विचार करतात आणि पापे करतात. म्हणून त्यांना शिक्षा करण्यासाठी मी येत आहे मी सर्व राष्ट्रांना व सर्व लोकांना गोळा करीन सर्व लोक एकत्र येऊन माझे सामर्थ्य पाहतील.
19काही लोकांवर मी खूण करीन. मी त्यांना वाचवीन. मी ह्या वाचविलेल्या काही लोकांना तार्शीश, पूल, लूद (धनुर्धाऱ्यांचा देश), तूबल, यवान आणि दूरदूरच्या देशांत पाठवीन. त्या लोकांनी कधीच माझी शिकवण ऐकलेली नाही. त्यांनी कधीच माझे तेज पाहिलेले नाही. म्हणून वाचविले गेलेले लोक, त्या राष्ट्रांना माझ्या तेजाबद्दल सांगतील.

20आणि ते सर्व राष्ट्रांतून तुमच्या भावा बहिणींना आणतील. ते त्यांना माझ्या पवित्र डोंगरावर, यरुशलेमला, आणतील. तुमची ही भावंडे घोड्यांवरून गाढवांवरून, उंटांवरून, रथांतून आणि गाड्यांतून येतील. तुमची ही भावंडे म्हणजे जणू काही इस्राएलच्या लोकांनी निर्मळ तबकांतून, परमेश्वराच्या मंदिरात आणलेले नजराणे असतील.
21ह्यातीलच काही लोकांना मी याजक व लेवी होण्यासाठी निवडीन." परमेश्वर हे सर्व म्हणाला.

## नवा स्वर्ग आणि नवी पृथ्वी

22"मी नवे जग निर्माण करीन, आणि नवा स्वर्ग व नवी पृथ्वी अक्षय राहतील. त्याचप्रमाणे तुमची नावे आणि मुले नेहमी माझ्याबरोबर असतील.
23प्रत्येक पूजेच्या दिवशी, सर्व लोक माझी उपासना करण्यासाठी येतील. ते प्रत्येक शब्बाथला आणि महिन्याच्या पहिल्या दिवशी येतील.

24"ते लोक माझ्या पवित्र नगरात येतील. आणि ते जर नगराच्या बाहेर गेले तर त्यांना माझ्याविरुध्द गेलेल्या लोकांची मृत शरीरे दिसतील. त्या मृत शरीरांत कधी न मरणारे किडे पडतील कधी न विझणारा अग्नी त्या मृत शरीरांना जाळून टाकील."

# यिर्मया

1 हे यिर्मयाचे संदेश आहेत, यिर्मया हिल्कीयाचा मुलगा
होता. तो अनाथोथ शहरातील याजकांच्या कुळातील
होता.* हे शहर बन्यामीनच्या कुटुंबाच्या मालकीच्या
जमिनीवर वसले आहे. 2योशीया यहूदाचा राजा असताना
देवाने यिर्मयाशी बोलायला आरंभ केला. योशीया आमोनचा
मुलगा होता. योशीयाच्या कारकिर्दीच्या तेराव्या वर्षापासून
देवाने यिर्मयाशी बोलायला सुरवात केली. 3यहूदाचा राजा
यहोयाकीम याच्या कारकिर्दीतही परमेश्वर यिर्मयाशी
बोलत राहिला. यहोयाकीम हा योशीयाचा मुलगा होय
योशीयाचा दुसरा मुलगा सिद्कीया हा यहूदाचा राजा
झाल्यावर त्याच्या कारकिर्दीच्या अकरा वर्षे पाच महिने
एवढ्या काळापर्यंत परमेश्वर यिर्मयाशी बोलला.
सिद्कीयाच्या अकरा वर्षाच्या कारकिर्दीच्या नंतर पाचव्या
महिन्यात यरुशलेममधील लोकांना दूर नेऊन हद्दपार
केले गेले.

## परमेश्वर यिर्मयाला बोलावितो

4यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. हा संदेश असा
होता

5"तू आईच्या गर्भात जन्म घेण्यापूर्वीपासून मला माहीत
होतास. तू जन्माला येण्यापूर्वीच मी तुझी विशेष
कामगिरीसाठी निवड केली. राष्ट्रांचा संदेष्टा म्हणून मी
तुझी निवड केली."

6मग यिर्मया म्हणाला, "पण सर्वशक्तिमान परमेश्वरा,
मला कसे बोलावे ते माहीत नाही. मी तर एक लहान
बआलक आहे."

7पण परमेश्वर मला म्हणाला,
"'मी लहान बआलक आहे' असे म्हणू नकोस. मी
तुला पाठवीन तेथे सगळीकडे तुला गेलेच पाहिजे. मी
तुला सांगीन ती प्रत्येक गोष्ट तू लोकांना सांगितलीच
पाहिजे.

8कोणालाही घाबरू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे. मी
तुझे रक्षण करीन." हा परमेश्वराचा संदेश होता.

9मग परमेश्वराने हात लांब करून माझ्या तोंडाला
स्पर्श केला. मग परमेश्वर मला म्हणाला,

"यिर्मया, मी माझे शब्द तुझ्या तोंडात घालीत आहे.
10खाली ओढण्यासाठी, फाडून टाकण्यासाठी, नष्ट
करून टाकण्यासाठी आणि उलथून टाकण्यासाठी,
उभारणी करण्यासाठी आणि नवीन लागवड करण्यासाठी
आजपासून मी राष्ट्रे आणि राज्ये तुझ्या ताब्यात देत आहे."

## दोन दृष्टान्त

11मला परमेश्वराचा संदेश मिळाला. तो असा होता.
"यिर्मया, तुला काय दिसते?"
मी परमेश्वराला सांगितले, "मला बदामाच्या झाडापासून
केलेली एक काठी दिसते."
12परमेश्वर मला म्हणाला, "तुला उत्तम दिसत आहे.
तुला पाठविलेले माझे शब्द खरे आहेत की नाही हे नक्की
करण्यासाठी मी लक्ष ठेवत आहे."*
13मग मला पुन्हा परमेश्वराचा संदेश मिळाला तो असा:
"यिर्मया, तुला काय दिसते?"
मी परमेश्वराला उत्तरादाखल म्हणालो, "मला उकळते
पाणी असलेले एक भांडे दिसत आहे. ते उत्तरेकडे कलत
आहे."

14परमेश्वर मला म्हणाला, "उत्तरेकडून काहीतरी
भयंकर आपत्ती येईल. ती ह्या देशातील सर्व लोकांवर
येईल.
15काही काळाने मी उत्तरेकडील राज्यातील सर्व
लोकांना बोलवीन." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या:
"त्या देशातील राजे येतील आणि यरुशलेमच्या वेशीजवळ
आपली सिहांसने स्थापन करतील.ते शहराच्या तटबंदीवर
हल्ला करतील. ते यहूदातील सर्व शहरांवर चढाई
करतील.

**तो ... कुळातील होता** हे याजक बहुधा अव्याथार याजकाच्या कुळातील होते. दावीद राजा असताना अब्याथार यरुशलेममध्ये सर्वांत श्रेष्ठ याजक होता. त्याला शलमोन राजाने अनाथोथला पाठविले. 1 राजा 2:26 पाहावे.

**मी ... ठेवत आहे** येथे शब्दांचा खेळ आहे. बदामाच्या लाकडाला वा काठीला हिब्रूमध्ये म्हणतात आणि ह्या शब्दाचा अर्थ 'लक्ष ठेवत आहे' असा होतो.

[16]आणि मी माझ्या लोकांविरुद्ध निकाल घोषित करीन. ते लोक वाईट आहेत. ते माझ्याविरुद्ध फिरले आहेत. म्हणून मी असे करीन.माझ्या लोकांनी माझा त्याग केला.त्यांनी दुसऱ्या देवतांना बळी अर्पण केले. त्यांनी स्वत:च्या हातांनी घडविलेल्या मूर्तीची पूजा केली.

[17]"यास्तव, यिर्मया, तयार हो, उभा राहा आणि लोकांशी बोल. मी तुला सांगितलेली प्रत्येक गोष्ट तू त्यांना सांग. लोकांना घाबरू नकोस, जर तू त्यांना घाबरलास, तर तू त्यांना घाबरावेस म्हणून मी सबळ कारण काढीन.

[18]माझ्या विषयी म्हणशील तर, आज मी तुला भक्क म शहराप्रमाणे वा लोखंडी खांबाप्रमाणे अथवा जस्ताच्या भिंतीप्रमाणे करीन.तू ह्या भूमीवरच्या सर्वांविरुद्ध, यहूदाच्या राजाविरुध्द, यहूदाच्या नेत्यांविरुध्द, तेथील याजकांविरुध्द आणि लोकांविरुद्ध समर्थपणे उभा राहशील

[19]ते सर्व लोक तुझ्याविरुद्ध लढतील, पण ते तुझा पराभव करणार नाहीत. का? कारण मी तुझ्याबरोबर आहे. मी तुझे रक्षण करीन." हा परमेश्वराचा संदेश आहे.

## यहूदा निष्ठावंत नव्हता

**2** यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. तो असा होता:
[2]"यिर्मया, जा आणि यरुशलेममधील लोकांशी बोल. त्यांना सांग:

"'तुमचे राष्ट्र तरुण होते त्या वेळी तुम्ही माझ्याशी निष्ठावंत होता. नववधूप्रमाणे तुम्ही मला अनुसरलात. तुम्ही वाळवंटातून आणि पडिक जमिनीतून माझ्या मागे आलात.

[3]इस्राएलचे लोक म्हणजे परमेश्वराला मिळालेली पवित्र देणगी होती. परमेश्वराने तोडलेले ते पहिले फळ होते. त्यांना दुखविण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकाला अपराधी ठरविले गेले. त्या पापी लोकांचे वाईट झाले.'"हा परमेश्वराकडून आलेला संदेश होता.

[4]याकोबच्या वंशजांनो, इस्राएलमधल्या कुळांनो, परमेश्वराचा संदेश ऐका.

[5]परमेश्वर असे म्हणतो:"मी तुमच्या पूर्वजांशी न्यायीपणाने वागलो नाही असे तुम्हाला वाटते का? म्हणून ते माझ्यापासून दूर गेले का? त्यांनी कवडी मोलाच्या दैवतांना पूजले व स्वत: कवडीमोल झाले.

[6]तुमचे पूर्वज असे म्हणाले नाहीत 'परमेश्वराने आम्हाला मिसरहून आणले. परमेश्वराने आम्हाला वाळवंटातून पार नेले. त्यानेच आम्हाला ओसाड आणि खडकाळ प्रदेशातून बाहेर नेले. काळोख व धोका असलेल्या, निर्जन, जेथून कोणीही प्रवास करीत नाही अशा प्रदेशातून देवाने आम्हाला पार केले. तो परमेश्वर आता कोठे आहे?'"

[7]परमेश्वर म्हणतो, "मी तुम्हाला अनेक चांगल्या गोष्टींनी भरलेल्या उत्तम प्रदेशात आणले. तुम्हाला तेथे पिकणारी फळे व धान्य खायला मिळावे म्हणून मी हे केले. पण तुम्ही माझी ही भूमी 'गलिच्छ' केली. मी तुम्हाला दिलेली ही भूमी तुम्ही खराब केली.

[8]"याजकांनी 'परमेश्वर कोठे आहे' असे विचारले नाही. कायदा जाणणाऱ्यांनी मला जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. इस्राएलचे नेते माझ्याविरुद्ध गेले. संदेष्ट्यांनी खोटा देव बआल याच्या नावे भविष्य वर्तविले. त्यांनी निरुपयोगी मूर्तीची पूजा केली."

[9]परमेश्वर म्हणतो, "म्हणून आता मी तुम्हाला पुन्हा दोषी ठरवीन. आणि तुमच्या नातवंडानासुद्धा दोषी ठरवीन.

[10]समुद्र पार करून कित्ती बेटावर जा. कोणाला तरी केदारला पाठवा. लक्षपूर्वक पाहा. कोणी असे कधी काही केले आहे का ते बघा!

[11]कोणत्या राष्ट्राने, नवीन दैवतांची पूजा करायची म्हणून, जुन्या दैवतांना पूजायचे थांबविले आहे का? नाही. आणि त्यांचे दैवत मुळी देवच नाही.पण माझ्या लोकांनी त्यांच्या तेजस्वी देवाची पूजा करायचे सोडून कवडीमोलाच्या मूर्तीची पूजा करणे सुरु केले.

[12]"आकाशा, घडलेल्या गोष्टीबद्दल तुला आश्चर्याचा धक्क ा बसू दे. भीतीने थरथर काप." हा परमेश्वराचा संदेश होता.

[13]"माझ्या लोकांनी दोन पापे केली. ते माझ्यापासून दूर गेले. (मी जिवंत पाण्याचा झरा आहे.) आणि त्यांनी स्वत:ची पाण्याची टाकी खोदली. (ते दैवंताकडे वळले.) पण ती टाकी फुटली आहे. त्यात पाणी राहू शकत नाही.

[14]"इस्राएलचे लोक गुलाम झाले आहेत का? गुलाम म्हणूनच जन्माला आलेल्या माणसाप्रमाणे ते आहेत का? इस्राएलची संपत्ती लोकांनी का लुटली?

[15]तरुण सिंह (शत्रू) इस्राएलकडे बघून डरकाळ्या फोडतात व गुरगुरतात. त्यांनी इस्राएलचा नाश केला. इस्राएलमधील शहरे जाळली गेली आहेत. तेथे कोणीही मागे उरले नाही.

[16]नोफ (मंमेफिस) आणि तहपन्हेस येथील लोकांनी तुमचा माथा फोडला आहे.

[17]तुमच्याच चुकीने हे संकट आले आहे. परमेश्वर तुमचा देव तुम्हाला योग्य मार्गाने नेत होता. पण तुम्हीच उलटे फिरलात.

[18]यहूदातील लोकांनो, पुढील गोष्टींचा विचार करा. मिसरला जाण्याने काही फायदा झाला का? शिहोराचे (नील नदीचे) पाणी पिण्याने काही लाभ झाला का? नाही. अश्शूरला जाण्याने आणि मोठ्या नदीचे (फरात नदीचे) पाणी पिण्याने काही मदत झाली का? नाही.

[19]तुम्ही दुष्कृत्ये केली. त्यामुळे तुम्हाला फक्त शिक्षा मिळेल. तुमच्यावर संकट येईल. व तो तुम्हाला धडा शिकवील. ह्याचा विचार करा. मग तुम्हाला समजेल की देवापासून दूर जाणे किती वाईट आहे! मला न घाबरणे व मान न देणे हे चूक आहे."माझा प्रभूचा, सर्वशक्तिमान परमेश्वराचा, हा संदेश होता.

[20]“यहूदा, फार वर्षांपूर्वी तू तुझे जोखड दूर फेकलेस. मी तुझ्यावर नियंत्रण ठेवत होतो ती बंधने तोडलीस. तू मला म्हणालीस, ‘मी तुझी सेवा करणार नाही.’ प्रत्येक उंच टेकडीवरील अथवा प्रत्येक हिरव्या झाडाखालील वारांगनेप्रमाणे तू झालीस .

[21]यहूदा, मी खास वेल म्हणून तुला लावले. तुम्ही सर्वजण उत्तम बीजाप्रमाणे होता. मग वाईट फळे देणाऱ्या वेलीत तुझे रूपांतर कसे झाले?

[22]जरी तू स्वत:ला खारान धुतलेस, खूप साबण लावलास, तरी मला तुझ्या अपराधाचा डाग दिसू शकेल.” हा परमेश्वर देवाकडून आलेला संदेश होता.

[23]“यहूदा, ‘मी अपराधी नाही. मी बआलदैवताच्या मूर्तीची पूजा केली नाही’ असे तू मला कसे म्हणू शकतेस? तू दरीमध्ये केलेल्या गोष्टींचा विचार कर. तू काय केलेस त्याबद्दल विचार कर. एका जागेवरून दुसऱ्या जागी धावणाऱ्या चपळ उंटिणीप्रमाणे तू आहेस.

[24]तू वाळवंटात राहणाऱ्या रानगाढवीप्रमाणे आहेस. समागमाच्या काळात ती वारा हुंगते. ती माजावर असताना कोणीही तिला परत आणू शकत नाही. त्या काळात ज्याला पाहिजे त्या नराला ती मिळू शकते. तिला मिळविणे सोपे असते.

[25]यहूदा, मूर्तीमागे धावण्याचे थांबव. त्या दैवतांची लागलेली तहान आता पुरे. पण तू म्हणतेस, ‘त्याचा काही उपयोग नाही. मी त्यांना सोडू शकत नाही. मला ते दैवत आवडतात. मला त्यांना अनुसरायचे आहे.’

[26]“चोराला लोकांनी पकडताच तो शरमिंदा होतो. त्याचप्रमाणे इस्राएलचे लोक झाले आहेत. राजे आणि नेते, याजक आणि संदेष्टे लज्जित झाले आहेत.

[27]ते लाकडाच्या तुकड्याशी बोलतात त्याला ‘माझे वडील’ म्हणतात. ते खडकाशी बोलतात. ते म्हणतात, ‘तू मला जन्म दिलास.’ त्या सर्व लोकांना शरमेने मान खाली घालायला लागतील. ते लोक माझ्याकडे पाहत नाहीत. त्यांनी माझ्याकडे पाठ फिरविली आहे. पण जेव्हा यहूदातील लोक संकटात सापडतात, तेव्हा ते मला म्हणतात, ‘ये आणि आम्हाला वाचव.’

[28]त्या मूर्तींना येऊ देत आणि तुम्हाला वाचवू देत. तुम्ही स्वत: घडविलेल्या त्या मूर्ती कोठे आहेत? तुम्ही संकटात असताना त्या मूर्ती येऊन तुम्हाला सोडवितात का ते पाहू या. यहूदा, तुला तुझ्या शहरांइतक्या मूर्ती आहेत!

[29]“तुम्ही माझ्याशी वाद का घालता? तुम्ही सर्व माझ्याविरुद्ध गेलात.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश होता.

[30]“यहूदातील लोकांनो, मी तुम्हाला शिक्षा केली, पण त्याचा काही फायदा झाला नाही. तुम्हाला शिक्षा झाल्यावरही तुम्ही परत आला नाहीत तुमच्याकडे आलेल्या संदेष्ट्यांना तुम्ही तलवारीने मारले. तुम्ही धोकादायक सिंहासारखे होता. तुम्ही संदेष्ट्यांना ठार मारले.”

[31]ह्या पिढीतील लोकांनो, परमेश्वराच्या संदेशाकडे लक्ष द्या. “इस्राएलच्या लोकांनामी वाळवंटासारखा आहे का? मी काळोखी आणि धोकादायक प्रदेशासारखा त्यांना वाटतो का? माझे लोक म्हणतात, ‘आमच्या मार्गाने जायला आम्ही स्वतंत्र आहोत. परमेश्वरा आम्ही तुझ्याकडे परत येणार नाही.’ ते असे का म्हणतात.?

[32]तरुण स्त्री आपले दागिने विसरत नाही. वधू आपला कमरपट्टा विसरत नाही. पण माझे लोक मला असंख्य वेळा विसरले आहेत.

[33]“यहूदा, प्रियकरांच्या (खोट्या देवांच्या) पाठलाग कसा करायचा हे तुला बरोबर माहीत आहे. दुष्कृत्ये करायला खरोखरच तू शिकली आहेस.

[34]तुझ्या हातांना रक्त लागले आहे. ते रक्त गरीब व निष्पाप माणसांचे आहे. तुझे घर फोडताना तू त्यांना पकडले नाहीस. तू कारण नसताना त्यांना ठार मारलेस.

[35]पण तरी तू म्हणतेस, ‘मी निरपराध आहे. परमेश्वर माझ्यावर रागावलेला नाही.’ मी तुला खोटे बोलल्याबद्दलही दोषी ठरवीन. का? कारण तू म्हणतेस, ‘मी काहीही चूक केलेली नाही.’

[36]मन बदलणे तुला अगदी सोपे आहे. अश्शूरने तुझी निराशा केली, म्हणून तू अश्शूरला सोडले आणि मदतीसाठी तू मिसरला गेलीस. पण मिसरसुध्दा तुझी निराशा करील.

[37]मग अखेरीला तुला मिसरलाही सोडावे लागेल आणि लाजेने तोंड लपवावे लागेल. तू त्या देशांवर विश्वास ठेवलास. पण परमेश्वराने त्या देशांना नाकारले. म्हणून जिंकण्यासाठी ते तुला मदत करु शकत नाहीत.

3 “एखाद्याने बायकोशी घटस्फोट घेतल्यासती त्याला सोडते आणि दुसऱ्याशी लग्न करते. मग तो माणूस परत आपल्या बायकोकडे जाऊ शकतो का? नाही. जर तो माणूस त्या बाईकडे परत गेला* तर तो देश ‘भ्रष्ट’ होतो. यहूदा, खूप प्रियकर (खोटे देव) असलेल्या वारांगनेप्रमाणे तू वागलीस आणि आता तुला माझ्याकडे परत यायचे आहे.” हा परमेश्वराचा संदेश होता.

[2]“यहूदा, टेकड्यांच्या उजाड माथ्यांकडे पाहा. अशी एक तरी जागा आहे का की जेथे तू तूझ्या प्रियकराबरोबर (खोट्या देवांबरोबर) समागम केला नाहीस? वाळवंटात वाट पाहाणाऱ्या अरबांप्रमाणे, तू प्रियकराची वाट बघत रस्त्याच्या कडेला बसलीस. तू देश ‘भ्रष्ट’ केलास. कसा? तू खूप वाईट गोष्टी केल्यास. तू माझा विश्वासघात केलास.

[3]तू पाप केलेस म्हणून पाऊस पडला नाही. वळवाचा पाऊस तर अजिबात पडला नाही. पण तरी तुला

---

**जर तो ... परत गेला** एखाद्याने आपल्या बायकोशी घटस्फोट घेतला व तिने दुसऱ्याशी लग्न केले. तर पुन्हा तिच्या पहिल्या नवऱ्याने तिच्याशी लग्न करणे हे मोशेच्या नियमाविरुद्ध होते. तिला तिच्या दुसऱ्या नवऱ्याने घटस्फोट दिला अथवा तिचा दुसरा नवरा मेला तरी, तिच्याशी लग्न करणेही नियमाविरुद्ध होते. अनु. 24:1-4 पाहावे.

लाज वाटत नाही. वारांगनेप्रमाणे तुझ्या तोंडावर निर्लज्जपणाचे भाव आहेत. तू तुझ्या कृत्यांबद्दल शरमिंदी होत नाहीस.

4पण आता तू मला ‘पिता’ म्हणत आहेस.तू म्हणालीस, ‘मी लहान असल्यापासून तू माझा मित्र आहेस.’

5तू असेसुद्धा म्हणालीस, ‘देव नेहमीच माझ्यावर रागावणार नाही. देवाचा राग सतत राहणार नाही.’

“यहूदा, तू असे म्हणतेस, पण तू करता येतील तेवढी दुष्कृत्यें केली आहेस.”

## दोन वाईट बहिणी इस्राएल आणि यहूदा

6योशीया यहुदावर राज्य करीत असताना, परमेश्वर माझ्याशी बोलला. परमेश्वर म्हणाला, “यिर्मया, इस्राएलने केलेली दुष्कृत्ये तू पाहिलीस ना? तिने माझा कसा विश्वासघात केले ते तू पाहिलेस. तिने प्रत्येक टेकडीवर आणि प्रत्येक हिरव्या झाडाखाली मूर्तीबरोबर व्यभिचार करून पाप केले.
7मी स्वत:शीच म्हणालो, ‘ही दुष्कृत्ये करून झाल्यावर तरी इस्राएल माझ्याकडे परत येईल.’ पण ती माझ्याकडे परत आली नाही. इस्राएलने काय केले हे इस्राएलच्या विश्वासघातकी बहिणीने यहूदाने पाहिले.
8इस्राएल विश्वासघातकी आहे आणि तिला मी दूर का पाठविले ते तिला माहीत आहे. तिने व्यभिचाराचे पाप केले म्हणून मी तिला घटस्फोट दिला हे तिला कळले आहे. पण ह्यामुळे तिची विश्वासघातकी बहीण भयभीत झाली नाही. यहूदाला भीती वाटली नाही. यहूदाने सुध्दा बाहेर जाऊन वारांगनेप्रमाणे व्यवहार केला.
9आपण वारांगनेप्रमाणे वागत आहोत ह्याची यहूदाला पर्वा नव्हती. म्हणून तिने तिचा देश ‘भ्रष्ट’ केला. दगड आणि लाकूड यांपासून तयार केलेल्या मूर्तीची पूजा करून तिने व्यभिचाराचे पाप केले.
10इस्राएलची विश्वासघातकी बहीण (यहूदा) मनापासून माझ्याकडे परत आली नाही. परत येण्याचे तिने फक्त ढोंग केले.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश होता.

11परमेश्वर मला म्हणाला, “इस्राएल माझ्याशी निष्ठावंत नाही. पण विश्वासघातकी यहूदापेक्षा तिच्याकडे सबळ सबबी होत्या.
12यिर्मया, उत्तरेकडे बघ आणि संदेश सांग:

‘इस्राएलच्या बेइमान लोकांनो, परत या.’ हा परमेश्वराकडून आलेला संदेश होता. ‘मी तुमच्यावर संतापायचे सोडून देईन.मी दयाळू आहे.’हा परमेश्वराचा संदेश होता. ‘मी कायमचा तुमच्यावर रागावणार नाही.’

13तुम्ही पाप केले आहे एवढे तुम्हाला समजले पाहिजे.तुम्ही परमेश्वराच्या, तुमच्या देवाच्या,विरुद्ध गेलात तेच तुमचे पाप आहे. तुम्ही दुसऱ्या राष्ट्रातील मूर्तींना प्रत्येक हिरव्या झाडाखाली पूजले. तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या नाहीत.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश होता.

14“तुम्ही लोक विश्वासघातकी आहात. पण माझ्याकडे परत या.” हा परमेश्वराचा संदेश होता.

“मी तुमचा प्रभू आहे मी प्रत्येक नगरातील एक आणि प्रत्येक कुटुंबातील दोन माणसे घेईन. आणि तुम्हाला सियोनला आणीन.
15मग मी तुम्हाला नवे मेंढपाळ (शासनकर्ते) देईन. ते माझ्याशी निष्ठावान असतील. ते ज्ञान आणि समज ह्यांच्या सहाय्याने तुम्हाला मार्गदर्शन करतील.
16त्या काळात, देशात तुमच्यापैकी बरेचजण असतील.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश होता.

“त्या वेळेला, लोक पुन्हा कधीही असे म्हणणार नाहीत, ‘परमेश्वराच्या कराराचा कोश आमच्याजवळ असण्याचे दिवस आम्हाला आठवतात.’ येथून पुढे ते त्या पवित्र कोशाचा विचारसुद्धा करणार नाहीत. त्यांना त्याची आठवण येणार नाही व चुकल्यासारखेही वाटणार नाही. ते दुसरा पवित्र कोश करणार नाहीत.
17त्या वेळेला यरुशलेम नगरीला ‘परमेश्वराचे सिंहासन’ म्हटले जाईल. परमेश्वराच्या नावाचा मान राखण्यासाठी सर्व राष्ट्रे यरुशलेममध्ये एकत्र येतील. ह्या पुढे ते त्यांच्या दुराग्रही आणि दुष्ट मनांचे अनुसरण करणार नाहीत.
18त्या दिवसांत यहूदाचे घराणे इस्राएलच्या घराण्याला येऊन मिळेल. उत्तरेकडच्या प्रदेशातून ते गोळा होऊन येतील मी त्यांच्या पूर्वजांना दिलेल्या भूमीत ते येतील.

19“मी, परमेश्वर, स्वत:शी म्हणालो, ‘माझ्या स्वत:च्या मुलांप्रमाणे तुम्हाला वागवावे असे मला वाटते. इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा, तुम्हाला, सुंदर व आल्हाददायक भूमी द्यावी अशी माझी इच्छा आहे.’मला वाटले की तुम्ही मला ‘पिता.’ म्हणाल व नेहमीच मला अनुसराल.

20पण तुम्ही पतीशी विश्वासघात करणाऱ्या पत्नीप्रमाणे आहात. इस्राएलच्या घराण्यातील लोकांनो, तुम्ही माझा विश्वासघात करीत आहात.”हा देवाचा संदेश होता.

21उजाड टेकड्यांवरून येणारा रडण्याचा आवाज तुम्ही ऐकू शकता. इस्राएलचे लोक रडत आहेत. ते दयेसाठी याचना करीत आहेत. ते फार पापी झाले. ते त्यांच्या परमेश्वर देवाला विसरले.

22परमेश्वर पुढे म्हणाला, “इस्राएलच्या लोकांनो, तुम्ही माझ्याशी विश्वासघात करता. पण माझ्याकडे परत या. माझ्याकडे परत या. जरी तुम्ही विश्वासघातकी असलात तरी मी तुम्हाला क्षमा करीन.”

पण लोकांनी म्हणावे, “हो! आम्ही तुझ्याकडे येऊ तूच परमेश्वर आमचा देव आहेस!

23टेकड्यांवर मूर्तीची पूजा करणे मूर्खपणाचे आहे. डोंगरावर मोठ्या, दिखाऊ मेजवान्या करणे चूक आहे. इस्राएलचे पापविमोचन नक्कीच आपल्या परमेश्वर देवाकडून येईल.

24त्या भयानक खोट्या देवाने बआल देवताने आमच्या वडिलांच्या मालकीचे सर्व काही खाल्ले आहे. त्या खोट्या

दैवताने आमच्या पूर्वजांची मुले व मुली गिळली. आमच्या तारुण्यापासून हे घडले. त्या भयानक खोट्या देवाने आमच्या वडिलांच्या मेंढ्या आणि गुरे आणि त्यांची कोकरे व वासरे घेतली.

25लज्जेचे आपण अंथरुण करू या आणि पांघरुणाने आपण शरीर झाकतो तशी लाज आपण पांघरु या. आम्ही आमच्या परमेश्वर देवाविरुद्ध जाऊन पाप केले. आम्ही आणि आमच्या वडिलांनी पाप केले. आम्ही लहान असल्यापासून परमेश्वर देवाच्या आज्ञा पाळल्या नाहीत."

4 हा परमेश्वराचा संदेश आहे "इस्राएल तुला परत यायचे असेल तर माझ्याकडे परत ये. तुझ्या मूर्ती फेकून दे. माझ्यापासून दूर जाऊन भटकू नकोस.

2तू ह्या गोष्टी केल्यास, तर तू शपथ घेण्यासाठी माझे नाव वापरू शकशील. 'परमेश्वर असेतो पर्यंत,' असे तू म्हणू शकशील. तू हे शब्द खऱ्या, प्रमाणिक आणि योग्य, तऱ्हेने वापरू शकशील. तू ह्या गोष्टी केल्यास परमेश्वर राष्ट्रांना आशीर्वाद देईल. ती राष्ट्रे परमेश्वराने केलेल्या कृत्यांबद्दल बढाया मारतील."

3परमेश्वर यहूदा व यरुशलेम मधील लोकांना म्हणतो:

"तुमची शेते नांगरलेली नाहीत. ती शेते नांगरा. काट्यात बी पेरू नका.

4परमेश्वराची माणसे व्हा. तुमची हृदये बदला* यहुदातील आणि यरुशलेममधील लोकांनो तुम्ही बदलला नाहीत, तर मी खूप रागावेन. माझा राग आगीप्रमाणे वेगाने पसरून तुम्हाला जाळून टाकील. असे का घडेल? तुम्ही केलेल्या दुष्कृत्यांमुळे असे घडेल."

## उत्तरेकडून येणारे अरिष्ट

5"यहूदाच्या लोकांना हा संदेश द्या.यरुशलेममधील प्रत्येकाला सांगा:

'सर्व देशभर रणशिंगे फुंका, मोठ्याने ओरडून सांगा,"एकत्र या. सुरक्षिततेसाठी आपण सर्व मजबूत शहराकडे जाऊ या.'

6खुणेचे ध्वज सियोनच्या दिशेने दाखवा. जीव वाचविण्यासाठी पळा. वाट पाहू नका. कारण मी उत्तरेकडून अरिष्ट आणीत आहे. मी भयानक विध्वंस घडवून आणीत आहे."

7"सिंह त्याच्या गुहेतून बाहेर आला आहे. राष्ट्रांचा नाश करणाऱ्याने कूच करायला सुरवात केली आहे. तुमच्या देशाचा नाश करण्यासाठी त्याने त्याचे घर सोडले आहे. तुमच्या शहरांचा नाश होईल. तेथे कोणीही शिल्लक राहणार नाही.

8म्हणून शोकवस्त्रे घाला आणि मोठ्याने आक्रोश करा. का? कारण परमेश्वर आमच्यावर रागावला आहे."

9परमेश्वर म्हणतो, "हे घडत असताना, राजा आणि त्याचे अधिकारी यांचा धीर सुटेल, याजक घाबरतील, संदेष्ट्यांना धक्का बसेल."

10नंतर, मी, यिर्मया, म्हणालो, "परमेश्वरा, माझ्या प्रभू तू यहुदातील आणि यरुशलेममधील लोकांना खरोखरच युक्तीने फसविलेस. 'तू त्यांना म्हणालास की तुम्हाला शांती मिळेल.' पण आता, तू तलवारीचे पातेच त्यांच्या नरड्याला लावीत आहेस."

11त्या वेळेला यहुदा व यरुशलेम येथील लोकांना एक संदेश दिला जाईल. "उजाड टेकड्यावरून गरम वारा वाहतो. तो वाळवंटातून माझ्या लोकांकडे वाहत येतो. फोलकटापासून धान्य वेगळे करण्याकरिता शेतकरी ज्या वाऱ्याचा उपयोग करतात, तसा हा सौम्य वारा नाही."

12हा वारा त्यापेक्षा जोराचा आहे आणि तो माझ्याकडून येतो आता, मी यहुदाच्या लोकांविरुद्ध माझा निकाल जाहीर करीन."

13पाहा! शत्रू ढगाप्रमाणे वर येतो. त्याचे रथ वावटळीप्रमाणे दिसतात, त्यांचे घोडे गरुडांपेक्षा वेगवान आहेत. हे सर्व आपल्या दृष्टीने अतिशय वाईट आहे. आपला विध्वंस झाला!

14यरुशलेममधील लोकांनो, तुमच्या मनातील पाप धुवून टाका. तुमची मने शुद्ध करा. मग तुम्ही वाचविले जाऊ शकता. दुष्ट बेत करीत बसू नका.

15ऐका! दान प्रांतातून दूताचा आवाज येत आहे. एफ्राईम ह्या टेकड्यांच्या देशातून हा माणूस वाईट बातमी आणीत आहे.

16"ही बातमी ह्या देशाला कथन करा. यरुशलेमच्या लोकांत ही बातमी पसरवा दुरवरच्या देशांतून शत्रू येत आहेत. यहुदाच्या विरुद्ध ते युद्धाची घोषणा करीत आहेत.

17शेताचे रक्षण करण्यासाठी लोक शेताभोवती कडे करतात तसा शत्रूने यरुशलेमला वेढा घातला आहे. यहूदा, तू माझ्याविरुद्ध गेलीस. म्हणून शत्रू तुझ्याविरुद्ध चढाई करण्यास येत आहे." हा परमेश्वराचा संदेश आहे.

18"तू ज्या तऱ्हेने राहिलीस आणि जी कर्मे केलीस. त्यामुळे हे संकट तुझ्यावर आले. तुझ्या पापाने तुझे जीवन कठीण केले. तुझ्या पापी जीवनामुळे, तुझ्या अंत:करणाला खोल जखमा होऊन वेदना झाल्या."

---

**तुमची ... बदला** सुंता करून देवाचे व्हा तुमच्या हृदयावरील कातडे कापून टाका. पुरुष आपल्या जननेंद्रियावरील कातडे कापून टाकून आपण देवाचे आहोत असे दाखवीत. येथे यिर्मया म्हणतो की खरे म्हणजे सुंता ही माणसाच्या हृदयाची (मनाची) झाली पाहिजे.

### यिर्मयाचा आक्रोश

19 अरे रे! दु:खाने आणि काळजीने माझ्या पोटात खड्डा पडत आहे. मी वेदनेने वाकत आहे. मी खरच खूप घाबरलो आहे. माझ्या हृदयात धडधडत आहे. मी गप्प बसू शकत नाही का? मी रणशिंग फुंकलेले ऐकले आहे. रणशिंग सैनिकांना युद्धासाठी बोलावीत आहे.

20 अरिष्टामागून अरिष्ट येते. संपूर्ण देशाचा नाश झाला. अचानक माझ्या तंबूचा नाश झाला. कनाती फाडल्या गेल्या.

21 परमेश्वरा, युद्धाची निशाणी मला किती काळ पाहिली पाहिजे? किती वेळ मी रणशिंग ऐकले पाहिजे?

22 देव म्हणतो, "माझे लोक मूर्ख आहेत. ते मला ओळखत नाहीत. ती मूर्ख मुले आहेत त्यांना समजत नाही. दुष्कृत्ये करण्यात ते पटाईत आहेत पण सत्कृत्ये कशी करावी त्यांना माहीत नाही."

### अरिष्ट येत आहे

23 मी पृथ्वीकडे पाहिले. पृथ्वी उजाड आणि अस्ताव्यस्त होती. पृथ्वीवर काहीही नव्हते. मी आकाशाकडे पाहिलेत्याचा प्रकाश गेला होता.*

24 मी डोंगराकडे पाहिले ते कापत होते. सर्व टेकड्या थरथरत होत्या.

25 मी पाहिले पण कोठेही माणसे नव्हती. आकाशातील सर्व पक्षी दूर उडून गेले होते.

26 मी पाहिले आणि सुपीक जमिनीचे वाळवंट झाले. त्या भूमीवरील सर्व शहरांचा नाश झाला. परमेश्वराने हे घडविले परमेश्वराने आणि त्याच्या क्रोधाने हे घडवून आणले.

27 परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो: "संपूर्ण देशाचा नाश होईल.(पण मी देशाचा संपूर्ण नाश करणार नाही.)

28 म्हणून देशातील लोक मृतांसाठी शोक करतील. आकाश काळे होईल. मी बोललो आहे ते बदलणार नाही. मी निर्णय घेतला आहे आणि मी बदलणार नाही."

29 यहुदातील लोक घोडेस्वारांचा व धनुर्धरांचा आवाज ऐकतील आणि ते पळून जातील. काही लोक गुहांतून लपतील काही झुडुपांत लपतील. काही डोंगरकड्यावर चढतील. यहुदातील सर्व शहरे ओस पडतील. तेथे कोणीही राहणार नाही.

30 यहूदा, तुझा नाश होत आला आहे. मग आता तू काय करीत आहेस? तुझा उत्तम लाल पोशाख तू का घालीत आहेस? तुझे सोन्याचे दागिने तू का घालीत आहेस? तू डोळ्यांचा साजशृंगार का करीत आहेस? तू स्वत:ला सुंदर बनवितेस पण हे वेळेचा अपव्यय करणे आहे. तुझे प्रियकर तुझा तिरस्कार करतात. ते तुला ठार मारण्याचा प्रयत्न करीत आहेत.

31 स्त्री प्रसूतिवेदना होताना ओरडते, तसा आवाज मी ऐकतो. पहिल्या बाळंतपणाच्या वेळेला स्त्री ज्याप्रमाणे किंकाळी फोडते, तशीच ती किंकाळी आहे. हा सियोनकन्येचा आवाज आहे. ती प्रार्थनेसाठी हात जोडत आहे. ती म्हणत आहे, "हे देवा, मी चक्कर येऊन पडण्याच्या बेतात आहे. खुन्यांनी मला घेरले आहे!"

### यहुदाच्या लोकांचे पाप

5 परमेश्वर म्हणतो, "यरुशलेमच्या रस्त्यावरून चाला. सभोवती पाहा आणि या गोष्टींचा विचार करा. नगरातील चव्हाटे शोधा. जो सत्याचा शोध घेतो, जो सच्चेपणाने वागतो असा एखादा सज्जन माणूस सापडू शकतो का ते पाहा. जर तुम्हाला एक तरी सज्जन व सत्यशील माणूस सापडला तरी मी यरुशलेमला क्षमा करीन. 2 लोक शपथ घेतात आणि म्हणतात, 'परमेश्वर असेपर्यंत.' पण ते काही त्यांच्या मनात नसते."

3 हे परमेश्वरा, मला माहीत आहे की तुझ्या लोकांनी तुझ्याशी एकनिष्ठपणे वागायला हवे आहे. तू यहूदातील लोकांना चोपलेस पण त्यांना काही वेदना झाल्या नाहीत. तू त्यांचा नाश केलास, पण त्यांनी धडा शिकण्यास नकार दिला. ते फार दुराग्रही झालेत. त्यांनी केलेल्या वाईट कृत्यांबद्दल त्यांना खेद वाटला नाही.

4 पण मी (यिर्मया) मनाशी म्हणालो, "गरीब लोकच एवढे मूर्ख असले पाहिजेत. परमेश्वराच्या चालीरिती ते शिकलेले नाहीत. त्यांना, त्यांच्या देवाची शिकवण माहीत नाही.

5 म्हणून मी यहुदाच्या नेत्यांकडे जाऊन त्यांच्याशी बोलेन. नेत्यांना परमेश्वराच्या चालीरिती नक्कीच माहीत असतात. त्यांना त्यांच्या देवाचे नियम माहीत असतात. ह्याची मला खात्री आहे!" पण परमेश्वराच्या सेवेतून मुक्त होण्यासाठी सर्व नेते एकत्र जमले होते.

6 ते देवाच्या विरुद्ध गेले म्हणून जंगलातील सिंह त्यांच्यावर हल्ला करील. जंगलातील लांडगा त्यांना ठार मारील. चित्ता त्यांच्या शहराजवळ लपला आहे. शहरातून बाहेर येणाऱ्या प्रत्येकाचे तो तुकडे तुकडे करील. यहूदातील लोकांनी पुन्हा पुन्हा पापे केल्याने हे घडून येईल. ते, अनेक वेळा, देवापासून दूर भटकत गेले आहेत.

7 देव म्हणाला, "यहूदा, मी तुला क्षमा करावी म्हणून तू मला एक तरी सबळ कारण सांग. तुझ्या मुलांनी माझा त्याग केला. त्यांनी मूर्तीपुढे शपथा वाहिल्या. पण त्या मूर्ती म्हणजे खरे देव नव्हेत. तुझ्या मुलांना पाहिजे ते सर्व मी दिले. पण तरी त्यांनी माझा विश्वासघात केला. त्यांनी आपला बराच वेळ वारांगनेबरोबर घालविला.

---

**पृथ्वी ... गेला होता** माणूस पृथ्वीवर येण्या आधीच्या स्थितीची तुलना यिर्मया आपल्या देशाशी करीत आहे. उत्पत्ति 1:9 पाहावे.

[8]ते लोक, भरपूर खाद्य खाणाऱ्या व समागमाला तयार
असणाऱ्या घोड्यांप्रमाणे आहेत. शेजाऱ्याच्या बायकोला
वासनेने हाका मारणाऱ्या घोड्यांप्रमाणे ते आहेत.
[9]ह्या कर्मांबद्दल मी यहूदातील लोकांना शिक्षा करावी
का?"हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. "हो! अशा
रीतीने जीवन जगणाऱ्या राष्ट्राला मी शिक्षा करीनच, हे
तू जाणतेस. त्यांच्या लायकीप्रमाणे मी त्यांना शिक्षा करीन.
[10]"यहूदाच्या द्राक्षवेलींच्या रांगांतून जा. वेली तोडून टाका
(पण त्यांचा संपूर्ण नाश करू नका) त्यांच्या फांद्या तोडा.
का? ह्या फांद्या परमेश्वराच्या मालकीच्या नाहीत.
[11]यहूदा व इस्राएल येथील घराणी, प्रत्येक बाबतीत,
माझा विश्वासघात करीत आली आहेत." हा परमेश्वराचा
संदेश आहे.
[12]"हे लोक परमेश्वराबद्दल खोटे बोलले. ते म्हणाले
आहेत, 'परमेश्वर आम्हाला काही करणार नाही. आमचे
काही वाईट होणार नाही. आमच्यावर हल्ला झालेला
आम्ही कधी पाहणार नाही. आम्ही कधी उपाशी राहणार
नाही.'
[13]"खोटे संदेष्टे पोकळ वाऱ्या प्रमाणे आहेत. देवाचे
शब्द त्यांच्याजवळ नाहीत* त्यांचे वाईट होईल."
[14]सर्वशक्तिमान परमेश्वराने पुढील गोष्टी
सांगितल्या."मी त्यांना शिक्षा करणार नाही असे ते लोक
म्हणाले म्हणून, यिर्मया, मी जे शब्द तुला देतो, ते आगीप्रमाणे
असतील, ते लोक लाकडाप्रमाणे असतील, ती आग त्यांना
पूर्णपणे जाळून टाकील."
[15]इस्राएलच्या वारसांनो हा परमेश्वराचा संदेश आहे.
"दूरवरच्या राष्ट्राला मी, तुमच्यावर हल्ला करण्यासाठी
लवकरच आणीन. ते शक्तिशाली राष्ट्र आहे. ते प्राचीन
राष्ट्र आहे. त्या राष्ट्रांतील लोक तुम्हाला माहीत नसणारी
भाषा बोलतात. ते काय बोलतात ते तुम्ही समजू शकणार
नाही.
[16]त्यांचे भाते उघड्या थडग्यांप्रमाणे आहेत. त्यांची सर्व
माणसे शक्तिशाली सैनिक आहेत.
[17]तुम्ही गोळा केलेले सर्व धान्य ते खातील. ते
तुमचे सर्व अन्न खाऊन टाकतील. ते तुमच्या
मुलामुलींना खाऊन टाकतील (त्यांचा नाश करतील)
ते तुमची गुरे, शेळ्या, मेंढ्या खातील. ते तुमची द्राक्षे
आणि अंजिरे फस्त करतील. त्यांच्या तलवारीच्या
जोरावर ते तुमच्या मजबूत शहरांचा नाश करतील. तुम्ही
ज्या शहरांवर विसंबता ती भक्कम शहरे ते नष्ट
करतील."
[18]"पण जेव्हा ते भयानक दिवस येतील. हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे, तेव्हा, यहूदा, मी
तुझा संपूर्ण नाश करणार नाही.
[19]यहूदाचे लोक तुला विचारतील, 'यिर्मया, आमच्या
परमेश्वर देवाने आमचे असे वाईट का केले?' त्यांना
पुढील उत्तर दे, 'यहूदाच्या लोकांनो, तुम्ही परमेश्वराला
सोडले आणि तुमच्या देशात तुम्ही परक्या मूर्तींची सेवा
केली. तुम्ही असे वागलात म्हणून आता तुम्ही परक्या
देशात परक्यांचीच सेवा कराल."
[20]परमेश्वर म्हणाला, "याकोबच्या वंशजांना आणि
यहूदातील राष्ट्रांना हा संदेश द्या.
[21]ऐका! 'तुम्हा मूर्खांना अक्कल नाही. तुम्हाला डोळे
असून दिसत नाही कान असून ऐकू येत नाही.
[22]खरोखर तुम्हाला माझी भिती वाटते.'"हा परमेश्वराचा
संदेश आहे.
"माझ्यापुढे तुम्ही भीतीने थरथर कापावे. समुद्राला सीमा
असावी म्हणून समुद्रकिनारे निर्माण करणारा मी एकमेव
आहे. पाणी अखंड जागच्या जागी राहावे म्हणून मी असे
केले. लाटा कधी किनाऱ्यावर आक्रमण करतात. पण
त्या किनाऱ्याचा नाश करीत नाहीत. लाटा गर्जना करीत
कधी कधी आत येतात, पण त्या किनाऱ्याच्या बाहेर
जाऊ शकत नाहीत.
[23]पण यहूदाचे लोक दुराग्रही आहेत. ते नेहमीच
माझ्याविरुद्ध जाण्यासाठी मार्ग आखत असतात. ते
माझ्यापासून दूर गेले आणि त्यांनी माझा त्याग केला.
[24]यहूदातील लोक आपल्या मनाशी असे कधीही म्हणत
नाहीत'आपण आपल्या परमेश्वर देवाला घाबरू या आणि
त्याचा मान राखू या. योग्य वेळेला तो आपल्याला आगोटीचा
व वळवाचा पाऊस देतो. योग्य वेळी आपल्याला कापणी
करता येईल, ह्याची तो खात्री करून घेतो.'
[25]यहूदातील लोकांनो, तुम्ही पाप केलेत म्हणूनच
पावसाळा व सुगीचा हंगाम आला नाही.तुमच्या पापांनी
परमेश्वराकडून मिळणाऱ्या ह्या चांगल्या गोष्टींचा आनंद
तुमच्यापासून हिरावून घेतला आहे.
[26]माझ्या माणसांत काही दुष्ट आहेत. ते
फासेपारध्यांप्रमाणे आहेत. हे लोक जाळे पसरवितात, पण
पक्ष्यांना पकडण्या ऐवजी ते माणसांना पकडतात.
[27]पक्ष्यांनी पिंजरे भरावेत तशी ह्या दुष्टांची घरे कपटांनी
भरलेली असतात. त्यांच्या कपटांनी त्यांना श्रीमंत व
शक्तिशाली बनविले.
[28]त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांमुळे ते पुष्ट व लठ्ठ झाले
आहेत. त्यांच्या दुष्कृत्यांना अंत नाही. ते अनाथांच्या वतीने
बोलणार नाहीत. ते त्यांना मदत करणार नाहीत. ते गरीब
लोकांना योग्य न्याय मिळवून देणार नाहीत.
[29]त्यांनी केलेल्या ह्या कर्मांबद्दल मी त्यांना शिक्षा करावी
का?"हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
"अशा राष्ट्राला मी शिक्षा करणार हे तुम्हाला माहीत
आहे. त्यांना योग्य ती शिक्षा मी करीन."
[30]परमेश्वर म्हणतो, "यहूदात भयानक व धक्कादायक
गोष्ट घडली आहे.

---

**देवाचे ... त्यांच्याजवळ नाही** देवाने सांगितलेले त्यांच्या मनात उतरले नाही वा त्यांच्यात उतरले नाही.

31संदेष्टे खोटे सांगतात, जे काम करण्यासाठी याजकांची निवड केली आहे, ते काम ते करणार नाहीत. आणि माझ्या लोकांना हे आवडते! पण तुमची शिक्षा जवळ आल्यावर तुम्ही काय कराल?"

## यरुशलेमला शत्रूचा घेराव

6 बन्यामीनच्या लोकांनो, जीव वाचविण्यासाठी पळा. यरुशलेमपासून दूर पळा. तकोवामध्ये तुतारी फुंका. बेथ-हक्क रेमवर धोक्याचा इशारा देणारे निशाण उभारा. हे सर्व करा कारण उत्तरेकडून अरिष्ट येत आहे. भयानक नाश तुमच्याकडे येत आहे.

2सियोनच्या कन्ये, तू सुंदर कुरणासारखी आहेस.

3मेंढपाळ आपापले कळप घेऊन यरुशलेमला येतात. ते तिच्या सर्व बाजूंना तंबू ठोकतात. प्रत्येक मेंढपाळ स्वत:च्या कळपाची काळजी घेतो.

4"यरुशलेमविरुद्ध लढण्यास तयार व्हा. उठा! आपण दुपारी नगरावर हल्ला करू पण आधीच उशीर होत आहे. संध्याछाया लांबत आहेत.

5म्हणून उठा! आपण रात्रीच तिच्यावर हल्लाकरू या व यरुशलेमच्या भक्क म तटबंदीचा नाश करू या."

6सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो, "यरुशलेमच्या भोवतालची झाडे कापा आणि तिच्याविरुद्ध मोर्चा बांधा. ह्या नगरीला शिक्षा व्हावीच ह्या नगरीच्या आत जुलुमाशिवाय काहीही नाही.

7जशी विहीर आपले पाणी ताजे ठेवते, तशीच यरुशलेम आपला दुष्टपणा ताजा ठेवते. मी नेहमीच येथील लूटमार व हिंसाचार याबद्दल ऐकतो. मी येथे सदोदित पीडा आणी घृणा पाहतो.

8यरुशलेम, धोक्याचा इशारा ऐक. जर तू ऐकले नाहीस तर मी तुझ्याकडे पाठ फिरवीन, तुझ्या भूमीचे ओसाड वाळवंट करीन. तेथे कोणीही राहू शकणार नाही."

9सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो "इस्राएलमध्ये मागे उरलेल्या इस्राएली लोकांना गोळा करा. द्राक्षवेलींवरची उरलेली द्राक्षे तुम्ही जशी गोळा करता, तसे त्यांना गोळा करा."द्राक्ष गोळा करणारा जसा प्रत्येक वेल तपासतो, तशी तुम्ही प्रत्येकाची तपासणी करा."

10मी कोणाशी बोलू शकतो?मी कोणाला इशारा देऊ शकतो?माझे कोण ऐकेल? इस्राएलच्या लोकांनी आपले कान बंद करून घेतले आहेत. म्हणून ते माझा इशारा ऐकू शकत नाहीत. लोकांना परमेश्वराची शिकवण आवडत नाही. त्यांना परमेश्वराचा संदेश ऐकावासा वाटत नाही.

11पण माझ्यात (यिर्मयात) परमेश्वराचा राग पूर्ण भरला आहे. "तो आतल्या आत दाबून धरण्याचा मला आता कंटाळा आला आहे. रस्त्यावर खेळणाऱ्या मुलांवर, एकत्र जमलेल्या तरुणांवर परमेश्वराचा राग ओत. पुरुष व त्याची बायको असे दोघेही, तसेच सर्व म्हातारे पकडले जातील.

12त्यांची घरे दुसऱ्यांना दिली जातील. त्यांची शेते व त्यांच्या बायका दुसऱ्यांना दिल्या जातील. मी माझा हात उगारीन आणि यहूदातील लोकांना शिक्षा करीन." हा परमेश्वराचा संदेश होता.

13"इस्राएलमधल्या सर्व लोकांना जास्तीच जास्त पैसा पाहिजे. अति महत्वाचे व अति सामान्य, सर्व सारखेच आहेत. संदेष्ट्यांपासून याजकापर्यंत सर्व खोटे बोलतात.

14माझे लोक अतिशय वाईटरीतीने दुखवले जात आले आहेत. संदेष्ट्यांनी आणि याजकांनी त्यांच्या जखमा बांधाव्यात. पण ते तर त्या जखमावर, किरकोळ खरचटल्यावर करतात त्याप्रमाणे इलाज करतात. ते म्हणतात, 'ठीक आहे, ठीक आहे'पण हे ठीक नाही.*

15संदेष्ट्यांना आणि याजकांना त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल लाज वाटली पाहिजे. पण त्यांना अजिबात लाज वाटत नाही. आपल्या दुष्कृत्यांची शरम वाटण्याएवढीही त्यांना जाणीव नाही. म्हणून बाकीच्यांबरोबर त्यांना शिक्षा होईल. मी जेव्हा लोकांना शिक्षा करीन तेव्हा हे सर्वजण जमिनीवर फेकले जातील." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

16परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो:"चौकात उभे राहा आणि पाहा. जुना रस्ता कोणता ते विचारा. चांगल्या रस्त्याची चौकशी करा व चांगल्या रस्त्यावरून चाला. तुम्ही असे केल्यास तुमचा तुम्हाला विश्वास सापडेल. पण तुम्ही लोक म्हणाला, 'आहात की आम्ही चांगल्या रस्त्यावरून चालणार नाही.'

17तुमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी मी रखवालदार निवडले. मी त्यांना सांगितले, 'रणशिंगाचा आवाज ऐका.' पण ते म्हणाले, 'आम्ही ऐकणार नाही.'

18तेव्हा सर्व राष्ट्रांनो, ऐका! त्या देशातील लोकांनो, लक्ष द्या.

19पृथ्वीवरच्या लोकांनो, ऐका! यहुदातील लोकांवर मी अरिष्ट आणणार आहे. का? कारण त्यांनी हेतूपूर्वक दुष्कृत्ये केली. माझ्या संदेशाकडे दुर्लक्ष केले, माझ्या आज्ञांचे पालन करण्याचे नाकारले."

20परमेश्वर म्हणतो, "तुम्ही शेबाहून माझ्यासाठी धूप कशाला आणता? दूरवरच्या देशातून सुगंधी काड्या कशाला आणता? तुम्ही आणलेल्या ह्या अग्नीत अर्पण करण्याच्या गोष्टी मला आनंदित करीत नाहीत. तुमचे यज्ञ मला संतुष्ट करीत नाहीत."

21मग परमेश्वर पुढे असे म्हणतो:"मी यहूदाच्या लोकांपुढे अडचणी निर्माण करीन. त्या वाटेत असलेल्या दगडाप्रमाणे असतील. वाटेतल्या दगडाला अडखळून लोक पडतात, त्याप्रमाणे वडील व मुले अडखळून पडतील. मित्र आणि शेजारी मरतील."

---

**ठीक आहे ... नाही** ह्याचा अर्थ शांतता नसताना ते शांततेची आश्वासने देतात.

22परमेश्वर पुढे असे म्हणतो:“उत्तरेकडून सैन्य येत
आहे. पृथ्वीवरच्या अतीदूरच्या ठिकाणाहून मोठे राष्ट्र
येत आहे.
23त्या सैनिकांजवळ धनुष्यबाण आहेत. ते क्रूर आहेत.
त्यांना दया माहीत नाही. ते खूप शक्तिशाली आहेत. ते
घोड्यावर स्वार होऊन येतात, तेव्हा समुद्राच्या गर्जनेसारखा
आवाज येतो. ते युद्धाच्या तयारीने येत आहेत. सियोनच्या
कन्ये, ते सैन्य तुझ्यावर हल्ला करण्यासाठी येत आहे.
24त्या सैन्याची बातमी आम्ही ऐकली आहे. आम्ही
भीतीने गर्भगळीत झालो आहोत. आम्ही अडचणीत सापडलो
आहोत असे वाटते. प्रसूती होणाऱ्या स्त्रीप्रमाणे आमची
स्थिती झाली आहे.
25बाहेर शेतात जाऊ नका. रस्त्यावर जाऊ नका. का?
कारण शत्रूजवळ तलवारी आहेत आणि सगळीकडे धोका
आहे.
26माझ्या लोकांनो, शोकवस्त्रे घाला. राखेत लोळा.
मृतांसाठी आक्रोश करा. एकुलता एक मुलगा गेल्याप्रमाणे
आकांत करा. कारण नाश करणारा अगदी लवकरच
आपल्याकडे येईल.
27“यिर्मया, मी (देवाने) तुला धातू पारखणाऱ्याप्रमाणे
केले आहे. तू माझ्या लोकांची परीक्षा कर आणि ते कसे
जगतात त्यावर नजर ठेव.
28माझे लोक माझ्याविरुद्ध गेले आहेत आणि ते दुराग्रही
आहेत. ते लोकांबद्दल खोट्या गोष्टी बोलतात. ते सर्व दुष्ट
आहेत. ते गंजलेल्या व कलंकित झालेल्या जस्त वा
लोखंडाप्रमाणे आहेत.
29चांदी शुद्ध करणाऱ्या कारागिराप्रमाणे ते आहेत.
फुंकणीने जोरात फुंकताच विस्तवाचा जाळ झाला आणि
त्यातून शिसे बाहेर आले.* चांदी शुध्द करण्याच्या प्रयत्नात
त्या कारागिराने आपला वेळ वाया घालविला. त्याचप्रमाणे
माझ्या लोकांमधून दुष्टपणा काढला गेला नाही.
30माझ्या लोकांना, ‘टाकाऊ चांदी’ असे म्हटले जाईल.
देवाने त्यांचा स्वीकार केला नाही म्हणून त्यांना हे नाव
दिले जाईल.”

## यिर्मयाचे मंदिरातील प्रवचन

7 यिर्मयासाठी परमेश्वराचा संदेश: 2यिर्मया,
परमेश्वराच्या घराच्या दाराजवळ उभा राहा आणि
हा उपदेश कर:
“यहूदातील सर्व लोकांनो, परमेश्वराचा संदेश ऐका.
देवाची पूजा करण्यासाठी आत येणाऱ्या सर्व लोकांनो,
ऐका! 3परमेश्वर हा इस्राएलच्या लोकांचा देव आहे.
सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो ‘तुमची जगण्याची
पद्धत बदला आणि सत्कृत्ये करा. तुम्ही असे केल्यास मी
तुम्हाला या ठिकाणी राहू देईन.* 4काही लोक खोटे
बोलतात त्यावर विश्वास ठेवू नका. ते म्हणतात “हे
परमेश्वराचे मंदिर आहे. परमेश्वराचे मंदिर, परमेश्वराचे
मंदिर.” 5तुम्ही तुमचा जीवनमार्ग बदललात आणि सत्कृत्ये
केलीत तर मी तुम्हाला येथे राहू देईन. तुम्ही एकमेकांशी
प्रामाणिक असले पाहिजे. 6तुम्ही अपरिचिताशीसुध्दा
प्रामाणिकपणे वागले पाहिजे. विधवांसाठी आणि
अनाथांसाठी तुम्ही योग्य गोष्टी केल्या पाहिजेत.
निरपराध्यांना मारू नका. दुसऱ्या देवांना अनुसरू नका.
का? कारण ह्या गोष्टी तुमच्या आयुष्याचा नाश करतील.
7तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्यात, तर मी तुम्हाला येथे राहू
देईन. मी ही भूमी कायमची तुमच्या पूर्वजांना दिली.
8‘पण तुम्ही ज्या लबाड्यांवर विश्वास ठेवत आहात,
त्या लबाड्या कवडीमोलाच्या आहेत. . 9तुम्ही चोरी आणि
खून कराल का? तुम्ही व्यभिचाराचे पाप कराल का?
तुम्ही दुसऱ्यांवर खोटे आरोप कराल का? तुम्ही बआल
देवाची पूजा कराल का? तुम्हाला माहीत नसणाऱ्या इतर
दैवतांना अनुसराल का? 10तुम्ही ही अशी पापे केलीत
तर तुम्ही माझ्या नावाच्या या घरात माझ्यासमोर उभे राहू
शकाल असे तुम्हाला वाटते का? अशा भयंकर गोष्टी
करून तुम्ही माझ्यासमोर उभे राहून म्हणू शकाल का
“आम्ही सुरक्षित आहोत?” 11हे मंदिर माझ्या नावाचे आहे.
तुमच्या दृष्टीने हे मंदिर म्हणजे दुसरे काही नसून लुटारूनी
लपण्याची जागा आहे का? मी तुमच्यावर नजर ठेवून
आहे.’” हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
12“यहूदातील लोकांनो, आता तुम्ही शीलो गावात जा.
माझ्या नावाचे पहिले घर मी जेथे बांधले, तेथे जा.
इस्राएलमधील लोकांनीसुध्दा दुष्कृत्ये केली. त्याबद्दल मी
काय केले, ते जाऊन पाहा.* 13इस्राएलच्या लोकांनो,
तुम्ही ही सर्व दुष्कृत्ये करीत होता.” हा परमेश्वराचा
संदेश आहे.! ‘मी पुन्हा पुन्हा तुमच्याशी बोललो, पण तुम्ही
माझे ऐकण्यास नकार दिला. मी तुम्हाला बोलाविले, पण
तुम्ही ओ दिली नाही. 14म्हणून, ज्यावर तुम्ही विश्वास
ठेवता व जे मी तुम्हाला व तुमच्या पूर्वजांना दिले ते
यरुशलेममधील माझ्या नावाचे घर मी नष्ट करीन.
शिलोतील मंदिराप्रमाणे मी ह्या मंदिराचा नाश करीन.
15एफ्राईममधील तुमच्या भावांना मी माझ्यापासून जसे दूर
फेकले, तसे मी तुम्हाला फेकीन.’
16“यिर्मया, तुला सांगतो, यहूदाच्या लोकांसाठी प्रार्थना
करू नकोस. त्यांच्यासाठी याचना व आळवणी करू नकोस.

---

**त्यातून … बाहेर आले** कामगार चांदीसारखे धातू शुद्ध करण्यासाठी ते वितळवीत. शिसे प्रथम वितळे. मग कामगार शिसे ओतून घेत. ह्यामुळे शुद्ध धातू बाजूला राही. येथे यिर्मया म्हणत आहे की सर्वच लोक वाईट आहेत.सर्व शिसासारखे आहेत चांदीसारखे कोणी नाही.

**मी … देईन** मी तुमच्याबरोबर राहीन.

**इस्राएलमधील … ते जाऊन पाहा** एली आणि शमुवेल ह्यांच्या काळी पलिष्ट्यांनी (पॅलेस्टाइनांनी) बहुधा शिलोचा नाश केला. 1 शमुवेल 4 पाहावे.

त्यांच्या मदतीकरिता मला विनवू नकोस. तू त्यांच्याकरिता
केलेली प्रार्थना मी ऐकणार नाही. 17ते लोक यहूदांच्या
गावांतून काय करीत आहेत, हे तू पाहतोस, हे मला
माहीत आहे. यरुशलेमच्या रस्त्यावर ते काय करीत आहेत
हे तुला दिसू शकते. 18यहूदातील लोक काय करीत
आहेत ते पाहा. मुले लाकडे गोळा करतात. वडील
त्याचा उपयोग सरपण म्हणून करतात. ते विस्तव
पेटवितात. बायका स्वर्गातील राणीला अर्पण करण्यासाठी
भाकर तयार करतात. यहूदातील हे लोक इतर दैवतांची
पूजा करताना दैवतांना अर्पण करण्यासाठी म्हणून पेय
ओततात. ते मला संताप आणण्यासाठी हे करतात. 19पण
यहूदातील लोक खरोखर ज्याला दुखवीत आहेत, तो मी
नाही." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. "ते फक्त
स्वत:ला दुखवीत आहेत. ते स्वत:लाच लज्जित करीत
आहेत."

20म्हणून परमेश्वर असे म्हणतो, "मी ह्या जागेवर माझा
राग काढीन. मी माणसांना, प्राण्यांना, रानातील झाडांना
आणि पिकांना शिक्षा करीन. माझा राग तप्त अग्नीप्रमाणे
असेल. कोणीही तो विझवू शकणार नाही."

## परमेश्वराला बळींपेक्षा आज्ञापालन हवे आहे

21सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, "जा
आणि तुम्हाला हवी तितकी होमार्पणे करा. तुम्हाला पाहिजे
तितके यज्ञ द्या. त्या यज्ञ दिलेल्या पशूंचे मांस तुम्हीच खा.
22मी तुमच्या पूर्वजांना मिसरमधून बाहेर आणले. मी
त्यांच्याशी बोललो. पण अर्पण करण्याच्या गोष्टींबद्दल व
बळींबद्दल मी त्यांना आज्ञा दिली नाही. 23मी त्यांना फक्त
पुढील आज्ञा दिली. 'माझी आज्ञा पाळा मग मी तुमचा देव
होईन व तुम्ही माझी माणसे व्हाल. मी आज्ञा करीन ते
करा म्हणजे तुमचे भले होईल.'

24"पण तुमच्या पूर्वजांनी माझे ऐकले नाही. त्यांनी
माझ्याकडे लक्ष दिले नाही. ते दुराग्रही होते आणि त्यांना
पाहिजे त्याच गोष्टी त्यांनी केल्या. ते सज्जन झाले नाहीत.
उलट जास्तच दुष्ट झाले. पुढे येण्याऐवजी ते मागे गेले.
25तुमच्या पूर्वजांनी मिसर सोडला त्या दिवसापासून
आजपावेतो मी माझे सेवक तुमच्याकडे पाठविले आहेत.
माझे सेवक संदेष्टे आहेत. मी पुन्हा पुन्हा त्यांना तुमच्याकडे
पाठविले. 26पण तुमच्या पूर्वजांनी माझे ऐकले नाही. त्यांनी
माझ्याकडे लक्ष दिले नाही. ते खूप दुराग्रही होते. त्यांनी
त्यांच्या वडिलांपेक्षा वाईट कृत्ये केली.

27"यिर्मया, यहूदाच्या लोकांना तू ह्या सर्व गोष्टी सांग
पण ते तुझे ऐकणार नाहीत. तू त्यांना बोलाविलेस तरी ते
तुला ओ देणार नाहीत. 28म्हणून तू त्यांना पुढील गोष्टी
सांगितल्या पाहिजेस. ह्या राष्ट्रांने परमेश्वराच्या म्हणजेच
त्यांच्या देवाच्या आज्ञा पाळल्या नाहीत. त्या राष्ट्रांतील
लोकांनी देवाची शिकवण ऐकली नाही. त्यांना खरी
शिकवण माहीत नाही.

## संहाराची दरी

29"यिर्मया, तुझे केस कापून दूर फेकून दे.* उजाड
डोंगरमाथ्यावर जा आणि रड. का? परमेश्वराने माणसांच्या
ह्या पिढीला नाकारले आहे. परमेश्वराने ह्या लोकांकडे
पाठ फिरविली आहे. रागाच्या भरात तो त्यांना शिक्षा
करील. 30हे असे कर कारण यहूदाच्या लोकांना पापे
करताना मी पाहिले आहे." हा परमेश्वराचा संदेश आहे.
"त्यांनी त्यांच्या मूर्ती स्थापन केल्या आहेत. मी त्या मूर्तींचा
तिरस्कार करतो. माझ्या नावाच्या मंदिरात त्यांनी त्या
मूर्ती स्थापिल्या आहेत. त्यांनी माझे घर 'अपवित्र'
केले आहे. 31यहूदाच्या लोकांनी बेन हिन्नोमच्या दरीत
तोफेतची उच्चस्थाने बांधली आहेत. त्या ठिकाणी लोक
स्वत:च्या मुलामुलींना ठार मारतात. आणि दैवताला अर्पण
करण्यासाठी म्हणून जाळतात. अशी आज्ञा मी कधीही
दिलेली नाही. असे काही माझ्या मनातही कधी आलेले
नाही. 32म्हणून मी तुम्हाला ताकीद देतो. असे दिवस येत
आहेत." हा परमेश्वराचा संदेश आहे, "लोक ह्या जागेला
पुन्हा कधीही तोफेत वा बेन हिन्नोमची दरी असे म्हणणार
नाहीत, तर तिला ते संहाराची दरी म्हणतील. असे नाव
देण्याचे कारण हेच की आणखी एका मृतालाही पुरण्यास
जागा राहणार नाही इतकी वेळ येईपर्यंत ते तोफेतमध्ये
मृतांना पुरतील. 33मग बाकी मृत शरीरे उघडीच जमिनीवर
पडतील आणि गिधाडांचे भक्ष्य होतील. वन्य पशू ती शरीरे
खातील. त्या गिधाडांना अथवा वन्य पशूंना हाकलायला
तेथे कोणीही जिवंत राहणार नाही. 34यहूदाच्या गावांतील
व यरुशलेमच्या रस्त्यांवरील उल्हासाच्या व आनंदाच्या
कल्लोळांचा मी शेवट करीन. यहूदात किंवा यरुशलेममध्ये
पुन्हा कधीही वधू वरांचा शब्द उमटणार नाही. ती भूमी
ओसाड वाळवंट होईल."

8 1–2हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे: "त्या
वेळी, लोक यहूदाच्या राजाची प्रमुख नेत्यांची,
याजकांची, संदेष्ट्यांची आणि यरुशलेममधील सर्व लोकांची
हाडे कबरीतून बाहेर काढतील. ते ती हाडे चंद्र सूर्य तारे
यांच्या खाली जमिनीवर पसरतील. यरुशलेमच्या लोकांना
चंद्र सूर्य तारे यांच्यावर प्रेम करायला, त्यांना अनुसरायला,
त्यांचा सल्ला घ्यायला आणि त्यांची पूजा करायला आवडते.
कोणीही ती हाडे गोळा करून परत पुरणार नाही. ती हाडे
जमिनीवर पसरलेल्या शेणखतासारखी असतील.

3"मी यहूदातील लोकांना सक्तीने त्यांची घरे व त्यांचा
देश सोडायला लावीन. लोकांना परक्या प्रदेशात नेले
जाईल. यहूदातील जे दुष्टलोक युध्दात मारले गेले नाहीत,
त्यांना आपण मारले गेलो असतो तर बरे झाले असते
असे वाटेल." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

---

**यिर्मया ... फेकून दे** केस कापण्याचा अर्थ शोक व्यक्त करणे असा होता. यिर्मया, राष्ट्रांच्या भयंकर स्थितीलबद्दल राष्ट्राला उद्देशून बोलत आहे.

## पाप आणि शिक्षा

4 यिर्मया, यहूदाच्या लोकांना हे सांग:
परमेश्वर असे म्हणतो:“माणूस जमिनीवर पडल्यास पुन्हा
उठतो व जर माणूस चुकीच्या मार्गाने गेला तर फिरून
मागे येतो, हे तुम्हाला माहीत आहे.
5 यहूदाचे लोक चुकीच्या मार्गाने गेले (जगले) पण
यरुशलेममधील लोक चुकीच्या मार्गाने सतत का जात
आहेत?ते त्यांच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवतात. ते
वळून परत येण्याचे नाकारतात.
6 मी त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकले आहे. ते योग्य ते
बोलत नाहीत. त्यांना त्यांच्या पापाबद्दल पश्चाताप वाटत
नाही. त्यांनी केलेल्या वाईट कर्मांचा ते विचार करीत
नाहीत. विचार केल्याशिवाय ते गोष्टी करतात. युद्धात
दौडणाऱ्या घोड्यांसारखे ते आहेत.
7 आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांनासुद्धा वेळेची योग्य जाणीव
असते. करकोचे, पारवे, निळवी व सारस ह्यांना नवीन
घरट्यात केव्हा जायचे ते समजते. पण माझ्या लोकांना,
देवाला त्यांच्याकडून काय हवे आहे ते कळत नाही.
8 “‘आमच्याजवळ परमेश्वराची शिकवण आहे म्हणून
आम्ही शहाणे आहोत!’असे तुम्ही म्हणत राहता.पण ते
खरे नाही. का? कारण लेखक लेखण्यांच्या साहाय्याने
खोटे बोलले आहेत.
9 त्या ‘शहाण्या लोकांनी’ परमेश्वराची शिकवण
ऐकण्याचे नाकारले. म्हणूनच ते अजिबात खरे शहाणे
नाहीत. ते ‘शहाणे लोक’ सापळ्यात सापडले गेले. त्यांना
धक्का बसला. त्यांची अप्रतिष्ठा झाली.
10 म्हणून मी त्यांच्या बायका दुसऱ्यांना देईन. त्यांची
शेते नव्या मालकांना देईन. इस्राएलमधल्या सर्व लोकांना
जास्तीच जास्त पैसा पाहिजे. अती महत्वाचे व अति सामान्य
सर्व सारखेच आहेत. संदेष्ट्यांपासून याजकांपर्यंत सर्व खोटे
बोलतात.
11 माझे लोक अतिशय वाईट रीतीने दुखावले जात
आले आहेत. संदेष्ट्यांनी आणि याजकांनी त्यांच्या जखमा
बांधाव्यात पण ते तर त्या जखमांवर, किरकोळ
खरचटल्यावर करतात, त्याप्रमाणे इलाज करतात. ते
म्हणतात, ‘ठीक आहे. ठीक आहेत.’ पण हे ठीक नाही.
12 संदेष्ट्यांना आणि याजकांना त्यांनी केलेल्या
दुष्कृत्यांबद्दल लाज वाटली पाहिजे. पण त्यांना अजिबात
लाज वाटत नाही. आपल्या दुष्कृत्यांची शरम
वाटण्याएवढीही त्यांना जाणीव नाही. म्हणून
बाकीच्यांबरोबर त्यांना शिक्षा होईल. मी जेव्हा लोकांना
शिक्षा करीन तेव्हा हे सर्वजण जमिनीवर फेकले जातील.
परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.
13 “मी त्यांची फळे व पिके काढून घेईन. मग तेथे
सुगीचा हंगाम होणार नाही.”हा परमेश्वराकडून आलेला
संदेश आहे. “वेलींवर एकही द्राक्ष नसेल. अंजिराच्या
झाडांवर एकही अंजिर नसेल. एवढेच नाही तर झाडांची
पानेही सुकतील व गळतील. मी त्यांना दिलेल्या गोष्टी
काढून घेईन.*
14 “आपण येथे नुसतेच का बसलो आहोत? या भक्कम
शहराकडे पळून जाऊ या, जर परमेश्वर आपला देव,
आपल्याला मारणारच असेल तर आपण तेथेच मरू या.
आपण परमेश्वराविरुद्ध वागून पाप केले. म्हणून देवाने
आपल्याला विषारी पाणी प्यायला दिले.
15 आम्ही शांतीची आशा केली पण आम्हाला काहीच
चांगले मिळाले नाही. तो आम्हाला क्षमा करील असे
आम्हाला वाटले पण अरिष्टच आले.
16 दानच्या कुळाच्या मालकीच्या भूमीवरून येणाऱ्या
शत्रूंच्या घोड्यांच्या फुरफुरण्याचा आवाज आम्ही ऐकतो.
त्यांच्या खुरांच्या दणदणाटाने जमीन हादरते. ते ही भूमी व
त्यावरील प्रत्येक गोष्टीचा नाश करण्यासाठी आले आहेत.
ते नगराचा व त्यात राहणाऱ्या सर्व लोकांना नाश
करण्यासाठी आले आहेत.
17 “यहूदाच्या लोकांनो, मी विषारी सर्प तुमच्यावर हल्ला
करण्यासाठी पाठवीत आहे. त्यांना आवरणे अशक्य आहे.
ते तुम्हाला दंश करतील.” हा देवाकडून आलेला संदेश
आहे.
18 देवा मी फार दुःखी आहे. मी फार घाबरलो
आहे.
19 माझ्या लोकांचे रडणे ऐक. ह्या देशात सगळीकडे
लोक मदतीसाठी आक्रोश करीत आहेत. ते म्हणतात,
“परमेश्वर अजून सियोनला आहे का? सियोनचा राजा
अजून तेथेच आहे का?”पण देव म्हणतो, “यहूदाच्या
लोकांनी परक्या कवडीमोलाच्या मूर्तीची पूजा केली. त्याने
मला खूप राग आला. त्यांनी असे का केले?
20 लोक म्हणतात, “सुगीचा हंगाम संपला, उन्हाळा गेला,
आणि तरीही आम्हाला वाचवण्यात आले नाही.”
21 माझे लोक दुखावले म्हणजे मी दुखावलो. मी
दुःखातिरेकाने बोलू शकत नाही.
22 गिलादमध्ये नक्कीच काही औषध आहे. तेथे नक्कीच
वैद्य आहे. मग माझ्या लोकांच्या जखमा का भरून येत
नाहीत?

9 जर माझे मस्तक पाण्याने भरलेले असते आणि माझे
डोळे अश्रूंचे झरे असते तर मी माझ्या नाश पावलेल्या
लोकांसाठी अहोरात्र रडलो असतो.
2 जर वाळवंटात माझी धर्मशाळा असती तर मी माझ्या
लोकांना सोडून त्यांच्यापासून खूप दूर जाऊ शकलो असतो.
का? कारण त्यांनी सर्वांनी देवाचा विश्वासघात केला
आहे. ते देवाच्या विरुद्ध गेले आहेत.
3 “ते त्यांच्या जिभा धनुष्यासारख्या वापरतात. त्यातून
खोट्याचे बाण उडतात. ह्या भूमीवर, सत्य नव्हे, तर असत्य,
खोटे बलवान झाले आहे, हे लोक एका पापाकडून दुसऱ्या

---

**मी ... घेईन** मूळ हिब्रूमधील ही ओळ समजणे अवघड आहे.

पापाकडे जातात. त्यांना माझे ज्ञान नाही."परमेश्वर असे
म्हणाला आहे.
4"तुमच्या शेजाऱ्यावर नजर ठेवा.तुमच्या स्वत:च्या
भावावरसुध्दा विश्वास ठेवू नका का? कारण प्रत्येक
भाऊ लबाड आहे.प्रत्येक शेजारी चहाडखोर आहे.
5प्रत्येकजण आपल्या शेजाऱ्याशी खोटे बोलतो, कोणीही
खरे बोलत नाही. यहूदाच्या लोकांनी आपल्या जिभांना
खोटे बोलण्यास शिकविले आहे त्यांना परत येणे अशक्य
होईपर्यंत त्यांनी पाप केले.
6एका वाईट गोष्टीमागून दुसरी वाईट गोष्ट आली.
खोट्यामागून खोटे आले. लोकांनी मला जाणून घ्यायचे
नाकारले." परमेश्वराने ह्या सर्व गोष्टी सांगितल्या.
7म्हणून, सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो: "धातू शुद्ध
आहे की नाही हे बघण्यासाठी कामगार तो तापवितो.
त्याप्रमाणे मी यहूदाच्या लोकांची परीक्षा घेईन. मला दुसरा
पर्याय नाही. माझ्या लोकांनी पाप केले.
8यहूदाच्या लोकांच्या जिभा टोकदार बाणाप्रमाणे आहेत.
ते खोटे बोलतात. प्रत्येकजण शेजाऱ्याशी वरवर चांगले
बोलतो. पण गुप्तपणे तो शेजाऱ्यावर हल्ला करण्याचा बेत
आखत आहे.
9"मी आता यहूदाच्या लोकांना शिक्षा करावी." हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. "मी शिक्षा करावी
अशा प्रकारचे ते लोक आहेत हे तुम्हाला माहीत आहे.
त्यांना योग्य ती शिक्षा मी करावी."
10मी, यिर्मया, डोंगरासाठी आकांत करीन. मी वैराण
शेतांसाठी शोकगीत गाईन. का? कारण सजीव सृष्टी नाहीशी
केली गेली आहे. तेथून आता कोणीही प्रवास करीत
नाही. गुरांचे हंबरणे ऐकू येत नाही. पक्षी दूर उडून गेले
आहेत. प्राणी निघून गेले आहेत.
11"मी, परमेश्वर, यरुशलेम नगरी म्हणजे कचऱ्याचा
ढीग करीन. ती कोल्ह्यांचे वसतिस्थान होईल. मी यहूदातील
नगरे नष्ट करीन. मग तेथे कोणीही राहणार नाही."
12ह्या गोष्टी समजू शकण्याइतका सुज्ञ कोणी आहे
का? परमेश्वराकडून शिकविला गेलेला कोणी आहे का?
परमेश्वराच्या संदेशाचे स्पष्टीकरण कोणी करू शकेल
का? ह्या भूमीचा नाश का झाला? जेथे कोणीही जात
नाही अशा वाळवंटासारखी ती का केली गेली?
13परमेश्वराने ह्या प्रश्नांची उत्तरे दिली. तो म्हणाला,
"माझ्या शिकवणुकीला अनुसरायचे यहूदाच्या लोकांनी
सोडून दिले. मी त्यांना पाठ दिले. पण त्यानी ऐकायचे
नाकारले. ते माझ्या शिकवणुकीप्रमाणे वागले नाहीत.
14यहूदातील लोक त्यांच्या मर्जीप्रमाणे जगले ते दुराग्रही
होते. बआल या खोट्या देवाला ते अनुसरले. त्यांच्या
वडिलांनी त्यांना खोट्या देवांना अनुसरायला शिकविले."
15सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो,
"लवकरच मी यहूदाच्या लोकांना कडू अन्न खायला
लावीन, विषारी पाणी प्यायला लावीन.
16मी यहूदाच्या लोकांना दुसऱ्या राष्ट्रांतून विखरून
टाकीन त्यांनी किंवा त्यांच्या वडिलांनी पूर्वी कधीही
ज्यांच्याबद्दल ऐकले नव्हते अशा परक्या देशांत ते राहतील.
मी तलवारी घेतलेले लोक पाठवीन. ते यहूदाच्या लोकांना
ठार मारतील. सर्व लोकांचा नाश होईपर्यंत ते संहार
करतील."
17सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो, "आता या
गोष्टींचा विचार करा. प्रेतयात्रेच्या वेळी रडणाऱ्या भाडोत्री
बायकांना बोलवा. त्या कामात वाकबगार असलेल्या
स्त्रियांना बोलवा.
18लोक म्हणतात, 'त्या बायकांना लवकर येऊन
आमच्यासाठी रडू द्या मग आमचे डोळे भरून येतील
आणि अश्रूंचा पूर येईल.'
19"सियोन मधून मोठ्याने रडण्याचा आवाज ऐकायला
येतो आहे. 'आपला खरोखरच नाश झाला आपली
खरोखरच अप्रतिष्ठा झाली. आता आपण आपली भूमी
सोडलीच पाहिजे. कारण आपली घरे नष्ट केली गेली.
आता ती दगडधोंड्यांचा ढिगारा झाली आहेत.'"
20आता, यहूदातील स्त्रियांनो, परमेश्वराकडून आलेला
संदेश ऐका. परमेश्वराच्या तोंडचे शब्द ऐका. देव म्हणतो,
"तुमच्या मुलींना मोठ्याने रडायला शिकवा. प्रत्येक बाईला
शोकगीत गाता आलेच पाहिजे.
21'मृत्यू आला आहे. तो चढून खिडक्यातून आता आला.
मृत्यू राजवाड्यात आला. रस्त्यांवर खेळणाऱ्या आमच्या
मुलांकडे आला. सार्वजनिक ठिकाणी जमणाऱ्या
तरुणांकडे तो आला.'
22"यिर्मया, या गोष्टी सांग:परमेश्वर म्हणतो,'मृत शरीरे
खताप्रमाणे शेतांत पडतील. शेतकऱ्यांनी कापलेल्या
धान्याप्रमाणे ती जमिनीवर पडतील. पण त्यांना गोळा
करणारे कोणीही नसेल.'"
23परमेश्वर म्हणतो, "शहाण्यांनी त्यांच्या
शहाणपणाबद्दल, बलवानांनी त्यांच्या बळाबद्दल व श्रीमंतांनी
त्यांच्या पैशाबद्दल बढाई मारू नये." असे परमेश्वर म्हणतो.
24पण कोणाला बढाईच मारायची असेल तर त्याला ह्या
गोष्टीसाठी मारू द्या.तो मला ओळखायला शिकला म्हणून
बढाई मारू द्या. मी परमेश्वर आहे, मी कृपाळू व न्यायी
आहे, जगात चांगल्या गोष्टी मी करतो आणि त्या गोष्टी
मला आवडतात हे कळल्याबद्दल त्याला बढाई मारू द्या."हा
परमेश्वराचा संदेश आहे.

25परमेश्वराचा संदेश असा आहे "ज्यांची फक्त शारीरिक
सुंता झाली आहे, अशांना शिक्षा करण्याची वेळ येत
आहे. 26मिसर, यहुदा, अदोम, अम्मोन, मवाब यातील व
वाळवंटात राहणाऱ्या इतर लोकांबद्दल मी बोलत आहे.
ह्या देशातील लोकांची शारीरिक सुंताही खरोखरी झालेली
नाही. पण इस्राएलच्या घराण्यातील लोकांच्या हृदयाची
सुंताही झालेली नाही."

## परमेश्वर आणि मूर्ती

10 इस्राएलच्या वंशजांनो, परमेश्वर तुमच्याविषयी
काय म्हणतो ते ऐका. 2परमेश्वर असे म्हणतो,
"दुसऱ्या देशांतील लोकांचे अनुकरण करू नका.
आकाशात दिसणाऱ्या काही खास गोष्टींना घाबरू नका.
या आकाशातील गोष्टी बघून दुसरे देश घाबरतात. परंतु
तुम्ही अजिबात घाबरू नका.
3त्या लोकांच्या चालीरीती अर्थशून्य आहेत.त्यांच्या मूर्ती
म्हणजे दुसरे काही नसून जंगलातील लाकडे आहेत
कामगार लाकूड पटाशीने छिनून त्या मूर्ती बनवितो.
4ते लोक, त्या मूर्ती चांदीसोन्याने मढवून त्यांना सुंदर
रूप देतात. त्या खाली पडू नयेत म्हणून हातोड्याने खिळे
मारून घट्ट बसवितात.
5इतर देशांतील अशा मूर्ती काकडीच्या मळ्यातील
बुजगावण्यासारख्या आहेत. त्या बोलू शकत नाहीत वा
चालू शकत नाहीत.लोकांनाच त्या वाहून न्याव्या लागतात.
तेव्हा त्यांना घाबरू नका. त्या मूर्ती तुमचे वाईटही करू
शकत नाहीत व चांगलेही करू शकत नाहीत."
6परमेश्वरा तुझ्यासारखा दुसरा कोणीही नाही. तू महान
आहेस.तुझ्या नावातच मोठेपण व सामर्थ्य आहे.
7परमेश्वरा, प्रत्येक माणसाने तुझा आदर केला पाहिजे.तू
सर्व राष्ट्रांचा राजा आहेस.म्हणूनच सर्वाना आदरणीय
आहेसत्या राष्ट्रांमध्ये काही शहाणी माणसे जरूर आहेत
पण तुझ्याइतके सुज्ञ कोणीही नाही.
8दुसऱ्या देशातील लोक मतिमंद आणि मूर्ख आहेत.
दीड दमडीच्या लाकडाच्या मूर्ती त्यांना उपदेश करतात.
9ते लोक तार्शिशहून आणलेल्या चांदीचा आणि
उफाजहून आणलेल्या सोन्याचा वापर करून पुतळे
बनवितात.ह्या मूर्ती सुतार आणि सोनार घडवितातत्या
मूर्तीवर ते निळ्या आणि जांभळ्या रंगाचे कपडे
चढवितात'शहाणे लोक' असे 'देव' तयार करतात.
10पण परमेश्वरच फक्त खरा देव आहे.खरा सजीव
असा केवळ देवच आहेशाश्वत शासन करणारा असा तो
राजा आहेत्याला राग आल्यास पृथ्वी कंप पावते.त्याचा
कोप देशांतील लोक सहन करू शकत नाहीत.
11परमेश्वर म्हणतो,"त्या लोकांना पुढील संदेश द्या.'त्या
खोट्या देवांनी पृथ्वीची आणि स्वर्गाची निर्मिती केली नाही.ते
स्वर्ग आणि पृथ्वीवरून नाहीसे होतील.*'"
12ज्याने आपल्या सामर्थ्याने पृथ्वी निर्माण केली असा
एकमेव देवच आहे.आपल्या ज्ञानाचा उपयोग करून त्याने
जग निर्माण केले आपल्या समंजसपणाच्या आधारे पृथ्वीवर
आकाश पांघरले.
13ढगांचा गडगडाट आणि आकाशातून पडणारा
मुसळधार पाऊस ही देवाचीच करणी आहे.पृथ्वीच्या प्रत्येक
भागावरील आकाशात तो मेघ पाठवितो.पावसाबरोबर वीज
पाठवितो. आपल्या भांडारातून वारा आणतो.
14लोक अगदी मूर्ख आहेत. आपण निर्माण केलेल्या
मूर्तीमुळेच सोनार मूर्ख बनविले जातात. त्या मूर्ती म्हणजे
फक्त असत्य आहे.ते फक्त थोतांडच* आहे
15त्या मूर्ती शून्य किंमतीच्या आहेत.त्या खोट्या आहेत
न्यायदानाच्या वेळी त्यांचा नाश होईल.
16पण याकोबचा देव त्या मूर्तीसारखा नाही.त्याने सर्व
गोष्टींची निर्मिती केलीआणि इस्राएलच्या वंशजांची, स्वत:चे
खास लोक म्हणून, निवड केली."सर्वशक्तिमान परमेश्वर"
हेच देवाचे नाव.

## विनाश येत आहे

17आपल्या मालकीच्या सर्व चीजवस्तू घेऊन पळून
जाण्याच्या तयारीत राहा.यहूदाच्या लोकांनो, शत्रूने तुमच्या
शहराला वेढले असून तुम्ही आता अडकला आहात.
18परमेश्वर म्हणतो, "यावेळी, मी यहूदाच्या लोकांना
ह्या देशाबाहेर घालवून देईन. मी त्यांना त्रास देऊन दु:ख
भोगण्यास भाग पाडीन म्हणजे त्यांना धडा मिळेल."
19अरेरे, मी (यिर्मया) फारच जखमी झालो.माझ्या जखमा
भरून येण्यासारख्या नाहीत.तरीसुद्धा मी स्वत:लाच
सांगतो,"हे माझे दु:ख मला पूर्णपणे भोगलेच पाहिजे."
20माझ्या तंबूचा नाश झाला.तंबूचे सर्व दोर तुटले आहेत.
माझी मुले मला सोडून निघून गेली आहेत. माझा तंबू
उभारायला एकही माणूस उरला नाही. माझा निवारा
बांधायला एकही माणूस शिल्लक नाही.
21मेंढपाळ (नेते) मूर्ख आहेत.ते परमेश्वराचा शोध
घेण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. ते शहाणे नाहीत. त्यामुळे
त्यांचे कळप (लोक) इतस्तत: विखरून हरवले आहेत.
22मोठा आवाज ऐका!तो आवाज उत्तरेकडून येत
आहेयहुदातील शहरांचा तो नाश करील.यहुदाचे निर्जन
वाळवंट होईल.तेथे कोल्ह्यांची वस्ती होईल.
23परमेश्वरा, माणसाच्या आयुष्यावर त्याचा स्वत:चा
खरा हक्क नसतो,हे मला माहीत आहे.लोक भविष्याच्या
योजना खरोखरच ठरवू शकत नाहीत.
24परमेश्वरा, आम्हाला सुधार!पण न्याय्य रीतीने
सुधार!रागाच्या भरात आम्हांला शिक्षा करू नकोस. नाही
तर तू कदाचित् आमचा नाश करशील.
25तुला राग आला असेल, तर दुसऱ्या राष्ट्रांना शिक्षा
कर.ते तुला जाणत नाहीत वा मान देत नाहीत.ते तुझी
उपासना करीत नाहीत.त्या राष्ट्रांनी याकोबच्या कुटुंबाचा

---

**ते ... नाहीसे होतील** हा भाग अरामिक भाषेत लिहिलेला आहे. हिब्रूत नव्हे. दुसऱ्या देशातील लोकांना काही लिहिताना ही भाषा वापरत असत. बंबिलानमध्ये (बाबेलमध्ये) हीच भाषा बोलली जाई.

**थोतांड** शब्दश 'चेतनाहीन.' देवाचे चैतन्य माणसाला शहाणे बनविले, अशी बायबलची शिकवण आहे.. 'निर्जीव' असाही अर्थ काढता येईल.

विनाश केला.त्यांनी इस्राएल नेस्तनाबून केले आणि
इस्राएलच्या भूमीचा नाश केला.

## करार मोडला आहे

11 यिर्मयाला मिळालेला संदेश असा होता: हा संदेश
परमेश्वराचा होता: 2“यिर्मया, या कराराची कलमे
ऐक यहूदाच्या लोकांना या कलमांबद्दल सांग.
यरुशलेममध्ये राहणाऱ्या लोकांनाही सांग. 3परमेश्वर,
इस्राएलचा देव असे म्हणतो ‘जे कोणी या कराराचे पालन
करणार नाहीत. त्यांचे वाईट होईल.’ 4तुमच्या पूर्वजांशी
केलेल्या कराराबद्दल मी बोलत आहे. त्यांची मिसर देशातून
सुटका करताना मी त्यांच्याशी हा करार केला होता. त्या
वेळी मिसर देश म्हणजे पुष्कळ संकटांची भूमी होती.
लोखंडालाही वितळवू शकणाऱ्या भट्टीप्रमाणे तो देश होता.
मी त्या लोकांना सांगितले की तुम्ही माझी आज्ञा पाळलीत,
तर तुम्ही माझे व्हाल व मी तुमचा देव होईन.

5“तुमच्या पूर्वजांना दिलेल्या वचनाकरिता मी हे केले.
दूध व मध यांची रेलचेल असलेली सुपीक भूमी द्यायचे
मी त्यांना कबूल केले होते. त्याच भूमीवर तुम्ही आता
राहत आहात.”

मी (यिर्मयाने) ‘होय, परमेश्वरा!’ म्हणून पुष्टी दिली.

6परमेश्वर मला म्हणाला, “यिर्मया, यहूदाच्या शहरांतून
व यरुशलेमच्या रस्त्यांतून हा संदेश शिकव. संदेश असा
आहे. कराराच्या शर्ती ऐका आणि त्यांचे पालन करा.
7मिसरच्या बाहेर येताना म्हणजेच मिसरमधून सुटका
करताना मी तुमच्या पूर्वजांना इशारा दिला होता. तेव्हापासून
आतापर्यंत मी परत परत इशारा देत आलो आहे की
माझी आज्ञा पाळा. 8पण तुमच्या पूर्वजांनी माझे ऐकले
नाही. ते दुराग्रही बनले आणि त्यांच्या दुष्ट प्रवृत्तीला आवडेल
तेच त्यांनी केले. माझ्या आज्ञा न पाळल्यास त्यांचे वाईट
होईल असे करार सांगतो. मी त्यांना माझ्या आज्ञा पाळण्यास
सांगितले, पण त्यांनी ते ऐकले नाही, म्हणून करारात
उल्लेखलेल्या सर्व वाईट गोष्टी मला त्यांच्याबाबत कराव्या
लागल्या.”

9परमेश्वर मला म्हणाला, “यिर्मया, यहुदातील आणि
यरुशलेममधील लोकांनी गुप्त योजना आखल्याचे मला
माहीत आहे. 10त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या पापांची ते
पुनरावृत्ती करीत आहेत. त्यांच्या पूर्वजांनी माझे संदेश
ऐकण्याचे नाकारले. त्यांनी दुसऱ्या देवांचे अनुसरण केले.
त्यांची पूजा केली. इस्राएल व यहूदाच्या वंशजांनी, त्यांच्या
पूर्वजांनी माझ्याशी केलेल्या, कराराचा भंग केला आहे.”

11म्हणून परमेश्वर म्हणतो, “मी यहूदाच्या लोकांना
कसल्यातरी भयंकर संकटात टाकीन. त्यातून त्यांना त्यांची
सुटका करून घेता येणार नाही. त्यांना दुःख होईल. आणि
मदतीसाठी ते माझा धावा करतील. पण मी त्यांचे ऐकणार
नाही. 12यहूदातील व यरुशलेममधील लोक त्या मूर्तीकडे
जातील. त्यांची प्रार्थना करून मदत मागतील ते त्या मूर्तीपुढे
धूप जाळतात. पण त्या भयंकर संकटकाळी लोकांना
मदत करणे त्या मूर्तींना शक्य होणार नाही.

13“यहूदावासीयांनो, तुमच्याकडे बऱ्याच मूर्ती आहेत.
यहूदामध्ये जेवढी नगरे आहेत, जवळजवळ तेवढ्याच मूर्ती
असतील. तिरस्करणीय बआल देवाची पूजा करण्यासाठी
तुम्ही ज्या वेदी बांधल्या आहेत, त्याही जवळजवळ
यरुशलेममधील रस्त्यांच्या संख्येइतक्या असतील.

14“यिर्मया, तुझ्यापुरते बोलायचे झाल्यास, तू यहूदाच्या
लोकांसाठी प्रार्थना करू नकोस. त्यांच्यासाठी आळवणी
करू नकोस. मी काही ऐकणार नाही. जेव्हा ते दुःख
भोगायला लागतील, तेव्हा माझा धावा करतील पण मी
त्यांचे ऐकणार नाही.

15“माझी प्रेमिका (यहूदा) माझ्या घरात (मंदिरात) का?
तिला तेथे येण्याचा काही अधिकार नाही. तिने बरीच
पापे केली आहेत. यहूदा, तुझी विशेष वचने आणि प्राण्यांचे
बळी तुला विनाशापासून तारतील, असे तुला वाटते का?
मला यज्ञ अर्पण करून तू शिक्षा टाळू शकशील असे
तुला वाटते का?”

16“दिसावयास देखणे असणाऱ्या हिरव्यागार जैतुन
झाडाचे’ नाव परमेश्वराने तुला दिले. पण जोराच्या वादळाने
देव त्या झाडाला आग लावील आणि त्याच्या फांद्या जाळून
टाकील.

17सर्वशक्तिमान परमेश्वराने तुझे रोपटे लावले, आणि
आता तोच तुझ्यावर संकटे येणार असे म्हणतो. का?
कारण इस्राएल आणि यहूदाच्या लोकांनी कुकर्मे केली.
त्यांनी ‘बआल’ देवाला यज्ञ अर्पण केले म्हणून मला राग
आला.”

## यिर्मयाविरुद्ध कट

18अनाथोथचे लोक माझ्याविरुद्ध कट करीत असल्याचे
परमेश्वराने मला दाखविले. परमेश्वराने मला ते करीत
असलेल्या गोष्टी दाखविल्या, त्यावरून ते माझ्याविरुद्ध
असल्याचे कळले. 19लोक माझ्याविरुद्ध असल्याचे
समजण्यापूर्वी मी कत्तल होण्याची वाट पाहणाऱ्या गरीब
कोकरासारखा होतो. ते माझ्याविरुद्ध आहेत याची मला
कल्पना नव्हती. “आपण या झाडाचा आणि त्याच्या फळांचा
नाश करू. आपण त्याला मारून टाकू म्हणजे लोक
त्याला विसरतील” असे ते माझ्याबद्दल म्हणत. 20पण
परमेश्वरा तू खरा न्यायी आहेस. लोकांच्या हृदयांची व
मनांची कशी परीक्षा करावयाची हे तू जाणतोस. मी तुला
माझे मुद्दे सांगेन आणि त्यांना योग्य शिक्षा देण्याचे तुझ्यावर
सोपवीन.

21अनाथोथचे लोक यिर्मयाला मारायचे ठरवीत होते.
ते लोक यिर्मयाला म्हणाले, “परमेश्वराच्या नावावर
भविष्यकथन करू नकोस, नाहीतर आम्ही तुला ठार
करु” देवाने अनाथोथच्या लोकांबद्दल निर्णय घेऊन

टाकला. 22सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणाला, “लवकरच अनाथोथच्या त्या लोकांना मी शिक्षा करीन. त्यांचे तरुण युद्धात कामी येतील. त्यांची मुलेमुली भुकेने मरतील. 23अनाथोथमधील एकही माणूस शिल्लक राहणार नाही. कोणीही वाचणार नाही. मी त्यांना शिक्षा करीन. मी त्यांचे वाईट घडवून आणीन”

## यिर्मयाचे देवापाशी गाऱ्हाणे

12 परमेश्वरा, जेव्हा मी तुझ्याशी वाद घालतो, तेव्हा तुझेच म्हणणे बरोबर ठरते.पण काही गोष्टी बरोबर वाटत नाहीत. त्याबद्दल मला तुला विचारावेसे वाटते.दुष्ट लोकच यशस्वी का होतात? तू ज्यांच्यावर विश्वास ठेवू शकत नाहीस, अशांना सुखाचे आयुष्य का मिळते?

2त्या दुष्टांना तूच इथे वसविलेस ती माणसे मजबूत मुळे असलेल्या झाडांप्रमाणे आहेत. ती वाढतात आणि फळे देतात. तोंडाने, तू त्यांना जवळचा व प्रिय असल्याचे, ते सांगतात. पण मनाने ते तुझ्यापासून फार दूर आहेत.

3पण, परमेश्वरा, तू माझे मन जाणतोस. तू मला पाहतोस आणि माझ्या मनाची परीक्षा घेतोस. कत्तल करण्यासाठी मेंढ्यांना जसे फरपटत आणतात, तसे त्यांना फरपटत आण. कत्तलीच्या दिवसासाठी त्यांची निवड कर.

4किती काळ जमीन कोरडी राहणार? किती काळ गवत वाळून मरणार? त्या दुष्ट लोकांच्या चुकीमुळे प्राणी आणि पक्षी मरून गेले. तरीसुद्धा ते लोक म्हणतात, “आमचे काय होईल हे पाहण्याइतक्या दीर्घकाळ यिर्मया जगणार नाही.”

## यिर्मयाला देवाने दिलेले उत्तर

5“यिर्मया, माणसांबरोबर धावण्याच्या शर्यतीत जर तू दमतोस, तर मग घोड्यांशी तू कशी स्पर्धा करणार? जर तू सुरक्षित ठिकाणी कंटाळलास, तर धोकादायक ठिकाणी काय करशील? यार्देन नदीकिनारी वाढणाऱ्या कांटेरी झुडुंपात तू काय करशील?

6ही सर्व माणसे तुझेच भाऊबंद आहेत. तुझ्याच कुटुंबातील माणसे तुझ्याविरुद्ध कट करीत आहेत. तुझ्याच घरातील माणसे तुझ्याविरुद्ध आवाज उठवीत आहे. जरी ते तुझ्याशी मित्रांसारखे बोलत असले, तरी तू त्यांच्यावर विश्वास ठेवू नकोस.”

## परमेश्वर आपल्या लोकांना म्हणजेच यहूदाला झिडकारतो

7“मी परमेश्वराचा माझ्या घराचा त्याग केला आहे. मी माझी मालमत्ता* सोडली आहे. मी माझी प्रियतमा (यहूदा) तिच्या वैऱ्यांच्या ताब्यात दिली आहे.

8माझे स्वत:चेच लोक जंगली सिंहाप्रमाणे माझ्याविरुद्ध उलटले. ते माझ्याकडे पाहून डरकाळ्या फोडू लागल्याने मी त्यांच्याकडे पाठ फिरविली.

9मरायला टेकल्यामुळे गिधाडांनी घेरलेल्या प्राण्याप्रमाणे माझ्या लोकांची स्थिती आहे. गिधाडे तिच्याभोवती (यहूदाभोवती) घिरट्या घालतात. वन्य प्राण्यांनो, तुम्हीसुध्दा या आणि काही खाद्य मिळवा.

10पुष्कळ मेंढपाळांनी (नेत्यांनी) माझ्या द्राक्षमळ्याचा नाश केला आहे. त्यांनी द्राक्षेवेली पायदळी तुडविल्या. त्यांनी माझ्या द्राक्षमळ्याचे वैराण वाळवंट केले.

11त्यांनी माझा मळा उजाड केला. तो सुकून मरून गेला. तेथे कोणीही राहत नाही. सर्व देश म्हणजे एक निर्जन वाळवंट झाले आहे. त्या मळ्याची काळजी घेण्यासाठी एकही माणूस उरला नाही.

12त्या रिकाम्या वाळवंटाच्या हिरवळीतून लूट करण्याकरिता सैन्य आले. परमेश्वराने त्या सैन्याचा उपयोग त्या देशाला शिक्षा करण्यासाठी केला. देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत राहणाऱ्या सर्वांना शिक्षा केली. कोणीही वाचला नाही.

13लोकांनी गहू पेरला, तर तिथे काटे उगवतील. लोक दमेपर्यंत खूप कष्ट करतील, पण या अफाट मेहनतीचे फळ त्यांना मिळणार नाही. त्यांच्या पिकाबाबत ते खजिल होतील. परमेश्वराच्या कोपामुळे या गोष्टी घडतील.”

## इस्राएलच्या शेजाऱ्यांना देवाचे वचन

14देव काय म्हणतो ते पाहा: “इस्राएलच्या भोवती राहणाऱ्या लोकांसाठी मी काय करणार आहे, ते मी तुम्हाला सांगतो. ते लोक फार दुष्ट आहेत. मी इस्राएलच्या लोकांना दिलेल्या जमिनीचा त्या लोकांनी नाश केला. त्या पापी लोकांना, मी, खेचून काढीन व त्यांच्या देशाबाहेर त्यांना हाकलून देईन. त्यांच्याबरोबर यहूदाच्या लोकांनाही मी बाहेर खेचीन. 15पण अशा रीतीने त्या लोकांना देशाबाहेर हाकलल्यावर मला त्यांची कणव येईल. मी प्रत्येक कुटुंब परत त्यांच्या देशात आणीन आणि त्यांची जमीन परत देईन. 16ह्यातून त्या लोकांनी योग्य तो बोध घ्यावा असे मला वाटते. पूर्वी त्या लोकांनी, माझ्या माणसांना, बआलच्या नावाने वचन घ्यायला शिकविले होते. आता मी त्याच रीतीने त्यांना धडा शिकविणार. वचन घेताना माझे नाव घेण्यास त्यांनी शिकावे असे मला वाटते. ‘देव नक्कीच असेपर्यंत’ अशी सुरवात त्यांनी करावी अशी माझी इच्छा आहे. त्यांनी असे केले तर मी त्यांना यशस्वी करीन आणि माझ्या लोकांत राहू देईन. 17पण जर एखाद्या राष्ट्राने माझा आदेश मानला नाही, तर त्या राष्ट्राचा मी समूळ नाश करीन. त्या राष्ट्राला मेलेल्या झाडाप्रमाणे उपटीन.” हा परमेश्वराचा संदेश आहे.

---

**घर ... मालमत्ता** ह्याचा अर्थ यहूदातील लोक.

## घागऱ्याचा संकेत

13 परमेश्वर मला असे म्हणाला: “यिर्मया, जा आणि
तागाचा घागरा विकत घे. नंतर तो नेस. तो ओला
होऊ देऊ नकोस.”
2परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे मी एक तागाचा घागरा
विकत आणला व नेसला. 3नंतर मला परमेश्वराकडून
दुसऱ्यांदा संदेश आला. 4तो असा होता: “यिर्मया, तू विकत
आणून नेसलेला घागरा घेऊन फरातला* जा. तिथे तो
खडकाला पडलेल्या चिरेत लपवून ठेव.”
5त्याप्रमाणे मी फरातला गेलो आणि अगदी परमेश्वराने
सांगितल्याप्रमाणे घागरा लपवून ठेवला. 6पुष्कळ दिवसांनी
देव मला म्हणाला, “यिर्मया, फरातला जा व लपवून
ठेवायला सांगितलेला घागरा परत घे.”
7त्याप्रमाणे मी फरातला गेलो आणि घागरा उकरून
काढला.मी दगडाच्या चिरेत लपविलेला घागरा बाहेर
काढला. पण आता तो इतका खराब झाला होता की मी
तो नेसू शकत नव्हतो. तो अगदी निरुपयोगी झाला होता.
8मग मला परमेश्वराचा संदेश आला. 9परमेश्वर मला
म्हणाला, “ज्याप्रमाणे घागरा अगदी खराब आणि निरुपयोगी
झाला, त्याचप्रमाणे यहूदातील आणि यरुशलेमधील
अहंकारी लोकांचा नाश होईल. 10मी यहुदाच्या उद्दाम
आणि पापी लोकांचा नाश करीन. ते लोक माझा संदेश
ऐकण्याचे नाकारतात. ते दुराग्रही असून आपल्याला पाहिजे
त्याच गोष्टी करतात. ते दुसऱ्या देवांना अनुसरतात व
त्यांची पूजा करतात. यहूदाच्या अशा लोकांची गत ह्या
तागाच्या घागऱ्याप्रमाणे होईल. त्यांचा नाश होऊन ते
निरुपयोगी ठरतील. 11घागरा जसा माणसाच्या कमरेभोवती
घट्ट लपेटला जातो, त्याप्रमाणे मी यहूदाची आणि इस्राएलची
कुटुंबे माझ्या कमरेला लपेटली.” हा परमेश्वराकडून
आलेला संदेश आहे. “त्या लोकांनी माझे व्हावे, मला
कीर्ती, प्रशंसा आणि मान मिळवून द्यावा म्हणून मी
असे केले. पण माझ्या लोकांना माझे ऐकावयाचे
नाही.”

## यहूदाला इशारे

12“यिर्मया, यहूदाच्या लोकांना सांग की परमेश्वर,
इस्राएलचा देव म्हणतो, ‘प्रत्येक चामड्याचा बुधला दारूने
भरावा.’ ते लोक तुला हसतील आणि म्हणतील ‘प्रत्येक
चामड्याचा बुधला दारूने भरावा हे आम्हाला माहीत आहे.’
13मग तू त्यांना सांग, ‘परमेश्वराचे म्हणणे असे आहे की
या देशात राहणाऱ्या प्रत्येक माणसाला मी दारुड्याप्रमाणे
असहाय करीन. मी हे दावीदच्या सिंहासनावर बसलेल्या
राजांबद्दल, याजकांबद्दल, संदेष्ट्यांबद्दल आणि
यरुशलेममध्ये राहणाऱ्या यच्चयावत लोकांबद्दल बोलत
आहे. 14यहूदाच्या लोकांना मी धडपडायला भाग पाडीन.
ते धडपडून एकमेकांच्या अंगावर पडतील. पिता पुत्र
एकमेकांवर पडतील. हा परमेश्वराचा संदेश आहे. “‘मला
त्याबद्दल वाईटही वाटणार नाही. आणि त्यांची दयाही येणार
नाही. अनुकंपा येऊन मी यहूदाच्या लोकांचे पारिपत्य
थांबविणार नाही.’”

15ऐका आणि लक्ष द्या. परमेश्वर तुमच्याशी बोलला
आहे. उन्मत्त बनू नका.
16परमेश्वराचा, तुमच्या देवाचा मान राखा. त्याचे
स्तवन करा, नाहीतर तो अंधकार पसरवील. अंधकारमय
टेकड्यांवर पडण्याआधीच त्याचे स्तुतिस्तोत्र गा. तुम्ही
यहूदाचे लोक प्रकाशाची वाट पाहता, पण परमेश्वर
प्रकाशाचे गाढ अंधकारात रूपांतर करेल. तो प्रकाशाला
दाट अंधारात बदलेल.
17यहूदाच्या लोकांनो, तुम्ही जर परमेश्वराचे ऐकणार
नसाल, तर मी एकांतात आक्रोश करीन. तुमचा उन्मत्तपणा
मला आक्रोश करायला भाग पाडेल. मी दारूण आकांत
करीन. माझे डोळे अश्रूंनी डबडबतील. का? कारण
परमेश्वराच्या मेंढरांच्या कळप (यहूदाचे लोक) पकडला
जाईल.
18राजा आणि राणीला या गोष्टी सांगा, “तुमचे सुंदर
मुकुट तुमच्या डोक्यांवरून खाली पडलेत. तुम्ही आता
तुमच्या सिंहासनावरून खाली उतरा.”
19नेगेवच्या वाळवंटातील शहरे बंद केली गेली आहेत.
कोणीही ती उघडू शकत नाही. यहूदाच्या सर्व लोकांना
कैद करून परागंदा करण्यात आले आहे.
20यरुशलेम, तो पाहा! उत्तरेकडून शत्रू चाल करून
येत आहे. तुझा कळप कोठे आहे? देवाने तुला या सुंदर
कळपाचे दान दिले. त्याची तू काळजी घ्यावीस अशी
अपेक्षा होती.
21आता त्या कळपाबद्दल परमेश्वराने जाब विचारल्यास
तू काय उत्तर देणार? तू लोकांना देवाबद्दल ज्ञान देशील
अशी अपेक्षा होती. तुझे नेते लोकांना मार्गदर्शन करतील
असे वाटत होते. पण त्यांनी त्यांचे कर्तव्य केले नाही.
तेव्हा आता तुला प्रसुतिवेदनांप्रमाणे वेदना व त्रास भोगावा
लागेल.
22तू कदाचित् स्वत:ला विचारशील, “माझ्यावरच असा
वाईट प्रसंग का आला?” तुझ्या अनेक पापांमुळे असे
झाले. तुझ्या पापाबद्दल तुझा घागरा फाडला गेला आणि
तुझी पादत्राणे काढून घेण्यात आली. तुझी मानहानी
करण्यासाठी हे करण्यात आले.
23काळा माणूस आपल्या कातडीचा रंग बदलू शकत
नाही. किंवा चित्ता आपल्या अंगावरील ठिपके बदलू
शकत नाही. त्याचप्रमाणे यरुशलेम, तू सुद्धा बदलणार

---

**फरात** हे बहुधा यरुशलेममधील खेडे असावे. अथवा यहोशवाच्या 18:23 या भागात बन्यामीनच्या देशातील शहरांच्या यादीत दिलेले ‘पारा’ नावाचे गावही असू शकेल. युफ्राटिस नदीलाही फरातच म्हणतात.

नाहीस आणि चांगल्या गोष्टी करणार नाहीस तू नेहमीच वाईट गोष्टी करशील.

[24] "मी तुम्हाला तुमची घरे सोडून जाण्यास भाग पाडीन. तुम्ही दाही दिशांना सैरावैरा पळत सुटाल. वाळवंटातील वाऱ्याने दूर उडून जाणाऱ्या फोलकटाप्रमाणे तुमची गत होईल.

[25]तुमच्याबाबत माझी योजना ही अशी आहे आणि त्याचप्रमाणे गोष्टी घडतील." हा परमेश्वराचा संदेश आहे.

"हे असे का घडेल? कारण तुम्हाला माझा विसर पडला. तुम्ही खोट्या देवावर विश्वास ठेवला.

[26]यरुशलेम, मी तुझा घागरा डोक्याकडून खेचीन. प्रत्येकजण तुला पाहील आणि तुझी बेअब्रू होईल.

[27]मी तू केलेली भयानक कृत्ये पाहिली आहेत.* जारांशी हसताना आणि संभोग करताना मी तुला पाहिले आहे. वेश्या बनायचेच तुझ्या मनात दिसते आहे. मी तुला डोंगरकपारीत आणि मैदानात पाहिले आहे. यरुशलेम, हे तुझ्या दृष्टीने वाईट आहे. या घृणास्पद पापें तू किती काळ करणार याचे मला नवल वाटते."

## अवर्षण आणि तोतये संदेष्टे

14 अवर्षणाबद्दल यिर्मयाला परमेश्वराने पुढील संदेश दिला.

[2]"यहूदा हे राष्ट्र, मेलेल्या लोकांकरिता आक्रंदत आहे. यहूदाच्या शहरामधील लोक अधिकाधिक क्षीण होत चालले आहेत ते जमिनीवर पडून आहेत. यरुशलेममधील लोक देवाकडे मदतीसाठी टाहो फोडत आहेत.

[3]नेते मंडळी आपल्या नोकरांना पाणी आणण्यासाठी पाठवितात. नोकर पाण्याच्या टाक्यांकडे जातात, पण त्यांना थोडेसुद्धा पाणी मिळत नाही. त्यामुळे त्यांना रिकामी भांडी घेऊन परत यावे लागते. म्हणून ते लज्जित व खजील होऊन आपले चेहरे झाकून घेतात.

[4]कोठेही पाऊस न पडल्यामुळे कोणीही पिकांसाठी जमिनीची मशागत करीत नाही.* शेतकरी हवालदिल झाले आहेत त्यामुळे त्यांनी आपले चेहरे झाकून घेतले आहेत.

[5]कोठेही गवत नसल्यामुळे हरिणी आपल्या नवजात पाडसाला एकटेच सोडून देते.

[6]उघड्या डोंगरावर उभी राहून, जंगली गाढवे कोल्ह्यांप्रमाणे हवा हुंगतात. पण त्यांना कोठेही काहीही खाण्यालायक दिसत नाही. कारण खाण्यालायक एकही झुडूप शिल्लक नाही."

## देवाकडून मदत मिळावी म्हणून प्रार्थना

[7]या गोष्टींना आम्हीच जबाबदार आहोत, हे आम्हाला माहीत आहे. आम्ही आमच्याच पापाचे भोग भोगत आहोत. परमेश्वरा, तुझे नाव राखण्यासाठी आम्हाला मदत कर. कारण आम्ही तुझ्याशी खूप वेळा प्रतारणा केली, हे आम्हाला कबूल आहे. आम्ही तुझ्याशी पापाचरण केले,

[8]देवा, तू इस्राएलचे आशास्थान आहेस. संकटकाळी तू इस्राएलला वाचवितोस. पण, आता, तू, फक्त रात्री मुक्काम करून पुढे जाणाऱ्या प्रवाशासारखा वाटतोस.

[9]अचानकपणे हल्ला झाल्यावर चकित झालेल्या माणसाप्रमाणे तू वाटतोस. कोणालाही वाचविण्यास असमर्थ असलेल्या हतबल सैनिकासारखा तू दिसतोस. पण परमेश्वरा, तू आमच्याबरोबर आहेस. आम्ही तुझ्या नावाने ओळखले जातो तेव्हा आम्हाला मदत न करता जाऊ नकोस."

## यहुदासाठी देवाचा संदेश

[10]यहूदाच्या लोकांबद्दल देवाचे म्हणणे असे आहे: "यहूदाच्या लोकांना माझा त्याग करणे आवडते. माझा त्याग करण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत. तेव्हा आता परमेश्वर त्यांचा स्वीकार करणार नाही. तो त्यांची दुष्कृत्ये लक्षात ठेवून त्यांच्या पापांबद्दल त्यांना शिक्षा करील."

[11]नंतर परमेश्वर मला म्हणाला, "यिर्मया, यहूदाच्या लोकांच्या भल्यासाठी तू विनवणी करू नकोस. [12]यहूदाचे लोक कदाचित् उपवास करून माझी प्रार्थना करतील. पण मी त्यांची प्रार्थना ऐकणार नाही. जरी त्यांनी मला होमार्पण व धान्यार्पणचा नैवेद्य दाखविला, तरी मी त्या लोकांचा स्वीकार करणार नाही. मी युद्धात यहूदाच्या लोकांचा नाश करीन. अन्न तोडून मी त्यांची उपासमार करीन. भयंकर रोगराई पसरवून मी त्यांना नष्ट करीन."

[13]पण मी परमेश्वराला म्हणालो, "परमेश्वरा, माझ्या प्रभू संदेष्टे तर लोकांना काही वेगळेच सांगत होते. ते लोकांना सांगत होते 'शत्रू कधीच तुमच्यावर हल्ला करणार नाही. तुमची कधीही उपासमार होणार नाही. परमेश्वर तुमच्या देशात शांती राखेल.'"

[14]मग परमेश्वर मला म्हणाला, "यिर्मया, माझ्या नावावर हे संदेष्टे असत्य कथन करतात. मी त्यांना पाठविलेले नाही. मी त्यांना आज्ञा केली नाही वा त्यांच्याशी बोललोही नाही. ते लोकांपुढे खोटे दृष्टान्त सांगतात, त्यांना मोहजालात फसवितात व स्वतःचे स्वप्नरंजन करतात. [15]माझ्या नावावर प्रवचने देणाऱ्या संदेष्ट्यांबद्दल बोलायचे झालेच तर, मी त्यांना पाठविले नाही. ते म्हणतात 'या देशावर कोणीही हल्ला करणार नाही.' ह्या देशाची कधीही उपासमार होणार नाही.' पण ते संदेष्टेच उपासमारीने मरतील. शत्रू त्यांना ठार करील. [16]आणि ज्या लोकांशी ते संदेष्टे बोलले, ते लोक रस्त्यावर उघडे पडतील. उपासमार व शत्रू यांचे ते बळी ठरतील. त्यांचे वा त्यांच्या बायकामुलांचे दफन

---

**मी ... पाहिली आहेत** हे वाक्य बहुधा खोट्या देवांच्या पूजेबद्दल असावे. पण मंदिरातील देवादासीबरोबर संभोग करणे हाही एक पूजेचा भाग होता.

**कोणीही ... नाही** हिब्रू अर्थ समजणे अशक्य असल्याने प्राचीन ग्रीक भाषांतरावरून ही ओळ घेतली आहे.

करण्यास कोणीही असणार नाही. मी त्यांना शिक्षा करीन.*

[17]“यिर्मया, यहूदाच्या लोकांना माझा संदेश सांग: ‘माझ्या डोळ्यांत अश्रू दाटून आलेत. माझ्या कुमारी मुलीसाठी मी रात्रंदिवस अव्याहतपणे आक्रोश करीन. माझ्या लोकांसाठी मी न थांबता आक्रोश करीन. का? कारण कोणीतरी त्यांच्यावर वार करून त्यांना चिरडले आहे. ते लोक गंभीररीत्या जखमी झाले आहेत.

[18]मी जर त्या देशात गेलो, तर मला तलवारीने मारले गेलेले लोक दिसतील. मी जर शहरात गेलो, तर मला सर्वत्र दौर्बल्य आढळेल. कारण लोकांच्याजवळ अन्न नाही. याजकांना आणि संदेष्ट्यांना परदेशात नेले आहे.’”

[19]“परमेश्वरा, तू यहूदाला पूर्णपणे त्याज्य ठरविले आहेस का? सियोनचा तुला तिरस्कार वाटतो का? आमची स्थिती परत न सुधारण्याइतके तू आमचे नुकसान केले आहेस. तू असे का केलेस? आम्हाला शांती पाहिजे होती. पण आमच्या वाट्याला काहीच चांगले आले नाही. जखमा भरून येण्याची आम्ही आशा केली, पण आमच्या वाट्याला फक्त भीती आली.

[20]परमेश्वरा, आम्ही पापी आहोत, ह्याची आम्हाला जाणीव आहे. आमच्या पूर्वजांनी दुष्कृत्ये केली. आम्ही तुझे अपराध केले.

[21]परमेश्वरा, तुझ्या नावाचा लौकिक राखण्याकरिता, आम्हाला दूर लोटू नकोस तुझ्या वैभवशाली सिंहासनाचा मान राख. आमच्याशी केलेला करार आठव. त्या कराराचा भंग करू नकोस.

[22]परदेशातील मूर्तीत पाऊस पाडण्याचे सामर्थ्य नाही. पावसाच्या सरी पाडण्याची ताकद आकाशात नाही. तूच एक आमचे आशास्थान आहेस. या सर्व गोष्टी करणारा तूच एकमेव आहेस.”

15 परमेश्वर मला म्हणाला, “यिर्मया, मोशे आणि शमुवेल जरी यहूदासाठी विनवणी करण्याकरिता माझ्याकडे आले असते तरी यहूदाची मला दया येणार नाही. यहूदाच्या लोकांची मला कीव वाटणार नाही. त्या लोकांना माझ्यापासून दूर ठेव. त्यांना निघून जाण्यास सांग. [2]ते लोक कदाचित् तुला विचारतील, ‘आम्ही कोठे जाऊ?’ तेव्हा तू त्यांना माझा पुढील संदेश दे परमेश्वर म्हणतो,

‘काही लोकांना मी मरणासाठी निवडले आहे. ते मरतीलच काही लोकांची निवड मी लढाईत मरण्यासाठी केली आहे. त्यांना तसेच मरण येईल. काहीना मी उपासमारीने मरण्यासाठी निवडले आहे. ते अन्नावाचून मरतील. काहीची निवड मी देशोधडीला लावण्यासाठीच केली आहे. त्यांना परदेशात कैदी म्हणून पाठविले जाईल.’

[3]मी त्यांच्यावर चार प्रकारचे संहारक सोडीन.’ हा परमेश्वराचा संदेश आहे. ‘मी त्यांना मारण्यासाठी तलवारधारी शत्रू पाठवीन. त्यांची शवे खेचून नेण्यासाठी मी कुत्र्यांना पाठवीन. त्यांची प्रेते खाण्यासाठी मी पक्षी व हिंस्र प्राणी सोडीन.

[4]पृथ्वीवरच्या सर्व लोकांना, एखाद्या भयंकर गोष्टीसाठी देण्याचे उदाहरण म्हणून मी यहूदाच्या लोकांचा उपयोग करीन. मनश्शेने यरुशलेममध्ये जे काय केले, त्यासाठी मी यहूदातील लोकांना शिक्षा करीन. कारण मनश्शे हा हिज्कीया राजाचा मुलगा व यहूदाचा राजा होता.’

[5]“यरुशलेम नगरी, तुझ्याबद्दल कोणालाही वाईट वाटणार नाही. कोणीही दु:खाने आक्रोश करणार नाही. तुझे कसे काय चालले आहे याची कोणीही विचारपूस करणार नाही.

[6]यरुशलेम, तू मला सोडून गेलीस!” हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. “तू पुन्हा पुन्हा माझा त्याग केलास. म्हणून मी तुला शिक्षा करीन. तुझा नाश करीन. तुझी शिक्षा पुढे ढकलण्याचा आता मला वीट आला आहे.

[7]मी माझ्या खुरपणीने यहूदाच्या लोकांना वेगळे काढीन आणि देशाच्या सीमेबाहेर पसरवून देईन माझे लोक सुधारले नाहीत म्हणून मी त्यांचा नाश करीन. मी त्यांच्या मुलांना घेऊन जाईन. [8]पुष्कळ स्त्रिया विधवा होतील. समुद्रातील वाळूच्यापेक्षा त्यांची संख्या जास्त असेल. भर मध्यान्ही मी संहारक आणीन. यहूद्यांच्या तरुण मुलांच्या आयांवर तो हल्ला करील. मी यहूदामधील लोकांना क्लेश देईन आणि त्यांच्यात घबराट निर्माण करीन. लवकरच मी हे घडवून आणीन.

[9]जे कोणी संहारातून बचावले असतील. त्यांना शत्रू हल्ला करून आपल्या तलवारींनी ठार मारेल. एखाद्या स्त्रीला जरी सात मुले असतील, तरी ती सर्व मरतील. त्या दु:खाने ती एवढा आक्रांत करील की ती अशक्त होऊन तिला श्वास घेणे कठीण होईल. ती उदास होईल व गोंधळून जाईल. दु:खाने तिला दिवसा, उजेडीही अंधार पसरल्यासारखे वाटेल.”

## यिर्मयाचे पुन्हा देवाकडे गाऱ्हाणे

[10]माते, तू मला (यिर्मयाला) जन्म दिलास याचा मला खेद वाटतो वाईट गोष्टीबद्दल सर्व देशावर दोषारोप व टीका करणे माझ्यासारख्याला भाग पडते. काहीही देणे घेणे नसताना, मला प्रत्येकजण शिव्याशाप देतो

[11]खरे म्हणजे परमेश्वरा, मी तुझी चांगली सेवा केली. संकटाच्या वेळी मी शत्रूंबद्दल तुझ्याकडे विनवणी केली.

---

**मी … करीन** याचा शब्दश अर्थ त्यांचा दुष्टपणा मी त्यांच्यावरच ओतीन.

## देवाचे यिर्मयाला उत्तर

12"यिर्मया, लोखंडाच्या तुकड्याचे कोणीही शतशा तुकडे
करू शकत नाही, हे तुला माहीत आहे. येथे लोखंड वा
पोलाद हा शब्द मी उत्तरेकडून येणाऱ्या पोलादासाठी
वापरत आहे. तसेच कोणीही काशाचे पण तुकडे तुकडे
करू शकत नाही.
13यहूदाच्या लोकांकडे बरीच संपत्ती आहे ती संपत्ती मी
दूसऱ्या लोकांना देईन.ती त्या लोकांना विकत घ्यावी
लागणार नाही. मीच ती त्यांना देईन. का? कारण यहूदाच्या
लोकांनी खूप पापे केली. यहूदाच्या प्रत्येक भागात त्यांनी
पापे केली.
14यहूदातील लोकांनो, मी तुम्हाला तुमच्या शत्रूचे गुलाम
करीन. तुम्हाला अनोळखी असलेल्या प्रदेशात तुम्ही गुलाम
व्हाल. मी खूप रागावलो आहे. माझा राग प्रखर
अग्नीसारखा आहे. त्यात तुम्ही जाळले जाल."
15परमेश्वरा, तू मला जाणतोस माझी आठवण ठेव व
माझी काळजी घे. लोक मला दुखवत आहेत त्यांना योग्य
ती शिक्षा कर. त्या लोकांशी तू संयमाने वागतोस. पण
त्यांना संयम दाखविताना, तू माझा नाश करू नकोस.
त्यांच्याशी संयमाने वागताना, माझा, मी तुझ्यासाठी भोगत
असलेल्या दु:खाचा परमेश्वरा विचार कर.
16मला तुझा संदेश मिळाला व मी तो खाल्ला (आत्मसात
केला.) तुझ्या संदेशाने मला खूप आनंद झाला. तुझ्या
नावाने ओळखले जाण्यात मला आनंद वाटतो कारण तुझे
नावच 'सर्वशक्तिमान परमेश्वर' असे आहे.
17लोकंच्या हसण्याखिदळण्यात आणि जल्लोशांत मी
कधीच सामील झालो नाही. माझ्यावर तुझा प्रभाव
असल्याने मी एकटाच बसून राहिलो. आजूबाजूला
असलेल्या दुष्टाईबद्दल तू माझ्यात क्रोध भरलास.
18पण तरीसुद्धा मी दुखावला का जातो? माझ्या जखमा
भरून येऊन बऱ्या का होत नाहीत, ते मला समजत
नाही. देवा, मला वाटते तू बदललास पाणी आटून गेलेल्या
झऱ्याप्रमाणे तू झालास. ज्यातून पाणी वाहायचे थांबले
आहे अशा प्रवाहाप्रमाणे तू झालास.
19मग परमेश्वर म्हणाला, "यिर्मया, तू बदललास आणि
माझ्याकडे परत आलास, तर मी शिक्षा करणार नाही.
मगच तू माझी सेवा करु शकतोस वायफळ बडबड न
करता, महत्वाचे तेवढेच बोललास, तर तू माझे शब्द
बोलू शकतोस. यहूदातील लोकांनी बदलावे व तुझ्याकडे
परत यावे. यिर्मया! पण तू मात्र त्यांच्यासारखा होऊ नकोस.
20त्या लोकांना तू काश्याची भिंत वाटशील, एवढा मी
तुला बलवान करीन. ते तुझ्याविरुद्ध लढतील, पण ते
तुझा पराभव करू शकणार नाहीत. का? कारण मी
तुझ्या पाठीशी आहे मी तुला मदत करीन आणि तुझे
रक्षण करीन." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
21"त्या दुष्ट लोकांपासून मी तुझे रक्षण करीन.ते लोक
तुला घाबरवितात. पण त्यांच्यापासून मी तुला वाचवीन."

## अरिष्टाचा दिवस

16 मला परमेश्वराचा संदेश आला: 2"यिर्मया, तू
लग्न करता कामा नये. या ठिकाणी तुला मुले
होता कामा नयेत"
3यहूदामध्ये जन्मणाऱ्या मुलांबद्दल आणि त्यांच्या
आईवडिलांबद्दल परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो. 4"त्या
लोकांना भयंकर वाईट प्रकारे मृत्यू येईल. त्यांच्यासाठी
कोणीही शोक करणार नाही. त्यांचे कोणीही दफन करणार
नाही. त्यांची प्रेते शेणाप्रमाणे जमिनीवर उघडी पडतील. ते
लोक शत्रूकडून मारले जातील वा उपासमारीने मरतील.
त्यांची प्रेते पक्षी व वन्य प्राणी ह्यांचे भक्ष्य होतील."
5म्हणून परमेश्वर म्हणतो, "यिर्मया, ज्या घरी लोक
अंत्यसंस्कारानंतर जेवण करीत असतील, त्या घरी तू
जाऊ नकोस. तेथे गेलेल्यासाठी शोक वा दु:ख प्रदर्शित
करायला जाऊ नकोस. ह्या गोष्टी तू करु नकोस. का?
कारण मी माझा आशीर्वाद मागे घेतला आहे. ह्या
लोकांबद्दल मला दया वाटणार नाही. मला त्यांच्याबद्दल
दु:ख होणार नाही." हा परमेश्वराचा संदेश आहे.
6"यहूदामध्ये महत्वाचे आणि सामान्य दोघेही मरतील.
त्यांचे कोणी दफन करणार नाही. अथवा त्यांच्याबद्दल
शोक करणार नाही. कोणीही दाढी करून वा मुंडन
करून त्यांच्यासाठी शोक प्रदर्शित करणार नाही.
7मृतांबद्दल शोक करणाऱ्यांसाठी कोणीही अन्न आणणार
नाही. ज्यांचे आईवडील गेले आहेत, त्यांचे कोणी सांत्वन
करणार नाही. मृतांसाठी शोक करणाऱ्यांसाठी, कोणीही
पेये आणून सांत्वन करणार नाही.
8"यिर्मया, ज्या घरात मेजवानी सुरु आहे, अशा घरात
तू जाऊ, नकोस, अशा घरात खाऊ पिऊ नकोस.
9सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, 'मी
लवकरच लोकांचा जल्लोश बंद पाडीन. लग्नसमारंभातील
आनंदकल्लोळ मी बंद करीन. तुझ्या आयुष्यातच हे घडेल,
इतक्या लवकर मी हे सर्व करीन.'
10"यिर्मया, यहूदाच्या लोकांना तू ह्या गोष्टी सांग लोक
तुला विचारतील 'परमेश्वराने आमच्याबद्दल या भयंकर
गोष्टी का सांगितल्या? आम्ही काय चूक केली? आम्ही
आमच्या परमेश्वर देवाचे काय पाप केले?' 11तेव्हा तू
त्यांना हे सांगितलेच पाहिजेस 'तुमच्या पूर्वजांनी परमेश्वराला
अनुसरायचे सोडल्याबद्दल ह्या भयंकर गोष्टी घडतील.'
हा देवाचा संदेश आहे. 'त्यांनी मला अनुसरायचे सोडले व
दुसऱ्या दैवतांना अनुसरण्यास सुरवात केली. ते त्यांची
सेवा करु लागले. त्यांनी दैवतांची पूजा केली. तुमच्या
पूर्वजांनी माझा त्याग केला आणि माझ्या आदेशांचे पालन
करणे सोडले. 12पण तुमच्या पूर्वजांपेक्षा तुम्ही वाईट पापे
केलीत. तुम्ही फार हटवादी आहात. तुम्हाला वाटेल ते
तुम्ही करता. माझ्या आज्ञा पाळत नाही. तुमचेच खरे
करता. 13म्हणून मी तुम्हाला देशाबाहेर हाकलीन. तुम्हाला
परदेशात जाणे भाग पाडीन, तुम्हाला किंवा तुमच्या

पूर्वजांनासुद्धा माहीत नसलेल्या देशांत तुम्ही जाल. त्या देशात, तुमच्या इच्छेप्रमाणे रात्रदिवस खोट्या देवांची सेवा तुम्ही करू शकाल, मी तुम्हाला मदतही करणार नाही किंवा तुमच्यावर कृपाही करणार नाही.'

14"आपल्या वचनाची खात्री देताना लोक म्हणतात 'परमेश्वराचे अस्तित्व जेवढे खरे आहे, तेवढे आपले वचन पक्के आहे. मिसरच्या भूमीतून इस्राएलच्या लोकांची सुटका त्या परमेश्वरानेच केली आहे.' पण आता देवाचा असा संदेश आहे, 'लोक वर म्हटल्याप्रमाणे म्हणणार नाहीत. असा काळ येऊ घातलेला आहे. 15लोक काहीतरी नवीनच म्हणतील, 'त्या परमेश्वराचे अस्तित्व खात्रीचे आहे, ज्याने इस्राएलच्या लोकांची उत्तरेतील प्रदेशातून सुटका केली.' त्यांना निरनिराळ्या प्रदेशांत पाठवून तेथून त्यांना परत आणणारा तोच एकमेव आहे' ते असे का म्हणतील? कारण इस्राएलच्या लोकांना मी त्याच्या पूर्वजांना दिलेल्या भूमीत परत आणीन.

16"लवकरच मी पुष्कळ कोळ्यांना येथे बोलावीन." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. "ते कोळी यहूदाच्या लोकांना पकडतील असे झाल्यावर मी पुष्कळ शिकाऱ्यांना आणीन. ते शिकारी प्रत्येक डोंगर, टेकड्या व कपारी यांमधून यहूदाच्या लोकांची शिकार करतील. 17त्यांची प्रत्येक कृती मला दिसते. यहूदाचे लोक त्यांची कृत्ये माझ्यापासून लपवू शकत नाहीत. त्यांचे पाप माझ्यापासून लपून राहात नाही. 18ती यहूदाच्या लोकांना त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल परत फेड करीन. मी यहूदाच्या लोकांना त्याच्या पापांची किंमत दामदुपटीने मोजायला लावीन. त्यांनी माझी भूमी 'अपवित्र' केली म्हणून मी असे करीन. त्यांनी भयानक मूर्ती स्थापून माझी भूमी कलंकित केली. मी त्या मूर्तीचा तिरस्कार करतो. पण त्यांनी माझा देशच त्या मूर्तींनी भरून टाकला."

## परमेश्वराजवळ प्रार्थना

19परमेश्वरा, तूच माझे सामर्थ्य आहेस आणि माझे संरक्षण आहेस. संकटकाळी धावत जाऊन आश्रय घ्यावा असे सुरक्षित स्थान तू आहेस. जगाच्या सर्व भागांतून राष्ट्रे तुझ्याकडे येतील. ते म्हणतील, "आमच्या वाडवडिलांनी खोटे देव जवळ बाळगले. त्या दीडदमडीच्या मूर्तींची पूजा केली. पण त्या मूर्तींनी त्यांना काहीही मदत केली नाही."

20लोक स्वत:साठी खरा देव निर्माण करू शकतात का? नाही. ते फक्त मूर्ती तयार करु शकतात. पण त्या मूर्ती म्हणजे खरे देव नव्हेत.

21परमेश्वर म्हणतो "म्हणून त्या मूर्ती बनविणाऱ्या लोकांना मी धडा शिकवीन. प्रथम मी त्यांना माझ्या शक्तीची व सामर्थ्याची जाणीव करून देईन. मग त्यांना कळेल की मीच खरा देव, मीच खरा परमेश्वर आहे."

## हृदयावर कोरलेला अपराध

17 "यहूदी लोकांची पापे, खोडता येणे शक्य नाही, अशा ठिकाणी लिहिली आहेत. ती लोखंडी लेखणीने दगडावर कोरली आहेत. हिरकणीचे टोक असलेल्या लेखणीने ती पाषाणावर कोरली आहेत. तो पाषाण म्हणजेच त्यांचे हृदय होय. ती पापे वेदीच्या शिंगांवर कोरली आहेत.

2खोट्या देवांना अर्पण केलेल्या त्या वेदी त्यांच्या मुलांना आठवतात. अशेरला अर्पण केलेले लाकडी खांब त्यांना आठवतात. टेकडीवरच्या व हिरव्या झाडाखालच्या त्या वस्तू त्यांना स्मरतात.

3विस्तीर्ण प्रदेशातील डोंगरावरील त्या वस्तू त्यांना आठवतात यहूदी लोकांकडे बरीच संपत्ती आहे ती सर्व मी दुसऱ्या देशांना देईन. तुम्ही जेथे पूजाआर्चा करता आणि जे पाप आहे, अशी उच्च स्थाने दुसरे लोक नष्ट करतील. 4मी तुम्हाला दिलेली भूमी तुम्ही गमवाल.मी तुमच्या शत्रूंना तुम्हाला गुलाम म्हणून अज्ञान भूमीत नेऊ देईन. का? कारण मी खूप संतापलो आहे. माझा संताप प्रखर अग्नीप्रमाणे आहे, त्यात तुम्ही कायमचे जळून भस्म व्हाल."

## लोकांवरील विश्वास आणि देवावरील विश्वास

5परमेश्वर म्हणतो, "जे दुसऱ्या लोकांवर विश्वास ठेवतात, त्यांचे वाईट होईल. सामर्थ्यासाठी जे दुसऱ्यावर विसंबतात, त्याचे भले होणार नाही का? कारण त्यांनी परमेश्वरावर विश्वास ठेवणे सोडून दिले.

6ते लोक वाळवंटातील झुडुपाप्रमाणे होत. निर्जन, उष्ण आणि कोरड्या व वाईट जमिनीवरील झुडुपाप्रमाणे ते आहेत. देव किती भले करू शकतो, ह्याची त्या झुडुपाला जाणीव नाही.

7परंतु परमेश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यावर कृपादृष्टी होईल. का? कारण परमेश्वर विश्वासास पात्र आहे, ह्याची देव त्याला प्रचिती देईल.

8तो माणूस पाण्याजवळ असलेल्या वृक्षाप्रमाणे बळकट होईल. त्या झाडाची मुळे लांब असल्याने त्याला पाणी मिळतेच. उष्ण दिवसांचे त्याला भय नसते. त्याची पाने नेहमीच हिरवी असतात. एखाद्या वर्षी पाऊस पडला नाही, तरी त्याला चिंता नसते. त्याला नेहमीच फळे धरतात.

9 "माणसाचे मन फार कपटी असते.त्याच्यावर काही औषध नाही. म्हणूनच कोणालाही मनाचे खरे आकलन होत नाही.

10पण मी प्रत्यक्ष परमेश्वर असल्याने, मी माणसाच्या मनात डोकावू शकतो मी माणसाच्या मनाची परीक्षा घेऊ शकतो. प्रत्येकाला काय हवे ते मी ठरवू शकतो प्रत्येकाला त्याच्या कर्माचे योग्य फळ मी देऊ शकतो.

11काही वेळा, एकादी पक्षीण स्वत: न घातलेले अंडे उबविते. धनासाठी जो माणूस फसवणूक करतो, तो ह्या पक्षिणी सारखाच असतो. अर्ध्या आयुष्यातच हा माणूस

धन गमावेल. त्याच्या आयुष्याच्या सरत्या काळात तो दुष्ट
म्हणून ओळखला जाईल."
12आरंभीपासून आमचे मंदिर म्हणजे देवासाठी एक
भव्य आसन झाले आहे. ती महत्वाची वास्तू आहे.
13परमेश्वरा, तू इस्राएलचे आशास्थान आहेस.तू
पाण्याच्या जिवंत झऱ्याप्रमाणे आहेस. जो परमेश्वराला
अनुसरणे सोडेल, त्याला लाजवले जाईल आणि त्याचे
आयुष्य अल्प असेल.*

## यिर्मयाची तिसरी तक्रार

14परमेश्वरा, तू मला बरे केलेस, तर मी पूर्ण बरा
होईन. तू मला वाचविलेस, तर मी खरोखच वाचेन. देवा,
मी तुझी स्तुती करतो.
15यहूदातील लोक मला सतत प्रश्न विचारतात.ते
विचारतात, "यिर्मया, परमेश्वराच्या संदेशाचे काय? तो
खरोखरीच खरा ठरतो का ते पाहू या."
16परमेश्वरा, मी तुला सोडून पळून गेलो नाही. मी
तुला अनुसरलो. मी तुला पाहिजे तसा मेंढपाळ बनलो. तो
भयंकर दिवस उजाडावा असे मला वाटत नव्हते. मी
सांगितलेल्या गोष्टी परमेश्वरा तुला माहीतच आहेत. काय
घडत आहे, ते तू पाहतोसच.
17परमेश्वरा, माझा नाश करू नकोस. संकटकाळी,
मला तुझा आधार वाटतो.
18लोक मला त्रास देतात. त्यांना तू खजील कर. पण
माझी निराशा करू नकोस. त्यांना धाक दाखव पण मला
घाबरवू नकोस तो भयंकर अरिष्टाचा दिवस माझ्या शत्रूंवर
आण आणि त्यांचा पुन्हा पुन्हा बिमोड कर.

## शब्बाथचा दिवस पवित्र मानणे

19परमेश्वराने मला पुढील गोष्टी सांगितल्या: "यिर्मया,
यहूदाचे राजे यरुशलेमच्या ज्या प्रवेशद्वारातून ये-जा
करतात, त्या लोकद्वारात जाऊन उभा राहा आणि लोकांना
माझा सदेश सांग. मग यरुशलेमच्या इतर प्रवेशद्वारापाशी
जाऊन हेच कर.
20"त्या लोकांना सांग, 'परमेश्वराचा संदेश ऐका.
यहूदाच्या राजांनो आणि लोकांनो व यरुशलेमच्या
प्रवेशद्वारांतून प्रवेश करणाऱ्या सर्वांनो, माझे ऐका.
21परमेश्वराने पुढील गोष्टी सांगितल्या आहेत: शब्बाथच्या
दिवशी तुम्ही ओझे वाहणार नाही याची काळजी घ्या. त्या
दिवशी, यरुशलेमच्या प्रवेशद्वारातून ओझी वाहून आणू
नका. 22त्या दिवशी, तुमच्या घरांतून ओझी बाहेर आणू
नका.त्या दिवशी कोणतेही काम करू नका. तुम्ही
शब्बाथचा दिवश एक पवित्र दिवस म्हणून पाळा. तुमच्या
पूर्वजांना मी हीच आज्ञा केली होती. 23पण त्यांनी ती
पाळली नाही. त्यांनी माझ्याकडे लक्ष दिले नाही. तुमचे
पूर्वज हटवादी होते. मी त्यांना शिक्षा केली, पण त्याचा
काहीच फायदा झाला नाही. त्यांनी माझे ऐकले नाही.
24पण तुम्ही माझी आज्ञा पाळण्याची काळजी घ्या.'" हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. "'शब्बाथच्या
दिवशी, यरुशलेमच्या प्रदेशद्वारातून, तुम्ही ओझी आणता
कामा नये. शब्बाथचे पावित्र्य राखा. कोणतेही काम न
करता तुम्ही हे करु शकता.
25"'तुम्ही जर ही आज्ञा पाळलीत, तर दावीदाच्या
सिंहासनावर बसणारे राजे यरुशलेमच्या प्रदेशद्वारांतून
येतील. ते रथांतून आणि घोड्यावरून येतील. यहूदाचे
आणि यरुशलेमचे नेते त्यांच्याबरोबर असतील.
यरुशलेममध्ये लोक कायमचे वास्तव्य करतील.
26यहूदाच्या शहरांतून लोक यरुशलेमला येतील,
यरुशलेमच्या आजूबाजूच्या खेड्यातून, बन्यामीनच्या
कुळातील लोक ज्या प्रदेशात राहतात,* त्या प्रदेशातून,
पश्चिमेच्या डोंगरपायथ्याच्या भागातून, डोंगराळ प्रदेशातून
आणि नेगेवमधून लोक यरुशलेमला येतील, हे सर्व लोक
होमार्पण धान्यार्पण, धूप आणतील आणि कृतज्ञता व्यक्त
करतील. ते हे सर्व परमेश्वराच्या मंदिरात आणतील.
27"'पण तुम्ही जर माझे ऐकले नाही अथवा माझी
आज्ञा पाळली नाही, तर वाईट गोष्टी घडतील जर तुम्ही
शब्बाथच्या दिवशी ओझे वाहिले, तर तुम्ही त्या दिवसाचे
पावित्र्य राखले नाही, असे होईल. मग कधीही
विझू न शकणारी आग मी लावीन. यरुशलेमच्या
प्रवेशद्वारापासून सुरु झालेली ही आग राजवाडे जाळेपर्यंत
जळत राहील.'"

## कुंभार आणि चिखल

18 हा संदेश यिर्मयाला परमेश्वराकडून आलेला
आहे: 2"यिर्मया, कुंभाराच्या घरी जा. मी तेथे
तुला माझा संदेश देईन."
3म्हणून मी कुंभाराच्या घरी गेलो, मी त्याला चाकावर
चिखल ठेवून काम करताना पाहिले. 4तो चिखलापासून
भांडे बनवीत होता. पण त्यात काहीतरी चुकले म्हणून
कुंभाराने त्याच चिखलाचा उपयोग करून दुसरे भांडे
बनविले. आपल्या हाताने त्याला पाहिजे तसा आकार
दिला.
5मग मला परमेश्वराचा संदेश मिळाला: 6"इस्राएलच्या
कुटुंबीयांनो, मी (देव) अगदी असेच तुमच्या बाबतीत करू
शकतो. तुम्ही जणू काही कुंभाराच्या हातातील चिखल
आहात आणि मी कुंभार आहे. 7मी राष्ट्र व राज्य ह्याबद्दल

---

**त्याचे ... असेल** शब्दश: अर्थ त्याचे नाव धुळीत लिहिले जाईल.' म्हणजेच कदाचित् त्याचे नाव लवकरच मरणाऱ्यांच्या यादीत लिहिले जाईल' किंवा वाळूत लिहिलेले नाव ज्याप्रमाणे पुसले जाते, तसे त्याचे आयुष्य लवकरच संपेल.

**बन्यामीनच्या ... राहतात** बन्यामीनचा देश यहूदाच्या उत्तरेला लागून होता.

बोलण्याची वेळ येण्याचा संभव आहे. मी कदाचित् त्या
राष्ट्राला वर ओढीन असे म्हणेन वा त्या राष्ट्रांला खाली
खेचून त्या राष्ट्राचा वा राज्याचा नाश करीन असेही
म्हणेन. 8पण त्या राष्ट्रातील लोकांचे हृदयपरिवर्तन झाल्यास
ते जगतील. त्या राष्ट्रातील लोक दुष्कृत्ये करण्याचे
कदाचित थांबवतील. मग माझे मतपरिवर्तन होईल. त्या
राष्ट्राचा नाश करण्याचा बेत मी अंमलात आणणार नाही.
9मी राष्ट्राबद्दल बोलण्याची आणखी एकदा वेळ, कदाचित्
येईल. मी ते राष्ट्र उभारीन आणि वसवेन असे मी म्हणेन.
10पण ते राष्ट्र पापे करीत आहे आणि माझी आज्ञा पाळत
नाही, असेही मला दिसण्याचा संभव आहे. मग मात्र त्या
राष्ट्राच्या भल्यासाठी योजलेल्या योजनांचा मला फेरविचार
करावा लागले.

11"म्हणून, यिर्मया, यरुशलेम आणि यहूदा येथे राहणाऱ्या
लोकांना सांग की परमेश्वर असे म्हणतो: 'आताच्या आता
तुमच्यावर संकटे आणण्याची मी तयारी करीत आहे. मी
तुमच्याविरुद्ध बेत आखत आहे. तेव्हा तुम्ही पापे करण्याचे
थांबवा. प्रत्येकाने बदलावे व सत्कृत्ये करावीत.' 12पण
यहूदातील लोक म्हणतील, 'असा प्रयत्न करून काही
भले होणार नाही. आम्हाला पाहिजे तेच आम्ही करीत
राहू आमच्यातील प्रत्येकाच्या हट्टी आणि दुष्ट मनाला
वाटेल तेच आम्ही करू.'"

13परमेश्वर सांगत असलेल्या गोष्टी ऐका: "दुसऱ्या
राष्ट्रांना हा प्रश्न विचारा. 'इस्राएलने केलेल्या पापाप्रमाणे,
पापे आणखी कोणी केल्याचे तुम्ही ऐकले आहे का?'
आणि इस्राएल तर देवाच्या दृष्टीने विशेष आहे. ती देवाच्या
वधूप्रमाणे आहे.

14तुम्हाला हेही माहीत आहे की लबानोनमधील
पर्वतांवरचे बर्फ कधीच वितळत नाही व थंड व सतत
वाहणारे झरे कधीच सुकत नाहीत.

15पण माझे लोक मला विसरले आहेत. ते कवडी
मोलाच्या मूर्तींना वस्तू अर्पण करतात. ते जे काय करतात,
त्यालाच अडखळतात त्यांच्या पूर्वजांच्या जुन्या रस्त्यांपाशी
ते अडखळतात माझी माणसे, माझ्यामागून चांगल्या मार्गाने
येण्याऐवजी, आडवळणाने व वाईट मार्गाने जाणे पसंत
करतील.

16म्हणून यहूदाचा देश म्हणजे एक निर्जन वाळवंट
होईल. ह्या देशाच्या जवळून जाताना, प्रत्येकवेळी लोक
धक्क्याने मान हलवून नि:श्वास सोडतील ह्या देशाचा,
अशा रीतीने, नाश झालेला पाहून त्यांना धक्का बसेल.

17मी यहूदाच्या लोकांची फाटाफूट करीन.ते त्यांच्या
शत्रूंपासून पळ काढतील. पूर्वेकडचा वारा ज्याप्रमाणे सर्व
वस्तू दूर उडवून देतो, त्याप्रमाणे मी यहूदातील लोकांना
दूर पसरवून देईन. मी त्या लोकांचा नाश करीन. मी
त्यांच्या मदतीला येत आहे, असे त्यांना दिसण्याऐवजी, मी
त्यांना सोडून जाताना दिसेन."

## यिर्मयाचे चौथे गाऱ्हाणे

18नंतर यिर्मयाचे शत्रू म्हणाले, "या आपण यिर्मयाविरुध्द
कट करू या. नियमांची शिकवण याजकांकडून नक्कीच
विसरली जाणार नाही. सुज्ञांचा सल्ला अजूनही
आमच्याजवळ असेल. आमच्यापाशी संदेष्ट्याचे शब्द
असतील. म्हणून त्याच्याबद्दल खोटे सांगू या. त्यामुळे त्याचा
नाश होईल. तो सांगत असलेल्या कोणत्याही गोष्टीकडे
आपण लक्ष द्यायचे नाही."

19परमेश्वरा, माझे ऐक! माझे म्हणणे ऐकून घे आणि
कोण बरोबर आहे ते ठरव

20चांगल्याची परतफेड लोकांनी दुष्टाव्याने करावी का?
नाही! देवा, मी केलेल्या गोष्टी तुला आठवतात का? मी
तुझ्यासमोर उभा राहिलो आणि ह्या लोकांना नू शिक्षा
करू नये म्हणून त्यांच्याविषयी चांगल्या गोष्टीमी तुला
सांगितल्या. पण ते मला सापळ्यात पकडून ठार मारायला
बघत आहेत.

21म्हणून दुष्काळात त्यांच्या मुलांची उपासमार होऊ
देत. त्यांचे शत्रू तलवारीने त्यांचा पराभव करू देत. त्यांच्या
बायका वांझ होऊ देत. यहूदातील पुरुषांना मृत्यू येऊ देत.
त्यांच्या बायकांना विधवा कर युद्धात तेथील तरूण मारले
जाऊ देत.

22त्यांच्या घरांत शोककळा पसरू देत. शत्रूला, अचानक,
त्यांच्यावर आक्रमण करायला लावून त्यांना रडव. माझ्या
शत्रूंनी मला सापळ्यात पकडण्याचा प्रयत्न केला, म्हणून
हे सर्व घडू देत. मी सापळ्यात अडकावे म्हणून त्यांनी
आपला सापळा लपवून ठेवला आहे.

23परमेश्वरा, मला मारण्यासाठी त्यांनी रचलेले बेत
तुला माहीत आहेतच. त्यांना त्यांच्या अपराधांबद्दल क्षमा
करू नकोस. त्यांची पापे पुसून टाकू नकोस. माझ्या
शत्रूंचा नाश कर. तू रागावला असतानाच त्या लोकांना
शिक्षा कर.

## फुटलेले मडके

19 परमेश्वर मला म्हणाला, "यिर्मया, जा आणि
कुंभाराकडून एक मातीचे मडके विकत घे.
2खापराच्या प्रवेशद्वाराजवळच्या बेन हिन्नोनच्या दरीकडे
जा. काही वडीलधाऱ्यांना नेत्यांना आणि याजकांना तुझ्या
बरोबर घे. मी तुला सांगतो त्या गोष्टी तेथे तू त्यांना सांग.
3तुझ्याबरोबर असलेल्या लोकांना सांग, 'यहूदाच्या राजांनो
आणि यरुशलेमच्या लोकांनो, परमेश्वराकडून आलेला
संदेश ऐका. सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएल लोकांचा
देव म्हणतो, "मी ह्या ठिकाणी लवकरच काहीतरी भयंकर
घडवून आणिन हे ऐकणारा प्रत्येकजण विस्मित होईल व
घाबरून जाईल. 4यहूदातील लोकांनी मला अनुसरायचे
सोडल्यामुळे मी हे घडवून आणीन. त्यांनी ही जागा परक्या
दैवतांना दिली. त्यांनी येथे दुसऱ्या दैवतांना होमबली अर्पण

केले. पूर्वी हे लोक त्या दैवतांना पूजत नव्हते. त्यांच्या
पूर्वजांनीही ह्या दैवतांची पूजा केली नाही. हे दुसऱ्या देशातून
आलेले दैवते आहेत. यहूदाच्या राजाने हे ठिकाण अश्राप
बआलकांच्या रक्ताने भिजवून टाकले आहे. [5]यहूदाच्या
राजाने बआल दैवतासाठी उच्चासने बांधली. लोक ह्या
जागांचा उपयोग आपल्या मुलांना अग्नीत जाळण्यासाठी
करतात. बआल दैवताला होमबली अर्पण केल्याप्रमाणे ते
आपली मुले जाळतात. मी त्यांना असे करायला सांगितलेले
नाही. मी तुमच्याजवळ तुमच्या मुलांचे बळी मागितलेले
नाहीत. अशा गोष्टी कधीही माझ्या मनातही आल्या नाहीत.
[6]हल्ली हिन्नोनच्या दरीला तोफेत म्हणतात. पण मी तुम्हाला
खात्रीपूर्वक सांगतो की अशी वेळ येईल की, हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे, त्या वेळी ह्या दरीला
लोक कत्तलीची दरी म्हणून ओळखतील. [7]येथेच मी
यहूदातील व यरुशलेममधील रचलेले बेत हाणून पाडीन.
त्या लोकांचा शत्रू पाठलाग करतील. मी ह्या ठिकाणी
यहूदातील लोकांना तलवारीच्या घावांनी मरू देईन. त्यांची
प्रेते गिधाडे व वन्य पशू ह्यांचे भक्ष्य होईल. [8]ह्या नगरीचा
मी पूर्णपणे नाश करीन. यरुशलेम जवळून जाताना लोक
निराशेने माना हलवतील व सुस्कारे सोडतील अशा तऱ्हेने
नगरीचा नाश झालेला पाहून त्यांना धक्का बसेल. [9]नगरीला
शत्रूसैन्याचा वेढा पडेल. ते सैन्य नगरीची रसद तोडेल. मग
नगरीतील लोकांची उपासमार सुरु होईल. लोकांना एवढी
भूक लागेल की ते स्वत:च्याच मुलांना खातील आणि
एकमेकांना खायला लागतील.'

[10]"यिर्मया, ह्या गोष्टी तू लोकांना सांग आणि लोक
पाहत असतानाच हे मडके फोड. [11]त्या वेळी पुढील गोष्टी
सांग: सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, 'कोणीतरी मातीचे
मडके फोडावे त्याप्रमाणे मी यहूदा व यरुशलेमला फोडीन;
हे मडके परत जोडता येणार नाही. यहूदाच्या बाबतही
असेच होईल. तोफेतमध्ये इतक्या मृतांना पुरण्यात येईल
की आणखी प्रेतांना पुरण्यास तेथे जागाच राहणार नाही.
[12]मी हे ह्या लोकांच्या बाबतीत ह्याच जागेवर घडवून
आणीन. मी ह्या नगरीला तोफेतप्रमाणे करीन.' हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. [13]'यरुशलेममधील
घरे तोफेतप्रमाणे अपवित्र होतील. राजांचे राजवाडे पण
तोफेतप्रमाणेच होतील. का? कारण लोकांनी त्या घराच्या
छपरांवर खोट्या देवांची पूजा केली. त्यांनी ताऱ्यांना पूजले
आणि त्यांच्याबद्दल आदर दाखविण्यासाठी हवी अर्पण केले.
दैवतांना त्यांनी पेयेही अर्पण केली.'"

[14]परमेश्वराने यिर्मयाला ज्या जागी प्रवचन देण्यास
सांगितले होते ती जागा म्हणजे तोफेत यिर्मयाने सोडली. तो
मग परमेश्वराच्या मंदिराकडे गेला. आणि मंदिराच्या
प्रांगणात उभा राहिला. यिर्मया सर्व लोकांना म्हणाला,
[15]"सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव काय म्हणतो
पाहा: 'मी यरुशलेमवर आणि त्याच्या आजूबाजूच्या
खेड्यांवर खूप अरिष्टे आणीन. लवकरच मी हे घडवून
आणीन. का? कारण लोक फार हट्टी झाले आहेत. ते
माझे ऐकत नाहीत आणि माझ्या आज्ञा पाळण्याचे
नाकारतात.'"

## यिर्मया आणि पशहूर

20 पशहूर नावाचा एक याजक होता. परमेश्वराच्या
मंदिरातील तो मुख्य अधिकारी होता. तो इम्मेरचा
मुलगा होता. यिर्मयाने मंदिराच्या प्रांगणात केलेल्या
भविष्यकथनात, ज्या सर्व गोष्टी सांगितल्या, त्या पशहूरने
ऐकल्या. [2]म्हणून त्यांने यिर्मया या संदेष्ट्याला मारले व
लाकडाच्या मोठ्या ठोकळ्यात त्याचे हातपाय अडकविले.
मंदिराच्या वरच्या प्रवेशद्वाराजवळ बन्यामीनच्या
प्रवेशद्वाराजवळ हे घडले. [3]दुसऱ्या दिवशी पशहूरने
यिर्मयाला खोड्यातून मोकळे केले, तेव्हा यिर्मया पशहूरला
म्हाणाला, "तुझे परमेश्वराने ठेवलेले नाव पशहूर नाही,
तर 'प्रत्येक बाजूला भय' असे आहे. [4]हेच तुझे नाव
कारण परमेश्वर म्हणतो, 'मी तुलाच तुझे भय करीन
तुझ्या सर्व मित्रांना तू भीतिदायक होशील. तुझ्या मित्रांना
शत्रू तलवारीने मारताना पाहशील. मी यहूदातील सर्व
माणसांना बाबेलच्या राजाच्या स्वाधीन करीन. तो त्यांना
बाबेल देशात घेऊन जाईल. आणि त्याचे सैन्य त्यांना
तलवारीने कापून काढील. [5]यरुशलेमच्या लोकांनी खूप
कष्ट करून वस्तू गोळा केल्या आणि ते श्रीमंत झाले.
पण मी त्यांच्या सर्व गोष्टी शत्रूला देईन. यरुशलेमच्या
राजाकडे पुष्कळ संपत्ती आहे. पण ती सर्व संपत्ती मी
शत्रूला देईन. शत्रू ती सर्व संपत्ती बाबेल देशात नेईल.
[6]पशहूर, तुला आणि तुझ्या घरातील सर्व लोकांना घरातून
नेले जाईल. तुम्हाला जबरदस्तीने नेले जाईल. तुम्हाला
बाबेल देशात राहावे लागेल. तू तेथेच मरशील आणि त्या
परक्या देशातच तुला पुरतील. तू तुझ्या प्रवचनात खोट्या
गोष्टी सांगितल्यास. ह्या गोष्टी घडणार नाहीत. असे खोटे
सांगितलेस. तुझे सर्व मित्रही बाबेलमध्येच मरतील आणि
त्यांना तिथेच पुरले जाईल.'"

## यिर्मयाचे पाचवे गाऱ्हाणे

[7]परमेश्वरा, तू मला मोहित केलेस आणि मी पण मोहित
झालो* तू माझ्यापेक्षा समर्थ असल्याने तू जिंकलासमी
हास्यास्पद ठरलो. लोक माझ्याकडे पाहून हसतात आणि
माझी चेष्टा करतात
[8]प्रत्येक वेळी मी बोलतो, ओरडतो मी हिंसा आणि
विध्वंस ह्याबद्दल आरडाओरड करतोमी मला
परमेश्वराकडून आलेला संदेश लोकांना सांगतो. पण

---

**मी ... झालो** देवाच्या वचनावर यिर्मयाचा विश्वास होता (पाहा 1:8) जेव्हा त्याची संदेष्टा म्हणून नेमणूक केली गेली तेव्हा तो स्वत:ला शत्रूपेक्षा बलवान समजला. पण शत्रूने त्याला त्रास दिल्यामुळे आपली फसवणूक झाली असे त्याला वाटले.

लोक माझा फक्त अपमान करतात आणि माझी चेष्टा करतात.

9कधी कधी मी स्वत:शीच म्हणतो, “मी परमेश्वराला विसरून जाईन. मी परमेश्वरा च्यावतीने ह्यापुढे बोलणार नाही.” पण मी असे म्हणताच परमेश्वराचा संदेश माझ्या मनात अग्नीप्रमाणे दाह निर्माण करतो. त्या वेळी, माझ्या हाडांच्या आत आत काही जळत आहे,असे मला वाटते. मी परमेश्वराचा संदेश माझ्या मनात फार वेळ दाबून ठेवू शकत नाही. आणि शेवटी तो मनात ठेवणे मला अशक्य होते.

10लोक माझ्याबद्दल कुजबुजताना मी ऐकतो. सगळीकडून ज्या गोष्टी मी ऐकतो, त्याने मी घाबरतो इतकेच नाही, तर माझे मित्रही माझ्याविरुद्ध बोलतात. मी काहीतरी चूक करावी म्हणून लोक वाट पाहात आहेत. ते म्हणत आहेत, “आपण खोटे बोलू या आणि त्याने वाईट कृत्य केल्याचे सांगू या. यिर्मयाला फसविणे कदाचित् शक्य आहे. मग तो आपल्या हातात सापडेल व आपली त्याच्यापासून सुटका होईल. मग आपण त्याला पकडू आणि सूड घेऊ.”

11पण परमेश्वर माझ्या पाठीशी आहे.परमेश्वर बलवान सैनिकाप्रमाणे आहे. म्हणून माझा पाठलाग करणारे पडतील. ते माझा पराभव करू शकणार नाहीत. ते पडतील, त्यांची निराशा होईल. त्यांची नामुष्की होईल आणि ही त्यांची नामुष्की इतर लोक कधीही विसरणार नाहीत.

12सर्व शक्तिमान परमेश्वरा तू चांगल्या लोकांची परीक्षा घेतोस. तू माणसाच्या मनात खोलवर पाहतोस. मी त्या लोकांविरुद्धचे माझे मुद्दे तुला सांगितले. मग आता तू त्यांना योग्य शिक्षा करताना मला पाहायला मिळू देत.

13परमेश्वराचे स्तवन करा. परमेश्वराची स्तुती करा. परमेश्वर गरिबांचे रक्षण करतो. तो दुष्टापासून त्यांना वाचवितो.

## यिर्मयाचे सहावे गाऱ्हाणे

14माझ्या जन्मदिवसाला शाप द्या. ज्या दिवशी मी आईच्या पोटी जन्माला आलो, त्या दिवसाला शुभ मानू नका.

15माझ्या जन्माची बातमी माझ्या वडिलाना देणाऱ्या माणसाला शाप द्या. “तुम्हाला मुलगा झाला” असे त्याने सांगताच माझ्या वडिलांना खूप आनंद झाला.

16परमेश्वराने नगरांचा जसा नाश केला,* तसाच त्या माणसांचाही होवो. परमेश्वराला त्या नगरांबदल अजिबात दया नाही. त्या माणसाला सकाळ दुपार युद्धाचा गदारोळ ऐकू येऊ देत.

17का? कारण त्या माणसाने, मी आईच्या पोटात असतानाच, मला मारले नाही. त्याने मला मारले असते, तर आईच माझी कबर झाली असती व माझा जन्मच झाला नसता.

18मी कशाला जन्मलो? मी फक्त क्लेश व दु:ख पाहिले. आणि माझे जीवन नामुष्कीत संपणार.

## देव सिद्कीया राजाची विनंती नाकरतो

21 यहूदाचा राजा सिद्कीया याने पशहूरला आणि सफन्या नावाच्या याजकाला यिर्मयाकडे पाठविले. त्याच वेळी यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. पशहूर हा मल्कीयाचा मुलगा होता, तर सफन्या मासेचा मुलगा होता. पशहूर व सफन्या ह्यांनी यिर्मयासाठी निरोप आणला. 2पशहूर आणि सफन्या यिर्मयाला म्हणाले, “आमच्यासाठी परमेश्वराजवळ प्रार्थना कर. काय घडणार आहेत ते परमेश्वराला विचार. कारण बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर आपल्यावर स्वारी करीत आहे, म्हणून आम्हाला भविष्यात काय घडणार हे जाणून घ्यायचे आहे. कदाचित् परमेश्वर पूर्वीप्रमाणे काही विस्मयकारक घटना घडवून आणील. कदाचित् परमेश्वर नबुखद्नेस्सरला स्वारी करण्यापासून परावृत्त करील व परतवून लावेल.”

3नंतर पशहूर व सफन्या यांना यिर्मया म्हणाला, “सिद्कीया राजाला सांगा, 4परमेश्वर, इस्राएलचा देव असे म्हणतो ‘तुमच्याजवळ युद्धोपयोगी शस्त्रे आहेत. तुम्ही त्याचा उपयोग बाबेलचा राजा व खास्दी यांच्यापासून तुमचे रक्षण करण्यासाठी करीत आहात. मी ती शस्त्रे निरुपयोगी करीन.

“‘बाबेलचे सैन्य नगरीच्या तटबंदीबाहेर सगळीकडे पसरले आहे. लवकरच त्या सैन्याला मी यरुशलेममध्ये आणीन. 5मी स्वत: यहूदाच्या लोकांविरुद्ध म्हणजे तुमच्याविरुद्ध लढेन. मी माझ्या सामर्थ्यवान हाताने तुमच्याशी युद्ध करीन. कारण मी तुमच्यावर फार रागावलो आहे. मी तुमच्याविरुद्ध जोरदार युद्ध करून माझ्या तुमच्यावरील रागाची तीव्रता सिद्ध करीन. 6यरुशलेममध्ये राहाणाऱ्या लोकांना मी ठार मारीन. सर्व शहरात रोगराई पसरवून मी माणसांना व प्राण्यांना मारीन. 7असे घडल्यावर,’” हा परमेश्वराचा संदेश आहे, “मी यहूदाचा राजा सिद्कीया याला, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याच्या स्वाधीन करीन. मी सिद्कीयाच्या अधिकाऱ्यानासुद्धा नबुखदनेस्सरच्या हवाली करीन. यरुशलेममधील काही लोक भयंकर रोगराई अथवा लढाई वा उपासमार याने मरणार नाहीत. पण त्या सर्वांना मी नबुखद्नेस्सरच्या ताब्यात देईन. मी यहूदाच्या शत्रूला विजयी करीन. नबुखद्नेस्सरच्या सैन्याला यहूदातील लोकांना ठार मारायचे आहे. म्हणून यहूदातील व यरुशलेममधील लोक तलवारीच्या घावाने मारले जातील. नबुखद्नेस्सर त्या लोकांना अजिबात दया दाखविणार नाही व त्यांच्याबद्दल त्याला दु:खही वाटणार नाही.’

8“यरुशलेममधील लोकांना असेही सांग, असे म्हणून परमेश्वराने पुढील गोष्टी सांगितल्या, ‘मी तुम्हाला जीवन

---

**देवाने ... केला** सदोम आणि गमोरा पाहा उत्पती 19.

मरण ह्यात निवड करण्याचे स्वातंत्र्य देईन. मी काय
म्हणतो ते समजावून घ्या. 9जो यरुशलेममध्ये राहील तो
लढाईत, उपासमारीने वा भयंकर रोगराईने मरेल, पण
जो कोणी यरुशलेमच्या बाहेर जाऊन बाबेलच्या सैन्याला
शरण जाईल. तो जगेल, त्या सैन्याने नगरीला वेढा घातला
आहे. म्हणून नगरीला रसद मिळू शकत नाही. पण जो
कोणी नगर सोडून जाईल, त्याचा जीव वाचेल. 10यरुशलेम
नगरीवर संकट आणण्याचे मी ठरविले आहे. मी तिला
मदत करणार नाही.'" हा परमेश्वराचा संदेश आहे. "'मी
बाबेलच्या राजाला यरुशलेम देऊन टाकीन. तो ती आगीत
भस्मसात करील.'

11"यहूदाच्या राजघराण्याला हे सांगा: परमेश्वराकडून
आलेला संदेश ऐका.
12दावीदाच्या घराण्यातील लोकांनो, परमेश्वर असे
म्हणतो, 'तुम्ही दररोज न्याय्यपणे लोकांचा निवाडा केला
पाहिजे. गुन्हेगारांपासून बळींचे रक्षण करा. तुम्ही असे
केले नाही, तर मी खूप रागावेन. माझा राग, कोणीही
विझवू न शकणाऱ्या अग्नीप्रमाणे असेल. तुम्ही दुष्कृत्ये
केली म्हणून असे होईल.'
13"यरुशलेम, मी तुझ्याविरुद्ध आहे.तू डोंगराच्या
शिखरावर बसतेस. तू ह्या दरीच्यावर राणीप्रमाणे बसतेस.
तुम्ही, यरुशलेममध्ये राहणारे लोक, म्हणता, 'कोणीही
आमच्यावर हल्ला करू शकणार नाही. कोणीही आमच्या
भक्कम नगरीत येणार नाही.' पण परमेश्वराकडून आलेला
हा संदेश ऐका:
14'तुम्हाला योग्य अशी शिक्षा मिळेल. तुमच्या रानास
मी आग लावेन ती आग तुमच्याभोवतीचे सर्व काही
जाळून टाकील.'"

## पापी राजांविरुद्ध निवाडा

22 परमेश्वर म्हणाला, "यिर्मया, राजवाड्यात जा
आणि यहूदाच्या राजाला हा संदेश आवर्जून सांग:
2'यहुदाच्या राजा, परमेश्वराकडून आलेला संदेश ऐक. तू
दावीदच्या सिंहासनावर बसून राज्य करतोस म्हणून हे
ऐक. राजा, तू आणि तुझ्या अधिकाऱ्यांनी माझे म्हणणे
ऐकलेच पाहिजे. यरुशलेमच्या प्रवेशद्वारावरून जाणाऱ्या
सर्व लोकांनी माझा संदेश ऐकलाच पाहिजे. 3परमेश्वर
म्हणतो, "फक्त योग्य व न्याय्य गोष्टीच करा. लुटल्या
जात असलेल्या लोकांचे लुटारूपासून रक्षण करा. अनाथ
मुलाशी अथवा विधवांशी वाईट वागू नका अथवा त्यांना
दुखवू नका. निरपराध्यांना मारू नका. 4तुम्ही माझ्या ह्या
आज्ञा पाळल्यात, तर काय होईल? दावीदाच्या सिंहासनावर
बसणारे राजे यरुशलेममध्ये, त्यांच्या अधिकाऱ्यांबरोबर
व लोकांबरोबर, रथांतून आणि घोड्यावर स्वार होऊन
आत येत राहतील. 5पण जर तुम्ही आज्ञा पाळल्या नाहीत,
तर परमेश्वर काय म्हणतो पाहा, मी, परमेश्वर, वचन
देतो की राजवाड्याचा नाश होऊन तेथे दगडविटांचा ढिगारा
होईल.'" 6यहूदाचा राजा राहत असलेल्या राजवाड्याबद्दल
परमेश्वराने पुढील उद्गार काढले.

"गिलादच्या जंगलाप्रमाणे वा लबानोनच्या पर्वताप्रमाणे
राजवाडा उंच आहे. पण मी त्याला वाळवंटाप्रमाणे करीन.
निर्जन शहराप्रमाणे तो ओसाड होईल.
7मी राजवाड्याचा नाश करण्यास माणसे पाठवीन. त्या
प्रत्येकाच्या हातात शस्त्र असेल. त्यांचा उपयोग ते राजवाडा
नष्ट करण्यासाठी करतील. ही माणसे, गंधसरुपासून
बनविलेल्या भक्कम व सुंदर तुळ्या कापून जाळून
टाकतील.

8"अनेक राष्ट्रांतील लोक या नगरीजवळून जाताना
एकमेकांना विचारतील 'यरुशलेम ह्या भव्य नगरीच्या
बाबतीत परमेश्वराने असे भयंकर कृत्य का केले?' 9ह्या
प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे असेल: 'यहूदातील लोक
परमेश्वर देवाबरोबर झालेल्या कराराप्रमाणे वागले नाहीत.
त्यांनी अन्य दैवतांना पूजले आणि त्यांची सेवा केली,
म्हणून देवाने यरुशलेमचा नाश केला.'"

## राजा यहोआहाज (शल्लूम) ह्याच्याविरुद्ध निवाडा

10मेलेल्या राजाकरिता* रडू नका. त्याच्यासाठी शोक
करू नका. पण हे ठिकाण सोडून जावे लागणाऱ्या
राजासाठी मात्र मोठ्याने रडा* कारण तो परत येणार
नाही. यहोआहाज त्याची जन्मभूमी पुन्हा कधीही पाहणार
नाही.

11योशीयाचा मुलगा शल्लूम (यहोआहाज) ह्याच्याबद्दल
परमेश्वर असे म्हणतो: (राजा योशीया यांच्या मृत्यूनंतर
त्याचा मुलगा शल्लूम यहूदाचा राजा झाला) "यहोआहाज
यरुशलेम सोडून दूर गेला आहे. तो पुन्हा यरुशलेममध्ये
येणार नाही. 12मिसरच्या लोकांनी यहोआहाजला पकडून
नेले आहे. तो तेथेच मरेल. त्याला परत ही भूमी दिसणार
नाही."

## राजा यहोयाकीमविरुद्ध निवाडा

13राजा यहोयाकीमचे वाईट होईल. तो वाईट गोष्टी
करीत आहे. आपला महाल तो बांधू शकेल. लोकांना

---

**मेलेला राजा** म्हणजे इ.स. पूर्वी 609 मध्ये मिसर देशाविरुद्धच्या युद्धात मारला गेलेला राजा योशीया.

**हे ठिकाण ... राजासाठी रडा** हा राजा म्हणजे योशीयाचा मुलगा यहोआहाज. योशीयाच्या मृत्यूनंतर तो राजा झाला. त्याचे दुसरे नाव शल्लूम. मिसरचा राजा नेको याने योशीयाचा पराभव केला. त्याने यहोआहाजला यहूदाच्या गादीवरून उतरविले व कैदी म्हणूण मिसरला नेले.

फसवून त्यावर माड्या चढवू शकेल. तो लोकांना काहीही
न देता त्यांच्याकडून काम करवून घेतो, त्यांना कामाची
मजुरी देत नाही.
14यहोयाकीम म्हणतो, "मी माझ्यासाठी मोठा वाडा
बांधीन. त्याला खूप मोठे मजले असतील." तो मोठ्या
खिडक्या असलेले घर बांधतो. तो तक्तपोशीसाठी गंधसरू
वापरतो आणि तक्तपोशीला लाल रंग देतो.
15यहोयाकीम, तुझ्या घरात खूप गंधसरू आहे म्हणून
त्यामुळे काही तू मोठा राजा होत नाहीस. तुझे वडील
योशीया अन्नपाण्यावरच समाधानी होते. त्यांनी फक्त
योग्य व न्याय्य गोष्टीच केल्या. त्यांच्या ह्या कृत्यांमुळे
त्यांच्याबाबतीत सर्व सुरळीत झाले.
16योशीयाने गरीब व गरजू अशा लोकांना मदत केली.
त्यामुळे त्यांचे सर्व व्यवस्थित झाले. यहोयाकीम, 'देवाला
ओळखणे ह्याचा अर्थ काय?' ह्याचा अर्थ योग्य रीतीने
जगणे व न्यायीपणाने वागणे. मला ओळखणे ह्याचा अर्थ
हाच होय. हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
17यहोयाकीम, तुला फक्त तुझा फायदाच दिसतो. तू
तुझ्यासाठी जास्तीत जास्त मिळविण्याचाच फक्त विचार
करतोस. निरापराध्यांना ठार मारण्यात व दुसऱ्याकडून
वस्तू चोरण्यातच तुझे मन जडले असते.
18योशीयाचा मुलगा राजा यहोयाकीम ह्यास परमेश्वर
असे म्हणतो की "यहोयाकीमसाठी यहूदातील लोक राहणार
नाहीत. 'हे माझ्या बंधू, मला यहोयाकीमबद्दल वाईट वाटते.'
असे ते एकमेकांना म्हणणार नाहीत. यहोयाकीमबद्दल ते
शोक करणार नाहीत. 'हे स्वामी! हे राजा! मला खूप
वाईट वाटते! मला खूप दु:ख होते!' असे ते म्हणणार
नाहीत.
19एखाद्या गाढवाला पुरावे तसे यरुशलेममधील लोक
यहोयाकीमचे दफन करतील. ते त्याचा मृत देह फरपटत
नेऊन यरुशलेमच्या वेशीबाहेर फेकून देतील.
20"यहूदा, लबानोनच्या डोंगरावर जाऊन मोठ्याने
ओरड.बाशानच्या डोंगरात तुझा आवाज ऐकू जाऊ देत.
अबारीमच्या डोंगरात जाऊन मोठ्याने ओरड. का? कारण
तुझ्या सर्व 'प्रियकराचा' नाश केला जाईल.
21"यहूदा, तुला सुरक्षित वाटले. पण मी तुला इशारा
दिला होता. पण तू माझे ऐकण्याचे नाकारलेस. तू तरुण
असल्यापासून अशीच वागत आलीस. तू तरुण
असल्यापासून माझ्या आज्ञा पाळल्या नाहीस, यहूदा!
22म्हणून मी दिलेली शिक्षा झंझावाताप्रमाणे येईल. ती
तुझ्या सर्व मेंढपाळांना लांब उडवून देईल. तुला वाटले
की दुसरी राष्ट्रे तुला मदत करतील. पण त्या राष्ट्रांचाही
पराभव होईल. मग खरोखरच तू निराश होशील. तू
केलेल्या वाईट गोष्टींची तुला लाज वाटेल.
23"राजा, तू तुझ्या उंच डोंगरावरच्या गंधसरुच्या
लाकडापासून बनविलेल्या वाड्यात राहतोस! म्हणजेच जणू
काही जेथून हे लाकूड येते त्या लबानोनमध्येच राहतोस
तुला वाटते की तू सुरक्षित आहेस! कारण तू उंच डोंगरावर
मोठ्या घरात राहतोस पण तुला शिक्षा झाल्यावर तू खरोखर
विव्हळशील. तुला प्रसूतिवेदनांप्रमाणे वेदना होतील."

## राजा यहोयाकीन (कोन्या) याच्याविरुध्द निवाडा

24"मी निश्चितपणे आहे म्हणूनच हे तुझ्याबाबत घडेल"
हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे, "यहोयाकीन,
यहोयाकीमच्या मुला, यहूदाच्या राजा, जरी तू माझ्या उजव्या
हातातील मुद्रा असलास, तरीही मी तुला उखडून टाकले
असते. तुझ्याबाबतीत असेच घडेल. 25यहोयाकीन, मी तुला
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर व खास्दी लोक ह्यांच्या
हवाली करीन. तू त्या लोकांना घाबरतोस. ते तुला ठार
मारू इच्छितात. 26तुझी व तुझ्या आईची जन्मभूमी नसलेल्या
देशात, मी, तुला व तुझ्या आईला फेकून देईन. तेथेच
तुम्ही दोघे मराल. 27यहोयाकीन, तू ह्या भूमीत परत यायला
बघशील. पण तुला येथे परत येऊ दिले जाणार नाही."

28कोणीतरी फेकून दिलेल्या, फुटक्या भांड्याप्रमाणे
कोन्या (यहोयाकीन) आहे. कोणालाही नको असलेल्या
भांड्याप्रमाणे तो आहे. यहोयाकीन व त्याची मुले ह्यांना
बाहेर का फेकले जाईल? परक्या देशात त्यांना का
फेकून देण्यात येईल?
29यहूदाच्या हे भूमी, भूमी, भूमी, परमेश्वराचा संदेश
ऐक!
30परमेश्वर म्हणतो, "यहोयाकीनबद्दल हे लिहून घे.
तो नि:संतान आहे, 'तो त्याच्या आयुष्यात यशस्वी होणार
नाही. त्याचा कोणताही मुलगा दावीदच्या सिंहासनावर
बसणार नाही कोणताही मुलगा यहूदावर राज्य करणार
नाही.'"

23 "यहूदातील लोकांच्या मेंढपाळांचे (नेत्यांचे) वाईट
होईल, ते मेंढ्यांचा नाश करीत आहेत. ते माझ्या
कुरणातून त्यांना चहूबाजूना पळवून लावीत आहेत." हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
2ते मेंढपाळ (नेते) माझ्या लोकांना जबाबदार आहेत,
आणि परमेश्वर, इस्राएलचा देव त्या मेंढपाळांना पुढील
गोष्टी सांगतो "तुम्ही मेंढपाळांनी (नेत्यांनी) माझ्या मेंढ्यांना
चारी दिशांना पळून जाण्यास भाग पाडले आहे. त्यांना
तुम्ही जबरदस्तीने लांब जायला लावले. तुम्ही त्यांची
काळजी घेतली नाही. पण मी तुमची काळजी घेईन. मी
तुम्हाला तुमच्या वाईट कृत्यांबद्दल शिक्षा करीन." हा
परमेश्वराचा संदेश आहे. 3"मी माझ्या मेंढ्या (लोक)
दुसऱ्या देशांत पाठविल्या पण ज्या मेंढ्या (लोक दुसऱ्या
देशात गेल्या आहेत, त्यांना मी गोळा करीन. मी त्यांना
त्यांच्या कुरणात परत आणीन. त्या मेंढ्या (लोक) त्यांच्या
कुरणात (देशात) परत आल्यावर, त्यांना पुष्कळ संतती
होऊन त्यांची संख्या वाढेल. 4मी माझ्या मेंढ्यांसाठी नवीन

मेंढपाळ (नेते) नेमीन. ते मेंढपाळ (नेते) माझ्या मेंढ्यांची (लोकांची) काळजी घेतील व माझ्या मेंढ्या (लोक) घाबरणार नाहीत वा भयभीत होणार नाहीत. माझी एकही मेंढी (माणूस) हरवणार नाही." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

## सदाचरणी "अंकुर"

5हा परमेश्वराचा संदेश आहे. "मी चांगला अंकुर निर्माण करण्याची वेळ येत आहे." तो चांगला अंकुर सुज्ञपणे राज्य करणारा राजा असेल. देशात योग्य व न्याय्य गोष्टी तो करेल.
6त्या चांगल्या 'अंकुराच्या' काळात यहूदातील लोक वाचतील. आणि इस्राएल सुरक्षित राहील. त्याचे नाव असेल परमेश्वर आमचा चांगुलपणा.

7""चिरंजीव असणाऱ्या, एकमेव असणाऱ्या परमेश्वराने इस्राएलच्या लोकांना मिसर देशातून बाहेर आणले' हे जुने वचन लोक पुन्हा उच्चारणार नाहीत, असे दिवस येत आहेत." हा परमेश्वराचा संदेश आहे.
8पण लोक काही नवीनच बोलतील. 'परमेश्वर चिरंजीव आहे परमेश्वर एकमेव आहे. त्याने इस्राएलच्या लोकांना उत्तरेकडील देशातून बाहेर आणले. त्याने त्या लोकांना ज्या ज्या देशात पाठविले होते, त्या त्या देशांतून बाहेर आणले.' मग इस्राएलचे लोक त्यांच्या स्वत:च्या देशात राहतील."

## खोट्या संदेष्ट्यांविरुद्ध निवाडा

9संदेष्ट्यांना संदेश: मी फार दु:खी आहे. माझे हृदय विदीर्ण झाले आहे. माझी सर्व हाडे थरथरत आहेत. माझी (यिर्मयाची) स्थिती मद्यप्यासारखी झाली आहे. का? परमेश्वरामुळे व त्याच्या पवित्र शब्दांमुळे.
10व्यभिचाराचे पाप केलेल्या लोकांनी यहूदा भरून गेला आहे. लोकांनी अनेक मार्गांनी निष्ठेचा त्याग केला आहे. परमेश्वराने शाप दिला आणि ही भूमी ओसाड झाली. कुरणातील हिरवळ वाळून मरत आहे. शेते वाळवंटाप्रमाणे झाली आहेत. संदेष्टे दुष्ट आहेत ते त्यांचे बळ (वजन) व शक्ती चुकीच्या पद्धतीने वापरतात.
11"संदेष्टेच काय, पण याजकसुद्धा पापी आहेत. माझ्या मंदिरात दुष्कृत्ये करताना मी त्यांना पाहिले आहे." हा परमेश्वराचा संदेश आहे.
12"मी माझा संदेश त्यांच्याकडे पाठविण्याचे बंद करीन. मग त्यांची स्थिती अंधारात चालणाऱ्यांसारखी होईल. मी असे केल्यास संदेष्टे व याजक ह्यांच्यासाठी वाट जणू निसरडी होईल. ते त्या अंधारात पडतील मी त्यांच्यावर अरीष्ट आणीन. मी त्यांना शिक्षा करीन." हा देवाकडून आलेला संदेश आहे.
13"शोमरोनच्या संदेष्ट्यांनी चुकीच्या गोष्टी केल्याचे मी पाहिले. मी त्यांना बआल या खोट्या दैवताच्या नावाने भविष्य वर्तविताना पाहिले. त्यांनी इस्राएलच्या लोकांना परमेश्वरापासून दूर नेले.
14आता मी यहूदाच्या संदेष्ट्यांना यरुशलेममध्ये भयंकर गोष्टी करताना पाहिले आहे. ते व्यभिचाराचे पाप करतात. ते खोट्या गोष्टी ऐकतात आणि खोट्या शिकवणुकीचे पालन करतात. ते दुष्टांना दुष्कृत्ये करायला प्रोत्साहन देतात. म्हणून लोक पाप करीतच राहतात. ते सदोममधील माणसाप्रमाणे आहेत. यरुशलेम आता मला गमोऱ्यासारखे वाटते."
15सर्वशक्तिमान परमेश्वर संदेष्ट्यांबद्दल म्हणतो, "मी त्या संदेष्ट्यांना शिक्षा करीन. विषमिश्रित अन्न खाण्यासारखी वा जहरमिश्रित पाणी पिण्यासारखी ती शिक्षा असेल. संदेष्ट्यांनी हा आध्यात्मिक आजार आणला व तो सर्व देशात पसरला. म्हणून मी त्यांना शिक्षा करीन. हा आजार यरुशलेममधील संदेष्ट्यांकडून आला."
16सर्वशक्तिमान परमेश्वर ह्या गोष्टी सांगतो : "हे संदेष्टे तुम्हाला जे काय सांगतात त्याकडे लक्ष देऊ नका. ते तुम्हाला मूर्ख बनविण्याचा प्रयत्न करतात. ते दृष्टान्ताबद्दल बोलतात. पण हे दृष्टान्त त्यांना माझ्याकडून घडत नाहीत, तर ते त्यांच्या मनाचेच असतात.
17काही लोक परमेश्वराकडून आलेल्या खऱ्या संदेशाला नाके मुरडतात. म्हणून हे संदेष्टे त्या लोकांना निराळ्याच गोष्टी सांगतात ते म्हणतात, 'तुम्हाला शांती लाभेल' काही लोक फार हट्टी आहेत. ते त्यांना पाहिजे त्याच गोष्टी करतात. मग ते संदेष्टे त्याना म्हणतात, 'तुमच्यावर कोणतीच आपत्ती येणार नाही.'
18पण ह्या संदेष्ट्यांमधील कोणीही स्वर्गातील देवांच्या सभेत* उभा राहिलेला नाही. त्यांच्यापैकी कोणीही परमेश्वराचा संदेश पाहिला वा ऐकला नाही. कोणीही परमेश्वराच्या संदेशाकडे बारकाईने लक्ष दिलेले नाही.
19आता परमेश्वराकडून वादळाप्रमाणे शिक्षा येईल. परमेश्वराचा राग तुफानाप्रमाणे असेल. तो त्या दुष्ट लोकांच्या डोक्यावर आदळून त्यांच्या डोक्यांचा चेंदामेंदा करील.
20परमेश्वराने जे करण्याचे ठरविले आहे, ते पूर्ण होईपर्यंत परमेश्वराचा राग शांत होणार नाही. पुढील दिवसांत तुम्हाला हे स्पष्टपणे समजेल.
21मी त्या संदेष्ट्यांना पाठविले नाही, पण तेच संदेश द्यायला धावले. मी त्यांच्याशी बोललो नाही, पण तेच माझ्यावतीने उपदेश करतात.
22जर ते माझ्या स्वर्गीय सभेत उभे राहिले असते, तर त्यांनी माझा संदेश यहूदाच्या लोकापर्यंत पोहोचविला असता.

---

**देवांच्या सभेत** जुन्या कराराप्रमाणे लोक देवाला स्वर्गातील लोकांचा, देवदूतांचा नेता मानीत व त्याप्रमाणे बोलत. पाहा 1 राजा 22:19–23.

त्यांनी लोकांना दुष्कृत्ये करण्यापासून परावृत्त केले असते.
त्यांनी लोकांना पाप करू दिले नसते."
23हा परमेश्वराचा संदेश आहे, "मी देव येथे आहे पण
मीच देव दूरवरच्या स्थळीही असतो."
24एखादा माणूस माझ्यापासून लपण्याचा प्रयत्न
करीलही, पण त्याला शोधणे मला अगदी सोपे आहे.
का? कारण मी स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांमध्ये सगळीकडे
आहे." परमेश्वर असे म्हणाला.

25"काही संदेष्टे माझ्या नावाने खोटा उपदेश करतात.
ते म्हणतात, 'मला स्वप्न पडले आहे! मला स्वप्न पडले
आहे!' मी त्याना असे म्हणताना ऐकले आहे. 26हे किती
काळ चालणार? ते खोट्याचाच विचार करतात आणि
त्याच खोट्या, असत्य गोष्टी लोकांना शिकवितात. 27हे
संदेष्टे, यहूदाच्या लोकांना माझे विस्मरण व्हावे असा
प्रयत्न करीत आहेत. एकमेकांना खोट्या स्वप्नाबद्दल सांगून
ते हे करीत आहेत. त्यांचे पूर्वज जसे माझे नाव विसरले,
तसेच आता ह्या लोकांनी मला विसरावे म्हणून ते प्रयत्न
करीत आहेत. ह्यांचे पूर्वज मला विसरले आणि त्यांनी
खोटे दैवत बआलची पूजा केली, 28काडी म्हणजे गहू
नव्हे! तसेच त्या संदेष्ट्यांची स्वप्ने म्हणजे माझा संदेश
नव्हे. जर एखाद्या माणसाला त्याच्या स्वप्नाबद्दल सांगायचे
असेल, तर सांगू द्या. पण जो कोणी माझा संदेश ऐकतो,
त्याला सत्य सांगू द्यावे. 29माझा संदेश अग्नीप्रमाणे आहे."
हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. "तो खडक
फोडणाऱ्या हातोड्याप्रमाणे आहे. 30"म्हणून मी खोट्या
संदेष्ट्यांविरुध्द आहे." हा परमेश्वराचा संदेश आहे. "हे
संदेष्टे एकमेकांकडून माझे शब्द चोरतात.* 31मी
त्यांच्याविरुद्ध आहे." हा परमेश्वराकडून आलेला संदेश
आहे. "ते त्यांचे स्वत:चे शब्द वापरतात आणि ते माझेच
शब्द आहेत असे भासवितात. 32खोट्या स्वप्नांबद्दल
सांगणाऱ्या खोट्या संदेष्ट्यांच्या मी विरुद्ध आहे." हा
परमेश्वराचा संदेश आहे. "ते त्यांच्या खोट्या बोलण्याने व
चुकीच्या शिकवणुकीने माझ्या लोकांना चुकीच्या मार्गाने
नेतात. लोकांना शिकविण्यासाठी मी त्यांना पाठविलेले
नाही. मी त्यांना माझ्यासाठी काही करण्याची आज्ञा कधीही
दिलेली नाही. ते यहूदाच्या लोकांना मुळीच मदत करू
शकत नाहीत." हा परमेश्वराचा संदेश आहे.

## देवाकडून शोकसंदेश

33"यहूदातील लोक वा संदेष्टे किंवा याजक कदाचित्
तुला विचारतील 'यिर्मया, परमेश्वराने काय घोषणा केली
आहे?' तू त्यांना उत्तर दे, 'तुम्ही म्हणजेच परमेश्वराला
फार मोठे ओझे आहात. मी हे ओझे खाली टाकून देईन'"
हा परमेश्वराचा संदेश आहे.
34कदाचित् एखादा संदेष्टा वा एखादा याजक किंवा
एखादा माणूस म्हणेल 'परमेश्वराची घोषणा ही आहे.' तो
खोटे बोलला. मी त्याला व त्याच्या सर्व कुटुंबआला शिक्षा
करीन. 35तुम्ही एकमेकांना असे विचारू शकता,
'परमेश्वराने काय उत्तर दिले?' किंवा 'परमेश्वर काय
म्हणाला?' 36पण तुम्ही कधीही 'परमेश्वराची घोषणा (भारी
बोजा) असा वाक्प्रचार वापरू नये.' कारण परमेश्वराचा
संदेश हा कोणालाही भारी बोजा वाटता कामा नये. पण
तुम्ही आमच्या देवाचे शब्द बदलता. तो जीवंत, सर्वशक्तिमान
परमेश्वर आहे.
37"तुम्हाला जर देवाच्या संदेशाबद्दल जाणून घ्यायचे
असेल, तर संदेष्ट्याला विचारा 'परमेश्वराने तुला काय
उत्तर दिले' किंवा 'परमेश्वर काय म्हणाला?' 38पण
'परमेश्वराची घोषणा (भारी बोजा) काय आहे?' असे
म्हणू नका. जर तुम्ही असे शब्द वापराल, तर परमेश्वर
तुम्हाला म्हणेल, 'तुम्ही माझ्या संदेशाला 'परमेश्वराची
घोषणा (भारी बोजा) असे म्हणू नये.' हे शब्द वापरू नका
असे मी बजावले. 39पण तुम्ही माझ्या संदेशाला 'भारी
बोजाच' म्हणालात. म्हणून मी तुम्हाला. मोठ्या ओझ्याप्रमाणे
वर उचलून माझ्यापासून लांब फेकून देईन. मी तुमच्या
पूर्वजांना यरुशलेम नगरी दिली. पण मी तुम्हाला आणि
त्या नगरीला माझ्यापासून दूर फेकीन. 40मी तुम्हाला
अप्रतिष्ठित करीन आणि ही बदनामी (हा ओशाळवाणेपणा)
तुम्ही कधीही विसरू शकणार नाही.'"

## चांगली अंजिरे आणि वाईट अंजिरे

24 परमेश्वराने मला पुढील गोष्टींचा दृष्टान्त दिला:
परमेश्वराच्या मंदिरासमोर दोन अंजिराच्या
टोपल्या व्यवस्थित मांडलेल्या मी पाहिल्या. (बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सर ह्याने यकोन्याला कैद करून नेले,
त्यांनंतर हा दृष्टान्त झाला. यकोन्या हा यहोयाकीम राजाचा
मुलगा होता. यकोन्या आणि त्याचे महत्वाचे अधिकारी
ह्यांना यरुशलेममधून दूर नेले गेले. त्यांना बाबेलला नेले
गेले. नबुखद्नेस्सरने यहूदातील सर्व सुतार व लोहार यांनाही
नेले.) 2एका टोपलीत खूप चांगली अंजिरे होती. ती
मोसमाच्या सुरवातीला पिकलेल्या अंजिरासारखी होती.
पण दुसऱ्या टोपलीत नासकी अंजिरे होती. ती खाण्यालायक
नव्हती.
3परमेश्वराने मला विचारले, "यिर्मया, तू काय
पाहिलेस?" मी म्हणालो, "मी अंजिरे पाहिली. चांगली
अंजिरे फारच उत्तम आहेत. पण वाईट अंजिरे फारच
नासकी आहेत. ती खाण्यासारखी नाहीत."
4नंतर परमेश्वराचा संदेश मला मिळाला. 5परमेश्वर,
इस्राएलचा देव म्हणाला, "यहूदातील लोकांना त्यांच्या

**हे ... चोरतात** येथे देव कदाचित् खोट्या संदेष्ट्यांबद्दल बोलत असावा. ते खऱ्या संदेष्ट्यांच्या शब्दांची आणि हावभावांची नक्कल करतात आणि ज्या लोकांना खरे संदेष्टे आणि खोटे संदेष्टे ह्यातील फरक कळत नाही, अशांना फसवतात.

देशापासून दूर नेले गेले आहे. त्यांच्या शत्रूने त्यांना बाबेलला
नेले. ते लोक ह्या चांगल्या अंजिरासारखे आहेत. मी
त्यांच्यावर दया करीन. 6मी त्यांचे रक्षण करीन. मी त्यांना
यहूदाला परत आणीन. मी त्यांचा नाश होऊ देणार नाही
मी त्यांना परत उभे करीन. मी नुसतेच त्यांना वर काढणार
नाही, तर त्यांना रुजवीन म्हणजे ते वाढू शकतील. 7मला
ओळखण्याची इच्छा मी त्यांच्यात निर्माण करीन. मग मी
परमेश्वर आहे हे त्यांना समजेल. ते माझे होतील व मी
त्यांचा देव होईन. बाबेलमधील हे सर्व कैदी
अंत:करणापासून माझ्याकडे परत आले आहेत. म्हणून
मी त्यांच्यासाठी हे करीन.

8“पण यहूदाचा राजा सिद्कीया हा त्या अतिशय
नासल्यामुळे खाण्यालायक न राहिलेल्या अंजिरासारखा
असेल. सिद्कीया त्याचे उच्चपदस्थ अधिकारी,
यरुशलेममध्ये उरलेले लोक व मिसरमध्ये राहत असलेले
यहूदी हे सर्व त्या नासक्या अंजिरासारखे असतील.

9“मी त्यांना शिक्षा करीन. त्या शिक्षेने पृथ्वीवरील सर्व
लोकांना धक्का बसेल. यहूदातील ह्या लोकांची इतर लोक
चेष्टा करतील लोक एकमेकांना त्यांच्याबद्दलचे विनोदी
किस्से सांगतील. मी त्यांना जेथे जेथे पाठवीन, तेथे तेथे
लोक त्यांना शाप देतील. 10मी त्यांच्यावर लढाई, उपासमार
आणि रोगराई ह्या आपत्ती पाठवीन. ते सर्व ठार होईपर्यंत
मी त्यांच्यावर हल्ला करीन. मग मी त्यांना आणि त्यांच्या
पूर्वजांना दिलेल्या भूमीवर ते अजिबात शिल्लक राहणार
नाहीत.”

## यिर्मयाच्या प्रवचनाचा सारांश

25 यहूदातील सर्व लोकांबद्दल यिर्मयाला मिळालेला
देवाचा संदेश असा आहे. यहोयाकीम राजाच्या
कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी* हा संदेश आला. यहोयाकीम
योशीयाचा मुलगा होता. यहोयाकीम राजाच्या कारकिर्दीचे
चौथे वर्ष हे बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याच्या
कारकिर्दीचे पहिलेच वर्ष होते. 2यहूदा आणि यरुशलेम
येथील लोकांना यिर्मयाने पुढील संदेश ऐकविला:

3गेली 23 वर्षे मी परमेश्वराचे संदेश पुन्हा पुन्हा तुम्हाला
सांगत आहे. यहूदाचा राजा आमोन ह्याचा मुलगा योशीया
ह्याच्या कारकिर्दीच्या 13 व्या वर्षापासून मी संदेष्टा आहे.
मी तेव्हापासून आजपावेतो तुम्हाला परमेश्वराकडून
आलेले संदेश ऐकविले आहेत. पण तुम्ही ऐकले नाही.
4परमेश्वराने, त्याच्या सेवकांना संदेष्ट्यांना पुन्हा पुन्हा
तुमच्याकडे पाठविले पण तुम्ही त्यांचे ऐकले नाही. तुम्ही
त्यांच्याकडे लक्षसुद्धा दिले नाही.

5ते संदेष्टे म्हणाले, “तुमची राहणी बदला. त्या वाईट
गोष्टी करू नका. तुम्ही तुमचे वागणे बदललेत, तर तुम्ही,
परमेश्वराने तुम्हाला आणि तुमच्या पूर्वजांना दिलेल्या
देशात, परत जाऊ शकाल. त्याने तुम्हाला ही भूमी कायमची
राहण्यास दिली होती. 6दुसऱ्या दैवतांना अनुसरू नका.
त्यांची सेवा वा पूजा करू नका. एखाद्या माणसाने तयार
केलेल्या मूर्तींची पूजा करू नका. त्यामुळे मला तुमचा
रागच येतो. असे करून तुम्ही स्वत:लाच दुखविता.*”

7“पण तुम्ही माझे ऐकले नाही.” हा परमेश्वराकडून
आलेला संदेश आहे. “माणसाने घडविलेल्या मूर्तीची तुम्ही
पूजा केली. त्यामुळे मला राग आला त्यामुळे तुम्ही दुखविले
जाता एवढेच.”

8सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणाला, “तुम्ही माझ्या
संदेशाकडे लक्ष दिले नाही. 9म्हणून मी लवकरच
उत्तरेकडील कुळांना बोलावून घेईन.” हा परमेश्वराचा
संदेश आहे. “मी लवकरच बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
ह्याला निरोप पाठवीन. तो माझा सेवक आहे. मी त्यांना
यहूदा व यहूदातील लोक यांच्याविरुध्द उठवीन. तुमच्या
देशाभोवतालच्या राष्ट्रांच्यासुद्धा विरोधात मी त्यांना
आणीन. मी त्या सर्व देशांचा नाश करीन. मी त्या भूमीचे
कायमचे ओसाड वाळवंट बनवीन. लोक ते देश व त्याचा
वाईट प्रकारे झालेला नाश पाहतील व हळहळतील. 10त्या
ठिकाणच्या सुखाच्या व आनंदाच्या कल्लोळांचा मी शेवट
करीन. तेथे नव वर वधूंचा सुखाचा शब्द उमटणार नाही,
जात्यांचा आवाज येणार नाही आणि दिव्यातला प्रकाश
नाहीसा होईल. 11ती सगळी भूमी वैराण वाळवंट होईल
तेथील सर्व लोक, 70 वर्षांपर्यंत बाबेलच्या राजाचे दास
होतील.

12“पण 70 वर्षांनंतर मी बाबेलच्या राजाला शिक्षा करीन.
मी बाबेल राष्ट्रालाही शिक्षा करीन.” हा परमेश्वराकडून
आलेला संदेश आहे. “मी खास्द्यांनी केलेल्या पापाबद्दल
त्यांच्या देशाला शिक्षा करीन. मी त्या भूमीचे रूपांतर
कायमच्या वाळवंटात करीन. 13बाबेलमध्ये खूप वाईट
गोष्टी घडतील हे मी सांगितले आहेच त्या सर्व गोष्टी
घडतीलच यिर्मयाने त्या परक्या देशाबद्दल भविष्यकथन
केलेच आहे. आणि या पुस्तकात सर्व धोक्याचे इशारे
लिहिले आहेत, 14हो! बाबेलच्या लोकांना खूप राष्ट्रांचे
आणि मोठ्या राजांचे दास्य करावे लागेल. त्यांच्या
कृत्यांबद्दल योग्य अशीच शिक्षा त्यांना मी देईन.”

## जगातील राष्ट्रांचा निवाडा

15परमेश्वराने, इस्राएलच्या देवाने मला या गोष्टी
सांगितल्या: “यिर्मया, माझ्या हातातील द्राक्षरसाचा प्याला
घे. तो माझ्या क्रोधाचा द्राक्षरस आहे. मी तुला वेगवेगळ्या
राष्ट्रात पाठवीत आहे. त्या सर्व राष्ट्रांना हा द्राक्षरस प्यायला
लाव. 16ते हा द्राक्षरस पितील. मग ते वांत्या करतील
आणि वेड्याप्रमाणे वागतील. मी लवकरच त्यांच्यावर

---

**चौथ्या वर्षी** म्हणजे इ.स. पूर्वी 605 हे वर्ष.

**असे … दुखविता** हे प्राचीन ग्रीक भाषांतर आहे. हिब्रूत हे वाक्य ‘मग मी तुला इजा करणार नाही’ असे आहे.

शत्रूला हल्ला करायला लावणार असल्याने ते असे
वागतील.”
17मग मी देवाच्या हातातून द्राक्षरसाचा प्याला घेतला.
देवाने मला पाठवलेल्या त्या सर्व राष्ट्रांत मी गेलो आणि
तेथील लोकांना त्यातील द्राक्षरस प्यायला लावला. 18मी
यहूदा आणि यरुशलेम यामधील लोकांसाठी तो द्राक्षरस
ओतला. यहूदातील राजे आणि नेते ह्यांना मी द्राक्षरस
प्यायला लावला. ते वैराण वाळवंट व्हावेत, त्या ठिकाणाचा
सर्वनाश व्हावा, तो नाश पाहून लोकांनी हायहाय करावे
व त्याबद्दल कोसावे म्हणून मी असे केले आणि तसेच
घडले. यहूदाचे आता तेच झाले आहे!
19मी मिसरच्या फारोलाही द्राक्षरस प्यायला भाग पाडले.
परमेश्वराच्या क्रोधाने भरलेल्या प्याल्यातून मी मिसरच्या
अधिकाऱ्यांना, महत्वाच्या नेत्यांना आणि लोकांना द्राक्षरस
प्यायला लावला.
20मी सर्व अरब व ऊस देशातील राजे यांनाही द्राक्षरस
पिण्यास दिला. मी पलिष्ट्यांच्या देशातील अश्कलोन,
गज्जा, एक्रोन या शहरांतील व अश्दोद शहरामधील उरलेले
अशा सर्व राजांना त्या प्याल्यातून द्राक्षरस पिण्यास भाग
पाडले.
21मग मी अदोम, मवाब व अम्मोन यामधील राजांनाही
द्राक्षरस प्यायला लावले.
22सोरच्या व सीदोनच्या सर्व राजांनाही मी द्राक्षरस पाजला.
खूप दूरच्या देशातील सर्व राजांनाही मी द्राक्षरस दिला.
23ददान, तेमा व बूज येथील लोकांनाही मी त्या प्याल्यातून
प्यायला लावले. मंदिरात दाढीच्या कडा कापणाऱ्या सर्व
लोकांना मी द्राक्षरस पिण्यास भाग पाडले.
24अरबस्तानातील सर्व राजांनाही मी द्राक्षरस प्यायला दिला.
हे राजे वाळवंटात राहतात. 25जिमरी, एलाम व मेदी येथील
सर्व राजांना मी द्राक्षरस पाजला. 26उत्तरेकडील सर्व, दूरच्या
व जवळच्या राजांना मी हा द्राक्षरस पिण्यास भाग पाडले.
एकामागून एकाला मी तो प्यायला लावला. पृथ्वीवरील
सर्व राज्यांना मी परमेश्वराच्या क्रोधाने भरलेल्या
प्याल्यातून प्यायला लावले. पण बाबेलचा राजा, सर्व
राष्ट्रांच्या नंतर या प्याल्यातून पिईल.
27“यिर्मया, तू त्या राष्ट्रांना सांग की सर्वशक्तिमान
परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, ‘माझ्या क्रोधाच्या
प्याल्यातून प्या. त्यामुळे झिंगा आणि वांत्या करा. पडा
आणि परत उठू नका. उठू नका कारण तुम्हाला ठार
करण्यासाठी मी तलवार पाठवीत आहे.’
28“ते लोक तुझ्या हातातून प्याला घेण्याचे नाकारतील.
ते त्यातील द्राक्षरस पिण्यास नकार देतील पण तू त्यांना
सांग ‘सर्वशक्तिमान परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो तुम्ही
खरोखरच ह्या प्याल्यातून प्यावे. 29माझ्या नावाने प्रसिध्द
असलेल्या यरुशलेम नगरीत वाईट गोष्टी घडवून आणण्यास
मी अगोदरच सुरवात केली आहे. आपल्याला शिक्षा होणार
नाही असे तुम्हाला वाटण्याचा संभव आहे. पण तुम्ही
चुकता आहात. तुम्हाला शिक्षा होईलच. मी पृथ्वीवरील
सर्व माणसांना मारण्यासाठी तलवारीला साद घालीत आहे.’”
हा परमेश्वराचा संदेश आहे.

30“यिर्मया, तू त्यांना पुढील संदेश दे: ‘परमेश्वर वरून
गर्जना करीत आहेतो त्याच्या पवित्र मंदिरातून गर्जना करीत
आहे. तो त्याच्या कुरणाला (लोकांना) ओरडतो. द्राक्षरस
काढताना, द्राक्षे तुडविताना, लोक ज्याप्रमाणे मोठ्याने
गातात, त्याप्रमाणे देवाच्या आरोळ्या मोठ्या आहेत.
31तो आवाज पृथ्वीवरील सर्व लोकांपर्यंत पसरतो. हा
सगळा गोंगाट कशासाठी आहे? परमेश्वर सर्व राष्ट्रांतील
लोकांना शिक्षा करीत आहे. परमेश्वराने लोकांच्याविरुद्ध
आपले म्हणणे मांडले. त्यांने लोकांचा न्यायनिवाडा केला.
आणि तो आता तलवारीने दुष्ट लोकांना ठार मारीत
आहे.’” हा परमेश्वराचा संदेश आहे.
32सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “अरिष्ट एका
देशातून दुसऱ्या देशात लवकरच पसरेल. तो पृथ्वीवरच्या
अती दूरच्या ठिकाणाहून वादळाप्रमाणे येईल.”

33त्या लोकांची प्रेते पृथ्वीच्या एका टोकाकडून
दुसऱ्या टोकाकडे पोहोचतील. त्यांच्यासाठी कोणीही
रडणार नाही. कोणीही ती गोळा करून पुरणार नाही.
शेणाप्रमाणे ती जमिनीवर पडतील.
34मेंढपाळांनो (नेत्यांनो) तुम्ही मेंढ्यांना (लोकांना)
वळवावे. प्रमुख नेत्यांनो, रडायला सुरवात करा. मेंढ्यांच्या
[लोकांच्या] नेत्यांनो, जमिनीवर दुःखाने लोळा का? कारण
ही तुमच्या कत्तलीची वेळ आहे. परमेश्वर तुम्हाला मोडील
आणि सगळीकडे पसरवील तुम्ही फुटक्या मडक्याच्या
तुकड्याप्रमाणे सगळीकडे पसराल.
35मेंढपाळांना लपायला कोठेही जागा राहणार नाही. ते
नेते पळून जाऊ शकणार नाहीत.
36मला मेंढपाळांच्या (नेत्यांचा) आरोळ्या ऐकू येतात
त्यांचे रडणे ऐकू परमेश्वर त्यांची कुरणें (देश) नष्ट
करीत आहे.
37त्या शांत कुरणांचा (जागांचा) नाश केला जाईल
आणि ती ओसाड वाळवटे होतील. परमेश्वर रागावल्याने
असे घडले.
38परमेश्वर गुहेत राहणाऱ्या भयंकर सिंहाप्रमाणे आहे.
परमेश्वर रागावला आहे. आणि त्याचा क्रोध त्या लोकांना
इजा करील. त्यांचा देश ओसाड वाळवंट होईल.

## मंदिरात यिर्मयाचा बोधपर उपदेश

26 यहूदाचा राजा यहोयाकीम ह्याच्या कारकिर्दीच्या
पहिल्याच वर्षी परमेश्वराकडून हा संदेश आला.
यहोयकीम हा योशीया राजाचा मुलगा होता. 2परमेश्वर
म्हणाला, “यिर्मया, परमेश्वराच्या मंदिराच्या प्रांगणात उभा

राहा आणि परमेश्वराच्या मंदिरात उपासना करण्यास
येणाऱ्यांना हा संदेश दे. मी तुला सांगितलेले सर्व यहूदातील
सगळ्या लोकांना सांग. माझ्या संदेशातील कोणताही भाग
गाळू नकोस. 3कदाचित् ते ऐकतीलही आणि माझ्या संदेशाचे
पालन करतील. पापी जीवन जगण्याचे ते कदाचित् सोडून
देतील. त्यांचे परिवर्तन झाल्यास, त्यांना शिक्षा करण्याच्या
माझ्या बेतांबद्दल मीही कदाचित् पुनर्विचार करीन. त्यांनी
खूप वाईट कृत्ये केली. त्याबद्दल त्यांना शिक्षा करण्याची
योजना मी आखत आहे. 4तू त्यांना सांग 'परमेश्वर काय
म्हणतो ते ऐका: मी तुम्हाला माझी शिकवण दिली. तुम्ही
माझ्या आज्ञा पाळल्याच पाहिजेत आणि माझ्या
शिकवणुकीप्रमाणे वागलेच पाहिजे. 5माझ्या सेवकांनी
तुम्हाला सांगितलेल्या गोष्टी तुम्ही ऐकल्याच पाहिजेत.
(संदेष्टे माझे सेवक आहेत) मी पुन्हा पुन्हा माझे सेवक
पाठविले. पण तुम्ही त्यांचे ऐकले नाही. 6तुम्ही माझे ऐकले
नाही तर मी माझे यरुशलेममधील मंदिर शीलोमधील
माझ्या पवित्र तंबूप्रमाणे* करीन दुसऱ्या शहरांवर अरिष्ट
यावे असे वाटणाऱ्या लोकांना यरुशलेम जरूर आठवेल.'"

7परमेश्वराच्या मंदिरातील यिर्मयाचे हे बोलणे याजकांनी,
संदेष्ट्यांनी आणि सगळ्या लोकांनी ऐकले. 8परमेश्वराने
आज्ञा केल्याप्रमाणे, यिर्मयाने, परमेश्वराने सांगितलेली
प्रत्येक गोष्ट सांगितली, नंतर याजकांनी, संदेष्ट्यांनी आणि
लोकांनी यिर्मयाला धरले. ते म्हणाले, "अशा भयंकर
गोष्टी सांगितल्याबद्दल तू मरशील! 9परमेश्वराच्या नावावर
अशा भयंकर गोष्टी सांगण्याचे धाडस तू कसे काय करू
शकतोस! शिलोच्या मंदिराप्रमाणे ह्या मंदिराचा नाश होईल,
असे म्हणण्याचे साहस तू कसे काय करू शकतोस यरुशलेम
निर्जन वाळवंटाप्रमाणे होईल असे तू कसे काय म्हणू
शकतोस!" परमेश्वराच्या मंदिरात सर्व लोक यिर्मयाभोवती
जमले.

10यहूदातील राज्यकर्त्यांना ही सर्व हकिगत कळली,
म्हणून ते राजवाड्यातून बाहेर आले व देवाच्या मंदिरात
गेले. तेथे ते नव्या प्रवेशद्वाराजवळ आपापल्या स्थानांवर
बसले. 'नवे प्रवेशद्वार' परमेश्वराच्या मंदिरात जाण्याचे
दार होते. 11नंतर याजक व संदेष्टे राज्यकर्त्यांशी व लोकाशी
बोलले. ते म्हणाले "यिर्मयाला ठार करावे. यरुशलेमबद्दल
तो वाईट भविष्यकथन करतो तुम्ही त्याचे बोलणे ऐकलेच
आहे."

12मग यिर्मया यहूदाच्या राज्यकर्त्यांशी व इतर लोकांशी
बोलला तो म्हणाला, "ह्या नगरीबद्दल व ह्या मंदिराबद्दल
ह्या गोष्टी सांगण्यासाठी परमेश्वरानेच मला
पाठविले.तुम्हीऐकलेला प्रत्येक शब्द परमेश्वराच्या तोंडचा
आहे. 13तुम्ही तुमची वागणूक बदला. तुम्ही सत्कृत्ये
करायला सुरवात केलीच पाहिजे. तुम्ही परमेश्वराचे,
तुमच्या देवाचे ऐकलेच पाहिजे. तुम्ही असे वागलात, तर
परमेश्वराचे हृदयपरिवर्तन होईल. त्याने सांगितलेल्या वाईट
गोष्टी तो करणार नाही. 14माझ्याबद्दल म्हणाल, तर मी
तुमच्या हातात आहे. तुम्हाला योग्य व बरोबर वाटेल ते
करा. 15पण तुम्ही मला ठार मारलेत, तर एका गोष्टीची
खात्री बाळगा. निरपराध माणसाला मारल्याबद्दल तुम्ही
अपराधी ठराल. तुम्ही ह्या नगरीला आणि तिच्यात
राहणाऱ्या प्रत्येक माणसालाही अपराधी बनवाल.
परमेश्वराने खरोखरीच मला तुमच्याकडे पाठविले आहे.
तुम्ही ऐकलेला संदेश खरेच परमेश्वराकडूनच आलेला
आहे."

16मग राज्यकर्ते व सर्व लोक बोलले. त्या लोकांनी
याजकांना व संदेष्ट्यांना सांगितले, "यिर्मयाला अजिबात
मारू नका. त्याने आपल्याला सांगितलेल्या गोष्टी
परमेश्वराकडून आपल्या देवाकडून येतात."

17नंतर काही वडीलधारी (नेते) उभे राहिले. ते सर्व
लोकांना उद्देशून म्हणाले, 18"संदेष्टा मीखा हा मोरष्टचा
राहणारा होता. हिज्कीया यहूदाचा राजा असताना मीखा
संदेष्टा होता. मीखाने यहूदाच्या लोकांना पुढील गोष्टी
सांगितल्या.*

सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "सियोनेचा नाश होईल
सियोन नांगरलेले शेत होईल. यरुशलेम दगडांची रास
होईल. मंदिर असलेल्या टेकडीवर रान माजेल."

19"हिज्कीया यहूदाचा राजा होता. पण हिज्कीयाने
मीखाला ठार मारले नाही. यहूदातील कोणीही मीखाला
ठार मारले नाही. हिज्कीयाला परमेश्वराबद्दल आदर
होता, हे तुम्हाला माहीतच आहे. त्याला परमेश्वराला
प्रसन्न ठेवण्याची इच्छा होती. हिज्कीया यहूदाचे वाईट
करील असे परमेश्वराने सांगितले होते. पण हिज्कीयाने
परमेश्वराची करूणा भाकली आणि परमेश्वराचे
हृदयपरिवर्तन झाले. परमेश्वराने त्या वाईट गोष्टी घडू
दिल्या नाहीत. आपण जर यिर्मयाला इजा केली, तर आपण
स्वत:वरच खूप संकटे ओढवून घेऊन ती आपलीच चूक
ठरेल."

20पूर्वी आणखी एकाने परमेश्वराचा संदेश ऐकविला
होता. त्याचे नाव उरीया तो शमायाचा मुलगा होता. उरीया
किर्याथ यारीमचा रहिवासी होता. त्याने ह्या नगरीच्या
विरोधात आणि या भूमीच्याही विरोधात, यिर्मयाप्रमाणेच
गोष्टी सांगितल्या होत्या. 21राजा यहोयाकीम, त्याचे
सैन्याधिकारी व यहूदातील नेते ह्यांनी उरीयाला संदेश
देताना ऐकले. ते रागावले. यहोयाकीम राजा उरीयाला
मारू इच्छित होता. हे उरीयाला कळले. तो घाबरला व

---

**माझ्या … तंबूप्रमाणे** बहुधा शमुवेलच्या काळात, शीलोमधील पवित्र जागेचा नाश केला गेला. पाहा यिर्मया 7 आणि 1 शमुवेल 4.

**मीखाने … सांगितल्या** पाहा मीखा 3:12.

मिसर देशात पळाला. 22पण यहोयाकीम राजाने एलनाथान नावाच्या माणसाबरोबर आणखी काही माणसे देऊन त्यांना मिसरला पाठविले. एलनाथान अखबोरचा मुलगा होता, 23त्या माणसांनी उरीयाला मिसरहून परत आणले. ते त्याला यहोयाकीम राजाकडे घेऊन गेले. यहोयाकीमने उरीयाला तलवारीने मारण्याचा हुकूम दिला. नंतर गरीब लोकांच्या दफनभूमीत त्याचे प्रेत फेकण्यात आले.

24पण अहीकाम या प्रतिष्ठित व्यक्तीने यिर्मयाला पाठिंबा दिला अहीकाम शाफानचा मुलगा होता. त्याने यिर्मयाला याजक व संदेष्टे यांच्यापासून वाचविले.

## नबुखद्नेस्सरला परमेश्वर राजा करतो

27 यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. यहूदाचा राजा सिद्कीया ह्याच्या कारकिर्दीच्या चौथ्या* वर्षी हा संदेश आला. सिद्कीया योशीया राजाचा मुलगा होता. 2परमेश्वर मला म्हणाला, “यिर्मया, पट्ट्या आणि बांबू यांच्यापासून जोखड तयार कर. ते तुझ्या मानेवर ठेव. 3मग यहूदाचा राजा सिद्कीया ह्याला भेटण्यासाठी यरुशलेमला अदोम, मवाब, अम्मोन, सोरा व सीदोन ह्या राजांचे जे दूत येतात, त्यांच्या हाती ह्या सर्व राजांना निरोप पाठव.* 4त्या दूतांना त्यांच्या स्वामींना असा निरोप द्यायला सांग की सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, ‘तुमच्या राजांना सांगा 5मी ही पृथ्वी व त्यावरील सर्व माणसे निर्माण केली. मी पृथ्वीवर सर्व प्राणी निर्माण केले. मी माझ्या प्रचंड सामर्थ्याच्या साहाय्याने आणि बळकट हाताने हे निर्माण केले. मी मला पाहिजे त्याला ही पृथ्वी देईन. 6सध्या मी तुमचे सर्व देश बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याच्या स्वाधीन केले आहेत. तो माझा सेवक आहे. मी वन्य प्राण्यांनासुद्धा त्याचा हूकूम पाळायला लावीन. 7सर्व राष्ट्रे, नबुखद्नेस्सर, त्याचा मुलगा आणि नातू ह्यांचे दास्य करतील. मग बाबेलच्या पराभवाची वेळ येईल. खूप राष्ट्रे आणि मोठे राजे बाबेलला त्याचा दास करतील.

8“‘पण आता, काही राष्ट्रे वा राज्ये बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याचे दास्य करण्यास कदाचित् नकार देतील. ते त्याचे जोखड आपल्या मानेवर ठेवण्यास कदाचित् तयार होणार नाहीत. असे झाल्यास मी काय करीन माहीत आहे? मी त्या राष्ट्रांवर युद्ध, उपासमार व भयंकर रोगराई ह्या आपत्ती आणून त्यांना शिक्षा करीन.’” हा परमेश्वराचा संदेश आहे. “‘त्या राष्ट्रांचा नाश होईपर्यंत मी हे करीन. नबुखद्नेस्सरच्या विरुद्ध लढणाऱ्या राष्ट्रांचा नाश मी त्याच्याच हातून करीन. 9तेव्हा तुम्ही तुमच्या संदेष्ट्यांचे ऐकू नका. भविष्य सांगण्यासाठी जादूचा उपयोग करणाऱ्या लोकांचे ऐकू नका. स्वप्नांचे अर्थ लावणाऱ्या लोकांचे ऐकू नका. मृतांशी बोलणाऱ्या व जादू करणाऱ्या लोकांचे ऐकू नका. हे सर्वजण तुम्हाला “तुम्ही बाबेलच्या राजाचे दास होणार नाही’ असे सांगतात.” 10पण ते खोटे बोलत आहेत. तुमच्या जन्मभूमीपासून तुम्हाला दूर नेण्यास ते कारणीभूत होतील. मी तुम्हाला तुमची घरे सोडायला भाग पाडीन. तुम्ही दुसऱ्या देशात मराल.

11“‘पण बाबेलच्या राजाच्या जोखडात आपल्या माना अडकविणारी व त्याचा हूकूम मानणारी राष्ट्रे जगतील. मी त्या राष्ट्रांना त्यांच्याच भूमीवर राहू देईन आणि बाबेलच्या राजाची सेवा करू देईन.’” हा देवाकडून आलेला संदेश आहे. “त्या राष्ट्रांतील लोक त्यांच्याच भूमीत राहून ती पिकवतील.

12“‘यहूदाचा राजा सिद्कीया ह्याला मी असाच संदेश दिला. मी म्हणालो, “सिद्कीया, तुला तुझी मान बाबेलच्या राजाच्या जोखडात अडकवलीच पाहिजे. आणि त्याचा हुकूम मानला पाहिजे. तू, बाबेलचा राजा आणि त्याची प्रजा, ह्यांची सेवा केलीस, तरच तू जगशील. 13जर तू बाबेलच्या राजाची सेवा करण्यास तयार झाला नाहीस. तर तू आणि तुझी प्रजा शत्रूचा हल्ला, उपासमार व रोगराई ह्यांनी मराल परमेश्वर म्हणतो की जे बाबेलच्या राजाची सेवा करण्याचे नाकारतील त्यांच्याबाबातीत ह्या गोष्टी घडतीलच. 14पण खोटे संदेष्टे सांगतात की तुम्हाला कधीच बाबेलचे गुलाम व्हावे लागणार नाही.

“‘त्यांचे मुळीच ऐकू नका. कारण ते तुम्हाला खोटा उपदेश करतात. 15मी त्या संदेष्ट्यांना पाठविलेले नाही.’” हा परमेश्वराचा संदेश आहे. “ते खोटे सांगतात व तो माझा संदेश आहे असे म्हणतात. म्हणून मी तुम्हा लोकांना दूर पाठवीन. तुम्ही मराल आणि तुम्हाला खोटे सांगणारे ते संदेष्टेही मरतील.”

16नंतर मी (यिर्मया) याजकांना व सर्व लोकांना म्हणालो, “परमेश्वर म्हणतो ते खोटे संदेष्टे म्हणतात ‘खास्यांनी परमेश्वराच्या मंदिरातून खूप गोष्टी घेतल्या आहेत. त्या सर्व लवकरच परत आणल्या जातील. ते संदेष्टे खोटे सांगतात.’ म्हणून त्यांचे ऐकू नका. 17त्यांच्याकडे लक्ष देऊ नका. बाबेलच्या राजाची सेवा करा. तुमच्या शिक्षेचा स्वीकार करा. म्हणजे तुम्ही जगाल. या यरुशलेम नगरीच्या नाशास तुम्ही कारणीभूत होण्याचे काहीच कारण नाही. 18ते जर खरेच संदेष्टे असतील आणि त्यांना परमेश्वराकडून खराच संदेश मिळाला असेल, तर त्यांना प्रार्थना करू द्या. ज्या गोष्टी अजूनही परमेश्वराच्या मंदिरात आहेत, त्यासाठी त्यांना आळवणी करू द्या. राजवाड्यात अजूनही शाबूत असलेल्या गोष्टींसाठी त्यांना विनवणी करू द्या. यरुशलेममध्ये अजूनही शिल्लक असलेल्या

---

**यहूदाचा राजा ... चौथ्या वर्षी** हिब्रूमध्ये ‘यहोयाकीम गादीवर बसण्याच्या सुरवातीचा काळ’ असा उल्लेख आहे. पण येथे लिहिण्यात चूक झाली असावी. ओवी 3 मध्ये सिद्कीयाचा उल्लेख आहे व यिर्मया 28:1 मध्ये चौथे वर्ष म्हणजे ख्रि. पू. 494–493 असा उल्लेख आहे.

**ह्या ... पाठव** शब्दाचा अर्थ ‘नंतर तुझ्या जोखडासारखेच जोखड पाठव.

गोष्टींसाठी त्या याजकांना प्रार्थना करू द्या. ह्या सर्व गोष्टी बाबेलला नेल्या जाऊ नयेत म्हणून त्यांना आळवणी करू द्या.”

[19]यरुशलेममध्ये अजूनही शिल्लक असलेल्या गोष्टींबद्दल सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो की मंदिरात अजूनही स्तंभ, काशाचे गंगाळ, हलविता येणाऱ्या बैठकी आणि इतर गोष्टी आहेत. [20]बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने ह्या गोष्टी* यरुशलेममध्येच सोडून दिल्या. त्याने यहूदाचा राजा यकन्या ह्याला कैद करून नेले, तेव्हा ह्या गोष्टी नेल्या नाहीत. यकन्या हा यहोयाकीम राजाचा मुलगा होता. नबुखद्नेस्सरने यहूदातील व यरुशलेममधील इतर महत्वाच्या व्यक्तींनासुद्धा नेले. [21]सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा देव, परमेश्वराच्या मंदिरात राजवाड्यात आणि यरुशलेममध्ये अजून शिल्लक राहिलेल्या वस्तूंच्याबद्दल पुढीलप्रमाणे भाकीत करतो, “ह्या सर्व वस्तूसुध्दा बाबेलला नेल्या जातील. [22]मी त्या वस्तू परत आणायला जाईपर्यंत त्या बाबेलमध्येच राहतील.” हा परमेश्वराचा संदेश आहे. “नंतर त्या गोष्टी मी परत आणीन. मी त्या पुन्हा ह्याच जागेवर ठेवीन.”

## खोटा संदेष्टा हनन्या

28 यहूदाचा राजा सिद्कीया याच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षाच्या पाचव्या महिन्यात* हनन्या हा संदेष्टा माझ्याशी बोलला. हनन्या हा अज्जूरचा मुलगा होता. तो गिबोन गावचा रहिवासी होता. परमेश्वराच्या मंदिरात तो माझ्याशी बोलला. तेव्हा याजक व इतर सर्व लोक तेथे उपस्थित होते. हनन्या म्हणाला, [2]“सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव असे म्हणतो ‘यहूदाच्या लोकांच्या मानेवर बाबेलच्या राजाने ठेवलेले जोखड मी मोडीन. [3]दोन वर्षांच्या आत, बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने परमेश्वराच्या मंदिरातून नेलेल्या वस्तू मी परत आणीन. नबुखद्नेस्सरने त्या वस्तू बाबेलमध्ये नेल्या आहेत. पण मी त्या यरुशलेमला परत आणीन. [4]यहूदाचा राजा यकन्या यालासुद्धा मी येथे परत आणीन. यकन्या यहोयाकीमचा मुलगा आहे. नबुखद्नेस्सरने यहूदातील ज्या लोकांना बळजबरीने घरे सोडून बाबेलला नेले, त्या सर्व लोकांनाही मी परत आणीन.’ हा परमेश्वराचा संदेश आहे. ‘अशा रीतीने बाबेलच्या राजाने यहूदाच्या लोकांवर लादलेले जोखड मी मोडीन.’”

[5]संदेष्टा हनन्याच्या ह्या वक्तव्यानंतर यिर्मया बोलला. ते परमेश्वराच्या मंदिरात उभे होते. याजक व सर्व लोक यिर्मयाचे बोलणे ऐकू शकत होते. [6]यिर्मया हनन्याला म्हणाला, ‘तथास्तु! (आमेन) परमेश्वर खरोखरच असे करो! परमेश्वर तुझा संदेश खरा करील, अशी मी आशा करतो. परमेश्वर खरोखरच त्याच्या मंदिरातील बाबेलला नेलेल्या वस्तू परत येथे आणो आणि बळजबरीने घरे सोडण्यास भाग पाडलेल्या लोकांना परमेश्वर येथे परत आणो! [7]“पण हनन्या, मला जे सर्व लोकांना सांगितले पाहिजे, ते तूही ऐक. [8]तू आणि मी संदेष्टा होण्याच्या खूप पूर्वी अनेक संदेष्टे होऊन गेले, हनन्या त्यांनी पुष्कळ देशांत आणि राज्यांत युद्ध, उपासमार आणि रोगराई येईल असे भाकीत केले. [9]पण जे संदेष्टे शांतीचा उपदेश करतात, ते खरोखरच परमेश्वराने पाठविलेले आहेत का, ते तपासून पाहिलेच पाहिजे. जर त्यांचा संदेश खरा ठरला, तर तो खरोखरच परमेश्वराने पाठविलेला संदेष्टा आहे हे लोकांना समजेल.”

[10]यिर्मयाच्या मानेवर जोखड होते, ते याजक हनन्याने काढून टाकले. व तोडून टाकले. [11]मग सगळ्या लोकांना ऐकू जावे म्हणून हनन्या मोठ्याने म्हणाला, “परमेश्वर म्हणतो ‘ह्याप्रमाणेच मी बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याचे जोखड तोडीन. त्याने ते जगातील सर्व राष्ट्रांच्या मानेवर ठेवले आहे. पण दोन वर्षांच्या आतच मी ते तोडून टाकीन.’”

हनन्या असे म्हणताच, यिर्मया मंदिरातून निघून गेला.

[12]जेव्हा यिर्मयाच्या मानेवरचे जोखड हनन्याने काढून तोडल्यानंतर यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. [13]परमेश्वर यिर्मयाला म्हणाला, “हनन्याला जाऊन सांग ‘परमेश्वर असे म्हणतो की तू लाकडाचे जोखड तोडलेस. पण त्यांच्या जागी मी लोखंडाचे बनवीन.’ [14]सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, ‘मी सर्व राष्ट्रांच्या मानेवर लोखंडाचे जोखड ठेवीन. बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याची त्यांनी सेवा करावी, म्हणून मी असे करीन. ते त्याचे गुलाम होतील. मी नबुखद्नेस्सरला वन्यपशूंवरही अंकुश ठेवायला लावीन.’”

[15]नंतर संदेष्टा यिर्मया संदेष्टा हनन्याला म्हणाला, “हनन्या! ऐक! परमेश्वराने तुला पाठविलेले नाही पण तू यहूदाच्या लोकांना लबाडीवर विश्वास ठेवावयास लावले. [16]म्हणून परमेश्वर म्हणतो, ‘हनन्या, लवकरच मी तुला ह्या जगातून उचलीन. ह्या वर्षी तू मरशील. का? कारण तू लोकांना परमेश्वराच्याविरुद्ध वागण्यास शिकविलेस.’”

[17]त्याच वर्षाच्या सातव्या महिन्यात हनन्या मेला.

## बाबेलमधील यहूदी कैद्यांना पत्र

29 बाबेलमध्ये राहणाऱ्या यहूदी कैद्यांना यिर्मयाने एक पत्र पाठविले. त्यांने ते पत्र वडीलधारी (नेते) याजक, संदेष्टे आणि बाबेलमध्ये राहणाऱ्या इतर सर्व लोकांना पाठविले. ह्या सर्वजणांना नबुखद्नेस्सरने यरुशलेममधून बाबेलला आणले होते. [2](राजा यकन्या, राजमाता, अधिकारी, यहूदाचे व यरुशलेमचे नेते, सुतार व लोहार ह्यांना यरुशलेममधून नेल्यावर यिर्मयाने हे पत्र पाठविले) [3]सिद्कीयाने एलासा व गमऱ्या यांना

---

**स्तंभ ... इतर गोष्टी** ह्या वस्तूंच्या वर्णनासाठी 1 राजा 7:23–37 पाहा.

**चौथा वर्षाच्या पाचव्या महिन्यात** साधारणत ख्रि. पू. 593.

नबुखद्नेस्सर राजाकडे पाठविले. सिद्कीया यहूदाचा राजा
होता. एलासा शाफानचा व गमऱ्या हिल्कीयाचा मुलगा
होता, यिर्मयाने, बाबेलला नेण्यासाठी, या दोघांजवळ, पत्र
दिले. पत्रातील मजकूर असा होता.

4यरुशलेममधून कैद करून ज्या लोकांना यरुशलेमहून
बाबेलला नेले आहे त्या सर्व लोकांना सर्वशक्तिमान
परमेश्वर, इस्राएलचा देव असे सांगतो 5"घरे बांधून त्यात
राहा तेथे वस्ती करा बागा लावा आणि तुम्ही पिकविलेले
खा. 6लग्न करा. तुम्हाला मुलेबाळे होऊ द्या. तुमच्या
मुलांचीही लग्ने होऊ द्या. म्हणजे त्यांनाही संतती होईल.
तुम्हाला खूप संतती होऊ द्या. तुमची संख्या बाबेलमध्ये
वाढू द्या. तुम्ही अल्पसंख्यक राहू नका. 7मी तुम्हाला ज्या
शहरांत पाठविले आहे, त्या शहरांचा फायदा करा. तुम्ही
राहत असलेल्या शहराच्या भल्यासाठी प्रभूकडे प्रार्थना
करा. का? कारण त्या शहरात शांतता नांदत असेल तर
तुम्हालाही शांती मिळेल." 8सर्वशक्तिमान परमेश्वर,
इस्राएलचा देव म्हणतो, "तुमचे संदेष्टे आणि जादू करणारे
लोक ह्यांच्याकडून फसू नका. त्यांना पडलेली स्वप्ने ऐकू
नका. 9ते खोटा उपदेश करीत आहेत, व तो संदेश असून
तो मी पाठविल्याचे सांगत आहेत. पण मी त्यांना पाठविलेला
नाही." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

10परमेश्वर असे म्हणतो, "सत्तर वर्षापर्यंत बाबेल
सामर्थ्यशाली राहील. त्यानंतर बाबेलमध्ये राहणाऱ्या
तुम्हा लोकांकडे मी येईन तुम्हाला यरुशलेमला परत
आणण्याचे सुवचन मी पूर्ण करीन.
11तुमच्याविषयीच्या योजना मला माहीत असल्याने
मी असे म्हणतो." हा परमेश्वराचा संदेश आहे
"तुमच्यासाठी मी चांगल्या योजना आखल्या आहेत.
तुम्हाला दुःखविण्याचा माझा बेत नाही. तुम्हाला आशा
आणि उज्वल भविष्य देण्याचे मी योजले आहे. 12मग
तुम्ही माझा धावा कराल. माझ्याकडे याल. माझी
प्रार्थना कराल. मग मी तुमच्या हाकेला ओ देईन.
13तुम्ही मला शोधाल आणि तुम्ही जेव्हा मनापासून
मला शोधाल, तेव्हा मी तुम्हाला सापडेन. 14मी
स्वतःला तुमच्याकडून सापडवून घेईन." हा
परमेश्वराचा संदेश आहे "मी तुमची कैदेतून सुटका
करीन. मी तुम्हाला ही जागा सोडायला लावली आता
मी तुम्हाला ज्या ज्या राष्ट्रांत आणि प्रदेशात पाठविले
होते तेथून गोळा करीन." हा परमेश्वराचा संदेश
आहे. "आणि जेथून तुम्हाला मी कैदी म्हणून पकडून
दूर नेण्यास भाग पाडले होते त्या जागी परत आणीन."
15"आम्हाला बाबेलमध्ये परमेश्वराने संदेष्टे दिले
असे कदाचित् तुम्ही म्हणू शकाल." 16पण बाबेलमध्ये
ज्यांना आणले गेले नाही, त्या तुमच्या आप्तांविषयी
परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो ह्या गोष्टी दावीदच्या
सिंहासनावर आता बसलेल्या राजासाठी व
यरुशलेममध्ये अजूनही राहत असलेल्या लोकांसाठी
आहेत.17सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो,
"यरुशलेममध्ये अजूनही राहत असलेल्या
लोकांविरुद्ध मी लढाई उपासमार व रोगराई या आपत्ती
पाठवीन. मी त्यांची स्थिती, खाण्यास अयोग्य
असलेल्या नासक्या अंजिरासारखी करीन. 18मी
अजूनही यरुशलेममध्ये राहत असलेल्या लोकांचा
लढाई, उपासमार व भयंकर रोगराई ह्यांनी पाठपुरावा
करीन. ह्यामुळे लोकांची जी स्थिती होईल ती जगातील
राज्यांचा भीतीने थरकाप उडेल. ज्या ज्या राष्ट्रांत
जायला त्यांना मी भाग पाडीन, तेथे तेथे त्यांच्याकडे
एक शाप म्हणून पाहिले जाईल. ह्या लोकांची स्थिती
पाहून ते विस्मयाने सुस्कारे सोडतील.
19यरुशलेममधील लोकांनी माझे ऐकले नाही, म्हणून
मी असे घडवून आणीन." हा परमेश्वराकडून आलेला
संदेश आहे "मी माझा संदेश पुन्हा पुन्हा त्यांच्याकडे
पाठविला. माझा संदेश देण्यासाठी मी माझ्या सेवकांना,
माझ्या संदेष्ट्यांना त्यांच्याकडे पाठविले. पण त्या
लोकांनी ऐकले नाही." हा परमेश्वराचा संदेश आहे.
20"तुम्ही कैदी आहात. मी तुम्हाला बळजबरीने
यरुशलेम सोडायला लावले व बाबेलला पाठविले.
म्हणून परमेश्वराचा संदेश ऐका."
21कोयालाचा मुलगा अहाब व मासेयाचा मुलगा
सिद्कीया यांच्याविषयी सर्वशक्तिमान परमेश्वर असे
म्हणतो "ह्या दोघांनी तुम्हाला खोटा संदेश दिला आहे
व तो संदेश माझ्याकडून आला असे त्यांनी सांगितले.
पण ते खोटे बोलले. मी त्या दोघा संदेष्ट्यांना, बाबेलचा
राजा नबुखद्नेस्सरच्या ताब्यात देईन आणि बाबेलचे
कैदी असलेल्या तुम्हा सर्व लोकांसमोर तो त्यांना
ठार करील 22यहूदी कैदी दुसऱ्याचे वाईट चिंततांना
त्या दोघांच्या नावाचा उदाहरण म्हणून उपयोग
करतील. ते म्हणतील, 'सिद्कीया व अहाब
यांच्याप्रमाणे परमेश्वर तुमचे वाईट करो! बाबेलच्या
राजाने त्या दोघांना जाळले.' 23त्या दोघा संदेष्ट्यांनी
इस्राएलमध्ये फार वाईट कृत्ये केली. शेजाऱ्यांच्या
बायकांबरोबर त्यांनी व्यभिचार केला. त्यांनी खोटे
सांगितले आणि ते खोटे माझा संदेश असल्याचे
लोकांना सांगितले. मी त्यांना ह्या गोष्टी करायला
सांगितल्या नव्हत्या त्यांनी काय केले आहे, ते मला
माहीत आहे मी त्याला साक्षी आहे." हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

## शमायाला देवाचा संदेश

24शमायालासुद्धा संदेश दे. शमाया नेहेलमी घराण्यातील
आहे. 25सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो,
"शमाया, तू यरुशलेममधील सर्व लोकांना पत्रे पाठविलीस.
मासेयाचा मुलगा याजक सफन्या ह्यासही तू पत्रे पाठविलीस.

तू सर्व याजकांनाही पत्रे पाठविलीस. परमेश्वराची परवानगी
न घेता, स्वत:च्या नावाने तू पत्रे पाठविलीस. 26शमाया,
सफन्याला पाठविलेल्या पत्रात तू असे लिहितोस ‘सफन्या,
परमेश्वराने तुला यहोयदाच्या जागी याजक म्हणून नेमले
आहे. परमेश्वराच्या मंदिराचा तू उत्तराधिकारी आहेस.
जो कोणी वेड्याप्रमाणे* वागेल, वा संदेष्टा असल्याचे
भासवेल, त्याला तू अटक करावेस तू त्या माणसाचे पाय
लाकडाच्या खोड्यात अडकवून त्याच्या गळ्यात लोखंडाची
बेडी घालावी. 27हल्ली यिर्मया आपण संदेष्टा असल्याचे
दाखवीत आहे. मग तू त्याला अटक का केले नाहीस?
28यिर्मयाने बाबेलमध्ये आम्हाला असा संदेश पाठविला
“तुम्हाला बाबेलमध्ये बराच काळ राहावे लागेल,
म्हणून घरे बांधा, वस्ती करा, बागा लावा व स्वत:
पिकविलेले खा.”’

29याजक सफन्याने हे पत्र संदेष्टा यिर्मयाला वाचून
दाखविले.”’ 30मग यिर्मयाला परमेश्वराचा संदेश मिळाला
तो असा: 31“यिर्मया, बाबेलमध्ये असलेल्या सर्व कैद्यांना
पुढील निरोप पाठव नेहेलमी घराण्यातील शमाया ह्या
माणसाबद्दल परमेश्वर असे म्हणतो ‘शमायाने तुम्हाला
उपदेश केला. पण मी त्याला पाठविलेले नाही. शमायाने
तुम्हाला खोटे सांगून त्यावर विश्वास ठेवायला लावले.
32शमाया असे वागला म्हणून परमेश्वर म्हणतो की मी
नेहेलमी घराण्यातील शमायाला लवकरच शिक्षा करीन.
मी त्याच्या घराण्याचा सर्वनाश करीन. मी माझ्या
लोकांसाठी ज्या चांगल्या गोष्टी करीन, त्यात त्याचा वाटा
असणार नाही.” हा परमेश्वराच संदेश आहे “‘शमायाने
लोकांना परमेश्वराविरुद्ध पढविले म्हणून मी त्याला शिक्षा
करीन.”’

## आशेचे वचन

30 यिर्मयाला परमेश्वराकडून पुढील संदेश आला.
2परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा देव म्हणाला,
“मी तुझ्याशी बोललेले शब्द ग्रंथात लिहून ठेव. ते तुझ्यासाठी
लिहून ठेव. 3असे करण्याचे कारण असा काळ येईल,”
हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे, “तेव्हा मी इस्राएल
आणि यहूदा येथील माझ्या हद्दपार केलेल्या लोकांना
परत आणीन.” हा परमेश्वराचा संदेश आहे. “त्यांच्या
पूर्वजांना दिलेल्या भूमीत मी त्यांना परत वस्ती करू देईन.
मग ती भूमी पुन्हा त्यांच्या मालकीची होईल.”

4इस्राएल व यहूदा येथील लोकांबद्दल परमेश्वराने हा
संदेश दिला. 5परमेश्वर म्हणाला,

“लोकांचे भीतीने रडणे आम्हाला ऐकू येते. लोक घाबरले
आहेत. कोठेही शांती नाही.

6“पुढील प्रश्न विचारा व त्यांचा विचार करा.
पुरुषाला मूल होऊ शकेल का? अर्थात् नाही मग
प्रत्येक पुरुष प्रसूतिवेदना होणाऱ्या बाई प्रमाणे पोट
धरताना का दिसत आहे? प्रत्येकाचा चेहरा मृताप्रमाणे
पांढराफटक का पडला आहे? का? कारण ते फार
घाबरले आहेत.

7“याकोबाच्या दृष्टीने हा फार महत्वाचा काळ आहे.
हा अतिशय संकटाचा काळ आहे. पुन्हा असा काळ
कधीच येणार नाही. पण याकोबाचे रक्षण होईल.

8“त्या वेळी,” हा सर्वशक्तिमान परमेश्वराकडून आलेला
संदेश आहे. “मी इस्राएल व यहूदा ह्यांच्यामधील लोकांच्या
मानेवरील जोखड तोडीन. तुमची बंधने तोडीन. परक्या
देशातील लोक पुन्हा माझ्या माणसांना गुलाम होण्यास
भाग पाडणार नाहीत. 9इस्राएल आणि यहूदा यांच्यामधील
लोक परक्या देशांची सेवा करणार नाहीत. नाही! ते
परमेश्वराची, त्यांच्या देवाची सेवा करतील. मी त्यांच्यासाठी
पाठवणार असलेल्या त्याच्या दावीद राजाचीही ते सेवा
करतील.

10“तेव्हा, याकोब, माझ्या सेवका, घाबरू नकोस.” हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. “इस्राएल, भीऊ
नकोस मी त्या दूरच्या ठिकाणाहून तुझे रक्षण करीन.
तुम्ही त्या दूरच्या प्रदेशात कैदी आहात. पण मी तुमच्या
वंशजांना वाचवीन. मी त्यांना तेथून परत आणीन.
याकोबला पुन्हा शांती लाभेल. लोक त्याला त्रास देणार
नाहीत. माझ्या माणसांना घाबरविणारा कोणीही शत्रू
नसेल.

11इस्राएलच्या व यहूदाच्या लोकांनो, मी तुमच्याबरोबर
आहे.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. “मी
तुमचे रक्षण करीन. मी तुम्हाला त्या राष्ट्रांमध्ये पाठविले.
पण त्या सर्व राष्ट्रांचा मी नाश करीन. खरंच! मी त्या
राष्ट्रांचा नाश करीन. पण मी तुमचा नाश करणार नाही.
तुम्ही केलेल्या पापांची शिक्षा तुम्हाला झालीच पाहिजे.
पण मी न्याय्यबुद्धीने तुम्हाला शिक्षा करीन.”

12परमेश्वर म्हणतो, “इस्राएलच्या व यहूदाच्या
लोकांनो, तुम्हाला कधीही बरी न होणारी जखम
झाली आहे, कधीही भरून न येणारी हानी पोहोचली
आहे.

13तुमच्या व्रणांची काळजी घेणारा कोणीही नाही. म्हणून
तुम्ही बरे होणार नाही.

14तुम्ही बऱ्याच राष्ट्रांचे मित्र झालात पण ती राष्ट्रे
तुमची पर्वा करीत नाहीत. तुमचे ‘मित्र’ तुम्हाला विसरले
आहेत. मी शत्रूला दुखवावे, तसे तुम्हाला दुखविले आहे.
मी तुम्हाला कडक शिक्षा केली. तुमच्या भयंकर
अपराधांसाठी मी हे केले. तुम्ही खूप पापे केलीत, म्हणून
मी असे केले.

---

**जो … वेड्याप्रमाणे** येथे शमाया हे शब्द यिर्मयासाठी वापरीत
आहे. पाहा ओव्या 27,28.

15इस्राएल आणि यहूदा, तुमच्या जखमेबद्दल तुम्ही
आरडाओरड का करता? तुमची जखम यातना देणारी
आहे. पण त्यावर काही इलाज नाही. मी, परमेश्वराने,
तुमच्या भयंकर अपराधांबद्दल ह्या गोष्टी घडवून आणल्या.
तुमची पापे खूप वाढली. म्हणून मी असे केले.
16त्या राष्ट्रांनी तुमचा नाश केला. पण आता त्या राष्ट्रांचा
नाश केला जाईल. इस्राएल व यहूदा, तुमच्या शत्रूंना कैद
केले जाईल. त्या लोकांनी तुमच्या वस्तू चोरल्या. पण
आता दुसरे लोक त्यांच्या वस्तू चोरतील. युद्धात त्यांनी
तुम्हाला लुटले. आता लढाईत इतर लोक त्यांना लुटतील.
17मी तुम्हाला पुन्हा तंदुरस्त करीन. तुमच्या जखमा मी
बऱ्या करीन. हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
"का? कारण दुसरे लोक म्हणतात तू बहिष्कृत आहेस. ते
म्हणतात, सियोनची काळजी करणारे कोणीही नाही."
18परमेश्वर म्हणतो, "सध्या याकोबाची माणसे बंदिवासात
आहेत. पण ती परत येतील. याकोबाच्या घरांची मला दया
येईल. सध्या नगरी म्हणजे पडक्या इमारतींनी भरलेली
टेकडी आहे. पण नगरी पुन्हा बांधली जाईल. राजाचा
राजवाडाही योग्य जागी बांधला जाईल.
19"तेथील लोक स्तुतिस्तोत्रे गातील. तेथे हास्याच्या लहरी
उठतील. त्यांना मी पुष्कळ संतती देईन इस्राएल व यहूदा
यांचा आकार लहान राहणार नाही मी त्यांना मान मिळवून
देईन.कोणीही त्यांना खाली पाहणार नाही.
20"याकोबाचे घराणे पूर्वीच्या इस्राएलच्या घराण्याप्रमाणे
होईल. मी, इस्राएल आणि यहूदा, यांना सामर्थ्यशाली करीन.
आणि त्यांना इजा करणाऱ्यांना मी शिक्षा करीन.
21त्यांच्यातीलच एक त्यांचे नेतृत्व करील.तो माझ्या
माणसांपैकीच एक असेल. मी सांगितल्यावरच लोक
माझ्याजवळ येऊ शकतील. मग मी त्या नेत्याला
माझ्याजवळ यायला सांगीन आणि तो माझ्याजवळ येईल.
तो मला जवळचा होईल.
22तुम्ही लोक माझे व्हाल आणि मी तुमचा देव होईन."
23"परमेश्वर खूप रागावला होता.त्याने लोकांना शिक्षा
केली. शिक्षा वादळाप्रमाणे आली. त्या दुष्ट माणसांविरुद्ध
शिक्षा तुफानाप्रमाणे आली.
24लोकांची शिक्षा पूर्ण होईपर्यंत परमेश्वराचा राग राहील.
परमेश्वराने ठरविलेली शिक्षा पूर्ण होईपर्यंत तो शांत होणार
नाही. यहूदाच्या लोकांनो, तो दिवस उजाडल्यावरच तुम्हाला
हे समजेल."

## नवीन इस्राएल

31 परमेश्वराने पुढील गोष्टी सांगितल्या: "त्या वेळी
मी इस्राएलमधील सर्व कुळांचा देव असेन आणि
ती सर्व माझी माणसे असतील."
2परमेश्वर म्हणतो: "काही लोक शत्रूकडून मारले
गेले नव्हते. ते लोक वाळवंटात आश्रय घेतील. इस्राएल
विश्रांतीच्या अपेक्षेने तेथे जाईल."
3खूप लांबून परमेश्वर लोकांना दर्शन देईल. परमेश्वर
म्हणतो, "लोकांनो, मी तुमच्यावर प्रेम करतो आणि ते
चिरंतन राहील. तुमची निष्ठा मी कायमची सांभाळीन.
4"इस्राएल, माझ्या वधू, मी तुझी पुन्हा निर्मिती करीन.
तुझ्यातून देश निर्माण करीन. तू तुझी खंजिरी उचलशील
आणि मौजमजा करणाऱ्या इतर लोकांबरोबर नृत्यात
सामील होशील.
5इस्राएलमधील शेतकऱ्यांनो, तुम्ही पुन्हा द्राक्षाच्या बागा
लावाल. शोमरोन शहराच्या भोवतालच्या टेकडीवर तुम्ही
द्राक्षवेलींची लागवड कराल. त्या द्राक्षमळ्यातील पिकांचा
तुम्ही आस्वाद घ्याल.
6अशी एक वेळ येईल की पहारेकरी ओरडून पुढील
आदेश देतील. 'या, आपण परमेश्वर देवाची उपासना
करण्यासाठी वर सियोनला जाऊ या.' एफ्राईम या डोंगराळ
प्रदेशातील पहारेकरीसुद्धा ओरडून हा संदेश देतील."

7परमेश्वर म्हणतो, "आनंदित व्हा आणि याकोबासाठी
गा. सर्व राष्ट्रांत अग्रेसर असलेल्या इस्राएलचा जयघोष
करा. स्तुतिस्तोत्रे गा व 'परमेश्वराने त्याच्या लोकांना
वाचविले* असे जाहीर करा. इस्राएलच्या जिवंत राहिलेल्या
लोकांचे देवाने रक्षण केले.'
8लक्षात ठेवा, मी त्या उत्तरेकडच्या देशातून इस्राएलला
आणीन. जगातील दूरदूरच्या ठिकाणाहून मी इस्राएलच्या
लोकांना एकत्र करीन. काही लोक आंधळे आणि पंगू
असतील. काही बायका गर्भवती असतील आणि त्यांच्या
प्रसूतींची वेळ आली असेल. पण खूप खूप लोक परत
येतील.
9ते लोक रडत परत येतील. पण मी त्यांचे नेतृत्व
करीन व त्यांचे सांत्वन करीन. मी त्यांना सोप्या वाटेने
नेईन म्हणजे ते अडखळणार नाहीत. मी त्याना अशाच
मार्गाने नेईन कारण मी इस्राएलचा पिता आहे आणि एफ्राईम
माझा पहिला मुलगा आहे.

10"राष्ट्रांनो, परमेश्वराकडून आलेला संदेश ऐका!
समुद्राकडील दूरच्या देशांत हा संदेश पोहोचवा. 'देवाने
इस्राएलच्या लोकांना पांगविले. पण देव त्यांना पुन्हा गोळा
करील. आणि तो आपल्या कळपावर (लोकांवर)
मेंढपाळाप्रमाणे लक्ष ठेवील.'
11परमेश्वर याकोबला परत आणील. परमेश्वराच्या
लोकांपेक्षा बलवान असलेल्या लोकांपासून परमेश्वर
त्याच्या लोकांचे रक्षण करील.
12इस्राएलचे लोक सियोनच्या शिखरावर येतील आणि
आनंदाने आरोळ्या ठोकतील. परमेश्वराने दिलेल्या
चांगल्या गोष्टींमुळे त्यांचे चेहरे आनंदाने उजळतील.

**देवाने … वाचविले** किंवा 'देवा! तुझ्या लोकांना वाचव' हा नेहमीचा विजयाचा जयघोष आहे.

परमेश्वर त्यांना धान्य, ताजा द्राक्षरस, ताजे तेल, कोकरे
आणि गाई देईल. भरपूर पाणी मिळालेल्या बागेप्रमाणे
त्यांची स्थिती होईल.इस्राएलच्या लोकांना पुन्हा कधीही
त्रास होणार नाही.
13मग इस्राएलमधील तरुणी आनंदित होऊन नाचतील
आणि तरुण व वृद्ध त्यांच्या नाचात सामील होतील. मी
त्यांचे दु:खाचे सुखात रूपांतर करीन. मी इस्राएलच्या
लोकांना समाधानात ठेवीन. मी त्यांच्या दु:खाचे सुखात
रूपांतर करीन.
14मी याजकांना भरपूर अन्न देईन. मी दिलेल्या
चांगल्याचुंगल्या गोष्टींमुळे माझ्या लोकांचे समाधान
होईल." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

15परमेश्वर म्हणतो, "रामामधून आवाज ऐकू येईल.
तो भयंकर आकांत असेल खूप शोक असेल. राहेल
आपल्या मुलांसाठी रडेल तिची मुले मेल्यामुळे ती
कोणाकडूनही सांत्वन करून घेणार नाही."
16पण परमेश्वर म्हणतो, "रडू नकोस! तुझे डोळे
आसवांनी भरू नकोस तुझ्या कामाबद्दल तुला बक्षीस
मिळेल" हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
"इस्राएलचे लोक त्यांच्या शत्रूंच्या देशातून परत येतील.
17इस्राएल, तुला आशा आहे." हा परमेश्वराचा संदेश
आहे. "तुझी मुले त्यांच्या स्वत:च्या देशात परत येतील.
18एफ्राईमला रडताना मी ऐकले आहे. एफ्राईमला मी
पुढील गोष्टी बोलताना ऐकले आहे. 'परमेश्वर तू खरोखरच
मला शिक्षा केलीस आणि मी धडा शिकलोमी बेबंद
वासराप्रमाणे होतो. कृपा करून मला शिक्षा करण्याचे
थांबव. मी तुझ्याकडे परत येईन. तू खरोखरच, परमेश्वर,
माझा देव आहेस.
19परमेश्वरा, मी तुझ्यापासून भटकले होते. पण मी
केलेली पापे मला कळली. म्हणून मी माझे मन आणि
जीवन बदलले. मी तरुण असताना, केलेल्या मूर्खपणाच्या
गोष्टींची मला लाज वाटते. त्यामुळे मला ओशाळे वाटते.'"

20देव म्हणतो, "एफ्राईम माझा लाडका मुलगा आहे, हे
तुम्हांला माहीतच आहेमी त्याच्यावर प्रेम करतो. हो! मी
नेहमीच एफ्राईमवर टीका केली. पण तरीही मला त्याची
आठवण येते. तो मला अतिशय प्रिय आहे. आणि मी
खरोखरच त्यांच्यावर दया करतो." हा परमेश्वराकडून
आलेला संदेश आहे.
21"इस्राएलच्या लोकानो, रस्त्यांवर खुणांचे फलक
लावा. घराकडे जाणाऱ्या वाटेवर खूण करा. वाटेवर
लक्ष ठेवा. तुम्ही ज्या रस्त्यावरून जात आहात. त्याचे
स्मरण ठेवा. इस्राएल माझ्या पत्नी, घरी ये. तुझ्या गावांना
परत ये.
22तू विश्वासघातकी मुलगी होतीस. पण तू बदलशील.
तू घरी येण्याआधी किती वेळ वाट बघशील?" "परमेश्वराने
अघटित निर्माण केले आहे. स्त्रीला पुरुषाभोवती फिरू
दिले.*"
23सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो,
"यहूदाच्या लोकांसाठी मी पुन्हा चांगल्या गोष्टी करीन.
कैदी म्हणून नेलेल्या लोकांना परत आणीन. त्या
वेळी, यहूदाच्या शहरांत व गावांत राहणारे सर्व लोक
म्हणतील, 'सदगृह, पवित्र पर्वतावर, परमेश्वर तुझे कल्याण
करो!*'
24"यहूदातील सर्व गावांतील लोक एकत्र येतील व तेथे
शांतता नांदेल. यहुदामधील शेतकरी आणि (मेंढ्यांचे)
कळप घेऊन फिरणारे सर्वजण शांतीने राहतील. 25दुबळ्या
आणि थकलेल्या लोकांना मी आराम आणि शक्ती देईन.
मी दु:खितांच्या इच्छा पुऱ्या करीन."
26हे ऐकल्यानंतर, मी (यिर्मया) उठलो, आणि
आजूबाजूला पाहिले. ती खरोखरच फार सुखद निद्रा होती.
27"असे दिवस येतील," हा परमेश्वराचा संदेश आहे.
"की तेव्हा मी यहूदाच्या व इस्राएलच्या घराण्यांची वृद्धी
होण्यास मदत करीन. मी त्यांच्या मुलांची व गुराढोरांचीही
वृद्धी होण्यास मदत करीन. हे सर्व जणू काही झाडे लावून
त्याची निगा राखण्यासारखे असेल.
28पूर्वी मी यहूदा आणि इस्राएल यांच्यावर लक्ष ठेवले.
व त्यांना उपटून काढण्यासाठी योग्य वेळ येण्याची वाट
पाहिली मी त्यांना फाडून काढले. मी त्यांचा नाश केला.
मी त्यांच्यावर खूप संकटे आणली. पण आता, त्यांनी
पुन्हा उभे राहावे व सामर्थ्यवान व्हावे म्हणून लक्ष ठेवीन."
हा परमेश्वराचा संदेश आहे.
29"आई-वडिलांनी आंबट द्राक्षे खाल्ली,

पण त्याची चव मात्र मुलांना चाखावी लागली.
ही म्हण लोक पुन्हा कधीही वापरणार नाहीत.

30प्रत्येकजण आपल्या पापाने मरेल. जो आंबट द्राक्षे खाईल,
तोच त्याची चव चाखील."

## नवा करार

31परमेश्वराने पुढील गोष्टी सांगितल्या: "मी इस्राएलच्या
व यहूदाच्या घराण्याशी नवा करार करण्याची वेळ येत
आहे. 32मी त्यांच्या पूर्वजांशी केलेल्या कराराप्रमाणे तो
असणार नाही. जेव्हा मी त्यांना हाताला धरून मिसरच्या

---

**स्त्रीला ... फिरू दिले** ह्या ओळीचा अर्थ समजण्यास कठीण आहे. कदाचित् ही ओळ म्हणजे यिर्मयाच्या काळात प्रचलित असलेल्या एखाद्या म्हणीचा भाग असेल.

**सदगृह ... करो!** हा सियोनच्या मंदिरासाठी दिलेला आशीर्वाद होतार. पवित्र डोंगर म्हणजे ज्यावर हे मंदिर बांधले आहे तो डोंगर.

बाहेर आणले होते, तेव्हा तो करार केला होता. तेव्हा मी त्यांचा स्वामी होतो. पण त्यांनी त्या कराराचा भंग केला.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

33“भविष्यात, मी इस्राएलच्या लोकांबरोबर पुढीलप्रमाणे करार करीन.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. “मी माझी शिकवण त्यांच्या मनावर बिंबवीन आणि त्यांच्या हृदयावर कोरीन. मी त्यांचा देव असेन व ते माझे लोक असतील.
34लोकांना, त्यांच्या शेजाऱ्यांना आणि नातेवाईकांना परमेश्वराची ओळख करून द्यावी लागणार नाही. का? कारण सर्वजण, लहानापासून थोरापर्यंत राजापासून रंकापर्यंत, मला ओळखत असतील.” हा परमेश्वराचा संदेश आहे. “त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मी त्यांना क्षमा करीन. मी त्यांच्या पापांचे स्मरण ठेवणार नाही.”

## परमेश्वर कधीही इस्राएलचा त्याग करणार नाही

35परमेश्वर म्हणतो, “परमेश्वर दिवसा सूर्याला प्रकाशित करतो आणि रात्री चंद्र व तारे यांना प्रकाशित करतो. परमेश्वर समुद्र घुसळतो म्हणून समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर आदळतात. सर्वशक्तिमान परमेश्वर असे त्याला म्हणतात.”

36परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो, “इस्राएलचे वंशज कधीही राष्ट्र बनल्याखेरीज राहणार नाहीत. सूर्य, चंद्र, तारे व समुद्र ह्यांच्यावरील माझे नियंत्रण ढळले, तरच असे होणे शक्य आहे.”

37परमेश्वर म्हणतो,“मी इस्राएलच्या वंशजांना कधीही नाकारणार नाही. लोक जर आकाशाचे मोजमाप करू शकले किवा पृथ्वीच्या पोटातील सर्व रहस्ये जाणू शकले, तरच हे घडणे शक्य आहे. तरच मी इस्राएलच्या वंशजाना नाकारीन. त्यानी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मगच मी त्यांना दूर करीन.” हा परमेश्वराचा संदेश आहे.

## नवीन यरुशलेम

38“असे दिवस येत आहेत की, हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे परमेश्वरासाठी यरुशलेम नगरी पुन्हा उभारली जाईल. हानानेलच्या बुरुजापासून कोपऱ्याच्या दारापर्यंत सगळी नगरी पुन्हा उभारली जाईल.
39ओळंबा कोपऱ्याच्या दारापासून थेट गारेबच्या टेकडीपर्यंत जाईल. आणि तेथून गवाथकडे वळेल.
40ज्या दरीत प्रेते व राख टाकली जाते, ती परमेश्वराला पवित्र वाटेल. ह्यात पूर्वेकडच्या किद्रोन दरीपासून घोडे दाराच्या कोपऱ्यापर्यंतच्या पठाराचा समावेश असेल. हा सर्व प्रदेश परमेश्वराला पवित्र वाटेल. यरुशलेमचा पुन्हा कधीही विध्वंस केला जाणार नाही वा तिचा नाश होणार नाही.”

## यिर्मया शेत विकत घेतो

32 सद्कीया यहूदाचा राजा होता त्याच्या कारकिर्दीचा दहाव्या वर्षी* यिर्मयाला परमेश्वराकडून एक संदेश आला. सिद्कीया राजाच्या कारकिर्दीचे दहावे वर्ष म्हणजेच नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीचे अठरावे वर्ष होय.
2त्यावेळी बाबेलच्या सैन्याने यरुशलेमला वेढा घातला होता. आणि यिर्मया चौकीदारांच्या पहाऱ्यात असलेल्या यहूदाच्या राजवाड्याच्या चौकात कैद केला गेला होता.
3–4(यहूदाचा राजा सिद्कीया ह्याला यिर्मयाने केलेले भविष्यकथन आवडले नाही. म्हणून त्याने यिर्मयाला कैद केले होते. यिर्मयाने सांगितले होते “परमेश्वर म्हणतो, ‘मी लवकरच यरुशलेम बाबेलच्या राजाच्या ताब्यात देईन. नबुखद्नेस्सर ही नगरी जिंकेल यहूदाचा राजा सिद्कीया खास्द्यांच्या सैन्यापासून पळून जाऊ शकणार नाही. त्याला बाबेलच्या राजाच्या ताब्यात दिले जाईल सिद्कीया बाबेलच्या राजाशी प्रत्यक्ष समोरासमोर बोलेल.
5बाबेलचा राजा सिद्कीयाला बाबेलला नेईल. मी त्याला शिक्षा करेपर्यत तो तेथेच राहील.’ हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. ‘तुम्ही जर बाबेलच्या सैन्याबरोबर युद्ध केलेत, तरी तुम्ही त्यात विजयी होणार नाही.’”.)

6यिर्मया कैदेत असताना म्हणाला, “मला परमेश्वराचा संदेश मिळाला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.
7यिर्मया, तुझे काका शल्लूम यांचा मुलगा हानामेल लवकरच तुझ्याकडे येईल आणि तुला म्हणेल ‘अनाथोथजवळचे माझे शेत, यिर्मया, तू विकत घे. तू माझा अगदी निकटचा नातेवाईक असल्याने, तूच ते विकत घे. तो तुझाच हक्क आणि तुझीच जबाबदारी आहे.’

8“मग परमेश्वराने सांगितल्याप्रमाणेच घडले. माझा चुलतभाऊ हानामेल पहारेकऱ्यांच्या चौकात मला भेटला आणि म्हणाला, ‘यिर्मया, अनाथोथ गावाजवळचे माझे शेत तू विकत घे. अनाथोथ हे गाव बन्यामीनच्या कुळाच्या मालकीच्या प्रदेशात होते. तूच ते तुझ्यासाठी विकत घे. कारण ते विकत घेऊन त्याचा मालक होण्याचा तुझा हक्क आणि जबाबदारी आहे.’

“तेव्हा मला कळले की हाच देवाचा संदेश होता. देवाचा संदेश असाच आहे हे मला माहीत होतेच.
9म्हणून मी माझा चुलतभाऊ हानामेल याच्याकडून ते शेत विकत घेतले. त्याबद्दल मी त्याला 17 चांदीची नाणी* दिली.
10मी खरेदीखतावर सही केली आणि त्याची एक मोहोरबंद प्रत माझ्याजवळ ठेवली काही लोकांना साक्षीला ठेवून मी सर्व गोष्टी केल्या मी ताजव्यात चांदी मोजली
11मग मी माझ्याजवळची मोहोरबंद खरेदीखताची प्रत आणि दुसरी उघडी प्रत अशा दोन्ही प्रती घेतल्या व.
12त्या बारूखला

**दहाव्या वर्षी** म्हणजे ख्रि. पू 588–587 याच वर्षी नबुखद्नेस्सरने यरुशलेमचा नाश केला

**चांदीची नाणी** औसाचा 2/5 भाग.

दिल्या, बारूख हा नरीयाचा व नरीया हा महसेयाचा मुलगा
होता. मोहोरबंद खरेदीखतात खरेदीच्या सर्व शर्ती नमूद
केलेल्या होत्या. माझा चुलत भाऊ हानामेल व इतर
साक्षीदार तेथे असतानाच मी खरेदीखत बारूखला दिले.
त्यावर इतर साक्षीदारांनीही सह्या केल्या. ते खरेदीखत मी
बारूखला देताना चौकात बसलेल्या यहूदाच्या पुष्कळ
लोकांनी पाहिले.
13“लोक सर्व पाहत असतानाच, मी बारूखला म्हणालो,
14“सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो,
‘खरेदीखताच्या, मोहोरबंद व उघड, अशा दोन्ही प्रती
मातीच्या मडक्यात ठेव. म्हणजे त्या दीर्घ काळ चांगल्या
टिकून राहतील. 15सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा
देव म्हणतो, “भविष्यकाळात माझी माणसे इस्राएलमध्ये
पुन्हा एकदा घरे, शेते आणि द्राक्षमळे विकत घेतील.”’
16“नरीयाचा मुलगा बारूख ह्याला खरेदीखत दिल्यावर
मी परमेश्वराची प्रार्थना केली. मी म्हणालो,

17“परमेश्वर देवा, तू आकाश आणि पृथ्वी निर्माण
केलीस. तुझ्या सामर्थ्याच्या बळावर आणि पसरलेल्या
हातामुळे तू ते निर्माण केलेस. तुला आश्चर्य कारक
वाटण्याजोगे काहीही नाही. तुला काहीही असाध्य
नाही. 18परमेश्वर, तू हजारो लोकांची निष्ठा
सांभाळणारा व त्यांच्यावर कृपा करणारा आहेस.
पण तूच वडिलांच्या पापांची शिक्षा मुलांना करतोस.
सर्वश्रेष्ठ व सामर्थ्यवान देवा, तुझे नाव आहे
सर्वशक्तिमान परमेश्वर 19परमेश्वर, फार मोठ्या
योजना आखतो आणि त्या पार पाडतो. लोक करीत
असलेली प्रत्येक कृती तू पाहतोस. तू सत्कृत्ये
करणाऱ्यांना बक्षिस देतोस व दुष्कृत्ये करणाऱ्यांना
शिक्षा करतोस. म्हणजेच प्रत्येकाला त्याच्या
पात्रतेप्रमाणे फळ देतोस. 20परमेश्वरा, तू मिसर देशात
अद्‌भुत चमत्कार केलास. आजपावेतोसुद्धा तू अद्‌भूत
चमत्कार केले आहेस. तू हे चमत्कार इस्राएलमध्ये
तर केलेच पण जेथे जेथे लोक आहेत तेथे तेथे
केलेस. त्यामुळेच तुझी कीर्ती झाली. 21परमेश्वरा,
अद्‌भूत चमत्कारांच्याआधारे तू इस्राएलच्या लोकांना
मिसरमधून बाहेर आणलेस. ह्या गोष्टी तू स्वत:च्या
सामर्थ्यवान हाताच्या बळावर केल्यास. तुझे सामर्थ्य
विस्मयकारक आहे.!
22“परमेश्वरा, ही भूमी तू इस्राएलच्या लोकांना
दिलीस. फार पूर्वी हीच भूमी तू त्यांच्या पूर्वजांना
द्यायचे कबूल केले होतेस. ही फार चांगली भूमी
आहे. ह्या चांगल्या भूमीवर अनेक चांगल्या गोष्टी
आहेत. 23इस्राएलचे लोक ह्या देशात आले आणि
त्यांनी तो देश आपल्या मालकीचा केला. पण त्या
लोकांनी तुझ्या आज्ञा पाळल्या नाहीत. त्यांनी तुझ्या
शिकवणुकीचा स्वीकार केला नाही. तुझ्या
आज्ञेप्रमाणे ते वागले नाहीत. म्हणून तू इस्राएलच्या
लोकांच्याबाबत भयंकर गोष्टी घडवून आणल्यास.
24“आणि आता, शत्रूने नगरीला वेढा घातला आहे.
यरुशलेमची तटबंदी ओलांडून जाण्यासाठी व नगरी
हस्तगत करण्यासाठी ते उतरंडी रचीत आहेत. युद्ध
उपासमार व भयंकर रोगराई यांच्या जोरावर बाबेलचे
सैन्य यरुशलेम नगरीचा पराभव करील. आता
बाबेलचे सैन्य यरुशलेमवर हल्ला करीत आहे.
परमेश्वरा, असे होईल असे तू म्हणाला होतास आणि
पाहा आता तसेच घडत आहे.
25“परमेश्वरा, माझ्या स्वामी, त्या सर्व वाईट गोष्टी
घडत आहेत. पण तू मला सांगत आहेस, “यिर्मया,
चांदी देऊन शेत विकत घे आणि खरेदीचे साक्षीदार
म्हणून काही लोकांना निवड’ बाबेलचे सैन्य नगरी
जिंकण्याच्या बेतात असताना, तू मला हे सांगत आहेस.
मी माझा पैसा अशा रीतीने वाया का घालवावा?”

26मग यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. 27“यिर्मया,
मी परमेश्वर आहे पृथ्वीवरच्या प्रत्येक माणसाचा मी देव
आहे. यिर्मया, मला काहीच अशक्य नाही, हे तुला माहीत
आहेच.” 28परमेश्वर असेही म्हणाला, “मी लवकरच
यरुशलेम नगरी बाबेलचे सैन्य आणि बाबेलचा राजा
नबुखद्‌नेस्सर ह्यांच्या ताब्यात देईन. ते सैन्य नगरी जिंकेल.
29बाबेलच्या सैन्याने नगरीवर हल्ला करण्यास अगोदरच
सुरवात केली आहे. ते लवकरच नगरीत प्रवेश करतील
व आग लावतील. ते नगरी बेचिराख करतील.
यरुशलेममधील लोकांनी घरांच्या धाब्यावर दैवत बआल
याला नैवेद्य दाखवून मला संतापवले. लोकांनी इतर मूर्तींना
पेये अर्पण केली. बाबेलचे सैन्य ती सर्व घरे जाळून टाकेल.
30मी इस्राएल आणि यहूदा येथील लोकांवर नजर ठेवली.
ते करीत असलेली प्रत्येक गोष्ट वाईट आहे. ते लहान
असल्यापासून दुष्कृत्ये करीत आहेत. इस्राएलच्या लोकांनी
मला फार संतापविले. त्यांनी स्वत:च्या हाताने तयार
केलेल्या मूर्तींची पूजा केल्याने मला अतिशय राग आला.”
हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
31“यरुशलेमच्या उभारणीपासून आतापर्यंत ह्या नगरीतल्या
लोकांनी मला संतापविले आहे. त्यांनी मला इतके
संतापविले की मला ती नगरी नजरे पुढून नाहीशी केलीच
पाहिजे. 32इस्राएल व यहूदा येथील लोकांनी केलेल्या
दुष्कृत्यांमुळे मी यरुशलेमचा नाश करीन. लोक, त्यांचे
राजे, नेते, त्यांचे याजक आणि संदेष्टे, यहूदातील व
यरुशलेममधील लोक यांनी मला फार संतापविले आहे.
33“त्या लोकांनी मदतीसाठी माझ्याकडे यावे पण त्यांनी
माझ्याकडे पाठ फिरविली मी त्यांना शिकविण्याचा पुन्हा
पुन्हा प्रयत्न केला पण त्यांनी माझे ऐकले नाही. मी त्यांना
नीती शिकवण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी लक्ष दिले
नाही. 34त्या लोकांनी त्यांच्या मूर्ती तयार केल्या मला त्या

मूर्तीची चीड येते. त्यानी त्या मूर्ती माझ्या नावावर असलेल्या
मंदिरात ठेवल्या. त्यामुळे माझे मंदिर ‘अपवित्र’ झाले.
35“बेन-हिन्नोमच्या दरीत त्यांना बआल या दैवतासाठी
उच्चस्थाने बांधली. ही पूजास्थाने त्यांनी आपल्या
मुलामुलींना जाळून मोलेखला बआलबळी देण्यासाठी
बांधली. अशा भयंकर गोष्टी करण्याची आज्ञा मी त्यांना
कधीच दिली नव्हती. यहूदातील लोक अशा भयंकर
गोष्टी करतील, असे माझ्या कधीही मनातसुद्धा आले
नव्हते.
36“तुम्ही लोक म्हणत आहात ‘बाबेलचा राजा यरुशलेम
जिंकेल ह्या नगरीचा पराभव करण्यासाठी तो युद्ध,
उपासमार आणि भयंकर रोगराई ह्यांचा उपयोग करील’
पण परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, 37‘मी इस्राएल व
यहूदा यामधील लोकांना त्यांचा देश सोडण्यास बळजबरीने
भाग पाडले आहे. मी त्यांच्यावर भयंकर रागावलो आहे.
पण मी त्यांना या ठिकाणी परत आणीन. मी त्यांना जेथे
जेथे जायला भाग पाडले, तेथून तेथून मी त्यांना गोळा
करीन. मी त्यांना येथे परत आणीन. मी त्यांना शांततेत व
सुखरूप राहू देईन. 38इस्राएलमधील आणि यहूदातील लोक
माझे होतील आणि मी त्यांचा देव होईन. 39त्यांनी खरोखरच
एक व्हावे म्हणून मी त्यांच्या मनात तशी इच्छा उत्पन्न
करीन. त्यांच्या आयुष्यभर माझ्या उपासनेची खरोखरीची
इच्छा हेच त्यांचे एकमेव ध्येय असेल. माझी उपासना
आणि आदर केल्याने त्यांचे आणि त्यांच्या मुलांचे खरोखरच
भले होईल.
40“‘यहूदातील आणि इस्राएलमधील लोकांबरोबर मी
एक करार करीन. तो करार चिरंतन राहील. ह्या
कराराप्रमाणे, मी ह्या लोकांकडे कधी पाठ फिरविणार
नाही. मी त्यांच्याशी नेहमी चांगला वागेन. मी त्यांना माझा
आदर करायची भावना देईन. मग ते माझ्यापासून कधीही
दूर जाणार नाहीत. 41ते मला प्रसन्न ठेवतील. त्यांचे भले
करण्यात मला मौज वाटेल. मी त्यांना ह्या भूमीत रूजवीन
आणि वाढवीन. मी माझ्या अंत:करणापासून हे करीन.’”
42परमेश्वर असे म्हणतो, “मी इस्राएलमधील आणि
यहूदातील लोकांवर मोठे अरिष्ट आणले आहे. तशाच
चांगल्या गोष्टीही आणीन. मी त्यांच्यासाठी चांगल्या गोष्टी
करण्याचे कबूल केले आहे. 43तुम्ही लोक म्हणत आहात,
‘ही जमीन म्हणजे ओसाड वाळवंट आहे. तेथे कोणी
मनुष्यप्राणी वा पशू नाहीत. बाबेलच्या सैन्याने या देशाचा
पराभव केला.’ पण भविष्यकाळात, ह्या देशात लोक
पुन्हा एकदा शेते खरेदी करतील. 44लोक आपले धन
वापरून शेते खरेदी करतील. ते करारावर सह्या करतील
आणि ते मोहोरबंद करतील. लोक खरेदीखतांवर सह्या
करतील, तेव्हा इतर लोक साक्षी असतील. बन्यामीनच्या
देशात, लोक पुन्हा जमीन विकत घेतील, यरुशलेम
भोवतीच्या प्रदेशातील जमीन ते खरेदी करतील. यहूदातील
शहरांत ते शेते विकत घेतील. त्याचप्रमाणे लोक डोंगराळ
प्रदेश पश्चिमेकडील डोंगरपायथा व दक्षिणेकडील वाळवंट
येथेही लोक जमीन विकत घेतील. मी तुमच्या लोकांना
परत घरी आणीन. मग असे घडून येईल.” हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

## देवाचे वचन

33 यिर्मयाला दुसऱ्यांदा परमेश्वराचा संदेश आला.
यिर्मया अजूनही पहारेकऱ्यांच्या चौकात कैद
होता. 2परमेश्वराने पृथ्वी निर्माण केली आणि तो तिचे
रक्षण करतो परमेश्वर हेच त्याचे नाव. परमेश्वर म्हणतो,
3“यहूदा, माझा धावा कर. मी ओ देईन. मी तुला महत्वाची
रहस्ये सांगीन. ह्या गोष्टी तू पूर्वी कधीच ऐकल्या नसशील.
4परमेश्वर इस्राएलचा देव आहे. परमेश्वर यरुशलेममधील
घरांविषयी व यहूदातील राजांच्या राजवाड्यांविषयी पुढील
गोष्टी सांगतो, शत्रू ती घरे पाडील. नगरांच्या तटबंदीपर्यंत
तो उतरंडी बांधील. शत्रू शहरांतील लोकांशी तलवारीने
लढेल.
5“यरुशलेमच्या लोकांनी खूप वाईट गोष्टी केल्या. म्हणून
मला त्या लोकांचा खूप राग आला. मी त्यांच्याविरुद्ध
गेलो. मी तेथे पुष्कळ माणसे मारीन. बाबेलचे सैन्य
यरुशलेमविरुद्ध लढण्यास येईल. यरुशलेमच्या घरांत खूप
मृतदेह असतील.
6“पण मग मी त्या नगरीतील लोकांना बरे करीन. मी
त्यांना शांती आणि सुरक्षा ह्यांचा आनंद लुटू देईन. 7यहूदा
आणि इस्राएल यांना मी परत आणीन पूर्वीप्रमाणेच मी त्या
लोकांना शक्तिशाली करीन. 8त्यांनी माझ्याशी पापे केली.
पण मी ती पापे धुवून टाकीन. ते माझ्याविरुद्ध लढले पण
मी त्यांना क्षमा करीन. 9मग यरुशलेम एक सुंदर ठिकाण
होईल. लोक सुखी असतील दुसऱ्या राष्ट्रांतील लोक त्या
नगरीची स्तुती करतील. यरुशलेममध्ये चांगल्या गोष्टी
घडत असल्याचे ऐकून इतर लोक प्रशंसा करतील. मी
इस्राएलला शांतता आणि हित प्राप्त करून दिल्यामुळे
त्यांना माझ्याबद्दल आदरयुक्त दरारा वाटेल व त्यामुळे ते
कापतील.
10“तुम्ही लोक म्हणत आहात “आमचा देश म्हणजे
ओसाड वाळवंट आहे. तेथे कोणी माणसे वा प्राणी राहत
नाहीत.’ यरुशलेमच्या रस्त्यांवर व यहूदाच्या शहरात सध्या
शांतता आहे. पण लवकरच तेथे कोलाहल सुरू होईल.
11तेथे सुखाचे व आनंदाचे कल्लोळ उठतील.
नव-वर-वधूंचे सुखसंवाद ऐकू येतील. परमेश्वराला
अर्पण करण्यासाठी भेटी घेऊन परमेश्वराच्या मंदिरात
येणाऱ्या लोकांचे आवाज ऐकू येतील. ते लोक म्हणतील,
‘परमेश्वर देवाची स्तुती करा. परमेश्वर चांगला आहे.
परमेश्वराची कृपा चिरंतन आहे!’ मी यहूदासाठी चांगल्या
गोष्टी करीन. -म्हणून लोक असे म्हणतील. ते सर्व
सुरुवातीला जसे होते तसे असेल.” देवाने ह्या गोष्टी
सांगितल्या.

12सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “आता ही जागा निर्जन
आहे. तेथे मनुष्य वा प्राणी कोणीही नाही. पण यहूदातील
गावे माणसांनी गजबजतील. तेथे मेंढपाळ असतील आणि
त्यांच्या मेंढ्यांना रवंथ करण्यासाठी कुरणेही असतील.
13मेंढ्या मेंढपाळांच्या पुढे चालत असताना, मेंढपाळ त्या
मोजतील. सर्व देशातील लोक-डोंगराळ प्रदेशातील,
पश्चिमेकडच्या डोंगरपायथ्याचे व नेगेव मधील लोक आणि
यहूदातील इतर शहरांतील माणसे मेंढ्यांची मोजदाद
करतील.”

## चांगली शाखा

14हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे. “मी इस्राएल
आणि यहूदा येथील लोकांना विशेष वचन दिले आहे मी
कबूल केलेल्या गोष्टी करण्याची वेळ येत आहे. 15त्यावेळी
दावीदच्या वंशवृक्षाची एक चांगली शाखा मी वाढवीन ती
‘शाखा’ देशासाठी चांगल्या आणि योग्य गोष्टी करील.
16ह्या ‘शाखेच्या’ काळात यहूदातील लोकांचे रक्षण केले
जाईल. लोक यरुशलेममध्ये सुखरूप राहतील. त्या शाखेचे
नाव ‘परमेश्वर चांगला आहे’” असे आहे.

17परमेश्वर म्हणतो, “दावीदाच्या घराण्यातील माणूस
नेहमीच सिंहासनावर बसेल व इस्राएलवर राज्य करील.
18आणि याजक नेहमी लेवी घराण्यातील असतील. ते
याजक नेहमी माझ्यासमोर उभे राहतील आणि ते मला
होमार्पण, धान्य अर्पण करतील आणि बळीही अर्पण
करतील.”

19यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. 20परमेश्वर
म्हणतो, “दिवस आणि रात्र यांच्याबरोबर मी करार केला
आहे. ते निरंतर राहतील असे मी मान्य केले, तुम्ही तो
करार बदलू शकत नाही. दिवस आणि रात्र नेहमी योग्य
वेळेलाच येतील. तुम्ही जर हा करार बदलू शकला,
21तरच तुम्ही माझा दावीद व लेवी यांच्याबरोबर झालेला
करार बदलू शकाल. मग दावीदाचे वंशज राजे होणार
नाहीत आणि लेवीच्या घराण्यातून याजक येणार नाहीत.
22पण मी माझा सेवक दावीद आणि लेवीचे कूळ यांना
मोठा वंश देईन. आकाशातील ताऱ्यांएवढी त्यांच्या
वंशजांची संख्या असेल-कोणीही आकाशातील तारे मोजू
शकत नाही. अथवा समुद्रकाठच्या वाळूच्या कणांएवढी
त्यांची संख्या असेल. कोणीही वाळूचे कण मोजू शकत
नाही.”

23यिर्मयाला परमेश्वराचा पुढील संदेश मिळाला
24“यिर्मया, लोक काय बोलतात, ते तू ऐकलेस का? ते
लोक म्हणतात ‘परमेश्वर इस्राएल आणि यहूदा या
घराण्यापासून दूर गेला. परमेश्वराने त्या लोकांची निवड
केली होती.’ पण आता तो त्यांचा राष्ट्र म्हणून सुद्धा
स्वीकार करीत नाही.”

25परमेश्वर म्हणतो, “माझा दिवस व रात्र
यांच्याबरोबरच्या कराराचा जर भंग झाला आणि मी जर
आकाश आणि पृथ्वी ह्यांच्यासाठी नियम केले नसते, तर
कदाचित् मी त्या लोकांना सोडले असते. 26मग कदाचित्
याकोबच्या वंशजांचा मी त्याग केला असता. आणि
दावीदच्या वंशजांना, अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांच्या
वंशजांवर राज्य करू दिले नसते. पण दावीद माझा सेवक
आहे. आणि मला त्या लोकांची दया येईल. आणि प्रेम
वाटेल. मी कैद्यांना पुन्हा त्यांच्या मायभूमीत परत आणीन.”

## यहूदाचा राजा सिद्कीया ह्याला इशारा

34 यिर्मयाला देवाचा संदेश आला. नबुखद्नेस्सर ह्या
बाबेलच्या राजाने यरुशलेम व तिच्या आजूबाजूची
गावे ह्यांच्याविरुध्द जेव्हा युद्ध पुकारले तेव्हा यिर्मयाला हा
संदेश मिळाला. नबुखद्नेस्सरकडे त्याचे स्वत:चे सैन्य व
त्याच्या साम्राज्यातील इतर राज्यांची सैन्ये व लोक होते.

2संदेश असा होता, परमेश्वर इस्राएलचा देव म्हणतो,
“यिर्मया, यहूदाचा राजा सिद्कीया याच्याकडे जा व पुढील
निरोप दे. ‘सिद्कीया, परमेश्वर असे म्हणतो की मी
लवकरच यरुशलेम बाबेलच्या राजाच्या ताब्यात देईन व
ती तो भस्मसात करील. 3सिद्कीया, तू बाबेलच्या राजाच्या
तावडीतून सुटणार नाहीस. तुला पकडून निश्चितपणे त्याच्या
ताब्यात दिले जाईल. तू बाबेलच्या राजाला प्रत्यक्ष पाहशील.
तुम्ही समोरासमोर येऊन एकमेकांशी बोलाल व तू
बाबेलला जाशील. 4सिद्कीया, यहूदाच्या राजा, परमेश्वराचे
वचन ऐक. परमेश्वर तुझ्याबद्दल असे म्हणतो तुला
तलवारीने मृत्यू येणार नाही. 5तुला शांतपणे मरण येईल.
तुझ्या आधी जे तुझे पूर्वज राजे झाले व ज्यांनी राज्य केले
त्यांना मान देण्यासाठी लोकांनी ज्याप्रमाणे दफनाच्या वेळी
अग्नी पेटविला, तसाच लोक तुला मान देण्यासाठी
पेटवतील. ते तुझ्याकरिता शोक करतील व म्हणतील
“हाय रे माझ्या धन्या!” मी स्वत: तुला हे वचन देत
आहे.’” हा परमेश्वराचा संदेश आहे.

6यिर्मयाने परमेश्वराचा संदेश यरुशलेममध्ये
सिद्कीयाला दिला. 7तेव्हा बाबेलच्या राजाचे सैन्य
यरुशलेमविरुद्ध लढत होते. यहूदातील ज्या शहरांचा पाडाव
झाला नव्हता, त्यांच्याशीही बाबेलचे सैन्य लढत होते. ती
शहरे म्हणजे लाखीश व अजेका ही होत. यहूदामध्ये
तटबंदी असलेली फक्त ही दोनच शहरे राहिली होती.

## लोक एका कराराचा भंग करतात.

8सर्व इब्री गुलामांना स्वातंत्र्य देण्याचा करार सिद्कीया
राजाने यरुशलेमच्या सर्व लोकांबरोबर केला होता. हा
करार झाल्यावर यिर्मयाला देवाचा संदेश आला. 9प्रत्येकाने
आपल्या इब्री गुलामांना बंधमुक्त करावे अशी अपेक्षा
होती. सर्व इब्री गुलामांना पुरूष व स्त्री यांना बंधमुक्त
करायचे होते. कोणीही यहुदी कुळातील माणसाला
गुलामगिरीत ठेवू नये, अशी अपेक्षा होती. 10यहूदातील
सर्व नेत्यांनी व सर्व लोकांनी या कराराला मान्यता दिली.

प्रत्येकजण आपल्याकडील स्त्री वा पुरुष गुलामांना ह्यापुढे
गुलाम म्हणून न ठेवता मुक्त करणार होता. प्रत्येकजण
कबूल झाला आणि सगळे गुलाम मुक्त झाले. [11]पण
त्यानंतर * ज्या लोकांकडे गुलाम होते, त्या लोकांनी आपला
विचार बदलला आणि त्यांनी मुक्त केलेल्यांना पकडून
पुन्हा गुलाम केले.

[12]मग यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. [13]यिर्मया,
परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा देव असे म्हणतो: "तुमचे
पूर्वज मिसरमध्ये गुलाम होते. मी त्यांना तेथून सोडविले हे
करताना मी त्यांच्याबरोबर एक करार केला. [14]मी तुमच्या
पूर्वजांना म्हणालो: 'प्रत्येक सात वर्षाच्या अखेरीला
प्रत्येकाने आपल्याकडील इब्री गुलामांना मुक्त केलेच
पाहिजे. तुमच्या एखाद्या इब्री बांधवाने स्वत:ला तुम्हाला
विकले असेल, तर त्याने सहा वर्षे तुमची गुलामी केल्यावर
तुम्ही त्याला जाऊ दिलेच पाहिजे.' पण तुमच्या पूर्वजांनी
माझे ऐकले नाही वा माझ्याकडे लक्ष दिले नाही. [15]काही
वेळा पूर्वी, योग्य ते करण्यापासून तुम्हीही विचलित झालात.
तुमच्यापैकी प्रत्येकाने आपल्याकडे गुलाम असलेल्या इब्री
बांधवाला स्वातंत्र्य दिले आणि माझ्या नावाने ओळखल्या
जाणाऱ्या मंदिरात, माझ्यापुढे एक करारही केलात. [16]पण
आता, तुमचे मन बदलले. तुम्ही माझ्या नावाचा मान
राखीत नाही, हे तुम्ही दाखवून दिलेत. तुम्ही हे कसे काय
केले? तुम्ही प्रत्येकाने मुक्त केलेल्या गुलामांना स्त्रिया व
पुरुष दोघांनाही परत पकडले. त्यांना बळजबरीने पुन्हा
गुलाम केलेत.

[17]"म्हणून परमेश्वर असे म्हणतो, 'तुम्ही माझी आज्ञा
पाळली नाही. तुम्ही तुमच्या इब्री गुलामांना स्वातंत्र्य दिले
नाही. तुम्ही कराराचे पालन केले नाही, म्हणून आता 'मी
"स्वातंत्र्य" देईन. हा परमेश्वराचा संदेश आहे युद्धात,
भयंकर रोगराईने अथवा उपासमारीने मरण्याचे "स्वातंत्र्य"
(मी तुम्हाला देईन) मी तुमच्याबाबतीत असे काहीतरी
करीन की त्याबद्दल ऐकून पृथ्वीवरची राज्ये भीतीने
चळाचळा कापतील. [18]कराराचा भंग करणाऱ्या आणि
माझ्यासमोर दिलेले वचन न पाळणाऱ्या लोकांना मी
शत्रूच्या हवाली करीन. ह्या लोकांनी वासराचे दोन तुकडे
केले व ते त्यामधून चालत गेले.* [19]माझ्यासमोर करार
करून, वासराच्या दोन तुकड्यांमधून चालत जाणारे हे
लोक म्हणजे यहूदा आणि यरुशलेमचे नेते, न्यायालयातील
महत्वाचे अधिकारी, याजक आणि या देशातील लोक
होत. [20]मी ह्या सर्व लोकांना त्यांच्या शत्रूंच्या अथवा त्यांना
मारू इच्छिणाऱ्या कोणाही व्यक्तीच्या हवाली करीन.
त्यांची प्रेते म्हणजे पक्षी व वन्य पशूंचे भक्ष्य होतील. [21]मी
यहूदाचा राजा सिद्कीया व तेथील नेते ह्यांना त्यांच्या
शत्रूंच्या अथवा त्यांना मारू इच्छिणाऱ्या लोकांच्या स्वाधीन
करीन. जरी बाबेलच्या सैन्याने यरुशलेम सोडले *असले,
तरी मी सिद्कीया आणि त्याच्या लोकांना बाबेलच्या
राजाच्या सैन्याच्या हवाली करीन. [22]मी बाबेलच्या
सैन्याला 'हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे' 'परत
यरुशलेममध्ये येण्याची आज्ञा देईन." ते सैन्य
यरुशलेमच्याविरुद्ध लढेल. ते ती नगरी ताब्यात घेतील,
तिला आग लावतील आणि ती बेचिराख करतील. मी
यहूदातील शहरांचा नाश करीन. ती शहरे म्हणजे ओसाड
वाळवंट होईल ती निर्जन होईल."

## रेखाबी घराण्याचे उत्तम उदाहरण

35 यहोयाकीम यहूदावर राज्य करीत असताना,
यिर्मयाला देवाचा संदेश आला. यहोयाकीम हा
योशीया राजाचा मुलगा होता. परमेश्वराकडून आलेला
संदेश असा होता. [2]"यिर्मया, रेखाब्यांकडे जा त्यांना देवाच्या
मंदिरातील एका बाजूच्या खोलीत बोलाव. त्यांना पिण्यास
मद्य दे."

[3]म्हणून मी (यिर्मया) याजनाकडे गेलो याजना हा
यिर्मयाचा* मुलगा होता आणि यिर्मया हबसिन्याचा मुलगा
होता. मी याजनाच्या सर्व भावांना व मुलांना आणि [4]रेखाबी
कुटुंबीयांना एकत्र केले आणि त्यांना परमेश्वराच्या मंदिरात
आणले. आम्ही सर्व हानानच्या मुलांच्या खोलीत गेलो.
हानान हा इग्दल्याचा मुलगा होता व तो 'देवाचा माणूस'
होता. ही खोली यहूदाच्या राजपुत्रांच्या खोली शेजारी होती.
द्वारपाळ मासेया याच्या खोलीच्या वर ही खोली होती.
मंदिराचा द्वारपाळ मासेया हा शल्लूमचा मुलगा होता. [5]नंतर
मी (यिर्मयाने) त्या रेखाबे कुटुंबीयांसमोर मद्य भरलेले
वाडगे व पेले ठेवले, मी म्हणालो, "थोडे मद्य प्या"

[6]पण ते म्हणाले, "आम्ही कधीच मद्य पीत नाही कारण
आमचे पूर्वज रेखाब यांचा मुलगा योनादाब यांनी आम्हाला
तशी आज्ञा दिली आहे 'तुम्ही आणि तुमच्या वंशजांनी
कधीही दारू घेऊ नये' असे त्यांनी सांगितले आहे. [7]शिवाय
त्यांनी असेही सांगितले आहे की तुम्ही कधीही घरे बांधू
नका, बी पेरू नका वा द्राक्षमळे लावू नका. ह्यातील
कोणतीच गोष्ट तुम्ही कधीही करू नका. तुम्ही फक्त

---

**त्यानंतर** ख्रि. पू. 588 च्या उन्हाळ्यात मिसरचे सैन्य यरुशलेमच्या मदतीला आले आणि त्यांच्याशी लढण्यासाठी बाबेलच्या सैन्याला थोडा काळ यरुशलेम सोडावे लागले. 'देवाने आपल्याला मदत केली आता सर्व सुरळीत होईल.' असे यरुशलेमच्या लोकांना वाटले म्हणून त्यांनी त्यांचे वचन पाळले नाही. मुक्त केलेल्या गुलामांना त्यांनी पुन्हा गुलामगिरीत जखडले.

**ह्या लोकांनी ... चालत गेले** महत्वाचा करार करताना लोक हा विधी करीत. वासरू (अथवा काही वेळा दुसरा एखादा प्राणी) मारून त्याचे दोन तुकडे करीत, व करार करणारे त्यामधून चालत जात. 'मी कराराचे पालन केले नाही तर माझीही स्थिती अशीच होईल.' असे काहीतरी म्हणत.

**यरुशलेम सोडले** पाहा यिर्मया 37:5 व संदर्भ टीप यिर्मया 34:11

**यिर्मया** हा संदेष्ट यिर्मया नव्हे, तर त्याच नावाचा दुसरा माणूस.

तंबूतच राहिले पाहिजे. तुम्ही असे केलेत तरच स्थलांतर
करीत तुम्ही ज्या जागी आला आहात, तेथे दीर्घ काळ
राहाल.’ 8आमचे पूर्वज योनादाब यांनी घालून दिलेले
निर्बंध आम्ही रेखाबे घराण्यातील लोक पाळत आलो
आहोत. आम्ही कधीच मद्य घेत नाही. आमच्या बायका
वा मुलेमुलीही मद्य घेत नाहीत. 9आम्ही आम्हाला
राहण्यासाठी घरे बांधीत नाही. आमची स्वत:च्या मालकीची
शेते वा द्राक्षमळे नाहीत. आम्ही कधीही शेती करीत
नाही. 10आम्ही फक्त तंबूत राहत आलो आणि आमचे
पूर्वज योनादाब यांनी सांगितल्याप्रमाणे वागत आलो. 11पण
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याने यहूदावर हल्ला
केल्यावर, आम्हाला यरुशलेमला जावेच लागले. आम्ही
एकमेकांना म्हणालो, ‘चला, आपण यरुशलेमला गेलेच
पाहिजे. तरच खास्द्यांच्या आणि अराम्यांच्या सैन्यापासून
आपला बचाव होईल.’ म्हणून आम्ही यरुशलेममध्ये
राहिलो.”

12मग यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला.
13सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो,
“यहूदातील व यरुशलेममधील लोकांना हा संदेश ऐकव
तुम्ही लोकांनी धडा शिकावा व माझ्या संदेशाचे पालन
करावे.” हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
14“रेखाबचा मुलगा योनादाब याने आपल्या मुलांना मद्य
‘पिऊ नका’ असे सांगितले आणि त्यांनी त्याचे ऐकले.
आजपर्यंत त्यांच्या वंशजांनी आपल्या पूर्वजांच्या आज्ञेचे
पालन केले. त्यांनी मद्य घेतले नाही. पण मी परमेश्वराने
स्वत: तुम्हाला पुन्हा पुन्हा संदेश दिले, तरी यहूदाच्या
लोकांनो, तुम्ही माझे ऐकले नाही. 15इस्राएल आणि यहूदा
येथील लोकांकडे मी माझे सेवक-संदेष्टे पाठविले. मी
त्यांना तुमच्याकडे पुन्हा पुन्हा पाठविले. ते संदेष्टे म्हणाले
‘इस्राएल आणि यहूदा येथील प्रत्येक माणसाने दुष्कृत्ये
करणे बंद करावे. तुम्ही चांगलेच असले पाहिजे. दुसऱ्या
दैवतांना अनुसरू नका. त्यांची पूजा वा सेवा करू नका.
तुम्ही माझे ऐकलेत, तर तुमच्या पूर्वजांना व तुम्हाला
दिलेल्या देशात तुम्ही राहाल.’ पण तुम्ही माझ्या संदेशाकडे
लक्ष दिले नाही. 16योनादाबच्या वंशजांनी त्यांच्या पूर्वजांनी
दिलेल्या आज्ञा पाळल्या. पण यहूदाच्या लोकांनी माझेही
ऐकले नाही.”

17म्हणून सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव
म्हणतो, “मी सांगतो, यहूदाचे आणि यरुशलेमचे वाईट
होईल. लवकरच मी त्यांचे वाईट करीन. मी त्या लोकांशी
बोललो, पण त्यांनी ऐकण्याचे नाकारले. मी त्यांना हाका
मारल्या, पण त्यांनी ओ दिली नाही.”

18नंतर यिर्मया रेखाब कुटुंबीयांना म्हणाला,
“सर्वशक्तिमान परमेश्वर इस्राएलचा देव असे म्हणतो ‘तुम्ही
तुमचे पूर्वज योनादाब ह्यांच्या आज्ञा पाळल्यात. त्यांच्या
शिकवणुकीप्रमाणे वागलात, त्यांनी सांगितल्याप्रमाणे
प्रत्येक गोष्ट केलीत. 19म्हणून सर्वशक्तिमान परमेश्वर,
इस्राएलचा देव म्हणतो, रेखाबचा मुलगा योनादाब याच्या
वंशजांपैकी एक नेहमीच माझ्या सेवेत राहील.’”

### राजा यहोयाकीम यिर्मयाचा पट जाळतो

36 यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला. योशीयाचा
मुलगा यहोयाकीम हा यहूदाचा राजा असताना
त्याच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी यिर्मयाला परमेश्वराचा
हा संदेश मिळाला. तो असा होता. 2“यिर्मया, मोठा पट घे
आणि मी तुला दिलेले सर्व संदेश त्यावर लिही. यहूदा,
इस्राएल आणि इतर राष्ट्रे ह्यांच्याविषयी मी तुला सांगितले
आहे. योशीयाच्या कारकिर्दीपासून आतापर्यंत मी तुला
सांगितलेले सर्व लिही. 3न जाणो यहूदाच्या घराण्याबाबत
मी ज्या योजना आखल्या आहेत, त्या ऐकून ते दुष्कर्मे
करण्याचे सोडून देतील. त्यांनी असे केल्यास, मी त्यांनी
केलेल्या वाईट पापांबद्दल त्यांना क्षमा करीन.”

4मग यिर्मयाने बारूख नावाच्या माणसाला बोलाविले.
बारूख नेरीयाचा मुलगा होता. यिर्मयाने, त्याला
परमेश्वराकडून आलेले संदेश, सांगितले व ते बारूखने
पटावर लिहून काढले. 5मग यिर्मया बारूखला म्हणाला,
“मी परमेश्वराच्या मंदिरात जाऊ शकत नाही. मला तेथे
जाण्याची परवानगी नाही. 6म्हणून तू परमेश्वराच्या मंदिरात
जावेस असे मला वाटते. उपवासाच्या दिवशी तेथे जा
आणि लोकांना पट वाचून दाखव. मला आलेले परमेश्वराचे
संदेश मी तुला सांगितले व ते तू लिहून घेतलेस. ते तू सर्व
लोकांना वाचून दाखव. यहूदाच्या शहरांतून यरुशलेममध्ये
आलेल्या सर्व लोकांना तू ते संदेश वाचून दाखव. 7कदाचित्
ते लोक देवाकडे मदतीसाठी धावा करतील. कदाचित्
प्रत्येकजण दुष्कर्मे करण्याचे सोडून देईल. परमेश्वर त्या
लोकांवर फार रागावल्याचे परमेश्वराने जाहीर केलेच
आहे!” 8नेरीयाचा मुलगा बारूख याने, यिर्मयाने त्याला
सांगितले होते त्याप्रमाणे केले. परमेश्वराचे संदेश लिहिलेला
पट बारूखने मोठ्याने वाचला. तो त्याने परमेश्वराच्या
मंदिरात वाचला.

9यहोयाकीम राजाच्या कारकिर्दीच्या पाचव्या वर्षाच्या
नवव्या महिन्यात उपास ठरविल्याचे जाहीर करण्यात आले.
यरुशलेममध्ये राहणारे व यहूदातील इतर शहरांतून
यरुशलेममध्ये आलेले अशा सर्वांनी परमेश्वरासमोर उपास
करावा अशी अपेक्षा होती. 10त्याच वेळी यिर्मयाच्या
शब्दातील पट बारूखने वाचून दाखविला. त्याने तो
परमेश्वराच्या मंदिरात वाचून दाखविला. हा पट वाचताना
बारूख गमऱ्याच्या घरच्या चौकातील खोलीत होता. ही
खोली मंदिराच्या ‘नवीन प्रवेशद्वारा’ जवळ होती. गमऱ्या
शाफानचा मुलगा होता. गमऱ्या मंदिरातील लेखनिक
होता.

11बारूखने वाचलेले पटावरचे परमेश्वराचे संदेश
मीखाया नावाच्या माणसाने ऐकले. शाफानचा मुलगा
गमऱ्या ह्याचा मीखाया मुलगा होता. 12पटावरील संदेश

ऐकताच, मीखाया राजवाड्यातील राजाच्या खासगी चिटणीसाच्या खोलीत गेला. तेथे सर्व वरिष्ठ अधिकारी बसलेले होते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे: खाजगी चिटणीस अलीशामा, शमायाचा मुलगा दलाया, अखबोरचा मुलगा एलनाथान, शाफानचा मुलगा गमऱ्या, हनन्याचा मुलगा सिद्कीया. आणखीही काही वरिष्ठ अधिकारी तेथे होते.
13बारूख पट वाचत असताना ऐकलेली प्रत्येक गोष्ट मीखायाने त्यांना सांगितली.

14मग त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यहूदी नावाच्या माणसाला बारूखकडे पाठविले. यहूदी नथन्याचा व नथन्या शलेम्याचा मुलगा होता. शलेम्याच्या वडिलांचे नाव कुशी. यहूदी बारूखला म्हणाला, "ज्या पटावरून तू वाचलेस तो घेऊन माझ्याबरोबर चल."

नेरीयाचा मुलगा बारूख याने पट घेतला व तो यहूदीबरोबर अधिकाऱ्यांकडे गेला.

15मग ते अधिकारी बारूखला म्हणाले, "बस आणि आम्हाला तो पट वाचून दाखव."

मग बारूखने तो पट त्यांना वाचून दाखविला.

16त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या पटावरील सर्व संदेश ऐकले. मग ते घाबरून एकमेकांकडे पाहू लागले. ते बारूखला म्हणाले, "पटावरील संदेशाबाबत आपण राजा यहोयाकीम ह्याला सांगितलेच पाहिजे." 17मग त्या
अधिकाऱ्यांनी बारूखला विचारले, "बारूख, ह्या पटावर लिहिलेले संदेश तुला कोठून मिळाले? यिर्मयाने तुला सांगितलेल्या गोष्टी तू लिहून घेतल्यास का ते आम्हाला सांग."

18बारूख म्हणाला, "हो! यिर्मयाने सांगितले व मी ते सर्व शाईने पटावर लिहिले."

19मग ते वरिष्ठ अधिकारी बारूखला म्हणाले, "तुला आणि यिर्मयाला कोठेतरी जाऊन लपलेच पाहिजे. तुमच्या लपण्याची जागा कोणालाही कळू देऊ नका."

20मग त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तो पट अलीशामा लेखनिकाच्या खोलीत ठेवला. ते राजा यहोयाकीम याच्याकडे गेले व त्यांनी त्याला पटाबद्दल सर्व काही सांगितले.

21–22यहोयाकीम राजाने यहूदीला तो पट आणण्यासाठी पाठविले. यहूदीने अलीशामा लेखनिकाच्या खोलीतून पट आणला. नंतर यहूदीने तो पट राजाला व तेथे उभ्या असलेल्या सेवकांना वाचून दाखविला. हे सर्व वर्षाच्या नवव्या महिन्यात घडले. तेव्हा राजा यहोयाकीम त्याच्या हिवाळी निवासात होता. समोरच्या चुलवणात शेकोटी पेटलेली होती. 23यहूदीने पट वाचायला सुरवात केली.
पण त्याने पटावरील दोन-तीन रकाने वाचताच, राजाने तो पट खेचून घेतला. त्याने लहान चाकूने ते पटावरील रकाने कापले आणि शेकोटीत फेकून दिले. शेवटी सगळाच पट त्याने जाळून टाकला. 24राजा यहोयाकीम व त्याचे
सेवक पटावरील मजकूर ऐकून घाबरले नाहीत. आपल्या चुकांबद्दल दु:ख प्रदर्शित करण्यासाठी त्यांनी आपले कपडे फाडले नाहीत.

25राजाने तो पट जाळू नये म्हणून एलनाथान, दलाया व गमऱ्या यांनी विनंती केली, पण राजाने त्यांचे ऐकले
नाही. 26यहोयाकीम राजाने लेखनिक बारूख व संदेष्टा यिर्मया यांना अटक करण्याचा काही लोकांना हूकूम दिला. ते लोक म्हणजे राजपुत्र यमेल, अरहज्रीएलचा मुलगा सराया व अब्देलचा मुलगा शलेम्या हे होत, पण त्यांना बारूख व यिर्मया सापडले नाहीत कारण त्यांना देवाने लपविले होते.

27यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला परमेश्वराचे सर्व संदेश लिहिलेला पट यहोयाकीमने जाळला, त्यानंतर हा संदेश आला. यिर्मयाने बारूखला सांगितले व बारूखने लिहून घेतले. तो संदेश असा होता.

28"यिर्मया, दुसरा पट घे. पहिल्या पटावर लिहिलेले सर्व संदेश दुसऱ्या पटावर लिही. पहिला पट यहूदाचा राजा यहोयाकीम याने जाळला. 29यिर्मया, यहूदाचा राजा
यहोयाकीम ह्याला असेही सांग 'परमेश्वर काय म्हणतो पाहा यहोयाकीम, तू तो पट जाळलास. तू म्हणालास "बाबेलचा राजा नक्की येईल आणि या देशाचा नाश करील असे यिर्मयाने का लिहिले? बाबेलचा राजा माणसे व पशू ह्या दोघांचाही नाश करील असे तो का म्हणाला?" 30म्हणून,
यहोयाकीम राजाबद्दल परमेश्वर असे म्हणतो की यहोयाकीमचे वंशज दावीदाच्या सिंहासनावर बसणार नाहीत. जेव्हा यहोयाकीम मरेल, तेव्हा त्याचे राजाच्या इतमामाने अंत्यसंस्कार होणार नाहीत, तर त्याचा मृतदेह जमिनीवर फेकून दिला जाईल. दिवसाची उष्णता आणि रात्रीचे थंड दव ह्यात तो मृतदेह पडून राहील. 31मी,
परमेश्वर, यहोयाकीम व त्याची मुले यांना शिक्षा करीन. मी त्याच्या अधिकाऱ्यांनाही शिक्षा करीन. कारण ते सर्व दुष्ट आहेत. मी त्यांच्यावर, यरुशलेममध्ये राहणाऱ्या लोकांवर व यहूदाच्या सर्व लोकांवर भयंकर अरिष्ट आणण्याचे निश्चित केले आहे. मी ठरविल्याप्रमाणे, त्यांचे वाईट करीन, कारण त्यांनी माझे ऐकले नाही.'"

32मग यिर्मयाने दुसरा पट घेतला व तो नेरियाचा मुलगा बारूख या लेखनिकाला दिला. यिर्मयाने सांगितले आणि बारूखने या पटावर लिहिले. या दुसऱ्या पटावरील संदेश, यहूदाचा राजा यहोयाकीम ह्याने जाळलेल्या पटावरील संदेशाप्रमाणेच होते. पण ह्या दुसऱ्या पटात त्या संदेशा बरोबरच त्या संदेशातील शब्दांप्रमाणे आणखी पुष्कळ शब्दांची भर घातलेली होती.

## यिर्मयाचा तुरूंगवास

37 नबुखद्नेस्सर बाबेलचा राजा होता. नबुखद्नेस्सरने, यहोयाकीमचा मुलगा यहोयाकीन उर्फ यकोन्या याच्याऐवजी, सिद्कीयाला यहूदाचा राजा केले. सिद्कीया योशीयाचा मुलगा होता.

2पण, परमेश्वराने यिर्मया या संदेष्ट्यातर्फे दिलेल्या
संदेशाकडे सिद्कीयाने लक्ष दिले नाही. सिद्कीयाच्या
सेवकांनी व यहूदाच्या लोकांनीही परमेश्वराच्या संदेशांकडे
दुर्लक्षच केले.

3राजा सिद्कीयाने यहूकल व याजक सफन्या ह्यांना
आपला निरोप देऊन यिर्मया संदेष्ट्याकडे पाठविले,
यहूकल शलेम्याचा व याजक सफन्या मासेयाचा मुलगा
होता. त्यांनी यिर्मयासाठी आणलेला निरोप असा होता
“यिर्मया, आमच्यासाठी परमेश्वर देवाजवळ प्रार्थना कर.”

4(त्यावेळी, यिर्मयाला कैद केलेले नव्हते, त्यामुळे तो
कोठेही जाण्यास मोकळा होता. 5नेमके ह्याच वेळी मिसर
देशातून फारोचे सैन्य यहूदाकडे आले. यरुशलेम जिंकून
घेण्यासाठी खास्द्यांच्या सैन्याने त्या नगरीला वेढा घातला
होता. त्यांच्यावर मिसरचे सैन्य चालून येत आहे हे त्याने
ऐकले. म्हणून मिसरच्या सैन्याशी दोन हात करण्यासाठी
खास्द्याच्या सैन्याने यरुशलेम सोडले.

6संदेष्टा यिर्मयाला देवाचा संदेश आला. 7“परमेश्वर,
इस्राएलच्या लोकांचा देव असे म्हणतो, ‘यहूकल व सफन्या,
यहूदाचा राजा सिद्कीया याने तुम्हाला मला काही प्रश्न
विचारण्यासाठी माझ्याकडे पाठविले आहे, हे मला माहीत
आहे. सिद्कीयाला सांगा की बाबेलच्या सैन्यापासून तुम्हाला
वाचविण्यासाठी फारोचे सैन्य मिसरमधून निघाले आहे.
पण त्या सैन्याला मिसरला परत जावे लागेल. 8मग बाबेलचे
सैन्य परत येईल. ते यरुशलेमवर हल्ला करील. ते
यरुशलेमचा पाडाव करून यरुशलेम जाळील.’ 9परमेश्वर
पुढे असे म्हणतो, ‘यरुशलेमच्या लोकांनो, स्वत:ची
फसवणूक करून घेऊ नका. “बाबेलचे सैन्य नक्की च
आपल्याला सोडून माघारी फिरेल, असे समजू नका.”
तसे होणार नाही. 10यरुशलेमच्या लोकांनो, समजा, जरी
तुम्ही, तुमच्यावर चाल करून आलेल्या खास्द्यांच्या सैन्याचा
पराभव करू शकला, तरी काही जखमी सैनिक त्यांच्या
तंबूत राहतील. ते येऊन यरुशलेम जाळतील.’”

11जेव्हा खास्द्यांच्या सैन्याने, मिसरचा राजा फारो याच्या
सैन्याबरोबर युद्ध करण्यासाठी, यरुशलेम सोडले, 12तेव्हा
यिर्मयाला, यरुशलेमहून बन्यामीनच्या देशात जायचे होते,
तेथे त्याच्या कुटुंबाच्या मालमत्तेची वाटणी व्हायची होती
म्हणून यिर्मया तेथे जाणार होता. 13पण यिर्मया यरुशलेमच्या
बन्यामीन प्रवेशद्वाराजवळ जाताच, तेथील पहारेकऱ्यांच्या
प्रमुखाने त्याला अटक केले. त्या प्रमुखाचे नाव इरीया
होते. इरीया शलेम्याचा मुलगा होता. व शलेम्या हनन्याचा
मुलगा होता. इरीयाने यिर्मयाला अटक केले व तो म्हणाला,
“यिर्मया, तू आम्हाला सोडून खास्द्यांच्या बाजूला जात
आहेत.”

14यिर्मया इरीयाला म्हणाला, “हे खरे नाही मी तुम्हाला
सोडून खास्द्यांकडे जात नाही” पण यिर्मयाचे म्हणणे इरीयाने
ऐकले नाही. त्यांनी यिर्मयाला अटक करून यरुशलेमच्या
वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नेले. 15ते अधिकारी यिर्मयावर
खूप रागावले. त्याने यिर्मयाला चोपून काढण्याचा हुकूम
दिला. मग त्यांनी यिर्मयाला तुरूंगात ठेवले, तुरूंग योनाथान
नावाच्या माणसाच्या घरात होता. योनाथान यहूदाच्या
राजाचा लेखनिक होता. त्याच्या घराचाच तुरुंग केला
होता. 16त्या लोकांनी योनाथानच्या घराच्या तळघराच्या
अंधार कोठडीत* यिर्मयाला ठेवले. यिर्मया तेथे बराच
काळ होता.

17मग सिद्कीया राजाने यिर्मयाला बोलाविणे पाठविले
आणि त्याला राजवाड्यात आणले. सिद्कीया एकांतात
यिर्मयाशी बोलला. त्याने यिर्मयाला विचारले,
“परमेश्वराकडून काही संदेश आला आहे का?”

यिर्मयाने उत्तर दिले, “हो! परमेश्वराकडून संदेश आला
आहे. सिद्कीया, तुला बाबेलच्या राजाच्या स्वाधीन केले
जाईल.” 18मग यिर्मया सिद्कीया राजाला म्हणाला, “माझे
काय चुकले! मी तुझ्याविरुद्ध अथवा तुझ्या
अधिकाऱ्यांविरुद्ध वा यरुशलेमच्या लोकांविरुद्ध काय
गुन्हा केला? मला तुरूंगात का टाकलेस? 19राजा सिद्कीया,
तुझे संदेष्टे कोठे आहेत? त्यांनी तुला खोटा संदेश दिला.
ते म्हणाले ‘बाबेलचा राजा तुझ्यावर किंवा यहूदावर हल्ला
करणार नाही.’ 20पण आता, माझ्या धन्या, यहूदाच्या राजा,
कृपया माझे ऐक. माझी विनंती तुला मान्य होवो. योनाथान
लेखनिकाच्या घरी मला परत पाठवू नये एवढेच माझे
मागणे आहे. तू मला परत पाठविलेस, तर मी तेथे मरेन.”

21म्हणून सिद्कीया राजाने यिर्मयाला पहारेकऱ्यांच्या
चौकात ठेवण्याचा हुकूम दिला व यिर्मयाला रस्त्यावरील
रोटीवाल्याकडून रोटी द्यावी असे ही सांगितले. नगरातील
रोट्या संपेपर्यंत यिर्मयाला रोटी दिली गेली. अशा रीतीने
यिर्मया चौकात पहारेकऱ्याच्या नजरेखाली राहिला.

## यिर्मयाला पाण्याच्या टाकीत टाकतात

38 यिर्मयाचे संदेशाबद्दलचे बोलणे काही वरिष्ठ
अधिकाऱ्यांनी ऐकले. मत्तानचा मुलगा शफाट्या,
पशहूरचा मुलगा गदल्या, शलेम्याचा मुलगा युकाल व
मल्कीयाचा मुलगा पशहूर हे ते राजाचे अधिकारी होत.
यिर्मया सर्व लोकांना पुढील संदेश सांगत होता. 2“परमेश्वर
असे म्हणतो ‘यरुशलेममध्ये राहणारा प्रत्येकजण युद्ध,
उपासमार वा भयंकर रोगराई ह्यांनी मरेल. पण बाबेलच्या
सैन्याला शरण जाणारा वाचेल, तो जिवानिशी सुटेल.’
3परमेश्वर पुढे असे म्हणतो ‘यरुशलेम नगरी निश्चितपणे
बाबेलच्या राजाच्या सैन्याच्या ताब्यात दिली जाईल. तो ती
हस्तगत करेल.’”

4यिर्मया जे हे लोकांना सांगत होता, ते वरिष्ठ
अधिकाऱ्यांनी ऐकले व ते सिद्कीया राजाकडे गेले.
राजाला म्हणाले, ‘यिर्मयाला ठार मारलेच पाहिजे. अजूनही

---

**अंधार कोठडी** जमिनीत खोलवर असलेले गुहेसारखे भुयार.
याचा उपयोग तुरुग म्हणून करीत.

शहरात असलेल्या सैनिकांना तो नाउमेद करीत आहे. तो
जे काय सांगत आहे, त्यामुळे प्रत्येकाचे धैर्य गळत आहे.
आपले चांगले व्हावे असे यिर्मयाला वाटत नाही.
यरुशलेमच्या लोकांचे वाईट होण्याची त्याची इच्छा आहे.'
5 सिद्कीया राजा त्या अधिकाऱ्यांना म्हणाला, "यिर्मया
तुमच्या हातात आहे. मी तुम्हाला थोपवू शकत नाही."
6 मग त्या अधिकाऱ्यांनी यिर्मयाला मल्कीयाच्या
पाण्याच्या टाकीत टाकले, (मल्कीया राजपुत्र होता) राजाचे
पहारेकरी राहत असलेल्या मंदिराच्या चौकात ही टाकी
होती.त्या अधिकाऱ्यांनी दोरांच्या साहाय्याने यिर्मयाला
पाण्याच्या टाकीत उतरविले. त्या टाकीत पाणी अजिबात
नव्हते, फक्त चिखल होता. यिर्मया त्या चिखलात रूतला.
7 यिर्मयाला त्या अधिकाऱ्यांनी पाण्याच्या टाकीत टाकले
हे एबद-मलेख याने ऐकले. एबद-मलेख कुश देशाचा
होता. तो राजाच्या पदरी एक प्रतिहारी* म्हणून होता.
सिद्कीया राजा बन्यामीनच्या प्रवेशद्वाराशी बसला होता.
म्हणून एबद-मलेख राजवाड्यातून निघाला आणि राजाशी
बोलण्यासाठी त्या प्रवेशद्वाराजवळ गेला. 8-9 एबद-मलेख
राजाला म्हणाला, "राजा, माझ्या धन्या, ते अधिकारी
दुष्टपणे वागले आहेत. त्यांनी संदेष्टा यिर्मयाला दुष्टपणे
वागविले. त्यांनी त्याला पाण्याच्या टाकीत टाकले आहे तो
मरावा म्हणून त्यांनी त्याला तेथे टाकले आहे!'*'
10 नंतर एबद-मलेख या कुशीला राजाने हूकूम दिला,
"एबद-मलेख, राजवाड्यातून तीन माणसे तुझ्याबरोबर घे.
जा आणि यिर्मया मरायच्या आधी त्याला पाण्याच्या टाकीतून
बाहेर काढ."
11 एबद-मलेख याने आपल्याबरोबर माणसे घेतली.
प्रथम तो राजवाड्यातील कोठाराच्या खालच्या खोलीत
गेला. त्याने काही चिंध्या व जुने पुराणे कपडे तेथून
घेतले. त्या चिंध्या त्याने दोराच्या साहाय्याने यिर्मयाकडे
सोडल्या. 12 एबद-मलेख हा कुशी यिर्मयाला म्हणाला,
"त्या चिंध्या आणि जुने पुराणे कपडे तुझ्या काखेत ठेव.
आम्ही तुला वर ओढू तेव्हा त्या चिंध्यांचा गादीप्रमाणे
उपयोग होईल व दोऱ्या तुला लागणार नाहीत."
एबद-मलेखने सांगितल्याप्रमाणे यिर्मयाने केले. 13 त्या
लोकांनी यिर्मयाला दोरांनी ओढून पाण्याच्या टाकीबाहेर
काढले, मग यिर्मया मंदिराच्या चौकात पहाऱ्यात राहिला.

## सिद्कीया यिर्मयाला काही प्रश्न पुन्हा विचारतो

14 नंतर सिद्कीया राजाने यिर्मयाला बोलवायला कोणाला
तरी पाठविले. त्याने यिर्मयाला परमेश्वराच्या मंदिराच्या
तिसऱ्या प्रवेशद्वाराजवळ आणविले मग राजा म्हणाला,
"यिर्मया, मी तुला काही विचारतो माझ्यापासून काही लपवू
नकोस. मला प्रत्येक गोष्ट प्रामाणिकपणे सांग!"
15 यिर्मया सिद्कीयाला म्हणाला, "मी तुला काही
सांगितले, तर तू बहुधा मला मारशील मी तुला जरी
सल्ला दिला, तरी तू माझे ऐकणार नाहीस!"
16 पण सिद्कीया राजाने गुप्तपणे शपथ घेतली. सिद्कीया
म्हणाला, परमेश्वराने आम्हाला जीव व जीवन दिले.
परमेश्वर नक्कीच आहे म्हणून मी वचन देतो की यिर्मया
मी तुला मारणार नाही. तुला मारू इच्छिणाऱ्या
अधिकाऱ्यांच्या हातात मी तुला देणार नाही, असेही मी
तुला वचन देतो.
17 मग यिर्मया सिद्कीया राजाला म्हणाला, "सर्वशक्तिमान
परमेश्वर हा इस्राएलचा देव आहे. तोच म्हणतो 'तुम्ही जर
बाबेलच्या राजाला शरण गेलात. तर तुमच्या जिविताचे
रक्षण होईल. यरुशलेम जाळले जाणार नाही. तू आणि
तुझे कुटुंबीयही जगाल. 18 पण तू शरण जाण्यास नकार
दिलास, तर यरुशलेम खास्द्यांच्या सैन्याच्या ताब्यात दिली
जाईल. ते यरुशलेम जाळून भस्मसात करतील आणि तू
त्यांच्या तावडीतून सुटणार नाहीस.'"
19 पण सिद्कीया राजा यिर्मयाला म्हणाला, "खास्द्यांच्या
सैन्याला जाऊन मिळालेल्या यहूदाच्या लोकांची मला भीती
वाटते. सैनिक मला त्या यहूदाच्या लोकांच्या ताब्यात देतील
व ते लोक माझ्याशी अत्यंत वाईट वागतील, मला मारतील
म्हणून मी घाबरतो."
20 पण यिर्मया म्हणाला, "सैनिक तुला त्या यहूदाच्या
लोकांच्या स्वाधीन करणार नाहीत. राजा सिद्कीया, माझ्या
सांगण्याप्रमाणे वागून परमेश्वराची आज्ञा पाळ. मग
तुझ्यासाठी सर्व सुरळीत होईल आणि तुझा जीवही वाचेल.
21 पण तू बाबेलच्या राजाला शरण जाण्यास नकार दिलास,
तर काय होईल, हे परमेश्वराने मला दाखविले आहे.
परमेश्वराने मला पुढीलप्रमाणे सांगितले. 22 यहूदाच्या
राजवाड्यात मागे राहिलेल्या सर्व स्त्रियांना बाबेलच्या
राजाच्या मुरव्य अधिकाऱ्यांपुढे आणले जाईल. त्या स्त्रिया
पुढील गाणे गाऊन तुमची चेष्टा करतील.

तुमच्या चांगल्या मित्रांनी तुम्हाला चुकीच्या मार्गाने नेले,
आणि ते तुमच्याहून बलवान झाले, तेच ते मित्र ज्यांच्यावर
तुम्ही विश्वास ठेवला. तुमचे पाय चिखलात रूतलेत.
तुमच्या मित्रांनी तुम्हाला सोडले.'

23 "तुमच्या बायका मुलांना बाहेर काढले जाईल. त्यांना
बाबेलच्या सैन्याच्या स्वाधीन केले जाईल. तू स्वत:ही त्या
सैन्याच्या तावडीतून सुटणार नाहीस. तुला बाबेलचा राजा
पकडेल आणि यरुशलेम जाळले जाईल."
24 मग सिद्कीया यिर्मयाला म्हणाला, "मी तुझ्याशी
बोललो हे कोणालाही सांगू नकोस. तसे केलेस, तर
मरशील. 25 कदाचित्, मी तुझ्याशी बोललो हे त्या

---

**प्रतिहारी** शब्दश: नपुंसक. राजाचे महत्वाचे अधिकारी बहुधा असे असत.

**तो मरावा ... आहे** शब्दश: 'नगरीत अन्न शिल्लक नसल्याने तो उपासमारीने मरेल.'

अधिकाऱ्यांना कळेल. मग ते तुझ्याकडे येतील आणि
म्हणतील, 'यिर्मया, तू सिद्कीया राजाला काय सांगितलेस
ते आम्हाला सांग तसेच सिद्कीया तुला काय म्हणाला
तेही सांग आमच्याशी खरे बोल व प्रत्येक गोष्ट सांग
नाहीतर आम्ही तुला ठार मारू.' 26जर ते असे म्हणाले
तर तू त्यांना सांग 'मी राजाकडे मला योनाथानच्या घरातील
अंधार कोठडीत परत पाठवू नका.' अशी गयावया केली.
मी तेथे परत गेलो, तर मी मरेन."

27ते वरिष्ठ अधिकारी यिर्मयाकडे येऊन प्रश्न विचारू
लागले. खरेच असे घडले मग राजाने हुकूम केल्याप्रमाणे
यिर्मयाने सांगितले. मग त्या अधिकाऱ्यांनी यिर्मयाला
सोडले. यिर्मया व राजा यांच्यात झालेले बोलणे कोणालाही
कळले नाही.

28मग यिर्मया, यरुशलेम जिंकले जाईपर्यंत, मंदिराच्या
चौकात पहाऱ्यात राहिला.

## यरुशलेमचा पाडाव

39 अशा रितीने यरुशलेमचा पाडाव झाला. यहूदाचा
राजा सिद्कीया याच्या कारकिर्दीच्या नवव्या
वर्षाच्या दहाव्या महिन्यात बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
आपले संपूर्ण सैन्य घेऊन यरुशलेमवर चालून आला.
नगरीचा पाडाव करण्यासाठी त्याने नगरीला वेढा घातला.
2आणि सिद्कीयाच्या कारकिर्दीच्या अकराव्या वर्षाच्या
चौथ्या महिन्याच्या नवव्या दिवशी यरुशलेमच्या तटबंदीला
भगदाड पडले. 3मग बाबेलच्या राजाचे सर्व वरिष्ठ
अधिकारी यरुशलेम नगरीत शिरले आणि मधल्या
प्रवेशद्वाराजवळ बसले. समगारचा राज्यपाल नेर्गलशरेसर
व नबो सर्सखीम हे मोठे अधिकारी आणि इतर महत्वाचे
अधिकारी ह्यांचा त्यात समावेश होता.

4सिद्कीया राजाने बाबेलच्या ह्या अधिकाऱ्यांना पाहिले
आणि तो सैनिकांबरोबर पळून गेला. त्यांनी रात्री यरुशलेम
सोडले ते राजाच्या बागेतून आणि तटबंदीच्या दोन
भिंतीमधल्या दारातून बाहेर पळाले. ते वाळवंटाकडे गेले.
5खास्द्यांच्या सैन्याने सिद्कीयाचा व त्याच्याबरोबर
असलेल्या सैनिकांचा पाठलाग केला आणि यरिहोच्या
मैदानात त्याना त्यांनी पकडले. त्यांनी सिद्कीयाला पकडून
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर ह्याच्याकडे नेले तेव्हा
नबुखद्नेस्सर हमाथ प्रांतातील रिब्ला येथे होता. सिद्कीयाचे
काय करायचे हे नबुखद्नेस्सरने ठरविले. 6रिब्लामध्ये,
सिद्कीयाच्या डोळ्यांदेखत, बाबेलच्या राजाने सिद्कीयाच्या
मुलांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना मारले. 7मग
नबुखद्नेस्सरने सिद्कीयाचे डोळे काढले आणि
साखळ्यांनी बांधून बाबेलला नेले.

8बाबेलच्या सैन्याने राजवाड्याला व यरुशलेम मधील
घरांना आग लावली त्यांनी यरुशलेमची तटबंदी फोडली.
9बाबेलच्या राजाच्या विशेष संरक्षकांचा प्रमुख नबूजरदान
हा होता. त्याने यरुशलेममध्ये राहिलेल्या लोकांना कैद
केले. व बाबेलला नेले. त्याला अगोदरच शरण आलेल्यांना
त्याने कैद केले. एकंदरीत त्याने येरुशलेममधील सर्व
लोकांनाच कैद केले. 10पण नबूजरदानने यहूदातील काही
गरीब लोकांना सोडले. ह्या लोकांजवळ काहीही नव्हते
म्हणून नबूजरदानने त्यांना द्राक्षमळे व जमीन दिली.

11पण नबुखद्नेस्सरने यिर्मयाच्या बाबतीत,
नबूजरदानला ताकीद दिली होती. नबूजरदान बाबेलच्या
राजाच्या खास संरक्षकांचा प्रमुख होता. नबुखद्नेस्सरने
अशी ताकीद दिली होती की. 12"यिर्मयाला शोधून काढा
व त्याची काळजी घ्या. त्याला इजा करू नका. तो मागेल
ते त्याला द्या."

13म्हणून राजाच्या खास संरक्षकांचा प्रमुख नबूजरदान
याने नबूशजबान या प्रमुख सेनाधिकाऱ्याला, नेर्गल सरेसर
या मोठ्या अधिकाऱ्याला आणि सैन्यातील इतर
अधिकाऱ्यांना यिर्मयाला शोधण्यासाठी पाठविले.
14मंदिराच्या चौकात, यहूदाच्या राजाच्या पहाऱ्यात
असलेल्या यिर्मयाला त्या लोकांनी सोडविले आणि
गदल्याकडे सोपविले. गदल्या अहिकामचा व अहिकाम
शाफानचा मुलगा होता. यिर्मयाला घरी पाठवावे असा
गदल्याला हुकूम होता. म्हणून यिर्मयाला घरी नेले गेले व
तो त्याच्या आप्तांमध्ये राहू लागला.

## परमेश्वराचा एबद-मलेखला संदेश

15यिर्मया मंदिराच्या चौकात पहाऱ्यात असताना त्याला
परमेश्वराचा संदेश आला. तो असा होता: 16"यिर्मया मूळ
कुशचा रहिवासी असलेल्या एबद-मलेखला संदेश दे
'सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा देव म्हणतो:
माझे यरुशलेमबद्दलचे भाकीत मी लवकरच खरे ठरवीन.
माझे संदेश अरिष्टावरून खरे ठरतील, चांगल्या गोष्टी
घडून नाही. सर्व गोष्टी खऱ्या ठरत असताना तू तुझ्या
डोळ्यांनी पाहशील. 17पण, एबद-मलेख, मी तुला त्या
दिवशी वाचवीन.' हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.
तू ज्या लोकांना घाबरतोस, त्यांच्या स्वाधीन मी तुला
करणार नाही. 18तू युध्दात मरणार नाहीस, तर तू निसटशील
आणि जगशील. तू माझ्यावर विश्वास ठेवलास, म्हणून हे
घडेल.'" हा परमेश्वराचा संदेश आहे.

## यिर्मयाची मुक्तता

40 यिर्मयाची रामा येथे, सुटका झाल्यावर
परमेश्वराकडून संदेश आला. बाबेलच्या
राजाच्या खास सैनिकांचा प्रमुख नबूजरदान ह्याला रामा
शहरात यिर्मया सापडला. यिर्मयाला बेड्या घातल्या होत्या.
यरुशलेम व यहूदा येथील सर्व कैद्यांबरोबरच तो होता.
त्या सर्वांना कैद करून बाबेलला नेले होते. 2नबूजरदानला
यिर्मया सापडताच, तो त्याच्याशी बोलला तो म्हणाला,
"यिर्मया, परमेश्वराने, तुझ्या देवानेच हे अरिष्ट ह्या स्थळी
येणार म्हणून भाकीत केले होते. 3आणि आता परमेश्वराने

सांगितल्याप्रमाणेच सर्व घडले आहे. तुम्ही यहूदातील
लोकांनी परमेश्वराविरुध्द पाप केल्यानेच हे अरिष्ट आले.
तुम्ही परमेश्वराची आज्ञा पाळली नाही. 4यिर्मया, आता
मी तुझी सुटका करीन. मी तुझ्या बेड्या काढतो तुझी
इच्छा असल्यास तू माझ्याबरोबर बाबेलला ये. मी तुझी
चांगली काळजी घेईन. पण, तुझी इच्छा नसल्यास, तू
माझ्याबरोबर येऊ नको. सर्व देश तुझ्यापुढे मोकळा आहे
तुला पाहिजे तेथे जा. 5किंवा शाफानपुत्र अहीकाम याचा
मुलगा गदल्या ह्याच्याकडे परत जा. बाबेलच्या राजाने
त्याला यहूदातील शहरांचा राज्यपाल म्हणून नेमले आहे.
परत जा आणि गदल्याबरोबर लोकांमध्ये राहा. नाहीतर
तुला पाहिजे तेथे तू जा."

नंतर नबूजरदानने त्याला अन्न व बक्षीस देऊन सोडून
दिले. 6मग यिर्मया, मिस्पा येथे अहीकामचा मुलगा गदल्या
ह्याच्याकडे गेला. तो गदल्याबरोबर यहूदात मागे राहिलेल्या
लोकांमध्ये राहिला.

## गदल्याचे अल्पकालीन राज्य

7यरुशलेमचा नाश झाला तेव्हा यहूदाच्या सैन्यातील
काही सैनिक, अधिकारी आणि त्यांची काही माणसे रानात
राहात होती. बाबेलच्या राजाने अहीकामचा मुलगा गदल्या
ह्यास, मागे राहिलेल्या लोकांचा अधिपती म्हणून नेमले
आहे, हे त्यांना कळले. अगदी गरीब स्त्री पुरुष व मुले
ह्यांना कैद करून बाबेलला नेले नव्हते हे लोक मागेच
राहिले होते. 8मग ते सैनिक मिस्पा येथे गदल्याकडे आले.
ते सैनिक म्हणजे नथन्याचा मुलगा इश्माएल, कारेहाचा
मुलगा योहानान व त्याचा भाऊ योनाथान तान्हुमेथचा
मुलगा सराया, नटोफाथी एफै याचे मुलगे, माकाथाचा
मुलगा याजन्या व ह्यांच्याबरोबरचे काही लोक होत.

9शाफानचा मुलगा अहीकाम व अहीकामचा मुलगा
गदल्या ह्या गदल्याने त्या सैनिकांना अधिक सुरक्षित वाटेल
असे करण्याची शपथ घेतली. गदल्या त्यांना म्हणाला
"खास्द्यांची सेवा करण्यास तुम्ही घाबरू नका.
(इस्राएलमध्ये) देशात वस्ती करा आणि बाबेलच्या राजाची
सेवा करा. असे केल्याने तुमचे भले होईल. 10मी स्वत:
मिस्पात राहीन. मी येथे येणाऱ्या खास्द्यांशी तुमच्यावतीने
बोलीन. तुम्ही हे काम माझ्यावर सोपवा. तुम्ही द्राक्षरस,
ग्रीष्मातील फळे व तेल यांचे उत्पादन करून रांजणात
साठवून ठेवावे तुम्ही ताबा मिळविलेल्या शहरात तुम्ही
राहा."

11बाबेलच्या राजाने यहूदातील काही लोकांना त्यांच्या
स्वत:च्या देशात राहू दिले आहे हे मवाब, अम्मोन, अदोम
व इतर देशात राहणाऱ्या सर्व यहूदी लोकांना समजले.
ह्या मागे राहिलेल्या लोकांसाठी शाफानपुत्र अहीकाम याचा
मुलगा गदल्या ह्यास बाबेलच्या राजाने, राज्यपाल म्हणून
नेमले असल्याचेही त्यांना कळले. 12ही बातमी कळताच
यहूदाचे लोक यहूदात परतले ते सर्व ज्या ज्या देशांत
पसरले गेले होते, तेथून ते गदल्याकडे मिस्पाला परतले,
ते परत आले व त्यांनी द्राक्षरस व ग्रीष्मातील फळे यांचा
पुष्कळ साठा केला.

13कारेहाचा मुलगा योहानान व अजूनही रानात राहात
असलेले यहूदाच्या सैन्यातील सर्व अधिकारी गदल्याकडे
आले. गदल्या मिस्पामध्ये होता. 14योहानान व त्याच्या
बरोबरचे आधिकारी गदल्याला म्हणाले, "अम्मोनी
लोकांचा राजा बआलीस ह्याला तुला ठार मारायचे आहे,
हे तुला माहीत आहे का? त्याने नथन्याचा मुलगा इश्माएल
ह्याला तुला मारण्यासाठी पाठविले आहे" पण अहीकामचा
मुलगा गदल्या ह्याचा ह्यावर विश्वास बसला नाही.

15मग मिस्पा येथे, एकांतात कारेहाचा मुलगा
योहानान हा गदल्याशी बोलला तो गदल्याला म्हणाला,
"मी नथन्याचा मुलगा इश्माएल ह्याला मारतो तू मला
परवानगी दे. ही गोष्ट कोणालाही कळणार नाही इश्माएल
तुला मारणार आहे, पण आम्ही त्याला तसे करू देणार
नाही. कारण तसे झाल्यास तुझ्याभोवती गोळा झालेल्या
सर्व यहूदी लोकांना पुन्हा इतर देशात पांगावे लागेल.
ह्याचाच अर्थ यहूदाचे उरलेले थोडे शिल्लक राहणार
नाही."

16पण अहीकामचा मुलगा गदल्या हा कारेहाचा मुलगा
योहानान ह्यास म्हणाला "इश्माएलला मारू नको. तू
त्याच्याबद्दल जे सांगत आहेस ते खरे नाही."

41 सातव्या महिन्यात नथन्याचा मुलगा इश्माएल हा
अहीकामचा मुलगा गदल्या ह्याच्याकडे आला.
नथन्या हा अलीशामाचा मुलगा होता. इश्माएल
त्याच्याबरोबर त्याच्या दहा माणसांना घेऊन आला. ते
सर्वजण मिस्पाला आले. इश्माएल राजघराण्यातील होता.
यहूदाच्या राजाच्या अधिकाऱ्यांपैकी तो एक होता इश्माएल
व त्याच्या बरोबरची माणसे गदल्याबरोबर जेवावयास
बसली. 2ते जेवत असतानाच, इश्माएल व त्याची दहा
माणसे उठली व त्यांनी अहीकामाचा मुलगा गदल्या ह्यास
तलवारीने ठार मारले. बाबेलच्या राजाने यहूदाचा राज्यपाल
म्हणून गदल्याची निवड केली होती. 3गदल्याबरोबर मिस्पा
येथे असलेल्या सर्व यहुद्यांनासुद्धा इश्माएलने ठार मारले.
एवढेच नाही तर, गदल्याबरोबर असलेल्या खास्दी
सैनिकांनासुद्धा त्याने ठार केले.

4–5गदल्याला मारल्याच्या दुसऱ्या दिवशी 80 लोक
मिस्पाला आले ते परमेश्वराच्या मंदिरात अर्पण
करण्यासाठी धान्य व धूप आणीत होते. त्या सर्वांनी दाढ्या
कापलेल्या होत्या अंगावर जखमा केलेल्या होत्या त्यांचे
कपडे फाटलेले होते, त्यांनी मुंडन केले होते.* ते शखेम,
शिलो व शोमरोन येथून आले *होते. त्यातील कोणालाही
गदल्याच्या वधाविषयी माहिती नव्हती. 6इश्माएलने मिस्पा

---

**त्या सर्वांनी ... होते** यरुशलेममधील देवाचे मंदिर उध्वस्त
झाल्याबद्दल शोकप्रदर्शन करण्यासाठी लोकांनी असे केले.

सोडले व तो त्या माणसांना भेटायला गेला. तो त्यांना
भेटायला जाताना रडला.* तो त्या माणसांना म्हणाला,
“अहीकामचा मुलगा गदल्या ह्याला भेटण्यास माझ्याबरोबर
चला.” 7ती 80 माणसे मिस्पाला गेली. इश्माएलने व
त्याच्या माणसांनी त्यातील 70 जणांना मारले. आणि त्यांची
प्रेते खूप खोल असलेल्या पाण्याच्या टाकीत टाकली. 8पण
राहिलेली दहा माणसे इश्माएलला म्हणाली, “आम्हाला
मारू नको. आमच्याजवळ गहू व सातू आहेत. तसेच तेल
व मधही आहे आम्ही ह्या गोष्टी शेतात लपवून ठेवल्या
आहेत.” म्हणून इश्माएलने ह्या दहा माणसांना सोडले.
इतरांसारखे त्यांना मारले नाही. 9[ती पाण्याची टाकी खूप
मोठी होती. ती यहूदाचा राजा आसा याने, युद्धाच्या वेळी
नगराला पाणी मिळावे म्हणून बांधली होती.* इस्राएलचा
राजा बाशा ह्याच्यापासून आपल्या नगराचा बचाव
करण्यासाठी आसाने असे केले होते. ती टाकी भरून
जाईपर्यंत इश्माएलने त्यात प्रेते टाकली.

10मिस्पामधील इतर सर्व लोकांना इश्माएलने
पकडले ह्या लोकांत राजाच्या मुली व इतर मागे
राहिलेले लोक होते. हे लोक म्हणजे नबूजरदानने
गदल्याला ज्या लोकांवर लक्ष ठेवण्यास नेमले होते,
तेच होत. नबूजर दान हा बाबेलच्या राजाच्या खास
रक्षकांचा प्रमुख होता. इश्माएलने त्या सर्व लोकांना कैद
केले व तो अम्मोनी लोकांचा देश पार करून जाण्यास
निघाला.

11त्याच्याबरोबर असलेल्या कारेहचा मुलगा योहानानला
व इतर सैन्याधिकाऱ्याना त्याने केलेली दुष्कृत्ये कळली.
12 म्हणून योहानान व इतर सैन्याधिकारी आपल्या लोकांना
घेऊन नथल्याचा मुलगा इश्माएल ह्याच्याशी लढण्यास
गेले. त्यांनी गिबोन जवळील तलावापाशी इश्माएलला
पकडले. 13इश्माएलने ज्यांना कैद करून नेले होते, त्या
कैद्यांनी योहानानला व सैन्याधिकाऱ्यांना पाहिले. त्यांना
मग खूप आनंद झाला. 14नंतर इश्माएलने पकडलेले सर्व
लोक मिस्पा येथून कारेहचा मुलगा योहानान ह्याच्याकडे
धावले. 15पण इश्माएल व त्याची आठ माणसे योहानानच्या
हातातून निसटली. ते अम्मोनच्या लोकांकडे पळाले.

16मग कारेहचा मुलगा योहानान व इतर सर्व
सैन्याधिकारी यांनी सर्व कैद्यांना सोडविले. गदल्याला ठार
मारल्यानंतर इश्माएलने ह्या लोकांना मिस्पा येथून आणले
होते. त्या वाचलेल्या लोकांत सैनिक, स्त्रिया, मुले व
दरबारातील अधिकारी होते. योहानानने त्यांना गिबोनमधून
परत आणले.

## मिसरकडे पलायन

17–18योहानान व इतर सैन्याधिकारी खास्द्यांना भीत
होते. बाबेलच्या राजाने गदल्याला यहूदाचा राज्यपाल म्हणून
निवडले होते. पण इश्माएलने गदल्याचा खून केला, म्हणून
खास्दी रागावले असतील अशी भीती योहानानला वाटत
होती. म्हणून त्यांनी मिसरला पळून जाण्याचे ठरविले
मिसरच्या वाटेवर ते गेरूथ किम्हाम येथे राहिले. गेरूथ
किम्हाम बेथलेहेमनजीक आहे.

42 ते गेरूथ किम्हाम येथे राहत असताना योहानान
व होशायाचा मुलगा यजन्या यिर्मया संदेष्ट्याकडे
गेले. त्यांच्याबरोबर सर्व सेनाधिकारीही होते. सर्वजण
राजापासून रंकापर्यंत यिर्मयाकडे गेले. 2ते सर्वजण यिर्मयाला
म्हणाले, “यिर्मया, कृपया आमची विनंती मान्य कर.
यहूदाच्या कुळातील वाचलेल्या सर्व लोकांसाठी
परमेश्वराकडे तुझ्या परमेश्वराकडे प्रार्थना कर. यिर्मया,
आमच्यापैकी फारच थोडे वाचले आहेत, हे तुला दिसतेच
आहे. एकेकाळी आम्ही संख्येने जास्त होतो. 3 यिर्मया,
आम्ही कोठे जावे व काय करावे हे तुझ्या परमेश्वर
देवाने आम्हाला सांगावे म्हणून तू प्रभूचा, तुझ्या देवाचा
धावा कर.”

4मग संदेष्टा यिर्मया म्हणाला, “तुमची विनंती मी ऐकली
तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी प्रभूची, तुमच्या देवाची करूणा
भागीन. देवाचे सर्व म्हणणे मी तुम्हाला सांगीन. मी
तुमच्यापासून काहीही लपविणार नाही.”

5मग ते लोक यिर्मयाला म्हणाले, “जर परमेश्वर देव
तुझ्याकडून जसे सांगतो तसे आम्ही वागलो नाही, तर
तुझा परमेश्वर देवच आमच्याविरुद्धचा खरा व प्रामाणिक
साक्षीदार असेल. 6आम्हाला त्याचा संदेश आवडला का
नाही हा पश्नच उद्‌भवत नाही. आम्ही परमेश्वराची,
आमच्या देवाची, आज्ञा पाळू. त्याच्याकडून संदेश
आणण्यासाठी आम्ही तुला पाठवीत आहोत. तो सांगेल ते
आम्ही ऐकू. मग आमचे कल्याण होईल खरंच, आम्ही
परमेश्वराची आमच्या देवाची आज्ञा पाळू.”

7दहा दिवसानंतर यिर्मयाला परमेश्वराचा संदेश आला.
8मग यिर्मयाने कारेहचा मुलगा योहानान, त्याच्याबरोबर
असलेले सेनाधिकारी व राजापासून रंकापर्यंत सर्व लोक
यांना एकत्र केले.

9मग तो त्यांना म्हणाला, “परमेश्वर, इस्राएलच्या
लोकांचा देव काय म्हणतो पाहा तुम्ही मला त्याच्याकडे
पाठविले तुम्ही मला केलेली विनंती मी त्याला सांगितली.
परमेश्वर असे म्हणतो: 10“जर तुम्ही यहूदात राहिलात,
तर मी तुमचा नाश करणार नाही. उलट मी तुम्हाला
सामर्थ्यशाली करीन. मी तुम्हाला रूजवीन, उपटून
टाकणार नाही. मी असे करण्याचे कारण म्हणजे तुमच्यावर
मला आणाव्या लागलेल्या वाईट प्रसंगामुळे मला वाईट
वाटते. 11सध्या तुम्ही बाबेलच्या राजाला भीत आहात.
पण त्याला भिऊ नका. बाबेलच्या राजाची अजिबात

---

**तो ... रडला** देवाचे मंदिर उध्वस्त झाल्याने आपल्याला दु:ख झाल्याचा इश्माएलने अभिनय केला.

**ती यहूदाचा राजा ... बांधली होती** काळापूर्वी 300 वर्षे राजा आसा होऊन गेला. त्याने मिस्पाच्या रक्षणासाठी केलेल्या गोष्टींसाठी 1 राजा 15:22 पाहा.

भीती बाळगू नका.' हा परमेश्वराचा संदेश आहे.
'कारण मी तुमच्याबरोबर आहे. मी तुमचे रक्षण
करीन. मी तुमची सुटका करीन. त्याचे हात
तुमच्यापर्यंत पोहोचू शकणार नाहीत. 12मी तुमच्यावर कृपा
करीन आणि बाबेलचा राजाही तुमच्याशी दयाळूपणाने
वागेल. तो तुम्हाला तुमच्या देशात परत आणील.' 13पण
कदाचित् 'आम्ही यहूदात राहणार नाही.' असे तुम्ही म्हणाल
तुम्ही असे म्हणाल्यास, तुम्ही परमेश्वराची, तुमच्या
देवाची अवज्ञा केल्यासारखे होईल. 14तुम्ही कदाचित्
असेही म्हणाल 'नाही, आम्ही मिसरमध्ये जाऊन राहू.
तेथे युध्द आम्हाला दिसणार नाही किंवा रणशिंगाचा
आवाज ऐकू येणार नाही तेथे आमची उपासमार होणार
नाही.'

15तुम्ही असे म्हणत असाल तर यहूदातील वाचलेल्या
लोकांनो, परमेश्वराचा संदेश ऐका. सर्वशक्तिमान
परमेश्वर, इस्राएलच्या लोकांना देव म्हणतो, 'तुम्ही
मिसरमध्ये जाऊन राहण्याचे निश्चित केल्यास पुढील गोष्टी
घडतील. 16ज्या तलवारीची तुम्हाला भीती वाटत आहे,
ती तुमचा तेथे पराभव करील. ज्या उपासमारीची तुम्ही
काळजी करीत आहा, ती तेथे तुम्हाला गाठील. तुम्ही
मिसरमध्ये मराल. 17जो कोणी मिसरमध्ये जाऊन राहण्याचे
निश्चित करील, तो युद्धात, वा उपासमारीने किंवा भयंकर
रोगराईने मरेल. मिसरमध्ये जाणारा एकही जण वाचणार
नाही. मी घडवून आणणार असलेल्या भयंकर संकटातून
कोणीही वाचणार नाही.'

18"मग सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा
देव पुढे म्हणतो, 'मी यरुशलेमवरचा माझा राग व्यक्त
करून दाखविला यरुशलेममध्ये राहणाऱ्या लोकांना मी
शिक्षा केली. त्याचप्रमाणे मिसरमध्ये जाणाऱ्या प्रत्येकावर
मी राग प्रकट करीन. दुसऱ्यांना शाप देताना लोक उदाहरण
म्हणून तुमचे नाव घेतील. तुम्ही म्हणजे जणू शिवी व्हाल
लोकांना तुमची लाज वाटेल लोक तुमचा अपमान करतील
तुम्हाला पुन्हा कधीही यहूदा दिसणार नाही.'

19"यहूदातील वाचलेल्या लोकांनो, 'मिसरला जाऊ
नका.' असे परमेश्वराने तुम्हाला सांगितले आहे, मी आताच
तुम्हाला ताकीद देतो. 20तुम्ही तुमच्या मृत्यूला कारण
होईल, अशी चूक करीत आहात तुम्ही मला परमेश्वराकडे,
तुमच्या देवाकडे, पाठविले तुम्ही मला म्हणाला,
'आमच्यासाठी आपल्या परमेश्वराकडे प्रार्थना कर.
परमेश्वराने करायला सांगितलेली प्रत्येक गोष्ट आम्हाला
सांग आम्ही परमेश्वराचे ऐकू.'

21म्हणून आज मी तुम्हाला परमेश्वराचा संदेश सांगितला
आहे. पण तुम्ही तुमच्या परमेश्वर देवाची आज्ञा पाळली
नाही. परमेश्वराने ज्या गोष्टी तुम्ही कराव्या हे सांगण्यासाठी
मला तुमच्याकडे पाठवले होते, त्या गोष्टी तुम्ही केल्या
नाहीत. 22तुम्ही मिसरमध्ये जाऊन राहू इच्छिता पण मग
तुम्ही युद्धात वा उपासमारीने अथवा भयंकर रोगराईने
मराल. ह्या गोष्टी तुमच्याबाबत घडतील, ह्याची खात्री
बाळगा."

43 अशा रीतीने यिर्मयाने परमेश्वराकडून, त्यांच्या
देवाकडून आलेला संदेश लोकांना सांगितला
परमेश्वराने लोकांना सांगण्यास सांगितलेली प्रत्येक गोष्ट
यिर्मयाने लोकांना ऐकविली.

2होशायाचा मुलगा अजऱ्या, कारेहचा मुलगा योहानान
व इतर काही लोक गर्विष्ठ व दुराग्रही होते. ते सर्व
यिर्मयावर रागावले. ते यिर्मयाला म्हणाले, "यिर्मया, तू
खोटे बोलत आहेस. 'तुम्ही मुळीच मिसरला जाऊन राहू
नये.' असे सांगण्यासाठी आमच्या परमेश्वर देवाने तुला
आमच्याकडे पाठविले नाही. 3"यिर्मया, नेरीयाचा मुलगा
बारूख तुला आमच्याविरुद्ध भडकावीत आहे असे आम्हाला
वाटते. आम्हाला खास्द्यांच्या हाती देण्याची त्याची इच्छा
आहे त्यांनी आम्हाला मारावे अथवा कैदी म्हणून बाबेलला
न्यावे म्हणून तो तुझ्यामार्फत असे सांगत आहे."

4म्हणून योहानान, सेनाधिकारी व इतर सर्व लोक ह्यांनी
परमेश्वराच्या आज्ञांचे उल्लंघन केले परमेश्वराने त्यांना
यहूदात राहण्याची आज्ञा दिली होती. 5पण परमेश्वराचे
ऐकण्याऐवजी, योहानान व सेनाधिकारी वाचलेल्या
लोकांना इतर देशांत नेले होते. पण ते यहूदाला परत
आले होते. 6आता, योहानान व सेनाधिकारी यांनी, पुरुष,
स्त्रिया व मुले ह्यांना गोळा करून मिसरला नेले. ह्या
लोकांत राजकन्याही होत्या (नबूजरदानने गदल्याला ह्या
लोकांवर लक्ष ठेवण्यासाठी नेमले होते. बाबेलच्या राजाच्या
खास रक्षकांचा नबूजरदान प्रमुख होता) योहानानने संदेष्टा
यिर्मया व नेरीयाचा मुलगा बारूख ह्यांनाही बरोबर नेले.
7त्या लोकांनी परमेश्वराचे ऐकले नाही ते सर्व लोक
मिसरला गेले ते तहपन्हेस येथे गेले.

8तहपन्हेस येथे यिर्मयाला परमेश्वराचा पुढीलप्रमाणे
संदेश मिळाला: 9"यिर्मया, काही मोठे धोंडे घे. ते तहपन्हेस
येथील फारोच्या कचेरीसमोरच्या विटामातीच्या
पादचारीमार्गावर पुर. तू हे यहूदातील लोक पाहत असताना,
कर. 10मग हे सर्व पाहत असलेल्या यहूदी लोकांना सांग
'सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, "मी
बाबेलचा राजा, नबुखद्नेस्सर, यास येथे पाठवीन, तो
माझा सेवक आहे. मी पुरलेल्या ह्या दगडांवर मी त्याचे
सिंहासन ठेवीन तो ह्या दगडावर त्याचे छत्र उभारील.
11नबुखद्नेस्सर येथे येईल व मिसरवर चढाई करील.
ज्यांचे मरण आहे, त्यांना तो ठार मारील. ज्यांना कैद
व्हायची आहे, त्यांना तो कैद करील. ज्यांचे मरण तलवारीने
आहे, त्यांना तो तलवारीने ठार करील. 12तो मिसरच्या
दैवतांच्या देवळांना आग लावील. तो देऊळे जाळील व
मूर्ती काढून नेईल. मेंढपाळ ज्याप्रमाणे त्याच्या कपड्यावरील
पिसवा व काटे ओढून काढून आपले कपडे स्वच्छ करतो,
त्याप्रमाणे नबुखद्नेस्सर मिसर साफ करील. मग तो
निर्धास्तपणे मिसर सोडून जाईल. 13तो मिसरमधील सूर्य

देवतेच्या देवळातील स्मृती शिलांचा नाश करील आणि
तेथील दैवतांची देऊळे जाळून टाकील.'"

## मिसरमध्ये राहणाऱ्या यहूदी लोकांना परमेश्वराचा संदेश

44 यिर्मयाला परमेश्वराचा संदेश मिळाला.
मिसरमध्ये राहणाऱ्या सर्व यहूदी लोकांसाठी तो
होता. हे लोक मिग्दोल, तहपनहेस, मेमफिस व दक्षिण
मिसर येथे राहत होते. संदेश असा होता: 2सर्वशक्तिमान
परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, "यरुशलेम नगरीवर व
यहूदाच्या इतर नगरांवर मी जी भयंकर संकटे आणली,
ती तुम्ही पाहिलीत. आता ती नगरे म्हणजे नुसती
दगडधोंड्यांची रास झाली आहेत. 3तेथे राहणाऱ्या लोकांनी
पाप केल्यामुळे मी त्यांचा नाश केला. त्यांनी अनेक
दैवतांना बळी अर्पण केले. त्यामुळे मला राग आला.
तुमच्या लोकांनी व पूर्वजांनी, पूर्वी कधी, त्या दैवतांना
पुजले नव्हते. 4मी त्या लोकांकडे माझे संदेष्टे पुन्हा पुन्हा
पाठविले ते माझे सेवक होते. त्या संदेष्ट्यांनी माझा संदेश
सांगितला आणि ते लोकांना म्हणाले, 'अशी भयंकर कृत्ये
करु नका. परमेश्वर मूर्तिपूजेचा तिरस्कार करतो.' 5पण
त्यांनी संदेष्ट्यांचे ऐकले नाही. त्यांनी संदेष्ट्यांकडे लक्ष
दिले नाही. ते दुष्कृत्ये करीतच राहिले ते दैवतांना बळी
अर्पण करीतच राहिले. 6म्हणून त्यांच्यावरचा माझा राग
मी व्यक्त केला. मी यहूदातील नगरांना व यरुशलेमच्या
मार्गांना शिक्षा केली. माझ्या रागामुळेच आज यरुशलेम
व यहूदातील नगरे नुसती दगडविटांच्या राशी झाली आहेत."
7म्हणून सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो,
"मूर्तीची पूजा करीत राहून तुम्ही स्वत:लाच इजा का
करून घेत आहात? तुम्ही पुरुष व स्त्रिया, मुले व बआलके
यांना यहूदाच्या कुळापासून तोडत आहात. त्यामुळे यहूदाच्या
कुळातील कोणीही शिल्लक राहणार नाही. 8मूर्तीपूजा
करून तुम्ही मला का संतापवता? आता तुम्ही मिसरमध्ये
राहात आहात आणि मिसरच्या दैवतांना बळी अर्पण करून
तुम्ही मला संतापवत आहात. तुम्ही तुमचाच नाश करून
घ्याल. ती तुमचीच चूक असेल. तुमचे वागणेच असे
असेल की दुसऱ्या राष्ट्रांतील लोक तुमच्याबद्दल वाईटच
बोलतील. जगातील इतर राष्ट्रे तुमची चेष्टा करतील.
9तुमच्या पूर्वजांनी केलेली दुष्कृत्ये तुम्ही विसरलात का?
यहूदाच्या राजा राण्यांनी केलेली वाईट कृत्ये तुम्हाला
आठवत नाहीत का? तुम्ही आणि तुमच्या बायकांनी यहूदात
व यरुशलेमच्या रस्त्यावर केलेली पापे तुम्ही विसरलात
का? 10आजतागायत यहूदातील लोक नम्र झालेले नाहीत
त्यांनी माझ्याबद्दल आदर दाखविलेला नाही. ते, माझ्या
शिकणुकीप्रमाणे वागले नाहीत मी तुम्हाला आणि तुमच्या
पूर्वजांना घालून दिलेले नियम त्यांनी पाळले नाहीत."
11म्हणून सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव
म्हणतो, "मी तुमच्यावर भयंकर संकटे आणण्याचे ठरविले
आहे. मी यहूदाच्या कुळाचा संपूर्ण नाश करीन. 12यहूदातील
अगदी थोडे लोक वाचले आहेत. ते येथे मिसरला आले
आहेत. पण यहूदातील कुळातल्या त्या वाचलेल्या लोकांचा
मी नाश करीन. अती महत्वाच्या व्यक्तीपासून अती
सामान्यपर्यंत सर्वच्या सर्व युद्धात ठार होतील वा उपासमारीने
मरतील. इतर राष्ट्रांतील लोक त्यांची निंदा करतील. त्या
लोकांच्या बाबतीत जे घडले, ते पाहून इतर राष्ट्रांतील
लोक घाबरतील. ते लोक म्हणजे जणू काय शिवी बनतील,
दुसरी राष्ट्रे त्यांचा अपमान करतील. 13मिसरमध्ये राहण्यास
गेलेल्या त्या लोकांना मी शिक्षा करीन. त्यासाठी मी
तलवार, उपासमार व भयंकर रोगराई या गोष्टींचा उपयोग
करीन. यरुशलेम नगरीला जशी मी शिक्षा केली, तशीच
त्यांना शिक्षा करीन. 14यहूदातून वाचून मिसरमध्ये
राहण्यास गेलेला एकही जण माझ्या शिक्षेतून सुटणार
नाही. त्यांच्यातील कोणीही यहूदास परतणार नाही. त्या
लोकांची यहूदात परत येऊन राहण्याची इच्छा आहे, पण
काही निसटून गेलेले लोक सोडून कोणीही यहूदात परत
जाणार नाही."
15मिसरमध्ये राहणाऱ्या यहूदी स्त्रिया दैवतांना बळी अर्पण
करीत होत्या त्यांच्या पतींना ते माहीत होते. पण त्यांनी
त्या स्त्रियांना असे करण्यापासून परावृत्त केले नाही. तेथे
असलेल्या यहूदी लोकांचा एक मोठा समुदाय एकत्र येत
होता हे लोक मिसरच्या दक्षिण भागात राहात होते ज्या
स्त्रिया दैवतांना बळी अर्पण करीत होत्या, त्यांचे पती
यिर्मयाला म्हणाले. 16"तू आम्हाला सांगितलेला
परमेश्वराचा संदेश आम्ही मानणार नाही 17आम्ही
स्वर्गातील राणीला बळी अर्पण करण्याचे वचन दिले आहे,
तेव्हा आम्ही त्याप्रमाणेच करू. आम्ही बळी व पेयार्पण
करून तिची पूजा करू. आम्ही पूर्वीही हे केले आहे.
आमच्या पूर्वजांनी, राजांनी व अधिकाऱ्यांनीही पूर्वी असेच
केले आम्ही सर्वांनी यहूदाच्या नगरांत आणि यरुशलेमच्या
रस्त्यावर हेच केले आम्ही स्वर्गातील राणीची पूजा केली
तेव्हा आम्हाला अन्नाची कमतरता नव्हती, आम्हाला
यश येत होते, आमचे काहीही वाईट झाले नाही. 18पण
आम्ही स्वर्गातील राणीला बळी व पेयार्पणे करून तिची
पूजा करण्याचे सोडून देताच आम्हाला अडचणी आल्या,
आमचे लोक तलवारीने व उपासमारीने मारले गेले."
19मग स्त्रिया बोलू लागल्या त्या यिर्मयाला म्हणाल्या,
"जे काही आम्ही करीत होतो, ते आमच्या पतींना माहीत
होते. स्वर्गातील राणीला बळी व पेयार्पण करण्याची त्यांची
आम्हाला परवानगी होती. आम्ही पुऱ्यांमधून तिच्या प्रतिमा
घडवीत होतो हेही त्यांना माहीत होते." 20मग ह्या सर्व
गोष्टी सांगणाऱ्या स्त्री पुरुषांशी यिर्मया बोलला 21तो त्या
लोकांना म्हणाला, "तुम्ही यहूदाच्या नगरांत आणि
यरुशलेमच्या रस्त्यांवर बळी दिले हे परमेश्वराच्या लक्षात
आहे. तुम्ही, तुमच्या पूर्वजांनी, राजांनी, अधिकाऱ्यांनी व
देशातील लोकांनी असेच केले परमेश्वराच्या लक्षात हे

सर्व होते. त्याने त्याबद्दल विचार केला. 22मग परमेश्वराची
सहनशक्ती संपली. तुम्ही केलेल्या वाईट आणि भयंकर
कृत्यांचा परमेश्वराला तिरस्कार वाटला. म्हणून त्याने
तुमच्या देशाचे ओसाड वाळवंट केले. तेथे आता कोणीही
राहत नाही. तो देश आता शापरूप झाला आहे. 23तुम्ही
दैवतांना बळी अर्पण केले, म्हणूनच असे वाईट घडले,
तुम्ही परमेश्वराविरुध्द वागून पाप केले. तुम्ही परमेश्वराचे
ऐकले नाही. त्याच्या शिकवणुकीप्रमाणे तुम्ही वागला
नाहीत अथवा त्याने घालून दिलेले नियम तुम्ही पाळले
नाहीत करारातील तुमच्या शर्ती तुम्ही पाळल्या नाहीत."

24यिर्मया त्या सर्वांना म्हणाला, "यहूदातून येऊन
मिसरमध्ये राहणाऱ्या तुम्ही सर्वांनी परमेश्वराचा संदेश
ऐका: 25सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा
देव म्हणतो, 'तुम्ही आणि तुमच्या स्त्रियांनी तुमच्या
म्हणण्याप्रमाणे केले. तुम्ही म्हणाला "आम्ही दिलेले वचन
पाळू. आम्ही स्वर्गातील राणीला बळी व पेये अर्पण करण्याचे
वचन दिले आहे." तर मग जा दिलेल्या वचनाप्रमाणे वागा
दिलेले वचन पाळा. 26पण मिसरमध्ये राहणाऱ्या सर्व
यहूदी लोकांनो परमेश्वराचा संदेश ऐका मी माझ्या महान
नावाची शपथ घेऊन वचन देतो की मिसरमध्ये राहणाऱ्या
यहूदी लोकांपैकी कोणीही पुन्हा कधीही वचन देताना,
माझी शपथ घेणार नाहीत ते पुन्हा कधीही "देवा शपथ.."
असे म्हणणार नाहीत.27"'मी त्या यहूदाच्या लोकांवर लक्ष
ठेवत आहे, पण ते काळजी घेण्यासाठी म्हणून नाही, तर
त्यांना इजा व्हावी म्हणून मिसरमध्ये राहणारे यहूदी लोक
उपासमारीने मरतील वा तलवारीने मारले जातील त्यांचा
संपूर्ण नाश होईपर्यंत हे मरणाचे सत्र चालूच राहील. 28काही
लोक तलवारीच्या वारातून निसटतील ते मिसरमधून
यहूदाला परत येतील पण असे लोक फारच थोडे असतील.
मग वाचलेल्या व मिसरमध्ये राहायला आलेल्या लोकांना
कोणाचे शब्द खरे ठरले ते कळेल. 'माझे शब्द खरे
ठरले की त्यांचे' ते त्यांना समजेल. 29मी तुम्हाला ह्याचा
पुरावा देईन.' हा परमेश्वराचा संदेश आहे, 'मी मिसरमध्येच
तुम्हाला शिक्षा करीन. मग तुम्हाला दुखविण्याची वचने
दिली होती ती खरी ठरतात, ह्याची तुम्हाला खात्री पटेल.
30मी म्हटल्याप्रमाणे करतो हाच तुमच्यासाठी पुरावा असेल.'
परमेश्वर पुढे म्हणतो, 'फारो हफ्रा हा मिसरचा राजा आहे
त्याचे शत्रू त्याला मारायला टपले आहेत. मी फारो हफ्राला
त्याच्या शत्रूंच्या ताब्यात देईन सिद्कीया यहूदाचा राजा
होता नबुखदनेस्सर त्याचा शत्रू होता, मी सिद्कीयाला
त्याच्या शत्रूच्या ताब्यात दिले त्याचप्रमाणे फारो हफ्राला
मी त्याच्या शत्रूच्या ताब्यात देईन.'"

## बारूखला संदेश

45 यहोयाकीम हा योशीयाचा मुलगा होता यहोयाकीम
यहूदावर राज्य करीत असताना त्याच्या
कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी यिर्मया या संदेष्ट्याने नेरीयाचा
मुलगा बारूख यास पुढील गोष्टी सांगितल्या बारूखने
त्या पटावर लिहिल्या यिर्मयाने बारूखला सांगितलेल्या
गोष्टी पुढीलप्रमाणे होत्या. 2"परमेश्वर, इस्राएलचा देव
तुला असे म्हणतो 3'बारूख, तू असे म्हणालास की माझ्या
दुष्टीने हे फार वाईट आहे. परमेश्वराने मला यातनांबरोबर
दु:ख दिले आहे. मी फार कंटाळलो आहे. माझ्या दु:खाने
मी हैराण झालो आहे. मी विश्रांती घेऊ शकत नाही.'"
4"यिर्मया, बारूखला असे सांग की परमेश्वर म्हणतो, 'मी
बांधलेले मीच तोडून टाकीन. मी पेरलेले मीच उपटून
टाकीन मी सर्व यहूदात असेच करीन. 5बारूख, तू
स्वत:साठी मोठ्या गोष्टींची अपेक्षा करतोस तशी अपेक्षा
करू नकोस. कारण मी सर्वांवर संकट आणीन.'
परमेश्वरानेच ह्या गोष्टी सांगितल्या 'तुला खूप ठिकाणी
जावे लागेल पण तू जेथे जाशील, तेथून मी तुझी जिवंतपणे
सुटका करीन.'"

## राष्ट्रांसाठी परमेश्वराचा संदेश

46 यिर्मया या संदेष्ट्याला जो संदेश मिळाला, तो
वेगवेगळ्या राष्ट्रांसाठी होता.

## मिसरसाठी संदेश

2हा संदेश मिसर देशासाठी आहे. फारो नखो ह्याच्या
सैन्याविषयी हा संदेश आहे. नखो मिसरचा राजा होता.
कर्कमीश शहराजवळ त्याच्या सैन्याचा पराभव झाला.
कर्कमीश फरात नदीच्या काठी आहे. योशीयाचा
मुलगा योहयाकीम यहूदाचा राजा असताना त्याच्या
कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर
याने फारो नखोच्या सैन्याचा कर्कमीश येथे पराभव केला.
परमेश्वराचा मिसरला पुढीलप्रमाणे संदेश आहे:

3"तुमच्या लहान मोठ्या ढाली तयार ठेवा. लढण्यासाठी
कूच करा 4घोडे तयार ठेवा. सैनिकांनो, घोड्यावर स्वार
व्हा, युद्धासाठी आपापल्या जागा धरा. शिरस्त्राण घाला.
भाल्यांना धार करा. चिलखत घाला. 5हे मी काय पाहतो?
ते सैन्य भयभीत झाले आहे, सैनिक दूर पळून जात आहेत
त्यांच्या शूर वीरांचा पराभव झाला आहे. ते घाईने पळून
जात आहेत. ते मागे वळून पाहत नाहीत. सगळीकडे
धोका आहे." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

6चपळ लोक दूर पळून जाऊ शकणार नाहीत. बलवान
सैनिक निसटू शकणार नाहीत. ते सगळे अडखळून पडतील.
हे सगळे फरात नदीच्या उत्तरेस घडेल.

7नील नदीप्रमाणे हा कोण येत आहे? त्या मोठ्या, वेगवान
नदीप्रमाणे कोण बरे येत आहे?

8उसळणाऱ्या नील नदीप्रमाणे मिसर येत आहे. प्रचंड,
वेगवान नदीप्रमाणे तो येत आहे. मिसर म्हणतो, 'मी
येऊन पृथ्वीला व्यापून टाकीन. मी शहरे व त्यात राहणाऱ्या
लोकांचा नाश करीन.'

9घोडेस्वारांनो, चढाई करा. सारथ्यांनो, रथ वेगाने हाका. शूर सैनिकांनो, कूच करा. कूश व फूट येथील सैनिकांनो, ढाली सांभाळा. लूदच्या सैनिकांनो, धनुष्याचा उपयोग करा.
10“पण त्या वेळी, आमच्या प्रभूचा, सर्वशक्तिमान परमेश्वराचाच जय होईल. तो त्यांना योग्य ती शिक्षा करील. परमेश्वराच्या शत्रूंना योग्य अशीच शिक्षा मिळेल. सर्वनाश होईपर्यंत तलवार वार करील. तलवारीला लागलेली रक्ताची तहान भागेपर्यंत ती लोकांना ठार करील. आमच्या प्रभूला, सर्वशक्तिमान परमेश्वराला बळी मिळावा म्हणून असे घडेल. हा बळी म्हणजे फरात नदीच्या काठी उत्तरेच्या प्रदेशात असलेले मिसरचे सैन्य होय.
11“मिसर, गिलादला जा आणि काही औषध मिळव. तू खूप औषधे मिळवशील, पण त्याचा उपयोग होणार नाही तू बरा होणार नाहीस.
12इतर राष्ट्र तुझा आक्रोश ऐकतील. सर्व पृथ्वीवर तो ऐकू जाईल. एक ‘शूर योद्धा’ दुसऱ्या ‘शूर योध्द्याला’ भिडेल. आणि दोघेही ‘शूर योद्धे’ बरोबरच खाली पडतील.”

13परमेश्वराने यिर्मया या संदेष्ट्याला जो संदेश दिला, तो मिसरवर स्वारी करून येणाऱ्या बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरबद्दल होता.

14“मिसरमध्ये ह्या संदेशाची घोषणा कर.मिग्दोल, नोफ व तहपन्हेस येथे जाहीर कर ‘युद्धाला तयार व्हा का? कारण तुमच्या भोवतालचे लोक तलवारीने मारले जात आहेत.’
15“मिसर, तुझे बलवान सैनिक मारले जातील.ते उभेच राहू शकणार नाहीत कारण परमेश्वरच त्यांना खाली पाडेल.
16ते पुन्हा पुन्हा धडपडतील. ते एकमेकावर पडतील ते म्हणतील, ‘उठा! आपण माघारी, आपल्या लोकां मध्ये जाऊ या आपण माय भूमीला परत जाऊ या आपला शत्रू आपला पराभव करीत आहे. आपण दूर गेलेच पाहिजे.’
17त्यांच्या मायभूमीत, ते सैनिक म्हणतील, ‘मिसरचा राजा फारो म्हणजे नुसताच गाजावाजा आहे. त्याच्या वैभवाचा काळ संपला आहे.’”
18हा राजाकडून आलेला संदेश आहे. तो राजा म्हणजे सर्वशक्तिमान परमेश्वरच होय. “मी शपथपूर्वक वचन देतो की सामर्थ्यवान नेता येईल. तो ताबोर आणि समुद्राजवळील कर्मेल पर्वताप्रमाणे महान असेल.
19मिसरच्या लोकांनो, गाशा गुंडाळा कैदेस तयार व्हा. का? कारण नोफचा नाश होऊन ते निर्जन होईल. त्या शहरांचा नाश केला जाईल. ती निर्जन होतील.
20“मिसर सुंदर गायीप्रमाणे आहे. पण उत्तरेकडून एक गोमाशी तिला त्रास देण्यास येत आहे.
21मिसरच्या सैन्यातील भाडोत्री सैनिक हे लठ्ठ वासराप्रमाणे आहेत. ते पाठ फिरवून पळून जातील. ते चढाईला समर्थपणे तोंड देणार नाहीत त्यांच्या नाशाची वेळ येत आहे. त्यांना लवकरच शिक्षा होईल.
22मिसर, फूत्कारणाऱ्या व निसटून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या सापाप्रमाणे आहे. शत्रू जवळ जवळ येत आहे आणि मिसरचे सैन्य पळून जाण्याचा प्रयत्न करीत आहे. शत्रू मिसरवर कुऱ्हाडीने हल्ला करतील. ते लाकूडतोड्यां प्रमाणे असतील.”
23परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो: “ते मिसरचे जंगल (सैन्य) तोडून टाकतील जंगलात (सैन्यात) खूप झाडे (सैनिक) आहेत. पण ती सर्व तोडली जातील. टोळापेक्षा तेथे जास्त सैनिक आहेत. कोणीही मोजू शकणार नाही एवढे सैनिक तेथे आहेत.
24मिसरची स्थिती लज्जास्पद होईल. उत्तरेचा शत्रू तिचा पराभव करील.”

25सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, “लवकरच मी नोच्या आमोन देवतेला शिक्षा करीन. मी फारो, मिसर आणि तिचे दैवत यांनाही शिक्षा करीन. मी मिसरच्या राजाला सजा देईन आणि फारोवर अवलंबून असलेल्या लोकांना शिक्षा करीन. 26मी ह्या सर्व लोकांचा त्यांच्या शत्रूंच्या हातून पराभव करीन. त्या शत्रूंची त्यांना मारण्याची इच्छा आहे. मी त्या लोकांना बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर व त्याचे सेवक ह्यांच्या हवाली करीन.”
“फार पूर्वी, मिसरला, शांतता होती. ह्या संकटकाळानंतरही मिसरला शांतता नांदेल.” परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

### उत्तर इस्राएलला संदेश

27“याकोब, माझ्या सेवका, घाबरू नकोस. इस्राएल, भिऊ नकोस दुरच्या ठिकाणाहून मी तुला वाचवीन. निरनिराळ्या देशांत कैदी म्हणून नेलेल्या तुझ्या मुलांचे मी रक्षण करीन. याकोबला पुन्हा शांतता व संरक्षण लाभेल. कोणीही त्याला भीती दाखविणार नाही.”
28परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो, “याकोब, माझ्या सेवका घाबरू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे मी तुला खूप निरनराळ्या ठिकाणी पाठविले पण मी तुझा संपूर्ण नाश करणार नाही. इतर राष्ट्रांचा मात्र मी नाश करीन. तुझ्या दुष्कृत्यांबद्दल तुला शिक्षा झालीच पाहिजे. म्हणून तुझ्या शिक्षेतून मी तुला सूट देणार नाही. मी तुला शिस्त लावीन हे खरे! पण ती न्याय्यपणाने लावीन.”

### पालिष्ट्यांविषयी संदेश

47 यिर्मया या संदेष्ट्याला परमेश्वराकडून पुढील संदेश आला. तो पालिष्ट्यांबाबत होता. फारोने गज्जा शहरावर हल्ला करण्यापूर्वी हा संदेश आला.

[2]परमेश्वर म्हणतो, "पाहा! उत्तरेला शत्रू-सैनिक एकत्र
आले आहेत वेगाने वाहून काठावर पसरणाऱ्या नदीप्रमाणे
ते येतील. पूर ज्याप्रमाणे जमीन व्यापतो, तसेच ते सर्व
देशांत पसरतील शहरे आणि त्यातील रहिवासी यांना ते
गिळतील. त्या देशात राहणारा प्रत्येकजण मदतीसाठी
आक्रोश करील.

[3]"त्यांना घोड्याच्या टापांचे आवाज ऐकू येतील रथांचा
गडगडाट व चाकांचा खडखडाट त्यांना ऐकू येईल. वडील
आपल्या मुलांचे रक्षण करू शकणार नाहीत. ते इतके
दुबळे होतील की ते मदत करू शकणार नाहीत.

[4]सर्व पलिष्ट्यांच्या नाशाची वेळ आली आहे. सोर आणि
सीदोन यांच्या उरलेल्या साहाय्यकांच्या नाशाची वेळ आली
आहे. लवकरच परमेश्वर पलिष्ट्यांचा नाश करील.
कपतोर द्विपातील वाचलेल्यांचाही तो नाश करील.

[5]गज्जाचे लोक दु:खी होतील आणि आपले मुंडन
करतील. अष्कलोनचे लोक शांत होतील. दरीतील
वाचलेल्या लोकांनो तुम्ही किती काळ स्वत:ला जखमा
करणार?

[6]"परमेश्वराच्या तलवारी, तू अजून थांबली नाहीस!
किती काळ तू लढत राहणार? परत आपल्या म्यानात
जा. थाब! शांत रहा!

[7]पण परमेश्वराची तलवार विश्रांती कशी घेऊ शकेल?
परमेश्वराने तिला आज्ञा दिली की अष्कलोन व
समुद्रकिनारा ह्यावर हल्ला कर."

## मवाबसाठी संदेश

48 हा संदेश मवाब देशासाठी आहे सर्वशक्तिमान
परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा देव असे
म्हणतो:

"नबो पर्वताला वाईट काळ येईल. त्याचा नाश होईल
किर्याथाईमचा गर्व उत्तरेल ते काबीज केले जाईल मजबूत
ठिकाणे वाकतील त्यांचे शतश: तुकडे होतील.

[2]पुन्हा कधीही मवाबची स्तुती ऐकू येणार नाही.
हेशबोनमधील लोक मवाबच्या पाडावाचा बेत आखतील
ते म्हणतील, 'या, आपण त्या देशाचा शेवट करू या.'
मदमेना, तू सुद्धा शांत होशील, तलवार तुझा पाठलाग
करील.

[3]होरोनाईमचा आक्रोश ऐका. तो गोंधळाचा व प्रंचड
नाशाचा आवाज आहे.

[4]मवाबचा नाश होईल. तिची लहान मुले मदतीसाठी
आक्रोश करतील.

[5]मवाबचे लोक लूहीथच्या रस्त्याने वर जाताना मोठ्याने
रडत आहेत. खाली, होरोनाईमच्या रस्त्यांवर यातनांचे व
दु:खाचे विव्हळणे ऐकू येते.

[6]पळा! जीव वाचविण्यासाठी पळा! वाळवंटातून
उडणाऱ्या झुडुपाप्रमाणे पळा!

[7]तुम्ही घडविलेल्या गोष्टी व तुमची संपत्ती यावर तुम्ही
भिस्त ठेवता,म्हणून तुम्ही पकडले जाल. कमोश दैवत
कैद केले जाईल आणि त्याच्याबरोबर त्याचे पुरोहित व
अधिकारी यांनाही नेले जाईल.

[8]प्रत्येक गावावर विध्वंसक येईल. त्यातून एकही गाव
सुटणार नाही. दरीचा नाश होईल पठारा चाही नाश
केला जाईल परमेश्वराने हे घडणार म्हणून सांगितले
आहे, तेव्हा तसे घडणारच.

[9]मवाबच्या शेतांवर मीठ पसरा देशाचे ओसाड वाळवंट
होईल. मवाबची शहरे निर्जन होतील. तेथे कोणीही राहणार
नाही.

[10]जो कोणी 'त्या' लोकांना मारण्यासाठी आपल्या
तलवारीचा उपयोग करीत नसेल, त्याचे वाईट होईल.

[11]मवाबला त्रास माहीत नाहीमवाब मुरायला ठेवलेल्या
मद्याप्रमाणे आहे त्याला कधी एका रांजणातून दुसऱ्या
रांजणात ओतलेले नाही. त्याला कधी कैद झालेली नाही.
म्हणून त्याची चव कायम आहे आणि त्याच्या वासात
फरक नाही."

[12]देव असे म्हणतो, "तुझ्या रांजणातून तुला ओतून
टाकण्यासाठी मी लवकरच माणसे पाठवीन. ते रांजण
रिकामे करून त्याचे तुकडे तुकडे करतील."

[13]मग दैवत कमोश याची मवाबच्या लोकांना लाज
वाटेल इस्राएलच्या लोकांनी बेथेल * येथील दैवतांवर भिस्त
ठेवली आणि त्याने त्यांना काहीच मदत केली नाही.
म्हणून ते खजील झाले मवाबचेही तसेच होईल.

[14]"'आम्ही चांगले सैनिक व शूरवीर आहोत' असे तुम्ही
म्हणू शकत नाही.

[15]शत्रू मवाबवर हल्ला करील. तो शहरात शिरून
त्यांचा नाश करील. कत्तलीत तिचे उत्तम तरुण मारले
जातील." हा राजाचा संदेश आहे, आणि राजाचे नाव आहे
सर्वशक्तिमान परमेश्वर,

[16]"मवाबचा शेवट जवळ आला आहे लवकरच तिचा
नाश होईल.

[17]त्या देशाभोवती राहणाऱ्यांनी त्यासाठी शोक करावा.
तुम्हाला मवाबची किर्ती माहीत आहे. म्हणून त्याच्यासाठी
शोक करा. म्हणा, 'राजाची सत्ता संपली मवाबचे सामर्थ्य
व वैभव गेले'

[18]"दोबोनच्या रहिवाशांनो, आपापल्या मानाच्या जागा
खाली करा. जमिनीवर धुळीत बसा. का? कारण मवाबचा
विनाश करणारा येत आहे, आणि तो तुमची मजबूत शहरे
नष्ट करील.

---

**बेथेल** ह्याचा अर्थ यराबाम राजाने बेथेल येथे बाधलेले मंदिर होय पाहा 1 राजा 12:28–33 तेथे अजूनही, चुकीच्या मार्गाने पूजा करीत होते, का कनानी लोकांचे खोटे देव 'एल' व 'बआल' ह्याची पूजा करीत होते हे स्पष्ट होत नाही.

19“अरोएरच्या रहिवाशांनो, रस्त्याच्या कडेला उभे
राहून पाहा! पाहा! माणसे पळून जात आहेत पाहा! स्त्रियाही
पळून जात आहेत त्यांना काय झाले ते विचारा
20“मवाबचा नाश होईल त्याची फजिती होईल. मवाब
आक्रोश करील. मवाबचा नाश झाला असे आर्णोन
नदीकाठच्या प्रदेशात जाहीर करा.
21उंच पठारावरील लोकांना शिक्षा केली जाईल.
होलोन, याहस व मेफाथ ह्या शहरांचा न्यायनिवाडा झाला
आहे.
22दीबोन, नबे, बेथ–दिबलाथाईम ह्याही शहरांचा निवाडा
झाला आहे.
23किर्याथाईम, बेथ–गामूल व बेथ मौन यांचा निकाल
लागला आहे.
24करीयोथ, बसरा व मवाबमधील दूरची व जवळची
शहरे यांचा न्यायनिवाडा झाला आहे.
25मवाबची शक्ती तोडण्यात आली आहे. मवाबचे
हात मोडले आहेत.” परमेश्वरानेच ह्या गोष्टी
सांगितल्या.
26“मवाब परमेश्वरापेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजला म्हणून,
तो, मद्यप्याप्रमाणे झोकांड्या खाईपर्यंत त्याला शिक्षा करा.तो
स्वत: च्याच वांतीत पडून लोळेल. लोक त्याची टर
उडवतील
27“मवाब, तू इस्राएलची चेष्टा केलीसइस्राएल चोरांमध्ये
पकडला गेला का? इस्राएलबद्दल बोलताना, प्रत्येक वेळी,
तू मान हलवून, स्वत: इस्राएलपेक्षा चांगला असल्याचा
अभिनय केलास.
28मवाबवासीयांनो, तुमची गावे सोडा, जाऊन
कडेकपारीत राहागुहेच्या तोंडाशी घरटे करणाऱ्या
पारव्यांप्रमाणे व्हा.”
29“आम्ही मवाबच्या गर्वाविषयी ऐकले आहे. तो फारच
गर्विष्ठ होता. तो स्वत:ला विशेष समजे. तो नेहमी बढाया
मारीत असे. तो फारच दुराभिमानी होता.”
30परमेश्वर म्हणतो, “मवाबला अकारण राग येतो आणि
तो स्वत:बद्दल बढाया मारतो हे मला ठाऊक आहे. पण
त्याच्या फुशारक्या खोट्या आहेत. तो बोलल्याप्रमाणे करू
शकत नाही.
31म्हणून मला मवाबसाठी रडू येते मला त्या देशातील
प्रत्येकाबद्दल वाईट वाटते. कीर हरेसमधील लोकांबद्दल
मला वाईट वाटते.
32याजेरसाठी मी तेथील लोकांबरोबर शोक करतो.
सिबा, पूर्वी तुझ्या द्राक्षवेली पार समुद्रापर्यंत पसरल्या होत्या
त्या पार याजेरपर्यंत पोहोचल्या होत्यापण विनाशकाने तुझी
फळे व द्राक्षे नेली आहेत
33मवाबच्या विस्तीर्ण द्राक्षमळ्यातून आनंद व सुख निघून
गेले. द्राक्षकुंडातील द्राक्षरसाचा प्रवाह मी अडविला आहे.
द्राक्षरस काढण्यासाठी द्राक्षे तुडविताना लोक गात वा नाचत
नाहीत. तेथे हर्षकल्लोळ नाहीत.
34“हेशबोन एलाले येथील लोक रडत आहेत. त्यांचे
रडणे पार याहसपर्यंत, सोअरपासून होरानाईम व
एग्लाथशलिशीयापर्यंत ऐकू येते. एवढेच नव्हे तर, निर्मीमचे
पाणी सुद्धा आटले आहे. 35मी मवाबला उच्चासनी त्याच्या
दैवताला अर्पण करू देणार नाही.” परमेश्वराने असे
सांगितले.
36“मला मवाबचे फार वाईट वाटते. बासरीतून
शोकसंगीताचे सूर बाहेर पडावेत, त्याप्रमाणे माझे मन
रडते. मला कीर हरेसच्या लोकांबद्दल दु:ख वाटते. त्यांचा
पैसा, संपत्ती सर्व काही हिरावून घेतले गेले. 37प्रत्येकाने
मुंडन व दाढी केली आहे. प्रत्येकाचा हात कापला आहे
व त्यातून रक्त वाहत आहे.* प्रत्येकजण शोकप्रवर्तक
वस्त्रे कमरेभोवती गुंडाळत आहे. 38मवाबमध्ये प्रत्येक
घराच्या धाब्यावर आणि प्रत्येक सार्वजनिक स्थानी, लोक
मृतांसाठी शोक करीत आहेत. मी रिकामा रांजण फोडावा
त्याप्रमाणे मवाबला फोडले, म्हणून सर्वत्र दु:ख झाले आहे.”
परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.
39“मवाबचे तुकडे तुकडे केले गेले. लोक रडत आहेत.
मवाब शरण आला. आता तो खजील झाला आहे. लोक
त्याची खिल्ली उडवितात खरे, पण घडलेल्या गोष्टीमुळे ते
भयभीतही होतात.”

40परमेश्वर म्हणतो, “पाहा! शत्रू गरुडाप्रमाणे खाली
झेपावत आहे. तो त्याचे पंख मवाबवर पसरवीत आहे.
41मवाबची शहरे काबीज केली जातील. लपण्याच्या
भक्क म जागांचा पाडाव होईल. त्या वेळी, मवाबचे सैनिक,
प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे भयभीत होतील.
42मवाब या राष्ट्राचा नाश होईल. का? कारण त्याने
स्वत:ला परमेश्वरापेक्षा श्रेष्ठ मानले.”
43परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो: “मवाबवासीयांनो,
भीती, गर्ता आणि सापळे तुमची वाट पाहात आहेत.
44लोक घाबरून पळतील ते गर्तेत पडतील एखादा
त्यातून वर आलाच, तर तो सापळ्यात सापडेल मी मवाबवर
शिक्षेचे वर्ष आणीन.” परमेश्वराने असे सांगितले.
45“लोक शक्तिशाली शत्रूपासून पळाले आहेत ते
सुरक्षेसाठी हेशबोनला पळाले पण तेथे सुरक्षा नव्हती.
हेशबोनमध्ये आग लागली सीहोनच्या गावात आग लागली
आणि ती मवाबच्या नेत्यांचा नाश करीत आहे. ती त्या
गर्विष्ठ लोकांचा नाश करीत आहे.
46मवाब, तुझे वाईट होणार.कमोशच्या लोकांचा नाश
होत आहे. तुझी मुलेमुली बंदिवान म्हणून वा कैदी*
म्हणून नेली जात आहेत.

---

**प्रत्येकाने ... वाहते आहे** मृतांबद्दलचा शोक प्रदर्शित करण्यासाठी लोक असे करीत.

**कमोश ... कैदी** मवाब राष्ट्राचा देव. हा अम्मोनी लोकांचा देव होता, तरी सुध्दा कमोशला राष्ट्रीय देव मानत.

[47]"मवाबचे लोक कैदी म्हणून नेले जातील पण पुढील
दिवसांत मी त्यांना परत आणीन." हा परमेश्वराचा संदेश
होता.

येथे मवाबचा न्यायनिवाडा संपतो

### अम्मोनसंबंधी संदेश

49 हा संदेश अम्मोनी लोकांसाठी आहे. परमेश्वर
म्हणतो, "अम्मोनी लोकांनो, इस्राएली लोकांना
मुले नाहीत असे तुम्हाला वाटते का? आईवडील गेल्यावर
तेथील जमिनीला कोणी वारस नाही असे तुम्ही समजता
का? म्हणूनच कदाचित् मिलकोमने गादची भूमी घेतली
का?"

[2]परमेश्वर म्हणतो, "अम्मोनीच्या राब्बातून युद्धाचा
खणखणाट ऐकण्याची वेळ येईल. राब्बाचा नाश होईल.
ते पडझड झालेल्या इमारतींनी झाकलेली ओसाड टेकडी
होईल. त्याच्या भोवतीची गावे जाळली जातील. ज्या
लोकांनी, इस्राएलच्या लोकांना इस्राएलची भूमी
बळजबरीने सोडायला लावली, त्यांच्याकडून इस्राएलचे
लोक आपल्या भूमीचा ताबा घेतील. पण भविष्यात, इस्राएल
त्यांना बळजबरीने हाकलून लावेल." परमेश्वराने हे
सांगितले.

[3]"हेशबोनच्या लोकांनो, रडा का? कारण आयचा नाश
झाला आहे. अम्मोनच्या राब्बातील स्त्रियांनो, शोक करा.
शोकप्रदर्शक कपडे घालून रडा! सुरक्षेसाठी शहराकडे
पळा! का? कारण शत्रू येत आहे. ते, मिलकोम दैवताला,
त्याच्या पुजाऱ्याला व इतर अधिकाऱ्यांना नेतील.

[4]तुम्ही तुमच्या सामर्थ्याबद्दल बढाया मारता. पण तुम्ही
दुर्बळ होत आहात. तुमचा पैसा तुम्हाला वाचवील असा
तुम्हाला विश्वास वाटतो तुमच्यावर हल्ला करण्याचा
कोणी विचारही करणार नाही असे तुम्ही समजता."

[5]पण सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो: "मी सर्व
बाजूंनी तुमच्यावर संकटे आणीन. तुम्ही सर्व पळून जाल
आणि कोणीही तुम्हाला एकत्र आणू शकणार नाही."

[6]"अम्मोनी लोकांना कैदी करून नेले जाईल. पण एक
वेळ अशी येईल की मी त्यांना परत आणीन." हा
परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

### अदोमबाबत संदेश

[7]हा संदेश अदोमसाठी आहे

सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो: "तेमानमध्ये जरासुद्धा
शहाणपण उरले नाही का? अदोमचे सुज्ञ लोक चांगला
सल्ला देऊ शकत नाहीत का? त्यांनी त्यांचे शहाणपण
गमावले का?

[8]ददानच्या लोकांनो, पळा! लपा! का? कारण मी
एसावाला त्याने केलेल्या दुष्कृत्याबद्दल शिक्षा करीन.

[9]"मजूर द्राक्षमळ्यातून द्राक्षे तोडतात पण ते, काही द्राक्षे,
झाडावरच, ठेवतात चोरसुद्धा सर्व नेत नाही.

[10]पण एसावातील सर्व काही मी काढून घेईन मी त्याच्या
सर्व लपायच्या जागा शोधून काढीन तो माझ्यापासून लपून
राहू शकणार नाही. त्याची मुले, नातेवाईक, शेजारी सर्व
मरतील.

[11]त्याच्या मुलांची काळजी घ्यायला कोणीही शिल्लक
राहणार नाही. त्याच्या बायका निराधार होतील." पण मी
(देव) तुमच्या अनाथ मुलांच्या जीवाचे रक्षण करीन.
तुमच्या विधवा माझ्यावर विश्वास ठेऊ शकतात."

[12]परमेश्वर म्हणतो: "काही लोक शिक्षेला पात्र नाहीत.
पण त्यांना सोसावे लागते. पण अदोम, तू शिक्षेला पात्र
आहेस. म्हणून तुला खरोखरीच शिक्षा होईल. तुझ्या
शिक्षेतून तुझी सुटका होणार नाही. तुला शिक्षा होईलच."
[13]परमेश्वर म्हणतो, "माझ्या अधिकारात मी वचन देतो
की बसऱ्याचा नाश होईल. ते शहर पडझड झालेल्या
दगडांची रास होईल. दुसऱ्या शहरांना शाप देताना लोक
बसऱ्याचे नाव उच्चारतील. लोक त्याचा अपमान करतील
आणि त्याभोवतालची गावेसुद्धा कायमची नाश पावतील."

[14]मी परमेश्वराकडून आलेला संदेश ऐकला
परमेश्वराने राष्ट्रांकडे दूत पाठविला. तो असा "तुमची
सैन्ये गोळा करा. लढायला सज्ज व्हा. अदोमकडे कूच
करा.

[15]"अदोम, मी तुला राष्ट्रांमध्ये क्षुद्र बनवीन. प्रत्येकजण
तुझा तिरस्कार करील.

[16]अदोम, तू दुसऱ्या राष्ट्रांना घाबरविलेस! म्हणून तू
स्वत:ला श्रेष्ठ समजलास! पण तू मूर्ख बनलास! तुझ्या
गर्वाने तुला फसविले. अदोम, तू डोंगरात उंचावर राहतोस
मोठ्या दगडधोंड्यांनी सुरक्षित केलेल्या जागी तू राहतोस
पण जरी तू गरूडाच्या घरट्याप्रमाणे उंच घर बांधलेस तरी
मी तुला पकडून खाली खेचून आणीन." परमेश्वराने ह्या
गोष्टी सांगितल्या

[17]अदोमचा नाश होईल. लोकांना ते पाहून धक्का बसेल.
नाश झालेली शहरे पाहून लोक चकित होऊन सुस्कारे
सोडतील.

[18]सदोम, गमोरा त्याभोवतालची गावे यांच्याप्रमाणे
अदोमचा नाश होईल. तेथे कोणीही राहणार नाही." देव
असे म्हणाला,

[19]"यार्देन नदीजवळच्या दाट झुडुपातून कधीतरी सिंह
येईल व तो, लोक शेतात जेथे मेंढ्या, व गुरे ठेवतात, तेथे
जाईल. मी त्या सिंहा सारखाच आहे. मी अदोमला जाईन
आणि त्या लोकांना घाबरवीन. मी त्यांना पळून जायला
भाग पाडीन, त्यांचा एकही तरुण मला थांबवू शकणार
नाही. कोणीही माझ्यासारखा नाही. कोणीही मला आव्हान

देणार नाही. त्यांचा कोणीही मेंढपाळ (नेता) माझ्या विरोधात उभा राहणार नाही."

20म्हणून अदोमच्या लोकांसाठी परमेश्वराने आखलेला बेत काय आहे तो ऐका: तेमानच्या लोकांचे काय करायचे ते परमेश्वराने ठरविले आहे. ते काय ठरविले आहे तेही ऐका. शत्रू अदोमच्या कळपातून (लोकांतून) लहान लेकरांना ओढून नेईल. त्यांनी केलेल्या कृत्यांमुळे अदोमच्या कुरणे ओसाड बनतील.

21अदोमच्या पडण्याच्या आवाजाने धरणी हादरेल.त्याचा आक्रोश तांबड्या समुद्रापर्यंत ऐकू जाईल.

22हेरलेल्या सावजावर घिरट्या घालणाऱ्या गरूडाप्रमाणे परमेश्वर आहे. परमेश्वर, गरुडाप्रमाणे, आपले पंख बसऱ्यावर पसरेल. त्या वेळी अदोमचे सैनिक फार भयभीत होतील प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे शूर सैनिक भीतीने रडतील.

## दिमिष्काबद्दल संदेश

23हा संदेश दिमिष्क शहरासाठी आहे.

'हमाथ व अर्पाद ही गावे घाबरली आहेत वाईट बातमी ऐकल्याने ती घाबरलीत. त्यांचा धीर खचला आहे. ते चिंताग्रस्त झाले आहेत आणि भयभीतही

24दिमीष्क दुबळे झाले आहे. लोकांना पळून जायचे आहे. लोक भीतिग्रस्त होण्याच्या बेतात आहेत. प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे लोकांना यातना व वेदना होत आहेत.

25"दिमिष्क एक सुखी नगरी होती. लोकांनी अजून ती 'मौजेची नगरी' सोडलेली नाही.

26म्हणून तरूण त्या नगरीतील सार्वजनिक स्थळी मरतील. त्या वेळी तिचे सर्व सैनिक मारले जातील." सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या

27"मी दिमिष्काच्या तटबंदीला आग लावीन. ती बेन-हदादचे मजबूत गड पूर्णपणे बेचिराख करील."

## केदार व हसोरसाठी संदेश

28हा संदेश केदारच्या कुळांसाठी व हासोरच्या राज्यकर्त्यांसाठी आहे. बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने त्यांचा पराभव केला.

परमेश्वर म्हणतो. "जा आणि केदारच्या कुळांवर चढाई करा. पूर्वेच्या लोकांचा नाश करा.

29त्यांचे तंबू व कळप नेले जातील. त्यांचे तंबू व संपत्ती घेतली जाईल त्यांचा शत्रू त्यांचे उंट नेईल. लोक त्यांना ओरडून सांगतील. 'आमच्याभोवती काहीतरी भयंकर घडत आहे.'

30लवकर पळा! हासोरवासीयांनो, लपायला चांगली जागा शोधा." हा परमेश्वराचा संदेश आहे. "नबुखद्नेस्सरने तुमच्याविरुद्ध कट केला आहे. तुमचा पराभव करण्यासाठी त्याने हुशारीने बेत रचला आहे.

31आपण सुरक्षित आहोत अशी भावना असलेले एक राष्ट्र आहे. त्याला अतिशय सुरक्षित वाटते. त्याच्या रक्षणासाठी दरवाजे वा कुंपण नाही. त्यांच्याजवळ कोणी माणसे राहात नाहीत. परमेश्वर म्हणतो, 'त्या राष्ट्रांवर हल्ला करा.'

32शत्रू त्यांचे उंट व गुरांचे मोठे कळप चोरेल. ते लोक त्यांच्या दाढीच्या कडा कापतात.* मी त्यांना जगाच्या लांबच्या कोपऱ्यात पळून जायला लावीन. मी, त्यांच्यावर, सगळीकडून संकटे आणीन." हा परमेश्वराचा संदेश आहे.

33"हासोरला फक्त कोल्ह्यांची वस्ती होईल. तेथे कोणीही मनुष्यप्राणी राहणार नाही. ती जागा निर्जन होईल. तेथे कायमचे ओसाड वाळवंट होईल."

## एलामबद्दल संदेश

34यहूदाचा राजा सिद्कीया ह्याच्या कारकिर्दीच्या सुरवातीच्या काळात यिर्मया या संदेष्ट्याला परमेश्वराचा संदेश मिळाला. तो एलाम या राष्ट्राबाबत होता.

35सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "मी लवकरच एलामचे धनुष्य मोडीन. धनुष्य हे त्याचे सर्वांत सामर्थ्यशाली शस्त्र आहे.

36मी एलामच्या विरुद्ध चार वारे सोडीन. मी त्यांना आकाशाच्या चार कोपऱ्यातून सोडीन. जगाच्या पाठीवर जेथे चारी वारे पोहोचतील अशा ठिकाणी मी त्यांना पाठवीन. एलामचे लोक कैदी म्हणून प्रत्येक राष्ट्रांतून नेले जातील.

37एलामचे त्याच्या शत्रूसमोर मी तुकडे तुकडे करीन. जे लोक त्याला ठार करू इच्छितात, त्यांच्यासमोर मी एलामला मोडीन. मी त्यांच्यावर भयंकर संकटे आणीन. मी कित्ती रागावलो आहे, हे त्यांना दाखवून देईल." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

"एलामचा पाठलाग करायला मी तलवार पाठवीन. मी त्या सर्वांना ठार करेपर्यंत, ती त्यांचा पाठलाग करील.

38नियंत्रण करणे माझ्या हातात आहे, हे मी एलामला दाखवून देईन. मी राजा व त्याचे अधिकारी यांना ठार करीन." हा देवाचा संदेश आहे.

39"पण भविष्यात, मी एलामला परत आणीन आणि तिच्याबाबतीत चांगल्या गोष्टी घडतील असे करीन." हा परमेश्वराकडून आलेला संदेश आहे.

## बाबेलबद्दल संदेश

50 बाबेल व खास्दी ह्यांच्यासाठी परमेश्वराने पुढील संदेश दिला हा संदेश देवाने यिर्मयामार्फत दिला.

2"सर्व राष्ट्रांत घोषणा कर!झेंडा उंच उभारून संदेश दे. माझा सगळा संदेश दे आणि सांग 'बाबेल काबीज केला जाईल. बेल दैवताची फजिती होईल. मरदोख घाबरून

---

**ते लोक ... कापतात** यहूदी लोक अरबांप्रमाणे दाढी कापत नसत.

जाईल. बाबेलच्या मूर्तींची विटंबना केली जाईल.त्या भयभीत होतील.'

3उत्तरेकडचे राष्ट्र बाबेलवर चढाई करील. ते राष्ट्र बाबेलचे ओसाड वाळवंट करील. तेथे कोणीही राहणार नाही. माणसे व प्राणी, दोघेही, तेथून पळ काढतील'"

4परमेश्वर म्हणतो, "त्या वेळी इस्राएलचे व यहूदाचे लोक एकत्र येतील.ते एकत्र येऊन रडतील,आणि एकत्रितपणेच त्यांच्या परमेश्वर देवाचा शोध घेतील.

5ते सियोनची वाट विचारतील, व ते त्या दिशेने चालायला सुरवात करतील. लोक म्हणतील,'चला, आपण स्वत: परमेश्वराला जाऊन मिळू या अखंड राहणारा एक करार करू या. आपण कधीही विसरणार नाही असा करार करू या.'

6"माझे लोक चुकलेल्या मेंढराप्रमाणे आहेत. त्यांच्या मेंढपाळांनी (नेत्यांनी) त्यांना चुकीच्या मार्गाने नेले. त्यांना डोंगर टेकड्यांतून भटकायला लावले. ते त्यांच्या विश्रांतीची जागा विसरले.

7ज्यांना माझे लोक सापडले, त्यांनी त्यांना दुखवले, आणि ते शत्रू म्हणाले, 'आम्ही काहीही चूक केली नाही.' त्या लोकांनी परमेश्वराविरुद्ध पाप केले. परमेश्वरच खरा त्यांचे विश्रांतिस्थान होता. त्यांच्या वडिलांनी परमेश्वर देवावरच विश्वास ठेवला.

8"बाबेलपासून दूर पळा खास्द्यांची भूमी सोडा कळपाच्या पुढे चालणाऱ्या एडक्याप्रमाणे व्हा.

9मी उत्तरेकडून खूप राष्ट्रांना एकत्र आणीन. ते बाबेलविरुद्ध लढायला सज्ज होतील. उत्तरेकडचे लोक बाबेल काबीज करतील. ते बाबेलवर बाणांचा वर्षाव करतील. ते बाण, युद्धावरून रिकाम्या हाताने कधीच न परतणाऱ्या, सैनिकांप्रमाणे असतील.

10शत्रू खास्द्यांची सर्व संपत्ती घेतील. सैनिक त्यांना पाहिजे ते लुटून नेतील." परमेश्वरानेच ह्या गोष्टी सांगितल्या.

11"बाबेल, तू आनंदी व उल्हसित आहेस तू माझी भूमी घेतलीस. धान्यात शिरलेल्या गायीप्रमाणे तू नाचतेस. तू आनंदाने घोड्याप्रमाणे खिंकाळतेस

12"आता तुझी आई खजील होईल. तुला जन्म देणारी ओशाळवाणी होईल. बाबेल सर्व राष्ट्रांत क्षुद्र ठरेल. ती म्हणजे ओसाड, निर्जन वाळवंट होईल.

13परमेश्वर आपला क्रोध प्रकट करील, म्हणून तेथे कोणीही राहणार नाही. बाबेल संपूर्ण निर्जन होईल.

"बाबेल जवळून जाणारा प्रत्येकजण भयभीत होईल. बाबेलचा असा वाईट रीतीने नाश झालेला पाहून ते हळहळतील.

14"बाबेलविरुद्ध लढण्यास सज्ज व्हा. धनुर्धाऱ्यांनो बाबेलवर बाणांचा वर्षाव करा. त्यात कमतरता करू नका. बाबेलने परमेश्वराविरुद्ध पाप केले आहे.

15बाबेलला वेढा घातलेल्या सैनिकांनो जयघोष करा. बाबेलने शरणागती पत्करली आहे. तिची तटबंदी व बुरूज पाडले आहेत. परमेश्वर त्यांना योग्य तीच शिक्षा करीत आहे. तिच्या लायकीप्रमाणे, तुम्ही राष्ट्रांनी तिला शिक्षा द्यावी. तिने जसे इतर राष्ट्रांशी वर्तन, केले, तसेच तिच्याशी करा.

16बाबेलमधील लोकांना धान्य पेरू देऊ नका. त्यांना पीक काढू देऊ नका. बाबेलच्या सैनिकांनी खूप कैद्यांना त्यांच्या शहरात आणले. पण आता शत्रू सैनिक आले आहेत, त्यामुळे कैदी आपापल्या घरी परत जात आहेत. ते आपल्या देशांकडे धाव घेत आहेत.

17"सर्व देशभर पसरलेल्या मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे इस्राएल आहे. सिंहाने पाठलाग करून दूर पळवून लावलेल्या मेंढराप्रमाणे इस्राएल आहे. त्यांच्यावर प्रथम हल्ला करणारा सिंह म्हणजे अश्शूरचा राजा आणि त्याची हाडे मोडणारा अखेरचा सिंह म्हणजे बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर होय."

18म्हणून सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलचा देव म्हणतो, "मी लवकरच बाबेलच्या राजाला व त्याच्या देशाला शिक्षा करीन. अश्शुरच्या राजाला केली तशीच बाबेलच्या राजाला मी शिक्षा करीन.

19"मी इस्राएलला त्याच्या भूमीत परत आणीन. कर्मेलच्या डोंगरावर व बाशानच्या भूमीत वाढलेले धान्य तो खाईल व तृप्त होईल. एफ्राईम व गिलाद येथील टेकड्यांवर तो चरेल."

20परमेश्वर म्हणतो, "त्या वेळी, लोक, इस्राएलचे अपराध शोधण्याचे कसून प्रयत्न करतील. पण अपराध असणारच नाही. लोक यहूदाची पापे शोधण्याचे प्रयत्न करतील. पण त्यांना एकही पाप सापडणार नाही. का? कारण मी इस्राएलमधील व यहूदातील काही वाचलेल्या लोकांचे रक्षण करीन आणि त्यांनी पाप केले असले तरी त्यांना क्षमा करीन."

21परमेश्वर म्हणतो, "मराथाईमवर हल्ला करा. पकोडच्या लोकांवर चढाई करा. त्यांच्यावर हल्ला करा. त्यांना ठार करा. त्यांचा संपूर्ण नाश करा. माझ्या आज्ञेप्रमाणे करा.

22"युध्दाचा खणखणाट सर्व देशात ऐकू जाऊ शकेल. तो मोठ्या नाशाचा आवाज असेल.

23बाबेलला 'सर्व जगाचा हातोडा' असे म्हटले गेले. पण आता 'हातोड्याचे तुकडे तुकडे झाले आहेत इतर राष्ट्रापेक्षा बाबेलचा सर्वाधिक नाश झाला आहे.

24बाबेल, मी तुझ्यासाठी सापळा रचला, आणि तुला समजण्याआधीच तू पकडला गेलास.तू परमेश्वराविरुद्ध लढलास,म्हणून तू सापडलास व पकडला गेलास.

25परमेश्वराने आपले कोठार उघडले आहे. त्यांच्या क्रोधाची हत्यारे परमेश्वराने बाहेर आणली आहेत. खास्द्यांच्या देशात सर्वशक्तिमान परमेश्वर देवाला काम करायचे असल्याने त्याने ती हत्यारे बाहेर काढली आहेत.

26दूरवरून बाबेलवर चालून या. तिची धान्याची कोठारे फोडा. बाबेलचा संपूर्ण नाश करा. कोणालाही जिवंत सोडू नका. धान्याच्या राशीप्रमाणे प्रेतांच्या राशी घाला.

27बाबेलमधल्या सर्व तरुण बैलांना (पुरुषांना) ठार करा. त्यांची कत्तल होऊ द्या. त्यांच्या पराभवाची वेळ आली आहे. त्यांचे फार वाईट होईल. ही त्यांच्या शिक्षेची वेळ आहे.

28लोक बाबेलमधून बाहेर धावत आहेत. ते त्या देशातून सुटका करून घेत आहेत. ते सियोनला येत आहेत. परमेश्वराच्या कृत्याबद्दल ते प्रत्येकाला सांगत आहेत. बाबेलला योग्य अशी शिक्षा परमेश्वर करीत असल्याबद्दल ते सांगत आहेत. बाबेलने परमेश्वराचे मंदिर उद्ध्वस्त केले म्हणून आता परमेश्वर बाबेलचा नाश करीत आहे.

29"धनुर्धाऱ्यांना बोलवा. त्यांना बाबेलवर हल्ला करायला सांगा. त्यांना शहराला वेढा घालायला सांगा. कोणालाही पळू देऊ नका. तिने केलेल्या दुष्कृत्यांची परतफेड करा. तिने इतर राष्ट्रांशी जसे वर्तन केले, तसेच तिच्याशी करा. बाबेलने परमेश्वराला मान दिला नाही. इस्राएलच्या पवित्र परमेश्वराशी तिने उध्दटपणा केला.म्हणून बाबेलला शिक्षा करा.

30बाबेलच्या तरुणांना रस्त्यांत ठार केले जाईल. त्याच दिवशी तिचे सर्व सैनिक मरतील." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

31"बाबेल, तू फार गर्विष्ठ आहेस, आणि मी तुझ्या विरुद्ध आहे" आमचा प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर ह्या गोष्टी सांगतो. "मी तुझ्या विरुद्ध आहे, आणि तुझी शिक्षेची वेळ आली आहे.

32गर्विष्ठ बाबेल अडखळून पडेल. आणि तिला उठायला कोणीही मदत करणार नाही. तिच्यातील गावांत मी आग लावीन. ती आग तिच्याभोवतालच्या प्रत्येकाला भस्मसात करील."

33सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "इस्राएल व यहूदा येथील लोक गुलाम झाले आहेत. शत्रूने त्यांना पकडून नेले व तो इस्राएलला सोडणार नाही.

34पण परमेश्वर त्या लोकांना परत आणेल. त्याचे नाव आहे 'सर्वशक्तिमान परमेश्वर देव' तो समर्थपणे त्या लोकांचे रक्षण करील. त्यामुळे त्या देशाला विश्रांती मिळू शकेल. पण बाबेलच्या लोकांना विश्रांती मिळणार नाही."

35देव म्हणतो, "तलवारी, बाबेलवासीयांना ठार कर. बाबेलमधील राजाच्या अधिकाऱ्यांना व ज्ञानी लोकांना ठार कर.

36तलवारी, बाबेलच्या याजकांना आणि खोट्या संदेष्ट्यांना ठार मार, ते मूर्ख माणसांसारखे होतील. बाबेलच्या सैनिकांना ठार मार, ते सैनिक भीतीने गर्भगळीत झाले आहेत.

37तलवारी, बाबेलचे घोडे व रथ नष्ट कर. दुसऱ्या देशांतून आणलेल्या भाडोत्री सैनिकांना मार. ते सैनिक अतिशय घाबरलेल्या स्त्रियांप्रमाणे भयभीत होतील. तलवारी, बाबेलच्या संपत्तीचा नाश कर. ती संपत्ती लुटली जाईल.

38तलवारी, बाबेलच्या पाण्याला झळ पोहोचव. तेथील सर्व पाणी सुकून जाईल. बाबेलमध्ये पुष्कळ मूर्ती आहेत त्या मूर्ती बाबेलचे लोक मूर्ख असल्यांचे दर्शवितात. म्हणून त्या लोकांचे वाटोळे होईल.

39"पुन्हा कधीही बाबेलमध्ये मनुष्यवस्ती होणार नाही. जंगली, कुत्रे, शहामृग, आणि वाळवंटातील इतर प्राणी तेथे राहतील. पण कोणीही मनुष्यप्राणी तेथे पुन्हा कधीही राहणार नाही.

40देवाने सदोम, गमोरा आणि त्या भोवतालच्या गावांचा संपूर्ण नाश केला. ती ठिकाणे आता निर्जन झाली आहेत. त्याचप्रमाणे, बाबेलमध्येही कोणी राहणार नाही, आणि तेथे कोणीही वस्ती करायला जाणार नाही.

41"पाहा! उत्तरेकडून लोक येत आहेत. ते एका शक्तिशाली राष्ट्रांतून येत आहेत. सर्व जगातील पुष्कळ राजे एकत्र येत आहेत.

42त्यांच्या सैन्यांजवळ धनुष्यबाण व भाले आहेत. ते सैनिक क्रूर आहेत. त्यांच्याजवळ दया नाही. ते घोड्यांवर स्वार होऊन येतात. त्या घोड्यांच्या टापांचा आवाज समुद्राच्या गर्जनेप्रमाणे असतो. ते आपापल्या जागा घेऊन लढाईसाठी उभे ठाकतात. बाबेल नगरावर हल्ला करण्यासाठी ते सज्ज आहेत.

43बाबेलच्या राजाने ह्या सैन्याबद्दल ऐकले, आणि तो फारच घाबरला. भीतीने त्याचे हातपाय गळून गेले. प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे त्याला कष्ट झाले."

44परमेश्वर म्हणतो, "कधीतरी, यार्देन नदीजवळच्या दाट झुडुपांतून सिंह येईल,व तो शेतांतील गोठ्यांमध्ये जाईल. मग सर्व गुरे दूर पळून जातील. मी त्या सिंहासारखाच असेन. बाबेलच्या भूमीपासूनच मी बाबेलला हुसकून लावीन. ह्यासाठी मी कोणाची निवड करावी बरे? कोणीही माझ्यासारखा नाही. मला आव्हान देणाराही कोणी नाही. म्हणून मीच हे करीन. मला पळवून लावण्यास कोणीही मेंढपाळ येणार नाही. मी बाबेलच्या लोकांचा पाठलाग करीन."

45बाबेलसाठी परमेश्वराने काय बेत केला आहे तो ऐका. खास्द्यांसाठी परमेश्वराने काय करायचे निश्चित केले आहे ते ऐका. बाबेलच्या कळपातील (लोकांतील) लहान मुलांना शत्रू फरपटत नेईल. मग बाबेलच्या कुरणांचा संपूर्ण नाश होईल. ह्या घटनेमुळे बाबेलला धक्का बसेल.

46बाबेल पडेल, आणि त्यामुळे पृथ्वी हादरेल राष्ट्रांतील लोक बाबेलचा आक्रोश ऐकतील.

51 परमेश्वर म्हणतो, "मी जोरदार वादळ निर्माण करीन. त्या वादळाचा तडाखा बाबेलला व तिच्या लोकांना देईन.

2मी बाबेलची उफाणणी करण्यासाठी परदेशी लोक पाठवीन. ते बाबेलला पाखडून काढतील. ते बाबेलमधून सर्व काही नेतील सैन्य बाबेलला वेढा देईल. बाबेलमध्ये भयंकर संहार होईल.

3बाबेलच्या सैन्याला त्यांच्या धनुष्यबाणांचा उपयोग करता येणार नाही. त्यांना चिलखते चढवायलाही वेळ मिळणार नाही. बाबेलच्या तरुण पिढीबद्दल खेद करू नका. बाबेलच्या सैन्याचा नाश करा.

4बाबेलचे सैनिक खास्द्यांच्या भूमीत गारद केले जातील. बाबेलच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात जखमी केले जातील."

5सर्वशक्तिमान परमेश्वराने इस्राएलला व यहूदास, विधवेप्रमाणे टाकून दिलेले नाही. देवाने त्या लोकांचा त्याग केलेला नाही. उलटपक्षी, त्याच लोकांनी इस्राएलच्या एकमेव पवित्र परमेश्वराला सोडण्याचा गुन्हा केला आहे. लोकांनी परमेश्वराला सोडले. पण देवाने काही त्या लोकांना दूर लोटले नाही.

6स्वतःचा जीव वाचविण्यासाठी बाबेलमधून दूर पळून जा. बाबेलच्या पापांबद्दल, मागे राहून, स्वतःवर मरण ओढवून घेऊ नका. त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल त्यांना परमेश्वराने सजा देण्याची वेळ आता आली आहे. बाबेलला योग्य अशीच सजा मिळेल.

7बाबेल म्हणजे जणू काही परमेश्वराच्या हातातील सोन्याचा प्याला होता. बाबेलने सर्व जगाला मद्य पाजले. राष्ट्रांनी बाबेलचे मद्य प्यायले आणि ते खुळे झाले.

8पण बाबेलचे अकस्मात पतन होईल आणि त्याची शकले पडतील. तिच्यासाठी शोक करा. तिच्या दुःखावर इलाज करा. कदाचित् तिच्या जखमा भरून येतील.

9आम्ही बाबेलला सुधारण्याचा प्रयत्न केला, पण ती पूर्वपदावर येणे शक्य नाही, तेव्हा आपण तिला सोडून आपापल्या देशात जाऊ या. स्वर्गातील देव बाबेलच्या शिक्षेबद्दल आणि भवितव्याबद्दल निर्णय घेईल.

10परमेश्वराने आपल्याला न्याय दिला.आपण त्याबद्दल सियोनमध्ये सांगू या. आपल्या परमेश्वर देवाने घडवून आणलेल्या गोष्टींबद्दल आपण बोलू या.

11बाण धारदार करा! ढाली घ्या. परमेश्वराला मेद्यांच्या राजाकडून बाबेल नष्ट करायचे होते, म्हणून त्याने त्यांना स्फूर्ती दिली. बाबेलच्या लोकांना योग्य अशी शिक्षा परमेश्वर करील. बाबेलच्या सैन्याने यरुशलेममधील परमेश्वरा चे मंदिर उध्वस्त केले. त्याबद्दल परमेश्वर त्यांना यथायोग्य शिक्षा करील.

12बाबेलच्या तटासमोर झेंडा उभारा. जास्ती रक्षक आणा. पहारेकऱ्यांना त्यांच्या जागी उभे करा. छुपा हल्ला करण्याची तयारी करा. परमेश्वर, त्याने ठरविल्याप्रमाणे, करील. बाबेलच्या लोकांविरुद्ध, त्याने सांगितल्याप्रमाणे, तो कारवाई करील.

13बाबेल, तू भरपूर पाण्याच्या ठिकाणी वसली आहेस. तुझ्याकडे भरपूर संपत्ती आहे. पण राष्ट्र म्हणून तुझा शेवट जवळ आला आहे. तुझा नाश करण्याची हीच वेळ आहे.

14सर्वशक्तिमान परमेश्वराने स्वतःच्या नावाने पुढील वचन दिले, "बाबेल, मी तुझ्यात मोठ्या प्रमाणात शत्रू सैन्य पेरीन. एखाद्या टोळ धाडीप्रमाणे असणारे हे सैन्य तुझ्याविरुध्दची लढाई जिंकेल. आणि तुझ्या भूमीवर उभे राहून ते जयघोष करील."

15परमेश्वराने आपली महान शक्ती वापरून ही पृथ्वी निर्माण केली. त्याने आपले ज्ञान वापरून जगाची उभारणी केली. आपल्या आकलन शक्तीने त्यावर आकाश पांघरले.

16जेव्हा परमेश्वर गरजतो, तेव्हा आकाशात ढगांचा गडगडाट होतो तो पृथ्वीवर सर्वत्र ढग पाठवितो पावसाबरोबर वीज पाठवित तो आपल्या कोठारातून वारा आणतो.

17पण लोक इतके मूर्ख असतात की देवाने काय केले ते जाणत नाहीत. कुशल कारागीर खोट्या दैवतांच्या मूर्ती करतात. त्या मूर्ती खोट्याच असतात. त्या म्हणजे कारगिराच्या मूर्खपणाचे प्रतीक होय. त्या मूर्ती काही जिवंत नसतात.

18त्या मूर्ती कवडीमोलाच्या आहेत. लोकांनी घडविलेल्या त्या मूर्ती म्हणजे भ्रम आहे. त्यांच्या न्यायनिवाड्याचा दिवस उजाडेल, आणि त्यांचा नाश केला जाईल.

19पण याकोबाचा अंश (देव) त्या टाकाऊ पुतळ्यांसारखा नाही. लोकांनी देवाला निर्माण केले नसून, देवाने त्या लोकांना निर्माण केले. प्रत्येक गोष्टीचा निर्माता तोच एकमेव आहे. त्याचे नाव आहे सर्वशक्तिमान परमेश्वर.

20परमेश्वर म्हणतो, "बाबेल, तू माझा दंडुका आहेस तुझा उपयोग मी राष्ट्रांची शकले व राज्यांचा नाश करण्यासाठी केला.

21तुझा उपयोग मी घोडे आणि स्वार, रथ आणि सारथी ह्यांचा नाश करण्यासाठी केला.

22पुरुष आणि स्त्रिया वृद्ध आणि तरुण, तरुणी यांचा नाश करण्यासाठी मी तुझा उपयोग केला.

23मेंढपाळ व कळप, शेतकरी आणि गाई, राज्यकर्ते व महत्वाचे अधिकारी यांचा नाश करण्यासाठी मी तुझा उपयोग केला.

24पण मी बाबेलचे व तेथील लोकांचे उट्टे काढीन. त्यांनी सियोनमध्ये जी दुष्कृत्ये केली, त्याचे परिणाम मी त्यांना भोगायला लावीन. यहूदा, तुझ्या लक्षात येईल, असे शासन मी त्यांना करीन." असे परमेश्वर म्हणाला,

25परमेश्वर म्हणतो, "बाबेल तू एखाद्या विनाशकारी पर्वताप्रमाणे आहेस, आणि मी तुझ्याविरुद्ध आहे. तू सर्व देशाचा नाश केलास, आणि मला ते आवडले नाही. मी माझ्या हाताच्या बळाने तुला कड्यांवरून लोटून देईन. आणि बेचिराख झालेल्या पर्वताप्रमाणे मी तुझी स्थिती करीन.

26इमारतींच्या पायासाठी लोक बाबेलमधून एकही दगड घेणार नाहीत. कोनाशिलेला लागणारा मोठा चिरा

लोकांना मिळणार नाही का? कारण तुमची नगरी म्हणजे पडीक दगडधोंड्यांचा कायमचा खच असेल." परमेश्वराने हे सांगितले.

27"देशात युद्धाचे निशाण उभारा! सर्व राष्ट्रांमध्ये कर्णा फुंका. बाबेलविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रांना सज्ज करा. अरारात, मिन्नी, आष्कनाज या राज्यांना बाबेलवर चढाई करण्यासाठी बोलवा. तिच्याविरुद्ध लढणाऱ्या सैन्याच्या सेनापतीची निवड करा. टोळधाडीप्रमाणे घोडे पाठवा.

28बाबेलविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रांची सिद्धता करा. मेद्यांच्या राजांना सज्ज करा. त्यांच्या अधिपतींना आणि अधिकाऱ्यांना लढण्यासाठी तयार करा. बाबेलच्या अंमलाखालच्या सर्व देशांना बाबेलच्या विरुद्ध लढण्यास सिद्ध करा.

29वेदना होत असल्याप्रमाणे भूमी कापते व हालते. बाबेलबद्दल परमेश्वराने ठरविलेला बेत परमेश्वराने सिद्धीस नेताच भूमी कंप पावेल. बाबेलचे निर्जन वाळवंटात रूपांतर करण्याचा देवाचा बेत आहे. तेथे कोणीही राहणार नाही.

30बाबेलच्या सैनिकांनी लढाई थांबवली आहे. ते त्यांच्या किल्ल्यांतच राहिले आहेत. त्यांची शक्ती संपली आहे ते बायकांप्रमाणे घाबरून गेले आहेत. बाबेलमधील घरे जळत आहेत. तिच्या वेशीच्या दारांचे अडसर मोडले आहेत.

31एका दूतामागून दुसरा दूत येतो. दूतामागून दूत येतात. ते बाबेलच्या राजाला संपूर्ण शहर काबीज केले गेल्याचे सांगतात.

32नदीचे उतार शत्रूच्या ताब्यात गेले आहेत. पाणथळ प्रदेश जळत आहेत. बाबेलचे सर्व सैनिक घाबरले आहेत."

33सर्वशक्तिमान परमेश्वर, इस्राएलच्या लोकांचा देव म्हणतो, "बाबेल म्हणजे जणू काही खळे आहे. सुगीच्या वेळी लोक फोलकटापासून दाणे वेगळे करण्यासाठी धान्य झोडपतात. आणि बाबेलला झोडपण्याची वेळ लवकरच येत आहे."

34सियोनचे लोक म्हणतील, "बाबेलच्या राजा नबुखद्नेस्सरने पूर्वी आमचा नाश केला. पूर्वी त्याने आम्हाला दुखावले. त्याने आमचे लोक नेले,व त्यामुळे आमची स्थिती रिकाम्या रांजणासारखी झाली. आमच्याजवळचे जेवढे चांगले, तेवढे त्याने नेले, आणि आम्हाला दूर फेकून दिले. तो पोट भरेपर्यंत आम्हाला खाणाऱ्या एखाद्या प्रचंड राक्षसासारखा होता.

35आम्हाला दुखविण्यासाठी बाबेलने भंयकर गोष्टी केल्या. आता त्याची परतफेड करण्याची आमची इच्छा आहे." सियोन मध्ये राहणारे लोक असे म्हणाले.

"आमच्या लोकांना मारण्याचा अपराध बाबेलच्या लोकांनी केला आहे. त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल त्यांना आता सजा मिळत आहे." यरुशलेम नगरी अशी म्हणाली.

36म्हणून परमेश्वर म्हणतो, "यहूदा, मी तुझे रक्षण करीन. बाबेलला शिक्षा होईल ह्याची मी दक्षता घेईन. मी बाबेलचा समुद्र आटवीन आणि तिचे जलस्रोत सुकवून टाकीन.

37बाबेल म्हणजे पडक्या इमारतींची रास होईल. जंगली कुत्रेच तेथे राहतील. लोक ती दगडधोंड्यांची रास पाहून चकित होतील. बाबेलचा विचार त्यांच्या मनात येताच ते हळहळतील. बाबेल अगदी निर्जन होईल.

38"बाबेलचे लोक गुरगुरणाऱ्या सिंहाच्या छाव्यासारखे आहेत. ते छाव्याप्रमाणे गुरगुरतात.

39ते शक्तिवान सिंहासारखे वागत आहेत. मी त्यांना मेजवानी देईन. मी त्यांना मद्य प्यायला लावीन. ते हसतील व मजा करतील. मग मात्र ते कायमचे झोपी जातील. ते पुन्हा कधीच उठणार नाहीत." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

40"बाबेल, मरणाची वाट पाहणाऱ्या शेळ्या, मेंढ्या, एडके ह्यांच्याप्रमाणे, असेल. मी त्यांना त्यांची कत्तल करण्यासाठी घेऊन जाईन.

41"शेशखचा" पराभव होईल. सर्व जगातील अत्युत्तम व गर्विष्ठ देशाला कैदी बनवले जाईल. दुसऱ्या राष्ट्रांतील लोक बाबेलकडे पाहून भयभीत होतील. कारण बाबेलला उध्वस्त होताना त्यांनी पाहिले होते.

42समुद्र बाबेलवर पसरेल.त्याच्या गरजणाऱ्या लाटा बाबेलला झाकून टाकतील.

43बाबेलमधील गावांचा नाश होईल आणि ती ओसाड बनतील. बाबेल एक रूक्ष वाळवंट होईल. तो निर्जन होईल. लोक ह्या भूमीतून नुसता प्रवाससुध्दा करणार नाहीत.

44बाबलेमधील बेल या दैवताला मी शिक्षा करीन. मी, त्यांने गिळलेल्यांना, त्याला ओकायला लावीन. बाबेलची तटबंदी पडेल, आणि इतर राष्ट्रे बाबेलकडे येणार नाहीत.

45माझ्या लोकांनो, बाबेलच्या शहरातून बाहेर या. जीव वाचविण्यासाठी पळा. परमेश्वराच्या कोपापासून दूर पळा.

46"माझ्या माणसांनो, भिऊ नका. अफवा पसरतील, पण घाबरू नका. एक अफवा ह्या वर्षी तर दुसरी पुढल्या वर्षी येईल. देशातील भयानक युध्दाबद्दल अफवा पसरतील. राजांच्या एकमेकांविरुद्ध चाललेल्या लढाईबद्दल वावड्या उठतील.

47बाबेलच्या दैवतांना शिक्षा करण्याची व संपूर्ण बाबेल देशाला लज्जित होण्याची, वेळ नक्कीच येईल. त्या शहराच्या रस्त्यांवर खूप प्रेते पडलेली असतील.

48मग आकाश व पृथ्वी जयघोष करील. कारण उत्तरेकडून बाबेलविरुद्ध लढण्यासाठी सैन्य येईल." परमेश्वरच असे म्हणाला,

49"बाबेलने इस्राएलच्या लोकांना ठार केले. पृथ्वीवरच्या प्रत्येक प्रदेशातील लोकांना बाबेल देशाने ठार मारले. म्हणून बाबेलचे पतन झालेच पाहिजे.

50तुम्ही लोकांनी तलवारीला चुकविले.तुम्ही घाई करून बाबेल सोडला पाहिजे. वाट पाहू नका.

तुम्ही दूरदेशी आहात. पण तुम्ही जेथे आहात, तेथून परमेश्वराचे स्मरण करा, आणि यरुशलेमची आठवण ठेवा.

51"आम्ही, यहूदाचे लोक लज्जित झालो आहोत. आमचा अपमान झाला आहे. का? कारण परके परमेश्वराच्या मंदिरातील पवित्र ठिकाणी गेले आहेत."

52परमेश्वर म्हणतो, "बाबेलमधील मूर्तींना शिक्षा करण्याची वेळ येत आहे.त्या वेळी, देशात सर्व ठिकाणी जखमी लोक यातनेने तळमळतील.

53कदाचित् बाबेल आकाशाला टेकेपर्यंत वाढली असती. बाबेलने आपले किल्ले मजबूत केले असते. पण मी तिच्याविरुद्ध लढण्यास माणसे पाठवीन, आणि ते तिचा नाश करतील." परमेश्वर असे म्हणाला,

54"बाबेलमध्ये लोक रडताना आपण ऐकू शकतो. लोक तेथील वस्तूंचा नाश करीत असल्याचे आपण ऐकतो.

55लवकरच परमेश्वर बाबेलचा नाश करील.त्या शहरातील कोलाहल तो शांत करील. लाटांच्या गर्जनेप्रमाणे गर्जना करीत शत्रू येतील. आजूबाजूचे लोक त्या गर्जना ऐकतील.

56सैन्य येईल व बाबेलचा नाश करील. बाबेलचे सैनिक पकडले जातील. त्यांची धनुष्ये मोडली जातील. का? कारण लोकांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल परमेश्वर त्यांना शिक्षा करतो. त्यांच्या पात्रतेनुसार परमेश्वर त्यांना पूर्ण शिक्षा करतो.

57बाबेलमधील ज्ञानी, महत्वाचे अधिकारी, राज्यपाल, इतर अधिकारी आणि सैनिक यांना मी मद्य पाजून झिंगायला भाग पाडीन. मग ते कायमचे झोपी जातील. परत कधीही उठणार नाहीत." राजा असे म्हणाला. त्या राजाचे नाव सर्वशक्तिमान परमेश्वर.

58सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "बाबेलची जाड मजबूत तटबंदी जमीनदोस्त केली जाईल. तिची उंच प्रवेशद्वारे जाळली जातील. बाबेलचे लोक खूप मेहनत करतील पण त्याचा काही उपयोग होणार नाही. शहर वाचविण्याच्या प्रयत्नात ते पार दमून जातील. ते सरपणाप्रमाणे होतील."

## यिर्मया बाबेलला संदेश पाठवितो

59सारया ह्या अधिकाऱ्याला यिर्मयाने पुढील संदेश दिला. सारया नेरीयाचा मुलगा होय व नेरीया हा मासेयाचा मुलगा होय. यहूदाचा राजा सिद्कीया ह्याच्याबरोबर सारया, सिद्कीयाच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी, बाबेलला गेला. त्याच वेळी, सारयाला यिर्मयाने संदेश दिला. 60यिर्मयाने बाबेलमध्ये घडून येणाऱ्या सर्व भयानक गोष्टी एका पटावर लिहिल्या होत्या.

61यिर्मया सारयाला म्हणाला, "सारया, बाबेलला जा. सर्व लोक हा संदेश ऐकतील अशी खात्री करून घेऊन तो वाच. 62मग म्हण, 'हे देवा, बाबेलचा नाश करीन असे तू म्हणालास तू तिचा नाश करशील. मग तेथे कोणी मनुष्यप्राणी वा पशू राहणार नाही ती जागा सदाकरिता ओसाड भग्नावशेष होईल.' 63हा संदेश वाचून संपताच पटाला एक दगड बांध. नंतर हा पट फरात नदीत फेकून दे. 64मग असे म्हण 'बाबेल बुडेल पुन्हा ती कधीही वर येणार नाही. कारण मी तिच्यावर भयंकर संकटे आणीन.' आणि बाबेलचे लोक थकून जातील."

येथे यिर्मयाचे बोलणे संपले.

## यरुशलेमचे पतन

52 सिद्कीया त्याच्या वयाच्या 21 व्या वर्षी यहूदाचा राजा झाला. त्याने 11 वर्षे यरुशलेमवर राज्य केले. त्याच्या आईचे नाव हमूटल. ती यिर्मयाची मुलगी होती. तिचे घराणे लिब्ना येथील होते. 2यहोयाकिम राजाप्रमाणेच सिद्कीयाने दुष्कृत्ये केली. हे परमेश्वराला आवडले नाही. 3परमेश्वराचा कोप ओढवून घेतल्याने यरुशलेम व यहूदामध्ये भयंकर गोष्टी घडल्या. शेवटी परमेश्वराने यरुशलेम व यहूदा येथील लोकांना आपल्या दृष्टीसमोरून दूर केले.

सिद्कीया बाबेलच्या राजाच्या विरोधात गेला. 4म्हणून सिद्कीयाच्या कारकिर्दीच्या नवव्या वर्षाच्या दहाव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी बाबेलचा राजा नबुखद्नेस्सरने यरुशलेमवर चाल केली. त्याने आपले सर्वच्या सर्व सैन्य बरोबर घेतले. त्या सैन्याने यरुशलेमच्या बाहेर तळ ठोकला. मग यरुशलेमचा तट ओलांडून जाण्यासाठी त्यांनी तटाभोवती उतरंडी तयार केल्या. 5सिद्कीया राजाच्या कारकिर्दीच्या अकराव्या वर्षापर्यंत बाबेलच्या सैन्याने यरुशलेमला वेढा घातला. 6सहाव्या वर्षाच्या चौथ्या महिन्याच्या नवव्या दिवशी उपासमारीचा कहर झाला. नगरीतल्या लोकांसाठी अन्नाचा कण नव्हता. 7सातव्या दिवशी, बाबेलचे सैन्य यरुशलेममध्ये घुसले. यरुशलेमचे सैनिक पळून गेले. त्यांनी रात्रीच्या वेळी नगर सोडले. दोन भिंतींच्या मधल्या दारातून ते पळून गेले. ते दार राजाच्या बागेजवळ होते. बाबेलच्या सैन्याने वेढा घातला असतानासुद्धा ते सैनिक वाळवंटाकडे पळाले.

8पण बाबेलच्या सैन्याने सिद्कीया राजाचा पाठलाग केला. त्यांनी सिद्कीयास यरीहोच्या मैदानात गाठले. सिद्कीयाचे सर्व सैनिक पळून गेले. 9बाबेलच्या सैन्याने सिद्कीयाला पकडले मग त्यांनी त्यास रिब्ला येथे बाबेलच्या राजाकडे नेले. रिब्ला शहर हमाथ देशात आहे. बाबेलच्या राजाने, रिब्ला येथे, सिद्कीया राजाला शिक्षा ठोठावली. 10रिब्लामध्येच बाबेलच्या राजाने सिद्कीयाच्या मुलांना मारले आणि सिद्कीयाला मुद्दाम ते पाहायला लावले. यहूदाच्या सर्व अधिकाऱ्यांनाही त्याने ठार केले. 11मग

बाबेलच्या राजाने सिद्कीयाने डोळे काढले. मग त्याला
बेड्या घालून बाबेलला नेले. तेथे त्याने सिद्कीयाला तुरुंगात
टाकले. सिद्कीया मरेपर्यंत तुरुंगातच होता.
12बाबेलच्या राजाच्या खास रक्षकांचा प्रमुख नबूजरदान
हा, नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या 19 व्या वर्षीच्या
पाचव्या महिन्याच्या दहाव्या दिवशी, यरुशलेमला आला.
नबूजरदान बाबेलमधील एक महत्वाचा अधिकारी होता.
13नबूजरदानने परमेश्वराचे मंदिर जाळले. त्याने राजवाडा
व यरुशलेममधील इतर घरेही जाळली. त्याने तेथील सर्व
महत्वाच्या इमारती बेचिराख केल्या. 14बाबेलच्या सैन्याने
यरुशलेमची तटबंदी पाडली. त्या सैन्याचा सेनापती राजाच्या
खास रक्षकांचा प्रमुख होता. 15सेनापती नबूजरदानने
यरुशलेममध्ये अजूनही राहत असलेल्या* सर्व लोकांना
कैदी म्हणून नेले. बाबेलच्या राजाला आधीच शरण
आलेल्यांनाही तो घेऊन गेला. यरुशलेममध्ये मागे राहिलेले
कुशल कारागीरही त्याने बरोबर नेले. 16पण नबूजरदानने
काही अगदी गरीब लोकांना द्राक्षमळ्यांत व शेतांत काम
करण्यासाठी मागेच ठेवले.

17–18बाबेलच्या सैन्याने मंदिरातील पितळी खांब,
घंगाळ व बैठकी* मोडल्या. त्यांनी ते सर्व पितळ बाबेलला
नेले. त्याचबरोबर पात्रे, फावडी, वात सारखी करण्याच्या
कात्र्या, वाडगे, तसराळी आणि मंदिरातील पूजेची
उपकरणेही नेली. 19राजाच्या खास रक्षकांच्या प्रमुखाने
कुंडे, विस्तव ठेवण्याची पात्रे, वाडगे, पात्रे, दीपदाने, तसराळी
आणि अर्पण केलेली पेयार्पणे ठेवण्याचे प्याले अशा सर्व
वस्तू नेल्या. थोडक्यात त्याने चांदी सोन्याच्या सर्व वस्तू
नेल्या. 20दोन खांब, घंगाळ, त्याखालील बारा बैल व
सरकत्या बैठकी अतिशय जड होत्या. शलमोन राजाने
त्या परमेश्वराच्या मंदिरासाठी बनविल्या होत्या. ह्या
वस्तूंसाठी वापरलेल्या पितळाचे वजन करणे अशक्य
होते. 21प्रत्येक खांब 31 फूट उंच होता. त्याचा घेर 21
फूट होता–हे खांब पोकळ होते. खांबाचा पत्रा 4 इंच
जाडीचा होता. 22पहिल्या खांबाचा पितळेचा कळस 8 फूट
उंच होता. जाळीकाम व चारी बांजूनी डाळिंबे कोरून तो
सुशोभित केलेला होता. दुसऱ्या खांबावरही डाळिंबे
कोरलेली होती. तो पहिल्या खांबासारखाच होता.
23खांबांच्या बाजूंवर 96 डाळिंबे कोरलेली होती. खांबाच्या
भोवती असलेल्या जाळीकामावर सर्व मिळून 100 डाळिंबे
होती.

24राजाच्या खास रक्षकांच्या प्रमुखाने सराया व सफन्या
यांना कैद करून नेले. सराया महायाजक होता, तर सफन्या
दुय्यम महायाजक होता. तीन द्वारपालांनाही कैदी म्हणून
नेले 25राजाच्या खास रक्षकांच्या प्रमुखाने सैनिकांवर
नेमलेला अधिकारी, तोपर्यंत नगरात असलेले राजाचे
सात सल्लागार, सैन्यात भरती होणाऱ्यांची नोंद ठेवणारा
लेखनिक, आणि नगरात असलेले साठ सामान्य लोक
यांना कैद केले. 26–27सेनापती नबूजरदानने ह्या सर्व
अधिकाऱ्यांना बाबेलच्या राजाकडे आणले बाबेलचा राजा
तेव्हा रिब्ला शहरात होता. रिब्ला हमाथ देशात आहे.
रिब्लामध्ये राजाने त्या सर्वांना ठार करण्याचा हुकूम
दिला.

अशा तऱ्हेने यहूदी लोकांना त्यांच्या देशातून नेले
गेले. 28आणि अशाप्रकारे नबुखद्नेस्सरने त्यांना कैद
केले

नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या 7 व्या वर्षी 3023
यहूदी लोकांना यहूदातून पकडून नेले.
29नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या 18 व्या वर्षी
832 लोकांना यरुशलेममधून नेले.
30नबुखद्नेस्सरच्या कारकिर्दीच्या 23 व्या वर्षी
नबूजरदानने 745 लोकांना कैद केले. तो राजाच्या
खास रक्षकांचा प्रमुख होता. एकूण 4600 लोकांना
कैदी म्हणून नेण्यात आले.

## यहोयाकीनची मुक्तता

31यहूदाचा राजा यहोयाकीन हा 37 वर्षे बाबेलच्या तुरुंगात
होता. त्याच्या तुरुंगवासाच्या 37 व्या वर्षी बाबेलचा राजा
अवीलमरदोख ह्यास त्याची दया आली व त्याने त्याची
मुक्तता केली. त्याच वर्षी अवील–मरदोख गादीवर बसला
होता. त्याने 12व्या महिन्याच्या 25व्या दिवशी यहोयाकीमची
सुटका केली. 32अवील–मरदोख यहोयाकीमशी गोड
बोलला. त्याच्याबरोबर बाबेलमध्ये असलेल्या इतर
राजांहून त्याने यहोयाकीमला सन्मानाची जागा दिली.
33म्हणून यहोयाकीनने कैद्याचा पोशाख उतरविला
उरलेल्या आयुष्यात त्याने नेमाने राजाबरोबर भोजन केले.
34यहोयाकीनच्या मृत्यूपर्यंत प्रत्येक दिवशी बाबेलचा राजा
त्याला भत्ता देत असे.

---

**यरुशलेममध्ये ... असलेल्या** ही ओळ प्राचीन ग्रीक भाषांतरातून घेतली आहे. हिब्रूमध्ये ह्या ओळीपूर्वी ‘काही अगदी गरीब लोक’ असे शब्द आहेत. ते चुकून पुढच्या ओवीतून घेतले गेले असावेत.

**मंदिरातील ... बैठकी** ह्या ओव्यांत देवाच्या मंदिरातून बाबेलच्या सैन्याने नेलेल्या सामानाची यादी दिली आहे. सामानाच्या वर्णनाकरिता 1 राजा 77:13 ते 26 पाहावे.

# विलापगीत

### यरुशलेम तिच्या नाशाबद्दल रडते

1 एके काळी यरुशलेम लोकांनी गजबजलेली नगरी
होती. पण आता ती अगदी ओसाड झाली आहे. यरुशलेम
जगातील मोठ्या नगरांमधील एक होती.पण आता ती
विधवेप्रमाणे झाली आहे.एके काळी ती नगरांमधील
राजकुमारी होती. पण आता तिला दासी केले गेले आहे.
2रात्री ती खूप दु:काने रडतेतिच्या गालांवर अश्रु
ओघळतात.पण तिचे सांत्वन करणारे कोणीही नाही. खूप
राष्ट्रांशी तिची मैत्री होती.पण आता तिचे दु:ख हलके
करणारे कोणीही नाही.तिच्या सर्व मित्रांनी तिच्याकडे पाठ
फिरविली.तिचे मित्रच तिचे शत्रू झाले.
3यहूदाने फार सोसले.नंतर यहूदाला कैद करून
परमुलुखांत नेले गेले.यहूदा इतर राष्ट्रांमध्ये जगते,पण
तिला आराम मिळाला नाही.तिचा पाठलाग करणाऱ्यांनी
तिला पकडले.अरूंद दरीत त्यांनी तिला गाठले.
4सियोनचे रस्ते दु:खी आहेतकारण आता पूर्वकाळासाठी
कोणीही कधीही सियोनकडे येत नाही. सियोनची सर्व दारे
नष्ट केली गेली.तिचे याजक उसासे टाकतात. तिच्या
तरुणींना पकडून नेले आहे ह्या सर्वामुळे ती दु:खी कष्टी
झाली आहे.
5यरुशलेमच्या शत्रूंची जीत झाली आहे. त्यांना यश
मिळाले आहे. परमेश्वराने तिला शिक्षा केली म्हणून
असे झाले. त्याने यरुशलेमच्या पापांबद्दल तिला शिक्षा
केली. तिची मुले दूर निघून गेली. त्यांचे शत्रू त्यांना
पकडून घेऊन गेले.
6सियोनकन्येचे सौंदर्य सरले. तिचे राजपुत्र हरणांसारखे
झाले, चरण्यासाठी कुरण नसणाऱ्या हरणांसारखे ते
झाले.ते हतबल होऊन पळाले. त्यांचा पाठलाग
करणाऱ्यांपासून ते लांब पळाले.
7यरुशलेम मागचा विचार करते. यरुशलेमला ती
दुखावली गेल्याची व बेघर झाल्याची आठवण आहे.
पूर्वी तिच्याजवळ असलेल्या चांगल्या गोष्टींचे तिला स्मरण
आहे. तिच्या लोकांना शत्रूने पकडल्याचे तिला स्मरते
तिला मदत करणारे कोणीही नव्हते हेही तिला आठवते.
तिचे शत्रू तिला पाहताच हसले. कारण तिचा नाश
झाला.
8यरुशलेमने फार पाप केले. तिच्या पापांमुळेच ती
भग्नावशेष रुपात उरली. लोकांनी पाहून चुकचुकावे असेच
ते रूप होय. पूर्वी लोकांनी तिचा आदर केला. पण आता
तेच तिचा तिरस्कार करतात. त्यानी तिची निर्भर्त्सना
केली म्हणून ते आता तिची घृणा करतात. यरुशलेम
आता कण्हत आहे. ती तोंड फिरविते.
9यरुशलेमची वस्त्रे मळीन झाली. तिच्यावर बितणाऱ्या
गोष्टींची तिला कल्पना नव्हती. तिचे पतन विस्मयकारक
होते. तिचे सांत्वन करणारे कोणीही नव्हते. "हे परमेश्वरा,'
ती म्हणते, 'माझी दशा काय झाली आहे पाहा! माझा शत्रू
त्याच्या मोठेपणाचा कसा तोरा मिळवितो आहे ते पाहा!"
10शत्रूने हात लाबंवून तिच्या सर्व चांगल्या गोष्टी घेतल्या.
खरे तर, तिने परकीय राष्ट्रांना तिच्या मंदिरात जाताना
पाहिले. पण परमेश्वरा, तू तर म्हणालास की ते आपल्या
समूहात येऊ शकणार नाहीत.
11यरुशलेममधील सर्व लोक उसासे टाकत आहेत. ते
अन्न शोधत आहेत. ते अन्नाच्या बदल्यात त्यांच्याजवळच्या
चांगल्या वस्तू देऊन टाकत आहेत. जगण्यासाठी ते असे
करीत आहेत. यरुशलेम म्हणते, "परमेश्वरा, माझ्याकडे
जरा पाहा! लोक माझा तिरस्कार कसा करतात ते बघ
तरी!
12रस्त्यावर जाणाऱ्या-येणाऱ्यांनो, तुम्हाला काहीच
वाटत नाही असे दिसते! पण जरा माझ्याकडे निरखून
पाहा. माझ्या वेदनेप्रमाणे आणखी दुसऱ्या कोणाच्या वेदना
आहेत का? माझ्या वाट्याला आलेल्या यातनांप्रमाणे दुसऱ्या
काही यातना आहेत का? परमेश्वराने शिक्षा म्हणून मला
दिलेल्या वेदनेप्रमाणे दुसऱ्या वेदना आहेत का? त्याच्या
कोपाच्या दिवशी त्याने मला शिक्षा केली आहे.
13परमेश्वराने वरून ज्वाला पाठविली, ती माझ्या हाडात
भिनली. त्याने माझ्या पायात फास अडकविला. आणि
मला गरगर फिरविले. त्याने मला ओसाड बनविले.
मला दिवसभर बरे वाटत नसते.
14"माझी पापे परमेश्वराने आपल्या स्वत:च्या हाताने
जोखडाप्रमाणे जखडली आहेत. परमेश्वराचे जोखड माझ्या
मानेवर आहे. परमेश्वराने मला दुर्बळ केले. ज्यांच्या
समोर मी उभी राहू शकणार नाही, अशांच्या हाती
परमश्वराने मला दिले आहे.
15 "माझ्या शूर सैनिकांना परमेश्वराने दूर लोटले. मग
माझ्या विरुध्द लढण्यासाठी व माझ्या तरुण सैनिकांना
मारण्यासाठी परमेश्वराने काही लोक आणले. देवाने

द्राक्षकुंडातील द्राक्षे तुडविली. ते द्राक्षकुंड यरुशलेमच्या कुमारी कन्येचे आहे.

16 “ह्या सगळ्याबद्दल मी आक्रोश करते. माझ्या डोळ्यांतून अश्रू पाण्याप्रमाणे वाहात आहेत. सांत्वन करायला माझ्याजवळ कोणी नाही. माझे दु:ख हलके करणारा कोणीही नाही. माझी मुले ओसाड भूमीप्रमाणे झाली आहेत, कारण शत्रूचा विजय झाला आहे.”

17सियोनने मदतीसाठी हात पसरले. तिला मदत करणारे कोणीही नव्हते. परमेश्वराने याकोबाच्या शत्रूंना हुकूम केला आहे. परमेश्वराने याकोबच्या शत्रूंना नगराला वेढा देण्याची आज्ञा दिली. यरुशलेम तिच्या शत्रूंमध्ये अपवित्र आहे.

18आता यरुशलेम म्हणते, “मी परमेश्वराचे ऐकण्याचे नाकारले, म्हणून परमेश्वर जे करीत आहे, ते योग्यच होय. तेव्हा सर्व लोकांनो, ऐका! माझ्या यातना पाहा! माझे तरुण तरुणी कैदी झाले आहेत.

19मी माझ्या प्रियकरांना हाका मारल्या पण त्यांनी मला फसविले. माझे पुजारी आणि वृध्द नगरीत वारले. ते स्वत:साठी अन्न शोधीत होते. त्यांना जगायचे होते.

20“परमेश्वरा, माझ्याकडे पाहा! मी दु:खी झाले आहे. माझे अंत:करण अस्वस्थ झाले आहे माझ्या मनात खळबळ उडाली आहे. असे होण्याचे कारण माझा हट्टी स्वभाव रस्त्यांवर माझी मुले तलवारीने मारण्यात आली. तर घरा घरांत प्रत्यक्ष मृत्यू होता.

21“माझे ऐका मी उसासे टाकीत आहे. माझे सांत्वन करणारा कोणीही नाही. माझ्या त्रासाबद्दल माझ्या शत्रूंना कळले आहे. त्यांना आनंद झाला आहे. तू माझे असे केल्यामुळे ते आनंदित झाले आहेत. तू म्हणालास की शिक्षेची वेळ येईल, व तू माझ्या शत्रूंना शिक्षा करशील. आता म्हटल्याप्रमाणे कर. माझ्याप्रमाणेच त्यांची स्थिती होऊ दे.

22“माझे शत्रू किती दुष्ट आहेत ते पाहा! मग माझ्या पापांमुळे तू माझ्याशी जसे वागलास तसाच तू त्यांच्याशी वागू शकशील. तू असे कर कारण मी पुन्हा पुन्हा उसासत आहे. माझे हृदय म्लान झाले आहे म्हणून तरी असेच कर.

## देवाने यरुशलेमचा नाश केला

2 परमेश्वराने सियोनकन्येला कसे अभ्राच्छादित केले आहे पाहा! त्याने इस्राएलचे वैभव धुळीला मिळविले. कोपाच्या दिवशी, इस्राएल आपले पायाखालचे आसन आहे, ह्याची परमेश्वराने आठवण ठेवली नाही.

2परमेश्वराने अजिबात दया न दाखविता याकोबच्या घरांचा नाश केला. संतापाच्या भरात त्याने यहूदाकन्येच्या गडांचा नाश केला. देवाने यहूदाचे राज्य व राज्यकर्ते धुळीला मिळविले. त्याने यहूदाच्या राज्याचा विध्वंस केला.

3परमेश्वर रागावला आणि त्याने इस्राएलाची सर्व शक्ती नष्ट केली. शत्रू येताच त्याने आपला उजवा हात इस्राएलापासून काढून घेतला. सर्वत्र पेट घेणाऱ्या ज्वालेप्रमाणे तो याकोबमध्ये पेटला.

4शत्रूप्रमाणे परमेश्वराने धनुष्याला बाण लावला. त्याने स्वत:ची तलवार उजव्या हातात धरली. यहूदाचा शत्रू असल्याप्रमाणे देवाने यहूदातील देखण्या पुरुषांना ठार केले. सियोनच्या तंबूवर परमेश्वराने आपला राग ओकला.

5परमेश्वर शत्रूप्रमाणे वागला. त्याने इस्राएल गिळले. त्याने तेथील सर्व राजवाडे, गड गिळंकृत केली. यहूदाच्या कन्येमधे त्याने मृतासाठी खूप शोक आक्रंदन निर्माण केले.

6बाग उपटून टाकावी, तसा परमेश्वराने आपला स्वत:चा तंबू उखडला. त्याची उपासना करण्यासाठी लोक जेथे जमत, ती जागा त्याने नष्ट केली. परमेश्वराने सण* व शब्बाथ दिवस ह्यांचा विसर पाडला आहे. परमेश्वर रागावला व त्याने राजा व याजक यांना दूर लोटले.

7परमेश्वर आपली वेदी व उपासनेचे पवित्रस्थान नापसंत केले. यरुशलेमच्या राजवाड्याच्या भिंती त्याने शत्रूला जमीनदोस्त करु दिल्या. परमेश्वराच्या मंदिरात शत्रूने जयघोष केला. पर्वणीचा दिवस असल्याप्रमाणे त्यांनी गोंगाट केला.

8सियोनकन्येची तटबंदी नष्ट करण्याचा परमेश्वराने बेत केला. तट कोठे फोडायचा हे दाखविण्यासाठी ओळंब्याने त्याने खूण केली. नाश थांबविण्यासाठी त्यांने स्वत:ने काही केले नाही. म्हणून त्याने सर्व तटांना शोक करण्यास भाग पाडले. त्या सर्व ओस पडल्या.

9यरुशलेमची द्वारे जमीनदोस्त झाली आहेत. परमेश्वराने द्वारांचे अडसर मोडूनतोडून नष्ट केले. तिचे राजे व राजपुत्र इतर राष्ट्रांत आहेत. तेथे त्यांना परमेश्वराविषयक शिकवण मिळत नाही. यरुशलेमच्या संदेष्ट्यांनासुध्दा परमेश्वराकडून दृष्टान्त मिळत नाहीत.

10सियोनेची वडिलधारी मंडळी अगदी मूकपणे धुळीत बसते. ते डोक्यात माती भरून घेतात. ते गोणपाटाचे कपडे घालतात. यरुशलेमच्या तरुणी दु:खाने मान खाली घालून बसतात.

11रडून रडून माझे डोळे थकले आहेत. माझे अंत:करण अस्वस्थ झाले आहे. माझे हृदय जमिनीवर टाकल्याप्रमाणे तळमळत आहे. कारण माझ्या लोकांचा नाश झाला आहे. मुले आणि तान्ही मूर्छित पडत आहेत. सार्वजनिक चौकांत ती मूर्छित पडत आहेत.

---

**परमेश्वराने सण** (विश्रांतीचे विशेष दिवस) किंवा “शब्बाथ” हा कदाचित शनिवार किंवा ज्या दिवशी लोकांनी काम करता कामा नये असे सर्व विशेष दिवस.

[12]ती मुले त्यांच्या आयांना म्हणतात, "भाकर आणि द्राक्षारस कोठे आहे?" मरतानाही ते हाच प्रश्न विचारतात, आणि आपल्या आईच्या मांडीवरच प्राण सोडतात

[13]सियोनच्या कुमारी कन्ये, मी तुझी तुलना कोणाशी करू शकतो? कशाबरोबर मी तुझी तुलना करू हे सियोनच्या कुमारी कन्ये? मी तुझे सांत्वन कसे करू? तुझा नाश समुद्राप्रमाणे प्रचंड आहे. तुला कोणी बरे करु शकेल असे मला वाटत नाही.

[14]तुझ्या संदेष्ट्यांनी तुझ्यासाठी दृष्टान्त पाहिले. पण त्यांचे दृष्टान्त म्हणजे निरर्थक व मुर्खपणाचे होते. तुझ्या पापाबद्दल त्यांनी उपदेश केला नाही. त्यांनी स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला नाही. पण त्यांनी खोटे संदेश देऊन तुला मूर्ख बनविले.

[15]रस्त्यावरून जाणारे तुला पाहून हादरतात व हळहळतात. यरुशलेमच्या कन्येकडे बघून ते चुकचुकतात. ते विचारतात, "लोक जिला 'सौंदर्यपूर्ण नगरी' अथवा 'पृथ्वीवरचा आनंद म्हणतात, ती नगरी हीच का?"'

[16]तुझे सर्व शत्रू तुला हसतात. ते तुझ्याकडे पाहून फूत्कार टाकतात आणि दातओठ खातात ते म्हणतात, "आम्ही त्यांना गिळले आहे. आम्ही खरोखरच ह्या दिवसाची वाट पाहात होतो. अखेर तो उजाडला."

[17]देवाने ठरविल्याप्रमाणे केले. तो जे करीन म्हणाला होता, तसेच त्याने केले. फार पूर्वी त्याने जी आज्ञा केली होती, ती त्याने पूर्ण केली. त्याने नाश केला व त्याला दया आली नाही. तुझ्याबाबतीत जे घडले, ते पाहून तुझ्या शत्रूंना आनंद झाला. हा आनंद त्यांना देवाने मिळवून दिला. देवाने तुझ्या शत्रूंना सामर्थ्यशाली बनविले.

[18]मनापासून परमेश्वराचा धावा करा. सियोनकन्येच्या तटबंदी, तू रात्रंदिवस झऱ्याप्रमाणे अश्रू ढाळ, थांबू नकोस! तुझे डोळे कोरडे पडू देऊ नकोस.

[19]ऊठ! रात्री आक्रोश कर. रात्रीच्या प्रत्येक प्रहराच्या आरंभाला रड. आपण पाणी ओततो, तसे मन मोकळे कर. परमेश्वरापुढे मन मोकळे कर. परमेश्वरापुढे हात जोड. तुझ्या मुलांच्या प्राणरक्षणासाठी परमेश्वराजवळ प्रार्थना कर. कारण तुझी मुले उपासमारीने मूर्छित पडत आहेत. नगराच्या रस्त्या-रस्त्यावर ती बेशुध्द होऊन पडत आहेत.

[20]परमेश्वरा, माझ्याकडे बघ! तू अशा रीतीने जिला वागविलेस ती कोण आहे ते तरी पाहा! मला तुला एक प्रश्न विचारू दे: स्त्रियांनी पोटच्या मुलांना, खावे काय? ज्या मुलांची त्यांनी काळजी घेतली त्यांना स्त्रियांनी खावे काय? परमेश्वराच्या मंदिरात धर्मगुरु व संदेष्टे मारले जावेत का?

[21]नगरीच्या रस्त्यांवर तरुण आणि वृध्द पडले आहेत. माझ्या तरुण तरुणी तलवारीने मृत्यू पावल्या आहेत. परमेश्वरा, तू कोपलास त्या दिवशी, अजिबात दया न दाखविता तू त्यांना मारलेस!

[22]तू माझ्या सर्व बाजूंनी दहशत निर्माण केलीस. मेजवानीला एखाद्याला आमंत्रण द्यावे त्याप्रमाणे तू दहशतीला आमंत्रण दिलेस. परमेश्वराच्या कोपाच्या दिवशी कोणीही सुटला नाही. मी ज्यांना जन्म दिला व ज्यांचे लालनपालन केले, त्यांना माझ्या शत्रूने ठार केले.

## एकजण स्वतःच्या दुःखाची कारणमीमांसा करतो

3 खूप संकटे पाहिलेला मी एक माणूस आहे. परमेश्वराने आम्हाला काठीने मारताना मी प्रत्यक्ष पाहिले.

[2]परमेश्वराने मला प्रकाशाकडे न नेता, अंधाराकडे नेले.

[3]परमेश्वराने त्याचा हात माझ्याविरुध्द केला. दिवसभर, त्याने आपला हात, पुन्हा पुन्हा, माझ्याविरुद्ध चालविला.

[4]त्यांने माझी त्वचा आणि मांस नष्ट केले आणि माझी हाडे मोडली.

[5]परमेश्वराने माझ्याभोवती दुःख व त्रास ह्यांच्या भिंती उभारल्या. त्यांने दुःख व त्रास माझ्याभोवती उभे केले.

[6]त्याने मला अंधकारात बसायला लावले. माझी स्थिती एखाद्या मृताप्रमाणे केली.

[7]परमेश्वराने मला बंदिवान केल्यामुळे मी बाहेर येऊ शकलो नाही. त्याने मला मोठमोठ्या बेड्या घातल्या.

[8]मी जेव्हा मदतीसाठी आक्रोश करतो, तेव्हासुध्दा परमेश्वर माझा धावा ऐकत नाही.

[9]त्याने दगडधोड्यांनी माझ्या रस्त्यात अडथळा निर्माण केला आहे. त्याने माझा मार्ग वाकडा केला आहे.

[10]परमेश्वर, माझ्यावर हल्ला करण्यासाठी टपून बसलेल्या, अस्वलासारखा आहे.लपून बसलेल्या सिंहासारखा तो आहे.

[11]परमेश्वराने मला माझ्या मार्गावरुन दूर केले. माझे तुकडे तुकडे केले. माझा नाश केला.

[12]त्याने त्याचे धनुष्य सज्ज केले. त्याने मला त्याच्या बाणांचे लक्ष्य बनविले.

[13]त्याने माझ्या पोटात बाणाने मारले.

[14]मी माझ्या माणसांमध्ये चेष्टेचा विषय झालो. सर्व दिवसभर, ते मला उद्देशून गाणी गातात व माझी टर्र उडवितात.

[15]परमेश्वराने मला हे विष (शिक्षा) प्यायला दिले. हे कडू पेय त्याने मला भरपूर पाजले.

[16]परमेश्वराने मला दाताने खडे फोडायला लावले. मला धुळीत लोटले.

[17]मला पुन्हा कधीही शांती मिळणार नाही, असे मला वाटले. मी चांगल्या गोष्टी तर विसरलो.

[18]मी मनाशी म्हणालो,"परमेश्वराच्या कृपेची मला मुळीच आशा नाही."

[19]परमेश्वरा, लक्षात ठेव. मी फार दुःखी आहे, व मला घर नाही. तू दिलेल्या कडू विषाचे (शिक्षेचे) स्मरण कर.

20मला माझ्या सर्व त्रासांची आठवण आहे. म्हणूनच मी
दु:खी आहे.
21पण मी पुढील काही गोष्टींचा विचार केला की मला
आशा वाटते.
22परमेश्वराच्या प्रेम व दयेला अंत नाही. परमेश्वराची
करुणा चिरंतन आहे.
23ती प्रत्येक दिवशी नवीन, ताजी असते. परमेश्वरा,
तुझी विश्वासार्हता महान आहे.
24मी मनाशी म्हणतो,“परमेश्वर माझा देव आहे. म्हणूनच
मला आशा वाटेल.”
25परमेश्वराची वाट पाहणाऱ्यांवर व त्याला
शोधणाऱ्यांवर तो कृपा करतो.
26परमेश्वराने आपले रक्षण करावे म्हणून मुकाट्याने
वाट पाहणे केव्हाही चांगले.
27परमेश्वराचे जोखड वाहणे केव्हाही बरेच. ते
तरूणपणापासून वाहणे तर फारच चांगले.
28परमेश्वर त्याचे जोखड मानेवर ठेवत असताना
माणसाने मुकाट्याने एकटे बसावे.
29माणसाने परमेश्वरापुढे नतमस्तक व्हावे. कोणी
सांगावे, अजूनही आशा असेल.
30जो मणुष्य मारत असेल त्याला खुशाल गालात मारू
द्यावे व तो अपमान सहन करूण घ्यावा.
31परमेश्वर लोकांकडे कायमची पाठ फिरवित नाही,
हे माणसाने लक्षात ठेवावे.
32परमेश्वर जेव्हा शिक्षा करतो, तेव्हा तो दया पण
दाखवितो. हा त्याचा दयाळूपणा त्याच्या जवळील महान
प्रेम व थोर करुणा ह्यामुळे आहे.
33लोकांना शिक्षा करण्याची देवाची इच्छा नसते. लोकांना
दु:ख द्यायला त्याला आवडत नाही.
34परमेश्वराला ह्या गोष्टी पसंत नाहीत. पृथ्वीवरील
सर्व बंदिवानांना कोणीतरी पायाखाली तुडविणे, त्याला
आवडत नाही.
35एका माणसाने दुसऱ्याशी अन्यायाने वागणे त्याला
पसंत नाही. पण काही लोक अशा वाईट गोष्टी सर्वश्रेष्ठ
ईश्वरासमक्ष करतात.
36एका व्यक्तिने दुसऱ्या व्यक्तिला फसविणे
परमेश्वराला आवडत नाही. ह्या अशा गोष्टी परमेश्वराला
अजिबात पसंत नाहीत.
37परमेश्वराच्या आज्ञेशिवाय, कोणी काहीही बोलावे
आणि ते घडून यावे असे होऊ शकत नाही.
38सर्वश्रेष्ठ देवच इष्ट वा अनिष्ट घडण्याची आज्ञा देतो.
39एखाद्याच्या पापांबद्दल परमेश्वराने त्याला शिक्षा
केल्यास तो माणूस तक्रार करू शकत नाही.
40आपण आपली कर्मे पाहू या आणि तपासू या व
नंतर परमेश्वराकडे परत जाऊ या.
41स्वर्गातील परमेश्वराकडे आपण आपले हृदय व हात
उंचावू या.
42आपण त्याला म्हणू या, “आम्ही पाप केले, आम्ही
हट्टीपणा केला. म्हणूनच तू आम्हाला क्षमा केली नाहीस.
43तू क्रोधाविष्ट झालास आमचा पाठलाग केलास आणि
दया न दाखविता आम्हाला ठार केलेस.
44कोणतीही प्रार्थना तुझ्यापर्यंत पोहोचू नये म्हणून तू
स्वत:ला अभ्रांनी वेढून घेतलेस.
45दुसऱ्या राष्ट्रांसमोर तू आम्हाला कचरा व धूळ
ह्यासारखे केलेस.
46आमचे सर्व शत्रू आम्हाला रागाने बोलतात.
47आम्ही घाबरलो आहोत. आम्ही गर्तेत पडलो आहोत.
आम्ही अतिशय जखमी झालो आहोत. आम्ही मोडून
पडलो आहोत.”
48माझ्या लोकांचा झालेला नाश पाहून मी रडते. माझ्या
डोळ्यांना धारा लागल्या आहेत.
49माझे डोळे गळतच राहतील, मी रडतच राहीन.
50परमेश्वरा, तू आपली नजर खाली वळवून
आमच्याकडे पाही पर्यंत मी रडतच राहीन. तू स्वर्गातून
आमच्याकडे लक्ष देईपर्यंत मी शोक करीन.
51माझ्या नगरातील सर्व मुलींची स्थिती पाहून माझे
डोळे मला दु:खी करतात.
52निष्कारण शत्रू बनलेल्या लोकांनी पाखरासारखी माझी
शिकार केली आहे.
53मी जिवंत असताना त्यांनी मला खड्ड्यात लोटले आणि
माझ्यावर दगड टाकले.
54माझ्या डोक्यावरुन पाणी गेले. मी मनाशी म्हणालो,
“आता सर्व संपले.”
55परमेश्रा मी तुझ्या नांवाने हाक मारली परमेश्वरा,
खड्ड्यातून तुझ्या नांवाचा धावा केला.
56तू माझा आवाज ऐकलास. तू तुझ्या कानावर हात
ठेवले नाहीस. माझी सुटका करण्याचे तू नाकारले नाहीस.
57मी धावा करताच तू आलास. तू मला म्हणालास,
“घाबरु नकोस.”
58परमेश्वरा, तू माझे रक्षण केलेस तू मला पुनर्जीवन
दिलेस.
59परमेश्वरा, तू माझा त्रास पाहिला आहेस. आता मला
न्याय दे.
60माझ्या शत्रूंनी मला कसे दुखविले आणि माझ्याविरुद्ध
कसे कट रचले ते तू पाहिले आहेस.
61त्या शत्रूंनी केलेला माझा अपमान आणि माझ्याविरुध्द
आखलेले बेत तू, परमेश्वरा, ऐकले आहेस.
62सर्व काळ, शंत्रूचे बोलणे व विचार माझ्या विरुध्द
आहेत.
63परमेश्वरा, बसता उठता ते माझी कशी खिल्ली
उडवितात ते पाहा.
64परमेश्वरा, त्यांना योग्य ते फळ दे. त्यांच्या कर्मांची
परत फेड कर.
65त्यांचे मन कठोर कर. नंतर त्यांना शाप दे.

66क्रोधाने त्यांचा पाठलाग कर व त्यांचा नाश कर. ह्या
आकाशाखाली, परमेश्वरा, त्यांचा नाश कर.

## यरुशलेमवरील हल्ल्यातील भयानकता

4 सोने कसे निस्तेज झाले आहे पाहा! चांगले सोने
कसे बदलले आहे बघा! रत्ने सगळीकडे पसरली
आहेत. रस्त्याच्या नाक्या–नाक्यावर ती विखुरली आहेत.
2सियोनच्या लोकांची किंमत भारी आहे. ते आपल्या
वजनाचे मोल सोन्यात ठरवितात. पण आता शत्रू त्यांना
मातीच्या जुन्या रांजणांप्रमाणे मानतो. कुंभाराने केलेल्या
मडक्याप्रमाणे तो त्यांना किंमत देतो.
3राजकुत्रेसुध्दा आपल्या पिल्लांना भरवितात. कोल्हीही
आपल्या पिल्लांना दुध देते. पण माझ्या लोकांची कन्या
दुष्ट आहे. त्या वाळवंटात राहणाऱ्या शहामृगाप्रमाणे आहेत.
4तान्ह्या मुलांची जीभ तहानेने टाळ्याला चिकटली आहे.
बालके भाकरी मागतात. पण त्यांना कोणीही भाकरी देत
नाही.
5एकेकाळी ज्यांनी पौष्टिक अन्न खाल्ले, तेच आता
रस्त्यावर मरत आहेत. जे चांगल्या, लाल कपड्यात वाढले,
ते आता कचऱ्याच्या ढिगांतून मिळेल ते उचलतात.
6माझ्या लोकांच्या मुलीचे पाप मोठे होते. सदोम व
गमोरा यांच्यापेक्षाही ते पाप मोठे होते. सदोमचा व गमोराचा
अचानक नाश झाला, आणि त्यात कोठल्याही माणसाचा
हात नव्हता.
7यहुदातील काही लोकांनी एका विशेष प्रकारे आपले
जीवन देवाला वाहिले होते. ते फार शुध्द होते. ते हिमापेक्षा
शुभ्र होते. दुधापेक्षा पांढरे होते. त्यांची कांती पोवळ्यांप्रमाणे
लाल होती. त्यांच्या दाढ्या म्हणजे जणू काही तेजस्वी
इंद्रनीलच.
8पण आता त्यांचे चेहरे काजळीपेक्षा काळे झाले आहेत.
त्यांना रस्त्यांत कोणी ओळखतसुध्दा नाही. त्यांची कातडी
सुरकुतली आहे. लाकडाप्रमाणे शुष्क होऊन ही हाडाला
चिकटली आहे.
9उपासमारीने मरण्यापेक्षा तलवारीने मेलेले बरे! कारण
उपासमार झालेले फारच दु:खी होते. ते व्याकुळ झाले
होते. शेतामधून काहीच न मिळाल्यामुळे ते मेले.
10त्या वेळी, प्रेमळ बायकांनीसुध्दा आपली मुले शिजविली
ती मुलेच त्यांच्या आयांचे अन्न झाले. माझ्या लोकांचा
नाश झाला, तेव्हा असे घडले.
11परमेश्वराने आपला सगळा क्रोध प्रकट केला. त्यांने
आपला सगळा राग बाहेर काढला. त्याने सियोनमध्ये
आग लावली त्या आगीत पायापर्यंत सियोन बेचिराख
झाले
12जगातील राजे, जे घडले त्यावर विश्वास ठेवू शकले
नाहीत. पृथ्वीवरील लोकांचा ह्यावर विश्वास बसला नाही.
यरुशलेमच्या प्रवेशद्वारांतून शत्रू येऊ शकेल ह्यावर
कोणाचाच विश्वास बसला नाही.
13यरुशलेमच्या संदेष्ट्यांनी पाप केले, धर्मगुरुंनी दुष्कृत्ये
केली,लोकांनी प्रामाणिक माणसांचे रक्त यरुशलेममध्ये
सांडले, म्हणूनच असे घडले.
14संदेष्टे आणि याजक आंधळ्यांप्रमाणे रस्त्यात भटकत
होते. ते रक्ताने माखले होते. कोणीही त्यांच्या वस्त्रालाही
शिवू शकले नाहीत कारण ती रक्ताने भरली होती.
15लोक ओरडले, “लांब व्हा! दूर व्हा! आम्हाला शिवू
नका.” ते लोक इकडे तिकडे भटकले कारण त्यांना
घरे नव्हती. दुसऱ्या राष्ट्रांतील लोक म्हणाले, “त्यांनी
आमच्याबरोबर राहू नये असेच आम्हाला वाटते.”
16परमेश्वराने स्वत: त्या लोकांचा नाश केला. त्याने
त्यांची अजिबात काळजी घेतली नाही. त्यांने याजकांना
मानले नाही त्यांने यहुदातील वृध्दांना दया दाखवली नाही.
17मदतीची वाट पाहून आमचे डोळे थकले आहेत. पण
कोठूनही मदत मिळत नाही. आमचेरक्षण करण्यास एखादे
राष्ट्र येत आहे का, ह्याची आम्ही बुरुजावरुन टेहळणी
केली. पण एकही देश आमच्याकडे आला नाही.
18सर्वकाळ, आमच्या शत्रूंनी आमची शिकार केली.
आम्ही रस्त्यांवरसुध्दा जाऊ शकलो नाही. आमचा शेवट
जवळ आला! आमचे आयुष्य सरले होते! आमचा अंत
आला!
19आमचा पाठलाग करणारे गरुडापेक्षाही वेगवान होते.
त्यांनी आमचा डोंगरांत पाठलाग केला. आम्हाला
पकडण्यासाठी ते वाळवंटात दडून बसले.
20आमच्या दृष्टीने राजा सर्वश्रेष्ठ होता. तो आमचा
श्वास होता. पण त्यांनी राजाला सापळ्यात पकडले. प्रत्यक्ष
परमेश्वरानेच राजाची निवड केली होती. राजाबद्दल आम्ही
असे म्हणालो होतो, “आम्ही त्याच्या सावलीत राहू, तो
इतर राष्ट्रांपासून आमचे रक्षण करतो.”
21अदोमच्या लोकांनो, आनंदित व्हा. ऊस देशात
राहणाऱ्यांनो, हर्षित व्हा. पण लक्षात ठेवा की परमेश्वराच्या
क्रोधाचा प्याला तुमच्याकडेसुध्दा येईल. तुम्ही जेव्हा
त्यातील पेय (शिक्षा) प्याल, तेव्हा झिंगाल आणि विवस्त्र
व्हाल.
22सियोन, तुझी शिक्षा संपली. आता पुन्हा तुला कैद
करुन नेले जाणार नाही. पण अदोमवासीयांनो, तुमची
पापे उघडी करुन परमेश्वर तुम्हाला शिक्षा करील.

## परमेश्वराकडे प्रार्थना

5 परमेश्वरा, आमचे काय झाले ते लक्षात ठेव. आमच्या
अप्रतिष्ठेकडे नजर टाक.
2आमचा देश परक्यांच्या हातात गेला आहे. आमची घरे
परदेशीयांना दिली गेली आहेत.
3आम्ही अनाथ झालो. आम्हाला वडील नाहीत. आमच्या
आयांची स्थिती विधवांसारखी झाली आहे.
4आम्हाला पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. आम्ही
वापरत असलेल्या लाकडाला पैसे मोजावे लागतात.

5आमच्या मानेवर सक्तीने जोखड ठेवले जाते. आम्ही
दमून जातो, पण आम्हाला विश्रांती नाही.
6पोटभर भाकरी मिळविण्यासाठी आम्ही मिसर व अश्शूर
यांच्याबरोबर करार केला.
7आमच्या पूर्वजांनी तुझ्याविरुध्द पाप केले. आता ते
नाहीत. पण त्यांच्या पापाची फळे आता आम्ही भोगत
आहोत.
8गुलाम आमचे राज्यकर्ते झाले. त्यांच्यापासून आम्हाला
कोणीही वाचवू शकत नाही.
9अन्नासाठी आम्ही जीवाची बाजी लावतो. वाळवंटात
तलवारधारी माणसे असतात.
10आमची कातडी भट्टीप्रमाणे तापली आहेत. भुकेमुळे
आम्हाला ताप चढला आहे.
11शत्रूंनी सियोनमधील स्त्रियांवर बलात्कार केला.
यहुदातील गावांमधील स्त्रियांवर त्यांनी बलात्कार केले.
12शत्रूंने आमच्या राजपुत्रांना फाशी दिली. त्याने
आमच्यातील वृध्दांचा मान ठेवला नाही.
13आमच्या तरुणांना शत्रूने गिरणीत धान्य दळायला
लावले. ते तरुण लाकडाच्या ढिगाऱ्याखाली अडखळले.
14वृध्द आता नगरीच्या द्वारांत बसत नाहीत. तरुण
गायनवादन करीत नाहीत.
15आमच्या नृत्याचे रूपांतर आता मृतांच्या शोकात
झाले आहे. आमच्या हृदयात आनंदाचा अंशही नाही.
16आम्ही पाप केल्यामुळे आमच्या डोक्यावरचा मुकुट
खाली पडला आहे. आणि वाईट गोष्टी घडल्या.
17ह्या सर्व गोष्टीमुळे आमचे मन खचले आहे. आम्हाला
डोळ्यांनी स्पष्टपणे दिसत नाही.
18सियोनचे डोंगर ओसाड झाले आहेत. सियोनच्या
डोंगरावर कोल्हे वावरतात.
19पण परमेश्वरा, तुझी सत्ता चिरंतन आहे. तुझे
राजसिंहासन चिरकाल राहील.
20परमेश्वर आम्हाला कायमचा विसरला आहेस असे
दिसते. तू आम्हाला दीर्घकाल सोडून गेला आहेस.
21परमेश्वरा, आम्हाला तुझ्याकडे परत ने. आम्ही
आनंदाने तुझ्याकडे येऊ. आमचे जीवन पूर्वीसारखे
कर.
22तू आमच्यावर खूप रागावला होतास! तू आमचा पूर्णपणे
त्याग केलास का?

# यहेज्केल

## प्रस्तावना

1 1–3मी बूजीचा मुलगा याजक यहेज्केल. मी परागंदा
झालो होतो. मी खास्द्यांच्या देशात खबार कालव्याच्या
काठी असताना आकाश दुभंगले व मला देवाचा दृष्टान्त
झाला. 30 व्या वर्षीच्या* चौथ्या महिन्याच्या (जूनच्या)
पाचव्या दिवसाची ही घटना आहे.

यहोयाखीन राजाच्या परागंदा होण्याच्या काळातील 5
व्या वर्षी, महिन्याच्या 5 व्या दिवशी, यहेज्केलला
परमेश्वराचा शब्द प्राप्त झाला. तेथेच त्याला परमेश्वराची
शक्ती प्राप्त झाली.

## परमेश्वर देवाच्या सिंहासनाचा रथ

4उत्तरेकडून एक धुळीचे वादळ येताना मी
(यहेज्केलने) पाहिले. तो एक मोठा ढग होता आणि
त्यातून आगीचा झोत बाहेर पडत होता. त्याच्याभोवती
प्रकाशाची प्रभा फाकली होती. आगीत धगधगणाऱ्या तप्त
धातू प्रमाणे तो दिसत होता. 5त्यामध्ये चार प्राणी होते.
ते मनुष्यप्राण्याप्रमाणे दिसत होते. 6पण त्या प्रत्येक
प्राण्याला चार तोंडे आणि चार पंख होते. 7त्यांचे पाय
सरळ होते. त्यांच्या पायांचे तळवे गाईच्या खुरांप्रमाणे होते.
ते चकाकी दिलेल्या पितळेप्रमाणे चमकत होते. 8त्यांच्या
पंखाखाली मानवी हात होते. ते चार प्राणी होते.
त्या प्रत्येकाला चार तोंडे व चार पंख होते. 9त्यांचे
पंख एकमेकांना स्पर्श करत होते. ते चालताना वळत
नव्हते. ते ज्या दिशेकडे पाहत, त्याच दिशेला जात
होते.

10प्रत्येक प्राण्याला चार तोंडे होती. प्रत्येकाचे समोरचे
तोंड माणसाचे होते. उजव्या बाजूला सिंहाचे, डाव्या बाजूला
बैलाचे व मागच्या बाजूला गरुडाचे तोंड होते. ते चारहीजण
दिसायला अगदी सारखे होते. 11ते प्राणी पंखांचा उपयोग
स्वत:ला झाकण्यासाठी करीत. दोन पंखांनी ते जवळ
असलेल्या प्राण्याला स्पर्श करीत. ते दोन पंखांनी अंग
झाकीत.
12ते पाहत होते त्याच दिशेने जात होते. वारा* जेथे नेईल,
तेथे ते गेले. पण चालताना ते वळत नव्हते.

13–14ते प्राणी असे दिसत होते: प्राण्यांच्या मध्येन
काहीतरी जळत्या निखाऱ्याप्रमाणे होते. लहान लहान
मशाली प्राण्यांमधून आणि त्यांच्या सभोवती फिराव्या तसा
तो अग्नी दिसत होता. तो प्रकाश झगझगीतपणे चमकत
होता आणि त्यातून वीज चमकत होती.

15–16मी प्राण्यांकडे पाहात होतो तेव्हा मला जमिनीला
टेकलेली चार चाके दिसली. प्रत्येक प्राण्यासाठी एक
चाक होते. सर्व चाके सारखीच दिसत होती. ती तेजस्वी
वैदुर्यापासून केल्याप्रमाणे दिसत होती. एकात दुसरे चाक
असल्याप्रमाणे ती दिसत होती. 17चाके चालताना कुठल्याही
दिशेला वळत पण चाके चालताना प्राणी वळत नव्हते.
18चाकांच्या धावा उंच आणि भयंकर होत्या. चारही
चाकांच्या धावांवर सर्वत्र डोळे होते.

19चाके त्या प्राण्यांबरोबरच फिरत. जर ते प्राणी
आकाशात उडाले, तर त्यांच्याबरोबर चाकेही उचलली
जात. 20वारा नेईल तिकडे ते जात व त्याप्रमाणे चाकेही
जात. का? कारण प्राण्यांचा वारा (शक्ती) चाकांत होता.
21म्हणून जर प्राणी हालले, तर चाकेही फिरत. प्राणी
थांबले की चाकेही थांबत. जर चाके हवेत उडाली, तर
प्राणीही वर जात. का? कारण वारा चाकांत होता.

22त्या प्राण्यांच्या डोक्यांवर विलक्षण असे काहीतरी
होते. वाडगा* पालथा घालावा तसे ते दिसत होते. तो
वाडगा स्फटिकाप्रमाणे स्वच्छ होता. 23ह्या वाडग्याखाली,
प्रत्येक प्राण्याला पंख होते आणि ते जवळच्या दुसऱ्या
प्राण्यापर्यंत पोहोचू शकत होते. दोन पंख एका बाजूला व
दोन पंख दुसऱ्या बाजूला पसरवून ते अंग झाकीत.

24मग मी पंखांचा आवाज ऐकला. प्राण्यांनी हालचाल
करताच पंखाचा प्रचंड आवाज होई. तो आवाज प्रचंड
पाण्याच्या खळखळाटाप्रमाणे होता. सर्वशक्तिमान देव
चालताना व्हावा, तसा तो आवाज मोठा होता. सैन्याच्या
आवाजाप्रमाणे अथवा लोकांच्या प्रचंड गर्दीच्या

---

**30 व्या वर्षी** हे कोणते वर्ष असावे, ते खात्रीपूर्वक सांगता येत नाही. कदाचित ते परागंदा झाल्यापासूनचे पाचवे वर्ष असेल, वा यहेज्केलने देवाचा अखेरचा दृष्टान्त झाल्यावर आपला खंड लिहावयास घेतला ते वर्ष असेल. यहेज्केलला झालेले, पहिला व अखेरचा दृष्टान्त, हे सारखेच होते.

**वारा** किंवा “चैतन्य.”

**वाडगा** हिब्रूमधील हाच शब्द उत्पत्ती 1:6–7 येथेही योजला आहे. आकाशावरील घुमटाचे वर्णन करण्याकरीता तो वापरला आहे.

आवाजासारखा तो आवाज होता. प्राणी थांबताच, त्यांचे
पंख त्यांच्या बाजूला खाली येत.
25ते प्राणी थांबले व त्यांनी आपले पंख खाली केले.
मग दुसरा एक खूप मोठा आवाज झाला. त्या प्राण्यांच्या
डोक्यांवरील वाडग्यातून तो आवाज आला.26त्या वाडग्यावर
काहीतरी होते. ते सिंहासनाप्रमाणे दिसत होते. ते
इंद्रनीलाप्रमाणे गर्द निळे होते. त्यावर माणसाप्रमाणे दिसणारी
आकृती बसलेली होती. 27मी त्याचा कमरेवरचा भाग
पाहिला. तो तप्त धातू प्रमाणे दिसत होता. त्याच्या भोवती
आगीचा लोळ असल्याप्रमाणे दिसत होते. मी त्याच्या
कमरेखालच्या भागाकडे पाहिले. तो आगीप्रमाणे दिसत
होता. त्याच्या सभोवती प्रभा फाकली होती.28त्याच्या भोवती
फाकलेले तेज इंद्रधनुष्याप्रमाणे होते. ते परमेश्वराच्या
वैभवाच्या तेजाप्रमाणे दिसत होते. म्हणून मी ते पाहाताच
जमिनीवर पालथे पडून, मस्तक टेकवून वंदन केले. त्या
नंतर,माझ्याशी कोणीतरी बोलत असल्याचे मला ऐकू आले.

2 तो आवाज म्हणाला, “मानवपुत्रा उठ मी तुझ्याशी
बोलणार आहे.”
2मग वाऱ्याचा झोत आला व त्याने मला उभे केले.
माझ्याशी बोलणाऱ्याचे (देवाचे) बोलणे मी ऐकले. 3तो
मला म्हणाला, “मानवपुत्रा, मी तुला इस्राएलाच्या घराण्याशी
बोलायला पाठवीत आहे. ते लोक अनेकदा माझ्याविरुद्ध
गेले. त्यांचे पूर्वजही माझ्या विरोधात गेले. पूर्वी त्यांनी
माझ्याविरुद्ध वागून पाप केले आणि अजूनही ते पाप
करीत आहेत. 4मी तुला त्या लोकांशी बोलण्यासाठी पाठवीत
आहे. ते फार हट्टी आहेत, निष्ठुर आहेत. पण तुला
त्यांच्याशी बोललेच पाहिजे. तू पुढील गोष्टी त्यांना सांगितल्या
पाहिजेस. ‘ह्या गोष्टी परमेश्वराने, आपल्या प्रभूने सांगितल्या
आहेत असे तू त्यांना बोलले पाहिजेस.’ 5पण ते तुझे ऐकणार
नाहीत. ते माझ्याविरुद्ध वागून पाप करीतच राहतील.
का? कारण ते बंडखोर आहेत. ते नेहमीच माझ्याविरुध्द
वागतात. पण तू ह्या गोष्टी त्यांना सांगच म्हणजे त्यांना
कळेल की त्यांच्यात एक संदेष्टा आहे.
6“मानवपुत्रा, त्या लोकांना घाबरू नकोस. ते जे बोलतात,
त्याला भिऊ नकोस. ते तुझ्या विरुद्ध जातील आणि तुला
इजा करण्याचा प्रयत्न करतील, हे अगदी खरे आहे. ते
काट्यांप्रमाणे आहेत. आपण विंचवामध्ये राहत आहोत
असे तुला वाटेल पण त्याच्या बोलण्याने घाबरून जाऊ
नकोस. ते बंडखोर लोक आहेत पण त्यांना भिऊ नकोस.
7मी तुला सांगितलेल्या गोष्टी तू त्यांना सांगितल्या पाहिजेस.
ते तुझे ऐकणार नाहीत, हे मला माहीत आहे. ते पापापासून
परावृत्त होणार नाहीत का? कारण ते बंडखोर आहेत.
8“मानवपुत्रा, मी तुला ज्या गोष्टी सांगतो, त्या तू
लक्षपूर्वक ऐकल्या पाहिजेस. त्या बंडखोर लोकांप्रमाणे
माझ्याविरुद्ध जाऊ नकोस. तुझे तोंड उघड आणि माझे
शब्द स्विकार कर. मग ते त्या लोकांना सांग. आता ते
खाऊन टाक.”
9नंतर मी (यहेज्केलने) एक हात माझ्यापर्यंत येताना
पाहिला. त्या हातात शब्द लिहिलेला पट होता. 10मी तो
पट उलगडला. त्यावर पुढे व मागे, अनेक प्रकारची
शोकगीते, शोककथा व इशारे लिहिलेले होते.

3 देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, तू जे पाहतोस, ते खा.
तो पट खा. मग त्या गोष्टी इस्राएलच्या लोकांना जाऊन
सांग.”
2मग मी तोंड उघडले व त्याने तो पट माझ्या तोंडात
घातला. 3नंतर देव म्हणाला, “मानवपुत्रा, मी तुला हा पट
देत आहे. तो गीळ. त्याने तुझे पोट भरू दे.”
मग मी तो पट सेवन केला. तो मला मधासारखा गोड
लागला.
4त्या नंतर देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, इस्राएलच्या
लोकांकडे जा. त्यांना माझे शब्द ऐकव. 5तुला ज्यांचे
बोलणे समजू शकणार नाही, अशा परदेशीयांकडे मी
तुला पाठवीत नाही. तुला दुसरी भाषा शिकायची गरज
नाही. मी तुला इस्राएल लोकांकडे पाठवीत आहे. 6तुला
समजत नसणाऱ्या भाषा बोलणाऱ्या निरनिराळ्या देशांत
मी तुला पाठवीत नाही. जर तू त्या लोकांशी जाऊन
बोलला असतास तर त्यांनी तुझे ऐकले असते. पण तुला
त्या कठीण भाषा शिकण्याची जरूरी नाही. 7नाही! मी
तुला इस्राएल लोकांकडेच पाठवीत आहे. त्यांची मनेच
फक्त कठोर आहेत! ते हट्टी आहेत. ते तुझे ऐकायला
नकार देतील. त्यांना माझे म्हणणे ऐकण्याची इच्छा नाही.
8“पण मी तुला त्यांच्याप्रमाणेच कठोर बनवीन. तुला
त्यांच्याप्रमाणे निष्ठुर बनवीन. 9हिरा गारगोटीच्या दगडापेक्षा
कठीण असतो. त्याचप्रमाणे तू त्यांच्यापेक्षा कठोर होशील.
तू जास्त हट्टी होशील, म्हणजे तू त्या लोकांना घाबरणार
नाहीस. माझ्या विरूध्द नेहमी जाणाऱ्या लोकांना तू
घाबरणार नाहिस.”
10मग देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, माझा प्रत्येक
शब्द तू ऐकला पाहिजेस, आणि ते शब्द लक्षात ठेवले
पाहिजेस. 11मग परागंदा झालेल्या तुझ्या सर्व लोकांना
जाऊन सांग, ‘परमेश्वराने, आपल्या प्रभूने पुढील गोष्टी
सांगितल्या:’ ते तुझे ऐकणार नाहीत. पाप करायचे थांबवणार
नाहीत, तरी तू ह्या गोष्टी सांगच.”
12मग वाऱ्याने मला उचलले. नंतर मला माझ्यामागून
आवाज आला. तो आवाज गडगडाटाप्रमाणे प्रचंड होता.
त्यांतून “परमेश्वराच्या वैभवाचा धन्यवाद असो” असे शब्द
आले. 13मग त्या प्राण्यांचे पंख फडफडले. पंख एकमेकांना
भिडताना प्रचंड आवाज झाला. त्यांच्या पुढील चाकांचा
खडखडाट झाला. तो आवाज गडगडाटाप्रमाणे होता.
14 वाऱ्याने मला उचलून दूर नेले. मी ती जागा सोडली.
माझा आत्मा* फार खिन्न आणि दुःखी झाला होता. पण
देवाची शक्ती मोठ्या प्रमाणात मला प्राप्त झाली होती. 15नंतर

**आत्मा** म्हणजेच “वारा.”

मी, तेल अबीब येथे सक्तीने राहत असलेल्या इस्राएली
लोकांकडे गेलो. ते खबार कालव्याजवळ राहात होते.
तेथे राहणाऱ्या लोकांना मी अभिवादन केले. मी
त्यांच्याबरोबर सात दिवस भीतिग्रस्त होऊन गप्प बसून
राहिलो.
16सात दिवसांनी मला परमेश्वराचा संदेश मिळाला. तो
असा: 17“मानवपुत्रा, मी तुला इस्राएलचा पहारेकरी करीत
आहे. इस्राएलबाबत घडणाऱ्या वाईट गोष्टी मी तुला सांगीन.
मग तू इस्राएलला त्या गोष्टींबद्दल इशारा दे. 18जर मी
म्हणालो ‘हा वाईट माणूस मरेल,’ तर तू त्या माणसाला
इशारा दिलाच पाहिजेस. तू त्याला त्याचा जीवनक्रम
बदलायला आणि दुष्कृत्ये करण्याचे टाळायला सांगितले
पाहिजेस. जर तू त्याला इशारा केला नाहीस, तर तो
मरेल. त्याने पाप केले, म्हणून तो मरेल. पण तरीसुद्धा
त्याच्या मृत्यूसाठी मी तुला जबाबदार धरीन. का? कारण
तू त्याच्याकडे जाऊन त्याला वाचविले नाहीस.
19“कदाचित् असेही होईल की तू एखाद्याला सावध
करशील, त्याला त्याचा मार्ग बदलायला सांगशील, दुष्कृत्ये
न करण्याचे आवाहन करशील. पण त्याने तुझे ऐकले
नाही, तर तो मरेल. तो त्याच्या पापामुळे मृत्यू पावेल, पण
तू त्याला सावध केले होतेस, म्हणून तुझा स्वत:चा जीव
वाचेल.
20“किंवा एखादा सज्जन चांगले वागणे सोडून देईल. मी
त्याच्या मार्गात असे काही ठेवीन की तो पडेल (पाप
करील). तो दुष्कृत्ये करायला लागेल, म्हणून मरेल. तो
पाप करीत होता व तू त्याला सावध केले नाहीस म्हणून
तो मरेल. अशा वेळी त्याच्या मृत्यूबद्दल मी तुला जबाबदार
धरीन. त्याने केलेली चांगली कृत्ये लोक विसरून जातील.
21“पण तू सज्जन माणसाला सावध केलेस आणि पाप न
करण्याबद्दल सांगितलेस आणि त्याने पाप करण्याचे सोडून
दिले, तर तो मरणार नाही. का? कारण तू सांगितले
आणि त्याने ऐकले. अशा प्रकारे तू तुझा स्वत:चाच जीव
वाचविला.”
22मग तेथेच परमेश्वराचा वरदहस्त मला लाभला. तो
मला म्हणाला, “उठ आणि दरीकडे जा. तेथे मी तुझ्याशी
बोलेन.”
23मग मी उठलो आणि दरीकडे गेलो. खबार
कालव्याजवळ पाहिली होती तशीच परमेश्वराची प्रभा
तेथे होती. तेव्हा मी नतमस्तक झालो. 24पण वारा आला
आणि त्याने मला वर उचलले. तो मला म्हणाला, “घरी
जा, आणि स्वत:ला घरात कोंडून घे. 25मानवपुत्रा, लोक
दोऱ्या घेऊन येतील आणि तुला बांधतील. ते तुला बाहेर
लोकांमध्ये जाऊ देणार नाहीत. 26मी तुझी जीभ टाळ्याला
चिकटवीन. मग तुला बोलता येणार नाही. मग त्या लोकांना
ते चुकीचे वागत आहेत हे सांगायला कोणीही नसेल. का?
कारण ते नेहमीच माझ्याविरुद्ध जातात. 27मी तुझ्याशी
बोलेन आणि नंतर तुला बोलण्याची परवानगी देईन. पण
तू त्यांना ‘परमेश्वर, आपला प्रभू पुढील गोष्टी सांगतो’
असे सांगितलेच पाहिजे. एखाद्याने ऐकण्याचे ठरविले तरी
वाहवा, न ऐकण्याचे ठरविले तरी वाहवा! ते लोक नेहमीच
माझ्याविरुद्ध वागतात.

4 “मानवपुत्रा, एक वीट घे. त्यावर यरुशलेमचे चित्र
कोर 2मग तू म्हणजे नगरीला वेढा घातलेले सैन्य
आहेस असे मान. नगरीभोवती मातीची भिंत बांध. म्हणजे
नगरीवर हल्ला करणे सोपे होईल. त्या भिंतीपर्यंत जाणारे
कच्चे रस्ते तयार कर. भिंती फोडण्यासाठी मोठे ओंडके
आण आणि नगरीभोवती सैन्याचा तळ ठोक. 3एक लोखंडी
कढई तुझ्या व नगरीच्या मध्ये ठेव. ही कढई म्हणजे तुला
व नगरीला विभागणारी भिंतच होय. ह्या रीतीने तू त्या
नगरीच्या विरुद्ध आहेस हे दाखव. तू त्या नगरीला वेढा
घालून हल्ला करशील. का? कारण हे इस्राएलच्या
लोकांसाठी प्रतीक वा खूण असेल. ह्यावरून मी (देव)
यरुशलेमवर हल्ला करणार असल्याचे स्पष्ट होईल.
4“तू तुझ्या डाव्या कुशीवर निजले पाहिजेस आणि इस्राएल
लोकांची पापे तू तुझ्या शिरावर घेतलीस असे दाखविणाऱ्या
गोष्टी तू केल्या पाहिजेस. तू जितके दिवस डाव्या कुशीवर
झोपशील, तितके दिवस तुला त्यांच्या अपराधांचा बोजा
वाहावा लागेल. 5तू 390 दिवस* इस्राएलच्या अपराधांचा
बोजा वाहिला पाहिजेस एक दिवस एक वर्षाबरोबर असेल.
अशा प्रकारे, इस्राएलला किती काळ शिक्षा होईल ते मी
तुला सांगत आहे.
6“त्यानंतर तू 40 दिवस तुझ्या उजव्या कुशीवर झोपशील.
ह्या वेळी, 40 दिवस तू यहूदाच्या अपराधांचा भार वाहशील.
एक दिवस एक वर्षाबरोबर असेल. अशा रीतीने मी तुला
यहुदाच्या शिक्षेचा काळ सांगत आहे.”
7देव पुन्हा बोलला तो म्हणाला, “आता अस्तन्या सावर
आणि विटेवर हात उगार. तू यरुशलेमवर हल्ला करण्याचे
नाटक कर. तू माझा दूत म्हणून लोकांशी बोलत आहेस
हे दाखविण्यासाठी असे कर. 8आता पाहा, मी तुला दोरीने
बांधतो म्हणजे नगरीवरचा हल्ला पूर्ण होईपर्यंत* तू एका
कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळू शकणार नाहीस.”
9देव असेही म्हणाला, “तू भाकरीसाठी थोडे धान्य
मिळविले पाहिजे. गहू, सातू, कडधान्य, मसूर, मका व
खपल्या गहू घे. तो एका भांड्यात एकत्र करून दळ.
भाकरी करण्यासाठी तू हे पीठ वापरशील. तू एका कुशीवर
390 दिवस झोपला असताना फक्त ह्याच पिठाच्या भाकरी
खाशील. 10रोजच्या भाकरीसाठी तुला फक्त 1 पेला*

---

**390 दिवस** प्राचीन ग्रीक भाषांतरात “190 दिवस” म्हटले आहे.

**नगरीवरचा ... होईपर्यंत** हिब्रूतील शब्दांचा खेळ येथे आहे. मूळ हिब्रू शब्दाचा अर्थ “भुकेची वेळ” वा “संकटाची वेळ” अथवा “नगरीवर हल्ला” असा होतो.

**1 पेला** म्हणजे “20 शेकेल” (शेकेल हे एक ज्यूंचे जुने माप आहे.)

पीठ वापरता येईल. ह्या पिठापासून केलेली भाकरी
दिवसभर पुरवून पुरवून तू खाशील. 11तुला रोज थोडेच
म्हणजे 3 पेले* पाणी पिता येईल. दिवसभर पुरवून पुरवून
तुला ते प्यावे लागेल. 12रोज तुला तुझी भाकरी केलीच
पाहिजे. वाळलेल्या मानवी विष्ठेची शेणी घेऊन तुला ती
जाळली पाहिजे. ती भाकरी त्या मानवी विष्ठेवर भाजून
लोकांसमक्ष खाल्ली पाहिजे.” 13नंतर परमेश्वर म्हणाला,
“तुझे हे खाणे, परदेशांत इस्राएल लोकांना अमंगळ भाकरी
खावी लागेल, हेच दाखवून देईल. मी त्या लोकांना सक्तीने
इस्राएल सोडून परदेशांत जाण्यास भाग पाडले.”

14मग मी (यहेज्केल) म्हणालो, “हे परमेश्वरा, माझ्या
प्रभु, पण मी कधीच अमंगळ अन्न खाल्लेले नाही.
एखाद्या रोगाने मेलेल्या प्राण्याचे अथवा हिंस्त्र प्राण्याने
मारलेल्या जनावराचे मांस मी कधीच खाल्लेले नाही.
बालपणापासून आजपर्यंत मी कधीच अमंगळ मांस खाल्लेले
नाही. असे काहीही मी कधीच तोंडात घातलेले
नाही.”

15मग देव मला म्हणाला, “ठीक आहे! मी तुला भाकरी
भाजण्यासाठी मानवी विष्ठेऐवजी शेण वापरू देईन. तुला
मानवी विष्ठा वापरावी लागणार नाही.”

16पुढे देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, यरुशलेमच्या
धान्य पुरवठ्याचा मी नाश करीत आहे. लोकांना खायला
अगदी थोडी भाकरी मिळेल. धान्य पुरवठ्याबाबत त्यांना
अत्यंत चिंता पडेल. त्यांना पिण्यालाही अगदी कमी पाणी
मिळेल. ते पाणी पिताना घाबरतील. 17का? कारण लोकांना
पुरेसे अन्न व पाणी मिळणार नाही. लोक एकमेकांना
भयंकर घाबरतील. त्यांच्या पापांमुळे ते क्षीण होत चाललेले
एकमेकांना दिसतील.”

5 1–2“मानवपुत्रा, तुझ्या भुकेच्या वेळे नंतर,* तू ह्या
गोष्टी केल्याच पाहिजेत. तू एक धारदार तलवार घे.
न्हाव्याच्या वस्तऱ्याप्रमाणे ती वापर आणि तुझे केस व
दाढी कापून टाक. केस तराजूत घालून त्यांचे वजन कर.
तुझ्या केसांचे तीन सारखे भाग कर. तुझे 1/3 केस (एक
भाग) ‘नगरीवर’ (विटेवर) ठेव आणि जाळ. याचा अर्थ
काही लोक नगराच्या आत मरतील. मग तलवारीने 1/3
केसांचे (आणखी एका भागाचे) बारीक बारीक तुकडे
कर आणि ते नगरीभोवती (विटेभोवती) टाक. ह्याचा
अर्थ काही लोक नगरामध्ये मरतील. मग राहिलेले 1/3
केस (उरलेला भाग) हवेत भिरकावून दे. वारा त्यांना
दूर उडवून नेऊ देत. ह्याचा अर्थ मी तलवार उपसून
दूरच्या देशांपर्यंत जाऊन काही लोकांचा पाठलाग करीन.
3पण तू जाऊन काही केस आण व त्यांना तुझ्या अंगरख्यात
बांध. ह्याचा अर्थ माझ्या काही लोकांना मी वाचवीन.
4उडून गेलेल्या केसातील काही केस मिळव आणि ते
विस्तवावर टाक. ह्याचा अर्थ अग्नी इस्राएलच्या संपूर्ण
घराचा जाळून नाश करील.”

5मग परमेश्वर, माझा प्रभू मला म्हणाला, “ती वीट
म्हणजे जणू यरुशलेम आहे. मी यरुशलेमला इतर राष्ट्रांच्या
मध्ये ठेवले आहे. आणि तिच्याभोवती इतर देश आहेत.
6यरुशलेमच्या लोकांनी माझ्या नियमांविरुद्ध बंड केले.
दुसऱ्या कोठल्याही राष्ट्रांपेक्षा ते वाईट आहेत. त्यांच्या
भोवती असलेल्या देशांतील लोकांपेक्षा त्यांनी माझे नियम
जास्त मोडले. त्यांनी माझ्या आज्ञा मानायचे नाकारले.
त्यांनी माझे नियम पाळले नाहीत.”

7म्हणून परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, “मी तुमच्यावर
भयंकर संकट आणीन. का?कारण तुम्ही माझे नियम
पाळले नाहीत, माझ्या आज्ञा मानल्या नाहीत. तुमच्या
आजूबाजूला राहणाऱ्या लोकांपेक्षा तुम्हीच माझे नियम
अधिक मोडलेत. एवढेच नाही तर ते लोक ज्या गोष्टी
चुकीच्या आहेत असे म्हणत होते, त्याच तुम्ही केल्यात.”
8म्हणून परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, “म्हणून आता मी
सुद्धा तुमच्या विरुद्ध आहे. ते इतर लोक पाहात असतानाच
मी तुला शिक्षा करीन. 9पूर्वी कधी केल्या नव्हत्या अशा
गोष्टी मी तुला करीन. आणि तशा भयंकर गोष्टी मी
कधीच पुन्हा करणार नाही. का? कारण तुम्ही फार
भयंकर गोष्टी केल्या. 10यरुशलेममधील लोक
उपासमारीने एवढे हैराण होतील की आईवडील मुलांना
व मुले आईवडीलांना खातील. मी अनेक मार्गांनी तुम्हाला
शिक्षा करीन. ज्यांना मी जिवंत ठेवलंय त्यांना मी सगळीकडे
पसरवीन.”

11परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, “यरुशलेम, मी माझ्या
जीवनाची शपथ घेऊन सांगतो की मी तुला शिक्षा करीन.
मी तुला शिक्षा करीन असे वचन देतो. का? कारण
माझ्या पवित्र स्थानावर तुम्ही भयंकर गोष्टी केल्या. त्यामुळे
ते स्थान अपवित्र झाले. मी तुम्हाला शिक्षा करीन. अजिबात
दया दाखविणार नाही. मला तुझ्याबद्दल वाईट वाटणार
नाही. 12तुमचे एक तृतीयांश लोक रोगराईने व उपासमारीने
नगरातच मरतील. एक तृतीयांश नगराबाहेर लढाईत
मरतील. आणि उरलेल्या एक तृतीयांश लोकांचा माझी
तलवार, दूरवरच्या देशांपर्यंत पाठलाग करील. तुमच्या
आजूबाजूला राहणारे लोक त्यांना लढाईत ठार करतील.
मगच माझा राग शांत होईल. 13ह्यानंतरच तुमच्या
लोकांवरचा माझा राग मावळेल. माझ्याशी ते अतिशय
वाईट वागले, त्यामुळे त्यांना शिक्षा होत आहे, हे मला
माहीत आहे. तसेच, ‘मीच परमेश्वर आहे व
त्यांच्याबद्दलच्या अतीव प्रेमापोटी* मी त्यांच्याशी बोललो
हे त्यांना त्या वेळी समजेल.”

---

**3 पेले** शब्दश: “1/6 हीन” (एक जुने माप.)

**तुझ्या … वेळेनंतर** किंवा “तू नगरीवर हल्ला केल्यानंतर” पाहा यहेज्केल 4:8.

**अतीव्र प्रेम** ह्या शब्दाचा हिबूतील अर्थ प्रेम, तिरस्कार, राग, आस्था, मत्सर अशा तीव्र भावना.

14देव म्हणाला, “यरुशलेम, मी तुझा नाश करीन. मग तू म्हणजे नुसता दगडमातीचा ढीग होशील. तुझ्या आजूबाजूचे लोक तुझी चेष्टा करतील. प्रत्येक येणारा जाणारा तुझी टर उडवेल. 15तुझ्या आजूबाजूचे लोक जशी तुझी चेष्टा करतील, तसेच तुझ्यावरून ते धडाही घेतील. मी रागावलो आणि तुला शिक्षा केली हे ते पाहतील. मी खूपच संतापलो होतो. मी तुला ताकीद दिली. मी परमेश्वर, काय करणार आहे, ते तुला सांगितले होते. 16मी तुझ्यावर उपासमारीची भयंकर वेळ आणीन, मी तुझा नाश करणाऱ्या गोष्टी तुझ्याकडे पाठवीन, हे मी तुला सांगितले होतेच. ती उपासमारीची वेळ पुन्हा पुन्हा यावी. मी तुझा धान्य पुरवठा बंद करीन हे मी तुला सांगितले होते. 17मी तुझ्यावर उपासमार आणि हिंस्त्र प्राणी पाठवीन. आणि ते तुझ्या मुलांना मारतील हे मी तुला सांगितले होते. नगरात सगळीकडे रोगराई व मृत्यू थैमान घालेल आणि शत्रू सैनिकांना तुझ्याविरुद्ध लढण्यासाठी आणीन, असे मी तुला बजावले होते. ह्या सर्व गोष्टी घडतील असे मी म्हणजेच परमेश्वराने तुला सांगितले होते आणि तसेच घडेल.”

6 मग पुन्हा मला परमेश्वराचा संदेश मिळाला. 2तो म्हणाला, “मानवपुत्रा, इस्राएलच्या पर्वतांकडे वळ. माझ्यातर्फे त्यांच्याविरुद्ध बोल. 3त्या पर्वतांना पुढील गोष्टी सांग.

‘इस्राएलच्या पर्वतांनो, परमेश्वराकडून, माझ्या प्रभूकडून आलेला संदेश ऐका. देव, माझा प्रभू, टेकड्या, पर्वत, घळी, दऱ्या या सर्वांना उद्देशून म्हणतो की पाहा! मी (म्हणजेच देव) तुमच्याविरुद्ध लढण्यासाठी शत्रूला आणीत आहे. मी तुमच्या उच्चस्थानांचा नाश करीन. 4–5तुमच्या वेदींचे तुकडे तुकडे केले जातील, तुमच्या धूप दानांचा ही चुराडा केला जाईल. तुमची प्रेते मी त्या घाणेरड्या मूर्तीपुढे फेकून देईन. मी तुमची हाडे तुमच्या वेदींभोवती पसरवीन. त्या गलिच्छ मूर्तीपुढे मी इस्राएल लोकांची प्रेते टाकीन. 6तुमचे लोक कोठेही राहात असले तरी त्यांचे वाईट होईल. त्यांची शहरे दगडमातीचे ढिगारे होतील. त्यांच्या उच्चस्थानांचा नाश होईल. का? कारण त्यांचा परत कधीही पूजेसाठी उपयोग केला जाऊ नये! त्या सगळ्या वेदींचा नाश केला जाईल. लोक त्या घाणेरड्या मूर्तीची पुन्हा कधीही पूजा करणार नाहीत. त्या धूपदानांचे तुकडे तुकडे केले जातील. तुम्ही तयार केलेल्या सर्व गोष्टींचा नाश केला जाईल. 7तुमचे लोक मारले जातील. मग तुम्हाला कळेल की मीच परमेश्वर आहे.”

8देव म्हणाला, “तुमच्यातील काही लोकांना मी निसटू देईन. ते दुसऱ्या देशांत थोड्या काळाकरिता राहतील. मी त्यांना विखरून टाकीन आणि दुसऱ्या देशांत राहायला भाग पाडीन. 9मग ह्या वाचलेल्या* लोकांना कैदी म्हणून नेले जाईल. त्यांना सक्तीने दुसऱ्या देशांत राहावे लागेल. पण ते लोक माझे स्मरण ठेवतील. मी त्यांचे हृदयपरिवर्तन केले. म्हणून त्यांनी केलेल्या दुष्कृत्याबद्दल ते स्वत:चीच घृणा करतील. भूतकाळात, त्यांनी माझ्याकडे पाठ फिरविली, माझा त्याग गेला. आपल्या नवऱ्याला सोडून दुसऱ्या पुरुषांच्या मागे लागणाऱ्या बाईप्रमाणे, ते त्या गलिच्छ मूर्तीच्या मागे लागले. त्यांनी भयंकर कृत्ये केली. 10पण ‘मीच परमेश्वर आहे’ हे त्यांना कळेल. त्यांना हेही कळेल की मी एखादी गोष्ट करायचे ठरविले, की ती करणारच. त्यांचे वाईट मीच केले, हे त्यांना समजेल.”

11नंतर परमेश्वर, माझा प्रभू, मला म्हणाला, “टाळ्या वाजवून आणि तुझे हातपाय आपटून इस्राएलच्या लोकांनी केलेल्या दुष्कृत्यांविरुद्ध बोल. ते रोगराईने व उपासमारीने मरतील अशी त्यांना ताकीद दे. ते युद्धात कामी येतील, असे त्यांना सांग. 12दूरचे लोक रोगराईने मरतील. ह्या जागेच्या आसपासचे लोक लढाईत मरतील आणि नगरात राहिलेले लोक उपासमारीने मरतील. मगच माझा राग शांत होईल. 13आणि तेव्हाच तुम्हाला मीच परमेश्वर आहे हे कळेल, जेव्हा तुमची प्रेते, तुमच्या घाणेरड्या मूर्ती आणि तुमच्या वेदी यांच्यापुढे पडतील, तेव्हाच तुम्हाला मी परमेश्वर असल्याचे समजून येईल. उंच टेकड्या, पर्वत, हिरवी झाडे, दाट पालवीची एलाची झाडे अशा ठिकाणी म्हणजेच तुमच्या पूजेच्या प्रत्येक ठिकाणी प्रेते पडतील. ह्या सर्व ठिकाणी तुम्ही बळी अर्पण केले आणि घाणेरड्या मूर्तीपुढे सुवासिक धूप जाळला. 14पण मी माझा हात उगारीन व तुला आणि तुझ्या लोकांना शिक्षा करीन मी मग ते लोक कुठेंही राहात असोत ह्या देशांचा नाश करीन. तो मग दिबला वाळवंटा पेक्षा ओसाड होईल. तेव्हाच त्यांना मीच परमेश्वर आहे हे कळून येईल.”

7 मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. 2तो म्हणाला, “मानवपुत्रा, हा आहे परमेश्वराचा, तुझ्या प्रभूचा, इस्राएलच्या भूमीसाठी संदेश.

शेवट येत आहे. संपूर्ण देशाचा नाश होईल.
3आता तुमचा अंतकाळ येत आहे. मी तुमच्यावर किती रागावलो आहे ते दाखवीन. तुम्ही केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मी तुम्हाला शिक्षा करीन. तुम्ही केलेल्या भयंकर कृत्यांची किंमत मी तुम्हाला मोजायला लावीन.
4मी तुम्हाला अजिबात दया दाखविणार नाही. मला तुमच्याबद्दल वाईट वाटणार नाही. तुमच्या दुष्कृत्यांबद्दल मी तुम्हाला सजा देत आहे. तुम्ही फारच भयंकर कर्मे केलीत. आता तुम्हाला कळेल की मीच देव आहे.”

5नंतर परमेश्वराने, माझ्या प्रभुने पुढील गोष्टी सांगितल्या. “एकापाठोपाठ एक अरिष्ट येईल. 6शेवट येत आहे. तो लवकरच येईल. 7इस्राएलवासीयांनो, तुम्ही

---

**वाचलेले** अरिष्टातून बचावलेले लोकच. येरे अर्थ “शत्रू सैन्यांच्या हल्ल्यात यहूदा व इस्राएलचा नाश झाला.” ह्या नाशातून वाचलेले यहूदी लोक.

शिटीचा आवाज ऐकत आहात ना? शत्रू येत आहे. शिक्षेची ती वेळ लवकरच येत आहे. पर्वतांवरून शत्रूचा आवाज अधिकाधिक वाढत चालला आहे. 8आता लवकरच, तुम्हाला, मी किती रागावलो आहे, ते कळेल. मी माझा सगळा राग तुमच्यावर काढीन. तुम्ही केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मी तुम्हाला शिक्षा करीन. तुम्ही केलेल्या भयंकर कर्मांची किंमत मी तुम्हाला मोजायला लावीन. 9मी तुम्हाला अजिबात दया दाखविणार नाही. मला तुमच्याबद्दल वाईट वाटणार नाही. तुम्ही केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मी तुम्हाला शिक्षा करत आहे. तुम्ही फारच भयानक कृत्ये केली. आता तुम्हाला कळेल की तुम्हाला दणका देणारा मी तुमचा परमेश्वर आहे.

10"रोप उगवते व वाढते आणि त्याला फुले येतात, त्याप्रमाणे शिक्षेची ती वेळ आली आहे. देवाने खूण केली आहे. शत्रू तयार झाला आहे. शिक्षेला सुरवात होत आहे. हातातील काठीला अंकुर फुटले आहेत.* गर्विष्ठ राजा (नबुखद्नेस्सर) अधिक तयार झाला आहे. 11तो हिंसक माणूस त्या दुष्टांना शिक्षा करायला सज्ज झाला आहे. इस्राएलमध्ये खूप लोक आहेत पण तो त्यांच्यातला नाही. तो त्या गर्दीतला एक नाही. तो कोणी त्या लोकांचा मोठा नेता नाही.

12"ती शिक्षेची वेळ आली आहे. तो दिवस जवळच आहे. विकत घेणाऱ्यांना आनंद होणार नाही, विकणाऱ्यांना खेद वाटणार नाही. का? कारण प्रत्येकालाच ती भयंकर शिक्षा भोगावी लागले. 13स्वत:ची मालमत्ता विकणाऱ्या लोकांना ती कधीच परत मिळणार नाही.* एखादा जरी जिवंत राहिला, तरी त्याला ती मिळणार नाही. का? कारण हा दृष्टान्त सर्व लोकांसाठी आहे. त्यामुळे एखादा जिवंत राहिल्यास, बाकीच्यांना काही आनंद होणार नाही.

14"ते तुतारी फुंकून लोकांना सावध करतील. लोक लढायला सज्ज होतील पण ते लढण्यास पुढे सरसावणार नाहीत. का? कारण मी सगळ्यांना माझ्या कोपाची तीव्रता दाखवून देईन. 15शत्रू नगरीबाहेर तलवार घेऊन सज्ज आहे. रोगराई व उपासमार नगरीत आहेत. एखादा बाहेर गेला, तर शत्रू सैनिक त्याला ठार करील. आणि ते नगरीत राहिले तर, उपासमार व रोगराई त्यांचा नाश करील.

16"पण काही लोक निसटतील ते पर्वताकडे धाव घेतील. पण त्यांना सुख लागणार नाही. पण स्वत:च्याच पापांमुळे ते दु:खी होतील. ते रडतील आणि दु:खाने पारव्याप्रमाणे घुमतील. 17लोक इतके दमलेले व दु:खी कष्टी असतील की ते हात उचलू शकणार नाहीत, त्यांचे पाय पाण्याप्रमाणे होतील. 18ते शोकप्रदर्शक कपडे घालतील आणि अतिशय भयभीत होतील. प्रत्येक चेहरा लज्जित झालेला तुम्हाला दिसेल. दु:ख प्रकट करण्यासाठी ते आपली डोकी भादरतील. 19ते त्यांच्याजवळील चांदीच्या मूर्ती रस्त्यावर टाकतील. सोन्याच्या मूर्ती त्यांना घाणेरड्या चिंध्यांप्रमाणे वाटतील. का? कारण परमेश्वराच्या क्रोधाग्नीतून त्या मूर्ती त्यांना वाचवू शकणार नाहीत. त्या मूर्ती म्हणजे फक्त लोकांचे पतन व्हावे (पाप करावे) म्हणून रचलेले सापळे होते. त्या लोकांना त्यांच्या मूर्ती अन्न देणार नाहीत व स्वत:चेही पोट भरणार नाहीत.

20"त्या लोकांनी आपल्या सुंदर दागिन्यांचा उपयोग करून मूर्ती घडविली. त्यांना त्याचा अभिमान वाटत होता. त्यांनी भयानक मूर्ती बनविल्या. त्यांनी अशा घाणेरड्या वस्तू तयार केल्या. म्हणून मी (देव) त्यांना घाणेरड्या लक्तराप्रमाणे दूर फेकून देईन. 21त्यांना मी परकीयांच्या हाती सोपवीन. ते परके त्यांची टर उडवितील. ते काहींना ठार करतील तर काहींना कैद करतील. 22मी तोंड फिरवीन, त्यांच्याकडे पाहणारसुद्धा नाही. ते परके लोक माझ्या मंदिराचा विध्वंस करतील. त्या पवित्र मंदिराच्या गाभाऱ्यात ते शिरतील आणि मंदिर अपवित्र करतील.

23"कैद्यांसाठी बेड्या तयार करा. का? कारण पुष्कळ लोकांना, दुसऱ्यांना ठार मारल्याबद्दल, शिक्षा केली जाईल. नगरीच्या प्रत्येक जागी हिंसा होईल. 24मी दुसऱ्या राष्ट्रांतून दुष्ट लोक आणीन. ते इस्राएलच्या लोकांची सर्व घरे बळकावतील. तुमचे गर्वाचे घर मी खाली करीन. तुमची पूजास्थाने दुसऱ्या राष्ट्रांतील लोक ताब्यात घेतील.

25"तुम्ही भीतीने कापाल. तुम्ही शांतीचा शोध घ्याल पण ती कोठेच मिळणार नाही. 26एकामागून एक वाईट गोष्टी तुम्ही ऐकाल. तुमच्या कानावर फक्त वाईट बातम्याच पडतील. तुम्ही संदेष्ट्याला शोधून दृष्टान्ताबद्दल विचारायला पाहाल, पण तुम्हाला असा कोणीच भेटणार नाही. याजकाजवळ तुम्हाला शिकविण्यासारखे काहीच नसेल. वडीलधारी मंडळी (नेते) तुम्हाला योग्य सल्ला देणार नाहीत. 27तुमचा राजा मृतांसाठी रडत असेल. नेते शोकप्रदर्शक कपडे घालतील. सामान्य लोकांची घाबरगुंडी उडेल. का? कारण त्यांच्या कर्मांचे फळ मी त्यांना देईन. मी त्यांची शिक्षा ठरवीन, आणि ती अंमलात आणीन. मगच त्या लोकांना मीच परमेश्वर असल्याचे कळून येईल."

8 ऐक दिवशी मी (यहेज्केल) माझ्या घरात बसलो होतो व यहुदातील वडीलधारी लोक (नेते) माझ्यासमोर बसले होते. परागंदा काळातील सहाव्या वर्षाच्या

---

**हातातील ... आहेत** ह्याचा सबंध देवाने अहरोनच्या काठीला कळ्या फुटविल्या होत्या त्या गोष्टीशी पुरावा. ह्या काळात काही लेवी मोशेच्या व अहरोनच्या विरुध्द गेले, तेव्हा देवाने त्यांचा संपूर्ण नाश केला पाहा गणना 16:1-17:11.

**स्वत:ची मालमत्ता ... मिळणार नाही** प्राचीन काळी इस्राएलमध्ये मालमत्ता कोणा एका व्यक्तीची नसून घराण्याची असायची. एखादी व्यक्तीने मालमत्ता विकल्यास, ती वार्षिकोत्सवाच्या वेळेला, त्या घराण्याला परत मिळे. येथे यहेज्केल सांगतो की ती कधीच परत मिळणार नाही.

सहाव्या महिन्याच्या (सप्टेंबरच्या) पाचव्या दिवसाची ही
गोष्ट आहे. एकदम माझ्यावर परमेश्वराचे, सामर्थ्य आले.
2–3 ज्वालेप्रमाणे काहीतरी मला दिसले. ते मनुष्याकृतीप्रमाणे
दिसत होते. कमरेखाली अग्नीप्रमाणे दिसत होते.
कमरेवरचा भाग तप्त धातूप्रमाणे तेजस्वी व चमकदार
होता. मग मला हातासारखे काहीतरी दिसले. तो हात पुढे
आला आणि त्याने माझे केस पकडले. मग वाऱ्याने मला
वर उचलले व देवाच्या दृष्टान्तातच त्या हाताने मला
यरुशलेमला नेले. त्याने मला उत्तरेकडच्या आतील
दाराजवळ नेले. देवाला ज्याचा मत्सर वाटत होता, तो
पुतळा तेथेच होता. 4 पण इस्राएलच्या देवाची प्रभाही तेथे
होती. खबार कालव्याजवळ मला झालेल्या दृष्टान्तातील
प्रभेप्रमाणेच ही प्रभा होती.

5 देव माझ्याशी बोलला. तो म्हणाला, “मानवपुत्रा,
उत्तरेकडे पाहा” म्हणून मी उत्तरेकडे पाहिले तो काय,
उत्तरेकडच्या वेदी-प्रवेशद्वाराजवळ देवाच्या मत्सराला
कारणीभूत झालेला तो पुतळा उभा होता.

6 मग देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, इस्राएलचे लोक
किती भयानक गोष्टी करीत आहेत, हे तू पाहतोस ना?
त्यांनी ही गोष्ट अगदी माझ्या मंदिरालगत उभी केली.
आणि जर तू माझ्याबरोबर आलास, तर तुला आणखी
भयानक गोष्टी दिसतील.”

7 मग मी मंदिराच्या चौकाच्या प्रवेशद्वाराकडे गेलो. तेथे
भिंतीत मला एक छिद्र दिसले. 8 देव मला म्हणाला,
“मानवपुत्रा, त्या भिंतीला छिद्र पाड.” मी तसेच केले. तेथे
मला एक दार दिसले.

9 मग देव मला म्हणाला, “लोक येथे भयंकर पाप
करीत आहेत ते जाऊन पाहा.” 10 म्हणून मी आत जाऊन
पाहिले ज्यांचा विचारही अमंगळ वाटावा अशा सर्व
प्रकारच्या सरपटणाऱ्या प्राण्यांच्या व पशूंच्या मूर्ती तेथे
होत्या. त्याच घाणेरड्या मूर्तींची इस्राएलचे लोक पूजा करीत
होते. प्रत्येक भिंतीवर त्या प्राण्यांची चित्रे कोरलेली
होती.

11 नंतर माझ्या लक्षात आले की तेथे शाफानचा मुलगा
याजन्या व सत्तर वडीलधारी नेते इतर लोकांबरोबर पूजा
करीत होते. ते लोकांच्या अगदी पुढेच होते. प्रत्येक नेत्याच्या
हातात धूपदान होते. धूपाचा सुवास आसमंतात दरवळला
होता. 12 देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, इस्राएलचे
वडीलधारे अंधारात काय करीत आहेत. हे तुला दिसतेय
ना? प्रत्येक माणसाला त्याच्या खोट्या देवासाठी वेगळी
खोली आहे. ते लोक मनाशी म्हणतात ‘परमेश्वर आम्हाला
पाहू शकत नाही. परमेश्वराने ह्या देशाचा त्याग केला.’”
13 नंतर देव म्हणाला, “जर तू माझ्याबरोबर आलास, तर
हे लोक आणखी भयंकर कृत्ये करीत असल्याचे तुला
दिसेल.”

14 मग देवाने मला परमेश्वराच्या मंदिराच्या
प्रवेशद्वाराकडे नेले. हे द्वार उत्तरेला होते. तेथे स्त्रिया बसून
रडत होत्या. त्या खोटा देव तम्मुज याच्यासाठी शोक करीत
होत्या.

15 देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, ह्या भयंकर गोष्टी
बघतो आहेस ना? माझ्याबरोबर ये म्हणजे तुला ह्यापेक्षा
वाईट गोष्टी दिसतील.” 16 मग त्याने मला परमेश्वराच्या
मंदिरातील आतल्या अंगणात नेले. तेथे पंचवीसजण
नतमस्तक होऊन पूजा करीत होते. ते द्वारमंडप व वेदी
यांच्यामध्ये होते. पण त्यांची तोंडे चुकीच्या दिशेला होती.
पवित्रस्थळाकडे त्यांच्या पाठी होत्या. ते नतमस्तक होऊन
सूर्याची पूजा करीत होते.

17 मग देव म्हणाला, “मानवपुत्रा, हे पाहतो आहेस ना?
यहुदाच्या लोकांना माझे मंदिर अशी भयंकर कृत्ये
करण्याएवढे क्षुद्र वाटते. हा देश हिंसेने भरला आहे. ते
मला संतापविणारी कृत्ये सतत करीत आहेत. पाहा! खोट्या
देवाप्रमाणेच चंद्राला मान देण्यासाठी नाकांत नथनी घालीत
आहेत.* 18 मी माझा राग त्यांच्यापाशी प्रकट करीन. मी
त्यांना अजिबात दया दाखविणार नाही. मला त्यांच्याबद्दल
वाईट वाटणार नाही. ते मला हाका मारतील पण मी
त्यांचे मुळीच ऐकणार नाही.”

9 मग देव नगरीला शिक्षा करणाऱ्या लोकांच्या
नेत्यांशी मोठ्याने बोलला. प्रत्येक नेत्याच्या हातात
स्वत:ची विध्वंसक शस्त्रे होती.* 2 नंतर मी वरच्या
प्रवेशद्वाराकडून सहा माणसांना येताना पाहिले. हे प्रवेशद्वार
उत्तरेला होते. प्रत्येकाच्या हातात प्राणघातक शस्त्रे
होती. एकाने तागाचे कपडे घातले होते. त्याच्या कमरेला
लेखणी आणि दौत होती. ते लोक मंदिरातील काशाच्या
वेदीपाशी जाऊन उभे राहिले. 3 करूब दूतांवर असणारी
देवाची प्रभा फाकली आणि मंदिराच्या दारापर्यंत गेली.
उंबरठ्यावर ती थांबली. मग तिने तागाचे कपडे घातलेल्या
व लेखणी व दौत जवळ असलेल्या माणसाला हाक
मारली.

4 मग परमेश्वर (म्हणजेच प्रभा) त्याला म्हणाला,
“यरुशलेम नगरीत फीर आणि लोक करीत असलेल्या
दुष्कृत्यांबद्दल दुःखी आणि अस्वस्थ असलेल्या प्रत्येकाच्या
कपाळावर खूण कर.”

5–6 मग देव इतरांशी बोलताना मी ऐकले, “तुम्ही त्या
माणसाच्या मागे जावे. ज्यांच्या कपाळावर खूण नाही त्यांना
तुम्ही ठार केलेच पाहिजे. मग ते वडीलधारी (नेते) असोत
वा तरुण तरुणी असोत किंवा मुले व त्यांच्या आया असोत.
कपाळावर खूण नसलेल्या प्रत्येकाला तुम्ही मारलेच
पाहिजे. अजिबात दया दाखवू नका. कोणाचीही कीव
करू नका. माझ्या मंदिरापासूनच सुरवात करा.” मग

---

**खोट्या देवाप्रमाणेच ... घालीत आहेत** किंवा “पाहा! ते त्यांच्या नाकात डहाळ्या अडकावीत आहेत.”

**प्रत्येक नेत्याच्या ... शस्त्रे होती** हिब्रूत हे वाक्य यहेज्केल 8:11 प्रमाणे आहे.

त्यांनी मंदिरा समोर असलेल्या वडीलधाऱ्यांपासूनच
(नेत्यांपासूनच) सुरवात केली.
7देव त्यांना म्हणाला, “ही जागा अस्वच्छ करा. हे अंगण
प्रेतांनी भरा! आता जा.” म्हणून मग ते नगरीत गेले आणि
त्यांनी लोकांना ठार केले.
8ती माणसे लोकांना मारायला गेली असताना, मी तेथेच
थांबलो. मी वाकून नमस्कार केला आणि आक्रोश करून
म्हणालो, “परमेश्वरा, माझ्या प्रभू, यरुशलेमवरचा तुझा
राग दाखविण्यासाठी इस्राएलात शेष राहिलेल्या प्रत्येकाला
तू ठार मारणार आहेस का?”
9देव म्हणाला, “इस्राएल आणि यहुदाच्या लोकांनी अनंत
पापे केली आहेत. ह्या देशात सगळीकडे खून होत आहेत.
ही नगरी अपराधांनी भरून गेली आहे. का? कारण
लोक मनाशीच म्हणतात, ‘देवाने ह्या देशाचा त्याग केला.
आम्ही काय करीत आहोत, हे त्याला दिसू शकत नाही.’
10मी अजिबात दया दाखविणार नाही. त्या लोकांबद्दल
मला वाईट वाटणार नाही. त्यांनी स्वत:वरच संकट ओढवून
घेतले आहे. मी फक्त त्यांना योग्य अशी शिक्षा देत आहे.
11मग तागाचे कपडे घातलेला व लेखणी आणि दौत
जवळ असणारा माणूस म्हणाला, “तुझ्या आज्ञेचे मी पालन
केले.”

10 मग मी करूब दूतांवर असलेल्या वाडग्याकडे
पाहिले. तो इंद्रनीलाप्रमाणे नितळ निळा दिसत
होता. आणि त्यावर सिंहासनासारखे काहीतरी होते. 2नंतर
सिंहासनावर जो बसलेला होता तो तागाचे कपडे घातलेल्या
देव म्हणाला, “करूब दूताच्या खाली असलेल्या चाकांच्या
मधल्या जागेत* पाऊल टाक. त्यांच्या मधून थोडे निखारे
घे. व ते यरुशलेमवर भिरकावून दे.”
तो माणूस माझ्या जवळून पुढे गेला. 3तो करूबाकडे
गेला तेव्हा करूब मंदिराच्या दक्षिणेकडील भागात उभे
होते. ढगाने आतले अंगण व्यापले. 4मग करूब दूतांवरून
परमेश्वराची प्रभा फाकली आणि मंदिराच्या उंबरठ्यापर्यंत
पोहोचली. मग ढगाने मंदिरच व्यापले आणि परमेश्वराच्या
प्रभेतून निघालेल्या तेजस्वी प्रकाशाने सर्व अंगणच व्यापले.
5मग करूबांच्या पंखाचा आवाज ऐकला. सर्वशक्तिमान
देव बोलू लागताच होणाऱ्या गडगडाटी आवाजासारखा
तोही आवाज प्रचंड होता. बाहेरच्या अंगणापर्यंत तो सहज
ऐकू येऊ शकत होता.
6करूबांच्या मध्ये असलेल्या चाकातल्या दरम्यान
जाऊन निखारे आणण्याची आज्ञा देवाने तागाचे कपडे
घातलेल्या माणसाला दिली. मग तो त्या ढगात शिरला व
एका चाकाजवळ उभा राहिला. 7मग एका करूबाने हात
लांब करून, त्यांच्यामधील काही धगधगते निखारे उचलले
आणि त्या माणसाच्या हाती दिले. मग तो माणूस निघून
गेला. 8(करूबांच्या पंखाखाली माणसाच्या हाताप्रमाणे
दिसणारा अवयव होता.)
9मग तेथे चार चाके असल्याचे माझ्या लक्षात आले.
प्रत्येक करूबाजवळ एक चाक होते. ती चाके नितळ
तृणमण्याप्रमाणे दिसत होती. 10ती चारही चाके सारखीच
होती. चाकात चाक असल्याप्रमाणे ती दिसत होती. 11ती
चालताना कोठल्याही दिशेने जात. पण करूब चालताना
कोणत्याही बाजूला वळत नसत. ज्या बाजूस त्यांचे डोके
होते, त्या बाजूसच ते जात. ते इकडे तिकडे वळत नसत.
12त्यांच्या सर्वांगावर म्हणजेच पाठींवर, हातांवर, पंखांवर
डोळे होतेच पण त्याशिवाय चाकांवरही डोळे होते. चारही
चाकांना डोळे होते. 13“चाकांच्या मधली जागा” असे त्या
चाकांना म्हटलेले मी ऐकले.
14–15प्रत्येक करूब दूताला चार तोंडे होती. पहिले
करूबाचे तोंड, दुसरे माणसाचे तोंड, तिसरे सिंहाचे तोंड व
चवथे गरूडाचे तोंड खबार कालव्याजवळच्या दृष्टान्तात
मी पाहिलेले प्राणी म्हणजे करूब दूतच होते.*
मग करूब हवेत उडाले. 16आणि चाकेही त्यांच्याबरोबर
वर गेली. जेव्हा करूब पंख पसरून हवेत उडत, तेव्हा
चाके दिशा बदलत नसत. 17करूब हवेत उडाले, तर
चाकेही उडत. ते स्थिर उभे राहिले, तर चाकेही स्थिर
राहात. का? कारण प्राण्यांचा वारा (शक्ती) त्यांच्यात होता.
18मग परमेश्वराची प्रभा मंदिराच्या उंबरठ्यावरून
करूबांच्या वर जाऊन थांबली. 19मग करूबांनी पंख
पसरले व ते हवेत उडाले. मी त्यांना मंदिर सोडून जाताना
पाहिले. चाकेही त्यांच्याबरोबर गेली मग ते देवाच्या
मंदिराच्या पूर्वेकडच्या प्रवेशद्वाराशी थांबले. इस्राएलच्या
देवाची प्रभा त्यांच्या वरच्या बाजूला होती. 20मग मी खबार
कालव्याजवळ इस्राएलच्या देवाच्या प्रभेखाली पाहिलेल्या
प्राण्याला ओळखले आणि माझ्या लक्षात आले की ते
प्राणी म्हणजे करूब दूतच होते. 21प्रत्येक प्राण्याला चार
तोंड व चार पंख होते. पंखाखाली मानवी हाताप्रमाणे
दिसणारा अवयव होता. 22खबार कालव्याजवळ पाहिलेल्या
चार तोंडाप्रमाणेच करूब दूतांची तोंडे होती. ते जात
असलेल्या दिशेकडेच सरळ पाहात होते.

11 मग वाऱ्याने मला परमेश्वराच्या मंदिराच्या
पूर्व–द्वाराजवळ नेले. ह्या दाराचे तोंड उगवतीला
होते. त्या प्रवेशद्वाराच्या तोंडाशी मी पंचवीस लोकांना पाहिले.
त्यांत अज्जूरचा मुलगा याजन्या आणि बनायाचा मुलगा
पलट्या हेही होते. हे लोकांचे नेते होते.
2मग देव मला म्हणाला, “मानवपुत्रा, ह्या नगरीत दुष्ट
बेत करणारे लोक हेच होत. हे लोक इतर लोकांना
वाईट गोष्टी करायला सांगतात. 3ते म्हणतात, ‘आपण

---

**चाकांच्या मधल्या जागेत** वादळाचा ढग वा वादळी ढग पहिल्या प्रकरणात वर्णन केलेले वादळ वा ढग हाच असावा. हिब्रूत या शब्दाचा अर्थ “चाके वा रथ असाही कदाचित् असू शकेल.” पाहा यहेज्केल 1.

**खबार कालव्याजवळच्या ... होते** पाहा यहेज्केल 1.

आपली घरे पुन्हा लवकरच बांधू. भांड्यातील मांसाप्रमाणे आपण येथे सुरक्षित आहोत.' 4ते खोटे बोलत आहेत. म्हणून तू माझ्यावतीने लोकांशी बोल. "मानवपुत्रा, लोकांना संदेश सांग."

5मग परमेश्वराचा आत्मा माझ्यात उतरला. तो मला म्हणाला, "ह्या गोष्टी मी सांगितल्या आहेत असे त्यांना सांग. इस्राएलच्या कुटुंबियांनो, तुम्ही फार मोठे बेत करीत आहात. पण तुमच्या मनांत काय आहे ते मी जाणतो. 6ह्या नगरीत तुम्ही पुष्कळांना ठार केले, रस्ते प्रेतांनी झाकून टाकले. 7आता परमेश्वर, आपला प्रभू पुढील गोष्टी सांगतो: 'ती प्रेते म्हणजे मांस व नगरी म्हणजे भांडे आहे. तो (नबुखद्नेस्सर) येईल आणि ह्या सुरक्षित भांड्यातून तुम्हाला बाहेर काढील. 8तुम्ही तलवारीला घाबरता. पण मी तलवारीलाच तुमच्यावर आणीत आहे." परमेश्वराने, आमच्या प्रभूने, ह्या गोष्टी सांगितल्या. मग त्या घडतीलच.

9देव असेही म्हणाला, "मी तुम्हा लोकांना या नगरीतून बाहेर काढीन, व परक्यांच्या हाती देईन. मी तुम्हाला शिक्षा करीन. 10तुम्ही तलवारीने मराल. मी तुम्हाला इस्राएलमध्येच शिक्षा करीन. म्हणजे तुम्हाला कळेल की शिक्षा करणारा मीच एक आहे. मीच परमेश्वर आहे. 11हो! ही जागा म्हणजे अन्न शिजविण्याचे भांडे होईल. त्यातील मांस तुम्ही असाल. मी तुम्हाला इस्राएलमध्येच शिक्षा करीन. 12मगच तुम्हाला 'मी परमेश्वर आहे' हे कळेल. तुम्ही मोडलात तो माझा कायदा होता. तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या नाहीत. तुम्ही तुमच्या आजूबाजूला असलेल्या रा ट्रांप्रमाणे जगण्याचे ठरविले."

13मी भविष्यवाणी संपवताच बनायाचा मुलगा पलट्या मेला. मी जमिनीवर पडलो. डोके टेकवून मी मोठ्याने ओरडलो, "हे परमेश्वरा, माझ्या प्रभु, तू इस्राएलच्या अवशेषाचा पूर्ण विध्वंस करणार आहेस!"

14पण मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला, 15"मानवपुत्रा, हा देश ज्यांना सक्तीने सोडावा लागला त्या इस्राएलच्या कुटुंबीयांचे, तुझ्या भाऊबंदाचे स्मरण कर. ते येथून दूर असलेल्या देशात राहतात. पण मी त्यांना परत आणीन. पण यरुशलेममध्ये राहणारे लोक म्हणतात, 'परमेश्वरापासून दूर राहा ही भूमी आम्हाला दिलेली आहे ती आमची आहे.'

16"म्हणून त्या लोकांना पुढील गोष्टी सांग; परमेश्वर, आमचा प्रभू, म्हणतो, 'मी माझ्या लोकांना दूरच्या देशांत सक्तीने घालविले, हे खरे आहे. मी त्यांना पुष्कळ देशांत विखुरले, त्या देशांतील मुक्क ामाच्या अल्पकाळात मीच त्यांचे मंदिर होईन." 17म्हणून, परमेश्वर, त्यांचा प्रभू, त्यांना परत आणेल हे तू त्याना सांगितले पाहिजे. मी तुम्हाला इतर राष्ट्रांत विखुरले पण तुम्हाला एकत्र करीन. आणि परत आणीन. इस्राएलची भूमी मी तुम्हाला परत देईन. 18आणि जेव्हा माझे लोक परत येतील, तेव्हा ते इथे असलेल्या त्या सर्व भयंकर घाणेरड्या मूर्तीचा नाश करतील. 19"ते सर्वजण एकच व्यक्ती असल्याप्रमाणे, मी त्यांच्यात ऐक्य निर्माण करीन. मी त्यांच्यात नवीन आत्मा ओतीन. त्यांचे दगडाचे हृदय काढून घेऊन तिथे मी खरे हृदय बसवीन. 20मग ते माझे नियम पाळतील, माझ्या आज्ञांचे पालन करतील. मी सांगतो, त्याच गोष्टी ते करतील. ते खऱ्या अर्थाने माझी माणसे होतील व मी त्यांचा देव होईन.'"

21मग देव पुढे म्हणाला, "पण सध्या, त्यांचे मन त्या भयानक, गलिच्छ मूर्तींचेच झाले आहे. त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल शिक्षा केलीच पाहिजे." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला, 22ह्यानंतर करूब दूतांनी पंख पसरले व ते हवेत उडाले. चाकेही त्यांच्याबरोबर गेली. इस्राएलच्या देवाची प्रभा त्यांच्यावर होती. 23परमेश्वराची प्रभा वर गेली व तिने यरुशलेम सोडले. ती क्षणभरच यरुशलेमच्या पूर्वेकडच्या टेकडीवर* थांबली. 24मग वाऱ्याने मला उचलून परत बाबेलला खास्द्यांच्या देशात आणले. इस्राएलच्या ज्या लोकांना बळजबरीने इस्राएल सोडावे लागले होते, त्यांच्यात त्याने मला आणले, मग, दृष्टान्तामध्येच, देवाच्या चैतन्याने मला सोडले व ते हवेत उंच गेले. मी हे सर्व दृष्टान्तात पाहिले. 25मी परागंदा झालेल्या लोकांशी बोललो. परमेश्वराने मला दाखविलेल्या सर्व गोष्टी मी त्यांना सांगितल्या.

12 मग मला परमेश्वराचा संदेश मिळाला. तो म्हणाला, 2"मानवपुत्रा, तू बंडखोर लोकांच्यात राहतोस. ते नेहमीच माझ्याविरुध्द जातात. मी त्यांच्याकरिता केलेल्या गोष्टी पाहण्यासाठी त्यांना डोळे आहेत. पण ते त्यांचा उपयोग करीत नाहीत. (ते ह्या गोष्टी पाहातच नाहीत.) मी करायला सागितलेल्या गोष्टी ऐकण्यासाठी त्यांना कान आहेत, पण ते माझ्या आज्ञा ऐकत नाहीत. का? कारण ते बंडखोर आहेत. 3म्हणून, मानवपुत्रा, सामान बांध, देशी जात असल्याचे नाटक कर. लोक तुला पाहत असताना हे कर. कदाचित ते तुला पाहतील पण ते फार बंडखोर आहेत.

4"तुझे सामान भरदिवसा बाहेर काढ म्हणजे लोकांना ते दिसू शकेल. संध्याकाळी, तू दूरच्या देशात कैदी म्हणून जात असल्याचे नाटक कर. 5लोक पाहात असतानाच भिंतीला एक भोक पाड आणि त्यातून पलिकडे जा. 6रात्री सामान पाठीवर टाकून चालू लाग. तू कोठे जात आहेस हे दिसू नये म्हणून तोंड झाकून घे. लोक पाहू शकतील अशाच तऱ्हेने तू या गोष्टी केल्या पाहिजेस. का? कारण मी तुझा उपयोग करून (तुझ्याकडून) इस्राएलच्या लोकांपुढे एक उदाहरण घालून देत आहे."

7म्हणून मी (यहेज्केलने) देवाच्या आज्ञेप्रमाणे सर्व केले. दिवसा मी माझे सामान बांधले व मी दूर देशी जात असल्याचे

**यरुशलेमच्या पूर्वेकडच्या टेकडीवर** म्हणजेच ऑलिव्हरचा पर्वत.

दाखविले. त्या दिवसाच्या सांध्याकाळी, मी हाताने भिंतीत
भोक पाडले व रात्री सामान खांद्यावर टाकून गाव सोडले.
सर्व लोक मला पाहत आहेत असे पाहूनच मी हे सर्व
केले.

8दुसऱ्या दिवशी सकाळी, परमेश्वर माझ्याशी बोलला.
तो म्हणाला, 9"मानवपुत्रा, तू काय करीत आहेस असे त्या
इस्राएलच्या बंडखोर लोकांनी तुला विचारले का?
10परमेश्वराने, त्यांच्या प्रभूने, त्यांना पुढील गोष्टी
सांगितल्या आहेत असे त्यांना सांग. हा दुःखद संदेश
यरुशलेमच्या नेत्यांबद्दल आणि इस्राएलमध्ये राहणाऱ्या
सर्व लोकांबद्दल आहे. 11त्यांना सांग, 'मी (यहेज्केल)
तुम्हा लोकांसाठी एक उदाहरण आहे. मी केलेल्या सर्व
गोष्टी खरे, म्हणजे तुमच्याबाबतीत घडणार आहेत.' तुम्हाला
खरोखरच कैदी म्हणून दूरच्या देशांत जाणे भाग पडेल.
12मग तुमचा नेता भिंतीला खिंडार पाडेल व रात्रीच्या
वेळी गुपचूपपणे पसार होईल. लोकांनी ओळखू नये म्हणून
तो आपला चेहरा झाकून घेईल. जाताना तो काहीही बघू
शकणार नाही. 13तो पळून जायचा प्रयत्न करील पण मी
(देव) त्याला पकडीन. तो माझ्या सापळ्यात अडकला
जाईल. मी त्याला बाबेलमध्ये, खास्द्यांच्या देशात आणीन.
पण त्याला कोठे नेले जात आहे, हे तो पाहू शकणार
नाही. शत्रू त्याचे डोळे काढून त्याला आंधळा करतील.
मग तो तेथेच मरेल. 14मी राजाच्या माणसांना इस्राएलच्या
भोवतालच्या परक्या देशांमधून राहण्यास भाग पाडीन, व
त्याचे सैन्य वाऱ्यावर सोडीन. शत्रूचे सैनिक त्यांचा पाठलाग
करतील. 15मग त्या लोकांना मीच देव आहे हे कळेल.
मीच त्यांना राष्ट्रां-राष्ट्रांतून विखुरले हे त्यांना कळून
चुकेल. मी त्यांना सक्तीने दुसऱ्या देशांत जायला लावले,
हे त्यांना समजेल.

16"पण मी काही लोकांना जिवंत राहू देईन. ते रोगराईने
वा उपासमारीने अथवा तलवारीने मरणार नाहीत. त्यांनी
माझ्याविरुद्ध ज्या भयंकर गोष्टी केल्या, त्या इतरांना ह्या
लोकांनी सांगाव्या, म्हणून मी त्यांना जिवंत ठेवीन. मग
मीच परमेश्वर आहे हे समजेल."

17मग परमेश्वराचा संदेश मला मिळाला. तो म्हणाला,
18"मानवपुत्रा, तू फार घाबरल्याचे नाटक कर. जेवताना
तू थरथर कापले पाहिजेस. तू काळजीत असल्याचे दाखव.
पाणी पितानाही भ्यायल्याचे सोंग कर. 19सामान्य माणसांना
तू हे सांगितले पाहिजेस 'यरुशलेममध्ये व इस्राएलच्या इतर
भागांत राहणाऱ्या लोकांना परमेश्वर, आमचा प्रभू, पुढील
गोष्टी सांगतो. खाता-पिताना तुम्ही काळजीने व भयाने
पछाडले जाल. का? कारण तुमच्या देशातील सर्व गोष्टींचा
नाश होईल. तेथे राहणाऱ्या सर्वांशी शत्रू अत्यंत क्रूरपणे
वागेल.20"आता तुमच्या गावांत खूप लोक राहात आहेत.
पण त्या सर्व गावांचा नाश होईल. तुमच्या संपूर्ण देशाचाच
नाश होईल. मगच 'मीच परमेश्वर आहे' हे तुमच्या लक्षात
येईल."

21मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो म्हणाला,
22"मानवपुत्रा, इस्राएल देशाबद्दल लोक पुढील गीत का
म्हणतात?

संकटे लवकर येणार नाहीत.
दृष्टान्त खरे होणार नाहीत.

23"'परमेश्वर, त्यांचा प्रभू, हे गीत बंद करील' असे
त्यांना सांग. ह्या पुढे ते इस्राएलबद्दल असे काही म्हणणार
नाहीत. त्याऐवजी ते पुढील गीत म्हणतील.

'लवकरच संकटे येतील
दृष्टान्त खरे ठरतील.'

24"ह्या पुढे इस्राएलला खोटे दृष्टान्त दिसणार नाहीत, हे
मात्र अगदी खरे आहे. खोटेनाटे सांगणारे जादूगार तेथे
असणार नाहीत. 25का? कारण मी परमेश्वर आहे. माझ्या
मनाप्रमाणे मी सांगतो व तेच घडेल. मी त्यास विलंब होऊ
देणार नाही. संकटे वेगाने येत आहेत. तुमच्याच आयुष्यात
ती येतील. बंडखोरांनो, मी जे म्हणतो, ते घडवून आणतो."
परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

26नंतर मला पुन्हा परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो
म्हणाला, 27"मानवपुत्रा, तुला झालेला दृष्टान्त प्रत्यक्षात
यायला खूप अवधी आहे असे इस्राएलच्या लोकांना वाटते.
येथून पुढे अनेक वर्षांनी घडणाऱ्या गोष्टींबद्दल तू बोलत
आहेस, असा त्यांचा समज आहे. 28म्हणून तू त्यांना ह्या
गोष्टी सांगितल्या पाहिजेस. 'परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो,
मी या पुढे अजिबात उशीर करणार नाही. मी जे घडेल
असे म्हणतो, ते घडेलच.'" देव, माझा प्रभू, असे म्हणाला.

13 त्यानंतर परमेश्वराचा संदेश मला मिळाला. तो
म्हणाला, 2"मानवपुत्रा, माझ्यावतीने इस्राएलच्या
संदेष्ट्यांशी बोल. ते संदेष्टे खरे म्हणजे माझ्यावतीने बोलत
नसून त्यांना पाहिजे ते सांगतात. म्हणून तू त्यांच्याशी
बोल. त्यांना पुढील गोष्टी सांग. 'परमेश्वराकडून आलेला
हा संदेश ऐका. 3परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो की
दुष्ट संदेष्ट्यांनो, तुमचे वाईट होईल. तुम्ही दृष्टान्तांत
पाहिलेल्या गोष्टी लोकांना न सांगता, तुमच्या मनाचेच
सांगता.

4"इस्राएल, ओसाड, पडक्या वास्तूंतून धावणाऱ्या
कोल्ह्यांप्रमाणे तुझे संदेष्टे असतील. 5नगरीच्या तटबंदीच्या
भगदाडांजवळ तू सैनिक ठेवले नाहीस वा
इस्राएलवासीयांच्या रक्षणासाठी भिंतही बांधली नाहीस. तेव्हा
परमेश्वराने तुला शिक्षा करायची वेळ येताच, तू युद्धात
हरशील.

6"'खोट्या संदेष्ट्यांनी दृष्टान्त पाहिल्याचे सांगितले. ते
जादू करतात आणि भविष्यात घडणाऱ्या गोष्टी सांगतात.
पण ते खोटे बोलतात. त्यांना परमेश्वराने पाठविल्याचे ते

सांगतात. पण ते खोटे आहे. खोटे खरे ठरावे म्हणून ते
अजूनही वाट पाहत आहेत.
7“‘खोट्या संदेष्ट्यांनो, तुम्ही पाहिलेले दृष्टान्त खरे नाहीत.
तुम्ही जादू केली व असे घडेल म्हणून सांगितले. पण
तुम्ही खोटे बोललात परमेश्वराने असे सांगितले असे
तुम्ही म्हणालात. पण मी तुमच्याशी बोललोच नाही.’”
8पण आता परमेश्वर, माझा प्रभू, खरोखरच बोलेल.
तो म्हणतो, “तुम्ही खोट्या गोष्टी सांगितल्या, तुम्ही खोटे
दृष्टान्त पाहिले. म्हणून मी (देव) तुमच्याविरुद्ध आहे.”
परमेश्वराने, माझ्या प्रभूने, असे म्हटले. 9परमेश्वर म्हणतो,
“खोटे दृष्टान्त पाहणाऱ्या आणि खोटे बोलणाऱ्या संदेष्ट्यांना
मी शिक्षा करीन. माझ्या लोकांतून मी त्यांना बाजूला
काढीन. इस्राएलच्या वंशजांच्या नामावळीत त्यांची नावे
असणार नाहीत. ते इस्राएलच्या भूमीत परत येणार नाहीत.
मगच तुम्हाला मी परमेश्वर व प्रभू असल्याचे कळेल.
10“ते खोटे संदेष्टे पुन्हा पुन्हा माझ्या लोकांशी खोटे
बोलले. त्यांनी ‘शांती प्रस्थापित होईल.’ असे सांगितले.
पण तेथे शांती नाही. भिंतीची चांगली दुरुस्ती करून लोकांनी
लढायला सज्ज होण्याची जरूरी आहे. पण त्याऐवजी लोक
भिंतीना फक्त गिलावा करतात. 11मी त्यांच्यावर गारांचा
वर्षाव करीन आणि मुसळधार पाऊस (शत्रू-सैन्य) पाडीन,
असे तू त्यांना सांग. जोराचे वारे वाहतील आणि तुफान
येईल. मग तटबंदी पडेल. 12भिंत पडेल आणि लोक
संदेष्ट्यांना विचारतील ‘तुम्ही गिलावा केला होता, त्याचे
काय झाले?’” 13परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, “मी
तुमच्यावर रागावलो आहे म्हणून मी वादळ उत्पन्न करीन,
मुसळधार पाऊस पाडीन, गारांचा वर्षाव करीन आणि
तुमचा संपूर्ण नाश करीन. 14तुम्ही भिंतीला गिलावा करता.
पण संपूर्ण तटबंदीच मी उद्ध्वस्त करीन. ती मी जमीनदोस्त
करीन. ती तुमच्या अंगावर पडेल आणि मग तुम्हाला
कळून चुकेल की मीच परमेश्वर आहे. 15मी माझा
सगळा राग त्या तटबंदीवर व तिच्यावर गिलावा देणाऱ्या
लोकांवर ओतून टाकीन. मग मी म्हणेन ‘आता भिंतही
नाही आणि तिच्यावर गिलावा करणारेही राहिले नाहीत.’
16“ह्या सर्व गोष्टी इस्राएलच्या खोट्या संदेष्ट्यांबाबत
घडतील. ते यरुशलेमच्या लोकांशी बोलतात. ते शांतीचे
भाकीत करतात. पण शांती मिळत नाही.” परमेश्वराने,
माझ्या प्रभूने, हे सांगितले.
17देव म्हणाला, “मानवपुत्रा, इस्राएल मधील स्त्री
संदेष्ट्यांकडे पाहा. त्या माझ्यावतीने बोलत नाहीत. त्या
त्यांच्या मनाचेच सांगतात. म्हणून तू माझ्यावतीने
त्यांच्याविरुद्ध बोल. तू त्यांना पुढील गोष्टी सांगितल्या
पाहिजेस. 18‘परमेश्वर, माझा प्रभू, ह्या गोष्टी सांगतो.
स्त्रियांनो, तुमचे वाईट होईल. तुम्ही कापडाच्या पट्ट्या
करून लोकांना बांगड्यांप्रमाणे घालायला देता, डोक्याला
बांधण्यासाठीही विशेष प्रकारचे पट्टे करून देता. तुम्ही
लोकांना सांगता की ह्या गोष्टीमध्ये तुमच्या आयुष्याचे
नियंत्रण करण्याची जादूची शक्ती आहे. स्वत:ला
जगविण्यासाठी तुम्ही लोकांना अशा रीतीने जाळ्यात
पकडता! 19तुम्ही मला लोकांच्यापुढे क्षुद्र बनविता. तुम्ही
ओंजळभर सातू व भाकरीच्या काही तुकड्यांसाठी त्यांना
माझ्याविरुद्ध फिरविता. माझ्या लोकांशी तुम्ही खोटे बोलता.
त्या लोकांना खोटे आवडते. तुम्ही ज्यांनी जगायला पाहिजे
त्यांना मारता आणि ज्यांनी मरायला पाहिजे, त्यांना जगविता.
20म्हणून परमेश्वर, प्रभू, तुम्हाला पुढील गोष्टी सांगतो,
तुम्ही बांगड्यासारखे कापडी पट्टे करून लोकांना सापळ्यात
पकडू बघता पण मी त्यांना मुक्त करीन. तुमच्या हातातील
ते कापडी पट्टे मी फाडून टाकीन, म्हणजे ते लोक
पिंजऱ्यातून सोडून दिलेल्या पाखराप्रमाणे स्वतंत्र होतील.
21“मी डोक्याला बांधायचे पट्टे तोडीन, आणि माझ्या
माणसांना तुमच्या पकडीतून सोडवीन. तुमच्या सापळ्यातून
ते निसटतील आणि मगच तुम्हाला कळेल की मी परमेश्वर
आहे.
22“‘तुमचे संदेष्टे खोट्या गोष्टी सांगतात. सज्जनांना त्याचा
त्रास होतो. मला हे पंसत नाही. तुम्ही वाईट लोकांना
पाठिंबा देता, त्यांना उत्तेजन देता. त्यांना त्यांचे मार्ग
बदलायला सांगत नाही. त्यांचे जीव वाचवायचा प्रयत्न
करीत नाही. 23तेव्हा ह्यापुढे तुम्हाला तुमचे निरर्थक दृष्टान्त
दिसणे बंद होईल तुम्ही जादूही करणार नाही. तुमच्यापासून
मी माझ्या लोकांचे रक्षण करीन. मग तुम्हाला कळेल
की मीच खरा परमेश्वर आहे.’”

14 इस्राएलमधील काही वडीलधारी माणसे (नेते)
माझ्याकडे आले. माझ्याशी बोलण्यासाठी ते
बसले. 2मला परमेश्वराचा संदेश आला. तो म्हणाला,
3“मानवपुत्रा, हे लोक तुझ्याशी बोलायला आले आहेत.
मला तू त्यांचा हिताच्या गोष्टी विचाराव्यास अशी
त्यांची इच्छा आहे. पण अजूनही त्यांच्याजवळ त्या
अमंगळ मूर्ती आहेत. त्यांना पाप करायला लावणाऱ्या
ह्या गोष्टी त्यांनी जवळ बाळगल्या आहेत. ते अजूनही
त्यांची पूजा करतात. मग ते सल्ला विचारण्यासाठी
माझ्याकडे कशाला येतात? मी त्यांच्या प्रश्नांना उत्तर द्यावे
का? नाही! 4पण उत्तर मी त्यांना देईन. मी त्यांना शिक्षा
करीन. तू ह्या गोष्टी त्यांना सांगच. ‘परमेश्वर, माझा प्रभू,
म्हणतो : जर कोणी इस्राएली संदेष्ट्यामार्फत मला सल्ला
विचारू लागला, तर संदेष्ट्याऐवजी मीच त्याच्या प्रश्नाला
उत्तर देईन. जरी त्याच्याजवळ त्या घाणेरड्या मूर्ती असल्या,
त्याला पापाला प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी त्याने जवळ
बाळगल्या आणि त्यांची तो अजूनही पूजा करीत असला,
तरी मी त्याच्या प्रश्नाला उत्तर देईन. त्याच्याजवळ त्या
अंमगळ मूर्ती असल्या, तरी मी त्याच्याशी बोलेन. 5का?
कारण मला त्यांच्या हृदयात हात घालायचा आहे. त्या
गलिच्छ मूर्तीसाठी त्यांनी माझा त्याग केला असला तरी,
मी त्यांच्यावर प्रेम करतो, हे मला त्यांना दाखवायचे
आहे.’

6"म्हणून इस्राएलच्या लोकांना पुढील गोष्टी सांग.
परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, 'त्या अमंगळ मूर्तीचा त्याग
करून माझ्याकडे परत या. त्या भयानक खोट्या देवांपासून
दूर व्हा. 7एखादा इस्राएली वा इस्राएलमध्ये राहणारा परका
हिताच्या गोष्टीसाठी संदेष्ट्याकडे जाऊन माझा सल्ला काय
आहे ते विचारू लागला, तर मी त्याला सल्ला देईन.
त्याच्याजवळ जरी त्या घाणेरड्या मूर्ती असल्या, त्याला
पाप करायला लावणाऱ्या गोष्टी त्याने जवळ बाळगल्या
आणि तो त्यांची अजूनही पूजा करीत असला, तरी मी
त्याच्या प्रश्नाला उत्तर देईन. आणि माझे उत्तर असे असेल.
8मी त्याच्याकडे पाठ फिरवीन. मी त्याचा नाश करीन.
तो इतरांसाठी एक उदाहरण होईल. लोक त्याला हसतील.
माझ्या लोकांतून मी त्याला बाजूला काढीन. मगच तुम्हाला
कळेल की मीच परमेश्वर आहे. 9जर एखाद्या संदेष्ट्याने
चुकीचे उत्तर दिले, तर मी, देवाने त्याला तसे* करण्यास
भाग पाडले आहे. मी त्याच्याविरूद्ध माझे सामर्थ्य वापरीन.
मी त्याचा नाश करीन आणि माझ्या माणसांतून इस्राएल
लोकातून त्याला काढून टाकीन. 10म्हणजेच सल्ला
विचारणारा, आणि त्याला उत्तर देणारा (संदेष्टा)ह्या
दोघांनाही सारखीच शिक्षा होईल. 11का? म्हणजे तो संदेष्टा
माझ्या माणसांना माझ्यापासून दूर नेणार नाहीत, माझे
लोकही पापांत बरबटणार नाहीत. मग ते माझे खास लोक
होतील, आणि मीच त्यांचा देव असेन.'" परमेश्वर, माझा
प्रभू, असे म्हणाला,

12मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो म्हणाला,
13"मानवपुत्रा, माझा त्याग करणाऱ्या आणि पाप करणाऱ्या
राष्ट्रांला मग ते राष्ट्र कोणतेही असो मी शिक्षा करीन.
त्यांचा अन्न पुरवठा मी बंद करीन. मी कदाचित् देशात
दुष्काळ पाडीन व लोक व प्राणी यांना देशातून बाहेर
काढीन. 14नोहा, दानीएल व इयोब हे तिथले असले,
आणि तरीसुध्दा मी त्या देशाला शिक्षा करीन. आपल्या
चांगुलपणाने फारतर ते स्वत:चा जीव वाचवू शकत असले
तरी त्या देशाला वाचवू शकत नाही." परमेश्वर, माझा
प्रभू, असे म्हणाला.

15देव म्हणाला, "अथवा, कदाचित् मी हिंस्र प्राणी त्या
देशात सोडीन आणि ते सर्व लोकांना ठार मारतील. त्या
हिंस्र प्राण्यांमुळे कोणीही त्या देशामधून प्रवास करणार
नाही. 16जर नोहा, दानीएल व इयोब तेथे राहात असते,
तर मी त्यांचे रक्षण केले असते. ते तिघे स्वत: चे
प्राण वाचवू शकले असते. पण माझ्या प्राणाची शपथ
घेऊन मी प्रतिज्ञा करतो ते इतरांचे प्राण वाचवू शकले
नसते. त्यांच्या मुला-मुलींनाही ते वाचवू शकले नसते.
पापी देशाचा नाश केला जाईल." परमेश्वर माझा प्रभू, हे
म्हणाला.

17देव म्हणाला, "किंवा मी कदाचित् त्या देशावर चढाई
करण्यासाठी शत्रूसैन्य पाठवीन. ते सैनिक त्या देशाचा
नाश करतील. मी तेथील सर्व माणसांना व प्राण्यांना
देशाबाहेर हालवीन. 18जर नोहा, दानीएल व इयोब तेथे
राहत असते, तर मी त्या तिघा सज्जानांना वाचविले असते.
ते स्वत:चा प्राण वाचवू शकले असते पण माझी शपथ
घेऊन वचन देतो की ते इतरांना म्हणजेच त्यांच्या
मुलामुलींनासुध्दा वाचवू शकले नसते. त्या पापी देशाचा
नाश केला जाईल" परमेश्वराने, माझ्या प्रभूने, ह्या गोष्टी
सांगितल्या.

19देव म्हणाला, "वा मी त्या देशात कदाचित् रोगराई
पसरवीन. मी माझ्या क्रोधाचा त्यांच्यावर वर्षाव करीन.
मी त्या देशातील सर्व लोकांचा व प्राण्यांचा मुक्काम तेथून
हालवीन. 20तेथे जर नोहा, दानीएल व इयोब राहात असते,
तर ते सज्जन असल्यामुळे मी त्यांना वाचविले असते. ते
तिघे स्वत:चे प्राण वाचवू शकले असते. पण माझी शपथ
घेऊन वचन देतो की ते इतराना म्हणजे त्यांच्या मुलामुलींना
सुद्धा वाचवू शकले नसते." परमेश्वर, माझा प्रभू, असे
म्हणाला.

21मग परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला, "यरुशलेमाची
स्थिती किती वाईट होणार त्याचा विचार कर. शत्रू सैनिक,
उपासमार, रोगराई आणि हिंस्र प्राणी या चारही शिक्षा मी
त्यांना करीन. त्या देशातील सर्व माणसांना व प्राण्यांचा मी
नाश करीन. 22काही लोक त्या देशातून निसटतील, ते
आपल्या मुलांमुलीना घेऊन, मदतीसाठी तुझ्याकडे येतील.
मग ते लोक खरोखर किती वाईट आहेत, हे तुला कळेल.
आणि यरुशलेमवर मी आणलेली सर्व संकटे पाहून तुला
बरेच वाटेल. 23ते कसे जगतात आणि कोणत्या वाईट
गोष्टी करतात हे तू पाहिल्यावर, त्यांना शिक्षा करण्यास
सबळ कारण आहे, हे तुला पटेल." परमेश्वर, माझा प्रभू,
असे म्हणाला.

15 मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो
म्हणाला, 2"मानवपुत्रा, रानातील झाडांच्या लहान
लहान फांद्यांपेक्षा द्राक्षवेलींचे तुकडे चांगले का? नाही.
3द्राक्षवेलीच्या लाकडाचा कशासाठी उपयोग होतो का?
नाही. ताटल्या अडकवून ठेवण्यासाठी त्याच्यापासून खुंट्या
बनविता येतात का? नाही. 4लोक त्या लाकडाला फक्त
आगीत टाकतात, काही काटक्या टोकाकडून जळू
लागतात, मध्यावर काळ्या पडतात, पण त्या काही पूर्णपणे
जळत नाहीत. त्या जळक्या काटक्यांचा काही उपयोग
आहे का? 5ते लाकूड जळण्यापूर्वी जर तुम्ही त्या लाकडाचा
उपयोग करू शकत नसाल, तर ते लाकूड जळल्यावर
नक्कीच त्याचा काही उपयोग होणार नाही. 6म्हणजेच
द्राक्षवेलींच्या काटक्या ह्या रानातल्या झाडांच्या
फांद्याप्रमाणेच आहेत. लोक त्या विस्तवात टाकतात आणि
त्या जळून जातात. त्याचप्रमाणे, यरुशलेमच्या लोकांना मी
आगीत टाकीन." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

---

**देव त्याला तसे** असत्य किंवा खोटा आत्मा (चैतन्य) देईल.
1 राजे 22:24 पाहा.

7“मी त्या लोकांना शिक्षा करीन. पण काही लोक त्या
अर्धवट जळालेल्या काटक्यांप्रमाणे असतील. त्यांना शिक्षा
होईल. पण त्यांचा संपूर्ण नाश होणार नाही. ‘मीच त्यांना
शिक्षा केली’ हे तुम्हाला दिसून येईल व मगच तुम्हाला
कळेल की मीच परमेश्वर आहे. 8त्या लोकांनी खोट्या
देवांसाठी माझा त्याग केला, म्हणून मी त्या देशाचा नाश
करीन.” परमेश्वराने, माझ्या प्रभूने, ह्या गोष्टी सांगितल्या

16 मला मग परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो
म्हणाला, 2“मानवपुत्रा, यरुशलेमच्या लोकांना
त्यांनी केलेल्या भयंकर कृत्यांबद्दल सांग. 3‘परमेश्वर,
माझा प्रभू, यरुशलेमला पुढील गोष्टी सांगतो, असे तू
त्याना सांगितले पाहिजे. तुझ्या इतिहासावर नजर टाक.
कनानमध्ये तुझा जन्म झाला. तुझे वडील अमोरी व आई
हित्ती होती. 4यरुशलेम, तू जन्मलीस तेव्हा तुझी नाळ
कापायला कोणीही नव्हते. कोणीही मीठ टाकून तुला
आंघोळ घातली नाही वा तुला दुपट्यात गुंडाळले नाही.
5यरुशलेम, तू अगदी एकटी होतीस. कोणाला तुझ्यासाठी
वाईट वाटले नाही वा कोणीही तुझी काळजी घेतली नाही.
तू जन्मताच, तुझ्या आईवडिलानी तुला शेतात टाकून
दिले. त्यावेळी तू रक्ताने माखलेली होतीस, तुझ्या अंगावर
वारही तशीच होती.

6“‘त्याच वेळी मी तुझ्याजवळून गेलो. मी तुला रक्तात
लोळताना व हातपाय हालविताना पाहिले. तू रक्ताने माखली
होतील. पण मी तुला म्हणालो, “जिवंत राहा” खरेच, तू
रक्ताने माखलेली असूनसुद्धा मी म्हणालो “जिवंत राहा.”
7शेतातल्या रोपट्याला जगवावे, तसे तुला जगवायला मी
मदत केली. तू वाढत गेलीस आणि तरुणी झालीस. तू
वयात आलीस, तुझ्यात तारुण्याची लक्षणे दिसू लागली.
तुझे केसही वाढू लागले, पण तरीसुद्धा तू विवस्त्रच होतीस,
उघडीच होतीस. 8मी तुला पाखरले. तू प्रणयोत्सुक झाली
होतीस. म्हणून माझे वस्त्र तुला लपेटून* मी तुझी नग्नता
झाकली. मी तुला लग्नाचे वचन दिले. मी तुझ्याबरोबर
करार केला आणि तू माझी झालीस.’” परमेश्वर, माझा
प्रभू, असे म्हणाला. 9“‘मी तुला आंघोळ घातली. तुझ्या
अंगावरचे रक्त धुवून काढले. तुझ्या अंगाला तेल चोळले.
10मी* तुला उत्तम वस्त्रे व मऊ चामड्याचे जोडे दिले.
तुझ्या डोक्याला तागाचा पट्टा गुंडाळला व तुला रेशमी
ओढणी पांघरली. 11मग मी तुला काही दागिने दिले.
तुझ्या हातात बांगड्या व गळ्यात हार घातला. 12मी तुला
नथ, कर्णभूषणे आणि सुंदर मुकुट देऊन सजविले. 13तू
तुझ्या सोन्या-चांदीच्या अलंकारात व ताग, रेशीम यांच्या
कशिदा काढलेल्या वस्त्रांत फारच सुंदर दिसत होतीस. तू
चांगल्यातले चांगले अन्न खाल्लेस. तुझे सौंदर्य अप्रतिम
होते. तू राणी झालीस! 14तुझ्या सौंदर्याने तुला प्रसिद्धी
मिळाली. पण माझ्यामुळे तू संदर झालीस!” परमेश्वराने,
माझ्या प्रभूने ह्या गोष्टी सांगितल्या.

15देव म्हणाला, “पण तू आपल्या सौंदर्यावरच विश्वास
ठेवायला सुरवात केलीस. तू तुझ्या चांगल्या नावाचा उपयोग
करून माझा विश्वासघात केलास. येणाऱ्या जाणाऱ्या
प्रत्येकाबरोबर तू वेश्येप्रमाणे वागलीस. त्या सर्वांच्या तू
स्वाधीन झालीस. 16तुझ्या सुंदर वस्त्रांचा उपयोग तू तुझी
पूजास्थाने सजविण्यासाठी केलास. आणि तेथे तू वेश्येसारखे
वर्तन केलेस. तुझ्याजवळ येणाऱ्या प्रत्येकाच्या तू स्वाधीन
झालीस. 17मग मी तुला दिलेल्या सोन्या चांदीच्या
अलंकाराचा उपयोग तू पुरूषांचे पुतळे बनविण्यासाठी
केलास आणि त्या पुतळ्यांशीही व्यभिचार केलास. 18सुंदर
कापड आणून तू त्या मूर्तींना कपडे शिवलेस. मी तुला
दिलेले अत्तर आणि धूप तू त्या मूर्तीपुढे ठेवलास. 19मी
तुला भाकरी, मध व तेल दिले. तेही तू त्या मूर्तींना
दिलेस. तू खोट्या देवांनी प्रसन्न व्हावे म्हणून सुगंधित द्रव्ये
म्हणून ह्या सर्व गोष्टी त्यांना अर्पण केल्यास. त्या खोट्या
देवांबरोबर तू वेश्येप्रमाणे वागलीस.” परमेश्वर, माझा
प्रभू, असे म्हणाला.

20देव म्हणाला, “आपल्याला मुले झाली. पण तू आपली
मुले घेतलीस व त्यांना ठार करून खोट्या देवांना अर्पण
केलेस. मला फसवून त्या खोट्या देवांकडे जाताना तू जी
दुष्कृत्ये केलीस त्यातील ही फक्त काहीच होत. 21“तू
माझ्या मुलांचा वध केलास आणि अग्निद्वारा त्यांना त्या
खोट्या देवापर्यंत पोहोचविलेस. 22तू माझा त्याग केलास
आणि अशी दुष्कृत्ये केलीस. तुला तुझ्या बालपणाचे
विस्मरण झाले. मला तू सापडलीस तेव्हा तू नग्नावस्थेत
रक्तात लोळत होतीस हे तुला आठवले नाही.

23“ह्या सर्व दुष्कृत्यानंतर हे यरुशलेम, तुझे भले होणार
नाही.” परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो. 24“ह्या सर्व
गोष्टीनंतर, तू त्या खोट्या देवांना पूजण्यासाठी मातीचा
ढिगारा रचलास. प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यावर तू अशी
पूजास्थाने बांधलीस. 25प्रत्येक रस्त्याच्या सुरवातीला तू
मातीचे ढिगारे रचलेस. तू तुझ्या सौंदर्याला कमीपणा
आणलास, तुझ्या सौंदर्याचा उपयोग तू तुझ्या जवळून
जाणाऱ्या प्रत्येकाला पकडण्यासाठी केलास. त्यांना तुझे
पाय दिसावे म्हणून तू तुझी वस्त्रे वर उचललीस आणि
त्यांच्याबरोबर वेश्येसारखी वागलीस. 26मग मोठे लिंग
असलेल्या शेजाऱ्याकडे, मिसरकडे तू गेलीस व मला
संतापविण्यासाठी त्याच्याबरोबर अनेकदा व्यभिचार
केलास. 27म्हणून मी तुला शिक्षा केली. तुझ्या भत्त्यातील
काही भाग (जमीन) मी काढून घेतला. तुझ्या शत्रूंना
म्हणजेच पलिष्ट्यांच्या मुलींना (शहरांना) त्यांना पाहिजे
तसे तुझ्याशी वागू दिले. तुझी दुष्कृत्ये पाहून त्यांनासुद्धा

---

**माझे ... लपेटून** ह्यावरून असे दिसते की देव तिचे रक्षण करण्याचे व काळजी घेण्याचे कबूल करीत आहे. पाहा रूथ 3:1–15.

**ओव्या 10 ते 13** येथे दिलेल्या यादीतील वस्तू पवित्र तंबू उभारण्यासाठी लागणाऱ्या वस्तू आहेत. पाहा निर्गम 25:40.

धक्का बसला. [28]मग तू अश्शूरकडे व्यभिचार करण्यासाठी
गेलीस. पण तुझे समाधान होऊ शकले नाही. तुझी कधीच
तृप्ती झाली नाही. [29]म्हणून मग तू कनानकडे वळलीस व
तेथून खास्द्यांकडे गेलीस. पण अजूनही तू तृप्त नाहीस.
[30]तू खूपच दुर्बल आहेस. म्हणूनच सर्व पुरुषांनी (देशांनी)
तुला पापे करायला लावले. तू निर्दयपणे हुकमत
चालवणाऱ्या वेश्येप्रमाणे वागलीस." परमेश्वर, माझा प्रभू,
असे म्हणाला.

[31]देव म्हणाला, "पण तू पूर्णपणे वेश्यावृत्ती पत्करली
नाहीस. तू प्रत्येक रस्त्याच्या टोकाला मातीचे ढिगारे रचलेस
व प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यावर पूजास्थाने बांधलीस. तू
सर्व पुरुषांबरोबर व्यभिचार केलास.* पण तू, वेश्येप्रमाणे,
त्यांच्याजवळ मोबदला मागितला नाहीस. [32]"व्यभिचारिणी,
तुला स्वत:च्या पतीऐवजी परक्यांबरोबर व्यभिचार
करायला आवडतो. [33]बहुतेक वेश्या पुरुषांना पैसे देण्यास
भाग पाडतात. पण तूच सर्व प्रियकरांना पैसे दिलेस. तू
व्यभिचारासाठी तुझ्याकडे बोलविलेल्या सर्व पुरुषांना पैसे
दिलेस. [34]तू बहुतेक वेश्यांच्या अगदी उलट वागलीस.
त्या पुरुषांकडून सक्तीने पैसे घेतात, तर तू तुझ्याबरोबर
व्यभिचार करण्यासाठी उलट पुरुषांनाच पैसे देतेस."

[35]वारांगने, परमेश्वराकडून आलेला संदेश ऐक.
[36]परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो, "तू पैसा खर्च केलास
आणि तुझ्या प्रियकरांना आणि घाणेरड्या देवांना तुझे नग्न
शरीर पाहू दिलेस, तुझ्याबरोबर व्यभिचार करू दिलास.
तुझ्या मुलांना ठार मारून त्यांचे रक्त खोट्या देवांना भेट
म्हणून दिलेस. [37]म्हणून मी तू ज्यांच्यावर प्रेम केलेस, त्या
तुझ्या सर्व प्रियकरांना आणि ज्यांचा तू तिरस्कार करतेस
त्यांना, एकत्र आणीन आणि तुझे नग्न शरीर पाहू देईन.*
तुझे संपूर्ण नग्न शरीर ते पाहतील. [38]मग मी तुला शिक्षा
करीन. खुनी व व्यभिचाराचे पाप केलेल्या स्त्रीप्रमाणे मी
तुला शिक्षा करीन. क्रोधाविष्ट व मत्सरी पतीकडून व्हावी,
तशी शिक्षा तुला होईल. [39]मी त्या तुझ्या प्रियकरांच्या
हाती तुला देईन. ते तुझे मातीचे ढिगारे उद्ध्वस्त करतील.
तुझी पूजास्थाने जाळतील. तुझी वस्त्रे फाडतील आणि तुझे
सुंदर अलंकार घेतील. मला तू ज्या अवस्थेत सापडलीस,
त्याच अवस्थेत (उघडी व नग्न) तुला ते सोडतील. [40]तुला
ठार करण्यासाठी लोकांना जमवून ते तुझ्यावर दगड
फेकतील. मग तलवारीने तुझे तुकडे तुकडे करतील.
[41]ते तुझे घर (मंदिर) जाळतील. इतर स्त्रियांना कळावे
म्हणून ते तुला शिक्षा करतील. मी तुला वेश्येप्रमाणे वागू
देणार नाही. तुझ्या प्रियकरांना पैसे देऊ देणार नाही.
[42]मग माझा राग व मत्सर निवळेल मी शांत होईन. पुन्हा
कधीही रागावणार नाही. [43]हे सर्व का घडलं? कारण
बालपणी काय घडले ह्याचे तुला विस्मरण झाले. तू वाईट
कृत्ये करून मला संतापविलेस. म्हणून त्या वाईट
गोष्टीबद्दल मला तुला शिक्षा करावी लागली. पण तू
त्याहून भयंकर गोष्टी करण्याचा बेत केलास." परमेश्वर,
माझा प्रभू, असे म्हणाला.

[44]"तुझ्याबद्दल बोलणाऱ्या सर्व लोकांना आता आणखी
एक गोष्ट सांगायला मिळेल. 'ती म्हणजे, खाण तसी माती
(जशी आई, तशी लेक)' [45]तू तुझ्या आईची मुलगी शोभतेस
खरी! पतीची किंवा मुलांची तुला पर्वा नाही. तू अगदी
तुझ्या बहिणीप्रमाणे आहेस. तुम्ही दोघीनी ही तुमच्या पतींचा
व मुलांचा तिरस्कार केला. तू तुझ्या आईवडिलांसारखी
आहेस. तुझी आई हित्ती तर वडील अमोरी होते. [46]तुझी
मोठी बहीण शोमरोन होय. ती तुझ्या उत्तरेला तिच्या
मुलींबरोबर (गावांसह) राहत होती. तुझी धाकटी बहीण
सदोम* ही तुझ्या दक्षिणेला तिच्या मुलींसह (गावांसह)
राहत होती. [47]त्यांनी केलेली भयंकर कृत्ये तू केलीसच
पण त्यांच्यापेक्षाही वाईट कृत्ये केलीस. [48]मी परमेश्वर व
प्रभू आहे. मी जिवंत आहे. माझ्या प्रतिज्ञेवर सांगतो की
सदोम व तिच्या मुलींनी, तुझ्याइतकी व तुझ्या मुलींइतकी
दुष्कृत्ये कधीच केली नाहीत."

[49]देव म्हणाला, "तुझी बहीण सदोम आणि तिच्या मुली
गर्विष्ठ होत्या. त्यांना अन्नधान्याची विपुलता होती आणि
त्यांच्याजवळ भरपूर वेळ होता. पण त्यांनी गरिबांना
असहाय्य लोकांना मदत केली नाही. [50]सदोम व तिच्या
मुली अती गर्विष्ठ झाल्या, आणि त्यांनी माझ्या समोर
भयानक गोष्टी करण्यास सुरवात केली. मी ते पाहताच
त्यांना शिक्षा केली."

[51]देव म्हणाला, "शोमरोनने तुझ्याहून अर्धीसुद्धा दुष्कृत्ये
केली नाहीत. तू तिच्यापेक्षा खूपच जास्त भयानक कृत्ये
केलीस. तू तुझ्या बहिणीपेक्षा खूपच जास्त पाप केलेस.
तुझ्या तुलनेत सदोम व शोमरोन बऱ्याच म्हणायच्या.
[52]"तेव्हा आता तुला अपमान सहन केलाच पाहिजे. तुझ्या
बहिणींना तुझ्या तुलनेत, तूच चांगले ठरविले आहेस. तू
भयंकर गोष्टी केल्या आहेस, तेव्हा तुला लज्जित व्हावेच
लागेल."

[53]देव म्हणाला, "मी सदोम आणि तिच्या भोवतीच्या
गावांचा नाश केला. मी शोमरोनचा आणि त्याच्या
भोवतालच्या गावांचाही नाश केला, आणि आता, यरुशलेम,
मी तुझा नाश करीन. मी ती शहरे पुन्हा वसवीन. यरुशलेम,
तुलासुध्दा मी पुन्हा वसवीन. [54]मी तुझे सांत्वन करीन.

---

**तू ... केलास** शब्दश अर्थ "तांब्याची नाणी तांबे ओतणे"; "पापाचा कलंक लागणाऱ्या गोष्टी तू केल्यास" असाही अर्थ होतो.

**तुझे ...पाहू देईन** हिब्रूमध्ये येथे योजलेल्या शब्दांचा अर्थ "परदेशात कैदी म्हणून नेणे" असा होतो.

**शोमरोन ... सदोम** यहेज्केलचे असे म्हणणे आहे की यहूदाचे लोक शोमरोन व सदोम येथील लोकांप्रमाणेच पापी आहेत. सदोम व शोमरोन येथील लोक इतके पापी होते की देवाने त्यांचा पूर्णत नाश केला.

मग तू स्वत: केलेली दुष्कृत्ये आठवून लज्जित होशील.
55तेव्हा तुझी आणि तुझ्या बहिणींची पुन्हा उभारणी होईल.
सदोम व तिच्याभोवतालची गावे, शोमरोन व तिच्या
आजुबाजूची गावे आणि तू व तुझ्या सभोवतीची गावेही
पुन्हा वसविली जातील.”

56देव म्हणाला, “पूर्वी तू गर्विष्ठ होतीस. तेव्हा तू आपल्या
बहिणीची सदोमची, चेष्टा केलीस. पण आता तू पुन्हा तसे
करणार नाहीस. 57तुला शिक्षा होण्याआधी, तुझे शेजारी
तुझी थट्टा करण्याआधी, तू अशी वागलीस. अरामच्या
आणि पलिष्ट्यांच्या मुली आता तुझी चेष्टा करीत आहेत.
58तू केलेल्या दुष्कृत्यांबद्दल तुला दु:ख भोगलेच पाहिजे.”
परमेश्वर असे म्हणाला.

59परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, “तू मला
जसे वागवलेस, तसेच मी तुला वागवीन. तू आपल्या लग्नाचे
वचन मोडलेस. आपल्यातील कराराचा मान राखला
नाहीस. 60पण आपण केलेल्या कराराची मला आठवण
असेल. मी तुझ्याबरोबर करार केला होता. आणि तो
कायम चालू राहणार आहे. 61मी तुझ्या बहिणींना तुझ्याकडे
आणीन आणि त्यांना तुझ्या मुली करीन. हे आपल्या
करारात नव्हते, पण मी हे तुझ्यासाठी करीन. मग तुला
तुझ्या दुष्कृत्यांचे स्मरण होऊन लाज वाटेल. 62मग मी
तुझ्याबरोबर माझा करार करीन. मग तुला कळेल की
मीच परमेश्वर आहे. 63मी तुझ्याशी चांगले वागीन. मग
तू माझे स्मरण ठेवशील. आणि तू केलेल्या वाईट कृत्यांची
तुला लाज वाटेल. तू जे काय केलेस, त्याबद्दल मी तुला
क्षमा करीन मग तुला पुन्हा लज्जित व्हावे लागणार नाही.”
परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

17 मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो
म्हणाला. 2“मानवपुत्रा, इस्राएलच्या लोकांना
पुढील कहाणी सांग व त्यांना त्याचा अर्थ विचार. 3त्यांना
सांग:

मोठे पंख असलेला एक प्रचंड गरूड (नबुखद्नेस्सर)
लबानोनला आला. त्याला खूप पिसे होती व त्यावर
ठिपके होते.

4त्याने मोठ्या गंधसरूचा शेंडा (लबानोन) तोडून
कनानला आणला. व्यापाऱ्यांच्या गावात त्याने एक फांदी
लावली.

5मग त्या गरूडाने कनानमधील काही बीज (लोक)
सुपीक जमिनीत नदीकाठी पेरले.

6बीज अंकुरले आणि द्राक्षवेल तरारली. ती वेल उत्तम
होती. ती उंच नव्हती, पण तिचा विस्तार मोठा होता.
तिला फांद्या फुटल्या व लहान वेलीचा वाढून मोठा वेल
झाला.

7मग मोठे पंख असलेल्या, दुसऱ्या मोठ्या गरूडाने हा
वेल पाहिला. त्या गरूडाला खूप पिसे होती. ह्या नव्या
गरूडाने आपली काळजी घ्यावी, असे द्राक्षवेलीला वाटत
होते. म्हणून तिने आपली मुळे गरूडाकडे वळविली.
तिच्या फांद्या त्याच्या दिशेने पसरल्या. ज्या मळ्यात ती
वेल लावली होती, त्या मळ्यापासून फांद्या वाढून दूर
गेल्या. नव्या गरूडाने आपल्याला पाणी द्यावे असे
द्राक्षवेलीला वाटले.

8ती द्राक्षवेल सुपीक मळ्यात लावली होती. तिच्या
जवळपास पुष्कळ पाणी होते. तिला खूप फांद्या फुटून
चांगली फळे धरू शकली असती. ती एक उत्तम वेल
झाली असती.”

9परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला: “ती वेल यशस्वी
होईल असे तुम्हाला वाटते का? नाही! नवा गरूड तो
उपटून टाकील. पक्षी तिची मुळे तोडेल. व तो सर्व द्राक्षे
खाऊन टाकील. मग कोवळी पाने सुकून गळून पडतील.
ती वेल सुकत जाईल. तिला मुळापासून उपटण्यास बळकट
हातांची व सामर्थ्यवान राष्ट्रांची गरज लागणार नाही.

10जेथे लावली आहे तेथेच ती वेल चांगली वाढेल का?
नाही! पूर्वेच्या गरम वाऱ्याने ती सुकेल व मरेल. जेथे
लावली तेथेच ती मरेल.”

11परमेश्वराचा आवाज मला ऐकू आला. तो म्हणाला,
12“इस्राएलच्या लोकांना ह्या गोष्टीचा अर्थ समजावून सांग.
ते नेहमीच माझ्याविरुद्ध जातात. त्यांना पुढील गोष्टी सांग.
पहिला गरूड म्हणजे बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर होय.
तो यरुशलेमला आला आणि त्याने राजाला व इतर नेत्यांना
आपल्याबरोबर बाबेलला नेले. 13मग नबुखद्नेस्सरने
राजघराण्यातील एका माणसाबरोबर करार केला. त्याने
त्याच्याकडून सक्तीने वचन घेतले. त्या माणसाने
नबुखद्नेस्सराशी निष्ठेने राहण्याचे वचन दिले.
नबुखद्नेस्सरने मग त्याला यहूदाचा नवा राजा केला. मग
त्याने यहूदातील सर्व सामर्थ्यवान पुरूषांना यहूदापासून दूर
नेले. 14त्यामुळे यहूदा हे दुर्बल झाले आणि ते
नबुखद्नेस्सराविरुद्ध बंड करू शकले नाही. यहूदाच्या
नव्या राजाबरोबर नबुखद्नेस्सरने केलेला करार लोकांना
सक्तीने पाळावा लागला. 15पण शेवटी कसेही करून ह्या
नव्या राजाने नबुखद्नेस्सराविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न
केलाच. त्याने आपले दूत पाठवून मिसरकडे मदत
मागितली त्यांना पुष्कळ घोडे व सैनिक मागितले. यहूदाचा
नवा राजा ह्यात यशस्वी होईल. असे तुम्हाला वाटते का?
नव्या राजाकडे करार मोडून शिक्षेतून सुटका करून
घेण्याइतके सामर्थ्य आहे, असे तुम्हाला वाटते का?”

16परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, “मी माझ्या प्राणाची
शपथ घेऊन सांगतो की नवा राजा बाबेलमध्येच मरेल.
नबुखद्नेस्सरने ह्या माणसाला यहूदाचा नवा राजा केले.
पण त्या माणसाने नबुखद्नेस्सरला दिलेले वचन मोडले.
त्याने कराराकडे दुर्लक्ष केले. 17आणि मिसरचा राजा
यहूदाच्या नव्या राजाचे रक्षण करू शकणार नाही. तो
कदाचित् मोठे सैन्य पाठवील, पण मिसरची प्रचंड शक्ती

यहूदाला वाचवू शकणार नाही. नबुखद्नेस्सरचे सैन्य नगरी
हस्तगत करण्यासाठी मातीचे रस्ते व भिंती बांधील खूप
लोक मरतील. 18पण यहूदाच्या राजाला पळून जाता येणार
नाही. का? कारण त्याने कराराकडे दुर्लक्ष केले.
नबुखद्नेस्सरला दिलेले वचन त्याने मोडले.” 19परमेश्वर,
माझा प्रभू, अशी प्रतिज्ञा करतो, “माझ्या प्राणाशपथ मी
यहूदाच्या राजाला शिक्षा करीन. का? कारण त्याने माझ्या
ताकिदींकडे लक्ष दिले नाही. त्याने आमचा करार मोडला.
20मी सापळा रचीन व त्यात तो पकडला जाईल. मग मी
त्याला बाबेलला आणून शिक्षा करीन. तो माझ्याविरुद्ध
गेला म्हणून मी त्याला शिक्षा करीन. 21मी त्याच्या सैन्याचा
नाश करीन. त्याचे चांगले सैनिक मी नष्ट करीन.
वाचलेल्या लोकांना मी वाऱ्यावर सोडून देईन. मग तुम्हाला
समजेल की मी परमेश्वर आहे. आणि मी ह्या गोष्टी
तुम्हाला सांगितल्या होत्या.”

22परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला,

“उंच गंधसरूची एक फांदी मी तोडून घेईन. शेंड्याची
डहाळी मी घेईन. आणि मी स्वत: उंच पर्वतावर ती
लावीन.
23“मी स्वत:, ती फांदी, इस्राएलच्या उंच पर्वतावर लावीन.
मग त्या फांदीचा वृक्ष होईल. त्याला फांद्या फुटून फळे
येतील. तो एक सुंदर गंधसरूचा वृक्ष असेल. त्याच्या
फांद्यांवर खूप पक्षी बसतील. त्याच्या सावलीला खूप पक्षी
राहतील.
24“मग दुसऱ्या झांडाना समजेल की मी उंच वृक्ष
जमीनदोस्त करतो. आणि लहान झांडांचे उंच वृक्ष करतो.
मीच हिरवीगार झाडे सुकवून टाकतो, व सुकलेल्या झाडांना
पालवी फुटवितो. मी परमेश्वर आहे. मी बोलतो, तेच
करतो.”

18 परमेश्वराचा संदेश मला मिळाला. तो म्हणाला,
2“आईवडिलांनी आंबट द्राक्षे खाल्ली. त्याची आंबट
चव मात्र मुलांनी घेतली. ही म्हण तुम्ही नेहमी म्हणता. ते
का?

तुम्ही पाप करू शकता, भविष्यकाळात कोणालातरी
त्याची शिक्षा मिळेल, असे तुम्हांला वाटते.

3पण परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, “माझ्या प्राणांची
शपथ घेऊन प्रतिज्ञा करतो की इस्राएलच्या लोकांना
ह्यापुढे ही म्हण खरी वाटणार नाही. 4मी सर्वांना सारखेच
वागवीन, मग ते आईवडील असोत वा मूल. जो पाप
करील, तो मरेल.
5“जर माणूस सज्जन तर तो जगेल. तो सर्वांशी चांगलेच
वागतो. 6तो डोंगरावर जात नाही व खोट्या देवांना दाखवलेले
नैवेद्य खात नाही, इस्राएलमधील अमंगल मूर्तींची तो प्रार्थना
करीत नाही. तो शेजाऱ्याच्या बायकोबरोबर व्यभिचार
करीत नाही, आपल्या स्वत:च्या बायकोच्या मासिक
पाळीच्या वेळी तिच्याजवळ जात नाही. 7तो सज्जन लोकांचा
फायदा घेत नाही, कर्ज देताना गहाण ठेवलेल्या वस्तू, तो
कर्जाची परतफेड होताच कर्जदाराला परत करतो. तो
सज्जन भुकेलेल्यांना अन्न देतो, गरजूंना कपडे देतो.
8एखाद्याला पैसे उसने दिल्यावर, तो त्यावर व्याज घेत
नाही. तो कपट करीत नाही. तो सर्वांशीच चांगला वागतो.
लोक त्याच्यावर विश्वास ठेवू शकतात. 9तो सज्जन माझे
नियम पाळतो, माझ्या निर्णयांवर विचार करतो, तो न्यायी
आणि विश्वसनीय होण्याचे शिकतो. तोच चांगला माणूस
होय, म्हणूनच तो जगेल.
10“पण त्या सज्जनाचा मुलगा कदाचित् ह्या सर्व चांगल्या
गोष्टी करणार नाही. तो मुलगा कदाचित् चोरी करीत
असेल व लोकांना ठार मारीत असेल. 11तो मुलगा पुढील
वाईट गोष्टी करत असेल. तो डोंगरावर जाऊन खोट्या
देवांना दाखविलेला नैवेद्य खात असेल, तो दुष्ट मुलगा
शेजाऱ्याच्या बायकोबरोबर, व्यभिचाराचे पाप करीत
असेल. 12तो गरीब असहाय्य लोकांना वाईट वागणूक देत
असेल, लोकांचा गैर फायदा घेत असेल, गहाण ठेवलेल्या
वस्तू कर्जफेडीनंतर कर्जदाराला परत करीत नसेल, तो
त्या अमंगल मूर्तींची प्रार्थना करीत असेल आणि आणखी
काही भयंकर गोष्टी करीत असेल. अशा कितीतरी वाईट
गोष्टी तो करीत असेल. 13एखाद्या गरजूला उसने पैसे
दिल्यावर हा दुष्ट मुलगा, त्या कर्जदाराकडून बळजबरीने
व्याज घेत असेल. असा दुष्ट मुलगा जगणार नाही. त्याने
भयंकर गोष्टी केल्याबद्दल, त्याला मृत्यूला सामोरे जावे
लागले व त्याच्या मरणाला तोच स्वत: जबाबदार असेल.
14“आता, या दुष्टालाही कदाचित् मुलगा असेल व
त्याने वडिलांच्या सर्व वाईट गोष्टी पाहिल्या असल्याने तो
वडिलांप्रमाणे वागण्याचे कदाचित् टाळेल. असा चांगला
मुलगा लोकांशी चांगलेच वागतो. 15तो डोंगरावर जात
नाही व खोट्या देवांचा प्रसाद खात नाही. तो इस्राएलमधील
घाणेरड्या मूर्तींची कधी प्रार्थना करीत नाही. शेजाऱ्याच्या
पत्नीबरोबर व्यभिचाराचे पाप करीत नाही. 16तो लोकांचा
फायदा घेत नाही. तो कर्जफेडीनंतर गहाण ठेवलेल्या
वस्तू कर्जदाराला परत करतो, भुकेलेल्यांना अन्न देतो,
गरजूंना कपडे देतो. 17तो गरिबांना मदत करतो गरजूला
पैसे उसने दिल्यास, त्यावर व्याज घेत नाही. तो माझे
नियम पाळतो त्याचप्रमाणे वागतो. त्याच्या वडिलांच्या
पापांसाठी, चांगल्या मुलाला मृत्युदंड मिळणार नाही. तो
मुलगा जिवंत राहील. 18वडील कदाचित लोकांना दुखवीत
असतील आणि चोरी करीत असतील. ते त्यांच्या
माणसांकरिता काहीच भल्या गोष्टी करीत नसतील ते
त्यांच्या पापांनी मरतील. पण वडिलांच्या पापाबद्दल मुलाला
शिक्षा होणार नाही.

19"तुम्ही कदाचित् विचाराल 'वडिलांच्या पापाबद्दल मुलाला शिक्षा का होणार नाही?' कारण मुलगा प्रामाणिक होता व त्याने सत्कृत्ये केली. त्याने माझ्या आज्ञा काळजीपूर्वक पाळल्या. म्हणून तो जगेल. 20पाप्यालाच मरण येईल. वडिलांच्या पापांबद्दल मुलाला शिक्षा होणार नाही. तसेच मुलाच्या पापांबद्दल वडिलांना शिक्षा होणार नाही. सज्जनाचा चांगुलपणा फक्त त्याच्या स्वत:चाच असतो. आणि वाईट माणसाचा वाईटपणा त्याच्या एकट्याचाच असतो.

21"पण, वाईट माणूस, सुधारला, तर तो मरणार नाही. तो जगेल. त्याने पूर्वी केलेल्या वाईट गोष्टी तो करण्याचे सोडून देईल. व माझे नियम काळजीपूर्वक पाळील तो सज्जन व प्रामाणिक होईल. 22तर मग देव त्याच्या दुष्कृत्यांचे स्मरण ठेवणार नाही. तो फक्त त्याचा चांगुलपणाच स्मरेल. मग तो माणूस जगेल."

23परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "वाईट लोकांनी मरावे अशी माझी इच्छा नाही. त्यांनी आपले मार्ग बदलावे.मग ते जगू शकतील.

24"कदाचित् भला माणूस चांगुलपणा सोडून देईल. वाईट माणसाने पूर्वी केलेली भयानक दुष्कृत्ये तो करील व सन्मार्ग सोडील. (असा माणूस जिवंत राहील का?) अशा रीतीने, त्या माणसाने वाईट मार्गाला लागून दुष्कृत्ये केल्यास, त्याच्या पूर्वीच्या सत्कृत्यांची आठवण देव ठेवणार नाही. तो देवाविरुद्ध वागून पापे करू लागला, हेच देवाच्या लक्षात राहील. म्हणून तो त्याच्या पापांचे फळ भोगेल. म्हणजेच मरेल."

25देव म्हणाला, "तुम्ही कदाचित् म्हणाल, 'देव, आमचा प्रभू न्यायी नाही' पण इस्राएलच्या लोकांनो, ऐका. तुम्हीच न्यायी नाही आहात. 26जर सज्जन बिघडला व दुष्ट झाला, तर त्याने त्याच्या दुष्कृत्याबद्दल मेलेच पाहिजे. 27पण वाईट माणूस सुधारला व सज्जन आणि प्रामाणिक झाला, तर तो त्याचा जीव वाचवील. तो जिवंत राहील. 28तो किती वाईट होता. हे त्याचे त्यालाच कळेल व तो माझ्याकडे परत येईल. पूर्वीप्रमाणे वाईट गोष्टी तो करणार नाही. मग तो जगेल. तो मरणार नाही."

29इस्राएलचे लोक म्हणाले, "हे न्याय्य नाही. परमेश्वर, आमचा प्रभू, असा असूच शकत नाही!" देव म्हणाला, "मी न्यायी आहे तुम्ही लोकच न्यायी नाही आहात. 30का? इस्राएलच्या लोकांनो, प्रत्येक माणसाच्या कर्माप्रमाणे मी त्या माणसाचा न्यायनिवाडा करतो." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला,

"म्हणून माझ्याकडे परत या. वाईट गोष्टी करण्याचे सोडून द्या. त्या भयंकर गोष्टींना, (मूर्तींना) तुम्हास पाप करण्यास, प्रवृत्त करू देऊ नका. 31तुम्ही तयार केलेल्या भयानक गोष्टी (मूर्ती) फेकून द्या. त्यांच्यामुळेच तुम्ही पाप करण्यास धजावता. तुमचे हृदयपरिवर्तन व आत्मपरिवर्तन होऊ द्या. इस्राएलच्या लोकांनो, स्वत:च स्वत:चा मृत्यू का ओढवून घेता? 32मला तुम्हाला ठार मारण्याची इच्छा नाही. कृपा करून परत या व जगा" परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

19 देव मला म्हणाला, "इस्राएलच्या नेत्यांबद्दल हे शोकगीत तू गायलेच पाहिजेस.

2""तुझी आई सिंहीणीसारखी आहे. ती तरुण सिंहांबरोबर झोपते. ती तरुण सिंहाबरोबर झोपली आणि तिला बरीच पिल्ले झाली.

3त्यापैकी एक पिल्लू उठते त्याची वाढ होऊन तो शक्तिशाली तरुण सिंह झाला आहे. तो शिकार करायला शिकला आहे. त्याने माणसाला मारून खाल्ले.

4लोकांनी त्याची गर्जना ऐकली, आणि त्यांनी त्याला सापळ्यात पकडले लोकांनी त्या सिंहाला वेसण घालून मिसरला नेले.

5""ते छावा नेता होईल' असे आई सिंहीणीला वाटले. पण आता तिची पूर्ण निराशा झाली आहे. मग तिने दुसऱ्या छाव्याला शिकवून तयार केले.

6तो तरुण सिंहाबरोबर शिकारीला गेला. तो, बलवान, तरुण, असा सिंह झाला. तो स्वत: शिकार करायला शिकला. त्याने माणसाला मारून खाल्ले.

7त्याने राजवाड्यांवर हल्ला केला, व शहरांचा नाश केला. त्या सिंहाची गर्जना ऐकताच, त्या देशातील प्रत्येक माणूस बोलायलासुध्दा घाबरत असे.

8मग त्याच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांनी त्याच्यासाठी सापळा लावला, आणि त्यांनी त्याला पकडले.

9त्यांनी त्याला वेसण घालून पिंजऱ्यात कोंडले. त्यांनी त्या सिंहाला सापळ्यात अडकविले. मग त्यांनी त्याला बाबेलच्या राजाकडे नेले. आता, इस्राएलच्या डोंगरातून त्याची गर्जना तुम्हाला ऐकू येऊ शकत नाही.

10""पाण्याकाठी लावलेल्या द्राक्षवेलीसारखी तुझी आई होती. तिला भरपूर पाणी मिळाल्यामुळे खूप ताणे फुटले.

11मग तिच्या फांद्या खूप वाढल्या. त्या हातातील काठ्यांप्रमाणे व राजदंडाप्रमाणे झाल्या.

12ती वेल उंचच उंच वाढली. तिला खूप फांद्या फुटून ती ढगांपर्यंत पोहोचली.

13पण त्या वेलीला मुळापासून उपटून फेकून देण्यात आले. पूर्वेकडील उष्ण वाऱ्यांमुळे तिची फळे वाळली. मजबूत फांद्या मोडल्या, आणि त्या फांद्या आगीत टाकल्या गेल्या.

14आता ती द्राक्षवेल, रूक्ष व निर्जल वाळवंटी प्रदेशात लावली आहे. सर्वांत मोठ्या फांदीला लागलेली आग पसरली. त्या आगीने सर्व डहाळ्यांचा व फळाचा नाश केला. आता हातात धरण्याची काठी व राजदंड उरला नाही.'

हे मृत्यूबद्दलचे शोकगीत, मृत्यूसाठीच, गायिले गेले.”

20 एक दिवस, इस्राएलमधील काही वडीलधारी
(नेते) परमेश्वराचा सल्ला विचारण्यासाठी
माझ्याकडे आले. परागंदा अवस्थेतील काळाच्या सातव्या
वर्षाच्या पाचव्या महिन्याच्या (ऑगस्ट) दहाव्या दिवशी ते
लोक आले आणि माझ्यापुढे बसले.
2मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो म्हणाला,
3“मानवपुत्रा, इस्राएलच्या वडीलधाऱ्यांशी (नेत्यांशी) बोल.
त्यांना सांग ‘परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो.
तुम्ही माझा सल्ला घेण्यासाठी आला आहात का? जर
तसे असेल. तर मी तुम्हाला सल्ला देणार नाही. परमेश्वर
माझा प्रभू, असे म्हणाला, 4मानवपुत्रा, तू त्यांची परीक्षा
करशील का? तू त्यांची पारख करशील का? त्यांच्या
वडिलांनी केलेल्या भयंकर गोष्टींबद्दल तू त्यांना सांगितले
पाहिजेस. 5‘परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो,
असे तू त्यांना सांगितले पाहिजेस; ज्या दिवशी मी इस्राएलची
निवड केली, याकोबाच्या वंशाला अभिवचन दिले आणि
अभय देऊन मी त्यांना माझी ओळख दिली. ‘मीच तुमचा
परमेश्वर आहे. असे वचन मी त्यांना मिसरमध्ये दिले,
6त्याच दिवशी, त्यांना मिसरमधून बाहेर काढून, मी त्यांना
देत असलेल्या भूमीकडे घेऊन जाण्याचेही कबूल केले.
ती भूमी अनेक चांगल्या गोष्टीनी भरलेली होती.* सर्व
देशांपेक्षा हा देश सुंदर होता.
7“इस्राएलच्या लोकांना त्यांच्या भयंकर मूर्ती दूर फेकून
देण्यास मी सांगितले. मिसरच्या त्या अमंगळ पुतळ्यांबरोबर
तुम्ही स्वत:ही अमंगळ होऊ नका, असेही मी त्यांना
सांगितले. मी परमेश्वरच तुमचा देव आहे.” 8पण त्यांनी
माझ्याकडे पाठ फिरविली व माझे ऐकण्याचे नाकारले,
त्यांनी त्यांच्या त्या भयंकर मूर्ती फेकल्या नाहीत ते
मिसरचे घाणेरडे पुतळे त्यांनी मिसरमध्येच टाकून दिले
नाहीत. मग माझ्या रागाचा पारा किती चढतो हे
त्यांना कळावे म्हणून मी (देवाने) मिसरमध्येच त्यांचा
नाश करण्याचा निश्चय केला. 9पण मी त्यांचा नाश
केला नाही. माझे लोक जेथे राहात होते तेथे, त्यांना,
मिसरमधून बाहेर काढण्याचे मी अगोदरच कबूल केले
होते. तेव्हा त्या सर्वांच्या देखत इस्राएलचा नाश मी केला
नाही कारण, मला माझ्या नावाला बट्टा लावायचा नव्हता.
10मी इस्राएलच्या लोकांना मिसरमधून बाहेर आणले.
व त्यांना वाळवंटात नेले. 11मग मी त्यांना माझे कायदे
शिकविले, माझे नियम घालून दिले. एखाद्याने ते
नियम पाळल्यास, तो जगेल. 12मी त्यांना विश्रांतीच्या
खास दिवसाबद्दलही सांगितले. त्या सुट्ट्या म्हणजे त्यांच्या
व माझ्यामधील विशेष संकेत होते, खूण होती. मीच
परमेश्वर आहे व ह्या माणसाना, मी, माझी विशेष
(पवित्र) माणसे करीत आहे हेच त्या खुणेवरून
दिसे.
13“‘पण वाळवंटात इस्राएली लोक माझ्याविरुध्द गेले.
त्यांनी माझे नियम पाळले नाहीत. माझे नियम पाळायला
त्यांनी नकार दिला. खरे म्हणजे, ते नियम अतिशय चांगले
होते. एखाद्याने ते पाळले असते तर तो नक्कीच जगला
असता! माझ्या सुट्ट्यांच्या विशेष दिवसांकडे त्यांनी त्यांना
काही महत्व नसल्याप्रमाणे दुर्लक्ष केले. पुष्कळ वेळा,
त्यांनी त्या दिवशी काम केले. म्हणून माझ्या क्रोधाचा
पूर्णाविष्कार दाखविण्यासाठी, त्यांचा वाळवंटात नाश
करण्याचा मी निश्चय केला. 14पण मी त्यांचा नाश केला
नाही. मी इस्राएलला मिसर. मधून बाहेर आणताना इतर
राष्ट्रांनी पाहिले होते. त्यांच्यासमोर इस्राएलचा नाश करून
मला माझ्या नावाला काळिमा फासायचा नव्हता.
15वाळवंटात त्या लोकांना मी आणखी एक वचन दिले.
ते असे जी भूमी मी त्यांना देत होतो, तेथे मी त्यांना नेणार
नाही. ती समृध्द भूमी होती. तो प्रदेश सर्व देशां पेक्षा सुंदर
होता.
16“‘इस्राएलच्या लोकांनी माझे नियम पाळण्यास नकार
दिला. ते माझ्या नियमनुसार वागले नाहीत. त्यांनी माझ्या
सुट्ट्यांच्या दिवसाला महत्व दिले नाही. त्यांची मने त्या
गलिच्छ मूर्तीमध्ये गुंतली असल्याने ते असे वागले. 17पण
मला त्यांची दया आल्याने मी त्यांचा वाळवंटात संपूर्ण
नाश केला नाही. 18मी त्यांच्या मुलांशी वाळवंटात बोललो.
मी त्यांना सांगितले, “तुमच्या आई-वडिलासारखे होऊ
नका. त्यांच्या गलिच्छ मूर्तीबरोबर तुम्हीही गलिच्छ होऊ
नका. नियम पाळू नका. त्यांच्या आज्ञा पाळू नका. त्यांच्या
त्या गलिच्छ गोष्टीबरोबर तुम्हीही गलिच्छ होऊ नका.
19मी परमेश्वर आहे, मीच तुमचा देव आहे. माझे नियम
पाळा. माझ्या आज्ञांचे पालन करा. मी सांगतो तसे वागा.
20माझ्या सुट्ट्यांच्या दिवसांचे महत्व तुम्हाला वाटते हे दाखवा
ते दिवस हे तुमच्या माझ्यामधील विशेष खूण आहे, ह्याची
आठवण ठेवा. मी परमेश्वर आहे आणि ते सुट्ट्यांचे दिवस
‘मी तुमचा देव आहे’ हेच दाखवितात.
21“‘पण ती मुले माझ्याविरुध्द गेली. त्यांनी माझे नियम
मानले नाहीत. माझ्या आज्ञा पाळल्या नाहीत. मी
सांगितलेल्या गोष्टी त्यांनी केल्या नाहीत. खरे म्हणजे,
माझे नियम चांगले आहेत. माणसाने ते पाळल्यास, तो
अवश्य जगेल. त्यांनी माझ्या सुट्ट्यांच्या विशेष दिवसांकडे
दुर्लक्ष केले. मग माझा राग किती आहे, हे त्यांना कळावे
म्हणून मी वाळवंटात त्यांचा संपूर्ण नाश करण्याचे ठरविले.
22पण मी मलाच आवरले. मी इस्राएलला मिसरमधून
बाहेर आणताना इतर राष्ट्रांनी पाहिले होते. त्या सर्वांसमक्ष
इस्राएलचा नाश करून मला माझ्या नावाला कलंक
लावायचा नव्हता. 23म्हणून त्या लोकांना मी आणखी
एक वचन दिले की मी त्यांना इतर राष्ट्रांत पसरवीन,
पुष्कळ वेगवेगळ्या देशांत पाठवीन.

---

**ती भूमी ... होती** शब्दश: अर्थ “दूधाच्या व मधाच्या नद्या वाहत आहेत, अशी भूमी.”

24“‘इस्राएल लोकांनी माझ्या आज्ञा पाळल्या नाहीत.
त्यांनी माझ्या नियमाप्रमाणे वागायचे नाकारले. माझ्या
सुट्ट्यांच्या विशेष दिवसांना त्यांनी महत्व दिले नाही. त्यांनी
त्यांच्या वडिलांच्या अमंगळ मूर्तींचीच पूजा केली. 25म्हणून
मी त्यांना वाईट नियम शिकविले त्यांना शुध्दीवर न
आणणाऱ्या आज्ञा मी त्यांना दिल्या. 26त्यांच्या दानांबरोबर
मी त्यांना अमंगळ होऊ दिले. त्यांनी स्वत:च्याच पहिल्यां
अपत्यांचेसुध्दा बळी देण्यास सुरवात केली. अशा रीतीने,
मी त्यांचा नाश केल्यावर त्यांना मीच परमेश्वर आहे. हे
समजेल!’ 27तेव्हा मानवपुत्रा, आता इस्राएलाच्या लोकांशी
बोल ‘परमेश्वर, माझा देव पुढील गोष्टी सांगतो, असे
साग: इस्राएलच्या लोकांनी माझी निंदा केली आणि
माझ्याविरुद्ध कट रचले. 28पण तरीसुद्धा, त्यांना कबूल
केलेल्या प्रदेशात मी त्यांना आणले. त्यांनी टेकड्या व
हिरवीगार झाडे पाहिली आणि ते त्या सर्व ठिकाणी पूजा
करण्यासाठी गेले. त्यांनी त्यांच्याबरोबर बळी आणि
संतापदायक नैवेद्य, नेले सुंदर गंध निर्माण करणारे यज्ञ
त्यांनी केले, त्यांनी तेथे पेये अर्पण करण्यासाठी नेली.
29मी इस्राएली लोकांना विचारले की तुम्ही ह्या उच्चस्थानी
कशा करिता जात आहात? आज देखिल ते उच्चस्थान
आहे.’”
30देव म्हणाला, “इस्राएलच्या लोकांनी अशा सर्व वाईट
गोष्टी केल्या. म्हणून त्यांच्याशी बोल. त्यांना सांग
‘परमेश्वर, माझा देव, पुढील गोष्टी सांगतो, तुमच्या पूर्वजांनी
केलेली कृत्ये करून तुम्ही स्वत:ला अमंगळ करून घेतले
आहे, गलिच्छ करून घेतले आहे, तुम्ही वेश्येप्रमाणे वागला
आहात. तुमच्या वाडवडिलांनी पूजलेल्या भयंकर
दैवतांसाठी तुम्ही माझा त्याग केला. 31तुम्ही तुमच्या पूर्वजांनी
अर्पण केलेल्या गोष्टीच आजही दैवताला अर्पण करीत
आहात. तुमच्या खोट्या देवांना बळी म्हणून तुम्ही स्वत:चीच
मुले आगीत टाकीत आहात. आजसुद्धा तुम्ही त्या घाणेरड्या,
अमंगळ देवांबरोबर स्वत:ला घाणेरडे करून घेत आहात.
मी तुम्हाला माझ्याजवळ येऊ देईन आणि तुम्हाला सल्ला
देईन. उपदेश करीन असे खरंच तुम्हाला वाटते का? मी
परमेश्वर व प्रभू आहे. मी स्वत:ची शपथ घेऊन प्रतिज्ञा
करतो की मी तुमच्या प्रश्नांना उत्तर देणार नाही वा तुम्हाला
मार्गदर्शन करणार नाही. 32तुम्हाला इतर राष्ट्रांसारखे
व्हायचे आहे असे सारखे तुम्ही म्हणत राहता. पण तुमचा
उद्देश आणि इच्छा कधीच पूर्ण होणार नाही. तुम्ही इतर
राष्ट्रांतील लोकांसारखे वागता. तुम्ही लाकडाच्या
तुकड्यांची व दगडांची (मूर्तीची) पूजा करता.’”
33परमेश्वर, माझा देव, म्हणतो, “मी शपथपूर्वक
प्रतिज्ञा करतो की मी राजा म्हणून तुमच्यावर राज्य करीन.
पण मी सामर्थ्यशाली हात तुमच्यावर उगारीन. तुम्हाला
शिक्षा करीन. माझा तुमच्यावरचा क्रोध मी प्रकट करीन.
34मी ह्या इतर राष्ट्रांतून तुम्हाला बाहेर काढीन. इतर
राष्ट्रांत तुम्हाला पसरविले पण मी तुम्हाला ह्या सर्व देशांतून
परत आणून एकत्र करीन. मग मी माझा हात तुमच्यावर
उचलून तुम्हाला शिक्षा करीन. मी तुमच्यावर माझा राग
किती आहे हे दाखवून देईन. 35मी तुम्हाला पूर्वीप्रमाणेच
वाळवंटात नेईन. पण तेथे इतर राष्ट्रे वसत असतील.
आपण समोरासमोर उभे राहू व मग मी तुमचा न्यायनिवाडा
करीन. 36मिसरजवळच्या वाळवंटात मी जसा तुमच्या
पूर्वजांचा न्यायनिवाडा केला तसाच मी तुमचाही करीन.”
परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला,
37“मी तुम्हाला अपराधी समजून, कराराप्रमाणे तुम्हाला
शिक्षा करीन. 38माझ्याविरुध्द गेलेल्या पापी लोकांना
तुमच्या मातृभूमीतून मी हालवीन. ते इस्राएलमध्ये कधीच
परत येणार नाहीत. मगच तुम्हाला मी परमेश्वर असल्याचे
पटेल.”
39इस्राएल लोकांनो, परमेश्वराने, माझ्या देवाने, पुढील
गोष्टी सांगितल्या कोणाला “त्या अमंगळ मूर्तीची पूजा
करावीशी वाटत असेल, तर खुशाल करू दे. पण नंतर
माझ्या सल्ल्याची अपेक्षा ठेवू नका. तुम्ही त्या गलिच्छ
मूर्तींना बलिदान देऊन ह्यापुढे अजिबात माझ्या नावाला
बट्टा लावू शकणार नाही.”
40परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो, “लोकांनी माझ्या
पवित्र डोंगरावर इस्राएलच्या उंच पर्वतावर माझी सेवा
करण्यासाठी आलेच पाहिजे. सर्व इस्राएलचे लोक त्यांच्या
भूमीवर असतील. ते त्यांच्या स्वत:च्या देशात असतील.
माझा सल्ला विचारायला येण्याची तीच जागा आहे. तेथेच
तुम्ही मला नैवेद्य दाखविला पाहिजे. त्या जागीच तुम्ही
मला अर्पण करण्यासाठी तुमच्या पिकाचा पहिला भाग
आणलाच पाहिजे. तुमची पवित्र दाने तेथेच तुम्ही मला
दिली पाहिजेत. 41मगच तुम्ही अर्पण केलेल्या वस्तूंच्या
सुंगधाने मी प्रसन्न होईन. मी तुम्हाला परत आणीन तेव्हाच
असे घडेल. मी तुम्हाला पुष्कळ देशांत विखरून टाकले.
पण मी तुम्हाला एकत्र करून माझे खास लोक म्हणून
पुन्हा तुमची निवड करीन. सर्व राष्ट्रांसमक्ष मी हे करीन.
42तुमच्या पूर्वजांना जी भूमी देण्याचे मी वचन दिले होते,
त्या इस्राएलच्या भूमीत मी तुम्हाला परत आणीन, तेव्हाच
तुम्हाला मी परमेश्वर असल्याचे समजेल. 43तेथेच
तुम्हाला अमंगळ करणाऱ्या तुमच्या वाईट कृत्यांची
आठवण होऊन, तुम्ही शरमिंदे व्हाल. 44इस्राएल लोकांनो,
तुम्ही खूप वाईट कृत्ये केलीत. त्यासाठी तुमचा सर्वनाश
व्हायला पाहिजे होता. पण माझे नाव राखण्यासाठी तुम्हाला
योग्य अशी शिक्षा मी केली नाही. ह्यावरून तुम्हाला मीच
देव आहे हे समजून येईल.” परमेश्वर, माझा प्रभू, असे
म्हणाला.
45मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले तो म्हणाला,
46“मानवपुत्रा, यहूदाच्या दक्षिणेकडच्या भागाकडे, म्हणजे
नेगेवकडे पाहा. नेगेवच्या रानाविरुद्ध बोल. 47नेगेवच्या
रानाला सांग, ‘परमेश्वराचे शब्द ऐका. प्रभू, माझा देव,
असे म्हणाला की तुझ्या रानात आग लावण्याची मी तयारी

केली आहे. ती आग प्रत्येक झाड-हिरवे व वाळलेले
जाळेल. ज्वाळा विझणार नाहीत. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतचा
प्रदेश आगीत जळेल. 48मी, परमेश्वराने, आग लावली हे
सर्व लोकांना समजेल. ती विझणार नाही.'"
49मग मी (यहेज्केल) म्हणालो, "बाप रे! परमेश्वरा,
माझ्या देवा, मी असे सांगितले, तर मी गोष्ट सांगत आहे.
असे लोक म्हणतील हे खरेच घडून येईल. ह्यावर त्यांचा
विश्वास बसणार नाही."

21 मग परमेश्वराचे शब्द मला पुन्हा ऐकू आले. तो
म्हणाला, 2"मानवपुत्रा, यरुशलेमकडे पाहा आणि
त्यांच्या पवित्र स्थानांच्या विरुद्ध बोल. माझ्यावतीने
इस्राएलच्या भूमीविरुद्ध बोल. 3इस्राएल देशाला सांग
'परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो मी तुमच्याविरुध्द आहे.
मी माझी तलवार म्यानातून उपसेन. मी सज्जनांना व
पाप्यांना तुझ्यापासून दूर करीन. 4मी सज्जन माणसांना व
पापी माणसांना तुझ्यापासून तोडीन. मी माझी तलवार
म्यानेतून उपसेन व दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत सर्व लोकांविरुद्ध
चालवीन. 5मग सगळ्यांना समजेल की मीच परमेश्वर
आहे. मी माझी तलवार म्यानातून उपसली आहे आणि
तिचे काम संपल्याशिवाय ती परत म्यानात जाणार नाही.
हेही त्यांना कळेल.'"
6देव मला म्हणाला, "मानवपुत्रा, अतिशय दु:खाने
आक्रंदणाऱ्या हृदय विदीर्ण झालेल्या माणसासारखा आवाज
तू सर्व लोकांसमोर काढ. 7मग ते तुला विचारतील 'तू
दु:ख का करीत आहेस?' मग तू सांगितले पाहिजेस 'वाईट
बातमीसाठी हा शोक आहे. त्या बातमीने सर्वांची मने
खचतील, हात लुळे पडतील, मने दुर्बल होतील, त्यांचे
गुढघे पाण्याप्रमाणे गळून जातील. पाहा! ती वाईट बातमी
येत आहे.' त्यामुळे ह्या गोष्टी घडतीलच." परमेश्वर, माझा
प्रभू असे म्हणाला,

## तलवार परजली आहे

8परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले तो म्हणाला,
9"मानवपुत्रा, माझ्यावतीने लोकांशी बोल. त्यांना सांग
'परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो.

"'पाहा! तलवार, धारदार तलवार! तलवारीला पाणी
दिले आहे.
10मारण्यासाठी तिला धार लावली आहे. ती विजेप्रमाणे
तळपावी म्हणून तिला पाणी दिले आहे. "'माझ्या मुला, मी
तुला ज्या काठीने शिक्षा करीत असे तिच्यापासून तू दूर
पळालास. त्या लाकडी काठीने शिक्षा करून घेण्याचे
नाकारलेस.
11म्हणून तलवारीला पाणी दिले आहे. आता तिचा
उपयोग करता येऊ शकेल. तलवारीला धार दिली आहे,
तिला पाणी दिले आहे. आता ती मारेकऱ्याच्या हातात
देता येईल.
12"'मानवपुत्रा, मोठ्याने ओरड व किंचाळ का? कारण
तलवार माझ्या लोकांवर व इस्राएलच्या राज्यकर्त्यांवर
चालविली जाणार आहे. त्या राजकर्त्यांना युद्ध हवे होते
म्हणून तलवार येईल तेव्हा ते माझ्या लोकांबरोबर असतील.
तेव्हा मांडीवर थापट्या मार आणि दु:ख प्रदर्शित
करण्यासाठी मोठ्याने आक्रोश कर. 13का? कारण ही
फक्त कसोटी नाही. तुम्ही शिक्षेसाठी लाकडाची काठी
नाकारलीत. मग तुम्हाला शिक्षा करण्यासाठी मी दुसरे
काय बरे वापरावे? हो फक्त तलवारच!'" परमेश्वर, माझा
प्रभू, असे म्हणाला.
14देव म्हणाला, "मानवपुत्रा, टाळी वाजव व माझ्यावतीने
लोकांशी बोल.

"तलवार, दोनदा खाली येऊ देत. तीनदा खाली येऊ
देत. ही तलवार लोकांना ठार मारण्याकरिता आहे. ती
प्रचंड संहार करण्याकरिता आहे. ती त्यांच्यात शिरेल.
15हृदयाचे भीतीने पाणी पाणी होईल. खूप लोक पडतील.
नगरीच्या वेशींजवळ, तलवार खूप लोकांना ठार
करील.हो! ती विजेप्रमाणे तळपेल. लोकाना मारण्यासाठीच
तिला पाणी दिले होते.
16तलवारी, धारदार राहा. उजवीकडे, समोर व डावीकडे
वार कर. तुझे पाते नेईल त्या सर्व ठिकाणी जा.
17"मग मीसुध्दा टाळी वाजवीन. मग माझा राग निवळेल.
मी, परमेश्वर, हे बोललो आहे."

## यरुशलेमकडे जाणाऱ्या मार्गाची निवड

18परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो म्हणाला,
19"मानवपुत्रा, बाबेलच्या राजाची तलवार इस्राएलला येऊ
शकेल, असे दोन रस्ते रेखाटून काढ दोन्ही रस्ते एकाच
देशातून (बाबेलमधून) येतील. मग नगरीला येणाऱ्या
रस्ताच्या सुरवातीला खूण कर. 20तलवार कोठल्या
रस्त्याचा उपयोग करील हे दाखविण्यासाठी खुणेचा वापर
कर. एक रस्ता अम्मोनच्या राब्बा शहराकडे जातो. दुसरा
रस्ता यहूदाकडे, यरुशलेम ह्या सुरक्षित केलेल्या
(तटबंदीने) नगरीकडे जातो. 21बाबेलचा राजा ह्या प्रदेशावर
हल्ला करण्यासाठी आपल्या इच्छेनुसार योजना आखत
आहे, हेच ह्यावरून दिसून येते. दोन रस्ते जेथून फुटतात,
त्या नाक्यावर बाबेलचा राजा आला आहे. भविष्य जाणून
घेण्यासाठी त्याने काही मंत्र-तंत्र केले आहेत. त्याने काही
बाण हलविले, आपल्या कुलदैवताला प्रश्न विचारले, त्याने
बळी दिलेल्या प्राण्याचे यकृत निरखिले.*
22"ह्या खुणांनी यरुशलेमकडे जाणारा रस्ता निवडण्यास
त्यास सांगितले. त्याने मोठे ओंडके आणण्याचे ठरविले
आहे. राजाने हुकूम देताच त्याचे सैनिक संहार करायला

---

**त्याने बाण ... निरखिले** खोट्या देवावर विश्वास ठेवणारे लोक भविष्य जाणून घेण्यासाठी ह्या गोष्टी करीत.

सुरवात करतील. ते रणगर्जना करतील. मग ते नगरीभोवती मातीची भिंत बांधतील व तेथून तटबंदी चढण्यासाठी रस्ता तयार करतील, ते लाकडाचे बुरुजही बांधतील. [23]“त्या मंत्र-तंत्रांच्या खुणा इस्राएल लोकांना निरर्थक वाटतील त्यांना दिलेली वचने त्यांना पुरेशी आहेत. पण परमेश्वराला त्यांच्या पापाचे स्मरण होईल. मग इस्राएल लोक पकडले जातील.”

[24]परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, “तुम्ही खूप वाईट गोष्टी केल्यात. तुमची पापे उघड उघड दिसतात. तुमच्या अपराधाचे स्मरण ठेवायला तुम्ही मला भाग पाडलेत. म्हणून तुम्ही शत्रूच्या हाती सापडाल. [25]आणि, इस्राएलच्या दुष्ट नेत्या, तुम्हाला ठार केले जाईल. तुझ्या शिक्षेची वेळ आली आहे, अंत जवळ आला आहे.”

[26]परमेश्वर, माझा देव, असे म्हणतो, “पागोटे काढा मुकुट उतरवा. बदल होण्याची वेळ आली आहे. महत्वाचे नेते सत्ताभ्रष्ट होतील, त्यांना खाली उतरविले जाईल, व आता जे सामान्य आहेत, ते महत्वाचे नेते बनतील. [27]मी त्या नगरीचा संपूर्ण नाश करीन. पण योग्य माणूस नवा राजा होईपर्यंत हे घडून येणार नाही. मग मी त्याला (बाबेलच्या राजाला) नगरी हस्तगत करू देईन.”

## अम्मोनच्याविरुद्ध भविष्यकथन

[28]देव म्हणाला, “मानवपुत्रा, माझ्यावतीने लोकांशी बोल. ‘परमेश्वर, माझा प्रभू, अम्मोनच्या लोकांबद्दल आणि त्यांच्या लज्जास्पद देवाबद्दल पुढील गोष्टी सांगतो, असे त्यांना सांग.

“पाहा! तलवार! तलवार म्यानातून बाहेर आली आहे. तिला पाणी चढविले आहे. ती मारायला तयार आहे. ती विजेप्रमाणे तळपावी म्हणून तिला पाणी चढविले आहे.

[29]तुमचे दृष्टान्त निरुपयोगी आहेत. तुमचे मंत्र-तंत्र तुम्हाला मदत करणार नाहीत. ते म्हणजे असत्याचे गाठोडे आहे. तलवार दुष्टांच्या गळ्याला भिडली आहे. लवकरच त्यांची फक्त कलेवरे उरतील त्यांची वेळ आली आहे. त्यांची पापे भरली आहेत.

## बाबेलविरुद्ध भविष्यकथन

[30]“‘तलवार (बाबेल) पुन्हा म्यानेत ठेवा. बाबेल, तुझ्या जन्मभूमीतच मी तुला न्याय देईन. [31]मी माझ्या राग तुझ्यावर ओतीन. माझा राग गरम वाऱ्याप्रमाणे तुला भाजून काढील. मी तुला क्रूर माणसांच्या* ताब्यात देईन. माणसांना ठार मारण्यात ते तरबेज आहेत. [32]तुझी स्थिती सरपणासारखी होईल. तुझे रक्त जमिनीत मुरेल. लोकांना तुझे पूर्णपणे विस्मरण होईल. मी, देव, हे बोललो आहे.!’”

**क्रूर माणसे** येथे शब्दांचा खेळ आहे मूळहिब्रू शब्दाचा अर्थ “जळणे” असा आहे.

## यहेज्केल यरुशलेमविरुद्ध बोलतो

22 मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले, तो म्हणाला,
[2]“मानवपुत्रा, तू न्याय करशील का? खुन्यांच्या नगरीचा (यरुशलेमचा) तू न्यायनिवाडा करशील का? तिने केलेल्या भयंकर गोष्टीबद्दल तू तिला सांगशील का? [3]“परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, असे तू तिला सांगितलेच पाहिजेस. नगरी खुन्यानी भरली आहे. म्हणूनच तिच्या शिक्षेची वेळ. लवकरच येईल. तिने स्वत:साठी अंमगळ मूर्ती तयार केल्या, आणि त्या मूर्तींनी तिला गलिच्छ केले.

[4]“‘यरुशलेमवासीयांनो, तुम्ही पुष्कळ लोकांना ठार केले. तुम्ही अमंगळ मूर्ती तयार केल्या. तुम्ही अपराधी आहात आणि तुम्हाला शिक्षा होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. तुमचा शेवट आला आहे. इतर राष्ट्रे तुमची टर उडवितील. ती तुम्हाला हसतील. [5]जवळचे व दूरचे तुमची चेष्टा करतील. तुम्ही तुमच्या नावाला काळिमा फासलात. तुम्हाला हास्याचा गडगडाट ऐकू येऊ शकतो.

[6]“‘पाहा! यरुशलेममध्ये, प्रत्येक राज्यकर्ता दुसऱ्याला ठार करण्याइतका सामर्थ्यशाली झाला. [7]यरुशलेमचे लोक आई-वडिलांचा मान ठेवीत नाहीत. राहणाऱ्या परदेशींयांना ते त्रास देतात. ते विधवांना व अनाथांना फसवितात. [8]तुम्ही लोक माझ्या पवित्र वस्तूंचा तिरस्कार करता. माझ्या विश्रांतीच्या खास दिवसांना महत्व देत नाही. [9]यरुशलेमचे लोक दुसऱ्यांबद्दल खोटेनाटे सांगतात. निष्पाप लोकांना ठार मारण्यासाठी ते असे करतात. लोक, डोंगरावर, खोट्या देवांची पूजा करण्यासाठी जातात व सहभोजन करण्यासाठी यरुशलेमला येतात. “यरुशलेममध्ये, लोक पुष्कळ लैंगिक पापे करतात. [10]ह्या नगरीत, ते वडिलांच्या पत्नीबरोबर व्यभिचार करतात. रजस्वला स्त्रीवरही ते बलात्कार करतात. [11]कोणी आपल्या शेजाऱ्याच्या बायकोबरोबर व्यभिचार करतो, कोणी स्वत:च्या सुनेबरोबर संबंध ठेऊन तिला अपवित्र करतो, तर कोणी त्यांच्या वडिलांच्या मुलीशी म्हणजेच स्वत:च्या बहिणीवरच बलात्कार करतो.

[12]“‘यरुशलेममध्ये, तुम्ही, लोकांना मारण्यासाठी पैसे घेता, उसने पैसे दिल्यास त्यावर व्याज आकारता, थोड्याशा पैशाकरिता शेजाऱ्यांना फसविता. तुम्ही लोक मला विसरले आहात. परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

[13]“देव म्हणाला, ‘इकडे पाहा! मी जोराने हात आपटून तुम्हाला थांबवीन. लोकांना फसविल्याबद्दल व ठार मारल्याबद्दल मी तुम्हाला शिक्षा करीन. [14]त्या वेळी तुम्हाला धैर्य राहील का? मी शिक्षा करायला येईन तेव्हा तुम्हाला शक्ती राहील का? नाही! मी परमेश्वर आहे. मी हे बोललो आहे. आणि मी बोलल्याप्रमाणे करीन. [15]मी तुम्हाला राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये विखरून टाकीन. मी तुम्हाला वेगवेगळ्या देशांत सक्तीने पाठवीन. ह्या नगरीतील अमंगळ गोष्टींचा मी संपूर्ण नाश करीन. [16]पण, यरुशलेम, तू अपवित्र

होशील. इतर राष्ट्रे ह्या घटना पाहतील. मग तुम्हाला कळून चुकेल की मीच परमेश्वर आहे.'"

### इस्राएल कवडीमोलाच्या टाकाऊ वस्तूप्रमाणे आहे

17परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले. तो म्हणाला,
18"मानवपुत्रा, चांदीच्या तुलनेत कास्य, लोखंड, शिसे व कथील कवडीमोलाचे आहेत. कामगार चांदी शुद्ध करण्यासाठी ती विस्तवात टाकतात. चांदी उष्णतेने वितळते आणि मग कामगार चांदीपासून टाकाऊ भाग वेगळा काढतात. इस्राएल हे राष्ट्र त्या टाकाऊ भागासारखे झाले
आहे. 19म्हणून परमेश्वर, प्रभू, पुढील गोष्टी सांगतो. 'तुम्ही सर्व लोक टाकाऊ भागासारखे झाले आहात. म्हणून मी
तुम्हाला यरुशलेममध्ये गोळा करीन. 20कामगार चांदी, कास्य, लोखंड, शिसे व कथील आगीत टाकतात. फुंकून विस्तव फुलवितात. मग धातू वितळू लागतो. त्याचप्रमाणे, मी तुम्हाला माझ्या आगीत टाकून वितळवीन. माझा भयंकर
क्रोध हीच ती आग होय. 21मी माझ्या रागाच्या अग्नीत तुम्हाला टाकीन. तो फुंकून प्रज्वलित करीन. मग तुम्ही
वितळू लागाल. 22चांदी आगीत वितळते. मग कामगार ती ओतून घेऊन बाजूला काढतात. त्याच पद्धतीने, तुम्ही नगरीत वितळाल. मगच तुम्हाला कळेल की मी परमेश्वर आहे आणि माझ्या रागाचा मी तुमच्यावर वर्षाव केला आहे.'"

### यहेज्केल यरुशलेमविरुद्ध बोलतो

23मला परमेश्वराकडून संदेश मिळाला तो म्हणाला,
24"मानवपुत्रा, इस्राएलशी बोल 'ती शुद्ध नाही'* असे तिला सांग. मी त्या देशावर रागावलो असल्याने, तेथे
पाऊस पडणार नाही. 25यरुशलेममधील संदेष्टे कट करीत आहेत. ते संदेष्टे सिंहासारखे आहेत. शिकारीचा समाचार घेताना तो गर्जना करतो. त्या संदेष्टांनी खूप आयुष्यांचा नाश केला, त्यांनी पुष्कळ किंमती वस्तू बळकावल्या आहेत, यरुशलेममधील अनेक स्त्रियांच्या वैधव्याला ते कारणीभूत झाले.

26"याजकांनी माझ्या शिकवणुकीचा नाश केला. माझ्या पवित्र वस्तू त्यांनी अपवित्र केल्या. त्यांना महत्व देत नाहीत. ते माझ्या पवित्र गोष्टी व इतर अपवित्र गोष्टी ह्यात फरक करीत नाहीत. शुद्ध व अशुद्ध गोष्टी सारख्याच मानतात. ते लोकांनाही ह्याबद्दल शिकवण देत नाहीत. माझ्या सुट्ट्यांच्या खास दिवसांचा मान राखत नाहीत. त्यांनी माझे पावित्र्य नष्ट केले.

27"यरुशलेमचे नेते, आपल्या शिकारीवर तुटून पडणाऱ्या लांडग्यासारखे आहेत. ते संपत्तीसाठी लोकांवर हल्ला करून त्यांना ठार मारतात.

28"संदेष्टे लोकांना ताकीद देत नाहीत. ते सत्य झाकून ठेवतात. हे संदेष्टे, तटबंदीची दुरुस्ती न करता, वरवर गिलावा देऊन भगदाडे बुजविणाऱ्या, कामगारांप्रमाणे आहेत. त्यांना फक्त खोटेच दिसते. ते मंत्र-तंत्राच्या आधारे भविष्य जाणून घेतात, पण लोकांशी फक्त खोटेच बोलतात. ते म्हणतात 'परमेश्वर, माझा देव, पुढील गोष्टी सांगतो.' पण हे सर्व खोटे आहे. परमेश्वर त्यांच्याशी बोललेला नाही.

29"सामान्य लोक एकमेकांचा फायदा घेतात. ते एकमेकांना फसवितात आणि लुबाडतात. ते गरीब, असहाय लोकांना अगदी क्षुद्र लेखतात. ते परदेशीयांना फसवितात व ह्याबद्दल देशात कायदा अस्तित्वात नसल्याप्रमाणेच वागतात.

30"मी, लोकांना, त्यांचा जीवनमार्ग बदलून, देशाचे रक्षण करण्यास सांगितले. मी तटबंदीची दुरुस्ती करण्यास सांगितले. लोकांना तटबंदीला पडलेल्या भगदाडाजवळ उभे राहून देशाच्या रक्षणाकरिता लढावे, अशी माझी इच्छा
होती. पण कोणीही मदतीला आले नाही. 31म्हणून मी माझा जळता राग त्यांच्यावर ओतीन. मी त्यांचा संपूर्ण नाश करीन. त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल त्यांना शिक्षा करीन. चूक सर्वस्वी त्यांची आहे." परमेश्वर, माझा देव, असे म्हणाला.

23 मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला,
2"मानवपुत्रा, शोमरोन व यरुशलेम ह्यांची गोष्ट ऐक. दोन बहिणी होत्या. त्यांनी एकाच आईच्या पोटी
जन्म घेतला होता. 3त्या अगदी तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच, मिसरमध्ये, वेश्या झाल्या. मिसरमध्ये, त्यांनी प्रथम प्रियाराधन केले आणि पुरुषांना स्तनाग्रांना स्पर्श
करू दिला व आपली स्तने त्यांच्या हाती दिली. 4त्यातील थोरल्या बहिणीचे नाव अहला व धाकटीचे अहलीबा असे होते. त्या बाहिणी माझ्या पत्नी झाल्या आम्हाला मुले झाली. (खरे म्हणजे अहला म्हणजेच शोमरोन व अहलीबा म्हणजे यरुशलेम होय.)

5"मग अहलाने माझा विश्वासघात केला-ती वेश्येसारखी वागू लागली. तिला प्रियकर हवेसे वाटू लागले.
'तिने अश्शूरच्या सैनिकांना 6निळ्या गणवेषांत पाहिले. ते सर्व तरुण, हवेसे वाटणारे. घोडेस्वार होते. ते नेते व
अधिकारी होते. 7अहलाने स्वत:त्या सर्वांच्याबरोबर व्यभिचार केला. ते सर्व अश्शूरच्या सैन्यातील निवडक सैनिक होते. तिला ते सर्व हवे होते. त्यांच्या अंमगळ
मूर्तीबरोबर तीही अमंगळ झाली. 8ह्या व्यतिरिक्त, तिने आपले मिसरबरोबरचे प्रेम प्रकरण चालूच ठेवले. ती अगदी तरुण असतानाच मिसरने तिच्याबरोबर प्रियाराधन केले होते. तिच्या कोवळ्या स्तनांना स्पर्श करणारा पहिला प्रियकर मिसरच होय. मिसरने आपले खोटे प्रेम तिच्यावर
ओतले. 9मी तिच्या प्रियकरांना तिच्या बरोबर व्यभिचार करू दिला. तिला अश्शुरी पाहिजे होते, म्हणून मी तिला

---

**ती शुद्ध नाही** येथे शब्दांचा खेळ आहे मूळ हिब्रू शब्दाचा अर्थ "पाऊस पडला नाही."

त्यांच्या स्वाधीन केले. 10त्यांनी तिच्यावर बलात्कार केला.
त्यांनी तिची मुले घेतली. आणि तलवारीने तिला ठार
केले. त्यांनी तिला शिक्षा केली. तिचे नाव सर्व स्त्रियांच्या
तोंडी अजूनही आहे.

11“तिच्या धाकट्या बहिणीने अहलीबाने हे सर्व पाहिले
पण तिने आपल्या बहिणीपेक्षा जास्त पापे केली. ती
अहलापेक्षा जास्त विश्वासघातकी होती. 12तिलाही अश्शुरी
नेते व अधिकारी हवे होते. निळ्या गणवेषातील ते घोडेस्वार
तिला हवेसे वाटले. ते कामना करण्यास योग्य असेच
तरुण होते. 13सारख्याच चुका करून, दोन्ही स्त्रिया,
स्वत:च्या आयुष्याचा नाश करून घेत आहेत, हे मला
दिसले.

14“अहलीबा माझा विश्वासघात करीतच राहिली.
बाबेलमध्ये, भिंतीवर कोरलेली पुरुषांची चित्रे तिने पाहिली.
ती लाल गणवेष घातलेल्या खास्दी पुरुषांची चित्रे होती.
15त्यांनी कमरेला पट्टे बांधले होते आणि डोक्याला लांब
फेटे बांधले होते. ते सर्व अतीरथीप्रमाणे दिसत होते. ते सर्व
मूळच्या खास्द्यांप्रमाणे दिसत होते. 16अहलीबा त्यांच्यावर
आसक्त झाली. 17म्हणून ते बाबेलचे पुरुष समागम
करण्यासाठी तिच्या शृंगारलेल्या शय्येवर गेले. त्यांनी तिला
भोगले आणि इतकी घाणेरडी, अमंगळ केले की तिला
त्यांची घृणा वाटू लागली.

18“अहलीबाने आपली बेईमानी सर्वांना पाहू दिली. तिने
आपल्या नग्न शरीराशी अनेक पुरुषांना मौज करु दिली.
त्यामुळे तिच्या बहिणीप्रमाणे मला तिचीही अतिशय घृणा
वाटू लागली. 19तिने पुन्हा पुन्हा माझा विश्वासघात केला.
मग तिला मिसरबरोबरच्या तिच्या ऐन तारुण्यातील प्रेम
प्रकरणाची आठवण झाली. 20गाढवासारखे इंद्रिय व
घोड्यासारखा वीर्यसाठा असलेल्या प्रियकराची तिला
आठवण झाली.

21“अहलीबा, तू तरुण होतीस तेव्हा तुझा प्रियकर तुझ्या
स्तनाग्रांना स्पर्श करी व तुझे स्तन हातात धरी, त्याची
तुला स्वप्ने पडू लागली. 22म्हणून, अहलीबा, परमेश्वर,
माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो ‘तुला तुझ्या प्रियकरांची
किळस वाटते. पण मी त्यांना येथे आणीन. ते तुझ्याभोवती
कोंडाळे करतील. 23बाबेलच्या पुरुषांना विशेषत: खास्द्यांना
मी येथे आणीन पकोड, शोआ व कोआ येथील पुरुषांनाही
आणीन आणि अश्शुरींना ही आणीन. त्या सर्व हवेसे
वाटणाऱ्या तरुण नेत्यांना, अधिकाऱ्यांना, अतीरथींना व
निवडक घोडेस्वारांना मी येथे आणीन. 24ह्या लोकांचा
जथा तुझ्याकडे येईल. ते घोड्यांवर स्वार होऊन वा रथांतून
तुझ्याकडे येतील. ते पुष्कळजण असतील. त्यांच्याजवळ
भाले, ढाली, शिरस्त्राणे असतील, ते तुझ्याभोवती जमतील.
तू माझ्याशी कसे वागलीस, हे मी त्यांना सांगीन. मग ते
त्यांच्या परीने तुला शिक्षा करतील. 25मी किती इर्ष्यावान
आहे, ते मी तुला दाखवीन. ते सर्व खूप संतापून तुझा
समाचार घेतील. ते तुझे नाक, कान कापतील. तलवारीने
तुला ठार करतील. ते तुझी मुले घेतील आणि तुझे असेल
नसेल ते सर्व ते जाळतील. 26ते तुझी उंची वस्त्रे व दागिने
घेतील. 27मिसरबरोबरच्या प्रेम प्रकराणाच्या स्वप्नांचा मी
चुराडा करीन. तू पुन्हा त्याच्याकडे डुंकून पाहणार नाहीस.
तू पुन्हा कधीही मिसरची आठवण काढणार नाहीस.’”

28परमेश्वराने, माझ्या देवाने, पुढील गोष्टी सांगितल्या.
“तू ज्यांची घृणा करतेस, त्यांच्याच ताब्यात मी तुला देत
आहे. तुला ज्यांची किळस वाटते, त्यांच्याच स्वाधीन मी
तुला करीत आहे. 29ते तुझा किती तिरस्कार करतात हे
ते तुला दाखवून देतील. तू मिळविलेली प्रत्येक गोष्ट ते
काढून घेतील. ते तुला उघडी नागडी करतील. लोकांना
तुझी पापे स्पष्ट दिसतील. तू वेश्येप्रमाणे वागलीस आणि
दुष्ट स्वप्ने पाहिलीस हे त्यांना कळेल. 30दुसऱ्या राष्ट्रांच्या
मागे लागून तू माझा त्याग केलास आणि ह्या वाईट गोष्टी
केल्यास. त्या अमंगळ मूर्तींना पूजायला तू सुरवात केलीस
तेव्हाच ही दुष्कृत्ये तू केलीस. 31तू तुझ्या बहिणीमागून
गेलीस आणि तिच्याप्रमाणे वागलीस. तू तिचा विषाचा प्याला
स्वत:च्या हातात घेतलास. तूच तुझ्या शिक्षेला कारणीभूत
आहेस.” 32परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो.

“तुझ्या बहिणीचा विषाचा पेला तू पिशील.तो पेला खूप
मोठा आहे. त्यात खूप विष (शिक्षा) मावते. लोक तुला
हसतील व तुझी चेष्टा करतील.

33तू दारूड्याप्रमाणे झोकांड्या खाशील. तू खूप दु:खी
होशील. तो विध्वंस व नाश यांनी भरलेला पेला आहे.
तुझ्या बहिणीने प्यायला, तसाच हा पेला (शिक्षा) आहे.

34तू त्या पेल्यातील विष पिशील. तू शेवटचा थेंबसुद्धा
पिशील. तू पेला फेकून देशील व त्याचे तुकडे तुकडे
होतील. तू वेदनेने स्वत:चेच स्तन उपटून काढशील.
असेच घडेल कारण मी परमेश्वर व प्रभू आहे आणि
मीच ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

35“म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो ‘यरुशलेम,
तू मला विसरलीस. तू मला दूर ढकललेस. मला मागे
ठेवले तेव्हा माझा त्याग केल्याबद्दल आणि वेश्येप्रमाणे
वागल्याबद्दल तुला शिक्षा झालीच पाहिजे. तुझ्या दुष्ट
स्वप्नांमुळे आणि दुराचारामुळे तुला भोग भोगलेच पाहिजेत.’”

## अहला व अहलीबा यांचा न्यायनिवाडा

36परमेश्वर, माझा प्रभू, मला म्हणाला, “मानवपुत्रा, तू
अहला व अहलीबा यांचा न्यायनिवाडा करशील का?
मग त्यांनी केलेल्या भयंकर गोष्टीबद्दल त्यांना सांग.
37त्यांनी व्यभिचाराचे पाप केले आहे. खुनाचा अपराध
त्यांनी केला आहे. त्या वेश्येप्रमाणे राहिल्या. त्या अमंगळ
मूर्तीसाठी त्यांनी माझा त्याग केला. त्यांना माझ्यापासून
झालेल्या मुलांना त्यांनी बळजबरीने आगीतून जायला
लावले. त्यांच्या घाणेरड्या मूर्तींना अन्न देण्यासाठी त्यांनी

हे सर्व केले. [38]त्यांनी माझे मंदिर अशुद्ध केले आणि
माझ्या सुट्ट्यांचे खास दिवस भ्रष्ट केले. [39]त्यांच्यां मूर्तींना
बळी देण्यासाठी त्यांनी त्यांच्या मुलांना ठार मारले. ते
माझ्या पवित्र स्थळी गेले. आणि ते स्थळ त्यांनी अपवित्र
केले. त्यांनी हे कृत्य माझ्या मंदिरात केले.

[40]"निरोपे पाठवून त्यांनी दूरदूरच्या पुरुषांना बोलाविले
ते पुरुष त्यांना भेटायला आले. त्यांच्यासाठी तुम्ही स्नान
केले, डोळ्यात काजळ घातले, अलंकार घातले. [41]तुम्ही
सुंदर शय्येवर बसलात व पुढे टेबल ठेवून त्यावर माझा
धूप व तेल ठेवलेत.

[42]"पुष्कळ लोकांची मेजवानी सुरु असल्याप्रमाणे
यरुशलेममधून आवाज आला. मेजवानीस खूप लोक
जमले. वाळवंटाकडून येणारे आधीपासूनच मद्य प्राशन
करीत होते. त्यांनी स्त्रियांना बांगड्या व मुकुट दिले.
[43]तेव्हा व्यभिचाराच्या पापाने कंटाळलेल्या एका स्त्रीशी
मी बोललो. मी तिला विचारले, 'ते तुझ्याशी व तू त्यांच्याशी
असेच व्यभिचाराचे पाप करीत राहणार का?' [44]पण
वेश्येकडे जावे, तसे ते तिच्याकडे जातच राहिले. खरेच!
ते पुन्हा पुन्हा अहला व अहलीबा या दुष्ट स्त्रियांकडे
जातच राहिले.

[45]"पण सज्जन लोक त्यांना अपराधी ठरवितील. त्या
स्त्रियांचा व्यभिचार व खून या अपराधांबद्दल ते त्यांचा
न्यायनिवाडा करतील. का? कारण अहला व अहलीबा
यांनी व्यभिचार तर केला आहेच, पण त्यांनी मारलेल्या
लोकांचे रक्त अजून त्यांच्या हाताला लागले आहे."

[46]परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला, "लोकांना एकत्र करा.
मग त्या लोकानाच अहला व अहलीबा यांना शिक्षा करू
द्या. लोकांचा जमाव त्यांना शिक्षा करील व त्या दोघींची
चेष्टा करील. [47]मग जमाव त्यांना दगडाने ठेचून मारील.
मग तलवारीने तो त्यांचे तुकडे तुकडे करील त्यांच्या
मुलांनाही जमाव मारील व त्यांची घरे जाळील. [48]अशा
रीतीने, ह्या देशावरचा कलंक मी घालवतो. तुमच्यासारख्या
लज्जास्पद गोष्टी न करण्याचा इशारा इतर स्त्रियांना मिळेल.
[49]तुम्ही केलेल्या दुष्कृत्यांबद्दल ते तुम्हाला शिक्षा करतील.
तुमच्या अमंगळ मूर्तींची पूजा केल्याबद्दल तुम्हाला शिक्षा
होईल. मग तुम्हाला मीच परमेश्वर व प्रभू असल्याचे
कळेल."

### भांडे व मांस

24 मला परमेश्वराचा, माझ्या देवाचा, संदेश
मिळाला. परागंदा काळातील नवव्या वर्षाच्या
दहाव्या महिन्याच्या (डिसेंबरच्या) दहाव्या दिवशी हा संदेश
आला तो म्हणाला, [2]"मानवपुत्रा, तू आजची तारीख व
पुढील टीपण लिहून ठेव. 'आज बाबेलच्या राजाच्या सैन्याने
यरुशलेमला वेढा घातला.' [3]आणि ही गोष्ट आज्ञा पाळण्यास
नकार देणाऱ्यांना (इस्राएलला) सांग त्यांना पुढील गोष्टी
सांग 'परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो.

"'भांडे चुलीवर ठेव. ते चुलीवर ठेवल्यावर त्यात पाणी
ओता.

[4]त्यात मासांचे तुकडे टाका.मांड्या आणि खांदे ह्याचा
प्रत्येक चांगला तुकडा त्यात टाका. त्यात निवडक हाडे
भरा.

[5]ह्यासाठी कळपातील उत्तम जनावर निवडा. भांड्याखाली
भरपूर लाकडे टाका. आणि मांसाचे तुकडे शिजवा. हाडे
शिजेपर्यंत रस्सा उकळवा.'

[6]प्रभू, माझा परमेश्वर, असे म्हणतो. "यरुशलेमचे
वाईट होईल. खुनी लोकांच्या नगरीला वाईट काळ येईल.
यरुशलेम गंज चढलेल्या भांड्याप्रमाणे आहे. ते गंजाचे
डाग निघू शकत नाहीत. ते भांडे स्वच्छ नसल्याने, तुम्ही
प्रत्येक मांसाचा तुकडा बाहेर काढा ते मांस खाऊ नका.
आणि त्या खराब झालेल्या मांसातून काहीही याजकांना
निवडू देऊ नका.

[7]यरुशलेम गंज चढलेल्या भांड्याप्रमाणे आहे. का?
कारण खुनांचे रक्त अजून तेथे आहे. तिने रक्त उघड्या
खडकावर पडू दिले. तिने ते जमिनीवर टाकून त्यावर
माती टाकली नाही.* [8]मग मीही तिचे रक्त उघड्या
खडकावर टाकले. म्हणून ते झाकले गेले नाही निष्पाप
लोकांना मारल्याबद्दल चिडून जाऊन लोकांनी तिला शिक्षा
करावी, म्हणून मी असे केले."

[9]"परमेश्वर, माझा प्रभू पुढील गोष्टी सांगतो 'खुन्यांनी
भरलेल्या नगरीचे वाईट होईल. मी आग भडकविण्यासाठी
खूप लाकूडफाट्याचा ढीग रचीन.

[10]खूप लाकडे भांड्याखाली सारा व पेटवा.मांस चांगले
शिजवा. त्यात मसाले घाला हाडे जळू द्या.

[11]मग रिकामेच भांडे विस्तवावर ठेवा.त्याच्या वरचे
डाग चमकू लागेपर्यंत ते तापू द्या. ते डाग वितळून जातील.
गंज नष्ट होईल.

[12]"'कदाचित् यरुशलेमने तिच्यावरील डाग घासून
काढण्यासाठी खूप मेहनत घेतली असेल. पण तो 'गंज'
निघणार नाही. फक्त आगच (शिक्षा) तो काढील.

[13]"'तुम्ही माझ्याविरुध्द वागून पाप केले आणि पापांनी
डागाळलात. तुम्हाला धुवून स्वच्छ करण्याची माझी इच्छा
होती. पण डाग निघाले नाही. माझा क्रोधाग्नी तुझ्याबाबतीत
शांत होईपर्यंत मीतुला स्वच्छ करण्याचा पुन्हा प्रयत्न
करणार नाही.

---

**तिने ते … नाही** मोशेचा नियम सांगतो की अन्नासाठी पशू मारल्यास त्याचे रक्त जमिनीवर ओतून मातीने झाकले पाहिजे. ह्याचा अर्थ मारेकरी त्या मारलेल्या प्राण्याचे जीवन तो पुन्हा देवाला परत देत आहे. पाहा लेवीय 17:1–16 आणि अनुवाद 12:1–25 जर ते रक्त मातीने झाकले नाही तर तो मारेकऱ्याविरुद्धचा पुरावा ठरतो. पाहा उत्पत्ती 4:10 ईयोब 15:18 व यशया 26:21.

[14]“‘मी परमेश्वर आहे. मी तुला सुनावलेली शिक्षा, तुला होईलच. मी तुला शिक्षा करायला कचरणार नाही. मला तुझ्याबद्दल वाईट वाटणार नाही. तू केलेल्या वाईट कृत्यांबद्दल मी तुला शिक्षा करीन.’ असे प्रभू, माझा परमेश्वर, म्हणाला.”

## यहेज्केलच्या पत्नीचा मृत्यू

[15]मग मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला,
[16]“मानवपुत्रा, तू तुझ्या पत्नीवर खूप प्रेम करतोस, पण मी तिला तुझ्यापासून दूर नेत आहे. तुझी पत्नी अचानक मृत्यू पावेल. पण तू अजिबात शोक करू नकोस. तू मोठ्याने रडू नकोस. तू अश्रू गाळू नकोस. [17]पण तुझ्या
दुःख दाखविणाऱ्या खुणा तू मूकपणे केल्या पाहिजेस. मृत पत्नीसाठी मोठ्याने आक्रोश करू नकोस. तू नेहमी घालतोस, तेच कपडे तू घातले पाहिजेस. फेटा किंवा पागोटे बांध, जोडे घाल. तुझे दुःख दाखविण्यासाठी मिशा झाकू नकोस. लोक साधारणपणे सुतकात पाठवितात, ते अन्न खाऊ नकोस.”

[18]दुसऱ्या दिवशी सकाळी देवाचे म्हणणे मी लोकांना सांगितले. त्याच दिवशी संध्याकाळी, माझी पत्नी वारली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी देवाने सांगितल्याप्रमाणे केले.
[19]मग लोकांनी मला विचारले, “तू असे का करीत आहेस? ह्याचा अर्थ काय?”

[20–21]मग मी त्यांना म्हणालो, “मला परमेश्वराचा संदेश मिळाला. त्याने मला इस्राएलच्या लोकांशी बोलायला सांगितले आहे. परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला, ‘असे पाहा, मी माझ्या पवित्र स्थानाचा नाश करीन. तुम्हाला त्या स्थानाचा अभिमान वाटतो व तुम्ही त्याची स्तुतिस्तोत्रे गाता. तुम्हाला ते स्थान पाहायला फार आवडते. पण मी त्या स्थानाचा नाश करीन आणि तुम्ही मागे ठेवलेली तुमची मुले लढाईत मारली जातील. [22]पण मी माझ्या
पत्नीच्या मृत्यूच्या वेळी जसे वागलो, तसेच तुम्ही वागा. तुमचे दुःख प्रदर्शित करण्यासाठी मिशा झाकू नका. साधारणपणे सुतकात खातात, ते अन्न खाऊ नका.
[23]पागोटी बांधा व जोडे घाला. तुमचे दुःख बाहेर दाखवू नका. रडू नका. पण तुम्ही तुमच्या पापांमुळे झिजत जाल. तुम्ही मुकाट्याने एकमेकाजवळ उसासे टाकाल.
[24]यहेज्केल, हे तुमच्यापुढे एक उदाहरण आहे. त्याने केले तेच तुम्ही कराल. शिक्षेची वेळ येईल. मगच तुम्हाला मी परमेश्वर आहे हे कळेल.’”

[25–26]“मानवपुत्रा, ती सुरक्षित जागा (यरुशलेम) मी लोकांकडून काढून घेईन. ते सुंदर ठिकाण त्यांना आनंद देते. त्यांना ते ठिकाण पाहायला आवडते. त्यांना ते खरोखरच प्रिय आहे. पण त्या वेळी, मी लोकांकडून ती नगरी आणि त्यांची मुले काढून घेईन. वाचलेला एकजण यरुशलेमबद्दल वाईट बातमी घेऊन तुझ्याकडे येईल. [27]त्या
वेळी, तू त्या माणसाशी बोलू शकशील. तू अजिबात गप्प बसणार नाहीस. अशा रीतीने, तू त्यांना एक उदाहरण ठरशील मगच त्यांना मी देव आहे हे समजेल.”

## अम्मोनकरिता भविष्यकथन

25 मला परमेश्वराचा संदेश मिळाला, तो म्हणाला, [2]“मानवपुत्रा, अम्मोनच्या लोकांकडे पाहा आणि माझ्यावतीने त्यांच्याशी बोल. [3]त्यांना सांग,
‘माझ्या परमेश्वर प्रभुचा संदेश ऐका. परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो की माझ्या पवित्र स्थानाचा नाश झाला, तेव्हा तुम्हाला खूप आनंद झाला. इस्राएलची भूमी उद्ध्वस्त करण्यात आली, तेव्हा तुम्ही इस्राएलच्या भूमीच्या विरुद्ध होता. यहूदी लोकांना कैदी म्हणून नेण्यात आले, तेव्हा तुम्ही यहूदी लोकांच्याविरुध्द होता. [4]म्हणून मी तुम्हाला
पूर्वेकडच्या लोकांच्या ताब्यात देईन. ते तुमची जमीन घेतील. तुमच्या देशात त्यांचे सैन्य तळ ठोकेल. ते तुमच्यामध्ये राहतील. ते तुमचे अन्न व दूध भक्षण करतील.
[5]“‘मी राब्बा शहराचे उंटासाठी कुरण करीन व अम्मोन देशाला मेंढ्यांचा कोंडवाडा करीन. मगच तुम्हाला समजेल की मीच देव आहे. [6]परमेश्वर असे म्हणतो, की यरुशलेमचा
नाश झाला म्हणून तुम्हाला आनंद झाला. तुम्ही टाळ्या पिटल्यात व थै थै नाचलात. इस्राएलच्या अपमानाची तुम्हाला मजा वाटली. [7]म्हणून मी तुम्हाला शिक्षा करीन.
सैनिकांनी युद्धात लुटलेल्या अमूल्य वस्तूंप्रमाणे तुम्ही व्हाल. तुम्ही तुमचा वारस गमवाल. तुम्ही दूरदेशी मराल. मी तुमच्या देशाचा नाश करीन. मगच तुम्हाला मीच परमेश्वर आहे.! हे समजून येईल.’”

## मवाब व सेईर यांच्याविषयी भविष्यकथन

[8]परमेश्वर, माझा प्रभू पुढीलप्रमाणे गोष्टी सांगतो: “मवाब व सेईर (अदोम) म्हणतात ‘यहूदा इतर राष्ट्रांप्रमाणेच आहे.’
[9]मी मवाबचा खांदा कापीन. देशाला भूषणावह असलेली बेथ-यशिमोथ, बाल-मौन, किर्याथाईम ही सीमेवरची शहरे मी काढून घेईन. [10]मग ही शहरे मी पूर्वेच्या लोकांना
देईन. त्यांना तुमची भूमी मिळेल. मी त्यांना अम्मोनच्या लोकांचा नाश करू देईन. अम्मोन हे एक राष्ट्र होते, ह्याचा लोकांना विसर पडेल. [11]मी मवाबला शिक्षा करीन.
मग त्यांना मीच परमेश्वर आहे. हे कळेल.”

## अदोमबद्दल भविष्यकथन

[12]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: “अदोमचे लोक यहूदाच्या लोकांच्याविरुद्ध गेले आणि त्यांनी त्यांचा सूड घेण्याचा प्रयत्न केला. म्हणून अदोमचे लोक अपराधी आहेत.” [13]म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो: “मी
अदोमला शिक्षा करीन. मी अदोमवासीयांचा व तेथील प्राण्यांचा नाश करीन. तेमानापासून ददानापर्यंत सर्व अदोम देशाचा मी नाश करीन. अदोमची माणसे लढाईत मारली

जातील. 14मी माझ्या लोकांच्या, इस्राएलच्या हातून,
अदोमचा सूड उगवीन. अशा रीतीने, माझा अदोमवरचा
राग इस्राएलचे लोक दाखवून देतील. मग मी अदोमला
शिक्षा केल्याचे अदोमच्या लोकांना कळेल." परमेश्वर,
माझा प्रभू, असे म्हणाला.

## पलिष्ट्यांकरिता भविष्यकथन

15परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
"पलिष्ट्यांनी सूड घ्यायचा प्रयत्न केला. ते फार क्रूर होते.
त्यांनी आपला राग खूप काळ मनात दाबून धरला."
16म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला, "मी पलिष्ट्यांना
शिक्षा करीन. हो! करेथच्या लोकांचा मी नाश करीन.
समुद्राकाठी राहणाऱ्या लोकांचा मी संपूर्ण नाश करीन.
17मी त्या लोकांना शिक्षा करीन. मी सूड घेईन. माझ्या
रागाने मी त्यांना धडा शिकवीन. मग त्यांना 'मीच परमेश्वर
असल्याचे कळेल."

## सोरविषयी शोकसंदेश

26 परागंदा अवस्थेच्या काळातील अकराव्या वर्षी,
महिन्याच्या पहिल्याच दिवशी, मला परमेश्वराचा
संदेश मिळाला. तो म्हणाला, 2"मानवपुत्रा, सोरने
यरुशलेमबद्दल वाईट उद्‌गार काढले. ती म्हणाली, 'अहा!
लोकांचे रक्षण करणाऱ्या प्रवेशद्वाराचा नाश झाला आहे.
आता मला द्वार मोकळे झाले आहे. नगरीचा (यरुशलेमचा)
नाश झाला. त्यामुळे तेथून मला खूप मौल्यवान वस्तू
मिळतील.'"

3म्हणून, प्रभू, माझा परमेश्वर, म्हणतो, "सोर, मी
तुझ्याविरुद्ध आहे. तुझ्याशी लढण्यासाठी मी खूप राष्ट्रांना
आणीन. काठावर पुन्हा पुन्हा येणाऱ्या लाटांप्रमाणे ते पुन्हा
पुन्हा येतील."

4देव म्हणाला, "ते शत्रुसैनिक सोरच्या तटबदीचा नाश
करतील आणि तिचे बुरूज पाडून टाकतील. मी तिच्या
वरचा मातीचा थर खरवडून टाकीन व तिचा ख़डक
करीन. 5मी सांगतो की ती समुद्रकाठची कोळ्यांची जाळी
पसरविण्याची जागा होईल." परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो,
"सोर म्हणजे सैनिकांची मौल्यवान लूट होईल. 6तिच्या
मुख्य भूप्रदेशावरच्या मुली (लहान गावे) लढाईत मारल्या
जातील. मगच त्यांना समजेल की मीच परमेश्वर आहे."

## नबुखद्नेस्सर सोरवर हल्ला करील

7परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो, "सोरवर उत्तरेकडून
शत्रू आणीन. तो म्हणजेच बाबेलचा राजाधिराज
नबुखद्नेस्सर होय. तो प्रचंड सैन्य घेऊन येईल. त्यात
घोडे, रथ, घोडेस्वार व इतर पुष्कळ सैनिक असतील. ते
सैनिक पुष्कळ वेगवेगळ्या राष्ट्रांतील असतील.
8नबुखद्नेस्सर मुख्य भूप्रदेशावरील तुझ्या मुलींना (लहान
गावांना) ठार करील. तो तुझ्या शहरावर हल्ला
करण्यासाठी बुरूज बांधील. तो तुझ्या शहराभोवती मातीचा
रस्ता तयार करील. तटबंदीपर्यंत जाणारा मातीचा मार्ग तो
बांधेल. 9तट पाडण्यासाठी तो ओंडके आणील. कुदळीने
तुझे बुरूज तो पाडील. 10त्याच्याजवळ इतके घोडे असतील
की त्यांच्या टापांनी उडालेली धूळ तुला झाकून टाकील.
तुझ्या वेशीतून बाबेलचा राजा जेव्हा प्रवेश करील, तेव्हा
घोडेस्वार, गाडे, रथ यांच्या खडखडाटाने तुझे तट हादरतील.
हो! तटबंदी पाडून ते तुझ्या शहरात शिरतील. 11बाबेलचा
राजा घोड्यावर स्वार होऊन शहरात फिरेल. त्यांच्या
घोड्यांच्या टापा (खूर) तुझे रस्ते तुडवितील. तो तलवारीच्या
वारांनी लोकांना ठार करील. शहरातील तुझे भक्कम
स्तंभ जमीनदोस्त होतील. 12नबुखद्नेस्सरचे लोक तुमची
संपत्ती लुटतील. तुमचा माल बळकावतील. ते तट उद्‌ध्वस्त
करतील आणि तुमच्या सुंदर घरांचा नाश करतील. ते
घरांच्या विटा, दगड, तुळ्या कचऱ्याप्रमाणे समुद्रात
टाकतील. 13मी तुझे आनंदगान बंद पाडीन. लोकांना
पुन्हा कधीही तुझ्या कडून सारंगीचे सूर ऐकू येणार नाहीत.
14मी तुझे रूपांतर उघड्या वाघड्या खडकात करीन. तू
म्हणजे समुद्रकाठची कोळ्यांचे जाळे पसरवून ठेवण्याची
जागा होशील. तुझी पुन्हा उभारणी होणार नाही. का?
कारण मी, परमेश्वर असे म्हणतो म्हणून!" प्रभू, माझा
परमेश्वर, असे म्हणाला.

## सोरसाठी इतर राष्ट्रांचा शोक

15परमेश्वर, माझा प्रभु, सोरला म्हणतो, "तुझे लोक
जखमी होतील व मारले जातील तेव्हा तुझे पतन होईल.
त्याच्या आवाजाने भूमध्य सुमुद्राकाठचे देश थरथर
कापतील. 16मग समुद्रकाठाजवळच्या देशांतील सर्व नेते
आपला शोक प्रकट करण्यासाठी सिंहासनावरून खाली
उतरतील. ते त्यांचे खास पोशाख उतरवितील. सुंदर वस्त्रे
काढून ठेवतील. मग ते 'थरकापाची (भीतीची) वस्त्रे'
घालतील आणि भीतीने कापत जमिनीवर बसतील. तुझा
इतका लवकर नाश झालेला पाहून त्यांना धक्का बसेल.
17ते तुझ्यासाठी पुढील शोकगीत गातील

"'हे सोर, तू प्रसिद्ध नगरी होतीस.* तुझ्यात राहण्यासाठी
लोक समुद्रपार करून आले.* तू प्रसिद्ध होतीस पण
आता तू संपली आहेस समुद्रावर तुझा आणि तुझ्या लोकांचा
वचक होता. मुख्य भूप्रदेशावर राहणाऱ्या लोकांवर तुझा
दरारा होता.

---

**तू ... होतील** ह्याचा अर्थ "लोकांनी तुझ्याकरिता शोक केला असाही होतो."

**तुझ्यात ... आले** ह्याचा अर्थ "लोक तुझ्यात खूप पूर्वीपासून राहात होते" असा होतो.

[18]आता, तू पडताच, समुद्रकाठच्या देशांचा भीतीने थरकाप उडेल. तू समुद्रकिनारी अनेक वसाहती स्थापिल्यास. तुझा नाश झाल्यावर, ते सर्व लोक भयभीत होतील.'"

[19]परमेश्वर, माझा प्रभू पुढील गोष्टी सांगतो, "सोर, मी तुझा नाश करीन. तू एक जुनाट, ओसाड शहर होशील. तेथे कोणीही राहणार नाही. मी तुझ्यावर समुद्राची भरती आणीन. प्रचंड समुद्राखाली तू झाकली जाशील. [20]मी तुला मृत राहतात तेथे म्हणजे पाताळात घालवीन. पूर्वी मेलेल्यांमध्ये तू सामील होशील. इतर जुनाट, ओसाड शहरांप्रमाणे मी तुला पृथ्वीच्या तळाशी पाठवीन. तू त्या सर्वांबरोबर थडग्यात राहशील. मग तुझ्यात कोणीही वस्ती करणार नाही. तू पुन्हा कधीही वसणार नाहीस. [21]तुझी स्थिती पाहून इतर लोक घाबरतील. तू संपशील. लोकतुला शोधतील, पण तू त्यांना पुन्हा कधीही सापडणार नाहीस" असे परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो.

## सोर समुद्रावरील व्यापाराचे मोठे केंद्र

27 मला पुन्हा परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला, [2]"मानवपुत्रा, सोरसाठी शोकगीत गा. [3]तिच्याबद्दल पुढील गोष्टी सांग

"'सोर, तू समुद्रावरचे प्रवेशद्वार आहेस. तू खूप राष्ट्रांची जणू व्यापारी आहेस. समुद्रकाठाने तू पुष्कळ देशांत प्रवास करतेस. 'प्रभू, माझा परमेश्वर, पुढील गोष्टी सांगतो.

[4]"'सोर, तू स्वत:ला इतकी सुंदर समजतेस, की जणू काही सौंदर्याची खाणच! तुझ्या शहराच्या सीमेवर भूमध्य समुद्र आहे. तुझ्या जहाजाप्रमाणे, तुझ्या कर्त्यांनी, तुला सौंदर्याने परिपूर्ण केले आहे.

[5]तुझ्या तक्तपोशीसाठी त्यांनी सनीरच्या सरूंचा उपयोग केला. तुझ्या डोलकाठीसाठी त्यांनी लबानोनचे गंधसरू वापरले.

[6]त्यांनी तुझी वल्ही बाशानमधील अल्लोन वृक्षापासून बनविली. त्यांनी तुझ्या डेकवरील खोली कित्ती बेटावरच्या बाक्स लाकडाची बनविली व ती हस्तिदंताने सजविली.

[7]तुझ्या शिडासाठी त्यांनी मिसरचे सुंदर वेलबुट्टीदार तागाचे कापड वापरले. ते शीड तुझे निशाण होते. तुझ्या खोलीचे पडदे निळे जांभळे होते. ते पडद्याचे कापड एलीशाहून आणलेले होते.

[8]सीदोन व अर्वद येथील लोक तुझ्या नावा वल्हवीत असत. सोर, तुझे सुज्ञ लोक तुझे नावाडी होते.

[9]गबालची वडील व कुशल माणसे तुझ्या जहाजावर डांबराने भेगा बुजविण्यासाठी होते. सर्व समुद्रावरची जहाजे व त्यांचे नावाडी व्यवसायासाठी तुझ्याकडे येत आणि तुझ्याशी व्यापार करीत.'

[10]"पारसी, लूदी व पूटी लोक तुझ्या सैन्यात होते. तेच तुझे लढवय्ये वीर होते. आपली शिरस्त्राणे आणि ढाली तुझ्या तटबंदीवर टांगीत त्यांनी तुझ्या शहराला मान व वैभव प्राप्त करून दिले. [11]अर्वाद येथील पहारेकरी तुझ्या वेशीवर पहारा करीत. गम्मादचे लोक बुरूजांवर असत. ते आपल्या ढाली तुझ्या तटावर टांगीत त्यांनी तुझे सौंदर्य पूर्णत्वाला नेले.

[12]"तार्शीश तुझा सर्वांत उत्तम ग्राहक होता. तुझ्याकडील उत्तमोत्तम वस्तूंच्या मोबदल्यात तो चांदी, लोखंड, कथील व शिसे देत असे. [13]यावान, तुबाल आणि काळ्या समुद्राजवळचे लोक तुझ्याबरोबर व्यापार करीत. तुझ्याजवळील वस्तूंच्या मोबदल्यात ते गुलाम व कास्य देत. [14]तोगार्मा राष्ट्रातील* लोक तुझ्याबरोबर घोडे, स्वारीचे घोडे व खेचरे ह्यांचा व्यापार करीत. [15]ददानी लोकसुद्धा तुझ्याशी व्यापार करीत. तू पुष्कळ ठिकाणी तुझ्या वस्तू विकत होतीस. त्या बदल्यात लोक तुला हस्तिदंत व टेंबुरणीचे लाकूड देत. [16]तुझ्याजवळ पुष्कळ चांगल्या वस्तू असल्याने अरामने तुझ्याबरोबर व्यापार केला. ते तुझ्या मालाच्या मोबदल्यात पाचू, जांभळे कापड, सुंदर वीणकाम, तागाचे उत्तम कापड, पोवळे आणि माणके देत.

[17]"यहूदा व इस्राएल ह्यांचाही तुझ्याबरोबर व्यापार होता. ते तुझ्या वस्तूंच्या मोबदल्यात गहू, ऑलिव्ह, अंजिराचा पहिला बहर, मध, तेल आणि उपशामक औषध देत. [18]दिमिष्क तुझा चांगला ग्राहक होता. तुझ्याकडील उत्तम वस्तूंसाठी त्याने तुझ्याबरोबर व्यापार केला. तुझ्या मालाच्या मोबदल्यात तो तुला हेल्बोनचा द्राक्षरस व पांढरी लोकर देत. [19]दिमिष्क तुझ्याबरोबर उसालच्या द्राक्षरसाचा व्यापार करी. त्या मोबदल्यात ते पोलाद, एक प्रकारची दालचिनी, ऊस देत. [20]ददानचा तुझ्याबरोबर खोगीराच्या कापडाचा व रपेट करावयास लागणाऱ्या घोड्यांचा मोठा व्यापार होता. [21]अरबस्तानचा व केदारच्या सर्व नेत्यांचा तुझ्याबरोबर कोकरे, एडके आणि बोकड्यांचा व्यापार होता. [22]"शबा व रामा येथील व्यापारी तुझ्याबरोबर उत्तम मसाले सर्व प्रकारचे जवाहीर आणि सोने यांचा व्यापार करीत. [23]हारान, कन्ने एदेन, शबा, अश्शूर व किल्मद [24]येथील व्यापारी उंची वस्त्रे, निळ्या रंगाची वीणकाम केलेली वस्त्रे, वेगवेगळ्या रंगाचे गालिचे, घट्ट विणीचे दोर व गंधसरूच्या लाकडापासून बनविलेल्या वस्तू ह्यांचा व्यापार करीत. [25]तार्शीशची जहाजे तुझा विकलेला माल नेत.

"सोर, तू त्या मालवाहू जहाजाप्रमाणे आहेस. संपत्तीने भरलेल्या समुद्रावरील जहाजाप्रमाणे आहेस.

---

**राष्ट्र** शब्दश: अर्थ "घर." कदाचित त्या देशाचे राजघराणे असाही अर्थ असावा.

[26]तुझ्या नाविकांनी तुला खोल समुद्रात नेले. पण पूर्वेचा जोरदार वारा तुझ्या समुद्रातील जहाजाचा नाश करील.

[27]"आणि तुझी सर्व संपत्ती समुद्रात सांडेल. तुझी संपत्ती, विकायचा व विकत घेतलेला माल सर्व समुद्रात पडेल.तुझी सर्व माणसे. नावाडी, खलाशी आणि डांबराने भेगा बुजविणारे कारागीर समुद्रात पडतील.तुझ्या शहरातील सर्व व्यापारी आणि सैनिक समुद्रात बुडतील. तुझ्या नाशाच्या दिवशीच हे घडेल.

[28]"तू, तुझ्या व्यापाऱ्यांना दुरवरच्या ठिकाणी पाठवितेस तुझ्या खलाशाचे रडणे ऐकून ती ठिकाणे भीतीने थरथर कापतील.

[29]जहाजावरील सर्व कामगार नावाडी, खलाशी, जहाजावरून समुद्रात उड्या घेतील व पोहून किनाऱ्याला लागतील.

[30]त्यांना तुझ्या स्थितीमुळे दु:ख वाटेल ते रडतील.ते डोक्यांत माती टाकतील, व राखेत लोळतील.

[31]ते तुझ्यासाठी डोक्यावरचे सर्व केस कापतील. शोकप्रदर्शक कपडे घालतील. मृतासाठी करतात तसे ते तुझ्यासाठी शोक करतील.

[32]"ते तुझ्यासाठी रडतील आणि ओक्साबोक्सी रडताना तुझ्याबद्दलचे पुढील शोकगीत गातील:

"'सोरसारखे कुणी नाही. सोरचा भर समुद्रात नाश झाला.

[33]तुझे व्यापारी समुद्रपार करून गेले. तुझ्या प्रचंड संपत्तीने आणि तुझ्या मालाने तू अनेकांना तृप्त केलेस. तू पृथ्वीवरील राजांना श्रीमंत केलेस.

[34]"पण आता तू समुद्र व त्याचे खोल पाणी यामुळे फुटलीस. तुझा माल व माणसे समुद्रात पडली.

[35]समुद्रकाठी राहणाऱ्या लोकांना तुझ्याबाबत धक्का बसला. त्यांचे राजे फारच घाबरले. त्यांच्या चेहऱ्यावरूनच, त्यांना केवढा धक्का बसला आहे, ते कळते.

[36]दुसऱ्या राष्ट्रांतील व्यापारी धक्का बसल्यामुळे आपापसात कुजबुज करत आहेत. तुझ्या बाबतीत जे काही घडले, त्यामुळे लोक भयभीत होतील. का? कारण तुझा शेवट झाला. तुझा शेवट झाला'"

## सोर स्वत:ला देवाप्रमाणे समजते

28 मला परमेश्वराचा संदेश मिळाला तो म्हणाला,
[2]"मानवपुत्रा, 'परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो,' असे सोरच्या राजाला सांग:

"'तू फार गर्विष्ठ आहेस. तू म्हणतोस "मी देव आहे. समुद्राच्या मध्यभागी मी देवाच्या आसनावर बसतो."

"'पण तू मानव आहेस, देव नाही.तुला आपण देव आहोत असे फक्त वाटते.

[3]तू स्वत:ला दानीएलापेक्षा बुद्धिमान समजतोस तू सर्व रहस्ये शोधू शकतोस असे तुला वाटते.

[4]तू तुझ्या शहाणपणाने व अकलेने स्वत:साठी संपत्ती गोळा केली आहेस. तुझ्या खजिन्यांत तू चांदी–सोने ठेवले आहेस.

[5]तुझ्या शहाणपणाने आणि व्यापारामुळे तुझी संपत्ती वाढली. आणि आता तुला त्यांचाच गर्व झाला आहे.

[6]"'म्हणून परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:सोर, तू स्वत:ला देवासारखी समजतेस!

[7]मी परक्यांना तुझ्याविरुद्ध लढण्यासाठी आणीन. ते राष्ट्रांमध्ये सर्वांत भयंकर आहेत. ते तलवारी उपसतील आणि तुझ्या शहाणपणाने मिळविलेल्या सर्व सुंदर गोष्टींचा नाश करतील. तुझे वैभव ते लयाला घालवितील.

[8]"ते तुला थडग्यात पोहोचवतील समुद्रात मेलेल्या नावाड्याप्रमाणे तुझी स्थिती होईल.

[9]माणूस तुला ठार मारेल. तरी तू त्याला "मी देव आहे." असे म्हणशील का? नाही तो तुला ताब्यात घेईल. मग तुला समजेल की तू मानव आहेस, देव नव्हे!

[10]परका तुला परदेशीयांसारखे* वागवेल आणि ठार करील. माझ्या आज्ञेमुळे ह्या गोष्टी घडतील.'" परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

[11]मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले तो म्हणाला,
[12]"मानवपुत्रा, सोरच्या राजाविषयीचे पुढील शोकगीत गा. त्याला सांग 'परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो

"'तू एक आदर्श माणूस होतास. तू ज्ञानी होतास. तू अतिशय देखणा होतास.

[13]तू एदेनमध्ये राहात होतास. एदेन हा देवाचा बाग आहे. तुझ्याजवळ माणके, पुष्कराज, हिरे, लसणा, गोमेद, सूर्यकांत मणी, नीलमणी, वैदूर्य पाच अशी सर्व प्रकारची मोल्यवान रत्ने होती,आणि ती सर्व सोन्याच्या कोंदणात बसविलेली होती. ज्या दिवशी तुला निर्माण केले त्याच दिवशी तुला हे सौंदर्य देण्यात आले. देवाने तुला सामर्थ्यशाली केले.

[14]तू एक अभिषिक्त करूब होतास तुझे पंख माझ्या सिंहासनावर पसरत. मी तुला देवाच्या पवित्र पर्वतावर ठेवी. तू रत्नांतून हिंडत होतास आणि अग्नीप्रमाणे तळपत होतास.

[15]मी तुला निर्मिले, तेव्हा तू सज्जन व प्रामाणिक होतास. पण नंतर तू दुष्ट झालास.

[16]तुझ्या व्यापाराने तुला खूप संपत्ती मिळवून दिली खरी, पण त्याने तुझ्यात क्रूरपणा निर्माण झाला, आणि तू पाप

---

**परदेशी** शब्दश: अर्थ "ज्यांची सुंता झाली नाही ते." देव आणि इस्राएल यांच्यात झालेल्या करारात सहभाग दाखविण्यासाठी प्रत्येक यहूदी पुरुषाची सुंता करीत पाहा उत्पत्ति 17:9–14.

केलेस. म्हणून मी तुला एखाद्या घाणेरड्या गोष्टीसारखी वागणूक दिली. मी तुला देवाच्या पर्वतावरून फेकून दिले. तू एक खास अभिषिक्त करूब देवदूत होतास, तुझे पंख माझ्या सिंहासनावर पसरत होते, पण मी तुला, अग्नीप्रमाणे तेजस्वी असलेल्या रत्नांपासून, सक्तीने दूर केले.

17तुझ्या सौंदर्याने तुला गर्विष्ठ बनविले. तुझ्या वैभवाने तुझ्या ज्ञानाचा नाश केला. म्हणून मी तुला खाली जमिनीवर लोटले. आता इतर राजे तुझ्याकडे डोळे विस्फारून पाहतात.

18तू खूप चुका केल्यास तू कपटी व्यापारी झालास आणि अशा तऱ्हेने, तू पवित्र स्थान अपवित्र केलेस. म्हणून मी तुझ्यातील आगीनेच तुला जाळीन. जमिनीवर तू राख होऊन पडशील. आता सर्वजण तुझी लाजिरवाणी स्थिती पाहू शकतात.

19तुझी अशी स्थिती पाहून इतर राष्ट्रांतील लोकांना धक्का बसला. तुझ्या बाबतीत जे घडले, ते पाहून लोक भयभीत होतील.तुझा शेवट झाला!'"

## सीदोनसाठी संदेश

20मला परमेश्वराचा संदेश मिळाला, तो म्हणाला,
21"मानवपुत्रा, सीदोनकडे पाहा व माझ्यावतीने तिच्याविरुद्ध असलेला संदेश तिला दे. 22सांग, 'परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो

"'सीदोन, मी तुझ्याविरुद्ध आहे! तुझे लोक माझा मान राखायला शिकतील. मी सीदोनला शिक्षा करीन. मग लोकांना कळेल की मीच परमेश्वर आहे, मी पवित्र आहे. व ते त्याप्रमाणे माझ्याशी आचरण करतील.

23मी सीदोनला रोगराई व मृत्यू पाठवीन. शहराबाहेरील तलवार (शत्रूसैनिक) तो मृत्यू आणील. मगच त्यांना कळून चुकेल की मी परमेश्वर आहे.'"

## राष्ट्रे इस्राएलची चेष्टा करण्याचे सोडून देतील

24"'इस्राएलच्या सभोवतालच्या देशांनी इस्राएलचा तिरस्कार केला. पण त्यांचे वाईट होईल. मग इस्राएलच्या लोकांना बोचणारे तीक्ष्ण सुरे वा काटेरी झुडुपे उरणार नाहीत, व त्यांना समजून येईल. की मीच परमेश्वर, त्यांचा प्रभू आहे.'"

25परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो "मी इस्राएलच्या लोकांना इतर राष्ट्रांत विखुरविले. पण मी पुन्हा त्यांना एकत्र आणीन मग त्या राष्ट्रांना मी पवित्र असल्याचे कळेल व ते माझ्याशी त्याप्रमाणे वागतील. त्या वेळी, माझा सेवक याकोब याला मी दिलेल्या भूमीवर इस्राएल लोक राहतील. 26"ते त्या भूमीवर सुरक्षितपणे राहतील. ते घरे बांधतील व द्राक्षमळे लावतील. त्यांचा तिरस्कार करणाऱ्या सभोवतालच्या राष्ट्रांना मी शिक्षा करीन. मग इस्राएलचे लोक निर्भयपणे राहतील व त्यांना पटेल की मीच त्यांचा परमेश्वर देव आहे."

## मिसरबाबत संदेश

29 परागंदा अवस्थेच्या दहाव्या वर्षाच्या, दहाव्या महिन्याच्या बाराव्या दिवशी मला परमेश्वराचा संदेश मिळाला. तो म्हणाला, 2"मानवपुत्रा, मिसरचा राजा फारो याच्याकडे पाहा, माझ्यावतीने त्याच्याबद्दल व मिसरबद्दल बोल. 3त्याला सांग 'प्रभू, माझा परमेश्वर, म्हणतो:

"'मिसरचा राजा, फारो, मी तुझ्याविरुद्ध आहे. तू नाईल नदीकिनारी पडून राहणारा प्रचंड समुद्रातला राक्षस आहेस. तू म्हणतोस, "ही माझी नदी आहे! मी ही नदी निर्मिली"

4–5"'पण मी तुझ्या जबड्यात गळ अडकवीन. नाईल नदीतील मासे तुझ्या खवल्यांना चिकटतील. मी तुला आणि त्या माशांना नदीतून ओढून बाहेर काढीन व जमिनीवर टाकीन. तेथून तुम्हाला कोणी उचलणार नाही वा पुरणार नाही. मी तुम्हाला पक्षी व हिंस्र पशू यांच्या स्वाधीन करीन. तुम्ही त्यांचे भक्ष्य व्हाल.

6मगच मिसरमध्ये राहणाऱ्या सर्व लोकांना कळून येईल की मीच परमेश्वर आहे.

"'मी ह्या गोष्टी का करीन.? कारण इस्राएलचे लोक मिसरवर अवलंबून होते. पण मिसर म्हणजे गवताचे कमकुवत पाते होता.

7इस्राएलचे लोक मिसरवर विसंबला. पण मिसरने फक्त त्यांचे हात आणि खांदे विंधले. ते तुझ्या आधारावर राहिले.पण तू त्यांची पाठ मोडून पिरगळलीस.'"

8म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "मी तुझ्याविरुद्ध तलवार आणीन. मी तुझी सर्व माणसे व सर्व प्राणी नष्ट करीन.

9मिसर ओसाड होईल. त्याचा नाश होईल. मग त्यांना समजेल की मी देव आहे."

देव म्हणाला, "मी असे का करीन.? कारण तू म्हणालास 'नदी माझी आहे. मी तिला निर्माण केले.' 10म्हणून मी (देव) तुझ्याविरुद्ध आहे. मी नाईल नदीच्या पुष्कळ पाटांच्या विरुद्ध आहे. मी मिसरचा संपूर्ण नाश करीन. मिग्दोलपासून सवेनेपर्यंतच नव्हे, तर कुशाच्या सीमेपर्यंतची तुझी सर्व गावे मी ओस पाडीन. 11कोणी मनुष्य वा प्राणी मिसरमधून जाणार नाही. 12चाळीस वर्षे कोणीही तेथे राहणार नाही. मी मिसऱ्यांना इतर राष्ट्रांत विखरून टाकीन. मी त्यांना परदेशात रोवीन."

13प्रभू, माझा परमेश्वर, म्हणतो, "मी मिसरच्या लोकांना पुष्कळ राष्ट्रांत विखरून टाकीन. पण 40 वर्षानंतर मी त्यांना पुन्हा एकत्र करीन. 14मिसरच्या कैद्यांना मी परत आणीन. मी त्यास त्यांच्या जन्मभूमीत पथ्रोस देशात परत आणीन. पण त्यांचे राज्य महत्वाचे राहणार नाही. 15"ते अगदी कमी महत्वाचे राज्य होईल. ते कधीच इतर राष्ट्रांपेक्षा वरचढ होणार नाही. मी त्याला एकढे लहान

करीन की ते दुसऱ्या राष्ट्रांवर सत्ता गाजविणार नाही.
[16]आणि इस्राएलचे लोक पुन्हा कधीही मिसरवर विसंबणार
नाहीत. इस्राएल लोकांना त्यांचे पाप आठवेल. मदतीसाठी
देवाकडे न जाता आपण मिसरकडे गेलो हे त्यांना आठवेल
आणि त्यांना समजेल की मीच परमेश्वर, प्रभू, आहे."

### मिसर बाबेलला मिळेल

[17]परागंदा अवस्थेच्या सत्ताविसाव्या वर्षाच्या, पहिल्या
महिन्याच्या (एप्रिलच्या) पहिल्या दिवशी, मला
परमेश्वराचा संदेश मिळाला. तो म्हणाला. [18]"मानवपुत्रा,
बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर याने आपल्या सैन्याला
सोरविरुद्ध जोराची लढाई करायला लावली. त्यांनी प्रत्येक
सैनिकाचा गोटा केला. ओझी उचलून त्यांच्या खांद्याची
सालटी निघाली. नबुखद्नेस्सरने व त्याच्या सैन्याने सोरचा
पराभव करण्यासाठी खूप कष्ट घेतले. पण ह्या कष्टाचे
फळ त्यांना मिळाले नाही." [19]म्हणून परमेश्वर, माझा
प्रभू, म्हणतो, "मिसरची भूमी मी बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सर यास देईन. तो मिसरच्या लोकांना घेऊन
जाईल. मिसरमधील मौल्यवान वस्तूही तो घेईल. हा
नबुखद्नेस्सरच्या सैन्याचा मोबदला असेल. [20]मिसरची
भूमी मी नबुखद्नेस्सराला त्याच्या मेहनतीचे बक्षीस म्हणून
दिली आहे. का? कारण त्यांनी हे काम माझ्यासाठी केले."
परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.
[21]"त्याच दिवशी, मी इस्राएलाच्या लोकांना सामर्थ्यवान
करीन. मग तू त्यांच्याशी बोलू शकशील आणि त्यांचे
लक्ष तुझ्याकडे जाईल.* त्यांना मीच परमेश्वर आहे." हे
कळेल.

### बाबेलचे सैन्य मिसरवर चढाई करील

30 मला पुन्हा परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो
म्हणाला, [2]"मानवपुत्रा, माझ्यावतीने बोल. 'मी
पुढील गोष्टी सांगतो' असे सांग.

"'ओरडून सांग "तो भयंकर दिवस येत आहे."
[3]तो दिवस नजीक आहे. हो! परमेश्वराचा न्यायाचा
दिवस जवळ आहे. तो ढगाळ दिवस असेल. ती राष्ट्रांची
न्यायनिवाडा करण्याची वेळ असेल.
[4]मिसरविरुद्ध तलवार उठेल. मिसरच्या पतनाच्या वेळी
कुश देशातील लोकांचा भीतीने थरकाप उडेल. बाबेलचे
सैन्य मिसरच्या लोकांना कैदी करून नेईल. मिसरचा
पाया उखडला जाईल.

[5]"'खूप लोकांनी मिसरबरोबर शांतता करार केला.
पण ते सर्व म्हणजे कुशी पूटी लूदी, अरेबिया येथील
लोक, मिश्र जाती, कूबी आणि इस्राएल लोक यांचा नाश
होईल.

[6]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: "मिसरला
मदत करणारे आपटतील त्यांच्या सत्तेचा तोरा उतरेल.
मिग्दोलपासून सवेनेपर्यंतचे मिसरचे लोक युद्धात मारले
जातील." परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला,
[7]मिसर नाश झालेल्या देशांच्या मालिकेत जाऊन बसेल.
मिसर त्या ओसाड देशांपैकी एक होईल.
[8]मी मिसरमध्ये आग लावीन. आणि मिसरच्या सर्व
सहाय्यकांचा नाश करीन. मगच त्यांना कळेल की मी
परमेश्वर आहे.

[9]"'त्याच वेळी, मी बाहेर दूत पाठवीन ते जहाजातून
कूशला वाईट बातमी सांगण्यासाठी जातील. आता
कूशला सुरक्षित वाटते. पण मिसरच्या शिक्षेच्या वेळी
कूशमधील लोकांचा भीतीने थरकाप उडेल. ती वेळ येत
आहे!

[10]परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणतो की "मिसरच्या
लोकांचा नाश करण्यासाठी मी बाबेलचा राजा
नबुखद्नेस्सरचा उपयोग करीन.
[11]सर्व राष्ट्रामध्ये, नबुखद्नेस्सर व त्याचे लोक भयंकर
आहेत. आणि मिसरचा नाश करण्यासाठी मी त्यांना
आणीन. ते मिसरविरुद्ध तलवारी उपसतील. ती भूमी
प्रेतांनी भरून टाकतील.
[12]मी नाईल नदीला कोरडी करीन, आणि ती जागा
दुष्टांना विकीन. मी, परमेश्वर, सांगतो की परक्यांकरवी
मी ती भूमी ओसाड करीन."

### मिसरच्या मूर्तीचा नाश होईल

[13]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: "मी
मिसरमधील मूर्तीचा सुध्दा नाश करीन. मी नोफातील
पुतळे त्यापासून दूर करीन. ह्यापुढे मिसरमध्ये कोणीही
नेता नसेल. मी मिसरमध्ये भीतीचे साम्राज्य निर्माण
करीन.
[14]मी पथ्रोसला ओसाड करीन. सोअनास आग लावीन
मी नोला शिक्षा करील.
[15]मिसरचा गड जो सीन त्यावर मी माझा संपूर्ण राग
काढीन. मी नोच्या लोकांचा नाश करीन.
[16]मी मिसरला आग लावीन. सीनला खूप वेदना होतील.
सैनिक नो शहरात घुसतील आणि नोफाला रोज नव्या
नव्या अडचणी येतील.
[17]आवेन व पी बेसेथ येथील तरुण युद्धात मारले जातील.
आणि स्त्रियांना धरून नेतील.
[18]ज्या दिवशी मी मिसरचे नियंत्रण मोडीन, तो दिवस
तहपन्हेसचा काळा दिवस असेल. मिसरच्या उन्मत्त सत्तेचा

---

**त्यांचे लक्ष … जाईल** कारण तुझे भाकित खरे ठरल्याचे त्यांना
समजून येईल.

अंत होईल. मिसरला ढग झाकेल आणि त्याच्या मुलींना कैद करून नेले जाईल.
[19]अशा रीतीने, मी मिसरला शिक्षा केल्यावर, त्यांना मी परमेश्वर आहे, हे पटेल.'"

## मिसर कायमचा दुर्बल होईल

[20]परागंदा काळतील अकराव्या वर्षांच्यां पहिल्या महिन्याच्या (एप्रिलच्या) सातव्या दिवशी मला परमेश्वराचा संदेश मिळाला. तो म्हणाला, [21]"मानवपुत्रा, मिसरच्या राजाचा फारोचा हात (सत्ता) मी मोडला आहे. त्याला कोणीही मलमपट्टी करणार नाही. व औषधही लावणार नाही. तो बरा होणार नाही. त्यांच्या हाताला तलवार धरण्याची शक्ती येणार नाही."

[22]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, "मी मिसरचा राजा फारो याच्याविरुद्ध आहे. मी त्याचे दोन्ही हात एक चांगला असलेला व दुसरा मोडलेला, मोडीन मी त्याला त्याच्या हातातून तलवार टाकायला भाग पाडीन. [23]मी मिसरच्या लोकांना राष्ट्रां-राष्ट्रांत विखरून टाकीन. [24]मी बाबेलच्या राजाचे हात बळकट करीन. मी माझी तलवार त्याच्या हाती देईन. पण मी फारोचे हात तोडीन. मग तो मरणयातना भोगणाऱ्या माणसाप्रमाणे आक्रोश करील. [25]मी बाबेलच्या राजाचे हात बळकट करीन, पण फारोचे हात तोडून टाकीन. मग त्यांना समजेल की मी परमेश्वर आहे. "मी माझी तलवार बाबेलच्या राजाला देईन. तो ती मिसरवर उपसेल. [26]मी मिसरी लोकांना इतर राष्ट्रांत विखरून टाकेल म्हणजे त्यांना मीच परमेश्वर आहे हे कळेल."

## अश्शूर गंधसरुप्रमाणे आहे

31 परागंदा काळाच्या अकराव्या वर्षीच्या तिसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी परमेश्वराचा संदेश मला मिळाला. तो म्हणाला, [2]"मानवपुत्रा, मिसरचा राजा फारो आणि त्याचे लोक यांना पुढील गोष्टी सांग:

"'मोठेपणात तुम्ही कोणासारखे आहात?
[3]अश्शूर सुंदर फांद्या असलेल्या व गर्द छाया असलेल्या लबानोनमधील उंच गंधसरुसारखा होता. त्याचा शेंडा ढगांना भिडला होता.
[4]पाण्यामुळे वृक्ष वाढला. नदीमुळे तो उंच झाला. वृक्षाभोवती नद्या वाहत होत्या. त्याच्यापासून निघणारे फक्त लहान पाटच मळ्यातील इतर झाडांपर्यंत जात.
[5]म्हणून तो वृक्ष मळ्यातील इतर झाडांपेक्षा उंच होता. त्यांला खूप फांद्या फुटल्या. त्याला भरपूर पाणी मिळाल्याने, त्याच्या फांद्या विस्तारल्या.
[6]सर्व पक्ष्यांनी त्या वृक्षाच्या फांद्यांमध्ये आपली घरटी बांधली. त्याच्या छायेत सर्व प्राण्यांची वीण होई. त्याच्या सावलीला सर्व मोठी राष्ट्रे राहात.
[7]वृक्ष फारच सुंदर होता. त्याच्या मुळांना भरपूर पाणी मिळाल्याने त्याचा विस्तार मोठा झाला, त्याच्या फांद्या लांब झाल्या.
[8]देवाच्या बागेतील, गंधसुरूंनासुध्दा एवढ्या फांद्या नव्हत्या देवदारुलाही एवढ्या फांद्या नव्हत्या, अर्मोन झाडांनाही अशा फांद्या नव्हत्या. देवाच्या बागेतील कोठलाच वृक्ष, ह्या वृक्षा इतका, सुंदर नव्हता.
[9]मी त्याला खूप फांद्या देऊन सुंदर बनविले. मग एदेनमधील म्हणजेच देवाच्या बागेतील वृक्ष त्याचा द्वेष करू लागले.'"

[10]मग, परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "वृक्ष उंच वाढला आहे. त्याचा शेडा ढगाला भिडला आहे. वृक्षाला आपल्या उंचीचा अभिमान आहे. [11]म्हणून मी त्यास एका बलिष्ट राजाच्या स्वाधीन करीन. तो त्या वृक्षाने केलेल्या दुष्कृत्यांबद्दल त्याला शिक्षा करील. मी त्या वृक्षाला त्याच्या दुष्टाव्याबद्दल माझ्या बागेतून काढून टाकीन. [12]राष्ट्रांतील अत्यंत भयंकर परक्यांनी त्याला तोडून फेकले. वृक्षाच्या फांद्या डोंगरदऱ्यात पडल्या त्या फांद्या त्या देशातून वाहणाऱ्या नद्यांतून वाहत गेल्या. त्या वृक्षाची सावली राहिली नसल्याने, पृथ्वीवरचे सगळे लोक दूर निघून गेले. [13]आता त्या तोडून टाकलेल्या झाडावर पक्ष्यांची वस्ती आहे. आणि हिंस्र श्वापदे त्याच्या तोडून टाकलेल्या फांद्यामधून संचार करत आहेत.
[14]"आता, पाण्याजवळचे कोठलेही झाड गर्व करणार नाही. कोणीही ढगापर्यंत पोहोचायचा प्रयत्न करणार नाही. ते पाणी पिणारे मोठे वृक्ष आपल्या उंचीची प्रौढी मिरविणार नाहीत. का? कारण प्रत्येकाला मरण अटळ आहे. त्यांना जमिनीखाली, शेओलमध्ये मृत्यूलोकांत जावे लागणार. इतर मृतांमध्ये, खोल विवरात त्यांना जावे लागणार."
[15]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो "ज्या दिवशी तो वृक्ष शेओलमध्ये मृत्युलोकांत गेला, त्या दिवशी मी लोकांना शोक करायला लावला. मी खोल पाण्याने त्या वृक्षाला झाकले.* वृक्षाच्या नद्यांचा प्रवाह मी अडविला. त्यामुळे झाडांकडे वाहणारे पाणी वाहण्याचे थांबले. मी त्याच्यासाठी लबानोनला शोक करायला भाग पाडले. त्या मोठ्या वृक्षाबद्दलच्या दु:खाने मळ्यातील झाडे म्लान झाली. [16]मी वृक्ष पाडला. त्याच्या आवाजाने राष्ट्र हादरली, घाबरली. मी वृक्षाला मृत्यूलोकांत जायला भाग पाडले. तो वृक्ष इतर लोकांबरोबर खोल विवरात जाऊन पडला. पूर्वी, एदेनमधल्या सर्व वृक्षांनी आणि लबानोनमधील उत्तम झाडांनी तेच पाणी प्यायले होते. धरणीखाली गेलेले ते वृक्ष मग समाधान पावले. [17]हो! ते वृक्षही मोठ्या वृक्षाबरोबर खाली गेले. ते लढाईत मारल्या गेलेल्या लोकांमध्ये जाऊन

---

**मी ... झाकले** येथे शब्दाचा खेळ आहे, पाणी झाडाला झाकण्याऐवजी पाण्याला दु:खाच्या कापडाने झाकले.

मिसळले. त्या मोठ्या वृक्षाने इतरांना बलवान केले होते.
राष्ट्रांमध्ये ती झाडे ह्या मोठ्या वृक्षाच्या सावलीला
राहिली.
18"तेव्हा हे मिसर देशा, एदेनमधल्या कोणत्या मोठ्या,
बलवान वृक्षाशी मी तुझी तुलना करावी? तू, मृत्युलोकांत,
त्या परदेशीयांबरोबर आणि लढाईत मारल्या गेलेल्या
लोकांबरोबर, जाऊन पडशील, फारो आणि त्याची माणसे
ह्यांच्याबाबतीत तसेच घडेल." देव, माझा प्रभू, असे म्हणाला.

## फारो: सिंह का मगर?

32 परागंदा काळाच्या बाराव्या वर्षाच्या बाराव्या
महिन्याच्या (मार्चच्या) पहिल्या दिवशी, मला
परमेश्वराचा संदेश मिळाला. तो म्हणाला, 2"मानवपुत्रा,
मिसरचा राजा फारो ह्याच्यासाठी हे शोकगीत गा. त्याला
सांग:

"'तू स्वत:ला राष्ट्रांमध्ये उन्मत्तपणे चालणारा बलिष्ठ
तरुण सिंह समजलास. पण खरे म्हणजे तू तळ्यांतील
मगरी प्रमाणे आहेस. तू प्रवाहातून रेटा देऊन मार्ग काढतोस
तुझ्या पायाने पाणी गढूळ करतोस, मिसरच्या नद्या घुसळून
काढतोस.'"

3परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:

"मी पुष्कळ लोकांना एकत्र जमविले आहे. आता मी
माझे जाळे तुझ्यावर फेकीन. मग ते लोक तुला आत
ओढून घेतील.
4मग मी तुला कोरड्या जमिनीवर टाकीन. मी तुला
शेतांत टाकीन. सर्व पक्षी येऊन तुला खाऊ देत. सर्व
ठिकाणचे सगळे हिंस्र प्राणी येऊन तुला खाऊन तृप्त होऊ
देत.
5मी तुझ्या मृत शरीराचे तुकडे पर्वतावर फेकीन आणि
त्या तुकड्यांनी दऱ्या भरून टाकीन.
6मी तुझे रक्त डोंगरांवर ओतीन. ते जमिनीत मुरेल.
नद्याही रक्ताने भरतील.
7मी तुला अदृश्य करीन. मी आकाश झाकीन व तारे
निस्तेज करीन. मी सूर्याला ढगाने झाकीन. आणि
चंद्रप्रकाश पडणार नाही.
8तुझ्यावर पडणारा आकाशातील सर्व प्रकाश मी निस्तेज
करीन. मी तुझ्या संपूर्ण देशाला अंधारात ठेवीन." माझा
प्रभु परमेश्वर ह्या गोष्टी म्हणाला आहे.

9"मी तुझा नाश करण्यासाठी शत्रूला आणले हे ऐकून
पुष्कळ लोक अस्वस्थ व दु:खी होतील. तुला अनोळखी
असलेली राष्ट्रेसुध्दा अस्वस्थ होतील. 10तुझ्याकडे पाहून
खूप लोकांना धक्का बसेल. मी माझी तलवार परजताच,
त्या लोकांचे राजे अत्यंत भयभीत होतील. तुझ्या पतनाच्या
दिवशी, क्षणाक्षणाला, ते थरथर कापतील. प्रत्येकाला
आपल्या जीवाचे भय वाटेल."
11का? कारण परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
"बाबेलच्या राजाची तलवार तुमच्यावर उपसली जाईल.
12लढाईत, त्या सैनिकांकरवी मी तुमचे लोक मारीन. ते
सर्वांत भयंकर अशा राष्ट्रांतून आलेले सैनिक आहेत.
मिसरच्या अभिमानास्पद गोष्टी ते लुटतील. मिसरच्या
लोकांचा नाश केला जाईल. 13मिसरच्या नद्यांच्या काठी
असणाऱ्या सर्व प्राण्यांचा नाश होईल. ह्यापुढे लोकांच्या
पायामुळे पाणी गढूळ होणार नाही. तसेच गुरांच्या खुरांमुळेही
ते खराब होणार नाही. 14मी मिसरचे पाणी शांत करीन.
नद्यांचा प्रवाह मंद करीन. त्यांना तेलाप्रमाणे निसरड्या
करीन." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला, 15"मी
मिसरची भूमी ओसाड करीन. त्यातील सर्व काही नष्ट
होईल मिसरमध्ये राहणाऱ्या सर्व लोकांना मी शिक्षा करीन.
मगच त्यांना 'मी देव व प्रभू' असल्याचे समजेल.
16"लोक मिसरसाठी शोकगीत गातील. इतर राष्ट्रांतील
मुलीही (गावे) त्याच्यासाठी शोकगीत गातील. त्या मिसर
व त्याचे लोक यांच्यासाठी ते गीत गातील." देव, माझा
प्रभू, असे म्हणाला.

## मिसरचा नाश

17परागंदा काळातील बाराव्या वर्षांच्या त्याच महिन्याच्या
पंधराव्या दिवशी मला परमेश्वराचा संदेश मिळाला तो
म्हणाला, 18"मानवपुत्रा, मिसरच्या लोकांसाठी शोक कर.
मिसरला आणि बलाढ्य राष्ट्रांच्या मुलींना थडग्याकडे ने.
त्यांना जमिनीखाली ने. म्हणजे ते खोल विवरात गेलेल्या
लोकांच्यामध्ये राहतील.
19"मिसर, तू कोणापेक्षाही चांगला नाहीस. मृत्युलोकांत
जा. त्या परदेशीयांबरोबर जाऊन पड.
20"लढाईत मारल्या गेलेल्या लोकांत मिसर जाऊन
पडेल. शत्रूने त्याला व त्याच्या सर्व लोकांना ओढून नेले
आहे.
21"बलवान व शक्तिशाली लोक युद्धात मारले गेले. ते
परदेशी मृत्युलोकात गेले. तेथून ते मिसरशी व त्याच्या
साहाय्यकर्त्यांशी बोलतील ते सुद्धा युद्धात मारले गेले.
22–23"अश्शूर व त्याचे सैन्य मृत्युलोकात आहे. खोल
विवरात अतिशय खोलात त्यांची थडगी आहेत. ते सर्व
अश्शूरी सैनिक लढाईत मारले गेले. अश्शुरच्या
थडग्याभोवती अश्शूरचे सैन्य आहे. ते जिवंत असताना
त्यांनी लोकांना घाबरविले. पण आता ते सर्व शांत झाले
आहेत–ते सर्व युद्धात मारले गेले.
24"एलाम तेथेच आहे व तिच्या थडग्याभोवती त्याचे
सर्व सैन्य आहे. ते सर्व लढाईत मारले गेले. ते परदेशी
जमिनीखाली खोल गेले. ते जिवंत असताना, लोक त्यांना
घाबरत. पण जमिनीखालच्या खोल विवरात त्यांनी
आपल्याबरोबर आपली अप्रतिष्ठाही नेली. 25त्यांनी एलाम

व युद्धात मारल्या गेलेल्या सैनिकांसाठी शय्या तयार केली.
एलामच्या थडग्याभोवती त्याचे सैनिक आहेत. ते सर्व
परदेशी युद्धात मारले गेले. ते जिवंत होते, तेव्हा त्यांनी
लोकांना घाबरविले. पण जमिनीखाली खोल विवरात त्यांनी
आपल्याबरोबर आपली अप्रतिष्ठाही नेली. त्यांना मारल्या
गेलेल्या इतर लोकांबरोबर ठेवले गेले.
26“मेशेख, तुबाल आणि त्यांची सैन्यही तेथेच आहेत.
त्यांची थडगी सभोवती आहेत. ते सर्व परदेशी लढाईत
मारले गेले. त्यांनी जिवंतपणी लोकांना घाबरविले. 27पण
ते आता पूर्वीच मृत्यू पावलेल्या बलवान लोकांबरोबर
पडून आहेत. त्यांना त्यांच्या शस्त्रास्त्रांबरोबर पुरले. त्यांच्या
तलवारी त्यांच्या डोक्याखाली ठेवल्या आहेत. पण त्यांचे
पाप त्यांच्या हाडांवर आहे. का? कारण जिवंत असताना
त्यांनी लोकांना घाबरविले.
28“मिसर, तुझासुद्धा नाश होईल. तू सुद्धा त्या परदेशी
लोकांच्यात जाऊन पडशील. युद्धात मारल्या गेलेल्या
सैनिकांच्यामध्ये तू जाशील.
29“तेथे अदोमसुद्धा आहे. तिच्याबरोबर तिचे राजे व
नेते आहेत. ते सुद्धा शक्तिशाली होते. पण आता ते युद्धात
मारल्या गेलेल्या इतर लोकांबरोबर पडतात. ते परदेशी
लोकांवर पडून आहेत. ते खोल विवरात गेलेल्या
लोकांबरोबर तेथे आहेत.
30“उत्तरेकडचे सर्वच्या सर्व राज्यकर्ते तेथे आहेत.
सीदोनचे सर्व सैनिकही तेथे आहेत. त्यांच्या बळाला लोक
घाबरले. पण ते आता शरमले आहेत. ते परदेशी, युद्धात
मारल्या गेलेल्या लोकांच्यामध्ये पडून आहेत. त्यांनी त्या
खोल विवरात जाताना स्वत:ची अप्रतिष्ठाही स्वत:बरोबर
नेली.
31“फारोला मृत्युलोकात गेलेले लोक दिसतील. तो
आणि त्याच्या बरोबरचे इतर लोक मग समाधान पावतील.
हो! फारो आणि त्याचे सर्व सैन्य युध्दात मारले जाईल.”
परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला,
32“फारो जिवंत असताना, मी लोकांना त्याची भीती
दाखविली. पण आता तो परदेशी लोकांबरोबर पडेल.
युद्धात मारल्या गेलेल्या इतर सैनिकांबरोबर फारो व
त्याचे सर्व सैन्य पडेल.” परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

## इस्राएलचा पहारेकरी म्हणून देव यहेज्केलला निवडतो

33 मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला.
2“मानवपुत्रा, तुझ्या माणसांशी बोल त्यांना सांग,
‘ह्या देशावर हल्ला करण्यासाठी कदाचित्, मी
शत्रूसैनिकांना आणीन. त्या वेळेस लोक एकाला पहारेकरी
म्हणून निवडतील. 3पहारेकऱ्याने शत्रूसैनिकांस येताना
पाहिल्यास, तो तुतारी फुंकून लोकांना सावध करतो.
4जर लोकांनी तुतारीचा आवाज ऐकूनही त्याकडे दुर्लक्ष
केले, तर शत्रू त्यांना पकडतील व कैदी म्हणून घेऊन
जातील. अशा वेळी मृत्यूला ज्याचा तोच जबाबदार असेल.
5जर एखाद्याने तुतारीचा आवाज ऐकूनही दुर्लक्ष केले, तर
त्याच्या मृत्यूची जबबादारी त्याची त्याच्यावरच असेल. तो
जर तुतारीच्या आवाजाने सावध झाला असता, तर वाचू
शकला असता.
6“‘पण, कदाचित्, असेही होईल की शत्रूसैनिकांना
पाहूनही पहारेकरी तुतारी फुंकणार नाही. त्याने लोकांना
सावध न केल्याने, शत्रूसैनिक त्यांना पकडतील व कैदी
म्हणून घेऊन जातील. त्यांनी पाप केले होते म्हणून ते
पकडले जातील हे खरे, पण जर ते ठार मारले गेले, तर
त्यांच्या मृत्यूला पहारेकरीही जबाबदार असेल.’
7“आता, मानवपुत्रा, इस्राएल लोकांचा पहारेकरी म्हणून
मी तुझी निवड करीत आहे. माझ्याकडून संदेश मिळताच,
माझ्यावतीने तू लोकांना जागृत केलेच पाहिजेस. 8मी
कदाचित् तुला सांगीन ‘हा दुष्ट मनुष्य मरेल,’ तर तू
माझ्यावतीने त्याच्याकडे जाऊन त्याला सावध केलेच
पाहिजेस. जर तू त्या दुष्ट माणसाकडे जाऊन त्याला सावध
केले नाहीस, त्याचा मार्ग बदलण्याबद्दल त्याला सांगितले
नाहीस, तर त्याच्या पापामुळे तो मरेल, पण त्याच्या मृत्यूची
जबाबदारी तुझ्यावरही येईल. 9पण तू त्या पाप्यास सावध
करून कुमार्ग सोडून सन्मार्ग धरण्यास सांगितलेस आणि
त्याने ह्यास नकार दिला, तर तो माणूस त्याच्या पापामुळे
मरेल. पण तू वाचशील.

## देवाला लोकांचा नाश करण्याची इच्छा नाही

10“मानवपुत्रा, माझ्यावतीने इस्राएलच्या लोकांशी बोल.
कदाचित्. ते लोक म्हणतील, ‘आम्ही पाप केले. नियम
मोडले आमची पापे आम्हाला बोजा झाली आहेत. आमच्या
पापांनी आम्ही सडलो आता जगण्यासाठी आम्ही काय
करावे?’
11“मी शपथपूर्वक सांगतो ‘दुष्टांचे मरण मी इच्छिले
नव्हते. मला त्यांनी मरावे असे अजिबात वाटत नाही. त्या
पापी लोकांनी परत माझ्याकडे यावे असे मला वाटते.
त्यांनी आपला मार्ग बदलावा म्हणजे त्यांना खरोखरीचे
जीवन जगता येईल. तेव्हा माझ्याकडे परत या. दुष्कृत्ये
करायचे सोडा. इस्राएलच्या लोकांनो, तुम्ही का मरावे?’
असे परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, असे तू त्या लोकांना
सांगितले पाहिजेस.
12“मानवपुत्रा, तू तुझ्या लोकांना असेही सांग ‘जर एखादा
सज्जन कुमार्गाला लागून पाप करू लागला, तर त्याने
पूर्वी केलेल्या चांगल्या गोष्टी त्याला वाचवू शकणार नाहीत.
तसेच एखादा पापापासून परावृत्त झाला, तर त्याची
भूतकाळातील पापे त्याचा नाश करू शकणार नाहीत.
तेव्हा लक्षात ठेवा, पूर्वी केलेली सत्कृत्ये, आता तुम्ही
दुष्कृत्ये करू लागल्यास तुम्हाला वाचविणार नाहीत.’
13“कदाचित् मी सज्जन माणसाला ‘तो जगेल’ असे सांगीन.
पण त्यामुळे त्याला ‘आपण पूर्वी केलेली सत्कृत्ये आपल्याला

वाचवतील. असे वाटेल. म्हणून तो पाप करू लागेल, तर
त्याची पूर्वीची सत्कृत्ये मी स्मरणार नाही. तो पाप करू
लागल्याने तो मरेल.’
14“किंवा मी दुष्टाला ‘तू मरशील’ असे सांगीन. पण तो
कदाचित त्याचा जीवनमार्ग बदलेल. तो पाप करण्याचे
सोडून देऊन चांगल्या रीतीने जगू लागेल. तो सज्जन व
प्रामाणिक होईल. 15त्याने कर्ज देताना गहाण म्हणून ठेवून
घेतलेल्या वस्तू तो कदाचित परत करेल. त्याने चोरलेल्या
वस्तूंची किंमत तो चुकती करील. जीवनातील नियमाप्रमाणे
तो चालू लागेल, तो वाईट गोष्टी करण्याचे सोडून देईल,
तर तो नक्कीच जगेल. तो मरणार नाही. 16त्याने पूर्वी
केलेली पापे मी स्मरणार नाही. का? कारण आता तो
योग्य रीतीने जगत आहे, तो प्रामाणिक झाला आहे. तेव्हा
तो जगेल.
17“पण तुझी माणसे म्हणतात, ‘हे योग्य नाही, परमेश्वर,
माझा प्रभू, असा असूच शकत नाही.’
“पण ते लोक प्रामाणिक नाहीत. त्यांनी बदललेच पाहिजे.
18जर सज्जन सत्कृत्ये सोडून दुष्कृत्ये करू लागला, तर
त्याच्या पापामुळे तो मरेल. 19आणि जर दुष्टाने पाप
करण्याचे सोडून दिले, तो चांगले जीवन जगू लागला,
प्रामाणिक झाला, तर तो जगेल. 20पण मी न्यायी नाही
असे तुम्ही अजूनही म्हणता. पण मी तुम्हाला सत्य सांगत
आहे. इस्राएलच्या लोकांनो, प्रत्येकाच्या कर्मांचा मी न्याय
करीन.”

## यरुशलेम काबीज केले जाते

21परागंदा अवस्थेच्या बाराव्या वर्षाच्या दहाव्या
महिन्याच्या (जानेवारी महिन्याच्या) पाचव्या दिवशी
यरुशलेममधून एक माणूस माझ्याकडे आला. तो तेथील
लढाईतून निसटून आला होता. तो म्हणाला, “नगरी
(यरुशलेम) काबीज केली गेली.”
22तो माणूस येण्यापूर्वीच्या संध्याकाळी परमेश्वराचे,
माझ्या प्रभूचे, सामर्थ्य माझ्यावर आले. देवाने मला मुके
केले. पण तो माणूस येण्याच्या वेळी परमेश्वराने मला
वाचा दिली व बोलण्यास प्रवृत्त केले. 23मग मला
परमेश्वराचा संदेश मिळाला. तो म्हणाला, 24“मानवपुत्रा,
इस्राएलच्या विद्ध्वंस झालेल्या गावांतून इस्राएली राहात
आहेत. ते म्हणतात, ‘अब्राहाम एकटा असताना देवाने
त्याला ही सर्व भूमी दिली. आता, आम्ही पुष्कळ आहोत
आणि ही भूमी नक्कीच आमची आहे. ही आमच्या
मालकीची आहे.’
25“तू त्यांना सांग की परमेश्वर, माझा प्रभू, पुढील
गोष्टी सांगतो ‘तुम्ही रक्तासकट मांस खाता. तुम्ही
मदतीकरिता तुमच्या मूर्तीकडे पाहता तुम्ही लोकांचे खून
करता. मग मी तुम्हाला ही भूमी का द्यावी? 26तुम्ही
तुमच्या स्वत:च्या तलवारीवर अवलंबून राहता.
तुमच्यातील प्रत्येकजण भयानक कृत्ये करतो,
शेजाऱ्याच्या बायकोबरोबर व्यभिचार करून पाप करतो,
तेव्हा तुम्हाला भूमी मिळू शकत नाही.’
27“तू त्यांना सांगितले पाहिजेस की परमेश्वर, माझा
प्रभू म्हणतो, “माझी शपथ घेऊन प्रतिज्ञा करतो की त्या
नाश झालेल्या गावांत राहणारे लोक तलवारीने मारले
जातील. जर एखादा शेतांत असेल. तर मी त्याला
प्राण्याकडून मारीन व त्या प्राण्याचे तो भक्ष्य होईल. जर
लोक गडात वा गुहेत लपले असतील, तर ते रोगराईने
मरतील. 28मी ती भूमी ओसाड व निर्जन करीन. त्या
देशाला अभिमानास्पद असणाऱ्या सर्व गोष्टी गमवाव्या
लागतील. इस्राएलचे पर्वत ओसाड होतील. तेथून कोणीही
जाणारसुद्धा नाही. 29त्या लोकांनी खूप भयानक कृत्ये
केली आहेत. म्हणून मी ती भूमी एक निर्जन, ओसाड
प्रदेश करीन. मग ह्या लोकांना कळेल की मीच परमेश्वर
आहे.”
30“‘आणि, मानवपुत्रा, आता तुझ्याबद्दल तुझे लोक
भिंतीला टेकून, त्यांच्या दारांत उभे राहून, तुझ्याबद्दल
बोलतात, ते एकमेकांना म्हणतात “चला, परमेश्वर काय
म्हणतो ते जाऊन ऐकू या.” 31म्हणून ते माझे लोक
असल्यासारखे तुझ्याकडे येतात. ते माझे लोक
असल्याप्रमाणे तुझ्यापुढे बसतात. ते तुझे म्हणणे ऐकतात,
पण तू सांगितल्याप्रमाणे ते करणार नाहीत. ते त्यांना भावते
तेच करू इच्छितात. ते लोकांना फसवून खूप पैसा मिळवू
बघतात.
32“‘तू त्यांच्या दृष्टीने प्रेमगीते गाणारा फक्त एक गायक
आहेस. तुझा गळा गोड आहे. तू तुझे वाद्य उत्तम वाजवितोस.
ते तुझे फक्त ऐकतात पण त्याप्रमाणे ते करणार नाहीत.
33पण तू गात असलेल्या गोष्टी खरोखरच घडतील. मगच
लोकांना कळेल की त्यांच्यामध्ये खरोखरच एक संदेष्टा
राहात होता.’”

## इस्राएल मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे आहे

34 मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला,
2“मानवपुत्रा, माझ्यावतीने इस्राएलच्या
मेंढपाळांविषयी (नेत्यांविषयी) बोल. माझ्यासाठी
त्यांच्याबरोबर बोल. त्यांना सांग की परमेश्वर, माझा प्रभू
पुढील गोष्टी सांगतो. ‘तुम्ही इस्राएलचे मेंढपाळ स्वत:च
फक्त चरत आहात.त्यामुळे तुमचे वाईट होईल. तुम्ही
कळपाला खायला का घालत नाही? 3तुम्ही धष्टपुष्ट
मेंढ्या खाता, त्यांच्या लोकरीचा उपयोग स्वत:ला कपडे
करण्याकरिता. करता तुम्ही धष्टपुष्ट मेंढ्या मारता. पण
कळपाला खायला घालीत नाही. 4तुम्ही दुर्बळांना सबळ
केले नाही. तुम्ही आजारी मेंढ्यांची काळजी घेतली नाही.
जखमींना मलमपट्टी केली नाही. काही मेंढ्या भरकटल्या
पण तुम्ही जाऊन त्यांना परत आणले नाही. तुम्ही त्यांना
शोधायला गेला नाहीत. नाही! तुम्ही फारच दुष्ट आणि

निष्ठुर होता. आणि मेंढ्यांनाही तुम्ही दुष्टपणाने व
निष्ठुरतेनेच वागविण्याचा प्रयत्न केला.
5""आणि कोणीच मेंढपाळ नसल्याने मेंढ्या आता
विखुरल्या आहेत. त्या हिंस्र पशूंचे भक्ष्य झाल्या आहेत,
कारण त्या पसरल्या गेल्या. 6माझा कळप सर्व डोंगरांतून
व सर्व टेकड्यांवरून भटकला, जगाच्या पाठीवरील प्रत्येक
ठिकाणी विखुरला आणि त्याचा शोध घेण्यास कोणीही
नव्हते.'"
7म्हणून, मेंढपाळांनो, परमेश्वराचे म्हणणे ऐका.
परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, 8"मी शपथपूर्वक प्रतिज्ञा
करतो. हिंस्र पशूंनी माझ्या मेंढ्या पकडल्या. खरंच! माझ्या
मेंढ्या वन्य प्राण्यांचे भक्ष्य झाल्या. का? कारण त्यांना
खरा मेंढपाळ नव्हता. माझ्या मेंढपाळांनी माझ्या कळपावर
लक्ष ठेवले नाही. नाही! त्यांनी फक्त मेंढ्या मारल्या व
स्वतःची पोटे भरली. त्यांनी माझ्या कळपाला खाऊ घातले
नाही."
9तेव्हा, मेंढपाळांनो, परमेश्वराचे म्हणणे ऐका.
10परमेश्वर म्हणतो, "मी त्या मेंढपाळांच्याविरुद्ध आहे. मी
माझ्या मेंढ्या त्यांच्याकडून परत मागीन. मी त्यांच्यावर
तोंडसुख घेईन. ह्यापुढे ते माझे मेंढपाळ असणार नाही.
मग ते स्वतःच्या तुंबड्या भरू शकणार नाहीत. आणि
त्यांच्यापासून मी माझ्या कळपाला वाचवीन. मग माझ्या
मेंढ्या त्यांचे भक्ष्य होणार नाहीत."
11परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "मी स्वतःच त्यांचा
मेंढपाळ होईन. मी माझ्या मेंढ्यांचा शोध घेईन. मी त्यांच्यावर
लक्ष ठेवीन. 12मेंढपाळ जर मेंढ्यांबरोबर असेल, तर त्या
भरकटू लागताच, तो त्यांचा शोध घेईल, त्याचप्रमाणे, मी
करीन. मी माझ्या मेंढ्यांना वाचवीन. त्या अंधाऱ्या व
ढगाळ दिवशी, त्या जेथे जेथे विखुरल्या असतील, तेथून
तेथून मी त्यांना परत आणीन. 13त्या त्या राष्ट्रांतून मी
त्यांना परत आणीन. निरनिराळ्या देशांतून मी त्यांना एकत्र
आणीन. मी त्यांना त्यांच्या भूमीत परत आणीन. मी त्यांना
इस्राएलच्या डोंगरांवर, झऱ्यांकाठी आणि लोक राहत
असलेल्या सर्व ठिकाणी चरू देईन. 14मी त्यांना चांगल्या
कुरणांत नेईन. इस्राएलच्या डोंगरावरील उंच ठिकाणी
त्या जातील. तेथे चांगल्या जमिनीवर त्या झोपतील आणि
गवत खातील. इस्राएलच्या डोंगरावरील उत्तम हिरवळीवर
त्या चरतील. 15हो! मी माझ्या कळपाला खायला घालीन.
आणि त्यांना विश्रांतीच्या जागी घेऊन जाईन." परमेश्वर,
माझा प्रभू, असे म्हणाला.
16"हरवलेल्या मेंढ्यांचा मी शोध घेईन. भटकलेल्यांना
मी परत आणीन. जखमी झालेल्या मेंढ्यांना मी मलमपट्टी
करीन. दुर्बलांना मी सबळ करीन. मी त्या लठ्ठ व मत्त
मेंढपाळांचा मात्र नाश करीन. त्यांना योग्य अशीच शिक्षा
मी देईन."
17परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, तू माझ्या
कळपा "मी माझ्या कळपातील मेंढ्या-मेंढ्यात, एडका व
बोकड ह्यांच्यात न्यायनिवाडा करीन. 18सुपीक जमिनीवर
वाढणारे गवत तुम्ही खाऊ शकता. मग इतर मेंढ्यांचे
गवत तुम्ही का चिरडून टाकता? तुम्ही भरपूर शुद्ध पाणी
पिऊ शकता. मग तुम्ही इतरांचे प्यायचे पाणी का ढवळता?
19तुमच्या पावलांनी, चिरडलेले गवत आणि ढवळलेले
पाणी, माझ्या कळपाने प्यायलेच पाहिजे."
20म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, त्यांना म्हणतो, "मी
स्वतः लठ्ठ मेंढी आणि बारीक मेंढी ह्यांच्यात निवाडा
करीन. 21तुम्ही बाजूने व खांद्याने ढकलता. तुमच्या शिंगांनी
तुम्ही दुर्बळ मेंढ्यांना खाली पाडता. तुम्ही, त्यांना ढकलून
दूर घालवून देता. 22म्हणून, मी माझ्या कळपाला वाचवीन.
यापुढे हिंस्र पशू त्यांना पकडणार नाहीत. मी मेंढ्या-मेंढ्यात
न्यायनिवाडा करीन. 23मग मी त्यांच्यावर एक मेंढपाळ
नेमीन. माझा सेवक दावीद, ह्याला मी मेंढपाळ म्हणून
नेमीन. तो त्यांना खायला घालील व त्यांचा मेंढपाळ होईल.
24मग मी, परमेश्वर व प्रभू, त्यांचा देव होईन. माझा
सेवक, दावीद राजा म्हणून त्यांच्यात राहील हे माझे
परमेश्वराचे शब्द आहेत.
25"मी माझ्या मेंढ्यांबरोबर एक शांततेचा करार करीन.
मी अपायकारक प्राण्यांना या भूमीतून दूर करीन. मग
मेंढ्या वाळवंटातही सुरक्षित राहू शकतील आणि रानात
सुरक्षितपणे झोपू शकतील. 26माझ्या टेकडी (यरुशलेम)
भोवतालच्या जागा आणि मेंढ्या ह्यांना मी आशीर्वाद देईन.
योग्य वेळी मी पाऊस पाडीन. ते आशीर्वादांच्या वर्षावात
न्हाऊन निघतील. 27शेतांत वाढणारी झाडे फळतील.
पृथ्वीवर सुगीचा मोसम येईल. त्यामुळे मेंढ्या त्यांच्या देशात
सुरक्षित राहतील. ज्यांच्या मानेवरील जोखड मी तोडून
टाकीन. ज्यांनी त्यांना गुलाम केले, त्यांच्या बळापासून मी
त्यांना वाचवीन. मग त्यांना कळेल की मीच परमेश्वर
आहे. 28यापुढे इतर राष्ट्रांकडून ते प्राण्याप्रमाणे पकडले
जाणार नाहीत. हिंस्र पशू त्यांना खाणार नाहीत. ते सुखरूप
राहतील. त्यांना कोणीही घाबरविणार नाही. 29जी सुंदर
आणि प्रसिद्ध होईल, अशी जमीन मी त्यांना देईन. मग
त्या देशात त्यांची उपासमार होणार नाही. यापुढे इतर
राष्ट्रांकडून त्यांना अपमान सहन करावा लागणार नाही.
30मग त्यांना समजून येईल की मीच त्यांचा परमेश्वर देव
आहे, व मी त्यांच्याबरोबर आहे, इस्राएलच्या लोकांना ती
माझी माणसे आहेत हेही कळेल." परमेश्वर, माझा प्रभू,
असे म्हणाला. 31तुम्ही माझी मेंढरे आहात, माझ्या
कुरणातील मेंढरे आहात. तुम्ही फक्त माणसे आहात आणि
मी तुमचा देव आहे." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

### अदोमबद्दल संदेश

35 मला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. तो म्हणाला,
2"मानवपुत्रा, सेईर पर्वताकडे पाहा, आणि
माझ्यावतीने त्याच्याविरुद्ध बोल. 3त्याला सांग 'परमेश्वर,
माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:

'"सेईर पर्वता, मी तुझ्याविरुद्ध आहे. मी तुला शिक्षा
करीन. मी तुला उजाड करीन.
4तुझ्या गावांचा मी नाश करीन. तू ओसाड होशील.
मग तुला कळून चुकेल की मी परमेश्वर आहे.
5का? कारण तू नेहमीच माझ्या माणसांच्या विरुद्ध
होतास. इस्राएलच्या अखेरच्या शिक्षेच्या वेळी, त्यांच्या
संकटकाळी, तू त्यांच्यावर तलवार चालविलीस."'

6म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "मी शपथपूर्वक
प्रतिज्ञा करतो की मी तुला मृत्युदंड देईन. मृत्यू तुझा
पाठलाग करील. लोकांना ठार करण्यात तुला घृणा वाटली
नाही. म्हणून मृत्यू तुझा पाठलाग करील. 7सेईर
पर्वताला ओसाड, उजाड करीन. त्या गावातून येणाऱ्या
प्रत्येकाला मी ठार करीन. तसेच त्या गावात जाऊ
पाहणाऱ्यालाही मी ठार मारीन. 8त्याचे डोंगर मी मृत
शरीरांनी झाकून टाकीन. टेकड्यांवर, दऱ्यांतून, आणि
घळींतून प्रेते पडतील. 9मी तुला कायमचा ओसाड करीन.
तुझ्या शहरांतून कोणीही राहणार नाही. मग तुला पटेल
की मीच परमेश्वर आहे."
10तू म्हणालास "ती दोन राष्ट्रे (इस्राएल व यहूदा) माझी
होतील आम्ही त्यांना आमच्या मालकीची करू."
पण परमेश्वर तिथे होता. 11आणि तो परमेश्वर, माझा
प्रभू, म्हणतो, "तू माझ्या माणसांचा द्वेष केलास. त्यांच्यावर
रागावलास, म्हणून मी तुझा तिरस्कार करतो. मी
शपथपूर्वक वचन देतो की तू जसे त्यांना दुखावलेस,
तशीच शिक्षा मी तुला करीन. मी तुला शिक्षा करून
लोकांना दाखवून देईन की मी त्यांच्या पाठीशी आहे.
12मग तुलासुद्धा कळेल की मी तू त्यांना उच्चारलेले सर्व
अपमानकारक शब्द ऐकले होते. इस्राएलच्या पर्वताबद्दल
तू खूप वाईट बोललास. तू म्हणालास 'इस्राएलचा नाश
झाला आहे. मी त्याला भक्ष्याप्रमाणे चोखीन.' 13तुला गर्व
झाला होता आणि तू माझ्याविरुद्ध बोललास. तू अनेक
वेळा माझ्याविरुद्ध बोललास, आणि मी खरेच सांगतो की
मी प्रत्येक शब्द ऐकला."
14परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "मी तुझा नाश केल्यावर
सर्व जगाला आनंद होईल. 15इस्राएलचा नाश झाल्यावर
तुला आनंद झाला होता. मी तुलाही अगदी तशीच वागणूक
देईन. सेईर पर्वताचा व संपूर्ण अदोम देशाचा नाश होईल.
मगच तुला समजेल की मी परमेश्वर आहे."

## इस्राएल पुन्हा उभारला जाईल

36 "मानवपुत्रा, माझ्यावतीने इस्राएलमधील पर्वताशी
बोल. त्यांना परमेश्वराचे म्हणणे लक्षपूर्वक
ऐकायला सांग. 2त्यांना सांग की परमेश्वर आणि प्रभू
पुढील गोष्टी सांगतो. 'शत्रू तुमच्याविषयी वाईट बोलताना
सुखावले ते म्हणाले की अरे वा! आता प्राचीन पर्वत
आमचे होतील.'

3"म्हणून माझ्यावतीने इस्राएलमधील पर्वतांशी बोल.
त्यांना सांग की परमेश्वर आणि प्रभू असे सांगतो 'शत्रूने
तुमची शहरे नष्ट केली, सर्व बाजूंनी तुमच्यावर हल्ला
केला. तुम्ही दुसऱ्या राष्ट्रांचे व्हावे म्हणून त्याने असे
केले. मग लोक तुमच्याबद्दल चर्चा करतील. तुमची
निंदानालस्ती करतील."'
4म्हणून, इस्राएलच्या पर्वतांनो, परमेश्वराचे, प्रभूचे,
म्हणणे ऐका. परमेश्वर व प्रभू पर्वत, टेकड्या, झरे, दऱ्या
उजाड भग्नावशेष, आणि सोडून दिलेली शहरे यांना असे
सांगतो की तुमच्या सभोवतालच्या इतर राष्ट्रांकडून तुम्ही
लुबाडले गेलात, त्यांनी तुमची टर उडविली. 5"म्हणून मी
वचन देतो की माझ्या बोलण्यात आवेश असेल. मी अदोम
आणि इतर राष्ट्रांना माझा राग जाणवून देईन. माझी जमीन
त्या लोकांनी स्वत:साठी घेतली, त्या वेळी त्यांना खूप
आनंद झाला. त्यांनी ती फक्त लुटण्यासाठी आणि नाश
करण्यासाठी घेतली."
6"म्हणून, परमेश्वर माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
म्हणून माझ्यावतीने इस्राएल देशाशी बोल. पर्वत, टेकड्या,
झरे आणि दऱ्या ह्यांच्याशी बोल. त्यांना सांग 'परमेश्वर,
माझा प्रभू म्हणतो मी आवेशाने आणि रागाने बोलेन.
का? कारण, इतर राष्ट्रांकडून तुम्हाला अपमान सहन
करावा लागला."'
7म्हणून, परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
"मी वचन देतो की तुमच्या भोवतालच्या राष्ट्रांचीही
अप्रतीष्ठा होईल.
8"पण इस्राएलच्या पर्वतांनो, माझ्या लोकांकरिता इस्राएल
लोकांसाठी तुम्ही झाडे वाढवाल आणि ती फळांनी बहरतील.
माझे लोक लवकरच परत येतील. 9मी तुमच्याबरोबर
आहे. मी तुम्हाला मदत करीन. लोक तुमच्या जमिनीची
मशागत करतील, बी पेरतील. 10तुमच्यावर खूप लोक
राहतील. सर्व इस्राएल लोक तेथे राहतील. शहरे लोकांनी
गजबजतील. नाश झालेली ठिकाणे पुन्हा नव्यासारखी
उभारली जातील. 11मी तुम्हाला खूप लोक व प्राणी देईन.
त्यांची संतती वाढेल पूर्वीप्रमाणे लोक राहू लागतील. मी
तुम्हाला, आरंभी होता त्यापेक्षा, चांगले करीन. मग तुम्हाला
कळेल की मी परमेश्वर आहे. 12हो! मी लोकांना माझ्या
माणसांना, हे इस्राएल तुझ्यावरून चालायला लावीन. ते
तुला स्वीकारतील आणि तू त्यांचा होशील, तू पुन्हा त्यांना
अपत्यहीन करणार नाहीस."
13परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: "इस्राएल
देश, लोक तुझ्याविषयी वाईट बोलतात. ते म्हणतात की
तू तुझ्या लोकांचा नाश केलास, तू मुले दूर नेलीस. 14पण
यापुढे तू लोकांचा नाश करणार नाहीस, मुले दूर नेणार
नाहीस." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला. 15"यापुढे
इतर राष्ट्रांना मी अपमान करू देणार नाही. ते तुझी
अप्रतिष्ठा करणार नाहीत. तू आणखी तुझी मुले गमावणार
नाहीस." परमेश्वर, माझा प्रभू, हे म्हणाला.

## परमेश्वर स्वत:च्या कीर्तीचे रक्षण करील

16मग परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले, तो म्हणाला, 17“मानवपुत्रा, इस्राएलचे लोक त्यांच्या स्वत:च्या देशात राहिले. पण दुष्कृत्ये करून त्यांनी तो देश गलिच्छ केला. रजस्वला स्त्रीप्रमाणे ते मला अशौच होते. 18देशात लोकांना ठार करून त्यांनी त्या भूमीवर रक्त सांडले. त्यांच्या मूर्तींनी देश अमंगळ केला. म्हणून मी त्यांना माझा क्रोध किती आहे ते दाखविले. 19मी त्यांना राष्ट्रा-राष्ट्रांत पसरविले आणि सर्व जगात विखरून टाकले. त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल मी त्यांना अशीच शिक्षा केली. 20ते त्या दुसऱ्या राष्ट्रांत गेले. तेथेही त्यांनी माझे पवित्र नाव धुळीला मिळवले, राष्ट्रे त्यांच्याबद्दल बोलली. ती म्हणाली, ‘हा परमेश्वर आहे तरी कसा? हे परमेश्वराचे लोक आहेत, पण त्यांनी त्याची भूमी सोडली.’

21“इस्राएलच्या लोकांनी माझे पवित्र नाव बदनाम केले. त्याबद्दल मला खेद वाटला. 22म्हणून इस्राएलच्या लोकांना सांग की परमेश्वर, प्रभू पुढील गोष्टी सांगतो ‘इस्राएल लोकानो, तुम्ही जेथे जेथे गेलात, तेथे तेथे तुम्ही माझे पवित्र नाव बदनाम केलेत. हे थांबविण्यासाठी मी काहीतरी करीन. ते मी तुमच्यासाठी म्हणून करणार नाही, तर माझ्या पवित्र नावासाठी करीन. 23मी त्या मोठ्या राष्ट्रांना दाखवून देईन की माझे नाव खरोखरच पवित्र आहे. तुम्ही त्या राष्ट्रांत माझ्या पवित्र नावाला कलंक लावलात. पण मी पवित्र आहे. हे मी तुम्हाला दाखवून देईन. मग त्या राष्ट्रांना, मी परमेश्वर असल्याचे, समजेल.’” परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

24देव म्हणाला, “मी तुम्हाला त्या राष्ट्रांतून बाहेर काढून एकत्र करीन आणि तुमच्या देशात तुम्हाला परत आणीन. 25मग तुमच्यावर शुद्ध पाणी शिंपडून मी तुम्हाला शुद्ध करीन. तुमची घाण मी धुवून काढीन. त्या ओंगळ मूर्तीचीही घाण मी धुवून काढीन आणि तुम्हाला शुद्ध करीन.”

26देव म्हणाला, “मी तुमच्यात नवीन आत्मा घालून नवे हृदय बसवीन तुमचे दगडाचे हृदय बदलून त्या जागी माणसाचे कोमल हृदय बसवीन. 27मी माझा आत्मा तुम्हाला देईन. मग तुम्ही बदलाल व माझे नियम पाळाल. काळजीपूर्वक माझ्या आज्ञा पाळाल. 28मग तुम्ही, मी तुमच्या पूर्वजांना दिलेल्या, देशात राहाल. तुम्ही माझे व्हाल व मी तुमचा देव होईन.”

29देव पुढे म्हणाला, “तसेच, मी तुमचे रक्षण करीन व तुम्हाला अपवित्र होऊ देणार नाही. मी पिकांना वाढायची आज्ञा देईन व तुमच्यावर उपासमारीची वेळ येऊ देणार नाही. 30मी तुमच्या फळबागाचे आणि शेतांचे उत्पादन वाढवीन मग तुम्हाला कधीही परक्या देशात भुकेने व्याकूळ होऊन लज्जित व्हावे लागणार नाही. 31तुम्ही केलेल्या वाईट गोष्टी तुम्हाला आठवतील. त्या गोष्टी चांगल्या नव्हत्या, हे तुम्हाला स्मरेल. मग तुम्ही केलेल्या पापाबद्दल आणि भयानक कृत्यांबद्दल स्वत:चाच तिरस्कार कराल.”

32परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, “तुम्ही पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्या असे मला वाटते. तुमच्या भल्याकरिता मी ह्या गोष्टी करीत नाही. मी माझ्या नावाकरिता त्या करीत आहे. म्हणून इस्राएल लोकांनो, तुम्ही ज्या तऱ्हेने जगलात, त्याची तुम्हाला लाज वाटली पाहिजे, तुम्ही ओशाळे झाले पाहिजे.”

33परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, “ज्या दिवशी मी तुमची पापे धूवून काढीन, त्या दिवशी मी लोकांना गावांत परत आणीन. विद्ध्वंस झालेली गावे पुन्हा वसविली जातील. 34जी भूमी, तिच्या जवळून जाणाऱ्या प्रत्येकाला, भग्नावशेषांच्या ढिगाप्रमाणे दिसत होती, तीच मशागत केल्याप्रमाणे दिसेल. 35वाटसरू म्हणतील, ‘पूर्वी, ह्या प्रदेशाचा विद्ध्वंस झाला. पण आता तोच एदेनच्या बागेप्रमाणे झाला आहे. शहरांचा नाश झाला. ती उद्ध्वस्त व ओसाड झाली. पण आता ती सुरक्षित आहेत आणि त्यांत लोकांनी वस्ती केली आहे.’”

36देव म्हणाला, “मग तुमच्या सभोवतालच्या राष्ट्रांना कळेल की मीच परमेश्वर आहे आणि मीच नष्ट झालेली ठिकाणे पुन्हा उभारली. ओसाड जमिनीत मी पेरणी केली. मी परमेश्वर आहे. मी हे बोललो, ते मी घडवून आणीन.”

37परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, “इस्राएलचे लोक मला त्यांच्याकरिता पुढील गोष्टी करण्यास सांगतील: त्यांची संख्या मी पुष्कळ मोठी करावी. त्यांना मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे करावे. 38यरुशलेमच्या खास सणांमध्ये असतात त्याप्रमाणे पवित्र मेंढ्या व बोकडांच्या पुष्कळ कळपांप्रमाणे पुष्कळ लोक तेथे राहतील. गावे व नष्ट झालेल्या जागा लोकांनी गजबजून जातील. मग त्यांना, मी देव आहे हे कळेल.”

## सुक्या हाडांचा दृष्टान्त

37 परमेश्वराचे सामर्थ्य माझ्यावर आले. परमेश्वराच्या आत्म्याने मला गावातून उचलून दरीच्या मध्यभागी आणून ठेवले. ती दरी मृतांच्या हाडांनी भरलेली होती. 2दरीत जमिनीवर पुष्कळ हाडे पडलेली होती. त्यामधून परमेश्वराने मला चालायला लावले. ती हाडे अगदी सुकलेली असल्याचे मी पाहिले.

3मग, परमेश्वर, माझा प्रभू, मला म्हणाला, “मानवपुत्रा, ही हाडे जिवंत होऊ शकतील का?”

मी उत्तरलो, “परमेश्वर देवा, ह्याचे उत्तर फक्त तुलाच माहीत आहे.”

4परमेश्वर, माझा प्रभू, मला म्हणाला, “माझ्यावतीने त्या हाडांशी बोल. त्यांना सांग ‘सुक्या हाडांनो, परमेश्वराचे म्हणणे ऐका. 5परमेश्वर, माझा प्रभू, तुम्हाला पुढील गोष्टी सांगतो: मी तुमच्यात प्राण निर्माण करीन मग तुम्ही जिवंत व्हाल. 6मी तुमच्यावर स्नायू आणि मांस चढवीन आणि

त्यावर कातडे ओढीन. मग तुमच्यात प्राण ओतीन. म्हणजे तुम्ही पुन्हा जिवंत व्हाल. मग तुम्हाला समजून चुकेल की मीच परमेश्वर व प्रभू आहे.'"

7मग मी परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे, त्याच्यावतीने हाडांशी बोललो. माझे बोलणे सुरू असतानाच, मला मोठा आवाज ऐकू आला. हाडांचा खुळखुळाट झाला. ती एकमेकांना जोडली गेली. 8माझ्या डोळ्यासमोर हाडांवर स्नायू, मांस व कातडे चढले. पण ती शरीरे हालली नाहीत. कारण त्यांत प्राण नव्हता.

9मग परमेश्वर, माझा प्रभू, मला म्हणाला, "माझ्यावतीने वाऱ्याशी बोल. त्याला पुढील गोष्टी माझ्यावतीने सांग: 'सर्व बाजूंनी येऊन तू ह्या शरीरात स्पंदन निर्माण कर त्यांच्यात प्राण घाल, म्हणजे ती पुन्हा जिवंत होतील.'"

10मग मी परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे वाऱ्याशी बोललो. मग मृत शरीरांत जीव आला. ती जिवंत होऊन उभी राहिली ते पुष्कळ लोक होते. ते मोठे सैन्यच होते.

11मग परमेश्वर, माझा प्रभू, मला म्हणाला, "मानवपुत्रा, ही हाडे म्हणजे जणू काही सर्व इस्राएली कुळच आहे. इस्राएलचे लोक म्हणतात, 'आमची हाडे सुकून गेली आहेत.* आम्हाला आशा राहिलेली नाही. आमचा संपूर्ण नाश झाला आहे.' 12म्हणून त्यांच्याशी माझ्यावतीने बोल. त्यांना सांग की परमेश्वर, माझा प्रभू म्हणतो 'माझ्या माणसांनो, मी कबरी उघडून तुम्हाला कबरीतून बाहेर काढीन. मग मी तुम्हाला इस्राएलच्या भूमीत आणीन. 13माझ्या माणसांनो, मी कबरी उघडून तुम्हाला त्यातून बाहेर काढल्यावर त्यांना कळेल की मीच परमेश्वर आहे. 14मी तुमच्यात माझा आत्मा* ओतीन. म्हणजे मग तुम्ही पुन्हा जिवंत व्हाल. मग मी तुम्हाला तुमच्या देशात परत आणीन. मगच तुम्हाला मी परमेश्वर असल्याचे कळेल. मी सांगितलेल्या गोष्टी मी घडवून आणल्या, हे ही तुमच्या लक्षात येईल.'" परमेश्वरच हे सर्व बोलला.

## यहुदा व इस्राएल यांचे एकीकरण

15मला परमेश्वराचे शब्द पुन्हा ऐकू आले. तो म्हणाला, 16"मानवपुत्रा, एक काठी घे आणि तिच्यावर पुढील संदेश लिही. 'ही काठी यहूदा आणि त्याचे मित्र* इस्राएलचे लोक यांच्या मालकीची आहे.' मग दुसरी काठी घेऊन तिच्यावर लिही 'ही एफ्राईमची काठी योसेफ व त्याचे मित्र इस्राएलचे लोक यांच्या मालकीची आहे.' 17मग त्या दोन काठ्या एकत्र जोड. तुझ्या हातांत ती एकच काठी असेल.

18"तुझे लोक तुला ह्याचा अर्थ विचारतील. 19त्यांना सांग की परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: 'मी एफ्राईमच्या आणि त्याच्या मित्रांच्या म्हणजेच इस्राएलच्या लोकांच्या हातांत असलेली योसेफाची काठी घेईन. मग ती मी यहुदाच्या काठीबरोबर ठेवीन. माझ्या हातांत त्या दोन काठ्यांची एकच काठी होईल.'

20"त्या काठ्या हातांत तुझ्या पुढे धर. त्यांच्यावर तू नांवे लिहिली आहेस. 21लोकांना सांग की परमेश्वर, माझा प्रभू पुढील गोष्टी सांगतो: 'इस्राएल लोक वेगवेगळ्या राष्ट्रांत गेले आहेत. तेथून त्यांना मी बाहेर काढीन. मी त्यांना सगळीकडून आणून, एकत्र गोळा करीन आणि त्यांना त्यांच्या देशात परत आणीन. 22इस्राएलच्या पर्वतीय क्षेत्रात मी त्यांचे एकच राष्ट्र करीन. त्या सर्वांचा मिळून एकच राजा असेल. यापुढे ती वेगवेगळी दोन राष्ट्रे असणार नाहीत, त्याचे दोन राज्यात विभाजन होणार नाही. 23ते यापुढे स्वत:ला त्या मूर्ती मुळे वा पुतळ्यांमुळे अमंगळ करून घेणार नाहीत. तसेच इतर अपराध करून ते अमंगळ होणार नाहीत. त्यांनी पापे केलेल्या सर्व ठिकाणापासून मी त्यांना सुरक्षित ठेवीन. त्यांना धुवून शुद्ध करीन. मग ते माझे होतील व मी त्यांचा देव होईन.

24"'माझा सेवक, दावीद, हा त्यांचा राजा होईल. त्या सर्वांना मिळून एकच मेंढपाळ असेल. ते माझ्या नियमाप्रमाणे वागतील आणि माझ्या कायद्यांचे पालन करतील. मी त्यांना करायला सांगितलेल्या गोष्टी ते करतील. 25माझा सेवक, याकोब, याला मी दिलेल्या भूमीवर ते राहतील. तुमचे पूर्वज तेथेच राहात होते. आता माझी माणसे तेथे राहतील. ते, त्यांची मुले, नातवंडे कायमची तेथे राहतील. दावीद हा माझा सेवक त्यांचा कायमचा नेता असेल. 26मी त्यांच्याबरोबर शांतता करार करीन. तो करार कायमस्वरूपी असेल. मी त्यांना त्यांची जमीन देण्यास, त्यांची संख्या वाढवून देण्यास, त्यांच्या तेथेच कायमचे माझे पवित्र स्थान ठेवण्यास कबूल आहे. 27त्यांच्यामध्येच माझा पवित्र तंबू असेल. हो! मी त्यांचा देव असेल व ते माझे लोक असतील. 28मग इतर राष्ट्रांना कळून येईल की मी परमेश्वर आहे आणि इस्राएलमध्ये चिरंतन असे माझे पवित्र स्थान करून त्या लोकांना मी माझी कायमची खास माणसे बनविली आहेत.'"

## गोगबद्दल संदेश

38 परमेश्वराचे शब्द मला ऐकू आले तो म्हणाला,
2"मानवपुत्रा, मागोगमधील गोगकडे बघ मेशेखचा व तुबालचा तो अती महत्वाचा नेता आहे. माझ्यावतीने गोगविरुद्ध बोल. 3त्याला सांग की परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, 'गोग तू मेशेख व तुबाल यांचा अती महत्वाचा नेता आहेस. पण मी तुझ्याविरुद्ध आहे. 4मी तुला पकडीन

---

**आमची ... आहेत** असी म्हणण्याची पद्धत अर्थ असा, की "आमच्यात बळ राहिले नाही."

**माझा आत्मा** चैतन्य आत्मा, तेज.

**मित्र** येथे शब्दांचा खेळ आहे. ह्यासाठी असलेल्या हिब्रू शब्दाचा अर्थ "एकत्र येत आहेत."

आणि परत आणीन. तुझ्या सैन्यातील सर्व माणसांना मी
परत आणीन. घोडे व सर्व घोडेस्वार यांनाही मी परत
आणीन. मी तुम्हाला सर्वांना वेसण घालून परत आणीन.
सर्व सैनिकांनी गणवेश घातलेले असतील आणि ढाली व
तलवारी घेतलेल्या असतील. 5पारस, कूश व पुट ह्यांचे
सैनिकही त्यांच्याबरोबर असतील. त्यांच्याजवळ ढाली
असतील आणि त्यांनी शिरस्त्राणे घातलेली असतील.
6त्याचप्रमाणे गोमर आणि अती उत्तरेचा देश तोगार्मा हेही
आपापल्या सैनिकांबरोबर असतील. त्या कैद्यांच्या
संचलनात प्रचंड संख्येने लोक असतील.

7"'सज्ज व्हा! हो! तुम्ही स्वत: आणि तुम्हाला येऊन
मिळालेली सैन्य ह्यांनी तयार राहा. तुम्ही लक्ष ठेवा आणि
हुशार राहा. 8पुष्कळ काळानंतर तुम्हाला कामाकरिता
बोलविण्यात येईल. पुढील काळात युद्धातून तरलेल्या
प्रदेशात, तुम्ही याल. ह्या प्रदेशातील लोकांना पुष्कळ
वेगवेगळ्या राष्ट्रांतून गोळा केले जाईल. आणि इस्राएलच्या
पर्वताकडे परत आणले जाईल. पूर्वी इस्राएलच्या पर्वतांचा
पुन्हा पुन्हा नाश केला गेला. पण हे लोक इतर राष्ट्रांतून
परत येतील. ते सर्वच्या सर्व सुरक्षित राहतील. 9पण तू
त्यांच्यावर चढाई करण्यासाठी येशील. तू वादळासारखा
येशील. सर्व देशाला व्यापणाऱ्या, गडगडाट करणाऱ्या
ढगासारखा तू येशील, तू आणि तुझ्याबरोबरचे इतर राष्ट्रांचे
सैन्य ह्या लोकांवर हल्ला करण्यासाठी याल.'"

10परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, "त्या
वेळी तुझ्या मनात एक कल्पना येईल तू एक दुष्ट बेत
आखू लागशील. 11तू म्हणशील, 'तटबंदी नसलेल्या
शहरांच्या देशावर (इस्राएलवर) मी हल्ला करीन. ते
लोक शांतीने राहतात. त्यांना ते सुरक्षित आहेत. असे
वाटते. त्यांचे रक्षण करण्यास गावांभोवती तट नाही. त्यांच्या
वेशींना अडसर नाहीत. खरे म्हणजे त्यांना वेसच नाही.
12मी त्या लोकांचा पराभव करून, त्यांची मौल्यवान संपत्ती
लुटीन. पूर्वी नाश झालेल्या, पण आता लोक राहात
असलेल्या स्थानांशी मी लढेन. इतर राष्ट्रांतून गोळा
झालेल्या लोकांशी (इस्राएलशी) मी लढेन. आता
त्यांच्याजवळ गुरेढोरे व मालमत्ता आहे. ते जगाच्या
चौकात रहातात. शक्तिशाली देशांना इतर शक्तिशाली
देशांकडे जाण्यासाठी त्या प्रदेशातून प्रवास करावाच
लागतो.'

13"शबा, ददान, तार्शीशचे व्यापारी आणि त्यांच्याबरोबर
व्यापार करणारी सर्व गावे तुला विचारतील 'तू मौल्यवान
वस्तू हस्तगत करण्यास आलास का? चांगल्या गोष्टी
बळकावण्यासाठी व सोने, चांदी, गुरेढोरे आणि मालमत्ता
लुटून नेण्यासाठी तू आपल्या सैन्याच्या जथ्याला घेऊन
आला आहेस का? सर्व अमूल्य वस्तू घेण्यासाठी तू आला
आहेस का?'"

14देव म्हणाला, "मानवपुत्रा, माझ्यावतीने गोगशी बोल.
त्याला सांग की परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
'माझे लोक शांतीने व सुरक्षीत राहात असतील, तेव्हा तू
त्यांच्यावर चढाई करण्यासाठी येशील. 15तू तुझ्या अगदी
उत्तरेकडच्या प्रदेशातून येशील. तू तुझ्याबरोबर खूप लोक
आणशील. ते सर्व घोड्यांवर स्वार होऊन येतील. तुझे
सैन्य मोठे व शक्तिशाली असेल. 16"तू माझ्या लोकांशी,
इस्राएलशी, लढण्यास येशील. तू देशाला व्यापणाऱ्या व
प्रचंड गर्जना करणाऱ्या ढगाप्रमाणे येशील. शेवटच्या
दिवसांत माझ्या देशाशी लढण्यासाठी मी तुला आणीन.
मग, गोग, राष्ट्रांना माझे सामर्थ्य कळून येईल. ते मला
मान देतील. त्यांना कळून चुकेल की मी पवित्र आहे. मी
तुला काय करील ते ते पाहातील.'"

17परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, "त्या
वेळी, मी पूर्वी जे तुझ्याजवळ बोललो होतो, ते लोकांना
आठवेल. मी माझ्या सेवकांचा, इस्राएलच्या संदेष्ट्यांचा
उपयोग केला हेही त्यांना आठवेल 'मी तुला त्यांच्याविरुद्ध
लढण्यासाठी आणीन. असे इस्राएलच्या संदेष्ट्यांनी,
माझ्यावतीने, पूर्वीच सांगितल्याचे त्यांना स्मरेल."

18परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला, "त्या वेळी गोग
इस्राएलच्या विरुद्ध लढण्यास येईल आणि मी माझा क्रोध
प्रकट करीन. 19माझ्या रागाच्या भरात आवेशाने मी पुढील
वचन देत आहे. इस्राएलमध्ये मोठे भूकंप होतील. 20त्या
वेळी सर्व सजीव भीतीने कापतील. समुद्रातील मासे, हवेत
भराऱ्या मारणारे पक्षी, रानातील हिंस्र प्राणी आणि
जमिनीवर सरपटणारे सर्व छोटे जीव आणि सर्व माणसे
ह्यांच्या भीतीने थरकाप उडेल. पर्वत व कडे कोसळतील.
प्रत्येक भिंत जमीनदोस्त होईल."

21परमेश्वर, माझा प्रभू, म्हणतो, "इस्राएलच्या पर्वतावर,
गोगविरुद्ध मी सर्व प्रकारचे भय आणीन*. त्याचे
सैनिक भीतीने एवढे गर्भगळीत होतील की ते
एकमेकांवरच तलवारीने हल्ले करून एकमेकांना
मारतील. 22मी रोगराई व मृत्यू ह्याद्वारे गोगला शिक्षा
करीन. गोग व पुष्कळ राष्ट्रांतून गोळा झालेल्या त्याच्या
सैन्यावर गारा, आग व गंधक ह्यांचा वर्षाव करीन. 23मग
मी किती थोर आहे ते दाखवीन. मी पवित्र आहे हे सिद्ध
करीन. पुष्कळ राष्ट्रे माझी कृत्ये पाहतील व मग त्यांना
'मी कोण आहे' हे कळून येईल. मग त्यांना पटेल की
मीच देव आहे."

## गोगचा आणि त्याच्या सैन्याचा मृत्यू

39 "मानवपुत्रा, माझ्यावतीने गोगच्याविरुद्ध बोल.
त्याला, परमेश्वर, प्रभू, पुढील गोष्टी सांगतो म्हणून
सांग: 'गोग, मेशेख आणि तुबाल यांचा तू सर्वांत महत्वाचा
नेता आहेस पण मी तुझ्याविरुद्ध आहे. 2मी तुला पकडून

---

**मी … आणीन** हे प्राचीन ग्रीक अनुवादातून घेतलेले आहे. हिब्रूमध्ये "मी तलवार आणीन."

परत आणीन. अती उत्तरेकडून मी तुला परत आणीन.
इम्राएलच्या पर्वतांशी लढण्यासाठी मी तुला परत आणीन.
3पण मी तुझ्या डाव्या हातातील धनुष्य व उजव्या हातातील
बाण खाली पाडीन. 4तू इम्राएलच्या पर्वतांत मारला जाशील.
लढाईत तू, तुझे सैन्य आणि तुझ्याबरोबरची राष्ट्रे यांना
ठार मारले जाईल. मी तुला मांसभक्षक पक्ष्यांचे व हिंस्र
प्राण्याचे भक्ष्य करीन. 5तू गावात प्रवेश करणार नाहीस.
मी सांगतो, बाहेरच्या मोकळ्या रानात तुला ठार मारले
जाईल.'" परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

6देव म्हणाला, "मागोगमध्ये व किनाऱ्यावर सुरक्षितपणे
राहणाऱ्या लोकांमध्ये मी आग लावीन. मग त्यांना 'मी
परमेश्वर आहे' हे समजेल. 7इम्राएलच्या माझ्या लोकांना
मी माझे पवित्र नाव माहीत करून देईन. यापुढे मी लोकांना
माझ्या पवित्र नावाला बट्टा लावू देणार नाही. राष्ट्रांना
कळेल की मीच परमेश्वर आहे, मीच इम्राएलमधील
एकमेव पवित्र आहे. 8ती वेळ येत आहे! ते घडेलच!"
परमेश्वर असे म्हणाला, "त्याच दिवसाबद्दल मी बोलत
आहे.

9"तेव्हा इम्राएलच्या गावांत राहणारे लोक त्या रानांत
जातील. ते शत्रूची शस्त्रे गोळा करून जाळतील. ते सर्व
ढाली, धनुष्य बाण, दंड व भाले जाळतील. ते ह्या शस्त्रांचा
उपयोग सरपण म्हणून सात वर्षे करतील. 10त्यामुळे त्यांना
सरपण गोळा करावे लागणार नाही वा जंगलांत लाकडे
तोडावी लागणार नाहीत. कारण ते शस्त्रांचा उपयोग
सरपणाप्रमाणे करतील. त्यांना लुटू पाहणाऱ्या
सैनिकांकडूनच ते मौल्यवान वस्तू काढून घेतील.
त्यांच्याकडून चांगल्या गोष्टी बळकावू पाहणाऱ्या
सैनिकांकडूनच ते अशा गोष्टी घेतील." परमेश्वर, माझा
प्रभू, असे म्हणाला.

11देव म्हणाला, "तेव्हा मी गोगला पुरण्यासाठी
इम्राएलमधील एक जागा निवडीन. मृत समुद्राच्या
पूर्वेकडील, वाटसरूंच्या दरीत गोगला पुरले जाईल. मग
प्रवाशांचा रस्ता अडेल. का? कारण त्या ठिकाणी गोग व
त्याच्या सैन्याला पुरले जाईल. लोक त्या जागेला 'गोगच्या
सैन्याची दरी' असे म्हणतील. 12भूमी शुद्ध करण्यासाठी,
इम्राएलच्या लोकांना, सात महिने त्यांना पुरावे लागेल.
13सामान्य लोक त्या शत्रू सैनिकांना पुरतील. मी ज्या
दिवशी गौरविला जाईन, त्या दिवशी इम्राएलच्या लोकांची
कीर्ती होईल." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

14देव म्हणाला, "त्या मेलेल्या सैनिकांना पुरण्यासाठी,
कामगारांना, पूर्ण वेळचे काम द्यावे लागेल. अशा रीतीने,
ते देशाला शुद्ध करतील. त्या कामगारांना सात महिने
काम करावे लागेल. ते भोवताली प्रेतांचा शोध घेतील.
15ते सभोवती पाहात जातील. त्यांच्यातील एखाद्याला
एखादे हाड दिसताच, तो तेथे खूण करून ठेवेल. कबर
खणणारे येऊन त्या हाडाला गोगच्या सैन्याच्या दरी'त
पुरेपर्यंत ती खूण तेथेच राहील. 16मृतांच्या त्या गावाला
हमोना* असे नाव दिले जाईल. अशा प्रकारे ते देश शुद्ध
करतील."

17परमेश्वर, मझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो, "मानवपुत्रा
माझ्यावतीने सर्व पक्ष्यांशी व हिंस्र प्राण्याशी बोल. त्यांना
सांग 'इकडे या! इकडे या! भोवताली गोळा व्हा. मी
तुमच्यासाठी देत असलेला बळी खा. इम्राएलच्या पर्वतांवर
फार मोठा बळी दिला जाईल. या मांस खा व रक्त प्या.
18शक्तिशाली सैनिकांचे मांस तुम्ही खाल. जागतिक नेत्यांचे
रक्त तुम्ही प्याल. ते एडके, मेंढ्या, बोकड व बाशानमधील
पुष्ट बैलांसारखे आहेत. 19तुम्हाला हवी तेवढी चरबी
तुम्ही खाऊ शकाल. पोट भरेपर्यंत रक्त तुम्ही प्याल.
तुम्ही मी मारलेल्या बळीला खाल व त्याचे रक्त प्याल.
20माझ्या टेबलावर तुम्हाला खाण्यासाठी भरपूर मांस असेल.
तेथे घोडे, सारथी, शक्तिशाली सैनिक आणि इतर लढवय्ये
असतील.'" परमेश्वराने, माझ्या प्रभूने, ह्या गोष्टी
सांगितल्या. 21देव म्हणाला, "मी जे केले, ते इतर राष्ट्रांना
पाहू देईन. मग ती राष्ट्रे मला मान द्यायला लागतील. त्या
शत्रूविरुद्ध वापरलेले माझे सामर्थ्य ते पाहतील. 22मग त्या
दिवसापासून, इम्राएलच्या लोकांना मीच त्यांचा परमेश्वर
देव असल्याचे समजून येईल. 23आणि इम्राएलच्या लोकांना
कैदी म्हणून इतर देशांत का नेले गेले, हेही इतर राष्ट्रांना
कळेल. त्यांना समजेल की माझी माणसेच माझ्याविरुद्ध
गेली. म्हणून मी त्यांच्याकडे पाठ फिरविली. त्यांच्या शत्रूंना
त्यांचा पराभव करू दिला. म्हणून माझे लोक लढाईत
मारले गेले. 24त्यांनी पाप केले व स्वत:ला अमंगळ करून
घेतले. म्हणून त्यांनी केलेल्या कर्माबद्दल मी त्यांना शिक्षा
केली. मी त्यांच्याकडे पाठ फिरविली आणि त्यांना मदत
करण्याचे नाकारले."

25म्हणून परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो,
"याकोबच्या लोकांना कैदेतून परत आणीन. इम्राएलच्या
सर्व लोकांवर मी दया करीन. माझ्या पवित्र नावाबद्दल
आवेशाने भावना प्रकट करीन. 26पूर्वी माझ्या विरुद्ध
केलेल्या दुष्टाव्याची लोकांना लाज वाटेल. ते माझ्याविरुद्ध
गेले ते सर्व विसरतील. ते त्यांच्या देशात सुरक्षितपणे
राहतील. त्यांना कोणीही घाबरविणार नाही. 27इतर
देशांतून मी माझ्या माणसांना परत आणीन. त्यांच्या
शत्रूंच्या देशांतून त्यांना गोळा करीन. मग मी किती
पवित्र आहे ते इतर पुष्कळ राष्ट्रांना कळेल. 28त्यांना
कळेल की मीच त्यांचा परमेश्वर आहे. का? कारण
मीच त्यांना कैदी म्हणून दुसऱ्या देशांत जायला भाग
पाडले आणि मीच त्याना एकत्र गोळा करून त्यांच्या
देशात परत आणले. 29इम्राएलच्या लोकांमध्ये मी माझा
आत्मा ओतीन आणि त्या नंतर मी कधीच माझ्या
लोकांपासून दूर जाणार नाही." परमेश्वराने, माझ्या प्रभूने,
ह्या गोष्टी सांगितल्या.

---

**हमोना** हिब्रू शब्दाचा अर्थ "गर्दी."

## नवे मंदिर

40 आमच्या परागंदा होण्याच्या काळातील
पंचविसाव्या वर्षाच्या आरंभाला (ऑक्टोंबरमध्ये)
महिन्याच्या दहाव्या दिवशी परमेश्वराचे सामर्थ्य माझ्यावर
आले. चौदा वर्षापूर्वी ह्याच दिवशी खास्द्यांनी यरुशलेम
हस्तगत केले होते. दृष्टान्तात परमेश्वराने मला तेथे नेले.
2दृष्टान्तात देवाने मला इस्राएल देशात नेले. मला त्याने
खूप उंच पर्वताजवळ ठेवले. त्या पर्वतावर गावासारखे
दिसणारे बांधकाम होते. ते दक्षिणेकडे होते. 3परमेश्वराने
मला तेथे आणले. तेथे एक माणूस होता. तो चकाकी
दिलेल्या काशाप्रमाणे होता. त्याच्या हातात मोजमापाची
सुती पट्टी व मापदंड होता. तो प्रवेशद्वाराजवळ उभा होता.
4तो माणूस मला म्हणाला, “मानवपुत्रा, तुझ्या डोळ्यांचा व
कानांचा उपयोग कर. ह्या गोष्टी पाहा आणि माझे म्हणणे
ऐक. मी दाखवीत असलेली प्रत्येक गोष्ट लक्षपूर्वक पाहा.
का? कारण ह्या गोष्टी मी तुला दाखविण्यासाठीच तुला
येथे आणले आहे. येथे पाहिलेले सर्व काही तू इस्राएलच्या
लोकांना सांगितले पाहिजेस.”
5मंदिरच्या सभोवतीची भिंत मी पाहिली. त्या माणसाच्या
हातात मोजपट्टी होती. ती सहा हात* (10 फूट 6 इंच)
लांब होती. मग त्याने त्या भिंतीची जाडी मोजली. ती एक
पट्टी (10 फूट 6 इंच) भरली. मग त्या माणसाने भिंतीची
उंची मोजली. ती एक पट्टी (10 फूट 6 इंच) भरली.
6मग तो माणूस पूर्वेच्या दाराजवळ गेला. तो पायऱ्या
चढला व त्याने दाराचा उंबरठा मोजला. तो एक पट्टी (10
फूट 6 इंच) रूंद होता. दुसरा उंबराही तेवढाच रूंद होता.
7चौकीदाराची खोली एक पट्टी (10 फूट 6 इंच) लांब व
एक पट्टी (10 फूट 6 इंच) रूद होती. दोन खोल्यांमधील
जागा 5 हात (8 फूट 9 इंच) होती. मंदिरासमोरच्या
प्रवेशद्वाराच्या द्वारमंडपाच्या दाराची रूंदी एक पट्टी होती.
8मग त्या माणसाने द्वारमंडप मोजला. 9तो 8 हात लांब
भरला. मग त्याने दाराच्या दोन्ही बाजूच्या भिंती मोजल्या.
प्रत्येक भिंत दोन हात (3 फूट 6 इंच) रुद होती. मंदिराच्या
समोरच्या प्रवेशद्वाराच्या शेवटी द्वारमंडप होता. 10दाराच्या
प्रत्येक बाजूला तीन लहान खोल्या होत्या. त्या सारख्या
मापाच्या होत्या. दोन्ही बाजूच्या दाराच्या बाजूच्या भिंती
सारख्या मापाच्या होत्या. 11त्या माणसाने दरवाजांची रूंदी
भरली. ते 10 हात आणि 13 हात लांब होती. 12प्रत्येक
खोलीसमोर एक बुटकी भिंत होती. ती एक हात (1फूट
6 इंच) उंच आणि 1 हात (1 फूट 6 इंच) जाड होती.
खोल्यांची प्रत्येक बाजू 6 हात (10 फूट 6 इंच) लांब
होती.
13माणसाने एका खोलीच्या छतापासून दुसऱ्या खोलीच्या
छतापर्यंतचे दाराचे मोजमाप केले. प्रत्येक दार दुसऱ्या
दाराच्या बरोबर समोर होते. ते एका दारापासून दुसऱ्या
दारापर्यंत 25 हात (43 फूट 9 इंच) भरले. 14त्या माणसाने
बाजूच्या भिंतीचे क्षेत्रफळ काढले. ह्यामध्ये पटांगणातील
द्वारमंडपाच्या बाजूच्या भिंतींचाही समावेश होता. एकंदर
क्षेत्रफळ साठ हात होते. 15द्वारमंडप बाहेरच्या बाजूपासून
आतल्या बाजूपर्यंत 50 हात (87 फूट 6 इंच) होता.
16चौकीदाराच्या खोल्या, बाजूच्या भिंती आणि द्वारमंडप
ह्यांच्यावर लहान लहान खिडक्या होत्या. खिडक्यांचा रूद
भाग प्रवेशद्वाराकडे होता. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूच्या
भिंतींवर खजुराची झाडे कोरलेली होती.

## बाहेरचे पटांगण

17मग त्या माणसाने मला बाहेरच्या पटांगणात आणले.
तेथे पटांगणाच्या सर्व बाजूंना खोल्या व फरसबंदी होती.
फरसबंदीपुढे तीस खोल्या होत्या. 18फरसबंदी दारांच्या
लांबी इतकीच रूंद होती. ती प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूच्या
शेवटापर्यंत होती. ही खालची फरसबंदी होय. 19मग त्या
माणसाने खालच्या दाराच्या आतील बाजूपासून पटांगणाच्या
बाहेरच्या भिंतीपर्यंतचे माप घेतले. ते 100 हात (175
फूट) पूर्वेला आणि 100 हात उत्तरेला असे भरले.
20बाहेरच्या पटांगणाच्या उत्तरेकडे तोंड असलेल्या
दाराची लांबी व रूंदीही त्या माणसाने मोजली. 21हे द्वार
त्याच्या प्रत्येक बाजूला असलेल्या तीन तीन खोल्या आणि
त्याचा द्वारमंडप ह्यांची मापे पहिल्या प्रवेशद्वाराएवढीच होती.
द्वार 50 हात लांब व 25 हात रूंद होते. 22पूर्वेकडे तोंड
असलेल्या द्वाराच्या खिडक्यांच्या, द्वारमंडपाच्या मापाच्याच
ह्या द्वाराच्या खिडक्या व द्वारमंडप होता. खजुरीच्या झाडांचे
नक्षीकामही अगदी तसेच होते. द्वाराला सात पायऱ्या होत्या
व द्वारमंडप आतल्या बाजूला होता. 23आतल्या पटांगणाला
उत्तरेच्या बाजूकडील दारासमोर एक दार होते. ते पूर्वेच्या
दाराप्रमाणे होते. त्या माणसाने एका दारापासून दुसऱ्या
दारापर्यंतचे अंतर मोजले. ते 100 हात (175 फूट) होते.
24मग त्या माणसाने मला दक्षिणेकडे नेले. तेथे मला
एक दार दिसले. त्या माणसाने त्या दाराच्या बाजूच्या भिंती
व द्वारमंडप ह्यांचे मोजमाप घेतले. ते इतर दारांच्या
खांबांप्रमाणे व द्वारमंडपांप्रमाणेच भरले. 25दार, त्याचा
द्वारमंडप ह्यांना इतर दारांप्रमाणेच खिडक्या होत्या. दार
50 हात लांब व 25 हात रूंद होते. 26दारापर्यंत सात
पायऱ्या होत्या. त्याचा द्वारमंडप आतल्या बाजूला होता.
त्याच्या भिंतींवर प्रत्येक बाजूला एक खजुरीचे झाड
कोरलेले होते. 27आतल्या पटांगणाच्या दक्षिणेला एक दार
होते. दक्षिणेकडील दारांमधील अंतर त्या माणसाने मोजले.
ते 100 हात (175 फूट) होते.

## आतले अंगण वा पटांगण

28मग त्या माणसाने मला दक्षिणेकडील दारातून आतल्या
अंगणात आणले. दक्षिणेकडचे दार इतर दारांच्याच मापाचे
होते. 29दक्षिणेकडच्या दाराजवळच्या खोल्या, बाजूच्या भिंती

---

**एक हात** म्हणजे “21 हात परिमाणास मराठी प्रतिशब्द नाही.”

आणि द्वारमंडप इतर दारांप्रमाणेच होते. दाराच्या व
द्वारमंडपाच्या सभोवताली खिडक्या होत्या. दार 50 हात
(87 फूट 6 इंच) लांब व 25 हात (43 फूट 9 इंच) रूंद
होते. त्यांच्या सर्व बाजूंनी द्वारमंडप होते. 30 द्वारमंडप 25
हात (43 फूट 9 इंच) रूंद आणि 5 हात लांब होता.
31 दक्षिणेच्या दाराचा द्वारमंडपाचे तोंड बाहेरच्या पटांगणाकडे
होते. त्याच्या खांबावर खजुरीची झाडे कोरलेली होती.
त्यांच्या जिन्याला आठ पायऱ्या होत्या. त्या प्रवेशद्वारापर्यंत
जात होत्या.

32 त्या माणसाने मला पूर्वेकडून आतल्या अंगणात
आणले. त्याने दार मोजले. ते इतर दारांच्या मापाचेच
होते. 33 पूर्वेच्या दाराकडील खोल्या बाजूच्या भिंती व
द्वारमंडप इतर दारांप्रमाणेच त्यांच्याच मापाचे होते. दाराच्या
व द्वारमंडपाच्या सभोवताली खिडक्या होत्या. पूर्वेकडील
दार 50 हात (87 फूट 6 इंच) लांब व 25 हात (43 फूट
9 इंच) रूंद होते. 34 त्याच्या द्वारमंडपाचे तोंड बाहेरच्या
पटांगणाकडे होते. दाराच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीवर
खजुरीच्या झाडांचे कोरीवकाम होते. त्याच्या जिन्याला
प्रवेशद्वारापर्यंत जाणाऱ्या आठ पायऱ्या होत्या.

35 मग मला त्या माणसाने उत्तरेच्या दाराकडे आणले.
त्याने ते मोजले. त्याची मापे इतर दारांप्रमाणेच होती.
36 त्याच्या खोल्या, बाजूच्या भिंती, व द्वारमंडप हे इतर
दारांच्या खोल्या, बाजूच्या भिंती व द्वारमंडप ह्यांच्याच मापाचे
होते. ते दार 50 हात (87 फूट 6 इंच) लांब व 25 हात
(43 फूट 9 इंच) रूंद होते. 37 आणि त्याचा द्वारामंडप
बाहेरच्या पटांगणाच्या जवळ असलेल्या दाराच्या शेवटाला
होता. दाराच्या दोन्ही भिंतीवर खजुरीच्या झाडांचे
कोरीवकाम होते. जिन्याला प्रवेशद्वाराकडे जाणाऱ्या आठ
पायऱ्या होत्या.

## अर्पण (बळी) तयार करण्यासाठी खोल्या

38 ह्या प्रवेशद्वाराच्या द्वारमंडपापाशी दार असलेली एक
खोली होती. ह्या खोलीत, याजक बळी देण्यासाठी आणलेल्या
प्राण्यांना धुवत असत. 39 द्वारमंडपाच्या प्रत्येक बाजूला
दोन टेबले होती. त्यावर होमार्पण, पापार्पण व दोषार्पण
यांसाठी आणलेले प्राणी मारीत असत. 40 द्वारमंडपाच्या
बाहेर, उत्तरेच्या दाराच्या तोंडापाशी, दोन टेबले होती.
द्वारमंडपाच्या दुसऱ्या बाजूलाही दोन टेबले होती. 41 चार
टेबले भिंतीच्या आत होती. व चार बाहेर होती. एकूण
तेथे आठ टेबले होती. ह्यावर याजक बळी देण्यासाठी
आणलेल्या प्राण्यांना मारीत असत. 42 होमार्पणासाठी ताशीव
दगडाची चार टेबले होती. ती 11/2 हात (2 फूट 7.1/2
इंच) उंच होती. होमार्पण वा बळी देण्यासाठी आणलेल्या
प्राण्यांना मारण्यासाठी लागणारी हत्यारे याजक ह्या
टेबलावर ठेवीत. 43 सर्व मंदिरात 3 इंच लांबीचे आकडे
भिंतीवर बसविलेले होते. अर्पण करण्यासाठी आणलेले
मांस टेबलावर होते.

## याजकांच्या खोल्या

44 आतल्या अंगणाच्या दाराच्या बाहेरच्या बाजूला दोन
खोल्या होत्या. एक उत्तरेच्या दारालगत होती. तिचे तोंड
दक्षिणेकडे होते. दुसरी दक्षिणेकडे होती. तिचे तोंड
उत्तरेकडे होते. 45 तो माणूस मला म्हणाला, "दक्षिणेकडे
तोंड असलेली ही खोली मंदिरात सेवा करण्याच्या कामावर
असलेल्या याजकाकरिता आहे. 46 पण उत्तरेकडे तोंड
असलेली खोली वेदीच्या सेवेचे काम करणाऱ्या
याजकासाठी आहे. हे सर्व याजक लेवीचे वंशज आहेत.
पण याजकांचा दुसरा गट सादोक वंशजांचा आहे व तेच
फक्त बळी परमेश्वराकडे आणून परमेश्वराची सेवा करू
शकतात."

47 त्या माणसाने पटांगण मोजले. ते अगदी चौरसाकृती
होते. ते 100 हात (175 फूट) लांब व 100 हात (175
फूट) रूंद होते. वेदी मंदिराच्या समोर होती.

## मंदीराचे द्वारमंडप

48 मग त्या माणसाने मला मंदिराच्या द्वारमंडपापाशी नेले.
आणि द्वारमंडपाच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींचे मोजमाप घेतले.
बाजूची प्रत्येक भिंत 5 हात जाड आणि 3 हात रूंद होती.
आणि दोन्हीमधील दार 14 हात होते. 49 द्वारमंडप 20 हात
रूंद व 20 हात लांब होते. द्वारमंडपाकडे यायला दहा
पायऱ्या होत्या. द्वारमंडपाच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीला प्रत्येकी
एक खांब होता. असे तेथे दोन खांब होते.

## मंदिरातील पवित्रस्थान

41 त्या माणसाने मला मंदिराच्या पवित्र स्थानात
आणले. त्यांने खोलीच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींचे
मोजमाप घेतले. ते प्रत्येक बाजूला 6 हात (10 फूट 6
इंच) जाड होते. 2 दार 10 हात (17 फूट 6 इंच) रूंद होते.
दाराच्या बाजू, प्रत्येक बाजूला, 5 हात (8 फूट 9 इंच)
होती. त्या माणसाने ती खोली मापली. ती 40 हात (70
फूट) लांब व 20 हात (35 फूट) रूंद होती.

## मंदिराचे परम पवित्र स्थान

3 मग तो माणूस शेवटच्या खोलीत गेला आणि त्याने
दाराच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींचे मोजमाप घेतले. प्रत्येक
बाजूची भिंत 2 हात जाड होती. आणि 7 हात रूंद होती.
दार 6 हात रूंद होते. 4 मग त्या माणसाने दालनाची लांबी
मोजली. ती 20 हात (35 फूट) लांब व 20 हात (35
फूट) रूंद होती. मधल्या दालनात प्रवेश करण्याआधी तो
मला म्हणाला, "ही सर्वांत पवित्र जागा आहे."

## मंदिराभोवती असलेल्या इतर खोल्या

5 मग त्याने मंदिराच्या भिंतीचे मोजमाप घेतले. ती 6
हात जाड होती. मंदिराच्या भोवताली असलेल्या बाजूच्या
खोल्या 4 हात (7 फूट) रूद होत्या. 6 बाजूच्या खोल्या

वेगवेगळ्या तीन मजल्यांवर होत्या. एकावर एक
अश्या त्या होत्या. प्रत्येक मजल्यावर 30 खोल्या होत्या.
मंदिराच्या भिंतीना कंगोरे केलेले होते. बाजूच्या
खोल्यांना ह्या कंगोऱ्यांचा आधार होता. पण मंदिराला
मात्र त्या जोडलेल्या नव्हत्या. 7ह्या खोल्या वर रूंद
होत गेल्या होत्यां. मंदिराभोवतालच्या खोल्यांच्या भिंत्ती
वर अरूंद होत गेल्या होत्या. म्हणून सर्वांत वरच्या
मजल्यावरील खोल्या जास्त रूंद होत्या. जिना खालच्या
मजल्यापासून दुसऱ्या मजल्यावरून सर्वांत वरच्या
मजल्यावर गेला होता.

8मंदिराच्या सर्व बाजूंनी फरसबंदी पाया असल्याचे मला
दिसले. बाजूला खोल्यांचा पाया संपूर्ण एक पट्टी (10 फूट
6 इंच) उंच होता. 9बाजूच्या खोल्यांची बाहेरची भिंत 5
हात (8 फूट 9 इंच) जाड होती. 10बाजूच्या खोल्या आणि
याजकाच्या खोल्या ह्याच्यामध्ये मोकळी जागा होती. ती
मंदिराच्या सर्व बाजूंनी 20 हात (35 फूट) एवढी होती.
11बाजूच्या खोल्यांची दारे फरसबंदीवर उघडत. हा फरसबंदी
पाया भिंतीचा भाग नव्हता. एक दार उत्तरेकडे तर दुसरे
दक्षिणेकडे होते. फरसबंदी पाया सर्व बाजूंनी 5 हात (8
फूट 9 इंच) रूंद होता.

12मंदिराच्या पश्चिमेकडची राखीव केलेल्या जागेतील
इमारत 70 हात रूंद आणि 90 हात लांब होती. त्या
इमारतीची भिंत सर्व बाजूंनी 5 हात (8 फूट 9 इंच) जाड
होती. ती 90 हात (175 फूट इंच) लांब होती. 13मग त्या
माणसाने मंदिराचे मोजमाप केले. मंदिराची 100 हात
(175 फूट) लांबी होती. भिंतीसकट इमारत आणि अंगण
ह्यांची लाबीही 100 हात (175 फूट) होती. 14मंदिराची
पूर्वेकडची समोरची बाजू आणि अंगण 100 हात (175
फूट) रूंद होते.

15मंदिराच्या पिछाडीला आरक्षीत जागेत असलेल्या
इमारतीचे तोंड पटांगणाकडे होते. ह्या इमारतीची आणि
तिच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीची लांबी त्या माणसाने मोजली.
ती 100 हात (175 फूट) भरली. सर्वांत पवित्र गाभारा,
पवित्र जागा आणि आतल्या पटांगणाकडे उघडणारा द्वारमंडप
ह्याच्या भिंतींना 16लाकडी तक्तपोशी होती. सर्व खिडक्या
व दारांना लाकडी चौकटी होत्या. दाराजवळ मंदिरात,
जमिनीपासून खिडक्यांपर्यंत लाकडी तक्तपोशी होती.
दाराच्या वरच्या भिंतींनाही अशी तक्तपोशी होती.
17आतल्या खोलीच्या आणि बाहेरच्या दालनाच्या सर्व
भिंतींवर कोरिवकाम केलेले होते. 18तेथे करूब
देवदूतांच्या आकृती आणि खजुरीची झाडे कोरलेली
होती. करूब देवदूतांच्यामध्ये खजुरीचे झाड कोरलेले
होते. प्रत्येक करूबाला दोन तोंडे होती. 19त्या दोन
तोंडांपैकी एक माणसाचे व एक सिंहाचे होते. व ती तोंडे
खजुरीच्या झाडाकडे पाहत होती. हे कोरिवकाम सर्व
मंदिरात केलेले होते. 20मधल्या दालनाच्या (पवित्र
गाभाऱ्याच्या) सर्व भिंतींवर जमिनीपासून दाराच्या
वरच्या भागापर्यंत करूब देवदूत व खजुरीची झाडे
कोरलेली होती.

21पवित्र गाभाऱ्याच्या दोन्ही बाजूंच्या भिंती चौकोनी
होत्या. 22सर्वांत पवित्र जागेच्या समोर वेदी प्रमाणे दिसणारी
लाकडी वस्तू होती. ती 3 हात (5 फूट 3 इंच) उंच व 2
हात (3 फूट 6 इंच) लांब होती. तिचे कोपरे, तळ व बाजू
लाकडाच्या होत्या तो माणूस मला म्हणाला, "हे देवाच्या
समोर असते, तेच टेबल आहे."

23(पवित्र जागा) आणि सर्वांत पवित्र गाभारा ह्यांना दोन
दोन दारे होती. 24प्रत्येक दरवाजा दोन लहान दारांचा
बनलेला होता. प्रत्येक दरवाज्याला दोन झुलती दारे होती.
25इतर भिंतीप्रमाणे मधल्या दालनाच्या (पवित्र जागेच्या)
दारांवर, करूब देवदूत व खजुरीची झाडे कोरलेली होती.
द्वारमंडपाच्या बाहेरच्या बाजूच्या दर्शनी भागावर लाकडाचे
आच्छादन होते. 26खिडक्यांभोवती चौकटी होत्या. आणि
द्वारमंडपाच्या दोन्ही बाजूच्या भिंती द्वारमंडपाचे छत आणि
मंदिराच्या सभोवतालच्या खोल्या ह्यांच्यावर खजुरीच्या
झाडांचे कोरीवकाम केलेले होते.

## याजकाची खोली

42 नंतर त्या माणसाने मला उत्तरेकडून बाहेरच्या
पटांगणात आणले. मग त्याने मला राखीव जागेच्या
पश्चिमेकडे असलेल्या खूप खोल्यांच्या इमारतीकडे नेले
आणि उत्तरेकडच्या इमारतीकडेही नेले. 2त्या इमारतीची
लांबी 100 हात व रूंदी 50 हात होती. लोक उत्तरेकडच्या
पटांगणातून ह्या इमारतीत प्रवेश करत. 3ह्या इमारतीला,
एकमेकांकडे तोंड असलेले सज्जे तीनही मजल्यावर होते.
त्यांच्यामध्ये 20 हात (35 फूटाची) मोकळी जागा होती.
ही मोकळी जागा इमारत आणि मंदिर यांमध्ये होती. दुसऱ्या
बाजूला असलेल्या खोल्यांची तोंडे बाहेरच्या पटांगणाच्या
फरसबंदीकडे होती. 4इमारतीचे प्रवेशद्वार उत्तरेकडे असले
तरी, 10 हात रूंदीचा आणि 100 हात लांबीचा रस्ता
इमारतीच्या दक्षिणेकडून गेला होता. 5ह्या इमारतीच्या सर्वांत
वरच्या मजल्यावरील खोल्या, मधल्या व खालच्या
मजल्यावरील खोल्यांपेक्षा अरूंद होत्या, कारण सज्जाने
बरीच जागा व्यापलेली होती. 6तीन मजल्यावर खोल्या
होत्या. बाहेरच्या पटांगणाप्रमाणे त्यांना खांब नव्हते. म्हणून
सर्वांत वरच्या मजल्यावरील खोल्या मधल्या व खालच्या
मजल्यावरील खोल्यांच्या काहीशा मागे होत्या. 7बाहेरच्या
बाजूला, खोल्यांना समांतर अशी भिंत होती. ती बाहेरच्या
पटांगणापर्यंत गेली होती. ती खोल्यांच्या समोर होती. तिची
लांबी 50 हात (87 फूट 6 इंच) होती. 8बाहेरच्या पटांगणात
असलेल्या खोल्या 50 हात (87 फूट 6 इंच) लांबीच्या
होत्या. मंदिराच्या बाजूची, इमारतीची एकूण लांबी 100
हात होती. 9ह्या खोल्यांच्या खाली, पश्चिमेला, बाहेरच्या
भिंतीच्या सुरवातीला, बाहेरच्या पटांगणातून पूर्वेच्या बाजूला
येण्यासाठी एक दार होते. 10दक्षिणेला, मंदिराच्या

अंगणासमोर आणि मंदिराच्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूला
खोल्या होत्या.
[11]ह्या खोल्यांसमोर एक रस्ता होता. ह्या खोल्या
उत्तरेकडील खोल्याप्रमाणेच होत्या. दक्षिणेकडची दारे,
लांबी-रूंदीला उत्तरेकडच्या दारांएवढीच होती.
दक्षिणेकडची दारे माप, नक्षी आणि प्रवेश याबाबतीत
उत्तरेकडच्या दारांप्रमाणेच होती. [12]दक्षिणेकडच्या
खोल्यांखाली, पूर्वेला उघडणारे दार होते. त्या दारातून
लोकांना भिंती लगतच्या उघड्या रस्त्यावरून आत येता
येत असे. दारांच्या पलीकडे विभागणारी भिंत होती.*
[13]तो माणूस मला म्हणाला, “पटांगणाच्या समोर
असलेल्या उत्तर व दक्षिण दिशेकडील खोल्या ह्या पवित्र
आहेत. देवाला बळी अर्पण करणाऱ्या याजकासाठी त्या
आहेत. याजक तेथे अती पवित्र पदार्थ खातील. व असा
पदार्थ ते तेथेच ठेवतात. का? कारण ती जागा पवित्र
आहे. ते पवित्र पदार्थ म्हणजे धान्यार्पण, पापार्पण व दोषार्पण
होत. [14]याजक तेथे जातील पण बाहेरच्या पटांगणात
येण्याआधी त्यांना प्रथम आपली सेवेची वस्त्रे तेथेच उतरवून
ठेवावी लागतील. का? कारण ती वस्त्रे पवित्र आहेत.
इतर लोक मंदिराच्या ज्या भागात जातात, तेथे याजकाला
जायचे असेल तर त्याने खोलीत जाऊन दुसरी वस्त्रे घातलीच
पाहिजेत.”

## बाहेरचे पटांगण

[15]आतील मंदिराच मोजमाप करून झाल्यावर त्या
माणसाने मला पूर्वेकडच्या दारातून बाहेर आणले. त्यांने
सर्व बाजूंनी बाहेरच्या पटांगणाचे मोजमाप केले. [16]मोजपट्टीने
त्याने पूर्वेची बाजू मोजली. ती लांबीला 500 हात (875
फूट) भरली. [17]त्याने उत्तरेची बाजू मोजली. ती लांबीला
500 हात (875 फूट) भरली. [18]त्याने दक्षिणेची बाजू
मोजली. तिची लांबी 500 हात (875 फूट) भरली. [19]मग
पश्चिमेकडे जाऊन त्याने माप घेतले तेही 500 हात (875
फूट) भरले. [20]त्याने चारी बाजूंनी मंदिराचे मोजमाप केले.
मंदिराभोवती भिंत होती. ती लांबीला 500 हात (875
फूट) व रूंदीला 500 हात (875 फूट) होती. तिच्यामुळे
पवित्र (सोवळ्याची) जागा व अपवित्र जागा अशा (पवित्र
न मानलेली) वेगवेगळ्या झाल्या होत्या.

## परमेश्वर त्याच्या लोकांमध्ये राहतो

43 पूर्वेकडे तोंड असलेल्या दाराजवळ त्या माणसाने
मला नेले. [2]पूर्वेकडून तेथे इस्राएलच्या देवाची
प्रभा फाकली. समुद्राच्या गर्जनेप्रमाणे देवाचा आवाज प्रचंड
होता. त्याच्या प्रभेने भूमी उजळली होती. [3]मी खबार
कालव्याजवळ पाहिलेल्या दृष्टान्तासारखाच हा दृष्टान्त
होता. मी जमिनीला डोके टेकवून नमस्कार केला.
[4]परमेश्वराची प्रभा पूर्वेच्या दारातून मंदिरात आली.
[5]मग वाऱ्याने* मला उचलले आणि आतल्या अंगणात
आणले. मंदिर परमेश्वराच्या प्रभेने भरून गेले. [6]मंदिराच्या
आतून कोणीतरी माझ्याशी बोलत असल्याचे मला जाणवले.
तो माणूस माझ्या शेजारीच उभा होता. [7]मंदिरातील आवाज
मला म्हणाला, “मानवपुत्रा, ही माझ्या सिंहासनाची व
चरणासनाची जागा आहे. येथे मी इस्राएलच्या लोकांमध्ये
कायमचा राहीन. इस्राएलचे लोक माझ्या पवित्र नावाला
पुन्हा कलंक लावणार नाहीत. राजे आणि राजघराण्यातील
लोक, व्यभिचाराचे पाप करून अथवा राजांची प्रेते ह्या
जागी पुरून पुन्हा कधीही माझ्या नावाला बट्टा लावणार
नाहीत. [8]माझ्या उंबऱ्याला त्यांचा उंबरा आणि माझ्या
दाराच्या खांबाला त्यांच्या दाराचा खांब लावून, ते मला
बदनाम करणार नाहीत. पूर्वी, त्यांच्या आणि माझ्यामध्ये
फक्त एक भिंत होती. त्यामुळेच त्यांनी प्रत्येक वेळी पाप
करताच अथवा भयंकर गोष्ट करताच माझी अप्रतिष्ठा
झाली. म्हणूनच मला राग आला व मी त्यांचा नाश
केला. [9]आता त्यांना व्यभिचाराचे पाप सोडून देऊ देत व
त्यांच्या राजांची प्रेते माझ्यापासून दूर ठेवून देत. म्हणजे मी
कायमचा त्यांच्यात राहीन.
[10]“आता, मानवपुत्रा, इस्राएलच्या लोकांना मंदिराबद्दल
सांग. मंदिराच्या योजनेबद्दल त्यांना कळेल. तेव्हा त्यांना
त्यांच्या पापाची लाज वाटेल. [11]मग त्यांना, स्वत: केलेल्या
वाईट कृत्यांची लाज वाटेल. त्यांना मंदिराच्या रचनेबद्दल
कळू दे. ते कसे बांधले आहे, प्रवेशद्वारे व बाहेर पडण्याची
दारे कोठे आहेत, सर्व नक्षीकाम कसे आहे ह्याबद्दल
त्यांना समजू दे. त्यांना मंदिराबद्दलचे सर्व विधिनियम
शिकव. हे सर्व तू लिहून ठेव म्हणजे सर्वजण ते पाहू
शकतील. मग ते मंदिराबाबतचे सर्व विधिनियम पाळतील.
ते ह्या गोष्टी करू शकतील. [12]मदिराचा नियम पुढीलप्रमाणे
आहे पर्वतमाथ्यावरची सर्व जागा अती पवित्र आहे. हा
मंदिराचा नियम आहे.

## वेदी

[13]“लांब मोजपट्टीचा* उपयोग करून, हाताच्या मापात,
वेदीची मापे पुढीलप्रमाणे आहेत. वेदीच्या तळाला सर्व
बाजूंनी पन्हळ होती. ती 1 हात (1 फूट 9 इंच) खोल व 1
हात (1 फूट 9 इंच) रूंद होती. तिच्या काठाजवळची कड
वीतभर (9 इंच) उंच होती. वेदीची उंची पुढीलप्रमाणे
होती. [14]जमिनीपासून खालच्या कंगोऱ्यापर्यंत तळ 2 हात
(3 फूट 6 इंच) होता. व रूंदी 1 हात (1 फूट 9 इंच)
होती. वेदी लहान कंगोऱ्यापासून मोठ्या कंगोऱ्यापर्यंत 4
हात (7 फूट) होती. ती 2 हात (3 फूट 6 इंच) रूंद होती.

**दक्षिणेकडच्या ... होती** ह्या ओवीचा हिब्रू अर्थ समजणे अतिशय कठीण आहे.

**वारा** परमेश्वरचा “आत्मा.”

**मोजपट्टी** शब्दश: 1 हात आणि 5 बोटे.

15वेदीवरील आग्निकुंड 4 हात (7 फूट) उंच होता.
प्रत्येक कोपऱ्याला एक अशी वेदीला चार शिंगे होती.
16वेदीवरील अग्निकुंडाची लांबी 12 हात (21 फूट) व
रूंदी 12 हात (21 फूट) होती. म्हणजेच ते अगदी बरोबर
चौरसाकृती होते. 17कंगोरासुद्धा चौरसाकृतीच होता. तो
14 हात (24 फूट 6 इंच) लांब व 14 हात (24 फूट 6
इंच) रूंद होता. त्याची कड 1/2 हात (10 1/2इंच) रूंद
होती. तळाजवळची पन्हळ 2 हात (3 फूट 6 इंच) रूंद
होती. वेदीच्या पायऱ्या पूर्वेकडे होत्या.”
18–19मग तो माणूस मला म्हणाला, “मानवपुत्रा,
परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: ‘वेदीसंबंधी
काही नियम आहेत. ज्या दिवशी बळी अर्पण करण्यासाठी
आणि रक्तसिंचन करण्यासाठी ह्या वेदीची स्थापना होईल,
त्या दिवशी सादोकच्या घराण्यातील माणसांना पापर्पण
म्हणून तू गोऱ्हा देशील. सादोक हे लेवीच्या कुळातील
आहेत. ते याजक आहेत.’” परमेश्वर, माझा प्रभू, पुढे
म्हणाला, ते मला पवित्रपदार्थ दाखवितील व माझी सेवा
करतील. 20“तू गोऱ्ह्याचे रक्त वेदीच्या चारी शिंगावर,
कंगोऱ्याच्या चारी कोपऱ्यावर आणि सर्व बाजूंच्या कडेवर
शिंपडशील. अशा रीतीने तू वेदी शुद्ध करशील. 21मग
पापार्पण करण्यासाठी बैल घे आणि त्याचे मंदिराच्या
इमारतीच्या बाहेर, मंदिराच्या आवारात योग्य जागी हवन
कर.

22“दुसऱ्या दिवशी तू निर्दोष बोकड अर्पण करशील.
तो पापार्पणासाठीच असेल. गोऱ्ह्याच्या रक्ताने ज्याप्रमाणे
वेदी शुद्ध केली गेली, त्याचप्रमाणे याजक ती शुद्ध करतील.
23वेदीची शुध्दता झाल्यानंतर निर्दोष गोऱ्हा व कळपातील
निर्दोष मेंढा अर्पण करशील. 24तू हे परमेश्वराला अर्पण
करशील. याजक त्यावर मीठ टाकतील. मग ते त्यांना
होमार्पण म्हणून अर्पण करतील. 25तू सात दिवस, पापार्पण
म्हणून रोज एक बोकड, एक गोऱ्हा व एक मेंढा अर्पणासाठी
तयार ठेवशील. गोऱ्हा व मेंढा हे निर्दोष असले पाहिजेत.
26सात दिवस, याजक, वेदीची शुद्धता करतील. मग ते
वेदी देवाच्या उपासनेसाठी तयार करतील. 27वेदी तयार
करून, परमेश्वराला अर्पण करण्यात सात दिवस जातील.
आठव्या दिवसापासून, याजक होमार्पणे व शांत्यर्पणे करु
शकतील आणि मी तुमचा स्वीकार करीन.” असे
परमेश्वर, माझा प्रभू, म्हणाला.

## बाहेरचे प्रवेशद्वार

44 नंतर त्या माणसाने मला परत, पूर्वेकडे तोंड
असलेल्या, बाहेरच्या प्रवेशद्वारापाशी आणले.
आम्ही प्रवेशद्वारा बाहेर होतो व ते बंद होते. 2परमेश्वर
मला म्हणाला, “हे बंदच राहील. ते उघडणार नाही. ह्यामधून
कोणीही प्रवेश करणार नाही. का? कारण इस्राएलच्या
परमेश्वराने ह्यातून प्रवेश केला. म्हणून ते बंदच राहिले
पाहिजे. 3लोकांचा राजा बंधुत्वदर्शक पदार्थ
परमेश्वराबरोबर खाताना या प्रवेशद्वारात बसेल.
प्रवेशद्वाराजवळच्या द्वारमंडपातून तो ये-जा करील.”

## मंदिराचे पावित्र्य

4मग त्या माणसाने मला उत्तरेकडच्या दारातून
मंदिरासमोर आणले. मी पाहिले तर काय, परमेश्वराची
प्रभा, परमेश्वराच्या मंदिरात, पसरत होती. मी जमिनीला
डोके टेकवून नमस्कार केला. 5परमेश्वर मला म्हणाला,
“मानवपुत्रा, अगदी लक्षपूर्वक पाहा! तुझ्या डोळ्यांचा आणि
कानांचा वापर कर. ह्या गोष्टी पाहा आणि परमेश्वराच्या
मंदिराच्या विधिनियमाबाबत मी जे सांगतो, ते लक्षपूर्वक
ऐक. मंदिराचे प्रवेश-मार्ग व पवित्र जागेचे बाहेर जाण्याचे
मार्ग काळजीपूर्वक पाहा. 6मग माझे म्हणणे ऐकण्याचे
नाकारणाऱ्या इस्राएलच्या सर्व लोकांना पुढील संदेश दे.
त्यांना सांग. की परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
‘इस्राएलच्या लोकांनो, तुम्ही केलेल्या भयंकर गोष्टी मला
अति झाल्या आहेत. 7ज्यांची खरोखरच सुंता झालेली
नाही, जे पूर्णपणे माझे झाले नाहीत, अशा परक्यांना तुम्ही
माझ्या मंदिरात आणले. अशा रीतीने तुम्ही माझे मंदिर
अमंगल केले. तुम्ही आपला करार मोडला, भयंकर
कृत्ये केली आणि मला भाकरी, चरबी आणि रक्ताचे
अर्पण केले पण ह्यामुळे माझे मंदिर अशुद्ध, अमंगळ
झाले. 8माझ्या पवित्र वस्तूंची तुम्ही काळजी घेतली नाही.
माझ्या पवित्र जागेची जबाबदारी तुम्ही परक्यांवर
टाकली.’”
9परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: ‘कोणीही
खरोखरीची सुंता न झालेला परका जरी तो कायमचा
इस्राएल लोकांच्यात राहत असला तरी-माझ्या मंदिरात
येता कामा नये. मंदिरात येण्याआधी त्यांची सुंता केली
गेलीच पाहिजे, व त्याने संपूर्णपणे मला वाहून घेतले पाहिजे.
10भूतकाळात, इस्राएलने जेव्हा माझ्याकडे पाठ फिरविली,
तेव्हा लेवींनी मला सोडले. आपल्या मूर्तींना
अनुसरण्यासाठी, इस्राएलने माझा त्याग केला. लेवींच्या
पापाबद्दल लेवींना शिक्षा होईल. 11माझ्या पवित्र जागेची
सेवा करण्यासाठी लेवींची निवड केली गेली होती. ते
मंदिराच्या प्रवेशद्वारांचे रक्षण करीत, मंदिरात सेवा करीत.
बळी देण्यासाठी लोकांनी आणलेल्या प्राण्यांचा ते बळी देत
व लोकांसाठी होमार्पणे करीत. लोकांना मदत करण्यासाठी
आणि त्यांची सेवा करण्यासाठी त्यांची निवड केली गेली
होती. 12पण त्या लेवींनी माझ्याविरुध्द पाप करण्यात आणि
त्यांच्या मूर्तींची पूजा करण्यात लोकांना मदत केली. म्हणून
मी ‘त्यांना त्यांच्या पापाबद्दल शिक्षा होईल. असे वचन
देतो.’” परमेश्वर, माझा प्रभू, हे म्हणाला.
13“म्हणून याजकाप्रमाणे, लेवी मला अर्पण करण्यास
काही आणणार नाहीत. ते माझ्या ‘पवित्र’ किंवा ‘अती
पवित्र’ गोष्टींच्या जवळ येणार नाहीत. त्यांनी केलेल्या
भयंकर कृत्यांचा काळिमा त्यांना वाहवा लागले. 14पण

मी त्यांना मंदिराची काळजी घेऊ देईन. ते मंदिरातील आवश्यक ती कामे करतील.

15"सर्व याजक लेवी-वंशाचे आहेत. पण जेव्हा इस्राएलचे लोक माझ्या विरोधात गेले, तेव्हा फक्त सादोकच्या घराण्यातील लोकांनी माझ्या पवित्र जागेची काळजी घेतली. म्हणून फक्त सादोकचे वंशजच मला अर्पण करण्याच्या वस्तू माझ्याकडे घेऊन येतील. बळी दिलेल्या प्राण्यांची चरबी व रक्त मला वाहण्यासाठी तेच फक्त माझ्यापुढे उभे राहतील." परमेश्वराने, माझ्या प्रभूने, ह्या गोष्टी सांगितल्या. 16"ते माझ्या पवित्र जागेत प्रवेश करतील. ते माझी सेवा करण्यासाठी माझ्या टेबलाजवळ येतील. मी त्यांना दिलेल्या गोष्टींची ते काळजी घेतील. 17ते आतल्या अंगणाच्या प्रवेशद्वारातून आत आले की तागाची वस्त्रे घालतील. आतल्या अंगणाच्या प्रवेशद्वारात काम करताना अथवा मंदिरात सेवा करताना ते लोकरीची वस्त्रे वापरणार नाहीत. 18ते तागाचे फेटे बांधतील. त्यांची अंतर्वस्त्रेही तागाची असतील. ज्यामुळे घाम येईल. अशा प्रकारची कोणतीही वस्त्रे ते घालणार नाहीत. 19माझी सेवा करताना घातलेली वस्त्रे, बाहेरच्या पटांगणात लोकांमध्ये जाण्यापूर्वी ते उतरवून ठेवतील ते ही वस्त्रे पवित्र खोल्यांत ठेवतील. मग ते दुसरे कपडे घालतील. अशा प्रकारे ते त्या पवित्र वस्त्रांना लोकांना शिवू देणार नाहीत.

20"हे याजक मुंडन करणार नाहीत वा केस लांब वाढविणार नाहीत तेव्हा ते फक्त आपले केस कातरून बारीक करतील. 21आतल्या अंगणात जाताना याजकाने द्राक्षरस पिऊ नये. 22कोणत्याही याजकाने विधवेशी वा घटस्फोटितेशी लग्न करू नये. त्यांनी इस्राएली कुमारिकेशी लग्न करावे. अथवा याजकाच्या विधवेशी लग्न केले तरी चालेल.

23"तसेच याजक लोकांना पवित्र व सामान्य ह्यातील भेद शिकवितील. ते लोकांना शुद्ध व अशुद्ध ह्यातील फरक समजण्यास मदत करतील. 24याजक न्यायालयाचे न्यायाधीश असतील. लोकांना न्याय देताना ते माझे कायदे पाळतील. ते माझ्या विशेष सणांचे विधिनियम पाळतील, माझ्या खास सुट्ट्यांच्या दिवसांचा मान आणि पावित्र्य राखतील. 25मृताच्या जवळ जाऊन ते अशुध्द होणार नाहीत, पण मृत व्यक्ती जर याजकाची स्वत:ची वडील, आई, मुलगा, मुलगी, भाऊ अथवा अविवाहित बहीण असेल, तर मात्र मृताजवळ गेले व अशुध्द झाले तरी चालेल. 26याजकाला शुद्ध केल्यावर, त्याने सात दिवस थांबले पाहिजे. 27मग तो पवित्र जागी जाऊ शकतो. पण ज्या दिवशी तो पवित्र जागेची सेवा करण्यासाठी आतल्या अंगणात जाईल, तेव्हा त्याने स्वत:साठी पापार्पण करावे." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

28"लेवींच्या मालकीच्या जमिनीबद्दल: मी त्यांची मालमत्ता आहे. त्यांना इस्राएलमध्ये तुम्ही काहीही मालमत्ता (जमीन) देऊ नका. मी त्यांचा इस्राएलमधील वाटा आहे. 29"त्यांना धान्यार्पणे, दोषार्पणे, पापार्पणे खायला मिळतील. इस्राएलच्या लोकांनी परमेश्वराला अर्पण केलेली प्रत्येक गोष्ट त्यांची असेल. 30प्रत्येक पिकाच्या बहराचा पहिला भाग याजकाचा असेल. मळलेल्या पिठाचा पहिला भागसुद्धा तुम्ही याजकाला द्यावा. त्यामुळे तुमच्या घराला आशिर्वाद मिळतील. 31आपोआप मेलेला वा हिंस्र श्वापदांनी मारून फाडलेला कोणताही प्राणी वा पक्षी याजकानी खाऊ नये.

## पवित्र वापरासाठी जमिनीची विभागणी

45 "ज्या वेळी इस्राएली वंशाच्या लोकांसाठी तुम्ही, चिठ्ठ्या टाकून, जमिनीची वाटणी कराल, तेव्हा जमिनीचा काही भाग वेगळा काढाल. तो परमेश्वराचा पवित्र भाग असेल. ती जमीन 25000 हात (8.12 मैल) लांबीची व 20000 हात (6.6 मैल) रूंदीची असेल. ती सर्व जमीन पवित्र असेल. 2जमिनीचा 500 हाताचा (875 फूटाचा) चौरस हा मंदिरासाठी असेल. मंदिराभोवती 50 हात (87 फूट 6 इंच) रूंदीची मोकळी जागा असेल. 3पवित्र प्रदेश 25000 हात (8.3 मैल) लाब व 10000 हात (3.3 मैल) रूंद असेल. मंदिर ह्याच भागात असेल. मंदिराची जागा अती पवित्र जागा मानली जाईल.

4परमेश्वराची सेवा करण्यासाठी परमेश्वराजवळ जाणाऱ्या, मंदिरात काम करणाऱ्या सेवकांसाठी, याजकासाठी हा जमिनीचा पवित्र भाग असेल. ती जागा याजकांची घरे व मंदिर यांच्यासाठी असेल. 5जमिनीचा 25000 हजार हाताचा (8.3 मैल लांबीचा) व 10000 हात (3.3 मैल) रूंदीचा भाग हा मंदिरात सेवा करणाऱ्या लेवींसाठी असेल. लेवींची गावेसुद्धा याच भागात वसतील.

6"गावासाठी तुम्ही 5000 हात (1.6 मैल) रूंदीची व 25000 हजार हात (8.3 मैल) लांबची जागा द्याल. ती पवित्र प्रदेशाच्या बाजूला असेल. इस्राएलच्या सर्व लोकांसाठी ही जागा असेल. 7पवित्र प्रदेशाच्या आणि गावाच्या मालकीच्या जमिनीच्या बाजूची जमीन राजासाठी असेल. म्हणजेच पवित्र प्रदेश व गावाच्या मालकीची जमीन या दोन्ही मधील ही जमीन असेल. ती लोकांना दिलेल्या जमिनीएवढीच असेल. ती पश्चिमेच्या सीमेपासून पूर्वेच्या सीमेपर्यंत पसरलेली असेल. 8ही जमीन म्हणजे राजाची इस्राएलमधील मालमत्ता असेल. त्यामुळे, यापुढे, राजा माझ्या लोकांना कष्ट देणार नाही उलट इस्राएलांना ते त्यांच्या वंशजांसाठी जमीन देईल."

9परमेश्वर, माझा प्रभू, पुढे म्हणतो, "इस्राएलच्या राजांनो, आता पुरे! लोकांशी क्रूरपणाने वागण्याचे सोडून द्या, लोकांची लुबाडणूक करू नका. न्यायाने वागा. सत्कृत्ये करा. माझ्या लोकांना सक्तीने घराबाहेर काढण्याचे सोडून द्या." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

10"लोकांना फसवू नका. योग्य वजन-मापे वापरा. 11एफा (कोरडे पदार्थ मोजण्याचे माप) बाथ (द्रव पदार्थ

मोजण्याचे माप) सारख्याच आकाराचे असू द्या. ही मापे
होमरच्या परिमाणात असली पाहिजेत. म्हणजे एफ व बाथ
1/10 होमर इतक्या मापाची असावीत. [12]शेकेल 20 गेरा
एवढा असला पाहिजे. मीना हा 60 शेकेल म्हणजेच 20
शेकेल, 25 शेकेल, 15 शेकेल एवढा असला पाहिजे.
[13]"पुढील गोष्टी तुम्ही अर्पण केल्याच पाहिजेत

प्रत्येक होमर (6 बुशल) गव्हासाठी 1/ 6 एफ (14 वाडगे) गडू. प्रत्येक होमर (6बुशल) जवासाठी 1/ 6 एफ (14 वाडगे) जव.

[14]प्रत्येक कोर (55गॅलन) ऑलिव्ह तेलासाठी 1/ 10
बाथ (1/ 2 गॅलन) ऑलिव्ह तेल. लक्षात ठेवा. 10
बाथचा एक होमर होतो 10 बाथचा एक कोर होतो
[15]आणि इस्राएलच्या चांगल्यातल्या चांगल्या कुरणातील
200 मेंढ्यांच्या कळपातील एक मेंढरू द्यावे.

"ही खास अर्पणे धान्यार्पण, होमार्पण व शांत्यर्पणे यासाठी आहेत. ह्यामुळे लोकांची शुद्धता होते." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

[16]"ह्या देशातील, प्रत्येकजण, राजाकरिता, या गोष्टी
अर्पण करील. [17]पण विशेष पवित्र दिवसांसाठी राजाने
आवश्यक त्या गोष्टी दिल्या पाहिजेत. सण, अमावस्या,
शब्बाथ ह्या दिवसांसाठी आणि इस्राएलच्या खास सणांसाठी
राजाने होमार्पणे, धान्यार्पणे व पेयार्पणे ह्यांची सोय केली
पाहिजे. इस्राएलच्या शुद्धतेसाठी असलेली पापार्पणे,
धान्यार्पणे, होमार्पणे व शांत्यर्पणेसुद्धा राजाने दिली
पाहिजेत."
[18]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: "पहिल्या
महिन्याच्या पहिल्या दिवशी, मंदिराच्या शुद्धतेसाठी तुम्ही
निर्दोष गोऱ्हा द्यावा. [19]याजक पापार्पणातील काही रक्त
मंदिराच्या दाराच्या चौकटीच्या खांबावर, वेदीच्या
कंगोऱ्याच्या टोंकावर आणि आतल्या अंगणाच्या
प्रवेशद्वाराच्या खांबांवर शिंपडतील. [20]कोणाही माणसाच्या
हातून नकळत वा माहीत नसल्याने पाप घडले असेल
म्हणून महिन्याच्या सातव्या दिवशी तुम्ही मघाशी सांगितले
तसे करावे. म्हणजे मंदिर शुद्ध होईल.

## वल्हांडणाच्या सणातील अर्पणे

[21]"पहिल्या महिन्याच्या चौदाव्या दिवशी तुम्ही
वल्हांडणाचा सण साजरा केला पाहिजे. बेखमीर भाकरीचा
सण ह्यावेळेसच सुरु होतो. तो सात दिवस चालतो. [22]त्या
वेळी, राजा स्वत:करिता आणि इस्राएलच्या लोकांकरिता
पापार्पण म्हणून बैल देईल. [23]सणाच्या सात दिवसात राजा
सात निर्दोष बैल व सात निर्दोष मेंढे ह्यांचे देवाला हवन
करील. राजा प्रत्येक दिवशी एक याप्रमाणे सात बैल
अर्पण करील. तसेच पापार्पण म्हणून रोज एक बोकड
देईल. [24]राजा प्रत्येक बैलाबरोबर एक एफ (1/ 2 बुशेल)
जव धान्यार्पण म्हणून देईल. प्रत्येक मेंढ्याबरोबर पण तो
एक एफ (1/ 2 बुशेल) जव देईल. प्रत्येक एफ धान्याबरोबर
राजाने एक हीन (1 गॅलन) तेल दिलेच पाहिजे. [25]मंडपाच्या
सणाच्या सात दिवसात राजाने असेच सर्व अर्पण करावे.
हा सण सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशी सुरु होतो.
त्या वेळची पापार्पण, होमार्पण, धान्यार्पण आणि तेलार्पण
ही अर्पणे असतील."

## राजा आणि सण

46 परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो:
"आंतल्या अंगणाचे पूर्वेकडचे दार कामाच्या सहा
दिवसांत बंद असेल. पण शब्बाथ व अमावस्या ह्या दिवशी
ते उघडले जाईल. [2]राजा, त्या दाराच्या द्वारमंडपापासून
आत जाऊन दाराच्या खांबाशी उभा राहील. मग याजक
त्याच्यासाठी होमार्पण व शांत्यर्पण करील. राजा दाराच्या
उंबऱ्यात उपासना करील मग तो बाहेर जाईल. पण दार
संध्याकाळशिवाय बंद होणार नाही. [3]देशातील लोकही
शब्बाथ व नवचंद्रदिनी ह्या दोन दिवशी दारातूनच
परमेश्वराची उपासना करतील.
[4]"शब्बाथच्या दिवशी राजा होमार्पण करील. त्याने सहा
निर्दोष कोकरे व निर्दोष मेंढा हे दिलेच पाहिजेत. [5]त्याने
मेंढ्याबरोबर एक एफ (1/2 बुशेल) धान्य दिले पाहिजे.
कोकरांबरोबर त्याने शक्य असेल तेवढे धान्य द्यावे. प्रत्येक
एक एक (1/2 बुशेल) धान्याबरोबर त्याने 1 हीन (1गॅलन)
तेल दिले पाहिजे.
[6]"नवचंद्रदिनी पहिल्या दिवशी त्याने एक निर्दोष गोऱ्हा
दिला पाहिजे. तसेच त्याने सहा निर्दोष कोकरे व एक
निर्दोष मेंढा द्यावा. [7]त्याने बैल व मेंढा ह्यांच्याबरोबर प्रत्येकी
एक एफ (1/2 बुशेल) धान्य द्यावे. कोकरांबरोबर त्याने,
त्याला शक्य असेल तेवढे धान्य द्यावे. मात्र प्रत्येक
एफबरोबर (1/2 बुशेल बरोबर) 1 हीन (गॅलन) तेल
द्यावे.
[8]"राजाने पूर्वद्वाराच्या द्वारमंडपापासून मंदिरात ये-जा
केली पाहिजे.
[9]"खास सणांच्या वेळी देशातील लोक परमेश्वरापा शी
येतील. त्यावेळी उत्तरेकडच्या दारातून आत आलेल्याने
दक्षिणेकडील दारातून बाहेर जावे व दक्षिणेकडच्या
दारातून आत आलेल्याने उत्तरेच्या दारातून बाहेर जावे.
कोणीही आलेल्या दारानेच बाहेर जाऊ नये. प्रत्येकाने
सरळ दिशेनेच गेले पाहिजे. [10]जेव्हा लोक आत जातील,
तेव्हा राजा आत जाईल व जेव्हा लोक बाहेर येतील,
तेव्हा राजा बाहेर येईल.
[11]"सणांच्या आणि विशेष सभांच्या वेळी, गोह्याबरोबर
1 एफ (1/2 बुशेल) धान्य दिलेच पाहिजे. तसेच प्रत्येक
मेंढ्याबरोबरही 1 एफ (1/2 बुशेल) धान्य द्यायला हवे.
कोकराबरोबर राजाने इच्छेप्रमाणे द्यावे मात्र 1 एफ (1/2

बुशेल) धान्याबरोबर 1 हीन (1गॅलन) तेल दिलेच
पाहिजे.
12"जेव्हा राजा स्वसंतोष अर्पण परमेश्वरासाठी
करील (कदाचित् ते होमार्पण असेल वा कदाचित्
शांत्यर्पण असेल किंवा स्वसंतोषदर्शक असेल.) तेव्हा पूर्वेचे
दार त्याच्यासाठी उघडले जाईल. मग शब्बाथच्या
दिवसाप्रमाणे तो अर्पण करील. तो जाताच, दार लावून
घेण्यात येईल.

## प्रतिदिवसाची अर्पणे

13"परमेश्वराला होमार्पण म्हणून रोज तुम्ही एक वर्षाचे
निर्दोष कोकरू द्यावे रोज सकाळी ते द्यावे. 14आणखी
रोज सकाळी कोकराबरोबर तुम्ही धान्यार्पण अर्पण करावे.
तुम्ही त्यासाठी 1/6 एफ (14 वाडगे) पीठ व हे पीठ
चांगले भिजण्यासाठी 1/3 हीन (1गॅलन) तेल द्यावे. हे
परमेश्वरासाठी रोज करावयाचे धान्यार्पण असेल.
15होमार्पणासाठी लोक कोकरू, धान्यार्पण व तेल रोज
सकाळी कायम देतील."

## राजाच्या वारसाहक्क संबंधी नियम

16परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो: "जर
राजाने आपल्या मालकीच्या जमिनीचा भाग, भेट म्हणून
आपल्या एखाद्या मुलाला दिला, तर तो त्या मुलाच्या
मालकीचा होईल. ती त्याची मालमत्ता होईल. 17पण राजाने
आपल्या मालकीच्या जमिनीचा काही भाग, आपल्या
एखाद्या गुलामाला दिला, तर स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत* तो
त्या गुलामाचा होईल. व त्यानंतर तो राजाला परत मिळेल.
फक्त राजाची मुलेच राजाकडून मिळालेली भेट ठेवू
शकतील. 18राजा कोणाही माणसाची जमीन घेणार नाही
अथवा कोणालाही सक्तीने जमीन सोडायला लावणार नाही.
त्याने आपल्या मालकीच्या जमिनीचा काही भाग आपल्या
मुलांना दिला पाहिजे. म्हणजे माझ्या लोकांना सक्तीने
जमीन सोडावी लागणार नाही."

## खास स्वयंपाकघरे

19मग त्या माणसाने मला दाराच्या जवळून पलीकडे
नेले. उत्तरेकडे असलेल्या याजकाच्या पवित्र खोल्याकडे
त्याने मला नेले. तेथे अगदी पश्चिमेला जागा असलेली
मला दिसली. 20तो माणूस मला म्हणाला, "येथे याजक
दोषार्पणे व पापार्पणे शिजवितील, धान्यार्पणे भाजतील. का?
कारण मग त्यांना हा पदार्थ बाहेरच्या अंगणात नेण्याची
जरूरी नाही. जेथे सामान्य लोक असतात, तेथे त्यांना ह्या
पवित्र गोष्टी न्याव्या लागणार नाहीत."
21मग मला त्या माणसाने बाहेरच्या पटांगणात आणले.
त्याने मला पटांगणाच्या चारी कोपऱ्यात नेले. प्रत्येक
कोपऱ्यात एक छोटासा चौक होता. 22चारी कोपऱ्यात
लहान चौक होते. प्रत्येक चौक 40 हात (70फूट) लांब
व 30 हात (52 फूट 6इंच) रूंद होता. चारी कोपरे
सारख्या मापाचे होते. 23चारी चौकांच्या भोवताली विटांची
भिंत होती. त्या भिंतीत स्वयंपाकासाठी जागा केलेली होती.
24तो माणूस मला म्हणाला, "ह्या येथे मंदिराचे सेवक
लोकांकरिता बळी दिलेल्या प्राण्यांचा पदार्थ शिजवितील."

## मंदिरातून वाहणारे पाणी

47 त्या माणसाने मला पुन्हा मंदिराच्या दाराशी नेले.
मंदिराच्या पूर्वेकडील उंबऱ्याच्या खालून पाणी
वाहताना मला दिसले (मंदिराचे तोंड पूर्वेला होते.) मंदिराच्या
दक्षिणेच्या भागाखालून पाणी वेदीच्या दक्षिणबाजूने वाहात
होते. 2त्या माणसाने मला उत्तरेच्या दाराने बाहेर आणले
आणि फिरवून पूर्वेकडील बाहेरच्या दाराकडे नेले. पाणी
दाराच्या दक्षिणेकडून येत होते.
3हातात मोजमापाची फीत घेऊन तो माणूस पूर्वेला गेला.
त्याने 1000 हात (1/3 मैल) अंतर मोजले मग त्याने
मला त्या अंतरापर्यंत पाण्यातून जायला सांगितले. पाणी
फक्त घोट्यापर्यंत होते. 4मग त्याने आणखी 1000 हाताचे
(1/3 मैलाचे) अंतर मोजले. पुन्हा मला पाण्यातून तेथपर्यंत
चालण्यास सांगितले. तेथे पाणी माझ्या गुडघ्यापर्यंत आले.
मग त्याने पुन्हा 1000 हाताचे (1/3 मैलाचे) अंतर मोजून,
तेथपर्यंत मला पाण्यातून चालण्यास सांगितले. तेथे पाणी
कमरेइतक्या खोलीचे होते. 5त्या माणसाने पुढे आणखी
1000 हात (1/3 मैल) अंतर मोजले. पण येथे पाणी
खूपच खोल असल्याने त्यातून चालणे शक्य नव्हते. त्याची
नदी झाली होती. पाणी पोहता येईल इतके खोल होते. पार
करता येणार नाही इतक्या खोलीची ती नदी होती. 6तो
माणूस मला म्हणाला, "मानवपुत्रा, तुला दिसलेल्या गोष्टी
तू लक्षपूर्वक पाहिल्यास ना?"
मग त्याने मला नदीच्या काठाने परत आणले. 7नदीच्या
काठाने परत येताना नदीच्या दोन्ही तीरांवर मला दाट
झाडी दिसली. 8तो माणूस मला म्हणाला, "हे पाणी पूर्वेला
वाहते. हे अराब दरीतून जाऊन मृत समुद्राला मिळते.
त्यामुळे त्या समुद्राचे पाणी ताजे होते. 9हे पाणी मृत समुद्राला
मिळत असल्याने तेथील पाणी ताजे व स्वच्छ होते. तेथे
खूप मासे मिळतात. ह्या नदीकाठच्या प्रदेशात सर्व प्रकारचे
प्राणी आहेत. 10एन-गेदीपासून एन-इग्लाइमपर्यंत तुला
मच्छीमार नदीकाठी उभे असलेले दिसू शकतील.
आपापली जाळी टाकून अनेक प्रकारचे मासे ते पकडत
असल्याचे तुला दिसेल. भूमध्य समुद्रात जितक्या प्रकारचे
मासे आहेत, तितक्याच प्रकारचे मासे मृतसमुद्रात आहेत.

---

**स्वातंत्र्याचे वर्ष** वा वार्षिकोत्सव गुलाम जर इस्राएली असेल तर इस्राएली लोकांना 50 वर्षानंतर त्यास मुक्त करावे लागे. त्या वेळेस गुलामाला जमिनीच्या मूळच्या मालकाला जमीन परत करावी लागे.

[11]पण दलदल आणि पाणथळीच्या लहान लहान जागा मिठासाठी तशाच ठेवल्या जातील. [12]नदीच्या दोन्ही काठावर सर्व प्रकारची फळझाडे वाढतात. त्यांची पाने कधीच सुकून गळत नाहीत. त्या झाडांवर नेहमीच फळे असतात. दर महिन्याला झाडांना बहर येतो का? कारण झाडांना मंदिरातून येणारे पाणी मिळते. झाडांची फळे खाण्यासाठी उपयोगी पडतील व पाने औषधी असतील."

## वंशांसाठी जमिनीची विभागणी

[13]परमेश्वर, माझा प्रभू, पुढील गोष्टी सांगतो "इस्राएलच्या बारा वंशासाठी जमिनीची विभागणी पुढीलप्रमाणे होईल. योसेफाला दोन भाग मिळतील. [14]तुम्ही जागेची सारखी वाटणी कराल. मी तुमच्या पूर्वजांना ही जमीन देण्याचे कबूल केले होते. म्हणून मी ती तुम्हाला देत आहे.

[15]"जमिनीच्या सीमा अशा असतील. उत्तरेला भूमध्य समुद्रापासून, हेथलोनच्या बाजूने हमाथकडे रस्ता वळतो तेथपर्यंत आणि पुढे सदाद, [16]बेरोथा, सिब्राईम (जे दिमिष्क व हमाथ यांच्या सीमेवर आहे.) हासेर-हत्तीकोन (जे हौरानच्या सीमेवर आहे.) येथपर्यंत. [17]म्हणजेच उत्तरेची सीमा समुद्रापासून, दिमिष्क व हमाथ यांच्या उत्तरसीमेवर असलेल्या हसर-एनोनपर्यंत असेल.

[18]"पूर्वेला सीमारेषा हसर-एनोनपासून हौरान व दिमिष्कमधून. पुढे यार्देन नदीच्या कडेने गिलाद व इस्राएलच्या मधून पूर्व समुद्राच्या पुढे पार तामारपर्यंत जाईल.

[19]"दाक्षिणेला तामारपासून पार मेरीबोथ-कादेशच्या हिरवळीच्या प्रदेशा पलीकडे मिसरच्या ओढ्याच्या पुढे भूमध्य समुद्रापर्यंत सीमा असेल.

[20]"पश्चिमेला अगदी लेबो-हामाथपर्यंतचा भूमध्य समुद्र हीच सीमा असेल.

[21]"तेव्हा तुम्ही ही जमीन इस्राएलच्या वंशांमध्ये आपापसात वाटाल. [22]तुम्ही तुमच्यात आणि तुमच्यामध्ये राहात असलेल्या परक्यांमध्ये अथवा ज्या परक्यांची मुले तुमच्यात राहात आहेत त्यांच्यात वाटाल. हे परके इस्राएलमध्ये जन्मलेल्या लोकांप्रमाणेच इस्राएलचे रहिवासी आहेत. त्यामुळे इस्राएलच्या वंशांना दिलेल्या जमिनीतील काही भाग तुम्ही ह्या लोकांना द्यावा. [23]हे परके जेथे राहतात, तेथे राहणाऱ्या इस्राएलींनी त्यांना काही जमीन दिलीच पाहिजे." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

## इस्राएलच्या वंशांसाठी जमीन

48 [1-7]"उत्तर-सीमा पूर्वेकडील भूमध्य समुद्रापासून पुढे हेथलोन, हामाथची खिंड ओलांडून पार पुढे दिमिष्क व हामाथ यांच्या सीमेवरील हसर-एनोनपर्यंत जाते. काही वंशांना दिलेला जमिनीचा पट्टा ह्या सीमेच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे पसरलेला असेल. ज्यांना ही जमीन दिली जाईल ते वंश उत्तरेकडून दक्षिणेकडे पुढीलप्रमाणे आहेत. दान, आशेर, नफताली, मनश्शे, एफ्राईम, रऊबेन, यहूदा.

## जमिनीचा विशेष विभाग

[8]"ह्या जमिनीचा पुढचा भाग विशेष वापरासाठी आहे. हा भाग यहूदाला मिळालेल्या जमिनीच्या दक्षिणेला आहे. हा प्रदेश उत्तरेकडून दक्षिणेकडे 25,000 हात (8.3 मैल) लांबीचा आहे. पूर्वेकडून पश्चिमेकडे त्याची रूंदी इतर वंशांना मिळालेल्या जमिनीच्या रूंदी एवढीच असेल ह्या जमिनीच्या मध्यावर मंदिर असेल. [9]तुम्ही जमीन परमेश्वराला अर्पण करावी. ती लांबीला 25,000 हात (8.3 मैल) व रूंदीला 20,000 हात (6.6 मैल) असेल. [10]ही विशेष जमीन याजकांना आणि लेवी यांच्यात विभागली जाईल.

"याजकांना ह्या जमिनीचा एक भाग मिळेल. ही जमीन उत्तरेला 25,000 हात लांबीची, पूर्वेला व पश्चिमेला दहा-दहा हजार हात रूंदीची असेल. तिची दक्षिणेला लांबी 25,000 हात असेल. ह्या जमिनीच्या बरोबर मध्यावर परमेश्वराचे मंदिर असेल. [11]ही जमीन सादोकच्या वशांजासाठी असेल. माझे पवित्र याजक म्हणून ह्या लोकांची निवड केली गेली होती का? कारण इस्राएलच्या लोकांनी जेव्हा माझा त्याग केला, तेव्हा त्यांनी माझी सेवा केली. लेवींच्या इतर वंशांप्रमाणे सादोकच्या लोकांनी मला सोडून दिले नाही. [12]ह्या पवित्र जमिनीच्या भागातील हा खास हिस्सा विशेषत: ह्या याजकांसाठीच असेल. हा भाग लेवींच्या भागाच्या पलीकडेच असेल.

[13]"याजकांना मिळालेल्या जमिनीच्या भागाचा पुढचा भाग लेवींच्या हिश्शाचा असेल. तो 25,000 हात (8.3 मैल) लांबीचा व 10,000 हात (3.3 मैल) रूंदीचा असेल. त्यांना पूर्ण लांबी रूंदीची, म्हणजे 25,000 हात (8.3 मैल) लांबीची व 20,000 हात (6.6 मैल) रूंदीची जमीन मिळेल. [14]लेवी ह्या जमिनीची विक्री वा अदलाबदली करू शकणार नाहीत. त्यांनी देशाचा भाग वेगळा तोडता कामा नये. का? कारण ही जमीन परमेश्वराची आहे. ती विशेष आहे तो जमिनीचा सर्वांत उत्कृष्ट भाग आहे.

## नगराच्या मालमत्तचे हिस्से

[15]"याजक व लेवी यांना दिलेली जमीन सोडून, 5,000 हात (1.6 मैल) रूंदीची व 25,000 हात (8.3 मैल) लांबीची जमीन शिल्लक राहील. ती नगरासाठी, कुरणासाठी, घरे बांधण्यासाठी उपयोगात येईल. सामान्य लोकांनी या जागेचा वापर करावा. नगर ह्या जमिनीच्या मध्यावर वसेल. [16]नगरीची मापे पुढीलप्रमाणे असतील उत्तर बाजू 4,500 हात दक्षिण बाजू 4,500 हात पूर्व व पश्चिम बाजूही तेवढ्याच म्हणजे 4,500 हात असतील. [17]नगरासाठी कुरण असेल. त्यांची चारी बाजूंची लांबी सारखी म्हणजे 250 हात (437 फूट 6 इंच) असेल. [18]पवित्र भागाच्या पूर्वेला व पश्चिमेला जी जमीन उरेल,

तिची लांबी 10,000 हात (3.3 मैल) असेल. ही जमीन पवित्र भागाच्या बाजूला लागून असेल. ह्या जमिनीत नगराच्या कामगारांसाठी धान्य पिकविले जाईल.
19नगरातील कामकरी जमिनीची मशागत करतील. हे लोक इस्राएली वंशांपैकी असतील.

20"हा जमिनीचा विशेष भाग चौरसाकृती असेल. तो 25,000 हात (8.3 मैल) लांब व 25,000 हात (8.3 मैल) रूंद असेल. खास उद्देशासाठी तुम्ही हा भाग वेगळा ठेवावा. ह्यातील एक हिस्सा याजकसाठी, एक लेवींसाठी व एक नगरासाठी असेल.

21–22"जमिनीच्या विशेष भागाचा एक हिस्सा राजाचा असेल. हा जमिनीचा विशेष भाग चौरसाकृती असेल. तो 25,000 हात (8.3 मैल) लांबीचा व 25,000 हात (8.3 मैल) रूंदीचा असेल. ह्यातील काही हिस्सा याजकाचा, काही लेवींचा व काही मंदिराकरिता आहे. मंदिर ह्या भागाच्या मध्यभागी आहे. शिल्लक राहिलेली जमीन देशाच्या राजाच्या मालकीची आहे. राजाला, बन्यामीनची जमीन व यहूदाची जमीन यांच्यामधील जमीन मिळेल.

23–27"ह्या विशेष जमिनीच्या दक्षिणेकडची जमीन यार्देन नदीच्या पूर्वेला राहणाऱ्या वंशांना मिळेल. पूर्व–सीमेपासून भूमध्य समुद्रापर्यंत पसरलेल्या ह्या जमिनीचा हिस्सा ज्या वंशांना मिळेल, ते वंश उत्तरेकडून दक्षिणेकडे असे: बन्यामीन, शिमोन, इस्साखार, जबुलून, गाद.
28गादच्या जमिनीची दाक्षिण सीमा तामारपासून मरीबोथ–कादेशच्या हिरवळीच्या प्रदेशापर्यंत आणि तेथून पुढे मिसरच्या ओढ्याच्या बाजूने थेट भूमध्य समुद्रापर्यंत जाते.
29हीच जमीन इस्राएलच्या वंशात विभागली जाईल. प्रत्येक वंशाला येथेच जमिनीचा भाग मिळेल." परमेश्वर, माझा प्रभू, असे म्हणाला.

## नगरीची प्रवेशद्वारे

30"नगरीची प्रवेशद्वारे पुढीलप्रमाणे त्यांना, इस्राएलच्या वंशांवरून नावे देण्यात येतील.

"नगरीची उत्तर बाजू 4,500 हात (1.5 मैल) लांबीची असेल.

31"तिला तीन द्वारे असतील. रऊबेनचे द्वार, यहूदाचे द्वार व लेवीचे द्वार.

32"नगरीची पूर्व बाजू 4,500 हात (1.5 मैल) लांब असेल. तिला तीन द्वारे असतील. योसेफाचे द्वार, बन्यामीनाचे द्वार व दानाचे द्वार.

33"नगरीची दक्षिण बाजूसुद्धा 4,500 हात (1.5 मैल) लांबीची असेल. तिलाही शिमोनाचे द्वार, इस्साखाराचे द्वार व जबुलूनाचे द्वार अशी तीन द्वारे असतील.

34"नगरीची पश्चिम बाजूही 4,500 हात (1.5 मैल) लांब असेल. तिच्या तीन द्वारांची नावे पुढीलप्रमाणे असतील. गादाचे द्वार, आशेराचे द्वार व नफतालीचे द्वार.

35"नगरीभोवतीचे अंतर 18,000 हात (6 मैल) असेल. या क्षणापासून नगरीचे नाव परमेश्वर तेथे आहे"'* असे पडेल.

---

**परमेश्वर तेथे आहे** हिब्रूमध्ये ह्या नावाचा अर्थ यरुशलेम.

# दानीएल

## दानीएलला बाबेलला नेले

1 नबुखदनेस्सर हा बाबेलाचा राजा होता. नबुखद्नेस्सर
यरुशलेमाला आला. आपल्या सैन्याच्या मदतीने त्याने
यरुशलेमला वेढा घातला. यहूदाचा राजा यहोयाकीम याच्या
कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी* हे घडले. 2परमेश्वरानेच
नबुखद्नेस्सराच्याकरवी यहूदाचा राजा यहोयाकीम याचा
पराभव केला. नबुखद्नेस्सरने देवाच्या मंदिरातील ताटल्या
व इतर वस्तू नेल्या आणि बाबेलमधील त्याच्या मूर्तीच्या
देवळात ठेवल्या.
3नंतर नबुखदनेस्सर राजाने अश्पनजला हुकूम केला.
(अश्पनज हा, राजाच्या सेवेत असणाऱ्या नपुंसक
अधिकाऱ्यांतील सर्वांत महत्वाचा अधिकारी होता.) राजाने
अश्पनजला, काही इस्राएली लोकांना त्याच्या राजवाड्यात
आणण्यास सांगितले. नबुखदनेस्सरला महत्वाच्या
घराण्यातील आणि राजघराण्यातील इस्राएली लोक हवे
होते. 4राजाला, सुदृढ, तरुण, ज्यांच्या अंगावर जखमेची
खूण वा व्रण नाही, ज्यांच्या शरीरांत काहीही दोष नाही
असे यहूदी तरुण हवे होते. ते देखणे व चाणाक्ष असावेत
अशी राजाची अपेक्षा होती. त्यांनी सहजतेने पण लवकर
सर्व गोष्टी शिकून राजाची सेवा करावी, अशी राजाची
इच्छा होती. राजाने अश्पनजला, इस्राएलच्या त्या तरुणांना,
खास्दी भाषा व लेखन शिकविण्यास सांगितले होते.
5राजा नबुखद्नेस्सर, त्या तरुणांना, तो स्वत: जे अन्न
खाई तेच अन्न व मद्य, ठरावीक प्रमाणात रोज देत असे.
इस्राएलच्या ह्या तरुणांनी तीन वर्षांत सर्व शिक्षण पूर्ण
करावे, अशी राजाची इच्छा होती. मग ते राजाच्या सेवेत
रूज व्हायचे होते. 6दानीएल, हनन्या, मीशाएल व अजऱ्या
असे ते चौघेजण होते. ते सर्व यहूदा वंशापैकी होते.
7नंतर अश्पनाजने ह्या यहूदी तरुणांना बाबेलच्या
लोकांच्या नावाप्रमाणे नावे दिली. ती अशी: दानीएलला
बेल्टशस्सर, हनन्याला शद्रख, मीशाएलला मेशख, व
अजऱ्याला अबेद्नगो.
8दानीएलला राजाचे ते पौष्टिक अन्न व मद्य घेऊन,
स्वत:ला अपवित्र करून घेण्याची अजिबात इच्छा
नव्हती. म्हणून त्याने ह्यासाठी अश्पनजची परवानगी
मागितली.
9देवाने अश्पनजला दानीएलशी चांगले व दयेने
वागण्याची बुध्दी दिली. 10पण अश्पनज दानीएलला
म्हणाला, “मला, माझ्या स्वामी, राजाची भीती वाटते.
तुम्हाला असे अन्न व पेय देण्याचा हुकूम राजाने दिला
आहे. तुम्ही हे अन्न खाल्ले नाहीत तर तुम्ही अशक्त व
आजारी दिसू लागाल, तुमच्याच वयाच्या इतर तरुणांपेक्षा
तुम्ही वाईट दिसू लागाल. राजाने हे पाहिले, तर तो माझ्यावर
रागावेल आणि माझे डोकेसुध्दा कदाचित् उडवेल. माझ्या
मृत्यूला मग तुम्हीच कारणीभूत व्हाल.”
11अश्पनजने दानीएल, हनन्या, मीशाएल व अजऱ्या
ह्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एका पहाकेऱ्याची नेमणूक
केली होती. त्या पहारेकऱ्याबरोबर मग दानीएलचे बोलणे
झाले. 12दानीएल त्याला म्हणाला, “आम्हाला खाण्यास
फक्त भाज्या व पिण्यास पाणी दे. असे तू दहा दिवस
करून बघ. 13दहा दिवसानंतर तू जे तरुण राजाने दिलेले
अन्न खातात, त्यांच्याबरोबर आमची तुलना करून, कोण
जास्त सुदृढ दिसतात, ते तुझे तूच ठरव. मग आम्हाला
काय द्यायचे ह्याचा निर्णय तुझा तूच घे. आम्ही तुझे नोकर
आहोत.”
14तेव्हा पहारेकरी दानीएल, हनन्या, मीशाएल, व
अजऱ्या यांची चाचणी घ्यायला तयार झाला. 15दहा
दिवसानंतर पाहिले तर दानीएल व त्याच्या मित्रांची प्रकृती
राजाचे पौष्टिक अन्न खाणाऱ्या इतर तरुणांपेक्षा निरोगी
होती. 16मग पहारेकऱ्याने, दानीएल, हनन्या, मीशाएल व
अजऱ्या ह्यांना राजाने दिलेल्या खास अन्नाऐवजी भाज्या
देण्याचाच परिपाठ ठेवला.
17देवाने ह्या चौघांना सुज्ञपणा व निरनिराळ्या प्रकारचे
साहित्य व विज्ञान शिकण्याची क्षमता दिली होती.
दानीएलला तर सर्व प्रकारच्या दृष्टांन्ताबद्दल व स्वप्नांबद्दल
समजू शके.
18सर्व तरुणांनी तीन वर्षांत शिकून तयार व्हावे, अशी
राजाची इच्छा होती. राजाने ठरवून दिलेल्या कालावधीनंतर
म्हणजे तीन वर्षांनंतर अश्पनजने सर्व तरुणांना
नबुखद्नेस्सर राजापुढे उभे केले. 19राजा त्यांच्याशी
बोलल्यावर, त्याच्या लक्षात आले की दानीएल, हनन्या,
मीशाएल व अजऱ्या ह्या चौघांएवढे कोणीही बुध्दिमान
नाहीत. म्हणून ह्याच चौघांना राजाच्या पदरी ठेवले गेले.
20जेव्हा जेव्हा राजाने त्यांना काही महत्वाचे विचारले,

---

**यहूदाचा ... वर्षी** म्हणजे ख्रि.पू. 605 मध्ये.

तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी त्यांचे ज्ञान व जाण दिसून आली.
त्याच्या राज्यातील ज्ञानी माणसांपेक्षा वा मांत्रिकांपेक्षा हे
दहापटीने हुशार आहेत, हे राजाच्या लक्षात आले. 21म्हणून
दानीएलला कोरेश राजाच्या कारकिर्दीच्या पहिल्या
वर्षापर्यंत राजाच्या पदरी ठेवून घेण्यात आले.

## नबुखद्नेस्सरचे स्वप्न

2 नबुखद्नेस्सरला त्याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षात
काही स्वप्ने पडली. त्या स्वप्नांमुळे तो काळजीत
पडला व त्याची झोप उडाली. 2म्हणून त्याने त्याच्या ज्ञानी
माणसांना बोलावून घेतले. हे ज्ञानी स्वप्नांचा अर्थ
लावण्यासाठी आणि भविष्यात काय घडेल, हे सांगण्यासाठी
मंत्र–तंत्र करीत व ताऱ्यांचे निरीक्षण करीत. ह्या लोकांनी
राजाला काय स्वप्न पडले आहे, ते सांगावे, अशी राजाची
इच्छा होती. मग ते लोक राजाच्या समोर येऊन उभे
राहिले.

3राजा त्यांना म्हणाला, “मला पडलेल्या स्वप्नामुळे मी
चिंतेत पडलो आहे. मला स्वप्नाचा अर्थ समजावून घ्यायचा
आहे.”

4मग खास्दी अरामी भाषेत राजाला म्हणाले, “राजा,
चिरंजीव हो! आम्ही तुझे सेवक आहोत. कृपा करून
आम्हाला तुझे स्वप्न सांग, म्हणजे मग आम्ही तुला त्याचा
अर्थ सागू.”

5तेव्हा नबुखद्नेस्सर राजा त्यांना म्हणाला, “नाही!
तुम्हीच मला स्वप्न व त्याचा अर्थ सांगितला पाहिजे.
तुम्ही हे सांगितले नाही, तर तुमचे तुकडे तुकडे करण्याचा
हुकूम मी देईन. एवढेच नाही तर तुमच्या घरांची राखरांगोळी
करीन. 6पण तुम्ही मला माझे स्वप्न आणि त्याचा अर्थ
सांगितलात, तर मी तुम्हाला भेटी, बक्षिसे देईन. तुमचा
सन्मान करीन. तेव्हा आता माझे स्वप्न व त्याचा अर्थ
सांगा.”

7ते ज्ञानी लोक पुन्हा राजाला म्हणाले, “कृपा करून
बस आम्हाला तुझे स्वप्न सांग म्हणजे आम्ही त्याचा अर्थ
सांगू.”

8मग नबुखद्नेस्सर उत्तरला, “तुम्ही वेळ काढीत आहात,
हे मला कळले आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्हाला
कळला, असे मला वाटते. 9तुम्ही मला माझे स्वप्न सांगितले
नाहीत तर तुम्हाला शिक्षा होणार, हे तुम्हाला माहीतच
आहे. म्हणून तुम्ही सर्व एक होऊन माझ्याशी खोटे बोलत
आहात. तुम्ही वेळकाढूपणा करू पाहत आहात. मी तुम्हाला
सांगितलेले विसरेन अशी आशा तुम्ही धरून आहात. पण
आता आधी मला माझे स्वप्न सांगा. तुम्ही मला स्वप्न
सांगू शकलात, तर तुम्ही त्याचा खरा अर्थही सांगू शकाल,
हे मला पटेल.”

10खास्दी राजाला म्हणाले, “राजा, तू जे मागत आहेस,
ते देऊ शकणारा एकही माणूस या पृथ्वीवर नाही.
अजूनपर्यंत कोणत्याही राजाने, ज्ञानी वा मांत्रिक अथवा
खास्दी याच्याजवळ अशा प्रकारची मागणी केलेली नाही.
अगदी मोठ्या व सामर्थ्यवान राजांनीसुध्दा ज्ञानी माणसांकडे
असे काही, कधीही मागितलेले नाही. 11राजा, अशक्य
गोष्ट करण्यास सांगत आहे. फक्त दैवतंच राजाला त्याचे
स्वप्न व त्याचा अर्थ सागू शकतात. पण दैवत माणसांमध्ये
राहात नाहीत.”

12हे बोलणे ऐकून राजाचा पारा चढला. मग त्याने
बाबेलमधील सर्व ज्ञानी माणसांना ठार करण्याचा हुकूम
दिला. 13राजाच्या हुकूमाची दवंडी पिटविण्यात आली.
सर्व ज्ञानी माणसे ठार केली जाणार होती. राजाचे लोक,
दानीएलला व त्याच्या मित्रांना ठार मारण्यासाठी त्यांचा
तपास करण्यासाठी गेले.

14अर्योक शिपायांचा म्होरक्या होता. तोच बाबेलमधील
ज्ञानी माणसांना ठार मारणार होता. पण दानीएल त्याच्याशी
चातुर्याने व विनयाने बोलला. 15दानीएल अर्योकला
म्हणाला राजाने अशी कडक शिक्षा का ठोठावली?”

मग अर्योकने राजाच्या स्वप्नाची सर्व हकिगत वर्णन
केली. मग दानीएलला सर्व समजले. 16सर्व हकिगत
समजताच दानीएल नबुखद्नेस्सर राजाकडे गेला व त्याने
राजाजवळ थोडा वेळ मागितला. मग तो राजाला त्याचे
स्वप्न व त्या स्वप्नाचा अर्थ सांगणार होता.

17मग दानीएल त्याच्या घरी गेला. हनन्या, मीशाएल व
अजऱ्या ह्या आपल्या मित्रांना त्याने सर्व हकिगत सांगितली.
18दानीएलाने आपल्या मित्रांना स्वर्गातील देवाची प्रार्थना
करण्यास सांगितले. दानीएलने त्यांना प्रार्थना करण्यास
सांगितले कारण त्यामुळे देव त्यांच्यावर कृपा करील व
हे रहस्य समजण्यास मदत करील. मग तो व त्याचे मित्र,
बाबेलच्या इतर ज्ञानी माणसाबरोबर मारले जाणार नाहीत,
असे त्याला वाटले.

19रात्री, देवाने दानीएलला दृष्टान्त देऊन सर्व रहस्य
उलगडून सांगितले. मग दानीएलने स्वर्गातील देवाचे
स्तुतिस्तोत्र गायले. तो म्हणाला,

20 “सदासर्वकाळ देवाच्या नावाची स्तुती करा. सामर्थ्य
व ज्ञान त्याच्यापाशीच आहे.

21तो काळ आणि ऋतू बदलतो. आणि राजेही बदलतो.
तोच राजांना सत्ता देतो. आणि तोच त्यांची सत्ता काढून
घेतो. लोकांनी शहाणे व्हावे म्हणून तो त्यांना शहाणपण
देतो, त्यांनी ज्ञानी व्हावे म्हणून तो त्यांना सर्व गोष्टी शिकू
देतो.

22समजण्यास अतिशय कठीण असलेली, गुप्त रहस्ये
त्याला माहीत असतात. प्रकाश त्याच्याबरोबर असल्यामुळे,
अंधारात आणि गुप्त जागी काय आहे ते त्याला कळते.

23माझ्या पूर्वजांच्या देवा, मी कृतज्ञ आहे, मी तुझी
स्तुती करतो. तू मला ज्ञान व शक्ती दिलीस. मी विचारलेल्या
गोष्टी सांगितल्यास. तूच मला राजाच्या स्वप्नाबद्दल
सांगितलेस.”

## दानीएल स्वप्नचा अर्थ सांगतो

24मग दानीएल अर्योककडे गेला. नबुखद्नेस्सर राजाने,
बाबेलमधील ज्ञानी माणसांना ठार मारण्याच्या काम
अर्योकचीच निवड केली होती. दानीएल त्याला म्हणाला,
"बाबेलमधील ज्ञानी माणसांना मारू नको. मला राजाकडे
घेऊन चल! मी राजाला, त्याचे स्वप्न व त्याचा अर्थ,
सांगीन."

25मग अर्योकने ताबडतोब दानीएलला राजाकडे नेले.
अर्योक राजाला म्हणाला, "महाराजांना त्यांच्या स्वप्नांचा
अर्थ सांगू शकणारा एकजण मला यहूदातील कैद्यां मध्ये
सापडला आहे."

26राजाने दानीएलला (बेलशटस्सरला) प्रश्न केला,
"तू मला माझे स्वप्न व त्याचा अर्थ सागू शकतोस का?"

27दानीएलने उत्तर दिले, "राजा, नबुखद्नेस्सर, तू
विचारलेली गुप्त गोष्ट ज्ञानी किवा मांत्रिक अथवा खास्दी
कोणीच सांगू शकणार नाही. 28पण अशा रहस्यमय गोष्टी
स्वर्गातील देवच सांगतो. पुढे काय घडणार हे
दाखविण्यासाठीच नबुखद्नेस्सर राजाला देवाने स्वप्नात
पाडले. तू झोपला असताना पुढील गोष्टी स्वप्नात
पाहिल्यास: 29राजा, तू तुझ्या शय्येवर झोपला होतास. मग
तू भविष्यात घडणाऱ्या गोष्टीबंद्दल विचार करायला
लागलास. देव लोकांना रहस्ये सांगू शकतो. त्याने तुला
भविष्यात काय घडणार ते दाखविले. 30देवाने मलाही ते
रहस्य सांगितले. का? मी इतरांपेक्षा ज्ञानी आहे म्हणून
नव्हे, तर तुला त्याचा अर्थ कळावा आणि तुझ्या मनात
काय विचार येऊन गेले ते तुला समजावे, म्हणूनच देवाने
मला हे रहस्य सांगितले.

31"राजा, तू स्वप्नात तुझ्यासमोर एक प्रचंड, चकचकीत,
मनावर छाप पाडणारा पुतळा पाहिलास. त्याच्याकडे बघताच
कोणाचेही डोळे आश्चर्याने विस्फारावे असा तो होता.
32–33पुतळ्याचे डोके शुध्द सोन्याचे होते. छाती आणि हात
चांदीचे होते पोट व वरील पायाच्या बाकीचा भाग काशाचा
होता. खालील पायाचा भाग लोखंडाचा होता. ह्या पुतळ्याची
पावले लोखंड व माती यांची होती. 34तू पुतळ्याकडे बघत
असतानाच एक कापलेला दगड तुला दिसला. तो दगड
कोणा माणसाने छेदलेला नव्हता. मग तो दगड [हवेतून
गेला] आणि पुतळ्याच्या लोखंड व माती यांनी बनलेल्या
पायावर आदळला. त्याने पावलांचा चक्क ाचूर केला.
35त्यानंतर एकदमच लोखंड माती, काशे, चांदी, सोने
ह्यांचा चुरा झाला तो चुरा उन्हाळ्यातील खळ्यातील
फोलकटाप्रमाणे वाऱ्याने दूरवर उडवला गेला. मागे
काहीच उरले नाही. तेथे पुतळा होता हे कोणलाही खरे
वाटले नसते. मग पुतळ्यावर आदळणाऱ्या दगडाचा मोठा
पर्वत झाला व त्याने सर्व पृथ्वी व्यापली.

36"हेच तुझे स्वप्न होते. आता आम्ही राजाला त्या
स्वप्नाचा अर्थ सांगतो. 37राजा, तू सर्वांमध्ये मोठा राजा
आहेस. स्वर्गातल्या देवाने तुला राज्य, सत्ता, सामर्थ्य व
वैभव दिले आहे. 38देवाने तुझ्याहाती नियंत्रण दिले आहे.
म्हणून तू माणसे, हिंस्र प्राणी, पक्षी ह्यावर काबू ठेवतोस. ते
जेथे कोठे असतील, तेथे त्यांच्यावर देवाने तुझी सत्ता
ठेवली आहे. नबुखद्नेस्सर राजा, तूच त्या पुतळ्याचे
सोन्याचे डोके आहेस.

39"तुझ्यानंतर येणारे राज्य म्हणजेच पुतळ्याचा
चांदीचा भाग, हे राज्य तुझ्या राज्याएवढे श्रेष्ठ नसेल.
नंतर, तिसरे राज्य पृथ्वीवर सत्ता गाजवेल हा काशाचा
भाग होय. 40मग चौथे राज्य येईल ते लोखंडाप्रमाणे मजबूत
असेल. ज्याप्रमाणे लोखंड वस्तूचे तुकडे करते, चुरा
करते, त्याप्रमाणे ते इतर सर्व राज्यांचा चक्क ाचूर
करील.

41"पुतळ्याच्या पावलांचा काही भाग लोखंडाचा व काही
मातीचा बनलेला होता, असे तुला दिसले. ह्याचा अर्थ
चौथ्या राज्यात भाग असतील. तू लोखंड मातीत मिसळलेले
पाहिलेस. म्हणजेच त्या राज्याला थोडे लोखंडासारखे बळ
असेल. 42पुतळ्याच्या पावलांचा काही भाग लोखंडाचा व
काही मातीचा होता. म्हणजेच चौथे राज्य काही प्रमाणात
लोखंडासारखे बळकट तर काही प्रमाणात मातीसारखे
दुर्बळ, कच्चे असेल. 43तू लोखंडात माती मिसळलेली
पाहिलेस पण लोखंड व माती यांचे एकजीव मिश्रण होऊ
शकत नाही त्याचप्रमाणे चौथ्या राज्यात वेगवेगळे लोक
असतील त्यांची एकी होणार नाही.

44"चौथ्या राजाच्या कारकिर्दीत, स्वर्गातला देव आणखी
एक राज्य निर्माण करील. ते कायमचे राहील. त्याचा
कधीही नाश होणार नाही. ते दुसऱ्या घराण्याकडे सोपविता
येणार नाही. हे राज्य इतर राज्यांना चिरडून टाकील,
त्यांचा शेवट करील पण ते राज्य सदासर्वकाळ टिकून
राहील.

45"राजा, तू पर्वतातून एक दगड छेदलेला पाहिलास.
पण तो कोणा माणसाने छेदलेला नव्हता. त्या दगडाने
लोखंड, माती, काशे, चांदी, सोने यांचा चुराडा केला.
ह्यातून देवाने तुला भविष्यात घडणाऱ्या घटनाच दाखविल्या
आहेत. स्वप्न खरे आहे व त्याच्या अर्थावरही तू विश्वास
ठेऊ शकतोस."

46मग नबुखद्नेस्सर राजाने दानीएलापुढे नमन केले.
त्याने दानीएलची स्तुती केली. दानीएलाच्या सन्मानार्थ
त्याला भेट व धूप देण्याचा त्याने हुकूम दिला. 47मग राजा
दानीएलला म्हणाला, "तुझा देव अती महत्वाचा व
सामर्थ्यशाली आहे, ह्याची मला खात्री पटली. तो परमेश्वरच
राजांचा राजा आहे. तो लोकांना अज्ञात गोष्टी सांगतो, हे
खरेच आहे म्हणून तू रहस्याचा उलगडा करून देऊ
शकलास."

48मग राजाने दानीएलला राज्यात महत्वाचे अधिकारपद
दिले. त्याने त्याला बहुमोल भेटी दिल्या. राजांने बाबेलच्या
परगण्याची सत्ता दानीएलकडे सोपविली. त्याने सर्व ज्ञानी
माणसांचा प्रमुख म्हणून दानीएलची नेमणूक केली. 49मग

शद्रख, मेशख व अबेद्नगो ह्यांची बाबेल परगण्याचे मुख्य
अधिकारी म्हणून नेमणूक करण्याची विनंती दानीएलने
राजाला केली व राजाने त्याच्या म्हणण्याप्रमाणे केले.
दानीएल स्वत: राजाचा महत्वाचा व जवळचा माणूस
बनला.

## सोन्याची मूर्ती व तापलेली भट्टी

3 नबुखद्नेस्सर राजाने एक सोन्याची मूर्ती केली होती.
ती 90 फूट* उंचीची व 9 फूट* रूंदीची होती.
नंतर त्याने ती दुरा नावाच्या सपाट प्रदेशात स्थापिली. हा
सपाट प्रदेश बाबेल परगण्यात होता. 2मग राजाने
प्रांताधिकारी, मुलकी अधिकारी, राज्यपाल, सल्लागार,
कोषाधिकारी, न्यायाधीश, राज्याचे कारभारी, व राज्याच्या
इतर सर्व महत्वाच्या अधिकाऱ्यांना एकत्र बोलाविले. त्या
सर्वांनी मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी एकत्र जमावे अशी राजाची
इच्छा होती.

3म्हणून ते सर्वजण येऊन नबुखद्नेस्सर राजाने
स्थापलेल्या मूर्तीसमोर उभे राहिले. 4तेव्हा राजाच्या वतीने
घोषणा करणारा मोठ्याने म्हणाला, “निरनिराळ्या
राष्ट्रांतून आलेल्या व वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या
लोकांनो, लक्षपूर्वक ऐका! तुम्हाला पुढील आज्ञा करण्यात
येत आहे: 5सर्व प्रकारच्या वाद्यांचा आवाज ऐकताच तुम्ही
नतमस्तक झाले पाहिजे. शिंगे, बासरी, सतार, अलगुजे,
वीणा, तंबोरा ह्या व इतर वाद्यांचा आवाज ऐकताच, तुम्ही
सोन्याच्या मूर्तीची पूजा केली पाहिजे. नबुखद्नेस्सर राजाने
तिची स्थापना केली आहे. 6जर कोणी नतमस्तक होऊन
मूर्तीची पूजा करण्याचे टाळले तर त्याला अतितप्त भट्टीत
ताबडतोब फेकून देण्यात येईल.”

7त्यामुळे शिंग, बासरी, सतार, अलगुजे, तंबोरा ह्यांचा
व इतर वाद्यांचा आवाज ऐकताच सर्वांनी नतमस्तक
होऊन मूर्तीची पूजा केली. सर्व लोक, राष्ट्रे, सर्व
भाषक ह्यांनी नबुखद्नेस्सर राजाने स्थापलेल्या मूर्तीची
पूजा केली.

8ह्यानंतर काही खास्दी राजाकडे येऊन यहूद्यांविरुध्द
तक्रार करू लागले. 9ते नबुखद्नेस्सर राजाला म्हणाले,
“राजा, चिरंजीव होवो! 10राजा, शींग, बासरी, सतार,
अलगुजे, वीणा, तंबोरा ह्या व इतर सर्व वाद्यांचा आवाज
ऐकताच, प्रत्येकाने नतमस्तक होऊन सोन्याच्या मूर्तीची
पूजा करण्याची आज्ञा तू दिली होतीस. 11आणि तू असेही
म्हणाला होतास की जो कोणी असे करणार नाही, त्याला
तापलेल्या भट्टीत टाकून देण्यात येईल. 12पण राजा, काही
यहूद्यांनी तुझ्या आज्ञांकडे दुर्लक्ष केले. त्यांना तू बाबेल
परगण्याचे मुख्य अधिकारी म्हणून नेमलेस. शद्रख, मेशख,
अबेद्नगो हेच ते यहूदी होत. ते तुझ्या दैवताला पूजत
नाहीत. तू स्थापलेल्या मूर्तीपुढे नतमस्तक होऊन, त्यांनी
मूर्तीची पूजा केली नाही.”

13नबुखद्नेस्सरला राग आला. त्याने शद्रख, मेशख व
अबेद्नगो यांना बोलविणे पाठविले. मग त्यांना राजापुढे
आणण्याात आले. 14नबुखद्नेस्सर त्यांना म्हणाला, “शद्रख,
मेशख, अबेद्नगो, तुम्ही माझ्या दैवताला पूजत नाही हे
खरे आहे का? मी स्थापलेल्या सोन्याच्या मूर्तीची नतमस्तक
होऊन तुम्ही पूजा केली नाही, हेही खरे का? 15तुम्ही
शिंगे, बासरी, सतार, अलगुजे, वीणा, तंबोरा ह्यांचा व
इतर वाद्यांचा आवाज ऐकताच, नतमस्तक होऊन सोन्याच्या
मूर्तीची पूजा केली पाहिजे. मी घडविलेल्या मूर्तीची पूजा
करण्यास तुम्ही तयार असाल, तर चांगलेच आहे. पण
तुम्ही पूजा केली नाही, तर तुम्हाला ताबडतोब तापलेल्या
भट्टीत टाकण्यात येईल. मग माझ्या हातून कोणताच देव
तुमची सुटका करू शकणार नाही.”

16शद्रख, मेशख व अबेद्नगो राजाला म्हणाले,
“नबुखद्नेस्सर, ह्या गोष्टींचे स्पष्टीकरण करण्याची
आम्हाला गरज वाटत नाही. 17जर तू आम्हाला, भट्टीत
टाकलेस, तर आम्ही उपासना करीत असलेला देव आमचे
रक्षण करू शकतो आणि त्याची इच्छा असल्यास तो
तुझ्यापासून आमचा बचावही करू शकतो. 18पण जरी
देवाने आम्हाला वाचविले नाही, तरी, हे राजा, आम्ही
तुझ्या दैवतांना आम्ही भजणार नाही, हे लक्षात ठेव.
तू स्थापलेल्या सोन्याच्या मूर्तीची आम्ही पूजा करणार
नाही.”

19मग नबुखद्नेस्सराला खूप राग आला. त्याने शद्रख,
मेशख व अबेद्नगो यांच्याकडे तुच्छतेने पाहिले. त्याने
भट्टी नेहमीपेक्षा सातपट तापविण्याची आज्ञा दिली. 20मग
नबुखद्नेस्सरने त्याच्या सैन्यातील काही बलवान
सैनिकांना शद्रख, मेशख व अबेद्नगो यांना बांधण्याचा
हुकूम केला, आणि त्यांना, त्या तिघांना, तापलेल्या भट्टीत
टाकायला सांगितले.

21मग त्या तिघांना बांधून भट्टीत टाकण्यात आले.
त्यांनी अंगरखे, विजारी, टोप्या आणि इतर कपडे घातलेले
होते. 22राजा हुकूम देतेवेळी अतिशय रागावला असल्याने,
त्यांनी घाईघाईने भट्टी तापविली भट्टीची आच एवढी
होती की तिच्या ज्वाळांनी बलवान सैनिक मेले.
शद्रख, मेशख, व अबेद्नगो यांना टाकण्यासाठी ते
भट्टीजवळ गेले, तेव्हाच ते ज्वाळांनी भाजून मेले. 23शद्रख,
मेशख, अबेद्नगो भट्टीत पडले. त्यांना अगदी घट्ट बांधले
होते.

24मग नबुखद्नेस्सरने एकदम उडी मारली. तो
आश्चर्यचकीत झाला. त्याने आपल्या सल्लागारांना
विचारले, “आपण तिघांनाच बांधले आणि तिघांनाच
भट्टीत टाकले खरे ना?” सल्लागार उत्तरले, “हो
महाराज!” 25मग राजा म्हणाला, “पाहा! मला अग्नीमध्ये
चार माणसे चालताना दिसतात. ते बांधलेले नाहीत

---

**90 फूट** शब्दश: 60 हात.

**9 फूट** शब्दश: 6 हात.

व जळलेलेही नाहीत. चौथा देवदूताप्रमाणे* दिसत
आहे."
26मग नबुखद्नेस्सर तापलेल्या भट्टीच्या तोंडाजवळ गेला.
तो ओरडला, 'शद्रख, मेशख, अबेद्नगो, बाहेर या. परात्पर
देवाच्या सेवकांनो, इकडे या.'
मग ती तिघे आगीतून बाहेर आले. 27ते बाहेर येताच,
प्रांताधिकारी, मुलकी अधिकारी, राजाचे सल्लागार
राज्यपाल ह्यांनी त्यांच्याभोवती गर्दी केली. आगीने शद्रख,
मेशख व अबेद्नगो जळाले नाही, हे त्यांनी पाहिले होते.
त्यांचे अंग, केस किंवा वस्त्रे काहीच जळाले नव्हते.
एवढेच नव्हे तर ते आगीत असूनसुध्दा त्यांच्या अंगाला
जळकट वास येत नव्हता.
28मग नबुखद्नेस्सर म्हणाला, "शद्रख, मेशख व
अबेद्नगो यांच्या देवाचे स्तवन करा. त्याने देवदूताला
पाठवून आपल्या सेवकांचे आगीपासून रक्षण केले. ह्या
तिघांनी आपल्या देवावर निष्ठा ठेवली. त्यांनी माझा हुकूम
मानला नाही आणि दुसऱ्या दैवताला भजण्या-पूजण्याऐवजी
ते मरण्यास तयार झाले. 29म्हणून मी आता असा नियम
करतो की शद्रख, मेशख व अबेद्नगो यांच्या देवाच्याविरुध्द
बोलणाऱ्याचे मग तो कोठल्याही राष्ट्राचा वा कोठलीही
भाषा बोलणारा असो, तुकडे तुकडे करण्यात येतील. व
त्याच्या घराची राखरांगोळी करण्यात येईल. दुसरा
कोठलेही दैवत आपल्या माणसांना असे वाचवू शकणार
नाही." 30मग राजाने त्या तिघांना बाबेल परगण्यात आणखी
महत्वाची पदे दिली.

## नबुखद्नेस्सरचे झाडाबद्दलचे स्वप्न

4 नबुखद्नेस्सर राजाने पुष्कळ राष्ट्रांना, निरनिराळ्या
भाषा बोलणाऱ्या लोकांना आणि जगात वेगवेगळ्या
ठिकाणी राहणाऱ्या लोकांना पुढील पत्र लिहिले:

अभिवादन,
2परात्पर देवाने माझ्यासाठी केलेले चमत्कार व
विस्मयकारक गोष्टी आपल्याला सांगताना मला
आनंद होत आहे.

3देवाने आश्चर्यकारक चमत्कार केले आहेत. त्याने
प्रभावी चमत्कार केले आहेत. देवाचे राज्य चिरंतन आहे.
आणि त्याचे प्रभुत्व पिढ्यान्पिढ्या राहील.

4मी, नबुखद्नेस्सर, माझ्या राजवाड्यात सुखात
होतो. मी यशस्वी जीवन जगत होतो. 5पण मला
पडलेल्या स्वप्नाने मी भयभीत झालो. मी झोपलो
असताना मला काही प्रतिमा दिसल्या, काही दृष्टान्त
झाले त्यामुळे मी फार घाबरलो. 6म्हणून बाबेलमधील
सर्व ज्ञानी माणसांना बोलावून आणण्याचा हुकूम दिला.
का? कारण तेच मला माझ्या स्वप्नाचा अर्थ सांगू
शकले असते. 7मांत्रिक व खास्दी ह्यांना मी माझ्या
स्वप्नाबद्दल सांगितले, पण ते त्याचा अर्थ सांगू शकले
नाहीत. 8अखेर, दानीएलने येऊन मला स्वप्नाबद्दल
सांगितले, (मी दानीएलला माझ्या दैवताबद्दलची
भक्तिभावना व्यक्त करण्यासाठी बेल्टशस्सर असे
नाव दिले आहे. पवित्र दैवतांचा आत्मा त्यांच्या अंगात
आहे.) 9मी म्हणालो,
"बेलटशस्सर, तू सर्व मांत्रिकांत श्रेष्ठ आहेस.
तुझ्या अंगात पवित्र दैवतांचे आत्मे येतात हे मला
ठाऊक आहे. तुला समजण्यास असे रहस्य कोणतेच
नाही, हेही मला माहीत आहे. मला पडलेल्या ह्या
स्वप्नाचा अर्थ तू मला सांग. 10मी झोपलो असताना
मला पुढील दृष्टान्त झाले मी पृथ्वीच्या मध्यभागी
एक वृक्ष पाहिला. तो खूप उंच होता. 11तो खूप
वाढला व मजबूत झाला त्याचा शेंडा आकाशाला
भिडला.* पृथ्वीच्या पाठीवरून तो कोठूनही दिसू
शकत असे. 12त्या वृक्षाची पाने सुंदर होती. त्याला
पुष्कळ चांगली फळे आली होती. त्या वृक्षापासून
प्रत्येकाला भरपूर अन्न मिळत होते, वन्य प्राण्यांना
त्या वृक्षाच्या छायेत आसरा मिळत होता, तर पक्षी
फांद्यांवर राहात होते. प्रत्येकाला वृक्षापासून भक्ष्य
मिळत होते.
13"मी झोपलो असताना, दृष्टान्तात हे सर्व पाहात
होतो. मग मी पवित्र देवदूताला स्वर्गातून खाली येताना
पाहिले. 14तो खूप मोठ्याने बोलला, तो म्हणाला,
'वृक्ष तोडा, त्यांच्या फांद्या छाटा, पाने ओरबाडून काढा.
त्याची फळे भोवताली विखरून टाका. मग वृक्षाखाली
राहाणारे प्राणी दूर पळून जातील, फांद्यांवर राहाणारे
पक्षी दूर उडून जातील. 15पण खोड व मुळे जमिनीत
तशीच; राहू द्यात. त्याभोवती लोखंड व कासे यांची
जाळी लावा. खोड व मुळे तेथेच राहातील.
त्यांच्याभोवती गवत कढेल ते खोड व ती मुळे तेथेच
झाडा-झुडुपांमध्ये वन्य पशूंबरोबर राहातील, व दवाने
भिजतील. 16तो वृक्ष ह्यापुढे माणसाप्रमाणे विचार
करणार नाही. मानव-हृदयाऐवची त्याला पशुहृदय
मिळेल अशा रीतीने त्याला सात पावसाळे (सात
वर्षे) काढावे लागतील.'
17"त्या पवित्र देवदूतांनी अशी शिक्षा मोठ्याने
सुनावली. का? कारण परात्पर देवाचेच प्रभुत्व
मानवांच्या सर्व राज्यांवर आहे, हे पृथ्वीवरील सर्व
लोकांना कळावे, देव त्याच्या इच्छेप्रमाणे ही राज्ये

---

**देवदूत** शब्दश: "देवाचा पुत्र."

**पृथ्वीच्या मध्यभागी ... भिडला** बाबेलच्या लोकांच्या मते पृथ्वी ताटली किंवा चाकाप्रमाणे गोल व चपटी होती आष्टि आकाश काचेचा वाडगा पालथा घालावा तसे पृथ्वीवर पालथे होते.

त्याला वाटेल त्या माणसांच्या हाती सोपवितो, त्या
राज्यांवर राज्य करण्यासाठी तो नम्र लोकांची निवड
करतो.
18"माझे, नबुखद्नेस्सर राजाचे, स्वप्न असे होते.
आता, बेल्टशस्सर, (दानीएल) मला त्याचा अर्थ
सांग. माझ्या राज्यातला कोणीही ज्ञानी माणूस मला
ह्याचा अर्थ सांगू शकणार नाही. पण बेल्टशस्सर,
तुझ्या अंगात देवाच आत्मा (वास करीत) असल्याने,
तू ह्या स्वप्नाचा अर्थ लावू शकतोस."

19मग काही काळापर्यंत दानीएल (म्हणजे बेल्टशस्सर)
एकदम गप्प झाला. तो या गोष्टीचा त्याच्या मनात विचार
करीत राहिला ते पाहून राजा म्हणाला, "बेल्टशस्सर
(दानीएल) मला स्वप्नचा अर्थ सांगताना घाबरू नकोस."
मग बेल्टशस्सर (दानीएल) राजाला म्हणाला, "हे स्वामी,
इडापिडा टळो! हे स्वप्न तुझ्या शत्रूंच्या संदर्भात असायला
हवे होते. आणि त्या स्वप्नाचा अर्थ तुझ्या विरोधात
असणाऱ्यांच्या संदर्भात असायला हवा होता. 20–21तू
स्वप्नात एक वृक्ष पाहिलास तो वृक्ष खूप वाढला, भक्क म
झाला, त्याचा शेंडा आकाशाला भिडला. पृथ्वीवरच्या
कोणत्याही जागेवरून तो दिसू शकत असे. त्याला सुंदर
पाने होती व भरपूर फळे होती. त्यामुळे प्रत्येकाला अन्न
मिळत होते. वन्य पशूंना त्याचा आसरा होता व त्याच्या
फांद्यांवर पक्षी घरटी बांधीत. असा वृक्ष तू पाहिलास.
22राजा, तूच तो वृक्ष आहेस, तू महान व सामर्थ्यशाली
झाला आहेस. आकाशाला भिडणाऱ्या उंच वृक्षाप्रमाणे तू
आहेस आणि तुझी सत्ता पृथ्वीच्या टोकापर्यंत पसरली
आहे.
23"राजा, तू पवित्र देवदूताला स्वर्गातून खाली येताना
पाहिलेस. तो देवदूत म्हणाला, 'वृक्ष तोडून टाका. त्याचा
नाश करा. पण खोड व मुळे राहू द्या. त्याभोवती लोखंड
व कासे यांची जाळी बसवा. त्याला गवतात राहू द्या. तो
दवात भिजेल. तो वन्य पशूंप्रमाणे राहील. सात पावसाळे
(सात वर्ष) असे काढावे लागतील.'
24"हे राजा, ह्याचा अर्थ परात्पर देवाने ह्याा गोष्टी तुझ्या
आयुष्यात घडवून आणण्याची आज्ञा दिली आहे.
25नबुखद्नेस्सर राजा, तुला सक्तीने लोकांपासून दूर जावे
लागेल. तू वन्य पशूंमध्ये राहाशील, गुरांप्रमाणे तुला गवत
खावे लागले. तू दवात भिजशील, सात पावसाळ्यानंतर
(सात वर्षानंतर) तू धडा शिकशील. परात्पर देवाचेच
माणसांच्या राज्यावर प्रभुत्व असते हे तुला कळेल. देव
त्याला पाहिजे त्यांच्याच हातांत राज्ये सोपवितो.
26"वृक्षाचा बुंधा व मुळे जमिनीत राहू देण्याची देवाची
आज्ञा आहे. ह्याचा अर्थ तुला तुझे राज्य परत मिळेल. पण
त्याआधी तुला तुझ्या राज्यावर परात्पर देवाचे प्रभुत्व
आहे हे कळायला हवे. 27तेव्हा, राजा, माझे ऐक पाप
करण्याचे सोडून दे. योग्य त्याच गोष्टी कर. वाईट कृत्ये
करू नकोस. गरिबांवर दया कर. मग कदाचित तुला
यशच मिळेल."
28नबुखद्नेस्सरच्या बाबतीत ह्या सर्व गोष्टी घडल्या.
29–30स्वप्न पडलेल्याला बारा महिने झाले. राजा
नबुखद्नेस्सर एकदा त्याच्या बाबेलच्या राजवाड्याच्या
छतावरून चालत असताना राजा म्हणाला, "पाहा!
बाबेलकडे पाहा, हे प्रचंड शहर मी वसविले. हा माझा
राजवाडा आहे. माझ्या सामर्थ्याच्या, जोरावर मी हा
राजवाडा बांधला. माझे मोठेपण दाखविण्यासाठीच मी तो
बांधला."
31त्याचे शब्द त्याच्या तोंडातच होते की स्वर्गातून आवाज
आला, "राजा नबुखद्नेस्सर, पुढे तुझे काय होणार आहे
ते पाहा: राजा म्हणून तुला असलेली सत्ता तुझ्यापासून
हिरावून घेतली जाईल. 32तुला सक्तीने लोकांपासून दूर
नेले जाईल. तू वन्य पशूंबरोबर राहाशील. गाईप्रमाणे तू
गवत खाशील. तुला धडा शिकायला सात पावसाळे (सात
वर्षे) जावे लागतील. मग तुला समजून चुकेल की परात्पर
देवाचेच माणसांच्या राज्यांवर प्रभुत्व असते व तो त्याच्या
इच्छेनुसार त्या त्या माणसांच्या हाती राज्ये सोपवितो!"
33ह्या गोष्टी ताबडतोब घडल्या. नबुखद्नेस्सरला
सक्तीने लोकांपासून दूर जावे लागले. त्याला गुरांप्रमाणे
गवत खावे लागले. तो दवात भिजला. त्याचे केस गरूडाच्या
पिसांप्रमाणे लांब वाढले, व नखे पक्ष्यांच्या नखांप्रमाणे
वाढली.
34ह्या काळाच्या अखेरीला, मी नबुखद्नेस्सरने
स्वर्गाकडे पाहिले आणि माझे मन ताळ्यावर आले, मग
मी परात्पर देवाचे स्तवन केले. त्या चिरंतनाचा मी मान
ठेवला, त्याचे उपकार मानले.

देवाचे प्रभुत्व अंखड आहे. त्याचे राज्य पिढ्यान्पिढ्या
राहणारे आहे.
35पृथ्वीवरचा मनुष्यप्राणी खरच महत्वाचा नाही. स्वर्गीय
सामर्थ्यांत व पृथ्वीवरच्या माणसांत देवाच्याच इच्छेने सर्व
काही घडते. त्याच्या सामर्थ्यशाली हाताला कोणी अडवू
शकत नाही. त्याच्या कृत्यांबद्दल कोणी त्याला प्रश्न विचारू
शकत नाही.

36अशारीतीने, त्या वेळी, देवाने माझे मन ताळ्यावर
आणले. राजा म्हणून माझा सन्मान व सत्ता मला
त्याने परत दिली. माझे सल्लागार व राजवंशातील
लोक पुन्हा मला विचारू लागले. मी पुन्हा राजा
झालो. आणि पूर्वीपेक्षा मी महान व अधिक
सामर्थ्यशाली झालो. 37आता, मी, नबुखद्नेस्सर,
स्वर्गाच्या राजाची स्तुतिस्तोत्रे गातो, त्याचा गौरव
करतो, त्याचे उपकार मानतो. तो करतो ती प्रत्येक
गोष्ट बरोबरच; असते तो नेहमीच न्याय मार्ग
स्वीकारतो आणि गर्विष्ठांना तो नम्र करतो.

## भिंतीवरील लेख

5 बेलशस्सर राजाने आपल्या हजार दरबाऱ्यांना मेजवानी दिली. राजा त्यांच्यासह मद्य पीत होता. 2 राजाने मद्य पिता-पिता आपल्या सेवकांना सोन्या चांदीचे प्याले आणण्याचा हुकूम दिला. हे प्याले, त्याचे आजोबा नबुखद्नेस्सर यांनी यरुशलेमच्या मंदिरातून आणले होते. राजघराण्यातील लोकांनी, राजाच्या स्त्रियांनी आणि दासींनी त्या प्याल्यांतून मद्य प्यावे अशी राजाची इच्छा होती. 3 म्हणून यरुशललेमच्या देवाच्या मंदिरातून आणलेले सोन्याचे प्याले त्यांनी आणले. राजा, दरबारी, राण्या व दासी हे त्यातून मद्य प्यायले. 4 मद्य पिता-पिता ते त्यांच्या मूर्तिदेवतांची स्तुती करीत होते. ज्या देवतांची ते स्तुती करीत होते ती दैवते म्हणजे सोने, चांदी, कासे, लोखंड, लाकूड व दगड यापासून बनविलेले पुतळे होते.

5 मग अचानक एक मानवी हात भिंतीवर लिहिताना दिसू लागला. भिंतीच्या गिलाव्यावर बोटांनी शब्द कोरले गेले, राजवाड्याच्या दिवठाणा जवळच्या भिंतीवर हाताने लिहीले जात असताना राजाने पाहिले.

6 बेलशस्सर राजा खूप घाबरला. त्याचा चेहरा भीतीने पांढराफटक पडला व त्याचे हातपाय थरथर कापू लागले, पायातला जोर गेल्याने तो उभा राहू शकत नव्हता. 7 राजाने मांत्रिक आणि खास्दी यांना बोलावून घेतले. तो त्या ज्ञानी माणसांना म्हणाला, "हा लेख वाचून जो कोणी त्याचा अर्थ मला सांगेल, त्याला मी बक्षिस देईन. मी त्याला महावस्त्रे देईन, त्याला सोन्याची साखळी देईन. मी त्याला राज्याचा तिसरा महत्वाचा अधिकारी करीन."

8 मग राजाची सगळी ज्ञानी माणसे आत आली. पण त्यांना लेख वाचता आला नाही. त्यांना त्याचा अर्थ कळू शकला नाही. 9 बेलशस्सर राजाचे दरबारी गोंधळून गेले. त्यामुळे राजा फारच घाबरला, तो काळजीत पडला, त्याचा चेहरा भीतीने पांढराफटक पडला.

10 तेवढ्यात राजाचा व राजदरबाऱ्यांचा आवाज ऐकून राजमाता मेजवानी चालली होती तिथे आली. ती म्हणाली, "राजा, चिरंजीव भव! घाबरू नकोस, भीतीने असा पांढराफटक होऊ नकोस. 11 तुझ्या राज्यात पवित्र दैवतांचा आत्मा ज्याच्यामध्ये वास करतो, असा एक माणूस आहे. तुझ्या वडिलांच्या काळात, ह्या माणसाने त्याला रहस्ये समजतात हे दाखवून दिले होते. तो अतिशय चलाख व सुज्ञ असल्याचे सिध्द झाले होते. ह्या गोष्टींत तो देवतासमान आहे. तुझ्या आजोबांनी, नबुखद्नेस्सर राजाने, त्याला सर्व ज्ञानी माणसांचा प्रमुख म्हणून नेमले होते. मांत्रिकांवर व खास्द्यांवर त्याचा प्रभाव होता. 12 मी ज्या माणसाबद्दल बोलत आहे, त्याचे नाव दानीएल आहे. राजाने त्याला बेलट्शस्सर असे नाव दिले आहे. बेलट्शस्सर (दानीएल) फार चलाख आहे व त्याला अनेक गोष्टी माहीत आहेत, स्वप्नांचा अर्थ सांगण्याची, रहस्ये उलगडण्याची, अवघड प्रश्नांची उत्तरे देण्याची क्षमता त्याच्यात आहे. त्याला बोलावून घे. तोच तुला भिंतीवरील लेखाचा अर्थ सांगेल."

13 मग दानीएलला राजासमोर उभे करण्यात आले. राजा दानीएलला म्हणाला, "तुझे नाव दानीएल आहे का? माझ्या वडिलांनी यहूदातून आणलेल्या कैद्यांपैकी तू एक आहेस का? 14 तुझ्या अंगात देवतांचा आत्मा आहे असे मला कळले आहे. तुला रहस्ये समजतात, तू फार चलाख व फार ज्ञानी आहेस असे मी ऐकले आहे. 15 भिंतीवरचा हा लेख वाचण्यासाठी मांत्रिक व ज्ञानी माणसे येथे आली. मला, त्यांनी ह्या लेखाचा अर्थ स्पष्ट करून सांगावा, अशी माझी अपेक्षा होती. पण त्यांना ते सांगता आले नाही. 16 मी तुझ्याबद्दल ऐकले आहे. तुला गोष्टींचा अर्थ स्पष्ट करता येतो आणि अवघड प्रश्नांची तू उत्तरे शोधू शकतोस असे मला समजले आहे. जर तू भिंतीवरचा लेख वाचून, त्याचा अर्थ मला सांगितलास, तर मी तुला महावस्त्रे देईन, सोन्याची साखळी तुझ्या गळ्यात घालीन आणि तुला माझ्या राज्यातील प्रमुख पदांपैकी तीन क्रमांकाचे पद देईन. 17 मग दानीएल राजाला म्हणाला, "बेलशस्सर राजा, तुझी दाने तुलाच लखलाभ होवोत! त्या भेटी पाहिजे तर दुसऱ्या कोणाला दे. मला काही नको. मात्र मी तुला भिंतीवरचा लेख वाचून अर्थ सांगतो.

18 "राजा, परात्पर देवाने, तुझ्या आजोबांना, राजा नबुखद्नेस्सरला खूप मोठा व सामर्थ्यशाली राजा केले. देवाने राजाला खूप महत्व दिले. 19 वेगवेगळ्या राष्ट्रांतील आणि निरनिराळे भाषा बोलणारे लोक नबुखद्नेस्सरला घाबरत. का? कारण परात्पर देवाने त्याला महान बनविले होते. जर एखाद्याने मरावे असे नबुखद्नेस्सरला वाटले, तर तो त्याला मारे. ह्याउलट एखाद्याने जगावे असे त्याला वाटल्यास तो त्याला जगू देई. त्याच्या इच्छेप्रमाणे तो एखाद्याला महत्व देई, तर एखाद्याला क्षुद्र लेखी.

20 "पण नबुखद्नेस्सरला गर्व झाला, तो दुराग्रही बनला. म्हणून त्याची सत्ता काढून घेतली गेली. त्याला सिंहासन सोडावे लागले, त्याच्या वैभवाचा लोप झाला. 21 मग त्याला सक्तीने लोकांपासून दूर करण्यात आले. त्याचे हृदय पशूप्रमाणे झाले. तो जंगली गाढवांबरोबर राहिला व त्याने गाईप्रमाणे गवत खाल्ले. तो दवात भिजला. तो धडा शिकेपर्यंत त्याला हे भोगावे लागले. मगच त्याला पटले की मनुष्याच्या राज्यावर परात्पर देवाचे प्रभुत्व असते, परात्पर देवाच्या इच्छेप्रमाणे राज्याचा राजा ठरविला जातो. 22 "पण बेलशस्सर, तुला हे सर्व ठाऊकच आहे. तू नबुखद्नेस्सरचा नातूच* आहेस पण अजूनही तू नम्र झाला नाहीस. 23 नाही! तू नम्र झाला नाहीस उलट तू स्वर्गातल्या देवाच्याविरुध्द गेलास. देवाच्या मंदिरातील

---

**नातू** किंवा मुलगा. ह्या शब्दावरून ते एकाच घराण्यातील असेलच पाहिजेत असा समज करून घेऊ नये. येथे अर्थ एवढाच की बेलशस्सर हा नबुखद्नेस्सर नंतर झालेला बाबेलचा एक राजा.

प्याले आणण्याचा तू हुकूम दिलास. त्या प्याल्यातून तू,
तुझे राजदरबारी, तुझ्या स्त्रिया आणि दासी मद्य प्यालात,
आणि सोने-चांदी, कासे, लोखंड, लाकूड वा दगड
यांच्यापासून बनविलेल्या देवतांची तू स्तुती केलीस. ते
खरे देव नाहीत. ते पाहू शकत नाहीत, ऐकू शकत नाहीत,
त्यांना काही समजत नाही. तू, तुझ्या जीवनावर व तू
करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीवर ज्या देवाचे प्रभुत्व
आहे, त्याचा मान राखला नाहीस. 24म्हणूनच भिंतीवर
ज्याने लिहिले तो हा हात देवाने पाठविला. 25भिंतीवरचे
शब्द पुढीलप्रमाणे आहेत:

मेने, मेने, तेकेल, उफारसीन.

26 “ह्या शब्दांचा अर्थ असा: मेने: देवाने तुझ्या राज्याच्या
शेवटाचे दिवस मोजलेत.
27तेकेल: तुला तोलले गेले, तेव्हा तू उणा पडलास
28 उफारसीन:तुझे राज्य तुझ्याकडून काढून घेण्यात
येत आहे. त्याचे विभाजन होईल व ते मेदी व पारसी
यांच्यात विभागले जाईल.”

29–30मग बेलशस्सरने दानीएलला महावस्त्रे देण्याचा
हुकूम दिला. त्याने दानीएलला सोन्याची साखळी व
राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचे पद दिले. त्याच रात्री,
खास्द्यांचा राजा, बेलशस्सर, याला ठार मारण्यात आले.
31आणि दारयावेश नावाचा बासष्ट वर्षे वयाचा मेदी नवा
राजा झाला.

## दानीएल आणि सिंह

6 सर्व राज्याचा कारभार करण्यासाठी 120
प्रांताधिकारी (सत्रप) नेमल्यास चांगले होईल असा
विचार दारयावेशाने केला. 2ह्या 120 प्रांताधिकाऱ्यांवर
(सत्रपांवर) लक्ष ठेवण्यासाठी त्याने जे तीनजण नेमले,
त्यातील एक दानीएल होता. कोणी राजाला फसवू नये व
राज्याचे काहीही नुकसान होऊ नये म्हणून दारयावेशने
तिघांची नेमणूक केली. 3दानीएल दुसऱ्या दोघांपेक्षा उजवा
ठरला. कारण दानीएलचे चारित्र्य चांगले होते व
त्याच्याजवळ प्रचंड क्षमता होती. दानीएलची राजावर इतकी
छाप पडली की सर्व राज्याचा कारभार त्याच्या हाती
सोपविण्याचा बेत त्याने केला. 4पण इतर दोघा पर्यवेक्षकांना
आणि सर्व प्राताधिकाऱ्यांना (सत्रपांना) ह्या बेताविषयी
कळताच ते दानीएलचा द्वेष करू लागले. दानीएलला दोष
देण्यासाठी काहीतरी कारण शोधण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू
केला. त्यासाठी दानीएल राज्यकारभार करताना ज्या
ज्या गोष्टी करी त्या त्या प्रत्येक गोष्टीवर त्यांनी नजर
ठेवली. पण त्यांना दानीएलची चूक सापडली नाही. त्यामुळे
ते दानीएलला दोषी ठरवू शकले नाहीत. दानीएल अतिशय
प्रामाणिक व विश्वासू होता. त्याने राजाला फसविले
नाही. तो अतिशय कष्ट करीत असे.

5शेवटी ते सर्व म्हणू लागले, “दानीएलाला त्याच्या
चुकीबद्दल दोषी ठरविणे आम्हाला कधीच जमणार नाही.
तेव्हा त्याच्या देवाच्या नियमांच्या संदर्भात आम्हाला तक्रार
करण्याजोगे काहीतरी शोधले पाहिजे.”
6तेव्हा मग ते दोन पर्यवेक्षक प्रांताधिकाऱ्यांसह राजाकडे
गेले. व राजाला म्हणाले, “दारयावेश राजा, चिरंजीव होवो!
7एक ठराव करण्याबाबत पर्यवेक्षक, मुलकी अधिकारी,
प्रांताधिकारी, सल्लागार व राज्यपाल यांचे एकमत झाले
आहे. आमच्या मते राजा तू असा हुकूम काढावास की
तुझ्याशिवाय, इतर दैवतांची वा माणसाची प्रार्थना जो कोणी
पुढील 30 दिवसांत करील त्याला सिंहाच्या गुहेत
(पिंजऱ्यात) टाकण्यात येईल. सर्वांनी हा कायदा पाळलाच
पाहिजे. 8तेव्हा राजा आताच्या आता हुकूम लिहून
त्याच्यावर शिक्कामोर्तब कर. म्हणजे तो कोणीही बदलू
शकणार नाही का? कारण मेदी का पारसी यांचे कायदे
रद्द होऊ शकत नाहीत किंवा बदलूही शकत नाहीत.”
9मग दारयावेश राजाने असा लेखी कायदा करून त्यावर
सही केली.
10दानीएल दररोज तीन वेळा देवाची प्रार्थना करीत
असे. दिवसातून तीन वेळा, गुडघे टेकून तो देवाची प्रार्थना
करी व स्तुतिस्तोत्र गाई. नव्या कायद्याविषयी ऐकताच,
दानीएल आपल्या घरी गेला. त्याने छतावरच्या त्याच्या
खोलीची यरुशलेमच्या बाजूची खिडकी उघडली आणि
नेहमीप्रमाणे गुडघे टेकून प्रार्थना केली.
11मग ते सगळे लोक एकत्र जमले व त्यांनी दानीएलला
देवाची प्रार्थना करताना आणि करूणा भाकताना पकडले.
12मग ते राजाकडे गेले. राजाशी त्याने केलेल्या
कायद्याविषयी ते बोलले. ते म्हणाले, “दारयावेश राजा,
पुढील 30 दिवसात, तुझ्याशिवाय, देवताची वा माणसाची
जो कोणी प्रार्थना करील, त्याला सिंहाच्या गुहेत (पिजंऱ्यात)
टाकण्यात येईल, असा लेखी कायदा करून त्यावर तू
सही केलीस हे खरे की नाही?”
राजा म्हणाला, “हो! मी त्यावर सही केली आणि मेदी
व पारसी यांचे कायदे रद्द होऊ शकत नाहीत वा त्यात
बदल होऊ शकत नाही.”
13मग ते लोक राजाला म्हणाले, “दानीएल तुझ्याकडे
दुर्लक्ष करीत आहे, राजा! तो यहूदाच्या कैद्यांपैकी एक
आहे. तो तू केलेल्या कायद्याकडे लक्ष देत नाही.
अजूनही दिवसातून तीन वेळा तो त्याच्या देवाची प्रार्थना
करतो.”
14हे ऐकून राजा फार दु:खी व अस्वस्थ झाला. राजाने
दानीएलला वाचवायचे ठरविले. सुर्यास्तापर्यंत राजाने
दानीएलला वाचाविण्यासाठी काही मार्ग निघतो का ह्याचा
विचार केला. 15मग ते लोक एकत्र जमून राजाकडे गेले
व त्याला म्हणाले, “हे राजा, मेदी व पारसी यांनी शिक्कामोर्तब
केलेला कायदा किंवा हुकूम कधीही रद्द होत नाही किंवा
बदलू शकत नाही, हे लक्षात ठेव.”

[16]अखेर दारयावेश राजाने हुकूम दिला. मग त्यांनी दानीएलला आणून सिंहाच्या गुहेत (पिंजऱ्यात) टाकले. राजा दानीएलला म्हणाला, "तू ज्या देवाची उपासना करतोस तो तुझा देव तूला वाचवील अशी मी आशा करतो." [17]गुहेच्या तोंडावर एक मोठी शिळा आणून बसविण्यात आली. मग राजाने त्या शिळेवर आपल्या अंगठीने आपली मुद्रा उमटविली. तसेच इतर दहबाऱ्यांच्या अंगठ्यांनी त्याने त्यांच्याही मुद्रा उमटविल्या. ह्याचा अर्थ कोणीही शिळा सरकवून दानीएलला सिंहाच्या गुहेच्या (पिजऱ्यांच्या) बाहेर काढू शकत नव्हता. [18]मग दारयावेश राजवाड्यात परतला. त्या रात्री त्याने अन्नाला स्पर्श केला नाही. कोणी येऊन आपले मनोरंजन करावे असे त्याला वाटले नाही, त्याला त्या रात्री झोपही आली नाही.

[19]दुसऱ्या दिवशी, फटफटताच दारयावेश राजा उठला आणि त्याने सिंहाच्या गुहेकडे (पिंजऱ्याकडे) धाव घेतली. [20]राजा खूप काळजीत होता. सिंहाच्या गुहेजवळ जाताच, त्याने दानीएलला हाक मारली. राजा ओरडला, "दानीएला, जिवंत देवाच्या सेवका, तुला, तुझ्या देवाने, सिंहांपासून वाचविले का? तू नेहमीच देवाची सेवा करीत आलास."

[21]दानीएल उत्तरला, "राजा, चिरायु असो! [22]माझ्या देवाने, मला वाचविण्यासाठी, देवदूताला पाठविले देवदूताने सिंहाची तोंडे बंद केली. मी निरपराधी आहे" हे माझ्या देवाला माहीत आहे म्हणूनच सिंहानी मला मारले नाही. राजा, मी तुझे कधीही काहीही वाईट केले नाही."

[23]दारयावेश राजाला खूप आनंद झाला. त्याने आपल्या सेवकांना दानीएलला सिंहाच्या गुहेतून (पिंजऱ्यातून) बाहेर उचलून आणण्यास सांगितले. दानीएलला बाहेर आणले तेव्हा त्याच्या शरीरावर एकही जखम नव्हती. दानीएलचा त्याच्या देवावर विश्वास असल्याने, त्याला सिंहानी काहीही इजा केली नाही.

[24]मग राजाने दानीएलला सिंहाच्या गुहेत (पिंजऱ्यात) टाकण्यासाठी त्याच्यावर दोषारोप ठेवणाऱ्या लोकांना आणण्याचा हुकूम दिला. त्या लोकांना, बायकामुलांसकट, सिंहांच्या गुहेत टाकण्यात आले. गुहेच्या जमिनीला त्यांनी स्पर्श करण्याआधीच सिंहांनी त्यांना पकडले आणि त्यांना खाऊन टाकले. [25]मग दारयावेश राजाने पृथ्वीवर सर्वत्र पसरलेल्या, निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या राष्ट्रांतील लोकांना पुढील पत्र पाठविले.

अभिवादन,

[26]मी नवीन कायदा करीत आहे. हा कायदा
राज्याच्या सर्व भागातील सर्व लोकांना लागू आहे.
तुम्ही सर्वांनी दानीएलच्या देवाला भ्यायला पाहिजे
आणि त्याचा मान राखला पाहिजे.

दानीएलचा देव हा जिंवत देव आहे, साक्षात देव आहे. तो सनातन आहे. त्याच्या राज्याचा कधीच नाश होत नाही. त्याचा प्रभाव कधीच नाहीसा होत नाही.

[27]देव माणसांना मदत करतो व त्याचे रक्षण करतो. स्वर्गात व पृथ्वीवर तो विस्मयकारक चमत्कार करतो. देवानेच सिंहांपासून दानीएलाला वाचविले."

[28]अशारीतीने राजा दारयावेश व पारसी राजा कोरेश या दोघांच्याही कारकिर्दीत दानीएल यशस्वी झाला.

## दानीएलचे चार प्राण्यांबद्दलचे स्वप्न

7 बाबेलचा राजा बेलशस्सर ह्याच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी* दानीएलला एक स्वप्न पडले. झोपलेला असताना त्याला दृष्टान्त झाले. ते दृष्टान्त दानीएलने लिहून ठेवले. [2]दानीएल म्हणाला, "मला रात्री दृष्टान्त झाला. दृष्टान्तात चारी दिशांनी वारा वाहात होता. त्या वाऱ्याने समुद्र खवळला. [3]समुद्रात चार प्राणी बाहेर येताना मला दिसले. ते आकाराने मोठे होते व एकमेकांपेक्षा वेगळे होते.

[4]"पहिला प्राणी सिंहासारखा होता व त्याला गरुडासारखे पंख होते. मी त्या प्राण्याचे निरीक्षण केले. त्यानंतर त्याचे पंख कापण्यात आले. तो जमिनीपासून वर उचलला गेला होता. त्यामुळे तो माणसारसाखा जमिनीवर दोन पायांवर उभा राहिला होता. त्याला मानवी हृदय (मन) देण्यात आले होते.

[5]"मग मी माझ्यासमोर दुसरा प्राणी पाहिला. तो अस्वलासारखा दिसत होता. तो त्याच्या एका अंगाने उचलला गेला होता. त्याच्या तोंडात त्याच्या दातांच्यामध्ये तीन फासळ्या होत्या, "ऊठ आणि तुला पाहिजे तिकडे मांस खा" असे त्याला सांगितले गेले.

[6]"ह्यानंतर मी पाहिले मला माझ्यासमोर तिसरा प्राणी दिसला. तो चित्याप्रमाणे होता. त्याच्या पाठीवर चार पंख होते. ते पक्ष्यांच्या पंखासारखे होते. त्याला चार डोकी होती. त्याला सत्ता गाजवायचा अधिकार दिला होता

[7]"त्यानंतर, मला दृष्टान्तात चौथा प्राणी दिसला. तो फारच नीच व भयंकर दिसत होता. तो फारच बलवान होता. त्याला लोखंडाचे मोठे दात होते, तो त्याच्या बळींना चिरडून खात होता आणि बळींचे उरलेले अवशेष तुडवीत होता. हा चौथा प्राणी मी पाहिलेल्या सर्व प्राण्यांपेक्षा भिन्न होता. त्याला दहा शिंगे होती.

[8]"मी त्या शिंगाबद्दल विचार करीत असतानाच, त्या शिंगामध्ये आणखी एक शिंग उगवले. ते लहान होते, त्या शिंगावर माणसाच्या डोळ्याप्रमाणे डोळे व तोंड होते. ते तोंड प्रौढी मिरवीत होते. त्या लहान शिंगाने तीन इतर शिंगे उपटून टाकली.

---

**बाबेलचा राजा ... पहिल्या वर्षी** म्हणजे ख्रि. पू. 553 मध्ये.

### चवथ्या प्राण्याचा न्यायनिवाडा

9“मी पाहतो तर आपापल्या जागी सिंहासने मांडली गेली व त्यावर प्राचीन राजा त्याच्या सिंहासनावर बसला. त्याचे कपडे व केस कापसाप्रमाणे सफेद होते. त्याचे सिंहासन अग्नीचे होते, व सिंहासनाची चाके ज्वालांची केलेली होती.

10 प्राचीन राजाच्या समोरून अग्नीची नदी वाहत होती. करोडो लोक त्याची सेवा करीत होते. कोट्यावधी लोक त्याच्यासमोर उभे होते. हे दृश्य, न्यायालय सुरू होण्याच्या तयारीत आहे व सर्वांची खाती आता उघडली जाणार आहेत, अशा प्रकारचे होते.

11“मी पुन्हा पुन्हा पाहात होतो. लहान शिंग प्रौढी मिरवीतच होते. चौथ्या प्राण्याला मारेपर्यंत मी निरीक्षण केले. त्याच्या शरीराचा नाश करून ते आगीत फेकून देण्यात आले. 12इतर प्राण्यांची सत्ता व अधिकार काढून घेण्यात आले. पण काही निश्चित काळापर्यंत जगण्याची परवानगी त्यांना देण्यात आली. 13माझ्या रात्रीच्या दृष्टान्तात मला मनुष्यप्राण्याच्या आकृतीसारखे काहीतरी दिसले. तो ढगांवरून येत होता. तो प्राचीन राजाकडे आला. त्याला राजासमोर आणण्यात आले.

14“मग त्या मनुष्यप्राण्याप्रमाणे दिसणाऱ्याला अधिकार, वैभव व संपूर्ण सत्ता देण्यात आली. सर्व लोक, राष्ट्रे व निरनिराळे भाषा बोलणारे सर्व त्याची सेवा करणार होते. त्याची सत्ता चिरंतन होती. त्याचे राज्य कायमचे होते, त्याचा कधीही नाश होणार नव्हता.

### चार प्राण्यांबद्दलच्या स्वप्नाचा अर्थ

15“मी, दानीएल, गोंधळलो व चिंतेत पडलो. मला दिसलेल्या दृष्टान्तानी मला काळजी वाटू लागली. 16उभे राहिलेल्यापैकी एकाजवळ मी गेलो. मी त्याला ह्या सर्वांचा अर्थ विचारला. मग त्याने मला तो सांगितला. त्याने मला ह्या सर्व गोष्टींचा अर्थ स्पष्ट करून सांगितला. 17–18तो म्हणाला, ‘चार मोठे प्राणी म्हणजे चार राज्ये: ती पृथ्वीतून उदयास येतील पण देवाच्या खास लोकांनाच राज्य मिळेल आणि ते सदासर्वकाळ राहील.’

19“मला चौथा प्राणी म्हणजे त्याचा अर्थ काय हे जाणून घ्यायची इच्छा होती. तो चौथा प्राणी इतर प्राण्यांपेक्षा वेगळा होता. तो फार भयंकर होता. त्याला लोखंडाचे हात व काशाची नखे होती. त्याच्या बळीला व शिकारीला तो संपूर्णपणे चिरडून टाकून खात होता व राहिलेले बळींचे अवशेष पायाखाली तुडवीत होता. 20त्याच्या डोक्यावरील दहा शिंगाबद्दलही मला जाणून घ्यायचे होते. उगवलेल्या लहान शिंगाबद्दलही मला उत्सुकता होती. त्या लहान शिंगाने इतर दहा शिंगातील तीन उपटून टाकली. ते इतर शिंगाच्या मानाने क्षुद्र होते. त्याला डोळे होते, तोंड होते, आणि ते तोंड सतत बढाया मारीत होते. 21“मी पाहत असतानाच, त्या लहान शिंगाने देवाच्या खास माणसांवर हल्ला करून लढण्यास सुरवात केली. ते शिंग लोकांना ठार करू लागले. 22प्राचीन राजाने येऊन, त्याचा न्यायनिवाडा करीपर्यंत त्या लहान शिंगाने देवाच्या खास माणसांना ठार मारणे चालूच ठेवले. प्राचीन राजाने लहान शिंगाचा निकाल घोषित केला. त्याचा देवाच्या खास माणसांना फायदा झाला त्यांना राज्य मिळाले.

23“त्याने मला पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले: “चौथा प्राणी म्हणजे पृथ्वीवर येणारे चौथे राज्य. ते इतर राज्यांपेक्षा भिन्न असेल. ते सर्व पृथ्वीवरच्या माणसांचा नाश करील, ते सर्व राष्ट्रांना तुडवून चिरडून टाकील. 24ती दहा शिंगे म्हणजे ह्या चौथ्या राज्याचे दहा राजे आहेत. ह्या दहा राजानंतर, आणखी एक राजा येईल त्याच्या आधीच्या राज्य करणाऱ्या राज्यांपेक्षा हा भिन्न असेल. तो तीन राजांचा पराभव करील. 25हा राजा परात्पर देवाच्या विरुध्द बोलेल. तो देवाच्या खास माणसांना दुखवेल व ठार मारील. आधीचे कायदे या काळ बदलायचा तो प्रयत्न करील. देवाचे खास लोक एक वेळ, अनेक वेळा व अर्धा वेळ* त्याच्या सत्तेखाली राहातील.

26“पण न्यायालय काय घडावे ते ठरवील. मग त्या राजाची सत्ता काढून घेण्यात येईल. त्याच्या राज्याचा पूर्णपणे अंत होईल. 27मग देवाचे खास लोक राज्य करतील, ते पृथ्वीवरच्या सर्व राज्यांतील सर्व लोकांवर राज्य करतील.* हे राज्य कायम राहील. व इतर राज्यातील लोक त्याला मान देतील, त्याची सेवा करतील.”

28“येथे स्वप्न संपले. मी, दानीएल, खूप घाबरलो, भीतीने माझा चेहरा पांढराफटक पडला. मी पाहिलेल्या व ऐकलेल्या ह्या गोष्टी इतरांना सांगितल्या नाहीत.”

### मेंढा व बोकड यांच्याबाबतचा दानीएलचा दृष्टान्त

8 बेलशस्सर राजाच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी* मला हा दृष्टान्त झाला. हा दृष्टान्त मलाच झाला. दुसऱ्या दृष्टान्तानंतर तो मला झाला. 2दृष्टान्तात मी पाहिले की मी शूशन शहरात आहे. शूशन ही एलाम परगण्याची राजधानी आहे. मी उलई नदीच्या काठी उभा होतो. 3मी वर पाहिले तर मला एक मेंढा त्या नदीकाठी उभा असलेला दिसला. त्याला दोन लांब शिंगे होती. पण एक दुसऱ्यापेक्षा अधिक लांब होते, जास्त लांब शिंग दुसऱ्यापेक्षा काहीसे मागे होते.

4मी पाहिले की मेंढा आपल्या शिंगांच्या साहाय्याने कोणत्याही वस्तूंना टक्कर देत होता. तो पश्चिमेकडे,

---

**वेळ** अनेक वेळा, अर्ध वेळ बहुधा 3 1/2 वर्षे.

**देवाचे ... राज्य करतील** शब्दश: अर्थ स्वर्गाखाली असलेल्या राज्यांची राज्य आणि रांज्यांची महानता संतांच्या हाती सोपविली जाईल.

**तिसऱ्या वर्षी** म्हणजे ख्रि. पू. 551 मध्ये.

उत्तरेकडे व दक्षिणेकडे पळताना मी पाहिला. त्याला कोणी प्राणी थोपवू शकत नव्हता, व कोणीही दुसऱ्या प्राण्याला वाचवू शकत नव्हता. मेंढा आपल्या मनाप्रमाणे करीत होता. तो खूपच शक्तिशाली झाला होता.

5मी मेंढ्याचा विचार करीत होतो, तोच पश्चिमेकडून एक बोकड आला. तो सर्व पृथ्वीभर धावत होता. त्याचे खूर मुळी जमिनीवर टेकतच नव्हते. ह्या बोकडाला डोळ्यांच्या बरोबर मध्यावर सहज दिसू शकेल असे एक शिंग होते.

6तो बोकडे, मी उलई नदीच्या काठी पाहिलेल्या, दोन शिंगे असलेल्या मेंढ्याजवळ आला. बोकड खूपच रागावलेला होता. तो मेंढ्याच्या अंगावर धावला. 7बोकडाला मेंढ्याच्या अंगावर जाताना मी पाहिले. बोकड फारच चिडला होता. त्याने मेंढ्याची दोन्ही शिंगे मोडली. मेंढा बोकडाला थोपवू शकला नाही. बोकडाने मेंढ्याला जमिनीवर लोळविले, त्याने मेंढ्याला तुडविले. बोकडापासून मेंढ्याला सोडवू शकेल असा तेथे कोणीही नव्हता.

8मग बोकड खूपच शक्तिशाली झाला पण तो बलिष्ठ होताच, त्याचे मोठे शिंग मोडले व त्या जागी चार शिंगे उगवली. ती सहज दिसण्यासारखी होती. त्यांची टोके चार दिशांना होती.

9मग त्या चार शिंगातील एकातून एक लहान शिंग उगवले आणि खूप मोठे झाले. ते नैऋत्य दिशेने वाढले. ते सुंदर प्रदेशांच्या दिशेने वाढले. 10ते लहान शिंग खूप मोठे झाले. ते आकाशाला भिडेपर्यंत वाढले. एवढेच नाही, तर त्याने काही ताऱ्यांना जमिनीवर फेकले. व त्यावर ते नाचले. 11ते खूप शक्तिशाली झाले. मग ते ताऱ्यांच्या राजाच्या (देवाच्या) विरुध्द गेले. त्याने राजाला (देवाला) दररोज ठरलेले बळी देण्याचे बंद केले. लोक जेथे राजाची उपासना करीत ती जागा त्याने पाडून टाकली. 12लहान शिंगाने पाप केले. रोजचे बळी देण्याची पध्दत मोडली. त्याने चांगुलपणा धुळीला मिळविला. लहान शिंगाने असे करून चांगले यश मिळविले. 13मग मी एक पवित्र आवाज बोलताना ऐकला. त्याला दुसऱ्या पवित्र आवाजाने उत्तर दिले. पहिला आवाज म्हणाला, "नित्याच्या बळींचे काय होणार हे ह्या दृष्टान्तावरून दिसते. सर्वनाश करणाऱ्या पापाबद्दल हा दृष्टान्त आहे. राजाला लोक जेथे पूजतात, त्या जागेचा नाश झाल्यास काय होईल, हेच ह्यावरून दिसते. लोकांनी ती जागा पायाखाली तुडविल्यावर काय होईल, हे ह्यावरून समजते. लोक ताऱ्यांवरून चालल्यावर काय होईल, हेही कळून येते. पण हे किती वेळ चालेल?"

14दुसरा पवित्र आवाज म्हणाला, "हे 2300 दिवस चालेल. मग पवित्र जागा परत उभी केली जाईल."

### दानीएलला दृष्टान्ताचा अर्थ सांगितला जातो

15मी, दानीएलने, हा दृष्टान्त पाहून, त्याचा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न केला. मी ह्या दृष्टान्ताबद्दल विचार करीत असतानाच एक माणसाप्रमाणे दिसणारी आकृती माझ्यासमोर येऊन उभी राहिली. 16मग मला माणसाचा आवाज ऐकू आला. तो उलई नदीवरून आला. तो आवाज मोठ्याने म्हणाला, "गाब्रीएल, ह्या माणसाला दृष्टान्ताचा अर्थ स्पष्ट कर."

17मग माणसाप्रमाणे दिसणारा गाब्रीएल देवदूत माझ्याजवळ आला. मी खूप घाबरलो. मी जमिनीवर पडलो. पण गाब्रीएल मला म्हणाला, "मुला, हा दृष्टान्त क्रोधाच्या शेवटच्या वेळेसंबंधी आहे हे समजून घे."

18गाब्रीएल बोलत असताना मी जमिनीवर पडलो व झोपी गेलो. मला अगदी गाढ झोप लागली. मग गाब्रीएलने मला स्पर्श केला व माझ्या पायावर उभे केले. 19गाब्रीएल म्हणाला, "आता मी तुला दृष्टान्ताचा अर्थ सांगतो. भविष्यात काय घडणार हे मी तुला सांगतो. तुझा दृष्टान्त क्रोधाच्या शेवटच्या वेळेसंबंधी आहे.

20"तू दोन शिंगे असलेला मेंढा पाहिलास. ती शिंगे म्हणजेच मेदय व पारस ही राज्ये होत. 21बोकड म्हणजे ग्रीसचा राजा होय. त्याच्या डोळ्यांमधील शिंग म्हणजे पहिला राजा होय. 22ते मोडले आणि त्या जागी चार शिंगे उगवली. ती चार शिंगे म्हणजे चार राज्ये होत. पहिल्या राजाच्या राष्ट्रातून ही चार राज्ये निर्माण होतील. पण पहिल्या राजाएवढी ती शक्तिशाली असणार नाहीत.

23"त्या राज्यांचा शेवट जवळ आला असताना, एक उध्दट व क्रूर राजा होईल. तो फार लबाड असेल. पातकी लोकांची दुष्कृत्ये पूर्णतेला पोहोंचल्यावर हे घडेल. 24"हा राजा खूप शक्तिशाली होईल. पण स्वत:च्या बळावर नव्हे, तो भयंकर संहाराला कारण होईल. तो करील त्या प्रत्येक गोष्टीत त्याला यश मिळेल. तो सामर्थ्यवान लोकांचा, देवाच्या खास लोकांचासुध्दा नाश करील.

25"हा राजा फार चलाख व लबाड असेल. तो आपल्या धूर्तपणाच्या आणि खोटेपणाच्या बळावर यश मिळवील. तो स्वत:ला खूप महत्वाचा समजेल. तो खूप लोकांचा अनपेक्षितपणे घात करील. राजपुत्रांच्या राजपुत्राशी (देवाशी) लढण्याचा तो प्रयत्न करील. पण त्या क्रूर राजाच्या सत्तेचा नाश होईल. पण त्याचा नाश करणारा हात मानवाचा नसेल.

26"त्या काळसंबंधीचा व मी सांगितलेल्या गोष्टींसंबंधीचा दृष्टान्त खरा आहे. पण दृष्टान्त मोहोरबंद करून ठेव. (दृष्टान्त गुप्त ठेव) ह्या गोष्टी खूप काळांनंतर घडणार आहेत."

27मी, दानीएल, खूप गळून गेलो. ह्या दृष्टान्तानंतर बरेच दिवस मी आजारी हो तो. मग मी उठून राज्याच्या कामाला लागलो. पण दृष्टान्तामुळे मी खूपच अस्वस्थ होतो. मला दृष्टान्ताचा अर्थ समजला नाही.

## दानीएलची प्रार्थना

9 दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षातच ह्या गोष्टी घडल्या. दारयावेश हा अहश्वेरोशाचा मुलगा होता. तो मेदी वंशातील होता. तो बाबेलचा राजा झाला.
2दारयावेश गादीवर बसला, त्या वर्षी मी, दानीएल, काही ग्रंथ वाचीत होतो. त्या ग्रंथात असे लिहिले होते की परमेश्वराने यिर्मयाला सांगितले, “70 वर्षांनंतर यरुशलेम पुन्हा वसविले जाईल.

3मग मी देव माझा प्रभू, याची प्रार्थना केली व कृपेची याचना केली. मी उपवास केला व शोकप्रदर्शक कपडे घातले. मी डोक्यात धूळ टाकून घेतली.
4मी परमेश्वराची, माझ्या देवाची, प्रार्थना केली. मी त्याच्याजवळ माझ्या पापांचा पाढा वाचला. मी म्हणालो, “परमेश्वरा, तू महान आणि भीतिदायक देव आहेस. तुझ्यावर प्रेम करणाऱ्या लोकांवर दया व प्रेम करून तू तुझा करार पाळतोस. तुझ्या आज्ञा पाळणाऱ्या लोकांबरोबरही तू कराराचे पालन करतोस.

5“पण परमेश्वरा, आम्ही पाप केले. आम्ही चुकीचे वागलो. आम्ही दुष्कृत्ये केली. आम्ही तुझ्याकडे पाठ फिरविली तुझ्या आज्ञा आणि न्याय निर्णय यांच्यापासून आम्ही दूर गेलो.
6आम्ही संदेष्ट्यांचे ऐकले नाही. ते तुझे सेवक होते. ते तुझ्यावतीने आमच्या राजाशी, नेत्यांशी, थोर मंडळींशी बोलले. इस्राएलमधील सर्व लोकांशी ते बोलले. पण आम्ही त्या संदेष्ट्यांचे ऐकले नाही.

7“परमेश्वरा, तू फार चांगला आहेस. आणि चांगुलपणा तुझ्यातच आहे. पण आज आमच्याकडे फक्त अप्रतिष्ठा आहे. आणि यरुशलेमच्या लोकांजवळ फक्त अपमान आहे. इस्राएलच्या लोकांजवळ मग ते जवळ असोत की लांब अपमानाखेरीच काही नाही. परमेश्वरा, तू त्या लोकांना पुष्कळ राष्ट्रांत विखरून टाकलेस आणि अशा, सर्व राष्ट्रांत राहाणाऱ्या, इस्राएलच्या लोकांना लाज वाटायला पाहिजे. परमेश्वरा, तुझ्याविरुध्द केलेल्या वाईट कर्मामुळे त्यांना शरम वाटायला पाहिजे.

8“परमेश्वरा, आम्हा सर्वांना लाज वाटली पहिजे. आमच्या सर्व राजांनी, नेत्यांनी आणि आमच्या पूर्वजांनी लाजेने मान खाली घातल्या पाहिजेत. का? कारण परमेश्वरा, त्यांनी तुझ्याविरुध्द पाप केले.

9“पण, परमेश्वरा, तू दयाळू आहेस. लोकांनी वाईट गोष्टी केल्या तरी तू क्षमा करतोस. आम्ही खरोखरच तुझ्याविरुध्द वागलो.
10आम्ही आमच्या परमेश्वर देवाचे ऐकले नाही. परमेश्वराने त्याच्या सेवका मार्फत संदेष्ट्यांमार्फत आम्हाला नियम सांगितले पण आम्ही त्या नियमांचे पालन केले नाही.
11तुझी शिकवण इस्राएलच्या एकाही माणसाने मानली नाही. त्या सर्वांनी तुझ्याकडे पाठ फिरविली. त्यांनी तुझे ऐकले नाही. मोशेच्या नियमांत शाप आणि वचने लिहिलेली आहेत (मोशे देवाचा सेवक होता). त्या शापांत आणि वचनांत, नियमांचे लालन न केल्यास होणाऱ्या शिक्षेबद्दल सांगितले आहे आणि त्या सर्व गोष्टी आमच्याबाबतीत घडल्या आहेत. आम्ही परमेश्वरा विरुध्द पाप केले, म्हणूनच असे घडले.

12“देवाने ह्या गोष्टी आमच्या आणि आमच्या नेत्यांच्या बाबतीत घडतील असे सांगितले आणि तशा त्या घडवूनही आणल्या. त्याने आमच्यावर वाईट प्रसंग आणले. यरुशलेमने जे सोसले, ते दुसऱ्या कोणत्याही नगराने सोसले नाही.
13आमच्याबाबतीत सर्व भयंकर गोष्टी घडल्या मोशेच्या नियमांत लिहिल्याप्रमाणेच सर्व घडले. पण अजूनही आम्ही परमेश्वराची करूणा भाकली नाही. अजूनही आम्ही पाप करीतच आहोत. परमेश्वरा, अजूनही आम्ही, तुझ्या सत्याकडे, लक्ष दिलेले नाही.
14परमेश्वराने भयानक संकटे आमच्यासाठी निर्माण करून ठेवली आणि त्याने ती आमच्यावर आणली. परमेश्वराची प्रत्येक कृती न्याय असल्यामुळेच, त्याने हे घडवून आणले पण अजूनही आपण परमेश्वराचे ऐकले नाही.

15“परमेश्वर, आमच्या देवा, तू तुझ्या सामर्थ्याच्या बळावर आम्हाला मिसरमधून बाहेर आणलेस, आम्ही तुझे आहोत. तुझ्या ह्या कृतीमुळे आजही तुझी ख्याती आहे. परमेश्वरा, आम्ही पाप केले. आम्ही भयानक कृत्ये केली.
16परमेश्वरा, तू योग्य त्याच गोष्टी करतोस. तू न्याय जाणतोस. त्यानुसार तुझे शहर जे यरुशलेम त्याच्यावरचा तुझा राग काढून घे. यरुशलेम हा तुझा पवित्र पर्वत आहे. आमच्या सभोवतालचे लोक आमचा अपमान करतात आणि तुझ्या लोकांची चेष्टा करतात. ह्याचे कारण, आम्ही आणि आमच्या पूर्वजांनी तुझ्याविरुध्द पाप केले, हेच होय.

17“आता, परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक. मी तुझा दास आहे, माझी मदतीसाठी केलेली प्रार्थना ऐक, तुझ्या पवित्र स्थानाचे भले कर.* तुझे पवित्र स्थान ओसाड पडले आहे. पण प्रभू तुझ्या चांगल्यासाठी ह्या चांगल्या गोष्टी कर.
18माझ्या देवा, माझा धावा, ऐक. डोळे उघडून आमच्यावर आलेली भयानक संकटे पाहा. तुझ्या नावाने प्रसिध्द असलेल्या नगरीची काय अवस्था झाली आहे ती पाहा. “आम्ही चांगले आहोत” असे मी म्हणत नाही. त्याकरिता मी ह्या गोष्टी मागत नाही, तर तू दयाळू आहेस हे मला ठाऊक आहे म्हणून मी तुझ्याकडे ह्या गोष्टी मागत आहे.
19परमेश्वरा, माझे ऐक आम्हाला क्षमा कर. परमेश्वरा, आमच्याकडे लक्ष दे आणि आमच्यासाठी काहीतरी कर. आता वाट पाहू नकोस! आताच काहीतरी कर. तुझ्या चांगल्यासाठी काहीतरी कर. परमेश्वरा, तुझ्या नावाने प्रसिध्द असलेल्या नगरीसाठी आणि तुझ्या लोकांसाठी काहीतरी आताच कर!”

---

**तुझ्या ... भले कर** शब्दश: तुझ्या पवित्र स्थानावर तुझी प्रभा चमकू दे.

### 70 आठवड्यांचा दृष्टान्त

20मी देवाजवळ ही प्रार्थना करीत होतो, मी त्याला माझ्या आणि इस्राएलच्या लोकांच्या पापांबद्दल सांगत होतो, मी परमेश्‍वराच्या पवित्र पर्वतासाठी प्रार्थना करीत होतो, 21तेवढ्यात गाब्रिएल माझ्याकडे आला. दृष्टान्तात मी ज्याला पाहिले होते तोच हा गाब्रिएल. तो घाईघाईने उडत माझ्याकडे आला. संध्याकाळच्या अर्पणाच्या वेळेला तो आला. 22मला जाणून घ्यावयाच्या होत्या त्या गोष्टी समजावून घेण्यास गाब्रिएलने मला मदत केली. तो म्हणाला, “दानीएला, मी तुला ज्ञान देण्यासाठी व समजावून सांगण्यासाठी आलो आहे. 23तू प्रार्थनेला सुरवात करता क्षणीच, आज्ञा मिळाली व ती तुला सांगायला मी आलो. देव तुझ्यावर खूप प्रेम करतो. तुला ही आज्ञा व दृष्टान्त समजेल.

24“दानीएला, देवाने तुझ्या लोकांसाठी आणि तुझ्या पवित्र नगरीसाठी 70 आठवडे दिले आहेत. हे 70 आठवडे, वाईट गोष्टी व पाप करावयाचे सोडून द्यावे, लोकांना पवित्र करावे, कायम राहाणारा चांगुलपणा आणावा, दृष्टान्त व संदेष्टे यांच्यावर शिक्क्‌ामोर्तब करावे, आणी पवित्र स्थान देवासाठी अर्पण केले जावे म्हणून दिले आहेत.

25“दानीएल, ह्या गोष्टी शिकून, समजावून घे. परत जा व यरुशलेम वसवा,” हा संदेश मिळाल्यापासून निवडलेला राजा* येईपर्यंतचा काळ सात आठवड्यांचा असेल. मग यरुशलेम पुन्हा वसविली जाईल. यरुशलेममध्ये पुन्हा लोकांना एकत्र येण्यासाठी जागा बांधल्या जातील. नगरीच्या संरक्षणासाठी नगरीभोवती चर असेल. 62 आठवड्यांत यरुशलेम वसविली जाईल. पण ह्या काळात खूप संकटे येतील. 26 62आठवड्यानंतर निवडलेला माणूस ठार मारला जाईल. तो गेलेला असेल.* मग भावी नेत्याचे लोक नगरीचा आणि पवित्र स्थानाचा नाश करतील. हा शेवट पुराप्रमाणे येईल. अखेरपर्यंत युध्द चालू राहील. त्या जागेचा संपूर्ण नाश करण्याची आज्ञा देवाने दिली आहे.

27“मग भावी नेता पुष्कळ लोकांबरोबर एक करार करील. तो करार एक आठवड्याचा असेल. आठवड्याच्या मध्येच अर्पणे व बळी देणे बंद होईल. मग विध्वंसक येईल. तो भयानक, विध्वंसक कृत्ये करील.* पण देवानेच त्याला संपूर्ण विनाशाची आज्ञा केलेली आहे.”

### दानीएलला हिद्देकेल नदीकाठी झालेला दृष्टान्त

10 कोरेश पारसचा राजा होता. कोरेश राजाच्या कारकिर्दीच्या तिसऱ्या वर्षी, दानीएलला पुढील गोष्टीविषयी कळले. (दानीएलचे दुसरे नाव बेल्टशस्सर असे होते.) ह्या गोष्टी सत्य होत्या परंतु समजण्यास कठीण होत्या. पण दानीएलला त्या समजल्या. दृष्टान्तामध्ये त्याला त्या समजावून सांगितल्या गेल्या.

2दानीएल म्हणतो, “त्या वेळी, मी, दानीएल, तीन आठवडे, खूप दु:खी होतो. 3त्या तीन आठवड्यांमध्ये मी आवडते जेवण केले नाही, मांस अजिबात खाल्ले नाही, मी मद्य प्यायलो नाही, स्वत:ला तेल लावले नाही तीन आठवडे मी असे केले.

4“वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या 24 व्या दिवशी मी हिद्देकेल नदीकाठी उभा असताना. 5मी वर पाहिले, तर माझ्यासमोर एक माणूस उभा होता. त्याने तागाचे कपडे घातले होते, उफाजमधील सोन्याचा कमरपट्टा त्याने बांधला होता. 6त्याचा देह चकचकीत दगडासारखा होता. त्याचा चेहरा विद्युतलतेप्रमाणे चमकत होता, त्याचे हात व पाय चमक दिलेल्या पितळाप्रमाणे होते. त्याचा आवाज लोकांच्या कोलाहलाप्रमाणे मोठा होता.

7“दृष्टान्त पाहणारा मी, दानीएल, एकटाच होतो माझ्याबरोबरच्या लोकांना दृष्टान्त दिसला नाही. पण तरीही ते घाबरले. ते इतके घाबरले, की दूर पळून जाऊन लपून बसले. 8मग मी एकटाच उरलो. मी दृष्टान्त पाहात होतो. त्या दृष्टान्ताने मी सुध्दा घाबरलो. माझा धीर खचला. मृत माणसाच्या चेहऱ्याप्रमाणे माझा चेहरा पांढराफटक पडला, मी असहाय झालो, 9मग मी दृष्टान्तातील त्या माणसाला बोलताना ऐकले. त्याचा आवाज ऐकताना, मला गाढ झोप लागली. मी जमिनीवर पालथा पडलो होतो.

10“मग मला एका हाताचा स्पर्श जाणवला. तो स्पर्श होताच मी हात गुडघे ह्यावर भार टाकून ओणवा झालो. मी इतका घाबरलो होतो की थरथर कापत होतो. 11दृष्टान्तातील माणूस मला म्हणाला, ‘दानीएला, देव तुझ्यावर खूप प्रेम करतो. मी तुझ्याशी बोलेन त्यावर काळजीपूर्वक विचार कर. उभा राहा मला तुझ्याकडेच पाठविले आहे.’ तो असे म्हणताच, मी उभा राहिलो भीतीमुळे अजूनही मी थरथर कापत होतो. 12मग दृष्टान्तातील माणूस पुन्हा बोलू लागला. तो म्हणाला, ‘दानीएला, घाबरू नकोस. ज्या दिवसापासून तू ज्ञान मिळविण्याचे व देवापुढे नम्र होण्याचे ठरविलेस, त्या दिवसापासून तो तुझी प्रार्थना ऐकत आहे. तू प्रार्थना करीत असल्यामुळेच, मी तुझ्याकडे आलो. 13पण पारसचा राजपुत्र (देवदूत) 21 दिवस माझ्याशी लढत होता व मला त्रास देत होता. पण महत्वाच्या राजपुत्रांपैकी (देवदूतांपैकी) एक, मिखाएल, माझ्या मदतीला आला. कारण मी तेथे अडकून पडलो होतो. 14भविष्यात, तुझ्या लोकांच्या बाबतीत काय घडणार आहे, हे तुला समजावून सांगायला, मी येथे आलो आहे. दानीएला, हा दृष्टान्त भविष्यकाळासंबंधी आहे.’

15“तो माणूस माझ्याशी बोलत असताना, मी खाली वाकून जमिनीवर डोके टेकविले. मी बोलू शकत नव्हतो. 16मग माणसाप्रमाणे दिसणाऱ्या एकाने माझ्या ओठांना

---

**निवडलेला राजा** शब्दश: “तैलविलेपन केलेला.”

**तो गेलेला असेल** किंवा “त्याला काहीही मिळणार नाही.”

**तो … करील** किंवा “भयानक विध्वंसाच्या पंखावर स्वार होऊन तो येईल.”

स्पर्श केला. मग मी तोंड उघडले व बोलू लागलो.
माझ्यासमोर उभ्या असणाऱ्याला मी म्हणालो, “महाराज,
दृष्टान्तात मी जे काही पाहिले, त्याने मी अस्वस्थ झालो
आहे आणि घाबरलो आहे. मी असहाय आहे. 17“महाराज,
मी दानीएल तुमचा सेवक. मी तुमच्याशी कसा बोलू शकेन?
माझा धीर खचला आहे व श्वास घेणेही मला कठीण
आहे.”
18“माणसाप्रमाणे दिसणाऱ्याने मला पुन्हा स्पर्श केला.
त्या स्पर्शाने मला शक्ती आली. 19मग तो म्हणाला,
‘दानीएला, घाबरू नकोस. देवाचे तुझ्यावर खूप प्रेम आहे,
तुला शांती लाभो! धीर धर! धीर धर!’
“त्याच्या बोलण्याने मला धीर आला. मग मी म्हणालो,
“महाराज, तुम्ही मला धीर दिलात आता तुम्ही बोलू
शकता.”
20“मग तो म्हणाला, “दानीएला, मी तुझ्याकडे का आलो,
तुला माहीत आहे का? लवकरच पारसच्या राजपुत्राशी
(देवदूताशी) लढायला मला परत गेले पाहिजे. मी जाईल
तेव्हा ग्रीसचा राजपुत्र (देवदूत) येईल. 21पण दानीएल,
जाण्याआधी, प्रथम सत्याच्या ग्रंथात काय लिहिले आहे, ते
मी तुला सांगितले पाहिजे. त्या दुष्ट देवदूतांच्या विरोधात
माझ्या बाजूने मीखाएलशिवाय कोणीही उभा राहणार नाही.
मीखाएल तुझ्या लोकांवर राज्य करणारा राजपुत्र (देवदूत)
आहे.

11 दारयावेश हा मेदी ज्या वर्षी गादीवर बसला,*
त्या वर्षी मी पारसच्या राजपुत्राच्या (देवदूताच्या)
विरुध्द मिखाएलच्या बाजूने लढण्यास उभा राहिलो.
2“‘आता, दानीएल, मी तुला सत्य काय आहे ते सांगतो.
पारसमध्ये अजून तीन राजे होतील. मग एक चौथा राजा
येईल. हा राजा पारसच्या आधीच्या राजांपेक्षा खूपच धनवान
असेल. सत्ता मिळवायला तो संपत्तीचा उपयोग करील. तो
प्रत्येकाला ग्रीसविरुध्द जायला लावील. 3मग एक बलवान
व शक्तिशाली राजा येईल. मोठ्या अधिकाराने तो सत्ता
गाजवेल त्याला पाहिजे ते तो करील. 4तो येताच त्याच्या
राज्याचे तुकडे पडतील जगाच्या चार भागांत त्याच्या राज्याचे
विभाजन होईल. त्या राजाची मुले किंवा नातवंडे ह्यांच्यात
त्याचे राज्य विभागले जाणार नाही. त्याच्यासारखी त्याच्या
राज्याला सत्ता मिळणार नाही. का? कारण त्याचे राज्य
हिसकावून घेतले जाईल व इतरांना दिले जाईल.
5“‘दक्षिणेचा राजा बलवान होईल. पण मग त्याचाच
एक सेनापती त्याचा पराभव करील. सेनापती राज्य करू
लागेल व तो खूपच सामर्थ्यवान होईल.
6“‘मग काही वर्षांनी, दक्षिणेचा राजा व तो सेनापती
एक करार करतील. दक्षिणेच्या राजाची मुलगी उत्तरेच्या
राजाशी लग्न करील. शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून ती
असे करील. पण ती व दक्षिणेचा राजा पुरेसे शक्तिशाली
नसतील. लोक तिच्याविरुध्द, तिला त्या देशात
आणणाऱ्याविरुध्द तसेच तिचे अपत्य व तिला मदत
करणारा या सर्वांविरुध्द उठतील.
7“‘पण तिच्याच कुटुंबातील एकजण [दक्षिणेच्या राजाची]
जागा घेईल तो उत्तरेच्या राजाच्या सैन्यावर हल्ला करील.
तो त्या राजाच्या भक्कम किल्ल्यात जाईल. तो लढेल
आणि जिंकेल. 8तो त्यांच्या देवतांच्या मूर्ती, धातूच्या मूर्ती
आणि सोन्या चांदीच्या किंमती वस्तू घेईल. तो त्या वस्तू
मिसरला नेईल. मग काही वर्षे तो उत्तरेच्या राजाला त्रास
देणार नाही. 9उत्तरेचा राजा दक्षिणेच्या राज्यावर हल्ला
करील. [पण त्याचा पराभव होईल व] तो आपल्या देशाला
परत जाईल.
10“‘उत्तरेच्या राजाची मुले युध्दाची तयारी करतील. ते
मोठे सैन्य जमवितील जोरदार पुराप्रमाणे ते सैन्य चटकन
देश पार करील. दक्षिणेच्या राजाच्या भक्कम
किल्ल्यावरसुध्दा ते सैन्य हल्ला करील. 11मग दक्षिणेचा
राजा खूप चिडेल. तो उत्तरेच्या राजावर चालून जाईल.
उत्तरेच्या राजाजवळ मोठे सैन्य असूनसुध्दा त्याचा पराभव
होईल. 12उत्तरेच्या सैन्याचा पराभव होईल व त्या सैनिकांना
धरून नेतील दक्षिणेच्या राजाला गर्व होईल. तो उत्तरेचे
हजारो सैनिक ठार करील. पण त्याचे यश फार काळ
टिकणार नाही. 13उत्तरेचा राजा दुसरे सैन्य जमवेल. ते
पहिल्या सैन्याहूनही मोठे असेल. खूप वर्षानंतर तो हल्ला
करील. ते सैन्य प्रचंड असेल. त्याच्याजवळ पुष्कळ शस्त्रास्त्रे
असतील. ते युध्दाला तयार असेल.
14“‘त्या वेळी, खूप लोक दक्षिणेच्या राजाच्याविरुध्द
असतील. युध्द आवडणारे तुमच्यातील काही तुमचेच लोक
दक्षिणेच्या राजाविरुध्द बंड करतील. ते विजयी होणार
नाहीत. पण त्यांच्या अशा वर्तनाने दृष्टान्त खरा ठरण्यास
मदत होईल. 15मग उत्तेरचा राजा येऊन, तटांना उतार
बांधून मजबूत शहर ताब्यात घेईल. दक्षिणेच्या सैन्याला
हल्ला परतविण्याचे बळ असणार नाही. दक्षिणेच्या सैन्यातील
शक्तिवान सैनिकसुध्दा उत्तरेचे सैन्य थोपवायला पुरे पडणार
नाहीत.
16“‘उत्तरेचा राजा त्याला पाहिजे ते करील. त्याला
कोणीही अडवू शकणार नाही. ‘सुंदर देशाची’ सत्ता व
नियंत्रण त्याच्या हाती येईल. त्याच्या हाती विध्वंसाचीही
शक्ती असेल. 17उत्तरेचा राजा, दक्षिणेच्या राजाविरुध्द
लढण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावण्याचा निश्चय
करील. तो दक्षिणेच्या राजाबरोबर एक करार करील. तो
आपल्या एका मुलीचे लग्न दक्षिणेच्या राजाशी लावून
देईल. दक्षिणेच्या राजाचा पराभव करण्यासाठी तो असे
करील, पण त्याचा बेत यशस्वी होणार नाही. त्याच्या
योजनांची त्याला मदत होणार नाही.
18“‘मग तो आपला मोर्चा भूमध्य समुद्राच्या
किनारपट्टीवरील देशांकडे वळवील. तो खूप शहरांचा
पराभव करील. पण मग एक सेनापती त्याचा गर्व व

---

**दारयावेशी … बसला** म्हणजे साधारणपणे ख्रि. पू. 521.

बंड यांचा शेवट करील. तो उत्तरेच्या राजाची अप्रतिष्ठा
करील.
19"'ह्यानंतर, उत्तरेचा राजा, स्वत:च्या देशातील भक्कम
किल्ल्यांत परत जाईल. पण तो दुर्बळ होईल व पडेल.
त्याचा अंत होईल.
20"'मग त्यानंतर उत्तरेच्या राजानंतर नवा राजा
येईल. ऐश्वर्यात राहता यावे म्हणून पुरेसा पैसा गोळा
करण्यासाठी तो कर वसुली करणाऱ्याला पाठवील पण
काही वर्षातच त्या राजाचा नाश होईल. पण तो लढाईत
मरणार नाही.
21"'त्याच्या मागून एक अतिशय क्रूर व तिरस्करणीय
माणूस येईल. राजघराण्यातील असण्याची त्याची योग्यता
नसेल.* लबाडी करून तो राजा होईल. लोकांना निर्भय
वाटत असताना, तो हल्ला करील. 22तो प्रचंड व शक्तिशाली
सैन्यांचा पराभव करील. तो नेत्याचा कराराच्या साहाय्याने
पराभव करील. 23ह्या क्रूर व तिरस्करणीय राजाबरोबर
खूप राष्ट्रे करार करतील. पण तो खोटे बोलेल व त्यांना
फसवील. तो मोठी सत्ता मिळवील पण अगदी थोडे लोक
त्याला पाठिंबा देतील.
24"'जेव्हा श्रीमंत देशांना सुरक्षित वाटत असेल, तेव्हाच
तो क्रूर राजा त्यांच्यावर चढाई करील. वाडवडिलांवर तो
अगदी योग्य वेळी हल्ला करील. त्याच्या वाडवडिलांना
यश मिळाले नाही, पण त्याला मिळेल. पराभूत झालेल्या
देशांतील वस्तू लूटून तो आपल्या अनुयायांना देईल. भक्कम
शहरांचा पराभव व नाश करण्याचे बेत तो आखेल.
त्याला यश मिळेल, पण काही काळापुरतेच.
25"'ह्या क्रूर राजाचे सैन्य मोठे असेल. तो त्या सैन्याचा
उपयोग त्याचे बळ व शौर्य ह्यांच्या प्रदर्शनासाठी करील व
दक्षिणेच्या राजावर हल्ला करील. दक्षिणेचा राजा खूप
मोठे व शक्तिशाली सैन्य जमवून युध्दावर जाईल पण
त्याच्या विरोधात असलेले लोक कट रचतील आणि
दक्षिणेच्या राजाचा पराजय होईल. 26दक्षिणेच्या राजाचे
चांगले मित्र समजले जाणारेच त्याचा नाश करण्याचा
प्रयत्न करतील त्याचे सैन्य पराभूत होईल. लढाईत त्याचे
पुष्कळ सैनिक मारले जातील. 27त्या दोन राजांनी
एकमेकांना दुखविण्याचा चंगच बांधला असेल. ते एकाच
टेबलावर बसून एकमेकांशी खोटे बोलतील. पण यातून
कोणाचाच फायदा होणार नाही. का? कारण देवाने त्यांच्या
शेवटाची वेळ निश्चित केली आहे.
28"'पुष्कळ संपत्तीसह उत्तरेचा राजा आपल्या देशात परत
जाईल मग पवित्र कराराच्याविरुध्द वाईट गोष्टी करण्याचे
तो ठरवील. तो त्याच्या बेताप्रमाणे सर्व गोष्टी करील व
मग आपल्या देशात परत जाईल. 29योग्य वेळ येताच,
पुन्हा, उत्तरेचा राजा, दक्षिणेच्या राजावर, स्वारी करील.
पण या वेळी, पूर्वीप्रमाणे, त्याला यश मिळणार नाही.
30कित्तीमची गलबते येऊन उत्तरेच्या राजाविरुध्द लढतील.
ती गलबते येताना पाहून तो घाबरेल. मग तो मागे वळेल
व आपला राग पवित्र करारावर काढील. तो मागे फिरेल
व ज्या लोकांनी पवित्र कराराला अनुसरायचे सोडून दिले
आहे, त्यांना तो मदत करील. 31यरुशलेमच्या मंदिरात
भयानक कृत्ये करण्यासाठी उत्तरेचा राजा सैन्य पाठवील
ते सैन्य लोकांना नित्याचे होमार्पण अर्पणे करू देणार
नाहीत. मग ते काहीतरी खरोखरच भयंकर कृत्य करतील
विनाशास कारणीभूत होणारी भयंकर गोष्ट ते स्थापन
करतील.
32"'पवित्र कराराला अनुसरण्याचे सोडून दिलेल्या
यहुद्यांना उत्तरेचा राजा खोटे नाटे सांगून आणि गोड बोलून
फसवील. ते यहूदी तर त्याहून वाईट पाप करतील. पण जे
यहुदी देवाला जाणतात व देवाच्या आज्ञा पाळतात ते यहुदी
बलवान होतील. ते हल्ला परतवितील.
33"'सुज्ञ यहूदी, पुष्कळ लोकांना शिकवतील आणि
इतर लोकांना घडणाऱ्या गोष्टी समजावून सांगतील पण
त्यांच्यापैकी काहीजणांना सुध्दा छळ सोसावा लागेल. अशा
काहींना तलवारीने मारले जाईल, काहींना जाळण्यात येईल,
किंवा तुरुंगात टाकण्यात येईल. काहींची घरे आणि वस्तू
काढून घेण्यात येतील.
34ह्या यहुद्यांचा पाडाव होत असताना त्यांना, फारच
थोडी मदत मिळेल. पण अशा सुज्ञ यहूद्यांना भेटायला
येणारे पुष्कळ यहुदी हे ढोंगीच असतील. 35काही सुज्ञ
यहूदी चुका करतील व पडतील पण छळ झालाच पाहिजे.
का? कारण त्यामुळे ते अखेरच्या क्षणापर्यंत अधिक
सामर्थ्यशाली, अधिक शुध्द आणि निर्दोष होतील मग,
योग्य वेळी, अंताचा काळ येईल.'"

## स्वत:चीच स्तुती करणारा राजा

36"'उत्तरेचा राजा त्याला पाहिजे ते करील. तो स्वत:बद्दल
बढाया मारील. तो स्वत: आपली स्तुती करील. व स्वत:ला
देवापेक्षा सुध्दा चांगले समजेल. कोणीही ऐकल्या नसतील
अशा गोष्टी तो सांगेल. देवांच्या देवाविरुध्द तो अशा गोष्टी
सांगेल. सर्व वाईट घडेपर्यंत त्याला यश मिळेल. देवाने
घडविण्याचे ठरविलेले घडेलच.
37"'उत्तरेचा राजा त्याच्या वडिलांनी पूजलेल्या देवांची
पर्वा करणार नाही. बायका पूजत असलेल्या देवताच्या
मूर्तीचीही तो तमा बाळगणार नाही. तो कोणत्याच देवाला
मानणार नाही. त्याउलट, तो स्वत:ची स्तुती करील आणि
स्वत:चे महत्व देवतांपेक्षा जास्त वाढवील. 38उत्तरेचा राजा
कोणत्याच देवताची पूजा करणार नाही, पण तो सत्तेची
पूजा करील. सत्ता आणि बळ हेच त्याचे देव असतील.
त्याच्या वाडवडिलांना त्याच्याप्रमाणे सत्तेचा लोभ नव्हता.
तो सत्तेच्या देवाची सोने चांदी किंमती रत्ने आणि नजराणे
ह्यांनी पूजा करतो.

---

**राजघराण्यातील ... नसेल** किंवा "त्यांच्याजवळ राजाला आवश्यक असणारे गुण नसतील."

39“‘हा उत्तरेचा राजा ह्या परक्या देवाच्या साहाय्याने
भक्कम गडावर हल्ला करील. त्याला साथ देणाऱ्या परकीय
राजांना तो जास्त मान देईल. पुष्कळ लोकांवर ते राज्य
करतील. त्या बदल्यात तो त्यांच्याकडून पैसा वसूल
करील.

40“‘अंतकाळी, दक्षिणेचा राजा उत्तरेच्या राजाशी लढेल.
उत्तरेचा राजा त्याच्यावर चढाई करील. तो रथ, घोडेस्वार
आणि मोठमोठी गलबते घेऊन येईल व चढाई करील. तो
पुराच्या लोढ्यांप्रमाणे येईल. 41उत्तरेच्या राजा सुंदर देशावर
हल्ला करील. तो खूप देशांचा पराभव करील. पण अदोम,
मवाब व अम्मोनचे नेते त्याच्या तावडीतून सुटतील.
42पुष्कळ देशांना तो आपले बळ दाखवील. तो किती
बलवान आहे, हे मिसरलासुध्दा कळेल. 43मिसरचा सोन्या
चांदीचा खजिना व सर्व संपत्ती त्याला मिळेल. लूबी व
कूशी त्याला मानतील (त्याची आज्ञा पाळतील). 44पण
उत्तरेच्या राजाला पूर्व व उत्तर दिशेकडून ऐकलेल्या
बातम्यांनी भीती वाटेल व रागही येईल. व तो अनेक
राष्ट्रांचासंपूर्ण नाश करण्यासाठी निघेल. 45तो आपला
तंबू सुंदर पवित्र पर्वत आणि समुद्र यांच्यामध्ये उभा
करील. पण अखेर, वाईट राजा मरेल त्याच्या अतंकाळी
त्याला मदत करायला त्याच्याजवळ कोणीही नसेल.’”

12 “दुष्टान्तातील माणूस म्हणाला, ‘त्या वेळी, महान
राजपुत्र (देवदूत) मिखाएल उभा राहील. मिखाएल
तुझ्या लोकांचा, यहूद्यांचा प्रमुख आहे, तेव्हा खूप संकटाचा
काळ असेल. पृथ्वीवर राष्ट्र निर्माण झाल्यापासून असा
काळ कधी आला नसेल. पण दानीएल, त्या वेळी, तुझ्या
लोकांपैकी ज्यांची नावे, जीवनाच्या ग्रंथात नोंदविली गेली
असतील, ते सर्व वाचतील.

2पृथ्वीवरील खूप मृत व पुरलेले उठतील. काहींना
चिरंजीवित्व लाभेल पण काहींना कायमची अप्रतिष्ठा व
तिरस्कार लाभेल. 3ज्ञानी आकाशाप्रमाणे तेजाने चमकून
उठतील, ज्या ज्ञानी लोकांनी इतरांना योग्य जीवनमार्ग
शिकविला, ते सदासर्वकाळ ताऱ्यांप्रमाणे चमकतील.

4“‘पण, दानीएला, तू हा संदेश गुप्त ठेव तू खाते बंद
करून टाक. अंतकाळापर्यंत हे तू गुप्त ठेवले पाहिजेस.
खूप लोक इकडे तिकडे सत्यज्ञानाचा शोध घेतील आणि
सत्यज्ञान वाढेल.’

5“मग मला, दानीएलला, दोन दुसरी माणसे दिसली
एक नदीकाठी माझ्याजवळ उभा होता आणि दुसरा
पैलथडीला उभा होता. 6तागाची वस्त्रे परिधान केलेला
माणूस नदीच्या पाण्यावर उभा होता. त्या दोघांतला एक
त्याला म्हणाला, “ह्या विस्मयकारक गोष्टी खऱ्या व्हायला
किती काळ लागेल?”

7“तागाचे कपडे परिधान केलेल्या व नदीच्या पाण्यावर
उभ्या राहिलेल्या माणसाने आपले, उजवा व डावा, दोन्ही
हात स्वर्गाकडे उंचावले आणि त्याने चिरंतर देवाची
शपथ घेऊन वचन देताना मी ऐकले. तो म्हणाला, “तो
काळ, एक वेळ, अनेक वेळा, (अ) आणि अर्धा* वेळेचा
असेल.” पवित्र लोकांच्या शक्तीचा बीमोड केला जाईल
आणि मग या सर्व गोष्टी अखेरीला खऱ्या ठरतील.”

8“मी उत्तर ऐकले पण मला त्याचा अर्थ खरोखरच
कळला नाही. म्हणून मी विचारले, “महाराज, ह्या सर्व
गोष्टी खऱ्या ठरल्यावर काय होईल.?”

9“तो म्हणाला, ‘दानीएला, तू तुझ्या जीवनाकडे लक्ष दे.
संदेश गुप्त ठेवलेला आहे. अंताच्या क्षणापर्यंत तो गुप्तच
राहील. 10पुष्कळ लोकांना शुध्द केले जाईल ते स्वत:ला
स्वच्छ करतील. पण दुष्ट दुष्टच राहातील. त्यांना ह्या
गोष्टी समजणार नाहीत. पण सुज्ञांना सर्व समजेल.

11“‘नित्याची होमार्पणे करणे बंद होईल. ह्या वेळेपासून
ती भयंकर नाश करणारी गोष्टी घडेपर्यंतचा काळ हा
1290 दिवसांचा असेल. 12जो वाट पाहील आणि 1335
दिवसांच्या अखेरपर्यंत पोहोचेल, तो खूप सुखी होईल.

13“दानीएल, तुझ्याबद्दल सांगायचे झाले तर, जा आणि
शेवटपर्यंत तुझे जीवन जग. तुला विश्रांती मिळेल आणि
अखेरील तू मृत्युलोकांतून उठशील आणि तुला तुझा
हिस्सा मिळेल.’”

---

**तो … वर्षांचा** शब्दश: वेळ, वेळा व अर्धी वेळ.

# होशेय

## परमेश्वराचा होशेयतर्फे संदेश

1 बैरीचा मुलगा होशेय याला परमेश्वराचा संदेश आला,
त्या वेळेस उज्जीया, योथाम, आहाज आणि हिज्कीया
हे यहूदाचे राजे होते. व योवाशाचा मुलगा यराबाम
इस्राएलावर राज्य करीत होता.
2हा होशेयला आलेला परमेश्वराचा पहिलाच संदेश
होता. परमेश्वर म्हणाला, "जा आणि वेश्येशी लग्न कर.
तिला मुले होऊ देत. का? कारण ह्या देशातील लोक
वेश्येप्रमाणेच वागले आहेत. त्यांनी परमेश्वराचा
विश्वासघात केला आहे."

## इज्रेलचा जन्म

3म्हणून होशयने दिब्लाइमाची मुलगी गोमर हिच्याशी
लग्न केले. तिला दिवस गेले व तिला मुलगा झाला.
4परमेश्वराने होशेयला सांगितले, "या मुलाचे नाव
इज्रेल ठेव. का? कारण लवकरच, येहू घराण्याने
इज्रेल दरीत जो रक्तपात केला, त्याबद्दल मी त्यांना
शिक्षा करणार आहे. मग मी इस्राएल राष्ट्रांचा शेवट
करीन. 5त्या वेळी मी इज्रेल दरीत, इस्राएलाचे धनुष्य
मोडीन."

## लो-रूहामाचा जन्म

6मग गोमरला पुन्हा दिवस गेले. ह्या खेपेस तिने एका
मुलीला जन्म दिला. परमेश्वर होशेयला म्हणाला, "तिचे
नाव लो-रूहामा ठेव. का? कारण मी यापुढे इस्राएल
राष्ट्राला अजिबात दया दाखविणार नाही. मी त्यांना क्षमा
करणार नाही. 7पण मी यहूदावर दया करीन. मी यहूदा
राष्ट्राला वाचवीन, त्यांना वाचविण्यासाठी मी धनुष्य
किंवा तलवार यांचा उपयोग करणार नाही, किंवा घोडदळ
वा सैनिक यांचा वापर करणार नाही. मी माझ्या सामर्थ्याच्या
बळावर त्यांना तारीन."

## लो-अम्मीचा जन्म

8मग लो-रूहमेचे दूध तुटल्यावर गोमरला पुन्हा दिवस
गेले या खेपेला तिने एका मुलाला जन्म दिला. 9परमेश्वराने
त्या मुलाचे नाव "लो-अम्मी ठेवण्यास सांगितले. का?
कारण तुम्ही माझे लोक नव्हेत व मी तुमचा परमेश्वर
नाही."

## इस्राएल लोकांच्या बहुसंख्यत्वाविषयी परमेश्वराचे वचन

10"भविष्यकाळात, समुद्रकाठच्या वाळूच्या कणांप्रमाणे
इस्राएली लोक असतील. तुम्ही वाळू मापू वा मोजू शकत
नाही. मग 'तुम्ही माझे लोक नव्हत' असे ज्यांना म्हणण्यात
आले, 'त्याऐवजी त्यांना तुम्ही जिवंत परमेश्वराची लेकरे
आहात.' असे म्हणण्यात येईल.
11"मग यहूदाचे व इस्राएलचे लोक एकत्र येतील. ते
त्यांच्यासाठी एक राजा निवडतील. त्याचे राष्ट भूप्रदेशापेक्षा
खूपच मोठे असेल. तेव्हा इज्रेलचा दिवस खरोखर चांगला
असेल."

2 "मग तुम्ही तुमच्या भावांना 'तुम्ही माझे आहात'
आणि बहिणींना 'त्याने तुमच्यावर दया केली' असे
म्हणाल."

## इस्राएल राष्ट्राशी परमेश्वर बोलतो

2"तुम्ही आपल्या आईशी वाद घाला. खुशाल वाद
घाला. कारण ती माझी पत्नी नाही व मी तिचा पती
नाही. वेश्येप्रमाणे वागण्याचे सोडून देण्यास तिला सांगा.
तिच्या स्तनापासून तिला तिच्या प्रियकरांना दूर करण्यास
सांगा. 3तिने जर व्यभिचार करण्याचे सोडण्यास नकार
दिला तर मी तिला नग्न करीन. तिला मी तिच्या
जन्माच्या वेळच्या अवस्थेप्रमाणे टाकीन. मी तिचे लोक
काढून घेईन मग ती ओसाड रूक्ष वाळवंटाप्रमाणे
होईल, मी तिला तहानेने मारीन. 4तिची मुले ही
वेश्येची मुले असल्याने मला त्यांची कीव येणार
नाही. 5त्यांची आई वेश्येप्रमाणे वागली. तिला
तिच्या कर्माची लाज वाटली पाहिजे. ती म्हणाली, 'मी
माझ्या प्रियकराकडे जाईन ते मला अन्नपाणी देतील.
ते मला लोकर, कापड, मद्य व जैतूनेचे तेल
देतील.'
6"म्हणून, मी (परमेश्वर) तुझा (इस्राएलचा) रस्ता काटे
पसरवून आडवीन. मी भिंत बांधीन मग तिला मार्ग सापडू
शकणार नाही. 7ती तिच्या प्रियकरांमागून धावेल पण
त्यांना ती गाठू शकणार नाही. ती तिच्या प्रियकरांना
शोधील, पण ते तिला सापडणार नाहीत. मग ती म्हणेल,
'मी माझ्या पहिल्या पतीकडे (परमेश्वराकडे) परत जाईन.

मी त्याच्याजवळ असताना माझे जीवन ह्याहून चांगले होते. आतापेक्षा ते आयुष्यच बरं होते.'

8"तिला धान्य, मद्य आणि तेल देणारा मीच एकमेव (परमेश्वर) आहे, हे तिला (इस्राएलाला) कळले नाही. मी तिला आणखी चांदी-सोने देत राहिलो पण इस्राएली लोकांनी त्या चांदी-सोन्याचा उपयोग बआलच्या मूर्ती घडविण्याकरिता केला. 9म्हणून, मी (परमेश्वर) परत येईन. मी धान्य पिकताच माझे धान्य व द्राक्षे तयार होताच धान्य आणि द्राक्षरस परत घेईन. मी तिला तिचे उघडे शरीर झाकण्यासाठी दिलेली लोकर व कापड परत घेईन. 10आता मी तिला उघडी करीन. ती नग्न होईल व तिचे सर्व प्रियकर तिला पाहू शकतील. माझ्या सामर्थ्यापासून तिचा कोणीही बचाव करू शकणार नाही. 11मी तिचा सर्व आनंद नष्ट करीन. तिच्या सुट्या तिच्या अमावस्येच्या मेजवान्या व विश्रांतीचे दिवस मी काढून घेईन. तिच्या खास मेजवान्या मी बंद करीन. 12मी तिच्या द्राक्षवेलींचा व तिच्या अंजिराच्या झाडांचा नाश करीन. ती म्हणाली होती, 'माझ्या प्रियकरांनी मला या गोष्टी दिल्या' पण मी तिच्या बागांचे रूप पालटून टाकीन. त्या जंगलाप्रमाणे होतील. वन्य पशू येऊन झाडे खातील.

13"तिने बालाची सेवा केली, म्हणून मी तिला शिक्षा करीन. तिने त्यांच्यापुढे धूप जाळला. तिने साजशृंगार केला. तिने दागदागिने व नथनी घातली मग ती तिच्या प्रियकरांकडे गेली व मला विसरली." परमेश्वरच असे म्हणाला:

14"म्हणून मी (परमेश्वर) तिला शिकवीन. मी तिला वाळवंटात नेईन. मी तिच्याशी प्रेमाने बोलेन. 15तेथे मी तिला द्राक्षमळे देईन अखोरची दरी आशेचे द्वार म्हणून देईन. मग तिच्या तरुणपणी मिसर देशातून बाहेर आल्यावर ज्याप्रमाणे तिने प्रत्युत्तर दिले होते, तसे ती देईल." 16परमेश्वरच असे म्हणतो.

"त्या वेळेला 'तू मला माझा पती' म्हणून संबोधशील. मला 'माझा बआल* असे म्हणणार नाहीस. 17मी तिच्या तोंडातून बालाचे नाव काढून टाकीन. मग लोक कधीही बालाचे नाव घेणार नाहीत.

18"त्या वेळेला, मी इस्राएली लोकांसाठी रानातल्या प्राण्यांबरोबर, आकाशातील पक्ष्यांबरोबर आणि जमिनीवर सरपटणाऱ्या प्राण्यांबरोबर एक करार करीन. मी धनुष्य तलवार व युध्दात वापरण्यात येणारी शस्त्रे मोडून टाकीन. त्या देशात एकही शस्त्र राहणार नाही. मी देश सुरक्षित करीन, त्यामुळे इस्राएलचे लोक शांतीने झोप घेतील. 19आणि मी (परमेश्वर) तुला माझी चिरंतन वधू करीन. मी चांगुलपणा, न्याय, प्रेम व दया यांच्यासह तुला वधू करून घेईन. 20मी तुला माझी विश्वासू वधू बनवीन. मग तू परमेश्वराला खरोखर जाणशील. 21मी त्या वेळेला प्रत्युत्तर देईन." परमेश्वर असे म्हणतो.

"मी आकाशाशी बोलेन व तो पृथ्वीवर पाऊस पाडील.
22भूमी धान्य, मद्य व तेल देईल. त्यामुळे इज्रेलच्या गरजा भागतील.
23तिच्या भूमीत मी तिचे पुष्कळ बीज* पेरीन. लो-रूमाहावर मी दया करीन. लो-अम्मीला मी 'माझे लोक' म्हणीन. मग ते मला 'तू माझा परमेश्वर' मानतील.'"

## होशेय गोमरला विकत घेऊन गुलामगिरीतून परत आणतो

3 मग परमेश्वर पुन्हा मला म्हणाला, "गोमरला खूप प्रियकर आहेत पण तू तिच्यावर प्रेम करीत राहिलेच पाहिजे. का? कारण परमेश्वर तसेच करतो. परमेश्वर इस्राएल लोकांवर सतत प्रेम करतो, पण ते लोक मात्र इतर दैवतांची पूजा करीत राहतात. त्यांना मनुकांच्या ढेपा खाणे आवडते."

2म्हणून मी सहा औंस चांदी व 9 बुशेल जव देऊन गोमरला विकत घेतले. 3मग मी तिला म्हणालो, "खूप दिवस तू माझ्याबरोबर घरात राहिले पाहिजेस. तू वेश्येप्रमाणे वागता कामा नयेस. तू दुसऱ्या पुरुषाबरोबर जाणार नाहीस. मीच तुझा पती असेन."

4ह्याचप्रमाणे, पुष्कळ दिवस इस्राएली लोकांना राजावाचून वा नेत्यावाचून काळ कंठावा लागेल. त्यांना बळी, स्मृतिशिळा, एफोद वा घराण्याचा देव यांच्यावाचून राहावे लागेल. 5ह्यानंतर इस्राएलचे लोक परत येतील. मग ते परमेश्वराला म्हणजेच त्यांच्या देवाला आणि दावीदाला म्हणजेच त्यांच्या राजाला शोधतील. शेवटच्या दिवसांत, ते परमेश्वराचा व त्याच्या चांगुलपणाचा आदर करतील.

## परमेश्वर इस्राएलवर रागावला आहे

4 इस्राएलच्या लोकांनो, परमेश्वराचा संदेश ऐका! ह्या देशात राहणाऱ्या लोकांविरुध्द परमेश्वर आपले म्हणणे मांडणार आहे. "ह्या देशातील लोकांना परमेश्वराची खरीखुरी ओळख नाही. ते सत्याने वागत नाहीत आणि परमेश्वराशी एकनिष्ठ नाहीत. 2लोक शपथ घेतात, खोटे बोलतात, ठार मारतात आणि चोरी करतात ते व्यभिचाराचे

---

**माझा बआल** ही शब्दखेळी आहे. बाल ह्या नांवाचा अर्थ "प्रभू किंवा पति" असाही होतो.

**पुष्कळ बीज** इज्रेल, लो-रूहामा, आणि लो-अम्मी होशयाची मुले आहेत. पण ह्या नावांना आणखीही विशेष अर्थ आहेत. इज्रेल ह्या नावांचा अर्थ "देव बिया पेरील." परंतु इस्राएलमधील एका मोठ्या खोऱ्याचेपण नांव इज्रेल आहे. हे असे दर्शविते की बहुधा देव त्याच्या लोकांना परत इस्राएलमध्ये आणील. लो-रूहामाचा अर्थ "तिला दया दाखविण्यात आली नाही." आणि लो-अम्मी म्हणजे "माझे लोक नव्हत."

पाप करतात आणि त्यांना मुले होतात ते पुन्हा पुन्हा खून
करतात. 3म्हणून देश, मृतासाठी शोक करणाऱ्या
माणसाप्रमाणे झाला आहे. देशातील सर्व लोक दुर्बल झाले
आहेत. रानातील प्राणी, आकाशातील पक्षी आणि समुद्रातील
मासेसुध्दा मरत आहेत. 4कोणीही दुसऱ्याशी वाद घालू
नये वा दुसऱ्याला दोष देऊ नये. हे याजका! माझा वाद
तुझ्याबरोबर आहे.* 5तुम्ही (याजक) दिवसा-ढवळ्या
पडाल आणि रात्री, तुमच्याबरोबर संदेष्टे पडतील. मी
तुमच्या आईचा नाश करीन.

6"माझ्या लोकांचा अज्ञानामुळे नाश झाला. तुम्ही
शिकण्याचे नाकारले आहे. म्हणून मी तुम्हाला माझ्या
सेवेत याजक होण्यास नकार देईन. तुम्ही तुमच्या देवाचा
नियम विसरलात, म्हणून मी तुमच्या मुलांना विसरेन. 7ते
गर्विष्ठ झाले, त्यांनी माझ्याविरुद्ध खूप पाप केले. म्हणून
मी त्यांचे वैभवाचे लाजिरवाण्या स्थितीत रूपांतर करीन.

8"लोकांच्या पापांमध्ये याजक सहभागी झाले. त्यांना ती
पापे आणखी पाहिजे आहेत. 9म्हणजेच याजक लोकांपेक्षा
वेगळे नाहीत. त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल मी त्यांना
शिक्षा करीन. त्यांच्या चुकांची मी परतफेड करीन. 10ते
खातील, पण त्यांची तृप्ती होणार नाही. ते व्यभिचाराचे पाप
करतील, पण त्यांना मुले होणार नाहीत. का? कारण
त्यांनी परमेश्वराचा त्याग केला आणि वेश्येप्रमाणे वर्तन
केले. 11व्यभिचार, कडक पेय, व नवीन मद्य माणसाची
सरळ विचार करण्याची ताकद नष्ट करतील. 12माझी
माणसे लाकडाच्या तुकड्यांना सल्ला विचारीत आहेत.
त्यांना वाटते की त्या काटक्या त्यांना उत्तर देतील. का?
कारण ते वेश्यांप्रमाणे त्या खोट्या देवाच्या मागे धावले.
त्यांनी त्यांच्या देवाचा त्याग केला व ते वेश्येप्रमाणे वागले.
13पर्वतमाथ्यांवर ते बळी देतात आणि डोंगरांवर अल्लोन
लिबने व एला या वृक्षांखाली धूप जाळतात. ह्या वृक्षांची
छाया चांगली असते. म्हणून तुमच्या मुली त्या वृक्षांखाली
वेश्यांप्रमाणे झोपतात, आणि तुमच्या सुना व्यभिचाराचे
पाप करतात.

14"मी तुमच्या मुलींनी वेश्या झाल्याबद्दल वा तुमच्या
सुनांना व्यभिचाराचे पाप केल्याबद्दल दोष देऊ शकत
नाही. पुरुष वेश्यांकडे जातात व त्यांच्याबरोबर झोपतात.
ते मंदिरातील कलावंतिणीबरोबर बळी अर्पण करतात.
म्हणजेच ते मूर्ख लोक स्वत:चाच नाश करून घेत आहेत.

## इस्राएलाची लज्जास्पद पापे

15"इस्राएल, तू वेश्येप्रमाणे वागतेस. पण यहूदाला अपराध
करु देऊ नयेस. तू गिल्गालला किंवा वर बेथ-आवेनला
जाऊ नकोस. वचने देताना परमेश्वराच्या नावाचा उपयोग
करू नकोस 'परमेश्वराशपथ' असे म्हणू नकोस.
16"परमेश्वराने इस्राएलला खूप गोष्टी दिल्या आहेत. खूप
गवत असलेल्या विस्तीर्ण कुरणात आपल्या मेंढ्यांना घेऊन
जाणाऱ्या मेंढपाळाप्रमाणे परमेश्वर आहे. पण इस्राएल पुन्हा
पुन्हा पळून जाणाऱ्या कालवडीप्रमाणे हट्टी आहे.
17एफ्राईमने त्याच्या मूर्तींशी हातमिळवणी केली आहे.
तेव्हा त्याला ऐकटा ठेवा.

18"एफ्राईम त्यांच्या धुंदीत सामील झाला आहे. मद्यपान
केल्यानंतर ते वेश्यांप्रमाणे वागत आहेत. ते आपल्या
प्रियकरांकडून लाजिरवाण्या भेटी मागतात. 19ते
संरक्षणासाठी त्या दैवतांजवळ गेले आणि त्यांनी आपली
विचार करण्याची शक्ती गमावली. त्यांनी अर्पण केलेले
बळी त्यांना नामुष्कीच आणतात."

## नेत्यांनी इस्राएलला व यहूदाला पाप करायला भाग पाडले

5 "याजकांनो, इस्राएल राष्ट्रा आणि राजाच्या
घराण्यातील लोकांनो, माझे म्हणणे ऐका. कारण हा
निवाडा तुमच्यासाठी आहे.

"तुम्ही मिस्पातील सापळ्याप्रमाणे आहात. ताबोरच्या
भूमीवर पसरलेल्या जाळ्याप्रमाणे तुम्ही आहात. 2तुम्ही
पुष्कळ वाईट कृत्ये केली आहेत, म्हणून मी तुम्हा साऱ्याना
शिक्षा करीन. 3एफ्राईमला मी ओळखून आहे. इस्राएलची
कृत्ये मला महीत आहेत. एफ्राईम, आता, यावेळी तू
वेश्येप्रमाणे वागत आहेस. इस्राएल पापाने बरबटली आहे.
4इस्राएलच्या लोकांनी खूप वाईट गोष्टी केल्या आहेत,
त्या वाईट गोष्टी त्यांना परमेश्वराकडे परत येण्यास
अडथळा करतात. ते नेहमी दुसऱ्या दैवतांच्या मागे मागे
जाण्याच्या मार्गाचाच विचार करतात. ते परमेश्वराला
ओळखत नाहीत. 5इस्राएलचा अहंकार त्यांच्याविरुध्द
पुरावा आहे. म्हणून इस्राएल आणि एफ्राईम त्यांच्या पापांना
अडखळतील. त्यांच्याबरोबर यहूदाही अडखळेल.

6"लोकांचे नेते परमेश्वराचा शोध घेतील. ते
त्यांच्याबरोबर त्यांच्या 'मेंढ्या' व 'गायी' घेतील. पण त्यांना
परमेश्वर सापडणार नाही. का? कारण त्यांने त्या लोकांचा
त्याग केला आहे. 7ते परमेश्वराशी प्रामाणिक राहात
नाहीत. त्यांची मुले परक्यांपासून झालेली आहेत. आता
परमेश्वर त्यांचा आणि त्यांच्या देशाचा पुन्हा नाश करील."

## इस्राएलच्या नाशाचे भविष्य

8"गिबात शिंग फुंका, रामात तुतारी फुंका.
बेथ-आवेनमध्ये इषारा द्या. बन्यामीन, तुझ्यामागे शत्रू
लागला आहे.

9शिक्षेच्या वेळी एफ्राईम ओसाड होईल ह्या गोष्टी नक्की
घडून येतील, असा खात्रीपूर्वक इषारा मी (परमेश्वर)
इस्राएलच्या घराण्यांना देतो.

---

**माझा वाद तुझ्याबरोबर आहे** किंवा "लोक एखाद्याविषयी तक्रार किंवा आरोप करू शकत नाहीत. लोक याजकाबरोबर वाद घालण्याप्रमाणे असाहाय्य आहेत." पुष्कळ वेळा याजक व लेवी न्यायाधिशाचे काम करीत असत आणि त्यांचे निर्णय अंतिम असत.

[10]दुसऱ्यांची मालमत्ता चोरणाऱ्या चोरांसारखे यहूदाचे नेते आहेत. म्हणून मी (परमेश्वर) माझ्या रागाचा त्यांच्यावर पाण्याप्रमाणे वर्षाव करीन.
[11]एफ्राईमला शिक्षा होईल. द्राक्षांप्रमाणे तो चिरडला व दाबला जाईल.का? कारण त्याने ओंगळाला अनुसरण्याचे ठरविले.
[12]कसर ज्याप्रमाणे कापडाच्या तुकड्याचा नाश करते, तसाच मी एफ्राईमचा नाश करीन. लाकडाचा तुकडा सडून नष्ट होतो, तसेच मी यहूदाला नष्ट करीन.
[13]एफ्राईमने स्वत:चा आजार व यहूदाने स्वत:ची जखम पाहिली. म्हणून मदतीसाठी ते अश्शुरकडे गेले. त्यांनी सम्राटाला त्यांच्या समस्या सांगितल्या. पण तो सम्राट तुम्हाला बरे करु शकत नाही. तो तुमची जखम भरून काढू शकत नाही.
[14]का? एफ्राईमच्या दृष्टीने मी सिंहाप्रमाणे होणार आहे. यहूदा राष्ट्राला मी तरुण सिंहासारखा होणार आहे. मी, हो मी, त्यांचे फाडून तुकडे तुकडे करीन. मी त्यांचे हरण करीन. आणि कोणीही त्यांना माझ्यापासून वाचवू शकणार नाही.
[15]लोक त्यांचा अपराध कबूल करेपर्यंत आणि माझा शोध घेईपर्यंत मी माझ्या जागी परत जाईन. हो! त्यांच्या अडचणीच्या वेळी ते माझा कसून शोध करतील."

## परमेश्वराकडे परत येण्याची फळे

6 "चला! आपण परमेश्वराकडे परत जाऊ या! त्याने आपल्याला दुखविले, पण तोच आपल्याला बरे करील. त्याने आपल्याला जखमी केले, पण तोच त्यावर मलमपट्टी करील.
[2]दोन दिवसांनी तो आपल्याला जिवंत करील. आणि तिसऱ्या दिवशी उठवील मग आपण त्यांच्याजवळ राहू शकू.
[3]आपण परमेश्वराबद्दल जाणून घेऊ या परमेश्वराला समजून घ्यायचा कसून प्रयत्न करू या. पहाट येते हे जसे आपल्याला माहीत आहे, तसेच तो येत आहे, हेही आपल्याला माहीत आहे. जमिनीला पाणी पुरविणाऱ्या वसंतातील पावसाप्रमाणे परमेश्वर येईल."

## लोक निष्ठावान नाहीत

[4]"एफ्राईम व यहूदा, मी तुमचे काय करावे बरे? तुमची निष्ठा सकाळच्या धुक्याप्रमाणे आहे. प्रात:काळीच नाहीशा होणाऱ्या दवाप्रमाणे तुमची निष्ठा आहे.
[5]मी संदेष्ट्यांचा उपयोग करून लोकांसाठी नियम केले. माझ्या आज्ञेप्रमाणे लोकांना ठार मारले गेले. त्या निर्णयांतून चांगल्या गोष्टी निर्माण होतील.
[6]का? कारण मला निष्ठावंत प्रेम पाहिजे, बळी नको. लोकांनी होमार्पणे आणण्यापेक्षा, परमेश्वराला जाणून घ्यावे, असे मला वाटते.
[7]पण लोकांनी आदामासारखाच करार मोडला त्यांच्या देशातच त्यांनी माझा विश्वासघात केला.
[8]गिलाद दुष्कर्मे करणाऱ्यांची नगरी आहे. लोकांनी दुसऱ्यांना फसविले व ठार मारले.
[9]लुटारू ज्याप्रमाणे कोणावर तरी हल्ला करण्यासाठी वाट बघत लपून बसतात, त्याचप्रमाणे धर्मगुरु शेखमला जाणाऱ्या रस्त्यावर वाटसंरूची वाट बघतात. त्यांनी दुष्कृत्ये केली आहेत.
[10]इस्राएलमध्ये भयंकर गोष्ट मी पाहीली आहे. एफ्राईम परमेश्वराशी निष्ठावान नाही इस्राएल पापाने बरबटली आहे.
[11]यहूदा, तुझ्यासाठी सुगीची वेळ ठेवलेली आहे. माझ्या लोकांना मी कैदेतून परत आणीन, तेव्हा ती वेळ येईल."

7 "मी इस्राएलला बरे करीन. मगच लोकांना एफ्राईमच्या पापाविषयी कळून येईल. लोकांना शोमरोनाचा खोटेपणाही समजेल. त्या नगरीत ये जा करणाऱ्या चोरांबद्दलही लोकांना समजेल.
[2]मी त्यांचे अपराध लक्षात ठेवीन, असे त्या लोकांना वाटत नाही. त्यांची दुष्कृत्ये सगळीकडे पसरली आहेत. मला त्यांची पापे स्पष्ट दिसू शकतात.
[3]त्यांची दुष्कृत्ये त्यांच्या राजाला आनंद देतात. त्यांची दैवते त्यांच्या नेत्यांना खुश करतात.
[4]रोटीवाला रोट्या बनविण्यासाठी कणीक मळतो तो रोटी भट्टीत ठेवतो रोटी फुगत असताना तो आच मोठी ठेवत नाही. पण इस्राएलचे लोक तसे नाहीत. ते त्यांची आच नेहमीच मोठी ठेवतात.
[5]आमच्या राजाच्या दिवशी, ते आच जास्त मोठी करतात. ते पेयांच्या मेजवान्या देतात. मद्याच्या गरमीने नेत्यांना मळमळते. मग राजाही परमेश्वराच्या निंदकांत सामील होतो.
[6]लोक कट रचतात. त्यांची मने तापलेल्या भट्टीप्रमाणे उत्तेजित होऊन जळतात. त्यांच्या मनातील खळबळ रात्रभर जळत राहाते. आणि सकाळी ती अतितप्त विस्तवाप्रमाणे होते.
[7]ते तापलेल्या भट्टीप्रमाणे आहेत. त्यांनी त्यांच्या राज्यकर्त्यांचा नाश केला. त्यांचे सर्व राजे पडले पण एकानेही मदतीसाठी मला हाक मारली नाही."

## इस्राएलचा नाश केला जाणार आहे, हे इस्राएलला ठाऊक नाही

[8]"एफ्राईम राष्ट्राबरोबर मिसळतो तो दोन्हीकडून न भाजलेल्या भाकरीप्रमाणे आहे.
[9]परके एफ्राईमची शक्ती नष्ट करतात. पण एफ्राईमला ते कळत नाही. त्याच्यावर पिकलेले केस पसरले आहेत. पण ते त्याला माहीत नाही.
[10]एफ्राईमचा गर्व त्यांच्याविरुध्द बोलतो लोकांना खूपच अडचणी आहेत, तरी ते परमेश्वराकडे, त्यांच्या

परमेश्वराकडे परत जात नाहीत. ते मदतीसाठी त्याच्याकडे पाहात नाहीत.

11म्हणजेच एफ्राईम मूर्ख पारव्याप्रमाणे बेअक्कल झाला आहे. लोकांनी मदतीसाठी मिसरला हाक मारली. ते मदत मागायला अश्शूरकडे गेले.

12ते मदतीसाठी त्या देशांकडे जातात खरे, पण मी त्यांना सापळ्यात पकडीन. मी माझे जाळे त्यांच्यावर फेकीन, आणि जाळ्यात अडकलेल्या आकाशातील पक्ष्याप्रमाणे मी त्यांना खाली आणीन. त्यांच्या करारांबद्दल मी त्यांना शिक्षा करीन.

13ते त्यांच्या दृष्टीने वाईट आहे. त्यांनी माझा त्याग केला. त्यांनी माझी आज्ञा पाळण्यांस नकार दिला म्हणून त्यांचा नाश होईल. मी त्या लोकांचे रक्षण केले. पण ते माझ्याविरुध्द खोटे बोलतात.

14मनापासून ते मला कधीही बोलावीत नाहीत. हो! ते त्यांच्या बिछान्यात रडतात आणि धान्य व नवीन मद्य मागताना ते स्वत:ला माझ्यापासून अलगच करतात मनाने ते माझ्यापासून दूर गेले आहेत.

15मी त्यांना शिकवण दिली आणि त्यांचे हात बळकट केले. पण त्यांनी माझ्याविरुध्द दुष्ट बेत रचले आहेत.

16ते मोडक्या धनुष्याप्रमाणे आहेत. त्यांनी दिशा बदलल्या पण ते परत माझ्याकडे आले नाहीत. त्यांचे नेते त्यांच्या सामर्थ्याबद्दल बढाई मारतात. पण ते तलवारीच्या वाराने मारले जातील.मग मिसरचे लोक त्यांना हसतील.

## मूर्तिपूजेने इस्राएलला नाशाकडे नेले

8 “रणशिंग फुंकून इषारा द्या परमेश्वराच्या घरावरील
गरुडाप्रमाणे व्हा. इस्राएल लोकांनी माझा करार मोडला
आहे त्यांनी माझे नियम पाळले नाहीत 2‘परमेश्वरा, आम्ही
इस्राएलमधील लोक तुला ओळखतो’ असे ते किंचाळून
मला म्हणतात. 3पण इस्राएलने चांगल्या गोष्टी नाकारल्या
म्हणून शत्रू त्याचा पाठलाग करतात. 4इस्राएल लोकांनी
त्यांचा राजा निवडला, पण सल्ला विचारण्यासाठी ते
माझ्याकडे आले नाहीत. इस्राएल लोकांनी नेते निवडले,
पण मी ओळखत असणाऱ्या लोकांची निवड त्यांनी केली
नाही. इस्राएल लोकांनी त्यांच्याजवळील सोन्या-चांदीचा
उपयोग स्वत:साठी मूर्ती तयार करण्याकंरिता केला. म्हणून
त्यांचा नाश होईल. 5-6शोमरोन, तुझे वासरू परमेश्वराने
नाकारले आहे परमेश्वर म्हणतो, ‘मी इस्राएल लोकांवर
रागावलो आहे.” इस्राएलच्या लोकांना त्यांच्या पापाबद्दल
शिक्षा केली जाईल काही कामगारांनी ते पुतळे घडविले
ते काही परमेश्वर नाहीत. शोमरोनच्या वासराचे तुकडे
तुकडे केले जातील 7इस्राएल लोकांनी मूर्खपणा केला. तो
वाऱ्याला पेरण्याप्रमाणे होता. म्हणून त्यांच्यावर संकटे
येतील-ते वावटळीचे पीक निर्माण करतील. शेतांत पीक
वाढेल, पण त्यापासून अन्न मिळणार नाही. जर काही
पिकलेच, तर परकेच ते खाऊन टाकतील.

8कोणालाही नको असलेल्या ताटासारखा इस्राएल असल्यामुळे त्याचा नाश केला गेला.इस्राएलला दूर फेकण्यात आले. म्हणून इस्राएल लोक इतर राष्ट्रांत विखुरले गेले.

9एफ्राईम त्याच्या ‘प्रेमिकाकडे’ गेला. रानटी गाढवाप्रमाणे तो अश्शूरकडे भटकला गेला.

10इस्राएल लोक इतर राष्ट्रांतील आपल्या ‘प्रियकरांकडे’ गेले. पण मी इस्राएलींना एकत्र गोळा करीन. पण त्या सामर्थ्यवान राजाच्या ओझ्यामुळे त्यांना थोडासा त्रास झालाच पाहिजे.

## इस्राएल देवाला विसरून मूर्तींना पुजतो

11एफ्राईमने पुष्कळ वेद्या बांधून पापच केले. त्या वेद्या एफ्राईमच्या पापाच्या वेद्या बनल्या आहेत.

12मी एफ्राईमसाठी जरी 10,000 नियम लिहिले, पण एफ्राईमने ते परक्यासाठी असल्याप्रमाणे मानले.

13इस्राएलींना बळी देणे आवडते. ते मांसाचा नैवेद्य दाखवून ते खातात. परमेश्वर त्यांनी दिलेले बळी स्वीकारीत नाही. त्याला त्यांची पापे स्मरतात. म्हणून तो त्यांना शिक्षा करील. कैदी म्हणून त्यांना मिसरला नेण्यात येईल.

14इस्राएलने राजवाडे बांधले. पण तो आपल्या कर्त्याला विसरला आता यहूदा गढ्या बांधतो आहे. पण मी यहूदातील गावाला आग लावीन आणि ती आग त्या गढ्यांना बेचिराख करील!”

## परागंदा अवस्थेचे दुःख

9 इस्राएल, इतर राष्ट्राप्रमाणे आनंदोत्सव करू नकोस.
आनंदात राहू नकोस! तू वेश्येप्रमाणे वागलास आणि
देवाचा त्याग केलास. प्रत्येक खळ्यावर तू व्यभिचाराचे
पाप केलेस.* 2पण त्या खळ्यांतील धान्य इस्राएलला
पुरणार नाही. इस्राएलला पुरेसे मद्य मिळणार नाही.

3इस्राएली परमेश्वराच्या भूमीत राहणार नाहीत. एफ्राईम
मिसरला परत जाईल. अश्शूरमध्ये त्यांना निषिध्द भक्ष्य
भक्षण करावे लागेल. 4इस्राएल लोक देवाला मद्य अर्पण
करणार नाहीत. ते परमेश्वराला बळी अर्पण करणार
नाहीत. त्यांचे बळी प्रेत संस्कारात खाल्ले जाणाऱ्या
अन्नसारखे असतील. जो कोणी ते खातो तो अशुध्द होतो.
त्यांच्या भाकरी परमेश्वराला मंदिरात पोचणार नाहीत.
त्या त्यांनाच खाव्या लागतील. 5ते (इस्राएली) परमेश्वराच्या
सुट्या व समारंभ साजरे करू शकणार नाहीत.

6इस्राएल लोक निघून गेले. कारण शत्रूने त्यांच्याकडून
सर्वकाही घेतले. पण मिसर त्यांचा स्वीकार करील. मोफ

**व्यभिचाराचे पाप केले** ह्याचा अर्थ असा की लोक देवाशी विश्वासू नव्हते. परंतु ह्याचा असाही अर्थ होतो की लोकांनी मंदीरातील वेश्याबरोबर लैंगिक संबंध केला. त्यांची खोटी दैवते त्यांना पुष्कळ संतती व उत्तम पिक देईल असा त्यांनी विश्वास ठेवला होता.

त्यांना मूठमाती देईल. त्यांच्या चांदीच्या खजिन्यांवर रानटी झुडुपे वाढतील. इस्राएल लोकांच्या राहण्याच्या ठिकाणी काटे उगवतील.

### इस्राएलने खऱ्या संदेष्ट्यांना नाकारले

7संदेष्टा म्हणतो, "इस्राएला, ह्या गोष्टी जाणून घे. शिक्षेची वेळ आली आहे. तुझ्या कुकर्मांची किंमत मोजण्याची वेळ आली आहे." पण इस्राएलचे लोक म्हणतात, "संदेष्टे मूर्ख आहे. देवाचेच आत्मे असलेला हा माणूस वेडा आहे." संदेष्टा म्हणतो, "तुमच्या दुष्कृत्यांबद्दल तुम्हाला शिक्षा होईल. तुमच्या तिरस्काराची सजा तुम्हाला मिळेल."
8परमेश्वर आणि संदेष्टा एफ्राईम वर लक्ष ठेवण्याऱ्या रखवालदाराप्रमाणे आहेत. पण रस्ताभर अनेक सापळे आहेत. आणि लोक संदेष्ट्याचा त्याच्या परमेश्वराच्या घरातसुध्दा, तिरस्कार करतात.

9गिबाच्या घटनेमध्ये इस्राएल लोक जितके दुष्ट होते तितकेच ते (आजही) आहेत. परमेश्वर त्यांची पापे स्मरेल व त्यांना त्याबद्दल शिक्षा करील.

### मूर्तिपूजेमुळे इस्राएलचा विद्ध्वंस झाला

10वाळवंटातील ताज्या द्राक्षांप्रमाणे त्यावेळी इस्राएल होता. तुमचे पूर्वज मोसमातील अंजिराच्या पहिल्या बहराप्रमाणे मला दिसले. पण मग ते बाल-पौरा कडे आले आणि ते बदलले. ते कुजल्यासारखे झाले ते ज्यांच्यावर प्रेम करीत त्या भयंकर गोष्टीसारखे (दैवतांसारखे) झाले.

### इस्राएलांना संतान होणार नाही

11एफ्राईमचे वैभव पक्षाप्रमाणे दूर उडून जाईल तेथे गर्भधारणा होणार नाही, प्रसूतीही होणार नाहीत आणि म्हणून बालकेही असणार नाहीत.
12पण जरी इस्राएलींनी मुले वाढविली तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. मी त्यांना मुलांचा वियोग घडवीन. त्यांना सोडून देईन. पण त्यांना संकटाशिवाय काही मिळणार नाही.

13-14एफ्राईम आपल्या मुलांना सापळ्याकडे नेत आहे, हे मी पाहू शकतो एफ्राईम आपली मुले मारेकऱ्यापुढे आणतो. परमेश्वर, त्यांना तुझ्या इच्छेप्रमाणे दे. गर्भापात होणारी गर्भाशये दे दूध न देणारे स्तन दे.

15त्यांची सर्व पापे गिल्गालमध्ये आहेत. म्हणून तेथपासूनच मला त्यांचा तिरस्कार वाटू लागला. मी त्यांना बळजबरीने माझे घर सोडायला लावीन. कारण ते दुष्कृत्ये करतात. ह्यापुढे मी त्यांच्यावर प्रेम करणार नाही. त्यांचे नेते बंडखोर आहेत. ते माझ्याविरुध्द गेले आहेत.

16एफ्राईमला शिक्षा होईल. त्यांचे मूळ मरत आहे. ते नि:संतान होतील. ते बालकांना कदाचित् जन्म देतील, पण त्यांच्या पोटी जन्मलेल्या अमूल्य बालकांना मी ठार मारीन.

17ते लोक माझ्या परमेश्वराचे ऐकणार नाहीत. म्हणून तोही त्यांचे ऐकणार नाही. आणि ते बेघर होऊन राष्ट्रा-राष्ट्रांतून भटकतील.

### इस्राएलच्या संपत्तीने त्याला मूर्तिपूजेकडे नेले

10 इस्राएल बहरलेल्या द्राक्षवेलीप्रमाणे आहे. त्याला परमेश्वराकडून पुष्कळ गोष्टी मिळत गेल्या पण त्याने दैवतांच्या देवांच्या मानासाठी खूपखूप वेद्या बांधल्या. त्याची भूमी अधिकाधिक चांगली होत गेली, तेव्हा त्याने अधिक चांगले स्तंभ दैवतांच्या मानासाठी उभे केले.

2इस्राएलाच्या लोकांनी परमेश्वराला फसविण्याचा प्रयत्न केला. पण आता त्यांनी त्यांचा अपराध कबूल केलाच पाहिजे. परमेश्वर त्यांच्या वेद्या मोडेल. तो त्यांच्या स्मारक स्तंभांचा नाश करील.

### इस्राएलींचे दुष्ट निर्णय

3आता इस्राएल लोक म्हणतात, "आम्हाला राजा नाही आम्ही परमेश्वराला मानत नाही. त्याचा राजा आमच्यासाठी काही करू शकत नाही."

4ते वचने देतात पण ते फक्त खोटे बोलत असतात. ते आपला शब्द पाळत नाहीत. ते दुसऱ्या देशांबरोबर करार करतात. परमेश्वराला ते करार आवडत नाहीत. न्यायाधीश नांगरलेल्या शेतात वाढणाऱ्या विषारी तणाप्रमाणे आहेत.

5शोमरोनमधील लोक बेथ:आवेन येथील वासरांची पूजा करतात. ते लोक अक्षरश: रडतील. ते याजकही खरोखरी रडतील. का? कारण त्यांची सुंदर मूर्ती नाहीशी झाली. ती
दूर नेली गेली. 6ती मूर्ती अश्शूरच्या महान राजाला भेट म्हणून नेली गेली तो, एफ्राईमची लज्जास्पद मूर्ती ठेवील.
इस्राएलला आपल्या मूर्तीची लाज वाटेल. 7शोमरोनच्या दैवतांचा नाश केला जाईल पाण्यावर तरंगणाऱ्या लाकडाच्या तुकड्याप्रमाणे त्यांची दशा होईल.

8इस्राएलाने पाप केले आणि उच्चस्थाने बांधली. आवेन मधील उच्चस्थानांचा नाश केला जाईल त्यांच्या वेदीवर काटेकुटे व तण वाढतील मग ते पर्वतांना म्हणतील, "आम्हाला झाका" आणि टेकड्यांना म्हणतील, "आमच्यावर पडा."

### इस्राएलला पापाची किंमत मोजावी लागेल

9इस्राएल, गिबाच्या काळापासून तू पाप केले आहेस ते लोक तेथे पाप करीतच राहिले. गिबातील ते दुष्ट युध्दात
खरोखरी पकडले जातील. 10मी त्यांना शिक्षा करण्यासाठी येईन सैन्ये त्यांच्या विरोधात गोळा होतील. ती इस्राएलींच्या दोन्ही पापाबद्दल त्यांना शिक्षा करतील.

11एफ्राईम शिकविलेल्या तरुण कालवडीप्रमाणे आहे. तिला खळ्यातील धान्यावरून चालायला आवडते. मी तिच्या गव्यात चांगले जोखड अडकवीन. एफ्राईमला दोराने

बांधीन मग यहूदा नांगरणी करील याकोब स्वत: ढेकळे फोडील.

[12]जर तुम्ही चांगुलपणा पेरलात, तर तुम्हाला खऱ्या प्रेमाचे पीक मिळेल तुमचे शेंत नांगरा तुम्हाला परमेश्वरासह पीक मिळेल. तो येईल आणि पावसाप्रमाणे तुमच्यावर चांगुलपणाचा वर्षाव करायला लावील.

[13]पण तुम्ही पाप पेरले, म्हणून तुम्हाला अडचणींचे पीक मिळाले तुम्हाला तुमच्या खोटेपणाचे फळ मिळाले. का? कारण तुम्ही तुमच्या शक्तीवर आणि तुमच्या सैनिकांवर विश्वास ठेवला. [14]म्हणून तुमच्या सैन्याला रणशिंग ऐकू येईल तुमच्या सर्व गढ्यांचा नाश होईल. तो नाश, शल्मनाने जसा बेथ-आर्बेलचा नाश केला, तसा असेल. त्या युध्दाच्या वेळी, आया मुलांबरोबर ठार मारल्या गेल्या. [15]आणि हे सर्व तुझ्याबाबतीत बेथेल येथे घडेल. का? कारण तुम्ही खूप पापे केली. तो दिवस उजाडताच इस्राएलच्या राजाचा संपूर्ण नाश होईल.

## इस्राएल परमेश्वराला विसरला आहे

11 परमेश्वर म्हणाला, "इस्राएल लहान बालक असताना, मी (परमेश्वराने) त्यांच्यावर प्रेम केले. आणि मी माझ्या मुलाला मिसरबाहेर बोलाविले.

[2]पण मी जितके अधिक इस्राएलींना बोलाविले, तितके जास्त ते मला सोडून गेले. त्यांनी बआलाना बळी अर्पण केले. मूर्ती पुढे धूप जाळला.

[3]"एफ्राईमला चालावयाला शिकविणारा मीच होतो. मी इस्राएलींना हातांवर उचलून घेतले. मी त्यांना बरे केले. पण त्यांना त्याची जाणीव नाही.

[4]मी त्यांना दोऱ्यांनी बांधून नेले. पण त्या प्रेमाच्या दोऱ्या होत्या. मी त्यांना मुक्त करणाऱ्या माणसाप्रमाणे होतो. मी खाली वाकून त्यांना जेवू घातले.

[5]"परमेश्वराकडे परत येण्यास इस्राएल लोकांनी नकार दिला म्हणून ते मिसरला जातील अश्शूरचा राजा त्यांचाही राजा होईल. [6]त्यांच्या गावांवर टांगती तलवार राहील. त्यांच्या सामर्थ्यवान पुरुषांना ती मारील त्यांच्या नेत्यांचा ती नाश करील.

[7]"मी परत यावे अशी माझ्या लोकांची अपेक्षा आहे. वरच्या परमेश्वराला ते बोलवतील पण देव त्यांना मदत करणार नाही."

## इस्राएलचा नाश करण्याची परमेश्वराची इच्छा नाही

[8]"एफ्राईम, तुला सोडून देण्याची माझी इच्छा नाही. इस्राएल, तुझे रक्षण करावे असे मला वाटते. अदमाह किवा सबोईम यांच्यासारखी तुझी स्थिती करावी असे मला वाटत नाही. माझे मन:परिवर्तन होत आहे. तुझ्याबद्दलचे माझे प्रेम अतिशय उत्कट आहे.

[9]मी, माझ्या भयंकर क्रोधाचा, विजय होऊ देणार नाही. मी पुन्हा एफ्राईमचा नाश करणार नाही. मी मानव नसून परमेश्वर आहे. मी तुमच्यामधला एकमेव पवित्र आहे मी तुमच्याबरोबर आहे. मी माझा क्रोध प्रकट करणार नाही.

[10]मी सिंहासारखी डरकाळी फोडीन. मी डरकाळी फोडताच, माझी मुले माझ्यामागून येतील ती पश्चिमेकडून भयाने थरथर कापत येतील.

[11]ती मिसरमधून घाबरलेल्या पाखरांप्रमाणे फडफड करीत येतील. अश्शूरमधून भयभीत होऊन कबुतरांप्रमाणे येतील. मग मी त्यांना घरी परत नेईन." परमेश्वर असे म्हणाला आहे.

[12]"एफ्राईमच्या दैवतांनी मला घेरून टाकले. इस्राएलच्या लोकांनी माझ्याकडे पाठ फिरविली. म्हणून त्यांचा नाश झाला. पण यहूदा अजून एल बरोबरच चालत आहे. यहूदा पवित्रांशी निष्ठावंत आहे."

## परमेश्वर इस्राएलच्याविरुध्द आहे

12 एफ्राईम त्याचा वेळ वाया घालवीत आहे-इस्राएल दिवसभर "वाऱ्याचा पाठलाग करतो." लोक अधिकाधिक खोटे बोलतात. ते जास्तीतजास्त चोऱ्या करतात. त्यांनी अश्शूरशी करार केले आहेत. आणि ते जैतून तेल मिसरला नेत आहेत.

[2]परमेश्वर म्हणतो, "माझे इस्राएलशी भांडण आहे. याकोबला त्याच्या कर्मांबद्दल सजा मिळालीच पाहिजे. त्याने केलेल्या वाईट कृत्यांबद्दल त्याला शिक्षा झालीच पाहिजे. [3]याकोबने आईच्या गर्भात असल्यापासूनच त्याच्या भावाला फसवायला सुरवात केली. याकोब शक्तिशाली तरुण होता. त्या वेळी तो परमेश्वराविरुध्द लढला. [4]याकोबने देवदूताशी मल्लयुध्द खेळले आणि तो जिंकला तो रडला व त्याने कृपा करण्याची याचना केली. हे बेथेलमध्ये घडले. तेथे तो आमच्याशी बोलला. [5]हो, खरेच, यहोवा सैन्यांचा परमेश्वर आहे. त्याचे नाव यहोवा (परमेश्वर) असे आहे. [6]म्हणून आपल्या परमेश्वराकडे परत या. त्याच्याशी निष्ठा ठेवा. योग्य तेच करा. तुमच्या परमेश्वरावर नेहमी विश्वास ठेवा.

[7]"याकोब, हा खरा व्यापारी आहे. तो त्याच्या मित्रांनासुध्दा फसवितो त्याचे तराजू सुध्दा खोटे आहेत. [8]एफ्राईम म्हणाला, 'मी श्रीमंत आहे. मला खरी संपत्ती सापडली आहे. माझे अपराध कोणालाही कळणार नाहीत. कोणालाही माझी पापे समजणार नाहीत.'

[9]"पण तुम्ही मिसरमध्ये असल्यापासून, मी परमेश्वर तुमचा परमेश्वर आहे. सभामंडपाच्या वेळेप्रमाणे तुम्हाला तंबूत राहायला भाग पाडीन.[10]मी संदेष्ट्यांशी बोललो मी त्यांना पुष्कळ दृष्टान्त दिले. माझी शिकवण तुम्हाला शिकविण्यासाठी मी त्यांना अनेक मार्ग दाखविले. [11]पण गिलादाच्या लोकांनी पाप केले आहे. तेथे पुष्कळ भयानक मूर्ती आहेत. गिल्गालमध्ये लोक बैलांना बळी अर्पण

करतात. त्यांच्या अनेक वेदी आहेत. नांगरलेल्या शेतात ज्याप्रमाणे ढेकळांच्या रांगा असतात, त्याप्रमाणे त्यांच्या वेदींच्या रंगाच्या रांगा आहेत.

12“याकोब अरामला पळून गेला. त्या जागी, इस्राएलने पत्नीसाठी सेवा केली. दुसरी पत्नी मिळावी म्हणून त्याने मेंढ्या पाळल्या. 13पण परमेश्वराने संदेष्ट्यांच्या साहाय्याने इस्राएलला मिसरमधून बाहेर आणले. संदेष्ट्यांचा उपयोग करून देवाने इस्राएलला सुरक्षित ठेवले. 14पण एफ्राईम परमेश्वराच्या रागास कारणीभूत झाला एफ्राईमने अनेक लोकांना ठार केले. म्हणून त्याला त्याच्या अपराधांबद्दल शिक्षा होईल. त्याचा प्रभू (परमेश्वर) त्याला अपमान सहन करायला लावील.”

## इस्राएलने आपला नाश स्वत:च करून घेतला

13 “इस्राएलमध्ये एफ्राईमने स्वत:चे महत्व वाढविले तो बोलत असे व लोक भीतीने थरथर कापत. पण एफ्राईमने पाप केले त्याने बआल देवताला पूजणे सुरु केले. 2ते इस्राएली अधिकच पाप करतात. ते स्वत:साठी मूर्ती तयार करतात. कारागीर चमत्कृतिपूर्ण चांदीच्या मूर्ती घडवितात व ते लोक त्या मूर्तीशी बोलतात. ते त्या मूर्तीपुढे बळी देतात. सोन्याच्या वासरांचे ते चुंबन घेतात. 3ह्याच कारणामुळे ते लोक लवकरच अदृश्य होतील. सकाळच्या धुक्याप्रमाणे त्यांची स्थिती होईल. सकाळी धुके थोड्यावेळ दिसते. व लगेच नाहीसे होते. इस्राएलींची दशा खव्व्यातून उडणाऱ्या फोलकटाप्रमाणे होईल. धुराड्यातून निघणारा धूर काही क्षणातच दिसेनासा होतो, तसे त्यांचे होईल.

4“तुम्ही मिसर देशात असल्यापासून मी परमेश्वर तुमचा परमेश्वर आहे माझ्याशिवाय दुसरा देव तुम्हाला माहीत नव्हता. ज्याने तुम्हाला वाचविले तो मीच. 5वाळवंटात, त्या रूक्ष प्रदेशात, मी तुम्हाला ओळखले. 6मी इस्राएल लोकांना अन्न दिले. त्यांनी ते खाल्ले व ते संतुष्ट झाले, तृप्त झाले. ते गर्विष्ठ झाले आणि ते मलाच विसरले.

7“म्हणूनच मी त्यांच्याशी सिंहासारखा वागेन. रस्त्यावर दबा धरून बसलेल्या चित्याप्रमाणे मी होईन. 8जिची पिल्ले तिच्यापासून हिरावून घेतली गेली आहेत अशी अस्वलाची मादी जसा हल्ला करील, तसाच मीही त्यांच्यावर तुटून पडेन. मी त्यांच्यावर चढाई करीन. मी त्यांच्या छाती फाडीन. सिंह किंवा इतर हिंस्र पशू आपली शिकार जशी फाडून खातात तसेच मी करीन.”

## परमेश्वराच्या क्रोधापासून इस्राएलला कोणीही वाचवू शकणार नाही

9“इस्राएल, मी तुला मदत केली. पण तू माझ्याविरुध्द गेलास म्हणून आता मी तुझा नाश करीन. 10तुझा राजा कोठे आहे? तुझ्या सर्व नगरांत तो तुला वाचवू शकत नाही. तुझे न्यायाधीश कोठे आहेत? ‘मला राजा व नेते दे’ अशी विनवणी तू केली होतीस. 11मी रागावलो आणि तुला राजा दिला. माझा क्रोध अधिक भडकताच, मी तुझा राजा काढून घेतला.

12“एफ्राईमने आपला अपराध लपविण्याचा प्रयत्न केला. त्याचे पाप म्हणजे गुप्त गोष्ट हे असे त्याला वाटले पण त्याच्या पापाची शिक्षा त्याला मिळेल.

13त्याची शिक्षा प्रसूतिवेदनांप्रमाणे असेल. तो सुज्ञ मुलगा नसेल त्याची जन्मवेळ येईल, तेव्हा तो वाचणार नाही.

14“मी त्यांना थडग्यापासून वाचवीन मी त्यांचा मृत्यूपासून बचाव करीन. मरणा, तुझी रोगराई कोठे आहे? थडग्या, तुझी शक्ती कोठे गेली? मला सूड घ्यायचा नाही.

15इस्राएल त्याच्या भावांत वाढतो आहे. पण पूर्वेकडून जोराचा वारा येईल. परमेश्वराचा वारा वाळवंटाकडून वाहील. मग इस्राएलची विहीर आटून जाईल. त्याचा झरा कोरडा पडेल. वारा इस्राएलच्या खजिन्यातील प्रत्येक मौल्यवान वस्तू काढून घेईल.

16शोमरोनला शिक्षा झालीच पाहिजे, का? कारण तिने परमेश्वराकडे पाठ फिरविली. इस्राएली तलवारीला बळी पडतील. त्यांच्या मुलांची खांडोळी केली जाईल. त्यांच्या गर्भवती स्त्रियांना फाडून टाकले जाईल.”

## परमेश्वराकडे परतणे

14 इस्राएला, तू पडलास. तू परमेश्वराविरुध्द पाप केलेस. पण आता परमेश्वराकडे, तुझ्या परमेश्वराकडे, परत ये. 2तू ज्या गोष्टी बोलणार आहेस, त्याबद्दल विचार कर व परमेश्वराकडे परत ये.

“त्याला सांग की आमचे पाप धुवून टाक आम्ही करीत असलेल्या चांगल्या गोष्टीं चा स्वीकार कर. आम्ही आमच्या ओठांद्वारे तुझी स्तुती करू.

3“अश्शूर आम्हाला वाचविणार नाही. आम्ही घोड्यांवर स्वार होणार नाही. आम्ही हातांनी बनविलेल्या गोष्टींना ‘आमचा देव’ असे पुन्हा म्हणणार नाही का? कारण अनाथांवर करुणा करणारा तूच एकमेव आहेस.”

## परमेश्वर इस्राएलला क्षमा करील

4परमेश्वर म्हणतो, “त्यानी माझा त्याग केला तरी मी त्यांना ह्या गोष्टीबद्दल क्षमा करीन. मी मोकळेपणाने त्यांच्यावर प्रेम करीन. आता मी त्यांच्यावर रागावलो नाही.

5मी इस्राएलासाठी दहिवराप्रमाणे होईन. इस्राएल लिलीप्रमाणे फुलेल, लबानोनमधील गंधसरूंप्रमाणे तो फोफावेल.

6त्याच्या फांद्यांचा विस्तार होईल व तो जैतुनाच्या सुंदर वृक्षाप्रमाणे होईल. लंबानोनमधील गंधसरूंच्या गंधाप्रमाणे त्याचा सुवास असेल.

7इस्राएलचे लोक, पुन्हा, माझ्या सुरक्षिततेत राहातील ते
धान्याप्रमाणे वाढतील ते वेलीप्रमाणे विस्तारतील. ते
लबानोनमधील द्राक्षारसाप्रमाणे होतील."

### परमेश्वर इस्राएलला मूर्तीबद्दल ताकीद देतो

8"एफ्राईम, माझा (परमेश्वराचा) मूर्तीशी काहीही संबंध
असणार नाही. तुमच्या प्रार्थनेला उत्तर देणारा मीच एकमीच
आहे. फक्त मीच तुमच्यावर लक्ष ठेवतो. मी सदाहरित
देवदारूसारखा आहे. माझ्यामुळे तुम्हाला फळ मिळते."

### अखेरचा सल्ला

9शहाण्या माणसाला या गोष्टी समजतात. चलाख
माणसाने या गोष्टी शिकाव्या परमेश्वराचे मार्ग योग्य
आहेत. त्यामुळे सज्जन जगतील व दुर्जन मरतील.

# योएल

## टोळधाडीमुळे पिकांचा नाश होईल

1 पथूएलचा मुलगा योएल ह्याला परमेश्वराकडून पुढील संदेश मिळाला:

[2]नेत्यांनो, हा संदेश ऐका! ह्या देशात राहणाऱ्या सर्व लोकानो, माझे ऐका! तुमच्या आयुष्यात पूर्वी, असे काही घडले आहे का? नाही. तुमच्या वडिलांच्या काळात असे काही घडले का? नाही.

[3]तुम्ही तुमच्या मुलांना ह्या गोष्टी सांगाल. तुमची मुले, त्यांच्या मुलांना व तुमची नातवंडे त्यांच्या पुढच्या पिढीला ह्या गोष्टी सांगतील.

[4]जे नाकतोड्याने सोडले, ते टोळाने खाल्ले. जे टोळाने सोडले, ते कुसरूडाने खाल्ले व जे कुसरूडाने सोडले, ते घुल्याने खाल्ले.*

## टोळधाड येते

[5]मद्यप्यांनो, जागे व्हा व रडा! सर्व दारूड्यांनो, रडा! का? कारण तुमचे गोड मद्य संपले आहे. पुन्हा तुम्हाला त्याची चव चाखता येणार नाही.

[6]माझ्या राष्ट्राबरोबर लढण्यासाठी एक मोठा व शक्तिशाली देश येत आहे. त्यांचे सैनिक अगणित आहेत. ते टोळ (शत्रू-सैनिक) तुमचा नाश करण्यास समर्थ आहेत. त्यांचे दात सिंहाच्या दाताप्रमाणे आहेत

[7]माझ्या द्राक्षवेलीवरची सर्व द्राक्षे ते 'टोळ' खातील. चांगल्या द्राक्षवेली जळाल्या व मेल्या माझ्या अंजिराच्या झाडाचा ते नाश करतील. माझी झाडे, ते, सोलून खातील. त्या झाडांच्या फांद्या पांढऱ्या पडून त्यांचा नाश होईल.

## लोकांचे आक्रंदन

[8]एखाद्या तरुण वाग्दत्त वधूचा भावी पती मारला गेल्यावर ती जशी रडते, तसे रडा!

[9]याजकांनो, परमेश्वराच्या सेवकांनो, शोक करा! का? कारण परमेश्वराच्या मंदिरात अन्नार्पणे व पेयार्पणे होणार नाहीत.

[10]शेतांचा नाश झाला आहे. भूमीसुध्दा रडत आहे. का? कारण धान्याचा नाश झाला आहे, नवे मद्य सुकून गेले आहे आणि जैतुनाचे तेल नाहीसे झाले आहे.

[11]शेतकऱ्यांनो, दु:खी व्हा! द्राक्षमळेवाल्यांनो, मोठ्याने रडा! गव्हासाठी व जवासाठी रडा! का? कारण शेतातील पीक नाहीसे झाले आहे.

[12]वेली सुकून गेल्या आहेत, अंजिराचे झाड वठत आहे, डाळींब, खजूर, सफरचंद अशी सर्वच बागेतील झाडे सुकत आहेत आणि लोकांमधील आनंद लोपला आहे.

[13]याजकांनो, शोकप्रदर्शक कपडे चढवून मोठ्याने रडा. वेदीच्या सेवकांनो, मोठ्याने शोक करा. माझ्या परमेश्वराच्या सेवकांनो, शोकप्रदर्शक कपडे घालूनच तुम्ही झोपाल. का? कारण परमेश्वराच्या मंदिरात यापुढे अन्नार्पणे व पेयार्पणे होणार नाहीत.

## टोळांचा भयंकर नाश

[14]'उपवासाची एक विशिष्ट वेळ असेल,' असे लोकांना सांगा. खास सभेसाठी लोकांना एकत्र बोलवा. देशात राहणाऱ्या लोकांना व नेत्यांना एकत्र गोळा करा. त्यांना प्रभूच्या, तुमच्या परमेश्वराच्या मंदिरात आणा, व परमेश्वराची प्रार्थना करा.

[15]शोक करा! का? कारण परमेश्वराचा खास दिवस जवळच आहे. त्या वेळी, सर्वशक्तिमान परमेश्वराची शिक्षा
हल्ल्याप्रमाणे अचानक येईल. [16]आमचे अन्न तुटले आहे.
आमच्या परमेश्वराच्या मंदिरातून आनंद व सुख निघून गेले आहे.

[17]आम्ही बियाणे पेरले पण ते मातीतच सुकून मरून गेले. आमची झाडे वाळली व मेली आहेत. आमची धान्याची कोठारे रिकामी झाली आहेत आणि कोसळत आहेत.

[18]प्राणी भुकेने व्याकूळ होऊन कण्हत आहेत. गुरांचे कळप गांगरून जाऊन, इतस्तत: भटकत आहेत. त्यांना
खाण्यास चारा नाही. मेंढ्या मरत आहेत. [19]हे परमेश्वरा,
मी तुझा मदतीसाठी धावा करतो. आगीने आमच्या हिरव्या
रानांचे वाळवंटात रूपांतर केले आहे. [20]हिंस्र पशूसुध्दा
तहानेने व्याकूळ झालेले आहेत आणि ते तुझ्या मदतीसाठी आक्रोश करत आहेत. झरे आटले आहेत-कोठेही पाणी

---

**जे ... खाल्ले** ही सर्व टोळांची निरनिराळी नावे आहेत. एकाच जातीच्या टोळांची ही वेगवेगळी नावे असू शकतील फक्त त्यांच्या वाढीच्या काळत वेगवेगव्या अवस्थांसाही जात असाव्यात.

नाही. आगीने आमच्या हिरव्या रानांचे वाळवंट केले
आहे.

## परमेश्वराचा येणारा दिवस

2 सियोन वरून रणशिंग फुंका! माझ्या पवित्र
पर्वतावरून मोठ्याने इषारा द्या. ह्या देशात राहणाऱ्या
लोकांचा भीतीने थरकाप उडू द्या. परमेश्वराचा खास
दिवस येत आहे. परमेश्वराचा खास दिवस अगदी जवळ
आला आहे.
2तो काळोखा, विषण्ण दिवस असेल. तो अंधकारमय
व ढगाळ दिवस असेल. सूर्योदयाच्या वेळी, तुम्हाला पर्वतावर
सैन्य पसरलेले दिसेल. ते सैन्य प्रचंड व शक्तिशाली असेल.
यापूर्वी कधी झाले नाही आणि यापुढे पुन्हा असे कधी
होणार नाही.
3धगधगती आग जसा नाश करते, तसा देशाचा नाश हे
सैन्य करील. त्यांच्यासमोरची भूमी एदेनच्या बागेसारखी
असेल, पण त्यांच्या मागे निर्जन वाळवंट असेल. त्यांच्या
तावडीतून काहीही सुटणार नाही.
4ते घोड्यांप्रमाणे दिसतात सैन्यातील घोड्याप्रमाणे ते
धावतात.
5त्यांचा आवाज ऐका. तो आवाज, पर्वतावर चढणाऱ्या
रथांच्या खडखडाटाप्रमाणे आहे. फोलकटे जाळणाऱ्या
आगीप्रमाणे तो आवाज आहे. ते बलवान आहेत. ते
युध्दासाठी सज्ज आहेत.
6ह्या सैन्यापुढे लोक भीतीने थरथर कापतात आणि
त्यांचे चेहेरे पांढरेफटक पडतात.
7सैनिक जोरात पळतात. ते तटांवर चढतात. प्रत्येक
सैनिक सरळ पुढे कूच करतो. ते आपला मार्ग सोडीत
नाहीत.
8ते एकमेकांना रेटीत नाहीत. प्रत्येकजण आपल्या वाटेने
जातो. जरी एकावर वार होऊन तो पडला, तरी दुसरे
कूच करीतच राहतात.
9ते नगरीकडे धाव घेतात. ते त्वरेने तटावर चढतात.
ते घरात शिरतात. चोराप्रमाणे ते खिडक्यांतून शिरतात.
10त्यांच्यापुढे धरणी व आकाश कापते, चंद्र-सूर्य काळे
पडतात आणि तारे तळपत नाहीत.
11परमेश्वर त्याच्या सैन्याला मोठ्याने हाक मारतो.
त्याचा तळ फार मोठा आहे. सैन्य त्याच्या आज्ञा पाळते.
ते सैन्य खूप बलशाली आहे. परमेश्वराचा खास दिवस हा
विलक्षण आणि भयंकर आहे. तो कोण सहन करू
शकेल?

## लोकांमध्ये परिवर्तन करण्यास परमेश्वर सांगतो

12परमेश्वराचा संदेश पुढीलप्रमाणे आहे: "मनापासून
माझ्याकडे परत या. तुम्ही दुष्कृत्ये केलीत. रडा, शोक
करा आणि उपवास करा.
13तुमचे कपडे फाडू नका, तर हृदये फाडा"*
परमेश्वराकडे, तुमच्या परमेश्वराकडे परत या. तो
कृपाळू व दयाळू आहे. तो शीघ्रकोपी नाही. तो खूप
प्रेमळ आहे. त्याने योजलेली कडक शिक्षा कदाचित् तो
बदलेलही.
14कदाचित परमेश्वराचे मन: परिवर्तन होईलही,
कोणी सांगावे! आणि कदाचित तो त्याच्या मागे
तुमच्यासाठी आशीर्वादही ठेवून जाईल. मग तुम्ही
परमेश्वराला, तुमच्या परमेश्वराला, अन्नार्पणे व पेयार्पणे
देऊ शकाल.

## परमेश्वराची प्रार्थना करा

15सियोन वरून रणशिंग फुंका. खास सभा बोलवा.
उपवासाची विशिष्ट वेळ ठरवा.
16लोकांना एकत्र जमवा, खास सभा बोलवा, वृध्दांना
एकत्र आणा मुलांना एकत्र जमवा, तान्ह्या मुलांना
एकाठिकाणी जमवा. शय्यागृहातून नवरा नवरीलाही येऊ
द्या.
17याजकांना, परमेश्वराच्या सेवकांना द्वारमंडप व वेदी
यांच्यामध्ये रडू द्या. ह्या सर्व लोकांनी म्हणावे, "परमेश्वरा,
तुझ्या माणसांवर दया कर. तुझ्या माणसांची अप्रतिष्ठा
होऊ देऊ नकोस. तुझी माणसे दुसऱ्या लोकांच्या चेष्टेचा
विषय होऊ नयेत. दुसऱ्या राष्ट्रातील लोकांनी आम्हाला
हसू नये वक्ष "कोठे आहे तुमचा परमेश्वर?" असे विचारू
नये.

## परमेश्वर देश पुन्हा उभा करील

18मग, देशासाठी, परमेश्वराच्या भावना उत्तेजित झाल्या.
त्याला, त्याच्या लोकांबद्दल वाईट वाटले.
19परमेश्वर त्याच्या लोकांशी बोलला. तो म्हणाला,
"मी तुमच्याकडे पुन्हा धान्य, द्राक्षरस आणि तेल पाठवीन.
तुम्ही तृप्त व्हाल. ह्यापुढे, इतर राष्ट्रांत तुमची अप्रतिष्ठा
मी होऊ देणार नाही.
20मी उत्तरे* कडून आलेल्या लोकांना तुमचा देश
सोडायला भाग पाडीन. मी त्यांना रूक्ष आणि ओसाड
देशात जायला लावीन. त्यातील काही पूर्व समुद्राकडे
जातील. तर काही पश्चिम समुद्राकडे जातील. त्या
लोकांनी फारच भयंकर कृत्ये केली आहेत. ते मृतांप्रमाणे
व सडलेल्या गोष्टींसारखे होतील. तेथे भयंकर दुर्गंधी
पसरेल."

---

**तुमचे ... फाडा** आपले दु:ख व्यक्त करण्यासाठी लोक कपडे फाडीत असत. येथे लोकांनी त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल खरोखरीच खेद प्रकट करावा अशी परमेश्वराची इच्छा आहे.

**उत्तर** यहूदावर हल्ला करण्यासाठी बाबेलचे सैन्य ह्याच दिशेने आले. इस्राएलच्या उत्तरेकडील आणि पूर्वेकडील देशांची सैन्ये नेहमी ह्याच मार्गाने येऊन यहूदावर व इस्राएलवर हल्ला करीत.

### देश पुन्हा नव्याने घडविला जाईल

21हे भूमी, घाबरू नकोस. सुखी आणि हर्षोल्लासित
हो! कारण परमेश्वर महान गोष्टी घडवून आणणार
आहे.

22रानातल्या प्राण्यानो, घाबरू नका. कारण
वाळवंटातील कुरणांत हिरवळ उगवेल, झाडांना फळे
लागतील. अंजिराची झाडे व द्राक्षवेली फळांनी लगडतील.
23म्हणून सियोनवासीयांनो, आनंदित व्हा. तुमच्या
परमेश्वर देवामध्ये संतोष माना. तो कृपावंत होऊन, पाऊस
देईल. तो पूर्वीप्रमाणेच, आगोटीचा व वळवाचा पाऊस
पाडील.

24खळी गव्हाने भरून जातील, आणि पिंपे द्राक्षरसाने
व जैतुनच्या तेलाने भरून वाहतील.
25"मी, परमेश्वराने, माझे सैन्य तुमच्याविरुध्द पाठविले.
तुमचे जे काही होते ते, नाकतोडे, टोळ, कुसरूड व घुले
यांनी खाल्ले.* पण, मी, परमेश्वर, तुमच्या संकटांच्या
वर्षांची भरपाई करीन.

26मग तुम्हाला भरपूर खायला मिळेल. तुम्ही तृप्त
व्हाल. तुम्ही, तुमच्या परमेश्वर देवाची, स्तुती कराल.
त्याने तुमच्यासाठी आश्चर्यकारक गोष्टी केल्या आहेत.
माझ्या लोकांना पुन्हा कधीही लज्जित व्हावे लागणार
नाही.

27मी इम्राएलच्या बाजूने आहे हे तुम्हाला समजेल. मीच
परमेश्वर म्हणजे तुमचा देव आहे, हेही तुम्हाला कळून
येईल. माझ्याशिवाय दुसरा कोणताच परमेश्वर नाही.
माझ्या लोकांना पुन्हा कधीही लज्जित व्हावे लागणार
नाही."

### परमेश्वर, स्वत:चा आत्मा सर्व लोकांत घालण्याचे वचन देतो

28 "ह्यानंतर मी माझा आत्मा सर्व लोकांत ओतीन
(घालीन). तुमची मुले-मुली भविष्य सांगतील तुमच्यातील
वृध्द स्वप्न पाहतील. तुमच्यातील तरुणांना दृष्टान्त होतील.
29त्या वेळी,मी माझा आत्मा पुरुष व स्त्री
सेवकांमध्येसुध्दा ओतीन.

30मी आकाशात आणि पृथ्वीवर आश्चर्यकारक खुणा
दाखवीन तेथे रक्त, आग व दाट धूर दिसेल.

31सूर्याऐवजी अंधार होईल. चंद्राचे रूपांतर रक्तात
होईल. मग परमेश्वराचा महान आणि भयंकर दिवस
उगवेल.

32आणि तेव्हा, परमेश्वराचे नाव घेणारा प्रत्येकजण
वाचेल. वाचवले गेलेले लोक सियोन पर्वतावर व
यरुशलेममध्ये असतील. परमेश्वराने सांगितल्याप्रमाणेच
हे घडेल. परमेश्वराने ज्यांना बोलावलेले होते असेच
लोक वाचलेल्यात असतील.

---

**नाकतोडे ... खाल्ले** पाहा योएल 1:4.

### यहूदाच्या शत्रूंना शिक्षा करण्याचे परमेश्वर वचन देतो

3 "त्या वेळी, यहूदा व यरुशलेम यांची कैदेतून
सुटका करून, मी त्यांना परत आणीन. 2मी, सर्व
राष्ट्रांनासुध्दा गोळा करून, खाली यहोशाफाटाच्या
दरीत* आणीन. तेथे मी त्यांचा न्यायनिवाडा करीन. त्या
राष्ट्रांनी माझ्या माणसांना म्हणजेच इस्राएल लोकांना
पांगविले. त्यांनी त्यांना बळजबरीने इतर राष्ट्रात राहण्यास
भाग पाडले म्हणून त्या राष्ट्रांना मी शिक्षा करीन. त्या
राष्ट्रांनी माझा देश वाटून घेतला. 3त्यांनी माझ्या
लोकांकरिता चिठ्या टाकल्या. वेश्या खरीदण्यासाठी
त्यांनी मुलगा विकला आणि मद्य खरीदण्यासाठी मुलगी
विकली.

4"सोर, सीदोन व पलेशेथच्या सर्व प्रांतानो, माझ्या
दृष्टीने तुम्हाला अजिबात महत्व* नाही. माझ्या
कृत्याबद्दल तुम्ही मला शिक्षा करीत आहात का? तुम्हाला
कदाचित् तसे वाटत असेल. पण लवकरच मी तुम्हाला
शिक्षा करीन. 5तुम्ही माझे सोने-चांदी घेतली. तुम्ही
माझा अमूल्य खजिना घेऊन आपल्या मंदिरात
ठेवलात.

6"तुम्ही यहूदाच्या व यरुशलेमच्या माणसांना यावनी
लोकांना विकले. अशा रीतीने, तुम्ही त्यांना देशोधडीला
लावू शकला. 7तुम्ही त्या खूप दूर असलेल्या प्रदेशात
माझ्या लोकांना पाठविले. पण मी त्यांना परत आणीन,
आणि तुम्ही जे काही केले, त्याबद्दल तुम्हाला शिक्षा करीन.
8तुमच्या मुला-मुलींना मी यहूद्यांना विकीन. मग ते त्या
मुलां-मुलींना दूरच्या शबाच्या लोकांना विकतील."
परमेश्वरानेच हे सांगितले.

### युध्दाला सज्ज व्हा

9राष्ट्रा-राष्ट्रामध्ये घोषणा करा: युध्दाला सज्ज व्हा.
बलवान माणसांना उठवा. सर्व योध्दे जवळ येऊ देत त्यांना
उठू द्या.

10फाळ मोडून त्यांच्या तलवारी करा. कोयत्यापासून
भाले करा. "दुबळ्याला मी बलवान योध्दा आहे" असे
म्हणू द्या.

11सर्व राष्ट्रांनो, त्वरा करा! त्या जागी एकत्र या. हे
परमेश्वरा, तुझे बलवान योध्दे आण.

12राष्ट्रांनो, उठा! यहोशाफाटच्या दरीत गोळा व्हा.
तेथे मी सभोवतालच्या राष्ट्रांचा न्याय करायला
बसेन.

13विळा आणा, कारण पीक तयार झाले आहे. या
आणि द्राक्षे तुडवा. कारण द्राक्षकुंड भरून गेले आहे.

---

**यहोशाफाटाच्या दरी** ह्या नावाचा अर्थ "परमेश्वराने न्याय दिला."

**माझ्या ... महत्व नाही** शब्दश: अर्थ माझा तुमचा काय संबंध?

पिंप भरून वाहत आहेत. कारण त्यांचे पाप मोठे
आहे.
[14]निर्णयाच्या* दरीत पुष्कळशी माणसे आहेत.
परमेश्वराचा विशेष दिवस जवळ आला आहे.
[15]चंद्र-सूर्य काळवंडतील. तारे निस्तेज होतील.
[16]परमेश्वर देव सियोनेहून गर्जना करील तो
यरुशलेमहून ओरडेल. आणि आकाश व पृथ्वी कापेल
पण परमेश्वराच्या लोकांना तो सुरक्षित स्थान असेल.
इस्राएलच्या लोकांना तो सुरक्षित जागा असेल.
[17]"मगच तुम्हाला कळेल की मीच तुमचा परमेश्वर
देव आहे. माझ्या पवित्र पर्वतावर म्हणजे सियोनावर मी
राहतो. यरुशलेम पवित्र होईल. त्या नगरीतून पुन्हा कधीही
परके जाणार नाहीत.

### नवजीवनाचे यहूदाला वचन

[18]त्या दिवशी, पर्वत गोड द्राक्षरसाने पाझरतील,
टेकड्यांवरून दूध वाहील, आणि यहूदाच्या कोरड्या
पडलेल्या नद्यांमधून पाणी वाहील. परमेश्वराच्या मंदिरातून
कारंजे उडतील आणि शिट्टीमाच्या दरीला पाणी पुरवतील.
[19]मिसर उजाड होईल. अदोमाचे ओसाड रान होईल.
का? कारण ते यहूद्यांशी क्रूरपणे वागले. त्यांनी त्यांच्या
देशातील निष्पाप लोकांना मारले
[20]परंतु, यहूदामध्ये नेहमीच लोक राहतील. ते
यरुशलेममध्ये पिढ्यान्‌पिढ्या वास करतील.
[21]त्या लोकांनी माझ्या लोकांना ठार केले. म्हणून मी
त्यांना खरोखरच शिक्षा करीन." कारण परमेश्वर देव
सियोनमध्ये वस्ती करील.

---

**निर्णयाच्या दरी** हे नाव यहोशाफाटच्या दरीप्रमाणेच आहे.

# आमोस

1 आमोस तकोवा नगरीतील मेंढपाळ होता. यहूद्यांचा राजा उज्जीया आणि इस्राएलचा राजा यराबाम यांच्या कारकिर्दीत आमोसला दृष्टान्त झाले. यराबाम योवाशाचा मुलगा होता हे दृष्टान्त भूकंपाच्या आधी दोन वर्षे झाले त्याचा हा संदेश.

## अरामाला शिक्षा

2आमोस म्हणाला:

परमेश्वर सियोनच्या सिंहाप्रमाणे गर्जना करतो. त्याची प्रचंड गुरगुर यरुशलेमपासून ऐकू येते; मेंढपाळांची कुरणे सुकलीत. कर्मेल पर्वतसुध्दा सुकला आहे.

3परमेश्वराने पुढील गोष्टी सांगितल्या, “दिमीष्कच्या लोकांनी पुष्कळ अपराध केल्यामुळे मी त्यांना खात्रीने शिक्षा करीन. का? कारण त्यांनी गिलादला धान्य मळण्याच्या लोखंडी अवजाराने मारले. 4मी हजाएलच्या घराला (आरामला) आग लावीन आणि ती आग बेन-हदादच्या उंच मनोऱ्यांचा नाश करील.

5“मी दिमिष्काच्या प्रवेशद्वाराचे भक्कम आडसरसुध्दा मोडीन. आवेनच्या दरीत गादीवर बसणाऱ्याचा मी नाश करीन. बेथ-एदेन राजदंडधारी राजाला मी नष्ट करीन. अरामाच्या लोकांचा पराभव होईल लोक त्यांना कीर देशात नेतील.” परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

## पलिष्ट्यांना शिक्षा

6परमेश्वर असे म्हणाला, “मी गज्जाच्या लोकांना नक्कीच शिक्षा करीन कारण त्यांनी फार अपराध केले आहेत. का? कारण त्यांनी संपूर्ण राष्ट्रावर ताबा मिळवून लोकांना गुलाम म्हणून अदोमला पाठविले. 7म्हणून मी गज्जाच्या कोटाला आग लावीन. ही आग गज्जाचे उंच मनोरे नष्ट करील 8अश्दोदच्या गादीवर बसणाऱ्याचा मी नाश करीन. अष्कलोनच्या राजदंड धारी राजाला मी नष्ट करीन. एक्रोनच्या लोकांना मी सजा देईन. मग अजूनही जिवंत असलेले पलिष्ट्यांचे लोक मरतील.” परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

## फोनेशियासाठी शिक्षा

9परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो, “सोरच्या पुष्कळ अपराधांबद्दल मी त्यांना नक्कीच शिक्षा करीन. का? कारण त्यांनी संपूर्ण राष्ट्र आपल्या ताब्यात घेऊन लोकांना गुलाम करून अदोमला पाठविले. त्यांच्या भावांबरोबर (इस्राएलबरोबर) केलेल्या कराराचे स्मरण त्यांना राहिले नाही. 10म्हणून सोरच्या तटबंदीला मी आग लावीन. सोरचे उंच मनोरे त्यामुळे नष्ट होतील.”

## अदोमींना शिक्षा

11परमेश्वर असे सांगतो, “अदोमच्या लोकांनी खूप अपराध केले आहेत म्हणून मी त्यांना शिक्षा करणारच का? कारण अदोमने तलवारीने त्याच्या भावाचा (इस्राएलचा) पाठलाग केला. अदोमला अजिबात दया आली नाही अदोमचा राग कायम राहिला. तो हिंस्त्र पशूप्रमाणे इस्राएलला फाडत राहिला. 12म्हणून मी तेमानला आग लावीन. त्यात बस्राचे मनोरे नष्ट करीन.”

## अम्मोनी लोकांना सजा

13परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो, “अम्मोनींच्या अनेक अपराधांबद्दल मी अमोनला नक्कीच शिक्षा करीन. का? कारण त्यांनी गिलादमध्ये गर्भवतींना ठार मारले. तेथील प्रदेश बळकावून आपल्या देशाचा विस्तार करण्यासाठी त्यांनी हे केले. 14म्हणून मी राब्बाच्या तटबंदीला आग लावीन. ती राब्बाचे उंच मनोरे भस्मसात करील त्यांच्यावर युध्दाच्या दिवशी होत असताना होणाऱ्या आरडाओरडीप्रमाणे आणि वावटळीप्रमाणे संकटे येतील. 15मग त्यांचा राजा व नेते पकडले जातील. त्यांना बरोबरच दूर नेले जाईल.” परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

## मवाबसाठी सजा

2 परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो, “मवाबच्या लोकांनी पुष्कळ अपराध केले आहेत म्हणून मी त्यांना शिक्षा करणारच. का? कारण त्यांनी अदोमच्या राजाची हाडे जाळून त्याचा चुना केला. 2म्हणून मी मवाबमध्ये आग लावीन. ती आग करीयोथचे उंच मनोरे नष्ट करून टाकील. तेथे भयंकर आरडाओरड होईल, रणशिंगाचा आवाज होईल आणि मवाब नष्ट होईल. 3अशारीतीने,

मवाबच्या राजांचा शेवट करीन. मी मवाबच्या नेत्यांना ठार करीन." परमेश्वर असे म्हणतो.

### यहूदाला शिक्षा

[4]परमेश्वर असे म्हणतो, "यहूदाने पुष्कळ अपराध केले असल्यामुळे मी यहूदाला शिक्षा करीन. का? कारण त्यांनी परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्यास नकार दिला. त्यांनी परमेश्वराच्या आज्ञा मानल्या नाहीत. त्यांच्या पूर्वजांनी असत्यावर विश्वास ठेवला. यहूदाच्या लोकांनी परमेश्वराला अनुसरण्याचे सोडून देण्यास हे असत्यच कारणीभूत झाले.
[5]म्हणून यहूदात आग लावीन. त्या आगीत यरुशलेमचे उंच मनोरे भस्मसात होतील."

### इस्राएलला शिक्षा

[6]परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो: "इस्राएलने पुष्कळ अपराध केले आहेत म्हणून मी त्याला शिक्षा करणारच. का? कारण इस्राएल लोकांनी थोड्या चांदीच्या तुकड्यांसाठी सज्जन, निष्पाप लोकांना विकले. त्यांनी गरिबांना जोड्याच्या किंमतीला विकले.
[7]गरिबांना धुळीत लोटून त्यांनी त्या गरिबांना तुडविले. दु:खितांची गाऱ्हाणी ऐकणे त्यांनी सोडून दिले. मुले व वडील यांनी एकाच स्त्रीशी शारिरिक संबंध ठेवले. त्यांनी माझे नाव धुळीला मिळवले.
[8]ते गरीब लोकांजवळून कपडे घेतात आणि वेदीजवळ बसून पूजा करताना त्या कपड्यावरच बसतात. ते गरिबांना पैसे कर्जाऊ देतात आणि त्याबदल्यात त्यांचे कपडे गहाण म्हणून ठेवून घेतात. ते लोकांना दंड देण्यास भाग पाडतात आणि त्या पैशातून स्वत:साठी मद्य विकत घेतात व त्यांच्या दैवतांच्या देवळात बसून ते पितात.

[9]"पण प्रत्यक्ष त्यांच्यासमोर अमोरींना मारणारा मीच होतो. अमोरी गंधसरूप्रमाणे उंच होते. ते अल्लोन वृक्षांप्रमाणे बळकट होते. परंतु मी त्यांच्या वरील फळांचा व खालील मुळांचा विध्वंस केला.

[10]"तुम्हाला मिसरमधून आणणारा मीच तो एकमेव! 40 वर्षे मी तुम्हाला वाळवंटातून पार नेले व अमोरींचा प्रदेश घेण्यास मीच तुम्हाला मदत केली.
[11]मी तुमच्यापैकी काही मुलांना संदेष्टे बनविले व तुमच्यातील काही तरुणांना नाजीर बनविले, इस्राएल लोकांनो हे खरे आहे!" परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.
[12]"पण तुम्ही नाजीरांना मद्य प्यायला लावले व संदेष्ट्यांना संदेश देण्यास मनाई केली.
[13]तुम्ही मला बोजाप्रमाणे आहात खूप वाळलेले गवत भरलेल्या गाडीप्रमाणे मी खाली वाकलो आहे. पण मी ह्याच तऱ्हेने तुम्हाला खाली दाबून टाकीन*.
[14]कोणीही पळून जाऊ शकणार नाही. अगदी जोरात धावणारा सुध्दा! बलवान पुरेसे बलवान राहणार नाहीत. सैनिक पळून जाऊन स्वत:ला वाचवू शकणार नाहीत.
[15]धनुर्धारी वाचणार नाहीत. जोरात धावणारे पळून जाणार नाहीत. घोडेस्वार जिवंत राहणार नाहीत.
[16]त्या वेळी खूप शूर सैनिकसुध्दा पळून जातील. त्यांना कपडे घालण्यासुध्दा वेळ मिळणार नाही." परमेश्वर असे म्हणतो.

### इस्राएलला ताकीद

3 इस्राएलच्या लोकांनो, संदेश ऐका! परमेश्वराने तुमच्याबद्दल पुढील गोष्टी सांगितल्या मी मिसरमधून ज्या घराण्यांना (इस्राएलला) आणले, त्यांच्याबद्दल हा संदेश आहे.
[2]"पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ घराणी आहेत पण मी फक्त तुमच्याच घराण्याला खास संबंध ठेवण्यासाठी निवडले पण तुम्ही माझ्याविरुध्द गेलात. म्हणून तुमच्या सर्व पापांसाठी मी तुम्हाला शिक्षा करीन."

### इस्राएलच्या शिक्षेचे कारण

[3]दोन माणसांचे एकमत झाल्याशिवाय ते एकमेकांबरोबर चालू शकणार नाहीत.
[4]शिकार मिळाल्यावरच जंगलातील सिंह गर्जना करील. जर सिंहाचा बछडा, त्याच्या गुहेत गुरगुरत असेल, तर त्याचा अर्थ त्याने काहीतरी पकडले आहे.
[5]जाळ्यात दाणे नसतील तर, पक्षी जाळ्यात जाणार नाही आणि सापळ्याचे दार बंद झाले, तर तो सापळा पक्ष्याला पकडणारच.
[6]जर इशाऱ्याची रणशिंगे फुंकली गेली, तर लोक भीतीने थरथर कापणारच. जेव्हा नगरीवर संकट येते, तेव्हा परमेश्वर त्याला कारणीभूत असतो.
[7]प्रभू माझा परमेश्वर कदाचित् काही करायचे निश्चित करील, पण तसे करण्यापूर्वी, तो, आपला बेत त्याच्या सेवकांना म्हणजेच संदेष्ट्यांना सागेल.
[8]सिंहाने डरकाळी फोडल्यास लोक भयभीत होतील व परमेश्वर बोलताच, संदेष्टे संदेश देतील.

[9–10]अश्दोद व मिसर यांच्या उंच मनोऱ्यांवरून पुढील संदेशाची घोषणा करा: "शोमरोनच्या पर्वतांवर या तेथे तुम्हाला भयंकर गोंधळ पाहायला मिळेल का? कारण लोकांना योग्य आचरण माहीत नाही. ते दुसऱ्यांशी क्रूरपणे वागले. दुसऱ्यांच्या वस्तू घेऊन त्यांनी त्यां उंच मनोऱ्यात लपवून ठेवल्या युध्दात लुटलेल्या वस्तूंनी त्यांचे खजिने भरून गेले आहेत."

[11]म्हणून परमेश्वर म्हणतो, "त्या देशावर शत्रू चालून येईल तो तुमचे सामर्थ्य हिरावून घेईल. तुम्ही तुमच्या उंच मनोऱ्यांमध्ये लपविलेल्या वस्तू तो घेईल."

[12]परमेश्वर म्हणतो,

"जर सिंहाने मेंढीवर हल्ला केला, तर कदाचित मेंढपाळ तिला वाचवायचा प्रयत्न करील. पण तो मेंढीचा काही भागच वाचवू शकेल. तो कदाचित् मेंढीचे दोन पाय वा कानाचा तुकडाच सिंहाच्या तोंडातून ओढून काढेल. त्याचप्रकारे इस्राएलमधील बहुतांश लोक वाचणार

---

**दाबून टाकीन** ह्याचा अर्थ बहुधा "मी तुम्हाला त्रास देईन." असा असावा.

नाहीत. शोमरोनमध्ये राहणारे लोक शय्येचा एखादा कोपरा किंवा बिछान्याच्या कापडाचा तुकडाच फक्त वाचवू शकतील."

13माझा प्रभू सर्वशक्तिमान परमेश्वर देव पुढील गोष्टी सांगतो: "याकोबच्या वंशजांना (इम्राएलला) ह्या गोष्टींबद्दल ताकीद द्या. 14इम्राएलने पाप केले व त्याबद्दल त्यांना शिक्षा करीन. मी बेथेलच्या वेदी नष्ट करीन. वेदीची शिंगे तोडली जातील व ती मातीत पडतील. 15हिवाळी महाल उन्हाळ्यातील महालाबरोबर मी नष्ट करीन. हस्तिदंती घरांचा आणि इतर पुष्कळ घरांचा नाश केला जाईल." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

## मौजमजा आवडणाऱ्या बायका

4 शोमरोनच्या पर्वतावर राहणाऱ्या, बाशानच्या गायींनो, मी काय म्हणतो ते ऐका! तुम्ही गरिबांना दुखविता! त्यांना चिरडून टाकता! तुम्ही तुमच्या नवऱ्यांना तुमच्यासाठी "मद्य आणण्यास सांगता!"

2परमेश्वराने, माझ्या प्रभूने शपथ घेतली आहे. त्याने त्याच्या पवित्र्याची शपथ घेऊन सांगितले की तुमच्यावर संकटे येतील. लोक आकड्यांनी ओढून तुम्हाला कैद करून नेतील. माशांचा गळ टाकून ते तुमच्या मुलांना नेतील. 3तुमच्या नगरीचा नाश होईल. तुमच्यातील प्रत्येकीला तटाच्या भगदाडातून बाहेर पडावे लागेल तुम्ही तुमच्या मृत बाळांना ढिगांत फेकाल.

परमेश्वर असे म्हणतो. 4"बेथेलला जा आणि पाप करा गिल्गालला* जाऊन आणखी पापे करा. सकाळी यज्ञ करा. तीन दिवसाच्या सुट्टीसाठी आपल्या पिकाचा दहावा भाग आणा. 5खमिराची आभार-अर्पणे द्या. अनिर्बंध इच्छा अर्पणांबद्दल प्रत्येकाला सांगा. इम्राएल, तुला ह्या गोष्टी करायला आवडते. मग जा आणि हे सर्वकर!" परमेश्वर असे म्हणतो.

6"तुम्ही माझ्याकडे यावे म्हणून मी खूप प्रयत्न केले. मी तुम्हाला अन्न दिले नाही. तुमच्या कोणत्याही गावात अन्न नव्हते. पण तुम्ही माझ्याकडे परत आला नाहीत." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

7"कापणीच्या हंगामाच्या तीन महिने आधीच मी पाऊस थांबविला. म्हणून पीक वाढलेच नाही मग मी एका गावात पाऊस पडू दिला पण दुसऱ्या गावात नाही. देशाच्या एका भागात पाऊस पडला पण दुसऱ्या भागातील जमीन अतिशय कोरडी झाली. 8म्हणून दोन-तीन गावांतील लोक दुसऱ्या एका गावाकडे पाण्यासाठी धडपडत गेले. पण प्रत्येकाला पुरेल एवढे पाणीच नव्हते. पण तरीसुध्दा मदत मागायला तुम्ही माझ्याकडे आला नाहीत." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

9"उष्णता व रोग ह्यांनी मी तुमची पिके मारली. मी तुमच्या बागांचा व द्राक्षमळ्यांचा नाश केला. टोळांनी तुमची अंजिराची व जैतुनाची झाडे फस्त केली. पण तरीही तुम्ही मदतीसाठी माझ्याकडे आला नाहीत." परमेश्वर ह्या गोष्टी बोलला. 10मिसरला मी पाठविली होती, तशीच रोगराई मी तुमच्यावर पाठविली. तुमच्या तरुणांना मी तलवारीने मारले. मी तुमचे घोडे काढून घेतले. मी तुमच्या तळांवर प्रेतांची दुर्गंधी पसरविली. पण तरीसुध्दा मदत मागायला तुम्ही माझ्याकडे आला नाहीत." परमेश्वर हे सर्व बोलला आहे.

11"सदोम आणि गमोरा यांचा मी जसा नाश केला. तसाच मी तुमचा नाश केला; आगीत ओढून काढलेल्या जळक्या काटकीप्रमाणे तुमची स्थिती होती. पण तरीही तुम्ही मदत मागायला माझ्याकडे आला नाहीत." परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

12"म्हणून, इम्राएल, मी तुझ्याबाबत पुढील गोष्टी करीन. मी तुझ्याशी असेच वागेन. इम्राएल, तुझ्या परमेश्वराला भेटण्यास सज्ज हो! 13मी कोण आहे? पर्वत निर्माण करणारा मीच तो एकमेव! मी तुमच्या मनाची निर्मिती केली. मीच लोकांना कसे बोलायचे ते शिकविले. मीच पहाटेचे अंधारात परिवर्तन करतो. मी पृथ्वीवरील पर्वत माझ्या पायाखाली तुडवतो मी कोण आहे? माझे नाव याव्हे मी सैन्याचा परमेश्वर आहे."

## इम्राएलसाठी शोकगीत

5 इम्राएलच्या लोकांनो, हे गीत ऐका हे विलापगीत तुमच्याबद्दल आहे.

2इम्राएलची कुमारिका पडली आहे. ती पुन्हा कधीही उठणार नाही. तिला एकटीलाच सोडून दिले आहे ती धुळीत लोळत आहे. तिला उठवणारा कोणीही नाही.

3परमेश्वर, माझा प्रभू पुढील गोष्टी सांगतो: "हजार माणसांना घेऊन नगर सोडणारे अधिकारी फक्त शंभर माणसांना घेऊन परततील. शंभर माणसांना बरोबर घेऊन नगर सोडणारेअधिकारी फक्त दहा माणसांना घेऊन परततील.

## परमेश्वर इम्राएलला परत येण्यासाठी प्रोत्साहन देतो

4परमेश्वर इम्राएल राष्ट्राला असे सांगतो, "मला शरण या आणि जगा.

5पण बेथेलास शरण जाऊ नका; गिल्गालला जाऊ नका; सीमा ओलांडून खाली बैरशेब्यालाही जाऊ नका.

---

**बेथेल ... गिल्गाल** इम्राएल लोकांची उपासनेची ठिकाणे. देवाची अशी इच्छा होती की इम्राएल व यहुदी लोकांनी फक्त यरुशलेममधील मंदिरातच त्याची उपासना करावी.

गिल्गालमधील लोकांना कैदी म्हणून नेले जाईल. आणि
बेथेलचा नाश केला जाईल.
6परमेश्वराकडे जा आणि जगा. तुम्ही परमेश्वराकडे
गेला नाहीत, तर योसेफच्या घराला आग लागेल. ती
आग योसेफचे घर भस्मसात करील. बेथेलमधील ही
आग कोणीही विझवू शकणार नाही.
7–9तुम्ही मदतीसाठी परमेश्वराची याचना करावी.
देवानेच कृत्तिका व मृगशीर्ष यांची निर्मिती केली.
तो परमेश्वरच अंधाराचे रूपांतर सकाळच्या उजेडात
करतो. तोच दिवसाचे परिवर्तन अंधाऱ्या रात्रीत
करतो. समुद्रातील पाण्याला बोलावून जमिनीवर
ओततो त्याचे नाव 'याव्हे!' तो एक मजबूत शहर
सुरक्षित ठेवतो, तर दुसऱ्या भक्कम शहराचा नाश होऊ
देतो."

## इस्राएली लोकांनी केलेली पापकर्मे

तुम्ही चांगुलपणा विषात बदलता तुम्ही न्यायाला मारून
धुळीत पडू देता.
10संदेष्टे चव्हाट्यांवर जाऊन लोक करीत असलेल्या
दुष्कृत्यांबद्दल बोलतात, पण अशा संदेष्ट्यांचा लोक
तिरस्कार करतात. संदेष्टे सरळ, चांगल्या सत्याची
शिकवण देतात. पण लोक त्यांचा रागच करतात.
11तुम्ही अन्यायाने गरिबांकडून कर घेता, त्यांच्याकडून
गव्हाचा खंड वसूल करता. तुम्ही कोरीव दगडांची
दिमाखदार घरे बांधता खरी, पण त्यात तुम्ही रहाणार
नाही. तुम्ही द्राक्षाच्या सुंदर बागा लावता, पण त्यापासून
निघणारा द्राक्षरस तुम्ही पीणार नाही.
12का? कारण मला तुमच्या पुष्कळ पापांची माहिती
आहे. तुम्ही खरोखरच काही वाईट कृत्ये केली आहेत.
योग्य आचरण करणाऱ्यांना तुम्ही दुखविता. चुकीच्या
गोष्टी करण्यासाठी पैसा घेता. न्यायालयात गरिबांवर
अन्याय करता.
13त्या वेळी, सुज्ञ शिक्षक गप्प बसतील. का? कारण
ती वाईट वेळ आहे.
14परमेश्वर तुमच्याबरोबर' आहे असे तुम्ही म्हणता,
मग सत्कृत्ये करा, दुष्कृत्ये नव्हे. त्यामुळे तुम्ही जगाल व
सर्व शक्तिमान परमेश्वर देव खरोखरच तुमच्याबरोबर
येईल.
15दुष्टाव्याचा तिरस्कार करा व चांगुलपणावर प्रेम करा.
न्यायालयात पुन्हा न्याय आणा. मग कदाचित
सर्व–शक्तिमान परमेश्वर देव योसेफच्या वाचलेल्या
वंशजांवर कृपा* करील.

---

**वंशजांवर कृपा (अवशेष)** संकटातून सुटका झालेले लोक.
म्हणजेच यहुद्यांचा व इस्राएल लोकांचा त्यांच्या शत्रूंपासून विध्वंस
होत असताना वाचलेले लोक.

## अतिशय दुःखाची वेळ येत आहे

16माझा प्रभू सर्वशक्तिमान देव म्हणतो, "लोक
चव्हाट्यावर रडत असतील रस्त्यांतून ते रडतील. धंदेवाईक
रडणाऱ्यांना लोक* भाड्याने बोलवून घेतील.
17द्राक्षमळ्यांत लोक रडत असतील. का? कारण मी
तुमच्यामध्ये फिरून व तुम्हाला शिक्षा करीन." परमेश्वराने
ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.
18परमेश्वरचा खास न्यायाचा दिवस पाहण्याची
तुमच्यापैकी काहींची इच्छा आहे. तुम्हाला तो दिवस का
बरे पहावयाचा आहे? परमेश्वराचा तो खास दिवस अंधार
आणणार आहे, उजेड नाही.
19सिंहापासून दूर पळणाऱ्या माणसावर अस्वलाने हल्ला
करावा, अशी तुमची स्थिती होईल. घरात जाऊन भिंतीवर
हात ठेवणाऱ्याला साप चावावा, तशी तुमची अवस्था
होईल.
20परमेश्वराचा खास दिवस अंधारच आणील, उजेड
नाहीतो निराशेचा दिवस असेल, प्रकाशाचा एक किरणही
नसेल तो आनंदचा दिवस नसेल.

## परमेश्वर इस्राएलची उपासना नाकारतो

21"मला तुमच्या सणांचा तिरस्कार वाटतो मी ते
मान्य करणार नाही. तुमच्या धार्मिक–सभा मला आवडत
नाहीत.
22तुम्ही मला होमार्पणे व अन्नार्पणे जरी दिलीत, तरी
मी ती स्वीकारणार नाही. शांत्यार्पणात, तुम्ही दिलेल्या
पुष्ट प्राण्यांकडे मी पाहणारसुध्दा नाही.
23तुमची कर्कश गाणी येथून दूर न्या. तुमचे वाद्यसंगीत
मी ऐकणार नाही.
24तुम्ही, तुमच्या देशातून, पाण्याप्रमाणे, न्यायीपणा वाहू
द्यावा. कधीही कोरडा न पडणाऱ्या झऱ्याप्रमाणे चांगुलपणा
वाहावा.
25इस्राएल, वाळवंटात, 40 वर्षे तू मला यज्ञ व दाने
अर्पण केलीस.
26पण तुम्ही सक्कूथ ह्या तुमच्या राजाची व कैवानची
मूर्तीसुध्दा वाहून नेली. तुम्ही स्वत:च तुमच्या दैवतांसाठी
तारा तयार केला.*

---

**धंदेवाईक रडणाऱ्यांना लोक** प्रेतक्रियेला जाऊन मृतासाठी
मोठ्याने रडणारे लोक. मृत व्यक्तिचे कुंटुंबीय व मित्र ह्या
लोकांना अन्न व पैसे देत असत.

**तुमच्या दैवतांसाठी तारा तयार केला** विशेष देवाचा किंवा
आकाशातील सर्व ताऱ्यांचा सन्मान करण्यासाठी हा असावा.
पुष्कळ लोकांना असे वाटत असे की सूर्य, चंद्र, तारे व ग्रह हे
देव किंवा देवदूत असावेत. ह्या वचनाचे असेही भाषांतर होऊ
शकते, "तम्ही तुमच्या राजासाठी मंडप व मूर्तीसाठी पादासन
वाहून न्याल तुम्ही तुमच्यासाठी बनविलेला तुमच्या देवाचा ताराही
तुम्ही वाहून न्याल." प्राचिन ग्रीक भाषांतरात मोलोख व राफान
ह्या नावांचा उल्लेख आहे.

27म्हणून मी तुम्हाला कैदी म्हणून दिमिष्काच्या पलीकडे
घालवीन.''परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या. त्याचे नाव
सर्वशक्तिमान देव!

### इसराएलचा शुभ-समय काढून घेतला जाईल

6 सयोनमधील काहींचे जीवन आरामदायी आहे.
शोमरोनच्या पर्वतावरील काही लोकांना नर्धास्त
वाटते. पण तुमच्यावर खूप संकटे येतील. जगातील उत्तम
नगरीतील तुम्ही "महत्वाचे लोक" आहात इस्राएलचे
[लोक] मदत मागण्यासाठी तुमच्याकडे येतात.
2कालनेला जाऊन पाहा. तेथून महानगरी 'हमाथला
जा. पलिष्ट्यांची नगरी गथला जा. तुम्ही ह्या राज्यांपेक्षा
चांगले आहात का? नाही. त्यांचे देश तुमच्या देशापेक्षा
मोठे आहेत.
3तुम्ही लोक करीत असलेल्या कृत्यांमुळे शिक्षेचा दिवस
जवळ जवळ येत आहे. तुम्ही त्या हिंसाचाराच्या नियमाला
जवळ जवळ आणता.
4पण तुम्ही सर्व सुखसोयी उपभोगता. तुम्ही हस्तिदंती
पलंगावर झोपता आणि गाद्या-गिर्द्यांवर पसरता. तुम्ही
कळपातील कोवळी कोकरे व गोठ्यातील वासरे खाता.
5तुम्ही वीणा वाजविता. आणि दाविदाप्रमाणे वाद्यांवर
सराव करता.
6तुम्ही दिमाखदार प्यालांतून मद्य पिता. तुम्ही चांगली
अत्तरे वापरता. पण योसेफच्या वंशाचा नाश होत आहे,
ह्याचा तुम्हाला खेदही वाटत नाही."

7ते लोक त्यांच्या गाद्या-गिर्द्यांवर पसरले आहेत पण
त्यांचा चांगला काळ संपेल कैद्यांप्रमाणे त्यांना परकीय
देशांत नेले जाईल ते अशारीतीने नेले जाणाऱ्यांतील पहिले
असतील. 8परमेश्वराने, माझ्या प्रभूने, स्वत:ची शपथ
घेतली. सर्वशक्तिमान परमेश्वर देवाने अशी शपथ घेतली,

"याकोबला ज्या गोष्टींचा अभिमान वाटतो, त्या गोष्टींचा
मला तिटकारा वाटतो. त्याच्या जबूत मनोऱ्यांचा मी
तिटकारा करतो. म्हणून मी शत्रूला ती नगरी व त्यातील
सर्व काही घेऊ देईन."

### फार थोडे इस्राएली जिवंत राहतील

9त्या वेळी, कदाचित् काही घरांत दहा लोक जिवंत
राहतील आणि ते सुध्दा मरतील. 10प्रेत घेऊन जाळण्यासाठी
एखादा नातेवाईक येईल. नातेवाईक घराच्या बाहेर हाडे
नेण्यासाठी जाईल. घरात कदाचित् कोणी लपले असेल
तर त्याला लोक विचारतील "तुझ्याजवळ आणखी एखादे
प्रेत आहे का?"
तो माणूस म्हणेल, "नाही......"
मग त्या माणसाचा नातेवाईक म्हणेल, "शू! आपण
परमेश्वराच्या नावाचा उल्लेख करायचा नसतो."

11पाहा! परमेश्वर देव आज्ञा देईल, मग मोठ्या घरांचे
तुकडे तुकडे होतील. व लहान घरांचे लहान लहान
तुकडे होतील.
12घोडे खडकावरून धावतात का? नाही. लोक गायांच्या
साहाय्याने जमीन नांगरतात का? नाही. पण तुम्ही सर्वकाही
वरचे खाली करता. तुम्ही चांगुलपणा व न्याय यांचे वीष
केले.
13तुम्ही लो-देबारमध्ये सुखी आहात. तुम्ही म्हणता,
"आम्ही आमच्या बळावर कर्नाईम घेतले."

14"पण इस्राएल, मी तुझ्याविरुध्द एका राष्ट्राला उठवीन.
ते राष्ट्र, तुमच्या संबंध देशाला लेबो-हमाथपासून
अराबाच्या ओढ्यापर्यंतच्या सगळ्या प्रदेशाला अडचणीत
आणेल.' सर्वशक्तिमान परमेश्वर देव हे सर्व बोलला.

### टोळांचा दृष्टान्त

7 परमेश्वराने मला पुढील गोष्टी दाखविल्या: दुसरे
पीक वाढण्यास सुरुवात व्हायच्या वेळेलाच, तो टोळ
तयार करीत होता. पहिल्या पिकाची राजाची कापणी
झाल्यानंतरचे हे दुसरे पीक होते. 2टोळांनी देशातील सर्व
गवत खाल्ले. त्यानंतर मी म्हणालो, "परमेश्वरा, माझ्या
प्रभू, मी विनवणी करतो, आम्हाला क्षमा कर. याकोब
जगू शकणार नाही तो फारच दुबळा आहे."
3मग ह्याबाबतीत परमेश्वराचे मन:परिवर्तन झाले
परमेश्वर म्हणाला, "ते घडणार नाही."

### अग्नीचा दृष्टान्त

4परमेश्वराने, माझ्या प्रभूने, मला पुढील गोष्टी
दाखविल्या मी पाहिले की परमेश्वर देवाने अग्नीला न्याय
देण्यास बोलाविले. अग्नीने मोठा डोह नष्ट केला व त्याने
भूमी गिळण्यास सुरवात केली. 5पण मी म्हणालो, "हे
परमेश्वर देवा, थांब, मी तुझी करूणा भाकतो याकोब
जगू शकणार नाही तो खूपच लहान आहे."
6मग परमेश्वराचे ह्या गोष्टीबाबत हृदयपरिवर्तन झाले.
परमेश्वर प्रभू म्हणाला, "हीही घटना घडणार
नाही."

### ओळंब्याचा दृष्टान्त

7परमेश्वराने मला पुढील गोष्टी दाखविल्या. परमेश्वर,
त्याच्या हातात ओळंबा घेऊन एका भिंतीजवळ उभा होता
(भिंत ओळंब्याने सरळ केलेली होती.) 8परमेश्वर मला
म्हणाला, "आमोस, तुला काय दिसते?"
मी म्हणालो, "ओळंबा."
मग माझा प्रभू म्हणाला, "पाहा, माझ्या माणसांमध्ये,
इस्राएलमध्ये मी ओळंबा धरीन. मी त्यांच्या दुष्टपणाकडे
दुर्लक्ष होऊ देणार नाही. मी वाईट डाग काढून टाकीन.
9इसहाकच्या उच्च स्थानाचा नाश होईल. इस्राएलची पवित्र

स्थाने धुळीला मिळतील. मी यराबाम घराण्यावर हल्ला करीन आणि त्यांना तलवारीने ठार मारीन."

## अमस्या आमोसला थांबविण्याचा प्रयत्न करतो

10बेथेल येथील एक याजक अमस्या ह्याने, "इस्राएलचा
राजा यराबाम ह्याला पुढील निरोप पाठविला. आमोस
तुझ्याविरुद्ध कट करीत आहे. तो इस्राएलच्या लोकांनी
तुझ्याविरुध्द उठाव करावा म्हणून प्रयत्न करीत आहे. तो
इतका बोलतोय की हा देश त्याचे सर्व शब्द मानू शकत
नाही. 11आमोस म्हणाला असे आहे, यराबाम तलवारीच्या
वाराने मरेल, आणि इस्राएलच्या लोकांना त्यांच्या देशातून
कैदी म्हणून बाहेर नेले जाईल."
12अमास्या आमोसला असेही म्हणाला, "अरे द्रष्ट्या,
खाली यहूदात जा आणि तेथे जेव! तेथेच दे तुझे प्रवचन.
13पण यापुढे बेथेलमध्ये संदेश देऊ करू नकोस. ही
यराबामची पवित्र जागा आहे, हे इस्राएलचे मंदिर आहे."
14मग आमोस अमास्याला म्हणाला, "मी धंदेवाईक
संदेष्टा नाही. मी संदेष्ट्यांच्या घराण्यातीलही नाही. मी गुरे
राखत होतो. आणि उंबरांच्या झाडांची निगा राखत होतो.
15मी मेंढपाळ होतो मेंढ्यांच्या मागे जात असतानाच
परमेश्वराने माझा स्वीकार केला. परमेश्वर मला म्हणाला,
'जा, माझ्या लोकांना, इस्राएलला, संदेश सांग.' 16म्हणून
परमेश्वराचा संदेश ऐका 'इस्राएलविरुध्द संदेश सांगू नकोस,
इसहाकच्या घराण्याविरुध्द प्रवचन देऊ नकोस' असे तू
मला सांगतोस. 17पण परमेश्वर म्हणतो, 'तुझी बायको
गावची वेश्या होईल. तुझी मुलेमुली तलवारीने मरतील.
दुसरे लोक तुमची भूमी घेऊन तिची आपापसात वाटणी
करतील. तू परदेशात मरशील इस्राएलच्या लोकांना
निश्चितच त्यांच्या देशातून कैदी म्हणून नेले जाईल.'"

## पिकलेल्या फळाचा दृष्टान्त

8 परमेश्वराने मला पुढील गोष्टी दाखविल्या मी एक
उन्हाळी फळांची टोपली पाहिली. 2परमेश्वराने मला
विचारले, "आमोस, तुला काय दिसते?"
मी म्हणालो, "उन्हाळी फळांची टोपली."
मग परमेश्वर मला म्हणाला, "माझ्या लोकांचा,
इस्राएलचा, शेवट आला आहे. ह्यापुढे मी त्यांच्या पापाकडे
दुर्लक्ष करणार नाही. 3मंदिरातील गाण्याचे रूपांतर
विलापिकेत होईल. परमेश्वर, माझा प्रभू असे म्हणाला.
सगळीकडे प्रेतेच प्रेते असतील. लोक गूपचूप, प्रेते उचलतील
आणि ढिगावर फेकतील."

## इस्राएलच्या व्यापाऱ्यांना फक्त पैसे मिळविण्यात स्वारस्य आहे

4माझे ऐका! तुम्ही असहाय्य लोकांना तुडविता ह्या
देशातील गरिबांचा नाश करण्याचा तुम्ही प्रयत्न करीत
आहात.
5तुम्ही, व्यापारीलोक म्हणता "प्रतिपदा केव्हा संपेल?
म्हणजे मग आम्ही आमचे धान्य विकू शकू. शब्बाथ,
केव्हा संपेल? म्हणजे मग आम्हाला गहू विकता येईल?
आम्ही किंमत वाढवू शकतो आणि माप लहान करू
शकतो तराजू आपल्या सोयीचे करून आपण लोकांना
फसवू शकतो.
6गरीब कर्ज फेडू शकत नाहीत, तेव्हा आपण त्यांना
गुलाम म्हणून विकत घेऊ. एका जोड्याच्या किंमतीत
आपण त्या असहाय्य लोकांना विकत घेऊ. हो! आणि
जमिनीवर सांडलेले गहू आपण विकू शकू."

7परमेश्वराने वचन दिले आहे त्याने त्याच्या नावाची,
याकोबच्या अभिमानाची शपथ घेऊन वचन दिले.

"त्या लोकांनी केलेली कृत्ये मी कधीही विसरणार
नाही.
8त्या कृत्यांमुळे सर्व भूमी हादरेल. ह्या देशात राहणारा
प्रत्येकजण मृतासाठी रडेल. मिसरमधील नील नदीप्रमाणे,
संपूर्ण देश वर फेकला जाऊन खाली आदळेल. देश
हेलकावे खाईल."
9परमेश्वराने पुढील गोष्टीही सांगितल्या "त्या वेळी, मी
सूर्याचा दुपारीच अस्त करीन. स्वच्छ निरभ्र दिवशी, मी
जगावर अंधार पसरवीन.
10मी तुमचे उत्सव शोकदिनांत बदलीन. तुमची सर्व
गाणी ही मृतांसाठीची शोकगीते होतील. मी प्रत्येकाला
शोकप्रदर्शक कपडे घालीन. मी प्रत्येक डोक्याचे मुंडन
करीन. एकुलता एक मुलगा गेल्यावर जसा आकांत
होतो, तसा मी करीन. तो फारच कडू शेवट असेल."

## देवाच्या वचनांच्या उपासमारीची भयंकर वेळ येत आहे

11परमेश्वर म्हणतो,
"पाहा! मी देशात उपासमार आणीन. ते दिवस येतच
आहेत लोकांना भाकरीची भूक नसेल.ते पाण्यासाठी
तहानेले नसतील परमेश्वरच्या वचनांचे ते भुकेले
असतील.
12लोक मृतसमुद्रापासून ते भूमध्यसमुद्रापर्यंत आणि
उत्तरेपासून पूर्वेपर्यंत भटकतील.परमेश्वराचे वचन शोधत
लोक इकडे तिकडे भटकतील. पण त्यांना ते सापडणार
नाहीत.
13त्या वेळी, सुंदर तरुण-तरुणी तहानेने दुर्बल
होतील.शोमरोनच्या पापाच्या* जोरावर त्यांनी वचने दिली.
ते म्हणाले, 'दान, तुझा परमेश्वर जिवंत आहे, तितक्याच
खात्रीपूर्वकआम्ही वचन देतो....' आणि ते म्हणाले, 'जितका
बैर-शेबा परमेश्वर जिवंत आहे, तितक्याच खात्रीपूर्वक

---

**शोमरोनाच्या पाप** शोमरोनमधील वासराचे दैवत.

आम्ही वचन देतो....' हे लोक पडतील, आणि ते परत कधीही उठणार नहीत."

## परमेश्वर वेदीजवळ उभा असल्याचा दृष्टान्त

9 मी प्रभूला वेदीजवळ उभे असल्याचे पाहिले तो म्हणाला,

"खांबांच्या माथ्यावर मार मग इमारत अगदी उंबऱ्यापासून हादरेल. खांब लोकांच्या डोक्यावर पाड. कोणी जिवंत राहिल्यास, मी त्याला तलवारीने ठार मारीन. एखादा पळून जाईल, पण सुटणार नाही. लोकांपैकी एकही सुटून पळू शकणार नाही.

2त्यांनी जमिनीत खोल खणले, मी त्यांना तेथून ओढून काढीन. ते आकाशात उंच गेले, तरी मी त्यांना तेथून खाली आणीन.

3ते जरी कर्मेल पर्वताच्या शिखरावर लपले, तरी तेथून मी त्यांना शोधून काढीन. व तेथून उचलून घेईन. जर त्यांनी माझ्यापासून लपण्यासाठी समुद्राचा तळ गाठला, तर मी सापाला आज्ञा करीन. व तो त्यांना चावेल."

4जर ते पकडले गेले. आणि त्यांचे शत्रू त्यांना घेऊन गेले. तर मी तलवारीला आज्ञा करीन. आणि ती त्यांना तेथे ठार मारील. मी त्यांच्यावर लक्ष ठेवीन हे खरे, पण त्यांना त्रास कसा होईल हे मी पाहीन. त्यांचे भले कसे होईल, हे मी पाहणार नाही."

## शिक्षा लोकांचा नाश करील

5माझा प्रभू, सर्वशक्तिमान परमेश्वर, जमिनीला स्पर्श करील आणि ती वितळेल. मग देशात राहणारे सर्व लोक मृतांसाठी शोक करतील मिसरमधील नील नदीप्रमाणे भूमीवर उठेल व खाली पडेल.

6आकाशाच्यावर परमेश्वराने माड्या बांधल्या. तो त्याचे आकाश पृथ्वीवर ठेवतो. तो समुद्राच्या पाण्याला बोलवितो. आणि पावसाच्या रूपात जमिनीवर ओततो. त्याचे नाव याव्हे* आहे.

## इस्राएलच्या नाशाचे परमेश्वर वचन देतो

7परमेश्वर असे म्हणतो: "इस्राएल, तू मला कूशी लोकांप्रमाणे आहेस. मी इस्राएलला मिसर देशातून बाहेर आणले. पलिष्ट्यांना मी कफतोरमधून आणि अरामींना कीर मधून आणले."

8परमेश्वर, माझा प्रभू, पापी राज्यावर (इस्राएलवर) लक्ष ठेवीत आहे. परमेश्वर म्हणाला, "मी इस्राएलला पृथ्वीतळावरून पुसून टाकीन. पण याकोबच्या घराण्याचा मी संपूर्ण नाश करणार नाही.

9इस्राएल राष्ट्राच्या नाशाची आज्ञा मी देत आहे. सर्व राष्ट्रांमध्ये मी इस्राएलच्या लोकांना पांगवीन. पण पीठ चाळण्यासारखे ते असेल. चाळणीतील पीठ हलविल्यावर, चांगले पीठ खाली पडते. व चाळ चाळणीतच राहते. याकोबच्या घराण्याचे तसेच होईल.

10माझ्या लोकांतील पापी म्हणतात, 'आमचे काही वाईट होणार नाही.' पण त्या सर्वांना तलवारीने ठार मारले जाईल."

## राज्याच्या पुनर्बांधणीचे परमेश्वर वचन देतो

11दाविदचा तंबू पडला आहे. पण त्या वेळी, मी तो तंबू पुन्हा उभारीन. मी भिंतींतील भगदाडे बुजवीन. उद्ध्वस्त झालेल्या वास्तू मी पुन्हा बांधीन. मी त्या पूर्वी होत्या, तशाच बांधीन.

12*मग अदोममध्ये जिवंत असलेले लोक आणि माझे नाव लावणारे लोक परमेश्वराकडे मदतीच्या आशेने पाहतील." परमेश्वर असे म्हणाला व तो तसेच घडवून आणील.

13परमेश्वर म्हणतो,"असे दिवस येत आहेत की नांगरणी करणारा कापणी करणाऱ्याला, द्राक्षे तुडविणारा द्राक्षे तोडणाऱ्याला, गाठील, टेकड्यां-डोंगरांतून गोड द्राक्षरस ओतला जाईल,

14मी माझ्या लोकांना, इस्राएलला, कैदेतून सोडवून परत आणीन. ते उद्ध्वस्त झालेली गावे पुन्हा वसवतील. आणि ते त्यांत वस्ती करतील.ते द्राक्षांचे मळे लावतील. आणि त्यापासून मिळणारा द्राक्षरस पितील. ते बागा लावतील, व त्यापासून मिळणारे पीक खातील.

15मी माझ्या लोकांना त्यांच्या देशात रुजवीन. आणि मी त्यांना दिलेल्या भूमीतून ते पुन्हा उपटले जाणार नाहीत. परमेश्वराने, तुमच्या परमेश्वराने, हे सांगितले आहे.

---

**याव्हे** हिब्रूमध्ये देवाचे नांव. ह्यांचे नेहमी "परमेश्वर" असे भाषांतर करतात. "तो आहे" किंवा "तो अस्तित्वात आणतो" असा हिब्रू शब्दा प्रमाणे हे नांव आहे.

**12 वे वचन** हे प्राचीन ग्रीक भाषांतरातले आहे. हिब्रूमध्ये हे पुढील प्रमाणे आहे "मग ते अदोमान अवशेष राहिलेल्या सर्व लोकांचा व ज्यास माझे नांव दिले आहे अशा सर्व राष्ट्रांचा ताबा घेतील."

# ओबद्या

### अदोमला शिक्षा होईल

हा ओबद्याचा दृष्टान्त आहे. परमेश्वर, माझा प्रभू अदोमाबद्दल पुढील प्रमाणे म्हणाला:

आम्ही परमेश्वर देवाकडून हकिगत ऐकली. राष्ट्रांकडे दूत पाठविला गेला. तो म्हणाला, "आपण अदोमाविरुध्द लढण्यास जाऊ या."

### परमेश्वर अदोमशी बोलतो

[2]"अदोम, मी तुला लहान राष्ट्र करीन.लोक तुझा खूप तिरस्कार करतील.

[3]तुझ्या गर्वाने तुला मूर्ख बनविले. उंच कड्यावरील गुहांत तू राहतोस. तुझे घर टेकडीवर उंच ठिकाणी आहे. म्हणून तू स्वत:शी म्हणतोस, 'मला कोणीही खाली जमिनीवर आणू शकत नाही.'"

### अदोमला खाली आणले जाईल

[4]परमेश्वर, देव, असे म्हणतो, "जरी तू गरुडाप्रमाणे वर जातोस, आणि ताऱ्यांमध्ये घरटे बांधतोस, तरी मी तुला खाली आणील."

[5]तुझा खरोखरीच नाश होईल.तुझ्याकडे चोर येतील. रात्री लुटारु येतील, ते चोर त्यांना पाहिजे ते सर्व नेतील. तुझ्या मळ्यातील द्राक्षे तोडताना मजूर काही द्राक्षे मागे ठेवतात.

[6]पण एसावचा लपविलेला खजिना शत्रू कसोशीने शोधेल. आणि त्यांना ते सर्व सापडेल.

[7]तुझे मित्र असलेले लोकच तुला देशातून बळजबरीने बाहेर काढतील. तुझे मित्र तुला फसवतील व चुकीच्या गोष्टी करण्यासाठी तुझी खात्री करतील.युध्दात तुझ्याबरोबर असलेले सोबती तुझ्यासाठी सापळा रचायचा बेत करीत आहेत. ते म्हणतात, 'ते तुझ्या लक्षात येणार नाही.'

[8]परमेश्वर म्हणतो, "त्याच दिवशी, मी अदोममधील सुज्ञांचा नाश करीन. एसावच्या पर्वतातून समजूत नष्ट करीन.

[9]तेमान, तुझे सामर्थ्यशाली पुरुष भयभीत होतील. एसावच्या पर्वतावरील प्रत्येकाचा नाश होईल. पुष्कळ लोक मारले जातील.

[10]तू अप्रतिष्ठेने माखशील. आणि तुझा कायमचा नाश होईल. का? कारण तू, तुझा भाऊ याकोब याच्याशी क्रूरपणे वागलास.

[11]तू इस्राएलच्या शत्रूंना जाऊन मिळालास; परक्यांनी इस्राएलचे धन लुटून नेले परदेशी इस्राएलच्या गावाच्या वेशीतून आत शिरले;

त्यांनी यरुशलेमचा कोणता भाग घ्यायचा ह्यासाठी चिठ्या टाकल्या; आणि तू अगदी तेथेच तुझ्या वाटणीची वाट बघत उभा होतास.

[12]तुझ्या भावाच्या संकटांना तू हसलास. तू असे करायला नको होतेस. लोकांनी जेव्हा यहुदाचा नाश केला तेव्हा तू आनंद मानलास,

तू तसे करायला नको होतेस. त्याच्या संकटसमयी तू प्रौढी मिरविलीस;असेही तू करायला नको होतेस.

[13]माझ्या लोकांच्या वेशीतून तू आत आलास; आणि त्यांच्या समस्यांकडे पाहून हसलास; तू असे करायला नको होतेस. त्यांच्या संकटसमयी तू त्यांची संपत्ती घेतलीस, तू असे करायला नको होतेस.

[14]जिथे रस्ते एकमेकांना छेदतात तिथे तू उभा राहिलास आणि पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा नाश केलास. तू असे करायला नको होते. जिवंत सुटलेल्यांना तू पकडलेस तू असे करायला नको होते.

### सर्व राष्ट्रांचा निकाल येत आहे

[15]परमेश्वराचा दिवस लवकरच सर्व राष्ट्रांकडे येत आहे; तू दुसऱ्या लोकांशी वाईट कृत्ये केलीस त्या वाईट गोष्टी तुझ्या बाबतीत घडतील. तू केलेली दुष्कर्मे तुझ्या डोक्यावर येऊन आदळतील.

[16]का? कारण तू माझ्या पवित्र पर्वतावर रक्त सांडलेस म्हणून दुसरी राष्ट्रेही तुझे रक्त सांडतील.* तू संपशील. तू कधी अस्तित्वात नव्हतास, अशीच तुझी दशा होईल.

[17]पण सियोन पर्वतावर काही वाचलेले असतील. ते माझे खास लोक असतील. याकोबाचे राष्ट्र* त्याच्या मालकीच्या गोष्टी परत स्वत:कडे घेईल.

---

**तुझे रक्त सांडतील** शब्दश: "पितील आणि गिळतील."

**याकोबाचे राष्ट्र** शब्दश: "याकोबचे घर." ह्याचा अर्थ इस्राएलचे लोक किंवा नेते असाही असू शकेल.

[18]याकोबाचे घराणे आगीप्रमाणे होईल योसेफाचे घराणे
जाळासारखे असेल पण एसावाचे राष्ट्र* राखेप्रमाणे
होईल यहुदाचे लोक अदोम जाळतील, ते अदोमचा नाश
करतील. एसाव राष्ट्रात मग कोणी शिल्लक राहणार
नाही.” का? कारण परमेश्वर देव असे म्हणाला
आहे.
[19]नेगेवचे लोक एसावाच्या पर्वतावर राहतील
डोंगराच्या पायथ्याशी राहणारे लोक पलिष्ट्यांचा देश
आपल्या ताब्यात घेतील. ते एफ्राईमाच्या व शोमरोनच्या
भूमीवर राहतील. गिलाद बन्यामीनच्या कबजात
जाईल.
[20]इस्राएलच्या लोकांना त्यांची घरे बळजबरीने सोडावी
लागली, पण ते सारफथ पर्यंतचा कनानचा प्रदेश घेतील
यहुदाच्या लोकांना बळजबरीने यरुशलेम सोडावे लागले
व ते सफारदमध्ये राहतात. पण ते नेगेवची गावे घेतील.
[21]विजेते सियोन पर्वतावर जातील, एसाव पर्वतावर
राहणाऱ्या लोकांवर ते राज्य करतील. आणि राज्य
परमेश्वराच्या मालकीचे होईल.

---

**एसावाचे राष्ट्र** शब्दश: “एसावचे घर.”

# योना

## परमेश्वर बोलवितो आणि योना पळ तो

1 अमित्तयाचा मुलगा योना ह्याच्याशी परमेश्वर बोलला. आणि म्हणाला, [2]“निनवे मोठी नगरी आहे. तेथे लोक दुष्कृत्ये करीत असल्याचे मी ऐकले आहे. तेव्हा त्या नगरात जा आणि लोकांना त्या वाईट गोष्टी करण्याचे थांबविण्यास सांग.”

[3]योनाला परमेश्वराची आज्ञा पाळायची नव्हती. म्हणून योनाने परमेश्वरापासून दूर पळून जाण्याचा प्रयत्न केला. योना याफोला गेला. योनाला तार्शिस या खूप दूरच्या नगराला जाणारे गलबत सापडले. योनाने सफरीचे पैसे भरले व तो गलबतावर चढला. गलबतावरील लोकांबरोबर योनाला तार्शिसला जाण्याची इच्छा होती. त्याला परमेश्वरापासून दूर पळायचे होते.

## मोठे तुफान

[4]पण परमेश्वराने समुद्रात मोठे तुफान निर्माण केले. वाऱ्याने समुद्र खवळला. तुफान प्रचंड होते आणि गलबत फुटण्याच्या बेताला आले. [5]गलबत बुडू नये म्हणून गलबतावरचे वजन कमी करावे असे गलबतावरील लोकांना वाटले. म्हणून त्यांनी गलबतावरील माल समुद्रात टाकण्यास सुरवात केली. खलाशी खूपच घाबरले होते. प्रत्येकजण आपापल्या दैवतांची प्रार्थना करु लागले.

योना झोपण्यासाठी गलबताच्या खालच्या तळाच्या भागात गेला होता. तो तेथे झोपला होता. [6]कप्तानाने योनाला पाहिले तो त्याला म्हणाला, “उठ! झोपलास का? तुझ्या दैवताची प्रार्थना कर. कदाचित् तुझ्या प्रार्थनेने तुझे दैवत ऐकेल आणि आपल्याला वाचवेल.”

## ह्या तुफानाचे कारण काय?

[7]मग लोक एकमेकांना म्हणाले, “आपल्यावर हे संकट का आले हे आपण चिठ्या टाकून पाहावे.”

म्हणून त्यांनी चिठ्या टाकल्या. त्यावरुन त्यांना कळले की योनामुळे हे संकट आले. [8]मग ते योनाला म्हणाले, “तुझ्यामुळे ही भयंकर गोष्ट आमच्याबाबत घडत आहे. तेव्हा तू काय केले आहेस ते सांग. तू काय करतोस? तू कोठचा? तुझा देश कोणता? तुझी माणसे कोण आहेत?”

[9]योना त्या लोकांना म्हणाला, “मी इब्री (यहूदी) आहे. मी स्वर्गातील परमेश्वर देवाची उपासना करतो. समुद्र आणि भूमीचा निर्माता तोच परमेश्वर आहे.”

[10]तो परमेश्वरापासून दूर पळत आहे, हेही योनाने त्या लोकांना सांगितले. हे कळताच ते अतिशय घाबरले. त्यांनी योनाला विचारले, “परमेश्वराविरुध्द तू कोणती भयंकर गोष्ट केलीस? [11]वादळ जास्तच घोंघावू लागले व लाटाही जास्तच उसळू लगल्या. तेव्हा ते लोक योनाला म्हणाले, “स्वत:ला वाचविण्यासाठी आम्ही काय करावे? समुद्र शांत होण्यासाठी तुझे आम्ही काय करावे? [12]योना त्यांना म्हणाला, “समुद्रातील तुफानाला मी कारणीभूत आहे. तेव्हा मला समुद्रात फेका, म्हणजे समुद्र शांत होईल.”

[13]परंतु त्या माणसांना योनाला समुद्रात फेकावे असे वाटत नव्हते. त्यांनी गलबत पुन्हा किनाऱ्याकडे नेण्याचा प्रयत्न केला पण त्यांना ते शक्य झाले नाही. वारा प्रचंड होता समुद्रही खवळलेला होता. आणि वादळाची तीव्रता वाढतच होती.

## योनाला शिक्षा

[14]म्हणून त्या लोकांनी परमेश्वराची करूणा भाकली, “परमेश्वरा, त्याने केलेल्या वाईट कृत्याबद्दल आम्ही या माणसाला समुद्रात फेकत आहोत. निष्पाप माणसाला मारले म्हणून तुम्ही अपराधी आहात.’ असे कृपया म्हणू नकोस. तू परमेश्वर आहेस आणि तुझ्या इच्छेप्रमाणे तू करशील, हे आम्हाला माहीत आहे. पण कृपा करुन आमच्यावर दया कर.”

[15]मग त्यांनी योनाला समुद्रात टाकले आणि तुफान थांबले. समुद्र शांत झाला. [16]हे पाहताच ती माणसे परमेश्वराला घाबरु लागली व मान देऊ लागली. त्यांनी परमेश्वराला यज्ञ केला आणि नवस केले.

[17]योना समुद्रात पडल्यावर, त्याला गिळण्यासाठी परमेश्वराने एक मोठा मासा निवडला. योना, तीन दिवस आणि तीन रात्र, माशाच्या पोटात होता.

2 माशाच्या पोटात असतानाच योनाने त्याच्या परमेश्वर देवाची प्रार्थना केली तो म्हणाला,

[2]“मी फार मोठ्या संकटात सापडलो होतो. मी मदतीसाठी परमेश्वराला हाक मारली, आणि त्याने मला ओ दिली.

जेव्हा मी खोल थडग्यात होतो तेव्हा, हे परमेश्वरा, मी
तुझी आळवणी केली आणि तू माझा आवाज ऐकलास.
3“तू मला समुद्रात फेकलेस तुझ्या प्रचंड लाटा माझ्यावरुन
गेल्या मी खोल, खोल समुद्रात गेलो, माझ्याभोवती पाणी
होते.
4मग मी विचार केला, ‘की मी आता अशा ठिकाणी
जावे की जिथे तू मला पाहू शकणार नाहीस.’
तरी पण मी तुझ्या पवित्र मंदिराकडे मदतीच्या आशेने
पाहतच राहिलो.
5“समुद्राच्या पाण्याने मला वेढले पाण्याने माझे तोंड
बुडाले आणि मी श्वासोच्छवास करू शकत नव्हतो मी
खाली खूप खोल समुद्रात गेलो माझ्या डोक्याभोवती
समुद्रशेवाळ गुंडाळले गेले.
6मी समुद्रतळाशी, पर्वताच्या पायथ्याशी होतो मला
कायमचे असे बंदिवासात राहावे लागणार, असेच मला
वाटले पण माझ्या परमेश्वर देवाने मला थडग्यातून बाहेर
काढले परमेश्वरा, तू मला नवजीवन दिलेस!
7“माझ्या आत्म्याने सर्व आशा सोडून दिल्या होत्या पण
मग मला परमेश्वराचे स्मरण झाले परमेश्वरा, मी तुझी
प्रार्थना केली आणि तुझ्या पवित्र मंदिरात ती तू ऐकलीस.
8“काहीजण निरुपयोगी मूर्तीची पूजा करतात पण ते
पुतळे त्यांना कधीच मदत करीत नाहीत.
9फक्त परमेश्वरा मुळेच तारण मिळते “हे परमेश्वरा,
मी तुला यज्ञ अर्पण करीन मी तुझे स्तवन करीन आणि
कृतज्ञता व्यक्त करीन मी तुला नवस बोलेन आणि तो
फेडेन.”
10मग परमेश्वर माशाशी बोलला आणि माशाने उलटी
करून योनाला कोरड्या भूमीवर टाकले.

## परमेश्वर बोलावितो आीण योना आज्ञा पाळतो

3 मग परमेश्वर योनाशी पुन्हा बोलला. परमेश्वर
म्हणाला, 2“त्या मोठ्या नगरीला, निनवेला जा आणि
मी सांगतो तो संदेश सांग.”
3मग योनाने परमेश्वराची आज्ञा पाळली. तो निनवेला
गेला. निनवे फार मोठी नगरी होती. नगरीच्या एका
टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यास तीन दिवस चालावे
लागे.
4योना नगरीच्या मध्यभागी जाऊन लोकांना उपदेश
करु लागला. योना म्हणाला, “चाळीस दिवसानंतर निनवेचा
नाश होईल.”
5निनवेच्या लोकांनी परमेश्वराच्या संदेशावर विश्वास
ठेवला. त्यांनी काही काळ उपवास करण्याचे ठरविले
आणि आपल्या पापांचा विचार करण्याचा निश्चय केला.
त्यांनी खेद प्रदर्शित करणारे खास कपडे घातले. नगरीतल्या
सर्व लोकांनी असे केले. मग तो राव असो की रंक.
6निनवेच्या राजाच्या कानावर या गोष्टी गेल्या. त्याला
त्याने केलेल्या वाईट कृत्यांबद्दल खेद वाटला. त्याने त्याचे
सिंहासन सोडले व आपली राजवस्त्रे उतरविली आणि
दुःख प्रकट करण्यासाठी असलेली वस्त्रे घातली. मग तो
राखेत बसला. 7त्याने एक विशेष संदेश लिहिला आणि तो
सर्व नगरीत घोषित केला.

राजा आणि महान राज्यकर्ते यांची आज्ञा:
काही काळ कोणत्याही माणसाने व पशूने काहीही
खाऊ नये. गुराढोरांनी रानांत चरु नये. निनवेत
राहणाऱ्या कोणत्याही सजीवाने खाऊ-पिऊ नये.
8प्रत्येक माणसाने व प्राण्याने दुःख प्रकट करणारे
वस्त्र पांघरले पाहिजे. माणसांनी परमेश्वरापाशी टाहो
फोडला पाहिजे. प्रत्येकाचे जीवन बदलले पाहिजे आणि
वाईट कर्मे करावयाचे थांबविले पाहिजे. 9मग कदाचित्
देवाचे मन:परिवर्तन होईल आणि योजलेल्या गोष्टी
तो करणार नाही. कदाचित् देवाच्या मनात बदल
होईल व तो रागावणार नाही, व आपला नाशही
होणार नाही.

10लोकांचे वागणे परमेश्वराने पाहिले. लोकांनी
दुष्कृत्ये करावयाचे सोडून दिले आहे हेही परमेश्वराने
पाहिले. मग परमेश्वराचे मन बदलले व त्याने
ठरविल्याप्रमाणे केले नाही. परमेश्वराने लोकांना शिक्षा
केली नाही.

## परमेश्वराच्या दयेचा योनाला राग येतो

4 परमेश्वराने नगरी वाचविली, ह्याचा योनाला आनंद
झाला नाही तर उलट तो रागावला. 2योनाने
परमेश्वराकडे तक्रार केली. तो म्हणाला, “हे असे होणार
हे मला माहीतच होते! मी माझ्या देशात होतो. तू मला येथे
येण्यास सांगितलेस. त्याच वेळी मला कळले की या पापी
नगरीच्या लोकांना तू क्षमा करणार. म्हणून मी तार्शिशला
पळून जायचे ठरविले. तू दयाळू परमेश्वर आहेस, हे मला
ठाऊक होते. तू दया दाखवितोस आणि लोकांना शिक्षा
करण्याची तुझी इच्छा नसते हे मला माहीतच होते. तू
दयेचा सागर आहेस, हे मी जाणून होतो. मला माहीत होते
की हे लोक पापांपासून परावृत्त झाल्यास, त्यांचा नाश
करण्याचा बेत तू बदलशील. 3म्हणून आता मी, परमेश्वरा,
तुला, मला ठार मारण्याची विनंती करतो. माझ्या दृष्टीने
जगण्यापेक्षा मरणे बरे!”
4मग परमेश्वर म्हणाला, “मी त्या लोकांचा नाश केला
नाही म्हणून तू असे रागावणे योग्य आहे असे तुला वाटते
का?”
5पण ह्या सर्व गोष्टींबद्दल अजूनही योनाच्या मनात राग
होता म्हणून तो नगरीबाहेर निघून गेला.नगरीजवळच्या,
पूर्वीकडील, एका ठिकाणी, योना गेला तेथे त्याने स्वत:साठी
निवारा तयार केला. मग तेथे तो सावलीत, नगरीचे काय
होते, ह्याची वाट पाहात बसला.

### भोपळ्याचा वेल आणि किडा

[6]परमेश्वराने, योनाच्या डोक्यावर, झटपट एक भोवळ्याचा वेल वाढविला. त्यामुळे योनाला बसायला थंड जागा झाली. त्याला आणखी आराम मिळायला मदत झाली. ह्या वेलामुळे योनाला खूप आनंद झाला.

[7]दुसऱ्या दिवशी सकाळी, वेलीचा काही भाग खाण्याकरिता परमेश्वराने एक किडा पाठविला. किड्याने वेल खायला सुरवात केली व वेल मेला.

[8]सूर्य डोक्यावर असताना, परमेश्वराने गरम पूर्वेचा वारा निर्माण केला. योनाच्या डोक्यावर ऊन तापले व तो फारच गळून गेला. त्याने मरणासाठी परमेश्वराची विनवणी केली. तो म्हणाला, "माझ्या मताने जगण्यापेक्षा मरणे बरे!"

[9]पण परमेश्वर त्याला म्हणाला, "हा वेल मेला म्हणून रागावणे तुला योग्य वाटते का?"

योना उत्तरला, "हो! माझा राग अगदी बरोबर आहे. मी रागाने मरुन जाण्याइतका रागावलो आहे."

[10]मग परमेश्वर म्हणाला, "तू त्या वेलासाठी काहीही केले नाहीस. तू त्याला वाढविले नाहीस. तो एका रात्रीत वाढला व दुसऱ्या दिवशी मेला आणि आता तुला त्या वेलाबद्दल वाईट वाटत आहे. [11]तू एका वेलासाठी अस्वस्थ होऊ शकतोस, तर मग निनवेसारख्या मोठ्या नगरीसाठी मला वाईट वाटणे अगदी शक्य आहे. त्या नगरीत 1,20,000 पेक्षा जास्त लोक व खूप प्राणी आहेत. त्या लोकांना आपण चुकीचे वागत आहोत, ह्याची जाणीव नव्हती."

# मीखा

## शोमरोन आणि इस्राएल यांना करावयाची शिक्षा

1 मीखाला परमेश्वराचे शब्द ऐकू आले. योथाम,
आहाज व हिज्कीया यांच्या काळात हे घडले. हे
सर्व यहूदाचे राजे होते. मीखा मोरेशेथचा होता. मीखाने
शोमरोन व यरुशलेम यांच्याविषयी पुढील दृष्टान्त
पाहिले.

2सर्व लोकांनो, ऐका! जग आणि त्यावरील प्रत्येकाने,
ऐका! माझा प्रभू परमेश्वर, त्याच्या पवित्र मंदिरातून येईल.
तुमच्याविरुध्दचा साक्षीदार म्हणून तो येईल.
3पाहा“ परमेश्वर त्याच्या स्थानातून बाहेर येत आहे.
पृथ्वीवरील उच्चस्थाने तुडविण्यासाठी तो येत आहे.
4विस्तवाजवळ ठेवल्यास मेण वितळते, तसे त्याच्या
पायाखाली पर्वत वितळतील. दऱ्या दुभंगतील आणि उंच
टेकड्यावरून वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे वाहू लागतील.
5का? ह्याला कारण याकोबचे पाप, तसेच इस्राएल
राष्ट्राची दुष्कर्मे आहेत.

## शोमरोन, पापाचे कारण

याकोबने पाप करण्याचे कारण काय? त्याला कारणीभूत
आहे शोमरोन. यहूदात उच्चस्थान कोठे आहे?
यरुशलेममध्ये.
6म्हणून मी शोमरोनला भूमीवरील खडकांच्या
ढिगाप्रमाणे करीन. ती द्राक्ष लागवडीच्या जागेप्रमाणे होईल.
शोमरोनचे चिरे मी दरीत ढकलून देईन. आणि तिथे
पायांखेरीज काहीही शिल्लक ठेवणार नाही.
7तिच्या सर्व मूर्तीचे तुकडे तुकडे केले जातील. तिच्या
वेश्येची संपत्ती (मूर्ती) आगीमध्ये भस्मसात होईल. तिच्या
सर्व खोट्या दैवतांच्या पुतळ्यांचा मी नाश करीन. का?
कारण शोमरोनने माझ्याशी विश्वासघात करून सर्व
धन मिळविले.* म्हणून माझ्याशी एकनिष्ठ नसलेल्या
लोकांमार्फत तिची संपत्ती घेतली जाईल*

## मीखाचे मोठे दुःख

8घडणाऱ्या गोर्ष्टीबद्दल मला फार दुःख होईल. मी
अनवाणी व वस्त्राशिवाय फिरेन. मी कोल्ह्याप्रमाणे मोठ्याने
आकांत करीन. आणि शहामृगाप्रमाणे ओरडीन.
9शोमरोनची जखम भरून येऊ शकत नाही. तिचा
आजार (पाप) यहूदापर्यंत पसरला आहे. तो माझ्या
माणसांच्या वेशीपर्यंत पोहोचला आहे. तो पार यरुशलेमपर्यंत
पसरला आहे.
10गथमध्ये हे सांगू नका. अंकोत ओरडू नका.
बेथ-अफ्रामध्ये धुळीत लोळा.
11शाफीरमध्ये राहणारे लोकहो, तुम्ही नग्न आणि
लज्जित होऊन आपल्या वाटेने फिरता. सअनानवासी बाहेर
पडणार नाहीत. बेथ-एसलामधील लोक शोक करतील.
आणि त्या शोकाचे कारण (आधार) तुम्ही असाल.
12मारोथमधील लोक सुवार्तेची वाट पाहता पाहता
दुर्बल होतील. का? कारण संकट परमेश्वराकडून खाली
यरुशलेमच्या वेशीपर्यंत आले आहे.
13लाखीशच्या महिले, गाडीला चपळ घोडा जुंप.
सियोनच्या पापाला लाखीशमध्ये सुरवात झाली. का?
कारण तू इस्राएलच्या पापांत सामील झालीस.
14म्हणून तू गथांतल्या मोरेशथला निरोपाचे नजराणे
दिले पाहिजेस. अकजीबची घरे इस्राएलच्या राजाला
फसवतील.
15मोरेशमध्ये राहणाऱ्या लोकांनो, तुमच्या विरुध्द
एका व्यक्तीला मी आणीन. तो तुमच्या मालकीच्या वस्तू
घेईल. इस्राएलचे वैभव (परमेश्वर) अदुल्लामला येईल.
16म्हणून केस कापा, मुंडन करा.* का? कारण
तुम्हाला प्रिय असलेल्या मुलांसाठी तुम्ही शोक कराल.
गरुडा प्रमाणे तुम्ही स्वतःचे डोक्याचे मुंडन करून घ्या
आणि दुःख प्रगट करा. का? कारण तुमच्या मुलांना
तुमच्यापासून दूर नेले जाईल.

## लोकांचे दुष्ट बेत

2 पाप करण्याचे बेत करणाऱ्यांवर संकट येईल. ते
लोक आपल्या शय्येवर दुष्ट बेत करीत पडतात
आणि सकाळी फटफटताच, योजलेली वाईट कर्मे करतात.

---

**शोमरोनने … मिळविले** शब्दशः “तिची कमाई म्हणजे वेश्येची कमाई होती.”

**माझ्याशी … घेतली जाईल** शब्दशः “ह्या गोष्टी वेश्येच्या कमाईतच परत जातील.”

**केस … करा** ह्यावरून त्या माणसाने परमेश्वराशी खास करार केला आहे. किंवा तो फार दुःखी आहे असे सिध्द होते.

का? कारण त्यांच्या इच्छेप्रमाणे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या
हाती आहे म्हणून.
2त्यांना शेते हवे असतात, म्हणून ते ती घेतात. घरे हवी
असतात, म्हणून घरे घेतात. ते एखाद्याला फसवितात.
आणि त्याचे घर घेतात. एखाद्याची फसवणूक करून
त्याची जमीन घेतात.

### लोकांना शिक्षा करण्याची परमेश्वराच्या योजना

3म्हणूनच परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो. "पाहा! ह्या
कुटुंबाला संकटात टाकण्याचे मी योजीत आहे. तुम्ही
स्वत:ला वाचवू शकणार नाही.* तुमचे गर्वहरण होईल.
का? कारण वाईट वेळ येत आहे.
4मग लोक तुमच्यावर गाणी रचतील. लोक ही शोकगीते
म्हणतील: 'आमचा विनाश झाला! परमेश्वराने आमची
भूमी काढून घेतली आणि ती दुसऱ्यांना दिली. हो
खरेच! त्याने माझी जमीन काढून घेतली. परमेश्वराने
आमची शेते घेऊन आमच्या शत्रूंमध्ये त्यांची वाटणी
केली.
5म्हणून आता आम्ही जमिनीचे मोजमाप करून त्या
जमिनीची वाटणी परमेश्वराच्या लोकात करु शकत
नाही.'"

### मीखाला उपदेश करण्यास मनाई

6लोक म्हणतात, "आम्हाला उपदेश करू नको.
आमच्याबद्दल वाईट गोष्टी सांगू नकोस आमचे काहीही
वाईट होणार नाही."
7पण याकोबच्या लोकांनो, मला ह्या गोष्टी सांगितल्याच
पाहिजेत. तुमच्या वाईट कृत्यांमुळे परमेश्वराची
सहनशीलता संपुष्टात येत आहे. तुम्ही नीट वागलात, तर
मी तुमच्यासाठी चांगली बातमी आणीन.

### परमेश्वराचे लोकच त्याचे शत्रू होतात

8माझ्या लोकांनो, तुम्ही शत्रू म्हणून (परमेश्वराचे
अथवा एकमेकाचे) उभे राहिलात. स्वत:ला सुरक्षित
समजणाऱ्या, जाणाऱ्या येणाऱ्या लोकांचे तुम्ही कपडे
चोरता. पण ते युध्दकैदी असल्यासारखे मानून तुम्ही त्यांच्या
वस्तू काढून घेता.
9तुम्ही माझ्या लोकांच्या स्त्रियांकडून चांगली घरे
काढून घेतलीत. त्यांच्या लहान मुलांपासून माझे वैभव
काढून घेतले.
10उठा आणि चालते व्हा! ही तुमची विसाव्याची जागा
असणार नाही. का? कारण तुम्ही ही जागा उद्ध्वस्त
केलीत. तुम्ही ती अस्वच्छ केलीत. म्हणून तिचा नाश
होईल. आणि तो विनाश भयंकर असेल.
11ह्या लोकांना माझे ऐकावयाचे नाही. पण एखादा
खोटे सांगू लागला, तर ते स्वीकारतील. जर खोटा
संदेष्टा येऊन म्हणाला, "भविष्यकाळात चांगले दिवस
येतील, द्राक्षरस आणि मद्याचा सुकाळ होईल, तर ते त्या
खोट्या प्रेषितावर विश्वास ठेवतील."

### परमेश्वर त्याच्या लोकांना एकत्र आणील

12हो! खरेच! मी याकोबच्या माणसांना एकत्र आणीन.
वाचलेल्या इस्राएल लोकांना मी एकत्र करीन. कुरणातील
कळपाप्रमाणे वा मेंढवाड्यातील मेंढराप्रमाणे मी त्यांना
एकत्र ठेवीन. मग पुष्कळ लोकांच्या गोंगाटाने ही जागा
भरून जाईल.
13फोडणारा लोकांना ढकलून पुढे जाईल व लोकांच्या
पुढे चालेल. तो वेशीचे दार फोडील आणि लोक ते गाव
सोडतील. त्या लोकांचा राजा त्यांच्यापुढे चालेल. परमेश्वर
सर्व लोकांच्या पुढे असेल.

### इस्राएलचे नेते पापामुळे अपराधी ठरतात

3 मग मी म्हणालो, "याकोबच्या नेत्यांनो, इस्राएल
राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांनो, न्याय म्हणजे काय" हे
तुम्हाला माहीत असावे!
2पण तुम्ही चांगल्याचा तिरस्कार करता आणि वाईटावर
प्रेम करता. तुम्ही लोकांची चामडी सोलता. त्यांच्या
हाडांवरून मांस ओढून काढता.
3तुम्ही माझ्या माणसांचा नाश करीत आहात.* तुम्ही
त्यांची कातडी सोलता आणि हाडे मोडता. भांड्यात
घालण्यासाठी ज्याप्रमाणे मांस चिरतात, त्याप्रमाणे तुम्ही
त्यांच्या हाडांचे तुकडे तुकडे करता.
4आता, तुम्ही कदाचित परमेश्वराची प्रार्थना कराल.
पण तो तुम्हाला ओ देणार नाही. नाही, परमेश्वर
तुमच्यापासून तोंड लपवेल. का? कारण तुम्ही दुष्कृत्ये
करता."

### भोंदू संदेष्टे

5भोंदू वा खोटे संदेष्टे परमेश्वराच्या लोकांना खोट्यागोष्टी
सांगत आहेत. परमेश्वर ह्या संदेष्ट्यांबद्दल पुढीलप्रमाणे
उद्गार काढतो.

"हे संदेष्टे पोटाद्वारे चालतात. जर लोकांनी ह्या संदेष्ट्यांना
खायला घातले तर ते ओरडतात, शांती नांदेल. पण जर
लोकांनी त्यांना खायला दिले नाही तर हे संदेष्टे
किंचाळतात, "युध्दाला तयार राहा!"
6म्हणून ही जणू काही तुमची रात्र आहे. म्हणूनच
तुम्हाला दृष्टान्त होत नाहीत. भविष्यात काय घडणार हे

---

**तुम्ही ... नाही** शब्दश: "त्या संकटापासून तुम्ही तुमच्या माना बाजूला सारणार नाही."

**तुम्ही ... करीत आहात** शब्दश: "त्यानी माझ्या माणसांचे मांस खाल्ले."

तुम्ही पाहू शकत नाही, म्हणून तुम्ही जणू अंधारातच आहात. संदेष्ट्यांच्या माथ्यांवरचा सूर्य मावळला आहे. तेव्हा भविष्यात घडणाऱ्या गोष्टी ते पाहू शकत नाहीत. म्हणजेच त्यांच्यापुढे जणू अंधार पसरलाय!

7द्रष्टे लज्जित झालेत ज्योतिषी ओशाळलेत. ते काहीच बोलणार नाहीत. का? कारण परमेश्वर त्यांच्याशी बोलणार नाही.

## मीखा परमेश्वराचा प्रामाणिक संदेष्टा आहे

8पण परमेश्वराच्या आत्म्याने मला अधिकार, चांगुलपणा व सामर्थ्याने भरून टाकले आहे. मी याकोबला त्याच्या पापांबद्दल सांगीन. हो! मी इस्राएलशी त्याच्या पापांविषयी बोलेन."

## इस्राएलच्या नेत्यांना दोष द्यायला हवा

9याकोबच्या नेत्यांनो आणि इस्राएलच्या शास्त्यांनो, माझे ऐका! तुम्ही योग्य चालीरीतीचा तिरस्कार करता. सरळ गोष्टीला तुम्ही वाकडी करता.

10लोकांना मारून तुम्ही सियोनची उभारणी केली. तुम्ही लोकांना फसवून यरुशलेम उभे केले.

11यरुशलेमचे न्यायाधीश, न्यायालयात कोणी जिंकायचे, हे ठरविण्यासाठी लाच घेतात. यरुशलेममधील याजकांना लोकांना शिकवण देण्यापूर्वी लोकांनी पैसे द्यावेच लागतात. भविष्य बघण्यापूर्वीच संदेष्ट्यांना पैसे चारावे लागतात. आणि मग हे नेते अपेक्षा करतात की परमेश्वराने त्यांना मदत करावी. ते म्हणतात, "आपले काहीही वाईट होणार नाही. कारण परमेश्वर आपल्याबरोबरच राहतो!"

12नेत्यांनो, तुमच्यामुळे सियोनचा नाश होईल. ती नांगरट जमीन होईल. यरुशलेम म्हणजे दगडधोड्यांची रास होईल. मंदिर ज्या टेकडीवर आहे, ती टेकडी निर्जन होईल व त्यावर घनदाट रान माजेल."

## यरुशलेममधून नियमशास्त्र येईल

4 शेवटल्या दिवसांत, देवाचे मंदिर ज्या पर्वतावर आहे, तो पर्वत सर्व पर्वतांत उंच असेल. टेकड्यांपेक्षा तो उंच होईल. आणि तिथे जाणाऱ्या लोकांचा प्रवाह सतत वाहत राहील.

2तेथे पुष्कळ देशातले लोक जातील. ते म्हणतील, "या! आपण परमेश्वराच्या पर्वतावर जाऊ या. याकोबच्या देवाच्या मंदिरात आपण जाऊ या. मग परमेश्वर आपल्याला त्याचा आचारधर्म शिकवील व आपण त्याचे अनुसरण करू." परमेश्वराच्या शिकवणुकीचा आणि परमेश्वराच्या संदेशाचा प्रारंभ यरुशलेममधून सियोन पर्वतावरून होईल. मग तो सर्व जगात पसरेल.

3तेव्हा सर्व राष्ट्रांतील लोकांचा परमेश्वर न्यायाधीश असेल. दूरच्या देशातील पुष्कळ लोकांमधील वाद परमेश्वर मिटवील. ते लोक लढण्यासाठी शस्त्रे वापरण्याचे सोडून देतील. ते त्यांच्या तलवारीपासून नांगर बनवतील आणि भाल्यांचा उपयोग झाडे छाटण्यासाठी करतील. लोक एकमेकांशी लढाई करणार नाहीत. लोकांना कधीही युध्दाचे शिक्षण दिले जाणार नाही.

4प्रत्येकजण आपल्या द्राक्षवेलीखाली व अंजिराच्या झाडाखाली बसेल. त्यांना कोणीही घाबविणार नाही. का? कारण सर्व शक्तिमान परमेश्वराने असे घडेल म्हणून सांगितले आहे.

5दुसऱ्या राष्ट्रातील लोक आपापल्या दैवतांना अनुसरतात. पण आम्ही आमच्या परमेश्वर देवाचे नाव घेत सदासर्वकाळ चालत राहू.

## राज्य परत आणले जाईल

6परमेश्वर म्हणतो, "यरुशलेमला दुखापत झाली व ती लंगडी झाली. ती दूर फेकली गेली. तिला दुखविले गेले व शिक्षा झाली. पण मी तिला माझ्याकडे परत आणीन.

7त्या लंगड्या नगरीतील लोकच वाचतील एके काळी त्या नगरीतील लोकांना बळजबरीने ती नगरी सोडावी लागली. पण मी त्यांचे एक बलशाली राष्ट्र करीन." परमेश्वर त्यांचा राजा असेल. तो सियोन पर्वतावरून चिरंतन काळापर्यंत राज्य करील.

8आणि तू, कळपाच्या मनोऱ्या, तुझी वेळ येईल. योफल, सियोनच्या टेकाडा, तू पुन्हा शासनाची जागा होशील. हो! पूर्वीप्रमाणेच राज्य यरुशलेममध्ये असेल."

## इस्राएल लोकांनी बाबेलला का जायला पाहिजे?

9आता, तू एवढ्या मोठ्याने का रडत आहेस? तुझा राजा गेला का? तुझ्या नेत्याला तू गमावलेस का? प्रसूतिवेदना होणाऱ्या स्त्रीप्रमाणे तुला त्रास होत आहे.

10सियोनच्या कन्ये, तुला वेदना जाणवू दे. तू आपल्या बाळाला जन्म दे." तुला या नगरीतून (यरुशलेममधून) बाहेर गेलेच पाहिजे. तू रानात राहशील. मला असे म्हणायचे आहे की तू बाबेलला जाशील. पण त्या ठिकाणापासून तुझे रक्षण केले जाईल. परमेश्वर तेथे जाऊन तुझी सुटका करील. तो, तुला, तुझ्या शत्रूंपासून दूर नेईल.

## परमेश्वर इतर राष्ट्रांचा नाश करील

11पुष्कळ राष्ट्रे तुझ्याविरुध्द लढण्यास आली आहेत. ती म्हणतात, "ती पाहा सियोन! या, आपण तिच्यावर हल्ला करु या."

12त्या लोकांनी त्यांचे बेत केलेत. पण परमेश्वर काय बेत करीत आहे, हे त्यांना माहीत नाही. परमेश्वराने त्या लोकांना विशेष उद्देशाने येथे आणले आहे. ते लोक, खळ्यातील धान्याप्रमाणे चिरडले जातील.

## इस्राएल त्याच्या शत्रूंचा पाडाव करील

[13]“सियोनच्या कन्ये, ऊठ आणि त्या लोकांना चिरडून
टाक. मी तुला खूप सामर्थ्यवान करीन. तुला जणू काही
लोखंडाची शिंगे व कास्याचे खूर असतील. तू पुष्कळांवर
आघात करून त्यांचे तुकडे तुकडे करशील. तू त्यांची
संपत्ती परमेश्वराला देशील. तू त्याचे धन जगाच्या
परमेश्वराला देशील.”

5 बलशाली नगरी, आता तुझे सैनिक गोळा कर. ते
आपल्यावर हल्ला करण्यासाठी सभोवती जमा होत
आहेत. ते आपल्या काठीने इस्राएलच्या न्यायाधीशाच्या
गालावर प्रहार करतील.

## बेथलहेममध्ये मसीहा (तारणारा) जन्म घेईल

[2]बेथलहेम एफ्राथा, तू यहूदातील सर्वात लहान गाव
आहेस. तू इतका लहान आहेस की तुझ्या कुटुंबाची
मोजदाद करणेही अशक्य आहे. पण “इस्राएलचा
राज्यकर्ता” माझ्यासाठी तुझ्यातून येईल. त्याचा प्रारंभ
प्राचीन काळापासून, अनंत काळापासून, झाला आहे.
[3]परमेश्वर, त्याच्या लोकांना, सोडून देईल. स्त्री आपल्या
मुलाला, वचनदत्त राजाला जन्म देईपर्यंत.* मग त्याचे
उरलेले भाऊ इस्राएलच्या लोकांकडे परत येतील.
[4]त्यानंतर इस्राएलचा राज्यकर्ता परमेश्वराच्या
सामर्थ्याने उभा राहील. त्याचा देव परमेश्वर याच्या
विस्मयकारक नांवाल उभा राहील आणि कळपाला
चारील. ते शांतीने राहातील. का? कारण त्या वेळी
परमेश्वराची महानता पृथ्वीच्या टोकापर्यंत पोहोचेल.
[5]मग शांती नांदेल. हो! अश्शूरचे सैन्य आपल्या देशात
येईल. आपल्या भव्य वाड्यांचा ते नाश करतील. पण
इस्राएलचा राज्यकर्ता सात मेंढपाळ आणि आठ नेते
निवडील.
[6]ते आपल्या तलवारीच्या बळावर अश्शूरींवर सत्ता
गाजवतील. निम्रोदच्या भूमीवर, हातात तलवार घेऊन,
राज्य करतील. ते लोकांवर राज्य करण्यासाठी आपल्या
तलवारीचा उपयोग करतील. पण इस्राएलचा राज्यकर्ता,
अश्शूरीपासून आपल्याला वाचवील. ते लोक आमच्या
देशात येतील व आमचे भव्य वाडे पायदळी तुडवतील.
[7]मग पुष्कळ राष्ट्रांमध्ये विखुरलेले याकोबचे वाचलेले
लोक, परमेश्वराकडून पडलेल्या आणि माणसांवर
अवलंबून नसलेल्या दवाप्रमाणे वाटतील. कोणासाठी पण
न थांबणाऱ्या गवतावरच्या सरीप्रमाणे ते असतील.
[8]पुष्कळ राष्ट्रांमध्ये विखुरलेले याकोबचे वाचलेले
लोक, पुष्कळांना, जंगलातील प्राण्यांमधील सिंहाप्रमाणे
वाटतील. मेंढ्यांच्या कळपांत आलेल्या तरुण सिंहाप्रमाणे
ते असतील मेंढ्यांच्या कळपातून जर सिंह गेला, तर तो
त्याला पाहिजे तेथेच जातो. त्याने जर एखाद्या जनावरावर
हल्ला केला तर कोणीही त्या जनावराला वाचवू शकत
नाही. वाचलेले लोक असेच असतील.
[9]तुम्ही तुमच्या शत्रूंवर हात उचलाल आणि त्यांचा
नाश कराल.

## लोक परमेश्वरावर अवलंबून राहतील

[10]परमेश्वर म्हणतो, “त्या वेळी, मी तुमचे घोडे काढून
घेईन. तुमचे रथ नष्ट करीन.
[11]तुमच्या देशातील गावांचा मी नाश करीन. तुमचे सर्व
किल्ले मी पाडून टाकीन.
[12]तुम्ही यापुढे जादूटोणा करण्याचा प्रयत्न करणार
नाही. तुमच्यात यापुढे भविष्य सांगण्याचा प्रयत्न करणारे
नसतील.
[13]मी तुमच्या खोट्या देवाच्या मूर्ती नष्ट करीन. त्या
खोट्या देवांचे स्मारकस्तंभ मी पाडून टाकीन. तुमच्या
हातांनी घडविलेल्या वस्तूंची तुम्ही पूजा करणार नाही.
[14]अशेराच्या पूजास्तंभांचा मी नाश करीन. मी तुमच्या
खोट्या देवांचा नाश करीन.
[15]काही लोक माझे ऐकणार नाहीत. पण मी माझा
क्रोध त्यांच्यावर प्रकट करीन. मी त्यांचे उट्टे काढीन.”

## परमेश्वराची तक्रार

6 परमेश्वर काय म्हणतो, ते आता ऐका. पर्वतांसमोर
तुमची बाजू मांडा. टेकड्यांना तुमची हकिगत
ऐकूद्या.*
[2]परमेश्वराची त्याच्या लोकांविरुध्द तक्रार आहे.
पर्वतांनो, परमेश्वराची तक्रार ऐका! पृथ्वीचे पाये
असलेल्यांनो, परमेश्वराचे ऐका! इस्राएल चूक आहे, हे
तो सिध्द करून दाखवील.
[3]परमेश्वर म्हणतो, “माझ्या माणसांनो, मी काय केले
ते सांगा! मी तुमच्या विरुध्द काही चूक केली का? मी
तुम्हाला जगणे अवघड केले का?
[4]मी केलेल्या गोष्टी मी तुम्हाला सांगणार आहे. मी
मोशे, अहरोन व मिर्यामला तुमच्याकडे पाठविले. मिसर
देशातून मी तुम्हाला आणले. दास्यातून मी तुमची मुक्तता
केली.
[5]माझ्या लोकांनो, मवाबचा राजा बालाक याचे दुष्ट
कट आठवा. बौराचा मुलगा बलाम, बालाकला काय
म्हणाला त्याची आठवण करा. शिट्टीमपासून
गिल्गालपर्यंत* काय घडले त्याचे स्मरण करा. ह्या गोष्टींचे
स्मरण केल्यावर तुमच्या लक्षात येईल की परमेश्वर
बरोबर होता.”

---

**स्त्री ... देईपर्यंत** ह्याचा अर्थ “यरुशलेम (स्त्री) त्रास होईल” आणि मग “नवे यरुशलेमला (मूळ) जन्माला येईल.”

**पर्वतांसमोर ... ऐकूद्या** न्यायालयातील दाण्याप्रमाणे हे आहे पर्वत व टेकड्या म्हणजे जणू न्यायाधीश व पंच आहेत.

**शिट्टीमपासून गिल्गालपर्यंत** ही कथा गण. 22-25 मध्ये आहे.

### परमेश्वराला आपल्याकडून काय पाहिजे

6परमेश्वराला भेटायला येताना मी काय आणले पाहिजे?
स्वर्गातील परमेश्वरापुढे नतमस्तक होताना मी काय
केले पाहिजे? होमार्पणे व एक वर्षाचे वासरू घेऊन मी
परमेश्वरापुढे यावे का?
71,000 मेंढे व 10,000 तेलाच्या नद्या यांनी परमेश्वर
प्रसन्न होईल का? माझ्या पापांची किंमत म्हणून मी
माझे पहिले अपत्य द्यावे का? माझ्या पोटच्या पोराला
माझ्या पापांची किंमत चुकती करण्याकरिता द्यावे का?
8हे माणसा, चांगुलपणा म्हणजे काय हे परमेश्वराने
तुला सांगितले. परमेश्वर तुमच्याकडून पुढील गोष्टींची
अपेक्षा करतो. दुसऱ्यांशी न्यायाने वागा. दया व निष्ठा
ह्यावर प्रेम करा. तुमच्या परमेश्वरापुढे नम्र होऊन
राहा. भेटी देऊन त्याच्यावर छाप पाडण्याचा प्रयत्न करू
नका.

### इस्राएल लोक काय करीत होते?

9परमेश्वराची वाणी नगरात ओरडते. सुज्ञ
परमेश्वराच्या* नामाचा मान राखतात. म्हणून शिक्षेच्या
दंडाकडे आणि ज्याने तो धरला आहे त्याच्याकडे लक्ष
द्या.*
10वाईट माणसे, त्यांनी चोरलेली संपत्ती, अजून लपवितात
का? ज्यांच्या टोपल्या अतिशय लहान आहेत, त्यांना हे
वाईट लोक अजूनही फसवितात का? होय या सर्व गोष्टी
अजूनही होत आहेत.
11जे दुष्ट लोक अजूनही लोकांना फसवण्यासाठी वजन
मापांचा उपयोग करतात त्यांना मी क्षमा करावी का?
चुकीचे माप देणारी वजने असलेली थैली वापरणाऱ्यांना
मी माफ करावे का?
12त्या नगरीतील श्रीमंत अजूनही क्रूर आहेत. तेथील
लोक अजूनही खोटे बोलतात. होय, ते लोक त्यांच्या
लबाड्या सांगतात.
13म्हणून मी तुम्हाला शिक्षा करायला सुरवात केली
आहे. तुम्ही पाप केले म्हणून मी तुमचा नाश करीन.
14तुम्ही खाल, पण तृप्त होणार नाही. तुम्ही भुकेले
आणि रिते राहाल* लोकांना सुरक्षिततेत आणण्याचा
तुम्ही प्रयत्न कराल. पण तुम्ही ज्यांना सोडविले त्यांना
तलवारधारी लोक जीवे मारतील.
15तुम्ही बी पेराल. पण तुम्हाला धान्य मिळणार नाही.
जैतुनांपासून तेल काढण्याचा तुम्ही प्रयत्न कराल, पण
तुम्हाला तेल मिळणार नाही. तुम्ही द्राक्षांचा चुराडा कराल
पण तुम्हाला पुरेसा रस पिण्यास मिळणार नाही.

---

**परमेश्वराच्या** शब्दश: "तुझ्या नाम."

**म्हणून शिक्षेच्या … लक्ष द्या** हिब्रूतील हे वाक्य स्पष्टपणे समजत नाही.

**तुम्ही …राहाल** ह्या ठिकाणचे हिब्रू वाक्य स्पष्टपणे समजतनाही.

16का? कारण तुम्ही अम्रीचे नियम पाळता. अहाबचे
घराणे करते त्या सर्व वाईट गोष्टी तुम्ही करता. तुम्ही
त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे वागता. म्हणून मी तुमचा नाश
होऊ देईन. तुमची नष्ट झालेली नगरी पाहून लोक
विस्मयोदगार काढतील. माझे लाजिरवाणे लोक कैदी
म्हणून नेले जातील* इतर राष्ट्रे तुम्हाला लाजिरवाणे
करतील. ती लाज तुम्हाला बाळगावी लागेल.

### लोकांच्या दुष्कृत्यांमुळे मीखा अस्वस्थ झाला आहे

7 मी अस्वस्थ झालो आहे कारण माझी स्थिती गोळा
केलेल्या फळासारखी आणि अगोदरच द्राक्षे
तोडल्यामुळे खाण्यासाठी द्राक्षे शिल्लक नाहीत तशी
झाली आहे. खाण्यासाठी द्राक्षे शिल्लक नाहीत. मला
आवडणारी पहिल्या बहराची अंजिरे अजिबात नाहीत.
2ह्याचाच अर्थ, सर्व प्रामाणिक लोक गेलेत. ह्या देशात
चांगले लोक उरले नाहीत. प्रत्येकजण कोणाला तरी ठार
मारण्यासाठी टपला आहे. प्रत्येकजण आपल्या भावाला
सापळ्यात अडकविण्याच्या प्रयत्नात आहे.
3लोक दोन्ही दोन्ही हातांनी दुष्कृत्ये करण्यात पटाईत
आहेत. अधिकारी लाच मागतात. न्यायालयातील निकाल
बदलण्यासाठी न्यायाधीश पैसे घेतात. "मोठे नेते" चांगले
आणि न्याय निर्णय घेत नाहीत. ते मनात येईल ते
करतात.
4त्यांच्यातील अतिशय चांगलाही काटेरी झुडुपाप्रमाणे
आहे. ते गुंतागुंत असलेल्या कोटेरी झुडुपापेक्षा वाकडा
(कपटी) आहे.

### शिक्षेचा दिवस येत आहे

हा दिवस येईल असे तुमच्या संदेष्ट्यांनी सांगितले होते.
तो तुमच्या पहारेकऱ्यांनी सांगितलेला दिवस आला आहे.
आता तुम्हाला शिक्षा होईल. तुमचा गोंधळ उडेल.
5तुमच्या शेजाऱ्यांवर विश्वास ठेवू नका. मित्रावरही
विश्वासून राहू नका. तुमच्या पत्नीशीसुध्दा मनमोकळे
बोलू नका.
6स्वत:च्या घरातील माणसेच वैरी होतील. मुलगा
वडिलांना मान देणार नाही. मुलगी आईविरुध्द जाईल.
सून सासूच्या विरोधात जाईल.

### परमेश्वर रक्षणकर्ता आहे

7म्हणून मी मदतीसाठी परमेश्वराकडे पाहतो.
परमेश्वराने माझे रक्षण करावे म्हणून मी वाट पाहतो.
माझा परमेश्वर माझे ऐकेल.
8मी पडलो आहे. पण शत्रूंनो, मला हसू नका. मी पुन्हा
उठेन. आता मी अंधारात बसतोय पण परमेश्वरच माझा
प्रकाश होईल.

---

**माझे …जातील** किंवा माझ्या लोकांचा अपमान दूर केलाजाईल.

## परमेश्वर क्षमा करतो

9मी परमेश्वराविरुध्द पाप केले. म्हणून तो माझ्यावर
रागावला. पण न्यायालयात तो माझ्यासाठी माझ्या दाव्यात
वाद घालेल. माझ्यासाठी योग्य गोष्टी तो करील. मग तो
मला बाहेर उजेडात आणील. मग मला त्याचे बरोबर
आहे हे कळेल.
10माझा शत्रू मला म्हणाला: "तुझा देव परमेश्वर
कोठे आहे?" पण माझा शत्रू ही पाहील आणि तो
लज्जित होईल. त्यावेळी मी तिला हसेन.* रस्त्यातील
चिखलावरून चालावे. तसे लोक त्याला तुडवीत
चालतील.

## यहूद्यांचे परत येणे

11तुमचे तट परत बांधण्याची वेळ येईल. त्या वेळेला,
देशाचा विस्तार होईल.
12तुमचे लोक तुमच्या देशात परत येतील. ते अश्शूर
आणि मिसरमधील गावे येथून परततील. ते मिसरमधून
व फरात नदीच्या पैलतीरावरून येतील. पश्चिमेकडच्या
समुद्राकडून आणि पूर्वेच्या पर्वतांतून ते येतील.
13देशात राहणाऱ्या लोकांमुळे व त्यांच्या कृत्यांमुळे
देशाचा नाश झाला आहे.
14म्हणून तुझ्या दंडाने लोकांवर राज्य कर. तुझ्या
मालकीच्या लोकांच्या समुदायावर राज्य कर. तो लोकांचा
समुदाय एकटाच रानात आणि कर्मेल पर्वतावर राहतो.
पूर्वीप्रमाणेच तो बाशान व गिलाद यांच्यामध्ये रातो.

## इस्राएल त्याच्या शत्रूचा पाडाव करील

15तुम्हाला मिसरमधून बाहेर आणताना मी खूप चमत्कार
केले. त्यांच्यासारखे आणखी चमत्कार मी तुम्हाला
दाखवीन.
16राष्ट्रे ते चमत्कार पाहून लज्जित होतील. माझ्या
तुलनेत त्यांची "शक्ती" काहीच नाही, हे त्यांना दिसेल. ते
विस्मयचकित होतील आणि आश्चर्याने तोंडावर हात
ठेवतील. कान झाकून घेऊन ते ऐकण्याचे नाकारतील.
17ते सापाप्रमाणे मातीत सरपटतील. भीतीने थरथर
कापतील. जमिनीत राहणाऱ्या किड्यांप्रमाणे आपल्या
बिळातून प्रभूकडे, आपल्या परमेश्वराकडे, यायला
लागतील. हे परमेश्वरा, ते तुला घाबरतील आणि मान
देतील.

## परमेश्वराची स्तुती

18परमेश्वरा तुझ्यासारखा दुसरा देव नाही. पापी
लोकांनाही तू क्षमा करतोस. तुझ्या वाचलेल्या लोकांनाही
तू क्षमा करतोस. परमेश्वर अनंतकाळ क्रोधाविष्ट
राहणारा नाही. का? कारण त्याला दयाळू व्हायला आवडते.
19तो परत येईल व आमचे सांत्वन करील. तो आमच्या
पापांचा चुराडा करील आणि आमची पापे खोल समुद्रात
फेकून देईल.
20हे देवा, याकोबशी प्रामाणिक राहा. अब्राहामबद्दल
तुला असलेले खरे प्रेम दाखव. फार पूर्वी तू आमच्या
पूर्वजांना दिलेले वचन पाळ

---

**मी त्याला हसेन** शब्दश: "मी तिच्याकडे पाहिले?"

# नहूम

1 हे पुस्तक म्हणजे एल्कोश येथील नहूमला झालेला
दृष्टान्त आहे. निनवे* या शहरा बद्दलचा हा शोकसंदेश
आहे.

## परमेश्वर निनवेवर रागावला आहे

2परमेश्वर हा ईर्ष्यावान देव आहे परमेश्वर
अपराध्यांना शिक्षा करतो परमेश्वर अपराध्यांना शिक्षा
करतो आणि तो खूप रागावतो परमेश्वर त्याच्या
शत्रूंना शिक्षा करतो. तो त्याच्या शत्रूंवर रागावलेला
असतो.
3परमेश्वर जसा सहनशील आहे, तसाच सामर्थ्यवान
आहे परमेश्वर अपराधी लोकांना शिक्षा करील.
त्यांना मोकळे सोडणार नाही परमेश्वर वाईट
माणसांना शिक्षा करण्यासाठी येत आहे झंझावात आणि
वादळ यांच्याद्वारे तो आपली शक्ती दाखवील माणूस
जमिनीवर धुळीतून चालतो, तर परमेश्वर ढगांवरून
चालतो.
4परमेश्वर समुद्राला कठोरपणे बोलेल आणि समुद्र
आटेल तो सर्व नद्या कोरड्या पाडेल बाशान व कर्मेल
येथील समृध्द प्रदेश सुकून नष्ट होईल लबानोनमधील
फुले कोमेजतील.
5परमेश्वर येईल तेव्हा पर्वतांचा भीतीने थरकाप होईल
टेकड्या वितळून जातील परमेश्वर येईल तेव्हा धरणी
भयभीत होऊन थरथर कापेल. एवढेच नाही तर, हे जग
आणि त्यातील प्रत्येक माणूस भीतीने कापेल.
6परमेश्वराच्या भयंकर क्रोधाला कोणीही तोंड देऊ
शकणार नाही त्याचा भयानक राग कोणीही सहन करू
शकणार नाही त्याचा क्रोध अग्नीप्रमाणे धगधगणारा असेल.
तो येताच खडक हादरतील.
7परमेश्वर फार चांगला आहे. संकटसमयी तो सुरक्षित
आश्रयस्थान आहे त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांची तो
काळजी घेतो.
8पण त्याच्या शत्रूंचा तो पूर्णपणे नाश करील पुराच्या
लोंढ्याप्रमाणे परमेश्वर त्यांना धुवून टाकील अंधारातून
तो त्याच्या शत्रूंचा पाठलाग करील.

**निनवे** अश्शूरची राजधानी. अश्शूरने इस्राएलचा, ख्रि. पू 722–721 मध्ये नाश केला हे नहूमच्या दृष्टान्ताचे पुस्तक आहे. नहूम एल्कोशचा रहिवासी होता.

9यहूदा, तू परमेश्वराविरुध्द कट का रचत आहेस?
पण परमेश्वर संपूर्ण विनाश करणार आहे. त्यामुळे तू
पुन्हा त्रास देणार नाहीस.
10भांड्याखाली जळणाऱ्या काटेरी झुडपाप्रमाणे तुझा
संपूर्ण नाश होईल सुक्या काटक्या जशा चटकन् जळून
जातात, तसा तुझा पटकन् नाश होईल.
11अश्शूर, तुझ्याकडून एक माणूस आला. त्याने
परमेश्वराविरुध्द कट रचला. त्याने वाईट सल्ला दिला.
12परमेश्वराने यहूदाला पुढील गोष्टी सांगितल्या
"अश्शूरचे लोक चांगले बलवान आहेत. त्यांच्यापाशी
मोठे सैन्य आहे." पण ते मारले जातील. त्यांचा अंत होईल
माझ्या लोकांनो, मी तुम्हाला त्रास दिला पण यापुढे, कधीही
मी तुम्हाला त्रास देणार नाही.
13आता मी तुमची अश्शूरच्या सत्तेपासून मुक्तता करीन
मी तुमच्या मानेवरचे जोखड काढून घेईन तुम्हाला
बांधणाऱ्या साखळ्या मी तोडून टाकीन."
14अश्शूरचा राजा, परमेश्वर तुझ्याबद्दल पुढील आज्ञा
देतो: "तुझे नाव लावायला तुझ्या वंशातील कोणीही उरणार
नाही. तुझ्या दैवतांच्या देवळातील कोरलेल्या मूर्ती व धातूचे
पुतळे यांचा मी नाश करीन मी तुझे थडगे तयार करत
आहे. कारण तुझा विनाश लवकरच ओढवणार आहे.
15यहूदा, पाहा! पर्वतांवरून कोण येत आहे, ते पाहा!
शुभवार्ता घेऊन दूत येत आहे तो म्हणतो की तेथे शांतता
आहे यहूदा, तुझे खास सण साजरे कर तू ज्या गोष्टी
करण्याचे वचन दिले आहेस, त्या गोष्टी कर दुष्ट तुझ्यावर
पुन्हा हल्ला करुन, तुझा पराभव करणार नाहीत त्या सर्व
दुष्टांचा नाश झाला आहे.

## निनवेचा नाश होईल

2 तुझ्यावर हल्ला करण्यासाठी शत्रू येत आहे तेव्हा,
तुझ्या शहरातील भक्कम जागांचे रक्षण कर. रस्त्यांवर
नजर ठेव. युध्दाला सज्ज हो! लढाईची तयारी कर!
2परमेश्वर इस्राएलच्या वैभवाप्रमाणेच याकोबलाही पुन्हा
वैभव प्राप्त करून देईल इस्राएलच्या ऐश्वर्याप्रमाणेच
याकोबचे ऐश्वर्य होईल शत्रूने त्यांचा नाश केला आणि
त्यांचे द्राक्षमळे उद्ध्वस्त केले.
3त्या सैनिकांच्या ढाली लाल आहेत त्यांचा पोशाख
लालभडक आहे लढण्यासाठी सज्ज होऊन उभे राहिलेले

त्यांचे रथ अग्नीच्या ज्वाळेप्रमाणे चमकताना दिसत आहेत
त्यांचे घोडे सरसावलेले आहेत.
4रथ रस्त्यांतून मोकाटपणे धावत आहेत चौकांमधून ते
पुढे–मागे कसेही पळत आहेत ते जळत्या मशालीप्रमाणे
किंवा ठिकठिकाणी तळपणाऱ्या विजेप्रमाणे दिसत आहेत.
5अश्शूरचा राजा त्याच्या सर्वोत्तम सैनिकांना बोलवत
आहे पण ते वाटेतच अडखळून पडत आहेत ते तटबंदीचे
रक्षण करण्यासाठी धाव घेत आहेत ते संरक्षक दरवाजे
खाली ओढून लावून घेत आहेत.
6पण नदीकाठची दारे उघडीच आहेत तेथून शत्रू
पुरासारखा आत शिरतो आणि राजवाड्याचा नाश करतो.
7शत्रू राणीला पकडून घेऊन जातात आणि तिच्या दासी
दु:खाने, पारव्याप्रमाणे विव्हळतात त्या छाती पिटून दु:ख
व्यक्त करतात.
8निनवे एक अशा तळ्यासारखे आले आहे, ज्याच्यातील
पाणी वाहून जात आहे लोक किंचाळतात, “थांबा! थांबा
पळून जाऊ नका!” पण त्याचा काहीही उपयोग होत
नाही.
9निनवेचा नाश करणाऱ्या सैनिकांनो, चांदी सोने लुटा
तेथे लुटण्यासारखे पुष्कळ आहे. खूप संपत्ती आहे.
10आता निनवे ओसाड झाले आहे सर्व चोरीला गेले
आहे. शहर उद्ध्वस्त झाले आहे लोकांचे धैर्य खचले
आहे भीतीने हृदयाचे पाणी पाणी होत आहे पाय लटपटत
आहेत, शरीरांचा थरकाप होत आहे, चेहेरे पांढरेफटक
पडले आहेत.
11कोठे आहे ती सिंहाची गुहा (निनवे)? सिंह–सिंहिणी
तेथे राहात होत्या. त्यांचे छावे निडर होते.
12त्यांच्या छाव्यांना आणि सिंहिणींना तृप्त करण्यासाठी
सिंहाने (निनवेच्या राजाने) खूप लोकांना मारले त्याची
गुहा (निनवे) मानवी शरीरांनी भरली त्याने मारलेल्या
स्त्रियांनी त्याची गुहा भरली.
13सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “निनवे, मी
तुझ्याविरुध्द आहे मी तुझे रथ जाळून टाकीन लढाईत मी
तुझ्या ‘छाव्यांना’ ठार मारीन तू पुन्हा पृथ्वीवर कोणाचीही
शिकार करणार नाहीस तुझ्या दूतांकडून पुन्हा कधीही
लोकांना वाईट बातमी ऐकावी लागणार नाही.”

## निनवेसाठी वाईट बातमी

3 खुन्यांच्या गावाचे वाईट होईल. निनवे खोट्यानाट्यांनी
भरलेले आहे दुसऱ्या देशांतून लुटलेल्या गोष्टींनी ते
भरले आहे ते शहर ठार मारणे आणि लुटणे या गोष्टी
कधीच थांबवत नाही.
2चाबकांच्या फटकाऱ्यांचे चाकांच्या खडखडाटाचे,
घोड्यांच्या टापांचे आणि रथांच्या घडघडाटाचे आवाज
तुम्ही ऐकू शकता.
3घोडदळ हल्ला करीत आहे. त्यांच्या तलवारी तळपत
आहेत भाले चमकत आहेत. खूप माणसे मेली आहेत.
प्रेतांचे ढीग लागलेत इतकी माणसे मेली आहेत की त्यांची
गणना करणे कठीण आहे लोक प्रेतांना अडखळून पडत
आहेत.
4हे सर्व निनवेमुळे झाले निनवे, अतिशय हाव असलेल्या
वेश्येप्रमाणे आहे. तिला आणखी हवे होते तिने स्वत:ला
पुष्कळ राष्ट्रांना विकले आणि आपल्या जादूने त्यांना
गुलाम बनविले.
5सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, “निनवे, मी
तुझ्याविरुध्द आहे मी तुझी वस्त्रे तोंडापर्यंत वर खेचीन*.
मी तुझे नग्न शरीर राष्ट्रांना पाहू देईन ती राज्ये तुझी
बेअब्रू झालेली पाहतील.
6मी तुझ्यावर चिखल फेक करीन मी तुला तिरस्कार
पूर्वक वागवीन लोक तुझ्याकडे पाहून हसतील.
7तुला पाहून प्रत्येकाला धक्का बसेल ते म्हणतील,
‘निनवेचा नाश झाला तिच्यासाठी कोण रडणार?’ निनवे,
तुझे सांत्वन करणारा कोणीही मला भेटणार नाही हे मला
माहीत आहे.”

8निनवे, तू नील नदीकाठच्या थेब्जपेक्षा
(नो–आमोनपेक्षा) चांगली आहेस का? नाही थेब्जच्या
सभोवती पाणी होते शत्रूंपासून रक्षण करण्यासाठी त्याचा
उपयोग होई ती पाण्याचा उपयोग भिंतीप्रमाणेही करी. 9कूश
व मिसर यांनी तिला खूप बळ दिले पूट व लूब ह्यांनी तिला
मदत केली. 10तरी थेब्जचा पराभव झाला तिच्या लोकांना
कैद करून परदेशात नेले गेले. रस्त्याच्या प्रत्येक चौकात
तिच्या लहान मुलांना सैनिकांनी मरेपर्यत मारले. प्रतिष्ठित
लोकांना, गुलाम म्हणून कोणी ठेवायचे, हे ठरविण्यासाठी
सैनिकांनी चिठ्या टाकल्या त्यांनी थेब्जच्या प्रतिष्ठितांना
बेड्या ठोकल्या.
11तेव्हा निनवे, तु सुध्दा दारुड्याप्रमाणे पडशील. तू
लपायचा प्रयत्न करशील. शत्रूपासून बचाव करण्यासाठी
सुरक्षित जागा तू शोधशील. 12पण, निनवे, तुझ्या सर्व
मजबूत जागा अंजिराच्या झाडांप्रमाणे होतील अंजिरे
पिकताच, कोणीही येऊन झाड हलविते आणि अंजिरे
त्याच्या तोंडात पडतात. तो ती खातो आणि निघून जातो.
13निनवे, तुझे सर्व लोक स्त्रियांप्रमाणे आहेत. आणि
शत्रूसैनिक त्यांना नेण्यासाठी टपले आहेत. तुझ्या देशाची
दारे, शत्रूंसाठी, सताड उघडली आहेत. दारांचे लाकडी
अडसर आगीत जळले आहेत.
14पाणी आणून साठवून ठेव. का? कारण शत्रूसैन्य
शहराला घेराव घालणार आहे. ते कोणालाही अन्न–पाणी
आत नेऊ देणार नाहीत. तुझ्या बचावाच्या जागा भक्कम
कर. विटा तयार करण्यासाठी माती मिळव. चुना कालव!

---

**मी तुझी वस्त्रे … खेचीन** येथे शब्दांचा खेळ आहे. हिब्रूत ह्या शब्दांचा ‘देशाचा नाश करून, तेथील लोकांना कैद करुन आपल्या राष्ट्रात नेणे’ असाही अर्थ होतो.

विटा बनविण्याचे साचे मिळव! [15]तू हे सर्व करु शकशील, पण आग तुझा संपूर्ण नाश करील. तलवार तुला कापून काढील. तुझा देश, येऊन सर्व फस्त करणाऱ्या टोळधाडीप्रमाणे दिसेल.

निनवे, तुझा विस्तार वाढत राहिला. तू टोळधाडीप्रमाणे झालीस. तू कुसरुडांच्या थव्याप्रमाणे झालीस. [16]तुझ्याकडे, निरनिराळ्या ठिकाणी जाऊन, वस्तू विकत आणणारे, पुष्कळ व्यापारी आहेत. आकाशात जेवढ्या चांदण्या आहेत तेवढे ते आहेत. ते टोळासारखे सर्व फस्त करुन निघून जाणारे आहेत. [17]तुझे सरकारी अधिकारीही असेच आहेत. टोळ थंड वेळी दगडी भिंतीवर बसतात. पण ऊन तापताच, भिंत गरम होते, तेव्हा ते दूर उडून जातात व कोठे जातात, ते कोणालाच माहीत नसते. तुझे अधिकारी अगदी असेच असतील.

[18]अश्शूराच्या राजा आणि तुझे मेंढपाळ (नेते) गाढ झोपले आहेत. ते सत्ताधारी लोक डुलक्या घेत आहेत. त्यामुळे तुझ्या मेंढ्या पर्वतांत भटकल्या आहेत. त्यांना परत आणायला कोणीही नाही. [19]निनवे, तुला खूप मार लागला आणि तुझी जखम कशानेही भरून येऊ शकत नाही. तुझ्या नाशाची बातमी ऐकताच प्रत्येकजण टाव्व्या वाजवितो सर्वांनाच त्यामुळे आनंद वाटतो. का? कारण तू त्यांना नेहमी ज्या यातना दिल्यास, त्या ते विसरले नाहीत.

# हबक्कूक

### हबक्कूकची देवाकडे तक्रार

1 संदेष्टा हबक्कूकला दिलेला संदेश असा आहे:
2परमेश्वरा, मी मदतीसाठी सतत आळवणी करीत
आहे. माझ्या हाकेला तू ओ कधी देणार? हिंसाचाराबद्दल
मी किती आरडाओरड केली पण तू काहीच केले नाहीस.
3लोक चोऱ्या करीत आहेत, दुसऱ्यांना दुखवीत आहेत,
वादविवाद करीत आहेत आणि भांडत आहेत. अशा भयंकर
गोष्टी तू मला का पाहायला लावीत आहेस? 4कायदा
दुबळा झाला असल्याने, लोकांना योग्य न्याय मिळत नाही.
दुष्ट सज्जनांवर विजय मिळवितात. म्हणजेच कायदा न्याय
राहिलेला नाही. न्यायाचा जय होत नाही.

### देवाचे हबक्कूकला उत्तर

5परमेश्वर म्हणाला, “इतर राष्ट्रांकडे पाहा! त्यांच्यावर
लक्ष ठेव. मग तू विस्मयचकित होशील. मी अशा काही
गोष्टी घडवून आणीन की तुझ्या आश्चर्याला पारावार
राहणार नाही. ते सर्व पाहिल्यावरच तुझा विश्वास बसेल.
नुसते सांगून तुला ते खरे वाटणार नाही. 6मी बाबेलला
एक बलिष्ठ राष्ट्र बनवीन, तेथील लोक क्षुद्र वृत्तीचे पण
समर्थ आणि दुष्ट लढवय्ये आहेत. ते सर्व जग पायाखाली
घालतील. त्यांच्या मालकीची नसलेली घरे व गावे, ते
स्वत:च्या ताब्यात घेतील. 7खास्दी लोक इतरांना
घाबरवतील. ते त्यांना पाहिजे ते करतील आणि पाहिजे
तेथे जातील. 8त्यांचे घोडे चित्यांपेक्षा चपळ आणि सूर्यास्ताच्या
वेळच्या लांडग्यांपेक्षा वाईट वृत्तीचे असतील. त्यांचे घोडेस्वार
दूरदूरच्या ठिकाणाहून येतील. भुकेला गरुड ज्याप्रमाणे
आकाशातून एकदम झडप घालतो, त्याप्रमाणेच ते शत्रूंवर
हल्ला करतील. 9खास्द्यांना एकच गोष्ट करायला आवडते
आणि ती म्हणजे लढाई. वाळवंटातील वाऱ्याप्रमाणे बाबेलचे
सैन्य वेगाने कूच करील. वाळूच्या अगणित कणांप्रमाणे,
असंख्य कैद्यांना खास्दी सैनिक धरून नेतील.

10“ते सैनिक इतर राष्ट्रांच्या राजांना हसतील. परदेशी
राज्यकर्ते त्यांच्या दृष्टीने चेष्टेचा विषय असेल. उंच व
भक्कम तटबंदी असलेल्या गावांची ते टर उडवतील. ते
तटाच्या भिंतीच्या टोकापर्यंत मातीचे साधे रस्ते बांधून
सहजगत्या गावांचा पाडाव करतील.

11मग ते वाऱ्याप्रमाणे निघून जातील व दुसरीकडे
लढतील. ते खास्दी त्यांच्या सामर्थ्यालाच फक्त भजतात.”

### हबक्कूकची दुसरी तक्रार

12त्यानंतर हबक्कूक म्हणाला, “परमेश्वरा, तू सनातन
परमेश्वर आहेस तू माझा कधीही न मरणारा पवित्र, देव
आहेस परमेश्वरा, जे केलेच पाहिजे, ते करण्यासाठीच तू
खास्द्यांना निर्मिले आहेस आमच्या खडका, यहूद्यांच्या
लोकांना शिक्षा करण्यासाठी तू त्यांना निर्मिले आहेस.

13तुझे डोळे इतके शुध्द आहेत की त्यांचा दुष्टपणा
पाहवत नाही. लोकांचे चुकीचे वागणे तू पाहू शकत
नाहीस. मग त्या दुष्टांचा विजय तू कसा पाहू शकतोस?
सज्जनांचा दुर्जन पराभव करतात तेव्हा तू प्रतिकार का
करत नाहीस?

14“तू लोकांना समुद्रातल्या माशांप्रमाणे केले आहेस
कोणीही प्रमुख नसलेल्या समुद्रातील लहान जीवांप्रमाणे
लोक आहेत.

15शत्रू त्यांना गळाच्या आणि जाळ्याच्या साहाय्याने
पकडतो तो त्यांना आत ओढतो. आपण पकडलेल्या
सावजावर, शत्रू खूष असतो.

16त्याचे जाळे त्याला, श्रीमंत म्हणून जगायला व उत्तम
अन्नाच्या चवीचे सुख मिळवायला मदत करते. म्हणून
शत्रू जाळ्यांची आराधना करतो. त्याच्या जाळ्याचा मान
राखण्यासाठी तो यज्ञ अर्पण करतो आणि धूप जाळतो.

17त्याच्या जाळ्याच्या मदतीने तो संपत्ती घेतच राहणार
का? कोणतीही दया न दाखविता, तो लोकांचा नाश
करीतच राहणार का?

2 “मी रखवालदारासारखा उभा राहून लक्ष ठेवीन
परमेश्वर मला काय सांगतो, त्याची मी वाट पाहीन
मी वाट पाहीन आणि तो माझ्या प्रश्नाला कसे उत्तर देतो
ते बघीन.”

### देवाचे हबक्कूकला उत्तर

2परमेश्वर मला म्हणाला, “मी तुला जे दाखवितो, ते
लिहून ठेव लोकांना सहज वाचता यावे, म्हणून पाटीवर
स्पष्ट लिही. 3हा संदेश भविष्यातील विशिष्ट काळासाठी
आहे. हा अंताबद्दलचा संदेश आहे आणि तो खरा ठरेल
ती वेळ कदाचित कधीच येणार नाही असे वाटेल, पण
धीर धरा आणि वाट पाहा! ती वेळ येईल ती येण्यास फार
विलंब लागणार नाही. 4जे लोक हा संदेश ऐकण्याचे
नाकारतील, त्यांना त्याचा फायदा होऊ शकणार नाही.

पण सज्जन माणूस ह्या संदेशावर विश्वास ठेवील. आणि
तो त्याच्या श्रध्देमुळे जगे"
5देव म्हणाला, "मद्य माणसाला दगा देऊ शकते.
त्याचप्रमाणे बलवान माणसाचा गर्व त्याला मूर्ख बनवू
शकतो. पण त्याला शांती मिळणार नाही. तो मृत्यूसारखा
असतो त्याची आसक्ती वाढतच राहाते. आणि मृत्यूप्रमाणेच,
त्याला कधीही समाधान मिळत नाही. तो इतर राष्ट्रांचा
पराभव करीतच राहील. त्या राष्ट्रांतील लोकांना तो कैद
करीतच राहील. 6पण लवकरच तो सर्व लोकांच्या चेष्टेचा
विषय होईल. ते त्याच्या पराभवाच्या कथा सांगतील. ते
हसून म्हणतील, 'फारच वाईट झाले बुवा! त्या माणसाने
खूप गोष्टी चोरल्या. त्याच्या मालकीच्या नसलेल्या गोष्टी
त्याने उचलल्या. पण त्यांचेच आता त्याला ओझे होईल.
त्याने कर्ज काढून स्वत:ला श्रीमंत बनवले.
7"तू (बलवान माणसाने) लोकांकडून पैसा घेतलास.
कधी ना कधी त्या लोकांना जाग येईल व काय झाले ते
समजेल. मग ते तुझ्या विरुध्द उभे राहतील. तुझ्याकडून
वस्तू घेतील व तू भयभीत होशील. 8तू पुष्कळ राष्ट्रांतून
बऱ्याच गोष्टी चोरल्यास. ते लोक तुझ्याकडून त्यांची
वसुली करतील. तू पुष्कळ लोकांना ठार मारलेस, देश
व गावे यांचा नाश केलास. त्या देशांतील व गावांतील
लोकांना मारलेस. 9हो! खरेच! चुकीच्या मार्गाने श्रीमंत
होणाऱ्या माणसाचे भले होणार नाही. हा माणूस सुरक्षित
जागी राहायला मिळावे, म्हणून अशा गोष्टी करतो. त्याच्या
उंच इमारतीमुळे तो वाचू शकेल असे त्याला वाटते. पण
त्याचे वाईट होईल.
10"तू (बलवान माणसाने) खूप माणसांचा नाश करण्याचा
कट रचला आहेस त्यामुळे तुझ्याच माणसांना मान खाली
घालावी लागेल. तू वाईट गोष्टी केल्या आहेत आणि तुझे
आयुष्य तू गमावशील. 11भिंतींतील दगडसुध्दा तुझ्याविरुध्द
ओरडतील तुझ्याच घराचे वासे त्यांना साथ देतील. कारण
तू चुकतोस हे त्यांना पटेल.
12"गाव वसविण्यासाठी लोकांना ठार मारून नेत्यांनी
पाप केले, ते त्यांच्यासाठी वाईट आहे. 13त्या लोकांनी
उभारलेले सर्व आगीत भस्मसात करावयाचे सर्वशक्तिमान
परमेश्वराने ठरविले आहे. त्यांच्या कामाचा काहीही
उपयोग होणार नाही. 14मग मात्र सर्वच लोकांना
परमेश्वराचे वैभवाने (गौरवाने) कळेल. समुद्राच्या
पसरणाऱ्या पाण्याप्रमाणे ही वार्ता सगळीकडे पसरेल. 15जी
व्यक्ति रागावते व इतर लोकांना सहन करायला लावते
तिचे खूप वाईट होईल. रागाने ती व्यक्ति इतरांना जमीनवर
जोरात आपटते. व त्यांना नग्न व दारूडे असल्याप्रमाणे
वागावते.
16"पण त्या माणसाला परमेश्वराचा राग काय असतो
ते कळेल. तो राग म्हणजे परमेश्वराच्या उजव्या हातातील
जणू विषाचा प्याला आहे. त्याची चव घेताच, तो माणूस,
मद्यप्याप्रमाणे, जमिनीवर कोसळून पडेल.
"दुष्ट राजा, तू त्या प्याल्यातील विष पिशील. तुला मान
तर मिळणार नाहीच, पण तुला लाज प्राप्त होईल. 17तू
लबानोनमधील पुष्कळांना दुखविलेस. तेथील पुष्कळ गुरे
तू चोरलीस. म्हणून त्या मृत माणसांची आणि तू तेथे
केलेल्या दुष्कर्मांची तुला भीती वाटेल. तेथील गावांत तू
वाईट कृत्ये केलीस आणि तेथील रहिवाशांशी तू वाईट
वागलास त्यामुळे तू भयभीत होशील."

## मूर्ती विषयी संदेश

18त्या माणसाचे दैवत त्याला मदत करणार नाही. का?
कारण तो देव म्हणजे काही लोकांनी धातूत कोरलेला
एक पुतळा आहे. ती फक्त एक मूर्ती आहे. तेव्हा
घडविणाऱ्याने तिच्याकडून मदतीची अपेक्षा करु नये. तो
पुतळा बोलसुध्दा शकत नाही. 19जो माणूस लाकडी
पुतळ्याला 'ऊठ उभा राहा' असे म्हणतो किंवा दगडाला
'जागा हो' असे सांगतो, त्याचे वाईट होईल, ह्या गोष्टी
त्याला मदत करु शकणार नाहीत. तो पुतळा कदाचित्
सोन्या–चांदीने मढविलेला असेल, पण त्यात प्राण नाही.
20पण परमेश्वर वेगळा आहे. परमेश्वर त्याच्या पवित्र
मंदिरात आहे. म्हणूनच सर्व पृथ्वीवर शांतता असावी व
सर्वांनीच परमेश्वराचा मान राखावा.

## हबक्कूकची प्रार्थना

3 ही संदेष्टा हबक्कूकची शिगयोनोथ प्रार्थना आहे
2परमेश्वरा, मी तुझी वार्ता ऐकली. परमेश्वर तू
भूतकाळात केलेल्या सामर्थ्यशाली गोष्टीने मी
विस्मयचकित झालो आहे. आता, आमच्या काळातही तू
अशाच मोठ्या गोष्टी घडवाव्यास म्हणून मी प्रार्थना करतो.
कृपया आमच्या आयुष्यातच त्या घडव. पण तुझ्या
खळबळजनक घटनांच्या वेळीही, आमच्यावर दया
करण्यास विसरु नकोस.
3तेमानहून देव येत आहे. पारान पर्वतावरुन पवित्र
परमेश्वर येत आहे. परमेश्वराच्या तेजाने स्वर्ग व्यापला
जातो आणि स्तुतीने पृथ्वी व्यापली जाते.
4ते तेज तेजस्वी, चमकदार प्रकाशाप्रमाणे आहे त्याच्या
हातातून किरण निघतात. त्या हातात मोठे सामर्थ्य लपले
आहे.
5आजार त्याच्या आधी गेला. आणि नाश करणारा
त्याच्यामागून गेला.
6परमेश्वराने स्वत: उभे राहून, पृथ्वीला न्याय दिला
त्याने राष्ट्रांतील लोकांवर नजर टाकली आणि त्या
लोकांचा भीतीने थरकाप झाला. पुष्कळ वर्षे पर्वत घट्टपणे
उभे होते पण त्यांचा चक्काचूर झाला. अती प्राचीन टेकड्या
खाली कोसळल्या देवाचे नेहमीच हे असे असते.
7कूशानची गावे संकटात असलेली मी पाहिली. मिद्यानची
घरे भीतीने कापली

8परमेश्वरा, तू नद्यांवर रागावला होतास का? झऱ्यांवर
तुझा राग होता का? समुद्रावर तू संतापला होतास का?
विजयासाठी तुझ्या घोड्यांवर स्वार होताना किंवा रथांवर
आरुढ होताना तू रागावला होतास का?
9त्या वेळीसुध्दा तू इंद्रधनुष्य दाखविलेस. पृथ्वीवरच्या
वंशाबरोबर तू केलेल्या कराराचा तो पुरावा होता रुक्ष
भूमीतून नद्या उगम पावल्या.
10तुला पाहून पर्वत कापले भूमीतून पाणी उसळले.
समुद्राच्या पाण्याने प्रचंड गर्जना केली. जणू काही त्याने
आपली भूमीवरील सत्ता गमावल्यामुळे ते आकांत करीत
होते.
11चंद्र-सूर्याचे तेज लोपले. तुझ्या विजांचा तेजस्वी
लखलखाट पाहून त्यांनी चमकणे सोडून दिले त्या विजा
म्हणजे जणू काही हवेत फेकलेले बाण व भाले होते.
12रागाच्या भरात, तू पृथ्वी पायाखाली तुडविलीस आणि
राष्ट्रांना शिक्षा केलीस.
13तू, तुझ्या माणसांच्या, रक्षणासाठी आलास. तू
निवडलेल्या राजाला, विजयाकडे नेण्यासाठी आलास.
रंकापासून रावापर्यंतच्या, प्रत्येक दुष्ट घरातील प्रमुखाला
तू ठार मारलेस. सेला
14शत्रू-सैनिकांना थोपविण्यासाठी तू मोशेच्या काठीचा
उपयोग केलास. ते सैनिक, प्रचंड वादळाप्रमाणे, आमच्यावर
हल्ला करण्यासाठी आले. गरीब माणसाला एकांतात
लुटावे, तसा सहज आमचा पाडाव करता येईल असे
त्यांना वाटले.
15पण तू तुझ्या घोड्यांना समुद्रातून कूच करायला
लावलेस त्यामुळे समुद्र घुसळला गेला.
16ही गोष्ट ऐकताच, मला कंप सुटला. मी मोठ्याने
किंचाळलो मी अतिशय दुर्बल झाल्याचे मला जाणवले.
मी जागच्या जागी नुसताच थरथर कापत उभा राहिलो.
म्हणून मी धीराने नाशाच्या दिवसाची वाट पाहीन शत्रू
आमच्यावर हल्ला करील.

## परमेश्वरामध्ये नेहमी आनंद करा

17कदाचित् अंजिराच्या झाडांना अंजिरे लागणार नाहीत.
वेलींना द्राक्षे लागणार नाहीत. जैतूनाच्या झाडांना फळे
लागणार नाहीत. शेतांत धान्य उगवणार नाही, गोठ्यात
शेळ्या मेंढ्या, गाईगुरे राहणार नाहीत,
18तरी मी परमेश्वराठायी आनंद करीन. माझ्या
तारणहाराजवळ, देवाजवळ मला सुख मिळेल.
19परमेश्वर, माझा प्रभू मला शक्ती देतो. हरिणाप्रमाणे
जलद धावायला मदत करतो देवच मला सुरक्षितपणे
पर्वतांवर नेतो.

*माझ्या तारा लावलेल्या वाद्यांत असलेल्या*
*त्या संगीत दिग्दर्शकाला.*

# सफन्या

1 हा परमेश्वराने सफन्याला दिलेला संदेश आहे.
योशीयाच्या कारकिर्दीत सफन्याला हा संदेश मिळाला.
योशीया हा यहूदाचा राजा आमोन याचा मुलगा होता.
सफन्या हा कूर्शीचा मुलगा होता. कूशी हा गदल्याचा,
गदल्या अमऱ्याचा व अमऱ्या हिज्कीयाचा मुलगा होता.

### लोकांचा न्यायनिवाडा करण्याचा परमेश्वराचा दिवस

2 देव म्हणतो, “पृथ्वीवरील सर्व गोष्टींचा मी नाश करीन.
3 सर्व प्राणिमात्रांचा मी नाश करीन. सर्व पक्षी व जलचर
मी नष्ट करीन. मी पापी आणि त्यांना पाप करण्यास
प्रवृत्त करणाऱ्या सर्व गोष्टी याचा नाश करीन. मी
पृथ्वीवरच्या सर्व लोकांना पृथ्वीवरून दूर करीन.”
परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.
4-5 परमेश्वर म्हणाला, “मी यहूदाला आणि
यरुशलेमवासीयांना शिक्षा करीन. त्या गोष्टींना मी त्या
स्थानावरुन दूर करीन. बआल-पूजेचा शेवटचा अंशसुध्दा
मी येथे राहू देणार नाही. याजक आणि छतांवर जाऊन
ताऱ्यांची* पूजा करणाऱ्या सर्व लोकांना मी दूर करीन.
त्या भोंदू याजकांना लोक विसरून जातील. काही लोक
आम्ही तुझीच पूजा करतो असे म्हणतात. त्यांनी माझी
उपासना करण्याचे वचन दिले होते. पण आता ते खोटा
देव मिलकोम याची पूजा करतात. तेव्हा अशा लोकांना
मी तेथून दूर करीन. 6 काही लोकांनी परमेश्वराकडे
पाठ केली. त्यांनी परमेश्वराला अनुसरायचे सोडले.
मदतीसाठी परमेश्वराला हाक मारायचे बंद केले, अशांना
मी त्या ठिकाणाहून उठवीन.”
7 परमेश्वर माझ्या, प्रभूसमोर शांत रहा! का? कारण
लोकांचा न्यायनिवाडा करण्याचा परमेश्वराने ठरविलेला
दिवस लवकरच येत आहे. परमेश्वराने यज्ञाची सिध्दता
केली आहे त्याने त्याच्या निमंत्रित पाहुण्यांना तयार रहायला
सांगितले आहे,*
8 परमेश्वर म्हणाला, “परमेश्वराच्या यज्ञार्पण
करण्याच्या दिवशी, मी राजाचे मुलगे व इतर नेते ह्यांना
शिक्षा करीन. परदेशीय वस्त्रे घातलेल्यांना पण मी सजा
देईन. 9 त्या वेळी, उंबऱ्यावरून उडी मारणाऱ्यांना आणि
धन्याचे घर असत्य व हिंसाचाराने भरणाऱ्यांना मी शिक्षा
ठोठावीन.”
10 परमेश्वर असेही म्हणाला त्या वेळेला, लोक
यरुशलेमच्या मासळी दाराशी मदतीसाठी हाका मारीत
असतील. गावाच्या इतर भागांत लोक रडत असतील.
नगरीभोवतीच्या टेकड्यांवरून लोकांना वस्तूंचा नाश होत
असताना येतो, तसा मोठा धडधडाट ऐकू येईल. 11 गावाच्या
खालच्या भागात राहणाऱ्या लोकांनो, तुम्ही रडाल. का?
कारण सर्व उद्योगपतींचा आणि श्रीमंत व्यापाऱ्यांचा नाश
होईल.
12 “तेव्हा मी एक दिवा घेऊन यरुशलेममधून शोध
करीन. जे लोक स्वत:च्या मनाप्रमाणे जगण्यात समाधान
मानतात अशा सर्वांना मी शोधीन. ‘परमेश्वर काहीच
करीत नाही. तो मदतही करीत नाही आणि दुखापतही
करीत नाही’ त्यांना वाटते. अशा लोकांना शोधून काढून
मी त्यांना शिक्षा करीन. 13 मग इतर लोक त्यांची संपत्ती
बळकावतील आणि त्यांच्या घरांचा नाश करतील. त्या
वेळी, ज्यांनी घरे बांधली, ते त्या घरात राहणार नाहीत
आणि ज्यांनी द्राक्षमळे लावले, त्यांना त्या द्राक्षांचा द्राक्षरस
मिळणार नाही. ह्या गोष्टी दुसऱ्यांनाच मिळतील.”
14 परमेश्वराने ठरविलेला न्यायदानाचा दिवस लवकरच
येत आहे तो दिवस जवळच आहे, आणि वेगाने येत आहे.
देवाच्या न्यायदानाच्या दिवशी. लोकांना मोठा आक्रांत
ऐकू येईल. वीरसुध्दा रडतील. 15 देव तेव्हा आपला क्रोध
प्रकट करील. तो भयंकर संकटाचा काळ असेल. ती
विद्ध्वंसाची वेळ असेल. ती अंधाकाराची वेळ असेल. तो
काळा, ढगाळ व वादळी दिवस असेल. 16 तो काळ
युध्दकाळासारखा असेल. युध्दकाळात लोक सुरक्षित
गावांतून व संरक्षक बुरुजांवरून शिंग आणि तुतारी
फुंकल्याचे आवाज ऐकतात.
17 परमेश्वर म्हणाला, “मी लोकांना जगणे कठीण करीन.
अंधळ्यांना ज्याप्रमाणे आपण कोठे जात आहोत हे कळत
नाही, तशी लोकांची स्थिती होईल का? कारण त्यांनी
परमेश्वराविरुध्द पाप केले. खूप लोक मारले जातील.

---

**ताऱ्यांची** शब्दश: “स्वर्गाचे सैन्य” ह्याचा अर्थ बहूधा तारे व ग्रह किंवा देवदूत असा असावा.

**त्याने ... रहायला सांगितले आहे** शब्दश: “बळीची तयारी केली. निवडले त्यांना पवित्र केले.” राजा युध्दकाळी तयारी करी तसेच हे आहे. ते देवाला खास बळी आणीत आणि सैनिकांना युध्दासाठी सज्ज करीत.

त्याचे रक्त जमिनीवर सांडेल. त्यांची प्रेते शेणासारखी
जमिनीवर पडतील. 18त्यांच्या सोन्या-चांदीची त्यांना मदत
होणार नाही. त्या वेळी, परमेश्वर खूपच कोपलेला व
रागावलेला असेल. परमेश्वर सर्व जगाचा नाश
करील. परमेश्वर पृथ्वीवरील सर्व गोष्टींचा संपूर्ण
नाश करील."

### देव लोकांना त्यांचे आचरण बदलण्यास सांगतो

2 निर्लज्ज लोकांनो, 2मलूल होऊन सुकून जाणाऱ्या
फुलाप्रमाणे तुमचे जीवन होण्याआधीच तुमचे आचार
बदला. दिवसाच्या उष्णतेने, फूल कोमेजून वाळून जाते.
परमेश्वराने आपला क्रोध प्रकट करताच, तुमचीही स्थिती
तशीच होईल. म्हणून परमेश्वराचा क्रोधाचा दिवस
तुमच्यावर येण्यापूर्वीच तुमचे आचरण बदला. 3सर्व दीन
लोकांनो, परमेश्वराला शरण या! त्याचे विधिनियम पाळा.
सत्कृत्य करायला शिका. नम्र होण्यास शिका. मग कदाचित्
परमेश्वर जेव्हा क्रोध प्रकट करील, तेव्हा तुम्ही सुरक्षित
राहाल.

### इस्राएलच्या शेजाऱ्यांना परमेश्वर शिक्षा करील

4गज्जात कोणीही शिल्लक राहणार नाही. अष्कलोनचा
नाश होईल दुपारी, अश्दोदमधील लोकांना, बळजबरीने
बाहेर काढले जाईल, एक्रोन ओसाड होईल.*
5पलिष्ट्यांनो, समुद्राकाठी राहणाऱ्या लोकांनो,
परमेश्वराचा हा संदेश तुमच्यासाठी आहे. कनान मधील
या फिलिस्ताईनच्या भूमीचा नाश होईल ते देश निर्जन
होतील. 6तुमची समुद्रकाठची जमीन मेंढ्यांसाठी व
मेंढपाळासाठी मोकळी राने होतील. 7त्यानंतर ती भूमी
यहूदातील जिवंत राहिलेल्या लोकांच्या मालकीची होईल.
यहूदातील ह्या लोकांची परमेश्वर आठवण ठेवील. आता
ते परदेशांत कैदेत आहेत. पण परमेश्वर त्यांना परत
आणील. मग यहूदातील लोक, आपल्या मेंढ्यांना त्या
कुरणांत चरु देतील. संध्याकाळी, ते अष्कलोनमधील
रिकाम्या घरात आडवे होतील.

8परमेश्वर म्हणतो, "यवाबच्या व अम्मोनच्या लोकांनी
काय केले, ते मला माहीत आहे त्यांनी माझ्या माणसांना
ओशाळवणे केले. माझ्या माणसांची जमीन काबीज करुन
त्यांनी स्वत:च्या देशाचा विस्तार केला. 9म्हणून, मी जिवंत
आहे याची मला जेवढी खात्री आहे तेवढ्याच ठामपणाने
मी वचन देतो की, सदोम व गमोरा यांच्यासारखाच
मवाब व अमोन यांचा नाश होईल. मी सर्वशक्तिमान
परमेश्वर आहे, मी इस्राएलचा देव आहे त्या देशांचा संपूर्ण
कायमचा नाश होईल, असे मी वचन देतो. त्यांच्या देशांच्या
जमिनीवर काटेकुटे माजतील. मृत समुद्रातील मिठाने
व्यापलेल्या जमिनीप्रमाणे ते देश होतील. माझ्या माणसांतील
जिवंत राहिलेली माणसे ती भूमी आणि त्या भूमीवर उरलेले
सर्व काही घेतील."

10मवाब व अमोन येथील लोकांची अशी स्थिती होण्याचे
कारण ते गर्विष्ठ होते. आणि सर्वशक्तिमान परमेश्वराच्या
माणसांच्या बाबतीत त्यांनी क्रूरपणाने कृती केली. त्यांनी
परमेश्वराच्या माणसांना कमीपणाने वागवले हेच होय.
11ते लोक परमेश्वराला घाबरतील. का? कारण परमेश्वर
त्यांच्या दैवतांचा नाश करील. मग दूरदूरच्या प्रदेशांतील
सर्व लोक परमेश्वराची उपासना करु लागतील. 12म्हणजे
कूशींनो, (इथियोपियातील लोकांनो,) तुम्हीसुध्दा, बंर का?
परमेश्वराची तलवार तुमच्या लोकांनाही मारील. 13नंतर
परमेश्वर उत्तरेकडे वळेल, अश्शूरला शिक्षा करील. तो
निनवेचा नाश करील. ते शहर म्हणजे ओसाड, रुक्ष वाळवंट
होईल. 14तेथे फक्त मेंढ्या व वन्यप्राणी राहतील. शिल्लक
राहिलेल्या खांबांवर घुबडे व कावळे बसतील. त्यांचा
आवाज खिडक्यांतून ऐकू येईल. कावळे दारांच्या
पायऱ्यांवर बसतील. त्या रिकाम्या घरांत काळे पक्षी जाऊन
बसतील. 15आता निनवेला फार गर्व झाला आहे. आता
ती खरोखरच सुखी आहे. आता तेथील लोकांना, आपण
अगदी सुरक्षित आहोत' असे वाटते. त्यांना निनवे जगातील
सर्वात महत्वाची वाटते. पण तिचा नाश होईल ती ओसाड
होईल. तेथे फक्त वन्यपशूच विसाव्याला जातील. तिचा
अतिशय वाईटरीतीने नाश झालेला पाहून वाटसरु तेथून
जाताना चुकचुकतील, निराशेने माना हलवतील.

### यरुशलेमचे भविष्य

3 यरुशलेम, तुझे लोक देवाविरुध्द लढले. त्यांनी
दुसऱ्यांना दुखविले आणि तुला पापाचा डाग लागला.
2तुझ्या लोकांनी माझे ऐकले नाही. त्यांनी माझी शिकवण
आत्मसात केली नाही. यरुशलेमने परमेश्वरावर विश्वास
ठेवला नाही. ती तिच्या देवाला शरण केली नाही.
3यरुशलेममधील नेते गुरगुरणाऱ्या सिंहाप्रमाणे आहेत. तिचे
न्यायाधीश संध्याकाळी मेंढ्यांवर हल्ला करुन, सकाळी
आपल्या भक्ष्याची काहीही नामोनिशाणी न ठेवणाऱ्या
भुकेल्या लांडग्याप्रमाणे आहेत. 4तिचे संदेष्टे अविचारी
असून जास्तीच जास्त हडप करण्यासाठी नेहमीच कट
करीत असतात तिचे याजक पवित्र गोष्टी अपवित्र
गोष्टींप्रमाणेच हाताळतात. देवाच्या शिकवणुकीचा त्यांनी
वाईट उपयोग केला आहे. 5पण देव अजूनही त्या नगरीत
आहे. आणि तो नेहमीच चांगला वागतो. देव कोणाचाही
कधीच अपराध करीत नाही. तो त्याच्या लोकांना नेहमीच
मदत करीत राहतो. योग्य निर्णय घेण्यास तो लोकांना
रोजच मदत करतो. पण वाईट लोकांना त्यांनी केलेल्या
वाईट गोष्टींची लाज वाटत नाही.

6देव म्हणतो, "मी संपूर्ण राष्ट्रांचा नाश केला आहे. मी
संरक्षक बुरुज नष्ट केले आहेत. मी त्यांच्या रस्त्यांचा

---

**गज्जात ... होईल** हिब्रू भाषेप्रमाणे, सफन्या येथे पॅलेस्टाईनमधील
शहरांच्या नावांशी शब्दार्थाचा खेळ खेळत आहे.

नाश केला आहे. आता तेथून कोणीही जात नाही. त्यांची
गावे निर्जन झाली आहेत. तेथे कोणीही राहात नाही. 7तू
ह्यापासून धडा शिकावास, म्हणून तुला मी ह्या गोष्टी
सांगत आहे. तू मला घाबरावेस व माझा मान राखावास,
असे मला वाटते. जर तू असे वागलास, तर तुझ्या घराचा
नाश होणार नाही. ठरविल्याप्रमाणे मग मी तुला शिक्षाही
करणार नाही." पण ते वाईट लोक, केल्या आहेत त्यापेक्षा
अधिक वाईट गोष्टीच करु इच्छीत होते.
8परमेश्वर म्हणाला, "थोडे थांब मी ऊभा राहून तुझा
न्यायनिवाडा करण्याची वाट बघ! अनेक राष्ट्रांतील
लोकांना गोळा करुन, तुला सजा देण्यासाठी त्यांचा वापर
करण्याचा मला हक्क आहे. माझा तुझ्यावरचा राग
दाखविण्यासाठी मी त्या लोकांचा उपयोग करीन. मी किती
चिडलो आहे हे त्यावरुन कळेल. संपूर्ण देशाचा नाश
होईल. 9त्यानंतर इतर देशातील लोकांना मी बदलून
टाकीन. मग ते स्पष्ट भाषा बोलतील आणि परमेश्वराचे
नाव घेतील. ते सर्वजण खांद्याला खांदा लावून एक होऊन.
माझी उपासना करतील. 10कूश देशातील नदीपलीकडचे
लोकसुध्दा येतील. माझी विखुरलेली माणसे मला शरण
येतील. माझी उपासना करणारे मला वाहण्यासाठी काही
गोष्टी घेऊन येतील.
11"मग, यरुशलेम, तुझ्या लोकांनी माझ्याविरुध्द
केलेल्या दुष्कृत्यांची तुला लाज वाटणार नाही. का? कारण
त्या वाईट लोकांना मी यरुशलेममधून बाहेर घालवीन.
त्या गर्विष्ठांना मी दूर नेईन. माझ्या पवित्र पर्वतावर त्या
माणसांतील कोणीही गर्विष्ठ असणार नाही. 12माझ्या नगरीत
(यरुशलेममध्ये) मी फक्त नम्र व लीन लोकांनाच राहू
देईन. ते परमेश्वराच्या नावावर श्रध्दा ठेवतील.
13"इस्राएलमधील जिवंत राहिलेले लोक वाईट कृत्ये
करणार नाहीत. ते खोटे बोलणार नाहीत. खोट्याच्या आधारे
ते इतरांना फसविणार नाहीत. चरून आडव्या होणाऱ्या
मेंढ्यांप्रमाणे ते शांत राहतील त्यांना कोणीही त्रास देणार
नाही."

### हर्षगीतह्य

14यरुशलेम, गा आणि सुखी हो! इस्राएल, आनंदाने
जल्लोष कर!यरुशलेम, आनंदात राहा! मजा कर!
15का? कारण परमेश्वराने तुला शिक्षा करण्याचे
थांबविले आहे.त्याने तुझ्या शत्रूंचे भक्क म मोर्चे नष्ट केले
आहेत. इस्राएलचा राजा, परमेश्वर तुझ्याबरोबर आहे.आता
तुला कोणत्याही अरिष्टाची काळजी करण्याचे कारण
नाही.
16त्या वेळेला, यरुशलेमला, असे सांगितले जाईल.समर्थ
हो! घाबरु नको!
17परमेश्वर तुझा देव, तुमच्याबरोबर आहे. तो बलवान
वीराप्रमाणे आहे. तो तुला वाचवील. तो तुझ्यावर किती
प्रेम करतो, हे तो तुला दाखवून देईल.तुझ्याबरोबर तो
किती सुखी आहे, हेही तुला दिसेल.
18मेजवानीच्या वेळेला लोक जसे हासतात, आनंदात
असतात, तसाच तो तुझ्याबरोबर हासेल आनंदात असेल."
परमेश्वर म्हणाला, "मी तुझी अप्रतिष्ठा दूर करीन.त्या
लोकांना मी तुला दुखवू देणार नाही.*
19त्या वेळी, तुला इजा करणाऱ्यांना मी शिक्षा करीन.
माझ्या इजा झालेल्या माणसांना मी वाचवीन. बळजबरीने
दूर पळून जायला लागलेल्या माझ्या माणसांना मी परत
आणीन. मी त्यांना कीर्ती मिळवून देईन. सर्व लोक त्यांची
प्रशंसा करतील.
20त्या वेळी, मी तुला परत आणीन. मी तुम्हा सर्वांना
परत एकत्र आणीन. मी तुला प्रसिध्दी मिळवून देईन.
सगळीकडचे लोक तुझी स्तुती करतील प्रत्यक्ष तुझ्या
डोळ्यांदेखत मी कैद्यांना परत आणीन,तेव्हाच हे सर्व
घडून येईल." परमेश्वरच असे म्हणाला आहे.

---

**मी तुझी ... देणार नाही** हिब्रूमधील या ओवीचा अर्थ समजत नाही.

# हाग्गय

## ही मंदिर बांधण्याची वेळ आहे

1 पारसचा राजा दारयावेश याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षाच्या सहाव्या महिन्याच्या पहिल्या दिवशी हाग्गयला देवाकडून संदेश मिळाला. हा संदेश शल्तीएलाचा मुलगा जरुब्बाबेल व यहोसादाकचा मुलगा यहोशवा यांच्याबद्दल होता. जरुब्बाबेल हा यहूदाचा राज्यपाल व यहोशवा प्रमुख याजक होता. संदेश असा आहे : [2]सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो "लोकांच्या मते परमेश्वराचे मंदिर  बांधण्यास ही वेळ योग्य नाही."

[3]हाग्गयला परमेश्वराकडून पुन्हा एकदा संदेश मिळाला हाग्गयने तो पुढीलप्रमाणे सांगितला : [4]"चांगल्या घरात स्वत: राहण्यास लोकांनो, तुम्हाला ही योग्य वेळ वाटते. भिंतीला सुरेख लाकडी तावदान असलेल्या घरांत तुम्ही राहता पण परमेश्वराचे घर [मंदिर] अजूनही भग्नावस्थेतच आहे. [5]आता सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, 'काय घडत आहे, त्याचा विचार करा. [6]तुम्ही खूप पेरले पण तुमच्या हाती थोडेच पीक लागले. तुम्हाला खायला मिळते खरे, पण पोटभर नाही. थोडेफार पिण्यास मिळते, पण धुंदी चढण्याइतके नाही. काही ल्यायला आहे, पण ऊब आणण्याइतके नाही. तुम्ही थोडा पैसा कमविता, पण तो कोठे जातो तेच कळत नाही. जणू काही तुमच्या खिशाला छिद्र पडले आहे.*"

[7]सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "तुम्ही काय करीत आहात, त्याचा विचार करा. [8]लाकडे आणण्यासाठी पर्वतावर जा, आणि मंदिर बांधा. मग मला त्यामुळे संतोष वाटेल आणि माझा गौरव झाला असे वाटेल." परमेश्वरानेच ह्या गोष्टी सांगितल्या.

[9]सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "तुम्ही खूप पिकाची अपेक्षा करता, पण पीक काढताना तुमच्या हाती फार थोडे  धान्य लागते. ते धान्य तुम्ही  घरी आणता आणि मी पाठविलेला वारा ते सर्व उधळून लावतो. हे का घडत आहे? का? कारण स्वत:च्या घराच्या काळजीने तुमच्यातील प्रत्येकजण घराकडे धाव घेतो. पण माझे घर मात्र अजूनही भग्नावस्थेत आहे. [10]म्हणूनच आकाश दवाला व पृथ्वी पिकांना रोखून धरते."

[11]परमेश्वर म्हणतो, "मी भूमीला आणि पर्वतांना रूक्ष होण्याची आज्ञा दिली आहे. जमिनीतून निर्माण होणाऱ्या प्रत्येक गोष्टीची आणि धान्य, नवीन मद्य, जैतुनाचे तेल ह्यांची नासाडी होईल. सर्व लोक आणि सर्व प्राणी दुर्बल होतील."

## नव्या मंदिराच्या बांधकामाला सुरवात

[12]परमेश्वर देवाने शल्तीएलचा मुलगा जरुब्बाबेल आणि यहोसादकाचा मुलगा यहोशवा ह्यांच्याशी बोलण्यासाठी हाग्गयला पाठविले होते. यहोशवा हा प्रमुख याजक होता. ह्या दोघांनी व इतर लोकांनी त्यांच्या परमेश्वर देवाची वाणी व हाग्गय प्रेषिताचे म्हणणे ऐकले. आणि त्यांनी त्यांचे भय. आणि परमेश्वर त्यांच्या देवाबद्दल, त्यांना वाटणारा आदर दाखविला.

[13]परमेश्वर देवाचा संदेश लोकांपर्यत पोहोचविण्यासाठी, देवानेच हाग्गयला दूत म्हणून पाठविले होते. तो संदेश असा होता. परमेश्वर म्हणतो, "मी तुझ्याबरोबर आहे."

[14]परमेश्वर देवाने, यहूदाचा राज्यपाल आणि शल्तीएलचा मुलगा जरुब्बाबेल याला यहोसादाकचा मुलगा प्रमुख याजक यहोशवाला आणि इतर लोकांना मंदिर बांधण्याच्याकामी उत्तेजन दिले. म्हणून त्या सर्वांनी, त्यांच्या देवाच्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या मंदिराच्या बांधकामाला सुरवात केली. [15]त्यांनी हे काम, पारसचा राजा दारयावेश याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षीच्या सहाव्या महिन्याच्या चोविसाव्या दिवशी सुरु केले.

## देव लोकांना उत्तेजन देतो

2 सातव्या महिन्याच्या एकविसाव्या दिवशी हाग्गयला परमेश्वराकडून संदेश मिळाला: [2]यहूदाचा राज्यपाल आणि शल्तीएलचा मुलगा जरुब्बाबेल व प्रमुख याजक यहोसादाकचा मुलगा यहोशवा आणि इतर लोक यांच्याशी तू बोल. त्यांना ह्या गोष्टी सांग. [3]"तुमच्यातील कितीजण ह्या मंदिराकडे पाहून ह्याची तुलना आधीच्या नाश झालेल्या सुंदर मंदिराशी करण्याचा प्रयत्न करतात? तुम्हाला काय वाटते? आधीच्या मंदिराच्या तुलनेत हे काहीच नाही ना? [4]पण आता परमेश्वर म्हणतो, 'जरुब्बाबेल, निराश होऊ नकोस.' यहोसादाकच्या मुला, प्रमुख याजक यहोशवा,

---

**जणू ... आहे** किंवा एखाद्याने बरीच छिद्रे असलेल्या पिशवीत पैसे साठविण्यासारखे आहे.'

'नाउमेद होऊ नकोस. या देशाच्या सर्व लोकांनो, धीर
सोडू नका. हे काम चालू ठेवा, मी तुमच्याबरोबर आहे.'
सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या."
5परमेश्वर म्हणतो, "तुम्ही मिसर सोडले, तेव्हा मी
तुमच्याबरोबर करार केला. मी माझ्या वचनाला जागलो.
माझा आत्मा तुमच्यात आहे. तेव्हा घाबरू नका. 6का?
कारण सर्वशक्तिमान परमेश्वर हे सांगत आहे. अगदी
थोड्या वेळात मी पुन्हा एकदा सर्व गोष्टी हलवून सोडीन
आकाश आणि पृथ्वी कंपित करीन समुद्र आणि कोरडी
जमीन यांना कंपित करीन. 7मी राष्ट्रांना धक्का देईन
आणि मग प्रत्येक राष्ट्र तुमच्याकडे संपत्ती घेऊन येईल
मग हे मंदिर वैभवाने भरून टाकीन. सर्वशक्तिमान
परमेश्वर हे सांगत आहे. 8त्यांच्याकडील सर्व सोने-चांदी
माझ्या मालकीची आहे सर्वशक्तिमान परमेश्वर ह्या गोष्टी
सांगत आहे. 9आणि सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणतो
की आताचे मंदिर हे आधीच्या मंदिरापेक्षा सुंदर असेल.
मी ह्या ठिकाणी शांतता प्रस्थापित करीन. लक्षात ठेवा,
सर्वशक्तिमान परमेश्वर ह्या गोष्टी सांगत आहे."

## काम सुरु झाले आहे आशीर्वाद मिळतील

10पारसचा राजा दारयावेश याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या
वर्षीच्या नवव्या महिन्याच्या चोविसाव्या दिवशी हाग्गय
संदेष्ट्याला परमेश्वराकडून पुढील संदेश मिळाला.
11सर्वशक्तिमान परमेश्वर या गोष्टींविषयी नियम काय
सांगत आहे, हे तू याजकांना विचारावे अशी मी तुला
आज्ञा देतो. 12"समजा एखादा माणूस वस्त्रांमधून मांस
नेतो. ते मांस परमेश्वराला अर्पण करण्यासाठी आहे म्हणून
ते पवित्र आहे. पण ज्या वस्त्रांत ते गुंडाळले आहे, त्या
वस्त्राचा स्पर्श भाकरी, किंवा शिजविलेले अन्न, मद्य,
तेल किंवा इतर अन्नाला झाला, तर ह्या स्पर्श झालेल्या
सर्व वस्तू पवित्र होतील का?"
याजक उत्तरले, "नाही"
13मग हाग्गयने विचारले, "एखाद्याने प्रेताला स्पर्श केला,
तर तो अशुध्द होतो, ह्या माणसाने दुसऱ्या कोणत्या
गोष्टीला स्पर्श केला, तर ती गोष्टसुध्दा अशुध्द होईल
का?"
याजक म्हणाले, "हो! ती गोष्टसुध्दा अशुध्दच होईल."
14मग हाग्गय म्हणाला, "परमेश्वर देव, या गोष्टी सांगतो.
'ह्या राष्ट्रातील लोकांबद्दलही असेच म्हणणे योग्य आहे. ते
माझ्या दृष्टीने शुध्द व पवित्र नव्हते. म्हणून त्यांनी ज्या
गोष्टींना स्पर्श केला, त्या अशुध्द झाल्या आणि ते वेदीवर
जे जे अर्पण करतात ते ते अशुध्द आहे.
15'आजच्या दिवसाच्या आधी काय घडले त्याचा विचार
करा. परमेश्वराच्या मंदिराचे काम तुम्ही सुरु केलेत त्या
पूर्वीच्या काळाचा विचार करा. 16लोकांना वीस मापे धान्य
पाहिजे असताना, राशीत दहा मापेच होते मद्यकुंडातून
लोकांना पन्नास बुधले मद्य पाहिजे होते तर त्याच्यात
फक्त वीसच बुधले मद्य होते. 17का? कारण मी तुम्हाला
शिक्षा केली. मी पाठविलेल्या रोगाने तुमची झाडे मेली.
तुम्ही स्वत:च्या हाताने बनविलेल्या वस्तू मी पाठविलेल्या
गारपिटीने नष्ट झाल्या. मी एवढे केले तरी तुम्ही मला
शरण आला नाहीत.' परमेश्वरच असे म्हणाला."
18परमेश्वर म्हणाला, "आज नवव्या महिन्याचा
चोविसावा दिवस आहे. परमेश्वराच्या मंदिराच्या पायाचे
काम तुम्ही पूर्ण केले आहे. आता ह्यापुढे काय होते
त्यावर लक्ष ठेवा. 19कोठारात अजून काही धान्य आहे
का? नाही. वेली, अंजीर, डाळिंबे, जैतुन ह्या झाडांकडे
पाहा. त्यांना फळे धरत आहेत का? नाही. पण आजपासून
मी तुम्हाला आशीर्वाद देईन."
20हाग्गयला महिन्याच्या चोविसाव्या दिवशी,
परमेश्वराकडून आणखी एक संदेश आला तो असा होता:
21"राज्यपाल जरुब्बाबेलकडे जा. त्याला सांग की मी
आकाश-पृथ्वी हालवीन. 22मी पुष्कळ राजे आणि राज्ये
उलथवून टाकीन. त्या दुसऱ्या लोकांच्या राज्यसत्तेचा मी
नाश करीन. मी त्यांच्या रथांचा व सारथ्यांचा नाश
करीन. त्यांच्या घोडदळाचा व घोडेस्वारांचा मी पराभव
करीन. आता त्या सैन्यांमध्ये मैत्री आहे. पण ते
एकमेकांविरुध्द उठतील आणि तलवारीने एकमेकांना
मारतील. 23सर्वशक्तिमान परमेश्वर ह्या गोष्टी सांगत आहे
शल्तीएलच्या मुला, जरुब्बाबेल, तू माझा सेवक आहेस
मी तुझी निवड केली आहे, आणि त्यावेळी मी तुझा मुद्रांकित
अंगठीप्रमाणे उपयोग करीन. मी ह्या गोष्टी केल्या आहेत
ह्याचा तू साक्षी वा पुरावा असशील."
सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

# जखऱ्या

## आपल्या लोकांनी परत यावे ही परमेश्वराची इच्छा

1 बरेख्याचा मुलगा जखऱ्या ह्याला परमेश्वराचा संदेश
मिळाला. पारसचा राजा दारयावेश याच्या कारकिर्दीला
एक वर्ष आणि आठ महिने झाले, तेव्हाची ही गोष्ट.
(जखऱ्या बरेख्याचा मुलगा व बरेख्या प्रेषित इद्दोचा मुलगा
होय.) हा संदेश पुढीलप्रमाणे होता:
2परमेश्वर तुमच्या पूर्वजांवर फार रागावला होता.
3म्हणून तू पुढील गोष्टी लोकांना सांगितल्या पाहिजेस.
परमेश्वर म्हणतो, "तुम्ही माझ्याकडे या आणि मी
तुमच्याकडे येईन." सर्व शक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी
सांगितल्या.
4परमेश्वर म्हणाला, "तुमच्या पूर्वजांप्रमाणे वागू नका.
तुमच्या पूर्वजांनी आपली वाईट वर्तणूक बदलावी, वाईट
गोष्टी करण्याचे टाळावे, ही सर्व शक्तिमान परमेश्वराची
इच्छा असल्याचे, त्या काळच्या संदेष्ट्यांनी त्यांना समजावून
सांगितले होते. पण त्यांनी माझे ऐकले नाही." परमेश्वराने
ह्या गोष्टीची आठवण करून दिली.
5परमेश्वर म्हणाला, "तुमचे पूर्वज कालवश झाले आणि
ते संदेष्टेसुध्दा चिरकाल जगले नाहीत. 6ते संदेष्टे माझे
सेवक होते. त्यांच्यामार्फत मी तुमच्या पूर्वजांना माझे नियम
आणि शिकवणूक कळवीत असे. शेवटी तुमच्या पूर्वजांना
धडा मिळाला. ते म्हणाले, 'सर्व शक्तिमान परमेश्वराने
बोलल्याप्रमाणे केले. आमच्या दुराचाराबद्दल व
दुष्कृत्यांबद्दल आम्हाला शिक्षा केली.' आणि ते देवाला
शरण आले.

## चार घोडे

7पारसचा राजा दारयावेश ह्याच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या
वर्षाच्या अकराव्या महिन्याच्या म्हणजे शेवटच्या
महिन्याच्या चोविसाव्या दिवशी जखऱ्याला परमेश्वराचा
आणखी एक संदेश मिळाला. (जखऱ्या हा बरेख्याचा
मुलगा. बरेख्या संदेष्टा इद्दोचा मुलगा.) संदेश असा
होता:
8रात्री, तांबड्या घोड्यावर आरूढ झालेला एक माणूस
मी पाहिला. तो दरीमध्ये हादस्सीमच्या झुडुपांत उभा होता.
त्याच्या मागे तांबड्या, तपकिरी आणि पांढऱ्या रंगाचे घोडे
होते. 9मी विचारले, "महाराज, हे घोडे इकडे कशाकरिता?"
तेव्हा माझ्याशी बोलत असलेला देवदूत म्हणाला, "हे घोडे
इकडे कशाकरिता आलेत हे मी तुला दाखवीन."
10मग हादस्सीमच्या झुडुपांत उभा असलेला माणूस
म्हणाला, "पृथ्वीवर इकडे तिकडे संचार करायला
परमेश्वराने हे घोडे पाठविलेत."
11नंतर ते घोडे हादस्सीमच्या झुडुपांत उभ्या असलेल्या
परमेश्वराच्या दूताशी बोलले. ते म्हणाले, "आम्ही पृथ्वीवर
इकडे तिकडे फिरलो. सर्वत्र स्थैर्य व शांतता आहे."
12मग परमेश्वराच्या दूताने विचारले, "परमेश्वरा,
यरुशलेमची आणि यहूदाच्या नगरीचे तू समाधान
करण्यापूर्वी त्यांची दु:खातून मुक्तता होण्यास आणखी किती
वेळ आहे? गेली सत्तर वर्षे तू या नगरींवर कोपला आहेस."
13माझ्याशी बोलत असलेल्या परमेश्वराच्या दूताला मग
परमेश्वराने उत्तर दिले. परमेश्वर चांगल्या व सांत्वनपर
शब्दांत बोलला. 14मग परमेश्वराच्या दूताने मला पुढील
गोष्ट लोकांना कळविण्यास सांगितल्या

सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो :
"मला यरुशलेम व सियोन यांच्याबद्दल अत्यंत प्रेम
वाटते.
15आणि जी राष्ट्रे स्वत:ला सुरक्षित समजतात,
त्यांच्याबद्दल मला अतिशय राग आहे. मी थोडासा रागावलो
आणि माझ्या लोकांना शिक्षा करण्यासाठी मी त्या राष्ट्रांचा
उपयोग केला. पण त्या राष्ट्रांनी प्रचंड नुकसान केले."
16म्हणून परमेश्वर म्हणतो, "मी यरुशलेमला परत
येईन आणि दया करून तिचे दु:ख हलके करीन." सर्व
शक्तिमान परमेश्वर म्हणतो, "यरुशलेमची पुन्हा उभारणी
केली जाईल आणि तिथे माझे निवासस्थान बांधले
जाईल."
17देवदूत म्हणाला, "लोकांना हेही सांग की, सर्व
शक्तिमान परमेश्वर म्हणतो, 'माझ्या नगरी पुन्हा संपन्न
होतील. मी सियोनचे सांत्वन करीन. माझी खास नगरी
म्हणून मी यरुशलेमची निवड करीन.'"

## चार शिंगे व चार कामगार

18मग मी वर बघितले असता मला चार शिंगे दिसली.
19माझ्याशी बोलत असलेल्या देवदूताला मी त्या शिंगांचा
अर्थ विचारला.

तो म्हणाला, “इस्राएल, यहूदा व यरुशलेम येथील
लोकांना देशोधडीला लावण्यास ह्याच शिंगांनी भाग पाडले.”
20मग परमेश्वराने मला चार कामगार दाखविले. 21मी
देवाला विचारले, “ते चार कामगार कशासाठी येत आहेत?”
तो म्हणाला, “ते शिंगांना घाबरवण्यासाठी आणि त्यांना
दूर भिरकावून देण्यासाठी आले आहेत. त्या शिंगांनी
यहूदाच्या लोकांना बळजबरीने देशोधडीला लावले. त्या
शिंगांनी कोणालाही दया दाखविली नाही. ती म्हणजे
यहूदाच्या लोकांवर हल्ला करून त्यांना परागंदा करणाऱ्या
राष्ट्रांची प्रतीके आहेत.”

## यरुशलेमची मोजणी

2 मग मी नजर वर वळविली, तेव्हा मला मोजमापाची
दोरी घेतलेला एक माणूस दिसला. 2मी त्याला विचारले,
“तू कोठे चाललास?”
तो मला म्हणाला, “मी यरुशलेमची मोजणी करायला
चाललोय मला यरुशलेमची लांबी-रूंदी पाहायची आहे.”
3मग माझ्याशी बोलत असलेला देवदूत निघून गेला.
आणि दुसरा देवदूत त्याच्याशी बोलायला गेला. 4दुसरा
देवदूत त्या पहिल्या देवदूताला म्हणाला, “धावत जा, आणि
त्या तरुणाला सांग की यरुशलेम मोजमाप करण्यापलीकडे
होईल. त्याला पुढील गोष्टी सांग :

“‘यरुशलेम ही तटबंदी नसलेली नगरी असेल. कारण
तेथे खूप माणसांचे व प्राण्यांचे वास्तव्य असेल.’
5परमेश्वर म्हणतो, ‘मी तिचे रक्षण करणारा अग्नीची
भिंत बनेन. तिला वैभव प्राप्त व्हावे म्हणून मी स्वत: तेथे
राहीन.’”

## आपल्या लोकांना देवाचे पाचारण

6देव म्हणतो, “त्वरा करा! उत्तरेतील प्रदेशातून पळून
जा. होय! मी तुमच्या लोकांना प्रत्येक दिशेला पांगविले हे
सत्य आहे.
7तुम्ही सियोनवासी बाबेलचे कैदी आहात. पण आता
निसटा! त्या नगरातून दूर पळा!” सर्व शक्तिमान परमेश्वर
माझ्याविषयी असे म्हणाला, की त्याने तुमची लूट करणाऱ्या
मला पाठवले. तुम्हाला मान मिळावा म्हणून त्याने मला
पाठवले.
8का? कारण जर त्यांनी तुला दुखविले तर ते (कृत्य)
देवाच्या डोळ्यातील बुबुळाला इजा करण्यासारखेच आहे.
9बाबेलच्या लोकांनी माझ्या लोकांना कैदी म्हणून
पकडून नेले. आणि त्यांना गुलाम बनवले. पण मी त्यांचा
पराभव करीन आणि ते माझ्या लोकांचे गुलाम होतील.
तेव्हा तुम्हाला पटेल की सर्वशक्तिमान परमेश्वराने मला
पाठविले आहे.”
10परमेश्वर म्हणतो,“सियोने, खूष हो! का? कारण मी
येत आहे व मी तुझ्या नगरीत राहीन.
11त्या वेळी पुष्कळ राष्ट्रांमधील लोक माझ्याकडे येतील.
ती माझी माणसे होतील. मी तुझ्या नगरीत राहीन.” मग
मला सर्व शक्तिमान परमेश्वराने पाठविले असल्याचे तुला
समजेल.
12स्वत:ची खास नगरी म्हणून परमेश्वर यरुशलेमची
फेरनिवड करील यहूदा म्हणजे परमेश्वराच्या पवित्र
भूमीचा वाटा असेल.
13सर्वजण शांत राहा! आपल्या पवित्र निवासातून
परमेश्वर येत आहे.

## मुख्ययाजक

3 मग देवदूताने मला मुख्ययाजक यहोशवा दाखविला.
योशीया परमेश्वराच्या दूताच्या पुढे होता. सैतान
योशीयच्या उजव्या बाजूस उभा होता. सैतान योशीयावर
वाईट कृत्ये करीत असल्याचा आरोप करण्यासाठी
आला होता. 2मग परमेश्वराचा दूत म्हणाला, “सैताना,
परमेश्वर तुला दोष देतो, आणि तो तुला दोष देतच राहील.
परमेश्वराने, त्याची खास नगरी म्हणून यरुशलेमची निवड
केली आहे. आगीतून पेटलेल्या काटकीला ओढून काढावे,
तसे देवाने यरुशलेमला वाचविले.”
3यहोशवा देवदूतापुढे उभा होता. त्याने मळकी वस्त्रे
घातली होती. 4मग जवळ उभ्या असलेल्या इतर
देवदूतांना हा देवदूत म्हणाला, “यहोशवाची मळकी वस्त्रे
काढून घ्या.” नंतर तो देवदूत योशीयाशी बोलला. तो
म्हणाला, “आता, मी तुझी सर्व पापे काढून घेतली
आहेत. आणि वस्त्रबदल म्हणून तुला नवीन वस्त्रे
देत आहे.”
5मग मी म्हणालो, “त्याच्या डोक्याला स्वच्छ फेटा
बांधा” त्याप्रमाणे त्यांनी यहोशवाला स्वच्छ फेटा बांधला.
परमेश्वराचा दूत तेथे उभा असतानाच त्यांनी त्याला स्वच्छ
वस्त्रेसुध्दा घातली. 6मग परमेश्वराच्या दूताने यहोशवाला
पुढील गोष्टी सांगितल्या :

7सर्व शक्तिमान परमेश्वर असे म्हणाला, “मी सांगतो
त्या प्रमाणे जीवन जग. मी सांगितलेल्या गोष्टी कर. मग
माझ्या मंदिराचा तूच मुख्य अधिकारी होशील. मंदिराच्या
पटांगणाची तू निगा राखशील. येथे उभ्या असलेल्या
देवदूतांप्रमाणे तुलाही माझ्या मंदिरात कोठेही वावरायला
मोकळीक असेल.
8तेव्हा यहोशवा मुख्ययाजका, तू स्वत: व तुझ्या समोर
बसलेल्या सहकारी याजकांनी ऐकले पाहिजे. माझा खास
सेवक मी आणल्यावर काय घडणार आहे, ह्याची ही
माणसे म्हणजे नमुने आहेत. त्याला कोंब म्हणतील.
9पाहा! मी यहोशवापुढे विशेष दगड ठेवतो. त्याला सात
बाजू* आहेत. मी त्यावर खास संदेश कोरीन. तो संदेश,

---

**बाजू** शब्दश: “डोळे.”

मी एका दिवसात पृथ्वीवरील* सर्व पाप नाहीसे करीत असल्याचे दाखवील."

10सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "त्या वेळी, लोक आपल्या मित्रांबरोबर व शेजाऱ्यांबरोबर बसून गप्पा मारतील. ते एकमेकांना अंजिराच्या झाडाखाली व द्राक्षवेलीखाली बसण्यासाठी बोलवतील."

## दिवठाण आणि जैतुनाची दोन झाडे

4 मग माझ्याशी बोलत असलेला देवदूत माझ्याजवळ आला व त्याने मला जागे केले. झोपेतून जागा होणाऱ्या
माणसाप्रमाणे मला वाटले. 2मग देवदूताने मला विचारले,
"तुला काय दिसते आहे?"

मी म्हणालो, "मला भरीव सोन्याचे दिवठाण दिसत आहे. त्यावर सात दिवे* आहेत. दिवठाणाच्या डोक्यावर एक वाटी आहे. त्या वाटीतून सात नळ्या काढल्या आहेत. प्रत्येक नळी एकेका दिव्याला जोडली आहे. वाटीतील तेल नळीतून प्रत्येक दिव्याला पोहोचते. 3वाटीच्या उजव्या
बाजूस व डाव्या बाजूस प्रत्येकी एकेक जैतूनाचे झाड
आहे." 4माझ्याशी बोलणाऱ्या देवदूताला मी विचारले,
"महाराज, या गोष्टींचा अर्थ काय?"
5तो देवदूत मला म्हणाला, "तुला या गोष्टींचा अर्थ
माहीत नाही?"

"नाही महाराज!" मी म्हणालो.
6मग त्याने मला सांगितले "हा जरूब्बाबेलला
परमेश्वराचा संदेश आहे. तो असा: 'तुझ्या बलाने अथवा
शक्तीने नव्हे तर माझ्या आत्म्याद्वारे तुला मदत मिळेल.'
सर्व शक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.
7तो उंच पर्वत जरूब्बाबेलला सपाट प्रदेश वाटेल. तो
मंदिर उभारेल. मंदिराचा सर्वांत महत्वाचा दगड
बसविल्यावर लोक "सुंदर! सुंदर!"' असा जल्लोश
करतील.
8परमेश्वराच्या संदेशाने मला आणखी सांगितले,
9"जरूब्बाबेल माझ्या मंदिराचा पाया घालेल. तो जेव्हा
मंदिर बांधून पूर्ण करील तेव्हा तुम्हाला समजेल की सर्व
शक्तिमान परमेश्वराने मला तुमच्याकडे पाठविले आहे.
10लोकांना लहानशा आरंभाची लाज वाटणार नाही. आणि
जेव्हा जरूब्बाबेल ओळंबा घेऊन पूर्ण बांधून झालेल्या
मंदिराची मोजमापे घ्यायला लागेल व तपासून पाहील,
तेव्हा त्यांना खरोखरीच आनंद वाटेल. तू पाहिलेल्या
दगडाच्या सात बाजू म्हणजे सर्व दिशांना पाहणारे
परमेश्वराचे डोळेच होत. ते पृथ्वीवरील सर्व काही पाहतात."
11मग मी (जखऱ्या) त्याला म्हणालो, "मी दिवठाणाच्या
उजव्या व डाव्या बाजूस एकेक जैतुनाचे झाड बघितले.
त्या जैतुनाच्या दोन झाडांचा अर्थ काय?" 12मी त्याला
असेही म्हणालो की मला जैतूनाच्या दोन शाखांना सोन्याच्या
नळ्या जोडलेल्या दिसल्या. त्यातून सोनेरी तेल वाहत होते.
ह्याचा अर्थ काय?
13तेव्हा देवदूताने मला विचारले, "तुला ह्या गोष्टींबद्दल
माहीती नाही?"

मी म्हणालो, "नाही, महाराज!"
14तेव्हा देवदूत म्हणाला, "परमेश्वराची सेवा
करण्यासाठी सर्व जगातून निवडलेल्या दोन माणसांची*
ती प्रतीके आहेत."

## उडता पट

5 मी पुन्हा वरती पाहिले आणि मला एक उडता पट
दिसला. 2देवदूताने मला विचारले, "तुला काय
दिसते?"

मी म्हणालो, "मला उडता पट दिसतो. तो 30 फूट लांब व 15 फूट रूंद आहे."
3तेव्हा देवदूताने मला सांगितले, "त्या पटावर एक शाप
लिहिला आहे. पटाच्या एका बाजूवर जे लोक चोरी करतात
त्यांच्यासाठी शाप आहे. आणि दुसऱ्या बाजूवर जे लोक
वचने देताना खोटे बोलतात त्यांच्यासाठी शाप आहे. 4सर्व
शक्तिमान परमेश्वर म्हणतो: मी हा पट चोरांच्या आणि
माझ्या नावाने खोटी वचने देणाऱ्या लोकांच्या घरी पाठवीन.
तो तेथेच राहील आणि त्या घरांचा नाश करील. दगड व
लाकडी खांबांचासुध्दा नाश होईल."

## स्त्री आणि बादली

5मग माझ्याशी बोलणारा देवदूत बाहेर गेला. तो म्हणाला,
"हे बघ! तुला काय येताना दिसतेय?"
6मी म्हणालो, "माहीत नाही ते काय आहे?'

तो म्हणाला, "ती एक मापन-बादली आहे." तो असेसुध्दा म्हणाला की ह्या देशातील लोकांचे पाप मोजण्यासाठी ती आहे."
7बादलीवरचे शिसाचे झाकण वर उचलेले होते. आणि
त्या बादलीत एक स्त्री बसली होती.* 8देवदूत म्हणाला,
"ही बाई पापाचे प्रतीक आहे!" मग त्याने त्या बाईला
बादलीत खाली ढकलले आणि ते शिशाचे झाकण
बादलीच्या तोंडावर बसवले. 9नंतर मी वर पाहिले, तर
मला करकोच्यासारखे पंख असलेल्या दोन स्त्रिया दिसल्या.
त्या उडाल्या आणि पंखांनी वारा कापत त्यांनी ती बादली
उचलली ती बादली घेऊन त्या उडू लागल्या. 10माझ्याशी

---

**पृथ्वीवरील** किंवा "ह्या देशातील."

**दिवे** जैतुनाच्या तेलावर हे दिवे जळत.

**जगातून निवडलेल्या दोन माणसांची** शब्दश: "तेलाचे पुत्र" नवीन राजे, याजक वा प्रेषित ह्यांच्यावर खास तेल ओतीत. ह्याचा अर्थ हे लोक देवाने निवडलेले आहेत असा होत असे.

**त्या टोपलीत ... होती** किंवा "टोपलीचे वजन 15 पौंड होते" वा 75 पौंडाचे शिसे टोपलीतून काढले," अथवा "1 किकार वजनाचे झाकण टोपलीवरून उचलले." 1 किकार=25 पौंड.

बोलणाऱ्या देवदूताला मी विचारले, "त्या ती बादली कोठे नेत आहेत?"
11देवदूत मला म्हणाला, "त्या बादलीसाठी एक घर शिनार मध्ये बांधण्यासाठी त्या जात आहेत. त्या तेथे बादली ठेवतील."

## चार रथ

6 मग मी वळून बघितले तेव्हा दोन जस्ताच्या पर्वतांतून
चार रथ जाताना दिसले. 2लाल रंगाचे घोडे पहिला
रथ ओढत होते. काळ्या रंगाचे घोडे दुसरा रथ ओढत
होते. 3पांढऱ्या रंगाचे घोडे तिसरा रथ ओढत होते. तर
लाल ठिपके असलेले घोडे चौथा रथ ओढत होते.
4माझ्याशी बोलणाऱ्या देवदूताला मी विचारले, "महाराज,
ह्या गोष्टींचा अर्थ काय?"
5देवदूत म्हणाला, "ते चार प्रकारचे वारे * आहेत.
जगन्नियंत्यासमोरून ते आत्ताच आलेत. 6काळे घोडे उत्तरेला,
लाल घोडे पूर्वेला, पांढरे घोडे पश्चिमेला व तांबडे ठिपके
असलेले घोडे दक्षिणेला जातील."
7तांबडे ठिपके असलेले घोडे, त्यांच्या भागात जाण्यास,
उत्सुक दिसत होते. म्हणून देवदूताने त्यांना भूमीमधून
संचार करण्यास सांगितले मग ते त्यांच्या भागांतून गेले.
8मग परमेश्वराने मला मोठ्याने हाक मारून सांगितले,
"बघ, उत्तरेकडे गेलेल्या घोड्यांनी बाबेलमध्ये आपले काम
पूर्ण केले आहे. त्यांनी माझा आत्मा शांत केला आहे. मी
आता रागावलेलो नाही."

## वरिष्ठ याजक यहोशवाला मुकुट मिळतो

9मग मला परमेश्वराचा आणखी एक संदेश मिळाला.
तो म्हणाला, 10"हेल्दय, तोबीया व यदया हे बाबेलच्या
बंद्यांकडून आले आहेत. त्याच्याकडून सोने आणि चांदी
घेऊन, सफन्याचा मुलगा, यहोशवाकडे जा. 11त्या
सोन्या-चांदीपासून मुकुट कर. तो योशीयाच्या डोक्यावर
ठेव. (यहोशवा मुख्ययाजक होता. तो यहोसादाकचा मुलगा
होता.) मग त्याला पुढील गोष्टी सांग :
12सर्व शक्तिमान परमेश्वर पुढील गोष्टी सांगतो:'कोंब'
नावाचा एक माणूस आहे. तो सामर्थ्यवान बनेल. तो
परमेश्वराचे मंदिर बांधील.
13तो परमेश्वराचे मंदिर बांधून गौरव प्राप्त करील.
स्वत:च्या सिंहासनावर बसून तो राज्य करील. त्याच्या
सिंहासनाजवळ याजक उभे राहतील. ते दोघे एकत्रितपणे,
शांतपणे काम करतील.'

14"लोकांना आठवण राहावी म्हणून ते मुकुट मंदिरात
ठेवतील. तो मुकुट हेल्दय, तोबीया, यदया व सफन्याचा
मुलगा योशिया यांना राजाचे सामर्थ्य देवाकडून येते याची
आठवण करून देईल. 15दूरवर राहणारे लोक येतील
आणि मंदिर बांधतील मग तुमची खात्री पटेल की
परमेश्वरानेच मला तुमच्याकडे पाठविले. जर तुम्ही
परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणे वागलात, तरच ह्या गोष्टी
घडून येतील."

## परमेश्वराला दयाळूपणा व करूणा पाहिजे

7 पारसचा राजा दारयावेश याच्या कारकिर्दीच्या चौथ्या
वर्षाच्या नवव्या महिन्याच्या (किसलेव महिन्याच्या)
चौथ्या दिवशी, जखऱ्याला परमेश्वराकडून संदेश आला.
2बेथेलच्या लोकांनी शरेसर, रगेम्मेलेक व त्यांची माणसे
यांना परमेश्वराकडे एक प्रश्न विचारायला पाठविले. 3ते
संदेष्ट्यांकडे आणि सर्व शक्तिमान परमेश्वराच्या मंदिरातील
याजकाकडे गेले आणि त्यांनी पुढील प्रश्न विचारला :
"मंदिराच्या नाशाबद्दल आम्ही गेली कित्येक वर्षे शोक
प्रकट करीत आलो आहोत. प्रत्येक वर्षाच्या पाचव्या
महिन्यात आम्ही शोक प्रकट करण्यासाठी आणि
उपवासासाठी खास वेळ देत आलो आहोत. हे आम्ही
असेच चालू ठेवायचे का?"
4मला सर्व शक्तिमान परमेश्वराकडून पुढील संदेश
मिळाला: 5"याजकांना आणि या देशातील इतर लोकांना
सांग की तुम्ही 70 वर्षे प्रत्येक वर्षाच्या पाचव्या आणि
सातव्या महिन्यात उपवास केलात व शोक प्रकट केलात.
पण हा उपवास खरोखरीच माझ्यासाठी होता का? नाही!
6तुम्ही खाल्ले-प्यायले ते माझ्यासाठी होते का? नाही ते
तुमच्याचसाठी होते. 7याच गोष्टी सांगण्यासाठी देवाने फार
पूर्वीच या आधीच्या संदेष्ट्यांचा उपयोग केला होता. जेव्हा
यरुशलेम ही एक भरभराट झालेली आणि लोकांनी
गजबजलेली नगरी होती, तेव्हादेखील देवाने ह्याच गोष्टी
सांगितल्या होत्या. यरुशलेमच्या भोवतालच्या गावात,
नेगेवला व पश्चिमेकडील डोंगरपायथ्याशी जेव्हा
लोकवस्ती होती, तेव्हादेखील देवाने हीच वचने सांगितली
होती."

8परमेश्वराचा जखऱ्याला पुढीलप्रमाणे संदेश आहे :
9सर्व शक्तिमान परमेश्वर असे म्हणतो की "जे योग्य व
न्याय्य आहे तेच तुम्ही करा. एकमेकांवर दया करा.
एकमेकांना करूणा दाखवा.
10विधवा, अनाथ, परके व गरीब यांना दुखवू नका.
एकमेकांचे वाईट करण्याचे मनातसुध्दा आणू नका."
11पण त्या लोकांनी ऐकण्याचे नाकारले. देवाला पाहिजे
ते करण्यास नकार दिला. देवाची वाणी ऐकू येऊ नये
म्हणून त्यांनी आपले कान झाकून घेतले.
12ते अतिशय दुराग्रही बनले. ते नियम पाळीनात. सर्व
शक्तिमान परमेश्वराने आपल्या आत्म्याचा उपयोग
करून संदेष्ट्यांमार्फत त्याच्या लोकांना संदेश पाठविले.

---

**चार प्रकारचे वारे** किंवा "चार आत्मे" चार वाऱ्यांचा नेहमीचा अर्थ उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम ह्या चार दिशांना वाहणारे वारे.

पण लोक ऐकेनात. तेव्हा सर्व शक्तिमान परमेश्वर कोपला.

13मग तो म्हणाला, “मी त्यांना आवाहन केले पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही. आता, त्यांनी माझा धावा केल्यास, मी ओ देणार नाही.

14एखाद्या झंझावाताप्रमाणे मी इतर राष्ट्रांना त्यांच्याविरुध्द उठवीन. ज्या राष्ट्रांची त्यांना माहिती नव्हती, अशी राष्ट्रे देशावर आक्रमण करून त्यांचा नाश करतील आणि हे प्रसन्न राष्ट्र नाश पावेल.”

## देवाचे यरुशलेमला आशीर्वाद देण्याचे वचन

8 सर्व शक्तिमान परमेश्वराचा हा संदेश आहे. 2सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “माझे सियोनवर खरोखरीच प्रेम आहे. माझे तिच्यावर इतके प्रेम आहे की तिची माझ्यावरील श्रध्दा उडताच माझा संताप झाला.” 3परमेश्वर म्हणतो, “मी सियोनला परत आलो आहे. मी यरुशलेमला रहात आहे. यरुशलेम “निष्ठावान नगरी म्हणून ओळखली जाईल. सर्व शक्तिमान परमेश्वराचा पर्वत, “पवित्र पर्वत” म्हणून ओळखला जाईल.”

4सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “वृध्द स्त्री–पुरुष यरुशलेमच्या सार्वजनिक ठिकाणी पुन्हा दिसू लागतील. लोक इतके दीर्घायुषी होतील की चालताना त्यांना काठीच्या आधाराची गरज भासेल. 5रस्त्यावर खेळणाऱ्या मुलांनी ती नगरी गजबजून जाईल. 6देव म्हणतो, वाचलेल्यांना* ह्याचे आश्चर्य वाटेल. आणि मलाही विस्मय वाटेल.”

7सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “पाहा! पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील देशांतून मी माझ्या माणसांची मुक्तता करीत आहे. 8मी त्यांना परत येथे आणीन ते यरुशलेममध्ये राहतील. ते माझे लोक होतील आणि मी त्यांचा कृपावंत व श्रध्दावान देव होईल.”

9सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “सामर्थ्यवान व्हा! सर्व शक्तिमान परमेश्वराने मंदिराच्या पुनर्निर्मितीच्या वेळी पाया घालताना, संदेष्ट्यांमार्फत जो संदेश दिला, तोच तुम्ही आज ऐकत आहात. 10त्या वेळेपूर्वी, पगारी कामगार ठेवायला वा भाड्याने जनावरे घ्यायला लोकांजवळ पैसा नव्हता. दळणवळण सुरक्षित नव्हते. सर्वच अडचणीतून सुटका झाली नव्हती. मी प्रत्येकाला दुसऱ्याविरुध्द भडकविले होते. 11पण आता तसे नाही. वाचलेल्यांची स्थिती तशी असणार नाही.” सर्व शक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.

12“ते लोक शांततेत लागवड करतील. त्यांच्या द्राक्षवेलींना द्राक्षे लागतील. जमीन चांगली पिके देईल आणि आकाश पाऊस देईल. मी ह्या सर्व गोष्टी माझ्या ह्या लोकांना देईन. 13शिव्या शाप देण्यासाठी लोकांनी इस्राएल व यहूदाच्या नावाचा वापर करण्यास सुरवात केली होती. पण मी इस्राएलची व यहूदाची पापातून मुक्तता करीन त्यांची नावे म्हणजे आशीर्वचन बनतील तेव्हा घाबरू नका! सामर्थ्यवान. व्हा!”

14सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “तुमच्या पूर्वजांनी मला संतापविले. म्हणून मी त्यांचा नाश करण्याचा निर्धार केला. माझा निश्चय बदलायचा नाही असे मी ठरविले.” सर्व शक्तिमान परमेश्वर असे म्हणाला. 15“पण आता मात्र माझे मन:परिवर्तन झाले आहे. आणि म्हणून मी यरुशलेमवर व यहूदाच्या लोकांशी चांगले वागायचे ठरविले आहे. तेव्हा घाबरू नका! 16पण तुम्हाला पुढील गोष्टी करणे भाग आहे! तुमच्या शेजाऱ्यांना सत्य सांगा. न्यायालयात निर्णय घेतेवेळी जे सत्य आणि योग्य अशाच गोष्टी करा. त्यामुळे शांतता येईल. 17आपल्या शेजाऱ्यांना त्रास देण्यासाठी कट करू नका. खोटी आश्वासने देऊ नका. अशा वाईट गोष्टीत आनंद मानू नका. का? कारण या गोष्टींची मला चीड आहे.” परमेश्वराने या गोष्टी सांगितल्या आहेत.

18सर्व शक्तिमान परमेश्वराकडून मला पुढील संदेश मिळाला: 19सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “तुम्ही चौथ्या, पाचव्या, सातव्या आणि दहाव्या महिन्याच्या विशिष्ट दिवशी शोक प्रकट करता उपवास करता. आता त्या शोकदिनांचे सणावारात परिवर्तन करा. ते छान, आनंदाचे सुटीचे दिवस होतील तुम्ही सत्य आणि शांती ह्यावर प्रेम केलेच पाहिजे.”

20सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “भविष्यात, पुष्कळ गावचे लोक यरुशलेमला येतील.

21निरनिराळ्या गावातील लोक एकमेकांना भेटतील. ते म्हणतील, ‘आम्ही सर्व शक्तिमान परमेश्वराची उपासना करण्यास जात आहोत.’ आणि इतर लोक म्हणतील, ‘आम्हालासुध्दा यावेसे वाटते.’”

22पुष्कळ लोक आणि बलिष्ठ राष्ट्रे, सर्व शक्तिमान परमेश्वराच्या शोधात आणि त्याची उपासना करण्यासाठी यरुशलेमला येतील. 23सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, “त्या वेळी, वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक यहूदाकडे येऊन त्याचा कोट पकडून त्याला विचारतील, ‘देव तुमच्याबरोबर आहे असे आम्ही ऐकलंय! त्याची उपासना करण्यासाठी आम्ही तुझ्याबरोबर येऊ का?’”

## इतर राष्ट्रांच्या विरोधात न्याय

9 देवाचा संदेश. एक शोकसंदेश हद्राख देश आणि त्या देशाची राजधानी दिमिष्क यांच्याबद्दल परमेश्वराचा संदेश: “इस्राएलमधील वंशांनाच फक्त देवाचे ज्ञान आहे असे नाही. प्रत्येकजण त्याच्याकडे मदतीची अपेक्षा करतो. 2हद्राखच्या सीमेवर हमाथ आहे. सोर व सीदोन हीही सीमेवर आहेत. (येथील लोक बुध्दिवान आहेत.) आणि

---

**वाचलेले** शत्रूंनी यहूदा आणि इस्राएल येथे केलेल्या विद्ध्वंसातून निसटलेले यहूदी लोक.

त्यांच्या विरुध्द हा संदेश आहे. 3सोरची बांधणी
किल्ल्याप्रमाणे आहे. तेथील लोकांनी प्रचंड चांदीचा साठा
केला आहे. त्यांच्याकडे धुळीसारखी चांदी व मातीसारखे
सोने आहे. 4पण परमेश्वर, आमचा प्रभू ते सर्व घेईल. तो
त्या नगराच्या शक्तिशाली आरमाराचा नाश करील आणि
ते नगर आगीत भस्मसात करील.

5"हे सर्व अष्कलोनचे लोक पाहतील आणि भयभीत
होतील. गज्जाचे लोक भीतीने थरथर कापतील आणि
एक्रोनचे लोक हे सर्व बघून आपल्या सर्व आशा सोडून
देतील. गज्जामध्ये राजा राहणार नाही. ह्यापुढे
अष्कलोनमध्ये एकही माणूस उरणार नाही. 6अश्दोदच्या
लोकांना आपले खरे जन्मदाते कोण ह्याचा पत्ता लागणार
नाही. गर्विष्ठ पलिष्ट्यांचा मी पूर्णपणे नाश करीन. 7ते,
यापुढे, रक्ताने माखलेले ताजे मांस वा निषिध्द अन्न खाणार
नाहीत. वाचलेले, थोडेफार पलिष्टे माझ्या लोकांत सामील
होतील आणि यहूदातील आणखी एक घराणे म्हणून
राहतील. एक्रोनचे लोक यबूश्यासारखेच माझ्या माणसांत
मिसळून जातील. मी माझ्या देशाचे रक्षण करीन. 8माझ्या
देशातून मी शत्रू-सैन्याला जाऊ देणार नाही. शत्रूंकडून
माझ्या लोकांना इजा पोहचवू देणार नाही. कारण माझ्या
लोकांनी पूर्वी किती यातना भोगल्या आहेत ते मी स्वत:
पाहिले आहे."

## भावी राजा

9सियोन, आनंदोत्सव कर! यरुशलेमवासीयांनो,
आनंदाने जल्लोश करा! पाहा! तुमचा राजा तुमच्याकडे
येत आहे. तो विजयी व चांगला राजा आहे. पण तो विनम्र
आहे. एका गाढवीच्या शिंगरावर, तो स्वार झाला आहे.

10राजा म्हणतो, "मी एफ्राईममधील रथांचा आणि
यरुशलेममधील घोडदळाचा नाश केला. युध्दात वापरलेले
धनुष्य-बाण मोडून टाकले." राजा शांतीची वार्ता राष्ट्रांना
देईल. तो राजा समुद्राच्या एका टोकापासून दुसऱ्या
टोकापर्यंत व पृथ्वीवर सर्वदूरपर्यंत राज्य करील.

## परमेश्वर त्याच्या माणसांना वाचवील

11यरुशलेम, तुझ्या करारावर शिक्क मोर्तब करण्यासाठी
आम्ही रक्त वापरले. म्हणून मी जमिनीतील खळग्यात
बंदिस्त असलेल्या तुझ्या लोकांना मुक्त करतो.*

12कैद्यांनो, घरी जा! आता तुमच्याकडे आशा
करण्यासारखे काहीतरी आहे. मी तुमच्याकडे येत आहे.
हे मी आता तुम्हाला सांगतो :

13यहूदा, मी तुझा धनुष्यासारखा उपयोग करीन.
एफ्राईमचा उपयोग मी बाणांसारखा करीन. इस्राएल, ग्रीसशी
लढण्यासाठी मी तुमचा उपयोग दणकट तलवारीसारखा
करीन.

14परमेश्वर त्यांना दर्शन देईल आणि विजेप्रमाणे आपले
बाण सोडील. परमेश्वराने, माझ्या प्रभुने, तुतारी फुंकताच
वाळवंटातील वाळूच्या वादळाप्रमाणे सैन्य हल्ला करील.

15सर्व शक्तिमान परमेश्वर आपल्या सैन्याचे रक्षण
करील. दगड व गोफणीचा उपयोग करून ते शत्रूचा
पराभव करतील. ते त्यांच्या शत्रू-सैन्याचे रक्त सांडतील.
मद्याप्रमाणे शत्रूच्या रक्ताचे पाट वाहतील. ते रक्त, वेदीच्या
कोपऱ्यांवर शिंपडलेल्या रक्ताप्रमाणे असेल.

16त्यावेळी, मेंढपाळ जसे आपल्या मेंढ्यांचे रक्षण करतो,
तसे परमेश्वर देव आपल्या लोकांचे रक्षण करील. आपले
लोक त्याला मूल्यवान वाटतील. ते त्याला त्याच्या
जमिनीवर चमकणाऱ्या रत्नांप्रमाणे वाटतील.

17सर्व काही चांगले आणि सुंदर होईल. सर्वत्र
आश्चर्यकारक पीक येईल. पण हे पीक फक्त अन्नधान्य
व मद्य देणारे नसेल तर तरुण-तरुणींचे असेल.

## परमेश्वराचे वचन

10 वसंत ऋतूत पावसासाठी परमेश्वराची प्रार्थना
करा. देव वीज पाठवील आणि पाऊस पडेल.
देव प्रत्येकाच्या शेतातील पीक वाढवील.

2लोक, भविष्य जाणण्यासाठी, त्यांच्याकडील लहान
मूर्तीचा व जादूटोण्याचा उपयोग करतात. पण ते सर्व व्यर्थ
आहे. त्यांना दृष्टान्त होतात आणि ते त्यांना पडलेल्या
स्वप्नांबद्दल सांगतात. पण ते सर्व केवळ अर्थहीन थोतांड
आहे. लोकांची स्थिती मदतीसाठी रडत सैरभैर फिरणाऱ्या
मेंढ्यांसारखी आहे. पण त्यांना वळविणारा कोणीही मेंढपाळ
नाही.

3परमेश्वर म्हणतो, "मी मेंढपाळांवर (नेत्यांवर) फार
रागावलो आहे, माझ्या मेंढरांच्या (लोकांच्या) ह्या स्थितीला
मी त्यांना जबाबदार धरले आहे." (यहूदातील लोक म्हणजे
देवाच्या मेंढ्यांचा कळपच. सर्व शक्तिमान परमेश्वर ह्या
कळपाची खरोखरच काळजी वाहतो. एखादा सैनिक जशी
आपल्या सुंदर घोड्याची काळजी घेतो, तशीच काळजी देव
ह्या माणसांची घेतो.)

4"यहूदातून कूच करणाऱ्या सैन्याबरोबरच कोनशिला,
तंबूच्या खुंट्या, युध्दात वापरावयाची धनुष्ये हे सर्व येईल.
5ते आपल्या शत्रूचा पराभव करतील. रस्त्यांतून चिखल
तुडवीत जावे, तसे ते शत्रूला तुडवीत जातील. परमेश्वर
त्यांच्याबाजूला असल्याने ते लढाई करतील आणि शत्रूच्या
घोडदळाचासुध्दा पराभव करतील. 6मी यहूद्यांच्या लोकांना
सामर्थ्यवान बनवीन. योसेफच्या वंशाला युध्द जिंकण्यास
साहाय्य करीन. आणि त्यांना सुरक्षितपणे व सुखरूप परत
आणीन. त्यांचे सांत्वन करीन आणि मी त्यांचा कधीच
त्याग केला नव्हता, असेच त्यांच्याशी वागेन. मी परमेश्वर
त्यांचा देव आहे व त्यांना मदत करीन. 7भरपूर मद्य

---

**जमिनीतील ... मुक्त करतो** जमिनीतील मोठमोठ्या खळग्यात
लोक पाणी साठवीत. कधी कधी ह्यांचा उपयोग कारागृहासारखा
पण केला जाई.

घेतलेल्या सैनिकांप्रमाणे एफ्राईमचे लोक खुष होतील.
लहान मुले आनंदून जातील. तेही खुष होतील.
परमेश्वराबरोबरचा त्यांचा वेळ आनंदात जाईल.
8“मी त्यांना शीळ वाजवून एकत्र बोलवीन. मी त्यांना
खरोखर वाचवीन. त्यांची संख्या खूप वाढेल. 9होय! मी
माझ्या लोकांना राष्ट्रां-राष्ट्रांत पांगवीत आलो आहे. पण
त्या दुरदूरच्या ठिकाणीही ते माझे स्मरण ठेवतील. ते
आणि त्यांची मुलेबाळे जगतील, वाचतील आणि परत
येतील. 10मी त्यांना मिसरमधून व अश्शूरमधून परत
आणीन मी त्यांना गिलादच्या भागात आणीन. पण तेथे
पुरेशी जागा नसल्याने मी त्यांना लबानोनमध्ये राहू देईन.”
11पूर्वी जसे देवाने आपल्या लोकांना मिसरच्या बाहेर आणले
तसेच तो आता आणील. तेव्हा देवाने समुद्राच्या लाटांवर
प्रहार करून समुद्र दुभंगविला होता आणि लोक तो
संकटाचा समुद्र पार करून आले होते. आता परमेश्वर
नद्यांचे पाणी आटवील. तो अश्शूरचे गर्वहरण करील
आणि मिसरची सत्ता नष्ट करील. 12परमेश्वर त्याच्या
लोकांना सामर्थ्यवान करील ते देवासाठी व त्याच्या
नावासाठी जगतील. परमेश्वरानेच ह्या गोष्टी सांगितल्या.

## यहूदाच्या आसपासच्या राष्ट्रंना देव शिक्षा करील

11 लबानोन, तू आपली दारे उघड म्हणजे अग्नी
आत शिरून तुझे गंधसरू जाळून टाकील.
2गंधसरू उन्मळून पडले म्हणून देवदार आक्रोश
करतील. ते प्रचंड वृक्ष दुसरीकडे नेले जातील. जंगलतोड
पाहून बाशानचे अल्लोन वृक्ष आकांत करतील.
3रडणाऱ्या मेंढपाळांचा आक्रोश ऐका. त्यांच्या बलवान
पुढाऱ्यांना दूर नेले गेले. तरूण सिंहाच्या गर्जना ऐका.
यार्देन नदीकाठची दाट झुडुपे काढून नेली

4परमेश्वर, माझा देव, म्हणतो, “मारण्यासाठी
वाढविलेल्या मेंढ्यांची काळजी घ्या. 5त्यांचे पुढारी
मालकांसारखे व व्यापाऱ्यांसारखे आहेत. मालकांनी मेंढ्या
मारल्या, तरी त्यांना शिक्षा होत नाही. व्यापारी मेंढ्या
विकतात आणि म्हणतात, “परमेश्वराचे स्तुतिस्तोत्र गा.
मी श्रीमंत झालो.” मेंढपाळांना मेंढ्यांबद्दल वाईट वाटत
नाही. 6मला या देशात राहणाऱ्या लोकांबद्दल दु:ख होत
नाही.” परमेश्वर असे म्हणाला, “पाहा! मी प्रत्येकाचा
शेजाऱ्याकडून व राजाकडून छळ मांडीन आणि अशारीतीने
त्यांच्या देशाचा नाश करवीन-मी त्यांना अडविणार नाही.”
7म्हणून मी त्या बळी देण्यासाठी पोसलेल्या मेंढ्यांची
काळजी घेतली. गरीब बिचाऱ्या मेंढ्या! मला दोन काठ्या
मिळाल्या. एका काठीला मी नाव दिले कृपा व दुसरीला
ऐक्य मग मी मेंढ्यांची निगा राखण्यास सुरवात केली.
8एका महिन्यात मी तीन मेंढपाळांना कामावरून काढून
टाकले. मला मेंढ्यांचा राग आला व त्या माझा तिरस्कार
करू लागल्या. 9मग मी त्यांना म्हणालो, “मी जातो मी
तुमचा सांभाळ करणार नाही. ज्यांना मरायचे आहे, त्यांना
मी मरू देईन. ज्यांना नाश पावायचे आहे, त्यांचा नाश
होऊ देईन यातून उरलेल्या एकमेकींचा नाश करतील.”
10मग मी “कृपा नावाची काठी उचलली आणि मोडली.
लोकांचा देवाशी झालेला करार मोडल्याचे मी यावरून
सूचित केले. 11म्हणून त्या दिवसापासून करार संपुष्टात
आला आणि माझ्याकडे निरखून पाहणाऱ्या त्या गरीब
मेंढ्यांची खात्री पटली की हा परमेश्वराकडून आलेला
संदेश होता.
12मग मी म्हणालो, “तुमची इच्छा असल्यास माझा पगार
द्या. इच्छा नसल्यास देऊ नका.” तेव्हा त्यांनी मला तीस
चांदीची नाणी दिली. 13तेव्हा परमेश्वर मला म्हणाला,
“त्यांच्यालेखी माझी किंमत एवढी आहे. एवढी मोठी
रक्कम* तू मंदिराच्या खजिन्यात फेकून दे.” मग मी तीस
चांदीची नाणी परमेश्वराच्या मंदिराच्या पैशाच्या पेटीत
टाकली. 14मग मी ऐक्य नावाच्या काठीचे दोन तुकडे
केले. यहूदा आणि इस्राएल यांच्यामधील ऐक्य संपल्याचे
दाखविण्यासाठी मी असे केले.
15मग परमेश्वर मला म्हणाला, “आता, मेंढ्या
वळविण्यासाठी मूर्ख मेंढपाळ कदाचित वापरतील अशा
वस्तू शोधून काढ. 16ह्याचा अर्थ मी ह्या देशासाठी
नवीन मेंढपाळ निवडीन असा होईल. पण ह्या तरुण
माणसाला हरवलेल्या मेंढ्यांची काळजी घेणे जमणार
नाही. त्याला जखमी मेंढ्यांचा औषधोपचार करून त्यांच्या
जखमा भरून काढणे जमणार नाही. ज्या मेंढ्या वाचल्यात
त्यांचा चारापाणी तो करू शकणार नाही. सशक्त मेंढ्या
संपूर्ण खाल्ल्या जातील. फक्त त्यांचे खूर शिल्लक
राहतील.”

17हे माझ्या कुचकामी मेंढपाळा, तू माझ्या मेंढ्यांना
टाकून गेलास! त्याला शिक्षा करा! त्याच्या उजव्या खांद्यावर
व उजव्या डोळ्यावर तलवारीने वार करा. म्हणजे त्याचा
उजवा खांदा निकामी होईल आणि तो उजव्या डोळ्याने
अंधळा होईल.

## यहूदाच्या सभोवतालच्या राष्ट्रांविषयी दृष्टान्त

12 इस्राएलबद्दल परमेश्वराचा शोकसंदेश.
परमेश्वराने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली.
माणसात आत्मा घातला. त्याने पुढील गोष्टी सांगितल्या:
2“पाहा! मी यरुशलेमला तिच्या भोवतालच्या राष्ट्रांचा
विषाचा प्याला बनवीन. ती राष्ट्रे त्या नगरीवर चढाई
करून येतील. आणि सर्वच्या सर्व यहूदाला वेढा पडेल.
3पण मी यरुशलेमला प्रचंड खडकाप्रमाणे करीन-जो तिचा

---

**एवढी मोठी रक्कम** देव चेष्टा करीत होता. ही रक्कम म्हणजे एका गुलामाची किंमत होती.

कब्जा घ्यायचा प्रयत्न करील, तो स्वत:च जखमी होईल. त्या लोकांना जखमा होतील आणि ओरखडे उठतील. पण जगातील सर्व राष्ट्रे यरुशलेमच्या विरुध्द लढण्यासाठी एकत्र येतील. 4पण, त्यावेळी, मी घोड्याला विथरवीन. त्यामुळे घोडेस्वाराचा गोंधळ उडेल. मी शत्रूच्या घोड्यांना अंधळे करीन. माझे डोळे मात्र उघडे असतील. आणि माझी नजर यहूद्यांच्या लोकांवर असेल. 5यहूदाचे नेते लोकांना प्रोत्साहन देतील. ते म्हणतील, "सर्व शक्तिमान परमेश्वर तुमचा देव आहे. तो आपल्याला बळ देतो." 6त्यावेळी मी यहूद्यांच्या नेत्यांना वणव्याप्रमाणे बनवीन. वणव्यात गवताची काडी जशी भस्मसात होते, तसे ते त्यांच्या शत्रूंचा नाश करतील. त्यांच्या सभोवतीच्या सर्व शत्रूंचा ते नाश करतील. यरुशलेमवासी काळजीमुक्त होतील व आराम करतील."

7परमेश्वर, प्रथम, यहूदाच्या लोकांना वाचवील म्हणजे यरुशलेममधील लोकांना फारशा बढाया मारता येणार नाहीत. यहूदातील इतर लोकांपेक्षा आम्ही फार बरे अशा बढाया दावीदच्या घराण्यातील लोकांना आणि यरुशलेममधील अन्य लोकांना मारता येणार नाहीत. 8पण परमेश्वर यरुशलेमच्या लोकांना वाचवील. सर्वात जास्त दुर्बल माणूससुध्दा दावीदासारखा वीर बनेल. आणि दावीदाच्या घराण्यातील पुरुष देवतांप्रमाणे होतील. परमेश्वराच्या स्वत:च्या दूताप्रमाणे ते लोकांचे नेतृत्व करतील.

9परमेश्वर म्हणतो, "त्यावेळी, यरुशलेमशी युध्द करण्यास आलेल्या राष्ट्रांचा नाश करण्याचा मी प्रयत्न करीन. 10मी दावीदाच्या घराण्यात आणि यरुशलेममध्ये राहणाऱ्या लोकांत करुणेचा व दयेचा आत्मा ओतीन. ज्यांनी "एका"ला टोचले, तेच माझ्याकडे बघतील, आणि कष्टी होतील. आपला एकुलता एक मुलगा वारल्यावर अथवा पहिला मुलगा वारल्यावर एखाद्याला जेवढे दु:ख होते, तेवढेच दु:ख त्यांना होईल. 11त्यावेळी यरुशलेममध्ये भंयकर शोककळा पसरेल आणि आक्रोश होईल. तो आक्रोश, मगिद्दोनच्या दरीत हदाद्रिम्मोनाच्या मृत्यूसमयी झालेल्या आक्रोशासारखा असेल. 12प्रत्येक कुटुंब आपापले दु:ख व्यक्त करील. दावीदाच्या कुळातील पुरुष, बायका दु:ख करतील. नाथानाचे घराणेही दु:ख करील. त्यांच्या बायकाही दु:ख करतील. 13लेवी घराण्यातील पुरुष व बायका आपापसात शोक करतील. शिमी घराण्यातील पुरुष व बायका आपापसात शोक करतील. 14आणि इतर कुळांतही असेच घ्ड़ेल. पुरुष व स्त्रिया स्वतंत्रपणे शोक करतील."

13 त्यावेळी दावीदाच्या वंशासाठी आणि यरुशलेममध्ये राहणाऱ्या इतर लोकांसाठी पाण्याचा नवा झरा फुटेल. त्याचा उपयोग लोकांची पापे धुण्यासाठी आणि त्यांना शुध्द करण्यासाठी होईल.

## यापुढे खोटे संदेष्टे राहणार नाहीत

2सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, "त्या वेळी जगातील सर्व मूर्तींचे मी उच्चाटन करीन. लोकांना त्यांची नावेसुध्दा आठवणार नाहीत. मी ढोंगी संदेष्ट्यांचा आणि अशुध्द आत्म्यांचा नायनाट करीन. 3एखाद्याने भविष्य वर्तविणे चालूच ठेवले, तर त्याला शिक्षा केली जाईल. त्याचे स्वत:चे आई-वडील त्याला म्हणतील, 'परमेश्वराच्या नावाने तू खोटे बोललास तेव्हा तुला मरणाशिवाय गत्यंतर नाही.' भविष्य वर्तविल्याबद्दल त्याचे आई–वडील त्याला भोसकतील. 4त्यावेळी संदेष्ट्यांना स्वत:च्या दृष्टान्तांची आणि संदेशाची लाज वाटेल. ज्यावरून संदेष्टा ओळखला जातो असे सणाचे कापड ते वापरणार नाहीत. भविष्याच्या नावाखाली खोटेनाटे सांगून लोकांना फसविण्यासाठी ते असे कपडे घालणार नाहीत. 5'मी संदेष्टा नाही. मी शेतकरी आहे मी लहानपणापासून शेतीच करीत आलोय.' असे ते सांगतील. 6पण इतर लोक त्याला विचारतील, 'मग तुझ्या हातावर जखमा कसल्या?' तेव्हा तो उत्तर देईल, 'मित्राच्या घरात मला मार देण्यात आला!'"

7सर्व शक्तिमान परमेश्वर म्हणतो, "हे तलवारी, मेंढपाळांवर प्रहार कर. माझ्या मित्रावर वार कर. मेंढपाळावर वार कर म्हणजे मेंढ्या पळून जातील आणि मी त्या लहान जीवांना शिक्षा करीन. 8त्या प्रदेशातील 2/3 लोक जखमी होऊन मरतील. पण 1/3 वाचतील. 9मग वाचलेल्यांची मी परीक्षा घेईन. मी त्यांना खूप त्रास देईन. चांदीची शुध्दता सिध्द करण्यासाठी तिला आगीत टाकले जाते. त्या आगीप्रमाणे संकटे येतील. सोन्याची पारख करतात तसा मी त्यांना पारखीन. मग ते माझा धावा करतील आणि मी त्यांना प्रतिसाद देईन. मी म्हणेण, 'तुम्ही माझे लोक आहात.' आणि ते म्हणतील, 'परमेश्वर आमचा देव आहे.'"

## निवाड्याचा दिवस

14 पाहा! परमेश्वराचा न्यायदानाचा ठराविक दिवस आहे. तुम्ही लुटलेली संपत्ती तुमच्या शहरात वाटली जाईल. 2यरुशलेमशी लढण्यासाठी मी सर्व राष्ट्रांना एकत्र करीन. ते नगरी ताब्यात घेतील आणि घरांचा नाश करतील. स्त्रियांवर बलात्कार करतील व अर्धे–अधिक लोक कैद केले जातील. पण उरलेल्या लोकांना नगरीतून नेले जाणार नाही. 3मग परमेश्वर त्या राष्ट्रांविरुध्द युध्द पुकारेल ते खरोखरीचे युध्द असेल. 4त्यावेळी, तो यरुशलेमच्या पूर्वेला असलेल्या जैतून पर्वतावर उभा राहील. जैतुन पर्वत दुभंगेल पर्वताचा काही भाग उत्तरेकडे व काही दक्षिणेकडे सरकेल. पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत एक खोल दरी निर्माण होईल. 5दरी जसजशी रुंदावून तुमच्याकडे सरकेल, तसतसे तुम्ही दूर पळायचा प्रयत्न कराल यहूदाचा राजा उज्जीया ह्याच्या काळात झालेल्या भूकंपाच्या वेळी तुम्ही जसे पळाला तसे पळाल. पण माझा परमेश्वर, देव

तेथे अवतरेल आणि त्याच्याबरोबर त्याचे सर्व पवित्र अनुयायी असतील.

6–7तो एक विशेष दिवस असेल त्यावेळी प्रकाश, गारठा वा कडाक्याची थंडी नसेल. कसे ते परमेश्वरालाच ठाऊक. पण तेव्हा दिवसही नसेल वा रात्र. त्यामुळे, नेहमीच्या अंधाराच्या वेळीही प्रकाश असेल. 8तेव्हा यरुशलेममधून सतत जिवंत पाण्याचा झरा वाहील* त्याला दोन पाट फुटतील. एक पाट पूर्वेकडे वाहत जाईल तर दुसरा पश्चिमेकडे वाहत जाऊन भूमध्य समुद्राला मिळेल. तो संपूर्ण वर्षभर–हिवाळ्यात व उन्हाळ्यात वाहील. 9त्यावेळी, परमेश्वर सर्व पृथ्वीचा राजा असेल. परमेश्वर एकच आहे व त्याचे नावही “एक”च आहे. 10तेव्हा यरुशलेमभोवतालचा सर्व प्रदेश अराबाच्या वाळवंटासारखा ओसाड होईल. निगेवमधील गेबापासून रिम्मोनपर्यंत पसरलेल्या वाळवंटासारखा तो देश होईल. पण सर्व यरुशलेम मात्र पुन्हा उभारले जाईल–अगदी बन्यामीनच्या प्रवेशद्वारापासून ते पहिल्या प्रवेशद्वारापर्यंत (कोपऱ्यावरच्या द्वारापर्यंत) आणि हनानेलच्या मनोऱ्यापासून राजाच्या द्राक्षकुंडापर्यंत) 11लोक तेथे वस्ती करण्यास जातील. यापुढे कोणीही शत्रू त्यांचा नाश करायला येणार नाही. यरुशलेम अगदी सुरक्षित असेल. 12पण यरुशलेमविरूध्द लढलेल्या राष्ट्रांना परमेश्वर शिक्षा करील. तो त्या राष्ट्रांना रोगराईने पछाडेल. जिवंतपणीच लोकांची कातडी कुजू लागेल. त्याचे डोळे त्यांच्या खाचांत आणि जिभा तोंडांत सडतील. 13–15हा भयंकर रोग शत्रू-सैन्याच्या छावणीत पसरेल. त्यांच्या घोड्यांना, खेचरांना, उंटाना आणि गाढवांनाही हा भयंकर रोग होईल. तेव्हा लोकांना खरोखरच परमेश्वराची भीती वाटेल प्रत्येकजण आपल्या शेजाऱ्याचा हात धरील आणि शेजारी एकमेकांशी भांडतील.* यहूदाचे लोक यरुशलेममध्ये लढतील. पण नगरीभोवतीच्या सर्व राष्ट्रांकडून त्यांना संपत्ती मिळेल त्यांना भरपूर सोने, चांदी आणि कपडालत्ता मिळेल. 16यरुशलेमशी लढण्यास आलेल्यापैकी काही वाचतील. आणि सर्व शक्तिमान परमेश्वराची उपासना करण्यासाठी ते दरवर्षी येतील. मंडपाचा सण साजरा करायला ते यरुशलेमला येतील. 17पृथ्वीवरील कोणत्याही कुटुंबातील लोक यरुशलेमला प्रभुराजाची, सर्व शक्तिमान परमेश्वराची उपासना करायला गेले नाहीत तर परमेश्वर त्यांच्या प्रदेशात पाऊस पाडणार नाही. 18जर मिसरमधील एखादे घराणे मंडपाचा सण साजरा करण्यासाठी आले नाही, तर शत्रूंच्या राष्ट्रांत परमेश्वराने जो भयंकर रोग पसरविला होता, तो रोग त्यांना होईल. 19“मंडपाच्या सणा”ला न आल्याबद्दल मिसरला व इतर राष्ट्रांना ही शिक्षा असेल. 20त्यावेळी, सर्व गोष्टी देवाच्या मालकीच्या असतील अगदी घोड्यांच्या सरंजामावरसुध्दा परमेश्वरासाठी पवित्र अशी चिठ्ठी असेल. परमेश्वराच्या मंदिरात वापरली जाणारी भांडी, वेदीवर वापरल्या जाणाऱ्या कटोऱ्यांइतकीच महत्वाची असतील. 21खरे, म्हणजे, यरुशलेममधील व यहूदातील प्रत्येक ताटावर सर्व शक्तिमान परमेश्वरास पवित्र असे लिहिलेले असेल. परमेश्वराची उपासना करणारा प्रत्येकजण या भांड्यांमध्ये अन्न शिजवून खाऊ शकेल.

त्यावेळी सर्व शक्तिमान परमेश्वराच्या मंदिरात वस्तूंची खरेदी-विक्री करणारे कोणीही व्यापारी नसतील.

---

**तेव्हा ... वाहील** शब्दश: “यरुशलेममधून जिवंत पाणी वाही.” यरुशलेमला पाणीपुरवठा करणारा मुख्य “गिहो” झरा सतत वाहत नसे.

**प्रत्येकजण ... भांडतील** ह्याचा हीब्रूतील अर्थ समजणे कठीण आहे.

# मलाखी

1 देवाचा संदेश. परमेश्वराकडून आलेला संदेश. हा
संदेश देण्यासाठी देवाने मलाखीचा उपयोग केला.

### देवाचे इस्राएलवर प्रेम आहे

2परमेश्वर म्हणाला, "माझे तुमच्यावर प्रेम आहे."
पण तुम्ही म्हणालात, "कशावरुन तू आमच्यावर प्रेम
करतोस?"
परमेश्वर म्हणाला, "एसाव याकोबचा भाऊ होता.
बरोबर? पण मी याकोबला निवडले.* 3आणि मी एसावचा
स्वीकार केला नाही.* मी त्याच्या डोंगरीदेशांचा नाश
केला. एसावच्या देशाचा नाश झाला. आता तिथे फक्त
रानटी कुत्री* राहतात."
4अदोमचे लोक कदाचित् असे म्हणतील, "आमचा नाश
झाला. पण आम्ही परत जाऊन आमची गावे वसवू."
पण सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "जर त्यांनी त्यांची
गावे पुन्हा वसविली, तर मी पुन्हा त्यांचा नाश करीन."
लोक अदोमला दुष्टांचा देश म्हणतात. लोक म्हणतात,
की परमेश्वर कायम त्या देशाचा तिरस्कार करील.
5तुम्ही हे पाहिले, म्हणूनच तुम्ही म्हणालात "देव महान
आहे. अगदी इस्राएलच्या बाहेरसुध्दा तो महान आहे."

### लोक देवाला मान देत नाहीत

6सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणाला, "मुले वडिलांना मान
देतात. सेवक मालकांना मान देतात. मी तुमचा पिता
आहे, मग तुम्ही माझा आदर का करीत नाही? मी
तुमचा प्रभू आहे, मग मला तुम्ही मान का देत नाही?
याजकांनो, तुम्ही माझ्या नावाचा मान राखत नाही."
उलट तुम्ही म्हणता "आम्ही तुझ्या नावाचा मान राखत
नाही, असे तुला वाटावे असे आम्ही काय केले आहे?"
7परमेश्वर म्हणाला, "तुम्ही अशुध्द भाकरी माझ्या
वेदीजवळ आणता."
पण तुम्ही विचारता "ती कशामुळे ती भाकरी अशुध्द
झाली?"
परमेश्वर म्हणाला, "माझ्या मेजाचा (वेदीचा) तुम्ही आदर
करीत नाही. 8यज्ञ करण्यासाठी तुम्ही अंधळी जनावरे
आणता. हे चूक आहे. यज्ञबली म्हणून तुम्ही आजारी व
पंगू जनावरे आणता हे बरोबर नाही. अशी आजारी जनावरे
राज्यपालाला द्यायचा प्रयत्न करा. तो भेट म्हणून अशा
रोगी जनावरांचा स्वीकार करील का? नाही तो त्यांचा
स्वीकार करणार नाही." सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या
गोष्टी सांगितल्या.
9"याजकांनो, देवाने आमच्यावर कृपा करावी, म्हणून
तुम्ही देवाची आळवणी करावी. पण तो तुमचे ऐकणार
नाही. आणि तो तुमचाच दोष असेल." सर्वशक्तिमान
परमेश्वर असे म्हणाला.
10"तुमच्यातील काही याजकांनी मंदिराची प्रवेशद्वारे बंद
करून योग्यरीतीने अग्नी प्रज्वलित करु शकतात पण मी
त्यांच्यांवर प्रसन्न नाही. मी त्यांच्या भेटी स्वीकारणार
नाही." सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणाला,
11"सर्वजगातील लोक माझ्या नावाचा मान राखतात.
सर्व जगातील लोक मला उत्तम भेटी आणतात. भेट म्हणून
उत्तम धूप माझ्यापुढे जाळतात. का? कारण त्या सर्व लोकांना
माझ्या नावाचे महत्व वाटते." सर्वशक्तिमान परमेश्वराने
ह्या गोष्टी सांगितल्या.

12"पण तुम्ही लोक माझ्या नावाचा मान राखीत नाही
असे दिसते. 'परमेश्वराचा मेज (वेदी) अशुध्द आहे' असे
तुम्ही म्हणता. 13आणि त्या वेदीवरचे अन्न तुम्हाला आवडत
नाही तुम्ही त्याचा वास घेता आणि खाण्यास नकार देता.
तुमच्या मते ते वाईट आहे. पण हे खरे नाही. मग तुम्ही
आजारी, लंगडी अथवा (जबरदस्तीने) चोरून आणलेली
जनावरे माझ्यासाठी आणता. रोगी जनावरांना मला यज्ञबली
म्हणून अर्पण करण्याचा प्रयत्न करता. पण मी त्यांचा
स्वीकार करणार नाही. 14काहीजणांजवळ चांगले नर
जातीचे पशू आहेत. ते, ते पशू मला यज्ञबली म्हणून अर्पण
करु शकतील पण ते तसे करीत नाहीत. काही लोक
चांगली जनावरे आणतात. ती मला अर्पण करण्याचे वचनही
देतात पण गुपचूप आजारी जनावरांबरोबर त्यांची
आदलाबदल करतात, आणि मला रोगी जनावरे अर्पण
करतात. अशा लोकांचे वाईट होईल. मी महान राजा
आहे. तुम्ही मला मान द्यावा. सर्व जगातील लोक मला

---

**निवडले** किंवा "प्रेम केले."

**स्वीकार केला नाही** किंवा "तिरस्कार केला."

**रानटी कुत्री** शब्दश: "कोल्हे."

मानतात." सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी
सांगितल्या.

## याजकांकरिता नियम

2 "याजकांनो, हा नियम तुमच्यासाठी आहे. माझे म्हणणे
ऐका. मी काय म्हणतो तिकडे लक्ष द्या. माझ्या नावाला
मान द्या. 2तसे न केल्यास, तुमचेच वाईट होईल. तुम्ही
ज्यांना आशीर्वाद* म्हणाल, त्याचे रुपांतर शापांत होईल
माझ्या नावाबद्दल आदर न दाखविल्यामुळे मी वाईट गोष्टी
घडवून आणीन." सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी
सांगितल्या.
3"लक्षात ठेवा! मी तुमच्या वंशजांना शिक्षा करीन.
याजकांनो, सणांमध्ये, तुम्ही मला यज्ञबली अर्पण करता.
मेलेल्या जनावरांच्या शरीरांतील आतील भाग व विष्ठा
काढून तुम्ही फेकून देता. पण मी ती विष्ठा तुमच्या
तोंडाना फासून, त्याबरोबर तुम्हालाही फेकून देईन. 4मगच
तुम्हाला मी ही आज्ञा का देत आहे, हे कळेल. माझा
लेवीबरोबरचा करार राहावा म्हणून मी हे सांगत आहे"
सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणाला :
5परमेश्वर म्हणाला, "मी लेवीबरोबर करार केला. मी
त्याला जीवन व शांती देण्याचे वचन दिले. आणि मी ते
त्याला दिले. लेवीने मला मान दिला. त्याने माझ्या नावाचा
आदर केला. 6लेवीने खरी शिकवण दिली. त्याने खोटे
शिकविले नाही लेवी प्रामाणिक होता आणि त्याला शांतीची
आवड होती. तो मला अनुसरला आणि त्याने पुष्कळांना
त्यांच्या पापाचरणापासून परावृत्त केले. 7परमेश्वराची
शिकवण याजकांना माहीत असली पाहिजे. लोकांना
याजकांकडून देवाची शिकवण घेता यावी. याजक
लोकांसाठी देवाचा दूत असावा."
8परमेश्वर म्हणाला, "तुम्ही याजकांनी मला अनुसरायचे
सोडून दिले. तुम्ही अनेक लोकांना चुकीने वागण्यासाठी
आपल्या शिकवणुकीचा उपयोग केलात. लेवीबरोबरच्या
कराराचा तुम्ही भंग केलात." सर्वशक्तिमान परमेश्वर हे
म्हणाला. 9"तुम्ही मी सांगितलेल्या मार्गाने जात नाही. माझी
शिकवण लोकांना सांगत असता तुम्ही पक्षपात केलात.
म्हणून मी तुम्हाला महत्वहीन करीन. लोक तुम्हाला मान
देणार नाहीत."

## यहूदा देवाशी सत्यनिष्ठ नव्हता

10आमचा पिता (देव) एकच आहे. आपल्यातील
प्रत्येकाला एकाच देवाने निर्माण केले आहे. मग लोक
आपल्या भावांनाच का फसवितात? ते लोक कराराचा
मान ठेवीत नाहीत. आमच्या पूर्वजांनी देवाशी केलेल्या
कराराचा ते मान राखत नाहीत. 11यहूद्यांच्या लोकांनी
इतरांना फसविले. यरुशलेमवासीयांनी आणि इस्राएल
लोकांनी भयानक कृत्ये केली. यहूद्यांच्या लोकांनी
परमेश्वराच्या पवित्र मंदिराचा अपमान केला. देवाला ते
स्थान प्रिय आहे. यहूद्यांच्या लोकांनी त्या परक्या देवतेची
पूजा करण्यास सुरवात केली. 12त्या लोकांना, परमेश्वर,
यहूदाच्या कुळांतून वगळेल. ते कदाचित् परमेश्वराला
अर्पण करण्यासाठी भेटी आणतील. पण त्याचा उपयोग
होणार नाही. 13तुम्ही आक्रंदन करुन, परमेश्वराची वेदी
अश्रूंनी भिजविलीत, तरी परमेश्वर तुमच्या भेटी
स्वीकारणार नाही. तुम्ही परमेश्वराला अर्पण करण्यास
आणलेल्या गोष्टींनी, तो प्रसन्न होणार नाही.
14तुम्ही विचारता "परमेश्वर आमच्या भेटी का
स्वीकारत नाही?" का? कारण तुम्ही केलेली दुष्कृत्ये
त्याने पाहिली आहेत. परमेश्वर तुमच्याविरुध्दचा साक्षीदार
आहे. तुम्ही तुमच्या पत्नीची फसवणूक करताना त्याने
पाहिले. तरुण असताना तिच्याशी विवाह केलास. ती तुमची
मैत्रीण होती. नंतर तुम्ही एकमेकांजवळ शपथा घेतल्या व
ती तुझी पत्नी झाली. पण तू तिला फसविलेस.
15पती-पत्नींनी शरीरांनी व मनांनी एक व्हावे अशी देवाची
इच्छा आहे. का? मग त्यांची मुलेही पवित्र होतील. म्हणून
आध्यात्मिक ऐक्याचे रक्षण करा. तुमच्या पत्नीला फसवू
नका. तुमच्या तारुण्यापासून ती तुमची अर्धांगिती आहे.
16इस्राएलचा परमेश्वर देव म्हणतो, "घटस्फोटाचा मला
तिटकारा आहे. आणि पुरुष करीत असलेल्या दुष्ट कर्मांची
मला घृणा वाटते. म्हणून तुमच्या आध्यात्मिक ऐक्याचे
रक्षण करा. तुमच्या पत्नीला फसवू नका."

## न्यायाची विशेष वेळ

17तुम्ही चुकीच्या गोष्टी शिकविल्या त्यामुळे
परमेश्वराला फार दुःख झाले. दुष्कृत्ये करणारे लोक
देवाला आवडतात, असे तुम्ही शिकविले. देवाला हे लोक
चांगले वाटतात, असे तुम्ही सांगितले. दुष्कृत्ये करणाऱ्यांना
देव शिक्षा करीत नाही, असे तुम्ही शिकविले.

3 सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, "पाहा! मी माझा
दूत पाठवीत आहे. तो माझ्यासाठी मार्ग तयार करील.
अनपेक्षितपणे तुम्ही ज्याचा शोध करत आहात तो प्रभु
त्याच्या मंदिरात येईल तुम्हांला हव्या असलेल्या नव्या
कराराचा तो दूत आहे तो खरोखरीच येत आहे."
2"त्यावेळेची तयारी कोणीही करु शकत नाही. तो येताच,
कोणीही त्याच्यासमोर उभा राहू शकणार नाही. तो
धगधगत्या अग्नीसारखा असेल. वस्तू अगदी स्वच्छ व्हाव्या
म्हणून वापरण्यात येणाऱ्या तीव्र साबणासारखा असेल.
3तो लेवीच्या लोकांना स्वच्छ करील. विस्तवात चांदी
ज्याप्रमाणे शुध्द केली जाते. तसा तो त्यांना शुध्द करील.
तो त्यांना चांदी सोन्याप्रमाणे शुध्द करील. मग ते
परमेश्वराला अर्पण करण्यासाठी भेटी आणतील आणि
सर्व गोष्टी योग्यरीतीने करतील. 4मग यरुशलेम व यहुदा

---

**आशीर्वाद** देवाचे नियम पाळण्याचा प्रयत्न करणाऱ्याच्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडाव्यात म्हणून आळवणी करणारे शब्द.

यांच्याकडून परमेश्वर भेटी स्वीकारील. हे सर्व अगदी
पूर्वीसारखे असेल प्राचीन काळासारखेच हे असेल. 5मग
मी तुमच्याकडे न्याय निवाडा करण्यासाठी येईन.
लोकांनी केलेल्या वाईट गोष्टी न्यायाधीशाला सांगणाऱ्या
माणसाप्रमाणे मी असेन काही लोक दुष्टपणे जादूटोणा
करतात. काही व्यभिचाराचे पाप करतात. काही
खोटी वचने देतात. काही आपल्या मजुरांना फसवितात.
ते मजुरांना कबूल केल्याप्रमाणे मजुरी देत नाहीत.
लोक विधवांना व अनाथांना मदत करीत नाहीत.
परक्याला कोणी मदत करीत नाही. माझा लोक मान
राखत नाहीत." सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी
सांगितल्या.

## देवाकडे चोरी

6"मी परमेश्वर आहे मी कधीही बदलत नाही. तुम्ही
याकोबची मुले आहात आणि तुमचा पूर्णपणे नाश झाला
नाही. 7पण तुम्ही माझे नियम कधीच पाळले नाहीत. तुमच्या
पूर्वजांनीसुध्दा मला अनुसरण्याचे सोडून दिले. तुम्ही
माझ्याकडे परत या आणि मी तुमच्याकडे परत येईन."
सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.
"तुम्ही विचारता 'आम्ही कसे परत येऊ शकतो?'
8"देवाकडे चोरी करण्याचे सोडून द्या. देवाकडे चोरी
करु नये. पण तुम्ही माझ्या वस्तू चोरल्या."
"तुम्ही मला विचारता, 'आम्ही तुझे काय चोरले?'
"तुम्ही मला तुमच्या वस्तूंचा एक दशांश भाग द्यायला
हवा. खास भेटी द्यायला हव्यात. पण तुम्ही हे मला देत
नाही. 9अशाप्रकारे तुमच्या संपूर्ण राष्टाने माझ्या गोष्टी
चोरल्या आहेत म्हणूनच तुमच्याबाबतीत वाईट गोष्टी
घडत आहेत." प्रभू सर्वशक्तिमान परमेश्वर असे
म्हणाला.
10सर्वशक्तिमान परमेश्वर म्हणतो, " ही परीक्षा
पाहण्याचा प्रयत्न करा. तुमच्या वाट्यातील दहावा भाग
माझ्याकडे आणा. तो भाग खजिन्यात ठेवा. माझ्या घरी
अन्न आणा. माझी परीक्षा घ्या. तुम्ही असे केलेत, तर मी
तुम्हाला खरेच आशीर्वाद देईन. आकाशातून पडणाऱ्या
वृष्टीप्रमाणे तुमच्यावर चांगल्या गोष्टींचा वर्षाव होईल.
प्रत्येक गोष्ट तुम्हांला जरुरीपेक्षा जास्त मिळेल. 11तुमच्या
पिकांचा मी, किडीमुळे नाश होऊ देणार नाही. सर्व
द्राक्षवेलींना द्राक्षे लागतील." सर्वशक्तिमान परमेश्वराने
ह्या गोष्टी सांगितल्या.
12"इतर राष्टांतील लोक तुमच्यांशी चांगले वागतील
तुमचा देश खरोखरच विलक्षण आनंददायक होईल."
सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणाला.

## न्यायनिवाड्याची विशेष वेळ

13परमेश्वर म्हणतो, "तुम्ही माझी निंदा केलीत."
पण तुम्हीच विचारता "आम्ही तुझ्याबद्दल काय बोललो?"
14तुम्ही म्हणालात "परमेश्वराची उपासना करणे व्यर्थ
आहे. आम्ही परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे केले. पण
आमचा काहीच फायदा झाला नाही. लोक प्रेतक्रियेच्या
वेळी जसे रडतात, तसे आम्ही पाप केले म्हणून शोक
केला पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. 15गर्विष्ठ
लोक सुखी आहेत, असे आम्हाला वाटते. दुष्टांना यश
मिळते. वाईट कृत्ये करून ते देवाचा अंत पाहतात पण देव
त्यांना शिक्षा करीत नाही."
16देवाचे अनुयायी एकमेकांशी बोलले व परमेश्वराने
ते ऐकले. त्याच्या समोर पुस्तक आहे. त्यामध्ये देवाच्या
अनुयायांची नावे आहेत. हेच लोक देवाच्या नावाला मान
देतात.
17परमेश्वर म्हणतो, "ते माझे आहेत मी त्यांच्यावर
दया करीन. आज्ञाधारक मुलावर जशी माणूस माया करतो,
तशी मी माझ्या अनुयायांवर दया करीन. 18तुम्ही माझ्याकडे
परत याल. मग दुष्ट माणूस आणि चांगला माणूस यातील
फरक तुम्हाला कळेल. देवाला अनुसरणारा व न
अनुसरणारा यातील भेद तुम्हाला समजेल.
4 "ती न्यायनिवाड्याची वेळ येत आहे. ती तापलेल्या
भट्टीसारखी असेल. सर्व गर्विष्ठांना आणि प्रत्येक
दुष्ट माणसाला शिक्षा होईल. सर्व पापी गवताच्या काडीप्रमाणे
जळून जातील. त्या वेळी, ते जळणाऱ्या झुडुपाप्रमाणे असतील
एकही फांदी वा मूळ शिल्लक ठेवले जाणार नाही."
सर्वशक्तिमान परमेश्वराने ह्या गोष्टी सांगितल्या.
2"पण माझ्या अनुयायांवर चांगुलपणा उगवत्या
सूर्याप्रमाणे चमकेल. सूर्याच्या किरणांप्रमाणे, त्यातून बरे
होण्याची शक्ती मिळेल. गोठ्यातून* सुटलेल्या
वासरांप्रमाणे, तुम्ही मुक्त व आनंदी व्हाल. 3मग तुम्ही त्या
दुष्टांना तुडवाल तुमच्या पायाखाली ते राखेप्रमाणे होतील.
न्यायदानाच्या वेळेला मी ह्या गोष्टी घडवून आणीन."
सर्वशक्तिमान परमेश्वर असे म्हणाला.
4"मोशेचे नियमशास्त्र लक्षात ठेवा आणि पाळा. मोशे
माझा सेवक होता. होरेब (सिनाय) पर्वतावर मी त्याला
विधिनियम सांगितले. ते सर्व इस्राएली लोकांसाठी होते."
5परमेश्वर म्हणाला, "हे पाहा, मी एलीया संदेष्ट्याला
तुमच्याकडे पाठवीत आहे. देवाच्या न्यायदानाच्या भयंकर
मोठ्या वेळेपूर्वी तो येईल. 6एलीया पालकांना त्यांच्या
मुलांजवळ व मुलांना त्यांच्या पालकांजवळ येण्यास मदत
करील. हे घडलेच पाहिजे नाहीतर मी (देव) येईन आणि
तुमच्या देशाचा संपूर्ण नाश करीन."

**गोठा** कुंपण घातलेली गुरांना बांधण्याची लहान जागा.

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**
- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from:
http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from:
http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html

# मत्तयाने लिहिलेले शुभवर्तमान

### येशूचा कुलवृत्तांत
***(लूक 3:23-38)***

1 येशू ख्रिस्ताचा कुलवृत्तांत येणेप्रमाणे: तो दाविदाच्या कुळात जन्मला. दावीद अब्राहामाच्या कुळातील होता.

2 अब्राहाम इसहाकाचा पिता होता.
इसहाक याकोबाचा पिता होता.
याकोब यहूदा व त्याच्या भावांचा पिता होता.
3 यहूदा पेरेस व जेरहाचा पिता होता.
(त्यांची आई तामार होती.)
पेरेस हेस्रोनाचा पिता होता.
हेस्रोन रामाचा पिता होता.
4 रामा अम्मीनादाबाचा पिता होता.
अम्मीनादाब नहशोनाचा पिता होता.
नहशोन सल्मोनाचा पिता होता.
5 सल्मोन बवाजाचा पिता होता.
(बवाजाची आई राहाब होती.)
बवाज ओबेदचा पिता होता.
(ओबेदची आई रूथ होती)
ओबेद इशायचा पिता होता.
6 इशाय दावीद राजाचा पिता होता.
दावीद शलमोनाचा पिता होता.
(शलमोनाची आई पूर्वी उरीयाची पत्नी होती.)
7 शलमोन रहबामचा पिता होता.
रहबाम अबीयाचा पिता होता.
अबीया आसाचा पिता होता.
8 आसा यहोशाफाटाचा पिता होता.
यहोशाफाट योरामाचा पिता होता.
योराम उज्जीयाचा पिता होता.
9 उज्जीया योथामचा पिता होता.
योथाम आहाजचा पिता होता.
आहाज हिज्कीयाचा पिता होता.
10 हिज्कीया मनश्शेचा पिता होता.
मनश्शे आमोनचा पिता होता.
आमोन योशीयाचा पिता होता.
11 योशीया यखन्या व त्याचे भाऊ यांचा पिता होता.
(जेव्हा यहूदी लोकांना गुलाम म्हणून
बाबेलास नेण्यात आले तेव्हा हे झाले.)
12 त्यांना बाबेलला नेण्यात आल्यानंतरचा
कुलवृत्तांत येणेप्रमाणे:
यखन्या शल्तीएलचा पिता होता.
शल्तीएल जरूब्बाबेलचा पिता होता.
13 जरूब्बाबेल अबीहूदचा पिता होता.
अबीहूद एल्याकीमचा पिता होता.
एल्याकीम अज्जुराचा पिता होता.
14 अज्जुर सादोकचा पिता होता.
सादोक याखीमचा पिता होता.
याखीम एलीहूदचा पिता होता.
15 एलीहूद एलाजारचा पिता होता.
एलाजार मत्तानचा पिता होता.
मत्तान याकोबाचा पिता होता.
16 याकोब योसेफाचा पिता होता.
योसेफ मरीयेचा पती होता.
मरीया येशूची आई होती.
येशूला 'ख्रिस्त'* म्हटले आहे.

17याप्रमाणे अब्राहामापासून दाविदापर्यंत चौदा पिढ्या
झाल्या आणि दाविदापासून बाबेलच्या बंदीवासापर्यंत चौदा
पिढ्या झाल्या. बाबेलच्या बंदिवासापासून ख्रिस्ताच्या
जन्मापर्यंत चौदा पिढ्या झाल्या.

### येशू ख्रिस्ताचा जन्म
***(लूक 2:1-7)***

18येशू ख्रिस्ताच्या आईचे नाव मरीया होते आणि येशू
ख्रिस्ताचा जन्म अशाप्रकारे झाला. मरीयेचे योसेफशी लग्न
ठरले होते. परंतु त्या अगोदरच ती पवित्र आत्म्याच्या
सामर्थ्याने गर्भवती आहे असे दिसून आले. 19तिचा भावी
पती योसेफ चांगला मनुष्य होता. तिची लोकांमध्ये बदनामी
होऊ नये म्हणून त्याने गुपचूप तिला सूटपत्र देण्याचा विचार
केला. 20पण असे विचार त्याच्या मनात घोळत असतानाच
देवाच्या दूताने स्वप्नात त्याला दर्शन दिले आणि सांगितले,
"दाविदाच्या वंशातील योसेफा, *मरीयेशी लग्न करण्यास

---

**ख्रिस्त** "अभिषिक्त" (मशीहा) किंवा देवाने निवडलेला.

**दावीदाच्या वंशातील योसेफा** दाविदाच्या घराण्यातील पुरुष इस्राएलाचा दुसरा राजा (ख्रिस्तापूर्वी सुमारे 1000 वर्ष)

अनमान करू नकोस कारण तिला होणारे मूल पवित्र
आत्म्यापासून* होणार आहे. 21त्याचे नाव तू येशू* ठेव.
कारण तो त्याच्या लोकांची पापापासून सुटका करील."
22हे सर्व यासाठी घडले की, प्रभुने संदेष्ट्यांच्या द्वारे जे
सांगितले होते, त्याची पूर्तता व्हावी. 23"कुमारी गर्भवती
होईल, ती एका मुलाला जन्म देईल आणि ते त्याला
'इम्मानुएल' म्हणजे 'आमच्याबरोबर देव आहे' असे
म्हणतील."
24जेव्हा योसेफ जागा झाला तेव्हा देवदूताने जशी त्याला
आज्ञा केली होती तसेच त्याने केले. त्याने मरीयेशी लग्न
केले. 25पण तिने मुलाला जन्म देईपर्यंत त्याने तिला जाणले
नाही. आणि योसेफने त्याचे नाव येशू ठेवले.

## ज्ञानी लोक येशूला भेटण्यास येतात

2 यहूदीयातील बेथलहेम गावात येशूचा जन्म झाला.
त्यावेळी हेरोद राजा राज्य करीत होता. येशूच्या
जन्मानंतर पूर्वेकडून काही ज्ञानी लोक यरुशलेमाला आले.
2आणि त्यांनी विचारले, "यहूद्यांचा नुकताच जन्मलेला
राजा कोठे आहे? कारण त्याचा जन्म सूचित करणारा
तारा आम्ही पूर्व दिशेस पाहिला म्हणून त्याला नमन
करण्यास आलो आहोत."
3हे ऐकून हेरोद राजा तसेच यरुशलेम नगराचे रहिवासी
घाबरून गेले.
4मग त्याने यहूदी लोकांचे सर्व मुख्य याजक व
नियमशास्त्राचे शिक्षक यांना बोलाविले आणि विचारले
की, "ख्रिस्ताचा जन्म कोठे होणार होता?" 5त्यांनी उत्तर
दिले, "यहूदीयातील बेथलहेम गावात. कारण देवाच्या
संदेष्ट्यांनी त्याविषयी असे लिहिले आहे की:

6'हे बेथलहेमा, यहूद्यांच्या भूमिप्रदेशा, तू यहूद्यांच्या
राज्यकर्त्यांमध्ये कनिष्ठ आहेस असे मुळीच नाही कारण
माझ्या इस्राएल लोकांचा सांभाळ करील, असा राज्यकर्ता
तुझ्यातून येईल.'" *मीखा* 5:2

7मग हेरोदाने पूर्वेकडील ज्ञानी लोकांची गुप्तपणे भेट
घेतली आणि तारा दिसल्याची नक्की वेळ माहीत करून
घेतली. 8नंतर त्याने त्यांना बेथलहेमला पाठविले. हेरोद
त्यांना म्हणाला, "तुम्ही जाऊन त्या बालकाचा नीट शोध
करा. आणि तुम्हांला ते सापडल्यावर मला सांगायला या.
म्हणजे मी सुद्धा जाऊन त्याला नमन करू शकेन."
9ज्ञानी लोकांनी राजाचे म्हणणे ऐकले व ते निघाले.
त्यांनी जो तारा पूर्वेला पाहिला होता तोच त्यांना परत
दिसला. ज्ञानी लोक त्या ताऱ्याच्या मागे गेले. जेथे बाळ
होते ते ठिकाण येईपर्यंत तारा त्यांच्यासमोर जात होता.
मग त्या ठिकाणावर तो थांबला. 10ज्ञानी लोकांना ते
पाहून फार आनंद झाला. 11ज्ञानी लोक बाळ होते त्या
गोठ्यात आले. त्यांनी बाळ व त्याची आई मरीया हिला
पाहिले. त्यांनी लवून त्या बालकाला नमन केले. नंतर
त्यांनी बाळासाठी आणलेल्या भेटवस्तु काढल्या. त्यांनी
बाळाला सोने, ऊद व गंधरस ह्या बहुमोल वस्तु दिल्या.
12पण देवाने स्वप्नाद्वारे त्या ज्ञानी लोकांना सावध केले
आणि हेरोदाकडे परत जाऊ नका असे सांगितले. तेव्हा ते
ज्ञानी लोक वेगळ्या मार्गाने आपल्या देशास परतले.

## येशूचे आईवडील त्याला इजिप्तला घेऊन जातात

13ज्ञानी लोक गेल्यानंतर, प्रभूचा दूत स्वप्नात येऊन
योसेफाला म्हणाला, "ऊठ! बालकाला आणि त्याच्या
आईला घेऊन निसटून इजिप्त देशास जा. कारण बाळाचा
घात करण्यासाठी हेरोद त्याचा शोध घेणार आहे, तेव्हा
मी तुला धोका टळल्याची सूचना देईपर्यंत इजिप्तमध्येच
राहा."
14तेव्हा तो उठला व रात्रीच बाळाला व त्याच्या आईला
घेऊन इजिप्त देशास गेला. 15आणि हेरोद मरेपर्यंत तेथेच
राहिला. प्रभु देवाने संदेष्टट्याच्या द्वारे सांगितले होते की,
'मी माझ्या मुलाला इजिप्त देशातून बोलाविले आहे'* ते
पूर्ण व्हावे म्हणून असे झाले.

## बेथलहेमातील मुलांची हेरोदाकडून कत्तल

16तेव्हा ज्ञानी लोकांनी आपल्याला फसविले, हे पाहून
हेरोद अतिशय रागावला. त्याने ज्ञानी लोकांकडून त्या
बालकाच्या जन्माची वेळ नीट समजून घेतली होती.
त्यानुसार बालक जन्मल्याला आता दोन वर्षे उलटली
होती. म्हणून त्याने माणसे पाठवून बेथलहेम व त्याच्या
आसपासच्या प्रदेशातील दोन वर्षांच्या व त्याहून कमी
वयाच्या मुलांची कत्तल करण्याची आज्ञा केली.
17यिर्मया संदेष्ट्यांच्या द्वारे देवाने जे सांगितले होते ते
अशा प्रकारे पूर्ण झाले. ते वचन असे होते :

18'रामा येथे आकांत ऐकू आला. दु:खदायक रडण्याचा
हा आकांत होता. राहेल आपल्या मुलांसाठी रडत आहे,
पण तिचे सांत्वन करणे अशक्य झाले कारण तिची मुले
मरण पावली आहेत."

*यिर्मया* 31:15

## योसेफ आणि मरीया इजिप्तहून परत येतात

19हेरोद मेल्यानंतर प्रभुचा दूत स्वप्नात योसेफाकडे
आला. योसेफ जेव्हा इजिप्तमध्ये होता तेव्हा हे घडले.

---

**पवित्र आत्मा** देवाचा आत्मा, ख्रिस्ताचा आत्मा आणि कैवारी. देव आणि ख्रिस्त यांच्यासह तो जगातील लोकांमध्ये देवाचे काम करतो.

**येशू** या नावाचा अर्थ "तारण."

**मी आपल्या ... आहे** होशेय 11:1

20दूत म्हणाला, “ऊठ! बाळाला आणि त्याच्या आईला
घेऊन इस्राएल देशास जा. जे लोक बाळाला मारू पाहत
होते ते आता मेले आहेत.”
21मग योसेफ बाळाला आणि त्याच्या आईला घेऊन
इस्राएल देशास गेला. 22हेरोदाच्या मृत्यूनंतर त्याच्या जागी
त्याचा मुलगा अर्खेलाव यहूदाचा राजा झाला आहे असे
जेव्हा योसेफाला समजले, तेव्हा तो तेथे जाण्यास घाबरला.
पण स्वप्नात त्याला ताकीद मिळाल्याने तो तेथून निघाला
आणि गालील प्रदेशात आला. 23योसेफ नासरेथ नावाच्या
गावात गेला आणि तेथे राहिला. ख्रिस्त नासरेथकर म्हटला
जाईल, असे जे देवाने संदेष्ट्यांच्या द्वारे सांगितले होते ते
पूर्ण व्हावे म्हणून हे झाले.

### बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे कार्य

***(मार्क 1:1-8; लूक 3:1-9, 15-17; योहान 1:19-28 )***

3 त्या दिवसांत बाप्तिस्मा करणारा योहान आला आणि
यहूदीयाच्या वैराण प्रदेशात उपदेश करू लागला; तो
म्हणाला, 2“तुमची अंत:करणे व जीवने वाईटपणाकडून
चांगुलपणामध्ये बदला कारण स्वर्गाचे राज्य जवळ येत
आहे.” 3यशया हा संदेष्टा ज्याच्याविषयी बोलत होता तो
हाच बाप्तिस्मा करणारा योहान. त्याविषयीचे यशयाचे
भविष्य असे होते:

“वैराण प्रदेशात एक मनुष्य ओरडून सांगत आहे; ‘प्रभु
देवासाठी मार्ग तयार करा; त्याच्या वाटा सरळ करा.’”

*यशया* 40:3

4योहानाचे कपडे उंटाच्या केसांपासून बनविलेले होते.
कातड्याचा कमरपट्टा त्याच्या कमरेभोवती होता. अन्न
म्हणून योहान टोळ आणि रानमध खात असे. 5लोक
योहानाचा उपदेश ऐकण्यास जात होते. यरुशलेम, सर्व
यहूदीया प्रांत आणि यार्देन नदीच्या भोवतालच्या प्रदेशातून
लोक येत होते. 6आपण केलेली पापे लोक त्याला सांगत
होते आणि योहान त्यांना यार्देन नदीत बाप्तिस्मा* देत
होता.
7योहान जेथे लोकांना बाप्तिस्मा देत होता तेथे अनेक
परूशी* आणि सदूकी* आले. जेव्हा योहानाने त्यांना
पाहिले तेव्हा तो त्यांना म्हणाला, “अहो, सापाच्या पिल्लांनो,
देवाचा जो राग ओढवणार आहे त्याच्यापासून दूर पळण्याचे
तुम्हांला कोणी सुचविले? 8म्हणून पश्चात्तापास योग्य अशी
फळे द्या. 9आणि ‘अब्राहाम माझा पिता आहे,’ अशी
फुशारकी तुम्हांला मारता येईल असे समजू नका; मी
तुम्हांस सांगतो की, देव अब्राहामासाठी या दगडापासून
मुले निर्माण करू शकतो. 10झाडे तोडण्यासाठी कुऱ्हाड
तयार आहे. चांगले फळ न देणारे प्रत्येक झाड कापून
अग्नीत टाकले जाईल. 11“तुम्ही तुमची अंत:करणे आणि
जीवने वाईटाकडून चांगल्याकडे बदलली आहेत हे
दर्शविण्यासाठी मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो, पण
माझ्यानंतर माझ्यापेक्षाही महान असा एक येत आहे, ज्याच्या
वहाणा उचलण्याची सुद्धा माझी लायकी नाही. तो पवित्र
आत्म्याने आणि अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करील. 12तो
धान्य निवडायला येईल. तो भुसा बाजूला काढील व धान्य
वेगळे करील. तो चांगले धान्य कोठारात साठविल व जे
चांगले नाही ते जाळून टाकील. तो भुसा कधीही न
विझणाऱ्या आगीमध्ये जाळून टाकील.”

### योहान येशूचा बाप्तिस्मा करतो

***(मार्क 1:9-11; लूक 3:21-22 )***

13तेव्हा येशू गालीलाहून यार्देन नदीकडे आला. त्याला
योहानाच्या हातून बाप्तिस्मा घ्यायचा होता. 14पण त्याला
थोपवीत योहान म्हणाला, “खरे तर मी आपल्या हातून
बाप्तिस्मा घ्यायचा असे असता आपण माझ्याकडे बाप्तिस्मा
घ्यायला आलात हे कसे?”
15येशूने त्याला उत्तर दिले, “आता असेच होऊ दे.
देवाची इच्छा हीच आहे म्हणून आपण असेच केले पाहिजे.”
तेव्हा योहान येशूचा बाप्तिस्मा करण्यास तयार झाला.
16येशूचा बाप्तिस्मा झाला आणि तो पाण्यातून वर आला,
तेव्हा आकाश उघडले, आणि देवाचा आत्मा एखाद्या
कबुतराप्रमाणे आपणावर उतरताना त्याला दिसला. 17त्याच
वेळी आकाशातून वाणी झाली की, “हा माझा पुत्र मला
परमप्रिय आहे, त्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.”

### येशूची परीक्षा

***(मार्क 1:12-13; लूक 4:1-13 )***

4 मग पवित्र आत्म्याने येशूला रानात नेले. मोहात पाडून
सैतानाने त्याची परीक्षा घ्यावी म्हणून त्याला तेथे
नेण्यात आले. 2चाळीस दिवस आणि चाळीस रात्री येशूने
काहीच खाल्ले नाही. त्यानंतर त्याला खूप भूक लागली.
3तेव्हा सैतान येशूची परीक्षा घेण्यासाठी त्याच्याकडे आला
व म्हणाला, “जर तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या दगडांना
भाकरी होण्याची आज्ञा दे.”

4येशूने उत्तर दिले, “असे लिहिले आहे की, ‘मनुष्य
केवळ भाकरीने जगेल असे नाही तर देवाच्या तोंडून
निघणाऱ्या प्रत्येक शब्दाने जगेल.’” *अनुवाद* 8:3

---

**बाप्तिस्मा** ह्या ग्रीक शब्दाचा अर्थ डुबविणे बुडविणे, एखादी व्यक्ति किंवा वस्तु अत्यल्प काळासाठी पाण्याखाली घालणे.

**परूशी** यहूदी धर्ममतातील एक गट. (तेच यहूदी धर्माचे नियम व रीतिरिवाज यांचे काटेकोर पालन करतात असा त्यांचा दावा असे.

**सदूकी** यहूदी धर्मातील एक अग्रेसर गट. जुन्या करारातील केवळ पाहिल्या पांच पुस्तकांचाच स्वीकार करणारे, मृत्युनंतर लोक पुन्हा जीवन नाही असा त्यांचा विश्वास असे.

5मग सैतानाने त्याला पवित्र नगरात (यरुशलेमात) नेले. सैतानाने येशूला मंदिराच्या कंगोऱ्यावर उभे केले. 6आणि त्याला म्हटले, “जर तू देवाचा पुत्र आहेस तर खाली उडी टाक. कारण असे लिहिले आहे की,

‘देव त्याच्या दूतांना तुझ्यासाठी आज्ञा करील आणि तुझे पाय खडकावर आपटू नयेत म्हणून ते तुला हातांवर झेलतील.’” *स्तोत्र* 91:11-12

7येशूने त्याला उत्तर दिले, “असे सुद्धा लिहिले आहे की,
‘देव जो तुझा प्रभु याची परीक्षा पाहू नको.’” *अनुवाद* 6:16

8मग सैतानाने येशूला एका खूप उंच पर्वतावर नेले. त्याने येशूला जगातील राज्ये आणि त्यांतील सर्व वैभव दाखविले. 9सैतान म्हणाला, “जर तू पाया पडून मला नमन करशील तर मी हे सारे तुला देईन.”
10तेव्हा येशू त्याला म्हणाला, “अरे सैताना, माझ्यापासून दूर हो! कारण असे लिहिले आहे की

‘देव जो तुझा प्रभु त्याचीच उपासना कर आणि केवळ त्याचीच सेवा कर.’” *अनुवाद* 6:13

11मग सैतान येशूला सोडून निघून गेला आणि देवदूत येऊन त्याची देखभाल करू लागले.

## येशू गालीलात त्याच्या कामाचा प्रारंभ करतो
### *(मार्क 1:14-15; लूक 4:14-15)*

12नंतर योहानाला तुरूंगात टाकले आहे हे ऐकून येशू गालीलास परतला. 13परंतु तो नासरेथ येथे राहिला नाही, तर गालील सरोवराजवळील कफर्णहूम नगरात जाऊन राहिला. जबुलून व नफताली ह्या प्रदेशांना लागूनच कफर्णहूम नगर आहे. 14यशया ह्या संदेष्ट्याने पूर्वी जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे यासाठी हे झाले. यशयाने वर्तविलेले भविष्य असे होते:

15‘जबुलून आणि नफताली प्रांत समुद्राकडे येणारे मार्ग, यार्देन नदीपलीकडचा प्रदेश व यहूदीतरांचा गालील यांमधील–
16अंधारात वावरणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला. मरणाचे सावट असलेल्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांसाठी प्रकाश अवतरला.” *यशया* 9:1-2

17त्यावेळेपासून येशू उपदेश करू लागला व म्हणू लागला की, “पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.”

## येशू काही शिष्य निवडतो
### *(मार्क 1:16-20; लूक 5:1-11)*

18नंतर तो गालीलच्या सरोवराजवळून जात असता त्याने पेत्र म्हटलेला शिमोन व त्याचा भाऊ अंद्रिया या दोघांना पाहिले. ते कोळी होते. ते जाळे टाकून मासे धरीत होते. 19तो त्यांना म्हणाला, “तुम्ही माझ्यामागे या म्हणजे मी तुम्हांला माणसे धरणारे करीन.” 20मग ते मागेपुढे न पाहता लगेच जाळे टाकून देऊन ते त्याच्या मागे चालू लागले. 21तेथून पुढे चालत जात असता त्याने दुसरे दोघे भाऊ म्हणजे जब्दीचा मुलगा याकोब व त्याचा भाऊ योहान यांना त्यांचे वडील जब्दी याच्याबरोबर नावेत आपली जाळी नीट करताना पाहिले. आणि त्याने त्यांना बोलावले. 22तेव्हा ते आपली नाव व आपले वडील यांना सोडून त्याच्या मागे गेले.

## येशू लोकांना शिकवितो आणि बरे करतो
### *(लूक 6:17-19)*

23येशू गालील प्रांतात सगळीकडे गेला. येशूने सभास्थानात जाऊन शिकविले व स्वर्गाच्या राज्याची सुवार्ता सांगितली. येशूने लोकांचे सर्व रोग व दुखणी बरी केली. 24येशूविषयीची बातमी सर्व सूरीया देशभर पसरली; मग जे दुखणेकरी होते, ज्यांना नाना प्रकारचे रोग व आजार होते, ज्यांना भूतबाधा झाली होती, जे फेफरेकरी व पक्षाघाती होते अशा सर्वांना लोकांनी त्याच्याकडे आणले आणि त्याने त्यांना बरे केले. 25मग गालील व दकापलीस, यरुशलेम व यहूदीया येथून व यार्देनेच्या पलीकडून आलेल्या लोकांचे मोठे समुदाय त्याच्यामागे चालले.

## येशू लोकांना शिकवितो
### *(लूक 6:20-23)*

5 येशूने तेथे पुष्कळ लोक पाहिले. म्हणून येशू डोंगरावर गेला आणि खाली बसला, मग त्याचे शिष्य त्याच्याजवळ आले. 2आणि त्याने त्यांना शिकविण्यास सुरुवात केली. तो म्हणाला,

3“जे आत्म्याने दीन ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.
4जे शोक करतात ते धन्य, कारण त्यांचे सांत्वन करण्यात येईल.
5जे नम्र ते धन्य, कारण त्यांना वचनदत्त भूमीचे वतन मिळेल.
6ज्यांना नीतीने वागण्याची तहान व भूक लागली आहे ते धन्य, कारण ते तृप्त होतील.
7जे दयाळू ते धन्य, कारण त्यांच्यावर दया करण्यात येईल.
8जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य कारण ते देवाला पाहतील.

9जे शांति करणारे ते धन्य, कारण त्यांना देवाची मुले
म्हटले जाईल.
10नीतिमत्त्वासाठी ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य कारण
स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.

11“जेव्हा माझ्यामुळे लोक तुमची निंदा करतील, तुमचा
छळ करतील व लबाडीने तुमच्याविरूद्ध सर्व प्रकारचे
वाईट बोलतील तेव्हा तुम्ही धन्य आहात.
12आनंद करा
आणि उल्हास करा कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे
आहे; कारण जे संदेष्टे तुमच्यापूर्वी होते त्यांचा त्यांनी
तसाच छळ केला.

## तुम्ही मिठासारखे तसेच प्रकाशासारखे आहात
## (*मार्क 9:50; लूक 14:34-35*)

13“तुम्ही पृथ्वीचे मीठ आहात, पण जर मिठाचा
खारटपणा गेला तर ते पुन्हा खारट बनवता येणार नाही व
ते निरुपयोगी बनेल. ते फेकून देण्याच्या लायकीचे बनेल.
माणसे ते पायदळी तुडवतील.
14“तुम्ही जगाचा प्रकाश आहात; डोंगरावर वसलेले
नगर लपत नाही.
15आणि दिवा लावून तो कोणी
भांड्याखाली लपवून ठेवीत नाही. उलट तो दिवठणीवर
ठेवतात म्हणजे तो दिवा घरातील सर्वांना प्रकाश देतो.
16“तशाच प्रकारे तुम्ही सुद्धा इतरांच्यासाठी प्रकाश असले
पाहिजे. यासाठी की त्यांनी तुमची चांगली कामे पाहावी
आणि तुमचा पिता जो स्वर्गात आहे त्याचे गौरव करावे.

## येशू आणि जुन्या करारातील संदर्भ

17“मी नियमशास्त्र किंवा संदेष्ट्याचे लिखाण रद्द
करायला आलो आहे असे समजू नका. मी ते रद्द करायला
नाही तर परिपूर्ण करायला आलो आहे.
18मी तुम्हांला
सत्य तेच सांगतो की, आकाश आणि पृथ्वीचा शेवट
होईपर्यंत नियमशास्त्रातील एका शब्दात देखील फरक
होणार नाही.
19म्हणून प्रत्येक व्यक्तीने लहानातील लहानाने
सुद्धा आज्ञा पाळावी व जर त्याने पाळली नाही व इतरांनाही
तसे करण्यास शिकविले नाही तर तो स्वर्गाच्या राज्यात
लहान गणला जाईल, पण जो आज्ञा पाळील व इतरांना
तसे करण्यास शिकवील त्याला स्वर्गाच्या राज्यात मोठे
गणले जाईल.
20कारण मी तुम्हांस सांगतो की परूशी
आणि नियमशास्त्राचे शिक्षक यांच्या नीतिमत्त्वापेक्षा तुमचे
नीतिमत्त्व अधिक चांगले असल्याशिवाय तुम्ही स्वर्गाच्या
राज्यात जाणारच नाही.

## रागासंबंधी येशूची शिकवण

21“तुम्ही ऐकले असेल की, फार पूर्वी आपल्या लोकांना
असे सांगण्यात आले होते की, ‘खून करू नका व जो
कोणी खून करतो तो न्यायदंडास पात्र ठरेल.’*
22पण मी
तुम्हांस सांगतो की, जर एखादा आपल्या भावावर रागावला
असेल तर तो न्यायदंडास पात्र ठरेल. पुन्हा जो आपल्या
भावाला, अरे वेड्या, असे म्हणेल तो न्यायसभेच्या दंडास
पात्र ठरेल. आणि जो त्याला मूर्ख म्हणेल तो नरकातील
अग्नीच्या शिक्षेस पात्र ठरेल.
23“म्हणून तू आपले दान अर्पण करण्यासाठी वेदीजवळ
आणले असता जर तुझ्या भावाच्या मनात तुझ्याविरुद्ध
काही आहे असे तुला तेथे आठवले,
24तर देवाला देण्यासाठी
आणलेले दान तेथेच वेदीपुढे ठेव. प्रथम जाऊन आपल्या
भावाबरोबर समेट कर आणि नंतर येऊन आपले दान दे.
25वाटेत तुझा वादी तुझ्याबरोबर आहे तोच त्याच्याशी
लगेच सलोखा कर नाहीतर कदाचित वादी तुला
न्यायाधीशाकडे नेईल व न्यायाधीश अधिकाऱ्याकडे नेईल
आणि अधिकारी तुला तुरुंगात टाकील.
26मी तुला खरे
सांगतो तू शेवटचा पैसा देईपर्यंत तुझी सुटका मुळीच होणार
नाही.

## लैंगिक पापाविषयी येशूची शिकवण

27“‘व्यभिचार करू नको’* असे पूर्वी सांगितल्याचे
तुम्ही ऐकले आहे,
28परंतु मी तुम्हांस सांगतो की, जो
कोणी एखाद्या स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहतो त्याने
आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे.
29जर
तुझा उजवा डोळा तुला पाप करायला प्रवृत्त करतो तर तो
काढून टाक व फेकून दे. संपूर्ण शरीर नरकात जाण्यापेक्षा
शरीराचा एखादा अवयव गमावलेला बरा.
30जर तुझा
उजवा हात तुला पापास प्रवृत्त करतो, तर तो तोडून फेकून
दे, कारण संपूर्ण शरीर नरकात जाण्यापेक्षा शरीराचा एक
अवयव गमावलेला बरा.

## घटस्फोटाविषयी येशूची शिकवण
## (*मत्तय 19:9; मार्क 10:11-12; लूक 16:18*)

31“‘जर एखादा मनुष्य आपल्या पत्नीला घटस्फोट देतो
तर त्याने तिला घटस्फोटाची लेखी सूचना द्यावी.’* असे
सांगितल्याचे तुम्ही जाणता.
32पण मी तुम्हांला सांगतो की,
जो कोणी आपल्या पत्नीला व्यभिचाराच्या कारणाशिवाय
इतर कारणामुळे टाकून देतो, तो तिला व्यभिचार करण्यास
प्रवृत्त करतो आणि जो कोणी अशा घटस्फोटित स्त्रीशी
विवाह करतो तो व्यभिचार करतो.

## शपथ घेण्याविषयी येशूची शिकवण

33“‘जेव्हा तू शपथ घेतोस तेव्हा ती तोडू नको. जी
शपथ देवाला वाहिली आहे ती खरी कर,’* असे

**खून करू ... ठरेल** निर्गम 20:13; अनुवाद 5:18

**व्यभिचार करू नको** निर्गम 20:14; अनुवाद 5:18

**जर ... द्यावी** अनुवाद 24:1

**जेव्हा ... कर** लेवीय 19:12; गणना 30:2; अनुवाद 23:21

सांगितल्याचे तुम्ही ऐकले आहे. 34परंतु मी तुम्हांला सांगतो
की, शपथ वाहूच नका; आकाशाची शपथ वाहू नका
कारण ते देवाचे आसन आहे. 35पृथ्वीचीही शपथ वाहू
नका कारण ती त्याच्या पायाचे आसन आहे; आणि
यरुशलेमाचीही शपथ वाहू नका, कारण त्या नगरीचा
राजा देव आहे.
36आपल्या मस्तकाचीही शपथ वाहू नका, कारण त्याचा
एखादा केसही पांढरा किंवा काळा होणे तुमच्या हाती
नाही. 37म्हणून तुमचे बोलणे 'होय' तर होय किंवा 'नाही'
एवढेच असावे. त्यापेक्षा जास्त जर असेल तर ते सैतानापासून
आहे.

## सुडासंबंधी येशूची शिकवण
### (*लूक 6:29-30*)

38"तुम्ही ऐकले आहे की असे सांगितले होते,
'डोळ्याबद्दल डोळा आणि दाताबद्दल दात.'* 39पण मी
तुम्हांला सांगतो, जो दुष्ट आहे त्याला अडवू नका, जर
कोणी तुमच्या उजव्या गालावर तुम्हांला मारील
त्याच्यासमोर दुसराही गाल पुढे करा. 40आणि जो कोणी
फिर्याद करून तुमचा अंगरखा घेऊ पाहतो त्याला तुमचा
झगाही द्या. 41जर कोणी तुम्हांला सक्तीने त्याच्याबरोबर
कांही अंतर घेऊन जाऊ इच्छितो तर त्याच्याबरोबर त्याच्या
दुप्पट अंतर जा. 42जो तुमच्याजवळ मागतो त्याला द्या
आणि जो तुमच्याकडून उसने घेऊ इच्छितो त्याला नकार
देऊ नका.

## सर्वांवर प्रेम करा
### (*लूक 6:27-28, 32-36*)

43"असे सांगितले होते की, 'आपल्या शेजाऱ्यावर प्रेम
करा* आणि आपल्या शत्रूचा द्वेष करा' असे तुम्ही ऐकले
आहे. 44पण मी तुम्हांला सांगतो, तुमच्या शत्रूवर प्रेम
करा. तुमचे जे वाईट करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.
45जर तुम्ही असे कराल, तर तुम्ही तुमच्या स्वर्गातील
पित्याचे खरे पुत्र व्हाल. तुमचा पिता चांगल्यावर आणि
वाईटावर अशा दोघांवरही सूर्य उगवितो. चांगल्यावरही
आणि वाईटावरही पाऊस पाडतो. 46कारण जे तुमच्यावर
प्रीति करतात त्यांच्यावर तुम्ही प्रीति करीत असाल तर
तुम्हांला प्रतिफळ मिळणार नाही. जकातदारही असेच
करतात.
47आणि जर तुम्ही तुमच्या मित्रांशी चांगले वागत असाल
तर तुम्ही इतरांपेक्षा फार चांगले आहात असे समजू नका.
देवाला न मानणारे लोकही असेच करतात. 48म्हणून
जसा तुमचा स्वर्गातील पिता परिपूर्ण आहे तसे तुम्हीही
परिपूर्ण व्हा.

---

**डोळ्याबद्दल ... दात** निर्गम 21:24 लेवीय 24:20

**आपल्य ... करा** लेवीय 19:18

## दान देण्याविषयी येशूची शिकवण

6 "जेव्हा तुम्ही चांगली कृत्ये करता तेव्हा ती गाजावाजा
न करता करा. लोकांच्या नजरेत भरावी म्हणून
जर तुम्ही सत्कृत्ये करणार असाल तर लक्षात ठेवा,
तुमच्या स्वर्गातील पित्याकडून तुम्हाला तुमचे प्रतिफळ
मिळणार नाही.
2"जेव्हा तुम्ही गरिबांना देता तेव्हा त्याचा गाजावाजा
करू नका. मी खरे तेच सांगतो. ढोंगी लोक तसेच करतात.
दान देण्यापूर्वी कर्णा फुंकून लोकांचे लक्ष वेधून घेतात.
सभास्थानात व रस्त्यावर ते जाहीरपणे अशी कामे करतात,
कारण इतर लोकांनी त्यांना मोठेपणा द्यावा अशी त्यांची
इच्छा असते. मी तुम्हांस सांगतो की, ते आपले प्रतिफळ
भरून पावले आहेत. 3म्हणून जेव्हा तुम्ही गरिबाला द्याल,
तेव्हा गुपचूप द्या. तुमचा उजवा हात काय करतो हे तुमच्या
डाव्या हाताला कळू नये. 4दान गुप्त असावे, कारण तुमच्या
पित्याला ते कळते व तो त्याचे फळ देतो.

## प्रार्थनेविषयी येशूची शिकवण
### (*लूक 11:2-4*)

5"जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा ढोंग्यांसारखे होऊ
नका. कारण आपण लोकांस दिसावे म्हणून सभास्थानांमध्ये
व रस्त्याच्या कोपऱ्यांवर उभे राहून प्रार्थना करणे त्यांना
आवडते. मी तुम्हांला खरे सांगतो की, त्यांना आपले
प्रतिफळ मिळाले आहे. 6पण तुम्ही जेव्हा प्रार्थना करता
तेव्हा आतल्या खोलीत जा, दार लावून घ्या, व जो तुमचा
पिता गुप्त आहे त्याची प्रार्थना करा. मग तुमचा पिता,
ज्याला कोणी पाहू शकत नाही तो तुम्हांला प्रतिफळ
देईल.
7"आणि जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा ज्यांना देव
माहीत नाही अशासारखे होऊ नका. ते निरर्थक बडबड
करतात. कारण आपण फार बोलल्याने आपले म्हणणे
ऐकले जाईल असे त्यांना वाटते. 8त्यांच्यासारखे होऊ
नका. तुम्हाला कशाची गरज आहे हे तुम्ही सांगण्यापूर्वी
तुमच्या पित्याला ठाऊक असते. 9म्हणून जेव्हा तुम्ही
प्रार्थना करता, तेव्हा तुम्ही अशी प्रार्थना करावी:

'हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानले
जावो.
10तुझे राज्य येवो; जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या
इच्छेप्रमाणे होवो. 11आमची रोजची भाकर आज आम्हांला
दे. 12जसे आमच्याविरूद्ध केलेल्या वाईटाची आम्ही क्षमा
करतो तसे आम्ही केलेल्या पापांची आम्हाला क्षमा कर,
13आम्हांला परीक्षेत आणू नकोस तर आम्हांला त्या
दुष्टापासून सोडीव.'

14कारण जर तुम्ही इतरांच्या चुकांची क्षमा कराल तर
तुमचा स्वर्गातील पिताही तुम्हांला क्षमा करील; 15पण

जर तुम्ही इतरांच्या चुकांची क्षमा करणार नाही, तर
तुमचा पिताही तुम्हांला क्षमा करणार नाही.

### उपासाविषयी येशूची शिकवण

16“जेव्हा तुम्ही उपास करता तेव्हा तुम्ही ढोंग्यांसारखे
चेहरा उदास करू नका. कारण आपण उपास करीत
आहोत हे लोकांना दिसावे म्हणून ते आपली मुखे उदास
करतात. मी तुम्हांला खरे सांगतो. त्यांना त्यांचे प्रतिफळ
मिळाले आहे.
17तुम्ही जेव्हा उपास करता तेव्हा आपल्या डोक्याला
तेल लावा आणि आपले तोंड धुवा. 18यासाठी की, तुम्ही
उपास करता हे लोकांना दिसू नये तर तुमच्या गुप्त
पित्याला दिसावे. मग तुमचा गुप्त पिता तुम्हांला प्रतिफळ
देईल.

### पैशापेक्षा देव अधिक महत्त्वाचा आहे
### *(लूक 12:33-34; 11:34-36; 16:13)*

19“येथे पृथ्वीवर स्वत:साठी संपत्ती साठवू नका. येथे
कसर व जंग लागून तिचा नाश होईल. आणि चोर घर
फोडून ती चोरून नेतील. 20म्हणून स्वर्गात आपणासाठी
संपत्ती साठवा. 21जेथे तुमचे धन आहे तेथे तुमचे मनही
लागेल. 22डोळा शरीराचा दिवा आहे. म्हणून जर तुमचे
डोळे चांगले असतील तर तुमचे सर्व शरीर प्रकाशमय
होईल. 23पण जर तुमचे डोळे वाईट असतील, तर तुमचे
सर्व शरीर पापाने अंधकारमय होईल. जर तुम्हाठायी
असणारा अंधकार वास्तविक अंधकार आहे, तर
खरोखरचा अंधार कितीतरी अंधकारमय असेल.
24““कोणालाही दोन धन्यांची चाकरी एकावेळी करणे
शक्य नाही. तो एकाचा तिरस्कार करील तर दुसऱ्याशी
निष्ठा राखील. किंवा तो एका धन्याचे ऐकेल व दुसऱ्याचे
ऐकणार नाही. तसेच तुम्हांला देवाची आणि पैशाची
(धनाची) सेवा एकाच वेळी करता येणार नाही.

### देवाच्या राज्याला प्रथमस्थान द्या
### *(लूक 12:22-34)*

25“म्हणून मी तुम्हांला सांगतो की, काय खावे आणि
काय प्यावे अशी आपल्या जीवाविषयी, किंवा काय पांघरावे
अशी आपल्या शरीराविषयी चिंता करू नका. जीव
अन्नापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे आणि शरीर वस्त्रापेक्षा
अधिक महत्त्वाचे आहे.
26आकाशातील पाखरांकडे पाहा. ती पेरीत नाहीत वा
कापणी करीत नाहीत किंवा गोदामात साठवूनही ठेवीत
नाहीत, तरी तुमचा स्वर्गातील पिता त्यांना खावयास देतो
आणि तुम्ही त्यांच्यापेक्षा अधिक मौल्यवान आहात, हे
तुम्हांला माहीत आहे.
27आणि चिंता करून आपले आयुष्य थोडे देखील वाढवणे
कोणाला शक्य आहे का?
28“आणि तुम्ही वस्त्राविषयी का काळजी करता?
रानातील फुले पाहा, ती कशी वाढतात? ती कष्ट करीत
नाहीत, आणि ती कातीतही नाहीत, 29तरी मी तुम्हांला
सांगतो की, शलमोन राजादेखील त्याच्या भर ऐश्वर्याच्या
काळात यांतील एखाद्या प्रमाणेही सजू शकला नव्हता.
30तर अहो अल्पविश्वासी लोकांनो, आज आहे तर उद्या
भट्टीत पडते, अशा रानफुलांना जर देव असा पोशाख
घालतो तर त्याहीपेक्षा विशेष असा पोशाख तुम्हांला
घालणार नाही काय? 31चिंता करू नका आणि असे
म्हणू नका की, ‘आम्ही काय खावे?’ किंवा ‘आम्ही काय
प्यावे?’ किंवा ‘आम्ही काय पांघरावे?’ 32सर्व लोक ज्यांना
देव माहीत नाही, ते सुध्दा या गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न
करतात, काळजी करू नका. कारण तुमच्या स्वर्गातील
पित्याला तुम्हांला या गोष्टींची गरज आहे हे माहीत आहे.
33तर पहिल्यांदा तुम्ही देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व
मिळविण्याचा प्रयत्न करा म्हणजे त्याबरोबर या सर्व गोष्टीही
तुम्हांला मिळतील. 34म्हणून उद्याची चिंता करू नका.
कारण प्रत्येक दिवस काही ना काही चिंता घेऊनच
उगवतो. म्हणून उद्याची चिंता उद्यासाठी दूर ठेवा.

### इतरांचा न्याय करण्याविषयी येशूची शिकवण
### *(लूक 6:37-38, 41-42)*

7 “तुमचा न्याय करण्यात येऊ नये म्हणून तुम्ही इतरांचा
न्याय करू नका. 2कारण ज्या न्यायाने तुम्ही इतरांचा
न्याय करता त्याच न्यायाने तुमचा न्याय केला जाईल,
आणि ज्या मापाने तुम्ही माप घालता त्याच मापाने तुम्हांला
परत माप घालतील. 3तू आपल्या डोळ्यातील मुसळ लक्षात
न घेता आपल्या भावाच्या डोळ्यातील कुसळ का पाहतोस?
4किंवा ‘तुझ्या डोळ्यातील कुसळ मला काढू दे’ असे
तुझ्या भावाला कसे म्हणू शकतोस? कारण पाहा, तुझ्या
डोळ्यात तर मुसळ आहे. 5अरे ढोंग्या, पहिल्यांदा तू आपल्या
डोळ्यातील मुसळ काढ म्हणजे तुझ्या भावाच्या डोळ्यातील
कुसळ काढायला तुला स्पष्ट दिसेल.
6“जे पवित्र ते कुत्र्यांना टाकू नका, ती उलटून तुम्हांला
फाडतील आणि आपले मोती डुकरांपुढे टाकू नका; टाकाल
तर ती त्यांना पायदळी तुडवतील.

### तुमच्या सर्व गरजा देवाला सांगा
### *(लूक 11:9-13)*

7“मागा म्हणजे तुम्हांला ते देण्यात येईल; शोधा आणि
तुम्हांला ते सापडेल; ठोका आणि तुमच्यासाठी दार उघडले
जाईल. 8कारण प्रत्येकजण जो मागतो त्याला मिळते, जो
शोधतो त्याला सापडते, आणि जो ठोकावतो, त्याच्यासाठी
दार उघडले जाते.
9“तुमच्यापैकी असा कोण मनुष्य आहे की, जो आपल्या
मुलाने भाकर मागितली तर त्याला दगड देईल? 10किंवा
मासा मागितला, तर त्याला साप देईल? 11वाईट असूनही

जर तुम्हांला आपल्या मुलांना चांगल्या गोष्टी देण्याचे कळते
तर तुमच्या स्वर्गातील पित्याकडे जे मागतात, त्यांच्या गरजा
तो किती चांगल्या प्रकारे भागवील?

### अति महत्त्वाचा नियम

12“यासाठी ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या
असे तुम्हांला वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी
करा. कारण नियमशास्त्राच्या व संदेष्टेयांच्या शिकवणीचे
सार हेच आहे.

### स्वर्गाकडे जाणारा मार्ग आणि नरकाकडे जाणारा मार्ग
### *(लूक 13:24)*

13“अरुंद दरवाजाने आत जा. कारण नाशाकडे जाण्याचा
दरवाजा रूंद आहे, व मार्ग पसरट आहे. आणि त्यातून
आत जाणारे पुष्कळ आहेत. 14पण जीवनाकडे जाण्याचा
दरवाजा अरूंद व मार्ग अडचणीचा आहे, आणि फारच
थोडयांना तो सापडतो.

### लोक काय काय करतात ते पाहा
### *(लूक 6:43-44; 13:25-27)*

15“खोट्या संदेष्ट्याविषयी सावध असा. ते गरीब मेंढराचे
रूप घेऊन तुमच्याकडे येतात. पण प्रत्यक्षात ते क्रूर
लांडग्यांसारखे आहेत. 16त्यांच्या करणीवरून तुम्ही त्यांस
ओळखाल. ज्याप्रमाणे काटेरी झाडाला द्राक्षे लागत नाहीत,
किंवा रिंगणीच्या झाडाला अंजिरे येत नाहीत, त्याचप्रमाणे
वाइटाला चांगले फळ येत नाही. 17प्रत्येक चांगले झाड
चांगली फळे देते, पण वाईट झाड वाईट फळे देते. 18चांगल्या
झाडाला वाईट फळे येणार नाहीत, आणि वाईट झाडाला
चांगली फळे येणार नाहीत. 19जे झाड चांगले फळ देत
नाही ते तोडण्यात येते व अग्नीत टाकले जाते. 20म्हणून
अशा धोकेबाज लोकांना तुम्ही त्यांच्या फळांवरून
ओळखाल. 21जो कोणी मला वरवर ‘प्रभु, प्रभु’ म्हणतो,
तो प्रत्येक जण स्वर्गाच्या राज्यात जाईलच असे नाही तर
माझ्या स्वर्गातील पित्याच्या इच्छेप्रमाणे जो वागेल तोच
स्वर्गाच्या राज्यात जाईल. 22त्या दिवशी मला अनेक जण
म्हणतील, ‘हे प्रभु, आम्ही तुझ्या नावाने भूते काढली व
तुझ्या नावाने पुष्कळ चमत्कार केले. 23तेव्हा मी त्यांना
स्पष्ट सांगेन की, मी तुम्हांला ओळखत नाही, अहो दुराचार
करणाऱ्यांनो, माझ्यापासून चालते व्हा.

### शहाणा मनुष्य व मूर्ख मनुष्य
### *(लूक 6:47-49)*

24“जो कोणी माझ्या सांगण्याप्रमाणे आचरण करतो तो
शहाण्या माणसासारखा आहे; अशा सुज्ञ माणसाने आपले
घर खडकावर बांधले. 25मग जोराचा पाऊस झाला आणि
पूर आला. जोराचा वारा आला. वादळात घर सापडले,
पण ते पडले नाही. कारण त्याचा पाया खडकावर बांधला
होता. 26जो कोणी माझे हे शब्द ऐकून त्याप्रमाणे आचरण
करीत नाही तो कोणा एका मूर्ख माणसासारखा आहे;
त्याने आपले घर वाळूवर बांधले. 27मग जोराचा पाऊस
आला आणि पूर आला. जोराचा वारा सुटला. वादळवाऱ्यात
ते घर सापडले आणि कोसळून पडले.”

28जेव्हा ह्या बोधकथा सांगण्याचे येशूने संपविले तेव्हा
लोकांचा समुदाय त्याच्या शिकवण्याने थक्क झाला.
29कारण येशू त्यांना त्यांच्या धर्मशिक्षकांप्रमाणे नव्हे, तर
अधिकारवाणीने शिकवीत होता.

### येशू एका आजारी माणसाला बरे करतो
### *(मार्क 1:40-45; लूक 5:12-16)*

8 येशू डोंगरावरून खाली आला. पुष्कळ लोक
त्याच्यामागे चालत होते. 2तेव्हा एक कुष्ठरोग झालेला
मनुष्य त्याच्याकडे येऊन वाकून त्याच्या पाया पडून
म्हणाला, “प्रभु, तुमची इच्छा असेल तर तुम्ही मला शुद्ध
करण्यास समर्थ आहात.”

3मग येशूने आपला हात पुढे करून त्याला स्पर्श केला
व म्हटले, “तू शुद्ध व्हावेस अशी माझी इच्छा आहे;”
आणि ताबडतोब तो कुष्ठरोगी बरा झाला. 4“हे जे घडले
ते कुणाला सांगू नकोस, तर जाऊन स्वत:ला याजकांना
दाखव आणि तू कुष्ठरोगमुक्त झालास ह्याचे प्रमाण म्हणून
मोशेने ठरवून दिलेले अर्पण वाहून टाक. ह्यामुळे तू शुद्ध
झाल्याचे लोकांना कळेल.”

### येशू सेनाधिकाऱ्याच्या नोकराला बरे करतो
### *(लूक 7:1-10; योहान 4:43-54)*

5येशू कफर्णहूम शहरास गेला. जेव्हा त्याने शहरात
प्रवेश केला, तेव्हा एक सेनाधिकारी त्याच्याकडे आला
6आणि विनंती करू लागला की, “प्रभु, माझा नोकर
पक्षाघाताने खूपच त्रासलेला आहे व तो माझ्या घरात
पडून आहे.”

7येशू त्याला म्हणाला, “मी येऊन त्याला बरे करीन.”

8तेव्हा सेनाधिकारी म्हणाला, “प्रभु, आपण माझ्या घरी
यावे इतकी माझी योग्यता नाही. आपण फक्त शब्द बोला
म्हणजे माझा नोकर बरा होईल. 9कारण मी स्वत: दुसऱ्या
अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करतो आणि माझ्या
हाताखाली देखील अनेक शिपाई आहेत. मी एखाद्याला
‘जा’ म्हणतो आणि तो जातो आणि दुसऱ्याला ‘ये’ म्हटल्यावर
तो येतो. मी माझ्या नोकराला ‘अमूक कर’ असे सांगतो
आणि तो ते करतो.”

10येशूने जेव्हा हे ऐकले तेव्हा त्याला आश्चर्य वाटले
आणि जे त्याच्यामागून चालत होते, त्यांना तो म्हणाला,
“मी तुम्हांला खरे सांगतो, इस्राएलात इतका मोठा विश्वास
असलेला एकही मनुष्य मला आढळला नाही. 11मी तुम्हांला
सांगतो, पुष्कळ जण पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून येतील
आणि अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्यासह स्वर्गाच्या

राज्यात मेजासभोवती मेजवानीसाठी बसतील. 12परंतु जे खरे वारस आहेत, ते बाहेरच्या अंधारात टाकले जातील. तेथे रडणे व दात खाणे चालेल"

13मग येशू सेनाधिकाऱ्याला म्हणाला, "जा! तू जसा विश्वास धरलास तसे होईल." आणि त्याच क्षणी त्याचा नोकर बरा झाला.

## येशू अनेकांना बरे करतो
### *(मार्क 1:29-34; लूक 4:38-41)*

14मग येशू पेत्राच्या घरी आला. तेथे पेत्राची सासू तापाने आजारी पडली आहे, असे येशूने पाहिले. 15त्याने तिच्या हाताला स्पर्श केला तेव्हा तिचा ताप निघाला. मग ती उठून त्याची सेवा करू लागली. 16त्या संध्याकाळी लोकांनी भूतबाधा झालेल्या पुष्कळ लोकांना त्याच्याकडे आणले येशूने शब्द बोलून ती भुते घालविली व सर्व प्रकारच्या रोग्यांना बरे केले 17यशया संदेष्ट्यांच्या द्वारे जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले. यशयाने असे म्हटले होते:

"त्याने आमच्या व्याधी स्वत:वर घेतल्या, त्याने आमचे रोग वाहिले." *यशया* 53:4

## येशूला अनुसरणे
### *(लूक 9:57-62)*

18आपल्या भोवती खूप लोक आहेत हे येशूने पाहिले तेव्हा त्याने त्यांना सरोवराच्या पलीकडे जाण्याची आज्ञा केली. 19मग एक नियमशास्त्राचा शिक्षक त्याच्याकडे आला आणि म्हणाला, "गुरुजी, आपण जेथे जाल तेथे मी आपल्या मागे येईन."

20येशू त्याला म्हणाला, "कोल्ह्यांना राहायला बिळे आणि आकाशातील पाखरांना घरटी आहेत, परंतु मनुष्याच्या पुत्राला डोके सुध्दा टेकावयास जागा नाही."

21मग येशूच्या शिष्यांपैकी आणखी एक जण येशूला म्हणाला, "प्रभु, पहिल्यांदा मला जाऊ द्या व माझ्या वडिलांना पुरून येऊ द्या. "

22पण येशू त्याला म्हणाला, "तू माझ्या मागे ये. जे मेलेले आहेत त्यांना त्यांच्या मेलेल्यांना पुरू दे."

## येशू वादळ थांबवितो
### *(मार्क 4:35-41; लूक 8:22-25)*

23मग येशू नावेत गेल्यावर त्याच्यामागून त्याचे शिष्य नावेत गेले. 24अचानक, समुद्रात इतके मोठे वादळ झाले की, नाव लाटांमध्ये पूर्णपणे गुरफटून गेली. आणि येशू तर नावेत झोपला होता. 25तेव्हा शिष्य त्याच्याकडे गेले आणि त्यांनी त्याला जागे केले व म्हटले, "प्रभु, आम्हांला वाचवा. आपण बुडत आहोत."

26येशूने उत्तर दिले, "तुम्ही विश्वासात किती उणे आहात रे? तुम्ही का घाबरता?" मग त्याने उठून वारा व लाटा यांना अधिकारवाणीने शांत होण्यास सांगितले. वारा थांबला. समुद्र अगदी शांत झाला. 27तेव्हा लोकांना मोठे आश्चर्य वाटले, ते म्हणाले, "हा कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे? वारा व समुद्र देखील त्याचे ऐकतात."

## येशू दोन माणसांमधून भूते काढतो
### *(मार्क 5:1-20; लूक 8:26-39)*

28मग येशू समुद्राच्या पलीकडे असलेल्या गरदेकरांच्या देशात आला, तेव्हा दोन भूतबाधा झालेली माणसे स्मशानातून येशूकडे आली. ही माणसे स्मशानातील कबरांमध्ये राहत होती. ती फार भेसूर होती, त्यामुळे कोणीही त्यांच्या वाटेला जात नसे. 29ती दोघे येशूकडे आली व म्हणाली, "देवाच्या पुत्रा, तुला आमच्याकडून काय पाहिजे? नेमलेल्या वेळेपूर्वीच तू आम्हांला शिक्षा करायला आलास काय? "

30त्या ठिकाणापासून थोड्या अंतरावर डुकरांचा एक कळप चरत होता. 31ती भुते त्याला विनंती करून लागली, ती म्हणाली, "जर तू आम्हांला ह्यांच्यामधून काढून टाकणार असशील तर आम्हांला त्या डुकरांच्या कळपात जाऊ दे. 32तेव्हा तो त्यांना म्हणाला, "जा." मग ती त्यांच्यामधून निघून डुकरांमध्ये गेली. तेव्हा तो संपूर्ण कळप कड्यावरून खाली धावत जाऊन पाण्यात बुडाला. 33मग त्यांना चारणारे पळाले व त्यांनी नगरात जाऊन सर्वांना हे वर्तमान, तसेच भूतबाधा झालेल्यांचे काय झाले तेही सांगितले. 34तेव्हा सर्व शहर येशूला भेटायला निघाले; आणि जेव्हा त्यांनी त्याला पाहिले तेव्हा येशूने त्यांच्या प्रदेशातून निघून जावे अशी विनंती त्यांनी त्याला केली.

## येशू एका पक्षाघाती मनुष्याला बरे करतो
### *(मार्क 2:1-12; लूक 5:17-26)*

9 येशू नावेत चढला व परत आपल्या नगरात गेला. 2तेव्हा काही लोकांनी पक्षघात झालेल्या मनुष्याला येशूकडे आणले. तो मनुष्य बाजेवर पडून होता. येशूने त्यांचा विश्वास पाहून त्या पक्षघाती मनुष्याला म्हटले, "तरुण मुला, काळजी करू नकोस. तुझ्या पापांची क्षमा झाली आहे." 3नियमशास्त्राच्या काही शिक्षकांनी हे ऐकले आणि ते आपसात म्हणाले, "हा मनुष्य तर ईश्वराची निंदा करीत आहे."

4त्यांचे विचार ओळखून येशू म्हणाला, "तुमच्या अंत:करणात तुम्ही वाईट विचार का करता? 5कारण, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे असे म्हणणे, किंवा उठून चालू लाग, असे म्हणणे यातून कोणते सोपे आहे? 6परंतु तुम्ही हे समजून घ्यावे की, मनुष्याच्या पुत्राला, पृथ्वीवर पापाची क्षमा करण्याचा अधिकार आहे." मग येशू त्या पक्षघाती मनुष्याला म्हणाला, "ऊठ! आपला बिछाना घे

आणि घरी जा.” 7मग तो उठून आपल्या घरी गेला. 8लोकांनी हे पाहिले व ते थक्क झाले आणि ज्या देवाने मनुष्यास असा अधिकार दिला त्याचा त्यांनी गौरव केला.

## येशू मत्तयाची निवड करतो

### *(मार्क 2:13-17; लूक 5:27-32)*

9मग येशू तेथून पुढे निघाला, तेव्हा त्याने मत्तय नावाच्या माणसाला जकातीच्या नाक्यावर बसलेले पाहिले. तेव्हा येशू त्याला म्हणाला, “माझ्यामागे ये.” तेव्हा तो उठून त्याच्यामागे गेला. 10येशू मत्तयाच्या घरी जेवत असता, पुष्कळ जकातदार व पापी आले आणि येशू व त्याचे शिष्य यांच्याबरोबर जेवायला बसले.

11परूशांनी ते पाहिले. त्यांनी येशूच्या शिष्यांस विचारले, “तुमचा गुरू जकातदार व पापी यांच्याबरोबर का जेवतो?” 12येशूने त्यांना हे बोलताना ऐकले, तो त्यांना म्हणाला, “जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची गरज नाही तर जे आजारी आहेत त्यांना आहे. 13मी तुम्हांला सांगतो, जा आणि याचा अर्थ काय ते शिका: ‘मला यज्ञपशूंची अर्पणे नकोत, तर दया हवी.’ मी नीतिमान लोकांना नव्हे, तर पापी लोकांना बोलावण्यास आलो आहे.”*

## येशू इतर धार्मिक यहुद्यांसारखा नाही

### *(मार्क 2:18-22; लूक 5:33-39)*

14मग योहानाचे शिष्य त्याच्याकडे आले आणि त्यांनी त्याला विचारले, “आम्ही व परूशी पुष्कळ वेळा उपास करतो. पण तुझे शिष्य उपास करीत नाहीत. ते का?”

15येशूने त्यांना उत्तर दिले, “नवरा मुलगा (वर) सोबत असताना त्याचे वऱ्हाडी दुःखी कसे राहतील? अशी वेळ येईल जेव्हा नवऱ्या मुलाला त्यांच्यापासून दूर केले जाईल तेव्हा ते उपास करतील. 16कोणी नव्या कापडाचे ठिगळ जुन्या कापडाला लावीत नाही, कारण ते ठिगळ त्या कापडापासून निघून जाईल व छिद्र अधिक मोठे होईल. 17तसेच नवा द्राक्षारस जुन्या कातडी पिशवीत कोणी घालीत नाहीत, घातला तर पिशव्या फुटतात व त्यांचा नाश होतो. म्हणून लोक नवा द्राक्षारस नव्या पिशव्यात घालतात, तेव्हा दोन्हीही चांगले राहतात.”

## येशू मृत मुलीला जीवंत करतो आणि आजारी स्त्रीला बरे करतो

### *(मार्क 5:21-43; लूक 8:40-56)*

18येशू या बोधकथा सांगत असता यहुद्यांच्या सभास्थानाचा एक अधिकारी त्याच्याकडे आला व येशूच्या पाया पडून म्हणाला, “माझी मुलगी आताच मेली आहे. परंतु आपण येऊन आपल्या हाताचा स्पर्श केला तर ती पुन्हा जिवंत होईल.”

19तेव्हा येशू व त्याचे शिष्य त्या सेनाधिकाऱ्याबरोबर निघाले. 20वाटेत बारा वर्षांपासून रक्तस्राव असलेली एक स्त्री मागून येऊन येशूच्या जवळ पोहोंचली व त्याच्या वस्त्राला शिवली. 21कारण तिने आपल्या मनात म्हटले, “मी केवळ त्याच्या वस्त्राला शिवले तरी बरी होईन.” 22तेव्हा येशू मागे वळून तिला पाहून म्हणाला, “बाई काळजी करू नकोस! तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.” आणि ती स्त्री त्याच क्षणी बरी झाली.

23मग येशू त्या यहुदी सभास्थानाच्या अधिकाऱ्याच्या घरात आला. तेव्हा त्याने बासरी वाजविणाऱ्या व गोंधळ करणाऱ्या जमावाला पाहिले. 24येशू म्हणाला, “जा, मुलगी मेलेली नाही, ती झोपेत आहे.” तेव्हा लोक येशूला हसले. 25मग त्या जमावाला बाहेर पाठविल्यावर त्याने आत जाऊन तिचा हात आपल्या हातात घेतला आणि ती मुलगी उठली. 26आणि ही बातमी त्या प्रांतात पसरली.

## येशू आणखी लोकांना बरे करतो

27तेव्हा येशू तेथून जात असता दोन आंधळे त्याच्यामागे ओरडत चालले. म्हणू लागले, “दाविदाच्या पुत्रा, आम्हांवर दया करा.”

28येशू आत गेला तेव्हा ते आंधळेही आत गेले. त्याने त्यांना विचारले, “मी तुम्हांला दृष्टि देऊ शकेन असा तुमचा विश्वास आहे का?”

“होय, प्रभु,” त्यांनी उत्तर दिले.

29मग त्याने त्यांच्या डोळ्यांना स्पर्श केला आणि म्हणाला, “तुमच्या विश्वासाप्रमाणे तुमच्या बाबतीत घडो.” 30आणि त्यांना पुन्हा दृष्टि आली. येशूने त्यांना सक्त ताकीद दिली, “पाहा, हे कोणाला कळू देऊ नका.” 31परंतु ते बाहेर गेले आणि त्यांनी त्या प्रदेशात सगळीकडे ही बातमी पसरविली. 32मग ते दोघे निघून जात असताना लोकांनी एका भूतबाधा झालेल्या माणसाला येशूकडे आणले. 33जेव्हा येशूने त्यामधून भूत काढून टाकले तेव्हा पूर्वी मुका असलेला तो मनुष्य बोलू लागला. लोकांना ह्याचे आश्चर्य वाटले व ते म्हणाले, “इस्राएलमध्ये याआधी असे कधीही झालेले पाहण्यात आले नाही.”

34परंतु परूशी म्हणाले, “हा भूतांच्या अधिपतीच्या साहाय्याने भुते काढतो.”

## येशूला असहाय लोकांविषयी कळवळा वाटतो

35येशू त्यांच्या सभास्थानांमध्ये शिक्षण देत व राज्याचे शुभवर्तमान गाजवीत आणि सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारचे आजार बरे करीत सर्व नगरातून व सर्व खेड्यातून फिरला. 36आणि जेव्हा त्याने त्रासलेल्या असहाय लोकांचे समुदाय पाहिले तेव्हा त्याला त्यांचा कळवळा आला. कारण मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे ते कष्टी व पांगलेले होते. 37तो आपल्या शिष्यांस म्हणाला, “पीक खरोखर फार आहे, पण कामकरी थोडे आहेत. 38म्हणून तुम्ही पिकाच्या

---

**मला … आहे** होशेय 6:6

प्रभूची प्रार्थना करा यासाठी की, त्याने आपल्या पिकाची कापणी करायला कामकरी पाठवावेत."

## येशू त्याच्या प्रेषितांना उपदेश करायला पाठवितो

*(मार्क 3:13-19; 6:7-13; लूक 6:12-16; 9:1-6)*

10 येशूने आपल्या बारा शिष्यांना आपल्याजवळ बोलाविले, आणि त्याने त्यांना भुते घालविण्याचा अधिकार दिला. तसेच प्रत्येक आजार व दुखणी बरे करण्याचा अधिकार दिला. 2बारा प्रेषितांची नावे अशी आहेत: पेत्र (ज्याला शिमोन म्हणत), आणि त्याचा भाऊ अंद्रिया, जब्दीचा मुलगा याकोब व त्याचा भाऊ योहान, 3फिलीप्प व बर्थलमय, थोमा आणि जकातदार मत्तय, अल्फीचा मुलगा याकोब व तद्दय, 4शिमोन कनानी व पुढे ज्याने त्याचा विश्वासघात केला तो यहूदा इस्कार्योत.

5या बाराजणांना पुढील सूचना देऊन पाठविण्यात आले: "यहुदीतर लोकांमध्ये जाऊ नका व शोमरोनी लोकांच्या कोणत्याही नगरात प्रवेश करू नका. 6तर त्याऐवजी इस्राएलच्या हरवलेल्या मेंढरांकडे जा. 7तुम्ही जाल तेव्हा हा संदेश जाहीर करा: 'स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे' 8रोग्यांना बरे करा, मृतांना उठवा. कुष्ठरोग्यांना शुद्ध करा, भुते काढा, तुम्हांला फुकट मिळाले आहे म्हणून फुकट द्या. 9तुमच्या कमरेला सोने, चांदी किंवा तांबे घेऊ नका. 10सोबत पिशवी घेऊ नका, तुमच्या प्रवासासाठी फक्त तुमचे अंगावरचे कपडे असू द्या व पायातील वहाणा असू द्या. अधिकचे वस्त्र किंवा वहाणा घेऊ नका. काठी घेऊ नका, कारण काम करणाऱ्याच्या गरजा भागणे आवश्यक आहे. 11ज्या कोणत्याही नगरात किंवा खेड्यात तुम्ही जाल, तेथे कोण योग्य व्यक्ति आहे याचा शोध करा आणि तेथून निघेपर्यंत त्या व्यक्तीच्या घरी राहा. 12त्या घरात प्रवेश करतेवेळी 'येथे शांति नांदो' असे म्हणा. 13जर ते घर खरोखर योग्य असेल तर तुमची शांति तेथे राहील पण जर ते घर योग्य नसेल तर तुमची शांति तुमच्याकडे परत येईल. 14आणि जो कोणी तुम्हांला स्वीकारणार नाही किंवा तुमचे शब्द ऐकणार नाही तेव्हा त्याच्या घरातून किंवा नगरातून बाहेर पडताना तुम्ही आपल्या पायाची धूळ झटकून टाका. 15मी तुम्हांला खरे सांगतो. न्यायाच्या दिवशी त्या नगरापेक्षा सदोम आणि गमोराला अधिक सोपे जाईल.

## येशू छळाविषयी सावध करतो

*(मार्क 13:9-13; लूक 21:12-17)*

16"लांडग्यांमध्ये जसे मेंढरास पाठवावे तसे मी तुम्हांस पाठवीत आहे, म्हणून तुम्ही सापांसारखे चतुर आणि कबुतरांसारखे सरळ स्वभावी असा. 17माणसांविषयी सावध असा, कारण ते तुम्हांला न्यायसभेच्या स्वाधीन करतील आणि त्यांच्या सभास्थानांमध्ये ते तुम्हांला फटके मारतील. 18माझ्यामुळे ते तुम्हांला राज्यपाल व राजे यांच्यासमोर आणतील. तुम्ही त्यांच्यापुढे व यहूदीतर लोकांसमोर माझ्याविषयी सांगाल. 19जेव्हा तुम्हांला अटक करतील तेव्हा काय बोलावे किंवा कसे बोलावे याविषयी काळजी करू नका. त्यावेळेला तुम्ही काय बोलायचे ते सांगितले जाईल. 20कारण बोलणारे तुम्ही नसून तुमच्या पित्याचा आत्मा तुमच्याद्वारे बोलेल.

21"भाऊ आपल्या भावाविरुद्ध व पिता आपल्या मुलाविरुद्ध उठेल आणि त्याला विश्वासघाताने मारण्यास सोपवून देईल. मुले आईवडिलांविरुद्ध उठून त्यांना जिवे मारण्यास देतील. 22माझ्यामुळे सर्व तुमचा द्वेष करतील. पण शेवटपर्यंत जो टिकेल तोच तरेल. 23एका ठिकाणी जर तुम्हांला त्रास दिला जाईल, तर दुसरीकडे जा. मी तुम्हांला खरे सांगतो मनुष्याचा पुत्र येईपर्यंत इस्राएलच्या सर्व गावांमध्ये तुमचे असे फिरणे संपणार नाही.

24"विद्यार्थी त्याच्या शिक्षकापेक्षा वरचढ नाही, किंवा नोकर मालकाच्या वरचढ नाही. 25विद्यार्थी आपल्या शिक्षकासारखा व नोकर आपल्या मालकासारखा होणे, इतके पुरे. जर घराच्या धन्याला त्यांनी बालजबूल म्हटले तर घरातील इतर माणसांना ते किती वाईट नावे ठेवतील!"

## लोकांचे नको तर देवाचे भय बाळगा

*(लूक 12:2-7)*

26"म्हणून त्यांना भिऊ नका, कारण उघडे होणार नाही असे काही झाकलेले नाही आणि कळणार नाही असे काही गुप्त नाही. 27जे मी तुम्हांला अंधारात सांगतो ते तुम्ही प्रकाशात बोला, आणि कानात सांगितलेले जे तुम्ही ऐकता ते तुम्ही छपरावरून गाजवा. 28जे शरीराला वधतात पण आत्म्याचा वध करू शकत नाहीत त्यांना भिऊ नका, तर त्यापेक्षा आत्म्याला व शरीराला जो मारू शकतो व नरकात टाकू शकतो त्याला भ्या. 29दोन चिमण्या एका पैशाला विकत नाहीत का? तरीही तुमच्या पित्याच्या इच्छेशिवाय त्यातील एकही जमिनीवर पडणार नाही.

30"आणि तुमच्या डोक्यावरचे केससुद्धा त्याने मोजलेले आहेत. 31म्हणून घाबरू नका. पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुम्ही अधिक मौल्यवान आहात.

32"जो कोणी मनुष्यांसमोर मला स्वीकारील त्याला मीसुद्धा माझ्या स्वर्गातील पित्यासमोर स्वीकारीन. 33पण जो कोणी मनुष्यांसमोर मला नाकारील त्याला मी सुद्धा माझ्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारीन. 34असे समजू नका की मी पृथ्वीवर शांति करायला आलो आहे; मी शांति स्थापित करायला आलो नाही तर तलवार चालवायला आलो आहे. 35-36मी फूट पाडायला आलो आहे,

'म्हणजे मुलाला त्याच्या पित्याविरुद्ध आणि मुलीला तिच्या आईविरुद्ध सुनेला तिच्या सासूविरुद्ध उभे करायला आलो आहे. सारांश मनुष्याच्या घरचीच माणसे त्याचे शत्रू होतील.' *मीखा 7:6*

37“जो माझ्यापेक्षा स्वत:च्या पित्यावर किंवा आईवर
अधिक प्रीति करतो, तो मला योग्य नाही. जो माझ्यापेक्षा
आपल्या मुलावर, मुलीवर अधिक प्रीति करतो, तो मला
योग्य नाही. 38जो आपला वधस्तंभ घेऊन माझ्यामागे
येण्याचे नाकारतो, तो मला योग्य नाही. 39जो आपला
जीव मिळवितो तो त्याला गमावील पण जो माझ्याकरिता
आपला जीव गमावतो तो त्याला मिळवील. 40जी व्यक्ति
तुम्हांला स्वीकारते ती व्यक्ति मला स्वीकारते आणि ज्या
पित्याने मला पाठविले त्यालाही स्वीकारते. 41जो कोणी
संदेष्ट्यांचा स्वीकार त्याच्या संदेशाच्या सेवेमुळे करतो,
त्याला संदेष्ट्याचे प्रतिफळ मिळेल, आणि जो धार्मिकाचा
स्वीकार त्याच्या धार्मिकतेसाठी करतो, त्याला धार्मिकाचे
प्रतिफळ मिळेल. 42मी तुम्हांला खरे सांगतो की, जो कोणी
शिष्यांच्या नावाने या लहानातील एकाला केवळ प्यालाभर
थंड पाणी प्यायला देईल तो आपल्या प्रतिफळाला मुळीच
मुकणार नाही.”

## येशू आणि बाप्तिस्मा करणारा योहान
*(लूक 7:18-35)*

11 येशूने त्याच्या बारा शिष्यांना ह्या गोष्टी सांगण्याचे
संपविल्यावर तो तेथून निघाला आणि गालील
प्रांतातील गावांमध्ये फिरून शिकवू आणि उपदेश करू
लागला. 2बाप्तिस्मा करणारा योहान तुरूंगात होता. त्याने
ख्रिस्त करीत असलेल्या गोष्टींविषयी ऐकले. तेव्हा योहानाने
काही शिष्यांना येशूकडे पाठविले. 3आणि त्याला विचारले,
“जो येणार होता, तो तूच आहेस? किंवा आम्ही दुसऱ्याची
वाट पाहावी?”
4येशूने उत्तर दिले, “जे तुम्ही ऐकता व पाहता ते योहानाला
जाऊन सांगा. 5आंधळे पाहू शकतात. पांगळे चालतात.
कुष्ठरोगी शुद्ध केले जातात, बहिरे ऐकतात, मेलेले
उठविले जातात व गरिबांना सुवार्ता सांगण्यात येते. 6धन्य
तो पुरुष जो माझ्यामुळे अडखळत नाही.”
7मग ते जात असता येशू योहानाविषयी लोकांशी बोलू
लागला, “तुम्ही वैराण प्रदेशात काय पाहायला गेला होता?
वाऱ्याने हलविलेला बोरू काय? 8तुम्ही काय पाहायला
गेला होता? तलम वस्त्र घातलेल्या माणसाला पाहायला
गेला होता काय? तलम वस्त्र घालणारे राजांच्या राजवाड्यात
असतात. 9तर मग तुम्ही बाहेर कशाला गेला होतात?
संदेष्ट्याला पाहायला काय? होय. मी तुम्हांला सांगतो,
आणि संदेष्ट्यांपेक्षा अधिक असा योहान होता.
10त्याच्याविषयी असे लिहिण्यात आले आहे:

‘पाहा, मी माझ्या दूताला तुझ्यापुढे पाठवितो तो तुझ्यासाठी
मार्ग तयार करील.’ *मलाखी* 3:1

11मी तुम्हांला खरे सांगतो की, स्त्रियांपासून
जन्मलेल्यांमध्ये बाप्तिस्मा करणारा योहान याच्यापेक्षा मोठा
असा कोणी झाला नाही, तरीही स्वर्गाच्या राज्यात जो
अगदी लहान आहे तो त्याच्यापेक्षा मोठा आहे. 12बाप्तिस्मा
करणाऱ्या योहानाच्या काळापासून आतापर्यंत लोक
स्वर्गाच्या राज्याचा स्वीकार व प्रसार प्रभावीपणे करीत
आहेत. 13कारण योहानापर्यंत सर्व संदेष्टे व नियमशास्त्र
यांनी संदेश दिले. 14आणि जर तुम्ही ते स्वीकारण्यास
तयार असाल तर येणारा एलीया तो हाच आहे. 15ज्याला
ऐकायला कान आहेत तो ऐको.

16“या पिढीला मी कोणती उपमा देऊ? जी मुले बाजारात
बसून आपल्या सोबत्यांना हाक मारतात त्यांच्यासारखी ही
पिढी आहे. 17ती म्हणतात,

‘आम्ही तुमच्यासाठी संगीत वाजविले तरी तुम्ही नाचला
नाहीत, आम्ही विलाप केला तरी तुम्ही ऊर बडवून घेतले
नाही.’

18योहान काही न खाता व पिता आला, पण ते म्हणतात
‘त्याला भूत लागले आहे’, 19इतरांप्रमाणेच मनुष्याचा पुत्र
खात पीत आला. लोक म्हणतात, ‘पाहा हा किती खातो?
किती पितो? जकातदार व पापी लोकांचा मित्र,’ परंतु
ज्ञानाची योग्यता त्याच्याद्वारे घडणाऱ्या योग्य गोष्टींमुळे
ठरते.”

## जे विश्वास ठेवीत नाहीत त्यांच्यापासून येशू लोकांना सावध करतो
*(लूक 10:13-15)*

20तेव्हा ज्या नगरांमध्ये त्याने सर्वात जास्त चमत्कार
केले होते त्या नगरांतील लोकांनी पश्चात्ताप केला नाही,
म्हणून येशूने त्यांना दोष दिला. 21“हे खोराजिना, तुझा
धिक्कार असो! हे बेथसैदा तुझा धिक्कार असो! कारण
तुमच्यामध्ये जी पराक्रमाची कृत्ये करण्यात आली ती जर
सोर व सिदोन यांच्यामध्ये केली असती तर त्यांनी त्वरेने
पूर्वीच गोणपाट नेसून व अंगाला राख फासून पश्चात्ताप
केला असता. 22पण मी तुम्हांला सांगतो की, न्यायाच्या
दिवशी सोर व सिदोन यांना तुमच्यापेक्षा अधिक सोपे
जाईल. 23आणि तू कफर्णहूमा, तू आकाशापर्यंत उंच होशील
काय? तू नरकापर्यंत खाली जाशील, कारण जे चमत्कार
तुझ्यामध्ये करण्यात आले ते जर सदोमात करण्यात आले
असते तर ते शहर आतापर्यंत टिकले असते. 24पण मी
तुम्हांस सांगतो की, न्यायाच्या दिवशी तुमच्यापेक्षा सदोम
नगराला सोपे जाईल.”

## येशू त्याच्या लोकांना विश्रांति देतो
*(लूक 10:21-22)*

25मग येशू म्हणाला, “हे पित्या, आकाशाच्या व पृथ्वीच्या
प्रभु मी तुझे उपकार मानतो. कारण तू या गोष्टी ज्ञानी व

बुद्धिमान लोकांपासून गुप्त ठेवून बालकांना प्रकट केल्या.
26होय पित्या, तू हे केलेस, कारण खरोखर तुला असेच
करायचे होते. 27माझ्या पित्याने मला सर्व काही दिले
आहे. आणि पित्यावाचून कोणी पुत्राला ओळखीत नाही,
आणि पुत्रावाचून व ज्याला प्रगट करायची पुत्राची
इच्छा आहे त्याच्याशिवाय कोणीही पित्याला ओळखीत
नाही. 28जे थकलेले व ओझ्याने लादलेले असे सर्व तुम्ही
मजकडे या आणि मी तुम्हांला विश्रांति देईन. 29माझे जू
आपणांवर घ्या; माझ्यापासून शिका, म्हणजे तुमच्या
आत्म्यास विश्रांति मिळेल. 30कारण माझे जू सोपे आहे
आणि माझे ओझे हलके आहे."

## काही यहूदी येशूवर टीका करतात

***(मार्क 2:23-28; लूक 6:1-5)***

12 त्या दिवशी म्हणजे शब्बाथ* दिवशी येशू धान्याच्या
शेतातून चालला होता. शेतात पीक उभे होते.
येशूच्या शिष्यांना भूक लागली होती, म्हणून ते कणसे
मोडून खाऊ लागले. 2जेव्हा परूश्यांनी हे पाहिले, तेव्हा
ते येशूला म्हणाले, "पाहा, तुमचे शिष्य शब्बाथ दिवशी जे
करू नये ते करीत आहेत." 3तेव्हा त्याने त्यांना म्हटले,
"दाविदाला व त्याच्याबरोबरच्या माणसांना भूक लागली
तेव्हा त्याने काय केले, हे तुम्ही वाचले आहे काय?
4देवाच्या मंदिरात तो गेला आणि त्याने व त्याच्या बरोबर
असलेल्या लोकांनी समर्पित केलेल्या भाकरी खाल्ल्या.
असे करणे नियमशास्त्राच्या विरुद्ध होते. फक्त याजकांनाच
ती भाकर खाण्याची परवानगी होती. 5आणि तुम्ही
नियमशास्त्र वाचले आहे की, प्रत्येक शब्बाथाच्या दिवशी
मंदिरातील याजक मंदिरात शब्बाथ पवित्र पाळण्याविषयीचा
नियम मोडीत असत परंतु ते तसे करू शकत असत. 6मी
तुम्हांला सांगतो की, मंदिरापेक्षा महान असा कोणीतरी
येथे आहे. 7पवित्र शास्त्र म्हणते, 'मला यज्ञपशूंची अर्पणे
नकोत, तर मला दया हवी.'* याचा खरा अर्थ तुम्हांला
समजला असता तर तुम्ही या निर्दोष लोकांना दोष लावला
नसता. 8कारण मनुष्याचा पुत्र शब्बाथाचा प्रभु आहे."

## येशू हात वाळलेल्या माणसाला बरे करतो

***(मार्क 3:1-6; लूक 6:6-11)***

9येशूने ते ठिकाण सोडले व यहूद्यांच्या सभास्थानात तो
गेला. 10सभास्थानात हात वाळलेला एक मनुष्य होता.
काही यहूद्यांनी येशूवर काही दोषारोप करता यावा या
हेतूने त्याला विचारले, "शब्बाथ दिवशी रोग बरे करणे
योग्य आहे काय?" 11येशूने त्यांना उत्तर दिले, "जर
तुमच्यापैकी एखाद्याकडे मेंढरू असेल व शब्बाथ दिवशी
ते खड्ड्यात पडले, तर तो त्याला वर काढणार नाही
काय? 12तर मग मनुष्य मेंढरापेक्षा कितीतरी अधिक
मौल्यवान आहे. म्हणून नियमशास्त्र लोकांना शब्बाथ
दिवशी चांगले करण्याची मोकळीक देते."
13मग येशू त्या वाळलेल्या हाताच्या मनुष्याला म्हणाला,
"तुझा हात पुढे सरळ कर". त्या मनुष्याने हात लांब केला
व तो हात बरा झाला आणि दुसऱ्या हातासारखाच चांगला
झाला. 14नंतर परुश्यांनी बाहेर जाऊन त्याला कसे मारावे
याविषयी मसलत केली.

## येशू देवाचा निवडलेला सेवक

15परूशी काय करीत आहेत ते येशूला माहीत होते.
म्हणून येशू तेथून गेला. पुष्कळ लोक येशूच्या मागे निघाले
व त्याने जे कोणी रोगी होते, त्या सर्वांना बरे केले.
16आणि त्याने त्यांना निक्षून सांगितले की, 'तो कोण
आहे, हे इतरांना सांगू नका.' 17यशया संदेष्ट्याच्या द्वारे जे
सांगितले गेले होते ते पूर्ण होण्यासाठी त्याने असे म्हटले.

18"हा माझा सेवक, याला मी निवडले आहे. मी त्याजवर
प्रीति करतो, आणि त्याच्याविषयी मला संतोष वाटतो. मी
आपला आत्मा त्याच्यावर ठेवीन, आणि तो यहूदीतरांसाठी
योग्य न्यायाची घोषणा करील.
19तो वाद घालणार नाही किंवा ओरडणार नाही;
रस्त्यावर लोक त्याचा आवाज ऐकणार नाहीत
20वाकलेला बोरू तो मोडणार नाही आणि मंदावलेली
वात तो विझविणार नाही. योग्य निर्णयाचा विजय होईपर्यंत
तो असे करील.
21सर्व लोक त्याच्यावर आशा ठेवतील."

*यशया* 42:1-4

## येशूचे सामर्थ्य देवाकडून आहे

***(मार्क 3:20-30; लूक 11:14-23; 12:10)***

22मग काही माणसांनी एकाला येशूकडे आणले. तो
मनुष्य आंधळा व मुका होता व त्याच्यामध्ये भूत होते.
येशूने त्या माणसाला बरे केले व तो बोलू लागला व पाहू
लागला. 23सर्व लोक चकित झाले, ते म्हणाले, "हा
दाविदाचा पुत्र असेल काय?" 24परुश्यांनी लोकांना हे
बोलताना ऐकले. परूशी म्हणाले, "भुते काढण्यासाठी
येशू बालजबूल सैतानाचे सामर्थ्य वापरतो आणि बालजबूल
हा तर भुतांचा प्रमुख आहे."
25परूशी कसला विचार करीत आहेत ते येशूला जाणवत
होते. म्हणून येशू त्यांना म्हणाला, "आपसात लढणारी
राज्ये नाश पावतात व फूट पडलेले शहर किंवा घर
टिकत नाही. 26आणि जर सैतानच सैतानाला काढतो तर
त्यांच्यात मतभेद आहे, त्यांच्यात फूट आहे मग त्याचे
राज्य कसे टिकेल? 27आणि मी जर बालजबुलाच्या

---

**शब्बाथ** यहूदी कॅलेंडरप्रमाणे आठवड्याचा सातवा दिवस. यहूदी लोकांकरिता तो एक विशेष धार्मिक दिवस समजला जात असे.

**मला ... दया हवी** होशेय 6:6

सहय्याने भुते काढतो तर तुमची मुले कोणाच्या सामर्थ्याने भुते काढतात. म्हणून तुमचे स्वत:चे लोक तुम्हांला चूक ठरवितील. 28परंतु मी जर देवाच्या साहाय्याने भुते काढतो तर देवाचे राज्य तुमच्यापर्यंत आले आहे हे निश्चित समजा.

29"किंवा एखाद्या बलवान मनुष्याच्या घरात शिरून, त्याच्या घरातील सर्व वस्तूंची चोरी जर कोणाला करायची असेल तर प्रथम त्या बलवान मनुष्याला तो बांधून टाकील व मग तो चोरी करील. 30एखादा मनुष्य जर माझे समर्थन करीत नसेल, तर तो माझ्याविरुद्ध आहे. जो मनुष्य माझ्याबरोबर काम करीत नाही तो माझ्याविरुद्ध काम करीत आहे. 31म्हणून मी तुम्हांला सांगतो, मनुष्यांना ते करीत असलेल्या सर्व पापांची क्षमा करण्यात येईल. ते जे काही वाईट बोलतील त्याबद्दलही क्षमा करण्यात येईल पण जर कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध बोलेल, तर त्याला क्षमा करण्यात येणार नाही. 32एखादा मनुष्य जर मनुष्याच्या पुत्राविरुद्ध काही बोलेल तर त्याला क्षमा करण्यात येईल पण जो कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध बोलेल त्याला क्षमा होणार नाही. त्याला या काळीही क्षमा होणार नाही व भविष्यातही होणार नाही.

### ज्या गोष्टी तुम्ही करता त्या तुम्ही कोण आहात हे दाखवितात
### *(लूक 6:43-45)*

33"जर तुम्हांला चांगले फळ हवे असेल, तर झाड चांगले करा. जर तुम्ही झाड चांगले करणार नाही, तर फळही चांगले येणार नाही. कारण झाड त्याच्या फळावरून ओळखले जाते. 34अहो सापाच्या पिल्लांनो, तुम्ही वाईट असता तुम्हांला चांगल्या गोष्टी कशा बोलता येतील? जे अंत:करणात आहे तेच तोंडावाटे बाहेर पडते. 35चांगला मनुष्य आपल्या चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी काढतो आणि वाईट माणूस आपल्या वाईट भांडारातून वाईट गोष्टी काढतो. 36आणखी मी तुम्हांस सांगतो की. जो प्रत्येक व्यर्थ शब्द लोक बोलतील त्याचा हिशेब ते न्यायाच्या दिवशी देतील. 37कारण तू आपल्या बोलण्यावरून न्यायी ठरशील आणि आपल्या बोलण्यावरूनच दोषी ठरशील."

### यहूदी लोक येशूकडे पुरावा मागतात
### *(मार्क 8:11-12; लूक 11:29-32)*

38काही नियमशास्त्राचे शिक्षक व परूशी यांच्यापैकी काही जणांनी येशूला म्हटले, "गुरूजी, तुमच्या हातून एखादे चिन्ह पहावे अशी आमची इच्छा आहे."

39येशूने उत्तर दिले, "जे लोक देवाशी प्रामाणिक नाहीत, पापी आहेत असे लोक पुराव्यासाठी चमत्कार पाहू इच्छितात. पण योना संदेष्ट्याशिवाय दुसरे चिन्ह तुम्हांला मिळणार नाही. 40कारण योना जसा तीन दिवस व तीन रात्री माशाच्या पोटात होता तसा मनुष्याचा पुत्र तीन दिवस व तीन रात्री पृथ्वीच्या पोटात राहील. 41जेव्हा तुमच्या पिढीचा न्याय होईल, तेव्हा निनवेचे लोक उभे राहतील, तुमच्याविरूद्ध साक्ष देतील आणि तुम्हांला दोष देतील. कारण त्यांनी योनाच्या उपदेशावरून पश्चात्ताप केला. आणि आता तर तुमच्यामध्ये योनापेक्षा महान असा कोणी एक येथे आहे. 42न्यायाच्या दिवशी दक्षिणेची राणी* या पिढीबरोबर उभी राहून हिला दोषी ठरवील. कारण शलमोनाचे ज्ञान ऐकायला ती पृथ्वीच्या शेवटापासून आली. आणि शलमोनापेक्षा महान असा कोणी येथे आहे!

### सध्याचे लोक पापी आहेत
### *(लूक 11:24-26)*

43"जेव्हा अशुद्ध आत्मा माणसाला सोडून बाहेर निघून जातो तेव्हा तो पाणी नसलेल्या ठिकाणाहून विसावा शोधीत फिरतो पण तो त्याला मिळत नाही. 44तेव्हा तो म्हणतो, 'जेथून मी आलो त्या माझ्या घरात मी परत जाईन' आणि जेव्हा तो परत येतो तेव्हा ते घर रिकामे असलेले तसेच स्वच्छ व नीटनेटके असे त्याला दिसते. 45नंतर तो जाऊन आपल्यापेक्षा वाईट असे दुसरे सात आणखी आत्मे आपल्याबरोबर घेतो व ते आत शिरून त्याला झपाटतात व त्याच्यात राहतात. मग त्या माणसाची शेवटची स्थिति पहिल्यापेक्षा वाईट होते. तसेच आजच्या ह्या पापी पिढीचे होईल."

### येशूचे अनुयायी हेच त्याचे कुटुंब
### *(मार्क 3:31-35; लूक 8:19-21)*

46तो लोकांशी बोलत असता, त्याची आई व त्याचे भाऊ त्याच्याशी बोलण्यासाठी बाहेर वाट पाहत उभे होते. 47तेव्हा कोणी तरी त्याला म्हणाले, "तुमची आई व भाऊ बाहेर उभे आहेत. ते तुमच्याशी बोलण्याची वाट पाहत आहेत." 48त्याच्याशी बोलणाऱ्याला त्याने उत्तर दिले, "कोण माझी आई? कोण माझा भाऊ?" 49मग तो आपल्या शिष्यांकडे हात करून म्हणाला, "पाहा हे माझे आई व माझे भाऊ आहेत. 50कारण माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेनुसार जे वागतात, तेच माझे भाऊ, बहीण आणि आई आहेत."

### बी पेरणाऱ्याची बोधकथा
### *(मार्क 4:1-9; लूक 8:4-8)*

13 त्याच दिवशी येशू घराबाहेर पडून सरोवराच्या काठी जाऊन बसला. 2पुष्कळ लोक त्याच्याभोवती जमले, म्हणून येशू नावेत जाऊन बसला व सर्व लोकसमुदाय किनाऱ्यावर उभा राहिला. 3तेव्हा त्याने त्यांना गोष्टीरूपाने बोध केला. तो म्हणाला, "एक शेतकरी बी पेरायला निघाला. 4तो पेरीत असता काही बी रस्त्यावर पडले, पक्षी आले व त्यांनी ते खाऊन टाकले. 5काही बी

---

**दक्षिणेची राणी** शबाची राणी 1 राजे 10:1-13

खडकाळ जमिनीवर पडले, तेथे पुरेशी माती नव्हती. तेथे
बी फार झपाट्याने वाढले. पण जमीन खोलवर नव्हती,
[6]म्हणून जेव्हा सूर्य उगवला तेव्हा रोपटे वाळून गेले. कारण
त्याला खोलवर मुळे नव्हती. [7]काही बी काटेरी झुडपावर
पडले. काटेरी झुडूप वाढले आणि त्याने रोपाची वाढ
खुंटविली. [8]काही बी चांगल्या जमिनीवर पडले, ते रोप
वाढले व त्याला धान्य आले. आणि कोठे शंभरपट, कोठे
साठपट, कोठे तीसपट असे त्याने पीक दिले. [9]ज्याला
ऐकायला कान आहेत तो ऐको!"

## येशूने बोधकथांचा वापर का केला
### *(मार्क 4:10-12; लूक 8:9-10)*

[10]मग शिष्य त्याच्याजवळ आले आणि त्यांनी विचारले,
"तुम्ही त्यांना गोष्टीरूपाने बोध का करता?"
[11]तेव्हा त्याने उत्तर दिले, "स्वर्गाच्या राज्याची रहस्ये
तुम्ही समजू शकता, पण त्यांना ते समजणार नाही. [12]कारण
ज्या कोणाजवळ आहे त्याला दिले जाईल व ते त्याला
पुष्कळ होईल, परंतु ज्या कोणाकडे नाही त्याच्याजवळ जे
असेल ते देखील त्याकडून काढून घेतले जाईल. [13]म्हणून
मी त्यांना गोष्टीरूपाने बोध करतो; कारण ते पाहत असताना
ही त्यांना दिसत नाही आणि ऐकत असतांनाही त्यांना
समजत नाही. [14]तेव्हा हे लोक दाखवून देत आहेत की,
त्यांच्यासंबंधी यशयाने पूर्वी जे लिहून ठेवले ते खरे आहे.
ते असे :

'तुम्ही लक्ष द्याल, ऐकाल पण तुम्हांला समजणार नाही,
तुम्ही पाहाल आणि निरीक्षण कराल पण तुम्हांला काहीच
दिसणार नाही
[15]कारण या लोकांचे अंत:करण कठीण झाले आहे
त्यांना कान आहेत पण ऐकू येत नाही. त्यांनी आपले
डोळे मिटले आहेत. यासाठी की, या लोकांनी आपल्या
डोळ्यांनी पाहू नये, आपल्या कानांनी ऐकू नये आपल्या
अंत:करणाने समजू नये व मागे फिरू नये, आणि मी
त्यांना बरे करू नये.' *यशया* 6:9-10

[16]पण तुमचे डोळे धन्य आहेत कारण ते पाहतात, तुमचे
कान धन्य आहेत कारण ते ऐकतात. [17]मी तुम्हांला खरे
सांगतो, तुम्ही ज्या गोष्टी पाहत आहा त्या पाहण्यासाठी
अनेक संदेष्टे व नीतिमान लोक आतुरतेने वाट पाहत
होते. तरी त्यांना त्या पाहता आल्या नाहीत, आणि तुम्ही
ज्या गोष्टी ऐकत आहात त्या ऐकण्याची त्यांची खूप इच्छा
होती तरी त्यांनी त्या ऐकल्या नाहीत.

## येशू बीयांविषयी स्पष्टीकरण करतो
### *(मार्क 4:13-20; लूक 8:11-15)*

[18]"पेरणाऱ्याच्या बोधकथेचा अर्थ काय हे समजून घ्या;
[19]कोणी राज्याची गोष्ट ऐकतो पण ती त्याला समजत
नाही, तेव्हा तो दुष्ट (सैतान) येतो व त्याच्या अंत:करणात
पेरलेले ते घेतो, वाटेवर पेरलेला तो हाच आहे. [20]खडकाळ
जागेवर पेरलेला तो असा आहे की, तो वचन ऐकतो व
लगेच आनंदाने स्वीकारतो. [21]तरी त्याच्यामध्ये मूळ
नसल्याने तो थोडा काळच टिकतो आणि वचनामुळे संकट
आले किंवा कोणी छळ केला, व त्रास झाला म्हणजे तो
लगेच अडखळतो. [22]आणि काटेरी झाडांमध्ये पेरलेला
असा आहे की, तो वचन ऐकतो पण जगिक गोष्टीविषयीचा
ओढा, संपत्तीचा मोह ही वचनाला वाढू देत नाहीत आणि
तो निष्फळ होतो. [23]चांगल्या जमिनीवर पेरलेला असा
आहे की, तो वचन ऐकतो, ते समजतो व तो निश्चितपणे
पीक देतो. कोणी शंभरपट, कोणी साठपट, कोणी तीसपट
असे पीक देतो."

## गहू आणि निदण यांची बोधकथा

[24]नंतर येशूने त्यांना दुसरी बोधकथा सांगितली. तो
म्हणाला, "स्वर्गाचे राज्य हे एखाद्या मनुष्याने आपल्या
शेतात चांगले बी पेरण्यासारखे आहे. [25]पण लोक झोपेत
असता त्या मनुष्याचा शत्रू आला व गव्हामध्ये निदण
पेरून गेला. [26]पण जेव्हा रोपे वाढली व दाणे आले तेव्हा
निदणही दिसू लागले. [27]मग त्या माणसाचे नोकर
त्याच्याकडे आले व म्हणाले, 'मालक, आपण आपल्या
शेतात चांगले बी पेरले ना? मग त्यात निदण कोठून
आले?' [28]तो त्यांना म्हणाला, 'कोणीतरी शत्रूने हे केले
आहे.' त्याच्या नोकरांनी विचारले, 'आम्ही जाऊन ते
उपटून टाकावे अशी आपली इच्छा आहे काय?'
[29]"पण तो मनुष्य म्हणाला, 'नको, तुम्ही निदण जमा
करीत असताना त्याबरोबर कदाचित गहूही उपटाल.
[30]कापणीपर्यंत दोन्ही बरोबर वाढू द्या. मग कापणीच्या
वेळेस मी कापणाऱ्यास सांगेन की पहिल्याने निदण जमा
करा व जाळण्यासाठी त्याच्या पेंढ्या बांधा. पण गहू माझ्या
गोदामात साठवा.'"

## येशूच्या आणखी काही बोधकथा
### *(मार्क 4:30-34; लूक 13:18-21)*

[31]मग येशूने त्यांना आणखी एक बोधकथा सांगितली.
तो म्हणाला, "स्वर्गाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे;
तो एका माणसाने घेऊन आपल्या शेतात पेरला. [32]मोहरीचा
दाणा सर्व दाण्यांहून लहान आहे, पण तो त्याचे झाड मात्र
खूप मोठे येते. इतके की, आकाशातील पाखरे येऊन
त्याच्या फांद्यांवर राहतात."
[33]मग येशूने लोकांना आणखी एक दाखला सांगितला:
"स्वर्गाचे राज्य खमिरासारखे आहे. ते एका स्त्रीने घेतले
व तीन मापे पिठामध्ये ठेवले तेव्हा ते सर्व पीठ फुगले."
[34]लोकांना बोध करण्यासाठी येशूने नेहमीच गोष्टींचा
उपयोग केला.

35ते यासाठी की, संदेष्ट्यांनी जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे. ते असे की :

“गोष्टी सांगायला मी आपले तोंड उघडीन, जगाच्या स्थापनेपासून गुप्त राहिलेल्या गोष्टी मी बोलेन.”

*स्तोत्र.* 78:2

## येशू बोधकथा समजावून सांगतो

36मग येशू लोकांना सोडून घरात गेला. त्याच्याकडे त्याचे शिष्य आले आणि म्हणाले, “शेतातील निदणाची बोधकथा आम्हांला नीट समजावून सांगा.”

37येशूने उत्तर दिले, “शेतामध्ये चांगले बी पेरणारा हा मनुष्याचा पुत्र आहे. 38आणि शेत हे जग आहे. चांगले बी हे देवाच्या राज्यातील मुले आहेत आणि निदण हे दुष्टाचे (सैतानाचे) मुलगे आहेत. 39हे निदण पेरणारा शत्रू हा सैतान आहे आणि कापणी या काळाची समाप्ति आहे व कापणी करणारे देवदूत आहेत. 40“म्हणून जसे निदण गोळा करून अग्नीत टाकतात त्याप्रमाणे या काळाच्या शेवटी होईल. 41मनुष्याचा पुत्र आपल्या दूतांना पाठवील आणि ते त्याच्या राज्यातून अडखळण करणाऱ्या सर्व गोष्टी आणि अन्याय करणारे यांना बाजूला काढतील 42आणि त्यांना अग्नीच्या भट्टीत टाकतील. तेथे रडणे व दात खाणे चालेल. 43तेव्हा नीतिमान लोक आपल्या पित्याच्या राज्यात सूर्यासारखे प्रकाशतील. ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको!

## गुप्त ठेवी आणि मोती यांच्या बोधकथा

44“स्वर्गाचे राज्य हे जणू काय शेतामध्ये लपवून ठेवलेल्या ठेवीसारखे आहे. एके दिवशी एका मनुष्याला ती ठेव सापडली. त्यामुळे त्या मनुष्याला खूप आनंद झाला. तो ती गुप्त ठेव पुन्हा त्याच शेतात लपवून ठेवतो व आपले सर्व काही विकून ते शेत विकत घेतो.

45“आणखी, स्वर्गाचे राज्य चांगल्या मोत्याचा शोध घेणाऱ्या व्यापाऱ्यासारखे आहे, 46एक दिवस त्याला एक अत्यंत सुंदर मोती सापडतो. तेव्हा तो जाऊन आपले सर्व काही विकतो आणि ते मोती विकत घेतो.

## माशाच्या जाळ्याविषयीची बोधकथा

47“तसेच, स्वर्गाचे राज्य पाण्यात टाकलेल्या जाळ्यासारखे आहे. जाळ्यात सर्व प्रकारचे मासे सापडतात. 48ते भरल्यावर माणसांनी ते ओढून किनाऱ्यावर आणले व बसून जे चांगले ते भांड्यात भरले व जे वाईट ते फेकून दिले. 49या काळाच्या शेवटी असेच होईल. देवदूत येतील आणि वाईटांना नीतिमान लोकांतून वेगळे करतील. 50वाईट लोकांना अग्नीत फेकून देण्यात येईल. तेथे रडणे व दात खाणे चालेल. 51येशूने शिष्यांना विचारले, “तुम्हांला या सर्व गोष्टी समजल्या काय?” तेव्हा ते म्हणाले, “होय.”

52तेव्हा त्याने त्यांना म्हटले, “प्रत्येक नियमशास्त्राचा शिक्षक ज्याला स्वर्गाच्या राज्याविषयी शिकविण्यात आले आहे तो घरमालकासारखा आहे. त्याच्याकडे अनेक जुन्या व नव्या गोष्टी घरातील तिजोरीत ठेवलेल्या आहेत.”

## येशू आपल्या गावी जातो
### (*मार्क 6:1-6; लूक 4:16-30*)

53येशूने लोकांना बोध करण्याचे व गोष्टी सांगून शिकविण्याचे संपवल्यानंतर तो निघून गेला. 54त्याने आपल्या गावी येऊन त्यांच्या सभास्थानामध्ये असे शिकविले की, ते चकित होऊन म्हणाले, “हे ज्ञान व ही सामर्थ्याची कृत्ये याला कशी आली? 55हा त्या सुताराचा मुलगा ना? याच्या आईला मरीया म्हणतात ना? आणि याकोब व योसेफ आणि शिमोन व यहूदा याचे भाऊ आहेत ना? 56याच्या सर्व बहिणी आपल्यात आहेत ना? मग याला या सर्व गोष्टी कशा आल्या असे ते त्याच्याविषयी गोंधळात पडले.” 57त्यांनी त्याला मानण्याचे नाकारले.

पण येशू त्यांना म्हणाला, “इतर लोक संदेष्ट्याचा सन्मान करतात. पण त्याच्या स्वत:च्या गावात किंवा घरात त्याचा सन्मान होत नाही.” 58तेथील लोकांच्या अविश्वासामुळे त्याने तेथे जास्त चमत्कार केले नाहीत.

## हेरोद येशूविषयी ऐकतो
### (*मार्क 6:14-29; लूक 9:7-9*)

14 त्या वेळी हेरोदाने* येशूविषयी बातमी ऐकली. 2तेव्हा त्याने आपल्या सेवकांना म्हटले, “येशू हा बाप्तिस्मा करणारा योहान आहे. तो मेलेल्यातून उठला आहे. त्यामुळेच तो हे चमत्कार करीत आहे.”

## बाप्तिस्मा करणारा योहान कसा मारला गेला

3हेरोदाने आपला भाऊ फिलिप्प याची पत्नी हेरोदिया हिच्यामुळे योहानाला अटक करून तुरूंगात टाकले होते. 4कारण योहान त्याला सांगत होता, “तू हेरोदियाला ठेवणे योग्य नाही,” 5हेरोद त्याला मारावयास पाहत होता, पण तो लोकांना भीत होता कारण लोकांचा असा विश्वास होता की, योहान संदेष्टा आहे.

6हेरोदाच्या वाढदिवशी हेरोदियाच्या मुलीने दरबारात नाच करून हेरोदाला संतुष्ट केले. 7त्यामुळे त्याने शपथ वाहून ती जे काही मागेल ते देण्याचे अभिवचन तिला दिले. 8तिच्या आईच्या सांगण्यावरून ती म्हणाही, “मला येथे तबकात बाप्तिस्मा करणारा योहान याचे शीर द्या” 9हेरोद राजाला फार वाईट वाटले. तरी त्याने आपल्या शपथपूर्वक दिलेल्या वचनामुळे व आमंत्रित लोकांमुळे ते द्यावे अशी आज्ञा केली. 10आणि त्याने तुरूंगात माणसे पाठवून योहानाचे शीर तोडले. 11मग त्यांनी त्याचे शीर

---

**हेरोद** हेरोद अन्तीपस. महान हेरोदाचा मुलगा

तबकात घालून त्या मुलीला आणून दिले. तिने ते आपल्या
आईकडे आणले. 12मग त्याच्या शिष्यांनी येऊन त्याचे
प्रेत उचलून नेले व त्याला पुरले. आणि त्यांनी जाऊन जे
घडले ते येशूला सांगितले.

### येशू पाच हजारांहून अधिक लोकांना जेवू घालतो
*(मार्क 6:30-44; लूक 9:10-17; योहान 6:1-14)*

13मग ते ऐकून येशू तेथून नावेत बसून निघून गेला व
नंतर नावेतून उतरून माळरानावर एका निवांत व एकाकी
जागी गेला. लोकांनी हे ऐकले तेव्हा ते पायी त्याच्याकडे
गेले. 14मग तो किनाऱ्यावर आला, जेव्हा त्याने मोठा
लोकसमुदाय पाहिला. तेव्हा त्याला त्यांच्याबद्दल कळवळा
वाटला. म्हणून जे आजारी होते त्यांना त्याने बरे केले.
15मग संध्याकाळ झाल्यावर त्याचे शिष्य त्याच्याकडे आले
आणि म्हणाले, "ही माळरानावरची उजाड जागा आहे
आणि भोजन वेळ होऊन गेली आहे. लोकांनी गावामध्ये
जाऊन स्वत:करिता अन्न विकत घ्यावे म्हणून त्यांना
पाठवून द्या." 16परंतु येशू त्यांना म्हणाला, "त्यांना जाण्याची
गरज नाही. तुम्हीच त्यांना खायला द्या."

17तेव्हा ते त्याला म्हणाले, "पाच भाकरी व दोन मासे
याशिवाय येथे आमच्याजवळ काहीच नाही." 18तो म्हणाला,
"त्या इकडे आणा." 19मग लोकांना गवतावर बसण्याची
आज्ञा केल्यावर त्याने त्या पाच भाकरी व दोन मासे
घेऊन वर आकाशाकडे पाहून त्यावर आशीर्वाद मागितला.
नंतर त्याने भाकरी मोडून शिष्यांना दिल्या व शिष्यांनी
लोकास दिल्या. 20ते सर्व जेवून तृप्त झाले. मग त्या
उरलेल्या तुकड्यांच्या त्यांनी बारा टोपल्या भरून घेतल्या.
21जेवणाऱ्यांमध्ये स्त्रिया व मुले मोजली नाहीत, पुरुष मात्र
पाच हजार होते.

### येशू सरोवरावरून चालतो
*(मार्क 6:45-52; योहान 6:15-21)*

22मग तो स्वत: लोकसमुदायास निरोप देईपर्यंत त्याने
शिष्यांना नावेत बसून लगेच आपल्यापुढे पलीकडे जाण्यास
सांगितले. 23लोकांना पाठवून दिल्यावर तो प्रार्थना
करण्यास एकांत ठिकाणी डोंगरावर गेला, रात्र झाली
तेव्हा तो तेथे एकटाच होता. 24पण त्यावेळी नाव
किनाऱ्यापासून बऱ्याच अंतरावर होती व ती लाटांनी
हेलकावत होती, कारण वारा समोरून वाहत होता.

25मग पहाटेच्या वेळी तो पाण्यावरून चालत शिष्यांकडे
आला. 26शिष्य त्याला पाण्यावरून चालताना पाहून घाबरून
गेले, त्यांना वाटले, भूतबीत आहे की काय म्हणून ते
"भूत, भूत" असे ओरडू लागले.

27पण येशू लगेच त्यांना म्हणाला, "काळजी करू नका!
मी आहे! भिऊ नका."

28पेत्र म्हणाला, "प्रभु जर तो तूच आहेस तर मला
पाण्यावरून तुझ्याकडे यायला सांग."

29येशू म्हणाला, "ये."

मग पेत्र नावेतून पाण्यात उतरला व पाण्यावरून चालत
येशूकडे जाऊ लागला. 30पण तो पाण्यावरून चालत
असतानाच वारा व लाटा पाहून तो भ्याला आणि बुडू
लागला. बुडताना ओरडला, "प्रभु, मला वाचवा."

31आणि लगेच येशूने आपला हात पुढे करून त्याला
धरले व म्हटले, "अरे अल्पविश्वासू माणसा, तू संशय
का धरलास?" 32मग ते नावेत बसल्यावर वारा थांबला.
33तेव्हा जे नावेत होते ते त्याला नमन करून म्हणाले,
"तुम्ही खरोखर देवाचे पुत्र आहात."

34नंतर ते पलीकडे गनेसरेत येथे पोहोचले. 35तेथील
लोकांनी येशूला पाहिले व सभोवतालच्या सर्व प्रदेशात
निरोप पाठविला व त्यांनी सर्व प्रकारच्या आजाऱ्यांस
त्याच्याकडे आणले. 36आणि आम्हांला आपल्या वस्त्राच्या
काठाला स्पर्श करू द्यावा, अशी विनंती केली, तेव्हा
जितक्यांनी स्पर्श केला तितके बरे झाले.

### देवाची आज्ञा आणि माणसांनी बनविलेले नियम
*(मार्क 7:1-23)*

15 तेव्हा यरुशलेमाहून काही परूशी व
नियमशास्त्राचे शिक्षक येशूकडे आले व म्हणाले,
2"तुमचे शिष्य पूर्वजांनी घालून दिलेले नियम का पाळत
नाहीत? कारण तुमचे शिष्य जेवणापूर्वी हात धूत नाहीत."

3येशूने उत्तर दिले, "आणि तुम्ही तुमच्या परंपरा
चालविण्यासाठी देवाची आज्ञा का मोडता? 4कारण देवाने
सांगितले आहे की, 'तुझ्या आईवडिलांचा मान राख.*'
'आणि जो कोणी आपल्या आईवडिलांबद्दल वाईट बोलतो,
त्याला जिवे मारावे.'* 5पण तुम्ही म्हणता, जो कोणी
पित्याला किंवा आईला म्हणेल की, 'तुला जे काही दिल्याने
तुझा जो फायदा झाला असता, ते मी देवाला अर्पण केले
आहे 6ते देवाचे नियम मोडीत आहेत.' आपल्या वडिलांचा
व आईचा सन्मान करू नये. याप्रकारे तुम्ही आपल्या
अशा परंपरेने देवाचे वचन रद्द केले आहे. 7अहो ढोंग्यांनो,
तुम्हांविषयी यशया संदेष्ट्यांने योग्य सांगितले आहे. तो
म्हणतो :

8'हे लोक, ओठांनी माझा सन्मान करतात पण त्यांचे
हृदय माझ्यापासून दूर आहे.

9आणि ते माणसांचे नियम आपली धर्मतत्त्वे म्हणून
शिकवितात आणि व्यर्थच माझी उपासना करतात.'"

*यशया 29:13*

10तेव्हा लोकांना जवळ बोलावून त्याने म्हटले, "ऐका
व समजून घ्या. 11जे तोंडाद्वारे आत जाते ते माणसाला

---

**तुझ्या ... राख** निर्गम 20:12; अनुवाद 5:16

**आणि जो ... मारावे** निर्गम 21:17

अशुद्ध करीत नाही, पण जे तोंडातून बाहेर निघते तेच माणसाला अशुद्ध करते."

12नंतर शिष्य जवळ येऊन त्याला म्हणाले, "परूश्यांनी जेव्हा हे ऐकले तेव्हा ते रागावले हे आपणांला कळले काय?" 13पण त्याने उत्तर देऊन म्हटले, "प्रत्येक रोपटे जे माझ्या स्वर्गातील पित्याने लावले नाही ते उपटले जाईल.
14त्यांना जाऊ द्या. ते आंधळे वाटाडे आहेत. जर एका आंधळ्याने दुसऱ्या आंधळ्याला वाट दाखवण्याचा प्रयत्न केला तर दोघेही खड्ड्यात पडतील."

15पेत्र म्हणाला, "आमच्यासाठी या बोधकथचे स्पष्टीकरण करा."

16"तुम्ही अजूनही बुद्धिमंदच आहात काय?" येशूने त्यांना विचारले. 17"जे काही तोंडात जाते ते सर्व पोटात जाते व मग बाहेर टाकले जाते. हे तुम्हांला अजून समजत नाही काय? 18परंतु ज्या गोष्टी तोंडातून बाहेर निघतात त्या अंत:करणातून येतात व त्याच माणसाला डागाळतात.
19कारण वाईट विचार, खून, व्यभिचार, जारकर्मे, खोट्या साक्षी, निंदा ही अंत:करणातून बाहेर निघतात. 20माणसाला डागाळणाऱ्या याच गोष्टी आहेत न धुतलेल्या हाताने खाण्याने माणसाला विटाळ होत नाही."

### येशू यहूदी नसलेल्या स्त्रीला मदत करतो
### *(मार्क 7:24-30)*

21नंतर येशू तेथून निघून सोर व सिदोन या भागात गेला. 22तेव्हा एक कनानी स्त्री त्या भागातून येशूकडे आली. ती स्त्री ओरडून म्हणाली, "प्रभु, दाविदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा. माझी मुलगी भुताने पछाडली आहे."

23पण येशूने तिला एका शब्दानेही उत्तर दिले नाही; तेव्हा त्याच्या शिष्यांनी येऊन त्याला विनंति केली, "तिला पाठवून द्या, कारण ती आमच्या मागे ओरडत येत आहे."

24पण येशूने उत्तर दिले, "मला देवाने फक्त इस्राएलाच्या हरवलेल्या मेंढरांकडे पाठविले आहे."

25मग ती स्त्री पुन्हा येशूकडे आली, ती येशूच्या पाया पडली व म्हणाली, "प्रभु, माझे साहाय्य करा. 26परंतु त्याने म्हटले, "मुलाची भाकर घेऊन कुत्र्यास टाकणे बरे नाही."

27ती स्त्री म्हणाली, "होय प्रभु, परंतु कुत्रीही आपल्या धन्याच्या मेजावरून पडलेले उष्टे चूर खातात. 28तेव्हा येशूने तिला म्हटले, "बाई, तुझा विश्वास मोठा आहे! तुझ्या इच्छेप्रमाणे तुला होवो." आणि तिची मुलगी बरी झाली.

### येशू अनेकांना बरे करतो

29नंतर येशू तेथून निघून गालील सरोवराकडे गेला. येशू डोंगरावर गेला आणि तेथे बसला. 30मग पुष्कळ लोक त्याच्याकडे आले, त्यांनी आपल्याबरोबर लुळे, पांगळे, आंधळे, बहिरे व इतर अनेक लोकांना आणले होते आणि त्यांनी त्या आजाऱ्यांना येशूच्या पायावर ठेवले. तेव्हा त्याने त्यांना बरे केले. 31मुके बोलू लागले, लुळे सशक्त झाले. व्यंग असलेले चांगले झाले, लंगडे चालू लागले, आंधळे पाहू लागले. हे पाहून लोक थक्क झाले, आणि त्यांनी इस्राएलाच्या देवाचा गौरव केले.

### येशू चार हजारांहून अधिकांना जेवू घालतो
### *(मार्क 8:1-10)*

32मग येशूने आपल्या शिष्यांस आपल्याजवळ बोलावून म्हटले, "मला लोकांचा कळवळा येतो. कारण ते आज तीन दिवस झाले माझ्याजवळ राहिले आहेत आणि त्यांच्याकडे खायला काही नाही, आणि त्यांना उपाशी पाठवावे अशी माझी इच्छा नाही, कारण ते वाटेत कदाचित मूर्च्छित होतील." 33शिष्य त्याला म्हणाले, "एवढ्या मोठ्या लोकसमुदायाला तृप्त करावे इतक्या भाकरी ह्या दूर रानात आमच्याजवळ कोठून असणार?"

34तेव्हा येशू म्हणाला, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?" ते म्हणाले, "आमच्याकडे सात भाकरी आहेत व काही मासे आहेत."

35मग त्याने लोकांना जमिनीवर बसविण्याची आज्ञा केली. 36मग त्या सात भाकरी व मासे घेऊन त्याने देवाचे उपकार मानले व त्या भाकरी मोडल्या व शिष्यांना दिल्या व शिष्यांनी लोकांना दिल्या. 37तेव्हा ते सर्व जेवून तृप्त झाले आणि त्यांनी उरलेल्या तुकड्यांनी भरलेल्या सात पाट्या गोळा केल्या. 38आणि जेवणारे, स्त्रिया व लेकरे सोडून चार हजार पुरुष होते. 39मग समुदायास निरोप दिल्यावर तो नावेत बसून मगदानाच्या हद्दीत गेला.

### यहुदी पुढारी येशूची परीक्षा पाहतात
### *(मार्क 8:11-13; लूक 12:54-56)*

16 परुशी आणि सदूकी येशूकडे आले. त्यांना येशूची परीक्षा पाहायची होती. आम्हांला आकाशातून चिन्ह दाखवा अशी मागणी त्यांनी केली.

2त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही संध्याकाळ झाली असता म्हणता आजचे हवामान चांगले असेल कारण आभाळ तांबूस आहे; 3आणि तुम्ही सकाळी म्हणता, आज वादळ होईल कारण आभाळ तांबूस व गडद आहे. तुम्हांला आभाळाचे स्वरूप ओळखता येते, पण काळाची लक्षणे ओळखता येत नाहीत? 4दुष्ट व व्यभिचारी पिढी चिन्ह शोधते, पण तिला योना संदेष्ट्यशिवाय दुसरे चिन्ह दिले जाणार नाही." मग तो त्यांना सोडून गेला.

### येशू यहुदी पुढाऱ्यांविषयी सावध करतो
### *(मार्क 8:14-21)*

5येशू आणि त्याचे शिष्य सरोवराच्या पलीकडे गेले तेव्हा भाकरी घ्यायला विसरले. 6तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "परूशी व सदूकी यांच्या खमिराविषयी सावध असा."

7तेव्हा ते आपापसात विचार करून म्हणाले, "आपण
भाकरी घेतल्या नाहीत म्हणून ते असे म्हणत आहे." 8पण
येशूने हे ओळखून म्हटले, "अहो अल्पविश्वासू, आपण
भाकरी घेतल्या नाहीत असा विचार तुम्ही आपापसामध्ये
का करता? 9तुम्हांला अजून आठवत नाही काय? पाच
भाकरींनी पाच हजार लोकांना जेवू घातले ते, आणि
त्यानंतर तुम्ही किती टोपल्या उचलून घेतल्या ते तुम्हांला
आठवत नाही काय? 10तसेच चार हजारांच्या जेवणाला
सात भाकरी, आणि तुम्ही किती टोपल्या उचलून घेतल्या
हे तुम्हांला आठवत नाही काय? 11मी भाकरी विषयी
तुम्हांला बोललो नाही, तर परूशी व सदूकी यांच्या
खमिराविषयी सावध राहा, असे म्हणालो, हे तुम्हांला कसे
समजत नाही?"

12तेव्हा त्यांना समजले की, त्याने त्यांना भाकरीच्या
खमिराविषयी सावध राहण्यास सांगितले नव्हते, तर परूशी
आणि सदूकी यांच्या शिकवणुकीविषयी सावध राहायला
सांगितले होते.

### पेत्र म्हणतो की येशू हा ख्रिस्त आहे
### *(मार्क 8:27-30; लूक 9:18-21)*

13येशू फिलिप्पाच्या कैसरिया या भागाकडे गेला. तो
त्याच्या शिष्यांना म्हणाला, "मनुष्याच्या पुत्राला लोक कोण
म्हणून म्हणतात?" 14आणि ते म्हणाले, "काही बाप्तिस्मा
करणारा योहान, तर कित्येक एलीया तर दुसरे काही
यिर्मया किंवा संदेष्ट्यांपैकी एक असे म्हणतात." 15मग
येशू त्यांना म्हणाला, "पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?"
16शिमोनाने उत्तर दिले, "तू ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र
आहेस."

17येशू म्हणाला, "शिमोना, योनाच्या पुत्रा, तू धन्य आहेस,
कारण रक्त व मांस यांनी तुला हे प्रगट केले नाही, तर
माझा पिता जो स्वर्गात आहे त्याने तुला हे प्रगट केले.
18आणखी मी तुला असे सांगतो की, तू पेत्र आहेस आणि
या खडकावर मी आपली मंडळी रचीन, आणि मृत्युलोकाचा
यावर अधिकार चालणार नाही. 19मी तुला स्वर्गाच्या
राज्याच्या किल्ल्या देईन आणि पृथ्वीवर जे काही तू
बांधून ठेवशील ते स्वर्गात बांधले जाईल आणि पृथ्वीवर
जे काही तू मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले
जाईल. 20तेव्हा त्याने शिष्यांस निक्षून सांगितले की, मी
ख्रिस्त आहे हे तुम्ही कोणालाही सांगू नका."

### येशू म्हणतो की त्याने मेलेच पाहिजे
### *(मार्क 8:31-9:1; लूक 9:22-27)*

21तेव्हापासून येशू ख्रिस्त आपल्या शिष्यास दाखवू
लागला की, आपण यरुशलेमला जावे आणि वडील
यहुदी नेते व मुख्य याजक आणि नियमशास्त्राचे शिक्षक
यांच्याकडून पुष्कळ दुःखे सोसावी व जिवे मारले जावे व
तिसऱ्या दिवशी पुन्हा उठविले जावे याचे अगत्य आहे.
22तेव्हा पेत्राने त्याला जवळ घेऊन निषेध करून म्हटले,
"प्रभु, या गोष्टीपासून देव तुझी सुटका करो. या गोष्टी
तुझ्या बाबतीत कधीही घडणार नाहीत!"

23परंतु तो वळून पेत्राला म्हणाला, "अरे सैताना,
माझ्यामागे हो, तू मला अडखळण आहेस. कारण तू देवाच्या
गोष्टींकडे लक्ष लावीत नाहीस तर मनुष्यांच्या गोष्टींकडे
लक्ष लावतोस."

24तेव्हा येशूने आपल्या शिष्यांस म्हटले, "जर कोणी
माझ्या मागे येऊ इच्छित असेल तर त्याने स्वतःला नाकारावे
आणि आपला वधस्तंभ उचलून घ्यावा व माझ्यामागे
यावे. 25कारण जो कोणी आपला जीव वाचवू इच्छितो तो
त्याला गमावील पण जो माझ्याकरिता आपला जीव गमावील
तो त्याला मिळवील. 26जर मनुष्याने सर्व जग मिळविले
आणि अनंतकालिक जीवन गमावले तर त्याला काय
लाभ? किंवा मनुष्य आपल्या जिवाचा काय मोबदला
देईल? 27कारण मनुष्याचा पुत्र आपल्या पित्याच्या वैभवात
आपल्या दूतांसहित येणार आहे; आणि तेव्हा तो प्रत्येकाला
ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणे मोबदला देईल. 28मी तुम्हांला
खरे सांगतो की, येथे उभे राहणाऱ्यातले काही जण असे
आहेत की, ते मनुष्याच्या पुत्राला त्याच्या राज्यात येताना
पाहतील तोपर्यंत त्यांना मरणाचा अनुभव येणारच नाही."

### येशू मोशे व एलीयाबरोबर दिसतो
### *(मार्क 9:2-13; लूक 9:28-36)*

17 सहा दिवसांनंतर येशूने पेत्र, याकोब व त्याचा
भाऊ योहान यांना आपल्याबरोबर घेतले व त्यांना
उंच डोंगरावर एकांती नेले. 2त्याचे शिष्य पाहत असतानाच
येशूचे रूप पालटले. त्याचे तोंड सूर्यासारखे प्रकाशले आणि
त्याची वस्त्रे प्रकाशासारखी पांढरी शुभ्र झाली. 3तेव्हा
मोशे व एलीया हे त्याच्याशी संभाषण करीत असलेले
त्यांना दिसले.

4पेत्र येशूला म्हणाला, "प्रभु, येथे असणे हे आपणांसाठी
बरे आहे. आपली इच्छा असेल तर मी येथे तीन मंडप
करतो, एक आपल्यासाठी, एक मोशेसाठी व एक
एलीयासाठी."

5पेत्र बोलत आहे, इतक्यात, एका तेजस्वी ढगाने
त्यांच्यावर सावली केली, आणि त्या ढगातून वाणी झाली,
"हा माझा प्रिय पुत्र आहे, याजविषयी मी संतुष्ट आहे, याचे
तुम्ही ऐका."

6येशुबरोबर असलेल्या शिष्यांनी ही वाणी ऐकली. तेव्हा
ते जमिनीवर पालथे पडले कारण ते फार भ्याले होते.
7तेव्हा येशू जवळ येऊन त्यांना स्पर्श करून म्हणाला,
"उठा! घाबरू नका." 8मग त्यांनी आपले डोळे उघडले
आणि वर पाहिले तेव्हा त्यांना येशू शिवाय दुसरे कोणीही
दिसले नाही.

9येशू आणि त्याचे शिष्य डोंगरावरून खाली उतरत
असताना, येशूने त्यांना आज्ञा केली की, डोंगरावर त्यांनी

जे पाहिले ते कोणालाही सांगू नये. मनुष्याचा पुत्र मरणातून
पुन्हा उठेपर्यंत वाट पाहा. 10मग त्याच्या शिष्यांनी म्हटले,
“नियमशास्त्राचे शिक्षक असे का म्हणतात की, एलीया
अगोदर आला पाहिजे?” 11तेव्हा त्याने उत्तर दिले, “एलीया
येऊन सर्व काही पूर्ववत करील हे खरे, 12पण मी तुम्हांला
सांगतो की, एलीया आलाच आहे आणि त्यांनी त्याला
ओळखले नाही पण त्यांना वाटले तसे त्यांनी त्याला केले.
मनुष्याचा पुत्रही त्यांच्याकडून असेच सहन करणार आहे.”
13तेव्हा त्यांना समजले की त्याने बाप्तिस्मा करणाऱ्या
योहानाविषयी सांगितले आहे.

### येशू एका फेफरेकरी मुलाला बरे करतो
### *(मार्क 9:14-29; लूक 9:37-43)*

14नंतर येशू व शिष्य लोकसमुदायाजवळ आल्यावर
एक मनुष्य त्याच्याकडे आला आणि त्याच्यापुढे गुडघे
टेकून म्हणाला, 15“प्रभु, माझ्या मुलावर दया करा. त्याला
फेफरे येतात व त्याचे फार हाल होतात कारण तो सारखा
विस्तवात आणि पाण्यात पडतो. 16मी त्याला आपल्या
शिष्यांकडे आणले पण त्यांना त्याला बरे करता येईना.”
17येशूने उत्तर दिले, “अहो अविश्वासू व विपरीत पिढीच्या
लोकांनो, मी तुमच्याबरोबर आणखी कोठवर राहू? मी
तुमचे किती सहन करू? त्याला माझ्याकडे आणा.”
18येशूने त्या मुलामध्ये असलेल्या भुताला कडक रीतीने
धमकावले, तेव्हा ते भूत त्याच्यातून निघून गेले आणि
त्याच घटकेला तो मुलगा बरा झाला.
19नंतर शिष्य एकांती येशूजवळ येऊन म्हणाले,
“आम्हांला (त्याच्यातील भूत) का काढता आले नाही?”
20तेव्हा तो म्हणाला, “तुमच्या अल्पविश्वासामुळे. मी
तुम्हांला खरे सांगतो, तुमच्यात जर मोहरीच्या दाण्याएवढा
विश्वास असेल तर तुम्ही या डोंगराला म्हणू शकता,
‘येथून निघून तेथे जा’ तर तो डोंगर जाईल. तुमच्यासाठी
काहीही अशक्य असणार नाही.” 21*

### येशू स्वतःच्या मरणाविशयी बोलतो
### *(मार्क 9:30-32; लूक 9:43-45)*

22जेव्हा ते एकत्र गालीलात आले तेव्हा तो त्यांना
म्हणाला, “मनुष्याचा पुत्र माणसांच्या हाती विश्वासघाताने
धरून दिला जाणार आहे. 23ते त्याला जिवे मारतील
आणि तिसऱ्या दिवशी तो पुन्हा उठविला जाईल.” तेव्हा
शिष्य फार दुःखी झाले.

### येशू कर देण्याविषयी शिकवितो

24येशू आणि त्याचे शिष्य कफर्णहूमास आले तेव्हा
मंदिराचा कर वसूल करणारे आले, ते पेत्राकडे येऊन
म्हणाले, “तुमचा गुरू कराचा रुपया देत नाही काय?”
25त्याने म्हटले, “होय देतो.” मग तो घरात आल्याबरोबर
तो बोलण्याअगोदर येशू म्हणाला, “शिमोना, तुला काय
वाटते? पृथ्वीवरील राजे जकात किंवा कर कोणाकडून
घेतात, आपल्या मुलांकडून की परक्याकडून?”
26जेव्हा तो म्हणाला, “परक्याकडून” तेव्हा येशूने त्याला
म्हटले, “तर मग मुले मोकळी आहेत. 27तरी आपण
त्यांना अडखळण आणू नये, म्हणून पाण्यात जाऊन गळ
टाक आणि पहिल्याने वर येईल तो मासा धरून त्याचे
तोंड उघड म्हणजे तुला दोन रुपयांचे एक नाणे सापडेल.
ते घेऊन माझ्याबद्दल व तुझ्याबद्दल दे.”

### सर्वांत महान कोण हे येशू सांगतो
### *(मार्क 9:33-37; लूक 9:46-48)*

18 त्या वेळेस शिष्य आले आणि त्यांनी विचारले,
“स्वर्गाच्या राज्यात सर्वांत महान कोण?”
2तेव्हा त्याने एका लहान बालकाला आपल्याजवळ
बोलावून त्यांच्यामध्ये उभे केले, 3आणि म्हटले, “मी
तुम्हांला खरे सांगतो, तुमच्यात बदल होऊन तुम्ही
बालकासारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात जाणारच
नाही. 4म्हणून जो कोणी आपणांला या बालकासारखे
लीन करतो तोच स्वर्गाच्या राज्यात सर्वांहून महान आहे.
5“आणि जो कोणी अशा एका लहान बालकाला माझ्या
नावाने स्वीकारतो, तो मला स्वीकारतो. 6परंतु जो कोणी
माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या ह्या लहानातील एकाला
अडखळण आणील त्याच्या गव्व्यात जात्याची मोठी तळी
बांधून त्याला समुद्राच्या खोल पाण्यात बुडविणे हे त्याच्या
फायद्याचे आहे.
7“जगाचा धिक्कार असो कारण त्याच्यातील काही
गोष्टींमुळे ते लोकांना पापात पाडते. तरी अशा काही
गोष्टी होत राहणारच, पण जे लोक या गोष्टींना कारणीभूत
होतात. त्यांना फार अहिताचे ठरेल. 8जर तुमचा उजवा
हात किंवा पाय तुम्हांला पापात पाडीत असेल तर तो
कापून टाका व फेकून द्या. तुम्ही एखादा अवयव गमावला,
परंतु अनंतकाळचे जीवन मिळविले तर त्यात तुमचे जास्त
हित आहे. दोन हात व दोन पाय यांच्यासह कधीही न
विझणाऱ्या अग्नीत (नरकात) तुम्ही टाकले जाण्यापेक्षा
ते जास्त बरे होईल.
9“जर तुमचा डोळा तुम्हांला पापात पाडीत असेल तर
तो उपटून फेकूनच द्या. कारण एकच डोळा असला
आणि तुम्हाला अनंतकालचे जीवन मिळाले तर ते जास्त
बरे आहे. दोन डोव्व्यांसह तुम्ही नरकात टाकले जाण्यापेक्षा
ते जास्त बरे आहे.

### येशू हरवलेल्या मेंढराची बोधकथा सांगतो
### *(लूक 15:3-7)*

10“सावध असा. ही लहान मुले कुचकामी आहेत असे
समजू नका. मी तुम्हांला सांगतो की, या लहान मुलांचे

---

**वचन 21** कांही ग्रीक प्रतीमध्ये समाविष्ट: तरी पण प्रार्थना व
उपास यांवाचून असल्या जातीचे भूत निघत नाही.

देवदूत स्वर्गात असतात आणि ते देवदूत माझ्या स्वर्गातील
पित्याबरोबर नेहमी असतात. 11*
12“जर एखाद्या मनुष्याजवळ 100 मेंढरे आहेत आणि
त्यांच्यापैकी एक मेंढरू हरवले तर तो 99 मेंढरे टेकडीवर
सोडून देईल आणि ते हरवलेले एक मेंढरू शोधायला
जाईल की नाही? 13आणि जर त्या मनुष्याला हरवलेले
मेंढरू सापडले तर त्याला कधीही न हरवलेल्या 99
मेंढरांबद्दल वाटणाऱ्या आनंदापेक्षा त्या एकासाठी जास्त
आनंद होईल. मी तुम्हांला खरे सांगतो, 14तशाच प्रकारे,
या लहान मुलांपैकी एकाचा अगदी लहानातील लहानाचा
ही नाश व्हावा अशी तुमच्या स्वर्गीय पित्याची इच्छा नाही.

## जेव्हा एखादी व्यक्ती तुमचे वाईट करते
## *(लूक 17:3)*

15“जर तुझा भाऊ अगर तुझी बहीण तुझ्यावर अन्याय
करील, तर जा आणि त्याला किंवा तिला तुझ्यावर काय
अन्याय झाला ते सांग आणि तोही एकांतात सांग. जर
त्याने किंवा तिने तुझे ऐकले तर तू त्याला किंवा तिला
आपला बंधु किंवा बहीण म्हणून परत मिळविले आहेस.
16पण जर तो किंवा ती तुझे ऐकत नसेल तर एकाला
किंवा दोघांना तुझ्याबरोबर घे, यासाठी की जे काही झाले
त्याविषयी साक्ष द्यायला दोन किंवा तीन जण तेथे असतील,*
17जर तो मनुष्य लोकांचेही ऐकणार नाही तर मंडळीसमोर
ही गोष्ट मांड. जर तो मनुष्य मंडळीचेही ऐकणार नाही,
तर मग तो देवाचा नाही, असे समज किंवा एखाद्या
जकातदारासारखा समज.
18“मी तुम्हांला खरे सांगतो, जेव्हा तुम्ही जगात न्याय
कराल तेव्हा तो देवाकडून झालेला न्याय असेल. जेव्हा
तुम्ही एखाद्याला क्षमा कराल तेव्हा ती देवाकडून झालेली
क्षमा असेल.
19“तसेच मी तुम्हांला सांगतो की, जर तुमच्यापैकी
दोघांचे एखाद्या गोष्टीविषयी एकमत झाले तर त्याकरिता
प्रार्थना करा. म्हणजे तुम्ही जी गोष्ट मागाल तुमचा स्वर्गीय
पिता तिची पूर्तता करील. 20हे खरे आहे कारण तुमच्यापैकी
जर दोघे किंवा तिघे माझ्या नावात एकत्र जमले असतील
तेथे त्यांच्यामध्ये मी आहे.”

## क्षमा न करणाऱ्या नोकराचा दाखला

21नंतर पेत्र येशूकडे आला आणि त्याने विचारले, “जर
माझा भाऊ माझ्यावर अन्याय करीत राहिला तर मी
त्याला किती वेळा क्षमा करावी? मी त्याला सात वेळा
क्षमा करावी काय?”
22येशूने उत्तर दिले, “मी तुला सांगतो, फक्त सातच
वेळा नाही तर उलट त्याने तुझ्यावर 77 वेळा* अन्याय
केला तरी तू त्याला क्षमा करीत राहा.”
23“म्हणून स्वर्गाच्या राज्याची तुलना एका राजाशी करता
येईल. आपले जे नोकर आपले देणे लागत होते त्यांच्याकडून
त्या राजाने पैसे परत घेण्याचे ठरविले. 24जेव्हा त्याने पैसे
जमा करायला सुरुवात केली, तेव्हा एक देणेकरी
ज्याच्याकडे 10,000 चांदीच्या नाण्याचे कर्ज होते त्याला
त्याच्याकडे आणण्यात आले.
25त्या देणेकऱ्याकडे राजाचे पैसे परत करण्यासाठी
काहीच नव्हते, तेव्हा मालकाने आज्ञा केली की त्याला,
त्याच्या पत्नीला, त्याच्या मुलांना आणि जे काही त्याच्याकडे
आहे ते सर्व विकले जावे आणि जे पैसे येतील त्यातून
कर्जाची परतफेड व्हावी.
26“परंतु त्या नोकराने पाया पडून, गयावया करीत
म्हटले, ‘मला थोडी सवलत द्या. जे काही मी तुमचे देणे
लागतो ते तुम्हाला परत करीन!’ 27त्या मालकाला आपल्या
नोकराबद्दल वाईट वाटले, म्हणून त्याने त्या नोकराचे
सर्व कर्ज माफ केले आणि त्याला सोडले.
28“नंतर त्याच नोकराचे काही शेकडे रुपये देणे लागत
असलेला दुसरा एक नोकर पहिल्या नोकराला भेटला.
त्याने त्या दुसऱ्या नोकराचा गळा पकडला आणि तो
त्याला म्हणाला, ‘तू माझे जे काही पैसे देणे लागतोस ते
सर्व आताच्या आता दे!’
29 ‘परंतु दुसरा नोकर गुडघे टेकून गयावया करीत
म्हणाला, ‘मला थोडी सवलत द्या. जे काही पैसे मी तुम्हांला
देणे लागतो ते परत करीन.’
30“पण पहिल्या नोकराने दुसऱ्या नोकराला सांभाळून
घेण्यास साफ नकार दिला. उलट तो गेला आणि त्याने
त्याला तुरुंगात टाकले, तेथे त्याला त्याचे कर्ज फिटेपर्यंत
राहावे लागणार होते. 31घडलेला हा प्रकार जेव्हा दुसऱ्या
नोकरांनी पाहिला तेव्हा ते फार दुःखी झाले, तेव्हा ते गेले
आणि त्यांनी जे सर्व घडले होते ते मालकाला सांगितले.
32“तेव्हा पहिल्या नोकराच्या मालकाने त्याला बोलाविले
व तो त्याला म्हणाला, ‘दुष्टा, तू माझे कितीतरी देणे
लागत होतास, परंतु मी तुझे देणे माफ करावे अशी विनंती
तू मला केलीस तेव्हा मी तुझे सर्व कर्ज माफ केले.
33म्हणून तू तुझ्याबरोबरच्या नोकरालाही तशीच दया
दाखवायची होतीस.’ 34मालक फार संतापला. शिक्षा म्हणून
मालकाने पहिल्या नोकराला तुरुंगात टाकले. आणि त्याने
सर्व कर्ज फेडीपर्यंत त्याला तुरुंगातून सोडले नाही.
35“जसे या राजाने केले तसेच माझा स्वर्गीय पिता तुमचे
करील. तुम्ही आपला भाऊ अगर बहीण यांना क्षमा
केली नाही तर तुमचा स्वर्गीय पिताही तुम्हांला क्षमा करणार
नाही.”

---

**वचन 11 वे** काही ग्रीक मूळ प्रतीमध्ये ते अहे: जे हरवलेले आहेत त्यांचे तारण करायला मनुष्याचा पुत्र आला आहे.

**जे काही ... असतील** अनुवाद 19:15

**सत्याहत्तर वेळा** किंवा साताच्या सत्तर वेळा उत्पत्ती 4:24

## येशू घटस्फोटाविषयी शिकवितो
### *(मार्क 10:1-12)*

19 येशूने या सर्व गोष्टी सांगितल्यानंतर तो गालीलातून
निघून गेला. आणि यार्देन नदीच्या दुसऱ्या
किनाऱ्याकडील यहूदा प्रांतात गेला. 2तेव्हा मोठा
लोकसमुदाय त्याच्या मागे गेला आणि तेथील अनेक
आजारी लोकांना येशूने बरे केले.

3काही परूशी येशूकडे आले. येशूने चुकीचे काही
बोलावे असा प्रयत्न त्यांनी चालविला. त्यांनी येशूला
विचारले, "कोणत्याही कारणास्तव एखाद्या मनुष्याने
आपल्या पत्नीला सोडचिठ्ठी द्यावी काय?"

4येशूने उत्तर दिले, "पवित्र शास्त्रात असे लिहिलेले
तुमच्या वाचनात निश्चितच आले असेल की, 'जेव्हा देवाने
जग उत्पन्न केले, तेव्हा त्याने नर व नारी असे उत्पन्न
केले.'* 5आणि देव म्हणाला, 'म्हणून पुरुष आपल्या
आईवडिलांना सोडील व आपल्या पत्नीला जडून राहील.
ती दोघे एकदेह होतील."* 6म्हणून दोन व्यक्ति या दोन
नाहीत तर एक आहेत. देवाने त्या दोघांना एकत्र जोडले
आहे. म्हणून कोणाही व्यक्तिने त्यांना वेगळे करू नये."

7परूश्यांनी विचारले, "असे जर आहे, तर मग पुरुषाने
सोडचिठ्ठी लिहून देण्याची आणि आपल्या पत्नीला सोडून
देण्याची मोकळीक देणारी आज्ञा मोशेने का दिली?"

8येशूने उत्तर दिले, "तुम्ही देवाची शिकवण मानण्यास
नकार दिल्याने तुमच्या पत्नींना सोडून देण्याची मोकळीक
दिली. पण सुरुवातीला सोडचिठ्ठी देण्याची मोकळीक नव्हती.
9मी तुम्हांस सांगतो, जो मनुष्य आपली पत्नी सोडून देतो
आणि दुसरीशी लग्न करतो तो व्यभिचार करतो. आपल्या
पत्नीला सोडचिठ्ठी देण्याचे एकच कारण आहे, ते म्हणजे
पहिल्या पत्नीने परपुरुषांशी व्यभिचार करणे होय!"

10मग त्याचे शिष्य त्याला म्हणाले, "जर पती व
पत्नीमधील परिस्थिति अशी असेल तर मग लग्न न
करणे जास्त योग्य ठरेल."

11येशूने उत्तर दिले, "लग्नाविषयीची अशी शिकवण
स्वीकारणे प्रत्येक मनुष्याला शक्य होणार नाही. परंतु
काही जणांना देवाने ही शिकवण ग्रहण करण्यास संमति
दिली आहे.

12काही लोकांची लग्न न करण्याची कारणे निराळी
असू शकतील. जन्मापासूनच काही माणसे अशी असतात
की, ती मुलांना जन्म देऊ शकत नाहीत. इतर काही
माणसांनी काही जणांना तसे बनविलेले असते तर आणखी
काही माणसांनी स्वर्गाच्या राज्याकरिता लग्न करणे सोडून
दिले आहे, परंतु ज्याला लग्न करणे शक्य होईल, त्या
मनुष्याने लग्नाविषयी ही शिकवण मान्य करावी."

## येशू बालकांचे स्वागत करतो
### *(मार्क 10:13-16; लूक 18:15-17)*

13नंतर येशूने आपल्या मुलांवर हात ठेवून प्रार्थना
करावी यासाठी काही लोकांनी आपली मुले त्याच्याकडे
आणली. येशूच्या शिष्यांनी त्यांना पाहिल्यावर ते बालकांना
घेऊन येशूकडे येण्यास मना करू लागले. 14परंतु येशू
म्हणाला, "लहान मुलांना मजकडे येऊ द्या, त्यांना मना
करू नका, कारण स्वर्गाचे राज्य या लहान मुलांसारख्या
लोकांचेच आहे." 15मुलांवर हात ठेवल्यावर येशू तेथून
निघून गेला.

## एक श्रीमंत मनुष्य येशूला अनुसरण्याचे नाकारतो
### *(मार्क 10:17-31; लूक 18:18-30)*

16एक मनुष्य येशूकडे आला आणि त्याने विचारले,
"गुरुजी, अनंतकाळचे जीवन मिळावे म्हणून मी कोणत्या
चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत?"

17येशूने उत्तर दिले, "काय चांगले आहे असे मला का
विचारतोस? फक्त देव एकच चांगला आहे पण जर तुला
अनंतकाळचे जीवन पाहिजे तर सर्व आज्ञा पाळ."

18त्याने विचारले, "कोणत्या आज्ञा?" येशूने उत्तर दिले,
"'खून करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू
नको, खोटी साक्ष देऊ नको. 19आपल्या आईवडिलांना
मान दे* आणि 'जशी स्वत:वर प्रीति करतोस तशी इतरांवर
प्रीति कर.'*" 20तो तरुण म्हणाला, "या सर्व आज्ञा मी
पाळत आलो आहे. मी आणखी काय करावे?"

21येशूने उत्तर दिले, "तुला जर परिपूर्ण व्हायचे असेल
तर जा आणि तुझे जे काही आहे ते विकून टाक. आणि
ते पैसे गरीबांना वाटून दे. म्हणजे स्वर्गात तुला मोठा ठेवा
मिळेल. मग ये आणि माझ्यामागे चालू लाग."

22पण जेव्हा त्या तरुणाने हे ऐकले, तेव्हा त्याला फार
दु:ख झाले. कारण तो खूप श्रीमंत होता, म्हणून तो येशूला
सोडून निघून गेला. 23तेव्हा येशू आपल्या शिष्यांना म्हणाला,
"मी तुम्हांला खरे सांगतो, धनवान माणसाला स्वर्गाच्या
राज्यात प्रवेश करणे फार कठीण जाईल. 24मी तुम्हांला
सांगतो की, धनवानाचा स्वर्गाच्या राज्यात प्रवेश होणे
यापेक्षा उंटाला सुईच्या नेढ्यातून जाणे जास्त सोपे आहे."

25जेव्हा शिष्यांनी हे ऐकले तेव्हा ते फार आश्चर्यचकित
झाले. त्यांनी येशूला विचारले, "मग कोणाचे तारण होईल?"

26येशूने आपल्या शिष्यांकडे पाहिले आणि तो म्हणाला,
"मनुष्यांना हे अशक्य आहे, पण देवासाठी सर्व गोष्टी
शक्य आहेत."

27पेत्र येशूला म्हणाला, "पाहा, आम्ही सर्व काही सोडले
आणि तुमच्या मागे आलो आहोत; मग आम्हांला काय
मिळेल?"

---

**जेव्हा ... केले** उत्पत्ति 1:27; 5:2

**म्हणून ... होतील** उत्पत्ति 2:24

**खून ... मान दे** निर्गम 20:12-16

**जशी ... कर** लेवीय 19:18

28येशू म्हणाला, “मी तुम्हांला खरे सांगतो; नव्या युगात
जेव्हा मनुष्याचा पुत्र त्याच्या गौरवी सिंहासनावर बसेल
तेव्हा तुम्ही जे सर्व माझ्यामागे आलात ते सर्व बारा आसनांवर
बसाल आणि इस्राएलाच्या बारा वंशांचा न्याय कराल.
29ज्याने ज्याने माझ्या मागे येण्याकरिता आपले घर, भाऊ,
बहीण, आईवडील, मुले, शेतीवाडी सोडली असेल तर
त्याला त्यापेक्षा कितीतरी जास्तपटीने लाभ होईल व त्याला
अनंतकाळचे जीवन मिळेल. 30पण पुष्कळसे जे आता
पहिले आहेत ते शेवटचे होतील आणि जे शेवटचे आहेत
ते पहिले होतील.”

## येशू शेतमजुराच्या बोधकथेचा वापर करतो

20 “स्वर्गाचे राज्य हे कोण्या शेतमालकासारखे आहे.
जो अगदी पहाटे त्याच्या द्राक्षमळ्यासाठी मोलाने
मजूर आणण्यासाठी गेला. 2त्या मनुष्याने एक दिवसाच्या
मजुरीकरिता प्रत्येकाला चांदीचे एक नाणे* देण्याचे कबूल
केले. आणि त्याने त्यांना द्राक्षाच्या मळ्यात कामास
पाठविले. 3सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास तो मनुष्य
बाजारात गेला तेव्हा तेथे काही माणसे उभी असलेली
त्याला दिसली. त्या लोकांना काहीच काम नव्हते. 4मग
तो त्यांना म्हणाला, ‘तुम्हीसुद्धा माझ्या द्राक्षमळ्यात कामाला
जा आणि जी योग्य मजुरी आहे ती मी तुम्हांला देईन.’
5मग ते काम करण्यास मळ्यात गेले.

“तो मनुष्य बारा वाजता आणि तीन वाजता बाजारात
गेला आणि त्या मनुष्याने आपल्या मळ्यात काम
करण्यासाठी काही लोकांना दोन वेळा जाऊन मजुरीवर
घेतले. 6पाच वाजता तो मनुष्य परत एकदा बाजारात गेला
तेव्हा आणखी काही लोक उभे असलेले त्याला आढळले.
त्याने त्यांना विचारले, ‘तुम्ही काही काम न करता दिवसभर
येथे का बरे उभे राहिला आहात?’

7त्या लोकांनी उत्तर दिले, ‘आम्हांला कोणी काम दिले
नाही.’ तो मनुष्य त्यांना म्हणाला, ‘तर मग तुम्ही जाऊन
माझ्या मळ्यात काम करा.’ 8संध्याकाळी मळ्याचा मालक
मुकादमाला म्हणाला, ‘मजुरांना बोलवा आणि त्यांना त्यांची
मजुरी देऊन टाका! मी ज्यांना अगदी शेवटी कामावर
आणले त्यांना अगोदर मजुरी द्या. नंतर बाकीच्या सर्वांना
मजुरी द्या. मी कामावर रोजगारीने पहिल्याने
बोलाविलेल्यांना सर्वांत शेवटी मजुरी द्या.’

9जे मजूर संध्याकाळी साधारण पाच वाजता कामावर
घेतले होते ते आपली मजुरी घेण्यासाठी आले. प्रत्येकाला
एक चांदीचे नाणे मजुरी मिळाली. 10मग ज्यांना सुरुवातीला
कामावर घेण्यात आले होते, ते आपली मजुरी घेण्यासाठी
आले, त्यांना वाटत होते की, इतरांपेक्षा त्यांना जास्त पैसे
मिळतील, पण त्यां सर्वांना एकच चांदीचे नाणे मजुरी
मिळाली. 11त्यांनी ते घेतले व मालकाकडे तक्रार करू
लागले. 12ते म्हणाले, ‘ज्यांना शेवटी कामावर घेतले त्यांनी
केवळ एक तासच काम केले. परंतु तुम्ही त्यांना आमच्या
बरोबरीने मजुरी दिली. आम्ही मात्र दिवसभर उन्हात
राबलो.’ 13परंतु मळ्याचा मालक त्यांच्यातील एकाला
म्हणाला, ‘मित्रा, मी तुझ्याबाबतीत अन्याय करीत नाही.
आपण यावर सहमत झालो नाही का की, मी तुला एक
चांदीचे नाणे मजुरी देईन? 14जे तुझे आहे ते घे आणि घरी
जा. तुम्हांला दिली तितकीच मजुरी मला या शेवटच्या
माणसाला द्यायची आहे. 15मी माझ्या पैशाचा वापर मला
पाहिजे तसा करू शकत नाही का? मी लोकांशी चांगला
आहे म्हणून, तुला हेवा वाटतो का?’

16“म्हणून आता जे शेवटचे आहेत ते पहिले होतील
आणि पहिले ते शेवटचे होतील.”

## येशू त्याच्या मरणाविषयी बोलतो
### *(मार्क 10:32-34; लूक 18:31-34)*

17येशू यरूशलेमला चालला होता. ते चालत असता
त्याने त्याच्या शिष्यांना बाजूला घेतले, आणि त्यांना म्हणाला,
18“ऐका, आपण यरुशलेमकडे जात आहोत. मनुष्याच्या
पुत्राला धरून मुख्य याजक व नियमशास्त्राचे शिक्षक
यांच्या हाती धरून देण्यात येईल. त्याने मेलेच पाहिजे असे
ते म्हणतील. 19ते मनुष्याच्या पुत्राला यहूदीतरांच्या हाती
देतील, ते लोक त्याची थट्टा करतील, त्याला चाबकाने
मारतील नंतर ते त्याला वधस्तंभावर खिळून जिवे मारतील.
परंतु मरणानंतर तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठविले
जाईल.”

## एका आईची खास विनंति
### *(मार्क 10:35-45)*

20त्यानंतर जब्दीच्या मुलांची आई, आपल्या मुलांसह
त्याच्याकडे आली. ती त्याच्या पाया पडली आणि तिने
त्याला एक विनंति केली. 21त्याने तिला विचारले, “तुला
काय पाहिजे?”

ती म्हणाली, “माझा एक मुलगा तुमच्या राज्यात तुमच्या
उजवीकडे बसेल आणि दुसरा डावीकडे बसेल असे वचन
द्या.”

22येशू तिला म्हणाला, “तू काय मागत आहेस ते तुला
माहीत नाही! जे दु:ख मला सोसावे लागणार आहे ते
तुमच्याने सोसवेल काय?”

ते म्हणाले, “होय. आम्ही ते सोसू शकू!”

23येशू त्यांना म्हणाला, “तुम्ही खरोखर माझ्या प्याल्यातून
प्याल खरे, पण माझ्या उजव्या आणि डाव्या हाताला
बसण्याचा मान, देणे हे ठरविणारा मी नाही, तर माझ्या
पित्याने तो मान कोणाला द्यायचा हे ठरविले आहे.”

24जेव्हा इतर दहा शिष्यांनी हे ऐकले तेव्हा ते त्या
दोघांवर रागावले. 25मग येशूने बोलावून त्यांना म्हटले,
“यहूदीतर लोकांच्या राजांना लोकांवर आपली सत्ता आहे
हे दाखविणे आवडते आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांना आपले

---

**चांदीचे एक नाणे** रोमन दिनारी, एका दिवसाची मजूरी.

अधिकार वाटेल तसे वापरणे आवडते. 26पण तुमचे वागणे
तसे नसावे! जर तुमच्यातील कोणाला मोठे व्हायचे असेल
तर त्याने तुमचा दासच झाले पाहिजे. 27आणि ज्याला
पहिला व्हावयाचे आहे त्याने कनिष्ट झाले पाहिजे. 28म्हणजे
तुम्ही मनुष्याच्या पुत्रासारखे असले पाहिजे जो इतरांकडून
सेवा करून घ्यायला आला नाही तर इतरांची सेवा करायला
आणि अनेकांचे तारण व्हावे यासाठी आपला जीव खंडणी
म्हणून देण्यासाठी आला."

## येशू दोन आंधळ्यांना बरे करतो
### *(मार्क 10:46-52; लूक 18:35-43)*

29ते यरीहो शहर सोडत असताना, मोठा लोकसमुदाय
त्याच्या मागे आला. 30रस्त्याच्या कडेला दोन आंधळे
बसले होते आणि जेव्हा त्यांनी ऐकले की, येशू तेथून जात
आहे, तेव्हा ते मोठ्याने ओरडले, "प्रभु येशू, दाविदाच्या
पुत्रा! आमच्यावर दया करा!"
31जमावाने त्यांना दटावले व त्यांना शांत राहण्यास
सांगितले. पण ते अधिकच मोठ्याने ओरडू लागले, "प्रभु,
दाविदाच्या पुत्रा, आमच्यावर दया करा!"
32मग येशू थांबला आणि त्यांच्याशी बोलला, त्याने
विचारले, "मी तुमच्यासाठी काय करावे अशी तुमची
इच्छा आहे?" 33त्या आंधळ्या मनुष्यांनी उत्तर दिले, "प्रभु,
आम्हांला दिसावे अशी आमची इच्छा आहे." 34येशूला
त्यांच्याबद्दल कळवळा आला, आणि त्याने त्यांच्या
डोळ्यांना स्पर्श केला. त्याच क्षणी त्यांना दिसू लागले.
आणि ते त्याच्या मागे गेले.

## येशू यरुशलेममध्ये राजासारखा प्रवेश करतो
### *(मार्क 11:1-11; लूक 19:28-38; योहान 12:12-19)*

21 येशू व त्याचे शिष्य यरुशलेमजवळ आले असता
ते जैतूनाचा डोंगर म्हटलेल्या टेकडीजवळ बेथफगे
या जागी थांबले. येशूने त्याच्या दोन शिष्यांना 2असे सांगून
पाठविले की, "तुमच्या समोर असलेल्या गावात जा. तुम्ही
गावात शिराल तेव्हा एक गाढवी बांधून ठेवलेली व तिच्या
जवळ एक शिंगरू असलेले तुम्हांला आढळेल. ती दोन्ही
गाढवे सोडून माझ्याकडे घेऊन या. 3जर कोणी तुम्हांला
विचारले की, ही गाढवे कशासाठी नेत आहात तर त्याला
सांगा की, "येशूला यांची गरज आहे. तो ती लगेच माझ्याकडे
पाठवील." 4हे यासाठी घडले की संदेष्ट्यांपैकी एक जण
जे बोलला होता ते पूर्ण व्हावे:

5"सीयोनेच्या कन्येला सांग: 'पाहा! तुझा राजा तुझ्याकडे
येत आहे! तो लीन आहे आणि नम्र होऊन गाढवावर
बसून येत आहे, होय, शिंगरावर, कष्ट करणाऱ्या प्राण्याच्या
शिंगरावर.'"
*जखऱ्या* 9:9

6त्याचे शिष्य गेले आणि जसे येशूने सांगितले होते तसे
त्यांनी केले. 7शिष्यांनी गाढवी व शिंगरू येशूकडे आणले.
त्या गाढवावर त्यांनी आपले अंगरखे घातले आणि येशू
त्यावर बसला. 8पुष्कळ लोकांनी आपले अंगरखे येशूसाठी
वाटेवर अंथरले. दुसऱ्या काही लोकांनी झाडांच्या फांद्या
तोडल्या आणि त्या रस्त्यावर पसरल्या. 9काही लोक
येशूच्या पुढे चालू लागले, काही लोक येशूच्या मागून
चालू लागले. ते लोक मोठ्याने जयघोष करू लागले,

"होसान्ना,* दाविदाच्या पुत्राला प्रभुच्या नावाने येणारा
धन्यवादित असो. स्वर्गीय देवाला होसान्ना!" *स्तोत्र.* 118:26

10जेव्हा येशूने यरुशलेममध्ये प्रवेश केला तेव्हा संपूर्ण
शहर ढवळून निघाले व लोक विचारत होते, "हा कोण
आहे?" 11जमाव उत्तर देत होता, "हा येशू संदेष्टा आहे, तो
गालील प्रांतातील नासरेथचा आहे."

## येशू मंदिरात जातो
### *(मार्क 11:15-19; लूक 19:45-48; योहान 2:13-22)*

12मग येशूने मंदिराच्या आवारात प्रवेश केला तेव्हा
तेथे जे लोक विक्री करीत होते व खरेदी करीत होते
तसेच पैशांची आपसात देवाण घेवाण करीत होते त्यांची
मेजे त्याने उलथून टाकली आणि जे लोक कबुतरे विकत
होते त्यांची बसण्याची बाके उलथून टाकली. 13येशू त्यांना
म्हणाला, "पवित्र शास्त्रात असे म्हटले आहे, 'माझे घर
प्रार्थनेचे घर म्हटले जाईल, पण तुम्ही त्याला लुटारूंची
गुहा केले आहे.'"*
14काही आंधळे आणि पांगळे लोक मंदिरात येशूकडे
आले. येशूने त्यांना बरे केले. 15जेव्हा मुख्य याजक व
नियमशास्त्राच्या शिक्षकांनी, येशूने केलेल्या आश्चर्यकारक
गोष्टी आणि मंदिराच्या आवारात लहान मुलांना "दाविदाच्या
पुत्राला होसान्ना" अशी घोषणा देताना पाहिले, तेव्हा या
सर्व गोष्टींमुळे त्यांना राग आला.
16त्यांनी त्याला विचारले, "ही मुले काय म्हणत आहेत
हे तुम्ही ऐकता ना?"
येशूने त्यांना उत्तर दिले, "होय, पवित्र शास्त्रात काय
लिहिले आहे ते तुम्ही ऐकले नाही का?
'तू बालके व तान्हुली यांना स्तुति करायला शिकविले
आहेस.'*
17नंतर येशू तेथून निघाला व बेथानीला गेला. तेथे तो
रात्रभर राहिला.

---

**होसान्ना** हा हिब्रु शब्द आहे, याचा अर्थ 'देवा आम्हांला वाचव पण या ठिकाणी याचा अर्थ आनंदाने देवाची स्तुति करणे असा होते.

**माझे ... आहे** यशया 56:7; यिर्मया 7:12

**तू बालके ... आहेस** स्तोत्र. 8:3

## येशू विश्वासाचे सामर्थ्य दर्शवितो
### *(मार्क 11:12-14, 20-24)*

18दुसऱ्या दिवशी पहाटे तो यरुशलेमकडे पुन्हा येत
असता त्याला भूक लागली. 19रस्त्याच्या कडेला त्याला
अंजिराचे एक झाड दिसले. अंजिर खायला मिळेल या
आशेने तो झाडाजवळ गेला. पण झाडावर त्याला एकही
अंजिर दिसले नाही. त्याला फक्त पाने होती. येशू त्या
झाडाला म्हणाला, "यापुढे तुला कधीही फळ न येवो!"
आणि ते झाड लगेच वाळून गेले आणि मेले.
20शिष्यांनी हे पाहिले, तेव्हा त्यांना फार आश्चर्य वाटले.
त्यांनी विचारले, "हे अंजिराचे झाड इतक्या लवकर वाळून
कसे गेले आणि मेले?"
21येशू त्याना म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो, जर
तुम्हांला विश्वास असेल, आणि जर तुम्ही संशय धरला
नाही तर मी जे अंजिराच्या झाडाबाबतीत केले तेच नव्हे
तर या डोंगराला उठून समुद्रात पड असे म्हणालात तरी ते
घडेल. 22जर तुमचा विश्वास असेल तर जे काही तुम्ही
प्रार्थनेत मागाल ते तुम्हांला मिळेल."

## यहूदी पुढारी येशूच्या अधिकाराविषयी शंका घेतात
### *(मार्क 11:27-33; लूक 20:1-8)*

23येशू मंदिरात गेला. येशू तेथे शिक्षण देत असताना
मुख्य याजक व वडीलजन येशूकडे आले. ते येशूला
म्हणाले, "तुम्ही कोणत्या अधिकाराने या गोष्टी करता?
हा अधिकार तुम्हांला कोणी दिला?"
24येशू म्हणाला, "मी सुद्धा तुम्हांला एक प्रश्न विचारतो.
जर तुम्ही मला उत्तर दिले तर मी कोणत्या अधिकाराने
या गोष्टी करतो, हे मी तुम्हांला सांगेन. 25तुम्ही मला
सांगा, योहान लोकांना बाप्तिस्मा देत असे, तेव्हा त्याला
तो देण्याचा अधिकार कोठून आला- देवाकडून की
मनुष्यांकडून?"
येशूच्या या प्रश्नावर ते चर्चा करू लागले. ते म्हणाले,
"'योहानाचा बाप्तिस्मा देवाकडून होता 'असे म्हणावे तर
येशू म्हणेल मग 'तुम्ही त्याच्यावर विश्वास का ठेवला
नाही?' 26पण जर 'तो मनुष्यांकडून होता' असे आपण
म्हणालो तर सर्व लोक आपल्यावर रागावतील. आपल्याला
लोकांची भीति आहे. कारण योहान हा एक संदेष्टा होता
असे ते सर्व जण मानतात."
27म्हणून त्यांनी येशूला उत्तर दिले, "योहानाचा अधिकार
कोठून होता हे आम्हांला माहीत नाही." तेव्हा येशू म्हणाला,
"मग मी कोणत्या अधिकाराने या गोष्टी करतो, हे मीही
तुम्हांला सांगणार नाही."

## येशू दोन पुत्रांचा दाखला सांगतो

28"याविषयी तुम्हांला काय वाटते ते मला सांगा. एका
मनुष्याला दोन मुलगे होते. तो मनुष्य आपल्या पहिल्या
मुलाकडे गेला आणि म्हणाला, 'माझ्या मुला, आज तू
माझ्या द्राक्षाच्या मळ्यात जा आणि काम कर.'
29"मुलाने उत्तर दिले, 'मी जाणार नाही.' परंतु नंतर
त्या मुलाने जायचे ठरविले व तो गेला.
30"नंतर वडील आपल्या दुसऱ्या मुलाकडे गेले आणि
म्हणाले, 'माझ्या मुला, आज तू जाऊन माझ्या द्राक्षाच्या
मळ्यात काम कर.' त्या मुलाने उत्तर दिले, 'होय बाबा,
मी जातो.' पण तो गेला नाही.
31"त्या दोघांपैकी कोणत्या मुलाने वडीलांची आज्ञा
पाळली?" ते म्हणाले, "पहिल्या मुलाने"
येशू त्यांना म्हणाला, "मी खरे सांगतो, जकातदार व
वेश्या हे वाईट लोक आहेत असे तुम्हांला वाटते, पण ते
तुमच्या अगोदर स्वर्गाच्या राज्यात जातील. 32जीवनाचा
खरा रस्ता कोणता हे तुम्हांला दाखवावे म्हणून योहान
आला आणि तुम्ही योहानाला मानले नाही. जकातदार व
वेश्या यांनी योहानावर विश्वास ठेवला हे तुम्ही पाहिले
पण तरी देखील तुम्ही आपले मन बदलण्यास आणि
योहानावर विश्वास ठेवण्यास तयार झाला नाही.

## देव आपला पुत्र पाठवितो
### *(मार्क 12:1-12; लूक 20:9-19)*

33"ही बोधकथा ऐका : एक मनुष्य होता, त्याचे शेत
होते. त्याने आपल्या शेतात द्राक्षे लावली. शेताच्या भोवती
त्याने एक भिंत बांधली आणि द्राक्षे कुस्करून रस
गाळण्याकरिता खड्डा करून एक घाणा तयार केला. आणि
टेहळणी करण्यासाठी एक मनोरा (माळा) बांधला. मग
त्याने आपला मळा काही शेतकऱ्यांना करायला खंडाने
दिला. मग तो परत गेला. 34जेव्हा द्राक्षे तोडणीचा हंगाम
जवळ आला, तेव्हा त्या मनुष्याने आपला वाटा
आणण्याकरिता काही नोकर खंडकरी शेतकऱ्याकडे
पाठविले. 35परंतु शेतकऱ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला.
एकाला मार दिला तर दुसऱ्या नोकराला जिवे मारले.
नंतर तिसऱ्याला दगडमार करून ठार केले. 36मग
शेतकऱ्यांकडे त्या मनुष्याने आणखी एकदा नोकर
पाठविले. पहिल्यापेक्षा त्याने जास्त नोकर पाठविले पण
त्या शेतकऱ्यांनी त्यांना तशीच वागणूक दिली. 37नंतर,
त्याने त्याच्या स्वत:च्या मुलाला त्यांच्याकडे पाठविले, तो
म्हणाला, 'निश्चितच ते माझ्या मुलाचा मान राखतील.'
38"पण जेव्हा शेतकऱ्यांनी त्याच्या मुलाला पाहिले तेव्हा
ते एकमेकास म्हणू लागले, 'हा तर मालकाचा मुलगा
आहे. तो वारस आहे. चला आपण त्याला ठार करू व
त्याचे वतन घेऊ.' 39त्यांनी त्याला धरले व मळ्याच्या
बाहेर फेकले व त्याला ठार मारले.
40"मग द्राक्षमळ्याचा मालक परत येईल तेव्हा या
शेतकऱ्यांचे काय करील?" 41यहूदी मुख्य याजक आणि
पुढारी म्हणाले, "तो त्या लोकांना खात्रीने मरणदंड देईल.
कारण ते दुष्ट होते. नंतर तो आपला मळा दुसऱ्यास

खंडाने देईल. हंगामाच्या दिवसात जे त्याच्या पिकाची वाटणी
देतील, अशांना तो ते देईल.”
42येशू त्यांना म्हणाला, “तुम्ही पवित्र शास्त्रात वाचले
असेलच की,

‘बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला दगड कोनशिला झाला
आहे हे प्रभूने केले आणि आमच्यासाठी हे अद्भुत आहे.’
*स्तोत्र.* 118:22-23

43“म्हणून मी तुम्हांला सांगतो की, देवाचे राज्य
तुमच्याकडून काढून घेण्यात येईल. देवाला आपल्या
राज्यात पाहिजेत अशा गोष्टी जे लोक करतील, त्यांना ते
देण्यात येईल. 44जो कोणी या दगडावर पडेल, त्याचे तुकडे
तुकडे होतील आणि जर हा दगड एखाद्या मनुष्यावर पडेल
तर त्या मनुष्याचा चक्काचूर होईल.”
45येशूने सांगितलेल्या या बोधकथा मुख्य याजकांनी
आणि परूश्यांनी ऐकल्या. येशू त्यांच्याविषयी बोलत आहे
हे त्यांनी ओळखले. 46त्यांना येशूला अटक करायचे
होते, पण त्यांना लोकांचे भय वाटत होते, कारण लोक
येशूला संदेष्टा मानीत होते.

## लोकांना भोजनाला दिलेल्या आमंत्रणाची बोधकथा
### *(लूक 14:15-24)*

22 येशूने त्यांच्याशी बोलण्यास सुरुवात करून पुन्हा
एकदा बोधकथेचा वापर केला. तो म्हणाला,
2“स्वर्गाचे राज्य एका राजासारखे आहे, त्याने त्याच्या
मुलाच्या लग्नानिमित्त भोजनाचे आमंत्रण दिले. 3त्याने
त्याच्या नोकरांना पाठवून, ज्यांना लग्नाचे आमंत्रण होते
आशांना बोलाविण्यास सांगितले. पण लोकांनी राजाच्या
मेजवानीस येण्यास नकार दिला.
4“नंतर राजाने आणखी काही नोकरांना पाठवून दिले.
राजा नोकरांना म्हणाला, ‘मी त्या लोकांना अगोदरच
आमंत्रण दिले आहे म्हणून आता जा आणि त्यांना सांगा,
‘पाहा, मेजवानी तयार आहे. मी चांगल्यातील चांगले बैल
आणि वासरे कापली आहेत आणि सगळे तयार आहे.
लग्नाच्या मेजवानीस या!’
5“नोकर गेले आणि त्यांनी लोकांस येण्यास सांगितले,
पण त्यांनी नोकरांच्याकडे लक्ष दिले नाही. ते आपापल्या
कामास निघून गेले. एक शेतात काम करायला गेला;
तर दुसरा व्यापार करायला गेला. 6काहींनी मालकाच्या
उरलेल्या नोकरांना पकडून मार दिला व जिवे मारले.
7राजा फार रागावला. त्याने त्याचे सैन्य पाठविले आणि
त्यांनी त्या खुन्यांना ठार मारले. त्यांनी त्यांचे शहर जाळले.
8“मग राजा त्याच्या नोकरांना म्हणाला, ‘मेजवानी तयार
आहे, पण ज्यांना बोलाविले होते ते पात्र नव्हते, 9म्हणून
रस्त्यांच्या कोपऱ्यांवर जा आणि तेथे तुम्हांला जे भेटतील
त्यांना लग्नाच्या मेजवानीला बोलवा.’ 10मग ते नोकर
रस्त्यावर गेले. त्यांना जे जे लोक भेटले त्यांना जमा
केले. ज्या ठिकाणी लग्नाची मेजवानी तयार होती तेथे
नोकरांनी चांगल्या आणि वाईट लोकांना जमा केले आणि
ती जागा भरून गेली.
11“मग त्या सर्वांना भेटण्यास राजा तेथे आला.
मेजवानीसाठी साजेल असा पोशाख न केलेला एक मनुष्य
राजाला तेथे आढळला. 12राजा त्याला म्हणाला, ‘मित्रा,
तुला येथे कोणी व कसे येऊ दिले? मेजवानीला साजेसे
कपडे नसताना तू येथे कसा आलास?’ पण तो गप्प राहिला.
13तेव्हा राजाने नोकरांना सांगितले, ‘या मनुष्याचे हात व
पाय बांधा आणि त्याला बाहेर अंधारात टाका, तेथे रडणे
आणि दातखाणे चालेल.’
14“कारण बोलाविलेले पुष्कळ आहेत पण निवडलेले
थोडे आहेत.”

## काही यहूदी पुढारी येशूला फसवू पाहतात
### *(मार्क 12:13-17; लूक 20:20-26)*

15मग परूशी गेले आणि येशूला कसे पकडावे याचा
कट करू लागले. त्याला शब्दात पकडण्याचा प्रयत्न करू
लागले. 16परूशांनी येशूला फसविण्याच्या हेतूने काही
माणसे त्याच्याकडे पाठविली. त्यांनी आपली काही माणसे
(शिष्य) आणि हेरोदी गटाच्या काही लोकांना येशूकडे
पाठविले. ते म्हणाले, “गुरुजी, आम्हांला माहीत आहे की
आपण सत्यवचनी आहात, आणि तुम्ही देवाचा मार्ग
प्रामाणिकपणे शिकविता, व दुसरे काय विचार करतात
याची तुम्ही पर्वा करीत नाही. तुम्ही सर्वांना समान मानता.
17म्हणून तुमचे मत आम्हांला सांगा: कैसराला कर देणे
योग्य आहे की नाही?”
18येशूला त्यांचा दुष्ट उद्देश माहीत होता, म्हणून तो
म्हणाला, “ढोंग्यांनो, तुम्ही माझी परीक्षा का घेत आहात?
19कर भरण्यासाठी जे नाणे वापरले जाते ते मला दाखवा.”
त्या लोकांनी येशूला चांदीचे एक नाणे दाखविले.
20तेव्हा येशूने विचारले, “या नाण्यावर कोणाचे चित्र
आहे? आणि या नाण्यावर कोणाचे नाव लिहिलेले आहे?”
21त्या लोकांनी उत्तर दिले, “त्यावर कैसराचे चित्र व नाव
दिले आहे.” यावर येशू त्यांना म्हणाला, “जे कैसराचे
आहे ते कैसराला द्या. आणि जे देवाचे आहे ते देवाला
द्या!” 22येशू जे म्हणाला ते त्या लोकांनी ऐकले तेव्हा ते
आश्चर्यचकित झाले आणि तेथून निघून गेले.

## काही सदूकी लोक येशूला फसवू पाहतात
### *(मार्क 12:18-27; लूक 20:27-40)*

23त्याच दिवशी काही सदूकी लोक त्याच्याकडे आले
(हे लोक असे समजतात की पुनरुत्थान नाही.) त्यांनी
येशूला एक प्रश्न विचारला, 24ते म्हणाले, “गुरुजी, मोशेने
शिकविले की, जर एखादा मनुष्य मेला आणि त्याला
मूलबाळ नसेल, तर त्याच्या भावाने किंवा जवळच्या

नातेवाईकाने त्याच्या पत्नीशी लग्न करावे, म्हणजे मेलेल्या
भावासाठी त्यांना मुले होतील. 25आता, आमच्यामध्ये सात
भाऊ होते. पहिल्याने लग्न केले आणि नंतर तो मेला
आणि त्याला मूल नसल्याने त्याच्या भावाने त्याच्या पत्नीशी
लग्न केले. 26असेच दुसऱ्या व तिसऱ्या भावाच्या बाबतीतही
घडले व सातही भावांनी तिच्याशी लग्न केले आणि मेले.
27शेवटी ती स्त्री मेली. 28आता प्रश्न असा आहे की,
पुनरुत्थानाच्या वेळेस ती कोणाची पत्नी असेल, कारण
सर्व सातही भावांनी तिच्याशी लग्न केले होते.”

29उत्तर देताना येशू त्यांना म्हणाला, “तुम्ही चुकीची
समजूत करून घेत आहात, कारण तुम्हांला देवाचे वचन
किंवा सामर्थ्य माहीत नाही. 30तुम्हांला समजले पाहिजे
की, पुनरुत्थानानंतरच्या जीवनात लोक लग्न करणार
नाहीत किंवा करून देणार नाहीत. उलट ते स्वर्गात
देवदूतासारखे असतील. 31तरी, मृतांच्या पुनरुत्थानाच्या
संदर्भात देव तुमच्या फायद्यासाठी जे बोलला ते तुम्ही
अजूनपर्यंत वाचले नाही काय? 32तो म्हणाला, ‘मी अब्राहाम,
इसहाक आणि याकोबाचा देव आहे.’* हा देव मेलेल्यांचा
देव नाही तर जिवंत लोकांचा देव आहे.”

33जेव्हा जमावाने हे ऐकले तेव्हा ते आश्चर्यचकित
झाले.

### कोणती आज्ञा सर्वांत महत्त्वाची आहे?

***(मार्क 12:28-34; लूक 10:25-28)***

34येशूने सदूकी लोकांना अशा बोधकथा सांगितल्या
की त्यांना वाद घालता येईना. हे परूश्यांनी ऐकले. म्हणून
परूश्यांनी एकत्र येऊन मसलत केली. 35एक परूशी
नियमशास्त्राचा जाणकार होता. त्या परूश्याने येशूची परीक्षा
पाहावी म्हणून प्रश्न केला. 36त्याने विचारले, “गुरुजी,
नियमशास्त्रातील कोणती आज्ञा सर्वांत महत्त्वाची आहे?”

37येशूने उत्तर दिले, “‘प्रभु तुमचा देव याजवर प्रीति
करा. तुम्ही त्याजवर पूर्ण हृदयाने, पूर्ण जिवाने, पूर्ण मनाने
प्रीति करा.’* 38ही पहिली आणि मोठी आज्ञा आहे.
39हिच्यासारखी दुसरी एक आहे: ‘जशी आपणावर तशी
इतरांवर प्रीति करा.’* 40सर्व नियमशास्त्र आणि संदेष्ट्यांचे
लिखाण या दोन आज्ञांवरच अवलंबून आहे.”

### येशू परूश्यांना प्रश्न विचारतो

***(मार्क 12:35-37; लूक 20:41-44)***

41म्हणून परूशी एकत्र उभे असताना, येशूने त्यांना
प्रश्न केला. 42येशू म्हणाला, “ख्रिस्ताविषयी तुमचे काय
मत आहे? तो कोणाचा पुत्र आहे?” परूश्यांनी उत्तर दिले,
“ख्रिस्त हा दाविदाचा पुत्र आहे.” 43त्यावर येशू त्यांना
म्हणाला, “मग दाविदाने त्याला प्रभु असे का म्हटले?
दाविदाच्या अंगी पवित्र आत्मा आला असता तो म्हणाला,

44 ‘प्रभु माझ्या प्रभूला (ख्रिस्ताला) म्हणाला, ‘मी तुझे
वैरी तुझे पादासन करीपर्यंत, माझ्या उजव्या बाजूला बैस.’
*स्तोत्र. 110:1*

45आता, मग जर दाविद त्याला प्रभु म्हणतो तर तो
दाविदाचा पुत्र कसा होऊ शकतो?” 46पण परुश्यांपैकी
कोणीही त्याच्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकला नाही. त्या
दिवसानंतर त्याला आणखी प्रश्न विचारण्याचे धाडस कोणीही
केले नाही.

### येशू धार्मिक पुढाऱ्यांवर टीका करतो

***(मार्क 12:38-40; लूक 11:37-52; 20:45-47)***

23 मग येशू लोकांशी व त्याच्या शिष्यांशी बोलला,
तो म्हणाला, 2“नियमशास्त्राचे शिक्षक व परूशी
यांना मोशेच्या नियमशास्त्राचे स्पष्टीकरण करण्याचे
अधिकार आहेत. 3म्हणून ते जसे सांगतात तसे तुम्ही
करा. पण ते जसे करतात तसे करू नका. मी असे
म्हणतो याचे कारण ते बोलतात पण त्याप्रमाणे करत
नाहीत. 4वाहावयास अवघड असे ओझे ते बांधतात व ते
ओझे लोकांच्या खांद्यांवर देतात व ते स्वत: ते ओझे
उचलायला एक बोटदेखील लावत नाहीत.

5“ते त्यांचे सर्व चांगले काम लोकांनी पाहावे म्हणून
करतात. ते पवित्र शास्त्र लिहिलेल्या लहान पेट्या*
मोठमोठ्या बनवितात आणि लोकांनी पाहावे म्हणून लांब
झगे घालतात. 6मेजवानीच्या ठिकाणी आपल्याला विशेष
मानाची जागा मिळावी असे त्यांना वाटते. तसेच यहूद्यांचे
सभास्थानात मोक्याच्या जागी बसायला त्यांना फार आवडते.
7बाजारातील मुख्य रस्त्याने जाता येता लोकांनी आपल्याला
मान द्यावा याची त्यांना फार आवड असते आणि लोकांनी
त्यांना ‘गुरुजी’ म्हणावे असे त्यांना वाटते.

8“परंतु तुम्ही स्वत:ला गुरुजी म्हणवून घेऊ नका. तुम्ही
सर्व एकमेकांचे बहीण भाऊ आहात, तुमचा गुरू एकच
आहे. 9आणि जगातील कोणालाही ‘पिता’ म्हणू नका.
कारण तुमचा पिता एकच आहे व तो स्वर्गात आहे.
10तुम्ही स्वत:ला ‘मालक’ म्हणवून घेऊ नका. तुमचा
मालक ख्रिस्त आहे. 11तुमच्यातील जो सेवक बनून तुमची
सेवा करतो तो तुमच्यात सर्वात मोठा होय. 12जो स्वत:ला
मोठा समजेल त्याला कमी लेखले जाईल. स्वत:ला लहान
समजणारा प्रत्येक जण मोठा गणला जाईल. 13अहो,
परूश्यांनो आणि नियमशास्त्राच्या शिक्षकांनो, हाय, हाय,

---

**मी ... आहे** निर्गम 3:6

**प्रभू ... प्रीति करा** अनुवाद 6:5.

**जशी ... करा** लेवीय 19:18

**लहान पेट्या** लहान चामडी पेट्या, ज्यात महत्त्वाची पवित्र वचने लिहीलेली असतात. काही यहूदी ते आपल्या कपाळवर व हातावर बांधून आपण फार धार्मिक आहोत हे दाखवितात.

तुम्ही ढोंगी आहात! तुम्ही स्वर्गाच्या राज्याचा रस्ता
लोकांसाठी खुला ठेवीत नाहीत. तुम्ही स्वत: तर आत
जात नाहीच पण जे आत जाण्याचा प्रयत्न करतात त्यांनाही
आत जाऊ देत नाहीत. 14*

15“परूश्यांनो व नियमशास्त्राच्या शिक्षकांनो, तुम्ही
दु:खी व्हाल. तुम्ही ढोंगी आहात! तुम्ही समुद्र व जमिनीवरून
प्रवास करून एक तरी शिष्य मिळतो का ते पाहता आणि
तुम्हांला तो मिळतो तेव्हा तुम्ही त्याला तुमच्याप्रमाणे
नरकपुत्रासारखे करून टाकता.

16“तुम्हांला दु:ख होईल. आंधळ्या वाटाड्यांनो, जे तुम्ही
म्हणता, ‘जर एखादा मंदिराच्या नावाने शपथ घेतो तर
त्याने ती पाळलीच पाहिजे याचे बंधन त्याच्यावर नाही;
पण जर एखादा मंदिरातील सोन्याची शपथ घेऊन बोलतो,
तर त्याने ती शपथ पाळलीच पाहिजे.’ 17तुम्ही मूर्ख आंधळे
आहात. सोने आणि मंदिर यांपैकी कोणते अधिक महत्त्वाचे?
मंदिर त्या सोन्याला पवित्र बनविते. 18आणि तुम्ही असे
म्हणता, ‘जर एखादा वेदीची शपथ घेतो तर त्यात काही
वावगे नाही. पण जर एखादा वेदीवरील अर्पणाची शपथ
घेतो तर त्याने ती शपथ पाळलीच पाहिजे.’ 19तुम्ही आंधळे
आहात. तुम्हांला काही दिसत नाही व कळत नाही! अर्पण
मोठे की वेदी मोठी? वेदीमुळे अर्पण पवित्र होते म्हणून
वेदी मोठी. 20म्हणून जो वेदीची शपथ घेतो तो त्या वेदीबरोबर
त्यावरच्या सर्वांची शपथ घेतो. 21तसेच जो मंदिराची शपथ
घेतो तो मंदिर व त्यात राहणाऱ्या देवाची देखील शपथ
घेतो. 22जो स्वर्गाची शपथ घेतो तो देवाच्या आसनाची व
त्यावर बसणाऱ्याचीही शपथ घेतो.

23“परूश्यांनो, नियमशास्त्राच्या शिक्षकांनो, तुम्ही दु:खी
व्हाल. तुम्ही ढोंगी आहात! तुमचे जे काही आहे त्याचा
दशांश तुम्ही देवाला देता– पुदिना, शेप, जिरे यांचा देखील
दंशाश देता. पण नियमशास्त्राच्या महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे–
न्यायाने वागणे, दया दाखविणे व प्रामाणिकपणे वागणे हे
तुम्ही पाळत नाही. या गोष्टी तुम्ही केल्या पाहिजेत व
तसेच इतरही केल्या पाहिजेत. 24तुम्ही आंधळे वाटाडे
आहात. जो पाण्याने भरलेल्या प्याल्यातून माशी बाजूला
करतो व उंटासह पाणी पिऊन टाकतो त्यांच्यासारखे तुम्ही
आहात. 25“अहो परूश्यांनो, नियमशास्त्राच्या शिक्षकांनो,
तुम्ही दु:खी व्हाल, तुम्ही ढोंगी आहात! तुम्ही आपल्या
ताटवाट्या बाहेरून घासता पुसता पण लोकांना फसवून
कमावलेला फायदा आणि असंयम यानी त्या आतून भरल्या
आहेत. 26अहो परूश्यांनो, तुम्ही आंधळे आहात! अगोदर
तुमची वाटी आतून घासा व धुवा म्हणजे ती बाहेरूनदेखील
खरोखर साफ होईल.

27“अहो परूश्यांनो, नियमशास्त्राच्या शिक्षकांनो, तुम्ही
दु:खी व्हाल. तुम्ही ढोंगी आहात! रंगसफेदी केलेल्या
कबरांसारखे तुम्ही आहात. त्या वरून चांगल्या दिसतात
पण आतून मेलेल्या माणसांच्या हाडांनी भरल्या आहेत
तसेच सर्व प्रकारच्या अशुद्ध गोष्टींनी त्या भरल्या आहेत.
28तुमचेही तसेच आहे. लोक तुमच्याकडे पाहतात आणि
तुम्ही चांगले आहात असे त्यांना वाटते. पण तुम्ही आतून
ढोंग व दुष्टपणा यांनी भरला आहात.

29अहो, परूश्यांनो, नियमशास्त्राच्य शिक्षकांनो, तुम्ही
दु:खी व्हाल. तुम्ही ढोंगी आहात! तुम्ही संदेष्ट्यांसाठी कबरा
बांधता. आणि जे लोक धार्मिक जीवन जगले त्यांची
थडगी सजवता.

30आणि तुम्ही म्हणता, ‘जर आम्ही आमच्या
वाडवडिलांच्या काळात जिवंत असतो तर त्यांना या
संदेष्ट्यांना जिवे मारण्यास मदत केली नसती.’ 31पण ज्यांनी
ज्यांनी त्यांना जिवे मारले, त्यांचेच तुम्ही वंशज आहात
याचा पुरावा तुम्ही देता. 32पुढे व्हा आणि तुमच्या
वाडवडिलांनी सुरू केलेली पापी कामे पूर्ण करा!

33“तुम्ही साप आहात. विषारी सापाची पिल्ले आहात!
तुम्ही देवाच्या हातून सुटू शकणार नाही. तुम्हा सर्वांना
दोषी ठरविण्यात येईल. तुम्ही नरकात जाल! 34मी तुम्हांला
सांगतो की मी तुमच्याकडे संदेष्टे, ज्ञानी लोक आणि
शिक्षक पाठवीत आहे. त्यांच्यातील काहींना तुम्ही जिवे
माराल. त्यांपैकी काहींना वधस्तंभावर खिळाल.
त्यांच्यातील काहींना तुमच्या सभास्थानात मारहाण कराल.
त्यांचा नगरानगरातून पाठलाग कराल.

35म्हणून ज्या चांगल्या लोकांचा वध या पृथ्वीवर झाला
त्या सर्वांसाठी तुम्ही दोषी ठराल. हाबेल या चांगल्या
मनुष्याच्या वधासाठी तुम्ही दोषी ठराल. आणि तुम्ही
बरख्याचा पुत्र जखऱ्याला जिवे मारण्याविषयी दोषी ठराल.
त्याला मंदिर आणि वेदी यांच्यामध्ये मारले होते. हाबेलाच्या
काळापासून ते जखऱ्याच्या* काळापर्यंत जे जे चांगले
लोक मारण्यात आले, त्यांच्या वधाविषयी तुम्ही दोषी
ठराल. 36मी तुम्हांला खरे सांगतो; तुम्ही लोक जिवंत
असेपर्यंत या गोष्टी घडतील.

## यरुशलेमच्या लोकांना येशू सावध करतो

*(लूक 13:34-35)*

37“अगे, यरुशलेमे, यरूशलेमे, तू संदेष्ट्यांना जिवे
मारतेस. देवाने तुझ्याकडे पाठविलेल्या लोकांना दगडमार
करतेस. कोंबडी जशी आपल्या पिल्लांना पंखाखाली
एकवटते तसे तुझ्यातील लोकांना एकवटण्याचा पुष्कळ
वेळा मी प्रयत्न केला, पण तू मला तसे करू दिले नाहीस.
38आता तुझे घर उजाड होईल. 39मी तुला सांगतो, ‘प्रभूच्या

---

**वचन 14** परूशयांनो, आणि नियमशास्त्राच्या शिक्षकांनो, तुम्ही दु:खी व्हाल. तुम्ही ढोंगी आहात. तुमही विधवांची घरे लुटता आणि लोकांनी पाहावे म्हणून लांबलचक प्रार्थना करता, म्हणून तुम्हांला फार कडक शिक्षा होईल.

**हाबेल ते जखऱ्या** हिब्रू भाषेतील जुन्या करारात (पवित्र शास्त्रात) हे दोघे पहिल्यांदा व शेवटी मारण्यात आलेली माणसे आहेत.

नावाने येणारा धन्यवादित असो.’* असे म्हणेपर्यंत तू मला
पाहणार नाहीस.”

## मंदिराचा भावी नाश
### (*मार्क 13:1-31; लूक 21:5-33*)

24 येशू मंदिरातून बाहेर निघून चालत निघाला
होता तेव्हा त्याचे शिष्य त्याच्याकडे आले. कारण
त्यांना त्याला मंदिराच्या इमारती दाखवायच्या होत्या.
2प्रतिसादादाखल, तो त्यांना म्हणाला, “तुम्ही या सर्व गोष्टी
पाहता, खरे ना? आता, मी तुम्हांला खरे सांगतो, येथे एक
दगड दुसऱ्या दगडावर राहणार नाही, त्यातील प्रत्येक
दगड खाली टाकला जाईल.”

3येशू जैतूनाच्या डोंगरावर बसला असताना, त्याचे शिष्य
त्याच्याशी एकांतात बोलावे म्हणून आले, ते म्हणाले,
“आम्हांला सांगा की या गोष्टी कधी होतील? तुम्ही परत
येण्याचा आणि जगाचा शेवट होण्याचा काळ जवळ आला
आहे हे आम्ही कोणत्या घटनांवरून ओळखावे?”

4येशूने त्यांना उत्तर दिले, “सांभाळा! कोणीही तुम्हांला
फसवू नये 5मी हे म्हणतो कारण असे पुष्कळ आहेत की
जे माझ्या नावाने येतील आणि ते म्हणतील, ‘मी ख्रिस्त
आहे.’ आणि ते पुष्कळ लोकांना फसवितील. 6तुम्ही
लढायांबद्दल आणि लढायांच्या अफवांबद्दल ऐकाल पण
त्यामुळे तुम्ही त्यांना भिऊ नका. या गोष्टी घडल्याच
पाहिजेत, तरी इतक्यात शेवट जवळ येणार नाही. 7होय,
एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर उठेल. अनेक ठिकाणी भूकंप
व दुष्काळ येतील, 8पण या सर्व गोष्टी म्हणजे प्रसूतीच्या
कळांची सुरूवात अशा आहेत.

9“लोक तुमच्याशी वाईट वागतील. तुमचा छळ व्हावा
आणि तुम्हांला जिवे मारावे यासाठी लोक तुम्हांला
राज्यकर्त्यांच्या हाती देतील. सर्व लोक तुमचा द्वेष करतील.
तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवला म्हणून या गोष्टी तुमच्यावर
ओढवतील. 10अशा वेळी बरेच विश्वासणारे आपला
विश्वास गमावतील. ते एकमेकाविरुद्ध उठतील आणि
एकमेकांचा द्वेष करतील. 11अनेक खोटे संदेष्टे येतील.
ते लोकांना चुकीचे शिक्षण देतील व त्यावर विश्वास
ठेवायला लावतील. 12सतत वाढणाऱ्या दुष्टाईमुळे
अधिकाधिक विश्र्वासणाऱ्यांची प्रीति कमी कमी होत
जाईल. 13पण जो मनुष्य शेवटपर्यंत खंबीरपणे वागेल तोच
तारला जाईल. 14सर्व जगभर देवाची सुवार्ता गाजविली
जाईल व हे सर्व राष्टातील लोकांना साक्ष असे होईल.
आणि मग शेवट होईल.

15“दानीएल संदेष्ट्यांने एका अमंगळ गोष्टीविषयी
सांगितले की, जिच्यामुळे नाश ओढवेल. अशी अमंगळ
गोष्ट ही पवित्र जागी– मंदिरामध्ये उभी असलेली तुम्ही
पाहाल.” तुम्ही लोक जे हे वाचाल ते याचा अर्थ समजून
घ्या. 16“त्यावेळी यहूदातील लोकांनी डोंगरावर पळून जावे.
17जो कोणी छपरावर असेल त्याने घरातील सामान
घेण्यासाठी उतरू नये. 18जर कोणी शेतात असेल तर
त्याने आपला सदरा घेण्यासाठी परत जाऊ नये. 19त्याकाळी
गर्भवती असलेल्या अगर तान्ही बालके असलेल्या स्त्रियांना
फार कठीण जाईल! 20जेव्हा या गोष्टी होतील आणि
तुम्हांला पळून जावे लागेल तेव्हा थंडीचे दिवस नसावेत
अथवा शब्बाथ दिवस नसावा यासाठी प्रार्थना करा.
21कारण त्याकाळी फार पीडा येतील. जगाच्या आरंभापासून
कधीही झाली नाही आणि पुन्हा कधी होणार नाही अशी
पीडा त्या काळी भोगावी लागेल. 22आणखी, देवाने ते
दिवस जर थोडेच ठेवले नसते तर कोणीच वाचले नसते.
परंतु त्याच्या निवडलेल्यांमुळे तो ते दिवस थोडे करील.
23त्या वेळी जर एखाद्याने तुम्हांला म्हटले, ‘पहा! ख्रिस्त
येथे आहे’ किंवा ‘तो तेथे आहे,’ तर त्याच्यावर विश्वास
ठेवू नका. 24खोटे ख्रिस्त आणि खोटे संदेष्टे उदयास येतील.
ते महान व आश्चर्यकारक चिन्हे दाखवतील. देवाच्या
निवडलेल्या लोकांना ते चिन्हे दाखवतील व लोकांना
एवढेच नव्हे तर देवाच्या निवडलेल्यांना फसविण्याचा प्रयत्न
करतील. 25या गोष्टी होण्या अगोदरच मी तुम्हांला सावध
केले आहे.

26“एखादा मनुष्य तुम्हांला सांगेल, ‘पाहा, मशीहा ओसाड
रानात आहे.’ तर तेथे जाऊ नका. किंवा जर ते म्हणाले,
‘पाहा, ख्रिस्त आतल्या खोलीत लपला आहे,’ तर त्याच्यावर
विश्वास ठेवू नका. 27मी हे म्हणतो कारण वीज जशी
पूर्वेकडून पश्चिमेकडे चमकताना सर्वांना दिसते तसेच
मनुष्याच्या पुत्राचे येणेदेखील असेल. 28जेथे कोठे प्रेत
असेल तेथे गिधाडेही असतील.

29 “छळानंतर लगेच, असे घडेल:

‘सूर्य अंधकारमय होईल व चंद्र प्रकाश देणार नाही.
आकाशातील तारे व नक्षत्रे गळून पडतील आकाशातील
सर्व शक्ती डळमळतील. आकाश गुंडाळीसारखे गुंडाळले
जाईल.’ *यशया 13:10; 34:4*

30“त्यावेळेला मनुष्याच्या पुत्राच्या येण्याचे चिन्ह
आकाशात दिसेल. तेव्हा जगातील सर्व लोक शोक
करतील. मनुष्याच्या पुत्राला सर्व जण मेघावर बसून येताना
पाहतील. तो महासामर्थ्य आणि वैभव यांच्यासह येईल.
31मनुष्याचा पुत्र तुतारीचा मोठा नाद करून आपले दूत
पृथ्वीभोवती पाठवून देईल. ते पृथ्वीच्या चारही कोपऱ्यातून,
आकाशाच्या एका सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत
निवडलेल्यांना गोळा करतील.

32“अंजिराच्या झाडापासून शिका: अंजिराच्या झाडाच्या
फांद्या जेव्हा हिरव्या आणि कोवळ्या असतात आणि पाने
फुटू लागतात तेव्हा उन्हाळा जवळ आला हे तुम्हांला
कळते. 33मी तुम्हांला ज्याविषयी सांगितले त्याबाबतीतही

---

**प्रभूच्या ... असो** स्तोत्र. 118:26

असेच होईल. जेव्हा या सर्व गोष्टी तुम्ही पाहाल तेव्हा वेळ
जवळ येत आहे हे तुम्ही ओळखाल. [34]मी तुम्हांला खरे
सांगतो: या गोष्टी होत असताना आजची ही पिढी नाहीशी
होणार नाही. [35]सर्व जग, आकाश, पृथ्वी नाहीशी होतील
पण माझी वचने कधीही नष्ट होणार नाहीत.

[36]“पण त्या दिवसाविषयी आणि त्या घटकेविषयी
कोणालाही माहीत नाही, स्वर्गातील देवदूतांनाही नाही,
किंवा खुद्द पुत्रालाही नाही. फक्त पिताच हे जाणतो.
[37]नोहाच्या काळी घडले तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या
वेळेसही होईल. [38]महापूर येण्याअगोदर लोक खातपीत
होते. लोक लग्न करीत होते. लग्न करून देत होते. नोहा
जहाजात जाईपर्यंत लोक या गोष्टी करीत होते. [39]त्यांना
माहीत नव्हते की काही तरी घडणार आहे. परंतु नंतर
पूर आला आणि सर्व लोक मरून गेले. मनुष्याचा पुत्र
आल्यावर असेच होईल. [40]दोघे जण शेतात एकत्र काम
करत असतील तर त्यातला एक जण वर घेतला जाईल
आणि दुसरा तेथेच राहील. [41]दोन स्त्रिया जात्यावर धान्य
दळत असतील तर त्या दोघीतील एक वर घेतली जाईल
आणि दुसरी तेथेच राहील. [42]“म्हणून तुम्ही तयार असा,
कारण तुम्हांला माहीत नाही की कोणत्या दिवशी तुमचा
प्रभु येत आहे, [43]हे लक्षात ठेवा, चोर केव्हा येईल हे जर
घराच्या मालकाला माहीत असते तर तो त्यासाठी तयारीत
राहिला असता आणि त्याने चोराला घर फोडू दिले नसते.
[44]या कारणासाठी तुम्हीसुद्धा तयार असले पाहिजे. जेव्हा
तुम्हांला अपेक्षा नसेल तेव्हा मनुष्याचा पुत्र येईल.

[45]“शहाणा आणि विश्वासू सेवक कोण बरे? दुसऱ्या
सेवकांना वेळेवर जेवण देण्याचे काम मालक एका
सेवकावर सोपवितो. हे काम करण्यासाठी मालक कोणाला
विश्वासाने सांगेल? [46]मालक आल्यावर आपले दिलेले
काम करीत असलेला सेवक खरोखर धन्य! [47]मी तुम्हांला
सांगतो: मालक आपल्या सर्व मालमत्तेवर त्या सेवकाची
नेमणूक करील. [48]पण जर सेवक वाईट निघाला आणि
आपला मालक लवकर घरी परत येणार नाही असे
म्हणाला तर काय होईल? [49]तो सेवक इतर सेवकांना
मारहाण करील आणि आपल्यासारख्या लोकांबरोबर
जेवण करील आणि दारू पिऊन मस्त होईल. [50]आणि तो
सेवक तयारीत नसेल अशा वेळी मालक येईल. [51]मग
मालक त्या सेवकाचे तुकडे करील. त्या सेवकाला मालक
ढोंगी लोकांबरोबर राहायला पाठवील. आणि त्या ठिकाणी
रडणे व दात खाणे चालेल.

## दहा कुमारिकांची बोधकथा

25 “त्या दिवसांत स्वर्गाचे राज्य दहा
कुमारिकांसारखे असेल, त्यांनी त्यांचे दिवे घेतले
व वराला भेटण्यास गेल्या. [2]त्या दहा मुलींपैकी पाच मूर्ख
होत्या आणि पाच शहाण्या होत्या. [3]मूर्ख मुलींनी आपले
दिवे घेतले, पण दिव्यासाठी तेल घेतले नाही. [4]शहाण्या
मुलींनी दिव्याबरोबर तेलही घेतले. [5]वराला उशीर झाल्याने
सर्वच मुलींना डुलक्या लागल्या व त्या झोपी गेल्या.

[6]“मध्यरात्री कोणीतरी घोषणा केली, ‘वर येत आहे!
बाहेर जाऊन त्याला भेटा!’

[7]“सर्व मुली जाग्या झाल्या आणि त्यांनी आपले दिवे
तयार केले. [8]पण मूर्ख मुली, हुशार मुलींना म्हणाल्या,
‘तुमच्यातील काही तेल आम्हांला द्या. आमचे दिवे विझत
आहेत.’

[9]“पण उत्तरादाखल हुशार मुली म्हणाल्या, ‘नाही, आम्ही
तुम्हांला काहीच देऊ शकत नाही, नाही तर तुम्हांला व
आम्हांलाही पुरणार नाही. त्याऐवजी तेल विकणाऱ्याकडे
जा आणि आपणांसाठी तेल विकत आणा.’

[10]“पाच मूर्ख मुली तेल विकत घ्यायला निघाल्या तेव्हा
वर आला. तेव्हा ज्या मुली तयार होत्या त्या मेजवानीसाठी
त्याच्याबरोबर आत गेल्या. मग दार बंद झाले.

[11]“शेवटी उरलेल्या पाच मुली आल्या आणि म्हणाल्या,
‘महाराज! महाराज! दार उघडा!’ [12]“पण तो त्यांना
उत्तरादाखल म्हणाला, ‘मी तुम्हांला खरे सांगतो: मी तुम्हांला
ओळखत नाही!’

[13]“म्हणून नेहमी तयार असा. कारण मनुष्याचा पुत्र
कधी येणार तो दिवस व ती वेळ तुम्हांला माहीत नाही.

## तीन नोकरांची बोधकथा
### (लूक *19:11-27*)

[14]“स्वर्गाचे राज्य अशा मनुष्यासारखे आहे, जो प्रवासाला
जाण्याअगोदर आपल्या नोकरांना बोलावून आपल्या
मालमत्तेवर लक्ष देण्यास सांगणाऱ्या मनुष्यासारखे स्वर्गाचे
राज्य आहे. [15]त्याच्यांतील एकाला त्याने पाच थैल्या रुपये
दिले. दुसऱ्याला त्याने दोन थैल्या रुपये दिले आणि
तिसऱ्याला त्याने एक थैली रुपये दिले. प्रत्येकाला त्याच्या
त्याच्या कुवतीप्रमाणे त्याने पैसे दिले. मग तो आपल्या
प्रवासाला गेला. [16]ज्याला पाच थैल्या रुपये दिले होते
त्याने त्याप्रमाणे काम करायला सुरुवात केली आणि
आणखी पाच थैल्या रुपये त्याने मिळविले. [17]त्याचप्रमाणे,
ज्याला दोन थैल्या रुपये मिळाले होते त्याने आणखी दोन
थैल्या रुपये कमविले. [18]पण ज्याला एक थैली मिळाली
होती, त्याने जमिनीत एक खड्डा खोदला आणि मालकाचे
पैसे त्यात लपविले.

[19]“बराच काळ लोटल्यानंतर त्या नोकरांचा मालक
आला व त्याने त्यांचा हिशेब घ्यायला सुरुवात केली.
[20]ज्याला पाच थैल्या रुपये मिळाले होते, त्याने मालकाकडे
रुपयाच्या आणखी पाच थैल्या आणून दिल्या, तो म्हणाला,
‘मालक, तुम्ही दिलेल्या रुपयांवर मी आणखी पाच थैल्या
रुपये मिळविले.’

[21]त्याचा मालक म्हणाला, ‘शाब्बास, चांगल्या आणि
इमानी दासा, तू भरंवसा ठेवण्यायोग्य नोकर आहेस. त्या
थोड्या पैशांचा तू चांगला वापर केलास म्हणून मी

पुष्कळांवर तुझी नेमणूक करीन. आत जा आणि आपल्या मालकाच्या आनंदात सहभागी हो!'

22"नंतर ज्या मनुष्याला रुपयांच्या दोन थैल्या मिळाल्या होत्या, तो मालककाकडे आला आणि म्हणाला, 'मालक, तुम्ही मला रुपयांच्या दोन थैल्या दिल्या होत्या त्यापासून मी आणखी दोन थैल्या कमाविल्या.'

23"मालक म्हणाला, 'चांगल्या आणि इमानी दासा! तू थोड्या पैशाविषयी इमानीपणे वागलास, म्हणून मी तुझी आणखी पुष्कळशा गोष्टींवर नेमणूक करीन. आत जा आणि आपल्या मालकाच्या आनंदात सहभागी हो!'

24"नंतर ज्याला रुपयाची एक थैली मिळाली होती तो मालकाकडे आला व म्हणाला, 'मालक, मला माहीत होते की आपण एक करड्या शिस्तीचे मनुष्य आहात. जेथे पेरणी केली नाही तेथे तुम्ही कापणी करता आणि जेथे बी पेरले नाही तेथे पीक घेता.
25मला आपली भीति होती. म्हणून मी जाऊन तुमच्या रुपयाची थैली जमिनीत लपवून ठेवली. हे घ्या! हे तुमचेच आहेत!'

26"मालकाने उत्तर दिले, 'अरे वाईट आणि आळशी नोकरा! मी जेथे पेरणी केली नाही तेथे कापणी करतो आणि जेथे बी पेरले नाही तेथे पीक घेतो, हे तुला माहीत होते.
27तर तू माझे पैसे पेढीत ठेवायचे होतेस म्हणजे मी घरी आल्यावर मला व्याजासहित पैसे मिळाले असते.'

28"म्हणून मालकाने दुसऱ्या नोकरांना सांगितले, 'याच्याजवळची रुपयांची थैली घ्या आणि ज्याच्याजवळ रुपयांच्या दहा थैल्या आहेत त्याला द्या.
29कारण आपल्याकडे जे आहे, त्याचा वापर करणाऱ्याला आणखी देण्यात येईल, आणि त्याला त्याच्या गरजेपेक्षा जास्त मिळेल. पण जो आपल्याजवळ असलेल्याचा उपयोग करीत नाही त्याच्याजवळ जे काही असेल ते सर्व त्याजपासून काढून घेण्यात येईल.'
30नंतर मालक म्हणाला, 'त्या निकामी नोकराला बाहेरच्या अंधारात घालवून द्या. तेथे रडणे व दात खाणे चालेल.'

## मनुष्याचा पुत्र सर्वांचा न्याय करील

31"मनुष्याचा पुत्र जेव्हा त्याच्या स्वर्गीय गौरवाने आपल्या देवदूतांसह येईल तेव्हा तो त्याच्या गौरवी आसनावर बसेल.
32मग सर्व राष्ट्रे त्याच्यासमोर एकत्र जमतील. त्यांना तो एकमेकांपासून विभक्त करील. ज्याप्रमाणे मेंढपाळ मेंढरे शेरडांपासून वेगळी करतो.
33तो मेंढरांना आपल्या उजवीकडे बसवील पण शेरडांना तो डावीकडे बसवील.

34"मग राजा जे त्याच्या उजवीकडे आहेत त्यांना म्हणेल, 'या, जे तुम्ही माझ्या पित्याचे आशीर्वादित आहात! जे तुमच्यासाठी तयार केले आहे त्या राज्याचे वतनदार व्हा. हे राज्य जगाच्या स्थापनेपासून तयार केले आहे.
35हे तुमचे राज्य आहे कारण जेव्हा मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खायला दिले. मी तहानेला होतो तेव्हा तुम्ही मला प्यावयास दिले. मी प्रवासी असता तुम्ही माझा पाहुणचार केलात
36मी कपड्यांशिवाय होतो तेव्हा तुम्ही मला कपडे दिलेत. मी आजारी होतो, तेव्हा तुम्ही माझी काळजी घेतलीत. मी तुरूंगात होतो तेव्हा तुम्ही माझ्याकडे समाचारासाठी आलात.'

37"मग जे नीतिमान आहेत ते उत्तर देतील, 'प्रभु आम्ही तुला केव्हा भुकेला व तहानेला पाहिला आणि तुला खायला आणि प्यायला दिले?
38आम्ही तुला प्रवासी म्हणून कधी पाहिले आणि तुझा पाहुणचार केला? किंवा आम्ही तुला केव्हा उघडे पाहिले व कपडे दिले?
39आणि तू आजारी असताना आम्ही तुला कधी भेटायला आलो? किंवा तुरूंगात असताना कधी तुझ्या समाचारास आलो?'

40"मग राजा त्यांना उत्तर देईल, 'मी तुम्हांला खरे सांगतो: येथे असलेल्या माझ्या बांधवातील अगदी लहानातील एकाला तुम्ही केले, तर ते तुम्ही मलाच केले.'
41मग राजा आपल्या डाव्या बाजूच्यांना म्हणेल, 'माझ्यापासून दूर जा, तुम्ही शापित आहात, अनंतकाळच्या अग्नीत जा. हा अग्नी सैतान व त्याच्या दूतांसाठी तयार केला आहे.
42ही तुमची शिक्षा आहे कारण मी भुकेला होतो पण तुम्ही मला काही खायला दिले नाही, मी तहानेला होतो पण तुम्ही मला काही प्यावयास दिले नाही.
43मी प्रवासी असता माझा पाहुणचार केला नाही. मी वस्त्रहीन होतो, पण तुम्ही मला कपडे दिले नाहीत. मी आजारी आणि तुरूंगात होतो पण तुम्ही माझी काळजी घेतली नाही.'

44"मग ते लोक सुद्धा त्याला उत्तर देतील, 'प्रभु आम्ही कधी तुला उपाशी अगर तहानेले पाहिले किंवा प्रवासी म्हणून कधी पाहिले? किंवा वस्त्रहीन, आजारी किंवा तुरुंगात कधी पाहिले आणि तुला मदत केली नाही?'

45"मग राजा त्यांना उत्तर देईल, 'मी तुम्हांला खरे सांगतो: माझ्या अनुयायातील लहानातील लहानाला काही करण्याचे जेव्हा जेव्हा तुम्ही नाकारले, तेव्हा तेव्हा ते तुम्ही मला करण्याचे नाकारले.'
46मग ते अनीतिमान लोक अनंतकाळच्या शिक्षेसाठी जातील, पण नीतिमान अनंतकाळच्या जीवनासाठी जातील."

## यहूदी पुढारी येशूला जिवे मारण्याचा कट करतात
### (मार्क 14:1-2; लूक 22:1-2; योहान 11:45-53)

26 येशूने या सर्व बोधकथा सांगण्याचे संपविल्यानंतर तो त्याच्या शिष्यांना म्हणाला,
2"परवा वल्हांडणाचा सण आहे हे तुम्हांला माहीत आहे. आणि मनुष्याचा पुत्र वधस्तंभावर खिळून जिवे मारला जाण्यासाठी शत्रूच्या हाती धरून दिला जाईल."

3मग मुख्य याजक आणि लोकांचे वडील, प्रमुख याजकाच्या घरी जमले. प्रमुख याजकाचे नाव कयफा होते.
4सभेत त्यांनी धूर्तपणे येशूला अटक करण्याचा आणि जिवे मारण्याचा कट केला.
5तरीही ते म्हणत होते, "वल्हांडण सणाच्या दिवसात आपण येशूला धरू शकणार नाही, कारण लोकांमध्ये दंगा होईल."

## एक स्त्री काही तरी विशेष करते
### *(मार्क 14:3-9; योहान 12:1-8)*

6येशू बेथानीमध्ये होता. तो शिमोन कुष्ठरोग्याच्या घरात
होता. 7येशू तेथे असताना एक बाई त्याच्याकडे आली.
उंची अत्तराने भरलेली अलाबास्त्र कुपी तिच्याजवळ होती.
येशू जेवत असता ही कुपी त्या बाईने त्याच्या डोक्यावर
ओतली. 8त्या बाईला हे करताना शिष्यांनी पाहिले, तेव्हा
त्यांना राग आला. शिष्य विचारू लागले, "या अत्तराचा
असा नाश का व्हावा? 9ते पुष्कळ पैशांना विकता आले
असते आणि ते पैसे गोरगरिबांना देता आले असते."
10येशूला ते काय म्हणत आहेत हे माहीत होते, त्याने
त्यांना विचारले, "तुम्ही त्या बाईला का त्रास देत आहा?
तिने माझ्यासाठी फार चांगले काम केले आहे. 11गरीब
लोक तुमच्याबरोबर नेहमीच असतील पण मी
तुमच्याबरोबर नेहमी असणार नाही. 12या बाईने माझ्या
शरीरावर हे अत्तर ओतले. मला पुरण्याच्या वेळेची तयारी
तिने केली. 13मी तुम्हांला खरे सांगतो, सर्व जगातील
लोकांना सुवार्ता सांगितली जाईल आणि जेथे सुवार्ता
सांगण्यात येईल तेथे या बाईने जे केले त्याचे वर्णन तिची
आठवण म्हणून करण्यात येईल."

## यहूदा येशूचा शत्रु होतो
### *(मार्क 14:10-11; लूक 22:3-6)*

14बारा शिष्यांपैकी एक यहूदा इस्कार्योत मुख्य
याजकांकडे गेला. 15यहूदा म्हणाला, "मी येशूला धरून
तुमच्या हाती दिले तर तुम्ही मला काय द्याल?" तेव्हा
त्यांनी त्याला चांदीची तीस नाणी दिली. 16तेव्हापासून यहूदा
येशूला धरून देण्याच्या संधीची वाट पाहू लागला.

## येशू वल्हांडण सणाचे भोजन खातो
### *(मार्क 14:21-22; लूक 22:7-14, 21-23; योहान 13:21-30)*

17बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी येशूचे
शिष्य त्याच्याकडे आले. ते म्हणाले, "वल्हांडण सणाच्या
जेवणाची सर्व तयारी आम्ही करणार आहोत. वल्हांडण
सणाचे जेवण कोठे करावे अशी तुमची इच्छा आहे?"
18येशू म्हणाला, "ज्याला मी ओळखतो अशा त्या
माणसाकडे खेड्यात जा आणि त्याला म्हणा, 'गुरुजी
म्हणतात: माझी वेळ जवळ आली आहे. तुझ्या घरी मी
माझ्या शिष्यांसह वल्हांडण सण साजरा करणार आहे.'"
19येशूने जे सांगितले होते ते त्याच्या शिष्यांनी केले
आणि त्यांनी वल्हांडण सणाचे जेवण तयार केले.
20संध्याकाळ झाल्यावर येशू आपल्या शिष्यांबरोबर मेजाशी
जेवावयास बसला.
21जेवण करीत असता येशू म्हणाला, "मी तुम्हांला खरे
सांगतो: तुमच्यापैकी एक जण माझा विश्वासघात करील."
22ते खूप दु:खी झाले आणि त्यांच्यातील प्रत्येक जण
त्याला विचारू लागला, "तो मी नाही ना प्रभु?"
23मग येशूने उत्तर दिले, "जो माझ्याबरोबर ताटात हात
घालतो तोच माझा विश्वासघात करील. 24जसे मनुष्याच्या
पुत्राविषयी पवित्र शास्त्रात लिहिले आहे, तसा मनुष्याच्या
पुत्राचा शेवट होईल, पण जो त्याचा विश्वासघात करील
त्याच्याविषयी मला दु:ख वाटते! तो जर जन्मला नसता
तर त्याच्यासाठी ते बरे झाले असते."
25मग यहूदा, जो त्याचा विश्वासघात करणार होता, तो
येशूकडे वळून म्हणाला, "तो मी आहे का, गुरुजी?" येशू
त्याला म्हणाला, "तू म्हणालास, तसेच आहे (म्हणजे होय
तो तूच आहेस.")

## प्रभुभोजन
### *(मार्क 14:22-26; लूक 22:15-20; 1 करिंथकरांस 11:23-25)*

26ते जेवण करीत असताना येशूने भाकर घेतली.
तिच्याबद्दल देवाचे उपकार मानले. आणि ती मोडली.
त्याने ती भाकर आपल्या शिष्यांना दिली. तो म्हणाला,
"हे घ्या आणि खा. हे माझे शरीर आहे."
27नंतर येशूने द्राक्षारसाचा प्याला घेतला. त्याबद्दल देवाचे
उपकार मानले आणि तो शिष्यांना दिला. येशू म्हणाला,
"तुम्ही सर्वांनी यातील प्यावे. कारण हे माझे रक्त आहे,
28हे नवा करार प्रस्थापित करते. ते पुष्कळ लोकांकरिता
ओतले जात आहे. यासाठी की त्यांच्या पापांची क्षमा व्हावी.
29मी तुम्हांला सांगतो: माझ्या पित्याच्या राज्यात आपण
सर्व एकत्र येईपर्यंत मी नवा द्राक्षारस पिणार नाही."
30मग त्यांनी वल्हांडणाचे गीत गाईले. नंतर ते जैतूनाच्या
डोंगरावर निघून गेले.

## येशू म्हणतो त्याचे शिष्य त्याला सोडून जातील
### *(मार्क 14:27-31; लूक 22:31-34; योहान 13:36-38)*

31येशूने सांगितले, "आज रात्रीच तुमच्या मनात
माझ्याविषयी शंकाकुशंका येतील आणि माझ्यावरील
तुमचा विश्वास उडेल. पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे:

'मी मेंढपाळाचा वध करीन, कळपातील मेंढरांची
दाणादाण होईल.' *जखऱ्या* 13:7

32पण मी मरणातून उठल्यानंतर, तुमच्या अगोदर
गालीलात जाईन." 33उत्तर देताना पेत्र म्हणाला, "इतर
सर्वांचा जरी तुमच्याविषयी गोंधळ झाला तरी माझा कधीही
होणार नाही!"
34येशू त्याला म्हणाला, "मी तुला खरे सांगतो: तू मला
ओळखत नाहीस असे आज रात्री कोंबडा आरवण्यापूर्वी
तू तीन वेळा म्हणशील." 35पेत्र म्हणाला, "तुम्हांला
ओळखीत नाही असे मी कधीही म्हणणार नाही. मग

मला तुमच्याबरोबर मरावे लागले तरी हरकत नाही.”
आणि इतर शिष्यसुद्धा असेच म्हणाले

## येशू एकटाच प्रार्थना करतो
*(मार्क 14:32-42; लूक 22:39-46)*

36नंतर गेथशेमाने नावाच्या जागी येशू आपल्या शिष्यांसह
गेला. येशू त्यांना म्हणाला, “मी थोडा पुढे जाऊन प्रार्थना
करीपर्यंत येथेच थांबा.” 37येशूने पेत्र आणि दोन जब्दीचे
पुत्र यांना आपल्याबरोबर यायला सांगितले. यानंतर येशू
मनातून फार दु:खी व व्याकूळ होऊ लागला. 38येशू
पेत्राला व जब्दीच्या दोघा पुत्रांना म्हणाला, “माझे दु:ख
मला इतके झाले आहे की, ते मला मारून टाकील. येथे
थांबा व माझ्याबरोबर जागे राहा.”
39तो थोडे अंतर पुढे गेला आणि जमिनीवर ओणवून
प्रार्थना करू लागला, “हे माझ्या पित्या, शक्य झाले तर
हा दु:खाचा प्याला माझ्यापुढून जाऊ दे, तथापि, माझ्या
इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे.” 40मग तो
शिष्यांकडे परत गेला तेव्हा ते झोपी गेले आहेत असे
त्याला आढळले. येशू पेत्राला म्हणाला, “तुम्हा लोकांना
माझ्याबरोबर एखादा तासही जागे राहता येत नाही काय?
41आपण परीक्षेत पडू नये म्हणून जागे राहा. आणि प्रार्थना
करीत राहा. यासाठी की तुम्ही मोहात पडू नये. जे योग्य
आहे ते तुमचा आत्मा करू इच्छितो, पण तुमचे शरीर
अशक्त आहे.”
42नंतर दुसऱ्यांदा जाऊन येशू प्रार्थना करू लागला,
“हे माझ्या पित्या, जर दु:खाचा हा प्याला पिणे मला अटळच
आहे तर तुझी इच्छा असेल तसे होवो.”
43नंतर येशू शिष्यांकडे परत गेला तेव्हा त्याला आढळून
आले की, त्यांचे डोळे जड झाले होते व ते झोपी गेले
आहेत कारण जागे राहणे त्यांना शक्य होत नव्हते. 44नंतर
येशू शिष्यांना पुन्हा सोडून तसाच पुढे गेला आणि त्याने
प्रार्थना केली. तिसऱ्या वेळी प्रार्थना करताना त्याने पुन्हा
हेच शब्द उच्चारले. 45यानंतर येशू परत शिष्यांकडे गेला
आणि त्यांना म्हणाला, “तुम्ही अजून झोप आणि विश्रांतिच
घेत आहात का? ऐका! मनुष्याचा पुत्र पापी लोकांच्या
हाती धरून दिला जाण्याची वेळ आली आहे. 46उठा!
आपल्याला निघालेच पाहिजे. हा पाहा, मला धरून शत्रूंच्या
हाती देणारा येत आहे.”

## येशूला अटक होते
*(मार्क 14:43-50; लूक 22:47-53; योहान 18:3-12)*

47येशू हे बोलत असतानाच बारा जणांपैकी एक जो
यहूदा, तो तेथे आला. त्याच्याबरोबर बरेच लोक होते.
मुख्य याजक, लोकांचे वडीलजन यांनी त्यांना पाठविले
होते. ते लोक तलवारी व सोटे घेऊन आले होते. 48येशूला
विश्वासघाताने धरून लोकांच्या हाती देणारा यहूदा याने
हाच येशू आहे याविषयी एक खूण सांगितली होती. यहूदा
म्हणाला, “ज्या मनुष्याचे मी चुंबन घेईन तोच येशू होय;
त्याला तुम्ही धरा.”
49मग यहूदा येशूकडे गेला आणि म्हणाला, “गुरुजी,”
आणि यहूदाने येशूचे चुंबन घेतले.
50येशू त्याला म्हणाला, “मित्रा, जे करण्यास आलास ते
कर!” मग ते येशूकडे आले. त्यांनी येशूवर हात टाकले
व त्याला धरले. 51हे झाल्यावर येशूबरोबर असलेल्या
एका अनुयायाने तलवारीला हात घातला आणि ती उपसली.
त्याने प्रमुख याजकाच्या नोकराचा कान कापला.
52येशू त्या मनुष्याला म्हणाला, “तू आपली तलवार
म्यानात ठेव. जे तलवारीचा वापर करतात ते तलवारीनेच
मरतात. 53मी माझ्या पित्याला सांगितले तर तो देवदूतांच्या
बारापेक्षा अधिक पलटणी पाठवील, हे तुम्हांला कळत
नाही काय? 54परंतु हे अशाच रीतीने झाले पाहिजे असा
पवित्र शास्त्रात जो लेख आहे तो कसा काय पूर्ण होईल?”
55यानंतर येशू सर्व लोकसमुदायाला म्हणाला, “जसा मी
कोणी गुन्हेगार आहे, अशा रीतीने तुम्ही तलवारी व सोटे
हाती घेऊन मला धरायला माझ्यावर चाल करून आला
काय? मी दररोज मंदिरात शिक्षण देत असता तुम्ही मला
धरले नाही. 56परंतु या सर्व गोष्टी अशासाठी झाल्या
आहेत की, संदेष्ट्यांनी जे लिहिले होते ते पूर्ण व्हावे.”
नंतर येशूचे सर्व शिष्य त्याला सोडून पळून गेले.

## यहूदी पुढाऱ्यांपुढे येशू
*(मार्क 14:53-65; लूक 22:54-55, 63-71;*
*योहान 18:13-14, 19-24)*

57त्या लोकांनी येशूला धरले, त्यांनी त्याला प्रमुख याजक
कयफा याच्या घरी नेले. तेथे नियमशास्त्राचे शिक्षक
आणि वडीलजन एकत्र जमले होते. 58पेत्र काही अंतर
ठेवून येशूच्या मागे चालला होता. पेत्र येशूच्या मागे मुख्य
याजकाच्या आवारापर्यंत गेला आणि काय होते ते
पाहण्यासाठी नोकरांसोबत बसला.
59येशूला मरणदंड द्यावा म्हणून मुख्य याजक आणि
सर्व यहूदी सभा त्याच्याविरुद्ध काही खोटे दोषारोप करता
येईल काय याचा प्रयत्न करू लागले. खोटी साक्ष देणारे
लोक सापडतात काय याचा शोध घेऊ लागले. 60पुष्कळ
लोक पुढे आले आणि येशूविरुद्ध साक्ष देऊ लागले. परंतु
येशूला जिवे मारण्याचे काहीही कारण यहूदी सभेला
सापडेना. शेवटी दोन माणसे पुढे आली, ती म्हणू लागली,
61“हा मनुष्य असे म्हणाला की, देवाचे मंदिर मी पाडू
शकतो आणि ते तीन दिवसात पुन्हा बांधू शकतो.”
62तेव्हा प्रमुख याजक उठून येशूला म्हणाला, “हे लोक
तुझ्याविरूद्ध साक्ष देत आहेत, तुझ्याविरुद्ध जे आरोप आहेत,
त्याविषयी तुला काही सांगायचे आहे का? हे सर्व खरे
सांगत आहेत काय?”
63पण येशूने काहीच उत्तर दिले नाही. परत एकदा
प्रमुख याजक येशूला म्हणाला, “जिवंत देवाच्या नावाची

शपथ. मी तुला बजावून सांगतो की खरे काय ते तू सांग!
तू देवाचा पुत्र ख्रिस्त आहेस काय?”
64येशू त्यांना म्हणाला, “होय, मी आहे. जसे तू म्हणालास.
तरी मी तुम्हांला सांगतो: ह्यापुढे मनुष्याच्या पुत्राला तुम्ही
ढगातून येताना पाहाल व त्याला देवाच्या उजवीकडे बसलेले
पाहाल.”
65जेव्हा प्रमुख याजकाने हे ऐकले, तेव्हा तो फार
संतापला. आपले कपडे फाडून तो म्हणाला, “याने देवाविरुद्ध
दुर्भाषण केले आहे! आम्हांला आणखी साक्षीदारांची गरज
राहिली नाही. ह्याला देवाची निंदा करताना तुम्ही ऐकले!
66तुम्हांला काय वाटते?”
यहूद्यांनी उत्तर दिले, “तो अपराधी आहे आणि त्याला
मेलेच पाहिजे.”
67तेव्हा ते त्याच्यावर थुंकले, त्यांनी त्याला मारले.
दुसऱ्यांनी चपराका मारल्या. 68ते म्हणाले, “ख्रिस्ता
आमच्यासाठी भविष्य सांग! तुला कोणी मारले?”

## आपण येशूला ओळखतो हे सांगायला पेत्र घाबरतो
### (*मार्क* *14:66-72;* *लूक* *22:56-62;* *योहान* *18:15-18, 25-27*)

69यावेळी पेत्र वाड्याच्या अंगणात बसला होता. प्रमुख
याजकाच्या दासीपैंकी एक दासी पेत्राकडे आली. ती
म्हणाली, “तू सुद्धा गालीलच्या येशूबरोबर होतास.”
70पण पेत्राने सर्वांसमोर ते नाकारले. तो म्हणाला, “तू
काय म्हणतेस ते मला माहीत नाही!” 71मग तो अंगणातून
निघून फाटकापाशी गेला. फाटकाजवळ दुसऱ्या एका
दासीने त्याला पाहिले. ती तेथे असलेल्या लोकांना म्हणाली,
“नासरे थकर येशूबरोबर हा होता.”
72पुन्हा एकदा पेत्र शपथ घेऊन येशूला नाकारतांना,
म्हणाला, “मी त्याला ओळखत नाही!”
73काही क्षणानंतर तेथे असलेले लोक पेत्राकडे वळाले
आणि त्याला म्हणाले, “तू खरोखर येशूच्या शिष्यांपैकी
एक आहेस, हे आम्हांला माहीत आहे. तुझ्या बोलण्यावरून
हे आम्हांला स्पष्ट दिसून येते.”
74मग तो स्वत:ला शाप देऊ लागला. तो जोराने म्हणाला,
“मी देवाशपथ सांगतो, येशू हा मनुष्य कोण आहे हे मला
माहीत नाही!” पेत्र असे म्हणाला तोच कोंबडा आरवला.
75नंतर येशू काय म्हणाला होता हे पेत्राला आठवले,
“कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील.”
यानंतर पेत्र तेथून बाहेर निघून गेला आणि दुःखातिशयाने
रडला.

## येशूला राज्यपाल पिलाताकडे नेतात
### (*मार्क* *15:1;* *लूक* *23:1-2;* *योहान* *18:28-32*)

27 जेव्हा सकाळ झाली तेव्हा सर्व मुख्य याजक व
वडीलजन यांनी येशूविरुद्ध कट केला. आणि
कशा प्रकारे येशूला ठार मारायचे याचा विचार केला.
2त्यांनी येशूला साखळदंडानी बांधून दूर नेले व राज्यपाल
पिलाताच्या स्वाधीन केले.

## यहूदाची आत्महत्या
### (*प्रेषितांची कृत्ये* *1:18-19*)

3त्याच वेळेला, यहूदा, जो येशूचा विश्वासघात करून
त्याला पकडून देण्यास कारणीभूत होता, त्याने पाहिले
की, त्यांनी येशूला जिवे मारण्याचे ठरविले आहे, तेव्हा
त्याने जे केले होते त्याचे त्याला वाईट वाटले. म्हणून
त्याने चांदीची तीस नाणी घेऊन मुख्य याजक व वडिलांना
परत दिली.
4तो म्हणाला, “मी पाप केले आहे, मी एका निष्पाप
मनुष्याला जिवे मारण्यासाठी तुमच्या हाती दिले.”
यहूदी पुढाऱ्यांनी उत्तर दिले, “आम्हांला त्याचे काय?
तो तुझा प्रश्न आहे!”
5तेव्हा यहूदाने ती चांदीची नाणी मंदिरात फेकून दिली
आणि तो गेला. मग बाहेर जाऊन त्याने स्वत:ला गळफास
लावून घेतला.
6मुख्य याजकांनी चांदीची ती तीस नाणी घेतली आणि
ते म्हणाले, “हे पैसे मंदिराच्या खजिन्यात ठेवता येणार
नाहीत. हे आमच्या नियमाविरुद्ध आहे, कारण ते पैसे
कोणाला तरी जिवे मारण्यासाठी दिले होते.”
7म्हणून त्यांनी त्या पैशांनी कुंभाराचे शेत नावाची जागा
विकत घेण्याचे ठरविले. यरुशलेमला भेट देण्यासाठी
येणाऱ्या माणसांना मरण आले तर त्यांना पुरण्यासाठी त्या
शेताचा उपयोग करता येईल. 8त्यामुळे आजही त्या जागेला
‘रक्ताचे शेत’ असे म्हणतात. 9अशा रीतीने यिर्मया संदेष्ट्याचे
बोल खरे ठरले. ते असे:
“त्यांनी चांदीची तीस नाणी घेतली हे पैसे यहूदी लोकांनी
त्याच्या (येशूच्या) जिवाचे मोल म्हणून देण्याचे ठरविले.
10मला प्रभु परमेश्वराने आज्ञा दिल्यानुसार चांदीच्या त्या
तीस नाण्यांनी त्यांनी कुंभाराचे शेत विकत घेतले.”*

## राज्यपाल पिलात येशूला प्रश्न विचारतो
### (*मार्क* *15:2-5;* *लूक* *23:3-5;* *योहान* *18:33-38*)

11राज्यपाल पिलातापुढे येशू उभा राहिला तेव्हा पिलाताने
त्याला प्रश्न विचारले. तो म्हणाला, “तू यहूद्यांचा राजा
आहेस काय?” येशूने उत्तर दिले, “होय, मी आहे, जसे
तुम्ही म्हणता.” 12पण जेव्हा मुख्य याजकांनी व वडिलांनी
त्याच्यावर दोषारोप केले, तेव्हा तो गप्प बसला. 13म्हणून
पिलात येशूला म्हणाला, “हे लोक तुझ्यावर जो दोषारोप
ठेवीत आहेत तो तू ऐकत आहेस ना? तर मग तू का उत्तर
देत नाहीस?”14परंतु येशूने पिलाताला काहीही उत्तर दिले
नाही. आणि पिलात आश्चर्यचकित झाला.

---

**त्यांनी ... घेतले** जखऱ्या 11:12-13; यिर्मया 32:6-9

### येशूला मुक्त करण्याचा पिलाताचा अयशस्वी प्रयत्न
### *(मार्क 15:6-15; लूक 23:13-25; योहान 18:39-19:16)*

15वल्हांडण सणानिमित्त दरवर्षी लोकसमुदायासाठी
तुरुंगातून एकाला सोडण्याची प्रथा होती. 16त्या विशिष्ट
वेळेला तेथे एक कुप्रसिद्ध कैदी होता. त्याचे नाव बरब्बा*
होते. 17म्हणून जेव्हा लोक जमले, तेव्हा पिलाताने त्यांना
विचारले, "तुमच्यासाठी मी कोणाला सोडावे अशी तुमची
इच्छा आहे? कुविख्यात बरब्बाला की ज्याला ख्रिस्त
म्हणतात त्या येशूला?"

18लोकांनी इर्षेला पेटून येशूला पिलाताच्या हाती दिले
होते हे पिलाताच्या ध्यानी आले. 19न्यायासनावर बसला
असता पिलात हे बोलला. तो तेथे बसलेला असतानाच त्याच्या पत्नीने त्याला एक निरोप पाठविला. तो निरोप असा होता: "या मनुष्याविषयी सावध राहा; कारण तो दोषी नाही. त्याच्याविषयी स्वप्न पडल्यामुळे मला आज दिवसभर फार दुःख सहन करावे लागले आहे."

20पण पिलाताने बरब्बाला सोडून द्यावे व येशूला जिवे मारावे अशी मागणी लोकांनी करावी म्हणून मुख्य याजकांनी व वडील जनांनी लोकसमुदायाचे मन वळविले.

21पिलात म्हणाला, "माझ्यासमोर बरब्बा व येशू दोघेही आहेत. मी तुमच्यासाठी कोणाला सोडून द्यावे अशी तुमची इच्छा आहे?" लोकांनी उत्तर दिले, 'बरब्बा.'

22पिलाताने विचारले, "मग ज्याला ख्रिस्त म्हणतात त्या येशूचे मी काय करावे?" सर्व लोक ओरडून म्हणाले, "त्याला वधस्तंभावर खिळून मारून टाका!"

23पिलाताने विचारले, "का? मी त्याला जिवे मारावे असे तुम्ही का म्हणता? त्याने काय अपराध केला आहे?"

परंतु सर्व लोक मोठ्याने ओरडून म्हणू लागले, "त्याला वधस्तंभावर खिळा!"

24लोकांच्या पुढे आपले काही चालणार नाही हे पिलाताने पाहिले. उलट लोक अधिक अशांत होऊ लागले होते म्हणून पिलाताने थोडे पाणी घेतले आणि लोकांच्या समोर आपले हात धुतले. मग पिलात म्हणाला, "या मनुष्याच्या मरणाची जबाबदारी माझ्यावर नाही, तुम्हीच त्यासाठी जबाबदार आहात."

25सर्व लोक ओरडून म्हणू लागले, "याच्या मरणाची जबाबदारी आमच्यावर असो. त्याच्यासाठी व्हायची शिक्षा आम्ही व आमची मुले भोगायला तयार आहोत."

26मग पिलाताने बरब्बाला सोडून दिले. येशूला चाबकाचे फटके मारावे असे पिलाताने आपल्या काही सैनिकांना सांगितले. नंतर येशूला वधस्तंभावर खिळून मारावे म्हणून पिलाताने शिपायांच्या हाती दिले.

### पिलाताचे शिपाई येशूची थट्टा करतात
### *(मार्क 15:16-20; योहान 19:2-3)*

27नंतर पिलाताचे शिपाई येशूला राज्यपालाच्या वाड्यात घेऊन आले. ते सर्व घोळक्याने येशूभोवती जमले. 28त्यांनी
येशूचे कपडे काढले व त्याला लाल किरमिजी झगा
घातला. 29काटेरी झाडाच्या फांद्यांचा एक मुगुट तयार
करून तो येशूच्या डोक्यावर ठेवला. तसेच त्यांनी त्याच्या उजव्या हातात एक काठी दिली. मग शिपाई येशूपुढे गुडघे टेकून त्याची थट्टा करू लागले. ते म्हणू लागले. "यहूद्यांचा राजा चिरायू होवो!" 30नंतर शिपाई येशूवर थुंकले. त्याच्या हातातील काठी त्यांनी घेतली आणि त्या काठीने त्याच्या डोक्यावर मारत राहिले. 31येशूची थट्टा करण्याचे
संपविल्यावर त्यांनी त्याचा झगा काढून घेतला आणि त्याचे कपडे त्याला घातले. मग ते त्याला वधस्तंभावर खिळून मारण्यासाठी घेऊन गेले.

### येशूला वधस्तंभावर खिळून मारतात
### *(मार्क 15:21-32; लूक 23:26-43; योहान 19:17-27)*

32शिपाई येशूला शहराबाहेर घेऊन चालले होते. तेव्हा त्यांनी एका मनुष्याला वेठीला धरून येशूचा वधस्तंभ वाहायला लावले. तो कुरेने या गावचा असून त्याचे नाव
शिमोन होते. 33जेव्हा ते 'गुलगुथा' (म्हणजे कवटीची जागा)
नावाच्या ठिकाणी येऊन पोहोचले. 34तेव्हा त्यांनी येशूला
पित्तमिश्रित द्राक्षारस प्यायला दिला. त्याने तो चाखला. पण
पिण्यास नकार दिला. 35त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले.
नंतर त्यांनी चिठ्ठ्या टाकून येशूचे कपडे आपसात वाटून
घेतले. 36शिपाई तेथे बसून येशूवर पहारा देऊ लागले.
37येशूच्या डोक्याच्या वरच्या बाजूला त्याच्यावर ठेवण्यात
आलेला दोषारोप लिहिलेला लेख शिपायांनी लावला.
त्यावर मजकूर होता, "येशू – यहूद्यांचा राजा." 38येशूच्या
दोन्ही बाजूंना दोन लुटारू खिळण्यात आले होते. 39जवळून
जाणारे लोक येशूची निंदा करू लागले. ते डोकी हलवू लागले.

40आणि म्हणू लागले, "तू म्हणालास की, 'हे मंदिर मोडून तीन दिवसात परत उभे करीन.' आता स्वतःचा बचाव कर! जर तू खरोखरच देवाचा पुत्र असलास तर वधस्तंभावरून खाली ये!"

41तसेच मुख्य याजक, नियमशास्त्राचे शिक्षक, वडील हेही तेथे होते. तेही इतरांसारखी येशूची निंदा करू लागले.
42ते म्हणू लागले, "याने दुसऱ्यांना वाचविले, परंतु तो स्वतःचा बचाव करू शकत नाही! लोक म्हणतात की, हा इस्त्राएल (यहूदी) लोकांचा राजा आहे. जर तो राजा असेल, तर त्याने वधस्तंभावरून खाली यावे. म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू! 43याचा देवावर
विश्वास आहे, जर देवाला तो खरोखर पाहिजे असेल तर त्याने त्याला वाचवावे. तो स्वतः असे म्हणत असे, 'मी देवाचा पुत्र आहे.'"

---

**बरब्बा** काही ग्रीक प्रतीमध्ये बरब्बाचा उल्लेख 'येशू बरब्बा' असा आढळतो.

[44]तसेच त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळलेले चोर
देखील येशूविषयी वाईट गोष्टी बोलू लागले.

## येशूचे मरण

***(मार्क 15:33-41; लूक 23:44-49; योहान 19:28-30)***

[45]दुपारनंतर लगेच सुमारे तीन तास सर्व भूमीवर अंधार
पसरला. [46]सुमारे तीन वाजता येशू मोठ्याने ओरडून
म्हणाला, "एलोई, एलोई, लमा सबकत्नी?" याचा अर्थ
"माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?"
[47]जे लोक तेथे उभे होते त्यांनी हे ऐकले. ते म्हणू लागले,
"तो एलीयाला हाक मारीत आहे!"

[48]एक जण लगेच धावत गेला आणि बोळा घेऊन
आला. त्या मनुष्याने तो बोळा आंबेत बुडविला आणि तो
वेताच्या टोकावर ठेवून येशूला प्यायला दिला. [49]परंतु
दुसरे काही लोक म्हणू लागले, "थांबा. एलीया येऊन
त्याला वाचवितो काय, हे आम्हांला पाहायचे आहे."

[50]पुन्हा एकदा येशूने मोठ्याने आरोळी मारली आणि
तो मरण पावला.

[51]त्याचवेळी, येशू मेल्याबरोबर मंदिरातील पडदा
वरपासून खालपर्यंत दुभागला गेला, भूकंप झाला, खडक
फुटले. [52]कबरी उघडल्या, आणि देवाचे बरेच लोक जे
मरण पावले होते, ते उठविले गेले. [53]ते लोक कबरींतून
बाहेर पडले, येशू मरणातून पुन्हा उठल्यावर ते लोक
पवित्र नगर अर्थात यरुशलेमामध्ये गेले आणि अनेक
लोकांनी त्यांना पाहिले. [54]सेनाधिकारी व त्याच्याबरोबर
येशूवर जे शिपाई पहारा देत होते त्यांनी भूकंप व जे
काही घडले ते पाहिले. आणि ते फार भ्याले. ते म्हणाले,
"हा मनुष्य खरोखर देवाचा पुत्र होता."

[55]तेथे बऱ्याच स्त्रिया वधस्तंभापासून काही अंतरावर
उभ्या राहून हे पाहत होत्या. येशूची सेवा करण्यासाठी या
स्त्रिया गालीलाहून त्याच्यामागून आल्या होत्या. [56]मरीया
मग्दालिया, याकोब व योसेफ यांची आई मरीया आणि
जब्दीचे पुत्र याकोब व योहान यांची आई तेथे होत्या.

## येशूला पुरतात

***(मार्क 15:42-47; लूक 23:50-56; योहान 19:38-42)***

[57]संध्याकाळ झाल्यावर योसेफ नावाचा एक श्रीमंत
मनुष्य तेथे आला. तो अरिमथाईचा होता व येशूचा अनुयायी
होता. [58]योसेफ पिलाताकडे गेला. आणि त्याने त्याचे शरीर
मागितले. पिलाताने येशूचे शरीर योसेफाला देण्याचा हुकूम
शिपायांना केला. [59]नंतर योसेफाने येशूचे शरीर घेतले
आणि नवीन तागाच्या कपड्यात ते गुंडाळले. [60]मग योसेफाने
खडकात खोदलेल्या नव्या कबरेत येशूचे शरीर ठेवले.
नंतर कबरेच्या तोंडावर एक मोठी धोंड लोटून ती कबर
बंद केली. या गोष्टी केल्यानंतर योसेफ निघून गेला.
[61]मरीया मग्दालिया, आणि मरीया नावाची दुसरी स्त्री
कबरेभोवती बसल्या होत्या.

## येशूच्या कबरेवर पहारा

[62]त्या दिवसाला तयारीचा दिवस* म्हणत असत. दुसऱ्या
दिवशी मुख्य याजक व परूशी पिलाताकडे गेले. [63]ते
म्हणाले, "महाराज, तो लबाड मनुष्य (येशू) जिवंत असताना
असे म्हणाला होता की, मी मरण पावल्यानंतर तीन
दिवसांनी परत उठेन.' [64]म्हणून तीन दिवसापर्यंत कबरेवर
कडक पहारा ठेवण्याचा हुकूम द्या. (कारण) त्याचे शिष्य
येऊन त्याचे शरीर चोरून नेण्याचा प्रयत्न करतील. मग
तो मरणानंतर पुन्हा उठला असे लोकांना सांगतील. ही
शेवटची फसवणूक पहिल्यापेक्षा अधिक वाईट होईल."

[65]पिलात म्हणाला, "तुम्ही शिपाई घेऊ शकता. जा
आणि कबरेवर कडक पहारा ठेवा." [66]म्हणून ते गेले
आणि कबरेवर कडक पहारा ठेवला. कबरेवर जी धोंड
होती तिच्यावर सरकारी शिक्का मारला. आणि तेथे पहारा
करण्यासाठी शिपाई नेमले.

## येशू मरणातून उठल्याची बातमी

***(मार्क 16:1-8; लूक 24:1-12; योहान 20:1-10)***

28 शब्बाथवारानंतरचा पहिला दिवस आला. पहाटेस
मरीया मग्दालिया, मरीया नावाची दुसरी स्त्री कबर
पाहावयास तेथे गेल्या.

[2]त्यावेळी तेथे मोठा भूकंप झाला. देवाचा दूत स्वर्गातून
तेथे आला. तो देवदूत कबरेकडे गेला. त्याने कबरेच्या
तोंडावरची धोंड बाजूला केली. नंतर तो देवदूत त्या धोंडेवर
बसला.

[3]चमकणाऱ्या विजेसारखा तो देवदूत दिसत होता. त्याचे
कपडे बर्फासारखे शुभ्र होते. [4]कबरेवर पहारा करणारे
शिपाई, देवदूत पाहून खूप घाबरले. ते थरथर कापू लागले.
आणि ते मेलेल्या माणसासारखे झाले.

[5]देवदूत म्हणाला, "भिऊ नका, ज्याला वधस्तंभावर
खिळले होते त्या येशूला तुम्ही पाहत आहात. [6]पण तो येथे
नाही. तो म्हणाला होता, त्याप्रमाणे त्याला मरणातून
उठविण्यात आले आहे. या आणि जेथे त्याचे शरीर ठेवले
होते ती जागा पाहा. [7]आता ताबडतोब निघा आणि त्याच्या
शिष्यांना सांगा : येशू मरणातून उठला आहे. तो गालीलात
जाणार आहे. तो तुमच्या अगोदर तेथे जाईल. तुम्ही त्याला
तेथे पाहाल."

नंतर देवदूत म्हणाला, "मी तुम्हांला सर्व काही सांगितले
आहे." [8]म्हणून त्या स्त्रिया लगबगीने कबरेजवळून
निघाल्या. त्या फार घाबरलेल्या होत्या. परंतु फार
आनंदितही झाल्या होत्या. जे काही घडले ते सांगण्यासाठी
त्या धावत निघाल्या.

[9]अचानक येशू त्यांना भेटला आणि तो त्यांना म्हणाला,
"शांती असो." त्या त्याच्याजवळ आल्या. त्यांनी त्याचे पाय
धरले आणि त्याची उपासना केली. [10]मग येशू त्यांना

---

**तयारीचा दिवस** शुक्रवार. शब्बाथाच्या अगोदरचा दिवस.

म्हणाला, “मला अडवू नका. माझ्या भावांना सांगा की
त्यांनी गालीलात जावे. तेथेच त्यांची माझी भेट होईल.”

### यहूदी पुढाऱ्यांना अहवाल

11स्त्रिया शिष्यांना सांगण्यासाठी गेल्या. तेव्हा कबरेवरील
पहारेकरी शिपायांतील काही जण नगरात गेले आणि
त्यांनी घडलेले सर्व मुख्य याजकांना सांगितले. 12नंतर
याजक जाऊन वडीलजनांना भेटले. आणि त्यांनी एक
बेत रचला. त्यांनी शिपायांना पुष्कळ पैसे देऊन असे
म्हणण्यास सांगितले. 13ते म्हणाले, “लोकांना असे सांगा
की, आम्ही रात्री झोपेत असताना येशूचे शिष्य आले
आणि त्यांनी त्याचे शरीर चोरून नेले. 14हे
जरराज्यपालाच्या कानावर गेले तर आम्ही त्याला पटवून
देऊ आणि तुम्हांला काही होऊ देणार नाही.” 15मग
शिपायांनी पैसे घेतले व याजकांनी सांगितले तसे केले.
आणि ही गोष्ट यहूदी लोकांत आजवर प्रचलित आहे.

### येशू आपल्या शिष्यांशी बोलतो

***(मार्क 16:14-18; लूक 24:36-49; योहान 20:19-23; प्रेषितांची कृत्ये 1:6-8)***

16अकरा शिष्य गालीलास निघून गेले. येशूने
सांगितलेल्या डोंगरावर ते हजर झाले. 17त्या डोंगरावर
येशू त्यांना दिसला. त्यांनी त्याची उपासना केली. पण
तो येशू आहे यावर शिष्यांपैकी काहींचा विश्वास
बसला नाही.

18तेव्हा येशू त्याच्याकडे आला आणि म्हणाला, “स्वर्गात
आणि पृथ्वीवर मला सर्व अधिकार देण्यात आला आहे.
19म्हणून तुम्ही जा आणि राष्ट्रातील लोकांस माझे
शिष्य करा. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावाने
बाप्तिस्मा द्या.

20आणि जे काही मी तुम्हांला शिकविले आहे ते त्या
लोकांना करायला शिकवा. आणि पाहा, काळाच्या
शेवटापर्यंत मी सदोदित तुमच्याबरोबर राहीन.”

# मार्कने लिहिलेले शुभवर्तमान

### येशू ख्रिस्ताचे येणे
**(*मत्तय 3:1-12; लूक 3:1-9, 15-17; योहान 1:19-28*)**

1 देवाचा पुत्र* येशू ख्रिस्त याच्या शुभवर्तमानाची सुरूवात. 2यशाया संदेष्ट्याच्या पुस्तकात असे लिहिले आहे:

“ऐका! मी माझ्या दूताला तुझ्याकडे पाठवीत आहे तो तुझ्यासाठी मार्ग तयार करील. *मलाखी 3:1*

3तेथे रानात एक व्यक्ति ओरडून सांगत होती: ‘प्रभूसाठी मार्ग तयार करा, त्याच्यासाठी वाटा सरळ करा.’”
*यशया 40:3*

4मग बाप्तिस्मा करणारा योहान आला व रानात लोकांचे बाप्तिस्मे करू लागला. लोकांना त्याने सांगितले की, जर त्यांना त्यांची अंत:करणे बदलायची असतील तर त्यांनी पश्चात्तापाचा बाप्तिस्मा घ्यायला पाहिजे. मग त्यांच्या पापांची क्षमा केली जाईल. 5यहूदीया व यरुशलेम येथील सर्व लोक योहानाकडे आले, त्यांनी आपली पापे कबूल केल्यावर त्याने त्यांचा यार्देन नदीत बाप्तिस्मा केला.

6योहान उंटाच्या केसांपासून केलेली वस्त्रे वापरीत असे. त्याच्या कंबरेला कातड्याचा पट्टा होता आणि तो टोळ व रानमध खात असे. 7योहानाने लोकांना हा संदेश दिला: “माझ्यापेक्षाही महान असा कोणी एक येत आहे, तो माझ्यानंतर येत आहे. मी त्याच्या वहाणांचा बंद सोडण्याच्यादेखील पात्रतेचा नाही. 8मी तुमचा पाण्याने बाप्तिस्मा करतो पण तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने करील.”

### येशूचा बाप्तिस्मा
**(*मत्तय 3:13-17; लूक 3:21-22*)**

9त्यावेळी येशू गालीलातील नासरेथहून जेथे योहान होता त्या ठिकाणी आला. यार्देन नदीत योहानाने येशूचा\ बाप्तिस्मा केला. 10येशू पाण्यातून वर येत असता त्याने आकाश उघडलेले पाहिले. आणि पवित्र आत्मा त्याच्यावर कबुतरासारखा आला. 11आकाशातून वाणी झाली. ती म्हणाली, “तू माझा प्रिय पुत्र आहेस, तुझ्यावर मी प्रेम करतो. तुझ्याविषयी मी संतुष्ट आहे.”

### परीक्षा होण्यासाठी येशू दूर जातो
**(*मत्तय 4:1-11; लूक 4:1-13*)**

12नंतर आत्म्याने येशूला एकट्याला रानात पाठविले. 13येशू रानात चाळीस दिवस होता. तो तेथे हिंस्त्र प्राण्यांबरोबर होता. तो तेथे असता सैतान त्याला मोह पाडून त्याची परीक्षा बघत होता. पण दूत येऊन त्याची सेवा करीत होते.

### येशू काही शिष्य निवडतो
**(*मत्तय 4:12-22; लूक 4:14-15; 5:1-11*)**

14यानंतर, योहानाला तुरुंगात टाकण्यात आले. येशू गालीलास गेला व देवाकडून आलेली सुवार्ता त्याने सांगितली. 15येशू म्हणाला, “आता योग्य वेळ आली आहे. देवाचे राज्य जवळ आले आहे. पश्चात्ताप करा आणि सुवार्तेवर विश्वास ठेवा. 16येशू गालीलाच्या सरोवराजवळून जात होता तेव्हा त्याने शिमोन* व शिमोनाचा भाऊ अंद्रिया याला सरोवरात जाळे टाकताना पाहिले कारण ते मासे धरणारे होते. 17येशू त्यांना म्हणाला, “माझ्या मागे या म्हणजे मी तुम्हांला माणसे धरणारे करीन. 18मग ते लगेचच जाळी सोडून त्याच्यामागे चालू लागले. 19आणि तो थोडा पुढे गेल्यावर त्याला जब्दीचा मुलगा याकोब व त्याचा भाऊ योहान हे दिसले. ते त्यांच्या नावेत होते व आपली जाळी तयार करीत होते. 20त्याने लगेच त्यांना हाक मारली. मग त्यांनी आपले वडील जब्दी व नोकरचाकर यांना नावेत सोडले आणि ते त्याच्या मागे गेले.

### दुष्ट आत्मा असलेल्या मनुष्याला येशू बरे करतो
**(*लूक 4:31-37*)**

21येशू व त्याचे शिष्य कफर्णहूमास गेले. लगेच येणाऱ्या शब्बाथ दिवशी येशू सभास्थानात गेला आणि लोकांना त्याने शिकविले. 22त्याच्या शिकवणुकीने ते चकित झाले, कारण येशू नियमशास्त्राच्या शिक्षकांप्रमाणे शिकवीत नव्हता, तर त्याला अधिकार असल्यासारखा शिकवीत होता. 23त्यांच्या सभास्थानात एक भूतबाधा झालेला मनुष्य

---

**देवाचा पुत्र** काही ग्रीक प्रतींमध्ये हे शब्द गाळलेले आहेत.

**शिमोन** शिमोनाचे दुसरे नाव पेत्र.

होता, तो एकदम मोठ्याने ओरडला, 24आणि म्हणाला, "नासरेथच्या येशू, तुला आमच्याकडून काय पाहिजे? तू आमचा नाश करावयास आला आहेस काय? तू कोण आहेस हे मला माहीत आहे, देवाचा पवित्र असा तू आहेस."

25परंतु येशूने त्याला अधिकारवाणीने म्हटले, "शांत राहा व याच्यातून नीघ." 26नंतर अशुद्ध आत्म्याने त्याला पिळले व तो मोठ्याने ओरडून त्याच्यातून बाहेर गेला.

27आणि लोक आश्चर्यचकित झाले, व एकमेकांस विचारू लागले, "येथे काय चालले आहे? हा मनुष्य काही तरी नवीन शिकवीत आहे. आणि तो अधिकाराने शिकवीत आहे. तो दुष्ट आत्म्यांना आज्ञा करतो आणि ते त्याचे ऐकतात!" 28मग येशूविषयीची बातमी ताबडतोब गालीलाच्या सर्व प्रदेशात पसरली.

## येशू पुष्कळ लोकांना बरे करतो
### (*मत्तय 8:14-17; लूक 4:38-41*)

29येशू व त्याच्या शिष्यांनी सभास्थान सोडले आणि लागलीच ते योहान व याकोब यांच्याबरोबर शिमोन व अंद्रिया यांच्या घरी गेले. 30शिमोनाची सासू तापाने बिछान्यावर पडली होती. तेव्हा त्यांनी ताबडतोब येशूला तिच्याविषयी सांगितले. 31तो तिच्याकडे गेला आणि तिला हाताला धरून त्याने उठविले. आणि तिचा ताप निघून गेला व ती त्याची सेवा करू लागली. 32संध्याकाळ झाली आणि सूर्य अस्ताला गेल्यावर त्यांनी सर्व आजारी लोकांस आणि भुतांनी पछाडलेल्या लोकांस त्याच्याकडे आणले. 33तेव्हा सर्व शहर घरापाशी दारापुढे जमा झाले. 34त्याने निरनिराळ्या रोगांनी आजारी असलेल्यांना बरे केले व अनेक लोकांतून भुते काढली. पण त्याने भुतांना बोलू दिले नाही कारण ती त्याला ओळखत होती.

## येशू लोकांना सुवार्ता सांगण्याची तयारी करतो
### (*लूक 4:42-44*)

35अगदी पहाटेच अंधार असतानाच त्याने घर सोडले आणि तो एकांत स्थळी गेला. तेथे त्याने प्रार्थना केली. 36शिमोन व त्याच्यासोबत असलेले येशूचा शोध करीत होते, 37आणि जेव्हा त्यांना तो सापडला तेव्हा ते त्याला म्हणाले, "सर्वजण तुमचा शोध करीत आहेत."

38तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "आपण जवळपासच्या ठिकाणी जाऊ या, म्हणजे मला तेथे देखील उपदेश करणे शक्य होईल. कारण त्या कारणासाठीच मी बाहेर पडलो आहे." 39मग तो सर्व गालीलातून, त्यांच्या सभास्थानातून उपदेश करीत आणि भुते काढीत फिरला.

## येशू एका आजारी मनुष्याला बरे करतो
### (*मत्तय 8:1-4; लूक 5:12-16*)

40एक कुष्ठरोगी येशूकडे आला व त्याच्यापुढे गुडघे टेकून त्याने स्वत:ला बरे करण्याची विनंति केली. तो येशूला म्हणाला, "जर तुमची इच्छा असेल तर तुम्हामध्ये मला शुद्ध करण्याचे सामर्थ्य आहे.

41येशूला त्याची दया आली. मग त्याने हात लांब केला आणि त्याला स्पर्श केला व त्याला म्हणाला, "मला तुला बरे करावयाचे आहे. तुझा कुष्टरोग बरा होवो." 42आणि लगेच त्याचे कुष्ठ गेले व तो शुद्ध झाला.

43येशूने त्याला सक्त ताकीद दिली व लगेच जाण्यास सांगितले. येशू त्याला म्हणाला, 44"पाहा, याविषयी कोणाला काहीही सांगू नकोस, परंतु जा आणि स्वत:ला याजकाला दाखव. व स्वत:च्या शुद्धीकरणासाठी मोशेच्या आज्ञेप्रमाणे अर्पण कर. हे यासाठी कर की, तू शुद्ध झाला आहेस याची त्या सर्वांना साक्ष पटावी. 45परंतु तो मनुष्य गेला व त्याने मोकळेपणाने सांगण्यास सुरूवात केली व ही बातमी पसरविली. याचा परिणाम असा झाला की, येशूला उघडपणे शहरात जाता येईना. म्हणून तो एकांतवासात राहिला. आणि चोहोबाजूंनी लोक त्याच्याकडे आले.

## येशू एका पक्षघाती मनुष्याला बरे करतो
### (*मत्तय 9:1-8; लूक 5:17-26*)

2 नंतर काही दिवसांनी येशू कफर्णहूमास परत गेला. तो घरी आहे ही बातमी लोकांपर्यंत गेली. 2तेव्हा इतके लोक जमले की जागा उरली नाही. एवढेच नव्हे तर दाराबाहेरदेखील जागा नव्हती. येशू त्यांना उपदेश करीत होता. 3काही लोक त्याच्याकडे पक्षघाती मनुष्याला घेऊन आले. त्याला चौघांनी उचलून आणले होते. 4परंतु गर्दीमुळे त्यांना त्या मनुष्याला येशूजवळ नेता येईना, मग तो होता तेथील त्याच्यावरचे छपर त्यांनी काढले व ज्या खाटेवर तो मनुष्य होता. ती खाट त्यांनी छपरातून खाली सोडता येईल अशी जागा केली व त्या पक्षघाती मनुष्याला खाली सोडले. 5येशूने त्यांचा विश्वास पाहिला तेव्हा तो पक्षघाती मनुष्याला म्हणाला, "मुला, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे."

6तेथे नियमशास्त्राचे काही शिक्षक बसले होते. ते आपसात कुजबूज करीत होते की, 7"हा मनुष्य असे का बोलत आहे? हा देवाची निंदा करीत आहे. देवाशिवाय कोण पापांची क्षमा करू शकतो?"

8आणि येशूला त्याच क्षणी त्याच्या आत्म्यात समजले की, ते स्वत:शी असा विचार करीत आहेत. तो त्यांस म्हणाला, "तुम्ही या गोष्टीविषयी आपसात का कुजबूज करता? 9'तुझ्या पापांची क्षमा झाली आहे' असे या पक्षघाती मनुष्याला म्हणणे किंवा 'ऊठ, आपला बिछाना उचल आणि आपल्या घरी जा,' असे म्हणणे; यातील कोणते सोपे आहे?"

10परंतु मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे हे समजावे म्हणून तो पक्षघाती मनुष्याला म्हणाला, 11"मी तुला सांगतो; ऊठ, तुझा बिछाना उचल आणि आपल्या घरी जा." 12मग तो लगेच उठला.

त्याने आपला बिछाना घेतला व सर्वांच्या समक्ष बाहेर
गेला. यामुळे ते सर्व थक्क झाले. त्यांनी देवाची स्तुति
केली आणि म्हणाले, "यासारखे आम्ही कधी पाहिले
नव्हते."
13येशू पुन्हा सरोवराकडे गेला व पुष्कळ लोक तेथे
त्याच्यामागे गेले आणि त्याने त्यांस शिक्षण दिले. 14नंतर
तो जात असता त्याने अल्फीचा मुलगा लेवी यांस
जकातनाक्यावर बसलेले पाहिले. मग येशू लेवीला
म्हणाला, "माझ्या मागे ये." तेव्हा लेवी उठला आणि
येशूच्या मागे गेला.
15नंतर येशू लेवीच्या घरी जेवत असता पुष्कळ
जकातदार व पापी लोकही येशू व त्याच्या शिष्यांबरोबर
जेवत होते. कारण तेथे जे त्याच्यामागे आले होते त्यांच्यापैकी
पुष्कळ जण होते, 16काही नियमशास्त्राचे शिक्षक जे परूशी
होते त्यांनी येशूला पापी व जकातदारांबरोबर जेवताना
पाहिले. ते त्याच्या शिष्यांस म्हणाले, "येशू हा पापी व
जकातदार यांच्याबरोबर का जेवत आहे?"
17येशूने हे ऐकले आणि तो त्यांना म्हणाला, "जे निरोगी
आहेत त्यांस वैद्याची गरज नाही पण रोग्यांस आहे. मी
नीतिमान लोकांस नाही तर पाप्यांस बोलवावयास आलो
आहे."

## येशू इतर धार्मिक पुढाऱ्यांसारखा नाही
### (*मत्तय 9:14-17; लूक 5:33-39*)

18जेव्हा योहानाचे शिष्य व परूशी उपास करीत होते.
ते काहीजण येशूकडे आले आणि त्याला म्हणाले, "योहानाचे
शिष्य व परूशी लोक उपास करतात परंतु तुझे शिष्य
उपास का करीत नाहीत?"
19येशू म्हणाला, "खरोखर जोपर्यंत वऱ्हाड्यांबरोबर
वर आहे तोपर्यंत त्यांनी उपास करावा अशी तुमची अपेक्षा
आहे काय? जोपर्यंत त्यांच्याबरोबर वर आहे तोपर्यंत त्यांना
उपास करणे शक्य नाही. 20परंतु असे दिवस येतील की,
वर त्यांच्यापासून घेतला जाईल आणि नंतर ते त्या दिवशी
उपास करतील.
21"कोणी नव्या कापडाचा तुकडा जुन्या कापडाला जोडीत
नाही, जर तो असे करतो तर नवे कापड आकसून
जाईल व जुन्याला अधिक फाडील व ते अधिकच फाटेल.
22तसेच नवा द्राक्षारस कोणीही द्राक्षारसाच्या जुन्या कातडी
पिशवीत घालीत नाही. जर तो असे करतो तर द्राक्षारस
कातडी पिशवीला फाडील आणि द्राक्षारस व द्राक्षारसाची
कातडी पिशवी यांचा नाश होईल. म्हणून तो नवा द्राक्षारस
नव्या पिशवीत घालतो."

## काही यहूदी येशूवर टीका करतात
### (*मत्तय 12:1-8; लूक 6:1-5*)

23नंतर असे झाले की, येशू शब्बाथ दिवशी शेतातून
जात असता, जाताना त्याचे शिष्य कणसे मोडू लागले.
24तेव्हा परूशी येशूला म्हणाले, "पाहा, शब्बाथ दिवशी जे
करू नये ते हे का करतात?"
25येशू म्हणाला, "जेव्हा दावीद व त्याच्याबरोबर असलेल्यां
लोकांना भूक लागली व त्यांना खावयाला हवे होते. तेव्हा
त्यांनी काय केले याविषयी तुम्ही ऐकले नाही काय?
26अब्याथार प्रमुख याजक असताना, तो देवाच्या मंदिरात
कसा गेला आणि देवाला समर्पित केलेल्या भाकरी, ज्या
नियमशास्त्रप्रमाणे याजकाशिवाय कोणीही खाऊ नयेत त्या
कशा खाल्ल्या व जे त्याच्याबरोबर होते त्यांनाही कशा
दिल्या, याविषयी तुम्ही वाचले नाही काय?
27तो त्यास सांगत होता, "शब्बाथ मनुष्यांसाठी करण्यात
आला. मनुष्य शब्बाथासाठी करण्यात आला नाही.
28म्हणून मनुष्याचा पुत्र शब्बाथाचादेखील प्रभु आहे.

## येशू वाळलेल्या हाताच्या मनुष्याला बरे करतो
### (*मत्तय 12:9-14; लूक 6:6-11*)

3 दुसऱ्यांदा येशू सभास्थानात गेला. तेथे वाळलेल्या
हाताचा मनुष्य होता. 2येशूवर आरोप करण्यासाठी
कारण मिळावे म्हणून तो शब्बाथ दिवशी त्या मनुष्याला
बरे करतो की काय हे पाहण्यासाठी काही लोक त्याच्यावर
बारकाईने नजर ठेवून होते. 3येशू वाळलेल्या हाताच्या
मनुष्याला म्हणाला, "लोकांच्या समोर उभा राहा."
4नंतर तो त्यांना म्हणाला, "शब्बाथ दिवशी चांगले
करणे किंवा वाईट करणे, जीव वाचविणे किंवा जिवे
मारणे यांतील कोणते योग्य आहे?" परंतु ते गप्प राहिले.
5येशूने सर्वांकडे रागाने पाहिले. त्यांच्या मनाच्या
कठीणतेमुळे तो फार खिन्न झाला. तो त्या मनुष्याला
म्हणाला, "तुझा हात पुढे सरळ कर," त्याने तो लांब
केला आणि त्याचा हात बरा झाला. 6नंतर परूशी निघून
गेले आणि लगेच त्याला ठार करणे कसे शक्य होईल
याविषयी हेरोदीयांबरोबर * येशूविरुद्ध कट करू लागले.

## पुष्कळ लोक येशूच्या मागे जातात

7येशू आपल्या शिष्यांसह गालील सरोवराकडे निघून
गेला आणि गालील व यहूदीयातून मोठा लोकसमुदाय
त्याच्या मागे आला. 8कारण तो करीत असलेल्या
कृत्यांविषयी त्यांनी ऐकले व यरुशलेम, इदूमिया, यार्देनच्या
पलीकडच्या प्रदेशातून, सोर व सीदोनच्या आसपासच्या
प्रदेशातून मोठा लोकसमुदाय येशूकडे आला. 9मग गर्दीमुळे
चेंगरुन जाऊ नये म्हणून त्याने आपल्या शिष्यांस एक
छोटी होडी आणावयास सांगितली, 10त्याने अनेक लोकांना
बरे केले होते म्हणून ज्यांना रोग होते ते त्याला स्पर्श
करण्यासाठी व वाट काढण्यासाठी पुढे रेटीत होते. 11जेव्हा
अशुद्ध आत्मे येशूला पाहत तेव्हा ते त्याच्यासमोर खाली
पडून मोठ्याने ओरडत की, "तू देवाचा पुत्र आहेस!"

---

**हेरोदीयांबरोबर** राजकीय यहूदी गट.

[12]पण त्याने त्यांना सक्त ताकीद दिली की, मला प्रगट
करू नका.

## येशू त्याचे बारा शिष्य निवडतो
*(मत्तय 10:1-4; लूक 6:12-16)*

[13]नंतर येशू डोंगरावर गेला आणि जे त्याला पाहिजे
होते त्यांना त्याने स्वत:कडे बोलाविले. व ते त्याच्याकडे
आले. [14]त्याने बारा जण निवडले व त्यांना प्रेषित हे नाव
दिले. त्याने त्यांची यासाठी निवड केली की, त्यांनी
त्याच्याजवळ असावे व त्यांना दुसऱ्या ठिकाणी उपदेश
करण्यासाठी त्याला पाठविता यावे. [15]व त्यांना भुते
काढण्याचा अधिकार असावा. [16]मग येशूने या बारा जणांची
निवड केली व जो शिमोन त्याला पेत्र हे नाव दिले.
[17]जब्दीचा मुलगा याकोब व याकोबाचा भाऊ योहान यांना
त्याने बेनेरेगेश, ज्याचा अर्थ 'गर्जनेचे पुत्र' असा होतो हे
नाव दिले. [18]अंद्रिया, फिलीप, बर्थलमय, मत्तय, थोमा,
अल्फीचा मुलगा याकोब, तद्दय, शिमोन कनानी [19]आणि
यहूदा इस्कर्योत ज्याने नंतर येशूचा विश्वासघात केला.

## काही यहूदी येशूमध्ये अशुद्ध आत्मा आहे असे म्हणतात
*(मत्तय 12:22-32; लूक 11:14-23,12:10)*

[20]नंतर येशू घरी गेला आणि पुन्हा एकदा एवढा मोठा
लोकसमुदाय जमला की, येशू व त्याचे शिष्य जेवूसुद्धा
शकले नाहीत. [21]त्याच्या कुटुंबातील लोकांनी याविषयी
ऐकले तेव्हा ते त्यास आणावयास गेले कारण लोक म्हणत
होते की तो वेडा आहे. [22]यरुशलेमेहून आलेले
नियमशास्त्राचे शिक्षक म्हणत होते की, "याच्यामध्ये
बालजबूल आहे." आणि त्या भुतांच्या अधिपतीच्या
सामर्थ्याने हा भुतांना घालवून देतो."

[23]मग येशूने त्यांना जवळ बोलाविले व बोधकथेच्या
साहाय्याने त्यांच्याशी बोलू लागला, "सैतानच सैतानाला
कसा काढू शकेल? [24]जर राज्यातच फूट पडली तर ते
राज्य टिकू शकत नाही. [25]आणि घरातच फूट पडली तर
ते घर टिकू शकत नाही. [26]तर मग सैतान स्वत:लाच
विरोध करू लागला आणि त्याच्यातच फूट पडली तर तो
टिकू शकणार नाही. परंतु त्याचा शेवट होईल. [27]खरोखर
कोणालाही बलवान मनुष्याच्या घरात शिरून त्याची
मिळकत लुटता येणार नाही. प्रथम त्या बलवान माणसाला
बांधले पाहिजे, मगच त्याचे घर लुटता येईल. [28]मी तुम्हांस
खरे सांगतो की, लोकांच्या पापांची व त्यांनी केलेल्या
देवाच्या निंदेची त्यांना क्षमा होईल. [29]पण जो कोणी पवित्र
आत्म्याची निंदा करील, त्याची कधीच क्षमा होणार नाही
आणि तो मनुष्य सार्वकालिक पापाचा दोषी आहे."

[30]येशू असे म्हणाला कारण नियमशास्त्राचे शिक्षक
म्हणाले की त्याच्यामध्ये अशुद्ध आत्मा आहे.

## येशूचे अनुयायी हे त्याचे खरे कुटुंब आहे
*(मत्तय 12:46-50; लूक 8:19-21)*

[31]नंतर येशूची आई आणि भाऊ तेथे आले. ते बाहेर
उभे राहिले आणि कोणाला तरी त्याला बोलवावायास
पाठविले. [32]लोकसमुदाय त्याच्याभोवती जमा झाला होता.
लोक येशूला म्हणाले, "पाहा तुझी आई व तुझे भाऊ
बाहेर तुझी वाट पाहत आहेत."

[33]त्याने त्यांना उत्तर दिले, "कोण माझी आई आणि
कोण माझे भाऊ?" [34]येशूने जे त्याच्याभोवती जमले होते
त्यांच्याकडे पाहिले आणि म्हणाला, "हे पाहा माझी आई
आणि माझे भाऊ. [35]जे जे कोणी देवाच्या इच्छेप्रमाणे
वागतात तेच माझे भाऊ, माझी बहीण व माझी आई
आहेत."

## बी पेरणाऱ्या शेतकऱ्याविषयीची बोधकथा
*(मत्तय 13:1-9; लूक 8:4-8)*

4 दुसऱ्या वेळी येशू सरोवराच्या काठी शिक्षण देऊ
लागला. पुष्कळ लोक त्याच्याभोवती जमले. मग
तो सरोवरातील नावेत बसला आणि सर्व लोक सरोवराच्या
किनाऱ्यावरील जमिनीवर होते. [2]त्याने बोधकथेवरून
पुष्कळ गोष्टी शिकविल्या. शिक्षण देताना तो म्हणाला,
[3]"ऐका! एक शेतकरी आपले बी पेरावयास गेला. [4]तो
पेरीत असता काही वाटेवर पडले व पक्ष्यांनी येऊन ते
सर्व खाऊन टाकले. [5]दुसरे काही बी खडकाळ जमिनीवर
पडले. तेथे फार माती नव्हती. माती खोल नसल्यामुळे ते
लवकर उगवले पण [6]सूर्य उगवल्यावर ते करपले आणि
मूळ रूजले नसल्यामुळे ते वाळून गेले. [7]काही बी काटेरी
झुडुपात पडले. काटेरी झुडपे अधिक वाढली आणि त्यांनी
त्याची वाढ खुंटविली. व त्याला पीक आले नाही [8]पण
काही बी चांगल्या जमिनीवर पडले, ते उगवले, वाढले
आणि भरपूर पीक आले आणि त्याचे कोठे तीसपट,
कोठे साठपट आणि कोठे शंभरपट पीक आले." [9]मग
तो म्हणाला, "ज्याला ऐकावयास कान आहेत तो ऐको!"

## येशू बोधकथांचा उपयोग का करतो हे सांगतो
*(मत्तय 13:10-17; लूक 8:9-10)*

[10]जेव्हा तो एकटा होता तेव्हा त्याच्याभोवती बारा
शिष्यांसह जे इतर होते त्यांनी त्या बोधकथांविषयी त्याला
विचारले.

[11]तो त्यास म्हणाला, "केवळ तुम्हांस देवाच्या राज्याचे
रहस्य जाणून घेण्याचे (अधिकार) देण्यात आले आहेत,
पण बाहेरच्यांना गोष्टीरूपात सांगितले आहे. [12]यासाठी
की,

'ते पाहत असता पाहतील पण त्यांना कधीच दिसणार
नाही ते ऐकत असता ऐकतील पण त्यांना कधीच समजणार

नाही जर त्यांनी पाहिले आणि त्यांना समजले तर त्यांच्यात
कदाचित बदल होईल आणि त्यांना क्षमा करण्यात येईल.'"
*यशया 6:9-10*

### बियांविषयीच्या बोधकथेचे येशू स्पष्टीकरण करतो
***(मत्तय 13:18-23; लूक 8:11-15)***

13मग तो त्यांस म्हणाला, "तुम्हांला ही बोधकथा समजत
नाही काय? तर मग तुम्हांला दुसरी कोणतीही गोष्ट कशी
समजेल? 14पेरणारा वचन पेरतो. 15काही लोक वाटेवर
पेरलेल्या बियांसारखे जेथे वचन पेरले आहे अशासारखे
आहेत. जेव्हा ते ऐकतात तेव्हा लगेच सैतान येतो आणि
त्यांच्यात पेरलेले वचन घेऊन जातो. 16काही लोक
खडकाळ जमिनीत पेरलेल्या बियांसारखे असतात. ते
ऐकतात तेव्हा लगेच आनंदाने ग्रहण करतात. 17पण त्यांनी
ते वचन आपल्यामध्ये खोलवर रूजू (मुळावू) न दिल्यामुळे
ते थोडाच काळ टिकतात. जेव्हा वचनामुळे संकटे येतात
किंवा त्रास होतो तेव्हा ते चटकन विश्वास ठेवण्याचे
सोडून देतात. 18इतर लोक काटेरी झुडपात बी पेरल्याप्रमाणे
आहेत. ते असे आहेत की, जे वचन ऐकतात. 19परंतु या
संसाराच्या चिंता, संपत्तीचा मोह, आणि इतर गोष्टींची इच्छा
या गोष्टी आड येतात, व वचन खुंटवितात व ते फळ देत
नाहीत. 20आणि इतर दुसरे चांगल्या जमिनीत पेरलेल्या
बियांसारखे आहेत. ते असे आहेत की जे वचन ऐकतात,
स्वीकारतात, आणि फळ देतात. कोणी तीसपट, साठपट,
कोणी शंभरपट."

### तुमच्याजवळ जे आहे त्याचा उपयोग केलाच पाहिजे
***(लूक 8:16-18)***

21आणखी तो त्यांस म्हणाला, "दिवा मापाखाली किंवा
पलंगाखाली कधी ठेवतात काय? तो दिवठणीवर
ठेवण्यासाठी आणीत नाहीत काय? 22प्रत्येक गोष्ट जी
झाकलेली आहे ती उघड होईल. आणि प्रत्येक गुप्त गोष्ट
जाहीर होईल. 23ज्याला कान आहेत तो ऐको!

24नंतर तो त्यांस म्हणाला, "तुम्ही जे ऐकता त्याचा
काळजीपूर्वक विचार करा. जे माप तुम्ही इतरांसाठी वापरता
त्याच मापाने तुमच्यासाठी मोजण्यात येईल. किंबहुना थोडे
जास्तच तुम्हांला देण्यात येईल. 25कारण ज्याच्याजवळ
आहे त्याला जास्त दिले जाईल आणि ज्या कोणाजवळ
नाही त्याच्यापासून जे आहे तेही काढून घेतले जाईल."

### येशू बियांच्या बोधकथेचा उपयोग करतो

26आणखी तो म्हणाला, "देवाचे राज्य असे आहे की,
एखादा मनुष्य जमिनीवर बी पसरून टाकतो. 27रात्री झोपतो
आणि दिवसा उठतो. बी रूजते व ते वाढते हे कसे होते हे
त्याला कळत नाही. 28जमीन आपोआप पीक उपजविते.
प्रथम अंकुर, नंतर तुरा, त्यानंतर दाण्यांनी भरलेली ओंबी,
मग कणसात पूर्ण वाढलेला दाणा. 29पीक तयार होते
तेव्हा तो त्याला लगेच विळा लावतो, कारण कापणीची
वेळ आलेली असते."

### देवाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे
***(मत्तय 13:31-32, 34-35; लूक 13:18-19)***

30येशू म्हणाला, "आपण देवाचे राज्य कशासारखे आहे
असे म्हणावे किंवा कोणती गोष्ट ते समजावून सांगण्यासाठी
उपयोगात आणावी? 31ते मोहरीच्या दाण्यासारखे आहे. जो
जमिनीत पेरतेवेळी पृथ्वीवरील सर्व दाण्यात सर्वात लहान
असतो. 32परंतु तो पेरला जातो तेव्हा तो वाढतो व मळ्यातील
सर्व झाडात मोठा होतो. त्याला मोठ्या फांद्या येतात आणि
आकाशातील पाखरे त्याच्या सावलीत घरटी बांधू
शकतात."

33अशा अनेक बोधकथांनी त्याने ते समजू शकतील
असा संदेश त्यांना सांगितला. 34बोधकथेचा उपयोग
केल्याशिवाय त्याने त्यांना इतर काहीही सांगितले नाही,
परंतु जेव्हा तो शिष्यांसह एकांतात होता तेव्हा त्याने शिष्यांना
सर्व समजावून सांगितले.

### येशू वादळ शांत करतो
***(मत्तय 8:23-27; लूक 8:22-25)***

35त्या दिवशी संध्याकाळ झाल्यावर तो त्यांना म्हणाला,
"आपण सरोवरापलीकडे जाऊ या." 36मग त्यांनी
लोकसमुदायाला सोडले आणि तो नावेत होता तसेच त्याला
घेऊन गेले. त्यांच्याबरोबर इतरही दुसऱ्या नावा होत्या.
37जोराच्या वाऱ्याचे वादळ आले आणि लाटा नावेवर
आदळू लागल्या व ती पाण्याने भरू लागली. 38परंतु येशू
मागच्या बाजूस वरामावर उशी घेऊन झोपला होता. त्यांनी
त्याला उठविले आणि म्हटले, "गुरुजी, आपण बुडत आहोत
तरी आपणांस काळजी वाटत नाही काय?"

39मग तो उठला आणि त्याने वाऱ्याला धमकाविले
आणि समुद्राला म्हणाला, "शांत हो! स्तब्ध राहा." मग
वारा थांबला व तेथे मोठी शांतता पसरली.

40मग तो त्यांना म्हणाला, "तुम्ही का भिता? तुमच्याकडे
अजूनही कसा विश्वास नाही?"

41परंतु ते अतिशय घाबरले आणि एकमेकास म्हणाले,
"हा आहे तरी कोण, की वारा आणि समुद्रदेखील त्याचे
ऐकतात."

### येशू दुष्ट आत्मा लागलेल्या मनुष्याला बरे करतो
***(मत्तय 8:28-34; लूक 8:26-39)***

5 मग ते सरोवराच्या पलीकडच्या बाजूच्या
गरसेकरांच्या देशात आले आणि तो नावेतून उतरला
तेव्हा 2लगेच एक दुष्ट आत्मा लागलेला मनुष्य स्मशानातून
निघून त्याच्याकडे आला. 3हा मनुष्य कबरेमध्ये राहत

असे. आणि कोणीही त्याला साखळदंडानी सुद्धा बांधून
ठेवू शकत नव्हते. 4कारण पुष्कळदा त्याच्या पायात बेड्या
घालून साखळ्यांनी बांधलेले असतानाही त्याने साखळ्या
तोडल्या आणि बेड्यांचे तुकडे केले. कोणीही त्याला काबूत
आणू शकत नव्हते. 5तो रात्रंदिवस कबरांतून आणि
डोंगरातून मोठ्याने ओरडत असे आणि दगडांनी स्वत:स
ठेचून घेत असे. 6त्याने येशूला दुरून पाहिले तेव्हा तो
येशूकडे धावत आला आणि त्याच्यापुढे पडून त्याने त्याला
नमन केले. 7व तो मोठ्याने ओरडून म्हणाला, "येशू,
परात्पर देवाच्या पुत्रा, तुला माझ्याकडून काय पाहिजे? मी
तुला देवाची शपथ घालून विनवितो की, मला छळू नकोस."
8(कारण येशू त्याला म्हणत होता, "अरे अशुद्ध आत्म्या,
या माणसातून नीघ.")

9मग येशूने त्याला विचारले, "तुझे नाव काय?"

तो मनुष्य येशूला म्हणाला, "माझे नाव सैन्य* आहे,
कारण आम्ही पुष्कळ आहोत." 10त्यांना या हद्दीतून घालवू
नये म्हणून. तो मनुष्य येशूला पुन्हा पुन्हा विनवीत होता.

11तेथे डोंगराच्या कडेला डुकरांचा एक मोठा कळप
चरत होता. 12मग त्या दुष्ट आत्म्याने येशूला विनंति
केली आणि म्हणाला, "आम्हांला त्या डुकरांत पाठव
म्हणजे आम्ही त्यांच्यात शिरू."

13मग त्याने त्यांना तसे करण्यास परवानगी दिली. मग
दुष्ट आत्मे त्या मनुष्यातून बाहेर आले आणि त्या डुकरांत
शिरले. मग तो दोन हजारांचा कळप टेकडीवरून पळत
खाली जाऊन सरोवरात पडला व बुडून मेला.

14त्या कळपाची राखण करणारे लोक दूर पळून गेले
व त्यांनी ही बातमी गावात व शेतात सांगितली, तेव्हा
काय झाले हे पाहण्यास लोक तेथे आले. 15ते येशूकडे
आले आणि त्यांनी त्या भूतग्रस्ताला तेथे बसलेले पाहिले.
त्याने कपडे घातले होते. तो शुद्धीवर आलेला व ज्याला
सैन्य नावाच्या भुतांनी पछाडले होते तो तोच होता हे
पाहिले तेव्हा त्यांना भीति वाटली. 16काही लोक तेथे होते
व त्यांनी येशूने काय केले हे पाहिले होते, त्यांनी ज्या
मनुष्यात दुष्ट आत्मा होता त्याच्या बाबतीत काय घडले हे
इतरांना सांगितले. 17मग लोक त्याला आमचा प्रांत सोडून
जा असे विनवू लागले.

18येशू नावेतून जात असता पूर्वी भूतग्रस्त असलेल्या
मनुष्याने त्याला आपणाबरोबर येऊ द्यावे अशी विनंति
केली. 19पण येशूने त्याला येऊ दिले नाही. तो त्यास
म्हणाला, "आपल्या घरी तुझ्या लोकांकडे जा आणि प्रभूने
तुझ्यासाठी जे केले ते सर्व सांग. प्रभूने तुझ्यावर कशी
दया केली तेही सांग." 20मग तो निघाला आणि येशूने
त्याच्यासाठी जे काही केले याविषयी दकापलिस येथील
लोकांना सांगू लागला, तेव्हा सर्व लोकांना आश्चर्य वाटले.

### येशू मृत मुलीला जीवन देतो व आजारी स्त्रीला बरे करतो
**(*मत्तय 9:18-26; लूक 8:40-56*)**

21नंतर येशू नावेत बसून परत सरोवरापलीकडे गेल्यावर,
मोठा समुदाय त्याच्या भोवती जमला. तो सरोवराजवळ
होता. 22याईर नावाचा यहूद्यांच्या सभास्थानाचा एक
अधिकारी तेथे आला. याईराने येशूला पाहिले तेव्हा तो
त्याच्या पाया पडला. 23आणि आग्रहाने विनंति करून
त्याला म्हणाला, "माझी लहान मुलगी मरावरायस टेकली
आहे. मी विनंति करतो की आपण येऊन तिला बरे
वाटावे म्हणून तिच्यावर हात ठेवावा."

24मग येशू त्याच्याबरोबर गेला. लोकांचा मोठा समुदाय
येशूच्या मागे चालत होता व ते त्याच्याभोवती गर्दी करीत
होते. 25त्या लोकांमध्ये एक स्त्री होती. ती बारा वर्षांपासून
रक्तस्रावाने पीडलेली होती. 26बऱ्याच वैद्यांकडून इलाज
करून घेऊनसुद्धा तिने बराच त्रास सहन केला होता.
तिच्याकडे होते नव्हते ते सर्व तिने उपचारासाठी खर्च
केले होते. पण ती बरी न होता, तिचा आजार वाढला
होता. 27त्या स्त्रीने येशूविषयी ऐकले तेव्हा ती गर्दीत
त्याच्यामागे आली व त्याच्या झग्याला तिने स्पर्श केला.
28कारण ती म्हणत होती, 'जर मी त्याच्या कपड्यांना
शिवले तरी बरी होईन." 29जेव्हा तिने त्याच्या झग्याला
स्पर्श केला, तेव्हा तिचा रक्तस्राव थांबला. व आपल्या
त्रासातून आपण मुक्त झालो आहोत असे तिला जाणवले.
30येशूला ताबडतोब जाणीव झाली की, आपल्या शरीरातून
शक्ती गेली आहे. तो गर्दीत वळून म्हणाला, "माझ्या
कपड्यांना कोणी स्पर्श केला?"

31शिष्य येशूला म्हणाले, "लोक तुमच्याभोवती गर्दी
करीत आहेत हे तुम्ही पाहता, आणि तरीही विचारता,
मला कोणी स्पर्श केला?"

32परंतु हे कोणी केले हे पाहण्यासाठी तो सभोवार
बघतच राहिला. 33त्या स्त्रीला ती बरी झाली आहे हे
माहीत होते म्हणून ती आली आणि येशूच्या पाया पडली.
ती स्त्री भीतिने थरथर कांपत होती. तिने येशूला सर्व
काही सांगितले. 34येशू त्या स्त्रीला म्हणाला, "मुली, तुझ्या
विश्वासाने तुला बरे केले आहे, शांतिने जा आणि त्रासापासून
मुक्त राहा."

35तो हे बोलत असता सभास्थानातील अधिकाऱ्याच्या
घरून काही माणसे निरोप घेऊन आली. ती म्हणाली,
"तुमची मुलगी मेली आहे. गुरूजींना का त्रास देता?"

36येशूने त्यांचे बोलणे ऐकले आणि तो यहूद्यांच्या
सभास्थानाच्या अधिकाऱ्याला म्हणाला, "भिऊ नको,
फक्त विश्वास धर."

37येशूने फक्त पेत्र, याकोब आणि याकोबाचा भाऊ
योहान यांनाच आपल्याबरोबर येऊ दिले. 38ते त्या
अधिकाऱ्याच्या घरी आले. त्याने लोकांना मोठ्याने
आकांत करताना व रडताना पाहिले. 39तो आत गेला

---

**सैन्य** रोमन सैन्यातील सुमारे 5000 सैनिकांची तुकडी.

आणि त्यांना म्हणाला, “तुम्ही लोक रडून असा गोंधळ का करीत आहात? ही मुलगी मेलेली नाही, ती झोपली आहे.” 40ते सर्व त्याला हसले. त्याने सर्व लोकांना बाहेर घालवून दिले व मुलीचे आईवडील व जे त्याच्याबरोबर होते त्यांना घेऊन जेथे मुलगी होती तेथे आत गेला. 41त्याने मुलीचा हात धरला आणि म्हणाला, “तलीथा कूम” म्हणजे (लहान मुली मी तुला सांगतो, ऊठ.”) 42ती लहान मुलगी लगेच उठली आणि सभोवती फिरू लागली (ती बारा वर्षाची होती.) ते फार आश्चर्यचकित झाले. 43नंतर त्याने त्यांना सक्त ताकीद दिली की हे कोणाला कळता कामा नये. त्याने तिला खाण्यास देण्याविषयी सांगितले.

## येशू आपल्या गावी जातो
### (मत्तय 13:53-58; लूक 4:16-30)

6 येशू तेथून निघाला आणि आपल्या गावी गेला आणि त्याचे शिष्य त्याच्यामागे गेले. 2शब्बाथ दिवशी तो सभास्थानात शिकवीत होता, पुष्कळ लोकांनी त्याची शिकवण ऐकली तेव्हा ते थक्क झाले. ते म्हणाले, “या माणसाला ही शिकवण कोठून मिळाली? आणि त्याला कोणते ज्ञान देण्यात आले आहे की, यासारखे चमत्कार त्याच्या हातून केले जातात? तो सुतार नाही काय?

3तो मरीयेचा मुलगाच ना? तो याकोब, योसे, यहूदा आणि शिमोनाचा भाऊ नव्हे काय? व या आपल्याबरोबर आहेत त्या याच्या बहिणी नव्हेत काय?” त्याचा स्वीकार करण्याविषयी त्यांना प्रश्न पडला.

4मग येशू त्यांना म्हणाला, “संदेष्ट्यांचा सन्मान होत नाही असे नाही पण त्याच्या गावात, शहरात, त्याच्या नातेवाईकात आणि त्याच्या कुटुंबात होत नसतो.’ 5आणि तेथे त्याला चमत्कार करता आला नाही. फक्त त्याने काही रोगी लोकांच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना बरे केले. त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले.

6नंतर येशू शिक्षण देत जवळपासच्या गावोगावी फिरला. 7त्याने बारा शिष्यांना आपणांकडे बोलावून घेतले व त्यांना जोडीजोडीने पाठविले आणि त्याने त्यांना अशुद्ध आत्म्यावर अधिकार दिला. 8त्याने त्यांना आज्ञा दिल्या की, “काठीशिवाय प्रवासासाठी त्यांनी काही घेऊ नये. भाकर, पिशवी किंवा कमरकशात पैसे काही घेऊ नका. 9त्यांनी वहाणा घालाव्यात पण जास्तीचा अंगरखा नको. 10तो त्यांना म्हणाला, “ज्या कुठल्याही घरात तुम्ही जाल तेथे तुम्ही ते शहर सोडेपर्यंत राहा. 11आणि ज्या ठिकाणी तुमचे स्वागत होणार नाही किंवा तुमचे ऐकणार नाहीत ते गाव तुम्ही सोडून जा. आणि त्यांच्याविरुद्ध साक्ष म्हणून तुमच्या पायाची धूळ तेथेच झटकून टाका. 12मग शिष्य गेले आणि लोकांनी पश्चात्ताप करावा म्हणून त्यांनी उपदेश केला. 13त्यांनी पुष्कळ भुते काढली आणि अनेक रोग्यांना जैतुनाचे तेल लावून त्यांना बरे केले.

## हेरोद येशूला बाप्तिस्मा करणारा योहान समजतो
### (मत्तय 14:1-12; लूक 9:7-9)

14हेरोद राजाने येशूविषयी ऐकले कारण येशूचे नाव सगळीकडे गाजले होते. काही लोक म्हणत होते, बाप्तिस्मा करणारा योहान मेलेल्यांतून उठला आहे म्हणून त्याच्याठायी चमत्कार करण्याचे सामर्थ्य आहे.

15इतर लोक म्हणत, “येशू एलीया आहे” तर काही जण म्हणत, “हा संदेष्टा फार पूर्वीच्या संदेष्ट्यांपैकी एक आहे.”

16परंतु हेरोदाने जेव्हा ऐकले तेव्हा तो म्हणाला, “ज्या योहानाचा मी शिरच्छेद केला तो मरणातून उठविला गेला आहे.”

## बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला असे मारले गेले

17कारण हेरोदाने स्वत: योहानाला पकडून तुरुंगात टाकण्याची आज्ञा दिली होती. त्याचा भाऊ फिलिप याची पत्नी हेरोदीया हिच्याबरोबर हेरोदाने लग्न केले. त्या कारणामुळे त्याने असे केले. 18योहान हेरोदाला सांगत असे की, “तुझ्या भावाच्या पत्नीशी असे लग्न करणे तुला योग्य नाही.” 19याकरिता हेरोदीयाने योहानाविरुद्ध मनात अढी धरली. ती त्याला ठार मारण्याची संधी पाहात होती. परंतु ती त्याला मारू शकली नाही. 20कारण हेरोद योहानाला भीत असे. हेरोदाला माहीत होते की, योहान नीतिमान आणि पवित्र मनुष्य आहे, म्हणून तो त्याचे संरक्षण करी. हेरोद योहानाचे बोलणे ऐके तेव्हा फार गोंधळून जाई परंतु तो आनंदाने त्याचे ऐकत असे.

21मग एके दिवशी संधी आली. आपल्या वाढदिवशी हेरोदाने आपले महत्त्वाचे अधिकारी, सैन्यातील सरदार व गालीलातील प्रमुख लोकांना मेजवानी दिली. 22हेरोदीयाची मुलगी मेजवानीच्या ठिकाणी आली व तिने नाच केला आणि हेरोद व आलेल्या पाहुण्यांना आनंदीत केले.

तेव्हा हेरोद राजा मुलीला म्हणाला, “तुला जे पाहिजे ते माग म्हणजे मी ते तुला देईन.” 23तो गंभीरपणे शपथ वाहून म्हणाला, “माझ्या अर्ध्या राज्यापर्यंत जे काही तू मागशील ते मी तुला देईन.” 24ती बाहेर गेली आणि तिच्या आईला म्हणाली, “मी काय मागू?” आई म्हणाली, “बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शीर.”

25आणि ती मुलगी लगेच आत राजाकडे गेली आणि म्हणाली, “मला तुम्ही या क्षणी बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शीर तबकात घालून द्यावे अशी माझी इच्छा आहे.” 26राजाला फार वाईट वाटले, परंतु त्याच्या शपथेमुळे व भोजनास आलेल्या पाहुण्यांमुळे त्याला तिला नकार द्यावा असे वाटले नाही. 27तेव्हा राजाने लगेच वध करणाऱ्याला पाठविले व योहानाचे शीर घेऊन येण्याची आज्ञा केली. मग तो गेला व तुरूंगात जाऊन त्याने योहानाचे शीर कापले. 28ते शीर तबकात घालून मुलीला दिले व मुलीने ते आईला दिले. 29योहानाच्या शिष्यांनी हे ऐकले

तेव्हा ते तेथे आले. त्यांनी त्याचे शरीर उचलले आणि
कबरेत नेऊन ठेवले.

## येशू पाच हजारहूंन अधिक लोकांना जेवू घालतो
**(*मत्तय 14:13-21; लूक 9:10-17; योहान 6:1-14*)**

30प्रेषित येशूभोवती जमले. त्यांनी जे केले आणि
शिकविले ते सर्व त्याला सांगितले. 31नंतर येशू त्यांना
म्हणाला, “तुम्ही माझ्याबरोबर एकांती चला आणि थोडा
विसावा घ्या. तो असे म्हणाला कारण तेथे पुष्कळ लोक
जात येत होते व त्यांना जेवायलाही सवड मिळत नव्हती.
32तेव्हा ते सर्वजण नावेत बसून निर्जन ठिकाणी गेले.
33परंतु पुष्कळ लोकांनी त्यांना जाताना पाहिले व ते
कोण आहेत हे त्यांना कळाले तेव्हा सर्व गावांतील लोक
पायीच धावत निघाले व येशू तेथे येण्याअगोदरच ते तेथे
पोहोंचले. 34येशू नावेतून उतरला तेव्हा त्याने मोठा
लोकसमुदाय पाहिला व त्याला त्यांचा कळवळा आला.
कारण ते मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखे होते. मग तो
त्यांना बऱ्याच गोष्टी शिकवू लागला. 35या वेळेपर्यंत
बराच उशीर झाला होता आणि (दिवस मावळतीला आला
होता.) मग त्याचे शिष्य त्याच्याकडे आले व म्हणाले, “ही
निर्जन जागा आहे व बराच उशीर झाला आहे. 36लोकांना
पाठवून द्या म्हणजे ते भोवतालच्या शेतात व खेड्यात
जाऊन त्यांच्यासाठी काहीतरी खायला विकत आणतील.”
37परंतु येशूने त्यांना उत्तर दिले, “तुम्ही त्यांना काहीतरी
खावयास द्या.” ते त्याला म्हणाले, “आम्ही जाऊन त्यांना
खाण्यासाठी दोनशे दीनारांच्या* भाकरी विकत आणाव्या
काय?” 38तो त्यांना म्हणाला, “जा आणि पाहा, की
तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?” त्यांनी पाहिले तेव्हा
ते म्हणाले, “आमच्याजवळ पाच भाकरी आणि दोन मासे
आहेत.”
39येशूने शिष्यांना सांगितले, “सर्व लोकांना गटागटाने
हिरवळीवर बसायला सांगा.” 40तेव्हा सर्व लोक गटागटाने
बसले. प्रत्येक गटात पन्नास ते शंभर लोक होते. 41येशूने
पाच भाकरी आणि दोन मासे घेतले. त्याने त्याचे वाटे
केले. त्याने तेथे आकाशाकडे पाहून देवाचे आभार मानले.
भाकरी मोडल्या व त्या लोकांना वाढण्यासाठी आपल्या
शिष्यांजवळ दिल्या. दोन मासेसुद्धा वाटून दिले. 42मग ते
सर्व जेवून तृप्त झाले. 43त्यांनी भाकरीच्या व माशांच्या
तुकड्यांनी भरलेल्या बारा टोपल्या भरल्या. 44आणि जे
पुरुष जेवले, त्यांची संख्या पाच हजार होती.

## येशू पाण्यावर चालतो
**(*मत्तय 14:22-23; योहान 6:15-21*)**

45नंतर येशूने लगेच शिष्यांना नावेत बसविले आणि
पलीकडे असलेल्या बेथसैदा येथे त्याच्यापुढे जाण्यास
सांगितले. तोपर्यंत त्याने लोकांना निरोप देऊन घरी पाठवले.
46त्यांना निरोप दिल्यावर तो प्रार्थना करण्यास डोंगरावर
गेला. 47संध्याकाळ झाली तेव्हा नाव सरोवराच्या मध्यभागी
होती आणि जमिनीवर येशू एकटाच होता. 48मग त्याने
त्यांना वल्ही मारणे अवघड जात आहे असे पाहिले. कारण
वारा त्यांच्या विरुद्धचा होता. पहाटे तीन ते सहाच्या दरम्यान
येशू नावेकडे गेला. येशू पाण्यावरून चालत होता व तो
त्यांना ओलांडून पुढे जाऊ लागला, 49जेव्हा त्यांनी त्याला
सरोवरावरून पाण्यावरून चालताना पाहिले तेव्हा त्यांना
ते भूत आहे असे वाटले व ते ओरडले. 50कारण त्या
सर्वांनी त्याला पाहिले व ते घाबरून गेले. तो लगेच त्यांना
म्हणाला, “धीर धरा, भिऊ नका, मी आहे.” 51नंतर तो
त्यांच्याकडे नावेत गेला तेव्हा वारा शांत झाला. ते अतिशय
आश्चर्यचकित झाले. 52कारण त्यांना भाकरीच्या
संदर्भातील चमत्कार समजलाच नव्हता आणि त्यांची मने
कठीण झाली होती.
53त्यांनी सरोवर ओलांडल्यावर ते गनेसरेतच्या
किनाऱ्याला आले व नाव (होडी) बांधून टाकली. 54ते
नावेतून उतरले, तेव्हा लोकांनी येशूला ओळखले. 55लोक
हे सांगण्यासाठी इतर सर्व लोकांकडे पळाले आणि
आजाऱ्यांना खाटेवर घालून जेथे तो आहे असे ऐकले
तेथे घेऊन जाऊ लागले. 56खेड्यात, गावात किंवा शेतात
आणि, जेथे बाजाराच्या जागी कोठे तो गेला तेथे लोकांनी
आपल्या आजारी माणसांना आणून ठेवले. त्यांनी त्याला
फक्त त्याच्या झग्याच्या काठाला स्पर्श करू देण्याची विनंति
केली. ज्यांनी त्याला स्पर्श केला ते बरे झाले.

## देवाचा नियम आणि माणसांनी बनविलेले नियम
**(*मत्तय 15:1-20*)**

7 काही परूशी आणि नियमशास्त्राचे शिक्षक जे
यरुशलेमेहून आले होते ते येशूभोवती जमले. 2आणि
त्यांनी त्याच्या काही शिष्यांना अशुद्ध (म्हणजे हात न
धुता) हातांनी जेवताना पाहिले. 3(कारण परूशी व इतर
सर्व यहूदी वाडवडिलांच्या रुढी पाळून विशिष्ट रीतीने
नीट हात धुतल्याशिवाय जेवत नाहीत.) 4बाजारातून
आणलेली कुठलीही वस्तू धुतल्याशिवाय ते खात नाहीत.
त्यांच्या पूर्वजांच्या इतर अनेक चालीरीति ते पाळतात
आणि प्याले, घागरी, तांब्याची भांडी धुणे अशा दुसऱ्या
इतर रूढीही पाळतात.
5मग परूशी व नियमशास्त्राचे शिक्षक यांनी येशूला
विचारले, “तुझे शिष्य वाडवडिलांच्या रूढी का पाळत
नाहीत? हात न धुता का जेवतात?” 6येशू त्यांना म्हणाला,
“यशयाने जेव्हा तुम्हा ढोंगी लोकांविषयी भविष्य केले
तेव्हा त्याचे बरोबरच होते. यशया लिहितो,

‘हे लोक ओठांनी माझा सन्मान करतात परंतु त्यांची
अंत:करणे माझ्यापासून दूर आहेत,

---

**दीनार** मजुराच्या एका दिवसाची मजुरी.

7ते व्यर्थ माझी उपासना करतात कारण ते लोकांना
शास्त्र म्हणून जे शिकवितात ते मनुष्यांनी केलेले नियम
असतात.' *यशया 29:13*

8तुम्ही देवाच्या आज्ञा पाळत नाही, तर आता तुम्ही मनुष्यांची
शिकवण पाळता आहात."
9आणखी तो त्यांना म्हणाला, "आपल्या स्वत:च्या रूढी
प्रस्थापित करण्यासाठी देवाच्या आज्ञा दूर करण्यात तुम्ही
पटाईत आहात. 10मोशे म्हणाला, "तू आपल्या
आईवडिलांचा सन्मान कर."* जो मनुष्य आपल्या
वडिलांबद्दल किंवा आईबद्दल वाईट बोलतो, त्याला ठार
मारलेच पाहिजे.* 11परंतु तुम्ही शिकविता, एखादा मनुष्य
आपल्या आईला व वडिलांना असे म्हणू शकतो की,
'तुम्हांला मदत करण्यासाठी माझ्याकडे थोडेफार आहे.
परंतु तुम्हांला मदत करण्यासाठी मी ते वापरणार नाही.
मी ते देवाला देईन,'

12तुम्ही त्याला त्याच्या वडिलांसाठी किंवा आईसाठी
काही करू देत नाही. 13तुम्ही अशा रूढी पाळण्याचे
शिकवून रूढींनी देवाचे वचन रद्द करता आणि तुम्ही
अशा प्रकारच्या अनेक गोष्टी करता.
14येशूने लोकांना आपल्याकडे पुन्हा बोलावून म्हटले,
"प्रत्येकाने माझे ऐका व हे समजून घ्या. 15बाहेरून
मनुष्याच्या आत जाऊन त्याला अपवित्र करील असे काही
नाही. ज्या कुणाला ऐकायला कान आहेत तो ऐको."
16*

17लोकसमुदायाला सोडून येशू घरात गेला तेव्हा शिष्यांनी
त्याला या दाखल्याविषयी विचारले, 18तो त्यांना म्हणाला,
"तुम्हांलादेखील हे समजत नाही काय?" जे बाहेरून
मनुष्याच्या आत जाते ते त्याला अपवित्र करीत नाही हे
तुम्हांला समजत नाही का? 19कारण ते त्याच्या
अंत:करणात जात नाही तर त्याच्या पोटात जाते. नंतर ते
शरीराबाहेर जाते. असे सांगून सर्व अन्न त्याने शुद्ध घोषित
केले.
20आणखी तो म्हणाला, "जे माणसाच्या आतून बाहेर
पडते ते माणसाला अपवित्र करते. कारण आतून म्हणजे
अंत:करणातून वाईट विचार बाहेर पडतात. 21जारकर्म,
चोरी, खून, 22व्यभिचार, लोभ, वाईटपणा, कपट,
असभ्यता, मत्सर, शिव्यागाळी, अहंकार आणि मूर्खपणा,
23या सर्व वाईट गोष्टी आतून बाहेर पडतात आणि माणसाला
अपवित्र करतात."

## यहूदी नसलेल्या स्त्रीला येशू मदत करतो
### (*मत्तय 15:21-28*)

24येशू त्या ठिकाणाहून निघाला आणि सोर प्रांताच्या
आसपासच्या प्रदेशात गेला. तो एका घरात गेला व हे
कोणाला कळू नये अशी त्याची इच्छा होती. परंतु तो
त्याची उपस्थिती लपवू शकला नाही. एका स्त्रीने ऐकले
की येशू तेथे आहे. तिच्या मुलीला अशुद्ध आत्मा लागलेला
होता. 25ती स्त्री आली व येशूच्या पाया पडली. 26ती स्त्री
ग्रीक होती व सिरीयातील फिनीशिया येथे जन्मली होती.
तिने येशूला आपल्या मुलीतून भूत काढण्याची विनंति
केली. 27येशू तिला म्हणाला, "प्रथम मुलांना तृप्त होऊ दे
कारण मुलांची भाकरी घेऊन कुत्र्याला टाकणे योग्य
नव्हे.
28परंतु ती त्याला म्हणाली, "प्रभू, कुत्रीसुद्धा मुलांच्या
हातून मेजाखाली पडलेला चुरा खातात."
29येशू त्या स्त्रीला म्हणाला, "तुझ्या या उत्तरामुळे तू
शांतीने घरी जा. तुझ्या मुलीतून भूत निघून गेले आहे."
30मग ती घरी आली आणि तिची मुलगी अंथरुणावर
पडली आहे व तिच्यातून भूत निघून गेले आहे, असे तिने
पाहिले.

## येशू एका बहिऱ्या मनुष्याला बरे करतो

31येशू सोरभोवतालच्या प्रदेशातून परतला आणि
सिदोनाहून दकापलीसच्या वाटेने गालील समुद्राकडे आला.
32तेथे काही लोकांनी एका बहिऱ्या तोतऱ्या मनुष्याला
येशूकडे आणले व आपण त्याच्यावर हात ठेवा अशी
विनंति केली. 33येशूने त्याला लोकांपासून एका बाजूस
घेऊन त्याच्या कानात आपली बोटे घातली. नंतर तो
थुंकला आणि त्या माणसाच्या जिभेला स्पर्श केला. 34त्याने
स्वर्गाकडे पाहून मोठा उसासा टाकला व म्हणाला,
"एप्फाथा" म्हणजे मोकळा हो. 35आणि त्याच क्षणी त्याचे
कान मोकळे झाले. त्याला बोलता येऊ लागले. त्याने
कोणाला सांगू नका अशी आज्ञा केली.
36येशू नेहमी अशा गोष्टी न सांगण्याविषयी लोकांना
सूचना देऊ लागला, (पण लोक त्याविषयी अधिकाअधिक
सांगत गेले.) 37ते लोक फारच आश्चर्यचकित झाले व
म्हणाले, "त्याने सर्व काही चांगले केले आहे. तो बहिऱ्यांना
ऐकण्यास आणि मुक्यांना बोलावयास लावतो."

## येशू चार हजारांपेक्षा अधिक लोकांना जेवू घालतो
### (*मत्तय 15:32-39*)

8 त्या दिवसात आणखी एका वेळी लोकांचा मोठा
समुदाय जमला. त्यांच्याजवळ खावयास काही नव्हते.
येशूने आपल्या शिष्यांस बोलाविले आणि त्यांना म्हणाला,
2"मला या लोकांचा कळवळा येतो कारण तीन दिवसांपासून
ते माझ्याबरोबर आहेत आणि त्यांच्याजवळ खावयास काही
नाही. 3मी जर त्यांना उपाशी घरी पाठविले तर ते रस्त्यातच

---

**तू आपल्या … कर** निर्गम. 20:12; अनुवाद 5:16.

**जो मनुष्य … पाहिजे** निर्गम. 21:17

**वचन 16** काही ग्रीक प्रतींत 16 वे वचन आहे. "ज्याला कान
आहेत तो ऐको!"

शुद्ध हरपून पडतील. त्यांच्यातील काही फार दुरून आले आहेत."

4त्याच्या शिष्यांनी उत्तर दिले, "या निर्जन जागी एवढ्या लोकांना पुरतील इतक्या भाकरी कोण मिळवू शकेल काय?"

5येशूने त्यांना विचारले, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? शिष्य म्हणाले, "आमच्याकडे सात भाकरी आहेत."

6नंतर त्याने लोकांना जमिनीवर बसण्याची आज्ञा केली. त्याने सात भाकरी घेतल्या, आभार मानले व त्या मोडल्या व आपल्या शिष्यांजवळ त्या वाढण्यास दिल्या. नंतर त्यांनी त्या लोकांना वाढल्या. 7त्यांच्याजवळ थोडे लहान मासे होते मग त्याने त्यावर आभार मानले व त्यांना तेही वाढावयास दिले. 8लोक जेऊन तृप्त झाले. उरलेल्या तुकड्यांच्या सात टोपल्या त्यांनी भरल्या. 9तेथे सुमारे चार हजार पुरुष होते. नंतर त्याने त्यांना घरी पाठवले. 10आणि लगेच तो आपल्या शिष्यांसह नावेत बसला व दल्मनुथा प्रांतात आला.

## परूशी येशूची परीक्षा पाहण्याचा प्रयत्न करतात
### *(मत्तय 16:1-4)*

11मग परूशी आले व त्याला प्रश्न विचारू लागले. त्याची परीक्षा पाहावी म्हणून त्यांनी त्याला स्वर्गातून चिन्ह मागितले. 12आपल्या आत्म्यात दीर्घ उसासा टाकून तो म्हणाला, "ही पिढी चिन्ह का मागते? मी तुम्हांस सांगतो की, या पिढीला चिन्ह दिले जाणार नाही." 13नंतर त्याने त्यांना सोडले व तो नावेत जाऊन बसला व सरोवराच्या पलीकडच्या बाजूस गेला.

## येशू यहूदी पुढाऱ्यांविरुद्ध इशारा देतो
### *(मत्तय 16:5-12)*

14शिष्य भाकरी आणण्याचे विसरले होते. एका भाकरीशिवाय त्यांच्याकडे काही नव्हते. 15येशूने त्यांना निक्षून सांगितले, "सांभाळा, परूश्यांचे खमीर व हेरोदाचे खमीर यापासून सावध राहा."

16मग ते आपसात चर्चा करू लागले की, "आपल्याजवळ भाकरी नाहीत म्हणून तसे बोलला की काय?"

17ते काय बोलतात हे ओळखून येशू त्यास म्हणाला, "आपणाजवळ भाकरी नाहीत याविषयी चर्चा का करता? अजून तुमच्या लक्षात आले नाही काय व तुम्हांला समजत नाही काय? तुमचे अंत:करण कठीण झाले आहे काय? 18तुमचे डोळे आंधळे आहेत काय? तुमचे कान बहिरे आहेत काय? आपल्याकडे पुरेशा भाकरी नसताना मी काय केले हे तुम्हांला आठवत नाही काय? 19पाच हजारांसाठी मी पाच भाकरी मोडल्या तेव्हा जे खाल्ले गेले नाही अशा भाकरींच्या किती टोपल्या तुम्ही गोळा केल्या ते आठवा. शिष्यांनी उत्तर दिले, "बारा टोपल्या."

20चार हजारांसाठी मी सात भाकरी मोडल्या, तेव्हा तुम्ही तुकड्यांच्या किती टोपल्या गोळा केल्या? शिष्यांनी उत्तर दिले, "सात टोपल्या." 21मग येशू त्यांना म्हणाला, "अजूनही तुम्हांला समजत नाही काय?"

## येशू बेथसैदा येथील आंधळ्याला बरे करतो

22ते बेथसैदा येथे आले आणि काही जणांनी त्याच्याकडे एका आंधळ्याला आणले व येशूने त्याला स्पर्श करावा अशी विनंति केली. 23मग त्याने आंधळ्याचा हात धरून त्याला गावाबाहेर नेले. मग येशू त्या आंधळ्याच्या डोळ्यात थुंकला व त्याच्यावर हात ठेवून त्याने विचारले, "तुला काही दिसते काय?"

24त्याने वर पाहिले आणि म्हणाला, "मला माणसे दिसतात व सभोवताली झाडे चालत असल्यासारखी दिसतात."

25नंतर येशूने पुन्हा आपले हात त्या माणसाच्या डोळ्यावर ठेवले. त्याने डोळे उघडले तेव्हा त्याला दृष्टी आली, त्याला सर्व काही स्पष्ट दिसु लागले 26येशूने त्याला, "त्या गावात पाऊलदेखील टाकू नको" असे सांगून घरी पाठवून दिले.

## पेत्र म्हणतो की येशू हा ख्रिस्त आहे
### *(मत्तय 16:13-20; लूक 9:18-21)*

27मग येशू व त्याचे शिष्य फिलीप्पै कैसरीयाच्या आसपासच्या खेड्यात गेले. वाटेत त्याने त्याच्या शिष्यांस विचारले, "लोक मला कोण म्हणून ओळखतात?"

28त्यांनी त्याला उत्तर दिले, "काही जण म्हणतात, तुम्ही बाप्तिस्मा करणारा योहान आहात तर इतर काही एलीया समजतात, तर दुसरे काही तुम्ही संदेष्ट्यांपैकी एक आहा असे म्हणतात."

29मग येशूने त्यांना विचारले, "तुम्हांला मी कोण आहे असे वाटते?"

पेत्राने उत्तर दिले, "तू ख्रिस्त आहेस."

30येशू शिष्यांना म्हणाला, "मी कोण आहे हे कोणालाही सांगू नका."

31तो त्यांना शिकवू लागला, "मनुष्याच्या पुत्राने पुष्कळ दु:ख भोगावे. वडील, मुख्य याजक, नियमशास्त्राचे शिक्षक यांजकडून नाकारले जावे, त्याला जिवे मारले जावे व तिसऱ्या दिवशी त्याने पुन्हा उठावे हे होणे अगत्याचे आहे. 32त्याने हे स्पष्टपणे सांगितले तेव्हा पेत्राने येशूला बाजूला घेतले व तो त्याला दटावू लागला. 33परंतु येशूने वळून आपल्या शिष्यांकडे पाहिले व पेत्राला धमकावून म्हटले, "अरे सैताना माझ्यापुढून निघून जा. देवाच्या गोष्टीविषयी तुला काही वाटत नाही. तुझे लक्ष देवाच्या गोष्टीकडे लागलेले नाही, तर फक्त मानवाच्या दृष्टिकोणातून महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टीकडे आहे."

34नंतर त्याने आपल्या शिष्यांसह लोकांना बोलाविले व त्यांना म्हणाला, "जर कोणाला माझ्या मागे यायचे आहे

तर त्याने आत्मत्याग करावा. आपला वधस्तंभ घ्यावा व
मला अनुसरावे. 35जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो
तो जिवाला मुकेल व जो कोणी माझ्यासाठी व सुवार्तेसाठी
जिवाला मुकेल तो आपला जीव वाचवील. 36मनुष्याने
सर्व जग मिळविले व जिवाचा नाश करून घेतला तर
त्याला काय लाभ? 37जिवाच्या मोबदल्यात मनुष्य काय
देऊ शकेल? 38या व्यभिचारी आणि पापी पिढीत जो
कोणी माझी व माझ्या वचनांची लाज धरतो तर मनुष्याचा
पुत्रही जेव्हा तो आपल्या पित्याच्या गौरवात पवित्र दूतांसह
येईल तेव्हा त्यांची लाज धरील."

9 येशू त्या लोकांना म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो
की, येथे उभे असलेले काही असे आहेत की.
ज्यांना देवाचे राज्य सामर्थ्यानिशी आलेले दिसेपर्यंत मरणाचा
अनुभव येणार नाही."

### मोशे व एलीयाबरोबर येशू

***(मत्तय 17:1-13; लूक 9:28-36)***

2सहा दिवसांनंतर येशूने पेत्र, याकोब आणि योहान
यांना आपल्याबरोबर एका उंच डोंगरावर नेले आणि तेथे
त्यांच्यासमोर त्याचे रूपांतर झाले. 3त्याची वस्त्रे चमकदार,
अत्यंत पांढरी शुभ्र, इतकी की तशी पृथ्वीवरील कोणत्याही
परिटालाशुभ्र करता येणार नाहीत, अशी होती. 4एलीया
व मोशे त्याच्याबरोबर प्रगट झाले, ते येशूबरोबर संभाषण
करीत होते. 5पेत्र येशूला म्हणाला, "गुरुजी, आपण येथे
आहोत हे चांगले आहे. आपण तीन मंडप बनवू. एक
आपणांसाठी, एक मोशेसाठी व एक एलीयासाठी." 6पेत्र
असे बोलला कारण काय बोलावे ते त्याला समजेना
कारण ते भयभीत झाले होते.

7मग एक मेघ आला आणि त्याने त्यांच्यावर छाया
केली. मेघातून एक वाणी झाली, "हा माझा प्रिय पुत्र आहे
याचे तुम्ही ऐका."

8आणि एकाएकी त्यांनी एकदम सभोवती पाहिले तेव्हा
त्यांना येशूशिवाय कोणीही दिसले नाही.

9ते डोंगरावरून खाली येत असता येशूने त्यांना आज्ञा
केली की, तुम्ही जे पाहिले आहे ते मनुष्याचा पुत्र मेलेल्यातून
उठेपर्यंत कोणालाही सांगू नका."

10म्हणून त्यांनी ही गोष्ट त्यांच्यातच ठेवली. परंतु ते
मेलेल्यांतून उठणे' याचा अर्थ काय याविषयी आपसात
चर्चा करीत होते. 11त्यांनी येशूला विचारले, "प्रथम एलीया
आला पाहिजे असे नियमशास्त्राचे शिक्षक का म्हणतात?"

12तो त्यांना म्हणाला, "होय, एलीया सर्व गोष्टी
व्यवस्थितपणे करण्यासाठी आला पाहिजे. परंतु मनुष्याच्या
पुत्राविषयी त्याने पुष्कळ दुःखे सोसावीत व नाकारले जावे
असे पवित्र शास्त्रात का लिहिले आहे? 13मी तुम्हांला
सांगतो, एलीया आधीच आला आहे आणि जसे त्याच्याविषयी
लिहिले आहे तसे, त्यांनी त्यांना पाहिजे तसे त्याचे केले."

### येशू एका आजारी मुलाला बरे करतो

***(मत्तय 17:14-20; लूक 9:37-43)***

14नंतर ते उरलेल्या शिष्यांजवळ आले, तेव्हा त्यांना
त्यांच्याभोवती मोठा लोकसमुदाय दिसला आणि
नियमशास्त्राचे शिक्षक त्यांच्याशी वाद घालीत होते. 15सर्व
लोक येशूला पाहताच आश्चर्यचकित झाले आणि ते त्याला
वंदन करण्यासाठी धावले. 16येशूने त्यांना विचारले, "तुम्ही
त्यांच्याशी कसला वाद घालीत आहात?"

17लोकांतील एकाने त्याला उत्तर दिले, "गुरुजी, मी
माझ्या मुलाला आपणकडे आणले. त्याला अशुद्ध आत्मा
लागला असून तो बोलू शकत नाही. 18आणि जेव्हा तो
त्याला धरतो तेव्हा त्याला खाली आपटतो व तोंडाला फेस
आणतो, दात चावतो व नंतर ताठ होतो. मी आपल्या
शिष्यांना त्याला काढावयास सांगितले परंतु ते काढू शकले
नाहीत."

19येशू त्यांना म्हणाला, "तुम्ही लोक विश्वास ठेवीत
नाही. मी तुमचे कोठवर सहन करू? मुलाला इकडे
आणा."

20नंतर त्यांनी मुलाला येशूकडे आणले आणि जेव्हा
त्या आत्म्याने येशूकडे पाहिले तेव्हा लगेच त्या मुलाला
पिळवटून टाकले. तो जमिनीवर पडला आणि तोंडाला
फेस आला आणि तो लोळू लागला.

21नंतर येशूने त्याच्या वडिलांना विचारले, "किती काळ
हा असा आहे?"

वडिलांनी उत्तर दिले, "बाळपणापासून हा असा आहे.
22पुष्कळदा ठार करण्यासाठी तो त्याला अग्नीत किंवा
पाण्यात टाकीत असे. परंतु आपण काही करत
असाल तर आम्हांवर दया करा, आणि आम्हांला मदत
करा."

23येशू त्याला म्हणाला, "तू म्हणालास तुम्हांला काही
तरी करणे शक्य असेल तर, परंतु जो विश्वास ठेवतो त्या
मनुष्याला सर्व काही शक्य असते."

24तेव्हा लागलेच मुलाचे वडील मोठ्याने ओरडून
म्हणाले, "मी विश्वास धरतो, माझा अविश्वास घालवण्यास
मदत करा."

25येशूने लोकसमुदाय त्याच्याकडे धावत येत आहे असे
पाहिले तेव्हा येशू त्या अशुद्ध आत्म्याला धमकावून
म्हणाला, "अरे याला मुके बहिरे करणाऱ्या आत्म्या मी
तुला आज्ञा करतो की, याच्यातून बाहेर नीघ आणि पुन्हा
कधीही याच्यात शिरू नको."

26नंतर तो अशुद्ध आत्मा किंचाळला व मुलाला अगदी
पिळवटून बाहेर निघाला. मुलगा मृतासारखा झाला आणि
लोकांना वाटले, तो मेला. 27परंतु येशूने त्याला हातास
धरून त्याच्या पायावर उभे केले. आणि मुलगा उभा
राहिला. 28नंतर येशू घरात गेल्यावर त्याच्या शिष्यांनी
त्याला एकांतात विचारले, "आम्ही तो अशुद्ध आत्मा का
काढू शकलो नाही?"

29येशू त्यांना म्हणाला, "ही असली भुते प्रार्थनेशिवाय व उपासावाचून दुसऱ्या कशाने निघणे शक्य नाही."

### येशू स्वतःच्या मरणाविषयी सांगतो
***(मत्तय 17:22-23; लूक 9:43-45)***

30ते तेथून निघाले आणि गालीलातून प्रवास करीत गेले. ते कोठे आहेत हे कोणालाही कळू नये अशी येशूची इच्छा होती. 31कारण तो आपल्या शिष्यांस शिकवीत होता. तो त्यांना म्हणाला, "मनुष्याचा पुत्र विश्वासघाताने धरून माणसांच्या हाती दिला जाणार आहे. ते त्याला ठार मारतील. परंतु मारला गेल्यानंतर तो तिसऱ्या दिवशी उठेल."

32पण या बोलण्याचा अर्थ त्यांना समजला नाही. आणि त्याविषयी त्याला विचारण्यास ते भीत होते.

### सर्वांत मोठा कोण हे येशू सांगतो
***(मत्तय 18:1-5; लूक 9:46-48)***

33येशू व त्याचे शिष्य कफर्णहूमास आले. येशू घरात असता त्याने त्यांना विचारले, "वाटेत तुम्ही कशाविषयी चर्चा करीत होता?" 34परंतु ते गप्प राहिले कारण वाटेत त्यांनी सर्वांत मोठा कोण याविषयी चर्चा केली होती.

35मग येशू खाली बसला, त्याने बारा जणांना बोलावून त्यांना म्हटले, "जर कोणाला पहिले व्हावयाचे असेल तर त्याने शेवटले झाले पाहिजे आणि सर्वांचा सेवक झाले पाहिजे."

36येशू एका बालकाला घेऊन त्यांच्यापुढे उभा राहिला. येशूने त्या बालकाच्या हातास धरले व बालकास उचलून घेऊन त्यांना म्हणाला, 37"जो कोणी ह्यासारख्या लहान बालकाला माझ्या नावाने स्वीकारतो तो मला स्वीकारतो आणि जो कोणी मला स्वीकारतो तो केवळ माझाच स्वीकार करतो असे नाही तर ज्याने मला पाठविले त्याचाही स्वीकार करतो.

### कोणीही मनुष्य जो आपणाविरुद्ध नाही तो आपल्या बाजूचा आहे
***(लूक 9:49-50)***

38योहान येशूला म्हणाला, "गुरुजी, आम्ही एकाला आपल्या नावाने भुते काढताना पाहिले आणि आम्ही त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला कारण तो आपल्यापैकी नव्हता."

39परंतु येशू म्हणाला, "त्याला मना करू नका, कारण जो कोणी माझ्या नावाने चमत्कार करतो तो नंतर माझ्याविषयी वाईट बोलू शकणार नाही. 40जो आपल्याविरुद्ध नाही तो आपल्याला अनुकूल आहे. 41मी तुम्हांला खरे सांगतो, ख्रिस्ताचे म्हणून तुम्हांला जो कोणी एक प्याला पाणी देईल तो नक्कीच आपल्या प्रतिफळाला मुकणार नाही. 42माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या या लहानातील एकाला देवापासून परावृत्त करील, त्याच्या गळ्यात जात्याची तळी बांधून त्याला समुद्रात फेकून देणे हे त्याच्यासाठी बरे आहे. 43जर तुझा उजवा हात तुला पाप करायला प्रवृत्त करतो तर तो तोडून टाक. दोन हात असून नरकात न विझणाऱ्या अग्नीत जाण्यापेक्षा व्यंग असून जीवनात जाणे बरे. 44* 45आणि जर तुझा पाय तुला पाप करावयास लावतो तर तो काढून टाक. दोन पाय असून नरकात फेकले जावे यापेक्षा लंगडे होऊन जीवनात गेलेले बरे. 46* 47-48जर तुझा उजवा डोळा तुला पाप करावयास लावितो तर तो काढून टाक. दोन डोळे असून जेथे त्यांना खाणारे किडे मरत नाहीत आणि अग्नि विझत नाही अशा नरकात फेकले जावे यापेक्षा एक डोळा असून देवाच्या राज्यात जाणे हे बरे. 49कारण प्रत्येकाची अग्नीने परीक्षा घेतली जाईल.

50"मीठ चांगले आहे. जर मिठाने त्याचा खारटपणा घालविला तर ते पुन्हा कसे खारट कराल. तुम्ही आपणामध्ये मीठ असू द्या आणि एकमेकांबरोबर शांतीने राहा."

### येशू घटस्फोटाविषयी शिकवितो
***(मत्तय 19:1-12)***

10 नंतर येशूने ती जागा सोडली आणि यहूदीया प्रांतात व यार्देन ओलांडून पलीकडे गेला. लोक पुन्हा गटागटाने त्याच्याकडे आले. आणि जसा त्याचा परिपाठ होता तसे त्याने त्यांना शिकविले.

2काही परूशी येशूकडे आले. त्यांनी त्याला विचारले, "आपल्या पत्नीला घटस्फोट द्यावा हे मनुष्यासाठी कायदेशीर आहे काय?" हे तर त्यांनी त्याची परीक्षा पाहण्यासाठी विचारले. 3येशूने त्यांना उत्तर दिले, "मोशेने तुम्हांला काय आज्ञा दिली आहे?" 4ते म्हणाले, "मोशेने पुरुषाला सूटपत्र लिहिण्याची व असे करून आपल्या बायकोला सोडण्याची परवानगी दिली आहे."

5येशू म्हणाला, "कारण केवळ तुमच्या हट्टामुळे मोशेने तुमच्यासाठी ही पर्यायी अनुमति दिली (लिहिली) आहे. 6परंतु उत्पत्तीच्या आरंभापासून देवाने त्यांना पुरुष व स्त्री असे निर्माण केले.* 7या कारणामुळे पुरुष आपल्या आईवडिलांना सोडील व आपल्या पत्नीशी जडून राहील. 8आणि ती दोघे एकदेह होतील.* म्हणून यापुढे ती दोन नाहीत तर एकदेह आहेत. 9यासाठी देवाने जे जोडले आहे ते मनुष्याने वेगळे करू नये." 10नंतर, येशू व शिष्य घरात असता शिष्यांनी या गोष्टीविषयी त्याला विचारले,

---

**वचन 44** काही ग्रीक प्रतीमध्ये वचन 44 जोडतात जे वचन 48 सारखेच आहे.

**वचन 46** काही ग्रीक प्रतीमध्ये वचन 46 जोडतात जे वचन 48 सारखेच आहे.

**उत्पत्तीच्या ... केले** उत्पत्ति 1:27

**या कारणामूळे ... होतील** उत्पत्ति 2:24

[11]येशू त्यांना म्हणाला, "जो कोणी आपली पत्नी टाकतो
व दुसरीबरोबर लग्न करतो तो आपल्या पत्नीविरुद्ध
व्यभिचार करतो. [12]आणि जर पत्नी आपल्या नवऱ्याला
सोडते आणि दुसऱ्याबरोबर लग्न करते तर तीही व्यभिचार
करते."

## येशू मुलांचा स्वीकार करतो
### *(मत्तय 19:13-15; लूक 18:15-17)*

[13]त्याने त्यांना स्पर्श करावा, यासाठी लोक लहान
बालकांना त्याच्याकडे आणीत होते. परंतु शिष्यांनी त्यांना
दटावले [14]येशूने हे पाहिले तेव्हा तो रागावला आणि
त्यांना म्हणाला, "लहान बालकांना माझ्याकडे येऊ द्या.
त्यांना मना करू नका कारण देवाचे राज्य
यांच्यासारख्यांचेच आहे. [15]मी तुम्हांस खरे सांगतो, जो
कोणी बालकासारखा देवाच्या राज्याचा स्वीकार करणार
नाही त्याचा तेथे कधीही प्रवेश होणार नाही." [16]तेव्हा
त्याने बालकांना उचलून जवळ घेतले. आपले हात
त्यांच्यावर ठेवले आणि आशीर्वाद दिला.

## श्रीमंत मनुष्य अनुसरण्याचे नाकारतो
### *(मत्तय 19:16-30; लूक 18:18-30)*

[17]येशू प्रवासाला निघाला असता एक मनुष्य त्याच्याकडे
धावत आला आणि त्याच्यापुडे गुडघे टेकून म्हणाला,
"उत्तम गुरूजी, अनंतकाळचे जीवन मिळण्यासाठी मी काय
करावे?"

[18]येशू त्याला म्हणाला, "तू मला उत्तम का म्हणतोस?
एका देवाशिवाय कोणी उत्तम नाही. [19]तुला आज्ञा माहीत
आहेतच : खून करू नको, व्यभिचार करू नको, चोरी
करू नको, खोटी साक्ष देऊ नको, फसवू नको, आपल्या
वडिलांचा व आपल्या आईचा सन्मान कर."

[20]तो मनुष्य म्हणाला, "गुरूजी, मी तरुणपणापासून या
आज्ञा पाळत आलो आहे."

[21]येशूने त्याच्याकडे पाहिले त्याला त्याच्याविषयी प्रेम
वाटले. तो त्याला म्हणाला, "तुझ्यामध्ये एका गोष्टीची
उणीव आहे. जा, तुझ्याजवळ जे सर्व आहे ते वीक. नंतर
ते गोरगरिबांस वाटून टाक. स्वर्गात तुला संपत्ती प्राप्त
होईल. तर मग चल आणि माझ्या मागे ये."

[22]हे शब्द ऐकून तो मनुष्य खूप निराश झाला व खिन्न
होऊन निघून गेला कारण त्याच्याजवळ खूप संपत्ति होती.
[23]येशूने सभोवताली पाहिले व तो आपल्या शिष्यांना
म्हणाला, "ज्याच्याजवळ संपत्ति आहे त्याचा देवाच्या राज्यात
(श्रीमंतांचा) प्रवेश होणे किती कठीण आहे!"

[24]त्याचे शब्द ऐकून शिष्य थक्क झाले, परंतु येशू त्यास
म्हणाला, "माझ्या मुलांनो, देवाच्या राज्यात श्रीमंताचा प्रवेश
होणे किती कठीण आहे! [25]श्रीमंतांचा देवाच्या राज्यात
प्रवेश होणे यापेक्षा उंटाला सुईच्या नेढयातून जाणे सोपे
आहे." [26]ते यापेक्षाही अधिक आश्चर्यचकित झाले आणि
एकमेकाला म्हणाले, "तर मग कोणाचे तारण होणे शक्य
आहे?"

[27]त्यांच्याकडे पाहून येशू म्हणाला, "मनुष्यांना हे अशक्य
आहे पण देवाला अशक्य नाही. कारण सर्व गोष्टी देवाला
शक्य आहेत."

[28]पेत्र त्याला म्हणू लागला, "पाहा, आम्ही सर्व सोडले
आणि आपल्या मागे आलो आहोत."

[29]येशू म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो की, ज्या
कोणी माझ्यासाठी व सुवार्तेसाठी आपले घर, भाऊ, बहिणी,
आईवडील, मुले किंवा शेतीवाडी सोडली, त्याचा छळ
झाला तरी [30]त्याला शंभरपटीने फायदा मिळेल आणि
येणाऱ्या युगात त्याला अनंतकाळचे जीवन मिळाल्याशिवाय
राहणार नाही." [31]परंतु ज्यांना सध्या मोठे स्थान आहे
भविष्यात त्यांना खालचे स्थान मिळेल व ज्यांना खालचे
स्थान आहे त्यांना मोठे स्थान मिळेल."

## येशू पुन्हा आपल्या मरणाविषयी सांगतो
### *(मत्तय 20:17-19; लूक 18:31-34)*

[32]ते वर यरुशलेमेच्या रस्त्यावरून जात असता येशू
त्यांच्यापुढे चालत होता. त्याचे शिष्य विस्मित झाले होते
आणि त्यांच्यामागून येणारे घाबरले होते. नंतर येशूने त्या
बारा शिष्यांना पुन्हा एका बाजूला घेतले आणि स्वत:च्या
बाबतीत काय घडणार आहे हे त्यांना सांगू लागला. [33]"ऐका!
आपण वर यरुशलेमेस जात आहोत आणि मनुष्याचा पुत्र
विश्वासघाताने धरून मुख्य याजक आणि नियमशास्त्राचे
शिक्षक यांच्या हाती दिला जाईल. ते त्याला मरणाची
शिक्षा देतील आणि ते त्याला यहूदीतर लोकांच्या हाती
देतील. [34]ते त्याची थट्टा करतील, त्याच्यावर थुंकतील,
त्याला फटके मारतील, ठार करतील आणि तीन दिवसांनी
तो पुन्हा उठेल."

## याकोब व योहान येशूला मदतीसाठी विचारतात
### *(मत्तय 20:20-28)*

[35]याकोब व योहान हे जब्दीचे मुलगे त्याच्याकडे आले.
आणि त्याला म्हणाले, "गुरूजी, आम्ही आपणांजवळ जे
मागू ते आपण आमच्यासाठी करावे अशी आमची इच्छा
आहे."

[36]येशू त्यांना म्हणाला, "मी तुमच्यासाठी काय करावे
अशी तुमची इच्छा आहे?"

[37]ते म्हणाले, "आपल्या वैभवात आमच्यापैकी एकाला
तुमच्या उजवीकडे व दुसऱ्याला डावीकडे बसण्याचा
अधिकार द्यावा."

[38]येशू त्यांना म्हणाला, "तुम्ही काय मागत आहात हे
तुम्हांस कळत नाही. मी जो प्याला पिणार आहे, तो तुमच्याने
पिणे शक्य आहे काय? किंवा मी जो बाप्तिस्मा घेणार
आहे तो तुमच्याने घेणे शक्य आहे काय?

39ते त्याला म्हणाले, “आम्हांस शक्य आहे.”
मग येशू त्यांना म्हणाला, “मी जो प्याला पिणार आहे
तो तुम्ही प्याल आणि जो बाप्तिस्मा घेईन तो तुम्ही घ्याल,
40परंतु माझ्या उजवीकडे किंवा डावीकडे बसू देणे माझ्या
हाती नाही. ज्यांच्यासाठी त्या जागा तयार केल्या आहेत,
त्यांच्यासाठीच त्या राखून ठेवल्या आहेत.”
41दहा शिष्यांनी या विनंतिविषयी ऐकले तेव्हा ते याकोब
व योहानावर फार रागावले. 42येशूने त्यांना जवळ
बोलाविले आणि म्हटले, “तुम्हांस माहीत आहे की,
परराष्ट्रीयांचे जे सत्ताधारी आहेत ते त्यांच्यावर स्वामित्व
गाजवितात आणि त्यांचे पुढारी त्यांच्यावर अधिकार
गाजवितात. 43परंतु तुमच्याबाबतीत तसे नाही. तुमच्यातील
जो कोणी मोठा होऊ पाहतो त्याने तुमचा सेवक झाले
पाहिजे. 44आणि जो कोणी पहिला होऊ इच्छितो त्याने
सर्वांचा सेवक झाले पाहिजे. 45कारण मनुष्याचा पुत्रही
सेवा करून घ्यावयास नाही तर तो सेवा करावयास आला
आहे. व अनेकांसाठी आपले जीवन खंडणी म्हणून
देण्यासाठी आला आहे.”

## येशू आंधळ्याला बरे करतो
### *(मत्तय 20:29-34; लूक 18:35-43)*

46मग ते यरीहोस आले. येशू आपले शिष्य व
लोकसमुदायासह यरीहो सोडून जात असता तिमयाचा मुलगा
बार्तीमय हा एक आंधळा भिकारी रस्त्याच्या कडेला बसला
होता. 47जेव्हा त्याने ऐकले की, नासरेथचा येशू जात
आहे तेव्हा तो मोठ्याने ओरडून म्हणून लागला, “येशू,
दाविदाचे पुत्र माझ्यावर दया करा.”
48तेव्हा त्याने गप्प बसावे म्हणून अनेकांनी त्याला
दटावले. पण तो अधिक मोठ्याने ओरडून म्हणू लागला.
“येशू दाविदाचे पुत्र मजवर दया करा.”
49मग येशू थांबला आणि म्हणाला, “त्याला बोलवा.
तेव्हा त्यांनी आंधळ्या मनुष्याला बोलाविले आणि म्हटले,
“धीर धर, येशू तुला बोलावीत आहे.” 50त्या आंधळ्याने
आपला झगा टाकला, उडी मारली व तो येशूकडे आला.
51येशू त्याला म्हणाला, “मी तुझ्यासाठी काय करावे
अशी तुझी इच्छा आहे?” आंधळा मनुष्य त्याला म्हणाला,
“गुरूजी मला पुन्हा दृष्टी प्राप्त व्हावी.” 52मग येशू त्याला
म्हणाला, “जा! तू विश्वास ठेवलास म्हणून तू बरा झाला
आहेस.” लगेच तो पाहू शकला (त्याला दृष्टी आली)
आणि रस्त्याने तो येशूच्या मागे चालू लागला.

## येशू यरुशलेमेत राजासारखा प्रवेश करतो
### *(मत्तय 21:1-11; लूक 19:28-40; योहान 12:12-19)*

11 जेव्हा ते यरुशलेमजवळ जैतुनाच्या डोंगराजवळ
बेथानी गावाजवळ आले तेव्हा येशूने आपल्या
दोन शिष्यास असे सांगून पाठविले की, 2“तुम्ही जे गाव
पुढे दिसते त्या गावात जा. गावात जाताच, ज्याच्यावर
कोणी बसले नाही असे शिंगरू बांधलेले आढळेल. ते
सोडा व येथे आणा. 3आणि जर कोणी तुम्हांला विचारले,
‘तुम्ही हे का नेत आहात?’ तर तुम्ही असे म्हणा, ‘प्रभूला
याची गरज आहे.’ व तो ते लगेच परत येथे पाठवील.”
4मग ते गेले आणि त्यांना रस्त्यावर, दाराजवळ एक
शिंगरू बांधलेले दिसले. मग त्यांनी ते सोडले. 5तेथे उभे
असलेल्या लोकांपैकी काही जण त्यांना म्हणाले, “हे शिंगरू
सोडून तुम्ही काय करीत आहात?” 6त्यांनी येशू त्यांना
काय म्हणाला ते सांगितले. तेव्हा त्या लोकांनी त्यास ते
शिंगरू नेऊ दिले. 7त्यांनी ते शिंगरू येशूकडे आणले.
त्यांनी आपली वस्त्रे त्याच्यावर पांघरली व येशू त्यावर
बसला. 8पुष्कळ लोकांनी आपले झगे रस्त्यावर पसरले
आणि इतरांनी शेतातून तोडलेल्या डहाव्या पसरल्या. 9पुढे
चालणारे व मागून येणारे घोषणा देऊ लागले,

“होसान्ना, प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादित असो.
*स्तोत्र. 118:25-26*

10आमचा पूर्वज दावीद याचे येणारे राज्य धन्यवादित
असो. स्वर्गात होसान्ना”
11नंतर येशूने यरुशलेमात प्रवेश केल्यावर तो मंदिरात
गेला व सभोवतालचे सर्व पाहिले. त्या सुमारास संध्याकाळ
झाली होती म्हणून तो बेथानीस गेला व शिष्यांना
आपल्याबरोबर नेले.
12दुसऱ्या दिवशी ते बेथानी सोडून जात असताना येशूला
भूक लागली. 13त्याने दूर असलेल्या व पानांनी भरलेल्या
अंजिराच्या झाडाकडे पाहिले. त्यावर काही मिळेल या
आशेने तो पाहावयास गेला पण तेथे त्याला पानांशिवाय
काही आढळले नाही. कारण तो अंजिराचा हंगाम नव्हता.
14नंतर तो त्याला म्हणाला, “यापुढे तुझे फळ कोणीही
कधीही खाणार नाही.” त्याच्या शिष्यांनी हे ऐकले.

## येशू मंदिरात जातो
### *(मत्तय 21:12-17; लूक 19:45-48; योहान 2:13-22)*

15नंतर ते यरुशलेमेत गेले आणि येशू मंदिरात गेला
तेव्हा मंदिरात जे खरेदी विक्रीचा व्यवहार करीत होते
त्यांना येशू बाहेर घालवू लागला. त्याने सराफांचे चौरंग
व जे कबुतरे विकत होते त्यांची बाके उलथून टाकली.
16येशूने मंदिरातून कोणालाही काहीही बाहेर नेऊ दिले
नाही. 17मग येशू शिकवू लागला. तो त्यांना म्हणाला,
“माझ्या घराला सर्व राष्ट्रांचे प्रार्थनामंदिर म्हणतील, असे
पवित्र शास्त्रात लिहिले नाही काय? परंतु तुम्ही त्याला
चोरांची गुहा बनविली आहे.”*

---

**माझ्या ... आहे** यिर्मया 7:11

18मुख्य याजकांनी आणि नियमशास्त्राच्या शिक्षकांनी
हे ऐकले आणि ते त्याला ठार मारण्याचा मार्ग शोधू
लागले. कारण सर्व लोक त्याच्या शिक्षणाने थक्क झाल्याने
ते त्याला भीत होते. 19त्या रात्री येशू व त्याचे शिष्य
शहराबाहेर गेले.

## येशू विश्वासाचे सामर्थ्य दाखवितो
***(मत्तय 21:20-22)***

20सकाळी येशू आणि त्याचे शिष्य जात असता त्यांनी ते
अंजिराचे झाड मुळापासून वाळून गेलेले पाहिले. 21पेत्राला
आठवण झाली. तो येशूला म्हणाला, "गुरूजी, पाहा! ज्या
अंजिराच्या झाडाला आपण शाप दिला ते वाळून गेले
आहे."
22येशूने उत्तर दिले, "देवावर विश्वास ठेवा. 23मी तुम्हांस
खरे सांगतो की, जो कोणी या डोंगराला 'उपटून समुद्रात
टाकला जा' असे म्हणेल व तो आपल्या मनात शंका न
धरता, त्याच्या शब्दांप्रमाणे घडेल असा विश्वास धरील
तर त्याच्यासाठी तसेच घडेल. 24या कारणास्तव मी तुम्हांस
सांगतो जे काही तुम्ही प्रार्थनेत मागाल ते मिळालेच आहे
असा विश्वास धरा आणि ते तुम्हांला मिळेल. 25जेव्हा
तुम्ही प्रार्थना करीत उभे राहता तेव्हा तुमच्या मनात जर
कोणाच्या विरुद्ध काही असेल तर त्याची क्षमा करा
यासाठी की, तुमच्या स्वर्गातील पित्याने तुमच्या पापांची
क्षमा करावी. 26परंतु तुम्ही जर क्षमा करणार नाही तर
तुमचा स्वर्गातील पिताही तुमच्या अपराधांची क्षमा करणार
नाही."

## यहूदी पुढारी येशूच्या अधिकाराविषयी संशय घेतात
***(मत्तय 21:23-27; लूक 20:1-8)***

27ते परत यरुशलेमेस आले. आणि येशू मंदिरात फिरत
असता मुख्य याजक, नियमशास्त्राचे शिक्षक आणि वडील
त्याच्याकडे आले. 28आणि त्याला म्हणाले, "आपण
कोणत्या अधिकाराने या गोष्टी करता? त्या करण्याचा
अधिकार आपणांस कोणी दिला?"
29येशू त्यांना म्हणाला, "मीही तुम्हांला एक प्रश्न
विचारतो आणि जर तुम्ही मला त्याचे उत्तर दिले तर मी
या गोष्टी कोणत्या अधिकाराने करतो हे तुम्हांस सांगेन.
30योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गातून होता की मनुष्यांपासून
होता? याचे उत्तर द्या."
31त्याविषयी त्यांनी आपसात चर्चा केली आणि म्हणू
लागले जर आपण तो स्वर्गापासून म्हणावे तर तो म्हणेल,
"मग त्यावर तुम्ही विश्वास का ठेवला नाही? 32परंतु जर
आपण तो मनुष्यांपासून आहे असे म्हणावे तर लोक
आपणावर रागावतील." पुढाऱ्यांना लोकांची भीति वाटत
होती. कारण सर्व लोकांचा विश्वास होता की योहान
खरोखर संदेष्टा होता. 33मग त्यांनी येशूला उत्तर दिले,
"आम्हांला माहीत नाही." तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "मग
मीही या गोष्टी कोणत्या अधिकाराने करीत आहे हे
तुम्हांला सांगत नाही."

## देव त्याचा पुत्र पाठवितो
***(मत्तय 21:33-46; लूक 20:9-19)***

12 येशू त्यांना बोधकथा सांगून शिकवू लागला.
"एका मनुष्याने द्राक्षाचा मळा लावला व
त्याच्याभोवती कुंपण घातले. त्याने द्राक्षारसासाठी कुंड
खणले, आणि टेहळणीसाठी माळा बांधला. त्याने तो
शेतकऱ्यास खंडाने दिला व तो दूर प्रवासास गेला.
2हंगामाच्या योग्य वेळी शेतकऱ्याकडून द्राक्षमळ्यातील
फळांचा योग्य हिस्सा मिळावा म्हणून त्याने एका नोकरास
पाठविले. 3परंतु त्यांनी नोकरास धरले, मारले आणि
रिकामे पाठवून दिले. 4नंतर त्याने दुसऱ्या नोकरास
पाठविले. त्यांनी त्याचे डोके फोडले आणि त्याला
अपमानकारक रीतीने वागविले. 5मग धन्याने आणखी
एका नोकराला पाठविले. त्यांनी त्याला जिवे मारले
त्याने इतर अनेकांना पाठविले. शेतकऱ्यांनी काहींना
हाणमार केली तर काहींना ठार मारले.
6धन्याजवळ पाठविण्यासाठी आता फक्त त्याचा प्रिय
मुलगा उरला होता. त्याने त्याला सर्वांत शेवटी पाठविले.
तो म्हणाला, "खात्रीने ते माझ्या मुलाला मान देतील." तो
त्याचा आवडता मुलगा होता, म्हणून शेवटी त्याने त्याला
त्या शेतकऱ्यांकडे पाठविले. 7परंतु ते शेतकरी एकमेकांस
म्हणाले, "हा तर वारस आहे. चला, आपण याला जिवे
मारू म्हणजे वतन आपले होईल!"
8मग त्यांनी त्याला धरले, जिवे मारले, आणि
द्राक्षमळ्याबाहेर फेकून दिले.
9तर मग द्राक्षमळ्याचा धनी काय करील? तो येईल
आणि शेतकऱ्यांना जिवे मारील व द्राक्षमळा दुसऱ्यांना
देईल. 10तुम्ही हा शास्त्रलेख वाचला नाही काय?

'जो दगड बांधणारांनी नाकारला तो कोनशिला झाला.
11हे प्रभूने केले. आणि ते आमच्यासाठी आश्चर्य
कारक आहे.' "

*स्तोत्र. 118:22-23*

12मग ते येशूला अटक करण्याचा मार्ग शोधू लागले.
परंतु त्यांना लोकांची भीति वाटत होती. त्याला अटक
करण्याची त्यांची इच्छा होती कारण त्यांना माहीत होते
की, ही बोधकथा त्याने त्यांनाच उद्देशून सांगितली होती.
मग ते त्याला सोडून निघून गेले.

## यहूदी पुढारी येशूला फसविण्याचा प्रयत्न करतात
***(मत्तय 22:15-22; लूक 20:20-26)***

13नंतर त्यांनी त्याला चुकीचे बोलताना पकडावे म्हणून
काही परूशी व हेरोदी यांना. त्याच्याकडे पाठविले. 14ते

त्याच्याकडे आले आणि म्हणाले, “गुरूजी आम्हांस माहीत
आहे की, आपण प्रामाणिक आहात आणि कुणाची तमा
न बाळगता आपण देवाचा मार्ग खरेपणाने शिकविता. तर
मग कैसराला कर देणे योग्य आहे की नाही? आणि
आम्ही तो द्यावा की न द्यावा?”

15परंतु येशूने त्यांचा ढोंगीपणा ओळखला व त्यांना
म्हणाला, “तुम्ही माझी परीक्षा का पाहता? माझ्याकडे
एक नाणे (चांदीचे एक नाणे) आणा म्हणजे मी ते
पाहीन.” 16मग त्यांनी त्याच्याकडे नाणे आणले. त्याने
त्यांना विचारले, “हा मुखवटा व लेख कोणाचा आहे?” ते
त्याला म्हणाले, “कैसराचा”
17मग येशू त्यांना म्हणाला, “कैसराचे ते कैसराला व
देवाचे ते देवाला द्या.” तेव्हा त्यांना त्याच्याविषयी फार
आश्चर्य वाटले.

## काही सदूकी येशूला फसविण्याचा प्रयत्न करतात
## *(मत्तय 22:23-33; लूक 20:27-40)*

18नंतर काही सदूकी त्याच्याकडे आले, (सदूकी
पुनरुत्थान नाही असे समजतात) त्यांनी त्याला विचारले,
19“गुरूजी, मोशाने आमच्यासाठी असे लिहिले आहे की,
जर कोणा मनुष्याचा भाऊ मेला व पत्नी राहिली, परंतु
मूलबाळ नसले तर वंश पुढे चालावा म्हणून त्या मनुष्याने
तिच्याबरोबर लग्न करावे आणि मेलेल्या भावाचा वंश
वाढवावा. 20असे कोणी सात भाऊ होते. पहिल्याने पत्नी
केली व तो मूलबाळ न होता मेला. 21दुसऱ्याने तिच्याबरोबर
लग्न केले, तोही मूलबाळ न होता मेला. 22तिसऱ्याने
तसेच केले. त्या सात भावांपैकी एकालाही त्या स्त्रीपासून,
मूलबाळ झाले नाही. शेवटी ती स्त्रीही मेली. 23सातही
भावांनी तिच्याबरोबर लग्न केले तर पुनरुत्थानाच्या वेळी
जेव्हा लोक मेलेल्यातून उठतील तेव्हा ती कोणाची पत्नी
असेल? कारण सातही जणांनी तिच्याबरोबर लग्न केले
होते.”
24येशू त्यांना म्हणाला, “खात्रीने, पवित्र शास्त्र आणि
देवाचे सामर्थ्य तुम्हांला माहीत नाही म्हणून तुम्ही अशी
चूक करीत आहात. 25कारण जेव्हा लोक मेलेल्यातून
उठतील तेव्हा ते लग्न करणार नाहीत व करुन देणार
नाहीत. त्याऐवजी ते स्वर्गातील देवदूताप्रमाणे असतील.
26परंतु मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयी तुम्ही मोशाच्या
पुस्तकातील जळत्या झुडपाविषयी वाचले नाही काय?
तेथे देव मोशाला म्हणाला, “मी अब्राहामाचा, इसहाकाचा
आणि याकोबाचा देव आहे.*
27तो मेलेल्यांचा देव नव्हे तर जिवंत लोकांचा देव
आहे. तुम्ही फार चुकत आहा.”

**मी अब्राहामाचा ... देव आहे** निर्गम. 3:6

## सर्वांत महत्त्वाची आज्ञा कोणती?
## *(मत्तय 22:34-40; लूक 10:25-28)*

28त्यानंतर एका नियमशास्त्राच्या शिक्षकाने त्यांना वाद
घालताना ऐकले. येशूने त्यांना किती चांगल्या प्रकारे
उत्तर दिले ते पाहिले. तेव्हा त्याने विचारले, “सर्व आज्ञांत
महत्त्वाची पहिली आज्ञा कोणती?”
29येशूने उत्तर दिले, “पहिली महत्त्वाची आज्ञा ही, ‘हे
इस्राएला, ऐक, आपला प्रभु देव अनन्य आहे. 30तू आपला
देव जो तुझा प्रभु आहे, त्याजवर संपूर्ण अंत:करणाने,
संपूर्ण जिवाने, संपूर्ण मनाने आणि संपूर्ण शक्तीने प्रीति
कर.’*
31दुसरी आज्ञा ही आहे, ‘जशी आपणांवर तशी आपल्या
शेजाऱ्यावर प्रीति कर.’* यापेक्षा दुसरी कोणतीही आज्ञा
मोठी नाही.”
32तो मनुष्य उत्तरला, “देव एकच आहे, गुरूजी, आणि
त्याच्याशिवाय कोणीही नाही असे आपण म्हणता ते योग्य
बोललात.” 33त्याच्यावर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण समजुतीने,
पूर्ण शक्तीने आणि जशी आपणावर तशी आपल्या
शेजाऱ्यावर प्रीति करणे हे सर्व यज्ञ व अर्पणे, जी आपणास
करण्याची आज्ञा दिली आहे, त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे
आहे.”
34येशूने पाहिले की, त्या मनुष्याने शहाणपणाने उत्तर
दिले आहे. तेव्हा तो त्याला म्हणाला, “तू देवाच्या राज्यापासून
दूर नाहीस.” त्यानंतर त्याला प्रश्न विचारण्याचे धाडस
कोणी केले नाही. 35येशू मंदिरात शिकवीत असता, तो
म्हणाला, “ख्रिस्त दाविदाचा पुत्र आहे असे नियमशास्त्राचे
शिक्षक म्हणतात ते कसे शक्य आहे?” 36दावीद स्वत:
पवित्र आत्म्याने प्रेरित होऊन म्हणाला,

‘प्रभु देव, माझ्या प्रभूला म्हणाला, मी तुझे वैरी तुझ्या
पायाखाली घालेपर्यंत तू माझ्या उजवीकडे बैस.’
*स्तोत्र. 110:1*

37दावीद स्वत: ख्रिस्ताला ‘प्रभु’ म्हणतो तर मग ख्रिस्त
दाविदाचा पुत्र कसा?” आणि मोठा लोकसमुदाय त्याचे
आनंदाने ऐकत होता.
38शिक्षण देताना तो म्हणाला, “नियमशास्त्राच्या
शिक्षकांविषयी सावध असा. त्यांना लांब झगे घालून
मिरवायला आणि बाजारात नमस्कार घ्यायला आवडते.
39आणि सभास्थानातील व मेजवानीतील सर्वांत महत्त्वाच्या
जागांची त्यांना आवड असते. 40ते विधवांची घरे
खाऊन टाकतात आणि धार्मिकता दाखविण्यासाठी ते
लांब लांब प्रार्थना करतात. या लोकांना फार कडक
शिक्षा होईल.”

**हे इस्राएला ... कर** अनुवाद 6:4-5
**जशी ... प्रीति कर** लेवीय 19:18

### विधवा दान देण्याचा अर्थ दाखविते
*(लूक 21:1-4)*

41येशू दानपेटीच्या समोर बसला असता लोक पेटीत
पैसे कसे टाकतात हे पाहत होता. आणि पुष्कळ श्रीमंत
लोक भरपूर पैसे टाकीत होते. 42नंतर एक गरीब विधवा
आली. तिने तांब्याची दोन लहान नाणी टाकली, ज्याची
किंमत शंभरातील एका पैशाएवढी होती.
43येशूने आपल्या शिष्यांना एकत्र बोलावले आणि
म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो, की सर्वांनी त्या पेटीत
जे दान टाकले त्या सर्वांपेक्षा या विधवेने अधिक टाकले
आहे. 44मी असे म्हणतो कारण त्यांच्याजवळ जे भरपूर
होते त्यामधून त्यांनी काही दान दिले, परंतु ती गरीब
असूनही तिच्याजवळ होते ते सर्व तिने देऊन टाकले. ती
सर्व तिच्या जीवनाची उपजीविका होती."

### मंदिराचा भावी विध्वंस
*(मत्तय 24:1-44; लूक 21:5-33)*

13 येशू मंदिरातून निघून जात असता त्याच्या
शिष्यांपैकी एक जण त्याला म्हणाला, "गुरूजी,
पाहा, खूप मोठ्या दगडांनी बांधलेली या मंदिराची इमारत
किती सुंदर आहे."
2येशू त्याला म्हणाला "तू या मोठ्या इमारती पाहतोस
ना? येथील एकही दगड दुसऱ्या दगडावर राहणार नाही.
त्यातील प्रत्येक खाली पाडला जाईल."
3येशू मंदिरासमोरच्या जैतुनाच्या डोंगरावर बसला होता.
पेत्र, याकोब, योहान आणि अंद्रिया यांनी त्याला एकांतात
विचारले, 4"या गोष्टी केव्हा घडतील हे आम्हांस सांगा.
आणि या गोष्टी पूर्ण होण्याची वेळ येईल तेव्हा कोणते
चिन्ह घडेल?"
5नंतर येशू त्यांना सांगू लागला, "तुम्हांला कोणी फसवू
नये म्हणून सावध राहा. 6पुष्कळ लोक माझ्या नावाने
येतील व म्हणतील की, 'मी तोच आहे' आणि ते पुष्कळांना
फसवतील. 7जेव्हा तुम्ही लढायाविषयी आणि लढायांच्या
अफवांविषयी ऐकाल तेव्हा घाबरू नका. हे निश्चितपणे
घडणारच आहे. पण एवढ्याने शेवट होणार नाही. 8एक
राष्ट्दुसऱ्या राष्ट्ावर उठेल, एक राज्य दुसऱ्या राज्यावर
उठेल, निरनिराळ्या ठिकाणी धरणीकंप होतील आणि
दुष्काळ होतील. पण या गोष्टी म्हणजे नाशाची सुरूवात
आहे.
9"तुम्ही सावध असा. ते तुम्हांला न्याय सभांच्या स्वाधीन
करतील आणि सभास्थानात तुम्हांला मार देतील. त्यांना
साक्ष व्हावी म्हणून तुम्हांला राज्यकर्ते व राजे यांच्यासमोर
उभे राहावे लागेल. 10या गोष्टी घडण्यापूर्वी सर्व राष्टांमध्ये
सुवार्तेची घोषणा झालीच पाहिजे. 11ते तुम्हांला अटक
करून चौकशीसाठी आणतील तेव्हा अगोदरच तुम्ही काय
बोलावे याची काळजी करू नका, तर त्या घटकेला जे
काही सुचविले जाईल ते बोला, कारण बोलणारे तुम्ही
नाही तर पवित्र आत्मा तुम्हासाठी बोलेल. 12भाऊ भावाला
व वडील आपल्या मुलाला ठार मारण्यासाठी विश्वासघात
करून धरून देतील. मुले आपल्या आईवडीलांविरुद्ध
उठतील आणि ते त्यांना ठार करवितील. 13आणि माझ्या
नावामुळे सर्व जण तुमचा द्वेष करतील, पण जो शेवटपर्यंत
टिकेल तोच तरेल.'
14"जेव्हा तुम्ही 'नाशाला कारण अशी भयंकर गोष्ट,
(दानीयाल संदेष्ट्याने सांगितलेला ओसाडीचा अमंगल
पदार्थ) जो जिथे नको तेथे पाहाल. "(वाचकाने याचा
अर्थ काय तो समजावून घ्यावा)" तेव्हा जे यहूदीयांत
आहेत त्यांनी डोंगरात पळू जावे. 15जो मनुष्य आपल्या
घराच्या छतावर असेल त्याने घरातून काही आणण्यासाठी
खाली उतरू नये. 16आणि जर एखादा मनुष्य शेतात
असेल तर त्याने आपला झगा आणण्यासाठी माघारी जाऊ
नये. 17त्या दिवसांत ज्या स्त्रियांची मुले तान्ही असतील व
अंगावर पीत असतील त्यांच्यासाठी हे अती भयंकर होईल.
18हे हिवाळ्यात होऊ नये म्हणून प्रार्थना करा. 19कारण
त्या दिवसात जो त्रास होईल तो देवाने जग निर्माण केले
त्या आरंभापासून तो आजपर्यंत कधीही झाला नसेल व
पुन्हा त्यासारखा कधीही होणार नाही, असा असेल. 20देवाने
जर ते दिवस कमी केले नसते तर कोणीही वाचला
नसता. परंतु ज्यांना त्याने निवडले आहे अशा निवडलेल्या
लोकांसाठी ते दिवस त्याने कमी केले आहेत. 21आणि
जर कोणी तुम्हांला म्हणेल की पाहा, ख्रिस्त येथे आहे
किंवा तेथे आहे, तर त्यावर विश्वास ठेवू नका. 22कारण
काही लोक आपण ख्रिस्त किंवा संदेष्टे असल्याचा खोटा
दावा करतील आणि शक्य झाले तर ते निवडलेल्या
लोकांना फसविण्यासाठी चिन्हे व आश्चर्यकर्मे करतील.
23तेव्हा तुम्ही सावध राहा. मी काळापूर्वीच तुम्हांला सर्व
काही सांगून ठेवले आहे.

24 "परंतु त्या दिवसांत ही संकटे येऊन गेल्यावर, 'सूर्य
अंधकारमय होईल व चंद्र प्रकाश देणार नाही.
25आकाशातून तारे पडतील आणि आकाशातील बळे
डळमळतील.' *यशया 13:10; 34:4*

26"आणि लोक मनुष्याचा पुत्र मेघारूढ होऊन मोठ्या
सामर्थ्यानिशी आणि वैभवाने येताना पाहतील. 27नंतर तो
आपल्या देवदूतास पाठवील व चार दिशांतून, पृथ्वीच्या
सीमेपासून ते आकाशाच्या सीमेपर्यंत त्याच्या निवडलेल्या
लोकांना एकत्र करील.
28"अंजिराच्या झाडापासून धडा घ्या. जेव्हा त्याच्या
डहाळ्या कोमल होतात आणि त्यावर पाने फुटतात तेव्हा
तुम्हांला उन्हाळा जवळ आला हे समजते. 29त्याचप्रमाणे
तुम्ही जेव्हा या गोष्टी घडताना पाहाल तेव्हा तुम्हांला
समजेल की, तो काळ अगदीच दाराशी येऊन ठेपला
आहे. 30मी तुम्हांला खरे सांगतो की, या सर्व गोष्टी

घडण्यापूर्वी ही पिढी खात्रीने नाहीशी होणार नाही. 31स्वर्ग
आणि पृथ्वी नाहीशी होतील पण माझी वचने नाहीशी
होणार नाहीत. 32त्या दिवसाविषयी किंवा त्या घटकेविषयी
कोणालाही ठाऊक नाही. देवदूतालाही नाही व पुत्रासही
नाही. फक्त पित्याला माहीत आहे. 33सावध असा, जागृत
असा कारण ती वेळ केव्हा येईल हे तुम्हांला ठाऊक
नाही.

34ती वेळ अशी आहे की, एक मनुष्य प्रवासाला निघते
वेळी घर सोडतो आणि त्याच्या प्रत्येक नोकराला काम
नेमून देतो. तो पहारेकऱ्यास जागरूक राहण्याची आज्ञा
करतो. 35म्हणून तुम्ही जागरूक असा, कारण घरधनी
केव्हा येईल हे तुम्हांस ठाऊक नाही. तो संध्याकाळी,
मध्यरात्री, पहाटे कोंबडा आरवण्यापूर्वी किंवा सकाळी
केव्हा येईल हे तुम्हांला माहीत नाही. 36जर तो अचानक
आला तर तुम्ही त्याला झोपलेले सापडू नका. 37मी तुम्हांला
सांगतो, ते सर्वांना सांगतो, 'जागृत राहा.'"

## यहूदी पुढारी येशूला ठार मारण्याचा कट करतात
*(मत्तय 26:1-5; लूक 22:1-2; योहान 11:45-53)*

14 वल्हांडण* आणि बेखमीर भाकरीच्या सणाच्या*
दोन दिवस अगोदर प्रमुख याजक आणि
नियमशास्त्राचे शिक्षक कपटाने त्याला धरून जिवे
मारण्याचा मार्ग शोधीत होते. 2कारण ते म्हणत होते "आपण
ते सणात करू नये नाही तर लोक दंगा करतील."

## एक स्त्री काही तरी विशेष करते
*(मत्तय 26:6-13; योहान 12:1-8)*

3येशू बेथानी येथे शिमोन कुष्ठरोगी याच्या घरी मेजावर
जेवायला बसला असता कोणी एक स्त्री वनस्पतींपासून
बनविलेल्या शुद्ध, सुगंधी तेलाची फार मौल्यवान अलाबास्त्र
कुपी घेऊन आली. तिने अलाबास्त्र कुपी फोडली आणि
सुगंधी तेल येशूच्या मस्तकावर ओतले.

4तेथे असलेले काही लोक रागावले, ते एकमेकांना
म्हणाले, "सुगंधी तेलाचा असा नाश व्हावा हे बरे नाही.
5कारण हे सुगंधी तेल तीस दिनारापेक्षा अधिक किंमतीला
विकता आले असते आणि ते पैसे गरीबांना देता आले
असते." त्यांनी तिच्यावर कडक टीका केली.

6पण येशू म्हणाला, "तिला एकाकी असू द्या. तिला का
त्रास देता? तिने माझ्यासाठी एक सुंदर कृत्य केले आहे.
7गरीब तर नेहमी तुमच्याजवळ असतील आणि पाहिजे
त्या वेळेला त्यांना मदत करणे तुम्हांला शक्य आहे. परंतु
मी नेहमीच तुमच्याबरोबर असेन असे नाही. 8तिला शक्य
झाले ते तिने केले. तिने दफनविधीच्या तयारीच्या
काळाअगोदरच माझ्या शरीरावर सुगंधी तेल ओतले आहे.
9मी तुम्हांला खरे सांगतो सर्व जगात जेथे कोठे सुवार्तेची
घोषणा केली जाईल तेथे तिची आठवण म्हणून तिने जे
केले ते नेहमीच सांगितले जाईल."

10नंतर बारा शिष्यांपैकी एक, यहूदा इस्कर्योत येशूला
विश्वासघाताने धरून देण्यासाठी प्रमुख याजकांकडे गेला.
11त्यांना हे ऐकून आनंद झाला. आणि त्यांनी त्याला पैसे
देण्याचे वचन दिले. मग यहूदा येशूला धरून त्यांच्या
हातात देण्याची संधि पाहू लागला.

12बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी जेव्हा
वल्हांडण सणाचा कोकरा मारीत असत तेव्हा येशूचे शिष्य
त्याला म्हणाले, "आम्ही जातो आणि वल्हांडण सणाच्या
भोजनाची तयारी करतो. आम्ही कोठे जाऊन तयारी
करावी अशी आपली इच्छा आहे?"

13येशूने आपल्या दोघा शिष्यांना पाठविले आणि त्यांना
सांगितले, "शहरात जा, आणि पाण्याचे भांडे घेऊन जाणारा
मनुष्य तुम्हांला भेटेल, त्याच्या मागे जा. 14आणि जेथे तो
आत जाईल त्या घराच्या मालकास सांगा, 'गुरुजी म्हणतात,
जेथे मला माझ्या शिष्यांबरोबर वल्हांडण सणाचे भोजन
करणे शक्य होईल अशी खोली कोठे आहे?' 15आणि तो
तुम्हांला माडीवरची एक मोठी नीटनेटकी केलेली खोली
दाखवील, तेथे आपणांसाठी तयारी करा."

16शिष्य निघाले आणि ते शहरात गेले. आणि येशूने
सांगितल्याप्रमाणे त्यांना सर्व आढळले. मग त्यांनी वल्हांडण
सणाच्या भोजनाची तयारी केली.

17संध्याकाळ झाली तेव्हा येशू बारा जणांसह आला.
18मेजावर बसून ते जेवीत असता येशू म्हणाला, "मी तुम्हांला
खरे सांगतो, तुमच्यापैकी जो एक जण मला शत्रूच्या स्वाधीन
करून देईल, तो माझ्याबरोबर येथे जेवीत आहे."

19शिष्य अतिशय खिन्न झाले व प्रत्येक जण त्याला
म्हणू लागला, "तो मी आहे का?"

20तो त्यांना म्हणाला, "बारा जणांपैकी एक जो
माझ्याबरोबर ताटात भाकर बुडवीत आहे तोच. 21हाय,
हाय, त्याच्याविषयी पवित्र शास्त्रात जसे लिहिले आहे,
तसा मनुष्याचा पुत्र जाईल, परंतु ज्याच्याकडून मनुष्याचा
पुत्र धरून दिला जाईल, त्याचा नाश होवो. तो जन्मला
नसता तर ते त्याच्यासाठी बरे झाले असते."

## प्रभु भोजन
*(मत्तय 26:26-30; लूक 22:15-20;*
*1 करिंथकरांस 11:23-25)*

22ते भोजन करीत असता येशूने भाकर घेतली,
उपकारस्तुति केली, ती मोडली आणि त्यांना दिली. तो
म्हणाला, "घ्या, हे माझे शरीर आहे."

---

**वल्हांडण सण** यहूदी लोकांचा महत्त्वाचा पवित्र दिवस. मोशेच्या काळात देवाने केलेल्या सुटकेची आठवण करण्यासाठी ते विशेष मेजवानी करतात.

**बेखमीर भाकरीच्या सण** महत्त्वाचा यहूदी सुट्ट्यांचा आठवडा. जुन्या करारात हा वल्हांडणानंतरच्या दिवशी सुरू झाला पण यावेळेपर्यंत दोन्ही सण एक झाले होते.

23नंतर येशूने प्याला घेतला, उपकारस्तुति केली. तो
प्याला त्यांना दिला आणि सर्व त्यांतून प्याले.
24मग येशू म्हणाला, "हे माझे नव्या कराराचे* रक्त
आहे. पुष्कळांसाठी ते ओतले जात आहे. 25मी तुम्हांला
खरे सांगतो की, देवाच्या राज्यात मी नवा द्राक्षारस पिईन
त्या दिवसापर्यंत मी यापुढे द्राक्षाचा उपज (द्राक्षारस) पिणार
नाही."
26नंतर त्यांनी उपकारस्तुतिचे गीत गाईले व ते जैतुनाच्या
डोंगराकडे निघून गेले.

## येशू सांगतो त्याचे सर्व शिष्य त्याला सोडून जातील
### (*मत्तय 26:31-35; लूक 22:31-34; योहान 13:36-38*)

27येशू शिष्यांना म्हणाला, "तुम्ही सर्व विश्वास गमावून
बसाल. कारण असे लिहिले आहे की,

'मी मेंढपाळास मारीन आणि मेंढरे विखुरली जातील.'
*जखऱ्या 13:7*

28परंतु माझे पुनरुत्थान झाल्यावर मी तुमच्यापुढे गालीलात
जाईन."
29पेत्र म्हणाला, "इतर सर्वांनी जरी त्यांचा विश्वास
गमावला तरी मी गमावणार नाही."
30मग येशू त्याला म्हणाला, "मी तुला खरे सांगतो,
आज रात्री दोनदा कोंबडा आरवण्यापूर्वी तू तीन वेळा
मला नाकारशील." 31तरीही पेत्र अधिक आवेशाने
म्हणाला, "जरी मला आपणांबरोबर मरावे लागले तरी
सुद्धा मी आपणांला नाकारणार नाही." आणि इतर सर्व
जण तसेच म्हणाले.

## येशू एकटाच प्रार्थना करतो
### (*मत्तय 26:36-46; लूक 22:39-46*)

32नंतर ते गेथशेमाने म्हटलेल्या जागी आले, तेव्हा येशू
त्याच्या शिष्यांना म्हणाला, "मी प्रार्थना करीपर्यंत येथे
बसा." 33येशूने आपल्याबरोबर पेत्र, याकोब व योहान
यांना घेतले. दु:ख व वेदनांनी त्याचे मन भरून आले.
34तो त्यांना म्हणाला, "माझा जीव मरणाइतका वेदना
सोशीत आहे. येथे राहा व जागृत असा."
35त्यांच्यापासून थोडे दूर अंतरावर जाऊन तो जमिनीवर
पडला आणि त्याने प्रार्थना केली की, "शक्य असेल तर
ही घटका मजपासून टळून जावो." 36तो म्हणाला, "अब्बा*
बापा, तुला सर्व काही शक्य आहे. हा प्याला मजपासून
दूर कर पण मला पाहिजे ते नको तर तुला पाहिजे ते
कर. (माझ्या इच्छेप्रमाणे नाही तर तुझ्या इच्छेप्रमाणे कर.)"
37नंतर येशू आला आणि त्यांना झोपलेले पाहिले. तो
पेत्राला म्हणाला, "शिमोना, तू झोपी गेलास काय? तासभर
तुझ्याच्याने जागे राहवत नाही काय? 38जागृत राहा आणि
प्रार्थना करा म्हणजे तुम्ही मोहात पडणार नाही. आत्मा
उत्सुक आहे पण देह अशक्त आहे."
39पुन्हा येशू दूर गेला आणि त्याच गोष्टी उच्चारून
त्याने प्रार्थना केली. 40नंतर तो परत आला व त्याला ते
झोपलेले आढळले. कारण त्यांचे डोळे जड झाले होते
आणि त्याला काय उत्तर द्यावे हे त्यांना कळेना.
41तो पुन्हा तिसऱ्या वेळेस आला आणि त्यांना म्हणाला,
"तुम्ही अजूनही झोपलेले आणि विश्रांति घेत आहात काय?
पुरे झाले! आता वेळ आली आहे. मनुष्याचा पुत्र पाप्यांच्या
हाती धरून दिला जात आहे. 42उठा, आपण जाऊ या.
पाहा, मला धरून देणारा मनुष्य इकडे येत आहे."

## येशूला अटक करण्यात येते
### (*मत्तय 26:47-56; लूक 22:47-53; योहान 18:3-12*)

43आणि येशू बोलत आहे तोपर्यंत बारा जणांपैकी एक–
यहूदा आला. त्याच्याबरोबर मुख्य याजक व नियमशास्त्राचे
शिक्षक आणि वडील यांनी पाठविलेले अनेक लोक
तलवारी व सोटे घेऊन आले. 44घात करून देणाऱ्याने
त्यांना अशी खूण दिली होती की, "मी ज्या कोणाचे चुंबन
घेईन तोच तो आहे, त्याला धरा आणि बाजूला काढा."
45मग यहूदा आल्याबरोबर तो येशूकडे गेला आणि
म्हणाला, "गुरूजी!" आणि यहूदाने येशूचे चुंबन घेतले.
46नंतर त्यांनी त्याच्यावर हात टाकले आणि त्याला अटक
केली. 47तेथे जवळ उभे असलेल्यांपैकी एकाने आपली
तलवार काढली आणि मुख्य याजकाच्या नोकरावर वार
करून त्याचा कान कापून टाकला. 48नंतर येशू त्यांना
म्हणाला, "मी लुटारू असल्याप्रमाणे तुम्ही तलवारी आणि
सोटे घेऊन मला पकडायला बाहेर पडलात काय?"
49मी दररोज मंदिरात शिकवीत असता तुम्हांबरोबर
होतो आणि तुम्ही मला अटक केली नाही. परंतु शास्त्रलेख
पूर्ण झालाच पाहिजे." 50सर्व शिष्य त्याला सोडून पळून
गेले. 51एक तरुण मनुष्य अंगावर तागाचे वस्त्र पांघरून
त्याच्या मागे चालत होता. त्यांनी त्याला पकडण्याचा
प्रयत्न केला, 52परंतु तो तागाचे वस्त्र टाकून उघडाच
पळून गेला.

## यहूदी पुढाऱ्यांबरोबर येशू
### (*मत्तय 26:57-68; लूक 22:54-55, 63-71; योहान 18:13-14,19-24*)

53नंतर त्यांनी येशूला तेथून मुख्य याजकाकडे नेले.
आणि सर्व मुख्य याजक, वडील व नियमशास्त्राचे शिक्षक
जमा झाले. 54थोडे अंतर ठेवून पेत्र येशूच्या मागे थेट

---

**कराराचे** काही प्रचीन प्रतीमध्ये 'कराराचे' या शब्दाअगोदर 'नवा' शाब्द जोडतात.

**अब्बा** मूल आपल्या वडीलांना ज्या नावाने हाक मारते ते नाव. हा शब्द अरेमिक असून त्याचा अर्थ मुलाचे वडील असा होतो.

मुख्य याजकाच्या वाड्यात गेला. तेथे पेत्र पहारेकऱ्याबरोबर
विस्तवाजवळ शेकत बसला.
55मुख्य याजक आणि सर्व यहूदी सभा येशूला जिवे
मारण्यासाठी पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत होते.
परंतु त्यांना काही मिळेना. 56पुष्कळांनी त्याच्याविरुद्ध
खोटी साक्ष दिली. परंतु त्यांची साक्ष सारखी नव्हती.
57नंतर काही जण उभे राहिले आणि त्याच्या विरुद्ध
साक्ष देऊन म्हणाले, "आम्ही त्याला असे म्हणताना ऐकले
की, 58'हाताने बांधलेले मंदिर मी पाडून टाकीन आणि
हातांनी न बांधलेले असे दुसरे मंदिर तीन दिवसात उभारीन.'
59परंतु तरीही या बाबतीत त्यांच्या साक्षीत मेळ नव्हता.
60नंतर मुख्य याजक त्यांच्यापुढे उभा राहिला आणि
त्याने येशूला विचारले, "तू उत्तर देणार नाहीस काय? हे
लोक तुझ्याविरुद्ध आरोप करताहेत हे कसे?"
61परंतु येशू गप्प राहिला. त्याने उत्तर दिले नाही. नंतर
मुख्य याजकाने पुन्हा विचारले, "धन्य देवाचा पुत्र तो तू
ख्रिस्त आहेस काय?" 62येशू म्हणाला, "मी आहे, आणि
तुम्ही मनुष्याच्या पुत्राला सर्वसमर्थ देवाच्या उजवीकडे
बसलेले व आकाशातील मेघांसह येताना पाहाल."
63मुख्य याजकाने आपले कपडे फाडले आणि म्हणाला,
"आपणांला अधिक साक्षीदारांची काय गरज आहे? 64तुम्ही
निंदा ऐकली आहे. तुम्हांला काय वाटते?"
सर्वांनी त्याला मरणदंड योग्य आहे अशी शिक्षा
फर्माविली. 65काही जण त्याच्यावर थुंकू लागले, त्याचे
तोंड झाकून बुक्के मारू लागले व त्याला म्हणू लागले,
"ओळख बरे, तुला कोणी मारले?" पहारेकऱ्यांनी त्याला
ताब्यात घेतले आणि मारले.

### येशूला ओळखतो हे सांगण्यास पेत्र घाबरतो
### *(मत्तय 26:69-75; लूक 22:56-62; योहान 18:15-18, 25-27)*

66पेत्र अंगणात असतानाच मुख्य याजकांच्या दासींपैकी
एक आली. 67आणि तिने पेत्राला शेकताना पाहिले. तेव्हा
तिने त्याच्याकडे निरखून पाहिले व म्हणाली, "तू सुद्धा
नासरेथकर येशूबरोबर होतास ना?"
68परंतु पेत्राने ते नाकारले, आणि म्हणाला, "तू काय
म्हणतेस हे मला कळत नाही व समजतही नाही." पेत्र
अंगणाच्या दरवाजाच्या देवडीवर गेला आणि कोंबडा
आरवला. 69जेव्हा दासीने त्याला पाहिले तेव्हा जे लोक
तेथे होते त्यांना ती म्हणू लागली की, "हा मनुष्य
त्यांच्यापैकीच एक आहे."
70पेत्राने पुन्हा ते नाकारले. नंतर थोड्या वेळाने तेथे
उभे असलेले लोक पेत्राला म्हणाले, "खात्रीने तू त्यांच्यापैकी
एक आहेस, कारण तू सुद्धा गालीली आहेस."
71पेत्र स्वत:ची निर्भत्सना करीत व शपथ वाहून म्हणाला,
"तुम्ही ज्या माणसाविषयी बोलत आहात त्याला मी ओळखत
नाही!"
72आणि लगेच दुसऱ्यांदा कोंबडा आरवला. "दोन वेळा
कोंबडा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील,"
असे येशू म्हणाला होता याची पेत्राला आठवण झाली व
तो अतिशय दु:खी झाला व ढसढसा रडला.

### राज्यपाल पिलात येशूला प्रश्न करतो
### *(मत्तय 27:1-2, 11-14; लूक 23:1-5; योहान 18:28-38)*

15 पहाट होताच मुख्य याजक, वडील, नियमशास्त्राचे
शिक्षक व सर्व यहूदी सभा यांनी एक योजना
आखली. त्यांनी येशूला बांधले आणि पिलाताच्या ताब्यात
दिले.
2पिलाताने त्याला विचारले, "तू यहूद्यांचा राजा आहेस
काय?"
येशूने उत्तर दिले, "तू म्हणतोस तसेच."
3मुख्य याजकांनी पुष्कळ बाबतीत येशूवर आरोप ठेवले.
4मग पिलाताने त्याला पुन्हा प्रश्न विचारला, "तू उत्तर
देणार नाहीस काय? पाहा, ते किती तरी गोष्टींविषयी
तुझ्यावर आरोप ठेवीत आहेत!"
5पण तरीही येशूने उत्तर दिले नाही म्हणून पिलाताला
आश्चर्य वाटले.

### पिलात येशूला मुक्त करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतो
### *(मत्तय 27:15-31; लूक 23:13-25; योहान 18:39-19:16)*

6वल्हांडण सणाच्या वेळी ते कोणत्याही एका कैद्याच्या
सुटकेची मागणी करीत असत. त्याला पिलात रिवाजा
प्रमाणे लोकांसाठी सोडत असे. 7बरब्बा नावाचा एक मनुष्य,
बंडखोरांबरोबर तुरुंगात होता. या लोकांनी दंगलीमध्ये
खून केला होता. 8लोक आले आणि पिलाताला तो नेहमी
त्यांच्यासाठी करीत असे तसे करायला लावले.
9पिलाताने विचारले, "तुमच्यासाठी यहूद्यांच्या राजाला
सोडावे अशी तुमची इच्छा आहे काय?" 10पिलात असे
म्हणाला कारण त्याला माहीत होते की, द्वेषामुळे मुख्य
याजकांनी येशूला धरून दिले होते. 11परंतु पिलाताने
त्याच्याऐवजी बरब्बाला सोडावे असे मुख्य याजकांनी
लोकांना चिथावले.
12परंतु पिलात त्यांना पुन्हा म्हणाला, "तर मग तुम्ही
ज्याला यहूद्यांचा राजा म्हणता त्याचे मी काय करावे अशी
तुमची इच्छा आहे?"
13ते पुन्हा मोठ्याने ओरडले, "त्याला वधस्तंभावर
खिळा!"
14पिलाताने पुन्हा विचारले, "का? त्याने कोणता गुन्हा
केला आहे?" ते सर्व अधिकच मोठ्याने ओरडले, "त्याला
वधस्तंभावर खिळा!"

15पिलाताला लोकांना खूष करायचे होते म्हणून त्याने त्यांच्यासाठी बरब्बाला सोडले आणि येशूला फटके मारून वधस्तंभावर खिळण्यासाठी शिपायांच्या स्वाधीन केले. 16शिपायांनी येशूला राज्यपालाच्या राजवाड्यात, ज्याला प्रयटोरियम म्हणतात तेथे नेले आणि त्यांनी सैनिकांची एक तुकडीच एकत्र बोलाविली. 17त्यांनी त्याच्या अंगावर जांभळा झगा घातला व काट्यांचा मुगुट करून त्याला घातला. 18ते त्याला मुजरा करू लागले आणि म्हणू लागले, “यहूद्यांच्या राजाचा जयजयकार असो.” 19त्यांनी वेताच्या काठीने वारंवार त्याच्या डोक्यावर मारले. त्याच्यावर थुंकले आणि गुडघे टेकून त्याला नमन केले. 20त्यांनी त्याची थट्टा केल्यावर त्याच्या अंगावरून जांभळा झगा काढून घेतला व त्याचे स्वत:चे कपडे त्याला घातले. नंतर वधस्तंभावर खिळणे शक्य व्हावे म्हणून ते त्याला बाहेर घेऊन गेले.

## येशूला वधस्तंभावर जिवे मारतात
***(मत्तय 27:32-44; लूक 23:26-43; योहान 19:17-27)***

21वाटेत त्यांना कुरेने येथील शिमोन नावाचा एक मनुष्य दिसला. तो अलेक्सांद्र व रूफ यांचा पिता होता व आपल्या शेतातून घरी परत चालला होता. मग सैनिकांनी त्याला जबरदस्तीने येशूचा वधस्तंभ वहावयास लावले. 22आणि त्यांनी येशूला गुलगुथा म्हणजे ‘कवटीची जागा’ म्हटलेल्या ठिकाणी आणले. 23त्यांनी त्याला बोळ मिसळलेला द्राक्षारस दिला परंतु त्याने तो घेतला नाही. 24त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले. कोणी कोणते कपडे घ्यावे यासाठी त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या व त्याचे कपडे वाटून घेतले. 25त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले तेव्हा सकाळचे नऊ वाजले होते. 26आणि त्याच्यावर त्याच्या दोषारोपाचा लेख, “यहूद्याचा राजा” असा लिहिला होता. 27त्यांनी त्याच्याबरोबर दोन लुटारूंना एकाला त्याच्या उजवीकडे व दुसऱ्याला त्याच्या डावीकडे वधस्तंभावर खिळले होते. 28* 29जवळून जाणारे लोक त्याची निंदा करीत होते. ते आपली डोकी हलवून म्हणाले, “अरे! मंदिर पाडून ते तीन दिवसात बांधणारा तो तूच ना! 30वधस्तंभावरून खाली ये आणि स्वत:चा बचाव कर.”

31तसेच मुख्य याजकांनी, नियमशास्त्राच्या शिक्षकांनी येशूची थट्टा केली आणि एकमेकाला म्हणाले, “त्याने दुसऱ्यांचे तारण केले पण त्याला स्वत:चा बचाव करता येत नाही! 32या मशीहाला, इस्राएलाचा राजा ख्रिस्त याला वधस्तंभावरून खाली येऊ द्या मग आम्ही ते पाहू आणि त्याच्यावर विश्वास ठेवू” आणि जे त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळले होते त्यांनी देखील त्याचा अपमान केला.

## येशूचे मरण
***(मत्तय 27:45-56; लूक 23:44-49; योहान 19:28-30)***

33दुपारची वेळ झाली. सगळ्या भूमीवर अंधार पडला. तो अंधार दुपारी तीन वाजेपर्यंत राहिला. 34मग तीन वाजता ख्रिस्त मोठ्याने आरोळी मारून म्हणाला, ‘एलोई, एलोई, लमा सबखथनी,” म्हणजे, “माझ्या देवा, माझ्या देवा, माझा त्याग तू का केलास?”

35जवळ उभे असलेल्या काही जणांनी हे ऐकले तेव्हा ते म्हणाले, “ऐका, तो एलीयाला बोलवीत आहे.”

36एक जण धावत गेला. त्याने स्पंज आंबेत बुडवून भरला. काठीवर ठेवला व तो येशूला पिण्यास दिला आणि म्हणाला, “थांबा! एलीया येऊन त्याला खाली उतरवितो की काय हे आपण पाहू.”

37मग मोठ्याने आरोळी मारून येशूने प्राण सोडला. 38तेव्हा मंदिरातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटला व त्याचे दोन भाग झाले.

39येशूच्या पुढे उभे असलेल्या सेनाधिकाऱ्याने जेव्हा त्याची आरोळी ऐकली आणि तो कसा मरण पावला हे पाहिले तेव्हा तो म्हणाला, “खरोखर हा मनुष्य देवाचा पुत्र होता.” 40तेथे असलेल्या काही स्त्रिया दुरून पाहत होत्या. त्यांच्यामध्ये मरीया मग्दालिया, धाकटा याकोब आणि योसे यांची आई मरीया व सलोमी या होत्या. 41येशू जेव्हा गालीलात होता तेव्हा या स्त्रिया त्याच्या मागे जात व त्याची सेवा करीत असत. याशिवाय त्याच्याबरोबर यरुशलेमेपर्यंत आलेल्या इतर अनेक स्त्रियाही होत्या.

## येशूला पुरतात
***(मत्तय 27:57-61; लूक 23:50-56; योहान 19:38-42)***

42त्या सुमारास संध्याकाळ झाली होती आणि तो तयारीचा म्हणजे शब्बाथाच्या आधीचा दिवस होता. 43योसेफ अरिमथाईकर न्यायसभेचा माननीय सभासद होता व तो सुद्धा देवाचे राज्य येण्याची वाट पाहत होता. तो योसेफ धैर्याने पिलाताकडे गेला आणि त्याने येशूचे शरीर मागितले. 44येशू इतक्या लवकर कसा मरण पावला याचे पिलाताला आश्चर्य वाटले. मग त्याने सेनाधिकारी बोलाविले आणि त्याना विचारले. येशूला मरून बराच वेळ झाला की काय? 45सेनाधिकाऱ्याकडून त्याने अहवाल ऐकला, तेव्हा त्याने ते शरीर योसेफाला दिले. 46मग योसेफाने तागाचे वस्त्र विकत आणले. आणि येशूला वधस्तंभावरून खाली काढले व त्याला तागाच्या वस्त्रात गुंडाळून ते त्याने खडकात खोदलेल्या कबरेत ठेवले. नंतर त्याने कबरेच्या तोंडावर धोंड बसविली. 47येशूला कोठे ठेवले हे मरीया मग्दालिया आणि योसेची आई मरीया हे सर्व बघत होत्या येशूला कुठे ठेवले हे त्यांनी पाहिले.

---

**वचन 28** काही ग्रीक आवृत्त्या 28 वे वचन घालतात. “आणि त्याला गुन्हेगारांमध्ये ठेवले हा शास्त्रलेख पूर्ण झाला.”

## येशू मरणातून उठला हे अनुयायांना कळते
***(मत्तय 28:1-8; लूक 24:1-12; योहान 20:1-10)***

16 शब्बाथाचा दिवस संपला तेव्हा मरीया मग्दालिया,
याकोबाची आई मरीया आणि सलोमी यांनी त्याला
लावण्याकरिता सुगंधी तेल विकत आणले. [2]आणि
आठवड्याच्या पहिल्या दिवशी, अगदी पहाटे सूर्योदयाच्या
वेळी त्या कबरेकडे गेल्या. [3]त्या एकमेकीस म्हणत होत्या
की, "कबरेच्या तोंडावरून आपणांसाठी धोंड कोण बाजूला
लोटील?"
[4]नंतर त्यांनी वर पाहिले आणि त्यांना धोंड दूर लोटलेली
आढळली. ती फारच मोठी होती. [5]त्या कबरेत आत
गेल्या तेव्हा त्या भयचकित झाल्या. त्यांना एक तरुण
पुरुष उजव्या बाजूस बसलेला आढळला. त्याने पांढरा
शुभ्र झगा घातला होता.
[6]तो त्यांना म्हणाला, "भयभीत होऊ नका, तुम्ही
नासरेथकर येशू जो वधस्तंभावर खिळला होता त्याचा
शोध करीत आहात. पण तो उठला आहे. येथे नाही.
त्यांनी त्याला ठेवले होते ती जागा पाहा. [7]जा आणि त्याच्या
शिष्यांना व पेत्रालाही सांगा की, तो तुमच्या अगोदर
गालीलात जात आहे. त्यांने तुम्हांस सांगितल्याप्रमाणे तेथे
तो तुम्हांस दृष्टीस पडेल."
[8]मग त्या बाहेर गेल्या आणि भीतीमुळे कबरेपासून
पळाल्या. त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी कोणाला काहीही
सांगितले नाही. कारण त्या भयभीत झाल्या होत्या.

## काही शिष्य येशूला पाहतात
***(मत्तय 28:9-10; योहान 20:11-18; लूक 24:13-35)***

[9]आठवड्याच्या पहिल्या दिवशी येशू उठल्यावर त्याने
प्रथम मरीया मग्दालियाला, जिच्यातून त्याने सात भुते
काढली होती, तिला दर्शन दिले.
[10]ती गेली आणि रडून शोक करणाऱ्या त्याच्या
अनुयायांना तिने हे वृत्त सांगितले. [11]त्यांनी ऐकले की तो
जिवंत आहे. व तिने त्याला पाहिले आहे. तेव्हा त्यांनी
तिच्या म्हणण्यावर विश्वास ठेवला नाही.
[12]यानंतर त्यांच्यापैकी दोघे उघड्या माळरानावर चालले
होते. गावाकडे जात असता येशू त्यांना दुसऱ्या रूपाने
प्रगट झाला. [13]ते परत आले व इतरांना त्याविषयी सांगितले
परंतु त्यांनी त्यांवरही विश्वास ठेवला नाही.

## .येशू शिष्यांबरोबर बोलतो
***(मत्तय 28:16-20; लूक 24:36-49; योहान 20:19-23; प्रेषितांची कृत्ये 1:6-8)***

[14]नंतर अकरा जण जेवत बसले असता येशू त्यांना
प्रगट झाला. त्याने शिष्यांच्या अविश्वासाबद्दल आणि त्यांच्या
अंत:करणाच्या कठोरतेबद्दल त्यांना समज दिली. कारण
ज्यांनी त्याला उठल्यावर पाहिले होते त्यांच्यावर त्यांनी
विश्वास ठेवला नाही.
[15]तो त्यांना म्हणाला, "संपूर्ण जगात जा आणि सर्व
सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा." [16]जो कोणी विश्वास
धरतो आणि बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, परंतु जो
विश्वास ठेवीत नाही त्याचा धिक्कार होईल. [17]आणि जे
विश्वास धरतील त्यांच्याबरोबर ही चिन्हे असतील. ते
माझ्या नावाने भुते काढतील, ते नव्या नव्या भाषा बोलतील.
[18]ते आपल्या हातांनी साप उचलतील आणि ते कोणतेही
विष पितील तेव्हा ते त्यांना बाधणार नाही. ते आजाऱ्यांवर
हात ठेवतील आणि ते बरे होतील."
[19]मग प्रभु येशू त्यांच्याबरोबर बोलल्यानंतर तो स्वर्गात
घेतला गेला आणि देवाच्या उजव्या बाजूस जाऊन बसला.
[20]शिष्य बाहेर गेले आणि त्यांनी प्रत्येक ठिकाणी सुवार्तेची
घोषणा केली. प्रभूने त्यांच्याबरोबर कार्य केले, व त्याने
वचनाबरोबर असणाऱ्या चिन्हांनी त्याची खात्री केली.

# लूकाने लिहिलेले शुभवर्तमान

### लूक येशूच्या जीवनाविषयी लिहितो

1 पुष्कळ लोकांनी आमच्यामध्ये घडलेल्या ऐतिहासिक
घटनांची नोंद करण्याचा प्रयत्न केला. 2त्यांनी त्याच
गोष्टी लिहिल्या ज्या आम्हांला काही इतर लोकांकडून
समजल्या होत्या–या लोकांनी त्या गोष्टी सुरुवातीपासून
पाहिल्या होत्या आणि देवाचा संदेश लोकांना सांगून त्याची
सेवा केली होती. 3थियफिला महाराज, सुरुवातीपासून या
सगळ्या गोष्टींचा काळजीपूर्वक अभ्यास मी केला आहे,
म्हणून मला असे वाटले की, या सर्व घटनांविषयी आपणांला
व्यवस्थित माहिती लिहावी. 4हे मी यासाठी लिहित आहे
की, जे काही तुम्हांला शिकविण्यात आले ते खरे आहे,
हे तुम्हांला समजावे.

### जखऱ्या आणि अलीशिबा

5यहूदीयाचा राजा हेरोद याच्या दिवसांत, जखऱ्या नावाचा
एक याजक होता. तो अबीयाच्या याजककुळातील होता.
त्याला एक पत्नी होती. ती अहरोनाच्या वंशातील कन्यांपैकी
होती. तिचे नाव अलीशिबा होते. 6दोघेही देवाच्या दृष्टीने
धार्मिक होते आणि प्रभूच्या आज्ञा व विधी पाळण्यात
काटेकोर होते. 7परंतु त्यांना मूल नव्हते कारण अलीशिबा
वांझ होती. आणि शिवाय दोघेही फार म्हातारे झाले होते.
8जेव्हा जखऱ्याच्या गटाची मंदिरात सेवा करण्याची
वेळ आली आणि त्यावेळी तो तेथे देवाचा याजक म्हणून
सेवा करीत होता, 9याजकांच्या प्रथेप्रमाणे मंदिरात देवापुढे
धूप जाळण्यासाठी चिठ्ठ्या टाकून त्याची निवड करण्यात
आली. 10जेव्हा धूप जाळण्याच्या वेळी सर्वजण बाहेर जमून
प्रार्थना करीत होते, 11तेव्हा देवाच्या दूताने त्याला दर्शन
दिले. देवदूत धूप जाळण्याच्या वेदीच्या उजव्या बाजूला
उभा होता. 12जेव्हा जखऱ्याने त्याला पाहिले तेव्हा तो
अस्वस्थ झाला, आणि त्याला भीति वाटली. 13देवदूत
त्याला म्हणाला, “जखऱ्या, भिऊ नको, कारण तुझी प्रार्थना
ऐकण्यात आली आहे, आणि तुझी पत्नी अलीशिबा
इजपासून तुला मुलगा होईल. तू त्याचे नाव योहान ठेव.
14तो तुला आनंद आणि सुख देईल. त्याचा जन्म होईल
तेव्हा पुष्कळ लोक आनंदित होतील. 15देवाच्या दृष्टीने
तो महान होईल. त्याने कोणतेही कडक पेय किंवा मद्य
पिऊ नये. आणि तो आईच्या गर्भात असल्यापासूनच पवित्र
आत्म्याने भरलेला असेल. 16आणि तो पुष्कळ इस्राएल
लोकांना प्रभु त्यांचा देव याच्याकडे वळविण्यास कारणीभूत
ठरेल. 17योहान स्वत: देवापुढे चालेल. तो एलीयाप्रमाणे
समर्थ होईल. एलीयाला जो आत्मा होता, तोच त्याला
असेल. तो वडिलांची अंत:करणे त्यांच्या मुलांकडे वळवील.
आज्ञा न मानणाऱ्यांना तो धार्मिकतेकडे नेईल. प्रभूसाठी
लोकांना तयार करण्यासाठी तो या गोष्टी करील.”
18मग जखऱ्या देवदूताला म्हणाला, “हे खरे आहे हे
मला कसे समजेल? कारण मी वृद्ध मनुष्य आहे, आणि
माझी पत्नीसुद्धा वृद्ध झाली आहे.”
19आणि देवदूताने उत्तर दिले. तो म्हणाला, “मी गब्रीएल
आहे. मी देवाच्या समक्षतेमध्ये उभा राहतो. आणि मला
तुझ्याशी बोलायला व तुला ही सुवार्ता सांगायला पाठविण्यात
आले आहे. 20पण हे लक्षात ठेव, तू मुका राहशील. हे
घडेपर्यंत तुला बोलता येणार नाही. कारण माझे शब्द जे
योग्य वेळी खरे ठरणार आहेत त्या माझ्या शब्दांवर तू
विश्वास ठेवला नाहीस.” 21लोक जखऱ्याची वाट पाहत
होते, आणि तो मंदिरात इतका वेळ का राहिला याचे
त्यांना नवल वाटत होते. 22जेव्हा तो बाहेर आला तेव्हा
त्याला त्यांच्याशी बोलता येईना. मग त्यांना जाणीव झाली
की, मंदिरात त्याने दृष्टान्त पाहिला आहे. तो त्यांना खुणा
करीत होता परंतु बोलू शकत नव्हता.
23मग असे झाले की, त्याच्या सेवेचा कालावधि
संपल्यानंतर तो घरी गेला.
24काही काळानंतर त्याची पत्नी अलीशिबा गरोदर
राहिली. आणि पाच महिने तिने स्वत: एकांतवास पत्करला.
ती म्हणाली, 25“शेवटी आता प्रभूने मला या मार्गाने मदत
केली आहे. लोकांमध्ये माझी लाज राखण्यासाठी त्याने
माझी पुष्कळ काळजी घेतली.”

### कुमारी मरीया

26अलीशिबाच्या सहाव्या महिन्यात, देवाने गब्रीएल
दूताला गालीलातील नासरेथ गावी पाठविले. 27योसेफ
नावाच्या मनुष्याशी ज्या कुमारीची मागणी झाली होती,
तिच्याकडे गब्रीएलाला पाठविण्यात आले. योसेफ हा
दाविदाच्या* घराण्यातील होता. तिचे नाव मरीया होते.
28गब्रीएल तिच्याकडे आला आणि म्हणाला, “अभिवादन!

---

**दावीद** ख्रिस्तपूर्व 1000 वर्षे, इस्राएलाचा राजा.

तुझ्यावर कृपा झालेली आहे. प्रभु तुझ्याबरोबर आहे."
29परंतु या शब्दांनी ती अस्वस्थ झाली, आणि या
अभिवादनाचा अर्थ काय असावा याचे ती नवल करू
लागली.

30देवदूत तिला म्हणाला, "मरीये, भिऊ नकोस, देवाने
तुझ्यावर कृपा केली आहे. 31ऐक! तू गरोदर राहशील,
आणि तुला मुलगा होईल, त्याचे नाव तू येशू ठेव. 32तो
महान होईल व त्याला सर्वोच्च देवाचा पुत्र म्हणतील.
आणि प्रभु देव त्याला त्याचा पिता दावीद याचे सिंहासन
देईल. 33याकोबाच्या घराण्यावर सर्वकाळासाठी तो सत्ता
चालवील. त्याच्या राज्याचा कधीही अंत होणार नाही."
34तेव्हा मरीया दूताला म्हणाली, "मी कुमारी असल्याने हे
असे कसे घडेल?"

35देवदूत तिला म्हणाला, "पवित्र आत्मा तुझ्यावर येईल,
आणि सर्वोच्च देवाचे सामर्थ्य तुझ्यावर सावली करील.
आणि म्हणून जे पवित्र बाळ जन्मास येईल, त्याला देवाचा
पुत्र म्हणतील. 36आणि याकडे लक्ष दे: तुझी नातेवाईक
अलीशिबा जरी वांझ असली तरी तीसुद्धा गरोदर आहे व
तिच्या पोटी पुत्र आहे. आणि ज्या स्त्रीला ते म्हणाले की
तुला मूल होणार नाही तिला आता सहावा महिना आहे!
37कारण देवाला कोणतीही गोष्ट अशक्य नाही."

38मरीया म्हणाली, "मी प्रभूची दासी आहे, आपण
म्हणालात तसे माझ्याबाबतीत घडो." मग देवदूत तिला
सोडून गेला.

## जखऱ्या व अलीशिबेला मरीया भेटते

39त्याच वेळी मरीया तयार झाली आणि लगेच यहूदीयाच्या
डोंगराळ भागातील एका गावी गेली. 40तिने जखऱ्याच्या
घरात प्रवेश केला आणि अलीशिबेला अभिवादन केले.
41आणि असे झाले की, जेव्हा अलीशिबेने मरीयेचे
अभिवादन ऐकले तेव्हा तिच्या पोटातील बालकाने उडी
मारली. आणि अलीशिबा पवित्र आत्म्याने भरून गेली.
42ती मोठ्या आवाजात बोलली, "सर्व स्त्रियांमध्ये तू अधिक
धन्य आहेस, तुझ्या पोटचे फळ धन्य आहे. 43परंतु माझ्या
बाबतीत अशी कोणती गोष्ट घडली की माझ्या प्रभूच्या
आईने माझ्याकडे यावे? 44कारण तुझ्या अभिवादनाचा
आवाज माझ्या कानी पडताक्षणीच, माझ्या पोटातील बाळाने
आनंदाने उडी घेतली. 45प्रभूने तुला ज्या गोष्टी घडतील
असे सांगितले त्यावर तू विश्वास ठेवलास म्हणून तू धन्य
आहेस."

## मरीया देवाची स्तुति करते

46आणि मरीया म्हणाली,

47"माझा आत्मा प्रभूची स्तुति करतो;माझा आत्मा माझ्या
तारणाऱ्या देवामध्ये आनंद करतो.

48कारण त्याने त्याच्या नम्र दासीची काळजी वाहिली.
होय, येथून पुढे सर्व लोक मला धन्य म्हणतील.

49कारण सर्वसमर्थाने माझ्यासाठी महान कृत्ये केली
आहेत. त्याचे नाव पवित्र आहे.

50जे त्याचे भय धरतात, त्यांच्यावर तो पिढ्यान्पिढ्या
दया करतो.

51त्याने आपल्या बाहूंनी आपले सामर्थ्य दाखविले;
गर्विष्ठ लोकांना त्यांच्या बढाईखोर विचारांसह विखरून
टाकले आहे.

52सत्ताधीशांना त्याने त्यांच्या सिंहासनावरून खाली
आणले आहे, आणि नम्र जनांना त्याने उंच केले आहे.

53त्याने भुकेलेल्यांना उत्तम पदार्थांनी समाधान दिले
आहे. श्रीमंत लोकांना त्याने रिकामे पाठविले आहे.

54त्याचा सेवक जो इस्राएल याला मदत करण्यास तो
आला आहे.

55त्याने आपल्या पूर्वजांना जे अभिवचन दिले होते
त्याप्रमाणे अब्राहाम व त्याच्या वंशजांवर दया करण्याचे
तो लक्षात ठेवतो."

56मरीया अलीशिबेबरोबर तीन महिने राहिली, आणि
मग ती तिच्या घरी परत गेली.

## योहानाचा जन्म

57अलीशिबेला तिचे मूल होण्याची वेळ आली, तेव्हा
तिने एका मुलाला जन्म दिला. 58तिच्या शेजाऱ्यांनी व
नातेवाईकांनी ऐकले की, देवाने तिच्यावर मोठी कृपा
केली आहे. ते तिच्या आनंदात सहभागी झाले.

59मग असे झाले की, आठव्या दिवशी मुलाची सुंता
करण्यासाठी ते आले, ते, त्याच्या बापाचे जे नाव होते तेच
म्हणजे जखऱ्या नाव ठेवणार होते. 60पण त्याची आई
म्हणाली, "नाही, त्याला योहान असे म्हणावे."

61ते तिला म्हणाले, "तुझ्या कोणत्याच नातेवाईकाचे
नाव ते नाही." 62नंतर त्यांनी त्याच्या वडिलांना खुणेने
विचारले," त्याला कोणते नाव ठेवायचे आहे?"

63त्याने लिहिण्यासाठी पाटी मागितली आणि लिहिले,
"त्याचे नाव योहान आहे." त्या सर्वांना खूपच आश्चर्य
वाटले. 64लगेच त्याचे तोंड उघडले आणि त्याची जीभ
मोकळी झाली, आणि तो बोलू लागला व देवाची स्तुति
करू लागला. 65सर्व शेजारी भयभीत झाले आणि
यहूदीयाच्या सर्व डोंगराळ प्रदेशात लोक या सर्व गोष्टींबद्दल
बोलत होते. 66ज्या कोणी हे ऐकले त्या प्रत्येकाने याविषयी
नवल केले. ते म्हणाले, "हे मूल पुढे कोण होणार आहे?"
कारण देवाचा वरदहस्त त्यांच्यावर होता.

## जखऱ्या देवाची स्तुति करतो

67मग त्याचा पिता जखऱ्या पवित्र आत्म्याने भरला
गेला, त्याने भविष्यवाणी केली; तो म्हणाला,

68"प्रभु, इस्राएलाचा देव धन्यवादित असो, कारण तो
त्याच्या लोकांना मदत करण्यास, व त्यांना मुक्त करण्यास
आला आहे.

69त्याने आमच्यासाठी आपला सेवक दावीद याच्या
घराण्यातून आम्हांला सामर्थ्यशाली तारणारा दिला आहे.

70देव म्हणाला की, मी असे करीन त्याच्या पवित्र
भविष्यवाद्यांकरवी तो हे बोलला व ते फार वर्षां पूर्वी
होऊन गेले.

71जे आमचे शत्रू आहेत व जे आमचा द्वेष करतात
त्यांच्यापासून मुक्त करण्याचे अभिवचन त्याने आम्हांला
दिले.

72आमच्या पूर्वजांवर दया दाखविण्यासाठी तो हे करणार
आहे. व त्यांच्याशी केलेला पवित्र करार लक्षात
ठेवण्यासाठी तो आमचे रक्षण करणार आहे.

73हा करार एक शपथ होती, जी त्याने आमचा पूर्वज
अब्राहाम याच्याशी घेतली

74ती अशी की, तो आम्हांला शत्रूच्या सामर्थ्यापासून
मुक्त करील, अशासाठी की, आम्ही त्याची सेवा निर्भयपणे
करू शकू.

75त्याची अशी इच्छा होती की, आम्ही त्याच्यासमोर
धार्मिकतेने व पवित्रतेने आमच्या आयुष्याचे सर्व दिवस
जगावे.

76"मुला, आता तुला सर्वोच्च देवाचा संदेष्टा म्हणतील.
प्रभूच्या येण्यासाठी लोकांना तयार करण्यासाठी तू त्याच्या
(प्रभु) पुढे चालशील.

77कारण तू प्रभूसमोर, त्याचा मार्ग तयार करण्यासाठी
आणि पापक्षमा मिळून तुमचे तारण होईल हे त्याच्या
लोकांना सांगण्यासाठी पुढे जाशील.

78कारण देवाच्या हळुवार करुणेमुळे स्वर्गीय दिवसाची
पहाट उजाडेल व मरणाच्या दाट छायेत जे जगत आहेत
त्यांच्यावर प्रकाशेल.

79आणि शांतीच्या मार्गावर आमच्या पावलांना मार्गदर्शन
करील."

80अशा रीतीने तिचा मुलगा मोठा होत गेला आणि
आत्म्यात सामर्थ्यशाली झाला. इस्राएल लोकांना प्रगट
होण्याच्या दिवसापर्यंत तो अरण्यात राहिला.

## येशूचा जन्म

***(मत्तय 1:18-25)***

2 त्या दिवसात कैसर औगुस्तकडून हुकूम झाला की,
रोमन जगातील सर्व लोकांच्या नावांची नोंद झालीच
पाहिजे. 2ही पहिली नावनोंदणी होती. क्वीरीनिय हा सूरिया
प्रांताचा राज्यपाल होता त्यावेळेस ही नावनोंदणी झाली.
3प्रत्येक जण नावनोंदणी करण्यासाठी आपापल्या गावी
गेला.

4मग योसेफसुद्धा गालीलातील नासरेथ गावाहून
यहूदीयातील दाविदाच्या बेथलेहेम या गावी गेला. कारण
तो दाविदाच्या घराण्यातील व कुळातील होता. 5जिच्याशी
त्याचे लग्न ठरले होते व जी गरोदर होती, त्या मरीयेसह
तो तेथे नावनोंदणी करण्यासाठी गेला. 6ते तेथे असतानाच
तिची बाळंतपणाची वेळ आली. 7आणि तिने तिच्या पहिल्या
मुलाला जन्म दिला. तिने त्याला फडक्यांमध्ये गुंडाळले व
गोठ्यात ठेवले, कारण धर्मशाळेत उतरण्यासाठी त्यांना
जागा मिळाली नाही.

## काही मेंढपाळ येशूविषयी ऐकतात

8आणि तेथे काही मेंढपाळ रात्रीच्या वेळी शेतामध्ये
राहून आपले कळप राखीत होते, 9आणि देवाचा एक दूत
त्यांच्यामोर प्रगट झाला व प्रभूचे तेज त्यांच्याभोवती पसरले.
आणि ते मेंढपाळ घाबरून गेले. 10देवदूत त्यांना म्हणाला:
"भिऊ नका, कारण मी तुम्हांला आनंदाची बातमी सांगणार
आहे, जिच्यामुळे सर्व लोकांना आनंद होणार आहे. 11कारण
आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे. तो ख्रिस्त
प्रभु आहे. 12आणि तुमच्यासाठी ही खूण असेल : फडक्यात
गुंडाळलेले आणि गोठ्यात निजविलेले बाळ तुम्हांला
आढळेल."

13आणि अचानक तेथे देवदूताबरोबर स्वर्गातील सैन्याचा
समुदाय जमला. ते देवाची स्तुति करीत होते आणि म्हणत
होते;

14"स्वर्गात देवाला गौरव आणि ज्यांच्याबद्दल देव
समाधानी आहे, त्या पृथ्वीवरील मनुष्यांत शांति"

15जेव्हा देवदूत त्यांना सोडून परत स्वर्गात गेले, तेव्हां
मेंढपाळ एकमेकांना म्हणाले, "चला, बेथलेहेमला जाऊ
या आणि घडलेली जी गोष्ट देवाने आम्हांला कळविली
ती पाहू या."

16ते घाईने गेले आणि त्यांना मरीया व योसेफ आढळले
आणि त्यांनी गोठ्यात ठेवलेले बाळ पाहिले. 17जेव्हा
मेंढपाळांनी त्याला पाहिले तेव्हा देवदूताने त्यांना त्या
बाळाविषयी जे सांगितले होते ते सर्वांना सांगितले. 18ज्यांनी
हे ऐकले ते सर्व मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टीमुळे चकित
झाले. 19पण मरीयेने या गोष्टी स्वत:जवळच ठेवल्या, व
सतत त्याविषयी विचार करू लागली. 20त्यांनी पाहिलेल्या
आणि ऐकलेल्या सर्व गोष्टींविषयी देवाचे गौरव आणि
स्तुति करीत मेंढपाळ घरी गेले; त्यांना जसे सांगण्यात
आले तसेच सर्व घडले.

21आणि जेव्हा बाळाची सुंता करण्याचा आठवा दिवस
आला, तेव्हा त्याचे नाव येशू ठेवले गेले. हे नाव देवदूतांनी
त्याला त्याची गर्भधारणा होण्यापूर्वीच ठेवले होते.

22मोशेच्या नियमाप्रमाणे जो त्यांचा शुद्धीकरणाच्या
विधीचा काळ होता तो आला तेव्हा त्याला देवापुढे सादर
करण्याचा विधि करण्यासाठी ते त्याला घेऊन यरुशलेमला
गेले. 23ज्याप्रमाणे प्रभूच्या नियमात लिहिले आहे;

"प्रत्येक प्रथम जन्मलेला नर प्रभूला अर्पण करावा."*

---

**प्रत्येक … करावा** निर्गम. 13:2

[24]आणि “कबुतरांच्या जोडीचा किंवा पारव्याच्या दोन
पिलांचा यज्ञ करावा.”*
प्रभूच्या या नियमाप्रमाणे यज्ञ अर्पण करण्यास ते गेले:

## शिमोन येशूला पाहतो

[25]यरुशलेम येथे एक मनुष्य होता, त्याचे नाव शिमोन
होते; तो नीतिमान आणि भक्तिशील होता. इस्राएलाचे सांत्वन
होण्याची तो वाट पाहत होता आणि पवित्र आत्मा त्याच्यावर
होता. [26]पवित्र आत्म्याने त्याला दाखवून दिले की, प्रभूच्या
ख्रिस्ताला पाहिल्याशिवाय तो मरणार नाही. [27]आत्म्याने
भरलेला तो मंदिरात गेला. आणि येशूच्या आईवडिलांनी
बाळाला नियमशास्त्रात सांगितलेल्या विधीप्रमाणे
करण्यासाठी त्याच्याजवळ आणले. [28]शिमोनाने येशूला
आपल्या हातात घेतले, आणि त्याने देवाची स्तुति केली.
तो म्हणाला:

[29]“आता, प्रभु, आपल्या वचनाप्रमाणे आपल्या सेवकाला
जाऊ दे,
[30]कारण माझ्या डोळ्यांनी तुझे तारण पाहिले आहे,
[31]जे तू सर्व लोकांच्या समोर केलेस.
[32]तो यहूदीतर लोकांना तुझा मार्ग प्रगट करण्यासाठी
प्रकाश असा आहे. आणि तो तुझे लोक इस्राएल यांच्यासाठी
गौरव असा आहे.”

[33]त्याच्याविषयी सांगितलेल्या गोष्टींमुळे त्याचे
आईवडील आश्चर्यचकित झाले. [34]मग शिमोनाने त्यांना
आशीर्वाद दिला, तो येशूची आई मरीया हिला म्हणाला,
“इस्राएलात, हे मूल, अनेकांचे पडणे व उठणे यांस
कारणीभूत ठरेल. जे चिन्ह नाकारले जाईल ते होण्याकरिता
याची नेमणूक झाली आहे. [35]अनेकांच्या मनातील विचार
प्रगट होण्यासाठी तुझ्या जिवातून तरवार आरपार जाईल.”

## हन्ना येशूला पाहते

[36]तेथे हन्ना नावाची एक संदेष्टी स्त्री होती. ती फनूएलाची
मुलगी होती. ती अशेर वंशाची होती. ती फार वृद्ध झाली
होती. ती लग्नानंतर आपल्या पतीसमवेत सात वर्षे राहिली.
[37]ती विधवा असून आता चौऱ्याऐंशी वर्षांची होती. तिने
मंदिर कधीही सोडले नाही; उपास व प्रार्थना करून ती
रात्रंदिवस उपासना करीत असे.
[38]ती त्यावेळी बालकाच्या आईवडिलांकडे आली व
तिने देवाचे आभार मानले. आणि जे यरुशलेमच्या
सुटकेविषयी वाट पाहत होते त्या सर्वांना तिने त्याच्याविषयी
सांगितले.

## योसेफ आणि मरीया घरी येतात

[39]प्रभूच्या नियमशास्त्राप्रमाणे त्यांनी सर्व पूर्ण केले व
नंतर ते गालीलातील त्यांच्या नासरेथ या गावी परतले.
[40]बालक वाढत होता, तो बलवान झाला, तो ज्ञानाने
परिपूर्ण झाला आणि देवाची कृपा त्याच्यावर होती.

## येशूचे बालपण

[41]प्रत्येक वर्षी त्याचे आईवडील वल्हांडण सणासाठी
यरुशलेमाला जात. [42]जेव्हा तो बारा वर्षांचा झाला तेव्हा
ते नेहमीप्रमाणे सणासाठी वर गेले. [43]सण संपल्यावर ते
घरी परतत असता, येशू (मुलगा) मात्र यरुशलेमातच
राहिला, पण त्याच्या आईवडिलांना हे माहीत नव्हते.
[44]कुठल्या तरी प्रवाश्यांच्या घोळक्याबरोबर तो येत असावा
असा विचार करून पुढे एक दिवसाचा प्रवास केला. मग
ते त्याला त्यांच्या नातेवाईकांमध्ये व मित्रांमध्ये शोधू लागले.
[45]जेव्हा तो त्यानां सापडला नाही तेव्हा त्याला शोधण्यासाठी
यरुशलेमास परत गेले.
[46]असे घडले की, तीन दिवसांनंतर तो त्यांना मंदिरात
सापडला. तो गुरुजनांच्यामध्ये बसून त्यांचे ऐकत होता व
त्यांना प्रश्न विचारीत होता. [47]ज्यांनी त्याचे बोलणे ऐकले
ते सर्व त्याच्या समजबुद्धीमुळे आणि उत्तरांमुळे चकित
झाले.
[48]जेव्हा त्याच्या आईवडिलांनी त्याला पाहिले तेव्हा ते
चकित झाले. त्याची आई त्याला म्हणाली, “मुला, तू
आमच्याबरोबर असे का केले? तुला शोधत असताना
तुझे वडील व मी अतिशय काळजीत होतो.”
[49]मग येशू त्यांना म्हणाला, “तुम्ही माझा शोध का
केलात? माझ्या पित्याचे कार्य जेथे आहे, तेथे मी असावे
हे तुम्हांला माहीत नव्हते काय?” [50]परंतु त्याने हे जे उत्तर
दिले ते त्यांना समजले नाही.
[51]मग तो त्यांच्याबरोबर नासरेथास गेला. आणि तो
त्यांच्या आज्ञेत राहिला. त्याची आई या सर्व गोष्टी
अंत:करणात ठेवीत होती. [52]येशू ज्ञानाने आणि शरीराने
देवाच्या आणि मनुष्यांच्या कृपेत वाढला.

## योहानाचा संदेश

*(मत्तय 3:1-12; मार्क 1:1-8; योहान 1:19-28)*

3 तिबिर्य कैसराच्या कारकीर्दीच्या पंधराव्या वर्षी, जेव्हा
पंतय पिलात यहूदीयाचा राज्यपाल होता, आणि हेरोद
गालीलचा अधिकारी असताना, आणि त्याचा भाऊ
फिलिप्प हा इतुरीया व त्राखोनीती या देशांचा अधिकारी
होता व लूसनिय हा अबिलेनेचा अधिकारी होता.

[2]हनन्या व केफा हे मुख्य याजक होते, तेव्हा वाळवंटात
देवाचे वचन जखऱ्याचा पुत्र योहान याच्याकडे आले. [3]तो
यार्देनेच्या सभोवतालच्या सर्व परिसरात गेला, व लोकांना
त्यांच्या पापांपासून क्षमा मिळण्यासाठी पश्चात्तापाचा

---

**कबुतरांच्या … करावा** लेवीय 12:8

बाप्तिस्मा घेण्याविषयी घोषणा करीत फिरला. 4हे यशया
संदेष्ट्याच्या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे झाले:

“वाळवंटात कोणाचा तरी आवाज ऐकू आला, ‘प्रभूसाठी
मार्ग तयार करा, त्याचे रस्ते सरळ करा.
5प्रत्येक दरी भरून येईल, आणि प्रत्येक डोंगर व
टेकडी सपाट केली जाईल वाकड्यातिकड्या जागा
सरळ केल्या जातील ओबडधोबड रस्ते सपाट केले जातील
6आणि सर्व लोक देवाचे तारण पाहतील!’”

*यशया 40:3-5*

7त्याच्याकडून बाप्तिस्मा करून घेण्यासाठी येणाऱ्या
जमावाला योहान म्हणाला: “अहो, सापाच्या पिल्लांनो,
येणाऱ्या क्रोधापासून सुटका करून घेण्यासाठी तुम्हांला
कोणी सावध केले? 8पश्चात्तापास योग्य असे फळ द्या,
आणि आपापसात असे म्हणू नका की, ‘आमच्यासाठी
अब्राहाम आमच्या पित्यासारखा आहे.’ मी तुम्हांला सांगतो
की, अब्राहामासाठी मुले निर्माण करण्यास देव या खडकांचा
उपयोग करण्यास समर्थ आहे. 9आणि झाडांच्या मुळांशी
कुऱ्हाड अगोदरच ठेवलेली आहे. आणि प्रत्येक झाड जे
चांगले फळ देत नाही ते तोडून आगीत टाकले जाईल.”
10जमावाने त्याला विचारले, “मग आता आम्ही काय
करावे?”
11त्याने उत्तर दिले, “ज्याच्याकडे दोन सदरे असतील
त्याने ज्याच्याकडे काहीच नाही त्याला ते वाटून द्यावे.
ज्याच्याकडे अन्न आहे त्यानेही तसेच करावे.”
12काही जकातदारही बाप्तिस्मा करून घ्यावयास आले
होते. ते म्हणाले, “गुरुजी, आम्ही काय करावे?”
13तो त्यांना म्हणाला, “गरजेपेक्षा जास्त जमा करू नका.”
हेच तुम्हांला सांगितले आहे. 14काही शिपायांनीसुद्धा त्याला
विचारले, “आणि आम्ही काय करावे?”
योहान त्यांना म्हणाला, “कोणाकडून बळजबरीने पैसे
घेऊ नका, कोणावरही खोटा आरोप करू नका. आणि
तुम्हांला मिळणाऱ्या पगारात समाधानी राहा.”
15लोक मशीहाची अपेक्षा करीत होते. आणि ते सर्व
त्यांच्या मनामध्ये योहानाबद्दल आश्चर्य करीत होते व
असा विचार करीत होते की, “कदाचित तो ख्रिस्त
असण्याची शक्यता आहे.”
16त्या सर्वांना योहानाने उत्तर दिले; तो म्हणाला, “मी
तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो, पण एकजण जो
माझ्यापेक्षाही सामर्थ्यशाली आहे तो येत आहे. त्याच्या
वहाणांचे बंद सोडण्यासही मी पात्र नाही. तो तुमचा बाप्तिस्मा
पवित्र आत्म्याने व अग्नीने करील. 17त्याचे खळे स्वच्छ
करण्यासाठी व त्याच्या कोठारात गहू साठविण्यासाठी
त्याच्या हातात त्याचे सूप आहे पण भुसा तो न विझविता
येणाऱ्या अग्नीने जाळून टाकील.” 18योहानाने इतर पुष्कळ
उत्तेजन देणाऱ्या शब्दांनी त्यांना बोध करून सुवार्ता
सांगितली.

19योहानाने हेरोद या सत्ताधीशाची कानउघडणी केली.
कारण त्याने त्याच्या भावाच्या पत्नीशी−हेरोदीयाशी
अनैतिक संबंध होते, तसेच इतर अनेक वाईट गोष्टी
त्याने केल्या होत्या. 20हे सर्व करून सुद्धा त्यात भर
म्हणून की काय त्याने योहानाला तुरुंगात टाकले.

## योहानाकरवी येशूचा बाप्तिस्मा
### (*मत्तय 3:13-17; मार्क 1:9-11*)

21तेव्हा असे झाले की, जेव्हा सर्व लोकांचा बाप्तिस्मा
केला जात होता, तेव्हा येशूचा सुद्धा बाप्तिस्मा झाला. तो
प्रार्थना करीत असता आकाश उघडले गेले. 22आणि
पवित्र आत्मा कबुतराच्या रूपात त्याच्यावर उतरला आणि
आकाशातून एक वाणी आली: “तू माझा प्रिय पुत्र आहेस,
मी तुझ्याविषयी फार संतुष्ट आहे.”

## योसेफाच्या घराण्याचा इतिहास
### (*मत्तय 1:1-17*)

23जेव्हा येशूने त्याच्या कार्यास सुरूवात केली तेव्हा तो
सुमारे तीस वर्षांचा होता. लोकांना असे वाटे की, येशू
योसेफाचा मुलगा आहे. योसेफ एलीचा मुलगा होता 24एली
मत्ताथाचा मुलगा होता, मत्ताथ लेवीचा मुलगा होता. लेवी
मल्खीचा मुलगा होता. मल्खी यन्नयाचा मुलगा होता. यन्नया
योसेफाचा मुलगा होता. 25योसेफ मत्तिथ्याचा मुलगा होता.
मत्तिथ्य अमोसाचा मुलगा होता. अमोस नहूमाचा मुलगा
होता. नहूम हेस्लीचा मुलगा होता. हेस्ली नग्गयाचा मुलगा
होता. 26नग्गय महथाचा मुलगा होता. महथ मत्तिथ्याचा
मुलगा होता. मत्तिथ्य शिमयीचा मुलगा होता. शिमयी
योसेखाचा मुलगा होता. योसेख योदाचा मुलगा होता.
27योदा योहानानाचा मुलगा होता. योहानान रेशाचा मुलगा
होता. रेशा जरूब्बाबेलाचा मुलगा होता. जरूब्बाबेल
शल्तीएलाचा मुलगा होता. शल्तीएल नेरीचा मुलगा होता.
28नेरी मल्खीचा मुलगा होता. मल्खी अद्दीचा मुलगा होता.
अद्दी कोसोमाचा मुलगा होता. कोसोम एल्मदामाचा मुलगा
होता. एल्मदाम एराचा मुलगा होता. 29एर येशूचा मुलगा
होता. येशू अलिएजरचा मुलगा होता. अलिएजर योरीमाचा
मुलगा होता. योरीम मत्ताथाचा मुलगा होता. मत्ताथ लेवीचा
मुलगा होता. 30लेवी शिमोनाचा मुलगा होता. शिमोन
यहूदाचा मुलगा होता. यहूदा योसेफाचा मुलगा होता. योसेफ
योनामाचा मुलगा होता. योनाम एल्याकीमाचा मुलगा होता.
31एल्याकीम मल्ल्याचा मुलगा होता. मल्ल्या मिन्नाचा
मुलगा होता. मिन्ना मत्ताथाचा मुलगा होता. मत्ताथ नाथानाचा
मुलगा होता. नाथान दाविदाचा मुलगा होता. 32दावीद
इशायाचा मुलगा होता. इशाय ओबेदाचा मुलगा होता.
ओबेद बवाजाचा मुलगा होता. बवाज सल्मोनाचा मुलगा
होता. सल्मोन नहशोनाचा मुलगा होता.
33नहशोन अम्मीनादाबाचा मुलगा होता. अम्मीनादाब
अर्णयाचा मुलगा होता. अर्णय हेस्रोनाचा मुलगा होता.

हेस्रोन पेरेसाचा मुलगा होता. पेरेस यहूदाचा मुलगा होता.
34यहूदा याकोबाचा मुलगा होता. याकोब इसहाकाचा मुलगा
होता. इसहाक अब्राहामाचा मुलगा होता. अब्राहाम तेरहाचा
मुलगा होता. तेरह नाहोराचा मुलगा होता. 35नाहोर सरुगाचा
मुलगा होता. सरुग रऊचा मुलगा होता. रऊ पेलेगाचा
मुलगा होता. पेलेग एबराचा मुलगा होता. एबर शेलहाचा
मुलगा होता.
36शेलह केनानाचा मुलगा होता. केनान अर्पक्षदाचा
मुलगा होता. अर्पक्षद शेमाचा मुलगा होता. शेम नोहाचा
मुलगा होता. नोहा लामेखाचा मुलगा होता. 37लामेख
मथुशलहाचा मुलगा होता. मथुशलह हनोखाचा मुलगा
होता. हनोख यारेदाचा मुलगा होता. यारेद महललेलाचा
मुलगा होता. महललेल केनानाचा मुलगा होता.
38केनान अनोशाचा मुलगा होता. अनोश शेथाचा मुलगा
होता. शेथ आदामाचा मुलगा होता. आदाम देवाचा मुलगा
होता.

## येशूची परीक्षा

***(मत्तय 4:1-11; मार्क 1:12-13)***

4 येशू पवित्र आत्म्याने पूर्ण भरून यार्देन नदीहून परतला.
मग आत्म्याने त्याला अरण्यात नेले. 2तेथे सैतानाने
त्याला चाळीस दिवस मोहात टाकले. त्या दिवसांत येशूने
काहीही खाल्ले नाही. जेव्हा ती वेळ संपली, तेव्हा येशूला
भूक लागली.
3सैतान त्याला म्हणाला, "जर तू देवाचा पुत्र आहेस, तर
या दगडांची भाकर करून दाखव."
4येशूने त्याला उत्तर दिले, "असे लिहिले आहे:

'मनुष्य फक्त भाकरीनेच जगेल असे नाही.'"

*अनुवाद 8:3*

5मग सैतान त्याला वर घेऊन गेला. आणि एका क्षणात
जगातील सर्व राज्ये त्याला दाखविली. 6सैतान त्याला
म्हणाला, "मी तुला या सर्व राज्यांचे अधिकार व गौरव
देईन कारण ते मला दिलेले आहे. आणि मी माझ्या
मर्जीनुसार ते देऊ शकतो. 7जर तू माझी उपासना करशील,
तर हे सर्व तुझे होईल."
8येशूने उत्तर दिले, पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे:

"तू प्रभु तुझा देव याचीच उपासना केली पाहिजे, आणि
फक्त त्याचीच सेवा केली पाहिजे.' " *अनुवाद 6:13*

9नंतर त्याने त्याला यरुशलेमाला नेले. आणि मंदिराच्या
उंच टोकावर त्याला उभे केले. आणि तो म्हणाला, "जर
तू देवाचा पुत्र आहेस तर येथून खाली उडी मार! 10असे
लिहिले आहे:

'तो तुझे संरक्षण करण्याची देवदूतांना आज्ञा करील.'

*स्तोत्र. 91:11*

आणि असेही लिहिले आहे:

11'ते तुला आपल्या हातावर उचलून धरतील, त्यामुळे
तुझा पाय दगडावर आपटणार नाही.'" *स्तोत्र. 91:12*

12येशूने उत्तर दिले, "पवित्र शास्त्रात असेही म्हटले
आहे,

'तू प्रभु, तुझा देव याची परीक्षा पाहू नकोस.'"

*अनुवाद 6:16*

13म्हणून सैतानाने प्रत्येक प्रकारे भुरळ घालण्याचे
संपविल्यावर, योग्य वेळ येईपर्यंत तो येशूला सोडून गेला.

## येशू लोकांना शिकवितो

***(मत्तय 4:12-17; मार्क 1:14-15)***

14मग आत्म्याच्या सामर्थ्यात येशू गालीलास परतला
आणि त्याच्याविषयीची बातमी सगळीकडे पसरली. 15त्याने
त्यांच्या सभास्थानात शिकविले. आणि सर्वांनी त्याची स्तुति
केली. 16मग तो नासरेथला गेला. जेथे तो लहानाचा
मोठा झाला होता, आणि शब्बाथ दिवशी त्याच्या प्रथेप्रमाणे
तो सभास्थानात गेला. तो वाचण्यासाठी उभा राहिला,
17आणि यशया संदेष्ट्याचे पुस्तक त्याला देण्यात आले.
त्याने ते पुस्तक उघडले आणि जो भाग शोधून काढला,
त्या ठिकाणी असे लिहिले आहे:

18"प्रभूचा आत्मा मजवर आहे. कारण त्याने मला
अभिषेक केला आहे, यासाठी की, गरिबांना सुवार्ता
सांगण्यासाठी बंदीवान म्हणून नेलेल्यांस स्वातंत्र्याची घोषणा
करण्यासाठी, आंधळ्यांना दृष्टि मिळावी व त्यांनी बघावे
यासाठी, जुलूम होणाऱ्यांची सुटका करण्यासाठी
19आणि प्रभूच्या कृपेच्या वर्षाची घोषणा करण्यासाठी
त्याने मला पाठविले आहे."

*यशया 61:1-2*

20मग त्याने पुस्तक बंद केले आणि सेवकाला परत
दिले व तो खाली बसला. सभास्थानातील प्रत्येक जण
त्याच्याकडे रोखून पाहत होता. 21त्याने त्यांच्याशी बोलण्यास
सुरुवात केली: "तुमच्या ऐकण्यामुळे आज हे शास्त्रवचन
पूर्ण झाले."
22तेव्हा प्रत्येकाने त्याच्याविषयी चांगले उद्गार काढले.
आणि त्याच्या मुखातून येणाऱ्या कृपेच्या शब्दांबद्दल ते
आश्चर्यचकित झाले. आणि ते म्हणाले, "हा योसेफाचाच
मुलगा नव्हे काय?"

[23]तो त्यांना म्हणाला, "अर्थात, तुम्ही मला ही म्हण लागू कराल; 'वैद्या, स्वत:ला बरे कर.' कफर्णहूमात ज्या गोष्टी तू केल्याचे आम्ही ऐकले त्या गोष्टी तुझ्या स्वत:च्या गावातसुद्धा कर."

मग तो म्हणाला, [24]"मी तुम्हांला खरे सांगतो, कोणीही संदेष्टा त्याच्या स्वत:च्या गावात स्वीकारला जात नाही.
[25]मी तुम्हांला खरे सांगतो, इस्राएलात एलीयाच्या काळात पुष्कळ विधवा होत्या, जेव्हा साडेतीन वर्षेपर्यंत पाऊस पडला नाही आणि सर्व प्रदेशात मोठा दुष्काळ पडला होता
[26]तरीही एलीयाला इतर कोणत्याही विधवेकडे पाठविण्यात आले नाही. त्याला सिदोन प्रांतातील सारफथ येथील विधवेकडेच पाठविण्यात आले.
[27]अलीशा संदेष्ट्याच्या वेळेस इस्राएलात अनेक कुष्ठरोगी होते परंतु त्यापैकी कोणीही शुद्ध झाला नाही. केवळ सूरीया येथील नामान कुष्ठरोग्यालाच शुद्ध करण्यात आले होते."

[28]जेव्हा सभास्थानातील लोकांनी हे ऐकले, तेव्हा ते फार रागावले.
[29]ते लोक उठले आणि त्यांनी त्याला (येशूला) शहराबाहेर घालवून दिले आणि ज्या टेकडीवर त्यांचे गाव वसले होते, त्या टेकडीच्या कड्याकडे त्याला ढकलून देण्यासाठी घेऊन गेले.
[30]परंतु तो त्यांच्यातून निघून आपल्या वाटेने गेला.

## येशू अशुद्ध आत्मा असलेल्या मनुष्याला बरे करतो
### (मार्क 1:21-28)

[31]नंतर तो गालीलातील कफर्णहूम गावी गेला. तो त्यांना शब्बाथ दिवशी शिक्षण देत असे.
[32]ते त्याच्या शिकवणीने आश्चर्यचकित झाले, कारण तो अधिकारवाणीने शिकवीत असे.
[33]सभास्थानात एक मनुष्य होता, त्याच्यात अशुद्ध आत्मा होता.
[34]तो मोठ्याने ओरडून म्हणाला, "हे नासरेथच्या येशू, तुला आमच्याकडून काय पाहिजे? तू आमचा नाश करावयास आला आहेस काय? तू कोण आहेस हे मला माहीत आहे: देवाचा पवित्र तोच तू आहेस."
[35]येशूने त्याला दटावले आणि म्हटले, "शांत राहा आणि त्याच्यातून नीघ!" तेव्हा त्या अशुद्ध आत्म्याने त्या मनुष्याला जमिनीवर खाली ढकलले व त्या माणसाला काहीही इजा न करता तो बाहेर आला.

[36]सर्व जण आश्चर्यचकित झाले व एकमेकांशी बोलू लागले, "हे कोणत्या प्रकारचे शब्द आहेत? अधिकाराने आणि सामर्थ्याने तो अशुद्ध आत्म्यांना आज्ञा करतो व ते बाहेर येतात."
[37]अशा प्रकारे त्या भागात त्याच्याविषयी सगळीकडे ही बातमी पसरली.

## येशू एका स्त्रीला बरे करतो
### (मत्तय 8:14-17; मार्क 1:29-34)

[38]येशू सभास्थानातून निघून शिमोनाच्या घरी गेला. शिमोनाची सासू अति तापाने आजारी होती. त्यांनी येशूला तिला बरे करण्याविषयी विनविले.
[39]येशू तिच्याजवळ उभा राहिला. त्याने तापाला आज्ञा दिली व ताप निघाला. ती ताबडतोब उठली आणि त्यांची सेवा करू लागली.

## इतर अनेकांना येशू बरे करतो

[40]सूर्य मावळतीला जात असताना, ज्यांची माणसे निरनिराळ्या रोगांनी आजारी होती त्या सर्वांना लोकांनी त्याच्याकडे आणले. प्रत्येकाच्या डोक्यावर हात ठेवून त्याने त्यांना बरे केले.
[41]कित्येकांमधून अशुद्ध आत्मे बाहेर आले. ते अशुद्ध आत्मे ओरडत होते आणि म्हणत होते, "तू देवाचा पुत्र आहेस." परंतु त्याने त्यांना दटावले व बोलू दिले नाही कारण त्यांना माहीत होते की, तो ख्रिस्त आहे.

## येशू इतर शहरांमध्ये जातो
### (मार्क 1:35-39)

[42]जेव्हा दिवस उगवला तेव्हा तो एकांत स्थळी गेला. पण लोक त्याला शोधत होते. तो जेथे होता तेथे ते लगेच आले. आणि त्याने त्यांच्यातून निघून जाऊ नये म्हणून प्रयत्न केले.
[43]तेव्हा तो त्यांना म्हणाला, "देवाच्या राज्याची सुवार्ता मला इतर गावांमध्येही सांगितली पाहिजे. कारण याच कारणासाठी मला पाठविले आहे."

[44]आणि तो यहूदीयाच्या वेगवेगळ्या सभास्थानात उपदेश करीत होता.

## पेत्र, याकोब आणि योहान येशूच्या मागे जातात
### (मत्तय 4:18-22; मार्क 1:16-20)

5 मग असे झाले की, लोकांनी त्याच्याभोवती गर्दी केली होती व ते देवाचे वचन ऐकत होते आणि तो गनेसरेत सरोवराच्या काठी उभा होता,
[2]तेव्हा त्याने सरोवरातील दोन होड्या पाहिल्या, पण होड्यातील कोळी बाहेर गेले होते व त्यांची जाळी धूत होते.
[3]त्यातील, शिमोनाच्या होडीवर येशू चढला आणि त्याने ती होडी किनाऱ्यापासून थोडी दूर नेण्यास सांगितले. नंतर तो होडीत बसला व लोकांना शिक्षण देऊ लागला.

[4]जेव्हा त्याने बोलणे संपविले, तेव्हा तो शिमोनाला म्हणाला, "खोल पाण्यात होडी ने आणि मासे पकडण्यासाठी तुझे जाळे खाली सोड."

[5]शिमोनाने उत्तर दिले, "गुरुजी संपूर्ण रात्र आम्ही खूप कष्ट घेतले पण काहीच मासे पकडू शकलो नाही. तरी आपण सांगत आहात म्हणून मी जाळे खाली सोडतो."
[6]जेव्हा त्यांनी तसे केले तेव्हा त्यांच्या जाळ्यात भरपूर मासे लागले. पण त्यांचे जाळे तुटू लागल्याने
[7]त्यांनी दुसऱ्या होडीतील आपल्या जोडीदारांना मदत करण्यासाठी बोलाविले. ते आले आणि त्यांनी इतके मासे भरले की, दोन्ही होड्या बुडू लागल्या.
[8]शिमोन पेत्राने जेव्हा हे पाहिले तेव्हा तो येशूच्या पाया पडला आणि म्हणाला, "प्रभु, माझ्यापासून दूर जा कारण मी पापी मनुष्य आहे!"

9तो असे म्हणाला कारण तो आणि त्याच्या साथीदारांना
इतके मासे मिळाले होते की, हे कसे झाले म्हणून ते
आश्चर्यात पडले. 10जब्दीचे पुत्र याकोब व योहान हे ही
त्यांच्याप्रमाणे आश्चर्यचकित झाले होते. ते शिमोनाचे
भागीदार होते.

मग येशू शिमोनाला म्हणाला, "भिऊ नको. कारण
येथून पुढे तू माणसे धरशील."

11त्यांनी त्यांच्या होड्या किनाऱ्याला आणल्या, नंतर
त्यानी सर्व काही सोडले आणि त्याच्यामागे गेले.

## येशू एका आजारी माणसाला बरे करतो
### (मत्तय 8:1-4; मार्क 1:40-45)

12आणि असे झाले की, तेव्हा येशू कुठल्या एका गावात
असता तेथे कुष्ठाने भरलेला एक मनुष्य होता. जेव्हा
त्याने येशूला पाहिले तेव्हा तो तोंडावर उपडा पडला आणि
त्याला विनंति केली, "प्रभु, जर तुझी इच्छा असेल तर तू
मला बरे करण्यास समर्थ आहेस."

13येशूने आपला हात लांब करून त्याला स्पर्श केला
आणि म्हटले, "मला तुला बरे करायचे आहे, बरा हो!"
आणि ताबडतोब त्याचे कुष्ठ नाहीसे झाले. 14मग येशूने
त्याला आज्ञा केली की, "कोणालाही सांगू नकोस. पण
जा आणि स्वत:ला याजकाला दाखव आणि तुझ्या
शुद्धतेबद्दल मोशेने आज्ञा केल्याप्रमाणे अर्पण कर. त्यांना
समजेल की तू बरा झाला आहेस. ते आश्चर्यचकित
झाले. त्यांच्यासाठी हा पुरावा म्हणून कर."

15परंतु येशूविषयीच्या बातम्या अधिक पसरतच गेल्या.
आणि मोठे जमाव त्याचे ऐकण्यासाठी व त्यांच्या रोगांपासून
मुक्त होण्यासाठी येत असत.

16परंतु येशू नेहमी एकांतात जात असे व प्रार्थना करीत
असे.

## येशू एका लंगड्या मनुष्याला बरे करतो
### (मत्तय 9:1-8; मार्क 2:1-12)

17असे झाले की एके दिवशी तो शिक्षण देत असता
तेथे परूशी व नियमशास्त्राचे शिक्षक बसले होते. ते गालील,
यहूदीया आणि यरूशलेम या भागातील प्रत्येक गावातून
आले होते. प्रभूचे सामर्थ्य त्याच्याजवळ होते त्यामुळे तो
बरे करत होता. 18काही लोक एका अर्धांगवायु झालेल्या
मनुष्याला बिछान्यात घालून घेऊन आले. त्यांनी त्याला
आत आणण्याचा व येशूसमोर खाली ठेवण्याचा प्रयत्न
केला. 19परंतु गर्दीमुळे आत आणण्याचा मार्ग त्यांना
सापडेना. ते छपरावर गेले, आणि त्याला खाटेसहित आत
सोडले. कौले काढून बरोबर मध्यभागी जेथे येशू बसला
होता तेथे सोडले.

20त्यांचा विश्वास पाहून येशू त्याला म्हणाला, "मनुष्या,
तुझ्या पापांची क्षमा झाली आहे!"

21नियमशास्त्राचे शिक्षक आणि परूशी स्वत:शी विचार
करू लागले: "हा कोण आहे, जो असे दुर्भाषण करीत
आहे? देवाशिवाय कोण पापांची क्षमा करू शकतो?"

22पण येशू त्यांचे विचार जाणून होता. तो त्यांना म्हणाला,
"तुम्ही आपल्या अंत:करणात असा विचार का करता?
23'तुझ्या पापांची क्षमा झाली आहे' किंवा 'ऊठ आणि
चालू लाग' यांतील कोणते म्हणणे सोपे आहे? 24पण तुम्हांला
हे कळावे की मनुष्याच्या पुत्राला* पृथ्वीवर पापांची क्षमा
करण्याचा अधिकार आहे." तो अर्धांगवायु झालेल्या
मनुष्याला म्हणाला, "मी तुला सांगतो ऊठ, आपला बिछाना
उचल आणि घरी जा."

25ताबडतोब तो उभा राहिला. ज्या बिछान्यावर तो झोपला
होता तो त्याने उचलला व देवाची स्तुति करीत आपल्या
घरी गेला. 26आणि ते सर्व आश्चर्यचकित झाले, आणि
देवाची स्तुति करू लागले. ते खरोखरच आश्चर्यचकित
झाले. ते म्हणाले, "आम्ही आज आश्चर्य पाहिले!"

## लेवी येशूमागे जातो
### (मत्तय 9:9-13; मार्क 2:13-17)

27यानंतर येशू बाहेर गेला आणि त्याने लेवी नावाच्या
जकातदाराला जकात नाक्यावर बसलेले पाहिले. येशू
त्याला म्हणाला, "माझ्या मागे ये!" 28लेवी सर्व काही
तेथेच सोडून उठला आणि त्याच्या मागे गेला.

29नंतर लेवीने त्याच्या घरी येशूसाठी मोठी मेजवानी
दिली. जकातदारांचा आणि इतर लोकांचा मोठा जमाव
त्याच्याबरोबर जेवत होता. 30परूशी आणि नियमशास्त्राचे
शिक्षक यांनी त्याच्या शिष्यांकडे तक्रार केली. ते म्हणाले,
"तुम्ही जकातदार आणि पापी लोकांबरोबर का जेवता?"

31येशू त्यांना म्हणाला, "जे निरोगी आहेत त्यांना वैद्याची
गरज नाही, पण जे रोगी आहेत, त्यांना वैद्याची गरज
आहे. 32मी धार्मिकांस नाही तर पाप्यांस पश्चात्ताप
करण्यासाठी बोलावण्यास आलो आहे.

## येशू उपासासंबंधीच्या प्रश्नाचे उत्तर देतो
### (मत्तय 9:14-17; मार्क 2:18-22)

33ते त्याला म्हणाले, योहानाचे शिष्य नेहमी उपास
करतात आणि प्रार्थना करतात. आणि परूश्यांचे शिष्यसुद्धा
तसेच करतात, पण तुझे शिष्य नेहमीच खातपीत असतात."

34येशू त्यांना म्हणाला, "नवरा मुलगा (वर) बरोबर
असताना त्याच्या पाहुण्यांना तुम्ही उपाशी ठेवाल काय?
35पण असे दिवस येत आहेत की, वराला त्यांच्यापासून
घेतले जाईल आणि त्या दिवसांत ते उपास करतील."

36त्याने त्यांना आणखी एक बोधकथा सांगितली,
"कोणीही नवीन कापडाचा तुकडा फाडून जुन्याला लावीत

---

**मनुष्याच्या पुत्राला** येशू. दानीएल 7:13-14. मशीहासाठी हे नाव दिलेले आहे. लोकांचे तारण करण्यासाठी देवाने निवडलेला.

नाही, जर तो तसे करतो तर तो नवे कापड फाडतो पण
नव्या कापडांचे ठिगळ जुन्या कापडाला योग्य दिसणार
नाही.
[37]आणि कोणीही नवा द्राक्षारस जुन्या द्राक्षारसाच्या
कातडी पिशवीत ठेवीत नाही जर तो असे करतो तर नवा
द्राक्षारस कातडी पिशवी फोडून बाहेर उसळेल. [38]नवा
द्राक्षारस नव्या कातडी पिशवीतच ठेवला पाहिजे.
[39]कोणालाही जुना द्राक्षारस प्याल्यानंतर नवा नको असतो
कारण तो म्हणतो, 'जुना द्राक्षारसच चांगला आहे.'"

## येशू हा शब्बाथाच्या दिवसाचा प्रभु आहे
### *(मत्तय 12:1-8; मार्क 2:23-28)*

6 नंतर असे झाले की, शब्बाथ दिवशी येशू शेतामधून
जात होता. आणि त्याचे शिष्य धान्याची कणसे मोडून
हातावर चोळून खात होते. [2]मग परूश्यांपैकी काही म्हणाले,
"शब्बाथ दिवशी जे करण्यास मना आहे, ते तुम्ही का
करता?"
[3]येशूने त्यांना म्हटले, "जेव्हा दावीद व त्याच्याबरोबर
असलेल्यांना भूक लागली तेव्हा त्यांनी काय केले हे
तुम्ही वाचले नाही काय? [4]तुम्ही हे ऐकले नाही का की,
तो देवाच्या मंदिरात गेला आणि अर्पणाची भाकर त्याने
खाल्ली व त्याच्याबरोबर जे होते त्यांना दिली. जी भाकर
फक्त याजकच खाऊ शकत असे ती त्यांनी खाल्ली."
[5]येशू त्यांना म्हणाला, "मनुष्याचा पुत्र शब्बाथाचा प्रभु
आहे."

## येशू एका मनुष्याला शब्बाथ दिवशी बरे करतो
### *(मत्तय 12:9-14; मार्क 3:1-6)*

[6]असे झाले की दुसऱ्या एका शब्बाथाच्या दिवशी येशू
सभास्थानात गेला, आणि शिकवू लागला. तेव्हा तेथे एक
मनुष्य होता. त्याचा उजवा हात वाळलेला होता. [7]येशू
शब्बाथ दिवशी कोणाला बरे करतो की काय हे
पाहण्यासाठी नियमशास्त्राचे शिक्षक व परूशी त्याच्यावर
पाळत ठेवून होते. यासाठी की, त्याच्यावर आरोप
ठेवण्यासाठी त्यांना काहीतरी कारण मिळावे.
[8]त्याला त्यांचे विचार माहीत होते, पण वाळलेल्या
हाताच्या मनुष्याला तो म्हणाला, "ऊठ आणि सर्वांसमोर
उभा राहा!" आणि तो मनुष्य उठला आणि तेथे उभा
राहिला.
[9]येशू त्यांना म्हणाला," मी तुम्हांला विचारतो, शब्बाथ
दिवशी कोणत्या गोष्टी करायला परवानगी आहे? चांगले
करणे की वाईट करणे? कोणते कायदेशीर आहे, एखाद्याचा
जीव वाचविणे का जीव घेणे? [10]येशूने सर्वांकडे पाहिले,
मग तो त्या मनुष्याला म्हणाला, "हात सरळ कर." त्याने
हात सरळ केला आणि त्याचा हात बरा झाला. [11]पण
परूशी व नियमशास्त्राचे शिक्षक खूप रागावले व येशूविषयी
काय करता येईल याविषयी आपापसात चर्चा करू लागले.

## येशू त्याच्या बारा शिष्यांना निवडतो
### *(मत्तय 10:1-4; मार्क 3:13-19)*

[12]त्या दिवसांत असे झाले की, येशू प्रार्थना करण्यासाठी
डोंगरावर गेला. त्याने ती रात्र देवाची प्रार्थना करण्यात
घालविली. [13]जेव्हा दिवस उगवला, तेव्हा त्याने शिष्यांना
आपणांकडे बोलाविले. त्याने त्यांच्यातील बारा जणांना
निवडले व त्यांना "प्रेषित" असे नाव दिले. [14]शिमोन–
त्याला पेत्र हे सुद्धा नाव दिले, आंद्रिया (पेत्राचा भाऊ),
याकोब आणि योहान, फिलिप्प, बर्थलमय, [15]मत्तय, थोमा,
अल्फीचा पुत्र याकोब, शिमोन ज्याला जिलोट म्हणत,
[16]याकोबाचा पुत्र यहूदा व यहूदा इस्कर्योत, जो पुढे
विश्वासघात करणारा निघाला.

## येशू लोकांना शिकवितो आणि रोग्यांस बरे करतो
### *(मत्तय 4:23-25; 5:1-12)*

[17]तो त्यांच्याबरोबर खाली उतरला व सपाट जागेवर
उभा राहिला आणि त्याच्या अनुयायांचा मोठा समुदाय
तेथे आला होता. व यहूदीया, यरूशलेम, सोर आणि
सिदोनच्या समुद्रकिनाऱ्याकडचे असे पुष्कळसे लोक तेथे
आले होते.
[18]ते तेथे त्याचे ऐकण्यास व त्यांच्या रोगापासून बरे
होण्यास आले होते. व ज्यांना अशुद्ध आत्म्यांची बाधा
होती त्यांनाही त्यांच्या व्याधींपासून मुक्त करण्यात आले.
[19]सगळा लोकसमुदाय त्याला स्पर्श करू पाहत होता.
कारण त्याच्यामधून सामर्थ्य येत होते व ते सर्वांना बरे
करीत होते.

[20]येशूने आपल्या शिष्यांकडे पाहिले व म्हणाला,
"जे तुम्ही गरीब आहात ते तुम्ही आशीर्वादित आहात
कारण देवाचे राज्य तुमचे आहे.
[21]तुम्ही जे भुकेले ते आशीर्वादित आहात कारण तुम्ही
तृप्त व्हाल. आता तुम्ही जे रडता ते तुम्ही आशीर्वादित
आहात कारण तुम्ही हसाल.
[22]"जेव्हा लोक तुमचा द्वेष करतील, तुम्हांला वाळीत
टाकतील आणि तुमचा अपमान करतील, जेव्हा तुमचे
नाव ते वाईट समजतील आणि मनुष्याच्या पुत्रामुळे तुम्हाला
नाकारतील, तेव्हा तुम्ही आशीर्वादित व्हाल. [23]त्या दिवशी
तुम्ही आनंद करा. आनंदाने उड्या मारा कारण स्वर्गात
तुमचे बक्षीस मोठे आहे! कारण त्यांच्या पूर्वजांनी संदेष्ट्यांना
सुध्दा तसेच केले.

[24]"पण श्रीमंतानो, तुम्हांला दु:ख होवो कारण तुम्हांला
अगोदरच सर्व सुख मिळाले आहे.
[25]जे तुम्ही तृप्त आहात त्या तुम्हांला दु:ख होवो, कारण
तुम्ही भुकेले व्हाल. जे आता हसतात त्यांना दु:ख होवो
कारण तुम्ही शोक कराल आणि रडाल.

26“जेव्हा सर्व तुमच्याविषयी चांगले बोलतील तेव्हा
तुम्हांला दु:ख होवो कारण त्यांच्या वाडवडिलांनी खोट्या
संदेष्ट्यांना असेच केले.

## तुमच्या शत्रूवर प्रेम करा
*(मत्तय 5:38-48; 7:12 )*

27“माझे ऐकणाऱ्यांना मी सांगतो. तुमच्या शत्रूंवर प्रेम
करा. जे तुमचा द्वेष करतात, त्यांचे चांगले करा. 28जे
तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या. जे तुम्हांला
वाईट वागवितात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. 29जर कोणी
तुमच्या एका गालावर मारतो तर त्याच्यासमोर दुसरा पण
गाल करा. जर कोणी तुमचा अंगरखा घेतो तर त्याला
तुमचा सदराही घेऊ द्या. 30जे तुम्हांला मागतात त्या
प्रत्येकाला द्या आणि जो तुमचे घेतो ते परत मागू नका.
31लोकांनी तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हांला वाटते
तसेच तुम्हीही त्यांच्याशी वागा. 32तुमच्यावर जे प्रेम करतात
त्यांच्यावर जर तुम्ही प्रेम केले, तर तुम्ही काय विशेष
केले? पापी लोकसुद्धा, जे त्यांच्यावर प्रेम करतात,
त्यांच्यावर प्रेम करतात. 33तुमचे जे चांगले करतात, त्यांचे
जर तुम्ही चांगले करता तर तुम्हांला काय लाभ? पापीसुद्धा
असेच करतात. 34ज्यांच्याकडून तुम्हांला परत मिळेल
अशी आशा असते, त्यांना जर उसने देता तर तुम्हांला
काय लाभ? पापीसुद्धा परत मिळावे या उद्देशाने दुसऱ्या
पाप्याला उसने देतात.

35पण तुमच्या शत्रूवर प्रेम करा आणि त्यांचे चांगले
करा. व कोणतीही अपेक्षा न ठेवता उसने द्या. मग तुमचे
बक्षीस मोठे असेल व तुम्ही सर्वोच्च देवाचे पुत्र व्हाल.
कारण देव हा कृतघ्न व दुष्ट लोकांवर दया करतो.
36जसा तुमचा पिता कनवाळू आहे तसे तुम्हीही कनवाळू
व्हा.

## स्वत:कडे पाहा
*(मत्तय 7:1-5 )*

37“दुसऱ्यांचा न्याय करू नका, म्हणजे तुमचाही न्याय
होणार नाही. दुसऱ्यांना दोषी ठरवू नका म्हणजे तुम्हांला
दोषी ठरविले जाणार नाही. दुसऱ्यांची क्षमा करा म्हणजे
तुमचीही क्षमा केली जाईल. 38दुसऱ्यांना द्या म्हणजे
तुम्हांलाही दिले जाईल. तुमच्या पदरात हलवून, दाबून,
ओसंडून वाहणारे उत्तम माप ओतले जाईल. जे माप तुम्ही
दुसऱ्यांसाठी वापरता त्याच मापाने तुम्हांला दिले जाईल.”

39त्याने त्यांना एक गोष्ट सांगितली: “एक आंधळा
दुसऱ्या आंधळ्याला मार्ग दाखवू शकेल काय? ते दोघेही
खड्ड्यात पडणार नाहीत काय? 40कोणताही शिष्य त्याच्या
गुरूच्या पातळीला जाऊ शकत नाही. पण प्रत्येक मनुष्य
जेव्हा तो पूर्ण शिकतो तेव्हा तो गुरुसारखाच असतो.

41“तू आपल्या भावाच्या डोळ्यतील कुसळ का पाहतोस?
स्वत:च्या डोळ्यातील मुसळ तुला दिसत नाही काय? 42तू
तुझ्या भावाला कसे म्हणू शकतोस, ‘बंधु, तुझ्या डोळ्यातील
कुसळ मला काढू दे.’ तुझ्या स्वत:च्या डोळ्यातील मुसळ
तुला दिसत नाही? ढोंग्या, प्रथम तुझ्या डोळ्यातील मुसळ
काढ मगच तुला तुझ्या भावाच्या डोळ्यातील कुसळ
काढताना चांगले दिसेल.

## दोन प्रकारची फळे
*(मत्तय 7:17-20; 12:34-35 )*

43“कोणतेही चांगले झाड असे नाही की जे वाईट फळ
देते, किंवा कोणतेही वाईट झाड असे नाही की जे चांगले
फळ देते. 44कारण प्रत्येक झाड हे त्याच्या फळावरून
ओळखले जाते. लोक काटेरी झुडुपातून अंजिरे गोळा
करीत नाहीत तसेच काटेरी झुडुपातून ते द्राक्षे गोळा करीत
नाहीत. 45चांगला मनुष्य त्याच्या अंत:करणात ज्या चांगल्या
गोष्टी साठविलेल्या असतात त्याच काढतो आणि दुष्ट
मनुष्य त्याच्या अंत:करणात जे वाईट आहे तेच बाहेर
काढतो. कारण मनुष्याच्या अंत:करणात जे असते तेच तो
मुखाद्वारे बोलतो.

## दोन प्रकारचे लोक
*(मत्तय 7:24-27 )*

46“तुम्ही मला प्रभु, प्रभु, का म्हणता, आणि मी जे
सांगतो ते तुम्ही का करीत नाही? 47प्रत्येक जण जो
माझ्याकडे येतो व माझी वचने ऐकतो व त्या आज्ञा पाळतो–
तो कसा आहे हे मी तुम्हांला दाखवितो: 48तो एका घर
बांधणाऱ्या मनुष्यासारखा आहे. त्याने खोल खोदले आणि
खडकावर पाया बांधला. मग पूर आला, तेव्हा नदीचे
पाणी घरावर आदळले. पण पाण्याने ते हलले नाही. कारण
ते चांगले बांधले होते.

49पण जो कोणी माझी वचने ऐकतो पण ती पाळीत
नाही, तो, ज्याने आपले घर पाया न घालता जमिनीवर
बांधले त्या मनुष्यासारखा आहे. नदीच्या पुराचे पाणी घरावर
आदळते व ते घर लगेच कोसळते आणि घर पूर्णपणे नष्ट
होते.”

## येशू एका नोकराला बरे करतो
*(मत्तय 8:5-13; योहान 4:43-54)*

7 ज्या बोधकथा लोकांनी ऐकाव्यात असे त्याला वाटत
होते त्या सांगण्याचे संपविल्यावर तो कफर्णहूमास
गेला. 2तेथे एक रोमी शताधिपती होता. त्याचा गुलाम
इतका आजारी होता की, तो मरावयास टेकला होता. हा
गुलाम त्या शताधिपतीचा फार आवडता होता. 3जेव्हा
शताधिपतीने येशूविषयी ऐकले तेव्हा त्याने काही यहूदी
वडील जनांना त्याच्याकडे पाठविले, व अशी विनंति केली
की, त्याने येऊन त्याच्या गुलामाला वाचवावे. 4जेव्हा ते
येशूकडे आले तेव्हा त्यांनी मन:पूर्वक विनंति केली. ते
म्हणाले, “तू त्याच्यासाठी हे करावेस कारण तो त्या योग्यतेचा

आहे. [5]कारण तो आमच्या लोकांवर प्रेम करतो, त्याने आमचे सभास्थान आम्हांला बांधून दिले."

[6]म्हणून येशू त्यांच्याबरोबर गेला. तो घरापासून दूर नव्हता, तोच शताधिपतीने मित्रांना असे सांगण्यासाठी पाठविले की, "प्रभु, आपण त्रास करून घेऊ नका. कारण आपण माझ्या घरी यावे इतकी माझी योग्यता नाही. [7]यासाठीच मी स्वत: आपणाकडे येऊ नये असा विचार केला होता. परंतु तुम्ही फक्त शब्द बोला, म्हणजे माझा चाकर बरा होईल. [8]कारण मीही ताबेदार असून माझ्या अधिपत्याखाली शिपाई आहेत. मी एखाद्याला 'जा' असे म्हणतो, आणि तो जातो. दुसऱ्याला 'ये' म्हणतो आणि तो येतो. मी माझ्या गुलामाला म्हणतो, 'हे कर!' आणि तो ते करतो."

[9]जेव्हा येशूने हे ऐकले तेव्हा त्याला त्याच्याविषयी (शताधिपतीविषयी) आश्चर्य वाटले. तो त्याच्यामागे येणाऱ्या जमावाकडे वळून म्हणाला, "मी तुम्हांला सांगतो, असा विश्वास मला इस्राएलात देखील आढळला नाही."

[10]ज्यांना पाठविले होते, ते घराकडे परतले, तेव्हा त्यांना आढळून आले की, तो सेवक बरा झाला आहे.

## येशू एका मेलेल्या माणसाला जिवंत करतो

[11]नंतर असे झाले की, येशू नाईन नावाच्या गावाला गेला. त्याच्याबरोबर त्याचे शिष्य व मोठा समुदाय होता. [12]तो गावाच्या वेशीजवळ आला असता, एका मेलेल्या माणसाला अंत्यविधीकरिता नेले जात होते. तो त्याच्या आईचा एकुलता एक मुलगा होता. आणि ती विधवा होती. आणि गावातील बरेच लोक तिच्याबरोबर होते. [13]जेव्हा प्रभूने तिला पाहिले, त्याला तिची अनुकंपा वाटली व तो तिला म्हणाला, "रडू नकोस." [14]नंतर तो पुढे तिरडीजवळ गेला व तिला स्पर्श केला. जे लोक तिरडी वाहून नेत होते, ते थांबले. [15]तेव्हा येशू म्हणाला, "तरुणा, मी तुला सांगतो, ऊठ!" आणि तो मृत मनुष्य उठून बसला व बोलू लागला. मग येशूने त्याला त्याच्या आईकडे दिले.

[16]ते सर्व भयचकित झाले, त्यांनी देवाचे गौरव केले; ते म्हणाले, "आमच्यामध्ये एक महान संदेष्टा प्रगट झाला आहे." आणि म्हणाले, "देव त्याच्या लोकांना मदत करण्यास आला आहे.!"

[17]येशूविषयीची ही बातमी सर्व यहूदीयात आणि सभोवतालच्या परिसरात पसरली.

## योहान प्रश्न विचारतो
### *(मत्तय 11:2-19)*

[18]योहानाच्या शिष्यांनी योहानाला जाऊन हे सर्व सांगितले, नंतर योहानाने आपल्या दोन शिष्यांना बोलाविले [19]आणि त्याने त्यांना प्रभूकडे हे विचारण्यासाठी पाठविले की. "जो येणारा तो तूच आहेस की, आम्ही दुसऱ्या कोणाची तरी अपेक्षा करावी?" [20]जेव्हा लोक त्याच्याकडे आले, ते म्हणाले, "बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने आम्हांला तुमच्याकडे हे विचारण्यास पाठविले आहे की, 'जो येणारा तो तूच आहेस की आम्ही दुसऱ्या कोणाची अपेक्षा करावी?'"

[21]त्यावेळी येशूने अनेक लोकांचे रोग, आजार बरे केले, पुष्कळांमधील भुते काढली, आंधळ्यांना दृष्टी दिली. [22]येशूने त्यांना उत्तर दिले, "जा आणि तुम्ही जे ऐकले व पाहिले आहे ते योहानाला सांगा: आंधळे पाहतात, लंगडे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले जिवंत केले जातात आणि गरीब लोक सुवार्ता ऐकतात. [23]जो मला अनमान न करता स्वीकारतो, तो धन्य."
[24]योहानाचे निरोपे गेल्यावर येशू समुदायाबरोबर योहानाविषयी बोलू लागला: "वाळवंटात तुम्ही काय पाहण्यासाठी गेला होता? वाऱ्याने वाकलेला बोरू? [25]नाही, मग काय पाहण्यासाठी तुम्ही गेला होता? कपडे घातलेला मनुष्य? नाही. तलम कपडे घालणारे आणि ऐषारामात राहणारे लोक राजवाड्यात राहतात. [26]पण तुम्ही बाहेर काय पाहण्यासाठी गेला होता? संदेष्टा? होय, मी तुम्हांला सांगतो, तुम्ही संदेष्ट्यापेक्षा काही तरी अधिक पाहिले आहे! [27]हाच तो ज्याच्याविषयी पवित्र शास्त्रात लिहिले आहे,

'पाहा, मी माझ्या संदेशवाहकाला माझ्यापुढे पाठवीत आहे. तो तुमच्यापुढे मार्ग तयार करील.' *मलाखी. 3:1*

[28]मी तुम्हांला सांगतो, जे स्त्रियांपासून जन्मले त्यात योहानापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. तरीही देवाच्या राज्यातील अगदी सामान्य माणूस सुध्दा त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

[29]"जेव्हा लोकांनी हे ऐकले, तेव्हा त्यांनी मान्य केले की, देवाची शिकवण चांगली आहे. जकातदारसुद्धा सहमत झाले. या लोकांना योहानाने अगोदरच बाप्तिस्मा दिला होता. [30]पण परूशी व नियमशास्त्राच्या शिक्षकांनी देवाची त्यांच्याविषयी असलेली योजना नाकारली. त्यांनी योहानाला त्यांचा बाप्तिस्मा करू दिला नाही.

[31]मग मी या पिढीची कोणाशी तुलना करू? ते कोणासारखे आहेत? [32]ते उनाड मुलांसारखे आहेत, ते बाजारात बसतात, ते एकमेकाला म्हणतात,

'आम्ही तुमच्यासाठी पावा वाजविला पण तुम्ही नाचला नाही. आम्ही तुमच्यासाठी शोकगीत गाईले पण तुम्ही रडला नाही.'

[33]बाप्तिस्मा करणारा योहान हा भाकर किंवा द्राक्षारस खात किंवा पीत आला नाही. पण तुम्ही म्हणता, 'त्याला भूत लागले आहे.' [34]मनुष्याचा पुत्र खात पीत आला आणि तुम्ही म्हणता; 'पाहा, तो खादाड, मद्यपी, जकातदारांचा

आणि पाप्यांचा मित्र आहे.’ 35ज्ञान तेव्हा योग्य ठरते,
जेव्हा त्याचा वापर केल्याने झालेल्या गोष्टी योग्य असतात.”

## शिमोन परूशी

36कोणा एका परूश्याने येशूला त्याच्याबरोबर जेवणाचे
आमंत्रण दिले, म्हणून तो परूश्याच्या घरी गेला व
मेजासभोवती आपल्या जागेवर बसला. 37तेथे त्या गावात
एक स्त्री होती. ती पापी होती. जेव्हा तिला समजले की.
येशू परूश्याच्या घरी जेवत आहे, तेव्हा तिने सुगंधी तेलाचे
एक अलाबास्त्र भांडे आणले. 38ती त्याच्या पाठीमागे पायाशी
उभी राहून रडत होती. ती आपल्या आसवांनी त्याचे पाय
भिजवू लागली. नंतर तिने ते आपल्या केसांनी पुसले,
त्याच्या पायाचे मुके घेतले व त्यावर सुगंधी तेल ओतले.
39ज्या परूश्याने हे आमंत्रण दिले होते त्याने ते पाहिले
आणि तो स्वत:शी म्हणाला, “जर हा मनुष्य संदेष्टा असता,
तर ही कोण व कशा प्रकारची स्त्री आपल्या पायाला
स्पर्श करीत आहे, हे त्याला कळले असते!”
40येशू त्याला म्हणाला, “शिमोना, मला तुला काही
सांगायचे आहे.” त्याने उत्तर दिले, “सांगा गुरुजी.”
41येशू म्हणाला, “एका सावकाराचे दोन कर्जदार होते.
एकाकडे पाचशे चांदीची नाणी आणि दुसऱ्याकडे पन्नास
चांदीची नाणी असे कर्ज होते. 42ते कर्ज फेडू शकत
नसल्याने सावकाराने दोघांचीही कर्जे माफ केली. आता
त्यांच्यापैकी कोण त्याच्यावर अधिक प्रेम करील?”
43शिमोनाने उत्तर दिले, “मला वाटते, ज्याचे कर्ज जास्त
होते तो.”
येशू त्याला म्हणाला, “तू बरोबर ओळखलेस.” 44तो
स्त्रीकडे वळून शिमोनाला म्हणाला, “तू ही स्त्री पाहतोस
काय? मी तुझ्या घरी आलो तेव्हा माझे पाय धुण्यास तू
मला पाणी दिले नाहीस. परंतु हिने माझे पाय अश्रूंनी
ओले केले. ते तिने केसांनी पुसले. 45तू मला साधे
शुभेच्छालिंगन सुध्दा दिले नाहीस, पण मी आत आल्यापासून
तिने माझ्या पायाचे मुके घेण्याचे थांबवले नाही. 46तू
माझ्या डोक्याला तेल लावले नाही, परंतु तिने माझ्या
पायावर सुगंधी तेल ओतले. 47यासाठी मी तुला सांगतो
की तिच्या अनेक पापांची क्षमा झाली आहे. हे स्पष्ट
आहे कारण तिने विपुल प्रेम दाखविले आहे. परंतु ज्याला
कमी माफ केले आहे तो कमी प्रेम करतो.”
48तेव्हा तो तिला म्हणाला, “तुझ्या पापांची क्षमा झाली
आहे.” 49नंतर जे त्यांच्याबरोबर जेवत होते ते स्वत:शीच
म्हणू लागले, “हा कोण आहे, जो पापांचीसुद्धा क्षमा करतो?”
50पण तो स्त्रीला म्हणाला, “तुझ्या विश्वासाने तुला
वाचविले आहे. शांतीने जा.”

## येशूबरोबरचे लोक

8 यानंतर असे झाले की, येशू सर्व गावांतून आणि
खेड्यामधून उपदेश करीत व देवाच्या राज्यासंबंधीची
सुवार्ता सांगत जात होता. आणि बारा प्रेषित त्याच्याबरोबर
होते. 2ज्यांच्यामधून भुते काढली होती व ज्यांना आजारातून
बरे केले होते अशा काही स्त्रियाही त्याच्याबरोबर होत्या:
मरीया जिला मग्दालिया म्हणत, तिच्यातून सात भुते बाहेर
पडली होती. 3हेरोदाच्या घराचा कारभारी खुजा याची
पत्नी योहान्ना, सूसान्ना आणि इतर अनेक स्त्रिया होत्या. या
स्त्रिया त्यांच्याकडे जे होते, म्हणजे त्यांच्या उत्पन्नातून येशू
व त्याच्या शिष्यांना देत असत.

## पेरणी करणाऱ्याची बोधकथा
*(मत्तय 13:1-17, मार्क 4:1-12)*

4जेव्हा मोठा जनसमुदाय जमत असे व प्रत्येक गावातून
लोक त्याच्याकडे येत असत, तेव्हा येशू बोधकथांचा उपयोग
करून बोलत असे:
5“एक शेतकरी आपले बी पेरायला गेला. तो पेरत
असताना काही बी रस्त्यावर पडले व ते तुडविले गेले.
आकाशातील पक्ष्यांनी ते खाऊन टाकले. 6काही बी
खडकाळ जमिनीवर पडले आणि उगवल्यावर वाळून
गेले कारण त्यात ओलावा नव्हता. 7काही बी काटेरी
झुडुपात पडले. काटेरी झुडुपे त्याच्याबरोबर वाढली व
त्याची वाढ खुंटविली. 8काही बी चांगल्या जमिनीवर पडले.
ते उगवले, वाढले व जे पेरले होते त्यापेक्षा शंभर पट
पीक जास्त आले.” या बोधकथा सांगत असता तो मोठ्याने
म्हणाला,
“ज्याला ऐकण्यास कान आहेत, त्याने ऐकावे!”
9त्याच्या शिष्यांनी या बोधकथेचा अर्थ काय असे
विचारले. 10म्हणून तो म्हणाला, “तुम्हांला देवाच्या राज्याची
रहस्ये जाणून घेण्याचा अधिकार दिलेला आहे. पण
इतरांच्यासाठी ते बोधकथेमध्ये दिले आहे.

‘यासाठी की, जरी ते पाहत असले, तरी त्यांना दिसू नये
आणि ऐकत असले तरी त्यांना समजू नये.’ *यशया 6:9*

## येशू बियाच्या बोधकथेचे स्पष्टीकरण करतो
*(मत्तय 13:18-23, मार्क 4:13-20)*

11“बोधकथेचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. बी हे देवाचा
संदेश आहे. 12आणि जे बी वाटेवर पडले ते जे ऐकतात
त्याचे दर्शक आहेत. नंतर सैतान येतो आणि त्यांच्या
हृदयातील बी घेऊन जातो, यासाठी की त्यांनी विश्वास
ठेवू नये व त्यांचे तारण होऊ नये. 13जे बी खडकावर
पडते ते असे आहे की, ते ऐकतात आणि आनंदाने संदेश
ग्रहण करतात. पण त्यांना मूळ नसते. ते काही वेळ
विश्वास ठेवतात पण परीक्षेच्या वेळी देवापासून दूर जातात.
14जे बी काटेरी झुडुपात पडलेले असते ते दर्शविते की, ते
ऐकतात परंतु आपल्या मार्गाने जात असता काळजी, श्रीमंती,
जीवनातील सुखे यांनी ते खुंटविले जाते. ते पक्व फळ देत
नाही. 15चांगल्या जमिनीतील बी दर्शविते की, ते चांगल्या

व प्रामाणिक अंत:करणाचे आहेत ते वचन ऐकतात. ग्रहण
करतात व धीराने फळ देतात.

### तुमच्या समजबुद्धीचा उपयोग करा
***(मत्तय 4:21-25)***

16“कोणीही दिवा लावून तो भांड्याने झाकून ठेवीत
नाही, किंवा खाटेखाली ठेवीत नाहीत, तर तो दिवठणीवर
ठेवतात, यासाठी की जे आत येतात त्यांना प्रकाश दिसावा.
17लक्षात ठेवा, असे काहीही लपविलेले नाही, जे उघड
होणार नाही. प्रत्येक रहस्य सर्वांना सांगितले जाईल आणि
ते प्रकाशात येईल. 18म्हणून तुम्ही कसे ऐकता याविषयी
काळजी घ्या कारण ज्याच्याजवळ आहे त्याला अधिक
दिले जाईल आणि ज्याच्याजवळ नाही, त्याच्याकडे जे
आहे असे वाटते तेदेखील काढून घेतले जाईल”.

### येशूचे शिष्य हेच त्याचे खरे कुटुंब
***(मत्तय 12:46-50; मार्क 3:31-35)***

19येशूची आई व त्याचे भाऊ त्याच्याकडे आले. पण
गर्दीमुळे त्यांना त्याच्याजवळ जाता येईना. 20म्हणून त्याला
असे सांगण्यात आले की, “तुझी आई व तुझे भाऊ बाहेर
उभे आहेत, त्यांना तुला भेटायचे आहे.”

21पण त्याने त्यांना उत्तर दिले, “जे देवाचे वचन ऐकतात
व त्याप्रमाणे करतात तेच माझी आई व माझे भाऊ आहेत.”

### शिष्य येशूचे सामर्थ्य पाहतात
***(मत्तय 8:23-27; मार्क 4:35-41)***

22त्या दिवसात एकदा असे झाले की, येशू त्याच्या
शिष्यांसह नावेत बसला. आणि तो त्यांना म्हणाला, “आपण
सरोवराच्या पलीकडच्या बाजूला जाऊ या.”

23आणि ते निघाले. ते जात असता येशू झोपी गेला.
सरोवरावर तुफान वादळी वारे सुरू झाले व नावेत पाणी
जाऊ लागले. ते अतिधोकादायक स्थितीत सापडले.
24म्हणून त्यांनी त्याला उठविले, ते त्याला म्हणाले, “गुरुजी,
गुरुजी, आपण बुडत आहोत!”

मग तो उठला. त्याने वारा व लाटा यांना दटाविले. ते
थांबले. व सर्वत्र शांतता पसरली. 25येशू त्यांना म्हणाला,
“तुमचा विश्वास कोठे आहे?” पण ते भयचकित आणि
विस्मित झाले व एकमेकांना म्हणाले, “हा आहे तरी
कोण? कारण तो वारा आणि लाटा यांनाही आज्ञा करतो
आणि ते त्याचे ऐकतात?”

### भुते अंगात असलेला माणूस
***(मत्तय 8:28-34; मार्क 5:1-20)***

26नंतर ते गालील सरोवरापलीकडील गरसेकरांच्या
प्रदेशात गेले. 27जेव्हा तो किनाऱ्यावर उतरला, तेव्हा
नगरातला एक मनुष्य त्याला भेटला. त्या माणसामध्ये
अनेक भुते होती. बराच काळपर्यंत त्याने कपडे घातले
नव्हते व तो घरातही राहिला नव्हता. तो कबरांमध्ये
राहत होता. 28जेव्हा त्याने येशूला पाहिले, तेव्हा तो मोठ्याने
ओरडला व त्याच्यापुढे पडला. तो मोठ्या आवाजात म्हणाला,
“येशू, सर्वोच्च देवाच्या पुत्रा, तुला माझ्यापासून काय पाहिजे?
मी तुला विनंति करतो की, मला त्रास देऊ नको.” 29तो
असे म्हणाला कारण येशूने भुताला त्याच्यातून बाहेर
येण्याची आज्ञा केली होती. कारण त्याने त्याला पुष्कळ
वेळा धरले होते. त्याला त्यावेळी साखळ्यांनी बांधले होते.
पायात बेड्या होत्या व त्याला पहाऱ्यात ठेवले होते परंतु
तो नेहमी साखळ्या तोडीत असे व भुते त्याला एकांतात
घेऊन जात असत.

30येशूने त्याला विचारले, “तुझे नाव काय आहे?”

तो म्हणाला, “सैन्य.” कारण त्याच्यात अनेक भुते शिरली
होती. 31भुतांनी येशूला विनवणी केली की, आम्हांला
अनंतकाळच्या अंधारात* जाण्याची आज्ञा करू नको.

32डोंगराच्या कडेला डुकरांचा एक मोठा कळप चरत
होता. भुतांनी त्याला विनंति केली, “आम्हांला त्या
डुकरांच्या मध्ये जाऊ दे.” आणि येशूने त्यांना तसे करण्याची
परवानगी दिली. 33मग भुते त्या मनुष्यातून बाहेर आली
आणि डुकरात शिरली. नंतर डुकरांचा कळप सरोवराकडे
जोरात पळाला आणि तो सारा कळप सरोवरात बुडून
मेला. 34जेव्हा डुकरांचा कळप राखणाऱ्यांनी हे पाहिले,
तेव्हा ते दूर पळाले व त्यांनी नगरात व त्या प्रदेशात हे
वर्तमान सांगितले. 35काय झाले हे पाहण्यासाठी लोक
बाहेर आले. ते येशूकडे आले आणि त्यांनी ज्या माणसाच्या
अंगातून भुते निघाली होती, त्याला येशूच्या पायाजवळ
बसलेला त्यांनी पाहिले. त्याने नीट कपडे घातले होते व
तो पूर्ण शुद्धीवर होता. या घटनेचे त्यांना भय वाटले.
36ज्यांनी हे पाहिले त्यांनी तो भूत लागलेला मनुष्य कसा
बरा झाला हे त्यांना सांगितले. 37तेव्हा गरसेकर प्रदेशातील
सर्व लोकांनी येशूला त्यांना सोडून जाण्यास सांगितले.
कारण ते सर्व फार घाबरले होते. मग येशू नावेत बसून
परत गेला. 38ज्याच्या अंगातून भुते निघाली होती तो
त्याच्याबरोबर जाण्यासाठी विनवणी करू लागला. पण
येशूने त्याला परत जायला सांगितले आणि म्हणाला, 39“घरी
जा आणि देवाने तुझ्यासाठी जे केले आहे ते सांग.” तेव्हा
तो मनुष्य गेला आणि येशूने त्याच्यासाठी जे काही केले ते
नगरातील सर्व लोकांना त्याने सांगितले.

### येशू मेलेल्या मुलीला जिवंत करतो व आजारी स्त्रीला बरे करतो
***(मत्तय 9:18-26; मार्क 5:21-43)***

40नंतर जेव्हा येशू परत आला तेव्हा लोकांनी त्याचे
स्वागत केले, कारण ते सर्व त्याची वाट पाहत होते.

---

**अनंतकाळच्या अंधारात** ज्याचा अंत (ठाव) लागत नाही असा खड्डा.

41त्याचवेळी याईर नावाचा एक मनुष्य आला. तेथील सभास्थानाचा तो अधिकारी होता. त्याने येशूच्या पाया पडून त्याला आपल्या घरी येण्याची विनंति केली. 42कारण त्याला बारा वर्षांची एक मुलगी होती आणि ती मरावयास टेकली होती.

येशू जात असता लोकांची गर्दी झाली होती व तो चेंगरला जात होता. 43आणि एक स्त्री तेथे होती. तिला बारा वर्षे रक्तस्राव होत होता. तिच्याकडे जे काही पैसे होते ते सर्व तिने वैद्यांसाठी खर्च केले पण कोणीही तिला बरे करू शकले नाही. 44ती त्याच्या मागोमाग आली. व तिने त्याच्या वस्त्राच्या टोकाला स्पर्श केला आणि ताबडतोब तिचा रक्तस्राव थांबला. 45मग येशू म्हणाला, “मला कोणी स्पर्श केला?”

ते सर्व जण नाकारीत असताना पेत्र म्हणाला, “सर्व जण आपल्याभोवती गर्दी करीत आहेत आणि तुम्हांला चेंगरीत आहेत.”

46परंतु येशू म्हणाला, “कोणी तरी मला स्पर्श केला आहे. कारण मला माहीत आहे की, माझ्यातून शक्ति निघाली आहे.” 47आपण येशूच्या नजरेतून सुटू शकणार नाही हे जेव्हा त्या स्त्रीने पाहिले तेव्हा ती थरथर कांपत आली आणि त्याच्या पाया पडली. तेथे तिने सर्व लोकांसमोर आपण त्याला का स्पर्श केला व आपण कसे बरे झालो ते सांगितले. 48तेव्हा तो तिला म्हणाला, “मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. शांतीने जा.”

49तो हे बोलत असतानाच कोणी तरी सभास्थानाच्या अधिकाऱ्याच्या घरून आले आणि म्हणाले, “तुमची मुलगी मरण पावली आहे. आता गुरुजींना त्रास देऊ नका.”

50येशूने हे ऐकले व तो सभास्थानाच्या अधिकाऱ्याला म्हणाला, “भिऊ नको, फक्त विश्वास ठेव आणि ती मरणातून वाचविली जाईल.

51जेव्हा येशू त्या घरी आला, त्याने आपणाबरोबर पेत्र, योहान, याकोब आणि मुलीचे आईवडील यांच्याशिवाय कोणालाही आत येऊ दिले नाही. 52सर्व लोक तिच्यासाठी रडत होते. येशू म्हणाला, “रडणे थांबवा, ती मेलेली नाही, ती झोपेत आहे.”

53पण ते त्याला हसले. कारण त्यांना माहीत होते की ती मेली आहे. 54परंतु त्याने तिचा हात धरला आणि मोठ्याने म्हणाला, “मुली, ऊठ!” 55मग, तेव्हा तिचा आत्मा पुन्हा आला आणि ती लगेच उभी राहिली. नंतर त्याने तिला खाण्यास देण्याची आज्ञा केली. 56तेव्हा तिचे आईवडील आश्चर्याने थक्क झाले, परंतु जे घडले त्याबद्दल कोणालाही सांगू नका अशी त्याने त्यांना आज्ञा केली.

## येशू बारा प्रेषितांना कामगिरीवर पाठवितो
### *(मत्तय 10:5-15; मार्क 6:7-13)*

9 येशूने बारा शिष्यांना एकत्र बोलाविले, आणि त्याने त्यांना सर्व भुतांवर सामर्थ्य व अधिकार दिला. आणि त्यांना त्याने रोग बरे करण्याचे सामर्थ्य दिले. 2नंतर त्याने त्यांना देवाच्या राज्याची घोषणा करण्यास व रोग्यांना बरे करण्यास पाठविले.

3तो त्यांना म्हणाला, “तुमच्या प्रवासासाठी बरोबर काठी, पिशवी, भाकरी, चांदीची नाणी, दोन-दोन अंगरखे असे काहीही घेऊ नका. 4आणि ज्या घरात तुम्ही जाल त्या घरातच तुम्ही राहा. व दुसऱ्या गावाला जाताना ते घर सोडा. 5जेथे लोक तुमचे स्वागत करणार नाहीत, तेथे गाव सोडताना त्यांच्याविरुद्ध साक्ष म्हणून आपल्या पायावरील धूळ झटकून टाका.”

6ते निघाल्यानंतर सर्व गावातून सुवार्ता सांगत व लोकांचे रोग बरे करीत गेले.

## हेरोदाचा येशूविषयी गोंधळ होतो
### *(मत्तय 14:1-12, मार्क 6:14-29)*

7जेव्हा हेरोद राज्यपालाने जे सर्व काही घडत होते त्याविषयी ऐकले, तेव्हा तो घोटाळ्यात पडला. कारण काही जणांनी असे म्हटले की, “योहान मेलेल्यांतून उठविला गेला आहे.” 8इतर काही जण असे म्हणत होते की, “एलीया पुन्हा आला आहे.” इतर काही जणांनी असे सांगितले की, “फार पूर्वीच्या संदेष्ट्यांपैकी एक जण मेलेल्यांतून पुन्हा जिवंत झाला आहे.”

9परंतु हेरोद म्हणाला, “मी योहानाचा शिरच्छेद केला आहे, मग ज्याच्याविषयी अशा गोष्टी ऐकत आहे, तो कोण आहे?” म्हणून हेरोदाने येशूला पाहण्याचा प्रयत्न केला.

## येशू पाच हजारांपेक्षा अधिक लोकांना जेवू घालतो
### *(मत्तय 14:13-21; मार्क 6:30-44; योहान 6:1-14)*

10शिष्य परत आले तेव्हा त्यांनी येशूला आपण केलेल्या सर्व गोष्टी सांगितल्या. नंतर येशू त्यांना घेऊन बेथसैदा नावाच्या नगरास गुप्तपणे गेला. 11पण लोकसमुदायाला हे कळाले व ते त्याच्यामागे गेले. त्याने त्यांचे स्वागत केले आणि त्यांना स्वर्गराज्याविषयी सांगितले. ज्यांना बरे होण्याची आवश्यकता होती, त्यांना त्याने बरे केले.

12दिवस मावळत असता प्रेषित त्याच्याकडे आले आणि म्हणाले, “लोकांना जाऊ द्या. म्हणजे ते आजूबाजूच्या शेतात आणि खेड्यात जातील व त्यांना खावयाला व राहण्यास मिळण्याची शक्यता आहे का ते पाहतील. कारण आपण दूर ठिकाणी आहोत.”

13पण तो त्यांना म्हणाला, “तुम्ही त्यांना काही खावयास द्या.”

ते म्हणाले, “आम्ही जाऊन या सर्व लोकांसाठी अन्न विकत घ्यावे असे तुम्हांला वाटते काय? आमच्याजवळ फक्त पाच भाकरी आणि दोन मासे याशिवाय काही नाही.” 14तेथे ते सुमारे पाच हजार पुरुष होते. परंतु तो आपल्या शिष्यांस म्हणाला, “त्यांना सुमारे पन्नासाच्या गटाने बसवा.”

15त्यांनी तसे केले व सर्वांना खाली बसविले. 16नंतर
त्याने पाच भाकरी व दोन मासे घेतले, मग स्वर्गाकडे
बघून त्याने भाकरी व मासे याबद्दल देवाचे उपकार मानले.
त्याचे तुकडे केले. नंतर लोकांना वाढण्यासाठी शिष्यांना
दिले. 17लोक जेवले व सर्व तृप्त झाले. आणि जेवून
झाल्यानंतर उरलेले गोळा करण्यात आले तेव्हा त्या
तुकड्यांच्या बारा टोपल्या भरल्या.

## येशू हा ख्रिस्त आहे
***(मत्तय 16:13-19; मार्क 8:27-29)***

18मग असे झाले की एकदा येशू एकटाच प्रार्थना करीत
असताना, त्याचे शिष्य त्याच्याबरोबर होते. त्याने त्यांना
विचारले, "मी कोण आहे याबद्दल लोक काय म्हणतात?"
19ते म्हणाले, "बाप्तिस्मा करणारा योहान, इतर काही
एलीया आणि काहीजण म्हणतात की, फार पूर्वी होऊन
गेलेल्या संदेष्ट्यांपैकी कोणी तरी उठला आहे."
20तो त्यांना म्हणाला, "तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?"
पेत्राने उत्तर दिले, "देवाचा ख्रिस्त."
21तेव्हा ताकीद देऊन त्याने त्यांना सूचना दिली की, हे
कोणालाही सांगू नका. 22येशू म्हणाला, "मनुष्याच्या पुत्राला
पुष्कळ दु:ख सोसणे आवश्यक आहे, आणि वडिलांनी,
मुख्य याजकांनी, नियमशास्त्राचे शिक्षक यांनी नाकारावे
व त्यांच्याकडून मारले जावे व पुन्हा तिसऱ्या दिवशी
उठावे हे आवश्यक आहे."
23नंतर तो त्या सर्वांना म्हणाला, "जर कोणा व्यक्तीला
माझ्या मागे यायचे असेल तर त्याने स्वत:ला नाकारले
पाहिजे. व दररोज स्वत:चा वधस्तंभ उचलून माझ्या मागे
आले पाहिजे. 24जो कोणी स्वत:चा जीव वाचवू पाहतो, तो
त्याला मुकेल, पण जो कोणी माझ्यासाठी जिवाला मुकेल
तो त्याला वाचवील. 25कोणी सर्व जग मिळविले परंतु
स्वत:चा नाश करून घेतला किंवा स्वत:ला गमाविले तर
त्याला काय लाभ? 26जो कोणी माझी व माझ्या वचनांची
लाज धरतो तर मनुष्याचा पुत्र जेव्हा त्याच्या वैभवाने,
पित्याच्या आणि पवित्र दूतांच्या गौरवाने येईल तेव्हा तोही
त्याची लाज धरील. 27परंतु मी तुम्हांला खरे सांगतो येथे
उभे राहिलेल्यांमध्ये असे काही आहेत की, स्वर्गाचे राज्य
पाहिल्याशिवाय त्यांना मरणाचा अनुभव येणारच नाही."

## मोशे, एलीया आणि ख्रिस्त
***(मत्तय 17:1-8; मार्क 9:2-8)***

28मग असे झाले की, तो असे बोलल्यावर साधारणपणे
आठ दिवसांनंतर, आपल्याबरोबर पेत्र, योहान व याकोब
यांना घेऊन डोंगरावर प्रार्थना करण्यास गेला. 29मग असे
घडले की, तो प्रार्थना करीत असताना त्याच्या चेहऱ्याचे
रूप पालटले व त्याचे कपडे डोळे दिपविण्याएवढे पांढरेशुभ्र
झाले. 30आणि तेथे दोघे जण त्याच्याबरोबर बोलत होते.
ते एलीया व मोशे होते. ते गौरवामध्ये प्रगट झाले होते,
31आणि ते येशूच्या मरणाविषयी, जे तो यरुशलेमामध्ये
पूर्ण करणार होता, त्याविषयी बोलत होते. 32पण पेत्र व
त्याच्याबरोबर असलेले सर्व झोपी गेले होते, जेव्हा ते जागे
झाले, त्यांनी येशूचे गौरव पाहिले, आणि दोन मनुष्यांना
त्याच्याबरोबर उभे असलेले पाहिले. 33मग असे झाले
की, ते दोघे जण येशूपासून विभक्त होत असताना, पेत्र
येशूला म्हणाला, "गुरुजी, आम्ही येथे आहोत ते चांगले
झाले. आपण तीन मंडप तयार करु या, एक तुमच्यासाठी,
एक मोशेसाठी व एक एलीयासाठी." (तो काय बोलत
होता हे त्याचे त्याला कळत नव्हते.)
34पण तो या गोष्टी सांगत असता एक मेघ खाली आला
आणि त्याने छायेने त्यांना झाकून टाकले. त्यांनी मेघामध्ये
प्रवेश केल्यानंतर ते घाबरले. 35आणि त्यांना वेढलेल्या
ढगातून एक वाणी ऐकू आली; ती म्हणाली, "हा माझा
पुत्र आहे; तो माझा निवडलेला आहे. त्याचे ऐका."
36जेव्हा वाणी झाली तेव्हा येशू एकटाच तेथे होता.
आणि याविषयी ते गप्प राहिले. त्यांनी त्यावेळी जे काही
पाहिले होते त्याविषयी कोणालाही काही सांगितले नाही.

## येशू भूतग्रस्त मुलाला बरे करतो
***(मत्तय 17:14-18; मार्क 9:14-27)***

37नंतर दुसऱ्या दिवशी असे झाले की, जेव्हा ते
डोंगरावरून खाली आले तेव्हा मोठा जमाव येशूला
भेटण्यासाठी आला. 38आणि त्याचवेळी जमावातील एक
मनुष्य मोठ्याने ओरडून म्हणाला, "गुरुजी, मी तुम्हांला
विनंति करतो, माझ्या मुलाकडे पाहा, कारण तो माझा
एकुलता एक मुलगा आहे. 39एकाएकी त्याला अशुद्ध
आत्मा धरतो व तो अचानक किंचाळतो, आणि तो त्याला
झटके देईपर्यंत पिळतो, त्यामुळे त्याच्या तोंडाला फेस येतो,
तो त्याला सोडीत नाही व त्याला गलितगात्र करतो. 40मी
तुमच्या शिष्यांना तो अशुद्ध आत्मा काढण्याची विनंति
केली, पण त्यांना ते शक्य झाले नाही."
41"येशू म्हणाला अहो, अविश्वासू व चुकलेल्या
लोकांनो! मी तुमच्याबरोबर किती काळ राहू व किती
काळ तुमचे सोसू? त्या मुलाला इकडे आणा." 42परंतु तो
येत असतानाच भुताने त्याला पाडले आणि पिळवटले.
येशूने अशुद्ध आत्म्याला धमकावले. त्याने मुलाला बरे
केले आणि त्याला त्याच्या वडिलांजवळ परत दिले.
43देवाचा महिमा पाहून ते सर्व फार आश्चर्यचकित झाले.

## येशू त्याच्या मरणाविषयी सांगतो
***(मत्तय 17:22-23; मार्क 9:30-32)***

पण सर्व लोक येशूने जे केले त्याविषयी आश्चर्य व्यक्त
करीत असताना, तो त्याच्या शिष्यांना म्हणाला.
44"मी तुमच्याजवळ ज्या गोष्टी सांगतो त्याकडे
काळजीपूर्वक लक्ष द्या. मनुष्याच्या पुत्राला लोकांच्या हाती
देण्यात येईल." 45पण शिष्यांना त्याचे बोलणे समजले

नाही. ते त्यांच्यापासून लपवून ठेवण्यात आले होते. यासाठी की ते त्यांना समजू नये. आणि या बोलण्याविषयी त्याला विचारण्याची त्यांना भीति वाटत होती.

### अति महत्त्वाची व्यक्ति
### (मत्तय 18:1-5; मार्क 9:33-37)

[46]आपणांमध्ये सर्वांत मोठा कोण असा शिष्यांमध्ये वाद
सुरू झाला. [47]पण येशूला त्यांच्या मनातले विचार समजले,
तेव्हा त्याने एका लहान बालकाला घेतले व त्याच्याजवळ
त्याला उभे केले. [48]येशू त्यानां म्हणाला, "जो कोणी ह्या
लहान बालकाला माझ्या नावाने स्वीकारतो तो मला स्वीकारतो आणि जो मला स्वीकारतो तो ज्याने मला पाठविले त्याला स्वीकारतो. कारण जो कोणी तुम्हा मध्ये सर्वांत लहान बनेल तो सर्वांत मोठा आहे."

### जी व्यक्ति तुमच्याविरुद्ध नाही ती तुम्हांला अनुकूल आहे
### (मार्क 9:38-40)

[49]परंतु योहानाने उत्तर दिले, "गुरुजी, आम्ही कोणाला
तरी तुमच्या नावाने भुते काढताना पाहिले, व आम्ही त्याला मना केले, कारण आम्ही जे तुम्हांला अनुसरतो
त्यापैकी तो नाही." [50]परंतु येशू योहानाला म्हणाला, "त्याला
मना करू नका, कारण जो तुमच्याविरुद्ध नाही तो तुम्हांला अनुकूल आहे."

### शोमरोननगर

[51]आता असे घडले की, जेव्हा त्याला स्वर्गात घेण्याची
वेळ आली, त्याने यरुशलेमाला जाण्याचे ठरविले. [52]त्याने
आपणांपुढे निरोपे पाठविले. ते गेले आणि येशूच्या येण्याविषयीच्या तयारीसाठी एका शोमरोनी खेड्यात गेले.
[53]पण शोमरोन्यांनी येशूचा स्वीकार केला नाही, कारण
तो यरुशलेमाकडे निघाला होता.

[54]जेव्हा याकोब व योहान या शिष्यांनी पाहिले, तेव्हा ते म्हणाले, "प्रभु, स्वर्गातील अग्नीने येऊन त्यांचा नाश करावा यासाठी आम्ही आज्ञा करावी असे तुला वाटते काय?"

[55]तेव्हा त्याने वळून त्यांना धमकावले. [56]आणि ते
दुसऱ्या खेड्यात निघून गेले.

### येशूला अनुसरणे
### (मत्तय 8:19-22)

[57]ते रस्त्याने चालत जात असता कोणी तरी त्याला म्हणाले, "तू जेथे कोठे जाशील तेथे मी तुझ्यामागे येईन."

[58]तेव्हा येशू त्याला म्हणाला, "कोल्ह्यांना बिळे आहेत, आणि आकाशातील पक्ष्यांना घरटी आहेत, पण मनुष्याच्या पुत्राला डोकेसुध्दा टेकावयास जागा नाही."

[59]तो दुसऱ्या एकाला म्हणाला, "माझ्यामागे ये." पण तो मनुष्य म्हणाला, "पहिल्यांदा मला जाऊ दे आणि माझ्या वडिलांना पुरू दे."

[60]पण येशू त्याला म्हणाला, "मेलेल्यांना त्यांच्या मेलेल्यांना पुरू दे. तू जा आणि देवाच्या राज्याची घोषणा कर."

[61]दुसरा म्हणाला, "मी तुला अनुसरेन, प्रभु पण अगोदर मला माझ्या घरातील लोकांचा निरोप घेऊ दे."

[62]पण येशू त्यांस म्हणाला, "जो कोणी नांगराला हात घालतो व मागे पाहतो तो देवाच्या राज्यासाठी योग्य नाही."

### येशू बहात्तर पुरुषांना कामगिरीवर पाठवितो

10 या घटनांनंतर प्रभूने इतर बहात्तर जणांची* नेमणूक केली. आणि येशूने त्यांना जोडीजोडीने पाठविले. त्याला ज्या ठिकाणी जायचे होते त्या प्रत्येक
गावात व ठिकाणी त्याने त्यांना पाठविले. [2]तो त्यांना
म्हणाला, "पीक फार आहे पण कामकरी थोडे आहेत. यास्तव पिकाच्या धन्याने त्याच्या पिकासाठी कामकरी
पाठवावेत यासाठी प्रार्थना करा. [3]जा! आणि लक्षात ठेवा,
लांडग्यात जशी कोंकरे तसे मी तुम्हास या जगात पाठवीत
आहे. [4]थैली, पिशवी किंवा वहाणा बरोबर घेऊ नका. व
रस्त्याने जाताना कोणाला सलाम करू नका. [5]कोणत्याही
घरात तुम्ही प्रवेश कराल तेव्हा पहिल्यांदा असे म्हणा, 'या
घरास शांति असो!' [6]जर तेथे शांतिप्रिय मनुष्य असेल तर
तुमची शांति त्याच्यावर राहील, परंतु तो मनुष्य शांतिप्रिय
नसेल तर तुमची शांति तुमच्याकडे परत येईल. [7]त्या
घरात तुम्हांला जे देतील ते खातपीत राहा. कारण कामकरी हा त्याच्या मजुरीस पात्र आहे. या घरातून त्या घरात असे
घर बदलू नका. [8]कोणत्याही नगरात तुम्ही प्रवेश कराल
तेव्हा आणि जेव्हा ते तुमचे स्वागत करतील तेव्हा,
तुमच्यासमोर जे वाढलेले असेल ते खा. [9]तेथील रोग्यांना
बरे करा आणि नंतर त्यांना सांगा की, 'देवाचे राज्य
लवकरच तुमच्याकडे येत आहे!' [10]परंतु तुम्ही एखाद्या
गावात प्रवेश कराल आणि त्यांनी जर तुमचे स्वागत केले
नाही तर रस्त्यात जा आणि म्हणा, [11]'आमच्या पायाला
लागलेली तुमच्या गावाची धूळदेखील आम्ही तुम्हांविरुद्ध झटकून टाकीत आहोत! तरीही हे लक्षात असू द्या की,
देवाचे राज्य लवकरच तुमच्येकडे येत आहे.!' [12]मी तुम्हांला
सांगतो, त्या दिवशी त्या गावापेक्षा सदोमातील लोकांना सोपे जाईल."

### जे विश्वास ठेवीत नाहीत त्यांना येशू इशारा देतो
### (मत्तय 11:20-24)

[13]"खोराजिना तुझ्यासाठी हे वाईट होईल! बेथसैदा*
तुझ्यासाठी हे वाईट होईल! कारण जे चमत्कार तुम्हांमध्ये

---

**बहात्तर जणांची** लूकाच्या काही ग्रीक प्रतीमध्ये सत्तर म्हटले आहे.

**खोराजिन, बेथसैदा** गालील सरोवरालगतची नगरे जेथे येशूने लोकांना संदेश दिले.

घडले ते जर सोर व सिदोनमध्ये घडले असते तर त्यांनी फार पूर्वीच गोणपाट नेसून राखेत बसून पश्चात्ताप केला असता.
[14]"तरीसुद्धा सोर व सिदोन यांना न्यायाच्या वेळी तुमच्यापेक्षा सोपे जाईल. [15]आणि कफर्णहूमा, तुला स्वर्गापर्यंत चढवले जाईल काय? तू तर अधोलोकातच जाशील. [16]जो शिष्यांचे ऐकतो तो माझे ऐकतो आणि जो शिष्यांना नाकारतो तो मला नाकारतो. आणि जो मला नाकारतो तो ज्याने मला पाठविले त्याला नाकारतो."

## सैतानाचे पतन

[17]ते बहात्तर लोक आनंदाने परतले आणि म्हणाले, "प्रभु, तुझ्या नावाने भुतेसुद्धा आम्हांला वश होतात!"
[18]तेव्हा तो त्यांना म्हणाला, "मी सैतानाला आकाशातून विजेसारखे पडताना पाहिले! [19]ऐका मी तुम्हांला साप आणि विंचू यांना तुडविण्याचा अधिकार दिला आहे. व मी तुम्हांला शत्रूच्या सर्व सामर्थ्यावर अधिकार दिलेला आहे. आणि कशानेच तुम्हांला अपाय होणार नाही.
[20]तथापि तुम्हांला भुते वश होतात याचा आनंद मानू नका तर तुमची नावे स्वर्गात लिहिली आहेत याचा आनंद माना."

## येशू पित्याला प्रार्थना करतो

*(मत्तय 11:25-27; 13:16-17)*

[21]त्या क्षणी तो पवित्र आत्म्यात उल्हासित झाला, आणि म्हणाला, "हे पित्या, स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या प्रभु मी तुझी स्तुति करतो, कारण तू या गोष्टी ज्ञानी आणि बुद्धिमान लोकांपासून लपवून ठेवून त्या लहान बाळकांस प्रकट केल्या आहेस. होय, पित्या कारण तुला जे बरे वाटले ते तू केलेस.
[22]"माझ्या पित्याने सर्व गोष्टी माझ्यासाठी दिल्या होत्या. आणि पुत्र कोण आहे हे पित्याशिवाय कोणालाच ठाऊक नाही. आणि पुत्राशिवाय कोणालाही पिता कोण आहे हे माहीत नाही व ज्या कोणाला ते प्रगट करण्याची पुत्राची इच्छा असेल त्यालाच फक्त माहीत आहे."
[23]आणि शिष्यांकडे वळून तो एकांतात बोलला, "तुम्ही जे पाहता ते पाहणारे डोळे धन्य. [24]मी तुम्हांस सांगतो, अनेक राजांनी व संदेष्ट्यांनी तुम्ही जे पाहता ते पाहण्याची इच्छा बाळगली, परंतु त्यांनी ते पाहिले नाही आणि तुम्ही जे ऐकता ते ऐकण्याची इच्छा बाळगली, परंतु त्यांनी ते ऐकले नाही."

## चांगला शोमरोनी

[25]नंतर एक नियमशास्त्राचा शिक्षक उभा राहिला आणि त्याने येशूची परीक्षा पाहण्याचा प्रथम केला. तो म्हणाला, "गुरुजी, अनंतकाळचे जीवन मिळण्यासाठी मी काय करावे?"
[26]तेव्हा येशू त्याला म्हणाला, "नियमशास्त्रात काय लिहिले आहे? तू त्यांत काय वाचतोस?"
[27]तो म्हणाला, "'तू तुझा देव प्रभु याच्यावर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण आत्म्याने, पूर्ण शक्तीने प्रीति कर.'* व 'स्वत:वर जशी प्रीति करतोस तशी तू आपल्या शेजाऱ्यावरही प्रीति कर.'*" [28]तेव्हा येशू त्याला म्हणाला, "तू बरोबर उत्तर दिलेस, हेच कर म्हणजे तू चिरकाल राहशील."
[29]पण आपण योग्य प्रश्न विचारला आहे हे इतरांना दाखवून देण्यासाठी त्याने येशूला विचारले, "मग माझा शेजारी कोण?"
[30]येशूने उत्तर दिले, "एक मनुष्य यरुशलेमाहून यरीहोस निघाला होता. आणि तो लुटारूंच्या हाती सापडला. त्यांनी त्याचे कपडे काढून घेतले. त्यांनी त्याला मारले, आणि त्याला अर्धमेला टाकून ते निघून गेले. [31]तेव्हा त्याचवेळी एक याजक त्या रस्त्याने जात होता. याजकाने त्याला पाहिले, पण तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने निघून गेला.
[32]त्याच मार्गाने एक लेवी त्या ठिकाणी आला. लेव्याने त्याला पाहिले. व तो सुध्दा रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने निघून गेला. [33]नंतर एक शोमरोनी त्याच रस्त्याने प्रवास करीत तेथे आला. जेव्हा त्याने त्या मनुष्याला पाहिले, तेव्हा त्याला त्याच्याविषयी कळवळा आला [34]तो त्याच्याजवळ आला त्याच्या जखमांवर तेल व द्राक्षारस ओतून त्या बांधल्या. नंतर त्या शोमरोन्याने त्याला आपल्या गाढवावर बसविले व त्याला उतारशाळेत आणले, व त्याची देखभाल केली. [35]दुसऱ्या दिवशी त्याने दोन दीनार*(सुमारे वीस रूपये) काढले आणि उतारशाळेच्या मालकाला दिले व म्हणाला, 'याची चांगली देखभाल कर म्हणजे यापेक्षा जे तू अधिक खर्च करशील ते मी परत आल्यावर तुला देईन.' "
[36]लुटारूंच्या तावडीत जो मनुष्य सापडला होता, त्याचा त्या तिघांपैकी कोण खरा शेजारी होता असे तुला वाटते?"
[37]तो नियमशास्त्राचा शिक्षक म्हणाला, "ज्याने त्या गरजू जखमी प्रवाशावर दया मनापासून केली तो."
तेव्हा येशू त्याला म्हणाला, "जा आणि तूही तसेच कर."

## मरीया आणि मार्था

[38]मग येशू आणि त्याचे शिष्य त्याच्या मार्गाने जात असता, तो एका खेड्यात आला. तेथे मार्था नावाच्या स्त्रीने त्याचे स्वागत करून आदरातिथ्य केले. [39]तिला मरीया नावाची एक बहीण होती. ती प्रभूच्या पायाजवळ बसली व तो काय बोलतो हे ऐकत राहिली. [40]पण मार्थेची अति कामामुळे तारांबळ झाली. ती येशूकडे आली आणि

---

**तू ... कर** अनुवाद 6:5

**स्वत:वर ... कर** लेवीय 19:18

**दिनार** एक नाणे, एका व्यक्तीच्या रोजच्या मजूरीइतके मूल्य.

म्हणाली, "प्रभु, माझ्या बहिणीने सर्व काम माझ्यावर टाकले याची तुला काळजी नाही काय? तेव्हा मला मदत करायला तिला सांग."
[41]प्रभूने उत्तर दिले, "मार्था, मार्था, तू पुष्कळ गोष्टींविषयी दगदग करतेस. [42]पण एक गोष्ट आवश्यक आहे. हे मी सांगतो कारण मरीयेने तिच्यासाठी चांगला कार्यभाग निवडला आहे. तो तिच्यापासून काढून घेतला जाणार नाही."

## येशू प्रार्थने विषयी शिकवितो
### (मत्तय 6:9-15; मार्क 7:7-11)

11 मग असे झाले की, तो एका ठिकाणी प्रार्थना करीत होता. प्रार्थना संपल्यावर शिष्यांपैकी एक जण त्याला म्हणाला, "प्रभु, योहानाने जशी त्याच्या शिष्यांना प्रार्थना शिकवली;" त्याचप्रमाणे आम्ही प्रार्थना कशी करावी ते आम्हास शिकवा."
[2]मग तो त्यांना म्हणाला, "जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा असे म्हणा:

'पित्या, तुझे नाव पवित्र राखले जावो. तुझे राज्य येवो,
[3]आम्हाला रोज लागणारी भाकर आज आम्हांला दे,
[4]आणि आमच्या पापांची आम्हांला क्षमा कर, कारण आम्ही सुद्धा जे आमचे वाईट करतात त्यांची क्षमा करतो. आणि आम्हांला परीक्षेत आणू नकोस तर आम्हास वाइटापासून सोडीव.'"

## मागत राहा

[5]मग येशू त्यास म्हणाला, "समजा तुमच्यापैकी कोणाला तरी एक मित्र होता. आणि तो त्याच्याकडे मध्यरात्री गेला व त्याला म्हणाला, 'मित्रा, मला तीन भाकरी उसन्या दे,
[6]कारण माझा मित्र नुकताच प्रवास करून माझ्याकडे आला आहे. आणि त्याला वाढायला माझ्याजवळ काहीही नाही.' [7]आणि समजा तो मनुष्य आतून म्हणाला, 'मला त्रास देऊ नको! अगोदरच दार लावलेले आहे. आणि माझी मुले माझ्याजवळ झोपलेली आहेत. मी तुला देण्यासाठी उठू शकत नाही.' [8]मी तुम्हाला सांगतो जरी तो उठून त्याला कांही देण्याची टाळटाळ करील तरी त्याच्या मित्राच्या आग्रही वृत्तीमुळे तो खात्रीने उठून त्याला पाहिजे ते देईल.
[9]आणि म्हणून मी तुम्हांला सांगतो, मागा म्हणजे तुम्हांला दिले जाईल. शोधा म्हणजे तुम्हांस सापडेल आणि ठोठवा म्हणजे तुम्हांसाठी उघडले जाईल. [10]कारण जो कोणी मागतो त्याला मिळेल. जो शोधतो त्याला सापडेल आणि जो कोणी ठोठावतो त्याच्यासाठी दार उघडले जाईल.
[11]तुम्हांमध्ये असा कोण पिता आहे की, त्याच्या मुलाने त्याला मासा मागितला असता त्यास माशाऐवजी साप देईल?
[12]किंवा जर मुलाने अंडे मागितले तर कोणता पिता त्याला विंचू देईल? [13]जर तुम्ही इतके वाईट असताना तुम्हांला तुमच्या मुलांना चांगल्या देणग्या देण्याचे समजते, तर जे त्याच्याकडे मागतात त्यांना स्वर्गातील पिता किती तरी अधिक पवित्र आत्मा देईल?"

## येशूचे सामर्थ्य देवापासून आहे
### (मत्तय 12:22-30; मार्क 3:20-27)

[14]येशू एक भूत काढीत होता. ते मुके होते. मग असे झाले की, जो मनुष्य बोलू शकत नव्हता तो, भूत बाहेर आल्यावर, बोलू लागला व लोकांचा जमाव चकित झाला.
[15]परंतु त्यांच्यातील काही लोक म्हणाले की, "भुतांचा प्रमुख जो बालजबूल याच्या साहाय्याने तो भुते काढतो."
[16]काहींनी त्याची परीक्षा पाहण्यासाठी स्वर्गातून चिन्ह मागितले. [17]पण त्यांच्या मनात काय होते हे त्याला माहीत होते आणि तो त्यांना म्हणाला, "आपसात फूट पडलेले प्रत्येक राज्य ओसाड पडते आणि एखाद्या घरात एकमेकांविरुद्ध भांडतात तेव्हा त्या घराचे तुकडे होतात.
[18]आणि तुम्ही म्हणता तशी जर भुतांमध्येही फूट पडली तर त्याचे राज्य कसे टिकेल? मी तुम्हांला हे विचारतो, कारण तुम्ही म्हणता मी बालजबूलच्या साहाय्याने भुते काढतो. .
[19]पण जर मी बालजबूलच्या साहाय्याने भुते काढतो, तर तुमचे अनुयायी ( तुमची मुले) कोणाच्या साहाय्याने भुते काढतात? म्हणून तेच तुमचा न्याय करतील. [20]परंतु जर मी देवाच्या साहाय्याने भुते काढतो, तर मग हे स्पष्ट आहे की, देवाचे राज्य तुमच्याकडे आले आहे. [21]जेव्हा एखादा बलवान मनुष्य आपल्या सुरक्षिततेसाठी पूर्ण शस्त्रसामग्री बाळगतो आणि स्वत:चे रक्षण करतो तेव्हा त्याची मालमत्ता सुरक्षित राहते. [22]परंतु कोणी त्याच्याहीपेक्षा अधिक बलवान त्याच्यावर हल्ला करून त्याचा पराभव करतो, तेव्हा ज्या शस्त्रसामग्रीवर त्याने भरंवसा ठेवला होता, ती तो घेऊन जातो व त्याला मिळालेली लूट आपल्या मित्रांना वाटतो. [23]जो माझ्या पक्षाचा नाही, तो माझ्याविरुद्ध आहे आणि जो माझ्याबरोबरीने गोळा करीत नाही, तर तो उधळून टाकतो.

## रिकामा मनुष्य
### (मत्तय 12:43-45)

[24]जेव्हा भूत माणसाबाहेर येते व ते विसावा घेण्यासाठी निर्जल प्रदेशात जागा शोधते. पण त्याला ती विश्रांति मिळत नाही. तेव्हा तो म्हणतो, 'मी ज्या घरातून बाहेर आलो त्या घरात परत जाईन.' [25]तो जातो आणि त्याला ते घर झाडून नीटनेटके केलेले आढळते. [26]नंतर तो जातो आणि आपणापेक्षा अधिक बळकट व दुष्ट असे सात आत्मे मिळवितो, आणि ते आत जातात आणि तेथेच राहतात. तेव्हा त्या मनुष्याची शेवटची अवस्था पहिल्यापेक्षा वाईट होते."

## खरे धन्य लोक

27असे घडले की, तो या गोष्टी बोलला तेव्हा गर्दीतील
एक स्त्री मोठ्याने ओरडून त्याला म्हणाली, "धन्य ते
गर्भाशय, ज्याने तुझा भार वाहिला व धन्य ती स्तने जी तू
चोखलीस!" 28परंतु तो म्हणाला, "जे देवाचे वचन ऐकतात
व पाळतात ते धन्य!"

## आम्हांला पुरावा दे

*(मत्तय 12:38-42; मार्क 8:12)*

29जसजसा लोकसमुदाय वाढू लागला, तेव्हा तो बोलू
लागला, "ही पिढी दुष्ट पिढी आहे. ती चिन्ह मागत आहे,
आणि योनाच्या चिन्हाशिवाय कोणतेही चिन्ह तिला दिले
जाणार नाही. 30कारण जसा योना निनवेच्या लोकांकरिता
चिन्ह होता तसा मनुष्याचा पुत्रही या पिढीसाठी चिन्ह
होईल. 31दक्षिणेकडची राणी* न्यायाच्या दिवशी या
पिढीविरुद्ध उठेल आणि ती त्यांचा धिक्कार करील. कारण
ती पृथ्वीच्या दक्षिण टोकाकडून शलमोनाचे शहाणपण
ऐकण्यासाठी आली, आणि आता तर शलमोनापेक्षाही थोर
असा कोणी एक येथे आहे. 32न्यायाच्या दिवशी निनवेचे
लोक या पिढीबरोबर उभे राहतील व त्यांचा धिक्कार
करतील. कारण योनाचा उपदेश ऐकून त्यांनी पश्चात्ताप
केला पण आता योनापेक्षाही थोर असा कोणी येथे आहे.

## जगासाठी प्रकाश असे व्हा

*(मत्तय 5:15; 6-22:23)*

33"कोणी दिवा लावून तळघरात किंवा भांड्याखाली
ठेवत नाहीत, उलट तो दिवठणीवर ठेवतात. यासाठी की
जे कोणी आत येतात त्यांना प्रकाश दिसणे शक्य व्हावे.
34डोळा हा तुमच्या शरीराचा दिवा आहे. जर तुमचे डोळे
चांगले आहेत, तर तुमचे शरीरही प्रकाशाने भरलेले आहे.
35पण ते जर वाईट आहेत तर तुमचे शरीर अंधकारमय
आहेत तुमच्यातला प्रकाश हा अंधार तर नाही ना, याची
काळजी घ्या. 36जर तुमचे सर्व शरीर प्रकाश आहे आणि
जर त्याचा एकही भाग अंधार नाही तर, जशी दिव्याची
प्रकाशकिरणे तुझ्यावर प्रकाशतात, तसे ते पूर्णपणे
प्रकाशतील."

## येशू परूश्यांवर टीका करतो

*(मत्तय 23:1-36; मार्क 12:38-40; लूक 20:45-47)*

37जेव्हा येशूने आपले बोलणे संपविले तेव्हा एका
परूश्याने त्याला आपल्याबरोबर जेवायला बोलाविले. तो
आत गेला आणि आपल्या जागी रेलून बसला. 38परंतु
त्याने जेवणापूर्वी हात धुतले नाहीत हे पाहून परूश्याला
फार आश्चर्य वाटले. 39तेव्हा प्रभु त्याला म्हणाला, "तुम्ही
परूशी प्याला व ताट बाहेरून स्वच्छ करता पण तुम्ही
आतून अधाशीपणाने व फसवणुकीच्या दुष्टतेने भरले
आहात. 40तुम्ही मूर्ख लोक! ज्याने बाहेरील बाजू बनवली
तो आतली बाजू बनवणार नाही का? 41पण जे आतमध्ये
आहे, ते गरिबांना द्या. आणि नंतर सर्व काही तुमच्यासाठी
स्वच्छ होईल. 42परूश्यांनो तुम्हाला धिक्कार असो कारण
तुम्ही पश्चात्ताप करता व पुदिन्याचा व प्रत्येक वनस्पतीचा
दशांश देता. परंतु तुम्ही न्याय आणि देवाविषयीचे प्रेम
याकडे दुर्लक्ष करता. तुम्ही या गोष्टी प्रथम काराव्यात व
मुख्य गोष्टींकडे दुर्लक्ष करू नये. 43परूश्यांनो तुमचा
धिक्कार असो, कारण तुम्हांला सभास्थानातील महत्त्वाच्या
जागी बसणे आणि बाजारात नमस्कार घेणे आवडते.
44तुमचा धिक्कार असो कारण तुम्ही खुणा न केलेल्या
कबरांसारखे आहात, अशा कबरांवर लोक नकळत पाय
देऊन चालतात."

## येशू यहूदी शिक्षकांशी बोलतो

45नियमशास्त्राचा एक शिक्षक येशूला म्हणाला, "गुरुजी,
तुम्ही असे बोलता तेव्हा तुम्ही आमचासुद्धा अपमान करता."
46तेव्हा येशू म्हणाला, "नियमशास्त्राच्या शिक्षकांनो
तुमचाही धिक्कार असो, कारण तुम्ही लोकांना वाहण्यास
कठीण असे ओझे लादता व ते उचलणयास तुमच्या एका
बोटानेसुद्धा मदत करीत नाही. 47तुमचा धिक्कार असो,
कारण तुमच्या पूर्वजांनी ठार केलेल्या भविष्यवाद्यांसाठी
तुम्ही कबरा बांधता. 48अशा प्रकारे तुमच्या पूर्वजांनी
केलेल्या कृत्यांचे समर्थन करता. 49यामुळे देवाचे ज्ञानसुद्धा
असे म्हणाले, 'मी प्रेषित व संदेष्टे त्यांच्याकडे पाठवील.
त्यांपैकी काही जणांना ते ठार मारतील व काही जणांचा
ते छळ करतील!'
50तेव्हा या पिढीस भविष्यवाद्यांचे जे रक्त जगाच्या
प्रारंभापासून सांडले गेले त्याबद्दल दंड भरून द्यावा लागेल.
51म्हणजे हाबेलाच्या रक्तापासून ते जखऱ्या जो देवाचे
मंदिर व वेदी यांच्यामध्ये मारला गेला. खरोखर मी तुम्हांस
सांगतो या पिढीला ते भरून द्यावे लागेल.
52"नियमशास्त्राच्या शिक्षकांनो तुमचा धिक्कार असो.
कारण तुम्ही ज्ञानाची किल्ली काढून घेतली आहे. तुम्ही
स्वत:ही आत गेला नाहीत आणि जे आत जाण्याचा प्रयत्न
करत होते, त्यांनाही जाऊ दिले नाही."
53येशू तेथून निघून जात असता नियमशास्त्राचे शिक्षक
व परूशी फार विरोध करू लागले व त्याला अनेक
गोष्टींविषयी प्रश्न विचारू लागले. 54तो जे बोलेल त्यामध्ये
त्याला एखाद्या सावजाप्रमाणे पकडण्यासाठी टपून बसले.

## परूश्यांसारखे होऊ नका

12 आणि म्हणून हजारो लोकांचा समुदाय जमला
होता. इतके लोक जमले होते की, ते एकमेकांना
तुडवू लागले. तेव्हा येशू प्रथम आपल्या शिष्यांशी बोलला:

---

**दक्षिणेकडची राणी** शीबाची राणी, देवाचे शहाणपण ऐकण्यासाठी ती 1000 मैल प्रवास करुन आली. वाचा 1 राजे 10:1-3

"परूश्यांच्या खमिराविषयी जपा, म्हणजे जे ढोंग आहे त्याविषयी जपा. 2उघड केले जाणार नाही असे काहीच झाकलेले नाही व जे कळणार नाही असे काहीच गुप्त नाही. 3यास्तव जे काही तुम्ही अंधारात बोलाल ते उजेडात ऐकले जाईल आणि जे काही तुम्ही कोणाच्या कानात एकांतात सांगाल ते घराच्या छपरावरून घोषित केले जाईल."

### फक्त देवाची भीति बाळगा
### *(मत्तय 10:28-31)*

4"परंतु माझ्या मित्रांनो, मी तुम्हांला सांगतो, जे शरीराला मारतात त्यांना तुम्ही भिऊ नये, कारण त्यानंतर त्यापेक्षा जास्त त्यांना काही करता येत नाही. 5तुम्ही कोणाची भीति बाळगावी हे मी तुम्हांला सांगतो. तुम्हांला ठार मारल्यांनतर तुम्हांस नरकात टाकून देण्यास जो समर्थ आहे, त्याची भीति धरा. होय, मी तुम्हांस सांगतो त्यालाच भ्या.

6"पाच चिमण्या दोन पैशांना विकतात की नाही? आणि त्यातील एकीचाही देवाला विसर पडत नाही. 7पण तुमच्या डोक्यावरील सर्व केसदेखील त्याने मोजलेले आहेत. भिऊ नका. पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुम्ही मोल्लवान आहात."

### येशूची लाज बाळगू नका
### *(मत्तय 10:32-33; 12:32; 10:19-20)*

8"प्रत्येक जण जो मला इतर लोकांसमोर स्वीकारतो, त्या मनुष्याला देवाच्या दूतासमोर मनुष्याचा पुत्रही स्वीकारील. 9परंतु जो मला इतर लोकांसमोर नाकारतो, तो देवदूतांसमोरही नाकारला जाईल.

10"प्रत्येक मनुष्य जो मनुष्याच्या पुत्राविरुद्ध बोलतो, त्याला क्षमा केली जाईल. परंतु जो पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करतो त्याला क्षमा केली जाणार नाही.

11"जेव्हा ते तुम्हांला सभास्थान, सरकार, अधिकारी यांच्यासमोर आणतील तेव्हा तुम्ही काय बोलावे किंवा स्वत:चा बचाव कसा करावा याविषयी आधीच चिंता करीत बसू नका. 12कारण तुम्ही काय बोलावे हे पवित्र आत्मा त्यावेळी तुम्हांला शिकवील."

### येशू स्वार्था विरुद्ध सूचना देतो

13नंतर लोकसमुदायातील एक जण त्याला म्हणाला, "गुरुजी, माझ्या भावाला वतन विभागून माझे मला द्यायला सांगा!"

14परंतु येशू त्याला म्हणाला, "मनुष्या, मला तुमच्यावर मध्यस्थ किंवा न्यायाधीश म्हणून कोणी नेमले?" 15मग येशू त्यांना म्हणाला, "सांभाळा आणि सर्व प्रकारच्या लोभापासून स्वत:ला दूर ठेवा. कारण जेव्हा एखाद्या माणसाजवळ त्याच्या गरजेपेक्षा अधिक असते तेव्हा ती संपत्ती म्हणजे त्याचे जीवन असे होत नाही."

16नंतर त्याने त्यास एक बोधकथा सांगितली: "कोणा एका धनवान मनुष्याच्या जमिनीत फार उत्तम पीक आले. 17तो स्वत:शी विचार करून असे म्हणाला, 'मी काय करू, कारण धान्य साठवायला माझ्याकडे जागा नाही?' 18मग तो म्हणाला, 'मी असे करीन की धान्याची कोठारे पाडून मोठी बांधीन, मी माझे सर्व धान्य व माल तेथे साठवीन. 19आणि मी माझ्या जिवाला म्हणेन, जिवा, तुझ्यासाठी पुष्कळ चांगल्या गोष्टी अनेक वर्षे पुरतील इतक्या आहेत. आराम कर. खा, पी आणि मजा कर." 20पण देव त्याला म्हणतो, 'मूर्खा, जर आज तू मेलास तर तू मिळविलेल्या गोष्टी कोणाला मिळतील?'

21"जो कोणी स्वत:साठी संपत्ती जमा करतो परंतु देवाच्या दृष्टीने जो धनवान नाही, अशा मनुष्यासारखे हे आहे."

### देवाच्या राज्याला प्रथम स्थान देणे
### *(मत्तय 6:25-34, 19-21)*

22मग येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, "म्हणून मी तुम्हांस सांगतो, स्वत:च्या जीवनाविषयी किंवा तुम्ही काय खावे याविषयी चिंता करू नका. किंवा तुमच्या शरीराविषयी म्हणजे कोणते कपडे घालावेत याविषयी चिंता करू नका. 23कारण अन्नापेक्षा जीव आणि कपड्यापेक्षा शरीर महत्त्वाचे आहे. 24कावळ्यांचा विचार करा. ते पेरीत नाहीत व कापणीही करीत नाहीत. त्यांना कोठार नाही व कणगीही नाही. तरीही देव त्याचे पोषण करतो. पक्ष्यांपेक्षा तुम्ही कितीतरी मोलवान आहात! 25चिंता करून तुम्हांपैकी कोण स्वत:च्या आयुष्यात एका तासाची भर घालू शकेल? 26ज्याअर्थी तुम्ही ही लहान गोष्ट करू शकत नाही, तर इतर गोष्टींविषयी चिंता का करता?

27रानफुले कशी वाढतात याचा विचार करा. ते कष्ट करीत नाहीत व कातीत नाहीत. तरी मी तुम्हांला सांगतो शलमोनानेसुद्धा आपल्या सर्व वैभवात त्यांच्यातील एकासारखाही पोशाख घातला नव्हता. 28जर देवाने जे आज आहे व उद्या भट्टीत टाकले जाईल अशा त्या रानातील गवताला असा पोशाख घातला आहे, तर तुम्ही जे अल्पविश्वासू त्या तुम्हांला तो कितीतरी अधिक (चांगला) पोशाख घालणार नाही काय! 29आणि तुम्ही काय खावे व काय प्यावे याविषयी खटपट करू नका. या गोष्टींविषयी चिंता करू नका. 30कारण जगातील सर्व लोक हे मिळविण्याची खटपट करतात पण या गोष्टींची गरज तुम्हांला आहे, हे तुमच्या पित्याला माहीत आहे. 31त्याऐवजी प्रथम त्याचे राज्य मिळविण्यासाठी झटा म्हणजे याही गोष्टी तुम्हांला दिल्या जातील.

### धनावर विश्वास ठेवू नका

32"लहान कळपा भिऊ नको, कारण तुम्हांला त्याचे राज्य द्यावे हे दयाळू पित्याला समाधानाचे वाटते. 33तुमच्याकडे असलेले सर्व विका आणि गरिबांना पैसे

द्या. जुन्या न होणाऱ्या व स्वर्गातही न संपणाऱ्या अशा थैल्या स्वत:साठी करा. जेथे चोर जाऊ शकणार नाही व कसरही त्याचा नाश करू शकणार नाही. 34कारण जेथे तुमचे धन आहे तेथे तुमचे मनही लागेल.

### सदैव तयार असा
***(मत्तय 24:45-51)***

35"तुमच्या कंबरा बांधलेल्या आणि दिवे लागलेले असू द्या. 36लग्नाच्या मेजवानीवरून त्यांचा मालक परत येईल अशी वाट पाहणाऱ्या लोकांसारखे व्हा. यासाठी की जेव्हा तो येतो व ठोठावतो तेव्हा त्याच्यासाठी ते ताबडतोब दार उघडतील. 37धन्य ते नोकर जे त्यांचा मालक परत आल्यावर त्याला जागे व तयारीत असलेले आढळतील. मी तुम्हांला खरे सांगतो, तो स्वत: त्यांची सेवा करण्यासाठी कंबर कसेल, त्यांना मेजावर बसायला सांगून त्यांची सेवा करील. 38तो मध्यरात्री येवो अगर त्यानंतर येवो. जर ते त्याला असे तयारीत आढळतील तर ते धन्य. 39परंतु याविषयी खात्री बाळगा; जर घराच्या मालकाला चोर केव्हा येणार हे माहीत असते तर त्याचे घर त्याने फोडू दिले नसते. 40तुम्हीही तयार असा कारण तुम्ही अपेक्षा करणार नाही अशा कोणत्याही क्षणी मनुष्याचा पुत्र येईल."

### विश्वासू नोकर कोण आहे

41मग पेत्र म्हणाला, "प्रभु, तुम्ही ही बोधकथा आम्हांलाच सांगत आहात की सर्वांना?"

42तेव्हा प्रभु म्हणाला, "असा कोण शहाणा व विश्वासू कारभारी आहे की, ज्याला प्रभु त्याच्या नोकरांना त्यांचे धान्य योग्य वेळी देण्यासाठी त्याची नेमणूक करील? 43त्याचा मालक येईल त्यावेळी असे करताना जो नोकर आढळेल तो धन्य. 44मी तुम्हांला खरे सांगतो, मालक त्या नोकराला त्याच्या सर्व मालमत्तेवर अधिकारी म्हणून नेमील. 45पण जर तो नोकर मनात म्हणतो, 'माझा मालक येण्यास फार विलंब लावतो.' व तो त्याच्या स्त्री व पुरुष नोकरांना मारहाण करतो व खाण्यापिण्यास सुरुवात करतो. 46ज्या दिवसाची तो वाट पाहत नाही त्या दिवशी त्या नोकराचा मालक येईल व अशा वेळी येईल की ती वेळ त्याला माहीत असणार नाही. आणि तो त्याचे वाभाडे वाभाडे काढील व तो त्याला अविश्वासू लोकांबरोबर ठेवील. 47ज्या नोकराला आपल्या मालकाची इच्छा माहीत असते व जो तयार राहत नाही, किंवा जो आपल्या मालकाच्या इच्छेप्रमाणे करीत नाही, त्या नोकराला खूप मार मिळेल. 48परंतु कसलाही वाईट हेतू न बाळगता मालकाला न आवडणारे जर त्याने केले असेल तर त्याला कमी मार बसेल. ज्या कोणाला पुष्कळ दिले आहे त्याच्याकडून पुष्कळाची अपेक्षा केली जाईल. ज्यांच्याजवळ जास्त ठेवले आहे त्यांच्याकडून जास्त मागितले जाईल."

### लोक येशूविषयी सहमत होणार नाहीत
***(मत्तय 10:34-36)***

49"मी पृथ्वीवर आग लावण्यास आलो आहे. मला असे वाटते की ती अगोदरच पेटली असती तर किती बरे झाले असेत. 50माझ्याकडे बाप्तिस्मा आहे व तो मला घ्यावयाचा आहे. आणि तो होईपर्यंत मी किती अस्वस्थ आहे! 51तुम्हांला असे वाटते का की मी पृथ्वीवर शांतता प्रस्थापित करण्यास आलो आहे? नाही, मी तुम्हांला सांगतो मी तुमच्यात फूट पाडण्यासाठी आलो आहे. 52मी असे म्हणतो कारण आतापासून घरातील पाच जणात एकमेकाविरुद्ध फूट पडेल. तिघे दोघांविरुद्ध व दोघे तिघांविरुद्ध अशी फूट पडेल.

53त्यांच्यात पित्याविरुद्ध मुलगा व मुलाविरुद्ध पिता अशी फूट पडेल, आईविरुद्ध मुलगी व मुलीविरुद्ध आई अशी फूट पडेल, सासूविरुद्ध सून व सुनेविरुद्ध सासू अशी त्यांच्यात फूट पडेल."

### समय ओळखणे
***(मत्तय 16:2-3)***

54तो लोकसमुदायाला म्हणाला, "तुम्ही जेव्हा पश्चिमेकडून ढग येताना पाहता तेव्हा तुम्ही लगेच म्हणता की, 'पाऊस पडेल' आणि तेच घडते. 55जेव्हा दक्षिणेकडचा वारा वाहतो, तेव्हा तुम्ही म्हणता 'उकाडा होईल' आणि तसे घडते. 56अहो ढोंग्यांनो! तुम्ही पृथ्वीवरील व आकाशातील स्थित्यंतरे पाहून अनुमान काढता, पण सध्याच्या काळाचा अर्थ तुम्हांला का काढता येत नाही?"

### तुमच्या समस्या सोडवा
***(मत्तय 5:25-26)***

57"आणि काय योग्य आहे हे तुमचे तुम्ही स्वत:च का ठरवीत नाही? 58तुम्ही तुमच्या वाद्याबरोबर न्यायालयात जात असता वाटेतच त्यांच्याशी समेट करा नाही तर तो तुम्हांला न्यायाधीशासमोर नेईल, आणि न्यायाधीश तुम्हांला दंडाधिकाऱ्याच्या स्वाधीन करील. आणि अधिकारी तुम्हांला तुरुंगात टाकील. 59मी तुम्हांला सांगतो, तुम्ही पै न पै देईपर्यंत तेथून बाहेर पडू शकणार नाही."

### तुमची अंत:करणे बदला

13 त्यावेळी तेथे काही लोक उपस्थित होते. त्यांनी येशूला गालीलातील त्या लोकांविषयी सांगितले, ज्यांचे रक्त पिलाताने* आधीच असलेल्या यज्ञपशूंच्या रक्तात मिसळले होते. 2त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्हांला वाटते का की, ह्या गालीलकरांनी जे भोगले त्यावरून ते इतर गालीलकरांपेक्षा जास्त पापी होते? 3नाही, मी तुम्हांस

---

**पिलात** पंतय पिलात हा रोमी राज्यापाल होता. तो यहुदायाचा इ.स. 26 ते 36 पर्यंत राज्यपाल होता.

सांगतो, जर तुम्ही पश्चात्ताप केला नाही तर ते जसे मेले
तसे तुम्हीही मराल. 4किंवा त्या अठरा जणांचे काय?
ज्यांच्यावर शिलोहाचा बुरूज पडला व ते मारले गेले?
तुम्हांला वाटते का की, यरुशलेम येथे राहणाऱ्या सर्व
लोकांपेक्षा ते अधिक दोषी होते? 5नाही, मी तुम्हांला
सांगतो जर तुम्ही पश्चात्ताप केला नाही तर तुम्ही सर्व जण
त्यांच्यासारखे मराल."

## निरुपयोगी झाड

6नंतर त्याने ही बोधकथा सांगितली, "एका माणसाने
त्याच्या बागेत अंजिराचे झाड लावले होते, त्यावर फळ
असेल म्हणून तो पाहावयास आला परंतु त्याला काहीही
आढळले नाही. 7म्हणून तो माळ्याला म्हणाला, 'पाहा, या
अंजिराच्या झाडावर फळ पाहण्यासाठी मी गेल्या तीन
वर्षांपासून येत आहे, परंतु मला त्यावर काहीही आढळले
नाही. तेव्हा ते तोडून टाक. त्याचा उगीच भुईला भार
कशाला?'
8माळ्याने उत्तर दिले, 'मालक, या एका वर्षासाठी ते
राहू द्या. मग मी त्याच्याभोवती खणून त्याला खत घालीन.
9मग येत्या वर्षात फळ आले तर छानच! जर आले नाही
तर मग आपण ते तोडून टाकावे."

## येशू एका स्त्रीला शब्बाथ दिवशी बरे करतो

10शब्बाथ दिवशी येशू एका सभास्थानात शिकवीत
होता. 11तेथे एक स्त्री होती. तिला अशुद्ध आत्म्याने अठरा
वर्षे पांगळे केले होते. ती कुबडी होती व तिला सरळ उभे
राहता येत नव्हते.
12येशूने तिला पाहिले, त्याने तिला बोलावले आणि तो
तिला म्हणाला, "बाई, तुझ्या आजारापासून तू मुक्त झाली
आहेस!"
13नंतर त्याने आपले हात तिच्यावर ठेवले आणि ती
तत्काळ सरळ झाली. आणि ती देवाची स्तुति करू लागली.
14नंतर सभास्थानाचा अधिकारी रागावला, कारण येशूने
शब्बाथ दिवशी तिला बरे केले होते. तो लोकांना म्हणाला,
"काम करण्यासाठी सहा दिवस आहेत म्हणून या सहा
दिवसांमध्ये या व बरे व्हा. पण शब्बाथ दिवशी येऊन बरे
होऊ नका."
15येशूने त्याला उत्तर दिले, आणि म्हणाला, "ढोंग्यांनो,
तुम्हांपैकी प्रत्येक जण त्याच्या बैलाला वा गाढवाला शब्बाथ
दिवशी त्याच्या ठिकाणाहून सोडून पाणी पाजायला घेऊन
जात नाही का? 16ही तर अब्राहामाची कन्या आहे. सैतानाने
हिला अठरा वर्षे बांधून ठेवले होते. ज्या बंधनात ती होती
त्यापासून तिला शब्बाथ दिवशी सोडविणे चूक होते काय?"
17तो असे म्हणाल्यावर जे त्याचा विरोध करीत होते त्यांना
लाज वाटली व त्याने ज्या अद्भुत गोष्टी केल्या होत्या
त्यामुळे सगळा समुदाय आनंद करू लागला.

## देवाचे राज्य कशासारखे आहे?

*(मत्तय 13:31-33; मार्क 4:30-32)*

18मग तो म्हणाला, "देवाचे राज्य कशासारखे आहे?
आणि मी त्याची कशाबरोबर तुलना करू? 19देवाचे राज्य
एका मोहरीच्या दाण्यासारखे आहे. तो मोहरीचा दाणा
एका मनुष्याने घेतला व आपल्या बागेत लावला, तो
वाढला आणि त्याचे झाड झाले. आकाशातील पाखरांनी
त्याच्या फांद्यांवर घरटी बांधली."
20तो पुन्हा म्हणाला, "मी देवाच्या राज्याची तुलना
कोणाबरोबर करू? 21ते खमिरासारखे आहे. एका स्त्रीने
तीन मापे पिठात खमिर मिसळले आणि ते सर्व खमिरामुळे
फुगले.'

## अरूंद दरवाजा

*(मत्तय 7:13-14, 21-23)*

22येशू गावागावांतून आणि खेड्यापाड्यांतून जात असता
व यरुशलेमाच्या दिशेने वाटचाल करीत असता तो लोकांना
शिकवीत होता. 23कोणीतरी त्याला विचारले, "प्रभु, फक्त
थोड्या लोकांचेच तारण होईल का?"
तो त्यांना म्हणाला, 24"अरूंद दरवाजाने आत जाण्याचा
प्रयत्न करा, कारण मी तुम्हांला सांगतो की, पुष्कळ जण
आत येण्याचा प्रयत्न करतील, पण त्यांना ते शक्य होणार
नाही. 25जेव्हा घराचा मालक उठून दार बंद करील,
तेव्हा तुम्ही बाहेर उभे राहाल व दार ठोठवाल. आणि
म्हणाल, 'प्रभु, आम्हांसाठी दार उघडा!' परंतु तो तुम्हांला
उत्तर देईल, 'तुम्ही कोठून आलात हे मला माहीत नाही.'
26नंतर तुम्ही म्हणाल, 'आम्ही तुमच्याबरोबर जेवलो,
आम्ही तुमच्याबरोबर प्यालो, आमच्या रस्त्यावर तुम्ही
शिक्षण दिले!'
27आणि तो तुम्हांला म्हणेल, "तुम्ही कोठून आलात हे
मला माहीत नाही, जे तुम्ही दुष्टपणा करता ते सर्व
माझ्यापासून निघून जा.' 28तेथे रडणे व दात खाणे चालेल,
तेव्हा तुम्ही अब्राहामाला, आणि इसहाकाला आणि
याकोबाला आणि सर्व संदेष्ट्यांना देवाच्या राज्यामध्ये
पाहाल, पण तुम्ही स्वत: मात्र बाहेर फेकलेले असाल.
29आणि लोक पूर्वेकडून, पश्चिमेकडून, उत्तरेकडून व
दक्षिणेकडून येतील व देवाच्या राज्यात मेजासभोवती
आपापल्या जागेवर बसतील. 30लक्षात ठेवा की, जे शेवटचे
आहेत ते पहिले होतील, व जे पहिले आहेत ते शेवटचे
होतील."

## येशू यरुशलेमामध्ये मरण पावेल

*(मत्तय 23:37-39)*

31त्यावेळी काही परूशी येशूकडे आले. आणि ते त्याला
म्हणाले, "येथून निघा व दुसरीकडे कुठे तरी जा, कारण
हेरोद तुम्हांला ठार मारणार आहे." 32येशू त्यांना म्हणाला,
"जा आणि त्या कोल्ह्याला सांगा, 'ऐक, मी लोकांतून भुते

काढीन, आज व उद्या रोग बरे करीन आणि तिसऱ्या दिवशी माझे काम संपवीन.’ 33तरीही आज, उद्या आणि परवा मला पुढे गेले पाहिजे कारण संदेष्टयांने यरुशलेमाबाहेर मरणे ह्याचा विचार करणे चूक आहे. 34“यरुशलेमे, यरुशलेमे, जी तू संदेष्टयांना मारतेस व देवाने पाठविलेल्यांवर दगडमार करतेस! कितीतरी वेळा कोंबडी जशी पिलांना आपल्या पंखाखाली एकवटते तसे तुम्हा लोकांना एकवटण्याची माझी इच्छा होती, पण तुमची तशी इच्छा नव्हती. 35पाहा, देवाने तुमच्या घराचा त्याग केला आहे. मी तुम्हांला सांगतो, ‘देवाच्या नावाने येणारा धन्यवादित असो’* असे म्हणण्याची वेळ येईपर्यंत तुम्ही मला पाहणार नाही.”

### शब्बाथ दिवशी रोग बरे करणे योग्य आहे काय?

14 एका शब्बाथ दिवशी तो प्रमुख परूश्यांपैकी एकाच्या घरी जेवावयास गेला, तेव्हा तेथे असणारे लोक येशूवर बारकाईने नजर ठेवीत होते. 2आणि तेथे त्याच्यासमोर जलोदर झालेला एक मनुष्य होता. 3येशूने नियमशास्त्राच्या शिक्षकांना व परूश्यांना विचारले, “शब्बाथ दिवशी बरे करणे नियमशास्त्राला धरून आहे की कसे?” 4पण ते गप्प राहिले. तेव्हा येशूने त्या आजारी माणसाला धरून त्याला बरे केले व त्याला पाठवून दिले. 5मग तो त्यांना म्हणाला, “जर तुमच्यापैकी एखाद्याला एक मुलगा किंवा एक बैल आहे व तो विहीरीत पडला, तर शब्बाथ दिवशी तुम्ही त्याला ताबडतोब बाहेर काढणार नाही काय?” 6आणि ह्या प्रश्नाला उत्तर देणे त्यांना जमले नाही.

### स्वत:ला महत्त्व देऊ नका

7मग त्याने पाहुण्यांना एक बोधकथा सांगितली, कारण त्याने पाहिले की, ते त्यांच्यासाठी मानाच्या जागा शोधीत होते. तो त्यांना म्हणाला, 8“जेव्हा एखादा तुम्हांला लग्नाच्या मेजवानीला आमंत्रित करील, तेव्हा मानाच्या आसनावर बसू नका. कारण तुमच्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या माणसाला त्याने कदाचित आमंत्रण दिले असेल. 9मग ज्याने तुम्हा दोघांना आमंत्रित केले आहे तो येईल, आणि तुम्हांला म्हणेल, ‘या माणसाला तुझी जागा दे.’ मग खजील होऊन तुम्हांला खालच्या जागी बसावे लागेल. 10पण जेव्हा तुम्हांला आमंत्रित केलेले असेल, तेव्हा जा आणि अगदी खालच्या (शेवटच्या) जागी जाऊन बसा. यासाठी की, जेव्हा यजमान येईल, तेव्हा तो तुम्हांला म्हणेल, ‘मित्रा, वरच्या आसनावर येऊन बैस.’ तेव्हा तुझ्या पाहुण्यांसमोर तुझा मान होईल. 11कारण जो कोणी स्वत:ला उच्च करितो त्याला लीन केले जाईल व जो स्वत:ला लीन करील त्याला उच्च केले जाईल.”

### तुम्हांला बक्षीस दिले जाईल

12मग ज्याने आमंत्रण दिले होते त्याला तो म्हणाला, “तू जेव्हा दुपारी किंवा संध्याकाळी भोजनास बोलावशील तेव्हा तुझ्या मित्रांना, भावांना, किंवा तुझ्या नातेवाईकांना वा श्रीमंत शेजाऱ्यांना बोलावू नको, कारण तेही तुला परत आमंत्रण देतील व अशा रीतीने तुझ्या आमंत्रणाची परतफेड केली जाईल. 13पण जेव्हा तू मेजवानी देशील, तेव्हा गरीब, लंगडे, पांगळे, आंधळे यांना आमंत्रण दे. 14आणि तुला आशीर्वाद मिळतील, कारण तुझी परतफेड करण्यासाठी त्यांच्याकडे काहीही असणार नाही. कारण नीतीमानांच्या पुनरुत्थानाच्या वेळी तुझी परतफेड होईल.”

### मोठ्या मेजवानीविषयीची गोष्ट
### (*मत्तय 22:1-10*)

15आता जेव्हा मेजाभोवती बसलेल्यांपैकी एकाने हे ऐकले, तेव्हा तो येशूला म्हणाला, “देवाच्या राज्यात जेवतो, तो प्रत्येक जण धन्य!”

16मग येशू त्याला म्हणाला, “एक मनुष्य एका मोठ्या मेजवानीची तयारी करीत होता. त्याने पुष्कळ लोकांना आमंत्रण दिले. 17भोजनाच्या वेळी ज्यांना आमंत्रण दिले होते त्यांना ‘या, कारण सर्व तयार आहे’ हे सांगण्यासाठी नोकराला पाठविले. 18ते सर्वजण सबब सांगू लागले. पहिला त्याला म्हणाला, ‘मी शेत विकत घेतले आहे आणि मला जाऊन ते पाहिले पाहिजे. कृपा करून मला क्षमा कर.’ 19दुसरा म्हणाला, ‘मी बैलाच्या पाच जोड्या विकत घेतल्या आहेत व त्या कशा आहेत हे बघण्यासाठी मी चाललो आहे. कृपा करून मला क्षमा कर.’ 20आणखी तिसरा म्हणाला, ‘मी लग्न केले आहे, व त्यामुळे मी येऊ शकणार नाही.’ 21म्हणून जेव्हा तो नोकर परत आला, तेव्हा त्याने आपल्या मालकाला या गोष्टी सांगितल्या. मग घराचा मालक रागावला आणि नोकराला म्हणाला, ‘लवकर बाहेर रस्त्यावर आणि नगरातल्या गल्ल्यांमध्ये जा व गरीब, आंधळे, असहाय्य, लंगडे यांना घेऊन इकडे ये!’ 22नोकर म्हणाला, ‘आपल्या आज्ञेप्रमाणे केले आहे. आणि तरीही जागा आहे.’ 23मालक नोकराला म्हणाला, ‘रस्त्यावर जा, कुंपणाजवळ जा आणि तेथे असलेल्या लोकांना आग्रहाने आत येण्यास सांग म्हणजे माझे घर भरून जाईल. 24कारण मी तुम्हांस सांगतो की, त्या आमंत्रित केलेल्या कोणालाही माझ्या मेजवानीतली चव पाहायला मिळणार नाही.’”

### प्रथम तुम्ही योजना आखा
### (*मत्तय 10:37-38*)

25मोठ्या संख्येने लोक येशूबरोबर चालत होते. तो त्यांच्याकडे वळाला व म्हणाला, 26“जर कोणी माझ्याकडे येतो आणि आपले वडील, आई, पत्नी, मुले, भाऊ, बहिणी एवढेच नव्हे, तर स्वत:च्या जिवाचासुद्धा द्वेष करीत नाही, तर तो माझा शिष्य होऊ शकत नाही. 27जो कोणी स्वत:चा

---

**देवाच्या ... असो** स्तोत्र. 118:26

वधस्तंभ घेऊन माझ्यामागे येणार नाही, तो माझा शिष्य
होऊ शकणार नाही. 28जर तुम्हांपैकी कोणाला बुरूज
बांधायचा असेल तर तो अगोदर बसून खर्चाचा अंदाज
करून तो पूर्ण करावयास त्याच्याजवळ पुरेसे आहे की
नाही हे पाहणार नाही काय? 29नाहीतर कदाचित तो पाया
घालील आणि पूर्ण करू शकणार नाही. आणि जे पाहणारे
आहेत ते त्याची थट्टा करतील आणि म्हणतील, 30‘या
मनुष्याने बांधण्यास सुरूवात केली पण पूर्ण करू शकला
नाही!’

31“किंवा एक राजा दुसऱ्या राजाबरोबर लढाई करण्यास
निघाला, तर तो अगोदर बसून याचा विचार करणार
नाही का की, त्याच्या दहा हजार मनुष्यांनिशी त्याच्या
शत्रूशी, जो वीस हजार सैन्यानिशी चालून येत आहे, त्याला
मुकाबला करता येणे शक्य आहे काय? 32जर तो त्याला
तोंड देऊ शकणार नसेल, तर त्याचा शत्रू दूर अंतरावर
असतानाच तो शिष्टमंडळ पाठवून शांततेसाठी तहअटींची
विचारणा करील. 33त्याच प्रकारे तुमच्यापैकी जो कोणी
सर्वस्वाचा त्याग करीत नाही त्याला माझा शिष्य होता
येणार नाही.

## तुमचा प्रभाव गमावू नका

*(मत्तय 5:13; मार्क 9:50)*

34“मीठ चांगले आहे. पण मिठाची जर चव गेली, तर
त्याला खारटपणा कशाने येईल? 35ते पूर्णपणे निरुपयोगी
ठरेल व लोक ते फेकून देतील.

“ज्याला ऐकायला कान आहेत तो ऐको!”

## स्वर्गातील आनंद

*(मत्तय 18:12-14)*

15 सर्व पापी लोक त्याचे ऐकायला त्याच्याकडे येत
होते. 2तेव्हा परूशी व नियमशास्त्राचे शिक्षक
कुरकूर करू लागले. ते म्हणू लागले, “हा पाप्यांचे स्वागत
करतो आणि त्यांच्याबरोबर जेवतो!”

3मग येशूने त्यांना ही गोष्ट सांगितली. 4“जर तुमच्यापैकी
कोणा एकाजवळ शंभर मेंढरे असून त्यातील एक हरवले,
तर तो नव्याण्णव रानांत सोडून हरवलेल्या मेंढरामागे ते
सापडेपर्यंत जाणार नाही काय? 5आणि जेव्हा त्याला ते
सापडते तेव्हा तो आनंदाने ते खांद्यांवर घेतो. 6आणि घरी
येतो, तेव्हा मित्रांना आणि शेजाऱ्यांना एकत्र करून म्हणतो,
‘माझ्याबरोबर आनंद करा कारण माझे हरवलेले मेंढरू
सापडले आहे.’ 7मी तुम्हांस सांगतो, त्याचप्रमाणे ज्यांना
पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांपेक्षा
पश्चात्ताप करणाऱ्या एका पाप्याबद्दल स्वर्गात अधिक
आनंद होईल.

8“समजा एका बाईजवळ चांदीची दहा नाणी आहेत. जर
तिचे एक नाणे हरवतले तर ती दिवा लावून घर झाडून ते
मिळेपर्यंत काळजीपूर्वक शोधणार नाही काय? 9आणि
जेव्हा तिला ते नाणे सापडते तेव्हा ती मैत्रिणींना आणि
शेजाऱ्यांना बोलाविते आणि म्हणते, ‘माझ्याबरोबर आनंद
करा कारण माझे हरवलेले नाणे सापडले आहे.’
10त्याचप्रमाणे पश्चात्ताप करणाऱ्या एका पाप्याबद्दल
देवाच्या दूतासमोर आनंद होतो हे मी तुम्हांस सांगतो.”

## घर सोडून गेलेला मुलगा

11मग येशू म्हणाला, “एका मनुष्याला दोन मुलगे होते.
12त्यापैकी धाकटा म्हणाला, ‘बाबा, मालमत्तेचा माझा वाटा
मला द्या.’ आणि वडिलांनी आपली संपत्ती दोघा मुलांमध्ये
विभागली. 13नंतर फार दिवस झाले नाहीत तोच धाकट्या
मुलाने आपले सर्व गोळा केले आणि तो दूरदेशी निघून
गेला. तेथे त्याने सर्व संपत्ती चैनीचे जीवन जगून उधळून
टाकली. 14त्याने सर्व पैसे खर्च केल्यावर, त्या देशांत
भयंकर दुष्काळ पडला व त्याला गरज भासू लागली.
15मग तो गेला आणि त्या देशातील एका नागरिकाजवळ
नोकरी करू लागला. त्या नागरिकाने त्याला डुकरे
चारावयास पाठविले. 16तेव्हा डुकरे खातात त्या शेंगा तरी
खाव्यात अशी त्याला इच्छा होई, पण कोणी त्याला काहीही
दिले नाही. 17नंतर तो शुद्धीवर आला आणि म्हणाला,
‘माझ्या पित्याच्या घरी किती तरी मजुरांना पुरून उरेल
इतके अन्न आहे आणि येथे मी भुकेने मरतो आहे! 18मी
उठून आपल्या वडिलांकडे जाईन आणि त्यांना म्हणेन,
बाबा, मी स्वर्गाविरुद्ध (देवाविरुद्ध) आणि तुमच्याविरुद्ध
पाप केले आहे. 19तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी
योग्य नाही. मला आपल्या रोजंदारीवरील मजुरांसारखे
ठेवा.’

20मग तो उठला आणि आपल्या पित्याकडे गेला. तो
दूर असतानाच पित्याने त्याला पाहिले आणि त्याला त्याचा
कळवळा आला. वडील पळत गेले आणि त्याच्या गळ्यात
पडले आणि त्याचे मुके घेतले.

## मुलगा परततो

21“मुलगा त्यांना म्हणाला, ‘बाबा, मी स्वर्गाविरुद्ध व
तुमच्याविरुद्ध पाप केले आहे. तुमचा मुलगा म्हणवून
घेण्यास मी योग्य नाही.’ 22परंतु वडील आपल्या नोकरांस
म्हणाले, “त्वरा करा, चांगला झगा आणून त्याला घाला.
त्याच्या हातात अंगठी आणि पायात जोडे घाला. 23आणि
पुष्ट वासरू आणून कापा, आपण खाऊ आणि आनंद
करू! 24कारण हा माझा मुलगा मेला होता पण जिवंत
झाला आहे! तो हरवला होता. पण आता सापडला आहे.’
व ते आनंद करू लागले.

## मोठा मुलगा येतो

25“त्याचा मोठा मुलगा शेतात होता. तो घराकडे निघाला.
जेव्हा तो घराजवळ आला, तेव्हा त्याने गायनवादन व
नाचण्याचा आवाज ऐकला. 26त्याने एका नोकराला

बोलावून विचारले, ‘हे सर्व काय चालले आहे?’ 27तो
नोकर त्याला म्हणाला, ‘तुमचा भाऊ आला आहे. तो
सुखरूप आला म्हणून तुमच्या वडिलांनी पुष्ट वासरू कापले
आहे.’

28मोठा मुलगा रागावला त्याला आत जाण्याची इच्छा
होईना. तेव्हा वडिलांनी येऊन त्याची समजूत काढली.
29परंतु त्याने वडिलांना उत्तर दिले, ‘पाहा, इतकी वर्षे मी
तुमची सेवा केली आहे व कधीही तुमची आज्ञा मोडली
नाही! मित्रांबरोबर आनंद करण्यासाठी तुम्ही मला कधी
बकरीसुद्धा दिली नाही. 30ज्याने तुमची सर्व संपत्ती
वेश्यांसाठी उधळली तो तुमचा मुलगा परत आला तेव्हा
तुम्ही त्याच्यासाठी पुष्ट वासरू कापले! ’31वडील त्याला
म्हणाले, ‘माझ्या मुला, तू नेहमीच माझ्याबरोबर आहेस
आणि जे माझे आहे ते सर्व तुझे आहे. 32आपण आनंद
आणि उत्सव केला पाहिजे कारण हा तुझा भाऊ मेला
होता तो जिवंत झाला आहे. तो हरवला होता, तो सापडला
आहे.’”

## खरी संपत्ती

16 येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, “एक श्रीमंत मनुष्य
होता. त्याचा एक कारभारी होता. ‘हा कारभारी
तुमचे पैसे उधळतो,’ असे त्या श्रीमंत माणसाला सांगण्यात
आले. 2म्हणून त्या श्रीमंत मनुष्याने कारभाऱ्याला आत
बोलावले आणि म्हणाला, ‘हे मी तुझ्याविषयी काय ऐकत
आहे? तुझ्या कारभाराचा हिशेब दे, कारण यापुढे कारभारी
म्हणून तुला राहता येणार नाही.’

3“तेव्हा कारभारी स्वत:शी म्हणाला, ‘मी काय करू?
माझे मालक माझे कारभाऱ्याचे काम काढून घेत आहेत.
शेतात कष्ट करण्याइतका मी बळकट नाही व भीक
मागण्याची मला लाज वाटते. 4मी काय करावे हे मला
माहीत आहे. यासाठी की जेव्हा मला कारभाऱ्याच्या
कामावरून काढून टाकतील, लोक मला त्यांच्या घरांमध्ये
घेतील.’

5“मग त्याने त्याच्या मालकाच्या प्रत्येक कर्जदाराला
बोलावले. पहिल्याला तो म्हणाला, ‘तू माझ्या मालकाचे
किती देणे लागतोस?’

6तो म्हणाला, ‘चार हजार लीटर जैतून तेल.’ मग तो
त्याला म्हणाला, ‘तुझा पावती घे बघू, खाली बस आणि
लवकर त्यावर दोन हजार लीटर लिही.’

7“मग दुसऱ्याला तो म्हणाला, ‘आणि तुझे किती देणे
आहे?’ तो म्हणाला, ‘तीस हजार किलो गहू.’ तो त्याला
म्हणाला, ‘तुझा हिशेबाची पावती घे व त्यावर पंचवीस
हजार किलो लिही.

8आणि मालकाने त्या अप्रामाणिक कारभाऱ्याची प्रशंसा
केली. कारण तो धूर्तपणे वागला होता. या जगाचे पुत्र
त्यांच्यासारख्यांशी वागताना प्रकाशाच्या पुत्रांपेक्षा अधिक
धूर्ततेने वागतात.

9“मी तुम्हांस सांगतो, तुमच्यासाठी तुमच्या ऐहिक संपत्तीने
मित्र मिळवा. यासाठी की, जेव्हा ते संपेल तेव्हा ते तुमचे
अनंतकाळच्या घरात स्वागत करतील. 10ज्या कोणावर
थोडा विश्वास ठेवणे शक्य आहे त्याच्यावर जास्त विश्वास
ठेवला जाण्याची शक्यता आहे. व जो कोणी थोडक्याविषयी
अविश्वासू आहे तो अधिकाविषयीसुद्धा अविश्वासू आहे.

11“म्हणून जर तुम्ही ऐहिक संपत्तीविषयी विश्वासू नाही,
तर मग खऱ्या संपत्तीविषयी तुमच्यावर कोण विश्वास
ठेवील?

12“जे दुसऱ्याचे आहे त्याविषयी तुम्ही विश्वासू नसाल
तर जे तुमचे आहे ते तुम्हांस कोण देईल?”

13“कोणत्याही नोकराला दोन मालकांची सेवा करता
येत नाही. एकाचा तो द्वेष करील व दुसऱ्यावर तो प्रेम
करील किंवा एकाशी तो प्रामाणिक राहील व दुसऱ्याला
तुच्छ मानील. तुम्ही एकाच वेळी देवाची व पैशाची सेवा
करू शकणार नाही.”

## देवाचे नियमशास्त्र बदलणे शक्य नाही
### *(मत्तय 11:12-13)*

14मग जे परुशी धनलोभी होते, त्यांनी हे सर्व ऐकले व
त्यांनी त्याचा उपहास केला. 15तो त्यांना म्हणाला, “तुम्ही
स्वत:ला लोकांसमोर नीतिमान म्हणून मिरवता दाखविता,
पण देव तुमची अंत:करणे ओळखतो. जे लोकांना महत्त्वाचे
वाटते ते देवाच्या दृष्टीने टाकाऊ आहे.

16“नियमशास्त्र व संदेष्टे योहानाप[5]त होते, तेव्हापासून
देवाच्या राज्याची सुवार्ता गाजविली जात आहे. व प्रत्येक
जण त्यात घुसण्याचा जोरदार प्रयत्न करीत आहे. 17एकवेळ
आकाश व पृथ्वी नाहीशी होणे शक्य होईल पण
नियमशास्त्राचा एक काना मात्राही नाहीसा होणार नाही.

## घटस्फोट आणि पुनर्विवाह

18“जो कोणी आपल्या पत्नीस सूटपत्र देतो व दुसरीबरोबर
लग्न करतो तो व्यभिचार करतो आणि जो कोणी एखाद्या
स्त्रीशी– जिला तिच्या पतीने टाकलेले आहे तिच्याशी
लग्न करतो तो व्यभिचार करतो.”

## श्रीमंत मनुष्य व लाजार

19“एक मनुष्य होता. तो श्रीमंत होता. तो जांभळी आणि
तलम वस्त्रे घालीत असे. प्रत्येक दिवस तो ऐषारामात
घालवीत असे. 20त्याच्या फाटकाजवळ लाजार नावाचा
एक गरीब मनुष्य पडून होता. त्याच्या अंगावर फोड भरलेले
होते. 21त्या श्रीमंत मनुष्याच्या टेबलावरून खाली पडलेले
असेल ते खाण्याची तो आतुरतेने वाट पाही. कुत्रीदेखील
येऊन त्याचे फोड चाटीत असत. 22मग असे झाले की, तो
गरीब मनुष्य मरण पावला, व देवदूतांनी त्याला अब्राहामाच्या
उराशी नेऊन ठेवले. नंतर श्रीमंत मनुष्यही मरण पावला
व त्याला पुरले गेले. 23आणि अधोलोकात, जेथे तो (श्रीमंत

मनुष्य) यातना भोगीत होता, तेथून त्याने वर पाहिले, व
दूरवर असलेल्या अब्राहामाला पाहिले आणि लाजाराला
त्याच्या शेजारी पाहिले, 24तो मोठ्याने ओरडला, “पित्या
अब्राहामा, माझ्यावर दया कर आणि लाजाराला पाठव,
यासाठी की तो बोटाचे टोक पाण्यात बुडवून माझी जीभ
थंड करील, कारण या अग्नीत मी भयंकर वेदना सहन
करीत आहे.!” 25परंतु अब्राहाम म्हणाला, “माझ्या मुला,
लक्षात ठेव की तुझ्या जीवनात जशा तुला चांगल्या गोष्टी
मिळाल्या, तशा लाजाराला वाईट गोष्टी मिळाल्या. पण
आता येथे तो समाधानात आहे व तू दु:खात आहेस.
26आणि या सगळ्याशिवाय, तुमच्या व आमच्यामध्ये एक
मोठी दरी ठेवलेली आहे, यासाठी की, येथून तुमच्याकडे
ज्यांना जायचे आहे त्यांना जाता येऊ नये व तुमच्याकडून
कोणालाही आमच्याकडे येता येऊ नये.’ 27तो श्रीमंत मनुष्य
म्हणाला, ‘मग तुला मी विनंति करतो की पित्या, लाजाराला
माझ्या पित्याच्या घरी पाठव, 28कारण मला पाच भाऊ
आहेत. त्याला त्यांना तरी सावध करू दे. म्हणजे ते तरी
या यातनेच्या ठिकाणी येणार नाहीत.’ 29पण अब्राहाम
म्हणाला, ‘त्यांच्याजवळ मोशे आणि संदेष्टये आहेत, त्यांचे
त्यांनी ऐकावे.’ 30तो श्रीमंत मनुष्य म्हणाला, ‘नाही, पित्या
अब्राहामा, मेलेल्यातील कोणी त्यांच्याकडे गेला तर ते
पश्चात्ताप करतील.’ 31अब्राहाम त्याला म्हणाला, ‘जर ते
मोशेचे आणि संदेष्टयांचे ऐकत नाहीत तर मेलेल्यांतून
जर कोणी उठला तरी त्यांची खात्री होणार नाही.’”

17 येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, “ज्या गोष्टी
लोकांना देवापासून दूर नेतात त्या येणे निश्चित
आहे, परंतु ज्याच्यामुळे त्या येणार त्याची वाईट दशा
होवो! 2त्याने या लहानातील एकाला पाप करावयास
लावण्यापेक्षा त्याच्या गळ्यात जात्याची तळी बांधून त्याला
समुद्रात फेकणे हे त्याच्यासाठी अधिक बरे होईल.
3स्वत:कडे लक्ष द्या! जर तुमचा भाऊ पाप करतो तर
त्याला धमकावा. आणि जर तो पश्चात्ताप करतो तर
त्याची क्षमा करा. 4जर तो तुझ्याविरुद्ध दिवसातून सात
वेळा पाप करतो आणि सात वेळा तुमच्याकडे येतो व
म्हणतो, ‘मी पश्चात्ताप करतो,’ त्याला क्षमा करा.”

## तुमचा विश्वास किती मोठा आहे?

5मग शिष्य प्रभूला म्हणाले, “आमचा विश्वास वाढव.”
6प्रभु म्हणाला, “जर तुमचा विश्वास मोहरीच्या
दाण्याएवढा असेल तर तुम्ही या तुतीच्या झाडाला म्हणू
शकता, ‘मुळासकट उपटून समुद्रात लावले जा.’ आणि ते
तुमची आज्ञा पाळील.”

## चांगले सेवक व्हा

7समजा, तुमच्यापैकी एकाला एक सेवक आहे. व तो
शेत नांगरीत आहे किंवा मेंढरे राखीत आहे. जेव्हा तो
शेतातून परत येतो, तुम्ही त्याला “ताबडतोब ये आणि
जेवायला बैस” असे म्हणाल का? 8उलट तुम्ही असे
म्हणणार नाही का, ‘माझे भोजन तयार कर. आणि कामाचे
कपडे घालून माझे खाणेपिणे चालू असताना माझी सेवा
कर. त्यानंतर तू खाऊ पिऊ शकतोस? 9ज्या गोष्टी
करण्याबद्दल तुम्ही नोकराला आज्ञा करता ते केल्याबद्दल
त्याचे आभार तुम्ही मानता काय?
10तुमच्या बाबतीतही हे तसेच आहे: जेव्हा तुम्हांला
करण्यास सांगितलेली सर्व कामे तुम्ही केल्यावर असे
म्हटले पाहिजे, ‘आम्ही कोणत्याही मानास पात्र नसलेले
सेवक आहोत आम्ही फक्त आमचे कर्तव्य केले आहे.’”

## कृतज्ञ असा

11येशू यरुशलेमाला जात असताना त्याने शोमरोन व
गालील यांच्या सीमेवरून प्रवास केला. 12तो एका खेड्यात
जात असताना, कुष्ठरोग झालेले दहा पुरुष त्याला भेटले.
ते दूर उभे राहिले.
13ते मोठ्याने ओरडून म्हणाले, “येशू, गुरुजी आम्हांवर
दया करा!”
14जेव्हा त्याने त्यांना पाहिले, तेव्हा तो म्हणाला, “जा,
आणि स्वत:ला याजकांना दाखवा.”* ते जात असतानाच
बरे झाले. 15जेव्हा त्यांच्यातील एकाने पाहिले की, आपण
बरे झालो आहोत, तेव्हा तो परत आला व त्याने मोठ्या
स्वरात देवाची स्तुति केली. 16तो येशूच्या पायाजवळ उपडा
पडला. आणि त्याने त्याचे उपकार मानले. तो शोमरोनी
होता. 17येशू त्याला म्हणाला, “दहाजण बरे झाले नव्हते
काय? नऊजण कोठे आहेत? 18या विदेशी माणसाशिवाय
कोणीही देवाची स्तुति करण्यासाठी परत आला नाही
काय?” 19येशू त्याला म्हणाला, “ऊठ, आणि जा. तुझ्या
विश्वासाने तुला बरे केले आहे.”

## देवाचे राज्य तुम्हांमध्ये आहे

***(मत्तय 24:23-28, 37-41)***

20एकदा, परूश्यांनी येशूला विचारले, देवाचे राज्य केव्हा
येईल, त्याने त्यांना उत्तर दिले, “देवाचे राज्य दृश्य स्वरूपात
येत नाही. लोक असे म्हणणार नाहीत की 21ते येथे आहे!
किंवा ते तेथे आहे!’ कारण देवाचे राज्य तुमच्यामध्ये
आहे.” 22पण शिष्यांना तो म्हणाला, “असे दिवस येतील
की जेव्हा मनुष्याच्या पुत्राच्या गौरवाने येण्याच्या एका
दिवसाची तुम्ही उत्सुकतेने वाट पाहाल. परंतु तो दिवस
तुम्ही पाहू शकणार नाही. 23आणि लोक तुम्हांला म्हणतील,
“तेथे पाहा! येथे पाहा!’ तेथे जाऊ नका. किंवा त्यांच्यामागे
जाऊ नका.

---

**स्वत:ला याजकांना दाखवा** मोशेच्या नियमशास्त्रात म्हटले आहे की, जेव्हा एखादा यहूदी कुष्टरोगी मुक्त झाला असेल तेव्हा तसे याजकांना जाहीर केले पाहिजे.

## जेव्हा येशू परत येतो

24"कारण जशी वीज आकाशाच्या एका बाजूपासून
दुसऱ्या बाजूपर्यंत चमकते आणि प्रकाशते तसेच मनुष्याच्या
पुत्राचे त्याच्या दिवसात होईल. 25पण पहिल्यांदा त्याने
पुष्कळ गोष्टींविषयी दु:ख भोगले पाहिजे. व या पिढीने
त्याला नाकारले पाहिजे. 26जसे नोहाच्या दिवसांत झाले,
तसेच मनुष्याच्या पुत्राच्या दिवसातदेखील होईल. ते खात
होते, पीत होते, लग्न करीत होते, लग्न करून देत होते.
27नोहा तारवात जाईपर्यंत असे चालले होते. मग पूर
आला. व त्या सर्वांचा नाश झाला. 28त्याचप्रकारे लोटाच्या
दिवसात झाले तसे होईल: ते खात होते, पीत होते. विकत
घेत होते. विकत देत होते. लागवड करीत होते. बांधीत
होते. 29परंतु ज्या दिवशी लोट सदोमातून बाहेर पडला त्या
दिवशी आकाशातून अग्नि व गंधक यांचा पाऊस पडला
आणि सर्वांचा नाश केला. 30मनुष्याचा पुत्र प्रगट होईल
तेव्हा असेच होईल.

31"त्या दिवशी जर एखादा छपरावर असेल व त्याचे
सामान घरात असेल, त्याने ते घेण्यासाठी घरात जाऊ
नये. त्याचप्रमाणे जो शेतात असेल त्याने परत जाऊ नये.
32लोटाच्या पत्नीची आठवण करा. 33जो कोणी आपला
जीव वाचवू पाहतो तो त्याला गमावील आणि जो कोणी
आपला जीव गमावील तो त्याला राखील. 34मी तुम्हांला
सांगतो, त्या रात्री बिछान्यावर दोघे असतील, त्यापैकी एक
घेतला जाईल व दुसरा ठेवला जाईल. 35दोन स्त्रिया धान्य
दळत असतील, तर त्यांपैकी एक घेतली जाईल व दुसरी
ठेवली जाईल. 36शेतात दोघे असतील एकाला घेतले जाईल
व दुसऱ्याला ठेविले जाईल." 37शिष्यांनी त्याला विचारले,
"कोठे प्रभु?" येशूने उत्तर दिले, "जेथे प्रेत असेल तेथे
गिधाडे जमतील."

## देव त्याच्या लोकांना उत्तर देईल

18 त्यांनी नेहमी आशा न सोडता प्रार्थना करावी व
ती करण्याचे कधीच सोडू नये हे शिकविण्यासाठी
त्याने त्यांना एक बोधकथा सांगितली. 2तो म्हणाला, "एका
नगरात एक न्यायाधीश होता. तो देवाला भीत नसे लोकांना
मानही देत नसे. 3त्या नगरात एक विधवा होती. ती वारंवार
येत असे व न्यायाधीशाला म्हणत असे, 'माझ्या
विरोधकांविरुद्ध मला न्याय मिळेल असे बघा!' 4काही
काळ त्याची इच्छा नव्हती पण शेवटी तो स्वत:शीच
म्हणाला, 'मी जरी देवाला भीत नाही व लोकांना मान देत
नाही. 5तरीही ती विधवा मला त्रास देत असल्याने तिला
न्याय मिळेल असे मी करतो, यासाठी की ती वारंवार
येऊन मला बेजार करणार नाही.'

6मग प्रभु म्हणाला, "अनीतिमान न्यायाधीश काय
म्हणाला त्याकडे लक्ष द्या. 7आणि मग जे देवाचे निवडलेले
लोक रात्रंदिवस त्याचा धावा करतात त्यांचा तो न्याय
करणार नाही काय? तो त्यांना मदत करावयास वेळ
लावील काय? 8मी तुम्हांस सांगतो, तो त्यांना न्याय देईल.
तरीही जेव्हा मनुष्याचा पुत्र येतो, तेव्हा त्याला पृथ्वीवर
विश्वास आढळेल काय?"

## देवाबरोबर योग्य ते संबंध असणे

9अशा लोकांना जे स्वत: नीतिमान असल्याचा अभिमान
बाळगत होते व इतरांना कमी लेखत होते, अशा लोकांसाठी
येशूने ही गोष्ट सांगितली. 10"दोघे जण प्रार्थना करावयास
वर मंदिरात गेले. एक परूशी होता व दुसरा जकातदार
होता. 11परूशी उभा राहिला व त्याने अशी प्रार्थना केली,
'हे देवा, मी तुझे उपकार मानतो कारण, इतर लोकांसारखा
म्हणजे चोर, फसविणारा, व्यभिचारी व या
जकातदारासारखा मी नाही. 12उलट मी आठवड्यातून
दोनदा उपास करतो, व माझ्या सर्व उत्पन्नाचा दहावा भाग
देतो.'

13"परंतु जकातदार दूर अंतरावर उभा राहिला व आपले
डोळे स्वर्गाकडे वर न उचलता आपली छाती बडवीत
म्हणाला, 'हे देवा, मज पापी माणसावर दया कर!' 14मी
तुम्हांला सांगतो हा मनुष्य, त्या दुसऱ्या माणसापेक्षा नीतिमान
ठरून घरी गेला. कारण जो कोणी स्वत:ला उंच करतो
त्याला नीच केले जाईल आणि जो कोणी स्वत:ला नीच
करतो त्याला उंच केले जाईल."

## देवाच्या राज्यात कोण प्रवेश करील?
*(मत्तय 19:13-15 मार्क 10:13-16)*

15आणि ते आपल्या बालकांनादेखील त्याच्याकडे
आणीत यासाठी की त्याने त्यांना स्पर्श करावा. पण जेव्हा
शिष्यांनी हे पाहिले तेव्हा ते त्यांना दटावू लागले. 16पण
येशूने बाळकांना त्याच्याकडे बोलाविले आणि म्हणाला,
"बालकांना मजकडे येऊ द्या. त्यांना अडवू नका. कारण
देवाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे. 17मी खरोखर
तुम्हांला सांगतो, जो कोणी देवाच्या राज्याचा बालकासारखा
स्वीकार करीत नाही. त्याचा स्वर्गात प्रवेश होणार नाही."

## एक श्रीमंत मनुष्य येशूला प्रश्न विचारतो
*(मत्तय 19:16-30; मार्क 10:17-31)*

18एका यहूदी पुढाऱ्याने त्याला विचारले, "उत्तम गुरुजी,
अनंतकाळचे जीवन मिळविण्यासाठी मी काय करू?"

19येशू त्याला म्हणाला, "मला उत्तम का म्हणतोस?
देवाशिवाय कोणीही उत्तम नाही.

20"तुला आज्ञा माहीत आहेत: 'व्यभिचार करू नको,
खून करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको,
तुझ्या आईवडिलांचा मान राख.'*

21तो पुढारी म्हणाला, "या सर्व आज्ञा मी माझ्या
तरुणपणासून पाळल्या आहेत."

---

**व्यभिचार ... मान राख** निर्गम 20:12-16 अनुवाद 5:16-20

[22]जेव्हा येशूने हे ऐकले, तेव्हा तो त्याला म्हणाला, "तुझ्यामध्ये अजून एका गोष्टीची उणीव आहे: तुझ्याजवळचे सर्व काही विकून ते गरिबांना वाट. म्हणजे स्वर्गात तुला संपत्ती मिळेल. मग ये. माझ्या मागे चल." [23]पण जेव्हा त्या पुढाऱ्याने हे ऐकले तेव्हा तो फार दु:खी झाला, कारण तो फार श्रीमंत होता. [24]जेव्हा येशूने पाहिले की, तो दु:खी झाला आहे, तो म्हणाला, "ज्यांच्याजवळ धन आहे, त्या लोकांचा देवाच्या राज्यात प्रवेश होणे किती कठीण आहे!
[25]"होय, श्रीमंत माणसाचा देवाच्या राज्यात प्रवेश होणे यापेक्षा उंटाने सुईच्या छिद्रातून जाणे सोपे आहे.

### कोणाचे तारण होईल?

[26]नंतर ज्या लोकांनी हे ऐकले, ते म्हणाले, "तर मग कोणाचे तारण होईल?" [27]येशू म्हणाला, "ज्या गोष्टी माणसांना अशक्य आहेत त्या देवाला शक्य आहेत."
[28]मग पेत्र म्हणाला, "पाहा, आमच्याकडे जे होते, ते सर्व सोडून आम्ही तुमच्यामागे आलो आहोत." [29]येशू त्यांना म्हणाला, "मी तुम्हांस खरे सांगतो, असा कोणीही नाही की ज्याने देवाच्या राज्यासाठी आपले घर किंवा पत्नी किंवा भाऊ, किंवा आईवडील सोडले आहेत, त्यांस या काळात व [30]येणाऱ्या काळातील अनंतकाळात याच्यापेक्षा कित्येक पटींनी मिळाले नाही."

### येशू मरणातून उठेल
### *(मत्तय 20:17-19; मार्क 10:32-34)*

[31]येशूने बारा प्रेषितांना बाजूला घेतले आणि त्यांना म्हणाला, "ऐका! आपण वर यरुशलेमास जात आहोत आणि भविष्यवाद्यांनी मनुष्याच्या पुत्राविषयी जे काही लिहिले होते ते पूर्ण होईल. [32]होय, त्याला विदेश्यांच्या हाती धरून देण्यात येईल, त्याची कुचेष्टा होईल, त्याची निंदा करतील, त्याच्यावर थुंकतील. [33]ते त्याला चाबकाचे फटके मारून रक्तबंबाळ करून ठार करतील. आणि तो तिसऱ्या दिवशी मरणातून उठेल." [34]शिष्यांना यातील काहीही कळाले नाही. कारण हे वचन त्यांच्यापासून लपवून ठेवण्यात आले होते. आणि तो कशाविषयी बोलत आहे हे त्यांना माहीत नव्हते.

### येशू एका आंधळ्यास बरे करतो
### *(मत्तय 20:29-34; मार्क 10:46-52)*

[35]येशू यरीहोजवळ येत असताना एक आंधळा रस्त्यावर बसून भीक मागत होता. [36]जेव्हा त्या आंधळ्या मनुष्याने जवळून जाणाऱ्या समुदायाचा आवाज ऐकला तेव्हा त्याने विचारले हे काय चालले आहे. [37]त्यांनी त्याला सांगितले की, "नासरेथकर येशू जात आहे."
[38]तो मोठ्याने ओरडून म्हणाला, "येशू दाविदाच्या पुत्रा माझ्यावर दया कर!"
[39]जे पुढे चालले होते त्यांनी त्याला गप्प राहण्यास सांगितले. परंतु तो आणखी मोठ्याने ओरडून म्हणाला, "दाविदाचे पुत्र माझ्यावर दया करा!"
[40]येशू थांबला, आणि त्याने आंधळ्याला आपणांकडे आणण्याची आज्ञा केली. जेव्हा आंधळा जवळ आला, तेव्हा येशूने त्याला विचारले, [41]"तुला काय हवे?" आंधळा मनुष्य म्हणाला, "प्रभु, मला परत दृष्टि प्राप्त व्हावी."
[42]येशू त्याला म्हणाला, "तुला दृष्टि येवो; तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." [43]तत्काळ त्याला दृष्टि आली आणि देवाचे गौरव करीत तो येशूच्या मागे गेला. सर्व लोकांनी हे पाहिले आणि देवाची स्तुति केली.

### जक्कय

19 येशूने यरीहोत प्रवेश केला आणि यरीहोतून जात होता. [2]तेथे जक्कय नावाचा मनुष्य होता. तो मुख्य जकातदार होता आणि खूप श्रीमंत होता. [3]येशू कोण आहे हे पाहण्याचा तो प्रयत्न करीत होता. परंतु गर्दीमुळे त्याला काही दिसेना, कारण तो बुटका होता. [4]तेव्हा तो सर्वांच्या पुढे पळत गेला आणि त्याला पाहण्यासाठी उंबराच्या झाडावर चढला. कारण तो त्याच रस्त्याने पुढे जाणार होता. [5]येशू जेव्हा त्या ठिकाणी आला तेव्हा वर पाहून जक्कय याला म्हणाला, "जक्कय या, त्वरा कर आणि खाली ये. कारण आज मला तुझ्याच घरी राहायचे आहे."
[6]मग तो घाईघाईने खाली उतरला आणि आनंदाने त्याचे स्वागत केले. [7]सर्व लोकांनी ते पाहिले, ते कुरकूर करू लागले. व म्हणू लागले की, "तो पापी माणसाचा पाहुणा होण्यास गेला आहे." [8]परंतु जक्कय उभा राहिला व प्रभूला म्हणाला, "गुरुजी, जे माझे आहे त्यातील अर्धे मी गरिबांना दिले असे समजा व मी कोणाला फसवून काही घेतले असेल तर ते चौपट परत करीन." [9]येशू त्याला म्हणाला, "आज या घराला तारण मिळाले आहे. कारण हा मनुष्यसुद्धा अब्राहामाचा पुत्र आहे. [10]कारण मनुष्याचा पुत्र जे हरवलेले ते शोधावयास व तारावयास आला आहे."

### देव तुम्हांला देतो त्या गोष्टींचा उपयोग करा
### *(मत्तय 25:14-30)*

[11]लोक या गोष्टी ऐकत असतानाच येशूने त्यांना आणखी एक गोष्ट सांगितली, कारण तो यरुशलेमाजवळ होता म्हणून त्यांनी असा विचार केला की, देवाचे राज्य तत्काळ प्रगट होणार आहे.
[12]मग येशू म्हणाला, "कोणी एक उच्च कुळातील मनुष्य आपली त्या भागाचा सरदार म्हणून नियुक्ती करून घेण्यासाठी व पुन्हा परतण्यासाठी दूरच्या देशी गेला. [13]त्याने त्याच्या नोकरांपैकी दहा नोकरांना बोलाविले. त्यांना त्याने दहा मोहरा* दिल्या. आणि तो त्यांना म्हणाला, "मी परत

---

**दहा मोहर** एका मजुराच्या तीन महिन्यांच्या पगाराइतकी एक मोहरेची किंमत.

येईपर्यंत यावर व्यापार करा. 14परंतु त्याचे प्रजाजन त्याचा
द्वेष करीत असत त्यांनी त्याच्यामागे एक शिष्टमंडळ
पाठविले, व सांगितले की, "या माणसाला आमचा राजा
करू नका."
15परंतु त्याची राजा म्हणून नेमणूक झाली व तो परत
आला. त्याने ज्या नोकरांना पैसे दिले होते त्यांना बोलावणे
पाठविले. यासाठी की, त्यांनी त्यापासून किती फायदा
मिळविला हे पाहावे. 16पहिला वर आला आणि म्हणाला,
"धनी तुम्ही दिलेल्या नाण्यावर मी आणखी दहा नाणी
मिळवली आहेत. 17तेव्हा तो त्याला म्हणाला, "चांगल्या
दासा, छान केलेस, तू थोडक्यांविषयी विश्वासू झालास,
म्हणून तू दहा नगरांवर अधिकारी होशील."
18मग दुसरा (नोकर) आला व म्हणाला, "तुमच्या पाच
नाण्यांवर मी पाच नाणी आणखी मिळवली."
19आणि तो त्याला म्हणाला, "तू पाच नगरांवर अधिकारी
असशील."
20मग दुसरा नोकर आला आणि म्हणाला, "धनी, आपण
दिलेले नाणे मी हातरुमालात बांधून ठेवले होते. 21आपण
कठोर आहात, मला तुमची भीति वाटत होती. जे आपण
ठेवले नाही, ते आपण काढता, आणि जे पेरिले नाही, ते
कापता." 22धनी त्यास म्हणाला, "दुष्ट माणसा, तुझ्याच
शब्दांनी मी तुझा न्याय करतो. तुला ठाऊक होते की मी
कडक शिस्तीचा माणूस आहे. मी जे दिले नाही ते घेतो
आणि जे पेरले नाही त्याची कापणी करतो, 23तर तू
माझा पैसा पेढीवर का ठेवला नाहीस? मग जेव्हा मी परत
आलो असतो तेव्हा ते मला व्याजासह मिळाले असते.
24त्याच्याजवळ उभे राहणाऱ्यांना तो म्हणाला,
'त्याच्याजवळून ते नाणे घ्या आणि ज्याच्याजवळ दहा नाणी
आहेत, त्याला द्या.' 25ते त्याला म्हणाले, 'धनी, त्याच्याजवळ
दहा नाणी आहेत,' 26धन्याने उत्तर दिले, 'मी तुम्हांला
सांगतो, ज्याच्याजवळ आहे, त्याला अधिक दिले जाईल
आणि ज्याच्याजवळ नाही, ज्याच्याकडे जे काही असेल ते
सुद्धा काढून घेतले जाईल. 27परंतु मी राज्य करू नये
अशी इच्छा करणाऱ्या माझ्या शत्रूंना येथे आणा आणि
माझ्यासमोर ठार मारा.'"

## येशू यरुशलेमेत प्रवेश करतो

**(*मत्तय 21:1-11; मार्क 11:1-11; योहान 12:12-19*)**

28येशूने या गोष्टी सांगितल्यावर तो वर यरुशलेमापर्यंत
गेला. 29जेव्हा तो वर जातच राहिला तेव्हा तो जैतून डोंगर
म्हटलेल्या टेकडीनजिक असलेल्या बेथफगे आणि
बेथानीजवळ आला तेव्हा त्याने आपल्या दोन शिष्यांना
असे सांगून पाठविले की, 30"तुमच्यासमोर असलेल्या
खेड्यात जा. तुम्ही प्रवेश करताच, ज्यावर कोणी बसले
नाही असे शिंगरू तुम्हास आढळेल. ते सोडून येथे आणा.
31जर तुम्हांला कोणी विचारले की, "तुम्ही ते का सोडता?"
तर म्हणा की, 'प्रभूला याची गरज आहे.'
32ज्यांना पाठविले होते, ते गेले आणि त्याने
सांगितल्याप्रमाणे त्यांस आढळले. 33ते सोडीत असता त्याचा
मालक त्यांना म्हणाला, "तुम्ही शिंगरू का सोडता?"
34ते म्हणाले, "प्रभूला याची गरज आहे." 35त्यांनी ते
येशूकडे आणले. त्यांनी आपले झगे शिंगरावर घातले
आणि येशूला त्याच्यावर बसविले. 36येशू रस्त्यावरून जात
असता लोक आपली वस्त्रे रस्त्यावर पसरीत होते.
37जेव्हा तो जैतून डोंगराच्या उतरणीवर आला तेव्हा
सर्व जनसमुदाय, त्यांनी जे चमत्कार पाहिले होते त्याबद्दल
मोठ्या आनंदाने देवाची स्तुति करू लागले.

38ते म्हणाले, "प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादित
असो!

*स्तोत्र. 118:26*

स्वर्गात शांति आणि उर्ध्वलोकी देवाला गौरव!"

39जमावातील काही परूशी येशूला म्हणाले, "गुरुजी,
आपल्या शिष्यांना दटावा."
40त्याने उत्तर दिले, "मी तुम्हांला सांगतो, जर ते शांत
बसतील तर हे धोंडे ओरडतील!"

## येशू यरुशलेमासाठी रडतो

41जेव्हा तो जवळ आला व त्याने शहर पाहिले, तेव्हा
तो त्यासाठी रडला. आणि म्हणाला, 42"जर आज कोणत्या
गोष्टी तुला शांति देतील हे माहीत असते तर!, परंतु आता
ते तुझ्या नजरेपासून लपवून ठेवण्यात आले आहे.
43तुझ्यावर असे दिवस येतील की, तुझे शत्रू तुझ्याभोवती
कोट उभारतील. तुला वेढीतील, आणि सर्व बाजूंनी तुला
कोंडीत पकडतील. 44ते तुला, तुझ्या मुलांना तुझ्या भिंतीच्या
आत धुळीस मिळवतील. व दगडावर दगड राहू देणार
नाही. कारण देवाचा तुझ्याकडे येण्याचा समय तू ओळखला
नाही."

## येशूचा मंदिरात प्रवेश

**(*मत्तय 21:12-17; मार्क 11:15-19 योहान 2:13-22*)**

45येशूने मंदिरात प्रवेश केला व जे विक्री करीत होते,
त्यांना बाहेर हाकलू लागला. 46तो त्यांस म्हणाला, "असे
लिहिले आहे की, 'माझे घर प्रार्थनेचे घर होईल!' पण
तुम्ही ते लुटारूंची गुहा केली आहे."*
47तो दररोज मंदिरात शिकवीत असे. मुख्य याजक,
नियमशास्त्राचे शिक्षक, लोकांचे पुढारी त्याला ठार
मारण्याचा प्रयत्न करीत होते. 48पण तसे करण्यासाठी
त्यांना काही मार्ग सापडत नव्हता. कारण सर्व लोक
त्याच्या शब्दांनी खिळून गेले होते.

---

**माझे ... आहे** यिर्मया 7:11

### यहूदी पुढारी येशूला एक प्रश्न विचारतात
***(मत्तय 21:23-27; मार्क 11:27-33)***

20 एके दिवशी येशू मंदिरात लोकांना शिक्षण देत
असताना व सुवार्ता सांगत असताना एकदा एक
मुख्य याजक आणि नियमशास्त्राचे शिक्षक, वडीलजनांसह
एकत्र वर त्याच्याकडे आले. 2ते त्याला म्हणाले, “आम्हांला
सांग, कोणत्या अधिकाराने तू या गोष्टी करत आहेस!
तुला हा अधिकार कुणी दिला?”
3तेव्हा त्याने त्यास उत्तर दिले, “मी सुद्धा तुम्हांला एक
प्रश्न विचारीन. तुम्ही मला सांगा: 4योहानाचा बाप्तिस्मा
स्वर्गापासून होता की मनुष्यापासून?”
5त्यांनी आपसात चर्चा केली आणि म्हणाले, “जर आपण
स्वर्गापासून म्हणावे, तर तो म्हणेल, तुम्ही त्याच्यावर
विश्वास का ठेवला नाही? 6पण जर आपण मनुष्यांकडून
म्हणावे, तर सर्व लोक आपणांस दगडमार करतील कारण
त्यांची खात्री होती की, योहान संदेष्टा होता.” 7म्हणून
त्यांनी असे उत्तर दिले की, तो कोणापासून होता हे त्यांना
माहीत नाही.
8मग येशू त्यांस म्हणाला, “मग मी या गोष्टी कोणत्या
अधिकाराने करतो हे तुम्हांला मी सुध्दा सांगणार नाही.

### देव आपला पुत्र पाठवितो
***(मत्तय 21:33-46; मार्क 12:1-12)***

9मग तो लोकांना ही गोष्ट सांगू लागला: “एका मनुष्याने
द्राक्षमळा लावला. व तो काही शेतकऱ्यांना मोलाने देऊन
बऱ्याच दिवसांसाठी दूर गेला. 10हंगामाच्या वेळी त्याने
नोकराला शेतकऱ्यांकडे पाठविले. यासाठी की, त्यांनी
द्राक्षमळ्यातील काही फळे द्यावीत. पण शेतकऱ्यांनी त्या
नोकराला मारले व रिकाम्या हाताने परत पाठविले.
11नंतर त्याने दुसऱ्या नोकराला पाठविले, पण त्यालासुद्धा
त्यांनी मारले. त्या नोकराला त्यांनी लज्जास्पद वागणूक
दिली. आणि रिकाम्या हाताने परत पाठविले. 12तेव्हा
त्याने तिसऱ्या नोकराला पाठविले. पण त्यालाही त्यांनी
जखमी करून बाहेर फेकून दिले.
13द्राक्षमळ्याचा मालक म्हणाला, “मी काय करू? मी
माझा स्वत:चा प्रिय पुत्र पाठवतो. कदाचित ते त्याला मान
देतील. 14पण जेव्हा शेतकऱ्यांनी मुलाला पाहिले, तेव्हा
त्यांनी आपसात चर्चा केली आणि म्हणाले, “हा तर वारस
आहे, आपण त्याला ठार मारू, म्हणजे वतन आपले
होईल.”
15त्यांनी त्याला द्राक्षमळ्याच्या बाहेर फेकले व ठार
मारले. “तर मग द्राक्षमळ्याचा मालक काय करील?
16तो येईल आणि त्या शेतकऱ्यांना ठार मारील व तो
द्राक्षमळा दुसऱ्यांना सोपवून देईल.”
त्यांनी हे ऐकले तेव्हा ते म्हणाले, “असे कधीही न
होवो.” 17येशूने त्यांच्याकडे पाहिले व म्हटले,

‘“तर मग जो दगड बांधणाऱ्यांनी नाकारला तोच
कोनशिला झाला’ *स्तोत्र. 118:22*

असे जे लिहिले आहे त्याचा अर्थ काय?”
18जो कोणी त्याच्यावर पडेल त्याचे तुकडे तुकडे होतील
परंतु ज्या कोणावर तो पडेल त्याचा चुराडा होईल.”
19नियमशास्त्राचे शिक्षक आणि मुख्य याजक यांनी
त्याचवेळी त्याला अटक करण्याचा प्रयत्न केला, पण
त्यांना लोकांची भीति वाटत होती. त्यांना त्याला अटक
करायचे होते, कारण त्यांना माहीत होते की, हा दाखला
त्याने त्यांनाच उद्देशून सांगितला होता.

### यहूदी पुढारी येशूला फसविण्याचा प्रयत्न करतात
***(मत्तय 22:15-22; मार्क 12:13-17)***

20तेव्हा त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली. आणि आपण
प्रामाणिक आहोत असे भासविणारे हेर पाठविले. त्यांची
अशी योजना होती की, त्याच्या बोलण्यात त्याला पकडावे
म्हणजे त्यांना त्याला राज्यपालाच्या ताब्यात देऊन त्यांच्या
अधिकाराच्या कक्षेत आणता आले असते. अधिकारामध्ये
सुपूर्त करता आले असते. 21म्हणून त्या हेरांनी त्याला
प्रश्न विचारला. ते म्हणाले, “गुरुजी, आम्हांला माहीत
आहे की, जे योग्य ते तुम्ही बोलता व शिकविता आणि
तुम्ही पक्षपात करीत नाही. तर सत्याने देवाचा मार्ग
शिकविता. 22आम्ही कैसराला कर द्यावा हे योग्य आहे
किंवा नाही?”
23ते धूर्तपणे आपल्याला फसवू पाहत आहेत याची येशूला
कल्पना होती. 24“मला एक नाणे दाखवा. त्यावर कोणाचा
मुखवटा व शिश्चा आहे?” ते म्हणाले, “कैसराचा.”
25तेव्हा तो त्यांना म्हणाला, “कैसराचे ते कैसराला
आणि देवाचे ते देवाला द्या.”
26तेव्हा लोकांसमोर तो जे बोलला त्यात त्याला धरणे
त्यांना शक्य झाले नाही. त्याच्या उत्तराने ते आश्चर्यचकित
झाले. आणि शांत झाले.

### काही सदूकी येशूला फसविण्याचा प्रयत्न करतात
***(मत्तय 22:23-33; मार्क 12:18-27)***

27मग पुनरुत्थान नाही असे म्हणणारे काही सदूकी
त्याच्याकडे आले. त्यांनी त्याला प्रश्न विचारला. ते म्हणाले,
28“गुरुजी, मोशेने आमच्यासाठी लिहून ठेवले आहे की
जर एखाद्याचा भाऊ मेला, व त्या भावाला पत्नी आहे पण
मूल नाही, तर त्याच्या भावाने त्या विधवेशी लग्न करावे
आणि भावासाठी त्याला मुले व्हावीत. 29सात भाऊ होते.
पहिल्या भावाने लग्न केले व तो मूल न होता मेला.
30नंतर दुसऱ्या भावाने तिच्याशी लग्न केले. 31नंतर
तिसऱ्याने तिच्याशी लग्न केले. सातही भावांबरोबर तीच
गोष्ट घडली. कोणालाही मुले न होता ते मरण पावले.
32नंतर ती स्त्रीही मरण पावली. 33तर मग पुनरुत्थानाच्या

वेळी ती कोणाची पत्नी होईल? कारण त्या सातांनीही तिच्याबरोबर लग्न केले होते.

34तेव्हा येशू त्यांना म्हणाला, “या युगातले लोक लग्न करून घेतात व लग्न करून देतात. 35परंतु जे लोक त्या येणाऱ्या युगामध्ये व मृतांच्या पुनरुत्थानामध्ये भाग घेण्यासाठी पात्र ठरतील, ते लग्न करून घेणार नाहीत, आणि लग्न करून देणार नाहीत 36आणि ते मरणार नाहीत, कारण ते देवदूतासारखे आहेत. ते पुनरुत्थानाचे पुत्र असल्यामुळे ते देवाचे पुत्रही आहेत. 37जळत्या झुडुपाविषयी मोशेने लिहिले, तेव्हा त्याने परमेश्वराला अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव आणि याकोबाचा देव असे म्हटले व मेलेलेसुद्धा उठविले जातात हे दाखवून दिले. 38देव मेलेल्यांचा नाही तर जिवंतांचा देव आहे. सर्व लोक जे त्याचे आहेत ते जिवंत आहेत.”

39काही नियमशास्त्राचे शिक्षक म्हणाले, “गुरुजी, उत्तम बोललात!” 40तेव्हा त्याला आणखी प्रश्न विचारण्याचे धाडस कोणी केले नाही.

## ख्रिस्त दावीदाचा पुत्र असेल काय?

*(मत्तय 22:41-46; मार्क 12:35-37)*

41परंतु तो त्यांना म्हणाला, “ख्रिस्त दावीदाचा पुत्र आहे असे ते कसे म्हणतात? 42कारण दावीद स्वत: स्तोत्राच्या पुस्तकात म्हणतो,

‘प्रभु माझ्या प्रभूला म्हणाला: तू माझ्या उजवीकडे बैस,
43जोपर्यंत मी तुझ्या शत्रूला तुझ्या पायाखालचे आसन करीत नाही तोपर्यंत.’ *स्तोत्र. 110:1*

44अशा रीतीने दावीद त्याला ‘प्रभु’ म्हणतो, तर मग ख्रिस्त दावीदाचा पुत्र कसा?”

## नियमशास्त्रातील शिक्षकांविरुद्ध इशारा

*(मत्तय 23:1-36; मार्क 12:38-40; लूक 11:37-54)*

45सर्व लोक हे ऐकत असताना तो शिष्यांना म्हणाला, “नियमशास्त्राच्या शिक्षकांविषयी सावध असा, त्यांना लांब झगे घालून फिरणे आवडते, 46त्यांना बाजारात नमस्कार घेण्यास, सभास्थानात महत्त्वाच्या आसनावर व मेजवानीच्या वेळी मानाच्या जागी बसणे आवडते. 47ते विधवांची घरे खाऊन फस्त करतात आणि देखाव्यासाठी लांब लांब प्रार्थना करतात. या माणसांना अत्यंत वाईट शिक्षा होईल.

## खरे दान

*(मार्क 12:41-44)*

21 येशूने वर पाहिले व श्रीमंत लोकांना दानपेटीत दाने टाकताना न्याहाळले. 2त्याने एका गरीब विधवेलाही तांब्याची दोन नाणी टाकताना पाहिले. 3तेव्हा तो म्हणाला, “मी तुम्हांला खरे सांगतो, या गरीब विधवेने इतर सर्वांपेक्षा अधिक टाकले. (मी असे म्हणतो) 4कारण या सर्व लोकांनी आपल्या भरपूर संपत्तीमधून काही भाग दान म्हणून टाकले. परंतु तिने गरीब असून आपल्या उपजीविकेतील सर्वच टाकले.

## मंदिराचा नाश

*(मत्तय 24:1-14; मार्क 13:1-13)*

5शिष्यातील काही जण मंदिराविषयी असे बोलत होते की, ते सुंदर पाषाणांनी आणि नवसाच्या अर्पणांनी सुशोभित केले आहे. येशू म्हणाला,

6“या गोष्टी तुम्ही पाहताना असे दिवस येतील की, एकावर एक असा एकही दगड ठेवला जाणार नाही. ते सर्व पाडले जातील.”

7त्यांनी त्याला प्रश्न विचारला आणि ते म्हणाले, “गुरुजी या गोष्टी केव्हा घडतील? व या गोष्टी घडणार आहेत यासंबंधी कोणते चिन्ह असेल?”

8आणि तो म्हणाला, “तुम्हांला कोणी फसवू नये म्हणून सावध राहा. कारण माझ्या नावाने पुष्कळ येतील आणि तो ‘मी आहे’ असे म्हणतील. आणि ते म्हणतील, ‘वेळ जवळ आली आहे.’ त्यांच्यामागे जाऊ नका! 9जेव्हा तुम्ही लढाया व दंगे याविषयी ऐकाल तेव्हा घाबरू नका. कारण या गोष्टी घडल्याच पाहिजेत. पण एवढ्यात शेवट होणार नाही.”

10मग तो त्यांना म्हणाला, “एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर उठेल, एक राज्य दुसऱ्या राज्यावर उठेल. 11मोठे भूकंप होतील, दुष्काळ पडतील, आणि वेगवेगळ्या ठिकाणी पीडा उद्‌भवतील, भितीदायक घटना घडतील. आणि आकाशात मोठी चिन्हे घडतील.

12“परंतु हे सर्व होण्यापूर्वी ते तुम्हांला अटक करतील. ते तुमचा छळ करतील. चौकशीसाठी ते तुम्हांस सभास्थानांसमोर उभे करतील आणि तुरूंगात टाकतील. माझ्या नावासाठी ते तुम्हांला राजे व राज्यपाल यांच्यासमोर नेतील. 13यामुळे तुम्हांला माझ्याविषयी साक्ष देण्याची संधी मिळेल.

14“आपला स्वत:चा बचाव कसा करायचा याविषयी काळजी करायची नाही अशी मनाची तयारी करा, 15कारण मी तुम्हांला असे शब्द व अशी बुद्धी देईन की ज्यामुळे त्यांना तुमचा विरोध करायला किंवा तुमच्याविरुद्ध बोलायला मुळीच जमणार नाही.

16“परंतु आईवडील, भाऊ, नातेवाईक आणि मित्र तुमचा विश्वासघात करतील आणि तुम्हांपैकी काही जणांना ठार मारतील. 17माझ्या नावामुळे सर्व जण तुमचा द्वेष करतील. 18परंतु तुमच्या डोक्यावरील एक केसही नाहीसा होणार नाही. 19आपल्या सहनशीलतेने तुम्ही जिवाचे रक्षण कराल.

## यरुशलेमेचा नाश

***(मत्तय 24:15-21; मार्क 13:14-19)***

20"जेव्हा तुम्ही यरुशलेमाला सैन्यानी वेढा घातलेला
पाहाल, तेव्हा तुम्हांला कळून येईल की, तिचा नाश
होण्याची वेळ आली आहे. 21जे यहूदीयात आहेत त्यांनी
डोंगरांमध्ये पळून गेले पाहिजे. जे रानात आहेत त्यांनी
शहरात जाऊ नये. 22ज्या सर्व गोष्टी लिहिलेल्या आहेत
त्या पूर्ण होण्यासाठी हे शिक्षेचे दिवस आहेत. 23त्या दिवसांत
ज्या गरोदर स्त्रिया आहेत, व ज्या बाळाचे पोषण करणाऱ्या
स्त्रिया आहेत, त्यांच्यासाठी ते किती भयंकर होईल. अशा
स्त्रियांची खरोखर दुर्दशा होईल. मी असे म्हणतो कारण
देशावर मोठे संकट येईल आणि लोकांवर देवाचा कोप
ओढवेल. 24ते तरवारीच्या धारेने पडतील आणि त्यांना
बंदीवान करून राष्ट्रांत नेतील आणि यहूदीतर लोकांचा
काळ संपेपर्यंत यहूदीतर राष्ट्रे यरुशलेम पायाखाली
तुडवतील.

## भिऊ नका

***(मत्तय 24:29-31; मार्क 13:24-27)***

25"सूर्य, चंद्र, तारे यांच्यात चिन्हे होतील, पृथ्वीवरील
राष्ट्रे हतबल होतील व समुद्राच्या गर्जणाऱ्या लाटांनी ते
घाबरून जातील. 26भीतीमुळे लोक बेशुद्ध होतील आणि
जगात काय घडणार आहे ह्या धास्तीमुळे व भीतीमुळे
लोक दुर्बल होतील. आकाशातील सामर्थ्ये डळमळीत
होतील. 27नंतर ते मनुष्याच्या पुत्राला सामर्थ्याने आणि
वैभवाने मेघात येताना पाहतील. 28मग या गोष्टी घडण्यास
आरंभ होईल, तेव्हा सरळ उभे राहा. आणि तुमचे मस्तक
वर करा, कारण तुमच्या सुटकेची वेळ जवळ येत आहे."

## माझी वचने सर्वकाळ टिकतील

***(मत्तय 24:32-35; मार्क 13:28-31)***

29नंतर त्याने त्यांस एक बोधकथा सांगितली:
"अंजिराच्या झाडाकडे व इतर दुसऱ्या सर्व झाडांकडे
पाहा. 30त्यांना पालवी येऊ लागली की, तुमचे तुम्हीच
समजता की, उन्हाळा अगदी जवळ आला आहे.
31त्याचप्रमाणे या गोष्टी घडताना तुम्ही पाहाल तेव्हा ओळखा
की देवाचे राज्य जवळ आले आहे.

32"मी तुम्हांस खरे सांगतो की, ह्या सर्व गोष्टी घडून
येईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही. 33आकाश व
पृथ्वी नाहीशी होतील पण माझी वचने नाहीशी होणार
नाहीत.

## सर्वदा तयार राहा

34"सावध राहा, दारूबाजी आणि अधाशीपणात तुमचा
वेळ घालवू नका, किंवा ऐहिक गोष्टींमध्ये मग्न राहू नका.
जर तुम्ही तसे कराल, तर तुम्ही व्यवस्थित विचार करू
शकणार नाही, व तुम्ही तयार नसताना तो दिवस (शेवट)
अकस्मात तुमच्यावर येईल. 35खरोखर, तो पृथ्वीवर
असणाऱ्या सर्व जिवंतांवर येईल. 36सर्व समयी जागृत
राहा. होणाऱ्या सर्व गोष्टींपासून जिवंत राहण्यासाठी आणि
विश्वासाने मनुष्याच्या पुत्रासमोर उभे राहणे शक्य व्हावे
यासाठी प्रार्थना करा."

37दर दिवशी तो मंदिरात शिक्षण देत असे. परंतु रात्री
मात्र तो जैतूनाचा डोंगर म्हटलेल्या टेकडीवर जात असे.
38सर्व लोक मंदिरात जाण्यासाठी व त्याचे ऐकण्यासाठी
पहाटेस उठून त्याच्याकडे जात.

## यहूदी पुढारी येशूला ठार मारावयास टपतात

***(मत्तय 26:1-5, 14-16; मार्क 14:1-2, 10-11; योहान 11:45-53)***

22 नंतर बेखमीर भाकरीचा सण ज्याला वल्हांडण
म्हणतात, तो समय जवळ येत होता. 2आणि मुख्य
याजक, नियमशास्त्राचे शिक्षक, येशूला कसे मारता येईल
हे बघत होते. कारण त्यांना लोकांची भीति वाटत होती.

## यहूदा येशू विरुध्द बेत आखतो

3नंतर सैतान यहूदामध्ये, ज्याला इस्कर्योत म्हणत, व
जो बारा जणांपैकी एक होता, त्याच्यात शिरला. 4यहूदा
मुख्य याजक व मंदिराचे अधिकारी यांच्याकडे गेला आणि
येशूला त्यांच्या हाती कसे धरून देता येईल याविषयी
त्याने बोलणी केली. 5त्यांना फार आनंद झाला व त्यांनी
त्याला पैसे देण्याचे मान्य केले. 6म्हणून त्याने संमति
दर्शविली आणि तो येशूला गर्दी नसेल तेव्हा धरून त्यांच्या
हाती देण्याची संधि शोधू लागला.

## वल्हांडण सणाच्या भोजनाची तयारी

***(मत्तय 26:17-25; मार्क 14:12-21; योहान 13:21-30)***

7बेखमीर भाकरीचा सण, ज्या दिवशी वल्हांडणाचे
कोकरू मारावयाचे तो दिवस आला. 8तेव्हा त्याने पेत्र व
योहान यांना सांगून पाठविले की, "जा आणि आपणांसाठी
वल्हांडण सणाचे भोजन तयार करा म्हणजे आपण ते
खाऊ."

9पेत्र व योहान येशूला म्हणाले, "आम्ही ते कोठे करावे
अशी तुमची इच्छा आहे?"

10तो त्यांना म्हणाला, "तुम्ही नगरात प्रवेश कराल
तेव्हा पाण्याचे भांडे घेऊन जाणारा एक मनुष्य तुम्हांला
भेटेल. तो ज्या घरात जाईल तेथे जा. 11आणि घरमालकांस
सांगा, 'गुरुजींनी तुम्हांला विचारले आहे की, माझ्या
शिष्यांसह वल्हांडण सणाचे भोजन करता येईल ती
पाहुण्यांची खोली कोठे आहे?' 12तो मनुष्य तुम्हांला
माडीवरील सजविलेली खोली दाखवील. तेथे तयारी करा."
13तेव्हा पेत्र व योहान तेथून निघाले. जसे येशूने सांगितले
तसेच सर्व घडले तेव्हा त्यांनी वल्हांडणाच्या भोजनाची
तयारी केली.

## प्रभु भोजन

***(मत्तय 26:26-30; मार्क 14:22-26; 1 करिंथकरांस 11:23-25)***

14वेळ झाली तेव्हा येशू त्याच्या शिष्यांसह भोजनास
बसला. 15तो त्यांना म्हणाला, "मी दु:ख भोगण्यापूर्वी
तुमच्याबरोबर वल्हांडण सणाचे भोजन घ्यावे अशी माझी
फार इच्छा होती. 16कारण मी तुम्हांस सांगतो की, देवाच्या
राज्यात हे परिपूर्ण होईपर्यंत मी पुन्हा हे भोजन करणार
नाही."

17नंतर त्याने पेला घेतला आणि उपकार मानले. तो
म्हणाला, "हे घ्या, आणि आपसात वाटून घ्या. 18कारण
मी तुम्हांस सांगतो की, देवाचे राज्य येईपर्यंत यापुढे मी
द्राक्षफळांचा रस घेणार नाही."

19नंतर त्याने भाकर घेतली आणि उपकार मानले.
त्याने ती मोडली आणि त्यांना दिली व म्हणाला, "हे माझे
शरीर आहे जे तुम्हांसाठी दिले आहे. माझ्या आठवणीसाठी
हे करा." 20त्याचप्रमाणे त्यांचे भोजन झाल्यावर त्याने
प्याला घेतला आणि म्हणाला, "हा प्याला माझ्या रक्तात
नवा करार आहे. जो तुमच्यासाठी ओतला जात आहे."*

## येशू विरुद्ध कोण जाईल?

21परंतु पाहा! माझा विश्वासघात करणाऱ्याचा हात
माझ्याबरोबरच मेजावर आहे. 22कारण मनुष्याचा पुत्र
जसे निश्चित केले आहे, त्याप्रमाणे मरावयास जाईल.
परंतु ज्याने त्याचा विश्वासघात केला आहे, त्याचा धिश्च ार
असो."

23आणि ते आपापसात एकमेकाला प्रश्न विचारू लागले,
"हे करणारा आपणापैकी कोण असावा?"

## सेवकासारखे व्हा

24तसेच, त्यांच्यामध्ये अशासंबंधी वाद निर्माण झाला
की, त्यांच्यामध्ये सर्वांत श्रेष्ठ कोण आहे. 25पण येशू
त्यांना म्हणाला, विदेश्यांचे राजे त्यांच्या लोकांवर (प्रजेवर)
सत्ता गाजवितात. इतर लोकांवर अधिकार असणारी माणसे
लोकांनी त्यांना लोकांचे उपकारकर्ते म्हणण्यास भाग
पाडतात. (स्वत:ला उपकारकर्ते म्हणवून घेतात.) 26परंतु
तुम्ही तसे नाही. त्याऐवजी तुमच्यातील सर्वांत मोठा
असलेल्याने सर्वांत लहान व्हावे व जो अधिकारी आहे
त्याने सेवक व्हावे. 27तेव्हा मोठा कोण: जो मेजावर बसतो
तो की जो सेवा करतो तो? जो मेजावर बसतो तो नाही
का? परंतु मी तुम्हांमध्ये सेवा करणारासारखा आहे. 28परंतु
माझ्या परीक्षेमध्ये माझ्या पाठीशी उभे राहिलेले असे तुम्हीच
आहात. 29ज्याप्रमाणे माझ्या पित्याने माझी नियुक्ति केली
तशी मी तुमची नियुक्ति राज्यावर करतो. 30म्हणून तुम्ही
माझ्या राज्यात माझ्या मेजावर खावे व प्यावे आणि
आसनावर बसून इस्राएलाच्या बारा वंशाचा न्याय करावा.

## तुमचा विश्वास ढळू देऊ नका

***(मत्तय 26:31-35; मार्क 14:27-31; योहान 13:36-38)***

31शिमोना, शिमोना, ऐक! सैतानाने तुम्हांला गव्हासारखे
चाळावे म्हणून मागितले आहे. 32परंतु शिमोना, तुझा विश्वास
ढळू नये, म्हणून मी तुझ्यासाठी प्रार्थना करून केली आहे
आणि तू पुन्हा माझ्याकडे वळलास म्हणजे तुझ्या भावांस
स्थिर कर.

33परंतु शिमोन पेत्र त्याला म्हणाला, "प्रभु, मी
तुझ्याबरोबर तुरूंगात जाण्यासाठी व मरण्यासाठी तयार
आहे."

34पण येशू म्हणाला, "पेत्रा, मी तुला सांगतो, तू मला
ओळखतोस हे तीन वेळा नाकारीपर्यंत आज कोंबडा
आरवणार नाही."

## संकटासाठी तयार राहा

35येशू शिष्यांना म्हणाला, "जेव्हा मी तुम्हांला थैली,
पिशवी व वहाणांशिवाय पाठविले, तेव्हा तुम्हांस काही
कमी पडले का?" ते म्हणाले, "काहीही नाही."

36तो त्यांना म्हणाला, "पण आता, ज्याच्याजवळ थैली
आहे त्याने ती घ्यावी व त्याने पिशवीसुद्धा घ्यावी. आणि
ज्याच्याजवळ तलवार नाही त्याने आपला झगा विकावा
आणि एक विकत घ्यावी. 37कारण मी तुम्हांस सांगतो, हा
शास्त्रभाग माझ्यामध्ये परिपूर्ण झालाच पाहिजे:

'आणि तो अपराधी असा गणला गेला.'

*यशया 53:12*

होय, हा माझ्याविषयीचा संदर्भ पूर्ण होत आहे."

38ते म्हणाले, "प्रभु, पहा, येथे दोन तरवारी आहेत." तो
त्यांना म्हणाला, "तेवढे पुरे!"

## येशू प्रेषितांना प्रार्थना करण्यास सांगतो

***(मत्तय 26:36-46; मार्क 14:32-42)***

39तो निघाला आणि नेहमीप्रमाणे जैतूनाच्या डोंगराकडे
गेला व शिष्यही त्याच्या मागोमाग गेले. 40तो त्या ठिकाणी
आला तेव्हा त्यांना म्हणाला, "तुम्ही मोहात पडू नये म्हणून
प्रार्थना करा."

41तो त्यांच्यापासून दगडाच्या टप्प्याइतका दूर गेल्यानंतर
त्याने गुडघे टेकले. आणि अशी प्रार्थना केली, "42पित्या,
जर तुझी इच्छा असेल तर हा प्याला माझ्याकडून घे. तरी
माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे."
43स्वर्गातून एक देवदूत आला व तो त्याला सामर्थ्य देत
राहिला 44दु:खाने ग्रासलेला असतानासुद्धा त्याने अधिक
काकुळतीने प्रार्थना केली. आणि त्याचा घाम रक्ताच्या

---

**वचन 20** काही ग्रीक प्रतीमध्ये 19 व्या वचनाचा शेवटचा भाग व 20 वे वचन पूर्णपणे नाहीत.

थेंबासारखा जमिनीवर पडत होता. [45]आणि जेव्हा प्रार्थना
करून तो उठला आणि शिष्यांकडे आला तेव्हा ते त्यांच्या
दु:खामुळे थकून जाऊन झोपी गेलेले आढळले. [46]तो
त्यांना म्हणाला, "तुम्ही का झोपत आहात? उठा, आणि
मोहात पडू नये म्हणून प्रार्थना करा."

### येशूला अटक

***(मत्तय 26:47-56; मार्क 14:43-50; योहान 18:3-11)***

[47]तो बोलत असता लोकांचा जमाव आला. आणि बारा
शिष्यातील यहूदा इस्कर्योत म्हटलेला एक जण त्यांच्यापुढे
चालत होता. येशूचे चुंबन घेण्यासाठी तो त्याच्याजवळ
आला. [48]परंतु येशू त्यास म्हणाला, "यहूदा, चुंबन घेऊन
मनुष्याच्या पुत्राचा तू विश्वासघात करतोस काय?"
[49]त्याच्याभोवती जे होते ते काय होणार हे पाहून म्हणाले,
"प्रभु, आम्ही तलवारीने मारावे काय?" [50]त्यांच्यापैकी
एकाने मुख्य याजकाच्या नोकरावर वार केला आणि
त्याचा उजवा कान कापला.

[51]येशूने उत्तर दिले, "असे काही करू नका. त्याने
त्याच्या कानाला स्पर्श केला व त्याला बरे केले.

[52]नंतर येशू मुख्य याजक, मंदिराचे मुख्य अधिकारी
आणि वडील जे त्याच्यावर चालून आले होते, त्यांना
म्हणाला, "तुम्ही तलवारी आणि सोटे घेऊन माझ्यावर
चालून आलात, जसा काय मी लुटारू आहे. [53]मी तर
तुम्हांबरोबर दररोज मंदिरात असे आणि तुम्ही माझ्यावर
हात टाकला नाही. परंतु ही तुमची आणि अंधाराची राज्य
करण्याची वेळ आहे."

### मी येशूला ओळखतो असे म्हणण्याची पेत्राला भीति वाटते

***(मत्तय 26:57-58, 69-75; मार्क 14:53-54, 66-72; योहान 18:12-18, 25-27)***

[54]त्यांनी त्याला अटक केली व ते त्याला मुख्य
याजकाच्या घरी घेऊन गेले. पण पेत्र दुरून त्यांच्या मागे
चालला. [55]त्यांनी अंगणाच्या मध्यभागी विस्तव पेटविला,
आणि त्याच्याभोवती बसले. पेत्रही त्यांच्यात बसला. [56]एका
दासीने तेथे त्याला विस्तवाच्या उजेडात बसलेले पाहिले.
तिने त्याच्याकडे निरखून पाहिले आणि ती म्हणाली, "हा
मनुष्यही त्याच्याबरोबर होता."

[57]पेत्र ते नाकारून म्हणाला, "बाई, मी त्याला ओळखत
नाही!" [58]थोड्या वेळानंतर दुसऱ्या मनुष्याने त्याला पाहिले
आणि म्हणाला, "तू सुद्धा त्यांच्यापैकी एक आहेस!" पण
पेत्र म्हणाला, "गृहस्था, मी नाही!"

[59]नंतर सुमारे एक तास झाल्यावर आणखी एक जण
ठामपणे म्हणाला, "खात्रीने हा मनुष्यसुद्धा त्याच्याबरोबर
होता, कारण हा गालीलाचा आहे."

[60]परंतु पेत्र म्हणाला, "गृहस्था तू काय बोलतोस ते
मला कळत नाही!" तो बोलत असताना त्याच क्षणी कोंबडा
आरवला. [61]आणि प्रभूने वळून पेत्राकडे पाहिले. पेत्राला
प्रभूने उच्चारलेले वाक्य आठवले. "आज कोंबडा
आरवण्यापूर्वी तू तीन वेळा मला नाकारशील," असे
सांगितलेले त्याला आठवले. [62]मग तो बाहेर गेला आणि
अतिदु:खाने रडला.

### लोक येशूचा उपहास करतात

***(मत्तय 26:67-68; मार्क 14:65)***

[63]येशूवर पहारा देणाऱ्या लोकांनी त्याचा उपहास
करायला व त्याला मारायला सुरूवात केली. [64]त्यांनी
त्याचे डोळे बांधले, व त्याला प्रश्न विचारू लागले. ते
म्हणाले, "ओळख बघू! तुला कोणी मारले?" [65]आणि ते
त्याचा अपमान करण्यासाठी आणखी पुष्कळ काही बोलले.

### यहूदी पुढाऱ्यांसमोर येशू

***(मत्तय 26:59-66; मार्क 14:55-64; योहान 18:19-24)***

[66]दिवस उगवला तेव्हा वडील लोकांची म्हणजे त्यात
दोन्ही प्रकारचे लोक, मुख्य याजक, व नियमशास्त्राचे
शिक्षक यांची सभा भरली. आणि ते त्याला त्यांच्या सभेत
घेऊन गेले. [67]ते म्हणाले, "जर तू ख्रिस्त आहेस तर
आम्हांला सांग."

येशू त्यांना म्हणाला, "जरी मी तुम्हांला सांगितले तरी
तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवणार नाही. [68]आणि जरी मी
तुम्हांला प्रश्न विचारला तरी तुम्ही उत्तर देणार नाही.
[69]पण आतापासून मनुष्याचा पुत्र सर्वसमर्थ देवाच्या
उजवीकडे बसलेला असेल."

[70]ते सर्व म्हणाले, "तर मग तू देवाचा पुत्र आहेस काय?"
त्याने त्यांना उत्तर दिले, "मी आहे असे तुम्ही म्हणता ते
बरोबर आहे."

[71]मग ते म्हणाले, "आता आपल्याला आणखी साक्षीची
काय गरज आहे? आपण स्वत: त्याच्या तोंडचे शब्द ऐकले
आहेत."

### राज्यपाल पिलात येशूला प्रश्न विचारतो

***(मत्तय 27:1-2, 11-14; मार्क 15:1-5; योहान 18:28-38)***

23 मग त्यांचा सर्व समुदाय उठला, व त्यांनी त्याला
(येशूला) पिलाताकडे नेले. [2]व ते त्याच्यावर
आरोप करू लागले. ते म्हणाले, "आम्ही या माणसाला
लोकांची दिशाभूल करताना पकडले. तो कैसराला कर
देण्यासाठी विरोध करतो आणि म्हणतो की, तो स्वत:
ख्रिस्त, एक राजा आहे."

[3]मग पिलाताने येशूला विचारले, "तू यहूद्यांचा राजा
आहेस काय?" येशू म्हणाला, "मी आहे हे तू म्हणतोस ते
बरोबर आहे." [4]मग पिलात मुख्य याजकांना आणि
जमावाला म्हणाला, "या माणसावर दोष ठेवण्यास मला
काही कारण आढळत नाही."

5पण त्यांनी आग्रह धरला. ते म्हणाले, “यहूदीयातील
सर्व लोकांना तो आपल्या शिकवणीने भडकावीत आहे,
त्याने गालीलापासून सुरूवात केली आणि येथपर्यंत आला
आहे.”

## पिलात येशूला हेरोदाकडे पाठवितो

6पिलाताने हे ऐकले, तेव्हा त्याने विचारले की, “हा
मनुष्य गालीलाचा आहे काय?” 7जेव्हा त्याला समजले
की, येशू हेरोदाच्या अंमलाखाली येतो. तेव्हा त्याने त्याला
हेरोदाकडे पाठविले. तो त्या दिवसांत यरुशलेमामध्येच
होता. 8हेरोदाने येशूला पाहिले तेव्हा त्याला फार आनंद
झाला, कारण त्याने त्याजविषयी ऐकले होते, व त्याला
असे वाटत होते की, तो एखादा चमत्कार करील व
आपल्याला तो बघायला मिळेल 9त्याने येशूला अनेक
प्रश्न विचारले, पण येशूने त्याला उत्तर दिले नाही. 10मुख्य
याजक आणि नियमशास्त्राचे शिक्षक तेथे उभे होते. ते
त्याच्याविरुद्ध जोरदारपणे आरोप करीत होते. 11हेरोदाने
त्याच्या शिपायांसह येशूला अपमानास्पद वागणूक दिली,
त्याची थट्टा केली. त्यांनी त्याच्यावर एक तलम झगा
घातला व त्याला पिलाताकडे परत पाठविले. 12त्याच
दिवशी हेरोद आणि पिलात एकमेकांचे मित्र बनले. त्यापूर्वी
ते एकमेकांचे वैरी होते.

## येशू मेलाच पाहिजे
### (*मत्तय 27:15-26; मार्क 15:6-15; योहान 18:39, 19:16*)

13पिलाताने मुख्य याजक, पुढारी आणि लोकांना एकत्र
बोलावले. 14तो त्यांना म्हणला, “तुम्ही या माणसाला तो
लोकांना भडकावीत होता म्हणून आणले, आता मी त्याची
तुमच्यासमोर चौकशी केली आहे आणि तुम्ही त्याच्याविरुद्ध
जे आरोप करीत आहात त्यासाठी मला काहीही आधार
सापडत नाही. 15हेरोदालाही आरोपाविषयी काहीही आधार
सापडला नाही. कारण त्याने त्याला परत आमच्याकडे
आणले आहे. तुम्हीही पाहू शकता की, मरणाची शिक्षा
देण्यास योग्य असे त्याने काहीही केलेले नाही. 16म्हणून
मी याला फटके मारून सोडून देतो. 17*
18पण ते सर्व एकत्र मोठ्याने ओरडले, “या माणसाला
ठार करा! आणि आम्हांसाठी बरब्बाला सोडा!” 19(बरब्बाने
शहरात खळबळ माजवली होती. त्याने काही लोकांना
ठारही केले होते, त्यामुळे त्याला तुरूंगात टाकले होते.)
20पुन्हा पिलात त्यांच्याशी बोलला, कारण येशूला
सोडण्याची त्याची इच्छा होती. 21पण ते ओरडतच राहिले,
“त्याला वधस्तंभावर खिळा, त्याला वधस्तंभावर खिळा!”
22तिसऱ्यांदा पिलात त्यांना म्हणाला, “परंतु या माणसाने
असा कोणता गुन्हा केला आहे? मरणाची शिक्षा देण्यायोग्य
असे मला याच्याविरुद्ध काहीही आढळले नाही. यास्तव
मी याला फटक्याची शिक्षा सांगून सोडून देतो.”
23परंतु ते मोठ्याने ओरडतच राहिले आणि त्याला
वधस्तंभावर खिळण्याची मागणी करू लागले. आणि
त्यांच्या ओरडण्याचा विजय झाला. 24पिलाताने त्यांची
मागणी मान्य करण्याचे ठरविले.
25जो मनुष्य दंगा आणि खून यासाठी तुरूंगात टाकला
गेला होता, व ज्याची त्यांनी मागणी केली होती त्याला
त्याने सोडून दिले. पिलाताने त्यांच्या इच्छेप्रमाणे
करण्यासाठी येशूला त्यांच्या हाती दिले.

## येशूला वधस्तंभावर खिळून ठार मारले
### (*मत्तय 27:32-44; मार्क 15:21-32; योहान 19:17-27*)

26ते त्याला घेऊन जात असताना, कुरेने येथील शिमोन
नावाच्या मनुष्याला त्यांनी धरले. तो शेताकडून येत होता.
त्यांनी वधस्तंभ त्याच्यावर ठेवला व त्यांनी त्याला तो
वधस्तंभ येशूच्या मागे वाहावयास लावला.
27लोकांचा मोठा समुदाय त्याच्यामागे चालला होता.
त्यामध्ये त्याच्यासाठी शोक करणाऱ्या आणि रडणाऱ्या
काही स्त्रियांचाही समावेश होता. 28येशू त्यांच्याकडे वळून
म्हणाला, “यरुशलेमच्या कन्यांनो, माझ्यासाठी रडू नका,
तर आपल्या स्वत:साठी आणि आपल्या मुलांबाळांसाठी
रडा. 29कारण असे दिवस येत आहेत, जेव्हा लोक म्हणतील,
‘धन्य त्या स्त्रिया ज्या वांझ आहेत, आणि धन्य ती गर्भाशये,
ज्यांनी जन्मदिले नाहीत, व धन्य ती स्तने, ज्यांनी कधी
पाजले नाही.’ 30‘तेव्हा ते पर्वतास म्हणतील, “आम्हांवर
पडा!” आणि ते टेकड्यांस म्हणतील. “आम्हांला झाका!”*
31जर लोक असे करतात जेव्हा झाड हिरवे असते, तर
झाड सुकल्यावर काय होईल?”
32दोन दुसरी माणसे जी दोघेही गुन्हेगार होती, त्यांनाही
मृत्युदंडाच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यासाठी नेत होते.
33आणि जेव्हा ते गुन्हेगारांसमवेत “कवटी” म्हटलेल्या
ठिकाणी आले, तेथे त्यांनी त्याला वधस्तंभी गुन्हेगारांमध्ये
खिळले. एका गुन्हेगाराला त्यांनी उजवीकडे ठेवले व
दुसऱ्याला डावीकडे ठेवले. 34नंतर येशू म्हणाला, “हे
बापा, त्यांची क्षमा कर, कारण ते काय करतात हे त्यांना
समजत नाही.”
त्यांनी चिठ्ठ्या टाकून त्याचे कपडे वाटून घेतले. 35लोक
तेथे पाहात उभे होते. आणि पुढारी थट्टा करून म्हणाले,
“त्याने दुसऱ्यांना वाचविले, जर तो ख्रिस्त, देवाचा
निवडलेला असेल तर त्याने स्वत:ला वाचवावे!”
36शिपायांनीही त्याची थट्टा केली. ते त्याच्याकडे आले
आणि त्यांनी त्याला आंब दिली. 37आणि ते म्हणाले, “
जर तू यहूद्यांचा राजा आहेस तर स्वत:ला वाचव!”

---

**वचन 17** काही ग्रीक प्रतीमध्ये, “प्रत्येक वर्षी वल्हांडणाच्या वेळी पिलाताला लोकांसाठी एका कैद्या सोडावे लागे”.

**तेव्हा ... झाका** होशेय 10:8

38त्याच्यावर असे लिहिले होते: "हा यहूदी लोकांचा राजा
आहे."
39तेथे खिळलेल्या एका गुन्हेगाराने त्याचा अपमान केला.
तो म्हणाला, "तू ख्रिस्त नाहीस काय? स्वत:ला व
आम्हालाही वाचव!"
40पण दुसऱ्या गुन्हेगाराने त्याला दटावले आणि म्हणाला,
"तुला देवाचे भय नाही का? तुलाही तीच शिक्षा झाली
आहे. 41पण आपली शिक्षा योग्य आहे. कारण आपण जे
केले त्याचे योग्य फळ आपणांस मिळत आहे. पण या
माणसाने काहीही अयोग्य केले नाही." 42नंतर तो म्हणाला,
"येशू, तू आपल्या राज्याधिकाराने येशील तेव्हा माझी
आठवण कर." 43येशू त्याला म्हणाला, "मी तुला खरे
सांगतो, आज तू मजबरोबर सुखलोकात असशील."

## येशूचा मृत्यू

***(मत्तय 27:45-56; मार्क 15:33-41; योहान 19:28-30)***

44त्यावेळी जवळजवळ दुपारचे बारा वाजले होते आणि
तीन वाजेपर्यंत सर्व प्रदेशावर अंधार पडला. त्यादरम्यान
सूर्य प्रकाशला नाही. 45आणि मंदिरातील पडदा फाटला
आणि त्याचे दोन भाग झाले. 46येशू मोठ्या आवाजात
ओरडला, "पित्या, मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपवून
देतो." असे म्हटल्यानंतर तो मेला. 47जेव्हा रोमी
सेनाधिकाऱ्याने काय घडले ते पाहिले तेव्हा त्याने देवाचे
गौरव केले आणि म्हणाला, "खरोखर हा नीतिमान मनुष्य
होता."
48हे दृष्य पाहण्यासाठी जमलेल्या लोकांनी घडलेल्या
गोष्टी पाहिल्या, तेव्हा ते छाती बडवीत परत गेले. 49परंतु
त्याच्या ओळखीचे सर्वजण हे पाहण्यासाठी दूर उभे राहिले.
त्यामध्ये गालीलाहून त्याच्यामागे आलेल्या स्त्रियाही होत्या.

## योसेफ अरिमथाईकर

***(मत्तय 27:57-61; मार्क 15:42-47; योहान 19:38-42)***

50तेथे एक योसेफ नावाचा एक मनुष्य होता. तो यहूदी
सभेचा सभासद होता. तो चांगला आणि धार्मिक मनुष्य
होता. 51तो सभेच्या निर्णयाशी व कृतीशी सहमत नव्हता.
तो यहूदीयातील अरिमथाई नगराचा होता. तो देवाच्या
राज्याची वाट पाहत होता. 52हा मनुष्य पिलाताकडे गेला
आणि त्याने येशूचे शरीर मागितले. 53ते त्याने
वधस्तंभावरून खाली काढले आणि तागाच्या वस्त्रात
गुंडाळले. नंतर ते खडकात खोदलेल्या कबरेत ठेवले. ही
कबर अशी होती की, जिच्यात तोपर्यंत कोणाला ही ठेवले
नव्हते. 54तो शुक्रवार (तयारीचा दिवस) होता, आणि
शब्बाथ सुरू होणार होता. 55गालीलाहून येशूबरोबर
आलेल्या स्त्रिया योसेफाच्या मागे गेल्या. त्यांनी ती कबर
व तिच्यामध्ये ते शरीर कसे ठेवले ते पाहिले. 56नंतर त्या
घरी गेल्या व त्यांनी सुगंधी मसाले आणि लेप तयार केले.
शब्बाथ दिवशी त्यांनी आज्ञेप्रमाणे विसावा घेतला.

## येशू मरणातून उठला आहे

***(मत्तय 28:1-10; मार्क 16:1-8; योहान 20:1-10)***

24 आठवड्याच्या पहिल्या दिवशी त्या स्त्रिया अगदी
पहाटेस कबरेकडे आल्या, आणि त्यांनी स्वत:
तयार केलेले मसाले आणले. 2त्यांना दगड कबरेवरून
लोटलेला आढळला. 3त्या आत गेल्या, परंतु त्यांना प्रभु
येशूचे शरीर सापडले नाही. 4यामुळे त्या अवाक् झाल्या
असतानाच, अचानक लखलखीत कपडे घातलेले दोन
पुरुष त्यांच्या बाजूला उभे राहिले. 5अतिशय भयभीत
होऊन त्यांनी आपले चेहरे जमिनीकडे वळविले. ते दोन
पुरुष त्यांना म्हणाले, "जो जिवंत आहे त्याचा शोध तुम्ही
मेलेल्यांमध्ये का करता? 6तो येथे नाही; तो उठला आहे!
तो गालीलात असताना त्याने तुम्हांला काय सांगितले
याची आठवण करा. 7तो असे म्हणाला की, मनुष्याच्या
पुत्राला धरून पापी लोकांच्या हाती द्यावे, त्याला वधस्तंभावर
खिळावे आणि तिसऱ्या दिवशी त्याने उठावे. 8नंतर स्त्रियांना
येशूच्या शब्दाची आठवण झाली.
9त्या कबरेपासून परतल्या आणि त्यांनी या सर्व गोष्टींचे
वर्तमान अकरा प्रेषितांना व इतर सर्वांना सांगितले. 10त्या
स्त्रिया मरीया मग्दालिया, योहान्ना, आणि याकोबाची आई
मरीया ह्या होत्या. त्या आणि इतर स्त्रियांसुद्धा ज्या
त्यांच्याबरोबर होत्या, प्रेषितांना या गोष्टी सांगत होत्या.
11पण प्रेषितांना त्यांचे सांगणे मूर्खपणाचे वाटले. आणि
त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही. 12पण पेत्र उठला
आणि कबरेकडे पळाला. त्याने खाली वाकून पाहिले पण
त्याला तागाच्या गुंडाळण्याच्या वस्त्राशिवाय काही आढळले
नाही. जे घडले त्याविषयी तो स्वत:शीच आश्चर्य करीत
दूर गेला.

## अम्माऊसच्या वाटेवर

***(मार्क 16:12-13)***

13त्याच दिवशी त्यांच्यातील दोघे शिष्य यरुशलेमापासून
सुमारे दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या अम्माऊस
नावाच्या गावाला चालले होते. 14ते एकमेकांशी या
घडलेल्या सर्व गोष्टींविषयी बोलत होते. 15ते बोलत असताना
आणि या गोष्टींची चर्चा करीत असताना येशू स्वत: आला
आणि त्यांच्याबरोब चालू लागला. 16पण त्यांचे डोळे त्याला
ओळखण्यापासून बंद करण्यात आले होते. 17येशू त्यांना
म्हणाला, "चालत असताना तुम्ही एकमेकांबरोबर बोलत
आहात त्या गोष्टी कोणत्या आहेत?"
चालता चालता ते थांबले. ते अतिशय दु:खी दिसले.
18त्यांच्यातील एकजण ज्याचे नाव क्लयपा होते, तो त्याला
म्हणला, "ह्या दिवसांमध्ये घडलेल्या गोष्टी माहीत नसलेले
असे यरुशलेमात राहणारे तुम्ही एकटेच आहात काय?"
19येशू त्यांना म्हणाला, "तुमच्या मते कोणत्या गोष्टी?"
ते त्याला म्हणाले, "नासरेथकर येशूविषयीच्या सर्व गोष्टी.

हाच तो मनुष्य जो आपल्या कृत्यांनी आणि शब्दांनी
देवासमोर आणि मनुष्यांसमोर एक महान संदेष्टा झाला.
20आणि आम्ही चर्चा करीत होतो की, कसे आमच्या
प्रमुख याजकांनी आणि अधिकाऱ्यांनी त्याला मरणदंड
भोगण्यासाठी स्वाधीन केले. आणि त्यांनी त्याला वधस्तंभी
खिळले. 21आम्ही अशी आशा केली होती की, तोच एक
आहे जो इस्राएलाची मुक्तता करील. आणि या
सगव्व्याशिवाय हे सर्व घडून गेलेल्या गोष्टीला आज तीन
दिवस झालेत.

22"आणि आमच्या परिवारातील काही स्त्रियांनी
आम्हांला थक्क केले आहे: आज अगदी पहाटे त्या
कबरेकडे गेल्या, परंतु त्यांना त्याचे शरीर सापडले नाही.
23त्यांनी येऊन आम्हांला सांगितले की, त्यांना देवदूतांचा
दृष्टात घडला आणि देवदूतांनी सांगितले की, तो जिवंत
आहे. 24तेव्हा आमच्यातील काही कबरेकडे गेले, आणि
स्त्रियांनी जसे सांगितले होते, तसेच त्यांना आढळले, पण
त्यांनी त्याला पाहिले नाही."

25मग येशू त्यांना म्हणाला, "संदेष्ट्यांनी सांगितलेल्या
सर्व गोष्टींवर विश्वास ठेवण्यास तुम्ही अति मूर्ख आणि
मंद आहात. 26ख्रिस्तासाठी या सर्व गोष्टी सहन करणे
आणि त्याच्या गौरवात जाणे आवश्यक नव्हते काय?"
27आणि म्हणून त्याने मोशेपासून सुरूवात करून आणि
सर्व संदेष्ट्यांपर्यंत सांगून, पवित्र शास्त्रात त्याच्याविषयी
काय लिहिले आहे ते सर्व त्याने त्यांना स्पष्ट करून
सांगितले.

28ज्या खेड्याकडे ते जात होते, त्याच्याजवळ ते आले
आणि येशूने असा बहाणा केला की, जणू काय तो पुढे
जाणार आहे. 29परंतु जास्त आग्रह करून ते म्हणाले,
"आमच्या बरोबर राहा. कारण जवळजवळ संध्याकाळ
झालीच आहे. आणि दिवसही जवळजवळ मावळला आहे."
मग तो त्यांच्याबरोबर राहावयास आत गेला.

30जेव्हा तो त्यांच्याबरोबर जेवायला मेजासभोवती बसला,
त्याने भाकर घेतली आणि उपकार मानले. नंतर त्याने
ती मोडली व ती त्यांना तो देऊ लागला. 31तेव्हा त्यांचे
डोळे उघडले आणि त्यांनी त्याला ओळखले. पण तो
त्यांच्यातून अदृश्य झाला.

32मग ते एकमेकांना म्हणू लागले, "तो वाटेवर आपणाशी
बोलत असताना व पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्ट करून
सांगत असताना आपली अंत:करणे आतल्या आत उकळत
नव्हती काय?"

33मग ते लगेच उठले, व यरुशलेमेस परत गेले. तेव्हा
त्यांना अकरा प्रेषित व त्यांच्याबरोबर असलेले इतर एकत्र
जमलेले आढळले. 34प्रेषित आणि इतरजण म्हणाले,
"खरोखर प्रभु उठला आहे! आणि शिमोनाला दिसला
आहे."

35नंतर त्या दोन शिष्यांनी वाटेत काय घडले ते त्याला
सांगितले आणि तो भाकर मोडत असताना त्यांनी त्याला
कसे ओळखले ते सांगितले.

## येशू त्याच्या अनुयायांना दर्शन देतो

***(मत्तय 28:16-20; मार्क 16:14-18; योहान 20:19-23; प्रेषितांची कृत्ये 1:6-8)***

36ते या गोष्टी त्यांना सांगत असतानाच येशू त्यांच्यामध्ये
उभा राहिला आणि त्यांस म्हणाला, "तुम्हांस शांति असो."
37ते दचकले आणि भयभीत झाले. त्यांना असे वाटले
की, ते भूत पाहत आहेत. 38तो त्यांना म्हणाला, "तुम्ही
असे अस्वस्थ का झालात? तुमच्या मनात शंका का
निर्माण झाल्या? 39माझे हात व पाय पाहा. तुम्हाला मी
दिसतो तोच मी आहे. मला स्पर्श करा आणि पाहा की,
मला आहे तसे हाडमांस भुताला नसते. 40असे बोलून
त्याने त्यांस आपले हातपाय दाखवले. तरीही त्यांच्या
आनंदामुळे त्यांना ते खरे वाटेना. 41ते आश्चर्यचकित
झाले तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "येथे तुमच्याजवळ
खाण्यासाठी काय आहे?" 42त्यांनी त्याला भाजलेला
माशाचा तुकडा दिला. 43त्याने तो घेतला व त्यांच्यासमोर
खाल्ला.

44तो त्यांना म्हणाला, "ह्याच त्या गोष्टी ज्या मी
तुम्हांबरोबर असताना सांगितल्या होत्या की, मोशेचे
नियमशास्त्र, भविष्यवादी आणि स्तोत्रे ह्यात माझ्याविषयी
जे सांगितले आहे ते सर्व पूर्ण झालेच पाहिजे."

45नंतर पवित्र शास्त्र समजण्यासाठी त्याने त्यांची मने
उघडली. 46मग तो त्यांना म्हणाला, "असे लिहिले आहे
की, ख्रिस्ताने दु:ख भोगावे आणि मेलेल्यांतून तिसऱ्या
दिवशी उठावे. 47आणि यरुशलेमापासून सुरूवात करून
सर्व राष्ट्रांस माझ्या पित्याने जे वचन दिले आहे ते पाठवीन.
पापक्षमेसाठी पश्चात्तापाची घोषणा करावी. 48या गोष्टींचे
तुम्ही साक्षी आहात. 49आता मी तुम्हांला माझ्या पित्याने
जे वचन दिले आहे ते पाठवीन. परंतु जोपर्यंत
तुम्ही स्वर्गीय सामर्थ्याने भरले जात नाही तोपर्यंत तुम्ही या
शहरातच राहा."

## येशू परत स्वर्गात जातो

***(मार्क 16:19-20; प्रेषितांची कृत्ये 1:9-11)***

50नंतर तो त्यांना बाहेर दूरवर बेथानीपर्यंत घेऊन गेला
आणि त्याने हात वर करून आशीर्वाद दिला. 51तो त्यांना
आशीर्वाद देत असतानाच तो त्यांना सोडून गेला. आणि
त्याला स्वर्गात घेण्यात आले.

52नंतर त्यांनी त्याची उपासना केली व ते मोठ्या आनंदाने
यरुशलेमाला परतले. 53आणि देवाची सतत स्तुति करीत
ते मंदिरात राहिले.

# योहानाने लिहिलेले शुभवर्तमान

## येशू जगात येतो

1 जगाची उत्पत्ति होण्यापूर्वी शब्द* अस्तित्वात होता. तो शब्द देवाबरोबर होता, आणि शब्द देव होता. 2तो शब्द सुरूवातीपासूनच देवाबरोबर होता. 3त्याच्याद्वारे (शब्दाच्या) सर्व काही निर्माण करण्यात आले त्याच्याशिवाय काहीच निर्माण करण्यात आले नाही. 4त्याच्यामध्ये जीवन होते. ते जीवन जगातील लोकांसाठी प्रकाश (समजबुद्धी, चांगुलपण) असे होते. 5हा प्रकाश अंधारात प्रकाशतो. पण त्या प्रकाशाला अंधाराने पराभूत* केले नाही.

6योहान* नावाचा एक मनुष्य होता. देवाने त्याला पाठविले. 7तो लोकांना प्रकाशाविषयी (ख्रिस्ताविषयी) सांगण्यासाठी आला. यासाठी की, योहानाकडून प्रकाश ाविषयी ऐकून लोकांनी विश्वास ठेवावा. 8योहान तो प्रकाश नव्हता, परंतु लोकांना प्रकाशाविषयी सांगण्यासाठी योहान आला. 9खरा प्रकाश जगात येणार होता. हा प्रकाश सर्व लोकांना प्रकाश देतो. 10शब्द अगोदरच जगात होता. त्याच्याद्वारेच जग निर्माण झाले. परंतु जगाने त्याला ओळखले नाही. 11तो जगात आला. जे त्याचे स्वत:चे होते त्या लोकांकडे आला, परंतु त्याच्या स्वत:च्याच लोकांनी त्याला आपले मानले नाही. 12काही लोकांनी त्याला आपले मानले. त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना त्याने देवाची मुले होण्याचा हक्क दिला. 13ही मुले लहान बालके जन्मतात तशी जन्मली नाहीत. त्यांचा जन्म आईवडिलांच्या इच्छेने किंवा योजनेमुळे झाला नाही, तर त्यांचा जन्म देवाकडून झाला.

14शब्द मनुष्य झाला आणि आमच्यामध्ये राहिला. आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते देवपित्याच्या एकमेव अशा पुत्राचे गौरव ख्रिस्ताशिवाय दुसरे असू शकत नाही. तो शब्द कृपा (दयाळूपणा) आणि सत्य यांनी पूर्णपणे भरला होता. 15योहानाने त्याच्याविषयी लोकांना सांगितले. योहान म्हणाला, "ज्याच्याविषयी मी सांगत आहे तो हाच. मी म्हणालो, माझ्यानंतर येणारा माझ्याहून थोर आहे, तो माझ्या अगोदरपासून आहे."

16शब्द (ख्रिस्त) हा कृपा (दयाळूपणा) व सत्य यांनी पूर्णपणे भरला होता. त्याच्याकडून आम्हांला भरपूर आशीर्वाद मिळाले.

17मोशेद्वारे नियमशास्त्र दिले, पण दया व सत्याचा मार्ग ही येशू ख्रिस्ताद्वारे प्राप्त झाली. 18कोणाही मनुष्याने आतापर्यंत देवाला कधी पाहिले नाही. परंतु एकमेव देव (येशू) जो बापाच्या उराशी आहे, तो पुत्राद्वारे आम्हांला प्रकट झाला आहे.*

## योहान येशूविषयी लोकांना सांगतो

***(मत्तय 3:1-12; मार्क 1:2-8; लूक 3:15-17)***

19यरुशलेम येथील यहूदी लोकांनी योहानाकडे काही याजक व लेवी* ह्यांना पाठविले. "तू कोण आहेस?" हे विचारण्यासाठी यहूदी लोकांनी त्यांना पाठविले.

20योहान अगदी मोकळेपणाने बोलला. त्याने उत्तर देण्यास नकार दिला नाही. तो स्पष्टपणे म्हणाला, "मी ख्रिस्त* नाही." योहानाने लोकांना तेच सांगितले.

21यहूदी लोकांनी योहानाला विचारले, "तर मग तू कोण आहेस? तू एलीया* आहेस काय?"

योहानाने उत्तर दिले, "नाही, मी एलीया नाही." यहूदी लोकांनी विचारले, "तू संदेष्टा आहेस काय?" योहानाने म्हटले, "नाही, मी संदेष्टा नाही."

22यावर यहूदी लोक म्हणाले, "तू कोण आहेस?" तुझ्याविषयी आम्हांला सांग. ज्या लोकांनी आम्हांला पाठविले, त्यांना आम्ही काय उत्तर द्यावे हे तू आम्हांला सांग. तू स्वत:ला कोण म्हणवितोस?" 23योहानाने त्यांना यशया संदेष्ट्याच्या शब्दात सांगितले,

---

**शब्द** ग्रीक शब्द 'लोगोस' चे मराठी भाषांतर, या ठिकाणी याचा अर्थ ख्रिस्त. मूळ अर्थ कोणतेही भाषांतर.

**पराभूत** किंवा समजणे.

**योहान** बाप्तिस्मा करणारा योहान. याने येशूच्या येण्याविषयी संदेश दिला. (वाचा. मत्तय 3रा व लूक 3रा अध्याय).

**परंतु … आहे** किंवा "परंतु फक्त देवाचा पित्याच्या अगदी जवळचा आहे." काही ग्रीक प्रतीमध्ये, "फक्त पुत्रच पित्याच्या अगदी जवळचा आहे," असे म्हटेलेले आहे.

**लेवी** हे लेवी वंशातील लोक होते. ते यहूदी याजकांना मंदिराच्या कामात मदत करीत असत.

**ख्रिस्त** देवाचा अभिषिक्त (मशीहा) किंवा देवाचा निवडलेला.

**एलीया** इ. स. पू. 850 मध्ये होऊन गेलेला एक संदेष्टा, यहूदी लोकांची अशी अपेक्षा होती की, मशीहा येण्यापूर्वी एलीया येईल.

"मी वैराण रानात ओरडणाऱ्या मनुष्याची वाणी आहे:
'प्रभूसाठी सरळ मार्ग तयार करा.' " *यशाया 40:3*

24परूशी लोकांनी या यहूदी लोकांना पाठविले होते.
25हे लोक योहानाला म्हणाले, "तू म्हणतोस की, मी ख्रिस्त
नाही; मी एलीया नाही किंवा मी संदेष्टाही नाही, मग तू
लोकांचा बाप्तिस्मा का करतोस?"
26योहानाने उत्तर दिले, "मी लोकांचा बाप्तिस्मा पाण्याने
करतो. परंतु तुम्हांला माहीत नाही असा एक मनुष्य येथे
तुमच्यात आहे. 27माझ्यानंतर येणारा तो हाच मनुष्य आहे.
त्याच्या वहाणांचे बंद सोडण्याइतकीही माझी लायकी नाही."
28यार्देन नदीपलीकडील बेथानी गावात या सर्व गोष्टी
घडल्या. योहान तेथेच लोकांचा बाप्तिस्मा करीत असे.
29दुसऱ्या दिवशी योहानाने येशूला आपणांकडे येताना
पाहिले. योहान म्हणाला, "पाहा, हा देवाचा कोकरा. जगाचे
पाप वाहून नेणारा. 30याच्याविषयी मी बोलत होतो. मी
म्हणालो, 'माझ्यानंतर एक मनुष्य येणार आहे. परंतु तो
माझ्याहून थोर आहे. तो माझ्या अगोदरपासून आहे. तो
सदाजीवी आहे.' 31तो कोण होता हे मलाही माहीत नव्हते.
परंतु मी पाण्याने बाप्तिस्मा* करीत आलो यासाठी की,
येशू हाच ख्रिस्त आहे हे इस्राएलाला (यहूदी लोकांना)
कळावे."
32-33नंतर योहान म्हणाला, "ख्रिस्त कोण होता हे
मलाही माहीत नव्हते परंतु मी लोकांचा बाप्तिस्मा पाण्याने
करावा म्हणून देवाने मला पाठविले. आणि देवाने मला
सांगितले, "आत्मा खाली येऊन एका मनुष्यावर
स्थिरावताना दिसेल. तोच मनुष्य पवित्र आत्म्याने*
बाप्तिस्मा करील." योहान म्हणाला, "हे होताना मी पाहिले
आहे. स्वर्गातून पवित्र आत्मा खाली उतरताना मी पाहिला.
आत्मा कबुतरासारखा दिसत होता. आणि तो त्याच्यावर
(येशूवर) येऊन स्थिरावला. 34म्हणून मी लोकांना सांगतो:
'तो (येशू) देवाचा पुत्र आहे.' "

## येशूचे पहिले शिष्य

35दुसऱ्या दिवशी योहान पुन्हा तेथे आला. योहानाबरोबर
त्याचे दोन शिष्य होते. 36योहानाने येशूला जाताना पाहिले.
योहान म्हणाला, "पाहा हा देवाचा कोकरा!"*
37योहान हे बोलत असता त्या दोघा शिष्यांनी ऐकले,
म्हणून ते योहानाचे शिष्य येशूच्या मागे गेले. 38येशूने मागे
वळून पाहिले तो दोघेजण आपल्यामागे येत आहेत असे
त्याला दिसले. येशूने विचारले, "तुम्हांला काय पाहिजे?"
ते दोघे म्हणाले, "गुरूजी (रब्बी), तुम्ही कोठे राहता?"
39येशूने उत्तर दिले, "माझ्याबरोबर या म्हणजे तुम्हांला
दिसेल." तेव्हा ते दोघेजण येशूबरोबर गेले. येशू राहत
होता ती जागा त्यांनी पाहिली. ते त्या दिवशी येशूबरोबर
तेथे राहिले. त्यावेळी सुमारे दुपारचे चार वाजले होते.
40येशूविषयी योहानाकडून ऐकल्यावर ते दोघे जण
येशूच्या मागे गेले. त्यांच्यापैकी एकाचे नाव अंद्रिया होते.
अंद्रिया हा शिमोन पेत्राचा भाऊ. 41अंद्रियाने पहिली गोष्ट
ही केली की, आपला भाऊ शिमोन याला शोधून काढले.
अंद्रिया शिमोनाला म्हणाला, "आम्हांला मशीहा सापडला
आहे."
42शिमोनाला घेऊन अंद्रिया येशूकडे आला. शिमोनाकडे
पाहून येशू म्हणाला, "तू योहानाचा पुत्र शिमोन आहेस.
तुला केफा* म्हणतील." 43दुसऱ्या दिवशी येशूने गालील
प्रांतात जाण्याचे ठरविले. तेव्हा तो फिलिप्पाला भेटला.
येशू त्याला म्हणाला, "माझ्यामागे ये."
44जसे अंद्रिया व पेत्र तसाच फिलिप्पही बेथसैदा या
गावचा होता. 45फिलिप्प नथनेलास भेटला व म्हणाला,
"मोशेने नियमशास्त्रात जे लिहिले आहे त्याची आठवण
कर. जो येणार आहे त्या मनुष्याविषयी मोशेने व
संदेष्ट्यांनीही लिहिले. तो आम्हांला सापडला आहे. त्याचे
नाव येशू आहे. तो योसेफाचा पुत्र असून नासरेथ गावचा
आहे."
46परंतु नथनेल फिलिप्पाला म्हणाला, "नासरेथ!
नासरेथमधून काही चांगले निघेल काय?" फिलिप्प
म्हणाला, "येऊन पहा."
47येशूने नथनेलाला आपल्याकडे येताना पाहिले. येशू
म्हणाला, "हा येत असलेला मनुष्य खरोखर देवाच्या
लोकांपैकी एक आहे. त्याच्यात खोटे काहीच नाही."
48"तुम्ही मला कसे ओळखता?" नथनेलाने विचारले.
येशूने उत्तर दिले, "तू अंजिराच्या झाडाखाली उभा होता.
तेव्हाच मी तुला पाहिले. फिलिप्पने तुला माझ्याविषयी
सांगण्यापूर्वीच."
49मग नथनेल येशूला म्हणाला, "रब्बी (गुरूजी) तुम्ही
देवाचे पुत्र आहात. तुम्ही इस्राएलाचे राजे आहात.
50येशू नथनेलला म्हणाला, "तू अंजिराच्या झाडाखाली
उभा असतानाच मी तुला पाहिले, असे मी सांगितले म्हणून
तुझा माझ्यावर विश्वास बसला. परंतु यापेक्षा मोठमोठ्या
गोष्टी तू पाहशील!" 51येशू पुढे म्हणाला, "खरे तेच मी
तुला सांगतो. स्वर्ग उघडलेला तुम्ही सर्व जण पाहाल.
देवदूत वर चढताना आणि मनुष्याच्या पुत्रावर खाली
उतरताना तुम्ही पाहाल."*

---

**बाप्तिस्मा** ग्रीक शब्द. याचा अर्थ एखादी व्यक्ति किंवा वस्तु काही वेळ पाण्याखाली बुडविणे.

**पवित्र आत्मा** याला देवाचा आत्मा, ख्रिस्ताचा आत्मा व सांत्वन करणारा म्हणतात. देव व ख्रिस्त यांच्यासह असलेला व तो जगामध्ये देवाचे कार्य करतो.

**देवाचा कोकरा** येशूचे नाव, येशू जणू कोकरा असून देवाला तो अर्पण केला आहे.

**केफा** ग्रीकमध्ये पेत्र व अरेमी केफायाचा अर्थ 'खडक'.

**देवदूत ... पाहाल** उत्पत्ति 28:12

## काना येथील लग्न

2 दोन दिवसांनी गालीलातील काना गावी एक लग्न
होते. येशूची आई तेथे होती. 2येशू व त्याचे शिष्य
यांनाही लग्नाला बोलाविले होते. 3लग्नात पुरेसा द्राक्षारस
नव्हता. सगळा द्राक्षारस संपला. तेव्हा येशूची आई त्याला
म्हणाली, "त्यांच्याजवळ द्राक्षारस नाही."

4येशूने उत्तर दिले, "आई, तू मला यात का गुंतवितेस?
माझी वेळ अजून आलेली नाही."

5येशूची आई नोकरांना म्हणाली, "येशू तुम्हांला सांगेल
तसे करा."

6त्या ठिकाणी दगडाचे सहा मोठे रांजण होते. यहूदी
लोक विशेष विधीप्रसंगी धुण्यासाठी* पाणि ठेवण्यासाठी
हे रांजण वापरीत असत. प्रत्येक रांजणात वीस ते तीस
बादल्या पाणी मावत असे.

7येशू नोकरांना म्हणाला, "हे रांजण पाण्याने भरा."
मग नोकरांनी ते रांजण काठोकाठ भरले. 8मग येशू
नोकरांना म्हणाला, "आता यातील काही पाणी काढा
आणि ते भोजनप्रमुखाकडे न्या."

मग नोकर ते पाणी घेऊन भोजनप्रमुखाकडे गेले. 9मग
लग्नसमारंभातील भोजनप्रमुखाने ते चाखून पाहिले, तर
पाण्याचा द्राक्षारस झालेला होता. तो द्राक्षारस कोठून आला
हे त्या माणसाला माहीत नव्हते. परंतु ज्या नोकरांनी ते
पाणी नेले होते त्यांना तो द्राक्षारस कोठून आला होता हे
माहीत होते. लग्नसमारंभाच्या भोजनप्रमुखाने वराला
बोलाविले.

10तो वराला म्हणाला, "लोक नेहमी उत्तम द्राक्षारस
पहिल्यांदा वाढतात. नंतर पाहुणे भरपूर प्याले म्हणजे मग
लोक हलक्या प्रतीचा वाढतात. परंतु तू तर उत्तम द्राक्षारस
अजून राखून ठेवला आहेस."

11स्वर्गीय सामर्थ्याचे चिन्ह म्हणून येशूने केलेला हा
पहिला चमत्कार होता. गालीलातील काना येथे येशूने हा
चमत्कार केला. आणि येशूने आपली महानता दाखवून
दिली. तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.

## येशू मंदिरात जातो

***(मत्तय 21:12-13; मार्क 11:15-17; लूक 19:45-46)***

12नंतर येशू कफर्णहूम गावी गेला. येशूची आई, भाऊ
व त्याचे शिष्य त्याच्यासोबत गेले. ते सर्व काही दिवस
कफर्णहूमास राहिले. 13यहूदी लोकांचा वल्हांडण सण अगदी
जवळ आला होता, म्हणून येशू यरुशलेमला गेला. 14येशू
यरुशलेम येथील मंदिरात गेला. येशूला मंदिरात गुरे, मेंढ्या
आणि कबुतरे विकणारी माणसे दिसली. काही माणसे
मेज मांडून बसल्याचे त्याने पाहिले. ती माणसे लोकांना
पैसे बदलून देण्याचा व्यापार करीत होती. 15येशूने दोऱ्यांचे
तुकडे जोडून एक चाबूक तयार केला. मग येशूने त्या
सर्वांना तसेच मेंढ्यांना व गुरांना मंदिरातून हाकलून दिले.
लोकांच्या पैशाचा व्यापार करणाऱ्यांचे मेज उलथेपालथे
केले आणि त्यांचे पैस विस्कटून टाकले. 16येशू कबुतरे
विकणाऱ्यांना म्हणाला, "या सर्व गोष्टी येथून घेऊन जा.
माझ्या पित्याचे घर विकणाऱ्याची व विकत घेणाऱ्याची
बाजारपेठ बनवू नका!"

17हे घडले तेव्हा येशूच्या शिष्यांना पवित्र शास्त्रात जे
लिहिले होते त्याची आठवण झाली:

"तुझ्या मंदिराच्या आवेशाने मला ग्रासून टाकले जाईल"
*स्तोत्र. 69:9*

18यहूदी लोक येशूला म्हणाले, "एखादा चमत्कार करून
आम्हांला चिन्ह दाखवा. आणि या गोष्टी करण्याचा तुम्हांला
अधिकार आहे हे सिद्ध करा."

19येशूने उत्तर दिले, "हे मंदिर नष्ट करा म्हणजे मी ते
तीन दिवसांत पुन्हा उभारीन."

20यहूदी लोक म्हणाले, "लोकांना हे मंदिर बांधण्यासाठी
शेहेचाळीस वर्षे लागली! आणि तुम्ही ते तीन दिवसांत
बांधू शकता यावर तुमचा खरोखरच विश्वास आहे काय?"

21(परंतु येशू मंदिराविषयी म्हणजे स्वतःच्या शरीराविषयी
बोलला. 22नंतर येशू मेलेल्यांतून पुन्हा उठविला गेला,
तेव्हा त्याच्या शिष्यांना तो हे बोलल्याचे आठवले. आणि
त्याच्या शिष्यांनी त्याच्याविषयी लिहिलेल्या पवित्र शास्त्रावर
आणि जे शब्द येशू बोलला त्यावर विश्वास ठेवला.)
23वल्हांडण सणासाठी येशू यरुशलेमात होता. पुष्कळ
लोकांनी येशूवर विश्वास ठेवला कारण तो करीत असलेले
चमत्कार त्यांनी पाहिले. 24परंतु येशूने त्यांच्यावर भरवसा
ठेवला नाही. कारण येशूला त्यांचे विचार माहीत होते.
25लोकांविषयी कोणी येशूला सांगावे याची त्याला काहीच
गरज नव्हती. लोकांच्या मनात काय आहे हे येशू जाणून
होता.

## येशू आणि निकदेम

3 निकदेम नावाचा एक मनुष्य होता. निकदेम परूशी
लोकांपैकी एक असून तो यहूदी लोकांचा एक
महत्त्वाचा पुढारी होता. 2एका रात्री निकदेम येशूकडे आला
आणि म्हणाला, "रब्बी, तुम्ही देवाकडून पाठविलेले शिक्षक
आहात हे आम्हांला माहीत आहे. कारण तुम्ही जे चमत्कार
करता ते देवाच्या मदतीशिवाय कोणाही माणसाला करता
येणार नाहीत."

3येशूने उत्तर दिले, "मी तुम्हांला खरे सांगतो. प्रत्येक
व्यक्तीचा नव्याने जन्म झालाच पाहिजे. जर एखाद्या माणसाचा
नव्याने जन्म झाला नाही, तर देवाचे राज्य पाहू शकणार
नाही."

---

**विधीप्रसंगी धुण्यासाठी** यहूदी लोकांचे धुण्यासंबंधीचे विशेष
नियम होते. म्हणजे जेवणापूर्वी, उपासनेपूर्वी व इतर विशेष
प्रसंगी.

4निकदेम म्हणाला, “जर एखादा माणूस म्हातारा असेल
तर त्याचा नव्याने जन्म कसा होईल? तो आपल्या आईच्या
उदरात परत जाऊ शकत नाही! म्हणून त्या व्यक्तीचा
दुसऱ्यांदा जन्म होणारच नाही!”
5येशूने उत्तर दिले, “मी तुम्हांला खरे सांगतो : मनुष्याचा
पाण्याने आणि आत्म्याने जन्म झाला नाही तर त्याचा
देवाच्या राज्यात प्रवेश होणे शक्यच नाही. 6मनुष्य मानवी
आईवडिलांच्या उदरी जन्माला येतो. परंतु त्याच्या आत्मिक
जीवनाचा जन्म पवित्र आत्म्यापासून होतो. 7तुमचा नवीन
जन्म झाला पाहिजे म्हणून मी तुम्हांला सांगितल्याबद्दल
आश्चर्यचकित होऊ नका. 8वाऱ्याला वाहायला पाहिजे
तिकडे तो वाहतो. वारा वाहताना तुम्हांला त्याचा आवाज
ऐकू येतो. परंतु वारा कोठून येतो व कोठे जातो हे तुम्हांला
कळत नाही. आत्म्यापासून जन्म पावलेल्या प्रत्येक माणसाचे
असेच असते.”
9निकदेम म्हणाला, “हे सारे कसे शक्य आहे?”
10येशू म्हणाला, “तुम्ही इस्राएलाचे प्रमुख शिक्षक आहात.
तरीही तुम्हांला या गोष्टी कळत नाहीत काय? 11मी तुम्हांला
खरे तेच सांगतो. आम्हांला जे माहीत आहे त्याविषयी
आम्ही बोलतो. जे पाहिले त्याविषयी आम्ही सांगतो. परंतु
आम्ही जे सांगतो ते तुम्ही लोक मानीत नाही. 12मी तुम्हांला
जगातील गोष्टींविषयी सांगितले पण तुमचा माझ्यावर
विश्वास बसत नाही. मग जर मी तुम्हांला स्वर्गातील
गोष्टींविषयी सांगितले तर तुम्ही विश्वास ठेवणारच नाही!
13मनुष्याचा पुत्र असा एकमेव आहे जो वर स्वर्गात जेथे
होता तेथे गेला आणि स्वर्गातून उतरून खाली आला.”
14“मोशेने अरण्यात असताना सापाला उंच केले.*
मनुष्याच्या पुत्रालाही तसेच उंच केले पाहिजे. 15अशासाठी
की जो कोणी मनुष्याच्या पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला
अनंतकाळचे जीवन मिळू शकते.”
16होय, देवाने जगावर एवढी प्रीति केली की त्याने
आपला एकुलता एक पुत्र दिला. देवाने आपला पुत्र यासाठी
दिला की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा
नाश होऊ नये तर त्याला अनंतकाळचे जीवन मिळावे.
17देवाने आपल्या पुत्राला जगात पाठविले. जगाचा न्याय
करण्यासाठी देवाने आपला पुत्र पाठविला नाही, तर
आपल्या पुत्राद्वारे जगाचे तारण व्हावे यासाठी देवाने त्याला
जगात पाठविले. 18जो कोणी देवाच्या पुत्रावर विश्वास
ठेवतो त्याचा न्याय (दोषी ठरविले जाणे) होणार नाही.
परंतु जो विश्वास ठेवीत नाही त्याचा न्याय झाल्यासारखाच
आहे. कारण त्याने देवाच्या एकुलत्या एका पुत्रावर विश्वास
ठेवला नाही. 19ज्या वस्तुस्थितीच्या आधारे लोकांचा न्याय
केला जातो ती ही जगामध्ये प्रकाश आला परंतु लोकांना
प्रकाश नको होता. त्यांना अंधार पाहिजे होता. कारण
लोक वाईट कृत्ये करीत होते. 20वाईट कृत्ये करणारा
प्रत्येक जण प्रकाशाचा द्वेष करतो. तो प्रकाशाकडे येत
नाही. कारण त्याने केलेली सर्व वाईट कृत्ये तो प्रकाश
उघड करील. 21परंतु जो सत्य मार्गाने चालतो तो
प्रकाशाकडे वळतो. आणि त्याने केलेली कामे देवाकडून
झाली होती हे तो प्रकाश दाखवून देईल. *

## येशू आणि बाप्तिस्मा करणारा योहान

22त्यानंतर येशू आणि त्याचे शिष्य यहूदीया प्रांतात गेले.
तेथे येशू आपल्या शिष्यांसह राहिला आणि लोकांचे
बाप्तिस्मे केले. 23योहान हा एनोन गावात लोकांचा
बाप्तिस्मा करीत असे. एनोन गाव शालिमनगराजवळ
आहे. तेथे भरपूर पाणी असल्याने योहान लोकांचा बाप्तिस्मा
तेथे करीत असे. बाप्तिस्मा करून घेण्यासाठी लोक तेथे
येत असत. 24(योहान तुरूंगात जाण्याच्या अगोदर हे घडले.)
25योहानाच्या काही शिष्यांचा दुसऱ्या यहूदी लोकांशी
वादविवाद झाला. नियमशास्त्रात सांगितलेल्या
शुद्धीकरणाच्या विधीविषयी ते वाद घालीत होते. 26म्हणून
ते शिष्य योहानाकडे आले व म्हणाले, रब्बी, यार्देन नदीच्या
पलीकडे जो मनुष्य तुमच्याबरोबर होता तो आठवतो?
तुम्ही त्याच्याविषयी साक्ष देखील दिली. तो मनुष्य लोकांना
बाप्तिस्मा देत आहे. व पुष्कळजण त्याच्याकडे जात आहेत.
27योहानाने उत्तर दिले, “देव जे देतो तेच माणसाला
मिळते. 28मी हे सांगताना तुम्ही स्वत:च ऐकले आहे की,
‘मी ख्रिस्त नाही. त्याच्याकरिता मार्ग तयार करण्यासाठी
देवाने ज्याला पुढे पाठविले तो मी आहे.’ 29ज्याला वधू
असते तो वर असतो. वराला मदत करणारा वराचा मित्र
वराची वाट पाहतो आणि वेगळ्या आवाजामुळे त्याच्या
येण्याची चाहूल लागते काय, ते कान देऊन ऐकतो. वराची
वाणी आली म्हणजे त्याच्या मित्राला आनंद होतो. तसाच
आनंद मला वाटत आहे. आणि माझ्या आनंदाची वेळ
आता आलेली आहे. 30तो महान व्हावा आणि मी लहान
व्हावे हे योग्यच आहे.”

## स्वर्गातून येणारा

31“जो (येशू) वरून येतो तो इतर सर्वांहून थोर आहे.
जो मनुष्य या जगापासून आला आहे तो जगाचा आहे. तो
जगातल्याच गोष्टींविषयी बोलतो, परंतु जो स्वर्गातून आला
तो (येशू) इतर लोकांहून थोर आहे. 32त्याने जे ऐकले व
पाहिले त्याविषयी सांगतो. परंतु तो सांगतो त्या गोष्टी कोणी
स्वीकारीत नाहीत. 33तो (येशू) जे सांगतो ते मान्य करणारा
माणूस, देव सत्य आहे याचा पुरावाच देतो. 34देवाने त्याला

---

**मोशेने … केले** जेव्हा देवाचे लोक साप चावल्यामुळे मरत होते. देवाने मोशेला पितळेचा साप करून एका खांबावर उंच करायला सांगितले. यासाठी की लोकांनी त्याकडे पाहावे व आरोग्य प्राप्त करून घ्यावे. गणना 21:4-9

**वचने 16-21** काही विद्वानांचे मत असे आहे की, ही वचने येशूचे शब्द आहेत. काही म्हणतात ती योहानाने लिहिली.

(येशूला) पाठविले. आणि देव सांगतो त्याच गोष्टींविषयी
तो सांगतो. कारण देव त्याला आत्म्याने पूर्णपणे भरतो.
35पिता पुत्रावर प्रीति करतो. पित्याने सर्व गोष्टींवरील
अधिकार पुत्राला दिलेला आहे. 36जो कोणी पुत्रावर
विश्वास ठेवतो त्याला अनंतकाळचे जीवन मिळते. परंतु
जो पुत्राची आज्ञा पाळीत नाही त्याला अनंतकाळचे जीवन
कधीही मिळणार नाही. उलट देवाचा क्रोध त्याच्यावर
राहतो."

## येशू शोमरोनी स्त्रीशी बोलतो

4 परूश्यांनी हे ऐकले की, येशू योहानापेक्षा अधिक
लोकांना बाप्तिस्मा देऊन शिष्य करून घेत आहे.
2(परंतु खरे पाहता, येशू स्वत: बाप्तिस्मा देत नसे, तर
त्याचे शिष्य त्याच्या वतीने लोकांना बाप्तिस्मा देत असत.)
परूश्यांनी आपणांविषयी ऐकले आहे हे येशूला समजले.
3म्हणून येशू यहूदीयातून निघून परत गालील प्रांतात गेला.
4गालीलाकडे जाताना येशूला शोमरोन प्रांतातून जावे
लागले.

5शोमरोनातील सूखार नावाच्या गावात येशू आला.
याकोबाने आपला मुलगा योसेफ याला दिलेल्या शेताजवळ
हे गाव आहे. 6याकोबाची विहीर तेथे होती. लांबच्या
प्रवासामुळे येशू थकला होता. म्हणून येशू विहीरीजवळ
बसला. ती दुपारची वेळ होती. 7तेव्हा पाणी नेण्यासाठी
एक शोमरोनी* स्त्री त्या विहीरीवर आली. येशू तिला
म्हणाला, "मला प्यावयास पाणी दे." 8हे घडले तेव्हा येशूचे
शिष्य अन्न विकत घेण्यासाठी गावात गेले होते.

9ती शोमरोनी स्त्री म्हणाली, "तुम्ही यहूदी आहात आणि
मी तर एक शोमरोनी स्त्री आहे. तुम्ही माझ्या हातून पाणी
प्यावयास मागता याचे मला मोठे आश्चर्य वाटते." (यहूदी
लोकांचे शोमरोनी लोकांशी सलोख्याचे संबंध नव्हते.*)

10येशूने उत्तर दिले, "देव काय दान देतो याविषयी तुला
माहीत नाही आणि तुझ्या हातून पाणि मागणारा कोण हे
देखील तुला माहीत नाही. तुला जर या गोष्टी माहीत
असत्या तर तूच माझ्याकडे मागितले असतेस. आणि मी
तुला जिवंत पाणी दिले असते."

11ती स्त्री म्हणाली, "महाराज, जिवंत पाणी तुम्हांला
कोठून मिळणार? विहीर तर फार खोल आहे. आणि
पाणी काढण्यासाठी तुमच्याजवळ पोहरा वगैरे काही नाही.
12आमचा पिता (पूर्वज) याकोब याच्यापेक्षाही तुम्ही मोठे
आहात काय? याकोबानेच ही विहीर आम्हांला दिली. ते
स्वत: या विहीरीचे पाणी पीत असत. शिवाय त्यांची मुले
व गुरेढोरे याच विहीरीचे पाणी पीत असत."

13येशू म्हणाला, "जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा
तहान लागेल. 14परंतु मी जे पाणी देतो ते पाणी जो पिईल
त्याला कधीही तहान लागणार नाही. मी दिलेले पाणी
त्याच्या अंतर्यामी जिवंत पाण्याच्या झऱ्यासारखे होईल.
त्या पाण्यामुळे त्याला अनंतकाळचे जीवन मिळेल."

15ती स्त्री येशूला म्हणाली, महाराज, "ते पाणी मला द्या,
म्हणजे मला पुन्हा तहान लागणार नाही. आणि पाणी
आणण्यासाठी मला इकडे परत यावे लागणार नाही."

16येशूने तिला सांगितले, "जा, तुझ्या पतीला घेऊन
इकडे ये!"

17ती स्त्री म्हणाली, "मला पती नाही." येशू तिला म्हणाला,
"हे तू बरोबर सांगितलेस की, तुला नवरा नाही. 18खरे
तर तुझे पाच पती झाले. आणि आता तू ज्याच्याबरोबर
राहतेस तो तुझा पती नाही. तेव्हा तू मला सत्यच सांगितलेस."

19ती स्त्री म्हणाली, "महाराज, मला आता कळले की,
तुम्ही एक संदेष्टा आहात. 20आमचे वाडवडील या डोंगरावर
उपासना करीत. परंतु तुम्ही यहूदी लोक म्हणता की,
यरुशलेम हीच ती जागा आहे जेथे लोकांनी उपासना
केली पाहिजे."

21येशू म्हणाला, "बाई, माझ्यावर विश्वास ठेव! अशी
वेळ येत आहे की, आपल्या पित्याची (देवाची) उपासना
करण्यासाठी यरुशलेमला अगर या डोंगरावर जाण्याची
गरज पडणार नाही. 22जे तुम्हांला समजत नाही त्याची
तुम्ही शोमरोनी उपासना करता. आम्ही यहूदी लोक
कशाची उपासना करतो हे आम्हांला चांगले कळते, कारण
यहूदी लोकांकडूनच तारण येते. 23असा काळ येत आहे
की, खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना
करतील. तशी वेळ आता आलेली आहे. आणि तशाच
प्रकारचे उपासक पित्याला पाहिजेत. 24देव आत्मा आहे.
म्हणून त्याच्या उपासकांनी आत्म्याने व खरेपणाने त्याची
उपासना केली पाहिजे."

25ती स्त्री म्हणाली, "मशीहा येणार आहे हे मला माहीत
आहे. मशीहा येईल तेव्हा तो आम्हांला प्रत्येक गोष्ट
समजावून सांगेल." 26येशू म्हणाला, "ती व्यक्ति तुझ्याशी
आता बोलत आहे. मीच तो मशीहा आहे."

27तेवढ्यात येशूचे शिष्य गावातून परत आले. येशू एका
बाईशी बोलत आहे हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. परंतु
"तुम्हांला काय पाहिजे?" अगर "तुम्ही तिच्याशी का बोलत
आहात?" असे त्यांच्यापैकी एकानेही विचारले नाही.

28मग ती स्त्री आपली पाण्याची घागर तशीच विहिरीवर
सोडून परत गावात गेली. तिने गावांतील लोकांना सांगितले,
29एका मनुष्याने मी आतापर्यंत जे काही केलेले आहे ते
सर्व सांगितले. त्याला भेटायला चला. कदाचित तो ख्रिस्त
असेल.

30मग लोक गावातून बाहेर पडले आणि येशूला भेटायला
आले. 31ती स्त्री गावात होती तेव्हा येशूचे शिष्य त्याला
विनवणी करू लागले, "गुरुजी, दोन घास खाऊन घ्या!"

---

**शोमरोनी** हे लोक शोमरोन प्रांताचे. हे काही प्रमाणात यहूदी होते. परंतु यहूदी तसे त्यांना स्वीकारीत नव्हते.

**यहूदी ... नव्हते** याचा असाही अर्थ होऊ शकतो की, शोमारोनी लोक ज्या वस्तु वापरीत त्या वस्तू यहूदी लोक वापरीत नसत.

32परंतु येशूने उत्तर दिले, “माझ्याजवळ खावयाला जे
अन्न आहे त्याविषयी तुम्हांला काहीच माहिती नाही.”
33म्हणून शिष्य एकमेकांना विचारू लागले, “येशूला
कोणीतरी अगोदरच काही खावयास आणून दिले काय?”
34येशू म्हणाला, “ज्याने मला पाठविले त्याच्या इच्छेप्रमाणे
करणे हेच माझे अन्न! त्याने मला दिलेले काम पूर्ण
करणे हेच माझे अन्न होय. 35जेव्हा तुम्ही पेरणी करता
तेव्हा तुम्ही नेहमी म्हणता, ‘पीक गोळा करायला अजून
चार महिने आहेत.’ परंतु मी तुम्हांला सांगतो, तुम्ही तुमचे
डोळे उघडा. लोकांकडे पाहा. पीक तयार असलेल्या
शेतांसारखेच ते आहेत. 36आताही पीक कापणाऱ्या
मजुराला मजुरी दिली जात आहे. तो अनंतकाळासाठी
पीक गोळा करीत आहे. म्हणून आता पेरणी करणारा
कापणी करणारासह आनंदी आहे. 37‘एक पेरणी करतो
तर दुसरा कापणी’ असे जे आपण म्हणतो ते किती खरे
आहे. 38ज्या पीकासाठी तुम्ही मेहनत केली नाही, त्याची
कापणी करण्यासाठी मी तुम्हांस पाठविले. दुसऱ्या लोकांनी
काम केले आणि त्यांनी केलेल्या श्रमाचा फायदा तुम्हांस
मिळतो.”

39त्या गावातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी येशूवर
विश्वास ठेवला. त्या स्त्रीने येशूविषयी जे सांगितले त्यावरून
त्यांनी विश्वास ठेवला. तिने त्यांना सांगितले होते,“ मी
केलेली प्रत्येक गोष्ट त्याने मला सांगितली.” 40शोमरोनी
लोक येशूकडे आले. त्यांनी येशूला त्यांच्याबरोबर
राहण्याची विनंती केली. म्हणून येशू तेथे दोन दिवस
राहिला. 41आणखी पुष्कळ लोकांनी येशूच्या शिक्षणामुळे
विश्वास ठेवला. 42ते लोक त्या स्त्रीला म्हणाले, “पहिल्यांदा
तू जे आम्हांला सांगितलेस त्यामुळे आम्ही येशूवर विश्वास
ठेवला. परंतु आता आम्ही स्वत:च त्याचे बोलणे ऐकले
त्यामुळे विश्वास ठेवतो. आता आम्हांला कळले की,
खरोखर हाच मनुष्य जगाचे तारण करील.”

## येशू अधिकाऱ्याच्या मुलाला बरे करतो
### (*मत्तय 8:5-13; लूक 7:1-10*)

43दोन दिवसांनी येशू तेथून निघाला आणि गालील
प्रांतात गेला. 44(पूर्वीच येशू म्हणाला होता की, संदेष्ट्याला
त्याच्या देशात मान मिळत नाही.) 45येशू जेव्हा गालीलात
आला तेव्हा तेथील लोकांनी त्याचे स्वागत केले. वल्हांडण
सणाच्या दिवसात यरुशलेम येथे येशूने केलेली सर्व कामे
लोकांनी पाहिली होती. कारण ते लोकही सणानिमित्त
तेथे गेले होते.

46येशू पुन्हा गालीलातील काना गावाला भेट देण्यास
गेला. काना गावीच येशूने पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर
केले होते. तेथे राजाचे जे मुख्य अधिकारी होते त्यापैकी
एक अधिकारी कफर्णहूम नगरात राहत होता. या माणसाचा
मुलगा आजारी होता. 47येशू यहूदीयातून आला आहे आणि
आता तो गालीलातच आहे हे त्या अधिकाऱ्याने ऐकले.
म्हणून तो मनुष्य येशूकडे काना गावी गेला. येशूने
कफर्णहूम येथे येऊन आपल्या मुलाला बरे करावे म्हणून
त्याने याचना केली. कारण त्याचा मुलगा जवळजवळ
मेला होता. 48येशू त्याला म्हणाला, “चमत्कार आणि
अद्भुत कामे पाहिली तरच तुम्ही लोक माझ्यावर विश्वास
ठेवाल.”

49राजाचा अधिकारी म्हणाला, “महाराज, माझा लहान
मुलगा मरण्यापूर्वी माझ्या घरी चला.
50येशूने उत्तर दिले, “जा, तुझा मुलगा वाचेल.”
येशूने सांगितले त्यावर विश्वास ठेवून तो मनुष्य घरी
गेला. 51तो घरी चाललेला असताना वाटेतच त्याचे नोकर
त्या माणसाला भेटले. त्यांनी त्याला सांगितले, “तुमचा
मुलगा बरा आहे.”

52त्या मनुष्याने विचारले, “माझ्या मुलाला कधीपासून
बरे वाटू लागले ?”

नोकर म्हणाले, “काल दुपारी एक वाजण्याच्या सुमारास
त्याचा ताप उतरला.”

53“तुझा मुलगा वाचेल” असे एक वाजण्याच्या सुमारासच
येशूने सांगितले होते, हे त्या मुलाच्या वडिलांना माहीत
होते. म्हणून त्याने व त्याच्या घरातील सर्वांनी येशूवर
विश्वास ठेवला. 54यहुदीयातून गालील प्रांतात आल्यानंतर
येशूने केलेला हा दुसरा चमत्कार.

## तळ्याकाठच्या रोग्याला येशू बरे करतो

5 नंतर एका यहुदी सणासाठी येशू यरुशलेमला गेला.
2यरुशलेमात एक तळे आहे. त्या तळ्याला लागून
पाच पडव्या आहेत. (होत्या) यहूदीभाषेत* त्या तळ्याला
बेथेझाथा* म्हणत. हे तळे मेंढरे नावाच्या वेशीजवळ
आहे. 3तळ्यालगतच्या पडव्यामध्ये अनेक रोगी पडून
असत. त्यात काही आंधळे, लंगडे व काही पांगळे होते.*
4कारण की देवदूत वेळोवेळी तळ्यात उतरून पाणी हालवीत
असे आणि पाणी हालविल्यानंतर प्रथम जो त्यात जाई
त्याला कोणताही रोग असेला तरी तो बरी होत असे.
5तेथे अडतीस वर्षे आजारी असलेला एक रोगी पडून
होता. 6येशूने त्याला तेथे पडलेले पाहिले. तो मनुष्य तेथे
बराच काळ पडून असावा हे येशूने ओळखले. म्हणून
येशूने त्या मनुष्याला विचारले, “तुला बरे व्हावयाला पाहिजे
का?”

---

**यहूदी भाषा** अरेमी, (हिब्रू) भाषा, पहिल्या शतकात.

**बेथेझाथा** बेथसैदा किंवा बेतेस्दा असेही म्हणतात.

**वचन 3** काही ग्रीक आवृत्त्यांत असे लिहिले आहे, ‘आणि ते पाणी हलण्याची वाट पाहू लागले.’ काही नंतरच्या आवृत्यांमध्ये चवथे वचन असे ही लिहिले आहे. ‘काही वेळा देवाचा दूत तळ्याकाठी येई व पाणी हलवी. देवाच्या दूताने असे केल्यानंतर जो कोणी रोगी प्रथम उतरत असे त्याला कोणताही रोग असला तरी तो बरा होत असे.

7त्या आजारी मनुष्याने उत्तर दिले, “महाराज, पाणी
हालते तेव्हा त्यात घेऊन जाण्यासाठी माझ्याजवळ कोणीच
व्यक्ति नाही. सर्वांत अगोदर पाण्यात उतरण्यासाठी मी
निघालो की, माझ्या अगोदर दुसराच रोगी पाण्यात उतरतो.”
8मग येशू म्हणाला, “उठून उभा राहा! आपली खाट
उचल आणि चालू लाग.” 9तेव्हा तो रोगी ताबडतोब बरा
झाला, तो आपली खाट उचलून चालू लागला.
हे सर्व ज्या दिवशी घडले तो शब्बाथाचा दिवस होता.
10म्हणून बऱ्या झालेल्या त्या मनुष्याला यहुदी म्हणाले,
“आज शब्बाथाचा दिवस आहे. शब्बाथाच्या दिवशी तू
आपली खाट उचलून नेणे आपल्या नियमशास्त्राच्या विरुद्ध
आहे.”
11परंतु तो मनुष्य म्हणाला, “ज्याने मला बरे केले,
त्यानेच मला सांगितले की, तू आपली खाट उचल आणि
चालू लाग.”
12यहुदी लोकांनी त्या मनुष्याला विचारले, “तुला आपली
खाट उचलून चालायला कोणी सांगितले?” 13परंतु तो
कोण होता हे त्या बऱ्या झालेल्या माणसाला माहीत नव्हते
त्या ठिकाणी बरेच लोक होते, आणि येशू तेथून निघून
गेला होता.
14त्यानंतर तो मनुष्य येशूला मंदिरात भेटला. तेव्हा
येशू त्याला म्हणाला, “पाहा, आता तू बरा झाला आहेस.
पण पाप करण्याचे सोडून दे. नाही तर तुझे अधिक वाईट
होईल!”
15नंतर तो मनुष्य तेथून निघाला आणि त्या यहूदी
लोकांकडे परत गेला. त्याने त्यांना सांगितले की, ज्याने
त्याला बरे केले तो येशू आहे.
16येशू शब्बाथ दिवशी या गोष्टी करीत होता म्हणून
यहूदी लोक येशूशी दुष्टपणे वागू लागले. 17परंतु येशू
यहूदी लोकांना म्हणाला, “माझा पिता नेहमीच काम करीत
असतो व म्हणून मीही काम करतो”.
18यावरून यहूदी लोकांचा येशूला जिवे मारण्याचा पक्का
निश्चय झाला. ते म्हणाले, “पहिली गोष्ट ही की, येशू
शब्बाथासंबंधीचा नियम मोडतो. दुसरे, ‘देव माझा पिता
आहे!’ असे तो म्हणाला. तो स्वत:ची देवाशी बरोबरी
करतो”.

## येशूला देवाचा अधिकार आहे

19परंतु येशूने उत्तर दिले, “मी तुम्हांला खरे सांगतो. पुत्र
जरी सर्व करू शकत असला, तरी पित्याच्या इच्छेला
डावलून एकटा काही करू शकत नाही. पिता करतो त्या
गोष्टी पुत्रही करतो. 20पिता पुत्रावर प्रीति करतो आणि
ज्या गोष्टी पिता करतो त्या सर्व तो पुत्राला दाखवितो. हा
मनुष्य बरा झाला, परंतु यापेक्षाही मोठमोठ्या गोष्टी
करण्याचे पिता पुत्राला दाखवील. तेव्हा तुम्ही सर्व जण
चकित व्हाल. 21पिता लोकांना मेलेल्यांतून उठवितो आणि
जीवन देतो. तसेच पुत्रही त्याला, ज्यांना द्यायला पाहिजे,
त्यांना जीवन देतो. 22याशिवाय, पिता कोणाचाही न्याय
करीत नाही. परंतु न्याय करण्याचा सर्व अधिकार पित्याने
पुत्राला दिलेला आहे. 23देवाने हे अशासाठी केले की,
लोक जसा पित्याचा सन्मान करतात, तसा त्यांनी पुत्राचाही
करावा. जर कोणी पुत्राचा मान राखीत नाही, तर तो
पित्याचाही मान राखीत नाही. पित्यानेच पुत्राला पाठविले
आहे.
24मी तुम्हांला खरे तेच सांगतो : जो माझे ऐकतो आणि
ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला
अनंतकालचे जीवन मिळेल. त्याला दोषी ठरविले जाणार
नाही. तर त्याने मरणातून निघून जीवनात प्रवेश केला
आहे. 25मी तुम्हांला खरे सांगतो. अशी महत्त्वाची वेळ येत
आहे. ती वेळ जवळजवळ आलेलीच आहे. जे लोक
पापामध्ये मृत आहेत ते देवाच्या पुत्राची वाणी ऐकतील
आणि देवाच्या पुत्राकडून ऐकलेल्या गोष्टी जे लोक
स्वीकारतील त्यांना अनंतकाळचे जीवन मिळेल. 26खुद्द
पित्यापासून (देवापासून) जीवनाचा लाभ होतो. म्हणून
पित्याने पुत्रालाही जीवन देण्याची देणगी दिली आहे. 27आणि
पुत्राने सर्व लोकांचा न्यायनिवाडा करावा असा अधिकार
पित्याने पुत्राला दिला आहे. कारण तो पुत्र मनुष्याचाही
पुत्र आहे. 28तुम्ही याचे आश्चर्य मानू नका. अशी वेळ
येत आहे की, सर्व लोक जे मेलेले आहेत व आपल्या
कबरेत आहेत ते त्याची वाणी ऐकतील. 29मग ते आपल्या
कबरेतून बाहेर येतील. ज्या लोकांनी आपल्या आयुष्यात
चांगली कामे केली, ते उठतील आणि त्यांना अनंतकाळचे
जीवन मिळेल. परंतु ज्या लोकांनी वाईट कामे केली ते
शिक्षा भोगण्यासाठी उठतील.

## येशू यहूदी लोकांशी बोलणे चालू ठेवतो

30“मी एकटा काहीच करू शकत नाही, मला
सांगितल्याप्रमाणेच मी न्याय करतो, म्हणून माझा न्याय
योग्य आहे. कारण मी स्वत:च्या समाधानासाठी नाही;
परंतु ज्याने मला पाठविले त्याच्या समाधानासाठी
न्याय करतो.”
31“जर मी स्वत:च माझ्याविषयी लोकांना सांगितले
तर लोक त्या गोष्टी मानणार नाहीत. 32परंतु लोकांना
याविषयी सांगणारा दुसरा एक जण आहे. आणि तो
माझ्याविषयी ज्या गोष्टी सांगतो त्या खऱ्या आहेत, हे मला
माहीत आहे.” 33तुम्ही योहानाकडे काही लोकांना पाठविले
आणि सत्याविषयी त्याने तुम्हांला सांगितलेच आहे.
34माझ्याविषयी लोकांना सांगण्यास मला कोणाही माणसाची
गरज नाही. परंतु तुमचे तारण व्हावे म्हणून मी या
गोष्टी तुम्हांला सांगतो. 35पेटलेला दिवा प्रकाश देतो,
तसाच योहान होता आणि तुम्हांला त्याच्या प्रकाशाकडून
काही काळ आनंद मिळाला.”
36“परंतु मजजवळ माझ्याविषयी योहानापेक्षाही मोठा
पुरावा आहे. जी कामे मी करतो तीच माझा पुरावा आहेत.

या गोष्टी माझ्या पित्याने मला करण्यासाठी दिलेल्या आहेत.
त्या गोष्टींवरून हे सिद्ध होते की, पित्याने मला पाठविले
आहे. 37आणि ज्या पित्याने मला पाठविले त्याने
स्वत:ही माझ्याविषयी साक्ष दिलेली आहे. परंतु तुम्ही त्याची
वाणी कधीही ऐकली नाही. तो कसा दिसतो हे तुम्ही
कधी पाहिले नाही. 38पित्याची शिकवण तुमच्यामध्ये राहात
नाही. कारण पित्याने ज्या एकाला तुमच्याकडे पाठविले
त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवीत नाही. 39तुम्ही शास्त्राचा
काळजीपूर्वक अभ्यास करता. त्या शास्त्राच्या द्वारे
आपल्याला अनंतकाळचे जीवन मिळते, असे तुम्हांला
वाटते, तेच शास्त्र माझ्याविषयी सांगते! 40तरी तुम्ही
अनंतकालचे जीवन मिळण्यासाठी मजकडे येण्यास नकार
देता."

41"मला माणसांकडून स्तुति नको. 42पण मी तुम्हांला
ओळखतो– तुम्हांमध्ये देवाविषयी प्रीति नाही हे मला माहीत
आहे. 43मी माझ्या पित्यापासून आलो आहे– मी
त्याच्यावतीने बोलतो. परंतु तरीही तुम्ही मला स्वीकारीत
नाही. पण जर दुसरा कोणी मनुष्य फक्त स्वत:विषयी
सांगत आला, तर मात्र तुम्ही त्याचे मानाल. 44तुम्हांला
एकमेकांकडून स्तुति करवून घ्यायला आवडते. परंतु
एकाच देवाकडून होणारी स्तुति मिळविण्याचा प्रयत्न तुम्ही
कधी करीत नाही. मग तुम्ही माझ्यावर कसा काय विश्वास
ठेवाल? 45मी पित्यासमोर उभा राहून तुम्हांला दोषी ठरवीन
असे समजू नका. तुमचे चुकते असे मोशेच तुम्हांला
म्हणतो, आणि मोशे आपले तारण करील अशी तुम्हांला
आशा आहे. 46जर तुम्ही खरोखरच मोशेवर विश्वास
ठेवला आहे, तर तुम्ही माझ्यावरही विश्वास ठेवाल. कारण
खुद्द मोशेनेच माझ्याविषयी लिहिले आहे. 47परंतु मोशेने
जे लिहिले आहे त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवीत नाही,
तर मी सांगतो त्या गोष्टींवर तुम्ही विश्वास ठेवू शकणारच
नाही."

## येशू पाच हजारांहून अधिक लोकांना खावयास देतो

*(मत्तय 14:13-21; मार्क 6:30-44; लूक 9:10-17)*

6 नंतर येशू गालील (किंवा तिबिर्या) सरोवराच्या
पलीकडे गेला. 2तेव्हा पुष्कळ लोक येशूच्या मागे
गेले. कारण येशूने अनेक आजारी लोकांना बरे केले. व
निरनिराळ्या मार्गांनी आपले जे सामर्थ्य दाखविले ते
लोकांनी पाहिले. म्हणून ते त्याच्यामागे गेले. 3मग येशू
टेकडीच्या वर चढून गेला. तो आपल्या शिष्यांसह तेथे
बसला. 4त्याच सुमारास यहूदी लोकांचा वल्हांडण सण
जवळ आला होता.

5येशूने नजर वर करून पाहिले तो लोकांचा मोठा
समुदाय आपणांकडे येताना त्याला दिसला. येशू फिलिप्पाला
म्हणाला, "आपण या लोकांना पुरेशा भाकरी कोठून
विकत आणाव्या बरे?" 6(फिलिप्पची परीक्षा पाहण्यासाठी
येशूने त्याला हा प्रश्न विचारला, कारण आपण काय
करायचे याचा विचार येशूने अगोदरच करून ठेवला
होता.)

7फिलिप्पने उत्तर दिले, "येथील प्रत्येकाला थोडी थोडी
भाकर दिली तरी या सर्वांना पुरेशा भाकर विकत
घेण्यासाठी आपणा सर्वांना महिनाभर काम करावे लागेल."
8आंद्रिया नावाचा दुसरा एक शिष्य तेथे होता. आंद्रिया
हा शिमोन पेत्राचा भाऊ होता. 9आंद्रिया म्हणाला, "येथे
असलेल्या एका लहान मुलाजवळ जवाच्या पाच भाकरी
आणि दोन लहान मासे आहेत. परंतु इतक्या लोकांना त्या
पुरणार नाहीत."

10येशू म्हणाला, "लोकांना खाली बसण्यास सांगा." ती
बरीच गवताळ अशी जागा होती. तेथे खाली बसलेले
सुमारे पाच हजार पुरुष होते. 11मग येशूने त्या भाकरी
हातात घेतल्या; येशूने भाकरीबद्दल देवाचे उपकार मानले
आणि त्या तेथे बसलेल्या लोकांना दिल्या. मासे घेऊन
त्याने तसेच केले. येशूने लोकांना पाहिजे तितके खाऊ
दिले. 12सर्व लोकांना खाण्यासाठी भरपूर होते. जेवण
झाल्यावर येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, "लोकांनी खाऊन
उरलेले भाकरींचे व माशांचे तुकडे गोळा करा. काहीही
वाया जाऊ देऊ नका."

13म्हणून शिष्यांनी उरलेले तुकडे जमा केले. लोकांनी
जेवायला सुरूवात केली, तेव्हा जवाच्या फक्त पाच भाकरी
तेथे होत्या. शिष्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या
भरल्या.

14येशूने केलेला हा चमत्कार लोकांनी पाहिला, तेव्हा
ते म्हणाले, "जगात येणारा संदेष्टा तो खरोखर हाच असला
पाहिजे."

15आपण राजा बनावे असे लोकांना वाटते हे येशूला
माहीत होते. येशूला आपला राजा करावे असा बेत लोकांनी
केला. तेव्हा येशू तेथून निघून एकटाच डोंगराळ भागात
गेला.

## येशू पाण्यावरून चालतो

*(मत्तय 14:22-27; मार्क 6:45-52)*

16त्या संध्याकाळी येशूचे शिष्य (गालील) सरोवराकडे
गेले. 17शिष्य एका नावेत बसून सरोवरापलीकडील
कफर्णहूम नगराकडे निघाले. आता अंधार पडला होता
आणि येशू अजून त्यांच्याकडे आलेला नव्हता. 18वारा
फारच जोराने वाहत होता आणि सरोवरात मोठमोठ्या
लाटा उसळू लागल्या होत्या. 19त्यांनी नाव तीन ते चार
मैल वल्हवीत नेली तेव्हा त्यांना येशू नावेकडे येताना
दिसला. तो सरोवराच्या पाण्यावरून चालत होता. तो
नावेकडेच येत होता. तेव्हा शिष्य घाबरले. 20परंतु येशू
त्यांना म्हणाला, "मी आहे, भिऊ नका." 21येशू असे
बोलल्यावर त्यांनी आनंदाने येशूला नावेत घेतले. आणि
त्यांना जायचे होते त्या ठिकाणी नाव लगेच येऊन काठाला
लागली.

## लोक येशूला शोधतात

22दुसरा दिवस उजाडला. काही लोक सरोवराच्या दुसऱ्या
काठावर राहिले होते. त्या लोकांना माहीत होते की, येशू
शिष्यांबरोबर नावेतून गेलेला नव्हता. त्यांना समजले की,
येशूचे शिष्य नावेत बसून निघून गेलेत आणि तेथे असलेली
तेवढीच एक नाव होती हेही त्यांना ठाऊक होते. 23पण
मग तिबिर्याहून आणखी काही नावा आल्या. आदल्या
दिवशी ज्या ठिकाणी लोकांनी अन्न खाल्ले त्या ठिकाणी
त्या नावा येऊन काठाला लागल्या. प्रभू येशूने देवाचे
उपकार मानल्यावर लोकांनी भाकरी खाल्ल्या तीच ही
जागा होती. 24आता येशू किंवा त्याचे शिष्य तेथे नाहीत हे
लोकांनी पाहिले. म्हणून लोक नावांमध्ये बसले आणि
कफर्णहूमला गेले. त्यांना येशूला शोधायचे होते.

## येशू जीवनाची भाकर

25लोकांना येशू सरोवराच्या दुसऱ्या काठावर भेटला.
लोक म्हणाले, "गुरूजी, तुम्ही इकडे कधी आलात?"

26येशूने उत्तर दिले, "तुम्ही माझा शोध का करता?
माझे सामर्थ्य सिद्ध करणारे चमत्कार पाहिले म्हणून तुम्ही
माझा शोध करता का? मी तुम्हांस खरे सांगतो, तुम्ही
मला शोधता, कारण तुम्ही भाकरी खाल्ल्या आणि तुमची
तृप्ती झाली. 27ऐहिक अन्न नाश पावते. म्हणून नाश
पावणाऱ्या अन्नासाठी कष्ट करू नका. परंतु जे अन्न
कायम टिकते आणि अनंतकाळचे जीवन देते, अशा
अन्नासाठी तुम्ही कष्ट करा. मनुष्याचा पुत्र ते अन्न तुम्हांला
देईल. देव जो पिता याने दाखवून दिले आहे की, तो
मनुष्याच्या पुत्राबरोबर आहे.

28लोकांनी येशूला विचारले, "आम्ही कोणत्या गोष्टी
कराव्यात अशी देवाची इच्छा आहे?"

29येशूने उत्तर दिले, "तुम्ही जे काम करावे अशी देवाची
इच्छा आहे, ते हेच की, देवाने ज्याला पाठविले, त्याच्यावर
तुम्ही विश्वास ठेवावा."

30मग लोक येशूला म्हणाले, "देवाने तुम्हांलाच पाठविले
आहे हे पटविण्यासाठी तुम्ही कोणता चमत्कार कराल?
तुम्हांला एखादा चमत्कार करताना जर आम्ही पाहिले
तर आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवू. तुम्ही काय कराल?
31अरण्यात आमच्या पूर्वजांनी देवाने दिलेला मान्ना खाल्ला.
पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, देवाने त्यांना
स्वर्गातील भाकर खायला दिली."

32येशू म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो. मोशेने तुमच्या
लोकांना स्वर्गातील भाकर दिली नाही. माझा पिता तुम्हांला
खरी स्वर्गीय भाकर देतो. 33देवाची भाकर कोणती? देवाची
भाकर म्हणजे जो स्वर्गातून खाली उतरतो आणि जगाला
जीवन देतो, तोच ती भाकर. "

34ते लोक येशूला म्हणाले, "महाराज, आम्हांला हीच
भाकर नेहमी द्या."

35मग येशू म्हणाला, "मीच ती जीवनाची भाकर आहे.
जो माझ्याकडे येतो त्याला कधीही भूक लागणार नाही.
आणि जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला कधीही तहान
लागणार नाही. 36मी तुम्हांला पूर्वीच सांगितले की, तुम्ही
मला पाहिले, तरीही विश्वास ठेवीत नाही. 37पिता माझे
लोक मला देतो. त्यातील प्रत्येकजण माझ्याकडे येईल
आणि माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला मी स्वीकारीन. 38मी
स्वर्गातून खाली आलो, ते नेहमीच देवाच्या इच्छेप्रमाणे
करण्यास आलो आहे. मला पाहिजे ते करायला मी आलो
नाही. 39देवाने मला दिलेल्या लोकांपैकी एकालाही मी
गमवू नये. परंतु त्या सर्वांना मी शेवटच्या दिवशी जिवंत
असे उठवायला हवे. ज्याने मला पाठविले त्याची मी हेच
करावे अशी इच्छा आहे. 40पुत्राला पाहून त्याच्यावर
विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अनंतकाळचे जीवन
आहे. मी त्या व्यक्तीला शेवटच्या दिवशी उठवीन. हेच
माझ्या पित्याला हवे."

41मग यहुदी लोक येशूविरुद्ध कुरकुर करू लागले.
कारण "स्वर्गातून खाली आलेली भाकर मी आहे" असे
तो म्हणाला. 42यहूदी लोक म्हणाले, "हा येशू आहे. आपण
त्याच्या आईवडिलांना ओळखतो. येशू तर योसेफाचाच
पुत्र आहे. 'मी स्वर्गातून खाली आलो आहे' असे तो कसे
काय म्हणू शकतो?"

43पण येशूने उत्तर दिले, "आपापसात कुरकूर करू
नका. 44पित्यानेच मला पाठविले आहे. पिताच लोकांना
माझ्याकडे पाठवितो. त्या लोकांना मी शेवटच्या दिवशी
परत उठवीन. पित्याने जर एखाद्या व्यक्तीला आकर्षित
केले नाही, तर ती व्यक्ति माझ्याकडे येऊ शकत नाही.
45संदेष्टयांनी असे लिहिले आहे की, 'देव सर्व लोकांना
शिक्षण देईल.'* लोक देवाचे ऐकतात आणि त्याच्याकडून
शिक्षण घेतात, तेच लोक माझ्याकडे वळतात. 46देवाने
ज्याला पाठविले त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणीही देवाला
पाहिले नाही. फक्त त्यानेच देवाला पाहिले आहे. 47मी
तुम्हांला खरे तेच सांगतो, "जो विश्वास ठेवतो त्याला
अनंतकाळचे जीवन मिळाले आहे. 48मी जीवन देणारी
भाकर आहे. 49तुमच्या वाडवडिलांनी अरण्यांत असताना
देवाने दिलेला मान्ना खाल्ला. परंतु इतर सर्व लोकांप्रमाणेच
ते मरण पावले. 50जी स्वर्गातून उतरते ती भाकर मी
आहे. जर ही भाकर कोणी खाईल तर तो कधीच मरणार
नाही. 51स्वर्गातून खाली उतरलेली जिवंत भाकर मी
आहे. जर कोणी ती भाकर खाईल तर तो अनंतकाळासाठी
जिवंत राहील. आणि ती भाकर म्हणजे माझे शरीर आहे.
जगातील लोकांना जीवन मिळावे मी माझे शरीर देईन."

52नंतर यहूदी आपापसात वाद घालू लागले. ते म्हणाले,
"हा मनुष्य आपले स्वत:चे शरीर आम्हांला कसे काय
खायला देऊ शकेल?"

---

**देव ... देईल** यशया 54:13

[53]येशू म्हणाला, “मी तुम्हांला खरे सांगतो, तुम्ही
मनुष्याच्या पुत्राचे शरीर खाल्ले पाहिजे आणि त्याचे रक्त
प्याले पाहिजे. जर तुम्ही हे करणार नाही, तर तुमच्यात
खरे जीवन नाही. [54]जो कोणी माझे शरीर खातो आणि
माझे रक्त पितो, त्याला अनंतकाळचे जीवन मिळेल.
शेवटच्या दिवशी मी त्याला उठवीन. [55]माझे शरीर खरे
अन्न आहे आणि माझे रक्त खरे पेय आहे. [56]जो माझे
शरीर खातो आणि माझे रक्त पितो तो माझ्यात राहतो
आणि मी त्याच्यामध्ये राहतो. [57]पित्याने मला पाठविले.
तो जिवंत आहे आणि पित्यामुळे मीही जगतो. म्हणून जो
कोणी मला खातो तो माझ्यामुळे जिवंत राहील. [58]आपल्या
वाडवडिलांनी अरण्यांत जी भाकर खाल्ली, त्या
भाकरीसारखा मी नाही. त्यांनी ती भाकर खाल्ली परंतु
इतर सर्व लोकांप्रमाणेच ते मरून गेले. मी स्वर्गातून
उतरलेली भाकर आहे. जो कोणी ही भाकर खातो तो
अनंतकाळ जगेल.”

[59]कफर्णहूम नगरातील सभास्थानात शिक्षण देताना
येशूने या सर्व गोष्टी सांगितल्या.

## अनंतकाळच्या जीवनाचे शब्द

[60]येशूच्या शिष्यांनी हे ऐकले. त्यांपैकी अनेकजण
म्हणाले, “हे शिक्षण स्वीकारण्यास फार कठीण आहे.
कोण हे शिक्षण मान्य करील?”

[61]आपले शिष्य याविषयी कुरकूर करीत आहेत, हे
येशूने ओळखले. म्हणून तो त्यांना म्हणाला, “ही शिकवण
तुम्हांला त्रासदायक वाटेल काय? [62]तर मग मनुष्याचा
पुत्र जेथून आला तेथे परत जाताना पाहून तुम्हांला तसेच
त्रासदायक वाटेल काय? [63]शरीराद्वारे मनुष्याला जीवन
मिळत नाही. परंतु आत्म्याकडून ते जीवन मिळते. मी
तुम्हांला सांगितलेल्या गोष्टी आत्म्याविषयी आहेत. म्हणूनच
या गोष्टीपासून जीवन मिळते. [64]परंतु तुमच्यातील काहीजण
विश्वास ठेवीत नाहीत.” जे लोक विश्वास ठेवीत नव्हते,
ते येशूला माहीत होते. येशूला हे अगदी सुरूवातीपासूनच
माहीत होते. आणि जो मनुष्य त्याचा विश्वासघात करणार
होता, तोही त्याला माहित होता. [65]येशू म्हणाला, “म्हणूनच
मी तुम्हांला म्हटले की, जर पिता एखाद्या व्यक्तीला
माझ्याकडे येऊ देत नसेल तर ती व्यक्ति येणारच नाही.”

[66]येशूने हे सर्व सांगितल्यावर त्याच्या शिष्यांपैकी बरेच
जण त्याला सोडून गेले; येशूच्या मागे जाण्याचे त्यांनी
सोडून दिले.

[67]नंतर येशूने आपल्या बारा शिष्यांना विचारले,
“तुम्हांलासुद्धा मला सोडून जावेसे वाटते काय?”

[68]शिमोन पेत्राने उत्तर दिले, “प्रभुजी आम्ही कोठे जाणार?
अनंतकालच्या जीवनाची वचने तर तुमच्याजवळ आहेत.
[69]आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवतो. तुम्ही पवित्र व्यक्ति
आहात हे आम्हांला माहीत आहे.”

[70]मग येशूने उत्तर दिले, “तुम्हा बारा जणांना मी
निवडले. पण तुमच्यातील एक सैतान आहे.”

[71]शिमोन इस्कर्योत याचा मुलगा यहूदा याच्याविषयी
येशू बोलत होता. यहूदा बारा शिष्यांपैकी एक होता. परंतु
पुढे हाच यहूदा येशूच्या विरुद्ध उठणार होता.

## येशू आणि त्याचे भाऊ

7 यानंतर येशू गालील प्रांतात फिरला. येशूला यहूदीया
प्रांतातून प्रवास करायला नको होता, कारण तेथील
काही यहूदी लोकांना येशूला जिवे मारायचे होते. [2]यहूदी
लोकांचा मंडपाचा सण* जवळ आला होता. [3]म्हणून
येशूचे भाऊ त्याला म्हणाले, “तू येथून सणासाठी यहूदीयात
जा. म्हणजे तू करतोस ते चमत्कार तेथे तुझे शिष्य पाहू
शकतील. [4]लोकांना माहिती व्हावी असे एखाद्याला वाटत
असेल तर त्याने तो करतो ती कामे लपवू नयेत. तू
जगाला प्रगट हो. तू जे चमत्कार करतोस ते त्यांना पाहू
दे.” [5]येशूच्या भावांनीसुद्धा त्याच्यावर विश्वास ठेवला नाही.
[6]येशू आपल्या भावांना म्हणाला, “माझी योग्य वेळ अजून
आलेली नाही. पण तुम्ही जाण्यासाठी मात्र कोणतीही वेळ
योग्य असेल. [7]जग तुमचा द्वेष करू शकत नाही. परंतु
जग माझा द्वेष करते. कारण जगातील लोक वाईट कामे
करतात हे मी त्यांना सांगतो. [8]तेव्हा तुम्ही सणासाठी जा.
मी आत्ताच सणाला येणार नाही. माझी योग्य वेळ अजून
आली नाही.” [9]हे सांगितल्यानंतर येशू गालीलातच राहिला.

[10]म्हणून येशूचे भाऊ सणासाठी तेथून निघून गेले. ते
गेल्यावर मग येशूही गेला. परंतु येशूने हे लोकांना उघडपणे
दाखविले नाही. [11]सणाच्या काळात यहूदी लोक येशूचा
शोध करीत होते. यहूदी म्हणाले, “तो मनुष्य कोठे आहे?”

[12]लोकांचा मोठा जमाव त्या ठिकाणी जमा झालेला
होता. त्यांतील अनेक लोक येशूविषयी आपसांत बोलत
होते. काही म्हणाले, “तो चांगला मनुष्य आहे.” परंतु
दुसरे काहीजण म्हणाले, “नाही, तो लोकांना ठकवितो.”
[13]परंतु लोकांपैकी कोणीच येशूविषयी उघडपणे बोलायला
धजत नव्हते. लोकांना यहूदी पुढाऱ्यांची भीति वाटत होती.

## येशू यरुशलेमात शिक्षण देतो

[14]अर्धाअधिक सण पार पडला होता तेव्हा येशू मंदिरात
गेला आणि तेथे लोकांना शिक्षण देण्यास त्याने सुरूवात
केली. [15]यहूदी लोकांना मोठे आश्चर्य वाटले. ते म्हणाले,
“हा माणूस शाळेत कधी शिकला नाही. हे एवढे तो कोठून
शिकला?”

[16]येशूने उत्तर दिले, “मी ज्या गोष्टी शिकवितो त्या
माझ्या स्वत:च्या नाहीत. माझी शिकवण मला पाठविणाऱ्या

---

**मंडपाचा सण** यहूदी लोकांचे वाडवडील मोशेच्या काळात चाळीस वर्षे अरण्यात फिरत राहिले, त्याची आठवण म्हणून यहूदी लोक दरवर्षी एक आठवडाभर मंडपात राहात.

पित्याकडून आलेली आहे. 17जो देवाच्या इच्छेप्रमाणे करतो
त्याला माझी शिकवण देवाकडून आहे हे कळेल. त्याला
हे कळेल की, माझी शिकवण माझी स्वत:ची नाही. 18जो
कोणी स्वत:च्या कल्पना शिकवितो, तो स्वत:ला
मानसन्मान मिळावा असा प्रयत्न करतो. परंतु ज्याने मला
पाठविले त्याचा सन्मान करण्याचा जो प्रयत्न करतो तोच
माणूस सत्य सांगतो. त्याचे काहीच खोटे नसते. 19मोशेने
तुम्हांला नियमशास्त्र दिले. खरे ना? परंतु तुमच्यातील
कोणी नियमशास्त्र पाळीत नाही. तुम्ही का बरे मला जिवे
मारायला पाहता?"

20लोकांनी उत्तर दिले, "तुम्हांला भूत लागले आहे.
आम्ही काही तुम्हांला जिवे मारण्याचा प्रयत्न करीत नाही."
21येशू त्यांना म्हणाला, "मी एक चमत्कार केला आणि
तुम्ही सारे चकित झालात. 22मोशेने तुम्हांला सुंतेचा नियम
दिला. परंतु खरे पाहता सुंता मोशेपासून आलेली नाही. ती
मोशेच्या आधीच आपल्या पूर्वजांपासून चालत आलेली
आहे. म्हणून कधी कधी शब्बाथ दिवशीही तुम्ही मुलांची
सुंता करता. 23याचा अर्थ मोशेच्या नियमांचे पालन
करण्यासाठी शब्बाथ दिवशीही बालकाची सुंता करता
येते. मग मी शब्बाथ दिवशी एका माणसाचे संपूर्ण शरीर
बरे केले तर तुम्ही माझ्यावर का रागावता? 24वरवर
पाहून न्याय करू नका. तर खरोखर काय बरोबर आहे
याची कसून शहानिशा करून योग्य प्रकारे न्याय करा."

### येशू हाच ख्रिस्त आहे काय? लोकांना पडलेला प्रश्न

25मग यरुशलेमात राहणारे काही लोक म्हणाले, "याच
माणसाला लोक जिवे मारण्याच्या प्रयत्नात आहेत. 26परंतु
सर्व लोक आपल्याला पाहू आणि ऐकू शकतील अशा
ठिकाणी हा शिक्षण देत आहे. आणि शिक्षण देताना त्याला
थांबविण्याचा कोणीही प्रयत्न करीत नाही. कदाचित हा
खरोखरच ख्रिस्त आहे असे पुढारी लोकांनी ठरविले
असेल. 27परंतु हा माणूस कोठून आला आहे हे आपल्याला
माहीत आहे. आणि खरोखरचा ख्रिस्त येईल तेव्हा तो
कोठून येईल हे कोणालाच कळणार नाही."

28अजूनही येशू मंदिरात शिक्षण देत होता. येशू म्हणाला,
"होय, तुम्ही मला ओळखता आणि मी कोठला हेही तुम्हांला
माहीत आहे. परंतु मी स्वत:च्या अधिकाराने आलो नाही.
जो खरा देव आहे त्याने मला पाठविले. तुम्ही त्याला
ओळखीत नाही. 29पण मी त्याला ओळखतो. मी
त्याच्याकडून आलो आणि त्यानेच मला पाठविले."

30येशू हे बोलला तेव्हा लोकांनी त्याला धरण्याचा प्रयत्न
केला, परंतु कोणीही त्याला धरू शकला नाही, कारण
त्याला मारले जाण्याची वेळ अजून आली नव्हती. 31परंतु
लोकांपैकी पुष्कळ जणांनी येशूवर विश्वास ठेवला. लोक
म्हणाले, "आम्ही ख्रिस्ताच्या येण्याची वाट पाहत आहोत.
ख्रिस्त आला तर या मनुष्याने केले त्याहून जास्त चमत्कार
तो करून दाखवील काय? नाही! म्हणून हाच ख्रिस्त
असला पाहिजे."

### यहूदी लोक येशूला अटक करण्याचा प्रयत्न करतात

32लोक येशूविषयी जे बोलत होते ते परूश्यांनी ऐकले.
म्हणून मुख्य याजक आणि परूशी यांनी येशूला अटक
करण्यासाठी मंदिराचे शिपाई पाठविले.

33मग येशू म्हणाला, "मी तुम्हा लोकांबरोबर आणखी
थोडा काळ राहीन. नंतर ज्याने मला पाठविले, त्याच्याकडे
मी परत जाईन. 34तुम्ही माझा शोध कराल पण मी तुम्हांला
सापडणार नाही."

35यहूदी आपापसात म्हणाले, "हा माणूस असा कोठे
जाणार आहे की जेथे आपण त्याला शोधू शकणार नाही?
ग्रीक शहरात राहणाऱ्या यहूदी लोकांकडे हा जाईल काय?
तो तेथील ग्रीक लोकांना शिक्षण देईल काय? 36हा माणूस
म्हणतो, 'तुम्ही माझा शोध कराल परंतु मी तुम्हांला
सापडणार नाही.' तो असेही म्हणतो, 'जेथे मी आहे तेथे
तुम्ही येऊ शकत नाही.' याचा अर्थ काय?"

### येशू पवित्र आत्म्याविषयी सांगतो

37सणाचा शेवटचा दिवस आला. तो फार महत्त्वाचा
दिवस होता. त्या दिवशी उभे राहून येशू मोठयाने म्हणाला,
"ज्याला तहान लागली असेल त्याने माझ्याकडे यावे आणि
प्यावे. 38जर कोणी माझ्यावर विश्वास ठेवील तर त्याच्या
अंत:करणातून जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील." असे पवित्र
शास्त्र सांगते. 39येशू आत्म्याविषयी बोलत होता. लोकांना
अजून पवित्र आत्मा देण्यात आला नव्हता. कारण येशू
अजून मरण पावला नव्हता आणि गौरवात उठविला गेला
नव्हता. परंतु नंतर येशूवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांना
तो मिळणार होता.

### लोक येशूविषयी वाद करतात

40येशूने सांगितलेल्या या गोष्टी लोकांनी ऐकल्या. काही
लोक म्हणाले, "हा माणूस खरोखरच संदेष्टा आहे.
41दुसरे म्हणाले, "हा ख्रिस्त आहे."

तर दुसरे काहीजण म्हणाले, "ख्रिस्त हा गालील प्रांतातून
येणार नाही." 42पवित्र शास्त्रात असेही लिहिले आहे की,
"ख्रिस्त दावीद राजाच्या घराण्यातून येईल."

43आणि पवित्र शास्त्रात असेही लिहिले आहे की, "दावीद
राजा राहत असे त्या बेथलहेम गावातून ख्रिस्त येईल."
तेव्हा येशूमुळे लोकांचे एकमत होईना. 44काहींना येशूला
अटक करायचे होते पण तसा प्रयत्न कोणीच केला नाही.

### यहूदी पुढारी येशूवर विश्वास ठेवण्यास नकार देतात

45मंदिराचे शिपाई मुख्य याजकांकडे आणि परूश्यांकडे
परत गेले. मुख्य याजकांनी व परूश्यांनी शिपायांना
विचारले, "तुम्ही येशूला का आणले नाही?"

46मंदिराचे शिपाई म्हणाले, “तो बोलतो त्या गोष्टी
कोणत्याही मानवी शब्दांपेक्षा महान आहेत!”
47मग परूशी म्हणाले, “म्हणजे येशूने तुम्हांलासुद्धा मूर्ख
बनविले! 48पुढाऱ्यांपैकी एकाने तरी येशूवर विश्वास
ठेवला का? नाही! आम्हा परूश्यांपैकी एकाने तरी
त्याच्यावर विश्वास ठेवला का? नाही! 49परंतु बाहेरच्या
लोकांना नियमशास्त्राची माहिती नाही, त्यांच्यावर देवाचा
कोप होईल!”
50परंतु त्या घोळक्यात निकदेम हजर होता. यापूर्वी हा
निकदेमच येशूला भेटायला आला होता* निकदेम
म्हणाला, 51“एखाद्या माणसाची बाजू ऐकून घेतल्याशिवाय
त्याला आपल्या नियमशास्त्राप्रमाणे दोषी ठरवता येत नाही.
त्याने काय केले हे कळल्याशिवाय आपण त्याचा न्याय
करू शकत नाही.”
52यहूदी पुढाऱ्यांनी उत्तर दिले, “तू सुद्धा गालील
प्रांतामधील आहेस काय? पवित्र शास्त्र वाचून पाहा!
गालीलातून एकही संदेष्टा येणार नाही. हे तुला कळेल.”

## व्यभिचार करताना पकडलेली स्त्री

53नंतर ते सर्व यहूदी पुढारी आपापल्या घरी गेले.
8 येशू जैतुनाच्या डोंगरावर* निघून गेला. 2दुसऱ्या
दिवशी सकाळीच येशू परत मंदिरात गेला. सर्व
लोक येशूकडे आले. येशू बसला आणि त्याने लोकांना
शिक्षण दिले. 3नियमशास्त्राचे शिक्षक व परूशी एका
स्त्रीला घेऊन तेथे आले. त्या स्त्रीला व्यभिचाराचे पाप
करताना पकडले होते. या यहूदी लोकांनी त्या स्त्रीला
बळजबरीने लोकांपुढे उभे केले. 4ते येशूला म्हणाले,
“गुरूजी, जो हिचा नवरा नाही, अशा माणसाशी व्यभिचार
करताना ह्या स्त्रीला पकडले. 5मोशेच्या नियमशास्त्रात
अशी आज्ञा दिलेली आहे की, असे कर्म करणाऱ्या
प्रत्येक स्त्रीला आम्ही धोंडमार करून जिवे मारले पाहिजे.
आम्ही काय करावे असे तुमचे मत आहे?” 6येशूला
पेचात पकडावे म्हणून यहूदी लोकांनी हा प्रश्न विचारला
होता. काही तरी चुकीचे बोलताना येशूला धरावे अशी
त्यांची इच्छा होती. म्हणजे मग त्यांना येशूवर आरोप
ठेवता आला असता. पण येशूने गुडघे टेकले व आपल्या
बोटाने जमिनीवर लिहू लागला. 7यहूदी पुढारी येशूला
प्रश्न विचारीतच राहिले, म्हणून येशू मान वर करून
त्यांच्याकडे पाहत म्हणाला, “ज्याने कधीच पाप केले
नाही असा एकतरी मनुष्य येथे आहे काय? निष्पाप मनुष्य
या स्त्रीवर पहिला दगड फेकू शकतो.” 8मग येशूने पुन्हा
गुडघे टेकले व जमिनीवर लिहू लागला. 9येशूचे हे शब्द
ज्या लोकांनी ऐकले, ते एक एक करून निघून जाऊ
लागले. जे वयस्कर होते ते अगोदर गेले. मग इतर लोक
गेले. येशू एकटाच त्या स्त्रीसह तेथे राहिला होता. ती
त्याच्यासमोर उभी होती. 10येशूने पुन्हा वर पाहिले आणि
तिला विचारले, “बाई, ते सर्व लोक निघून गेले आहेत,
त्यातील एकानेही तुला दोषी ठरविले नाही काय?”
11त्या स्त्रीने उत्तर दिले, “महाराज, मला कोणीही दोषी
ठरविले नाही.”
मग येशू म्हणाला, “मग मीही तुझा न्याय करीत नाही.
आता तू जाऊ शकतेस. पण परत पाप करू नकोस.”

---

*[वचने 7:53 ते 8:11 अति जुन्या व उत्तम ग्रीक प्रतीमध्ये ही वचने नाहीत ]*

## येशू जगाचा प्रकाश आहे

12नंतर येशू पुन्हा लोकांशी बोलू लागला. तो म्हणाला,
“मी जगाचा प्रकाश आहे. जो माझ्यामागे येतो तो कधीही
अंधारात राहणार नाही. त्या माणसाजवळ जीवन देणारा
प्रकाश राहील.”
13परंतु परूशी लोक येशूला म्हणाले, “जेव्हा तुम्ही
स्वत: आपल्याविषयी बोलता, तेव्हा ह्या गोष्टी खऱ्या
आहेत असे म्हणणारे तुम्ही एकटेच असता. तेव्हा तुम्ही
सांगता त्या गोष्टी आम्ही स्वीकारू शकत नाही.”
14येशूने उत्तर दिले, “होय, मी स्वत:च माझ्याविषयी ह्या
गोष्टी सांगत आहे. परंतु मी सांगतो त्या गोष्टींवर लोक
विश्वास ठेवू शकतील. कारण मी कोठून आलो हे मला
माहीत आहे व कोठे जाणार हे मला माहीत आहे. मी
तुमच्यासारखा नाही. मी कोठून आलो व कोठे जाणार हे
तुम्हांला माहीत नाही. 15तुम्ही एखाद्याचा न्याय करता
तसाच माझाही करता. मी कोणाचा न्याय करीत नाही.
16पण जर मी न्याय केला तर त्यात माझा न्याय खरा
असतो. कारण जेव्हा मी न्याय करतो तेव्हा मी एकटा
नसतो. ज्या पित्याने मला पाठविले, तो माझ्याबरोबर असतो.
17तुमचे स्वत:चेच नियमशास्त्र असे म्हणते की, दोन
साक्षीदार एकाच गोष्टीविषयी साक्ष देतात तेव्हा ते काय
म्हणतात, ते तुम्हांला स्वीकारावेच लागते. 18स्वत:विषयी
बोलणाऱ्या दोघा साक्षीदारांपैकी मी एक साक्षीदार आहे.
आणि ज्या पित्याने मला पाठविले, तो दुसरा साक्षीदार
आहे.”
19लोकांनी येशूला विचारले, “तुमचा पिता कोठे आहे.?”
येशूने उत्तर दिले, “तुम्ही मला अगर माझ्या पित्याला
ओळखत नाही. जर तुम्ही मला ओळखले असते तर
माझ्या पित्यालाही ओळखले असते.” 20येशू मंदिरात शिक्षण
देत असता या गोष्टी बोलला. ज्या पेटीत लोक पैसे टाकीत
त्या पेटीजवळच तो होता. परंतु येशूला कोणी अटक
केली (पकडले) नाही. कारण त्याची वेळ अजून आलेली
नव्हती.

---

**निकदेम ... होता** योहान 3:1-21

**जैतुनाच्या डोंगरावर** यरूशलेम शहराजवळची टेकडी.

## यहूदी लोकांना येशूविषयी समजत नाही

21येशू पुन्हा लोकांना म्हणाला, “मी लवकरच तुम्हांला
सोडून जाईन. तुम्ही माझा शोध कराल, परंतु तुम्ही आपल्या
पापात मराल. मी जातो तेथे तुम्ही येऊ शकत नाही.”
22म्हणून यहूदी लोक एकमेकांस विचारू लागले, “येशू
स्वत:ला ठार करणार नाही ना? यासाठी तो असे म्हणाला
का, ‘की मी जाणार आहे, तिकडे तुम्ही येऊ शकणार
नाही?’ 23पण येशू म्हणाला, “तुम्ही लोक येथील खालचे
आहात. पण मी वरचा आहे. तुम्ही या जगाचे आहा; परंतु
मी या जगाचा नाही. 24तुम्ही आपल्या पापात मराल असे
मी म्हणालो, होय. ‘मी आहे’* यावर तुम्ही विश्वास ठेवीत
नाही, तर तुम्ही पापात मराल.”
25यहूदी लोकांनी विचारले, “मग तुम्ही कोण आहात?”
येशूने उत्तर दिले, “मी सुरूवातीपासून तुम्हांला सांगत
आलो तोच मी आहे. 26तुमच्याविषयी बोलण्यासारख्या
बऱ्याच गोष्टी माझ्याकडे आहेत. मी तुमचा न्याय करू
शकतो. परंतु ज्याने मला पाठविले त्याच्याकडून ऐकलेल्या
गोष्टीच मी लोकांना सांगतो. आणि तो सत्य सांगतो.”
27येशू कोणाविषयी बोलत आहे, हे लोकांना समजेना.
येशू त्यांना पित्याविषयी सांगत होता. 28म्हणून येशू लोकांना
म्हणाला, “तुम्ही मनुष्याच्या पुत्राला उंच कराल
(वधस्तंभावर ठार माराल). मग तो मी आहे हे समजू
शकाल. मी ज्या गोष्टी करतो त्या माझ्या स्वत:च्या
अधिकारात करीत नाही, हे तुम्हांला समजेल. तुम्हांला
समजेल की, ज्या गोष्टी मला पित्याने शिकविल्या त्याच
गोष्टीविषयी मी बोलतो. 29ज्याने मला पाठविले तो
माझ्याबरोबर आहे. त्याला ज्यामुळे संतोष होतो तेच मी
नेहमी करतो. म्हणून त्याने मला एकटे सोडले नाही.”
30येशू या गोष्टी बोलत असता अनेकांनी त्याच्यावर विश्वास
ठेवला.

## पापापासून सुटका याविषयी येशू बोलतो

31ज्यांनी येशूवर विश्वास ठेवला, त्या यहूदी लोकांना
तो म्हणाला, “तुम्ही जर नेहमी माझ्या शिकवणुकीचे पालन
कराल, तरच तुम्ही माझे खरे शिष्य आहात. 32मग सत्य
काय आहे हे तुम्हांला समजेल. आणि सत्य तुम्हांला मोकळे
करील.” 33यहूदी लोकांनी उत्तर दिले, “आम्ही अब्राहामाचे
लोक आहोत आणि आम्ही कधीच गुलाम नव्हतो तर
आम्ही मोकळे होऊ असे तुम्ही का म्हणता?”
34येशूने उत्तर दिले, “मी तुम्हांला खरे तेच सांगतो. जो
प्रत्येक पाप करतो तो गुलाम आहे. पाप त्याचा मालक
आहे. 35गुलाम कुटुंबात कायमचा राहत नाही. परंतु पुत्र
कायमचा आपल्या कुटुंबात राहतो. 36म्हणून जर पुत्र
तुमची सुटका करतो, तर तुम्ही खरोखरच मोकळे व्हाल.
37तुम्ही अब्राहामाचे लोक आहात हे मला माहीत आहे.
परंतु तुम्ही मला जिवे मारावयास टपलेले आहात. कारण
तुम्हांला माझे शिक्षण स्वीकारायला नको आहे. 38माझ्या
पित्याने जे काही मला दाखवून दिले, तेच मी तुम्हांला
सांगत आहे. परंतु तुमच्या पित्याने तुम्हांला सांगितले तेच
तुम्ही करता.”
39यहूदी लोकांनी उत्तर दिले, “आमचा पिता अब्राहाम
आहे.”
येशू म्हणाला, “तुम्ही जर खरोखरच अब्राहामाची संतति
असता तर अब्राहामाने केल्या त्याच गोष्टी तुम्ही केल्या
असत्या. 40देवाकडून जे सत्य ऐकले ते तुम्हांला सांगणारा
मी एक मनुष्य आहे. परंतु तुम्ही मला जिवे मारायला
पाहता. अब्राहामाने तसे केले नाही. 41पण अब्राहामाने जे
केले नाही ते तुम्ही करता याचा अर्थ तुम्ही त्याची मुले
नाहीत तर तुमचा पिता अब्राहाम नसून कोणी वेगळा
आहे.”
परंतु यहूदी म्हणाले, “ज्या मुलांना आपला पिता कोण
आहे ते माहीत नाही त्यांच्यासारखे आम्ही नाही! देव
आमचा पिता आहे. तोच एक आमचा पिता आहे.”
42येशू त्या यहूदी लोकांना म्हणाला, “जर देव खरोखरच
तुमचा पिता असता, तर तुम्ही माझ्यावर प्रीति केली असती.
मी पित्याकडून आलो आणि आता मी येथे आहे. मी
माझ्या स्वत:च्या अधिकारात आलो नाही. देवानेच मला
पाठविले. 43मी म्हणतो, मी देत असलेली शिकवण तुम्हांला
समजत नाही का? कारण की तुम्हांला माझी शिकवण
स्वीकारता येत नाही. 44तुमचा पिता सैतान आहे. तुम्ही
त्याचे आहात. त्याला करायला पाहिजे तेच तुम्ही करता.
सैतान सुरूवातीपासूनच खुनी आहे. सैतान सत्याच्या विरुद्ध
आहे. आणि सैतानाच्या ठायी सत्य नाही. तो सांगतो त्या
लबाड्याप्रमाणेच तो आहे. सैतान लबाड आहे. आणि तो
असत्याचा पिता आहे. 45मी सत्य बोलतो म्हणून तुम्ही
माझ्यावर विश्वास ठेवीत नाही. 46मी एखाद्या पापाविषयी
दोषी आहे असे तुमच्यातील कोणी सिद्ध करू शकेल
काय? जर मी सत्य सांगतो तर तुम्ही माझ्यावर विश्वास
का ठेवीत नाही? 47जो देवाचा आहे, तो देवाचे म्हणणे
ऐकतो. परंतु तुम्ही देवाचे म्हणणे ऐकत नाही. कारण
तुम्ही देवाचे लोक नाहीत.”

## स्वत:विषयी व अब्राहामाविषयी येशू बोलतो

48यहूदी म्हणाले, “तुम्ही शोमरोनी आहात, तुम्हांला
भूताने पछाडले आहे, असे आम्ही म्हणालो तर आम्ही
म्हणतो तेच बरोबर नाही काय?”
49येशूने उत्तर दिले, “मला भूत लागले नाही. मी तर
आपल्या पित्याचा मान राखतो. परंतु तुम्ही माझा मान
राखीत नाही. 50स्वत:ला सन्मान मिळविण्याचा प्रयत्न मी
करीत नाही. माझा सन्मान व्हावा असे एकाला (देवाला)

---

**मी आहे** जुन्या करारातील निर्गम. 3:14 मध्ये वापरलेल्या देवाच्या नावासारखे हे आहे. परंतु ‘मी तो (खिस्त) आहे’ असाही याचा अर्थ होऊ शकतो.

वाटते. तोच न्यायाधीश आहे, 51मी तुम्हांला खरे तेच सांगतो. जो कोणी माझ्या शिक्षणाचे पालन करतो तो कधीही मरणार नाही. 52यहूदी लोक म्हणाले, "तुमच्यात खरोखर भूत संचारले आहे. हे आता आम्हांला माहीत झाले. अब्राहाम आणि संदेष्टे मेले. परंतु तुम्ही म्हणता, 'जो माझ्या शिकवणूकीचे पालन करतो तो कधीच मरणार नही.' 53तुम्ही आमचा पिता अब्राहाम याच्यापेक्षाही थोर आहात असे तुम्हांला वाटते काय? अब्राहाम मेला. तसेच संदेष्टेही मेले. तुम्ही स्वत:ला समजता तरी कोण?"

54येशूने उत्तर दिले, "जर मी स्वत:च स्वत:चा सन्मान केला तर त्या सन्मानाला काहीच अर्थ नाही. माझा पिता माझा सन्मान करतो. तो आमचा देव आहे असे तुम्ही म्हणता. 55परंतु तुम्ही खरोखर त्याला ओळखीत नाही. पण मी त्याला ओळखतो. तो सांगतो त्याचे पालन मी करतो. मी त्याला ओळखीत नाही असे जर मी म्हणालो, तर तुम्ही लबाड आहात तसा मीही लबाड ठरेन. परंतु मी त्याला नक्कीच ओळखतो. आणि तो जे काही सांगतो त्याचे पालन करतो. 56माझ्या येण्याचा दिवस पाहण्याच्या आशेने तुमचा पिता अब्राहाम आनंदित झाला होता. त्याने तो दिवस पाहिला आणि त्याला आनंद झाला."

57यहूदी लोक येशूला म्हणाले, "तुम्ही अब्राहामाला कधीच पाहिले नाही. तुम्ही पन्नास वर्षांचेही नाही!"

58येशूने उत्तर दिले, "मी तुम्हांला खरे तेच सांगतो: अब्राहामाच्या जन्मापूर्वी पासून मी आहे." 59जेव्हा येशू असे बोलला तेव्हा लोकांनी त्याला मारण्यासाठी दगड उचलले. पण येशू गुप्त झाला आणि नंतर मंदिरात निघून गेला.

## जन्मापासून आंधळा असलेल्या मनुष्याला येशू दृष्टि देतो

9 येशू चालला असताना त्याने एक आंधळा मनुष्य पाहिला. हा मनुष्य त्याच्या जन्मापासून आंधळा होता. 2येशूच्या शिष्यांनी त्याला विचारले, "गुरुजी, हा मनुष्य आंधळा जन्मला. परंतु तो कोणाच्या पापामुळे आंधळा जन्मला? त्याच्या स्वत:च्या का त्याच्या आईवडिलांच्या पापामुळे?"

3येशूने उत्तर दिले, "त्याच्या स्वत:च्या पापामुळे अगर त्याच्या आईवडीलांच्या पापामुळे हा आंधळा झाला नाही. मी याला बरे करताना लोकांना देवाचे सामर्थ्य दाखविता यावे म्हणून हा आंधळा जन्मला. 4दिवस आहे तोपर्यंत, ज्याने मला पाठविले त्याचे काम आपण करीत राहिले पाहिजे. रात्र येत आहे आणि रात्री कोणी काम करू शकत नाही. 5मी जगात आहे तोपर्यंत मी जगाचा प्रकाश आहे."

6असे बोलल्यानंतर, येशू मातीवर थुंकला. त्याने त्या थुंकीने चिखल केला. आणि त्या चिखलाचा गोळा करून त्याने त्या माणसाच्या डोळ्यांवर ठेवला. 7मग येशूने त्या मनुष्याला सांगितले, "जाऊन शिलोह तळ्यात डोळे धू." (शिलोह म्हणजे पाठविलेला) म्हणून तो मनुष्य त्या तळ्यापाशी गेला. त्याने डोळे धुतले आणि तो परत आला. तेव्हा त्याला चांगले दिसू लागले होते.

8काही लोकांनी त्याला भीक मागताना पूर्वी पाहिले होते. ही माणसे आणि त्याचे शेजारी म्हणाले, "पाहा! येथे बसून भीक मागत असे तो मनुष्य हाच आहे ना?"

9काही लोक म्हणाले, "होय! हा तोच आहे." परंतु दुसरे काही म्हणाले, "नाही हा तो मनुष्य नाही. हा फक्त त्याच्यासारखा दिसतो."

मग तो माणूस स्वत: होऊनच म्हणाला, "अहो, मीच तो पूर्वीचा आंधळा आहे."

10लोकांनी विचारले, "अरे असे घडले तरी काय? तुला कसे दिसू लागले?"

11त्या मनुष्याने उत्तर दिले, "लोक ज्याला येशू म्हणतात त्याने थोडा चिखल केला. त्याने तो चिखल माझ्या डोळ्यांवर लावला. मग येशूने मला शिलोह तळ्याकडे जाऊन धुण्यास सांगितले. म्हणून मी शिलोह तळ्यावर जाऊन डोळे धुतले. आणि मग मला दिसू लागले."

12लोकांनी त्या मनुष्याला विचारले, "तो मनुष्य कोठे आहे?" त्या मनुष्याने उत्तर दिले, "मला माहीत नाही."

## येशूने बरे केलेल्या मनुष्याची परूश्यांकडून चौकशी

13मग लोकांनी परूशी लोकांकडे त्या मनुष्याला नेले. हाच पूर्वी आंधळा मनुष्य होता. 14येशूने चिखल करून त्या मनुष्याचे डोळे बरे केले होते. ज्या दिवशी येशूने हे केले तो शब्बाथ दिवस होता. 15म्हणून आता परूशी लोक त्या मनुष्याला विचारू लागले, "तुला कसे काय दिसू लागले?"

त्या मनुष्याने उत्तर दिले, "त्याने माझ्या डोळ्यांवर चिखल लावला. मी डोळे धुतले आणि आता मी पाहू शकतो."

16परूश्यांतील काही लोक म्हणाले, "हा मनुष्य शब्बाथाचा नियम पाळीत नाही. म्हणून तो देवापासून नाही."

दुसरे लोक म्हणाले, "परंतु एखादा मनुष्य पापी असेल तर त्याला असे चमत्कार करताच येणार नाहीत." याविषयी त्या यहूदी लोकांचे एकमत होईना.

17मग यहूदी पुढाऱ्यांनी त्या मनुष्याला पुन्हा विचारले, "त्या मनुष्याने तुला बरे केले, आणि आता तुला दिसते, तर त्याच्याविषयी तुला काय म्हणायचे आहे?"

त्या मनुष्याने उत्तर दिले, "तो एक संदेष्टा आहे.

18हे या माणसाच्या बाबतीत घडले आहे यावर यहूदी लोकांचा विश्वासच बसेना. हा मनुष्य आंधळा होता आणि आता त्याला दिसते या गोष्टीवर त्यांचा विश्वास बसत नव्हता. नंतर त्यांनी त्या मनुष्याच्या आईवडिलांना बोलावून घेतले.

19यहूदी लोकांनी त्याच्या आईवडिलांना विचारले, "हा तुमचाच मुलगा आहे काय? तुम्ही म्हणता हा जन्मापासून आंधळा होता तर आता याला कसे काय दिसू लागले?"

20त्याच्या आईवडिलांनी उत्तर दिले, "हा आमचाच मुलगा
आहे. आणि तो आंधळाच जन्माला आला हे आम्हांला
माहीत आहे. 21परंतु त्याला आता कसे दिसायला लागले
आणि त्याचे डोळे कोणी बरे केले हे आम्हांला माहीत
नाही. त्यालाच विचारा. तो स्वत: बद्दल सांगण्याइतका
सुज्ञ झाला आहे. 22त्याचे आईवडील असे म्हणाले कारण
त्यांना यहूदी धर्मपुढाऱ्यांची फार भीति वाटत होती. येशू
हा ख्रिस्त आहे, असे जो कोणी म्हणेल, त्याला शिक्षा
करायची असे यहूदी पुढाऱ्यांनी अगोदरच ठरवून ठेवलेले
होते. अशा लोकांना यहूदी पुढारी सभास्थानाबाहेर घालवू
शकत होते. 23म्हणून 'त्यालाच विचारा तो आता मोठा
झाला आहे' असे त्या मनुष्याचे आईवडील म्हणाले.

24मग जो पूर्वी आंधळा होता त्याला यहूदी पुढाऱ्यांनी
पुन्हा बोलाविले. ते त्याला म्हणाले, "तुला बरे केले म्हणून
तू देवाला गौरव द्यावे. हा मनुष्य पापी आहे हे आम्हांला
माहीत आहे."

25त्या मनुष्याने उत्तर दिले, "तो पापी आहे की नाही हे
मला माहीत नाही. परंतु हे मला नक्की माहीत आहे की,
मी पूर्वी आंधळा होतो आणि आता मला दिसते."

26यहूदी पुढाऱ्यांनी विचारले, "त्याने तुला काय केले?
त्याने तुझे डोळे कसे बरे केले?" 27त्या मनुष्याने उत्तर
दिले, "ते मी तुम्हांला अगोदरच सांगितले आहे. परंतु
तुम्ही माझे ऐकत नाही. पुन्हा तुम्हांला ते ऐकावेसे वाटते
काय? तुम्हांलाही त्याचे शिष्य व्हावयाची इच्छा आहे काय?"

28यहूदी पुढारी फार संतापले आणि त्याला फारच वाईट
रीतीने बोलू लागले. ते त्याला म्हणाले, "तू त्याचा शिष्य
आहेस. आम्ही तर मोशेचे शिष्य आहोत. 29देव मोशेशी
बोलत असे हे आम्हांला माहीत आहे. परंतु हा मनुष्य
कोण, कोठून आला हे आम्हांला माहीत नाही."

30त्या मनुष्याने उत्तर दिले, "ही फारच विचित्र गोष्ट
आहे. येशू कोठून आला हे तुम्हांला माहीत नाही. परंतु
त्याने माझे डोळे बरे केले. 31देव पापी लोकांचे ऐकत
नाही हे आपणा सर्वांना माहीत आहे. पण जो त्याची उपासना
करतो आणि त्याची आज्ञा पाळतो त्याचेच तो ऐकेल.
32जो मनुष्य जन्मजात आंधळा होता, त्याला दृष्टी येण्याची
ही पहिलीच वेळ आहे. 33हा मनुष्य देवाकडूनच आला
असला पाहिजे. जर तो देवाकडून आला नसता तर त्याला
असे काहीच करता आले नसते."

34यहूदी पुढाऱ्यांनी उत्तर दिले, "तू तर पापात जन्मला
आहेस तू आम्हांला शिकवू पाहतोस काय?" आणि यहूदी
पुढाऱ्यांनी त्या मनुष्याला तेथून हुसकून लावले.

## आध्यात्मिक आंधळेपणा

35यहूदी पुढाऱ्यांनी त्या मनुष्याला बळजबरीने हुसकावून
लावले, हे येशूने ऐकले, म्हणून येशू त्या मनुष्याला भेटला
आणि म्हणाला, "तू मनुष्याच्या पुत्रावर विश्वास ठेवतोस
काय?" 36त्या मनुष्याने विचारले, "महाराज, हा मनुष्याचा
पुत्र कोण? मला सांगा, म्हणजे मला त्याच्यावर विश्वास
ठेवता येईल."

37येशू त्याला म्हणाला, "तू त्याला अगोदरच पाहिले
आहेस. मनुष्याचा पुत्र आता तुझ्याशी बोलत आहे."

38"होय, प्रभु, मी विश्वास ठेवतो." त्या मनुष्याने उत्तर
दिले. मग त्या मनुष्याने खाली वाकून येशूला वंदन केले.

39येशू म्हणाला, "जगाचा न्याय व्हावा म्हणून मी जगात
आलो आहे. मी आलो आहे तो यासाठी की, जे आंधळे
आहेत त्यांना दिसावे. आणि आम्हांला पाहता येते असे
वाटणारे आंधळे व्हावेत."

40परुश्यांतील काही जण येशूच्या आजूबाजूला होते.
त्यांनी येशूला हे बोलताना ऐकले. आणि त्यांनी विचारले,
"काय, आम्हीसुद्धा आंधळे आहोत असे तुला म्हणायचे
आहे काय?"

41येशू म्हणाला, "तुम्ही जर खरोखरच आंधळे (समज
नसलेले) असता, तर तुम्ही पापाबद्दल दोषी ठरला नसता.
परंतु 'आम्हांस दिसते' असे तुम्ही म्हणता (तुम्ही काय
करता हे जाणता) म्हणून तुम्ही दोषी आहात."

## मेंढपाळ आणि त्याची मेंढरे

10 येशू म्हणाला, "मी तुम्हांला खरे तेच सांगतो.
जेव्हा एखादा मनुष्य मेंढवाड्यात प्रवेश करतो,
तेव्हा त्याने दाराचाच उपयोग करावा. जर तो दुसऱ्या
मार्गाने चढतो तर तो लुटारू आहे. तो मेंढरे चोरण्याचा
प्रयत्न करीत आहे, 2परंतु मेंढरांची काळजी घेणारा
दारातूनच आत जातो. तो मेंढपाळ आहे. 3दारावरचा
पहारेकरी मेंढपाळासाठी दार उघडतो आणि मेंढरे आपल्या
मेंढपाळाचा आवाज ऐकतात. मेंढपाळ आपल्या मेंढरांना
त्यांच्या नावाने हाका मारतो. आणि त्यांना तो बाहेर घेऊन
जातो. 4आपली सर्व मेंढरे बाहेर पडल्यावर तो त्यांच्या पुढे
पुढे चालतो. (त्यांचे नेतृत्व करतो). मेंढरे त्याच्या मागोमाग
जातात. कारण ती त्याचा आवाज ओळखतात. 5अनोळखी
माणसांच्या मागे मेंढरे कधीच जाणार नाहीत. ती त्या
माणसापासून दूर पळून जातील. कारण त्यांना त्यांचा आवाज
परिचयाचा नसतो. 6येशूने लोकांना हा दाखला सांगितला.
परंतु तो काय सांगत आहे हे लोकांना समजले नाही.

## येशू उत्तम मेंढपाळ आहे

7म्हणून येशू पुन्हा म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो.
मी मेंढरांचे दार आहे. 8माझ्याअगोदर आलेले सर्व चोर व
लुटारू होते. मेंढरांनी त्यांचे आवाज ऐकले नाहीत. 9मी
दार आहे. जो माझ्याद्वारे आत जातो त्याचे तारण होईल.
त्याला आत येता येईल व बाहेर जाता येईल. त्याला
पाहिजे ते सर्व त्याला मिळेल. 10चोर चोरी करायला, ठार
मारायला आणि नाश करायला येतो. परंतु मी जीवन
देण्यासाठी आलो. असे जीवन जे भरपूर आणि चांगले
आहे.

11“मी चांगला मेंढपाळ आहे. चांगला मेंढपाळ आपल्या
मेंढरासाठी स्वत:चा जीव देतो. 12ज्याला मजुरी देऊन
मेंढरे राखायला ठेवलेले असते तो मेंढपाळापेक्षा निराळा
असतो. मजुरीवर मेंढरे राखणारा कळपाचा मालक नसतो.
मेंढपाळ हाच कळपाचा मालक असतो. म्हणून मजुरीवर
काम करणारा माणूस लांडगा येताना पाहून मेंढरे सोडतो
आणि पळून जातो. मग लांडगा मेंढरांवर हल्ला करून
त्यांची दाणादाण करतो. 13मजूर पळून जातो कारण तो
रोजंदारीवरचा कामगार असतो. तो मेंढरांची खरी काळजी
करीत नाही.

14–15“मी मेंढरांची (लोकांची) काळजी घेणारा मेंढपाळ
आहे. जसा पिता मला ओळखतो तसा मी माझ्या मेंढरांना
ओळखतो. आणि जसा मी पित्याला ओळखतो तशी माझी
मेंढरे मला ओळखतात. या मेंढरांसाठी मी आपला जीव
देतो. 16माझी दुसरीही मेंढरे आहेत ती येथे या कळपात
नाहीत. त्यांनाही मला मार्गदर्शन केले पाहिजे. ते माझा
आवाज ऐकतील आणि भविष्यकाळात एक कळप आणि
एक मेंढपाळ असे होईल. 17मी आपला जीव देतो म्हणून
माझा पिता मजवर प्रीति करतो. मी आपला जीव परत
घेण्याकरिता देतो. 18तो कोणी माझ्यापासून घेत नाही. मी
माझा स्वत:चा जीव स्वत:च्या इच्छेने देतो. माझा जीव
देण्याचा मला अधिकार आहे. आणि मला तो परत
घेण्याचाही अधिकार आहे. हेच करण्याची माझ्या पित्याने
मला आज्ञा दिली आहे.”

19येशूने सांगितलेल्या ह्या गोष्टींमुळे यहूदी लोकांचे
आपापसात एकमत होईना. 20यहूदी लोकांपैकी पुष्कळजण
म्हणाले, “याला भूत लागले आहे. म्हणून याचे डोके
ठिकाणावर नाही. त्याचे का ऐकावे?”

21परंतु दुसरे काही जण म्हणाले, “हा करतो तशा
गोष्टी भूताने डोके फिरविलेला मनुष्य करीत नाही. भूत
आंधळ्या माणसाचे डोळे बरे करील काय? मुळीच नाही!”

22यरुशलेमात साजरा होणारा समर्पणाचा सण* जवळ
आला. तो हिवाळा होता. 23येशू मंदिरातील शलमोनाच्या
देवडीत* त होता. 24यहूदी लोक येशूच्याभोवती जमा
झाले. आणि म्हणाले, “किती दिवस तुम्ही आम्हांला असे
गोंधळात ठेवणार आहात? जर तुम्हीच ख्रिस्त असाल तर
आम्हांला तसे स्पष्टच सांगा!”

## येशूच्या विरोधात यहूदी पुढारी

25येशूने उत्तर दिले, “मी तुम्हांला आधीच सांगितले.
परंतु तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवला नाही. मी माझ्या
पित्याच्या नावाने जी कामे करतो. ती कामे सुध्दा मी
कोण आहे याची साक्ष देतात. 26पण तुम्ही विश्वास ठेवीत
नाही. कारण तुम्ही माझी मेंढरे (लोक) नाहीत. 27माझी
मेंढरे माझी वाणी ऐकतात. मी त्यांना ओळखतो. आणि ती
माझ्यामागे येतात. 28मी माझ्या मेंढरांना अनंतकाळचे जीवन
देतो. ती कधीच मरणार नाहीत. आणि त्यांना कोणीच
माझ्या हातून हिरावून घेणार नाही. 29माझ्या पित्याने माझी
मेंढरे माझ्या हाती दिली आहेत. तो सर्वांहून थोर आहे.
माझ्या पित्याच्या हातून ती कोणी हिरावून घेणार नाही.
30माझा पिता आणि मी एक आहोत.”

31तेव्हा यहूदी पुढाऱ्यांनी येशूला ठार मारण्यासाठी पुन्हा
धोंडे उचलले.

32परंतु येशू त्यांना म्हणाला, “पित्यापासून आलेल्या
कितीतरी चांगल्या गोष्टी मी केल्या. त्या गोष्टी तुम्ही
पाहिल्या आहेत. त्यापैकी कोणत्या चांगल्या गोष्टीसाठी
तुम्ही मला जिवे मारीत आहात?”

33यहूदी पुढाऱ्यांनी उत्तर दिले, “तुम्ही केलेल्या
कोणत्याही चांगल्या गोष्टींसाठी आम्ही तुम्हांला मारीत
नाही. परंतु तुम्ही ज्या गोष्टी बोलता त्या देवाविरुद्ध आहेत.
तुम्ही फक्त मानव आहात, पण स्वत:ला देवासारखेच
आहोत असे मानता! आणि म्हणून आम्ही तुम्हांला धोंडमार
करून ठार करीत आहोत!”

34येशूने उत्तर दिले, “तुमच्या नियमशास्त्रात असे लिहिले
आहे; ‘मी म्हणालो, तुम्ही देव आहात’* 35ज्या लोकांना
देवाने त्याची आज्ञा वचने दिली त्यांच्याविषयी ते सांगते.
पवित्र शास्त्रात त्या लोकांना देवाने असे म्हटले आणि
पवित्र शास्त्र नेहमीच खरे आहे.

36त्याच्या कामासाठी देवाने मला निवडले. देवाने मला
जगात पाठविले. मी देवाचा पुत्र आहे. आणि तुम्ही म्हणता,
मी बोलतो त्या गोष्टी देवाविरुद्ध आहेत, 37जे माझा पिता
करतो ते जर मी करत नाही, तर तुम्ही माझ्या सांगण्यावर
विश्वास ठेवू नका. 38परंतु माझा पिता करतो तीच कृत्यांवर
जर मी करतो, तर मी करतो त्या माझ्या गोष्टींवर विश्वास
ठेवा. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवणार नाही. पण मी
करतो त्या गोष्टींवर तरी विश्वास ठेवा. मग तुम्ही ओळखाल
आणि समजून घ्याल की, पिता माझ्यामध्ये आहे, आणि
मी पित्यामध्ये आहे.”

39यहूदी लोकांनी येशूला पुन्हा धरण्याचा प्रयत्न केला.
परंतु येशू त्यांच्यातून निघून गेला. 40मग येशू यार्देन नदी
ओलांडून माघारी गेला. येशु जेथे योहान लोकांना बाप्तिस्मा
देत असे तेथे गेला. येशू तेथेच राहिला. 41आणि पुष्कळ
लोक त्याच्याकडे आले. लोक म्हणाले, “योहानाने कधी
चमत्कार केला नाही. परंतु योहानाने या मनुष्याविषयी जे
सांगितले ते खरे आहे.”

42आणि त्याठिकाणी अनेक लोकांनी येशूवर विश्वास
ठेवला.

---

**समर्पणाचा सण** डिसेंबर महिन्यात यहूदी लोक साजरा करीत असलेला खास आठवडा.

**शलमोनाच्या देवडीत** मंदिराच्या पूर्वेकडील भाग. हा छप्पराने आच्छादित केलेला होता.

**मी … आहात** स्तोत्र. 82:6

## लाजराचा मृत्यू

11 लाजर नावाचा एक मनुष्य आजारी होता. तो बेथानी गावात राहत होता. याच गावात मार्था आणि मरीया राहत होत्या. 2ज्या मरीयेने प्रभूला सुगंधी तेल लावले व त्याचे पाय आपल्या केसांनी पुसले तिचा हा भाऊ होता. 3त्या बहिणींनी येशूला निरोप पाठविला की, हे प्रभु ज्याच्यावर तू प्रीति करतोस तो आजारी आहे.

4पण येशूने हे ऐकून म्हटले, "हा आजार मरणासाठी नव्हे तर देवाच्या गौरवासाठी आहे. याद्वारे देवाचे गौरव व्हावे यासाठी हा आजार आहे". 5येशू मार्था, मरीया व लाजर यांच्यावर प्रीति करीत असे. 6म्हणून तो आजारी आहे हे ऐकल्यावरही तो होता त्याच ठिकाणी दोन दिवस राहिला. 7नंतर त्याने शिष्यांना म्हटले, "आपण यहूदीयात परत जाऊ."

8शिष्य त्याला म्हणाले, "गुरुजी, यहूदी आपणांस दगडमार करू पाहत होते आणि आपण पुन्हा तेथे जात आहात काय?"

9येशूने उत्तर दिले, "दिवसाचे बारा तास असतात की नाहीत? जर एखादा दिवसा चालतो, तर त्याला ठेच लागत नाही. कारण तो या जगाचा प्रकाश पाहतो. 10पण जर कोणी रात्री चालतो, तर त्याला ठेच लागते कारण त्याच्याकडे प्रकाश नसतो."

11या गोष्टी बोलल्यानंतर तो त्यांना म्हणाला, "आपला मित्र लाजर झोपी गेला आहे. पण मी त्याला झोपेतून जागे करावे तरीही जात आहे." 12तेव्हा त्याचे शिष्य म्हणाले, "प्रभु, तो झोपी गेला असेल तर बरा होईल." 13पण येशू खरे तर त्याच्या मरणाविषयी बोलला होता. पण तो त्याच्या नेहमीच्या झोपेविषयी बोलत आहे, असे त्यांना वाटले. 14तेव्हा येशूने त्यांना स्पष्ट सांगितले, "लाजर मेला आहे. 15आणि मी तेथे नव्हतो म्हणून मला तुमच्यामुळे आनंद वाटतो. यासाठी की तुम्ही विश्वास धरावा. आपण त्याच्याकडे जाऊ या." 16तेव्हा दिदुम म्हटलेला थोमा शिष्यांना म्हणाला, "आपणही त्याच्याबरोबर जाऊ या अशासाठी की आपणही त्याच्याबरोबर मरू."

## बेथानीत येशू

17येशू आल्यावर त्याला समजले की, लाजराला चार दिवसांपूर्वीच कबरेत ठेवण्यात आले आहे. 18बेथानी यरुशलेमापासून तीन किलोमीटर अंतरापेक्षा कमी होते. 19आणि पुष्कळसे यहूदी मार्था, मरीयेकडे त्यांचा भाऊ मेला याबद्दल सांत्वन करण्यासाठी आले होते.

20जेव्हा मार्थाने ऐकले की, आपल्या घरी येशू येत आहे तेव्हा ती त्याला भेटायला बाहेर गेली, पण मरीया घरातच राहिली. 21"प्रभु" मार्था येशूला म्हणाली, "तू जर येथे असतास तर माझा भाऊ मेला नसता, 22पण मला माहीत आहे की, तू जे मागशील ते देव तुला देईल."

23येशू म्हणाला, "तुझा भाऊ पुन्हा उठेल."

24मार्था म्हणाली, "मला माहीत आहे शेवटच्या दिवशी पुनरुत्थानाच्या वेळेस तो पुन्हा उठेल."

25येशू तिला म्हणाला, "मी पुनरुत्थान आणि जीवन आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असेल तरी जगेल. 26आणि जो कोणी जगतो आणि माझ्यावर विश्वास ठेवतो. तो कधीच मरणार नाही. तू यावर विश्वास ठेवतेस काय?" 27"होय प्रभु," ती त्याला म्हणाली, "तू ख्रिस्त आहेस असा मी विश्वास धरते. तू या जगात आलेला आहे देवाचा पुत्र आहेस."

## येशू रडतो

28आणि असे म्हटल्यानंतर ती परत गेली आणि आपली बहीण मरीया हिला एका बाजूला बोलाविले आणि म्हणाली, "गुरुजी येथे आहेत. आणि ते तुला विचारीत आहेत." 29जेव्हा मरीयेने हे ऐकले तेव्हा ती लगेच उठली आणि त्याच्याकडे गेली. 30आता तोपर्यंत येशू त्या खेड्याच्या आत आला नव्हता. तर मार्था त्याला भेटली, तेथेच अजूनपर्यंत होता. 31तेव्हा जे यहूदी तिच्या घरात तिचे सांत्वन करीत होते ते मरीया लगबगीने उठून बाहेर गेली असे पाहून ती कबरेकडे शोक करायला गेली असे समजून तिच्यामागे गेले. 32मग जेथे येशू होता तेथे मरीया आल्यावर ती त्याला पाहून त्याच्या पाया पडली व त्याला म्हणाली, "प्रभु, आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता."

33मग येशू तिला रडताना पाहून व तिच्याबरोबर असलेल्या यहूद्यांनाही रडताना पाहून आत्म्यात व्याकुळ झाला व हेलावून गेला. 34तो म्हणाला, "तुम्ही त्याला कोठे ठेवले आहे?" ते म्हणाले, "प्रभु, या आणि पाहा." 35येशू रडला.

36तेव्हा यहूदी म्हणाले, "पहा! त्याला तो किती आवडत होता." 37पण त्यांच्यातील कित्येक म्हणाले, "ज्याने आंधळ्याचे डोळे उघडले, त्या या मनुष्याला लाजराला मरणापासून वाचविता येऊ नये काय?"

## येशू लाजराला जिवंत करतो

38मग येशू पुन्हा अंत:करणात विव्हळ झाला असता कबरेकडे आला. ती गुहा होती. आणि तिच्यावर दगड लोटला होता. 39येशूने म्हटले, "हा दगड काढा."

मार्था म्हणाली, "पण प्रभु, लाजर मरून चार दिवस झाले आहेत, त्याला आता दुर्गंधी येत असेल." ती मृत लाजराची बहीण होती.

40येशूने तिला म्हटले, "जर तू विश्वास धरशील तर देवाचे गौरव पाहशील, असे मी तुला सांगितले नव्हते काय?"

41मग त्यांनी दगड बाजूला केला. तेव्हा येशू वर पाहून म्हणाला, "पित्या, तू माझे ऐकले, म्हणून मी तुझे उपकार मानतो. 42आणि तू नेहमीच माझे ऐकतोस हे मला माहीत आहे. पण जो लोकसमुदाय आजूबाजूला उभा आहे

त्यांच्यासाठी मी हे बोललो. यासाठी की तू मला पाठविले
आहेस यावर त्यांनी विश्वास ठेवावा."
43असे बोलल्यावर त्याने मोठ्याने हाक मारली, "लाजरा,
बाहेर ये." 44मग जो मेला होता तो लाजर जिवंत होऊन
बाहेर आला. त्याचे हात पाय वस्त्रांनी बांधले होते व तोंड
रुमालाने झाकले होते. येशू लोकांना म्हणाला, "त्याला
मोकळे करा आणि जाऊ द्या."

## यहूदी पुढारी येशूला ठार मारण्याचा कट करतात

***(मत्तय 26:1-5; मार्क 14:1-2; लूक 22:1-2)***

45जे यहूदी मरीयेकडे आले होते, त्यांनी येशूने जे केले
ते पाहिले आणि त्यांच्यापैकी पुष्कळांनी त्याच्यावर विश्वास
ठेवला. 46पण त्यांच्यातील काहींनी परूश्यांकडे जाऊन
येशूने जे केले होते ते त्यांना सांगितले. 47तेव्हा मुख्य
याजकांनी व परूश्यांनी सभा भरवून म्हटले, हा मनुष्य
पुष्कळ चमत्कार करीत आहे. 48आम्ही त्याला असेच
राहू दिले तर सर्व लोक त्याच्यावर विश्वास ठेवतील
आणि रोमी येऊन आमचे मंदिर व राष्ट दोन्हीही घेतील."
49तेव्हा त्यांच्यातील कयफा नावाची व्यक्ति त्या वर्षी
प्रमुख याजक होती. तो त्यांना म्हणाला, "तुम्हांला काहीच
माहिती नाही! 50तुम्ही हे लक्षात घेत नाही की, सर्व
लोकांसाठी एका माणसाने मरणे हे सर्व राष्ट्राचा नाश
होण्यापेक्षा हिताचे आहे."
51तो हे स्वत: होऊन बोलला नाही तर त्यावर्षी तो
प्रमुख याजक होता म्हणून त्याने संदेश दिला की, येशू
त्या राष्टाकरिता मरणार आहे. 52केवळ त्या राष्टासाठी
असे नाही, तर यासाठी की, त्याने देवाच्या पांगलेल्यांना
एकत्र करावे, म्हणून तो मरणार आहे.
53म्हणून त्या दिवसापासून त्यांनी त्याला जिवे मारण्याची
मसलत केली. 54यामुळे येशू तेव्हापासून उघडपणे
यहूद्यांमध्ये फिरला नाही. त्याऐवजी तो रानाजवळच्या
प्रदेशातील एफ्राईम नावाच्या नगरात गेला व तेथे शिष्यांसह
राहिला. 55तेव्हा यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला
होता आणि सणाअगोदर पुष्कळ लोक आपणांस शुद्ध
करायला देशातून वर यरुशलेमेस गेले.
56ते येशूचा शोध करीत राहिले. आणि मंदिरात उभे
असताना एकमेकास म्हणाले, "तुम्हाला काय वाटते? तो
सणाला येणार नाही काय?" 57पण मुख्य याजक व
परूश्यांनी अशी आज्ञा केली होती की, येशू कोठे आहे हे
ज्याला कळेल त्याने त्यांना कळवावे, म्हणजे ते त्याला
पकडू शकतील.

## येशू आपल्या मित्रांबरोबर बेथानी येथे

***(मत्तय 26:6-13; मार्क 14:3-9)***

12 मग येशू वल्हांडण सणाच्या अगोदर सहा दिवस
असताना बेथानीस आला. येशूने ज्याला
मेलेल्यातून उठविले होते तो लाजर तेथे होता. 2म्हणून
तेथे त्यांनी त्याच्यासाठी संध्याकाळचे भोजन आयोजित
केले. मार्था जेवण वाढत होती आणि लाजर त्यांच्याबरोबर
जेवायला बसला होता. 3तेव्हा मरीयेने अर्धा किलो शुद्ध
जटामांसीचे मोलवान सुगंधी तेल घेऊन येशूच्या पायावर
ओतले व आपल्या केसाने त्याचे पाय पुसले व सर्व घर
त्या सुवासाने भरले.
4पण त्याच्या शिष्यांपैकी एक, यहूदा इस्कर्योत ज्याने
नंतर त्याचा विश्वासघात केला होता, त्याने विरोध केला.
म्हणून तो म्हणाला, 5"हे सुगंधी द्रव्य विकून आलेले पैसे
गरिबांना का देण्यात आले नाहीत? ते तेल चांदीच्या तीनशे
रुपयाच्या किमतीचे होते." 6गरिबांचा कळवळा आला
म्हणून त्याने असे म्हटले नाही, तर तो चोर होता आणि
त्याच्याजवळ पेटी होती व तिच्यात जे पैसे टाकण्यात येत,
ते तो चोरून घेई म्हणून तो असे म्हणाला.
7"तिला एकटे सोडा," येशूने उत्तर दिले, "मला पुरण्याच्या
दिवसासाठी ते तेल राखून ठेवण्यात आले. 8तुमच्यात
गरीब नेहमीच असतील, पण मी तुमच्यात नेहमी असणार
नाही."

## लाजराविरुद्ध कट

9मग तो तेथे आहे हे यहूदीयांतील बऱ्याच जणांना
कळले. तेव्हा फक्त येशूसाठीच नव्हे तर ज्याला त्याने
मेलेल्यातून उठविले होते त्या लाजराला पाहावे म्हणून ते
आले.
10तेव्हा मुख्य याजकांनी लाजराला मारण्याचा कट
केला. 11कारण त्याच्यामुळे पुष्कळ लोक येशूकडे जात
होते व त्याच्यावर विश्वास ठेवीत होते.

## येशू यरुशलेमात प्रवेश करतो

***(मत्तय 21:1-11; मार्क 11:1-11; लूक 19:28-40)***

12दुसऱ्या दिवशी सणासाठी आलेल्या मोठ्या जमावाने
ऐकले की येशू यरुशलेमकडे येत आहे. 13त्यांनी खजुरीच्या
झाडाच्या फांद्या घेतल्या आणि त्याला भेटण्यास गेले. ते
ओरडून जयघोष करीत होते.

"होसान्ना! प्रभूच्या नावाने येणारा धन्यवादित असो!
इस्राएलचा राजा धन्यवादित असो!

*स्तोत्र. 118:25-26*

14येशूला एक शिंगरू दिसले त्यावर तो बसला. आणि
संदेष्ट्यांनी लिहिल्याप्रमाणे हे झाले. ते असे:

15"सीयोनेच्या कन्ये, भिऊ नको; पहा, तुझा राजा येत
आहे; गाढवीच्या शिंगरावर बसून येत आहे."

*जखऱ्या 9:9*

16सुरवातीला शिष्यांना या गोष्टी समजल्या नाहीत पण
येशूचे गौरव झाल्यावर त्यांना जाणीव झाली की,

त्याच्याविषयी या गोष्टी लिहिल्या होत्या आणि त्यांनी या
गोष्टी त्याच्यासाठी केल्या.

## लोक येशूविषयी सांगतात

17मग जो जमाव त्याने लाजरला कबरेतून आणलेले व
मरणातून उठविलेले पाहत होता तो जमाव सातत्याने
त्याच्याविषयी सांगत होता. 18पुष्कळ लोक त्याला जाऊन
भेटले कारण त्याने तो चमत्कार केला होता हे त्यांनी
ऐकले होते. 19म्हणून परूशी एकमेकांस म्हणाले, "पहा,
याच्यापुढे आपले काही चालत नाही. सगळे जग त्याच्यामागे
चालले आहे!"

## येशू जीवन आणि मरण याविषयी बोलतो

20आता सणाच्या वेळी उपासनेसाठी जे लोक वर गेले
होते त्यांच्यात काही ग्रीक होते. 21ते फिलिप्पाकडे आले,
जो गालीलातील बेथसैदा येथील होता, त्यांनी विनंति केली,
"महाराज, येशूला पाहावे अशी आमची इच्छा आहे."
22फिलिप्प अंद्रियाकडे हे सांगण्यास गेला; नंतर अंद्रिया व
फिलिप्प यांनी येशूला सांगितले.

23येशू त्यांना म्हणाला, "मनुष्याच्या पुत्राचे गौरव होण्याची
वेळ आली आहे. 24मी तुम्हांला खरे सांगतो, गव्हाचा
दाणा भूमीत पडून मेला नाही, तर एकटाच राहतो, पण तो
मेला तर पुष्कळ फळ देतो. 25जो आपल्या जिवावर प्रीति
करतो तो त्याला गमावेल पण जो या जगात आपल्या
जिवाचा द्वेष करतो तो त्याला अनंतकाळाच्या जीवनासाठी
राखील. 26जो कोणी माझी सेवा करतो त्याने मला अनुसरले
पाहिजे. जेथे मी असेन तेथे माझे सेवकही असतील. जो
माझी सेवा करतो त्याचा सन्मान माझा पिता करील."

## येशू त्याच्या मरणाविषयी बोलतो

27"माझे अंत:करण व्याकूळ झाले आहे. आणि मी
आता काय सांगू? "पित्या माझी या घटकेपासून सुटका
कर? केवळ याच कारणासाठी या वेळेला मी आलो.
28पित्या, तुझे गौरव कर!"

तेव्हा आकाशातून वाणी झाली की, "मी त्याचे गौरव
केले आहे व पुन्हाही त्याचे गौरव करीन." 29जो जमाव
तेथे होता त्याने हे ऐकले व म्हटले, "गडगडाट झाला."
दुसरे म्हणाले, देवदूत त्याच्याशी बोलला.

30येशू म्हणाला, "हा आवाज तुमच्यासाठी होता.
माझ्यासाठी नव्हे. 31या जगाचा न्याय होण्याची आता वेळ
आली आहे. या जगाच्या राजकुमाराला हाकलून देण्यात
येईल. 32परंतु मी, जेव्हा पृथ्वीपासून वर उचलला जाईन,
तेव्हा मी सर्व लोकांना माझ्याकडे ओढीन." 33त्याने हे
यासाठी म्हटले की कोणत्या प्रकारच्या मरणाने तो मरणार
आहे हे त्याला दाखवायचे होते.

34जमाव म्हणाला, "ख्रिस्त सर्वकाळ राहतो असे आम्ही
नियमशास्त्रातून ऐकले आहे, तर मनुष्याच्या पुत्राला उंच
केले पाहिजे असे तुम्ही का म्हणता? मनुष्याचा पुत्र कोण
आहे?"

35मग येशू त्यांना म्हणाला, "आणखी थोडा वेळ प्रकाश
तुमच्यामध्ये असणार आहे. तुमच्यामध्ये प्रकाश आहे
तोपर्यंत तुम्ही चाला. यासाठी की अंधाराने तुमच्यावर
मात करू नये. कारण जो अंधारात चालतो त्याला आपण
कोठे जातो हे कळत नाही. 36तुम्ही प्रकाशाची मुले व्हावे
म्हणून तुम्हांला प्रकाश आहे तोपर्यंत त्याच्यावर विश्वास
ठेवा." येशू या गोष्टी बोलला, मग तो निघून गेला. आणि
त्यांच्यापासून गुप्त राहिला.

## यहूदी येशूवर विश्वास ठेवण्याचे नाकारतात

37येशूने इतके चमत्कार त्यांच्यासमोर केलेले
असतानाही ते त्याच्यावर विश्वास ठेवीनात. 38यासाठी
की, यशया संदेष्टेयाचे वचन पूर्ण व्हावे :

"प्रभु, आमच्या संदेशावर कोणी विश्वास ठेवला आहे.
आणि प्रभूचा हस्तप्रताप कोणास प्रगट झाला आहे?"
*यशया 53:1*

39या कारणासाठी त्यांनी विश्वास ठेवला नाही, जसे
यशया एके ठिकाणी म्हणतो,

40"त्यांनी डोळ्यांनी पाहू नये, व अंत:करणाने समजू
नये, फिरू नये व मी त्यांना बरे करू नये म्हणून त्याने
त्यांचे डोळे आंधळे केले आणि त्यांचे अंत:करण कठीण
केले आहे." *यशया 6:10*

41यशया असे म्हणाला, कारण त्याने त्याचे गौरव पाहिले
आणि तो त्याच्याविषयी बोलला. 42तरीही अधिकाऱ्यातील
पुष्कळांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. पण आपणांस
सभास्थानाच्या बाहेर घालवू नये म्हणून परूश्यांमुळे त्यांनी
हे पत्करले नाही. 43कारण त्यांना देवाच्या गौरवापेक्षा
मनुष्याकडील गौरव अधिक आवडले.

## येशूची शिकवण लोकांचा न्याय करील

44तेव्हा येशू मोठ्याने बोलला, "जो माझ्यावर विश्वास
ठेवतो तो माझ्यावर विश्वास ठेवतो असे नाही, तर ज्याने
मला पाठविले त्याच्यावर विश्वास ठेवतो. 45आणि जो
मला पाहतो, तो ज्याने मला पाठविले त्याला पाहतो. 46मी
प्रकाश असा जगात आलो आहे. यासाठी की जो कोणी
माझ्यावर विश्वास ठेवतो त्याने अंधारात राहू नये.

47"आणि जो कोणी माझी वचने ऐकून पाळीत नाही,
त्याचा न्याय मी ठरवीत नाही. कारण मी जगाचा न्याय
करण्यासाठी आलो नाही, तर जगाच्या तारणासाठी आलो
आहे. 48जो माझा स्वीकार करीत नाही व माझ्या
वचनाप्रमाणे वागत नाही त्याचा न्याय करणारा कोणी

एक आहे. जे वचन मी बोललो तेच शेवटच्या दिवशी
त्याचा न्याय करील. 49कारण मी स्वत:हून बोललो असे
नाही तर मी काय सांगावे व काय बोलावे याविषयी ज्या
पित्याने मला पाठविले, त्यानेच मला आज्ञा केली आहे.
50आणि त्याची आज्ञा अनंतकाळचे जीवन आहे. हे मला
ठाऊक आहे, म्हणून जे काही मी बोलतो ते जसे पित्याने
मला सांगितले तसेच बोलतो."

## येशू त्याच्या शिष्यांचे पाय धुतो

13 मग वल्हांडण सणापूर्वी येशूने आपण या जगातून
निघून पित्याकडे जावे असा समय आला आहे,
हे जाणून आपले स्वत:चे लोक जे जगात होते त्यांच्यावर
शेवटपर्यंत प्रीति केली. 2मग संध्याकाळचे भोजन होण्याच्या
वेळेस सैतानाने शिमोनाचा मुलगा यहूदा इस्कर्योत याच्या
मनात त्याला शत्रूंच्या हाती द्यावे असे आधीच घालून दिले
असताना, 3आपल्या हाती पित्याने सर्व काही दिले आहे
आणि आपण देवापासून आलो आणि आता देवाकडे जातो
हे ओळखून, 4येशू जेवणावरून उठला, त्याने आपली
बाह्यवस्त्रे काढून ठेवली व रुमाल घेऊन आपल्या कमरेस
बांधला. 5मग तो गंगाळात पाणी ओतून शिष्यांचे पाय धुऊ
लागला. आणि कमरेस बांधलेल्या रुमालाने पुसू लागला.
6मग तो शिमोन पेत्राकडे आला; पण पेत्र त्याला म्हणाला,
"प्रभु, तू माझे पाय धुणार काय?"
7येशूने उत्तर दिले, "मी आता जे करीत आहे, ते तुला
आता कळणार नाही. तर पुढे तुला कळेल." 8पेत्र त्याला
म्हणाला, "तू माझे पाय कधीही धुवायचे नाहीत."
येशूने उत्तर दिले, "जर मी तुझे पाय धुतले नाहीत तर
तुला माझ्या बरोबर वाटा नाही."
8शिमोन पेत्राने उत्तर दिले, 9"मग प्रभु माझे पायच नव्हे
तर हात व डोकेही धुवा."
10येशूने उत्तर दिले, "ज्याची आंघोळ झाली आहे, त्याचे
फक्त पाय धुतले तरी चालेल, कारण तो स्वच्छच आहे.
तुम्ही स्वच्छ आहात पण सर्वच नाहीत." 11आपल्याला
कोण धरून देणार हे येशूला माहीत होते, म्हणून "तुम्ही
सर्वच शुद्ध नाहीत" असे तो म्हणाला.
12जेव्हा त्याने त्याचे पाय धुण्याचे संपविले तेव्हा त्याने
आपली बाह्यवस्त्रे घातली व आपल्या जागेवर आला.
त्याने त्यांना विचारले, "मी काय केले हे तुम्हांला समजले
काय? 13तुम्ही मला 'गुरुजी' आणि 'प्रभु' म्हणता आणि
योग्य म्हणता, कारण मी तोच आहे. 14म्हणून मी जो प्रभु
आणि गुरू असूनही मी तुमचे पाय धुतले तर तुम्हीही
एकमेकांचे पाय धुवावे. 15कारण जसे मी केले तसे तुम्हीही
करावे म्हणून मी तुम्हांला उदाहरण घालून दिले. 16मी
खरे सांगतो, दास आपल्या मालकापेक्षा श्रेष्ठ नाही आणि
पाठविलेला ज्याने पाठविले त्याच्यापेक्षा श्रेष्ठ नाही. 17या
गोष्टी जर तुम्ही समजता आणि त्या तुम्ही जर केल्या तर
तुम्ही आशीर्वादित आहात.

18"मी तुम्हां सर्वांविषयी बोलत नाही. ज्यांना मी निवडले
ते मला माहीत आहेत." परंतु पवित्र शास्त्रात जसे लिहिले
आहे तसे घडलेच पाहिजे : 'जो माझी भाकर खातो त्याने
माझ्यावर आपली टाच उचलली आहे.'*
19हे होण्याअगोदरच मी तुम्हांस सांगतो, यासाठी की
जेव्हा हे होईल तेव्हा तुम्ही विश्वास धरावा, की मी तो
आहे. 20मी तुम्हांस खरे सांगतो ज्या कोणाला मी पाठवितो
त्याला जो स्वीकारतो, तो मला स्वीकारतो, आणि जो
मला स्वीकारतो तो ज्याने मला पाठविले त्याला
स्वीकारतो."

## येशू त्याच्याविरुद्ध कोण असेल ते सांगतो

*(मत्तय 26:20-25; मार्क 14:17-21; लूक 22:21-23)*

21असे बोलल्यावर येशू आपल्या आत्म्यात व्याकुळ
झाला आणि उघडपणे म्हणाला, "मी तुम्हांला खरे सांगतो,
तुमच्यातील एकजण मला धरून देईल."
22तेव्हा तो कोणाविषयी बोलतो असा संशय धरून शिष्य
एकमेकांकडे पाहू लागले. 23आणि ज्याच्यावर येशू प्रीति
करीत असे असा त्याच्या शिष्यातील एकजण येशूच्याजवळ
खेटून बसला होता. 24शिमोन पेत्राने त्या शिष्याला खुणावले
आणि म्हणाला, "ज्याच्याविषयी तो बोलतो तो कोण आहे
हे विचार." 25तेव्हा तो तसाच येशूच्या अगदी जवळ असता
त्याला म्हणाला, "प्रभु तो कोण आहे?"
26येशूने उत्तर दिले, "ज्याला मी भाकरीचा तुकडा ताटात
भिजवून देईन तोच तो आहे." मग त्याने भाकरीचा तुकडा
ताटात बुडवून घेतला व तो शिमोनाचा मुलगा यहूदा
इस्कर्योत याला दिला. 27त्याने भाकरीचा तुकडा घेतला
आणि सैतानाने त्याचा ताबा घेतला. मग येशूने त्याला
म्हटले, "तुला जे करायचे आहे ते लवकर कर." 28पण
त्याने त्याला काय सांगितले हे जेवणास बसलेल्यांपैकी
कोणाला कळले नाही. 29कारण यहूदाजवळ पैशाचा
व्यवहार होता. काहींना वाटले येशू त्याला भोजनास जे
पाहिजे ते आणण्यासाठी सांगत आहे किंवा गरिबाला काही
देण्याविषयी सांगत आहे. 30यहूदाने भाकर घेतल्याबरोबर
तो बाहेर गेला कारण ती वेळ रात्रीची होती.

## येशू त्याच्या मरणाविषयी बोलतो

31तो गेल्यावर येशू म्हणाला, "आता मनुष्याच्या पुत्राचे
गौरव झाले आहे आणि त्याच्याठायी देवाचे गौरव झाले
आहे. 32देव आपल्याठायी त्याचे गौरव करील. तो त्याचे
गौरव लवकर करील. 33"माझ्या मुलांनो, अजून थोडा
वेळ मी तुमच्याबरोबर आहे. तुम्ही माझा शोध कराल
आणि जसे मी यहूद्यांस सांगितले की, जेथे मी जातो तेथे
तुमच्याने येता येणार नाही. तसेच मी तुम्हांलाही आता
सांगतो.

---

**जो माझी ... आहे** स्तोत्र. 41:9

34“मी तुम्हांला नवी आज्ञा देतो की, तुम्ही एकमेकांवर
प्रीति करा, जशी मी तुम्हांवर प्रीति केली आहे तशीच
तुम्हीही एकमेकांवर प्रीति करा. 35तुमची एकमेकांवर
प्रीति असली तर सर्व ओळखतील की तुम्ही माझे शिष्य
आहात.”

## पेत्र येशूला नाकारिल

***(मत्तय 26:31-35; मार्क 14:27-31; लूक 22:31-34)***

36शिमोन पेत्र त्याला म्हणाला, “प्रभु, तुम्ही कोठे जात
आहात?”

येशूने उत्तर दिले, “जेथे मी जातो तेथे तुझ्याने येता
येणार नाही. पण नंतर तू माझ्यामागे येशील.” 37पेत्र त्याला
म्हणाला, “माझ्याने आताच तुमच्या मागे का येता येणार
नाही?” मी तुमच्यासाठी मरायला तयार आहे.”

38मग येशूने उत्तर दिले, “तू खरोखर आपला जीव
मजसाठी देशील? मी खरे सांगतो. तू मला तीन वेळा
नाकारीपर्यंत कोंबडा आरवणार नाही.”

## येशू शिष्यांचे समाधान करतो

14 “तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ नये, देवावर
विश्वास ठेवा आणि माझ्यावरही विश्वास ठेवा.
2माझ्या पित्याच्या घरात राहण्याच्या पुष्कळ जागा आहेत,
जागा नसत्या तर मी तुम्हांला सांगितले असते. कारण मी
तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. 3मी गेल्यावर
तुमच्यासाठी जागा तयार करीन आणि पुन्हा येईन. आणि
तुम्हांला माझ्याजवळ घेईन. यासाठी की जेथे मी आहे तेथे
तुम्हीही असावे. 4आणि मी कोठे जातो तिकडे जाण्याचा
मार्गही तुम्हांला ठाऊक आहे.”

5थोमा येशूला म्हणाला, “प्रभु, तुम्ही कोठे जात आहात
हे आम्हांला ठाऊक नाही. मग आम्हांला मार्ग कसा
ठाऊक असणार?”

6येशूने उत्तर दिले, “मी मार्ग, सत्य आणि जीवन आहे.
केवळ माझ्याद्वारेच पित्याजवळ जाता येते. 7जर तुम्ही
मला ओळखले असते तर माझ्या पित्यालाही ओळखले
असते, आणि आतापासून तुम्ही त्याला ओळखता व त्याला
पाहिले आहे.”

8फिलिप्प येशूला म्हणाला, “प्रभु, आम्हांला पिता दाखवा.
एवढेच आमचे मागणे आहे.

9येशूने त्याला म्हटले, “फिलिप्पा, मी इतका वेळ
तुमच्याजवळ असताना तू मला ओळखले नाहीस काय?
ज्याने मला पाहिले आहे, त्याने पित्याला पाहिले आहे. तर
मग ‘आम्हांला पिता दाखव’ असे तू कसे म्हणतोस? 10मी
पित्यामध्ये आहे व पिता मजमध्ये आहे, असा विश्वास तू
धरत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगतो त्या
माझ्या स्वत:च्या नाहीत तर माझ्यामध्ये जो पिता आहे तो
स्वत: कामे करतो. 11मी पित्यामध्ये आहे व पिता मजमध्ये
आहे असा विश्वास धरा. नाहीतर मी केलेल्या कामावरून
तरी माझ्यावर विश्वास ठेवा. 12मी तुम्हांला खरे सांगतो
मी जी कामे करतो ती कामे माझ्यावर विश्वास ठेवणाराही
करील. आणि त्यापेक्षाही मोठी कामे करील. कारण मी
पित्याकडे जातो. 13आणि तुम्ही जे काही माझ्या नावाने
माझ्याजवळ मागाल ते मी करीन यासाठी की, पुत्रामध्ये
पित्याचे गौरव व्हावे. 14जर तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ
काही मागाल तर ते मी करीन.”

## पवित्र आत्म्याचे अभिवचन

15“जर तुम्ही माझ्यावर प्रीति करित असाल, तर ज्या
आज्ञा मी करतो त्या तुम्ही पाळाल. 16आणि मी पित्याला
सांगेन आणि तो तुम्हांला दुसरा साहाय्यकर्ता देईल, यासाठी
की त्याने तुम्हांबरोबर सर्वकाळ राहावे. 17साहाय्यकर्ता
हा सत्याचा आत्मा आहे. जग त्याचा स्वीकार करू शकत
नाहीत. कारण ते त्याला पाहत किंवा ओळखत नाही. पण
तुम्ही त्याला ओळखता, कारण तो तुमच्याबरोबर राहतो,
तो तुमच्यामध्ये वास करील.

18“मी तुम्हांला अनाथ असे सोडणार नाही. मी
तुमच्याकडे येईन. 19आणखी काही वेळाने जग मला
पाहणार नाही. परंतु तुम्ही मला पाहाल. मी जगतो आहे
म्हणून तुम्हीही जगाल. 20त्या दिवशी तुम्हांला जाणीव
होईल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे आणि तुम्ही
माझ्यामध्ये आहात मी तुमच्यामध्ये आहे. 21ज्याच्याकडे
माझ्या आज्ञा आहेत आणि त्या जो पाळतो, तो असा आहे
की जो माझ्यावर प्रीति करतो. त्याच्यावर पिता प्रीति
करील. मीसुद्धा त्याच्यावर प्रीति करीन आणि स्वत:ला
त्याच्यासाठी प्रगट करीन.”

22मग यहूदा (यहूदा इस्कर्योत नव्हे) त्याला म्हणाला,
“पण प्रभु, तू आम्हांसमोर स्वत:ला का प्रगट करणार
आहेस आणि जगासमोर का नाही?”

23येशूने उत्तर दिले, “जर कोणी माझ्यावर प्रीति करतो
तर तो माझी शिकवण पाळील. माझा पिता त्याच्यावर
प्रीति करील. आम्ही त्याच्याकडे येऊ व त्याच्याबरोबर
राहू. 24जो माझ्यावर प्रीति करीत नाही, तो माझी शिकवण
पाळणार नाही. हे शब्द जे तुम्ही ऐकता ते माझे नाहीत.
ज्या पित्याने मला पाठविले त्याचे हे शब्द आहेत.”

25“मी तुम्हांजवळ राहत असतानाच तुम्हांस या गोष्टी
सांगितल्या आहेत. 26तरी ज्याला पिता माझ्या नावाने
पाठवील तो साहाय्यकर्ता म्हणजे पवित्र आत्मा तुम्हांस
सर्व शिकवील. आणि ज्या गोष्टी मी तुम्हांस सांगितल्या
त्या सर्वांची तुम्हांस आठवण करून देईल.

27“शांति मी तुमच्याजवळ ठेवतो, माझी शांति मी तुम्हांला
देतो. जसे जग देते तशी शांति मी तुम्हांला देत नाही.
तुमची अंत:करणे अस्वस्थ होऊ देऊ नका. आणि भिऊ
नका. 28‘मी जातो आणि तुम्हांकडे येणार आहे’ असे मी
तुम्हांस सांगितले ते तुम्ही ऐकले आहे, जर तुमची माझ्यावर
प्रीति असती तर मी पित्याकडे जातो याबद्दल तुम्ही आनंद

केला असता. कारण माझा पिता माझ्यापेक्षा महान आहे.
29मी तुम्हांला हे घडण्यापूर्वी सांगितले आहे. यासाठी की
जेव्हा हे घडेल तेव्हा तुम्ही विश्वास धरावा. 30मी जास्त
काळ तुमच्याशी बोलणार नाही. कारण या जगाचा अधिपती
येत आहे, तरी त्याचा माझ्यावर अधिकार नाही. 31परंतु
जगाने हे शिकले पाहिजे की, मी पित्यावर प्रीति करतो
आणि माझ्या पित्याने जी आज्ञा मला केलेली आहे, नेमके
तसेच मी करतो.

“चला आता, आपण निघू या.”

## येशू द्राक्षवेल आहे

15 मी खरा द्राक्षवेल आणि माझा पिता माळी आहे.
2तो माझ्यातील फळ न देणारी प्रत्येक फांदी
तोडून टाकतो. ज्या प्रत्येक फांद्या फळ देतात त्यांनी अधिक
फळ द्यावे म्हणून त्या द्राक्षवेलीला तो साफ करतो. 3जे
वचन मी तुम्हांला सांगितले, त्यामुळे तुम्ही आता स्वच्छ
झालाच आहा. 4तुम्ही माझ्यामध्ये राहा आणि मी तुम्हांमध्ये
राहीन. जसा फाटा वेलात राहिल्यावाचून त्याच्याने फळ
देता येत नाही तसे माझ्यामध्ये राहिल्याशिवाय तुम्हांला
फळ देता येणार नाही.

5“मी वेल आहे, तुम्ही फाटे आहा, जो माझ्यामध्ये
राहतो व मी त्याच्यामध्ये राहतो, तोच पुष्कळ फळ देतो.
कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुमच्याने काही होत
नाही. 6कोणी माझ्यामध्ये राहिला नाही तर तो फाट्याप्रमाणे
बाहेर टाकला जातो. तो वाळून जातो मग त्याला गोळा
करून अग्नीत टाकतात व ते जाळण्यात येते. 7“तुम्ही
माझ्यामध्ये राहिलात व माझी वचने तुम्हामध्ये राहिली
तर जे काही तुम्हांला पाहिजे ते तुम्ही मागा म्हणजे ते
तुम्हांस मिळेल. 8तुम्ही पुष्कळ फळ दिल्यानेच माझ्या
पित्याचे गौरव होते, आणि तुम्ही माझे शिष्य व्हाल.

9जशी पित्याने माझ्यावर प्रीति केली आहे तशीच मीही
तुम्हांवर प्रीति केली आहे. माझ्या प्रीतीत राहा. 10ज्याप्रमाणे
मी आपल्या पित्याच्या आज्ञा पाळल्या म्हणून त्याच्या प्रीतीत
राहतो तसेच तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर माझ्या प्रीतीत
राहाल. 11माझा आनंद तुम्हांमध्ये राहावा आणि तुमचा
आनंद पूर्ण व्हावा, म्हणून मी तुम्हांला या गोष्टी सांगितल्या
आहेत. 12जशी मी तुम्हांवर प्रीति केली तशीच तुम्ही
एकमेकांवर प्रीति करा. ही माझी आज्ञा आहे. 13आपल्या
मित्रासाठी मरावे, यापेक्षा कोणाचीही प्रीति मोठी नाही.
14मी आज्ञा करतो तसे तुम्ही वागता तर तुम्ही माझे मित्र
आहात. 15आता मी तुम्हांला सेवक म्हणत नाही, कारण
आपला धनी काय करतो हे सेवकाला माहीत नसते, पण
मी तुम्हांला मित्र म्हणतो कारण ज्या गोष्टी मी आपल्या
पित्याकडून ऐकल्या त्या सर्व तुम्हांला कळविल्या आहेत.
16तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले
आणि नेमले आहे. यासाठी की, तुम्ही जाऊन फळ द्यावे.
आणि तुमचे फळ टिकावे. यासाठी की जे काही तुम्ही
माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते त्याने तुम्हांस द्यावे.
17तुम्ही एकमेकांवर प्रीति करावी म्हणून या गोष्टी मी
तुम्हांस आज्ञा देऊन सांगतो.

## येशू त्याच्या अनुयायांना सूचना देतो

18“जर जग तुमचा द्वेष करते, तर लक्षात ठेवा की,
पहिल्यांदा जगाने माझासुध्दा द्वेष केलेला आहे. 19तुम्ही
जर जगाचे असता तर जगाने तुम्हावर जशी ते स्वत:वर
करतात तशी प्रीति केली असती. पण तुम्ही जगाचे नसल्याने,
आणि तुमची जगातून निवड केल्याने, जग तुमचा द्वेष
करते. 20जे शब्द तुम्हांला सांगितले ते लक्षात ठेवा.
कोणताही नोकर आपल्या मालकापेक्षा श्रेष्ठ नसतो. त्यांनी
जर माझी छळणूक केली तर ते तुमचीही करतील. त्यांनी
जर माझी शिकवण पाळली तर ते तुमचीसुद्धा पाळतील.
21माझ्या नावामुळे ते तुमच्याशी अशाप्रकारे वागतील,
कारण ज्याने मला पाठविले, त्याला ते ओळखत नाहीत.
22जर मी आलो नसतो आणि त्यांना सांगितले नसते तर ते
पापाबद्दल दोषी ठरले नसते. आता त्यांना त्यांच्या पापाविषयी
सबब सांगता येणार नाही. 23जो माझा द्वेष करतो तो
माझ्या पित्याचाही द्वेष करतो. 24मी त्या लोकांमध्ये अशा
गोष्टी केल्या ज्या दुसऱ्या कोणीही केल्या नाहीत. मी जर
त्या गोष्टी केल्या नसत्या, तर पापाबद्दल ते दोषी ठरले
नसते, पण आता त्यांनी ते चमत्कार पाहिले आहेत आणि
तरीही त्यांनी माझा व माझ्या पित्याचा द्वेष केला. 25परंतु
नियमशास्त्रात लिहिलेले पूर्ण व्हावे म्हणून हे घडले: ‘कारण
नसताना त्यांनी माझा द्वेष केला.’*

26“पित्यापासून मी साहाय्यकर्ता पाठवीन. साहाय्यकर्ता
हा सत्याचा आत्मा आहे. तो पित्यापासून येतो. जेव्हा तो
येतो तेव्हा तो माझ्याविषयी सांगतो. 27आणि तुम्हीसुद्धा
माझ्याविषयी लोकांना सांगाल. कारण तुम्ही माझ्याबरोबर
सुरूवातीपासून आहात.”

16 मी हे सर्व तुम्हांला सांगितले आहे ते यासाठी की,
तुम्ही माझ्यावरील विश्वासाविषयी भुलविले जाऊ
नये. 2ते तुम्हांला सभास्थानाच्या बाहेर काढतील; खरे
पाहता अशी वेळ येत आहे की, जो कोणी तुमचा जीव
घेईल त्याला वाटेल की, आपण देवाची सेवाच करीत
आहोत. 3आणि ते तुम्हांला असे जरूर करतील कारण
त्यांना पिता किंवा मी माहीत नाही. 4मी तुम्हांला आता या
गोष्टी सांगितल्या आहेत, म्हणून या गोष्टी घडण्याची वेळ
येईल, तेव्हा मी तुम्हांला त्यांच्याविषयी सावध केले होते
हे तुमच्या लक्षात येईल.

## पवित्र आत्म्याचे कार्य

5“परंतु ज्याने मला पाठविले त्याच्याकडे आता मी जातो.
‘तरी तू कोठे जातोस’ असे तुम्हांतील कोणी मला विचारीत

---

**कारण … केला** स्तोत्र. 69:4

नाही. 6पण या गोष्टी मी तुम्हांला सांगितल्या आहेत म्हणून
तुमचे अंत:करण दु:खाने भरले आहे. 7तरी तुम्हांस खरे
ते सांगतो, मी जातो हे तुमच्या हिताचे आहे कारण मी
गेलो नाही तर साहाय्यकर्ता तुमच्याकडे येणार नाही. पण
जर मी गेलो तर मी त्याला तुमच्याकडे पाठवीन. 8आणि
तो येऊन पाप, धार्मिकता आणि न्याय याविषयी जग दोषी
आहे हे सिद्ध करील. 9मी पापाविषयी सांगितले तर, लोक
माझ्यावर विश्ववास ठेवीत नाहीत. साहाय्यकर्ता (पवित्र
आत्मा ) त्यांना त्यांची जाणीव करून देईल
10नीतिमत्त्वाविषयी मी पित्याकडे जात आहे. मी देवाशी
प्रामाणिक असण्याचे तो साहाय्यकर्ता (पवित्र आत्मा) त्यांना
पटवून देईल" 11हा साहाय्यकर्ता जगाला न्यायाचे सत्य
पटवून देईल. कारण या जगाच्या अधिपतीचा (सैतान)
न्याय होऊन चुकला आहे. 12"मला आणखी पुष्कळ
सांगावयाचे आहे. तुम्हांला झेपणार नाही इतके सांगायचे
आहे. 13पण जेव्हा तो सत्याचा आत्मा येतो, तेव्हा तो
तुम्हांला सर्व सत्यात मार्गदर्शन करील. तो त्याचे स्वत:चे
असे काही बोलणार नाही. तो जे ऐकतो तेच तो बोलेल,
आणि जे अजून यावयाचे आहे. त्याविषयी तो तुम्हांला
सांगेल. 14जे माझे आहे त्यातून घेऊन आणि ते तुम्हांला
कळवून तो माझे गौरव करील. 15जे सर्व पित्याचे आहे,
ते माझे आहे. या कारणासाठीच मी म्हणालो, की आत्मा
जे माझे आहे त्यातून घेईल आणि ते तुम्हांला कळवील.

## दु:ख आनंदामध्ये बदलेल

16"थोड्या वेळाने तुम्ही मला पाहणार नाही, नंतर थोड्या
वेळाने तुम्ही मला पाहाल." 17त्याच्या शिष्यांतील काही
जण एकमेकांस म्हणाले, "तो असे म्हणतो याचा अर्थ
काय? थोड्या वेळाने तुम्ही मला पाहणार नाही. मग थोड्या
वेळाने तुम्ही मला पाहाल. कारण मी पित्याकडे जात
आहे!" 18ते विचारतच राहिले, 'थोड्या वेळाने' याचा अर्थ
काय? तो काय म्हणत आहे हे आम्हांला समजत नाही."

19येशूने पाहिले की, याविषयी त्यांना काही विचारायचे
आहे. म्हणून तो त्यांना म्हणाला, "तुम्ही एकमेकांना हे
विचारीत आहात काय की, जेव्हा मी म्हणालो, 'थोड्या
वेळाने तुम्ही मला पाहणार नाही, आणि मग थोड्या वेळाने
तुम्ही मला पाहाल?' 20मी तुम्हांला खरे सांगतो, जग आनंद
करीत असताना तुम्ही रडाल आणि शोक कराल. तुम्ही
दु:खी व्हाल, पण तुमेच दु:ख आनंदात बदलेल. 21जन्म
देणाऱ्या स्त्रीला वेदना होतात कारण तिची वेळ आलेली
असते. पण जेव्हा बाळ जन्मते तेव्हा ती सर्व वेदना विसरते.
कारण एक बाळ या जगात जन्म घेते. 22त्याप्रमाणे तुम्हाला
आता खरोखर दु:ख आहे, पण मी तुम्हांला पुन्हा भेटेन,
आणि तुम्ही आनंद कराल आणि कोणीही तुमचा आनंद
हिरावून घेणार नाही. 23त्या दिवशी तुम्ही माझ्याकडे काही
मागणार नाही. मी खरे सांगतो, माझ्या नावाने जे काही
तुम्ही मागाल ते माझा पिता तुम्हांला देईल. 24आतापर्यंत
तुम्ही माझ्या नावाने काही मागितले नाही. मागा म्हणजे
तुम्हांला मिळेल आणि तुमचा आनंद परिपूर्ण होईल."

## जगावर विजय

25"जरी मी तुम्हांला रूपकाच्या भाषेत या गोष्टी
सांगितल्या आहेत, तरी मी आणखी अशा प्रकारची भाषा
बोलणार नाही. पण साधेपणाने पित्याविषयी तुम्हांला सांगेन.
26त्या दिवशी तुम्ही माझ्या नावाने मागाल, आणि मी
तुमच्यासाठी पित्याकडे विनंति करीन असे मी म्हणत
नाही. 27कारण पिता स्वत: तुमच्यावर प्रीति करतो कारण
तुम्ही माझ्यावर प्रीति केली व माझ्यावर विश्वास ठेवला
की, मी देवापासून आलो. 28मी पित्यापासून आलो आणि
जगात प्रवेशलो आणि आता मी जग सोडत आहे. आणि
पित्याकडे पुन्हा जात आहे."

29मग येशूचे शिष्य म्हणाले, "आता तुम्ही स्पष्टपणे
बोलत आहात आणि रूपकाची भाषा वापरीत नाही. 30आता
आम्हांला पक्के समजले की, तुम्हांला सर्व माहीत आहे.
आणि तुम्हाला कोणी प्रश्न विचारण्याचीसुद्धा आवश्यकता
नाही. यामुळे आमचा विश्वास बसतो की, आपण देवापासून
आला आहात."

31येशूने उत्तर दिले, "आता तुम्ही विश्वास धरू लागला
काय? 32पण अशी वेळ येत आहे आणि आली आहे,
जेव्हा तुमची पांगापांग होईल. प्रत्येक जण त्याच्या घरी
जाईल. तुम्ही मला एकटेच सोडाल, तरीही मी एकटा
नाही कारण माझा पिता मजबरोबर आहे." 33"मी तुम्हांला
या गोष्टी सांगितल्या आहेत. यासाठी की माझ्यामध्ये तुम्हांला
शांति मिळावी. या जगात तुम्हांला त्रास होईल. पण धीर
धरा! मी जगावर मात केली आहे."

## येशू त्याच्या अनुयायांसाठी प्रार्थना करतो

17 येशूने हे बोलणे संपविल्यावर आपले डोळे
आकाशाकडे लावले आणि प्रार्थना केली: "पित्या,
वेळ आली आहे, पुत्राचे गौरव कर, यासाठी की, पुत्र तुझे
गौरव करील. 2तू त्याला जे दिले आहे त्या सर्वांना त्याने
अनंतकालचे जीवन द्यावे यासाठी सर्व मनुष्यांवर तू त्याला
अधिकार दिलास त्याप्रमाणे त्याने तुझे गौरव करावे. 3आणि
अनंतकाळचे जीवन हेच की, तू जो एकच खरा देव त्या
तुला व ज्याला तू पाठविलेस त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी
ओळखावे. 4तू मला जे काम करायला दिले ते संपवून मी
पृथ्वीवर तुला गौरविले. 5तर आता हे पित्या, जग होण्यापूर्वी
तुझ्याबरोबर जे गौरव मला होते त्याद्वारे तू स्वत:बरोबर
माझे गौरव कर."

6"ज्यांना तू मला या जगातून दिलेस, त्यांना मी तुला
प्रगट केले. ते तुझे होते. व तू त्यांना माझ्या स्वाधीन
केलेस. आणि त्यांनी तुझे वचन पाळले. 7आता त्यांना
माहीत आहे की, जे काही तू मला दिले आहेस ते तुझ्यापासून
येते. 8कारण जी वचने तू मला दिली आहेस ती मी त्यांना

दिली. आणि त्यांनी ती स्वीकारली. त्यांना निश्चितार्थाने
माहीत होते की, मी तुझ्यापासून आलो आहे. आणि त्यांनी
विश्वास ठेवला की तू मला पाठविले आहेस. 9मी
त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. मी जगासाठी प्रार्थना करीत
नाही. तर ज्यांना तू माझ्या स्वाधीन केलेस, त्यांच्यासाठीच
कारण ते तुझे आहेत. 10माझ्याकडे जे काही आहे ते तुझे
आहे आणि जे तुझे आहे ते माझे आहे. आणि त्यांच्याद्वारे
गौरव माझ्याकडे आले आहे. 11आणि यापुढे मी जगात
नाही, ते जगात आहेत, आणि मी तुझ्याकडे येत आहे. हे
पवित्र पित्या, जे नाव तू मला दिले आहेस, त्या तुझ्या
नावात त्यांना राख, यासाठी की, जसे आपण एक आहोत
तसे त्यांनीही एक व्हावे. 12मी त्यांच्याबरोबर होतो तोपर्यंत
जे नाव तू मला दिलेस त्या तुझ्या नावात मी त्यांना राखले.
आणि मी त्यांना संभाळले आणि ज्याने नाशाचा मार्ग
निवडला होता त्याच्याशिवाय त्यांच्यातील कोणी नाश
पावला नाही. हे यासाठी झाले की शास्त्रलेख पूर्ण व्हावा.
13"पण आता मी तुझ्याकडे येत आहे. आणि त्यांच्यामध्ये
माझा आनंद पूर्ण व्हावा म्हणून मी जगात या गोष्टी सांगतो."

14"मी त्यांना तुझे शब्द दिले आहेत आणि जगाने त्यांचा
द्वेष केला, कारण जसा मी या जगाचा नाही तसे तेही या
जगाचे नाहीत. 15या जगातून तू त्यांना काढून घ्यावेस
अशी माझी प्रार्थना नाही, पण दुष्टांपासून तू त्यांचे रक्षण
करावेस. 16जसा मी या जगाचा नाही, तसे तेसुद्धा या
जगाचे नाहीत. 17तू त्यांना सत्यात पवित्र कर. कारण
तुझा शब्द हेच सत्य आहे. 18जसे तू मला या जगात
पाठविले तसे मी त्यांना या जगात पाठवितो. 19त्यांच्यासाठी
मी स्वत:ला पवित्र करतो यासाठी की तेसुद्धा खऱ्या
अर्थाने पवित्र व्हावेत. 20आणि मी फक्त त्यांच्यासाठीच
विनंति करतो असे नाही, तर त्यांच्या वचनावरून जे
माझ्यावर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठीही विनंति करतो.
21यासाठी की, त्या सर्वांनी एक व्हावे. पित्या, जसा तू
माझ्यामध्ये व मी तुझ्यामध्ये तसेच त्यांनी आम्हांमध्ये असावे.
यासाठी की, तू मला पाठविले असा जगाने विश्वास धरावा.
22आणि तू जे गौरव मला दिले आहे ते मी त्यांना दिले
आहे. यासाठी की जसे आपण एक आहो तसे त्यांनीही
एक व्हावे. 23मी त्यांच्यामध्ये आणि तू माझ्यामध्ये. ते
पूर्णपणे ऐक्यात आणले जावेत यासाठी की, हे जगाला
माहीत व्हावे की तू मला पाठविलेस आणि जशी तू माझ्यावर
प्रीति केलीस तशी मीही त्यांच्यावर केली.

24"हे पित्या, जे लोक तू मला दिलेस, त्यांनी मी जेथे
आहे तेथे माझ्याबरोबर असावे असे मला वाटते. आणि
त्यांनी माझे गौरव करावे. जगाच्या निर्मितीपूर्वी तू माझ्यावर
प्रीति केली, म्हणून जे गौरव तू मला दिलेस, तेच हे गौरव
आहे. 25नीतिमान पित्या, जरी जग तुला ओळखत नाही,
तरी मी तुला ओळखतो, आणि त्यांना माहीत आहे की, तू
मला पाठविलेले आहेस. 26मी त्यांना तुझा परिचय करून
दिला आहे. व तुझी ओळख करून देतच राहीन यासाठी
की जे प्रेम तू माझ्यावर करतोस ते त्यांच्यावरही करावेस
आणि मी स्वत: त्यांच्यामध्ये असावे."

## येशूला अटक

***(मत्तय 26:47-56; मार्क 14:43-50; लूक 22:47-53)***

18 या गोष्टी बोलल्यावर येशू आपल्या
शिष्यांबरोबर किद्रोन ओहोळाच्या पलीकडे गेला.
तेथे एक बाग होती. त्या बागेत तो व त्याचे शिष्य गेले.

2आणि त्याला धरून शत्रूच्या हाती देणारा यहूदा यालाही
ही जागा ठाऊक होती. कारण येशू आपल्या शिष्यांबरोबर
नेहमी तेथे येत असे. 3तेव्हा शिपायांची तुकडी, मुख्य
याजकाचे काही अधिकारी, परूशी यांना वाट दाखवीत
यहूदा तेथे बागेत आला. ते मशाल, कंदील आणि हत्यारे
घेऊन आले होते. 4मग येशू आपल्या बाबतीत जे काही
होणार हे सर्व जाणून पुढे जाऊन त्यांना म्हणाला, "तुम्हांला
कोण पाहिजे?"

5"नासरेथचा येशू." ते म्हणाले.

येशूने उत्तर दिले, "तो मी आहे" (आणि विश्वासघात
करणारा यहूदा तेथे त्यांच्यामध्ये उभा होता)

6जेव्हा येशू म्हणाला, "तो मी आहे," ते मागे सरले
आणि जमिनीवर पडले. 7पुन्हा त्याने त्यांना विचारले,
"तुम्हांला कोण पाहिजे?"

आणि ते म्हणाले, "नासरेथचा येशू"

8येशूने उत्तर दिले, "मी तुम्हांला सांगितले की तो मी
आहे. जर तुम्ही मला शोधत असाल तर या लोकांना
जाऊ द्या." 9हे यासाठी घडले की, जे शब्द बोलण्यात
आले होते, ते सर्व पूर्ण व्हावेत, "जे तू मला दिलेस त्यांतील
एकही मी गमावला नाही." 10मग शिमोन पेत्र, ज्याच्याकडे
तलवार होती, त्याने ती बाहेर काढली व मुख्य याजकाच्या
सेवकाचा कान कापला (सेवकाचे नाव मल्ख होते)
11येशूने पेत्राला आज्ञा केली, "तुझी तलवार तिच्या जागेवर
ठेव! पित्याने दिलेला प्याला मी पिऊ नये काय?"

## येशूला हन्नाकडे आणतात

***(मत्तय 26:57-58; मार्क 14:53-54; लूक 22:54)***

12मग शिपायांची तुकडी व त्यांचा सरदार आणि यहूदी
रक्षक यांनी येशूला अटक केली. त्याला त्यांनी बांधले
आणि 13त्याला प्रथम हन्नाकडे आणले. तो कयफा या
प्रमुख याजकाचा सासरा होता. कयफा त्या वर्षीचा प्रमुख
याजक होता. 14आणि कयफा हाच असे म्हणणारा होता
की सर्व माणसांसाठी एका माणसाने मरणे बरे.

## येशूला ओळखण्याविषयी पेत्र खोटे बोलतो

***(मत्तय 26:69-70; मार्क 14:66-68; लूक 22:55-57)***

15शिमोन पेत्र व दुसरा शिष्य येशूच्या मागून चालले.
कारण हा शिष्य प्रमुख याजकाच्या ओळखीचा होता, म्हणून
तो येशूच्या बरोबर प्रमुख याजकाच्या वाड्यात आत गेला.

16परंतु पेत्र दाराशी बाहेर उभा राहिला. म्हणून जो दुसरा
शिष्य प्रमुख याजकाच्या ओळखीचा होता त्याने बाहेर
जाऊन तेथे कामावर असणाऱ्या मुलीला सांगून पेत्राला
आत आणले.
17ती मुलगी पेत्राला म्हणाली, “तूही त्या मनुष्याच्या
शिष्यांपैकी आहेस काय?”
पेत्राने उत्तर दिले, “मी नाही.” 18थंडी असल्याने नोकरांनी
व रक्षकांनी स्वत:ला गरम राखण्यासाठी शेकोटी पेटविली
होती व ते शेकत उभे राहिले होते. पेत्रही त्यांच्याबरोबर
शेकत उभा राहिला होता.

## मुख्य याजकाकडून येशूची चौकशी

*(**मत्तय** 26:59-66; **मार्क** 14:55-64; **लूक** 22:66-71)*

19तेव्हा प्रमुख याजकाने येशूला त्याच्या शिष्यांविषयी व
त्याच्या शिकवणुकीविषयी विचारले, 20येशूने त्याला उत्तर
दिले की, “मी उघडपणे जगाशी बोललो, सभास्थानात व
मंदिरात जेथे सर्व यहूदी एकत्र जमतात तेथे मी नेहमी
शिकविले आणि मी गुप्त असे काहीच बोललो नाही.
21मला तू का विचारतोस? ज्यांनी माझी शिकवण ऐकली,
त्यांना विचार. मी काय बोललो ते त्यांना माहीत आहे.”
22येशूने असे म्हटले तेव्हा तेथे उभे असलेल्या रक्षकाने
येशूला चपराक मारली. रक्षक म्हणाला, “तू प्रमुख
याजकाला असे उत्तर देतोस काय?”
23येशूने त्याला उत्तर दिले, “जर मी वाईट बोललो
असेन तर तसे सांग की मी चुकीचे बोललो पण जर
चांगले बोललो असलो तर तू मला का मारतोस?” 24हन्नाने
त्याला बांधलेलेच मुख्य याजक कयफाकडे पाठविले.

## पेत्र पुन्हा खोटे बोलतो

*(**मत्तय** 26:71-75; **मार्क** 14:69-72; **लूक** 22:58-62)*

25शिमोन पेत्र शेकत असता, त्याला विचारले गेले, “तू
त्याच्या शिष्यांपैकी एक नाहीस ना?”
त्याने ते नाकारले, “मी नाही.”
26मुख्य याजकाच्या नोकरांपैकी एकजण ज्याचा कान
पेत्राने कापला होता त्याचा नातेवाईक होता. तो म्हणाला,
“मी तुला त्याच्याबरोबर बागेत पाहिले नाही काय?” 27पेत्राने
पुन्हा ते नाकारले. आणि त्या क्षणी कोंबडा आरवला.

## येशूला पिलातासमोर आणतात

*(**मत्तय** 27:1-2, 11-31; **मार्क** 15:1-20; **लूक** 23:1-25)*

28नंतर यहूदी येशूला कयफाच्या घरातून रोमन
राजवाड्याकडे घेऊन गेले. तेव्हा पहाट झाली होती. आपण
विटाळले जाऊ नये व वल्हांडणाचे भोजन करता यावे
म्हणून ते राजवाड्यात गेले नाहीत.
29म्हणून पिलात त्यांच्याकडे बाहेर येऊन म्हणाला,
“तुम्ही या माणसावर कोणता आरोप करीत आहात?”
30तेव्हा त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले, “हा जर दुष्कर्मी
नसता तर आम्ही याला तुमच्या स्वाधीन केले नसते.”
31मग पिलाताने त्यांना म्हटले, “तुम्ही याला घेऊन आपल्या
नियमशास्त्राप्रमाणे त्याचा न्याय करा.” यहूदी म्हणाले,
“आम्हांला कोणाचा जीव घेण्याचा अधिकार नाही.”
32आपल्याला कसले मरण येणार हे सुचवून येशू जे
वचन बोलला होता ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले.
33मग पिलात पुन्हा राजवाड्यात गेला. येशूला बोलावले
आणि विचारले, “तू यहूद्यांचा राजा आहेस काय?” 34येशूने
विचारले, “तू हे स्वत:हून विचारतोस की, दुसऱ्यांनी तुला
माझ्याविषयी सांगितले.”
35पिलाताने उत्तर दिले, “मी यहूदी आहे काय? तुझे
लोक आणि तुझ्या मुख्य याजकांनी तुला माझ्या हाती
दिले. तू काय केले आहेस?”
36येशू म्हणाला, “माझे राज्य या जगाचे नाही. जर ते
असते तर यहूद्यांपासून माझी सुटका करण्यासाठी माझे
सेवक लढले नसते का? पण माझे राज्य दुसऱ्या ठिकाणचे
आहे.”
37पिलात म्हणाला, “तर तू एक राजा आहेस!”
येशूने उत्तर दिले, “मी राजा आहे असे तू म्हणतोस
तेव्हा बरोबर म्हणतोस. खरे पाहता, या कारणासाठी मी
जन्मलो आणि सत्याविषयी साक्ष देण्यासाठी मी या जगात
आलो. जे सर्व सत्याच्या बाजूचे आहेत ते माझे ऐकतात.”
38पिलाताने विचारले, “सत्य काय आहे?” असे म्हणून
तो पुन्हा यहूद्यांकडे गेला. आणि म्हणाला, “मला याच्यात
काहीच अपराध सापडत नाही. 39पण वल्हांडण सणात मी
तुम्हांसाठी एकाला सोडावे अशी तुमच्यामध्ये रीत आहे.
म्हणून मी तुमच्यासाठी यहूद्यांच्या राजाला सोडावे अशी
तुमची इच्छा आहे काय?”
40ते ओरडले, “नको, त्याला नको! ‘आम्हांला बरब्बाला
सोडा!’ बरब्बा एक दरोडेखोर होता.

19 मग पिलाताने येशूला नेऊन फटके मारण्याची
आज्ञा दिली. 2आणि शिपायांनी काट्यांचा मुगुट
गुंफून तो त्याच्या डोक्यात घातला. व त्याला जांभळे वस्त्र
घातले. 3ते त्याच्याजवळ वारंवार येऊन त्याला म्हणाले,’
‘हे यहूद्यांच्या राजा, तुझा जयजयकार असो!” आणि त्यांनी
त्याच्या तोंडावर मारले.
4पुन्हा एकदा पिलात बाहेर आला आणि यहूद्यांना
म्हणाला, “पाहा! मी त्याला बाहेर तुमच्याकडे आणत
आहे, तुम्हांला हे समजावे म्हणून की, मला त्याच्यावर
दोषारोप ठेवायला कोणतेच कारण सापडत नाही.” 5जेव्हा
येशू काट्यांचा मुगुट व जांभळी वस्त्रे घालून बाहेर आला,
तेव्हा पिलात त्यांना म्हणाला, “हा पहा तो मनुष्य!”
6मुख्य याजक व त्यांचे रक्षक त्याला पाहताक्षणीच
मोठयाने ओरडले, “त्याला वधस्तंभावर खिळा!
वधस्तंभावर खिळा!” पण पिलाताने उत्तर दिले, “तुम्ही
त्याला घ्या व वधस्तंभावर खिळा. माझ्या दृष्टीने त्याच्यावर
आरोप ठेवण्यास कोणतेही कारण मला दिसत नाही.”

7यहूद्यांनी जोर देऊन म्हटले, “आम्हांला नियमशास्त्र
आहे, आणि त्या नियमशास्त्राप्रमाणे त्याने मेलेच पाहिजे.
कारण त्याने स्वत: देवाचा पुत्र असल्याचा दावा केला.”
8जेव्हा पिलाताने हे ऐकले, तेव्हा तो अधिकच घाबरला.
9आणि तो आत राजवाड्यात परत गेला. येशूला त्याने
विचारले, “तू कोठून आला आहेस?” पण येशूने त्याला
उत्तर दिले नाही 10पिलात म्हणाला, “तू माझ्याशी बोलण्यास
नकार देतोस काय? तुला वधस्तंभावर खिळण्याची किंवा
मुक्त करण्याची ताकद मला आहे, हे तुला समजत नाही
का?”

11येशूने उत्तर दिले, “जर वरून अधिकार देण्यात आला
नसता, तर तुला माझ्यावर अधिकार नसता. म्हणून ज्याने
मला तुझ्या स्वाधीन केले तो महान पापाचा दोषी आहे.”

12तेव्हापासून पिलाताने येशूला सोडण्याचा प्रयत्न केला,
पण यहूदी मोठमोठयाने ओरडत राहिले, “जर तुम्ही या
माणसाला जाऊ दिले, तर तुम्ही कैसराचे मित्र नाही. जो
कोणी स्वत: राजा असल्याचा दावा करतो, तो कैसराला
विरोध करतो.”

13जेव्हा पिलाताने हे ऐकले, तेव्हा त्याने येशूला बाहेर
आणले आणि फरसबंदी नावाची जागा, जिला इब्री भाषेत
‘गब्बाथा’ म्हणतात तेथे तो न्यायासनावर बसला. 14तो तर
वल्हांडणाची तयारी करण्याचा दिवस असून दुपारची वेळ
झाली होती.

15पिलात त्या यहूद्यांना म्हणाला, “पहा हा तुमचा राजा.”
यहूदी ओरडले, “त्याला घेऊन जा! त्याला घेऊन जा!
आणि वधस्तंभावर खिळून मारा!”

पिलाताने त्यांना विचारले, “मी तुमच्या राजाला वधस्तंभी
द्यावे काय?” मुख्य याजकांनी उत्तर दिले, “आम्हांला
कैसराशिवाय दुसरा कोणी राजा नाही.”

16मग त्याने त्याला वधस्तंभी खिळण्यासाठी त्यांच्या
हाती दिले.

## येशूला वधस्तंभावर खिळून मारतात

***(मत्तय 27:32-44; मार्क 15:21-32; लूक 23:26-43)***

मग शिपायांनी येशूचा ताबा घेतला. 17येशूने स्वत:चा
वधस्तंभ वाहिला. तो बाहेर कवटीची जागा म्हटलेल्या
ठिकाणी गेला. (इब्री भाषेत त्याला गुलगुथा म्हणतात.)
18गुलगुथा येथे त्यांनी येशूला वधस्तंभावर खिव्व्यांनी
ठोकले. त्यांनी आणखी दोन मनुष्यांनासुद्धा वधस्तंभावर
खिळले. त्या दोघांना त्यांनी येशूच्या दोन्ही बाजूंना खिळले
व मध्ये येशूला खिळले.

19आणि पिलाताने एक वाक्य लिहिले आणि ते
वधस्तंभावर लावले. त्यावर असे लिहिले होते की, “येशू
नासरेथकर- यहूद्यांचा राजा” 20ती पाटी यहूदी भाषेत
लिहिली होती. पुष्कळ यहूदी लोकांनी ती पाटी वाचली,
कारण येशूला जेथे वधस्तंभावर देण्यात आले होते ते
ठिकाण शहराच्या जवळ होते. तसेच ते लॅटीन, ग्रीक
आरामी भाषेतही लिहिले होते. 21यहूद्यांच्या मुख्य याजकांनी
पिलाताला विरोध केला. ते म्हणाले, ‘यहूद्यांचा राजा’ असे
लिहू नका, ‘तर हा मनुष्य यहूदी लोकांचा राजा आहे ’
“असा दावा करतो. असे लिहा.”

22पिलाताने म्हटले, “मी जे लिहिले ते लिहिले.”

23जेव्हा शिपायांनी येशूला वधस्तंभावर खिळले, तेव्हा
त्यांनी त्याची वस्त्रे घेतली. आणि चौघात ती वाटून घेतली.
फक्त अंतर्वस्त्रे ठेवली. हा पोशाख वरपासून खालपर्यंत
पूर्ण विणलेला होता. त्याला शिवलेले नव्हते. 24म्हणून ते
एकमेकांस म्हणाले, “हा आपण फाडू नये, तर यासाठी
चिठ्ठ्या टाकून कोणाला मिळतो ते ठरवू या.” हे यासाठी
घडले की, पवित्र शास्त्रात जे लिहिले होते ते पूर्ण व्हावे.

“त्यांनी माझी वस्त्रे आप आपसांत वाटून घेतली आणि
माझ्या वस्त्रासाठी चिठ्ठ्या टाकल्या.” *स्तोत्र. 22:18*

म्हणून शिपायांनी असे केले.

25येशूच्या वधस्तंभाशेजारी त्याची आई, त्याच्या आईची
बहीण, क्लोपाची आई मरीया आणि मरीया मग्दालिया
उभ्या होत्या. 26जेव्हा येशूने त्याच्या आईला तेथे पाहिले.
आणि ज्या शिष्यावर त्याची प्रीति होती तो जवळच उभा
होता. तेव्हा तो त्याच्या आईला म्हणाला, “आई, हा तुझा
मुलगा आहे,” 27आणि त्या शिष्याला येशू म्हणाला, “ही
तुझी आई आहे.” म्हणून त्या दिवसापासून या शिष्याने
तिला आपल्या घरी नेले.

## येशू प्राण सोडतो

***(मत्तय 27:45-56; मार्क 15:33-41; लूक 23:44-49)***

28नंतर, हे ओळखून की आता सर्व पूर्ण झाले आहे,
आणि पवित्र शास्त्रातील वचनांची परिपूर्ती व्हावी म्हणून,
येशू म्हणाला, “मला तहान लागली आहे.” 29तेथे एक
आंब भरून ठेवलेले भांडे होते, म्हणून त्यांनी बोळा आंबेत
बुडवून भरून एजोबाच्या काठीवर ठेवून त्याच्या तोंडाला
लावला. 30येशू आंब घेतल्यावर म्हणाला, “पूर्ण झाले
आहे.” मग त्याने आपले डोके लववून आपला आत्मा
सोडून दिला. 31तो तयारीचा दिवस होता व दुसऱ्या दिवशी
विशेष शब्बाथाचा दिवस होता. शब्बाथ दिवशी शरीरे
वधस्तंभावर राहू नयेत अशी यहूदी लोकांची इच्छा होती.
त्यांनी पिलाताला पाय तोडण्याची आणि शरीरे
वधस्तंभावरून खाली घेण्याविषयी विचारले. 32म्हणून
शिपायांनी येऊन येशूबरोबर वधस्तंभी खिळलेल्या
पहिल्याचे व नंतर दुसऱ्याचे पाय मोडून टाकले. 33पण
जेव्हा ते येशूकडे आले. तेव्हा त्यांना आढळून आले की,
तो अगोदरच मेला आहे. तेव्हा त्यांनी त्याचे पाय मोडले
नाहीत. 34तरी शिपायांपैकी एकाने त्याच्या कुशीत भाला
भोसकला, तेव्हा लगेच रक्त आणि पाणी बाहेर निघाले.
35ज्या मनुष्याने हे पाहिले, त्याने साक्ष दिली आहे आणि

त्याची साक्ष खरी आहे. त्याला माहीत आहे की, तो खरे
बोलतो व तो साक्ष देतो यासाठी की, तुम्ही विश्वास धरावा.
36या गोष्टी अशासाठी घडल्या की, पवित्र शास्त्राची परिपूर्ती
व्हावी: "त्याचे एकही हाड मोडणार नाही."* 37आणि
दुसऱ्या शास्त्रभागात म्हटले आहे : "ज्याला त्यांनी भोसकले
त्याला ते पाहतील."*

## येशूला कबरेत ठेवतात

***(मत्तय 27:57-61; मार्क 15:42-47; लूक 23:50-56)***

38नंतर अरिमथाई येथील योसेफाने पिलाताला येशूचे
शरीर मागितले. योसेफ हा येशूचा शिष्य होता, पण गुप्त
रीतीने, कारण त्याला यहूद्यांची भीति वाटत होती.
पिलाताच्या परवानगीने तो आला व शरीर घेऊन गेला.
39त्याच्याबरोबर निकदेम होता. याच मनुष्याने रात्रीच्या
वेळी येशूची भेट घेतली होती. निकदेम शंभर पौंड*
गंधरस व अगरू* घेऊन आला. 40मग त्यांनी येशूचे
शरीर घेतले आणि यहूदी लोकांच्या प्रेत पुरण्याच्या
रीतीप्रमाणे सुगंधित द्रव्यासहित तागांनी ते गुंडाळले. 41जेथे
त्याला वधस्तंभी मारले होते तेथे एक बाग होती. आणि
त्या बागेत एक नवीन थडगे होते. व त्या थडग्यात आतापर्यंत
कोणालाच ठेवलेले नव्हते. 42तो यहूद्यांच्या सणाच्या
पूर्वतयारीचा दिवस असल्याने व ते थडगे जवळ असल्याने
त्यांनी येशूला तेथेच ठेवले.

## काही अनुयायांना येशूची कबर रिकामी दिसते

***(मत्तय 28:1-10; मार्क 16:1-8; लूक 24:1-12)***

20 मग रविवारी सकाळी अगदी पहाटे मरीया
मग्दालिया थडग्याकडे आली आणि थडग्यावरून
धोंड काढलेली आहे असे तिला आढळले. 2म्हणून तिने
शिमोन पेत्र व ज्याच्यावर येशूची प्रीति होती तो दुसरा
शिष्य यांच्याकडे धावत येऊन म्हटले, "त्यांनी प्रभूला
थडग्यातून काढून नेऊन कोठे ठेवले हे आम्हांला माहीत
नाही."

3मग पेत्र व दुसरा शिष्य हे निघाले व थडग्याकडे गेले.
4तेव्हा ते दोघे बरोबर पळत गेले. आणि तो दुसरा शिष्य
पेत्रापेक्षा लवकर पुढे जाऊन त्याच्या आधी थडग्याजवळ
पोहोचला. 5आणि त्याने वाकून आत डोकावले. तेव्हा
त्याने तागाची वस्त्रे पडलेली पाहिली, पण तो आत गेला
नाही. 6मग शिमोन पेत्रही त्याच्यामागून आला व थडग्यात
आत गेला. 7तेव्हा तागाची वस्त्रे पडलेली आणि जो रुमाल
त्याच्या डोक्याला होता, तो तागाच्या वस्त्राबरोबर नाही,
तर निराळा एकीकडे गुंडाळलेला पडलेला त्याने पाहिला.
8शेवटी तो दुसरा शिष्य जो थडग्याकडे पहिल्यांदा पोहोचला
होता, तोसुद्धा आत गेला. त्याने पाहिले आणि विश्वास
ठेवला. 9येशूने मरणातून पुन्हा उठणे आवश्यक आहे, हे
त्यांना अजूनसुद्धा समजले नव्हते.

## येशू मरीया मग्दालियाला दिसतो

***(मार्क 16:9-11)***

10मग शिष्य त्यांच्या घरी गेले. 11पण मरीया थडग्यासमोर
रडत उभी राहिली. ती रडत असता आत डोकावण्यासाठी
वाकली 12आणि तिने दोन देवदूतांना पांढऱ्या पोशाखात
जेथे येशूचे शरीर होते तेथे बसलेले पाहिले. एकजण डोके
होते, तेथे बसला होता व एकजण पायाजवळ बसला होता.
13त्यांनी तिला विचारले, "बाई तू का रडत आहेस?"

ती म्हणाली, "ते माझ्या प्रभूला घेऊन गेले आहेत आणि
मला माहीत नाही, त्यांनी त्याला कोठे ठेवले आहे."
14यावेळी ती पाठमोरी वळाली. तिने तेथे येशूला उभे
असलेले पाहिले. पण तिला हे समजले नाही की तो येशू
आहे. 15तो म्हणाला, "बाई, तू का रडत आहेस? तू कोणाला
शोधत आहेस?"

तिला वाटले तो माळी आहे. ती म्हणाली, "दादा, जर तू
त्याला कोठे नेले असशील, तर मला सांग तू त्याला कोठे
ठेवले आहेस, म्हणजे मी त्याला घेऊन जाईन."

16येशू तिला म्हणाला, "मरीये"

ती त्याच्याकडे वळाली आणि अरेमी भाषेत मोठ्याने
ओरडली, "रब्बूनी!" (याचा अर्थ गुरूजी) 17येशू तिला
म्हणाला, "माझ्याजवळ येऊ नकोस, कारण मी अजून
पित्याकडे गेलो नाही. तर माझ्या भावांकडे जा आणि
त्यांना सांग : मी माझ्या पित्याकडे व तुमच्या पित्याकडे व
माझ्या देवाकडे व तुमच्या देवाकडे जात आहे."

18मरीया मग्दालिया ही बातमी घेऊन शिष्यांकडे गेली.
"मी प्रभुला पाहिले आहे!" आणि तिने त्यांना सांगितले
की, त्याने या गोष्टी सांगितल्या आहेत.

## येशू त्याच्या शिष्यांना दिसतो

***(मत्तय 28:16-20; मार्क 16:14-18; लूक 24:36-49)***

19आणि आठवड्याच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी शिष्य
होते तेथील दार यहूदी लोकांच्या भीतीमुळे बंद असता,
येशू आला व मध्ये उभा राहिला. त्यांना म्हणाला, "तुम्हांला
शांति असो." 20असे बोलल्यावर त्याने आपले हात व
कूस त्यांना दाखविली, तेव्हा प्रभूला पाहून शिष्यांना आनंद
झाला.

21पुन्हा येशू म्हणाला, "तुम्हांबरोबर शांति असो! जसे
पित्याने मला पाठवले आहे, तसे मी तुम्हांला पाठवितो."
22आणि असे म्हणून त्याने त्यांच्यावर फुंकर टाकला
आणि म्हणाला, "पवित्र आत्मा स्वीकारा. 23जर तुम्ही

---

**त्याचे ... नाही** स्तोत्र. 34:20; निर्गम . 12:46; गणना 9:12

**ज्याला ... पाहतील** जखऱ्या 12:10

100 **रोमी पौंड** आजच्या 75 पौंडाइतके.

**गंधरस व अगरू** सुंदर सुवास असलेले मसाल्याचे पदार्थ. अत्तर म्हणून उपयोग, तसेच मृत शरीराला लावण्यास.

कोणाच्या पापांची क्षमा केली, तर त्याला पापक्षमा मिळेल.
जर तुम्ही क्षमा केली नाही तर त्यांची क्षमा होणार नाही."

## येशू थोमाला दिसतो

24आता थोमा (याला दिदुम म्हणत) बारा शिष्यांपैकी
एक होता. येशू आला तेव्हा तो शिष्यांबरोबर नव्हता.
25तेव्हा इतर शिष्यांनी त्याला सांगितले की, "आम्ही प्रभूला
पाहिले आहे!" पण तो त्यांना म्हणाला, "त्याच्या हातांमधील
खिळ्यांचे व्रण पाहिल्याशिवाय व खिळ्यांच्या व्रणांत माझे
बोट घातल्याशिवाय व त्याच्या कुशीत माझा हात
घातल्याशिवाय मी विश्वास धरणार नाही."
26एक आठवड्यानंतर येशूचे शिष्य त्या घरामध्ये पुन्हा
बसले होते व थोमा त्यांच्याबरोबर होता. जरी दार बंद होते
तरी येशू आत आला व त्यांच्यामध्ये उभा राहिला. आणि
म्हणाला, "तुम्हांबरोबर शांति असो." 27मग तो थोमाला
म्हणाला, "तुझे बोट इकडे कर व माझे हात पाहा आणि
तुझा हात इकडे कर व माझ्या कुशीत घाल. संशय सोड
आणि विश्वास ठेव." 28थोमा त्याला म्हणाला, "माझा
प्रभु आणि माझा देव!"
29मग येशू त्याला म्हणाला, "तू मला पाहिले आहेस
म्हणून तू विश्वास ठेवला आहेस, पण ज्यांनी मला पाहिले
नाही तरीही त्यांनी विश्वास धरला ते धन्य आहेत."

## योहानाने हे पुस्तक का लिहिले?

30आणखी या पुस्तकात लिहिली नाहीत अशी पुष्कळ
अद्भुत चिन्हे येशूने त्याच्या शिष्यांच्या समवेत केली. ती
या पुस्तकात लिहिली नाहीत. 31पण ही लिहिली यासाठी
की, तुम्ही विश्वास ठेवावा की, येशू हा ख्रिस्त आहे,
देवाचा पुत्र आहे आणि विश्वास ठेवल्याने त्याच्या नावात
तुम्हांला जीवन मिळेल.

## येशू सात शिष्यांना दिसतो

21 नंतर येशू त्याच्या शिष्यांना पुन्हा दिसला. तो
तिबीर्या सरोवराजवळ (जे गालीलात होते) त्या
ठिकाणी दिसला. हे अशा प्रकारे घडले: 2काही शिष्य
एकत्र होते. ते म्हणजे शिमोन पेत्र, थोमा (दिदुम म्हणत
तो), गालीलातील काना येथील नथनीएल, जब्दीचे मुलगे,
व त्याच्या शिष्यांतील दुसरे दोघे असे ते होते. 3शिमोन
पेत्राने त्यांना म्हटले, "मी मासे धरायला जातो." ते त्याला
म्हणाले, "आम्हीही तुझ्याबरोबर येतो." नंतर ते बाहेर
गेले व नावेत बसले, पण त्या रात्री त्यांना काहीही मिळाले
नाही.
4दुसऱ्या दिवशी पहाटे येशू किनाऱ्यावर उभा राहिला.
पण शिष्यांना समजले नाही की तो येशू आहे. 5तो त्यांना
म्हणाला, "मित्रांनो, तुम्ही काही मासे पकडले का?" त्यांनी
उत्तर दिले, "नाही."
6तो म्हणाला, "तुमचे जाळे नावेच्या उजव्या बाजूला
टाका व मग तुम्हांला काही मासे मिळतील." जेव्हा त्यांनी
तसे केले, तेव्हा त्यांना पुष्कळ मासे मिळाल्यामुळे जाळे
ओढता येईना.
7तेव्हा येशूची ज्याच्यावर प्रीति होती तो पेत्राला म्हणाला,
"तो प्रभु आहे!" असे म्हणता क्षणीच पेत्राने कपडे गुंडाळले.
(कारण त्याने कपडे काढले होते) व पाण्यात उडी मारली.
8दुसरे शिष्य माशांचे जाळे ओढीत होडीतून आले कारण
ते काठापासून दूर नव्हते. फक्त शंभर यार्ड होते. 9जेव्हा
ते किनाऱ्याला आले, त्यांनी कोळशांनी पेटविलेला विस्तव
पाहिला व मासे आणि भाकर त्यावर ठेवलेली पाहिली.
10येशूने त्यांना म्हटले, "तुम्ही आता धरलेल्या माशांतून
काही मासे आणा."
11शिमोन पेत्राने नावेत जाऊन एकशे त्रेपन्न मोठ्या
माशांनी भरलेले जाळे काठास आणले. इतके मासे
असतानाही जाळे फाटले नाही. 12येशू त्यांना म्हणाला,
"या, जेवा, "तेव्हा तो प्रभु आहे असे त्यांना समजले.
म्हणून शिष्यांपैकी कोणी त्याला, तू कोण आहेस, हे
विचारायला धजला नाही. 13मग येशूने येऊन भाकर
घेतली व त्यांना दिली. तसेच मासळीही दिली.
14येशू मेलेल्यांतून उठल्यावर तो आपल्या शिष्यांस
प्रगट होण्याची ही तिसरी वेळ.

## येशू पेत्राबरोबर बोलतो

15मग जेव्हा त्यांनी खाणे संपविले, येशू पेत्राला म्हणाला,
"योहानाच्या मुला, शिमोना, तू माझ्यावर या सर्वांपेक्षा
अधिक प्रीति करतोस काय?"
तो म्हणाला, "होय प्रभु, तुम्हांला माहीत आहे की, मी
तुमच्यावर प्रीति करतो."
येशू म्हणाला, "माझ्या कोकरांना चार."
16पुन्हा येशू म्हणाला, "शिमोना, योहानाच्या मुला, तू
खरोखर माझ्यावर प्रीति करतोस का?"
पेत्राने उत्तर दिले, "होय प्रभु तुम्हांला माहीत आहे की
मी तुमच्यावर प्रीति करतो."
येशू म्हणाला, "माझ्या मेंढरांची काळजी घे."
17तिसऱ्या वेळी तो त्याला म्हणाला, "शिमोना, योहानाच्या
मुला, तू माझ्यावर प्रीति करतोस का?"
पेत्र दुःखी झाला कारण येशूने त्याला तिसऱ्यांदा विचारले
होते, 'तू माझ्यावर प्रीति करतोस का?'
तो म्हणाला, "प्रभु, तुम्हांला सर्व गोष्टी माहीत आहेत,
तुम्हांला माहीत आहे की, मी तुमच्यावर प्रीति करतो."
येशू म्हणाला, "माझ्या मेंढरांना चार. 18मी खरे सांगतो,
तू तरुण होतास, तेव्हा तू स्वत: पोशाख करून तुला जेथे
पाहिजे तेथे जात होतास. पण जेव्हा तू म्हातारा होशील
तेव्हा तू आपला हात लांब करशील, आणि दुसरा कोणीतरी
तुला पोशाख घालील. आणि जेथे तुझी इच्छा नाही तेथे
नेईल."

[19]तो कोणत्या प्रकारच्या मरणाने तो मरणार व देवाचे
गौरव करणार हे सुचविण्यासाठी येशू हे बोलला. हे
बोलल्यानंतर तो म्हणाला, "माझ्यामागे ये."
[20]मग पेत्राने वळून ज्या शिष्यावर येशू प्रीति करीत
असे, तो त्यांच्यामागे येत होता. (हा तोच होता, जो भोजनाच्या
वेळी येशूजवळ बिलगून बसला होता. आणि म्हणाला होता,
"प्रभु, तुझा विश्वासघात कोण करणार आहे?)" त्याला
पाहिले. [21]जेव्हा पेत्राने त्याला पाहिले, तेव्हा त्याने विचारले,
"प्रभु, याचे काय?"
[22]येशूने उत्तर दिले, "मी परत येईपर्यंत त्याने जगावे
अशी माझी इच्छा असेल, तर तुला त्याचे काय? तू मला
अनुसर." [23]या कारणामुळे अशी अफवा बंधुवर्गात पसरली
की, हा शिष्य मरणार नाही. पण येशू असे म्हणाला
नव्हता की, तो मरणार नाही, तो फक्त म्हणाला, "मी
येईपर्यंत त्याने जिवंत राहावे, अशी माझी इच्छा असेल,
तर तुला त्याचे काय?"
[24]जो शिष्य या गोष्टीविषयी साक्ष देतो व ज्याने या गोष्टी
लिहिल्या तोच हा शिष्य आहे. आणि त्याची साक्ष खरी
आहे, हे आम्हांला माहीत आहे. [25]आणि येशूने केलेली
दुसरीही पुष्कळ कामे आहेत, ती एकेक लिहिली तर
लिहिलेली पुस्तके या जगात ठेवायला जागा पुरणार नाही,
असे मला वाटते.

# प्रेषितांचीं कृत्यें

## लूक दुसरे पुस्तक लिहितो

1 प्रिय थियफिलस, येशूने जे सर्व काही केले आणि
शिकविले त्याविषयी मी पहिले पुस्तक लिहिले.
2येशूच्या सुरुवातीपासून ते, तो स्वर्गात जाईपर्यंतच्या संपूर्ण
जीवनाविषयी मी लिहिले. हे घडण्यापूर्वी येशूने जे प्रेषित*
निवडले होते त्यांच्याशी तो बोलला. येशूने प्रेषितांना पवित्र
आत्म्याच्या सहाय्याने त्यांनी जे करायला पाहिजे त्याविषयी
सूचना दिल्या. 3हे येशूच्या मृत्यूनंतरचे होते. परंतु त्याने
प्रेषितांना दाखविले की, तो जिवंत आहे. येशूने अनेक
सामर्थ्यशाली कृत्ये करून दाखवून हे सिद्ध केले. मरणातून
उठविले गेल्यानंतर चाळीस दिवसांपर्यंत येशूला प्रेषितांनी
पुष्कळ वेळा पाहिले. येशू प्रेषितांशी देवाच्या राज्याविषयी
बोलला. 4एकदा येशू त्यांच्यासह जेवत बसलेला असताना
त्याने सांगितले की, यरुशलेम सोडू नका. येशू म्हणाला,
“पित्याने तुम्हांला अभिवचन दिले आहे; मी तुम्हांला
त्याविषयी पूर्वी सांगितले होते. येथे (यरुशलेमात) त्याचे
अभिवचन मिळण्याची वाट पाहा. 5योहानाने लोकांचा
पाण्याने बाप्तिस्मा* केला. परंतु थोड्याच दिवसांत तुमचा
बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने* होईल.”

## येशू वर स्वर्गात घेतला जातो

6सर्व प्रेषित एकत्र जमले होते. त्यांनी येशूला विचारले,
“प्रभूजी, ह्याच काळात यहूदी लोकांना तुम्ही त्यांचे राज्य
पुन्हा देणार काय?” 7येशू त्यांना म्हणाला, “केवळ
पित्यालाच तारखा व वेळा ठरविण्याचा अधिकार आहे.
ह्या गोष्टीची माहिती असणे तुम्हा कडे नाही. 8परंतु
पवित्र आत्मा तुम्हांकडे येईल. मग तुम्हांला शक्ति
मिळेल. तुम्ही माझे साक्षी व्हाल. तुम्ही लोकांना
माझ्याविषयी सांगाल. पहिल्यांदा यरुशलेम येथील लोकांना
तुम्ही सांगाल. नंतर तुम्ही यहूदीया, शोमरोन व जगाच्या
सर्व भागात सांगाल.”
9नंतर येशूने प्रेषितांना या गोष्टी सांगितल्यावर, तो
आकाशात उचलला गेला. प्रेषित हे पाहत असताना येशू
ढगाआड गेला. आणि ते त्याला पाहू शकले नाहीत. 10येशू
दूर जात होता, आणि प्रेषित आकाशात पाहत असताना
पांढरी वस्त्रे परिधान केलेले दोन पुरुष (देवदूत) अचानक
त्यांच्याजवळ येऊन उभे राहिले.
11आणि ते दोघे प्रेषितांना म्हणाले, “गालीलकरांनो,
तुम्ही आकाशाकडे पाहत येथे का उभे राहिलात? हा येशू
तुमच्यापासून जसा वर स्वर्गात घेतला गेला व त्याला
(येशूला) जाताना तुम्ही पाहिलेत त्याच मार्गाने तो परत
येईल.”

## एक नवा प्रेषित निवडण्यात येतो

12नंतर प्रेषित जैतुनाच्या डोंगरावरून यरुशलेमास परत
गेले. (हा डोंगर यरुशलेमापासून एक किलोमीटर अंतरावर
आहे.) 13प्रेषित शहरात परत आल्यावर ज्या ठिकाणी
मुक्कामाला होते, त्या ठिकाणी गेले. ही माडीवरची खोली
होती. त्या ठिकाणी हे प्रेषित होते: पेत्र, योहान, याकोब,
आंद्रिया, फिलिप्प, थोमा, बर्थलमय, मत्तय, याकोब
(अल्फीचा पुत्र), शिमोन (झिलोट* म्हणून माहीत
असलेला) आणि यहूदा (याकोबाचा पुत्र).
14हे सर्व प्रेषित एकत्र राहत होते. ते एकाच उद्देशाने
सतत प्रार्थना करीत होते. काही स्त्रिया, मरीया येशूची
आई आणि त्याचे भाऊ प्रेषितांबरोबर होते.
15काही दिवसांनी विश्वासणाऱ्यांची एक सभा झाली.
(तेथे सुमारे 120 जण होते.) तेव्हा पेत्र उभा राहिला
आणि म्हणाला, 16–17“बंधुंनो, पवित्र शास्त्रामध्ये पवित्र
आत्मा दावीदाकरवी बोलला ते, काहीतरी घडणे आवश्यक
आहे. आपल्या गटातील एक जण जो यहूदा त्याच्याविषयी
तो बोलत होता. ते असे की, यहूदा आपल्याबरोबर सेवा
करीत होता. आत्मा म्हणाला की, येशूला धरून देण्यासाठी
यहूदा लोकांचे पुढारीपण करील.”
18यहूदाला हे वाईट काम करण्यासाठी पैसे देण्यात
आले होते. या पैशांनी त्याच्यासाठी शेत विकत घेतले
गेले. परंतु यहूदा आपल्या डोक्यावर पडला. त्याचे शरीर
तुटले. व त्याची सर्व आतडी बाहेर पडली. 19यरुशलेम

---

**प्रेषित** येशूने आपल्यासाठी निवडलेले खास मदतनीस.

**बाप्तिस्मा** ग्रीक शब्द याचा अर्थ बुडविणे. एखादी व्यक्ति किंवा वस्तु काही काळ पाण्याखाली बुडविणे.

**पवित्र आत्मा** याला देवाचा आत्मा, ख्रिस्ताचा आत्मा व सांत्वन करणारा असे म्हणतात. तो देव व ख्रिस्त यांच्यासह देवाच्यासाठी जगातील लोकामंध्ये कार्य करतो.

**झिलोट** हा यहूदी लोकांमधील एक राजकीय गट होता.

येथील सर्व लोकांना हे समजले. म्हणून त्यांनी त्या शेताचे नाव हकलदमा असे ठेवले. त्यांच्या भाषेत हकलदमा याचा अर्थ “रक्ताचे शेत” असा होता.

[20]पेत्र म्हणाला, “स्तोत्रसंहितेत (यहूदाविषयी) असे लिहिले आहे:

‘त्याच्या जमिनीजवळ (मालमत्तेजवळ) लोक न जावोत;
कोणीही तिच्यात वस्ती न करो!’ *स्तोत्र. 69:25*

आणखी असे लिहिले आहे: ‘त्याचा कारभार दुसरा घेवो.’ *स्तोत्र. 109:8*

[21–22]म्हणून आता दुसऱ्या व्यक्तीने आमच्यात आले पाहिजे आणि येशूच्या मरणानंतर झालेल्या पुनरुत्थानाचे साक्षीदार व्हावे. प्रभु येशू आपल्याबरोबर असलेल्या संपूर्ण काळात आपल्या गटात राहिलेल्यांपैकी तो मनुष्य असायला पाहिजे. योहान लोकांचा बाप्तिस्मा करीत असे त्या काळापासून ते येशूला आपल्यातून वर स्वर्गात घेण्यात आले त्या वेळेपर्यंत आपल्यामध्ये राहत असलेल्यांपैकीच हा मनुष्य असला पाहिजे.”

[23]प्रेषितांनी दोन मनुष्यांना गटासमोर उभे केले. एक जण योसेफ बर्सबा होता. (त्याचे उपनाव युस्त होते.) व दुसरा मत्थिया होता. [24–25]प्रेषितांनी प्रार्थना केली, “प्रभु, तू सर्वांची मने जाणतोस. या दोघांपैकी हे काम करण्यासाठी तू कोणाची निवड केलेली आहेस हे आम्हांला सांग. यहूदाने या सेवेकडे पाठ फिरवली. आणि ज्या ठिकाणचा तो होता तिकडे गेला. ” [26]नंतर दोघातील एकाची निवड करण्यासाठी प्रेषितांनी फासे (सोंगट्या) टाकले. फाशावरून प्रभुला मत्थिया पाहिजे होता हे दिसून आले. म्हणून तो इतर अकरा शिष्यांसह प्रेषित झाला.

## पवित्र आत्म्याचे आगमन

2 पन्नासावाचा * दिवस आला, तेव्हा सर्व प्रेषित एका ठिकाणी एकत्र होते. [2]अचानक आकाशातून आवाज ऐकू आला. तो आवाज सोसाट्याने वाहणाऱ्या वाऱ्यासारखा होता. ज्या ठिकाणी ते बसले होते ते घर त्या आवाजाने भरून गेले. [3]त्यांनी अग्नीच्या ज्वालांसारखे काहीतरी पाहिले. त्या ज्वाला विभक्त होत्या. आणि तेथील प्रत्येक मनुष्यावर एक एक अशा उभ्या राहिल्या. [4]ते सर्व पवित्र आत्म्याने भरून गेले आणि ते निरनिराळ्या भाषा बोलू लागले. हे करण्यासाठी पवित्र आत्मा त्यांना सामर्थ्य देत होता.

[5]त्यावेळी यरुशलेमामध्ये काही फार धार्मिक यहूदी लोक होते. हे लोक जगातील प्रत्येक देशाचे होते. [6]या लोकांपैकी मोठा गट हा आवाज ऐकल्यामुळे तेथे आला. ते आश्चर्यचकित झाले कारण प्रेषित बोलत होते आणि प्रत्येक मनुष्याला त्याची स्वत:ची भाषा ऐकायला मिळाली. [7]यामुळे यहूदी लोक अचंबित झाले. त्यांना हे समजत नव्हते की, प्रेषित हे कसे करू शकले. ते म्हणाले, “पाहा! ही माणसे (प्रेषित) ज्यांना आपण बोलताना ऐकत आहोत ती सर्व गालीली* आहेत! [8]पण आपण त्यांचे बोलणे आपल्या स्वत:च्या भाषेत ऐकत आहोत. हे कसे शक्य आहे? आपण भिन्न देशाचे आहोत: [9]पार्थी, मेदी, एलाम, मेसोपोटेमिया, यहूदा, कपदुकीया, पंत, आशिया* [10]फ्रुगिया, पंफिलीया, इजिप्त, कुरेने शहराजवळचा लिबीयाचा भाग, रोमचे प्रवासी, [11]क्रेत व अरब प्रदेश असे आपण सर्व निरनिराळ्या देशांचे आहोत. आपल्यापैकी काही जन्मानेच यहूदी आहेत. काही जण धर्मांतरीत आहेत. आपण या निरनिराळ्या देशांचे आहोत. परंतु आपण ह्या लोकांचे बोलणे आपापल्या भाषेत ऐकत आहोत! आपण सर्व ते देवाविषयीच्या ज्या महान गोष्टी बोलत आहेत त्या समजू शकतो.” [12]ते लोक आश्चर्यचकित झाले, आणि गोंधळून गेले. त्यांनी एकमेकांना विचारले, “काय चालले आहे?” [13]दुसरे लोक प्रेषितांना हसत होते. त्यांना असे वाटले की, प्रेषित द्राक्षारस खूप प्रमाणात प्यालेले आहेत.

## पेत्राचे लोकांपुढे भाषण

[14]मग पेत्र अकरा प्रेषितांसह उठून उभा राहिला. आणि तेथे असलेल्या लोकांना ऐकू जावे म्हणून मोठ्याने बोलला. तो म्हणाला, “माझ्या यहूदी बंधूंनो, आणि तुम्ही सर्व यरुशलेमचे रहिवासी, माझे ऐका. मी जे सांगतो, ते तुम्हांला समजणे जरूरीचे आहे. काळजीपूर्वक ऐका. [15]सकाळचे नऊ वाजलेले आहेत आणि तुम्हांला वाटते तसे हे लोक द्राक्षारसाच्या धुंदीत बोलत नाहीत! [16]परंतु आज येथे ज्या गोष्टी घडताना तुम्ही पाहत आहात त्याविषयी योएल संदेष्ट्याने लिहीले होते. योएल असे लिहिले:

[17]‘देव म्हणतो: शेवटल्या दिवसात मी अखिल मानवांवर आपला आत्मा ओतीन तुमचे पुत्र व कन्या भविष्य सांगतील तुमच्या तरुणांना दृष्टांत* होतील; तुमच्या वृद्धांना विशेष स्वप्ने पडतील.

[18]त्यावेळी मी माझा आत्मा माझ्यासेवकांवर, पुरुषांवर व स्त्रियांवर ओतीन आणि ते भविष्य सांगतील.

[19]वर आकाशात मी अद्भुत गोष्टी दाखवीन. खाली पृथ्वीवर मी पुरावे देईन. तेथे रक्त, अग्नि आणि दाट धूर असतील.

---

**पन्नासावाचा** वल्हांडण सणानंतर पन्नास दिवसांनी येणारा यहूदी सण. गव्हाच्या कापणीचा हंगाम साजरा करतात.

**गालीली** लोकांना वाटले गालीलचे लोक केवळ त्यांची स्वत:चीच भाषा बोलू शकतात.

**आशिया** आशिया मायनरचा पश्चिमेकडील भाग.

**दृष्टांत** जणू काय स्वप्नच. ज्याचा उपयोग देव लोकांशी बोलण्यासाठी करतो.

20सूर्य अंधारामध्ये बदलला जाईल चंद्र रक्तासारखा
लाल होईल नंतर प्रभुचा महान व गौरवी दिवस येईल.
21प्रत्येक व्यक्ति जी प्रभुवर विश्वास ठेवते ती वाचेल.

*योएल 2:28-32*

22"माझ्या यहूदी बांधवानो, हे शब्द ऐका: नासरेथचा
येशू हा एक फार विशेष मनुष्य होता. देवाने तुम्हांला हे
स्पष्टपणे दाखविले आहे. देवाने येशूच्या हातून मोठ्या
सामर्थ्यशाली व अद्भुत गोष्टी तुमच्यामध्ये करून हे
सिद्ध केले. तुम्ही सर्वांनी या गोष्टी पाहिल्या. म्हणून तुम्ही
हे जाणता की हे सत्य आहे. 23तुमच्याकरिता येशूला
देण्यात आले आणि तुम्ही त्याला जिवे मारले. वाईट
लोकांच्या मदतीने तुम्ही येशूला वधस्तंभावर खिळले.
परंतु हे सर्व होणार हे देव जाणून होता. ती देवाचीच
योजना होती. फार पूर्वीच देवाने ही योजना तयार केली
होती. 24येशूने मरणाचे दु:ख सहन केले. परंतु देवाने
त्याला मुक्त केले. देवाने येशूला मरणातून उठविले. मरण
येशूला बांधून ठेवू शकले नाही. 25येशूविषयी दावीद असे
म्हणतो:

'मी प्रभूला नेहमी माझ्यासमोर पाहिले आहे: मला सुरक्षित
ठेवण्यासाठी तो माझ्या उजवीकडे असतो
26म्हणून माझे हृदय आनंदात आहे आणि माझे तोंड
आनंदाने बोलते. होय, माझे शरीरदेखील आशा धरून
राहील
27कारण तू माझा जीव मरणाच्या जागेत* राहू देणार
नाहीस तू तुझ्या पवित्र लोकांच्या शरीराला कुजण्याचा
अनुभव येऊ देणार नाहीस.
28तू मला कसे जगायचे ते शिकविलेस. तू माझ्याजवळ
येशील. आणि मला मोठा आनंद देशील.'

*स्तोत्र. 16:8-11*

29"माझ्या बांधवांनो, खरोखर आपला पूर्वज दावीद
याच्याविषयी मी तुम्हांला सांगू शकतो. तो मेला आणि
पुरला गेला. आणि त्याची कबर आजच्या ह्या दिवसापर्यंत
आपल्यामध्ये आहे. 30दावीद हा संदेष्टा* होता. आणि देव
जे काही बोलला ते त्याला माहीत होते. दावीदाला देवाने
अभिवचन दिले की, तो त्याच्याच घराण्यातून एका व्यक्तीला
त्याच्या राजासनावर बसवील. 31ते घडण्यापूर्वीच दावीदाला
हे माहीत होते. यासाठीच दावीद त्या व्यक्तीबद्दल असे
म्हणतो:

'त्याला मरणाच्या जागेत राहू दिले नाही. त्याचा देह
कबरेमध्ये कुजला नाही.'

**मरणाची जागा** शब्दश: मृत्युलोक, नरक.

**संदेष्टा** देवाच्या वतीने बोलणारी व्यक्ति.

दावीद ख्रिस्ताच्या मरणातून पुन्हा उठविण्याविषयी म्हणत
होता. 32म्हणून येशूला देवाने मरणातून उठविले, दाविदाला
नाही! आम्ही सर्व ह्या गोष्टीचे साक्षीदार आहोत. आम्ही
त्याला पाहिले! 33येशूला स्वर्गात उचलून घेण्यात आले.
आता येशू देवाच्या उजवीकडे देवाबरोबर आहे. देवाने
येशूला आता पवित्र आत्मा दिलेला आहे. हाच पवित्र
आत्मा देण्याचे वचन देवाने दिले होते. म्हणून आता येशू
तो आत्मा ओतीत आहे. हेच तुम्ही पाहत आहात व ऐकत
आहात! 34दावीद वर स्वर्गात उचलला गेला नाही, तर
येशूला वर स्वर्गात उचलून घेण्यात आले. दावीद स्वत:
म्हणाला,

'प्रभु (देव) माझ्या प्रभुला म्हणाला: मी तुझे वैरी
35तुझ्या सामर्थ्याखाली घालीपर्यंत* माझ्या उजवीकडे
बैस.

*स्तोत्र. 110:1*

36"म्हणून, सर्व यहूदी लोकांना खरोखर हे समजले
पाहिजे की देवाने येशूला प्रभु व ख्रिस्त* असे केलेले
आहे. तुम्ही वधस्तंभावर खिळून मारलेला हाच तो मनुष्य!"
37जेव्हा लोकांनी हे ऐकले, तेव्हा त्यांना फार फार
दु:ख झाले. त्यांनी पेत्राला व इतर प्रेषितांना विचारले,
"आम्ही काय करावे?"
38पेत्र त्यांना म्हणाला, "तुमची हृदये व जीविते बदला
आणि येशू ख्रिस्ताच्या नावात तुम्ही प्रत्येकाने बाप्तिस्मा
घ्यावा. मग देव तुमच्या पापांची क्षमा करील आणि तुम्हांला
पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल. 39हे अभिवचन
तुम्हांसाठी आहे. हे तुमच्या मुलांना आणि जे लोक खूप
दूर आहेत त्यांनासुद्धा आहे. प्रभु आपला देव, ज्यांना
स्वत:कडे बोलावितो अशा प्रत्येक व्यक्तीला ते दिलेले
आहे."
40पेत्राने दुसऱ्या पुष्कळ शब्दांत त्यांना सावधान केले;
त्याने त्यांना विनवणी केली, "ह्या युगाच्या दुष्टाई पासून
स्वत:चा बचाव करा!" 41मग ज्यांनी पेत्राने सांगितलेल्या
गोष्टींचा स्वीकार केला, त्यांचा बाप्तिस्मा करण्याता आला.
त्या दिवशी विश्वासणाऱ्यांच्या बंधुवर्गामध्ये तीन हजार
लोकांची भर पडली. 42सर्व विश्वासणारे एकत्र भेटत
असत. ते त्यांचा वेळ प्रेषितांची शिकवण शिकण्यात
घालवीत. विश्वासणारे एकमेकांशी सहभागिता करीत. ते
एकत्र खात आणि एकत्र प्रार्थना करीत.

### विश्वासणाऱ्यांचा सहभाग

43प्रेषित अनेक सामर्थ्यशाली आणि अद्भुत गोष्टी
करीत; आणि प्रत्येक व्यक्तीला देवाविषयी आदर वाटू

**सामर्थ्याखाली घालीपर्यंत** शब्दश: मी तुझ्या शत्रूचे तुझ्या
पायांखाली आसन करीपर्यंत.

**ख्रिस्त** अभिषिक्त (मशीहा) देवाचा निवडलेला.

लागला. 44सर्व विश्वासणारे एकत्र राहत. प्रत्येक गोष्ट ते
आपापसात वाटत असत. 45विश्वासणाऱ्यांनी आपल्या
मालकीच्या जमिनी व वस्तू विकल्या. नंतर त्यांनी पैसे
विभागून ज्यांना आवश्यकता होती अशा लोकांना दिले.
46सर्व विश्वासणारे मंदिरामध्ये दररोज एकत्र जमत. त्या
सर्वांचा उद्देश सारखाच होता. ते त्यांच्या घरामध्ये एकत्र
खात. आपले अन्न इतरांना वाटण्यात त्यांना फार आनंद
होत असे आणि आनंदी मनाने ते खात असत. 47विश्वासणारे
देवाची स्तुति करीत. आणि सर्व लोकांना ते आवडत
असत. आणि अधिकाधिक लोक तारले जात होते. व
विश्वासणाऱ्यांच्या गटामध्ये प्रभु रोज अनेक लोकांची
भर घालीत असे.

### पेत्र एका लंगड्या मनुष्याला बरे करतो

3 एके दिवशी पेत्र व योहान मंदिराकडे जात होते.
त्यावेळी दुपारचे तीन वाजले होते. मंदिरातील प्रार्थनेची
ती नेहमीची वेळ होती. 2जेव्हा ते मंदिरात जाऊ लागले,
तेव्हा त्या ठिकाणी एक मनुष्य होता. हा मनुष्य
जन्मापासूनचा लंगडा होता. त्याला चालता येत नव्हते.
म्हणून काही मित्र त्याला उचलून घेऊन आले. दररोज
त्याचे मित्र त्याला मंदिराकडे आणीत असत. ते त्या लंगड्या
माणसाला मंदिराच्या एका दरवाजाजवळ ठेवीत असत. या
दरवाजाचे नाव सुंदर दरवाजा असे होते. तेथे तो मनुष्य
मंदिरात येणाऱ्या लोकांकडे भीक मागत असे. 3त्या दिवशी
त्या लंगड्या मनुष्याने पेत्र व योहानाला मंदिरात जाताना
पाहिले. त्याने त्यांच्याकडे पैसे मागितले. 4पेत्र व योहान
यांनी त्या माणसाकडे पाहिले व म्हटले, “आमच्याकडे
पाहा!” 5त्या मनुष्याने त्यांच्याकडे पाहिले; त्याला वाटले
ते त्याला काही पैसे देतील. 6परंतु पेत्र म्हणाला, “माझ्याकडे
सोने किंवा चांदी काही नाही, परंतु माझ्याकडे दुसरे काही
तरी आहे, ते मी तुला देतो: नासरेथच्या येशू ख्रिस्ताच्या
नावाने ऊठ आणि चालू लाग!” 7मग पेत्राने त्या माणसाचा
उजवा हात धरला व त्याला उठविले. आणि ताबडतोब
त्या मनुष्याच्या पायात व घोट्यात शक्ति आली. 8तो माणूस
उडी मारून उभा राहिला व चालू लागला. तो चालत,
बागडत, आणि देवाचे गुणगान करीत त्यांच्याबरोबर मंदिरात
गेला. 9–10सर्व लोकांनी त्याला ओळखले. मंदिराच्या सुंदर
नावाच्या दरवाजापाशी भीक मागत बसत असे तो हाच
म्हणून त्यांनी त्याला ओळखले. आता त्यांनी त्याच
माणसाला चालताना व देवाची स्तुति करताना पाहिले.
लोक आश्चर्यचकित झाले. हे कसे घडले हे त्यांना समजत
नव्हते.

### पेत्र लोकांच्या पुढे भाषण करतो

11तो लंगडा मनुष्य पेत्र व योहान यांना बिलगून उभा
होता. सर्व लोक आश्चर्यचकित झाले होते. कारण तो
मनुष्य बरा झाला होता. ते पेत्र व योहान उभे असलेल्या
शलमोनाच्या द्वारमंडपाकडे* धावत येऊ लागले. 12जेव्हा
पेत्राने हे पाहिले, तो लोकांना म्हणाला, “माझ्या यहूदी
बंधूंनो, ह्यामुळे तुम्हांला आश्चर्य का वाटत आहे? तुम्ही
आमच्याकडे असे पाहात आहात की जणू काय आमच्या
सामर्थ्यानेच हा मनुष्य चालू लागला आहे. तुम्हांला असे
वाटते का की, आमच्या चांगुलपणामुळे असे घडले?
13नाही! देवाने हे केले! तो अब्राहामाचा देव आहे,
इसहाकाचा देव आहे आणि तो याकोबाचा देव आहे.
आमच्या पूर्वजांचा तो देव आहे. त्याचा खास सेवक येशू
याला त्याने गौरव दिलेला. परंतु तुम्ही येशूला मारण्यासाठी
दिले. पिलाताने येशूला मुक्त करण्याचा निर्णय घेतला,
परंतु तुम्ही पिलाताला सांगितले की, तुम्हांला येशू नको.
14येशू शुद्ध आणि चांगला (निष्पाप) होता. परंतु तुम्ही
म्हणाला तुम्हाला तो नको. तुम्ही पिलाताला सांगितले की
येशूऐवजी आम्हांला एक खुनी दे. 15आणि म्हणून जो
जीवन देतो त्याला तुम्ही मारले! परंतु देवाने त्याला मरणातून
उठविले. आम्ही त्याचे साक्षी आहो. आम्ही आमच्या
डोळ्यांनी ते पाहिले. 16येशूच्या सामर्थ्यानेच हा लंगडा
बरा झाला. आम्ही येशूच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला
म्हणून हे घडले. तुम्ही या मनुष्याला पाहू शकता. आणि
तुम्ही त्याला ओळखता. येशूवरील विश्वासाने तो पूर्णपणे
बरा झाला. तुम्ही हे घडलेले पाहिले!

17“माझ्या बंधूनो, तुम्ही येशूला जे केले ते तुम्ही अजाणता
केले. (तुम्हांला समजत नव्हते, तुम्ही काय करीत आहात.
तुमच्या नेत्यांनासुद्धा हे समजले नाही.) 18देवाने सांगितले
या गोष्टी घडतील. देवाने भविष्यवाद्यांकरवी हे सांगितले
की, त्याचा ख्रिस्त दुःखसहन करील व मरेल. मी तुम्हांला
सांगितलेले आहे की, देवाने हे कसे घडवून आणले.
19म्हणून तुम्ही तुमची हृदये व जीवने बदलली पाहिजेत!
देवाकडे परत या आणि तो तुमच्या पापांची क्षमा करील.
20मग प्रभु (देव) तुम्हांला आध्यात्मिक विश्रांतीसाठी वेळ
देईल. तो तुम्हाला येशू देईल, ज्याला त्याने ख्रिस्त म्हणून
निवडले. 21परंतु देवाने त्याच्या पवित्र भविष्यवाद्यांच्या
तोंडून ज्या गोष्टी आरंभापासूनच सांगितल्या त्या घडून
येईपर्यंत त्याला स्वर्गातच राहिले पाहिजे. 22मोशे म्हणाला,
‘प्रभु तुमचा देव तुम्हांला संदेष्टा देईल. तो संदेष्टा तुमच्या
स्वत:च्या (यहूदी लोकांच्या) मधूनच देईल.* तो
माझ्यासारखा भविष्यवादी असेल. तो जे तुम्हांला सांगेल
ते सारे तुम्ही पाळा. 23जो कोणी संदेष्ट्याची (भविष्यवादी)
आज्ञा पाळणार नाही, त्याचे आपल्या बांधवांमधून
मुळासकट उच्चाटन होईल.’ 24शमुवेल व इतर संदेष्टे
(भविष्यवादी) जे शमुवेलानंतर झाले, जे देवासाठी बोलले,
ते या आताच्या काळाविषयी बोलले. 25संदेष्टे ज्या

---

**शलमोनाचा द्वारमंडप** मंदिराचा पूर्वेकडील भाग, तो छपराने आच्छादित होता.

**प्रभु तुमचा ... देईल** अनुवाद 18:15,19

गोष्टींविषयी बोलले, त्या गोष्टी तुम्हांला मिळाल्या आहेत. देवाने तुमच्या वाडवडिलांशी (पूर्वजांशी) जो करार केला तो तुम्हांला मिळाला आहे. देवाने तुमचा पिता अब्राहाम याला म्हटले, 'तुझ्या कुटुंबामुळे पृथ्वीवरील राष्ट्रे आशीर्वादित होतील.* 26देवाने आपला खास सेवक येशू याला प्रथम तुमच्याकडे पाठविले. तुमच्या वाईट मार्गापासून तुम्हांला परावृत्त करण्याकडून.' तुम्हांला आशीर्वाद देण्यासाठी देवाने येशूला पाठविले."

## पेत्र व योहान यहूदी धर्मसभेपुढे

4 पेत्र व योहान लोकांशी बोलत असताना, काही लोक त्यांच्याकडे आले. त्यातील काही यहूदी याजक, मंदिराचे रक्षण करणाऱ्या शिपायांचा कप्तान व काही सदूकी लोक होते. 2ते चिडले होते. कारण दोन प्रेषित लोकांना शिकवीत होते. पेत्र व योहान लोकांना शिकवीत होते की, येशूच्या सामर्थ्याने मेलेली माणसे पुन्हा उठतील. 3यहूदी पुढाऱ्यांनी व नियमशास्त्र शिक्षकांनी पेत्र व योहानाला धरले व तुरुंगात टाकले. अगोदरच रात्र झाली होती, म्हणून त्यांनी पेत्र व योहान यांना दुसऱ्या दिवसापर्यंत तुरुंगात ठेवले. 4परंतु पेत्र व योहान यांचा संदेश ऐकणाऱ्या पुष्कळ लोकांनी, त्यांनी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवला. विश्वासणाऱ्यांच्या गटामध्ये सुमारे पाच हजार लोक होते. 5दुसऱ्या दिवशी यहूदी लोकांचे पुढारी, वडीलजन, व नियमशास्त्र शिकविणारे शिक्षक यरुशलेममध्ये एकत्र जमले. 6हन्ना (प्रमुख याजक), केफा, योहान आणि अलेक्सांद्र हे तेथे होते. तसेच प्रमुख याजकाच्या घरातील प्रत्येक जण हजर होता. 7त्यांनी पेत्र व योहान यांना सर्वांसमोर उभे राहण्यास सांगितले. यहूदी पुढाऱ्यांनी पुष्कळ वेळा त्यांना विचारले, "या लंगड्या माणसाला तुम्ही कसे बरे केले? कोणत्या शक्तीचा उपयोग तुम्ही केला? कोणाच्या अधिकाराने हे तुम्ही केले?"

8मग पेत्र पवित्र आत्म्याने भरला गेला. तो त्यांना म्हणाला, "अहो पुढाऱ्यांनो आणि वडीलधारी लोकांनो; 9या लंगड्या माणसाच्या बाबतीत जी चांगली गोष्ट झाली त्याबद्दल तुम्ही आम्हांला प्रश्न विचारीत आहात काय? तुम्ही आम्हांला विचारीत आहात का की याला कोणी बरे केले? 10तुम्ही सर्वांनी आणि यहूदी लोकांनी समजून घ्यावे अशी आमची इच्छा आहे, ती ही की, नासरेथच्या येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याने हा मनुष्य बरा झाला! तुम्ही येशूला वधस्तंभावर खिळले. देवाने त्याला मरणातून उठविले. हा मनुष्य लंगडा होता, पण आता तो चांगला झाला आहे. आणि येशूच्या सामर्थ्यामुळे तुमच्यासमोर उभा राहू शकत आहे!

11'तुम्ही बांधणारांनी जो दगड नापसंत केला, जो पुढे कोनशिल झाला तोच हा येशू होय.' *स्तोत्र. 118:22*

12येशू हा एकमेव आहे जो लोकांना तारू शकेल. त्याचे नाव हेच सामर्थ्य फक्त जगामध्ये आहे जे लोकांना तारण्यासाठी दिले आहे. आमचे तारण येशूद्वारे झालेच पाहिजे!"

13यहूदी लोकांना समजले की, पेत्र व योहान यांचे खास प्रशिक्षण किंवा शिक्षण झालेले नाही. पण पुढाऱ्यांनी हे सुद्धा पाहिले की, पेत्र व योहान बोलायला घाबरत नव्हते. म्हणून पुढारी आश्चर्यचकित झाले. मग त्यांना उमगले की, पेत्र व योहान येशूबरोबर होते. 14त्यांनी पाहिले की, तो लंगडा मनुष्य तेथे दोन प्रेषितांसह उभा आहे. त्यांनी पाहिले की, तो मनुष्य बरा झालेला आहे. म्हणून ते प्रेषितांविरूद्ध काही बोलू शकत नव्हते. 15यहूदी पुढारी त्यांना म्हणाले की, त्यांनी सभा सोडून जावे. मग पुढारी काय करायला हवे याविषयी एकमेकांमध्ये विचारविनिमय करू लागले. 16ते म्हणाले, "या मनुष्यांचे आपण काय करावे? यरुशलेममधील प्रत्येक व्यक्ति हे जाणते की, त्यांनी एक महान चमत्कार केला आहे. हे स्पष्ट आहे. आपण असे म्हणू शकत नाही की ते खरे नाही. 17परंतु आपण त्यांना त्या माणसाविषयी (येशूविषयी) सांगण्यास (प्रतिबंध करू) घाबरून सोडू. मग ही समस्या लोकांमध्ये पसरणार नाही."

18मग यहूदी पुढाऱ्यांनी पेत्र व योहान यांना परत आत बोलाविले. त्यांनी प्रेषितांना सांगितले की, येशूच्या नावाने काही करू नका व शिकवू नका. 19पण पेत्र व योहान यांनी त्यांना उत्तर दिले, "तुम्हांला कोणते बरोबर वाटते? देव काय इच्छितो? आम्ही तुमची की देवाची आज्ञा पाळायची? 20आम्ही शांत बसू शकत नाही. आम्ही ज्या गोष्टी पाहिल्या आणि ऐकल्या त्या आम्हांला सांगितल्याच पाहिजेत."

21–22प्रेषितांना शिक्षा करण्याचा मार्ग त्यांना सापडेना; कारण जे काही घडले होते त्याविषयी लोक देवाची स्तुति करीत होते. (हा चमत्कार देवाकडून घडला होता. शिवाय जो बरा झाला होता, तो चाळीस वर्षांहून अधिक वयाचा होता.) म्हणून यहूदी पुढाऱ्यांनी प्रेषितांना पुन्हा ताकीद दिली व त्यांना सोडून दिले.

## पेत्र व योहान विश्वासणाऱ्यांकडे परततात

23पेत्र व योहान यांची सुटका झाल्यावर ते त्यांच्या स्वतःच्या बंधुवर्गाकडे परत गेले. त्यांनी प्रमुख याजक व प्रमुख वडील यहूदी पुढारी जे बोलले ते सर्व त्यांनी बंधुवर्गास सांगितले. 24जेव्हा विश्वासणाऱ्यांनी हे ऐकले, तेव्हा त्या सर्वांनी एक मनाने देवाला प्रार्थना केली. ते म्हणाले, "सर्वसमर्थ प्रभु, तूच आकाश, जमीन, समुद्र व जगातील सर्वांचा निर्माणकर्ता आहेस. 25आमचा पिता दावीद हा तुझा सेवक होता. पवित्र आत्म्याच्या सहाय्याने त्याने हे शब्द लिहिले:

---

**तुझ्या … होतील** उत्पत्ति 22:18, 26:24

‘राष्ट्रे का ओरडत आहेत? लोक (देवाविरुद्ध) का
व्यर्थ कट रचित आहेत?
26या भूतलावरील राजे लढाईसाठी सज्ज झाले आणि
प्रभु परमेश्वर व त्याचा ख्रिस्त यांच्याविरुद्ध एकवट झाले
आहेत.’ *स्तोत्र. 2:1-2*

27या गोष्टी खरोखर घडल्या, जेव्हा हेरोद,* पंत पिलात,
यहूदीतर राष्ट्रे व यहूदी लोक हे सर्व जण येशूविरुद्ध
‘एकत्र आले.’ 28त्यांनी तुझी योजना प्रत्यक्षात आणली. हे
सर्व तुझ्या सामर्थ्याने व तुझ्या इच्छेने घडले. 29आणि
आता प्रभु, ते काय म्हणत आहेत ते ऐक. ते आम्हांला
भेडसावण्याचा प्रयत्न करीत आहेत! प्रभु, आम्ही तुझे
सेवक आहोत. तुला आम्ही जे बोलावे असे वाटते ते न
भीता बोलण्यासाठी आम्हांला मदत कर. 30तुझे सामर्थ्य
दाखवून आम्ही धीट बनण्यासाठी आम्हांला मदत कर;
आजारी लोकांना बरे कर, पुरावे दे आणि चमत्कार
कर, जे येशू जो तुझा पवित्र सेवक याच्या सामर्थ्याने
घडतील.”
31विश्वासणाऱ्यांनी प्रार्थना केल्यावर, ज्या ठिकाणी ते
एकत्र जमले होते ती जागा हादरली, ते सर्व पवित्र आत्म्याने
भरले गेले. व ते न भीता देवाचा संदेश सांगत गेले.

## विश्वासणाऱ्यांचा सहभाग

32विश्वासणाऱ्यांचा हा परिवार एक मनाने व ऐक्याने
राहत असे. ते एकचित्त होते. परिवारामधील कोणीही
आपल्या मालमत्तेवर स्वतंत्र अधिकार सांगत नसे. उलट
प्रत्येक गोष्ट ते वाटून घेत. 33मोठ्या सामर्थ्याने प्रेषित
लोकांना प्रभु येशू मेलेल्यांतून उठला याविषयी साक्ष देत.
आणि त्या विश्वासणाऱ्यांवर देवाचा मोठा आशीर्वाद होता.
34त्यांना आवश्यकता भासे ते सर्व त्यांना मिळत असे.
प्रत्येक जण ज्याची स्वत:ची शेत (जमीन) होती किंवा घर
होती, त्यांनी ते पैशासाठी विकले व विकून आलेले पैसे
त्यांनी प्रेषितांच्या हवाली केले. 35आणि प्रत्येक व्यक्तीला
त्याच्या गरजेनुसार पुरवठा केला जात असे.
36एका विश्वासणाऱ्याचे नाव होते योसेफ. प्रेषित त्याला
बर्णबा म्हणत. (याचा अर्थ, “जो इतरांना मदत करतो तो
मनुष्य.”) तो लेवी वंशातला होता. आणि कुप्र बेटावर
जन्मलेला होता. 37योसेफाचे स्वच:चे शेत होते, ते त्याने
विकले व पैसे त्याने प्रेषितांकडे दिले.

## हनन्या आणि सप्पीरा

5 हनन्या नावाचा एक मनुष्य होता त्याच्या पत्नीचे
नाव सप्पीरा होते. हनन्याने त्याच्याकडे जी काही
जमीन होती ती विकली. 2परंतु विकून आलेल्या पैशातून
त्याने थोडेच पैसे प्रेषितांच्या हातात दिले. त्याने त्यातील
काही पैसे गुपचूप काढून स्वत:साठी ठेवले होते. त्याच्या
पत्नीला हे माहीत होते. तिने या गोष्टीला संमति दिली
होती. 3पेत्र म्हणाला, “हनन्या, तू तुझ्या अंत:करणावर
सैतानाला का अधिकार चालवू देतोस? तू खोटे बोललास
व पवित्र आत्म्याला फसविण्याचा प्रयत्न केलास. तू जमीन
विकलीस, पण त्यातील काही पैसे स्वत:साठी का ठेवलेस?
4ती जमीन विकण्यापूर्वी तुझी होती. आणि विकल्यानंतर
सुद्धा ते पैसे तुला जसे पाहिजे तसे खर्च करता आले
असते. अशी वाईट गोष्ट करावी असा विचार तू का
केलास? तू मनुष्यांशी नाही, तर देवाशी खोटे बोललास!”
5–6जेव्हा हनन्याने हे ऐकले तेव्हा तो खाली पडला आणि
मरण पावला. काही तरुण लोकांनी त्याचे शरीर गुंडाळले
व बाहेर नेऊन पुरले. ज्या प्रत्येक मनुष्याने हे ऐकले, तो
अति भयभीत झाला.
7सुमारे तीन तासांनंतर त्याची पत्नी आत आली. सप्पीरा
तिच्या नवऱ्याच्या बाबतीत जे झाले ते काहीच माहीत
नव्हते.
8पेत्र तिला म्हणाला, “मला सांग, तुमच्या शेतासाठी
तुम्हांला किती पैसे मिळाले, (अमुक) इतक्याच पैशांना
मिळाले काय?” सप्पीरास उत्तर दिले, “होय, आम्हाला
शेत विकून तेवढेच पैसे मिळाले.”
9पेत्र म्हणाला, “देवाच्या आत्म्याची परीक्षा पाहण्याचे तू
व तुझ्यानवऱ्याने का ठरविले? ऐक! त्या पावलांचा आवाज
ऐकतेस का? ज्या माणसांनी तुझ्या नवऱ्याला पुरले ते
दाराजवळच आहेत! (तुझ्या नवऱ्याला जसे नेले) तसेच
ते तुलाही नेतील.” 10त्याच क्षणी सप्पीर त्याच्या पायाजवळ
खाली पडली आणि मेली. तरुण माणसे आली, त्यांनी
पाहिले की, ती मेलेली आहे. त्या माणसांनी तिला बाहेर
नेले आणि तिच्या नवऱ्याजवळ पुरले. 11सर्व विश्वासणारे
आणि इतर दुसरे लोक ज्यांनी याविषयी ऐकले ते अतिशय
भयभीत झाले.

## देवाचे पुरावे

12प्रेषितांनी पुष्कळसे चमत्कार व सामर्थ्यशाली गोष्टी
केल्या. सर्व लोकांनी या गोष्टी पाहिल्या. आणि ते सर्व
एकचित्ताने शलमोनाच्या द्वारमंडपात जमत असत. 13आणि
इतर लोकांतील कोणी त्यांच्याजवळ उभे राहण्याचे धैर्य
करीत नसत. परंतु सर्व प्रेषितांची स्तुति करीत; 14आणि
किती तरी लोक पुढे येऊन प्रभु येशूवर विश्वास ठेवीत.
अशा रीतीने बरेच पुरुष व स्त्रिया येऊन त्यांना मिळाल्या.
15त्यामुळे पेत्र रस्त्याने जाऊ लागला म्हणजे त्याची सावली
रोगी व आजारी लोकांच्यावर पडावी यासाठी लोक त्यांना
वाटेवर खाट अगर अंथरुणावर ठेवीत असत. 16लोक
यरुशलेम सभोवतालच्या गावांगावातून येऊ लागले. आणि
त्यांचे आजारी व भूतबाधा झालेले लोक यांना ते आणू
लागले. तेव्हा ही सर्व माणसे बरी केली गेली.

---

**हेरोद** महान हेरोदचा मुलगा. त्याचे नाव अन्टीपस. हा गालीली व पेरीया प्रांताचा रोमी सत्तेच्या वतीने शासन चालवणारा राजा होता.

### यहूदी प्रेषितांना मना करण्याचा प्रयत्न करतात

17प्रमुख याजक आणि त्याचे सर्व मित्र (सदूकी नावाचा एक गट) यांना फार हेवा वाटू लागला. 18त्यांनी प्रेषितांना धरले आणि तुरुंगात टाकले. 19पण रात्रीच्या वेळी देवाच्या दूताने तुरूंगाचा दरवाजा उघडला. देवदूताने प्रेषितांना बाहेर आणले आणि म्हणाला, 20“जा आणि मंदिरात उभे राहा. येशू ख्रिस्तामधील जे नवीन जीवन आहे त्याविषयी लोकांना सांगा.” 21जेव्हा प्रेषितांनी हे ऐकले, त्यांनी ती आज्ञा पाळली आणि मंदिरात गेले. ती पहाटेची वेळ होती. आणि तेथे लोकांना शिक्षण देऊ लागले. प्रमुख याजक व त्याचे मित्र सभास्थानात आले. त्यांनी यहूदी पुढाऱ्यांची सभा आणि सर्व वडीलजन, जे यहूदी लोकांचे नेते होते यांची एकत्र सभा बोलाविली. मग प्रेषितांना तेथे घेऊन येण्यासाठी काही जणांना तुरुंगात पाठविले. 22जेव्हा शिपाई तुरुंगामध्ये त्यांना पाहावयास गेले, तेव्हा त्यांना आतमध्ये प्रेषित आढळले नाहीत. म्हणून त्यांनी परत जाऊन यहूदी पुढाऱ्यांना त्याविषयी सांगितले. 23शिपाई म्हणाले, “तुरुंगाची दारे बंद केलेली व त्यांस कुलुप लावलेले होते. तसेच पहारेकरीही दारावर पहारा देत आहेत. परंतु आम्ही जेव्हा दार उघडले, तेव्हा आतमध्ये कोणीच आढळले नाही!” 24मंदिराच्या पहारेकऱ्यांच्या सरदाराने आणि प्रमुख याजकाने हे शब्द ऐकले. ते गोंधळात पडले. व यानंतर काय होईल याबद्दल बुचकळ्यात पडले. 25नंतर कोणी एक आला आणि म्हणाला, “ज्या लोकांना तुम्ही तुरुंगात टाकले ते तर मंदिरात उभे राहून लोकांना शिक्षण देत आहेत!” 26तेव्हा कप्तान व त्याचे लोक बाहेर गेले व प्रेषितांना पुन्हा घेऊन आले. त्यावेळी त्यांनी बळाचा वापर केला नाही, कारण त्यांना लोकांचे भय वाटले व असे वाटले की लोक कदाचित त्यांना दगडमार करतील.

27त्यांनी प्रेषितांना आणून सभेपुढे उभे केले. प्रमुख याजकाने प्रेषितांना प्रश्न विचारले. 28तो म्हणाला, “आम्ही तुम्हांला (येशू) या मनुष्याच्या नावाने शिक्षण देऊ नका म्हणून ताकीद दिली होती. आणि तरीही तुम्ही तुमच्या शिकवणुकीचा प्रसार सर्व यरुशलेमभर केलात. आणि या मनुष्याच्या (येशूच्या) मरणाचा दोष आमच्यावर ठेवण्यासाठी तुम्ही प्रयत्न करीत आहात.”

29पेत्र व इतर प्रेषितांनी उत्तर दिले, “आम्हांला देवाची आज्ञा पाळलीच पाहिजे, तुमची नाही! 30तुम्ही येशूला मारले. तुम्ही त्याला वधस्तंभावर खिळले. परंतु त्याच देवाने, जो आमच्या वाडवडिलांचा (पूर्वजांचा) देव होता, त्याने येशूला मरणातून उठविले! 31देवाने त्याला उठविले व आपल्या उजवीकडे बसविले. देवाने येशूला राजपुत्र व उद्धारकर्ता म्हणून उजवीकडे बसविले. देवाने हे यासाठी केले की, यहूदी लोकांनी त्यांची हृदये व जीविते बदलावीत. ह्या गोष्टी घडताना आम्ही पाहिल्या. 32पवित्र आत्मासुद्धा हे खरे आहे हे दर्शवितो. जे लोक देवाची आज्ञा पाळतात त्या सर्वांना त्याने पवित्र आत्मा दिलेला आहे.”

33जेव्हा यहूदी सभेच्या पुढाऱ्यांनी हे शब्द ऐकले, तेव्हा ते खूप रागावले. त्यांनी प्रेषितांना जिवे मारण्यासंबंधी विचार सुरू केला. 34सभेमध्ये गमलीएल नावाचा एक परूशी उभा राहिला. नियमशास्त्राचा तो शिक्षक होता. आणि सर्व लोक त्याला मान देत असत. त्याने लोकांना सांगितले की, काही वेळासाठी प्रेषितांना बाहेर पाठवा. 35नंतर तो त्यांना म्हणाला, “इस्राएलच्या लोकांनो, या लोकांना जे काही करण्याचा विचार तुम्ही करीत आहात त्याबद्दल सावधगिरी बाळगा. 36काही काळापूर्वी थुदासचा जन्म झाला. आपण कोणी थोर असल्याचा दावा त्याने केला. सुमारे चारशे जण त्याला जाऊन मिळाले. पण त्याला ठार मारण्यात आले त्याचवेळी त्याचे अनुयायीही पांगले. ते काहीच करू शकले नाहीत.

37नंतर, गालीलातून यहूदा नावाचा माणूस आला. ती वेळ जनगणनेची होती. त्यानेही काही अनुयायांचे नेतृत्व केले. त्यालासुद्धा मारण्यात आले. व त्याचे सर्व अनुयायी पांगले व पळून गेले. 38म्हणून आता मी तुम्हांला सांगतो: या लोकांपासून दूर राहा. त्यांना एकटे सोडा. जर त्यांच्या योजना मनुष्यांच्या असतील तर ते अपयशी ठरतील. 39पण जर हे देवापासून असतील तर तुम्ही त्यांना रोखू शकणार नाही. उलट तुम्ही देवाविरुद्ध लढत आहात असे होईल!”

यहूदी लोकांनी गमलीएलचा सल्ला मानला. 40त्यांनी प्रेषितांना पुन्हा बोलाविले. त्यांना फटके मारले. आणि येशूच्या नावाने पुन्हा त्यांनी काही बोलू नये असा आदेश दिला. आणि त्यांनी प्रेषितांना सोडून दिले. 41प्रेषित सभा सोडून गेले. येशूच्या नावासाठी आपण निंदानालस्ती सहन करण्याच्या योग्यतेचे ठरलो यामुळे ते आनंदी झाले. 42आणि नंतर प्रेषितांनी लोकांना शिकविण्याचे सोडले नाही. प्रेषित लोकांना सातत्याने शुभवार्ता सांगत राहिले. येशू हा प्रभु आहे, हे ते दररोज मंदिरात व लोकांच्या घरांमध्ये सांगत असत.

### विशेष कामासाठी सात जणांची निवड केली जाते

6 अधिकाधिक लोक येशूचे अनुयायी होत होते. पण याचवेळी ग्रीक बोलणाऱ्या अनुयायांचा यहूदी अनुयायांशी वाद झाला. ते म्हणाले की, अनुयायांना मिळणारा जो रोजचा अन्नाचा वाटा असतो, तो त्यांच्या विधवांना मिळण्याविषयी दुर्लक्ष होते. 2बारा प्रेषितांनी सर्व अनुयायांना एकत्र बोलाविले. प्रेषित त्यांना म्हणाले, “देवाचे वचन शिकविण्याचे आमचे काम थांबलेले आहे. हे चांगले नाही! लोकांना काही खाण्यासाठी देणे यापेक्षा देवाचे वचन सातत्याने शिकविणे हे आमच्यासाठी अधिक चांगले. 3म्हणून बंधूनो, तुमचे स्वत:चे सात लोक निवडा. लोकांनी त्यांना हे चांगले आहेत असे म्हटले पाहिजे. ते ज्ञानाने व आत्म्याने पूर्ण भरलेले असावेत. आणि त्यांना ही सेवा करण्यास आपण देऊ. 4मग आपण आपला संपूर्ण वेळ

प्रार्थना करण्यात व देवाचे वचन शिकविण्यात घालवू
शकतो.”

5बंधुवर्गातील सगळ्यांना ही कल्पना आवडली. मग
त्यांनी या सात जणांची निवड केली: स्तेफन (मोठा विश्वास
व पवित्र आत्म्याने पूर्ण भरलेला मनुष्य, फिलिप्प),*
प्रखर, नीकनोर, तिम्मोन, पार्मिना आणि निकलाव
(अंतुखियाकर जो यहूदी झाला होता). 6नंतर त्यांनी या
सात जणांना प्रेषितांसमोर उभे केले. प्रेषितांनी त्यांच्यावर
हात ठेवले व प्रार्थना केली. 7देवाचे वचन जास्तीत जास्त
लोकांपर्यंत जात होते. यरुशलेममधील अनुयायांचा गट
मोठा होत होता. एवढेच नव्हे तर एका मोठ्या यहूदी
याजकवर्गाने विश्वास ठेवला व आज्ञा पाळल्या.

## स्तेफनाविरुद्ध यहूदी लोक

8स्तेफन (सात लोकांपैकी एक) यास मोठा आशीर्वाद
मिळाला. देवाने त्याला लोकांसमोर अद्भूत चमत्कार
करण्याचे सामर्थ्य दिले होते. 9परंतु काही यहूदी आले
आणि त्यांनी स्तेफनाबरोबर वाद घातला. हे यहूदी
सभास्थानातून* आले होते. त्याला लिबर्तीनांसाठी
सभास्थान असे म्हणत. (हे सभास्थान कुरेने, आणि
अलेक्सांद्र येथील यहूदी लोकांसाठी सुद्धा होते). किलीकिया
व आशियातील यहूदीसुद्धा त्यांच्याबरोबर होते. ते सर्व
आले आणि स्तेफनाबरोबर वाद घालू लागले. 10परंतु
ज्या ज्ञानाने व आत्म्याच्या प्रेरणेने स्तेफन बोलत होता
त्यापुढे यहूदी लोकांचा टिकाव लागेना. 11तेव्हा त्यांनी
काही लोकांना पैसे दिले व असे बोलायला शिकविले
की, “आम्ही स्तेफनाला मोशे व देव यांच्यावरूध्द दुर्भाषण
करताना म्हणजे वाईट गोष्टी बोलताना ऐकले.” 12त्यामुळे
लोकसमुदाय, यहूदी वडीलजन आणि परूशी लोक
भडकले. ते इतके चिडले की, त्यांनी येऊन स्तेफनाला
धरले. आणि त्याला यहूदी लोकांच्या (पुढाऱ्यांच्या) सभेत
नेले. 13आणि त्यांनी तेथे खोटे साक्षीदार आणले, ते म्हणाले,
“हा मनुष्य (स्तेफन) पवित्र मंदिराविषयी नेहमी वाईट
बोलतो. आणि तो मोशेच्या नियमशास्त्राविषयी नेहमी वाईट
बोलतो. 14आम्ही त्याला असे बोलताना ऐकले आहे की,
नासरेथचा येशू ही जागा नष्ट करील आणि मोशेने घालून
दिलेल्या चालीरीती बदलून टाकील.” 15धर्मसभेत
बसलेल्या सर्व सभासदांनी स्तेफनाकडे न्याहाळून पाहिले.
तेव्हा त्याचा चेहरा देवदूताच्या चेहऱ्यासारखा दिसत होता.

## स्तेफनाचे भाषण

7 प्रमुख याजक स्तेफनाला म्हणाला, “हे सर्व खरे
आहे काय?” 2स्तेफनाने उत्तर दिले, “माझ्या यहूदी
वडीलजनांनो आणि बंधूंनो, माझे ऐका. आपला पिता
(पूर्वज) अब्राहाम मेसोपोटेमिया येथे असताना आपल्या
गौरवी देवाने त्याला दर्शन दिले. हे तो हारान येथे राहण्यापूर्वी
घडले होते. 3देव अब्राहामाला म्हणाला, ‘तुझा देश व तुझे
नातेवाईक सोड. आणि मी दाखवीन त्या देशात जा!’*
4म्हणून अब्राहामाने आपले वतन खास्द्यांचा देश सोडला
आणि तो हारान येथे राहू लागला. अब्राहामाच्या वडिलांच्या
मृत्यूनंतर देवाने त्याला या ठिकाणी पाठविले, जेथे आता
तुम्ही राहत आहात. 5परंतु देवाने अब्राहामाला या
जमिनीतील काही दिले नाही. देवाने यातील एक पाऊल
ठेवण्या इतकी सुध्दा जमीन त्याला दिली नाही. परंतु
देवाने त्याला अभिवचन दिले की भविष्यात तो त्याला ही
जमीन देईल. व त्याच्या मुलांनाही देईल. अब्राहामाला
संतान होण्यापूर्वी हे घडले. 6देव त्याला म्हणाला, ‘तुझी
संतती उपरी होईल. ते दुसऱ्या देशात राहतील. तेथील
लोक तुझ्यावंशजांना गुलाम बनवितील आणि त्यांना चारशे
वर्षे वाईट रीतीने वागवतील. 7परंतु जो देश त्यांना गुलाम
बनवील त्यांना मी शिक्षा देईन.’* देव असे सुद्धा म्हणाला,
‘त्या गोष्टी घडल्यानंतर, तुझे लोक त्या देशातून बाहेर
येतील. मग तुझे लोक या ठिकाणी माझी उपासना
करतील.’* 8देवाने अब्राहामाशी करार केला, या कराराचे
चिन्ह होते सुंता. आणि म्हणून जेव्हा अब्राहामाला मुलगा
झाला, तेव्हा अब्राहामाने आपल्या मुलाची, तो आठ
दिवसांचा असताना, सुंता केली. त्याच्या मुलाचे नाव इसहाक
होते. इसहाकानेसुद्धा आपला मुलगा याकोब याची सुंता
केली. व याकोबाने आपल्या मुलांची सुंता केली. हे पुत्र
नंतर बारा (पूर्वज) वडील झाले.

9“या वडिलांना (पूर्वजांना) योसेफाचा मत्सर वाटला.
त्यांनी योसेफाला इजिप्तमध्ये एक गुलाम म्हणून विकले.
परंतु योसेफाबरोबर देव होता. 10योसेफावर तेथे खूप संकटे
आली पण देवाने त्याला सर्व संकटांतून सोडविले. देवाने
योसेफाला ज्ञान व शहाणपण दिले. त्यामुळे इजिप्तचा राजा,
फारो, याची मर्जी योसेफाला संपादन करता आली. फारोने
योसेफाला इजिप्त देशावर व त्याच्या घरावर अधिपती
म्हणून नेमले. 11मग सर्व इजिप्त व कनान देशावर दुष्काळ
पडला. आणि लोकांच्या दु:खाला अंत राहिला नाही.
आमच्या पूर्वजांना अन्नधान्य मिळेनासे झाले. 12जेव्हा
याकोबाने ऐकले की, इजिप्त देशामध्ये धान्य आहे, त्याने
आपल्या पूर्वजांना तिथे पाठविले. ही पहिली वेळ होती.
13ते दुसऱ्या वेळी आले तेव्हा योसेफाने आपली ओळख
त्यांना करून दिली. आणि फारो राजाला योसेफाच्या
कुटुंबाची माहिती झाली. 14मग योसेफाने काही लोकांना
आपल्या वडिलांना, आणि त्याच्या कुटुंबातील पंच्याहत्तर

---

**फिलिप्प** प्रेषित फिलिप्प नव्हे.

**सभास्थान** या ठिकाणी (इमारतीत) यहूदी लोक देवाचे वचन वाचण्यासाठी व अभ्यासण्यासाठी येत असत.

**तुझा देश ... देशात जा** उत्पत्ति 12:1

**तुझी संतती ... शिक्षा देईन** उत्पत्ति 15:13-14

**या ठिकाणी ... उपासना करतील** उत्पत्ति 15:14; निर्गम 3:12

लोकांना इजिप्त येथे. बोलावण्यासाठी पाठविले. 15मग
याकोब इजिप्त देशात गेला आणि तो व आपले पूर्वज
तेथेच मरण पावले. 16नंतर त्यांचे मृतदेह शेखेमला नेण्यात
आले व तेथेच त्यांना पुरण्यात आले. अब्राहामाने शेखेम
येथे हामोराच्या पुत्रांना पुरेपूर मोबदला देऊन विकत
घेतलेल्या कबरीत त्यांना पुरण्यात आले.

17देवाने अब्राहामाला दिलेले वचन पुरे होण्याची वेळ
जसजशी जवळ येऊ लागली, तसतशी इजिप्त देशातील
आपल्या लोकांची संख्या वाढू लागली. 18शेवटी, ज्या
राजाला योसेफाची माहिती नव्हती, असा राजा इजिप्तवर
राज्य करू लागला. 19त्या (नवीन) राजाने फार हुशारीने
आपल्या लोकांचा फायदा घेतला. तो आपल्या लोकांशी
फार निर्दयतेने वागू लागला. तो त्यांच्या बालकांना घराबाहेर
टाकून देण्यास भाग पाडू लागला. ती बालके जिवंत राहू
नयेत हा त्याचा हेतु होता. 20त्या काळात मोशेचा जन्म
झाला. आणि तो (देवाच्या नजरेत) फार सुंदर बालक
होता. तीन महिन्यांपर्यंत त्याच्या वडिलांच्या घरात वाढला.
21आणि जेव्हा त्याला घराबाहेर ठेवण्यात आले तेव्हा
फारोच्या कन्येने त्याला घेतले. तिने त्याला आपल्या
मुलासारखा वाढवला. 22इजिप्तच्या लोकांनी त्याला सर्व
प्रकारच्या ज्ञानात सुशिक्षित केले. तसेच तो बोलण्यात व
कृतीत भारदस्त झाला.

23"जेव्हा तो चाळीस वर्षांचा झाला, त्याने विचार केला
की, आपले बांधव, जे यहूदी लोक त्यांना जाऊन भेटावे,
24आणि जेव्हा त्याने आपल्या इस्राएली बांधवांपैकी एकाला
वाईट वागविले जाताना पाहिले, तेव्हा त्याने त्या इजिप्तच्या
रहिवाश्याला मारले. व आपल्या बांधवाची सुटका केली;
छळ केला जाणाऱ्या यहूदी मनुष्याच्या वतीने त्याने बदला
घेतला. 25देव त्याच्या हातून यहूदी लोकांची सुटका करीत
आहे, हे यहूदी लोकांना कळेल असे मोशेला वाटले,
परंतु त्यांना ते कळले नाही. 26दुसऱ्या दिवशी दोन यहूदी
माणसे भांडण करताना मोशेने पाहिली, ते पाहून मोशे
त्यांच्यात मध्यस्थी करू लागला. तो त्यांना म्हणाला,
'पुरुषांनो, तुम्ही एकमेकांचे भाऊ आहात, तुम्ही
एकमेकांशी का भांडत आहात?' 27परंतु जो मनुष्य
आपल्या शेजाऱ्याशी वाईट रीतीने वागत होता, त्याने मोशेला
एका बाजूला सारून म्हटले, 'आमच्यावर अधिकार
गाजवायला आणि आमचा न्यायनिवाडा करायला तुला
कोणी नेमिले? 28काल तू त्या इजिप्तच्या माणसाला ठार
मारलेस; तसाच माझाही जीव घेण्याचे तुझ्या मनात आहे
का?'*

29"जेव्हा मोशेने त्याला हे बोलताना ऐकले, तेव्हा तो
इजिप्त सोडून पळून गेला. आणि मिद्यान्यांच्या देशात उपरी
म्हणून राहू लागला आणि तेथेच त्याला दोन मुलगे झाले.
30चाळीस वर्षांनंतर मोशे सीनाय पर्वताजवळच्या वाळवंटात
होता. एका जळणाऱ्या झुडपात मोशेला देवदूताचे दर्शन
झाले. 31जेव्हा मोशेने हे पाहिले तेव्हा तो आश्चर्यचकित
झाला. नीट पाहता यावे म्हणून तो त्या जळत्या झुडपाजवळ
गेला. मोशेने एक वाणी ऐकली. तो आवाज प्रभूचा होता.
32प्रभु म्हणाला, 'मी तुझ्या वाडवडिलांचा देव आहे–
अब्राहाम, इसहाक, याकोब यांचा देव आहे.' मोशे भीतीने
थरथर कापू लागला. डोळे वर करून पाहण्याचे धाडस
त्याला होईना. 33देव त्याला म्हणाला, 'तुझ्या पायातील
वहाणा काढ! कारण ज्या जागेवर तू उभा आहेस ती जागा
पवित्र आहे. 34माझ्या लोकांचा इजिप्त देशात होणारा छळ
मी पाहिला आहे. आणि त्यांचे विव्हळणे माझ्या कानी
आले आहे. म्हणून त्यांची सुटका करण्यास मी खाली
आलो आहे. आता ये, मी तुला परत इजिप्त देशाला
पाठवीत आहे.'*

35"मोशे हाच तो मनुष्य होता, ज्याला यहूदी लोकांनी
नाकारले. 'तुला कोणी आमच्यावर अधिकार गाजवायला
आणि न्याय करायला निवडले आहे काय?' असे ते त्याला
म्हणाले. मोशे हाच मनुष्य आहे की ज्याला देवाने
शासनकर्ता व तारणारा म्हणून पाठविले. देवाने मोशेला
देवदूताच्या मदतीने पाठविले. याच देवदूताला मोशेने जळत्या
झुडपात पाहिले होते. 36म्हणून मोशेने लोकांना बाहेर
काढले. त्याने सामर्थ्यशाली कृत्ये व चमत्कार केले.
मोशेने ह्या गोष्टी इजिप्तमध्ये, तांबड्या समुद्राजवळ, आणि
वाळवंटात चाळीस वर्षे केल्या. 37हा तोच मोशे आहे,
ज्याने यहूदी लोकांना असे म्हटले: 'देव तुम्हाला एक
भविष्यवादी देईल. तो भविष्यवादी तुमच्याच लोकांमधून
येईल. तो माझ्यासारखाच भविष्यवादी असेल' 38जो
अरण्यात यहूद्यांबरोबर होता, सीनाय पर्वतावर
आपणाबरोबर बोलणाऱ्या देवदूताबरोबर व आपल्या
वाडवडीलांबरोबर होता ज्याला आम्हास देण्यासाठी
जीवनदायी वचने मिळाली होती, तोच हा मोशे होय.

39"परंतु आपले वाडवडील त्याचे ऐकायला तयार नव्हते.
त्यांनी त्याचे ऐकले नाही. आणि त्यांनी त्याला नाकारले.
त्यांची मने इजिप्त देशाकडे परत ओढ घेऊ लागली.
40आपले वाडवडील अहरोनाला म्हणाले, 'आमच्यापुढे
चालतील असे देव आमच्यासाठी तयार कर. कारण इजिप्त
देशातून काढून आम्हांला बाहेर घेऊन येणारा हा मोशे,
त्याचे काय झाले हे आम्हांला माहीत नाही'. 41त्यांनी याच
काळात वासरासारखी दिसणारी एक मूर्ती तयार केली
आणि त्या मूर्तीला अर्पणे सादर केली. आपल्या हातांनी
घडविलेल्या या मूर्तीपुढे त्यांनी आनंदोत्सव साजरा केला!
42पण देवाने त्या लोकांकडे पाठ फिरविली आणि
आकाशातील समूहांची (तारे, नक्षत्र, अशा खोट्या देवांची)
भक्ति करीत राहण्यासाठी मोकळे सोडले. कारण
भविष्यवाद्यांच्या पुस्तकात असे लिहिले आहे: देव म्हणतो,

---

**आमच्यावर ... आहे का** निर्गम 2:14

**तुझ्या पायातील ... पाठवीत आहे** निर्गम 3:5-10

‘अहो यहूदी लोकांनो, तुम्ही वधलेल्या पशूंची अर्पणे मला आणली नाहीत, रानातील चाळीस वर्षांत
43तुम्ही तुमच्याबरोबर मोलेखासाठी तंबू (उपासनेचे स्थळ) आणि तुमचा देव रेफान यासाठी ताऱ्यांच्या मूर्ती नेल्यात या मूर्ती तुम्ही केल्या यासाठी की तुम्हांला उपासना करता यावी म्हणून मी तुम्हांला दूर बाबेलोनपलीकडे पाठवीन’ *आमोस 5:24-27*

44“अरण्यात आपल्या वाडवडिलांच्या बरोबर साक्षीदाखल देवाचा तंबू होता. देवाने तो जसा बनविण्यास सांगितले त्याप्रमाणे व देवाने दाखविलेल्या नमुन्याप्रमाणे मोशेने तो बनविला. 45नंतर यहोशवाने आपल्या वाडवडिलांचे नेतृत्व करून इतर देशांच्या जमिनी काबिज केल्या. ती राष्ट्रे परमेश्वराने आमच्या पुढून घालविली. जेव्हा आपले लोक या नवीन प्रदेशात गेले तेव्हा हाच तंबू त्यांनी सोबत नेला. आमच्या लोकांना हा तंबू त्यांच्या वाडवडिलांकडून मिळाला व आपल्या पूर्वजांनी दावीदाच्या काळापर्यंत तो ठेवला. 46दावीद देवाच्या मर्जीचा असल्याने, याकोबाच्या देवासाठी मंदिर बांधण्याची इच्छा त्याने दर्शविली. 47परंतु देवाचे मंदिर शलमोनाने बांधले.

48“कारण सर्वोच्च देव मनुष्यांनी त्यांच्या हातांनी बांधलेल्या घरात राहत नाही. भविष्यवादी असे लिहितात:

49‘प्रभु म्हणतो, स्वर्ग माझे सिंहासन आहे. पृथ्वी ही माझे पाय ठेवण्याचे आसन आहे. तुम्ही माझ्यासाठी कसले घर बांधू शकता? मला विश्रांती घेण्यासाठी दुसऱ्या ठिकाणाची गरज नाही.
50माझ्या हातांनी या सर्व गोष्टी केल्या नाहीत काय?’
*यशया 66:1-2*

51“तुम्ही जे ताठ मानेचे लोक आहात त्या तुमची मने व कान विदेशी लोकांसारखी असून तुम्ही नेहमीच पवित्र आत्म्याला आपल्या पूर्वजांप्रमाणेच नाकारीत आला आहात. 52तुमच्या वाडवडिलांनी छळ केला नाही, असा कोणी एखादा भविष्यवादी होऊन गेला काय? एक धार्मिक (ख्रिस्त) येणार अशी घोषणा करणाऱ्यांचा त्यांनी वध केला. आणि आता तर तुम्ही त्याचा ही (ख्रिस्ताचा) विश्वासघात व खून केलात. 53तुम्हीच लोक आहात, ज्यांना नियमशास्त्र मिळाले. देवाने हे नियमशास्त्र देवदूतांकरवी दिले. परंतु तुम्ही ते पाळीत नाही!”

## स्तेफनाचा वध होतो

54यहूदी लोकांनी स्तेफनाला हे बोलताना ऐकले व त्यांना फार राग आला. ते त्याच्याविरुद्ध दातओठ खाऊ लागले. 55परंतु स्तेफन पवित्र आत्म्याने भरलेला होता. त्याने आपली नजर वर स्वर्गाकडे लावली. देवाचा गौरव त्याने पाहिला. त्याने येशूला देवाच्या उजवीकडे उभे असलेले पाहिले. 56तो म्हणाला, “पहा! स्वर्ग उघडलेला मला दिसत आहे. व मी मनुष्याच्या पुत्राला देवाच्या उजवीकडे उभा असलेला पाहत आहे!”
57स्तेफनाचे हे शब्द ऐकून यहूदी मोठ्याने ओरडले. त्यांनी आपले कान स्वत:च्या हातांनी झाकून घेतले. नंतर ते सर्व मिळून स्तेफनावर धावून गेले. 58त्यांनी स्तेफनाला धरून ओढीत शहराच्या बाहेर नेले व त्याला दगडमार करू लागले. जे साक्षी होते, त्यांनी आपले कपडे शौल नावाच्या एका तरुण मनुष्यापाशी ठेवले होते. 59ते स्तेफनावर दगडमार करीत असताना तो मोठ्याने प्रार्थना करीत म्हणाला, “हे प्रभु येशू, माझ्या आत्म्याचा स्वीकार कर!” 60नंतर स्तेफनाने आपले गुडघे टेकले व मोठ्याने ओरडून म्हणाला, “प्रभु, यांचे हे करणे त्यांच्या माथी पाप असे मानू नको!” असे बोलून त्याने प्राण सोडला.

## विश्वासणाऱ्यांवर संकट

8 स्तेफनाचा जो खून झाला त्याला शौलाची संमति होती. त्या दिवसापासून यरुशलेम येथील ख्रिस्ताच्या मंडळीचा मोठा छळ सुरू झाला. प्रेषितांशिवाय इतर सर्व विश्वासणारे शिष्य यहूदा व शोमरोन प्रांताच्या कानाकोपऱ्यात पांगून गेले. 2–3काही धार्मिक माणसांनी स्तेफनाला पुरले आणि त्याच्यासाठी त्यांनी फार शोक केला. शौलाने ख्रिस्ताच्या मंडळीचा छळ करण्यास सुरूवात केली. तो घरोघर जाई. स्त्रिया व पुरुष यांना धरून खेचून नेई व तुरुंगात टाकीत असे. 4विश्वासणारे सगळीकडे पांगले होते. जेथे कोठे विश्वासणारे जात, तेथे ते लोकांना सुवार्ता सांगत.

## शोमरोनात फिलिप्पाची सेवा

5फिलिप्प* शोमरोनातील एका शहरात गेला. त्याने ख्रिस्ताचा संदेश दिला. तेथील लोकांनी फिलिप्पाचे बोलणे ऐकले व त्याने केलेले चमत्कार पाहिले. 6फिलिप्प ज्या गोष्टी त्यांना सांगत असे त्या ते लक्षपूर्वक ऐकत असत. 7त्यांच्यापैकी पुष्कळांना अशुद्ध आत्मे लागले होते. पण फिलिप्पाने ते सर्व घालविले होते. ते माणसांच्या शरीरातून बाहेर पडताना मोठ्याने ओरडत बाहेर पडत असत. तेथे बरेच लंगडे व अर्धांगवायू झालेले लोक होते. फिलिप्पाने या लोकांना बरे केले. 8यामुळे शहरातील लोक फार आनंदित झाले. 9शिमोन नावाचा मनुष्य त्या नगरात राहत होता. तो जादूचे प्रयोग करीत असे. त्याच्या प्रयोगांमुळे लोक आश्चर्यचकित होत असत. तो स्वत:ला फार मोठा समजत असे.
10अगदी लहानापासून थोरापर्यंत लोक लक्षपूर्वक त्याचे ऐकत. ते म्हणत असत. “देवाची महान शक्ति असे ज्याला

**फिलिप्प** प्रेषित नव्हे, दुसरा मनुष्य.

म्हणतात तोच हा मनुष्य आहे!" 11त्याने आपल्या जादूमुळे
बराच काळपर्यंत लोकांना चकीत केले असल्याने लोक
त्याच्याकडे लक्ष देत असत. 12परंतु जेव्हा देवाच्या
राज्याविषयीची सुवार्ता आणि येशू ख्रिस्ताचे नाव फिलिप्पाने
त्या लोकांना सांगितले तेव्हा त्यांनी त्याच्यावर विश्वास
ठेवला. तेव्हा लोकांना बाप्तिस्मा देण्यात आला. त्यांच्यात
जसे पुरुष होते, तशा स्त्रियाही होत्या. 13स्वत: शिमोनाने
विश्वास ठेवला आणि त्याचा बाप्तिस्मा झाल्यावर तो
फिलिप्प बरोबर राहू लागला. आणि झालेले चमत्कार
आणि अद्भुत चिन्हे पाहून शिमोन आश्चर्याने थक्क झाला.
14यरुशलेममधील प्रेषितांनी हे ऐकले की शोमरोनातील
लोकांनी देवाच्या वचनाचा स्वीकार केला, म्हणून पेत्र व
योहान यांना प्रेषितांनी शोमरोनातील लोकांकडे पाठविले.
15जेव्हा पेत्र व योहान आले, तेव्हा त्यांनी शोमरोनी
विश्वासणाऱ्यांना पवित्र आत्मा मिळावा म्हणून प्रार्थना
केली. 16या लोकांचा प्रभु येशूच्या नावात बाप्तिस्मा झाला
होता, परंतु पवित्र आत्मा अजून त्यांच्यावर आला नव्हता.
17मग पेत्र व योहान यांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवला
आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला.

18शिमोनाने पाहिले की, प्रेषितांच्या हात ठेवण्याने
लोकांना पवित्र आत्मा मिळाला, तेव्हा शिमोन प्रेषितांना
पैसे देऊ लागला. 19शिमोन म्हणाला, "मी ज्याच्यावर हात
ठेवीन त्याला पवित्र आत्मा मिळेल, अशी शक्ति मला
सुध्दा द्या."

20पेत्र शिमोनाला म्हणाला, "तुझा व तुझ्या पैशाचा नाश
होवो! कारण, देवाचे दान पैशाच्या बळावर विकत घेण्याचा
तू विचार केलास! 21या कामात तू आमचा सहभागी होऊ
शकणार नाहीस. कारण तुझे अंत:करण देवासमोर योग्य
नाही. 22आपले हृदय बदल, तू ज्या या वाईट गोष्टी केल्या
आहेत, त्या सोडून दे. प्रभूला (देवाला) प्रार्थना कर.
कदाचित तुझ्या पश्चात्तप्त अंत:करणामुळे तो तुला क्षमा
करील. 23कारण तुझ्या मनात कटू मत्सर भरलेला आहे.
व तू पापाचा दास झालेला आहेस, हे मला दिसून आले
आहे!"

24शिमोनाने उत्तर दिले, "आपण दोघेही माझ्यासाठी
देवाजवळ प्रार्थना करावी. यासाठी की, ज्या गोष्टीबद्दल
तुम्ही बोललात त्यांपैकी एकही गोष्ट माझ्यावर न येवो!"

25नंतर दोन्ही प्रेषितांनी आपली साक्ष लोकांना दिली
(जे त्यांनी येशूला करताना पाहिले होते ते सांगितले.)
त्यांनी प्रभूचा संदेश त्यांना सांगितला. मग ते यरुशलेमला
परत गेले. परत येताना वाटेत त्यांनी अनेक शोमरोनी
गावांत सुवार्ता सांगितली.

## इथिओपियाच्या मनुष्याला फिलिप्पा शिक्षण देतो

26देवाचा दूत फिलिप्पाशी बोलला, तो म्हणाला "तयार
हो आणि दक्षिणेकडे जा. यरुशलेमहून गाझाकडे जाणाऱ्या
रस्त्याने जा– तो रस्ता वाळवंटातून जातो." 27मग फिलिप्प
तयार झाला व गेला. रस्त्यात त्याला एक इथिओपियाचा
मनुष्य भेटला. तो मनुष्य षंढ होता. तो इथिओपियाच्या
कांदके राणीकडे उच्च पदावर अधिकारी म्हणून कामाला
होता. तो राणीच्या खजिन्याचा मुख्य होता. तो यरुशलेमला
उपासना करण्यासाठी गेला होता. 28आता तो आपल्या
घरी चालला होता. तो त्याच्या रथात बसला होता आणि
यशया संदेष्टयाचे पुस्तक वाचत होता. 29पवित्र आत्मा
फिलिप्पाला म्हणाला, "त्या रथाजवळ जा!" 30मग फिलिप्प
त्या रथाजवळ धावत धावत गेला, तेव्हा तो मनुष्य वाचत
असताना त्याने ऐकले. फिलिप्प त्याला म्हणाला, "तुम्ही
जे वाचत आहात, त्याचा अर्थ तुम्हांला कळतो का?"

31तो अधिकारी म्हणाला, "मला हे कसे समजेल?
कोणीतरी याचा उलगडा करून मला सांगायला हवे."
आणि त्याने फिलिप्पाला रथात चढून आपल्यापाशी
बसण्यास बोलाविले. 32पवित्र शास्त्रातील जो भाग तो वाचत
होता, तो भाग पुढीलप्रमाणे होता:

"वधायला नेत असलेल्या मेंढरासारखा तो होता. लोकर
कातरणाऱ्यांपुढे गप्प राहणाऱ्या मेंढराप्रमाणे तो शांत
राहिला. त्याने आपले तोंड उघडले नाही.
33त्याला लज्जित केले गेले, त्याचे हक्क काढून घेतले
गेले. त्याच्या पिढीविषयी कोणतीही गोष्ट पुढे वर्णिली
जाणार नाही. कारण पृथ्वीवरील त्याचे जीवन संपविले
गेले आहे." *यशया 53:7-8*

34तो अधिकारी फिलिप्पाला म्हणाला, "कृपा करून
मला सांगा, भविष्यवादी हे कोणाविषयी बोलतो आहे? तो
स्वत:विषयी बोलत आहे की दुसऱ्या कोणाविषयी बोलत
आहे?" 35मग फिलिप्पाने तोंड उघडले व पवित्र शास्त्रातील
या भागापासून सुरुवात करून येशूविषयीची सुवार्ता त्याला
सांगितली.

36ते दोघे प्रवास करीत असताना एका पाण्याच्या
ठिकाणाजवळ (तळ्याजवळ) आले. अधिकारी म्हणाला,
"पहा! येथे पाणी आहे! माझा बाप्तिस्मा करायला कोणती
अडचण आहे?"
37* 38आणि षंढाने रथ थांबविण्याची आज्ञा केली.
नंतर फिलिप्प व षंढ हे दोघे उतरून पाण्यात गेले आणि
फिलिप्पाने त्याचा बाप्तिस्मा केला. 39जेव्हा ते पाण्याबाहेर
आले, तेव्हा प्रभूच्या आत्म्याने फिलिप्पाला दूर नेले आणि
त्या अधिकाऱ्याला फिलिप्प पुन्हा दिसला नाही. पण तो
अधिकारी पुढे तसाच मोठ्या आनंदाने प्रवास करीत घरी
गेला.

---

**वचन 37** काही अगदी अलीकडील प्रतींमध्ये असे लिहिले आहे: फिलिप्पाने उत्तर दिले, "तुम्ही अंत:करणापासून जर विश्वास ठेवत असाल, तर तुम्हीही बाप्तिस्मा घेऊ शकता." तो अधिकारी म्हणाला, "येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे, असा मी विश्वास धरतो."

40आपण अजोत नगरात आहोत असे फिलिप्पाला दिसून
आले आणि पुढे जात असताना जी गावे लागली त्या सर्व
गावात त्याने सुवार्ता सांगितली. नंतर तो कैसरीयाला गेला.

## शौलाचे परिवर्तन

9 शौल यरूशलेममध्ये प्रभूच्या अनुयायांना अजूनही
धमकावण्याचा व जिवे मारण्याचा प्रयत्न करीत
होता. म्हणून तो प्रमुख याजकांकडे गेला. 2शौलाने त्याला
दिमिष्क येथील सभास्थानातील यहूदी लोकांना पत्र
लिहिण्यास सांगितले. शौलाला प्रमुख याजकाकडून
दिमिष्क येथील ख्रिस्ताच्या अनुयायांना पकडण्यासाठी
अधिकार पाहिजे होता. जर त्याला तेथे कोणी विश्वासणारा,
मग तो पुरुष असो अथवा स्त्री, सापडले असते तर त्याने
त्यांना अटक करून यरूशलेमला आणले असते. 3मग
शौल दिमिष्काला गेला. जेव्हा तो शहराजवळ आला तेव्हा
एकाएकी आकाशातून फारच प्रखर प्रकाश त्याच्याभोवती
चमकला. 4शौल जमिनीवर पडला. एक वाणी त्याच्याशी
बोलताना त्याने ऐकली, “शौला, शौला! तू माझा छळ का
करतोस?”

5शौल म्हणाला, “प्रभु तू कोण आहेस?”

ती वाणी म्हणाली, “मी येशू आहे. ज्याचा तू छळ करीत
आहेस तो मीच आहे. 6आता ऊठ आणि नगरात जा. तुला
काय करायचे आहे, हे तुला तेथे कोणी तरी सांगेल.”

7जी माणसे शौलाबरोबर प्रवास करीत होती, ती तेथेच
स्तब्ध उभी राहिली. त्या लोकांनी आवाज ऐकला, पण
त्यांना कोणी दिसले नाही. 8शौल जमिनीवरून उठला.
त्याने डोळे उघडले, पण त्याला काहीच दिसेना. म्हणून जे
लोक त्याच्या बरोबर होते, त्यांनी त्याचा हात धरून त्याला
दिमिष्क शहरात नेले. 9तीन दिवसांपर्यंत शौलाला काहीच
दिसत नव्हते. त्याने काहीच खाल्ले किंवा प्यायले नाही.

10दिमिष्कमध्ये येशूचा एक अनुयायी होता. त्याचे नाव
हनन्या होते. प्रभु त्याच्याशी एका दृष्टान्तात बोलला: तो
म्हणाला, “हनन्या!”

हनन्याने उत्तर दिले, “मी आहे, प्रभु!”

11प्रभु हनन्याला म्हणाला, “ऊठ आणि नीट नावाच्या
रस्त्यावर जा. तेथे यहूदाचे* घर शोध व तार्ससहून आलेल्या
शौल नावाच्या व्यक्तिबद्दल विचार. सध्या तो तेथे आहे व
प्रार्थना करीत आहे. 12शौलाने दृष्टान्त पाहिला आहे.
त्यात हनन्या नावाचा मनुष्य आपल्याकडे आला असून
आपल्यावर हात ठेवीत आहे, असे त्याला दिसले. व त्यानंतर
त्याला पुन्हा दृष्टी प्राप्त झाली, असे त्याला दिसले.”

13परंतु हनन्याने उत्तर दिले, “प्रभु मी त्या मनुष्याविषयी
अनेक लोकांच्या तोंडून ऐकले आहे. यरुशलेम येथील
तुझ्या संतांशी तो किती वाईट रीतीने वागला हे मी ऐकले
आहे. 14आणि आता जे तुझ्या नावावर विश्वास ठेवतात,
अशा लोकांना बांधून नेण्यासाठी प्रमुख याजकाकडून
अधिकारपत्र घेऊन हा शौल येथे आला आहे.”

15परंतु प्रभु म्हणाला, “जा! एका महत्त्वाच्या कामाकरिता
मी त्याला निवडले आहे. माझ्याविषयी त्याने राजांना,
यहूदी लोकांना, आणि दुसऱ्या राष्ट्रांना सांगितले पाहिजे.
16माझ्या नावाकरिता ज्या गोष्टी त्याला सहन कराव्या
लागतील त्या मी त्याला दाखवून देईन.”

17हनन्या निघाला, आणि यहूदाच्या घरी गेला. त्याने
शौलाच्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हटले, “शौला,
माझ्या बंधू, प्रभु येशूने मला पाठविले. ज्याने तुला इकडे
येत असता रस्त्यावर दर्शन दिले त्यानेच मला तुझ्याकडे
पाठविले. येशूने मला पाठविले यासाठी की, तुला पुन्हा
पाहता यावे व पवित्र आत्म्याने तू भरला जावास.”
18लागलीच खपल्यासारखे काही तरी शौलाच्या
डोळ्यांवरून खाली पडले. आणि त्याला पुन्हा दृष्टी आली
शौल तेथून उठल्यावर त्याचा बाप्तिस्मा करण्यात आला.
19नंतर त्याने अन्न सेवन केल्यावर त्याच्या अंगात जोम
आला. शौल काही दिवस दिमिष्क येथील शिष्यांबरोबर
राहिला.

## शौल दिमिष्कात सुवार्ता सांगतो

20यानंतर सरळ सभास्थानात जाऊन शौल येशूच्या
नावाची घोषणा करू लागला. “येशू हा देवाचा पुत्र आहे.”

21ज्या लोकांनी शौलाचे बोलणे ऐकले त्या सर्वांना मोठे
नवल वाटले. ते म्हणाले, “यरुशलेम येथील ज्या लोकांचा
येशूच्या नावावर विश्वास आहे, त्या सर्वांचा नाश करू
पाहणारा हाच नाही काय? तो येशूच्या अनुयायांना अटक
करण्यासाठी येथे आला आहे व तो त्यांना यरुशलेम
येथील प्रमुख याजकासमोर उभे करणार आहे.”

22परंतु शौल अधिकाधिक सामर्थ्यशाली होत गेला.
त्याने हे सिद्ध केले की, येशू हाच ख्रिस्त आहे. आणि
त्याचे पुरावे इतके सबळ होते की, दिमिष्क येथील यहूदी
त्याच्याबरोबर वाद घालू शकले नाहीत.

## शौल यहूदी लोकांपासून निसटून जातो

23बऱ्याच दिवसांनंतर यहूदी लोकांनी शौलाला जिवे
मारण्याचा कट रचला. 24यहूदी रात्रंदिवस शहराच्या
वेशीवर पहारा देत होते. व शौलाला पकडण्याची वाट
पाहत होते. त्यांना शौलाला ठार मारायचे होते, पण त्यांचा
हा बेत शौलास समजला. 25एक रात्री शौलाने ज्यांना
शिक्षण दिले होते अशा काही अनुयायांनी शहरातून
जाण्यासाठी शौलाला मदत केली. अनुयायांनी शौलाला
एका टोपलीत ठेवले. नंतर त्यांनी टोपली गावकुसावरून
रात्रीच्या वेळी खाली सोडली.

---

**यहूदा** हे कोणत्याही प्रेषिताचे नाव नाही.

### यरुशलेममध्ये शौल

26नंतर शौल यरुशलेमला गेला. तेथील विश्वास
णाऱ्यांच्या परिवारात मिसळण्याचा त्याने प्रयत्न केला,
पण ते त्याला घाबरत होते. त्यांचा विश्वासच बसत नव्हता
की, शौल खरोखर येशूचा शिष्य झाला आहे. 27परंतु
बर्णबाने शौलाचा स्वीकार केला व त्याला घेऊन प्रेषितांकडे
गेला. बर्णबाने सांगितले की, शौलाने येशूला दिमिष्कच्या
रस्त्यावर पाहिले आहे. येशू त्याच्याशी कसा बोलला हेही
त्याने सविस्तरपणे सांगितले. मग त्याने प्रेषितांना सांगितले
की, येशूविषयीची सुवार्ता शौलाने मोठ्या धैर्याने दिमिष्क
येथील लोकांना सांगितली.

28मग शौल अनुयायांसह तेथे राहिला. तो यरुशलेममध्ये
सगळीकडे गेला व धैर्याने प्रभुची सुवार्ता सांगू लागला.
29शौल नेहमी ग्रीक भाषा बोलणाऱ्या यहूदी लोकांशी
बोलत असे तो त्यांच्याशी वादविवाद करीत असे. पण ते
त्याला मारण्याचा प्रयत्न करीत होते. 30जेव्हा बंधुजनांना
(विश्वासणाऱ्यांना) हे कळाले तेव्हा त्यांनी त्याला कैसरीया
येथे नेले, व नंतर तेथून त्याला तार्सस नगराला पाठविले.

31मंडळी जेथे कोठे ती होती–यहूदीया, गालीली, शोमरोन,
तेथे त्यांना शांति लाभली. पवित्र आत्म्याच्या साहाय्याने
हा गट अधिक शक्तिशाली बनला. आपल्या वागणुकीने
विश्वासणाऱ्यांनी दाखवून दिले की, ते प्रभूचा आदर
करतात. या कारणामुळे विश्वासणाऱ्यांचा परिवार मोठा
होत गेला.

32पेत्र यरुशलेमच्या सभोवतालच्या गावामध्ये फिरला.
लोद या गावामध्ये जे विश्वासणारे होते, त्यांना भेटला.
33लोद येथे त्याला ऐनेयास नावाचा माणूस आढळला.
त्याच्या अंगातून वारे गेल्याने तो पंगू झाला होता व आठ
वर्षे अंथरुणाला खिळून होता. 34पेत्र त्याला म्हणाला,
"ऐनेयास, येशू ख्रिस्त तुला बरे करीत आहे. ऊठ, आपले
अंथरुण नीट कर!" ऐनेयास ताबडतोब उभा राहिला.
35लोद येथे राहणाऱ्या सर्व लोकांनी आणि शारोनाच्या
पठारावर राहणाऱ्यांनी त्याला पाहिले. तेव्हा ते सर्व प्रभूकडे
वळले.

### यापो येथे पेत्र

36यापो शहरात येशूची एक शिष्या राहत होती. तिचे
नाव तबिथा होते (ग्रीक भाषेत तिचे नाव दुर्कस होते,
त्याचा अर्थ हरीण) ती नेहमी लोकांसाठी चांगली कामे
करीत असे. गरीबांना दानधर्म करीत असे. 37जेव्हा पेत्र
लोदमध्ये होता. तेव्हा तबिथा आजारी पडली व मेली.
त्यांनी (लोकांनी) तिचे शरीर धुतले व ते माडीवरच्या
एका खोलीत ठेवले. 38यापो येथील अनुयायांनी ऐकले
की, पेत्र लोदमध्ये आहे. (लोद हे यापोजवळ आहे,) म्हणून
त्यांनी दोन माणसे पाठविली. त्यांनी त्याला विनंति केली.
ते म्हणाले, "त्वरा करा, आमच्याकडे लवकर या!" 39पेत्र
तयार झाला व त्यांच्याबरोबर गेला. जेव्हा तो तेथे पोहोचला
तेव्हा त्यांनी त्याला माडीवरच्या खोलीत नेले. सर्व विधवा
स्त्रिया पेत्राभोवती उभ्या राहिल्या. त्या रडत होत्या. दुर्कस
(तबीथा) जिवंत असताना जे कपडे व झगे तिने तयार
केले होते ते त्यांनी पेत्राला दाखवले. 40पेत्राने खोलीतील
सर्वांना बाहेर काढले. त्याने गुडघे टेकून प्रार्थना केली.
आणि दुर्कसच्या शरीराकडे वळून तो म्हणाला, "तबिथा
ऊठ!" तेव्हा तिने डोळे उघडले. जेव्हा तिने पेत्राला पाहिले
तेव्हा ती उठून बसली.

41त्याने तिला आपला हात देऊन उभे राहण्यास मदत
केली. नंतर त्याने विश्वासणाऱ्यांना आणि विधवा स्त्रियांना
खोलीमध्ये बोलाविले. त्याने तबिथाला त्यांना दाखवले.
ती जिवंत होती! 42यापोामधील सर्व लोकांना हे समजले.
यातील पुष्कळ लोकांनी प्रभूवर विश्वास ठेवला. 43पेत्र
यापोमध्ये बरेच दिवस राहिला. तो शिमोन नावाच्या
चांभाराकडे राहिला.

### पेत्र आणि कर्नेल्य

10 कर्नेल्य नावाचा मनुष्य कैसरीयामध्ये राहत होता.
तो इटलीक नावाच्या पलटणीत शताधिपती होता.
2कर्नेल्य हा धर्मशील असून आपल्या कुटुंबासह देवाचे
भय बाळगणारा होता. तो गोरगरिबांना पुष्कळसा दानधर्म
करीत असे आणि तो नेहमी देवाची प्रार्थना करीत असे.
3एके दिवशी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास, कर्नेल्याला
दृष्टान्त झाला. त्याने तो स्पष्टपणे पाहिला. त्या दृष्टान्तात
देवाचा एक दूत त्याच्याकडे आला आणि त्याला म्हणाला,
"कर्नेल्या!"

4कर्नेल्य देवदूताकडे पाहू लागला. तो भयभीत झाला
होता. "काय आहे, प्रभु?"

देवदूत कर्नेल्याला म्हणाला, "देवाने तुझी प्रार्थना ऐकली
आहे. ज्या गोष्टी तू गरीबांना दिल्या आहेत, त्या देवाने
पाहिल्या आहेत. देवाला तुझी आठवण आहे. 5तू यापो
गावी माणसे पाठीव आणि शिमोन नावाच्या माणसाला
घेऊन ये. शिमोनाला पेत्र असे सुद्धा म्हणततात; तो 6शिमोन
नावाच्याच चाभाराच्या घरी राहत आहे. त्याचे घर
समुद्राजवळ आहे." 7कर्नेल्याशी बोलणे झाल्यावर देवदूत
निघून गेला. नंतर कर्नेल्याने त्याचे दोन विश्वासू नोकर
व एका धर्मशील शिपायाला बोलावून घेतले. 8कर्नेल्याने
या तिघांना घडलेले सर्व काही सांगितले, आणि त्यांना
यापोला पाठविले.

9सऱ्या दिवशी ही माणसे यापो गावाजवळ आली. ती
दुपारची वेळ होती. त्याच वेळी प्रार्थना करावयास पेत्र
गच्चीवर गेला. 10पेत्राला भूक लागली होती. त्याला खायला
पाहिजे होते. ते पेत्रासाठी जेवण करीत असता पेत्राला तंद्री
लागली. 11आणि आपल्यासमोर आकाश उघडले असून
चारही कोपऱ्यांना बांधून खाली सोडल्यामुळे मोठ्या
चादरीसारखे काही तरी जमिनीवर येत आहे, असे त्याला
दिसू लागले. 12त्या चादरीत वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी

होते. उदा. चालणारे, सरपटणारे, आकाशात उडणारे पक्षी
त्यात होते. 13नंतर एक वाणी पेत्राने ऐकली, "पेत्रा, ऊठ;
यापैकी कोणताही प्राणी मारून खा."
14पण पेत्र म्हणाला, "मी तसे कधीच करणार नाही,
प्रभु! जे अशुद्ध व अपवित्र आहे असे कोणतेही अन्न मी
अद्याप खाल्लेले नाही."
15पण ती वाणी त्याला पुन्हा म्हणाली, "देवाने या गोष्टी
शुद्ध केल्या आहेत. त्यांना अपवित्र म्हणू नकोस!" 16असे
तीन वेळा घडले. मग त्या सगळ्या गोष्टी वर स्वर्गामध्ये
पुन्हा घेतल्या गेल्या.
17पेत्र भयचकित होऊन या दृष्टान्ताचा अर्थ काय असावा
याविषयी विचार करू लागला. ज्या लोकांना कर्नेल्याने
पाठविले होते, त्यांना शिमोनाचे घर सापडले. ते दाराजवळ
उभे होते. 18त्यांनी विचारले, "शिमोन पेत्र येथेच राहतो
काय?"
19पेत्र अजूनसुद्धा या दृष्टान्ताविषयीच विचार करीत
होता. पण आत्मा त्याला म्हणाला, "ऐक, तीन माणसे
तुला शोधीत आहेत. 20ऊठ आणि पायऱ्या उतरून खाली
जा. कारण मीच त्यांना पाठवले आहे. काही संशय न
धरता त्यांच्याबरोबर जा." 21मग पेत्र खाली त्या माणसांकडे
गेला. तो म्हणाला, "तुम्ही ज्याचा शोध करीत आहात तो
मीच आहे. तुम्ही येथे का आलात?"
22ती माणसे म्हणाली, "एका पवित्र दूताने तुम्हांला
आमंत्रित करण्याविषयी कर्नेल्याला सांगितले होते. कर्नेल्य
हा शताधिपती आहे. तो चांगला धर्मशील मनुष्य आहे. तो
देवाची उपासना करतो. सर्व यहूदी लोक त्याचा आदर
करतात. तुम्हांला घरी बोलावून तुमचे शब्द ऐकावेत असे
देवदूताने त्याला सांगितले आहे." 23पेत्राने त्यांना आत
बोलावून घेतले व रात्रभर मुक्काम करण्यास सांगितले.
दुसऱ्या दिवशी पेत्र तयार झाला व त्या तीन मनुष्यांबरोबर
गेला. यापो येथील काही बंधुही पेत्राबरोबर गेले. 24दुसऱ्या
दिवशी पेत्र कैसरीया शहरात आला. कर्नेल्य त्याची वाट
पाहत होता. त्याने आपले जवळचे मित्र व नातेवाईक
यांनाही आपल्या घरी जमा केले होते. 25जेव्हा पेत्र आत
गेला, तेव्हा कर्नेल्य त्याला भेटला. कर्नेल्याने पेत्राच्या
पाया पडून आदराने त्याला अभिवादन केले. 26पण पेत्र
म्हणाला, "उभा राहा, मी तुझ्यासारखाच मनुष्य आहे."
27पेत्र त्याच्याशी बोलत घरात गेला आणि आतमध्ये बरेच
लोक जमलेले त्याने पाहिले. 28पेत्र त्या लोकांना म्हणाला,
"तुम्ही हे जाणता की, यहूदी मनुष्याने इतर जातींच्या
लोकांच्या घरी जाणे किंवा त्यांच्याशी संबंध ठेवणे हे
यहूदी नियमाला धरून नाही, पण देवाने मला दाखविले
आहे की, मी इतर मनुष्यमात्राला 'अशुद्ध' किंवा 'अपवित्र'
मानू नये. 29याच कारणासाठी जेव्हा हे लोक मला
बोलावण्यास आले, तेव्हा मी त्यांच्याशी वाद घातला नाही.
आता, कृपा करून मला सांगा, तुम्ही मला येथे का
बोलाविले?"
30कर्नेल्य म्हणाला, "चार दिवसांपूर्वी, माझ्या घरांमध्ये
मी प्रार्थना करीत होतो. बरोबर याच वेळेला म्हणजे दुपारचे
तीन वाजता मी प्रार्थना करीत होतो. अचानक एक मनुष्य
माझ्यासमोर उभा राहिला. त्याने लखलखीत, चमकदार
कपडे घातले होते. 31तो मनुष्य म्हणाला, 'कर्नेल्या! देवाने
तुझी प्रार्थना ऐकली आहे. गरीब लोकांना ज्या वस्तू तू
दिल्या आहेत ते देवाने पाहिले आहे. देव तुझी आठवण
करतो. 32म्हणून यापो या शहरी काही माणसे पाठव व
शिमोन पेत्राला बोलावून घे. पेत्र हा शिमोन चांभाराच्या
घरी राहत आहे. आणि त्याचे घर समुद्राच्या जवळ आहे.'
33तेव्हा मी लागलीच तुम्हांला निरोप पाठविला. तुम्ही
येथे आलात ही तुमची मोठी कृपा आहे. तेव्हा आम्हांला
जे काही सांगण्याची आज्ञा प्रभूने तुम्हांला दिली आहे, ते
ऐकण्यासाठी आम्ही सर्व आता येथे देवासमोर जमलेले
आहोत."

## कर्नेल्याच्या घरात पेत्र भाषण करतो

34पेत्राने बोलायला सुरुवात केली: "मला आता हे
खरोखर समजले आहे की, देवाला प्रत्येक मनुष्य सारखाच
आहे. 35जो कोणी त्याची भक्ति करतो आणि योग्य ते
करतो, त्याला देव स्वीकारतो. व्यक्ति कोणत्या देशाची
आहे, हे महत्त्वाचे नाही. 36देव यहूदी लोकांशी बोलला.
देवाने त्यांना सुवार्ता पाठविली की, येशू ख्रिस्ताद्वारे शांति
जगात आली आहे. येशू सर्वांचा प्रभु आहे! 37सगळ्या
यहूदा प्रांतात काय घडले हे तुम्हा सर्वांना माहीत आहे.
त्याची सुरूवात योहानाने लोकांना बाप्तिस्म्याविषयी
गालीलात जो संदेश दिला, त्याने झाली. 38नासरेथच्या
येशूविषयी तुम्हांला माहिती आहे. देवाने त्याला पवित्र
आत्मा व सामर्थ्य देऊन ख्रिस्त बनविले. येशू सगळीकडे
लोकांच्यासाठी चांगल्या गोष्टी करीत गेला. जे लोक दुष्ट
आत्म्याने पछाडले होते त्यांना येशूने बरे केले. त्यामुळे
देव येशूबरोबर आहे हे दिसून आले. 39येशूने संपूर्ण यहूदी
प्रांतात आणि यरुशलेमात जे जे केले त्या सर्व गोष्टी
आम्ही पाहिल्या आणि आम्ही त्याचे साक्षीदार आहोत.
पण येशूला मारण्यात आले. लाकडाच्या वधस्तंभावर त्यांनी
त्याला खिळले.

40परंतु देवाने तिसऱ्या दिवशी त्याला जिवंत केले!
देवाने येशूला लोकांना स्पष्ट पाहू दिले. 41परंतु सर्वच
माणसांनी येशूला पाहिले नाही. देवाने त्यांना अगोदरच
साक्षीदार म्हणून निवडले होते, त्यांनीच त्याला पाहिले. ते
साक्षीदार आम्ही आहोत! येशू मरणातून उठविला
गेल्यानंतर आम्ही त्याच्याबरोबर अन्नपाणी सेवन केले.
42येशूने आम्हांला लोकांना उपदेश करायला सांगितले.
जिवंतांचा आणि मेलेल्यांचा न्याय करण्यासाठी देवाने त्याला
आपल्याला आहे हे सांगण्यासाठी त्याने आम्हांला आज्ञा
केली. 43जो कोणी येशूवर विश्वास ठेवतो, त्याला क्षमा

केली जाईल. येशूच्या नावामध्ये देव त्या व्यक्तिच्या पापांची
क्षमा करील. सर्व संदेष्टे हे खरे आहे असे म्हणतात."

## यहूदी नसलेल्यांवर पवित्र आत्मा येतो

44पेत्र हे बोलत असतानाच त्याचे बोलणे ऐकत बसलेल्या
सर्व लोकांवर पवित्र आत्मा आला. 45यहूदी विश्वासणारे
जे पेत्राबरोबर आले होते, ते चकित झाले. यहूदी नसलेल्या
लोकांवरसुद्धा पवित्र आत्मा ओतला गेला, यामुळे ते चकित
झाले. 46आणि यहूदी नसलेल्या लोकांना निरनिराळ्या
भाषा बोलताना आणि देवाची स्तुति करताना यहूदी लोकांनी
पाहिले. 47मग पेत्र म्हणाला, "या लोकांना पाण्याने बाप्तिस्मा
देण्यास आपण नकार देऊ शकत नाही. ज्याप्रमाणे आम्हांला
मिळाला, त्याचप्रमाणे त्यांनाही पवित्र आत्मा मिळाला आहे."
48म्हणून पेत्राने कर्नेल्य, त्याचे नातेवाईक आणि मित्र
यांना बाप्तिस्मा देण्याची आज्ञा केली. मग पेत्राने आणखी
काही दिवस त्यांच्याबरोबर राहावे अशी त्या लोकांनी
त्याला विनंति केली.

## पेत्र यरुशलेमला परत येतो

11 यहूदी नसलेल्या लोकांनीसुद्धा देवाच्या वचनाचा
स्वीकार केला आहे हे यहूदा प्रांतातील प्रेषितांनी
व बंधूंनी ऐकले. 2पण जेव्हा पेत्र यरुशलेमला आला,
तेव्हा काही यहूदी विश्वासणाऱ्यांनी त्याच्याशी वाद घातला.
3ते म्हणाले, "जे सुंता न झालेले व यहूदीतर आहेत अशा
लोकांच्या घरी तुम्ही गेला, एवढेच नव्हे तर तुम्ही त्यांच्यासह
जेवणही केले!"

4म्हणून पेत्राने त्यांना सर्व घटना स्पष्ट करून सांगितल्या.
5पेत्र म्हणाला, "मी यापो शहरात होतो. प्रार्थना करीत
असताना मला तंद्री लागल्यासारखे झाले व मला दृष्टान्त
घडला. मी दृष्टान्तामध्ये आकाशातून काही तरी खाली
येताना पाहिले. ते मोठ्या चादरीसारखे दिसत होते. व
त्याचे चारही कोपरे धरून ते खाली सोडले जात होते. ते
खाली आले आणि अगदी माझ्याजवळ थांबले. 6मी त्याच्या
आतमध्ये पाहिले. मी त्यात पाळीव आणि जंगली प्राणी
पाहिले. सरपटणारे प्राणी आणि उडणारे पक्षी मी त्यात
पाहिले. 7एक वाणी माझ्याशी बोलताना मी ऐकली. 'पेत्रा,
ऊठ, यातील कोणताही प्राणी मार व खा!' 8पण मी म्हणालो,
'प्रभु, मी असे कधीही करणार नाही. मी अपवित्र किंवा
अशुद्ध असे कधीच खाल्ले नाही'. 9आकाशातून त्या
वाणीने पुन्हा उत्तर दिले, 'देवाने या गोष्टी शुद्ध केल्या
आहेत. त्यांना अपवित्र म्हणू नकोस!' 10असे तीन वेळा
घडले. मग ते सर्व पुन्हा वर आकाशात घेतले गेले.
11तेवढ्यात तीन माणसे मी ज्या घरामध्ये राहत होतो, तेथे
आली. कैसरीया शहरातून या तीन माणसांना माझ्याकडे
पाठविण्यात आले होते. 12आत्म्याने मला कोणत्याही
प्रकारचा संशय न धरिता त्यांच्याबरोबर जाण्यास सांगितले.
हे सहा बंधु (विश्वासणारे) जे येथे आहेत, तेही माझ्याबरोबर
होते. आम्ही कर्नेल्याच्या घरी गेलो. 13कर्नेल्याने आपल्या
घरात देवदूत उभा असलेला कसा दिसला हे आम्हास
सांगितले. देवदूत कर्नेल्याला म्हणाला, "काही माणसे यापोस
पाठव. शिमोन पेत्राला बोलावून घे. 14तो तुझ्याशी बोलेल.
तो ज्या गोष्टी तुला सांगेल, त्यामुळे तुझे व तुझ्या कुटुंबाचे
तारण होईल.' 15त्यानंतर मी माझ्या भाषणाला सुरुवात
केली. सुरुवातीला ज्याप्रमाणे पवित्र आत्मा आपल्यावर
आला तसाच तो त्यांच्यावरही आला. 16तेव्हा मला प्रभूचे
शब्द आठवले. प्रभु म्हणाला होता, 'योहान लोकांचा
बाप्तिस्मा पाण्याने करीत असे. पण तुमचा बाप्तिस्मा पवित्र
आत्म्याने होईल!' 17आपण येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला
तेव्हा जसे आपणांस तसे त्यांसही देवाने सारखेच दान
दिले. मग देवाचे काम मी कसा थांबवू शकत होतो?"

18जेव्हा यहूदी विश्वासणाऱ्यांनी या गोष्टी ऐकल्या, तेव्हा
त्यांनी आपले म्हणणे थांबविले. त्यांनी देवाची स्तति केली
आणि म्हणाले, "म्हणजे देव यहूदी नसलेल्यांना त्यांचे
अंत:करण बदलण्यासाठी मोकळीक देत आहे आणि
आम्हांला जसे जीवन प्राप्त झाले तसे त्यांनाही देऊ इच्छीत
आहे "

## अंत्युखियाला सुवार्ता येते

19स्तेफन मारला गेल्यानंतरच्या काळात जो छळ झाला,
त्यामुळे विश्वासणारे पांगले. यातील काही दूरच्या ठिकाणी,
उदा. फेनीके, कुप्र व अंत्युखियापर्यंत गेले.
विश्वासणाऱ्यांनी या ठिकाणी फक्त यहूदी लोकांनाच सुवार्ता
सांगितली. 20यातील काही विश्वासणारे कुप्र व कुरेने
येथे राहणारे होते. जेव्हा हे लोक अंत्युखियात आले,
तेव्हा ते ग्रीक लोकांशीही बोलले. त्यांनी या ग्रीक लोकांना
येशूविषयीची सुवार्ता सांगितली. 21प्रभु विश्वासणाऱ्यांना
मदत करीत होता आणि बऱ्याच मोठ्या गटाने विश्वास
ठेवला व ते प्रभूला अनुसरू लागले.

22याविषयीची बातमी यरुशलेम येथील विवासणाऱ्या
मंडळीच्या कानावर आली. म्हणून यरूशलेम येथील
विश्वासणाऱ्यांनी बर्णबाला अंत्युखियाला पाठविले.
23–24बर्णबा चांगला मनुष्य होता. तो पवित्र आत्म्याने
आणि विश्वासाने पूर्णपणे भरलेला होता. जेव्हा बर्णबा
अंत्युखियाला गेला, तेव्हा त्याने पाहिले की, देवाने या
लोकांना खूपच आशीर्वाद दिला आहे. त्यामुळे बर्णबाला
खूप आनंद झाला. अंत्युखियातील सर्व विश्वासणाऱ्यांना
त्याने उत्तेजन दिले. त्याने त्यांना सांगितले, "कधीही तुमचा
विश्वास गमावू नका. नेहमी प्रभूची आज्ञा अंत:करणापासून
पाळा." पुष्कळ लोक खिस्ताचे अनुयायी झाले.

25जेव्हा बर्णबा तार्सस शहरी गेला तेव्हा तो शौलाचा
शोध घेत होता. 26जेव्हा बर्णबाने त्याला शोधले तेव्हा
त्याने शौलाला आपल्यासह अंत्युखियाला आणले. शौलाने
व बर्णबाने वर्षभर तेथे राहून पुष्कळ लोकांना शिकवले.
अंत्युखियामध्ये येशूच्या अनुयायांना 'ख्रिस्ती' हे नाव

पहिल्यांदा मिळाले. [27]याच काळात काही संदेष्टे यरुशलेमहून अंत्युखियास आले. [28]यांच्यापैकी एकाचे नाव अगाब होते. अंत्युखियात तो उभा राहिला आणि बोलू लागला. पवित्र आत्म्याच्या साहाय्याने तो म्हणाला, "फार वाईट काळ सर्व पृथ्वीवर येत आहे. लोकांना खायला अन्न मिळणार नाही." (क्लौदिया राजा राज्य करीत होता तेव्हा त्याच्या काळात हे घडले.) [29]विश्वासणाऱ्यांनी ठरविले की, यहूदीया येथील आपल्या बंधु व भगिनींना जास्तीत जास्त मदत पाठविण्याचा प्रयत्न करावा प्रत्येक विश्वासणाऱ्याने जास्तीत जास्त मदत पाठवण्याचे ठरविले. [30]त्यांनी पैसे गोळा करून बर्णबा व शौल यांच्याकडे दिले. मग बर्णबा व शौल यांनी ते पैसे यहूदीयातील वडीलजनांकडे आणले.

## हेरोद अग्रिप्पा ख्रिस्ती मंडळीला दुखावतो

12 त्याच काळात हेरोद राजा मंडळीतील काही विशिष्ट विश्वासणऱ्यांचा छळ करू लागला. [2]हेरोदाने याकोबाला तलवारीने मारण्याची आज्ञा केली. याकोब हा योहानाचा भाऊ होता. [3]हेरोदाने पाहिले की, यहूदी लोकांना हे आवडले आहे. म्हणून त्याने पेत्रालासुद्धा अटक करण्याचे ठरविले. (हे वल्हांडण सणाच्या काळात घडले.) [4]हेरोदाने पेत्राला अटक करून तुरुंगात टाकले. सोळा शिपाई पेत्राभोवती पहारा देत होते. हेरोदाला वल्हांडण होईपर्यंत थांबायचे होते. मग त्याने पेत्राला लोकांसमोर आणण्याची योजना केली. [5]म्हणून पेत्राला तुंगात ठेवण्यात आले. पण मंडळी सातत्याने पेत्रासाठी देवाकडे प्रार्थना करीत होती.

## पेत्र तुरूंग सोडतो

[6]पेत्र दोन शिपायांच्यामध्ये झोपला होता. त्याला साखळ्यांनी बांधले होते. तुरुंगाच्या दाराजवळ आणखी काही शिपाई पहारा देत होते. ती रात्रीची वेळ होती व हेरोदाने असा विचार केला की, दुसऱ्या दिवशी पेत्राला लोकांसमोर आणावे. [7]अचानक देवाचा दूत तेथे उभा राहिला. तुरुंगाच्या खोलीत एकदम प्रकाश पडला. देवदूताने पेत्राच्या कुशीला स्पर्श करून त्याला उठविले. देवदूत म्हणाला, "लवकर ऊठ!" तेव्हा पेत्राच्या हातातील साखळ्या गळून पडल्या. [8]देवदूत पेत्राला म्हणाला, "कपडे घाल व तुझ्या वहाणा घाल." मग पेत्राने कपडे घातले. मग देवदूत म्हणाला, "तुझा झगा अंगात घाल व माझ्यामागे ये!" [9]मग देवदूत बाहेर पडला व पेत्र त्याच्या मागे चालला. पेत्राला कळत नव्हते की, देवदूत हे खरोखर काय करीत आहे. त्याला वाटले आपण दृष्टान्त पाहत आहोत. [10]पहिल्या व दुसऱ्या फेऱ्यातील पहारेकऱ्यांना ओलांडून पेत्र व देवदूत लोखंडी फाटकाजवळ येऊन पोहोंचले. शहर आणि त्यांच्यामध्ये आता फक्त फाटकच होते. ते फाटक त्यांच्यासाठी आपोआप उघडले. पेत्र व देवदूत फाटकामधून बाहेर पडले. त्यांनी एक रस्ता पार केला आणि अचानक देवदूत पेत्राला सोडून निघून गेला. [11]पेत्राला मग कळले की नेमके काय घडले. आणि तो म्हणाला, "आता मला समजले की प्रभूने त्याचा दूत माझ्याकडे पाठविला. व त्याने मला हेरोदापासून सोडविले. यहूदी लोकांना वाटले की, माझा छळ होईल. पण प्रभूने मला या सर्वांतून सोडविले आहे."

[12]या गोष्टीची जाणीव झाल्यावर पेत्र मरीयेच्या घरी गेला. ती योहानाची आई होती. (योहानाला मार्क असेही म्हणत) पुष्कळ लोक त्या ठिकाणी जमले होते. ते सर्व प्रार्थना करीत होते. [13]पेत्राने बाहेरील बाजूने दार ठोठावले. तेव्हा रुदा नावाची दासी दार उघडण्यासाठी आली. [14]तिने पेत्राचा आवाज लगेच ओळखला आणि ती खूप आनंदित झाली. ती दार उघडण्याचेसुद्धा विसरून गेली. ती आतमध्ये पळाली आणि लोकांना तिने सांगितले, "पेत्र दाराजवळ उभा आहे!" [15]विश्वासणारे रुदाला म्हणाले, "तू बावचळलीस!" परंतु पेत्र दाराजवळ उभा आहे, असे रुदा परत परत अगदी कळकळीने सांगू लागली. म्हणून लोक म्हणाले, "तो पेत्राचा दूत असला पाहिजे!"

[16]पण पेत्र बाहेरून दार सारखे ठोठावत होता. जेव्हा विश्वासणाऱ्यांनी दार उघडले, तेव्हा त्यांनी पेत्राला पाहिले. ते चकित झाले होते. [17]पेत्राने हाताने खुणावून शांत राहायला सांगितले. मग त्याने प्रभूने तुरुंगातून कसे आणले हे सविस्तर सांगितले. तो म्हणाला, "याकोब व इतर बांधवांना काय घडले ते सांगा." मग पेत्र तेथून निघून दुसऱ्या ठिकाणी गेला. [18]दुसऱ्या दिवशी शिपाई फार हताश झाले होते. पेत्राचे काय झाले असावे याचा ते विचार करीत होते. [19]हेरोदाने पेत्राला सगळीकडे शोधले पण तो त्याला शोधू शकला नाही. मग हेरोदाने पहारेकऱ्यांना प्रश्न विचारले व त्यांना मरणाची शिक्षा ठोठावली.

## हेरोद अग्रिप्पाचे मरण

नंतर हेरोद यहूदातून निघून गेला. तो कैसरीया शहरात गेला व तेथे काही काळ राहिला. [20]हेरोद सोर व सिदोन नगरातील लोकांवर फार रागावला होता. ते लोक मिळून हेरोदाला भेटायला आले. ब्लस्तसला आपल्या बाजूला वळविण्यात ते यशस्वी झाले. ब्लस्तस हा राजाचा खाजगी सेवक होता. लोकांनी हेरोदाकडे शांततेची मागणी केली कारण त्यांचा देश अन्नधान्याच्या बाबतीत हेरोदाच्या देशावर अवलंबून होता.

[21]हेरोदाने त्यांना भेटण्यासाठी एक दिवस ठरविला. त्या दिवशी हेरोदाने आपला सुंदर दरबारी पोशाख घातला होता. तो सिंहासनावर बसून लोकांसमोर भाषण करू लागला. [22]लोक मोठ्याने ओरडून म्हणाले, "ही तर देवाची वाणी आहे, मनुष्याची नव्हे!" हेरोदाने या स्तुतीचा स्वीकार केला. [23]आणि त्याने देवाला गौरव दिला नाही, म्हणून देवाच्या दूताने लगेच त्याला आजारी पाडले. किड्यांनी त्याला आतून खाल्ले आणि तो मेला.

24देवाचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पसरत होता.
व लोकांना प्रेरित करीत होता. विश्वासणाऱ्यांचा गट
दिवसेंदिवस मोठा होत होता.
25बर्णबा व शौलाने त्यांचे यरुशलेम येथील काम
संपविल्यानंतर ते अंत्युखियाला परत आले. त्यांनी मार्क
योहान याला त्यांच्याबरोबर घेतले.

## बर्णबा व शौल यांची खास कामासाठी निवड होते

13 अंत्युखिया येथील ख्रिस्ती मंडळीत काही संदेष्टेये
व शिक्षक होते. ते पुढीलप्रमाणे: बर्णबा, निग्र
शिमोन, लूक्य कुरेनेकर, मनाएन (जो हेरोदाबरोबर
लहानाचा मोठा झाला), आणि शौल. 2ही सर्व माणसे
देवाची सेवा करीत असत व उपास करीत असत. पवित्र
आत्मा त्यांना म्हणाला, "बर्णबा व शौलाला माझ्याकडे
द्या. एक खास काम त्यांच्याकडून मला करवून घ्यायचे
आहे. हे काम करण्यासाठी मी त्यांना निवडले आहे"
3म्हणून मंडळीने उपास व प्रार्थना केल्या. त्यांनी बर्णबा
व शौल यांच्या डोक्यांवर हात ठेवून प्रार्थना केली. मग
त्यांना पाठवून दिले.

## कुप्र येथे बर्णबा व शौल

4पवित्र आत्म्याच्या द्वारे बर्णबा व शौल यांना पाठविण्यात
आले. ते सलुकीया शहराला गेले. नंतर ते समुद्रमार्गे कुप्र
बेटावर गेले. 5जेव्हा बर्णबा व शौल सलमीन शहरात
आले, तेव्हा त्यांनी देवाचा संदेश यहूदी लोकांच्या
सभास्थानात दिला. मार्क म्हटलेला योहान त्यांच्या मदतीला
होता. 6ते संपूर्ण बेट पार करून पफे शहरास गेले. पफे
येथे त्यांना एक यहूदी मनुष्य भेटला. तो जादूच्या करामती
करीत असे. त्याचे नाव बर्येशू होते. तो खोटा संदेष्टा होता.
7बर्येशू नेहमी सिर्ग्य पौल याच्या निकट राहण्याचा प्रयत्न
करायचा. सिर्ग्य पौल राज्यपाल होता. व तो हुशार होता.
त्याने बर्णबा व शौल यांना आपणाकडे बोलाविले. त्याला
त्यांचा संदेश ऐकावयाचा होता. 8परंतु अलीम जादूगार हा
बर्णबा व शौल यांच्या विरुद्ध होता. (ग्रीक भाषेत बर्येशूसाठी
अलीम शब्द वापरतात. त्याचा अर्थ तोच आहे.)
राज्यपालाने येशूवर विश्वास ठेवू नये म्हणून अलीमने
त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. 9पण शौल आत्म्याने
भरला होता. (शौलाचे दुसरे नाव पौल) पौलाने अलीमकडे
(बर्येशूकडे) पाहिले व म्हणाला, 10"सैतानाच्या पुत्रा! जे
काही योग्य असेल त्या सर्वांचा तू शत्रू आहेस. तू दुष्टाईने
व खोटेपणाने भरलेला आहेस. तू देवाचे सत्य नेहमी
खोटेपणात बदलण्याचा प्रयत्न करतोस! 11आता तुला देवाने
स्पर्श करताच तू आंधळा होशील. भर दिवसाच्या उन्हातही
तुला काही काळ दिसणार नाही."
मग अलीमसाठी सर्व काही अंधकारमय झाले. चाचपडत
तो इकडेतिकडे फिरू लागला. कोणीतरी मदतीला घेऊन
त्याचा हात धरून जाण्यासाठी प्रयत्न करू लागला. 12जेव्हा
राज्यपालाने ते पाहिले (सिर्ग्य पौल) त्याने विश्वास ठेवला.
प्रभूच्या शिक्षणाने तो चकित झाला.

## पौल व बर्णबा कुप्र सोडतात

13पौल व जे लोक त्याच्याबरोबर होते ते पफेकडून
समुद्रमार्गे निघाले. ते पंफुल्यातील पिर्गा गावी आले. परंतु
योहान (मार्क) त्यांना सोडून परत यरुशलेमला गेला.
14त्यांनी त्यांचा प्रवास पुढे चालू ठेवला. पिर्गापासून पुढे ते
अंत्युखियास गेले. (जे पिसीदीयाजवळ होते.) अंत्युखियात
असताना शब्बाथ दिवशी ते यहूदी सभास्थानात गेले आणि
तेथे बसले.
15पवित्र शास्त्रातील नियमशास्त्र आणि संदेष्ट्यांच्या
लिखाणाचे वाचन झाले. मग सभास्थानाच्या अधिकाऱ्यांनी
पौल व बर्णबाला निरोप पाठविला: "बंधूनो, येथील लोकांना
काही मदत होईल असे काही तरी तुम्हांला सांगायचे
असेल तर कृपा करून बोला!"
16पौल उभा राहिला. आणि आपला हात उंचावून
(लोकांचे लक्ष वेधून घेऊन) म्हणाला, "माझ्या यहूदी
बांधवानो व इतर लोकहो, जे तुम्ही खऱ्या देवाची उपासना
करता, ते कृपा करून माझे ऐका! 17इस्राएलाच्या देवाने
आपल्या वाडवडिलांची निवड केली. ते ज्या काळात
इजिप्तमध्ये परकी म्हणून राहत होते, त्याकाळात देवाने
त्यांना यशस्वी होण्यास मदत केली. मोठ्या सामर्थ्याने
देवाने त्यांना त्या देशातून बाहेर आणले. 18आणि देवाने
अरण्यातील चाळीस वर्षांत त्यांना सहनशीलता दाखविली.
19देवाने कनानच्या प्रदेशातील सात राष्ट्रांना नाश केला.
देवाने त्यांच्या जमिनी त्याच्या लोकांना दिल्या. 20हे सर्व
साधारणपणे चारशेपन्नास वर्षांत घडले.
"त्यानंतर देवाने आपल्या लोकांना शास्ते (नेते) दिले.
ते शमुवेल संदेष्ट्याच्या काळापर्यंत. 21मग लोकांनी राजाची
मागणी केली. देवाने त्यांना किशाचा पुत्र शौल याला
दिले. शौल हा बन्यामिनाच्या वंशातील होता. तो चाळीस
वर्षेपर्यंत राजा होता. 22नंतर देवाने शौलाला काढून टाकले.
देवाने दावीदाला त्यांचा राजा केले. दावीदाविषयी देव असे
बोलला: दावीद, इशायाचा पुत्र, हा मला आवडला. मला
ज्या गोष्टी पाहिजेत त्या सर्व तो करील. 23याच दाविदाच्या
वंशजातून देवाने इस्राएल लोकांचा तारणारा आणिला. तो
वंशज येशू आहे. देवाने हे करण्याचे अभिवचन दिले
होते. 24येशू येण्यापूर्वी सर्व यहूदी लोकांना योहानाने उपदेश
केला. त्यांच्या अंत:करणात बदल व्हावा म्हणून योहानाने
लोकांना सांगितले की, त्यांनी बाप्तिस्मा घेतला पाहिजे.
25जेव्हा योहान आपले काम संपवत होता, तेव्हा तो म्हणाला,
'मी कोण आहे असे तुम्हांला वाटते? मी ख्रिस्त नाही. तो
नंतर येत आहे. त्याच्या वहाणांचे बंद सोडण्याची सुद्धा
माझी लायकी नाही.'
26"माझ्या बंधूनो, अब्राहामाच्या कुटुंबातील पुत्रांनो,
आणि तुम्ही यहूदी नसलेले पण खऱ्या देवाची उपासना

करणारे, ऐका! या तारणाची बातमी आम्हांला सांगितली
गेली. 27जे यरूशलेममध्ये राहतात ते यहूदी व यहूदी पुढारी
यांना जाणीव झाली नाही की, येशू हा तारणारा होता.
येशूविषयी जे शब्द भविष्यवाद्यांनी लिहिले ते यहूदी
लोकांसाठी प्रत्येक शब्बाथाच्या वारी वाचले गेले. परंतु
त्यांना ते समजले नाही. यहूदी लोकांनी येशूचा धिक्कार
केला. जेव्हा त्यांनी असे केले, तेव्हा त्यांनी भविष्यावाद्यांचे
म्हणणे खरे ठरविले! 28येशूने का मरावे याचे खरे कारण
ते शोधू शकले नाहीत. पण त्यांनी पिलाताला सांगितले
की त्याला जिवे मारावे. 29शास्त्रामध्ये येशूच्याबद्दल या
गोष्टी लिहिल्या होत्या की, जे वाईट ते त्याच्याबाबतीत
घडणारे होते, ते सर्व या यहूदी लोकांनी येशूला केले. मग
त्यांनी येशूला वधस्तंभावरून खाली घेतले. व त्याला
कबरेत ठेवले. 30पण देवाने त्याला मरणातून उठविले
31यानंतर, पुष्कळ दिवसांपर्यंत जे त्याच्याबरोबर होते, त्यांना
गालीला पासून यरुशलेमपर्यंत येशूने दर्शन दिले. ते लोक
आता त्याचे साक्षीदार म्हणून लोकांसमोर आहेत. 32आम्ही
तुम्हांला देवाने जे अभिवचन आमच्या वाडवडिलांना
(पूर्वजांना) दिले त्याविषयी सुवार्ता सांगतो. 33आम्ही त्यांची
लेकरे (वंशज) आहोत आणि देवाने हे अभिवचन आमच्या
बाबतीत खरे करून दाखविले. देवाने हे येशूला मरणातून
पुन्हा उठविण्याद्वारे केले. आम्ही याविषयी
स्तोत्रसंहितातेमध्येसुद्धा वाचतो:

'तू माझा पुत्र आहेस. आज मी तुझा पिता झालो आहे.'
*स्तोत्र. 2:7*

34देवाने येशूला मरणातून उठविले. येशू पुन्हा कबरेत
जाऊन माती बनणार नाही. म्हणून देव म्हणाला:

'दाविदाला देण्यात आलेली पवित्र व सत्यअभिवचने मी
तुला देईन' *यशया 55:3*

35 पण दुसऱ्या ठिकाणी देव म्हणतो:

'तू तुझ्या पवित्र पुरुषाला कबरेत कुजण्याचा अनुभव
घडू देणार नाहीस.' *स्तोत्र. 16:10*

36ज्या काळात दावीद राहत होता तेव्हा त्याने देवाच्या
इच्छेप्रमाणे केले. मग तो मेला. आपल्या वाडवडिलांशेजारी
त्याला पुरले. आणि कबरेत त्याचे शरीर कुजले 37पण
ज्याला देवाने मरणातून पुन्हा उठविले, त्याला कुजण्याचा
अनुभव आला नाही. 38–39बंधूनो, आम्ही जे सांगत आहोत
ते तुम्ही समजून घेतले पाहिजे: या एकाकडूनच तुमच्या
पापांची क्षमा तुम्हांला मिळू शकते. मोशेचे नियमशास्त्र
तुम्हांला तुमच्या पापांपासून मुक्त करणार नाही. पण प्रत्येक
व्यक्ति जी त्याच्यावर विश्वास ठेवते, ती त्याच्याद्वारे त्या
सर्वांविषयी न्यायी ठरविली जाते. 40संदेष्टेयांनी सांगितलेल्या
काही गोष्टी घडतील. सावध राहा! या गोष्टी तुमच्याबाबत
होऊ नयत म्हणून जपा. भविष्यवादी म्हणाला:

41'ऐका, जे तुम्ही संशय धरता! तुम्ही चकित होता पण
मग दूर जाता व मरता; कारण तुमच्या काळामध्ये मी
(देव) काही तरी करीन ज्याच्यावर तुमचा विश्वास बसणार
नाही कोणी ते स्पष्ट करून सांगितले तरी तुम्ही त्याच्यावर
विश्वास ठेवणार नाही.'" *हबक्कूक 1:5*

42जेव्हा पौल व बर्णबा (सभास्थानातून) जाऊ लागले,
तेव्हा लोक म्हणाले की, पुढील शब्बाथाच्या दिवशी परत
या आणि आम्हांला याविषयी अधिक सांगा.
43सभास्थानातील बैठक संपल्यावर अनेक यहूदी लोक
आणि यहूदी मतानुसारी चालणारे इतर धार्मिक लोक
पौल व बर्णबा यांच्यामागे गेले. पौल व बर्णबा यांनी त्या
लोकांना देवाच्या कृपेत टिकून राहण्यास कळकळीची
विनंति केली.
44पुढील शब्बाथवारी शहरातील जवळ जवळ सर्व लोक
देवाचे वचन ऐकण्यासाठी एकत्र आले. 45यहूदी लोकांनी
त्या सर्वांना तेथे पाहिले. त्यामुळे यहूदी लोकांना मत्सर
वाटू लागला. तेही काही फार वाईट गोष्टी बोलले आणि
जे पौल बोलला त्याविरुद्ध वाद उपस्थित केला. 46पण
पौल व बर्णबा फार धैर्याने बोलले. ते म्हणाले, "देवाचा
संदेश तुम्हा यहूद्यांना प्रथम आम्हांला सांगितलाच पाहिजे.
पण तुम्ही ऐकण्यास नकार देत आहात. तुम्ही तुमचे
स्वत:चेच नुकसान करून घेत आहात. व अनंतकाळचे
जीवन प्राप्त करून घेण्यासाठी अपात्र ठरत आहात! म्हणून
आम्ही आता दुसऱ्या देशांतील यहूदीतर लोकांकडे जाऊ!
47प्रभूने आम्हांला हे करण्यास सांगितले आहे. प्रभु
म्हणाला:

'दुसऱ्या देशांसाठी मी तुम्हाला प्रकाश असे केले यासाठी
की, तुम्ही पृथ्वीवरील सर्व लोकांना तारणाचा मार्ग दाखवू
शकाल.'" *यशया 49:6*

48जेव्हा यहूदी नसलेल्यांनी पौलाला असे बोलताना ऐकले
तेव्हा ते फार आनंदित झाले. देवाच्या संदेशाचा त्यांनी
बहुमान केला. आणि त्या लोकांपैकी पुष्कळांनी संदेशावर
विश्वास ठेवला. कारण ते अनंतकाळच्या जीवनासाठी
निवडले गेले होते.
49आणि म्हणून देवाचा संदेश संपूर्ण देशात सांगितला
गेला. 50तेव्हा यहूदी लोकांनी शहरातील काही धार्मिक
स्त्रिया व पुढारी यांना भडकावून दिले. त्या लोकांनी पौल
व बर्णबा यांच्याविरुद्ध अनेक वाईट गोष्टी केल्या आणि
त्यांना शहराबाहेर घालवून दिले. 51मग पौल व बर्णबा
यांनी आपल्या पायाची धूळ झटकली. व ते इकुन्या शहराला

गेले. 52पण अंत्युखियातील येशूचे अनुयायी आनंदाने व
पवित्र आत्म्याने भरून गेले होते.

## इकुन्या येथे पौल व बर्णबा

14 पौल व बर्णबा इकुन्या शहरात गेले. ते तेथील
यहूदी सभास्थानात गेले. (प्रत्येक शहरात
गेल्यावर ते असेच करीत) तेथील लोकांशी ते बोलले.
पौल व बर्णबा इतके चांगले बोलले की, पुष्कळ यहूदी
लोकांनी व ग्रीक लोकांनी त्यांनी जे सांगितले त्यावर
विश्वास ठेवला. 2परंतु काही यहूदी लोकांनी विश्वास
ठेवला नाही. त्यांनी यहूदीतर लोकांची मने भडकाविली
आणि बंधुजनांविषयीची मने वाईट केली. 3म्हणून पौल व
बर्णबाने त्या ठिकाणी बरेच दिवस मुक्काम केला. आणि
धैर्याने येशूविषयी सांगत राहिले. पौल व बर्णबाने देवाच्या
कृपेविषयी संदेश दिला. देवाने त्यांना पौल व बर्णबाला
चमत्कार व अद्भुत कृत्ये करण्यास मदत करून ते जे
काही सांगत होते ते खरे ठरविले. 4परंतु शहरातील काही
लोकांना यहूदी लोकांची मते पटली. दुसऱ्या लोकांना
पौल व बर्णबाचे म्हणणे पटले. (त्यांनी विश्वास ठेवला)
त्यामुळे शहरात दोन तट पडले.

5काही यहूदीतर लोक, काही यहूदी लोक व त्यांचे
पुढारी यांनी पौल व बर्णबाला बांधले व इजा करण्याचा
प्रयत्न केला. त्यांना पौल व बर्णबा यांना दगडमार करून
मारावयाचे होते. 6जेव्हा पौल व बर्णबा यांना त्याविषयी
कळले तेव्हा त्यांनी ते शहर सोडले. ते लुस्र व दर्बे या
लुकवनियाच्या नगरात गेले. आणि त्या शहरांच्या
सभोवतालच्या परिसरात गेले. 7त्या ठिकाणीसुद्धा त्यांनी
सुवार्ता सांगितली.

## लुस्र व दर्बे येथे पौल

8लुस्र येथे एक मनुष्य होता त्याचे पाय अधू होते तो
जन्मत:च पांगळा जन्मला होता. व कधीच चालला नव्हता.
9पौल भाषण करीत असताना हा मनुष्य ऐकत होता.
पौलाने त्याच्याकडे पाहिले, पौलाने पाहिले की, देव त्याला
बरे करील असा त्या मनुष्याचा विश्वास झाला आहे.
10तेव्हा पौल मोठ्याने म्हणाला, "तुझ्या पायावर उभा
राहा!" तेव्हा त्या मनुष्याने उंच उडी मारली आणि चालू
लागला. 11पौलाने केलेले लोकांनी जेव्हा पाहिले, तेव्हा
ते आपल्या लुकवनिया भाषेत ओरडले. ते म्हणाले, "देव
माणसांसारखे झाले आहेत! ते आमच्याकडे खाली आले
आहेत!" 12लोकांनी बर्णबाला ज्युपिटर* म्हटले व पौलाला
मर्क्युरी* म्हटले. कारण पौल मुख्य बोलणारा होता.
13ज्युपिटरचे मंदिर जवळ होते. या मंदिराचा पुजारी काही
बैल व फुले घेऊन वेशीजवळ आला. पुजारी व लोकांना
पौल व बर्णबा यांची उपासना करण्यासाठी त्यांच्यापुढे
बळी द्यावयाचा होता.

14परंतु ते काय करीत आहेत, हे जेव्हा पौल व बर्णबा
यांना समजले तेव्हा त्यांनी आपले कपडे फाडले व लोकांच्या
गर्दीत शिरले आणि मोठ्याने म्हणाले, 15"लोकांनो, ह्या
गोष्टी तुम्ही का करीत आहात? आम्ही देव नाही! तुम्हांला
जशा भावना आहेत, तशाच आम्हालाही आहेत! आम्ही
तुम्हांला सुवार्ता सांगायला आलो. आम्ही तुम्हांला हे सांगत
आहोत की या व्यर्थ गोष्टींपासून तुम्ही तुमचे मन वळवावे.
खऱ्या जिवंत देवाकडे आपले मन लावावे. त्यानेच आकाश,
पृथ्वी, समुद्र व जे काही आहे ते निर्माण केले. 16भूतकाळात,
देवाने सर्व राष्ट्रांना त्यांना जसे पाहिजे तसे वागू दिले.
17परंतु देवाने अशा गोष्टी केल्या की त्या द्वारे तो खरा
आहे हे सिद्ध व्हावे. तो तुमच्यासाठी चांगल्या गोष्टी करतो.
तो तुम्हांला आकाशातून पाऊस देतो. योग्य वेळी तो तुम्हांला
चांगले पीक देतो. तो तुम्हांला भरपूर अन्न देतो व तो
तुमची अंत:करणे आनंदाने भरतो" 18पौल व बर्णबाने ह्या
गोष्टी लोकांना सांगितल्या. व मोठ्या प्रयासाने आपणास
यज्ञ अर्पिण्यापासून त्याना परावृत केले.

19नंतर अंत्युखिया व इकुन्या येथील काही यहूदी लोक
तेथे आले. त्यांनी लोकसमुदायाची मने आपल्या बाजूस
वळविली. आणि पौलाला दगडमार केला. त्यात पौल
मेला असे समजून त्यांनी त्याला ओढत नेऊन नगराबाहेर
टाकले. 20येशूचे शिष्य पौलाभोवती जमा झाले मग पौल
उठून परत शहरात गेला व दुसऱ्या दिवशी ते दोघे दर्बेला
गेले.

## सिरीयातील अंत्युखियाला परत येणे

21आणि त्या नगरात त्यांनी सुवार्ता सांगून अनेक लोकांना
शिष्य केले. त्यानंतर ते लुस्त्र, इकुन्या आणि अंत्युखिया
नगरांना परत आले. 22आणि त्यांनी तेथील शिष्यांना
येशूवरील विश्वासात बळकट केले. त्यांनी आपल्या
विश्वासात अढळ राहावे म्हणून उत्तेजन दिले. ते म्हणाले,
"अनेक दु:खांना तोंड देत आपण देवाच्या राज्यात प्रवेश
केला पाहिजे." 23पौल व बर्णबाने प्रत्येक मंडळीत
वडीलजनांची नेमणूक केली. त्यांनी या वडिलांसाठी उपास
आणि प्रार्थना केल्या. प्रभु येशूवर विश्वास असलेले असे
सर्व वडीलजन होते म्हणून पौलाने व बर्णबाने त्यांना
प्रभूच्या हाती सोपविले.

24पौल आणि बर्णबा पिसीदिया प्रदेशातून गेले नंतर ते
पंफुलिया येथे आले. 25त्यांनी पिर्गा शहरात देवाचा संदेश
दिला नंतर ते अत्तालिया शहरात गेले. 26नंतर तेथून पुढे
पौल व बर्णबा सिरीया येथील अंत्युखियात समुद्रमार्गे गेले.
जे काम त्यांनी पूर्ण केले होते त्याची सुरुवात त्यांनी
अंत्युखियापासूनच केली होती.

27जेव्हा ते तेथे पोहोंचले, तेव्हा त्यांनी मंडळीला एकत्र
बोलाविले आणि देवाने त्यांच्याबाबतीत ज्या ज्या गोष्टी

---

**ज्युपिटर** अनेक ग्रीक देवांमधील अत्यंत महत्त्वाचा देव.

**मर्क्युरी** ग्रीकांचा आणखी एक देव. तो इतर देवांचा निरोप्या आहे असे ते मानीत.

केल्या त्या त्यांना सांगितल्या तसेच दुसऱ्या देशातील
यहूदीतर लोकांमध्ये देवाने कसे दार उघडले ते सांगितले.
28नंतर ते शिष्यांबरोबर तेथे बरेच दिवस राहिले.

## यरुशलेम येथील सभा

15 मग काही माणसे यहूदीया प्रांतातून अंत्युखियास
आली. ती बंधुजनांना (यहूदीतर) शिक्षण देऊ
लागली: "तुमची सुंता झालेली नसेल तर तुमचे तारण
होणार नाही. मोशेने आम्हांला हे करायला शिकविले."
2पौल व बर्णबा या शिक्षणाविरुद्ध होते. या विषयावर त्या
लोकांशी पौलाने व बर्णबाने वाद घातला, म्हणून लोकांनी
असे ठरविले की, पौल, बर्णबा व इतर काही जणांना
यरुशलेमला पाठवायचे. हे लोक त्या ठिकाणी प्रेषित व
वडीलजनांशी या विषयावर अधिक बोलण्यासाठी गेले.
3मंडळीने त्यांना प्रवासास जाण्यासाठी मदत केली. हे लोक
फेनीके व शोमरोन प्रांतातून जात असता यहूदीतर विदेशी
लोक देवाकडे कसे वळले. याविषयी सविस्तर हकीगत
त्यांनी तेथील बंधुवर्गाला सांगितली. त्यामुळे ते फार आनंदित
झाले. 4ते जेव्हा यरुशलेमला पोहोंचले तेव्हा तेथील ख्रिस्ती
मंडळी, प्रेषित आणि वडीलजन यांनी त्यांचे स्वागत केले.
त्यावेळी पौल व बर्णबा यांनी आपल्या हातून देवाने जे
काम करून घेतले त्याविषयी सविस्तर सांगितले.
5परूशी गटातील काही विश्वासणारे उभे राहिले आणि
म्हणाले, "यहूदीतर विश्वासणाऱ्यांची सुंता झालीच पाहिजे.
तसेच आपण त्यांना मोशेचे नियम पाळण्याविषयी शिकविले
पाहिजे!"
6मग प्रेषित आणि वडीलजन या समस्येचा अभ्यास
करण्यासाठी एकत्र जमले. 7त्यावर प्रदीर्घ चर्चा झाली.
मग पेत्र उभा राहिला. आणि त्यांना म्हणाला, "माझ्या
बंधूंनो मला माहीत आहे, सुरुवातीला जे काही घडले, ते
तुमच्या आठवणीत आहे. जे यहूदी नाहीत, त्या लोकांना
सुवार्ता सांगण्यासाठी तुमच्यामधून देवाने माझी निवड केली.
यासाठी की, त्यांनीही विश्वास धरावा. 8देव सर्वांचे विचार
जाणतो. आणि त्याने या यहूदीतर लोकांचा स्वीकार केला
आहे. देवाने जसा आम्हांला पवित्र आत्मा दिला, तसाच
त्यांनाही देऊन त्याने हे आम्हांस दाखवून दिले. 9देवाच्या
दृष्टीने ते लोक आपल्यापेक्षा वेगळे नाहीत. जेव्हा त्यांनी
विश्वास ठेवला, तेव्हा त्याने त्यांची हृदये शुद्ध केली.
10मग आता यहूदीतर लोकांच्या मानेवर जड जू तुम्ही का
ठेवीत आहात? तुम्ही देवाला राग आणीत आहात काय?
आपण व आपले वाडवडील (पूर्वज) हे ओझे वाहण्याइतके
सशक्त नव्हतो. 11आम्ही असा विश्वास धरतो की, आम्ही
आणि हे लोक प्रभु येशूच्या कृपेमुळे तारले जाणार आहोत."
12मग सगळे लोक शांत झाले. ते पौल व बर्णबाचे
बोलणे ऐकू लागले. पौलाने व बर्णबाने लोकांना सांगितले
की, देवाने त्यांच्याद्वारे यहूदीतर लोकांमध्ये चमत्कार व
अद्भुत कृत्ये केली. 13पौलाने व बर्णबाने आपले बोलणे
संपविले. मग याकोब बोलला. तो म्हणाला, "माझ्या बंधूनो,
माझे ऐका. 14शिमोन (पेत्र) याने यहूदीतर लोकांना देवाने
आपले प्रेम कसे दाखविले ते सांगितले. पहिल्यांदाच देवाने
यहूदीतर लोकांना स्वीकारले. आणि त्यांना आपले लोक
बनविले. 15संदेष्टेयांच्या शब्दांनी सुद्धा याला सहमती
दर्शविली:

16'मी (देव) यानंतर परत येईन मी दाविदाचे घर पुन्हा
बांधीन ते पडलेले आहे त्याच्या घराचे पडलेले भाग मी
पुन्हा बांधीन मी त्याचे घर नवे करीन
17मग इतर सर्व लोक देवाचा शोध करतील सर्व
यहूदीतर लोकसुद्धा माझे लोक आहेत असे मी मानतो.
प्रभु (देव) असे म्हणाला, व हे करणारा तोच आहे.
18या सर्व गोष्टी सुरुवातीपासूनच माहीत आहेत'

*अमोस 9:11-12*

19"म्हणून मला वाटते जे यहूदीतर बंधु देवाकडे वळले
आहेत, त्याना आपण तसदी देऊ नये.

20त्याऐवजी आपण त्यांना एक पत्र लिहू या. आपण
त्यांना या गोष्टी सांगू:

मूर्तिपुढे ठेवलेले अन्न खाऊ नका. (त्यामुळे अन्न अशुद्ध
होते) कोणत्याही प्रकारचे अनैतिक पाप करू नका. रक्त
चाखू नका गुदमरून मारलेले प्राणी खाऊ नका.

21त्यांनी या गोष्टी करू नयेत. कारण अजूनसुद्धा प्रत्येक
शहरात यहूदी लोक आहेत जे मोशेचे नियम शिकवितात.
बऱ्याच वर्षांपासून दर शब्बाथ दिवशी सभास्थानातून
मोशेचे नियम वाचण्यात येतात."

## यहूदीतर विश्वासणाऱ्यांना पत्र

22प्रेषितांना, वडीलजनांना व सगळ्या मंडळीला वाटत
होते की, पौल व बर्णबा यांच्याबरोबर आणखी काही
माणसे अंत्युखियाला पाठवावीत. मंडळीने त्यांचे स्वत:चे
काही लोक निवडलले. 23त्यांनी यहूदा (बर्सब्बा) आणि
सीला यांना निवडले. यरुशलेमधील बंधुवर्गामध्ये या
माणसांचा आदर केला जात असे. मंडळीने या लोकांबरोबर
हे पत्र पाठविले. पत्रात असे लिहिले होते की,

प्रेषित, वडीलजन आणि तुमचे बंधुजन यांजकडून
अंत्युखिया शहरातील तसेच सीरीया व किलकिया
देशातील सर्व यहूदी नसलेल्या बांधवांस: प्रिय बंधूनो,
24आम्ही असे ऐकले की, आमच्यातील काही लोक
तुमच्याकडे आले. ज्या गोष्टी त्यांनी सांगितल्या
त्यामुळे तुम्हांला त्रास झाला व तुम्ही हताश झालात.
परंतु आम्ही त्यांना हे करण्यास सांगितले नाही!

25आम्ही सर्वांनी या गोष्टीला सहमती दर्शविली
की, काही लोकांची निवड करून त्यांना तुमच्याकडे
पाठवावे. आमचे प्रिय मित्र पौल व बर्णबा यांच्यासह
ते असतील. 26बर्णबा व पौल यांनी आपल्या प्रभु
येशू ख्रिस्ताच्या सेवेसाठी आपले जीवन दिले आहे.
27म्हणून आम्ही यहूदा व सीला यांना त्यांच्याबरोबर
पाठवत आहोत. ते सुद्धा तुम्हांला त्याच गोष्टी
सांगतील. 28पवित्र आत्म्याला असे वाटते की,
तुमच्यावर आता अधिक ओझे असू नये. आणि
आम्हांला ते मान्य आहे. तुम्ही फक्त पुढील गोष्टी
कराव्यात:

29कोणतेही अन्न जे मूर्तीला वाहिले आहे ते खाऊ नका
रक्त चाखू नका गुदमरून मारलेले प्राणी खाऊ नका.
कोणत्याही प्रकारचे अनैतिक पाप करू नका.

जर तुम्ही या गोष्टींपासून दूर राहाल, तर तुम्ही
चांगले कराल आता आम्ही तुमचा निरोप घेतो
कळावे.'

30मग पौल, बर्णबा, यहूदा व सीला यांनी यरुशलेम
सोडले. ते अंत्युखियास गेले. अंत्युखियात त्यांनी
विश्वासणाऱ्यांना एकत्र केले. आणि त्यांना ते पत्र दिले.
31जेव्हा त्यांनी ते पत्र वाचले. ते आनंदित झाले. पत्राने
त्यांचे समाधान झाले. 32यहूदा व सीला हेसुद्धा संदेष्टे होते.
त्यांनी विश्वासणाऱ्या बंधूंना विश्वासात भक्कम
करण्यासाठी पुष्कळ गोष्टी सांगितल्या. 33यहूदा व सीला
काही काळ तेथे राहिल्यानंतर ते निघून गेले. बंधूंकडून
त्यांना शांतीचा आशीर्वाद मिळाला. ज्या यरुशलेममधील
बंधूनी यहूदा व सीला यांना पाठवले होते, त्यांच्याकडे ते
परत गेले. 34*
35पण पौल व बर्णबा अंत्युखियातच राहिले. त्यांनी व
इतर पुष्कळ लोकांनी सुवार्ता सांगितली आणि प्रभूचा
संदेश लोकांना शिकविला.

### पौल व बर्णबा वेगळे होतात

36काही दिवसांनंतर पौलाने बर्णबाला सांगितले, "आपण
पुष्कळ गावात प्रभूचा संदेश दिला. आपण पुन्हा या गावांमध्ये
तेथील बंधुभगिनींना भेट देण्यासाठी आणि त्यांचे कसे
काय चालले आहे हे पाहण्यासाठी जायला हवे." 37बर्णबाला
त्यांच्यासोबत योहान (मार्क) यालाही घ्यायचे होते. 38पण
ज्याने पंफुलिया येथे त्यांची साथ सोडली व आपले काम
पूर्ण केले नाही, त्याला आपल्यासोबत घेऊ नये असे
पौलाचे म्हणणे होते 39पौल आणि बर्णबा यांच्यात यावरून
मोठा वाद झाला. ते विभक्त झाले व वेगळ्या मार्गांनी
गेले. बर्णबा योहानासह कुप्र येथे समुद्रमार्गे गेला. 40पौलाने
सीलाला आपल्यासोबत नेण्यासाठी निवडले.
अंत्युखियातील बांधवांनी, पौलाला देवाच्या कृपेवर सोपवले
आणि मग त्यांना रवाना केले. 41पौल, सीरीया व किलकीया
भागातील मंडळ्यांना स्थैर्य देत गेला.

### तीमथ्य पौल व सीला यांच्यासह जातो

16 पौल दर्बे व लुस्त्र या शहरांमध्ये गेला. तेथे ख्रिस्ताचा
एक शिष्य ज्याचे नाव तीमथ्य, तो होता. तीमथ्याची
आई एक यहूदी विश्वासणारी स्त्री होती. त्याचा पिता एक
ग्रीक मनुष्य होता. 2तीमथ्याविषयी लुस्त्र व इकुन्या येथील
बंधुजनांचे फार चांगले मत होते. 3तीमथ्याला
आपल्याबरोबर प्रवासाला घेऊन जावे अशी पौलाची इच्छा
होती. पण त्या भागात राहणाऱ्या यहूदी लोकांना माहीत
होते की, तीमथ्याचे वडील ग्रीक (यहूदीतर) आहेत. म्हणून
पौलाने यहूदी लोकांचे समाधान होण्यासाठी तीमथ्याची
सुंता केली. 4मग पौल व त्याच्याबरोबर असलेले लोक
इतर शहरांमधून प्रवास करीत निघाले. यरुशलेममधील
प्रेषितांनी व वडीलजनांनी दिलेले नियम व त्यावरचे निर्णय
ते विश्वासणाऱ्यांना देत गेले. त्यांनी विश्वासणाऱ्यांना त्या
नियमांचे पालन करण्यास सांगितले. 5मग मंडळ्या
विश्वासात भक्कम होत गेल्या व संख्येतदेखील त्या वाढत
गेल्या.

### पौलाला आशियातून बोलावतात

6पौल व त्याच्याबरोबर असलेले बंधू फ्रुगिया व गलतीया
या प्रदेशातून गेले. आशिया देशात पवित्र आत्म्याने त्यांना
सुवार्ता सांगण्यास मना केले. 7पौल व तीमथ्य मिसिया
देशाच्या जवळ गेले. त्यांना बिथनीया प्रांतात जायचे होते.
पण येशूच्या आत्म्याने त्यांना आत जाऊ दिले नाही. 8म्हणून
ते मिसियाजवळून जाऊन त्रोवस येथे गेले. 9त्या रात्री
पौलाने एक दृष्टान्त पाहिला. या दृष्टान्तामध्ये
"मासेदोनियाला या आणि आम्हांला मदत करा!" अशी
विनंति मासेदोनियातील कोणीतरी मनुष्य उभा राहून
पौलाला करीत होता. 10पौलाला हा दृष्टान्त झाल्यावर
आम्ही तेथे जाऊन तेथील लोकांना सुवार्ता सांगावी यासाठी
देवाने आम्हांला बोलाविले. हे आम्ही समजलो. आणि
लगेच मासेदोनियाला जाण्याच्या तयारीला लागलो.

### लीदीयाच्या मनाचा पालट

11नंतर आम्ही जहाजाने त्रोवस सोडले आणि आम्ही
समथ्राकेस येथे समुद्रमार्गे आलो. दुसऱ्या दिवशी
नियापोलीस येथे गेलो. 12नंतर आम्ही फिलिप्पैला गेलो.
ते त्या भागातील मासेदोनियातील पहिले नगर आहे. ते
रोमी लोकांचे नगर आहे. त्या नगरात आम्ही काही दिवस
राहिलो.

---

**वचन 34** प्रेषितांनी केलेले कार्याच्या काही प्रतीमध्ये वचन
34 आहे. "... पण सीलने तेथेच राहायचे ठरविले."

13शब्बाथवारी आम्ही त्या नगराच्या वेशीच्या बाहेर प्रार्थना करण्यासाठी नदीकाठी सुरक्षित जागा आढळेल असे वाटल्यावरून तेथे जाऊन बसलो. आणि तेथे जमा झालेल्या स्त्रियांशी बोलू लागलो. 14त्यांच्यामध्ये लुदियाने नावाची स्त्री होती. ती थुवतीरा नगरची होती. ती किरमीजी रंगाच्या कापडाचा व्यापार करीत असे. ती चांगली देवभक्त होती. लीदीयाने पौलाचे बोलणे ऐकले. देवाने तिचे अंत:करण उघडले. पौलाने जे सांगितले त्यावर तिने विश्वास ठेवला. 15तिचा व तिच्या घरामध्ये राहणाऱ्या सर्वांचा बाप्तिस्मा करण्यात आला. मग लुदियाच्या आम्हांला तिच्या घरी बोलाविले. ती म्हणाली, तुम्हाला जर खरोखरच वाटत असेल की मी प्रभु येशूमध्ये विश्वासणारी आहे, तर माझ्या घरी येऊन राहा. तिने आम्हांला तिच्या घरी राहावे म्हणून गळ घातली.

## पौल व सीला तुरूंगात

16एकदा आम्ही प्रार्थनेला जात असताना. एक दासीकाम करणारी मुलगी आम्हांला भेटली. तिच्या अंगात येत असे* ती दैवप्रश्ना सांगून आपल्या घरधन्यास पुष्कळ मिळकत करून देत असे. 17ती मुलगी पौलाच्या व आमच्या मागे आली. ती मोठ्याने म्हणाली, 'हे लोक सर्वोच्च देवाचे सेवक आहेत! ते तुम्हांला सांगत आहेत की, तुमचे तारण कसे होईल!' 18तिने हे असे बरेच दिवस केले. त्यामुले पौल विचलित झाला. मग तो वळला व त्या आत्म्याला म्हणाला, 'येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्याने, मी तुला आज्ञा देतो, तिच्यातून बाहेर निघ!' ताबडतोब तो आत्मा बाहेर आला.

19ज्या लोकांची ही मुलगी नोकरी करीत असे त्यांनी हे पाहिले. त्यांनी हे ओळखले की, आता ते त्या मुलीचा वापर पैसे कमविण्यासाठी करू शकणार नाहीत. म्हणून त्यांनी पौल व सीला यांना धरून शहरातील सभेच्या ठिकाणी ओढून नेले. शहराचे अधिकारीही तेथे होते. 20त्या लोकांनी पौल व सीला यांना पुढाऱ्यांपुढे आणले. व ते म्हणाले, "हे लोक यहूदी आहेत. आपल्या शहरात ते त्रास देत आहेत. 21आमच्यासाठी ज्या गोष्टी योग्य नाहीत त्या करण्यासाठी ते लोकांना सांगत आहेत. आम्ही रोमी नागरिक आहोत व या गोष्टी आम्ही करणार नाही. 22लोक पौल व सीला यांच्याविरुद्ध होते. मग पुढाऱ्यांनी पौलाचे व सीलाचे कपडे फाडले व लोकांना सांगितले की, त्यांना काठीने मारा. 23लोकांनी पौलाला व सीला यांना पुष्कळ मारले. मग पुढाऱ्यांनी त्या दोघांना तुंरुगात टाकले. पुढाऱ्यांनी तुरुंगाधिकाऱ्याला सांगितले, "फार काळजीपूर्वक यांच्यावर पहारा ठेवा!" 24अधिकाऱ्याने तो खास आदेश मिळाल्यावर पौल व सीला यांना तुरुंगात आत दूरवर ठेवले. त्याने त्यांचे पाय लाकडाच्या ओंडक्यांमध्ये बांधले.

25मध्यरात्रीच्या वेळी पौल व सीला, देवाची गीते गात होते व प्रार्थना करीत होते व इतर कैदी ऐकत होते. 26अचानक मोठा धरणीकंप झाला. तो इतका जबरदस्त होता की त्यामुळे तुरुंगाचे पाये डळमळले. मग तुरूंगाचे सर्व दरवाजे उघडले. सर्व कैद्यांची त्यांच्या साखळदंडातून सुटका झाली. 27तुरुंगाधिकारी जागा झाला. त्याने पाहिले की, तुरुंगाचे दरवाजे उघडे आहेत. त्याला वाटले कैदी अगोदरच पळाले असतील म्हणून अधिकाऱ्याने आपली तरवार काढली, तो स्वत:ला मारणार होता 28इतक्यात पौल ओरडला, "स्वत:ला इजा करून घेऊ नकोस आम्ही सर्व येथेच आहोत!"

29अधिकाऱ्याने कोणाला तरी दिवा आणायला सांगितले. मग तो आतमध्ये पळाला. तो थरथर कापत होता. तो पौल व सीला यांच्यापुढे पडला. 30मग त्यांने त्यांना बाहेर आणले आणि म्हणाला, "पुरुषांनो, माझे तारण व्हावे म्हणून मी काय करावे?"

31ते त्याला म्हणाले, "प्रभु येशूवर विश्वास ठेव आणि तुझे तारण होईल– तुझे व तुझ्या घरात राहणाऱ्या सर्वांचे तारण होईल."

32पौलाने व सीलाने तुरुंगाधिकाऱ्याच्या घरातील सर्वांना व त्यालासुद्धा प्रभूचा संदेश सांगितला. 33त्या वेळी बरीच रात्र झाली होती, पण तुरुंगाधिकाऱ्यांने पौल व सीला यांच्या जखमा धुतल्या. मग अधिकारी व त्याच्या घरातील सर्वांना बाप्तिस्मा झाला. 34नंतर त्याने पौल व सीला यांना घरी नेले व अन्न खावयास दिले. सर्व लोक अतिशय आनंदित झाले होते. कारण ते आता देवावर विश्वास ठेवीत होते.

35दुसऱ्या दिवशी सकाळी पुढाऱ्यांनी काही शिपायांना पाठविले व तुरुंगाधिकाऱ्याला निरोप दिला की, "त्या लोकांना (पौल व सीला) यांना मोकळे सोडा!"

36तुरुंग अधिकारी पौलाला म्हणाला, "पुढाऱ्यांनी या शिपायांना तुम्हाला सोडण्याविषयी सांगितले आहे. तुम्ही आता जाऊ शकता. शांतीने जा."

37परंतु पौल त्या शिपायांना म्हणाला, "तुमच्या पुढाऱ्यांनी आम्ही चूक केली आहे हे सिद्ध केले नाही. परंतु त्यांनी आम्हांला लोकांसमोर मारले व तुरूंगात टाकले. आम्ही रोमी नागरिक आहोत म्हणून आम्हांला अधिकार आहेत. आता पुढाऱ्यांना वाटते की आम्ही गुप्तपणे निघून जावे. नाही! पुढाऱ्यांनी येऊन आम्हांला बाहेर काढले पाहिजे!"

38शिपायांनी पुढाऱ्यांना पौल जे म्हणाला, ते सांगितले. जेव्हा पुढाऱ्यांनी ऐकले की पौल व सीला रोमी नागरिक आहेत, तेव्हा ते घाबरले. 39मग पुढाऱ्यांनी येऊन त्यांची क्षमा मागितली. पुढाऱ्यांनी येऊन त्यांना सोडविले व शहर सोडण्याविषयी सांगितले. 40पण जेव्हा पौल व सीला तुरुंगाबाहेर आले, तेव्हा ते लीदीयाच्या घरी गेले. त्यांनी तेथे काही विश्वासणाऱ्यांना पाहिले. व त्यांना धीर दिला. मग पौल व सीला गेले.

---

**अंगात येत असे** सैतानाचा आत्मा जो विशेष ज्ञान देतो.

## थेस्सलनीका येथे पौल

17 पौल व सीला अंफिपुली व अपुल्लोनिया या प्रदेशांतून प्रवास करीत गेले. ते थेस्सलनीका शहरात आले. त्या शहरात यहूदी लोकांचे सभास्थान होते. [2]यहूदी लोकांना भेटण्यासाठी पौल सभास्थानात गेला. तो असे नेहमीच करीत असे. तीन आठवडे प्रत्येक शब्बाथवारी पवित्र शास्त्राविषयी पौलाने यहूदी लोकांशी चर्चा केली. [3]पौलाने पवित्र शास्त्रातील वचने यहूदी लोकांना स्पष्ट करून सांगितली. त्याने दाखवून दिले की, ख्रिस्ताने मरणे अगत्याचे होते. तसेच त्याचे मरणातून उठणेही अगत्याचे होते. पौल म्हणाला, “हा मनुष्य ‘येशू’ ज्याच्याबद्दल मी तुम्हांला सांगत आहे तो ‘ख्रिस्त’ आहे.” [4]सभास्थानांमध्ये काही ग्रीक लोक होते, जे खऱ्या देवाची उपासना करीत. तेथे काही महत्त्वाच्या स्त्रियाही होत्या. यातील पुष्कळ लोक पौल व सीला यांना जाऊन मिळाले.

[5]पण ज्या यहूदी लोकांनी विश्वास ठेवला नव्हता, ते जळफळू लागले. शहरातून काही दुष्ट माणसांना त्यांनी भाड्याने आणले. त्या दुष्ट माणसांनी आणखी लोकांना जमा केले व शहरात अशांतता निर्माण केली. लोक यासोनाच्या घरी गेले. पौल व सीला यांचा शोध घेत ते गेले. त्या लोकांची अशी इच्छा होती की, पौल व सीला यांना लोकांसमोर आणायचे. [6]पण त्यांना पौल व सीला सापडले नाहीत. म्हणून लोकांनी यासोनाला व आणखी काही दुसऱ्या विश्वासणाऱ्यांना नगराच्या अधिकाऱ्यांपुढे ओढीत नेले. ते मोठ्याने ओरडून म्हणाले, “या लोकांनी जगात सगळीकडे उलथापालथ केली. आणि आता ते येथेसुद्धा आले आहेत! [7]यासोनाने त्यांना आपल्या घरी ठेवले. कैसराच्या* नियमांविरुद्ध हे लोक करतात. ते म्हणत की, आणखी एक राजा आहे. त्याचे नाव येशू आहे.”

[8]शहराच्या अधिकाऱ्यांनी व इतर लोकांनी हे ऐकले. ते खूपच अस्वस्थ झाले. [9]त्यांनी यासोनला व इतर विश्वासणाऱ्यांना दंड भरण्यास सांगितले. मग त्यांनी विश्वासणाऱ्यांना जाऊ दिले.

## पौल व सीला बिरुया येथे जातात

[10]त्याच रात्री विश्वासणाऱ्यांनी पौल व सीला यांना बिरुया नावाच्या दुसऱ्या शहरी पाठविले. बिरुयामध्ये पौल व सीला यहूदी सभास्थानामध्ये गेले. [11]हे यहूदी लोक थेस्सलनीका येथील यहूदी लोकांपेक्षा बरे होते. पौल व सीला यांनी गोष्टी सांगितल्या. त्या गोष्टी त्यांनी आनंदाने ऐकल्या. बिरुया येथील हे यहूदी लोक पवित्र शास्त्राचा दररोज अभ्यास करीत. या गोष्टी खऱ्याच घडल्या आहेत की काय याविषयी जाणून घेण्यास ते उत्सुक होते. [12]यातील पुष्कळ यहूदी लोकांनी विश्वास ठेवला. पुष्कळशा ग्रीक पुरुषांनी व स्त्रियांनी (ज्यांना समाजात महत्त्व होते.) त्यांनीसुद्धा विश्वास ठेवला. [13]परंतु जेव्हा थेस्सलनीका येथील यहूदी लोकांना समजले की पौल बिरुया येथेही देवाचे वचन सांगत आहे, ते बिरुया येथे सुद्धा आले. थेस्सलनीका येथील यहूदी लोकांनी बिरुया येथील लोकांना हैराण केले व त्रास दिला. [14]म्हणून विश्वासणाऱ्यांनी पौलाला ताबडतोब सुमुद्राकडे नेले. पण सीला व तीमथ्य तेथेच राहिले. [15]विश्वासणारे जे पौलाबरोबर गेले होते त्यांनी त्याला अथेनै शहरात आणले. या बांधवांनी पौलचा संदेश जो सीला व तीमथ्यासाठी होता, तो घेऊन ते परत आले. संदेशात असे म्हटले होते, “तुम्हांला शक्य होईल तितक्या लवकर माझ्याकडे या.”

## अथेनै येथे पौल

[16]पौल अथेनै येथे सीला व तीमथ्य यांची वाट पाहत होता. पौलाचे मन अस्वस्थ झाले. कारण त्याने पाहिले की, ते शहर मूर्तींनी भरलेले आहे. [17]सभास्थानामध्ये पौल जे खऱ्या देवाची उपासना करीत अशा यहूदी व ग्रीक लोकांशी बोलला. शहराच्या व्यापार क्षेत्रातील काही लोकांशीही पौल बोलला. पौल दररोज लोकांशी बोलत असे. [18]काही एपिकूरपंथी व स्तोयिक पंथीय तत्त्वज्ञानी मंडळीने त्याच्याशी वाद घातला.

त्यांच्यातील काही म्हणाले, “या माणसाला तो काय बोलत आहे, ते त्याचे त्यालाच कळत नाही. तो काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे?” पौल त्यांना येशूच्या मरणातून पुन्हा उठण्याची सुवार्ता सांगत होता. ते म्हणाले, “असे वाटते की तो आपल्याला दुसऱ्या कोणत्या तरी देवाबद्दल सांगत आहे” [19]त्यांनी पौलाला धरले व अरीयपगाच्या* सभेपुढे नेले. ते म्हणाले, “तुम्ही आम्हांला जी नवी कल्पना शिकवीत आहात ती कृपा करून स्पष्ट करून सांगा. [20]तुम्ही ज्या गोष्टी सांगत आहात त्या आमच्यासाठी नवीन आहेत. यापूर्वी आम्ही हे कधीही ऐकले नाही. या शिकवणीचा अर्थ काय हे आम्हांला जाणून घ्यायचे आहे.” [21](अथेनै येथे राहणारे तसेच त्यांच्यात राहणारे विदेशी लोक नेहमी नव्या कल्पनांविषयी बोलण्यात वेळ घालवित असत).

[22]मग पौल अरीयपगाच्या सभेपुढे उभा राहिला. पौल म्हणाला, “अथेनैच्या लोकांनो, मी पाहत आहे की, सर्व गोष्टींमध्ये तुम्ही फार धार्मिक आहात. [23]मी तुमच्या शहरातून जात होतो आणि ज्यांची तुम्ही उपासना करता ते मी पाहिले. मी एक वेदी पाहिली. त्यावर असे लिहिले होते: ‘अज्ञात देवाला’. तुम्ही अशा देवाची उपासना करता जो तुम्हांला माहीत नाही. याच देवाविषयी मी तुम्हांला सांगत आहे! [24]ज्याने हे सर्व जग व त्यातील सर्व काही

**कैसर** रोमच्या सम्राटाला दिलेले नाव.

**अरीयपगाचीसभा** अथेनै शहरातील पुढाऱ्यांचा महत्त्वाचा गट, ह्या गटातील लोक न्यायाधीशासारखे गणले जातात.

निर्माण केले तोच हा देव आहे. तो जमीन व आकाश यांचा प्रभु आहे. मनुष्यांनी बांधलेल्या मंदिरात तो राहत नाही! 25हा देव जीवन देतो, श्वास देतो व सगळे काही देतो. त्याला जे पाहिजे ते सगळे त्याच्याकडे आहे. 26देवाने एका माणसाला (आदाम) निर्माण करून सुरुवात केली. त्याच्यापासून त्याने वेगवेगळे लोक निर्माण केले. देवाने त्यांना सगळीकडे राहण्यास मुभा दिली. देवाने त्यांना काळ व सीमा ठरवून दिल्या. 27त्यांनी देवाचा शोध करावा अशी त्याची इच्छा होती. कदाचित तो त्यांचा शोध करील व त्यांना तो सापडेल. पण तो आमच्या कोणापासूनही दूर नाही.

28आम्ही त्याच्यासह राहतो आम्ही त्याच्यासह चालतो आम्ही त्याच्यासह आहोत,'

तुमच्यातीलच काही लोकांनी असे लिहिले आहे:

'आम्ही त्याची मुले आहोत'

29आपण देवाची मुले आहोत. म्हणून इतर लोक ज्या प्रकारे समजतात त्या प्रकारचा देव आहे असे आपण मुळीच समजू नये. तो सोने, चांदी, किंवा दगडासारखा नाही. 30भूतकाळात लोक देवाला समजू शकले नाहीत पण देवाने त्याकडे दुर्लक्ष केले. पण आता, जगातील प्रत्येक व्यक्तीला देव सांगतो की, त्याने आपले हृदय व जीवन बदलावे. 31देवाने एक दिवस ठरविलेला आहे, ज्या दिवशी तो जगातील प्रत्येक व्यक्तीला न्याय करील. तो नि:पक्षपाती असेल. हे करण्यासाठी तो एका माणसाचा (येशूचा) वापर करील. देवाने त्याला फार पूर्वीच निवडले आहे. व प्रत्येक माणसाला देवाने हे दाखवून दिले आहे; त्या माणसाला मरणातून पुन्हा उठवून दाखवून दिले आहे!"

32जेव्हा लोकांनी ऐकले की, येशूला मरणातून पुन्हा उठविण्यात आले तेव्हा त्यांच्यातील काही जण हसू लागले. लोक म्हणाले, "आम्ही याविषयी नंतर पुन्हा ऐकू!" 33पौल त्यांच्यापासून निघून गेला. 34पण काही लोकांनी पौलावर विश्वास ठेवला व ते त्याला जाऊन मिळाले. त्यांच्यापैकी एक दिओनुस्य होता. तो अरीयपगा सभेचा सभासद होता. दामारि नावाच्या स्त्रीनेही विश्वास ठेवला. आणखीही काही लोक होते, ज्यांनी विश्वास ठेवला.

## करिंथमध्ये पौल

18 नंतर पौलाने अथेनै शहर सोडले व करिंथ शहरास गेला. 2करिंथमध्ये पौल एका यहूदी मनुष्याला भेटला ज्याचे नाव अक्विल्ला असे होते. तो पंत येथील रहिवासी होता. आपली पत्नी प्रिस्किल्ला हिच्यासह नुकताच तो इटलीहून आला होता. कारण सर्व यहूदी लोकांनी रोम शहर सोडून गेले पाहिजे असा हुकूम क्लौद्य* याने काढला होता. पौल त्यांना (अक्विल्ला व प्रिस्किल्ला) भेटावयास गेला. 3पौलासारखेच ते तंबू बनविणारे होते. तो त्यांच्याबरोबर राहिला व त्यांच्याबरोबर काम करू लागला. 4प्रत्येक शब्बाथवारी पौल सभास्थानात यहूदी लोकांशी व ग्रीक लोकांशी बोलत असे (चर्चा करीत असे) आणि तो यहूदी व ग्रीक लोकांची मने वळविण्याचा प्रयत्न करीत असे.

5जेव्हा सीला व तीमथ्य हे मासेदोनियाहून परत आले, तेव्हा पौल उपदेश करण्यात आपला सर्व वेळ घालवू लागला. येशू हाच ख्रिस्त आहे अशी साक्ष देऊ लागला. 6परंतु यहूदी लोकांनी पौलाला विरोध केला. त्याला ते (यहूदी लोक) वाईट रीतीने बोलले. तेव्हा आपला निषेध दर्शविण्याकरिता पौलाने आपल्या अंगावरील कपडे झटकले. तो यहूदी लोकांना म्हणाला, "जर तुमचे तारण झाले नाही, तर तो तुमचा दोष असेल! तुमचे रक्त तुमच्याच माथी असो! मी जबाबदार नाही. येथून पुढे मी यहूदीतर लोकांकडेच जाईन." 7पौल तेथून निघाला आणि सभास्थानाजवळ राहत असलेल्या तीत युस्त नावाच्या देवाच्या भक्ताच्या घरी गेला. 8त्या सभास्थानाचा क्रिस्प हा पुढारी होता. क्रिस्पने व त्याच्या घरातील सर्वांनी प्रभूवर विश्वास ठेवला. करिंथ येथील पुष्कळ लोकांनी पौलाचे बोलणे ऐकले आणि विश्वास ठेवला. करिंथ येथिल पुष्कळ लोकांनी पौलाचे बोलणे ऐकले आणि विश्वास ठवला आणि त्यांचा बाप्तिस्मा करण्यात आला.

9एके रात्री, प्रभु स्वप्नामध्ये पौलाशी बोलला, "घाबरू नको! बोलत राहा, शांत राहू नको! 10मी तुझ्याबरोबर आहे. कोणीही तुझ्यावर हल्ला करणार नाही व तुला इजा करणार नाही; कारण या शहरात माझे पुष्कळ लोक आहेत." 11म्हणून पौल तेथे दीड वर्षे देवाचे वचन त्या लोकांना शिकवीत राहिला.

## पौलाला गल्लियोपुढे उभे करतात

12जेव्हा गल्लियो अखया प्रांताचा राज्यपाल होता, त्यावेळेस काही यहूदी पौलाविरुद्ध एकत्र आले आणि त्याला न्यायसभेपुढे उभे केले. 13यहूदी लोक म्हणाले, "हा मनुष्य अशा रीतीने लोकांना देवाची उपासना करायला शिकवीत आहे की, जे नियमशास्त्राच्या विरुद्ध आहे."

14पौल काही बोलणार इतक्यात गल्लियो यहूदी लोकांना म्हणाला, "एखादा अपराध किंवा वाईट गोष्ट असती तर तुमचे म्हणणे ऐकून घेणे रास्त ठरले असते. 15परंतु ज्याअर्थी ही बाब शब्द, नावे व तुमच्या नियमशास्त्रातील प्रश्नांशी संबंधित आहे, त्याअर्थी तुम्हीच तुमची समस्या सोडवा. अशा गोष्टींबाबत न्याय करण्यास मी नकार देतो!" 16मग गल्लियोने त्यांना न्यायालयाबाहेर घालवून दिले. 17मग

---

**क्लौद्य** रोमचा सम्राट (इ.स. 41-54)

त्या सर्वांनी यहूदी सभास्थानाचा प्रमुख सोस्थनेस याला मारहाण केली, पण गल्लियोने त्याकडे लक्ष दिले नाही.

### पौल अंत्युखियास परत जातो

18पौल बंधुजनांबरोबर बरेच दिवस राहिला. नंतर तो निघाला, व सूरिया देशाला समुद्रमार्गे गेला. आणि त्याच्याबरोबर प्रिस्किल्ला व अक्विल्ला ही दोघे होती. पौलाने किंख्रिया येथे आपल्या डोक्याचे मुंडण केले. कारण त्याने नवस केला होता. 19मग ते इफिस येथे आले. पौलाने प्रिस्किल्ला व अक्विल्ला यांना तेथे सोडले. तो सभास्थानात गेला आणि यहूदी लोकांबरोबर वादविवाद केला. 20जेव्हा त्यांनी त्याला तेथे आणखी काही वेळ थांबण्यासाठी सांगितले, तेव्हा तो कबूल झाला नाही. 21परंतु जाता जाता तो म्हणाला, “देवाची इच्छा असेल तर मी परत तुमच्याकडे येईन.” मग तो समुद्रमार्गे इफिसहून निघाला.

22जेव्हा तो कैसरीया येथे आला, तेव्हा तो तेथून वर यरुशलेमला गेला. आणि मंडळीला भेटला. मग तो खाली अंत्युखियाला गेला. 23तेथे काही दिवस राहिल्यानंतर तो गेला, आणि गलतिया व फ्रुगिया या प्रदेशातून ठिकठिकाणी प्रवास करीत गेला. त्याने येशूच्या अनुयायांना विश्वासात बळकट केले.

### इफिस व अखया (करिंथ) येथे अपुल्लो

24अपुल्लो नावाचा एक यहूदी होता. तो आलेक्सांद्र येथे जन्मला होता. तो उच्च शिक्षित होता. तो इफिस येथे आला. त्याला पवित्र शास्त्राचे सखोल ज्ञान होते. 25देवाच्या मार्गाचे शिक्षण त्याला देण्यात आले होते. तो आत्म्यात आवेशी असल्यामुळे येशूविषयी अचूकतेने शिकवीत असे व बोलत असे, तरी त्याला फक्त योहानाचा बाप्तिस्माच ठाऊक होता. 26नंतर तो यहूदी लोकांच्या सभास्थानात धैर्याने बोलू लागला. जेव्हा प्रिस्किल्ला व अक्विल्ला यांनी त्याला बोलताना ऐकले, तेव्हा त्यांनी त्याला एका बाजूला घेतले. आणि देवाच्या मार्गाविषयी अधिक अचूक रीतीने त्याला स्पष्ट करून सांगितले. 27अपुल्लोला अखया देशाला जायचे होते, तेव्हा बंधुंनी त्याला उत्तेजन दिले. आणि तेथील येशूच्या अनुयायांना त्याचे स्वागत करण्याविषयी लिहिले. जेव्हा तो पोहोंचला, तेव्हा ज्यांनी कृपेमुळे (येशूवर) विश्वास ठेवला होता, त्यांना त्याने खूप मदत केली. 28जाहीर वादविवादात त्याने यहूदी लोकांना फार जोरदारपणे पराभूत केले. आणि पवित्र शास्त्राच्या आधारे येशू हाच ख्रिस्त आहे हे सिद्ध केले.

### इफिस येथे पौल

19 तेव्हा असे झाले की, अपुल्लो करिंथ येथे असताना पौल निरनिराळ्या भागातून प्रवास करीत इफिस येथे आला. तेथे त्याला येशूचे काही अनुयायी आढळले. 2पौलाने त्यांना विचारले, “जेव्हा तुम्ही विश्वास ठेवला, तेव्हा तुम्हांला पवित्र आत्मा मिळाला काय?”

ते अनुयायी त्याला म्हणाले, “पवित्र आत्मा आहे हे सुद्धा आम्ही ऐकलेले नाही!”

3तो म्हणाला, “मग कसला बाप्तिस्मा तुम्ही घेतला?”

ते म्हणाले, “योहानाचा बाप्तिस्मा.”

4पौल म्हणाला, “योहानाचा बाप्तिस्मा पश्चात्तापाचा होता. त्याने लोकांना सांगितले की, त्याच्यानंतर जो येत आहे, त्याच्यावर लोकांनी विश्वास ठेवावा. तो येणारा म्हणजे येशू होय.”

5जेव्हा त्यांनी हे ऐकले, तेव्हा त्यांनी प्रभु येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला. 6आणि जेव्हा पौलाने त्याचे हात त्यांच्यावर ठेवले, तेव्हा पवित्र आत्मा त्यांच्यावर आला आणि ते निरनिराळ्या भाषा बोलू लागले व भविष्य सांगू लागले. 7या गटात सर्व मिळून बारा पुरुष होते.

8पौल यहूदी सभास्थानात जात असे व तीन महिने धैर्याने बोलत असे, देवाच्या राज्याविषयी चर्चा करीत व यहूदी लोकांचे मन वळवीत असे. 9परंतु त्यांच्यातील काही कठीण मनाचे झाले. व त्यांनी विश्वास ठेवण्यास नकार दिला, आणि देवाच्या मार्गाविषयी वाईट बोलले. मग पौल त्यांच्यातून निघून गेला व शिष्यांनाही त्यांच्यातून वेगळे केले. आणि तुरन्नाच्या शाळेत दररोज त्यांच्याशी चर्चा केली. 10हे असे दोन वर्षे चालले, याचा परिणाम असा झाला की, आशियात राहत असलेल्या सर्व यहूदी व यहूदीतर लोकांपर्यंत प्रभु येशूचे वचन पोहोंचले.

11देवाने पौलाच्या हातून असामान्य चमत्कार घडविले. 12पौलाने वापरलेले रुमाल आणि कपडेही काही लोक नेत असत. लोक या गोष्टी आजारी लोकांवर ठेवीत असत. जेव्हा ते असे करीत तेव्हा आजारी लोक बरे होत आणि दुष्ट आत्मे त्यांना सोडून जात.

13–14काही यहूदी सुद्धा सगळीकडे प्रवास करीत असत व लोकांमधून दुष्ट आत्मे घालवीत असत. ते दुष्ट आत्म्याने पछाडलेल्या व्यक्तिमधून प्रभु येशूच्या नावाने ते आत्मे घालवीत असत. ते म्हणत, “पौल ज्या येशूच्या नावाने घोषणा करतो त्या नावाने मी तुला आज्ञा करतो.” स्किवा नावाच्या यहूदी मुख्य याजकाचे सात पुत्र असे करीत होते.

15परंतु एकदा एक अशुद्ध आत्मा त्यांना म्हणाला, “मी येशूला ओळखतो, पौल मला माहीत आहे, पण तुम्ही कोण आहात?”

16मग ज्याला दुष्ट आत्मा लागला होता त्या मनुष्याने त्यांच्यावर उडी मारली. त्याने त्यांच्यावर सरशी केली व त्यांना पराभूत केले. तेव्हा ते दोघे उघडे व जखमी होऊन घरातून पळाले. 17इफिस येथे राहणाऱ्या सर्व यहूदी व यहूदीतर लोकांना हे समजले. तेव्हा सर्वांना भीति वाटली. आणि लोक प्रभु येशूच्या नावाचा अधिकच आदर करू लागले. 18पुष्कळसे विश्वासणारे पापकबुली देऊ लागले व ज्या वाईट गोष्टी त्यांनी केल्या होत्या, त्या सांगू लागले.

[19]काही विश्वासणाऱ्यांनी जादूची कामे केली होती. या
विश्वासणाऱ्यांनी आपली जादूची पुस्तके सर्व लोकांसमोर
आणली आणि जाळली. त्या पुस्तकांची किंमत पन्नास
हजार चांदीच्या नाण्यांइतकी भरली. [20]अशा रीतीने प्रभूच्या
वचनाचा दूरवर प्रसार झाला व ते फार परिणामकारक
ठरले. [21]या गोष्टी घडल्यानंतर पौलाने मनात ठरविले
की, मासेदोनिया व अखया या प्रांतांतून प्रवास करीत पुढे
यरुशलेमला जायचे. तो म्हणाला, "मी तेथे गेल्यानंतर
मला रोमदेखील पाहिलेच पाहिजे." [22]म्हणून त्याचे दोन
मदतनीस तीमथ्य व एरास्त यांना त्याने मासेदोनियाला
पाठवून दिले. आणि त्याने आणखी काही काळ आशियात
घालविला.

### इफिस येथे दंगा

[23]या काळामध्ये त्या मार्गाविषयी (ख्रिस्ती चळवळीविषयी)
मोठा गोंधळ उडाला. [24]देमेत्रिय नावाचा एक मनुष्य होता.
तो सोनार होता. तो अर्तमी देवीचे देव्हारे बनवीत असे. जे
कारागीर होते त्यांना यामुळे खूप पैसे मिळत. [25]त्या सर्वांना
व या धंद्याशी संबंध असलेल्या सर्वांना त्याने एकत्र केले.
आणि तो म्हणाला, "लोकहो, तुम्हांला माहीत आहे की,
या धंद्यापासून आपल्याला चांगला पैसा मिळतो. [26]पण
पहा तो पौल नावाचा मनुष्य काय करीत आहे! तो काय
म्हणत आहे ते ऐका! पौलाने पुष्कळ लोकांना प्रभावित
केले आहे व बदलले आहे. त्याने हे इफिसमध्ये व सगळ्या
आशियामध्ये केले आहे. तो म्हणतो, माणसांच्या हातून
बनविलेले देव खरे देव नाहीत. [27]यामुळे केवळ आपल्या
धंद्याची बदनामी होण्याची भीति नसून अर्तमी या महान
देवीच्या मंदिराचे महत्त्व नाहीसे होईल व तिचे मोठेपण
नाहीसे होण्याची भीति आहे. ही अशी देवी आहे की,
जिची पूजा सर्व आशियात व जगात केली जाते."

[28]जेव्हा त्यांनी हे ऐकले तेव्हा ते फार रागावले. आणि
मोठ्याने ओरडून म्हणू लागले, "इफिसकरांची अर्तमी
थोर आहे!" [29]शहरातील लोकांमध्ये गोंधळ उडाला. आणि
लोकांनी गायस व अरीस्तार्ख या पौलाबरोबर सोबती म्हणून
प्रवास करणाऱ्या मासेदोनियाच्या रहिवाश्यांना पकडून
नाट्यगृहात नेले. [30]पौल लोकांच्या पुढे जाऊ इच्छीत होता
पण येशूचे अनुयायी त्याला असे करू देईनात [31]पौलाचे
काही मित्र जे प्रांताधिकारी होते, त्यांनी निरोप पाठवून
त्याने नाट्यगृहात जाऊ नये अशी कळकळीची विनंति
केली. [32]एकत्र जमलेल्या जमावातून काही लोक एक
घोषणा करू लागले तर दुसरे लोक इतर घोषणा करू
लागले. त्यामुळे सगळा जमाव अगदी गोंधळून गेला. आणि
त्यातील पुष्कळ जणांना माहीत नव्हते की, आपण या
नाट्यभवनात एकत्र का आलोत. [33]यहूदी लोकांनी
अलेक्सांद्र नावाच्या एका मनुष्याला ढकलीत नेऊन
सर्वांच्या समोर उभे केले. तो आपल्या हातांनी खुणावून
त्यांना समजावण्याचा प्रयत्न करू लागला. [34]पण जेव्हा
लोकांना समजले की, तो एक यहूदी आहे, तेव्हा जवळ
जवळ दोन तास सातत्याने ते एका आवाजात ओरडत
राहिले, "इफिसकरांची अर्तमी देवी थोर आहे!"

[35]शहराचा लेखनिक लोकांना शांत करीत म्हणाला,
"इफिसच्या लोकांनो, थोर अर्तमी देवीचे व स्वर्गातून
पडलेल्या पवित्र दगडाचे इफिस हे रक्षणकर्ते आहे. हे
ज्याला माहीत नाही असा एक तरी माणूस जगात आहे
काय? [36]ज्याअर्थी या गोष्टी नाकारता येत नाहीत त्याअर्थी
तुम्ही शांत राहिलेच पाहिजे. उतावळेपणा करू नये. [37]तुम्ही
या दोघांना (गायस व अरिस्तार्ख) येथे घेऊन आलात.
वस्तुत: त्यांनी मंदिरातील कशाचीही चोरी केली नाही
किंवा आपल्या देवीची निंदा केलेली नाही. [38]जर देमेत्रिय
व त्याच्याबरोबर असलेल्या कारागिरांच्या काही तक्रारी
असतील, तर त्यासाठी न्यायालये उघडी आहेत. तेथे ते
एकमेकांवर आरोप करू शकतात! [39]परंतु जर तुम्हांला
एखाद्या गोष्टीची चौकशी करायची असेल तर नियमित
सभेत त्यासंबंधी विचार केला जाईल. [40]आज येथे जे
काही घडलेले आहे, त्याबद्दल योग्य ते कारण आपणांस
सांगता येणार नाही, त्यामुळे आपणच ही दंगल सुरू केली
असा आरोप आपल्यावर केला जाण्याची भीति आहे."
[41]असे सांगून झाल्यानंतर त्याने जमावाला जाण्यास
सांगितले.

### पौल मासेदोनिया व ग्रीसला जातो

20 जेव्हा गोंधळ थांबला, तेव्हा पौलाने येशूच्या
अनुयायांना भेटायला बोलाविले आणि त्यांना
उत्तेजन दिल्यानंतर त्यांचा निरोप घेतला. आणि तो
मासेदोनियाला निघाला. [2]मासेदोनियातून जात असताना
निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या येशूच्या अनुयायांना
त्याने अनेक गोष्टी सांगून धीर दिला. मग पौल ग्रीसला
आला. [3]त्या ठिकाणी तो तीन महिने राहिला. पौल सूरियाला
समुद्रमार्गे निघाला असता, यहूदी लोकांनी त्याच्याविरुद्ध
कट रचला. हे पाहून त्याने मासेदोनियातून परत फिरण्याचे
ठरविले. [4]त्याच्याबरोबर काही लोक होते ते असे: बिरुया
शहराच्या पुर्राचा मुलगा सोपत्र, थेस्सलनीका येथील
अरिस्तार्ख व सकुंद, दर्बे येथील गायस आणि तीमथ्य,
तुखिक व त्रफिम हे आशिया प्रांतातील होते. [5]ही माणसे
आमच्यापुढे गेली व त्रोवस येथे आमची वाट पाहू लागली.
[6]बेखमीर भाकरीच्या यहूदी सणानंतर आम्ही फिलीप्पै
येथून समुद्रमार्गे निघालो आणि पाच दिवसांनी त्रोवस येथे
त्यांना जाऊन भेटलो व तेथे सात दिवस राहिलो.

### पौलाची त्रोवसला शेवटची भेट

[7]मग आठवड्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे रविवारी
आम्ही सर्व भाकर मोडण्यासाठी* एकत्र जमलो असताना,

---

**भाकर मोडणे** याचा सरळ अर्थ जेवण करणे असा होतो. परंतु
येथे त्याचा अर्थ प्रभुच्या भोजनामध्ये सहभागी होणे असा होतो.

पौल त्यांच्याबरोबर बोलू लागला कारण दुसऱ्या दिवशी
निघण्याचा त्याचा बेत होता. तो मध्यरात्रीपर्यंत बोलत
राहिला. 8वरच्या मजल्यावरील ज्या खोलीत आम्ही जमा
झालो होतो तेथे पुष्कळ दिवे होते. 9युतुख नावाचा एक
तरुण खिडकीत बसला होता. पौल बोलत असताना
त्याच्यावर झोपेचा इतका अंमल चढला की, तो तिसऱ्या
मजल्यावरून खाली पडला. जेव्हा त्याला उचलले, तेव्हा
तो मेलेला आढळला. 10पौल खाली गेला व त्याच्यावर
ओणवा पडला आणि त्याला आपल्या हातांनी कवेत धरून
म्हणाला, "चिंता करू नका! त्याच्यात अजून जीव आहे."
11मग पौल वर गेला. त्यांने भाकर मोडली व ती खाल्ली.
पहाट होईपर्यंत तो त्यांच्याशी बोलला. मग तो गेला. 12त्या
तरुणाला त्यांनी जिवंत असे घरी नेले. त्या सर्वांना फार
समाधान झाले.

### त्रोवसापासून मिलेतापर्यंत प्रवास

13तेथून आम्ही पुढे निघालो व अस्सा या नगरी समुद्रमार्गे
निघालो. तेथे आम्ही पौलाला घेणार होतो. त्यानेच अशा
प्रकारे योजना केली होती, ती म्हणजे त्याने स्वत: पायी
जायचे. 14जेव्हा आम्हांला तो अस्सा येथे भेटला, तेव्हा
आम्ही त्याला जहाजात घेतले. आणि आम्ही मितुलेनाला
गेलो. 15दुसऱ्या दिवशी आम्ही जहाजाने मितुलेनाहून
निघालो व खियासमोर आलो. मग दुसऱ्या दिवशी सामा
बेट ओलांडले आणि एक दिवसानंतर मिलेतला आलो.
16कारण पौलाने ठरविले होते की इफिस येथे थांबायचे
नाही. आशियात त्याला जास्त वेळ थांबायचे नव्हते. तो
घाई करीत होता कारण शक्य झाल्यास पन्नासाव्या
दिवसाच्या सणासाठी त्याला यरुशलेम येथे राहावयास हवे
होते.

### पौल इफिस येथील वडीलजनांशी बोलतो

17मिलेताहून इफिस येथे निरोप पाठवून पौलाने तेथील
मंडळीच्या वडीलजनांना बोलावून घेतले. 18जेव्हा ते आले,
तेव्हा तो त्यांना म्हणाला, "आशियात आलो त्या दिवसापासून
मी तुमच्या सोबत असताना कसा राहिलो हे तुम्हांला
माहीत आहे. 19मी प्रभूची सेवा पूर्ण नम्रतेने व रडून
केली. यहूदी लोकांनी केलेल्या कटामुळे निर्माण झालेल्या
उपद्रवांना तोंड देत मी त्याची सेवा केली. 20जे काही
तुमच्या चांगल्यासाठी होते ते तुम्हांला सांगण्यासाठी
कोणतीही कसर ठेवली नाही, हे तुम्हांला माहीत आहे.
आणि या गोष्टी जाहीरपणे व घराघरातून सांगण्यासाठी मी
कधीही मागेपुढे पाहिले नाही. 21पश्चात्ताप करून देवाकडे
वळण्याविषयी आणि आपल्या प्रभु येशूवरील
विश्वासाविषयी यहूदी व ग्रीक लोकांना सारखीच साक्ष
दिली. 22आणि आता आत्म्याच्या आज्ञेने यरुशलेमला
चाललो आहे, आणि तेथे माझ्याबाबतीत काय घडेल हे
माहीत नाही. 23मला फक्त एकच गोष्ट माहीत आहे की
प्रत्येक शहरात पवित्र आत्मा मला सावध करतो. तुरुंगवास
व संकटे माझी वाट पाहत आहेत हे तो मला सांगतो 24मी
माझ्या जीवनाविषयी काळजी करीत नाही. सर्वांत महत्त्वाची
गोष्ट म्हणजे मी माझे काम पूर्ण करणे. प्रभु येशूने जे
काम मला दिले ते मला पूर्ण करायला पाहिजे– ते काम
म्हणजे– देवाच्या कृपेबद्दल (दयाळूपणाबद्दल) ची सुवार्ता
लोकांना सांगितली पाहिजे.

25"राज्याची घोषणा करीत ज्या लोकांत मी फिरलो
त्या तुम्हांतील कोणालाही मी पुन्हा कधीही दिसणार नाही
हे आता मला माहीत आहे. 26म्हणून मी तुम्हांला जाहीरपणे
सांगतो की, सर्वांच्या रक्तासंबंधाने मी निर्दोष असा आहे.
27देवाची संपूर्ण इच्छा काय आहे हे प्रगट करण्यास मी
कधीही मागेपुढे पाहिलेले नाही. 28तुमची स्वत:ची व देवाच्या
सर्व लोकांची, ज्यांना देवाने तुम्हांला दिलेले आहे, त्यांची
काळजी घ्या. कळपाची (देवाच्या लोकांची) काळजी
घेण्याचे काम पवित्र आत्म्याने तुम्हांला दिलेले आहे. तुम्ही
मंडळीसाठी मेंढपाळासारखे असले पाहिजे. ही मंडळी देवाने
स्वत:चे रक्त देऊन विकत घेतली. 29मला माहीत आहे
की, मी गेल्यावर तुमच्यामध्ये भयंकर असे दुष्ट लांडगे
येतील. ते कळपाला सोडणार नाहीत. 30तुमच्यामधूनसुद्धा
लोक उठतील. चुकीचे असे तुम्हांला शिकवून आपल्या
मागे घेऊन जातील.

31यासाठी सावध राहा. तुम्हांतील प्रत्येकाला गेले तीन
वर्षे डोळ्यांत अश्रु आणून सावध करण्याचे मी कधीच
थांबविले नाही हे आठवा. 32आणि आता मी तुम्हांला
देवाच्या व वचनाच्या कृपेच्या अधीन करतो. जी तुमची
वाढ करण्यासाठी समर्थ आहे. व सर्व पवित्र केलेल्यांमध्ये
वतन द्यावयाला समर्थ आहे. 33मी कोणाच्याही सोन्याचा,
चांदीचा व कपड्यांचा लोभ धरला नाही. 34मी आपल्या
स्वत:च्या व माझ्याबरोबर राहणाऱ्यांच्या गरजा माझ्या
हातांनी भागविल्या हे तुम्हांला चांगले माहीत आहे. 35अशा
रीतीने मी तुम्हास उदाहरण घालून दिले आहे की जे
दुर्बल आहेत अशांना आपण स्वत: मेहनत करून मदत
केली पाहिजे. व प्रभु येशूचे शब्द लक्षात ठेवले पाहिजेत.
तो स्वत: म्हणाला, 'घेण्यापेक्षा देणे अधिक आशीर्वादाचे
असते.'"

36आणि हे बोलल्यावर पौलाने गुडघे टेकले आणि
प्रार्थना केली. 37तेव्हा प्रत्येकाला खूपच रडू आले. ते
पौलाच्या गळ्यात पडले व त्याचे मुके घेत राहिले. 38ते
पुन्हा त्याला कधीही पाहू शकणार नाहीत, या वाक्याने
त्यांना फार दु:ख झाले. मग ते त्याला जहाजापर्यंत निरोप
देण्यास गेले.

### पौल यरुशलेमला जातो

21 त्यांचा निरोप घेतल्यानंतर आम्ही समुद्रमार्गे
निघालो. आणि सरळ प्रवास करीत कोस येथे

आलो. दुसऱ्या दिवशी आम्ही रुदास गेलो. तेथून आम्ही
पातरा येथे गेलो. 2तेथे फेनीकेला जाणारे जहाज आम्हांला
आढळले. तेव्हा आम्ही जहाजात बसून पुढे निघालो. 3तेव्हा
कुप्र आमच्या नजरेत आले. परंतु ते डाव्या अंगाला टाकून
आम्ही थेट सूरीया देशाला रवाना झालो व सोर येथे
उतरलो. कारण तेथे जहाजातील माल उतरावयाचा होता.
4तेथे येशूचे काही शिष्य आम्हाला आढळले. आणि आम्ही
त्यांच्याबरोबर सात दिवस राहिलो. पवित्र आत्म्याच्या
सूचनेवरून त्यांनी पौलाला असे सांगितले की, त्याने
यरुशलेमला जाऊ नये 5आमच्या भेटीचे दिवस संपत
आल्यावर आम्ही तेथून निघून आमचा पुढील प्रवास परत
सुरू केला. त्यावेळी तेथील बंधुजन आपल्या पत्नी,
मुलांच्याबरोबर आमच्यासह शहराबाहेर आले व तेथील
समुद्रकिनाऱ्यावर आम्ही गुडघे टेकले व प्रार्थना केली.
6मग एकमेकांचा निरोप घेऊन आम्ही जहाजात बसलो व
ते लोक आपापल्या घरी गेले.

7सोर पासून आम्ही आमचा प्रवास सुरू केला व पोलेमा
येथे उतरलो. आणि तेथील बंधुवर्गास भेटलो. त्यांच्याबरोबर
एक दिवस राहिलो. 8आणि दुसऱ्या दिवशी निघून आम्ही
कैसरीयास आलो व सुवार्तिक फिलिप्प याच्या घरी जाऊन
राहिलो. तो निवडलेल्या सात सेवकांपैकी* एक होता.
9त्याला चार मुली होत्या. त्यांची लग्ने झालेली नव्हती. या
मुलींना देवाच्या गोष्टी (भविष्याविषयीचे) सांगण्याचे दान
होते. 10त्या बंधूच्या बरोबर बरेच दिवस राहिल्यावर अगब
नावाचा संदेष्टा यहूदीयाहून तेथे आला. 11त्याने आमची
भेट घेऊन पौलाच्या कमरेचा पट्टा मागून घेतला. त्याने
स्वत:चे हात व पाय बांधले आणि तो म्हणाला, "पवित्र
आत्मा असे महणतो: हा पट्टा ज्या मनुष्याच्या कमरेचा
आहे, त्याला यरुशलेमा येथील यहूदी लोक असेच बांधतील
व यहूदीतरांच्या हाती देतील."

12आम्ही व तेथील सर्वांनी ते शब्द ऐकले. तेव्हा आम्ही
व इतर लोकांनी पौलाला कळकळीची विनंति केली की,
त्याने यरुशलेमला जाऊ नये. 13पण पौल म्हणाला, "तुम्ही
हे काय करीत आहा, असे रडून तुम्ही मला हळवे बनवीत
आहात काय? मी फक्त बांधून घेण्यासाठीच नव्हे तर प्रभु
येशूच्या नावासाठी यरुशलेममध्ये मरायलादेखील तयार
आहे."

14यरुशलेमापासून दूर राहण्यासाठी आम्ही त्याचे मन
वळवू शकलो नाही. म्हणून आम्ही त्याला विनंति करायची
सोडली आणि म्हटले, "प्रभूच्या इच्छेप्रमाणे होवो."

15त्यानंतर आम्ही तयार झालो आणि यरुशलेमला
निघालो. 16कैसरीया येथील येशूचे काही शिष्य
आमच्याबरोबर आले आणि आम्हांला म्नासोनकडे घेऊन
गेले. कारण त्याच्याकडेच आम्ही राहणार होतो. तो
(म्नासोन) कुप्रचा होता. तो सुरुवातीच्या काळात प्रथम
शिष्य झालेल्यांपैकी एक होता.

## पौल याकोबाची भेट घेतो

17आम्ही जेव्हा यरुशलेमला पोहोंचलो, तेव्हा तेथील
बंधुजनांनी मोठ्या आनंदाने आमचे स्वागत केले. 18दुसऱ्या
दिवशी पौल आमच्यासह याकोबाला भेटायला आला. तेव्हा
सर्व वडीलजन हजर होते. 19पौल त्यांना भेटला. नंतर
त्याच्या हातून देवाने यहूदीतर लोकांत कशीकशी सेवा
करून घेतली, याविषयी क्रमवार सविस्तर माहिती
सांगितली. 20जेव्हा त्यांनी हे ऐकले तेव्हा त्यांनी देवाचा
गौरव केला. आणि ते त्याला म्हणाले, "बंधु, तू पाहशील
की हजारो यहूदी विश्वासणारे झालेत. पण त्यांना असे
वाटते की, मोशेचे नियम पाळणे फार महत्त्वाचे आहे.
21या यहूदी लोकांनी तुझ्याविषयी ऐकले आहे की, जे
यहूदी इतर देशांत राहतात त्यांना तू मोशेचे नियम पाळू
नका असे सांगतोस. तसेच आपल्या मुलांची सुंता करू
नका असे सांगतो व आपल्या चालीरीति पाळू नका असे
सांगतो. 22मग आता काय केले पाहिजे? तू येथे आला
आहेस हे त्यांना नक्की कळेल.

23तेव्हा आता आम्ही सांगतो तसे कर: आमच्यातील
चार लोकांनी नवस केला आहे. 24त्या चौघांना घे व
स्वत:चे त्यांच्यासह शुद्धीकरण करून घे. त्या चौघांना
त्यांच्या डोक्याचे मुंडण करता यावे म्हणून त्यांचा खर्च तू
कर. मग सर्वांना हे समजेल की, त्यांनी जे काही तुझ्याबद्दल
ऐकले आहे ते खरे नाही, उलट तू नियमशास्त्राचे पालन
करतोस हे दिसेल.

25जे विदेशी विश्वासणारे आहेत त्यांना आम्ही पत्र लिहिले
आहे. ते असे

'मूर्तीला वाहिलेले अन्न त्यांनी खाऊ नये.
रक्त अगर गुदमरून मारलेले प्राणी
त्यांनी खाऊ नयेत
अनैतिक कृत्ये करू नयेत.'"

26मग पौलानेच त्या चार लोकांना आपल्याबरोबर घेतले.
दुसऱ्या दिवशी शुद्धीकरणाच्या विधीमध्ये तो सहभागी
झाला. मग तो मंदिरात गेला. शुद्धीकरणाचे दिवस केव्हा
संपतील हे जाहीर केले. शेवटच्या दिवशी प्रत्येकासाठी
अर्पण देण्यात येईल.

27सात दिवस जवळ जवळ संपत आले होते. परंतु
आशियातील काही यहूदी लोकांनी पौलाला मंदिरात पाहिले.
त्यांनी लोकांना भडकाविले व त्याला (पौलाला) धरले.
28ते मोठ्याने ओरडून म्हणाले, "इस्राएलच्या लोकांनो,
मदत करा! हाच तो मनुष्य आहे, जो सर्व लोकांना सगळीकडे
आपल्या लोकांविरुद्ध, आपल्या नियमांविरुद्ध व या
जागेबद्दल शिकवीत आहे, आणि आता त्याने विदेशी
लोकांना देखील मंदिरात आणले आहे, आणि ही पवित्र

---

**सेवक** सात लोक ज्यांची खास कामाकरिता नेमणूक झाली होती. (प्रे. कृ. 6:1-6)

जागा विटाळविली आहे.” 29ते असे म्हणाले, कारण
इफिसच्या त्रफिमला त्यांनी पौलाबरोबर यरुशलेम येथे
पाहिले होते. त्रफिम यहूदी नव्हता, तो ग्रीक होता. लोकांना
वाटले, पौलानेच त्याला मंदिरात नेले आहे.

30सर्व शहर खवळून उठले. सगळे लोक धावू लागले.
त्यांनी पौलाला पकडले व मंदिरातून बाहेर ओढून काढले.
लगेच दारे बंद करण्यात आली. 31ते त्याला ठार मारण्याचा
प्रयत्न करीत असतानाच रोमी सैन्याच्या सरदाराकडे बातमी
गेली की, शहरात सगळीकडे गोंधळ उडालेला आहे.
32ताबडतोब त्याने काही शिपाई व काही शताधिपती घेतले.
व तो यहूदी जेथे पौलाला मारीत होते, तेथे धावत गेला.
जेव्हा यहूदी लोकांनी रोमी सरदाराला व सैन्याला पाहिले
तेव्हा त्यांनी पौलाला मारण्याचे थांबविले. 33मग सरदार
पौलाकडे आला व त्याला अटक केली व त्याला
साखळदंडानी बांधण्याचा आदेश दिला. मग सरदाराने पौल
कोण आहे व त्याने काय केले आहे याविषयी विचारले.
34गर्दीतून वेगवेगळ्या प्रकारचे आवाज ऐकू येऊ लागले.
गोंधळामुळे व ओरडण्यामुळे सरदाराला सत्य काय आहे
हे जाणून घेता येईना. म्हणून सरदाराने शिपायांना हुकूम
दिला की, पौलाला इमारतीत घेऊन जावे. 35जेव्हा पौल
इमारतीच्या पायऱ्यांजवळ आला तेव्हा शिपायांना त्याला
उचलून आत न्यावे लागले. 36कारण जमाव हिंसक बनत
चालला होता. जमाव त्याच्यामागे चालला होता व ओरडत
होता, “त्याला जिवे मारा!”

37शिपाई पौलाला इमारतीत घेऊन जाणार इतक्यात
पौल सरदाराला म्हणाला, “मी काही बोलू शकतो काय?”
तो सरदार म्हणाला, “तुला ग्रीक बोलता येते काय? 38मग
मला वाटते, तो मनुष्य तू नाहीस. मला वाटले इजिप्तच्या
ज्या मजुराने काही दिवसांपूर्वी बंड करून सरकारला
त्रास देण्याचा प्रयत्न केला, तोच तू आहेस. त्या इजिप्तच्या
मनुष्यांने चार हजार दहशतवाद्यांना अरण्यात नेले.”

39पौल म्हणाला, “किलकिया प्रांतातील तार्सस नगरात
राहणारा मी एक यहूदी आहे. मी एका महत्त्वाच्या शहराचा
नागरिक आहे. मी तुम्हांला विनवितो, मला लोकांशी
बोलू द्या.”

40जेव्हा सरदाराने त्याला बोलण्याची परवानगी दिली
तेव्हा तो पायऱ्यांवर उभा राहिला आणि आपल्या हाताने
त्याने लोकांना शांत राहण्यास सांगितले. जेव्हा सगळीकडे
शांतता पसरली तेव्हा पौल हिब्रू भाषेत बोलू लागला:

## पौल लोकांसमोर भाषण करतो

22 “बंधूनो व वडीलजनांनो, “मी माझ्या बचावासाठी
जे काही सांगतो ते ऐका.” 2जेव्हा लोकांनी
पौलाला हिब्रू भाषेत बोलताना ऐकले तेव्हा ते अधिकच
शांत झाले. पौल म्हणाला, 3“मी एक यहूदी आहे. आणि
किलिकीया प्रांतातील तार्स येथे माझा जन्म झाला. परंतु
याच शहरात मा लहानाचा मोठा झालो. आपल्या पूर्वजांच्या
नियमांचे सविस्तर शिक्षण मी गमालीएल यांच्या पायाजवळ
बसून घेतले. जसे तुम्ही आज देवाविषयीच्या आवेशाने
भरलेले आहात तसाच मी देखील देवाविषयीच्या आवेशाने
भरलेला होतो. 4या मार्गाचा (ख्रिस्ती चळवळीचा) पुरस्कार
करणाऱ्यांचा मी त्यांच्या मरणापर्यंत छळ केला. मी स्त्री
व पुरुषांना अटक करून तुरुंगात टाकले. 5याची मुख्य
याजक व धर्मसभेचे सर्व वडीलजन साक्ष देतील.
त्यांच्याकडून दिमिष्कातील त्यांच्या बंधुजनांच्या नावाने
मी पत्रे घेतली. आणि तेथे ह्या मार्गाचे (ख्रिस्ती) जे लोक
होते, त्यांना कैदी म्हणून यरुशलेमास घेऊन येणार होतो,
यासाठी की त्यांना शिक्षा व्हावी.

## पौल त्याचा पालट कसा झाला हे सांगतो

6“तेव्हा असे झाले की, मी प्रवास करीत दिमिष्क
शहराजवळ आलो असताना दुपारच्या वेळी माझ्याभोवती
आकाशातून लख्ख प्रकाश पडला. 7मी जमिनीवर पडलो.
आणि मी एक वाणी माझ्याशी बोलताना ऐकली. ‘शौला,
शौला, माझा छळ तू का करतोस? 8मी उत्तर दिले, ‘प्रभु,
तू कोण आहेस?’ तो मला म्हणाला, ‘तू ज्याचा छळ करीत
आहेस तो नासरेथचा येशू मी आहे.’ 9जे माझ्याबरोबर
होते त्यांनी प्रकाश पाहिला, पण जो आवाज माझ्याशी
बोलत होता तो त्यांना ऐकू आला नाही. 10मी म्हणालो,
‘प्रभु मी काय करु?’ आणि प्रभु मला म्हणाला, ‘ऊठ
आणि दिमिष्कात जा. तेथे तुला जे काम नेमून देण्यात
आले आहे ते सांगण्यात येईल. 11त्या प्रकाशामुळे मला
काही दिसेनासे झाले. तेव्हा माझ्या सोबत्यांनी मला हाताला
धरून नेले आणि मी दिमिष्कला पोहोंचलो.

12“नियमशास्त्राचे भक्तिभावाने पालन करणारा हनन्या
नावाचा एक मनुष्य होता. तेथे राहणारे सर्व यहूदी
त्याच्याबद्दल चांगले बोलत. 13तो माझ्याकडे आला, आणि
माझ्याजवळ उभा राहून तो म्हणाला, ‘बंधु शौल, तू पुन्हा
पाहू लागशील!’ आणि त्याच घटकेला मला दिसू लागले.
14तो म्हणाला, ‘आपल्या पूर्वजांच्या (वाडवडिलांच्या) देवाने
तुला निवडले आहे. यासाठी की त्याची इच्छा तुला कळावी.
त्या धार्मिकाला तू पहावेस. आणि त्याच्या तोंडचे शब्द
तुला ऐकायला मिळावेत. 15कारण तू जे काही पाहिलेस
आणि ऐकलेस, याविषयी तू त्याचा सर्वांसमोर साक्षीदार
होशील. 16मग आता, कशाची वाट पाहतोस? ऊठ, आणि
बाप्तिस्मा घे व तुझी पापे धुवून टाक. येशूवर विश्वास
ठेवून हे कर.’

17“मग असे झाले की, जेव्हा मी यरुशलेमला परत
आलो, आणि मंदिरात प्रार्थना करीत होतो, तेव्हा मला
दृष्टान्त झाला. 18मी येशूला पाहिले, आणि येशू मला
म्हणाला, ‘घाई कर! यरुशलेम ताबडतोब सोड! येथील
लोक माझ्याविषयीचे सत्य स्वीकारणार नाहीत.’ 19पण
मी म्हणालो, ‘प्रभु जे लोक तुझ्यावर विश्वास ठेवीत होते,
त्यांना अटक करून मारण्यासाठी मी जात असे, हे या

लोकांना माहीत आहे. 20आणि जेव्हा तुझा साक्षीदार स्तेफन याचे रक्त सांडले तेव्हा तेथे उभा राहून मी त्याला संमति दर्शवीत होतो. आणि ज्या लोकांनी स्तेफनाला मारले त्यांचे कपडे मी राखीत होतो.' 21तेव्हा प्रभु मला म्हणाला, 'जा! मी तुला दूरवरच्या यहूदीतर विदेशी लोकांकडे पाठवीन.'"

22येथपर्यंत यहूदी लोकांनी पौलाचे बोलणे ऐकले मग ते मोठमोठ्याने ओरडून म्हणू लागले, "अशा मनुष्याला पृथ्वीवरून नाहीसे केले पाहिजे! तो जिवंत राहण्याच्या लायकीचा नाही!" 23ते मोठमोठ्याने ओरडत होते, आपल्या अंगावरील कपडे काढून फेकीत होते, आणि हवेत धूळ उधळीत होते. हे पाहून सरदाराने पौलाला किल्ल्यात नेण्याची आज्ञा केली. 24त्याने शिपायांना सांगितले, पौलाला चाबकाने मारा. अशा प्रकारे हे लोक पौलाविरुद्ध का ओरड करीत आहेत हे सरादाराला जाणून घ्यायचे होते. 25परंतु जेव्हा पौलाला चाबकाने मारण्यासाठी बाहेर काढले. तेव्हा पौल जवळ उभ्या असलेल्या शताधिपतीला म्हणाला, "ज्याच्यामध्ये काही अपराध आढळत नाही अशा रोमी नागरिकाला तुमचे हे चाबकाचे मारणे कायदेशीर ठरते काय?"

26जेव्हा शताधिपतीने हे ऐकले तेव्हा तो सरदाराकडे गेला आणि म्हणाला, "तुम्ही काय करीत आहात? तो मनुष्य तर रोमी नागरिक आहे." 27सरदार पौलाकडे आला व म्हणाला, "मला सांग, तू रोमी नागरिक आहेस काय?" पौल म्हणाला, "होय."

28शताधिपती म्हणाला, "रोमी नागरिकत्व मिळविण्यासाठी मला पुष्कळ पैसे द्यावे लागले."

पौल म्हणाला, "मी जन्मत:च रोमी नागरिक आहे."

29जे लोक त्याला प्रश्न विचारणार होते, ते ताबडतोब मागे सरकले. सरदार घाबरला, कारण त्याने पौलाला बांधले होते, व पौल हा रोमी नागरिक होता. त्यामुळे तो घाबरला.

## पौल यहूदी पुढाऱ्यांशी बोलतो

30दुसऱ्या दिवशी यहूदी लोक पौलावर नेमके कशामुळे दोष ठेवीत होते हे समजून घेण्यासाठी सरदाराने त्याला मोकळे सोडले. मग त्याने मुख्य याजक व धर्मसभेचे सभासद यांना एकत्र जमण्याची आज्ञा केली. मग त्याने पौलाला आणून त्यांच्यापुढे उभे केले.

23 पौल यहूदी धर्मसभेच्या सभासदांकडे रोखून पाहत म्हणाला, "माझ्या बंधूनो, मी आजपर्यंत चांगला विवेकभाव बाळगून देवासमोर माझे जीवन जगत आलो आहे." 2तेव्हा मुख्य याजक हनन्या याने पौलाच्या जवळ उभे राहिलेल्यांना पौलाच्या थोबाडीत मारण्यास सांगितले. 3पौल हनन्याला म्हणाला, "सफेती लावलेल्या भिंतीसारख्या माणसा, देव तुला मारील! त्या ठिकाणी बसून नियमशास्त्राप्रमाणे माझा न्याय करतो आणि तरीही नियमशास्त्राच्या विरुद्ध मला थोबाडीत मारण्याचा आदेश देतोस?" 4जे लोक पौलाच्या जवळ उभे होते ते म्हणाले, "देवाच्या मुख्य याजकाविरुद्ध तू असे बोलू शकत नाहीस. तू त्याचा अपमान करतोस काय?"

5पौल म्हणाला, "बंधूनो, तो मनुष्य मुख्य याजक आहे हे मला माहीत नव्हते. कारण असे लिहिले आहे की, 'तू आपल्या शासन करणाऱ्याविरुद्ध बोलू नकोस.'"*

6जेव्हा पौलाच्या लक्षात आले की, धर्मसभेतील एक गट सदूकी आहे तर दुसरा परूशी. तेव्हा पौल मोठ्याने ओरडून सर्व धर्मसभेपुढे म्हणाला, "बंधूनो, मी एक परुशी आहे, परूश्याचा मुलगा आहे! मेलेल्यांच्या पुन्हा उठण्यासंबंधी माझी जी आशा आहे, त्यामुळे माझ्यावर हा चौकशीचा प्रसंग आला आहे."

7पौलाने असे म्हणताच, परूशी व सदूकी या दोन गटांमध्ये कलह सुरू झाला. आणि धर्मसभेत फूट पडली. 8(सदूकी असे म्हणतात की, मृतांचे पुनरुत्थान नाही आणि देवदूत व आत्मे नसतात, परूशी दोन्हीवर विश्वास ठेवतात.) 9सर्व यहूदी मोठमोठ्याने ओरडून बोलू लागले. तेव्हा नियमशास्त्राचे काही शिक्षक उभे राहिले व जोरदारपणे आपले म्हणणे मांडू लागले. ते म्हणाले, "या मनुष्यात आम्हांला काहीच दोष आढळत नाही. कदाचित एखादा देवदूत किंवा आत्मा त्याच्याशी बोलला असेल!"

10वादविवादाला हिंसक रूप येऊ लागले. तेव्हा लोक पौलाचे कदाचित तुकडे तुकडे करतील, अशी सरदाराला भीति वाटू लागली. म्हणून त्याने शिपायांना पौलाला तेथून घेऊन जाण्याची आज्ञा केली. व त्याला किल्ल्यात घेऊन जाण्यास सांगितले.

11त्या रात्री प्रभु पौलाजवळ उभा राहिला. आणि म्हणाला, "धीर धर! कारण जशी तू माझ्याविषयी यरुशलेममध्ये साक्ष दिलीस तशी तुला माझ्याविषयी रोम येथे साक्ष द्यावी लागेल."

12दुसऱ्या सकाळी काही यहूदी लोकांनी एकजूट करून कट रचला, त्यांना पौलाला जिवे मारायचे होते. यहूदी लोकांनी अशा प्रकारची शपथ वाहिली की, पौलाला ठार मारेपर्यंत अन्नपाणी सेवन करायचे नाही. 13अशा प्रकारे कट करणाऱ्यांची संख्या चाळीस होती. 14या यहूदी पुढाऱ्यांनी जाऊन मुख्य याजक व वडीलजनांशी बोलणी केली. यहूदी म्हणाले, "आम्ही एक गंभीर शपथ घेतली आहे. पौलाला मारेपर्यंत आम्ही काही खाणार वा पिणार नाही! 15म्हणून तुम्ही आता असे करा: तुम्ही (मुख्य याजक) व धर्मसभेने अशा प्रकारचा विनंति अर्ज सरदाराला लिहा की, पौलासंबंधी अधिक बारकाईने चौकशी करायची असल्याने पौलाला आमच्याकडे घेऊन यावे. तो येथे येण्याआगोदरच आम्ही त्याला ठार मारण्याच्या तयारीत असू."

---

**तू आपल्या ... नकोस** निर्गम 22:28

16पण पौलाच्या बहिणीच्या मुलाने या सर्व गोष्टी ऐकल्या
व तो किल्ल्यात गेला. त्याने पौलाला सर्व काही सांगितले.
17पौलाने एका शताधिपतीला बोलाविले आणि सांगितले,
या तरुणाला सरदाराकडे घेऊन जा. कारण सरदाराला
सांगण्यासारखे याच्याकडे काहीतरी आहे. 18मग त्याने
त्या मुलाला घेतले व सरदाराकडे गेला व त्याला म्हणाला,
"कैदेत असलेल्या पौलाने मला बोलावून या तरुणाला
तुमच्याकडे घेऊन जायला सांगितले. कारण हा तुम्हांला
काही तरी सांगणार आहे."

19सरदाराने त्या तरुणाचा हात धरून बाजूला नेले आणि
तो त्याला म्हणाला, "तू मला काय सांगणार आहेस?"

20तो मुलगा म्हणाला, "यहूदी लोकांनी असे ठरविले
आहे की, पौलाला घेऊन तुम्हांला उद्या धर्मसभेपुढे यायला
सांगायचे, व अशा बहाण्याने त्याला आणायचे की, जणू
काय त्यांना पौलाची अधिक बारकाईने चौकशी करायची
आहे. 21पण त्यांच्यावर विश्वास ठेवू नका! कारण चाळीस
लोकांहून अधिक लोक लपून बसणार आहेत व पौलाला
गाठून मारणार आहेत. त्यांनी अशा प्रकारची शपथ वाहिली
आहे की, जोपर्यंत ते पौलाला मारणार नाहीत तोपर्यंत
कोणीही काहीही खाणार वा पिणार नाही. म्हणून ते आता
तुमच्या होकाराची वाट पाहत अगदी तयारीत आहेत."

22 "तू मला ह्यांविषयी सांगितले आहेस, हे कोणाला
सांगू नको!" असे म्हणून सरदाराने त्याला जाण्याची आज्ञा
केली.

### पौलाला कैसरीया येथे पाठवितात

23मग सरदाराने दोघा शताधिपतींना बोलाविले. आणि
म्हणाला, "दोनशे शिपाई कैसरीयाला जाण्यासाठी तयार
ठेवा. तसेच सत्तर घोडेस्वार व दोनशे भालेदार रात्री नऊ
वाजता येथून जाण्यासाठी तयार ठेवा! 24खोगीर घातलेला
घोडा पौलासाठी तयार ठेवा. आणि त्याला राज्यपाल
फेलीक्स यांच्याकडे सुखरूप न्या." 25सरदाराने एक पत्र
लिहिले. त्यात असे लिहिलेले होते:

26क्लौद्य लुसिया याजकडून,
राज्यपाल फेलिक्स महाराज यांस,
सलाम.

27या मनुष्याला यहूदी लोकांनी धरले होते. ते
त्याला ठार मारण्याच्या बेतात होते. पण तेवढ्यात
माझ्या शिपायांसह मी तेथे गेलो व त्याला सोडविले.
तो रोमी नागरिक आहे हे समजल्यावरून मी त्याची
सुटका केली. 28यहूदी लोक त्याच्यावर का दोषारोप
करीत आहेत हे कळावे म्हणून मी त्याला धर्मसभेपुढे
घेऊन गेलो. 29यहूदी लोकांच्या नियमशास्त्राच्या
प्रश्नावरून त्यांनी त्याला दोषी ठरविले हे मला दिसून
आले. पण त्याच्यावर असा कोणताही आरोप नव्हता,
ज्याची शिक्षा मरणदंड किंवा तुरूंगवास होईल. 30जेव्हा
या मनुष्याला जिवे मारण्याचा कट रचला गेल्याचे
मला कळले तेव्हा मी त्याला ताबडतोब आपल्याकडे
पाठविले.

31शिपायांनी त्यांना मिळालेल्या हुकुमाचे पालन केले.
ते पौलाला घेऊन रात्रीच अंतिपत्रिसास गेले. 32दुसऱ्या
दिवशी घोडेस्वार पौलासोबत कैसरियास गेले. व शिपाई
किल्ल्यात परतले. 33जेव्हा पौल व घोडेस्वार कैसरियास
पोहोंचले, तेव्हा त्यांनी राज्यपालाला पत्र दिले. व पौलाला
त्याच्या स्वाधीन केले. 34राज्यपालाने ते पत्र वाचले. व
पौल कोणत्या प्रांताचा आहे हे विचारले. जेव्हा त्याला
समजले की, तो किलिकीयाचा आहे, तेव्हा तो म्हणाला,
35"तुझ्यावर दोष ठेवणारे आले म्हणजे तुझे ऐकेन." पौलाला
हेरोदाच्या* राजवड्यात पहाऱ्यात ठेवावे असा
हुकूमराज्यपालाने दिला.

### यहूदी लोक पौलावर दोष ठेवतात

24 पाच दिवसांनतर हनन्या कैसरिया येथे गेला.
हनन्या मुख्य याजक होता. हनन्याने
आपल्याबरोबर काही यहूदी वडीलजन आणि तिर्तुल्ल
नावाचा वकील यांना कैसरिया येथे नेले; त्यांनी
राज्यपालापुढे पौलावरील दोषारोप सादर केले. 2जेव्हा
पौलाला आत नेण्यात आले तेव्हा तिर्तुल्ल याने पौलावरील
आरोप सांगण्यास सुरुवात केली.

तो म्हणाला, "फेलिक्स महाराज, तुमच्यामुळे आम्हांला
फार शांतता लाभली असून, तुमच्या दूरदृष्टीमुळे जरूर
असलेल्या सुधारणासुद्धा या देशात झाल्या आहेत. 3फेलिक्स
महाराज, आम्ही हे सर्व प्रकारांनी व सर्व ठिकाणी हे
कृतज्ञतेने मान्य करतो. 4परंतु तुमचा अधिक वेळ न
घेता, आम्ही जे काही तुम्हांला थोडक्यात सांगतो, ते ऐकून
घेण्याची कृपा करावी, ही विनंति करतो. 5हा मनुष्य त्रास
देणारा आहे. जगात सगळीकडे यहूदी लोकांना त्याने त्रास
दिलेला आहे. तो नासरेथकराच्या पंथाचा पुढारी आहे.
6–7त्याने देवाचे मंदिर विटाळण्याचा प्रयत्न केला. परंतु
आम्ही त्याला धरले* 8या गोष्टी खऱ्या आहेत की नाही
हे तुम्ही ठरवू शकता. त्याला काही प्रश्न विचारा." 9इतर
यहूदी लोकांनी याला मान्यता दिली व सांगितले की, "हे
सर्व खरे आहे!"

10जेव्हा राज्यपालाने पौलाला बोलण्यास खुणावले, तेव्हा
पौल म्हणाला, "फेलिक्स महाराज, बरीच वर्षे या देशाचे

---

**हेरोद** पहिला हेरोद (महान) यहूदा प्रांतातील (ख्रि. पू. 40-4)

**वचने 6-8** काही ग्रीक प्रतींमध्ये (6ब-8अ) जोडलेले आढळते.
"आणि आमच्या नियमशास्त्राप्रमाणे या मनुष्याला आम्हांला न्याय
करायचा होता. पण लुसिया अधिकारी आला व बळाचा वापर
करून याला आमच्यातून घेऊन आला. आणि लुसियाने त्याच्या
माणसांना तुमच्याकडे जाण्याची व आम्हांवर आरोप ठेवण्याची
आज्ञा केली."

न्यायाधीश म्हणून आपण काम करीत आहात, म्हणून
मला आपणा समोर स्वत:चा बचाव करायला आनंद वाटत
आहे. 11यरुशलेम येथे उपासनेसाठी जाऊन मला बारापेक्षा
जास्त दिवस झालेले नाहीत, ही गोष्ट खरी आहे की
नाही, हे आपण पडताळून पाहू शकता 12मी मंदिरात
कोणाशी वाद घालताना, सभास्थानात किंवा बाहेर कोठे
कोणाला चिथावून देताना या लोकांना आढळलो नाही.
13हे लोक माझ्यावर जो आरोप ठेवीत आहेत, तो त्यांना
तुमच्यासमोर सिद्ध करता येणार नाही. 14मात्र मी हे
आपल्यासमोर कबूल करतो: या मार्गाने (ख्रिस्ती मार्गाने)
जाऊन मी आपल्या वाडवडिलांच्या देवाची उपासना करतो
त्या मार्गाला हे लोक पंथ म्हणतात. जे काही नियमशास्त्रात
सांगितले आहे आणि जे काही आमच्या संदेष्ट्यानी
सांगितलेले आहे. त्या सर्वांवर मी विश्वास ठेवतो. 15आणि
धार्मिकांचे व वाईटांचेही मरणातून पुन्हा उठणे होणार
आहे, ही गोष्ट हे लोकही माझ्याबरोबर मानतील अशी
मी देवामध्ये आशा बाळगतो. 16यासाठी देवापुढे आणि
मनुष्यांपुढे आपला विवेक शुद्ध असावा याचा मी नेहमी
आटोकाट प्रयत्न करीत असतो.

17“अनेक वर्षे दूर राहिल्यानंतर माझ्या लोकांतील
गरीबांना दान देऊन यरुशलेममध्ये स्वत:साठी अर्पण करावे
म्हणून मी मंदिरात जाऊन हा विधी करीत असताना,
शुद्धीकरण झालेला असा मी त्यांस आढळलो. 18तेथे मी
कसलाही जमाव केला नव्हता अगर दंगा ही केला नव्हता
19पण आशियातील काही लोक तेथे हजर होते. 20जर
त्यांना माझ्याविरुद्ध काही म्हणायचे असेल, तर त्यांनी
आपणांपुढे हजर होऊन मला दोषलावावा. किंवा मी जेव्हा
धर्मसभेपुढे उभा राहिलो, त्यावेळी माझ्यामध्ये काही चूक
त्यांना आढळली असेल, तर त्यांनी तसे सांगावे. 21मी या
लोकांमध्ये उभे राहून मोठ्याने म्हणालो की, ‘मेलेल्यांतून
पुन्हा उठण्याच्या प्रश्नावरून माझा न्यायनिवाडा होत आहे.’
या एका गोष्टीशिवाय दुसरा आरोप माझ्यावर करायचा
असेल तर यांनी तसे सांगावे.”

22फेलिक्सला (ख्रिस्ती) मार्गाविषयी चांगली माहिती
असल्याने त्याने सुनावणी थांबवली. फेलिक्स म्हणाला,
“जेव्हा लुसिया सरदार येथे येईल, तेव्हा तुझ्या प्रकरणाचा
काय निर्णय घ्यायचा ते मी ठरवीन.” 23मग फेलिक्सने
शताधिपतीला आज्ञा केली की, पौलाला पहाऱ्यात ठेवावे,
परंतु त्याला थोडी मोकळीक देण्यात यावी. आणि असाही
हुकूम केला की, त्याच्या मित्रांना त्याची गरज भागविण्यास
मना करू नये.

### पौल फेलिक्स व त्याच्या पत्नीशी बोलतो

24काही दिवसांनंतर फेलिक्स आपली पत्नी द्रुसिल्ला
हिच्याबरोबर आला. ती एक यहूदी स्त्री होती. फेलिक्सने
पौलाला बोलावणे पाठविले. आणि त्याने येशू ख्रिस्तावरील
विश्वासाबाबत पौलाचे बोलणे ऐकून घेतले. 25परंतु जेव्हा
पौलाने धार्मिकपणा, आत्मसंयमन, आणि होणाऱ्या
न्यायाविषयी सांगितले, तेव्हा फेलिक्सला भीति वाटली.
तो पौलाला म्हणाला, “आता तू जा, परत वेळ मिळाला
म्हणजे मी तुला बोलावीन.” 26यावेळी पौल त्याला पैसे
देऊ करील असे त्याला वाटत होते म्हणून फेलिक्स
त्याला वरचेवर बोलावणे पाठवत असे आणि त्याच्याशी
बोलत असे. 27दोन वर्षे झाल्यावर फेलिक्सच्या जागी
पुर्क्य फेस्त हा राज्यपाल झाला. आणि यहूदी लोकांचे
मन मोडण्याची फेलिक्सची इच्छा नव्हती, म्हणून त्याने
जाण्यापूर्वी पौलाला तुरुंगातच ठेवले.

### पौल कैसराची भेट घेऊ इच्छितो

25 मग त्या प्रांतात फेस्त आला. आणि तीन दिवसांनी
तो कैसरीयाहून वर यरुशलेमला गेला. 2मुख्य
याजकांनी आणि यहूदी पुढाऱ्यांनी फेस्तच्या पुढे पौलावरील
आरोप सादर केले. 3आणि पौलाला यरुशलेमला पाठवून
द्यावे, अशी त्याला विनंति केली. पौलाला वाटेत ठार
मारण्याचा ते कट करीत होते. 4फेस्तने उत्तर दिले, “पौल
कैसरीया येथे बंदिवासात आहे आणि मी स्वत: लवकरच
कैसरीयाला जाणार आहे. 5तुमच्यातील काही पुढाऱ्यांनी
माझ्याबरोबर तिकडे खाली यावे, आणि जर त्या मनुष्याने
काही चूक केली असेल तर त्याच्यावर दोषारोप ठेवावा.”

6त्यांच्याबरोबर आठ ते दहा दिवस घालविल्यानंतर
फेस्त खाली कैसरीयाला परत गेला. दुसऱ्या दिवशी फेस्त
न्यायालयात बसला आणि त्याने आपल्यासमोर पौलाला
हजर करण्याचा आदेश दिला. 7जेव्हा पौल तेथे हजर
झाला, तेव्हा यरुशलेमहून तेथे आलेले यहूदी लोकही
पौलाच्या सभोवती उभे राहिले. त्यांनी त्याच्यावर पुष्कळ
गंभीर आरोप ठेवले, परंतु ते आरोप यहूदी लोक सिद्ध
करू शकले नाहीत. 8पौल आपला बचाव करण्यासाठी
असे म्हणाला, “मी यहूदी लोकांच्या नियमशास्त्राच्या,
मंदिराच्या किंवा कैसराच्या विरुद्ध काही गुन्हा केलेला
नाही.”

9फेस्तला यहूदी लोकांना खूष करायचे होते म्हणून तो
पौलाला म्हणाला, “यरुशलेम येथे जाऊन माझ्यासमोर
तुझी चौकशी व्हावी अशी तुझी इच्छा आहे काय?”

10पौल म्हणाला, “मी आता कैसराच्या न्यायासनासमोर
उभा असून त्याच्यासमोर माझा न्यायनिवाडा व्हावा, अशी
माझी इच्छा आहे. मी यहूदी लोकांचा काहीही अपराध
केलेला नाही, हे आपणांस चांगले माहीत आहे. 11मी जर
काही गुन्हा केला असेल तर मला मरणदंड झाला पाहिजे.
आणि त्यापासून सुटका व्हावी असा प्रयत्न मी करणार
नाही. परंतु जे आरोप हे लोक माझ्यावर करीत आहेत,
ते खरे नसतील तर मला कोणी यांच्या हाती देऊ शकणार
नाही. मी आपले गाऱ्हाणे कैसरासमोर मांडू इच्छितो.”

12यावर फेस्तने आपल्या सभेशी सल्लामसलत केली.
मग त्याने पौलाला सांगितले, “तू कैसरापुढे आपला

न्यायनिवाडा व्हावा अशी इच्छा दाखविली आहे, म्हणून तुला कैसरासमोर पाठविण्यात येईल."

## हेरोद अग्रिप्पासमोर पौल

13काही दिवसांनंतर फेस्ताचे स्वागत करण्याच्या हेतूने
राजा अग्रिप्पा* आणि बर्णीका* कैसरीयाला येऊन त्याला
भेटले. 14ती दोघे तेथे बरेच दिवस राहिल्यावर फेस्तने
पौलाचे प्रकरण राजाला समजावून सांगितले. तो म्हणाला,
"फेलिक्सने तुरुंगात ठेवलेला एक कैदी येथे आहे. 15जेव्हा
मी यरुशलेम येथे होतो, तेव्हा यहूदी लोकांचा मुख्य याजक
आणि वडीलजन यांनी त्याच्याविरुद्ध फिर्याद केली. आणि
त्याला दोषी ठरवावे अशी मागणी केली. 16वादी व प्रतिवादी
यांना एकमेकांसमोर आणल्याशिवाय आणि आरोपीला
आपला बचाव करण्याची संधि मिळेपर्यंत, त्याला इतरांकडे
सोपविण्याची रोमी लोकांची रीत नाही. असे मी यहूदी
लोकांना सांगितले. 17म्हणून ते जेव्हा माझ्याबरोबर येथे
आले, तेव्हा मी उशीर न करता दुसऱ्याच दिवशी
न्यायासनावर बसलो, आणि त्या मनुष्याला समोर
आणण्याची आज्ञा केली. 18त्याच्यावर आरोप करणारे
जेव्हा त्याच्याविरुद्ध बोलण्यास उभे राहिले, तेव्हा माझ्या
अपेक्षेप्रमाणे कसल्याही गुन्ह्याबाबत त्यांनी त्याच्यावर
आरोप केले नाहीत. 19उलट आपल्या धर्माविषयी आणि
कोणा एका मनुष्याविषयी ज्याचे नाव येशू आहे,
त्याच्यावरून यहूदी लोकांनी त्या माणसाशी वाद केला.
येशू हा जरी मेलेला असला, तरी पौलाचा असा दावा
आहे की, येशू जिवंत आहे. 20या प्रश्नाची चौकशी कशी
करावी हे मला समजेना. तेव्हा त्या यहूदी मनुष्याविरुद्ध
यहूदी लोकांचे जे आरोप आहेत, त्याबाबत त्याला यरुशलेम
येथे नेऊन त्याचा न्याय केला जावा अशी त्याची इच्छा
आहे काय, असे मी त्याला विचारले. 21सम्राटाकडून
आपल्या न्यायनिवाडा होईपर्यंत आपण कैदेत राहू असे
जेव्हा पौल म्हणाला, तेव्हा मी आज्ञा केली की, कैसराकडे
पाठविणे शक्य होईपर्यंत त्याला तुरुंगातच ठेवावे."

22यावर अग्रिप्पा फेस्तला म्हणाला, "मला स्वत:ला या
मनुष्याचे म्हणणे ऐकावेसे वाटते."

फेस्तने त्याला उत्तर दिले, "उद्या त्याचे म्हणणे तुम्ही ऐकू शकाल."

23म्हणून दुसऱ्या दिवशी अग्रिप्पा आणि बर्णीका मोठ्या
थाटामाटात आले. व लष्करी सरदार व शहरातील मुख्य
नागरिकांसह दरबारात प्रवेश केला. तेव्हा फेस्तच्या
आज्ञेनुसार पौलाला तेथे आणण्यात आले. 24मग फेस्त
म्हणाला, "राजे अग्रिप्पा महाराज आणि आमच्याबरोबर
येथे उपस्थित असलेले सर्वजण, या मनुष्याला पाहा! याच्याच
विषयी यरुशलेम व कैसरिया येथील सर्व यहूदी लोकांनी
माझ्याकडे अर्ज दिलेला आहे. याला जिवंत राहू देऊ
नये, असा आकांत ते करतात. 25परंतु याला मरणदंड
द्यावा असे याने काहीही केले नाही, असे मला आढळून
आले. आणि त्याने स्वत:च आपणांला सम्राटाकडून
(कैसराकडून) न्याय मिळावा अशी मागणी केली, म्हणून
मी त्याला कैसरासमोर न्यायासाठी पाठविण्याचे ठरविले
आहे. 26परंतु सम्राटाला याच्याविषयी निश्चित असे
कळवावे, असे माझ्याकडे काही नाही. म्हणून मी याला
तुमच्यापुढे आणि विशेषत: राजा अग्रिप्पापुढे आणून उभे
केले आहे. ते अशाकरिता की, या चौकशीनंतर मला या
मनुष्याविषयी काहीतरी लिहिता यावे. 27शेवटी एखाद्या
कैद्याला कसलाही आरोप न ठेवता कैसराकडे पाठविणे
मला योग्य वाटत नाही."

## राजा अग्रिप्पापुढे पौल

26 अग्रिप्पा पौलाला म्हणाला, "तुला तुझी बाजू
मांडायला परवानगी आहे." यावर पौलाने आपला
हात उंच करून आपल्या बचावाचे भाषण सुरू केले:
2"अग्रिप्पा महाराज, मी स्वत:ला धन्य समजतो कारण
मला आपल्यासमोर माझ्याविरुद्ध केलेल्या आरोपांचा
बचाव करण्याची संधि आज मिळाली. 3विशेषत: यहूदी
चालीरीति आणि प्रश्न इत्यादी गोष्टींची आपणांला चांगल्या
प्रकारे माहिती असल्याने तर हे जास्तच खरे म्हणावे
लागेल. तेव्हा आपण माझे बोलणे धीराने ऐकून घ्यावे
अशी मी विनंति करतो.

4"मी माझे जीवन तरुणपणापासून माझ्या प्रांतात व
यरुशलेमात कशा रीतिने जगत आलो हे सर्व यहूदी लोकांना
चांगले माहीत आहे. 5ते मला बऱ्याच काळापासून
ओळखतात. आणि त्यांची इच्छा असेल तर मी एक परूशी
म्हणजे आमच्या यहूदी धर्माच्या एका कट्टर गटाचा सभासद
या नात्याने कसा जगत आलो याविषयी ते साक्ष देऊ
शकतील. 6आता मी आमच्या वाडवडिलांना देवाने जे
वचन दिले होते, त्याच्या आशेकरिता माझा न्याय व्हावा
यासाठी येथे उभा आहे. 7आपल्या देवाची रात्रंदिवस
कळकळीने उपासना करीत असताना हे जे वचन देवाने
दिले ते पुरे होण्याची आशा आमच्या बाराही वंशाना वाटत
आहे. या आशेमुळेच महाराज, यहूदी लोक माझ्यावर
दोषारोप करीत आहेत. 8देव मेलेल्यांना परत उठवितो,
असे तुमच्यापैकी कित्येकांना विश्वास न ठेवण्यासारखे
का वाटावे. 9नासरेथच्या येशूच्या नावाविरुद्ध जे जे काही
करता येईल ते ते मी करावे असे मलादेखील वाटत होते.
10आणि नेमके हेच मी यरुशलेम येथे केले. कारण मुख्य
याजकांकडून मला तसा अधिकार मिळाला होता. म्हणून
मी देवाच्या अनेक संतांना तुरुंगात टाकले. आणि हे जे
संतगण जिवे मारले गेले, त्यांच्याविरुद्ध मी माझे मत
नोंदविले. 11अनेक सभास्थानात मी त्यांना शिक्षा केली.

---

**अग्रिप्पा** दुसरा हेरोद. महान हेरोद अग्रिप्पाचा हा नातू.

**बर्णीका** अग्रिप्पाची बहिण, पहिल्या हेरोद अग्रिप्पाची ती सर्वांत मोठी मुलगी होती.

आणि देवाविरुद्ध जबरीने वाईट भाषण करायला लावण्याचा
मी प्रयत्न केला. या लोकांवरील माझा राग इतक्या
पराकोटीला गेला होता की, मी त्यांचा छळ करण्याकरिता
इतर शहरांमध्ये देखील जात असे.

### येशूचे दर्शन झाल्याचे पौल सांगतो

12“एकदा दिमिष्क शहराला जाण्यासाठी मुख्य
याजकांनी मला अधिकार व परवानगी दिली तेव्हा महाराज,
13वाटेत भर दुपारच्या वेळी मी माझ्या व माझ्यासमवेत
असणाऱ्यांच्या भोवती स्वर्गीय प्रकाश फाकलेला पाहिला.
तो प्रकाश सूर्यापेक्षाही जास्त प्रखर होता. 14आम्ही सर्व
खाली जमिनीवर पडलो आणि हिब्रू भाषेत माझ्याशी
बोलताना एक वाणी मी ऐकली. ती वाणी म्हणाली, ‘शौला,
शौला, माझा छळ तू का करतोस? अणुकुचीदार काठीवर
लाथ मारणे तुला हानिकारक आहे,’ 15आणि मी म्हणालो,
‘प्रभु, तू कोण आहेस?’ प्रभूने उत्तर दिले, ‘मी येशू आहे,
ज्याचा तू छळ करीत आहेस. 16पण ऊठ आणि उभा
राहा! या कारणांसाठी मी तुला दर्शन दिले आहे: तुला
सेवक म्हणून नेमावे व जे काही तुला दाखविले व जे
दाखवीन त्याचा साक्षीदार म्हणून तुला नेमावे. 17मी तुझी
यहूदी व यहूदीतर विदेशी यांच्यापासून सुटका करीन.
आणि यहूदीतर विदेशी लोकांकडे पाठवीन. 18यासाठी
की, त्यांचे डोळे उघडावे व याविषयीचे सत्य काय आहे हे
तू लोकांना दाखवून द्यावेस व त्यामुळे त्यांना त्यांच्या
पापांची क्षमा मिळेल आणि माझ्यामध्ये विश्वासामुळे पवित्र
झालेल्या लोकांमध्ये जागा मिळेल.’ ”

### पौल त्याच्या कामाविषयी सांगतो

19यासाठी, “अग्रिप्पा महाराज मला जो स्वर्गीय दृष्टान्त
झाला, त्याचा मी आज्ञाभंग केला नाही. 20उलट पहिल्यांदा
दिमिष्कातील आणि नंतर यरुशलेमातील, यहूदा प्रांतातील
सर्व आणि यहूदीतर विदेशी लोकांनासुद्धा प्रभुच्या वचनाची
साक्ष दिली. त्यांनी पश्चात्ताप करावा, देवाकडे वळावे
आणि पश्चात्तापाला साजेल अशी कामे करावी असे मी
त्यांना सांगितले. 21या कारणांमुळे मी मंदिरात असताना
यहूदी लोकांनी मला धरले आणि जिवे मारण्याचा प्रयत्न
केला. परंतु देवाने मला मदत केली म्हणून मी आज येथे
उभा राहून समाजातील लहानथोरांना साक्ष देत आहे.
22जे काही पुढे होणार होते, त्याविषयी संदेष्ट्यांनी व मोशेने
जे सांगितले त्यापेक्षा दुसरे मी सांगत नाही. 23त्यानुसार
देवाचा अभिषिक्त जो ख्रिस्त (मशीहा) तो दु:ख सहन
करील. आणि मेलेल्यांतून उठविला जाणाऱ्यांत तो पहिला
असेल. यहूदी लोकांना तसेच इतर विदेशी लोकांना देव
प्रकाशात नेईल.”

### पौल अग्रिप्पाचे मन वळविण्याचा प्रयत्न करतो

24पौल आपल्या बचावासंबंधी बोलत असताना फेस्त
त्याला मोठ्याने म्हणाला, “पौला, तू वेडा आहेस. जास्त
ज्ञानामुळे तुला वेड लागले आहे!”
25पौलाने उत्तर दिले, “फेस्त महाराज, मी वेडा नाही;
तर ज्या गोष्टी खऱ्या आहेत आणि अगदी योग्य आहेत,
त्यांच्याविषयीच मी बोलत आहे. 26येथे हजर असलेल्या
महाराजांना याविषयी चांगली माहिती आहे, आणि यामुळे
मी त्यांच्याशी उघडपणाने बोलू शकतो. त्याच्या ध्यानातून
काही सुटले नसेल, असे मला खात्रीने वाटते. मी हे
म्हणतो, कारण ही गोष्ट एखाद्या कानाकोपऱ्यात झाली
नाही. 27अग्रिप्पा महाराज, भविष्यावाद्यांनी जे लिहिले
त्यावर तुमचा विश्वास आहे काय? तुमचा त्यावर विश्वास
आहे हे मला नक्की माहीत आहे.”
28यावर अग्रिप्पा म्हणाला, “एवढ्या थोड्या वेळात ख्रिस्ती
होण्यासाठी तू माझे मन वळवू शकशील असे तुला वाटते
काय?”
29पौलाने उत्तर दिले, “थोड्या वेळात म्हणा अगर जास्त
वेळात म्हणा, मी जसा आहे तसे केवळ तुम्हीच नव्हे तर
आज जे जे येथे बसून माझे बोलणे ऐकत आहेत त्या
सर्वांनी माझ्यासारखे या साखळदंडाखेरीज, विश्वास ठेवणारे
व्हावे, अशी माझी देवाला नम्र विनंति आहे.”
30यानंतर राजा, बर्णीका, राज्यपाल आणि त्यांच्याबरोबर
इतर जे तेथे बसले होते, ते सर्व उठले. 31ते न्यायालयातून
बाहेर पडल्यावर एकमेकांशी बोलत होते. ते म्हणाले,
“ज्यामुळे तुरुंगवास किंवा मरणदंड द्यावा असे काहीही या
मनुष्याने केले नाही.” 32अग्रिप्पा फेस्तला म्हणाला, “या
मनुष्याने कैसराकडे न्याय मागितला नसता, तर त्याला
सोडून देता आले असते.”

### पौल समुद्रमार्गे रोमला निघतो

27 जेव्हा आम्ही समुद्रमार्गे इटलीला जाण्याचे ठरविले
तेव्हा पौल व इतर काही कैद्यांना युल्य नावाच्या
शताधिपतीच्या हाती सोपविण्यात आले. युल्य हा सम्राटाच्या
सेनेतील एक अधिकारी होता. 2अद्रमुत्तिय येथील एका
जहाजातून आम्ही जाणार होतो. हे जहाज आशियाच्या
किनाऱ्यावरील बंदरे घेत पुढे जाणार होते. आम्ही या
जहाजातून प्रवासाला निघालो. तेव्हा मासेदोनियातील
थेस्सलनीका येथे राहणारा अरिस्तार्ख आमच्याबरोबर
होता.
3दुसऱ्या दिवशी आम्ही सिदोन नगराला पोहोंचलो. युल्य
पौलाशी फार चांगला वागला. पौलाच्या मित्राना त्याची
काळजी घेता यावी म्हणून त्याने मोकळीक दिली. 4तेथून
आम्ही समुद्रमार्गे पुढे निघालो. आणि कुप्रच्या
किनाऱ्याकिनाऱ्याने निघालो कारण वारा समोरचा होता.
5किलकिया व पंफुल्याजवळच्या समुद्राला पार करून
लुक्या प्रांतातील मुर्या बंदरात पोहोंचलो. 6तेथे शताधिपतीला
इटलीला जाणारे आलेक्झांद्रीयाचे एक जहाज आढळले.
त्याने आम्हांला त्या जहाजात बसविले.

7आम्ही बरेच दिवस हळूहळू प्रवास करीत होतो. कनिदा
येथपर्यंत येण्यासाठी आम्हांला फार कष्ट पडले कारण
वारा तोंडचा होता. आम्हांला पुढे जाता येईना. म्हणून
आम्ही क्रेताच्या दक्षिणेकडून सलमोनाच्या समोरच्या बाजूस
गेलो. 8यापुढे आमचे जहाज क्रेतच्या किनाऱ्याने मोठ्या
अडचणींतून सुरक्षित बंदर येथे पोहोंचले. तेथे जवळच
लसया नगर होते.

9बराच वेळ वाया गेला होता. आणि पुढील प्रवास करणे
बरेच अवघड झाले होते. कारण एव्हाना यहूद्यांच्या उपासाचा
काळही* निघून गेला होता. तेव्हा पौलाने त्यांना
सावधानतेचा इशारा दिला. पौल म्हणला, 10“पुरुषांनो,
मला वाटते, आपल्या प्रवासात जहाजातील मालाला आणि
जहाजालाच नव्हे तर आपल्या जीवालाही धोका होईल!”
11परंतु पौलाच्या मताशी जहाजाचा कप्तान व मालक
सहमत झाले नाहीत, उलट जहाजाच्या कप्तानाच्या व
मालकाच्या बोलण्यावरच शताधिपतीचा जास्त विश्वास
होता. 12परंतु हे बंदर (सुरक्षित म्हटलेले) हिवाळ्यात
मुक्काम करायला सोईचे नव्हते. म्हणून बहुमताने पुढे
निघावे असे ठरले. आणि फेनिकेला जाण्याचा प्रयत्न
करावा आणि शक्य झाले तर तेथेच हिवाळा घालवावा
असे ठरले. (फेनिके हे क्रेत बेटावरील शहर होते. त्याचे
बंदर नैऋत्य व वायव्य दिशेला होते.)

### वादळ

13जेव्हा दक्षिणेकडून मंद वारे वाहू लागले, तेव्हा ते
नांगर उचलून क्रेताच्या किनाऱ्याकिनाऱ्याने तारू
हाकारीत जाऊ लागले. जहाजावरच्या लोकांना वाटू लागले
की, अशाच प्रकारचे वारे आम्हांला पाहिजे होते. व तसेच
ते वाहत आहे. 14परंतु लवकरच क्रेत बेटावरून ‘ईशान्येचे’
म्हटलेले वादळी वारे वाहू लागले. 15आणि जहाज वादळी
वाऱ्यात सापडले. व त्याला पुढे जाता येईना. तेव्हा पुढे
जाण्याचा प्रयत्न सोडून आम्ही वाऱ्याने जहाज भरकटू
दिले. 16मग कौदा नावाच्या लहानशा बेटाच्या
किनाऱ्याकिनाऱ्याने आम्ही जाऊ लागलो. मग थोड्या
खटपटीनंतर जीवनरक्षक होडी वर उचलून घेतली.
17जीवन रक्षक होडी आत घेतल्यावर लोकांनी जहाज
दोरखंडाने आवळून बांधले. जहाज वाळू असलेल्या सूर्ती*
नावाच्या उथळ जागी आदळेल या भीतीने त्यांनी शीड
खाली काढले. तेव्हा वाऱ्याने ते भरकटू लागले. 18जोरदार
वादळी वाऱ्याचे तडाखे खावे लागल्याने लोकांनी दुसऱ्या
दिवशी जहाजावरील सामान बाहेर टाकून दिले. 19तिसऱ्या
दिवशी जहाजाची काही सामग्री त्यांनी आपल्या हातांनी
बाहेर काढून टाकली. 20बरेच दिवस आम्हांला सूर्य किंवा
तारे दिसले नाहीत. वादळ फारच भयंकर होते. आम्ही
आमच्या सर्व आशा सोडून दिल्या. आम्ही मरणार असे
आम्हांला वाटू लागले.

21बराच काळपर्यंत लोकांनी अन्नपाणी घेतले नव्हते.
मग पौल त्यांच्यासमोर उभा राहिला आणि म्हणाला,
“गृहस्थांनो, क्रेतावरून मुक्काम हलवू नका, हा माझा
सल्ला तुम्ही ऐकायला पाहिजे होता. म्हणजे हा त्रास व ही
हानि तुम्हांला टाळता आली असती. पण आता तुम्ही धीर
धरावा अशी माझी विनंति आहे. 22कारण तुमच्यापैकी
एकाच्याही जीवाला धोका पोहोंचणार नाही. आपले जहाज
मात्र गमवावे लागेल. 23मी ज्या देवाचा सेवक आहे आणि
ज्याची भक्ति मी करतो, त्याचा दूत काल रात्री माझ्या
बाजूला उभा राहीला. 24आणि तो दूत म्हणाला, ‘पौला
भिऊ नको! तुला कैसरापुढे उभे राहिलेच पाहिजे.
तुझ्याबरोबर प्रवास करणारे जे लोक आहेत, त्यांच्या
जीवाचे रक्षण करण्याचे वचन देवाने मला दिले आहे.’
25तेव्हा गृहस्थांनो, तुम्ही सर्व धीर धरा! कारण मला जसे
दूताने सांगितले, अगदी तसे होणार असा मला विश्वास
आहे. 26परंतु आपणास एखाद्या बेटावर उतरून थांबावे
लागले.”

27चौदाव्या रात्री आमचे जहाज अद्रिया समुद्रातून चालले
होते, तेव्हा खलाशांनी जहाज एखाद्या भूमीजवळ पोहोंचले
असावे असा अंदाज केला. 28त्यांनी पाण्याची खोली मोजली
तेव्हा ती वीस वाव भरली. आणखी काही वेळाने त्यांनी
परत एकदा समुद्राची खोली मोजली तेव्हा ती पंधरा वाव
भरली. 29ओबडधोबड खडकाळ जागेवर आपले जहाज
आदळेल अशी भीति वाटल्याने त्यांनी चार नांगर जहाजाच्या
मागील बाजूने टाकले आणि दिवस उजाडण्याची वाट पाहू
लागले. 30खलाशांनी जहाजातून सुटका करून घेण्याचा
प्रयत्न केला. त्यांनी जहाजाच्या पुढील भागातून नांगर
टाकल्याचे भासवून जीवनरक्षक होड्या समुद्रात टाकल्या.
31परंतु पौल शताधिपतीला व इतर शिपायांना म्हणाला,
“जर हे लोक जहाजात राहणार नाहीत, तर तुम्ही वाचणार
नाही.” 32यावर शिपायांनी जीवनरक्षक होड्यांचे दोर कापून
टाकले. आणि त्या खाली पाण्यात पडू दिल्या.

33पहाट होण्याअगोदर पौलाने त्या सर्वांना काहीतरी
खाण्याचा आग्रह केला. तो म्हणाला, “आज चौदावा दिवस
आहे. तुम्ही आतुरतेने वाट पाहत आहात पण खाणेपिणे
काही केले नाही. अन्नाचा कणही खाल्ला नाही. 34तुम्ही
थोडे तरी खा. कारण तुमचा टिकाव लागण्यासाठी तुम्ही
खाणे जरूरीचे आहे. तुम्ही खावे अशी मी तुम्हांला विनंति
करतो. तुमच्यापैकी कोणाच्या केसालाही धक्का लागणार
नाही.” 35असे बोलल्यानंतर पौलाने भाकर घेतली आणि
सर्वांच्या समक्ष देवाचे उपकार मानले. ती भाकर मोडून
तो खाऊ लागला. 36ते पाहून त्या सर्वांना धीर आला
आणि ते जेवले. 37आम्ही सर्व मिळून जहाजात दोनशे
शाहातर लोक होतो. 38त्या सर्वांनी पुरेसे खाल्ल्या

---

**उपासाचा काळ** हा वर्षातील प्रायश्चित्ताचा दिवस असे. यहूदी लोकांचा महत्वाचा पवित्र दिवस.

**सूर्ती** लिबीयाच्या किनाऱ्यालगत असलेली उथळ जागा.

प्यायलयांनंतर धान्य समुद्रात टाकून दिले आणि जहाजातील
भार कमी केला.

### जहाज नष्ट होते

39दिवस उजाडल्यावर त्यांना भूभागाची ओळख पटली
नाही. परंतु तेथे किनारा असलेल्या उपसागरासारखी ती
जागा दिसून आली. म्हणून शक्य झाल्यास तेथील
किनाऱ्याला जहाज लावण्याचे त्यांनी ठरविले. 40म्हणून
त्यांनी नांगर कापले आणि समुद्रात पडू दिले. त्याचबरोबर
सुकाणूंच्या दोऱ्या एकत्र केल्या. नंतर त्यांनी जहाजाच्या
पुढच्या भागाचे शीड वारा भरावे म्हणून उभे केले आणि
जहाज किनाऱ्याला आणले. 41परंतु दोन समुद्रांमधील
वर आलेल्या वाळूच्या ढिगावर जहाज जोराने आदळले.
तेव्हा जहाजाची पुढची बाजू वाळूमध्ये रुतून बसली आणि
गलबताचा मागचा भाग लाटांच्या तडाख्यामुळे तुटू लागला.
42तेव्हा शिपायांनी कैद्यांना मारण्याचे ठरविले. यासाठी
की त्यांच्यातील कोणी पोहोत जाऊन पळू नये. 43परंतु
शताधिपतीला पौलाला वाचवायचे होते म्हणून त्याने
शिपायांना तो विचार सोडून देण्यास सांगितले. आणि ज्यांना
पोहता येत असेल त्यांनी जहाजातून उड्या टाकून
किनाऱ्याला जावे अशी आज्ञा केली. 44बाकीच्या लोकांनी
फळ्यांच्या अगर जहाजाच्या तुटलेल्या लाकडांच्या आधारे
भूमी गाठावी असे सांगितले. अशा रीतीने जहाजातील सर्व
जण सुखरूपपणे भूमीवर पोहोंचले.

### माल्ता बेटावर पौल

28 जेव्हा आमचे पाय सुखरूपपणे तेथील जमीनीला
लागले. तेव्हा आम्हांला कळले की, त्या बेटाचे
नाव माल्ता असे आहे. 2तेथील रहिवाश्यांनी आम्हांला
अतिशय ममतेने वागविले. त्यांनी एक शेकोटी पेटविली
आणि आमचे स्वागत केले. कारण पाऊस पडू लागला
होता. व थंडीही होती. 3पौलाने काटक्या गोळा केल्या
आणि तो त्या शेकोटीत टाकू लागला. उष्णतेमुळे तेथून
एक साप निघाला. आणि त्याने पौलाच्या हाताला विळखा
घातला. 4ते पाहून तेथील रहिवासी एकमेकांना म्हणू
लागले, "हा मनुष्य खुनी असला पाहिजे. समुद्रातून जरी
हा वाचला असला तरी देवाच्या न्यायामुळे याचे आयुष्य
संपुष्टातच आले आहे!" 5परंतु पौलाने तो प्राणी शेकोटीत
झटकून टाकला. आणि पौलाला काही अपाय झाला
नाही. 6त्या बेटावरील लोकांना पौलाचे अंग सुजून येईल
किंवा पौल एकाएकी मरून पडेल असे वाटत होते. बराच
वेळ वाट पाहूनही पौलाला काहीही विकार झाल्याचे दिसेना,
तेव्हा त्या लोकांचे विचार पालटले, आणि पौल देवच
आहे असे ते म्हणू लागले.

7तेथून जवळच पुब्ल्य नावाच्या मनुष्याची शेती होती.
पुब्ल्य हा त्या बेटाचा मुख्य अधिकारी होता. त्याने आम्हा
सर्वांचे त्याच्या घरी स्वागत केले आणि तीन दिवस आमचा
चांगला पाहुणचार केला. 8पुब्ल्याचे वडील तापाने व
हगवणीने आजारी होते, त्यामुळे अंथरुणाला खिळून होते.
पौल त्या आजारी व्यक्तिला भेटायला गेला प्रार्थना करून
पौलाने आपला हात त्याच्यावर ठेवला आणि त्या मनुष्याला
बरे केले. 9हे घडलेले पाहिल्यावर त्या बेटावरील इतर
आजारी लोक पौलाकडे आले आणि बरे झाले. 10त्यांनी
आम्हांला सन्मानपूर्वक पुष्कळ वस्तू भेटीदाखल दिल्या.
आणि जेव्हा आम्ही परत प्रवासाला निघालो तेव्हा आम्हांला
लागणाऱ्या अनेक गोष्टी पुरविल्या.

### पौल रोमला रवाना होतो

11आम्ही तेथे हिवाळ्यात राहिल्यावर आलेक्सांद्रा
शहरातील एका जहाजातून पुढील प्रवासाला निघालो. ते
जहाज त्या बेटावर हिवाळाभर मुक्कामाला होते. त्या
जहाजाच्या समोरील बाजूस 'जुळ्या देवाचे'* चिन्ह होते.
12मग आम्ही सुराकूस येथे जाऊन पोहोंचलो आणि तेथे
तीन दिवस राहिलो. 13तेथून शिडे उभारून आम्ही निघालो,
आणि रेगियोन नगराला गेलो. तेथे एक दिवस मुक्काम
केला. नंतर दक्षिणेकडील वारा सुटल्यावर दुसऱ्या दिवशी
पुत्युलास गेलो. 14त्या शहरात आम्हांला काही बंधु
(विश्वासणारे) आढळले. त्या बंधूंच्या सांगण्यावरून आम्ही
तेथे सात दिवस राहिलो. मग आम्ही रोम येथे जाऊन
पोहोंचलो. 15तेथील बंधुनी आमच्याबद्दलची वार्ता ऐकली
होती. ते आमच्या भेटीसाठी अप्पीयाच्या बाजारपेठेपर्यंत
आणि तीन धर्मशाळेपर्यंत आले. पौलाची त्यांची भेट
झाल्यावर त्याने देवाचे उपकार मानले. व त्याला धीर
आला.

### रोम येथे पौल

16आम्ही रोम येथे पोहोंचल्यावर पौलाला एकटे राहायला
परवानगी मिळाली. परंतु त्याच्यावर देखरेख करण्यासाठी
एक शिपाई ठेवण्यात आला. 17तीन दिवसांनंतर पौलाने
सर्व यहूदी पुढाऱ्यांना एकत्र बोलावले. जेव्हा सर्व जण
जमा झाले तेव्हा पौल त्यांना म्हणाला, "बंधूंनो, आपल्या
बांधवांविरुद्ध मी काहीही केलेले नाही. तरी मला यरुशलेम
येथे पकडून रोमी लोकांच्या हाती कैदी म्हणून देण्यात
आले. आणि 18त्यांनी माझी चौकशी केली. तेव्हा त्यांची
मला सोडून देण्याची इच्छा होती. कारण मरणदंडाला योग्य
असा कोणताही गुन्हा मी केला नव्हता. 19परंतु यहूदी
लोकांनी जेव्हा माझ्या सुटकेला हरकत घेतली, तेव्हा
कैसराकडे न्याय मागणे मला भाग पडले. याचा अर्थ
असा नाही की, यहूदी लोकांविरुद्ध मला दोषारोप करण्याची

**जुळे देव** केस्टर व पुलुक्स या ग्रीक देवांचे पुतळे.

इच्छा आहे. [20]या कारणासाठी तुम्हाला भेटण्याची आणि तुमच्याशी बोलण्याची मी इच्छा दाखविली. कारण इस्राएलाच्या आशेच्या निष्ठेमुळेच मी या साखळदंडानी जखडलो गेलो आहे."

[21]यहूदी पुढारी पौलाला म्हणाले, "आम्हांला तुमच्या बाबत यहूदीयाहून कसलेही पत्र आलेले नाही, अगर तिकडून येणाऱ्या बंधुजनांपैकी एकाही भावाने तुमच्याविषयी वाईट कळविले अथवा बोललेले नाही. [22]परंतु तुमची मते काय आहेत हे समजून घेण्याची आमची इच्छा आहे. कारण या गटाविरुद्ध (ख्रिस्ती गटाविरुद्ध) सगळीकडे लोक बोलतात हे आम्हांला माहीत आहे."

[23]तेव्हा (रोम शहरातील) यहूदी लोकांनी एक बैठकीचा दिवस ठरविला. जेथे पौल राहत होता, तेथे ते मोठ्या संख्येने जमा झाले. तेव्हा पौलाने त्यांना समजावून सांगितले आणि देवाच्या राज्याविषयी आपली साक्ष दिली. मोशेच्या नियमशास्त्रापासून आणि संदेष्ट्यांच्यापासून फोड करून येशूविषयी त्यांची खात्री पटविण्याचा प्रयत्न केला. हे तो (पौल) सकाळपासून संध्याकाळपर्यंत करीत होता. [24]त्याने फोड करून सांगितलेल्या गोष्टींविषयी काही जणांची खात्री पटली, तर काहींनी तो बोलत असलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवला नाही.

[25]पौल पुढील एक गोष्ट बोलला, त्यावरून मतभेद होऊन त्यांच्यापैकी काही जण उठले आणि तेथून जाऊ लागले. पौल म्हणाला, "यशया संदेष्टयांच्चया द्वारे पवित्र आत्मा आपल्या वाडवडिलांशी जे बोलला, ते खरोखरच किती खरे आहे! यशया म्हणाला होता:

[26]'या लोकांकडे (यहूदी) तुम्ही जा, आणि त्यांना सांगा: तुम्ही एकाल तर खरे पण तुम्हांला समजणार नाही. तुम्ही पाहाल तुम्हाला दिसेल पण तुम्हा काय पाहात ते तुम्हाला कळणार नाही

[27]कारण या लोकांचे विचार मंद झाले आहेत त्यांच्या कानांनी त्यांना ऐकू येत नाही. आणि त्यांनी आपले डोळे बंद केले आहेत नाहीतर त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले असते आणि आपल्या कानांनी ऐकले असते आणि माझ्याकडे वळाले असते आणि मी त्यांना बरे केले असते.'

*यशाया 6:9-10*

[28]"म्हणून देवाचे हे तारण यहूदीतर विदेशी लोकांकडे पाठविण्यात आले आहे. हे तुम्हा यहूदी लोकांना कळावे. ते ऐकतील." [29]*

[30]पूर्ण दोन वर्षे तो त्याच्या भाड्याच्या घरात राहिला. जे जे त्याला भेटायला येत, त्यांचे तो स्वागत करी. [31]त्याने देवाच्या राज्याविषयी प्रचार केला. त्याने प्रभु येशूविषयी शिक्षण दिले. तो हे काम फार धैर्याने करीत असे. आणि कोणीही त्याला बोलण्यात अडवू शकले नाही.

---

**वचन 29** काही प्रतीमध्ये 29 वे वचन घालण्यात आले आहे: "पौलाने असे म्हटल्यावर यहूदी लोक तेथून निघाले. ते आपापसात फार वादविवाद करीत होते."

# पौलाचे रोमकरांस पत्र

1 प्रेषित होण्यासाठी पाचारण केलेला; देवाची सुवार्ता सांगण्यासाठी वेगळा केलेला ख्रिस्त येशूचा सेवक पौल याजकडून,

2 देवाच्या संदेष्ट्याच्या द्वारे पवित्र शास्त्रात पूर्वी सांगितलेली होती, 3 ती ही सुवार्ता देवाचा पुत्र प्रभु येशू ख्रिस्त जो देहाने एक मनुष्य म्हणून दाविदाच्या वंशात जन्माला आला याच्याविषयी आहे. 4 पण पवित्रतेच्या आत्माच्याद्वारे तो मरणातून पुन्हा जिवंत झाला त्यामुळे त्याच्या सामर्थ्यासह “देवाचा पुत्र” असा गणला गेला. 5 त्या आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे आम्हांला कृपा आणि प्रेषित पद मिळाले आहे. अशासाठी की जे यहूदी नाहीत त्यांच्यामध्ये त्याच्या नावांकरिता विश्वासाच्या आज्ञापालनामुळे जो आज्ञाधारकपणा निर्माण होतो तो निर्माण करावा. 6 तुम्हीही त्या यहूदी नसलेल्यांमध्ये आणि देवाकडून येशू ख्रिस्ताचे अनुयायी होण्यासाठी बोलाविलेले आहात.

7 ज्या लोकांवर देवाने प्रेम केले आहे व त्याचे पवित्र जन होण्यासाठी बोलाविलेले असे जे लोक रोममध्ये आहेत त्या सर्वांना मी लिहित आहे. आपला पिता व प्रभु येशू ख्रिस्त यांजकडून तुम्हांस कृपा व शांति असो.

## आभाराची प्रार्थना

8 सुरूवातीलाच तुम्हां सर्वांसाठी येशू ख्रिस्ताद्वारे मी देवाचे आभार मानतो, कारण तुमचा विश्वास जगात सगळीकडे जाहीर होत आहे. 9 देव माझा साक्षी आहे, ज्याची सेवा मी आत्म्याने त्याच्या पुत्राची सुवार्ता सांगून करतो. मी तुमची नेहमी आठवण करतो. 10 माझ्या प्रार्थनेत मी नेहमी मागतो, जर देवाची इच्छा असेल तर शेवटी मला तुम्हांला भेटता येणे शक्य व्हावे. 11 मला तुम्हांला भेटण्याची फार इच्छा आहे. यासाठी की काही आध्यात्मिक दानांविषयी तुम्हांबरोबर सहभागी व्हावे आणि तुम्ही बलवान व्हावे. 12 म्हणजे जोपर्यंत मी तुमच्यामध्ये आहे तोपर्यंत आपण एकमेकांना विश्वासामध्ये मदत करू. माझ्या विश्वासामुळे तुम्हांला व तुमच्या विश्वासामुळे मला फायदा होईल. 13 बंधूनो, पुष्कळ वेळा तुम्हांला भेट देण्याची मला इच्छा झाली. यासाठी की, जसे मला यहूदीतरांमध्ये मिळाले, तसे तुमच्यामध्येसुद्धा फळ मिळावे. परंतु आतापर्यंत मला तुमच्यापर्यंत येण्यास अडथळे आले हे तुम्हांला माहीत असावे.

14 मी सर्व लोकांची–ग्रीक आणि ग्रीक नसलेले, शहाणे आणि मूर्ख– सेवा केली पाहिजे. 15 त्यासाठीच तुम्ही जे रोममध्ये आहात त्या तुम्हांला सुद्धा सुवार्ता सांगण्याची माझी फार इच्छा आहे.

16 मला सुवार्तेची लाज वाटत नाही. कारण देवाचे सामर्थ्य जो कोणी विश्वास ठेवतो त्या सर्वांसाठी तारण आहे. प्रथम यहूद्यांकारिता आणि नंतर ग्रीकांसाठी. 17 कारण सुवार्तेमध्ये देवाचे नितिमत्त्व ते विश्वासापासून विश्वास असे प्रगट झाले आहे. पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, ‘नितिमान विश्वासाद्वारे वाचेल.’*

## सर्व लोकांनी चुका केल्या आहेत

18 लोकांनी केलेल्या प्रत्येक अनितीच्या कृत्यांमुळे व जे आपल्या अनीतीने सत्य दाबून ठेवतात, त्यांच्यामुळे स्वर्गातून देवाचा क्रोध प्रगट होतो. 19 हे असे होत आहे कारण देवाविषयीचे ज्ञान त्यांच्यात दिसून येते व देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. 20 जगाच्या निर्मितीपासून देवाचे अदृश्य गुण, त्याचे सनातन सामर्थ्य व त्याचे देवपण हे देवाने ज्या गोष्टी निर्माण केल्या त्यावरून प्रगट होतात. आणि जर तुम्हांला हे कळत नाही, तर ह्याचे तुम्हांला कसलेच समर्थन करता येणार नाही. 21 कारण जरी त्यांना देव माहीत होता तरी त्यांनी देव म्हणून त्याचा आदर केला नाही, किंवा त्याचे आभार मानले नाहीत, उलट ते आपल्या विचारात निष्फळ झाले आणि मूर्ख अंत:करणे अंधकारमय झाली. 22 जरी गर्वाने त्यांनी स्वत:ला शहाणे समजले तरी ते मूर्ख ठरले. 23 आणि अविनाशी देवाचे गौरव याची मर्त्य मानव, पक्षी, चार पायाचे प्राणी, सरपटणारे प्राणी यांच्यासारख्या दिसणाऱ्या प्रतिमांशी अदलाबदल केली.

24 यासाठी देवाने त्यांना त्यांच्या मनातील वाईट वासनांच्या व वैषयिक अशुद्धतेमुळे सोडून दिले आणि त्यांनी एकमेकांच्या देहाचा अनादर करावा यासाठी त्यांस मोकळीक दिली. 25 त्यांनी देवाच्या खरेपणाशी लबाडीची अदलाबदल केली व निर्माणकर्त्याऐवजी जे निर्मिलेले त्याची उपासना केली. निर्माणकर्ता सर्वकाळ धन्यवादित आहे. आमेन. 26 तेव्हा त्याची त्यांना शिक्षा मिळावी म्हणून देवाने

---

**नीतिमान ... वाचेल** हबक्कूक 2:4

नाईलाजाने त्यांना त्यांच्यावर सोडून दिले. त्यांना लाजिरवाण्या वासनांच्या स्वाधीन केले. त्यांच्या स्त्रियांनी स्त्रियांशी अनैसर्गिक संबंध ठेवले. [27]तसेच पुरुषांनी स्त्रियांबरोबर नैसर्गिक संबंध ठेवणे बाजूला ठेवले व ते एकमेकाविषयी वासनेने पेटून निघाले. पुरुषांनी पुरुषांशी अनुचित कर्म केले आणि आपल्या ह्या निर्लज्ज कृत्यांमुळे त्यांना त्यांच्यामध्ये हे फळ मिळाले.

[28]आणि जेव्हापासून त्यांनी देवाला ओळखण्याचे नाकारले, तेव्हापासून देवाने त्यांना अशुद्ध मनाच्या हवाली केले व ज्या अयोग्य गोष्टी त्यांनी करू नयेत त्या करण्यास मोकळीक दिली. [29]ते सर्व प्रकारची अनीति, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा, हेवा, खून, भांडणे, कपट, कुबुद्धि यांनी भरलेले असून दुसऱ्याविषयी नेहमी वाईट विचार करतात. [30]ते चहाडखोर, दुसऱ्याची निंदा करणारे, देवाचा तिटकारा करणारे, उद्धट, बढाया मारणारे, वाईट मार्ग शोधून काढणारे, आईवडिलांची आज्ञा न मानणारे; तसेच [31]मूर्ख, दिलेले वचन मोडणारे, कुटुंबियांबद्दल वात्सल्य नसणारे, दुष्ट असे आहेत. [32]देवाच्या नितिमत्वाचा जो नियम सांगतो की, जे लोक असे वागतात ते मरणास योग्य आहेत असे जरी त्यांना माहीत होते तरी ते त्या गोष्टी करतात इतकेच नव्हे तर जे असे करतात त्यांना मान्यताही देतात.

## तुम्ही यहूदीसुद्धा पापी आहात

2 म्हणून हे मनुष्या, तू जो कोणी आहेस व जेव्हा तू न्यायासनासमोर बसतोस तेव्हा तुला सबब नाही, कारण जेव्हा तू दुसऱ्यांचा न्याय करतोस तेव्हा तू स्वत:लाही दोषी ठरवितोस कारण जो तू न्याय करतोस, तो तूही तीच गोष्ट करतोस. [2]आता आपणांला माहीत आहे की, जे अशा वाईट गोष्टी करतात त्यांचा न्याय देव करतो. आणि देवाचा न्याय योग्य असतो. [3]तुम्हीसुद्धा जे अशा वाईट गोष्टी करतात त्यांचा न्याय करता पण तुम्हीसुद्धा त्याच गोष्टी करता म्हणून निश्चितपणे तुम्हांला माहीत आहे की, देव तुमचा न्याय करील आणि स्वत:ची सुटका करून घेणे तुम्हांला शक्य होणार नाही. [4]देव तुमच्याशी अत्यंत दयाळूपणे वागतो. तो तुमच्याशी सहनशीलतेने वागतो, तुमच्यामध्ये बदल व्हावा म्हणून देव वाट पाहतो, पण त्याच्या दयाळूपणाबद्दल तुम्ही काहीच विचार करीत नाही. कदाचित तुम्ही तुमचे मन व जीवन बदलावे म्हणून देव तुमच्याशी दयाळूपणे वागतो हे तुम्हांला समजत नसेल. [5]पण तुम्ही लोक कठीण व उद्धट मनाचे आहात, तुम्ही बदलण्यास तयार नाही, त्यामुळे तुम्ही स्वत:च तुमची शिक्षा अधिकाधिक वाढवित आहात. जेव्हा देव (तुम्हाला) त्याचा क्रोध दर्शवील, त्यावेळी तुम्हांला शिक्षा होईल. त्या दिवशी लोक देवाचा यथायोग्य न्याय पाहतील. [6]देव प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कृत्यांप्रमाणे फळ देईल. [7]नेटाने चांगले करीत राहून गौरव, मान, अमरत्व मिळविण्याचा जे लोक प्रयत्न करतात त्यांना तो अनंतकाळचे जीवन देईल. [8]परंतु जे स्वार्थीपणामुळे सत्यात चालणे नाकारतात, व अनीतिने चालतात त्यांची तो क्रोधाने भरपाई करील. [9]जो जे वाईट ते करतो, त्या प्रत्येक मानवावर संकटे आणि दु:खे येतील. म्हणजे पहिल्यांदा यहूद्यांवर व नंतर ग्रीक लोकांवर येतील. [10]परंतु जो चांगली कृत्ये करतो त्या प्रत्येकाला गौरव, मान आणि शांति मिळेल. प्रथम यहूद्यांना व मग ग्रीक लोकांना मिळेल. [11]देवाजवळ पक्षपात नाही.

[12]जे सर्व नियमशास्त्राबाहेर असून पाप करतात, ते नियमशास्त्राबाहेर नाश पावतील. व जितक्यांनी नियम शास्त्राधीन असून पाप केले तितक्यांना नियमशास्त्रानुसार शिक्षा होईल. [13]कारण जे नियमशास्त्र ऐकतात ते देवाच्या दृष्टीने नितिमान आहेत असे नाही. परंतु जे नियमशास्त्र पाळतात आणि नियमशास्त्रांत सांगितल्याप्रमाणे करतात ते नीतिमान ठरतील. [14]कारण जेव्हा यहूदी नसलेले (विदेशी) ज्यांना नियमशास्त्र नाही, मूलत: जरी त्यांना नियमशास्त्र नाही, तरीही नियमशास्त्राप्रमाणे करतात ते स्वत:च नियमशास्त्र आहेत. [15]म्हणजे ते त्याच्या हृदयात नियमशास्त्र लिहिले आहे, असे दाखवतात त्यांची सद्सद्विवेक बुद्धीसुध्दा साक्ष देते आणि त्यांचे एकमेकां विषयीचे विचार त्यांना आरोपी किंवा दोषमुक्त करतात. [16]जेव्हा देव येशू ख्रिस्ताद्वारे मनुष्यांच्या रहस्यांचा, माझ्या सुवार्तेप्रमाणे न्याय करील त्या दिवशी या गोष्टी घडतील.

## यहूदी आणि नियमशास्त्र

[17]परंतु आता तुम्ही जे स्वत:ला यहूदी समजता आणि नियमशास्त्रावर विश्वास ठेवता व आपण देवाच्या जवळचे आहोत असा अभिमान बाळगता, [18]त्या तुम्हांला त्याची इच्छा कळते आणि ज्या सर्वोत्तम गोष्टी आहेत, त्या तुम्ही स्वीकारता कारण नियमशास्त्राद्वारे तुम्हांला शिक्षण मिळाले आहे. [19]तुम्हाला वाटतें की ज्यांना योग्य मार्ग माहित नाही त्यांचे तुम्ही मार्गदर्शक आहात. जे लोक अंधारात (पापांत) आहेत, त्यांचा तुम्ही प्रकाश आहात आणि तुमची खात्री झाली आहे की तुम्ही आंधळ्यांचें पुढारी, जे अंधारात आहेत त्यांचा प्रकाश, [20]मूर्खांचे शिक्षक, बालकांचे गुरु आहात. कारण नियमशास्त्रात तुम्हांला ज्ञान आणि सत्याचे मूर्त स्वरूप मिळाले आहे. [21]तर मग तुम्ही जे दुसऱ्यांना शिकविता ते तुम्ही स्वत:ला का शिकवित नाही? तुम्ही चोरी करू नये असा उपदेश करता पण तुम्ही स्वत: चोरी का करता? [22]तुम्ही व्यभिचार करू नये असे म्हणता ते तुम्ही व्यभिचार का करतां? तुम्ही मूर्तिचा तिरस्कार करता पण देवळात चोरी करता? [23]तुम्ही नियमशास्त्राविषयी बढाई मारता, ते तुम्ही नियमशास्त्र मोडून देवाचा अपमान का करता? [24]शास्त्रलेखात लिहिल्यानुसार तुमच्यामुळे 'विदेशी लोकांमध्ये देवाच्या नावाचा अपमान होत आहे.'* [25]तुम्ही

**विदेशी ... आहे** यशया 52:5

नियमशास्त्र पाळीत असला तर सुंतेला मोल आहे. पण जर तुम्ही नियमशास्त्र पाळीत नाही तर, तुमची सुंता न झाल्यासारखी आहे.
26सुंता न झालेला मनुष्य जर नियमशास्त्राचे पालन करतो, तर त्याची सुंता न होणे हे सुंता झाल्याप्रमाणे समजण्यात येणार नाही काय?
27ज्या मनुष्याची शारीरिक रीतीने सुंता झाली नाही आणि जो नियमशास्त्र पूर्ण करतो, तो ज्या तुम्हांला लिखित नियम व सुंता आहे, तरी नियमशास्त्र मोडता त्या तुमचा न्याय करील.
28कारण जो बाहेरून यहूदी आहे तो खरोखर यहूदी नाही व देहाची बाह्यत्कारी सुंता ही सुंता नव्हे.
29पण जो अंत:करणाचा यहूदी, तो यहूदी आहे आणि खरी सुंता लेखी नियमांद्वारे नव्हे तर आत्म्याने अंत:करणाची केलेली सुंता होय. त्याची प्रशंसा माणसांकडून नव्हे, तर देवाकडून होते.

3 तर मग यहूदी असण्यात फायदा काय? किंवा सुंतेपासून फायदा काय?
2सर्व बाबतीत पुष्कळच आहे. कारण सर्वप्रथम त्यांना देवाची वचने विश्वासाने सोपविण्यात आली होती.
3हे खरे आहे की त्यातील काही अविश्वासू होते; देवाच्या विश्वासूपणाला अविश्वासूपणा नाहीसा करील काय?
4खात्रीने नाही! देव खरा असलाच पाहिजे आणि प्रत्येक मनुष्य खोटा. पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की,

"तू बोलशील तेव्हा योग्य ठरशील आणि तुझा न्याय होत असता तू विजय मिळविशील." *स्तोत्र. 51:4*

5जर आपल्या दुष्टपणामुळे देवाचा न्याय स्पष्ट होत असेल तर त्याला काय म्हणावे? देव जो आपणावर क्रोध आणतो त्याला अनीतिमान म्हणावे काय? (मी हे मानवाप्रमाणे बोलतो).
6खात्रीने नाही! कारण मग देव जगाचा न्याय कसा करील?
7परंतु तुम्ही असे म्हणाल की, "जर देवाचा खरेपणा माझ्या खोटेपणामुळे त्याच्या गौरवासाठी उठून दिसत असेल, तर मग मी पापी का गणला जातो?"
8आपण का वाईट करू नये जर त्याचा परिणाम चांगला होत असेल. कारण काही जण आपल्या विरुध्द वाईट बोलत आहेत, आणि त्यानां मिळणारी शिक्षा त्याबद्दलचा न्याय आहे.

## सर्व लोक दोषी आहेत

9तर मग काय? आम्ही यहूदी, विदेशी लोकांपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत आहोत काय? मुळीच नाही! कारण यहूदी आणि ग्रीक हे सारखेच पापाच्या अधिकाराखाली आहेत.
10शास्त्रात असे लिहिले आहे:

"पापाशिवाय असा कोणीही नाही. एकही नाही.
11समंजस असा कोणी नाही. कोणीही देवाचा शोध करीत नाही.
12ते सर्व दूर गेले आहेत, आणि सर्व लोक निरुपयोगी झाले आहेत. चांगले करणारा कोणी नाही, एकही नाही." *स्तोत्र. 14:1-3*

13"लोकांची तोंडे उघड्या कबरांसारखी आहेत ते आपल्या जिभांनी लोकांना फसवितात." *स्तोत्र. 5:9*

"ते ज्या गोष्टी बोलतात त्यात सापाचे विष असते." *स्तोत्र. 140:3*

14"त्यांची तोंडे शापांनी आणि कडूपणाने भरली आहेत." *स्तोत्र. 10:7*

15"त्यांचे पाय रक्तपात करण्यास नेहमी तयार असतात.
16जेथे कोठे ते जातात तेथे विध्वंस व विपत्ती आणतात.
17त्यांना शांतीचा मार्ग माहीत नाही." *यशया 59:7-8*

18"त्यांच्या डोळ्यांपुढे देवाचे भय नाही." *स्तोत्र. 36:1*

19आता आपणाला माहीत आहे की, नियम शास्त्र जे सांगते ते नियमशास्त्राच्या आधिन असणाऱ्यांकरिता आहे व मनुष्यांच्या कामचुकार पणाला आळा घालण्यासाठी व सर्व जगाला चांगले व पूर्ण होण्यासाठी आहे.त्या नियमशास्त्र प्रमाणे सर्व दोषी आहेत.
20नियमशास्त्राच्या कर्मांनी कोणीही देवासमोर नीतिमान ठरणार नाही. कारण नियमशास्त्राद्वारे पापाची जाणीव होते.

## देव लोकांना नीतिमान कसे करतो?

21परंतु आता देवाची मानवाविषयीची नीतिमत्त्वाची कृती नियमशास्त्राव्यतिरिक्त प्रगट झाली आहे. त्याला नियमशास्त्र आणि संदेष्ट्यांची साक्ष आहे.
22देवाची नीतिमत्त्वाची कृती ही येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे आहे आणि जे विश्वास ठेवतात त्या सर्वांसाठी दाखविली आहे. त्यात भेदभाव नाही.
23सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत.
24परंतु त्यांना देवाने त्याच्या कृपेने येशू ख्रिस्ताद्वारे खंडणी भरून नीतिमान ठरविले आहे.
25लोकांच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून ख्रिस्ताचे रक्त सांडून देवाने त्याला जाहीरपणे पुढे केले. देवाने हे यासाठी सिद्ध केले की तो नीतिमान आहे हे सिद्ध व्हावे.
26देवाच्या सहनशीलतेमुळे त्याने हे सिद्ध केले की, या सध्याच्या काळी तो नीतिमान आहे. यासाठी जो ख्रिस्तावर विश्वास ठेवतो, तो नीतिमान असावा.
27मग आमच्या बढाई मारण्याचे प्रयोजन काय? ती वगळण्यात आली. कोणत्या प्रकारच्या नियमाने? कर्माच्या काय? नाही, तर ज्यामध्ये विश्वास आहे, त्याच्या आधारे.
28कारण आपण असे मानतो की, मनुष्य देवावरील विश्वासाने नियमशास्त्रातील कर्मांशिवाय नीतिमान ठरतो.

[29]किंवा देव फक्त यहूद्यांचाच आहे काय? तो विदेशी लोकांचा नाही काय? होय, तो विदेशी लोकांचादेखील आहे. [30]ज्याअर्थी देव एकच आहे, त्याअर्थी तो ज्यांची सुंता झाली आहे, त्यांच्या विश्वासाने आणि ज्यांची सुंता झालेली नाही अशांनाही विश्वासाने नीतिमान ठरवील.
[31]तर मग आपण या विश्वासाचा आग्रह धरून नियमशास्त्र निरर्थक ठरवितो काय? खात्रीने नाही, आपण तर नियमशास्त्राला मान्यता देतो.

## अब्राहामाचे उदाहरण

4 तर मग अब्राहाम जो मानवी रितीने आपला पूर्वज याच्याविषयी आपण काय म्हणावे? [2]जर अब्राहाम आपल्या कर्मांनी नीतिमान ठरला तर त्याला अभिमान बाळगण्यास जागा आहे, परंतु त्याला देवासमोर अभिमान बाळगणे शक्य नाही. [3]कारण शास्त्र काय सांगते? “अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि त्याचा विश्वास त्याला नीतिमत्त्व असा गणण्यात आला.” [4]जो कोणी काम करतो, त्याला मजुरी ही मेहरबानी म्हणून नव्हे तर त्याचा मोबदला म्हणून दिली जाते. [5]कोणताही मनुष्य कर्मे करून देवाच्या दृष्टीने नीतिमान ठरू शकत नाही. म्हणून त्याने देवावरच भरवसा ठेवावा. मग देव त्या मनुष्याचा भरवसा स्वीकारून त्याला आपला दृष्टीने नीतिमान ठरवतो. दुराचारी मनुष्यालाही नीतिमान ठरविणारा देवच आहे.
[6]ज्याला देव कर्माविचून नीतिमान ठरवितो, त्याच्याविषयीही दावीद म्हणतो;

[7]“ज्याच्या अपराधांची क्षमा झाली आहे. ज्याच्या पापावर पांघरूण घातले आहे तो धन्य!
[8]धन्य तो पुरुष ज्याच्या पापांचा हिशेब प्रभु करणार नाही.”

*स्तोत्र. 32:1-2*

[9]तर मग हे नीतिमत्त्व ज्यांची सुंता झाली आहे आणि ज्यांची सुंता झाली नाही अशांनाही लागू होते काय? जे बेसुंती आहेत अशांनाही ते लागू पडते कारण आम्ही म्हणतो, “अब्राहामाचा विश्वास त्याला नीतिमान असा गणण्यात आला.” [10]आणि तो कसा गणण्यात आला, तो सुंता झालेला असताना का सुंता झालेली नसताना? [11]सुंता झालेली नसताना ही त्याने जो विश्वास दाखविला त्याचा परिणाम व नीतिमत्त्वाचा शिक्का म्हणून त्याला सुंता ही खूण मिळाली, यासाठी की, जे सुंता झाली नसताही विश्वास ठेवतात, त्यांच्याकडे ते नीतिमत्त्व गणले जावे. (त्यांचा तो पिता आहे.) [12]आणि तो ज्यांची सुंता झाली आहे त्यांचाही पिता आहे. पण त्यांची सुंता झालेली आहे म्हणून तो त्यांचा पिता झाला नाही, तर आपला पूर्वज अब्राहाम याची सुंता होण्यापूर्वीसुद्धा तो जसा विश्वासात जगत होता, तसे जर ते जगले तरच अब्राहाम त्यांचा पिता होऊ शकतो.

## विश्वासाद्वारे मिळालेले देवाचे अभिवचन

[13]अब्राहाम आणि त्याच्या वंशजांना जे अभिवचन मिळाले की, ते जगाचे वारस होतील, ते अभिवचन नियमशास्त्रामुळे आले नाही, तर विश्वासाचा परिणाम असलेल्या नीतिमत्त्वामुळे आले. [14]लोकांना देवाने दिलेले अभिवचन जर नियमशास्त्र पाळण्याने मिळत असेल तर विश्वास व्यर्थ आहे. आणि देवाने अब्राहामाला दिलेले अभिवचन व्यर्थ आहे. [15]कारण नियमशास्त्र मनुष्यांच्या आज्ञाभंगामुळे देवाचा क्रोध निर्माण करते आणि जेथे नियमशास्त्र नाही, तेथे आज्ञा मोडणेही नाही.

[16]म्हणून देवाचे वचन हे विश्वासाचा परिणाम आहे यासाठी की ते कृपेद्वारे मिळावे. अशा रीतीने ते अभिवचन अब्राहामाच्या सर्व संततीला आहे, फक्त नियमशास्त्रावर अवलंबून राहतात अशांसाठीच नव्हे तर आब्राहामा प्रमाणे विश्वासाने जगणाऱ्या प्रत्येकासाठी आहे. [17]पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे: “मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा पिता केले आहे.”* आब्राहामाचा देव जो मेलेल्यांना जीवन देतो, जे अस्तित्वात नाही त्यांना अस्तित्वात आणतो त्या देवासमोर हे खरे आहे.

[18]आपल्या अंत:करणात आशा धरून सर्व मानवाच्या अपेक्षेपेक्षा विरुद्ध असा विश्वास धरला म्हणून, “तुझी संतती ताऱ्यांसारखी अगणित होईल आणि तुझे असंख्य वंशज होतील,” असे जे म्हटले आहे त्याप्रमाणे तो ‘अनेक राष्ट्रांचा पिता’ झाला. [19]अब्राहाम जवळ जवळ शंभर वर्षांचा झाला होता, त्यामुळे त्याचे शरीर मृतवतच झाल्यासारखे होते. तसेच सारेलासुद्धा मूल होणे शक्य नव्हते. अब्राहामाने याविषयी विचार केला होता, तरीपण त्याने त्याचा विश्वास कमकुवत होऊ दिला नाही. [20]देवाने जे अभिवचन दिले आहे त्याविषयी त्याने कधीच संशय बाळगला नाही. त्याने विश्वास ठेवण्याचे कधीच थांबविले नाही. तो विश्वासात बळकट होत गेला आणि त्याने देवाला गौरव दिले. [21]त्याची पूर्ण खात्री होती की, देवाने जे अभिवचन दिले ते पूर्ण करण्यास तो समर्थ आहे.
[22]“म्हणूनच त्याला नीतिमान असे गणण्यात आले.”*
[23]ते अभिवचन केवळ अब्राहामासाठीच होते असे नव्हे,
[24]तर आपल्यासाठीसुद्धा होते, ज्याने आपल्या प्रभु येशुला मेलेल्यांतून उठविले आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो,
[25]येशूला आमच्या पापांकरिता मरण्यासाठी दिले गेले. आणि त्याला मरणातून उठविण्यात आले यासाठी की, देवासमोर आम्ही नीतिमान ठरविले जावे.

## देवाशी नीतिमान

5 ज्याअर्थी विश्वासाने आपल्याला नीतिमान ठरविले आहे त्याअर्थी आपल्या विश्वासाचा परिणाम म्हणून

---

**मी ... आहे** उत्पत्ति 17:5

**म्हणूनच ... आले** उत्पत्ति 15:6

आपल्याला येशू ख्रिस्ताद्वारे देवाकडून शांति मिळाली आहे.
2आता आपण ज्या कृपेमध्ये आहोत, त्यात त्याच्याद्वारे
विश्वासाने आम्हीसुद्धा प्रवेश मिळविला आहे. आणि आम्ही
देवाच्या गौरवाचे भागीदार होण्याच्या आशेने अभिमान
बाळगतो. 3याशिवाय आम्ही संकटांतही अभिमान बाळगतो;
कारण आम्हांस ठाऊक आहे की, या संकटांमुळे आम्हांला
अधिक धीर येतो, 4आणि धीराने आम्ही कसोटीस उतरतो
आणि कसोटीस उतरल्याने आशा उत्पन्न होते 5आणि
आशा लाजवित नाही. कारण आपणांस दिलेल्या पवित्र
आत्म्याकडून आपल्या अंत:करणात देवाची प्रीति ओतली
आहे.

6आम्ही जेव्हा आमचे स्वत:चे तारण करण्यासाठी अशक्त
होतो तेव्हा ख्रिस्त योग्य वेळी आमच्यासाठी मरण पावला.
7आता नीतिमान मनुष्यासाठी सुध्दा कदाचित कोणी मरणार
नाही. एखादा मनुष्य चांगला असेल तर त्याच्यासाठी
मरण्याचे धाडस कदाचित कोणीतरी करील. 8परंतु आम्ही
पापी असतानाच ख्रिस्त आमच्यासाठी मरण पावला. त्याद्वारे
त्याने दाखवून दिले की, तो आमच्यावर फार प्रेम करतो.

9तर मग आता आपण खिस्ताच्या रक्ताने नीतिमान
ठरलो आहोत, म्हणून ख्रिस्ताद्वारे देवाच्या रागापासून आपण
वाचले जाणार आहोत. 10आम्ही देवाचे शत्रू असताही
त्याच्या पुत्राच्या मरणाद्वारे त्याने आमच्याशी समेट केला.
त्यामुळे आता आम्ही देवाचे मित्र असल्यामुळे देव आम्हांला
त्याच्या पुत्राच्या जीवनाद्वारे रक्षील. 11इतकेच नव्हे तर
ज्याच्याद्वारे आमचा देवाबरोबर समेट झाला त्या आपल्या
प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे आम्हीसुद्धा देवाविषयी अभिमान
बाळगतो.

## आदाम आणि ख्रिस्त

12म्हणून पाप जसे एका मनुष्याद्वारे, जगात आले आणि
पापाद्वारे मरण आले, तसेच सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व
माणसांमध्ये मरण आले.

13नियमशास्त्र जगात येण्यापूर्वी पाप जगात आले होते.
परंतु नियमशास्त्र नसल्यामुळे कोणाच्याही हिशेबी पाप
गणले जात नव्हते. 14परंतु मरणाने आदामाच्या काळापासून
ते मोशेच्या काळापर्यंत राज्य केले. ज्यांनी पाप केले
नाही, त्यांच्यांवरसुद्धा मरणाने राज्य केले.

देवाची आज्ञा न मानून आदामाने पाप केले म्हणून तो
मेला आदाम, ख्रिस्त जो येणार होता, त्याचे प्रतिरूप आहे.
15पण देवाची मोफत देणगी आदामाच्या पापासारखी नाही.
कारण आदामाच्या पापामुळे पुष्कळ जण मरण पावले.
देवाची कृपा आणि दान, एक मानव येशू ख्रिस्ताच्या
कृपेद्वारे आली व विशेषेकरून सर्व लोकांकरिता विपुल
झाली.

16आदामाने पाप केल्यानंतर तो दोषी ठरला होता पण
देवाची देणगी वेगळी आहे. देवाची मोफत देणगी पुष्कळ
पापांनंतर आली आणि त्या देणगीमुळे तिने आपल्या
लोकांना देवासमोर नीतिमान केले. 17एका मनुष्याच्या
पापामुळे मरणाने राज्य केले. पण आता काही लोक
देवाच्या कृपेची विपुलता आणि देणगी जिच्यामध्ये नीतिमत्त्व
आहे, ते अनुभवतात. ते विशेषेकरून येशू ख्रिस्ताद्वारे
जीवनात राज्य करतील.

18म्हणून एका पापामुळे सर्व मनुष्यांना शिक्षा झाली
तसेच एका नीतिमत्त्वाच्या कृत्याने सर्व लोकांना
अनंतकालचे जीवन देणारे नीतिमत्त्व मिळाले.

19यास्तव आदामाच्या आज्ञाभंगामुळे पुष्कळांना पापी
ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे ख्रिस्ताच्या आज्ञापालनाने
पुष्कळांना नीतिमान ठरविण्यात येईल. 20पापे
वाढवण्यासाठी म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला. परंतु
जेथे पाप वाढले तेथे देवाची कृपाही विपुल झाली.
21अशासाठी की, जसे पापाने मरणाच्या योगे राज्य केले,
त्याच रीतीने देवाची कृपाही, नीतिमत्त्वाने आपल्या प्रभु
येशू ख्रिस्ताद्वारे अनंतकाळच्या जीवनासाठी राज्य करील.

## पापात मेलेले पण ख्रिस्तात जिवंत

6 तर मग आपण काय म्हणावे? देवाची कृपा वाढावी
म्हणून आपण पापांत राहावे काय? 2खात्रीने नाही.
आपण जे पापाला मेलो ते अजूनही जिवंत कसे राहू?
3तुम्हांला माहीत नाही का की ज्या आपण प्रभु येशू
ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतला होता त्या आपला त्याच्या
मरणातही बाप्तिस्मा झाला. 4म्हणून आपण त्याच्या
मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो यासाठी
की, पित्याच्या गौरवाने ख्रिस्त जसा मेलेल्यांतून उठविला
गेला तसे आम्हीही जीवनाच्या नवीनपणात चालावे.

5कारण जर त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने आपण
त्याच्याशी जोडलो आहोत, तर त्याच्या पुनरुत्थानाच्या
प्रतिरूपाने त्याच्याशी जोडले जाऊ. 6आपणांला हे माहीत
आहे की, आपल्यातील जुना मनुष्य ख्रिस्ताबरोबर
वधस्तंभावर खिळला गेला यासाठी की आपल्या पापमय
शरीराचा नाश व्हावा व यापुढे आपण पापाचे दास होऊ
नये. 7कारण जो कोणी ख्रिस्ताबरोबर मरतो तो पापापासून
मुक्त होऊन नीतिमान होतो.

8आणि जर आपण ख्रिस्ताबरोबर मेलो तर आम्ही
विश्वास धरतो की, त्याच्याबरोबर जिवंतही राहू. 9कारण
आम्हांस माहीत आहे की, ख्रिस्त जो मेलेल्यांतून उठविला
गेला तो यापुढे मरणार नाही. मरणाची त्याच्यावर सत्ता
चालणार नाही. 10जे मरण तो मेला ते एकदाच पापासाठी
मेला, परंतु जे जीवन तो जगतो ते तो देवासाठी जगतो.
11त्याच रीतीने तुम्ही स्वत:ला पापाला मेलेले पण ख्रिस्त
येशूमध्ये व देवासाठी जिवंत असे समजा.

12यासाठी की तुम्ही पापाच्या वाईट वासना पाळाव्यात
म्हणून पापाने तुमच्यावर राज्य करू नये. 13आणि अनीतिची
साधने व्हावीत म्हणून तुम्ही आपल्या शरीराचे अवयव
पापाच्या स्वाधीन करू नका. त्याऐवजी तुम्ही जे मरणातून

उठविलेले लोक व जे आता जिवंत आहात ते आपणांला देवाच्या स्वाधीन करा. आपल्या शरीराचे अवयव नीतिची साधने व्हावीत म्हणून देवाच्या स्वाधीन करा.

14पाप तुम्हांवर राज्य करणार नाही. कारण तुम्ही नियमशास्त्राधीन नाही तर देवाच्या कृपेच्या अधीन आहात.

## नीतिमत्तेचे दास

15तर मग आपण काय करावे? आपण नियमशास्त्राधीन नसून देवाच्या कृपेच्या अधीन आहोत म्हणून पाप करावे
काय? 16खात्रीने नाही. तुम्हांला माहीत नाही काय की जेव्हा तुम्ही स्वत:ला आज्ञापालनाकरता एखाद्याच्या स्वाधीन करता तर ज्याची आज्ञा तुम्ही पाळता त्याचे गुलाम आहात. तुम्ही पापांत चालू शकता किंवा देवाची आज्ञा पाळू शकता. पापांमुळे आध्यात्मिक मरण येते. पण
देवाची आज्ञा पाळल्याने तुम्हांला नीतिमत्त्व मिळते. 17पूर्वी
तुम्ही पापाचे गुलाम होता. पाप तुम्हांला काबूत ठेवीत होते. पण देवाचे उपकार मानू या की, ज्या गोष्टी तुम्हांला
शिकविल्या गेल्या त्या तुम्ही पूर्णपणे पाळल्या. 18तुम्हांला
पापांपासून मुक्त केले गेले. आणि नीतिमत्त्वाचे गुलाम करण्यात आले.

19तुमच्या शरीराच्या दुर्बलतेमुळे व लोकांना समजावे म्हणून मी उदाहरणाचा उपयोग करीत आहे. कारण जसे तुम्ही आपले अवयव अशुद्धतेच्या आणि परिणाम म्हणून गुलाम होण्यासाठी स्वैरतेच्या अधीन केले त्याच रीतीने आता आपल्या शरीराचे अवयव देवाच्या सेवेला नीतिमत्त्वाचे गुलाम व्हावे म्हणून अर्पण करा.

20कारण जेव्हा तुम्ही पापाचे गुलाम होता, तेव्हा
नीतिमत्त्वासंबंधाने मोकळे होता. 21आणि त्यावेळेला
तुम्हांला काय फळ मिळाले, त्या गोष्टीची तुम्हांला आता
लाज वाटते, ज्याचा शेवट मरण आहे. 22परंतु आता तुम्हांला
पापापासून मुक्त करून देवाचे गुलाम केले आहे. देवाच्या सेवेसाठी तुमचे फळ तुम्हांला मिळाले आहे व त्याचा शेवटचा परिणाम म्हणजे अनंतकाळचे जीवन आहे.
23कारण पापाची मजुरी मरण आहे. परंतु देवाची ख्रिस्त येशूमध्ये दिलेली मोफत देणगी म्हणजे अनंतकाळचे जीवन आहे.

## विवाहावरून उदाहरण

7 बंधूनो, तुम्हांस माहीत नाही काय? कारण नियमशास्त्र माहीत असलेल्या लोकांबरोबर मी बोलत आहे की, जोपर्यंत मनुष्य जिवंत आहे, तोपर्यंत नियमशास्त्र त्याच्यावर
सत्ता चालविते. 2कारण लग्न झालेली स्त्री जोपर्यंत तिचा
पती जिवंत आहे तोपर्यंत ती नियमशास्त्राने त्याला बांधलेली असते, पण जर तिचा नवरा मेला तर ती पतीविषयीच्या
नियमातून मोकळी होते. 3म्हणून पती जिवंत असताना ती
दुसऱ्याची झाली, तर तिला व्यभिचारिणी असे म्हणतील. पण जर तिचा पती मरण पावला तर ती लग्नाच्या नियमातून मुक्त होते आणि जरी ती दुसऱ्या पुरुषाची पत्नी झाली तरी ती व्यभिचारिणी होत नाही.

4माझ्या बंधूनो, अशाच प्रकारे नियमशास्त्राप्रमाणे तुम्हांलाही ख्रिस्ताच्या शरीराद्वारे ठार मारण्यात आले यासाठी की तुम्ही दुसऱ्या पुरुषाचे, जो मेलेल्यातून उठविला गेला होता त्याचे व्हावे, यासाठी की देवाच्या सेवेसाठी
आमचा वापर व्हावा. 5कारण जेव्हा आम्ही आमच्या
पापी मानवी स्वभावाप्रमाणे जगत होतो तेव्हा पापी वासना नियमशास्त्राच्या द्वारे मरणाला फळ देण्यासाठी आपल्या
अवयवामध्ये कार्य करीत होत्या. 6ज्या नियमशास्त्रामध्ये
आम्ही कैदी झालो होतो त्यात आम्ही मेलेलो असल्याने आता आम्ही नियमशास्त्रापासून मुक्त आहोत तेव्हा आता आम्ही देव, आमचा प्रभु याची पवित्र शास्त्राच्या जुनेपणाप्रमाणे नव्हे तर आत्म्याच्या नवेपणाप्रमाणे सेवा करतो.

## पापाविरुद्धची लढाई

7तर मग आता आपण काय म्हणतो? नियमशास्त्र पाप आहे असे आम्ही म्हणावे काय? खात्रीने नाही! कारण नियमशास्त्रावाचून पाप काय आहे हे मला समजले नसते. खरोखर "लोभ धरू नको" असे नियमशास्त्राने सांगितले नसते तर लोभ म्हणजे काय हे मला माहीत झाले नसते.*
8परंतु पापाने संधी साधली आणि मजमध्ये सर्व प्रकारचा
लोभ भरला. कारण नियमशास्त्राशिवाय पाप मृतवत आहे.
9एके काळी मी नियमशास्त्राशिवाय जगत होतो, परंतु
जेव्हा नियमशास्त्र आले तेव्हा पाप संजीवित झाले. 10आणि
मी मरण पावलो, जी आज्ञा जीवन आणण्यासाठी योजण्यात आली होती तिचा परिणाम माझ्यासाठी मरण असा झाला.
11कारण पापाने संधी साधली आणि त्या आज्ञेयोगे मला
फसविले व तिच्याद्वारे ठार केले. 12म्हणून आम्ही असा
निष्कर्ष काढतो की, नियमशास्त्र पवित्र आहे आणि आज्ञा
पवित्र, नीतिमान आणि उत्तम आहेत. 13याचा अर्थ असा
आहे का, की जे उत्तम होते ते माझ्यासाठी मरण होते काय? खात्रीने नाही! परंतु पाप हे पाप म्हणून ओळखले जावे म्हणून त्याने जे उत्तम त्याद्वारे मजमध्ये मरण निर्माण केले. यासाठी की, पाप त्या आज्ञेमुळे कमालीचे पापिष्ठ व्हावे.

## मनुष्याच्या मनातील लढा

14कारण आम्हांला माहीत आहे की, नियमशास्त्र आत्मिक आणि मी दैहिक मनुष्य आहे. मी गुलाम म्हणून पापांत शरणागत राहावे म्हणून विकलेला असा आहे.
15मी काय करतो हे मला माहीत नाही कारण काय
करायचे हे मला माहीत नाही. कारण ज्या गोष्टींचा मी
द्वेष करतो, त्याच गोष्टी मी करतो. 16आणि ज्या गोष्टी

---

**लोभ ... नसते** निर्गम. 20:17; अनुवाद 5:21

मला कराव्याशा वाटत नाही त्याच करतो तर नियमशास्त्र
उत्तम आहे हे मान्य करतो. 17परंतु खरे तर मी त्या
करतो असे नव्हे तर माझ्या ठायी वसत असलेले पाप त्या
गोष्टी करते.

18होय, मला माहीत आहे की, जे चांगले आहे ते
माझ्यामध्ये वसत नाही. 19चांगले करण्याची माझ्या ठायी
इच्छा आहे, परंतु तसे मी करीत नाही, त्याऐवजी जे फार
वाईट व जे मला करावेसे वाटत नाही तेच करतो.

20आणि ज्याअर्थी, ज्या गोष्टी मला कराव्याशा वाटत
नाहीत त्या मी करतो, तेव्हा खरे तर त्या गोष्टी मी करतो
असे नाही तर माझ्याठायी असणारे पाप त्या गोष्टी करते.

21तर माझ्यामध्ये मला हा नियम आढळतो की,
माझ्यातील मनुष्याला चांगले करावेसे वाटते पण वाईट
ही एकच गोष्ट माझ्याबरोबर आहे. 22माझ्या आत असलेला
मनुष्य देवाच्या नियमशास्त्रामुळे आनंद करतो.

23परंतु माझ्या अवयवात मला निराळाच नियम कार्य
करताना दिसतो. तो माझ्या मनावर अमल करणाऱ्या
नियमाबरोबर लढतो. आणि पापाने मजवर लादलेल्या
नियमाचा, जो माझ्या शरीरात कार्य करतो, त्याचा कैदी
करतो. 24मी अत्यंत दु:खी मनुष्य आहे! मरणाधीन
असलेल्या शरीरापासून मला कोण सोडवील? 25परंतु
आमचा प्रभु येशू ख्रिस्त याच्याद्वारे देवाचे आभार मानतो.

तर मग माझ्या मनाने मी देवाच्या नियमाचा गुलाम
आहे. पण माझ्या पापी स्वभावाने मी पापाने माझ्यावर
लादलेल्या नियमाचा गुलाम आहे.

## पवित्र आत्म्यात जीवन

8 म्हणून आता जे ख्रिस्त येशूमध्ये आहेत त्यांना शिक्षा
नाही. 2कारण आत्म्याचा जो नियम ख्रिस्त येशूमध्ये
जीवन देतो त्याने पापाचा नियम जो तुम्हांला मरणाकडे
नेतो त्यापासून मुक्त केले आहे. 3नियमशास्त्र समर्थ आहे
पण आपण दूर्बळ आहोत त्यामुळे वाचु शकत नाही, देवाने
आपल्या पुत्राला पापी देहाच्या प्रतिरूपाने व पापाकरिता
पाठवून ख्रिस्ताच्या देहामध्ये पापाला न्यायदंड ठरविला.
4यासाठी की, नीतिच्या व आवश्यक गोष्टी आपण जे
देहाच्या पापमय स्वभावाप्रमाणे नव्हे तर आत्म्याप्रमाणे
चालतो, त्या आमच्याद्वारे पूर्ण व्हाव्यात.

5कारण जे त्यांच्या मानवी पापी देहाप्रमाणे जगतात ते
देहाच्या गोष्टींचा विचार करतात, परंतु जे आत्म्याने
चालतात व ज्यांचे मन आत्म्याच्या गोष्टींकडे लागलेले
असते ते त्याप्रमाणे जीवन जगतात. 6देहाचे चिंतन हे मरण
आहे. पण आत्म्याचे मनन हे जीवन आणि शांति आहे.
7मानवी स्वभावाचे अधिकार असलेले पापी मन म्हणजे
देवाबरोबर वैर आहे. कारण ते देवाच्या नियमाच्या आधीन
होत नाही, व त्याला आधीन होताही येत नाही. 8कारण जे
देहस्वभावाच्या आधीन आहेत त्यांना देवाला प्रसन्न करता
येत नाही.

9देवाचा आत्मा तुम्हांमध्ये राहतो, तर तुम्ही देहाचे नसून
आत्म्याचे आहात. परंतु जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा
नसेल तर तो ख्रिस्ताचा नाही. 10उलट जर ख्रिस्त तुम्हांमध्ये
आहे व तुमचा देह पापामुळे मेला आहे तरी नीतिमत्त्वामुळे
तुमच्या आत्म्यातच जीवन आहे. 11आणि ज्या आत्म्याने
येशूला मरणातून उठविले तो त्याचा आत्मा तुम्हांमध्ये
राहतो त्या तुमच्या मर्त्य शरीराला जीवन देईल.

12तर मग बंधूनो, आम्ही कर्जदार आहोत, देहाप्रमाणे
जगण्यास देहाचे नव्हे, 13कारण जर तुम्ही तुमच्या पापी
देहस्वभावाप्रमाणे जीवन जगाल तर तुम्ही मरणार आहात,
परंतु आत्म्याच्या करवी जर तुम्ही देहाची कर्मे ठार माराल
तर तुम्ही जगाल.

14कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवितो, तितके
देवाची मुले आहेत. 15पुन्हा भीति वाटू नये म्हणून तुम्हांला
गुलामगिरीचा आत्मा मिळाला नाही, तर तुम्हांला
दत्तकपणाचा आत्मा मिळाला आहे. त्याच्यायोगे आम्ही
“अब्बा, बापा” अशी हाक मारतो. 16तो आत्मा स्वत:
आपल्याबरोबर दुजोरा देतो की, आपण देवाची मुले आहोत.
17आपण जर देवाची मुले आहोत तर आम्ही वारसही
आहोत आणि ख्रिस्ताबरोबर वारस आहोत. खरोखर आपण
त्याच्याबरोबर दु:ख भोगतो यासाठी की, त्याच्याबरोबर
आपणांस गौरवही मिळावे.

## भविष्यात आम्हांला गौरव मिळेल

18कारण भविष्यकाळात आपल्याला प्रगट करण्यात
येणाऱ्या गौरवाच्या तुलनेने सध्याच्या काळातील दु:खे
काहीच नाहीत असे मी मानतो. 19कारण निर्माण केलेले
जग पुत्राच्या प्रगट होण्याच्या काळाची वाट पाहत आहे.
20निर्माण केलेले जग सर्व स्वाधीन होते ते इच्छेने नव्हे
तर देवाने ते अधीन ठेवले होते म्हणून, 21या आशेने की,
निर्माण केलेले जग त्याच्या अशुद्धतेच्या गुलामगिरीतून
मुक्त व्हावे. व देवाच्या मुलांचे वैभवी गौरव त्याने उपभोगावे.

22कारण आपल्याला माहीत आहे की, आजपर्यंत, निर्माण
केलेले संपूर्ण जग कण्हत, वेदना भोगीत आहे. 23परंतु
निर्माण केलेले जगच नव्हे तर आपणांस ज्यांना आत्म्याचे
प्रथम फळही मिळाले आहे ते, आपणही संपूर्ण
दत्तकपणासाठी आपल्या शरीराच्या नाशवंत, मर्त्य
स्वभावापासून मुक्ती व्हावी म्हणून आतल्याआत कण्हत
आहोत. 24आपण आपल्या मनातील या आशेने तारले
गेलो आहोत. परंतु आपण ज्याची आशा धरली ते पाहू
शकलो तर ही आशा नसेल. कारण जे पाहतो त्याची
आशा कोण धरील? 25परंतु जर आपण जे पाहत नाही
त्याची आशा धरतो तर आपण धीराने त्याची वाट पाहतो.

26जेव्हा आपण कण्हतो तेव्हा आत्माही आपल्या
अशक्तपणात आपणांस मदत करतो. कारण कशासाठी
आपण प्रार्थना करावी, हे आपणांस माहीतसुद्धा नसते.
परंतु आत्मा स्वत: आपणांसाठी शब्दांनी जे व्यक्त करता

येत नाही, अशा कण्हण्याने मध्यस्थी करतो. 27परंतु जो
देव आपली अंत:करणे शोधतो त्याला आत्म्याचा हेतू
काय आहे हे माहीत आहे. कारण देवाच्या इच्छेने आत्मा
संताच्या वतीने मध्यस्थी करतो.

28आणि आपणास माहीत आहे की, प्रत्येक गोष्टीत
हेतूप्रमाणे आत्मा जे देवावर प्रेम करतात व त्याच्या
संकल्पाप्रमाणे बोलाविलेले असतात त्यांच्यासह जे चांगले
आहे ते करण्याचे काम करतो. 29ज्यांना देवाने अगोदरच
निवडले होते त्यांना त्याच्या पुत्राच्या सारखे व्हावे म्हणून
नेमले होते. यासाठी की देवाचा पुत्र पुष्कळ बंधूंमध्ये
ज्येष्ठ व्हावा. 30देवाने ज्यांना अगोदरच नेमले होते, ज्यांना
बोलाविले होते त्यांना नीतिमान केले आणि ज्यांना नीतिमान
केले त्यांना गौरवसुद्धा दिले.

## देवाची ख्रिस्त येशूमधील प्रीति

31यावरून आपण काय म्हणावे? देव जर आपल्या
बाजूचा आहे तर आपल्या विरुद्ध कोण? 32ज्याने आपल्या
पुत्राला राखून ठेवले नाही, परंतु आपणा सर्वांसाठी
मरण्यासाठी दिले तो आपणांला पुत्रासह सर्व काही देणार
नाही काय? 33देवाच्या निवडलेल्या लोकांवर आरोप कोण
ठेवील? देव हाच एक त्यांना निरपराध ठरवितो. 34दोषी
ठरवितो तो कोण? जो मेला आणि याहीपेक्षा अधिक
महत्त्वाचे म्हणजे जो उठविला गेला व देवाच्या उजवीकडे
बसला आहे, जो आपल्या वतीने मध्यस्थी करतो तो ख्रिस्त
येशू आहे. 35ख्रिस्ताच्या प्रेमापासून आपणांस कोण वेगळे
करील? त्रास, कष्ट, छळ, भूक, नग्नता, संकटे किंवा
तलवारीने वध हे वेगळे करतील काय? 36असे लिहिले
आहे की,

"दिवसभर आम्ही तुझ्यामुळे वधले जात आहोत.
आम्हांला कापायला नेत असलेल्या मेंढराप्रमाणे
समजतात." *स्तोत्र. 44:22*

37तरी या सर्व गोष्टींमध्ये आम्ही ज्याने आम्हांवर प्रीति
केली त्याच्याद्वारे अत्यंत वैभवी जय मिळवीत आहोत.
38कारण माझी खात्री आहे की, मरण किंवा जीवन,
देवदूत, अधिकारी आत्मे हल्लीच्या किंवा भविष्यकाळात,
39येशूचे सामर्थ्य, उंच किंवा खाली, जगात निर्माण केलेली
कुठलीही गोष्ट आपणांस देवाचे प्रेम जे ख्रिस्तामध्ये आढळते
त्यापासून वेगळे करू शकणार नाही.

## देव आणि यहूदी लोक

9 मी ख्रिस्तामध्ये खरे बोलतो, खोटे बोलत नाही. पवित्र
आत्म्याने बोध केलेला माझा विवेक मजविषयी साक्ष
देतो 2की, मला मोठे दु:ख आहे आणि माझ्या अंत:करणात
सतत वेदना आहेत, 3कारण माझे भाऊ, वंशाने माझे
नातेवाईक यांच्याकरिता शापित व्हावे आणि ख्रिस्तापासून
मी वेगळा केलेला असावा अशी मी इच्छा करतो. 4इस्राएली
कोण आहेत? ते देवाचे निवडलेले लोक आहेत. या
लोकांकडे देवाचे गौरव आणि देवाने त्यांच्याशी केलेला
करार आहे. देवाने त्यांना नियमशास्त्र दिले. आणि उपासना
करण्याचा योग्य मार्ग दिला. आणि देवाने त्यांना त्याचे
अभिवचन दिले आहे. 5त्यांचे पूर्वज थोर आहेत. मानवी
दृष्टीने सांगताना ख्रिस्त त्यांच्यापासून आला, जो
सदासर्वकाळ सर्व लोकांवर धन्यवादित देव आहे. आमेन.

6परंतु देवाचे वचन व्यर्थ झाले असे नाही. कारण सर्व
जण जे इस्त्रएलापासून आले आहेत ते खरोखरच इस्राएली
आहेत असे नाही. 7याचा अर्थ असाही नाही की, ते
अब्राहामापासून आलेले आहेत, म्हणून खरोखरच ती
अब्राहामाची मुले आहेत, तर देवाने म्हटल्याप्रमाणे,
"इसहाकाच्या वंशातील लोकांना तुझे संतान म्हटले
जाईल."* 8म्हणजे देहदृष्ट्या जन्मली ती देवाची मुले आहेत
असे नाही तर वचनाच्या मुलांना संतान म्हटले आहे.
9"नेमलेल्या वेळी मी परत येईन त्यावेळेला सारेला पुत्र
होईल."* आणि हे ते वचन आहे.

10इतकेच नव्हे तर रिबेकासुद्धा एकाकडून म्हणजे
आपला पूर्वज इसहाक याच्याकडून गरोदर झाली. 11मुले
जन्माला येण्यापूर्वी आणि त्यांनी काही बरे किंवा वाईट
केले नव्हते, तेव्हा निवडीवरून असणारा देवाचा पूर्वसंकल्प
कायम राहावा, म्हणजे कर्मावरून नाही तर
बोलावणाऱ्याच्या इच्छेवरून घडावे. 12म्हणून तिला
सांगितले होते की, "वडील धाकट्याची सेवा करील."*

13पवित्र शास्त्रात लिहिले आहे की, "मी याकोबावर
प्रेम केले आणि एसावाचा द्वेष केला."*

14तर मग आपण काय म्हणावे? देवाच्या ठायी अन्याय
नाही. आहे काय? खात्रीने नाही. 15कारण तो मोशेला
म्हणाला, "ज्याच्यावर मला दया करायची त्यावर मी दया
करीन, आणि ज्याच्यावर करुणा करायची त्याच्यावर
करुणा करीन."* 16म्हणून ते इच्छा करणाऱ्या वर
किंवा पाळणाऱ्यावर नव्हे तर दयाळू देवावर अवलंबून
आहे. 17कारण पवित्र शास्त्रात देव फारोला म्हणाला,
"याच हेतूसाठी मी तुला उच्च केले यासाठी की मी तुझ्यामध्ये
आपले सामर्थ्य दाखववावे आणि माझे नाव सर्व पृथ्वीवर
गाजविले जावे."* 18म्हणून देव ज्याच्यावर दया करायची
त्यास दया करतो आणि ज्यास कठीण करायचे त्यास
कठीण करतो.

---

**इसहाकाच्या ... जाईल** उत्पत्ति 21:12

**नेमलेल्या ... होईल** उत्पत्ति 18:10,14

**वडील ... करील** उत्पत्ति 24:23

**मी ... केला** मलाखी 1:2-3

**ज्याच्यावर ... करीन** निर्गम 33:19

**याच ... जावे** निर्गम 9:16

19तुमच्यापैकी एखादा मला म्हणेल, “देव जर आमच्या
कृति नियंत्रित करतो तर तो अजूनही आमचे दोष का
काढतो? शेवटी त्याच्या इच्छेला कोण विरोध करील?”
20होय, हे मानवा, देवाला उलट उत्तर देणारा तू कोण
आहेस? जे घडले आहे ते घडणाऱ्याला, “तू मला असे का
केलेस” असे विचारील काय? 21एका ठराविक
गोव्व्यापासून एक भांडे गौरवासाठी आणि एक भांडे
अपमानासाठी करावे असा कुंभाराला मातीवर अधिकार
नाही काय?
22परंतु देवाला जरी त्याचा राग आणि सामर्थ्य व्यक्त
करावेसे वाटत होते, तरी त्याने जी माणसे नाशासाठी
नेमलेली होती, त्यांचे मोठ्या धीराने सहन केले नाही
काय?
23जी त्याच्या दयेची पात्रे होणार होती, त्यांना त्याने
गौरव मिळण्यासाठी तयार केले, त्यांचे त्याने सहन केले
यासाठी की त्यांना त्याच्या दयेची विपुलता कळावी. 24ज्या
आपणांला त्याने फक्त यहूद्यांतूनच नव्हे तर विदेशातूनही
बोलाविले होते. 25होशेयाच्या ग्रंथात पवित्र शास्त्र सांगते,

“जे माझे लोक नव्हते, त्यांना मी माझे लोक म्हणेन.
आणि ज्या स्त्रीवर प्रीति केली नव्हती तिला प्रिय म्हणेन.”

*होशेय 2:23*

26“आणि असे होईल की, जेथे ‘तुम्ही माझे लोक नाहीत’
असे म्हटले होते तेथे त्यांना जिवंत देवाची मुले म्हणण्यात
येईल.” *होशेय 1:10*

27आणि यशया इस्राएलाविषयी असे ओरडून सांगतो
की,
“जरी इस्राएलाविषयी मुलांची संख्या समुद्राच्या
वाळूसारखी असली तरी त्यांच्यातील फक्त थोडेच तारण
पावतील. 28कारण पूर्ण करून व आटोपते घेऊन प्रभु
पृथ्वीवर आपला शब्द अंमलात आणील.”*
29आणि जसे यशयाने पूर्वी सांगितले होते,
“जर सेनाधीश परमेश्वराने आम्हांसाठी बीज राहू दिले
नसते तर आम्ही सदोम आणि गमोरासारखे झालो
असतो.”*
30तर मग आपण काय म्हणावे? आम्ही असे अनुमान
काढतो की, जे यहूदीतर देवाला अपेक्षित असलेल्या
नीतिमत्त्वाच्या मागे लागले नव्हते त्यांना त्यांचे न्यायीपण
विश्वासाचा परिणाम म्हणून मिळाले. 31परंतु इस्राएल लोक
जे नियमशास्त्राच्या पालनातून मिळणाऱ्या नीतिमत्त्वाच्या
मागे लागले होते त्यांना नियमशास्त्र मिळाले नाही. 32का
नाही? कारण ते हे नीतिमत्त्व विश्वासाने नाही तर त्यांनी
केलेल्या कर्मांनी मिळेल असे समजून त्याच्या मागे लागले
होते व ते अडखळण्याच्या दगडावर ठेचाळले. 33पवित्र
शास्त्रात असे लिहिले आहे,

“पाहा मी सीयोनात अडखळण्याचा दगड आणि अपाय
करणारा खडक ठेवतो. परंतु जो त्याच्यावर विश्वास
ठेवतो तो लज्जित होणार नाही.”

*यशया 8:14; 28:16*

10 बंधूनो, इस्राएलाच्या वतीने माझी मनीषा आणि
देवाजवळ प्रार्थना आहे की, 2त्यांचे तारण व्हावे,
कारण मी त्यांच्याविषयी साक्ष देतो की, त्यांना देवाविषयी
कळकळ आहे, परंतु ती ज्ञानावर आधारित नाही.
3देवापासून मिळणाऱ्या नीतिमत्त्वाविषयी त्यांना माहिती
नसल्यामुळे ते आपलेच नीतिमत्त्व स्थापावयास पाहत होते.
त्यामुळे ते देवाच्या नीतिमत्त्वाला वश झाले नाहीत. 4कारण
ख्रिस्त नियमशास्त्राचा शेवट आहे यासाठी की, जे विश्वास
ठेवतात त्यांना नीतिमत्त्व मिळावे.
5नियमशास्त्राद्वारे मिळणाऱ्या नीतिमत्त्वाविषयी मोशे
लिहितो, “जो मनुष्य या गोष्टी करतो तो त्याकडून जगेल.”*
6विश्वासाने मिळणारे नीतिमत्त्व हे सांगते, “तुम्ही आपल्या
मनात म्हणू नका की स्वर्गात कोण जाईल? (म्हणजे
ख्रिस्ताला खाली आणावयास) 7किंवा “खाली अधोलोकात
कोण जाईल? (म्हणजे ख्रिस्ताला मेलेल्यातून वर
आणायला). 8नाही! शास्त्र काय म्हणते? “ते वचन
तुमच्याजवळ, तुमच्या मुखात, तुमच्या अंत:करणात
आहे.”* ते वचन हे आहे 9की, जर तू तुझ्या मुखाने
“येशू प्रभु आहे” असा विश्वास धरतोस आणि आपल्या
अंत:करणात देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा
विश्वास धरतोस तुझे तारण होईल 10कारण नीतिमत्त्वासाठी
मनुष्य अंत:करणाने विश्वास ठेवतो आणि तारणासाठी
विश्वासाने कबूल करतो. 11शास्त्र सांगते, “जो कोणी
त्याच्यावर विश्वास ठेवतो तो लज्जित होणार नाही.”*
12याचे कारण की, यहूदी आणि ग्रीक यांच्यात भेद नाही.
कारण प्रभु हा सर्वांचा प्रभु आहे. जे हाक मारतात त्या
सर्वांवर दया करण्या इतका तो संपन्न आहे. 13कारण “जे
कोणी प्रभूचे नाव घेऊन हाक मारतील, त्यांचे तारण
होईल.”*
14परंतु ज्याच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही त्याला
हाक मारणे त्यांना कसे शक्य होईल? ज्याच्याविषयी त्यांनी
ऐकले नाही त्याच्यावर विश्वास ठेवणे त्यांना कसे शक्य

---

**जरी ... आणील** यशया 10:22-23

**जर ... असतो** यशया 1:9

**जो मनुष्य ... जगेल** लेवीय 18:5

**वचन 6–8** अनुवाद 30:12-14

**जो कोणी ... नाही** यशय 28:16

**जे कोणी ... होईल** योएल 1 2:32

होईल? आणि जर कोणी त्यांना उपदेश केला नाही, तर
ते कसे ऐकतील? 15त्यांना जर पाठविले नाही तर उपदेश
करणे त्यांना कसे शक्य होईल? असे लिहिले आहे की,
“शुभवार्ता आणणाऱ्याचे पाय किती सुंदर आहेत!”*
16परंतु सर्वच यहूद्यांनी ती शुभवार्ता स्वीकारली नाही.
यशयाने म्हटल्याप्रमाणे “प्रभो, आम्ही ज्या गोष्टी त्यांना
सांगितल्या, त्यावर कोणी विश्वास ठेवला?” 17म्हणून जे
ऐकले त्याचा परिणाम विश्वास आणि जेव्हा कोणी
येशूविषयी उपदेश केला.
18परंतु मी म्हणतो, “त्यांनी आमचा उपदेश ऐकला
नव्हता काय?” होय. त्यानी ऐकला; आत्मा म्हणतो:

“त्यांच्या आवाजाचा नाद सर्व पृथ्वीवर गेला आहे आणि
त्यांचे शब्द पृथ्वीच्या शेवटापर्यंत गेले आहेत.”
*स्तोत्र. 11:4*

19परंतु मी म्हणतो, “इस्राएल लोकांना कळले नव्हते
काय?” होय, त्यांना कळले. प्रथम मोशे म्हणतो,

“खरे तर ज्या लोकांचे राष्ट्र नाही त्यांचा उपयोग करून
मी तुम्हांला मत्सरी करीन. विश्वासहीन राष्ट्राचा उपयोग
करून मी तुम्हांला राग आणीन.” *अनुवाद 32:21*

20नंतर यशया फार धीट होऊन म्हणतो,

“जे मला शोधीत नव्हते त्यांना मी सापडलो, जे माझी
चौकशी करीत नसत त्यांना मी प्रगट झालो.”
*यशया 65:1*

21परंतु देव इस्राएल लोकांविषयी म्हणतो, “ज्या लोकांनी
माझी आज्ञा मोडली, आणि मला विरोध केला त्यांच्याकडे
सर्व दिवसभर मी आपले हात पसरले आहेत.”*

## देव त्याच्या लोकांना विसरला नाही

11 तर मग मी म्हणतो, “देवाने आपल्या लोकांना
सोडून दिले आहे काय?” खात्रीने नाही! कारण
मीही इस्राएली आहे. अब्राहामापासूनचा, बन्यामिन
वंशातला. 2देवाला ज्यांचे पूर्वज्ञान होते त्या इस्राएली लोकांना
त्याने सोडून दिले नाही. एलियासंबंधी पवित्र शास्त्र काय
म्हणते ते तुम्हांस ठाऊक नाही काय? तो देवाजवळ इस्राएल
लोकांविरुद्ध अशी विनंति करतो की,
3“हे प्रभु, त्यांनी तुझ्या भविष्यवाद्यांना ठार मारले आहे.
त्यांनी तुझ्या वेद्या पाडून टाकल्या आहेत. तुझ्या संदेष्ट्यां
पैकी मीच एकटा राहिलो आहे. आणि ते माझाही जीव
घ्यावयास पाहतात.”* 4परंतु त्याला देवाचे काय उत्तर
मिळाले? देव म्हणतो, “ज्यांनी बालापुढे गुडघे टेकले नाहीत
अशी सात हजार माणसे मी आपणासाठी राखून ठेवली
आहेत.”* 5त्याच प्रमाणे हल्ली देवाच्या कृपेच्या
निवडीप्रमाणे काही शिल्लक राहिले आहेत. 6आणि जर
तो देवाच्या कृपेचा परिणाम असेल तर तो लोकांच्या
कर्माचा नाही. नाही तर देवाची कृपा ही कृपाच राहत
नाही. 7तर मग काय? इस्राएल लोक जे मिळविण्याचा
प्रयत्न करीत होते ते त्यांना मिळाले नाही. परंतु जे निवडलेले
त्यांना मिळाले आणि बाकीचे कठीण झाले. 8पवित्र शास्त्रात
लिहिल्याप्रमाणे:

“देवाने त्यांना बधीरपणाचा आत्मा, पाहू न शकणारे
डोळे ऐकू न शकणारे कान दिले आणि आजपर्यंत हे असे
चालूच आहे.” *अनुवाद 29:4*

9दाविद म्हणतो,

“त्यांचे मेज त्यांस सापळा आणि फास होवो. त्यांचे पतन
होवो आणि त्यांना अपराधाबद्दल शिक्षा व प्रायश्चित्त मिळो.
10दिसू नये म्हणून त्यांचे डोळे अंधकारमय होवोत.
आणि त्यांच्या कष्टाच्या ओझ्याखाली तू सर्वकाळ त्यांच्या
पाठी वाकीव.” *स्तोत्र. 69:22-23*

11म्हणून मी असे म्हणतो, यहूद्यांचा नाश व्हावा म्हणून
ते अडखळले नाहीत काय? खात्रीने नाही! त्यांच्या चुकीमुळे
विदेशी लोकांना तारण प्राप्त व्हावे आणि त्यामुळे
त्यांच्यामध्ये ईर्षा उत्पन्न व्हावी म्हणून असे झाले. 12परंतु
त्यांनी केलेल्या चुकीचा अर्थ जगास विपुलता आणि आमचा
बोध उपदेश न ऐकल्याने त्यांच्या संख्येत झालेला ऱ्हास
याचा अर्थ यहूदीतरास विपुलता तर आमचा बोध
स्वीकारल्याने त्यांचा समावेश झाल्यास किती तरी अधिक
विपुलता येईल.
13तर तुम्ही जे यहूदी नाही त्यांना मी निश्चितपणे सांगतो
कारण मी यहूदीतरांसाठी प्रेषित आहे. मी माझ्या सेवेला
मान देतो. 14या आशेने की, माझ्या हाडामांसातल्यांना
ईर्ष्यावान करून त्यांच्यातील काही जणांचे तारण करावे.
15जर देवाने त्यांच्या केलेल्या अव्हेराचा परिणाम जगासाठी
समेट झाला. तर देवाकडून स्वीकार याचा अर्थ मेलेल्यांतून
जिवंत होणे, नाही का? 16जर प्रथम भाग पवित्र आहे, तर
संपूर्ण पिठाचा गोळा पवित्र आहे. जर झाडाचे मूळ पवित्र
आहे तर फांद्यासुद्धा पवित्र आहेत.
17परंतु काही डहाळ्या तोडून टाकण्यात आल्या आणि
तुम्ही रानटी जैतून असता कलम करून लावले गेलात व

---

**शुभवार्ता ... आहेत** यशया 52:7

**ज्या ... आहेत** यशया 65:2

**हे प्रभु ... पाहतात** 1राजे 19:10,14

**ज्यांनी ... आहेत** 1राजे 19:18

जैतुनाच्या पौष्टिक मुळाचे भागीदार झालात. 18तर तुम्ही
त्या तोडलेल्या फांद्यांहून मोठे आहात अशी बढाई मारू
नका. लक्षात ठेवा, तुम्ही मुळाला आधार देत नाही, तर
मूळ तुमचे पोषण करते.
19आता तुम्ही म्हणाल, “होय, आमचे कलम व्हावे
यासाठीच फांद्या तोडल्या होत्या.” 20त्या त्यांच्या
अविश्वासामुळे तोडून टाकण्यात आल्या हे खरे आहे
परंतु तुम्ही तुमच्या विश्वासामुळे स्थिर आहात. यास्तव
अभिमान बाळगू नका. तर भीति बाळगा. 21कारण देवाने
जर मूळ फांद्याही राखल्या नाहीत तर तो तुम्हांलाही राखणार
नाही.
22अशा प्रकारे तुम्ही देवाचा दयाळूपणा आणि कठोरताही
पाहा. जे पतन पावले आहेत त्यांच्याविषयी कठोरता परंतु
देवाचा तुमच्याविषयीचा दयाळूपणा, जर तुम्ही त्याच्या दयेत
राहिला नाहीत तर तुम्हांला झाडापासून छाटून टाकले
जाईल. 23आणि इस्राएल त्याच्या अविश्वासात राहिले नाही
तर तेही कलम पुन्हा लावण्यात येईल. कारण देव त्यांना
कलम म्हणून लावण्यास समर्थ आहे. 24म्हणून तुम्ही जे
निसर्गत: रानटी जैतुनांची फांदी म्हणून तोडले गेलात आणि
निसर्गक्रम सोडून मशागत केलेल्या जैतुनाच्या झाडास
कलम असे लावले गेलात तर किती सहजपणे मशागत
केलेल्या जैतुनांच्या फांद्या त्या मूळच्या झाडात कलम
केल्या जातील!
25परंतु बंधूनो, तुम्ही आपल्या शहाणपणावर अवलंबून
या रहस्याविषयी अजाण असावे असे मला वाटत नाही.
इस्राएली लोकांत अंशत: कठीणपणा आला आहे आणि
तो देवाच्या कुटुंबात विदेशी लोकांचा भरणा पूर्ण होईपर्यंत
राहणार आहे. 26आणि नंतर इस्राएलाचे राष्ट्र म्हणून तारण
होईल. असे लिहिले आहे,

“मुक्त करणारा सीयोनातून येईल, तो याकोबाच्या
घराण्यातून त्यांची सर्व अभक्ती दूर करील.
27जेव्हा मी त्यांच्या पातकांची क्षमा करीन. तेव्हा
त्यांच्याशी मी हा करार करीन.”
*यशया 59:20-21; 27:9*

28जेथ पर्यंत सुवार्तेचा संबंध आहे ते तुमच्यामुळे शत्रू
आहेत परंतु देवाच्या निवडीमुळे त्याने पूर्वजांना दिलेल्या
वचनाप्रमाणे देव त्यांच्यावर प्रेम करतो. 29कारण देवाने
ज्यांना बोलाविले आहे आणि तो जे देतो त्याच्याविषयी
कधीही आपले मत बदलत नाही.
30कारण जसे तुम्ही पूर्वी देवाची आज्ञा पाळत नव्हता,
परंतु आता तुम्हांला त्यांच्या आज्ञाभंगामुळे देवाची दया
मिळाली आहे. 31त्याचप्रमाणे तेही आता आज्ञा मोडणारे
झाले आहेत, यासाठी की त्यांना आता देवाची कृपा मिळावी.
32कारण देवाने सर्व लोकांना आज्ञाभंगाच्या तरुंगात कोंडले
आहे, यासाठी की, त्याने त्यांच्यावर दया करावी.

## देवाचे गौरव

33देवाच्या बुद्धीची आणि ज्ञानाची संपत्ती किती अगाध
आहे. त्याच्या निर्णय आणि त्याच्या मार्गाचा माग काढणे
कठीण आहे. 34पवित्र शास्त्र सांगते,

“प्रभूचे मन कोणाला माहीत आहे किंवा त्याचा सल्लागार
कोण असेल?” *यशया 40:13*

35“प्रथम कोणी काही त्याला दिले का यासाठी की
त्याची परतफेड देवाने करावी?” *ईयोब 41:11*

36कारण सर्व गोष्टी त्याने निर्माण केल्या आणि त्याच्या
द्वारे अस्तित्वात आहेत. त्याला युगानुयुग गौरव असो.
आमेन.

## आपले जीवन देवाला द्या

12 म्हणून बंधूंनो, देवाच्या दयेमुळे मी तुम्हांला
विनवितो की, तुमची शरीरे देवाला संतोष देणारा
जिवंत यज्ञ अशी अर्पण करा. ही तुमची आध्यात्मिक
सेवा आहे. 2आणि यापुढे या जगाच्या आदर्शाप्रमाणे आचरण
करू नका, त्याऐवजी तुमच्या मनाच्या नवीनपणामुळे तुमचा
बदल होऊ द्या. यासाठी की देवाची पूर्ण आणि त्याला
आनंद देणारी उत्तम इच्छा काय आहे हे तुम्हांला कळावे
व तिचा तुम्ही स्वीकार करावा. 3मला देण्यात आलेल्या
कृपादानाच्या दृष्टीने मी तुम्हांतील प्रत्येकाला सांगतो की,
विचार करण्यास योग्य आहे त्या आपल्या योग्यतेपेक्षा
आपणांला अधिक श्रेष्ठ मानू नका. तर देवाने सोपवून
दिलेल्या परिमाणाप्रमाणे समंजस असा जो मार्ग त्या दृष्टीने
विचार करा. 4कारण एका शरीरात आपले अनेक अवयव
आहेत तरी सर्व अवयवांचे कार्य एकच नसते. 5त्याचप्रमाणे,
आपण पुष्कळ अंग असून ख्रिस्तामध्ये एक शरीर व
एकमेकांचे अवयव आहोत. 6देवाने दाखविलेल्या दयेनुसार
आपणांस निरनिराळी दाने आहेत, जर कोणाला देवाचा
संदेश देण्याचे दान आहे तर त्याने ते आपल्या विश्वासाच्या
प्रमाणाने उपयोगात आणावे. 7जर कोणाला सेवेचे दान
असेल तर त्याने सेवेला वाहून घ्यावे. कोणाला शिक्षणाचे
दान असेल तर त्याने शिक्षणाला वाहून घ्यावे. 8कोणाला
बोध करण्याचे दान असेल तर त्याने बोध करण्यास
वाहून घ्यावे. ज्याला दानधर्म देण्याचे दान असेल त्याने ते
सद्हेतूने द्यावे. ज्याला अधिकाराचे दान असेल त्याने दक्षतेने
ते काम करावे. ज्याला दयेचे दान असेल त्याने आनंदाने
दया करावी.
9तुमची प्रीति प्रामाणिक असावी. जे वाईट त्याचा द्वेष
करा व बऱ्याला चिकटून राहा. 10बंधूप्रेमाच्या बाबतीत
एकमेकांशी ममतेने वागा. आदराच्या बाबतीत स्वत:पेक्षा
इतरांचा बहुमान करा. 11आस्थेविषयी आळशी होऊ नका.
आत्म्यात उत्सुक असा. प्रभूची सेवा करा. 12आपल्या

घरात आनंदी राहा. संकटात सहनशील राहा. चिकाटीने
प्रार्थना करा. 13पवित्र जनांच्या गरजा भागवा. आदरातिथ्य
करण्यात तत्पर असा.

14जे तुमचा छळ करतात त्यांना आशीर्वाद द्या.
आशीर्वादच द्या. शाप देऊ नका. 15जे आनंद करतात
त्यांच्याबरोबर आनंद करा. रडणाऱ्यांबरोबर रडा.
16एकमेकांबरोबर ऐक्याने रहा, गर्व करू नका. त्याऐवजी
नम्र लोकांच्या सहवासात रहा. स्वत:स शहाणे समजू नका.
17कोणाचीही वाईटाबद्दल वाईट अशी फेड करून नका.
सर्व लोकांच्या दृष्टीने चांगले ते करण्याचा प्रयत्न करा.
18शक्य असेल तर ते तुमच्यावर अवलंबून असल्याने
सर्व लोकांबरोबर शांतीने राहा.

19प्रिय बंधूंनो, सूड उगवू नका. देवाच्या रागाला वाट
द्या. असे लिहिले आहे, “सूड घेणे माझ्याकडे आहे. मी
फेड करीन असे प्रभु म्हणतो.”* 20“तुमचा शत्रू भुकेला
असल्यास त्यास खावयास द्या, तहानेला असेल तर प्यावयास
द्या. कारण असे केल्याने तुम्ही त्याच्या डोक्यावर
निखाऱ्यांची रास कराल.”* 21वाइटाने जिंकले जाऊ
नका तर चांगल्याने वाइटास जिंका.

13 प्रत्येकाने वरिष्ठ अधिकाऱ्याच्या अधीन असावे,
कारण देवाने नेमल्यावाचून अधिकार स्थापित
होत नाही व जे आहेत ते देवाने नेमलेले आहेत. 2परिणामी,
जो अधिकाऱ्याला विरोध करतो, तो स्वत:ला जे देवाने
आज्ञापिले आहे त्याला विरोध करतो व जे देवाच्या आज्ञेस
विरोध करतात ते स्वत:वर न्याय ओढवून घेतील.
3अधिकारी चांगल्या कृत्यांसाठी नाही तर वाईट कृत्यांसाठी
धाक असतात. तुला अधिकाऱ्याची भीति वाटू नये काय?
चांगले ते कर म्हणजे तुझी प्रशंसा होईल. 4होय, तो तुझे
चांगले करणारा देवाचा सेवक आहे, परंतु वाईट करशील
तर त्याची भीति बाळग. कारण तो तलवार व्यर्थ बाळगीत
नाही. त्याचे वाईट करणाऱ्याचा सूड घेणारा तो देवाचा
सेवक आहे. 5यासाठी देवाचा राग जो केवळ शिक्षेद्वारे
प्रगट होतो त्याच्यामुळे नव्हे, तर तुझ्या सद्सदविवेकबुध्दीने
अधीन राहणे आवश्यक आहे.

6आणि त्यामुळेच तुम्ही कर देता. कारण ते देवाचे
अधिकारी आहेत. व हेच काम ते करतात. 7तू ज्यांचा
ऋ णी आहेस त्यांचे देणे देऊन टाक. ज्यांना कर द्यावयाचा
त्यांना कर दे. ज्यांना जकात द्यावयाची त्यांना जकात दे.
ज्यांचा धाक धरायचा त्यांचा धाक धर. ज्याला मान
द्यायचा त्याला मान दे.

## लोकांवर प्रीति करणे हाच एक नियम

8एकमेकांवर प्रीति करण्याशिवाय कोणाच्याही ऋ णात
राहू नका. कारण जो इतरांवर प्रीति करतो, त्याने
नियमशास्त्र पाळले आहे. 9“व्यभिचार करू नको, खून
करू नको, चोरी करू नको, वाईटाचा लोभ धरू नको”*
या आज्ञांमुळे मी असे म्हणतो आणि आणखी एखादी आज्ञा
असेल तर ती आज्ञा “जशी आपणांवर तशी आपल्या
शेजाऱ्यावर प्रीति कर”* या शब्दात सामावलेली आहे.
10प्रीति शेजाऱ्याचे वाईट करीत नाही, म्हणून प्रीति
नियमशास्त्राची पूर्णता आहे.

11आणि तुम्ही हे करा कारण तुम्हांस ठाऊक आहे
की, आपण ज्या काळात राहतो त्यातून तुम्ही उठावे अशी
वेळ आली आहे. कारण जेव्हा आम्ही विश्वास ठेवला
त्यापेक्षाही आमचे तारण अधिक जवळ आले आहे. 12रात्र
जवळ जवळ संपत आली आहे आणि ‘दिवस’ जवळ आला
आहे. म्हणून आपण अंधाराची कामे बाजूला टाकू या
आणि प्रकाशाची शस्त्रसामुग्री धारण करू. 13दिवसा आपण
जसे काळजीपूर्वक वागतो, तसे वागू या. खादाडपणात,
मद्यपानात, लैंगिकतेत, स्वैरपणात, भांडणात, द्वेषात नको,
14तर त्याऐवजी येशू ख्रिस्ताला परिधान करा. आणि
आपल्या पापी वासना मध्ये गुंतून राहू नका.

## इतर लोकांवर टीका करू नका

14 जो विश्वासात दुर्बल आहे त्याचा स्वीकार करा.
पण मतभेदावरून भांडणाच्या हेतूने नव्हे.
2एखाद्याचा विश्वास असा असतो की, तो सर्व गोष्टी खाऊ
शकतो, परंतु दुर्बल मनुष्य भाजीच खातो. 3जो कोणत्याही
प्रकारचे अन्न खातो त्याने जो काही विशिष्ट गोष्टी खात
नाही, त्याला तुच्छ मानू नये. आणि जो काही विशिष्ट
गोष्टी खातो त्याने त्याला दोष देऊ नये कारण देवाने
त्याचा स्वीकार केला आहे. 4दुसऱ्याच्या नोकराला दोष
लावणारा तू कोण आहेस? त्याच्या मालकाच्या दृष्टीने तो
स्थिर राहील किंवा त्याचे पतन झाले असताही स्थिर
राहील. कारण त्याला स्थिर करण्यास मालक समर्थ
आहे.

5एखादा मनुष्य एक दिवस दुसऱ्या दिवसापेक्षा अधिक
मानतो परंतु दुसरा मनुष्य प्रत्येक दिवस सारखाच मानतो.
प्रत्येकाने आपल्या मनाची पूर्ण खात्री करून घ्यावी. 6जो
विशेष दिवस पाळतो तो प्रभूचा मान राखण्यासाठी पाळतो
आणि जो कोणत्याही प्रकारचे अन्न खातो तो प्रभूचा मान
राखण्यासाठी खातो. विशिष्ट प्रकारचे अन्न खात नाही तो
प्रभूचा मान ठेवण्यासाठी खात नाही. तो सुद्धा देवाचे आभार
मानतो. 7कारण कोणीही स्वत:साठी जगत नाही. किंवा
मरत नाही. जर आपण जगतो तर प्रभूचे लोक म्हणून
जगतो आणि मरतो तर प्रभूचे लोक म्हणून मरतो. 8म्हणून
जर आपण जगतो किंवा मरतो तर आपण प्रभूचे आहोत.
9ख्रिस्त मेला आणि जिवंत झाला यासाठी की त्याने जे

---

**सूड ... म्हणतो** अनुवाद 32:35

**तुमचा ... कराल** नीतिसूत्रें 25:21-22

**व्यभिचार ... धरू नको** निर्गम 20:13-15,17

**जशी ... प्रीति कर** लेवीय 19:18

आता मेलेले आहेत आणि जे अजूनही जिवंत आहेत त्या दोघांचा प्रभु व्हावे. 10तेव्हा तू आपल्या बलवान भावाला दोष का लावतो? किंवा जो अशक्त आहे त्या भावाला तुच्छ का मानतोस? कारण आपण सर्व जण देवाच्या न्यायासनासमोर उभे राहणार आहोत. 11असे लिहिले आहे की,

“प्रभु म्हणतो खात्रीने मी जिंवत आहे प्रत्येक गुडघा माझ्यासमोर टेकला जाईल आणि प्रत्येक जीभ देवाचे उपकार मानील.”

यशया *45:23*

12म्हणून प्रत्येक जण आपापल्यासंबंधी देवाला हिशेब देईल.

## इतरांना पाप करू देऊ नका

13म्हणून आपण एकमेकांचा न्याय करण्याचे थांबवू या. तुम्ही असा निश्चय करावा की, तुम्ही आपल्या भावाच्या मार्गात पाप करण्यासाठी मोह किंवा अडखळण ठेवणार नाही. 14मला माहीत आहे आणि मी जो प्रभु येशूमध्ये आहे त्या माझी खात्री झाली आहे की, जो पदार्थ खाण्यास अशुद्ध आहे असे समजतो त्याशिवाय कोणताही पदार्थ मूळचा अशुद्ध नाही. त्याच्यासाठी ते अशुद्ध आहे. 15जर खाण्यामुळे तुझा भाऊ दु:खी झाला आहे तर तू प्रीतीने वागत नाहीस. ज्याच्यासाठी ख्रिस्त मरण पावला त्याचा तुझ्या अन्नाने नाश करू नकोस. 16म्हणून तुम्हांसाठी जे चांगले आहे त्याची निंदा होऊ नये. 17खाणे पिणे यात देवाचे राज्य नाही. परंतु नीतिमत्त्व, शांति आणि आनंद, जो पवित्र आत्म्यात आहे त्यामध्ये आहे. 18जो कोणी अशा प्रकारे जगून ख्रिस्ताची सेवा करतो तो देवाला आनंद देणारा आणि सर्व लोकांनी पसंत केलेला असा आहे.

19तर मग आपण शांतीला आणि एकमेकांच्या वाढीला मदत करणाऱ्या गोष्टींच्या मागे लागावे. 20तुम्ही खाता त्या अन्नामुळे देवाच्या कार्याचा नाश करू नका. सर्व गोष्टी शुद्ध आहेत. असंतोषाने खाणे मनुष्यासाठी चुकीचे आहे. 21मांस न खाणे, द्राक्षारस न पिणे, तुझा भाऊ न अडखळेल असे करणे चांगले आहे. 22तुझा जो विश्वास आहे तो देवासमोर तुझ्या ठायी असू दे. ज्याला योग्य आहे असे वाटते व त्यामुळे जो स्वत:चा द्वेष करीत नाही तो धन्य. 23जर तो पुढे जाऊन आपण हे टाळावे असा विश्वास ठेवूनखातो तो देवासमोर दोषी ठरतो. कारण त्याची कृति विश्वासावर आधारित नाही. ते पाप आहे.

15 आपण जे आत्मिकरीत्या सशक्त आहोत त्या आपण आपणाला सुखी न करता अशक्तांच्या दुर्बलतेचा भार वाहिला पाहिजे. 2आपल्यापैकी प्रत्येकाने त्याच्या शेजाऱ्याला त्यांच्याकरिता व त्यांची उन्नती व्हावी या हेतूने सुखी करावे. 3ख्रिस्ताने सुद्धा स्वत:ला सुखी केले नाही. याउलट पवित्र शास्त्रात लिहिले आहे. “तुझी निंदा करणाऱ्यांनी केलेली निंदा माझ्यावर आली आहे.”*

4आता पवित्र शास्त्रात पूर्वी जे लिहिले होते ते आपल्या शिक्षणाकरिता लिहिले होते यासाठी की, शास्त्रापासून मिळणारे उत्तेजन आणि धीर यांची आपण आशा धरावी म्हणून शिकवितो. 5आणि देव जो धीराचा आणि उत्तेजनाचा उगम आहे, तो तुम्ही ख्रिस्त येशूच्या उदाहरणाप्रमाणे एकमेकांबरोबर एकमताने राहावे असे करावे. 6म्हणजे तुम्ही सर्व जण एक मुखाने देव जो आपला प्रभु येशू ख्रिस्ताचा पिता याला गौरव द्यावे. 7म्हणून ख्रिस्ताने देवाच्या गौरवासाठी तुम्हाला स्वीकारले, तसे तुम्ही एकमेकांचा स्वीकार व स्वागत करा. 8मी तुम्हांस सांगतो देवाच्या सत्यतेसाठी ख्रिस्त सुंती लोकांचा, यहूदी लोकांचा सेवक झाला यासाठी की पूर्वजांना दिलेली वचने निश्चित व्हावीत. 9यासाठी की यहूदीतर लोक देवाने त्यांच्यावर दाखविलेल्या दयेबद्दल गौरव करतील. पवित्र शास्त्रात लिहिले आहे:

“म्हणून विदेशी लोकांमध्ये मी तुझे उपकार मानीन. आणि तुझ्या नावाची स्तुति करीन.” *स्तोत्र. 18:49*

10आणि पुन्हा शास्त्र असे म्हणते,

“विदेशी लोकांनो, देवाच्या निवडलेल्या लोकांबरोबर आनंद करा.” *अनुवाद 32:43*

11आणि पुन्हा शास्त्र असे म्हणते,

“अहो सर्व विदेशी लोकांनो, प्रभूचे स्तवन करा आणि सर्व लोक त्याची स्तुति करोत.” *स्तोत्र. 117:1*

12यशयासुद्धा असे म्हणतो,

“इशायाचे मूळ प्रगट होईल, ते राष्ट्रावर राज्य करावयास उत्पन्न होईल. ती राष्ट्रे त्याच्यावर आपला विश्वास ठेवतील.” *यशया 11:10*

13देव जो सर्व आशेचा उगम, त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला तो आनंदाने व शांतीने भरो, यासाठी की, तुम्ही पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आशेत विपुल व्हावे.

## पौल त्याच्या कामाविषयी बोलतो

14माझ्या बंधूंनो, मी तुम्हांविषयी निश्चिंत आहे की, तुम्ही चांगुलपणाने, ज्ञानाने पूर्ण भरलेले व एकमेकांस बोध करावयास समर्थ आहात. 15परंतु तुम्हांला धीटपणे

**तुझी … आहे** स्तोत्र. 69:9

काही गोष्टींची आठवण देण्यासाठी लिहिले आहे. मी हे
देवाने दिलेल्या देणगीमुळे असे केले. 16ते हे की, विदेशी
लोकांची सेवा करण्यासाठी मी ख्रिस्त येशूचा सेवक व्हावे
व देवाच्या सुवार्तेचे याजकपण करावे, अशासाठी परराष्टीय
हे देवाला मान्य, पवित्र आत्म्याचे समर्पित असे व्हावे.
17तर मग मी जो आता ख्रिस्त येशूमध्ये आहे तो देवाशी
संबंधित असलेल्या गोष्टीत अभिमान बाळगतो. 18कारण
माझ्या शब्दांनी आणि कृत्यांनी विदेशी लोकांनी आज्ञापालन
करावे अशा ज्या गोष्टी ख्रिस्ताने माझ्या करवी घडविल्या
नाहीत, त्या सांगण्याचे धैर्य मी करणार नाही. 19अद्भुते,
चमत्काराच्या व देवाच्या आत्म्याच्या सामर्थ्याने मी
यरुशलेमेपासून इल्लूरिकमाच्या सभोवती ख्रिस्ताची सुवार्ता
सांगण्याचे पूर्ण केले आहे. 20जेथे ख्रिस्ताचे नाव सांगितले
जात नाही अशा ठिकाणी सुवार्ता सांगण्याची माझी आकांक्षा
आहे. यासाठी की मी दुसऱ्याच्या पायावर बांधु नये. 21परंतु
असे लिहिले आहे,

"ज्यांना त्याचे वर्तमान आले नाही ते ऐकतील आणि
ऐकले नाही ते समजतील." *यशया 52:15*

22या कारणांमुळे मला तुमच्याकडे येण्यास पुष्कळ वेळा
अडथळा झाला.
23परंतु ज्या अर्थी मला या प्रांतात एकही ठिकाण राहिले
नाही, व पुष्कळ वर्षांपासून तुम्हांला भेटण्याची माझी इच्छा
आहे. 24जेव्हा मी स्पेनला जाईल तेव्हा तुम्हांला भेटण्याचा
विचार करीत आहे व तुमच्याविषयी माझे मन भरल्यावर
माझ्या त्या प्रवासात तुम्ही मला मदत कराल अशी आशा
आहे. 25पण मी यरुशलेमातील संतांच्या सेवेसाठी जात
आहे. 26कारण मासेदोनिया आणि अखिया येथील
मंडळ्यांनी यरुशलेमेतील गरीब संत जनांना मदत करण्याचे
ठरविले आहे. 27ते त्यांचे ऋणी आहेत. व त्यांनी हे
करण्याचे ठरविले आहे, कारण जर यहूदीतरांना
इस्राएलाच्या आशीर्वादात भागी मिळाली आहे, तर त्यांनी
त्यांच्या ऐहिक गरजा भागवून त्यांची सेवा करावी. 28मग
हे काम संपवून त्याचे फळ सुरक्षितपणे त्यांच्या हाती
सोपविल्यावर जेव्हा मी स्पेनला जाण्यासाठी निघेन, तेव्हा
मी त्या मार्गाने जात असता तुमच्या शहरातून जाईन.
29आणि मला माहीत आहे की, मी जेव्हा तुमच्याकडे
येईन, तेव्हा ख्रिस्ताच्या पूर्ण आशीर्वादाने भरलेला असा
येईन.
30बंधूंनो, आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामुळे आणि
आत्म्याकडून जे प्रेम आपणांकडे येते त्यामुळे माझ्या वतीने,
माझ्याबरोबर देवाजवळ आग्रहाने प्रार्थना करण्याची विनंति
करतो. 31यासाठी की यहूदीयात जे अविश्वासू आहेत
त्यांच्यापासून माझी सुटका व्हावी आणि यरुशलेमेतील
मंडळीतील माझी सेवा संताना मान्य व्हावी. 32यासाठी की,
देवाच्या इच्छेने मी तुम्हांकडे आनंदाने यावे आणि
तुम्हांबरोबर ताजेतवाने व्हावे. 33शांतीचा देव तुम्हा
सर्वांबरोबर असो. आमेन.

## पौलाला काही गोष्टी शेवटी सांगायच्या आहेत

16 किंख्रिया येथील मंडळीची सेविका, आमची बहीण
फिबी हिची मी तुम्हांला शिफारस करतो 2की,
संतांना योग्य अशा प्रकारे तुम्ही तिचा स्वीकार करावा.
आणि तिला तुमच्याकडून जी मदत लागेल ती करावी.
कारण माझ्यासह ती पुष्कळांना मदत करणारी होती.
3ख्रिस्तामध्ये माझे सहकारी प्रिस्किल्ला आणि अक्विला
यांना सलाम सांगा. 4ज्यांनी माझ्यासाठी आपले जीव धोक्यात
घातले होते. त्यांचे केवळ मीच आभार मानतो असे नाही,
तर विदेशात स्थापन झालेल्या मंडळ्याही आभार मानतात.
5त्याशिवाय त्यांच्या घरी जी मंडळी जमते तिलाही सलाम
सांगा.
माझा प्रिय मित्र अपैनत जो ख्रिस्तासाठी आशिया
खंडातील प्रथम फळ आहे यालाही सलाम सांगा. 6मरीया
जिने तुमच्यासाठी फार काम केले तिला सलाम सांगा.
7अंद्रोनीक आणि युनिया, माझे नातेवाईक आणि
सहबंदिवान जे प्रेषितांमध्ये नामांकित आहेत व ख्रिस्तात
माझ्यापूर्वी होते त्यांना सलाम सांगा. 8प्रभूमध्ये माझा प्रिय
आंप्लियात याला सलाम सांगा. 9ख्रिस्तामध्ये आमचा
सहकारी उर्बान व माझा प्रिय मित्र स्ताखु यांना सलाम
सांगा.
10ख्रिस्तामध्ये पसंतीस उतरलेला अपिल्लेस याला सलाम
सांगा. अरिस्तबूल याच्या घरातील मंडळीस सलाम सांगा.
11माझा नातेवाईक हेरोदियोन आणि नार्किसास याच्या
घरातली मंडळी जी प्रभूमध्ये आहे, त्यांना सलाम सांगा.
12त्रुफैना आणि त्रुफीसा जे प्रभूमध्ये श्रम करणारे आहेत
त्यांना सलाम सांगा. प्रिय पर्सिस जिने प्रभूमध्ये फार श्रम
केले आहेत तिला सलाम सांगा.
13प्रभूमध्ये निवडलेला रूफ आणि त्याची आई जी माझीही
आई आहे तिला सलाम सांगा. 14असुंक्रित, फ्लगोन, हर्मेस,
पत्रबास, हर्मास आणि त्यांच्याबरोबर जे बंधु आहेत त्यांना
सलाम सांगा. 15फिललग, युलिया, निरिय, त्याची बहीण
ओलुंपा आणि त्याच्याबरोबर असलेले सर्व संतगण यांना
सलाम सांगा. 16पवित्र चुंबनाने एकमेकांना सलाम करा.
ख्रिस्ताच्या सर्व मंडळ्या तुम्हांला सलाम सांगतात.
17बंधूजनहो, मी तुम्हांस विनंति करतो की, तुम्हांला जे
शिक्षण मिळाले आहे त्याविरुद्ध जे कलह आणि असंतोष
निर्माण करतात त्यांच्यावर लक्ष ठेवा व त्यांच्यापासून दूर
राहा. 18असे लोक आपल्या प्रभूची सेवा करीत नाहीत,
परंतु स्वत:च्या पोटाची सेवा करतात. आपल्या मधुर व
खुशामत करणाऱ्या भाषणाने भोळ्या लोकांची फसवणूक
करता. 19त्यांच्यापासून दूर राहा कारण सर्व विश्वास
णाऱ्यांना तुम्ही किती आज्ञाधारक आहात हे माहीत आहे,
म्हणून तुम्हाविषयी मी फार आनंदात आहे. परंतु मला

तुम्ही जे चांगले त्याविषयी शहाणे आणि वाईटाविषयी भोळे
असावे असे वाटते. 20शांतीचा देव लवकरच सैतानाला
तुमच्या पायदळी तुडवील आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची
कृपा तुम्हांबरोबर असो. 21माझा सहकारी तिमथ्य
त्याचप्रमाणे माझे नातेवाईक लुक्य, यासोन व सोसिपतेर
हे तुम्हांला सलाम सांगतात. 22पौलासाठी हे पत्र लिहून
देणारा मी तर्तिय तुम्हांला प्रभूमध्ये सलाम सांगतो.

23माझे व सर्व मंडळीचे आतिथ्य करणारा गायस तुम्हांला
सलाम सांगतो. नगराचा खजिनदार एरास्त आणि आमचा
भाऊ क्वर्त तुम्हांला सलाम सांगतात. 24(आपला प्रभु येशू
ख्रिस्त याची कृपा तुम्हा सर्वांबरोबर असो. आमेन.) 25आता
देव जो तुमच्या विश्वासात, तुम्हांला मी सांगत असलेल्या
सुवार्तेप्रमाणे आणि प्रभु येशू ख्रिस्ताविषयी विदित करण्यास
व तुमच्या विश्वासात स्थिर करण्यास समर्थ आहे, त्याला
व देवाच्या रहस्याच्या प्रकटीकरणाला, धरून जे पुष्कळ
काळपर्यंत गुप्त ठेवले होत ते प्रकट करणाऱ्या देवाला
गौरव असो. 26परंतु आता आपणांला भविष्यवाद्यांच्या
लिखाणाद्वारे दाखवून दिले आहे की, हे गुप्त सत्य सनातन
देवाच्या आज्ञेप्रमाणे सर्व परराष्ट्रीयांनी विश्वासापासून
आज्ञाधारकपणा निर्माण करावा यासाठी माहीत करून
दिले आहे. 27एकच ज्ञानी देव त्याला येशू ख्रिस्ताद्वारे
युगानुयुगे गौरव असो. आमेन.

# पौलाचे करिंथकरांस पहिले पत्र

1 देवाच्या इच्छेप्रमाणे ख्रिस्त येशूचा प्रेषित होण्याकरिता निवडलेला, मी पौल आणि बंधु सोस्थनेस यांजकडून 2देवाच्या सेवेला समर्पित केलल्या करिंथ येथील मंडळीस तसेच देवाने पवित्र होण्यास बोलाविलेल्या (पाचारलेल्या) व येशू ख्रिस्ताच्या नावावर विश्वास ठेवणऱ्या सर्व बंधूजनांस:

3देव पिता आणि त्यांचा व आपला प्रभु (येशू ख्रिस्त) यांजपासून कृपा व शांति असो.

## पौल देवाचे उपकार मानतो

4मी नेहमीच माझ्या देवाचे तुमच्यासाठी उपकार मानतो. कारण ख्रिस्त येशूमध्ये देवाची कृपा तुम्हांला मिळाली आहे, 5–6त्याच्यामध्ये तुम्ही प्रत्येक बाबतीत संपन्न झाला आहात : सर्व प्रकारच्या बोलण्यात व सर्व प्रकारच्या ज्ञानात, जशी आम्ही ख्रिस्ताविषयी साक्ष दिली, तुमच्यात ती पक्की झाली, याचा परिणाम असा झाला की, 7तुम्ही कोणत्याही दानात कमी पडत नाही, कारण तुम्ही ख्रिस्ताच्या येण्याची वाट पाहता. 8तो सुद्धा आपल्या प्रभु येशूच्या दिवशी शेवटपर्यंत तुम्हांस निर्दोष असे प्रस्थापित करील. 9ज्याने आपला पुत्र येशू ख्रिस्त, आपला प्रभु याच्या सहभागीपणात तुम्हांला बोलावले होते तो देव विश्‍वसनीय आहे.

## करिंथ येथील मंडळीतील समस्या

10परंतु बंधूनो, प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावांमध्ये मी तुम्हांस विनंति करतो की, तुम्ही सर्वांनी सारखेच बोलावे आणि तुमच्यात मतभेद असू नयेत, तर तुम्ही एकाच विचाराने व एकाच हेतूने परिपूर्ण व्हावे. 11कारण क्लोअेच्या घरातील माणसांकडून मला असे कळविण्यात आले की, तुमच्यात भांडणे आहेत, 12माझे म्हणणे असे आहे की तुमच्यातील प्रत्येक जण म्हणतो, "मी पौलाचा आहे," "मी अपुल्लोचा आहे," "मी पेत्राचा आहे," "मी ख्रिस्ताचा आहे." 13ख्रिस्त विभागला गेला आहे का? पौल वधस्तंभावर तुमच्यासाठी खिळला गेला होता का?" पौलाच्या नावाने तुमचा बाप्तिस्मा, झालाय का? 14मी देवाचे आभार मानतो की, क्रिस्प व गायस यांच्याशिवाय मी कोणाचाही बाप्तिस्मा केला नाही. 15यासाठी की कोणीही म्हणू नये की, माझ्या नावात तुमचा बाप्तिस्मा करण्यात आला. 16स्तेफनाच्या घरच्यांचासुद्धा मी बाप्तिस्मा केला, पण उरलेल्यांविषयी म्हणाल, तर इतर कोणाचाही बाप्तिस्मा केल्याचे मला आठवत नाही. 17कारण ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करण्यासाठी नाही तर सुवार्ता सांगण्यासाठी पाठविले, ती भाषणाच्या ज्ञानाने नव्हे, तर अशासाठी की, ख्रिस्ताच्या वधस्तंभाचे सामर्थ्य निरर्थक होऊ नये.

## ख्रिस्तामध्ये देवाचे सामर्थ्य आणि ज्ञान

18कारण ज्यांचा नाश होत आहे अशांसाठी वधस्तंभाविषयीचा संदेश मूर्खपणाचा आहे, परंतु ज्यांचे तारण होत आहे, अशांसाठी तो देवाचे सामर्थ्य आहे. 19कारण पवित्र शास्त्रांत असे लिहिले आहे,

"शहाण्यांचे शहाणपण मी नष्ट करीन, आणि बुद्धिवंतांची बुध्दि मी बाजूला करीन." *यशया 29:14*

20ज्ञानी मनुष्य कोठे आहे? विद्वान कोठे आहे? या जगातील वाद घालणारा कोठे आहे? देवाने जगाचे ज्ञान मूर्खपणाचे ठरविले नाही का? 21म्हणून, देवाच्या ज्ञानात असतानाही, जगाला स्वत:च्या ज्ञानाने देवाला ओळखता आले नाही, आम्ही जो "मूर्खपणाचा" संदेश गाजवितो त्यामुळे जे विश्‍वासणारे आहेत त्यांचे तारण करण्याचे देवाने निवडले. 22कारण अनेक यहूदी लोक चमत्काराची चिन्हे विचारतात आणि ग्रीक लोक ज्ञानाचा शोध घेतात, 23परंतु आम्ही वधस्तंभावर खिळलेला ख्रिस्त गाजवितो. हा संदेश यहूदी लोकांसाठी अडखळण, आणि यहूदीतरांसाठी मूर्खपणा असा आहे. 24परंतु ज्यांना बोलावलेले आहे, अशा यहूदी व ग्रीक दोघांसही ख्रिस्त हा संदेश आहे तो देवाचे सामर्थ्य व देवाचे ज्ञान असाही आहे. 25तथापि ज्यांस तुम्ही देवाचा 'मूर्खपणा' म्हणता ते मानवप्राण्याच्या शहाणपणापेक्षा अधिक शहाणपणाचे आहे. आणि ज्यांस तुम्ही देवाचा 'दुर्बळपणा' समजता ते मानवप्राण्याच्या सशक्तपणाहून अधिक शक्तिशाली आहे.

26तर आता बंधुभगिनींनो, देवाने तुम्हांला केलेल्या पाचारणाबद्दल विचार करा. मानवी दृष्टिकोनातून तुमच्यातील पुष्कळसे शहाणे नव्हते. तुमच्यापैकी पुष्कळसे सामर्थ्यशाली नव्हते. तुमच्यापैकी पुष्कळसे उच्च कुळातले नव्हते, 27त्याऐवजी जगातले जे मूर्ख पण त्यांना त्याने निवडले, यासाठी की, शहाण्या माणसास फजित करावे.

28आणि देवाने दीन, तुच्छ मानलेले, जे “नगण्य” त्यांना
निवडले. यासाठी की जे “काहीतरी” आहेत त्यांना नगण्य
करावे. 29यासाठी की कोणीही देवासमोर बढाई मारू नये.
30कारण तो ख्रिस्त येशूमध्ये तुमच्या जीवनाचा उगम आहे.
व तो देवाची देणगी म्हणून आपले ज्ञान, आपले नीतिमत्त्व,
आपले पवित्रीकरण आणि आपली खंडणी असा झाला.
31यासाठी की शास्त्रात असे लिहिले आहे, “जो बढाई
मारतो त्याने देवाविषयी बढाई मारावी.”

## ख्रिस्ताविषयीचा वधस्तंभावरील संदेश

2 म्हणून बंधूनो, जेव्हा मी तुमच्याकडे आलो, तेव्हा
मी देवाचे रहस्यमय सत्य मानवी ज्ञानाने किंवा
वक्तृत्वकलेने सांगण्यासाठी आलो नाही. 2कारण
तुमच्यामध्ये असताना फक्त येशू ख्रिस्त आणि तोही
वधस्तंभावर खिळलेला याशिवाय कशाचेही ज्ञान असू
नये असा मी निश्चय केला आहे. 3तेव्हा मी तुमच्याकडे
अशक्तपणाने, भीतियुक्त असा व थरथर कापत आलो
आहे. 4माझे भाषण व संदेश हे मन वळविणाऱ्या मानवी
ज्ञानाद्वारे दिलेले नव्हते, ते आत्मा आणि सामर्थ्य यांचा
पुरावा असलेले होते. 5यासाठी की, तुमचा विश्वास मानवी
ज्ञानावर नव्हे तर देवाच्या सामर्थ्यावर असावा.

## देवाचेज्ञान

6परंतु जे प्रौढ आहेत त्यांना आम्ही ज्ञान देतो. या युगाच्या
अधिकाऱ्यांना नव्हे, ज्यांचा शेवट करण्यासाठी आणण्यात
येत आहे. 7त्याऐवजी, जे लपविलेले आहे, आणि हे युग
सुरू होण्यापूर्वी देवाने आमच्या गौरवासाठी नेमले होते ते
देवाचे रहस्यमय ज्ञान देतो. 8जे या युगाच्या कोणाही
सत्ताधीशाला माहीत नव्हते, कारण जर त्यांना कळले
असते, तर त्यांनी गौरवी प्रभूला वधस्तंभावर खिळले
नसते. 9परंतु ज्याप्रमाणे पवित्र शास्त्र म्हणते,

“डोळ्यांनी पाहिले नाही, कानांनी ऐकले नाही, आणि
मनुष्याच्या अंत:करणाने जे उपजविले नाही, ते देवाने
त्याच्यावर प्रेम करणाऱ्यांसाठी तयार केले आहे.”
*यशया 64:4*

10परंतु देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपणांस प्रकट केले
आहे. कारण आत्मा हा प्रत्येक गोष्टीचा शोध घेतो, एवढेच
नव्हे तर तो देवाच्या सखोलतेच्या गुप्ततेचाही शोध घेतो.
11कारण मनुष्याच्या आत्म्याशिवाय त्या मनुष्याच्या गोष्टी
ओळखणारा दुसरा कोण मनुष्य आहे? याप्रमाणेच देवाच्या
आत्म्याशिवाय देवाचे विचार कोणीच ओळखू शकत नाही.
12परंतु आम्हांला जगाचा आत्मा मिळाला नाही, तर
देवापासूनचा आत्मा मिळाला आहे. यासाठी की, देवाने
ज्या गोष्टी फुकट दिल्या आहेत त्यांचे आम्हांला ज्ञान
व्हावे. 13मानवी ज्ञानाने शिकविलेल्या शब्दांनी आम्ही या
गोष्टी सांगत नाही, तर आत्म्याने शिकविलेल्या शब्दांनी,
आध्यात्मिक शब्द उपयोगात आणून आध्यात्मिक गोष्टींचे
स्पष्टीकरण करतो. 14स्वाभाविक मनुष्य देवाच्या
आत्म्याने प्रगट झालेल्या गोष्टी ग्रहण करीत नाही. कारण
त्या त्याला मूर्खपणाच्या आहेत. आणि त्या त्याला समजत
नाहीत, कारण त्यांची आध्यात्मिक रितीने पारख केली
जाते. 15परंतु आध्यात्मिक मनुष्य सर्व गोष्ट पारखू शकतो
कारण त्याची पारख करणे कोणालाही शक्य नसते. कारण
पवित्र शास्त्र म्हणते,

16“प्रभूचे मन कोण जाणतो, जो त्याला शिकवू शकेल?”
*यशया 40:13*

परंतु आमच्या ठायी ख्रिस्ताचे मन आहे.

## माणसांना अनुसरणे चुकीचे आहे

3 परंतु बंधूंनो आध्यात्मिक लोक म्हणून मी तुमच्याशी
बोलू शकत नव्हतो. त्याऐवजी मला तुमच्याशी देहिक
लोकांसारखे आणि ख्रिस्तामधील बालकासारखे बोलावे
लागले. 2मी तुम्हांला पिण्यासाठी दूध दिले, जड अन्न दिले
नाही. कारण तुम्ही जड अन्न खाऊ शकत नव्हता. व
आतासुद्धा तुम्ही खाऊ शकत नाही. 3कारण तुम्ही
अजूनसुद्धा दैहिक आहात. कारण तुमच्यात मत्सर व
भांडणे चालू आहेत, तर तुम्ही दैहिक नाही काय, व
जगातील लोकांसारखे वागत नाही काय? 4कारण जेव्हा
काही म्हणतात, “मी पौलाचा आहे,” आणि इतर दुसरे
म्हणतात, “मी अपुल्लोसाचा आहे,” तेव्हा तुम्ही जगिक
लोकांसारखे वागत नाही काय?
5तर मग अपुल्लोस कोण आणि पौल कोण? आम्ही
केवळ सेवक आहोत, ज्यांच्याद्वारे तुम्ही विश्वासणारे झाला
आणि आम्हा प्रत्येकाला देवाने जे काम नेमून दिले ते
काम आम्ही केले. 6मी बी लावले, अपुल्लोसाने त्याला
पाणी घातले, पण देवाने त्याची वाढ केली. 7म्हणून जो बी
पेरतो तो किंवा जो पाणी घालतो तो महत्त्वाचा नाही, तर
देव जो त्याची वाढ करतो तो महत्त्वाचा आहे. 8जे बी
पेरतात व पाणी घालतात ते एक आहेत व प्रत्येकाला
त्याच्या फळावर आधारित अशी मजूरी मिळेल 9कारण
देवा समवेत आपण सर्वजण कामगार आहोत.
तुम्ही देवाचे शेत आहात व देवाची इमारत आहात.
10आणि देवाच्या दानाप्रमाणे जे मला दिले होते त्याप्रमाणे
सूज्ञ, कुशल बांधणाऱ्यांप्रमाणे पाया घातला. पण दुसरा
कोणी तरी त्यावर बांधतो, परंतु प्रत्येकाने आपण त्यावर
कसे बांधतो याविषयी खबरदारी घ्यावी. 11येशू ख्रिस्त जो
पाया आहे त्याच्यावाचून इतर कोणीही दुसरा पाया घालू
शकत नाही. 12जर कोणी त्या पायावर सोने, चांदी,
मौल्यवान दगड, लाकूड, गवत किंवा पेंढा यांनी बांधतो.
13तर प्रत्येक व्यक्तीचे काम स्पष्ट दिसून येईल. कारण

तो दिवस ते स्पष्ट करील, तो दिवस अग्नीने प्रगट होईल व तोच अग्नि प्रत्येक माणसाचे काम कसे आहे हे ठरविण्यासाठी परीक्षा घेईल. 14ज्या कोणाचे बांधकाम, जे त्या पायावर बांधलेले आहे ते टिकेल. 15त्याला बक्षीस मिळेल. जर एखाद्याचे काम जळून गेले, तर त्याचे नुकसान होईल, परंतु जेव्हा तो इमारतीला लागलेल्या अग्नीपासून बचावासाठी पळून जाईल. तेव्हा तो तारला जाईल.

16तुम्ही देवाचे मंदिर आहात आणि देवाचा आत्मा तुमच्यामध्ये राहतो हे तुम्हांला माहीत नाही काय? 17जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करतो तर देव त्याचा नाश करील. कारण देवाचे मंदिर पवित्र आहे आणि ते तुम्ही आहात. 18कोणीही स्वत:ला फसवू नये. जर कोणी स्वत:ला या जगाच्या दृष्टिकोणानुसार शहाणा समजत असेल तर त्याने खरोखर ज्ञानी होण्यासाठी “मूर्ख” व्हावे. 19कारण या जगाचे ज्ञान देवाच्या दृष्टीने मूर्खपणाचे आहे. असे लिहिले आहे, “देव शहाण्यांना हुशारीमध्ये पकडतो.” 20आणि पुन्हा “देव जाणतो की, शहाण्यांचे विचार निरर्थक आहेत.” 21म्हणून मनुष्यांविषयी कोणीही फुशारकी मारू नये. कारण सर्व गोष्टी तुमच्या आहेत. 22तर तो पौल, अपुल्लोस, पेत्र, जग, जीवन किंवा मरण असो, वर्तमानकाळाच्या गोष्टी असोत अथवा भविष्यकाळाच्या गोष्टी असोत, सर्व गोष्टी तुमच्या आहेत. 23तुम्ही ख्रिस्तामध्ये आहात आणि ख्रिस्त देवाचा आहे.

## ख्रिस्ताचे प्रेषित

4 एखाद्या व्यक्तीने आम्हाविषयी अशा प्रकारे समजावे: ख्रिस्ताचे सेवक व देवाच्या रहस्याचे कारभारी. 2आणखी असे की, जबाबदारी असलेल्या कारभाऱ्याने विश्वासू असले पाहिजे. 3पण तुम्हांकडून किंवा कोणा मानवी न्यायाधीशाकडून माझा न्याय व्हावा याबद्दल मला काही वाटत नाही, किंवा मी माझा स्वत:चादेखील न्याय करीत नाही. 4कारण माझी विवेकबुद्धी शुद्ध आहे. पण त्यामुळे मी निर्दोष ठरत नाही. प्रभु हाच माझा न्यायनिवाडा करतो. 5म्हणून योग्य समय येईपर्यंत म्हणजे प्रभु येईपर्यंत न्यायनिवाडा करू नका. तो अंधारामध्ये दडलेल्या गोष्टींवर प्रकाश टाकील व अंत: करणातील हेतू उघडकीस आणील, त्यावेळी देवाकडून प्रत्येकाची प्रशंसा होईल.

6बंधूनो, तुमच्यासाठी मी या गोष्टी माझ्याकरीता व अपुल्लोसाभरीता लागू केल्या आहेत. यासाठी की “पवित्र शास्त्र सांगते त्यापलीकडे जाऊ नका,” हे आमच्या उदाहरणावरून तुम्ही शिकावे व तुम्ही गर्वाने फुगून जाऊ नये म्हणजे एखाद्याला चांगली वागणूक देऊन दुसऱ्याला विरोध करू नये. 7कोण म्हणतो की तू दुसऱ्यापेक्षा चांगला आहेस? आणि तुझ्याजवळ असे काय आहे जे तुला मिळाले नाही? ज्याअर्थी तुला सर्व मिळाले आहे, तर तुला मिळाले नाही अशी बढाई का मारतोस?

8तुम्हांला असे वाटते की, तुम्ही अगोदरच श्रीमंत झाला आहात, तृप्त झाला आहात, तुम्हांला असे वाटते की आमच्याशिवाय तुम्ही राजे झाला आहात आणि माझी अशी इच्छा आहे की तुम्ही खरोखरच राजे होता, यासाठी की आम्ही तुमच्यासह राजे झालो असतो. 9कारण मला वाटते की देवाने आम्हांला मरण्यासाठी शिक्षा दिलेल्या अशा लोकांसारखे शेवटचे प्रेषित केले कारण आम्ही जगाला, देवदूतांना तसेच माणसांना जाहीर प्रदर्शनासारखे झालो आहोत. 10आम्ही ख्रिस्तासाठी मूर्ख, तर तुम्ही ख्रिस्तामध्ये किती हुशार आहात! आम्ही अशक्त आहोत, पण तुम्ही किती बलवान आहात! तुम्ही आदरणीय आहात, पण आम्ही तुच्छ आहोत!

11अगदी या क्षणापर्यंत आम्ही भुकेले आणि तहानलेले, फाटकेतुटके कपडे घातलेले, ठोसे मारलेले, आम्ही बेघर असे आहोत. 12आणि आम्ही श्रम करतो, आम्ही स्वत:च्या हातांनी काम करतो, 13जेव्हा आमची निंदा होते, तेव्हा आम्ही आशीर्वाद देतो. जेव्हा आमचा छळ होतो तेव्हा आम्ही सहन करतो. जेव्हा आमची निंदा होते, आम्ही दयाळूपणे त्यांच्याशी बोलतो, या क्षणापर्यंत आम्ही जगासाठी गाळ आणि कचरा असे झालो आहोत.

14मी तुम्हांला हे लाजविण्यासाठी लिहित नाही; तर उलट मी तुम्हांला माझ्या प्रिय लेकरांप्रमाणे चांगल्या गोष्टींची जाणीव करून देतो, 15कारण जरी तुम्हांला खिस्तामध्ये दहा हजार पालक असले तरी पुष्कळ वडील नाहीत. कारण ख्रिस्त येशूमध्ये सुवार्तेच्या योगे मी तुम्हांला जन्म दिला आहे, 16यास्तव मी तुम्हांला बोध करतो की, माझे अनुकरण करा. 17यासाठीच तिमथ्याला तुमच्याकडे पाठविले आहे. प्रभूमध्ये तो माझा प्रिय व विश्वासू पुत्र आहे. ज्याप्रमाणे मी त्यांना सगळीकडे प्रत्येक मंडळीमध्ये शिकवितो, तसेच तो ख्रिस्तामधील माझ्या शिकवणूकीची आठवण करून देईल.

18पण जणू काय मी तुमच्याकडे येणारच नव्हतो, म्हणून काही जण गर्वाने फुगले होते. 19तरीही जर प्रभूची इच्छा असेल तर मी लवकरच तुमच्याकडे येईन. आणि मग मला समजेल की, जे गर्वाने फुगून गेले ते किती चांगले वक्ते आहेत हे नव्हे, तर ते किती सामर्थ्यशाली आहेत, हे मला समजेल. 20कारण देवाचे राज्य बोलण्यावर अवलंबून नसते तर सामर्थ्यावर असते. 21तुम्हांला कोणते पाहिजे?

मी तुमच्याकडे तुम्हांला शिक्षा करण्यासाठी काठी घेऊन यावे की, प्रीतीने व सौम्यतेच्या आत्म्याने यावे?

## मंडळीतील एक नैतिक समस्या

5 खरोखरच असे सांगण्यात आले आहे की, तुमच्यामध्ये जारकर्म चालू आहे. ते असे की, आपणामध्ये कोणी आपल्या सावत्र आईशी अनैतिक संबंध ठेऊन आहे. वास्तविक असले दुष्कृत्य विदेशी लोकांमध्येही आढळणार नाही. 2आणि तरीही तुम्ही गर्वाने

फुगला आहात, परंतु तुम्हांला त्याबद्दल शोक व्हायला
नको होता का? ज्या कोणी हे कर्म केले असेल त्याला
तुमच्यातून काढून टाकले पाहिजे. 3कारण जरी मी शरीराने
तुमच्यात नसलो तरी आत्म्याने हजर आहे. आणि हजर
असल्याप्रमाणे त्यांचा मी अगोदरच न्याय केलेला आहे,
ज्याने हे अयोग्य कृत्य केले आहे, 4-5जेव्हा तुम्ही प्रभु
येशूच्या नावात आणि माझ्या आत्म्यात एकत्र जमता व
आपल्या प्रभू येशूच्या सामर्थ्यात एकत्र येता, तेव्हा अशा
माणसाला त्याच्या देहस्वभावाचा नाश व्हावा म्हणून
सैतानाच्या स्वाधीन करावे यासाठी की त्याचा आत्मा
प्रभूच्या दिवशी तारला जावा.

6तुमचे बढाई मारणे चांगले नाही. तुम्हांला माहीत नाही
का की, "थोडेसे खमीर सगळे पीठ फुगविते." 7जुने खमीर
काढून टाका. यासाठी की, तुम्ही नवीन पीठाचा गोळा
व्हावे आणि ख्रिस्ती लोकांसारखे तुम्ही असे आहात:
बेखमीर, कारण ख्रिस्त, आपला वल्हांडणाचा कोकरा
आम्हांला शुद्ध करण्यासाठी त्याचे अर्पण झाले. 8यासाठी
चला आपण वल्हांडणाचा सण पाळू या. जुन्या खमीराच्या
भाकरीने नव्हे तर खरेपणाच्या बेखमीर भाकरीने पाळावा.

9जे जारकर्मी आहेत त्यांची संगत धरू नये असे मी
माझ्या पूर्वीच्या पत्रात लिहिले होते. 10माझ्या म्हणण्याचा
असा अर्थ नाही की, तुम्ही या जगातील जे लोक जारकर्मी,
लोभी, फसविणारे किंवा मूर्तिपूजक यांची संगत धरू नये
असे नाही. त्याबाबतीत तुम्हांलाच हे जग सोडून द्यावे
लागेल. 11परंतु असे आहे की, मी तुम्हांला लिहिले होते,
तुम्हांतील जो कोणी स्वत:ला बंधु म्हणतो, परंतु जर तो
जारकर्मी, लोभी, मूर्तीपूजक निंदक, मद्यपि, फसविणारा
असेल तर त्याची संगत धरू नये. अशा माणसाबरोबर
भोजनसुद्धा करू नये. 12परंतु जे मंडळीबाहेर आहेत त्यांचा
निवाडा करणे माझे काम आहे काय? जे मंडळीत आहेत
त्यांचा न्याय तुम्ही करीत नाही काय? 13देव जे मंडळीबाहेर
आहेत त्यांचा न्याय करील. पवित्र शास्त्र म्हणते,
"तुमच्यामधून दुष्ट मनुष्याला काढून टाका."

## ख्रिस्ती लोकांमधील समस्यांचा न्याय

6 जेव्हा तुमच्यापैकी एखाद्याचा दुसऱ्या व्यक्तीबरोबर
भांडणतंटा असेल तर ती समस्या (वाद) देवाच्या
पवित्र लोकांपुढे न आणता ती व्यक्ति तो वाद न्यायालयात
अनीतिमान लोकांसमोर नेण्याचे धाडस का करते?

2किंवा तुम्हांला माहीत नाही का की देवाचे पवित्र
लोक जगाचा न्याय करतील? आणि जर जगाचा न्याय
तुमच्याकडून होणार आहे तर लहानशा बाबींमध्ये त्याचा
न्याय करण्यासाठी तुम्ही अपात्र आहात काय?

3आपण देवदूतांचा न्याय करणार आहोत हे तुम्हांला
माहीत नाही का? तर मग रोजच्या जीवनातील साध्या
गोष्टींचा विचारसुद्धा कशाला? 4म्हणून जर दररोज तुम्हांला
प्रकरणे निकालात काढायची असतील, तर ज्यांना मंडळीत
काही पाठिंबा नाही, अशा माणसांना न्यायाधीश म्हणून
का नियुक्त करता? 5तुम्हाला लाज वाटावी म्हणून मी हे
म्हणत आहे. गोष्टी इतक्या वाईट होत आहेत का की,
तुमच्यामध्ये एकही सुज्ञ मनुष्य नाही जो त्याच्या (ख्रिस्ती)
भावांचा समेट घडवून आणू शकेल?

6पण एक भाऊ दुसऱ्या भावाविरुद्ध न्यायालयात जातो
आणि तुम्ही हे सर्व अविश्वासणाऱ्यांसमोर करीत आहात?

7वास्तविक, तुमचे एकमेकांविरुद्ध खटले आहेत यातच
तुमचा संपूर्ण पराभव झाला आहे. त्याऐवजी तुम्ही स्वत:वर
अन्याय का होऊ देत नाही? त्याऐवजी तुम्ही स्वत:ची
लुबाडणूक का होऊ देत नाही? 8उलट तुम्ही स्वत: अन्याय
करता व लुबाडणूक करता, आणि तुम्ही हे सर्व तुमच्या
ख्रिस्ती बांधवांना करता!

9किंवा तुम्हांला माहीत नाही का की, अनीतिमान
लोकांना देवाच्या राज्यात वतन मिळणार नाही? तुमची
स्वत:ची फसवणूक होऊ देऊ नका! जारकर्मी, मूर्तिपूजक,
व्यभिचारी, पुरुषवेश्या (पुरुष जे समलिंगी संबंधास तयार
होतात), समलिंगी संबंध ठेवणारे पुरुष, किंवा

10दरोडेखोर, लोभी, दारूडे, निंदा करणारे, फसविणारे
यांपैकी कोणीही देवाच्या राज्यात प्रवेश करणार नाही.
11आणि तुमच्यातील काही असे होते. पण तुम्ही स्वत:स
धुतलेले होते, तुम्हाला देवाच्या सेवेला समर्पित केलेले
होते. प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये तुम्ही नीतिमान ठरला
होता व देवाच्या आत्म्यामध्ये नीतिमान ठरला होता.

## देवाच्या गौरवासाठी तुमच्या शरीरांचा उपयोग करा

12"मी काहीही करण्यास मुक्त आहे," पण प्रत्येक गोष्ट
हितकारक नसते. होय, "मी काहीही करण्यास मुक्त आहे,
पण कोणत्याही गोष्टीचे वर्चस्व माझ्यावर होऊ देणार
नाही. 13"अन्न पोटासाठी आहे व पोट अन्नासाठी आहे."
आणि हे खरे आहे. पण देव अन्नाचा व पोटाचा अशा
दोघांचाही नाश करील. आणि आमची शरीरे ही
जारकर्मासाठी नाही तर देवाच्या सेवेसाठी आणि प्रभूच्या
शरीराच्या हितासाठी आहेत. 14आणि देवाने केवळ प्रभूलाच
मरणातून उठविले असे नाही तर तो आम्हांलाही आपल्या
सामर्थ्याने मरणातून उठवील. 15तुम्हाला माहीत नाही का
की, तुमची शरीरे ख्रिस्ताला जोडलेली आहेत? तर मग जे
ख्रिस्ताशी जोडलेले आहे ते घेऊन मी वेश्येला जोडावे
काय? निश्चितच नाही! किंवा तुम्हांस ठाऊक नाही काय
की, जो वेश्येशी जडतो तो तिच्याशी एकदेह होतो. 16"कारण
ती दोघे एकदेह होतील असे शास्त्रच सांगते. "17परंतु जो
स्वत: प्रभूशी जडतो तो त्याच्याशी आत्म्यात एक आहे.

18जारकर्मापासून दूर पळा. मनुष्य एखादे पाप करणे
शक्य आहे ते त्याच्या शरीराबाहेरचे आहे. परंतु जो जारकर्म
करतो तो त्याच्या स्वत:च्या शरीराविरुद्ध पाप करतो.
19किंवा तुम्हाला हे माहीत नाही काय तुमची शरीरे ही
तुमच्यामध्ये जो पवित्र आत्मा आहे व जो तुम्हांला देवाकडून

प्राप्त झाला त्यांचे मंदिर आहे, आणि स्वत:चे असे तुम्ही
नाही? 20कारण तुम्हांला किंमत देऊन विकत घेतले
आहे. म्हणून तुमच्या शरीराने देवाला गौरव द्या.

## विवाहाविषयी

7 आता, तुम्ही ज्याविषयी आपणा त्यासंबंधाने: एखाद्या
मनुष्याने एखाद्या स्त्रीला स्पर्श न करणे हे त्याच्यासाठी
चांगले आहे, 2परंतु जारकर्माचा मोह टाळण्यासाठी, प्रत्येक
पुरुषाला त्याची स्वत:ची पत्नी असावी. व प्रत्येक स्त्रीला
तिचा स्वत:चा पती असावा. 3पतीने त्याच्या पत्नीला पत्नी
म्हणून तिचा हक्क द्यावा आणि त्याप्रमाणे पत्नीने तिच्या
पतीला पतीचा हक्क द्यावा. 4पत्नीला तिच्या स्वत:च्या
शरीरावर अधिकार नाही तर तो तिच्या पतीला आहे.
5विषयसुखासाठी एकमेकाला वंचित करू नका. तुम्हालं
प्रार्थनेला वेळ देता यावा म्हणून एकमेकांच्या संमतीने
ठराविक वेळेकरीता दूर राहा. आणि मग पुन्हा एक व्हा
यासाठी की, सैतानाने तुमच्यात आत्मसंयमन नसल्याने
मोहात पाडू नये. 6परंतु मी हे तुम्हांला सवलत म्हणून
सांगतो. आज्ञा म्हणून नव्हे. 7मला असे वाटते की, सर्व
लोक माझ्यासारखे असावेत पण प्रत्येक व्यक्तीला त्याचे
स्वत:चे असे देवापासून दान आहे. एकाला एका प्रकारे
राहण्याचे आणि दुसऱ्याला दुसऱ्या प्रकारे राहण्याचे. 8परंतु
जे अविवाहित व विधवा आहेत त्यांना मी म्हणून की,
म्हपासारखीचराहिली तर त त्यांना बरे.
9–10आता जे विवाहित आहेत त्यांना मी आज्ञा देतो. मी
ती आज्ञा देत नसून प्रभु देत आहे. पत्नीने तिच्या पतीपासून
वेगळे होण्याचे पाहू नये. 11पण जर ती वेगळे राहते तर
तिने लग्न न करताच राहावे किंवा पतीबरोबर समेट
करावा. आणि पतीने आपल्या पत्नीला सोडचिठ्ठी देऊ
नये.
12आता इतरासाठी सांगतो, आणि हे मी सांगत आहे,
प्रभु नाही: जर एखाद्या ख्रिस्ती बांधवाची पत्नी विश्वास
ठेवणारी नसेल, आणि त्याच्याबरोबर राहण्यास ती राजी
असेल तर त्याने तिला सोडचिठ्ठी देऊ नये. 13आणि एखाद्या
स्त्रीचा नवरा जर विश्वास ठेवणारा नसेल आणि तो
तिच्याबरोबर राहण्यास राजी असेल तर तिने त्याला
सोडचिठ्ठी देऊ नये, 14कारण विश्वास न ठेवणाऱ्या पतीचे
त्याच्या ख्रिस्ती पत्नीबरोबरच्या निकट सहवासाद्वारे
पवित्रीकरण झाले आहे आणि विश्वास न ठेवणाऱ्या
पत्नीचे त्या ख्रिस्ती पतीबरोबरच्या निकट सहवासाद्वारे
त्यांचे नाते देवाच्या दृष्टीनेही कायदेशीर आहे. नाहीतर
तुमची मुले अशुद्ध झाली असती, परंतु आता ती पवित्र
आहेत. 15तरीही विश्वास न ठेवणारा वेगळा होत असेल
तर त्याने वेगळे व्हावे. याबाबतीत ख्रिस्ती बंधु किंवा
बहीण यांना मोकळीक आहे. देवाने आपल्याला शांतीने
राहण्यासाठी बोलावले आहे. 16कारण पत्नी, तू तुझ्या
विश्वास न ठेवणाऱ्या पतीला तारू शकशील हे तुला
कसे माहीत? किंवा पती, तू आपल्या विश्वास न ठेवणाऱ्या
पत्नीला तारशील हे तुला कसे माहीत?

## देवाने पाचारण केल्याप्रमाणे राहा.

17फक्त, देवाने प्रत्येकाला जसे नेमले आहे आणि देवाने
जसे प्रत्येकाला पाचारण केले आहे त्याप्रमाणे त्याने राहावे.
आणि अशी मी सर्व मंडळ्यांना आज्ञा करतो. 18एखाद्याला
जेव्हा देवाने पाचारण केले होते तेव्हा त्याची अगोदरच
सुंता झाली होती काय? त्याने आपली सुंता लपवू नये.
कोणाला सुंता न झालेल्या स्थितीत पाचारण झाले काय,
तर त्याने सुंता करू नये. 19सुंता म्हणजे काही नाही व
सुंता न होणे म्हणजेही काही नाही. तर देवाची आज्ञा
पाळणे यात सर्व काही आहे. 20प्रत्येकाने ज्या स्थितीत
त्याला पाचारण झाले त्या स्थितीत राहावे. 21तुला गुलाम
म्हणून पाचारण झाले होते काय? त्यामुळे तुला त्रास होऊ
नये, परंतु तुला स्वतंत्र होणे शक्य असेल तर पुढे हो व
संधीचा उपयोग करून घे.
22कारण जो कोणी प्रभूमध्ये गुलाम असा पाचारण
केलेला होता तो देवाचा मुक्त केलेला मनुष्य आहे.
त्याचप्रमाणे ज्या मुक्त मनुष्याला देवाचे पाचारण झाले
आहे तो देवाचा गुलाम आहे. 23तुम्हांला किंमत देऊन
विकत घेतले होते. मनुष्यांचे गुलाम होऊ नका. 24बंधूनो,
तुम्हांतील प्रत्येकाने ज्या स्थितीत त्याला पाचारण झाले
होते, त्याच स्थितीत त्याने देवासमोर राहावे.

## विवाह करून घेण्याविषयीचे प्रश्न

25आता कुमारिकेविषयी, मला प्रभूपासून आज्ञा नाही,
पण मी माझे मत देतो. जो मी विश्वसनीय आहे कारण
प्रभूने आम्हावर दया दाखविली. 26मी हे असे समजतो:
सध्याच्या दुर्दशेत हे चांगले आहे, (होय) हे चांगले आहे
की, एखाद्याने माझ्यासारखे एकटे राहावे. 27तुम्ही पत्नीशी
बांधलेले आहात काय? तर मोकळे होण्यास पाहू नका.
स्त्रीपासून मोकळे आहात काय? लग्न करण्याचे पाहू
नका. 28पण जरी तुम्ही लग्न केले तरी तुम्ही पाप केलेले
नाही. आणि जर कुमारिका लग्न करते तर तिने पाप
केले नाही. पण अशा लोकांना शारीरिक पीडा होतील
आणि या पीडा टाळण्यासाठी मी तुम्हाला मदत करण्याचा
प्रयत्न करीत आहे.
29हेच मी म्हणत आहे, बंधूनो, वेळ थोडा आहे. येथून
पुढे ज्यांना पत्न्या आहेत त्यांनी त्या नसल्यासारखे राहावे.
30जे शोक करीत आहेत त्यांनी शोक करीत नसल्यासारखे,
जे आनंदी आहेत त्यांनी आनंदी नसल्यासारखे, जे वस्तु
विकत घेत आहेत, त्यांनी जणू काही त्यांच्याकडे स्वत:चे
काहीच नाही 31आणि जे लोक जग त्यांना ज्या गोष्टी देऊ
करते व त्या गोष्टींचा जे उपयोग करून घेतात, त्यांनी
जणू काय त्या गोष्टींचा पूर्ण उपयोग करून घेतला नाही,
असे राहावे. कारण या जगाची सध्याची स्थिती लयास
जात आहे.

32माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही काळजीपासून
मुक्त असावे. अविवाहित पुरुष प्रभूच्या कामाविषयी आणि
त्याला कसे संतोषविता येईल याबाबत काळजीत असतो.
33परंतु विवाहित पुरुष जगिक गोष्टीविषयी आणि आपल्या
पत्नीला कसे आनंदीत ठेवता येईल या काळजीत असतो.
34त्यामुळे तो द्विधा अवस्थेत असतो. आणि एखादी
अविवाहित स्त्री किंवा कुमारिका, प्रभूच्या कामाबद्दल
उत्सुक असते. यासाठी की, तिने शरीराने आणि आत्म्याने
पवित्र असावे. परंतु विवाहित स्त्री जगिक गोष्टी आणि
तिच्या पतीला कसे आनंदी ठेवता येईल याचीच चिंता
करते. 35मी हे तुमच्याच फायद्यासाठी सांगत आहे.
तुमच्यावर बंधने लादण्यासाठी सांगत नाही. आचरणातील,
सुव्यवस्थेतील फायद्यासाठी व प्रभूच्या सेवेसाठी
विनाअडथळा तुम्हाला समर्पण करणे शक्य व्हावे म्हणून
सांगतो. 36जर एखाद्याला असे वाटते की, तो त्याच्या
कुमारिकेविषयी योग्य ते करीत नाही आणि जर त्याच्या
भावना तीव्र आहेत, तर त्या दोघांनी पुढे होऊन लग्न
करून घेणे आवश्यक आहे. त्याला जे वाटते ते त्याने
करावे. 37तो पाप करीत नाही. त्याने लग्न करून घ्यावे.
परंतु जो स्वत: मनाचा खंबीर आहे व जो कोणत्याही
दडपणाखाली नाही पण ज्याचा स्वत:च्या इच्छेवर ताबा
आहे. व ज्याने आपल्या मनात विचार केला आहे की
आपल्या कुमारिकेला ती जशी आहे तशीच ठेवावी म्हणजे
तिच्याशी विवाह करू नये, तर तो चांगले करतो. 38म्हणून
जो कुमारिकेशी लग्न करतो तो चांगले करतो पण जो
तिच्याशी लग्न करीत नाही तो अधिक चांगले करील.

39पति जिवंत आहे तोपर्यंत स्त्री लग्नाने बांधलेली आहे,
पण तिचा पति मेला तर तिला पाहिजे त्याच्याशी परंतु
केवळ प्रभूमध्ये लग्न करण्यास ती मोकळी आहे. 40परंतु
माझ्या मते ती आहे तशीच राहिली तर ती अधिक सुखी
होईल आणि मला असे वाटते की, मलाही प्रभूचा आत्मा
आहे.

## मूर्तीला अर्पिलेल्या अन्नाविषयी

8 आता, मूर्तींना अर्पण केलेल्या गोष्टींविषयी: आम्हाला
माहीत आहे की, “आम्हा सर्वांना ज्ञान आहे.” ज्ञान
लोकांना गर्वाने फुगविते. परंतु प्रीति लोकांना बलवान
होत जाण्यास मदत करते. 2जर एखाद्याला वाटत असेल
की, त्याला काही माहीत आहे, तर जसे त्याला कळायला
पाहिजे तसे त्याला माहीत नसते. 3पण जर कोणी देवावर
प्रीति करतो तर देवाला तो माहीत असतो. 4म्हणून मूर्तिला
वाहिलेल्या अन्नाविषयी आपल्याला माहीत आहे की,
“जगामध्ये खरी मूर्तिच नाही.” आणि त्या एकाशिवाय
दुसरा देव नाही. 5आणि जरी लोक त्यांना देव म्हणतात,
तरी असे अनेक तथाकथित देव आहेत जे स्वर्गात किंवा
पृथ्वीवर आहेत (आणि पुष्कळ देव व पुष्कळ प्रभु आहेत)
6परंतु आमच्यासाठी फक्त एकच देव जो पिता तो आहे.
आणि ज्याच्यासाठी आपण जगतो आणि ज्याच्यापासून सर्व
गोष्टी येतात आणि फक्त एकच प्रभु येशू ख्रिस्त आहे.
ज्याच्याद्वारे सर्व गोष्टी अस्तित्वात येतात व ज्याच्याद्वारे
आपण जगतो.

7पण प्रत्येकाला हे ज्ञान नसते. काहींना, ज्यांना आतापर्यंत
मूर्तीची उपासना करण्याची सवय होती ते असे मांस खातात
व असा विचार करतात ते मूर्तीला वाहिलेले होते. आणि
त्यांची सद्सद्विवेकबुद्धि दुर्बल असल्याने त्यांच्या कृत्यांना
डागाळलेली आहे. 8परंतु अन्न आपणाला देवाजवळ
आणणार नाही. जर आम्ही खाल्ले नाही तर वाईट होणार
नाही किंवा खाल्ले तर अधिक चांगले होणार नाही.

9तुमचा हा अधिकार जे दुर्बल आहेत त्यांच्यासाठी
अपराध तर नाही याकडे लक्ष द्या. 10कारण तू जो या
गोष्टीचे ज्ञान असलेला त्या तुला दुर्बल बुद्धिच्या कोणी
मूर्तिच्या मंदिरात जेवताना पाहिले, तर तो दुर्बल असून
त्याची विवेकबुद्धि आत्यंतिक प्रबळ झाल्याने मूर्तीला
वाहिलेले मांस खाण्यास त्याला उत्तेजन मिळणार नाही
काय? 11तो जो दुर्बल आहे, त्या तुझ्या भावासाठी ख्रिस्त
मरण पावला त्याचा तुझ्या ज्ञानामुळे नाश होतो. 12आणि
अशा प्रकारे तुझ्या बंधूविरुद्ध पाप करून आणि त्याच्या
दुर्बल विवेकबुध्दीला जखम करून तुम्ही ख्रिस्ताविरुद्ध
पाप करता. 13म्हणून अन्न जर माझ्या बंधूना पाप करायला
लावते तर मी कधीही मांस खाणार नाही. यासाठी की
माझ्या बंधूने पाप करू नये.

9 मी मुक्त नाही का? मी प्रेषित नाही का? आमचा प्रभु
येशू याला मी पाहिले नाही का? तुम्ही माझे प्रभूमधील
काम नाही का? 2जरी मी इतरांच्यासाठी प्रेषित नसलो
तरीही तुमच्यासाठी मी एक आहे. कारण तुम्ही प्रभूमध्ये
असलेल्या माझ्या प्रेषितपणाचा शिक्का आहात.

3जे माझी परीक्षा घेऊ पाहतात, त्यांच्याविरुद्ध माझा
बचाव असा आहे. 4मला खाण्याचा आणि पिण्याचा हक्क
नाही काय? 5इतर प्रेषित, प्रभूचे भाऊ आणि पेत्र
यांच्यासारखे एखाद्या विश्वासणाऱ्या व्यक्तीला पत्नी करून
घेण्याचा मला हक्क नाही काय? 6का फक्त बर्णबा व
मलाच आमच्या उपजीविकेकरिता काम न करण्याचा
हक्क आहे? 7स्वत:च्या खर्चाने सैनिक म्हणून सेवा करणारा
असा कोण आहे? द्राक्षमळा लावून द्राक्षे खात नाही असा
कोण आहे? किंवा मेंढ्यांचे कळप पाळून कळपाचे काही
दूध पित नाही असा कोण आहे?

8फक्त मानवी दैनंदिन व्यवहारानुसार मी हे सांगत नाही.
तर नियमशास्त्रसुद्धा हेच सांगत नाही का? 9मोशेच्या
नियमशास्त्रात असे लिहिले आहे, “मळणी करीत असताना
बैलाला मुसके घालू नकोस.”* देव बैलांची काळजी
करीत नाही, 10तो खात्रीने आमच्याविषयीच सांगत नाही
काय? होय, ते आमच्यासाठीच लिहिले होते, कारण जो

---

**मळणी करीत ... नकोस** अनुवाद 25:4

नांगरतो त्याने अपेक्षेने नांगरावे. आणि जो मळणी करतो
त्याने पिकात वाटा असावा या हेतूने मळणी करावी.
11जर आम्ही तुमच्या फायद्यासाठी आध्यात्मिक बी पेरले,
तर तुमच्यापासून ऐहिक गरजांची कापणी केली तर ती
मोठी गोष्ट आहे काय? 12जर इतरही तुमच्यापासून ऐहिक
गोष्टींची कापणी करण्याच्या या अधिकारात सहभागी
होत असतील तर तसे करण्याचे आम्हालाही यापेक्षा अधिक
मोठे कारण नाही काय? परंतु आम्ही हा अधिकार बजावला
नाही. त्याऐवजी ख्रिस्ताच्या सुवार्तेच्या मार्गात अडथळा
येऊ नये म्हणून आम्ही सर्व गोष्टी सहन करतो. 13तुम्हाला
माहीत नाही काय मंदिरात जे काम करतात ते त्यांचे अन्न
मंदिरातून घेतात, आणि जे नियमितपणे वेदीची सेवा
करतात, ते वेदीवर जे अर्पण केले जाते त्यात सहभागी
होतात. 14त्याचप्रकारे, प्रभूने आज्ञा केली आहे की, जे
सुवार्ता गाजवितात त्यांनी त्या सुवार्ता गाजविण्याकडून
आपला चरितार्थ चालवावा.

15परंतु मी या कोणत्याही अधिकाराचा वापर केला
नाही. आणि माझ्या बाबतीत असे घडावे म्हणूनही मी हे
लिहिले नाही. कारण माझे अभिमान बाळगण्याचे कारण
कोणी हिरावून घेण्यापेक्षा मी मरण पत्करीन, 16कारण
जर मी सुवार्ता गाजवितो, तर मला अभिमान बाळगण्याचे
काही कारण नाही, कारण मला ते करणे आवश्यक
आहे. आणि जर मी सुवार्ता गाजविली नाही तर माझ्यासाठी
ते किती वाईट असेल! 17कारण जर मी हे स्वेच्छेने
करतो तर मी बक्षिसास पात्र आहे, पण जर एखादे कार्य
माझ्यावर सोपविले आहे जे माझ्या आवडीने नव्हे 18तर
माझे बक्षीस कोणते? ते हे की मी फुकट सुवार्ता सांगावी
यासाठी की, सुवार्ता सांगत असताना मी वेतन मिळण्याच्या
अधिकाराचा पूर्ण उपयोग करू नये.

19कारण, जरी मी सर्व लोकांपासून मुक्त असलो तरी
मी स्वत:ला सर्व लोकांचा गुलाम करून घेतले आहे.
21यासाठी की, मी अधिक मिळवावे. 20यहूदी लोकांना
जिंकण्यासाठी यहूदी लोकांसाठी मी यहूदी झालो. जे
नियमशास्त्राधीन आहेत त्यांच्यासाठी 21मी नियम
शास्त्राधीन असणाऱ्या लोकांसारखा झालो. (जरी मी
नियमशास्त्राधीन नाही तरी तसा झालो). यासाठी की जे
नियमशास्त्रविरहीत आहेत त्यांना मी नियमशास्त्रविरहीत
असा झालो. (जरी मी देवाच्या नियमशास्त्राशिवाय नाही)
तरी मी ख्रिस्ताच्या नियमाधीन आहे. यासाठी की, जे
नियमशास्त्रविरहीत आहेत त्यांना जिंकता यावे. 22-23जे
दुर्बल आहेत त्यांच्यासाठी मी दुर्बल झालो यासाठी की
दुर्बलांना मला जिंकता यावे. मी सर्वांसाठी सर्व काही
झालो आहे यासाठी की त्या आशीर्वादाचा वाटेकरी मला
होता यावे. 24तुम्हांला माहीत नाही का मैदानातील शर्यतीत
धावणारे सर्व धावतात, परंतु एकालाच बक्षिस मिळते?
अशा प्रकारे धावा की तुम्ही ते जिंकाल. 25प्रत्येक जण
जो शर्यतीत धावतो तो सर्व बाबतीत कडक रीतीने प्रशिक्षण
घेतो (आत्मसंयमन करतो.) ते नाशवंत गौरवाचा मुगुट
मिळविण्यासाठी असे करतात, परंतु आम्ही अविनाशी
मुगुट मिळविण्यासाठी करतो. 26यास्तव मी अनिश्चितपणे
नाही तर ज्याला ध्येय आहे अशासारखा धावतो. तसेच जो
कोणी नुसताच वाऱ्यावर प्रहार करीत नाही, तसे मी
मुष्टीयुद्ध करतो, 27त्याऐवजी मी आपल्या शरीराला
कठोरपणे वागवितो आणि त्याला ताब्यात आणतो म्हणजे
दुसऱ्यांना उपदेश केल्यानंतर देवाकडून मी नाकारला
जाऊ नये.

## यहूदी लोकांसारखे होऊ नका

10 बंधूनो, तुम्हांला हे माहीत असावे असे मला वाटते
की, आपले सर्व पूर्वज मेघाखाली होते. ते सर्व
तांबड्या समुद्रातून सुखरूप पार गेले. 2मोशेचे अनुयायी
म्हणून त्या सर्वांचा मेघात व समुद्रात बाप्तिस्मा झाला.
3-4त्यांनी एकच आध्यात्मिक अन्न खाल्ले. व ते एकच
आध्यात्मिक पेय प्याले. कारण ते त्यांच्यामागून चालणाऱ्या
खडकातून पीत होते. आणि तो खडक ख्रिस्त होता. 5परंतु
देव त्यांच्यातील पुष्कळ लोकांविषयी आनंदी नव्हता, आणि
त्यांना अरण्यात ठार मारण्यात आले.

6आणि या गोष्टी आमच्यासाठी उदाहरण म्हणून घडल्या,
कारण ज्याप्रमाणे त्यांनी वाईट गोष्टींची अपेक्षा केली,
त्याप्रमाणे आपण वाईटाची इच्छा धरणारे लोक होऊ नये.
7त्यांच्यापैकी काही जण होते तसे मूर्तिपूजक होऊ नका.
पवित्र शास्त्रात लिहिल्याप्रमाणे, "लोक खाण्यापिण्यास
खाली बसले आणि ते नाचणे, मौजमजा करण्यासाठी
उठले." 8ज्याप्रमाणे त्यांच्यातील काही जणांनी केले तसे
जारकर्म आपण करू नये. त्याचा परिणाम असा झाला
की, एका दिवसात तेवीस हजार लोक मरण पावले. 9आणि
त्यांच्यातील काही जणांनी पाहिली तशी आपण ख्रिस्ताची
परीक्षा पाहू नये. याचा परिणाम असा झाला की, सापांकडून
ते मारले गेले. 10कुरकूर करू नका, ज्याप्रमाणे त्यांच्यातील
काहीजणांनी केली, याचा परिणाम असा झाल की,
मृत्युदूताकडून ते मारले गेले.

11या गोष्टी त्यांच्याबाबतीत उदाहरणार्थ होत्या म्हणून
घडल्या. व त्या गोष्टी लिहिल्या गेल्या यासाठी की आम्ही
ज्यांच्यावर युगाचा शेवट आला आहे अशा आपणासाठी
त्या इशारा अशा व्हाव्यात 12म्हणून मी खंबीरपणे उभा
आहे असा जो विचार करतो त्याने आपण पडू नये म्हणून
जपावे. 13जे मनुष्याला सामान्य नाही अशा कोणत्याही
मोहाने तुम्हाला पकडले नाही. परंतु देव विश्वसनीय आहे.
तुम्हांला सहन करता येते त्यापलीकडे तो तुमची परीक्षा
घेणार नाही. परंतु त्या मोहाबरोबर, त्यातून बाहेर पडण्याचा
मार्गही तयार करील. म्हणजे तुम्हांला सहन करणे शक्य
होईल. 14तेव्हा, माझ्या प्रियांनो, मूर्तिपूजा टाळा. 15मी
तुमच्याशी बुद्धिमान लोक समजून बोलत आहे. मी काय
बोलत आहे याचा तुम्हीच न्याय करा. 16"आशीर्वादाचा

प्याला" जो आशीर्वादित करण्यास सांगतो, तो ख्रिस्ताच्या
रक्तात सहभागी आहे, नाही का? 17वस्तुस्थिती अशी
आहे की फक्त भाकरीचा एकच तुकडा आहे म्हणजे
आपण सर्व एकाच शरीरापासून आहोत, आपण पुष्कळजण
एक भाकर, एक शरीर आहोत. कारण आपला सर्वांचा
त्या भाकरीत भाग आहे. 18इस्राएल राष्टाकडे पाहा. जे
अर्पण केलेले खातात ते वेदीचे भागीदार आहेत. नाही
का? 19तर मी काय म्हणतो ? माझ्या म्हणण्याचा अर्थ
असा आहे का की मूर्तिला वाहिलेले अन्न काहीतरी आहे
किंवा ती मूर्ति काहीतरी आहे? 20नाही, परंतु उलट माझ्या
म्हणण्याचा अर्थ असा आहे की, जे अर्पण ते लोक करतात
ते अर्पण भुतांना करतात, देवाला करीत नाहीत आणि
तुम्ही भूताचे भागीदार व्हावे असे मला वाटत नाही! 21तुम्ही
देवाचा आणि भुताचासुद्धा असे दोन्ही प्याले पिऊ शकत
नाही. तुम्ही प्रभूच्या मेजाचे आणि भुताच्या मेजाचे भागीदार
होऊ शकत नाही. 22आपण प्रभूला ईर्षेस पेटाविण्याचा
प्रयत्न करीत आहोत का? कारण तो जितका सामर्थ्यशाली
आहे तितके आम्ही नाही.

### तुमचे स्वातंत्र्य देवाच्या गौरवासाठी उपयोगात आणा

23"काहीही करण्यास आम्ही मुक्त आहोत." पण सर्वच
हितकारक नाही. "आम्ही काहीही करण्यास मुक्त आहोत."
परंतु सर्व गोष्टी लोकांना सामर्थ्ययुक्त होण्यास मदत करीत
नाहीत. 24कोणीही स्वत:चेच हित पाहू नये तर दुसऱ्यांचेही
पाहावे. 25मांसाच्या बाजारात जे मांस विकले जाते ते
कोणतेही मांस खा. विवेकबुध्दीला त्या मांसाविषयीचे
कोणतेही प्रश्न न विचारता खा. 26कारण ज्याप्रमाणे पवित्र
शास्त्र म्हणते, "पृथ्वी व तिच्यावरील सर्व काही प्रभूचे
आहे."

27विश्वास न ठेवणाऱ्यांपैकी जर कोणी तुम्हांला
जेवावयास बोलाविले आणि तुम्हांस जावेसे वाटले तर
सद्सद्विवेकबुद्धिने कोणतेही प्रश्न न विचारता तुमच्यापुढे
वाढलेले सर्व खा. 28परंतु जर कोणी तुम्हांस सांगितले
की, 'हे मांस यज्ञात देवाला अर्पिलेले होते,' तर
विवेकबुद्धिसाठी किंवा ज्या मनुष्याने सांगितले त्याच्यासाठी
खाऊ नका.

29आणि जेव्हा मी 'विवेक' म्हणतो तो स्वत:चा असे मी
म्हणत नाही तर इतरांचा. आणि हेच फक्त एक कारण
आहे. कारण माझ्या स्वातंत्र्याचा इतरांच्या
सद्सद्विवेकबुद्धिने न्याय का करावा? 30जर मी
आभारपूर्वक अन्न खातो तर माझ्यावर टीका होऊ नये.
कारण या गोष्टींबद्दल देवाला मी धन्यवाद देतो. 31म्हणून
खाताना, पिताना किंवा काहीही करताना सर्व काही देवाच्या
गौरवासाठी करा. 32यहूदी लोक, ग्रीक लोक किंवा देवाच्या
मंडळीला अडखळण होऊ नका. 33जसा मी प्रत्येक बाबतीत
सर्वांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतो आणि माझ्यासाठी
काय हितकारक आहे हे न पाहता इतर प्रत्येकासाठी
काय हितकारक आहे ते पाहतो यासाठी की त्यांचे तारण
व्हावे.

11 मी जसे ख्रिस्ताचे अनुकरण करतो तसे माझे
अनुकरण करणारे व्हा.

### अधिकाराखाली असणे

2मी तुमची प्रशंसा करतो कारण तुम्ही माझी नेहमी
आठवण करता आणि मी जी शिकवण तुम्हाला दिली, ती
तुम्ही काटेकोरपणे पाळता. 3परंतु तुम्हाला हे माहीत व्हावे
असे मला वाटते की, ख्रिस्त हा प्रत्येक पुरुषाचे मस्तक
आहे. आणि प्रत्येक पुरुष हा स्त्रीचे मस्तक आहे, आणि
देव ख्रिस्ताचे मस्तक आहे. 4प्रत्येक मनुष्य जो प्रार्थना
करताना किंवा देवाकडून आलेला संदेश देताना आपले
मस्तक आच्छादितो तो मस्तकाला लज्जा आणतो. 5परंतु
प्रत्येक स्त्री जी आपले मस्तक न झाकता लोकांमध्ये
देवाचा संदेश सांगते ती मस्तकाचा अपमान करते. कारण
ती स्त्री मुंडलेल्या स्त्री सारखीच आहे. 6जर स्त्री आपले
मस्तक आच्छादित नाही तर तिने आपले केस कापून
घ्यावेत. परंतु केस कापणे किंवा मुंडण करणे स्त्रीस
लज्जास्पद आहे. तिने आपले मस्तक झाकावे. 7ज्याअर्थी
मनुष्य देवाची प्रतिमा आणि वैभव प्रतिबिंबित करतो
त्याअर्थी त्याने मस्तक झाकणे योग्य नाही. परंतु स्त्री
पुरुषाचे वैभव आहे. 8पुरुष स्त्रीपासून नाही परंतु स्त्री
पुरुषापासून आली आहे. 9आणि मनुष्य स्त्रीकरिता निर्माण
केला गेला नाही, तर स्त्री पुरुषासाठी निर्माण केली गेली.
10यासाठी देवाने स्त्रीला अधिकार दिलेला आहे त्याचे
चिन्ह म्हणून तिने आपले मस्तक आच्छादावे व
देवदूतांकरितासुद्धा तिने हे करावे.

11तरीही प्रभूमध्ये स्त्री पुरुषापासून स्वतंत्र नाही व पुरूष
स्त्रीपासून स्वतंत्र नाही. 12कारण स्त्री जशी पुरूषापासून
आहे, तसा पुरुषही स्त्रीपासून जन्माला येतो. परंतु सर्व
गोष्टी देवापासून आहेत. 13हे तुम्हीच ठरवा की, मस्तक
न आच्छादिता सभेत देवाची प्रार्थना करणे स्त्रीसाठी योग्य
आहे का? 14पुरुषांनी लांब केस वाढविणे हे त्याच्यासाठी
लज्जास्पद आहे. असे निसर्गसुद्धा तुम्हाला शिकवीत नाही
काय? 15परंतु स्त्रीने लांब केस राखणे हा तिचा मान आहे
कारण तिला तिचे केस निसर्गत: आच्छादनासाठी दिले
आहेत. 16जर कोणाला वाद घालायचा असेल तर मला
दाखवून द्या की, आमची अशी रूढी नाही व देवाच्या
मंडळ्यांचीही नाही.

### प्रभु भोजन

17पण आता ही पुढची आज्ञा देत असताना मी तुमची
प्रशंसा मंडळी म्हणून करीत नाही, कारण तुमच्या एकत्र
येण्याने तुमचे चांगले न होता तुमची हानि होते. 18प्रथम,
मी ऐकतो की, जेव्हा मंडळीमध्ये तुम्ही एकत्र जमता, तेथे
तुमच्यामध्ये गट असतात, आणि काही प्रमाणात ते खरे

मानतो. 19(तरीही तुम्हांमध्ये पक्ष असावेत) यासाठी की, जे तुमच्यामध्ये पसंतीस उतरलेले आहेत ते प्रगट व्हावेत. 20म्हणून जेव्हा तुम्ही एकत्र येता तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने प्रभुभोजन घेत नाही. 21कारण तुम्ही भोजन करता तेव्हा तुम्हांतील प्रत्येक जण अगोदरच आपले स्वत:चे भोजन करतो. एक भुकेला राहतो तर दुसरा प्यायलेला असतो. 22खाण्यापिण्यासाठी तुम्हांला घरे नाहीत का? का तुम्ही देवाच्या मंडळीला तुच्छ मानता आणि जे गरीब आहेत त्यांना खिजविता? मी तुम्हांला काय म्हणू? मी तुमची प्रशंसा करू काय? याबाबतीत मी तुमची प्रशंसा करीत नाही. 23कारण प्रभूपासून जे मला मिळाले तेच मी तुम्हांला दिले. प्रभु येशूला ज्या रात्री मारण्यासाठी धरून देण्यात आले. त्याने भाकर घेतली. 24आणि उपकार मानल्यावर ती मोडली आणि म्हणाला, "हे माझे शरीर आहे, जे मी तुमच्यासाठी देत आहे. माझी आठवण करण्यासाठी हे करा." 25त्याचप्रमाणे त्यांनी भोजन केल्यावर त्याने द्राक्षारसाचा प्याला घेतला आणि म्हणाला, "हा द्राक्षारसाचा प्याला माझ्या रक्ताने स्थापित केलेला नवा करार आहे. जेव्हा जेव्हा तुम्ही द्राक्षारस प्याल तेव्हा माझी आठवण करण्यासाठी हे करा." 26कारण जितके वेळा तुम्ही ही भाकर खाता व हा द्राक्षारसाचा प्याला पिता, तितके वेळा तुम्ही प्रभूच्या मरणाची तो येईपर्यंत घोषणा करीता. 27म्हणून जो कोणी अयोग्य रीतीने प्रभूची भाकर खातो किंवा द्राक्षारसाचा प्याला पितो. तो प्रभूच्या शरीराविषयी आणि रक्ताविषयी दोषी ठरेल. 28परंतु मनुष्याने स्वत:ची परीक्षा करावी. आणि नंतर भाकर खावी किंवा द्राक्षारसाचा प्याला प्यावा. 29कारण जर तो प्रभूच्या शरीराचा अर्थ न जाणता ती भाकर खातो व द्राक्षारसाचा प्याला पितो तर तो खाण्याने आणि पिण्याने स्वत:वर न्याय ओढवून घेतो. 30याच कारणामुळे तुम्हांतील अनेक जण आजारी आहेत. आणि पुष्कळजण झोपलेले आहेत. 31परंतु जर आम्ही आमची परीक्षा करू तर आमच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही. 32प्रभूकडून आमचा न्याय केला जातो तेव्हा आम्हांला शिस्त लावण्यात येते, यासाठी की, जगातील इतर लोकांबरोबर आम्हांलाही शिक्षा होऊ नये.

33म्हणून माझ्या बंधूनो, जेव्हा तुम्ही भोजनास एकत्र येता, तेव्हा एकमेकांसाठी थांबा. 34जर कोणी खरोखरच भुकेला असेल तर त्याने घरी खावे यासाठी की तुम्ही न्यायनिवाड्यासाठी एकत्र जमू नये. मी येईन तेव्हा इतर गोष्टी सुरळीत करून देईन.

## पवित्र आत्म्याची दाने

12 आता, बंधूनो, आध्यात्मिक दानांसबंधी तुम्ही अज्ञान असावे असे मला वाटत नाही. 2तुम्हाला माहीत आहे की जेव्हा तुम्ही यहूदीतर होता तेव्हा मूर्तिपूजेकडे तुमचा कल होता. 3म्हणून मी तुम्हांला सांगत आहे की, देवाच्या आत्म्याने बोलणारा कोणीही मनुष्य असे म्हणत नाही की, "येशू शापित असो." आणि पवित्र आत्म्याशिवाय कोणीही "येशू प्रभु आहे," असे म्हणू शकत नाही.

4आध्यात्मिक दाने विभागलेली आहेत पण तोच आत्मा ही विभागणी करतो. 5सेवेचे प्रकार आहेत, परंतु ज्याची आम्ही सेवा करतो तो एकच आहे. 6कार्य करण्याचे वेगवेगळे विभाग आहेत पण ह्या सेवा एकाच देवाकडून येतात. 7कारण प्रत्येकाच्या फायद्यासाठी एकेकाला आत्म्याचे प्रकटीकरण दिले आहे. 8एका व्यक्तीला आत्म्याच्या द्वारे दैवी ज्ञानाचे वचन सांगण्याचे शहाणपण दिले जाते. आणि दुसऱ्या व्यक्तीला त्याच आत्म्याच्या द्वारे दैवी ज्ञानाने बोलण्याचे, 9कोणाला त्याच आत्म्याने विश्वास व दुसऱ्याला फक्त त्याच एका आत्म्याद्वारे बरे करण्याचे दान दिले आहे. 10दुसऱ्या कोणाला अद्भुत कार्ये करण्याची शक्ति व दुसऱ्याला भविष्य सांगण्याची शक्ति, तर दुसऱ्याला आत्म्या आत्म्यातील फरक ओळखण्याची, दुसऱ्या कोणाला वेगवेगळ्या भाषा बोलण्याची, दुसऱ्याला भाषांतर करुन अर्थ सांगण्याची शक्ति दिली आहे. 11परंतु तो एकच आत्मा जो त्याच्या इच्छेप्रमाणे एकेकाला वाटून देऊन ही सर्व कार्ये पूर्णत्वास नेतो.

## ख्रिस्ताचे शरीर

12कारण ज्याप्रमाणे आपणातील प्रत्येकाला एकच शरीर आणि त्याला अनेक अवयव असतात, आणि तरीही सर्व अवयव जरी ते पुष्कळ असले तरी त्यांचे मिळून एक शरीर बनते. तसाच ख्रिस्तसुद्धा आहे. 13जर आपण यहूदी किंवा ग्रीक, गुलाम किंवा स्वतंत्र असून आपणांला एकच आत्मा देह म्हणून दिला आहे. कारण एका आत्म्याने आपणाला एक शरीर होण्यासाठी बाप्तिस्मा दिलेला आहे.

14आता एका मानवी शरीरात एकच अवयव असत नाही, तर पुष्कळ असतात 15जर पाय म्हणतो, "मी हात नाही म्हणून मी शरीराचा नाही," तर तो या कारणासाठी शरीराचा नाही असे होत नाही, होते का? 16आणि जर कान म्हणेल, "मी डोळा नाही म्हणून मी शरीराचा नाही," तर तो या कारणासाठी शरीराचा नाही असे होत नाही. होते का? 17संबंध शरीरच जर डोळा असते तर आपल्याला ऐकता कसे आले असते? 18परंतु प्रत्यक्षात शरीरातील प्रत्येक अवयव देवाने त्याच्या इच्छेप्रमाणे ठेवला आहे. 19आणि सर्व अवयव जर एकच अवयव असते तर शरीर कोठे असते? 20पण असे आहे की, अवयव अनेक आहेत, शरीर मात्र एकच आहे.

21डोळा हाताला म्हणू शकत नाही की, "मला तुझी गरज नाही." किंवा दुसरे उदाहरण द्यायचे तर डोके पायांना म्हणू शकत नाही, "मला तुमची गरज नाही." 22याच्या उलट जे अवयव आपण कमी महत्त्वाचे समजतो, त्यांची आपण अधिक काळजी घेतो. 23आणि जे न दाखवण्याजोगे

अवयव त्यांना मोठ्या सभ्यतेने वागवतो. 24पण आपल्या दाखविता येण्याजोग्या अवयवांना तशी गरज नसते. त्याऐवजी जे अवयव उणे आहेत त्यांना मोठा मान देण्यासाठी देवाने असे शरीर जुळविले आहे, 25यासाठी की शरीरात कोणतेही मतभेद नसावेत तर उलट अवयवांनी एकमेकांची काळजी घ्यावी. 26जर शरीराचा एक अवयव दुखत असेल तर सर्व अवयव त्याच्याबरोबर दु:ख सोसतात. एका अवयवाचा सन्मान झाला तर सर्व अवयव त्याच्याबरोबर आनंदीत होतात.

27म्हणून तुम्ही ख्रिस्ताचे शरीर आहात आणि वैयक्तिकरीत्या अवयव आहात 28शिवाय देवाने मंडळीत प्रथम प्रेषित, दुसरे संदेष्टे, तिसरे शिक्षक, जे चमत्कार करतात ते, ज्यांना आरोग्य देण्याचे दान आहे ते, 29जे लोक मदत करतात, जे पुढारीपण करतात व ज्या लोकांना भिन्न भिन्न भाषा बोलण्याचे दान आहे, असे लोक ठेवले आहेत. म्हणजे सर्वच प्रेषित नाहीत, सर्वच संदेष्टे नाहीत, सर्वच शिक्षक नाहीत, सर्वांनाच चमत्कार करण्याची शक्ति नाही. 30सर्वांनाच आरोग्य देण्याची दाने नाहीत, सर्वच अन्य भाषेत बोलत नाहीत, सर्वांनाच भाषांचा अर्थ सांगण्याची शक्ति नाही. 31तथापि आत्म्याच्या अधिक मोठ्या दानांसाठी प्रयत्न करा. आणि आता मी तुम्हांस ह्याहूनही उत्तम मार्ग दाखवितो.

## प्रीति

13 मी माणसांच्या जिभांनी बोललो व देवदूतांच्यासुद्धा भाषेत बोलणे मला शक्य असले, माझ्या ठायी प्रीति नसली तर मी वाजणारी थाळी किंवा मोठा आवाज करणारी झांज आहे. 2जर मला देवासाठी संदेश देण्याची शक्ति असली आणि मला सर्व रहस्ये माहीत असली, सर्व दैवी ज्ञान असले आणि डोंगर ढळविता येतील असा दृढ विश्वास असला, परंतु माझ्या ठायी प्रीति नसली, 3तर मी काहीच नाही. आणि मी जर माझे सर्व धन गरजवंताच्या अन्नदानासाठी दिले आणि मी माझे शरीर जाळण्यासाठी दिले पण जर माझ्यात प्रीति नसली, 4तरी मी काहीच मिळवीत नाही. प्रीति गर्व करीत नाही.

प्रीति सहनशील आहे, प्रीति दयाळू आहे. ती हेवा करीत नाही. प्रीति बढाई मारीत नाही. 5ती गर्वाने फुगत नाही. ती अयोग्य रीतीने वागत नाही. ती स्वार्थी नाही, ती चिडत नाही. तिच्याविरुद्ध केलेल्याची नोंद ती ठेवीत नाही. 6वाईटात ती आनंद मानीत नाही. परंतु सत्याविषयी इतरांबरोबर ती आनंद मानते. 7सर्व काही खरे मानण्यास सिध्द असते 8ती नेहमी विश्वास ठेवते. आशा धरते. नेहमी सहन करते. प्रीति कधी संपत नाही. पण भविष्य सांगण्याची दाने ती बाजूला केली जातील. इतर भाषा बोलण्याचे दान असेल तर ते थांबेल. ज्ञानाचे दान असेल तर ते बाजूला केले जाईल. 9कारण आमचे ज्ञान अपूर्ण आहे. आम्ही देवासाठी बोलतो (भविष्य सांगतो). आम्ही अपूर्ण भविष्य सांगतो. 10पण जेव्हा पूर्णत्व येते तेव्हा जे अपूर्ण आहे ते नाहीसे केले जाईल. 11जेव्हा मी मूल होतो, तेव्हा मूलासारखा बोलत असे, मी मूलासारखा विचार करीत असे. मुलासारखा उहापोह करीत असे. परंतु जेव्हा मी मोठा झालो, तेव्हा मी लहानपणाच्या गोष्टी सोडून दिल्या आहेत. 12आता आपण आरशात अस्पष्ट प्रतिबिंब पाहतो, परंतु जेव्हा पूर्णत्व येते तेव्हा आपण समोरासमोर पाहू. आता मला अंशत: कळते. परंतु ती वेळ येईल तेव्हा देव मला ओळखतो, तसा मी पूर्णपणे ओळखीन. 13सारांश, या तीन गोष्टी राहतात : विश्वास, आशा आणि प्रीति पण यातील सर्वांत महान प्रीति आहे.

## मंडळीला मदत करण्यासाठी आध्यात्मिक दाने वापरा

14 प्रीतीसाठी प्रयत्न करा. आणि आध्यात्मिक दानांची विशेषत: तुम्हांला संदेश देता यावा याची मनापासून इच्छा बाळगा. 2ज्याला इतर भाषांमध्ये बोलण्याचे दान आहे तो खरे पाहता माणसांबरोबर बोलत नाही तर देवाबरोबर बोलतो. कारण तो काय बोलतो हे कोणालाही कळत नाही. आत्म्याच्या द्वारे तो गूढ गोष्टी बोलतो. 3परंतु जो संदेश देतो तो लोकांशी बोध, उन्नती, उपदेश याविषयी बोलतो. 4ज्याला दुसऱ्या भाषेत बोलण्याचे दान आहे, तो स्वत:चीच आध्यात्मिकदृष्ट्या उन्नती करून घेतो, पण ज्याला संदेश देण्याचे (देवासाठी बोलण्याचे) दान आहे तो संपूर्ण मंडळीची उन्नती करतो. 5आता तुम्ही सर्वांनी भाषांमध्ये बोलावे अशी माझी इच्छा आहे, परंतु त्याहीपेक्षा जर तुम्हांला संदेश देता आले तर मला अधिक आवडेल. जो संदेश देतो, (देवासाठी बोलतो) तो भाषा बोलणाऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहे, पण भाषा बोलणारा हा संदेश देणाऱ्यासारखाच (देवासाठी बोलणाऱ्यासारखाच) आहे, जर त्याने जी भाषा तो बोलतो तिचा अर्थ सांगितला तर, त्याद्वारे संपूर्ण मंडळी आध्यात्मिकदृष्ट्या बळकट होते.

6आता, बंधूनो, जर मी तुमच्याकडे अन्य भाषा बोलण्यासाठी आलो तर तुमचा कसा फायदा होईल? तुमचा फायदा होण्यासाठी मी तुमच्याकडे प्रकटीकरण, दैवी ज्ञान, देवाकडून संदेश किंवा शिकवणूक आणायला नको का? 7हे निर्जीव वस्तू उदा. बासरी, वीणा यासारखे आवाज काढण्यासारखे आहे: जर ते वाद्य ते निर्माण करीत असलेल्या वेगवेगव्या आवाजातील फरक स्पष्ट करीत नाही, तर एखाद्याला बासरीवर किंवा वीणेवर कोणते संगीत वाजवले जात आहे ते कसे कळेल? 8आणि जर कर्णा अस्पष्ट आवाज काढील तर लढाईसाठी कोण तयार होईल? 9त्याचप्रमाणे सहज समजेल अशा भाषेतून बोलल्याशिवाय तुम्ही काय बोलला हे कोणाला कसे समजेल? कारण तुम्ही हवेत बोलल्यासारखे होईल. 10नि:संशय, जगात पुष्कळ प्रकारच्या भाषा आहेत, व

कोणतीही अर्थविरहीत नाही. 11म्हणून जर मला भाषेचा अर्थ समजला नाही तर जो बोलत आहे त्याच्यासाठी मी विदेशी ठरेन व जो बोलणारा आहे तो माझ्यासाठी विदेशी होईल. 12नेमके तेच तुम्हांलाही लागू पडते जर तुम्ही आध्यात्मिक दाने मिळावीत म्हणून उत्सुक आहात तर मंडळीच्या उन्नतीसाठी, मंडळीला आध्यत्मिक मजबूती येण्यासाठी जोरदार प्रयत्न करा.

13म्हणून, जो दुसऱ्या भाषेत बोलतो त्याने तो जे बोलला आहे त्याचा अर्थ सांगता यावा म्हणून प्रार्थना करावी. 14कारण जर मी दुसऱ्या भाषेतून प्रार्थना केली तर माझा आत्माही प्रार्थना करतो पण माझे मन रिकामे राहते. 15मग काय केले पाहिजे? मी माझ्या आत्म्याने प्रार्थना करीन पण त्याचप्रमाणे मी माझ्या बुद्धिनेही प्रार्थना करीन. 16कारण जर तू तुझ्या आत्म्याने देवाचे धन्यवाद करशील तर जो फक्त ऐकणारा सामान्य तेथे बसला असेल तर तो तुझ्या उपकारस्तुतीच्या प्रार्थनेत "आमेन" कसे म्हणेल? कारण तू काय म्हणतोस ते त्याला कळत नाही. 17आता तू धन्यवाद देत असलास हे जरी चांगले असले तरी दुसरी व्यक्ति आध्यात्मिकदृष्ट्या बलवान झालेली नसते.

18मी देवाचे उपकार मानतो, कारण मी तुम्हा सर्वांपेक्षा अधिक भाषा बोलू शकतो ज्याचे दान मला आहे, 19परंतु सभेत इतरांनाही बोध करता यावा म्हणून इतर भाषेत दहा हजार शब्द बोलण्यापेक्षा माझ्या मनाप्रमाणे पाच शब्द सांगणे मी पसंत करतो.

20बंधूनो, तुमच्या विचार करण्यात मुलासारखे असू नका. त्याऐवजी दुष्टतेच्या बाबतीत लहान बाळासारखे निरागस परंतु आपल्या विचारात प्रौढ व्हा. 21नियमशास्त्र म्हणते,

"इतर भाषा बोलणाऱ्याचा उपयोग करून, मी या लोकांशी बोलेन तरीसुद्धा ते माझे ऐकणार नाहीत."*

*यशया 28:11-12*

हे असे प्रभु म्हणतो.

22म्हणून इतर भाषांमध्ये बोलण्याचे दान हे अविश्वासणाऱ्यांसाठी नसून विश्वासणाऱ्यांसाठी आहे. 23म्हणून जर संपूर्ण मंडळी एकत्र येते व प्रत्येकजण दुसऱ्या भाषेत बोलत असेल (आणि) जर एखादा बाहेरचा किंवा अविश्वासणारा आत आला, तर तुम्ही वेडे आहात असे ते तुम्हाला म्हणणार नाही का?

24परंतु जर प्रत्येक जण संदेश देऊ लागला आणि जर अविश्वासणारा किंवा बाहेरचा आत आला, तर सर्वजण जे बोलत असतील त्यामुळे त्या ऐकणाऱ्याला त्याच्या पापाची जाणीव होते, ते सर्व त्याचा न्याय करतात; 25त्याच्या अंत:करणातील गुपिते माहीत होतात. आणि मग तो पालथा पडतो आणि देवाची उपासना करतो व म्हणतो "खरोखर देव तुमच्यामध्ये आहे!"

## तुमच्या भेटींनी मंडळीला मदत व्हावी

26बंधूनो, मग काय करावे? जेव्हा तुम्ही एकत्र येता, प्रत्येकाकडे गाण्यासाठी स्तोत्र असते कोणाकडे शिक्षण असते. कोणाकडे प्रकटीकरण असते. कोणी दुसऱ्या भाषेत बोलतो, कोणी त्या भाषेचा अर्थ सांगतो. प्रत्येक गोष्ट मंडळीच्या वाढीसाठी केली गेली पाहिजे. 27जर कोणी दुसऱ्या भाषेत बोलणार असेल तर दोघांनी किंवा जास्तीत जास्त तिघांनी बोलावे, एका वेळी एकानेच बोलावे. आणि एका व्यक्तीने त्या बोलण्याचा अर्थ सांगावा. 28जर मंडळीत अर्थ सांगणारा कोणी नसेल तर भाषा बोलणाऱ्याने सभेत गप्प बसावे. व स्वत:शी व देवाशी बोलावे.

29दोघा किंवा तिघांनी संदेश द्यावा व इतरांनीही ते काय बोलतात याची परीक्षा करावी. 30बसलेल्यांपैकी एखाद्या व्यक्तीला जर काही प्रकट झाले तर पहिल्या संदेश देणाऱ्याने गप्प बसावे. 31जर तुम्हा सर्वांना संदेश देता येत असेल, तर एका वेळी एकानेच बोलावे, यासाठी की सर्वजण शिकतील. सर्वांना बोधपर मार्गदर्शन मिळेल. 32जे आत्मे भविष्यवाद्यांना प्रेरणा देतात, ते त्या संदेष्ट्यांच्या स्वाधीन असतात. 33कारण देव हा बेशिस्तपणा आणणारा नसून, शांति आणणारा देव आहे. जशा सर्व मंडळ्या देवाच्या पवित्र लोकांच्या बनलेल्या असतात,

34स्त्रियांनी सभेत गप्प बसावे. कारण त्यांच्यासाठी सभेत बोलण्याची परवानगी देण्यात आलेली नाही, कारण नियमशास्त्रसुद्धा असेच म्हणते, 35त्यांना जर काही शिकायचे असेल, तर त्यांनी स्वत:च्या पतीला घरी विचारावे. कारण स्त्रीने सभेत बोलणे हे तिला लज्जास्पद आहे. 36तुमच्याकडूनच देवाचा संदेश बाहेर गेला होता काय? किंवा ते फक्त तुमच्यापर्यंतच आले आहे?

37एखादा जर स्वत:ला संदेष्टा समजत असेल किंवा जर तो धार्मिक मनुष्य असेल तर त्याने हे ओळखले पाहिजे की, जे मी तुम्हाला लिहित आहे ती देवाकडून देण्यात आलेली आज्ञा आहे. 38म्हणून जर कोणी ती मानत नसेल, तर त्यालाही मानण्यात येणार नाही. 39म्हणून माझ्या बंधूंनो, देवासाठी संदेश देण्यासाठी उत्सुक असा, दुसऱ्या भाषेत बोलणाऱ्याला मना करू नका. 40तर सर्व गोष्टी योग्य रीतीने आणि व्यवस्थित असाव्यात.

## ख्रिस्ताविषयीची सुवार्ता

15 आता बंधूंनो, मला तुम्हाला आठवण करून द्यावीशी वाटते, की ज्या सुवार्तेविषयी मी तुम्हाला उपदेश केला व जी तुम्हीसुद्धा स्वीकारलीत व जिच्यात तुम्ही बळकट आहात. 2आणि जिच्यामुळे तुमचे तारण झाले आहे. ज्या वचनाने मी तुम्हांस सुवार्ता सांगितली ते तुम्ही दृढ धरता तर तुम्ही विश्वास धरल्याशिवाय काही उपयोग नाही, नाहीतर तुमची स्वीकृती व्यर्थ आहे.

3कारण मलासुद्धा पहिल्यांदा जे मिळाले ते मी तुमच्या स्वाधीन केले: ते हे की ख्रिस्त आमच्या पापांसाठी मरण

पावला, हे जे वचनात लिहिले आहे. 4व त्याला पुरण्यात
आले. व तिसऱ्या दिवशी त्याला उठविण्यात आले, 5व
तो पेत्राला दिसला, नंतर बारा प्रेषितांना, 6नंतर तो एकाच
वेळी पाचशे हून अधिक बांधवांना दिसला. त्यांच्यापैकी
बहुसंख्य अजूनही जिवंत आहेत, तर काही मेले आहेत.
7नंतर तो याकोबाला दिसला, मग पुन्हा तो सर्व प्रेषितांना
दिसला, 8आणि शेवटी मी जो अवेळी जन्मलो, त्या मलासुद्धा
तो दिसला. 9कारण प्रेषितांमध्ये मी कनिष्ठ आहे. मी
प्रेषित म्हणून घेण्याच्यासुद्धा योग्यतेचा नाही. कारण देवाच्या
मंडळीचा मी छळ केला. 10पण देवाच्या दयेने मी जो आहे
तो मी (प्रेषित) आहे. आणि त्याची माझ्यावरची कृपा
व्यर्थ गेली नाही. उलट त्या सर्वांपेक्षा अधिक काम मी
केले आहे, करणारा मी नव्हतो. तर देवाची दया जी
माझ्याबरोबर होती, ती करीत होती. 11म्हणून, जरी मी
तुम्हांला उपदेश केला किंवा त्यांनी उपदेश केला, तरी
आम्ही सर्व हाच उपदेश करू, आणि तुम्ही यावरच विश्वास
ठेवला.

## आम्हांला मेलेल्यांतून उठविण्यात येईल

12पण जर आम्ही ख्रिस्त मेलेल्यांतून उठविला गेला
आहे अशी सुवार्ता गाजवितो, तर मृतांचे पुनरुत्थान नाही
असे तुमच्यातील काहीजण म्हणतात हे कसे? 13जर मृतांचे
पुनरुत्थान नाही, तर ख्रिस्त मरणातून उठविला गेला
नाही, 14आणि जर ख्रिस्त मरणातून उठविला गेला नाही
तर आमचा संदेश व्यर्थ आहे आणि तुमचा विश्वासही
व्यर्थ आहे. 15आणि आम्हीसुद्धा देवाविषयीचे खोटे साक्षीदार
ठरू कारण आम्ही देवासमोर शपथपूर्वक साक्ष दिली
आहे की, ख्रिस्ताला मेलेल्यांतून त्याने उठविले, पण जसे
ते म्हणतात त्याप्रमाणे जर देवाने ख्रिस्ताला उठविले नाही,
तर मेलेले मरणातून उठविले जात नाहीत. 16आणि जर
मृतांना उठविले जात नाही, तर ख्रिस्ताला मरणातून
उठविण्यात आले नाही. 17आणि जर ख्रिस्त मरणातून
उठविला गेला नाही, तर तुमचा विश्वास व्यर्थ आहे;
तुम्ही अजूनसुद्धा पापातच आहात; 18होय, आणि जे ख्रिस्तात
मेलेले आहेत, त्यांचा नाश झाला आहे. 19जर ख्रिस्तावर
असलेली आमची आशा ही, फक्त या पृथ्वीवरील
जीवनासाठीच असली, तर सर्व मनुष्यात आम्ही दयनीय
असे आहोत. 20परंतु आता प्रत्यक्षात ख्रिस्त मरणातून
उठविला गेला आहे. जे मेलेले आहेत त्यांच्यातील तो
प्रथम फळ आहे. 21कारण ज्याअर्थी मनुष्याद्वारे मरण
आले त्याप्रमाणे मृतांचे पुनरुत्थानसुद्धा मनुष्याद्वारेच आले.
22कारण जसे आदामाद्वारे सर्व मरण पावतात तसेच सर्वजण
ख्रिस्ताद्वारे जिवंत केले जातील. 23पण प्रत्येक जण त्याच्या
क्रमानुसार, ख्रिस्त जो प्रथम फळ आहे, आणि मग ख्रिस्त
येण्याच्या वेळी त्याचे असलेले, 24मग शेवट येईल. प्रत्येक
अधिपती, प्रत्येक सत्ता, व प्रत्येक सामर्थ्य जेव्हा ख्रिस्त
नाहीसे करील, तेव्हा ख्रिस्त देवपित्याला राज्य देईल.
25कारण देवाने ख्रिस्ताचे शत्रू ख्रिस्ताच्या पायाखाली
ठेवीपर्यंत ख्रिस्ताने राज्य केले पाहिजे. 26शेवटचा शत्रू
असल्यासारखा मृत्यूचा नाश केला पाहिजे. 27कारण 'देवाने
सर्व काही त्याच्या अधिकारात ठेवले आहे." आता जेव्हा
पवित्र शास्त्र म्हणते की, "सर्व गोष्टी" अंकीत केल्या
आहेत तेव्हा सर्व स्पष्ट आहे की, ज्याने सर्व गोष्टी त्याच्या
अंकीत केल्या आहेत, तो देव सोडून इतर सर्व गोष्टी
त्याच्या अधिकार क्षेत्रात आहेत. 28आणि सर्व गोष्टी जेव्हा
स्वाधीन केलेल्या आहेत, तेव्हा पुत्रसुद्धा देवाच्या, ज्याने
सर्व गोष्टी स्वाधीन केल्या आहेत, स्वत: स्वाधीन केला
जाईल यासाठी की, देव सर्वांवर संपूर्णपणे अधिपती असावा.
29नाहीतर, मेलेल्यांसाठी व त्यांची पुन्हा भेट होईल या
आशेने ज्यांनी बाप्तिस्मा घेतला आहे ते काय करतील?
जर मेलेले उठविले जात नाहीत तर त्यांच्यासाठी लोक
बाप्तिस्मा का घेतात?
30आम्हीसुद्धा प्रत्येक घटकेला धोक्याला का तोंड देतो?
31बंधूजनहो, मी शपथपूर्वक सांगतो की, ख्रिस्त येशूमध्ये
माझा तुमच्याविषयी अभिमान आहे, मी दररोज मरतो
32इफिसात मी रानटी प्राण्याबरोबर लढलो, तर मी काय
मिळविले? जर मेलेले उठविले जात नाहीत तर "आपण
खाऊ पिऊ, कारण आपण उद्या मरून जाऊ!" 33फसू
नका, "वाईट सोबती चांगल्या सवयी बिघडवितात."
34शुद्धीवर या. जसे तुम्ही यायला पाहिजे आणि पाप करीत
जाऊ नका. कारण तुम्हांपैकी काहीजण देवाविषयी अज्ञानी
आहेत. हे मी तुम्हांस लाजविण्यासाठी बोलतो.

## आपले शरीर कोणत्या प्रकारचे असेल?

35परंतु कोणीतरी म्हणेल? "मेलेले कसे उठविले जातात?
कोणत्या प्रकारच्या शरीराने ते येतात?" 36तू किती मूर्ख
आहेस? तू जे पेरतोस ते प्रथम मेल्याशिवाय जिवंत होत
नाही. 37आणि तू लावतोस (पेरतोस) त्यासंबंधी तू जे
जमिनीत पेरतोस ते वाढलेले रोपटे नसून जे वाढतच
राहणार आहे, ते नव्हे तर फक्त धान्य (दाणा). तो गव्हाचा
किंवा इतर कोठला तरी असेल. 38आणि मग देवाने
निवडल्याप्रमाणे तो त्याला आकार देतो. तो प्रत्येक दाण्याला
त्याचे स्वत:चे 'शरीर' देतो. 39जिवंत प्राणीमात्रांचे सर्वांचे
देह सारखेच नसतात. त्याऐवजी मनुष्याचे शरीर एक
प्रकारचे असते. प्राण्यांचे शरीर दुसऱ्या प्रकारचे असते,
पक्ष्यांचे वेगळ्या प्रकारचे असते; आणि माशांचे आणखी
वेगळ्या प्रकारचे असते. 40तसेच स्वर्गीय शरीरे आहेत
आणि पृथ्वीवरील शरीरे आहेत, पण स्वर्गीय शरीराचे
वैभव एक प्रकारचे असते, तर जगिक शरीराला दुसरे
असते. 41सूर्याचे तेज वेगळ्या प्रकारचे तर चंद्राचे तेज
वेगळ्या प्रकारचे असते. ताऱ्यांचे तेज वेगळ्या प्रकारचे
असते. आणि तेजाबाबत एक तारा दुसऱ्या ताऱ्यांहून निराळा
असतो.

42म्हणून मृतांच्या पुनरुत्थानाबाबत असे असेल. शरीर
जे जमिनीत पुरले गेले आहे. ते नाश पावणारे आहे, जे
शरीर उठविण्यात येते ते अविनाशी आहे. 43जे शरीर
जमिनीत पुरले आहे, ते अपमानात पुरलेले असते. ते
अशक्त असते पण उठविले जाते ते सशक्त शरीर असते
44जे जमिनीत पुरले जाते ते नैसर्गिक शरीर आहे जे
उठविले जाते ते आध्यात्मिक शरीर आहे. जर नैसर्गिक
शरीरे आहेत तर आध्यात्मिक शरीरेसुद्धा असतात. 45आणि
तेच पवित्र शास्त्र सांगते, "पहिला मनुष्य, आदाम हा जिवंत
प्राणी झाला," पण ख्रिस्त जो शेवटचा आदाम झाला तो
जीवन देणारा आत्मा झाला. 46परंतु जे आध्यात्मिक ते
प्रथम नाही, जे जगिक ते प्रथम, मग जे आध्यात्मिक आहे
ते. 47पहिला मनुष्य मातीतून आला म्हणजे तो धुळीपासून
बनविला गेला, तर दुसरा मनुष्य स्वर्गातून आला.
48ज्याप्रमाणे तो मनुष्य मातीपासून बनविला गेला, त्याप्रमाणे
लोकसुद्धा मातीपासूनच बनविले गेले आणि त्या स्वर्गीय
मनुष्याप्रमाणे स्वर्गीय लोकही तसेच आहेत. 49ज्याप्रमाणे
तयार केलेल्या माणसाची प्रतिमा आपण धारण केली
आहे, तशी आपणसुद्धा स्वर्गीय माणसाची प्रतिमा धारण
करू.

50बंधूनो, मी तुम्हांला सांगतो, आपल्या मांस व रक्त
असलेल्या जगिक शरीराला देवाच्या राज्यात वाटा मिळू
शकत नाही. तसेच विनाशीपण अविनाशीपणाचा वारसा
मिळवू शकत नाही. 51पाहा! मी तुम्हांला एक रहस्यमय
सत्य सांगत आहे. आपण सर्व मरणार नाही. आपण सर्व
बदलून जाऊ.

52क्षणात, डोळ्यांची उघडझाप होते इतक्या लवकर,
जेव्हा शेवटचा कर्णा वाजेल, कारण कर्णा वाजेल आणि
मेलेले अविनाशीपणात उठविले जातील आणि आपण जे
अजूनही जिवंत आहोत ते बदलून जाऊ. 53कारण या
विनाशी शरीराने अविनाशीपण धारण करावे आणि या
मर्त्य शरीराने अमरत्व धारण केलेच पाहिजे. 54जेव्हा हे
विनाशी शरीर अविनाशीपण धारण करील व हे मर्त्य
शरीर अमरत्व धारण करील, तेव्हा पवित्र शास्त्रात
सांगितल्याप्रमाणे होईल.

"विजयात मरण गिळले गेले आहे."*

*यशया 25:8*

55"अरे मरणा तुझा विजय कोठे आहे? मरणा, तुझी
नांगी कोठे आहे?"*

*होशेय 13:14*

56मरणाची नांगी पाप आहे आणि पापाचे सामर्थ्य
नियमशास्त्रापासून येते. 57पण देवाला धन्यवाद असो, जो
प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे आम्हाला विजय देतो!

58म्हणून माझ्या प्रिय बंधूनो, स्थिर आणि अचल राहा.
नेहमी स्वत:ला प्रभूच्या कार्यासाठी वाहून घ्या. कारण
तुम्ही जाणता की प्रभूमध्ये तुमचे काम व्यर्थ नाही.

## इतर विश्वासणाऱ्यांसाठी वर्गणी

16 आता, देवाच्या लोकांकरिता वर्गणी गोळा
करण्याविषयी, जसे मी गलतीयातील मंडळ्यांना
आज्ञा केली त्याप्रमाणे तुम्हीही तसे करावे. 2प्रत्येक रविवारी
तुम्हांतील प्रत्येकाने आपल्या घरी, जो काही त्याला नफा
मिळाला असेल त्यातून काढून ठेवावे आणि बचत करावी.
3मी येईन तेव्हा ज्या माणसांना तुम्ही मान्यता द्याल त्यांना
मी ओळखपत्रे देऊन तुमच्या देणग्या यरुशलेमला नेण्यासाठी
पाठवीन. 4आणि जर माझेसुद्धा जाणे योग्य असेल तर ते
माझ्याबरोबर येतील.

## पौलाच्या योजना

5मी मासेदोनियातून जाईन तेव्हा तुमच्याकडे येईन कारण
मासेदोनियातून जाण्याची माझी योजना आहे. 6परंतु
कदाचित शक्यतो मी तुमच्याबरोबर काही काळ घालवीन
किंवा हिवाळासुद्धा तुमच्यात घालवीन. यासाठी की मी
जिकडे जाणार आहे तिकडे तुम्ही मला पाठवावे. 7जाता
जाता तुम्हांला भेटण्याची माझी इच्छा नाही. कारण जर
देवाची इच्छा असेल तर तुमच्यासमवेत काही काळ
घालवावा अशी इच्छा मी धरतो. 8पन्नासाव्या दिवसाच्या
सणापर्यंत मी इफिसात राहीन 9कारण माझ्यासाठी मोठे
आणि परिणामकारक दार उघडले आहे. आणि असे
अनेक आहेत जे मला विरोध करतात.

10जर तीमथ्य आला तर तो तुमच्याजवळ निर्भयपणे
कसा राहील याकडे लक्ष द्या. कारण तोही माझ्यासारखेच
प्रभूचे कार्य करीत आहे. 11यास्तव कोणीही त्याला तुच्छ
मानू नये. तर मग त्याने माझ्याकडे यावे म्हणून त्याला
शांतीने पाठवा. कारण इतर बंधूंबरोबर त्याच्या येण्याची
मी वाट पाहत आहे.

12आता आपला बंधु अपुल्लोविषयी, इतर बंधूंबरोबर
त्याने तुमच्याकडे यावे म्हणून मी त्याला भरपूर उत्तेजन
दिले. परंतु आताच त्याने तुमच्याकडे यावे अशी देवाची
इच्छा नव्हती. त्याला संधी मिळाल्यावर तो येईल.

## पौल आपले पत्र संपवितो

13सावध असा, तुमच्या विश्वासात बळकट राहा.
14धैर्यशील व्हा. सशक्त व्हा. प्रत्येक गोष्ट जी तुम्ही कराल
ती प्रीतीत करा. 15बंधूंनो, मी तुम्हांला बोध करतो तुम्हांला
स्तेफनच्या घराची माहिती आहे आणि जाणीवही आहे की
ते अखयाचे प्रथम फळ आहे. त्यांनी स्वत: संतांची सेवा
करण्याचे ठरविले आहे. 16प्रत्येक जण जो या कार्यात
सामील होतो व प्रभूसाठी श्रम करतो अशा लोकांच्या
तुम्हीसुद्धा अधीन व्हा.

17 स्तेफन, फर्तुतात आणि अखायिक हे आल्याने मला
आनंद झाला. कारण तुम्ही माझ्यासाठी जे केले ते तुम्ही
करू शकला नसता. 18 कारण त्यांनी माझा व तुमचा
आत्मा प्रफुल्लीत केला आहे. अशा लोकांना मान्यता
द्या. 19 आशियातील मंडळ्या तुम्हांला सलाम सांगतात.
अक्विला, प्रिस्कील्ला व जी मंडळी त्यांच्या घरात जमते,
ती प्रभूमध्ये तुम्हांला फार सलाम सांगतात. 20 सर्व बंधु
तुम्हांला सलाम सांगतात. पवित्र चुंबनाने एकमेकांना सलाम
करा.

21 मी, पौल स्वत: माझ्या स्वत:च्या हाताने हा सलाम
लिहीत आहे. 22 जर कोणी प्रभूवर प्रीति करीत नाही, तर
तो शापित होवो. “मारानाथा; हे प्रभु ये” 23 प्रभु येशूची
कृपा तुम्हांबरोबर असो! 24 ख्रिस्त येशूमध्ये माझी प्रीति
तुम्हां सर्वांबरोबर असो.

# पौलाचे करिंथकरांस दुसरे पत्र

1 देवाच्या इच्छेने ख्रिस्त येशूचा प्रेषित झालेला पौल याजकडून, तसेच आपला बंधु तीमथ्य याजकडून,
देवाची करिंथ येथील मंडळी आणि अखयातील संपूर्ण प्रदेशातील देवाच्या लोकांना
2देव आपला पिता आणि प्रभु येशू ख्रिस्त याजकडून कृपा व शांति असो.

### पौल देवाचे उपकार मानतो

3आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा देव आणि पिता, करूणायुक्त देवपिता. तो सांत्वन करणारा देव आहे.
4तो आमच्या सर्व कठीण काळात आमचे सांत्वन करतो; यासाठी की, आम्ही इतर लोकांचे त्यांच्या अडचणीत सांत्वन करू शकू. देव जे सांत्वन आम्हाला देतो त्याच सांत्वनाने आम्ही इतरांचे सांत्वन करू शकतो.

5आणि ख्रिस्ताच्या पुष्कळ दु:खामध्ये सहभागी होतो, त्याच प्रकारे ख्रिस्ताद्वारे आम्हांला पुष्कळ सांत्वन मिळते
6जर आमच्यावर संकटे येतात तर ती संकटे तुमच्या सांत्वनासाठी आणि तारणासाठी आहेत, जर आमच्याकडे सांत्वन आहे तर ते तुमच्या सांत्वनासाठी आहे. यामुळे आम्हाला जे दु:ख आहे तशाच प्रकारचे दु:ख सहन करायला, धीराने सहन करायला मदत होते.
7आमची तुमच्याविषयीची आशा बळकट आहे. कारण आम्हांला ठाऊक आहे की, जसे तुम्ही दु:खाचे भागीदार आहात तसे सांत्वनाचेही भागीदार आहात.

8बंधूंनो, आशिया प्रांतात जो त्रास आम्ही सहन केला त्याविषयी तुम्ही अंधारात असावे अशी आमची इच्छा नाही. आम्हांला तेथे मोठे ओझे होते. आमच्या शक्तिपलीकडचे ते ओझे होते. आम्ही जीवनाविषयीची आशासुद्धा सोडून दिली होती.
9खरोखर आम्हांला वाटत होते की, आम्ही मरू, पण आम्ही आपल्या स्वत:वर भरंवसा ठेवू नये, यासाठी हे घडले . हे यासाठी घडले की, जो मनुष्यांना मरणातून उठवितो त्याच्यावर आम्ही विश्वास ठेवावा.
10देवाने आम्हांला मरणाच्या मोठ्या संकटातून वाचविले. आणि देव आम्हांला पुढेदेखील वाचवील. आम्ही त्याच्यावर आमची आशा ठेवली आहे. यासाठी की, तो यापुढे ही आम्हांस सोडवील.
11तुम्ही प्रार्थना करण्याने आम्हांला मदत करावी. मग पुष्कळ लोक आमच्यासाठी उपकार मानतील की त्यांच्या पुष्कळ प्रार्थनांमुळे देवाने आम्हाला आशीर्वादित केले आहे.

### पौलाच्या योजनेत बदल

12कारण आम्हाला अभिमान बाळगण्याचे कारण, म्हणजे आमच्या सद्सद्विवेकबुद्धीची साक्ष होय. ती अशी की आम्ही मानवी ज्ञानाने नव्हे तर देवाच्या कृपेने, देवाच्या पवित्रतेने व प्रामाणिकपणे जगात व विशेषकरून तुमच्याजवळ वागलो.
13कारण ज्या गोष्टी तुम्ही वाचता किंवा मान्य करता, त्याशिवाय दुसऱ्या गोष्टी आम्ही तुम्हांस लिहित नाही. आणि शेवटपर्यंत तुम्ही नीट जाणून घ्याल अशी आशा धरतो.
14आणि त्याप्रमाणे तुम्ही आम्हांस काही अंशी जाणता की प्रभु येशूच्या दिवशी जसे आम्ही तुमच्याविषयी अभिमान बाळगतो तसे तुम्हीही आमच्याविषयी अभिमान बाळगता.

15मला याविषयीची खात्री असल्याने तुम्हांला पहिल्याने भेटण्याची योजना केली, यासाठी की तुम्हांला फायदा व्हावा.
16मी मासेदोनियाला जाताना तुम्हांला भेटण्याची योजना केली आणि मासेदोनियाहून परत येताना तुमच्याकडे येण्याचे ठरविले आणि त्यानंतर तुम्ही मला यहूदीयाला जाण्यासाठी मदत करावी.
17जेव्हा मी असा बेत केला, तेव्हा तो मी गंभीरपणे विचार न करता केला काय? किंवा मी माझ्या योजना जगाच्या रीतीप्रमाणे करतो काय, म्हणजे मी एकाच वेळेला "होय, होय" आणि "नाही, नाही" असे म्हणतो काय?

18पण देव खात्रीने विश्वासपात्र आहे. म्हणून तुम्हांजवळ आम्ही तुम्हांला होय किंवा नाही म्हणून असे वचन दिलेले नाही, असे नाही.
19कारण देवाचा पुत्र येशू ख्रिस्त जो आम्हांकडून, म्हणजे मी, सिल्वान व तीमथ्य यांजकडून तुम्हांमध्ये गाजविला गेला, तो होय किंवा नाही असा झाला नाही, तर तो फक्त होकारार्थीच आहे.
20कारण देवाची वचने कितीही असली तरी ती त्याच्यामध्ये होकारार्थी आहेत, यामुळे त्याच्यद्वारे आम्हांकडून देवाचे गौरव व्हावे म्हणून त्याच्याद्वारे विशेष आशीर्वाद आहे (आमेन).
21आता जो तुम्हांसहित आम्हांस ख्रिस्तामध्ये स्थिर करतो व ज्याने आम्हांस अभिषेक केला तो देव आहे.
22मालकीपणाचा शिक्का आमच्यावर मारला व जो येणार आहे त्याबद्दलची खात्री म्हणून आपला आत्मा आमच्या अंतरंगात ठेव म्हणून ठेवला.

23मी देवाला साक्षी होण्यासाठी हाक मारून आपल्या जिवाची शपथ घेऊन सांगतो की तुमच्याशी कठोर व्यवहार

करू नये म्हणून मी करिंथला आलो नाही. 24आम्ही
तुमच्या विश्वासावर स्वामित्व करतो असे नाही, पण तुमच्या
आनंदासाठी आम्ही तुमच्याबरोबर काम करतो. कारण
विश्वासाने तुम्ही स्थिर राहता.

2 म्हणून मी असा निश्चय केला की, मी पुन्हा तुमची
दु:खदायक अशी भेट घेणार नाही. 2कारण जर मी
तुम्हांला दु:ख देतो तर मला तुमच्याशिवाय आनंद कोण
देईल? 3आणि मी तुम्हांस हे यासाठी लिहिले की, मी
आल्यावर ज्यांच्यापासून मी आनंदी व्हावे त्यांच्यापासून
मला दु:ख होऊ नये. मला तुम्हा सर्वांविषयी विश्वास
आहे की, माझा आनंद तो तुम्हा सर्वांचादेखील आहे.
4कारण मी अत्यंत दु:खाने व कळवळून हे लिहित आहे
पण तुम्हांला खिन्न करावे म्हणून नव्हे तर तुमच्याविषयी
माझ्या मनात जी प्रीति आहे तिची खोली तुम्हांला समजावी
म्हणून लिहित आहे.

## ज्याने चूक केली त्याला क्षमा करा

5जर कोणी कोणाला दु:ख दिले असेल तर त्याने फक्त
मलाच ते दिले असे नाही, तर काही प्रमाणात तुम्हा सर्वांना
दिले आहे. त्यासंबंधी मी फार कठीण होऊ इच्छित नाही.
6अशा मनुष्यांना सगव्व्यांनी मिळून दिलेली शिक्षा पुरे.
7आता त्याऐवजी तुम्ही त्याला क्षमा केली पाहिजे आणि
त्याचे सांत्वन केले पाहिजे. यासाठी की अति दु:खाने तो
दबून जाऊ नये. 8मी विनंति करतो, म्हणून तुमचे
त्याच्यावरील प्रेम पुन्हा व्यक्त करा. 9मी तुम्हांला लिहिण्याचे
कारण हेच की तुम्ही परीक्षेत टिकता की नाही व प्रत्येक
बाबतीत तुम्हा आज्ञाधारक राहता की नाही हे पाहावे.
10जर तुम्ही एखाद्याला क्षमा करता तर मीसुद्धा त्याला
क्षमा करीन. आणि ज्याची ज्या कशाची मी क्षमा केली
आहे, आणि त्यातूनही जर काही क्षमा करण्याचे राहिले
असेल–तर मी ख्रिस्ताच्या नजरेत तुमची क्षमा केली आहे.
11यासाठी की सैतानाने आम्हांवर वरचढ होऊ नये. कारण
त्याच्या योजना आम्हाला माहीत नाहीत असे नाही.

## त्रोवस येथील पौलाची काळजी

12जेव्हा मी ख्रिस्ताच्या सुवार्तेकरिता त्रोवसास आलो
तेव्हा प्रभूमध्ये मजसाठी दार उघडल्यावर, 13माझा भाऊ
तीत मला तेथे सापडला नाही, म्हणून माझ्या आत्म्याचे
समाधान झाले नाही. पण तेथील लोकांचा निरोप घेऊन
मी मासेदोनियास गेलो.

## ख्रिस्ताद्वारे विजय

14पण देवाचे आभार मानतो जो ख्रिस्तामध्ये नेहमी
आम्हांला विजयी करतो व त्याच्याविषयीच्या ज्ञानाचा सुगंध
आमच्याद्वारे सगळीकडे पसरवितो. 15कारण आम्ही, जे
तारले जात आहेत व जे नाश पावत आहेत ते देवाला
वाहिलेला ख्रिस्ताचा सुगंध असे आहोत. 16हखलेल्यांसाठी
आम्ही मरणाचा वास आहोत तर जे तारले गेले आहेत,
त्यांच्यासाठी आम्ही जीवनाचा सुगंध आहोत. आणि या
कामासाठी बरोबरीचा कोण आहे? 17इतरांसारखे आम्ही
फायद्यासाठी देवाच्या वचनाचे काम करीत नाही. याउलट
ख्रिस्तामध्ये देवासमोर आम्ही देवाने पाठविलेल्या
माणसांसारखे प्रामाणिकपणे बोलतो.

## देवाच्या नव्या कराराचे सेवक

3 पुन्हा, आम्ही आमची प्रशंसा करायला लागलो काय?
किंवा आम्हांला काही लोकांसारखी तुमच्याकडे
येण्यास किंवा तुमच्याकडून येण्यास शिफारसपत्रांची
आवश्यकता आहे काय? 2तुम्ही स्वत:च आमची
शिफारसपत्रे आहात, आमच्या अंत:करणावर लिहिलेले,
प्रत्येकाने वाचलेले व प्रत्येकाला माहीत असलेले. 3तुम्ही
दाखवून देता की, तुम्ही ख्रिस्ताकडून आलेले पत्र आहात,
आणि ते आमच्या सेवेचा परिणाम शाईने लिहिलेले पत्र
नव्हे, तर जिवंत देवाच्या आत्म्याने लिहिलेले, दगडी
पाट्यावर नव्हे तर मानवी हृदयाच्या पाट्यांवर लिहिलेले
आहात.

4देवासमोर ख्रिस्ताद्वारे अशा प्रकारचा आमचा विश्वास
आहे. 5असे नाही की आम्ही स्वत:हून आमच्यासाठी
सर्वकाही करण्यास समर्थ आहोत, तर आमचे सामर्थ्य
देवापासून येते. 6त्याने आम्हांला नव्या कराराचे सेवक
म्हणून समर्थ बनविले आहे– पत्राने नव्हे तर आत्म्याने,
कारण पत्र मारून टाकते, पण आत्मा जीवन देतो.

## नवा करार महान गौरव आणतो

7आता जर सेवेमुळे मरण येते, जी दगडावर अक्षरांनी
कोरलेली होती आणि जर ती सेवा गौरवाने आली, यासाठी
की, इस्राएल लोकांना मोशेच्या चेहऱ्याचे तेजोवलय पाहता
येऊ नये, जरी ते तेज कमी होत चालले होते. 8तर आत्म्याची
सेवा त्यापेक्षा गौरवी होणार नाही काय? 9कारण जर सेवा
जी माणसाचा निषेध करते ती गौरवी असेल, तर तिच्यापेक्षा
कितीतरी गौरवी ती सेवा असेल जी नीतिमत्त्व आणते!
10त्यात गौरव होते, पण जेव्हा त्यापेक्षा महान गौरवासमोर
तुलना केली जाते, तेव्हा ते कमी होते. 11आणि जर ते
निस्तेज होत जाणारे गौरवाने आले तर जे टिकते त्याचे
गौरव किती महान असेल!

12म्हणून आम्हांला अशी आशा असल्यामुळे, आम्ही
फार धीट आहोत. 13आम्ही मोशेप्रमाणे नाही, ज्याने तोंडावर
आवरण घेऊन त्याच्या चेहऱ्याच्या तेजामुळे (इस्राएली
लोकांचे डोळे दिपून जाऊ नयेत) त्याचा चेहरा लोकांना
दिसणार नाही म्हणून तोंड झाकून घेतले. जरी त्या वेळेला
त्याचे तेज कमी होत चालले होते.

14पण त्यांची मने मंद करण्यात आली होती. कारण
आजपर्यंत तोच पडदा (आवरण) राहतो, जेव्हा जुना करार
वाचला जातो. तो हटवण्यात आलेला नाही. कारण केवळ

ख्रिस्तामध्येच तो बाजूला घेतला जाईल. 15तरी आजपर्यंत जेव्हा मोशेचे ग्रंथ वाचतात तेव्हा त्यांच्या मनावर आच्छादन राहते. 16पण जेव्हा केव्हा कोणी प्रभूकडे वळतो तेव्हा ते आवरण काढून घेतले जाते.

17प्रभु आत्मा आहे आणि जेथे प्रभूचा आत्मा आहे तेथे मोकळेपणा आहे. 18तर आपण सर्वजण आवरण नसलेल्या चेहऱ्याने प्रभुचे गौरव आरशात पाहिल्याप्रमाणे पाहत असता, प्रभु जो आत्मा याच्यापासून गौरवातून गौरवात असे त्याच्या प्रतिरूपात रूपांतरीत होत जातो.

### मातीच्या भांड्यातील आध्यात्मिक ठेवा

4 म्हणून देवाच्या दयेद्वारे आम्हाला ही सेवा मिळाली आहे, आम्ही धीर सोडत नाही. 2तर आम्ही लज्जास्पद गुप्त गोष्टी सोडून दिल्या आहेत, आम्ही कपटाने वागत नाही. आणि कपटदृष्टीने देवाच्या वचनाचा उपयोग करीत नाही, तर देवासमोर खरेपण प्रगट करण्यास आम्ही आपणांसमोर सर्व लोकांच्या सद्सद्विवेकबुध्दिला पटवितो. 3आणि जरी आमचे शुभवर्तमान आवरण घातलेले आहे, जे नाश पावत आहेत अशांसाठी ते आच्छादित आहे. 4या जगाच्या देवाने अविश्वासणाऱ्यांची मने आंधळी केली आहेत. यासाठी की ख्रिस्ताच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांना पाहता येऊन नये. जो देवाच्या प्रतिमेचा आहे. 5कारण आम्ही आमचीच सुवार्ता सांगत नाही तर ख्रिस्त येशू हाच प्रभु आहे अशी घोषणा करतो आणि आम्ही येशू ख्रिस्तासाठी तुमचे सेवक आहोत असे स्वत:विषयी सांगतो. 6कारण देव, जो म्हणाला, “अंधारातून प्रकाश होवो.” त्याने तो प्रकाश, आमच्या अंत:करणात ख्रिस्ताच्या चेहेऱ्यात देवाच्या गौरवाच्या ज्ञानात दाखवावा. 7पण आमचा हा ठेवा मातीच्या भांड्यामध्ये आहे. यासाठी की, सामर्थ्याची पराकोटी देवापासून येते, आम्हांकडून नाही. 8आम्हांवर चारी दिशांनी संकटे येतात, पण आम्ही अजून चिरडले गेलो नाही, गोंधळलेलो आहोत, पण निराश झालो नाही. 9छळ झालेलै असे आहोत पण टाकून दिलेले असे आम्ही नाही, खाली पडलेलो असलो तरी आमचा नाश झालेला नाही.

10आम्ही नेहमी येशूचे मरण आमच्या शरीरात घेऊन जात असतो. यासाठी की ख्रिस्ताचे जीवनही आमच्या शरीराद्वारे प्रकट व्हावे. 11कारण आम्ही जे जिवंत आहोत ते आम्ही नेहमीच ख्रिस्ताकरिता मरणाला सोपविलेले आहोत. यासाठी त्याचे जीवन आमच्या मर्त्य शरीराद्वारे प्रकट व्हावे. 12म्हणून मग, आमच्यामध्ये मृत्यू काम करीत आहे, पण तुमच्यामध्ये जीवन काम करीत आहे.

13असे लिहिले आहे: “मी विश्वास ठेवला; म्हणून मी बोललो आहे.” विश्वासाच्या त्याच आत्म्याने आम्हीसुद्धा विश्वास ठेवतो आणि म्हणून बोलतो. 14कारण आम्हांला माहीत आहे ज्याने प्रभु येशूला उठविले, तो त्याच्याबरोबर आम्हांला उठवील व आम्हांला तुमच्याबरोबरच त्याच्यासमोर सादर करील. 15कारण या सर्व गोष्टी तुम्हाकरिता आहेत. यासाठी की, पुष्कळांच्या द्वारे विपुल झालेली कृपा अनेकांच्या उपकारस्तुतीमुळे देवाचे भरघोस गौरव होण्याला कारण व्हावी.

### विश्वासाचे जगणे

16म्हणून आम्ही धीर सोडीत नाही. जरी बाह्यदृष्ट्या आम्ही व्यर्थ ठरत आहोत तरी अंतरीकदृष्ट्या आम्ही दिवसेंदिवस नवीन होत आहोत. 17कारण आमची हलकी व क्षणिक दु:खे ही आमच्यासाठी अनंतकाळचे गौरव मिळवीत आहेत, जे दु:खापेक्षा कितीतरी मोठे आहे. 18म्हणून आम्ही ज्या गोष्टी कायमस्वरूपात दिसत नाहीत तिकडे आमचे डोळे लावीत नाही पण जे दिसत नाही, पण अविनाशी आहे त्याकडे डोळे लावतो. कारण जे दिसते ते क्षणिक आहे, पण जे दिसत नाही, ते अनंतकालीक आहे.

5 आता आम्हांला माहीत आहे की, जेव्हा जगिक घर ज्यामध्ये आम्ही राहतो, नष्ट झाले, तर आम्हाला देवापासून मिळालेले अनंतकाळचे घर स्वर्गात आहे. ते मानवी हातांनी बांधलेले नाही. 2दरम्यान आम्ही कण्हतो, आमच्या स्वर्गीय निवासस्थानासह पोशाख करण्यास आम्ही आतुर झालो आहोत. 3कारण जेव्हा आम्ही पोशाख करू, तेव्हा आम्ही नग्न दिसणार नाही. 4कारण या घरामध्ये आम्ही असताना आम्ही कण्हतो, आणि ओझ्याने दबले जातो. कारण वस्त्रहीन असण्याची आमची इच्छा नसते, पण आमची इच्छा आहे की, आमच्या स्वर्गीय निवासस्थानाने पोशाख करावा. यासाठी की जे मर्त्य आहेत ते जीवनाने गिळावे. 5आता देवानेच आम्हांला नेमक्या याच कारणासाठी निर्माण केले, आणि हमी म्हणून पवित्र आत्मादिला, जो येणार आहे त्याबद्दलची खात्री बाळगा.

6म्हणून आम्हांला नेहमीच विश्वास असतो आणि माहीत असते की, जोपर्यंत आम्ही या शरीरात राहत आहोत, तोपर्यंत आम्ही प्रभूपासून दूर आहोत. 7आम्ही विश्वासाने जगतो, जे बघतो त्याने 8आम्हांला विश्वास आहे, मी म्हणतो, आणि शरीरापासून दूर राहण्याचे आम्ही पसंत करू. आणि प्रभुसंगती राहू. 9म्हणून त्याला संतोषविणे हे आम्ही आमचे ध्येय करतो, आम्ही शरीराने जगत असलो किंवा प्रभूपासून दूर असलो तरी. 10कारण आम्हांला सर्वांना ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभे राहायचे आहे. आणि प्रत्येकाला त्याचे जे प्रतिफळ मिळणार आहे. म्हणजे शरीरात असताना ज्या वाईट किंवा चांगल्या गोष्टी केल्या त्याप्रमाणे बक्षिस मिळेल.

### देवाचे मित्र होण्यासाठी लोकांना मदत करणे

11म्हणून आम्ही जाणतो की देवाचे भय कशासाठी धरायचे व त्यासाठी आम्ही मनुष्यांना वळविण्याचे प्रयत्न करतो. आम्ही जे आहोत ते देवासमोर स्पष्ट आहोत. आणि माझी आशा आहे की, तुमची सद्सद्विवेकबुध्दि

आम्हांला जाणते. 12आम्ही तुमच्यासमोर आमची पात्रता
पुन्हा एकदा सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत नाही. पण
आमच्याविषयी तुम्ही अभिमान बाळगावा यासाठी संधी
देत आहोत, यासाठी की तुम्ही अशांना उत्तर द्यावे की जे
पाहिलेल्या गोष्टीविषयी अभिमान बाळगतात आणि
अंत:करणात जे आहे त्याविषयी बाळगत नाहीत. 13जरी
आम्ही वेडे असलो तरी ते ख्रिस्तासाठी, जर आम्ही आमच्या
योग्य मन:स्थितीत असलो तर ते तुमच्यासाठी. 14कारण
ख्रिस्ताचे प्रेम आम्हाला भाग पाडते, कारण आमची खात्री
झाली आहे की, जर एक सर्वांसाठी मेला आणि म्हणून
सर्व मेले. 15आणि तो सर्वांसाठी मेला, यासाठी की जे
जगतात त्यांनी स्वत:साठीच जगू नये तर जो त्यांच्यासाठी
मेला व पुन्हा उठला त्याच्यासाठी जगावे.

16म्हणून आतापासून जगिक दृष्टीकोनातून आम्ही
कोणाल मानत नाही. तरी एकेकाळी आम्ही ख्रिस्ताला
अशाप्रकारे मानले. पण आता आम्ही तसे करीत नाही.
17म्हणून, जर कोणी ख्रिस्तामध्ये आहे, तर तो नवी उत्पत्ति
आहे. जुने गेले आहे. नवीन आले आहे! 18हे सर्व देवापासून
आहे त्याने ख्रिस्ताद्वारे आमच्याशी स्वत:चा समेट केला
आणि आम्हांला समेटाची सेवा दिली. 19देव ख्रिस्तामध्ये
जगाशी स्वत:चा समेट करीत होता. मनुष्यांची पापे
त्यांच्याविरुद्ध मोजत नव्हता. आणि त्याने आम्हांला समेटाचा
संदेश दिला आहे. 20म्हणून आम्ही ख्रिस्ताचे राजदूत आहोत,
जणू काय देव आमच्या द्वारे त्याचे आवाहन करीत होता.
ख्रिस्ताच्या वतीने आम्ही तुम्हांला विनंति करतो. देवाशी
समेट करा. 21ज्याच्याठायी पाप नव्हते त्याला आमच्यासाठी
देवाने पाप केले. यासाठी की त्याच्यामध्ये आम्ही देवाचे
नीतिमत्त्व व्हावे.

6 देवाचे सहकर्मचारी म्हणून आम्ही तुम्हांला विनंति
करतो की, जी देवाची कृपा आपल्याला मिळते ती
व्यर्थ घालवू नका. 2कारण तो म्हणतो,

“माझ्या सोयीच्या वेळी मी तुझे ऐकले आणि तारणाच्या
दिवसात मी तुला मदत केली.” *यशया 49:8*

मी तुम्हांला सांगतो, देवाच्या “सोयीची वेळ” आताच आहे.
आताच “तारणाचा दिवस” आहे.

3आमची सेवा दोषी ठरू नये यासाठी आम्ही कोणालाही
दोष देत नाही. 4उलट सर्व प्रकारच्या परिस्थितीत आम्ही
देवाचे सेवक होतो हे आम्ही दाखवून दिले. मग आम्हांला
त्रास सोसावा लागो, नाहीतर अडचणी येवोत, छळ होवो
नाहीतर वेदना होवोत. छळात, आणि दु:खात 5फटके
खाण्यात, तुरुंगवासात आणि दंग्यात, कठोर श्रमात, जागून
काढलेल्या रात्रीत, भुकेले असताना, 6शुद्धतेत,
समजूतदारपणात, सहनशीलतेत, आणि दयाळूपणात, पवित्र
आत्म्याच्या आणि निर्व्याज प्रीतीमुळे, 7सत्य बोलण्यात,
आणि देवाच्या सामर्थ्यात, आक्रमक आणि संरक्षक पद्धतीने
नीतिमत्त्वाच्या शस्त्रांसह, 8गौरव व अपमानाद्वारे,
आमच्याबद्दलच्या वाईट व चांगल्या बातमीने शहाणपणाने,
तरीही फसविणारे ठरले गेलेलो. 9जरी आम्ही प्रसिद्ध असलो,
तरी अप्रसिद्ध असे समजले गेलेलो, मरत असलेले तरी
जगत असलेलो, मारलेले तरी अजून ठार न केलेले,
10दु:खी तरी नेहमी आनंद करीत, गरीब तरी पुष्कळांना
श्रीमंत करणारे, जवळ काही नसलेले तरी सर्व काही
जवळ असणारे असे आहोत.

11आम्ही मोकळेपणाने तुमच्याशी बोललो,
करिंथकरांनो, आणि आमची अंत:करणे तुमच्यासमोर
अगदी पूर्णपणे रीतीने उघडी केली. 12आम्ही तुमच्याबद्दल
प्रेमभावना ठेवण्याचे थांबवले नाही, पण तुमची
आमच्याबद्दलची प्रेमभावना मात्र थबकली आहे.
13आपल्यातली देवाणघेवाण चांगली असावी म्हणून मी
तुमच्याशी माझ्या मुलांप्रमाणे बोलतो. तुम्हीही तुमची
अंत:करणे विशाल करा.

### ख्रिस्ती नसलेल्यांबरोबर राहण्याविषयी सूचना

14जे तुमच्या बरोबरीचे नाहीत त्यांच्याबरोबर एका
जुवाखाली एकत्र येऊ नका. नाहीतर नीतिमान व दुष्टपणा
यात काय फरक उरला? किंवा प्रकाश व अंधार यात
कोणते साम्य आहे? 15ख्रिस्त आणि बलियाल* यांचा
सलोखा कसा होणार? विश्वासणाऱ्याचा अविश्वासणाऱ्या
बरोबर काय सारखेपणा आहे? 16देवाचे मंदिर आणि मूर्ति
यांच्या मान्यता एक कशा असतील? कारण आम्ही जिवंत
देवाचे मंदिर आहोत. ज्याप्रमाणे देवाने म्हटले आहे:

“मी त्यांच्याबरोबर राहीन, आणि त्यांच्याबरोबर चालेन,
मी त्यांचा देव होईन आणि ते माझे लोक होतील.”

*लेवीय 26:11-12*

17“म्हणून त्यांच्यामधून बाहेर या आणि स्वत:ला
त्यांच्यापासून वेगळे करा. प्रभु म्हणतो, अशुद्ध वस्तूला
स्पर्श करू नका, आणि मी तुम्हांला स्वीकारीन.”

*यशया 52:11*

18“मी तुम्हांला पिता असा होईन, तुम्ही माझी मुले व
कन्या व्हाल, असे सर्वसमर्थ प्रभु म्हणतो.”

*2 शमुवेल 7:14; 7:8*

7 प्रिय मित्रांनो, देवाची अभिवचने आमच्याकडे
असल्याने जे शरीर व आत्म्याला दुषित करते त्या
प्रत्येक गोष्टीपासून स्वत:ला शुद्ध ठेवू या. देवाविषयी
असलेल्या आदराने पवित्रतेत परिपूर्ण होऊ या.

---

**बलियाल** सैतान

## पौलाचा आनंद

2तुमच्या अंत:करणात आमच्यासाठी जागा करा: आम्ही
कोणाचेही वाईट केले नाही. आम्ही कोणाला भ्रष्ट केले
नाही. आम्ही कोणाचा गैर फायदा घेतला नाही. 3मी तुम्हांला
तुमचा निषेध करावा म्हणून असे म्हणत नाही. मी तुम्हांला
अगोदरही सांगितले आहे की, आमच्या अंत:करणात
तुमच्याविषयी असे स्थान आहे की, आम्ही तुमच्याबरोबर
जगू किंवा मरू. 4मला तुमच्याविषयी मोठा विश्वास वाटतो,
मला तुमच्याविषयी खूप अभिमान वाटतो. तुमच्या बाबतीत
मी अधिक उत्तेजित झालो आहे. अनेक त्रास झाले तरी
आमच्या सर्व त्रासात आमच्या आनंदाला उधाण आले
आहे.

5कारण जेव्हा आम्ही मासेदोनियाला आलो, तेव्हा
आमच्या या शरीराला विसावा नव्हता. पण आम्हांला
प्रत्येक ठिकाणी त्रास देण्यात आला, बाहेरून भांडणे, आतून
भीति होती. 6पण जे हताश झाले आहेत त्याचे सांत्वन देव
करतो, त्याने तीताच्या येण्याने आमचे सांत्वन केले.
7त्याच्यामुळेच नव्हे तर तुम्ही त्याला दिलेल्या
सांत्वनामुळेसुद्धा. तुमच्या आमच्याबद्दल असलेल्या
ओढीबद्दल त्याने आम्हांला सांगितले आहे. तुमचे खोलवरचे
दु:ख, माझ्याबद्दलची तुमची असलेली तीव्र सदिच्छा याविषयी
सांगितले. त्यामुळे माझा आनंद पूर्वीपेक्षा वाढला आहे.

8जरी मी माझ्या पत्रामुळे तुम्हांला दु:खावले असले तरी
त्याबद्दल मला खेद होत नाही. जरी मला खेद होत असला
तरी मला आता जाणवले आहे की, माझ्या पत्रामुळे तुम्हांला
दु:ख झाले. पण फक्त थोड्या वेळापुरते असावे. 9तरी
आता मी आनंदी आहे. यासाठी नाही की, तुम्हांला दु:खी
केले, तर यासाठी की तुमच्या दु:खामुळे तुम्ही पश्चात्ताप
केला. कारण देवाने इच्छिल्याप्रमाणे तुम्ही दु:खी झाला
आणि म्हणून आमच्याकडून कुणाची कोणत्याही प्रकारे
हानि झाली नाही. 10दैवी दु:ख तारणाप्रत नेणारा पश्चात्ताप
आणते आणि कोणताही खेद बाळगीत नाही, पण जगिक
दु:ख मरण आणते. 11पहा दैवी दु:खामुळे तुमच्यात काय
निर्माण झाले आहे: किती तरी गंभीरपणा आणि आत्मियता,
स्वत:ला स्पष्ट करण्यासाठी किती उत्सुकता, किती संताप,
किती सावधानता, किती ओढ, किती सदिच्छा व न्याय
मिळवून देण्यासाठी किती तत्परता, या बाबतीत प्रत्येक
गोष्टीत तुम्ही स्वत:ला निर्दोष असे सिद्ध केले. 12म्हणून
जरी मी तुम्हांला लिहिले तरी ते कोणी चूक केली म्हणून
किंवा कोणी दुसऱ्याला दु:ख दिले म्हणून नाही तर उलट
देवासमोर तुम्ही आमच्या बाबतीतील तुमची आत्मियता
दाखवली हे तुम्हांला पाहता यावे. 13यामुळे आम्हास
उत्तेजन मिळाले.

आमच्या स्वत:च्या उत्तेजनाशिवाय आणखी आम्ही
विशेषत: तीताला आनंदीत पाहून आम्हांला आनंद झाला
कारण त्याचा आत्मा तुम्हा सर्वांमुळे ताजातवाना झाला
आहे. 14मी त्याला तुमच्याविषयी अभिमानाने सांगितले
आणि तुम्ही मला लज्जित केले नाही. पण जे सर्व काही
आम्ही तुम्हांला सांगितले ते खरे खरे होते. तसा आमचा
तुमच्याविषयीचा अभिमान जो तीताला सांगितला ह्याच
रीतीने स्वत:चा खरेपणा सिद्ध केला. 15आणि जेव्हा त्याला
तुमचा आज्ञाधारकपणा आठवतो तेव्हा त्याचे तुमच्या
विषयीचे प्रेम अधिकच वाढते. त्याचा स्वीकार तुम्ही भीत
व कांपत केला 16मला आनंद वाटतो की मला
तुमच्याविषयी पूर्ण विश्वास वाटू शकतो.

## ख्रिस्ती देणे

8 आणि आता, बंधूनो, आम्हांला असे वाटते की, तुम्ही
हे जाणून घ्यावे की, मासेदोनियातील मंडळ्यांना देवाने
कशी कृपा दिली. 2अत्यंत खडतर अशी संकटे असली
तरी त्यांचा ओसंडून वाहणारा आनंद आणि त्यांचे आत्यंतिक
दारिद्य विशाल उदारतेत उभे राहिले. 3कारण मी साक्ष
देतो की, त्यांना जितके शक्य होते तितके त्यांनी दिले.
आणि त्यांच्या क्षमतेपेक्षाही जास्त दिले. त्यांनी उत्स्फूर्तपणे
स्वत:ला दिले. 4संतांच्या सेवेमुळे मिळणाऱ्या
आशीर्वादामध्ये सहभागी होण्याचा बहुमान मिळावा म्हणून
त्यांनी आस्थेवाईकपणे आम्हांला विनंति केली. 5आणि
आम्ही अपेक्षा केली त्याप्रमाणे त्यांनी केले नाही, तर
त्यांनी स्वत:ला प्रथम देवाला दिले. आणि मग देवाच्या
इच्छेला राखून आम्हांला दिले.

6मग आम्ही तीताला विनंति केली, त्याने अगोदर जशी
सुरुवात केली होती तशीच त्याने तुम्हामध्ये या कृपेची
पूर्णताही करावी. 7 म्हणून जसे तुम्ही सर्व गोष्टीत, म्हणजे
विश्वासात, बोलण्यात ज्ञानात व सर्व आस्थेत व आम्हांवरील
आपल्या प्रीतीत वाढला आहा, तसे तुम्ही या कृपेतही फार
वाढावे.

8मी तुम्हांला आज्ञा करीत नाही. पण मला तुमच्या
प्रेमाच्या प्रामाणिकतेची तुलना इतरांच्या आस्थेशी करायची
आहे. 9कारण तुम्हांला आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा
माहीत आहे की, जरी तो श्रीमंत होता तरी तुमच्याकरिता
तो गरीब झाला, यासाठी की, त्याच्या गरिबीने तुम्ही श्रीमंत
व्हावे. 10आणि तुमच्या फायद्यासाठी माझा सल्ला असा
आहे की, गेल्या वर्षी तुम्ही केवळ देण्यातच नव्हे तर तशी
इच्छा करण्यात पहिले होता. 11आता ते काम पूर्ण करा,
यासाठी की कार्य करण्याची तुमची उत्सुकता ही ती
तुमच्याकडे ज्या प्रमाणात आहे त्यानुसार पूर्ण करण्यात
यावी.

12कारण जर इच्छा असेल, तर एखाद्याकडे जे असेल
तसे मान्य होईल. जर नसेल तर मान्य होणार नाही.
13दुसऱ्याचे ओझे हलके करण्यासाठी तुमच्यावर ओझे
लादावे असे नाही तर समानता असावी म्हणून. 14सध्याच्या
काळात तुमच्या विपुलतेतून त्यांची गरज भागावी. यासाठी
की नंतर त्याच्या विपुलतेमुळे तुमच्या गरजा भागविल्या
जाव्यात. मग समानता येईल. 15पवित्र शास्त्र म्हणते,

“ज्याने पुष्कळ गोळा केले होते, त्याला जास्त झाले नाही. ज्याने थोडे गोळा केले होते, त्याला कमी पडले नाही.” *निर्गम 16:18*

## तीत आणि त्याचे सोबती

[16]जी आस्था माझ्यामध्ये तुमच्याविषयी आहे ती आस्था देवाने तीताच्या अंत:करणात घातली याबद्दल मी देवाचे आभार मानतो, [17]कारण तीताने आमच्या आवाहनाचे स्वागतच केले असे नाही तर तो पुष्कळ उत्सुकतेने आणि त्याच्या स्वत:च्या मोठ्या आस्थेने तुमच्याकडे येत आहे. [18]आणि आम्ही त्याच्याबरोबर एका बंधूला ज्याची त्याच्या सुवार्तेबद्दलच्या मंडळ्यातील सेवेबद्दल वाहवा होत आहे, त्याला पाठवीत आहोत. [19]यापेक्षा अधिक म्हणजे मंडळ्यांनी आम्हासंगती दानार्पण घेऊन जाण्यासाठी त्याची निवड केली. जे आम्ही प्रभुच्या गौरवासाठी करतो आणि मदत करण्याची आमची उत्सुकता दिसावी म्हणून हे करतो.

[20]ही जी विपुलता आम्हांकडून सेवेस उपयोगी पडत आहे तिच्या कामात कोणीही आम्हांवर दोष लावू नये म्हणून आम्ही काळजीपूर्वक वागत आहोत. [21]कारण जे प्रभूच्या दृष्टीने चांगले तेच आम्ही योजितो, एवढेच नाही तर माणसांच्या दृष्टीने जे चांगले ते योजितो.

[22]त्याला सोडून आम्ही त्यांच्याबरोबर आमच्या बंधूलाही पाठवित आहोत. ज्याने आम्हाला स्वत:ला पुष्कळ बाबतीत आवेशी असल्याचे सिद्ध करून दाखविले आहे आणि आता त्याला तुमच्याबद्दल वाटत असलेल्या विश्वासामुळे तो अधिक आवेशी झाला आहे.

[23]तीताच्या बाबतीत सांगायाचे तर, तो तुमच्यामधील माझा एक सहकारी व सहकर्मचारी आहे, आमच्या इतर बंधूंच्या बाबतीत सांगायचे तर, ते ख्रिस्ताला गौरव व मंडळ्यांचे प्रतिनिधी आहेत. [24]म्हणून या लोकांना तुमच्या प्रेमाचा पुरावा द्या. आणि आम्हांला तुमच्याबद्दल वाटत असलेल्या अभिमानाबद्दलचे समर्थन करा. यासाठी की, मंडळ्यांनी ते पाहावे.

## ख्रिस्ती बांधवांकरिता मदत

9 या संताच्या सेवेसाठी मी तुम्हांला काही लिहावे याची गरज भासत नाही. [2]कारण मदत करण्याबद्दलची तुमची उत्सुकता मला माहीत आहे. आणि मी मासेदोनियातील लोकांना याविषयी अभिमानाने सांगत होतो की, गेल्या वर्षापासून अखयातील तुम्ही लोक देण्यासाठी तयार आहात आणि तुमच्या जोशामुळे पुष्कळ जण कृति करण्यास आवेशाने पुढे आले आहेत. [3]परंतु मी भावांना यासाठी पाठवीत आहे की, आमचा तुमच्याविषयी या बाबतीत अभिमान पोकळ ठरू नये. पण जसे आम्ही तुम्हांला सांगितले तसे तुम्ही तयार असावे. [4]कारण कोणी मासेदोनियाचा मनुष्य माझ्याबरोबर आला, आणि जर त्याने तुम्हांला तयार नसलेले पाहिले, तर तुम्ही लज्जित व्हाल असे आम्हाला म्हणायचे नाही. तर आम्ही लज्जित होऊ. [5]म्हणून मला हे आवश्यक आहे की, बंधूनी आम्हांला आगाऊ भेट देण्यासाठी त्यांना विनंति करावी आणि उदार देणगी जी तुम्ही देण्याचे अभिवचन दिले आहे, तिच्याविषयीची व्यवस्था संपवावी. मग ती उदारहस्ते दिलेली देणगी ठरेल व कुरकुर करीत दिलेले दान ठरणार नाही.

[6]हे लक्षात ठेवा: जो हात राखून पेरतो तो त्याच मापाने कापणी करील, आणि जो उदार हाताने पेरील तो त्याच मापाने कापणी करील. [7]प्रत्येक माणसाने अंत:करणात ठरविल्याप्रमाणे द्यावे, खेदाने किंवा बळजबरीने देणे भाग पडते म्हणून देऊ नये. कारण आनंदाने देणाऱ्यावर देव प्रेम करतो. [8]आणि देव तुम्हाला कृपेने विपुल देण्यास समर्थ आहे. यासाठी की सर्व गोष्टीत सर्व वेळी, तुम्हांला विपुलता मिळेल आणि चांगल्या कामासाठी अधिक तत्पर व्हाल. [9]असे लिहिले आहे:

“तो गरीबांना उदारहस्ते देतो, त्याची दया अनंतकाळपर्यंत राहील.”

*स्तोत्र. 112:9*

[10]जो पेरणाऱ्याला बी व खाणाऱ्याला अन्न पुरवितो, तो तुम्हाला पेरायला बी पुरवील आणि ते अनेकपट करील. आणि तुमच्या नीतिमत्त्वाची फळे वाढवील. [11]सर्व प्रकारच्या उदारपणाकरिता प्रत्येक गोष्टीत धनवान व्हाल. यामुळे तुम्हीदेखील उदारपणे द्यावे ज्यामुळे देवाची स्तुति होईल. [12]कारण या अर्पणकार्याची ही सेवा संताच्या गरजा पुरविते. इतकेच केवळ नाही तर देवाला अनेक गोष्टी दिल्याने विपुलता येते. [13]कारण या सेवेमुळे तुम्ही स्वत:ला योग्य शाबित करता, आणि ते देवाचे गौरव करतात. तुम्ही ज्यावर विश्वास ठेवता त्या ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाला अधीन असल्याने तुमचे स्वीकारणे. [14]आणखी ते तुम्हाकरिता प्रार्थना करीत असता तुम्हावर देवाने जी विपुल कृपा केली आहे, त्यामुळे तुमची भेट व्हावी अशी उत्कंठा ते धरतात. [15]देवाच्या अनिर्वाच्य देणग्यांबद्दल त्याचे आभार मानतो.

## पौल त्याच्या सेवेचे समर्थन करतो

10 ख्रिस्ताच्या नम्रतेने व सौम्यतेने मी तुम्हांला उत्तेजन देतो. मी, पौल, जेव्हा तुमच्या समोर येतो तेव्हा ‘भित्रा’ असतो पण जेव्हा तुमच्यापासून दूर असतो तेव्हा “धीट” असतो! [2]मी आशा करतो की, जेव्हा मी येतो तेव्हा, काही लोक ज्यांना असे वाटते की आम्ही जगाच्या रीतीप्रमाणे जगतो त्यांच्याबाबतीत लोक जितकी अपेक्षा करतात, तितका मी धीट असणार नाही, जितकी मी अपेक्षा करतो. [3]कारण जरी आम्ही जगामध्ये राहत असलो, तरी जगाप्रमाणे लढाई करीत नाही. [4] ज्या शस्त्राने आम्ही

लढाई करतो ती जगातल्या शस्त्रांसारखी नाहीत. उलट, त्यांच्यामध्ये दैवी शक्ति आहे ज्यामुळे शत्रूचे बुरूज नष्ट होतात. 5आम्ही वाद आणि जे देवाविषयीच्या ज्ञानाविरुद्ध उभे राहते ते नष्ट करतो आणि प्रत्येक विचार पकडून त्याला ख्रिस्ताच्या आज्ञा पाळायला लावतो. 6आणि तुमचा आज्ञाधारकपणा पूर्ण झाल्यावर आम्ही प्रत्येक आज्ञाभंगाच्या कृतीला शिक्षा करण्यास तयार असू.

7तुम्ही वरवर बघता, जर कोणी तो ख्रिस्ताचा आहे याविषयी खात्री बाळगतो तर त्याने हे लक्षात घ्यावे की जितका तो ख्रिस्ताचा आहे तितके आम्हीसुद्धा आहोत. 8आणि जो आमचा अधिकार प्रभूने आम्हांस खाली पाडण्यास नव्हे, तर तुमच्या वाढीसाठी दिला आहे त्याविषयी जरी काही विशेष अभिमान बाळगला, तरी मी लज्जित होणार नाही. 9हे मी यासाठी बोलतो की, मी माझ्या पत्राद्वारे तुम्हांला भीति घालणारा असा वाटू नये. 10कोणी म्हणतो की, त्याची पत्रे वजनदार आणि जोरदार आहेत पण व्यक्तिश: तो प्रभावहीन आणि बोलण्यात कमकुवत असा आहे. 11अशा लोकांना हे समजावे की, जेव्हा आम्ही नसतो तेव्हा आम्ही आमच्या पत्रात जे असतो तसे जेव्हा आम्ही प्रत्याक्षात हजर राहू आमच्या कृतीमध्ये सुद्धा असू.

12जे कित्येक स्वत:ची प्रशंसा करतात, त्यांच्याबरोबर आम्ही आपणांस समजायला किंवा त्यांच्याशी आपली तुलना करायचे धाडस करीत नाही, ते तर स्वत:स स्वत:कडून मोजत असता व स्वत:ची स्वत:बरोबर तुलना करीत असता बुध्दिहीन असे आहेत. 13परंतु आम्ही आमच्या आम्हांला आखून दिलेल्या मर्यादेपलीकडच्या गोष्टीविषयी प्रशंसा करणार नाही. तर जी मर्यादा देवाने आम्हांस घालून दिली आहे, तिच्याप्रमाणे आम्ही प्रशंसा करून घेतो. ती मर्यादा तर तुम्हापर्यंतही पोहोंचणारी आहे. 14आमच्या अभिमान बाळगण्यामध्ये आम्ही फार दूर जात आहोत असे नाही. तसे असते तर आम्ही तुमच्याप्रत आलो नसतो. ख्रिस्ताचे शुभवर्तमान सांगण्यासाठी तुमच्यापर्यंत आलो. 15आम्ही आपल्या मर्यादेपलीकडच्या गोष्टीविषयी, दुसऱ्याच्या श्रमाविषयी नावाजून घेत नाही. किंवा आम्हांला नेमून दिलेल्या कामापेक्षा जास्त करणार नाही, तर आम्हांस अशी आशा आहे की, तुमचा विश्वास वाढेल तेव्हा आम्ही आपल्या मर्यादेच्या प्रमाणात तुम्हांकडून अगदी विस्तार पावलेले असे होऊ.

16यासाठी की, शुभवर्तमानाचा तुमच्या पलीकडील प्रदेशात प्रसार करू. कारण दुसऱ्या माणसाच्या प्रदेशात अगोदरच झालेल्या कामाविषयी अभिमान बाळगण्याचे आम्हाला काही कारण नाही. 17पण “जो अभिमान बाळगतो, त्याने प्रभूमध्ये बाळगावा.”* 18कारण जो स्वत:ची प्रशंसा करतो तो योग्य नाही, पण ज्याची देव प्रशंसा करतो तो मान्य असतो.

## पौल आणि खोटे प्रेषित

11 माझी आशा आहे की, आपण माझा थोडासा मूर्खपणा माझ्यासाठी सहन कराल. पण तो तुम्ही करीतच आहा. 2मला तुमचा हेवा वाटतो व तो दैवी हेवा वाटतो. मी तुम्हांला एक पती देण्याचे (म्हणजे) ख्रिस्ताला देण्याचे अभिवचन दिले होते. यासाठी की मला तुम्हांला शुद्ध कुमारिका असे त्याला सादर करता येईल. 3पण मला भीति वाटते की जसे हव्वेला फसविण्यात आले व ते सर्पाच्या धुर्ततेने फसविण्यात आले, तसे तुमचे मनही कसेतरी तुमच्या प्रामाणिकपणापासून आणि ख्रिस्ताच्या शुद्ध भक्तीपासून दूर नेले जाईल.

4कारण जर एखादा तुमच्याकडे येऊन आम्ही जो येशू गाजवितो त्यापेक्षा वेगळा किंवा तुम्ही जे शुभवर्तमान स्वीकारले, त्यापेक्षा वेगळे शुभवर्तमान स्वीकारले तर तुम्ही ते सहज सहन करता.

5पण मला वाटते मी अति श्रेष्ठ प्रेषितांपेक्षा कुठल्या प्रकारे कमी आहे असे नाही. 6मी प्रशिक्षित वक्ता नसेन. परंतु मला ज्ञान आहे. आम्ही हे तुम्हांला प्रत्येक प्रकारे पूर्णपणे स्पष्ट केले आहे.

7तुम्ही उंच व्हावे म्हणून मी आपणांला नीच केले म्हणजे मी देवाचे शुभवर्तमान तुम्हांला फुकट सांगितले यात मी पाप केले काय? 8तुमची सेवा करण्यासाठी मी दुसऱ्या मंडळ्यांकडून वेतन घेऊन त्यांना लुटले. 9आणि मी तुम्हांजवळ होतो तेव्हा मला कमी पडले असतानाही मी कोणाला भार असा झालो नाही. कारण मासेदोनियाहून जे बंधु आले त्यांनी माझी गरज पुरविली. आणि सर्व गोष्टीत मी तुम्हांस ओझे होऊ नये म्हणून मी स्वत:स ठेवले आणि यापुढेही ठेवीन. 10ख्रिस्ताचे खरेपण माझ्यामध्ये आहे म्हणून मी सांगतो की, अखया प्रांतात कुणीही माझ्या अभिमानास विरोध करणार नाही. 11का? कारण मी तुम्हांवर प्रेम करीत नाही काय? देव जाणतो की, मी तुमच्यावर प्रेम करतो!

12आणि मी जे करतो ते मी करीत राहीन यासाठी की, जे आमच्याबरोबर समानता साधण्याची संधी शोधत आहेत. ज्या गोष्टीविषयी ते अभिमान बाळगतात, त्यांना मी त्यांच्या पायाखालची जमीन सरकेल असे करीन.

13कारण असे लोक खोटे प्रेषित आहेत, ते फसविणारे कामगार आहेत, ख्रिस्ताच्या प्रेषितांचे रूप धारण करणारे आहेत 14आणि यात आश्चर्य नाही, कारण सैतानदेखील प्रकाशाच्या दूताचे रूप धारण करतो. 15म्हणून त्याचे सेवकही जर न्यायीपणाच्या सेवकाचे रूप धारण करतात, त्यामुळे त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. त्यांचा शेवट त्यांच्या कार्याप्रमाणे होईल.

## पौल त्याच्या दुःखसहनाविषयी सांगतो

16मी पुन्हा म्हणतो: कोणीही मला मूर्ख समजू नये. पण जर तुम्ही समजता तर जसा मूर्खाचा तसा माझा स्वीकार

---

**जो ... बाळगावा** यिर्मया 9:24

करा. यासाठी की मी थोडासा अभिमान बाळगीन. 17या
आत्मप्रौढी मिरविण्याच्या प्रकारामध्ये मी जसा प्रभु बोलतो
तसे बोलत नाही. तर मूर्खासारखे बोलतो. 18जसे बरेच
लोक जगिक गोष्टीविषयी प्रौढी मिरवितात, तशी मीही
प्रौढी मिरवीन. 19तुम्ही शहाणे असल्याने मूर्खांचे आनंदाने
सहन करता! 20वस्तुत: जे कोणी तुम्हाला गुलाम करते,
किंवा छळ करते किंवा तुमचा गैर फायदा घेते किंवा
स्वत: पुढे येण्याचा प्रयत्न करते किंवा तुमच्या तोंडावर
मारते तरी तुम्ही त्यांचे सहन करता. 21आम्ही जणू अशक्त
असल्यासारखे मी लज्जेने बोलतो.

पण ज्याविषयी कोणी अभिमान धरण्याविषयी धीट असेल
त्याविषयी मीही धीट आहे (हे मी मूर्खपणाने बोलतो) 22ते
इब्री आहेत काय? मीही आहे. ते ख्रिस्ताचे सेवक आहेत
काय? (मी हे मूर्खासारखे बोलतो) मी अधिक आहे. 23मी
पुष्कळ कठीण काम केले आहे. सारखा तुरूंगात जात
होतो, पराकाष्ठेचे फटके खाल्ले, पुन्हा आणि पुन्हा मरणाला
सामोरे गेलो. 24पाच वेळेला यहूद्यांकडून मला एकोणचाळीस
फटके बसले. 25तीन वेळा काठीने मारण्यात आले, एकदा
मला दगडमार करण्यात आला, तीन वेळा माझे जहाज
फुटले, खुल्या समुद्रात मी एक रात्र व एक दिवस घालविला.
26मी सातत्याने फिरत होतो, नदीच्या प्रवासात धोका होता.
लुटारूंकडून धोका होता. माझ्या स्वत:च्या देशबांधवांकडून
धोका होता. विदेशी लोकांकडून, शहरांमध्ये धोका होता.
डोंगराळ प्रदेशात धोका होता. समुद्रात धोका होता, खोट्या
बंधूंकडून धोका होता. 27मी कष्ट केले आणि घाम गाळला,
व पुष्कळ वेळा जागरण केले. मला भूक माहीत आहे.
तहान माहीत आहे. पुष्कळ वेळा मी अन्नाशिवाय राहिलो.
थंडीत व उघडा असा मी राहिलो, 28या सर्व गोष्टींशिवाय
मी दररोज मंडळ्याप्रती माझ्या असलेल्या आस्थेमुळे
दबावाखाली होतो. 29कोण अशक्त आहे, आणि मला
अशक्तपणा माहीत नाही? कोण पापात पडला आहे? आणि
मी माझ्यामध्ये जळत नाही?

30जर मला अभिमान बाळगायचा असेल तर, माझ्या
अशक्तपणा दाखविणाऱ्या गोष्टीविषयी मी अभिमान
बाळगीन. 31देव आणि प्रभु येशूचा पिता, ज्याची
अनंतकाळपर्यंत स्तुति केली पाहिजे, तो हे जाणतो की मी
खोटे बोलत नाही. 32दिमिष्कात अरीतास राजाचा राज्यपाल
याने मला अटक करण्यासाठी शहराला पहारा दिला
होता. 33पण मला टोपलीत बसवून खिडकीतून
गावकुसावरून उतरविण्यात आले आणि त्याच्या हातून
मी निसटलो.

## पौलाच्या जीवनातील खास आशीर्वाद

12 मी प्रौढी मिरविलीच पाहिजे. जरी त्यापासून
कोणताही लाभ नाही. मी आता प्रभूचे दृष्टान्त व
प्रकटीकरण याकडे वळतो. 2ख्रिस्तामधील एक माणूस
मला माहीत आहे जो चौदा वर्षा5पूवी तिसऱ्या स्वर्गात
घेतला गेला. तो शरीरात किंवा शरीराबाहेर घेतला गेला
हे मला माहीत नाही, देव जाणतो. 3आणि मला माहीत
आहे, हा मनुष्य शरीरात किंवा शरीराबाहेर मला माहीत
नाही पण देव जाणतो. 4तो सुखलोकात घेतला गेला, त्याने
व्यक्त न करता येण्यासारख्या गोष्टी ऐकल्या. अशा गोष्टी,
ज्या माणसांना सांगण्याची परवानगी नाही. 5मी अशा
माणसाविषयी प्रौढी बाळगीन. परंतु माझ्या
अशक्तपणाशिवाय मी स्वत:विषयी अभिमान बाळगणार
नाही. 6जरी मी ख्रिस्ताचा अभिमान बाळगण्याचे निवडले.
तरी मी मूर्ख असणार नाही. कारण मी सत्य बोलत असेन
पण मी स्वत:ला आवरतो. यासाठी की कोणी माझ्या मागे
जे काही पाहतो किंवा माझ्यापासून जे काही ऐकतो त्यापेक्षा
कोणीही मला अधिक मानू नये.

7आणि माझ्या प्रकटीकरणाच्या अतिशय मोठेपणामुळे
मी खूप जास्त चढून जाऊ नये म्हणून माझ्या शरीरात
रूतणारा काटा, (सैतानाचा दूत) मला ठोसे मारण्यासाठी
ठेवण्यात आला. 8तीन वेळा मी प्रभूला विनंति केली की,
तो माझ्यातून काढून टाक. 9पण तो मला म्हणाला, "माझी
कृपा तुला पुरे. कारण माझे सामर्थ्य अशक्तपणात पूर्णत्वास
येते." म्हणून मी माझ्या अशक्तपणाबद्दल आनंदाने प्रौढी
मिरवीन. यासाठी की ख्रिस्ताचे सामर्थ्य माझ्यावर स्थिर
राहावे. 10या कारणासाठी ख्रिस्ताकरिता अशक्तपणात
आनंद करतो. अपमानात, कठीण परिस्थितित, छळात,
अडचणीच्या वेळी, कारण जेव्हा मी अशक्त, तेव्हा मी
सशक्त असतो.

## करिंथ येथील ख्रिस्ती लोकांविषयी पौलाचे प्रेम

11मी स्वत:च मूर्ख झालो पण तसे होण्यास तुम्ही मला
भाग पाडले तुमच्याकडून माझी प्रशंसा व्हावयाची होती.
जरी मी काही नसलो तरी अतिश्रेष्ठ प्रेषितांपेक्षा मी कमी
नव्हतो. 12प्रेषितांची चिन्हे ही आहेत: चिन्हे, चमत्कार,
अद्भुत कृत्ये ही खरोखरच सर्व सहनशीलतेने मी तुम्हांमध्ये
केली. 13कारण मी तुम्हांला भार झालो नाही, ही गोष्ट
सोडली तर, इतर मंडळ्यापेक्षा ही गोष्ट सोडली तर तुम्ही
कशात उणे आहात? या चुकीबद्दल मला क्षमा करा.

14पाहा, आता तिसऱ्यांदा तुम्हाकडे येण्यासाठी मी तयार
आहे. आणि मी तुम्हांला भार होणार नाही. कारण मी
तुमची संपत्ती मिळवायला येणार नाही. तर तुम्हांला
मिळवण्यासाठी येणार आहे. शेवटी मुलांनी त्यांच्या
आईवडिलांसाठी बचत करायची नसते तर आईवडिलांनी
मुलांसाठी बचत करायची असते. 15म्हणून मी फार आनंदाने
माझ्याकडे जे काही आहे, ते तुमच्यासाठी खर्च करीन
आणि स्वत:देखील खर्ची पडेन. जर मी तुमच्यावर अधिक
प्रेम करतो तर तुम्ही माझ्यावर कमी प्रेम कराल?

16तर असो, मी चतुर असल्याने, मी तुमच्यासाठी ओझे
झालो नाही, तर मी तुम्हांला चकविले व पकडले, असे

खुशाल म्हणा. 17ज्यांना मी तुमच्याकडे पाठविले त्यांच्यातील कोणाकडून तरी मी तुम्हांपासून काही फायदा घेतला आहे का? 18मी तीताला तुमच्याकडे जाण्यास विनंति केली आणि मी त्याच्याबरोबर भावाला पाठविले. तीताने तुम्हांपासून काही फायदा करून घेतला काय? आम्ही एकाच आत्म्याने जगत नाही काय? एका आत्म्याने एकाच मार्गाने चाललो नाही काय?

19तुम्ही असा विचार करीत आहा काय की आम्ही आमचे समर्थन तुमच्यासमोर करीत आहोत? ख्रिस्तामध्ये असल्याप्रमाणे आम्ही देवासमोर बोलत आहोत. आणि प्रिय मित्रांनो, जे काही आम्ही करतो ते तुम्हांला बळकट करण्यासाठी. 20कारण मला भय वाटते की, मी आल्यावर कदाचित जसे मी इच्छितो तसे तुम्ही मला आढळणार नाही. आणि जसे तुम्ही इच्छित नाही तसा असलेला मी तुम्हांस आढळेन. म्हणजे कदाचित भांडणे, मत्सर, राग, कलह, चहाड्या, कुजबूज रूसणे, अव्यवस्था ही दिसून येतील. 21म्हणजे मी पुन्हा आल्यावर माझा देव मला तुम्हाजवळ नीच करील. आणि ज्यांनी पूर्वी पाप केले होते आणि आपण केलेल्या जारकर्माचा, अशुद्धपणाचा, व कामातुरपणाचा त्याग केला नाही, व त्यांच्याबद्दल पश्चात्ताप केला नाही, अशा अनेकांसाठी मला शोक करावा लागेल.

## शेवटची सूचना आणि सलाम

13 ही माझी तुम्हांला भेटण्याची तिसरी वेळ आहे. “प्रत्येक गोष्ट दोन किंवा तीन साक्षीदारांच्या साक्षीने सिद्ध करावी.”* 2मी अगोदरच सूचना दिलेली होती जेव्हा दुसऱ्यावेळी मी तुमच्याबरोबर होतो. आता मी तुमच्यात नसताना ती सूचना पुन्हा सांगतो: माझ्या परत येण्याच्या वेळी अगोदर ज्यांनी पाप केले त्यांना मी सोडणार नाही किंवा दुसऱ्यांनाही नाही. 3ख्रिस्त माझ्याद्वारे बोलतो याविषयीच्या पुराव्याची तुम्ही मागणी करीत आहात. तुमच्याशी व्यवहार करताना तो अशक्त नाही तर सामर्थ्यशाली आहे. 4कारण जरी तो अशक्तपणात वधस्तंभावर खिळला गेला तरी तो देवाच्या सामर्थ्याने जिवंत आहे, कारण आम्हीही त्याच्यामध्ये अशक्त आहोत. तरी देवाच्या सामर्थ्याने त्याच्याबरोबर तुमच्यासाठी आम्ही जिवंत असू.

5तुम्ही विश्वासात आहा की नाही याविषयी स्वत:ची परीक्षा पाहा. पारख करा. ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे, ह्याची जाणीव तुम्हांला होत नाही का? जर अर्थात तुम्ही परीक्षेत उतरला नाही तर. 6आणि माझा विश्वास आहे की, तुम्ही हे शोधाल की, या परीक्षेत आम्ही अनुत्तीर्ण झालो नाही. 7आता आम्ही देवाजवळ अशी प्रार्थना करतो की, तुम्ही काहीही चुकीचे करणार नाही. आम्ही परीक्षेत उत्तीर्ण व्हावे यासाठी नव्हे तर अशासाठी की, आम्ही जरी नाकारलेल्यासारखे असलो तरी तुम्ही चांगले काम करावे. 8कारण खरेपणाविरुद्ध आम्हांस काही करता येत नाही. तर खरेपणासाठी करता येते. 9जेव्हा आम्ही अशक्त आहो आणि तुम्ही शक्तीमान आहा, तेव्हा आम्ही आनंद करतो. आणि आम्ही प्रार्थनाही करतो, ती अशी की, तुम्ही पूर्ण व्हावे. 10यामुळे तुम्हापासून आम्ही दूर असताना हे तुम्हांला लिहितो, यासाठी की, प्रभूने जो अधिकार तुम्हांला खाली पाडून टाकण्यासाठी नव्हे तर वृद्धीसाठी मला दिला त्याप्रमाणे जवळ आल्यावर मी कठोर वागू नये.

11शेवटी बंधूनो, आपण भेटू या. परिपूर्णतेकडे ध्येय असू द्या. जसे मी तुम्हांला सांगितले तसे करा. एका मनाचे व्हा, शांतीने राहा. आणि प्रीतीचा व शांतीचा देव तुमच्याबरोबर असेल. 12पवित्र चुंबनाने एकमेकास भेटा. 13सर्व संत आपणंस सलाम सांगतात. 14प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा आणि देवाची प्रीति आणि पवित्र आत्म्याची सहभागिता तुम्हा सर्वांबरोबर असो.

---

**प्रत्येक ... करावी** अनुवाद 19:15

# पौलाचे गलतीकरांस पत्र

1 प्रेषित पौलाकडून, प्रेषित होण्यासाठी मी मनुष्यांकडून
निवडला गेलो नाही. मनुष्यांकडून मला पाठविण्यात
आले नव्हते. देव जो पिता त्याने व येशू ख्रिस्ताने मला
प्रेषित केले. देवानेच येशूला मरणातून उठविले.
2हे पत्र ख्रिस्तामधील जे बंधु माझ्याबरोबर आहेत
त्यांच्याकडूनही आहे. आणि हे गलतीया* येथील
मंडळ्यांना (विश्वासणाऱ्यांच्या गटांना) लिहिले आहे.
3यांची कृपा चांगुलपण व शांति तुम्हाबरोबर असो.
4येशूने स्वत:ला आमच्या पापांसाठी दिले. ज्या दुष्ट जगात
आम्ही राहतो त्यापासून आम्हांला मुक्त करण्यासाठी त्याने
असे केले आणि देव जो पिता त्याची हीच इच्छा होती.
5त्याला सदासर्वकाळ गौरव असो. आमेन.

### फक्त एकच सुवार्ता खरी आहे

6मला आश्चर्य वाटते की ज्या देवाने तुम्हांला ख्रिस्ताद्वारे
बोलाविले आहे त्याच्यापासून तुम्ही इतक्या लवकर दुसऱ्या
सुवार्तेकडे वळत आहात. 7ती खरी सुवार्ता नाही पण असे
काही जण आहेत की ते तुम्हांला गोंधळात टाकीत आहेत
व ख्रिस्ताविषयीची सुवार्ता बदलण्याचा प्रयत्न करीत आहेत.
8आम्ही तुम्हाला सांगितली त्याहून निराळी सुवार्ता आम्ही
किंवा स्वर्गातील दूतांनी जर तुम्हांला सांगितली तर देवाचा
शाप त्याच्यावर येवो. 9आम्ही अगोदर सांगितल्याप्रमाणे
आणि आता पुन्हा सांगतो तुम्ही जी स्वीकारली आहे
तिच्याहून वेगळी सुवार्ता जर कोणी तुम्हांस सांगत असेल
तर देव त्याला शाप देवो.
10आता मी मनुष्याला किंवा देवाला संतोषविण्याचा प्रयत्न
करीत आहे काय? मी मनुष्यांना संतुष्ट करीत राहिलो
असतो तर ख्रिस्ताचा गुलाम झालो नसतो.

### पौलाचा अधिकार देवाकडून आहे

11बंधूनो, तुम्हांला माहीत असावे असे मला वाटते ते हे
की जी सुवार्ता मी तुम्हांस सांगितली तो मानवी संदेश
नाही. 12कारण मला ती मनुष्यांकडून झालेल्या
प्रकटीकरणामुळे कळली नाही तर येशू ख्रिस्ताने मला ती
दाखविली.
13यहूदी धर्मातील माझ्या पूर्वीच्या जीवनाविषयी तुम्ही
ऐकले आहे. आणि हे जाणता की देवाच्या मंडळीचा मी
भयंकर छळ केला होता. आणि तिचा नाश करण्याचा ही
प्रयत्न केला. 14माझ्या यहूदी धर्माच्या पालनाबाबत मी
माझ्या वयाच्या लोकांपेक्षा कितीतरी पुढे होतो. माझ्या
पूर्वजांनी दिलेल्या शिकवणीविषयी मी त्याला पूर्ण वाहिलेला
होतो.
15त्यामुळे मी जन्मण्याअगोदरच देवाने माझ्यासाठी वेगळी
योजना आखली होती आणि त्याच्या कृपेत त्याची सेवा
करण्यासाठी त्याने मला बोलावले. 16आणि जेव्हा देवाने
त्याचा पुत्र मला प्रगट करण्याचे ठरविले ते यासाठी की,
विदेशी लोकांमध्ये पुत्राविषयीची सुवार्ता मी सांगावी. मी
कोणत्याही मनुष्याबरोबर सल्लामसलत केली नाही.
17किंवा जे माझ्यापूर्वी प्रेषित होते त्यांना भेटण्यासाठी
यरुशलेमात वर गेलो नाही. त्याऐवजी मी ताबडतोब
अरबस्तानात गेलो आणि मग दिमिष्कास परत आलो.
18मग तीन वर्षांनंतर पेत्राबरोबर ओळख करून
घेण्यासाठी यरुशेलमला गेलो. आणि त्याच्याबरोबर मी
पंधरा दिवस राहिलो. 19परंतु प्रेषितांपैकी दुसऱ्यांना मी
पाहिले नाही; मी फक्त प्रभु येशूचा भाऊ याकोब यालाच
पाहिले. 20आणि मी देवासमोर शपथ घेऊन सांगतो की जे
काही मी तुम्हांला लिहित आहे, ते खोटे नाही. 21नंतर मी
सूरीया व किलीकिया प्रांतांत गेलो.
22परंतु यहूदीया येथे विश्वासात ज्या ख्रिस्ताच्या मंडळ्या
आहेत त्यांना मी व्यक्तीश: माहीत नव्हतो. 23त्यांनी फक्त
ऐकले होते. लोक म्हणतात: "ज्या मनुष्याने ज्या
विश्वासासाठी पूर्वी आपला छळ केला, ज्या विश्वासाचा
त्याने नाश करण्याचा प्रयत्न केला तो आता त्याचीच
घोषणा करीत आहे." 24आणि माझ्यामुळे त्यांनी देवाचे
गौरव केले.

### इतर प्रेषितांनी पौलाचा स्वीकार केला

2 मग चौदा वर्षांच्या काळानंतर मी पुन्हा यरुशलेमास
गेलो. मी बर्णबाबरोबर गेलो. तीतालासुद्धा
माझ्याबरोबर घेतले. 2मी जावे असे देवाने मला प्रगट
केले, म्हणून मी गेलो. ज्याप्रमाणे मी पूर्वी यहूदीतर
लोकांमध्ये सुवार्ता सांगितली तशी मी खाजगीपणे पुढाऱ्यांच्या
सभेतसुद्धा सुवार्ता सांगितली. यासाठी की, भूतकाळातील

---

**गलतीया** कदाचित पौलाने सुवार्ता कार्यासाठी केलेल्या पहिल्या
प्रवासात ज्या मंडळ्यांची सुरूवात केली तो भाग. पाहा. प्रे कृ.
23 व 24 अध्याय.

किंवा चालू स्थितीला माझे काम व्यर्थ जाऊ नये. 3त्याचा
परिणाम असा झाला की, तीत, जो माझ्याबरोबर होता, तो
ग्रीक असतानाही त्याला सुंता करवून घेण्यास भाग पाडण्यात
आले नाही. 4कारण ख्रिस्त येशूमध्ये आम्हांला जे स्वातंत्र्य
मिळाले ते हेरण्यासाठी व आम्हांला गुलाम करता यावे
म्हणून ज्या खोट्या विश्वासणाऱ्यांना आत आणण्यात आले
त्यामुळे हे झाले. 5सुवार्तेमधील सत्य तुमच्याजवळच राहावे
म्हणून आम्ही क्षणभरदेखील त्यांना वश झालो नाही.

6जे लोक महत्त्वाचे आहेत असे लोक समजत होते
त्यांच्याकडून मला काहीही मिळाले नाही. जे कोणी ते
होते त्यांच्यामुळे मला काही फरक पडला नाही; सर्व
माणसे देवासमोर सारखीच आहेत. काहीही असो, त्या
प्रतिष्ठित माणसांनी माझ्यामध्ये किंवा माझ्या संदेशांमध्ये
कोणतीही भर टाकली नाही. 7उलट, जेव्हा ते म्हणतात
की, विदेशी लोकांना सुवार्ता सांगण्याचे कार्य माझ्यावर
सोपविण्यात आले आहे, ज्याप्रमाणे पेत्राला यहूदी लोकांना
सुवार्ता सांगण्याचे कार्य सोपविलेले आहे. 8कारण ज्याने
पेत्राला यहूदी लोकांकरिता प्रेषित बनविले त्यानेच मला
विदेशी लोकांकरिता प्रेषित बनविले. 9म्हणून याकोब,
पेत्र व योहान ज्यांची मंडळीचे आधारस्तंभ म्हणून प्रसिद्धी
होती, त्यांनी देवाने मला दिलेला अधिकार ओळखला
आणि बर्णबा व माझ्याशी सहभागितेचे चिन्ह म्हणून हात
मिळविला व सहमती दर्शविली की आम्ही विदेशी
लोकांमध्ये जाऊन संदेश द्यावा. आणि त्यांनी जाऊन यहूदी
लोकांना उपदेश करावा. 10त्यांनी फक्त हेच सांगितले
की, त्यांच्या गरिबांना मदत करण्याची आम्ही आठवण
ठेवावी. आणि मी ते सर्व करण्यास राजी होतो एवढेच
नव्हे तर ते करण्यास अधीर झालो होतो.

## पेत्राची चूक झाली असे पौल दाखवून देतो

11पण, जेव्हा पेत्र अंत्युखियात आला तेव्हा मी त्याला
उघडपणे विरोध केला. कारण त्याने स्पष्टपणे चूक केली
होती. 12कारण याकोबाने पाठविलेली काही माणसे
येण्यापूर्वी पेत्र विदेशी लोकांबरोबर जेवत असे. पण जेव्हा
ते (याकोबाने पाठविलेले यहूदी) आले तेव्हा त्याने अंग
काढून घेतले आणि तो विदेशी लोकांपासून वेगळा झाला.
कारण या यहूदी लोकांचा विश्वास होता की, विदेशी
माणसांची सुंता झालीच पाहिजे, म्हणून त्यांची त्याला भीती
वाटत होती. 13व बाकीचे यहूदी लोकसुद्धा त्याच्या ढोंगामध्ये
सामील झाले, येथपर्यंत की, बर्णबासुद्धा त्यांच्या ढोंगाला
वश झाला. 14जेव्हा मी पाहिले की, सुवार्तेच्या सत्याच्या
सरळ मार्गात ते योग्य प्रकारे वागत नाहीत, तेव्हा मी
सर्वांसमोर पेत्राला म्हणालो, "जर तू जो यहूदी आहेस व
यहूदीतरांप्रमाणे वागत आहेस व यहूदी माणसाप्रमाणे वागत
नाहीस तर तू विदेशी लोकांना यहूदी लोकांच्या चालीरीतींचे
अनुकरण करण्यास त्यांना कसे भाग पाडू शकतोस?"

15आम्ही जन्माने यहूदी आहोत आणि "पापी यहूदीतर
लोकांपैकी" नाही. 16तरीही आम्हांला माहीत होते की,
मनुष्य नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही,
तर येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याने ठरतो. म्हणून आम्ही
आमचा विश्वास येशू ख्रिस्तावर ठेवला आहे. यासाठी
की, ख्रिस्तावरील विश्वासाने आम्ही नीतिमान ठरावे,
नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे. कारण कोणीही देहधारी
मनुष्य नियमाशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरणार नाही.
17पण जर, आम्ही ख्रिस्तामध्ये नीतिमान होण्याचे पाहतो,
तर आम्ही यहूदीसुद्धा विदेश्यांप्रमाणे पापी असे आढळतो.
याचा अर्थ असा आहे की, ख्रिस्त पापाचा सेवक आहे
काय?

18अर्थातच नाही! कारण जर मी या सोडून दिलेल्या
पद्धतीप्रमाणे पुन्हा शिकविण्यास सुरुवात केली, तर मी
नियमशास्त्र मोडणारा होतो. 19कारण नियमशास्त्रामुळे मी
नियमशास्त्राला "मेलो" यासाठी की मी देवासाठी जगावे.
मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळला गेलो. 20यासाठी
की यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्यामध्ये
जगतो. आता देहामध्ये जे जीवन मी जगतो ते मी ज्याने
माझ्यावर प्रीती केली आणि माझ्याऐवजी स्वत:ला दिले
त्या देवाच्या पुत्रावरील विश्वासाने जगतो. 21मी देवाची
कृपा नाकारीत नाही. कारण जर नीतिमत्त्व नियम
शास्त्रामुळे मिळत असेल तर ख्रिस्त विनाकारण मरण
पावला.

## विश्वासाद्वारे देवाचा आशीर्वाद येतो

3 अहो मूर्ख गलतीकरांनो! ज्या तुमच्या डोळ्यांसमोर
येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर खिळलेले जाहीर रीतीने
तुम्हांला वर्णन करून सांगितले होते त्या तुम्हांला कोणी
भुरळ घातली आहे? 2मला तुमच्याकडून ही एक गोष्ट
शिकायची आहे? आत्म्याची दाने तुम्हाला नियमशास्त्राचे
पालन करण्याने मिळाली आहेत की सुवार्ता ऐकून
तिच्यावर विश्वास ठेवल्याने मिळाली आहेत? 3तुम्ही इतके
मूर्ख आहात का की, जे जीवन तुम्ही आत्म्यात सुरू केले
ते आता देहाने पूर्ण करीत आहात? 4तुम्ही व्यर्थच इतकी
दु:खे अनुभवली का? माझी आशा आहे की ती व्यर्थ
नव्हती. 5देव जो तुम्हांला आत्मा पुरवितो आणि तुम्हामध्ये
चमत्कार करतो, तो तुम्ही नियमशास्त्राचे पालन करता
म्हणून का सुवार्ता ऐकून तीवर विश्वास ठेवला म्हणून तो
हे करतो.

6ते, अब्राहामाविषयी पवित्र शास्त्र सांगते तसे आहे:
"त्याने देवावर विश्वास ठेवला, आणि ते त्याच्यासाठी
देवाकडून नीतिमत्त्व असे गणण्यात आले." 7मग तुम्हाला
समजले पाहिजे की जे विश्वास ठेवतात, तेच अब्राहामाचे
खरे वंशज आहेत. 8पवित्र शास्त्राने आधीच सांगितले
आहे की, देव विदेशी लोकांना त्यांच्या विश्वासाने नीतिमान
ठरवील. त्याने अब्राहामाला पूर्वीच सुवार्ता सांगितली की,

“तुझ्याद्वारे सर्व राष्ट्रे आशीर्वादित होतील.” 9म्हणून ज्यांचा
विश्वास आहे त्यांना विश्वासणाऱ्या अब्राहामासह
आशीर्वाद मिळेल. 10परंतु नियमशास्त्राच्या कृतीवर जे
अवलंबून राहतात ते शापित आहेत. कारण शास्त्रात असे
लिहिले आहे की, “नियमशास्त्राच्या पुस्तकात लिहिलेल्या
सर्व गोष्टी करण्यात जो कोणी टिकून राहत नाही, तो
शापित असो.” 11नियमशास्त्रामुळे कोणीही मनुष्य
देवासमोर नीतिमान ठरत नाही, हे उघड आहे. कारण
शास्त्र सांगते की, “विश्वासामुळे नीतिमान मनुष्य जगेल.”
12नियमशास्त्र विश्वासाचे नाही. त्याऐवजी पवित्र शास्त्र
असे सांगते की, “जो कोणी ते पाळतो तो त्यामुळे जगेल.”
13ख्रिस्ताने आपल्याला नियमशास्त्राच्या शापापासून मुक्त
केले आहे. आपणासाठी शाप होऊन त्याने हे केले. असे
लिहिले आहे: “प्रत्येकजण जो कोणी झाडावर टांगला
आहे तो शापित असो.” 14ख्रिस्ताने आम्हाला मुक्त केले
यासाठी की, अब्राहामाला मिळालेला आशीर्वाद ख्रिस्ताद्वारे
विदेश्यांना मिळावा. यासाठी की विश्वासाद्वारे आम्हांला
आत्म्याचे अभिवचन मिळावे.

## नियमशास्त्र आणि अभिवचन

15बंधूंनो, मी तुम्हांला रोजच्या जीवनातील उदाहरण
देतो. ज्याप्रमाणे मनुष्यांनी केलेला करार कोणीही रद्द
करत नाही किंवा त्यात भर घालीत नाही. याबाबतीतसुद्धा
तसेच आहे. 16अब्राहामाला व त्याच्या वंशजांना अभिवचने
दिलेली होती. लक्षात घ्या की, ते “आणि त्याच्या वंशजांना”
असे अनेकजणांसंबंधी म्हणत नाही, तर जसे काय ते
एका व्यक्तीला म्हणते, “आणि तुझ्या संतानाला” (आणि
तो वंशज) ख्रिस्त आहे. 17माझ्या म्हणण्याचा अर्थ असा
की, देवाने अगोदर निश्चित केलेला करार चारशे तीस
वर्षे उशिरा आलेल्या नियमशास्त्राने अभिवचन रद्द
करण्यास केला नव्हता. 18कारण वतन जर नियम
शास्त्रावर अवलंबून होते, तर येथून पुढे ते अभिवचनावर
अवलंबून असणार नाही. परंतु देवाने अभिवचनामुळे
अब्राहामाला मुक्तपणे हे वतन दिले.
19तर मग, नियमशास्त्राचा उद्देश काय होता? ज्या
संतानाला वचन दिले होते त्याच्या येण्यापर्यंत पापामुळे ते
अभिवचनाला जोडण्यात आले होते. नियमशास्त्र हे
देवदूताकरवी मोशे या मध्यस्थाच्या हाती देण्यात आले.
20आता मध्यस्थ हा फक्त एकाच पक्षाचा नसतो. पण देव
एकच आहे आणि त्याची अभिवचने दुसऱ्या पक्षावर
अवलंबून नाहीत.

## मोशेच्या नियमशास्त्राचा हेतु

21नियमशास्त्र हे देवाच्या अभिवचनाविरुद्ध आहे, असा
याचा अर्थ होतो का? अर्थातच नाही! कारण लोकांना
जीवन आणण्यासाठी जर नियमशास्त्र देण्यात आले असेल,
तर मग नीतिमत्त्व त्याच नियमशास्त्राद्वारे येईल. 22पण
पवित्र शास्त्राने स्पष्ट केले आहे की, संपूर्ण जग हे पापाच्या
सामर्थ्याने जखडून टाकले होते, यासाठी की, जे अभिवचन
देण्यात आले होते ते जे येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतात,
त्यांना देण्यात यावे.
23हा विश्वास येण्याअगोदर नियमशास्त्राने आपणांस
कैद्याप्रमाणे पहाऱ्यात ठेवले होते. आणि हा येणारा विश्वास
आम्हांला प्रगट होईपर्यंत आम्हांला कैदी म्हणून ठेवण्यात
आले होते. 24त्यामुळे आपल्या विश्वासाच्या आधारे आपण
नीतिमान ठरविले जावे म्हणून नियमशास्त्र जे आपणांला
ख्रिस्ताकडे घेऊन येणारे होते, ते आपले पालक होते.
25पण आता हा विश्वास आलाच आहे, तर यापुढे आम्ही
या कडक पालकाच्या अधीन नाही. 26कारण तुम्ही सर्व
सुवार्तेवर विश्वास ठेवल्यामुळे येशू ख्रिस्ताद्वारे देवाचे पुत्र
आहात. 27कारण तुम्ही जितक्यांनी ख्रिस्तात बाप्तिस्मा
घेतला तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे. 28तेथे
यहूदी किंवा ग्रीक, गुलाम किंवा स्वतंत्र, पुरुष किंवा स्त्री
हा भेदच नाही. कारण तुम्ही सर्व ख्रिस्त येशूमध्ये एक
आहात. 29आणि जर तुम्ही ख्रिस्ताचे आहात तर तुम्ही
अब्राहामाचे संतान आणि देवाने अब्राहामाला दिलेल्या
वचनानुसार वारस आहात.

4 मी जे म्हणत आहे ते हे की, जोपर्यंत वारसदार हा
लहान मूल आहे तोपर्यंत तो गुलामापेक्षा वेगळा नाही.
जरी तो सर्वांचा मालक असला तरी, 2तो जोपर्यंत त्याच्या
पित्याने नेमून दिलेला वेळ आहे तोपर्यंत पालकांच्या आणि
विश्वस्तांच्या ताब्यात असतो. 3याच प्रकारे जोपर्यंत आम्ही
“मुले” होतो तोपर्यंत आम्हीसुद्धा या जगाच्या निरर्थक
नियमांचे गुलाम होतो. 4परंतु जेव्हा काळाची पूर्णता झाली,
तेव्हा देवाने आपला पुत्र पाठविला, जो स्त्रीपासून जन्मला,
व नियम शास्त्राप्रमाणे वागला. 5यासाठी की, त्याने जे
नियमशास्त्राधीन होते त्यांना सोडवावे व देवाची मुले म्हणून
स्वीकारावे.
6आणि तुम्ही त्याचे पुत्र आहात, म्हणून देवाने आपल्या
पुत्राच्या आत्म्याला तुमच्या अंत:करणात पाठविले आहे.
आत्मा “अब्बा”* म्हणजे “पित्या” अशी हाक मारतो.
7म्हणून तू आता गुलाम नाही, तर एक पुत्र आहेस, आणि
जर पुत्र आहेस तर देवाने तुला त्याचा वारसदारही बनविले
आहे.

## गलतीया येथील ख्रिस्ती लोकांकरिता पौलाचे प्रेम

8गतकाळात जेव्हा तुम्ही देवाला ओळखीत नव्हता, तेव्हा
खऱ्या अर्थाने जे देव नव्हते, त्यांचे तुम्ही गुलाम होता.
9परंतु आता तुम्ही देवाला ओळखता किंवा आता देवाने
तुमची ओळख करून घेतली आहे. तर मग आता तुम्ही
ज्यांचे गुलाम होण्याचे प्रयत्न करीत आहात त्या दुर्बल

---

**अब्बा** हा अरेमी शब्द आहे. याचा अर्थ पिता.

आणि निरुपयोगी नियमाकडे कसे वळता? 10तुम्ही विशेष
दिवस, महिने, ऋतू आणि वर्षे पाळता. 11मला तुमच्याविषयी
भीती वाटते मला वाईट वाटते की, मी तुमच्यासाठी केलेले
श्रम व्यर्थ आहेत.
12बंधूनो, मी तुम्हांला कळकळीची विनंति करतो की
कृपा करून माझ्यासारखे व्हा. कारण मी तुमच्यासारखा
झालो. असे काही नाही की, तुम्ही माझे काही वाईट केले
होते. 13तुम्हांला माहीत आहे की, माझ्या शारीरिक
दुर्बलतेमुळे प्रथमत: मी तुम्हांला सुवार्ता सांगितली. 14आणि
माझ्या शारीरिक दुर्बलतेबाबत तुमची कठीण परीक्षा होत
असतानाही उलट माझे एखाद्या देवदूतासारखे तुम्ही स्वागत
केले. जणू काय मीच स्वत: ख्रिस्त असल्यासारखे स्वागत
केले. 15मग जो आनंद तुम्हांला मिळाला तो कोठे आहे?
कारण मी तुम्हांविषयी साक्ष देतो की, जर तुम्ही समर्थ
असता तर तुम्ही तुमचे स्वत:चे डोळे काढून ते मला दिले
असते. 16तुम्हांला खरे सांगितले म्हणून मी तुमचा वैरी
झालो काय?
17तुम्ही नियमशास्त्र पाळावे असे ज्यांना वाटते त्यांना
तुमच्याविषयी उत्साहवर्धक आस्था आहे, पण चांगल्या
हेतूसाठी नाही. माझ्यापासून तुम्हांला वेगळे करण्याचा ते
प्रयत्न करीत आहेत. यासाठी की तुम्हांला त्यांच्याविषयी
उत्साहवर्धक आस्था वाटेल. 18हे नेहमीच चांगले असते
की, कोणासाठी तरी विशेष (उत्साहवर्धक) आस्था असावी
पण ती कोणत्या तरी चांगल्या गोष्टीसाठी आणि मी जेव्हा
तुमच्याबरोबर असतो, फक्त तेव्हाच नव्हे. 19माझ्या प्रिय
मुलांनो, तुमच्यामुळे मी पुन्हा एकदा प्रसूतिवेदनातून जात
आहे आणि तुम्ही ख्रिस्तासारखे होईपर्यंत मला तसे करावेच
लागेल. 20आता मला तुमच्याबरोबर तेथे हजर राहावेसे
व स्वर बदलून वेगळ्या प्रकारे बोलावेसे वाटते, कारण
तुमच्याविषयी मी गोंधळात पडलो आहे.

## हागार आणि साराचे उदाहरण

21जे तुम्ही नियमशास्त्राधीन राहू इच्छिता त्या तुम्हांला
मला विचारू द्या की, नियमशास्त्र काय म्हणते, ते तुम्हांला
माहीत आहे का? 22असे लिहिले आहे की, अब्राहामाला
दोन पुत्र होते. एक त्याला गुलाम मुलीपासून झाला व
दुसरा स्वतंत्र स्त्रीपासून जन्मलेला 23देवाच्या वचनाचा
परिणाम म्हणून जन्मला.
24या गोष्टी दृष्टांतरूप आहेत. त्या स्त्रिया दोन करार
आहेत. एक करार सीनाय पर्वतावर झाला. आणि ज्यांच्या
नशिबी गुलामगिरी होती अशा लोकांना त्याने जन्म दिला.
हा करार हागारशी संबंध दर्शवितो. 25हागार ही
अरबस्तानातील सीनाय पर्वताचे दर्शक हल्लीच्या
यरुशलेमचे बाह्यरूप आहे. कारण ती आपल्या मुलांसह
गुलामगिरीत आहे. 26परंतु स्वर्गीय यरुशलेम स्वतंत्र आहे.
स्वर्गीय यरुशलेम ही आमची आई आहे. 27कारण असे
लिहिले आहे,

जिने जन्म दिला नाही, त्या मूल नसलेल्या (स्त्रीने)
आनंद करावा! ज्या तुला प्रसूतिवेदना झालेल्या नाहीत ती
तू आनंदाने घोष कर, आरोळी मार, कारण जिला पती
आहे तिच्या मुलांपेक्षा सोडलेल्या स्त्रीची मुले अधिक
आहेत" *यशया 54:1*

28–29बंधूनो, आता तुम्ही इसहाकासारखी देवाच्या
वचनाचा परिणाम म्हणून जन्मलेली मुले आहात. परंतु तो
त्यावेळी जसा देहस्वभावाप्रमाणे जन्मला होता व त्याने
आत्म्याच्या सामर्थ्याने जन्मलेल्यांचा छळ केला तसे आता
आहे. 30पण पवित्र शास्त्र काय सांगते? "त्या गुलाम मुलीला
व तिच्या पुत्राला घालवून दे. कारण गुलाम मुलगा स्वतंत्र
स्त्रीच्या मुलाबरोबर वारस होणार नाही." 31यासाठी बंधूंनो,
आपण गुलाम मुलीची नाही तर स्वतंत्र स्त्रीची मुले आहोत.

## तुमचे स्वातंत्र्य राखा

5 आम्ही स्वातंत्र्यात राहावे म्हणून ख्रिस्ताने आम्हांला
मुक्त केले, म्हणून स्थिर राहा. आणि नियमशास्त्राच्या
जुवाच्या गुलामगिरीचे ओझे पुन्हा लादून घेऊ नका. 2ऐका!
मी पौल, तुम्हांला सांगत आहे की, जर सुंता करून
घेऊन तुम्ही नियमशास्त्राकडे वळला तर ख्रिस्त
तुमच्यासाठी कोणत्याही किंमतीचा नाही. 3सुंता करून
घेणाऱ्या प्रत्येक माणसाला मी पुन्हा एकदा जाहीर करतो
की, तो संपूर्ण नियमशास्त्र पाळण्यास बांधलेला आहे.
4तुमच्यापैकी जे नियमशास्त्राने नीतिमान ठरू पाहतात,
त्यांचा ख्रिस्ताबरोबरचा संबंध तुटला आहे. देवाच्या दयेच्या
बाहेर आता तुम्ही आहात. 5आम्ही तर आत्म्याने
विश्र्वासाकडून न्यायीपणाच्या आशेची वाट पाहात आहोत.
6कारण ख्रिस्त येशूमध्ये सुंता झालेले व सुंता न झालेले
यांना काही अर्थ नाही तर विश्वास जो प्रीतीद्वारे कार्य
करतो त्याला आहे.
7तुम्ही इतकी चांगली ख्रिस्ती शर्यत धावत होता तर
तुम्हाला सत्याचे पालन करण्यास कोणी अडथळा केला?
8सत्यापासून मन वळवणारे तुमचे कठोर वर्तन ज्याने
तुम्हांला बोलाविले त्या देवापासून येत नाही. 9"थोडेसे
खमीर कणकेचा गोळा फुगवून टाकते." 10प्रभूमध्ये मला
तुमच्याविषयी खात्री आहे की, जे मी तुम्हांला शिकविले
त्याच्याशिवाय इतर विचार तुम्ही करणार नाही. परंतु जो
तुम्हांला त्रास देत आहे, तो कोणी का असेना, दंड भोगील.
11बंधूजनहो, काही जण असा आरोप करतात की,
अजूनही सुंतेची गरज आहे असा उपदेश मी करतो. जर
तसे आहे तर अजूनही माझा छळ का होत आहे? आणि
जर मी सुंतेच्या आवश्यकतेविषयी उपदेश करीत असतो
तर वधस्तंभाविषयीची तत्त्वे राहिली नसती. 12माझी इच्छा
आहे की, जे तुम्हामध्ये अस्थिरता उत्पन्न करतात त्यांनी
सुंतेबरोबर स्वत:ला नामर्द करून घ्यावे.

13परंतु स्वतंत्रतेमध्ये राहावे म्हणून तुम्हा बंधूना देवाने
बोलावले आहे. फक्त तुमच्या देहाला जे आवडते ते
करण्याची एक सबब म्हणून तुमच्या स्वातंत्र्याचा उपयोग
करू नका. त्याऐवजी प्रीतीमध्ये एकमेकांची सेवा करा
(दास व्हा). 14कारण संपूर्ण नियमशास्त्राचा सारांश एकाच
वचनात सामावला आहे. ते सांगते, “जसे आपणांवर तसे
आपल्या सोबतीच्या व्यक्तीवरही प्रेम करा.” 15पण जर
तुम्ही एकमेकांना चावत राहिला व खाऊन टाकीत असला,
तर एकमेकांना गिळून टाकणार नाही, याविषयी सावध
राहा.

## आत्मा आणि मानवी स्वभाव

16पण मी म्हणतो: तुम्ही आत्म्यात चाला, आणि तुम्ही
देहाच्या पापी इच्छा पूर्ण करणार नाही. 17कारण आपला
देह ज्याची इच्छा करतो ते आत्म्याविरुद्ध आहे, आणि
आत्मा जी इच्छा करतो, ती देहाविरुद्ध आहेत. परिणाम
म्हणून तुम्हांला जे करावयास पाहिजे ते करता येत नाही.
18पण जर तुम्ही आत्म्याकडून चालविले जाता तर तुम्ही
नियमशास्त्राधीन नाही. 19देहाची कर्मे तर उघड आहेत,
ती म्हणजे, जारकर्म, अशुद्धता, कामातुरपणा, 20मूर्तिपूजा,
चेटूक, द्वेष, मारामारी, मत्सर, राग, स्वार्थी हेवेदावे, पक्षभेद,
21दारूबाजी, रंगेलपणा, अशासारख्या दुसऱ्या सर्व गोष्टी.
या गोष्टींविषयी मी तुम्हाला सूचना देत आहे. ज्याप्रमाणे
मी पूर्वी तुम्हांला सूचना केल्या होत्या. जे लोक अशा
गोष्टी करतात त्यांना देवाच्या राज्यात वाटा मिळणार नाही.
22पण आत्मा या गोष्टी निर्माण करतो; प्रीति, आनंद,
शांति, सहनशीलता, दयाळूपणा, चांगुलपणा, विश्वास,
23सौम्यता व आत्मसंयमन. अशा गोष्टींविरुद्ध नियमशास्त्र
नाही. 24जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी देहस्वभावाला त्यांच्या
वासना व इच्छांसह वधस्तंभावर खिळले आहे. 25जर
आम्ही आत्म्याने जगतो, तर तो जसा चालवितो तसे
आम्हीसुद्धा त्याच्यामागे चालू या. 26आम्ही पोकळ बढाई
मारणारे, एकमेकांना चीड आणणारे, एकमेकांचा हेवा
करणारे होऊ नये.

## एकमेकांना मदत करा

6 बंधूंनो, कोणी दोषात सापडला, तर तुम्ही जे
आध्यात्मिकदृष्ट्या पुढारलेले आहात त्या तुम्ही त्याला
सुधारावे. पण ते सौम्यतेच्या आत्म्याने हे करा. आणि
स्वत:कडे लक्ष ठेवा. यासाठी की तुम्हीही मोहात पडू नये.
2एकमेकांची ओझी वाहा. अशा रितीने तुम्ही ख्रिस्ताचा
नियम पूर्ण कराल. 3कारण जर कोणी स्वत:ला महत्त्वाचा
समजतो, प्रत्यक्षात तो नसला तरी, तर तो स्वत:ची फसवणूक
करून घेतो. 4प्रत्येकाने आपल्या कामाची परीक्षा करावी
आणि मगच स्वत:ची इतरांबरोबर तुलना न करता
स्वत:विषयी अभिमान बाळगणे त्याला शक्य होईल. 5कारण
प्रत्येकाला त्याची स्वत:ची जबाबदारी असलीच पाहिजे.
6ज्याला कोणाला देवाच्या वचनांचे शिक्षण मिळाले आहे,
त्याने जो शिक्षण देत आहे त्याला सर्व चांगल्या गोष्टीत
वाटा द्यावा.

## जीवन हे शेत पेरणाऱ्यासारखे आहे

7तुम्ही फसू नका. देवाची थट्टा होणे शक्य नाही. कारण
एखादी व्यक्ति जे पेरीते त्याचेच त्याला फळ मिळेल. 8जो
कोणी आपल्या देहस्वभावाचे बीज पेरतो त्याला
देहस्वभावापासून नाशाचे पीक मिळेल. पण जो आत्म्यात
बीज पेरतो, त्याला आत्म्यापासून सार्वकालिक जीवनाचे
पीक मिळेल. 9जे चांगले आहे ते करण्याचा आपण कंटाळा
करू नये. कारण आपण आळस केला नाही, तर योग्य
वेळी आपणांस आपले पीक मिळेल. 10तर मग ज्याप्रमाणे
आपणांस संधि मिळेल, तसे सर्व लोकांचे आणि विशेषत:
ज्यांनी सुवार्तेवर विश्वास ठेवला आहे त्यांच्या घराण्याचे
चांगले करू या.

11पाहा किती मोठे अक्षरे मी लिहिलीत. 12ज्यांना बाह्य
देखावा करणे आवडते, ते तुम्हांला सुंता करून घेण्याची
सक्ती करतात. परंतु ते अशासाठी की ख्रिस्ताच्या
वधस्तंभामुळे त्यांचा छळ होऊ नये. 13परंतु सुंता करून
घेणारेही नियमशास्त्र पाळीत नाहीत आणि तरीही तुमची
सुंता व्हावी असे त्यांना वाटते. यासाठी की, त्यांना तुमच्या
देहावरून फुशारकी मारता यावी. 14आपल्या प्रभु येशू
ख्रिस्ताच्या वधस्तंभाशिवाय मी कशाचाही अभिमान बाळगू
नये. त्याच्या द्वारे मला जग वधस्तंभावर खिळलेले, व मी
जगाला वधस्तंभावर खिळलेला आहे. 15कारण सुंता होणे
किंवा न होणे काही नाही, तर नवी उत्पत्ति हीच महत्त्वाची
आहे. 16तर जितके हा नियम पाळतील तितक्यांवर आणि
देवाच्या सर्व इस्राएलावर शांति व दया असो.

17आता इथून पुढे मी एवढेच मागतो की, यापुढे कोणीही
मला त्रास देऊ नये. कारण आधीच मी येशूच्या खुणा
माझ्या शरीरावर धारण केलेल्या आहेत. 18बंधूनो, आपल्या
प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुमच्याबरोबर असो. आमेन.

# पौलाचे इफिसकरांस पत्र

1 देवाच्या इच्छेने झालेला येशू ख्रिस्ताचा दास पौल याजकडून,

इफिस* येथे जे देवाचे लोक आहेत त्यांना व येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांना,

2 देव आपला पिता आणि आपला प्रभु येशू ख्रिस्त यांजकडून कृपा व शांति असो.

### ख्रिस्तात आध्यात्मिक आशीर्वाद

3 आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गराज्यातील प्रत्येक आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आम्हांला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे. 4 ख्रिस्तामध्ये देवाने आम्हांला जग निर्माण होण्यापूर्वी त्याच्या आमच्यावरील प्रेमामुळे त्याच्यासमोर आम्ही निर्दोष व पवित्र असावे म्हणून निवडले आहे. 5 त्याच्या कृपायुक्त हेतूनुसार येशू ख्रिस्ताद्वारे त्याने दत्तक होण्यासाठी आमची नेमणूक केली. 6 त्याने हे त्याच्या गौरवी कृपेची स्तुति व्हावी म्हणून केले. ही कृपा त्याने त्याच्या प्रिय पुत्राद्वारे आम्हांला फुकट दिली. 7 त्याच्यामध्ये ख्रिस्ताच्या रक्ताने आम्ही स्वतंत्र केले गेलो, त्याच्या कृपेच्या समृद्धीने आम्हांला आमच्या पापांची क्षमा मिळाली आहे. 8 त्याची कृपा आपले ज्ञान आणि समजबुद्धी वाढविण्यास कारणीभूत ठरली आहे. 9 ख्रिस्तामध्ये आपणांला दाखविण्याच्या त्याच्या अनुग्रहाप्रमाणे त्याच्या इच्छेचे रहस्य आपल्याला कळविले. 10 पृथ्वीवरील आणि स्वर्गातील सर्व गोष्टी ख्रिस्तामध्ये एकत्र आणण्यासाठी अशी ती योजना काळाच्या पूर्णतेसाठी होती.

11 ख्रिस्तामध्ये आम्ही देवाचे लोक म्हणून निवडले गेलो होतो. यासाठी आम्ही अगोदरच निवडले गेलो होतो. देवाचा हेतू लक्षात घेऊन जो सर्व गोष्टी त्याच्या इच्छेच्या हेतूनुसार पूर्णत्वास नेतो 12 यासाठी की, ज्या आम्ही ख्रिस्तावर अगोदरच आशा ठेवली होती, त्या आम्हांकडून त्याच्या गौरवाची स्तुति व्हावी. 13 ख्रिस्ताद्वारे तुम्हीसुद्धा जेव्हा सत्याची म्हणजे तुमच्या तारणाची सुवार्ता ऐकली आणि ख्रिस्तावर विश्वास ठेवला, तेव्हा पवित्र आत्म्याच्या अभिवचनाचा देवाने तुम्हांवर शिक्का मारला 14 जोपर्यंत देव, आम्ही जे त्याचे आहोत त्यांना पूर्ण आणि शेवटचे स्वातंत्र्य देईपर्यंत पवित्र आत्मा हा आमच्या वतनाच्या हिश्शाचा विसार आहे. आणि यामुळे त्याच्या गौरवाची स्तुति होईल.

### पौलाची प्रार्थना

15 यासाठी, जेव्हापासून मी तुमच्या प्रभु येशूवरील विश्वासाविषयी ऐकले आणि देवाच्या लोकांबद्दलच्या तुमच्या प्रेमाविषयी ऐकले, 16 तेव्हापासून तुमच्यासाठी देवाचे उपकार मानण्याचे मी थांबविले नाही. 17 मी प्रार्थना करतो की, आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताचा देव, गौरवी पिता, तुम्हाला ज्ञान व प्रकटीकरणाचे आध्यात्मिक सामर्थ्य जे पित्याविषयी ज्ञान तुम्हांला पुरवील, ते देवो.

18 मी असे सांगतो की, तुमच्या अंत:करणाचे डोळे प्रकाशित होवोत यासाठी की तुम्हाला तुमच्या पाचारणाची आशा व संतांमध्ये त्याच्या वतनाच्या वैभवाची श्रीमंती किती आहे हे कळावे. 19 आणि आम्हांला विश्वासणाऱ्यांसाठी त्याचे अतुलनीय सामर्थ्य किती महान आहे, जणू काय त्याच्या प्रचंड सामर्थ्याचा तो सराव आहे.

20 जो तो ख्रिस्तामध्ये करतो. जेव्हा त्याला (ख्रिस्ताला) मरणातून उठविले आणि स्वर्गाच्या राज्यात देवाच्या उजव्या हाताला बसविले. 21 देवाने ख्रिस्ताला प्रत्येक अधिपती, अधिकारी, सामर्थ्य, प्रभूत्व आणि प्रत्येक सामर्थ्याचे नाव जे या युगातच नव्हे तर येणाऱ्या युगातही दिले जाईल त्या सर्वांपेक्षा उंच ठिकाणी ठेवले. 22 आणि देवाने ख्रिस्ताला मंडळीचा सर्वोच्च प्रमुख केले. 23 मंडळी ख्रिस्ताचे शरीर आहे. जी पूर्णता त्याने सर्व गोष्टींमध्ये सर्व रीतीने भरली आहे, ती पूर्णता तो मंडळीला देतो.

### मरणाकडून जीवनाकडे

2 पूर्वी तुम्ही आपले अपराध आणि पातके यांमुळे आध्यात्मिक रीतीने मेला होता, 2 ज्यामध्ये तुम्ही पूर्वी जगत होता, जगातील दुष्ट मार्गाचे अनुकरण करीत होता, आणि आपल्याला न दिसणारे आध्यात्मिक सामर्थ्य ज्याच्याकडे आहे त्या सत्ताधीशाचे अनुकरण करीत होता. जे देवाच्या आज्ञा पाळीत नाहीत त्यांच्या जीवनामध्ये हाच आत्मा कार्य करीत आहे. 3 एके काळी आम्हीसुद्धा त्यांच्यामध्ये आमच्या मानवी देहाच्या दुष्ट इच्छांचे समाधान करीत होतो आणि आमच्या मानवी मनाच्या दुष्ट वासनांची

---

**इफिस** काही प्राचीन प्रतींमध्ये 'इफिस' हा शब्द वगळलेला आहे.

पूर्तता करीत होतो. तसेच जगातील इतरांप्रमाणेच आम्ही त्याच्या क्रोधाची मुले झालो होतो.

[4]पण देव खूप दयाळू आहे. त्याच्या महान प्रीतीने त्याने आमच्यावर प्रेम केले. [5]आम्ही आध्यात्मिकदृष्ट्या आमच्या पापांमध्ये मेलेले असतानाच त्याने आम्हांला ख्रिस्ताबरोबर जीवन दिले. (तुमचे तारण देवाच्या कृपेने झाले आहे.) [6]देवाने आम्हांला ख्रिस्ताबरोबर नविन जीवनात उठविले आणि स्वर्गाच्या राज्यात त्याच्याबरोबर त्याच्या आसनावर बसविले, कारण आम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहोत. [7]देवाने हे केले यासाठी की, येणाऱ्या युगात त्याच्या अतुलनीय कृपेची संपत्ती दाखविता यावी आणि ख्रिस्त येशूमध्ये आम्हांविषयीची ममता व्यक्त करावी. [8]कारण देवाच्या कृपेने विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झाले आणि ते तुमच्याकडून झाले नाही, तर ते देवापासूनचे दान असे आहे. [9]आणि एखादा काही काम करतो त्याचा परिणाम म्हणून नव्हे. यासाठी कोणी बढाई मारू नये. [10]कारण आम्ही देवाच्या हाताने घडविलेले आहोत. ख्रिस्तामध्ये आम्हांला चांगल्या कामासाठी निर्माण केले. जे देवाने अगोदरच तयार केले होते. यासाठी की, त्यामध्ये चालणे आम्हांला शक्य व्हावे.

## ख्रिस्तामध्ये एक

[11]म्हणून, आठवा की एके काळी, तुम्ही यहूदीतर म्हणून जन्मला होता आणि त्यांना (विदेश्यांना) सुंता न झालेले असे, ज्यांची सुंता झालेली होती ते यहूदी लोक म्हणत होते. [12]आठवा की, त्यावेळी तुम्ही ख्रिस्तविरहित, देवाचे लोक जे इस्राएल त्या समाजातून तुम्हाला बहिष्कृत केले होते, आणि देवाच्या अभिवचनाशी निगडित अशा कराराशी तुम्ही परके असे होता, तुम्ही या जगात आशेशिवाय आणि देवाशिवाय जगला. [13]पण आता, ख्रिस्तामध्ये जे तुम्ही एके काळी देवापासून दूर होता, ते तुम्ही ख्रिस्ताच्या रक्ताने त्याच्याजवळ आणलेले आहात. [14]कारण त्याच्याद्वारे आम्हांला शांतीचा लाभ झाला आहे. त्याने दोन्ही गोष्टी एक केल्या आणि आपल्या शरीराने त्याने वैराचा, दुभागणाऱ्या भिंतीचा अडथळा पाडून टाकला. [15]त्याने नियमशास्त्र त्याच्या नीतिनियमांसहित रद्द केले. यासाठी की स्वत:मध्ये दोघांचा एक मानव निर्माण करून शांति करणे त्याला शक्य व्हावे. [16]आणि त्याच्या वधस्तंभावरील मरणाद्वारे देवाबरोबर एका शरीरात त्या दोघांमध्ये समेट घडवून आणता यावा, ज्यामुळे या दोन गोष्टीतील वैमनस्य संपवता येईल. [17]म्हणून तो आला आणि त्याने जे तुम्ही देवापासून दूर होता व जे तुम्ही देवाजवळ होता त्या तुम्हाला शांतीची सुवार्ता सांगितली, [18]कारण त्याच्या द्वारे, आम्हा दोघांचा एका आत्म्याच्या द्वारे देवाजवळ प्रवेश होतो.

[19]यामुळे, तुम्ही आता परके आणि यहूदीतर नाहीत. तर तुम्ही देवाच्या लोकांबरोबरचे सहनागरिक आणि देवाचे कुटुंबीय आहात. [20]तुम्ही प्रेषित आणि संदेष्टे या पायावर बांधलेली इमारत आहा, आणि ख्रिस्त येशू स्वत: तिचा कोनशिला आहे. [21]संपूर्ण इमारत त्याच्याद्वारे जोडली गेली आणि प्रभूमध्ये एक पवित्र मंदिर होण्यासाठी वाढत आहे. [22]त्याच्यामध्ये तुम्हीही इतरांबरोबर आत्म्याच्या द्वारे देवाचे राहण्याचे ठिकाण तयार करण्यासाठी एकत्र रचले जात आहात.

## पौलाचे विदेशी लोकांसाठी कार्य

3 या कारणासाठी मी, पौल तुम्हा विदेशी लोकांसाठी ख्रिस्त येशूचा कैदी आहे. [2]देवाची कृपा तुमच्यापर्यंत पोचविण्याची व्यवस्था करण्याचे काम माझ्यावर सोपवल्याचे तुम्ही जाणता [3]आणि जशी मी अगोदर तुम्हांला थोडक्यात लिहिली होती ती देवाची गूढ योजना मला प्रकटीकरणाच्या द्वारे कळविण्यात आली. [4]जर तुम्ही ती वाचाल तर तुम्हांला माझ्या ख्रिस्ताच्या रहस्याविषयीचे पूर्ण ज्ञान होणे शक्य होईल. [5]मागील पिढ्यांमध्ये हे रहस्य मनुष्यांच्या पुत्रांना सांगण्यात आले नव्हते, जसे आता त्याच्या पवित्र प्रेषितांना आणि संदेश देणाऱ्यांना आत्म्याच्या द्वारे प्रकट करण्यात आले आहे. [6]हे रहस्य ते आहे की, सुवार्तेद्वारे विदेशी लोक हे यहूदी लोकांबरोबर सहवारसदार आहेत, ते एकाच शरीराचे अवयव आहेत. आणि ख्रिस्त येशूमध्ये देवाने दिलेल्या अभिवचनामध्ये सहभागीदार आहेत.

[7]देवाच्या प्रभावी कृतीच्या सामर्थ्याचा परिणाम म्हणून जे कृपेचे दान मला देण्यात आले होते त्यामुळे मी सुवार्ता सांगण्याची जबाबदारी दिलेला सेवक झालो. [8]जरी मी देवाच्या सर्व लोकांमध्ये लहानातील लहान आहे तरी मला हे देवाच्या गहन अशा संपत्तीची सुवार्ता यहूदीतरांना सांगावी हे कृपेचे दान मला दिले गेले,

[9]आणि रहस्यमय योजना सर्व लोकांना कळविण्यास सांगितली. ज्या देवाने सर्व गोष्टी निर्माण केल्या, त्याच्याकडे काळाच्या सुरूवातीपासून ही रहस्यमय योजना देवामध्ये लपून अशी राहिली होती. [10]यासाठी की आता मंडळीद्वारे सत्ताधीश आणि आकाशातील शक्ती यांना देवाचे वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान व्हावे. [11]देवाच्या अनंतकाळच्या हेतूला अनुसरून जे त्याने आपला प्रभु येशू ख्रिस्त याच्यामध्ये पूर्णत्वास नेले. [12]त्या ख्रिस्तामध्ये आम्हांला देवाच्या समक्षतेत आमच्या ख्रिस्तावरील विश्वासामुळे धैर्य आणि पूर्ण विश्वास आहे. [13]म्हणून, मी प्रार्थितो की, तुमच्यासाठी मला होणाऱ्या क्लेशामुळे तुम्ही माघार घेऊ नये. कारण हे क्लेश आमचे गौरव आहेत.

## ख्रिस्ताची प्रीति

[14-15]या कारणासाठी ज्याच्यापासून स्वर्गातील आणि पृथ्वीवरील प्रत्येक घराण्याला नाव मिळाले आहे, त्या पित्यासमोर गुडघे टेकून प्रार्थना करतो. [16]मी प्रार्थना करतो की, त्याने आपल्या वैभवी संपत्तीप्रमाणे तुम्हांला

त्याच्या आत्म्याच्या द्वारे, पराक्रमाने तुमच्या अंतर्यामी बलवान होण्यास मान्यता द्यावी. 17आणि विश्वासाद्वारे ख्रिस्त तुमच्या अंत:करणात राहावा. व तुमची मुळे चांगली रुजलेली व प्रीतीत मुळावलेली असावी. 18यासाठी की, सर्व संतांच्यासह ख्रिस्ताच्या प्रीतीची रूंदी, लांबी, उंची आणि खोली किती आहे हे समजून घेण्यास तुम्हांला सामर्थ्य प्राप्त व्हावे. 19आणि ख्रिस्ताची प्रीति जी ज्ञान्यांना मागे टाकते हे कळावे यासाठी की तुम्ही देवाच्या पूर्णत्वाने भरावे.

20आणि आता देव जो आपल्या सामर्थ्यानुसार आम्हांमध्ये कार्य करतो इतकेच नव्हे तर आम्ही मागितल्यापेक्षा किंवा आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक कार्य करण्यास तो समर्थ आहे, 21त्याला मंडळी आणि ख्रिस्त येशूमध्ये सर्व पिढ्यानपिढ्यासाठी सदासर्वकाळ गौरव असो.

## शरीराचे ऐक्य

4 म्हणून मी, जो प्रभूमधील कैदी, (दास) तो तुम्हांला विनंती करतो, देवाकडून तुम्हाला जे पाचारण झालेले आहे, त्याला शोभेल अशा प्रकारे राहा. 2नेहमी नम्रता, सौम्यता दाखवा. आणि सहनशीलतेने एकमेकांबरोबर प्रीतीने राहा. 3शांतीच्या बंधनाने आत्म्याचे ऐक्य राखण्यासाठी प्रत्येक गोष्टीत प्रयत्न करा. 4एक शरीर व एकच आत्मा आहे. ज्याप्रमाणे तुम्हालाही एकाच आशेत सहभागी होण्यास बोलाविले होते. 5एक प्रभु, एक विश्वास, एक बाप्तिस्मा, 6एक देव आणी पिता जो सर्वांचा मालक आहे. जो प्रत्येक गोष्टीद्वारे कार्य करतो आणि जो प्रत्येकात आहे,

7ख्रिस्ताच्या दानाच्या मोजमापाप्रमाणे आपणांस प्रत्येकाला कृपेचे विशेष दान दिले आहे. 8यासाठीच पवित्र शास्त्र असे म्हणते,

"जेव्हा तो उच्चस्थानी चढला, तेव्हा त्याने युद्धकैद्यांस आपणांबरोबर नेले आणि त्याने लोकांना देणग्या दिल्या."

*स्तोत्र. 68:18*

9आता, जेव्हा ते असे म्हणते, "वर चढला" तर त्याचा अर्थ काय? म्हणजे तो पृथ्वीच्या खालील प्रदेशात सुध्दा उतरला असाच होतो की नाही? 10जो खाली उतरला तोच वर सर्व स्वर्गांहून उंच ठिकाणी चढला. यासाठी की सर्व गोष्टी त्याला भरता याव्यात. 11आणि त्याने स्वत:च काही लोकांना प्रेषित, इतर काही जणांना भविष्य सांगणारे सुवार्तिक, तर दुसऱ्यांना मेंढपाळ व शिक्षक असे होण्याची दाने दिली. 12ख्रिस्ताने त्या देणग्या देवाचे लोक सेवेच्या कार्यासाठी तयार करण्यास व आत्मिकरीतीने ख्रिस्ताचे शरीर सामर्थ्यवान होण्यासाठी दिल्या. 13आम्हा सर्वांना आमच्या पित्यातील एकत्वापणामुळे विश्वासाची आणि देवाच्या पुत्राविषयीच्या ज्ञानाची जाणीव होते आणि पूर्णत्वाची जी परिमाणे ख्रिस्ताने आणली आहेत त्या उच्चतेपर्यंत पोहोंचून परिपक्व मनुष्य होण्यासाठी आमची वाढ होते.

14हे असे आहे म्हणून यापुढे आपण लहान बाळकासारखे नसावे. म्हणजे माणसांच्या कपटाने त्यांची लबाडी जी कपटयोजनेला महत्त्व देते, अशा प्रत्येक नव्या शिकवणुकीच्या वाऱ्याने तुमचे मार्ग लाटांनी इकडे तिकडे हेलकावणारे होऊ नयेत 15त्याऐवजी आपण प्रेमाने सत्य बोलावे आणि प्रत्येक मार्गाने ख्रिस्तासारखे होण्यासाठी वाढावे. ख्रिस्त हा मस्तक आहे. 16ज्यावर सर्व शरीर आधारित आहे, ते आधार देणाऱ्या प्रत्येक अस्थिबंधनाने जोडलेले आणि एकत्र बांधलेले असते. आणि प्रत्येक भाग त्याने जसे कार्य करायला पाहिजे तसे करतो. संपूर्ण शरीर वाढते व प्रीतीत बळकट होत जाते.

## अशा मार्गाने तुम्ही जगावे

17म्हणून मी हे म्हणतो व प्रभूच्या नावात सावध करतो: ज्याप्रमाणे विदेशी त्यांच्या मनाच्या व्यर्थतेप्रमाणे चालतात तसे चालू नका. 18त्यांची अंत:करणे अंधकारमय अशा स्थितीत आहेत आणि देवापासून जे जीवन येते त्यापासून ते वेगळे झाले आहेत. कारण ते अजाण आहेत, आणि त्यांची अंत:करणे कठीण झाली आहेत. 19त्यांना आता कशाचीच लाज वाटत नाही व त्यांनी स्वत:ला कामातुरपणाला वाहून घेतले आहे व प्रत्येक प्रकारच्या अशुद्धतेच्या सवयीला वाहून घेतले आहे. 20परंतु तुम्ही अशा प्रकारे ख्रिस्त शिकला नाही. आणि 21मला यात काही शंका नाही की, तुम्ही त्याच्याविषयी ऐकले आहे. आणि येशूमध्ये जे सत्य आहे त्याप्रमाणे त्याचे अनुयायी म्हणून ते सत्य तुम्ही शिकला असाल. 22तुमच्या पूर्वीच्या जीवनाविषयी, तुम्हांला तुमच्या जुन्या मनुष्यापासून सुटका करून घेण्यास शिकविले होते, जो मनुष्य फसवणुकीच्या इच्छेने अशुद्ध झाला आहे, 23यासाठी तुम्ही अंत:करणामध्ये व आत्म्यात नवे केले जावे आणि 24नवा मनुष्य तुम्ही धारण करावा, जो देवाप्रमाणे निर्माण केलेला आहे. 25"म्हणून लबाडी करू नका! प्रत्येक व्यक्तीने त्याच्याबरोबरच्या व्यक्तीशी खरे तेच बोलावे." 26"तुम्ही रागवा पण पाप करू नका." सूर्यास्तापूर्वी तुम्ही तुमचा राग सोडून द्यावा. 27तुमचा पराभव करण्याची सैतानाला संधी देऊ नका. 28जो कोणी चोरी करीत असेल तर त्याने यापुढे चोरी करू नये. उलट, त्याने आपल्या हातांनी काम करावे यासाठी की जो कोणी गरजू असेल त्याला त्यातून वाटा देण्यासाठी त्याच्याकडे काहीतरी असावे.

29तुमच्या तोंडून कोणतीही वाईट भाषा न निघो, तर आध्यात्मिक सामर्थ्यासाठी ज्याची लोकांना गरज आहे ते चांगले मात्र निघो. यासाठी की, जे ऐकतील त्यांना आशीर्वाद प्राप्त होईल. 30आणि देवाच्या पवित्र आत्म्याला दु:खी करू नका. कारण तुम्ही आत्म्याबरोबर देवाची संपत्ती

म्हणून तारणाच्या दिवसासाठी शिक्का मारलेले असे आहात.
31सर्व प्रकारची कटुता, संताप, राग, ओरडणे, देवाची
निंदा ही सर्व प्रकारच्या दुष्टाईबरोबर तुम्हामधून दूर करावी.
32एकमेकांबरोबर दयाळू आणि कनवाळू व्हा. आणि देवाने
ख्रिस्तामध्ये क्षमा केली तशी एकमेकांना क्षमा करा.

5 प्रिय मुलांप्रमाणे देवाचे अनुकरण करणारे व्हा, 2आणि
ख्रिस्ताने जशी आमच्यावर प्रीति केली तसे प्रीतीमध्ये
चाला, त्याने आमच्याकरिता मधुर सुगंध असे देवाला
अर्पण व यज्ञ केला.

3जारकर्म, कोणत्याही प्रकारची अशुद्धता किंवा
अधाशीपणा याचे तुमच्यामध्ये नावही निघू नये, हे देवाच्या
पवित्र लोकांसाठी योग्य नाही. 4तसेच कोणतेही लाजिरवाणे
भाषण, मूर्खपणाचे बोलणे किंवा घाणेरडे विनोद तुमच्यात
असू नयेत. ते योग्य नाही. उलट उपकारस्तुति असावी.
5कारण तुम्हांला हे माहीत असावे की: जो मनुष्य जारकर्मी,
अशुद्ध किंवा अधाशी जे मूर्तिपूजेसारखेच आहे, त्या
मनुष्याला देवाच्या आणि ख्रिस्ताच्या राज्यात वतन असणार
नाही.

6पोकळ भाषणाने कोणी तुम्हांला फसवू नये. कारण
या कारणांमुळे जे आज्ञा मोडतात, त्यांच्यावर देवाचा क्रोध
येणार आहे. 7म्हणून त्यांचे भागीदार होऊ नका. 8मी हे
सांगतो कारण एके काळी तुम्ही पूर्णपणे अंधारात होता,
पण आता तुम्ही प्रभूचे अनुयायी म्हणून पूर्ण प्रकाशात
आहात. प्रकाशात चालणाऱ्या लेकरांसारखे व्हा. 9कारण
प्रकाशाची फळे प्रत्येक चांगुलपणात, नीतीमत्त्वात, आणि
सत्यात दिसून येतात. 10नेहमी प्रभूला कशाने संतोष होईल
हे शोधण्याचा प्रयत्न करा. 11आणि अंधाराची जी निष्फळ
कार्ये आहेत त्यांचे भागीदार होऊ नका. तर उलट, ती
उघडकीस आणा. 12कारण ज्या गुप्त गोष्टी त्यांनी केल्या
आहेत, त्याविषयी बोलणेही लज्जास्पद आहे. 13पण जेव्हा
सर्व काही प्रकाशाद्वारे उघड होते, तेव्हा प्रत्येक गोष्ट
दिसते, 14आणि जी प्रत्येक गोष्ट दिसते, ती प्रकाश आहे.
म्हणूनच आम्ही असे म्हणतो:

"हे झोपलेल्या जागा हो व मेलेल्यांतून ऊठ, आणि
ख्रिस्त तुझ्यावर प्रकाशेल."

15म्हणून, तुम्ही कसे जगता, याविषयी सावध असा.
मूर्ख लोकांसारखे होऊ नका. तर शहाण्या लोकांसारखे
व्हा. 16जे चांगल्या संधीचा उपयोग करतात. कारण हे
दिवस वाईट आहेत. 17म्हणून मूर्खासारखे वागू नका, तर
उलट देवाची इच्छा काय आहे ते जाणून घ्या. 18द्राक्षारस
पिऊन झिंगल्यासारखे राहू नका. त्यामुळे मनुष्य सर्वच
बाबतीत बेताल होतो. उलट आत्म्याने पूर्ण भरले जा.
19स्तोत्रे, गीते, आणि आध्यात्मिक गीतांनी एकमेकाबरोबर
सुसंवाद साधा. गाणी गा. आणि आपल्या अंत:करणात
प्रभूसाठी गायन गा. 20आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावात
देव जो आपला पिता आहे त्याचे प्रत्येक गोष्टीबद्दल नेहमी
उपकार माना.

## पती–पत्नी

21ख्रिस्ताच्या भयात एकमेकांच्या अधीन असा.
22पत्नींनो, जशा तुम्ही प्रभूच्या अधीन होता, तशा आपल्या
पतींच्या अधीन असा. 23कारण ख्रिस्त जसा मंडळीचे मस्तक
आहे, तसा पती पत्नीचे मस्तक आहे. ख्रिस्त स्वत:च
शरीराचा तारणारा आहे. 24पण, ज्याप्रमाणे मंडळी ख्रिस्ताला
शरण जाते, त्याचप्रमाणे पत्नीने प्रत्येक बाबतीत आपल्या
पतीच्या अधीन असावे. 25पतींनो, ज्याप्रमाणे ख्रिस्त
मंडळीवर प्रीति करतो, तशी तुम्ही आपल्या पत्नीवर प्रीति
करा. त्याने तिच्यासाठी स्वत:ला दिले, 26यासाठी की,
त्याने तिला देवाच्या वचनरूपी पाण्याने धुऊन निर्मळ
करावे. 27यासाठी की, तो मंडळीला स्वत:साठी गौरवी
वधू म्हणून सादर करील. तिला कोणताही डाग नसेल.
किंवा सुरकुती किंवा कोणत्याही प्रकारची अपूर्णता नसेल
तर ती पवित्र व निर्दोष असेल.

28याप्रकारे पतींनी सुद्धा आपल्या पत्नींवर असेच प्रेम
करावे, जसे ते स्वत:च्या शरीरावर प्रेम करतात. जो
कोणी त्याच्या स्वत:च्या पत्नीवर प्रेम करतो, तो स्वत:वर
प्रेम करतो. 29कारण आतापर्यंत कोणीही आपल्या शरीराचा
द्वेष केला नाही. उलट तो त्याचे पोषण करतो. त्याची
काळजी घेतो. ज्याप्रमाणे ख्रिस्त मंडळीचे पोषण करतो व
काळजी घेतो. 30कारण आपण त्याच्या शरीराचे अवयव
आहोत. 31शास्त्र सांगते त्याप्रमाणे, "म्हणून मनुष्य त्याचे
वडील व आई यांना सोडील व त्याच्या पत्नीशी जडून
राहील. आणि ते दोघे एकदेह होतील."*

32हे गूढ सत्य फार महत्त्वाचे आहे आणि मी हे सांगत
आहे की ते ख्रिस्त व मंडळीला लागू पडते. 33तरीही,
तुमच्यातील प्रत्येकाने त्याच्या स्वत:च्या पत्नीवर प्रेम केले
पाहिजे. व पत्नीनेही पतीचा मान राखाला पाहिजे.

## मुले आणि आईवडील

6 मुलांनो, प्रभूशी प्रामाणिक राहून आपल्या
आईवडिलांच्या आज्ञा पाळा. कारण ते योग्य आहे.
2"तुझ्या वडिलाचा व आईचा मान राख."*
3अभिवचनाबरोबरची ही पहिली आज्ञा असल्याने,
"तुझ्यासाठी सर्व काही चांगले असावे आणि पृथ्वीवर
तुला दीर्घ आयुष्य लाभावे."* 4आणि वडिलांनो, आपल्या
मुलांना राग येईल असे करू नका. उलट, देवापासून जी
माहिती व शिक्षण येते त्यात त्यांना वाढवा.

---

**म्हणून ... होतील** उत्पत्ति 2:24

**तुझ्या ... राख** निर्गम 20:12; अनुवाद 5:16

**तुझ्यासाठी ... लाभावे** निर्गम 20:12; अनुवाद 5:16

## गुलाम आणि मालक

5गुलामांनो, तुमच्या पृथ्वीवरील मालकांची आज्ञा आदराने, थरथर कांपत, आणि तुमच्या अंत:करणाच्या प्रामाणिकतेने पाळा. ज्याप्रमाणे तुम्ही ख्रिस्ताची आज्ञा पाळता तशी पाळा. 6जेव्हा माणसे तुमच्याकडे पाहत असतील तेव्हाच फक्त काम करू नका. मनुष्याला पसंत पडावे यासाठी प्रयत्न करू नका. उलट ख्रिस्ताच्या गुलामासारखे काम करा, कारण (ख्रिस्ताचे गुलाम) देवाची इच्छा आपल्या अंत:करणापासून पूर्ण करतात. 7गुलाम म्हणून उत्साहाने जणू काय माणसांची नव्हे, तर "प्रभूची" सेवा करीत आहात, असे काम करा.

8लक्षात ठेवा की, तुम्हांतील प्रत्येकजण जर काही चांगले करतो तर तो गुलाम असो किंवा स्वतंत्र असो, ते त्याला प्रभूकडून परत मिळेल. 9आणि मालकांनो, तुम्हीही त्यांच्याशी तसेच वागा आणि धमकाविण्याचे सोडून द्या. लक्षात ठेवा की तुमचा आणि त्यांचा धनी स्वर्गात आहे. आणि त्याच्याजवळ पक्षपात नाही.

## देवाची संपूर्ण शस्त्रसामग्री धारण करा

10शेवटी, प्रभूमध्ये तुम्ही त्याच्या महान शक्तीसामर्थ्याने सशक्त व्हा. 11देवाने दिलेले संपूर्ण चिलखत धारण करा. यासाठी की तुम्हांला सैतानाच्या दुष्ट योजनांविरुद्ध उभे राहता यावे. 12कारण आपले झगडणे, रक्तमांसाबरोबर नाही, तर सत्ताधीशांविरुद्ध, अधिकाऱ्याविरुद्ध, या अंधकारातील जगाच्या सामर्थ्याबरोबर आणि आकाशातील दुष्ट आत्म्यांविरुद्ध आहे. 13म्हणून देवाने दिलेली संपूर्ण शस्त्रसामग्री घ्या. म्हणजे तुम्हाला सर्व ते केल्यावर टिकून राहता येईल व वाईट दिवस आल्यावर तुम्हाला प्रतिकार करता येईल.

14म्हणून भक्कमपणे उभे राहा! सत्याने आपली कंबर बांधा, नीतीमत्त्वाचे उरस्त्राण धारण करा. 15आणि सुवार्ता व शांती यांची घोषणा करण्यासाठी सज्जतेच्या वहाणा पायी घाला. 16या सर्व गोष्टींबरोबर ढाल म्हणून विश्वास घ्या. ज्यामुळे त्या दुष्टाने मारलेले सर्व जळते बाण तुम्हांला विझविणे शक्य होईल. 17आणि तारणाचे शिरस्त्राण घ्या, आणि आत्म्याची तलवार जो देवाचा संदेश आहे, तो घ्या. 18प्रत्येक प्रसंगी सर्व प्रकारे प्रार्थनापूर्वक विनंति करून आत्म्यात प्रार्थना करा. चिकाटी व प्रार्थनेसह सर्व संतांसाठी प्रार्थना करीत जागृत राहा.

19आणि माझ्यासाठी प्रार्थना करीत राहा. कारण जेव्हा मी तोंड उघडेन तेव्हा मला संदेश प्राप्त व्हावा. यासाठी की धैर्याने मला सुवार्तेचे रहस्य माहीत करून देणे शक्य व्हावे. 20त्याच्या वतीने मी साखळदंडानी बांधलेला राजदूत म्हणून सेवा करीत आहे. धैर्याने मला ती सांगता यावी म्हणून प्रार्थना करा.

## शेवटच्या शुभेच्छा

21यासाठी तुम्हाला हे कळावे की मी कसा आहे आणि काय करीत आहे, म्हणून तुखिक तुम्हांला सर्व काही सांगेल. तो आमचा प्रिय भाऊ आणि प्रभूमध्ये विश्वासू सेवक आहे. 22मी त्याला केवळ या कारणासाठीच तुमच्याकडे पाठवीत आहे की माझ्याविषयीचे वर्तमान तुम्हांला कळावे आणि तुमच्या अंत:करणाचे समाधान व्हावे. 23देवपिता आणि प्रभु येशू ख्रिस्तापासून आता बंधु बहिणींना विश्वासासह प्रीति आणि शांति लाभो. 24जे सर्व जण आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावर अविनाशी प्रीति करतात, त्या सर्वांबरोबर देवाची कृपा असो.

# पौलाचे फिलिप्पैकरांस पत्र

1 ख्रिस्त येशूचे दास असलेल्या पौल व तीमथ्य
यांजकडून, फिलिप्पै येथे राहणाऱ्या ख्रिस्त येशूमधील
देवाच्या सर्व पवित्र लोकांना, तसेच सर्व वडील मंडळीला
व खास मदतनिसांना, 2देव आपला पिता आणि आपला
प्रभु येशू ख्रिस्त याजपासून तुम्हांस कृपा असो.

## पौलाची प्रार्थना

3प्रत्येक वेळी जेव्हा मी तुमची आठवण करतो, तेव्हा
देवाचे आभार मानतो. 4नेहमीच तुमच्यासाठी केलेल्या
प्रत्येक प्रार्थनेच्यावेळी मी आनंदाने प्रार्थना करतो. 5कारण
अगदी पहिल्या दिवसांपासून ते आजपर्यंत सुवार्तेच्या कामात
तुमचा सहभाग आहे. 6मला याची खात्री आहे की, ज्या
देवाने तुमच्यामध्ये अशा प्रकारचे चांगले कार्य सुरू केले
आहे, तो ख्रिस्त येशू येण्याच्या वेळेपर्यंत ते पूर्ण करीत
आणील.

7तुम्हा सर्वांविषयी असा विचार करणे मला योग्य वाटते
कारण तुम्ही माझ्या हृदयात आहात. आणि मी तुरूंगात
असतानाच केवळ नव्हे तर जेव्हा मी सुवार्तेचे सत्य ठासून
सिद्ध करीत होतो, तेव्हा ही देवाने जी कृपा मला दिली
आहे त्यात तुम्हीसुद्धा माझ्याबरोबर वाटेकरी होता. 8देव
माझा साक्षी आहे, कारण ख्रिस्त येशूने जे प्रेम दाखविले
त्यामुळे तुम्हां सर्वांसाठी मी अधीर झालो होतो.

9आणि माझी हीच प्रार्थना आहे:

की तुमचे प्रेम अधिकाधिक वाढत जाईल पूर्ण ज्ञान व
सर्व प्रकारच्या समजबुद्धीने वाढत जाईल.

10मी अशी प्रार्थना करतो की, तुमच्याठायी हे गुण
असावेत, यासाठी की जे शुद्ध व निर्दोष ते तुम्ही निवडावे,
आणि अशा प्रकारे ख्रिस्ताच्या येण्याच्या दिवसासाठी तुम्ही
शुद्ध व निर्दोष असावे,

11आणि देवाच्या गौरवासाठी, स्तुति साठी आणि
नीतिमत्त्वाचे फळ देण्यासाठी भरून जावे.

## पौलाच्या त्रासामुळे प्रभूच्या कार्याला मदत होते

12बंधूनो, जे काही माझ्या बाबतीत घडले त्यामुळे
सुवार्ताकार्यात प्रत्यक्ष वाढ झाली हे तुम्हाला कळावे अशी
माझी इच्छा आहे. 13याचा परिणाम असा झाला की,
राजवाड्याच्या सर्व पहारेकऱ्यांना व येथे असणाऱ्या सर्वांना
हे माहीत झाले की, मी ख्रिस्ताला अनुसरतो म्हणून मला
तुरूंगवास भोगावा लागत आहे. 14शिवाय, पुष्कळशा
बांधवांना माझ्या तुरूंगवासामुळे उत्तेजन मिळाले. व ते
बोलण्यात ख्रिस्तामध्ये अधिकाधिक धीट होत चालले
आहेत व न भिता संदेश देत आहेत.

15हे खरे आहे की त्यांच्यातील काही जण हेव्याने व
वैरभावाने ख्रिस्ताचा संदेश देतात, पण इतर चांगल्या
भावनेने ख्रिस्ताचा संदेश देतात. 16हे लोक प्रेमापोटी असे
करतात, कारण त्यांना माहीत आहे की, सुवार्तेचे समर्थन
करण्यासाठी देवाने मला येथे ठेवले आहे. 17पण दुसरे
ख्रिस्ताची घोषणा स्वार्थी ध्येयाने करतात आणि
प्रामाणिकपणे करीत नाहीत, कारण त्यांना वाटते की, मी
तुरूंगात असताना मला त्रास देणे त्यांना शक्य होईल.

18पण त्यामुळे काय होते? महत्त्वाची गोष्ट अशी आहे
की, प्रत्येक मार्गाने चांगला हेतू असो की वाईट हेतू असो,
ख्रिस्त गाजविला जातो. आणि त्यामुळे मला आनंद होतो.
आणि मला आनंद होतच राहील. 19कारण मला माहीत
आहे तुमच्या प्रार्थनेमुळे आणि येशू ख्रिस्ताच्या आत्म्याद्वारे
येणाऱ्या मदतीमुळे याचा परिणाम माझ्या सुटकेत होणार
आहे. 20हे माझ्या उत्सुक अपेक्षेप्रमाणे व आशेप्रमाणे आहे,
कारण मला खात्री आहे की, माझी निराशा होणार नाही,
पण आता नेहमीसारखे माझ्या सर्व धैर्याने माझ्या जगण्याने
किंवा मरण्याने ख्रिस्ताचा माझ्या शरीराद्वारे महिमा होईल.
21कारण माझ्यासाठी जगणे म्हणजे ख्रिस्त आणि मरणे
म्हणजे लाभ आहे. 22पण जर मी या शरीरातच राहिलो
तर त्याचा अर्थ असा की, माझ्या कामाचे फळ, आनंद
मी अनुभवीन. मला माहीत नाही की मी काय निवडीन.
23या दोन पर्यायातून निवडण्यासाठी माझ्यावर मोठा दबाव
आहे. माझी अशी इच्छा आहे की, या जीवनातून जाऊन
ख्रिस्ताबरोबर असावे कारण ते फार फार चांगले होईल.
24पण तुमच्यासाठी या शरीरात राहणे हे माझ्यासाठी अधिक
आवश्यक आहे. 25आणि मला याची खात्री असल्याने
मला माहीत आहे की मी येथेच राहीन व तुमच्याबरोबर
असेन. 26यासाठी की तुमच्याबरोबर पुन्हा असण्याचा
परिणाम म्हणून तुम्हांला अभिमान बाळगण्यास अधिक
योग्य कारण मिळेल.

27पण कोणत्याही परिस्थितीत ख्रिस्ताच्या सुवार्तेला योग्य
अशा प्रकारे तुम्ही वागा. यासाठी की, जरी मी तुम्हांला
येऊन भेटलो किंवा तुमच्यापासून दूर असलो तरी मला

तुमच्याविषयी असे ऐकायला मिळो की तुम्ही एका आत्म्यात
खंबीर असे उभे आहात, तुम्ही सुवार्तेच्या विश्वासाने,
एकजीवाने धडपड करीत आहात. 28आणि जे तुम्हांला
विरोध करतात त्यांना तुम्ही भ्याला नाहीत. तुमचे हे धैर्य
त्यांच्या नाशाचा पुरावा होईल. पण तुमच्या तारणाचा पुरावा
होईल. आणि हे देवाकडून असेल. 29कारण, ख्रिस्ताच्या
वतीने केवळ त्याच्यावर विश्वास ठेवणे एवढेच नव्हे तर
त्याच्यासाठी दु:ख भोगणे असा हक्क तुम्हांला देण्यात
आलेला आहे. 30माझ्यामध्ये चाललेले युंद्ध तुम्ही
अनुभवलेले आहे आणि पाहिले आहे आताही ते माझ्यामध्ये
चालले असल्याचे तुम्ही ऐकत आहात.

## संघटित व्हा आणि एकमेकाची काळजी घ्या

2 जर मग खिस्तात तुमच्यामध्ये काही उत्तेजन आहे,
जर तुमच्यामध्ये तुमच्या प्रीतीतून वाढणारे सांत्वन
आहे, जर तुमच्यामध्ये आत्म्यात काही भाग आहे, जर
तुमच्यामध्ये जिव्हाळा व कळवळा आहे, 2तर मला पूर्णपणे
आनंदी करा. मी सांगतो की, तुम्ही त्याच गोष्टीचा विचार
करता, एकमेकांविषयी सारखेच प्रेम आहे तर आत्म्यात
एक व्हा, आणि एकच उद्देश असू द्या. 3हेवा किंवा पोकळ
व्यर्थ अभिमानाने काहीही करू नका. उलट नम्रतेने
एकमेकांना स्वत:पेक्षा चांगले माना. 4प्रत्येक व्यक्तीने
केवळ आपलेच हित पाहू नये, तर प्रत्येकाने दुसऱ्यांचे
हितसुद्धा पाहावे.

## ख्रिस्ताकडून निस्वार्थी होण्याचे शिका

5ख्रिस्त येशूच्या ठायी जे विचार होते तसेच तुमचेही
असू द्या. 6जरी तो देवाच्या स्वरूपाचा होता तरी देवासारखे
असणे हे संपत्ती राखून ठेवण्यासारखे मानले नाही. 7उलट
त्याने सर्व काही सोडून दिले, आणि त्याने गुलामाचे स्वरूप
धारण केले आणि मनुष्याचे रूप धारण केले व तो आपल्या
दिसण्यात मनुष्यासारखा झाला. 8त्याने स्वत:ला नम्र केले.
आणि मरेपर्यंत तो आज्ञाधारक राहिला. होय,
वधस्तंभावरच्या मरणापर्यंत तो नम्र झाला. 9म्हणून देवाने
सुद्धा त्याला अत्युच्च केले, व सर्व नावाहून जे नाव श्रेष्ठ
आहे ते त्याला दिले. 10यासाठी की, स्वर्गात, पृथ्वीवर व
पृथ्वीखाली जे आहेत त्या सर्वांनी येशूच्या नावाच्या
महिम्यासाठी गुडघे टेकावेत. 11व प्रत्येक जिभेने जाहीर
करावे की, "येशू ख्रिस्त हा देव पिता आहे."

## देवाला पाहिजे तसे लोक व्हा

12म्हणून माझ्या प्रियांनो, जसे तुम्ही मी प्रत्यक्ष असतानाच
नव्हे तर आता दूर असतानासुद्धा आज्ञा पाळता तसे भीतीने
कापत तुमचे तारण पूर्ण होण्यासाठी कार्य करीत राहा.
13कारण देवच असा एक आहे जो तुमच्यामध्ये कार्य
करण्याची इच्छा निर्माण करतो व तो संतुष्ट होईल अशा
रीतीने कार्य पूर्णत्वास नेतो.

14प्रत्येक गोष्ट तक्रार किंवा भांडण न करता करा,
यासाठी की, 15तुम्ही निर्दोष व शुद्ध असे या कुटिल व
विपरीत पिढीतील लोकांमध्ये असावे. आणि त्यांच्यामध्ये
अंधाऱ्या जगातील प्रकाशासारखे चमकावे. 16तुम्ही त्यांना
जीवनाचे वचन सांगत असता, माझे शर्यतीत धावणे व्यर्थ
झाले नाही असे मला दिसते, यासाठी की ख्रिस्ताच्या परत
येण्याच्या दिवशी मला तुमचा अभिमान वाटावा. 17तुमच्या
यज्ञार्पणासमवेत तसेच तुमच्या विश्वासाच्या सेवेसमवेत जरी
मी अर्पिला गेलो तरी ते आनंदाने करतो आणि तुमच्या
समवेत आनंदी बनतो. 18त्याच प्रकारे, तुम्हीसुद्धा आनंदी
असावे, आणि तुमच्या आनंदात मला सहभागी करावे.

## तीमथ्थी व एपफ्रदीत यांच्याविषयी बातमी

19पण मला आशा आहे, प्रभु येशूच्या साहाय्याने मी
लवकरच तीमथ्थीला तुमच्याकडे पाठवीन यासाठी की,
तुमच्याविषयीच्या बातमीने मला उत्तेजन मिळावे. 20तोच
एक आहे ज्याला पाठविण्याची माझी इच्छा आहे कारण
माझ्यासारख्याच भावना असणारा दुसरा कोणी
माझ्याजवळ नाही आणि त्याला तुमच्या कल्याणाची
मनापासून कळकळ आहे. 21सर्व जण त्यांच्या हिताकडेच
लक्ष देतात व ख्रिस्ताच्या हिताकडे लक्ष देत नाहीत. 22आणि
तुम्हांला त्याचा स्वभाव माहीत आहे, सुवार्ता वाढविण्यासाठी
जसे मुलगा पित्याची सेवा करतो तशी त्याने त्याच्या योग्यतेने
माझ्याबरोबर सेवा केली आहे. 23त्याला तुमच्याकडे
पाठविण्याविषयी मी आशा करीत आहे. माझ्याबाबतीत
काय होते ते कळताच त्याला तुमच्याकडे पाठवीन. 24आणि
माझा असा विश्वास आहे की, देवाच्या साहाय्याने मला
स्वत:लासुद्धा तुमच्याकडे येणे लवकरच शक्य होईल.
25एपफ्रदीत, जो माझा बंधु आहे, सहकारी व सहशिपाई
आहे, त्याला तुमच्याकडे पाठविण्याची आवश्यकता आहे,
असे मला वाटले. तसेच तो तुमचा प्रतिनिधी आहे जो
माझ्या गरजेच्या वेळी मला साहाय्य करतो. मी असे
करण्याचे ठरविले आहे कारण तो तुम्हा सर्वांना भेटण्यास
आतुर झाला आहे. 26मी त्याला पाठवितो कारण त्याला
तुम्हांला फार भेटावेसे वाटते. तुम्ही तो आजारी असल्याचे
जे ऐकले त्यामुळे त्याला काळजी वाटत आहे. 27तो
खरोखरच आजारी होता, अगदी मरणाला टेकला होता,
पण देवाने त्याच्यावर करुणा केली; त्याच्यावरच केली
असे नाही, तर माझ्यावरही केली, यासाठी की, मला
आणखी दु:ख होऊ नये. 28म्हणून, अधिक अधीरतेने, मी
त्याला पाठवीत आहे. यासाठी की जेव्हा तुम्ही त्याला
पाहाल तेव्हा पुन्हा एकदा तुम्ही आनंदी व्हाल आणि मी
निश्चिंत असेन. 29म्हणून, प्रभूमध्ये त्याचे स्वागत करा
आणि अशा लोकांचा सन्मान करा, कारण ख्रिस्ताच्या
कामासाठी तो जवळजवळ मेला होता. 30त्याने त्याचे जीवन
धोक्यात घातले, यासाठी की, माझी सेवा करण्यात तुमच्यात
जी उणीव होती ती भरून काढावी.

## कोणत्याही गोष्टीपेक्षा ख्रिस्त अधिक महत्त्वाचा आहे

**3** शेवटी, माझ्या बंधूंनो, प्रभूमध्ये आनंद करा. त्याच गोष्टी मी पुन्हा लिहिण्यास मला त्रासदायक वाटत नाहीत, आणि ते तुमच्यासाठी सुरक्षित आहे. 2“कुत्र्या” विषयी सावध असा! दुष्कर्मीविषयी सावध असा! शरीराला इजा करणाऱ्यांपासून सावध असा, 3कारण आम्हीच खरे सुंता झालेले लोक आहोत, आणि आम्ही जे देवाच्या आत्म्याने त्याची सेवा करतो ते आम्ही येशू ख्रिस्ताचा अभिमान बाळगतो आणि ऐहिक गोष्टींवर विश्वास ठेवीत नाही. 4जरी मला स्वत:ला जगिक गोष्टींवर विश्वास ठेवण्यास जागा आहे. जर दुसऱ्या कोणाला जगिक गोष्टीवर विश्वास ठेवण्यास कारण आहे असे वाटते. 5तर मला अधिक वाटते. मी जेव्हा आठ वर्षांचा होतो, तेव्हा माझी सुंता झाली. मी इस्राएल देशाचा आहे. बन्यामिन वंशाचा आहे, इब्री आईवडिलांपासून झालेला मी इब्री आहे. नियमशास्त्राच्या माझ्या दृष्टिकोनाबद्दल म्हणाल तर मी परूशी आहे. 6माझ्या आस्थेविषयी म्हणाल तर मी मंडळीचा छळ केला. नियमशास्त्राने ठरवून दिलेल्या नीतिमत्त्वाविषयी मी निर्दोष आहे. 7त्याऐवजी जो मला लाभ होता तो आता मी ख्रिस्तासाठी नुकसान असे समजतो. 8शिवाय माझ्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या विषयीच्या सर्वश्रेष्ठ ज्ञानामुळे मी इतर सर्व काही हानि समजतो. त्याच्यासाठी सर्व काही मी गमावलेले आहे. ख्रिस्ताला मिळविण्यासाठी मी सर्व काही कचरा समजतो. 9आणि त्याला शोधण्यासाठी माझे नीतिमत्त्व नसताही म्हणजे नियमशास्त्रावर आधारित नव्हे, परंतु नीतिमत्त्व जे ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे प्राप्त होते ते देवापासून प्राप्त होणारे आणि विश्वासावर आधारित आहे. 10मला ख्रिस्ताला जाणून घ्यायचे आहे आणि जेव्हा तो मरणातून पुन्हा उठला तेव्हा जे सामर्थ्य प्रगट झाले त्याचा अनुभव घ्यायचा आहे, मला त्याच्या दु:खसहनामध्ये सुद्धा त्याचा अनुभव घेण्यासाठी त्यात भाग घ्यायचा आहे आणि त्याच्या मरणाशी अनुरूप व्हायचे आहे. 11या आशेने की, मला मृतांमधून पुनरुत्थान मिळावे.

## ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न

12हे असे नाही की मी अगोदरच बक्षिस मिळविले आहे किंवा अगोदरच परिपूर्ण झालो आहे. ज्या बक्षिसासाठी ख्रिस्त येशूने मला ताब्यात घेतले ते बक्षिस मिळविण्याचा मी प्रयत्न करतो. 13बंधूंनो, ते मी मिळविले असे मानीत नाही, परंतु एक गोष्ट आहे की, जी करण्याचा मी निश्चय करतो, जे भूतकाळात आहे ते मी विसरतो, आणि ते माझ्यापुढे आहे ते मिळविण्याचा प्रयत्न करतो. 14ख्रिस्त येशूमध्ये वरील पाचारण जे देवाचे बक्षीस त्या उद्दीष्टासाठी मी झटतो. 15तेव्हा आपण सर्व जे परिपक्व (प्रौढ) त्या आमची एकच प्रवृत्ती आहे आणि एखाद्या मुद्यावर तुम्ही वेगळा विचार केला तरी देव तुम्हांस तेही प्रकट करील. 16फक्त आपण ज्या सत्यापर्यंत पोहोंचलो त्याच्याच मागे चालत राहावे. 17बंधूंनो, माझे अनुकरण करण्यासाठी इतरांबरोबर सहभागी व्हा. आणि आम्ही जसे तुमच्यासमोर उदाहरणादाखल आहोत, त्याप्रमाणे जे चालतात त्यांच्याकडे लक्ष द्या. 18कारण यापूर्वी मी तुम्हांला जसे अनेक वेळा सांगितले व आताही पुन्हा रडत सांगतो, पुष्कळ जण असे आहेत की, जे ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या वैऱ्यासारखे वागतात. 19नाश हा त्यांचा शेवट, पोट हा त्यांचा देव आहे आणि त्यांच्या निर्लज्जपणामध्ये त्यांचे गौरव आहे ते फक्त ऐहिक गोष्टीविषयीच विचार करतात. 20आमचा स्वदेश स्वर्गात आहे, तेथून येणारा तारणारा प्रभु येशू ख्रिस्त याची आम्ही वाट पाहत आहोत. 21त्याच्या ज्या सामर्थ्याने तो सर्व काही आपल्या स्वाधीन करण्यास समर्थ आहे त्याने तो आपले शरीर बदलून टाकील. आणि त्याच्या वैभवी शरीरासारखे करील.

## काही गोष्टी करणे

**4** म्हणून माझ्या प्रिय आणि भेटीस आतुर झालेल्या बंधूंनो, माझा आनंद आणि मुकुट असलेल्यांनो मी तुम्हांला सांगितल्याप्रमाणे प्रभूमध्ये स्थिर राहा. 2मी युवदीया आणि संतुखेला सुद्धा प्रभूमध्ये बहिणी या नात्याने एकच विचार करण्यासाठी उत्तेजन देत आहे. 3माझ्या विश्वासू सहकाऱ्यांनो, मी तुम्हाला सांगतो की, ज्या स्त्रियांनी माझ्याबरोबर सुवार्तेच्या प्रसारासाठी कष्ट घेतले आणि ज्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहिली आहेत त्यांना कृपा करून मदत करा.

4प्रभूमध्ये नेहमी आनंद करा. 5मी पुन्हा म्हणेन: आनंद करा! तुमची सौम्यता सर्व लोकांना समजावी. प्रभु जवळ आहे. 6कशाचीही काळजी करू नका, तर प्रत्येक परिस्थितीत प्रार्थना आणि विनंत्या उपकार मानून तुमच्या विनंत्या देवाला कळवा. 7जी शांति देवापासून येते, जी शांति सर्व मानवी समजबुद्धीच्या पलीकडे आहे, ती तुमचे अंत:करण व मन ख्रिस्त येशूमध्ये सुरक्षित ठेवील.

8शेवटी, बंधूंनो, जे काही सत्य आहे, जे काही उदात्त आहे, जे काही योग्य आहे, जे काही शुद्ध आहे, जे काही सुंदर आहे, जे काही प्रशंसनीय आहे, जर सद्गुण आहे, आणि जर काही स्तुति आहे, या गोष्टींनी तुमची मने भरून टाका. 9जे काही तुम्ही शिकला आहात, जे तुम्हांला मिळाले आहे व जे माझ्याकडून ऐकले आहे आणि जे मी करताना तुम्ही पाहिले आहे, त्या गोष्टी करीत राहा. आणि देव जो शांतीचा उगम आहे तो तुमच्याबरोबर राहील.

## फिलिप्पैच्या ख्रिस्ती लोकांचे पौल आभार मानतो

10मी प्रभूमध्ये खूपच आनंदित झालो कारण शेवटी तुमची माझ्याबद्दलची काळजी जागृत झाली. अर्थात तुम्ही नेहमीच माझी काळजी घेतली. परंतु ती दाखविण्याची संधी तुम्हांला मिळाली नाही. 11मी हे गरजेपोटी बोलतो

असे नाही कारण आहे त्या स्थितीत मी समाधानी राहण्याचे शिकलो आहे. 12गरजू स्थितीत किंवा सर्व विपुल असताना कसे राहायचे ते मी जाणतो. कोणत्याही वेळी आणि सर्व परिस्थितीत तृप्त राहण्याचे व भुकेले राहण्याचे, भरपूर बाळगण्याचे आणि अपूरेपणात राहाण्याचे अशा सर्व परिस्थितीत राहण्याचे रहस्य मी शिकलो आहे. 13जो ख्रिस्त मला सामर्थ्य देतो त्याच्या द्वारे मी सर्व परिस्थितीचा सामना करू शकतो.

14तरीही माझ्या संकटकाळात तुम्ही साहाय्य केलेत हे चांगले केले. 15तुम्हा फिलिप्पैकरांना माहीत आहे की, सुवार्ता सांगण्याच्या सुरुवातीच्या काळात जेव्हा मी मासेदोनिया सोडले, तेव्हा तुमच्याशिवाय कोणत्याही मंडळीने माझ्याशी देवाणघेवाण केली नाही. 16कारण जेव्हा मी थेस्सलनीकात होतो, तेव्हा बऱ्याचदा तुम्ही माझी गरज भागविण्यासाठी मदत पाठविली. 17मी तुमच्याकडून केवळ देणगीची अपेक्षा करतो असे नाही, उलट, तुमच्या हिशेबी अधिक फळवृद्धी व्हावी असे पाहतो. 18माझ्या गरजेपुरते माझ्याजवळ सर्व काही आहे आणि ते विपुल आहे. एपफ्रदीताच्या करवी ज्या गोष्टी तुम्ही पाठविल्या त्या मिळाल्यामुळे गरजेपेक्षा अधिक माझ्याजवळ आहे. ते मधुर सुगंधी अर्पण स्वीकारण्यास योग्य असा यज्ञ जो देवाला संतोष देणार असा आहे.

19आणि माझा देव तुमच्या सर्व गरजा ख्रिस्त येशूच्या ठायी असलेल्या त्याच्या गौरवी संपत्तीला साजेल अशा रीतीने पुरवील. 20आपला देव व पिता याला अनंतकाळ गौरव असो. आमेन.

21ख्रिस्त येशूमधील प्रत्येक संताला सलाम सांगा. माझ्याबरोबर जे बंधु आहेत ते तुम्हांला सलाम सांगतात. 22येथील सर्व संत विशेषेकरून कैसराच्या घरातील संत तुम्हांला सलाम सांगतात.

23प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुमच्या आत्म्याबरोबर असो.

# पौलाचे कलस्सैकरांस पत्र

1 देवाच्या इच्छेने येशू ख्रिस्ताचा प्रेषित पौल आणि आमचा
बंधु तीमथ्यी याजकडून,
2ख्रिस्तामध्ये आमचे जे विश्वासू बंधु आहेत, त्या कलस्सै
येथील देवाच्या पवित्र लोकांना: देव, आमचा पिता
याजकडून तुम्हास कृपा व शांति असो.
3आम्ही जेव्हा तुमच्यासाठी प्रार्थना करतो, तेव्हा आम्ही
नेहमी देवाचे, जो आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताचा पिता आहे
त्याचे, आभार मानतो. 4कारण आम्ही ख्रिस्त येशूवरील
तुमच्या विश्वासाविषयी आणि देवाच्या सर्व लोकांविषयी
तुम्हाला वाटत असलेल्या प्रेमाविषयी ऐकले आहे. 5कारण
स्वर्गामध्ये जी आशा तुमच्यासाठी राखून ठेवली आहे.
तुम्ही पहिल्यांदा त्या आशेविषयी खऱ्या संदेशाद्वारे म्हणजेच
सुवार्तेद्वारे ऐकले. 6जी सुवार्ता तुमच्याकडे आली आहे,
संपूर्ण जगातून त्या सुवार्तेचे फळ मिळत आहे व ती वाढत
आहे. ज्याप्रमाणे ती तुमच्यामध्येसुद्धा तशीच वाढत होती व
फळ देत होती, ज्या दिवसापासून तुम्ही देवाच्या कृपेविषयी
ऐकले व ती खरोखर काय आहे हे समजून घेतले तेव्हापासून
ती कार्य करीत आहे.
7तुम्ही ते, आमचा सहसेवक एपफ्रास, जो आमच्या
वतीने ख्रिस्ताचा विश्वासू सेवक आहे, त्याच्याकडून शिकून
घेतले आहे. 8त्याने आम्हांला तुमचे प्रेम आत्म्यापासून
आहे त्याविषयीही सांगितले. 9या कारणासाठी, आम्हीसुद्धा
तुमच्याविषयी ज्या दिवसापासून ऐकले, तेव्हापासून
तुमच्यासाठी प्रार्थना करण्याचे थांबविले नाही. आम्ही
प्रार्थना करीत आहोत की:

तुम्ही देवाच्या इच्छेच्या सर्व प्रकारच्या ज्ञानाने आणि
आध्यात्मिक समंजसपणाने भरले जावे.
10यासाठी की, त्याला योग्य असे तुम्ही चालावे. आणि
सर्व बाबतीत त्याला आनंद द्यावा; आणि तुम्ही देवाच्या
ज्ञानात वाढावे;
11त्याच्या गौरवी सामर्थ्यात त्याच्या महान सामर्थ्यामुळे
समर्थ बनण्यासाठी तुम्हांला सहनशीलता व धैर्य प्राप्त व्हावे.

12आणि आनंदाने पित्याला धन्यवाद द्यावेत, ज्याने
तुम्हाला प्रकाशात राहणाऱ्या देवाच्या लोकांचे जे वतन
आहे त्यात वाटा मिळण्यासाठी पात्र केले. 13देवाने
अंधाराच्या अधिपत्यापासून आमची सुटका केली आणि
त्याच्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणले. 14पुत्राद्वारे आम्हांला
आमच्या पापांची क्षमा मिळाली.

### जेव्हा आम्ही ख्रिस्ताकडे पाहतो तेव्हा आम्ही देवाला पाहतो

15तो अदृश्य देवाची प्रतिमा आहे आणि निर्माण केलेल्या
सर्व गोष्टीत तो प्रथम आहे. 16कारण स्वर्गात आणि पृथ्वीवर
सर्व काही त्याच्या सामर्थ्याने निर्माण केले गेले. जे काही
दृश्य आहे आणि जे काही अदृश्य आहे, सिंहासने असोत
किंवा सामर्थ्य असो, सत्ताधीश असोत किंवा अधिपती
असोत सर्व काही त्याच्याद्वारे निर्माण केले गेले. 17सर्व
गोष्टी निर्माण होण्याच्या अगोदरपासून तो अस्तित्वात आहे.
सर्व गोष्टी त्याच्याद्वारे चालतात. 18आणि तो शरीराचा
म्हणजे मंडळीचा मस्तक आहे. तो प्रारंभ आहे. मृतांमधून
पुनरुत्थान पावलेल्यांमध्ये तो प्रथम आहे. यासाठी की
प्रत्येक गोष्टीत त्याला प्रथम स्थान मिळावे. 19कारण
देवाने त्याच्या सर्व पूर्णतेत त्याच्यामध्ये राहण्याचे निवडले.
20आणि ख्रिस्ताद्वारे सर्व गोष्टींचा स्वत:शी म्हणजे त्या
पृथ्वीवरील गोष्टी असोत, किंवा स्वर्गातील गोष्टी असोत
समेट करण्याचे ठरविले. ख्रिस्ताने जे रक्त वधस्तंभावर
सांडले त्याद्वारे देवाने शांति केली.
21एके काळी तुम्ही परके होता आणि तुमच्या विचारांमुळे
आणि तुमच्या दुष्ट कृत्यांमुळे तुम्ही देवाचे शत्रू होता.
22परंतु आता, ख्रिस्ताच्या शारीरिक देहाने व त्याच्या
मरणाने देवाने तुमचा त्याच्याशी समेट घडवून आणला
आहे यासाठी की, त्याच्यासमोर पवित्र, निष्कलंक आणि
दोषविरहीत असे सादर करावे. 23तुम्ही तुमच्या विश्वासात
दृढ व स्थिर असावे आणि जी सुवार्ता तुम्ही ऐकली आहे
तिच्याद्वारे तुम्हांला दिलेल्या आशेपासून दूर जाऊ नये,
ज्याचा मी पौल सेवक झालो.

### मंडळीकरिता पौलाचे कार्य

24आता, तुमच्यासाठी मला झालेल्या दु:खात मला आनंद
वाटतो आणि माझ्या स्वत:च्या शरीरात मी ख्रिस्ताचे त्याच्या
देहाचे म्हणजे मंडळीच्या वतीने ख्रिस्ताचे जे दु:ख कमी
पडत आहे ते मी पूर्ण करीत आहे. 25देवाच्या आज्ञेप्रमाणे
मी एक त्यांच्यापैकी सेवक झालो. ती आज्ञा तुमचा फायदा

व्हावा म्हणून दिली होती. ती म्हणजे देवाचा संदेश पूर्णपणे
गाजवावा. 26हा संदेश एक रहस्य आहे, जे अनेक युगांपासून
आणि अनेक पिढ्यांपासून लपवून ठेवले होते. परंतु आता
ते देवाने त्याच्या लोकांना माहीत करून दिले आहे.
27देवाला त्याच्या लोकांना माहीत करून द्यायचे होते की,
विदेशी लोकांमध्ये या वैभवी रहस्याची संपत्ती ख्रिस्त येशू
जो तुम्हांमध्ये आहे आणि जो देवाच्या गौरवामध्ये सहभागी
होण्याची आमची आशा आहे. 28आम्ही त्याची घोषणा
करतो. प्रत्येक व्यक्तीला सूचना देतो, व प्रत्येक व्यक्तीला
शक्य ते ज्ञानाने शिकविण्याचा प्रयत्न करतो यासाठी की,
आम्हांला प्रत्येक व्यक्ति ख्रिस्तामध्ये पूर्ण अशी देवाला
सादर करता यावी. 29या उद्देशाने मी झगडत आहे.
ख्रिस्ताच्या शक्तीच्या उपयोगाने, जी माझ्यामध्ये
सामर्थ्यशाली रीतीने कार्य करीत आहे.

2 कारण माझी अशी इच्छा आहे की, तुमच्यावतीने
जो महान झगडा मी करीत आहे आणि जे
लावादिकीयात आहेत त्यांच्या वतीने आणि ज्यांची माझी
व्यक्तिश: भेट झाली नाही अशा सर्वांसाठी जो महान
झगडा मी केला तो तुम्हांला माहीत व्हावा. 2यासाठी की,
त्यांच्या मनाला समाधान वाटावे. आणि ते प्रेमाने एकत्र
जोडले जावेत, आणि खात्रीची सर्व संपत्ती जी समजबुद्धीने
येते ती मिळावी. तसेच देवाचे रहस्य जो ख्रिस्त त्याच्याविषयी
पूर्ण ज्ञान मिळावे. 3ज्यामध्ये ज्ञानाची आणि शहाणपणाची
सर्व संपत्ती लपलेली आहे.

4मी हे म्हणत आहे ते यासाठी की, तुम्हांला दिसायला
चांगल्या पण खोट्या कल्पनांनी फसवू नये. 5कारण मी
जरी शरीराने तुम्हांपासून दूर असलो तरीही आत्म्यात मी
तुम्हाबरोबर आहे आणि तुमच्या जीवनातील नीटनेटकेपणा
आणि ख्रिस्तावरील विश्वासासाठी खंबीरता पाहून मी
आनंदीत आहे.

## ख्रिस्तात जगत राहा

6म्हणून ज्याप्रमाणे तुम्हांला दिलेल्या शिक्षणाद्वारे तुम्हाला
येशू ख्रिस्त व प्रभु म्हणून मिळाला, तसे त्याच्यामध्ये एक
होत चला. 7त्याच्यामध्ये मुळावलेले, त्याच्यावर उभारलेले,
तुमच्या विश्वासात दृढ झालेले असे व्हा आणि देवाची
उपकारस्तुति करीत ओसंडून जा.

8मूलभूत शिक्षण जे ख्रिस्तापासून नाही व मनुष्यांनी
हस्तांतरित केले आहे त्या मानवी तत्त्वज्ञानाने व पोकळ
फसव्या कल्पनांनी तुम्हांला कोणीही कैद्यासारखे घेऊन
जाऊ नये म्हणून सावध असा. 9कारण देवाचे पूर्णत्व
त्याच्यात शरीरात राहते. 10आणि तो जो प्रत्येक सत्तेच्या
व अधिकाराच्या उच्चस्थानी आहे, त्याच्यामध्ये तुम्ही पूर्ण
झाले आहात.

11मानवी हातांनी न केलेल्या सुंतेने तुम्हीसुद्धा
त्याच्यामध्ये सुंता झालेले आहात. ख्रिस्ताने केलेल्या सुंतेद्वारे
तुम्ही तुमच्या पापाच्या सामर्थ्यापासून मुक्त झाला होता.
12हे असेच घडले जेव्हा तुम्ही बाप्तिस्मा करण्याच्या
कृतीमध्ये त्याच्याबरोबर पुरले गेला आणि तुम्ही
त्याच्यामध्ये देवाच्या कृतीमध्ये तुमच्या विश्वासाद्वारे
उठविले गेला, ज्याने (देवाने) ख्रिस्ताला मेलेल्यांतून
उठविले. 13तुमच्या पापांमुळे आणि तुमची सुंता न झाल्याने
तुम्ही आध्यात्मिकरीत्या मृत झाला होता, परंतु देवाने
ख्रिस्ताबरोबर तुम्हाला जीवन दिले आणि त्याने आमच्या
सर्व पापांची क्षमा केली. 14त्याने आमच्याविरुद्ध असलेल्या
आरोपपत्राचा निवाडा असलेला दस्तऐवज आणि ज्यात
आम्हांला विरोध होता, तो त्याने आमच्यातून काढून घेतला,
आणि वधस्तंभावर खिळ्यांनी ठोकून रद्द केला. 15त्याने
स्वत: वधस्तंभाद्वारे सत्ता आणि अधिकार हाणून पाडून
त्यांवर विजय मिळविला आहे.

## मनुष्यांनी केलेल नियम पाळू नका

16म्हणून कोणीही तुमच्यावर खाण्याविषयी आणि
पिण्याविषयी किंवा मेजवान्यांविषयी, नवचंद्रोउत्सवाविषयी
किंवा शब्बाथ दिवसांविषयी टीका करू नये. 17कारण ते
फक्त येणाऱ्या गोष्टींची सावली आहेत. परंतु खरे शरीर
ज्यामुळे सावली पडते ते तर ख्रिस्ताचे आहे. 18कोणीही
जो स्वत:चा अपमान, नम्रतेची कृत्ये व देवदूतांची उपासना
यात समाधान मानून घेतो, त्याने तुम्हाला बक्षिसासाठी
अपात्र ठरवू नये. असा मनुष्य नेहमी हे सर्व दृष्टान्त
पाहिल्यासारखे बोलतो आणि कोणतेही कारण नसता
त्याच्या आध्यात्मिक नसलेल्या अंत:करणामुळे गर्वाने
फुगलेला असतो. 19आणि असा मनुष्य ख्रिस्त जो मस्तक
त्याला धरीत नाही. संपूर्ण शरीर त्याच्या अस्थिबंधाचे
स्नायू, स्नायूंनी आधार दिलेले आणि एकत्रित धरल्याने
देवापासून होणारी वाढ यात वाढते त्याबद्दल त्याला धन्यवाद
असो. 20जर तुम्ही ख्रिस्ताबरोबर मेला आहात व या जगाच्या
प्राथमिक शिक्षणापासून मुक्त झाला आहात, तर मग का
तुम्ही या जगाचे असल्यासारखे त्यांच्या नियमांच्या अधीन
राहाता 21"याला स्पर्श करू नका!" "त्याची चव पाहू
नका!" 22या सर्व गोष्टी त्यांच्या वापराबरोबर नाहीशा
होणार आहेत. अशा नियमांच्या अधीन होताना, तुम्ही
मानवी नियम व शिकवणूक यांचे पालन करता.
23खरोखर, मनुष्यांनी केलेला धर्म, स्वत:चा अपमान,
नम्रतेची कृत्ये, शरीराचा छळ, या विषयीच्या ज्ञानाबद्दल
त्यांची कीर्ति आहे, परंतु शरीराच्या समाधानाविरुद्ध
लढताना ते काही किंमतीचे नाहीत.

## ख्रिस्तातील तुमचे नवे जीवन

3 म्हणून जसे तुम्हांला ख्रिस्ताबरोबर मेलेल्यामधून
उठविले गेले आहे तर, स्वर्गातील म्हणजे ज्या वरील
गोष्टी आहेत त्यासाठी प्रयत्न करा. जेथे ख्रिस्त देवाच्या
उजव्या हाताला बसलेला आहे. 2ज्या वरील (स्वर्गातील)
गोष्टी आहेत त्याबद्दलचा विचार करा. ज्या गोष्टी

पृथ्वीवरच्या आहेत त्यांचा विचार करू नका. 3कारण
तुम्ही मेलेले आहात आणि तुमचे नवे जीवन देवामध्ये
ख्रिस्ताबरोबर लपलेले आहे. 4जेव्हा ख्रिस्त, जो आमचे
जीवन आहे, त्याच्या दुसऱ्या येण्याच्या वेळेस प्रगट होईल.
तेव्हा तुम्हीही त्याच्याबरोबर गौरवात प्रकट व्हाल.

5म्हणून तुमच्यामध्ये पृथ्वीतलावरील जे काही आहे ते
सर्व जिवे मारा. जारकर्म, अशुद्धता, लोभ, दुष्ट इच्छा,
अधाशीपणा, जी एक प्रकारची मूर्तिपूजा आहे. 6कारण या
गोष्टींमुळे देवाचा राग ओढवणार आहे.* 7तुम्हीसुद्धा असेच
जीवन जगत होता जेव्हा तुम्ही अशा गोष्टी करीत होता,

8पण आता, तुम्ही या सर्व गोष्टी बाजूला केल्या पाहिजेत:
राग, क्रोध, दुष्टता, निंदा आणि तुमच्या मुखातील लज्जास्पद
बोलणे, या सर्व गोष्टी तुम्ही दूर केल्याच पाहिजेत.
9एकमेकाशी लबाडी करू नका. कारण तुम्ही जुना मनुष्य
त्याच्या कृतीसह काढून टाकला आहे. 10आणि तुम्ही
नवीन मनुष्य धारण केला आहे. हे नवे रूप त्याच्या
निर्माणकर्त्याच्या प्रतिमेप्रमाणे सतत नवे होत जाते. यासाठी
की या नव्या मनुष्याला देवाचे पूर्ण ज्ञान मिळावे. 11परिणाम
म्हणून यहूदी व विदेशी असा कोणताही फरक नाही.
एखाद्याची सुंता झालेला किंवा एखाद्याची सुंता न झालेला,
बेताल, व असंस्कृत, गुलाम आणि स्वतंत्र मनुष्य असा
कोणताही फरक नाही. पण ख्रिस्त हाच सर्व काही आहे
आणि तो सर्व विश्वासणाऱ्यात आहे.

12म्हणून, जसे देवाचे निवडलेले लोक जे पवित्र आहेत,
तसे करुणा, दयाळूपणा, नम्रता, सौम्यता, आणि धीर हे
परिधान करावे. 13एकमेकांचे सहन करा. जशी प्रभूने
तुम्हांला क्षमा केली तशी एखाद्याविरुद्ध तक्रार असेल तर
एकमेकांना क्षमा करा. 14या सर्वांवर प्रीतीचे वस्त्र परिधान
करा. जे त्या सर्वांना एकत्र ठेवते आणि त्यांना परिपूर्ण
करते. 15आणि ख्रिस्ताची शांति जिच्यासाठी तुम्ही जे एका
देहातील लोक त्या तुम्हांला बोलाविले होते ती तुमच्या
अंत:करणावर राज्य करो आणि नेहमी उपकार मानणारे
व्हा. 16ख्रिस्ताचा संदेश तुमच्यामध्ये त्याच्या सर्व वैभवाने
राहावा. एकमेकांना महान असा शहाणपणाने शिकवा व
बोध करा. स्तोत्रे, व गीते गा, आणि आध्यात्मिक गीते
गाऊन उपकारस्तुतीसह आपल्या अंत:करणात देवाला
गीते गा. 17आणि प्रत्येक गोष्ट जी तुम्ही बोलता किंवा
करता ते प्रभु येशूच्या नावात करावे. यामुळे तुम्ही
देवपित्याचे त्याच्याद्वारे आभार मानता.

## लोकांबरोबर तुमचे जीवन

18पत्नींनो, जसे प्रभूमध्ये योग्य आहे तसे तुम्ही आपल्या
पतींच्या अधीन राहा.

19पतींनो, आपल्या पत्नीवर प्रेम करा आणि
त्यांच्याबरोबर कठोरतेने वागू नका.

20मुलांनो, सर्व गोष्टीत आपल्या आईवडिलांची आज्ञा
पाळा. कारण प्रभूच्या अनुयायांचे असे वागणे देवाला आनंद
देणारे आहे.

21वडिलांनो, आपल्या मुलाला चिडवू नका. म्हणजे ते
निराश होणार नाहीत.

22गुलामांनो, तुमच्या जगिक मालकाच्या सर्व आज्ञा
पाळा आणि मनुष्याला संतोषविणाऱ्या, डोळ्यांनी देखरेख
करण्यासाठी नव्हे तर त्याऐवजी पूर्ण मनाने प्रभूला भिऊन
आज्ञा पाळा. कारण तुम्ही प्रभूचा आदर करता. 23तुमच्या
अंत:करणापासून काम करा. जणू काय तुम्ही प्रभूसाठी
काम करीत आहात, मनुष्यांसाठी नव्हे असे काम करा.
24लक्षात ठेवा, प्रभू तुम्हांला तुमच्या स्वर्गीय वारशाचे
बक्षीस देईल. ख्रिस्त जो तुमचा खरा धनी त्याची सेवा
करीत राहा. 25कारण जो कोणी वाईट करतो, त्याचेसुद्धा
तसेच होईल. देव असेच वागवील कारण त्याच्याकडे
पक्षपात नाही.

4 मालकांनो, आपल्या गुलामांना जे न्याय्य व योग्य ते
द्या.

## पौल ख्रिस्ती लोकांना काही गोष्टी करावयास सांगतो

2नेहमी प्रार्थना करीत राहा. उपकारस्तुति करीत
त्यामध्ये दक्ष राहा. 3त्याचवेळी आमच्यासाठीसुद्धा प्रार्थना
करा, यासाठी की, ख्रिस्ताविषयीचे जे रहस्य देवाने आम्हांला
कळविले, त्याविषयी बोलण्यासाठी, त्याचा संदेश
ऐकण्यासाठी, देवाने आमच्यासाठी दार उघडावे. कारण
त्या उपदेश करण्याने मी बंधनात आहे. 4ते रहस्य ज्या
रीतीने मी सांगावयास पाहिजे, त्याप्रकारे सांगण्यासाठी
माझ्यासाठी प्रार्थना करा.

5बाहेरच्या लोकांबरोबर सुज्ञतेने वागा आणि प्रत्येक
संधीचा चांगला फायदा करून घ्या. 6तुमचे बोलणे नेहमी
कृपायुक्त आणि मिठाने रुचकर केल्यासारखे असावे.
यासाठी की प्रत्येक मनुष्याला कसे उत्तर द्यावे हे तुम्हांला
कळावे.

## पौलाबरोबर असलेल्या लोकांविषयीची बातमी

7तुखिक, प्रिय बंधु, विश्वासू सेवक आणि प्रभूमधील
सहकारी तो तुम्हांला माझ्याविषयी सगळी माहिती देईल.
8त्याला मी याच कारणाने पाठवीत आहे की,
आमच्याविषयीची बातमी तुम्हांला कळावी आणि तुमची
अंत:करणे उत्तेजित व्हावीत. 9मी त्याला आमचा विश्वासू
व प्रिय बंधु अनेसिम, जो तुमच्यातील एक आहे,
याच्याबरोबर पाठवीत आहे. ते तुम्हांला येथे काय घडत
आहे ते सांगतील.

10अरिस्तार्ख, माझ्या सोबतीचा कैदी, तुम्हाला सलाम
सांगतो. त्याचप्रमाणे बर्णबाचा चुलत भाऊ मार्क

---

**कारण ... आहे** काही प्राचीन पुढील शब्द जोडतात, जे आज्ञा पाळीत नाहीत त्याजवर.

ज्याच्याविषयी तुम्हाला अगोदरच माहिती मिळाली आहे, तो जर तुमच्याकडे आला तर त्याचे स्वागत करा. 11येशू ज्याला युस्त म्हणतात तोसुद्धा तुम्हाला सलाम सांगतो. यहूदी विश्वासणाऱ्यांपैकी फक्त हेच काय ते देवाच्या राज्याचा प्रसार करण्यात माझ्याबरोबर काम करीत आहेत. ते मला आधीच फार मोठा आधार आहेत.

12एपफ्रासमुद्धा तुम्हाला सलाम सांगतो, तो तुमच्यापैकीच ख्रिस्त येशूचा सेवक आहे. तुम्ही आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व वाढलेले आणि देवाच्या इच्छेप्रमाणे करण्यात तुम्ही पूर्णपणे गुंतलेले असावे. 13जे लवादिकीयात व हेरापल्लीत राहत आहेत त्यांच्यासाठी तो फार श्रम करीत आहे. याचा मी साक्षी आहे. 14प्रिय वैद्य लूक आणि देमास तुम्हांला सलाम सांगतात. 15लावदिकीयात राहणारे बंधु आणि नेफा आणि तिच्या घरी जमणारी मंडळी यांना सलाम सांगा. 16आणि जेव्हा तुम्हाला हे पत्र वाचून दाखविले जाईल, तेव्हा ते लावदकीयाच्या मंडळीतसुद्धा वाचले जाते की नाही ते पाहा आणि तू सुध्दा माझे पत्र वाच. 17आणि अर्खिप्पाला सांगा, "जी सेवा तुला प्रभूमध्ये मिळाली आहे ती पुढे चालू ठेव."

18मी, पौल, हा सलाम माझ्या स्वत:च्या हस्ताक्षरात लिहितो. मी तुरुंगात आहे हे लक्षात ठेवा. देवाची कृपा तुम्हांबरोबर असो.

# पौलाचे थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र

1 पौल, सिल्वान आणि तीमथ्य यांच्या द्वारे देव जो पिता त्यामध्ये तसेच प्रभु येशू ख्रिस्तामध्ये दृढ असलेल्या थेस्सलनीकाच्या मंडळीस, देवाची कृपा व शांति लाभो.

### थेस्सलनीकाकरांचा विश्वास आणि जीवन

2आम्ही नेहमीच प्रार्थनांमध्ये तुमची आठवण करून
तुम्हा सर्वांसाठी देवाचे आभार मानतो. 3आम्ही आमचा
देव व पित्यासमोर तुमचे विश्वासाचे कार्य, तुम्ही प्रेमाने केलेले श्रम, आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावरील दृढ आशेने सोशिकपणे धरलेला धीर याची सतत आठवण
करतो. 4माझ्या बंधूंनो, देवाने प्रीतीत केलेली तुमची निवड
ही आम्हाला माहीत आहे. 5कारण आमची सुवार्ता तुमच्याकडे केवळ शब्दांनी आली नाही तर पवित्र आत्म्याने व पूर्ण खात्रीने आली हे तुम्हांला माहीत आहे, आम्ही तुमच्यामध्ये कसे राहिलो तुम्हांला माहीत आहे. ते तुमच्या
फायद्यासाठी होते. 6आणि तुम्ही आमचे व प्रभूचे अनुकरण करणारे झाला, पवित्र आत्म्याकडून मिळणाऱ्या आनंदात
तुम्ही मोठ्या कष्टाने संदेश स्वीकारलात. 7त्याचा परिणाम म्हणजे तुम्ही सर्व विश्वासणाऱ्यासाठी जे मासेदोनियात व
अखियात होते त्यांच्यासाठी आदर्श असे झालात 8कारण
तुमच्याकडून गाजविण्यात आलेला संदेश केवळ मासेदोनिया आणि अखियातच ऐकला गेला असे नाही तर तुमचा देवावरील विश्वास सगळीकडे माहीत झाला आहे.
म्हणून आम्हांला काही सांगण्याची गरज नाही. 9कारण ते
स्वत:च आमच्याविषयी सांगत आहेत म्हणजे कशा प्रकारे तुम्ही आमचे स्वागत केले तसेच तुम्ही मूर्तिपासून देवाकडे कसे वळलात व खऱ्या आणि जिवंत देवाची सेवा
करण्यासाठी कसे वळलात. 10आणि आता ज्याला देवाने
मेलेल्यांतून उठविले त्या त्याच्या स्वर्गातून येणाऱ्या पुत्राची तुम्ही वाट पाहत आहात. तोच येशू देवाच्या येणाऱ्या क्रोधापासून आपले रक्षण करतो.

### पौलाचे थेस्सलनीकातील कार्य

2 बंधूंनो, तुमचे तुम्हांलाच माहीत आहे की, आम्ही
तुम्हाला दिलेली भेट व्यर्थ झाली नाही. 2पण तुम्हाला
माहीत आहे की, आम्हांला मागे फिलिप्पै येथे त्रास आणि अपमान सहन करावा लागला. पण देवाच्या साहाय्याने मोठा विरोध झाला असताना देवाकडून येणारी सुवार्ता
सांगण्यासाठी आम्हांला धैर्य प्राप्त झाले. 3खरोखर आमची
घोषणा आमच्याकडून झालेल्या चुकांमुळे किंवा अशुद्ध
हेतूने किंवा भ्रमाने येत नाही. 4उलट, ज्याप्रमाणे देवाने
पसंत केलेले, सुवार्तेचे कार्य सोपविलेले असे आम्ही आहोत म्हणून आम्ही बोलतो. आम्ही मनुष्याला संतुष्ट करण्यासाठी नाही, तर देवाला, जो आमच्या उद्दिष्टांची
परीक्षा घेतो 5खरोखर, तुम्हांला माहीत आहे की, आम्ही
तुमच्यासमोर खुशामत करणाऱ्या शब्दांनी बोललो नाही, किंवा आमचे उपदेश करणे हे आमचा लोभ झाकण्याचे खोटे कारण नव्हते, कारण देव आमचा साक्षी आहे!
6किंवा आम्ही लोकांकडून, तुमच्याकडून किंवा दुसऱ्या
कोणाकडून सन्मान मिळावा म्हणून अपेक्षा करीत नव्हतो. ख्रिस्ताचे प्रेषित या नात्याने, जरी आम्हांला आमचा अधिकार तुमच्यावर दाखविता आला असता,

7तरीही आम्ही तुमच्यामध्ये आई जशी प्रेमाने तिच्या
मुलाला स्वत:चे दूध पाजते आणि काळजी घेते, तसे आम्ही
तुमच्यात सौम्य होतो.* 8कारण आम्हाला तुमच्याविषयी
इतके प्रेम वाटले की, आम्ही तुमच्याबरोबर देवाकडून येणारी सुवार्ताच नव्हे तर आमचे स्वत:चे जीवनसुद्धा देण्यास तयार होतो. याचे कारण म्हणजे, तुम्ही आमच्यासाठी प्रिय
झाला होता. 9बंधूंनो, आम्ही देवाकडून आलेली सुवार्ता
सांगत असताना, तुम्हाला आठवत असेल की आम्ही रात्रंदिवस किती कष्ट केले. आमचे कष्ट आणि श्रम तुम्ही जाणता ते यासाठी केले की, तुम्हा कोणावरही भार
पडू नये. 10तुम्ही साक्षी आहात आणि देवसुद्धा साक्षी आहे
की, आम्ही किती धार्मिकतेने, न्यायाने आणि निर्दोष रीतीने
तुम्हा विश्वासणाऱ्यांबरोबर वागलो. 11आणि तुम्हाला हे
चांगले माहीत आहे की, जसा पिता आपल्या मुलांना वागवितो तसे आम्ही तुम्हातील प्रत्येकाला वागविले आहे.
12अशा प्रकारे आम्ही तुम्हांला उत्तेजन दिले, सांत्वन केले.
आणि तुम्हांला साक्ष दिली की, देवाला आवडेल अशा प्रकारे वागा. जो त्याच्या राज्यात व गौरवात तुम्हाला बोलावितो.

13आणि, या कारणासाठी आम्हीसुद्धा देवाचे सातत्याने
आभार मानतो, कारण जेव्हा तुम्ही आमच्याकडून देवाचा

---

**आम्ही ... होतो** पुष्कळ जुन्या प्रतीत “आम्ही तुमच्यामते लहान बालके असे झालो.” असे लिहिले आहे.

संदेश ऐकला, तेव्हा तुम्ही तो मनुष्याकडून आलेला म्हणून स्वीकारला नाही, तर देवापासून आलेला जसा खरा होता तसाच स्वीकारला. देवाचा संदेश, जो तुम्हा विश्वास णाऱ्यांच्यामध्ये सुद्धा कार्य करीत आहे.
14कारण बंधूनो, तुम्ही येशूमध्ये देवाच्या ज्या मंडळ्या यहूदीयात आहेत त्याचे अनुकरण करणारे झाला आहात, कारण त्यांनी यहूद्यांच्या हातून जसे दुःख सोसले, तसेच तुम्ही तुमच्या देशबांधवांकडून दुःख सोसले.
15त्यांनी प्रभु येशूला आणि संदेष्ट्यांना मारले, त्यांनी आम्हांला बाहेर हाकलून लावले, ते देवाला संतोष देत नाहीत आणि ते सर्व लोकांच्या विरुद्ध आहेत.
16यहूदीतर लोकांचे तारण होण्यासाठी आम्ही त्यांच्याशी बोलायला हवे, परंतु ते आम्हांला मना करून एक प्रकारे पापच करीत आहेत. ते या पापाद्वारे जे ते नेहमी करीत आले आहेत आपल्या पापाचे माप भरत आले आहेत. आणि आता शेवटी आणि पूर्णतेने देवाचा क्रोध त्यांच्यावर ओढवला आहे.

## पौलाची त्यांना पुन्हा भेटण्याची इच्छा

17बंधूंनो, आमच्यासाठी, आम्ही तुमच्यापासून थोड्या वेळासाठी वेगळे झालो होतो. आम्ही शरीराने वेगळे झालो होतो, विचाराने नाही आणि आम्ही तुम्हाला भेटण्यासाठी फार अधीर झालो होतो. आणि तुम्हाला भेटण्याची फार इच्छा होती.
18होय, तुमची भेट घेण्याचा खरोखर आम्ही प्रयत्न केला होता. खरोखर मी पौलाने एकदा दोनदा प्रयत्न केला परंतु सैतानाने असे करण्यापासून आम्हाला परावृत्त केले.
19शेवटी, जेव्हा आपला प्रभु येशू दुसऱ्यांदा येईल, तेव्हा त्याच्यासमोर उभे राहू तेव्हा आमची आशा, किंवा आनंद किंवा मुकुट काय असेल, ज्याचा आम्हांला अभिमान वाटेल? ते तुम्हीच नाही का?
20होय, तुम्ही आमचा गौरव व आनंद आहात!

3 म्हणून, आम्हाला अधिक वाट पाहणे शक्य नसल्याने, आम्ही अथेन्स येथेच राहण्याचे ठरविले.
2आणि आम्ही तीमथ्याला पाठविले. जो आमचा भाऊ आणि देवाच्या कामाकरीता ख्रिस्ताच्या सुवार्तेची घोषणा करण्याकरीता सहकारी असा आहे, आम्ही त्याला तुम्हाला दृढ करण्यासाठी आणि तुमच्याविषयीच्या विश्वासात तुम्हाला उत्तेजन देण्यासाठी पाठविले आहे.
3यासाठी की, सध्या होणाऱ्या छळामुळे तुम्ही कोणी अस्वस्थ होऊ नये. कारण तुम्हाला स्वतःलाच माहीत आहे की, यासाठीच आमची दैवी नेमणूक झाली आहे.
4खरे तर जेव्हा आम्ही तुमच्याबरोबर होतो तेव्हा आम्ही तुम्हांला अगोदरपासूनच सातत्याने सांगत होतो की, आपला छळ होणार आहे आणि तुम्हांला माहीत आहे की, नेमके तसेच घडले आहे.
5म्हणून मी अधिक काळ वाट पाहू शकत नसल्याने तुमच्या विश्वासाविषयी माहिती करून घेण्याविषयी तीमथ्याला पाठविले. कारण मोहात टाकणाऱ्याने तुम्हाला मोहात टाकले असेल आणि आमचे श्रम व्यर्थ गेले असतील अशी मला भीति वाटत होती.

6पण तीमथ्य आताच तुमच्याकडून परत आला आहे. आणि त्याने आम्हांला तुमचा विश्वास व प्रीति याविषयी चांगली बातमी सांगितली आहे. त्याने आम्हाला सांगितले की, तुम्ही नेहमीच आमच्याविषयीच्या चांगल्या आठवणी काढता आणि ज्याप्रमाणे आम्ही तुम्हांला भेटण्यासाठी आतुर झालो आहोत, तसे तुम्हीही झाला आहात.
7म्हणून आमच्या सर्व अडचणीत व त्रासात बंधूंनो, तुमच्याविषयी आम्ही उत्तेजित झालो याला कारण म्हणजे तुमचा विश्वास.
8होय आम्हाला माहीत आहे तुम्ही प्रभूमध्ये भक्कमपणे उभे आहात आणि ही गोष्ट आमच्यासाठी जीवनदायी श्वास आहे.
9तुमच्यामुळे आमच्या देवासमक्ष ज्या सर्व आनंदाचा अनुभव आम्ही घेत आहोत त्याबद्दलचे देवाकडे तुमच्यासाठी आम्ही पुरेसे आभार कसे मानायचे?
10दिवस आणि रात्र आम्ही कळकळीने प्रार्थना करीत आहोत की, आम्हाला तुमची व्यक्तिशः भेट घेणे शक्य व्हावे आणि अजुनही तुमच्या विश्वासात जी उणीव आहे ती पुरवावी.

11आता देव स्वतः आमचा पिता आहे आणि आमचा प्रभु येशू ख्रिस्त तो आम्हांला तुमच्याकडे येण्याचा मार्ग दाखवो.
12प्रभु करो आणि तुम्हाला प्रीतीत वाढवो. आणि भरून टाको. जसे आम्ही तुम्हावरील प्रेमाने भरभरून वाहत आहोत तसे तुम्हीही एकमेकासाठी व सर्वांसाठी प्रीतीने भरभरून वाहावे.
13यासाठी की, जेव्हा आमचा प्रभु येशू त्याच्या पवित्र जनांसह येतो तेव्हा तो अशा प्रकारे तुमची अंतःकरणे बळकट करो आणि त्यांना पवित्रतेने निर्दोष करो.

## देवाला संतोषविणारे जीवन

4 बंधूंनो, मला आता तुम्हाला काही इतर गोष्टींविषयी सांगायचे आहे: प्रभु येशूचे अनुयायी या नात्याने आम्ही तुम्हाला विनंति करतो व बोध करतो की, देवाला कसे संतोषवायचे याचे शिक्षण तुम्हांला आमच्याकडून जसे मिळाले, तसे तुम्ही खरोखरच जगत आहात, आणि तुम्ही ते जास्तीत जास्त करा.
2कारण तुम्हांला हे माहीत आहे की, प्रभु येशूच्या अधिकाराने कोणत्या आज्ञा आम्ही तुम्हांस दिल्या होत्या.
3आणि हेच देवाला पाहिजे आहे. तुम्ही पवित्र असावे ही त्याची इच्छा आहे. तुम्ही जारकर्मापासून दूर असावे ही त्याची इच्छा आहे.
4त्याची अशी इच्छा आहे की, तुम्हातील प्रत्येकाने स्वतःच्या शरीरावर ताबा मिळविण्यास शिकावे.*
5आणि ज्यांना देव माहीत नाही, ज्यांना देवाची ओळख नाही त्या विदेशी लोकांप्रमाणे कामवासनेने नव्हे.
6त्याची हीसुद्धा इच्छा आहे की, तुम्ही प्रत्येकाने आपआपल्या बंधूचा याबाबतीत गैरफायदा घेऊ नये. कारण जसा आम्ही पूर्वी इशारा

---

**तुम्हातील ... शिकावे** याचा अर्थ असासुद्धा होऊ शकतो की, 'आपल्या स्वतःच्या पत्नीबरोबर कसे राहायचे ते शिकावे.'

देऊन सांगितले होते की, प्रभु या सर्व गोष्टींचा सूड घेणारा
आहे. 7कारण देवाने आम्हाला अमंगळ जीवनासाठी नव्हे,
तर शुद्ध जीवनासाठी बोलाविले होते. 8म्हणून जो कोणी
हे शिक्षण नाकारतो, तो मनुष्याला नव्हे तर पवित्र आत्मा
देणाऱ्या देवाला नाकारतो.

9आता ख्रिस्तातील तुमच्या भाऊ बहिणीच्या प्रीतीविषयी
आम्ही तुम्हाला लिहिण्याची गरज आहे असे नाही. कारण
एकमेकावर प्रीति करावी असे देवानेच तुम्हांला शिकविले
आहे. 10आणि हे खरे पाहता, जे तुम्ही तुमच्या सर्व बंधूंबरोबर
सर्व मासेदोनियाभर प्रीती करीत आहात. परंतु बंधूंनो,
आम्ही तुम्हांस कळकळीने सांगतो की ती विपुलतेने करा.

11आम्ही तुम्हांला आज्ञा केल्याप्रमाणे शांततापूर्ण जीवन
जगण्याची, आपले काम आपण करण्याची, आणि आपल्या
स्वत:च्या हातांनी काम करण्याची इच्छा करा. 12यासाठी
की बाहेरचे लोक तुम्ही ज्या प्रकारे जगता ते पाहून
तुमचा आदर करतील आणि यासाठी की, तुमच्या
गरजांसाठी इतर कोणावरही अवलंबून राहावे लागू नये.

## प्रभूचे येणे

13बंधूंनो, तुम्हाला हे माहीत असावे अशी माझी इच्छा
आहे, जे मेलेले आहेत, अशांसाठी इतरांसारखे दु:ख करू
नये. कारण इतरांना आशा नाही. 14कारण जर आम्ही
विश्वास ठेवतो की येशू मेला होता आणि नंतर मरणातून
पुन्हा जिवंत झाला, तसेच देवही येशूबरोबर, त्याच्यावर
(येशूवर) विश्वास ठेवून मेलेले आहेत, त्यांना त्याप्रमाणे
परत जिवंत करील. 15आता आम्ही जे तुम्हांला सांगत
आहोत तो एक संदेश आहे. जे आम्ही जिवंत आहोत, ते
आम्ही प्रभूच्या दुसऱ्या येण्याच्या वेळेपर्यंत तग धरू. जे
मेलेले आहेत त्यांच्या अगोदर आम्ही निश्चितच जाणार
नाही. 16कारण, जेव्हा मोठ्याने मुख्य देवदूताच्या आवाजात
आणि देवाच्या कर्ण्याच्या आवाजात आज्ञा दिली जाईल,
तेव्हा, प्रभु स्वत: स्वर्गातून खाली उतरेल आणि जे ख्रिस्तात
मेले होते ते प्रथम उठतील. 17मग आपल्यापैकी जे जिवंत
असतील ते प्रभूला अंतराळात भेटण्यासाठी त्यांच्याबरोबर
ढगात वर घेतले जातील. आणि अशा प्रकारे आम्ही
प्रभूबरोबर सदासर्वकाळ राहू. 18म्हणून या शब्दांनी
एकमेकाचे समाधान करा.

## प्रभूच्या येण्यासाठी तयार राहा

5 बंधूंनो, वेळ आणि तारीखवार मी तुम्हांला लिहिण्याची
गरज नाही. 2कारण तुम्ही स्वत:च हे चांगल्या प्रकारे
जाणता की, प्रभूच्या परत येण्याचा दिवस येईल. तो जणू
काय रात्रीचा चोर जसा येतो तसा येईल. 3जेव्हा लोक
म्हणतात, "सगळीकडे शांतता व सुरक्षितता आहे." तेव्हा
त्यांच्यावर अचानक विनाश ओढवेल, ज्याप्रमाणे गर्भवती
स्त्रीला अचानक वेदना होतात व मग ते सुटू शकणार
नाहीत! 4परंतु बंधूंनो, त्या दिवसाने चोराप्रमाणे अचानक
येऊन आपल्याला गाठून आश्चर्यात टाकावे अशा प्रकारे
आपण अंधारात नाही. 5कारण तुम्ही सर्वजण प्रकाशाचे
पुत्र आहात व दिवसाचे पुत्र आहा, आम्ही अंधाराचे किंवा
रात्रीचे नाही. 6म्हणून आपण इतरांसारखे झोपू नये. उलट
आपण सावध राहू व आमच्या स्वत:वर ताबा ठेवण्याचा
प्रयत्न करू. 7कारण जे झोपतात ते रात्री झोपतात व जे
दारू पितात ते रात्री दारू पितात, 8परंतु आपण दिवसाचे
असल्याने स्वत:वर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करू या. आपण
विश्वास आणि प्रीतीचे छातीला उरस्त्राण घालू या. आणि
आमचे शिरस्त्राण म्हणून तारणाची आशा ठेवू या. 9कारण
देवाने आम्हाला त्याचा क्रोध सहन करण्यासाठी निवडले
नाही, तर आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे तारण मिळावे
म्हणून निवडले आहे. 10तो आमच्यासाठी मरण पावला
यासाठी की, आम्ही मेलेले असू किंवा जिवंत असू, जेव्हा
येशू येईल तेव्हा आम्हाला त्याबरोबर एकत्र राहता यावे.
11म्हणून एकमेकांना उत्तेजन द्या. आणि जसे आता तुम्ही
करीत आहात तसे आध्यात्मिक रीतीने एकमेकांना पूर्ण
मनाने बळकट करा.

## शेवटच्या सूचना आणि सलाम

12परंतु बंधूंनो, आम्ही तुम्हांला विनंति करतो, की जे
तुम्हामध्ये श्रम व प्रभूमध्ये मार्गदर्शन करतात आणि शिक्षण
देतात, त्यांना तुम्ही मान द्या. 13आम्ही तुम्हाला अशी
विनंति करतो की, त्यांनी तुमच्याबरोबर केलेल्या कामामुळे
त्यांना प्रेमाने मोठा मान द्या. एकमेकांबरोबर शांतीने राहा.
14बंधूंनो, आम्ही तुम्हाला आग्रह करतो की, "आळशी
लोकांना ताकीद द्या." भित्र्यांना उत्तेजन द्या आणि अशक्तांना
मदत करा. व सर्व लोकांबरोबर सहनशीलतेने राहा.
15कोणीही वाईटाची फेड वाईटाने करू नये म्हणून लक्षात
ठेवा. परंतु नेहमी एकमेकांचे आणि सर्व लोकांचे चांगले
करण्याचा प्रयत्न करा. 16सर्वदा आनंद करा. 17नेहमी
प्रार्थना करीत राहा. 18प्रत्येक परिस्थितीत देवाचे उपकार
माना. 19आत्म्याला विझविण्याचा प्रयत्न करू नका.
20संदेष्ट्यांच्या संदेशाचा उपहास करू नका. 21पण हे
देवाकडून आले आहेत याची परीक्षा करून खात्री करून
घेण्याची सवय करा. जे चांगले ते धरून ठेवा. 22दुष्टाईच्या
प्रत्येक प्रकारापासून दूर राहा. 23देव स्वत: जो शांतीचा
उगम आहे. तो तुम्हांला त्याच्यासाठी पूर्णपणे समर्पित करो
आणि तुमचे सर्व मनुष्यपण म्हणजे तुमचा आत्मा, जीव
आणि शरीर प्रभु येशू ख्रिस्ताच्या आगमनाच्या वेळी पूर्णपणे
निर्दोष राखो. 24देव जो तुम्हाला बोलावितो तो विश्वासू
आहे आणि खरोखरच तो तसे करील.

25बंधूंनो, कृपा करून आमच्यासाठीसुद्धा प्रार्थना करा.
26पवित्र चुंबनाने सर्व बंधूंना सलाम करा. 27मी तुम्हांला
प्रभूची शपथ घ्यावयाला सांगतो की, हे पत्र सर्व बंधूना
वाचून दाखविण्यात यावे. 28आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची
कृपा तुम्हा सर्वांबरोबर असो.

# पौलाचे थेस्सलनीकाकरांस दुसरे पत्र

1 पौल सिल्वान आणि तीमथ्य याजकडून, थेस्सलनीका येथील मंडळीला जो देव आपला पिता आणि प्रभु येशू ख्रिस्ताची आहे त्यांना

2देवपिता आणि प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा आणि शांति तुम्हांबरोबर असो.

3बंधूंनो, आम्ही नेहमीच तुमच्यासाठी देवाचे आभार मानतो व तसे करणे योग्य आहे. कारण तुमचा विश्वास अद्भुत रीतीने वाढत आहे आणि जे प्रेम तुम्हांतील प्रत्येकाचे एकमेकांवर आहे ते वाढत आहे. 4म्हणून आम्हाला स्वत: देवाच्या मंडळ्यांमध्ये सर्व छळात व तुम्ही सहन करीत असलेले दु:ख, त्याविषयीची तुमची सहनशीलता सोशिकपणा आणि विश्वासाचा अभिमान वाटतो.

### देवाच्या न्यायाविषयी पौल सांगतो

5देव त्याच्या न्याय करण्यामध्ये योग्य आहे हा त्याचा पुरावा आहे. त्याचा हेतू हा आहे की ज्यासाठी आता तुम्हांला त्रास सोसावा लागत आहे, त्या देवाच्या राज्यात प्रवेश करण्यास तुम्हांला पात्र ठरविले जावे. 6खरोखर जे तुम्हांला दु:ख देतात त्याची दु:खाने परतफेड करणे हे देवाच्या दृष्टीने त्याच्यासाठी योग्य आहे. 7आणि आमच्याबरोबर जे तुम्ही दु:ख भोगीत आहात त्यांना आमच्याबरोबर विश्रांती देण्यासाठी, प्रभु येशू प्रकट होताना तो स्वर्गातून आपले सामर्थ्यवान दूत आणि अग्निज्वालेसह येईल. 8आणि ज्यांना देव माहीत नाही आणि आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेसाठी आवश्यक त्या आज्ञा पाळीत नाहीत त्यांना देव शिक्षा करील. 9ते अनंतकाळचा नाश असलेला असा शिक्षेचा दंड भरतील. ते प्रभु येशूच्या समक्षतेतून आणि वैभवी सामर्थ्यातून वगळले जातील. 10त्या दिवशी जेव्हा तो त्याच्या पवित्र लोकांत गौरविला जाण्यासाठी सर्व विश्वासणाऱ्याकडून आश्चर्यचकित केले जाण्यासाठी येईल तेव्हा त्यात तुमचाही समावेश आहे कारण त्याविषयी आम्ही सांगितलेल्या साक्षीवर तुम्ही विश्वास ठेवला.

11या कारणासाठी आम्ही नेहमी तुमच्यासाठी प्रार्थना करतो व विनंति करतो की, आमच्या देवाने त्याच्या पाचारणासाठी योग्य असे तुम्हाला गणावे तुमच्या विश्वासापासून निर्माण होणारे प्रत्येक काम व चांगुलपणाचा निश्चय समर्थपणे पूर्ण करावा. 12यासाठी की आमचा देव आणि प्रभु येशूच्या कृपेने आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताचे नाव तुमच्यामध्ये आणि तुम्ही त्याच्यामध्ये गौरविले जावे.

### वाईट गोष्टी घडतील

2 आता बंधूंनो, आम्ही तुम्हांला विनंति करतो, ती प्रभु येशू ख्रिस्ताच्या येण्याविषयी, आणि त्याच्याबरोबर आमच्या एकत्र भेटण्याविषयी. 2आम्ही तुम्हांला विनंती करतो की, तुम्ही तुमचे मन पूर्णपणे अस्वस्थ होऊ देऊ नका किंवा सतत विचलित होऊ नका, जर तुम्ही ऐकले की, प्रभूचा दिवस आला आहे, काही लोक अशा प्रकारचे भविष्य वर्तवतील. किंवा काही लोक शिकवणुकीद्वारे किंवा काही लोक आम्हांकडून पत्र लिहिले आहे असे भासवून असा दावा करतील. 3तर कोणीही तुम्हाला कोणत्याही प्रकारे फसवू नये. म्हणून सावध असा. मी असे म्हणतो कारण पहिल्यांदा मोठी बंडखोरी झाल्याशिवाय प्रभूचा दिवस येणार नाही. आणि जो नाशासाठी नेमला आहे, तो नियम मोडणारा प्रकट होईल. 4तो विरोध करील आणि स्वत:ला सर्व गोष्टींच्या वर उच्च करील. त्याला देव किंवा उपासना करण्याची कोणतीही एखादी वस्तु असे म्हणतील. येथपर्यंत की तो देवाच्या मंदिरात जाईल आणि सिंहासनावर बसेल आणि तो स्वत:ला देव असे जाहीर करील.

5मी तुमच्याबरोबरच होतो तेव्हा तुम्हाला मी ह्या गोष्टींबद्दल सांगत होतो. ते तुम्हाला आठवत नाही काय? 6आणि म्हणून अशा प्रकारे त्याला कशाचा प्रतिबंध होत आहे हे तुम्हांला माहीत आहे. यासाठी तो योग्य वेळी प्रकट व्हावा. 7मी हे म्हणतो कारण दुष्टपणाची रहस्यमय शक्ति आधीपासूनच जगात काम करीत आहे. पण असा एक आहे जो दुष्टाची रहस्यमय शक्ति थोपवीत आहे. आणि जोपर्यंत ती शक्ति मार्गातून काढून बाजूला टाकली जात नाही, तोपर्यंत तो ती शक्ति थोपवून धरील 8आणि मग दुष्ट प्रकट होईल. प्रभु येशू त्याला आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील आणि प्रभु जेव्हा त्याच्या येण्याच्या वेळी मोठ्या वैभवाने प्रकट होईल तेव्हा तो त्याचा नाश करील. 9दुष्टाचे येणे सैतानाच्या सामर्थ्याने होईल आणि त्याच्या येण्याबरोबर खोटे चमत्कार, चिन्हे आणि अद्भुत गोष्टी घडतील.

10आणि जे नरकाच्या वाटेवर आहेत त्यांच्याविरुद्ध
प्रत्येक प्रकारची दुष्टता फसवणूक व्हावी म्हणून तो
आणील, कारण त्यांनी सत्यावर प्रेम करण्याचे नाकारले.
यासाठी की त्यांचे तारण होणे शक्य व्हावे. 11आणि या
कारणासाठी देवाने त्यांना भ्रम पडेल असे केले. यासाठी
की, जे खोटे आहे त्यावर त्यांनी विश्वास ठेवावा. 12आणि
त्यांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही तर दुष्टतेत आनंद
मानला, त्यांना शिक्षा मिळावी.

## तारणासाठी तुमची निवड झाली आहे

13पण आम्ही देवाकडे तुमच्याविषयी नेहमीच आभार
मानले पाहिजेत. ज्यांच्यावर देव प्रेम करतो असे तुम्ही
आमचे बंधु आहात. कारण आत्म्याच्या द्वारे शुद्धीकरण
आणि सत्यावर विश्वास ठेवून तारण व्हावे म्हणून देवाने
तुम्हाला प्रारंभापासून निवडले आहे. 14आणि या
तारणासाठीच,आम्ही सांगितलेल्या सुवार्तेद्वारेच देवाने
तुम्हांला बोलाविले. यासाठी की, आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताचे
जे गौरव ते तुम्हांलाही मिळावे 15म्हणून बंधूंनो, दृढ उभे
राहा. आणि आमच्या तोंडच्या वचनाद्वारे किंवा आमच्या
पत्राद्वारे जी परंपरा आम्ही तुम्हाला शिकविली आहे तिला
धरून उभे राहा. 16आता प्रभु येशू ख्रिस्त स्वत: आणि
देव आमचा पिता ज्याने आम्हावर प्रेम केले आणि ज्याने
आपल्या कृपेमध्ये आम्हाला अनंतकाळचे समाधान आणि
चांगली आशा दिली. 17ते तुमच्या अंत:करणाला समाधान
देवोत व तुम्ही ज्या प्रत्येक चांगल्या गोष्टी करता अथवा
सांगता त्यामध्ये तुम्हाला बळकट करो.

## आमच्यासाठी प्रार्थना करा

3 आम्हाला आणखी काही गोष्टी तुम्हाला सांगावयाच्या
आहेत: बंधूंनो, कृपा करून आमच्यासाठी प्रार्थना
करा. यासाठी की जसा तुमच्यामध्ये झाला तसा प्रभूच्या
संदेशाचा प्रसार लवकर व्हावा आणि ते गौरविले जावे.
2आणि प्रार्थना करा की, हेकट व दुष्ट माणसांपासून
आमची सुटका व्हावी कारण सर्वच लोकांचा प्रभूवर
विश्वास नाही. 3पण प्रभु विश्वासू आहे. तो तुम्हांला बळकट
करील व दुष्टांपासून तुमचे रक्षण करील. 4प्रभूमध्ये
आम्हांला तुमच्याविषयी विश्वास आहे आणि खात्री आहे
की, जे आम्ही तुम्हाला करण्यासाठी सांगत आहोत ते
तुम्ही करीत आहात व ते पुढे करीतच राहाल. 5प्रभु
तुमची अंत:करणे देवाच्या प्रीतीत आणि ख्रिस्ताच्या सोशिक
सहनशीलतेकडे नेवो.

## कार्य करण्यासाठी अटी

6आता, बंधूंनो, आम्ही तुम्हांला आमच्या प्रभु येशू
ख्रिस्ताच्या नावात आज्ञा करतो की, जो कोणी बंधु, ज्या
परंपरा त्यांना आमच्याकडून मिळाल्या त्या परंपरांप्रमाणे
चालत नाही, तर आळशी जीवन जगत आहे तर
त्याच्यापासून दूर राहा. 7मी तुम्हांला हे सांगतो कारण
तुम्ही स्वत: जाणता की तुम्ही आमचे अनुकरण कसे
करायचे, कारण आम्ही तुमच्यामध्ये आळशी नव्हतो.
8किंवा कोणाकडूनही आम्ही फुकटची भाकर खाल्ली
नाही. उलट, रात्रंदिवस आम्ही काबाडकष्ट केले यासाठी
की तुमच्यावर आम्ही ओझे होऊ नये. 9याचा अर्थ असा
नाही की, आम्हांला तुमच्याकडून मदत मागण्याचा
अधिकार नाही, पण आम्ही आमच्या गरजा भागविण्यासाठी
काम केले ते यासाठी की, आम्ही तुमच्यासमोर उदाहरण
ठेवावे व तुम्ही आमचे अनुकरण करावे. 10कारण आम्ही
जेव्हा तुमच्याबरोबर होतो, तेव्हा आम्ही तुम्हांला हा नियम
दिला: “जर एखाद्याला काम करायचे नसेल, तर त्याने
खाऊ नये.”

11आम्ही हे सांगतो कारण आम्ही ऐकतो की तुमच्यापैकी
काही जण आळशीपणाचे जीवन जगत आहेत. ते काहीच
काम करीत नाहीत. उलट कोणत्याही दिशाहीन
असल्यासारखे इकडे तिकडे फिरत असतात. (इतरांच्या
कामात दखल देतात) 12आम्ही अशा लोकांना आज्ञा
करतो व प्रभु येशू ख्रिस्तामध्ये बोध करतो की, त्यांनी
शांतीने काम करावे आणि स्वत:ची भाकर स्वत:च मिळवून
खावी. 13पण बंधूंनो, तुम्ही तुमच्यासाठी चांगले करीत
असता थकू नका.

14जर कोणी या पत्राद्वारे आमच्या सूचनांचे पालन करीत
नाही, तर तो कोण आहे हे लक्षात ठेवा व त्याच्याबरोबर
राहू नका, यासाठी की त्याला लाज वाटावी. 15पण त्याला
शत्रू समजू नका, परंतु धाक द्या, जसे त्याला तुमचा
भाऊ समजा.

## शेवटचे शब्द

16आता प्रभु स्वत: जो शांतीचा उगम आहे. तो तुम्हाला
सर्वकाळ आणि सर्व प्रकारे शांति देवो. प्रभु तुम्हा सर्वांबरोबर
असो. 17मी पौल माझ्या स्वत:च्या हातांनी हा सलाम
लिहितो. माझ्या प्रत्येक पत्राची ही खूण आहे. ह्या प्रकारे
मी प्रत्येक पत्र लिहितो व अशा प्रकारे लिहितो.

18आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुम्हा सर्वांबरोबर
असो.

# पौलाचे तीमथ्थाला पहिले पत्र

1 आपला तारणारा देव आणि आपली आशा ख्रिस्त
येशू यांच्या आज्ञेने ख्रिस्त येशूचा प्रेषित पौल याजकडून
2विश्वासातील माझा खरा पुत्र तीमथ्य याला: देव जो
पिता आणि आपला ख्रिस्त येशू, आमचा प्रभु याच्याकडून
तुला कृपा, दया आणि शांति लाभो.

### खोट्या शिक्षणाविरुद्ध इशारा

3मी मासेदोनियाला जात असता तुला कळकळीने विनंति
केल्याप्रमाणे तू इफिस येथे राहावेस असे माझे म्हणणे
आहे. यासाठी की, काही ठराविक लोकांना खोटे शिक्षण
देऊ नका अशी तुला त्यांना आज्ञा करता यावी. किंवा
4कथा–कहाण्यांच्या आहारी जाऊ नका आणि न संपणाऱ्या
वंशावळ्या याकडे लक्ष देऊ नका असे तू त्यांना सांगावेस.
कारण त्यामुळे भांडण वाढते आणि विश्वासाने देवाची
योजना जी पूर्ण होते ती या गोष्टीमुळे पूर्ण होत नाही.
5आणि या आज्ञेचे उद्दिष्ट प्रीति आहे, जी शुद्ध
अंत:करणातून, चांगल्या सदसदविवेकबुद्धीतून व
प्रामाणिक विश्वासातून उगम पावते. 6काहींनी पतनामुळे
या गोष्टीकडून आपले लक्ष दुसरीकडे लावले आहे व ते
व्यर्थ बडबडीकडे वळले आहेत. 7त्यांना नियमशास्त्राचे
शिक्षक व्हायचे होते, पण ते ज्या गोष्टीविषयी मोठ्या
आत्मविश्वासाने बोलतात व सांगतात त्या त्यांनाच कळत
नाहीत.

8आता आम्हाला हे माहीत आहे की, नियमशास्त्र
खरोखरच चांगले आहे. जर कोणी त्याचा चांगला वापर
करतो. 9म्हणजे हे जाणून घेऊन की, नियमशास्त्र हे
नीतिमान लोकांसाठी केलेले नाही तर नियमशास्त्राचा
भंग करणाऱ्या आणि बंडखोर लोकांसाठी, तिरस्करणीय
लोकांसाठी, पाप्यांसाठी, भक्तिहीन आणि अधर्मी
लोकांसाठी, वडिलांना ठार मारणाऱ्या, आईला ठार
मारणाऱ्यासाठी,

10खुनी लोकांसाठी, जारकर्मी, समलिंगसंभोगी, इतर
मनुष्यांना फसविणारे, खोटारडे, खोटी शपथ घेणारे
यांच्यासाठी आहे. इतर जे दुसरे सगळे करतात ते चांगल्या
शिक्षणाविरुद्ध आहेत, 11गौरवी सुवार्ता जी धन्यवादित
देवाकडून येते आणि जी माझ्यावर सोपविली आहे, तिला
हे अनुसरून आहे.

### देवाच्या दयेबद्दल उपकार

12जो मला सामर्थ्य देतो त्या ख्रिस्त येशू आपल्या प्रभूचे
मी उपकार मानतो कारण त्याने मला विश्वासू
समजले आणि त्याने मला त्याची सेवा करण्यासाठी नियुक्त
केले. 13जरी मी पूर्वी निंदा करणारा, मनस्ताप देणारा
आणि हिंसक होतो, तरी माझ्यावर दया दाखविण्यात आली.
तोपर्यंत मी विश्वासणारा नव्हतो म्हणून अज्ञानामुळे मी
तसा वागलो. 14परंतु विश्वास आणि दया जी ख्रिस्त येशूमध्ये
सापडते ती आपल्या प्रभूच्या कृपेने ओसंडून वाहिली.

15एक विश्वसनीय वचन आहे जे स्वीकारावयास पूर्णपणे
योग्य आहे. येशू ख्रिस्त पाप्यांना तारावयास या जगात
आला. मी त्या पाप्यातील पहिला आहे. 16परंतु केवळ
याच हेतूने माझ्यावर दया दाखविण्यात आली. यासाठी की
माझ्यासारख्या अत्यंत वाईट पाप्याच्या उदाहरणावरून,
पुढील काळात जे त्याजवर विश्वास ठेवतील त्यांना
अनंतकाळचे जीवन मिळावे. 17आता अनंतकाळचा राजा
जो अविनाशी व अदृश्य आहे अशा एकाच देवाला महिमा
आणि गौरव अनंतकाळासाठी असो. आमेन.

18तिमथ्या, माझ्या मुला, मी तुला तुझ्याविषयी पूर्वीच
सांगण्यात आलेल्या संदेशानुसार ही आज्ञा सोपवीत आहे.
यासाठी की सुयुद्ध करण्यात तिचा उपयोग करता यावा.
19तुम्हांला विश्वास आणि चांगला विवेक असावा.
कित्येकांनी चांगला विवेक नाकारून विश्वास
तारवाप्रमाणे उद्ध्वस्त केला आहे. 20त्यात हूमनाय आणि
आलेक्सांद्र आहेत त्यांना मी सैतानाच्या स्वाधीन केले
आहे यासाठी की, देवाविरुद्ध न बोलण्याविषयी त्यांनी
शिकावे.

### पुरुष आणि स्त्रियांसाठी काही नियम

2 सर्वांत प्रथम मी कळकळीने विनंति करतो की,
मागण्या, प्रार्थना, विनंत्या व आभारप्रदर्शन सर्व
माणसांच्या वतीने करावे. 2आणि विशेषत: राजांच्या वतीने
करावे आणि अधिकाऱ्याच्या वतीने करावे. प्रार्थना करा
की, आम्हांला स्थिर, शांत आणि देवाच्या पूर्ण भक्तीत
सन्मानाने जगता यावे. 3हे आपला तारणारा देव याच्या
दृष्टीने चांगले व स्वीकार करण्यास योग्य आहे, 4ज्याला
सर्व लोकांचे तारण व्हावे आणि त्यांना सत्य समजावे असे
वाटते. 5कारण फक्त एकच देव आहे. आणि देव व

मनुष्य यांच्यामध्ये एकच मध्यस्थ आहे: तो म्हणजे ख्रिस्त येशू जो स्वत: मनुष्य होता. 6सर्व लोकांच्या पापांची खंडणी म्हणून त्याने स्वत:ला दिले. अशा प्रकारे देवाच्या योजनेविषयी त्याने योग्य वेळी साक्ष दिली. 7आणि या साक्षीचा प्रसार करण्यासाठी मला घोषणा करणारा आणि प्रेषित (मी खरे सांगतो, खोटे सांगत नाही!) असा विदेशी लोकांमध्ये विश्वास आणि सत्याचा शिक्षक म्हणून नेमण्यात आले.

8म्हणून प्रत्येक ठिकाणी पुरुषांनी प्रार्थना करावी अशी माझी इच्छा आहे. ते प्रार्थना करीत असताना त्यांनी आपले हात उंचवावेत, जे देवाला पवित्र असे आहेत. व असे न रागावता व न भांडण करता करावे.

9त्याचप्रमाणे, माझी अशी इच्छा आहे की, स्त्रियांनी स्वत:ला साध्यासुध्या वेशाने, नम्रतेने, मर्यादेने, शोभित करावे. त्यांनी वेगव्व्या पद्धतीच्या केसरचना करू नयेत. तसेच सोने, किंवा मोती किंवा महाग कपडे वापरू नयेत. 10उलट देवासाठी समर्पित जीवन जगणाऱ्या स्त्रियांनी स्वत:ला चांगल्या कृत्यांनी सुशोभित करणे अगदी योग्य आहे.

11स्त्रीने शांतपणे, पूर्ण अधीनतेने शिकावे. 12मी स्त्रीला शिकविण्याची परवानगी देत नाही किंवा पुरुषावर अधिकार गाजवण्यास परवानगी देत नाही. त्याऐवजी तिने शांत राहावे. 13मी असे म्हणतो, कारण प्रथम आदाम निर्माण करण्यात आला. 14त्यानंतर हवा. आदाम फसविला गेला नाही तर स्त्री फसविली गेली. आणि ती पापात पडली. 15परंतु स्त्रिया जर विश्वास, प्रीती, पवित्रता व योग्य आत्मसंयमनात राहिल्या तर बालकाला जन्म देण्यामुळे त्यांचे तारण होईल.

## मंडळीतील पुढारी

3 हे सत्य वचन आहे: जर कोणी (मंडळीत) अध्यक्ष* (सर्वांगीण काळजीवाहक) होण्याची इच्छा धरतो तर तो चांगल्या कामाची इच्छा धरतो. 2आता अध्यक्षाने (सर्वांगीण काळजीवाहकाने) त्याचे जीवन लोकांनी टीका करू नये अशा रीतीने जगावे. त्याला एकच पत्नी असावी. 3तो मद्य पिणारा नसावा, तो हिंसक वृत्तीचा नसावा तर तो सभ्य, आत्मसंयमी, आदरणीय, व आदरातिथ्य करणारा असावा. तो शिकविण्यात प्रवीण असावा. 4तो पैशावर प्रेम करणारा नसावा. त्याने त्याच्या कुटुंबाचा चांगला पुढारी असावे आणि त्याने त्याची लेकरे त्याच्या आज्ञेत ठेवावीत. 5(जर एखाद्याला स्वत:च्या कुटुंबाची देखभाल करता येत नसेल तर तो देवाच्या मंडळीची काळजी कशी घेईल?) 6तो ह्या कार्यात नवशिका नसावा म्हणजे तो गर्वाने फुगून जाणार नाही. व सैतानाला जशी शिक्षा झाली तशी शिक्षा होऊन त्याचा अंत होणार नाही. 7आणखी म्हणजे बाहेरच्या लोकांमध्ये त्याचे चांगले नाव असावे. यासाठी की त्याच्यावर टीका होऊ नये. व त्याने सैतानाच्या जाळ्यात सापडू नये

## मंडळीत सेवाकार्य करणारे

8त्याचप्रमाणे, विशेष मदतनीस* आदरणीय असावेत, ते दुटप्पी नसावेत, ते विश्वसनीय असावेत. ते अति मद्यपान करणारे व दुतोंडे नसावेत आणि अनीतिने पैसे मिळवून श्रीमंत होण्याची त्यांना आवड नसावी. 9देवाने जे आम्हांला प्रकट केले आहे ते आमच्या विश्वासाचे सखोल सत्य त्यांनी स्वच्छ विवेकाने धरून ठेवावे. 10वडिलांप्रमाणे यांचीसुद्धा प्रथम परीक्षा व्हावी, मग जर त्यांच्या विरुद्ध असे आढळले नाही, तर त्यांनी मदतनीसाचे काम करावे. 11त्याचप्रमाणे,* (विशेष मदतनीस) स्त्रियांनीही आदरणीय असावे. त्या चुगलखोर नसाव्यात. तर सभ्य व प्रत्येक बाबतीत विश्वसनीय असाव्यात. 12जे खास मदतनीस आहेत त्यांना फक्त एकच पत्नी असावी. आणि त्यांनी त्यांच्या मुलांची व कुटुंबाची चांगल्या प्रकारे काळजी घ्यावी. 13कारण मदतनीस म्हणून जे चांगली सेवा करतात, ते त्यांच्यासाठी आदरणीय स्थान मिळवितात आणि ख्रिस्त येशूमध्ये त्यांच्या विश्वासात महान आत्मविश्वास मिळवितात.

## आपल्या जीवनाचे रहस्य

14मी तुझ्याकडे लवकरच येण्याची इच्छा धरून असलो तरी मी तुला या गोष्टी लिहीत आहे. 15यासाठी की, जरी मला उशीर झाला तरी देवाच्या घरात म्हणजे जिवंत देवाच्या मंडळीत एखाद्या व्यक्तीने कसे वागावे हे तुला माहीत असावे. ती मंडळी सत्याचा खांब व पाया अशी आहे. 16आणि आपल्या सुभक्तीचे रहस्य निर्विवाद मोठे आहे.

तो मानवी शरीरात दिसला; आत्म्याने तो नीतिमान ठरविला गेला, देवदूतांनी त्याला पाहिले होते; राष्टांमध्ये तो गाजविला गेला. जगाने त्याच्यावर विश्वास ठेवला आणि स्वर्गामध्ये तो गौरवाने घेतला गेला.

---

**अध्यक्ष** शब्दश: मुकादम (देखरेख करणारा), बऱ्याच लोकांपैकी जे मंडळीचे नेतृत्व करतात, त्यांच्यापैकी एक. त्यांना पाळक (मेंढपाळ) ही म्हणतात. देवाच्या लोकांची काळजी घेण्याचे त्यांचे काम असते. (प्रे. कृ. 20:26).

**मदतनीस** शब्दश: डीकन्स हा ग्रीक शब्द आहे. त्याचा अर्थ सेवक असा आहे. या लोकांनी मंडळीत विशेष सेवा करावी म्हणून त्यांची नियुक्ती होत असे.

**त्याचप्रमाणे** या कदाचित मदतनीसांच्या पत्नीही असाव्यात. पण बहुधा त्या खास सेवेसाठी नियुक्त केलेल्या स्त्रिया असाव्यात.

## खोट्या शिक्षकांविरुद्ध इशारा

4 आत्मा स्पष्ट म्हणतो की, नंतरच्या काळात काही
जण विश्वास सोडतील, ते भविष्य सांगणारे आत्मे,
जे फसविणारे आहेत त्यांच्याकडे लक्ष देतील, 2आणि
भूतापासून येणाऱ्या शिक्षणाकडे आणि ढोंगी फसविणाऱ्यां
कडे लक्ष देतील. 3ते लोकांना लग्न करण्यास मना करतात
व काही अन्नपदार्थ टाळण्यासाठी सांगतात. जे विश्वासणारे
आहेत, व ज्यांना सत्य माहीत आहे अशांनी उपकार
मानून घेण्यासाठी देवाने ते निर्माण केले आहेत. 4कारण
देवाने केलेली प्रत्येक गोष्ट चांगली आहे व जर उपकार
मानून आम्ही घेतो तर कोणतीही गोष्ट नाकारू नये.
5कारण प्रत्येक वेळी ती देवाच्या शब्दाने आणि प्रार्थनेने
पवित्र केली जाते.

## ख्रिस्त येशूचा चांगला सेवक हो

6तेव्हा बंधु, जर तू या गोष्टी ख्रिस्ती बंधुभगिनींना
शिकविल्या, तर तू जो सत्यात व विश्वासात वाढलास व
चांगल्या शिक्षणाला अनुसरलास तो तू ख्रिस्त येशूचा चांगला
सेवक होशील. 7परंतु देवहीन गोष्टी, ज्या म्हाताऱ्या स्त्रियांचे
लक्षण आहे ते टाळ आणि स्वत:ला सतत देवाच्या भक्तीमध्ये
गुंतवण्याची सवय ठेव. 8कारण शारीरिक शिकवणुकीला
अल्प महत्त्व आहे पण देवाच्या सेवेला सर्व प्रकारे महत्त्व
आहे, कारण ते सध्याच्या जीवनाविषयी आणि भविष्यातील
जीवनाविषयी आशीर्वादाचे अभिवचन आहे. 9हे सत्य वचन
आहे जे सर्वथा स्वीकारावयास योग्य आहे. 10म्हणून आम्ही
जास्त काम करतो आणि धडपड करतो. कारण आम्ही,
जो सर्व लोकांचा व विशेषेकरून जे विश्वास ठेवतात,
अशा विश्वासणाऱ्यांचा विशेषकरून तारणारा आहे त्या
जिवंत देवावर आशा ठेवली आहे.
11आज्ञा कर आणि या गोष्टी शिकव. 12तू तरुण आहेस
म्हणून कोणी तुला तुच्छ मानू नये. त्याऐवजी,
विश्वासणाऱ्यांसाठी तू तुझ्या बोलण्याने, तुझ्या वागण्याने,
तुझ्या प्रेम दर्शविण्याने, तुझ्या असलेल्या विश्वासाने व
तुझ्या शुद्ध जीवनाने त्यांचा आदर्श हो. 13मी येईपर्यंत
लोकांमध्ये देवाचे वचन वाचण्यात, बोध करण्यात व
शिकविण्यात स्वत:ला वाहून घे. 14जेव्हा वडीलजनांनी
तुझ्यावर हात ठेवला त्यावेळी भविष्याच्या संदेशाचा परिणाम
म्हणून तुला मिळालेली देणगी जी तुझ्यामध्ये आहे, त्याविषयी
निष्काळजी राहू नको. 15या सर्व गोष्टींकडे पूर्ण लक्ष दे,
त्यात पूर्ण गढून जा. यासाठी की तुझी प्रगती सर्व लोकांना
दिसून यावी. 16आपणांकडे व आपल्या शिकवणुकीकडे
लक्ष दे. त्यामध्ये टिकून राहा. कारण असे केल्याने तू
स्वत:चे व जे तुझे ऐकतात, त्यांचे तारण करशील.

## इतर लोकांबरोबर राहण्याचे काही नियम

5 वडील माणसाला कठोरपणे बोलू नको, उलट
पित्याप्रमाणे त्याला बोध कर. 2तरुणांना भावासारखे,
वृद्ध स्त्रियांना आईसारखे, तरुण स्त्रियांना बहिणीसारखे
पूर्ण शुद्ध भावाने वागीव.
3ज्या विधवा खरोखरच निराधार आहेत त्यांची काळजी
घे. 4पण जर एखाद्या विधवेला मुले किंवा नातवंडे असतील
तर त्यांनी प्रथम आपल्या घरच्यांची काळजी घेऊन आपला
धर्म प्रत्यक्षात आणावा आणि अशा प्रकारे आपल्या
आईवडिलांची किंवा आजीआजोबांची परतफेड करावी.
कारण हे देवाला मान्य आहे. 5जी स्त्री खरी विधवा आहे,
व तिची काळजी घेण्यासाठी कोणी नाही तिची आशा
देवावर असते व ती रात्रंदिवस देवाकडे प्रार्थना व विनंत्या
करीत असते. 6पण जी विधवा चैनीत राहते, ती जरी
जिवंत असेल तरी ती खरोखर मेलेली आहे. 7म्हणून
लोकांना याविषयी निक्षून सांग. यासाठी की, कोणालाही
त्यांच्याकडे दोष दाखविण्यास वाव राहणार नाही. 8पण
जर कोणी त्याच्या स्वत:च्या नातेवाईकासाठी आणि
विशेषत: त्याच्या कुटुंबातील जवळच्यांसाठी तरतूद करीत
नाही, तर त्याने विश्वास नाकारलेला आहे. व तो अविश्वासू
माणसांपेक्षा वाईट आहे.
9एखादी विधवा जी कमीत कमी साठ वर्षांची असेल,
जिला सोडचिठ्ठी देण्यात आली नाही व जिचे दुसऱ्यांदा
लग्न झाले नाही, अशाच स्त्रियांची विधवा म्हणून नोंद
घ्यावी. 10चांगले काम करण्याबद्दल तिचा नावलौकिक
असेल व तिने मुलाबाळांना वाढवल असेल, जिने अनोळखी
लोकांचे स्वागत केले असेल, संताचे पाय धुतले असतील,
त्रासात असलेल्यांना मदत केली असेल व सर्व चांगले
काम करण्यात स्वत:ला वाहून घेतले असेल, तिचा
विधवांच्या खास यादीत समावेश करावा.
11पण तरुण विधवांची यादीत नोंद करण्याचे टाळावे.
कारण जेव्हा त्या ख्रिस्ताला सोडून अविचारी होतात, तेव्हा
त्यांना पुन्हा लग्न करावेसे वाटते. 12आणि त्या दोषी धरल्या
जातील, कारण त्यांनी त्यांचे मूळ वचन मोडलेले असते.
13आणखी, त्या आळशी बनतात व घरोघरी फिरतात. त्या
आळशी बनतात एवढेच नाही तर इतर लोकांच्या भानगडीत
स्वत:ला गुरफटून घेतात व इतरांविषयी खोटनाटे बोलतात.
ज्या गोष्टी बोलू नयेत, त्या गोष्टी बोलतात. 14यासाठी
माझी अशी इच्छा आहे की, तरुण स्त्रियांनी (विधवांनी)
लग्ने करावीत. मुलांचे संगोपन करावे व आपले घर
चालवावे. आपल्या शत्रूला आपली निंदा करण्यास वाव
मिळू देऊ नये. 15मी तर असे म्हणतो कारण काही
विधवा सैतानामागे जाण्यासाठी वळाल्यादेखील आहेत.
16जर एखाद्या विश्वासणाऱ्या स्त्रीच्या घरात विधवा
स्त्रिया असतील तर तिनेत्यांची काळजी घ्यावी* व
मंडळीवर भार टाकू नये. यासाठी की ज्या खरोखरच

---

**जर एखाद्या ... घ्यावी** काही प्राचीन ग्रीक प्रतींमध्ये लिहिले आहे, जर एखादा मनुष्य किंवा स्त्री जी विश्वासणारी आहे त्याच्याकडे विधवा असेल तर त्याने त्यांना मदत करावी.

विधवा आहेत त्यांना ते मदत करू शकतील. 17जे वडील
मंडळीची चांगली सेवा करतात त्यांना दुप्पट मान देण्याच्या
योग्यतेचे समजावे, विशेषत: जे उपदेश करण्याचे व
शिकविण्याचे काम करतात त्यांना. 18कारण पवित्र शास्त्र
म्हणते, "धान्याची मळणी करताना बैलाला मुसक्या बांधू
नको,"* आणि मजुरचा त्याच्या मजुरीवर हक्क आहे."*
19दोन किंवा तीन साक्षीदारांनी पाठिंबा दिल्याशिवाय
वडिलावरील आरोप दाखल करू नकोस. 20जे पाप करीत
राहतात त्यांचा जाहीरपणे निषेध कर. यासाठी की,
इतरांनाही भय वाटावे.
21देव, येशू ख्रिस्त व निवडलेले देवदूत यांच्यासमोर मी
निक्षून आज्ञा करतो की, तू कोणताही पूर्वग्रह न ठेवता या
गोष्टी पाळ व पक्षपाताने काहीही करू नको.
22देवाच्या सेवेसाठी नियुक्ती करण्याठी कोणावरही घाईने
हात न ठेवण्याची सवय कर. इतरांच्या पापांत वाटेकरी
होऊ नको. नेहमी स्वत:ला शुद्ध राख.
23नुसतेच पाणी पिण्याचे थांबव आणि तुझ्या पचनासाठी
व वारंवारच्या दुखण्यासाठी द्राक्षारसाचा वापर कर.
24काही लोकांची पापे स्पष्ट आहेत. व ती त्यांच्याअगोदर
न्यायालयात जातात पण दुसऱ्या लोकांची पापे त्यांच्या
मागून जातात. 25त्याचप्रमाणे, चांगली कामेही स्पष्ट आहेत
ती सुध्दा कायमची लपविता येत नाहीत.
6 जे सर्व गुलाम म्हणून विधर्मी मालकाच्या जुवाखाली
काम करीत आहेत त्यांनी त्यांच्या मालकांना पूर्ण
आदर देण्यायोग्य समजावे. यासाठी की देवाच्या नावाची
आणि आमच्या शिक्षणावर अशीतशी टीका होणार नाही.
2व ज्या गुलामांचे मालक विश्वासणारे आहेत, त्यांनी
त्यांच्या मालकांना कमी मान देऊ नये. कारण वस्तुस्थिती
अशी आहे की, ते मालक त्यांचे बंधू आहेत. उलट त्या
गुलामांनी त्यांच्या मालकांची सेवा अधिक चांगल्या प्रकारे
करावी. कारण ज्यांना लाभ मिळतो ते विश्वासणारे व
प्रियजन आहेत. या गोष्टी लोकांना शिकीव व बोध करून
तसे करायला सांग.

## खोटे शिक्षण आणि खरी संपत्ती

3जर कोणी काही वेगळे शिकवितो व ख्रिस्त येशू
आपला प्रभू याची जी निकोप वचने आणि देवाच्या सेवेचे
खरे शिक्षण मान्य करीत नाही 4तर तो गर्वाने फुगलेला
आहे व त्याला काही समजत नाही. त्याऐवजी तो भांडणे व
शब्दकलह यांनी वेडापिसा झालेला आहे. या गोष्टींपासून
हेवा, भांडण, निंदा, दुष्ट तर्क 5आणि ज्यांची मने डागाळलेली
आणि सत्यापासून हिरावलेली आहेत अशा माणसांची
सततची भांडणे होतात, त्यांना असे वाटते की, देवाची
सेवा करणे हे श्रीमंत होण्याचे माध्यम आहे.
6वास्तविक पाहता संतोषाने देवाची सेवा करीत असताना
मिळणारे समाधान हा फार मोठा लाभ आहे. 7कारण
आपण जगात काहीही आणले नाही म्हणून आपण हे
ओळखावे की, आपणसुद्धा या जगातून काहीही बाहेर
घेऊन जाऊ शकणार नाही. 8जर आपणांस अन्न, वस्त्र
(आसरा) असेल तर त्यामध्ये आपण संतुष्ट असावे. 9पण
जे श्रीमंत होऊ पाहतात ते मोहात आणि सापळ्यात व
अति मूर्खपणाच्या आणि हानिकारक वासनांच्या आहारी
जाऊन नाश पावतात. 10कारण पैशाचे प्रेम हे सर्व वाईटाचे
मूळ आहे. काही लोक त्याची इच्छा धरल्याने
विश्वासापासून दूर गेले आहेत. त्यामुळे त्यांनी स्वत:लाच
पुष्कळ दु:ख करून घेतले आहे.

## तू लक्षात ठेवाव्यास अशा काही गोष्टी

11पण देवाच्या माणसा, तू या गोष्टींपासून दूर राहा.
न्यायीपणा, सुभक्ती, विश्वास आणि प्रेम, सहनशीलता,
आणि लीनता यासाठी जोराचा प्रयत्न कर. 12विश्वासाच्या
चांगल्या स्पर्धेत टिकून राहा. ज्यासाठी तुला बोलाविले
होते, त्या अनंतकाळच्या जीवनाला दृढ धर. तू अनेक
साक्षीदारांसमोर चांगली साक्ष दिलीस 13जो सर्वांना जीवन
देतो त्या देवासमोर आणि पंतय पिलातासमोर ज्याने चांगली
साक्ष दिली त्या ख्रिस्त येशूसमोर मी तुला आज्ञा करतो.
14आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्या समयापर्यंत
निष्कलंक आणि दोषरहित राहावे म्हणून ही आज्ञा पाळ.
15जो धन्य, एकच सार्वभौम, राजांचा राजा आणि प्रभूंचा
प्रभु ह्या धन्यवादिताच्या निर्णयानुसार, योग्य समय आल्यावर
हे घडवून आणील.
16ज्या एकालाच अमरत्व आहे, ज्यापर्यंत पोहोंचता येणार
नाही अशा प्रकाशात राहतो. ज्याला कोणीही पाहिले नाही
किंवा पाहू शकत नाही, त्याला सन्मान आणि अनंतकाळचे
सामर्थ्य असो. 17या युगातील श्रीमंतास आज्ञा कर की,
गर्विष्ठ होऊ नका. पैसा जो चंचल आहे त्यावर त्यांनी
आशा ठेवू नये, परंतु देव जो विपुलपणे उपभोगासाठी सर्व
पुरवितो त्यावर आशा ठेवावी.
18चांगले करण्याची त्यांना आज्ञा कर. चांगल्या कृत्यात
धनवान आणि उदार असावे. व स्वत:जवळ जे आहे त्यात
इतरांबरोबर सहभागी होण्याची इच्छा असावी. 19असे
करण्याने ते स्वत:साठी स्वर्गीय धनाचा साठा करतील जो
भावी काळासाठी भक्कम पाया असे होईल त्यामुळे त्यांना
खऱ्या जीवनाचा ताबा मिळेल.
20तिमथ्या, तुझ्याजवळ विश्वासाने सांभाळावयास
दिलेल्या ठेवीचे रक्षण कर. रिकाम्या वटवटीपासून आणि
चुकीने ज्याला तथाकथित "ज्ञान" म्हणतात त्याच्याशी
संबंधित असलेल्या परस्परविरोधी विश्वासापासून दूर जा.
21ज्यांनी हा दावा केला ते या "विद्येमुळे" विश्वासाच्या
खुणेपासून ढळले आहेत. देवाची कृपा तुम्हांबरोबर असो.

---

**धान्याची ... बांधू नको** अनुवाद 25:4

**मजुराचा ... हक्क आहे** लूक 10:7

# पौलाचे तीमथ्थाला दुसरे पत्र

1 येशू ख्रिस्तामध्ये असलेल्या जीवनाविषयीच्या अभिवचनाची घोषणा करण्यास, देवाच्या इच्छेने पाठविलेला ख्रिस्त येशूचा प्रेषित पौल याजकडून,

2प्रिय मुलगा तीमथ्य याला, देवपिता आणि आमचा प्रभु येशू ख्रिस्त याच्यापासून कृपा दया व शांति असो.

## आभारप्रदर्शन आणि उत्तेजन

3माझ्या पूर्वजांप्रमाणे ज्या देवाची मी शुद्ध विवेकभावाने भक्ती करतो, त्या देवाचे मी उपकार मानतो; आणि रात्रंदिवस माझ्या प्रार्थनेत तुझी नेहमी आठवण करतो. 4माझ्यासाठी तू ढाळलेल्या अश्रूंची आठवण करताना तुला भेटण्याची आतुरतेने वाट पाहतो. यासाठी की मी आनंदाने भरून जावे. 5तुझ्यातील प्रामाणिक विश्वासाचे मला स्मरण होते जो पहिल्यांदा तुझी आजी लोईसमध्ये होता आणि तुझी आई युनीकेमध्ये होता. आणि माझी खात्री आहे की तोच विश्वास तुझ्यामध्येही आहे. 6या कारणासाठी मी तुला आठवण करून देतो की, जेव्हा मी माझे हात तुझ्यावर ठेवले तेव्हा देवाच्या दानाची जी ज्योत तुला मिळाली ती तेवत ठेव. 7कारण देवाने आम्हांला भित्रेपणाचा आत्मा दिला नाही. तर तो सावधानतेचा व सामर्थ्याची स्फूर्ति देणारा आत्मा दिला आहे.

8म्हणून आपल्या प्रभूविषयी साक्ष देण्यासाठी लाज धरू नको किंवा मी जो त्याच्यासाठी कैदी झालो त्या माझी लाज धरू नको. तर माझ्याबरोबर सुवार्तेसाठी दु:ख सोस. देव तुला जे सामर्थ्य देतो त्याच्या साहाय्याने दु:ख सोस.

9त्याने आम्हांला तारले आणि त्याने आम्हांला समर्पित जीवनासाठी पाचारण केले. आम्ही काही सत्कृत्ये केली म्हणून नाही तर त्याच्या स्वत:च्या हेतूने व कृपेने केले. ही कृपा काळाच्या सुरूवातीलाच देवाने ख्रिस्त येशूमध्ये आम्हांस दिली होती. 10पण जी आता आम्हाला आमचा तारणारा ख्रिस्त येशू याच्या भूतलावर अवतीर्ण होण्याने प्रगट करण्यात आली आहे. ख्रिस्ताने मरणाचा नाश केला आणि सुवार्तेद्वारे अमरत्व व जीवन प्रकाशात आणले. 11मला त्या सुवार्तेचा उपदेशक, प्रेषित आणि शिक्षक असे नेमले होते. 12आणि या कारणांमुळे मीसुद्धा दु:ख भोगीत आहे. परंतु मी लाजत नाही कारण ज्याच्यावर मी विश्वास ठेवला आहे त्याला मी जाणतो आणि माझी खात्री पटली आहे की, तो दिवस येईपर्यंत त्याने जे माझ्याकडे सोपविले आहे त्याचे तो रक्षण करील. 13माझ्याकडून ऐकून घेतलेल्या सत्य शिक्षणाचा गाभा दृढ धर. आणि ख्रिस्त येशूमध्ये सापडणाऱ्या विश्वासाने व प्रीतीने ते कर. 14आपणामध्ये वस्ती करणाऱ्या पवित्र आत्म्याद्वारे त्या चांगल्या ठेवीचे रक्षण कर.

15आशिया प्रांतामध्ये असणाऱ्या सर्वांनी मला सोडले आहे हे तुला ठाऊकच आहे. त्यामध्ये फुगल व हर्मगनेस आहेत. 16अनेसिफराच्या घरावर प्रभु दया दाखवो. कारण त्याने अनेकदा माझे समाधान केले आहे. आणि माझ्या तुरूंगात असण्याची त्याला लाज वाटली नाही. 17उलट रोममध्ये असताना त्याने माझा तपास लागेपर्यंत कसोशीने माझा शोध केला. 18प्रभु करो आणि त्याला त्या दिवशी प्रभूकडून दया मिळो कारण माझ्या इफिसातील वास्तव्य काळात त्याने अनेक प्रकारे माझी सेवा केली हे तुला चांगले माहीत आहे.

## ख्रिस्त येशूचा एकनिष्ठ सैनिक

2 माझ्या मुला तू ख्रिस्त येशूच्या ठायी असलेल्या कृपेत बलवान हो. 2माझ्याकडून ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमोर ऐकल्यास त्या घे व इतरांना शिकविण्यास समर्थ अशा विश्वासू लोकांवर सोपवून दे. 3ख्रिस्त येशूचा चांगला सैनिक या नात्याने आपल्या दु:खाचा सहभागी बनून राहा.

4सैनिकाचे काम करणारा कोणीही जीवनातील संसाराच्या कामकाजात अडकत नाही. यासाठी की त्याला आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला संतुष्ट करता यावे. 5जर कोणी मैदानी स्पर्धेत भाग घेतो तर नियमाप्रमाणे स्पर्धेत घेतल्याशिवाय त्याला विजयाचा मुकुट मिळविता येत नाही. 6अति श्रम करणारा शेतकरी हा पहिल्या फळाचा वाटा घेणारा असावा. 7मी काय म्हणतो याविषयी तू विचार करावा अशी माझी इच्छा आहे. प्रभु तुला या सर्व गोष्टी समजून घेण्याचे सामर्थ्य देईल.

8येशू ख्रिस्त जो मेलेल्यांतून उठला व दाविदाचा वंशज आहे त्याची आठवण करीत राहा. जी सुवार्ता मी सांगतो तिचा हा गाभा आहे.

9कारण सुवार्तेमुळे मी दु:ख सहन करतो. येथपर्यंत की, गुन्हेगाराप्रमाणे साखळदंडानी मला बांधण्यात आले. पण देवाचे शिक्षण बांधले गेले नाही. 10म्हणून, देवाच्या

निवडलेल्यांसाठी मी सर्व काही सोशीत आहे, म्हणजे
त्यांनाही ख्रिस्त येशूद्वारे मिळणारे तारण व अनंतकाळचे
गौरव प्राप्त व्हावे.
11येथे एक विश्वसनीय सत्य आहे:

जर आम्ही त्याच्यासह मेलेले आहोत. तर त्याच्याबरोबर
जीवंतही राहू
12जर आम्ही दु:खसहन केले तर आम्ही त्याच्याबरोबर
राज्यसुद्धा करू जर आम्ही त्याला नाकारले तर तोही
आम्हाला नाकारील
13जरी आम्ही अविश्वासू आहोत तरी तो अजूनही
विश्वासू आहे कारण तो स्वत:ला नाकारू शकत नाही.

## मान्य सेवक

14लोकांना या गोष्टीची आठवण करून देत राहा.
देवासमोर त्यांना निक्षून ताकीद दे की, शब्दांविषयी भांडू
नका. असे भांडण कोणत्याही फायद्याचे नाही. फक्त जे
ऐकतात त्यांचा ते नाश करते. 15देवाने पसंत केलेला व
देवाचे वचन योग्य रीतीने शिकवण्यास पात्र असा आणि
जे काम करतोस त्यात लाज वाटण्यासारखे काहीही
नसलेला असा देवाने पसंत केलेला कामकरी होण्याचा
प्रयत्न कर. 16पण ऐहिक वादविवाद टाळ कारण ते लोकांना
देवापासून अधिकाधिक दूर नेतात. 17आणि अशा प्रकारे
वादविवाद करणाऱ्यांची शिकवण कर्करोगासारखी
पसरते. या लोकांमध्ये हुमनाय आणि फिलेत आहेत, 18जे
सत्यापासून दूर गेले आहेत. ते म्हणतात की, मरणानंतरचे
सर्व लोकांचे पुनरुत्थान आधीच झाले आहे व ते काही
लोकांच्या विश्वासाचा नाश करीत आहेत. 19तथापि देवाने
घातलेला भक्क म पाया त्यावर असलेला शिक्क ा यासह
स्थिर राहतो. “प्रभु जे त्याचे आहेत त्यांना ओळखतो.”*
“जो कोणी प्रभूचे नाव घेतो त्याने वाईटापासून वळलेच
पाहिजे.”
20मोठ्या घरात केवळ सोन्याचांदीची भांडी असतात असे
नाही तर लाकूड व माती यापासून बनविलेलीही असतात.
काही प्रतिष्ठेच्या कामात वापरण्यासाठी असतात तर दुसरी
काही कनिष्ठ प्रतीच्या कामी वापरण्यासाठी नेमलेली
असतात. 21म्हणून जर मनुष्य या अशुद्धतेपासून स्वत:ला
शुद्ध करील तर तो मानसन्मानास योग्य असे भांडे होईल
व धन्यासाठी प्रत्येकसमर्पित कामासाठी पवित्र केलेले व
उपयुक्त पात्र होईल.
22पण तरुणपणाच्या वासनांपासून दूर पळ जे प्रभूला
शुद्ध अंत:करणाने हाक मारतात व प्रभूवर विश्वास
ठेवतात, अशांच्या बरोबर, नीतिमत्त्व, विश्वास, प्रीति आणि
शांति यांच्या मागे लाग. 23नेहमी मूर्ख व निरर्थक अशा
वादविवादापासून दूर राहा. कारण तुला माहीत आहे की,
त्यामुळे भांडणे निर्माण होतात. 24देवाच्या सेवकाने भांडू
नये, तर सर्व लोकांशी दयाधर्माने वागावे तसेच शिक्षणात
कुशल व सहनशील असावे. 25जे त्याला विरोध करतात,
त्यांना विनयाने शिक्षण द्यावे या आशेने की देवाने त्यांना
पश्चात्ताप करण्यास सहाय्य करावे आणि त्यांना सत्याची
ओळख व्हावी. 26ते शुद्धीवर यावेत व सैतानाच्या
सापळ्यांतून जेथे सैतानाने त्यांना त्याच्या इच्छेप्रमाणे
करण्यासाठी ठेवले आहे, तेथून त्यांची सुटका व्हावी.

## शेवटचे दिवस

3 हे लक्षात ठेव: शेवटच्या दिवसांत कठीण समय
आपल्यावर येतील. 2लोक स्वार्थी, धनलोभी,
बढाईखोर, गर्विष्ठ, शिव्याशाप देणारे, आईवडिलांची आज्ञा
न मानणारे, कृतघ्न, अधार्मिक 3इतरांवर प्रीति नसणारे,
क्षमा न करणारे, चहाडखोर, मोकाट सुटलेले, क्रूर,
चांगल्याच्या विरुद्ध असले, 4विश्वासघातकी, उतावीळ,
गर्वाने फुगले, देवावर प्रेम करण्यापेक्षा चैनीची अधिक
आवड धरणारे असे होतील; 5ते देवाच्या सेवेचे बाहेरचे
स्वरूप चांगले राखतील, परंतु त्याचे सामर्थ्य नाकारतील.
त्यांच्यापासून नेहमी दूर राहा. 6मी हे म्हणतो कारण
त्यांच्यांपैकी काही घरात शिरकाव करतात व पापाने
भरलेल्या, सर्व प्रकारच्या वासनांनी बहकलेल्या,
कमकुवत स्त्रियांवर ताबा मिळवितात. 7अशा स्त्रिया नेहमी
शिकण्याचा प्रयत्न करतात. पण सत्याच्या पूर्ण ज्ञानापर्यंत
त्या कधीही जाऊ शकत नाहीत. 8यान्नेस व यांब्रेस यांनी
जसा मोशेला विरोध केला तसा ही माणसे सत्याला विरोध
करतात. ज्यांची मने भ्रष्ट आहेत व सत्य अनुसरण्यात
अयशस्वी ठरलेली अशी ही माणसे आहेत. 9ते पुढे अधिक
प्रगती करणार नाहीत. कारण जसा यान्नेस व यांब्रेस यांचा
मूर्खपणा प्रकट झाला तसा यांचा मूर्खपणा सर्वांना प्रकट
होईल.

## शेवटच्या सूचना

10तरीही तू माझी शिकवण, वागणूक, जीवनातील माझे
ध्येय, माझा विश्वास, माझा धीर, माझी प्रीति, माझी
सहनशीलता ही पाळली आहेस. 11अंत्युखिया, इकुन्या,
आणि लुस्त्र येथे ज्या गोष्टी माझ्या बाबतीत घडल्या, जो
भयंकर छळ मी सोसला ते माझे दु:ख तुला माहीत आहे!
परंतु प्रभूने या सर्व त्रासांपासून मला सोडविले. 12खरे
पाहता, जे जे ख्रिस्त येशूमध्ये शुद्ध जीवन जगू इच्छितात,
त्या सर्वांचा छळ होईल. 13पण दुष्ट लोक व भोंदू लोक
इतरांना वरचेवर फसवीत राहतील आणि स्वत:ही फसून
अधिक वाईटाकडे जातील.
14पण तुझ्या बाबतीत, ज्या गोष्टी तू शिकलास व
ज्याविषयी तुझी खात्री झाली आहे त्या तू तशाच पुढे चालू
ठेव. ती सत्ये ज्या कोणापासून तू शिकलास ते तुला
ठाऊक आहे. तू त्यांच्यावर विश्वास ठेवू शकतोस. 15तुला

---

**प्रभु ... ओळखतो** गणना 16:5

माहीत आहे की, तू आपल्या अतिबाल्यावस्थेत असल्यापासूनच तुला पवित्र शास्त्र वचनांची माहिती आहे. त्यांच्या ठायी तुला शहाणे बनविण्याचे व तारणाकडे घेऊन जाण्याचे सामर्थ्य आहे. ते तुला तारणाकडे नेण्यासाठी लागणारे ज्ञान देण्यास समर्थ आहे.
[16]प्रत्येक शास्त्रलेख देवाच्या प्रेरणेने लिहिला असल्यामुळे तो सत्य समजण्यास, वाईटाचा निषेध करण्यास, चुका सुधारण्यास व योग्य जीवन जगण्याचे मार्गदर्शन करण्यास उपयुक्त आहे.
[17]यासाठी की, देवाचा माणूस प्रवीण होऊन पूर्णपणे प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा.

4 देवासमोर आणि ख्रिस्त येशूसमोर मी तुला गांभीर्याने आज्ञा करतो, जे जिवंत आहेत व जे मेलेले आहेत त्यांचा येशू ख्रिस्त हाच न्याय करणार आहे. येशू ख्रिस्ताचे राज्य व त्याचे परत येणे याविषयी घोषणा कर. मी तुला देवासमोर व ख्रिस्तासमोर ही आज्ञा करतो.
[2]वचन गाजवीत राहा. सोयीच्या किंवा गैरसोयीच्या अशा कोणत्याही वेळी तुझे कार्य करण्यास तयार राहा. लोकांना जे करायचे आहे, त्याविषयी त्यांची खात्री पटव. जेव्हा ते चुका करतील तेव्हा त्यांना सावध कर; लोकांना उत्तेजन दे. आणि हे सर्व काळजीपूर्वक शिक्षण देण्याने व मोठ्या सहनशीलतेने कर.
[3]मी असे म्हणतो कारण अशी वेळ येईल जेव्हा लोक चांगले शिक्षण ऐकण्याची इच्छा धरणार नाहीत. त्याऐवजी त्यांच्या स्वत:च्या इच्छांना पूरक असे शिक्षक ते त्यांच्यासाठी जमा करतील. त्यांची कानउघडणी कर.
[4]सत्यापासून ते आपले कान दुसरीकडे वळवतील व आपले लक्ष ते भाकड कथांकडे लावतील.
[5]पण तुझ्याबाबतीत स्वत: सावधानतेने वाग, दु:ख सहन कर; सुवार्तेची घोषणा करण्याचे काम कर; देवाने दिलेली सेवा पूर्ण कर.

[6]माझ्याबाबतीत म्हणायचे तर, मी अगोदरच पेयार्पणा सारखा ओतला जात आहे. व माझी या जीवनातून जाण्याची वेळ आली आहे.
[7]मी सुयुद्ध जिंकेले आहे. मी माझी शर्यत संपविली आहे. मी विश्वास राखला आहे.
[8]आता माझ्यासाठी विजेत्यासाठी असलेला मुकुट जो नीतिमत्त्व, तो वाट पाहत आहे. आणि प्रभु जो नीतिमान न्यायाधीश, तो मला त्या दिवशी मुकुट देईल आणि केवळ मलाच तो देईल असे नाही तर जे सर्व त्याच्या येण्याची प्रेमाने वाट पाहत आहेत, अशा सर्वांना देईल.

## व्यक्तिगत संदेश

[9]तुला शक्य होईल तितक्या लवकर मला भेटावयाला येण्याचा प्रयत्न कर.
[10]कारण देमास मला सोडून थेस्सलनीकास गेला आहे. कारण त्याला आजचे हे जग प्रिय आहे. क्रेस्केस गलतीयास गेला आहे. व तीत दालमतीयास गेला आहे.
[11]लूक एकटा असा आहे की, जो अजूनदेखील माझ्याजवळ आहे. जेव्हा तू येशील तेव्हा मार्कलाही तुझ्याबरोबर घेऊन ये. कारण सेवेकरिता तो मला उपयोगी आहे.
[12]तुखिकाला मी इफिसास पाठविले आहे.

[13]त्रोवसात कार्पाच्या घरी राहिलेला माझा झगा येताना घेऊन ये. तसेच माझी पुस्तके, विशेषत: चर्मपत्राच्या गुंडाळ्या घेऊन ये.
[14]आलेक्सांद्र तांबटाने माझे खूप नुकसान केले आहे. त्याने केलेल्या त्याच्या कृत्यांबद्दल देव त्याची फेड करील.
[15]त्याच्यापासून स्वत:चे रक्षण कर. कारण त्याने आपल्या शिक्षणाला जोरदारपणे विरोध केला होता.

[16]पहिल्यांदा जेव्हा मला माझा बचाव करायचा होता तेव्हा मला कोणीही साथ केली नाही. त्याऐवजी ते सर्व मला सोडून गेले. देवाकडून हे त्यांच्याविरुद्ध मोजले जाऊ नये.

[17]प्रभु माझ्या बाजूने उभा राहिला आणि मला सामर्थ्य दिले यासाठी की, माझ्याकडून संदेशाची पूर्ण घोषणा व्हावी व सर्व विदेश्यांनी ती ऐकावी. सिंहाच्या मुखातून त्याने मला सोडविले.
[18]प्रभु मला सर्व दुष्कृत्यांपासून सोडवील व त्याच्या स्वर्गाच्या राज्यात सुखरूपपणे आणील. त्याला सदासर्वकाळपर्यंत गौरव असो.

## शेवटचा सलाम

[19]प्रिस्कीला अक्विल्ला आणि अनेसिफरच्या घरातील लोकांना सलाम सांग.
[20]एरास्त करिंथात राहिला. त्रफिमाला मी मिलेता येथे सोडले कारण तो आजारी होता.
[21]तू हिवाळ्यापूर्वी येण्याचा अधिक प्रयत्न कर. युबुल, पुदेश, लीन, क्लौदिया व इतर सर्व बंधु तुला सलाम सांगतात.
[22]प्रभु तुझ्या आत्म्याबरोबर असो. देवाची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असो.

# पौलाचे तीताला पत्र

1 देवाचा सेवक व येशू ख्रिस्ताचा प्रेषित पौल याजकडून,
देवाच्या निवडलेल्या लोकांच्या विश्वासात त्यांना मदत
करण्यासाठी मला पाठविण्यात आले. त्या लोकांना सत्याची
ओळख करवून देण्यासाठी मला पाठविले. व ते सत्य
लोकांना देवाची सेवा कशी करायची हे दाखविते. 2तो
विश्वास आणि ते ज्ञान अनंतकाळच्या जीवनाच्या आमच्या
आशेमुळे येते. काळाची सुरुवात होण्यापूर्वी देवाने त्या
जीवनाचे अभिवचन आम्हांला दिले. आणि देव खोटे बोलत
नाही. 3देवाने आपल्या योग्य वेळी त्या जीवनाविषयीचा
संदेश जगाला प्रकट केला. देवाने ते काम माझ्यावर
सोपविले. त्या गोष्टींविषयी मी संदेश दिला कारण आमच्या
तारणाऱ्या देवाने मला तसे करण्याची आज्ञा केली होती.
4विश्वासातील माझा खरा मुलगा तीत याला मी लिहीत
आहे. देव पिता व ख्रिस्त येशू आपला तारणारा याजकडून
तुला कृपा, दया व शांति असो.

### तीताचे क्रेतातील कार्य

5मी तुला क्रेत येथे सोडून या कारणासाठी आलो: की
जे अजून अपूर्ण राहिले होते ते तू व्यवस्थित करावेस व
मी तुला आज्ञा केल्याप्रमाणे प्रत्येक गावी वडील नेमावेत.
6ज्याच्यावर दुराचरणाचा दोष नसेल, ज्याला एकच पत्नी
असेल, ज्याला मुले असून ती विश्वासणारी असतील.
ज्याच्यावर स्वैर जीवन जगल्याचा आरोप नसेल, अशा
प्रकारच्या व्यक्तीस नेमावे. 7कारण अध्यक्ष (सर्वांगीण
काळजीवाहक) हा देवाचा कारभारी असल्यामुळे तो दोषी
नसावा. तो उद्धट नसावा, त्याला लवकर राग येऊ नये;
तो मद्यपान करणारा नसावा, तो भांडणची आवड नसणारा,
अप्रामाणिकपणे पैसे मिळविण्याची आवड नसणारा असावा.
8तर तो आदरातिथ्य करणारा, चांगुलपणावर प्रेम करणारा,
शहाणा, नीतिमान, भक्तीशील व स्वत:वर संयम ठेवणारा
असावा. 9विश्वसनीय संदेश जसा तो शिकविला गेला
त्याला दृढ धरून राहावे यासाठी की, हितकारक शिक्षणाने
लोकांना बोध करण्यास समर्थ असावे. व जे विरोध करतात,
त्यांची चूक कौशल्याने त्यांना पटवून द्यावी.
10हे महत्त्वाचे आहे कारण पुष्कळ लोक बंड करणारे
आहेत. जे व्यर्थ गोष्टींविषयी बडबड करतात व लोकांना
फसवितात. मी विशेषेकरून, जे सुंता झालेले आहेत त्यांना
संबोधून बोलत आहे. 11त्यांची तोंडे बंद केलीच पाहिजेत,
ज्या गोष्टी शिकवू नयेत त्या ते शिकवीत आहेत. ते हे
यासाठी करीत आहेत की, अयोग्य मार्गाने पैसे मिळवावेत.
अशा रीतीने ते संपूर्ण घराण्याचा नाश करीत आहेत.
12त्यांच्यापैकीच एक क्रेतीय संदेष्टा (भविष्यवादी) स्वत:
म्हणाला, “क्रेतीय नेहमीच खोटारडे आहेत. दुष्ट पशू आणि
आळशी, खादाड आहेत.” 13हे वाक्य खरे आहे. म्हणून
नेहमीच त्यांना कडक रीतीने धमकाव. यासाठी की,
त्यांनी विश्वासात खंबीर व्हावे. 14आणि यहूदी भाकडकथा
व जे सत्य नाकारतात अशा लोकांच्या आज्ञांकडे लक्ष
देऊ नये. 15शुद्ध असणाऱ्या सर्वांना, सर्व गोष्टी शुद्ध
आहेत; पण ज्यांचे विचार व विवेकभाव ही दोन्हीही पापाने
भ्रष्ट झाली आहेत व जे विश्वास ठेवीत नाहीत त्यांना
काहीच शुद्ध नाही. 16ते देवाला ओळखत असल्याचा
दावा करतात, पण ते त्यांच्या कृत्यांनी देवाला ओळखल्याचे
नाकारतात. ते अमंगळ व आज्ञा मोडणारे, व कोणतेच
चांगले कृत्य करण्यास लायक नसलेले असे त्यांचे त्यांनीच
दाखवून दिले आहे.

### खऱ्या शिक्षणाला अनुसरणे

2 तू मात्र नेहमी सत्य किंवा निकोप शिक्षणाला
शोभणाऱ्या अशा गोष्टी बोल. 2वडील माणसांनी
आत्मसंयमित, आदरणीय व शहाणे असावे आणि
विश्वासात, प्रीतीत व सहनशीलतेत बळकट असावे.
3त्याचप्रमाणे वृद्ध स्त्रियांना आपल्या वागण्यात आदरणीय
असण्याबाबत शिकीव. त्यां चहाडखोर नसाव्यात. तसेच
त्यांना मद्यपानाची सवयनसावी व त्यांना जे चांगले तेच
शिकवावे. 4यासाठी की, त्यांनी तरुण स्त्रियांना, त्यांच्या
पतींवर प्रेम करण्यास, त्यांच्या मुलांवर प्रेम करण्यास
शिकवावे. 5त्यांनी शहाणे व शुद्ध असण्यास, त्यांच्या घराची
काळजी घेण्यास व दयाळू असण्यास, आपल्या पतींच्या
अधीन असण्यास शिकवावे. यासाठी की देवाच्या संदेशाची
कोणालाही निंदा करता येऊ नये. 6त्याचप्रमाणे, तरुण
मनुष्यांनी शहाणे व्हावे यासाठी त्यांना उत्तेजन देत राहा.
7प्रत्येक गोष्टीत स्वत:ला तू चांगल्या कामाचा कित्ता असे
दाखवून दे. तुझ्या शिक्षणात शुद्धता व गंभीरता असावी.
8ज्यावर कोणी टीका करू शकत नाही असा चांगल्या
बोलण्याचा उपयोग कर. यासाठी की, जे तुला विरोध

करतात त्यांनी लज्जित व्हावे. 9गुलामांना, सर्व बाबतीत त्यांच्या मालकांच्या अधीन राहण्यासाठी व त्यांना संतोष देण्याविषयी व हुज्जत न घालण्याविषयी शिकीव. 10तसेच चोरी करू नये तर पूर्णपणे विश्वासूपणा दाखविण्यास सांग. यासाठी की, त्यांनी आपला तारणारा देव याच्या शिकवणुकीला सर्व बाबतीत सन्मान मिळवून द्यावा.

11कारण सर्व माणसांना देवाची तारक कृपा प्रगट झाली आहे. 12ती आम्हाला शिकविते की, आपण अभक्ति व ऐहिक गोष्टींची हाव यांचा नकार करावा आणि या सध्याच्या जगात आपण सुज्ञपणाने व नीतीने वागावे, व देवाप्रती आपली भक्ती प्रकट करावी. 13आणि आपली धन्य आशा म्हणजे आपला महान देव व आपला तारणारा येशू ख्रिस्त याच्या गौरवी प्रकट होण्याच्या दिवसाची आतुरतेने वाट पाहावी. 14त्याने स्वत:ला आमच्यासाठी दिले यासाठी की सर्व दुष्टतेपासून त्याने खंडणी भरून आम्हांस सोडवावे व चांगली कृत्ये करण्यासाठी आवेशी असलेले असे जे केवळ आपले लोक त्यांना स्वत:साठी शुद्ध करावे.

15या गोष्टीविषयी बोध करीत राहा आणि कडक शब्दात कानउघाडणी करीत राहा आणि हे पूर्ण अधिकाराने कर. कोणीही तुला तुच्छ मानू नये.

## जगण्याचा योग्य मार्ग

3 सत्ताधीश, आणि अधिकारी यांच्या अधीन राहण्या विषयी व त्यांच्या आज्ञा पाळण्याविषयी व प्रत्येक चांगले काम करण्यास तयार राहण्याविषयी, 2कोणाचीही निंदा न करण्याविषयी, भांडण टाळण्याविषयी आणि सर्व माणसांना मोठी नम्रता दाखविण्याविषयी त्यांना सतत आठवण करून देत राहा.

3मी हे सांगतो कारण आपणसुद्धा एके काळी मूर्ख, आज्ञा न पाळणारे आणि बहकलेले असे होतो. आम्ही सर्व प्रकारच्या वासनांची व विलासाची गुलामाप्रमाणे सेवा करणारे होतो. आम्ही दुष्टतेचे व हेव्यादाव्याचे जीवन जगत होतो. इतर लोक आमचा द्वेष करीत. आणि आम्ही एकमेकांचा द्वेष करीत होतो. 4पण जेव्हा आमच्या तारणाऱ्या देवाची कृपा व प्रीति मानवाप्रती प्रकट झाली, तेव्हा 5त्याने आम्हाला तारले. देवाकडून निर्दोष म्हणवून घेण्यासाठी आम्ही केलेल्या कोणत्याही कृत्यांनी नव्हे तर त्याच्या दयेमुळे आम्ही तारले गेलो आणि ते आमच्याकडे नव्या जन्माच्या स्नानाद्वारे आम्ही नवीन जन्म पावलो आणि पवित्र आत्म्याद्वारे प्राप्त झालेले नवीकरण यांनी तारले गेलो. 6देवाने तो पवित्र आत्मा आमचा तारणारा येशू ख्रिस्त याच्या द्वारे विपुलपणे आम्हावर ओतला. 7यासाठी की, आता देवाकडून त्याच्या कृपेमध्ये आम्ही निर्दोष घोषित केले जावे. अनंतकाळच्या जीवनाच्या आशेने आम्ही त्याचे वारस व्हावे. 8ही शिकवण विश्वसनीय आहे. आणि यावर जोर द्यावा असे मला वाटते. यासाठी की, ज्यांनी देवावर विश्वास ठेवला आहे, त्यांनी चांगली कृत्ये करण्याविषयी काळजी घ्यावी. या गोष्टी लोकांसाठी चांगल्या व हिताच्या आहेत. 9परंतु मूर्खपणाचे वाद, वंशावळीसंबंधी चर्चा, भांडणे, नियमशास्त्राविषयीचा झगडा टाळ. कारण ते निष्फळ व निरर्थक असे आहेत. 10एकदोन वेळा बोध करून, फूट पाडणाऱ्या व्यक्तीला टाळा. 11कारण तुला माहीत आहे की, असा मनुष्य वाइटाकडे वाहवत गेला आहे व तो पाप करीत आहे व त्याने स्वत:लाच दोषी ठरविले आहे.

## लक्षात ठेवण्यासाठी काही गोष्टी

12जेव्हा मी अर्तमाला किंवा तुखिकाला तुझ्याकडे पाठवीन तेव्हा मला भेटण्यासाठी निकपलिसास येण्याचा तू होईल तितका प्रयत्न कर. कारण तेथे हिवाळा घालविण्याचे मी ठरविले आहे. 13जेना वकील व अपुल्लो यांना त्यांच्या प्रवासासाठी ज्याची गरज भासेल ती पुरविण्यासाठी तू सर्वतोपरी प्रयत्न कर. यासाठी की, त्यांना कशाचीही कमतरता भासू नये. 14आपल्या लोकांनी चांगली कृत्ये करण्याविषयी शिकले पाहिजे यासाठी की तातडीच्या गरजा भागविल्या जाव्यात, म्हणजे ते निष्फळ ठरणार नाहीत.

15माझ्याबरोबरचे सर्वजण तुला सलाम सांगतात. विश्वासामध्ये आम्हावर प्रेम करणाऱ्या सर्वांना सलाम सांग. देवाची कृपा तुम्हा सर्वांबरोबर असो.

# पौलाचे फिलेमोनाला पत्र

ख्रिस्त येशूकरीता कैदी झालेला पौल, व आपला बंधु तिमथ्य यांजकडून, आमचा प्रिय बंधु व सहकारी फिलेमोन 2आणि आमची बहीण अफ्फिया, अर्खिप्प, आमचा सहसैनिक, आणि तुझ्या घरात जी मंडळी एकत्र येते, यांना: 3देव आमचा पिता याजपासून व प्रभु येशू ख्रिस्तापासून कृपा व शांति असो.

## फिलेमोनचे प्रेम आणि विश्वास

4जेव्हा मी प्रार्थनेत तुझी आठवण करतो, तेव्हा नेहमी मी माझ्या देवाचे उपकार मानतो. 5कारण तुझ्या प्रेमाविषयी आणि तुझ्या विश्वासाविषयी, जो विश्वास तू प्रभु येशूवर ठेवतोस त्याविषयी मी ऐकतो, ज्या देवाच्या सर्व लोकांसाठी जे प्रेम तुझ्याकडे आहे, त्याविषयी मी ऐकतो, 6मी अशी प्रार्थना करतो की, ज्या विश्वासाचा सहभागी तू आमच्याबरोबर आहेस, तो विश्वास आमच्यामध्ये असलेल्या ख्रिस्त येशूमधील सर्व चांगल्या गोष्टी त्या सखोलपणे समजण्यासाठी तुला मार्गदर्शन करोत. 7तुझ्या प्रेमामुळे मला मोठा आनंद आणि समाधान मिळाले आहे. कारण बंधु, तुझ्या प्रयत्नांमुळे देवाच्या लोकांची अंत:करणे संजीवित झाली आहेत.

## अनेसिमचा भाऊ म्हणून स्वीकार कर

8म्हणून, जरी मी तुझा बंधु म्हणून तुला तुझे योग्य कर्तव्य करण्याविषयी आज्ञा करून सांगण्याचे धैर्य असले, तरी 9प्रेमामुळे मी तुला आवाहन करणे पसंत करतो. मी पौल, एक वृद्ध मनुष्य म्हणून जसा आहे तसा स्वत:ला सादर करतो आणि आता ख्रिस्त येशूमधील कैदीसुद्धा असलेला असा,

10मी तुला माझ्या मुलासमान असलेला अनेसिम, ज्याच्याशी मी तुरुंगात असताना पित्याप्रमाणे वागलो, त्याजविषयी कळकळीने विनवितो की, 11पूर्वी तो तुला निरुपयोगी होता पण आता तो तुलाच नाही तर मलासुद्धा उपयोगी आहे.* 12मी त्याला तुझ्याकडे परत पाठवीत आहे. मी असे म्हणायला हवे की, मी त्याला पाठवीत असताना जणू काय माझे हृदयच पाठवित आहे. 13त्याला येथे माझ्याजवळ ठेवायला मला आवडेल यासाठी की सुवार्तेमुळे मिळालेल्या तुरुंगवासामध्ये त्याने तुझ्या जागी माझी मदत करावी. 14परंतु तुझ्या संमतीशिवाय मला काहीही करायचे नव्हते. यासाठी की तुझे कोणतेही चांगले कार्य दडपणामुळे होऊ नये तर तुझ्या खुशीने व्हावे.

15कदाचित त्याला थोड्या काळासाठी तुझ्यापासून दूर घेतले जाणे यासाठी झाले असावे की, तू त्याला कायमचे तुझ्याजवळ घ्यावे. 16एक गुलाम म्हणून नव्हे, उलट गुलामापेक्षाही चांगला एक भाऊ म्हणून घ्यावे. मी त्याच्यावर खूप प्रेम करतो. पण तू त्याच्यावर त्याहीपेक्षा अधिक प्रेम करशील, फक्त एक मनुष्य म्हणूनच नव्हे, तर प्रभूमधील एक बंधु म्हणून. 17तर जर मग तू मला खरोखर भागीदार समजतोस, तर माझे स्वागत जसे तू केले असतेस तसे त्याचे स्वागत कर. 18आणि जर त्याने तुझे काही नुकसान केले असेल किंवा काही देणे लागत असेल तर ते माझ्या नावावर लाव.

19मी, पौल, हे माझ्या स्वत:च्या हातांनी लिहीत आहे: मी याची तुला परतफेड करीन. (मी तुला हे सांगण्याची गरज नाही की, तुझे स्वत:चे जीवन तू मला देणे लागतोस.) 20होय बंधु, प्रभूमध्ये मला तुझ्यापासून काही फायदा हवा आहे. ख्रिस्तामध्ये माझे अंत:करण उल्हासित कर. 21तुझ्या आज्ञाधारकपणाविषयी मला खात्री आहे म्हणून मी तुला लिहीत आहे. मला माहीत आहे की, मी सांगत असलेल्या गोष्टीपेक्षा तू अधिक करशील.

22शिवाय कृपा करून माझ्या विश्रांती करिता खोली तयार करून ठेव. कारण माझा विश्वास आहे की, तुमच्या प्रार्थनांचा परिणाम म्हणून मला सुरक्षिततरीत्या तुमच्या स्वाधीन करण्यात येईल. 23येशू ख्रिस्तामध्ये माझ्यासह बंदिवान एपफ्रास 24तसेच मार्क, अरिस्तार्ख, देमास व लूक जे माझे सहकारी आहेत, ते सलाम सांगतात. 25प्रभु येशू ख्रिस्ताची कृपा तुमच्या आत्म्याबरोबर असो. आमेन.

---

**पूर्वी तो ... उपयोगी आहे** पौल याठिकाणी अनेसिम हा शब्द दोन अर्थांनी वापरतो. अनेसिम म्हणजे उपयोगी.

# इब्री लोकांस पत्र

### देव त्याच्या पुत्राद्वारे बोलला आहे

1 भूतकाळात देव आपल्या पूर्वजांशी संदेष्ट्यांच्या द्वारे पुष्कळ वेळा वेगवेगळ्या मार्गांनी बोलला. [2]पण या शेवटच्या दिवसांत तो आपल्याशी त्याच्या पुत्राद्वारे बोलला, त्याने पुत्राला सर्व गोष्टींचा वारस म्हणून नेमले. देवाने हे जगसुद्धा पुत्राकरवीच निर्माण केले. [3]पुत्र हा देवाच्या गौरवाचे तेज आहे. तो देवाच्या स्वभावाचे तंतोतंत प्रतिरूप असा आहे. पुत्र आपल्या सामर्थ्यशाली शब्दाने सर्व गोष्टी राखतो. पुत्राने लोकांना त्यांच्या पापांपासून शुद्ध केले, नंतर तो स्वर्गातील सर्वश्रेष्ठ देवाच्या उजव्या बाजूला बसला. [4]तो देवदूतांपेक्षा श्रेष्ठ झाला. त्याचे नावसुद्धा जे त्याला मिळाले ते त्यांच्या नावापेक्षा श्रेष्ठ आहे.

[5]त्याने कोणत्याही देवदूताला म्हटले नाही की,

"तू माझा पुत्र आहेस; आज मी तुझा पिता झालो आहे."

*स्तोत्र. 2:7*

देवाने कोणत्याही देवदूताला म्हटले नाही की,

"मी त्याचा पिता होईन, व तो माझा पुत्र होईल."

*2 शमुवेल 7:14*

[6]आणि पुन्हा, देव जेव्हा त्याच्या पुत्राला जगामध्ये आणतो, तो म्हणतो,

"देवाचे सर्व देवदूत त्याची उपासना करोत."

*अनुवाद 32:43*

[7]देवदूताविषयी देव असे म्हणतो,

"तो त्याच्या देवदूतांना वारा बनवितो, आणि त्याच्या सेवकांना तो अग्नीच्या ज्वाला बनवितो."

*स्तोत्र. 104:4*

[8] पण पुत्राविषयी तो असे म्हणतो,

"तुझे सिंहासन, हे देवा, तुझे सिंहासन सदासर्वकाळासाठी आहे, आणि तुझे राज्य न्यायाचे असेल.

[9]नीति तुला नेहमी प्रिय आहे. अनीतीचा तू द्वेष करतोस. म्हणून देवाने तुझ्या देवाने, तुझ्या सोबत्यांपेक्षा तुला आनंददायी तेलाचा अभिषेक केला आहे."

*स्तोत्र. 45:6-7*

[10]आणि देव असेही म्हणाला,

"हे प्रभु, सुरुवातीला तू पृथ्वीचा पाया घातलास, आणि आकाश तुझ्या हातचे काम आहे.

[11]ती संपुष्टात येतील पण तू सतत राहशील ते कापडासारखे जुने होतील.

[12]तू त्यांना अंगरख्यासारखे गुंडाळशील, तू त्यांना कपड्यासारखे बदलशील, पण तू नेहमी सारखाच राहशील, आणि तुझी वर्षे कधीही संपणार नाहीत."

*स्तोत्र. 102:25-27*

[13] तो कोणत्याही दूताला असे म्हणाला नाही,

"तुझ्या वैऱ्याला तुझ्या पायाखाली घालेपर्यंत तू माझ्या उजवीकडे बैस."

*स्तोत्र. 110:1*

[14]सर्व देवदूत देवाच्या सेवेतील आत्मे नाहीत काय? आणि तारणाचा वारसा ज्यांना मिळेल त्यांना मदत करायला ते पाठविले जातात की नाही?

### आमचे तारण नियमशास्त्रापेक्षा मोठे आहे

2 त्यासाठी ज्या सत्याविषयी आपण ऐकलेले आहे त्याकडे आपण अधिक काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. यासाठी की, आपण त्यातून निसटून जाऊ नये. [2]कारण नियमशास्त्र जे देवदूतांकरवी सांगितले गेले ते इतके प्रभावी होते आणि जर प्रत्येक आज्ञाभंगाच्या व प्रत्येक अवमानाच्या कृत्याला योग्य ती शिक्षा होते. [3]तर आपण अशा महान तारणाकडे लक्ष दिले नाही, मग आपण शिक्षेपासून कसे सुटू? या तारणाची पहिली घोषणा प्रभूने केली. ज्यांनी प्रभूचे ऐकले त्यांच्याकडून याची खात्री पटली [4]देवानेसुद्धा चिन्हांद्वारे, अद्भुत कृत्यांद्वारे, आणि निरनिराळ्या चमत्कारांद्वारे, त्यांच्या साक्षीची भर व त्याच्या इच्छेनुसार पवित्र आत्म्याची दाने वाटून दिली.

### त्यांचे तारण करण्यासाठी ख्रिस्त मनुष्यांसारखा झाला

5जे येणारे नवीन जग होते त्याचे सत्ताधीश म्हणून देवाने देवदूतांची निवड केली नाही, त्याच भविष्यकाळातील जगाविषयी आपण बोलत आहोत. 6पवित्र शास्त्रामध्ये एका ठिकाणी असे लिहिले आहे:

"मनुष्य कोण आहे की ज्याची तुला चिंता वाटते? किंवा मनुष्याचा पुत्र कोण आहे की ज्याचा तू विचार करावास?
7थोड्या काळासाठी तू त्याला देवदूतांपेक्षा कमी केले तू त्याला गौरव व सन्मान यांचा मुकुट घातला आहेस
8तू सर्व काही त्याच्या पायाखाली (अधिकाराखाली) ठेवलेस." *स्तोत्र. 8:4-6*

देवाने सर्व काही त्याच्या अधिपत्याखाली ठेवले आणि कोणतीही गोष्ट त्याच्या अधिपत्याखाली ठेवायची सोडली नाही. पण आता अजूनपर्यंत सर्व काही त्याच्या अधिपत्याखाली ठेवलेले आपण पाहत नाही. 9परंतु आपण येशूला पाहतो, ज्याला काही काळासाठी देवदूतांपेक्षा किंचित कमी केले होते. आता आम्ही त्याला, त्याने सहन केलेल्या मरणामुळे, गौरव व सन्मान यांचा मुगुट घातल्याचे पाहत आहोत. कारण देवाच्या कृपेमुळे येशूने सर्व मानवजातीसाठी मरण सोसले.

10देव असा आहे ज्याने सर्व गोष्टी निर्माण केल्या आणि सर्व गोष्टी त्याच्या गौरवासाठी आहेत. देवाला त्याच्या गौरवाचे भागीदार होण्यासाठी पुष्कळ पुत्र व कन्या पाहिजेत. म्हणून देवाने जे त्याला करायला पाहिजे होते ते केले. त्याने येशूला जो त्या लोकांना तारणापर्यंत नेतो त्याला परिपूर्ण केले. देवाने येशूला त्याच्या दु:खसहनाद्वारे परिपूर्ण तारणारा बनविले.

11जो लोकांना पवित्र करतो व ज्यांना पवित्र करण्यात आले आहे, ते सर्व एकाच कुटुंबाचे आहेत या कारणासाठी तो त्यांना बंधु आणि भगिनी म्हणण्यास लाजत नाही. 12येशू म्हणतो,

"मी तुझे नाव माझ्या बंधु आणि भगिनींना सांगेन मी सभेसमोर तुझी स्तुति गाईन."

*स्तोत्र. 22:22*

13तो आणखी म्हणतो,

"मी माझा विश्वास देवावर ठेवीन" *यशया 8:17*

आणि तो पुन्हा म्हणतो,

"येथे मी आहे आणि माझ्याबरोबर देवाने दिलेली मुले आहेत." *यशया 8:18*

14म्हणून मुले रक्त व मांस यांची बनलेली असल्याने त्यानेसुद्धा त्या रक्तात व मांसात त्यांच्यासमवेत भाग घेतला. येशूने हे यासाठी केले की, ज्याच्याकडे मरणाची सत्ता आहे, अशा सैतानाचा मरणाने नाश करावा. 15आणि जे लोक त्यांच्या सर्व आयुष्यात मरणाचे भय मनात ठेवून त्याचे गुलाम असल्यासारखे जगत होते त्यांना मुक्त करावे. 16कारण हे स्पष्ट आहे की, तो काही देवदूतांना मदत करत नाही, उलट अब्राहामाचे जे वंशज आहेत त्यांना तो मदत करतो, 17या कारणासाठी देवाच्या सेवेतील दयाळू व विश्वासू असा मुख्य याजक होण्यासाठी आणि लोकांच्या पापांसाठी प्रायश्चित्त करण्यासाठी येशूला सर्व गोष्टींमध्ये आपल्या बांधवांसारखे होणे अत्यंत आवश्यक होते. 18कारण ज्याअर्थी त्याला स्वत:ला परीक्षेला व दु:खसहनाला तोंड द्यावे लागले, त्याअर्थी ज्यांना आता परीक्षेला तोंड द्यावे लागत आहे त्यांना मदत करण्यास तो समर्थ आहे.

### येशू मोशेपेक्षा महान आहे

3 म्हणून पवित्र बंधूनो, ज्यांना देवाने बोलाविलेले आहे, त्यांनी येशूविषयी विचार करावा. तो देवाचा प्रेषित (प्रतिनिधी) आणि आमच्या विश्वासाचा मुख्य याजक आहे. 2ज्या देवाने त्याला प्रेषित व मुख्य याजक म्हणून नेमले त्याच्याशी येशू विश्वासू होता, जसा देवाच्या संपूर्ण घराण्यात मोशे देवाशी विश्वासू होता. 3ज्याप्रमाणे घरापेक्षा घर बांधणाराला अधिक मान असतो, त्याप्रमाणे येशू हा मोशेपेक्षा अधिक सन्मानास पात्र गणला गेला. 4कारण प्रत्येक घर बांधणारा कोणीतरी असतो, पण देवाने सर्व काही बांधलेले आहे. 5देवाच्या संपूर्ण घराण्यात मोशे हा सेवक म्हणून अधिक विश्वासू होता, देव ज्या गोष्टी पुढील काळात सांगणार होता, त्याविषयी त्याने लोकांना साक्ष दिली. 6परंतु ख्रिस्त हा पुत्र म्हणून देवाच्या घराण्यात विश्वासू आहे आणि जर आम्ही आपला विश्वास व आशा यांचा अभिमान बाळगतो व धीर धरतो, तर आपणही त्याचे घर आहोत.

### आपण सतत देवाला अनुसरले पाहिजे

7म्हणून, पवित्र आत्मा म्हणतो, त्याप्रमाणे,

"आज, जर तुम्ही देवाची वाणी ऐकाल,
8तर आपली अंत:करणे कठीण करू नका. ज्याप्रमाणे तुम्ही अरण्यामध्ये देवाची परीक्षा पाहण्यासाठी देवाविरुद्ध बंडखोरी केली,
9जेथे तुमच्या वाडवडिलांनी माझी परीक्षा पाहिली व मला कसोटीस लावले, तेथे त्यांनी चाळीस वर्षे सामर्थ्यशाली कामे पाहिली.

10त्यामुळे मी या पिढीवर रागावलो आणि म्हणालो, 'या
लोकांच्या मनात नेहमी चुकीचे विचार येतात, या लोकांना
माझे मार्ग कधीही समजले नाहीत'
11म्हणून रागाच्या भरात मी शप वाहून म्हणालो, 'हे
लोक मी देऊ केलेल्या विसाव्याच्या ठिकाणी कधीच
प्रवेश करणार नाहीत.'"

*स्तोत्र. 95:7-11*

12सावध असा, बंधूंनो, तुमच्यापैकी कोणाचीही
अंत:करणे दुष्ट व अविश्वासू असू नयेत, ती जिवंत
देवापासून दूर नेतात. 13उलट, 'आज' म्हटलेला काळ
आहे तोपर्यंत, प्रत्येक दिवशी एकमेकांना उत्तेजन द्या,
यासाठी की तुमच्यापैकी कोणाचीही पापामुळे फसगत
होऊन तुमची अंत:करणे कठीण होऊ नयेत. 14कारण
आपण सर्व जण ख्रिस्तामध्ये त्याच्यावरील विश्वासाचे
वाटेकरी आहोत. जर आम्ही सुरुवातीला धरलेला आमचा
विश्वास शेवटपर्यंत दृढ धरून राहिलो, तर 15पवित्र शास्त्रात
लिहिल्याप्रमाणे:

"आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तेव्हा तुम्ही
देवाविरुद्ध बंड केलेत; तशी आपली अंत:करणे कठीण
करू नका."

*स्तोत्र. 95:7-8*

16ज्यांनी देवाची वाणी ऐकली पण त्याच्याविरुद्ध बंड
केले असे कोण होते? तेच लोक नव्हते का, ज्यांना
मोशेने इजिप्त देशातून बाहेर नेले होते? 17आणि तो (देव)
कोणावर चाळीस वर्षे रागावला होता? ते सर्व तेच नव्हते
काय, ज्यांनी पाप केले आणि ज्यांची प्रेते अरण्यात पडली
होती.
18कोणाविषयी देवाने अशी शपथ वाहिली की ते माझ्या
विसाव्याच्या ठिकाणी प्रवेश करणार नाहीत? ज्यांनी त्याच्या
आज्ञा मोडल्या तेच नव्हते काय? 19म्हणून आपण पाहतो
की, ते लोक देवाच्या विसाव्याच्या ठिकाणी त्यांच्या
अविश्वासामुळे येऊ शकले नाहीत.

4 ज्याअर्थी देवापासून मिळालेले अभिवचन जे त्याच्या
विसाव्याच्या ठिकाणी प्रवेश करण्यासाठीचे आहे,
ते अजून तसेच आहे. म्हणून तुमच्यापैकी कोणीही ते
चुकवू नये म्हणून काळजी घ्या. 2कारण आम्हालासुद्धा
सुवार्ता सांगितली गेली आहे ज्याप्रमाणे ती इस्राएल लोकांना
सांगण्यात आली होती. परंतु जो संदेश त्यांनी ऐकला
त्यापासून त्यांना फायदा झाला नाही कारण तो संदेश
त्यांनी ऐकला पण त्यांनी विश्वासाने स्वीकारला नाही.
3ज्या आम्ही विश्वास ठेवला ते पवित्र शास्त्रात
लिहिल्याप्रमाणे त्या विसाव्याच्या ठिकाणी प्रवेश करणार
आहोत. जसे देवाने म्हटले आहे,

"म्हणून मी माझ्या रागाच्या भरात अशी शपथ वाहून
म्हणालो, 'ते माझ्या विसाव्याच्या ठिकाणी कधीच प्रवेश
करणार नाहीत'"

*स्तोत्र. 95:11*

जगाच्या निर्मितीपासूनचे त्याचे काम संपलेले होते तरी तो
असे म्हणाला. 4कारण पवित्र शास्त्रात तो सातव्या दिवसा
बद्दल असे बोलला आहे की: "आणि सातव्या दिवशी
देवाने त्याच्या सर्व कामापासून विश्रांति घेतली."* 5आणि
पुन्हा या वचनांमध्ये तो म्हणतो, "ते माझ्या विसाव्याच्या
ठिकाणी कधीही प्रवेश करणार नाहीत"
6ज्यांना अगोदर सुवार्ता सांगण्यात आली होती त्यांचा
त्यांच्या अविश्वासामुळे त्यात प्रवेश झाला नाही, तरी हे
खरे आहे की, काही जणांचा त्या विसाव्यात प्रवेश होणार
आहे. 7त्यांच्यासाठी देवाने पुन्हा एक वेळ निश्चित केली
असून त्याला तो "आज" असे म्हणतो, अगोदरच उद्धृत
केलेल्या उताऱ्यामध्ये म्हटल्याप्रमाणे देव त्या दिवसाविषयी
पुष्कळ वर्षांनी दाविदाद्वारे बोलला:

"आज, जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर आपली
अंत:करणे कठीण करू नका." *स्तोत्र. 95:7-8*

8कारण जर यहोशवा त्यांना देवाने दिलेल्या विसाव्याच्या
ठिकाणी घेऊन गेला, तर देव दुसऱ्या दिवसाबद्दल पुन्हा
बोलला नसता. 9म्हणून देवाच्या लोकांसाठी अजूनही
सातवा म्हणजे विसाव्याचा दिवस आहे. 10कारण जो कोणी
देवाच्या विसाव्याच्या ठिकाणी प्रवेश करतो, तो त्याच्या
स्वत:च्या कामापासून विसावा घेतो. ज्याप्रमाणे देवाने
त्याच्या कामापासून विसावा घेतला होता. 11म्हणून त्या
विसाव्याच्या ठिकाणी प्रवेश करण्यासाठी आपण सर्वतोपरी
प्रयत्न करू या. यासाठी की, कोणीही इस्राएल लोकांनी
आज्ञाभंग केल्याप्रमाणे त्यांचे अनुकरण करू नये.
12कारण देवाचे वचन जिवंत आणि कार्य करणारे
आहे आणि कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा अधिक धारदार
आहे. ते आपला आत्मा, जीव, सांधे, आणि मज्जा यांना
भेदून आरपार जाणारे आहे. ते अंत:करणाचे विचार व
कल्पना यांचे परीक्षक असे आहे. 13आणि कोणतीही
अशी निर्मित गोष्ट नाही की जी त्याच्यापासून लपलेली
आहे आणि ज्याच्यापाशी आम्हांला सर्व गोष्टींचा हिशेब
द्यावयाचा आहे. त्याच्यासमोर सर्व गोष्टी उघड व स्पष्ट
अशा आहेत.

### देवासमोर येण्यास येशू आपणांस मदत करतो

14म्हणून, ज्याअर्थी आम्हाला येशू देवाचा पुत्र हा महान
मुख्य याजक लाभला आहे व जो स्वर्गात गेला आहे,

---

**आणि ... घेतली** उत्पति 2:2

असा जो विश्वास आपण गाजवितो तो अखंडपणे भक्कम धरू या. 15कारण आपल्याला लाभलेला महान याजक असा नाही, जो आपल्या अशक्तपणाबद्दल सहानुभूति दर्शविण्यास असमर्थ आहे. पण आपल्याला असा याजक लाभला आहे की, जो आमच्यासारखाच सर्व प्रकारच्या मोहाच्या अनुभवातून गेला. तरीही तो पूर्णपणे निष्पाप राहिला. 16म्हणून आपण त्याच्या कृपेच्या सिंहासनाजवळ ठाम निर्धाराने जाऊ या. यासाठी की, आमच्या गरजेच्या वेळी साहाय्य मिळावे म्हणून आम्हाला दया व कृपा प्राप्त व्हावी.

5 प्रत्येक मुख्य याजकाची निवड लोकांमधून होते. आणि लोकांच्या वतीने त्यांच्या पापांसाठी जी दाने व अर्पणे देवाला सादर केली जातात, त्या कामाकरिता मुख्य याजक नेमलेला असतो. 2प्रत्येक मुख्य याजक हे जे चुका करतात व जे अज्ञानी आहेत त्यांच्याशी सौम्यपणे वागण्यास असमर्थ असतो कारण तो स्वत: दुबळा असतो. 3आणि त्या दुबळेपणामुळे त्याने त्याच्या पापांसाठी तसेच लोकांच्या पापांसाठी अर्पणे केलीच पाहिजेत. 4आणि कोणीही मुख्य याजकपणाचा बहुमान स्वत:च्या पुढाकाराने घेत नसतो, तर अहरोनाला होते तसे त्यालाही देवाचे पाचारण असणे आवश्यक असते. 5त्याचप्रमाणे, ख्रिस्ताने मुख्य याजक होण्याचा गौरव स्वत:हून आपणावर घेतले नाही, परंतु देव ख्रिस्ताला म्हणाला,

“तू माझा पुत्र आहेस आज मी तुला जन्म दिला आहे.”
*स्तोत्र. 2:7*

6दुसऱ्या शास्त्रभागात तो असे म्हणतो,

“मलकीसदेकाप्रमाणे तू अनंतकाळासाठी याजक आहेस” *स्तोत्र. 110:4*

7येशूच्या पृथ्वीवरील जीवनाच्या काळात, त्याने देवाकडे मोठ्याने ओरडून आणि रडून प्रार्थना व विनंत्या केल्या. जो देव त्याला मृत्युपासून वाचवू शकत होता. आणि देवाविषयीच्या त्याच्या सन्माननीय आदरामुळे येशूच्या प्रार्थना ऐकल्या गेल्या.

8जरी तो पुत्र होता, तरी त्याने ज्या गोष्टी सोशिल्या त्यापासून तो आज्ञाधारकपणा शिकला. 9आणि नंतर त्याला परिपूर्ण केल्यावर, जे त्याच्या आज्ञा पाळतात त्यांच्यासाठी अनंतकाळच्या तारणासाठी तो उगम झाला 10व मलकीसदेकाच्या संप्रदायास अनुसरून देवाकडून तो प्रमुख याजक म्हणून नियुक्त झाला.

11याविषयी सांगण्यासारखे पुष्कळ आहे, पण तुम्हांला ते स्पष्ट करणे कठीण आहे. कारण तुम्ही ऐकण्यात खूप मंद झाला आहात. 12आतापर्यंत तुम्ही शिक्षक व्हायला हवे होते, तरी देवाच्या शिक्षणाचे प्राथमिक धडे पुन्हा तुम्हाला कोणीतरी शिकविण्याची गरज आहे. तुम्हांला दुधाची गरज आहे, सकस अन्नाची नव्हे! 13कारण जो कोणी अजून दुधावरच जगतो त्याला वचनाच्या पोक्त शिक्षणाची काहीही माहिती नसते. कारण अजून तो बाळच असतो. 14परंतु याउलट सकस अन्न हे प्रौढांसाठी योग्य असते. ख्रिस्ती लोकांची इंद्रिये ख्रिस्ती जीवनाच्या सरावामुळे चांगले व वाईट यांतील भेद ओळखण्यास तयार झालेली असतात.

6 म्हणून ख्रिस्ताविषयीची प्राथमिक माहिती आपण मागे सोडून देऊ व प्रौढतेप्रत जाऊ. 2पुन्हा एकदा देवावरचा विश्वास, बाप्तिस्म्याविषयीची* शिकवण, डोक्यावर हात ठेवणे, मृतांचे पुनरुत्थान आणि अनंतकाळचा न्यायनिवाडा, देवावरील विश्वास, आपल्या निर्जीव गतजीवनाचा पश्चात्ताप या मूलभूत गोष्टींचा पाया आपण पुन्हा घालू नये. 3आणि जर देवाची इच्छा असेल तर आपण पूर्ण ख्रिस्तीपणापर्यंत जाऊ. 4ज्यांना स्वर्गीय दानांचा अनुभव आलेला आहे व जे पवित्र आत्म्याचे भागीदार झाले आहेत, त्यांना पुन्हा पश्चात्तापाकडे नेणे अशक्य आहे. 5तसेच देवाच्या वचनाची गोडी अनुभवली आहे, व येणाऱ्या युगाच्या सामर्थ्याचा अनुभव आहे आणि 6त्यानंतर ख्रिस्तापासून जर ते दूर गेले तर त्यांना पश्चात्तापाकडे वळविणे अशक्य आहे, कारण त्याच्या स्वत:च्या हानीकरता ते देवाच्या पुत्राला पुन्हा वधस्तंभावर खिळतात व लोकांच्या अवकृपेच्या समोर त्याला आणतात.

7जी जमीन वेळोवेळी पडणाऱ्या पावसाचे पाणी पिते व ज्या लोकांकडून तिची लागवड होते त्यांच्यासाठी धान्य उपजविते तिला देवाकडून आशीर्वाद प्राप्त होतो. 8पण जी जमीन काटे व कुसळे उपजविते, ती निरुपयोगी आहे व तिला शाप मिळण्याची भिति असते; तिचा अग्नीने नाश होईल.

9बंधूंजनहो, आम्ही या गोष्टी तुम्हाला सांगत आहोत, पण खरोखर आम्ही तुमच्याकडून अधिक चांगल्याची अपेक्षा करतो. आम्हांला अशी खात्री आहे की, ज्या तारणाचा भाग असलेल्या गोष्टी आहेत त्या तुम्ही कराल. 10कारण तुम्ही केलेली पवित्रजनांची सेवा, त्या सेवेत तुम्ही अजूनही दाखवीत असलेले सातत्य, तुमचे काम व त्याच्या लोकांना दानाद्वारे व इतर मदत करण्याद्वारे तुम्ही त्याच्यावर केलेले प्रेम ही सर्व विसरण्याइतका देव अन्यायी नाही. 11पण आमची अशी इच्छा आहे की, तुमच्या आशेच्या पूर्तीची पूर्ण खात्री होण्याकरिता तुमच्यातील प्रत्येकाने शेवटपर्यंत कार्याची अशीच आवड दाखवावी. 12आम्हांला असे वाटते की, तुम्ही आळशी बनू नये. तर जे लोक विश्वासाद्वारे व धीराद्वारे देवाने दिलेल्या अभिवचनाचे

---

**बाप्तिस्मा** या ठिकाणी याचे दोन अर्थ होऊ शकतात. दोन्हीपैकी एक. (1) याचा ख्रिस्ती बाप्तिस्मा (काही क्षणाकरिता पाण्यात बुडविणे किंवा (2) यहूदी विधिपूर्वक धुण्याची पद्धत.

फळ मिळवितात अशा लोकांचे अनुकरण करणारे तुम्ही व्हावे.

13जेव्हा देवाने अब्राहामाला वचन दिले, तेव्हा त्याच्यापेक्षा कोणी मोठा नसल्याने देवाने स्वत:च्याच नावाने शपथ वाहिली. 14तो म्हणाला, "मी तुला भरपूर आशीर्वाद देईन आणि मी तुझ्या वंशजांना सतत बहुगुणित करीत राहीन."

15म्हणून धीराने वाट पाहिल्यानंतर देवाने जे वचन त्याला दिले होते ते त्याला प्राप्त झाले. 16लोक, नेहमी शपथ वाहताना आपल्यापेक्षा जो मोठा असतो त्याच्या नावाचा उपयोग करतात. कारण शपथ ही विदित केलेल्या सत्याची खात्री पटविणे व सर्व वादाचा शेवट करणे यासाठी असते. 17आपल्या योजनेचे कधीही न बदलणारे स्वरूप वचनाच्या वारसदारांना कळावे अशी देवाची इच्छा आहे. म्हणून त्याने वाहिलेल्या शपथेच्या द्वारे याबाबत हमी दिली. 18देवाने असे केले यासाठी की, ज्यांच्याविषयी लबाडी करणे देवासाठी अशक्य आहे अशा दोन न बदलणाऱ्या कृतींमुळे (त्याचे वचन व शपथ) जे आपण आश्रयाकरिता निघालो आहोत, त्या आपणांस त्या आशेसंबधाने अधिक उत्तेजन प्राप्त व्हावे. 19आम्हांला ही आशा जणू काय भक्कम, सुरक्षित अशा नांगरासारखी आत्म्याला आहे व ही आशा मंदिराच्या पडद्यामागील आतील बाजूस प्रवेश करते, 20जेथे आमच्यापुढे धावत येशू आमच्यासाठी आत गेलेला आहे. तो मलकीसदेकाप्रमाणे अनंतकाळासाठी मुख्य याजक झाला आहे.

## मुख्य याजक मलकीसदेक

7 हा मलकीसदेक शालेमाचा राजा होता. आणि तो सर्वोच्च देवाचा याजक होता. राजांचा पराभव करून अब्राहाम परतत असताना मलकीसदेक त्याला भेटला. मलकीसदेकाने त्याला आशीर्वाद दिला. 2व अब्राहामाने आपल्या सर्वस्वाचा दहावा भाग त्याला (मलकीसदेकाला) दिला. मलकीसदेकाच्या नावाचा अर्थ "नीतिमत्त्वाचा राजा" त्याचप्रमाणे तो शालेमाचा राजा असल्याने त्याचा अर्थ "शांतीचा राजा" असा होतो. 3मलकीसदेकाचे आईवडील किंवा त्याचे पूर्वज, त्याचा जन्म किंवा मृत्यूची नोंद आढळत नाही. देवपुत्राच्या प्रतिमेशी तो हुबेहूब मिळताजुळता असल्यामुळे तो देखील अनंतकाळासाठी याजकच राहणार आहे.

4यावरून तुम्ही पाहता की, मलकीसदेक किती महान पुरुष होता! मूळ पुरुष अब्राहाम यानेसुद्धा आपल्या लुटीतील दहावा भाग त्याला दिला. 5आणि लेवीचे वंशज जे याजक झाले त्यांनी मोशेच्या नियमशास्त्रातील आज्ञेप्रमाणे लोकांकडून (आपल्या सहोदरांकडून), जरी ते अब्राहामाचे वंशज होते तरी, दशांश गोळा करावा. 6मलकीसदेक लेव्याच्या वंशजांपैकी नव्हता, पण तरीही त्याने अब्राहामाकडून दशमांश घेतला. आणि ज्याला देवाकडून अभिवचन मिळाले होते, त्याला (अब्राहामाला) त्याने आशीर्वाद दिला. 7यामध्ये कोणत्याही प्रकारचा संशय नाही की, श्रेष्ठ व्यक्ती कनिष्ठाला आशीर्वाद देते. 8एका बाबतीत म्हणजेच लेव्यांच्या बाबतीत, जो मनुष्य मरतो तो दशमांश गोळा करतो, पण दुसऱ्या बाबतीत म्हणजे मलकीसदेकाच्या बाबतीत, पवित्र शास्त्रात लिहिल्याप्रमाणे दशमांश अशा व्यक्तीने घेतला की जी अजूनही जिवंत आहे. 9एखादा असेही म्हणू शकतो की, लेवी जे दशमांश गोळा करीत, प्रत्यक्षात तेही अब्राहामाद्वारे मलकीसदेकाला दशमांश देत. 10कारण जेव्हा मलकीसदेक अब्राहामाला भेटला त्यावेळी लेवी जणू त्याचा पूर्वज अब्राहाम याच्या शरीरात बीजरूपाने होता.

11लेवीय वंशजांच्या याजकीय पद्धतीने लोकांना नियमशास्त्र दिले गेले पण तशा प्रकारच्या याजकीय पद्धतीने लोक धार्मिकदृष्ट्या परिपूर्ण बनू शकले नसते. म्हणून आणखी एका याजकाच्या येण्याची आवश्यकता होती. तो अहरोनासारखा नसून मलकीसदेकासारखा हवा होता. 12कारण जेव्हा याजकपणात बदल होतो तेव्हा नियमशास्त्रसुद्धा बदलणे अपरिहार्य होते. 13कारण या सर्व गोष्टी ज्याच्याबद्दल सांगितल्या आहेत, तो लेवी वंशापेक्षा वेगळ्या वंशाचा आहे. व त्याच्या (लेवीच्या) वंशातील कोणीही वेदीजवळ अशा प्रकारची याजकीय सेवा केलेली नाही. 14हे स्पष्ट आहे की, आमचा प्रभु यहूदा वंशातील होता आणि या वंशासंबंधी याजकपणाबद्दल मोशेने काहीही सांगितले नाही.

## येशू हा मलकीसदेक याजकासारखा आहे

15आणि जेव्हा या दुसऱ्या प्रकारचा नवीन याजक मलकीसदेकासारखा येतो तेव्हा ही गोष्ट आणखी स्पष्ट होते. 16मानवी नियमशास्त्राच्या हुकूमाने येशूला याजक करण्यात आले नव्हते तर अक्षय जीवनाच्या सामर्थ्याच्या आधारे त्याला याजक करण्यात आले. 17कारण अशाप्रकारे त्याच्याविषयी पवित्र शास्त्रात लिहिले आहे:

"तू मलकीसदेकासारखा अनंतकाळासाठी याजक आहेस"*

18जुना नियम बाजूला ठेवण्यात आला आहे, कारण तो दुबळा व निरुपयोगी होता. 19कारण नियमशास्त्रामुळे कोणतीच गोष्ट पूर्ण झाली नाही आणि आता एक अधिक चांगली आशा आम्हांला देण्यात आली आहे, जिच्यामुळे आम्ही देवाजवळ येतो. 20हेसुद्धा महत्त्वाचे आहे की देवाने येशूला मुख्य याजक करताना शपथेशिवाय केले नाही. जेव्हा इतरांना याजक करण्यात आले तेव्हा त्यांना शपथेशिवाय याजक करण्यात आले. 21पण येशू जेव्हा याजक बनला तेव्हा तो शपथेने बनला. ज्याने त्याला सांगितले की,

---

**तू ... आहेस** स्तोत्र. 110:4

"प्रभूने शपथ वाहिली आहे, आणि तो आपले मत
बदलणार नाही: 'तू अनंतकाळचा याजक आहेस.'"
*स्तोत्र. 110:4*

22याचा अर्थ असा की, येशू हा अधिक चांगल्या कराराची
खात्री आहे. 23तसेच, इतर पुष्कळ मुख्य याजक होते.
परंतु मरणामुळे पुढे ते याजकपद चालवू शकले नाही.
24त्याचे याजकपद कायमचे आहे, कारण तो सर्वकाळ
राहतो. 25म्हणून, जे त्याच्याद्वारे देवाकडे येतात त्यांना तो
अनंतकाळासाठी तारण्यास समर्थ आहे. कारण
त्यांच्यासाठी मध्यस्थी करण्यास तो सदैव जिवंत आहे.
26म्हणून येशू अगदी आपल्या गरजांस अनुरूप असा
मुख्य याजक आहे, ज्याची आम्हाला गरज आहे. तो
पवित्र, निष्कपट आणि निष्कलंक आहे; दोषविरहित
आणि शुद्ध आहे, तो पाप्यांपासून वेगळा केलेला आहे.
त्याला आकाशाहूनही उंच केलेले आहे.
27दुसरे मुख्य याजक जसे दररोज अर्पणे अर्पण
करतात तसे करण्याची त्याला गरज नाही. जे इतर याजक
पहिल्यांदा त्यांच्या पापांसाठी व मग लोकांच्या पापांसाठी
जसे अर्पण करतात तसे त्याला करण्याची गरज नाही.
त्याने जेव्हा स्वत:ला अर्पण केले त्याचवेळी एकदाच व
कायमचेच अर्पण केले आहे. 28कारण नियमशास्त्र मानवी
दुर्बलता असलेल्या मनुष्याची मुख्य याजक म्हणून नेमणूक
करते. परंतु नियमशास्त्रानंतर शपथेचे वचन देण्यात
आल्यामुळे पुत्र हा सर्वकाळासाठी परिपूर्ण असा मुख्य
याजक झाला.

## येशू आपला मुख्य याजक

8 आम्ही जे सांगत आहोत त्याचा मुद्दा असा आहे की:
असा मुख्य याजक आम्हांला लाभलेला आहे की,
जो स्वर्गामध्ये देवाच्या सिंहासनाच्या उजव्या बाजूस बसतो,
2आणि कोणत्याही मानवनिर्मित मंडपात नव्हे, तर प्रभु
परमेश्वराने बनविलेल्या खऱ्याखुऱ्या मंदिराच्या
परमपवित्रस्थानात तो मुख्य याजकाची सेवा करतो. 3प्रत्येक
मुख्य याजक जो नेमलेला असतो, त्याला दाने व अर्पणे
सादर करावी लागतात. म्हणून आपल्या ह्या मुख्य
याजकालादेखील काहीतरी सादर करणे जरुरीचे होते.
4जर तो पृथ्वीवर असता तर तो मुख्य याजकदेखील
झाला नसता. कारण तेथे अगोदरचे नियमशास्त्राप्रमाणे
दानांचे अर्पण करणारे आहेत. 5ते जी कामे करतात, ती
स्वर्गातील गोष्टींची नक्कल आणि छाया अशी आहेत.
परमेश्वराचा मंडप घालीत असताना देवाने मोशेला जो
आदेश दिला, तशी ही सेवा आहे, कारण देव म्हणाला,
"तुला पर्वतावर मी जो नमुना दाखविला त्या सूचनांबरहुकूम
प्रत्येक गोष्ट कर."
6परंतु येशूला नेमून दिलेली याजकीय सेवा मुख्य
याजकांच्या सेवेहून जशी फारच वरच्या दर्जाची आहे,
तसाच येशू ज्या नवीन कराराचा मध्यस्थ आहे, तो करार
अगोदरच्या कराराहून अधिक वरच्या दर्जाचा आहे, कारण
तो करार अधिक चांगल्या वचनांच्या पायावर उभा आहे.
7जर पूर्वीचा करार दोषविरहित असता तर त्याच्या
जागी दुसऱ्या कराराची गरज भासली नसती. 8परंतु देवाला
लोकांमध्ये दोष आढळला. तो म्हणाला, "परमेश्वर म्हणतो,
असे दिवस येत आहेत, जेव्हा मी इस्राएल लोकांबरोबर
नवा करार करीन व यहूदाच्या घराण्याशी नवा करार
करीन.
9ज्याप्रमाणे मी त्यांच्या पूर्वजांशी केला तशा प्रकारचा
हा करार असणार नाही. त्या दिवशी मी त्यांच्या हाताला
धरून इजिप्त देशातून बाहेर आणले, ते माझ्याशी केलेल्या
कराराशी विश्वासू राहिले नाही, त्यामुळे मी त्यांच्याकडे
पाठ फिरवली.
10परमेश्वर म्हणतो, "त्या दिवसांनंतर मी इस्राएल
लोकांबरोबर असा करार करीन; मी माझे नियम त्यांच्या
अंत:करणात घालीन, त्यांच्या हृदयांवर ते लिहीन, मी
त्यांचा देव होईन, ते माझे लोक होतील.
11तुमच्या प्रभूला ओळखा असे एखाद्या मनुष्याने आपल्या
बंधूला अथवा आपल्या देशबांधवाला सांगण्याची गरज
पडणार नाही, कारण त्यांच्यातील कनिष्ठापासून वरिष्ठांपर्यंत
सर्वजण मला ओळखतील.
12कारण मी दयाळूपणे यापुढे त्यांचे अपराध माफ करीन.
त्यांची पापे विसरून जाईन." *यिर्मया 31:31-34*

13या कराराला नवीन करार म्हटले म्हणून त्याने पहिला
करार जुना ठरविला. जे जुने ते निकामी ठरते व नाहीसे
होऊन जाते.

## जुन्या कराराप्रमाणे उपासना

9 पहिल्या करारात उपासनेसंबंधी काही नियम होते
आणि मनुष्यांनी बनविलेले एक पवित्रस्थान होते.
2कारण दीपस्तंभ व अर्पणाच्या विशेष भाकरी ठेवण्यासाठी
पहिल्या मंडपामध्ये एक मेज ठेवण्यात आला होता. हा जो
पहिला मंडप होता त्याला पवित्र स्थान असे म्हणतात.
3दुसऱ्या पडद्यामागे एक खोली (मंडप) होती, त्याला
परमपवित्रस्थान म्हणत* 4त्यामध्ये ऊद जाळण्यासाठी
सोन्याची वेदी होती. आणि कराराची पेटी (कोष).* ही
पेटी (कोष) संपूर्ण सोन्याने मढवलेली होती त्या पेटीत
(कोषात) एका सोन्याच्या भांड्यात मान्ना होता, तसेच
अहरोनाची काठी जिला पाने फुटलेली होती व कराराच्या
दगडी पाट्या होत्या. 5या पेटीवर (कोषावर) गौरवाचे

---

**परमपवित्रस्थान म्हणत** अती पवित्र ठिकाण. ज्या ठिकाणी
देव मुख्य याजकाला भेटे असे म्हणत.

**पेटी (कोष)** लाकडी पेटी जी सोन्याने मढवलेली होती व
जिच्यात देवाने दिलेल्या दहा आज्ञा दिलेल्या दगडी होत्या.

करूबीम दयासनावर* सावली करीत होते. परंतु या
गोष्टींबाबत सविस्तर चर्चा आता आपण करू शकत नाही.
6या व्यवस्थेनुसार याजकगण आपल्या कर्तव्यकर्मासाठी
पहिल्या मंडपात प्रवेश करीत असत. 7पण केवळ एकटा
मुख्य याजकच वर्षातून एकवेदाच दुसऱ्या खोलीत
(मंडपात) जाई, शिवाय तो रक्त घेतल्याशिवाय आत जात
नसे. ते रक्त तो स्वत:साठी (स्वत:च्या पापांसाठी) व
लोकांच्या अज्ञानाच्या पापांसाठी अर्पण करायला आत
जात असे. 8याद्वारे पवित्र आत्मा हे दर्शवितो की, पहिला
मंडप उभा आहे तोपर्यंत परमपवित्रस्थानात जाण्याचा मार्ग
खुला नाही. 9हे सर्व आजच्या काळात प्रतिकात्मक आहे.
याचा अर्थ असा की, देवाला दिलेली दाने व त्याला वाहिलेली
अर्पणे यामुळे उपासकाची सदसद्विवेकबुद्धि परिपूर्ण होऊ
शकत नाही. 10हे विधी केवळ बाह्य बाबी म्हणजे अन्न व
पाणी तसेच निरनिराळ्या प्रकारच्या औपचारिक
धुण्याबाबत संबंधित आहेत.

## नव्या कराराप्रमाणे उपासना

11पण आता ख्रिस्त हा घडून आलेल्या चांगल्या गोष्टींचा
मुख्य याजक म्हणून आला आहे. तो मनुष्याच्या हातांनी
बांधला नव्हता अशा महान तसेच सर्व दृष्टींनी परिपूर्ण
अशा मंडपामध्ये, या निर्मितीमधील, 12बकरे किंवा वासरू
यांचे रक्त घेऊन नव्हे, तर आपले स्वत:चेच रक्त घेऊन
परमपवित्रस्थानात गेला; व त्याने सर्व काळासाठी स्वत:च
एकदाच अर्पण करून आपल्याला कायमचे तारण मिळवून
दिले. 13कारण बकरे व बैल यांचे रक्त; तसेच कालवडीची
राख त्यांच्यावर शिंपडले तर त्याची अपवित्र शरीरे शुद्ध
होतात, 14तर ख्रिस्ताचे रक्त देवासाठी त्याहून कितीतरी
अधिक परिणामकारक अर्पण ठरू शकेल! ख्रिस्ताने
सदाजीवी आत्म्याच्याद्वारे आपल्या स्वत:चे डागविरहित
आणि परिपूर्ण असे अर्पण केले. त्याचे रक्त आपल्या
निर्जीव कर्मांमुळे मरून गेलेली आपली सदसद्विवेकबुद्धि
शुद्ध करील. अशासाठी की, आपण जिवंत देवाची उपासना
करू शकू.

15पहिल्या काळात ज्या चुका झाल्या, त्या चुकांपासून
सुटका व्हावी म्हणून देव आपल्या वचनानुसार
अनंतकालच्या वतनासाठी ज्या लोकांना बोलावितो,
त्यांच्याकरिता ख्रिस्त हा नवीन कराराचा मध्यस्थ झाला
आहे.

16जेथे मृत्यूपत्र केलेले आहे तेथे ते करून ठेवणाराचा
मृत्यू झाला आहे, हे सिद्ध होणे जरुरीचे असते. 17कारण
मृत्युपत्र करणारा जिवंत आहे तोपर्यंत मृत्युपत्र अंमलात
येऊ शकत नाही. 18म्हणून रक्त सांडल्याशिवाय पहिला
करारदेखील अंमलात आला नव्हता. 19कारण
नियमशास्त्राची प्रत्येक आज्ञा सर्व लोकांसमोर जाहीर
केल्यानंतर मोशेने पाण्याबरोबर वासराचे व बकऱ्याचे
रक्त तसेच किरमिजी लोकर आणि एजोबाच्या फांद्या हे
सर्व बरोबर घेतले; आणि ते त्याने नियमशास्त्राच्या
पुस्तकावर आणि सर्व लोकांवर शिंपडले. 20तो म्हणाला,
"जो करार पाळण्याची देवाने तुम्हाला आज्ञा केली होती
त्या कराराचे हे रक्त आहे." 21त्याचप्रमाणे त्याने मंडपावर
व उपासनेसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व वस्तूंवर ते रक्त
शिंपडले. 22खरे पाहता, नियमशास्त्राप्रमाणे जवळजवळ
प्रत्येक गोष्ट रक्ताने धुतलीच पाहिजे आणि रक्त
सांडल्याशिवाय क्षमा मिळत नाही.

## ख्रिस्ताचे अर्पण पाप नाहीसे करते

23म्हणून स्वर्गातील गोष्टींच्या नमुन्याप्रमाणे असलेल्या
वस्तू यज्ञाच्या द्वारे शुद्ध करणे जरुरीचे होते. पण त्याहूनही
अधिक चांगल्या यज्ञाने स्वर्गीय गोष्टींच्या प्रतिमा शुद्ध
केल्या जातात. 24कारण ख्रिस्ताने मानवी हातांनी केलेल्या
पवित्रस्थानात पाऊल ठेवले असे नाही, तर ते स्थान
खऱ्या वस्तूची केवळ प्रतिमाच आहे. देवाच्या समोर हजर
होण्यासाठी खुद्द स्वर्गात त्याने प्रवेश केला. 25जे त्याचे
स्वत:चे नाही असे रक्त घेऊन जसा मुख्य याजक
परमपवित्रस्थानात दरवर्षी जातो तसा ख्रिस्त पुन्हा पुन्हा
परमपवित्रस्थानात गेला नाही. 26तसे असते तर ख्रिस्ताला
जगाच्या स्थापनेपासून स्वत:चे अर्पण पुष्कळ वेळा करावे
लागले असते. परंतु आता युगाच्या शेवटी आपल्या स्वत:ला
अर्पण करून पाप नाहीसे करण्यासाठी तो एकदाच प्रकट
झाला आहे. 27आणि जसे लोकांना एकदाच मरण व
नंतर न्यायासनासमोर येणे नेमून ठेवलेले असते, 28तसाच
ख्रिस्त पुष्कळ लोकांची पापे नाहीशी करण्याकरिता
अर्पणरूपाने केवळ एका वेळेस दिला गेला आणि परत
एकदा, दुसऱ्या वेळेस, त्यांची पापे नाहीशी करावी म्हणून
नव्हे, परंतु जे त्याची आतुरतेने वाट पाहतात त्यांच्यासाठी
दिसेल.

## ख्रिस्ताचे अर्पण आम्हाला परिपूर्ण करते

10 कारण नियमशास्त्र हे भविष्यकाळात येणाऱ्या
चांगल्या गोष्टींची केवळ एक छाया आहे. त्या
सत्याचे ते खरे स्वरूप नव्हे. म्हणून देवाची उपासना
करण्यासाठी जे त्याच्याजवळ येतात त्यांना नियमशास्त्र
त्याच अर्पणांमुळे जी वर्षानुवर्षे पुन्हा पुन्हा केली जातात,
ते कदापि परिपूर्ण करू शकत नाही. 2जर नियमशास्त्र
लोकांना परिपूर्ण करू शकले असते तर यज्ञ अर्पण
करण्याचे थांबले नसते का? कारण उपासना करणारे,
कायमचेच शुद्ध झाले असते आणि त्यानंतर आपल्या
पापांच्या बाबतीत दोषी ठरले नसते.

---

**दयासन** कराराच्या पवित्र कोषाचा वरचा भाग. ज्या जागी लोकांच्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून याजक वर्षातून एकदा पशूचे रक्त टाकीत असे ती जागा.

3पण त्याऐवजी ते यज्ञ दरवर्षी पापांची आठवण करून देतात. 4कारण बैलांच्या किंवा बकऱ्याच्या रक्ताने पाप नाहीसे होणे शक्य नाही.

5म्हणून ख्रिस्त जेव्हा या जगात आला, तेव्हा तो म्हणाला,

"तुला यज्ञ किंवा अर्पणे नको होती, पण तू माझ्यासाठी शरीर तयार केले.

6होमार्पणांनी व पापार्पणांनी तुला आनंद वाटला नाही.

7मग मी म्हणालो, 'हा मी आहे! नियमशास्त्राच्या गुंडाळ्यामध्ये माझ्याबद्दल लिहून ठेवले आहे, देवा, तुझी इच्छा पूर्ण करण्यास मी आलो आहे.'" *स्तोत्र. 40:6-8*

8पहिल्याने तो म्हणाला, "तुला यज्ञांनी, अर्पणांनी, होमार्पणांनी व पापार्पणांनी संतोष वाटत नाही." (जरी नियमशास्त्रानुसार ही अर्पणे आवश्यक ठरतात तरीदेखील.) 9मग तो म्हणाला, "हा मी आहे! तुझी इच्छा पूर्ण करण्यास मी आलो आहे." अशा रीतीने त्याने दुसरी व्यवस्था करण्यासाठी पहिली रद्द केली. 10देवाच्या इच्छेनुसार येशू ख्रिस्ताच्या देहाच्या एकदाच झालेल्या अर्पणाद्वारे आपण शुद्ध करण्यात आलो.

11प्रत्येक यहूदी याजक उभा राहतो आणि दररोज त्याची धार्मिक कामे करत असतो आणि ज्यामुळे पाप नाहीसे होत नाही असे यज्ञ तो वारंवार अर्पण करतो. 12परंतु आपल्या पापांसाठी येशूने त्याच्या देहाचे एकमेव अर्पण केले. कारण ते सर्वकाळासाठी चांगले होते. तो आता देवाच्या उजवीकडे बसला आहे. 13आणि आता त्याच्या शत्रूला त्याच्या पायाखाली घालीपर्यंत तो वाट पाहत आहे. 14कारण अनंतकाळच्या त्याने केलेल्या एका यज्ञाच्या द्वारे त्याने ज्यांना शुद्ध केले, त्यांना परिपूर्ण केले.

15पवित्र आत्माही याबाबत आपल्याला साक्ष देतो. पहिल्यांदा तो असे म्हणतो,

16"त्या दिवसानंतर मी त्यांच्याशी हा करार करीन, असे प्रभु म्हणतो, मी माझे नियम त्यांच्या अंत:करणात ठेवीन आणि ते त्यांच्या मनावर लिहीन. *यिर्मया 31:33*

17 मग तो म्हणतो,

आणि मी त्यांची पापे व नियमविरहित कृत्ये कधीही आठवणार नाही." *यिर्मया 31:34*

18जेथे या पापांची क्षमा झाली आहे, तेथे पापाच्या आणखी अर्पणाची आवश्यकता भासणार नाही.

## देवाच्या जवळ या

19म्हणून बंधु आणि भगिनींनो, येशूच्या रक्ताद्वारे आपण बिनधास्तपणे परमपवित्र स्थानामध्ये प्रवेश करतो. 20त्याच्या शरीराद्वारे, त्याने उघडलेल्या नवीन आणि जिवंत अशा मार्गामुळे आपण न भीता परमपवित्रस्थानात पाऊल ठेवू शकतो. 21आणि देवाच्या घराण्यावर आपल्याला महान असा मुख्य याजक मिळाला आहे. 22म्हणून आपण आपली मळीन विवेकबद्धि शुद्ध करण्यासाठी आपल्या मनावर केलेल्या येशूच्या रक्तसिंचनाने आणि आपली शरीरे पवित्र पाण्याने धुतल्याने आपण विश्वास, आश्वासन तसेच तळमळ यांनी भरलेल्या अंत:करणाने देवाच्या जवळ जाऊ. 23आपल्याला जी आशा आहे तिला आपण चिकटून राहू कारण ज्याने आपल्याला अभिवचन दिले, तो विश्वासू आहे. 24आपण एकमेकांस समजून घेऊ व प्रेम आणि चांगली कामे करण्याकरिता एकमेकांना उत्तेजन देऊ. 25आणि काही जणांना जी वाईट सवय असते तसे आपण एकत्र येण्याचे बंद करू नये, परंतु एकमेकांना उत्तजेन देऊ या, आणि तो दिवस* जवळ येत असताना तसे उत्तेजन देण्याची अधिकच गरज आहे.

## ख्रिस्तापासून दूर जाऊ नका

26सत्याचे ज्ञान प्राप्त झाल्यानंतरसुद्धा जर आपण जाणूनबुजून पाप करीत राहिलो, तर मग पापांसाठी यापुढे आणखी अर्पण करण्याचे बाकी राहिले नाही.

27पण जे देवाला विरोध करतात त्यांना भयंकर अशा न्यायनिवाड्याशिवाय व भयंकर अशा भस्म करणाऱ्या अग्नीशिवाय दुसरे काही शिल्लक राहिले नाही. 28जो कोणी मोशेचे नियमशास्त्र नाकारतो त्याला दोघा किंवा तिघांच्या साक्षीच्या आधारे कसलीही दया न दाखविता मारतात. 29तर मग ज्याने देवाच्या पुत्राला पायाखाली तुडविले, ज्या रक्ताने त्याला शुद्ध केले त्या रक्ताला अपवित्र ठरविले आणि ज्याने कृपेच्या आत्म्याचा अपमान केला, त्या मनुष्याला कितीतरी अधिक शिक्षा मिळेल याचा विचार करा! 30कारण त्याला ओळखतो तो म्हणतो, "सूड घेणे माझ्या हाती आहे; मी परतफेड करीन."* पुन्हा तो असे म्हणतो, "प्रभू आपल्या लोकांचा न्याय करील."* 31जीवंत देवाच्या हाती सापडणे किती भयंकर गोष्ट आहे.

## तुम्ही आपला आनंद व धैर्य गमावू नका

32ते पूर्वीचे दिवस आठवा, जेव्हा नुकताच तुम्हाला सुवार्तेचा प्रकाश प्राप्त झाला होता, तेव्हा तुम्ही भयंकर दु:खे सोसली. 33काही वेळा जाहीरपणे तुमचा अपमान करण्यात आला. आणि वाईट शब्द वापरण्यात आले. तर काही वेळा ज्यांना अशा रीतीने वागणूक मिळाली त्यांचे सहभागी व्हावे लागले. 34एवढेच नाही, तर त्यांच्यासाठी तुम्ही झीजदेखील सोसली. जे तुरूंगात होते त्यांना तुम्ही

---

**तो दिवस** कदाचित ख्रिस्त पुन्हा येईल ती वेळ.

**सूड ... करीन** अनुवाद 32:35

**प्रभु ... करील** स्तोत्र 35:14

मदत केली. त्यांच्या दु:खात सहभागी झाला आणि जे
तुमच्याकडे होते ते तुमच्याकडून घेण्यात आले तरी तुम्ही
आनंदी होता. कारण तुमच्याजवळ अधिक चांगली व
सर्वकाळ टिकणारी संपत्ती आहे, हे तुम्ही जाणून होता.
35म्हणून तुमच्यामध्ये जो दृढ विश्वास होता तो सोडू
नका. कारण त्यापासून तुम्हाला मोठा लाभ होणार आहे.
36तुम्ही धीर धरणे जरूरीचे आहे. म्हणजे जेव्हा तुम्ही
देवाची इच्छा पूर्ण करून त्याने तुम्हांला दिलेल्या त्याच्या
वचनाप्रमाणे तुम्ही प्रतिफळ मिळवावे. 37आता अगदी
थोडक्या अवधीनंतर,

"जो येणारा आहे, तो येईल, तो उशीर लावणार नाही.
38परंतु माझा धार्मिक पुरुष विश्वासाने वाचेल आणि
जर तो पाठ फिरवील तर माझ्या जिवाला संतोष होणार
नाही." *हबक्कूक 2:3-4*

39परंतु पाठ फिरवून नष्ट झालेल्यांपैकी आपण नाही,
तर आपल्या जिवाचे तारण साधून विश्वास बागळणाऱ्यांपैकी
आहोत.

### विश्वास

11 आता विश्वास म्हणजे, आम्ही जी आशा धरतो
त्याबद्दलची खात्री, म्हणजे ज्या गोष्टी आपण पाहू
शकत नाही त्याबद्दल भरंवसा असणे. 2यासाठीच म्हणजे
त्यांच्या विश्वासासाठीच देवाने पूर्वीच्या लोकांना उंचावले
होते. 3विश्वासामुळेच आम्हांला समजते की, या जगाची
निर्मिती देवाच्या आज्ञेने झाली. म्हणून जे काही आता
दिसते ते जे दिसत नव्हते त्यापासून निर्माण केले गेले.
4विश्वासामुळेच हाबेलाने काईनापेक्षा अधिक चांगला यज्ञ
देवाला अर्पण केला. देवाने हाबेलाची दाने मान्य केल्यामुळे
विश्वासाच्याद्वारे तो धार्मिक म्हणून उंचावण्यात आला,
आणि जरी तो मेला असला तरी तो आपल्या विश्वासामुळे
अजून बोलतो.
5विश्वासामुळे हनोखाला देवाकडे नेण्यात आले, यासाठी
की, त्याला मरणाचा अनुभव आला नाही व तो कोणाला
सापडला जाऊ नये म्हणून देवाने त्याला दूर नेले. पण तो
वर घेतला जाण्यापूर्वी त्याच्याबद्दल साक्ष देण्यात आली
की, तो देवाला संतोषवीत असे. 6आणि विश्वासाशिवाय
देवाला संतोषविणे अशक्य आहे. कारण जो कोणी देवाकडे
येतो त्याने असा विश्वास धरला पाहिजे की देव आहे
आणि जे त्याला शोधतात त्यांना तो बक्षीस देतो. 7ज्या
गोष्टी अजून पाहिल्या नव्हत्या, अशा गोष्टींच्या बाबतीत
नोहाला सावधान करण्यात आले होते तेव्हा त्याने
विश्वासाने त्याची दखल घेतली. आणि आपल्या कुटुंबाचा
बचाव करण्यासाठी जहाज बांधले, विश्वासामुळेच त्याने
जगाचा धिक्कार केला आणि विश्वासामुळे लाभणाऱ्या
धार्मिकतेचा तो वारस बनला.
8जेव्हा देवाने अब्राहामाला पाचारण केले तेव्हा
विश्वासानेच त्याने आज्ञापालन केले. आणि त्याला वतन
म्हणून जी जागा मिळणार होती त्या जागेकडे तो गेला.
आपण कोठे जात आहोत हे त्याला ठाऊक नसतानादेखील
तो बाहेर पडला. 9विश्वासाने तो वचनदत्त देशात एखाद्या
उपऱ्यासारखा राहिला. इसहाक व याकोब यांच्यासारखा
तोदेखील तंबूत राहिला. कारण ते दोघेही अब्राहामाला
दिलेल्या त्याच वचनाचे वारसदार होते. 10ज्या नगराला
मजबूत पाया आहे व ज्याचा प्रयोजक बांधकाम कारागीर
स्वत: देव आहे अशा नगराची ते वाट पाहात होते.
11आपण दिलेल्या वचनाबाबत देव विश्वासू आहे हे
जाणून सारा ही जरी वांझ होती आणि अब्राहामाचे वय
लेकरे होण्याच्या अगदी मर्यादेपलीकडे गेले होते, तरी
विश्वासाने मुलाला जन्म देण्याची शक्ति त्यांना मिळाली.
12आणि जवळजवळ मरावयास टेकलेल्या अशा एका
अब्राहामापासून आकाशातील ताऱ्यांच्या संख्येएवढी आणि
समुद्रकिनाऱ्यावरील वाळूच्या कणांइतकी अगणित संतति
जन्मास आली. 13हे सर्व लोक विश्वासात मरण पावले.
देण्यात आलेल्या वचनांचे प्रतिफळ त्यांना प्राप्त झाले नव्हते.
परंतु त्यांनी विश्वासाने ते दुरूनच पाहिले व त्याचे स्वागत
केले आणि त्यांनी उघडपणे कबूल केले की ते परके
आणि प्रवासी आहेत. 14जे लोक अशा गोष्टी बोलतात ते
हेच दर्शवितात की ते त्यांच्या वतनासाठी देश पाहत आहेत.
15ते जर आपण सोडून आलेल्या देशाबद्दल विचार करीत
असते तर त्यांना त्या देशात परत जाण्याची संधी मिळाली
असती 16परंतु ते लोक त्याहून अधिक चांगल्या देशाची
म्हणजे स्वर्गाच्या वतनाची इच्छा धरून होते. म्हणून देवाला
त्यांचा देव म्हणवून घ्यायला लाज वाटली नाही. कारण
त्याने त्यांच्यासाठी एक नगर तयार केले आहे.
17जेव्हा देवाने अब्राहामाची परीक्षा पाहिली, तेव्हा
विश्वासाने आपला पुत्र इसहाक याला अर्पण केले. होय,
ज्याला अभिवचने दिली होती, तो आपला एकुलता एक
पुत्र अर्पण करण्यास तयार झाला होता. 18आणि देवाने
त्याला सांगितले होते की, "इसहाकाकडूनच तुझ्या वंशाची
वाढ होईल."*
19अब्राहामाचा असा विश्वास होता की, देव मनुष्याला
मरणातून पुन्हा उठवू शकतो आणि अलंकारिक भाषेत
बोलायचे झाले तर इसहाक त्याला जसा काय मरणातून
परत मिळाला.
20इसहाकाने विश्वासाने याकोबाला व एसावाला पुढील
काळासाठी आशीर्वाद दिले. 21विश्वासाने याकोब, जेव्हा
तो मरत होता, तेव्हा त्याने योसेफाच्या प्रत्येक मुलाला
आशीर्वाद दिला आणि आपल्या काठीवर तो टेकला
असताना त्याने देवाची उपासना केली. 22आपल्या
आयुष्याच्या शेवटी योसेफ विश्वासाने इस्राएल लोक इजिप्त

**इसहाकाकडून ... होईल** उत्पत्ति 2:12

देशाच्या बाहेर जाण्याबाबत बोलला आणि त्याच्या
अस्थिसंबंधी काय करायचे याच्या सूचना त्याने दिल्या.
23जेव्हा मोशे जन्मला तेव्हा विश्वासाने त्याच्या
आईवडिलांनी त्याला तीन महिने लपवून ठेवले कारण
त्यांनी पाहिले की ते बाळ सुंदर आहे आणि राजाज्ञेची
त्यांना भीति वाटली नाही.
24विश्वासाने मोशेने जेव्हा तो मोठा झाला, तेव्हा फारोच्या
कन्येचा पुत्र म्हणवून घेण्याचे नाकारले. 25पापाचे
अल्पकाळ टिकणारे सुख भोगण्यापेक्षा देवाच्या
लोकांबरोवर त्रास सहन करण्याचे त्याने निवडले. 26इजिप्त
देशातील संपत्तीपेक्षा ख्रिस्तासाठी अपमान सहन करणे हे
अधिक मौल्यवान आहे, असे त्याने मानले. कारण तो
पुढे मिळणाऱ्या बक्षीसाकडे पाहत होता. 27राजाच्या रागाची
भिति न बाळगता, मोशेने इजिप्त देश सोडला. जणू काय
न दिसणाऱ्या देवाला पाहत असल्यासारखा त्याने धीर
धरला. 28नाश करणाऱ्याने (देवदूताने) इस्राएल लोकांच्या
प्रथम जन्मलेल्या मुलांपैकी एकालाही हात लावू नये म्हणून
त्याने विश्वासाने वल्हांडण सण पाळला आणि रक्त शिंपडले.
29विश्वासाने त्यांनी जणू काय कोरड्या जमिनीवरून
चालावे, तसा तांबडा समुद्र पार केला. पण जेव्हा इजिप्तच्या
लोकांनी तसे करण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते बुडाले.
30लोकांनी विश्वासाने सात दिवस फेऱ्या मारल्यावर
यरीहोची भिंत पडली. 31राहाब वेश्येच्या विश्वासामुळेच
ज्या लोकांनी आज्ञा मोडली त्यांच्याबरोबर ती मारली
गेली नाही कारण तिने हेरांचे शांतीने स्वागत केले.
32मी आणखी काय सांगू? गिदोन, बाराक, शमशोन,
इफ्ताह, दावीद, शमुवेल आदि संदेष्टे यांच्याबाबत सांगू
लागलो तर वेळ पुरणार नाही. 33लोकांनी विश्वासाने
राज्ये जिंकली, न्याय स्थापित केला, आणि त्यांना देवाची
अभिवचने मिळाली, त्यांनी सिंहांची तोंडे बंद केली. 34त्यांनी
अग्निचे सामर्थ्य नष्ट केले. तरवारीने मरण्यापासून
बचावले. अशक्तपणात त्यांनी सामर्थ्य मिळविले. ते लढाईत
सामर्थ्यशाली ठरले. आणि त्यांनी परकी सेना मागे हटविली.
35स्त्रियांना त्यांचे मरण पावलेले पुन्हा जिवंत असे मिळाले,
इतरांना वेदना सोसाव्या लागल्या कारण त्यांनी अधिक
चांगले पुनरुत्थान मिळावे म्हणून सुटका करून घेण्यास
नकार दिला. 36काहींना निंदा व चाबकाचा मार सहन
करावा लागला. तर काहींना बेड्या व तुरूंगवास भोगावे
लागले. 37त्यांना दगडमार झाला. करवतीने त्यांना
चिरण्यात आले. त्यांना तरवारीने मारण्यात आले. ते मेंढ्यांचे
व बकऱ्यांचे कातडे पांघरून फिरत राहिले. ते निराधार
झाले. त्यांना अती दबावाखाली भारी पीडा देण्यात आल्या.
38त्यांच्यासाठी जग योग्य नव्हते. ते जंगलात, डोंगरकपारीत,
गुहांमधून व जमिनीतील बिळांतून लपून फिरत राहिले.
39या लोकांना त्यांच्या विश्वासाविषयी चांगले बोलण्यात
आले पण देवाने त्यांना जे अभिवचन दिले होते ते त्यांना
मिळाले नाही. 40देवाने आमच्यासाठी काहीतरी अधिक
चांगली योजना तयार केली होती यासाठी की
आमच्याबरोबर त्यांनाही परिपूर्ण करावे.

## येशूचे उदाहरण आपणसुध्दा अनुसरावे

12 म्हणून, विश्वास धरणारे पुष्कळ ढगांसारखे
साक्षीदार सभोवती असल्याने आपल्याला अडथळा
आणणाऱ्या सर्व गोष्टी तसेच सहजासहजी गुंतविणारे पाप
आपण दूर फेकू या व जी शर्यत आपल्यासमोर आहे ती
शर्यत आपण चिकाटीने पूर्ण करू. 2जो आमचे विश्वासात
नेतृत्व करतो आणि पूर्णत्वास नेतो त्या येशूवर आपले
लक्ष केंद्रित करू या. जो आनंद त्याच्यासमोर होता त्यासाठी
येशूने वधस्तंभ सहन केला होता. वधस्तंभावरील निंदास्पद
मरणाला त्याने तुच्छ मानले आणि आता त्याने देवाच्या
सिंहासनाजवळील उजवीकडे जागा घेतली आहे. 3तुम्ही
खचून जाऊ नये आणि धीर सोडू नये म्हणून पापी लोकांचा
मोठ्या प्रमाणातील विरोध सहन केला. त्याचा विचार
करा. 4पापाविरुद्धच्या तुमच्या युद्धात तुम्ही रक्त सांडेपर्यंत
अजून झगडा दिला नाही. 5ज्याच्याकडून तुम्हांला उत्तेजन
मिळेल असा जो शब्द (मुले) तुम्हाला उद्देशून वापरण्यात
आला आहे त्याचा कदाचित तुम्हाला विसर पडलेला दिसतो:
"माझ्या मुला, प्रभूच्या शिस्तीचा अनादर करू नको,
आणि जेव्हा तो तुला ताव्व्यावर आणतो, तेव्हा तू धीर
सोडू नको
6कारण ज्याच्यावर प्रभु प्रेम करतो, त्यांना तो शिस्त
लावतो आणि ज्यांना तो आपले पुत्र म्हणून स्वीकारतो,
त्यांना तो शिक्षा करतो."

*नीतिसूत्रे 3:11-12*

7हा कठीण समय आहे म्हणून शिस्त सहन कर. ते
असे दर्शविते की, देव तुम्हांला मुलांसारखी वागणूक देत
आहे; कारण असा कोणता मुलगा आहे ज्याला वडील
शिस्त लावीत नाहीत? 8जर तुम्हांला शिस्त लावलेली
नाही तर जसा इतर सर्व मुलांचा अनुभव असतो तसे
तुम्ही अनौरस मुले आहात आणि तुम्ही खरे पुत्र नाही.
9याशिवाय आम्हा सर्वांना जगिक पिता असताना त्यांनी
आम्हाला शिस्त लावली आणि त्याबद्दल आम्ही त्यांचा
आदर राखला. तर मग आम्ही आमच्या आध्यात्मिक
पित्याच्या किती तरी अधिक प्रमाणात अधीन होऊन
जगले पाहिजे बरे? 10आमच्या मानवी वडिलांनी त्यांच्या
दृष्टीने अती उत्तम अशी शिस्त थोड्या काळासाठी लावली.
पण देव आम्हाला आमच्या चांगल्यासाठी शिस्त लावतो,
यासाठी की, त्याच्या पवित्रपणात आपणही वाटेकरी व्हावे.
11शिक्षेने शिस्त लावण्याच्या वेळेस कोणतीही शिक्षा चांगली
वाटत नाही, तर दुःखाची वाटते. पण नंतर ज्या लोकांना
शिस्तीचे धडे शिकायला मिळाले आहेत, त्यांना
धार्मिकपणाच्या आणि शांतीच्या जीवनाची फळे चाखण्याची
संधि मिळते.

### आपण कसे जगतो याविषयी जागरूक राहा

12म्हणून तुमचे गळून गेलेले हात उंच करा आणि
तुमचे अशक्त गुडघे बळकट करा! 13तुमच्या पावलांकरिता
सरळ रस्ता तयार करा, यासाठी की, लंगडे पाय निकामी
होऊ नयेत, तर उलट ते बरे व्हावेत.

14सर्व लोकांबरोबर शांतीने राहण्याचा प्रयत्न करा व
पवित्र जीवन जगण्याचा प्रयत्न करा. कारण त्याशिवाय
(पवित्रतेशिवाय) कोणालाही प्रभूला पाहता येणार नाही.
15कोणीही देवाची कृपा चुकवू नये, यासाठी तिकडे लक्ष
द्या आणि इकडे लक्ष द्या की, कोणतेही कडूपणाचे मूळ
वाहून त्यापासून समस्या निर्माण होऊ नये व इतर लोकांची
मने कलुषित करू नये, म्हणून जपा. 16कोणीही व्यभिचारी
असू नये किंवा एका जेवणापायी आपला वडीलकीचा
हक्क विकून टाकणाऱ्या एसावासारखे जगिक विचाराचे
असू नये याकडे लक्ष द्या. 17नंतर तुम्हाला माहीत आहे
जेव्हा त्याला वारसहक्काने आशीर्वाद अपेक्षित होता, तेव्हा
तो नाकारण्यात आला. जरी त्याने रडून आशीर्वाद
मिळविण्याचा प्रयत्न केला. तरी आपल्या वडिलाचे मन
तो बदलू शकला नाही.

18ज्या पर्वताला हाताने स्पर्श करता येतो; जो अग्नीच्या
ज्वालांनी पेटलेला आहे, जो अंधार, दु:ख व वादळ यांनी
भरलेला आहे. अशा पर्वताकडे तुम्ही आला नाही. तर
एका नविन ठिकाणी आला आहात. 19कर्ण्याच्या
आवाजाजवळ तुम्ही आला नाहीत किंवा शब्द
उच्चारणाऱ्याच्या वाणी याजवळ तुम्ही आला नाही. असा
आवाज ज्यानी ऐकला त्यानी अशी विनंती केली की,
त्यांनी यापुढे आणखी वाणी ऐकवू नये. 20कारण ते जी
आज्ञा केली होती सहन करू शकले नाहीत. "जर एखाद्या
प्राण्याने जरी पर्वताला स्पर्श केला तरी त्याला दगडमार
करण्यात यावा."*

21खरोखर ते दृश्य इतके भयंकर होते की, मोशे म्हणाला,
"भीतीमुळे मी थरथर कांपत आहे."*

22परंतु तुम्ही सीनाय पर्वताजवळ जिवंत देवाच्या
नगराजवळ आणि स्वर्गीय यरुशलेम येथे आलेले आहात
आणि तुम्ही आनंदाने जमा झालेल्या हजारो देवदूतांजवळ
आलेले आहात. 23आणि तुम्ही प्रथम जन्मलेल्या मुलांच्या
मंडळीकडे, ज्यांची नावे स्वर्गात लिहिली आहेत अशांकडे
आला आहात, आणि तुम्ही देव जो सर्वांचा न्यायाधीश
आहे त्याच्याकडे आला आहात, आणि तुम्ही नीतिमान
लोकांच्या आत्म्यांकडे जे पूर्ण आहेत त्यांच्याकडे आला
आहात. 24आणि तुम्ही जो नव्या कराराचा मध्यस्थ येशू
त्याच्याकडे आला आहात, आणि तुम्ही शिंपडण्यात
आलेल्या रक्ताकडे आलात की जे रक्त हाबेलाच्या रक्तापेक्षा
अधिक चांगल्या गोष्टी सांगते.

25जो बोलतो त्याचे ऐकण्यासाठी नकार देऊ नका.
त्याविषयी खात्री असू द्या. ज्याने पृथ्वीवर त्यांना सावध
राहण्याविषयी सांगताना त्याचे ऐकायचे नाही असे ज्यांनी
ठरविले ते लोक जर सुटू शकले नाहीत तर मग जो
स्वर्गातून सावध करतो, त्याच्याकडे दुर्लक्ष केले तर
आम्हाला सुटकेसाठी कोणता मार्ग राहीला बरे?

26त्यावेळेस त्याच्या आवाजाने भूमि हादरली पण आता
त्याने असे अभिवचन दिले आहे की, "पुन्हा एकदा
मी केवळ पृथ्वीच नव्हे तर आकाशही हादरवून
टाकीन."*

27"पुन्हा एकदा" हे शब्द हेच दर्शवितात की, ज्या गोष्टी
उत्पन्न केलेल्या आहेत त्या काढून टाकण्यात येतील. ज्या
गोष्टी हलविता येत नाहीत त्या तशाच राहतील. 28म्हणून,
आम्हाला अढळ असे राज्य देण्यात येत असताना आपण
त्याविषयी कृतज्ञता बाळगू या, आणि आदराने व भयभीत
होऊन देवाला मान्य होईल अशी त्याची उपासना करू.
29कारण आपला देव भस्म करणारा अग्नि आहे.

13 ख्रिस्तामध्ये एकमेकांवर अखंडपणे बंधु व
भगिनीसारखी प्रीति करा. 2पाहुणचार करण्याचे
विसरू नका. असे करण्याने काहींनी त्यांच्या नकळत
देवदूतांचे स्वागत केले आहे. 3तुम्ही स्वत: त्यांच्याबरोबर
तुरुंगात होता असे समजून जे तुरुंगात आहेत त्यांची आठवण
करा. तुम्हीही देहात असल्याने जे दु:ख भोगीत आहेत
त्यांची आठवण ठेवा.

4सर्वांनी लग्नाचा आदर करावा. व वैवाहिक अशुद्धता
असू नये. कारण जे व्यभिचारी व विषयवासनेबद्दल भ्रष्ट
आहेत अशा लोकांचा देव न्याय करील. 5आपले जीवन
पैशाच्या लोभापासून दूर ठेवा व तुमच्याकडे जे आहे
त्यातच समाधान माना. कारण देवाने असे म्हटले आहे,

> "मी कधीही तुला सोडणार नाही, मी कधीही तुला
> त्यागणार नाही" *अनुवाद 31:6*

6म्हणून आपण खात्रीने म्हणू शकतो

> "देव माझा साहायकर्ता आहे, मी भिणार नाही. मनुष्य
> माझे काय करणार?" *स्तोत्र. 118:6*

7ज्यांनी तुम्हांला देवाचा संदेश दिला त्या पुढाऱ्यांची
आठवण ठेवा. त्यांच्या जीवनातील निष्पत्ती पाहा. आणि
त्यांच्या विश्वासाचे अनुकरण करा. 8येशू ख्रिस्त काल,
आज आणि युगानुयुगे सारखाच आहे.

9निरनिराळ्या तऱ्हेच्या विचित्र शिकवणुकींमुळे
बहकून जाऊ नका. अन्नाच्या विधीने नव्हे, तर देवाच्या
कृपेने आपली हृदये बळकट केलेली फार बरी. कारण

---

**जर एखाद्या ... याव** निर्गम 19:12-13

**भीतीमुळे ... आहे** अनुवाद 9:19

**पुन्हा ... टाकीन** हाग्गय 2:6

अन्नाच्या विधींचे पालन करण्याने कोणाचेही हित झालेले नाही. [10]ज्या वेदीवरील अन्न खाण्याचा किंवा सहभागी होण्याचा अधिकार मंडपात सेवा करणाऱ्यांनाही नाही. अशी वेदी आपल्याकडे आहे. [11]यहूदी मुख्य याजक प्राण्यांचे रक्त परमपवित्रस्थानात पापाचे अर्पण म्हणून घेऊन जातात. परंतु केवळ प्राण्यांची शरीरे छावणीच्या बाहेर नेऊन जाळतात. [12]म्हणून येशूने सुद्धा स्वत:च्या रक्ताने लोकांना शुद्ध करावे यासाठी नगराच्या वेशी बाहेर दु:ख सोसले. [13]म्हणून आपण छावणीच्या बाहेर जाऊ आणि येशूच्या अपमानाचे वाटेकरी होऊ. [14]कारण कायमस्वरूपी असे नगर आपल्याला येथे नसले तरी भविष्यकाळात येणारे जे नगर आहे त्याच्याकडे आपण पाहत आहोत. [15]तर मग आपण येशूच्या द्वारे स्तुतीचा यज्ञ सातत्याने करू या. म्हणजे त्याचे नाव आपल्या ओठांनी सतत घेऊ या. [16]आणि इतरांसाठी चांगले ते करण्यास आणि दानधर्म करण्यास विसरू नका. कारण अशा अर्पणाने देवाला संतोष होतो.

[17]आपल्या पुढाऱ्यांच्या आज्ञा पाळा आणि त्यांच्या अधीन असा. ज्यांना हिशेब द्यावयाचा असतो त्यांच्याप्रमाणे तुमच्या जीवासंबंधाने ते जागरूक असतात. त्यांच्या आज्ञा पाळा यासाठी की, त्यांनी त्यांचे काम दु:खाने न करता आनंदाने करावे.

[18]आमच्यासाठी प्रार्थना करा. आमची सदसद्विवेक बुध्दि शुद्ध आहे याविषयी आमची खात्री आहे आणि सर्व बाबतीत जे नेहमी बरोबर आहे तेच सदैव करीत राहावे अशी आमची इच्छा आहे.

[19]मी तुम्हांला विनंति करतो की, देवाने मला लवकरच तुमच्याकडे परत पाठवावे म्हणून प्रार्थना करा.

[20]ज्या शांतीच्या देवाने आपल्या मेंढरांचा (म्हणजे आपल्या लोकांचा) मेंढपाळ, आपला प्रभु येशू ख्रिस्त याला रक्ताच्या युगानुयुगाच्या नव्या कराराद्वारे उठविले. [21]त्याची इच्छा पूर्ण करायला तुम्हांला चांगल्या गोष्टींनी सिद्ध करो आणि येशू ख्रिस्ताच्या द्वारे त्याला संतोष देणारे काम आपल्यामध्ये करो. त्याला युगानुयुगे गौरव असो. आमेन.

[22]बंधुजनहो, हा जो बोधपर संदेश मी थोडक्यात लिहिला आहे, तो धीर धरून ऐका अशी विनंति तुम्हांला करतो. [23]आपला बंधु तीमथ्य हा तुरूंगातून सुटला आहे. जर तो लवकर माझ्याकडे आला, तर जेव्हा मी तुम्हाला भेटायला येईन तेव्हा तो मजकडे येईल. [24]तुमच्या सर्व पुढाऱ्यांना व देवाच्या सर्व संतांना सलाम सांगा, इटली येथील सर्वजण तुम्हांला सलाम सांगतात.

[25]देवाची कृपा तुम्हां सर्वांबरोबर असो. आमेन.

# याकोबाचें पत्र

1 देवाचा आणि प्रभु येशू ख्रिस्ताचा सेवक, याकोब याजकडून, देवाच्या लोकांचे "बारा वंश" जे जगभर विखुरलेले आहेत त्यांना सलाम!

### विश्वास आणि शहाणपण

2माझ्या बंधूंनो, ज्या ज्या वेळी तुमच्यावर निरनिराळ्या परीक्षा येतील तेव्हा तुम्ही स्वत:ला अत्यंत सुदैवी समजा,
3कारण तुम्हांला माहीत आहे की, तुमच्या विश्वासाच्या परीक्षेमुळे धीर निर्माण होतो. 4आणि त्या धीराला परिपूर्ण काम करू द्या. यासाठी की तुम्ही प्रौढ, परिपूर्ण व कोणत्याही बाबतीत कमतरता नसलेले असे व्हावे. 5म्हणून जर तुमच्यातील कोणी शहाणपणात उणा असेल तर त्याने ते देवाकडे मागावे. जो सर्व लोकांना उदार हस्ते देतो, आणि जो दोष शोधीत नाही, असा देव ते त्याला देईल. 6पण त्याने विश्वासाने मागितले पाहिजे व संशय धरू नये. कारण जो संशय धरतो तो वाऱ्यामुळे इकडेतिकडे हेलकावणाऱ्या समुद्रातील लाटेसारखा आहे. 7अशा मनुष्यांने असा विचार करू नये की, प्रभूपासून त्याला काही प्राप्त होईल. 8कारण तो द्विधा आहे आणि तो जे करतो त्या सर्वांत तो अस्थिर आहे.

### खरी संपत्ती

9गरिबीत असलेल्या बंधूने, देवाने त्याला आध्यात्मिक संपत्ती दिलेली आहे याविषयी अभिमान बाळगावा. 10आणि श्रीमंत बंधूने देवाने त्याला दीनतेत आणले याचा अभिमान बाळगावा. कारण तो एखाद्या रानफुलासारखा नाहीसा होतो.
11सूर्य त्याच्या प्रखर उष्णतेसह वर येतो आणि झुडपे वाळून जातात. मोहोर गळून पडतो व त्याचा लोभसवाणा पेहराव नाहीसा होतो. त्याचप्रमाणे श्रीमंत मनुष्यदेखील त्याच्या उद्योगात असताना नाहीसा होईल.

### परिक्षा देवापासून येत नाही

12धन्य तो पुरूष जो त्याच्या परीक्षेत टिकतो, कारण जेव्हा ती परीक्षा तो उत्तीर्ण होईल, तेव्हा त्याला विजेत्याचा मुगूट मिळेल. तो मुगुट देवाने जे त्याच्यावर प्रेम करतात त्यांना देण्याचे अभिवचन दिले आहे.
13कोणीही, जेव्हा तो परीक्षेत पडतो, तेव्हा असे म्हणू नये की, "हे संकट देवाने माझ्यावर आणले." कारण देवाला वाईट गोष्टींचा मोह पडणार नाही आणि तो कोणालाही मोहात पाडत नाही. 14तर प्रत्येक जण त्याच्या स्वत:च्या इच्छेनुसार मोहात पडतो. तो आकृष्ट केला जातो व मोहात पडतो. 15मनात वासना निर्माण झाली की, तिच्या पोटी पापाचा जन्म होतो व पापाची जेव्हा पूर्ण वाढ होते तेव्हा ते मरणाला जन्म देते.
16माझ्या प्रिय बंधूंनो, स्वत:ची फसवणूक होऊ देऊ नका. 17प्रत्येक उत्तम व परिपूर्ण देणगी वरून येते. स्वर्गीय प्रकाश ज्याने निर्माण केला त्या पित्यापासून ती येते. आणि ज्याच्यावर तारांगणाच्या हालचालीचा काहीही परिणाम होत नाही, अशा पित्यापासून ती देणगी येते.
18सत्याच्या संदेशाद्वारे आपण त्याची मुले व्हावे ही त्याची इच्छा पूर्ण होण्यासाठी आपली निवड केली आहे. पित्याने निर्माण केलेल्या सर्व गोष्टींमध्ये आपण "प्रथम फळ" व्हावे यासाठी त्याने असे केले.

### ऐकणे आणि आज्ञा पाळणे

19माझ्या प्रिय बंधूंनो, हे लक्षात ठेवा: प्रत्येक मनुष्य ऐकण्यास तत्पर असावा, बोलण्यात सावकाश असावा आणि रागावण्यात मंद असावा. 20कारण मनुष्याच्या रागामुळे देव ज्या नीतीमत्त्वाची अपेक्षा करतो ते निर्माण होत नाही. 21म्हणून तुमच्यासभोवतीच्या सर्व अमंगळ गोष्टींपासून पूर्णपणे स्वत:ची सुटका करून घ्या. आणि जी तुमच्या आत्म्याचे तारण करण्यास समर्थ आहे ती देवाची शिकवण तुमच्या अंत:करणात मुळावलेली आहे ती लीनतेने स्विकारा. 22देवाची शिकवण काय सांगते त्याप्रमाणे नेहमी करा व फक्त ऐकूच नका तर त्याप्रमाणे करा कारण जर तुम्ही फक्त ऐकता तर तुम्ही स्वत:ची फसवणूक करता. 23जो कोणी देवाचे वचन ऐकतो परंतु त्यानुसार वागत नाही, तो आरशामध्ये आपले नैसर्गिक तोंड पाहणाऱ्यासारखा आहे. 24तो मनुष्य स्वत:कडे लक्षपूर्वक पाहतो. नंतर निघून जातो आणि आपण कसे होतो ते लगेच विसरून जातो. 25पण देवाचे परिपूर्ण व लोकांना स्वतंत्र बनविणारे जे नियम आहेत, त्यांच्याकडे जो बारकाईने पाहतो, सतत अभ्यास करतो आणि वचन ऐकून ते विसरून न जाता त्यानुसार चालतो, तो मनुष्य जे काही करतो त्यामध्ये आशीर्वादित होईल.

## देवाच्या उपासनेचा मार्ग

26जर एखादा मनुष्य स्वत:ला धार्मिक समजतो आणि
तरी स्वत:च्या जिभेवर ताबा ठेवीत नाही, तर तो स्वत:ला
फसवितो. त्या व्यक्तीची धार्मिकता निरर्थक आहे. 27अनाथ
व विधवा यांच्या संकटात जो त्यांची काळजी घेतो, व
स्वत:ला जगातील बिघडलेल्या वातावरणापासून दूर ठेवतो.
अशा मनुष्याची धार्मिकता देवासमोर शुद्ध व निर्दोष ठरते.

## सर्व लोकांवर प्रेम करा

2 माझ्या बंधूंनो, गौरवी प्रभु येशू ख्रिस्तावरील
विश्वासाची व पक्षपातीपणाची सांगड घालू नका.
2समजा एक मनुष्य सोन्याची अंगठी व सुंदर कपडे घालून
तुमच्या सभेला आला व एक गरीब मनुष्य अव्यवस्थित
कपडे घालून आला. 3आणि समजा चांगला पोशाख घालून
आलेल्या मनुष्याला तुम्ही विशेष मानसन्मान दाखवून
त्याला म्हणाला, “येथे ज्या चांगल्या खुर्च्या आहेत त्यापैकी
एखाद्या खुर्चीवर बसा.” आणि समजा तुम्ही त्या गरीब
माणसाला म्हणाला, “तिकडे उभा राहा.” किंवा “माझ्या
पायाजवळ बस.” 4तर या बाबतीत तुम्ही दोघांत पक्षपातीपणा
दाखविलात की नाही? आणि तुम्ही आपल्या मनात वाईट
कल्पना बाळगणारे न्यायाधीश ठरलात की नाही?
5माझ्या प्रिय बंधूंनो, ऐका! देवानेच जगाच्या
दृष्टिकोनातून गरीब असले त्यांना विश्वासात श्रीमंत
होण्यासाठी निवडले नाही काय, आणि जे त्याच्यावर प्रीति
करतात त्यांना देवराज्याचे वारस म्हणून निवडण्याचे
अभिवचन दिले नाही का? 6पण तुम्ही तर गरीब मनुष्याला
तुच्छ लेखिले! तुमची पिळवणूक करणारे श्रीमंत लोकच
नाहीत काय आणि तुम्हाला न्यायालयात नेणारे तेच लोक
नाहीत काय? 7ख्रिस्ताच्या उत्तम नावाची, जे नाव तुम्हाला
देण्यात आले त्याची निंदा हेच श्रीमंत लोक करीत नाहीत
का?
8जर तुम्ही पवित्र शास्त्रातील महान आज्ञा “आपल्या
शेजाऱ्.ावर आपल्यासारखीच प्रीति करा” पाळता तर तुम्ही
योग्य करता. 9पण जर तुम्ही पक्षपात करता, तर तुम्ही
पाप करता आणि नियम मोडण्याचा दोष तुमच्यावर येतो.
10कारण जर कोणी संपूर्ण नियमशास्त्राचे पालन करतो
पण एका नियमाबाबतीत चुकतो, तर तो संपूर्ण
नियमशास्त्राबाबतीत दोषी ठरतो. 11कारण “व्यभिचार करू
नको” असे जो म्हणाला, “तो असे सुद्धा म्हणाला की,
“खून करू नको.” म्हणून जर तुम्ही व्यभिचार करीत
नाही पण खून करता तर तुम्ही नियमशास्त्र मोडता.
12अशा लोकांसारखे बोला व वागा की, ज्यांचा न्याय
अशा नियमांमुळे होणार आहे की, ज्यामुळे स्वातंत्र्य मिळेल.
13जो दयाळूपणे वागला नसेल त्याचा न्यायही देव त्याच्यावर
दया न दाखविताच करील. पण दया न्यायावर विजय
मिळविते!

## विश्वास व चांगली कामे

14माझ्या बंधूंनो, जर एखादा म्हणतो की, मी विश्वास
धरतो पण तशी कृती करीत नाही तर त्याचा काय उपयोग?
तो विश्वास त्याला तारू शकणार नाही. शकेल का?
15जर एखादा बंधु किंवा भगिनी यांना कपड्यांची
आवश्यकता असेल व त्यांना रोजचे अन्नसुद्धा मिळत
नसेल 16आणि तुमच्यापैकी एखादा त्यांना म्हणतो, “देवबाप
तुम्हांला आशीर्वाद देवो! उबदार कपडे घाला आणि चांगले
खा.” पण तुम्ही त्यांच्या शरीराला जे आवश्यक ते देत
नाही, तर तो काय चांगले करतो?
17त्याचप्रमाणे विश्वासाबरोबर जर कृतीची जोड नसेल
तर तो केवळ एक मृत असाच विश्वास असेल. 18पण
एखादा म्हणेल, “तुझ्याकडे विश्वास आहे तर माझ्याकडे
काम आहे.” कृतीशिवाय तुझा विश्वास दाखव, आणि
माझा विश्वास मी माझ्या कृतीने दाखवीन. 19तुम्ही असा
विश्वास धरता का की, फक्त एकच देव आहे? उत्तम!
भुतेदेखील असा विश्वास धरतात व थरथर कापतात.
20अरे मूढ माणसा, कृतीशिवाय विश्वास व्यर्थ आहे
याचा तुला पुरावा पाहिजे काय? 21आपला पूर्वज अब्राहाम
याने त्याचा पुत्र इसहाक याला वेदीवर परमेश्वराला अर्पण
करण्याची तयारी दर्शविली, तेव्हा त्याच्या या कामामुळे
तो देवाच्या दृष्टीत नीतिमान ठरला नाही काय? 22तू
पाहतोस की त्याच्या कृतीमध्ये विश्वाससुद्धा बरोबरीने
कार्यरत होता व त्याचा विश्वास त्याच्या कृतीमुळे पूर्ण
झाला. 23आणि अशा रीतीने पवित्र शास्त्र जे सांगते, ते
परिपूर्ण झाले की, “अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला
आणि त्याचा विश्वास हा त्याचे नीतिमत्त्व मोजला गेला.”*
आणि त्या कारणामुळे त्याला “देवाचा मित्र” असे म्हटले
गेले. 24केवळ विश्वासामुळे नव्हे, तर त्याच्या कृतीमुळे
मनुष्य देवासमोर नीतिमान ठरविला जातो, हे तुम्ही पाहता.
25त्याचप्रमाणे राहाब वेश्येने इस्राएली हेरांना आसरा
देऊन, काही वेळानंतर निराळ्या वाटेने तेथून निसटून
जाण्यासाठी मदत केली. तेव्हा ही कृती तिचे नीतिमत्त्व
मानले गेले नाही काय?
26म्हणून, ज्याप्रमाणे शरीर हे आत्म्याशिवाय मेलेले
आहे, त्याचप्रमाणे विश्वास हा कृत्यांवाचून मेलेला असा
आहे.

## ज्या गोष्टी आपण बोलतो त्यावर ताबा ठेवणे

3 माझ्या बंधूंनो, तुमच्यापैकी पुष्कळजण शिक्षक होऊ
पाहत नाहीत काय? तुम्हांला माहीत आहे की, जे
आपण शिक्षक आहोत त्या आपला काटेकोरपणे न्याय
होईल. 2मी तुम्हाला सावध करीत आहे, कारण आपण
पुष्कळ पापे करतो आणि जर कोणी त्याच्या बोलण्यात
चुका करीत नाही तर तो परिपूर्ण मनुष्य आहे. 3आपण

---

**आब्राहामाने ... गेला** उत्पत्ति 25:6

घोड्यांच्या तोंडांना लगाम घालतो यासाठी की, त्यांनी
आपल्या आज्ञा पाळाव्यात. आणि अशा प्रकारे आपण
त्यांचे संपूर्ण शरीर नियंत्रणात ठेऊ शकतो. 4किंवा जहाजाचे
उदाहरण घ्या. जरी ते खूप मोठे असले व जोरदार वाऱ्यामुळे
चालविले जाते तरी ते लहान सुकाणूद्वारे ताब्यात ठेवता
येते व सुकाणूधर नावाड्याच्या इच्छेला येईल तिकडे नेता
येते. 5त्याचप्रकारे जीभ ही शरीराचा लहानसा भाग आहे,
पण ती मोठमोठ्या गोष्टी केल्याची बढाई मारते.

फक्त विचार करा, कितीतरी मोठे जंगल लहानशा
आगीने पेट घेते! 6होय, जीभ ही ज्वाला आहे. आपल्या
शरीराच्या सर्व अवयवामध्ये वाईट गोष्टींची ती खाणच
आहे. जीभ ही आपल्या सर्व शरीराला विटाळविणारी
आहे. ती आपल्याला अपवित्र करते. आपल्या सर्व
अस्तित्वालाच ती आग लावते. ती नरकाच्या ज्वालांनी
जीवन पेटवते. 7पशू, पक्षी, सरपटणारे जीवजंतु, साप आणि
समुद्रातील निरनिराळ्या जातीचे जीव माणूस पाळू शकतो
आणि प्रत्यक्षात त्याने तसे केले आहे. 8पण कोणताही
मनुष्य आपली जीभ ताब्यात ठेवू शकत नाही. ती फार
चंचल, भयंकर, हिंस्र, दुराचारी आणि जहाल विषाने
भरलेली असते.

9आपला प्रभु आणि स्वर्गीय पिता याची स्तुति आपण
आपल्या जिभेने करतो आणि जे मानव देवाच्या प्रतिमेचे
बनविलेले आहेत, त्यांना जिभेने शापही देतो! 10एकाच
तोंडातून आशीर्वाद निघतात व शापही निघतात. माझ्या
बंधूंनो, हे असे असू नये. 11एकाच झऱ्यातून गोड व कडू
पाणी येऊ शकत नाही. 12माझ्या बंधूंनो, अंजिराच्या झाडाला
जैतुनाची फळे येतील काय? किंवा द्राक्षवेलीला अंजिर
लागतील काय? कधीच नाही. तसेच खारट पाण्याच्या
झऱ्यातून गोड पाणी येऊ शकणार नाही.

## खरे शहाणपण

13तुमच्यामध्ये कोण शहाणा व ज्ञानाने भरलेला आहे?
त्याने त्याचे शहाणपण त्याच्या चांगल्या वागणुकीने
दाखवावे. नम्रतेने केल्या जाणाऱ्या कृतीद्वारे त्याने आपले
शहाणपण दाखवावे. 14पण जर तुमच्या हृदयात कटूरता,
मत्सर व स्वार्थी उद्देश असतील तर तुम्ही तुमच्या
शहाणपणाची फुशारकी मारू शकणार नाही. कारण तसे
करणे म्हणजे खोटेपणाच्या आड सत्य लपविण्यासारखे
आहे. 15कारण अशा प्रकारचे शहाणपण वरून, स्वर्गातून
आलेले नाही, तर ते पृथ्वीवरचे आहे. अधार्मिक आणि
सैतानी आहे.

16कारण जेथे मत्सर व स्वार्थी ध्येये आढळतात तेथे
अव्यवस्थितपणा व सर्व प्रकारचे वाईट व्यवहारही
आढळतात. 17पण वरून लाभलेले शहाणपण मुळात शुद्ध,
शांतिदायक, समजूतदारपणाचे आणि मनमोकळे असून ते
दयेचे व चांगली कामे यांना उत्तेजन देणारे असते. तसेच ते
पक्षपात न करणारे व कळकळीचे असते. 18जे लोक
शांततेच्या मार्गाने शांति स्थापन करण्याचा प्रयत्न करतात
त्यांना सरळ, नीतिपूर्ण वागण्यामुळे मिळणाऱ्या चांगल्या
गोष्टींचा लाभ होतो.

## स्वत:ला देवाला द्या

4 तुमच्यामध्ये भांडणे व झगडे कोठून येतात?
तुमच्यामध्ये ज्या स्वार्थी भावना संघर्ष करतात
त्यामधून ते येत नाही काय? 2तुम्हांला काही गोष्टी पाहिजे
असतात पण त्या तुम्हांला मिळत नाही, म्हणून तुम्ही खून
करता व दुसऱ्या लोकांचा मत्सर करता पण तरीही
तुम्हांला पाहिजे ते मिळत नाही. म्हणून तुम्ही भांडण व
झगडे करता. तुम्हाला पाहिजे त्या गोष्टी मिळत नाहीत
कारण तुम्ही देवाला मागत नाही.

3आणि जेव्हा तुम्ही मागता, तेव्हा तुम्हाला काहीही
मिळत नाही, कारण तुम्ही चुकीच्या उद्देशाने मागता,
यासाठी की तुम्हाला जे काही मिळेल ते तुमच्या स्वत:च्या
सुखासाठी वापरता.

4अप्रामाणिक लोकांनो, तुम्हाला हे माहीत नाही का
की, जगाशी मैत्री हे देवाबरोबरचे वैर आहे. जो मनुष्य
जगाशी मैत्री करतो तो देवाशी वैर करतो. 5पवित्र शास्त्र
सांगते त्यात काही अर्थ नाही काय? जेव्हा ते म्हणते, की
देवाने जो आत्मा आमच्यात ठेवला आहे तो आमची हेव्याने
वाट पाहतो.*

6पण देव आम्हांवर त्याहूनही मोठी कृपा करतो.
त्यासाठीच पवित्र शास्त्र म्हणते, “देव गर्विष्ठाचा विरोध
करतो, पण नम्र जनांवर तो दया करतो.”* 7म्हणून
स्वत:ला देवाच्या स्वाधीन करा. सैतानाला विरोध करा.
आणि तो तुमच्यापासून पळून जाईल. 8देवाजवळ या, आणि
तो तुमच्याजवळ येईल. पाप्यांनो, तुमचे हात स्वच्छ करा.
आणि तुमची अंत:करणे शुद्ध करा, जे तुम्ही द्विबुद्धीचे
आहात.

9दु:खी व्हा, शोक करा, आणि रडा! तुमचे हसणे
दु:खात बदलो. तुमच्या आनंदाचे खेदात रूपांतर होवो.
10तुम्ही प्रभूसमोर नम्र व्हा म्हणजे तो तुम्हांला उच्च स्थान
देईल.

## तुम्ही न्यायाधीश नाही

11बंधूंनो, एकमेकांविरुद्ध वाईट बोलण्याचे थांबवा. जो
त्याच्या भावाविरुद्ध बोलतो किंवा जो त्याच्या भावाचा
न्याय करतो तो नियमशास्त्राविरुद्ध बोलतो. आणि तो
नियमशास्त्राचा न्याय करतो. आणि जर तुम्ही नियम
शास्त्राचा न्याय करता तर तुम्ही नियमशास्त्र जे सांगते ते
करीत नाही व तुम्ही न्यायाधीश आहात.

---

**देवाने ... वाट पाहतो** किंवा आत्मा जो देवाने ठेवला तो हेव्याने भरला आहे.

**देव ... दया करतो** नीतिसूत्रे 3:34

12नियमाशास्त्र देणारा न्यायाधीश फक्त एकच आहे.
फक्त देवच तारण करण्यास व नाश करण्यास समर्थ
आहे. तू जो तुझ्या शेजाऱ्याचा न्याय करतोस तो तू स्वत:ला
कोण समजतोस?

## देवाला तुमच्या जीवनाची योजना करू द्या

13ऐक, तू म्हणतोस, "आज किंवा उद्या आपण या शहरी
किंवा त्या शहरी जाऊ व तेथे आपण एक वर्ष घालवू
आणि आपण तेथे व्यापार करू व पैसा कमवू." 14तुला हे
देखील माहीत नाही की, उद्या तुझे काय होईल. अखेर
तुझे जीवन तरी काय आहे? कारण थोड्या काळपर्यंत
दिसणारे आणि मग अदृष्य होणारे असे धुके तुम्ही आहात.
15त्याऐवजी, तुम्ही नेहमी असे म्हणा, "जर प्रभूची इच्छा
असेल तर आपण जगू आणि आपण हे किंवा ते करू."
16पण तुम्ही तर घमेंड बाळगता आणि बढाई मारता आणि
अशी बढाई मारणे वाईट आहे. 17म्हणून जर तुम्हांला
चांगले कसे करायचे हे माहीत असूनही जर ते तुम्ही
करीत नाही, तर तुम्ही पाप करता.

## स्वार्थी श्रीमंत लोकांना शिक्षा होईल

5 श्रीमंत लोकहो ऐका! तुमच्यावर जी संकटे येत
आहेत त्याबद्दल रडा व आक्रोश करा. 2तुमची
संपत्ति नाश पावली आहे. व तुमच्या कपड्यांना कसर
खाऊन टाकीत आहेत. 3तुमच्या सोन्याचांदीवर गंज चढला
आहे. त्याच्यावर चढलेला गंज तुमच्याविरुद्ध साक्ष देईल
आणि तुमचे शरीर अग्नीसारखे खाऊन टाकील. अशा
युगामध्ये तुम्ही तुमचे धन साठवून वेगळे ठेवले आहे,
ज्याचा शेवट जवळ आला आहे! 4पहा! तुमच्या शेतात
कापणी करणाऱ्या मजुरांची मजुरी जी तुम्ही अडवून
धरलीत ती ओरडून दु:ख करीत आहे आणि कापणी
करणाऱ्यांचे रडणे प्रभु परमेश्वराच्या सैन्याच्या कानी
पोहोंचले आहे. 5जगात असताना तुम्ही ऐषारामात जगला
आणि मन मानेल तसे वागला. वधावयाच्या दिवसासाठी
खाऊनपिऊन तयार केलेल्या पशूसारखे तुम्ही पुष्ट झालात.
6जे लोक तुम्हाला काहीही विरोध करीत नाही अशा
निरपराध लोकांना तुम्ही दोषी ठरविले आहे आणि त्यांची
हत्या केली आहे.

## धीर धरा

7यासाठी बंधूंनो, प्रभूच्या येण्यापर्यंत धीर धरा, लक्षात
ठेवा की, शेतकरी आपल्या शेतातील मोलवान पिकाची
वाट पाहतो. तो धीराने त्याची वाट पाहतो. पहिला व
शेवटचा पाऊस मिळेपर्यंत वाट पाहतो. 8तुम्हीसुद्धा धीराने
वाट पाहिली पाहिजे. धैर्य धरा, कारण प्रभूचे दुसरे आगमन
जवळ आले आहे. 9बंधूंनो, एकमेकांविरुद्ध कुरकूर
करण्याचे थांबवा, यासाठी की तुम्ही दोषी ठरू नये. पहा!
न्यायाधीश दाराजवळ आत येण्यासाठी तयारीत उभा आहे.
10बंधूंनो, दु:ख सहन करीत देवाच्या नावाने लोकांशी
धीर धरून बोलणाऱ्या संदेष्ट्याचे उदाहरण तुम्ही
आपल्यासमोर ठेवा. 11त्यांनी दु:ख सहन केले म्हणून
आपण त्यांना धन्य समजतो, हे लक्षात ठेवा. तुम्ही ईयोबाच्या
धीराविषयी ऐकले आहे आणि तुम्हांला माहीत आहे की,
प्रभूने ईयोबाच्या वतीने त्याचा शेवट कसा केला. प्रभु
दयाळू आणि खूप कनवाळू आहे, ह्या गोष्टीचे त्याने
प्रात्यक्षिक दाखविले. 12याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे
बंधूंनो, स्वर्गाच्या किंवा पृथ्वीच्या नावाने शपथ वाहायचे
थांबवा किंवा इतर कोणत्याही प्रकारची शपथ वाहू नका.
तुमचे "होय" हे "होयच" असू द्या. तुमचे "नाही" हे "नाहीच"
असू द्या, यासाठी की तुम्ही देवाच्या परीक्षेत येऊ नये.

## प्रार्थनेचे सामर्थ्य

13तुमच्यातील कोणी संकटात आहे काय? त्याने प्रार्थना
करावी. कोणी आनंदी आहे काय? त्याने स्तुतिगान करावे.
14तुमच्यापैकी कोणी आजारी आहे काय? त्याने मंडळीतील
वडिलांना बोलवावे व त्यांना त्याच्यासाठी प्रार्थना करण्यास
सांगावे, आणि प्रभूच्या नावाने त्याच्यावर तेल लावावे
15विश्वासाने केलेली प्रार्थना आजारी मनुष्याला बरे करील
व प्रभु त्याला उठविल. जर त्याने पापे केली असतील तर
प्रभु त्याची क्षमा करील. 16म्हणून एकमेकांकडे आपल्या
पापांची कबुली द्या आणि एकमेकांसाठी प्रार्थना करा.
यासाठी की, तुम्ही बरे व्हावे. नीतिमान मनुष्याची प्रार्थना
सामर्थ्ययुक्त व परिणामकारक असते. 17एलीया हा
आपल्यासारख्या स्वभावाचा मनुष्य होता. पाऊस पडू नये
म्हणून त्याने कळकळीने प्रार्थना केली आणि नंतरची
साडेतीन वर्षे देशात पाऊस पडला नाही. 18मग त्याने पुन्हा
प्रार्थना केली व आकाशाने पाऊस दिला आणि पृथ्वीने
आपले धान्य उपजविले. 19माझ्या बंधूंनो, जर तुमच्यापैकी
कोणी चुकला किंवा सत्यापासून दूर भटकला असेल
आणि जर कोणी त्याला परत आणले तर पापी मनुष्याला
चुकीच्या मार्गावरून तो परत आणतो. 20तो त्याचा जीव
मरणाच्या दाढेतून सोडवितो. आणि त्याच्या पुष्कळ पापांची
क्षमा होते.

# पेत्राचें पहिले पत्र

## येशू ख्रिस्ताचा प्रेषित पेत्र याजकडून

1 देवाचे निवडलेले लोक जे या जगात प्रवासी आहेत,
जे पंत, गलतिया, कप्पदुकिया, आशिया व बिथुनिया
प्रांतात विखुरलेले आहेत त्या यहूदी लोकांना, 2देवपित्याने
फार पूर्वीच केलेल्या योजनेप्रमाणे आत्म्याच्याद्वारे तुम्ही
पवित्र व्हावे, येशू ख्रिस्ताच्या आज्ञेत राहावे आणि येशूचे
रक्त तुमच्यावर शिंपडून तुम्हांला शुद्ध करावे, याकरीता
तुम्हाला निवडले आहे. त्या तुम्हाला देवाची कृपा व शांति
भरपूर प्रमाणात लाभो.

## जिवंत आशा

3आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या पित्याची, देवाची स्तुति
असो! त्याच्या महान दयेमुळे त्याने आमचा नवा जन्म
होऊ दिला, आणि येशूला मेलेल्यातून उठविण्याने जिवंत
व नवीन आशा दिली. 4आणि ज्याचा कधी नाश होत
नाही, ज्याच्यावर काही दोष नाही, व जे कधी झिजत
नाही असे वतन स्वर्गात आपल्यासाठी राखून ठेवले आहे.
5आणि शेवटच्या काळात प्रगट करण्यात येणारे तारण
तुम्हाला मिळावे म्हणून विश्वासाच्या द्वारे, देवाच्या
सामर्थ्याने तुमचे रक्षण केले आहे. 6वेगवेगळ्या प्रकारच्या
पीडांनी काही काळापर्यंत तुम्ही दु:खी होणे जरी जरुरीचे
असले, तरी यामुळे आनंद करीत आहा. 7नाशवंत सोने
शुध्द करण्याकरिता अग्नित टाकले जाते. त्याहून अधिक
मौल्यवान अशा तुमच्या विश्वासाची कसोटी व्हावी, आणि
येशू ख्रिस्ताच्या परत येण्याच्या वेळी तो खरा ठरावा आणि
तुम्हाला स्तुति, गौरव व सन्मान मिळावा याची आवश्यकता
आहे. 8जरी तुम्ही येशूला पाहिले नाही, तरी तुम्ही त्याच्यावर
प्रीति करता. जरी आता तुम्ही त्याच्याकडे पाहू शकत
नसला तरी तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवता आणि तुम्ही
व्यक्त करता येणार नाही, अशा गौरवी आनंदाने भरला
आहात. 9तुमच्या विश्वासाचे ध्येय जे तुमच्या आत्म्याचे
तारण ते तुम्हाला प्राप्त होत आहे. 10तुमच्याकडे येणार
असलेल्या कृपेसंबंधी ज्या संदेष्ट्यांनी भविष्य वर्तविले
होते त्यांनी त्या तारणाबाबत फार मन:पूर्वक शोध घेतला
व काळजीपूर्वक चौकशी केली. 11ख्रिस्ताचा आत्मा
त्यांच्यामध्ये राहात होता. ते शोध घेत होते की कोणत्या
वेळी व कोणत्या परिस्थितीत ख्रिस्ताच्या दु:खाचा व
गौरवाचा शोध घेण्यास आत्मा सुचवीत आहे. 12स्वर्गातून
पाठविलेल्या आत्म्याद्वारे ज्यांनी शुभवर्तमान तुमच्याकडे
आणले. त्यांनीच तुम्हांस आता या गोष्टी विदित केल्या.
त्याच गोष्टी कळविण्याची जी सेवा ते करीत होते, ती
स्वत:साठी नाही, तर आमच्यासाठी करीत होते, त्या गोष्टी
बारकाईने पाहण्यासाठी देवदूतसुद्धा उत्सुक आहेत.

## पवित्र जीवनाकरिता पाचारण

13म्हणून मानसिकदृष्ट्या सावध असा आणि पूर्णपणे
आत्मसंयमन करा. जेव्हा येशू ख्रिस्त प्रकट होईल तेव्हा
तुम्हाला जे आशीर्वाद देण्यात येतील त्यावर तुमची आशा
केंद्रित करा. 14आज्ञाधारक मुलांप्रमाणे वागा व तुम्ही
अज्ञानी असताना, तुम्हांला पूर्वी ज्या दुष्ट इच्छा होत्या
त्याप्रमाणे तुमच्या जीवनाला आकार देण्याचे थांबवा.
15त्याऐवजी ज्या देवाने तुम्हाला पाचारण केले तो पवित्र
आहे, तुम्हीसुद्धा प्रत्येक गोष्ट जी तुम्ही कराल त्यात
पवित्र असा. 16कारण असे लिहिले आहे: "पवित्र व्हा,
कारण मी पवित्र आहे."*

17आणि ज्याप्रमाणे, देवाला तुम्ही पिता म्हणून हाक
मारता, जो लोकांचा नि:पक्षपातीपणे, प्रत्येकाच्या
कृत्यांप्रमाणे न्याय करतो, म्हणून या परक्या भूमीवर तुम्ही
वास्तव्य करीत असताना, या काळात देवाबद्दलच्या
आदरयुक्त भीतीमध्ये आपले जीवन जगा. 18तुम्हांला माहीत
आहे की, सोने किंवा चांदी अशा कोणत्याही नाश पावणाऱ्या
वस्तूंनी निरर्थक जीवनापासून तुमची सुटका करण्यात
आली नाही. जी तुम्हांला तुमच्या पूर्वजापासून मिळाली
आहे. 19तर कसलाही डाग किंवा दोष नसलेल्या
कोकऱ्यासारख्या ख्रिस्ताच्या बहुमोल रक्ताने तुमची सुटका
केली आहे. 20जगाच्या निर्मितीच्या अगोदर ख्रिस्ताची निवड
करण्यात आली होती. पण तुमच्याकरिता या शेवटच्या
दिवसात त्याला प्रकट करण्यात आले. 21ज्या देवाने त्याला
मेलेल्यांतून उठविले व त्याला गौरव दिले त्या देवावर
तुम्ही विश्वास ठेवणारे झाला आहात. म्हणून तुमचा
विश्वास आणि आशा देवामध्ये आहे.

22आता तुम्ही स्वत:ला शुद्ध केले आहे. सत्याची आज्ञा
पाळून शेवटपर्यंत प्रामाणिक बंधुप्रीति करा. एकमेकांवर

---

**पवित्र ... आहे** लेवीय 11:44,45; 19:2; 20:7

शुद्ध हृदयाने प्रीति करण्याकडे लक्ष द्या. 23जे बीज नाशवंत
आहे त्यापासून तुमचा नवा जन्म झाला नाही तर जे बीज
अविनाशी त्यामुळे झाला आहे. तुमचा नवा जन्म देवाच्या
वचनाद्वारे जे जिवंत आहे व टिकते त्यापासून झाला आहे.
24म्हणून पवित्र शास्त्र सांगते,

"सर्व लोक गवतासारखे आहेत आणि त्यांचे सर्व वैभव
गवतातील रानफुलासारखे आहे. गवत सुकते, फूल गळून
पडते,
25परंतु आमच्या प्रभूचे वचन अनंतकाळ टिकते."

*यशया 40:6-8*

आणि हाच तारणाचा संदेश आहे. जो तुम्हाला सांगितला
गेला.

## जिवंत धोंडा व पवित्र राष्ट्र

2 म्हणून सर्व प्रकारची दुष्टता, तसेच फसवणूक,
ढोंगीपणा हेवा, निंदा यापासून सुटका करून घ्या.
2नुकत्याच जन्मलेल्या लहान बाळासारखे तुम्ही शुद्ध
आध्यात्मिक दूधाची इच्छा धरा. यासाठी की त्यापासून
तुमची वाढ होईल व तुमचे तारण होईल. 3आता "प्रभु
चांगला आहे याचा अनुभव तुम्ही घेतला आहे."*

4जिवंत धोंडा जो प्रभु येशू त्याच्याकडे या. जो जगातील
लोकांकडून नाकारला गेला. पण जो देवाला बहुमोल
असा आहे आणि ज्याला देवानेच निवडले आहे. 5तुम्हीसुद्धा,
जिवंत धोंड्याप्रमाणे आध्यात्मिक मंदिर बांधण्यासाठी रचिले
जात आहा. पवित्र याजकगणांप्रमाणे सेवा करण्यासाठी,
ज्यांचे काम म्हणजे आध्यात्मिक अर्पणाचा देवासमोर यज्ञ
करणे असे आहे. जे देवाला, येशू ख्रिस्ताद्वारे मान्य आहे.
6म्हणून खालील उतारा पवित्र शास्त्रात नमूद केला आहे:

"पहा सियोनात मी कोनशिला बसवितो, जी मौल्यवान
व निवडलेली आहे आणि जो कोणी त्यावर विश्वास
ठेवतो तो कधीही लज्जित होणार नाही."

*यशया 28:16*

7तुम्ही जे या धोंड्यावर विश्वास ठेवता, त्या तुम्हांला तो
मौल्यवान आहे. पण जे विश्वास धरीत नाहीत त्यांना,

"बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला धोंडा तोच कोनशिला
झाला आहे." *स्तोत्र. 118:22*

8तो असा झाला,

"एक धोंडा जो लोकांना अडखळवितो आणि एक खडक
जो लोकांना पाडतो." *यशया 8:14*

ते लोक अडखळतात कारण ते देवाची आज्ञा पाळत
नाहीत. त्यांना त्याच्यासाठी नेमलेले आहे.

9पण तुम्ही निवडलेले लोक आहात. तुम्ही राज्याचे
याजक आहात, तुम्ही पवित्र राष्ट्र आहात, तुम्ही देवाचे
असलेले लोक आहात, यासाठी की, ज्या देवाने तुम्हाला
अंधारातून काढून त्याच्या अद्भुत प्रकाशात आणले त्याची
सामर्थ्यशाली कृत्ये तुम्ही प्रकट करावी. 10एकवेळ तुम्ही
लोक नव्हता पण आता तुम्ही देवाचे लोक आहात. एके
काळी तुम्हाला करुणा दाखविण्यात आली नव्हती पण
आता तुम्हाला देवाची करुणा दाखविण्यात आली.

## देवासाठी जगा

11प्रियजनहो, मी तुम्हाला तुम्ही जणू काय प्रवासी आणि
या जगात परके असल्यासारखा बोध करतो की, तुमच्या
आत्म्याच्या विरुद्ध नेहमी लढत राहणाऱ्या शारीरिक
वासनांपासून तुम्ही दूर राहा. 12जरी विदेशी लोक तुमच्यावर
टीका करतात आणि अपराध केल्याबद्दल दोष देतात तरी
तुम्ही आपले वागणे इतके चांगले ठेवा की, तुमची चांगली
कामे पाहून विदेशी लोकांनी देवाच्या परत येण्याच्या दिवशी
त्याला गौरव द्यावे.

## प्रत्येक मानवी अधिकाऱ्याची आज्ञा पाळा

13प्रभूकरिता प्रत्येक मानवी अधिकाऱ्याच्या अधीन
असा. 14राजाच्या अधीन असा, जो सर्वोच्च अधिकारी
आहे आणि राज्यपालांच्या अधीन असा. कारण अयोग्य
करणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी आणि चांगली कामे
करणाऱ्यांना शाबासकी देण्यासाठी प्रान्ताधिपतीने त्यांना
पाठविले आहे. 15म्हणून जेव्हा तुम्ही चांगले काम करता
तेव्हा मूर्ख लोकांचे अविचारी बोलणे तुम्ही बंद करता
आणि हीच देवाची इच्छा आहे. 16मुक्त लोकांसारखे जगा.
पण तुमच्या मुक्तपणे जगण्याच्या नावाखाली वाईट गोष्टींना
वाव देऊ नका. उलट देवाचे सेवक असल्याप्रमाणे जगा.
17सर्व लोकांचा आदर करा. ख्रिस्तातील तुमच्या बंधूवर्गावर
प्रीति करा. देवाप्रती भीतीयुक्त आदर असू द्या. राजाला
मान द्या.

## ख्रिस्ताच्या दुःखसहनाचे उदाहरण

18घरातील गुलामांनो, संपूर्ण आदराने तुमच्या
मालकाच्या अधीन असा. जे चांगले आणि दयाळू आहेत
त्यांच्याशीच नव्हे तर जे कठोरतेने वागतात त्यांच्यासुद्धा
अधीन असा. 19कारण हे प्रशंसनीय आहे. जर एखादा
त्याच्या अंत:करणात असलेल्या देवाच्या इच्छेसंबंधाने
जागरूक आहे व अन्यायामुळे त्याला दुःख सोसावे लागते.
20कारण जर तुम्ही केलेल्या चुकीबद्दल तुम्हांला मार
मिळाला आणि तुम्हांला तो सहन करावा लागतो, तर ते
देवासमोर मान्य आहे. 21यासाठी देवाने आपल्याला
बोलावले आहे; कारण ख्रिस्ताने देखील आपल्यासाठी

---

**प्रभु ... आहे** स्तोत्र. 34:8

दु:ख सहन केले आणि आपण त्याच्या पावलांवर पाऊल टाकून चालावे, म्हणून स्वत:च्या अशा वागण्याने आपल्यासमोर उदाहण ठेवले.

[22]"त्याने कोणतेही पाप केले नाही, त्याच्या मुखात कपट नव्हते." *यशया 53:9*

[23]जेव्हा लोकांनी त्याचा अपमान केला तेव्हा त्याने उलट अपमान केला नाही. जेव्हा त्याने दु:ख सहन केले तेव्हा त्याने धमकी दिली नाही. परंतु जो न्यायाने निवाडा करतो त्या देवाच्या हाती स्वत:ला सोपवून दिले. [24]त्याने स्वत: आमची पापे वाहिली त्याच्या शरीरावर घेऊन वधस्तंभावर वाहिली, यासाठी की आम्ही आमच्या पापाला मरावे. आणि नीतीमत्त्वासाठी जगावे. त्याला झालेल्या जखमांमुळे तुम्हाला आरोग्य मिळाले. [25]तुम्ही मेंढराप्रमाणे बहकत होता. पण आता तुमच्या जीवनाचा जो मेंढपाळ व संरक्षक त्याच्याकडे परत आला आहात.

## पत्नी आणि पती

3 त्याचप्रमाणे, पत्नींनो, आपल्या पतींच्या अधीन असा. यासाठी की, त्यांच्यापैकी काहींनी जर देवाची आज्ञा पाळली नाही तर काही न बोलताही आपल्या सद्वर्तनाने त्यांची मने जिंकता येतील. [2]जेव्हा ते तुमचे शुद्ध आणि आदरयुक्त वागणे पाहतील [3]तुमची सुंदरता बाह्यस्वरूपाची नसावी म्हणजे वेगवेगळ्या प्रकारे केस सुशोभित करण्याने, सोन्याचे दागिने वापरण्याने किंवा चांगले कपडे घातल्याने आलेली नसावी. [4]त्याऐवजी तुमची सुंदरता अंत:करणाची, जी कधीही नाश पावत नाही, अशी असली पाहिजे ती सौम्य, शांत स्वभावाची असली पाहिजे जी देवाच्या दृष्टीने अतिमौल्यवान आहे. [5]पूर्वीच्या काळातील ज्या पवित्र स्त्रिया होऊन गेल्या, त्यांनी अशाच प्रकारे आपल्या सर्व आशा देवावर केन्द्रीत करून आपली स्वत:ची सुंदरता वाढीस लावली त्या स्त्रिया आपल्या पतींच्या अधीन असत. [6]साराने अब्राहामाची आज्ञा पाळली आणि अब्राहामाला आपला मालक मानले. जर तुम्ही चांगली कामे करता व कशाचीही भीति मनात बाळगत नाही तर तुम्ही तिच्या म्हणजे सारेच्या मुली आहात. [7]तसेच पतींनो, तुम्ही आपल्या पत्नींबरोबर समंजसपणाने राहा. त्या जरी अबला असल्या तरी त्या देवाच्या कृपेमध्ये तुमच्याबरोबरच वारस आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्याविषयी आदर बाळगा, म्हणजे तुम्ही ज्या प्रार्थना देवाला सादर करता त्यात कसलीही बाधा येणार नाही.

## चांगल्या कामासाठी दु:ख सोसणे

[8]शेवटी सारांश हा की, तुम्ही सर्वजण एकमेकांशी विचार व भावना यांच्या ऐक्याने, सहानुभूतीने आपल्या भाऊबहिणींशी प्रेमाने, दयाळूपणे आणि नम्रतेने राहा. [9]वाइटाची परतफेड वाइटाने करू नका, किंवा अपमानाची फेड अपमानाने करू नका. उलट, त्या व्यक्तीसाठी देवाकडे आशीर्वाद मागा. कारण देवाने तुम्हाला हे करण्यासाठीच बोलाविले होते. यासाठी की, तुम्हाला देवाचा आशीर्वादाचा वारसा मिळावा. [10]पवित्र शास्त्र म्हणते,

"ज्याला जीवनाचा आनंद उपभोगायचा आहे, व चांगले दिवस पहावयाचे आहेत, त्याने आपली जीभ वाईट बोलण्यापासून आवरली पाहिजे, आणि त्याने आपल्या ओठांनी खोट्या गोष्टी बोलू नयेत.
[11]दुष्टतेपासून त्याने दूर व्हावे व चांगले ते करावे. त्याने शांतीचा शोध करून ती मिळविली पाहिजे
[12]जे नीतिमान लोक आहेत त्यांच्यावर प्रभुची नजर असते आणि त्यांच्या प्रार्थना तो कान देऊन ऐकतो पण जे वाईट गोष्टी करतात त्यांच्याकडे प्रभु पाठ फिरवितो."
*स्तोत्र. 34:12-16*

[13]जे चांगले ते करण्यास तुम्ही उत्सुक असाल तर अशी कोण व्यक्ती आहे जी तुम्हाला इजा करण्याचा प्रयत्न करील? पण, [14]जे योग्य ते करूनसुद्धा जर तुम्हांला दु:ख सहन करावे लागते, तर तुम्ही धन्य आहात. म्हणून "त्या लोकांची भीति बाळगू नका किंवा गर्भगळित होऊ नका"*
[15]पण आपल्या अंत:करणात ख्रिस्त हा प्रभु आहे असा आदर बाळगा तुमच्यामध्ये जी आशा आहे, तिच्याविषयी तुम्हांला कोणी विचारले तर त्याचे समर्थन करण्यास सदैव तयार राहा. [16]पण हे सौम्यतेने व आदराने करा. ख्रिस्तामध्ये जगत असताना तुमच्या चांगल्या वागणुकीवर जे आरोप करतात त्यांना लाज वाटेल, अशा रीतीने तुम्ही आपली विवेकबुद्धी शुद्ध राखा. [17]कारण चांगले काम करूनदेखील आपण दु:ख सोसावे अशी जर देवाची इच्छा असेल तर वाईट करून दु:ख भोगण्यापेक्षा ते अधिक चांगले. [18]ख्रिस्तदेखील आपल्या पापांसाठी एकदाच मरण पावला. एक नीतिमान दुसऱ्या अनीतिमानांसाठी मरण पावला. यासाठी की, तुम्हाला देवाकडे जाता यावे. त्याच्या शरीरासंबंधी म्हटले तर त्याला मारले गेले पण त्याच्या आत्म्यासंबंधी म्हटले तर त्याला पुन्हा जीवन दिले गेले. [19]आत्मिक रूपाने देखील ख्रिस्त बंदिवासात असलेल्या आत्म्यांकडे गेला व सुवार्ता सांगितली. [20]फार पूर्वी नोहाच्या काळात जेव्हा जहाज बांधले जात होते आणि देव धीराने वाट पाहत होता, त्यावेळी ज्यांनी देवाची आज्ञा पाळली नाही, तेच हे आत्मे होत. फक्त थोडकेच म्हणजे आठ लोकच जहाजात गेले व त्यांचा पाण्यापासून बचाव झाला. [21]ते पाणी आत्मा चिन्हात्मकरीत्या बाप्तिस्म्याचे ज्यामुळे आता तुमचे तारण होते त्याचे प्रतीक आहे. बाप्तिस्मा म्हणजे शरीरावरील धूळ काढणे नव्हे, तर तो देवाकडे

---

**त्या लोकांची ... नका** यशया 8:12

शुद्ध विवेक मिळावा म्हणून केलेला करार आहे. हे सर्व येशू ख्रिस्ताच्या मरणातून पुन्हा उठण्यामुळे घडू शकले. 22तो स्वर्गात गेलेला आहे आणि देवाच्या उजव्या हाताशी बसला आहे. देवदूत, अधिकार आणि सामर्थ्य हे सर्व त्याच्या अधीन आहेत.

### बदललेली जीवने

4 ख्रिस्ताने जसा शारीरिक दुःखसहनाचा अनुभव घेतला, तसेच तुम्हीसुद्धा ख्रिस्ताची जशी चित्तवृत्ति होती तशा प्रकारच्या चित्तवृत्तीने सज्ज व्हा. मी असे म्हणतो कारण ज्याने शारीरिक दुःखसहनाचा अनुभव घेतला आहे तो पाप करण्याचे सोडून देतो. 2म्हणून तो या जगात राहत असता आपल्या उरलेल्या पृथ्वीवरील जीवनात मानवी वासनांच्या आहारी जाणार नाही तर देवाची इच्छा पूर्ण करण्याकडे लक्ष देईल. 3कारण तुम्ही आजपर्यंत विदेशी लोकांसारखे आयुष्य जगत आला म्हणजे तुम्ही कामातुरपणाच्या कृतीत चालला, देहवासना, मद्यपान, बदफैलीपणा, रंगेलपणा आणि अमंगळ मूर्तिपूजा यात बेभान जीवन जगलात. 4आता तुम्ही त्यांच्यासारखे वाहवत जात नाही याचे त्यांना आश्चर्य वाटते. म्हणून तुम्हांस शिव्याशाप देतात.

5ते त्यांच्या वागणुकीचा हिशोब येशू ख्रिस्त जो जिवंतांचा आणि मेलेल्यांचा न्याय करण्यास तयार आहे, त्यास देतील. 6कारण जे मेलेले आहेत त्यांनासुद्धा सुवार्ता सांगण्यात आली होती यासाठी की, मनुष्यांप्रमाणेच शारीरिकदृष्ट्या त्यांचा न्याय व्हावा आणि आध्यात्मिकदृष्ट्या देवासमान सार्वकालिक जीवन जगावे.

### देवाने दिलेल्या देणग्यांचे चांगले कारभारी व्हा

7सर्व गोष्टींचा शेवट होण्याची वेळ जवळ आली आहे. म्हणून पूर्णपणे सावधानतेने वागा आणि प्रार्थना करण्यास सतत तयार राहा. 8सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, एकमेकांवर सात्याने प्रेम करा. कारण प्रेम पापाच्या राशीवर पांघरूण घालते. 9कुरकूर न करता एकमेकांचा पाहूणचार करा. 10तुमच्यातील प्रत्येकाने देवाकडील कारभारी या नात्याने तुम्हाला प्राप्त झालेल्या विविध दानांचा एकमेकांची सेवा करण्यासाठी काळजीपूर्वक वापर. करावा वेगवेगळी दाने असलेला कारभारी करतो तसा करावा. 11सर्व बाबतीत येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाला गौरव मिळावे यासाठी जो भाषण करतो त्याने देवापासून आपल्याला वचन आले आहे असे बोलावे; जो सेवक आहे त्याने देवाने पुरविलेल्या सामर्थ्यानुसार सेवा करीत राहावे. यासाठी की सर्व गोष्टीत येशू ख्रिस्ताद्वारे देवाला गौरव दिले जावे. कारण गौरव व सामर्थ्य अनंतकालासाठी त्याचीच आहेत. आमेन.

### ख्रिस्ती म्हणून दुःख सहन करणे

12प्रिय मित्रांनो, तुमच्यावर मोठे संकट येऊन तुमची कसोटी होते तेव्हा नवल वाटून घेऊ नका. 13त्याऐवजी, तुम्ही ख्रिस्ताच्या दुःखसहनाचे भागीदार झाल्याबद्दल आनंद करा. यासाठी की, जेव्हा त्याचे गौरव प्रकट होईल तेव्हा तुम्ही आनंदाने आरोळी मारावी. 14जर तुम्ही ख्रिस्ताचे अनुयायी आहात म्हणून कोणी तुमचा अपमान केला तर तुम्ही धन्य आहात. कारण देवाचा गौरवी आत्मा तुमच्यावर विसावतो. 15म्हणून, तुमच्यातील कोणास खुनी, चोर, भ्रष्टाचारी किंवा इतरांच्या खाजगी व्यवहारात लुडबूड करणारा म्हणून दुःख सोसावे लागू नये. 16पण जर तुम्ही ख्रिस्ती म्हणून दुःख सहन केले तर तुम्हांला त्याबद्दल लाज वाटण्याचे मुळीच कारण नाही. तर तुम्हांला “ख्रिस्ती” हे नाव मिळाल्याने देवाला गौरव द्यावे. 17कारण देवाच्या घराण्यापासून सुरूवात करून न्यायनिवाडा व्हावा अशी वेळ आली आहे. आणि त्याचा आरंभ पहिल्यांदा आपल्यापासून होईल, तर देवाच्या सुवार्तेचा सन्मान करण्याचे जे नाकारतील त्या लोकांचा शेवट कसा होईल बरे?

18आणि “जर चांगल्या माणसाचे तारण होणे अवघड आहे तर मग जो अधार्मिक व पापी मनुष्य आहे त्याचे काय होईल?”*

19तर मग ज्यांना देवाच्या इच्छेनुसार दुःख सोसावे लागते, त्यांनी आपल्या निर्माणकर्त्या देवाच्या हाती आपले जीवन सोपवून द्यावे आणि त्यांनी चांगली कामे करीत राहावे.

### देवाचा कळप

5 आता मी तुमच्यातील वडीलजनांना आवाहन करतो (मी स्वत: एक वडील आहे आणि ख्रिस्ताच्या दुःखसहनाचा साक्षीदार आहे, तसेच भविष्यकाळात प्रकट होणाऱ्या गौरवाचा भागीदारसुद्धा आहे.) 2तुमच्या देखभालीसाठी असलेल्या देवाच्या कळपाचे संगोपन करा. व त्याचा सर्वांगीण काळजीवाहक असल्यासारखे त्या कळपाचे पालनपोषण करा. तुम्हांला बळजबरीने करायला सांगितले म्हणून नाही, तर देवाला पाहिजे म्हणून स्वसंतोषाने कळपाचे पालनपोषण करा. तुम्ही पैशाचे लोभी आहात म्हणून काम करू नका तर तुम्ही सेवा करण्यास अधीर आहात म्हणून सेवा करा. 3आणि ज्यांची काळजी घेण्याची कामगिरी तुमच्यावर सोपविली आहे, त्यांच्याशी एखाद्या हुकूमशहाप्रमाणे वागू नका, तर तुमच्या सर्व कळपापुढे एक उदाहरण होईल असे वागा. 4आणि जेव्हा तुमचा मुख्य मेंढपाळ येईल, तेव्हा तुम्हाला कधीही नाश न

---

**जर … होईल** नीतिसूत्रे 11:31

पावणारा गौरवी मुगुट देईल. [5]त्याचप्रकारे तरुण बंधुनो,
वडीलजनांच्या अधिन असा. आणि तुम्ही सर्वजण लीनतेचा
पोशाख घालून एकमेकाशी विनयाने वागा कारण

"देव गर्विष्ठ लोकांचा विरोध करतो, पण दीनावर कृपा करतो." *नीतिसूत्रे 3:34*

[6]देवाने योग्य वेळी तुम्हांस उंच करावे यासाठी देवाच्या
बलशाली हाताखाली लीनतेने राहा. [7]तुमच्या सर्व चिंता
देवावर टाका, कारण तो तुमची काळजी घेतो, [8]सावध
आणि जागरूक असा. तुमचा वैरी जो सैतान तो गर्जना
करीत फिरणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे म्हणून
सगळीकडे फिरत असतो.
[9]त्याचा विरोध करा आणि तुमच्या विश्वासात खंबीर
राहा. कारण तुम्हाला माहीत आहे की, जगभर असलेल्या
बंधूभगिनींना अशाच प्रकारचे दु:ख सहन करावे लागले,
जसे तुम्ही सध्या अनुभवीत आहात.
[10]परंतु काही काळ दु:ख सहन केल्यानंतर सर्व कृपेचा
उगम जो देव, ज्याने येशू ख्रिस्ताच्या अनंतकाळच्या गौरवात
भागीदार होण्यासाठी तुम्हाला पाचारण केले तो स्वत:
तुम्हाला पुन्हा खंबीरपणे उभे करील. तुम्हाला सामर्थ्य
देईल. तुम्हाला स्थिरता देईल. [11]त्याचे सामर्थ्य अनंतकाळचे
आहे! आमेन.

### शेवटचा सलाम

[12]तुम्हाला देवाच्या खऱ्या कृपेची साक्ष द्यावी व तुम्हाला
उत्तेजन द्यावे म्हणून मी हे पत्र सिल्वानच्या हातून थोडक्यात
लिहीत आहे कारण सिल्वान हा आपला विश्वासू भाऊ
आहे. असे मी समजतो. देवाच्या खऱ्या कृपेत दृढ राहा.
[13]तुमच्याबरोबरच देवाने निवडलेली बाबेल येथील
मंडळी तुम्हांला सलाम सांगते, तसेच ख्रिस्तातील माझा
पुत्र मार्क तुम्हांला सलाम सांगतो. [14]तुम्ही एकमेकांना
प्रीतीच्या चुंबनाने सलाम करा. तुम्ही जे सर्व ख्रिस्तामध्ये
आहात त्या तुम्हांबरोबर शांति असो.

# पेत्राचें दुसरे पत्र

1 ख्रिस्त येशूचा दास व प्रेषित असलेल्या शिमोन
पेत्राकडून,
देवाकडून, ज्यांना तारणारा येशू ख्रिस्त याच्या द्वारे,
मौल्यवान विश्वास आमच्या बरोबरीनेच मिळाला आहे
अशांना, 2देव आणि आपला प्रभु येशू याच्या ओळखीमुळे
तुम्हाला देवाची कृपा व शांति विपुल प्रमाणात लाभो.

### प्रत्येक गोष्ट जी आम्हांला पाहिजे ती देवाने दिलेली आहे

3जे काही जीवनासंबंधी व देवाच्या भक्तीसंबंधी आहे ते
सर्व आम्हाला येशूच्या दैवी सामर्थ्याने दिले आहे. कारण
ज्याने आम्हाला त्याच्या स्वत:च्या गौरवाने व चांगुलपणाने
बोलविले आहे त्याला आम्ही ओळखतो. 4या गोष्टींच्या
म्हणजे गौरव व चांगुलपणा यांच्याद्वारे देवाने आपल्याला
फार महान आणि मौल्यवान असे आशीर्वादाचे अभिवचन
दिले आहे यासाठी की, त्यांच्याद्वारे आम्ही देवासारखे व्हावे
आणि जगातील दुष्ट लोकांच्या वासनांमुळे नाशापासून
सुटका करून घ्यावी. 5म्हणून या कारणासाठी आपल्या
कडून होता होईल ते प्रयत्न करून देण्यात उदारपणाची,
विश्वासात चांगुलपणाची, चांगुलपणात ज्ञानाची, 6ज्ञानात
आत्मसंयमनाची, आत्मसंयमात धीराची आणि धीरात
देवाच्या प्रामाणिक सेवेची भर घाला 7आणि देवाच्या
प्रामाणिक सेवेस बंधुप्रीतीची व बंधुप्रीतीस प्रीतीची जोड द्या.
8जर या सर्व गोष्टी तुमच्यात असतील व या गोष्टी वाढत
असतील तर त्या तुम्हाला क्रियाशील व फळ देणारे लोक
करून आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या ज्ञानात परिपूर्ण
करतील. 9पण ज्याच्या अंगी हे गुण नसतील तो पायापुरते
पाहणारा व आंधळा ठरेल. आणि त्याच्या गतकाळातील
पापापासून त्याला शुद्ध केल्याचा विसर त्याला पडला
आहे. 10म्हणून बंधूंनो, तुम्हाला देवाने खरोखरच पाचारण
केले आहे आणि निवडले आहे, हे दाखविण्यासाठी अधिक
उत्सुक असा. कारण जर तुम्ही या गोष्टी करता तर
तुम्ही कधीही अडखळणार नाही आणि पडणार नाही.
11आणि अशा प्रकारे आपला प्रभु व तारणारा येशू ख्रिस्त
याच्या अनंतकाळच्या राज्यात उदारपणे तुमचे स्वागत
करण्यात येईल.

12या कारणासाठी, या गोष्टींची मी तुम्हांला सतत आठवण
करून देत राहीन. जरी तुम्हांला त्या माहीत असल्या
आणि तुमच्याप्रत आलेल्या सत्यात तुम्ही चांगले
स्थिरावलेले असला, 13तरी हे सांगणे मी अगदी योग्य
समजतो की, जोपर्यंत या शरीराने मी जिवंत आहे तोपर्यंत
तुम्हांला आठवण करून देऊन जागे ठेवणे योग्य आहे.
14कारण मला माहीत आहे की आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताने
मला हे स्पष्ट केले आहे की, लवकरच मला हे शरीर
सोडावे लागणार आहे.* 15म्हणून या जीवनातून गेल्यानंतर
या गोष्टींची आठवण करून देण्यासाठी मी सर्व प्रसंगी
प्रयत्नांची पराकाष्ठा करीन.

### आम्ही ख्रिस्ताचे वैभव पाहिले

16कारण आपल्या प्रभु येशूच्या सामर्थ्ययुक्त
आगमनाविषयी जेव्हा आम्ही तुम्हांला सांगितले, तेव्हा
अक्कलहुशारीने बनवलेल्या भाखडकथांवर आम्ही
विसंबून राहिलो नाही. उलट आम्ही आमच्या डोळ्यांनी
त्याची महानता पाहिली.

17कारण त्याला सन्मान व गौरव ही देवपित्याकडून
प्राप्त झालीत, तेव्हा उदात्त गौरवाने अशी वाणी त्याच्याकडे
आली: "हा माझा प्रिय पुत्र आहे याजविषयी मी संतुष्ट
आहे."

18आणि त्याच्याबरोबर पवित्र डोंगरावर असताना* ही
वाणी स्वर्गातून येत असताना आम्ही स्वत: ऐकली.

19आम्ही संदेष्ट्यांचे भविष्यवचन अती विश्वसनीय असे
समजून त्यास मान देतो. त्याकडे लक्ष देऊन तुम्ही फार
चांगले करता, कारण अगदी अंधारात प्रकाशणाऱ्या
दीपाप्रमाणे ते दिसते म्हणून दिवस उजाडून प्रभात तारा
तुमच्या अंत:करणात प्रकाशेपर्यंत तुम्ही त्याकडे ध्यान
देऊन पाहाल तर चांगले होईल.

20प्रथम तुम्ही हे समजले पाहिजे की, पवित्र शास्त्रातील
कोणतेही भविष्यवचन कोणाही मनुष्याच्या बुद्धीने उकलत
नाही. 21कारण एखाद्या मनुष्याला पाहिजे म्हणून
भविष्यवाणी झालेली नाही, तर जे लोक पवित्र आत्म्याने
प्रेरित झालेले होते. त्यांनीच ती लोकांपर्यंत पोहचविलेली
आहे.

---

**लवकरच ... आहे** योहान 21:18-19.

**आणि ... असताना** मत्तय 17:1-9.

## खोटे शिक्षक

2 तरीही देवाच्या लोकांमध्ये खोटे संदेष्टे होऊन गेले
तसे तुमच्यामध्ये खोटे शिक्षक असणार. ते लोकांमध्ये
विध्वंसक विचार पसरवतील. आणि ज्या प्रभूने त्यांच्यासाठी
स्वातंत्र्य विकत घेतले त्याचा ते स्वीकार करणार नाहीत.
असे करण्याने ते स्वत:वर ताबडतोब नाश ओढवून घेतील.
2तसेच पुष्कळ लोक प्रखर लैंगिक वासनांच्या आहारी
जाऊन अनैसर्गिक शरीर व्यवहारात गुरफटतील.
त्यांच्यामुळे खऱ्या मार्गाची निंदा होईल 3त्यांच्या
अधाशीपणामुळे त्यांनी तयार केलेल्या शिकवणुकीने
पैशांसाठी तुमची पिळवणूक करतील. फार पूर्वी देवाने
त्यांना दिलेली शिक्षा ही पोकळ धमकी नाही तर त्यांचा
नाश त्यांची वाट पाहत आहे.

4कारण देवाने, ज्या देवदूतांनी पाप केले त्यांनादेखील
सोडले नाही, तर न्यायाचा दिवस येईपर्यंत त्यांना
अधोलोकाच्या गडद अंधारात टाकले. 5देवाने प्राचीन
काळातील जगाचीसुद्धा गय केली नाही; तेव्हा त्याने नोहाचे,
ज्याने लोकांना योग्य रीतीने राहण्यासाठी उपदेश केला व
त्याच्याबरोबर इतर सात लोकांचे संरक्षण केले आणि
अधार्मिक लोकांनी भरलेल्या या जगावर पाण्याचा महापूर
आणला. 6देवाने सदोम व गमोरा या शहरांना जाळून
बेचिराख करण्याची शिक्षा दिली व भविष्यकाळात
अनैतिक लोकांचे काय होईल हे या उदाहरणाने दाखवून
दिले. 7आपल्या अनीतिच्या वागण्याने ज्या बेबंद लोकांनी
लोटासारख्या चांगल्या माणसाला कष्टविले, त्याची देवाने
सुटका केली. 8दिवसेंदिवस त्या लोकांमध्ये राहत असताना,
त्या नियमविरहीत लोकांमुळे जे तो पाहत व ऐकत होता
त्यामुळे त्या चांगल्या मनुष्याला आपले धार्मिक हृदय,
फाटून जाते की काय असे त्याला वाटत होते. 9अशा
प्रकारे, प्रभुला, धार्मिक लोकांची त्यांच्या दु:खापासून
सुटका कशी करायची हे माहीत आहे आणि त्याला माहीत
आहे की न्यायाच्या दिवसापर्यंत दुष्ट लोकांना शिक्षेसाठी
कसे ठेवायचे. 10विशेषत: जे पापमय वासनांच्या भ्रष्ट
मार्गाने गेले आहेत, आणि प्रभुचा अधिकार असताना
देखील उद्धटपणे व मन मानेल तसे वागणारे ते लोक
गौरवी देवदूतांची निंदा करायला भीत नाहीत.

11याउलट देवदूत जे या लोकांपेक्षा सामर्थ्याने व बळाने
महान आहेत, ते देवासमोर या लोकांविरुद्ध अपमानास्पद
गैर काही बोलत नाहीत. 12परंतु हे लोक ज्यांना पकडून
मारून टाकावे अशा देहस्वभावानुसार चालणाऱ्या
बुद्धीहीन पशूंसारखे आहेत. ज्या गोष्टींबद्दल ते अज्ञानी
आहेत, त्याविरुद्ध हे लोक बोलतात. ज्याप्रमाणे प्राण्यांचा
नाश केला जातो, त्याचप्रमाणे (खोट्या शिक्षकांचाही) नाश
केला जाईल. 13आणि त्यांनी इतरांना दुखावल्याचे आणि
अन्यायाचे फळ म्हणून त्यांनाही दुखाविण्यात येईल. भर
दिवसा वाईट गोष्ट करण्यात आनंद आहे असे ते लोक
मानतात. ते डाग आणि कलंक असे आहेत, ते
तुमच्याबरोबर मेजवानीत सामील होताना आपल्या
कपटाच्या आनंदात बेभान होतात. 14त्यांची पापी नजर
प्रत्येक स्त्रीकडे कामूकतेने वळते व असले पाप करायचे
ते कधीही सोडत नाहीत. डळमळीत मनाच्या लोकांना ते
भुरळ घालून पापात ओढतात त्यांची मने अधाशीपणात
तरबेज झालेली असतात. ते लोक शापित आहेत. 15सरळ
वाट सोडून ते भलतीकडे भरकटत गेले आहेत. बौराचा
पुत्र बलाम याच्यासारखी वाट त्यांनी धरली आहे. बलामाला
अयोग्य गोष्टी करण्याकरिता लाच घेणे आवडत असे.
16परंतु त्याच्या दोषामुळे त्याची कानउघडणी करण्यात
आली. कधीही बोलू न शकणाऱ्या गाढवाने माणसासारखे
बोलून संदेष्ट्याच्या वेडगळपणास आवर घातला.

17हे खोटे शिक्षक पाणी नसलेले कोरडे झरे व वादळाने
पांगविलेले ढग आहेत. खोल अंधारात त्यांच्यासाठी जागा
राखून ठेवली आहे. 18ते पोकळ बढाया मारतात व जे
लोक चुकीचे जीवन जगणाऱ्यांच्या संगतीपासून सुटकेचा
प्रयत्न करू लागले आहेत, अशांची फसवणूक करून
देहवासनांच्या अनैतिकतेचा मोह टाकतात. 19हे जे खोटे
शिक्षक आहेत ते लोकांना मोकळीक देण्याचे वचन देतात
परंतु ते स्वत:च नाशवंत जीवनाचे दास आहेत. कारण
एखाद्या मनुष्यावर ज्या गोष्टीचा पगडा बसलेला असतो
त्याचा तो गुलाम बनतो. 20म्हणून आपला प्रभू व तारणारा
येशू ख्रिस्त यांची ज्या लोकांना ओळख होते, त्यांची जगाच्या
दूषित वातावारणापासून सुटका होते. परंतु नंतर पुन्हा
एकदा जगाचे अशुद्ध वातावरण या लोकांवर आपला
पगडा बसविते. मग त्यांची शेवटची स्थिती अगोदरच्या
स्थितीहून जास्तच वाईट होते. 21त्यांना जर चांगला मार्ग
माहीत झाला नसता तर चांगले झाले असते कारण चांगला
मार्ग माहीत होणे आणि त्या लोकांना दिलेल्या पवित्र
शिक्षणापासून त्यांनी वळणे, यापेक्षा (अगोदरची स्थिती
चांगली होती.) 22त्यांच्या बाबतीत जे घडले ते या खऱ्या
म्हणीत सांगितले आहे: “आपल्याच ओकीकडे परतणारा
कुत्रा” आणि दुसऱ्या म्हणीत: “स्वच्छ केले तरी चिखलात
लोळणारे डुक्कर.”

## येशू परत येईल

3 प्रिय मित्रांनो, हे दुसरे पत्र मी तुम्हाला लिहिले आहे.
दोन्ही पत्रांमध्ये या गोष्टींची आठवण करून देण्यासाठी
तुमची शुद्ध मने जागी करण्याचा प्रयत्न केला आहे.
2देवाच्या पवित्र संदेष्ट्यांनी वापरलेले शब्द आणि तुमच्या
प्रेषितांकडून आपल्या प्रभु व तारणाऱ्याने दिलेल्या आज्ञांची
तुम्ही आठवण करावी अशी माझी इच्छा आहे. 3पहिल्यांदा
आम्ही जे तुम्हाला सांगितले ते तुम्ही समजून घेतले पाहिजे,
ते म्हणजे, शेवटच्या दिवसांत थट्टेखोर लोक येतील जे
आपल्या इच्छेप्रमाणे वागतील. 4आणि म्हणतील,
“ख्रिस्ताच्या येण्याविषयीच्या अभिवचनाचे काय झाले?
आम्हाला ते जाणून घ्यायचे आहे, कारण आमचे पूर्वज

मेल्यापासून प्रत्येक गोष्ट जगाच्या निर्मितीच्या पासून जशी
चालत आली तशीच ती आजसुद्धा घडत आहे." 5पण
जेव्हा ते असे म्हणतात, तेव्हा ते मुद्दामच विसरतात की,
फार पूर्वीपासून आकाश व पृथ्वी अस्तित्वात होती, जी
देवाच्या शब्दाने पाण्यामधून आकारास आली. 6जेव्हा
मागे जग अस्तित्वात होते तेव्हा याच घटकांमुळे महापूर
येऊन पृथ्वीचा नाश झाला. 7परंतु आता जे आकाश व
पृथ्वी आहेत ती याच शब्दाने अग्निद्वारे नष्ट होण्यासाठी
राखून ठेवली आहेत. त्यांना त्याच दिवसासाठी राखून
ठेवण्यात आले आहे, जेव्हा अधार्मिक लोकांचा न्याय
होऊन त्यांचा नाश होईल.

8परंतु, प्रिय मित्रांनो, ही एक गोष्ट विसरू नका की,
प्रभूला एक दिवस एक हजार वर्षांसारखा आणि एक
हजार वर्षे एका दिवसासारखी आहेत.* 9देव त्याच्या
अभिवचनाची परिपूर्ती करण्यासाठी उशीर लावणार नाही.
जसे काही लोकांना वाटते, परंतु तो आमच्याशी धीराने
वागतो. कारण आपल्यापैकी कोणाचा नाश व्हावा असे
त्याला वाटत नाही. वास्तविक सर्व लोकांनी पश्चात्ताप
करावा असे त्याला वाटते.

10परंतु प्रभूचा दिवस एका चोरासारखा येईल, त्यादिवशी
आकाश मोठ्या गर्जनेने नाहीसे होईल व आकाशातील
सर्व गोष्टी जळून नाहीशा होतील आणि पृथ्वीवरील लोक
व त्यांची कामे उघडकीस येतील.* 11जर अशा प्रकारे
सर्व गोष्टींचा नाश होणार आहे तर तुम्ही कोणत्या प्रकारचे
लोक असायला पाहिजे याचा विचार करा. तुम्ही आपले
जीवन पवित्रतेने जगावे व देवाच्या सेवेत रममग्र असावे.
12तुम्ही प्रभुच्या येण्याच्या दिवसाची वाट पाहावी यासाठी
की देवाच्या येण्याचा दिवस अधिक लवकर यावा. त्या
गर्जनेने (आवाजाने) आकाश पेटून नष्ट होईल व
आकाशातील सर्व गोष्टी आगीत वितळतील. 13पण देवाच्या
वचनाप्रमाणे, जेथे चांगुलपणा वास करतो असे नवे आकाश
व नवी पृथ्वी यांची आपण वाट पाहू. 14म्हणून प्रिय मित्रांनो,
ज्याअर्थी तुम्ही या गोष्टींची वाट पाहत आहात, त्याअर्थी
आपणास प्रभूसमोर डागरहित, दोषरहित व शांतता
टिकविण्यांचा आटोकाट प्रयत्न करा. 15आणि ही गोष्ट
मनामध्ये ठेवा की, आपल्या प्रभूचा धीर म्हणजे तारण,
ज्याप्रमाणे आपला प्रिय बंधु पौल याला देवाने दिलेल्या
शहाणपणामुळे त्याने तुम्हांला लिहिले.

16त्या पत्रात, जसे इतर सर्व पत्रांत असते, त्याप्रमाणे तो
या गोष्टीविषयी सांगतो. त्याच्या पत्रामध्ये काही गोष्टी
आहेत ज्या समजण्यास कठीण आहेत. अज्ञानी व चंचल
मनाचे लोक पवित्र शास्त्रातील इतर गोष्टींप्रमाणे या
गोष्टींचादेखील विपर्यास करून गैरअर्थ लावतात व
परिणामी आपला स्वत:चा नाश करून घेतात. 17यासाठी,
प्रिय मित्रांनो, तुम्हाला या गोष्टी अगोदरच माहीत असल्याने
स्वत:चे रक्षण करा. यासाठी की, नियमशास्त्रविरहित
लोकांच्या चुकीमुळे तुम्ही भरकटत जाऊ नये आणि
तुमची जी विश्वासाविषयीची अढळ भूमिका आहे,
तिच्यापासून विचलित होऊ नये म्हणून संभाळा. 18परंतु
आपला प्रभु व तारणारा येशू ख्रिस्त याच्या कृपेत आणि
त्याच्याकडून मिळणाऱ्या ज्ञानात वाढत राहा. त्याला आता
आणि अनंतकाळपर्यंत गौरव असो.

---

**प्रभूला ... आहेत** नीतिसूत्रे 9:4.

**आणी ... येतील** काही प्राचीन प्रतीत 'जळून नाहीशा होतील' किंवा 'अदृष्य होतील.'

# योहानाचें पहिले पत्र

1 जगाच्या सुरुवातीपासून हे होते. हे आम्ही ऐकले आहे. आम्ही आमच्या डोळ्यांनी ते पाहिले आहे. आम्ही ते निरखून पाहिले आहे. आम्ही ते आमच्या हातांनी चाचपले आहे. जो शब्द जीवन देतो त्याविषयी आम्ही बोलत आहोत. 2ते जीवन आम्हास प्रकटविण्यात आले. आम्ही ते पाहिले आहे; त्याविषयी आम्ही साक्ष देतो; आणि त्या अनंतकाळच्या जीवनाविषयी आम्ही तुम्हांला घोषणा करीत आहोत. ते जीवन पित्याबरोबर होते आणि ते आम्हाला प्रकटविण्यात आले.

3आम्ही ते पाहिले आहे व ऐकले आहे आणि आम्ही आता ते तुम्हालाही घोषित करीत आहोत, यासाठी की तुमचीही आमच्यासह सहभागिता असावी. आमची सहभागिता तर देवपिता व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याजबरोबर आहे. 4म्हणून आम्ही तुम्हांला या गोष्टींविषयी लिहीत आहोत. यासाठी की तुमचा आनंद पूर्ण व्हावा.

### देव आमच्या पापांची क्षमा करतो

5आणि हा संदेश आहे जो आम्ही येशू ख्रिस्ताकडून ऐकला आहे आणि जो आम्ही तुम्हाला घोषित करीत आहोत. देव प्रकाश आहे आणि त्याच्यामध्ये मुळीच अंधार नाही.

6जर आम्ही म्हणतो की, आमची देवाबरोबर सहभागिता आहे पण पापाच्या अंधारामध्ये आम्ही राहतो तर आम्ही खोटे बोलत आहोत व आम्ही सत्याला अनुसरत नाही. 7पण जर आम्ही प्रकाशात चालतो, जसा देव प्रकाशात आहे तर आमची विश्वासणारे या नात्याने एकमेकांबरोबर सहभागिता आहे. आणि देवाचा पुत्र येशू याचे रक्त आम्हाला सर्व पापांपासून शुद्ध करते.

8जर आम्ही असे म्हणतो की, आमच्यामध्ये कोणतेही पाप नाही, तर आम्ही स्वत:ला फसवीत आहोत. आणि आमच्यामध्ये सत्य नाही. 9जर आम्ही आमची पापे कबूल करतो, तर आमच्या पापांपासून आम्हांला क्षमा करण्यास देव विश्वासू व न्यायी आहे. आणि आमच्या सर्व अनीतीपासून तो आम्हाला शुद्ध करतो. 10जर आम्ही म्हणतो की आम्ही पाप केले नाही तर आम्ही देवाला लबाड ठरवितो. आणि त्याचा संदेश आमच्या अंत:करणात नाही.

### येशू आमचा साहाय्यकर्ता

2 माझ्या प्रिय मुलांनो, तुम्ही पाप करू नये यासाठी मी तुम्हांला या गोष्टी लिहीत आहे, पण जर एखादा पाप करतो तर पित्याकडे आमच्या वतीने विनवणी करणारा मध्यस्थ आमच्याकडे आहे. तो येशू ख्रिस्त आहे, जो नीतिमान आहे. 2तो अर्पण आहे जो आमचे पाप आमच्यापासून काढून घेतो आणि केवळ आमचेच पाप नव्हे तर सगळ्या जगाचे पाप काढून घेतो.

3जर आम्ही त्याच्या आज्ञा पाळतो तर हाच मार्ग आहे ज्याविषयी आम्हाला खात्री आहे की, आम्ही देवाला खऱ्या अर्थाने ओळखले आहे. 4जो असे म्हणतो की, "मी देवाला ओळखतो!" आणि त्याच्या आज्ञा पाळत नाही तर तो लबाड आहे; आणि त्याच्यामध्ये सत्य नाही. 5पण जर कोणी देवाची शिकवण पाळतो, तर देवाविषयीचे त्याचे प्रेम त्याच्यामध्ये पूर्ण झाले आहे. हाच मार्ग आहे ज्याद्वारे आम्ही खात्री बाळगू शकतो की, आम्ही देवामध्ये आहोत. 6मी देवामध्ये राहतो असे जो म्हणतो, त्याने जसा येशू जगला तसे जगले पाहिजे.

### इतर लोकांवर प्रेम करा अशी देवाने आज्ञा दिली

7प्रिय मित्रांनो, मी तुम्हांला नवी आज्ञा लिहीत नाही तर जुनीच आज्ञा लिहीत आहे, जी तुम्हांला सुरूवातीपासूनच देण्यात आली होती. 8ती जुनी आज्ञा म्हणजे जो संदेश तुम्ही ऐकला आहे तीच आज्ञा आहे. शिवाय नवीन आज्ञेप्रमाणे मी तिजविषयी लिहीतो कारण या गोष्टीविषयीचे सत्य ख्रिस्ताच्या जीवनामध्ये आणि तुमच्या जीवनामध्ये दर्शविण्यात आली. कारण अंधार नाहीसा होत आहे व खरा प्रकाश अगोदरपासूनच प्रकाशत आहे.

9जो असे म्हणतो की तो प्रकाशात आहे आणि तरीही आपल्या भावाचा द्वेष करतो तो अजूनसुद्धा अंधारात आहे. 10जो आपल्या भावावर प्रेम करतो तो प्रकाशाता राहतो, आणि त्याच्या जीवनामध्ये अशी कोणतीही गोष्ट नसते, जी एखाद्याला पापात पडण्यास भाग पाडते.

11पण जो आपल्या भावाचा द्वेष करतो तो अंधारात आहे. तो अंधारात जगत आहे व तो कोठे जात आहे हे त्याला कळत नाही. कारण अंधारामुळे तो आंधळा झालेला आहे.

12प्रिय मुलांनो, मी तुम्हांला लिहीत आहे, कारण
ख्रिस्तामुळे तुमच्या पापांची क्षमा झालेली आहे.
13वडिलांनो, मी तुम्हांला लिहितो कारण जो
सुरुवातीपासून अस्तित्वात आहे, त्याला तुम्ही ओळखता.
तरुणांनो, मी तुम्हांला लिहीत आहे, कारण दुष्टावर तुम्ही
जय मिळविला आहे.
14मुलांनो, मी तुम्हांला लिहीत आहे, कारण तुम्हांला
पिता माहीत आहे. वडिलांनो, मी तुम्हांला लिहिले, कारण
जो सुरूवातीपासून अस्तित्वात आहे. त्याची तुम्हांला ओळख
झाली आहे. तरुणांनो, मी तुम्हांला लिहिले, कारण तुम्ही
सशक्त आहात; देवाचे वचन तुमच्यामध्ये राहते, कारण
तुम्ही दुष्टावर मात केली आहे.

15जगावर किंवा जगातील गोष्टींवर प्रेम करू नका.
जर कोणी जगावर प्रेम करतो, तर पित्याविषयी त्याच्या
अंत:करणात प्रेम नाही. 16कारण जगात जे सर्व काही
आहे, ते म्हणजे पापी देहाला संतोषविणारी लैंगिक वासना,
डोव्व्यांची वासना, व संसाराविषयीची फुशारकी हे
पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत. 17जग व जगातील
वासना नाहीशा होत आहेत. पण जो देवाच्या इच्छेप्रमाणे
करतो तो अनंतकाळपर्यंत जगेल.

## ख्रिस्ताच्या शत्रूंना अनुसरू नका

18माझ्या मुलांनो, शेवट जवळ आला आहे आणि तुम्ही
ऐकल्याप्रमाणे ख्रिस्तविरोधी येत आहेत आणि आताही
पुष्कळ ख्रिस्तविरोधी दिसू लागले आहेत. त्यामुळेच
आम्हाला कळते की, शेवट जवळ आला आहे. 19ते
आमच्यातूनच बाहेर निघाले, पण ते खऱ्या अर्थाने
आमच्यातील नव्हतेच. मी हे म्हणतो कारण जर ते खरेच
आमच्यातील असते तर ते आमच्यात राहिले असते. पण
ते गेले यासाठी की, त्यांना आम्हांला दाखवायचे होते की
त्यांच्यातील कोणीच आमचा नव्हता.
20पण जो पवित्र असा ख्रिस्त याने तुमचा आत्म्याने
अभिषेक केला आहे, म्हणून तुम्हा सर्वांना सत्य माहीत
आहे. 21मी तुम्हांला सत्य माहीत नाही म्हणून लिहीत
नाही पण तुम्हांला ते माहीत आहे कारण सत्यापासून
कोणतेच असत्य येत नाही.
22येशू हा ख्रिस्त नाही असे म्हणणारा खोटा नाही काय?
असा मनुष्य ख्रिस्तविरोधी आहे. तो पिता आणि पुत्र या
दोघांनाही नाकारतो. 23जो पुत्राचा नाकार करतो त्याला
पिताही नसतो, पण जो पुत्राला मानतो त्याला पिताही असतो.
24तुमच्या बाबतीत जे तुम्ही सुरूवातीपासून ऐकले आहे,
त्यामध्येच राहा. सुरूवातीपासून जे तुम्ही ऐकले त्यात जर
तुम्ही राहाल, तर तुम्ही पुत्रामध्ये व पित्यामध्ये राहाल.
25आणि देवाने आम्हांला जे देण्याचे अभिवचन दिले आहे:
ते म्हणजे अनंतकाळचे जीवन होय. 26जे तुम्हाला
फसविण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांच्याविषयी मी तुम्हांला
या गोष्टी लिहीत आहे. 27पण तुमच्याबाबतीत म्हटले तर,
ज्या (पवित्र व्यक्तीकडून) तुम्हांला अभिषेक करण्यात
आला तो तुमच्यामध्ये राहतो. म्हणून दुसऱ्या कोणी तुम्हांला
शिकवावे याची गरज नाही. त्याऐवजी ज्या आत्म्यासह
तुमचा अभिषेक (पवित्र व्यक्तीकडून) झाला या सर्व
गोष्टींविषयी तो तुम्हांला शिकवितो आणि लक्षात ठेवा
की, तो खरा आहे आणि खोटा मुळीच नाही. जसे त्याने
तुम्हाला जे करण्यास शिकविले आहे तसे तुम्ही ख्रिस्तामध्ये
राहा.
28म्हणून आता, प्रिय मुलांनो, ख्रिस्तामध्ये राहा. यासाठी
की, जेव्हा ख्रिस्त प्रकट होईल, तेव्हा आम्हांला दृढविश्वास
मिळेल व जेव्हा तो परत येतो तेव्हा त्याच्याद्वारे आम्ही
लज्जित केले जाणार नाही. 29जर तुम्हांला माहीत आहे
की, ख्रिस्त नीतिमान आहे तर जे लोक चांगले काम
करतात ते देवाचे पुत्र आहेत हे देखील तुम्हाला कळेल.

## आपण देवाची मुले आहोत

3 पित्याने आपल्यावर जे महान प्रेम केले आहे
त्याविषयी विचार करा. आम्हांला देवाची मुले
म्हणण्यापर्यंत त्याने प्रेम केले! आणि आम्ही खरोखरच
(देवाची मुले) आहोत! या कारणामुळे जग आम्हाला
ओळखत नाही, कारण त्यांनी (जगाने) ख्रिस्ताला ओळखले
नाही. 2प्रिय मित्रांनो, आता आम्ही देवाची मुले आहोत,
आणि भविष्यकाळात कसे असेल ते अजून माहीत करून
देण्यात आले नाही. तरीही आम्हाला माहीत आहे की,
जेव्हा ख्रिस्त पुन्हा येईल, तेव्हा आम्ही त्याच्यासारखे असू.
कारण तो जसा आहे तसे आम्ही त्याला पाहू. 3आणि ज्या
प्रत्येकाने ही आशा ख्रिस्तावर ठेवली आहे, तो स्वत:ला
शुद्ध करतो, जसा ख्रिस्त शुद्ध आहे. 4प्रत्येकजण जो पाप
करतो तो देवाचा नियम मोडतो. कारण पाप हे नियमभंग
आहे. 5लोकांचे पाप घेऊन जाण्यासाठी ख्रिस्त प्रकट झाला
हे तुम्हांस माहीत आहे, आणि त्याच्यामध्ये कोणतेही पाप
नाही.
6प्रत्येकजण जो ख्रिस्तामध्ये राहतो तो पाप करीत राहात
नाही. प्रत्येकजण जो पाप करीत राहतो त्याने त्याला
पाहिले नाही, आणि त्याला तो ओळखत सुद्धा नाही.
7प्रिय मुलांनो, तुम्हांला कोणी फसवू नये. जो योग्य ते
करतो तो जसा ख्रिस्त चांगला आहे तसा चांगला आहे.
8जो पापमय जीवन जगतच राहतो तो सैतानाचा आहे,
कारण सैतान सुरुवातीपासून पाप करीत आहे आणि
सैतानाची कामे नष्ट करावी या उद्देशानेच देवाचा पुत्र
प्रकट झाला.
9जो देवाचा पुत्र झाला आहे तो कोणीही पाप करीत
नाही. कारण खुद्द देवाचे बी त्या व्यक्तीमध्ये असते. त्यामुळे
तो पापात राहू शकत नाही. कारण तो देवाचे मूल बनला
आहे. 10जी देवाची मुले आहेत व जी सैतानाची मुले
आहेत, त्यांना तुम्ही अशा प्रकारे सांगू शकता: प्रत्येकजण

जे योग्य ते करीत नाही आणि जो त्याच्या भावावर प्रेम
करीत नाही तो देवाचा नाही.

## आम्ही एकमेकांवर प्रीति केली पाहिजे

11आपण एकमेकांवर प्रीति करावी, ही शिकवण आपण
सुरूवातीपासून ऐकली आहे. 12काईन जो त्या दुष्टाचा
(सैतानाचा) होता तसे आम्ही असू नये कारण त्याने त्याच्या
भावाला मारले आणि कोणत्या कारणासाठी त्याने त्याला
मारले? त्याने तसे केले कारण त्याची स्वत:ची कृत्ये दुष्ट
होती, तर त्याच्या भावाची कृत्ये चांगली होती.
13बंधूनो, जर जग तुमचा द्वेष करते तर त्याचे आश्चर्य
मानू नका. 14आपल्याला माहीत आहे की, आपण मरणातून
जीवनात गेलो आहोत. कारण आपण आपल्या बंधूवर
प्रीति करतो. जो प्रीति करीत नाही तो मरणात राहतो.
15जो कोणी आपल्या भावाचा द्वेष करतो, तो खुनी आहे.
आणि तुम्हांला माहीत आहे की, खुनी माणसाला त्याच्या
ठायी असलेले अनंतकाळचे जीवन मिळत नाही. 16अशा
रीतीने ख्रिस्ताने आपल्यासाठी स्वत:चा जीव दिला. यामुळे
प्रेम काय आहे ते आपल्याला समजते. म्हणून आपण
देखील आपल्या भावासाठी जीव दिला पाहिजे. 17जर
कोणाजवळ जगिक संपत्ती आहे आणि त्याचा भाऊ गरजेत
आहे हे तो पाहतो पण तरीही त्याच्यावर दया करीत नाही
तर त्याच्यामध्ये देवाची प्रीती राहते असे आपण कसे म्हणू
शकतो? 18प्रिय मुलांनो, आपली प्रीति केवळ शब्दांनी
बोलण्याएवढीच मर्यादित नसावी तर ती कृती सहीत व
खरीखुरी असावी.
19आम्ही सत्याचे आहोत ते यावरून आम्हांस कळेल
आणि अशाप्रकारे देवासमोर आमच्या अंत:करणाची खात्री
पटेल 20जेव्हा जेव्हा आमचे अंत:करण आम्हांला दोष
देईल, हे यासाठी की आमच्या अंत:करणापेक्षा देव महान
आहे. आणि सर्व काही (तो) जाणतो.
21प्रिय मित्रांनो, वाईट करण्याबद्दल जर आमची
अंत:करणे आम्हांला दोष देत नाहीत तर देवाकडे
जाण्यासाठी आम्हांला खात्री आहे. 22आणि देवाकडे आम्ही
जे मागतो ते आम्हाला प्राप्त होते. कारण आम्ही त्याच्या
आज्ञा पाळतो, आणि त्याला जे संतोषकारक आहे ते
आम्ही करीत आहोत. 23तो आम्हांला अशी आज्ञा करतो
की येशू ख्रिस्ताच्या नावावर आम्ही विश्वास ठेवला पाहिजे
आणि एकमेकांवर प्रीति केली पाहिजे, जशी येशूने
आम्हांला आज्ञा केली आहे. 24जो देवाची आज्ञा पाळतो
तो त्याच्यामध्ये राहतो आणि देव त्या व्यक्तीमध्ये राहतो.
देव आमच्यामध्ये राहतो हे आम्हांला यावरून समजते,
त्याने दिलेल्या आत्म्यामुळे आम्हाला हे समजते.

## खोट्या शिक्षकांविरुद्ध योहानाचा इशारा

4 प्रिय मित्रांनो, प्रत्येक संदेष्ट्याचा आत्म्यावर विश्वास
ठेवण्याची सवय लावून घेऊ नका. त्याऐवजी नेहमी
त्या आत्म्यांची परीक्षा करा व ते (खरोखर) देवापासून
आहेत का ते पाहा. मी हे तुम्हांला सांगतो कारण जगात
पुष्कळ खोटे संदेष्टे निघाले आहेत. 2अशा प्रकारे तुम्ही
देवाचा आत्मा ओळखू शकता: प्रत्येक संदेष्ट्याचा आत्मा
जो कबूल करतो की, “येशू ख्रिस्त या जगात मानवी
रूपात आला.” तो देवापासून आहे. 3आणि प्रत्येक
संदेष्ट्याचा आत्मा जो येशूविषयी कबुली देत नाही तो
देवापासून नाही. अशी व्यक्ति म्हणजे ख्रिस्तविरोधी होय.
ज्याच्या येण्याविषयी तुम्ही ऐकले आहे. तो अगोदरच जगात
आला आहे. 4माझ्या मुलांनो, तुम्ही देवाचे आहात, म्हणून
तुम्ही ख्रिस्तविरोध्याच्या अनुयायांना जिंकले आहे, कारण
जगामध्ये जो सैतान आहे त्याच्यापेक्षा जो तुमच्यामध्ये आहे
तो महान देव आहे. 5ते लोक म्हणजे ख्रिस्ताचे शत्रू जगाचे
आहेत यासाठी की ते जगापासूनच्या गोष्टी बोलतात व
जग त्यांचे ऐकते. 6पण आम्ही देवाचे आहोत. जो देवाला
ओळखतो तो आपले ऐकतो. परंतु जो देवाचा नाही तो
आपले ऐकत नाही. अशा रीतीने सत्य प्रकट करणारा
आत्मा आणि लोकांना दूर नेणारा आत्मा कोणता हे
आपण ओळखू शकतो.

## प्रीति देवापासून येते

7प्रिय मित्रांनो, आपण एकमेकांवर प्रीति करू या, कारण
प्रीती देवाकडून येते, आणि प्रत्येकजण 8जो प्रीति करतो
तो देवाचे मूल होतो आणि देवाला ओळखतो. जो प्रीति
करीत नाही, त्याची देवाशी ओळख झालेलीच नाही. कारण
देव प्रीति आहे. 9अशा प्रकारे देवाने त्याची आम्हावरील
प्रीति दर्शविली : त्याने आपला एकुलता एक पुत्र या
जगात पाठविला यासाठी की त्याच्याद्वारे आम्हाला जीवन
मिळावे. 10आम्ही देवावर प्रीति केली असे नाही तर त्याने
आम्हांवर प्रीति केली व आपल्या एकुलत्या एका पुत्राला
आमच्या पापाकरिता प्रायश्चित्त म्हणून पाठविले; यामध्ये
खरी प्रीति आहे.
11प्रिय मित्रांनो, जर देवाने आमच्यावर अशा प्रकारे
प्रीति केली तर आम्ही एकमेकांवर प्रीति केलीच पाहिजे.
12देवाला कोणी कधीही पाहिले नाही. पण जर आपण
एकमेकांवर प्रीति करीत राहिलो तर देव आमच्यामध्ये
राहतो व त्याची आम्हांवरील प्रीति पूर्णत्वास आणलेली
आहे. 13अशा प्रकारे आम्हांला समजू शकते की देव
आमच्यामध्ये राहतो व आम्ही त्याच्यामध्ये राहतो: त्याने
त्याचा आत्मा आमच्यात राहू दिला आहे. 14ही गोष्ट
आम्ही पाहिली आहे व आम्ही साक्ष देतो की, जगाचा
तारणारा होण्यासाठी पित्याने पुत्राला पाठविले आहे. 15जर
कोणी “येशू हा देवाचा पुत्र आहे” हे कबूल करतो तर देव
त्या व्यक्तीमध्ये राहतो आणि ती व्यक्ति देवामध्ये रहाते.
16आणि म्हणून आम्ही ओळखतो आणि त्या प्रीतीवर आम्ही
विश्वास ठेवतो की, जी देवाने आमच्यावर केली. देव
प्रीति आहे. आणि जो प्रीतीत राहतो तो देवामध्ये राहतो

आणि देव त्या व्यक्तीमध्ये राहतो 17अशा प्रकारे
आमच्याबाबतीत प्रीति पूर्ण होते यासाठी की न्यायाच्या
दिवशी आम्हाला दृढविश्वास प्राप्त व्हावा. अशा प्रकारचा
आत्मविश्वास आमचा आहे कारण या जगामध्ये जे जीवन
आम्ही जगत आहोत ते ख्रिस्ताच्या जीवनासारखे आहे.
18प्रीतीमध्ये कोणतीही भिति नसते. उलट पूर्ण प्रीति भीतीला
घालवून देते. प्रीति शिक्षेशी संबंधित आहे. आणि जो भीतीमय
जीवन जगतो तो प्रीतीत पूर्ण झालेला नाही.

19आम्ही प्रीति करतो कारण देवाने आमच्यावर
पहिल्यांदा प्रीति केली. 20जर एखादा म्हणतो, "मी देवावर
प्रीति करतो," पण त्याच्या भावाचा द्वेष करतो, तर तो
खोटे बोलतो. मी हे म्हणतो कारण ज्याला त्याने पाहिलेले
आहे अशा भावावर जर एखादा प्रीति करीत नाही, तर
ज्या देवाला त्याने पाहिले नाही त्याच्यावर तो प्रीति करू
शकत नाही! 21आम्हांला ख्रिस्ताकडून ही आज्ञा मिळाली
आहे: जो देवावर प्रीति करतो त्याने त्याच्या भावावर प्रीति
केलीच पाहिजे.

## देवाची मुले जगाविरुद्ध विजयी होतात

5 प्रत्येकजण जो विश्वास ठेवतो की येशू हा ख्रिस्त
आहे तो देवाचे मूल झालेला आहे. आणि प्रत्येकजण
जो पित्यावर प्रीति करतो तो त्याच्या मुलावरही प्रीति
करतो. 2अशा प्रकारे आम्ही ओळखतो की आम्ही देवाच्या
पुत्रावर प्रीति करतो: देवावर प्रीति करण्याने व त्याच्या
आज्ञा पाळण्याने. 3देवाप्रती असलेली आमची प्रीति आम्ही
त्याच्या आज्ञापालनाकडून दाखवू शकतो आणि त्याच्या
आज्ञा फार अवजड नाहीत. 4कारण प्रत्येकजण जो देवाचा
मूल होतो तो जगावर विजय मिळवितो. आणि यामुळे
आम्हांला जगावर विजय मिळाला: आमच्या विश्वासाने.
5येशू हा देवाचा पुत्र आहे असा विश्वास धरणाऱ्याशिवाय
जगावर विजय मिळविणारा कोण आहे?

## देवाने आम्हाला त्याच्या पुत्राविषयी सांगितले

6येशू ख्रिस्त आमच्याकडे पाणी व रक्त यांच्यासह आला.
तो केवळ पाण्याद्वारेच आमच्याकडे आला असे नाही तर
पाणी आणि रक्ताद्वारे आला. व आत्मा ही साक्ष देतो,
कारण आत्मा सत्य आहे. 7साक्ष देणारे तीन साक्षीदार
आहेत: 8आत्मा, पाणी आणि रक्त, आणि तिघेही एकच
साक्ष देतात. 9जर आम्ही मनुष्यांनी दिलेली साक्ष स्वीकारतो,
तर देवाने दिलेली साक्ष त्यांच्या साक्षीहून अधिक महान
आहे हे आपण ओळखले पाहिजे. देवाने आपणास दिलेली
साक्ष ही त्याच्या एकुलत्या एका पुत्राविषयीची आहे. 10जो
कोणी देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवतो त्याच्या स्वत:मध्ये
ही साक्ष आहे. जो देवाच्या साक्षीवर विश्वास ठेवीत नाही,
त्याने देवाला लबाड ठरविले आहे. कारण देवाने आपल्या
स्वत:च्या पुत्राबाबत दिलेल्या साक्षीवर त्याने विश्वास ठेवला
नाही.

11आणि देवाची जी साक्ष आहे ती ही आहे की, देवाने
आपल्याला अनंतकाळचे जीवन दिले आहे आणि हे जीवन
त्याच्या पुत्रामध्ये आहे. 12ज्याच्याजवळ पुत्र आहे त्याला
खरे जीवन आहे पण ज्याच्याजवळ पुत्र नाही त्याला खरे
जीवन नाही.

## आता आपल्याला अनंतकाळचे जीवन आहे

13जे देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवतात त्यांना
मी या गोष्टी लिहीत आहे, यासाठी की, तुम्हाला
अनंतकाळचे जीवन आहे, याविषयी तुम्ही निश्चिंत असावे,
14आणि आम्हांला देवामध्ये खात्री आहे की, जेव्हा आम्ही
एखाद्या गोष्टीसाठी त्याच्या इच्छेप्रमाणे प्रार्थना करतो, तेव्हा
तो आमचे ऐकतो. 15आणि आम्हांला हे माहीत आहे की
जर तो आमचे ऐकतो, तर कोणत्याही कारणासाठी जरी
आम्ही प्रार्थना केली, तर आम्हांस माहीत आहे की, जे
काही आम्ही मागितले आहे ते आम्हांला मिळालेच आहे.

16जर एखाद्याला त्याचा भाऊ पापांत पडलेला दिसला
आणि त्याचा परिणाम अनंतकाळचे मरण नसेल तर त्या
भावासाठी त्याने प्रार्थना करावी. आणि देव त्याला जीवन
देईल. ज्या गोष्टीचा परिणाम अनंतकाळचे मरण नाही
अशा पापामध्ये पडणाऱ्यासाठी जे जीवन (देव देतो) त्या
जीवनाविषयी मी हे बोलत आहे. ज्या पापाचा परिणाम
मरण आहे. अशा तऱ्हेच्या पापाबाबत तुम्ही प्रार्थना करावी
असे मी म्हणत नाही. 17सर्व अनीति हे पाप आहे, पण
असे पाप आहे ज्याचा परिणाम मरण नाही.

18आम्ही जाणतो की, जो कोणी देवाचे मूल झाला आहे
तो पाप करीत रहात नाही. जो देवापासून जन्मला आहे.
देव स्वत: त्याचे संरक्षण करतो आणि सैतान त्याला हात
लावू शकत नाही. 19आम्हाला माहीत आहे की आम्ही
देवाचे आहोत, जरी संपूर्ण जग हे त्या सैतानाच्या
नियंत्रणाखाली आहे.

20पण आम्हाला माहीत आहे की देवाचा पुत्र आला
आहे व त्याने आम्हाला समजबुद्धी दिलेली आहे, यासाठी
की, जो खरा आहे त्या देवाला आम्ही ओळखावे. आणि
आपणास माहीत आहे की, त्याचा पुत्र येशू ख्रिस्त आला
आहे व जो खरा देव आणि देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याजमध्ये
आम्ही राहात आहोत. पिता हा खरा देव आहे आणि तो
अनंतकाळचे जीवन आहे. 21माझ्या मुलांनो, स्वत:ला
मूर्तिपूजेपासून दूर राखा.

# योहानाचें दुसरे पत्र

वडिलाकडून,*
देवाने निवडलेल्या बाईना* व तिच्या मुलांना,
सत्यात सहभागी असलेल्या लोकांप्रमाणे ज्यांच्यावर मी
प्रीति करतो, आणि तुमच्यावर प्रीति करणारा मी एकटाच
नाही, तर ज्यांची सत्याशी ओळख झाली आहे असे
सर्वजणसुद्धा प्रीति करतात. [2]या सत्यामुळे जे आमच्यामध्ये
असते, ते आमच्यामध्ये अनंतकाळपर्यंत राहील.
[3]देवपित्यापासून आणि पित्याचा पुत्र प्रभु येशू ख्रिस्त
याजपासून कृपा, दया व शांति ही सत्यात व प्रीतित
आपणाबरोबर राहोत.
[4]पित्याने आपल्याला दिलेल्या आज्ञेप्रमाणे तुमची काही
मुले सत्यात चालतात असे मला दिसून आले म्हणून मला
फार आनंद झाला.
[5]आणि आता, बाई, कुरिया, मी तुला नम्रपणे विनंति
करतो की, आपण एकमेकांवर प्रीति करावी. मी ही तुला
नवी आज्ञा करतो असे नाही, तर जी प्रारंभापासून तुला
देण्यात आलेली होती. [6]आणि त्याच्या आज्ञेत राहणे
म्हणजेच प्रीति करणे होय. हीच आज्ञा आहे जी तुम्ही
सुरुवातीपासून ऐकली आहे: की तुम्ही प्रीतीचे जीवन जगावे.
[7]येशू मानवी देह धारण करून या जगात आला या
गोष्टीवर विश्वास न ठेवणारे अनेक फसवे भोंदू लोक
जगात निघाले आहेत. असा फसविणारा भोंदू मनुष्य हाच
ख्रिस्तविरोधी होय. [8]सावध असा! यासाठी की ज्यासाठी
आम्ही काम केले ते तुम्ही हातचे जाऊ देऊ नये तर
त्याचे पूर्ण प्रतिफळ तुम्हांला मिळावे.
[9]जो मनुष्य ख्रिस्ताविषयीच्या शिकवणुकीप्रमाणे चालत
नाही, तर तिचे उल्लंघन करतो, त्याला देव मिळाला
नाही. जो कोणी ख्रिस्ताविषयीच्या शिकवणुकीप्रमाणे
चालतो त्याला देवपिता व पुत्र असे दोन्ही मिळाले आहेत.
[10]जर एखादा मनुष्य तुमच्या घरी आला आणि ख्रिस्ताची
शिकवण आचरणात आणीत नसला तर त्याला आपल्या
घरात घेऊ नका. किंवा त्याला सलामही करू नका.
[11]कारण अशा मनुष्याला जो कोणी सलाम करतो तो
त्याच्या वाईट कामांमध्ये सहभागी होतो.
[12]मला जरी अनेक गोष्टी तुम्हांला लिहायच्या आहेत
तरी त्या तुम्हांला मी शाई व लेखणीने लिहू इच्छित नाही.
तर त्याऐवजी तुम्हांला भेटावे व प्रत्यक्ष सर्व काही बोलावे
अशी आशा मनात बाळगून आहे. म्हणजे आपला आनंद
त्यामुळे परिपूर्ण होईल. [13]देवाने निवडून घेतलेल्या तुमच्या
बहिणीची* मुले तुम्हांला सलाम सांगतात.

---

**वडील** याचा अर्थ कदाचित योहान प्रेषित असेल. वडील म्हणजे वयस्कर मनुष्य. तसेच मंडळीतील खास साहाय्यक असाही अर्थ.

**बाई** या ठिकाणी याचा अर्थ मंडळी असा असेल व तिची मुले म्हणजे मंडळीचे सभासद.

**बहीण** पहिल्या वचनातील बाईची बहीण. याचा अर्थ कदाचित दुसरी स्त्री किंवा मंडळी होऊ शकेल.

# योहानाचें तिसरे पत्र

वडिलाकडून,*

माझा प्रिय मित्र गायस ज्याच्यावर मी सत्यामध्ये* प्रीति करतो त्यास,

2माझ्या प्रिय मित्रा, जसे आध्यात्मिक जीवनात तुझे चांगले चालले आहे हे मला माहीत आहे तसेच इतर बाबतीतही तुझे चांगले चालावे आणि तुझे आरोग्य चांगले असावे अशी मी प्रार्थना करतो.
3जेव्हा काही बंधु आले आणि सत्यात तू सातत्याने कसे चालतोस याविषयी त्यांनी साक्ष दिली आणि तू सत्याविषयीच्या विश्वासूपणाबद्दल मला सांगितले तेव्हा मला फार आनंद झाला.
4माझी मुले सत्यात चालतात हे ऐकून जितका आनंद मला होतो तितका कशानेही होत नाही.

5माझ्या प्रिय मित्रा, आपल्या बंधूंच्या परक्यांच्या कल्याणासाठी जे काही करणे तुला शक्य आहे ते तू विश्वासूपणे करीत आहेस.
6जे बंधु आले व ज्यांनी तू दाखविलेल्या प्रीतिविषयी मंडळीसमोर साक्ष दिली, त्यांच्या पुढील वाटचालीकरिता देवाला आवडेल अशा प्रकारे
7शक्य ते सर्व कर, कारण ते ख्रिस्ताच्या सेवेसाठी दौऱ्यावर निघाले आहेत व अविश्वासणाऱ्यांकडून त्यांनी काहीही स्वीकारले नाही.
8म्हणून आम्ही विश्वासणाऱ्यांनी त्यांना मदत केलीच पाहिजे. यासाठी की आम्ही सत्यासाठी एकमेकांचे भागीदार होऊ.

9मी मंडळीला पत्र लिहिले पण दियत्रेफस ज्याला त्यांचा नेता व्हायचे आहे व जे सांगतो ते तो स्वीकारीत नाही.
10या कारणामुळे जेव्हा मी येतो तेव्हा तो जे करीत आहे ते दाखवून देईन. तो वाईट शब्दांनी खोटेपणाने माझ्याविरुद्ध बोलत आहे व एवढ्यावरच तो समाधान मानीत नाही, तर त्यात भर म्हणून बंधूंचा तो स्वीकार करीत नाहीच उलट मंडळीतील जे लोक त्यांचा स्वीकार करू इच्छितात त्यांना अडथळा करतो, आणि त्यांना मंडळीबाहेर घालवितो!

11माझ्या प्रिय मित्रा, जे चांगले आहे त्याचे अनुकरण कर. वाइटाचे अनुकरण करू नको. जे चांगले आहे ते जो करतो, तो देवाचा आहे. जो वाईट करतो त्याने देवाला पाहिले नाही.

12प्रत्येक जण देमेत्रियाविषयी चांगली साक्ष देतात व सत्यदेखील तसेच सांगते. आणि आम्ही देखील त्याच्याविषयी तसेच म्हणतो, आणि तुम्हांला माहीत आहे की, आमची साक्ष खरी आहे.

13मला तुला पुष्कळ गोष्टी लिहावयाच्या आहेत पण मला शाई व लेखणीने तुला लिहावे असे वाटत नाही.
14त्याऐवजी, तुला लवकर भेटण्याची मला आशा आहे. मग आपल्याला समोरासमोर बोलता येईल.
15तुझ्याबरोबर शांति असो. तुझे सर्व मित्र तुला सलाम सांगतात. तेथील सर्व मित्रांना नावाने आमचा सलाम सांग.

---

**वडील** हा योहान प्रेषित असावा. मंडळीतील खास मदतनीस. वडीलधारी व्यक्ति.

**सत्य** सत्य किंवा ख्रिस्ताविषयाची 'सुवार्ता' जी वार्ता विश्वासणाऱ्यांना एकत्र बांधते.

# यहूदाचें पत्र

येशू ख्रिस्ताचा सेवक आणि याकोबाचा भाऊ असलेल्या
यहूदाकडून,
देवाने ज्या तुम्हांला पाचारण केले आहे त्यांस, देवपिता
तुमच्यावर प्रीती करतो व येशू ख्रिस्ताद्वारे तुम्ही सुरक्षित
ठेवले जात आहात.
2देवाची करुणा, शांति आणि प्रीती तुम्हांला अधिकाधिक
लाभो.

### जे चुका करतात त्यांना देव शिक्षा करील

3प्रिय मित्रांनो, जरी मली तुम्हांला आपल्या समाईक
तारणाविषयी लिहिण्याची आतुरतेने तयारी करीत होतो
तरी एका गोष्टीविषयी मला लिहावेसे वाटते. ते म्हणजे
देवाने आपल्या संतांना, एकदा दिलेला विश्वास
टिकविण्यासाठी लढत राहा. 4याचे कारण ज्यांच्याविषयी
पवित्र शास्त्रात फार पूर्वीच लिहिले आहे की अशी माणसे
तुमच्यात चोरून शिरली आहेत. ते अधार्मिक लोक आहेत.
अनीतीने वागण्यासाठी देवाची दया हे निमित्त आहे असे ते
मानतात. आणि आमचा प्रभु व एकमेव धनी अशा प्रभु
येशू ख्रिस्ताला ते मानत नाहीत, जी शिक्षेसाठी यापूर्वीच
नेमलेली होती, अशी ही माणसे आहेत.
5जरी तुम्हांला या गोष्टी माहीत असल्या तरी मला
तुम्हांला आठवण करून द्यावीशी वाटते की, ज्या प्रभूने
आपल्या लोकांना एकदा इजिप्त देशातून सोडवून
आणल्यानंतर ज्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवण्याचे
नाकारले; अशांचा त्याने नंतर नाश केला 6तसेच ज्या
देवदूतांनी आपली सार्वभौम सत्ता टिकवली नाही, परंतु
आपली रहाण्याची जागा सोडून दिली, त्यांची देखील तुम्हाला
आठवण करून द्यायला पाहिजे. देवाने त्यांना सर्वकालच्या
बंधनांनी जखडून काळोखात ठेवले यासाठी की शेवटच्या
महान दिवशी त्यांचा न्याय करता यावा. 7त्याचप्रमाणे, या
देवदूतांसारखीच सदोम व गमोरा आणि त्या शहराच्या
आसपासच्या नगरांनी लैंगिक अनीतीचे आचरण केले
आणि अस्वाभाविक लैंगिक संबधाच्या मागे ती लागली.
अनंतकाळच्या अग्निच्या शिक्षेसाठी ती राखून ठेवली
आहेत. एक उदाहरण म्हणून ती आपल्यासमोर ठेवली
आहेत. 8अगदी तशाच प्रकारे, हे लोक जे तुमच्या गटात
आले ते स्वप्नांनी बहकले व त्यांनी आपली शरीरे विटाळली
आहेत. ते प्रभूचा अधिकार बाजूला ठेवतात व ते गौरवी
थोरामोठ्यांविरूद्ध (देवदूतांविरूद्ध) निंदानालस्तीची भाषा
वापरतात. 9मीखाएल जो मुख्य देवदूत, याने जेव्हा मोशेच्या
शरीराविषयी सैतानाबरोबर वाद घातला तेव्हा त्यानेसुद्धा
त्याच्याविरुद्ध अपमानास्पद आरोप करण्याचे धाडस केले
नाही. तो फक्त म्हणाला, "प्रभु तुला धमकावो."
10पण हे लोक, ज्या गोष्टी त्यांना समजत नाहीत त्यांची
हे निंदा करतात. आणि जनावरासारखे केवळ मूळ
स्वभावाला अनुसरून जे काही त्यांना समजते. अगदी
त्याच गोष्टीमुळे ते नाश पावतात. 11या लोकांसाठी हे
फार वाईट आहे! काईनाने जो मार्ग धरला तोच यांनी
धरलेला आहे. आपला फायदा व्हावा म्हणून ते बलामाप्रमाणे
गोंधळून मोकाट धावत सुटले आहेत आणि कोरहाच्या
बंडाळीत भाग घेणाऱ्या लोकांचा नाश झाला तसाच या
लोकांचा देखील नाश होत आहे. 12हे लोक तुमच्या
भातामध्ये दडलेले धोकादायक खडे, असल्यासारखे आहेत.
ते खुशाल तुमच्याबरोबर जेवणखाणे करतात, ते फक्त
स्वत:च चरत राहाणारे असे मेंढपाळ आहेत, ते पाणी
नसलेल्या ढगांसारखे असून ते वाऱ्यामुळे वाहवत जातात.
ते लोक म्हणजे हिवाळ्यातील फळहीन व समूळ उपटली
गेलेली आणि दोनदा मेलेली झाडे आहेत. 13ते लोक
आपल्या लज्जास्पद कामामुळे फेसाळणाऱ्या समुद्राच्या
लाटांप्रमाणे आहेत, ते जणू काळ्याकुट्ट अंधारात दडलेले
तारे असे आहेत.
14हनोख, आदामापासूनचा सातवा मनुष्य यानेसुद्धा या
लोकांविषयी असेच भाकीत केले आहे: "पाहा हजारो
पवित्र देवदूतांसह प्रभु येत आहे. 15तो अखिल जगातील
लोकांचा न्याय करील आणि सर्व लोकांना त्यांनी केलेल्या
अधर्माच्या कामासाठी आणि देवाची चाड न बाळगणाऱ्या
पापी लोकांनी त्याच्याविरुद्ध जे कठोर, वाईट शब्द आपल्या
तोंडावाटे काढले त्याकरीता तो त्यांना दोषी ठरवील."
16हे लोक कुरकुर करणारे व दोष दाखविणारे आहेत,
ते आपल्या वासनांप्रमाणे चालणारे आणि आपल्या तोंडाने
बढाया मारणारे लोक आहेत. ते आपल्या फायद्यासाठी
इतरांचा तोंडपूजेपणा करतात.

### सावधानतेचा इशारा आणि करावयाच्या गोष्टी

17पण, तुम्ही प्रियजनहो, आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या
प्रेषितांनी पूर्वी सांगितलेले शब्द आठवा. 18त्यांनी सांगितले,

"काळाच्या शेवटी देवाविषयी थट्टेने बोलणारे लोक असतील, ते त्यांच्या स्वत:च्याच अधार्मिक इच्छांच्या मागे जातील." [19]असे लोक फूट पाडतात. ते त्यांच्या मूळ स्वभावाप्रमाणे चालतात. त्यांना आत्मा नाही.

[20]पण तुम्ही प्रिय मित्रांनो, आपल्यापवित्र शिकविण्यात आलेल्या विश्वासात परस्परांना आध्यात्मिक रीतीने बळकट करा. पवित्र आत्म्याने युक्त होऊन प्रार्थना करा.

[21]आणि तुम्हांला अनंतकाळच्या जीवनात घेऊन जाणाऱ्या आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या कृपेची वाट पाहत, देवाच्या प्रीतीत स्वत:ला राखा. [22]विश्वासात डळमळीत असलेल्या लोकांवर दया करा.

[23]त्यांना अग्नीतून ओढून काढून वाचवा. पण दया दाखविण्याच्या वेळी काळजी घ्या. आणि त्यांच्या दैहिक पापामुळे मळीन झालेल्या कपड्यांचा तिरस्कार करा.

## देवाची स्तुति करा

[24]आता, तुम्ही पडू नये म्हणून तुम्हाला राखावयास जो समर्थ आहे आणि तुम्हाला आपल्या गौरवी समक्षतेत शुद्ध असे सादर करायला जो मोठ्या आनंदाने तयार आहे, त्याला आणि आपले तारण करणारा जो [25]एकच देव आहे, त्याला आपला प्रभु येशू ह्‌ख्रिस्त याच्याद्वारे गौरव, मान, पराक्रम आणि अधिकार काल, आज आणि अनंतकाळ असो. आमेन.

# योहानाला झालेले प्रकटीकरण

## योहान या पुस्तकाविषयी सांगतो

1 हे येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण आहे. ज्या गोष्टी
लवकरच घडणे आवश्यक आहे, ते आपल्या सेवकांना
दाखविण्यासाठी देवाने येशूला हे देवापासून प्राप्त झाले
ख्रिस्ताने त्याच्या देवदूताला पाठवून या सर्व गोष्टी योहानाला
दाखविण्यास सांगितले. 2योहानाने जे काही पाहिले त्या
सर्व गोष्टींविषयी साक्ष दिली की येशू ख्रिस्ताने हे त्याला
सांगितले; देवाकडून आलेला हा संदेश आहे. 3जी व्यक्ती
देवाकडून आलेल्या या संदेशाचे शब्द उघडपणे वाचते ती
धन्य आहे. आणि जे लोक हा संदेश ऐकतात आणि
त्यामध्ये लिहिलेल्या गोष्टी पाळतात ते धन्य आहेत. कारण
आता जास्त वेळ उरला नाही.

## योहान येशूचा संदेश मंडळ्यांना कळवितो

4योहानाकडून, आशिया* प्रांतातील सात मंडळ्यांना:
जो आहे, जो होता व जो येणार आहे त्या एकापासून
(देवापासून): आणि त्याच्या सिंहासनासमोरील सात
आत्म्यांकडून तुम्हांस कृपा व शांति असो. 5आणि येशू
ख्रिस्त विश्वासू साक्षी आहे, जो मेलेल्यांमधून उठविले
गेलेल्यांमध्ये पहिला आहे. पृथ्वीवरील राजांचा तो सत्ताधीश
आहे. आणि जो येशू आमच्यावर प्रेम करतो, ज्या येशूने
आम्हाला आमच्या पापांपासून त्याच्या रक्ताने मुक्त केले;
6ज्याने आम्हांला राज्य आणि देवपित्याची सेवा करणारे
याजक बनविले त्या येशूला गौरव व सामर्थ्य
अनंतकाळपर्यंत असोत! आमेन.

7पहा, येशू ढगांसह येत आहे! प्रत्येक व्यक्ति त्याला
पाहील, ज्यांनी त्याला भोसकले ते सुद्धा त्याला पाहतील.
पृथ्वीवरील सर्व लोक त्याच्यामुळे आक्रोश करतील. होय,
असेच होईल! आमेन.

8प्रभु देव म्हणतो, "मी अल्फा आणि ओमेगा* आहे.
मी जो आहे, जो होतो आणि जो येत आहे. मी सर्वसमर्थ
आहे."

9मी योहान आहे, आणि मी तुमचा बंधु आहे. आपण
ख्रिस्तामध्ये एकत्र आहोत आणि आपण या गोष्टींमध्ये
वाटेकरी आहोत. दु:खसहनात, राज्यात, धीराने सहन
करण्यात, येशूच्या सत्यात आणि देवाच्या संदेशात मी
विश्वासू होतो त्यामुळे मी पात्म* नावाच्या बेटावर होतो.
10प्रभूच्या दिवशी आत्म्याने माझा ताबा घेतला. माझ्या
मागे मी एक मोठा आवाज ऐकला. तो आवाज कर्ण्यासारखा
ऐकू आला. 11तो आवाज म्हणाला, "तू या सर्व गोष्टी
पाहतोस त्या तू पुस्तकात लिही, आणि सात मंडळ्यांना
पाठव: इफिस, स्मुर्णा, पर्गम, थुवतीरा, सार्दीस,
फिलदेल्फिया आणि लावदिकीया."

12माझ्याबरोबर कोण बोलत आहे हे पाहण्यासाठी मी
मागे वळलो, जेव्हा मी मागे वळालो तेव्हा मी सोन्याच्या
सात दीपसमया पाहिल्या. 13मी कोणाला तरी दीपस्तंभामध्ये
पाहिले जो "मनुष्याच्या पुत्रासारखा" होता. त्याने लांब
पायघोळ झगा घातला होता. त्याने सोन्याचा पट्टा छातीवर
बांधला होता. 14त्याचे डोके आणि केस बर्फासारख्या
पांढऱ्या लोकरीप्रमाणे शुभ्र होते. त्याचे डोळे अग्नीच्या
ज्वालेसारखे होते.

15त्याचे पाय भट्टीत गरम झाल्यानंतर चमकणाऱ्या
पितळासारखे होते. त्याचा आवाज पुराचे पाणी जसा आवाज
करते तसा होता. 16त्याच्या उजव्या हातात सात तारे होते.
त्याच्या तोंडातून दोन्ही बाजूंनी तीक्ष्ण धार असणारी तरवार
निघाली. तो दिवसाच्या मध्यान्ही अतिशय प्रखर तेजाने
प्रकाशणाऱ्या सूर्यासारखा दिसत होता.

17जेव्हा मी त्याला पाहिले, तेव्हा मी मेलेल्या माणसा
सारखा त्याच्या पायाजवळ पडलो त्याने त्याचा उजवा हात
माझ्यावर ठेवला आणि म्हणाला, "घाबरू नको! मी पहिला
आणि शेवटला आहे. मी जिवंत आहे, 18मी मेलो होतो,
पण पाहा; मी अनंतकाळासाठी जिवंत आहे! आणि माझ्या
जवळ मरणाच्या व अधोलोकाच्या किल्ल्या आहेत.
19म्हणून ज्या गोष्टी तू पाहतोस त्या लिही. ज्या गोष्टी
आता घडत आहेत त्या लिही. आणि ज्या गोष्टी नंतर
घडणार आहेत त्याही लिही. 20जे सात तारे तू माझ्या
हातात पाहिलेस आणि ज्यात सात सोन्याच्या दीपसमया तू
पाहिल्यास त्यांचा गुपित अर्थ हा आहे: सात दीपसमया या
सात मंडळ्या आहेत. आणि सात तारे हे सात मंडळ्यांचे
देवदूत आहेत.

---

**आशिया** आशिया मायनरचा पश्चिम भाग (सध्याचे तुर्कस्तान)

**अल्फा आणि ओमेगा** ग्रीक मूळाक्षरातील पहिले आणि शेवटचे अक्षर याचा अर्थ प्रारंभ आणि शेवट आहे.

**पात्म** तुर्कस्तानजवळच्या अगीयन समुद्रातील एक लहानसे बेट.

## इफिस येथील मंडळीला

2 “इफिस येथील मंडळीच्या दूताला हे लिही: “जो
आपल्या उजव्या हातात सात तारे धरतो आणि सात
सोनेरी दीपसमयांमधून चालतो त्याचे हे शब्द आहेत: 2तू
काय करतोस ते मला माहीत आहे. तू खूप काम करतोस
व धीर धरतोस हे मला माहीत आहे. मला हे माहीत आहे
की दुष्ट मनुष्यांचा तू स्वीकार करीत नाहीस आणि जे
स्वत:ला प्रेषित समजतात पण जे तसे नाहीत त्यांची कसोटी
तू घेतलेली आहेस आणि ते खोटे आहेत हे तुला समजले
आहे. 3माझ्या नावासाठी तू धीर धरलास. माझ्या नावामुळे
तू दु:ख सोसलेस आहे आणि तू थकला नाहीस.
4“तरीही तुझ्याविरुद्ध माझे म्हणणे आहे: तू तुझी पहिली
प्रीति सोडली आहेस. 5ज्या उंचीवरून तू पडलास ते लक्षात
आण! पश्चात्ताप कर व प्रथम जी कामे केलीस ती पुन्हा
कर. जर तू पश्चात्ताप केला नाहीस, तर मी येईन आणि
तुझी दीपसमई तिच्या ठिकाणाहून काढून टाकीन. 6पण
असे काही आहे जे तू करतोस, तू निकलाईतांच्या*
कृत्यांचा द्वेष करतोस, मीही त्यांच्या कृत्यांचा द्वेष करितो.
7“आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान आहेत
तो ऐको! जो विजय मिळवितो त्याला मी जीवनाच्या झाडाचे
(फळ) खाण्याचा अधिकार देईन. ते झाड देवाच्या
सुखलोकात आहे.

## स्मुर्णा येथील मंडळीला

8“स्मुर्णा येथील मंडळीच्या दूताला हे लिही: “जो पहिला
आणि शेवटला आहे त्याचे हे शब्द आहेत, जो मेला होता
पण पुन्हा जीवनात आला. 9मला तुमचे क्लेश आणि
गरिबी माहीत आहे. तरीही तुम्ही श्रीमंत आहात! ज्या
वाईट गोष्टी लोक बोलतात त्याविषयी मला माहीत आहे,
ते म्हणतात आम्ही यहूदी आहोत, पण ते नाहीत. ते सैतानाची
सभा आहेत. 10जे दु:ख तुला सहन करायचे आहे त्याविषयी
घाबरू नकोस. मी तुला सांगतो, तुम्हांपैकी काहींना तुमची
परीक्षा पाहण्यासाठी सैतानाकडून तुरूंगात टाकतील आणि
तुम्ही दहा दिवस छळ सहन कराल. पण तरीही मरेपर्यंत
विश्वासू राहा आणि मग मी तुम्हांला जीवनाचा मुगुट
देईन.
11“आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान
आहेत तो ऐको. जो विजय मिळवितो त्याला दुसऱ्या मरणाची
इजा होणारच नाही.

## पर्गम येथील मंडळीला

12“पर्गम येथील मंडळीच्या दूताला लिही: ज्याच्याकडे
दोन्ही बाजूंनी धार असणारी तीक्ष्ण तरवार आहे, त्याचे हे
शब्द आहेत, 13मला माहीत आहे जेथे सैतानाचे सिंहासन
आहे तेथे तुम्ही राहता. तरीही तुम्ही माझ्या नावात दृढ
आहात. अंतिपाच्या काळामध्येसुद्धा माझ्यावर तुमचा
असलेला विश्वास तुम्ही नाकारला नाही. अंतिपा माझा
विश्वासू साक्षीदार होता. तो तुमच्या शहरात मारला गेला.
सैतान जेथे राहतो असे ते तुमचे शहर आहे.
14“तरीही तुमच्याविरुद्ध माझे म्हणणे आहे: तुमच्यात
असे लोक आहेत की जे बलामाची शिकवण आचरणात
आणतात. बलामाने बालाकाला इस्राएल लोकांना पाप
करायला कसे लावायचे ते शिकविले. त्या लोकांनी लैंगिक
पापे करून आणि मूर्तीला वाहिलेले अन्न खाऊन पाप
केले. 15त्याचप्रमाणे निकलाईताची शिकवण आचरणारे
तुमच्यामध्येसुद्धा काहीजण आहेत. 16म्हणून पश्चात्ताप
करा! नाहीतर मी लवकरच तुमच्याकडे येईन आणि
आपल्या तोंडातील तरवारीने त्यांच्याशी लढेन.
17“आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान
आहेत तो ऐका. जो विजय मिळवितो त्याला मी लपवून
ठेवलेल्या मान्यातून काही देईन. मी त्याला पांढरा दगड
(खडा) देईन ज्यावर नवीन नाव लिहिलेले असेल. ज्याला
तो प्राप्त होईल त्यालाच ते समजेल.

## थुवतीरा येथील मंडळीला

18“थुवतीरा येथील मंडळीच्या दूताला लिही: “देवाचा
पुत्र हे सांगत आहे, ज्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे
आहेत आणि ज्याचे पाय चमकणाऱ्या पितळासारखे आहेत.
19मला तुमची कामे, तुमचे प्रेम आणि विश्वास, तुमची
सेवा आणि धीर माहीत आहे. आणि तुम्ही पहिल्यापेक्षा
आता जास्त करीत आहात हे माहीत आहे.
20तरीसुद्धा तुमच्याविरुद्ध माझे म्हणणे आहे: इजबेल
नावाची स्त्री जी स्वत:ला संदेष्टी म्हणविते आणि ती तिच्या
शिकवणीने माझ्या सेवकांना अनैतिक लैंगिक पाप व
मूर्तीसमोर ठेवलेले अन्न खावयास मोहविते. तरी तुम्ही
तिला खुशाल तसे करू देता. 21मी तिला तिच्या अनैतिक
लैंगिक पापाविषयी पश्चात्ताप करण्यासाठी वेळ दिला आहे.
परंतु ती तसे करायला तयार नाही. 22म्हणून मी तिला
दु:खाच्या बिछान्यावर खिळवीन आणि जे तिच्याबरोबर
व्यभिचाराचे पाप करतात त्यांना भयंकर दु:ख भोगावयास
लावीन. जर ती तिच्या मार्गापासून पश्चात्ताप पावली नाही
23तर मी तिच्या अनुयायांना ठार मारून टाकीन. मग सर्व
मंडळ्यांना हे कळेल की मी तो आहे जो अंत:करणे
आणि मने पारखतो. तुमच्या कृतींप्रमाणे मी प्रत्येकाला
तुमचा मोबदला देईन.
24“पण थुवतीरा येथील मंडळीतील जे दुसरे लोक आहेत
जे तिची शिकवण आचरीत नाहीत त्यांना मी सांगतो की,
ज्या तुम्ही सैतानाची म्हणविलेली खोल गुपिते जाणली
नाहीत, त्या तुमच्यावर मी दुसरे ओझे लादणार नाही.
25मी येईपर्यंत जे तुमच्याकडे आहे त्याला धरून राहा.

---

**निकलाईतांच्या** चुकीच्या कल्पना अनुसरणारा समूह.

26"जो विजय मिळवितो व शेवटपर्यंत माझ्या इच्छेप्रमाणे
करतो त्याला मी राष्ट्रांवर अधिकार देईन.

27'तो त्यांच्यावर लोहदंडाने अधिकार गाजवील मातीच्या
भांड्यासारखा तो त्यांचा चुराडा करील.' *स्तोत्र. 2:9*

जसा पित्याकडून मला अधिकार प्राप्त झाला आहे, 28तसा
मीसुद्धा त्याला पहाटेचा तारा देईन. 29आत्मा मंडळ्यांना
काय म्हणतो हे ज्याला कान आहेत तो ऐको.

## सार्दीस येथील मंडळीला

3 "सार्दीस येथील मंडळीच्या दूताला लिही: "जो देवाचे
सात आत्मे धरतो व सात तारे धरतो त्याचे हे शब्द
आहेत. मला तुमची कामे माहीत आहेत, जिवंत
असण्याबद्दल तुमचा लौकिक आहे. पण तुम्ही मेलेले
आहात. 2जागे व्हा! जे उरलेले आहेत आणि मरणाच्या
ह्यमार्गावर आहेत त्यांना मजबूत करा. कारण माझ्या
देवाच्या दृष्टीने तुमची कृत्ये पूर्ण झाल्याचे मला आढळले
नाही. 3म्हणून लक्षात ठेवा, जे तुम्हाला प्राप्त झालेले
आहे आणि जे तुम्ही ऐकले आहे त्याप्रमाणे वागा. आणि
पश्चात्ताप करा. पण जर तुम्ही जागे होत नाही, तर मी
एखाद्या चोरासारखा येईन आणि तुम्हाला हे कळणार
नाही की मी नेमक्या कोणत्या वेळेला तुमच्याकडे येईन.
4तरी तुमच्यात थोडे लोक आहेत जे सार्दीसमध्ये आहेत
ज्यांनी स्वत:ला स्वच्छ राखले आहे. ते लोक माझ्याबरोबर
चालतील. ते पांढरी वस्त्रे घालतील कारण ते पात्र आहेत.
5प्रत्येक व्यक्ति जी विजय मिळविते, ती त्यांच्यासारखी
पांढरी वस्त्रे परिधान करील. मी त्या व्यक्तीचे नाव
जीवनाच्या पुस्तकातून काढणार तर नाहीच पण माझ्या
पित्यासमोर व त्याच्या देवदूतांसमोर त्याचे नाव स्वीकारीन.
6आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो हे ज्याला कान आहेत
तो ऐको.

## फिलदेल्फिया येथील मंडळीला

7"फिलदेल्फिया येथील मंडळीच्या दूताला लिही:
"जो पवित्र, सत्य, जो दाविदाची किल्ली ठेवतो त्याचे हे
शब्द आहेत, जे तो उघडतो, ते कोणी बंद करू शकणार
नाही आणि जे तो बंद करतो ते कोणी उघडू शकणार
नाही. 8मला तुमची कामे माहीत आहेत, पाहा मी
तुमच्यासमोर दार उघडे करून ठेवले आहे. जे कोणीही
बंद करू शकणार नाही. मला माहीत आहे की, तू दुर्बळ
आहेस, तरी तू माझा शब्द पाळला आहेस, आणि माझे
नाव नाकारले नाहीस. 9जे सैतानाच्या सभास्थानाचे आहेत,
ते स्वत:ला यहूदी समजतात पण ते यहूदी नाहीत तर ते
खोटारडे आहेत. मी त्यांना तुमच्याकडे आणून तुमच्या
पाया पडायला लावीन. आणि त्यांना समजेल की मी
तुमच्यावर प्रीति केली आहे. 10धीराने सहन करण्याविषयी
तुम्ही माझी आज्ञा पाळली आहे. म्हणून सर्व जगावर जो
संकटाचा समय येणार आहे त्यापासून मी तुम्हांला राखीन.
हा त्रास जे लोक या पृथ्वीवर राहातात त्यांची परीक्षा
होण्यासाठी होईल.
11"मी लवकर येत आहे. जे तुझ्याकडे आहे त्याला
घट्ट धरून राहा यासाठी की कोणीही तुझा मुगुट घेऊ
नये. 12जो विजय मिळवितो त्याला मी माझ्या देवाच्या
मंदिराचा खांब बनवीन. तो पुन्हा कधीही त्याला सोडणार
नाही. मी त्याच्यावर माझ्या देवाचे नाव व माझ्या देवाच्या
शहराचे नाव नवे यरुशलेम असे लिहीन. जे माझ्या
देवापासून स्वर्गातून खाली येत आहे. आणि मी त्याच्यावर
माझे नवे नाव लिहीन. 13आत्मा मंडळ्यांना काय म्हणतो
हे ज्याला कान आहेत तो ऐको.

## लावदिकीया येथील मंडळीला

14"लावदिकीया येथील मंडळीच्या दूताला लिही:
"जो आमेन* आहे, विश्वासू आणि खरा साक्षीदार
आहे, देवाच्या निर्मितीवरील सत्ताधीश आहे त्याचे हे शब्द
आहेत. 15मला तुमची कामे माहीत आहेत तुम्ही थंडही
नाही व गरमही नाही. माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही
दोन्हींपैकी एक काहीतरी असावे! 16पण, तुम्ही कोमट
असल्याने– मी तुम्हांला तोंडातून (थुंकून) टाकणार आहे.
17तुम्ही म्हणता, 'मी श्रीमंत आहे, मी संपत्ति मिळविली
आहे. आणि मला कोणत्याही गोष्टीची गरज नाही. पण
तुम्हाला याची जाणीव होत नाही की, तुम्ही नीच, नराधम,
दयनीय, गरीब, आंधळे व ओंगळ आहात. 18मी तुम्हाला
सल्ला देतो की, अग्नीत शुद्ध केलेले सोने माझ्याकडून
विकत घ्या, म्हणजे तुम्ही श्रीमंत व्हाल. आणि शुभ्र वस्त्रे
विकत घ्या व तुमची लज्जास्पद नग्नता तुम्ही झाका.
आणि स्पष्ट दिसावे म्हणून डोळ्यात घालण्यास अंजन
विकत घ्या.
19"ज्यांच्यावर मी प्रेम करतो, त्यांना दटावतो व शिस्त
लावतो म्हणून कसोशीचे प्रयत्न करावयास लागा आणि
पश्चात्ताप करा. 20मी येथे आहे! मी दाराजवळ उभा
राहतो व दार ठोठावतो. जर कोणी माझा आवाज ऐकतो
आणि दार उघडतो, तर मी आत येईन आणि त्याच्याबरोबर
जेवीन व तोही माझ्याबरोबर जेवेल. 21"जो विजय मिळवील
त्याला मी माझ्या सिंहासनावर बसण्याचा अधिकार देईन
ज्याप्रमाणे मी विजय मिळविला आणि माझ्या पित्याच्या
सिंहासनावर बसलो. 22आत्मा मंडळ्यास काय म्हणतो, हे
ज्याला कान आहेत तो ऐको."

## योहान स्वर्ग पाहतो

4 तेव्हा मी पाहिले आणि स्वर्गात दार माझ्यासमोर
उघडलेले दिसले. आणि अगोदर जसा आवाज मी

---

**आमेन** या ठिकाणी येशूचे नाव म्हणून वापरले आहे. याचा
अर्थ जे सत्य आहे त्याचे जोरदारपणे समर्थन करणे.

माझ्याशी बोलताना ऐकला होता तसाच आवाज मी ऐकला.
तो आवाज कर्ण्याच्या आवाजासारखा होता. तो आवाज
म्हणाला, "इकडे ये, आणि मी तुला यानंतर जे घडणार
आहे ते दाखवितो."
2त्याच क्षणी आत्म्याने माझा ताबा घेतला. तेथे स्वर्गात
माझ्यासमोर सिंहासन होते. कोणी एक त्यावर बसलेले
होते. 3त्यावर जो बसला होता तो यास्फे व सार्दी या
रत्नांसारखा होता आणि सिंहासनाभोवती पाचूसारखे
दिसणारे मेघधनुष्य होते. 4सिंहासनाभोवती चोवीस आसने
होती, आणि त्या आसनांवर शुभ्र कपडे घातलेले व
डोक्यावर सोन्याचा मुगुट असलेले चोवीस वडील बसले
होते. 5सिंहासनापासून विजा व भिन्न आवाज निघत होते.
शिवाय गडगडाट निघत होते. सिंहासनासमोर सात दिवे
जळत होते. ते देवाचे सात आत्मे होते. 6तसेच सिंहासनासमोर
काचेच्या समुद्रासारखे काहीतरी दिसत होते. ते
स्फटिकासारखे स्पष्ट होते.

मध्यभागी, सिंहासनाभोवती चार जिवंत प्राणी होते आणि
ते डोळ्यांनी भरले होते. पुढे डोळा, मागे डोळे. 7पहिला
जिवंत प्राणी सिंहासारखा होता. दुसरा बैलासारखा होता.
तिसऱ्याचा चेहरा मनुष्यासारखा होता. आणि चवथा उडत्या
गरूडासारखा होता. 8त्या प्रत्येक जिवंत प्राण्याला सहा
पंख होते. व त्यांना सगळीकडे डोळे होते. त्यांच्या
पंखाखालीसुद्धा डोळे होते. दिवस व रात्र न थांबता ते
म्हणत होते:

"पवित्र, पवित्र, पवित्र, हा प्रभु देव सर्वसमर्थ जो होता,
जो आहे, आणि जो येणार आहे."

9जेव्हा जेव्हा ते जिवंत प्राणी सिंहासनावर बसलेल्याचा
गौरव, सन्मान व उपकारस्तुति करीत होते आणि व जो
सिंहासनावर बसलेला होता तो अनंतकाळपर्यंत जगत
राहणारा आहे, 10तेव्हा तेव्हा जो सिंहासनावर बसला होता
आणि अनंतकाळपर्यंत राहतो त्याच्यासमोर चोवीस वडील
पाया पडत होते आणि त्याची उपासना करीत होते. ते
आपले मुगुट सिंहासनासमोर ठेवत होते. व म्हणत होते
की:

11"आमचा प्रभु आणि देव! तू गौरव, सन्मान आणि
सामर्थ्य प्राप्तकरून घेण्यास योग्य आहेस. तू सर्व काही
तयार केलेस तुला वाटत होते म्हणून सर्व काही अस्तित्वात
आले आणि करण्यात आले."

5 मग मी, जो सिंहासनावर बसला होता त्याच्या उजव्या
हातात गुंडाळी पाहिली. गुंडाळीवर दोन्ही बाजूंनी
लिहिले होते. आणि ती गुंडाळी सात शिक्के मारून बंद
केली होती. 2आणि मी एक सामर्थ्यशाली देवदूत पाहिला.
तो देवदूत मोठ्या आवाजात म्हणाला, "गुंडाळीचे शिक्के
तोडून ती उघडण्यास कोण पात्र आहे?" 3परंतु स्वर्गात,
पृथ्वीवर किंवा पृथ्वीखाली कोणीही ते शिक्के तोडण्यास
आणि त्यामध्ये पाहण्यास समर्थ नव्हता. 4मी खूप रडलो
कारण ती गुंडाळी उघडून आतमध्ये काय आहे हे पाहण्याच्या
योग्यतेच कोणीही नव्हते.
5पण वडीलांपैकी एकजण मला म्हणाला, "रडू नकोस!
पहा, यहूदा वंशाचा सिंह, दाविदाचा अंकुर हा विजयी
झाला आहे. तो गुंडाळी उघडण्यास व तिचे सात शिक्के
उघडण्यास समर्थ आहे."
6मग मी एक कोकरा पाहिला. सिंहासनाच्या मध्यभागी
उभा असलेला व त्याच्या भोवती चार जिवंत प्राणी असलेले
मी पाहिले. व वडीलही त्याच्याभोवती होते. कोकरा
बांधल्यासारखा दिसत होता. त्याला सात शिंगे आणि सात
डोळे होते. आणि हे जणू देवाचे सात आत्मे असून ते सर्व
जगभर पाठविले होते. 7कोकरा आला आणि त्याने जो,
सिंहासनावर बसला होता, त्याच्या उजव्या हातातून ती
गुंडाळी घेतली. 8आणि जेव्हा त्याने ती घेतली तेव्हा चार
जिवंत प्राणी व चोवीस वडीलजन कोकऱ्यासमोर उपडे
पडले. प्रत्येकाजवळ वीणा व प्रत्येकाच्या हातात सुवासिक
उदाने भरलेल्या सोन्याच्या वाट्या होत्या. या वाट्या म्हणजे
देवाच्या लोकांच्या प्रार्थना होत्या. 9आणि त्यांनी नवे गाणे
गाईले:

"तू गुंडाळी घेण्यास आणि तिचे शिक्के उघडण्यास समर्थ
आहेस, कारण तुला वधण्यात आले आणि तू आपल्या
रक्ताने मनुष्यांना प्रत्येक वंशातून, वेगवेगळ्या भाषा
बोलणाऱ्या जमातीतून, आणि राष्टांतून विकत घेतले.
10तू त्यांना राज्य आणि पृथ्वीवर आपल्या देवासाठी
याजक बनविले आणि नंतर ते पृथ्वीवर सत्ता गाजवितील"

11मग मी पाहिले सिंहासन आणि, चार जिवंत प्राणी व
वडीलजन यांच्या सभोवती अगणित देवदूतांची वाणी ऐकली,
त्यांची संख्या अयुतांची अयुते व हजारो हजार होती. 12देवदूत
मोठ्या आवाजात म्हणाले,

"जो वधलेला कोकरा होता तो सामर्थ्य, संपत्ति, शहाणपण
आणि शक्ति, सन्मान, गौरव आणि स्तुतीस पात्र आहे!"

13प्रत्येक निर्माण केलेली वस्तु आकाशात व पृथ्वीवर,
पृथ्वीखाली व समुद्रातील अवघ्यांना मी असे गाताना ऐकले
की,

"जो सिंहासनावर बसतो त्याला व कोकऱ्याला स्तुति,
सन्मान, गौरव आणि सामर्थ्य अनंतकाळपर्यंत असो!"

14चार जिवंत प्राणी म्हणाले, "आमेन!" मग वडीलजनांनी
खाली पडून त्याला अभिवादन केले.

6 मग मी पाहिले की, कोकऱ्याने सात शिक्क्यांपैकी
एक उघडला. मी त्या चार जिवंत प्राण्यांपैकी एकाला
ढगाच्या गडगडाटासारखे बोलताना ऐकले. तो म्हणाला,
“ये!” 2मी पाहिले आणि तेथे माझ्यासमोर पांढरा घोडा
होता. घोडेस्वाराने धनुष्य धरले होते. त्याला मुगुट देण्यात
आला होता. तो निघाला, शत्रूचा पराभव करीत निघाला,
तो विजय मिळविण्यासाठी निघाला.
3जेव्हा कोकऱ्याने दुसरा शिक्का उघडला, तेव्हा मी
दुसऱ्या प्राण्याला बोलताना ऐकले. तो म्हणाला, “ये!”
4मी पाहिले तेव्हा लाल रंग असलेला दुसरा घोडा निघाला.
घोडेस्वाराला पृथ्वीवरून शांति काढून घेण्याचा अधिकार
दिला होता. म्हणजे लोकांनी आपापसांत एकमेकाला ठार
करावे. त्याला मोठी तरवार देण्यात आली होती.
5जेव्हा कोकऱ्याने तिसरा शिक्का उघडला, तेव्हा मी
तिसऱ्या जिवंत प्राण्याला बोलताना ऐकले, “ये!” मी पाहिले
तेव्हा माझ्यासमोर काळा घोडा होता व घोडेस्वाराच्या
हातात तराजू होते असे मला दिसले 6मग मी जणू काय
चारही जिवंत प्राणी बोलल्यासारखा आवाज ऐकला. ते
म्हणत होते, “एक किलो गहू एका दिवसाच्या मजुरीइतके,
आणि तीन किलो बार्ली एका दिवसाच्या मजुरीइतकी,
मात्र तेल व द्राक्षारस वाया घालवू नका.”
7जेव्हा त्याने चौथा शिक्का उघडला, तेव्हा मी चौथ्या
जिवंत प्राण्याचा आवाज ऐकला. तो म्हणाला, “ये आणि
पाहा!” 8मी पाहिले तेव्हा माझ्यासमोर फिक्या रंगाचा
घोडा मला दिसला. त्यावरच्या घोडेस्वाराचे नाव मृत्यु
होते. आणि त्याच्या मागोमाग अधोलोक चालला होता.
आणि त्यांना पृथ्वीच्या चौथ्या भागावर (पृथ्वीच्या पाव
भागावर) लोकांना तरवारीने मारण्याचा, दुष्काळाने आणि
पटकीने मारण्याचा व पृथ्वीवरील जंगली हिंस्र प्राण्यांकडून
मारण्याचा अधिकार दिला होता.
9जेव्हा त्याने पाचवा शिक्का उघडला तेव्हा मी काही
आत्मे वेदीखाली पाहिले. त्यांना देवाच्या वचनासाठी आणि
त्यांनी राखलेल्या साक्षीमुळे ठार मारण्यात आले होते.
10ते मोठ्या आवाजात म्हणाले, “पवित्र आणि सत्य प्रभु,
कोठपर्यंत तू पृथ्वीवरील लोकांचा न्याय करणार नाहीस
आणि आम्हाला ठार मारल्याबद्दल त्यांना शिक्षा करणार
नाहीस?” 11त्या प्रत्येक आत्म्याला मग एक एक पांढरा
शुभ्र झगा देण्यात आला. आणि त्यांना सांगण्यात आले
की, त्यांचे काही बांधव ख्रिस्ताच्या सेवेत आहेत व यांना
जसे मारण्यात आले, तसे त्यांनाही मारण्यात येईल व ते
पूर्ण होईपर्यंत त्यांनी थोडा वेळ थांबावे.
12मग कोकऱ्याला सहावा शिक्का उघडताना मी पाहिले.
तेव्हा मोठा भूकंप झाला, सूर्य मेंढीच्या केसांपासून
बनविलेल्या काळ्या कापडासारखा झाला. पूर्ण चंद्र
रक्तासारखा लाल झाला. 13ज्याप्रमाणे अंजिराचे झाड वारा
आला म्हणजे अंजिरे खाली पाडते तसे आकाशातून तारे
पृथ्वीवर पडले. 14जसे गुंडाळी गुंडाळतात तसे, आकाश
गुंडाळले गेले. आणि प्रत्येक पर्वत व बेट त्याच्या स्थानावरून
हलविले गेले.
15मग सर्व लोक गुहेत, पर्वतांच्या, खडकांच्या मागे
लपले. त्यामध्ये जगातील राजे, सत्ताधीश, सेनापती, श्रीमंत
लोक आणि सामर्थ्यशाली लोक होते. प्रत्येक व्यक्ति,
गुलाम किंवा स्वतंत्र लपून बसली. 16लोक पर्वतांना आणि
खडकांना म्हणाले, “आमच्यावर पडा. जो सिंहासनावर
बसला आहे त्याच्या चेहऱ्यासमोरून आम्हांला लपवा.
कोकऱ्याच्या रागापासून आम्हाला लपवा. 17कारण
त्याच्या रागाचा मोठा दिवस आला आहे. त्यासमोर कोणीच
टिकाव धरू शकत नाही!”

## इस्राएलचे एकशे चव्वेचाळीस हजार लोक

7 यानंतर मी चार देवदूतांना पृथ्वीच्या चार कोपऱ्यांना
उभे राहिलेले पाहिले. देवदूतांनी पृथ्वीचे चारही
दिशांचे वारे अडविले होते. जमिनीवर, समुद्रावर किंवा
कोणत्याही झाडावर वारा वाहू नये म्हणून ते वाऱ्याला
थोपवीत होते. 2तेव्हा मी आणखी एक देवदूत पूर्वेकडून
वर येताना पाहिला. या देवदूताकडे जिवंत देवाचा शिक्का
होता. या देवदूताने त्या चार देवदूतांना मोठ्या आवाजात
बोलाविले. हे चार देवदूत असे होते की ज्यांना देवाने
पृथ्वी व समुद्राला इजा करण्याचे सामर्थ्य दिले. देवदूत
त्या देवदूतांना म्हणाला, 3“जमिनीला, किंवा समुद्राला किंवा
झाडांना, जे देवाची सेवा करतात त्या लोकांना आम्ही
शिक्का मारेपर्यंत इजा करू नका.” 4मग मी ज्यांना शिक्का
मारला होता त्यांची संख्या ऐकली. इस्राएल लोकांच्या
प्रत्येक वंशावर शिक्का मारला, ते एकशे चव्वेचाळीस
हजार होते.

| | | |
|---|---|---|
| 5 यहूदा वंशातील | 12,000 | लोकांना |
| रऊबेन वंशातील | 12,000 | लोकांना |
| गाद वंशातील | 12,000 | लोकांना |
| 6 अशेर वंशातील | 12,000 | लोकांना |
| नफताली वंशातील | 12,000 | लोकांना |
| मनश्शे वंशातील | 12,000 | लोकांना |
| 7 शिमोन वंशातील | 12,000 | लोकांना |
| लेवी वंशातील | 12,000 | लोकांना |
| इस्साखार वंशातील | 12,000 | लोकांना |
| 8 जबुलून वंशातील | 12,000 | लोकांना |
| योसेफ वंशातील | 12,000 | लोकांना |
| बन्यामिन वंशातील | 12,000 | लोकांना |

## मोठा समुदाय

9यानंतर मी पाहिले, तेव्हा अफाट लोकसमुदाय मला
दिसला. तेथे इतके लोक होते की, कोणालाही ते मोजता
आले नसते. ते प्रत्येक राष्ट्राचे, वंशाचे, जमातीचे, आणि
भाषेचे लोक होते. हे लोक सिंहासनासमोर आणि

कोकऱ्यासमोर उभे होते. त्या सर्वांनी पांढरे शुभ्र झगे घातले होते आणि त्यांच्या हातात झावळ्याच्या फांद्या होत्या. 10ते मोठ्याने ओरडत होते, "तारण आमच्या देवाचे आहे. व आमच्या कोकऱ्याचे आहे, जो सिंहासनावर बसतो." 11सर्व देवदूत सिंहासनाभोवती उभे होते आणि वडिलजनांच्या आणि चार प्राण्यांच्या भोवती उभे होते. ते सिंहासनासमोर पालथे पडले आणि त्यांनी देवाची आराधना केली. 12ते म्हणाले, "आमेन! स्तुति गौरव, शहाणपण, आभार, सन्मान, सामर्थ्य आणि पराक्रम अनंतकाळासाठी आमच्या देवाची आहेत. आमेन!"

13मग वडीलांपैकी एकाने मला विचारले, "हे पांढरे झगे घातलेले कोण आहेत? व कोठून आले आहेत?"

14मी म्हणालो, "महाराज, आपणाला माहीत आहे."

आणि तो वडील म्हणाला, "हे लोक मोठ्या त्रासातून बाहेर आलेले आहेत, त्यांनी त्यांची वस्त्रे कोकऱ्याच्या रक्तात धुतली आहेत. आता स्वच्छ व शुभ्र झाले आहेत. 15म्हणून आता हे लोक देवाच्या सिंहासनासमोर आहेत. हे लोक देवाची त्याच्या मंदिरात रात्रंदिवस सेवा करतात आणि जो सिंहासनावर बसलेला आहे, तो त्यांचे रक्षण करील. 16त्या लोकांना पुन्हा केव्हाच भूक लागणार नाही. त्यांना पुन्हा केव्हाच तहान लागणार नाही. सूर्यामुळे त्यांना बाधा होणार नाही. कोणतीही उष्णता त्यांना जाळून टाकणार नाही. 17सिंहासनाच्या मध्यभागी असलेला कोकरा त्यांचा मेंढपाळ असेल. ज्या झऱ्यांचे पाणी जीवन देते तेथे तो त्यांना नेईल. आणि देव त्यांच्या डोळ्यांतील सर्व अश्रु पुसून टाकील."

## सातवा शिक्का

8 कोकऱ्याने सातवा शिक्का उघडला. तेव्हा स्वर्गात अर्धा तासपर्यंत सर्वत्र शांतता होती. 2आणि मी सात देवदूतांना देवासमोर उभे असलेले पाहिले. त्यांना सात कर्णे दिले होते.

3दुसरा देवदूत आला आणि वेदीजवळ उभा राहिला. या देवदूताकडे सोनेरी धूप ठेवण्याचे भांडे होते, त्यांच्याकडे धूप प्रार्थनेसह अर्पण करण्यासाठी दिले होते. ह्या प्रार्थना देवाच्या पवित्र लोकांच्या होत्या. देवदूताने त्याचे अर्पण सिंहासनासमोर सोनेरी वेदीवर ठेवले. 4धुपाचा धूर देवदूताच्या हातातून देवाच्या सिंहासनासमोर गेला. धूर देवाच्या लोकांच्या प्रार्थनेसह गेला. 5मग देवदूताने धुपाटणे घेऊन, वेदीवरील अग्नीने ते भरले व ते पृथ्वीवर टाकले तेव्हा विजा चमकू लागल्या. मेघांचा गडगडाट व इतर आवाज झाले. आणि भूकंप झाला.

## सात देवदूत त्यांचे कर्णे वाजवितात

6मग सात देवदूत त्यांचे कर्णे वाजविण्यास तयार झाले. 7पहिल्या देवदूताने कर्णा वाजविला आणि रक्तमिश्रित गारा व अग्नि पृथ्वीवर टाकण्यात आले. तेव्हा पृथ्वीचा एक तृतीयांश भाग आणि एक तृतीयांश झाडे व सर्व हिरवे गवत जळून गेले.

8दुसऱ्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला. तेव्हा अग्नीने जळत असलेल्या मोठ्या डोंगरासारखे काहीतरी समुद्रात टाकले गेले. आणि एक तृतीयांश समुद्राचे रक्त झाले. 9आणि एक तृतीयांश समुद्रातील जीव मेले. आणि एक तृतीयांश जहाजे नष्ट झाली.

10तिसऱ्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला तेव्हा एक मोठा तारा मशालीप्रमाणे पेटलेला आकाशातून पडला. तो तारा नद्यांच्या एक तृतीयांश भागावर पडला आणि झऱ्यांच्या एक तृतीयांश भागावर पडला. 11त्या ताऱ्याचे नाव कडूदवणा आणि एक तृतीयांश पाणी कडू झाले. ते कडू असलेले पाणी पिऊन पुष्कळ लोक मेले.

12चौथ्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला. तेव्हा सूर्याच्या एक तृतीयांश भागावर आघात झाला. चंद्राच्या एक तृतीयांश भागावर व ताऱ्यांच्या एक तृतीयांश भागावर आघात झाला. त्यामुळे त्याचा एक तृतीयांश भाग काळा झाला. दिवसाचा एक तृतीयांश काळा भाग झाला. रात्रीचा एक तृतीयांश भाग काळा झाला.

13मी पाहत असताना, आकाशात उंचावर मी गरूडाला उडताना पाहिले. गरूड मोठ्या आवाजात म्हणाला, "संकट! संकट! संकट, पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांवर संकट येत आहे. हे संकट तीन देवदूतांनी कर्णा वाजविल्यावर येईल."

9 पाचव्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला, तेव्हा मी आकाशातून एका ताऱ्याला पृथ्वीवर पडताना पाहिले. अथांग दऱ्याकडे नेणाऱ्या खोल बोगद्याची किल्ली त्याला देण्यात आली. 2मोठ्या भट्टीतून धूर यावा तसा त्या बोगद्यातून धूर येऊ लागला. बोगद्यातून येणाऱ्या धुरामुळे सूर्य आणि आकाश काळे झाले 3मग धुरातून टोळधाड पृथ्वीवर आली. त्यांना पृथ्वीवरील विंचवासारखा दंश करण्याचा अधिकार दिला होता. 4टोळांना सांगण्यात आले होते की त्यांनी गवताला, रोपांना किंवा झाडांना हानि पोहचवू नये. ज्या लोकांच्या कपाळावर देवाचा शिक्का मारण्यात आला नसेल त्यांनाच चावण्यास त्यांना सांगण्यात आले होते. 5या टोळांना लोकांना वेदना देण्यासाठी पाच महिने वेळ दिला होता. अधिकार दिला होता. पण त्यांना लोकांना ठार मारण्याचा अधिकार देण्यात आला नव्हता. त्यांच्या दंशाने ज्या वेदना होत त्या वेदना विंचवाने डंख मारल्यावर होतात तशा होत होत्या. 6या दिवसात अनेक जण मरण्यासाठी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतील पण त्यांना तो सापडणार नाही. त्यांना मरावेसे वाटेल पण मरण त्यांच्यापासून लपून राहील.

7युद्धासाठी तयार असलेल्या घोड्यांसारखे टोळ दिसत होते. त्यांच्या डोक्यांवर त्यांनी सोनेरी मुगुटासारखे काही घातले होते. त्यांचे चेहरे मनुष्यांच्या चेहऱ्यासारखे दिसत होते. 8त्यांचे केस स्त्रियांच्या केसांसारखे होते. त्यांचे दात सिंहाच्या दातांसारखे होते. 9त्यांची छाती लोखंडी

उरस्त्राणासारखी (चिलखतासारखी) दिसत होती आणि त्यांच्या पंखांचा आवाज युद्धात वेगाने धावणाऱ्या अनेक घोडयांच्या रथासारखा होता. 10त्यांना विंचवासारख्या शेपट्या व नांग्या होत्या. लोकांना पाच महिने वेदना देण्याची त्यांच्या शेपटीत ताकद होती. 11टोळांचा एक राजा होता. हा राजा अथांग दऱ्याचा दूत होता. यहूदी भाषेत त्याचे नाव अबद्दोन, आणि ग्रीक भाषेत त्याचे नाव अपुल्लोन (विध्वंसमूलक) होते. 12पहिले मोठे संकट आता येऊन गेले होते. आणखी दोन मोठी संकटे येणार आहेत.

13सहाव्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला. तेव्हा मी देवासमोर असलेल्या सोनेरी वेदीवरून चारपैकी एका शिंगापासून येणारा आवाज ऐकला. 14तो आवाज त्या सहाव्या दूताला ज्याच्याकडे कर्णा होता त्याला म्हणाला, “फरात नदीवर बांधून ठेवलेले चार देवदूत सोड.” 15ते चार देवदूत या घटकेसाठी, या दिवसासाठी, या महिन्यासाठी, या वर्षासाठी तयार ठेवले होते. पृथ्वीवरील एक तृतीयांश लोकांना मारण्यासाठी हे देवदूत सोडण्यात आले. 16घोडदळाची संख्या मी ऐकली. तो 200,000,000 इतके घोडदळ होते. 17माझ्या दृष्टान्तात मी घोडे आणि घोड्यांवर असलेले स्वार पाहिले. ते अशा प्रकारे दिसत होते: तांबड्या रंगाचे, गडद निळे आणि पिवळे असे त्यांचे उरस्त्राण (चिल खत) होते. घोड्यांची मस्तके सिंहाच्या मस्तकासारखी दिसत होती. घोड्यांच्या तोंडांतून अग्नि, धूर व गंधरस येत होते. 18घोडयांच्या तोंडातून येणाऱ्या या तीन पीडा – अग्नि, धूर व गंधरस यामुळे पृथ्वीवरील एक तृतीयांश लोक मारले गेले. 19घोड्यांची शक्ति त्यांच्या तोंडात तशी त्यांच्या शेपटीतसुद्धा होती. त्या शेपट्या सापासारख्या असून त्यांना दंश करण्यासाठी डोके होते. ते लोकांना जखमी करीत असत. 20इतर लोकांना या वाईट गोष्टींमुळे मारले गेले नाहीत. पण तरीही या लोकांनी आपली अंत:करणे व जीविते बदलली नाहीत. आणि आपल्या हातांनी ज्या गोष्टी ते करीत होते त्यापासून वळले नाहीत. ते सैतानाची म्हणजे सोने, चांदी, तांबे, दगड आणि लाकूड यांच्या मूर्तींची, ज्या पाहू शकत नाहीत, ऐकू शकत नाहीत व चालू शकत नाहीत, अशांची भक्ति करण्याचे त्यांनी थांबविले नाही. 21या लोकांनी इतरांना मारण्यापासून आपली अंत:करणे बदलली नाहीत खून चेटके तसेच लैंगिक पापांपासून आणि चोरीपासून परावृत्त झाले नाहीत.

## देवदूत आणि लहान गुंडाळी

10 मग मी आणखी एक शक्तीशाली देवदूत स्वर्गातून येताना पाहिला. तो ढगांनी आच्छादलेला होता. त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होते. त्याचा चेहरा सूर्यासारखा होता, त्याचे पाय जणू काय अग्नीचे खांब होते. 2त्याने लहान गुंडाळी धरली होती, जी त्याच्या हातात उघडी होती. त्याने त्याचा उजवा पाय समुद्रात ठेवला होता व डावा पाय जमिनीवर ठेवला होता. 3आणि त्याने सिंहाच्या गर्जनेसारखी मोठ्याने गर्जना केली. जेव्हा तो ओरडला, तेव्हा त्या सात मेघगर्जनांनी आपापले शब्द उच्चारले. 4जेव्हा त्या सात मेघगर्जना बोलल्या, त्यावेळी मी लिहिणार एवढ्यात मला आकाशातून वाणी आली, ती म्हणाली, “सात मेघगर्जनांनी काढलेले शब्द बंद करून ठेव. ते लिहू नको.”

5मग ज्या देवदूताला मी समुद्रात व जमिनीवर पाहिले होते त्याने आपला उजवा हात स्वर्गाकडे उचलला. 6जो अनंतकाळ जगतो, ज्याने आकाश व त्यातील सर्व काही बनविले, पृथ्वी व तीवरील सर्व काही बनविले, समुद्र व त्यातील सर्व काही बनविले, त्याच्या नावाने शपथ वाहिली. आणि म्हणाला, “आता आणखी विलंब होणार नाही! 7पण जेव्हा सातवा देवदूत कर्णा वाजविण्याच्या तयारीत असेल त्या दिवसात देवाची गुप्त योजना पूर्ण होईल. त्याचे सेवक जे संदेष्टे (भविष्यवादी) त्यांना दिलेल्या वचनानुसार घडून येईल.”

8तेव्हा आकाशातून झालेली वाणी जी मी ऐकली होती ती पुन्हा मला बोलली, “जा, गुंडाळी घे, जी गुंडाळी समुद्र व जमीन यावर उभ्या असलेल्या देवदूताच्या हातात उघडी आहे ती घे.”

9म्हणून मी त्या देवदूताकडे गेलो व मला ती लहान गुंडाळी दे असे म्हणालो. तो मला म्हणला, “ही घे, आणि ही खा. ती खाल्ल्याने तुझे पोट कडू होईल. पण तुझ्या तोंडाला मात्र ते मधासारखे गोड लागेल.” 10मी ती लहान गुंडाळी देवदूताच्या हातून घेतली व खाऊन टाकली. माझ्या तोंडात मला ती मधासारखी गोड वाटली. पण जेव्हा ती मी खाल्ली, तेव्हा माझे पोट कडवट झाले. 11तेव्हा मला सांगण्यात आले, “तू पुन्हा पुष्कळ लोकांना, राष्ट्रांना, वेगवेगव्या भाषा बोलणाऱ्यांना व राजांना संदेश सांगितले पाहिजेत.”

## दोन साक्षीदार

11 मग मला मोजमाप करण्यासाठी वापरण्यात येण्यासारखी काठी देण्यात आली. आणि मला सांगण्यात आले, “जा आणि देवाचे मंदीर, वेदी व तेथील उपासकांचे मोजमाप कर. 2पण बाहेरचे अंगण सोडून दे. त्याचे मोजमाप करू नको. कारण ते विदेशी लोकांना दिलेले आहे. ते बेचाळीस महिने पवित्र शहर तुडवितील. 3आणि मी माझ्या दोन साक्षीदारांना सामर्थ्य देईन. ते देवाचा संदेश 1,260 दिवस देतील. ते तागाची वस्त्रे* घालतील.” 4हे दोन साक्षीदार म्हणजे दोन जैतुनाची झाडे आहेत. आणि पृथ्वीच्या प्रभूसमोर असणाऱ्या दीपसमया आहेत. 5जर एखाद्या व्यक्तीने त्या साक्षीदारांना दुखविण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या तोंडातून अग्नि निघून त्यांच्या

---

**तागाची वस्त्रे** जाडेभरडे तागाचे वस्त्र. दु:ख व्यक्त करण्यासाठी काही वेळा लोक ते वापरतात.

शत्रूंना भस्म करीत राहत असे. जो कोणी त्यांना इजा
करण्याचा प्रयत्न करीत असे त्याला अवश्य मरावे लागे.
6या साक्षीदारांना ते संदेश देत असताना पाऊस पडला तर
तो थांबविण्याचे सामर्थ्य आहे. त्या साक्षीदारांना पाण्याचे
रक्त करण्याचे सामर्थ्य आहे. पृथ्वीवर प्रत्येक प्रकारचे
संकट पाठविण्याचे सामर्थ्य आहे आणि त्यांना पाहिजे
तितके वेळा ते हे करू शकतात.

7आणि जेव्हा दोन साक्षीदार त्यांचा संदेश देण्याचे
संपवतील तेव्हा त्या अभांग दऱ्यातून येणारा प्राणी त्यांच्याशी
लढाई करील. प्राणी त्यांचा पराभव करील व, त्यांना
मारून टाकील. 8त्या साक्षीदारांची शरीरे मोठ्या शहराच्या
रस्त्यावर पडतील. त्या शहरांचे नाव सदोम आणि इजिप्त
असे आहे. शहरांच्या या नावांना विशेष अर्थ आहे. या
शहरातच आपल्या प्रभूला वधस्तंभावर मारण्यात आले.
9साडेतीन दिवसांपर्यंत प्रत्येक वंशाचे. जमातीचे, भाषेचे
आणि राष्ट्राचे लोक त्या साक्षीदारांच्या शरीरांकडे पाहतील.
पण त्यांना पुरण्यास नकार देतील. 10पृथ्वीवर राहणारे
लोक त्या दोन साक्षीदारांच्या मृत्यूने आनंद पावतील ते
मेजवान्या आयोजित करतील व एकमेकांना भेटी
पाठवतील. ते असे करतील कारण या दोन साक्षीदारांनी
पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांना अतोनात क्लेश दिले होते.

11पण साडेतीन दिवसांनंतर देवाकडील जीवनाच्या
श्वासाने त्या साक्षीदारांमध्ये प्रवेश केला. आणि ते त्यांच्या
पायांवर उभे राहिले. ज्या सर्व लोकांनी त्यांना पाहिले ते
सर्व घाबरून गेले.

12मग त्या दोन साक्षीदारांनी स्वर्गातून मोठा आवाज
ऐकला. तो म्हणाला, “इकडे वर या!” मग ते दोन साक्षीदार
ढगातून स्वर्गात गेले. त्यांच्या शत्रूंनी त्यांना वर जाताना
पाहिले.

13त्याच वेळेला मोठा भूकंप झाला. एक दंशाश शहर
नष्ट झाले व भूकंपात सात हजार लोक मारले गेले. जे
लोक मेले नाहीत ते खूप घाबरले होते. त्यांनी स्वर्गातील
देवाला गौरव दिले.

14दुसरे मोठे संकट संपले. तिसरे मोठे संकट लवकरच
येत आहे.

## सातवा कर्णा

15सातव्या देवदूताने त्याचा कर्णा वाजविला. तेव्हा स्वर्गात
मोठ्याने आवाज झाले. ते आवाज म्हणाले:

“जगाचे राज्य आता आमच्या प्रभूचे व त्याच्या ख्रिस्ताचे
झाले आहे. आणि तो अनंतकाळपर्यंत राज्य करील.”

16मग जे चोवीस वडील सिंहासनावर बसले होते, ते
आपल्या चेहऱ्यावर पडले त्यांनी आणि देवाची भक्ती
केली. हे वडील देवासमोर त्यांच्या सिंहासनावर बसले.
17ते म्हणाले:

“आम्ही तुझे आभार मानतो. सर्वसमर्थ प्रभु देवा, तूच
एक आहेस की जो तू आहेस व होतास. आम्ही तुझे
उपकार मानतो कारण तुझे महान सामर्थ्य वापरून सत्ता
चालविण्यास सुरुवात केलीस

18जगातील लोक रागावले पण आता तुझा राग आला
आहे, आता मेलेल्या माणसांचा न्याय करण्याची वेळ आली
आहे. तुझे सेवक, संदेष्टे यांना बक्षीस देण्याची वेळ आली
आहे. आणि तुझ्या पवित्र लोकांना बक्षिस देण्याची वेळ
आली आहे. जे लहानमोठे लोक तुझा आदर करतात,
त्यांना बक्षिस देण्याची वेळ आली आहे. जे पृथ्वीचा नाश
करतात, त्यांचा नाश करण्याची वेळ आली आहे!”

19मग देवाने स्वर्गातील मंदिर उघडले. तेव्हा तेथे
कराराचा कोश दिसला आणि विजा चमकू लागल्या.
गोंगाट, गडगडाट, भूकंप व गारांचे वादळ झाले.

## स्त्री आणि प्रचंड साप

12 आणि मग एक अद्भुत महान चिन्ह आकाशात
दिसले. तेथे एक स्त्री होती. ती सूर्याचा पेहराव
केलेली होती. चंद्र तिच्या पायाखाली होता. तिच्या डोक्यावर
बारा ताऱ्यांचा मुगुट होता. 2ती स्त्री गरोदर होती. ती
(बाळाला) जन्म देणार असल्याने वेदनांनी ओरडली. 3मग
दुसरे एक चिन्ह आकाशात दिसले: तेथे फार मोठा तांबडा
साप होता. त्या सापाला सात डोकी होती व त्या सातही
डोक्यांवर एक एक मुगूट होता. त्या सापाला दहा शिंगे
सुद्धा होती. 4त्या सापाने आपल्या शेपटीच्या फटकाऱ्याने
एक तृतीयांश तारे झटकून पृथ्वीवर खाली टाकून दिले.
जी स्त्री बाळाला जन्म देणार होती त्या स्त्रीच्या समोर तो
प्रचंड साप उभा राहिला. त्या सापाला त्या स्त्रीने जन्म
दिलेल्या बाळाला खायचे होते. 5त्या स्त्रीने एका मुलाला
जन्म दिला. तो मुलगा लोखंडी दंडाने सर्व राष्ट्रांवर सत्ता
चालविणार होता. तिच्या मुलाला देवाकडे व त्याच्या
सिंहासनाकडे नेण्यात आले. 6ती स्त्री देवाने तिच्यासाठी
अरण्यात तयार केलेल्या ठिकाणाकडे पळून गेली. तेथे
त्या स्त्रीची एक हजार दोनशे साठ दिवस काळजी घेण्यात
येईल.

7मग स्वर्गात एक युद्ध झाले. मीखाएल * आणि त्याचे
दूत त्या प्रचंड सापाविरुद्ध लढले. साप व त्याचे दूत हे
सुद्धा त्यांच्याशी लढले. 8पण साप तितका बलवान नव्हता.
प्रचंड साप व त्याच्या दूतांना स्वर्गातील त्यांचे स्थान गमवावे
लागले. 9सापाला आकाशातून खाली फेकण्यात आले.
तो प्रचंड साप, सैतान म्हटलेला तोच तो जुनाट साप होय.
तो संपूर्ण जगाला चकवतो. त्या सापाला त्याच्या दूतांसह
पृथ्वीवर टाकण्यात आले.

---

**मीखाएल** मुख्य देवदूत. देवाच्या इतर दूतांचा पुढारी
(यहूदा 9)

10मग मी आकाशातून एक मोठी वाणी ऐकली. ती
म्हणाली, “तारण, सामर्थ्य, आमच्या देवाचे राज्य आणि
त्याच्या ख्रिस्ताचा अधिकार ही आली आहेत. कारण
आमच्या भावांना दोष लावणारा जो अहोरात्र आमच्या
देवासमोर त्यांना शिव्याशाप देत होता, याला खाली
फेकण्यात आले आहे. आमच्या देवासमोर तो आमच्या
भावांवर दिवस आणि रात्र दोषारोप करीत होता, त्याचा
11आमच्या भावांनी कोकऱ्याच्या रक्ताने आणि जे सत्य
ते सांगत होते, त्या सत्याने पराभव केला. त्यांनी त्यांच्या
जिवांवर अति प्रेम केले नाही. ते मरणाला भ्याले नाही,
12म्हणून आकाशांनो, व जे तुम्ही तेथे राहता ते तुम्ही
आनंदी असा. पण पृथ्वी व समुद्राचे वाईट होईल. कारण
सैतान खाली तुमच्याकडे गेला आहे. तो रागाने भरलेला
आहे. त्याला माहीत आहे की त्याच्याकडे जास्त वेळ
नाही.”
13जेव्हा त्या प्रचंड सापाने पाहिले की त्याला पृथ्वीवर
खाली फेकण्यात आले आहे तेव्हा ज्या स्त्रीने मुलाला
जन्म दिला होता, तिच्या मागे तो लागला. 14मग सापासमोरून
तिच्यासाठी अरण्यात तयार केलेल्या ठिकाणी उडून जाता
यावे म्हणून त्या स्त्रीला मोठ्या गरूडाचे पंख देण्यात आले
होते. मग त्या ठिकाणी साडेतीन वर्षेपर्यंत तिचे पोषण केले
जाते. 15मग त्या सापाने आपल्या तोंडातून नदीसारखे पाणी
ओतले. सापाने ते पाणी स्त्रीकडे ओतले यासाठी की तिने
त्या पाण्यात वाहत जावे. 16पण पृथ्वीने तिला मदत केली.
पृथ्वीने तिचे तोंड उघडले व त्या प्रचंड सापाच्या तोंडातून
आलेली नदी तिने गिळून टाकली. 17मग तो साप त्या
स्त्रीवर फार रागावला. मग तो साप त्या स्त्रीच्या इतर
मुलांशी युद्ध करण्यास दूर निघून गेला. तिची मुले ही
आहेत जी देवाच्या आज्ञेचे पालन करतात आणि येशूने
शिकविलेले सत्य त्यांच्याकडे आहे.
18तो प्रचंड साप समुद्रकिनाऱ्यावर उभा राहिला.

## दोन प्राणी

13 मग मी एक श्वापद समुद्रातून वर येताना पाहिले.
त्याला दहा शिंगे आणि सात डोकी होती. त्याच्या
शिंगांवर दहा मुकुट होते आणि प्रत्येक डोक्यावर
देवनिंदाव्यंजक नाव लिहिले होते. 2हा पशू चित्त्यासारखा
दिसत होता. त्याचे पाय अस्वलाच्या पायासारखे होते. त्याला
सिंहाच्या तोंडासारखे तोंड होते. त्या प्रचंड सापाने त्या
प्राण्याला त्याची शक्ति, त्याचे सिंहासन आणि मोठा अधिकार
दिला.
3त्या प्राण्याच्या डोक्यांपैकी एक डोके जबर जखमी
झालेले दिसत होते. पण ती जखम बरी झाली. जगातील
सर्व लोक चकित झाले आणि ते सर्व त्या श्वापदाच्या मागे
गेले. 4लोकांनी त्या प्रचंड सापाची उपासना केली कारण
त्याने त्याची शक्ति त्या श्वापदाला दिली होती. लोकांनी
त्या प्राण्याची उपासना केली. त्यांनी विचारले, “या
प्राण्याइतका सामर्थ्यशाली कोण आहे? त्याच्याविरुद्ध कोण
लढाई करू शकेल?”
5त्या श्वापदाला मोठ्या अवास्तव गोष्टी बोलण्याची मुभा
देण्यात आली व देवाविरुद्ध अनेक दुर्भाषणयुक्त गोष्टी तो
बोलला. त्या प्राण्याला बेचाळीस महिने त्याचे सामर्थ्य
वापरण्यास सांगण्यात आले. 6त्या प्राण्याने देवाविरुद्ध वाईट
गोष्टी बोलण्यासाठी तोंड उघडले. त्या प्राण्याने देवाच्या
नावाविरुद्धसुद्धा वाईट गोष्टी बोलण्यास कमी केले नाही.
व देव राहतो त्या ठिकाणाबद्दल सुध्दा वाईट गोष्टी तो
बोलला. व जे सर्व स्वर्गात राहतात त्यांच्याविषयी वाईट
गोष्टी बोलल्या. 7देवाच्या पवित्र लोकांविरुद्ध युद्ध करण्यास
व त्यांना पराभूत करण्यास त्या प्राण्याला शक्ति देण्यात
आली. त्या प्राण्याला प्रत्येक वंश, जमात, भाषा आणि
राष्टांतील लोकांवर अधिकार देण्यात आला आहे. 8आणि
जगाच्या निर्मितीपासून ज्यांची नावे वधलेल्या कोकऱ्याच्या
जीवनाच्या पुस्तकात लिहिली नाहीत, ते सर्व त्या पशूची
भक्ति करतील. 9“ज्याला कान आहेत तो ऐको.

10जर एखादा मनुष्य दुसऱ्यास कैदी बनवतो तर तो
मनुष्यही कैदी बनविण्यात येतो. जर एखादा मनुष्य
तलवारीने मरतो तर त्या मनुष्याला तलवारीनेच मारण्यात
येते.

याचा अर्थ असा की देवाच्या पवित्र लोकांनी धीर व
विश्वास धरला पाहिजे.”
11मग मी एक दुसरे श्वापद पृथ्वीतून वर येताना पाहिले.
त्याला कोकऱ्यासारखी दोन शिंगे होती. पण ते प्रचंड
सापासारखे बोलत होते. 12हा प्राणी पहिल्या प्राण्यासमोर
उभा राहतो व पहिल्या प्राण्याकडे जी शक्ति होती तीच तो
वापरतो. पृथ्वीवर राहणाऱ्या सर्व लोकांनी पहिल्या प्राण्याची
उपासना करावी यासाठी तो आपली शक्ति वापरतो. पहिला
प्राणी असा होता की त्याला प्राणघातक अशी जखम होती
जी बरी झाली होती. 13हे दुसरे श्वापद मोठी चिन्हे करते.
लोक पाहत असताना तो स्वर्गातून पृथ्वीवर अग्नीसुद्धा
येईल असे करतो 14आणि त्याला पहिल्या श्वापदासमोर
चिन्हे करण्याचा अधिकार दिला होता म्हणून ते म्हणजे
जे श्वापद जखमी होऊनही वाचले, त्याची मूर्ति बनवून
त्याची भक्ति करावी अशी पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांना
आज्ञा करतो. 15दुसऱ्या प्राण्याला पहिल्या प्राण्याच्या मूर्तीला
जीवन देण्यासाठी शक्ति देण्यात आली. मग ती मूर्ती बोलेल
व जे लोक तिची भक्ति करीत नाहीत त्यांना ठार मारण्याची
आज्ञा देईल. 16दुसऱ्या प्राण्याने सर्व लोकांना– लहान
मोठ्या, श्रीमंत आणि गरीब, स्वतंत्र व दास – बळजबरी
केली की, त्यांनी त्यांच्या उजव्या हातावर किंवा कपाळावर
चिन्ह करून घ्यावे. 17यासाठी की, चिन्ह असल्याशिवाय
कोणीही व्यक्तीने विकू नये किंवा विकत घेऊ नये. हे
चिन्ह म्हणजे त्या प्राण्याचे नाव किंवा त्याच्या नावाची

संख्या आहे. 18ज्या माणसाला समजबुद्धी आहे, त्याने त्या प्राण्याच्या संख्ये अर्थ शोधावा. ही संख्या मनुष्यांची संख्या आहे. त्यांची संख्या आहे 666.

## मुक्त केलेल्याचे गीत

14 मग मी पाहिले, आणि तेथे माझ्यासमोर कोकरा होता. तो सियोन पर्वतावर*उभा होता. त्याच्याबरोबर 1,44,000 लोक होते. त्यांच्या कपाळांवर त्याचे आणि त्याच्या पित्याचे नाव लिहिलेले होते. 2आणि आकाशातून पुराच्या लाटांचा लोंढा आल्यासारखा आवाज, ढगांचा मोठा गडगडाटाचा आवाज ऐकला. जो आवाज मी ऐकला तो जणू काय अनेक लोक आपल्या वीणा वाजवीत आहेत तसा आवाज होता.

3ते लोक सिंहासनासमोर आणि चार जिवंत प्राण्यांसमोर आणि वडिलांसमोर नवे गीत गात होते. जे लोक पृथ्वीपासून मुक्त करण्यात आलेले, असे 1,44,000 तेच हे गाणे शिकू शकले. त्यांच्याशिवाय दुसरे कोणीही ते गीत शिकू शकले नाही. 4हे लोक असे होते की त्यांनी स्त्रियांशी वाईट कर्म करून स्वत:ला भ्रष्ट केले नाही. त्यांनी स्वत:ला शुद्ध राखले. कोकरा जेथे गेला तेथे ते गेले. हे पृथ्वीवरील लोकांमधून खंडणी भरून मुक्त केलेले होते. देवाला आणि कोकऱ्याला अर्पिलेले ते पहिले आहेत. 5त्याच्या मुखान असत्य कधी आढलेले नाही खोटे बोलण्याबद्दल ते निर्दोष होते.

## तीन देवदूत

6मग मी आणखी एक देवदूत हवेत उंच उडताना पाहिला. पृथ्वीवरील लोकांना सांगण्यासाठी म्हणजे प्रत्येक राष्ट्राच्या, वंशाच्या, भाषेच्या आणि जमातीच्या लोकांना सांगण्यासाठी त्या देवदूताकडे अनंतकाळचे शुभवर्तमान होते. 7देवदूत मोठ्या आवाजात म्हणाला, "ज्याने आकाश, पृथ्वी, समुद्र, व पाण्याचे झरे निर्माण केले, त्या देवाचे भय धरा आणि त्याची स्तुति करा. देवाने न्याय करावा अशी वेळ आली आहे. देवाची उपासना करा." 8मग पहिल्या देवदूताच्या मागे दुसरा देवदूत गेला आणि म्हणाला, "तिचा नाश झालेला आहे! बाबेल हे मोठे शहर नष्ट झाले आहे. त्या नगरीने सर्व राष्टांना तिच्या व्यभिचाराचा द्राक्षारस व देवाचा राग प्यायला लावला."

9तिसरा देवदूत पहिल्या दोन देवदूतांच्या मागे गेला. तिसरा देवदूत मोठ्या आवाजात म्हणाला: "जो माणूस प्राण्याची आणि प्राण्याच्या मूर्तीची उपासना करतो, त्याला त्याच्या कपाळावर किंवा हातावर प्राण्याची खूण करू देतो, 10तो मनुष्य देवाच्या रागाच्या सर्व शक्तीनिशी बनवलेला द्राक्षारस पिईल. त्या व्यक्तीला पवित्र देवदूतांसमोर व कोकऱ्यासमोर जळत्या गंधकाने पीडले जाईल. 11आणि त्यांच्या जळत्या वेदनांतून अनंतकाळसाठी धूर निघेल. जे लोक प्राण्याची उपासना करतात आणि त्याच्या मूर्तीची उपासना करतात किंवा ज्यांना त्याच्या नावाचे चिन्ह आहे. त्यांना रात्र असो किंवा दिवस असो, विश्रांति मिळणार नाही." 12याचा अर्थ असा की, देवाच्या पवित्र लोकांनी धीर धरला पाहिजे. त्यांनी देवाच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत. आणि येशूमधील त्यांचा विश्वास टिकवला पाहिजे.

13मग मी स्वर्गातून एक आवाज ऐकला. तो आवाज म्हणाला, "हे लिही: येथून पुढे, जे प्रभूमध्ये मेलेले आहेत, ते त्यांच्या श्रमापासून विश्रांति घेतील."

आत्मा म्हणतो, "होय, हे खरे आहे. ते लोक आपल्या कठीण कामापासून विश्रांति पावतील. त्यांनी केलेल्या गोष्टी त्यांच्याबरोबर राहतील."

## पृथ्वीची कापणी

14मी पाहिले आणि तेथे माझ्यासमोर पांढरा ढग होता. त्या ढगावर बसलेला मनुष्याच्या पुत्रासारखा दिसत होता. त्याच्या डोक्यावर सोनेरी मुगुट आणि त्याच्या हातात धारदार विळा होता. 15मग आणखी एक देवदूत मंदिरामधून बाहेर आला व ढगावर बसलेल्यास मोठ्याने म्हणाला, "तुझा विळा घे व (पृथ्वीवरून) पीक गोळा कर. कापणीची वेळ आली आहे. पृथ्वीचे फळ पिकले आहे." 16मग जो ढगावर बसला होता त्याने त्याचा विळा पृथ्वीवर चालविला. आणि पृथ्वीची कापणी केली.

17मग दुसरा देवदूत स्वर्गातील मंदिरातून बाहेर आला. या देवदूताकडेसुद्धा धारदार विळा होता. 18मग आणखी एक देवदूत वेदीकडून आला. या देवदूताचा अग्नीवर अधिकार होता. या देवदूताने धारदार विळा असलेल्या देवदूताला बोलाविले. तो म्हणाला, "तुझा धारदार विळा घे आणि पृथ्वीवरील द्राक्षाचे घड काढ. पृथ्वीची द्राक्षे पिकली आहेत. 19देवदूताने त्याचा विळा पृथ्वीवर चालवला. देवदूताने पृथ्वीची द्राक्षे गोळा केली आणि देवाच्या क्रोधाच्या घाण्यात टाकली. 20ती द्राक्षे द्राक्षाच्या कुंडात शहराबाहेर तुडविली गेली. त्यातून रक्त वाहिले. त्याचा प्रवाह घोड्याच्या डोक्यापर्यंत पोहोंचेल इतका असून तो 200 मैलांपर्यंत वाहत गेला.

## शेवटच्या पीडेसह देवदूत

15 मग मी आणखी एक अद्भुत चिन्ह स्वर्गात पाहिले. ते महान आणि चकित करणारे होते. तेथे सात देवदूतांनी सात पीडा आणल्या होत्या. या शेवटच्या पीडा होत्या कारण त्यानंतर देवाचा क्रोध नाहीसा होणार आहे.

2मी अग्नि काचेच्या समुद्रात मिसळल्यासारखा पाहिला. सर्व लोकांनी ज्यांनी त्या प्राण्यावर, त्याच्या मूर्तीवर आणि त्याच्या नावाच्या संख्येवर विजय मिळविला होता ते सर्व समुद्राजवळ उभे होते. या लोकांकडे देवाने दिलेली वीणा

---

**सियोन पर्वत** यरुशलेमचे दुसरे नाव. याचा अर्थ आध्यात्मिक शहर जेथे देवाचे लोक त्याच्याबरोबर राहतील.

होती. 3त्यांनी देवाचा सेवक मोशे याचे गीत आणि कोकऱ्याचे गीत गाईले:

“प्रभु देवा, सर्वसमर्था तू महान आणि अद्‌भुत गोष्टी करतोस. राष्टांच्या राजा, तुझे मार्ग योग्य व खरे आहेत
4हे प्रभु, सर्व लोक तुला घाबरतील सर्व लोक तुझ्या नावाची स्तुति करतील. फक्त तूच पवित्र आहेस सर्व लोक येऊन तुझी उपासना करतील कारण तुझी नीतीमत्त्वाची कृत्ये प्रकट झाली आहेत.”

5त्यानंतर मी स्वर्गामध्ये मंदिर (साक्षीचा मंडप)* पाहिले. मंदिर उघडे होते. 6आणि सात पीडा आणणारे सात देवदूत मंदिराबाहेर आले. त्यांनी स्वच्छ चमकदार तागाचे कपडे घातले होते. त्यानी त्यांच्या छातीवर सोन्याच्या पट्ट्या बांधल्या होत्या.

7मग सात देवदूतांना चार जिवंत प्राण्यांपैकी एकाने सात सोनेरी वाट्या दिल्या जो देव अनंतकाळपर्यंत राहतो त्याच्या रागाने त्या वाट्या भरल्या. 8आणि देवाच्या तेजामधून व पराक्रमामधून निघालेल्या धुराने मंदिर भरले. आणि कोणीही सात देवदूतांच्या सात पीडा पूर्ण होईपर्यंत मंदिरात प्रवेश करू शकले नाही.

## देवाच्या रागाने वाट्या भरल्या

16 मग मी मंदिरातून एक मोठा आवाज ऐकला. तो सात देवदूतांना म्हणाला, “जा, पृथ्वीवर देवाच्या रागाच्या सात वाट्या ओता.”

2पहिला देवदूत गेला आणि त्याने जमिनीवर त्याची वाटी ओतली. तेव्हा सर्व लोकांना ज्यांच्यावर श्वापदाचे चिन्ह होते आणि जे त्याच्या मूर्तीची पूजा करीत होते त्यांना अतिशय कुरूप आणि वेदना देणारे फोड आले.

3दुसऱ्या देवदूताने त्याची वाटी समुद्रावर ओतली. मग समुद्र रक्तासारखा, मेलेल्या माणसाच्या रक्तासारखा झाला. समुद्रातील प्रत्येक जीवधारी प्राणी मेले.

4तिसऱ्या देवदूताने त्याची वाटी नद्या व झऱ्यांवर ओतली. तेव्हा नद्यामझरे व रक्तमय झाले. 5मग मी पाण्याच्या देवदूताला हे बोलताना ऐकले:

“केवळ तूच एक आहेस, जो तू आहेस आणि जो तू होतास. तू पवित्र आहेस. जे न्याय तू दिलेस ते योग्य दिलेस.
6लोकांनी तुझ्या पवित्र लोकांचे रक्त सांडले. तुझ्या संदेष्ट्यांचे रक्त सांडले आता तू त्या लोकांना रक्त प्यावयास दिले आहेस. कारण ते याच पात्रतेचे आहेत.”

7त्यानंतर मी वेदीला असे बोलताना ऐकले की,

“होय, प्रभु देवा सर्वसमर्था, तुझा न्याय खरा आणि योग्य आहे.”

8चौथ्या देवदूताने त्याची वाटी सूर्यावर ओतली. सूर्याला लोकांना अग्नीने जाळून टाकण्याची शक्ती दिली होती. 9भयंकर अशा उष्णतेमुळे लोक जळाले. त्या लोकांनी देवाच्या नावाला शिव्याशाप दिले की ज्याला या संकटांवर ताबा आहे. पण लोकांनी पश्चात्ताप करण्याचे नाकारले व देवाचे गौरव करण्याचे नाकारले.

10पाचव्या देवदूताने त्याची वाटी श्वापदाच्या सिंहासनावर ओतली. आणि प्राण्याच्या राज्यावर अंधार पसरला. दु:खामुळे लोक त्यांच्या जिभा चावत होते. 11लोकांनी स्वर्गाच्या देवाला शाप दिले, कारण त्यांना वेदना होत होत्या व फोड आले होते. पण लोकांनी आपल्या पापकृत्यांपासून पश्चात्ताप करण्याचे नाकारले.

12सहाव्या देवदूताने त्याची वाटी फरात नदीवर ओतली. नदीतील पाणी सुकून गेले. त्यामुळे पूर्वेकडून येणाऱ्या राजांसाठी रस्ता तयार झाला. 13तेव्हा मी तीन अशुद्ध आत्मे जे बेडकासारखे दिसत होते ते पाहिले. ते प्रचंड सापाच्या मुखातून बाहेर आले. श्वापदाच्या मुखातून बाहेर आले, खोट्या संदेष्ट्याच्या मुखातून बाहेर आले. 14हे सर्व दुष्ट आत्मे सैतानाचे आत्मे आहेत. ते चमत्कार करतात, हे आत्मे सगळ्या जगातील राजांकडे जातात व त्यांना सर्वसमर्थ देवाच्या महान दिवशी लढाईसाठी एकत्र जमवतात.

15“पाहा, जसा चोर येतो तसा मी येईन. तेव्हा लोकांसमोर आपली लज्जा दिसू नये म्हणून जो जागा राहील. आणि आपले कपडे तयार ठेवतो तो धन्य.”

16मग दुष्ट आत्म्यांनी हर्मगिदोन* नावाच्या ठिकाणी सर्व राजांना एकत्र आणले.

17मग सातव्या देवदूताने त्याची वाटी हवेत ओतली. तेव्हा मंदिरातून सिंहासनाजवळून मोठा आवाज आला. तो म्हणाला, “हे पूर्ण झाले आहे.” 18मग विजा चमकू लागल्या. गोंगाट, गडगडाट व फार प्रचंड भूकंप झाला. लोक पृथ्वीवर असल्यापासून असला प्रचंड भूकंप कधी झालाच नव्हता. 19महान शहर तीन विभागात विभागले गेले. राष्ट्रांतील शहरे नष्ट झाली. आणि देव महान बाबेलला विसरला नव्हता. त्याने त्यांच्या भयंकर रागाच्या द्राक्षारसाचा पेला बाबेलला दिला. 20प्रत्येक बेट नाहीसे झाले. आणि पर्वत पूर्णपणे नष्ट झाले. 21लोकांवर आकाशातून गारांचा वर्षाव झाला. या प्रत्येक गारा 100 पौंड* वजनाच्या होत्या. या

---

**साक्षीचा मंडप** इस्राएल लोक इजिप्तमधून बाहेर आल्यानंतर देवाने हा मंडप बांधण्यास सांगितले ते देवाच्या समक्षतेचे व उपासनेचे ठिकाण होते (निर्गम 25–27; 35–38).

**हर्मगिदोन** हा शब्द हिब्रू भाषेतील आहे. देव व सैतान यांच्यातील शेवटचे युध्द.

**100 पौंड** सुमारे एक मण (चाळीस किलो).

गारांच्या संकटामुळे लोकांनी पश्चात्ताप करण्याऐवजी देवाला शाप दिले कारण ही पीडा खरोखरच महाभयंकर होती.

## श्वापदावर बसलेली तुच्छ स्त्री

17 सात वाट्या असलेल्या सात देवदूतांपैकी एक जण माझ्याकडे आला आणि मला म्हणला, “ये, मी तुला त्या अति नीच वेश्येला झालेली शिक्षा दाखवतो. ती बहुत जलांवर बसली आहे. 2पृथ्वीवरील राजांनी तिच्याशी व्यभिचार केला. आणि तिच्या लैंगिक पापाच्या द्राक्षारसाने पृथ्वीवरील लोक धुंद झाले आहेत.”

3मग देवदूताने मला आत्म्याद्वारे वाळवंटात नेले. तेथे मी एका स्त्रीला किरमिजी रंगाच्या श्वापदावर बसलेले पाहिले. त्या श्वापदाच्या अंगावर वाईट नावे लिहिली होती. त्या श्वापदाला सात डोकी आणि दहा शिंगे होती, 4त्या स्त्रीने किरमिजी व जांभळी वस्त्रे घातली होती. तिने घातलेल्या सोने, जवाहिर व मोत्यांनी ती चमकत होती. तिच्या हातात सोन्याचा पेला होता, हा पेला वाईट गोष्टींनी आणि तिच्या लैंगिक पापांच्या अशुद्धतेने भरला होता. 5तिच्या कपाळावर नाव लिहिले होते. त्या नावाला गुपित अर्थ आहे. त्यावर असे लिहिले होते:

**मोठी बाबेल**
**वेश्यांची व पृथ्वीवरील**
**ओंगळ गोष्टींची माता**

6मी पाहिले ती स्त्री रक्तसेवनाने मस्त झाली होती. ती देवाच्या पवित्र लोकांचे रक्त प्याली होती. ज्या लोकांनी येशूविषयी सांगितले त्यांचे रक्त ती प्याली होती.

जेव्हा मी तिला पाहिले तेव्हा फार आश्चर्यचकित झालो. 7मग देवदूत मला म्हणाला, “तू आश्चर्यचकित का झालास? मी तुला त्या स्त्रीचे आणि ती ज्या श्वापदावर बसली आहे, ज्याला सात डोकी व दहा शिंगे आहेत त्याचे रहस्य सांगतो. 8जो श्वापद तू पाहिला तो (पूर्वी) होता, आता तो नाही. आणि तो तळविरहित बोगद्यातून येईल आणि नष्ट केला जाईल. पृथ्वीवर राहणारे लोक ज्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात पृथ्वीच्या स्थापनेपासून लिहिलेली नाहीत ते जेव्हा श्वापदाला पाहतील, तेव्हा ते आश्चर्यचकित होतील कारण तो (पूर्वी) होता, आता तो नाही आणि तरी तो येईल.

9“यासाठी शहाणपण असलेल्या बुद्धीची आवश्यकता आहे. सात डोकी या सात टेकड्या आहेत, ज्यावर ती स्त्री बसते.

10“ते सात राजेसुद्धा आहेत. त्यापैकी पाच राजे पतन पावले आहेत. एक आहे आणि एक अजून आला नाही. पण जेव्हा तो येईल तेव्हा तो फारच थोडा वेळ थांबेल. 11जो प्राणी (पूर्वी) होता आणि जो आता नाही तो आठवा राजा आहे. आणि तो त्या सात राजांपासून आहे. आणि तो आपल्या नाशाकडे जात आहे.

12“जी दहा शिंगे तू पाहिलीस ते ज्यांना अजून सत्ताधिकार मिळाला नाही, असे दहा राजे आहेत. पण त्यांना श्वापदाबरोबर एका घटकेसाठी राजासारखा अधिकार मिळेल. 13त्यांचा एकच हेतू आहे. आणि ते त्यांची शक्ती व अधिकार श्वापदाला देतील. 14ते कोकऱ्याबरोबर युद्ध करतील पण कोकरा त्यांच्यावर मात करील. कारण तो प्रभूंचा प्रभु व राजांचा राजा आहे. आणि त्याच्याबरोबर त्याने बोलाविलेले, निवडलेले, विश्वासू अनुयायी असतील.”

15मग देवदूत मला म्हणाला, “जे पाण्यांचे प्रवाह तू पाहिले, ज्यावर वेश्या बसली होती, ते म्हणजे पुष्कळ लोक, समुदाय, राष्टांचे व भाषा बोलणारे लोक आहेत. 16तो श्वापद आणि दहा शिंगे तू पाहिलीस ते त्या वेश्येचा तिरस्कार करतील. ते तिला ओसाड, उजाड करतील आणि तिला नग्न सोडून देतील, ते तिचे मांस खातील, व अग्नीने तिला जाळतील. 17देवाचे वचन पूर्ण होईपर्यंत, देवाने त्या श्वापदाला सत्ता चालविण्याचा अधिकार देण्याचे कबूल केले आहे. देवाने त्याचा हेतु पूर्ण करण्याचे त्यांच्या मनात घातले आहे. 18जी स्त्री तू पाहिलीस ती मोठी नगरी आहे, जी पृथ्वीवरच्या राजांवर सत्ता गाजवील.”

## बाबेलचा नाश होतो

18 यानंतर मी दुसऱ्या एका देवदूताला आकाशातून खाली येताना पाहिले. त्याच्याकडे मोठे अधिकार होते. आणि त्याच्या गौरवाने पृथ्वी झळाळत होती. 2प्रचंड आवाजात तो ओरडला:

“पडली! महान बाबेल पडली! ती दुष्ट आत्म्यांचे घर बनली आहे. आणि प्रत्येक दुष्ट आत्म्याचा आश्रय आणि प्रत्येक अशुद्ध, धिक्कारलेल्या पक्षांचा आश्रय झाली आहे.
3कारण तिच्या व्यभिचाराचा द्राक्षारस जो वेड लावणारा आहे तो सर्व राष्ट्रांनी प्याली आहेत. पृथ्वीवरील राजांनी तिच्याशी व्यभिचार केला आहे आणि पृथ्वीवरील व्यापारी तिच्या अति संपत्तीने व ऐषारामाने श्रीमंत झाले आहेत.”

4मग मी दुसरा एक आवाज आकाशातून ऐकला. तो म्हणाला:

“माझ्या लोकांनो, तिच्यातून बाहेर या यासाठी की तिच्या पापात तुमचा वाटा असू नये यासाठी की तुमच्यावर तिच्या कोणत्याही पीडा येऊ नयेत.
5कारण तिची पापे स्वर्गाला भिडली आहेत. आणि देवाला तिच्या अपराधांची आठवण झाली आहे.
6तिने ज्याप्रमाणे तुम्हाला दिले आहे, तसे तुम्ही तिचे परत करा. तिने जे काही केले आहे त्याच्या दुप्पट तुम्ही

तिच्यासाठी करा तिने दुसऱ्यांना दिले त्याच्या दुप्पट प्रमाणात
तेज मद्य तिच्या प्याल्यात भरा.
7तिने स्वत:ला जसे गौरव आणि ऐषाराम दिला तितक्या
प्रमाणात तुम्ही तिला छळ व दु:ख द्या. ती तिच्या अंत:करणात
गर्वाने म्हणते, 'मी राणीसारखी सिंहासनावर बसते, मी
विधवा नाही.' आणि मी केव्हाच शोक करणार नाही.
8म्हणून एका दिवसात तिच्या पीडा तिच्यावर येतील.
(त्या पीडा म्हणजे): मृत्यू, शोक आणि दुष्काळ ती आगीत
भस्म होऊन जाईल कारण सामर्थ्यशाली प्रभु देव तिचा
न्याय करील."

9पृथ्वीवरील ज्या राजांनी त्या स्त्रीशी व्यभिचार केला,
आणि जे तिच्या विलासाच्या दिवसाचे भागीदार झाले, ते
ती जळत असताना निघणारा धूर पाहून रडतील आणि
तिच्याबद्दल शोक करतील. 10तिच्या शारीरिक पीडांच्या
भीतीमुळे ते राजे दूर उभे राहतील. आणि ओरडतील:\

"भयंकर! भयंकर, हे महान नगरी बाबेल, सामर्थ्याच्या
शहरा! एका तासात तुझा न्याय तुझ्यावर येईल!"

11पृथ्वीचे व्यापारी तिच्यासाठी रडतील आणि शोक
करतील, कारण आता त्यांचा माल कोणीही घेणार नाही.
12तो माल असा: सोने, चांदी, मौल्यवान रत्ने, मोती,
तागाचे तलम कापड, किरमिजी, रेशमी व जांभळे कापड,
निरनिराळ्या प्रकारचे सुगंधी लाकूड, सर्व प्रकारची
हस्तीदंती पात्रे, मोलवान लाकडे, तांब्याची, लोखंडाची व
संगमरवरी पाषाणाची पात्रे. 13दालचिनी, उटणे ऊद, धूप,
द्राक्षारस व जैतुनाचे तेल, मैदा व गहू, गुरेढोरे व मेंढरे,
घोडे व रथ, दासदासी, मानवी जीव.

14"बाबेल, ज्या उत्तम गोष्टींची तुला अपेक्षा होती, त्या
गोष्टी आता तुझ्यापासून गेल्या आहेत तुझी सर्व श्रीमंती व
वैभव नाहीसे झाले आहे. त्याची तुला परत कधी भरपाई
होणार नाही."

15ज्या व्यापाऱ्यांनी असा माल विकला, आणि त्यांची
संपत्ति तिच्यापासून मिळविली ते तिच्या पीडेच्या भीतीमुळे
दूर उभे राहतील. ते रडतील व शोक करतील. 16आणि
ओरडतील:

"भयंकर! भयंकर, हे महानगरी, तलम तागाचे,
किरमिजी व जांभळे पोशाख नेसून जी नगरी सजली होती
सोने, मौल्यवान रत्ने व मोती यांनी ती झगमगत होती!
17एका तासात अशा प्रकारची प्रचंड संपत्ति नष्ट झाली!"

प्रत्येक तांडेल, जलप्रवासी तसेच खलाशी आणि समुद्रावर
पोट भरणारे सर्व लोक त्या नगरीपासून दूर राहतील.
18आणि ती जळत असताना तिचा धूर ते पाहतील तेव्हा ते
ओरडून म्हणतील, "या नगरीसारखी दुसरी एवढी महान
नगरी झाली नाही." 19मग ते आपल्या डोक्यात धूळ
घालतील आणि शोक करतील.

"भयंकर! भयंकर! हे महान नगरी, ज्या सर्वांकडे समुद्रात
जहाजे आहेत ते तिच्या संपत्तीमुळे श्रीमंत झाले एका तासात
तिचा सर्वनाश झाला.
20हे स्वर्गा, तिच्याबद्दल आनंद कर! संतानो, प्रेषितांनो
आणि संदेष्ट्यांनो आनंद करा! तिने ज्या प्रकारे तुम्हाला
नागविले त्याबद्दल देवाने तिचा न्याय केला आहे."

21मग एका बलवान देवदूताने जात्याच्या मोठ्या
तळीसारखा धोंडा उचलून तो समुद्रात टाकून दिला. आणि
म्हणाला :

"अगदी अशीच महान बाबेल नगरी जोराने खाली
फेकण्यात येईल आणि परत ती कधीही कोणाला सापडणार
नाही.
22वीणा वाजविणाऱ्यांचा, संगीत वाजविणाऱ्यांचा, बासरी
वाजविणाऱ्यांचा आणि कर्णा वाजविणाऱ्यांचा आवाज परत
कधी तुझ्या येथे ऐकू येणार नाही. कोणताही कारागिरीचा
व्यापारी तुझ्यामध्ये आढळणार नाही तुझ्या येथे जात्याचा
आवाज कधी ऐकू येणार नाही.
23दिव्याचा प्रकाश तुझ्यामध्ये पुन्हा कधी प्रकाशणार
नाही तुझ्या येथे वधूवरांचा आवाज पुन्हा कधी ऐकू येणार
नाही तुझे व्यापारी जगातील मोठी माणसे होती तुझ्या
जादूटोण्यामुळे सर्व राष्टे बहकली गेली
24त्या नगरीमध्ये संदेष्ट्यांचे देवाच्या पवित्र लोकांचे आणि
जगात ज्यांची हत्या करण्यात आली अशांचे रक्त सांडल्याचे
दिसून आले."

## स्वर्गात लोक देवाची स्तुति करतात

19 यानंतर मी मोठ्या जनसमुदायाच्या गर्जनेसारखा
स्वर्गातून आवाज ऐकला. ते म्हणत होते:

"हालेलुया! तारण, गौरव आणि सत्ता आमच्या देवाची
आहेत
2कारण त्याचे न्यायनिवाडे खरे आणि योग्य आहेत ज्या
मोठ्या वेश्येने आपल्या व्यभिचारी वागण्याने सर्व पृथ्वी
भ्रष्ट केली, तिला देवाने शिक्षा केली आहे. त्याच्या
सेवकाच्या रक्ताचा त्याने सूड घेतला आहे."

3ते पुन्हा म्हणाले,

"हालेलुया! तिच्यापासून निघालेला धूर अनंतकाळ वर
जातो."

4मग चोवीस वडीलजन आणि चार जिवंत प्राणी जो देव
सिंहासनावर बसला आहे त्याच्या पाया पडले व त्यांनी
त्याची उपासना केली. ते म्हणाले:
"आमेन, हालेलुया!"
5मग सिंहासनावरून एक वाणी झाली, ती म्हणाली,

"देवाच्या सर्व सेवकांनो, त्याची स्तुति करा, जे तुम्ही
त्याचे भय धरता ते तुम्ही सर्व लहानथोर देवाची स्तुति
करा!"

6नंतर मोठ्या लोकसमुदायाच्या गर्जनेसारखा आवाज
मी ऐकला, तो आवाज महापूराच्या आणि मेघांच्या मोठया
गडगडाटासारखा होता. तो लोकसमुदाय असे मोठ्याने
म्हणत होता की:

"हालेलुया! कारण आमच्या सर्वसमर्थ देवाने सत्ता
गाजविण्यास सुरूवात केली आहे.
7आपण उल्हास करू व आनंदात राहू! आणि त्याचे
गौरव करू कारण कोकऱ्याचे लग्न जवळ आले आहे.
आणि त्याच्या वधूने स्वत:ला नटवून तयार केले आहे
8तिला स्वच्छ, चमकणारे तागाचे कपडे नेसायला दिले
आहेत."

(देवाच्या पवित्र लोकांनी केलेली नीतीमत्त्वाची कामे
म्हणजेच तलम तागाचे कपडे आहेत)
9नंतर तो देवदूत मला म्हणाला, "हे लिही, ज्यांना
कोकऱ्याच्या लग्नाच्या मेजवानीचे आमंत्रण दिले आहे,
ते धन्य!" तो मला म्हणाला, "हे देवाचे खरेखुरे शब्द
आहेत."
10यावर मी देवदूताच्या पायावर डोके ठेवून त्याची
उपासना करू लागलो; परंतु देवदूत म्हणाला, "असे करू
नको. मी तर तुझ्याबरोबरीचा आणि येशूच्या सत्याबाबत
साक्ष देण्याची जबाबदारी तुझ्या ज्या भावांवर आहे, त्यांच्या
बरोबरीचा एक सेवक मात्र आहे. देवाची उपासना कर!
येशूच्या सत्याचे शिक्षण देणे हाच देवाच्या संदेशाचा आत्मा
आहे."

## पांढऱ्या घोड्यावरचा स्वार

11नंतर माझ्यासमोर स्वर्ग उघडलेला मी पाहिला; आणि
माझ्यासमोर एक पांढरा घोडा होता. त्या घोड्यावर
बसलेल्याचे 'नाव विश्वासू आणि खरा' असे होते; कारण
तो न्यायाने निवाडा करतो आणि न्यायाने लढाई करतो.
12त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे आहेत. आणि
त्याच्या डोक्यावर अनेक मुगुट आहेत. त्याचे नाव
त्याच्यावर लिहिले आहे. ते नाव काय आहे हे त्याच्याशिवाय
इतर कोणालाही माहीत नाही. 13त्याने आपल्या अंगात
रक्तामध्ये भिजविलेला झगा घातला होता. त्या स्वाराचे
नाव "देवाचा शब्द" असे आहे. 14स्वच्छ आणि पांढरे
शुभ्र कपडे घातलेले स्वर्गातील सैन्य पांढऱ्या घोड्यांवर
बसून त्याच्या मागे येत होते. 15त्याच्या तोंडातून एक धारदार
तरवार येते जिच्याने तो राष्ट्रांना नमवील. आणि लोखंडी
दंडाने तो त्यांच्यावर सत्ता गाजवील. सर्वसमर्थ देवाच्या
अतीकोपाची द्राक्षे तो द्राक्षकुंडामध्ये तुडवील. 16त्याच्या
झग्यावर आणि त्याच्या मांडीवर हे नाव लिहिले आहे:

## राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभु

17नंतर सूर्यात उभा राहिलेला एक देवदूत मी पाहिला.
तो मोठ्याने ओरडून आकाशामध्ये उडणाऱ्या सर्व पक्ष्यांना
म्हणत होता, "या! देवाच्या महान मेजवानीसाठी जमा व्हा!
18म्हणजे राजे, सरदार आणि प्रसिद्ध माणसांचे मांस तुम्हांला
खावयाला मिळेल. घोड्यांचे आणि त्यांच्यावर स्वार
झालेल्यांचे, तसेच स्वतंत्र व गुलाम, लहान व थोर अशा
सर्व लोकांचे मांस तुम्हालां खावयाला मिळेल."
19मग मी ते श्वापद आणि पृथ्वीवरील राजे आपापले
सैन्य घेऊन जमा झालेले पाहिले. घोडेस्वाराबरोबर व
त्याच्या सैन्याबरोबर लढाई करण्यासाठी ते जमा झाले
होते. 20त्या श्वापदाला पकडण्यात आले. त्या प्राण्याच्या
समक्ष ज्या खोट्या संदेष्ट्याने चमत्कार केले होते, त्याला
देखील प्राण्याबरोबर पकडण्यात आले. प्राण्याचा शिक्का
अंगावर असलेल्या आणि त्याच्या मूर्तीची उपासना
करणाऱ्या लोकांना त्या खोट्या संदेष्ट्याने चमत्कार
दाखवून फसविले. त्या दोघांना (प्राणी आणि खोटा संदेष्टा
यांना) धगधगत्या गंधकाच्या अग्नीने भरलेल्या तव्व्यात
जिवंत असे टाकण्यात आले. 21शिल्लक राहिलेले सैन्य,
घोडेस्वाराच्या तोंडामधून निघालेल्या तरवारीने ठार
मारण्यात आले. आणि साऱ्या पक्ष्यांनी त्या सैनिकांचे
मांस पोटभर खाल्ले.

## एक हजार वर्षे

20 आणि मी एक देवदूत स्वर्गातून खाली येताना
पाहिला. त्याच्या हातात खोल बोगद्याची किल्ली
आणि एक मोठा साखळदंड होता. 2त्या देवदूताने त्या
जुनाट अजगराला म्हणजे सैतानाला धरले आणि एक
हजार वर्षासाठी साखळदंडाने बांधून ठेवले. 3त्याने एक
हजार वर्षे पुरी होईपर्यंत राष्टांना आणखी फसवू नये,
म्हणून त्या देवदूताने त्याला खोल बोगद्यात टाकून दिले.
आणि त्या दाराला कुलूप लावून शिक्का मारला. त्या
काळांनंतर पुन्हा थोडा काळ त्याला मोकळे सोडण्यात
येणार होते.
4नंतर ज्यांच्यावर लोक बसलेले आहेत, अशी काही
सिंहासने मी पाहिली. या लोकांना न्यायनिवाडा करण्याचा
अधिकार देण्यात आला होता आणि येशूबाबतच्या
सत्याविषयी साक्ष दिल्यामुळे व प्रभु देवाच्या संदेशामुळे
ज्या लोकांना जिवे मारण्यात आले, त्यांचे आत्मे मी पाहिले.

त्या लोकांनी श्वापदाची अथवा त्याच्या मूर्तीची उपासना केली नव्हती, आणि त्यांच्या कपाळावर किंवा हातावर त्या जनावराचा शिक्का मारलेला नव्हता. ते परत जिवंत झाले. आणि त्यांनी ख्रिस्ताबरोबर एक हजार वर्षे राज्य केले. 5(इतर जे मेले होते, ते एक हजार वर्षे पुरी होईपर्यंत परत जिवंत झाले नाही) जे पहिले पुनरुत्थान ते हेच होय. 6ज्याला पहिल्या पुनरुत्थानात भाग आहे, तो धन्य! त्या लोकांवर दुसऱ्या मरणाची सत्ता चालणार नाही; उलट ते लोक देवाचे आणि ख्रिस्ताचे याजक होतील; आणि ते त्याच्याबरोबर एक हजार वर्षे राज्य करतील.

7नंतर, जेव्हा एक हजार वर्षे संपतील, तेव्हा सैतानाला त्याच्या तुरुंगवासातून सोडण्यात येईल, 8आणि जगाच्या चारही कोपऱ्यात पसरलेल्या राष्टांना फसविण्यासाठी सैतान बंदीवासातून बाहेर पडेल. त्याने फसवून गोग व मागोग यांना लढाईसाठी एकत्र आणले. त्यांची संख्या सागराच्या वाळूच्या संख्येइतकी आहे. 9ते सैतानाचे सैनिक जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चाल करून आले आणि त्यांनी देवाच्या लोकांच्या छावणीला व प्रिय नगराला वेढा दिला. परंतु स्वर्गातून अग्नि खाली उतरला आणि त्यांना जाळून त्यांची राख केली. 10मग ज्याने त्यांना फसविले होते, त्याला त्या धगधगत्या सरोवरामध्ये, श्वापद आणि खोटा संदेष्टा यांना टाकले होते त्या गंधकाच्या तळ्यात टाकण्यात येईल. आणि त्यांना अनंतकाळ रात्रंदिवस पीडा होत राहील. 11नंतर एक मोठे पांढरे सिंहासन आणि त्याच्यावर जो बसला होता. त्याला मी पाहिले. त्याच्या समोरून पृथ्वी आणि आकाश ही पळून गेली. आणि त्यांच्यासाठी कोठेच जागा नव्हती. 12नंतर मेलेले लहानथोर लोक सिंहासनासमोर उभे राहिलेले मी पाहिले. अनेक पुस्तके उघडलेली होती. आणि आणखी एक, म्हणजे जीवनी पुस्तक उघडले होते. आणि त्या पुस्तकात लिहिलेल्या त्या मेलेल्या लोकांच्या कृतीप्रमाणे त्यांचा न्यायनिवाडा करण्यात आला. 13सागराने आपल्यामधील मेलेले लोक बाहेर सोडून दिले. तसेच मरण आणि अधोलोक यांनी आपल्यामधील मेलेले लोक सोडून दिले. आणि प्रत्येक मनुष्याचा न्याय ज्याच्या त्याच्या कृत्यानुसार करण्यात आला. 14नंतर मरण व अधोलोक यांना अग्नीच्या तळ्यात टाकण्यात आले. हे अग्नीचे तळे म्हणजे दुसरे मरण होय. 15आणि जर कोणाचे नाव जीवनी पुस्तकात सापडले नाही, तर त्याला अग्नीच्या तळ्यात टाकण्यात येत होते.

## नवीन यरुशलेम

21 मग मी नवीन स्वर्ग आणि नवीन पृथ्वी* पाहिली. कारण पहिले आकाश आणि पहिली पृथ्वी ही नाहीशी झाली होती. आणि कोणताही समुद्र राहिला नव्हता. 2पवित्र नगर यरुशलेम देवापासून खाली उतरताना मी पाहिले. ते नगर– यरूशलेम, वरासाठी सजविलेल्या वधूसारखे दिसत होते. 3आणि स्वर्गातील सिंहासनापासून झालेली मोठी वाणी मी ऐकली. ती वाणी म्हणाली, “आता माणसांच्या बरोबर देवाची वस्ती आहे. आणि तो त्यांच्या बरोबर राहील. आणि तो त्यांचा देव होईल. 4तो त्यांच्या डोळ्यांतील अश्रु पूसून टाकील. आणि येथून पुढे मरण असणार नाही. शोक करणे, रडणे आणि अथवा दुःखसहन् करणे राहणार नाही. कारण सर्व जुन्या गोष्टी नाहीशा झालेल्या आहेत.”

5जो सिंहासनावर बसलेला होता, तो म्हणाला, “पाहा मी सर्व काही नवीन करीत आहे!” मग तो पुढे म्हणाला, “लिही! कारण हे शब्द विश्वास ठेवण्याला योग्य आणि खरे आहेत.”

6नंतर तो मला म्हणाला, “पूर्ण झाले आहे! मी अल्फा व ओमेगा, आरंभ व शेवट आहे. जो कोणी तहानेला आहे, त्याला मी जीवनी पाण्याच्या झऱ्यातील पाणी फुकट देईन. 7जो विजय मिळवितो, त्याला या सर्व गोष्टी मिळतील, मी त्याचा देव होईन, व तो माझा पुत्र होईल. 8परंतु भित्रे, विश्वास न ठेवणारे अमंगळ, खुनी, व्यभिचारी, (म्हणजे लैंगिक अनीतीने वागणारे लोक), चेटकी, मूर्तिपूजा करणारे आणि सर्व खोटे बोलणारे अशा सर्वांना अग्नीने व गंधकाने धगधगणाऱ्या तळ्यामध्ये जागा मिळेल. हे दुसरे मरण आहे.”

9मग ज्या देवदूतांच्या हातात सात पीडांनी भरलेल्या सात वाट्या होत्या. त्यांच्यापैकी एक देवदूत आला, आणि तो मला म्हणाला, “इकडे ये! जी कोकऱ्याची वधु आहे, ती मी तुला दाखवितो.” 10मी आत्म्याने भरून गेलो असता देवदूत मला एका उंच पर्वतावर घेऊन गेला. आणि त्याने पवित्र नगर, यरुशलेम, स्वर्गातून देवापासून खाली उतरताना मला दाखविले. 11ते नगर देवाच्या गौरवाने झळकत होते. त्याचे तेज एखाद्या मोलवान रत्नासारखे होते; स्फटिकासारख्या चमकत असणाऱ्या यास्फे रत्नासारखे होते. 12त्या नगराच्या सभोवती मोठमोठ्या उंच भिंती होत्या. आणि त्याला बारा वेशी होत्या. त्या बारा वेशींजवळ बारा देवदूत उभे होते. आणि त्या वेशींवर इस्राएलाच्या बारा वंशांची नावे लिहिलेली होती. 13त्या नगराला पूर्व दिशेला तीन, उत्तर दिशेला तीन, दक्षिण दिशेला तीन आणि पश्चिम दिशेला तीन वेशी होत्या. 14नगराच्या भिंतीना बारा पाये होते. त्या पायांवर कोकऱ्याच्या बारा प्रेषितांची नावे लिहिलेली होती.

15नगराची, वेशीची आणि भिंतीची लांबी–रूंदी मोजता यावी म्हणून जो देवदूत माझ्याशी बोलला, त्याच्याजवळ सोन्याची एक मोजपट्टी होती. 16नगर चौरस आकाराचे होते. त्याची लांबी व रूंदी सारखीच होती. देवदूताने सोन्याच्या मोजपट्टीने नगराचे माप मोजून पाहिले. ते पंधरा हजार

---

**नवीन स्वर्ग आणि नवीन पृथ्वी** यशया 65:17; 66:22 2 पेत्र 3:13

मैल* भरले. नगराची लांबी, रूंदी व उंची समसमान होत्या. 17नंतर देवदूताने नगराच्या भिंतीचे माप घेतले. ते मनुष्याच्या हाताने 72 मीटर (216 फूट)* भरले. देवदूताच्या हाताने देखील माप तेवढेच भरले. 18नगराच्या भिंती यास्फे रत्नाच्या होत्या. आणि नगर शुद्ध सोन्याचे, चमकणाऱ्या काचेसारखे होते. 19नगराचे पाये प्रत्येक प्रकारच्या मोलवान अशा रत्नांनी सजविले होते. पहिला पाया यास्फे रत्नाचा होता. दुसरा नीळ, तिसरा शिवधातु, चौथा पाचू (पाच), 20पाचवा गोमेद, सहावा सार्दी, सातवा लसणा, आठवा वैडूर्य, नववा पुष्कराज, दहावा सोनलसणी, अकरावा याकिंथ, बारावा पद्मराग रत्नाचा होता. 21बारा वेशी बारा मोत्यांनी बनविल्या होत्या. आणि प्रत्येक वेस एकाएका रत्नाची होती. नगरातील रस्ता शुद्ध सोन्याचा, काचेसारखा स्पष्ट होता. 22त्या नगरात मला कोठेही मंदीर दिसले नाही; 23प्रभु देवाचे जे तेज ते अखिल नगराला उजेड पुरवीत होते, आणि कोकरा हा त्याचा दिवा आहे. 24राष्टे त्या दिव्याच्या प्रकाशात चालतील. आणि जगातील राजे आपले वैभव त्या नगराकडे आणतील. 25त्या नगराच्या वेशी दिवसा कधीही बंद केल्या जाणार नाहीत आणि तेथे कधीही रात्र असणार नाही. 26राष्टांचे वैभव आणि संपत्ती त्या नगरात आणण्यात येतील. 27जे अशुद्ध आहे, ते त्या नगरात प्रवेश करू शकणार नाही. अथवा लाजिरवाणे काम अगर लबाडी करणाऱ्याचा शिरकाव त्या नगरात होणार नाही. कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात ज्या लोकांची नावे नोंदविली आहेत, केवळ तेच लोक त्या नगरात जाऊ शकतील.

22 नंतर देवदूताने मला जीवनाच्या पाण्याची एक नदी दाखविली. ती नदी स्फटिकासारखी स्पष्ट होती. ती नदी देवाच्या आणि कोकऱ्याच्या राजासनापासून उगम पावत होती. 2आणि नगराच्या रस्त्यांच्या मधोमध वाहत होती. नदीच्या दोन्ही काठांवर उगवलेली झाडे जीवनाची झाडे होती. त्यांच्यातील प्रत्येक झाड दरमहा आपले फळ देते. झाडांची पाने राष्टांना आरोग्य देण्यासाठी उपयोगी पडत होती. 3त्या नगरात यापुढे कसलाही शाप असणार नाही. देवाचे सेवक त्याची उपासना करतील. 4आणि ते त्याचे मुख पाहतील. व त्यांच्या कपाळावर देवाचे नाव लिहिलेले असेल. 5त्या नगरात यापुढे कधीही रात्र होणार नाही. लोकांना प्रकाश मिळविण्यासाठी ह्यापुढे कुठल्याही दिव्याची अथवा सूर्याची गरज पडणार नाही; कारण प्रभु देव आपला प्रकाश त्यांना पुरवील. आणि ते लोक अनंतकाळ राज्य करतील. 6नंतर देवदूत मला म्हणाला, "हे शब्द विश्वासयोग्य आणि खरे आहेत. जो प्रभु संदेष्ट्यांच्या आत्म्यांचा प्रभु आहे, त्याने आपला दूत पाठविला. ज्या गोष्टी लवकर घडून आल्या पाहिजेत, त्या आपल्या सेवकांना दाखवून देण्यासाठी त्याने आपला दूत पाठविला आहे." 7"पाहा, मी लवकर येत आहे. या पुस्तकातील संदेशवचनांचे जो पालन करतो, तो धन्य!"

8ज्या मनुष्याने या गोष्टी ऐकल्या आणि त्यांनी पाहिल्या, तो मनुष्य मी, योहान आहे. मी जेव्हा या गोष्टी ऐकल्या आणि पाहिल्या, तेव्हा या गोष्टी मला दाखवीत असलेल्या देवदूताच्या पाया पडून मी त्याची उपासना करू लागलो. 9परंतु तो देवदूत मला म्हणाला, "असे करू नको. मी तुझ्याबरोबर आणि तुझे भाऊ संदेष्टे, जे ह्या पुस्तकात नमूद केलेल्या वचनांचे पालन करतात, त्यांच्याबरोबर काम करणारा देवाचा एक सेवक आहे. देवाची उपासना कर!" 10नंतर देवदूत मला म्हणाला, "भावी काळाबाबतच्या या पुस्तकातील संदेश गुप्त ठेवू नकोस; कारण या गोष्टी घडून येण्याची वेळ आता जवळ आली आहे. 11जो मनुष्य अयोग्य वागतो. तो आणखी चुकीचे वर्तन करीत राहू दे! जो मलिन आहे, त्याला आणखी मलिन राहू दे! जो मनुष्य पवित्र आहे, त्याला आणखी पवित्रपणाने चालू दे."

12"पाहा! मी लवकर येत आहे, आणि माझे वेतन तुमच्याकरिता घेऊन येईन. प्रत्येकाला त्याच्या कर्मानुसार मी फळ देईन. 13मी अल्फा व ओमेगा, पहिला व अखेरचा, आरंभ आणि शेवट आहे.

14"जे आपले झगे साफ धुतात, ते धन्य! त्यांना जीवनी झाडाचे फळ खाण्याचा आणि वेशीतून नगरामध्ये जाण्याचा हक्क राहील. 15परंतु "कुत्रे" चेटकी, जादूटोणा करणारे, व्यभिचारी, मूर्तिपूजा करणारे, आणि निरनिराळ्या रीतीने लबाडी करणारे व लबाड बोलणारे बाहेर राहतील.

16"तुमच्या आपापल्या मंडळ्यांसाठी याबाबतीत साक्ष देण्याकरिता आपला देवदूत मी, येशूने पाठविलेला आहे. मी दाविदाच्या कुळातील एक अंकुर व वंशज आणि पहाटेचा तेजस्वी तारा आहे." 17आत्मा आणि नवरी असे म्हणतात की, "ये! आणि जो कोणी हे ऐकतो, तो असे म्हणो की, "ये!" आणि जो तहानेला आहे, तो येवो, ज्या कोणाला पाहिजे, तो फुकट दिले जाणारे जीवनी पाणी घेवो. 18या पुस्तकात भाविष्यकाळाबाबत नमूद केलेली वचने जो ऐकतो, त्याला मी गंभीरपणे सावधान करतो: जर कोणी ह्यामध्ये भर घालील, तर या पुस्तकात लिहिलेल्या पीडा देव त्याच्यावर आणील. 19आणि जो कोणी भविष्यकाळाबाबत संदेश देणाऱ्या या पुस्तकामधून काही काढून टाकील, त्याचा ज्यांच्याबाबत या पुस्तकात लिहिले आहे, त्या जीवनाच्या झाडाचा आणि पवित्र नगराचा वाटा देव काढून घेईल. 20जो येशू या गोष्टीविषयी साक्ष देतो, तो म्हणतो, "होय, मी लवकर येतो."

आमेन, ये प्रभु येशू, ये!

21प्रभु येशूची कृपा देवाच्या सर्व लोकांबरोबर असो.

---

**मैल** मुळात बारा हजार स्टेडिया.

**मीटर** मुळात 144 क्युबिट.

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**

- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from:
http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from:
http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html

# शब्दकोश

**अब्राम** म्हणजे "माननीय पिता."

**अब्राहाम** म्हणजे "राष्टांचा पिता."

**अदोम** तो यहूदा प्रांताच्या पूर्व दिशेकडे होता.

**अल्लोन बाकूथ** म्हणजे "ओक दु:खाचे झाड."

**अराम** म्हणजेच "अदोम."

**अहला** ह्या शब्दाचा अर्थ "तंबू." बहुधा हा इस्राएलच लोक देवाची पूजा करण्यासाठी जात तो पवित्र तंबू असावा.

**अहलीबा** ह्या शब्दाचा अर्थ "माझा तंबू तुझ्या देशात आहे."

**अहश्वेरोश** ख्रि.पू. 485-465 या सुमाराला होऊन गेलेला पारसचा राजा.

**अश्शूरचा राजा** म्हणजे बहुधा, पारसचा राजा दारयावेश असावा.

**अध्यापक** याचा मूळ अर्थ लेखक. पोथ्यांच्या हस्तलिखित प्रती करणारा. त्या पुस्तकांचा अभ्यास करुन ते अध्यापक बनत.

**अरामीभाषा** बाबेल साम्राज्याची राजभाषा.

**अदुल्लाम गुहेत** किंवा "किल्ल्यात."

**अरामी** प्राचीन सिरियातील व्यक्ति. येथे कदाचित अब्राहाम, इसहाक किंवा कदाचित याकोब (इस्राएल) असावा.

**अधोलोकाच्या** किंवा "शिओल" म्हणजे मृत्यूचे स्थान.

**अनाथ, विधवा** विधवा म्हणजे ज्यांचे पती गेले आहेत अशा स्त्रिया. अनाथ म्हणजे ज्यांना आई-वडील नाहीत असे. ह्या सर्वांची काळजी घेणारे कोणीही नसे.

**अरूमायेथे** यालाच तोरमा असेही म्हणतात ही अबीमलेखची ही राजधानी. शखेमच्या दक्षिणेला आठ मैलावर हे गाव असावे.

**अबीब** ह्या नांवाचा अर्थ "धान्याची कोवळी कणसे" असा आहे. यहुदी लोकांच्या वर्षाचा हा पहिला महिना असून ह्याला निसान असेही म्हणतात. मार्च-एप्रिलच्या दरम्यान हा महिना येतो.

**अशुध्द** अस्वच्छ, अपवित्र वा देवाच्या पूजेला चालणार नाही असे.

**अधिकृत माप** देवळात किंवा ज्यूच्या मंदिरात वापरात असलेले प्रमाणित माप.

**अमंगळ भाकरी** एखाद्या अमंगळ गोष्टीचा स्पर्श झालेली भाकरी अशी भाकरी खाल्लेला माणूस देवाच्या पूजेत भाग घेऊ शकत नसे. मंगल—अमंगळ ह्याबाबतच्या नियमासाठी लेवीय 11–15 पाहावे.

**अमोन** खूप वर्षे, आमोन हा मिसरचा श्रेष्ठ देव होता. ह्या भविष्यकथनाच्या वेळेला, उत्तर मिसरमध्ये त्याची विशेष पूजा होत नव्हती, पण दक्षिण मिसरमध्ये, विशेषत: मिसरच्या थेबेस ह्या राजधानीच्या आजूबाजूच्या भागात त्याचे महत्व फार होते.

**अभेद्य दुर्ग** परमेश्वराचे एक नाव परमेश्वर भक्क्म तटबंदीसारखा, किल्ल्यासारखा रक्षण करणारा आहे, या अर्थाने.

**अष्कलोन** पलिष्ट्यांच्या पाच नगरांपैकी एक.

**अष्कोल** हे नाव म्हणजे हिब्रू भाषेतील द्राक्षाचा घड या अर्थाचा शब्द.

**अनाक** हे लोक धिप्पाड, शक्तिशाली लढवैय्ये होते.

**अबीब महिन्यात** "वसंतऋ तूत" किंवा प्राचीन यहुदी पंचांगाप्रमाणे पहिल्या महिन्यात म्हणजे निसान महिन्यात.

**अकजीब** या नावाचा अर्थ "खोटे" वा "फसवणूक."

**अशुद्ध पदार्थ** अग्राहय, किंवा अपवित्र परमेश्वराच्या उपसनेतवर्ज्य असलेला. शुध्दअशुध्द पदार्थाबाबत जुन्या करारातील नियमांसाठी पाहा लेवीय 11–15.

**अशेरा** कनानींची महत्वाची दैवत. ती "बआलची पत्नी आहे असे त्या वेळी लोक समजत.

**अम्री** हा इस्राएलचा राजा होता. ह्याने राष्टाला खोट्या परमेश्वरांची पूजा करण्यासाठी प्रवृत्त केले पाहा 1 राजा 16:21-26.

**अदुल्लाम** ह्या गुहेत दावीद, शौलपासून पळाल्यावर, लपला होता (पाहा 1 शमु. 22:1).

**अमावास्ये निमित्त मेजवानी** ज्यू महिन्याचा पहिला दिवस हा विश्रांतीचा आणि पूजेचा दिवस असे. लोक यादिवशी एकत्र जमून यज्ञार्पणे करत. पाहा लेवीय 7:16–21.

**अराम नहराईम किंवा** "मेसोपोटेमियाचे अरामीन."

**अराम सोबा किंवा** "मध्य सिरियातले अरामीन."

**अश्शूर** शब्दश: किहीम हे म्हणजे इस्राएलच्या पश्चिमेला भूमध्य समुद्रात असलेले अश्शूर क्रेट किंवा दुसरे एखादे शहर असू शकेल

**अबीब महिन्यात** म्हणजेच निसान महिन्यात किंवा वसंतऋ तूत म्हणजे हल्लीच्या मार्च एप्रिल महिन्यांच्या दरम्यान.

**अधोलोक** मेल्यावर सर्वजण येथे जातात असे मानले जाते. बहुतेक वेळा हा शब्द 'थडगे' या अर्थाने वापरतात. आपले आत्मे जेथे जातात ती ही जागा असाही ह्या शब्दाचा अर्थ होऊ शकतो येथे भाषांतरात ह्या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून पाताळ हा शब्द वापरला आहे.

**अशेरा** कनान्यांची ही महत्वाची दैवता. ही बालची पत्नी अशी या लोकांची समजूत होती.

**अराराट** पूर्व तुर्कस्थानातील उरार्तु प्राचीन नगर.

**अम्नोन** अबशालोम आणि तामारचा हा सावत्र भाऊ ही सर्व दावीदाची मुले, पण अम्नोनची आई वेगळी होती. पाहा 2 शमुवेल 3:2-3.

**अदोम भूमी** इस्राएलाच्या दक्षिणेकडील आणि पूर्वेकडील भूमी.

**अविवाहित** शब्दश: "कुमरिका" लग्न न झालेली व कोणाबरोबरही लैंगिक संबंध नसलेली मुलगी.

**अमावास्या** ज्यू महिन्याचा पहिला दिवस हा पूजा करण्याचा खास दिवस होता.

**अनाथ** कनानी लोकांची युध्द देवता येथे त्याचे वेगवेगळे अर्थ होऊशकतात 1) शमगारच्या आईचे किंवा वडलांचे नाव, 2) शमगार, एक मोठा योध्दा, 3) अनाथ नावाच्या नगरातील शमगार.

**अशेरा दैवताचे स्तंभ** अशेरा देवतेच्या सन्मानार्थ हे स्तंभ उभे करण्यात येत असत. लोकांचा असा विश्वास होता की ही देवता पुष्कळ संतति देते.

**अदोम** यहूदाच्या अतिदक्षिणेकडील देश. अदोमचे लोक याकोबचा जुळा भाऊ एसावचे वंशज आहेत. हे इस्राएलींचे शत्रू आहेत.

**अनिर्बंध इच्छा अर्पण** ह्या सर्व गोष्टी मोशेच्या नियमशास्त्राविरुध्द होत्या. पुढाऱ्यांनी व खोट्या याजकांनी हे नवीन सुट्टीचे दिवस व देवाच्या उपासनेच्या वेगळ्या पध्दती सुरू केल्या.

**अमाना** लबोनानमधल्या पर्वताचे नाव.

**अगरू** एका विशिष्ट झाडापासून तयार केलेले अत्तर.

**अंगरखा** किंवा बुरखा माणसाचे तोंड झाकण्यासाठी वापरण्यात येणारे कापड.

**अपवित्र** शुध्द व अशुध्द गोष्टीं बाबतच्या जुन्या करारातील नियमांसाठी पाहा लेवी. 11:15.

**अरामी भाषा** बाबेल साम्राज्याची अधिकृत भाषा. इतर पुष्कळ देशांतील लोक दुसऱ्या देशांतील लोकांना सरकारी पत्रे ह्याच भाषेतूनच लिहीत. दानीएलच्या ग्रंथाचा मूळ भाग येथपासून 7:28 पर्यंत ह्याच भाषेत लिहिलेला आहे.

**अलगूज** एक प्रकारचे सात तारा असलेले वाद्य. हेही कदाचित सारंगीप्रमाणे असावे. हेही नाव ग्रीकमध्ये दुसऱ्या भाषेतून बहुधा ग्रीकमधूनच आलेले असावे.

**अनाकी लोक** अनाकचे वंशज हे लोक धिप्पाड, प्रबळ व लढाऊपणाबाबत फार प्रसिध्द होते. पाहा गणना 13:33.

**अजाजेल (बकरा)** ह्या शब्दाचा किंवा नांवाचा अर्थ माहीत नाही. बकरा सर्व लोकांची पापे 'वाहून नतो' अशी कल्पना असावी.

**अबेल मिस्राईम** म्हणजे "मिसरच्या लोकांचे शोकाचे दिवस."

**आशेर** म्हणजे हिब्रू भाषेत "आनंदी" किंवा "आशीर्वादित."

**आज्ञापट** म्हणजे दहा आज्ञा लिहिलेल्या दगडी पाट्या.

**आवेन व पी बसेथ** मिसरमधील हेलेओपोलीस व बुबास्टीस ही शहरे.

**आज्ञा** ह्याचा अर्थ "नियम, निर्बंध असाही होतो." इस्राएलमधील लोकांना शिकविण्यासाठी, देवाने मोशेसला घालून दिलेले नियम असा अर्थ काही वेळा केला जातो.

**आठवणी खातर** पूर्वी घडलेल्या गोष्टींची आठवण ठेवण्यासाठी काही गोष्टीं वस्तू करणे.

**आयुष्य शब्दश:** "आत्मा."

**आमेन** हिब्रू शब्द याचा अर्थ जे म्हटले गेले आहे त्याच्याशी एखादा माणूस सहमत आहे असा होतो.

**आश्रयनगर** एखाद्याच्या हातून चुकून हत्या घडल्यास संतप्त नातलगापासून लांब पळून जायचे सुरक्षित नगर. पाहा यहेशवा 20:1–9.

**आज्ञापटाची ती पेटी** दहा आज्ञा लिहिलेल्या दगडी पाट्या व सिनाय वाळवंटात देव त्याच्या लोकांबरोबर होता हे सिध्द करणाऱ्या काही इतर गोष्टी ज्या पेटीत ठेवल्या आहेत ती पेटी. ह्या पेटीला "करारनाम्याची पेटी" असेही म्हणतात.

**आरामकर** शब्दश "तुझे पाय धू."

**आहाज** यहुदाचा राजा ह्याने ख्रि. पू. 735–721 या काळात राज्य केले.

**आल्हाददायक** किंवा "भरगच्च आणि हिरव्या" गवताच्या कुरणासारखा.

**आय** ह्या गावाच्या नांवाचा अर्थ "उजाड" असा आहे.

**आशेर** ह्याचा अर्थ "अशीर्वादीत" किंवा "आनंदी" आहे.

**आज्ञापटा** शब्दाश: पुरावा दहा आज्ञा लिहिलेल्या सपाट पाट्या. इस्राएल लोक व देव ह्यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्याच्या त्या पुरावा होत.

**आपापल्या वतनात** (स्वत:ची मालमत्ता) इस्राएलमध्ये, जमीन कुंटूंबाच्या किंवा कुंटूंबातील गटाच्या मालकिची असे. एखादी व्यक्ति जमीन विकू शकत असे. परंतु पन्नासाव्या वर्षी ती परत मूळ मालकी असलेल्या कुंटुंबाची किंवा कुंटुंबातील गटाच्या मालकीची होत असे.

**इसहाक** म्हणजे "हसणारा" कारण देवाने अब्राहामला मुलगा होण्याचे वचन देताच तो हसला.

**इस्राएलच्या संपूर्ण घर** बहुधा ह्याचा अर्थ "इस्राएलच्या उत्तरेकडील दहा घराणी" असा असावा.

**इशाय** दाविद राजाचे वडील.

**इम्मानुएल** ह्याचा अर्थ "देव आमच्या पाठिशी आहे."

**इस्राएल** कधी याचा अर्थ देशवाचक असतो इथे वंशवाचक म्हणून घ्यायचा आहे.

**इंद्रनील मणी** क्वचित आढळणारा अतिशय किमती हिरा.

**इस्साखार** म्हणजे हिब्रू भाषेत "बक्षीस" किंवा "वेतन."

**इथ्रो** तो एक मिद्यानी याजक होता.

**इस्राएलची पापे** म्हणजे यरुशलेमच्या मंदिराव्यतिरिक्त बांधलेली पूजास्थाने येथे बहुधा खोट्या देवांची पूजा होत असावी. पुराणवस्तु संशोधकांना तेल लाखीशमध्ये असे "मंदिर" आणि स्मृतिशिला सापडल्या आहेत.

**इथिओपिया** ह्याला "कुश" असेही म्हणतात. आफ्रिका खंडात लाल समुद्राजवळ हा देश आहे.

**ईर–हरेस** किंवा "विनाश नगर" वा "सूर्य नगर."

**उरीम व थुम्मीम** परमेश्वराचा निर्णय जाणून घेण्यासाठी याजकाने आपल्या ऊरपटात ठेवावयाच्या, विशेष दगडाचा, लाकडाचा किंवा हडकाचा लहान तुकडा, अशा वस्तूच त्यांना ऊरीम व थुम्मीम म्हणत असत.

**उपशामक औषध** झाडे झुडुपापासून केलेले मलम औषध म्हणून वापरतात.

**उंबऱ्यावरुन उडी मारणारे** परदेशी देव दागोन ह्याची पूजा करणारे वा त्या पूजाविधीचे अनुकरण करणारे, असा ह्याचा अर्थ होतो. पाहा 1 शमु. 5:5.

**उच्चस्थाने** येथे अर्थ "टेकड्या" एवढाच असावा किंवा परमेश्वराची वा खोट्या परमेश्वरांची पूजास्थाने असाही अर्थ असू शकतो ही स्थाने नेहमी टेकड्यांवर वा डोंगरावर असत.

**उज्जीया** यहुदाचा राजा ह्याने ख्रि. पू. 767–740 या काळात राज्य केले.

**उडणारे साप** शब्दाश अर्थ तोच "उडणारे साप."

**डाळिंबा** आत लहान बिया असलेले लहान फळ. प्रत्येक बी भोवती फळाचा चविष्ट भाग असतो.

**उच्च स्वरात** मूळशब्द "अलामोथ" याचा नेमका अर्थ माहीत नाही. "उच्च स्वर" असा त्याचा अर्थ असावा.

**उंच जागा** देवाची वा खोट्या देवाची प्रार्थना करण्याची उंचावरची जागा. या जागा उंच पर्वतावर वा टेकडीवर असतात.

**उपरे** सुंता न झालेले लोक यहोवाच्या कराराशी संबंध नसलेले.

**उरीम आणि थुम्मीम** याद्वारे परमेश्वराकडून माणसाला उत्तरे मिळत. मात्र याचे स्वरुप काय हे कसे घडत होते याची कल्पना येत नाही.

**उरले सुरले धान्य** कापणीच्या वेळी काही ओंब्या शेतातच राहू द्याव्या असा दंडक होता. ते धान्य गोर गरिबानी उचलून न्यायला मुभा होती.

**ऊद-धूप** एका झाडाचा वाळवलेला रस, तो जाळून गोड वास निर्माण होतो तो देवाला भेट म्हणून अर्पण करतात.

**ऊफारसीन शब्दश** अर्थ "पेरेस" एक वजन. हा शब्द "विभाग करणे" या शब्दासारखा आहे. "परस" या वा "पर्शिया" या नावाप्रमाणे पण तो शब्द आहे.

**एसेक** म्हणजे "वाद" किंवा "झगडा."

**एल–बरीथ** "कराराचा परमेश्वर" असा या परमेश्वराच्या नावाचा अर्थ होय.

**एलीशा** बहुदा "सायप्रस" कदाचित् हा भूभाग एगकोमी, सायप्रस जवळ असावा किंवा हे ग्रीक बेट असावे.

**एफोद** किंवा पुरोहिताचा मदतनीस म्हणून ओळखू यावे म्हणून अंगावर घालायचा विशेष प्रकारचा अंगरखा.

**एफ्राईम** म्हणजे हिब्रू भाषेत "दुहेरी फळ देणारा" किंवा "दुहेरी यश देणारा."

**एबर** युफ्रेटस नदीच्या पश्चिमेला रहात असलेले लोक किंवा एबरचे वंशज.

**एजोबाची** छोट्या छोट्या फांद्या आणि पाने असलेली वनस्पती. याचा उपयोग एखाद्याला शुध्द करण्याच्या समारंभ प्रसंगी, पाणी किंवा रक्त शिंपडण्यासाठी करतात.

**एल–शदाय** म्हणजे "सर्वसमर्थ देव."

**एसावच्या देशाचा** म्हणजेच अदोम. अदोम हे एसावचेच दुसरे नाव.

**एलीएजार** म्हणजे "माझा देव मला मदत करतो."

**एक झाकण** म्हणजे एक दयासन.

**एबद मलेख** यिर्मया 38:7–13 पाहा.

**एफ्राथा बेथलहेम** या शहरात दावीदाचा जन्म झाला.

**ऐवजी** एक प्रकारचे धान्य.

**ऐरण** अतिशय जड व मोठा धातूचा ठोकळा. लोहार (लोखंडाचे काम करणारा) ऐरणीवर गरम धातू ठेवून ठोकतो त्यामुळे धातूचा आकार बदलतो.

**ओबेद अदोम** यरुशलेम जवळ राहणारा लेवीवंशातील माणूस.

**ओसाड डोंगर** बहुधा बॅबिलॉन देश.

**ओळंबा** एका टोकाला वजन असलेली दोरी. कामगार, त्यांनी बांधलेली भिंत सरळ आहे ना ह्याची खात्री करून घेण्यासाठी ओळंबा वापरतात. ते दोरीला रंग लावतात व तिला झटका देतात. त्यामुळे भिंतीवर रंगाची सरळ रेषा उमटते. मग कामगार वक्रभाग घासून काढतात.

**ओफिर** निळ्या आणि करड्या रंगाच्या छटा असलेला एक हिरा.

**काइन** या शब्दाना अर्थ "निर्माण करणे तेव्हा हव्वा म्हणाली, "परमेश्वरच्या मदतीने मी पुरुषसंतानाला निर्माण केले आहे."

**कमोश** केशोश मवाबी लोकांचा देव होता.

**कोरेश राजाच्या कारकिर्दिच्या पहिल्या वर्षी** म्हणजे ख्रि. पू. 539 मध्ये.

**कळपाचा मनोरा** किंवा हा यरुशलेमचा एक भाग असावा मनोऱ्यात बसून आपल्या कळपावर लक्ष ठेवणाऱ्या मेंढपाळाप्रमाणे नेते असावे.

**कृत्तिका** प्रसिध्द नक्षत्र सात बहिणी या नावाने ते ओळखळे जाते (वृषभ राशीतील एका तारका पुंजातील तारा).

**कुमारिकेचा** जिचा कोणाशीही शारीरिक संबंध आलेला नाही अशी शुध्द स्त्री.

**कर्ज** घेण्यासाठी तारण म्हणून ठेवलेली वस्तू जर कर्ज नाही फेडण्यात आले तर कर्ज देणारा सदरील वस्तू स्वत:कडे ठेवून घेऊ शकतो.

**कराराचा कोश** दहा आज्ञा लिहिलेल्या मातीच्या पाट्या व सिनाई वाळवंटात देव त्याच्चा लोकांबरोबर होता हे सिध्द करणाऱ्या काही इतर गोष्टी ज्या पेटीत ठेवल्या आहेत ती पेटी ह्या पेटीला "करारनाम्याची पेटी" असेही म्हणतात.

**किशोन नदी** ताबोर डोंगरापासून दहा मैलावरील एक नदी.

**कमोश** अम्मोनी लोकांचा देव मिल्कोम, पण मवाब देशाचा राष्टीय देव कमोश.

**कुमरी** कुमारीका जिचा कोणाशीही शारीरिक संबंध आलेला नाही अशी शुध्द स्त्री.

**कुळक** टोकदार दगड किंवा लोखंडी तुकडे जोडलेली लाकडी फळी.

**कमळाचे झाड** एक प्रकारचे झाड त्याच्या पानांची दाट सावली पडते.

**काबूल प्रांत** या शब्दाचा अर्थ हिब्रूभाषेत 'कुचकामी' असा होतो.

**कोणीच नाही हे कसे** पाळणारे अशुध्द आहेत असे समजण्यात येत असे. परमेश्वराच्या नैवेद्याचे अन्न त्यांना खाता येत नसे.

**काठी** आणि आकडी मेंढपाळ त्यांच्या मेंढ्या राखण्यासाठी काठी वापरतो ती काठी.

**करार** आणि वचने हा कदाचित् मोशेचा कायदा असू शकेल. देवाने हा करार इस्राएलाच्या लोकांबरोबर केला.

**करार शब्दश:** "पुरावा" ज्या सपाट दगडावर देव आणि इस्राएलचे लोक यांच्यातील कराराचा पुरावा म्हणून परमेश्वराच्या दहा आज्ञा लिहिल्या तो दगड.

**कादेशाचे** वाळवंट सिरियातील वाळवंट याचा अर्थ "पवित्र वाळवंट" असाही होईल.

**कोल्हे** रानटी प्राणी. हा प्राणी निर्मनुष्य जागी राहातो.

**कृतज्ञतापूर्वक होमार्पण** देवाने लोकांसाठी केलेल्या चांगल्या गोष्टीबद्दलच्या उपकाराची परत फेड म्हणून देवाला खुश करण्यासाठी लोक देवाला चांगल्या गोष्टी अर्पण करीत. प्राण्याचा एखादा भाग वेदीवर भाजला जाई परंतु लोक त्याचा बहुतांश भाग जेवणाच्या वेळी खात असत. पाहा लेवि. 7:11–26.

**किरिआथ येआरीम शब्दश:** "जंगलाचे प्रदेश" हिब्रू भाषेत "जंगल" म्हणजे शहराचे नाव.

**केशर** पिवळे फुल याचा उपयोग अत्तर करण्यासाठी करतात.

**कमलपुष्प** एक फूल, इथे हे लाल रंगाचे फूल आहे.

**केदार** इस्राएलच्या पूर्वेकडील देश.

**क्यू** किंवा सिलिसिया आत्ताच्या दक्षिण तुर्कस्थानातला भाग.

**कित्ती** हे सायप्रसमधील अथवा क्रेटमधील बेट असावे.

**कनान** जेथे कनानी लोक राहतात, तो देश इस्राएल. लेबानन व सिरीया यांचा काही भाग मिळून हा देश बनला आहे.

**कर्मेल** ह्याचा अर्थ "देवाचा द्राक्षमळा" उत्तर इस्राएलमध्ये ह्या नावाची अनेक शहरे व टेकड्या आहेत.

**कुत्री** व डुकरे कुत्री आणि डुकरे बळी म्हणून अर्पण केलेली देवाला आवडत नसत.

**कित्ती बेटे** म्हणजे सायप्रस बेटे. भूमध्य समुद्रातील इतर बेटांना आणि किनारपट्टीलगतच्या प्रदेशालाही हे नाव वापरीत.

**केदार** पॅलेस्टाईनच्या पूर्वेला असलेल्या वाळवंटात राहणाऱ्या अरब समूहाचे नाव.

**कराराचा कोश** दहा आज्ञा लिहिलेल्या मातीच्या पाट्या व सिनाई वाळवंटात देव त्याच्या लोकांबरोबर होता हे सिद्ध करणाऱ्या काही इतर गोष्टी ज्या पेटीत ठेवल्या आहेत ती पेटी. ह्या पेटीला 'करारनाम्याची पेटी' असेही म्हणतात.

**कुमारी मुलगी** यरुशलेमचे दुसरे नाव.

**करूब देवदूत** देवाचे खास दूत. ह्यांच्या मूर्ती कराराच्या पेटीच्या वरच्या भागावर आहेत.

**करूबाचे तोंड** हे तोंड म्हणजेच यहेज्केल 1:10 मध्ये सांगितलेले बैलाचे तोंड होय पाहा यहेज्केल 10:22.

**कुमारिका** हिब्रू शब्दाचा असा अर्थ आहे, "कोणाबरोबरही लैंगिक संबंध झाला नाही अशी स्त्री," "नवरी" किंवा "वाग्दत्त वधू" येथे हिचा अर्थ शोमरोन आहे.

**किल्ले** किंवा गढी संरक्षणासाठी तटबंदी असलेली इमारत वा गाव.

**कोयता** झाडाच्या फांद्या कापण्यासाठी वापरावयाचे हत्यार पाहा यश. 2:4.

**क्षितिज** लांबवर तेथे आकाश धरतीला टेकलेले दिसते ती जागा.

**कपतोर द्वीप** कधी ह्याला (क्रेट) म्हटले जाते, तर कधी सायप्रस बायबलच्या म्हणण्याप्रमाणे पॅलेस्टाईनचे लोक मूळचे येथीलच.

**कुंभार** मातीची भांडी (बरण्या, वाडगे वगैरे) घडविणारा. हिब्रूमध्ये या शब्दाचा अर्थ 'निर्माता' किंवा 'नवीन गोष्टी तयार करणारा' असा आहे.

**खंदकमार्गे** जमिनीच्या पोटातून यरुशलेम नगरात नेणारा एक पाण्याने भरलेला खंदक प्राचीन काळी खणलेला होता. दावीद व त्याची माणसे यांनी त्याचा वापर केला.

**खळे** धान्यापासून भुसा वेगळा करण्याकरिता धान्य झोडपले किंवा तुडविले जावे ती जागा.

**खोटे** परमेश्वर किंवा "गावे."

**खूर** घोड्याच्या पावलाचा कठीण भाग.

**खव्व्यात** धान्य झोडपणे मळणी करणे धान्य झोडपणे किंवा त्यावरुन चालणे ज्या योगे ते टरफलापासून वेगळे काढळे जाते.

**खडक देवाचे नाव.** यावरुन तो किल्ल्यासाारखा किंवा सुरक्षित जागेसारखा आहे हे सुचवले जाते.

**खास** कपडे लोक देवळात प्रार्थनेसाठी जाताना खास कपडे घालत असत ते.

**खास्दी** बाबेलमधील एक महत्वाचा वंश बाबेलचे राजे ह्याच वंशातील होते. हे लोक सुशिक्षित होते. त्यांनी विज्ञान, इतिहास, निरनिराळ्या भाषांचा अभ्यास केला होता. पण ते मंत्रतंत्र करून ताऱ्यांवर भविष्य जाणू शकता असा त्यांचा विश्वास होता.

**खापराचे प्रवेशद्वार** यरुशलेमच्या प्रत्येक प्रवेशद्वाराला स्वतंत्र नाव होते.

**खळे** कणसापासून धान्य वेगळे करण्यासाठी ह्या ठिकाणी कणसांची झोडपणी करण्यात येते.

**खाण** ज्या ठिकाण खडक फोडून दगड काढण्यात येत ती जागा.

**गाद** म्हणजे हिब्रू भाषेत "भाग्यवान" किंवा "नशीबवान."

**गेर्षोम** ह्या इब्री भाषेतील शब्दाचा अर्थ 'हा इथला परकीय' असा आहे; मोशेने आपल्या मुलाला हे नांव दिले कारण मोशे परक्या देशात राहात होता.

**गोफण दगड** मारण्यासाठी वापरण्यात येणारा चामड्याचा तुकडा.

**गहाण** कर्जाच्या मोबदल्यात वस्तू गहाण ठेवणे जर पैसे परत केले नाहीत तर कर्ज देणारा ती वस्तू घेऊ शकतो.

**गोष्टी** गोष्टी म्हणजे कदाचित् त्यांच्या मूर्ती.

**गंधसरू** येथे वृक्ष, झुडुपे आणि प्राणी हे यहूदाच्या आसपासच्या देशांतील नेत्यांची प्रतीके आहेत.

**गरूड** किंवा "गिधाड."

**गथ** पलिष्ट्यांचे राजधानीचे शहर.

**गिलावा** एक प्रकारची माती किंवा चुना लोक ह्याचा उपयोग भिंतीला लावण्यासाठी करीत असत.

**गिबा** हे ठिकाण यबूसच्या उत्तरेला काही मैलावर आहे.

**गांधीलमाशा** मधमाशी सारखा दंश करणारा किटक येथे. "देवाचा देवदूत" किंवा "त्याचे महान सामर्थ्य" असा अर्थ असावा.

**गवत, ताटे** शब्दश "जवस" ह्याचा उपयोग तागाचे कापड बनविण्यासाठी करण्यात येत असे.

**गटगटांनी** शब्दश विभाग पाडून, तुकड्या तुकड्यांनी.

**गेर्षोम** गेर्षोम या नांवाचा अर्थ हिब्रू भाषेतील "तेथे परका" या अर्थाच्या शब्दासारखा आहे.

**गोल कप** किंवा "उलटी वाटी" दगडाची वाटी कात कामाच्या यंत्रावर केलेली आणि द्राक्षारस कपात ओतण्यापूर्वी नीट एकजीव करण्यासाठी वापरण्यात येणारी वाटी. याचा अर्थ अर्धचंद्राकृती वाटी असाही होऊ शकेल.

**गदल्या** यहूदाचा राज्यपाल म्हणून नबुखदनेस्सरने ह्याची नेमणूक केली होती.

**गबाल** म्हणजेच "बईब्लोस."

**गंधरस व ऊद** उंची मसाले. ते जाळल्यानंतर सुंदर वास येतो.

**गे–हराशीम** "कुशल कारागिरांचे खोरे" असाही याचा अर्थ होतो.

**गड** संरक्षणासाठी उंच व मजबूत भिंत असलेली इमारत वा गाव.

**गांधील माश्या** मधमाशी प्रमाणे दंश करणारा एक किटक या ठिकाणी याचा अर्थ देवाचा दूत किंवा त्याचे महान सामर्थ्य असा असावा.

**घार** ससाण्यासारखा एक पक्षी.

**घुसळत** साय लोणी निघेपर्यंत घुसळणे.

**घरात** राजावाडा किंवा मंदिर असायाचा अर्थ असावा.

**चिठ्ठ्या** काड्या दगड किंवा हाडाचे तुकडे निर्णय करण्यासाठी चिठ्ठ्या म्हणून वापरीत पहा म्हणी 16–33.

**चिठ्या टाकणे** बरीक काटक्या वा दगड अथवा हाडांचे तुकडे फास म्हणून वापरून निर्णय घेत. पाहा नीति. 16:33.

**चादर** लग्नाच्या वेळी ती कुमारिका होती ह्याचा पुरवा म्हणून नवरी लग्नाच्या रात्री रक्ताने भरलेली सदर चादर जपून ठेवत असे.

**चांदीची महिरप** किंवा "आधार देणे" बहुतेक वेळा आडव्या पट्ट्या आणि मनोरे भिंतींना आधार देण्यासाठी बांधत परंतु इथे त्याचा अर्थ सजावट असावा असे वाटते.

**छत** प्राचीन इस्राएलमध्ये, घराचे छत सपाट असे व त्याचा उपयोग एका खोलीसारखा करीत.

**छप्पर, धाबा** इस्राएलमध्ये घराचे छप्पर सपाट, धाब्याचे असे. लोक ह्याचा उपयोग वस्तू ठेवण्यासाठी खोली म्हणून करीत असत.

**जू** नांगर किंवा गाडी ओढण्यासाठी बैलाच्या अगर दुसऱ्या कुठल्या जनावराच्या मानेवर ठेवण्यात येणारा लाकडाचा ओंडका.

**जरुब्बाबेल** यालाच शेशबज्जर असेही म्हणत.

**जीवनाचा वृक्ष** असा वृक्ष ज्याची फळे माणसाला चिरंजीव राहाण्याची शक्ति देतात. (पाहा 3:22 व 22:1–2.)

**जोखड** ओझे वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारा ओंडका. ह्यावरून तो माणूस गुलाम आहे, हे कळून येत असे.

**जाण्याची खुर्ची** लोक ज्यात बसून प्रवास करतात अशी खूर्ची. ही खूर्ची आच्छादित असे आणि तिला खांब असत. गुलाम त्या खांबांना धरून खूर्ची उचलत व लोकांना नेत.

**जटामासी** या झाडापासून मिळालेले उंची तेल. त्याचा अत्तरासारखा उपयोग केला जाई.

**ज्येष्ठ पुत्राचा** म्हणजे कुटुंबात जन्मलेले पहिले अपत्य पूर्वीच्या काळी मोठ्या मुलाला फार महत्व असे.

**जात्याच्या खालच्या** पाती धान्न दळण्याचे जाते यात एका सपाट दगडावर दुसरा सपाट दगड ठेवतात. दोन दगडांच्या मध्ये धान्याचे पीठ होते.

**जबुलून** म्हणजे हिब्रू भाषेत "स्तुती" किंवा "सन्मान."

**झाडांची** एला वृक्ष लोक पूजेतील मूर्तीप्रमाणे या झाडांची पूजा करीत.

**टोळधाड** नाकतोड्यासारखे किटक. ते थोड्याच वेळात संपूर्ण पिकाचा नाश करू शकत असत.

**ठरविल** अधिकृत माप देवळात किंवा ज्यूच्या मंदिरात वापरात असलेले प्रमाणित माप.

**डाळिंब** पुष्कळ लहान बिया असलेले एक तांबूस रंगाचे फळ. प्रत्येक बीला मऊ, रसदार गराचे आवरण असते.

**डोलकाठी** शिडाच्या नौकेवरील शीड लावण्याची काठी.

**ढोंगी** चांगुलपणाचे सोंग आणणारी दुष्ट माणसे.

**त्राता** आपल्या मृत आप्ताच्या कुटुंबियांची काळजी घेणारा, त्यांचे रक्षण करणारा हा बरेचदा आपल्या गरिब नातेवाईकांची गुलामगिरीतून मुक्तता करीत असे.

**तरस** दुसऱ्या प्राण्यांनी मारलेल्या जनावरांचे मास खाणारी एक प्रकारची जंगली कुत्री.

**तिऱ्हाका** हा बहुधा मिसरत्या (मिसरचा) फारो ताहारका असावा. ह्याने ख्रि. पू. 690–664 असे राज्य केले.

**तटबंदी** शहराभोवती वा घराभोवती बांधलेली संरक्षक भिंत.

**तेल** घातलेस डोके याचा अर्थ या माणसाला देवाने बरीच संपत्ती दिली किंवा देवाने त्याला कुणीतरी मोठा, एखादा राजा, याजक किंवा नेता (पुढारी) म्हणून निवडले असा होतो.

**तार्शीश** इस्राएलपासून खूप दूर असलेले एक शहर बहुदा स्पेनमधले भूमध्य समुद्रात जाणाऱ्या मोठ्या जहाजासाठी तार्शिश प्रसिध्द होते.

**तेमान आणि शलमा** अरेबियन आदिवासी लोक सलमाचा हिब्रूत "शलमोन" होतो पण सलमा, सलमोन याची तुलना रूथ 4:20–21 यात.

**तिरझा** उत्तर इस्राएलाचे राजधानीचे नगर.

**तुझा शिक्का** अंगठी मातीत किंवा गरम मेणात ठसा उमटवण्यासाठी तो ठसा त्यात दाबतात. हा ठसा माणसाच्या सहीसारखा असतो. म्हणून त्या वस्तू न हरवणे महत्वाचे मानीत.

**तर्तान** अश्शूरचा सैन्याधिारी.

**तोफेत** गेन्ना, हिन्नोनची दरी "मोलख" या खोट्या देवाला प्रसन्न करण्यासाठी लोक या दरीत आपले मुले मारून टाकीत म्हणजेच बळी देत.

**तेमान** अदोमच्या उत्तरेकडील शहर.

**तेल अबीब** इस्राएलच्या बाहेरचे ठिकाण ते नक्की कोठे आहे ते माहीत नाही. ह्या नावाचा अर्थ.

**तम्मुज** लोकांच्या मते हा खोटा देव मेल्यावर त्याची पत्नी इश्तार हिने प्रत्येकाला रडण्यास व शोक करण्यास सांगितले. असे केल्याने तम्मुज पुन्हा जिवंत होईल, असे तिला वाटले. हा समारंभ चौथ्या महिन्याच्या (जून/जुलै) दुसऱ्या दिवशी असे. ह्या समारंभावरूनच त्या महिन्याला 'तम्मुज' हे नाव पडले.

**तेकेल हिब्रू** "शेकेल" प्रमाणे एक वजन. ह्या शब्दाचा अर्थ "वजन करणे" असाही होऊ शकतो.

**ताग आंबाडीच्या** तंतूपासून केलेला धागा वा कापड.

**तंबोरा** एक पिशवी व पुष्कळ वळ्या वा शिंगे असलह्याले वाद्य. हिब्रूमध्ये हे नाव ग्रीकमधील "सिंपोनि" ह्यावरून आले असावे.

**तेमान** अदोममधील दक्षिणेकडील एक महत्वाचे शहर. कदाचित ते राजधानीचे शहरसुध्दा असेल.

**तेल** विशेष प्रकारचे तेल. धर्मगुरु व मंदिरातील गोष्टी ह्यांना पवित्र (विशेष) करण्यासाठी हे लावीत. पाहा निर्गम 30:22–33.

**ताईत** हे हार व तोडे ह्यांच्याबरोबर घातले जात. वाईट गोष्ट अथवा संकट ह्यापासून ताईत रक्षण करतात अशी लोकांची समजूत होती.

**थडगे** किंवा "शेओल" मृतात्मे जिथे जातात ती जागा.

**थेब्ज** मिसरमधील एक मोठे शहर. ह्या शहराचा अश्शूरच्या सैन्याने, ख्रि. पू. 663 मध्ये नाश केला. हिब्रूत नो आमोन.

**दालचिनी** अत्तर करण्यासाठी वापरण्यात येणारा एक मसाल्याचा पदार्थ.

**दृष्टान्त** ज्यायोगे परमेश्वर माणसांशी बोले, असे स्वप्नासारखे काही तरी.

**ददान** म्हणजे "उस" पाहा ओवी. 20.

**दानीएल** पुराणकालीन ज्ञानी पुरुष.

**द्राक्षवेल** पुष्कळ वेळा संदेष्ट इस्राएलला देवाचा द्राक्षामळा वा द्राक्षवेळ म्हणतात.

**दृष्टान्त** स्वप्नाप्रमाणे काहीतरी भास अशा वेळी, ह्या दृष्टान्ताच्या साहाय्यने देव लोकांशी बोले.

**दिव्य दृष्टी** अथवा "स्वप्नासारख्या" वा समाधीसारख्या अवस्थेत दिसणारे दृश्य. आपल्या प्रेषितांशी बोलण्यासाठी देव अशा विशेष प्रकारच्या स्वप्नांचा उपयोग करी.

**दाराचे खांब** देवाची आठवण व्हावी म्हणून इस्राएलच्या लोकांनी काही विशेष गोष्टी दाराच्या चौकटीवर ठेवायची पध्दत होती. अनु. 6:9 पाहावे.

**देवाचे मंदिर** यरुशलेमच्या लोकांची अशी समजूत होती की देवाचे मंदिर तेथे असल्याने तो यरुशलेमचे नेहमी रक्षण करतो. त्यांना वाटे आपण कितीही पापे केली तरी हरकत नाही. देव आपले रक्षण करीलच.

**दावीदचे घराण्यातील** यहूदाचे राजघराणे. दावीदचे वंशज यहूदावर राज्य करतील असे देवाने वचन दिले होते.

**दान** दानच्या कुळातील लोक इस्राएलच्या उत्तर सीमेजवळ राहात. उत्तरेकडून येणाऱ्या शत्रूंचा हल्ला प्रथम त्यांच्यावर होई.

**दुमा** एदोम ह्या हिब्रू शब्दाचा अर्थ 'शांतता' अथवा 'नाश' असा आहे.

**देवदूत** शब्दश: "पवित्र असलेले."

**दृष्टांन्त** स्वप्नासारखे काही तरी ज्याच्या साहाय्याने देव भक्तांशी बोलत असे.

**देवळातील वेश्या** लोक कनान देशात खोट्या दैवतांची पूजा करीत असत तेव्हा पुरुष व स्त्रिया दोन्ही त्यांची शरीरे लैगिंक पाप करण्यासाठी देत असत. ते पुजारी म्हणून सेवा करीत असत.

**दान** म्हणजे इब्री भाषेतील शब्दार्थाप्रमाणे "न्यायाधीश."

**दोन करूब** म्हणजे देवाचे विशेष प्रकारचे दूत.

**दावीद नगर** यरुशलेम नगराचा एक भाग.

**दानपासून बैरशेबापर्यंत** म्हणजे सर्व इस्राएल, दान हे सर्वात उत्तरेकडील आणि बैरशेबा हे दक्षिणेकडील शहर होय.

**दयासनाचे स्थान** करार कोशाचाच हा एक भाग होय. मूळ हिब्रू शब्दाचा अर्थ झाकण "आच्छादन" किंवा "पापक्षालनाची जागा" असा होऊ शकतो.

**दागोन** पलिष्टयांचा राष्ट्रीय देव. त्याचे मस्तक, हात आणि धड माणसासारखे असून शरीराचा खालचा भाग माशाच्या शेपटीप्रमाणे असतो.

**दासी** किंवा "ठेवलेली बाई" ही दुसरी बायको असल्याप्रमाणेच असे.

**दुर्ग** देवाचा भक्कम आधार सुचित करण्यासाठी त्याला दुर्ग म्हणतात.

**देवाचा घर** कदाचित याचा अर्थ "देवाचे घराणे (इस्राएल)" किंवा "पवित्र तंबू" किंवा मंदिर असा असावा."

**दागोन** भरपूर पिकासाठी कनानी लोक या परमेश्वराची पूजा करत. पलिष्ट्यांचा हा बहुधा सर्वात महत्वाचा परमेश्वर.

**दर्शनमंडप** पवित्र तंबू (निवास मंडप). येथे इस्राएल लोक देवाची भेट घेण्यासाठी जात असत.

**द्राक्षकुंड** ह्यात द्राक्षारस काढण्यासाठी द्राक्षे तुडविण्यात येतात. हे दगडाल एक उथळ खड्डा करून तयार करण्यात येते.

**दिवस दुखवटा** मृत माणसाविषयी शोक व्यक्त करणे, प्राचीन इस्राएलमध्ये लोक खूप मोठ्याने दु:ख व्यक्त करीत असत. खास कपडे घालत आणि दु:खी आहोत हे दाखवण्यासाठी डोक्यावर राख घालत असत.

**दुसऱ्या महिन्याच्या** इय्यार महिन्याच्या.

**दर्शन मंडपावर** पवित्र तंबू इथे इस्राएलचे लोक देवाला भेटायला आले.

**धनुर्धारी** धनुष्य आणि बाण वापरणारे सैनिक.

**धन्याचे घर** ह्याचा अर्थ देवाची वा खोट्या देवांचे पूजास्थान, म्हणजेच देऊळ होय.

**धूप** धूप एका विशिष्ट वनस्पतीचा वाळविलेला रस. हा जाळल्यास सुवास येतो हा देवाला अर्पण करतात. हा खास धूप फक्त मंदिरात जाळीत पाहा. निर्गम. 30:34–38.

**नफताली** म्हणजे हिब्रू भाषेत "माझी जिद्द."

**नेगेव** वाळवंट यहूदाच्या दक्षिणेकडील वाळवंटी प्रदेश.

**निनवे** अश्शूरची राजधानी. अश्शूरने इस्राएलचा, खि.पू 722–721 मध्ये नाश केला.

**नोहा, दानीएल व इयोब** प्राचीन काळात होऊन गेलेले हे तिघे पुरुष. त्यांचा सज्जनपणा व सुज्ञपणा यासाठी प्रसिद्ध होते. नोहा व इयोब यांच्या गोष्टी बायबलमध्ये तर दानीएलच्या गोष्टी रास शामराच्या लिखाणात आढळतात.

**नाजीर** परमेश्वराशी विशेष करार केलेला माणूस या विषयी पाहा गणता 6:1–21.

**नातलग** इस्राएलमध्ये प्राचीन काळी अशीप्रथा होती की एखादा माणूस मूलबाळ व्हायच्या आधी मरणपावला तर त्याचा जवळचा नातलग विधवेचा स्वीकार करत असे. तिला त्याच्या पासून मुले होत. तो त्या कुटुंबाची काळजी घेई पण त्या कुटुंबाची सर्व मालमता त्या मृत माणसाच्या नावे च राही.

**नोफ आणि तहपन्हेस** मिसर (इजिप्त) मधील दोन शहरे.

**नेगेब** यहुदाच्या दक्षिणेकडील वाळवंटी प्रदेश.

**नेफीलीम** या प्रसिध्द कुटुंबात उंच आणि शक्तिशाली लढाऊ पुरुष होते. पाहा उत्पत्ती 6:2-4.

**नाबल** या शब्दाचा अर्थच "मूर्ख."

**निवडलेला** किंवा "धर्म कार्यासाठी तेलाचा अभिषेक करणारा" देवाने एखाद्याला काही कामासाठी निवडणे असाही अर्थ होतो. परंतु बहुतेक वेळा "खास राजा" असा अर्थ होतो.

**नबो पर्वत** इस्राएलच्या पूवेकडे असलेल्या मवाब देशातील पर्वत.

**नाजीर** देवाला विशेष वचन दिलेली व्यक्ति. हे नांव "च्या पासून वेगळे करणे" अशा अर्थाच्या हिब्रू शब्दापासून आहे.

**पनीएल** म्हणजे "देवाचे मुख."

**पूर्वज** शब्दश: अर्थ वडील. ह्या शब्दाचा खरा अथ. वाडवडील म्हणजे आतापर्यंत झालेल्या पिढ्या.

**पहिला महिना असे** अबाब हा महिना होय तो साधारणपणे असेल मार्चच्या मध्यापासून एप्रिलच्या मध्यापर्यंत येत असे.

**प्रायश्चित करावे्** किंवा पवित्र करणे यहूद्यांचा शब्दाचा अर्थ झाकणे किंवा लपवणे किंवा पाप नाहीसे करणे असा आहे.

**पापी ठरला** अधिकृत माप देवळात किंवा ज्यूच्या मंदिरात वापरात असलेले प्रमाणित माप.

**परागंदा** स्वत:चे घर सोडून परक्या देशात जाण्यास बळजबरीने भाग पाडणे.

**पवित्र निवास मंडप** किंवा इस्राएलींच्या मंडपात देव त्याना भेटायला आला होता.

**परमेश्वराची प्रभा** परमेश्वर लोकांसमोर आला तेव्हा त्याने घेतलेले एक रूप. इथे ते झगझगीत प्रकाशाच्या स्वरूपात किंवा उंच ढगांच्या स्वरूपात असू शकेल.

**पूर्वज** शब्दश: वडील म्हणजे एखाद्याचे आई वडील आजी आजे आणि इतर सर्व लोक त्यांच्यापासून वंश वाढला.

**परमेश्वराचा आज्ञापटाचा कोश** किंवा एक पेटी ज्यात दहा आज्ञा कोरलेल्या दगडी पाट्या असत. इस्राएल लोक व परमेश्वर ह्यांच्यामध्ये झालेल्या कराराचा तो पुरावा होता.

**पवित्र** ठेवलेला किंवा खास कार्यासाठी निवडलेला.

**पहिल्या महिनायाच्या** निसान, यहुदी क़ॅलेंडरमधील पहिला महिना. तो मार्च–एप्रिल मध्ये येत असे.

**पन्नासाव्या वर्षी** ह्या वेळी जे शिंग फुंकण्यात येत असे त्यापासून हिब्रू शब्द आला आहे.

**पवित्र निवास मंडप** किंवा इस्राएलींच्या मंडपात देव त्यांना भेटायला आला होता.

**पागोटे** वा फेटा डोक्याला बांधायचा कापडाचा लांबलचक तुकडा हा टोपीवरूनही बांधीत.

**पवित्र स्थान** पवित्र मंडपातील एक खोली.

**पहिला मुलगा** कुटुंबात प्रथम जन्मलेले मूल प्राचीन काळी पहिला मुलगा फार महत्वाचा मानला जाई.

**प्रायश्चित्ताच्या दिवशी** याचे दुसरे नाव योम किप्पूर आहे. ज्यू लोकांचा महात्वाचा सण या दिवशी मुख्य याजक सर्वात पवित्रठिकाणी गेला आणि त्याने एक विधी केला त्यामुळे लोकांची पापे नाहीशी झाली लोक पापा पासून मुक्त झाले.

**पितळी** हिब्रूमध्ये या धातूसाठी जो शब्द आहे त्याचा अर्थ पितळ, तांबे किंवा ब्राँझ असा काहीही होऊ शकतो.

**पर्वाइम** येथे सोने मुबलक प्रमाणावर होते. हा बहुधा ओफिर देशातील भाग असावा.

**पुरुष वेश्या** लैंगिक पापासाठी स्वत:चे शरीर दुसऱ्या पुरुषांना विकणारे पुरुष. हे मुख्यत: चुकीच्या देवाची प्रार्थना करण्यासाठी असे.

**पोरके** काळजी घेण्यास आई–वडील नसलेली मुले.

**पवित्र भाकर** पवित्र सभामंडपात ठेवण्यात येणारी विशिष्ट प्रकारची भाकर. त्याला किंवा ही म्हणतात ही फक्त याजकक्काची भाकर.

**पहिली फळ** गव्हासारखी धान्ये व इतर पीके जी मे व जूनच्या सुमाराला तयार होतात ही पहिली पीके काढल्यानंतर ती देवाला अर्पण करतात.

**प्रायश्चिताचा दिवशी** “योम किप्पूर” असेही म्हटले आहे. यहुद्यांचा अति–महत्वाचा पवित्र दिवस. या दिवशी मुख्य याजक परमपवित्र स्थानात जाऊन लोकांच्या पापाबद्दल प्रायश्चित करीत असे.

**पवित्र** स्वच्छ उपासनेसाठी देवाला चालत असलेले काहीही.

**पहारोकरी** प्रेषितांचे दुसरे नाव. ह्याचा अर्थ तटावर उभे राहून दुरून येणाऱ्या संकटांवर नजर ठेवणाऱ्या पहारेकऱ्यांसारखे, प्रेषित आहेत.

**पोवळे** सागरात सापडणारा एक खनिज पदार्थ, अतिशय लहान समुद्री प्राण्याचा सांगाडा मुख्यत गुलाबी, लाल किंवा काळ्या रंगाचा असतो.

**पीत स्फटिक** पिवळ्या रंगाचा खडा.

**पगडी** डोक्याला गुंडाळण्याचे एक लांब वस्त्र किंवा डोक्यावर घालायची टोपी.

**पवित्र तंबू** ज्या ठिकाणी इस्राएलच्या लोकांनी देवाची प्रार्थना केली तो खास तंबू इथे कदाचित् यरुशलेममधील मंदिर असाही अर्थ होऊ शकेल.

**पाडस** लहान हरिण.

**पेकह** उत्तर इस्राएलचा राजा. रमाल्याचा पुत्र. ह्याने साधारणपणे ख्रि. पू. 740–731 ह्या काळात राज्य केले.

**प्रेमज्वर** किंवा “मला प्रेमज्वर झाला आहे.”

**प्रतिष्ठित नागरिक** नगरातील अथवा देशातील महत्वाचे लोक. हे चांगल्या मोठ्या घराण्यातील होते. त्यांना कधीही गुलाम व्हावे लागले नाही.

**परमेश्वराचे गौरव** देव लोकांना प्रत्यक्ष सामोरे जाताना वेगवेगळी रूपे घेई.त्यातील एक अतिशय तेजस्वी प्रकाशासारखे असे. निर्गम. 40:34–36 पाहावे.

**पशहूर** हा पशहूर म्हणजे यिर्मया 20:1 मध्ये उल्लेख केलेला पशहूर नाही.

**पवित्र आवाज** बहुधा देवदूताचा.

**पवित्र जन** हे कदाचित देवदूत किंवा खोटी कनानी दैवते असावीत.

**पोवळे** समुद्रातील कीटकांचा सांगाडा, हा दगडाप्रमाणे कठीण असतो. अलंकारात उपयोग करतात.

**पूजास्थान किंवा उच्चस्थाने** देवाची किंवा खोट्या देवांच्या पूजेच्या जागा. ह्या नेहमी टेकड्यांवर वा पर्वतांवर असत. ह्या जागाशिवाय यरुशलेममधील मंदिर असाही अर्थ होतो.

**प्रतिपदा** हा हिब्रू महिन्याचा पहिला दिवस असे. ह्या दिवशी देवाची उपासना करण्यासाठी विशेष सभा बोलावण्यात येत असे.

**प्राचीन राजा** शब्दश: प्राचीन कालखंड. ह्या देवाच्या नावावरून फार वर्षांपासून देव महान राजा आहे हेच दिसून येते.

**पॅलेस्टाईन** किंवा “पलिष्ट.”

**पट** लांब चामड्याची वा पपायरसची (कागदाची) सुरळी हिचा उपयोग पुस्तके, पत्र वा कायदेशीर दस्तऐवज लिहिण्यासाठी करीत.

**पवित्र पर्वत, सियोनचा पर्वत** यरुशलेम ज्यावर बांधले गेले आहे त्यातील एक पर्वत कधी कधी सियोनचा अर्थच यरुशलेम असा केला जातो.

**प्रांताधिकारी** परगण्यद्वचे प्रमुख पारसी अधिकारी.

**परमेश्‍वरासाठी पवित्र** मंदिरात उपयोगात येणाऱ्या सर्व वस्तूंवर असे लिहिलेले होते. ह्याचा अर्थ ह्या गोष्टी देवाच्या असून विशिष्ट कार्यासाठीच ते वापरल्या जाऊ शकत. अशी चिठ्ठी असलेल्या ताटल्या याजक फक्त पवित्र स्थानीच वापरू शकत.

**प्रतिष्ठापन**ा मंदिर पूर्ण झाल्यानंतर ते देवाला अर्पण करण्याचा समारंभ.

**प्रचंड राक्षस** पुराणात देवाविरुद्ध लढणाऱ्या समुद्रातील राक्षसाच्या कथा आहेत. संदेष्ट मिसरला अनेकवेळा समुद्र–राक्षस म्हणतात. पण येथे ह्याचा अर्थ नाईल नदीच्या तीरावर आराम करणारी मगर असा असावा.

**परमेश्‍वरा जागा हो** लोकांनी जेव्हा कराराची पेटी उचलली आणि ती आपल्या बरोबर युध्दावर नेली तेव्हा लोक असे म्हणाले यावरून देव त्यांच्या बरोबर होता असे दिसते पाहा गणना 10:35–36.

**फुरफुरणे** घोडयाचा आवाज.

**फोलकट** गहू किंवा सातू यासारख्या झाडांपासून टरफलासकट व देठासकट वेगळे केलेले धान्य (कणसे). शेतकरी धान्य बाजूला करतो व फोलकट किंवा भुसकट वाऱ्यावर उडून जाऊ देतो.

**फासे** काड्या दगड किंवा हाडाचे तुकडे फासे म्हणून काही निर्णय घेण्यासाठी वापरणे.

**फेटा** लांब कापड डोक्याभोवती अथवा टोपीभोवती गुडाळून बनविलेले डोक्याचे आच्छादन.

**फुरसे** फार विषारी सर्प.

**बाबेल** म्हणजे “घोटाळा.”

**बआल देव** हे खोटे दैवत पाऊस व वादळ आणते असा कनानी लोकांचा विश्‍वास होता. त्यांना असेही वाटत असे की त्या दैवताने जमीन तयार केली आहे व ते उत्तम पिक वाढविते.

**बैर–शेबा** यहुदा प्रांतातील एक गाव. ह्या नांवाचा अर्थ “वचनाची विहिर” असा आहे.

**बळी** अर्पण करणे देवाला अर्पण करण्यात येणारी वस्तू एखादा खास प्राणी मारुन त्याला वेदीवर जाळण्यात येई.

**बेथेल, गिलगाल, बैरशेबा** ही प्राचिन काळची उपासनेची स्थाने होती. अब्राहाम व याकोब ह्यांनी ह्या ठिकाणी वेद्या बांधल्या होत्या. परंतु देवाने इस्राएल लोकांना सांगितले होते की यरुशलेमातील मंदिरात जाऊन त्याची उपासना करावी.

**बाशानाच्या गायी** ह्याचा अर्थ शोमरोनातील श्रीमंत स्त्रिया. बाशान यार्देन नदीच्या पूर्वेला आहे. ते धष्टपुष्ट गायी, बैलांमुळे प्रसिध्द आहे.

**बराख** या हिब्रू शब्दाचा अर्थ “आशीर्वाद” किंवा “स्तुती” असा होतो.

**बेनओनी** म्हणजे “माझ्या दुःखाचा पुत्र.”

**बआल** हे खोटे दैवत पाऊस व वादळ आणते असा कनानी लोकांचा विश्‍वास होता. त्यांना असेही वाटे की दैवताने जमीन तयार केली आहे व उत्तम पिक पण ते वाढविते.

**बन्यामीन** म्हणजे “माझ्या उजव्या हाताचा पुत्र” किंवा “माझा आवडता पुत्र.”

**बाल** “बाल” हा पावसाचा, वादळाचा देव आहे, तसेच त्यामुळे जमिनीत धान्य पिकते अशी कनानी लोकांनी समजूत होती.

**बेथेल** यहूदाच्या जवळचे इस्राएलच्या दक्षिणेकडचे नगर.

**बरीया** या हिब्रू शब्दाचा अर्थ “वाईट” किंवा “आपत्ती” असा होतो.

**बेखमीर भाकर** खमीर न घालता केलेली भाकर.

**बेन–हिन्नोम** ह्या दरीला गेहेन्ना असेही म्हणत. हा शब्द हिब्रू मधील ‘हिन्नोनची दरी’ या शब्दावरून आला आहे. देव दुष्टांना कशी शिक्षा करतो ह्याचे, ही जागा म्हणजे, उत्तम उदारहण आहे.

**बेखमीर भाकर** खमीर न घालता केलेली भाकर.

**बेहेमोथ** हा कुठल्या प्रकारचा प्राणी आहे याची कल्पना नाही. तो कदाचित् गेंड्यासारखा वा हत्तीसारखा प्राणी असावा.

**बलामाचे लोक** किंवा ही अमोनी लोकांची जमीन होती.

**बळी** कोणत्या तरी प्रकारची इजा वा त्रास झालेला. गुन्ह्याच्या वेळी बहुधा कोणाला तरी अशी इजा होत असे वा काहीतरी गमवावे लागत असे.

**बाशान** इस्राएलचा अती उत्तरेकडील प्रदेश.

**बेलशस्सर राजाच्या कारकिर्दीत** ह्या काळी, दानीएलचा ग्रंथ हिब्रूमध्ये पुन्हा लिहिला गेला. दानीएल 2:7–7:28 हा भाग, बाबेल साम्राज्याची जी अधिकृत भाषा अरामी होती, त्या भाषेत लिहिलेला होता.

**भूर्जपत्र** लिहिण्याचा कागद ज्यापासून तयार करतात ती वनस्पती बोटीचा किंवा जहाजाचा बाहेरचा भागही त्यापासून तयार करतात (भूर्जपत्र).

**भाता** सैनिक ज्यात बाण ठेवतो ते.

**भविष्यकथन** देवाच्यावतीने बोलणे.

**भविष्य सांगणे** परमेश्‍वराकडून मिळालेला खास संदेश लोकांना शिकविणे.

**भविष्यासाठी** किंवा “त्याच्या आपायकारक होण्यासाठी.”

**भाडोत्री स्त्री** स्त्री किंवा “बुरखा घेतलेली स्त्री” याचा अर्थ वेश्या असाही होऊ शकतो.

**भेगा बुजविणे** जहाजाच्या तक्तपोशीत डांबर व दोरी ह्यांचे मिश्रण बसवून ती गळू नाही म्हणून जलाभेध करीत असत.

**मूर्ख बहुतेक** वेळा याचा अर्थ जे लोक देवावर विश्वास ठेवत नाहीत आणि देवाचे ऐकत नाहीत असा होतो यावरुन ते मूर्ख आहेत हे कळते.

**मिस्पा** अर्थ पहारा ठेवण्याची जागा म्हणजे “पहारा करण्याचा बुरुज.”

**महनाइम** म्हणजे “दोन तळ.”

**मंदिर** यहूद्यांच्या उपासनेसाठी यरुशलेममध्ये बांघलेली खास वास्तू. यहूद्यांनी देवाची उपासना यरुशलेमच्या मंदिरात करावी अशी परमेश्वराने आज्ञा केली होती.

**मंडपाचा सण** ह्या सणाच्या सुट्टीत, लोक यरुशलेमला जात, तात्पुरते निवारे उभारत, आठवडाभर तेथे राहात आणि देवाबरोबर सर्वजण एकत्र आनंदात वेळ घालवीत.

**मिलकोम** अम्मोनींचा देव.

**मनुष्यप्राणी** शब्दश: अर्थ मानवपुत्र येथे असे सांगायचे आहे की ती आकृती सामान्य माणसारखी दिसत होती, देवदूताप्रमाणे अथवा प्राण्याप्रमाणे नाही.

**मोकळी** हिब्रू या अर्थाच्या शब्दाचा अर्थ “पॅलेस्टाईनचे लोक” असा होतो.

**महावस्त्रे हा** शब्द मी जांभळी वस्त्रे ह्यासाठी वापरला आहे. बायबलच्या काळात जांभळ्या रंगाचे कपडे हे श्रीमंती व सत्ता ह्याचे द्योतक असावेत, राजे लोक बहुधा वापरीत असावेत. पण भारतीय संस्कृतीत जांभळ्या रंगाच्या वस्त्रांना असे मूल्य नसल्याने महावस्त्रे शब्द वापरला आहे. महावस्त्रे भरजरी, रेशमी, किंमती असतात. त्यामुळे ह्या शब्दावरून अभिप्रेत अर्थ स्पष्ट होतो असे वाटते.

**मेने हिब्रूतील** “मीना”प्रमाणे एक वजन. हा शब्द “मोजणे” ह्या शब्दाप्रमाणे आहे.

**मूर्ती** लोक पूजीत असलेल्या खोट्या परमेश्वरांचे पुतळे.

**मुद्रा** रबरी शिक्क्‍ याप्रमाणे वापरता येणारे लहान दगड वा अंगठ्या ओल्या मातीत वा गरम मेणात दाबल्यास त्यांची एक खूण राही. ती खूण सहीप्रमाणेच मानली जाई.

**मिल्कोम** अम्मोनी लोकांचा देव

**मरदोख** बाबेलचा महत्वाचा वा श्रेष्ठ दैवत.

**महिन्याचा पहिला दिवस** “चंद्रदर्शन” प्रतिपदा ज्यू लोकांच्या महिन्याचा पहिला दिवस हा पूजेचा खास दिवस होता.

**मृगजळ** वाळवंटात जमिनीवरची उष्ण हवा पाण्यासारखी दिसते त्यास “मृगजळ’ म्हणतात.

**मेजवानी** मूळ हिब्रू शब्दाचा अर्थ सर्वांचा नैवेद्य. ह्या वेळी सर्व लोक एकत्र येऊन सहभोजनाचा व देवाच्या सहवासाचा आनंद लुटीत. येथे अर्थ पूजेऐवजी गोंधळांची, गडबडीची मेजवानी. पाहा अनुवाद 14:22-29, 26:1-15.

**मानवपुत्र** एखाद्याला हाक मारण्याची पद्धत. येथे हा शब्द यहेज्केलला उद्देशून वापरला आहे.

**मोठे ओंडके** ह्यांचा उपयोग सैनिक शहराच्या तटाला वा प्रवेशद्वारांना भगदाडे पाडण्यासाठी करीत.

**मंदिर** देवाच्या उपासनासाठी बांधलेली विशेष प्रकारची इमारत. देवाने ज्यूंना (यहुद्यांना) त्याची पूजा यरुशलेमच्या मंदिरात करावी अशी आज्ञा दिली होती.

**मोठी आग होते** किंवा “परमेश्वराची ज्वाला.”

**मुकुट** त्याने आपल्या डोक्यावर ठेवला तो फुलांचा गुच्छ.

**मॅगॉट** अळीसारखा दिसणारा एक लहान कीटक, त्याचे माशीत रुपांतर होते. तो बहुधा प्रेतांवर किंवा कुजलेल्या वस्तूंवर आढळतो. ईयोब इथे जे बोलत आहे तसे त्याला खरोखरच बोलायचे नाही. तो इथे उपरोधाने बोलत आहे.

**मेंदी** गोड वास असलेली, झुबक्याने पिवळी फुले येणारी वनस्पती.

**मनुका** किंवा “किसमिसची भाकरी.”

**मूत्राशय** यकृतातली मूत्र साठवणारी पिशवी. ही पिशवी फाटते तेव्हा त्यातील मूत्र बाहेर येते. इथे याचा अर्थ अतिशय दु:खद आणि वाईट असे काही सहन करायला लागणे.

**मिल्लो** ‘मिल्लो’ म्हणजे यरुशलेममधील मंदिराच्या आग्नेय दिशेकडील उंचवट्यासारखा भूप्रदेष असावा.

**मंदसुरात** मूळशब्द “शमीनीथ” याचाही नेमका अर्थ माहीत. नाही पण “खालच्या पट्टीने” असा त्याचा अर्थ असावा.

**मृत्युलोक** शब्दश: “थडगे” मेल्यानंतर माणूस तेथे जातो ती जागा.

**मिल्लो** यरुशलेममधील देवळाभोवतालच्या भागातील दक्षिणपूर्व कोपऱ्यात जो उंचवटा आहे तो म्हणजे ‘मिल्लो’ असावा.

**मफिबोशेथ** शब्दश: “तुझ्या स्वामीचा नातू (शब्दश): आजोबा शब्दश: वडीलांचे.”

**मंडपांचा सण** पिकाबद्दल कृतज्ञता म्हणून साजरा करायचा सण. हा सातव्या महिन्यात असतो आणि तो सात दिवस साजरा करतात. पाहा निर्गमण 23:16, लेवी. 23:34-36,43.

**मेंढपाळ** किंवा “दूत, निरोप्ये.”

**मेशेख** यालाच “मश” असेही म्हणतात. पाहा उत्पत्ती 10:23.

**मांडीचा भाग** विशेष महत्वाच्या पाहुण्यांच्या साठी राखून ठेवलेला. हा बहुधा डाव्या तंगडीचा भाग असावा. उजवी तंगडी यज्ञात बळी अर्पण करणाऱ्या पुरोहितासाठी असे. पुरोहित त्या प्राण्याला मारण्यात मदत करी आणि त्याची चरबी परमेश्वरा साठी वेदीवर ठेवी.

**मोशेचा सासरा** कदाचित “जावई” ही असू शकेल.

**मूढ** ही शब्द खेळी आहे. हिब्रूमध्ये “मूर्ख” म्हणजे “लायकी नसलेला.”

**मांत्रिक** ही व्यक्ति मृत लोकांच्या आत्म्याबरोबर बोलते.

**मान्ना** 40 वर्षे रानात भटकत असताना इस्राएल लोकांसाठी देवाने पाठविलेले खास अन्न.

**मूर्ती** लोक पूजत असलेले खोट्या देवांचे पुतळे.

**मंडपाचा सण** याला सुकोथ किंवा तंबूचा सण असेही म्हणतात. प्राचीन इस्राएलमध्ये त्या तात्पुरत्या मंडप उभारून राहात त्यामुळे त्सीन वाळवंटात त्यांनी जे दिवस काढले होते त्याची आठवण जागी होत असे.

**मारा** म्हणजे "कडू" पडले होते.

**मवाबचे शहर** किंवा अर मोआब.

**मनश्शे** म्हणजे "विसर पाडणारा."

**मरीबा** याचा अर्थ वादविवाद किंवा बंडखोरी असा आहे.

**मस्सा** म्हणजे "परीक्षा."

**मळणीच्या वेळी** धान्याची टरफले काढण्यासाठी ते जेथे ठोकले जाते अथवा त्यावरून जेथे चालण्यात येते ती जागा.

**महारोग** फक्त महारोगच नव्हे तर बुरशी, अळंबी व एक प्रकारचा वाईट त्यचारोग ह्यांचा पण ह्या हिब्रू शब्दात समावेश आहे.

**मंडपाचा सणाच्या** या सणाला "सुक्कोथ" व "मंडपाचा सण" अशीही नांवे आहेत कारण या वेळी सीनायाच्या रानातील आठवणीसाठी लोक सात दिवस "तंबूत आश्रय घेऊन" राहात असत.

**मंदिरात आणावे** म्हणजे "पवित्र मंडपात" आणावे–याच ठिकाणी लोक परमेश्वराला भेटावयास जातील.

**मान्ना इस्राएलाचे लोक** 40 वर्ष वाळवंटात भटकत असताना देवाने पाठवलेले खास अन्न.

**मिसर शब्दश:** "राहाब" या शब्दाचा अर्थ "डॅगन" असा आहे ते मिसरचे लोकप्रिय नाव झाले होते.

**मेशेक, केदार** या ठिकाणचे लोक प्रसिध्द सैनिक होते.

**याव्हे यिरे** म्हणजे "परमेश्वर देव पाहतो."

**याकोब** म्हणजे "पाठोपाठ येणारा वा कपटी."

**यहूदा** म्हणजे हिब्रू भाषेत "त्याची स्तुति झाली आहे."

**याव्हे** शब्दश: परमेश्वर.

**यरुब्बाल** "बालला वाद घालू दे" अशा अर्थाचे हे हिब्रू शब्द "पक्षपात करणे" किंवा "संरक्षण करणे" अशा अर्थाने ते अलीकडच्या ओवीत (31) वापरले आहेत.

**याजकांना** शब्दश: "सुंती एफोद" घातलेल्यांना.

**यहूदातील बाला** किर्याथ यारीमचेच दुसरे नाव.

**याबेस** हिब्रूमध्ये याचा अर्थ "वेदना" असा आहे.

**योथाम** यहुदाचा राजा ह्याने ख्रि. पू. 740–735 या काळात राज्य केले.

**याशारच्या पुस्तक** इस्राएलच्या लढायांविषयीचे एक प्राचीन पुस्तक.

**यशुरुन** "इस्राएल" चे दुसरे नांव. ह्याचा अर्थ "चांगला" किंवा "प्रामाणिक."

**यहोआहाज** 2 इतिहास 22:1–12 मध्ये त्यालाच "अहज्या" म्हटलेले आहे.

**याह देवासाठी** असलेले हिब्रू नाव. या नावाचा अर्थ नेहमी "परमेश्वर" असा करावा.

**याह** यहोवा देवासाठी हिब्रू नाव.

**यशुरूना** इस्राएलचे दुसरे नाव. याचा अर्थ "चांगला" किंवा "प्रामाणिक."

**यज्ञ** देवाला द्यावयाची भेट. कधी कधी हा एक खास प्राणी असे. त्याला मारून वेदीवर भाजत असत.

**याजकाला म्हणू** किंवा "देवदूत", "निरोप्या" हा देवदूत असू शकले किंवा देवाशी बोलणारा याजक किंवा ज्ञानी पुरुष.

**यकोन्या** यहोयाकीन राजाचे हे दुसरे नाव. इ.स. पूर्वी 597 ला ह्याला कैद केले गेले.

**योसेफाचे घर** येथे ह्याचा अर्थ इस्राएलमधील दहा कुंटुंब गटांचे राष्ट. इस्राएलमधील एफ्राईम व मनश्शे ह्या कुंटुंब गटांच्या तो पूर्वज होता.

**यदुथुनसाठी किंवा,** "यदुथुन गायनासाठी" हा कदाचित् मंदिरातील एक संगीतकार असावा. पाहा 1 इतिहास 9:16; 16:38–42.

**योसेफ** देव मला आणखी एक मुलगा देवो असे सुप्रसिध्द वचन आहे.

**यगर सहादूथा** म्हणजे अरेमाईक भाषेत "कराराची दगडांची रास."

**राक्षस चुकीचा देव किंवा,** "गार्विष्ठ फसविणारे लोक."

**राजदंड** राजाने जवळ बाळगायची एक खास काठी त्यावरुन तो राज्यकर्ता आहे, ते कळून येई.

**रस** "मादक पेय" अथवा "रक्त."

**रक्त** "मादक येप" अथवा "शक्ती."

**राष्ट** शब्दश: "घर" ह्याचा अर्थ त्या देशाचे राजघराणे असाही असू शकेल.

**राहिलेल्या** आपत्तीमधून निभावलेले लोक येथे ह्या शब्दाचा अर्थ "इस्राएल व यहूदा ह्यांचा शत्रूने नाश केला, त्यावेळी त्या नाशातून जिवंत राहिलेले लोक असा आहे."

**राजा अर्तहशश्त** हा अहश्वेरोशचा मुलगा. ख्रि.पू. 465–424 च्या सुमारास तो पारसचा राजा होता.

**रसीन** सिरीयाचा राजा. ह्याने साधारणपणे ख्रि. पू. 740–731 ह्या काळात राज्य केले.

**रेखांबे** घराणे रेखाबचा मुलगा योनादाब यांचे वंशज त्यांना देवाबद्दल आत्यंतिक निष्ठा होती. योनादाबच्या गोष्टीसाठी 2 राजा 10:15–28 पाहावे.

**राहेल** याकोबची पत्नी येथे ह्या शब्दाचा अर्थ 'बाबेलबरोबरच्या युद्धात मारल्या गेलेल्या पुरुषांच्या रडणाऱ्या बायका व आया' असा आहे.

**रानातील राजवाडा** म्हणजेच बेथ हा यार. शलमोनाने शस्त्र व संपत्ती साठविण्यासाठी बांधलेले शहर.

**रथ** लढाईत वापरण्यात येणारी छोटी गाडी पण इथे याचा अर्थ प्रवासात वापरण्यात येणारी खूर्ची असाही होईल जसा 3:8 मधे आहे.

**राजकन्या** शब्दश: “बाथ–नादिब राजकुमाराची मुलगी” हा शब्द “अम्मीनादिब” 6:12 या शब्दसारखा आहे.

**रथचालक** म्हणजेच “तीस” किंवा “तीन” पाहा 2 शमुवेल 23:8.

**रऊबेन** म्हणजे हिब्रू भाषेत “पाहा हा मुलगा.”

**रगुवेल** ह्याला इथ्रो असेही नांव आहे.

**राहाब** ड्रॅगन किंवा समुद्रातील राक्षस राहाब समुद्राला आपल्या काबूत ठेवतो असा समज होता. राहाबाला देवाचा शत्रू किंवा काहीतरी अंमगल असे माने जाते.

**राशीचक्र** रात्रीच्या वेळी आकाशात दिसणारा तारकांचा समुह. हा कदाचित् राशीचक्रातल्या 12 राशींचा समूह असावा. त्या राशी आकाशातून अशा रीतीने भ्रमण करतात को ज्या योगे प्रत्येक महिन्यात आकाशातल्या कुठल्यातरी भागात एक नवीन रास यावी.

**रहोबोथ** म्हणजे “विस्तारित” खुल्या जागा किंवा “उडवी रस्ता.”

**लेवी** म्हणजे हिब्रू भाषेत “एकत्र या.”

**लेवीचे** लोक लेवी कुळातले वा घराण्यातील हे लोक मंदिरात धर्मगुरूंना मदत करीत आणि मुलकी शासनाचीही कामे करीत.

**लबानोन** इस्राएलच्या उत्तरेकडचा देश तो गंधसरू व पाईन वृक्ष ह्यासाठी प्रसिध्द आहे.

**लिव्याथान** हा कुठल्या प्रकारचा प्राणी आहे याची कल्पना नाही. तो कदाचित मगरीसारखा किंवा एखादा मोठा सागरी राक्षस असावा.

**लेवी** लेवी या कुळातील लोक. ह्यांनाच फक्त मंदिरात धर्मगुरुना मदत करण्याची मुभा होती.

**लेखक** वेगवेगळे लेखन उतरवून घेऊन त्याची नक्कल करणारे. ह्या लिखाणात काही खंड असे होते की पुढे त्यांचा ‘जुना करार’ झाला. ही माणसे आपला पुष्कळ वेळ ह्या लिखाणात घालवीत असत. त्यामुळे त्याचा अर्थ लावण्यात ते वाकबगार होते.

**लैंगिक संबंध** शब्दश: “ची नग्नता उघड करणे.”

**लैंगिक पाप** बरेचदा लैंगिक पाप म्हणजे चुकीच्या देवाची पूजा करणे असे याचा अर्थ पुरूष त्यांच्या बायकांशी एकनिष्ठ नव्हते आणि ते देवांशी ही एकनिष्ठ नव्हते कारण ते चुकीच्या देवाची आराधना करत असाही होऊ शकतो.

**लव्हाळी** लिहिण्याचा कागद ज्यापासून तयार केला जातो ती वनस्पती याच्या सालीचा उपयोग बोटीचा, जहाजाचा बाहेरील भाग करण्यासाठी होतो.

**लो–रूहामा** हिब्रूमध्ये ह्या नांवाचा अर्थ “तिला दया मिळत नाही” असा आहे.

**लो–अम्मी** हिब्रूमध्ये ह्या नांवाचा अर्थ “माझे लोक नव्हत” असा आहे.

**वेदीची शिंगे** देवीचे कोपरे शिंगाच्या आकाराचे होते. ही जणू काही लोकांची सुरक्षततेची जागा होती. एखाद्याने काही चूक केल्यास, तो वेदीचा आश्रय घेऊ शके. त्याचा अपराध सिद्ध झाल्यासच त्याला शिक्षा करू शकत. ‘येथे यिर्मया ‘यहूदातील लोकांसाठी सुरक्षित जागा कोठेही नाही.’ असे सांगत आहे.

**वाढविणार नाहीत** असे करणे हे दु:खी असल्याचे निदर्शक आहे आणि धर्मगुरूना तर देवाची सेवा करण्यात आनंदच वाटला पाहिजे.

**विणकऱ्याच्या मागापेक्षा** धोटा विणकर दोरे सूत एकमेकात विणण्यासाठी जे सामान वापरतो ते.

**व्यभिचार** दुसऱ्याशी लैंगिक व्यवहार करून लग्नाचे वचन मोडणे.

**वल्हांडण** ह्या हिब्रू शब्दाचा अर्थ टाळणे, “झटकन निघून जाणे” वा रक्षण करणे.

**वंशज** एखाद्याची मुले व त्याचा पुढील काळातील वंश.

**वडील** शब्दश: पूर्वज म्हणजे एखाद्याचे आई वडील आजी आजे आणि इतर सर्व लोक त्यांच्यापासून वंश वाढला.

**वेदीवरील अग्नी** (इंधन) ज्यावर बळी जाळण्यात येतो ती जागा.

**वेदी** मेज किंवा बळी देण्यासाठी उंच केलेली जागा.

**व्यापारी** स्तूंची खरेदी विक्री करून उदर निर्वाह करणारा

**व्यभिचार** विवाहाचा करार वा वचन लैंगिक पाप करून मोडणे.

**वेश्या** पैसे देऊन तिच्या बरोबर पुरुष लैंगिक पाप करतात अशी स्त्री. काहीवेळा देवाशी विश्वासू नसलेली आणि त्याला अनुसरण्याचे थांबवलेली व्यक्ति असाही ह्याचा अर्थ असू शकतो.

**वेखंड** गवतासारखी वनस्पती. तिचा उपयोग अत्तर करण्यासाठी करतात.

**वडिल (बुजुर्ग)** शहरातील वृध्द नेते. ते निर्णय घेण्यात लोकांना मदत करीत.

**वेदी** देवाला अर्पण करण्यात आलेले बळी जेथे जाळले जातात ते दगडी मेज.

**वशीकरण (देवऋषि)** ही व्यक्ति अशुध्द आत्म्याच्या मदतीने जादू करते.

**व्यभिचार (लैंगिक)** पाप करून लग्नाचा करार मोडणे.

**वल्हांडण** यहुद्यांचा फार महत्वाचा सण. प्रत्येक वसंत ऋतुत देवाने मिसरच्या दास्यातून सुटका केल्याची आठवण म्हणून ह्या दिवशी विशेष जेवण करण्यात येते.

**विंचू** शेपटीत दंश मारण्यासाठी नांगी असलेले किटक. त्याच्या दंशाने खूप वेदना होतात.

**वाचलेले** आपत्तीमधून निभावलेले लोक. येथे शत्रूकडून यहूदा व इस्राएल यांचा नाश झाला तेव्हा त्या नाशातून बचावलेले यहूदी लोक.

**वेद्या** देवाला बळी अर्पण करण्यासाठी वापरण्यात येत असलेला दगडी मेज (टेबल).

**वेश्या** पुरुष ज्या स्त्रीला लैंगिक पापासाठी पैसे देतो ती स्त्री. काही वेळा याचा अर्थ देवाशी प्रामाणिक नसलेला आणि त्याचे न ऐकणारा माणूस असाही होतो.

**विधवा** ज्यांचा नवरा मेला आहे अशा स्त्रिया, बहुतेकवेळा या स्त्रियांची काळजी घेणारे कुणी नसे.

**शेथ** म्हणजे "दिलेला."

**शेबा** म्हणजे "सात" किंवा "शपथ."

**शिमोन** म्हणजे हिब्रू भाषेत "तो ऐकतो."

**शब्बाथ दिवस** म्हणजे विसावा घेण्याचा व प्रभूदेवाला मान देण्याचा विशेष दिवस आहे.

**शब्बाथ** विश्रांतीचे विशेष दिवस किंवा हा कदाचित शनिवार किंवा ज्या दिवशी लोकांनी काम करता कामा नये असे सर्व विशेष दिवस.

**शेकेल** किंवा औसाच्या 2/5.

**शुद्ध करणे** किंवा पवित्र करणे हिब्रू शब्दाचा अर्थ झाकणे किंवा लपवणे किंवा पाप नाहीसे करणे असा आहे.

**शुध्द** पवित्र वा स्वच्छ देवाच्या उपासनासाठी स्वीकार करण्याजेगे.

**शीहोर नदी** कदाचित नाईल नदीची पूर्वेकडील एक उपनदी.

**शाप** दुसऱ्याचे वाईट व्हावे म्हणून उच्चारलेले शब्द.

**शेशय, अहीमन, व तलमय** अनाक नावाच्या माणसाची ही मुले, ती राक्षसी होती. पाहा गणना 13:22.

**शखेमची गढीमध्ये** हा भाग खुद्द शहरात नव्हे तर बहुधा शहराच्या जवळ्असावा.

**शमुवेल** त्याचे नाव एल [परमेश्वर] असा या नावाचा अर्थ होतो. यातले एक अक्षर कमी केले तर हिब्रूमध्ये "शौल" असा "विचारणे" या अर्थाचा शब्द होतो. या प्रकारणात शमुवेल शौल आणि "विचारणे, विनंती" अशा वेगवेगळ्या अर्थछटा उमटतील असा शब्दाचार वेळ आहे.

**शिंगात तेल भरुन घे** जनावराच्या पोकळ शिंगाचा वापर बाटलीसारखा करत असत.

**शुचिर्भूत** शुध्द किंवा परमेश्वराच्या पूजेत चालण्यासारखे. जुन्या करारातील या शुध्द अशुध्दतेच्या कल्पनांविषयी पाहा लेवीय 11–15.

**शब्बाथच्या भरपाई** नियमशास्त्राप्रमाणे दरसातव्या वर्षी जमीन न कसता तिला विश्रांती द्यायची असे.

**शेशबस्सर** शेशबस्सर म्हणजेच बहुदा जरुब्बाबेल असावा. "जरुब्बाबेलचा" अर्थ "बाबेलमध्ये परका असलेला" किंवा "बाबेल सोडून गेलेला" असा आहे. शेशबस्सर हे त्याचे बहुथा अरामी नाव असावे.

**शबाई लोक** वाळवंटी भागातील एक जमात. यांच्या टोळ्या लोकांवर हल्ला करुन त्यांची चीजवस्तू लुटून नेत.

**शाप** कुणाला तरी किंवा कशाचे तरी वाईट होण्याची इच्छा धरणे.

**शांती याचा अर्थ** "शालोम" परंतु हा शब्द "नमस्ते" किंवा "अच्छा" साठी वापरला जाई.

**शब्बाथ** ज्यू लोकांचा विश्रांतीचा आणि प्रार्थना करण्याचा खास दिवस.

**शआर–याशूब** ह्या नावाचा अर्थ "फारच थोडे लोक परत येतील" असा आहे.

**शिलोह** यरुशलेममधील एक तळे. नव्या करारात ह्याला "सिलोम" म्हटले आहे.

**शारोन दरी** पॅलेस्टाईनच्या किनाऱ्यावरील खोलगट जमीन.

**शेबा** इस्राएलच्या दक्षिणेकडील प्रदेश. सध्या हा प्रदेश सौदी अरेबियात आहे. यिर्मयाच्या काळात मसाल्याच्या व्यापाराचे हे केंद्र होते.

**शब्बाथ शनिवार,** यहूदी लोकांचा पूजेचा व विश्रांतीचा खास दिवस.

**शोमरोन** इस्राएलच्या उत्तरेकडील राज्याची राजधानी. येथील लोकांनी दुष्कृत्ये केली म्हणून देवाने तिचा नाश केला.

**शहामृग** वाळवंटात राहणारा एक मोठा पक्षी तो उडू शकत नाही.

**शेकेल** 2/5 औंसाएवढे हे माप असे पैशाची रक्कमही ह्या मापात सांगत.

**शूशन** पर्शियाची राजधानी.

**शोमरोन, तुझे वासरू** शोमरोन इस्राएलची राजधानी होती. इस्राएल लोकांनी वासरांच्या मूर्ती बनवून त्या दान, बेथेल येथील मंदिरात ठेवल्या. त्या मूर्ती परमेश्वराच्या किंवा खोट्या दैवताच्या दर्शक होत्या का नाही हे स्पष्ट कळत नाही. परंतु त्यांनी त्या मूर्ती वापरू नयेत अशी देवाची इच्छा होती. पाहा 1 राजे 12:26–30.

**शोमरोन** इस्राएलच्या उत्तरेकडील दहा वंशांच्या राज्याची राजधानी. येथे अर्थ "उत्तरेकडील राज्य."

**शिनार** बाबेलचा मनारा (उत्पत्ति 11:2) व बाबेल नगर ज्या सपाट प्रदेशावर वसले होते तो प्रदेश.

**शपथ** देवाला दिलेले खास वचन. ठराविक काळात काही विशेष गोष्ट घडल्यास शपथ घेणारा देवाला विशेष बळी अर्पण करी किंवा भेटी अर्पण करी.

**सारा** म्हणजे "राणी."

**सुक्कोथ** यार्देन नदीच्या पूर्वेस असलेल्या सुक्कोथ या. म्हणजे "तात्पुरता निवारा."

**सुंता** इस्राएल लोकात सुंता करण्याची म्हणजे पुरुषाची अग्रत्वचा कापून टाकण्याची पद्धत होती; ती यासाठी की देवाचे नियम व शिक्षण आपण पाळू असा देवाशी विशेष करार केल्याचा तो पुरावा असे.

**सेईर** एसावाला "अदोम" हेही नांव दिले आहे.सेईर त्या देशाचेच हे दुसरे नाव आहे.

**सापनाथ-पानेह** या नांवाचा मिसरच्या भाषेत अर्त "जीव टिकवणारा" आणि इब्री भाषेत "गूढ किंवा गुप्त गोष्टींचा उलगडा करणारा" असा आहे.

**समक्षतेची भाकर** ही समक्षतेची भाकर पवित्र स्थानातील विशेष मेजावर देवापुढे रोज सकाळी ठेवली जात असे.

**सुंता करावी** अग्रत्वचा कापून टाकणे. देवाने इस्राएलाशी केलेल्या करारात सहभागी असल्याचे दर्शविण्यासाठी प्रत्येक यहुदी पुरूषाला सुंता करावी लागे.

**साप** किंवा "पळून जाणारा 'राक्षस" हे राहाबाचे दुसरे नाव असावे. पाहा यशया 27:1.

**सन्हेरीब** अश्शूरचा राजा. ह्याने इ.स. पू. 706–681 या काळात राज्य केले.

**सप्तर्षीना** प्रसिध्द नक्षत्र (तारकांचा समूह) त्याला "मोठा तारकापुंज" असे ही म्हणातात. त्याच्या जवळ एक लहान नक्षत्र असते ते अस्वलासारखे दिसते. त्याला "लहान तारकापुंज" असे म्हणतात.

**सियोन** यरुशलेम पर्वताचा पूर्वोत्तर भाग कधी कधी याचा अर्थ यरुशलेममध्ये राहाणारे देवाचे भक्त असा होऊ शकेल.

**सर्वांत पवित्र** जागा देवळातली वा तंबूतली सर्वांत पवित्र जागा. या खोलीत कराराची पेटी आणि करूब देवदूत असत. हे एक प्रकारचे सिंहासन होते. इथे देव इस्राएलचा राजा म्हणून बसत असे.

**सिर्योन** किंवा "हर्मोन पर्वत."

**संध्याकाळ** यहुदी लोकांच्या वेळेनुसार सुर्यास्ताला दिवस सुरु होत असे.

**सर्वशक्तिमान देव** शब्दशः एल शादाय.

**सेथच्या सर्व मुलांचा** किंवा सेथ. सेथ आदोमचा तिसरा मुलगा होता. याचा अर्थ आदोमचा मुलगा किंवा एनोशचा मुलगा किंवा ते सर्व लोक असा देखील असू शकेल

**स्मारक स्तंभ** लोकांना काहीतरी विशेष प्रकारची आठवण करून देण्यासाठी हे स्तंभ उभारले होते. प्राचिन इस्राएलात खोट्या देवांची पूजा करण्यासाठी लोक नेहमी असे स्तंभ उभे करीत असत.

**स्वर्गातील राणी** बहुधा ही खोटी देवी अर्स्टार्ट असावी. ती रती आणि युद्ध ह्यांची देवता होती. मेसोपोटेमियातील लोक तिची पूजा करीत. त्यांच्या समजुतीप्रमाणे ती म्हणजे चांदणीसारखा दिसणारा शुक्रतारा होय.

**सुंता** करणे वरची कातडी कापणे. प्रत्येक यहुद्याची (ज्यूची) सुंता करीत. देवाने इस्राएलबरोबर केलेल्या करारात तो माणूस भागीदार झाला हे ह्यावरून समजले जाई. उत्पत्ति 17:9 ते 14 पाहावे.

**संदेष्टा** देवाचा खास सेवक म्हणून देवाने निवडलेला माणूस. देव त्यांना स्वप्न व दृष्टान्त ह्यांच्या साहाय्याने लोकांना शिकवण द्यायला लावीत असे.

**सदोम आणि गमोरा** लोकांच्या दुष्टाईमुळे देवाने ह्या दोन शहरांचा विध्वंस केला.

**सुंता** करणे वरच कातडी कापणे. प्रत्येक यहुद्याची (ज्यूची) सुंता करीत. देवाने इस्राएलबरोबर केलेल्या करारात तो माणूस भागीदार झाला हे ह्यावरून समजले जाई.

**सूर्य देवता** मिसरमधील सर्वांत श्रेष्ठ देव.

**स्वर्गातील राणी** बहुधा खोटी देवी ती काम आणि युद्ध यांची देवता होती. मोसेपोटेमियातील लोक तिची पूजा करीत. आकाशात चांदणीप्रमाणे दिसणारा शुक्र म्हणजेच ही देवी असे त्यांना वाटे.

**सीहोनचे गाव** म्हणजेच हेशबोन पाहा गणना 21:25–30.

**सभा मंडप** पवित्र तंबू ज्या ठिकाष्टी इस्राएलच्या लोकांनी देवाची प्रार्थना केली तो खास तंबू इथे कदाचित् यरूशलेममधील मंदिर असाही अर्थ होऊ शकेल.

**सलमोन** डोंगर शखेमजवळच्या एबाल पर्वताचेच हे दुसरे नाव असावे.

**सहाय्य दगड** किंवा "एबनेजर."

**संदेष्टा** म्हणजे लोकांशी संवाद साधण्यासाठी, त्यांच्याशी बोलण्यासाठी परमेश्वराने पाठवलेला माणूस.

**सर्वांसमक्ष** शब्दशः "सूर्यदिखत."

**सुवासिक द्रव्ये** याजक, भविष्यवादी, राजे यांच्या अभिषेकासाठी बहुधा हे खास तेल वापरत असावेत. पाहा निर्गम 30:22–38.

**संदेष्ट** देवाचा खास सेवक म्हणून देवाने निवडलेला माणूस. देव त्यांना स्वप्न व दृष्टान्त ह्यांच्या साहाय्याने लोकांना शिकवण द्यायला लावीत असे.

**संतापाचा नैवेद्य** खरे म्हणजे लोक ह्यास "सहभोजन" म्हणत. पण यहेज्केल येथे चेष्टा करीत आहे आणि 'असे भोजन देवाच्या रागाला कारणीभूत होत असे' असे दर्शवीत आहे.

**सत्पर्षि, मृगशील व कृत्तिका** रात्रीच्या वेळी आकाशात दिसणारा तारकांचा नक्षत्रांचा पुंज

**सुंगधी दव्य** एका झाडाच्या डिंकापासून बनवलेले अत्तर.

**सुवासिक द्रव्ये** शब्दशः "व्यापाऱ्यांची भुकटी." आयात केलेले मसाले उद धूप.

**सुगंध** वास शब्दशः "तुझ्या नाकाचा श्वास."

**सनीर** "बर्फाच्या पर्वताचे" अमोरिट नाव. याचा अर्थ हर्मोन पर्वत असा होतो.

**सर्वांत उंच पर्वत किंवा** "एकचा पर्वत सिरिया" किंवा लेबानन मधील पवित्र पर्वत असावा किंवा देवाचा पर्वत ज्या ठिकाणी देव त्याच्या दूतांना भेटतो.

**सदोम व गमोरा** ह्या दोन्ही शहरांतील माणसे पापी असल्याने परमेश्वराने ह्या दोन्ही शहरांचा नाश केला.

**सियोन** यरुशलेम ज्या डोंगरावर वसलेले आहे त्याचा दक्षिणपूर्वेचा भाग. काहीवेला ह्यांचा अर्थ यरुशलेममध्ये राहाणारे देवाचे लोक असाही होतो.

**सियोनची कन्या** यरुशलेमचे दुसरे नाव.

**संदेष्टे** देवाने खास सेवक म्हणून निवडलेला. देव स्वप्ने व दृष्टान्त ह्यांच्याद्वारे लोकांना देण्याची शिकवण त्याला दाखवीत असे.

**सीयोनकन्या** यरुशलेम.

**सतार** सारंगीसारखे वाद्य. हा शब्द हिब्रूमध्ये दुसऱ्या भाषेतून म्हणजे बहुधा ग्रीकमधू1 आला आहे. ह्यासाठी ग्रीक शब्द "कीत्तारीस" असा आहे.

**सर्गोन अश्शूरचा राजा** साधारणपणे ख्रि. पू. 721–705 ह्या काळात त्याने राज्य केले.

**समुद्रातील किल्ला** टायर शहराचे आणखी एक नाव.

**सायप्रस** शब्दश: "कित्ती" ह्याला "क्रेटही" म्हणतात.

**स्वच्छ** किंवा "स्वीकारण्याजोगे" शुध्द व देवाच्या पूजेत वापरण्यायोग. पाहा लेवी. 11–15. ह्यात जुन्या करारातील शुध्द–अशुध्द यांचे नियम सांगितले आहेत.

**सभामंडपाच्या वेळेत** लोक जेथे देवाची उपासना करत असे विशेष तंबू. कदाचित ह्याच्या अर्थ असा असावा की, "सुक्कोथच्या सणात असल्याप्रमाणे" त्या सणात यहुदी लोक तंबूत किंवा तात्पुरत्या बांधलेल्या घरात राहात असत.

**हानेस** मिसरमधील एक शहर.

**हर्मा** याचा अर्थ "पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले."

**हिज्कीया** यहुदाचा राजा ह्याने ख्रि. पू.

**हिन्नोमपुत्राचे खोरे:** या खोऱ्याला पुढे "गेहेन्ना" असे म्हणू लागले. ते यरुशलेमच्या दक्षिणेला होते. या खोऱ्यात तान्ह्या बाळांचा व मुलांचा देवतांना बळी दिला जात असे.

**हमोरच्या लोकांचे** मूळ शखेम या गावात जन्मलेले. हमोर हा शखेमचा मूळ पुरुष असे "उत्पत्ति 34" मधील कथेत म्हटले आहे.

**हुंडा** त्याकाळात नवरामुलगा वधूपित्याला हुंडा देत असे.

**हर्मा** या नावाचा अर्थ "पूर्णपणे उध्वस्त झालेला" किंवा "देवाला पूर्णपणे दिलेली भेट." पाहा लेवी 27:28-29.

**हरण किंवा,** "देवदाराचे झाड."

**हाम मिसर** देशातील लोक हामचे वंशज होते. पाहा उत्पत्ति 10:6–10.

**हामचा देश किंवा "मिसर"** बायबल असे सांगते की मिसरचे लोक हामचे वंशज आहेत. पाहा उत्पत्ति 10:6–20.

**होमर** एक माप हे 6 बुशेल अथवा 48.4 गॅलन इतके होते.

# यहेज्केल द्वारापासून वर्णन
# मंदिराचे पुन:निर्माण







## बाहेरच्या अंगणाच्या पूर्वेकडील
## प्रवेश द्वार

Copyright © 2005 by World Bible Translation Center




Copyright © 2005 by World Bible Translation Center




Copyright ' 2005 by World Bible Translation Center




Copyright © 2005 by World Bible Translation Center




Copyright © 2005 by World Bible Translation Center




Copyright ' 2005 by World Bible Translation Center




Copyright ' 2005 by World Bible Translation Center

# License Agreement for Bible Texts

***World Bible Translation Center***
***Last Updated: September 21, 2006***

Copyright © 2006 by World Bible Translation Center
All rights reserved.

**These Scriptures:**
- Are copyrighted by World Bible Translation Center.
- Are not public domain.
- May not be altered or modified in any form.
- May not be sold or offered for sale in any form.
- May not be used for commercial purposes (including, but not limited to, use in advertising or Web banners used for the purpose of selling online add space).
- May be distributed without modification in electronic form for non-commercial use. However, they may not be hosted on any kind of server (including a Web or ftp server) without written permission. A copy of this license (without modification) must also be included.
- May be quoted for any purpose, up to 1,000 verses, without written permission. However, the extent of quotation must not comprise a complete book nor should it amount to more than 50% of the work in which it is quoted. A copyright notice must appear on the title or copyright page using this pattern: "Taken from the HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™ © 2006 by World Bible Translation Center, Inc. and used by permission." If the text quoted is from one of WBTC's non-English versions, the printed title of the actual text quoted will be substituted for "HOLY BIBLE: EASY-TO-READ VERSION™." The copyright notice must appear in English or be translated into another language. When quotations from WBTC's text are used in non-saleable media, such as church bulletins, orders of service, posters, transparencies or similar media, a complete copyright notice is not required, but the initials of the version (such as "ERV" for the Easy-to-Read Version™ in English) must appear at the end of each quotation.

Any use of these Scriptures other than those listed above is prohibited. For additional rights and permission for usage, such as the use of WBTC's text on a Web site, or for clarification of any of the above, please contact World Bible Translation Center in writing or by email at distribution@wbtc.com.

World Bible Translation Center
P.O. Box 820648
Fort Worth, Texas 76182, USA
Telephone: 1-817-595-1664
Toll-Free in US: 1-888-54-BIBLE
E-mail: info@wbtc.com

**WBTC's web site –** World Bible Translation Center's web site: http://www.wbtc.org

**Order online –** To order a copy of our texts online, go to: http://www.wbtc.org

**Current license agreement –** *This license is subject to change without notice. The current license can be found at:* http://www.wbtc.org/downloads/biblelicense.htm

**Trouble viewing this file –** If the text in this document does not display correctly, use Adobe Acrobat Reader 5.0 or higher. Download Adobe Acrobat Reader from: http://www.adobe.com/products/acrobat/readstep2.html

**Viewing Chinese or Korean PDFs –** To view the Chinese or Korean PDFs, it may be necessary to download the Chinese Simplified or Korean font pack from Adobe. Download the font packs from: http://www.adobe.com/products/acrobat/acrrasianfontpack.html